।।ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जयजय स्वसंवेद्या आत्मरूपा।।

योगदा

श्रीज्ञानेश्वरी

श्रीकृष्ण परमात्म्याने गीताख्यानप्रसंगी ध्वनित केलेल्या गूढगर्भ भक्तिरसपूर्ण ईश्वरप्रणिधानाधारित योगाचे
श्रीज्ञानेश्वरमाउलींनी जे अंतरंग रहस्य श्रीज्ञानेश्वरीत प्रकट केले आहे, त्याचे सविस्तर सटीप उद्घाटन



पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९३।।
तयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाची घडी झाडूनि। उपलविलें म्यां जाणुनी। ग्राहीक श्रोते।।२९४।।

श्रीज्ञानेश्वरांच्या पंथराज आणि अभंगांतील भक्तियोगाचे कुंडलिनीशक्तिरहस्य

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासास अत्यंत उपयुक्त अशी ग्रंथामागील भूमिका
आणि एका योग्याचे आत्मवृत्त हे भूमिकेचे परिशिष्टात्मक प्रकरण

ज्ञानेश्वरीतील भक्तियोग, पंथराज, कर्मयोग व ज्ञान या विषयांचे सविस्तर विषयवार विवेचन
कुंडलिनीशक्तिवर आधारित लययोगाचे शास्त्रशुद्ध आनुभविक विवरण

ज्ञानेश्वरीच्या सर्व ओव्यांवर अनेक ग्रंथांधारे विषयवार विवेचन आणि गीतेच्या अनुरोधाने त्यांचा विचार
श्रीज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञान आणि योगविषयक भूमिका आणि त्यांच्या संजीवनसमाधीचे रहस्य

अमृतानुभवातील प्रकरणांचा आणि ज्ञानदेवांच्या अंदाजे ३०० अभंगांचा विषयसंदर्भानुसार आवश्यक तो समावेश आणि विचार
पातञ्जलयोगसूत्रे, नारदभक्तिसूत्रे, श्रीमत् शंकराचार्य भगवत्पाद यांचे योगतारावली, सौंदर्यलहरी, विवेकचूडामणि, अपरोक्षानुभूति,
पंचीकरण आणि गीता व ब्रह्मसूत्रभाष्य, एकनाथी भागवत यांचे विषय समजावून देण्यासाठी सुयोग्य उपयोजन आणि संदर्भ

ज्ञानेश्वरभक्त आणि सर्वसामान्य भाविक, शक्तिपात सांप्रदायिक, योग आणि भक्तिमार्गीय,अनेकानेक पंथांचे आणि उपपंथांचे पथिक
साधक, गृहस्थ,वानप्रस्थी, संन्यासी, योगी पारमार्थिक, भगवंतांचे भक्त अशा अध्यात्माच्या मार्गावरून वाटचाल करणाऱ्या
आणि करू इच्छिणाऱ्या सर्वांना आणि ज्ञानेश्वर वाङ्मयाच्या जिज्ञासू आणि प्रामाणिक अभ्यासकांना
आवश्यक ते संपूर्ण मार्गदर्शन करणारा अपूर्व ग्रंथ

लेखक: विभाकर वि. लेले (स्वामी योगेश्वरानंद)

माघ शु.४ श के१९३३ गणेशजयंती

योगदा

श्रीज्ञानेश्वरी

पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९३।।
तयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाची घडी झाडूनि। उपलविलें म्यां जाणुनी। ग्राहीक श्रोते।।२९४।।

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासास अत्यंत उपयुक्त अशी ग्रंथामागील भूमिका आणि एका योग्याचे आत्मवृत्त हे भूमिकेचे परिशिष्टात्मक प्रकरण

श्रीकृष्ण परमात्म्याने गीताख्यानप्रसंगी ध्वनित केलेल्या गूढगर्भ भक्तिरसपूर्ण ईश्वरप्रणिधानाधारित योगाचे श्रीज्ञानेश्वरमाउलींनी जे अंतरंग रहस्य श्रीज्ञानेश्वरीत प्रकट केले आहे, त्याचे सविस्तर सटीप उद्घाटन

❊ज्ञानेश्वरीतील भक्तियोग, पंथराज, कर्मयोग व ज्ञान या विषयांचे सविस्तर विषयवार विवेचन कुंडलिनीशक्तीवर आधारित लययोगाचे शास्त्रशुद्ध आनुभविक विवरण

❊ज्ञानेश्वरीच्या सर्व ओव्यांवर अनेक ग्रंथांधारे विषयवार विवेचन आणि गीतेच्या अनुरोधाने त्यांचा विचार

❊श्रीज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञान आणि योगविषयक भूमिका आणि त्यांच्या संजीवनसमाधीचे रहस्य अमृतानुभवातील प्रकरणांचा आणि ज्ञानदेवांच्या अंदाजे ३००अभंगांचा विषयसंदर्भानुसार आवश्यक तो समावेश आणि विचार

❊विषय समजावून देण्यासाठी पातञ्जलयोगसूत्रे, नारदभक्तिसूत्रे, श्रीमत् शंकराचार्य भगवत्पाद यांचे योगतारावलि, सौंदर्यलहरी, विवेकचूडामणि, अपरोक्षानुभूति, पंचीकरण आणि गीता व ब्रह्मसूत्रभाष्य, एकनाथी भागवत यांचे सुयोग्य उपयोजन आणि संदर्भ

❊ज्ञानेश्वरभक्त आणि सर्वसामान्य भाविक, शक्तिपात सांप्रदायिक, योग आणि भक्तिमार्गीय, अनेकानेक पंथांचे आणि उपपंथांचे पथिक साधक, गृहस्थ,वानप्रस्थी, संन्यासी, योगी पारमार्थिक, भगवंतांचे भक्त अशा अध्यात्माच्या मार्गावरुन वाटचाल करणाऱ्या आणि करू इच्छिणाऱ्या सर्वांना आणि ज्ञानेश्वर वाङ्मयाच्या जिज्ञासू आणि प्रामाणिक अभ्यासकांना आवश्यक ते संपूर्ण मार्गदर्शन करणारा अपूर्व ग्रंथ

लेखक: स्वामी योगेश्वरानंद

(विभाकर वि. लेले)

माघ शु.४ शके १९३३ सोमवार दि.०७.०२.२०११
श्रीगणेशजयंती योगेश्वर कुटीर, वृंदावनधाम

YOGADA SHRI DNYANESHWARI

Author: Shri Yogeshwaranand

(Vibhakar V. Lele)

B.E. B.Sc. LL.B.

योगदा श्रीज्ञानेश्वरी

लेखक: स्वामी योगेश्वरानंद (गुरुदत्त नाम)

विभाकर वि. लेले (व्यावहारिक नाम)

माघ शु.४ शके १९३३ सोमवार दि.०७.०२.२०११

श्रीगणेशजयंती योगेश्वर कुटीर, वृंदावनधाम

First Indian e-Edition, 2011

An authorised publication of

Yogeshwar Kutir Prakashan, Vrindavan-dham

c/o V.V.Lele, Vyaghreshwar Prasad

Manpada Road, Dombivli, 421201

e-copy in India by Yogeshwar Kutir Prakashan

ISBN:Being obtained

For Private Circulation Only

श्री ज्ञानेश्वर माउली समाधी, आळंदी



हा ग्रंथ कोणाला अर्पण करू!

दिवंगत मातापिता आणि पत्नी; कन्या आणि पुत्र; यांना

त्यांच्या माझ्यावरच्या प्रेमाखातर आणि ग्रंथलेखनास परोपरीचे साहाय्य केल्याबद्दल,

की मित्र आणि सुहृदांना ज्यांना तो फार आवडला आहे;

की मला गुरुवत असलेले आपले ग्रंथ जसे काही माझ्यासाठीच रचून ठेवलेले आहेत, अशा ग्रंथकारांना;

माझ्या सांप्रदायिक आणि परंपराप्राप्त श्रीसद्गुरूंना

की आणखी कोणा अनामिकांना!

या सर्वांच्याच हृदिस्थ असणाऱ्या

श्रीज्ञानेश्वरस्वरूप जनार्दन श्रीकृष्णपरमात्म्यालाच

योगदा श्रीज्ञानेश्वरी

हा माझा ग्रंथ त्याच्यावरल्या प्रेमाने आणि भक्तिभावाने माझ्या त्याच्याप्रतिच्या सेवेप्रीत्यर्थ

एक फूल ना फुलाची पाकळी या भावनेने त्याच्याच वचनावर आसंबून -

"पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।

तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।गीता।।" -

मी सादर श्रद्धापूर्वक अर्पण करतो!!!

त्याने तो ग्रहण करावा अन् मला कृतार्थ करावे, हीच त्याच्या चरणी प्रार्थना!!!

ॐॐॐॐॐॐॐॐ

"त्वदीय वस्तू मे गोविन्द करोमि त्वदर्पणम्।।"

ॐॐॐॐॐॐॐॐ

किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्त्तन हें सिद्धीं गेलें।

एथ माझें जी उरलें। पाईकपण ।।१८-१७९२।।

ॐॐॐ

माउलींचा शरणागत -

विभाकर वि. लेले [स्वामी योगेश्वरानंद]

ॐॐॐॐॐॐॐॐ

लेखकाचा परिचय



विभाकर लेले

[स्वामी योगेश्वरानंद]

बी. ई, बी. एस्सी, एलएल. बी.

अभियांत्रिकी व्यावसायिक सल्लागार

अनेक विषयांची आवड असलेले संशोधक

गणित, खगोलशास्त्र, खगोलभौतिकीविज्ञान, विज्ञान, अभियांत्रिकी, जनुकशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि आण्विक विज्ञान, वेद.

मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषा अवगत आणि साहित्याची आवड

तत्त्वज्ञान, गूढवाद, योगविद्या, ज्ञान, भक्तिशास्त्र, तंत्रशास्त्रे आणि उपनिषदादी विषयांचे प्राच्यविद्यासंशोधक

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वरमाउलींचा सिद्धमहायोग [कुंडलिनी योग] - पंथराज/क्रमयोग आणि पातञ्जलयोगाचे अनुभवसिद्ध जाणकार तज्ज्ञ.

गुरुसंप्रदाय आणि परंपरा
नाथसिद्धसंप्रदायाची मुख्य परंपराः आदिनाथ - उमादेवी - मत्स्येन्द्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तिनाथ - संत ज्ञानेश्वर - सत्यामलनाथ – गैबीनाथ - साध्वी माई गुप्तनाथ - उद्बोधनाथ - केसरीनाथ - शिवदीननाथ - नरहरिनाथ - महिपतिनाथ - वासुदेवनाथ

ऋणानुबंधी

१. श्रीमत् गौडपादाचार्य - आचार्य श्रीमत् शंकरभगवान - अद्वैतानंद - सत्यदेवानंद सरस्वति

२. सिद्ध संप्रदायः श्रीनित्यानंद स्वामी - मुक्तानंद - अवधूतानंद

ग्रंथप्रसिद्धीः

मराठीतील १. 'योगदा श्रीज्ञानेश्वरी' (मूळ ग्रंथ आणि त्याचे एकूण १२ भाग)
Main book available as Print-copy on
i. Pothi.com http://pothi.com/pothi/node/186419 &
http://pothi.com/pothi/node/186420 &
ii. As e-book on Pothi.com as ebook4321

2. **'एका नाथसिद्धयोग्याचे आत्मवृत्त' – Eka Natha Siddha Yogyache Atmavritta**

As Print copy on
i. Pothi.com at https://pothi.com/pothi/book/vibhakar-vitthal-lele-eka-nathasiddha-yogyache atmavritta &
ii. As e-book on Pothi.com as ebook4321

2. **इंग्रजी ग्रंथ:** Books in this Series in English: **'Yoga Of Gita Expounded By Saint Dnyaneshwar'**:

1. Autobiography of A Natha Siddha Yogin [Travails Of A Mystique`] - 560 pages
Available as i. Print copy on Pothi.com's store at
https://pothi.com/pothi/book/vibhakar-vitthal-lele-autobiography-natha-siddha-yogi
ii. As e-book on Pothi.com as ebook7466

2. Inner Secrets Of Rajayoga - Saint Dnyaneshwar On Kundalini Yoga [Practice - Methods And Processes] - 620 pages
Available as i. Print copy on Pothi.com's store at
https://pothi.com/pothi/book/vibhakar-vitthal-lele-inner-secrets-rajayoga
ii. As e-book on Pothi.com as ebook7485

3. Ishwara And Worship [Upasana] - Central Theme Of Gita - 300 pages/
Available as i. printed book on Pothi.com at
https://pothi.com/pothi/book/vibhakar-v-lele-swami-yogeshwarananda-swaroopa-worship-and-philosophy
ii. As e-book on Pothi.com as ebook7484

4. Rajayoga Of Gita [Kundalini] Karma-Jnana-Bhakti-Dhyana - 362 pages/
Available as i. printed book on Pothi.com at
https://pothi.com/pothi/node/191757
ii. As e-book on Pothi.com as ebook7541

5. Rajayoga Consummation [Kundalini] Karma-Jnana-Bhakti-Dhyana - 432 pages/
Available as i. printed book at
https://pothi.com/pothi/book/vibhakar-lele-swami-yogeshwarananda-rajayoga-consummation-kundalini-karma-jnana-bhakti-dhyana
ii. As e-book on Pothi.com as ebook7540

6. Dnyaneshwari In Nutshell - 174 pages/
Available as i. Printed book on Pothi.com at
https://pothi.com/pothi/book/vibhakar-v-lele-swami-yogeshwarananda-dnyaneshwari-nutshell
ii. As e-book on Pothi.com as ebook8225

==

योगदा श्रीज्ञानेश्वरी या ग्रंथाचा
आणि
विभाकर लेले
या ग्रंथलेखकाचा अल्प परिचय

साधकजनांस नमस्कार,

कुणीतरी एकदा गीता वाचता का? असे विचारल्यावरः "अहो! काय आहे त्या गीतेत एवढे? अठरा अध्याय अठरापगड व्यक्तींनी लिहिलेली ती गीता. कशाला ती वाचायची!" असे अनुदार उद्गार ज्यांच्या मुखातून निघाले अशा अत्यंत नास्तिक पण हुशार इंजिनिअर मध्यमवयीन व्यक्तीला अचानक अनाहत नादानुभव सुरु झाला व त्यानंतर त्याचा झालेला आध्यात्मिक प्रवास.. . .

त्यांचे नाव आहे श्री विभाकर लेले [सांप्रदायिक नाम - श्री स्वामी योगेश्वरानंद]. ते सायन्स-इंजीनीयरींग आणि कायद्याचे उच्च शिक्षण घेतलेले आहेत. त्यांच्या या प्रकारच्या पार्श्वभूमीवर त्यांना आलेले आध्यात्मिक अनुभव विशेष आहेत. त्यांची ही कथा भाविक आध्यात्मिक तसेच अश्रद्धाळू नास्तिकांनासुद्धा प्रेरणा देणारी आहे.

वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षानंतर त्यांच्या जीवनात घडलेले हे आश्चर्यकारक परिवर्तन! पंचेचाळीसाव्या वर्षी ही व्यक्ति सहज एका परिचिताकडे गेली असताना तेथे श्रीज्ञानेश्वरी पारायण चालू होते. आता तेथून लगेच कसे जायचे अशा भीडेखातर थोडा वेळ बसले असताना अचानक अतिप्रसन्न तंद्रा किंवा समाधिजन्य अवस्थेचा त्यांना अनुभव आला. माउलीची कृपाच झाली जणू! अन् त्यानंतर बदलूनच गेले अवघे सगळे!

पुढील काळात काहीही विशेष साधना नसताना योगातील सर्व अनुभव त्यांना आले. आयुष्यात केवळ दोनच वेळा श्रीज्ञानेश्वरीचे पारायण घडले, पण माउलीच्या कृपेने त्यातून **योगदा श्रीज्ञानेश्वरी** हा श्रीज्ञानेश्वरीचे योगाधारे विवरण असलेला सुमारे साडेतीन सहस्त्र पृष्ठांचा बृहत ग्रंथ निर्माण झाला. अत्यंत सुंदर असलेल्या हस्ताक्षरात लिहिलेल्या मूळ हस्तलिखितात कुठेही खाडाखोड वा फेरबदल नाही!!

ग्रंथ लेखन कालावधी मे १९९१ पासून २०११.

योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी ।
पाहतां पाहतां मना न पुरेचि धणी ।।१।।
देखिला देखिला माये देवाचा तो देवो ।
फिटला संदेहो निमाले दुजेपण ।।२।।
अनंतरूपें अनंतवेषें देखिलें म्यां त्यासीं ।
बापरखुमादेवीवरू खूण बाणली कैसीं ।।३।।

गुरुकृपेने अशी दिव्य अनुभूति प्राप्त झाल्यावर, ती अनुभूति सर्वांना प्राप्त व्हावी अशी कळकळ बाळगणाऱ्या श्रीज्ञानेश्वर माउलीचे अंतःकरण वा हृदय म्हणजे **श्रीभावार्थदीपिका** वा **ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरी**: श्रीज्ञानेश्वरीसारखा पवित्र ग्रंथ पलंगावर आरामशीर पडून वाचावा कां या संभ्रमाबद्दल त्यांना कुणी सांगितलेले उत्तरः "अहो तुम्हाला हवे तसे वाचा. अमृत आहे. स्नान करून सोवळे नेसून चंदनी पाटावर बसून सोन्याच्या वाटीतून अमृत प्यायले काय आणि झोपेत का होईना, वाकडे तोंड करत ती वाटी तोंडाला लावली काय! परिणाम काही वेगळा होईल का?"

"श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ गहन" या उक्तीप्रमाणे केवळ अभ्यासाचे दृष्टीने नव्हे तर या ग्रंथराजाच्या स्थूल आकारातूनही त्यांना आलेल्या दोन अनुभूति सर्वांना मुद्दाम सांगाव्याशा वाटतातः-

१. एकदा मध्यरात्री श्री ज्ञानेश्वरी ग्रंथातून अनेकरंगी (पिवळ्या, हिरव्या, जांभळ्या, लाल, निळ्या, चंदेरी, सोनेरी) अशा प्रकाश शलाका निघून आपल्या अंतःकरणात प्रवेशत आहेत असा अनुभव त्यांना आलेला आहे. (त्याचीच परिणती जणू त्यांना आलेले योगानुभव व **योगदा श्रीज्ञानेश्वरी** ग्रंथनिर्मिती)

२. साधनेच्या एका काळात अंगाचा अत्यंत दाह होऊ लागल्यावर श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ केवळ जवळ ठेवल्याने तो दाह शमल्याचा अनुभव त्यांना आला व कित्येक दिवस ते श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ उराशी कवटाळून झोपत असत.

आपल्यावर असलेल्या श्रीज्ञानेश्वर माउलीच्या कृपेप्रमाणेच, श्री गजानन महाराज गुप्ते व श्री स्वामी स्वरूपानंदांच्या कृपेचा त्यांनी उल्लेख केलेला आहे. श्री स्वामी स्वरूपानंदांच्या दर्शनाचा योग कधी आला नाही पण त्यांची आपल्यावर कृपा असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले आहे. त्यांनी केलेल्या श्रीस्वामी स्वरूपानंदसंकलित **श्री ज्ञानेश्वरी नित्यपाठ** याच्या नित्य वाचनाचा उल्लेख केलेला आहे. एका पुस्तकातील श्री स्वामी स्वरूपानंदांचा फोटो त्यांनी अजूनही अत्यंत जपून ठेवला आहे.

हल्लीच्या युगात अध्यात्म व ईश्वराविषयक साशंकतेने पहाणाऱ्या जुन्या व नव्या पिढीच्या लोकांपुढे श्री विभाकर लेले यांचे (स्वामी योगेश्वरानंदांचे) आध्यात्मिक अनुभव एक आदर्श आहे असे वाटते.

योगदा श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ – ग्रंथपरिचयस्कंधातील **एका नाथ सिद्ध योग्याचे आत्मवृत्त** हा भाग योगजिज्ञासू अणि ज्ञानेश्वरप्रेमी उत्सुकांनी जरूर वाचावा.

योगदा श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ १. छापील दोन किंवा तीन भागात आणि २. संपूर्ण ई-ग्रंथ पुढील वेबसाईट लिंक वरून डाऊनलोड करता येतील.

१. **योगदा श्री ज्ञानेश्वरी**चे छापील दोन खंड तसेच **एका नाथसिद्धयोग्याचे आत्मवृत्त** हे त्यांचे ग्रंथ Pothi.com वर पण मिळू शकतात.

Links:

१. **योगदा श्री ज्ञानेश्वरी खंड-१** - http://pothi.com/pothi/node/186419 &

योगदा श्री ज्ञानेश्वरी खंड-२ - http://pothi.com/pothi/node/186420

and as e-book on Pothi.com as ebook4321

२. **एका नाथसिद्धयोग्याचे आत्मवृत्त** –

i. https://pothi.com/pothi/book/vibhakar-vitthal-lele-eka-nathasiddha-yogyache-atmavritta

ii. As e-book on Pothi.com as ebook4321

२. **तसेच योगदा श्री ज्ञानेश्वरीचे छापील तीन खंड तसेच 'एका नाथसिद्धयोग्याचे आत्मवृत्त'** हे त्यांचे ग्रंथ Createspace.com व Amazon.com / Amazon.in / Amazon.uk वर पण मिळू शकतात.

ii. At Createspace.com/Amazon.com –

a. Yogada Shri Dnyaneshwari (Vol 1) under Title ID:4034683 and ISBN-13:978-1480157576/10:1480157550;

b. Yogada Shri Dnyaneshwari (Vol 2) under Title ID:6027878 and ISBN-13:978-1523720842/10:1523720840 and

c. Yogada Shri Dnyaneshwari (Vol 3) under Title ID:6027919 and ISBN-13:978-1523720989/10:1523720980

iii. As e-book on Pothi.com as ebook4321

२. **एका नाथसिद्धयोग्याचे आत्मवृत्त** –

At Createspace.com/Amazon.com – Under Title ID: 6025763 ISBN-13: 978-1523705511/ ISBN-10:1523705515

त्यांच्या अनुभूतीपूर्ण लेखनात त्यांची अभ्यासू वृत्ती, विषय मांडणी, संदर्भ-उल्लेख हे वाचकांस नक्कीच जाणवतील. विषय अत्यंत गहन असूनसुद्धा त्यांचे लेखन मूळ विषयास सोडून कधीही भरकटलेले आढळत नाही.

साधनेच्या काळात वेळोवेळी आलेल्या अनुभूतीच्या संदर्भात त्यांना ज्या ज्या वेळी जे जे ग्रंथ शंकानिरसनार्थ आवश्यक होते ते ते आश्चर्यकारकरीत्या मिळत गेले. योगदा श्रीज्ञानेश्वरीमध्ये विविध ग्रंथांचे संदर्भ त्या त्या ठिकाणी अचूक आले असून लेखनप्रवाहही अत्यंत उत्फूर्त, ओघवता आहे. विषय गहन परंतु भाषाशैली सहज सोपी आहे. श्रीज्ञानेश्वरमाउलीची कृपा आहे यात शंकाच नाही. इतके सर्व असूनही त्यांचा निगर्वी, प्रेमळ स्वभाव, साधेपणा कुणासही अत्यंत भावेल. श्री लेले सध्या ठाणे/डोंबिवली येथे रहात आहेत. त्यांचा ईमेल पुढीलप्रमाणे आहे.

श्री विभाकर लेले : ईमेलः vibvitle@gmail.com

ईमेलद्वारे त्यांच्याशी संपर्क होऊ शकतो व ते सत्तरी ओलांडल्यावर या वयातही ईमेलद्वारे शंकानिरसन करतात. आपणास इच्छा असल्यास हा मेल आपल्या साधकीय परिवारात वा WhatsApp/ फेसबुकवर पाठवू शकता ज्याद्वारे जास्तीत जास्त साधकांना, जिज्ञासूंना याचा लाभ घेता येईल.
कळावे,
सुदेश चोगले, मुंबई

श्री सुदेश चोगले हे स्वतः एक संगणकतज आहेत. त्यांना स्वतःलाही साधकावस्थेत काही सविशेष अनुभूती आलेल्या आहेत. लेखकाचे पुस्तक हाती पडल्यावर त्यांना त्याची भेट घ्यावी असे प्रकर्षाने वाटले. त्याप्रमाणे घडून आले आणि त्यांनी ग्रंथ आणि लेखक यांबाबत स्वतः होऊन हा संदेश आपल्या परिचित आणि साधकवर्गात प्रसृत केला. त्यांचा krishnasaraswati.com नावाचा स्वतःचा blog आहे. ते स्वतः उत्कृष्ट आणि उत्स्फूर्त काव्यरचना करतात. ते अध्यात्माचे एक प्रगल्भ अभ्यासक आणि विचारवंत आहेत. त्यांचा लेखकाशी परिचय आणि भेट **योगदा श्रीज्ञानेश्वरी** त्यांच्या हातात पडल्यानंतर झाली.

इतर सुज्ञ आणि उच्चविद्याविभूषित वाचकांचे अभिप्राय

Dear Vibhakarji

I am actually close to end of the volume 1 of Yogada Dnyaneshwari. I have some questions on Chapter 15 commentary but I will write to you in detail on that subject as I have to take the page references to make it easier.

In my view, so far, your book gives very in-depth understanding of Dnyaneshwari and Bhagawadgita. It also establishes very proper logical thread that runs back and forth in these books.

I am eager to continue to volume 2, to learn how it links to the individual's urge towards enlightenment.

One advantage I found of using your book as compared to formal editions of Dnyaneshwari is that as I am progressing, I find that I can get gist of Saint Dnyaneshwar's language and essence very easily. With only formal Dnyaneshwari edition that I am having traditionally at home, it was somehow always difficult. Perhaps your book came at the proper time. Most places, I find that Saint Dnyaneshwar's elaboration is even more reader-friendly than in the Gita Shlokas. I am no expert but these are just some of my observations.

To end this unsolicited comment I must say that I was attracted to your book as you have said in your books to have experienced various spiritual stages by yourselves and for which I have lot of curiosity which aroused even further as I come to end of volume 1.

With best regards,
Sunil R Hasabnis, Pune

श्री सुनील हसबनीस हे एक वरिष्ठ इंजीनीयर आहेत. ते एका स्वीस कंपनीचे CEO-MD आहेत. त्यांनी 'योगदा श्रीज्ञानेश्वरी' या ग्रंथाची छापील प्रत सर्वांअगोदर विकत घेतली आहे आणि त्यातून ते आपला अतिव्यस्त दिनक्रम सांभाळून ज्ञानेश्वरीचा अभ्यास करतात. त्यांचा हा अभिप्राय अनाहूत असा प्राप्त झाला आहे. तो वाचकांच्या निदर्शनास आणून देत आहोत.

श्री लेलेसाहेब,

आपली योगदा श्री ज्ञानेश्वरी अत्यंत मौल्यवान आहे. ग्रंथ प्रचंड आहे. अभ्यासकाने कष्ट घेऊन लिहिलेला आहे. त्यातील खोली खोल खोलच जाते. मी सध्या भूमिकाच वाचत आहे. अप्रतिम! जसा काही एखादा खूप प्रगल्भ प्रबंधच समोर आहे असे वाटते. ज्ञानेश्वरीच्या साहित्यात अनमोल भर निश्चितच आहे. अभिनंदन आणि धन्यवाद.
R.Y.Deshpande

I personally met Mr. V. V. Lele, on 26th April, 2016. I am amazed to see his Herculean efforts in bringing about/publishing "YOGADA SHRI DNYANESHWARI". He has done yeoman service to the society as a whole and to the posterity in particular.
Madhav Ranade

He has done yeoman service to the society as a whole and to the posterity in particular." That indeed is true, a landmark work on Jnaneshwari! I wish it also comes out in English in due course of time, if not as it is but with an approach suitable for that kind of audience.
R.Y. Deshpande

Many many thanks. I have quickly scrolled down **Book 6: Central Theme Of Gita [Gita - Tattwajnana and Upasana]** (English version of योगदा श्री ज्ञानेश्वरीचा सहावा स्कंध) and find it very scholarly. Its metaphysics is a great subject of study and I must congratulate the author for it. Although I may have differences of approach in this regard, it is certainly something which must be valued. The difference of approach is in the sense of metaphysics shrouding the revelatory-spiritual that is there in the Gita, which perhaps is the most significant contribution of it as a scripture.
R.Y.Deshpande

प्रो. श्री आर. वाय. देशपांडे हे BARC त भूतपूर्व Senior Scientist होते. त्यांना भौतिकशास्त्र या विषयाचे सविशेष ज्ञान आहे. २५ वर्षे सेवा केल्यानंतर त्यांचे गेली ३० वर्षे महायोगी श्री अरविंद यांच्या पांडिचेरी येथील आश्रमात वास्तव्य आहे. तिथे ते भौतिकशास्त्राचे प्राध्यापक आहेत. त्यांचा ज्ञानेश्वरीचा उत्तम व्यासंग आहे. `The Wager Of Ambrosia' हे ज्ञानेश्वरीचे रसग्रहणात्मक पुस्तक आणि इतर अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. महायोगी श्रीअरविंदांच्या विचारांचा आणि ग्रंथांचा, विशेषतः 'सावित्री'चा त्यांचा उत्तम अभ्यास आहे. त्यांनी व्यक्तवलेल्या योगदा श्री ज्ञानेश्वरीचे इंग्रजीत रूपांतर व्हावे या इच्छेची आंशिक पूर्तता (५०%) लेखकाकडून आतापावेतो झालेली आहे. त्याचा सुपरिपाक पुढील दोन ग्रंथरूपे झाला आहे: १. **Autobiography of A Natha Siddha Yogi** आणि २. **Inner Secrets of Rajayoga.**

श्री सुरेश तथा माधवराव रानडे हे भारतीय सैन्यदलातील कर्नलच्या दर्जाचे BSF मधील सेवानिवृत्त Commandant आहेत. पावसच्या श्री स्वामी स्वरूपानंदांनी ज्या देसाई कुटुंबाच्या वास्तूत अनेक वर्षे वास्तव्य केले होते, त्या देसाई घराण्यातील सौ. बनुताई यांचे ते चिरंजीव आहेत. ते स्वामींचे दीक्षित असून त्यांचा ज्ञानेश्वरीचा आणि श्रीस्वामी स्वरूपानंदांच्या अवीट ग्रंथसंपदेचा उत्तम अभ्यास आणि व्यासंग आहे. त्यांना ज्ञानेश्वरी ओवी नि ओवी कंठस्थ आहे. ते स्वतः **स्वामी म्हणे (SwamiMhane.com)** हा **Blog** चालवतात. त्यावर त्यांचे उत्कृष्ट विचार मांडलेले असतात.

त्यांनी स्वतंत्रपणे '**योगदा श्री ज्ञानेश्वरी**'ला आणि प्रस्तुत ग्रंथलेखकाला स्वामी स्वरूपानंदांचे आशीर्वाद कळवले आहेत. त्यांचा हा अभिप्राय उत्स्फूर्त आहे. त्यांच्या हातात लेखकाची 'योगदा श्री ज्ञानेश्वरी' पडल्यानंतर त्यांनी स्वत: होऊन लेखकाशी संपर्क साधला. त्यांची आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. माधवीताईंची प्रत्यक्ष भेट नुकतीच एप्रिल २०१६ त झाली.

From: Rosalind O'Hanlon

I have now had a chance to go through your most interesting and informative work on the Philosophy and Yoga of Gita and the Dnyaneshwari. I must say that I enjoyed the work enormously, and learned a very great deal from it.

In the first portion, you have brought together and presented to the reader, in an accessible form, all of the different streams of Hindu religious and philosophical thought, and the great scholars and thinkers who devised the various schools. Not only that, but you have in the most painstaking and clear way, mapped out how these schools relate to one another. What an achievement! It is the sort of overview that can only be produced by deep reading and learning over many years. And yet you have succeeded in writing in a way that sparks the reader's interest and draws him in, without too much baffling technical details. If only our regular academics could write in this approachable way!

I also much enjoyed the second part of the work, in which you make the case for your own 'Yoga'-centred perspective on these works. I do not have the competence to offer any judgement on the argument, but it seemed to me clear, and plausible. It is always good to have the personal perspective of the author, I feel, and that certainly came across very clearly. Altogether, it was the most enjoyable and stimulating read.

From the point of view of style, I cannot suggest improvements - it reads very well indeed as it is, with a clear and correct English style. You are to be congratulated on an all-round fine achievement!

Rosalind O'Hanlon
Professor of Indian History and Culture
Oriental Institute
Oxford

ऑक्सफर्ड येथील डॉ. रोझालींड ओ'हॅनलॉन यांच्यशी माझ्या इतर लिखाणानिमित्त माझा परिचय झाला होता. त्या एकदा लंडन मुक्कामी मला येऊन भेटूनही गेलेल्या आहेत. त्यांना मराठी येते आणि महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा त्यांना उत्तम परिचय आहे. महात्मा ज्योतिबा फुले त्यांचा ग्रंथ आहे आणि अन्य भारातीय सामाजिक, तसेच सांस्कृतिक विषयांवर त्यांचे अनेक प्रबंध प्रसिद्ध झालेले आहेत. योगदा श्रीज्ञानेश्वरीचा परिचयात्मक भूमिकेचा भाग मी त्यांना इंग्रजीतून रूपांतरीत करून अभिप्रायासाठी पाठवला होता. त्यावर वरील अभिप्राय मिळाला.

❄

प्रिय वाचक, नमस्कार.

नुकताच एक श्रीनिवृत्तिनाथांचा अभंग प्राप्त झाला आहे. त्यात वर्णिलेले अनुभव आणि अनुभूती यात या यौगिक आत्मवृत्तपर ग्रंथाचे म्हटले तर सार आहे. या ग्रंथात सर्वश्रेष्ठ अनभूती अनाहतनादाची सांगितली आहे. तो सगळा अभंग श्री श्रीपादजी अभ्यंकर/श्री सुदेश चोगले यांच्याकडून प्राप्त झाला. तोच जिज्ञासुंच्या एतद्विषयक शंकानिरसनार्थ देत आहे:

फळले भाग्य माझे । धन्य झालो संसारी ।
सद्गुरू भेटले हो । त्यांनी धरियले करी ।।
पश्चिमेसी चालविले । आत्मस्थिती निर्धारी ।
त्रिकुटावरी नांदे । देखियेले पंढरी ।। ते सुख काय सांगू ।।१।।
राऊळामाजीं जातां । राहे देह अवस्था ।
मन हे उन्मन झाले । नसे बद्धतेची वार्ता ।।
हेतु हा मावळला । शब्दा आली निःशब्दता ।
तटस्थ होऊनि ठेले । निजरूप पाहता ।। ते सुख काय सांगू ।।२।।
आरती विठ्ठलाची । पूर्ण उजळली अंतरी ।।
प्रकाश थोर झाला । साठवेना अंबरीं ।
रवि शशि मावळले । तया तेजा माझारीं ।।
<u>वाजती दिव्य वाद्ये । अनाहत गजरी</u> ।। ते सुख काय सांगू ।।३।।
आनंद सागरात । प्रेमें बुडी दिधली ।
लाभले सौख्य मोठे । न ये वाचे बोलता ।।
सद्गुरूचेनि संगें । ऐसीं केली आरती ।
निवृत्ती आनंदात । तेथ वृत्ती निमाली ।। ते सुख काय सांगू ।।४।।
आरतीचेनी योगे । गेले मीपण माझे ।। ते सुख काय सांगू ।।५।।

प्रस्तुत लेखकाला अनेक वाचकांचे उत्साहवर्धक अभिप्राय मिळाले. तसेच अनेक वाचक त्यांच्या संपर्कात आले आणि त्यातील बऱ्याच जणांनी त्यांची प्रत्यक्ष घरी येऊन भेट घेतली. त्यात इंग्लंड-अमेरिकेपासून तर आसेतु-हिमाचल अशा पसरलेल्या भारतभूतील वाचक आहेत.

त्यांच्या उत्साही पाठिंब्यामुळे या लेखकाचा लेखनोत्साह वर्धित होऊन '**योगदा**'चे इंग्रजी रुपांतर अमराठी भाषिकांसाठी चालू केले आहे. त्याचेही काही भाग प्रसिद्ध झाले आहेत आणि त्या लिखाणालाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सर्वत्र मिळालेल्या अशा अभिजात वाचक-अभ्यासकांच्या सहर्ष प्रोत्साहनासाठी लेखक त्या सर्वांचा अत्यंत आभारी अन् ऋणी आहे.

हे सगळे ग्रंथकौतुक माउली श्रीज्ञानदेवांच्या अन् त्या जगन्नियंत्या श्री गोपालकृष्णाच्या श्रीचरणी अर्पण करावे हीच एकमेव भावना हा लेखक मनीमानसी वागवत असतो. आले ते सुयश त्या दयाघन ईश्वराचेच आहे. म्हणून ज्ञानेश्वरमाउलीचे बोट धरत तो म्हणतो की:

भरूनि सद्भावाची अंजुली ।
मियां वोवियां फुलें मोकलीं ।
अर्पिलीं अंघ्रियुगलीं ।
विश्वरूपाचां ।।११-७०८।।

ॐॐॐ

विभाकर विठ्ठल लेले

[स्वामी योगेश्वरानंद]

ग्रंथलेखक

ॐॐॐ

❄

::ग्रंथाचा परिचय::

❖ ग्रंथनाम :::: योगदा श्रीज्ञानेश्वरी

लेखक:स्वामी योगेश्वरानंद

❖ **स्थूल स्वरूप**

- पृष्ठ संख्या -१३५० स्टँडर्ड ए-४- डबल कॉलम
- खंड : परिचयस्कंधासह १५ स्कंध
- प्रकरणे : भूमिकेसह ६० उन्मेष

❖ **ग्रंथाचे स्वरूप**

विषय: श्रीकृष्ण परमात्म्याने गीताख्यानप्रसंगी ध्वनित केलेल्या गूढगर्भ भक्तिरसपूर्ण ईश्वरप्रणिधानाधारित योगाचे श्रीज्ञानेश्वरमाउलींनी जे अंतरंग रहस्य श्रीज्ञानेश्वरीत प्रकट केले आहे,

त्याचे सविस्तर सटीप उद्‌घाटन आणि त्यानिमित्त:

- ज्ञानेश्वरीतील भक्तियोग, पंथराज, कर्मयोग व ज्ञान या विषयांचे सविस्तर विषयवार विवेचन
- कुंडलिनीशक्तीवर आधारित लययोगाचे शास्त्रशुद्ध आनुभविक विवरण
- ज्ञानेश्वरीच्या सगळ्या ओव्यांवर विषयवार विवेचन आणि गीतेच्या अनुरोधाने त्यांचा विचार
- अमृतानुभवातील प्रकरणांचा विषयसंदर्भानुसार आवश्यक तो समावेश आणि विचार
- श्रीज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञान आणि योगविषयक भूमिका आणि त्यांच्या संजीवनसमाधीचे रहस्य
- चिद्विलासाचे तत्त्वज्ञान आणि विषयसंदर्भानुसार जैन-बौद्धादी व षड्‌दर्शने, द्वैताद्वैतादी तत्त्वज्ञानप्रणाल्या आणि आधुनिक विज्ञान यांचा विचार
- भारतीय तत्त्वज्ञानप्रणाल्या, न्यायादी षड्‌शास्त्रे, इतर वैदिक दर्शने व अवैदिक विचारधारा यांचा आवश्यक तो संक्षिप्त परिचय
- पातञ्जलयोगसूत्रे, नारदभक्तिसूत्रे, श्रीमत् शंकराचार्य भगवत्पाद यांचे योगतारावलि, सौंदर्यलहरी, विवेकचूडामणि, अपरोक्षानुभूति, पंचीकरण आणि गीता व ब्रह्मसूत्रभाष्य, तसेच इतर विद्वान आणि योग्यांच्या गीता, ज्ञानेश्वरी, उपासना आणि योगशास्त्र यांवरील ग्रंथांचा योगाच्या संदर्भात विचार
- श्रीज्ञानदेवांचे अभंग, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी आणि प्रकरणग्रंथ यांच्या साहाय्याने श्रीगीता-ज्ञानेश्वरीतील योग आणि भक्तीचे दिसून येणारे वैशिष्ट्य
- शक्तिपातयोग, सिद्धमहायोग, राजयोग, वेदोपनिषदांतील उपासना, भक्ति व योग आणि तंत्रशास्त्रदृष्ट्या श्रीज्ञानेश्वरांच्या पंथराज योगप्रणालीचा विचार
- श्रीज्ञानदेवांच्या श्रीज्ञानेश्वरी व इतर वाङ्मयातून प्रकट होणारे त्यांचे तत्त्वज्ञान आणि योगमार्ग यांचा विचार
- श्रीज्ञानेश्वरांनी प्रकट केलेल्या गीतेतील योग आणि तत्त्वज्ञान यांचा प्रस्तुत ग्रंथलेखकास प्रतीत होणारा स्वतंत्र अर्थ आणि संबंधित विचार

- कर्म-भक्ति-ज्ञान या त्रिवेणीचा ज्ञानेश्वरांच्या सद्गुरुपदिष्ट कुंडलिन्यधिष्ठित *पंथराज* या (ज्याला ते *क्रमयोग* असेही म्हणतात, त्या) योगप्रयागी समन्वयात्मक संगम

- ग्रंथलेखकाचे योगानुभव: गीता-ज्ञानेश्वरी या योग आणि उपासनाशास्त्रांवरचा ग्रंथ पढिक पांडित्याचा नसावा. ग्रंथलेखकाने स्वतः योगानुभव घेत घेत हा ग्रंथ लिहिला आहे. "एका योग्याचे आत्मवृत्त" या यौगिक आत्मवृत्ताद्वारे ते ग्रंथात समाविष्ट केले आहेत.

❖ ग्रंथाचे प्रयोजन

- सर्वसामान्य भाविक आणि ज्ञानेश्वरभक्त, ज्ञानेश्वर वाङ्मयाचे जिज्ञासू आणि प्रामाणिक अभ्यासक, शक्तिपात सांप्रदायिक, योग आणि भक्तिमार्गीय, अनेकानेक पंथांचे आणि उपपंथांचे पथिक साधक, संन्यासी, गृहस्थ,वानप्रस्थी, कृष्णाचे असो की पांडुरंगाचे, रामाचे असो की जगदंबेचे, जे जे कोणी भगवंताचे भक्त आहेत, योगी आहेत, कोणीही का असेनात,पारमार्थिक आहेत, अध्यात्माच्या मार्गावरून वाटचाल करणारे किंवा करू इच्छिणारे आहेत, त्या त्या सगळ्यांना या **योगदा श्रीज्ञानेश्वरी** या ग्रंथाद्वारे हवे तितके संपूर्ण मार्गदर्शन होईल, असा ग्रंथलेखकाला पूर्ण विश्वास आहे.

❖ सविस्तर मांडलेली ग्रंथामागील भूमिका:

- यात पुढील महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश केलेला आहे:

- ग्रंथामागील सविस्तर भूमिकेत ग्रंथाचे प्रयोजन व ग्रंथाचा आराखडा मांडलेला आहे.
- गीतेतील तत्त्वज्ञानाचे वेगवेगळ्या दार्शनिकांनी आणि तत्त्वज्ञान्यांनी लावलेले भिन्नभिन्न अर्थ व त्यामागील कारणपरंपरा यांचा विचार
- भारतीय तत्त्वज्ञानप्रणाल्या, न्यायादी षट्शास्त्रे, इतर वैदिक दर्शने व अवैदिक विचारधारा यांचा संक्षिप्त परिचय
- गीतेच्या तत्त्वज्ञान व योगासंबंधी ज्ञानदेवांनी लावलेला वेगळा अर्थ
- गीतोपदिष्ट योग, पातञ्जलयोगसूत्रे व कुंडलिन्यधिष्ठित योगाचा संबंध
- श्रीज्ञानदेवांनी गीतेतील मूळ योगाचे पंथराजस्वरूपात स्पष्ट निर्देशन करण्यामागच्या विचारपरंपरेचे विवेचन
- कर्म, भक्ति व ज्ञान यांचा परस्परात अविरोध
- आधुनिक विज्ञान आणि भारतीय तत्त्वज्ञानप्रणाल्या, दर्शने व योगशास्त्र यांतील अंतर्गत विरोधाचे वास्तवतावाद आणि योगज अनुभूती (Realism as juxtaposed to Surrealism) यांच्या संदर्भात परीक्षण

❖ ज्ञानेश्वरीचे केवळ सार्थ विवरण करणे किंवा निव्वळ काव्यसाहित्यसौंदर्यादी दृष्टीने त्यावर लिहिणे ही दृष्टी या ग्रंथलेखनामागे नाही. तत्त्वज्ञान, उपासना (भक्ति, कर्म, ज्ञान आणि योग) आणि ज्ञानेश्वरांची अधिकृत योगप्रणाली हेच या ग्रंथातील प्रमुख विषय होत.

❖ श्रीज्ञानदेवांनी लावलेला गीतेचा अर्थ, त्यांच्या मते तिच्यात दिसून येणारे तत्त्वज्ञान आणि तिची प्रमुख योगप्रणाली या तीन स्तंभांवर येथे प्रस्तुत केलेला "योगदा श्रीज्ञानेश्वरी" हा ग्रंथ रचलेला आहे.

❖ या विषयांवरील अशा प्रकारच्या ग्रंथाला साजेशी सुयोग्य मराठी भाषा त्यासाठी उपयोजित केलेली आहे. भाषेचे लालित्य हे मुख्य नसून गीता-ज्ञानेश्वरीच्या विषयांच्या अनुषंगाने ग्रंथाची मांडणी सुस्पष्ट करता यावी अशी वैज्ञानिक दृष्टीची भाषा प्रयोगात आणलेली आहे.

❖ श्रीगीता आणि ज्ञानेश्वरी यांच्या आणि ज्ञानदेवांच्या समग्र वाङ्मयाच्या अभ्यासकांना तसेच जिज्ञासूंना आणि ग्रंथाच्या प्रयोजनात सांगितलेल्या सर्व उपासक, योगसाधक, भक्त इत्यादींनाही हा ग्रंथ उपयुक्त ठरेल, असे त्याचे स्वरूप आहे.

❖ संदर्भ ग्रंथादी:

संदर्भ ग्रंथांचा सुयोग्य निर्देश ग्रंथात ठिकठिकाणी केलेला आहे. त्याव्यतिरिक्त ग्रंथामागील भूमिकेत सूचित केल्याप्रमाणे ज्या ज्या ग्रंथांचा माझ्या विचारांना चालना देऊन या ग्रंथलेखनास उपयोग झाला, त्यांचा निर्देश एका विस्तृत संदर्भ व ग्रंथसूचीत केलेला आहे. त्यायोगे जिज्ञासू आणि अभ्यासकांना या विषयावरील वाचनीय ग्रंथांची माहिती मिळेल. येथे त्या ग्रंथांचा केवळ अंगुलिनिर्देश करत आहे.

त्यात पुढील विषयांवरील अनेक ग्रंथ आहेत:

- वेदोपनिषदे, चांगदेवपासष्टी, पंचीकरण, योगवासिष्ठ, हरिपाठ
- श्रीमद्भगवद्गीता: गीता प्रेस, स्व.आदरणीय लो.टिळक - गीतारहस्य, श्री.पांडुरंगशास्त्री आठवले, स्वामी चिन्मयानंद, योगी अरविंद, योगी योगानंद, गुरुदेव रानडे, ॲनी बेझंट-भगवानदास, श्रीरामानुजांचे गीताभाष्य, गीता प्रेसचे आणि प्रसाद प्रकाशनाचे गीताभाष्य,श्री.ल.प्रभुपादस्वामी, श्री.शैलेंद्र शर्मा-लाहिडीमहाशय इ.चे ग्रंथ
- श्रीज्ञानेश्वरी: ह.भ.प.श्री.मामा दांडेकर, श्री.केळकर व मंगरूळकर, श्री.बाबामहाराज आर्वीकर - दिव्यामृतधारा, श्री.साखरेमहाराज, श्री.बाबाजीमहाराज पंडित, स्वामी श्री.स्वरूपानंद -अभंग ज्ञानेश्वरी व नित्यपाठ ज्ञानेश्वरी,श्री.रा.ना.वेलिंगकर - ज्ञानेश्वरीचे शब्दभांडार, श्री.कुंटे -सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी, श्री.के.रा.जोशी इ.चे ग्रंथ
- अमृतानुभव: श्री.स्वामी स्वरूपानंद, श्री.जोगमहाराज, श्री.शिवकल्याणस्वामी, श्री.रंगनाथमहाराज परभणीकर, प्रज्ञाचक्षू श्री.गुलाबराव महाराज इ.चे ग्रंथ
- संतांचे अभंग: ज्ञानदेवांच्या अभंगांची गाथा - श्री.प्र.न.जोशी आणि श्री.साखरेमहाराज, श्री.तुकाराम,श्री. एकनाथ, मुक्ताई, नामदेव, सोपानदेव इ.च्या अभंगगाथा
- योगतारावलि व नारदभक्तिसूत्रे -श्री.चं.वा.दांडेकर, सौदर्यलहरी व भक्तिसूत्रे श्रीस्वामी श्रीविष्णुतीर्थमहाराज, विवेकचूडामणि, अपरोक्षानुभूति - श्री.स्वामी चिन्मयानंद, श्री.स्वामी मुक्तानंद-शिवसूत्रे, प्रत्यभिज्ञादर्शन इ.
- पातञ्जलयोगसूत्रे व व्यासभाष्य: श्री.स्वामी हरिहरानंद आरण्य, श्री.स्वामी विवेकानंद, श्री.स्वामी विष्णुतीर्थमहाराज, श्री.ओमानंदस्वामी, श्री.कृ.के.कोल्हटकर, श्री.नानाभाई रेळे इ.चे ग्रंथ
- योगशास्त्र व तंत्रशास्त्र: Sir John Woodroffe यांचे The Serpent Power इ.ग्रंथ, श्री.गजाननमहाराज गुप्ते, श्री.गोपीनाथ कविराज आणि इतरांचे अनेक ग्रंथ

- **शक्तिपातयोग: पं.गोपीनाथ कविराज, श्री.स्वामी मुक्तानंद, श्री.स्वामी विष्णुतीर्थ महाराज, श्री.स्वामी शिवोम्तीर्थ, श्री.के.रा.जोशी, इ.मान्यवरांचे ग्रंथ**
- **भारतीय तत्त्वज्ञान: डॉ.ग.ना.जोशी यांचा भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् (१२ खंडात्मक) इतिहास, श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी इ.चे ग्रंथ**
- **अध्यात्मशास्त्र: श्री.बेलसरेमहाराज, श्री.गुरुदेव रानडे, इ.चे ग्रंथ**
- **आधुनिक विज्ञान: "The Encyclopaedia of Ignorance" by Eminent Nobel Laureates आणि इतर असंख्य ग्रंथ**

❖ **यात्व्यतिरिक्त इतर अनेक ग्रंथांचा प्रस्तुत ग्रंथलेखनासाठी विषय आकळून घेण्यास उपयोग झाला. त्या सगळ्यांचा येथे उल्लेख करणे शक्य नाही. प्रस्तुत लेखकाच्या जन्मभर चालत आलेल्या व्यासंग आणि वाचनप्रवासातूनच या ग्रंथाची निर्मिती होऊ शकली. "ग्रंथ माझे गुरु" असे म्हणत त्या सर्व नामनिर्देश केलेल्या आणि न केलेल्या ग्रंथांचे व ग्रंथकर्त्यांचे ऋण तो मानतो आहे.**

- **डॉ.श्री.प्र.न.जोशी यांच्या ग्रंथातील अनुक्रमांक उल्लेखून ज्ञानदेवांचे अभंग दिले असलेत, तरी त्यांचा अर्थ स्वतंत्रपणे लेखकाने आपल्या योगानुभवांच्या प्रकाशात आणि प्रतिपाद्य विषयानुरोधाने केलेला आहे.**
- **ग्रंथलेखनासाठी श्री.शं.वा.तथा मामासाहेब दांडेकर यांच्या ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा फक्त अनुक्रमांक वापरला आहे. ओव्या आणि त्यांचा अर्थ यांसाठी अनेक विचारवंतांच्या ज्ञानेश्वरीच्या ओव्या आणि त्यांनी केलेले अर्थ तपासून जशा त्याला पटल्या, तशा ओव्या देऊन त्यांचा अर्थ लेखकाने स्वत:च्या शब्दात विषयाच्या संदर्भानुसार दिलेला आहे.**

❖ **ग्रंथलेखनाचा काळ : मे १९९१ते २०११: सर्व लेखन उत्स्फूर्त, सप्रयोग व यौगिक अनुभव घेत घेत, तसेच व्यवसायादी व्यवधाने दक्षतापूर्वक सांभाळून केलेले असल्याने बृहद स्वरूपाच्या *योगदा श्रीज्ञानेश्वरी* या ग्रंथास इतका कालावधी लागणे आवश्यक होते.**

❖ **ग्रंथाची पूर्वप्रसिद्धी पुणे व मुंबई परिसर, ग्रंथलेखकाचे मित्रमंडळ व इतर स्नेही, काही विद्वान आणि वाचक मंडळी यांच्यात झालेली आहे.**

ॐॐॐ

ले.स्वामी योगेश्वरानंद

(विभाकर वि. लेले)

योगदा श्रीज्ञानेश्वरी

खंड व प्रकरणांची अनुक्रमणिका

:::योगदा श्रीज्ञानेश्वरी:::

:विषयवार संक्षिप्त अनुक्रमणिका:

::ग्रंथपरिचयस्कंध::

::द्वितीय स्कंध::योगसाधना::(उन्मेष ८-१५) (१२० - २४२)

::सप्तम स्कंध::कर्माचे स्वरूप::(उन्मेष ३० ते ३३) (पृ.क्र.४५४ते ५२४)

::अष्टम स्कंध::उपासना रहस्य::(उन्मेष ३४-३५) (पृ.क्र.५२५ ते ५५८)

::नवम स्कंध::ईश्वराचे अंतरंग::(उन्मेष ३६-३८) (५५९-६१०)

::दशम स्कंध::कर्मपथदिग्दर्शन::(उन्मेष ३९-१ -४३)(६११-७१२)

::एकादश स्कंध::योगवैभव::(४४-१ - ४६)(७११-८३०)

उन्मेष ४४-१:योगविभवभाण्डार:पंथराज:(७११-७२६)

उन्मेष ४४-२:योगविभवभाण्डार:कुंडलिनी जगदंबा:(७२७-७४३)

उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ:(७४४-७७५)

उन्मेष ४५-२:लययोगसमालोचन:योगशास्त्रसमन्वय:(७७६-७९७)

उन्मेष उन्मेष ४६:योगपर अभंग:(७९८-८३०)

::द्वादश स्कंध:भक्तिवैभव::(४७-५१)(८३१-९८०)

उन्मेष ४७-१::अनन्यभक्ती:(८३१-८४७)

उन्मेष ४७-२:परमभक्ती:(८४८-८५७)

उन्मेष ४८-१:विश्वरूपप्रकटन: (८५८-८७६)

::त्रयोदश स्कंध::योग-भक्तिसार::(५२-५६) (९८१-१०९६)

ॐॐ

:::योगदा श्रीज्ञानेश्वरी:::

::ग्रन्थामागील भूमिका::

::पूर्वरंग::

::ज्ञानेश्वरी आणि मी::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::मध्यरंग-१::

::भारतीय तत्त्वज्ञानप्रणाली::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::मध्यरंग-२::

::वास्तववाद, विज्ञान व दर्शने::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उत्तररंग::

::गीता व ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान व योग::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

ॐ श्री ॐ

:::योगदा श्रीज्ञानेश्वरी:::

::ग्रन्थामागील भूमिका::

::पूर्वरंग::

::ज्ञानेश्वरी आणि मी::

संत श्रीज्ञानेश्वर, ज्ञानदेवी आणि मी::::

लेखनारम्भ

बघता बघतां ज्ञानेश्वरीवरील या लिखाणास सुरुवात होऊन जवळजवळ बारा वर्षे होऊन गेली अन ते पूर्ण झालेही. मुळांत कांही विशेष हेतू न धरतां सुरु झालेले हे लेखन असे विस्तृत रूप घेईल व जवळ जवळ ३०००पृष्ठांचे हस्तलिखित असा आकार घेईल अशी पूर्वी कधीच मी कल्पनाही करूं शकलो नसतो.

श्रीज्ञानेश्वर व ज्ञानदेवी याविषयी स्फुट लेखन ५-२५ पानांचे करावे एवढाच माफक उद्देश व तोही कोणत्या एका अनाकलनीय अशा स्फूर्तीतून उद्भवला होता आणि झालेही तसेच. पहिल्या जोमांत १०-१२ पाने लिहिली अन नंतरच्या दोन तीन आठवड्यांत पुढील ८-१० पाने असे करतां करतां चाळीस पन्नास पाने लिहून झाली. होता होता शंभरएक पृष्ठे एवढा मजकूर लिहिला गेला अन लिखाणास एक दिशा प्राप्त झाली आहे असे वाटूं लागले. ती दिशा धरून पुढची शे-सव्वाशे पाने लिहून झाल्यावर आपणांकडून एवढेच लिखाण व्हावयाचे होते असे वाटून लेखणीस विराम देत समारोप केला. लिखाण तसेच कांही महिने ठेऊन दिले होते.

त्यानंतर पुनः अचानक एकदां असे वाटले की आपण हाच विषय पुढे चालवीत जावे आणि संपूर्ण ज्ञानदेवीवर विषय उलगडत जाईल तसे लिहावे. ज्ञानदेवीच्या अदमासे *९००० ओव्या* व श्रीगीतेचे *७०० श्लोक* त्यांच्या अर्थासह त्यांत यावेत आणि हे सर्व शक्य तितके आपल्याच भाषेंत असावे. त्याचे स्वरूप मुक्त चिंतनाचे असावे असे मला वाटले. आपण सगळेच कोणत्या ना कोणत्या विषयाचे जसे सतत चिंतन करीतच असतो, तसेच माझेही ज्ञानेश्वरीसंबंधित अल्पस्वल्प चिंतन यांत आलेले आहे.

या विचारांनी संथ गतीने लेखन करीत असतां नवनवीन कल्पना सुचत गेल्या आणि आवश्यकतेनुसार इतर ग्रंथांचा आधार घेत ज्ञानेश्वरी व गीतेतील विविध महत्त्वाच्या विषयांची उकल कितपत करतां येते ते पाहूं या असे मला वाटूं लागले.

संदर्भग्रंथ

त्यानुसार पातञ्जलयोगसूत्रे, नारदभक्तिसूत्रे, योगतारावली, गीतेवरील शांकरभाष्य, सौंदर्यलहरी, ज्ञानदेवांचे अभंग, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी, अपरोक्षानुभूती, पंचीकरण, शिवसूत्रे – प्रत्यभिज्ञादर्शन, विवेकचूडामणी, योगवासिष्ठ, वेदोपनिषदे व गीता, ज्ञानेश्वरी, योगशास्त्र, तंत्रशास्त्र व यांवरील आर्थर ॲव्हलॉनचे *Serpent Power* व इतर तंत्रविषयक ग्रंथ, तसेच शक्तिपात संप्रदायांचे पं.गोपिनाथ कविराज, मुक्तानंद, श्रीविष्णुतीर्थ महाराज, श्री के.रा.जोशी इ.मान्यवरांचे ग्रंथ व लिखाण, वैदिक साधनेविषयींचे वाङ्मय, तुकाराम, एकनाथ, नामदेव, निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई इ.संतांचे अभंग, इतर वाङ्मय व हरिपाठ, भारतीय व इतर तत्वज्ञानांविषयींचे ग्रंथ अशा प्रकारच्या अनेक ग्रंथांचे परिशीलन करून, कधी ते समग्र वाचून तर कधी ते हव्या त्या विषयासाठी चाळून पाहून, त्यावर विचार करून ज्ञानेश्वरींतील विविध विषयांची माझ्या मतीनुसार व कुवतीप्रमाणे उकल करण्याचा हा माझा खरे तर एक स्वांतःसुखाय असा प्रयत्न आहे.

लेखकाची मर्यादा

येथे हेही नमूद करणे उचित होईल की माझे शिक्षण मराठी माध्यमांतून सातवीआठवीच झाले आहे. पुढील शालेय शिक्षणाचे माध्यम हिंदी होते. नंतरच्या सायन्स व इंजिनीयरींग आणि कायद्याच्या शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्याने त्याही भाषेचा आवश्यक तो परिचय आहे. मी भाषाविषयक तज्ज्ञ *M.A. Ph.D.*इ.नाही. मराठीभाषाविषयक माझे सामर्थ्य त्या दृष्टीने असे मर्यादित आहे. त्यामुळे या ग्रंथांतरी मी जे विचार व्यक्तवले आहेत, त्यांतील मराठी भाषा तशा श्रेष्ठ दर्जाची नसल्यास कोणीही शब्दच्छल करून त्यांतून मला अभिप्रेत नसलेले अर्थ काढून माझ्या सद्हेतूचा विपर्यास करुं नये ही विनंती. असो.

या लिखाणाचा इतर वाचकांना काय उपयोग होईल हे खरे तर मी सांगू शकत नाही. पण एक मात्र नक्की. जो कोणी समानधर्मा वाचक माझ्याच पूर्वपीठिकेवरून या लेखनाकडे बघूं शकेल, त्याला ते गीता-ज्ञानेश्वरीचा अधिक मागोवा घेण्यास प्रवृत्त करील असे मात्र मला प्रामाणिकपणे वाटते.

थोरथोर विचारवंत व विद्वान, मान्यतम लेखक व विचिकित्सक, मोठेमोठे अभ्यासक यांना हे लिखाण उपयुक्त ठरेल असे ते कदाचित असणार नाही. कारण ज्या वैचारिक पातळीवरून हे केले गेले आहे ती त्यांच्या तुलनेंत एका layman पण bibliophile अशा साध्या मनुष्याची आहे. पण ज्ञानेश्वरीचा अभ्यास करू इच्छिणारे व प्रेमी, रसिक आणि ज्ञानेश्वरीच्या अनुषंगाने गीतेचा अभ्यास करू इच्छिणारे या सर्वांना हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल अशी माझी धारणा आहे.

विचारवंत, विद्वान, मान्यतम लेखक व विचिकित्सक, मोठेमोठे अभ्यासक अशा सिद्धप्रज्ञ, स्वयंप्रकाशित सिद्धहस्तांचे वाङ्मय जेव्हां माझ्यासारख्यांच्या हाती पडते, तेव्हां आमची पात्रापात्रता न पहातां, ते वाचावे की नाही हे कळत नसतांनाही कधीकधी आम्ही ते वाचतो. त्यावेळी आम्ही कोणी त्या त्या विषयांतील तज्ज्ञ वा अभ्यासक नसतो. अनेक ठिकाणी प्रवचनांतून, चर्चेतून वा प्रसारमाध्यमांतून ऐकलेले, वाचलेले विचार आम्हांभोवती कोंडाळे करून असतात. आमच्यापैकी काही जणांच्या स्मरणशक्ती व इतर बौद्धिक क्षमता तशा तेवढ्या या महाभागांएवढ्या विकसित झालेल्या नसतात.

पण तरीही आम्हांला कधीकधी हे आध्यात्मिक विचार आपल्यापर्यंत येऊन पोहोचावेत असे फार वाटते. मग आम्ही त्यांची संगती आम्हाला जशी जमेल तशी लावूं पहातो.

तर्कशास्त्र, तत्वज्ञान, वेदोपनिषदे, गीता-ज्ञानेश्वरी, संतमहंत व साक्षात्कारी पुरुषांचे अनुभव, शास्त्रे इ.अनेक गोष्टींचा आम्हाला सखोल असा परिचय नसतो. कांही वाचीव, कांही स्वतःच्या त्याबाबतच्या कल्पना अशा सर्व गोष्टींचा गोपालकाला करून आम्ही आम्हाला रुचेल, पटेल तसा त्यांचा अर्थ लावत असतो. आजचा विचार उद्यां पक्का असेलच असेही नाही. थोडक्यांत आम्ही त्या त्या विषयांचे जाणकार वा तज्ज्ञ नसल्याने कोणत्याही विशिष्ट अशा विचारप्रणालीशी एकनिष्ठ असे असतोच असे नाही. पण अर्थातच हा आमच्यासारख्यांचा एक गुणात्मक विशेषही आहे. कारण त्यामुळे आमचे विचार पूर्वग्रहदूषित असण्याचा संभवही कमीच असतो.

ज्ञानेश्वरीचा परीसस्पर्श

अशी ही जी आवळ्याभोपळ्यांची मोट मी माझ्या वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षापर्यंत बांधली होती, तिच्यांत आमूलाग्र बदल झाला तो जेव्हां ज्ञानेश्वरी माझ्या हाती आली तेव्हां. मी मुळांत गणित, भौतिकशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचा स्नातक व नंतरचा व्यावसायिक. अध्यात्मविषयाचा तसा अनोळखी. देवदेवतार्चनादी बाबींचा अनभ्यस्त. त्यांतून संस्कृत येतच नाही म्हटले तरी चालेल.

मराठी मातृभाषा व तीही संस्कृतोद्भव आणि संस्कृतप्रचुर अशी कांहीशी परिचित असणे एवढाच माझा संस्कृत भाषेविषयींचा प्लस पॉइंट! अर्थातच वेद, उपनिषदे इ.प्राच्य वाङ्मय व गीता आणि तत्वज्ञानविषयक विचारांचा मूल संस्कृत स्रोत हा मला सहसा अप्राप्यच! पण तरीही अनेक विद्वद्वरांनी या विषयांवर मराठी, इंग्रजी व हिंदी या मला साधारणतया अवगत असणाऱ्या भाषांत लिखाण केले असल्याने त्यांचा काही परिचय घडण्याचे भाग्य मला लाभूं शकले. पण या विषयांकडे माझी बुद्धी आकर्षिली गेली ती मात्र वयाची जवळपास पंचेचाळीस वर्षे उलटून गेल्यावरच.

तसेच घरी धार्मिक परंपरागत सनातनी पुरोहिती वळण नसल्याने याविषयींचे पाठांतर इ.काहींच जवळ नव्हते. या विषयांची अल्पशी जाणसुद्धां तेव्हांपर्यंत नव्हतीच म्हटले तरी चालेल. नाही म्हणायला गीतेचे एक छोटेखानी पुस्तक माझ्याजवळ कॉलेज सुटल्यावेळेपासून होते.

वाचनाची लहानपणापासून खूप आवड असल्याने हाती येईल ते पुस्तक, कळो न कळो, वाचून काढायला मी बघत असे. त्यामुळे नववी-दहावीत असता स्व. लोकमान्य टिळकांचा ***गीतारहस्य*** हा माझ्या आजोबांच्या संग्रहीचा ग्रंथ हाती पडताच मी तो वाचून काढण्यास पाहूं गेलो. पण शें-दोनशें पाने कशीबशी वाचून तो बाजूस ठेवावा लागला. कारण प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही माझ्या अल्प व अपरिपक्व मतीला त्यांतील एकही वाक्य धड कळेना. हीच परिस्थिती *अध्यात्म* या विषयाबाबत माझ्या पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंत होती. आजही मला *गीतारहस्य* किंवा *शांकरभाष्य* या प्रकारचे ग्रंथ विद्वानांप्रमाणे उत्तमरीत्या समजूं शकतात अशा भ्रमांत मी नाही. पण अभ्यासांती ते वाचण्या आणि समजावून घेण्याइतपत मजल मी गाठली आहे, हे मात्र निश्चित! असो.

मागे म्हटली तशी जी एकास एक अशी अनेक विचारांची खिचडी आम्ही laymen तयार करतो, तिला ***ज्ञानेश्वरी***च्या विचारांची आणि ज्ञानदेवांच्या ***अमृतानुभव-अभंगादी*** वाङ्मयसंपदेची अवीट गोडी प्राप्त होण्याचे भाग्य मला वयाच्या पन्नाशीत लाभले. एकदा मात्र ज्ञानेश्वरी हाती आली - त्यानंतर तो ग्रंथ मला दूर करतां येण्यासारखा राहिला नाही. किंबहुना लोखंडाने चुंबकास चिकटून बसावे तसा मी त्याकडे आकर्षिला गेलो. त्यांतील विचारांनी माझा अंतर्बाह्य वेध घेतला.

माझ्या मनांतील सर्व विचार ज्ञानेश्वरीच्या परीसस्पर्शाने उजळून जाऊं लागले. ***अध्यात्म व योग*** या विषयांची मजसारख्या त्या विषयांतील अल्पज्ञाने जी आवळ्याभोपळ्याची मोट बांधली होती, ती सुटून त्यांतील प्रत्येक विचाराचे ज्ञानदेवांच्या संगतीने पृथक्करण, विश्लेषण व समन्वयन होऊं लागले. जो तो विचार आपापल्या योग्य त्या स्थानी जाऊन बसूं लागला. त्या विचारांना सुंदर दिशा प्राप्त झाली. मी स्वप्नांतही कधी कल्पना करूं शकलो नसतो असे दिव्य अमृत रसायन त्याच विचारांतून मंथून निघूं लागले.

स्वानुभूतीची जोड

या सगळ्या परिवर्तनास जोड मिळाली ती कांही विशिष्ट अनुभूतींची. मी काही कोणी महान योगी, सिद्ध इ.नाही. मी आहे एक साधा सामान्य साधक. पण तरीही दैववशात् मला काही अतींद्रिय असे अनुभव आले. योगविषयक कांही अनुभूती प्राप्त झाली. ***कुंडलिनी*** विषयक जे शास्त्र आहे, त्यांतील कांही अनुभव कोणा अज्ञेय महानांच्या कृपेने माझ्या गंवसणींत पडले. ते माझे अनुभव मी या ग्रंथाच्या ***"एका योग्याचे आत्मवृत्त"*** या परिशिष्टवजा सदरात समाविष्ट केले आहेत.

कांही अनुभवसिद्ध व्यक्तींकडून त्या अनुभवांची खातरजमा झाली. त्यावरून मी माझ्यापुरता तरी त्या कुंडलिनीयोगशास्त्राच्या

प्रचितीविषयी आश्वस्त झालो. ज्ञानेश्वरमाऊलीने आपल्या ग्रंथांतरी जे कुंडलिनीयोगविषयकविस्तृत विवेचन केले आहे, ते नक्कीच साधार आहे अशी माझ्यासारख्या पाश्चात्य मटिरिॲलिझम् मानणाऱ्या व डिटर्मिनिस्टीक अशी भौतिकीशास्त्रे *(फिजिक्स, केमिस्ट्री, बॉयॉलॉजी)*, तंत्रज्ञान, मानववंशशास्त्र *(अँथ्रॉपॉलॉजी)*, गणित *(मॅथेमॅटिक्स व स्टॅटिस्टिक्स)*इंजीनीयरींग व टेक्नॉलॉजी, खगोलशास्त्र *(कॉस्मागॉनी, कॉस्मॉलॉजी व ॲस्ट्रॉनॉमी)*, जैवरसायनशास्त्र *(बॉयोकेमिस्ट्री)*, इ.विषयांच्या विद्यार्थी व परिचिताची खात्री पटली, म्हणूनच मी या विषयांकडे वळलो.

अन्यथा अतींद्रिय म्हणून समजल्या जाणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञान व योगशास्त्रविषयक अनेक गोष्टींवर विश्वास ठेवणे मजसारख्या मुळांत तार्किक व शंकेखोर आणि अंधश्रद्धा नसणाऱ्या मनुष्यास जन्मांत कधीच जमले नसते. आजही इतक्या वर्षांनी पूर्वी मिळालेल्या व सध्याही अनुभवास येणाऱ्या त्या अतींद्रिय अनुभवांकडे मी सजगपणेच पाहूं इच्छितो. कारण मला मिळालेले सायन्स व इंजिनीयरींगचे प्रशिक्षण व जन्मभराची तशीच विचार करण्याची सवय हे होय. *I am not at all a credulous person and I won't ask anybody, leave alone my friends and readers, to be one!*

याच कारणाने आजवर आम्ही सर्वसामान्य ज्यांना अध्यात्मांतील वा योगांतील personal गुरू म्हणतो, त्यांच्याकडे मी शिष्यत्वभावनेने कधीही शरण जाऊ शकलेलो नाही. कोणी याविषयींचा गुरू करूच नये असे माझे मत नाही. पण तसा माझा निखालस विश्वास बसावा अशा व्यक्ती मला अद्याप दिसून आलेली नाही, हे पण माझ्या या अशा अतितार्किक स्वभावामुळेच असले पाहिजे. असे असूनही मी प्रयत्न न करताच आणि तसा गुरूंप्रति कोणताही सश्रद्ध भाव न ठेवताही मला एक नाथसांप्रदायिक आणि दुसरे दोन शांकरानुयायी आणि नित्यानंदपरंपरेतील असे एकूण तीन गुरू मिळालेच आहेत. त्यांबाबत अधिक माहिती ***"एका योग्याचे आत्मवृत्त"*** या परिशिष्टात दिली आहे.

ग्रंथ माझे गुरू

असे करण्यास आणखीही एक कारण घडले. ते हे की तत्वज्ञानाचा उत्तम अभ्यास केलेल्या एका आध्यात्मिक व्यक्तीकडून मला मिळालेले मार्गदर्शन होय. त्यांनी कोणाही जीवित व्यक्तीकडे आध्यात्मिक गुरू म्हणून पाहू नये, तर ज्ञानेश्वरांसारखे जे संत पूर्वीच होऊन गेले आहेत व ज्यांच्याकडून आपली कोणतीही वंचना होण्याची अजिबात शक्यता नाही, ज्यांच्यावर आपली पूर्ण श्रद्धा नक्कीच बसू शकते, अशांच्या समाधिस्थानी जाऊन त्यांच्या कृपेची याचना करावी असे निक्षून सांगितले. त्यांचे सांगणे योग्य आहे असे मला पटले. म्हणून कोणाही हयात व्यक्तीस गुरू करण्याचा प्रसंग माझ्यावर आला नाही आणि *ग्रंथ माझे गुरू* ही वृत्ती मी आजन्म जोपासली आहे. त्यामुळे मला योग्य त्या गुरूंचा सहवास तसा सतत लाभलेलाच आहे. असो.

तर हे जे लेखन माझ्या हातून होत गेले, त्याची अशी ही संक्षिप्त भूमिका आहे. माझ्यासारखा तत्वज्ञान विषयाची, अध्यात्म वा योगशास्त्राची कोणतीही अर्जित पूर्वपीठिका नसलेला एक सामान्य वाचक या सर्व विषयांबाबत कसा विचार करूं जातो, त्याचे उदाहरण म्हणजे हा ग्रंथ आहे. त्या सगळ्यांतून आम्हांसारख्यांना काय गवसू शकते, त्याची मिती त्यांत आहे.

तत्वज्ञांचा विचार आमच्याकडे येऊन पोहोचतांना त्याचे स्वरूप कसे होते, हेही त्यांत दिसून येईल. जे विचार फक्त तत्त्वज्ञांनाच सांगावेत असे असतात, ते जेव्हां येनकेन प्रकारेण आमच्यासारख्यांकडे पोहोचतात, तेव्हां ते कसे आगळेवेगळे रूप धारण करतात, ते पाहून आपल्या विचारांचे आम्हासारख्या सामान्यांकडून केले गेलेले असे पृथक्करण, असे हे रूपांतर त्यांना कदाचित रुचणार नाही असेही वाटते. पण त्यांनी क्षमाशीलतेने या ग्रंथाकडे पहावे, अशी मी प्रार्थना करतो. आणि अशीच माझी प्रार्थना अन्य थोर विचारवंत, विद्वान, साहित्यिक, लेखक, संतमंडळी व त्यांचे भक्त, आचार्य, शास्त्रांचे अध्वर्यु व जाणकार आणि जे कोणी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून असतील वा समजले जात असतील, त्या सर्वांच्याप्रति आहे.

त्या सर्व महाभागांच्याच उत्तमोत्तम विचारांचे व तत्त्वज्ञानाचे आमच्या सामान्य बुद्धीच्या आरशांत उमटलेले हे प्रतिबिंब आज जरी कदाचित गबाळे, विकृत असे त्यांना वाटणारे असले, वस्तुदर्शी असे जरी ते दिसत नसले, तरी कदाचित कधीकाळी आमच्या या आरशावरील रजःकण कालमानेकरून, प्रयत्नपूर्वक अनेकानेक जन्मांतरी दूर होत जाऊन, बिंब कोणते व प्रतिबिंब कोणते ते जाणत्यासही कळेनासे होऊं शकेल! आणि हाच आशीर्वाद त्या थोर थोर तत्वज्ञ, संत, कविवरादी मान्यतमांकडून मी आम्हांसारख्यांसाठी प्रार्थित आहे!

निवृत्तिरूप विश्वात्मक देवांनी ज्ञानराजांना जसे कृपाळूपणे पसायदान दिले, तसेच त्या थोर अंतःकरणाच्या महोदयांनी व त्यांच्या असलेल्या उत्तराधिकाऱ्यांनी आमच्या दीनांच्या ओंजळीत टाकावे, हीच नम्र विनंती पुनः पुनः करून पुढील निवेदनाकडे वळतो.

या ग्रंथाचे प्रयोजन

ज्ञानेश्वरीवर व ती ज्या गीतेवर लिहीली आहे, तिच्यावर अशा या दोन्ही ग्रंथांवर विद्वान मान्यवरांनी लिहिलेले अनेकानेक उत्तमोत्तम ग्रंथ व इतर वाङ्मय सहज उपलब्ध असताही मजसारख्या एकाने हा वेगळा ग्रंथ रचण्याचे धाडस कां दाखवावे, हे व्यर्थ कष्ट कां उपसावे, असाही एक प्रश्न कोणी विचारतील, तर त्याचे माझ्यापरीने स्पष्टीकरण पूर्वीच केले आहे.

त्यांतून ज्ञानदेवीवर आणि गीतेवर या श्रेष्ठांनी वाहिलेल्या नितांत सुंदर, सुवासिक, रंगीबेरंगी, मनोहर अशा शेवंती, जाईजुई, मोगरा, चंपक, चमेली, गुलाब, बकुल, मालती, अनंत, मदनबाण, कमलदले

या पुष्पांसारखे अन् कृष्णकमळासारखे नाजूक अन देखणे असे जरी हे मी वाहिलेले तुलसीदलयुक्त भावकुसुम नसले, जरी सेतुबंधनांत श्रीरामाला मदत करणाऱ्या नल, नील, जांबुवान, हनुमंत अशा दिग्गजांच्या तोडीचे काम ती एक धिटुकली खारोटी कधीच करूं शकली नसती, तरीही तिने ज्या भावाने वाळूचे चार कण समुद्री लोटू पाहिले, त्याच भावनेने मी हे लिखाण करण्याचे धारिष्ट करतो आहे. गीता -ज्ञानेश्वरी समुद्रमंथनाच्या कामांत थोरामोठ्यांबरोबर हा माझा आपुलकीचा विनम्र हातभार आहे.

जगन्नाथाच्या गीता-ज्ञानेश्वरी रथास माझेही दोन दुर्बल हात लावून पावन होण्याचा माझा हा एक मनापासूनचा अल्प प्रयत्न आहे. असे हे माझे लेखन आपणां सर्वांनी गोड मानून घ्यावे ही विनंती. आणि या ज्ञानेश्वरी-गीतेच्या अथांग सागरीं यथेच्छ विहरण्याची शक्ती ज्या प्रभूने मोठमोठ्या देवमाशांसारख्या जलचरांना दिली, त्यानेच तर ना पिटुकल्या माशांनाही तेथेच पोहायची शक्ती दिली आहे! आणि तो ज्ञानसागरही त्या छोट्यांना येथे पोहूं नका असे कधीतरी म्हणतो कां! समुद्रांत मोठमोठ्या मंदराचलाच्या आकाराच्या जलचरांनीच तेवढा संचार करावा आणि पिटुकल्या माशांनी,***एरे शफरे***, तेथे पोहूंच नये काय!

ज्ञानेश्वरीची प्रमाणप्रत व ओव्यांचा अन्वयार्थ

असो. समानशीलांसाठी घडलेले हे ग्रंथलेखन करतांना मी काय केले ते सांगणे उचित ठरेल. जेव्हां दोनशे-अडीचशे पाने लिहीली व या लिखाणास एका विस्तृत ग्रंथाचा आकार येणे क्रमप्राप्त आहे असे मला दिसून आले, तेव्हां मी एक विचार केला. तोपावेतो ज्ञानेश्वरीच्या ओव्या व त्यांचा अनुक्रमांक मी श्री सत्यानंदसरस्वतींच्या ज्ञानेश्वरीच्या प्रतीवरून घेत होतो, त्यांत बदल केला. त्याऐवजी वारकरी संप्रदायांत ख्यातकीर्त असलेल्या *प.पू.वै.मामासाहेब तथा श्री.शं.वा.दांडेकर* यांच्या प्रतीनुसार ओव्या व अनुक्रमांक देण्याचे ठरविले. त्याला कारणे दोन. एक म्हणजे सदर प्रत जिज्ञासूंस सहजासहजी उपलब्ध होण्यासारखी वाटली व तिच्यांत ज्ञानेश्वरीवर सुदीर्घ प्रस्तावनावजा विद्वच्चर्चा ग्रंथारंभीच केलेली असून ओव्यांचा सुलभ अर्थ त्यांनी दिलेला आहे. आणि दुसरे असे की प.पू.समाधिस्थ स्वामी श्रीस्वरूपानंदांनी आपल्या ***अभंग ज्ञानेश्वरी*** या ग्रंथास आधार म्हणून त्याच प्रतीतील ओव्या घेतल्याचे कळले म्हणूनही!

ज्ञानेश्वरीच्या ओव्यांची एकूण संख्या, पाठभेद, मूळ ओव्या कोणत्या, प्रक्षिप्त ओव्या कोणत्या, एकनाथी शुद्ध प्रतीप्रमाणे कोणत्या ओव्या असाव्यात, त्यांचा नेमका क्रम आणि अर्थ कसा असावा, गीतेच्या कोणत्या श्लोकावर कोणत्या ओव्यांनी विवेचन केले आहे इ.इ.अनेक विवादास्पद विषय आपल्या विद्वानांनी बहुचर्चित केलेले असे आहेत. त्या विषयांत अवगाहन करण्याची माझी इच्छा नाही, तसेच आवश्यकताही नाही. पण या सर्व शब्दजंजाळांतून बाहेर पडण्यासाठी स्वामी स्वरूपानंदांसारख्या साक्षात्कारी पुरुषाने दाखवून दिलेली वाट मी स्वीकारण्यास प्रवृत्त झालो, यांत माझ्या श्रद्धेचाहीनाही म्हटले तरी थोडा भाग आहे, हे पण मी जिज्ञासू वाचकांसाठी नमूद करून ठेवत आहे.

दुसरे असे की ज्या दृष्टिकोनांतून मी गीता-ज्ञानेश्वरीकडे पाहत आहे, तेथे पाठभेद, प्रक्षिप्त ओव्या, इ.विषयांना फारसा वाव नाही. कारण माझ्या समाधानासाठी या विषयांवरील जे जे ग्रंथ मी पाहिले, ज्या ज्या विविध ज्ञानेश्वरीच्या प्रतींचा आढावा घेतला, त्यांवरून मला तरी असे वाटत गेले की as an overview मला जो गीता-ज्ञानेश्वरीचा अर्थ गंवसला आहे, भावला आहे, त्यांत या पाठभेदादींनी कांहीही फरक पडत नाही.

योगशास्त्रविषयक काहीकाही बाबींशी संबंधित असणारे पाठभेद मात्र तसे कांही वेळा महत्वाचे असूं शकतात. त्यासाठी अर्थातच त्या शास्त्राचे यथायोग्य परिपूर्ण अध्ययन करून योगानुभूती असलेल्या व ज्ञानेश्वरकालीन भाषेच्या तज्ज्ञ अशा अधिकारी व्यक्तींचीच मते माझ्या लेखनासाठी उपयुक्त आहेत. या सर्वगुणसंपन्न अशा कोणा व्यक्तीचा ज्ञानेश्वरीवरील याविषयींचा ग्रंथ माझ्या पाहण्यांत आला नाही. पाठभेदादींचा महत्वपूर्ण योगशास्त्रीय विचार ज्ञानेश्वरीच्या एकूणएक ओव्यांबाबत कोणी केलेला अद्याप माझ्या माहितीत नाही. केवळ वै.श्री.बाबामहाराज आर्वीकर यांच्या ***दिव्यामृतधारा*** या ग्रंथात फक्त *बाराव्या* अध्यायांतील ओव्यांसंबंधी असा विचार केलेला मला दिसून आला. असो.

या कारणांमुळे विषयानुरोधाने जातांना मी या चर्चेस फारसा प्रवृत्त झालो नाही. तसेच माझा उद्देशही मूलतः तरी साहित्यिक, linguistics इ.चर्चेचा नाही. तरीही या विषयांवरील मान्यवरांच्या ग्रंथांचा मला ज्ञानदेवीचा सोपान अर्थ समजून घेण्यास उपयोग झाला हे निश्चितच आणि म्हणूनच त्यांचे सर्वांचे एक मोठे ऋण माझ्यावर आहे, हे मी प्रांजळपणे मान्य करतो.

अर्थातच ओव्यांचा विषयानुरूप अर्थ देतांना आणि त्यांचा गीताश्लोकानुरोधाने संदर्भ लावतांना मात्र मी जरा जास्त चोखंदळपणा दाखविला आणि मला कळलेला अर्थ मला भावलेल्या शब्दांत मी व्यक्तविला आहे. अन्यथा त्यांत माझे म्हणावे असे काय राहिले असते! ओव्यांचा अर्थ अवगत होण्यासाठी मला वेगवेगळ्या प्रतकारांनी केलेल्या अर्थनिर्णयाची मदत झाली. तसेच श्री.रा.ना.वेलिंगकर यांच्या ज्ञानदेवीवरील शब्दकोशाचेही ***(ज्ञानेश्वरीचे शब्द भाण्डार)*** साहाय्य झाले.

विशेष उपयोग *श्री. केळकर-मंगरूळकर* यांच्या प्रतीचाही झाला. पण ती प्रत जरा उशीराच माझ्या हाती पडली. त्यांचा ओवींतील शब्दांचा अन्वयार्थ देण्याची पद्धत मला फार आवडली. येथे जाताजाता हे नमूद करावेसे वाटते की या ग्रंथाचे लेखन साधारणपणे *१९९१ ते २००३ (स्वामी स्वरूपानंद पुण्यतिथी)* अशी जवळ जवळ बारा वर्षे

आणि नंतर खंड पडत २००५-०७, २०१०-११ असे मधूनमधून थोडेथोडे असे मी करत गेलो. असो.

गीता श्लोकार्थ

गीतेच्या श्लोकांसंबंधी विशेष चर्चा करण्याचा हा प्रसंग नाही. कारण मूळ विषय आहे ज्ञानेश्वरी. पण ज्या ग्रंथावर ज्ञानदेवांनी आपली टीका रचली, त्यासंबंधीही थोडा विचार करणे आवश्यकच वाटते. गीतेचे आज प्रचलित असलेले सर्वसामान्यपणे मान्य असे सातशे श्लोक आहेत. त्यांच्यातही पाठभेद, प्रक्षिप्तादि चर्चेस विद्वन्मतानुसार खूप वाव आहे. विभक्तिप्रत्यय, पाणिनीय भाषानुबंध, इ.चर्चा मोठ्यामोठ्यांनी केलेली आहे.

अर्थाबाबत तर न बोलणेच बरे, इतके अनेकविध आणि परस्परविरोधी गीतेचे अर्थ विद्वद्वरांनी केलेले आहेत. आणि मूळ महाभारतांत सध्या प्रचलित असणारी गीता नव्हतीच असे पण एक *"मूले कुठार:"* प्रकारचे अकटोविकट मत ऐकीवांत आहे. कसेहि असले तरी आपणांस त्या मताशी या ग्रंथानुरोधाने कांहीच कर्तव्य नाही. कारण मग गीता-शांकरभाष्यादी ग्रंथ व ज्ञानेश्वरी, तसेच माझा हा ग्रंथ यांचा विचारच करण्याचे प्रयोजनसुद्धा उरत नाही. असो.

असे आहे तरी शांकरभाष्यानुसार जे गीतेचे श्लोक दिले जातात, तेच सर्वतः मान्य असल्याचे वाटते. त्यावरून गीतेचे श्लोक कोणते व कसे घ्यावे हा प्रश्न मला आला नाही. या पाठभेदादींवर *ॲनी बेझंट* यांच्या गीतेतून काही जिज्ञासा तृप्त करणारी माहिती मला मिळाली. अर्थासाठी अनेक ग्रंथांचा उपयोग झाला. विषयप्रवाहास अनुसरून वेगवेगळे ग्रंथार्थ पाहून त्या त्या गीताश्लोकांचा त्या त्या स्थळी मला भावलेला अर्थ, वेळप्रसंगी कांहीसा उत्तान, तर प्रसंगविशेषी पाल्हाळीक असा अर्थ मी माझ्या अल्पमतीनुसार घेतला आहे, असेही कोणाचे मत होऊं शकेल. पण माझ्या कुवतीनुसार मी हा गीता श्लोकार्थ समजून दिला आहे हे खरे.

माननीय लो.टिळकांनी आपल्या ग्रंथांत गीताश्लोकांचा अर्थ करतांना त्यांतील प्रत्येक संस्कृत शब्दास मराठी प्रतिशब्द योजण्याची आणि अर्थवाहित्वासाठी योजलेले पूरक शब्द, विभक्तिप्रत्ययादी कंसात स्वतंत्रपणे देण्याची जी सजगता दाखवली आहे, ती वस्तुतः गीताश्लोकार्थासाठी अत्यंत आदर्श पद्धती आहे. पण मी या विषयाचा कोणी मोठा ज्ञाता नाही ही माझी भूमिका पूर्वीच स्पष्ट केली आहे व त्यामुळे माझ्या हातून कळतनकळत घडलेल्या या गीताश्लोकार्थांच्या अतिक्रमणास तो सर्वज्ञाता श्रीगोपाल नक्कीच क्षमा करील आणि योग्य तो गीतार्थ माझ्या बुद्धीत प्रकाशवील अशी माझी श्रद्धा आहे.

गीताश्लोकांतील कोणते शब्द ज्ञानेश्वरीतील कोणत्या ओव्यांशी संबंधित आहेत, ते ताडून पहाण्यास मला कै. श्री. अण्णा मोरेश्वर कुंटे यांच्या ***सटीप ज्ञानेश्वरी*** या ग्रंथाचा खूप उपयोग झाला. हा भाग त्यांच्या प्रतीत अगदी सुस्पष्ट असा दिला आहे, हेही मी जिज्ञासूंसाठी नमूद करतो.

ग्रंथांतील विषयानुबंध

मी जे हे लेखन केले आहे, त्याची रचना वा आकृतीबंध ***"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे"*** या पहिल्या गीता श्लोकापासून *व* ***"ॐ नमोजी आद्या"*** *या ज्ञानदेवीच्या प्रथमारंभीच्या ओवीपासून* सुरुवात करून सलगपणे *१८व्या अध्याया*च्या ***"यत्र योगेश्वर: कृष्णो"*** या शेवटच्या श्लोकापर्यंत व ज्ञानदेवांच्या ***"तैं बारा शतें बारोत्तरें । टीका केली ज्ञानेश्वरें ।।"*** या शेवटच्या ओवीपर्यंत गीता व ज्ञानेश्वरीच्या अध्याय व ओव्यांच्या क्रमानुसारी असे केलेले नाही.

मूलतः जरी हे लेखन या स्वरूपाचे होईल असे मला माहीत नव्हते, तरी जेव्हा त्यास काही एक आकार प्राप्त होऊं लागला, तेव्हांच माझ्या लक्षात एकूण ग्रंथाचा विषयानुबंध स्पष्ट येऊ लागला.

मुळात सर्व ग्रंथ लिहून झाल्यानंतर दोनतीन वर्षांनी त्या लेखनाचे विभाग ***(स्कंध)*** व त्यांची प्रकरणे ***(उन्मेष)*** पाडले. त्याअंतर्गत येणाऱ्या विविध विषयांची शीर्षके व उपशीर्षके तेव्हाच दिली. असे एकंदर ***चौदा स्कंध व अठ्ठावन उन्मेष*** मिळून हा ग्रंथ पूर्ण झाला. त्याची ही प्रस्तावना (***"ग्रंथामागील भूमिका"*** आणि ***"एका योग्याचे आत्मवृत्त"*** हे दोन अधिक उन्मेष) आता त्यानंतर दोन ते पाच वर्षांनी लिहीत आहे, ती वाचकांस ग्रंथाचे यथायोग्य मूल्यमापन करता येऊन त्याचा उपयोग व्हावा म्हणून.

गीता-ज्ञानेश्वरीतील अनेक विषय ज्या मार्गे विचारांचा मी पाठपुरावा केला त्या क्रमाने मूळ ज्ञानेश्वरी वा गीतेचा क्रम सोडून प्रगटले आहेत, हे खरेच. अर्थात यामागे ***जीव, जगत व ईश्वर यांचा परस्परसंबंध*** दाखवून***योगसाधनेचे मला आकळलेले रहस्य*** ज्या एका महासिद्धांताच्या आंवाक्यांत आणून मी अधोरेखित करू इच्छित होतो, तोच आकृतिबंध कारण आहे. त्या दृष्टीने पाहिले असता अध्यात्माची खरी सुरुवात जेथून होते त्या ***कृपा*** या विषयापासून प्रारंभ करून ***गुरुकृपा*** हा महत्त्वाचा विषय प्रथम घेऊन त्याची परिणती कशात कोणत्या रीतीने होते हे विषय त्यानंतर क्रमाक्रमाने घेतले आहेत.

ज्ञानेश्वरीच्या मूळ ओव्या देण्यामागील कारण

कोणी म्हणतील की ज्ञानेश्वरी हा ग्रंथ कसा ***साहित्य सोनियाचिया खाणी*** असा आहे, मग तुमचा हा त्यावरील ग्रंथ तसा का नाही; तर त्याला माझ्यापाशी एकच उत्तर आहे. ते म्हणजे ज्ञानदेव ते ज्ञानदेवच! त्यांची कळाकुसरी माझ्याजवळ कशी असेल! आणि हा ग्रंथ अगदीच असातसा वाटू नये म्हणून ज्ञानदेवांच्या समग्र ओव्या मी मुळातूनच प्रत्येक ठिकाणी घेत गेलो आहे. त्यांच्यावरच माझे शब्द आकारत गेलो आहे. शक्य तो प्रामाणिकपणे त्यांना अनुसरत गेलो आहे.

याप्रमाणे ज्ञानदेवीच्या सरासरी *१००० ओव्या,* अमृतानुभवाची कांही प्रकरणे, चांगदेव पासष्टीच्या कांही ओव्या, ज्ञानदेवांचा हरिपाठ

व इतर कांही अभंग असे मूळ जसेच्या तसे मी या ग्रंथांतरी ग्रथित केले आहेत. त्यामुळे जिज्ञासूंस मी काय विचार मांडले आहेत, त्यांचा जो कोणता अर्थ माझ्या शब्दांतून प्रकट केला आहे, त्याच्या संदर्भासाठी दुसरे ग्रंथ समोर ठेवण्याची जरूर भासणार नाही, हा उद्देश तर सफल होतोच; पण मुख्य म्हणजे ज्ञानदेवांच्या वाणीतून स्त्रवणाऱ्या माधुर्यामध्ये, त्यांच्या साहित्याच्या सुसंपन्न रसधारेमध्ये, त्यांच्या अमृतमय बोलांमध्ये, त्यांच्या प्रगल्भ विचारांमध्ये, त्यांच्या अवीट अशा अनुभूतिप्रकटनामध्ये, त्यांच्या अलौकिक अशा त्या काव्याविष्कारामध्ये माझे हे बोबडे, अस्फुट, अजाण बोल मिसळून जाऊन त्यांच्या वाणीतून मूर्त होणाऱ्या ॐकारस्वरूपामध्ये माझे हे स्वल्प झंकार विरून जावेत; ज्ञानदेवांचे हे साहित्यविश्व प्रकट करतांना, त्यांची ही वाङ्मयी मूर्ती चक्षूंपुढे साकारवितांना, माझा ***हा क्षुद्र मी - हा अहं - हे माझे क्षुद्र ब्रह्मांड*** त्यांच्यात विलीन व्हावे आणि आपणा सर्वा सामान्यांना-त्यांच्या बालकांना त्यांच्यासह सुखेनैव आकल्प आयुष्य नांदता यावे, ही माझ्या अंतरीची आसही तसे करण्यामागे आहे.

अशा मूळ ओव्या देण्यामुळे ग्रंथाचा आकार फार वाढतो, तो प्रसिद्ध करणे फार खर्चाचे ठरेल, त्यासाठी ओव्यांचे फक्त अध्यायानुक्रमांक दिलेत तरी चालेल, असे विचार प्रस्तुत केले जात आहेत. त्याबाबत मी तर एवढेच समजतो की या माझ्या ग्रंथास ज्ञानदेवांच्या अमृतवाणीविना काय मूल्य आहे! म्हणून ग्रंथ शक्यतो जसा लिहीला तसाच, ओव्यांसह शक्यतो प्रकाशित व्हावा, अशी माझी मनीषा आहे.

ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरीबद्दल म्हटले आहे की ती मूळ गीतेसह वाचा किंवा तशीच वाचा, त्यांचा ग्रंथ सुरम्यच आहे. तो ग्रंथ ***गीतेवीण रंगु दावी*** असा आहे. पण आम्हा सामान्यांचे लिखाण तसे कधी तरी होऊं शकते कां! आणि माझेच तुणतुणे सारखे लोकांपुढे वाजविणेही तसे योग्य वाटत नाही. म्हणून ज्या कोणास ज्ञानदेवी माझ्या पद्धतीने समजावून घ्यावयाची आहे, त्याने ज्ञानदेवीच्या या ग्रंथांतरी दिलेल्या ओव्या जरूर वाचल्या पाहिजेत, त्यांचा आस्वाद घेतघेत त्याने हे माझे विचार पहावेत, अशी माझी आग्रहपूर्वक विनंती आहे. त्यांतून माझे जे काही सांगण्यात कोठे चुकले असेल तेही त्याच्या लक्षात येईल व योग्य ते सार, योग्य तो अर्थ असा जिज्ञासू ग्रहण करील अशी माझी खात्री आहे. माझी ही अपेक्षा रास्त असल्याचे सर्व समान विचारांच्या व्यक्तींस मान्य होईल असे वाटते. असो.

त्याचप्रमाणे विषयानुरोधाने काहीकाही प्रसंगी गीताश्लोक, ज्ञानदेवांच्या ओव्या इ.भाग पुनरुक्त झाला आहे. जिज्ञासूंच्या मनात विषय नीट ठसावा व त्याला त्याचे सूत्र न सोडता, पुनः मागील ठिकाणी वळून पहावे लागू नये म्हणून मी हे असे केले आहे. पण असा भाग फारसा नाही. तसेच काही विषय पुनः उपस्थित झालेले आहेत असे कोणाला वाटले, तर त्याने ते नीट तपासून पाहिल्यास ते वेगळ्याच संदर्भात आणि नव्याच matrix मध्ये, तसेच मूळ विचारास घनीभूत *(condensation)* करणे व त्यास विवक्षित दिशा निश्चित करून देणे (*direction finding*) यासाठीच बहुशः मी असे केले असल्याचे त्यास आढळून येईल असे मला वाटते. असो.

या पूर्वप्राथमिक पार्श्वभूमिकेनंतर आपण आता वळू या ***गीता-ज्ञानेश्वरी*** च्या अभ्यासास अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या ***तत्त्वज्ञान आणि योग*** या विषयांच्या परिचयाकडे. त्यासाठी आपण पुढील भागांतून पाहणार आहोत अनेक वैदिक, अवैदिक अशा ***भारतीय तत्त्वज्ञानाच्या धारा, विज्ञानाचा दृष्टिकोन*** आणि ***गीता-ज्ञानेश्वरीच्या तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये,*** तसेच वैदिक तत्त्वज्ञानप्रणालीत महत्त्वाच्या असणाऱ्या ***यौगिक अनुभूतींचे वास्तव दर्शन*** आणि ***ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या कुंडलिनी या यौगिक वास्तव संकल्पनेची वैशिष्ट्ये,*** पण ती सर्व अत्यंत संक्षेपाने!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::ग्रन्थामागील भूमिका::

::मध्यरंग-१::

::भारतीय तत्त्वज्ञानप्रणाली::

गीता-ज्ञानेश्वरी यातील तत्त्वज्ञानविचार::::

गीतेतील तत्त्वज्ञान विचार

जीव-जगत-ईश्वर यांचा विचार तत्त्वज्ञान करते. जीवाचे अस्तित्व मानणे; जगत सत्य मानणे; ईश्वर सत्य मानणे; येथपासून ते, ही सर्व एक वा अनेक मानणे; त्यांतील कांही वा सर्वच्या सर्व असत्य मानणे; त्यांचा परस्परांशी जाणवणारा दृकप्रत्ययी संबंधच तेवढा सत्य मानणे; अथवा तोही मिथ्या मानणे; या सर्वांस आपापल्या विचारप्रणालीनुसार जड वा चेतन वा कमी अधिक प्रमाणात चिज्जड मानणे इ.अनेकानेक तत्त्वज्ञानप्रणाल्या पौर्वात्य तथा पाश्चिमात्य जगतात प्रचलित आहेत.

द्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत, शुद्धाद्वैत, चार्वाक, जैन, बौद्ध, सांख्य, न्याय, मीमांसादी दर्शने इ.वाद ही वानगीदाखल त्या भिन्नभिन्न प्रणालींची पौर्वात्य जगांतील उदाहरणे यासाठी प्रसिद्ध आहेत. जिज्ञासूंसाठी यांतील कांही मते अत्यंत संक्षेपाने व मला जशी समजली तशी मी पुढे मांडली आहेत. ग्रंथ अधिक समजण्यास त्यांचा उपयोग होईल अशी माझी धारणा आहे.

तत्त्वज्ञानाचा असा हा विषय जिज्ञासू म्हणून समजून घेणे मला ज्ञानेश्वरी समजावून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटला. ज्ञानेश्वरांना यासंबंधी कोणते मत मान्य आहे; ते कोणास अनुसरतात, हा मोठाच गहन विषय मोठमोठ्या अभ्यासकांनी विद्वत्तापूर्णरीत्या हाताळलेला आहे. गीतेच्या तत्त्वज्ञानाबद्दल पण मूळ असेच कोडे आहे व ते महान आचार्य व त्यांच्यानंतरचे पंडितश्रेष्ठी यांनी आपापल्यापरीने उलगडून दाखविले आहे, हे सर्वांस सहसा ज्ञात असेच आहे.

या सर्व मतमतांतरांतून मार्ग कसा निघेल, ज्ञानेश्वरांचा विचार आपण कोणत्या दृष्टीने समजावून घ्यावा, बरे त्यांच्या तत्त्वज्ञानाचा जो *केवलाद्वैत* वा असाच कोणता विचार एकदां ठरवला तर त्याच्याशी जुळणारा असा कोणता योगमार्ग त्याच्यात येणाऱ्या अनुभूतींसह ज्ञानेश्वरीने दिग्दर्शित केला आहे, असे बरेच प्रश्न आपणापुढे येतात.

तत्त्वज्ञान विषयक संदर्भग्रंथ

या दृष्टीने हा विषय आपल्यापरीने आकलन व्हावा म्हणून मला जमतील तसे ग्रंथ पहात गेलो. त्यांत जसे श्रीमच्छंकराचार्यांचे ***गीताभाष्य*** होते, तसेच ***रामानुजभाष्य*** होते. स्व.लो.टिळकांचे ***गीतारहस्य*** होते. तसेच श्री.ल.प्रभुपादस्वामींचे ***गीता जशी आहे तशी*** होते, *चिन्मयानंदांची गीता* होती, *पं.राधाकृष्णन, ॲनी बेझंट यांची गीता*, महर्षी अरविंदांचे **Essays on The Gita** होते. पं.वि.दा.सातवळेकर यांची ***पुरुषार्थबोधिनी टीका*** होती.

हे आणि अन्य इतर वाङ्मय मिळेल तसे पाहत गेलो. न.चिं. केळकरांच्या ***तत्वज्ञान खंडा***चा, डॉ. ग. ना. जोशी यांच्या ***भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास*** या बारा खंडात्मक विशाल ग्रंथराजाचा, *तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री.के.वि.बेलसरे, श्रीगुरुदेव रानडे* यांच्या तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांचा, अशा अनेक स्रोतांचा त्यासाठी मी माझ्या शक्त्यनुरुप परिचय करून घेतला. ज्ञानेश्वरीवरील अनेक आधुनिक पंडित, विद्वान, अभ्यासक यांचे वाङ्मय व ग्रंथसंपदा माझ्या आंवाक्यानुसार मी पाहीले. *संदर्भग्रंथ* म्हणून त्या सर्वांची यादी मोठी होईल. त्यामुळे त्यातल्या त्यात आवश्यक वाटलेल्या ग्रंथांची यादी जशी जमेल तशी या ग्रंथांत समाविष्ट करावी असा माझा प्रयत्न असेल. असो.

तत्त्वज्ञान या विषयाची सखोल मिती कळावी म्हणून जैन, बौद्ध ही मते, तसेच शैवांच्या मतप्रणाली, शाक्तमत, पाश्चिमात्यांची तत्त्वज्ञानविषयक सर्वसाधारण मते, Philosophy of Science and Abstract Mathematics, जैवशास्त्रीय उपपत्त्या इ.चा मी जमेल तसा मूलतः परिचय करून घेतला. हे सर्व कांही या ग्रंथांत मला मांडता येणार नव्हते आणि माझा तसा आंवाकाही नाही. परंतु विश्वाला गवसणी घालू पाहणाऱ्या या तत्त्वज्ञान विषयाचा माझ्या मनाच्या समाधानासाठी मला पाठपुरावा करावासा वाटत होता; त्याचे इंगित कळावे असे वाटत होते; यासाठी हे सर्व वाचन करून, जमेल तसेतसे आकळून घ्यावे आणि याचे अंतिम विचारमंथन अंतर्मनात होऊन त्याकडून आपल्या विचारांस कांही निश्चित अशी दिशा प्राप्त व्हावी, या उद्देशाने मी हे सर्व माझ्या मनोबुद्धीच्या गुहेत लोटत गेलो – ते जसे समजेल तसे समजून घेत गेलो.

जैवरसायनशास्त्राचा आद्य प्रवर्तक केकुल *(Kekule)* यास स्वप्नांत मुखात पुच्छ धरलेल्या सर्पाकृती वेटोळ्याचा दृष्टांत होऊन त्यामुळे बेंझिनच्या आण्विक रचनेचा त्याच्यापुढे अनेक दिवस उभा राहिलेला यक्षप्रश्न सुटला व बेंझिन रींगचा अभूतपूर्व शोध त्याला लागला. ही सर्व प्रसुप्त मनाची किमया! माझ्या या सर्व उपक्रमातून तसेच कांही घडेल; *Carl Jung*ने अनुभवले तसे त्या सर्व अंतर्मनातील विचारांचे ताऱ्यांसारखे आकुंचन, वा वैश्विक आद्य परमाणुसारखे घनीकरण होऊन; त्याचा केव्हां तरी स्फोट होऊन एक नवे beautifully orchestrated असे विचारविश्व माझ्याही अंतर्यामी प्रगटेल अशी मला एक आशाही वाटत होती! त्यासाठीच हा वाचन-मनन-चिंतनाचा एवढा अट्टाहास माझ्याकडून घडत असावा. असो.

भारतीय तत्त्वज्ञान आणि त्यातील वेदांत::::

भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख

मागेच म्हटल्याप्रमाणे आता थोडे भारतीय तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांविषयीचे विचार थोडक्यात पाहू या. हा ग्रंथ समजण्यास त्यामुळे काही साहाय्य होईल, हे नक्कीच! श्रीगीतेचे प्राचीन मान्यवर टीकाकार कोण कोण होते, त्याचा निर्देश पुढे ग्रंथातील संबंधित भागात केला आहे. गीतेवरील या टीका विविध द्वैताद्वैतादी मतांस अनुसरून केल्या गेल्या आहेत.

गीतेचे ***द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, केवलाद्वैत, शुद्धाद्वैत, द्वैताद्वैत*** अशा अनेक पद्धतींनी अर्थ लावले गेले आहेत. त्या दृष्टीने त्या विविध मतांचा अल्प परिचय करून घेणे क्रमप्राप्त ठरते. या सिद्धांतांच्याबाबत जिज्ञासूंनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की हा सर्व तत्त्वज्ञानविषयक विचार अति उच्च अशा बौद्धिक व तार्किक पातळीवर मांडलेला असतो.

तत्त्वज्ञान *(Philosophy)* या विषयाचा गाढा व्यासंग, संस्कृत भाषेवर असाधारण प्रभुत्व, वेदवाङ्मय, श्रुति-स्मृति-पुराणे-उपनिषदे यांचा सखोल अभ्यास, न्यायव्याकरणादी शास्त्रांत पारंगतता, ब्रह्मसूत्रे-गीता यांवर प्रभुत्व, चौफेर वाचन, एकपाठी स्मरणशक्ती, तैलबुद्धी अशा अनेकानेक गुणांचा उत्कर्ष आपल्याठायी झाल्याशिवाय हा तत्त्वज्ञानाचा प्रांत सहसा कोणासही अगम्य असाच राहणारा आहे.

इतउपरांत त्या त्या तत्त्वज्ञानाची प्रत्यक्ष साक्षात्कारपूर्ण अनुभूती घेतल्याशिवाय त्यावर कोणतेही विचार व्यक्तवणे म्हणजे मृगजळाशी खेळणे होय. तरीही केवळ जिज्ञासेपोटी आपण हा अतिक्रांत मतीचा प्रांत नजरेखालून घालू इच्छित आहोत. थोरथोर विचारवंतांनी इतस्ततःपसरवून ठेवलेले हे तत्त्वज्ञान आपण जसे समजेल, तसे संक्षिप्तरीत्या पाहू या; पण वरील मर्यादांना अनुसरतच!

१)अद्वैत व द्वैत - मूळ संकल्पना

सर्वदूर विश्वात, प्राणिमात्रात, स्थावरजंगमात एकच एक मूलतत्त्व विद्यमान आहे, या विचारास स्थूलमानेकरून ***अद्वैत तत्त्वज्ञान*** अशी संज्ञा वापरतात. ***द्वैत*** म्हणजे द्वित्व वा दोन असणे; दोन तत्त्वे विद्यमान असणे; दोघांचेही अनदित्व असणे; एकमेकांसापेक्ष कोण आधी व कोण नंतर हे लक्षण नसणे.

अद्वैत विचाराने ज्या तत्त्वाचा बोध होतो, ते तत्त्व सर्वांहून प्रथमचे असते. इतर वस्तू त्याच्यानंतरच्या, त्याच्यापासून किंवा त्याच्यामुळे उद्भवलेल्या असतात. अद्वैतत्त्वाबद्दल आपण असाही विचार करू शकतो की जे प्रमुख *(Primary)* तत्त्व ते अद्वैततत्त्व *(Fundamental)* आणि इतर तत्त्व / तत्त्वे उपप्रमुख *(Secondry / subordinate)* होत. या विचारात सामान्यपणे जे पूर्णपणे द्वैती तत्त्वज्ञान आहे, त्याचीही अद्वैत तत्त्वज्ञानात गणना करता येते.

अद्वैत हे द्रष्ट्या आत्म्यास लक्षून म्हटले आहे, ते मूळ ***बृहदारण्यक*** उपनिषदात. सर्वदूर एकचएक आत्मा भरून आहे आणि हे कसे अनुभवावे ते *बृहदारण्यक* सांगते: ***"आत्मा एव आसीत् पुरुषविधः।"(मंत्र क्र.४०चतुर्थ ब्राह्मण)*** - हा पुरुषरूप आत्मा प्रथम अगदी एकटा होता.

"स वै नैवं रेमे, तस्मादेकाकी न रमते, स द्वितीयमैच्छत्।" (मं.क्र.४२ चतु.ब्रा.) - त्याला करमेना! म्हणून त्याने दुसरे असावे अशी इच्छा केली आणि जगताची निर्मिती झाली. ***हेच द्वैत आणि हेच अद्वैत!!***

२)केवलाद्वैत - शाङ्कर अद्वैत

एकच निर्गुण ब्रह्म अंतिम सत्य आहे; जीवात्मा भिन्न नाही आणि हे विश्व मिथ्या आहे, भास आहे, अशी आद्यश्रीमच्छंकराचार्यांनी प्रसारित केलेल्या अद्वैत तत्त्वज्ञानाची धुरा आहे. हे तत्त्वज्ञान मुळात त्यांनी आपले परात्पर गुरू गौडपाद व गुरू गोविंद यती यांच्याकडून घेतले. ***मांडूक्यकारिका*** हिच्याद्वारे गौडपादांनी त्याची मूळ मांडणी केली.

केवल म्हणजे निर्गुण, नित्यमुक्त, मोक्ष; ***द्वैत*** म्हणजे दोन किंवा दोनापेक्षा अधिक, अद्वैत म्हणजे जे द्वैत नाही ते - एक, अशी ***केवलाद्वैत*** या शब्दाची उकल होते. द्वैतरहित ते अद्वैत! जीवात्मा व परमात्मा असा भेद म्हणजे ***द्वैत.*** शांकरवेदांतानुसार असा भेद नाही. तसेच परमात्मा व विश्व किंवा द्रष्टा व दृश्य असाही वस्तुतः भेद नाही.

दृश्य जगत हे आभासमय व म्हणून मिथ्या आहे. *छांदोग्य* व *बृहदारण्यक* उपनिषदे, तसेच ऋग्वेदाचे *नासदीयसूक्त* यांत केवलाद्वैताची बीजे आहेत.

शांकरतत्त्वज्ञानाच्या संदर्भात काही संज्ञा प्रचलित आहेत. त्या अशाः

मायावाद - जगत वा दृश्य हे मिथ्या आहे; ब्रह्मावर मायेमुळे दिसणारे विवर्त आहे. यासच ***विवर्तवाद*** असे म्हणतात.

आभासवाद - जीव व ईश ही शुद्ध ब्रह्माची प्रतिबिंबे म्हणजे आभास होत. म्हणून हे दोन्ही मिथ्या होत.

प्रतिबिंबवाद - मायेत प्रतिबिंबित झालेले चैतन्य म्हणजे जीव होय.

दृष्टिसृष्टिवाद - अज्ञान या उपाधीसह असलेले बिंबचैतन्य म्हणजे *ईश* आणि अज्ञान या उपाधीतील प्रतिबिंबरूप चैतन्य म्हणजे *जीव* होय.

अवच्छेदवाद - अज्ञानाने अनवच्छिन्न चैतन्य *ईश्वर* होय आणि अज्ञानाने अवच्छिन्न चैतन्य ***जीव*** होय. याच अर्थी ***जीव हा ईश्वराचा अंश आहे*** असे म्हणतात.

मायावादानुसार हे जगत ***मिथ्या*** आहे. याचा अर्थ सामान्यपणे जगतास अस्तित्व नाही, ते स्वप्नदृश्याप्रमाणे असत्य आहे, असा घेतला जातो. पण *मिथ्या* म्हणजे मूळचे जे नाही, ते, असाही अर्थ केला जाऊ शकतो *(secondry or subordinate and not the prime or fundamental)*. त्यामुळे ब्रह्मदत्ताच्या अद्वैतसंप्रदायास अनुरूप अशी सत्‌बरोबर असत्‌ही अस्तित्वात असते,

ही संकल्पना व्यवहार्य ठरू शकते. ***शांकरमते व ब्रह्मदत्तमते ब्रह्म हीच एकमेव व समग्र सत्ता होय.***

अद्वैततत्त्वास *ब्रह्म, आत्मा, परमात्मा, सत्* इ.विविध संबोधने दिली जातात. विशिष्ट प्रणालीनुसार त्यांची गुण-लक्षणे इ.त कदाचित फरक असू शकतो. द्वैततत्त्वज्ञानातही परमोच्च सत्तेस अशीच संबोधने - *परब्रह्म, ईश्वर* इ.दिली जातात. आपण स्थूलमानानेच विचार करत असल्याने त्या विषयात न पडणेच उचित.

जिज्ञासूंनी सविस्तर माहितीसाठी प्रा.डॉ.श्री.ग.ना.जोशी यांचे ***भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास (खंड १ ते १२)***, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, तसेच श्री.बापटशास्त्री इ.मान्यवरांचे, डॉ.श्री.राधाकृष्णन महोदय, हिरियण्णा, गुरुदेव श्री.रा.द.रानडे, श्री.बेलसरेमहाराज इ.तत्त्वज्ञ पंडितांचे अध्यात्म व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ जरूर पाहावेत. असो.

३)द्वैतवाद आणि अद्वैतवाद

वेदांतात अद्वैताप्रमाणेच ***द्वैताद्वैत*** व ***द्वैत*** तत्त्वज्ञानाचीही मांडणी झालेली आहे. विविध मतांचे हे भिन्न प्रवाह वेदांतगंगेत सामावलेले आहेत. आद्यश्रीमच्छंकराचार्यांप्रमाणेच तत्त्वज्ञानी असे *श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य, श्रीनिंबार्काचार्य, श्रीवल्लभाचार्य, श्रीभास्कराचार्य, श्रीकंठाचार्य* इ.महापुरुष होऊन गेले.

ते सगळेच ब्रह्मवादी आणि अंतिम सत्य वा श्रेष्ठ असे ब्रह्माचेच स्वरूप मानणारे होते. परंतु ब्रह्माची गुण-लक्षणे, त्याचा जगत व जीव यांच्याशी असणारा संबंध, मोक्षाची स्थिती, जगत-जीव-ईश्वर यांविषयीच्या संकल्पना, माया वा प्रकृतिविचार, जगदुत्पत्ति-स्थिती - लय इ.विचार यांविषयी या सर्वांत मतभिन्नता आहे. परंतु वेदप्रामाण्य या सर्वांना मान्य असल्याने त्यांची मते ***आस्तिक*** होत; जैन व बौद्धांसारखे वेदप्रामाण्य नाकारणारे नास्तिक तत्त्वज्ञान सध्या आपण विचारात घेत नाही आहोत. असो.

आस्तिक याचा दुसरा अर्थ ईश्वराला परमोच्च समजणारे. शांकरमत निर्गुण ब्रह्मास अंतिम सत्ता समजते व ईश्वरास थोडे गौणत्व देऊन त्याला ***सगुण ब्रह्म*** वा ***शबल ब्रह्म*** अशी संज्ञा वापरते. पण रामानुजाचार्य व मध्वाचार्य, वल्लभाचार्य इ.ईश्वरवादी द्वैती तत्त्वज्ञ ईश्वरासच परब्रह्म मानून त्याच्या भक्तीस साक्षात्काराचे एकमात्र साधन समजतात. श्रीमच्छंकराचार्य मात्र ***"ज्ञानादेव तु कैवल्यम्"*** इतकी ज्ञानासच मोक्षाचे साधन म्हणून मान्यता देतात.

शांकर ***केवलाद्वैत*** जीवास, जगतास व ईश्वरास आभासात्मक ठरवून अत्यंत गौणत्व देते. ***जगत-जीव-ईश्वर-ब्रह्म*** अशी चढत्या पायरीची रचना असल्याचे त्या मतात दिसून येते. रामानुजादी विचारवंतांना त्यांचा ***मायावाद*** -जीव व ईश्वरास गौणत्व देणे -पटत नाही. मध्वांनी वेदोपनिषदादींचा आपल्या द्वैती दृष्टीने विचार करून द्वैत तत्त्वज्ञानपर अर्थ लावला आहे.

सगळे द्वैती जीवात्म्याला सत्य मानतात. ईश्वरास म्हणजे परब्रह्मास ते प्राधान्य तर देतातच. पण जीवात्म्यास असत्पर मानत नाहीत. अनेकत्वाचा ते श्रीशंकराचार्यांप्रमाणे एकत्वात निरास करत नाहीत. जीव, जगत व ईश्वर यांना मायिक न समजता ते सत्यच समजतात. ईश्वरोपासना-ईश्वरप्रणिधान-भक्ती या मार्गास ते खरा साधनामार्ग समजतात. त्यांचे हे द्वैतमूलक विचार आण्विक जीवांच्या अपेक्षेत अत्यंत व्यवहार्य ठरतात, हे सांगणे न लगे!

द्वैती व अद्वैती अशा या तत्त्वज्ञानात रामानुजांचे *विशिष्टाद्वैत,* मध्वांचे *द्वैत,* निंबार्काचार्यांचे *द्वैताद्वैत,* वल्लभाचे *शुद्धाद्वैत* या प्रणाली प्रसिद्ध आहेत. त्यांचेही परस्परसापेक्ष भेद आहेत.

द्वैतवाद म्हणजे परमात्मा, जीवात्मा व इतर अचेतन पदार्थ वा विश्व ही स्वभावतः, म्हणजे मुळातूनच, परस्परांहून अति भिन्न आहेत, असा सिद्धांत होय. द्वैतवादाची परंपरा ***कठ, मुंडक*** व ***श्वेताश्वतर*** उपनिषदांवरून प्रायः सिद्ध केली जाते.

ब्रह्मसूत्रे ही एका अर्थी गीतेहूनही प्राचीन समजली पाहिजेत. ***"ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः।।१३-४।।"*** असे सांगून श्रीकृष्णांनी असे सूचित केलेले आहे, असे काही विद्वानांचे मत आहे. त्यातील **बादरायणा**च्या **ब्रह्मसूत्रा**चासुद्धा सर्व प्रमुख आचार्यांनी आपापले तत्त्व सिद्ध करण्यासाठी विनियोग केल्याचे दिसून येते. त्या बहुतेक सर्वांनी या ब्रह्मसूत्रावर तपशिलवार भाष्ये लिहिलेली आहेत.

ब्रह्मसूत्रे, प्रमुख दशोपनिषदे आणि ***गीता*** यांना ***प्रस्थानत्रयी*** म्हणजे ***ब्रह्मविद्येची त्रिसूत्री*** मानले आहे. यांच्यावर विधाने वा भाष्ये करून *श्रीशंकर, रामानुज,मध्व, निंबार्क आणि वल्लभ* या प्रमुख पाच तत्त्वविदांनी आपापली तत्त्वप्रणाली सिद्ध केल्याचे दिसते.

४) मध्वाचार्यांचे द्वैत

यास *वैष्णवमत* असेही म्हणतात. *शैवद्वैत* प्रणालीहून भिन्नत्व सूचित करावे, या अर्थी हा शब्दप्रयोग होतो. मध्व पंचभेद सांगतातः १) जीव व ईश्वर यांतील भेद, २) ईश्वर व जगत यांचा भेद, ३) जगत-जीव यांचा भेद, ४) एक जीव व दुसरा जीव यांचा भेद व ५) जगतातील विविध पदार्थांतील भेद.

या दृष्टीने हे तत्त्वज्ञान अत्यंत व्यवहार्य असून जड साधकांस लवकर अवगत होणारे आहे. ईश्वराचा साक्षात्कार हा भाग सोडला, तर शेवटचे तीन भेद प्रत्येक जीवाच्या रोजच्या अनुभवातील आहेत. *भेद म्हणजे भिन्नता.*

मध्वाचार्यांची शिकवण अशी आहेः *कर्म, ज्ञान व भक्ती* ही तिन्ही मोक्षाची साधने आहेत. निषिद्ध कर्मे वर्ज्य करावीत. नित्य, नैमित्तिक व काम्य कर्मे सांग करून ईश्वरार्पण करावीत. कर्मफलाबाबत विरक्त असावे. याप्रमाणे आचरण ठेवल्याने पाप नाश पावते. कर्मे ईश्वरार्पणबुद्धीने व वैराग्ययुक्त अंतःकरणाने न केली तर बंधनकारक होतात.

मुमुक्षूने प्रथमपासूनच भक्तीची कांस धरावी. मुक्तीसाठी लक्ष्मीसह विष्णू हाच आराध्य व ध्येय्य विषय असावा. स्वतःस ईश्वरचरणी लीन करावे. ईश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपाचे ज्ञान हेही मोक्षाचे साधन आहे. ईश्वराच्या साक्षात्काराने हे ज्ञान होते. ईश्वराच्या अनुग्रहाने त्याचा साक्षात्कार होतो. ***साक्षात्कार हेच खरे अपरोक्षज्ञान!*** भक्तीची परिपक्व अवस्था म्हणजे हेच ज्ञान होय.

भक्तीमुळे ईश्वराचा अनुग्रह व मोक्षाची प्राप्ती होते. मोक्ष म्हणजे जन्ममृत्युचक्रातून सुटका. मुमुक्षूस जिवंतपणीच साक्षात्कार होऊ शकतो. मध्व *मुक्ती* मानतात. देहपातानंतर जीवास परमेश्वराचे नित्य सान्निध्य लाभते. त्याला आपले मूळ ज्ञानानंदस्वरूप शुद्धत्वाने अनुभवास येते.

भगवान विष्णूंचा शाश्वत देह ज्ञान व आनंद आहे; त्याचाही अनुभव भगवत्सान्निध्यामुळे जीवास मोक्षावस्थेत येतो. मध्व चार प्रकारची मोक्षस्थिती मानतात- *सालोक्य, सामीप्य, सारुप्य व सायुज्यता.* आपण योगशास्त्रदृष्ट्या या चार अवस्थांचा विचार ग्रंथातील योग्य त्या ठिकाणी केलेला आहे, तो जिज्ञासूंनी जरूर तर नजरेखालून घालावा. मध्वांचे मुक्तिधाम म्हणजे वैकुंठ व ईश्वर हा विष्णू होय.

५) रामानुजाचार्यांचे विशिष्टाद्वैत

रामानुजांच्या *विशिष्ट-अद्वैत* सिद्धांतानुसार श्रीशंकराचार्य जो निर्गुण व सगुण ब्रह्म *(ईश्वर)* असा भेद करतात, तो नाही; ***अंतिम सत्ता हीच ईश्वर वा परब्रह्म होय.*** जीव व जगत ही त्याचीच व्यक्त रूपे होत. ईश्वरच त्यांचे कारण होय. प्रलयकाळी जीव व जगत अव्यक्त आणि सूक्ष्म रूपात ईश्वरात सामावून राहतात.

सृष्ट्योत्पत्तीकाळी अव्यक्त तन्मात्रे व्यक्त रूपात दृष्ट होतात. प्रलयकाळात ब्रह्म कारणावस्थेत असते आणि विश्वोत्पत्तीकाली ब्रह्माची कार्यावस्था असते. जीव व जगत ही पूर्णतया ईश्वरावलंबी आहेत. ईश्वर सर्वांतर्यामी वसत असतो.

तो विश्वाचे व जीवांचे कारण असला तरी नित्य, अपरिवर्तनीय व अविकारी असा ईश्वर हा जगातील घटना, सुख-दुःख इ.सर्वांपासून अलिप्त असतो. ईश्वर हा पूर्ण असतो. ईश्वरावतारास शरीराची बंधने नसतात. त्याचे शरीर दिव्य असते. तो कर्माने लिप्त होत नाही.

रामानुज विष्णूसच ईश्वर मानतात. पुरुष, भगवान, वासुदेव, ब्रह्म, नारायण ही त्याचीच वेगवेगळी नावे आहेत. तो सर्वगुणसंपन्न असून दोषादी वैगुण्ये व अशुभत्व यांपासून मुक्त असतो. तो सर्वांस व्यापून आहे. तेज, बल, ऐश्वर्य, प्रज्ञान व शौर्य हे त्याचे प्रमुख गुण आहेत. तो निर्गुणही आहे आणि सगुणही आहे.

ज्ञान हा आत्म्याचा सारभूत गुण आहे. ईश्वर सर्वज्ञ असतो. ईश्वर हा मानवांचा खरा आधार आहे. अशा प्रकारे रामानुजांनी हे ***ईश्वरप्रधान विशिष्ट अद्वैत*** प्रतिपादन करून ब्रह्म व ईश्वर या शांकरकल्पनांचा समन्वय साधून, ब्रह्म व माया यांचा ईश्वरात अंतर्भाव करून, अद्वैत तत्त्वज्ञानास वास्तविकता प्रदान केली आहे.

त्यांच्या ईश्वरविषयक बऱ्याच कल्पना इतर अद्वैती व द्वैती आचार्यांस पण मान्य आहेत, असे दिसते. ते जीवात्म्यांस सत्य मानतात. पण त्यांचा उगम ईश्वरात आहे आणि अंती ते ईश्वरातच विलीन होतात म्हणून आणि ब्रह्म व माया यांचा एका ईश्वरात अंतर्भाव केल्याने, त्यांचा हा सिद्धांत अद्वैतपर आहे म्हणून प्रसृत झाला आहे. त्यांचा हा ईश्वर ***चित्-अचित्विशिष्ट*** असा आहे.

रामानुजमते जीव *चिदणु* आहे. त्याचे *बद्ध, मुक्त* व *नित्यमुक्त* असे प्रकार असतात. गरुड, शेषादी असे जीव नित्यमुक्त व म्हणून कर्म व प्रकृती यांपासून नित्यमुक्त असतात. मुक्तांना पूर्वी बंधन होते, पण कर्म-ज्ञान-भक्तीद्वारे ते मुक्त होतात. बद्ध जीव कर्म व अज्ञान यांच्या फेऱ्यात अडकलेले असतात. अज्ञान व कर्म हे बंधास कारण असतात. जीवात्मा मोक्षातही लोप पावत नाही. तर स्वरूप, ज्ञान व आनंदात विलीन होतो. त्याचा अहंभाव लोपतो. परंतु त्यास ईश्वराचे सर्जन व नियंतृत्व प्राप्त होत नाहीत.

सर्व मुक्त जीव एकाच कोटीचे होतात. त्यांना दिव्यस्थान-परंधाम -परमपद-वैकुंठ प्राप्त होते. रामानुज मध्वांपेक्षा *सार्ष्टि*नामक मुक्तीचा आणखी एक म्हणजे पाचवा प्रकार मानतात. *भक्ती-ईश्वरोपासना-ईश्वरप्रणिधान* यास रामानुज मोक्षाचे खरे साधन मानतात. *परमोच्च भक्ती हेच ज्ञान असे ते मानतात.* ईश्वरास अनन्यशरण होणे हे भक्तीसाठी अवश्यंभावी आहे. *मुख्या* व *वैधी* असे *परा* व *गौणी* यांसारखेच भक्तीचे प्रकार ते मानतात.

६) भास्कराचार्यांचा भेदाभेदवाद

श्रीमच्छंकराचार्यांचे केवलाद्वैत सांगते, ***"अविभक्तं विभक्तेषु; अभेदः भेदेषु; एकं अनेकेषु;"!*** परंतु अभेदाइतकीच मध्वादिकांनी भेदासही सत्यता आहे, असे प्रतिपादन केले. *भास्कराचार्य व निंबार्क* या दोघांचेही असेच मत आहे. भास्करांना ***भेदाभेदवादी*** व निंबार्कांना ***द्वैताद्वैतवादी*** असे म्हणूनच म्हटले जाते.

त्यातील भास्कराचार्यमते बौद्धांचे शून्यमूलक तत्त्वज्ञान श्रीमच्छंकराचार्यांनी वेगळ्या पद्धतीने मायावादाच्या रूपाने मांडले असल्याने ते विफल आहे. *महायानी* बौद्धमताशी साधर्म्य असणारे *शून्यवादपर* तत्त्वज्ञान मांडल्याच्या श्रीमच्छंकराचार्यांवरील कथित आरोपावरून त्यांची *प्रच्छन्न बौद्ध* अशी संभावनासुद्धा मध्वादिक करतात. असो.

श्रीरामानुजाचार्य व श्रीभास्कराचार्य या उभयतांचे गुरू *श्रीयादवप्रकाश* हे भेदाभेदवादाचे मंडण करणारे प्रसिद्ध पंडित होत. रामानुजांनी स्वयंप्रज्ञेवर *विशिष्टाद्वैत* मांडले, तर भास्कराचार्यांनी भेदाभेदवादाचे आपले स्वयंनिर्धारित मत प्रस्थापिले.

ब्रह्म हे सर्वातीत, निरपेक्ष तसेच सापेक्ष आहे; चेतन व अचेतन यांच्यात प्रपंचभेद आहे; ब्रह्म व अचेतन यांच्यात सकृद्दर्शनी जरी भेद असला तरी त्यांत मूळचाच अभेद आहे, असे *भास्करमत* आहे.

गुरू *यादवप्रकाश* अचित्‌ला चित्‌चीच एक अवस्था मानतात आणि त्यांत सारभूत भेद आहे, असे मानत नाहीत, हा *भास्करमत* आणि त्यांचे गुरू यादवप्रकाश या दोघांच्या मतात एक मूलभूत फरक दिसतो. भेदाभेदाची तत्त्वज्ञाने व तत्त्वचिंतक असे होतः

१) **भास्कर** -➢ *औपाधिक* भेदाभेदवाद

२) **यादवप्रकाश** -➢ *स्वाभाविक* भेदाभेदवाद

३) **चैतन्य महाप्रभू** -➢ *अचिंत्य* भेदाभेदवाद

४) **निंबार्क** -➢ *द्वैताद्वैत* वाद

यांच्यात मतभिन्नता असली तरी ते सर्व शांकरमताचे कट्टर विरोधक आहेत.

भास्करमताचा पाया १)भेदभेदाचा नियम, २) सगुणब्रह्म, ३) ज्ञानकर्मसमुच्चयासह भक्तीचे साधन व ४) विदेहमुक्ती यांवर बेतलेला आहे.

ब्रह्मच कार्यरूप व कारणरूप असल्याचे ते म्हणतातः ***"कारणात्मा एव कार्यात्मना अवस्थितः।"*** - *उपाधि* सापेक्ष ***कारणब्रह्म*** अगणित जीव व अनंत जड वस्तूंत अभिव्यक्त होते. उपाधी सुटली की जीव व जगत पुनश्च ब्रह्माशी एकरूपत्व पावतात. शांकर *केवलाद्वैत* व रामानुजांचे *विशिष्टाद्वैत* यातली एक कडी *(link)* असावी, तसे *भास्करमत* आहे.

भास्करांचे वैशिष्ट्य असे आहे की दार्शनिकाच्या कसोट्या ते उत्तम जाणतात व स्पष्ट सांगतात. मूळ श्रुती व स्मृती आणि सूत्रे जे सांगतात, ते यथातथ्य, जसेच्या तसे जाणून सांगण्याचे महत्त्व ते प्रतिपादितात; *श्रुतहानी* व अश्रुतकल्पना या दोषांपासून तत्त्वज्ञान विमुक्त असले पाहिजे; मूळ श्रुतिवचनांची ओढाताण करून अर्थ काढणे, त्यात नसलेल्या कल्पना मांडणे, यांवर त्यांचा आक्षेप आहे.

स्वतःच्या कल्पनांना गौण मानून ***श्रुतिवचने व खरा आध्यात्मिक अनुभव*** यांच्यावर *दर्शन* आधारले पाहिजे, असे ते स्पष्ट म्हणतात. श्रुत्यादींचे साग्र व सखोल अर्थ घेतले पाहिजेत, याबाबत ते आग्रही आहेत. शुद्ध अभेद वा अद्वैत, तसेच पराकोटीचा भेद वा द्वैत त्यांना काल्पनिक वाटतात.

मायावादाचे खंडण हे त्यांचे जीवितकार्य आहे. ते आचार्य श्रीशंकरांबाबत सडेतोडपणे म्हणतात की ***"श्रुत्यर्थं आचार्योक्तिं च पृष्ठतः कृत्वा मायामात्रं स्वबुद्ध्या कल्पयित्वा अन्यदेव दर्शनं रचयन्ति।"*** - आचार्यांनी स्वतःचेच मत श्रुत्यर्थ म्हणून मांडले आणि स्वबुद्धीने मायेची कल्पना करून आपले तत्त्वज्ञान मांडले आहे, असा त्यांनी शांकरमतावर प्रहार केला आहे.

जीवात्मा हा ब्रह्मच असतो. पण *अविद्या, काम* व *कर्म* या उपाधी त्याच्या ब्रह्मत्वास मर्यादित करतात. या शृंखलांचा नाश करणे हीच त्याची मुक्ती, असे भास्करमत आहे. ब्रह्म हीच अंतिम सत्ता आहे, हे त्यांना मान्य आहे. त्यांच्या ईश्वरविषयक कल्पना रामानुजमतास जवळच्या आहेत.

जीवात्म्यास मुक्ती देण्यासाठी निराकार ब्रह्मच साकार व मूर्त होते; आपल्या परिणामशक्तियोगे ते *चित्* व *अचित्* दोन्ही होते; *निर्गुण ब्रह्म* व *सगुण ब्रह्म* या त्याच एका सत्तेच्या अव्यक्त व व्यक्त दशा आहेत; ब्रह्म अनंत आहे व त्याचा एक भाग ईश्वर व जीव आणि जगत ही होत, असे ते म्हणतात.

उपाधियुक्त ब्रह्म *सांत* होते व उपाधिविमुक्त झाले की तेच *अनंत* असते, अशी त्यांची जीव-जगत-ईश्वर-उपाधिसापेक्ष ब्रह्मत्वाची पायाभूत कल्पना आहे. म्हणून त्यांच्या मतास ***औपाधिक भेदाभेदवाद*** असे म्हणतात.

७) निंबार्काचार्यांचा द्वैताद्वैतवाद

शांकरमते जगत ही *माया* आहे; विश्व हा भ्रम आहे. **रामानुज ईश्वरास मूळ मानून *जीव व जगत* ही त्याची *विशेषणे* आहेत, असे समजतात.** मध्वाचार्य *पंचभेद* प्रमाण मानतात. पण ईश्वरास स्वतंत्र मानून भेदांना त्याच्या स्वाधीन समजतात. तर भास्कराचार्य भेदासही अभेदाइतकेच सत्य मानतात.

रामानुज आणि मध्व यांचा ईश्वर ***विष्णू*** आहे. निंबार्क हेसुद्धा भेदाभेदवादीच होत. त्यांचा ईश्वर ***कृष्ण*** आहे. शुद्धाद्वैतप्रणेते वल्लभाचार्यसुद्धा कृष्णासच ईश्वरत्व देतात. असो.

निंबार्कांना विष्णूच्या सुदर्शनचक्राचा अवतार समजले जाते. त्यांच्या आयुष्यात घडलेल्या एका आख्यायिक घटनेमुळे त्यांना *निंबार्क* म्हणजे *निंबवृक्षाच्या शेंड्यावर सूर्य म्हणून दिसलेले विष्णूचे सुदर्शनचक्र* असे नांव दिले गेले. ते विष्णूचे परमभक्त होते. त्याला ते कृष्णस्वरूपात पाहत असत. त्यांच्या संप्रदायास ***सनत्कुमार संप्रदाय*** असेही म्हणतात.

परमात्मा, जीवात्मा व जगत अथवा जडविश्व ही परस्परभिन्न होत; पण तरीही जीवात्मा व जगत ही परमात्म्याशी अभिन्न आहेत; परमात्मा हा नित्य ज्ञानरूप-आनंदमय, स्वयंपूर्ण, स्वतंत्र आहे; जड प्रकृती व तिच्याद्वारे परिणमणारे हे दृश्य जगत आणि असंख्य जीवात्मे हे सर्व परमेश्वरी अंश आहेत; परमेश्वराप्रमाणेच जीवात्मे हे नित्य व अविकारी आहेत.

सूक्ष्मा प्रकृती विकारी असून तिचा जगद्रूपी परिणाम विकार होय; प्रकृती व तिचे विकार एकमेकांशी अभिन्न होत; प्रकृतीसुद्धा विकरण पावत असली, तरी नित्यच आहे; तिचा विकार म्हणजे ही सृष्टी; उत्पत्ती-स्थिती अवस्थात ते विकार व्यक्त होतात; लयकाळी ते पुनश्च प्रकृतीत विलीन पावतात, अव्यक्त दशेत जातात. परमेश्वर व जीवात्मा हे चिद्रूपी आहेत, तर प्रकृती *अचिद्* आहे, असे सिद्धांत निंबार्क प्रसृत करतात.

या निंबार्कांच्या द्वैताद्वैतवादाचे ***ब्रह्मपरिणामवाद*** असेही नांव आहे. ब्रह्म अविकृत राहूनही जीव व जगत-जड व प्रकृती-या रूपांनी परिणाम पावते. म्हणून ही ईश्वर-जीव-जगत*(प्रकृती)* ही त्रयी सारखीच सत्य आहे, असा या मतातील *अभेदातील भेद* आहे.

निंबार्कमताचे *अवयवीपक्ष* असेही वर्णन केले जाते. कारण चित् व अचित्; वा जीव व प्रकृती यांना ते परमात्म्याचे *अंश* मानतात. परमात्मा हा *अवयवी* वा *अंशी* होय. ***अंश व अंशी यांचा अवयव व अवयवी असा भेदाभेदसंबंध* असतो; अभेदातही भेद किंवा भेदातही अभेद तो हाच!**

तसेच चित् व जड पदार्थ हे स्वरूपतः परमात्म्याहून भिन्न जरी असले, तरी त्यांची स्थिती ब्रह्मातच असते. या कारणाने ईश्वर-जीव-जगत ही त्रयी अभिन्नच समजली पाहिजे, असे या मताचे म्हणणे आहे.

त्रिगुणात्मिका प्रकृती म्हणजे *माया* होय. जीवास आपला ब्रह्माशी असलेला अभेद मायेच्या प्रभावामुळे कळून येत नाही. हा *अभेद न जाणणे म्हणजेच अज्ञान! ज्ञान म्हणजे हा संबंध जाणणे.* **भगवदनुग्रहामुळे जीवास ब्रह्मसाक्षात्कार घडून येतो व हे ज्ञान प्राप्त होते.** यासच निंबार्क *ध्रुवस्मृती, पराभक्ती, चिरंतन ध्यान* इ.संज्ञा देतात. या ज्ञानाने रागद्वेषादी दोषांची पूर्ण निवृत्ती होते व हेयाचा शाश्वत अंत होतो.

निंबार्कांच्या द्वैताद्वैतवादास ***स्वाभाविक भेदाभेदवाद*** असेही म्हणतात. ते त्रितत्त्वे नित्य व सत्य असल्याचे मानतात. ती म्हणजे *१)ब्रह्म, २) चित् व ३) अचित्* अशी होत. निंबार्क *वैष्णववेदांती* आहेत. ते ब्रह्मास *हरि* किंवा *कृष्ण* म्हणून संबोधतात.

सर्वात उच्च, श्रेष्ठ, पर, दिक्कालातीत, ज्याच्याहून मोठे तत्त्व नाही, ज्याच्या शक्ती व गुणांस अंत नाही, जे सर्वांस अंतर्बाह्य व्यापून असते, जे सर्वच असते, त्यास ते ***ब्रह्म*** असे म्हणतात. *भेद* त्याच्या आश्रयाने राहतात. त्यांचा ब्रह्माशी अभेद असूनही भेद असतोच. ***"त्यत्तिष्ठत् दशाङ्गुलम्"*** असे निंबार्कांचे *ब्रह्म* आहे.

"एवमेव तस्य तयोश्च सर्वात्मत्व सर्वनियंतृत्व सर्वव्यापकत्व-स्वतंत्रस्वत्वसर्वाधारत्वादियोगेनब्रह्मात्मकत्वतन्नियम्यत्वतद्व्याप्यत्व-तत्तन्त्रसत्त्वपराधेयत्वादियोगेन चाभेद इति एष सर्व भूतान्तरात्मा अन्तःप्रविष्टः शास्ता जनानाम्।" असे ते ब्रह्माविषयी म्हणतात.

माती जशी घटात असते, दूध जसे दह्यात असते, तसे ब्रह्म यच्चयावत सर्व स्थावरजंगमादींत असते. सर्वात्म, सर्वनियंता, सर्वव्यापक, स्वतंत्र, सर्वाधार, सर्वांचे अंतर्यामी, सर्वांचे नियामक, आधेय, सर्व भूतांचा अंतरात्मा होऊन त्यांच्यात प्रविष्ट झालेले, जनांचे व सर्वांचे शासक असे ब्रह्म असून त्याच्या तंत्राने, त्याच्या स्वत्वावर ही सर्व भूते अवलंबून चालतात, असे *निंबार्कमत* आहे आणि तरीही सर्व भूतांशी त्याचा अभेद आहे, हे ते स्पष्टच सांगतात.

विश्व ही त्याची केवळ लीला आहे, असे वैष्णवमतास अनुसरत तेही म्हणतात. त्यांचे ब्रह्म *निर्गुण व सगुण* या भेदांकडे न वळता असे आहे की हे भेद करण्याचे तेथे काही कारणच नाही; ***सर्वगुणमंडित* असे हे ब्रह्म असल्याने त्यात निर्गुणाचाही सगुणाप्रमाणेच समावेश होतो.** ईश्वर अवतार घेतो ही कल्पना निंबार्क मान्य करतात.

जीवांचे वर्गीकरण ते बद्ध व मुक्त अशा दोन कोटींत करतात. ***"ब्रह्मविकारः संसारः।"*** - विश्व हे ब्रह्माचा विकार आहे, असे सांगून ते जगत-जीव-ईश्वर यांचा परस्परसंबंध दर्शवितात. विश्व ब्रह्मातून व्यक्त होते; ते ब्रह्माचा परिणाम आहे, असा ***ब्रह्मपरिणामवाद*** ते मांडतात.

जीवाचा बंध अज्ञानामुळे असतो. जेव्हा तो आपले अंशात्मक रूप व परमात्म्याचे सच्चिदानंदस्वरूप जाणतो व तसा त्याला साक्षात्कार होतो, तेव्हा तो मुक्त होतो. त्यासाठी गुरूवर श्रद्धा ठेवून ईश्वराची भक्ती करणे, त्याला सर्वस्व अर्पण करून ईश्वराचा प्रसाद मिळवणे, आपणास कृष्णाचे दास मानणे, त्याच्यावर अनन्यशरणतेने अवलंबून राहणे, हा मार्ग निंबार्क सांगतात.

मुक्त जीवात्मा ईश्वरात प्रवेशतो, पण आपला आण्विक सच्चिदानंदरूपी ***अहं*** ठेवूनच! त्यास विदेहमुक्ती लाभते. ईश्वराची सृष्टि-लयादी शक्ती मुक्तांस नसते. त्यांना मिळणाऱ्या मुक्तीचे योगजिज्ञासूंना उपयुक्त ठरेल असे हे वर्णन पाहाः

"आपले सर्व कर्म फळांसह उल्लंघून संत - मुक्त जीव - स्थूल शरीराचा त्याग करून सुषुम्ना नाडीतून प्राकृतमंडलाच्या *(अ,उ व म या त्रिमात्रांच्या प्रांताच्या)** पलीकडे जातो व *विरजा*नदीच्या काठावर येतो.*(*हाच आज्ञाचक्रस्थ प्रांत होय.)* ही नदी भौतिक *(अ-उ-म चे)** विश्व व विष्णुलोक *(*आज्ञाचक्रापुढील शून्याचा प्रांत)* यांच्यामधील सीमाप्रदेशातून वाहते. येथे तो आपल्या सूक्ष्मशरीरा*चा *(*कारणदेहाचा)* ब्रह्मा*त *(*महाकारणदेहात)* विलय करून ईश्वराच्या **अतीत स्वरूपा**त* *(*महाशून्यात)* प्रवेश करतो. असा मुक्त जीव ईश्वरामध्ये त्याच्या विशिष्ट रूपात राहतो. कृष्ण त्याला आपल्या लीलेत सहचर म्हणून सहभागी करून घेतो."

(**टीपःयोगशास्त्रीय स्पष्टीकरण**-निंबार्कांच्या मुक्तावस्थेचे योगशास्त्रीय स्पष्टीकरण या ग्रंथलेखकाने स्वतःच शोधले आहे व ते या * चिह्नाने दर्शविले आहे.)

निंबार्क *जीवन्मुक्ती* व *क्रममुक्ती* असे भेद, सगुण ब्रह्म व निर्गुण ब्रह्म असा फरक करत नाहीत. त्यांच्या मुक्तावस्थाप्राप्तीच्या उपरोक्त विरजादी मार्गक्रमणेवरून असे म्हणावेसे वाटते की त्यांचा हा जो व्यष्टी - समष्टीतील मुक्तावस्थेचा मार्ग आहे, त्याची व्यष्टीतील प्रतिकृती म्हणजे या ग्रंथात आपण ज्ञानदेवांची *पंचशून्ये* अभ्यासतांना जे अवलोकणार आहोत, ते योग्यांचे मुक्तिमार्गक्रमणच होय. असो.

लक्ष्मीसह विष्णू हे त्यांचे वैकुंठाचे स्वरूप आहे. *सदाचार, वर्णाश्रमविहित व्यापारधर्म, मंत्रजप व भक्ती ही चतुःसूत्री* अवलंबून कोणाही मनुष्यास-स्त्रीशूद्रादी कोणासही मुक्ती मिळवता येते, असे निंबार्कांचे मत आहे.

त्यांचा *द्वैताद्वैतवाद* प्राचीन *उपनिषदे* व बादरायणाची *ब्रह्मसूत्रे* यांचा प्रामाणिकपणे अभ्यास करून, सुसंगत रीतीने व स्वतःची कल्पित आग्रही मते त्याआड न आणता मांडला असल्याचे विद्वानांचे मत आहे.

प्रकृतीला *शांकरपूर्व द्वैताद्वैती* चित्स्वरूपच मानत असत. समुद्राच्या लाटा व समुद्र जसे एकाच निखळ जलस्वरूपाचे असतात, तसेच प्रकृतीसुद्धा चैतन्यस्वरूप आहे; सुवर्ण व त्याचे अलंकार जसे एकाच स्वरूपाचे असतात, तसे ब्रह्म, प्रकृती व जीव एकाच स्वरूपाचे आहेत, असे मत पूर्वी मांडले जात असे. ***काश्मिरी शैवमत*** आणि ज्ञानदेवांचा ***चिद्विलासवाद*** ही दोन्ही या प्राचीन *द्वैताद्वैत* व *भेदाभेद* प्रणाल्यांशी मिळतीजुळती आहेत. निंबार्क मात्र प्रकृतीस *अचित्* मानतात, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे. असो.

८) वल्लभाचार्यांचा शुद्धाद्वैतवाद

शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुज, भास्कर व निंबार्क या प्रमुख तत्त्वज्ञान्यांनंतर इसवी सनाच्या सोळाव्या शतकारंभी *श्रीवल्लभाचार्य* होऊन गेले. त्यांचा जन्म अलौकिक होता, अशी दंतकथा आहे. ते श्रीकृष्णाचे परमभक्त होते व *गीता, उपनिषदे व ब्रह्मसूत्रे* या प्रस्थानत्रयीव्यतिरिक्त त्यांना **श्रीमद्भागवता**चेही प्रामाण्य फार वाटत असे. त्यांनी पूर्वसूरींचे व विशेषतः वरील मुख्य तत्त्वज्ञ आचार्यांचे तत्त्वज्ञान अभ्यासिले होते.

ते *अद्वैतवादी* होते. पण त्यांना शंकराचार्यांचा *मायावाद* पूर्णपणे अमान्य होता. हे त्यांचे मायेविषयीचे मत निंबार्कांच्याप्रमाणेच होते. कारण या दोघांच्या मते श्रुतिस्मृत्यादी ग्रंथांत मायेचा कोणताही उल्लेख नसून शंकराचार्यांनी केवळ स्वबुद्धीने मायावाद प्रसृत केला आहे.

एक विशेष म्हणजे हे प्रमुख पाच आचार्य सगळे दाक्षिणात्य ब्राह्मणच होते. तत्त्वज्ञानाचा हा विशाल वृक्ष या आाचार्यरूपी पाच प्रमुख शाखांनी मंडित होऊन दक्षिण भारताच्या भूमीतच उगवला. पण त्याची पाळेमुळे आणि शाखापल्लवपाने अखिल भारतभर पसरली!

वल्लभांनी भागवतावर तहहयात कीर्तने केली आणि लोकांना कृष्णभक्तीचा सतत उपदेश केला. विविध मतांच्या वैदिक पंडितांशी, वामाचाऱ्यांशी, बौद्ध व जैन पंडितांशी त्यांनी वाद केले व आपल्या मताचे प्रतिस्थापन केले. ***मायेविरहित अद्वैत*** त्यांचे प्रतिपाद्य असल्याने त्यास ***शुद्धाद्वैत*** असे ते म्हणत व त्याप्रमाणे त्यांच्या मतास *शुद्धाद्वैत* अशी संज्ञा मिळाली.

कर्म, ज्ञान व योग यांना *मोक्षोपाय* म्हणून ते मान्यता देत नाहीत, तर केवळ *कृष्णभक्ती* हाच एकमेव मोक्षोपाय आहे, असे त्यांचे मत व शिकवणही आहे.

शंकराचार्यांचे संन्यासाशिवाय ज्ञान व मुक्ती नाही, हे मतही त्यांना अमान्य होते. उलट स्त्रीशूद्रादी कोणीही असो! त्या सर्वांनी गृहस्थधर्माचे यथायोग्य पलन करावे व कृष्णभक्ती करावी; एका श्रीकृष्णासच ***"श्रीकृष्ण शरणं मम"*** असे म्हणून अनन्यशरण व्हावे; म्हणजे श्रीकृष्णाचा प्रसाद प्राप्त होऊन ते कितीही जरी दुराचरणी असले, तरी धर्मात्मा होऊन मुक्ती पावतील असे त्यांचे सांगणे होते. त्यांच्या या कृष्णभक्तिमार्गास ***पुष्टिमार्ग*** असे म्हणतात.

"मायासंबंधरहितं शुद्धमित्युच्यते बुधैः। कार्यकारणरूपं हि शुद्धं ब्रह्म न मायिकम्।।" असे शुद्धब्रह्माचे वर्णन ते सांगतात. ब्रह्मास मायोपाधी वगैरे नाही. ते सदैव शुद्धस्वरूपात सर्वत्र विद्यमान असते, ब्रह्म हेच जगाचे *निमित्तकारण* आहे व तेच उपादानकारणही आहे. शांकरमते ब्रह्म *उपादानकारण* असू शकत नाही. पण वल्लभ ब्रह्मच सर्व व्यापून राहते; नाम,रूप, कर्म वा प्रपंचात सच्चिदानंदस्वरूप ब्रह्मच भरलेले आहे, असे ते प्रतिपादितात.

त्यांचे हे ***शुद्धब्रह्म*** सर्वधर्मयुक्त आहे. श्रीमच्छंकराचार्यांच्या मताप्रमाणे ते निव्वळ निर्गुण, निराकार, निर्विशेष व निर्धर्मक नाही. कारण अशा ब्रह्माचे ज्ञान होणे व मोक्षप्राप्ती असंभव आहे, असे ते म्हणतात. ***वल्लभ ब्रह्मास सच्चिदानंद, परब्रह्म, सर्वव्यापक, अव्यय, स्वतंत्र, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ व निर्गुण अशा प्रकारचे मानतात. ब्रह्म हेच भगवान आणि परमात्मा!***

ज्ञानदेवांप्रमाणेच त्यांचे ब्रह्म सगुण व निर्गुण दोन्ही आहे. ***"तुज सगुण म्हणू कीं निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।।"*** अशीच त्यांचीही कल्पना आहे. *सगुण तो ईश्वर व निर्गुण ते ब्रह्म अशी मायोपाधिक शबल ब्रह्मकल्पना* शांकरवेदांत मांडतो; तिला श्रुती इ.चा काहीही आधार नाही; भ्रांतिवादी वेदांत्यांनी मायेचे मृगजल निर्मिले आहे व असत्य वेदांतमते प्रसृत केली आहेत, अशी वल्लभांची धारणा आहे. ते समन्वायिक मताचे समर्थन करणारे आहेत.

निर्गुण, अविकारी, सच्चिदानंदस्वरूप असे त्यांचे ब्रह्म स्वाभाविकपणेच सर्वज्ञ, सर्वशक्तिमान व क्रियाशील आहे. ***"पराऽस्यशक्तिः त्रिविधैव श्रुयते। स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च।।"*** असे म्हणून ते ब्रह्मास भेदरहितत्व असल्याचे सांगतात. *देश, काल, वस्तु व स्वरूप* असे भेद त्याच्याठायी नाहीत; ते सजातीय *(जीव-ब्रह्मभेद)*, विजातीय *(जड-ब्रह्मभेद)* व स्वगत *(जीव-ब्रह्म-जडभेद)* असे भेद नसणारे आहे; साखरेच्या पुतळीचे अवयव अंतर्बाह्य साखरेचेच जसे असतात, तसे जीव-जगत-ब्रह्म ही सर्व एकमात्र ब्रह्मस्वरूपच होत, असे ते मानतात.

ब्रह्म नियतधर्मरूप आहे, *अंश व अंशी* असे भेद त्याच्याठायी आहेत, हा विचारही त्यांना पटत नाही. जग हे ब्रह्माची *लीला* आहे, असे ते मानतात. ती लीला पण त्याच्या स्वरूपाहून अभिन्न आहे, असे ते सांगतात. हे ब्रह्मच श्रीकृष्णपरमात्मा आहे; भागवतातील वर्णन

त्याच्याच लीलेचे आहे, असे भक्तिमार्गी मत त्यांचा *पुष्टिसंप्रदाय* मानतो. सच्चिदानंद, निर्गुण, निराकार ब्रह्मच विश्वरूपाने अभिव्यक्त होते, परिणाम पावते; पण ब्रह्म अविकृतच असते आणि जसेच्या तसेच राहते, असा *अविकृत परिणामवाद* वल्लभ सांगतात. रामानुज *परिणामवादी* आहेत; शंकराचार्य *विवर्तवाद* सांगतात.

परिणामवादी *विकृत* व *अविकृत* अशी दोन प्रकारे *कार्यकारण उपपत्ती* सांगतात. दूधापासून दह्याची निर्मिती हे विकृत परिणामवादाचे उदाहरण आहे. कारणात विकृती येऊन कार्यनिर्मिती होते, ती अशी.

कोळी आपल्या पोटातील धागा काढून जाळे विणून पुनः ते गिळून नष्ट करतो. या निर्मितीपूर्वी, मध्ये व जाळे नाशल्यानंतरही तो जसाच्या तसाच राहतो, असे अविकृत परिणामवादाचे विद्वन्मान्य उदाहरण आहे. श्रीवल्लभाचार्य जीव-जगत-ईश्वराचा संबंध याच प्रकारच्या अविकृत परिणामवादाने स्पष्ट करू इच्छितात.

कार्य-कारण, जीव-ईश्वर या सर्वांचे *मायारहित अद्वैत* आहे; ब्रह्मच जगाचे उपादान वा निर्मितिकारण आहे, असा ***मायावादसापेक्ष ब्रह्मवाद*** वल्लभ सांगतात.

"पूर्णमदः। पूर्णमिदं। पूर्णात्पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।" असे ब्रह्मलक्षण ते सांगतात. ब्रह्मास *आविर्भाव* व *तिरोभाव* या शक्ती आहेत; त्यांद्वारे जगत्क्रीडा चालते. ब्रह्माचे तीन आकार आहेतः *१) परब्रह्म - पुरुषोत्तम, २) अंतर्यामी व ३) अक्षरब्रह्म* असे ते असल्याचे वल्लभमत आहे. ***"ईशावास्यमिदं सर्वं यात्किञ्च जगत्यां जगत्।"*** या *ईशावास्योपनिषद* वचनावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे.

जीव ब्रह्माचाच अंश आहे, पण तरीही पूर्णब्रह्मच आहे, असे ते मानतात. जीवांची जीवन्मुक्ती त्यांना मान्य आहे. ईश्वराची *कृपा* किंवा *प्रसाद* म्हणजे *पुष्टी* व ती मिळवणे हे जीवाचे एकमेव ध्येय असले पाहिजे, या त्यांच्या उपदेशावरून त्यांच्या मतास *पुष्टिमत* असे म्हटले जाते. नारदभक्तिसूत्रातील एकादश वा नवधा भक्ति त्यांना मान्य आहेत. सर्वश्रेष्ठ भक्तीस - पराभक्तीस - ते *पुष्टिभक्ति* असे म्हणतात. हीच शांडिल्यमते *परानुरक्ती* होय.

९) समन्वय

प्रत्येक तत्त्वज्ञानी आपापल्या मताचा किती एकांगी अभिनिवेश बाळगतो, ते आपण वल्लभांचे उद्गार पहून समजू शकतो. ते म्हणतात कीः ***"अत्रापि शाङ्करा शैवा माध्वा रामानुजादयः। निम्बार्का भास्करा भिक्षुर्येऽन्ये ते दोषसंश्रिताः। अस्माकं व्यासचरणैर्यदुक्तं न ततोऽन्यथा।। इति सर्वेषु मार्गेषु दोषाः सन्ति ततो हरिम्। शुद्धाद्वैतावलम्बेन भजेत सुविनिश्चितम्।।"*** - हे असे त्यांच्या **शुद्धाद्वैतमार्तण्ड**ात म्हटले आहे.

पूर्वसूरी समस्त आचार्यांना, बौद्ध-जैनादी मतांना मोडीत काढून वल्लभ स्वतःचे *हरिशुद्धाद्वैत*च प्रमाण असल्याचे व व्यासांना खरेखुरे अनुसरणारे आहे, असे प्रतिपादितात!!!

या ठिकाणी या सर्व तत्त्वज्ञानविचारांचा संक्षिप्त असा परिचय समाप्त करतांना जैनांचा ***स्यादवाद*** काय म्हणतो, ते पाहण्यासरखे आहे. *स्यादवाद* सांगतो की सर्वच दर्शने, सर्वच तत्त्वज्ञाने एकांगी असतात; पण त्या त्या स्वीकारलेल्या वैयक्तिक दृष्टिकोनातून प्रत्येक मत-दर्शन-तत्त्वज्ञान परिपूर्णच असते, सत्यच असते.

स्यादवादाचा यापुरता आश्रय केला की सर्वच आचार्य किती महान आहेत, ते कळते. आपणास कोणाची भूमिका रुचते, त्यावरच शेवटी आपण कोणास स्वीकारतो, हे ठरणार! शेवटी जिज्ञासूची किंवा मुमुक्षूची वैयक्तिक आवडनिवड व बुद्धी हीच त्याचे तत्त्वज्ञान व मोक्षमार्ग ठरवतात.

अनंतगुणनिधान ब्रह्माची अनंत रूपे आहेत. एका औपनिषदिक कथेत एक रंग बदलणारा सरडा असतो, तो जसा वारंवार रंग पालटत असतो, तसेच हे ब्रह्म भासते; कोणास कोणत्या प्रकारचे तर कोणास कोणत्या प्रकारचे! पण त्याच्याठायी हे सर्व गुण *(attributes)* आहेत; हे सर्व रंग आहेत. कोणास एक रंग तर कोणास दुसरा रंग जरी दिसला, तरी सरडा मात्र तोच्या तोच आहे, या लक्षणेने आपणास या सर्व तत्त्वज्ञानांचा समन्वय करता येतो!!! ज्ञानदेवांनीही *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* विचाराचा मागोवा घेतांना असाच सर्व तत्त्वविचारांचा समन्वय केल्याचे आपण या ग्रंथात योग्य ठिकाणी पाहणारच आहोत!

१०) इतर मुख्य मते - तत्त्वज्ञाने - प्रवाह::::

अचिंत्यभेदाभेदवाद

श्रीगौरांगप्रभू वा कृष्णचैतन्य या वंगदेशीय चैतन्यसंप्रदायप्रवर्तक महान कृष्णभक्तांनी *मध्व* संप्रदायाची दीक्षा घेतली होती. पण मध्वांचे अकटोविकटीचे द्वैत त्यांना मान्य नव्हते. ते *भेदाभेदवाद* मानत असत व द्वैतातही अद्वैत पाहत असत. एकाच वेळी भेदात अभेद व अभेदातही भेद असणे तर्कदृष्ट्या सयुक्तिक ठरत नाही. म्हणून ते या भेदाभेदाचे स्वरूप *अचिंत्य* असल्याचे प्रतिपादितात. यामुळे त्यांच्या मतास ***अचिंत्य भेदाभेदवाद*** असे म्हणतात.

भेदाभेदवादाच्या विविध मतांमध्ये अतिसूक्ष्म असे मतमतांतर असते. *जड व चित्* किंवा *अचित् व चित्* यांच्या सीमारेषा, चिद्वादाचे तौलनिक वजन, पारिभाषिक भेद, जीवांचे प्रकार, ईश्वराचे नाम-कृष्ण की विष्णू, नारायण इ., मोक्षाचे प्रकार, वैकुंठाचे वर्णन, भक्तीचे प्रकार व साधनाभेद, वासुदेवादी चार व्यूह अशा विविध पैलूंच्या अनुरोधाने त्यांच्यात सूक्ष्म असे भेद आहेत. त्यांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानप्राणाली समग्र अभ्यासल्याशिवाय या विषयाची इत्थंभूत माहिती मिळणे शक्य नाही. संक्षिप्त रीत्या मांडण्याइतके सोपे ते मुद्दे नाहीत. असो.

काश्मिरी शैवमत

वसुमत या काश्मिरी पंडिताने या मताची स्पष्ट उभारणी केली. त्याचे तत्त्वज्ञान *प्रत्यभिज्ञा, स्पंदशास्त्र, षडर्धशास्त्र* व *षडर्धक्रमविज्ञान* या नावांनीही ओळखले जाते.

शिव हे या मताचे श्रेष्ठ तत्त्व. ते आपल्या *स्पंदरूपा* शक्तीशी नित्य युत असते. गुरूकडून मुमुक्षूस या तत्त्वाचे ज्ञान *"शिवोहम्"* असे होते व अज्ञानाची निवृत्ती होते. वसुगुप्ताने ***शिवसूत्रे*** रचून हे शास्त्र विकसित केले.

विशुद्ध स्वरूपातील *शैव अद्वैतवाद* हे या तत्त्वज्ञानाचे खरे स्वरुप आहे. *शब्दब्रह्मवाद* व शैवांचा *शक्त्यद्वयवाद* यांस हे तत्त्वज्ञान विरोध करते. *अभिनवगुप्त* हाही या सिद्धांताचा पुरस्कर्ता असून मताच्या शास्त्रबद्ध मांडणीत त्याचा मोठा हातभार आहे. हे मत शैवागमांवर आधारित आहे. शैवागमे अठ्ठावीस होती व त्यांना वेदांइतकीच दाक्षिणात्यांत मान्यता होती, असे म्हणतात.

त्यांच्या मते सत्ता ही एकता असून अनिर्वचनीय व अचिंत्य आहे. तिला कोणतेच विधेय लागू पडत नाही. हीच अंतिम वा परमसत्ता होय आणि ती तेवढ्याच अनिर्वचनीय अशा जीवात्म्याच्या साराशी अभिन्न असते. जीवात्म्याने या सत्तेशी *अभेद* साधला की त्यास ती प्राप्त होते. या मतास *स्वातंत्र्यवाद, आभासवाद* व *त्रिक्* अशीही नावे आहेत.

स्वतंत्र इच्छाशक्ती, विश्व म्हणजे अंतिम सत्तेचे साकार रूप, चोवीस पदार्थ व पुरुष यांच्याशी समन्वय, शांकरवेदांतातील मायेचा स्वीकार अशी या मताची वैशिष्ट्ये होत. ***जगत हे सर्व पदार्थांसह परमसत्तेचा आविष्कार होय, असा या मताचा सिद्धांत आहे.*** ही परमसत्ता गूढ आहे, असे मानल्याने या मतास *गूढवादी* समजले जाते. या सत्तेस ते *महेश्वर* असे म्हणतात.

हे मत *वास्तववाद* व *चिद्वाद* या परस्परविरोधी विचारसरणींचा समन्वय साधते. *ईश्वराद्वयवाद* असे त्याचे स्वरूप आहे. *लीला* हे त्या ईश्वराचे जगताशी असलेले नाते आहे. हे तत्त्वज्ञान ज्ञानेशाना अभिप्रेत असलेल्या व विद्वज्जन ज्याला ***चिद्विलासवाद*** असे म्हणतात, त्यास फार जवळचे आहे, असे मान्यवर समजतात.

इतर शैवमते

पाशुपत *नकुलीश* शैवमतही अद्वैतप्रधान आहे. दक्षिण भारतात अनेक शैवमते प्रचुर आहेत. त्यांत द्वैती व अद्वैती अशी दोन्ही मते आढळतात. *शैव, शाक्त, तांत्रिक, गाणपत्य, सिद्धांतशैव, वीरशैव, रौद्र, भैरव, कालामुख, वाम* असे अनेकानेक शैव व तत्सम सिद्धांत त्यांत प्रचलित आहेत. *कट्टर अद्वैती काश्मिरी शैवमत, द्वैताद्वैती पाशुपतमत, विशिष्टाद्वैती श्रीकंठमत* अशा मतच्छटाही या सर्व शैवमतांत आहेत.

तांत्रिक वामाचारी, हरिहर, नाथपंथ, अर्धनारीश्वर, रससिद्धांत, मार्तंडभैरव, अघोर असे पंथोपपंथ शैवमतप्रधान आहेत. *ज्ञान-योग-भक्ती* यांचा साधना म्हणून या मतांत प्रामुख्याने पुरस्कार केलेला आढळतो. ***कुंडलिनीशक्ती व तत्संबंधित योग,*** रससिद्धी, संजीवनी व तत्संबंधी कल्पना या सर्व, या ना त्या स्वरूपात या पंथांत महत्त्वाच्या मानल्या जातात. असो. त्या सर्वांचा अल्प परिचय करून घेणेही आपल्या प्राप्त विषयाच्या आवाक्यात घेणे अशक्यच असल्याने इत्यलम्!!!

उर्वरित षट्दर्शने::::

साङ्ख्य दर्शन

हे अत्यंत प्राचीन समजले जाते. *सेश्वर* व *निरीश्वर* असे या दर्शनाचे दोन भिन्न मतप्रवाह आहेत. सेश्वर साङ्ख्यांचे ग्रंथ कालप्रवाहात लोप पावले. निरीश्वरवादी साङ्ख्यांचेही अनेक ग्रंथ असेच ***"कालाय तस्मै नमः"*** करत कालौघात वाहून गेले.

पातञ्जलयोगदर्शन सेश्वर आहे, असे श्री.कृ.के.कोल्हटकर यांनी त्यांच्या ***पातञ्जलयोगदर्शन अर्थात भारतीय मानसशास्त्र*** या ग्रंथात सप्रमाण सिद्ध करून दाखविले आहे. इतरही काही विद्वानांचे तसेच मत आहे. साङ्ख्यांची *निरीश्वर* अशी समजली जाणारी विचारसरणी पण खरेच तशी आहे का, की ती पण *ईश्वरवादी*च आहे, हा एक वादग्रस्त विषय आहे.

साङ्ख्य व योग या दर्शनांचा एकत्र विचार करावा असे *हिरियण्णा* या पंडितांचे मत आहे. या ग्रंथात विषयानुरोधाने आपण *पातञ्जलयोगसूत्रे* सविस्तर अभ्यासणार आहोतच. त्यामुळे योगदर्शनाचा तूर्त येथे वेगळा विचार करणे आवश्यक नाही. एवढेच सांगितले की पुरे की *साङ्ख्य* हे एक तत्त्वज्ञान आहे, तर *योग* हे त्याचे पूरक असे आत्मज्ञान करून देणारे क्रियाशास्त्र आहे.

साङ्ख्य प्रामुख्याने द्वैतवादी आहेत. *पुरुष* व *प्रकृती* ही दोन अंतिम परस्परभिन्न तत्त्वे आहेत. त्यांच्या एकत्र येण्याने विश्व उत्पन्न झाले. सर्व जगद्व्यापार या दोनही तत्त्वांच्या विद्यमाने चालतो. *पुरुष* हे *शुद्ध चैतन्य* आहे. *प्रकृती* हे जडविश्वाचे *आदिकारण* आहे. विश्व तिच्यातून आकारास येते व अंती तिच्यातच लय पावते. *जाणीव, ज्ञान, विचार व बुद्धी* ही सूक्ष्म अंगे पुरुषोद्भव आहेत. प्रकृतीचा विकास होत जाऊन विश्वाची, पुरुष धरून *पंचवीस तत्त्वे* होतात. **महत् *(बुद्धी)*, अहंकार, पंच तन्मात्रे, पंच ज्ञानेंद्रिये, पंचमहाभूते, पंच कर्मेंद्रिये, मन, प्रकृती व पुरुष हीच ती मूळ तत्त्वे.**

साङ्ख्यदर्शन *वास्तववादी* आहे. ते विश्वास सत्यच समजते. ज्ञानाला महत्त्व देते. *कैवल्यप्राप्ती* हे त्यांच्या मते सर्वोच्च ध्येय आहे. ते जीवास चिदावस्था प्राप्त करून देण्यावर भर देते. या दृष्टीने ते चिद्वादाकडे झुकणारे आहे.

या मताची उभारणी ज्या ***सत्कार्यवाद*** या संकल्पनेवर झाली आहे, ती अशीः कार्य हे व्यक्त होण्यापूर्वी कारणात अव्यक्त रूपात उपस्थित असते, जसे तेलबियांत तेल असते. *कार्यकारणभाव* तो हाच.

वरील कल्पना नैय्यायिकांच्या ***आरंभवाद*** या कल्पनेशी विरोधी अहे. नैय्यायिकमते कार्य हे कारणात प्रारंभापासून नसते, तर ते

कारणापासून नव्याने निर्माण होते. यास ***आरंभवाद*** असे म्हटले जाते.

प्रकृती अत्यंत *सूक्ष्म, जड-अचेतन-मनबुद्धिरहित* असते. ती नित्य क्रियाशील असते. ती अजात आहे. तसेच ती अदृश्य, अव्यक्त व सर्व विकारांचे कारण आहे. पंचमहाभूते व मनासह अकरा इंद्रिये हे विकार होत. *पुरुष* हा साङ्ख्यकारिकेप्रमाणे *साक्षी, केवल, मध्यस्थ, द्रष्टा व अकर्तृक* असा आहे. ज्ञाताही तोच आहे.

पुरुषाचे अनेकत्व *साङ्ख्य* मान्य करतात. विश्वात एकूण साठ पदार्थ असल्याचे *साङ्ख्य* त्यांच्या विश्लेषणात्मक पद्धतीने स्पष्ट करतात. प्रकृतीची साङ्ख्यांनुसार होणारी उत्क्रांती वा सर्ग आपण या ग्रंथात नंतर लो.टिळकानी त्यांच्या ***गीतारहस्य*** या ग्रंथी निर्देशिलेली *ब्रह्मांडाचा वंशवृक्ष* ही संकल्पना अभ्यासतांना पाहणारच आहोत. याबाबत तेवढाच निर्देश सांप्रत पुरे.

बंध व मोक्ष खरे तर नसतातच, असे *साङ्ख्य* म्हणतात. पुरुषास तथाकथित बंध अज्ञानामुळे भासतो. ज्ञानामुळे त्याचा मोक्ष होतो. *जीवन्मुक्ती* व *विदेहमुक्ती* दोन्ही *साङ्ख्य* मानतात. *साङ्ख्य तत्त्वज्ञान प्रत्यक्ष, अनुमान आणि शब्द किंवा आप्तवाक्य* या प्रमाणांवर अवलंबून आहे. असो. *कपिल, आसुरी, वाचस्पतिमिश्र, गौडपाद, विज्ञानभिक्षू, पतञ्जली, अनिरुद्ध, चरक, सनक, सनंद, ईश्वरकृष्ण* इ.प्रमुख साङ्ख्य होते.

न्यायदर्शन (तर्कशास्त्र)

न्यायदर्शन हे तत्त्वज्ञानापेक्षा तत्त्वज्ञानाच्या प्रमाणांचे शास्त्र आहे, असे म्हणणे अधिक उचित वाटते. हे निखळ आध्यात्मिक तर्कशास्त्र आहे. *साङ्ख्य व योग* या जोडगोळीप्रमाणेच *न्याय व वैशेषिक* ही भारतीय दर्शनांची जोडी प्रसिद्ध आहे. *वैशेषिकदर्शन* बौद्ध मतास जवळचे आहे. इतके की ज्ञानेश अक्षरगणेशाच्या सहा हातातील एकात याचे ***"बौद्धमतसंकेतु। वार्तिकांचां"*** अशा खंडित दंताच्या स्वरूपात वैशेषिकदर्शनाचा शाखाचंद्रन्यायाने निर्देश करतात. तसेच ***"तर्कु तोचि परशु"*** असे दुसऱ्या हातात धारण केलेल्या न्यायदर्शनाचा उल्लेख त्यांनी त्याच *अक्षरगणेश*रूपकात केलेला आहे. असो.

वेदांचे प्रमाणित अर्थ सिद्ध करण्याच्या मीमांसकांच्या खटपटीतून न्यायाचा उदय आणि विकास झाला. बौद्धादी अवैदिक मते परास्त करण्यासाठी त्याचा विस्तार होऊन त्यात साक्षेपी परिभाषेची भर पडली व ज्यास *नव्यन्याय* म्हणतात, ते प्रगत शास्त्र पुढे आले.

न्यायास वैशेषिकांचा *सद्वस्तुविचार* मान्य आहे. त्यांचा *आरंभवाद* ही प्रसिद्ध आहे. न्यायास आधार व पुरावा यांचे फार महत्त्व वाटते. *अक्षपाद* किंवा *गौतम* हा या दर्शनाचा आद्य प्रणेता होय. *नव्यन्याय* हा *श्री. गंगेश उपाध्याय* यांनी तेराव्या शतकात प्रसृत केला.

न्याय हे दर्शन *तर्कनिष्ठ वास्तववादी* आहे. *ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय* या त्रिपुटीवर न्यायाची उभारणी आहे. अभिभव व स्मृती या दोन मार्गांनी ज्ञान होते. बाह्यजगाचे, त्यातील वस्तू, विषय व घटना यांचे अस्तित्व न्याय सत्य मानते. न्यायास चार प्रमाणे मान्य आहेत. ती म्हणजे *१) प्रत्यक्ष, २) अनुमान, ३) उपमान व ४) शब्द.* यांच्याद्वारे यथार्थ ज्ञान प्राप्त होते.

स्मृती, संशय, तर्क व विपर्यय यांमुळे अयथार्थ ज्ञान होते. नैय्यायिक सोळा पदार्थांच्या किंवा विषयांच्या यथार्थ ज्ञानाने मोक्षाची प्राप्ती होते, असे मानतात. ते असेः *१) प्रमाण, २) प्रमेय, ३) संशय, ४) प्रयोजन, ५) दृष्टांत, ६) सिद्धांत, ७) अवयव, ८) तर्क, ९) निर्णय, १०) वाद, ११) जल्प, १२) वितंडा, १३) हेत्वाभास, १४) च्छल, १५) जाति व १६) निग्रहस्थान-मिथ्याज्ञान, दोष, प्रवृत्ती व जन्म आणि दुःख यांचे निराकरण होय.*

योगज प्रत्यक्ष प्रमाण अलौकिक व अतींद्रिय असले, तरी न्यायास मान्य आहे. प्रत्यक्षाचे ते *सविकल्पक* व *निर्विकल्पक* असेही भेद करतात. अनुमानाचेही *स्वार्थानुमान* म्हणजे स्वतःस पटणारे व *परार्थानुमान* म्हणजे तर्कदृष्ट्या इतरांसही पटवता येणारे असे भेद त्यांनी केले आहेत.

दोन घटनांचा एकमेकांशी नित्य असणारा संबंध म्हणजे *व्याप्ति.* हा दोन रीतीने सिद्ध केला जातोः *१) अन्वय* व *२) व्यतिरेक.* धूम व अग्नी, पर्जन्य व मेघ यांचा संबंध अन्वयाचे उदाहरण होय. जेथे धूम, तेथे अग्नी! जेथे पर्जन्य तेथे मेघ! असे हे प्रमाण आहे. हेतू व साध्य किंवा दोन घटना यांत नेहमीच सहभाव असतोच असे नाही. तापलेला लालभडक लोहगोल हा अग्नीचे साहचर्य दाखवतो, पण तेथे धूम मात्र नाही. या विचारपद्धतीस *व्यतिरेक* म्हणतात.

शब्दांचे अर्थ ईश्वरेच्छेने ठरलेले असतात, असे नैय्यायिक मानतात. शब्दार्थाबाबत त्यांचा *स्फोटवाद* प्रसिद्ध आहे. वेदवचनांचे शब्दप्रामाण्य ते मानतात. वेदांसच मूळ *शब्दब्रह्म* असे म्हणत असत. नंतर स्मृती इ.चाही शब्दब्रह्मात समावेश होऊ लागला.

(**टीपःशब्दब्रह्म**-योगिजनांच्या मते जेथपावेतो विचार पोहोचतो, जेथे नाद-बिंदु-कला-ज्योतीचा प्रांत आहे, ते शब्दब्रह्म होय. अकार, उकार व मकार एकवटले, ***"तेथ शब्दब्रह्म कवळले; ते मियां श्रीगुरुकृपा। नमिलें आदिबीज।।१-२०।।"*** असे ज्ञानेशांनी म्हटलेले आपणास ठाऊकच आहे.)

न्याय तसेच *वैशेषिक* मते *आत्मा* हे एक द्रव्य आहे. *जाणीव* ही आत्म्याहून भिन्न व वेगळी असते. शरीर व आत्मा हे परस्पर अतिभिन्न आहेत. आत्मा हा ज्ञानेंद्रियांशी एकरूप नसतो. तो सर्वेंद्रियसमन्वायक आहे. तो नित्य, विभु व अविनाशी आहे, तसाच अविकारीही आहे. तो शरीराबरोबर नष्ट होत नाही.

आत्माच द्रष्टा व उपभोक्ता आहे. तो निरवयव आहे. तो कशाशीही युत नाही. प्रत्येकास वेगळा आत्मा असतो. त्यास जीवात्मा असे म्हटले आहे. *कर्मसिद्धांत* नैय्यायिकांस मान्य आहे. जीवास जन्ममृत्युचक्र आहे. आत्म्याचे ज्ञान होण्याचे दोन मार्ग आहेतः

१) *अहंप्रत्यय* म्हणजे स्वयंप्रकाशी स्वात्म्याची जाणीव होणे व २) *अनुमान* - याने इतरांठायी असणारा आत्मा जाणणे.

ज्ञान होणे, चैतन्य असणे, जाणीव होणे हे आत्म्याचे गुण नाहीत. साङ्ख्य व वेदांतात आत्म्यास चैतन्यरूप मानलेले आहे. पण न्याय तसे मानत नाही, तर आत्मा हे एक चैतन्यक्षम किंवा ज्ञानक्षम द्रव्य आहे, असे मानतात. त्यांचे हे मत जैनादींच्या आत्म्याविषयीच्या मतासारखेच आहे. आत्मा चिद्रूप नाही, त्यास शरीरसंबंधाने ज्ञान होते, अन्यथा नाही, असे नैय्यायिक-वैशेषिकांचा सिद्धांत सांगतो.

न्याय ईश्वरास कर्ता, धर्ता, संहारक, जगाचे निमित्तकारण असल्याचे मानतो. नैय्यायिक ईश्वरास जगाचे उपादानकारण *(निर्मितीचे कारण)* मानत नाहीत. ते वास्तववादी व द्वैती आहेत. ईश्वर हा परमआत्मा आहे. त्याच्या ज्ञान, इच्छा, संकल्प इत्यादी अपरिमित शक्ती वा गुण आहेत.

न्यायशास्त्रास मोक्ष मान्य आहे. ती सुखदुःखातीत अवस्था आहे; पुनर्जन्म नसणे अशी निःश्रेयस स्थिती आहे. तत्त्वज्ञानाने मिथ्याज्ञान नाश पावते, दोष दूर होतात, प्रवृत्ती नष्ट होते व पुनर्जन्म येत नाही. असा दुःखनाश हाच मोक्ष असे नैय्यायिक मानतात. असो.

वैशेषिकदर्शन (सद्वस्तुशास्त्र)

नैय्यायिकांचे खरे तत्त्वज्ञान हे *वैशेषिकदर्शन*च समजले जाते, इतका न्याय व वैशेषिकदर्शनांचा घनिष्ट व अविभाज्य संबंध आहे. **कणाद**ाने या वैशेषिकदर्शनाची उभारणी केली. बौद्धमतास हे दर्शन अति जवळचे आहे, असे विद्वान मानतात. न्यायाची ज्ञान व प्रमाण ही शास्त्रे वैशेषिकांस मान्य आहेत. पण त्यांचा भर सद्वस्तुमीमांसा *(चिद्वाद)* व सत्ताशास्त्रावर जास्त आहे. त्यामुळे विश्वोत्पत्ती, विश्वरचना, विश्वाचे आदी *(Cosmology and Cosmogony)* इ. विषयांवर त्यांनी आपले विशिष्ट असे सिद्धांत मांडलेले आहेत.

कणाद हा या शास्त्राचा आद्यप्रवर्तक. त्यास *उलूक* असेही नांव होते. म्हणून वैशेषिकास *औलूक्यदर्शन* असेही म्हणतात. यास परमाणुप्रधान अनेकत्ववाद वा बहुत्ववाद असे पण म्हणतात. कारण विश्वाच्या मूळ संरचनेत परमाणूंचा मोठा सहभाग आहे, असे हे शास्त्र प्रतिपादिते. वैशेषिकदर्शनास*मायावाद* पूर्णतः अमान्य आहे. वैज्ञानिकवास्तववादाच्या जवळ येणारे हे पहिलेच भारतीय दर्शन होय.

ते श्रुतिप्रामाण्यावर अवास्तव भर देत नाही, तर विश्वातील वस्तू व घटना यांचे परीक्षण व निरीक्षण करून बुद्धी व तर्क यांच्याद्वारे त्यांचा अर्थ लावून आपले सिद्धांत मांडते. ही पद्धत जवळजवळ आधुनिक वैज्ञानिक सैद्धांतिक वापरतात, तशीच दिसते.

विशेष म्हणजे प्रत्येक वस्तूचे अन्य पदार्थांपासून असणारे भिन्नत्व किंवा वेगळेपणा *(Individuality)*. *वैशेषिक* हे संबोधन त्यांच्या या कल्पनेमुळेच प्रचारात आले. ते *सप्त पदार्थ* मानतात व विश्व त्यांचे मिळून झालेले आहे, प्रत्येक द्रव्य *(पदार्थ)* स्वतंत्र व स्वयंभू आणि परस्परविभिन्न आहे, असा त्यांचा सिद्धांत आहे. ती सप्त द्रव्ये अशी आहेतः *१)महाभूते, २) दिक्, ३) काल, ४) मन, ५) आत्मा, ६) प्रत्येक द्रव्याचे अणू व परमाणू व ७) द्रव्ये.*

द्रव्ये ९ प्रकारची आहेत. पृथिव्यादी पंचमहाभूते आहेत. ही द्रव्ये व महाभूते परमाणूंची बनलेली आहेत. *परमाणू* अत्यंत सूक्ष्म व न दिसणारे-अतींद्रिय असतात. ते अविभाज्य, निरवयव व अविनाशी असतात. ते शाश्वत असतात. ते नष्ट होत नाहीत.

द्रव्य या संज्ञेने वैशेषिक जी ९ द्रव्ये सांगतात, ती व सप्त द्रव्ये वेगळी नाहीत. कारण *पाच महाभूते, काल, मन, दिक् व आत्मा* ही नऊ द्रव्ये आहेत. मनास ते *अंतरींद्रिय* म्हणतात. बाह्य जगाशी त्याचा संबंध येऊन, सुख, दुःखादी ज्ञान करून देणारे ते मन. गुणांची अभिव्यक्ती पदार्थांद्वारे होते. असे गुण *चोवीस* आहेत.

आत्मा हे नित्य व विभु असे द्रव्य मानले आहे. त्याचे गुण असे - *ज्ञान, इच्छा, द्वेष, निश्चय, सुख, धर्म व अधर्म.* भौतिक वा जड पदार्थांत हे गुण नसतात. अजड वा चिद्रूप पदार्थ तो आत्मा! त्याची उत्पत्ती होत नाही. त्यास विनाश नसतो. तो सर्वव्यापी आहे. तो शरीराद्वारे व्यक्त होतो.

प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र वेगवेगळा आत्मा असतो-हाच जीवात्मा! जीवात्म्याचे अनेकत्व हा विशेषत्वाचाच एक भाग होय!! *कर्म* म्हणजे क्रियाशीलता, चलनवलन, हालचाल. *कर्म* हा द्रव्याचा आश्रित असा विशेष गुण आहे. विशेष गुण म्हणजे सामान्य गुणाच्या विरोधी किंवा भिन्न, असा अर्थ केला जातो. *समवाय* म्हणजे अनन्यसाधारण संबंध. दोन वस्तू, पदार्थ, द्रव्ये, घटना इ.तील असा संबंध म्हणजे *समवाय.*

कणाद ईश्वरास मानतो की नाही, हा एक वादाचा मुद्दा आहे. पण त्याचे सर्व भाष्यकार त्यास ईश्वराची संकल्पना मान्य होती असे समजून भाष्ये करतात. तदनुसार वैशेषिकांचा ***ईश्वर*** *सर्वज्ञ, नित्य, पूर्ण, सर्वांचा स्वामी, जीवात्म्यांना त्यांच्या कर्मांची फळे देणारा, सर्वशक्तिमान पण नीतिनियमांने जगद्व्यापार चालविणारा, वेदांचा उक्ता* असा आहे.

तो परमाणूंना गती देतो व ते एखाद्या चेंडूसारखे गोलगोल फिरत राहतात. त्यांचे परस्परांशी संयोग होऊन अनेक वस्तू आकारास येतात. ईश्वर जगाचा कर्ता असला तरी जगाची सामग्री असणारी महाभूते, त्यांचे परमाणू व जीवात्मे हे अनादी आहेत. त्यांचे अनादी कालापासून ईश्वराशी सहअस्तित्व आहे. *परमाणू* जगाचे उपादान *(निर्मिती)* कारण आहेत, तर *ईश्वर* हे *निमित्तकारण* आहे.

ईश्वर जगद्व्यापाराचा प्रवर्तक असूनही त्या वेगळा अलिप्त राहतो. तो स्वेच्छेने जग निर्मितो व त्याचा लय करतो. अदृष्टातून दृष्टोत्पत्ती, स्थिती व पुनः अदृष्टात लय ही त्याची सृष्टीचा सर्ग-स्थिती व लयात्मक कार्ये होत. सर्व जीवांना विश्रांती द्यावी म्हणून ईश्वर सृष्टीचा लय करतो.

वैशेषिकांची मुक्तीची एक विशेष कल्पना आहे. बंधनाचे कारण अज्ञान व ज्ञानाने मोक्षप्राप्ती अशा संकल्पना त्यांना मान्य आहेत. जीवात्मा अज्ञानामुळे कर्म करत राहतो व बद्ध होऊन राहतो. कर्मे करण्याचे थांबवले की संचित तयार होत नाही व कुंभाराच्या चाकाला कोणी गती देत नसले की ते जसे हळूहळू संथ गतीने चालतचालत स्तब्ध होते, तशी कर्माची परमाणूंना गती देण्याची शक्ती कर्मे थांबवल्याने नष्ट होऊन कर्मचक्र बंद पडते. त्याबरोबरच जन्ममृत्युचक्र संपते.

जीवात्मा शरीर व मन यांपासून सुटा होतो व त्याला शुद्ध स्वरूपसाक्षात्कार घडतो. हाच *मोक्ष* होय. त्यात दुःखांचा पूर्ण निरास होतो; जीवात्मा द्रव्याच्या स्थितीत राहतो; ज्ञान-सुख-दुःख व इतर कसले पण अनुभव येत नाहीत. मोक्षावस्थेत याबरोबरच चैतन्याचा लोप होऊन आत्मा जणू जड, संवेदनाहीन, निर्जीव, निर्गुण, निर्विकल्पक, सुखदुःखादिरहित असा होऊन राहतो. तो अचेतन होतो; काष्ठवत वा पाषाणवत होतो. ही मोक्षकल्पना अनाकर्षक आहे. तो आत्मा पुनः शरीरी होऊ शकतो. कारण सुप्त रूपात तेवढी शक्ती त्या आत्म्याजवळ वसते. असो.

वैशेषिकांच्या धर्मादी आचरणकल्पना समाजाच्या नीतीनियमांस अनुसरणाऱ्या आहेत. वर्णाश्रमधर्म त्यांना मान्य आहे. परंतु मोक्षासाठी सर्व कर्मे धर्म्यकर्मांसह सोडलीच पाहिजेत, असे ते म्हणतात. ईश्वराचे अस्तित्व ही त्यांच्या विचारप्रणालीतील एक तर्काद्वारे सहज न उलगडणारी गोष्ट असून अनेक प्रश्न उपस्थित करते. हा या तत्त्वज्ञानाचा मोठा दोष समजला पाहिजे. असो. वेदांचे अपौरुषेयत्वही त्यांना मान्य नाही. ही मतभिन्नताही लक्षणीय आहे.

वैशेषिकांनी *दिक्* व *काल* ही दोन द्रव्ये ज्या प्रकारे सांगितली आहेत, तो आधुनिक वैज्ञानिक विचारांच्या जवळ येणारा आहे. *दिक्*ने नेहमीच्या दिशांपेक्षा *रौद्री* नामक एक अधिक अकरावी दिशा सांगितली जाते. घटना कालात घडतात, तशा *दिक्* मध्येही घडतात. दिशा या सापेक्ष आहेत. *काल* जसा नित्य, अनंत, सर्वव्यापी व एक आहे, तशीच *दिक्* ही आहे.

काल व *दिक्* यांचे अनेक प्रकारे सादृशत्व आहे. कालातील संबंध स्थिर व न बदलणारे असतात, तर *दिक्* संबंध बदलणारे असतात. *दिक्* हे व *काल* हे आकाशाप्रमाणे भूतद्रव्य नाही. पदार्थ आकाशात असतात. आकाश हे जडद्रव्य आहे, तर *दिक्* हे मनाशी संबंधित आहे. *काल* हा अदृश्य व असंवेद्य आहे. कालाचे विभाग मनामुळे घडतात. खरे तर *काल* अविभाज्य आहे, त्यात मागे, आधी, नंतर असे भाग नाहीत. *काल व दिक्* या मनाने अनुभवण्याच्या वस्तू आहेत.

आईन्स्टाईनने जशी अवकाशाबरोबर *(Space)* विश्वाला *काल (Time)* ही मिती प्रदान केली, तशाच वैशेषिकांनी आकाशास *दिक्* व *काल* या मिती दिल्या. अवकाश *(Space)* व काल *(Time)* यांचा प्रकाशगतीशी संबंध आहे, या अर्थी आईन्स्टाईन जेव्हा प्रकाशगतीशी संबंधित असा आपला सापेक्षतावादाचा सिद्धांत *(Theory of Relativity)* मांडतो, तेव्हा तो ही *दिक्* व *काल* या पदार्थांची गृहीतके अनाहूतपणे, अकल्पितरीत्या, सुप्त आध्यात्मिक चेतनेच्या आविष्कारामुळे आपसुकच विचारात घेतो, असे आपण म्हणू शकतो.

वैशेषिकांप्रमाणेच *जैन* तत्त्वज्ञानीही परमाणू *(अणू)*, काल व दिक् ही तत्त्वे मानतात. त्यांच्या या संज्ञांच्या अर्थात वैशेषिकांपेक्षा थोडी फार भिन्नता आहे. जैन तत्त्वज्ञांची एवूꣳणच मते वैशेषिकदर्शनमतांबरोबर अभ्यासण्यासारखी आहेत. *दिक्* व *काल* ही एकमेकांसापेक्ष आहेत आणि एकाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व असू शकत नाही, ही कल्पना आईन्स्टाईनच्या Space and Time या संकल्पनांशी मिळतीजुळती असल्याचे दिसते, हे नमूद करण्यासारखे आहे.

आईन्स्टाईनने पदार्थ *(Matter)* व ऊर्जा *(Energy)* यातील सीमारेषा उखडून विश्वाचे मूलद्रव्य काही वेगळेच असावे, असाही संकेत दिला आहे. त्याच्यानंतरचे आधुनिक भौतिकशास्त्र त्या अनुरोधाने Leptons व Quarks या मूल वैश्विक कणांकडे निर्देश करते आहे, तर String Theory सारखे नवनवीन सिद्धांत विश्वास मूलभूत अशा Strings कडे व त्यांच्या अनेक संरचनांकडे विश्वाचे आद्यकण म्हणून पाहू लागले आहे. *वैशेषिक आणि जैन तत्त्वज्ञ भौतिक विश्वाचे मूलकण म्हणून ज्या परमाणूंचा निर्देश करतात, तिकडेच नाही का ही आधुनिक विज्ञानाची वाटचाल होत आहे!*

वैज्ञानिक अद्यापही जैविक विश्वाचा *(Bio-Universe)* मूलगामी विचार करू शकलेले नाहीत. पण प्रगत प्रागैतिहासिक भारतीय दर्शन ***चित्*** या मूलतत्त्वाचा निर्देश करून जाणीव, जीव, मन, त्यांचा शरीराशी व विश्वातील पदार्थांशी संबंध इ.प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करते. *विशेष म्हणजे त्यात वैशेषिकांनी मन व आत्मा ही चित्संबंधित द्रव्ये प्रतिपादिली व हा प्रश्न सोडवण्यास चालना दिली, हे त्यांचे कर्तृत्व नक्कीच प्रशंसनीय आहे.* इत्यलम्!

आईन्स्टाईन व आधुनिक भौतिकशास्त्रज्ञ गेल्या शतकापासून निव्वळ भौतिक विश्वाच्या सर्व गुणधर्मांचा उगडा करता येईल अशा ज्या Unified Field Theoryच्या मागे लागले आहेत व जी त्यांना अद्यापही गवसली नाही, एवं च काय की आता त्यांना असेही वाटू लागले आहे की अशी Theory असेलही, पण ती नक्कीच सध्याच्या मानवी बुद्धीच्या मर्यादेपलीकडील व आकलनाबाहेरची असावी! याबाबत दि.१४ जून २०१० च्या Times of India मध्ये पंधराव्या पानावर पुनरुधृत केलेल्या Jonathan Leake यांच्या "Our Brain Incapable of Cracking Mysteries of The Universe" या Articleची जिज्ञासूंनी जरूर नोंद घ्यावी.

Lord Rees,President, Royal Society, London, यांच्या म्हणण्याप्रमाणे मानवी बुद्धिमत्तेच्या नैसर्गिक मर्यादा लक्षात घेता समांतर विश्व, Big Bang होण्यामागचे कारण, The Nature of Human Consciousness इ.अनेक आधुनिक वैज्ञानिक कोड्यांचा उलगडा मानवास कधीतरी का होईना, होईल, अशी आशा करणे व्यर्थ आहे. एखाद्या जलचराच्या बुद्धीस जेवढे समुद्राचे ज्ञान होऊ शकेल, त्याहीपेक्षा मानवी बुद्धी विश्वाची ही गहन कोडी उलगडण्यास थिटी आहे.

पण अशा या बहुचर्चित आणि बहुवांछित Unified Field Theory चा, Life Force, Consciousness यांचासुद्धा उलगडा करणारा हा असा वैशेषिकी अवतार सहस्त्रो वर्षांपूर्वी भारतीय तत्त्वज्ञानाने प्रतिपादिला, हे किती स्पृहणीय आहे व त्या विचारवंतांनी आधुनिक विज्ञानाची उपकरणे वा विचार यांची कोणतीही मदत न घेता स्वतंत्रपणे केवढी बौद्धिक झेप घेतली होती, ते पाहून आपण अचंबित होतो!!

पूर्वमीमांसा

पूर्वमीमांसा व *उत्तरमीमांसा* वा *वेदांत,* ही एका दृष्टीने जोडशास्त्रे समजली जातात. खरे तर पूर्वमीमांसकांस वेद सोडले तर इतर नंतरच्या शास्त्रांचे आणि वेदवाङ्मयाचे काहीच कौतुक नाही. वेदप्रामाण्य हे एकच एक त्यांना मान्य आहे. वेदातील कर्मकांड, अर्थ, काम व स्वर्ग, तदनुषंगिक धर्म, यज्ञयाग, देवदेवतार्चन-यजन-याजन- पूजन -स्तुती-स्तोत्रे-मंत्र, विधी यांचीच चर्चा खरे तर *पूर्वमीमांसा* करते.

चिद्वादी भाग पूर्वमीमांसेत नंतर आला. त्यातही विश्वोत्पत्ती, रचना, विश्वकार्य, ईश्वर, मूलतत्त्वे इ.विषयीच्या मीमांसकांच्या कल्पना साङ्ख्य, न्याय व वैशेषिक इ.मतांतून घेतलेल्या आहेत, असे विद्वानांचे मत आहे. *कुमारिलभट्ट, प्रभाकर, जैमिनी* इ.मीमांसकांच्या मतांतही तशी एकवाक्यता नाही.

मीमांसक तसे वास्तववादीच आहेत. ते ज्ञानास स्वयंप्रकाशी समजतात. त्यांना सहा प्रमाणे मान्य आहेत. ती अशीः *१) प्रत्यक्ष, २) अनुमान, ३) शब्द, ४) उपमान, ५) अर्थापत्ती व ६) अनुपलब्धी.*

प्रत्यक्ष प्रमाणातही *सविकल्पक व निर्विकल्पक योगज* हे भेद ते करतात. शब्दाचे *पौरुषेय* व *अपौरुषेय* प्रकार आहेत. वेद हे अपौरुषेय, सार्वभौम, अतींद्रिय व अभौतिक असे *शब्दप्रामाण्य* आहे. मीमांसकांनी शब्द व वाक्य यांचा अर्थ करण्यासाठी स्वतंत्र शास्त्र वापरले आहे. कारण त्यांच्यात शब्दप्रामाण्याइतके महत्त्व कशासही नाही.

मीमांसक आत्म्याचे अस्तित्व मानतात. तो खरा ज्ञाता, भोक्ता व कर्ता असून ज्ञानाचा आश्रय आहे; नित्य, सर्वगत, व्यापक, विभु व द्रव्यरूप आहे; शरीरेंद्रिये, मन बुद्ध्यादींपेक्षा तो भिन्न आहे; *संविद* किंवा *जाणीव* ही आत्म्याचे स्वरूप नाही; तो पूर्णपणे चिद्रूप नाही; शरीरेंद्रियसंघाताचे संचलन व नियंत्रण आत्मा करतो. तो स्थिर व अविकारी आहे.

आत्मा स्वसंवेद्य आहे; इच्छा, सुख-दु:खे, प्रयत्न व ज्ञान यांचे अधिष्ठान तोच आहे. तो ***"नेति, नेति"*** असा आहे. आत्मा दिसू शकत नाही. आत्म्याचे अनेकत्व मीमांसक मानतात. जीवात्मे तेवढे आत्मे व तेवढी शरीरे व विदेही मुक्तात्मे असतात; असंख्य परमाणू व द्रव्ये असतात; स्वर्ग-नरक असतात; मोक्षावस्था असते; असे ते मानतात.

मीमांसकांस *कर्मसिद्धांत* व *भ्रमज्ञान* मान्य आहे. सगळे विश्व नित्य, अक्षय व अविनाशी असून सतत तसेच कार्य करत राहते; त्याची कोणी निर्मिती केली नाही व त्याचा लयही कधी होणार नाही; असे त्यांचे मत आहे.काही मीमांसक ईश्वरास मानतात, तर पूर्वसूरींचे मीमांसक ईश्वराचे अस्तित्व मानत नाहीत.

धर्म हा अतींद्रिय आहे. धर्म व मोक्ष यांची वचने वेद सांगतात आणि मनुष्यास कोणते कर्म आचरावे, ते आज्ञापितात. त्या वेदाज्ञा शिरोधार्य आहेत व वेदोक्त असेच प्रत्येक मनुष्याचे वर्तन असले पाहिजे, असा मीमांसकांचा अट्टाहास आहे.

यज्ञकर्म हे वेदोक्त कर्म अत्यंत महत्त्वाचे आहे. पश्वादी हिंसात्मक यज्ञ वेदोक्त आहेत की नाहीत; स्त्रियांना वेदांचा व यज्ञाचा अधिकार आहे की नाही; कर्मे वेदाज्ञा म्हणून करावयाची की स्वर्गप्राप्ती व सुखासाठी करावयाची; अंतिम ध्येय मोक्ष आहे की नाही; अशा महत्त्वाच्या विषयांवर मीमांसकात मतभिन्नता आहे.

मोक्ष ही कल्पनासुद्धा मीमांसेत नंतरची आहे. मोक्षाचा विचारही न करता मनुष्याने निरुपाधिकरीत्या धर्म आचरावा; आचरणाने काय साध्य प्राप्त होते, याचा त्याने विचारही करू नये, असे एकांतिक मत पूर्वमीमांसकांचे होते. *उत्तरकाली त्यांनी मोक्ष हे धर्माचे अंतिम ध्येय समजले व आत्मज्ञानाने मोक्ष होतो, असे मानले.* देवता मंत्रात्मक असतात व त्यांना आहुती दिल्याशिवाय यज्ञ व कर्म सांग सफल होत नाही, इतके देवतामाहात्म्य ते मानतात. असो.

जीवन जगण्याची एक वैदिक विचारसरणी असे खरे म्हणावे तर पूर्वमीमांसेचे स्वरूप आहे; त्यात तत्त्वविचाराचा विशेष भाग नाही. उपनिषदादी वाङ्मय वेद-ब्राह्मणोत्तरकालीन आहे व *उत्तरमीमांसा* वा *वेदांत* हाही नंतरच्या तत्त्वज्ञानाचा भाग आहे. त्यातही पूर्वमीमांसेच्या विषयांची चर्चा असून *आत्मानात्मविवेक* हे वेदांताचे वैशिष्ट्य आहे. द्वैताद्वैतवादांनिमित्त तो भाग आपण अगोदरच पाहिला आहे.

नास्तिक दर्शने::::

अवैदिक मते

आतापर्यंत आपण वेदांना मान्यता देणारी वैदिक तत्त्वज्ञाने आणि दर्शने पाहिलीत. पण जैन-बौद्धादी भारतीय तत्त्वज्ञाने वेदांना मानत नाहीत. तरीही त्यांचा पण स्वल्प परिचय करून घेणे आपल्यास

एकूणच हा सर्व तत्त्वज्ञानाचा आणि ज्ञानदेवांच्या विचारांचा मागोवा घेण्यास व आकलन होण्यासाठी उपयुक्त आहे. म्हणून आता जैनमत व बौद्धमत या दोन अवैदिक नास्तिक मतांना थोडा स्पर्श करून पुढील विवेचनाकडे वळू या. म्हणजे ***तत्त्वज्ञान*** या विषयाची तोंडओळख बरीचशी पूर्ण होईल. असो.

जैनमत::::

इतिहास

जैनधर्म वैदिक आणि बौद्ध धर्माच्या आधीचा की नंतरचा याबाबत विद्वानांत मतभेद आहेत. ***महावीर*** व ***बुद्ध*** हे साधारणपणे एकाच शतकातील होते, असे मानले तर जैन धर्म हा बौद्धधर्माहून पुरातन आहे, असे दिसते. कारण गौतमबुद्ध हे बौद्धधर्माचा संस्थापक आहेत, हे निर्विवादच आहे आणि जैनधर्म महावीरांच्या पूर्वीच्या २३ *(किंवा ६)* तीर्थंकरांपासून चालत आलेला आहे.

ऋषभनाथ हे त्यांचे आद्य तीर्थंकर समजले जातात. *ऋषभदेव* हे विष्णूच्या २४ अवतारांपैकी एक अवतारही होत. *वर्धमान महावीर* हे जैनांचे शेवटचे म्हणजे चोवीसावे तीर्थंकर होत. दिगंबर जैन महावीरांना सहावे तीर्थंकर मानतात व भद्रबाहूंना आठवे व शेवटचे तीर्थंकर म्हणून मान्यता देतात. जैनांचे ***श्वेतांबर*** व ***दिगंबर*** हे दोन संप्रदाय सुप्रसिद्धच आहेत. जैन तत्त्वज्ञानग्रंथ बहुशः अर्धमागधी व काही जुने ग्रंथ संस्कृत या भाषांमध्ये आहेत.

यमनियम

जैनधर्म हा यमनियमांनी बांधलेल्या आचारविचारांवर फार भर देतो. *सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्यव्रतपालन, क्षुधा-तृषाविषयक तितिक्षा, मलमूत्रनिक्षेप* इ.बाबत त्यांचे या संदर्भात अत्यंत कडक नियम आहेत. दिगंबरपंथीय तर अपरिग्रहाचे कडोविकडीचे माहात्म्य मानतात. म्हणून लज्जारक्षणार्थसुद्धा ते वस्त्राचाही परिग्रह करत नाहीत.

दिगंबर असल्याशिवाय मोक्षप्राप्ती होणार नाही, असे त्यांचे मत आहे. स्त्रियांना नैसर्गिक लज्जेमुळे दिगंबर राहणे शक्य नसते. म्हणून त्यांना या जन्मी मोक्ष नाही, असे ते मानतात. आचारविचारभेदांनुसार या दोन श्वेतांबर व दिगंबर नामक उपपंथांचे मतभिन्नतेनुरूप वेगवेगळ्या नावांचे *८४ गच्छ वा उपपंथ* जैनांत झाले आहेत. असो.

दिगंबर मते जैनांचे मूळ प्रमाणग्रंथ लुप्त झाले आहेत. श्वेतांबरांजवळ जे ग्रंथ आहेत, ते मूळचे नाहीत, असे त्यांचे मत आहे. तरीही जे ग्रंथ श्वेतांबर प्रमाण मानतात, ते आणि मौखिक परंपरा यातून जैन तत्त्वज्ञानाचा विचार करून मान्यवर विद्वान आपली याविषयीची मते बनवतांना दिसतात. त्यांचाच गोषवारा आपण घेत आहोत.

वास्तववादी तत्त्वज्ञान

जैन तत्त्वज्ञान वास्तववादी आहे. Pluralistic Realism अथवा *अनेकांतात्मक वास्तववाद* असा त्यांचा विश्व व त्याच्या व्यापाराविषयी दृष्टिकोन आहे. *स्यादवाद* हा या वास्तववादाच्या मुळाशी असणारा जैनांचा सिद्धांत आहे. तो आपण मागेच पाहिला आहे.रंग बदलणाऱ्या सरड्याच्या औपनिषदिक कथेशी या स्यादवादाचे थोडे सारूप्य आहे, असे आपणास सहजच गमते.

अनेकांतवाद म्हणजे सत्तेला अनेक पैलू आहेत, ती विविध प्रकारे दिसते, भासते व असते आणि हे विविध पैलू वास्तवच होत; त्यांत विरोधाभास असला तरी तोही सत्तेचाच अंगीभूत गुण होय. जैनमते सत्तेला अनंत गुणधर्म आहेत आणि ती वेगवेगळ्या स्थलकालसंदर्भानुसार वेगवेगळ्या व्यक्तींस वेगवेगळ्या स्वरूपाची आहे, असे जाणवते. एकाच वेळी एकाच व्यक्तीस सत्तेचे हे अनेकानेक धर्म प्रतीत होणे निव्वळ अशक्य आहे. तसे झाले तर ती व्यक्ती सर्वज्ञानीच होईल ! सत्तेप्रमाणे वस्तूसुद्धा अनेकधर्मात्मक असतात.

जैनमते सत्तेत परिवर्तनीयता व अपरिवर्तनीयता, शाश्वतता व अशाश्वतता, भेद व अभेद, अनेकत्व व एकत्व, नित्यता व लय आणि उत्पत्ती, सांतत्व व अनंतत्व इ.अनेक परस्परविरोधी दिसणारे गुण एकसमयावच्छेदेकरून एकत्र नांदतात. *सत्ता* हीच सर्वश्रेष्ठ असून तीच सार्वभौम सर्वंकष आहे; ईश्वर म्हणून तिचा कोणी चालक-मालक वा नियंता नाही.

विश्व *जीव* व *अजीव (चेतन व जड)* अशा दोन अंतिम तत्त्वात विभागलेले आहे; ही दोन तत्त्वे परस्परांपासून पृथक व स्वतंत्र असून त्यांचे सहअस्तित्व असते; *जीव* हा भोक्ता व *अजीव* हे भोग्य विषय असतात; जीवास जाणीव, बोध किंवा ज्ञान असते, जे अजीवांस नसते; रूपात्म अजीवास *पुद्गल* अशीही संज्ञा आहे व त्यांच्याठायी अचेतनत्व व रूपादी गुण असतात; जीवास अस्तित्व, अमूर्तत्व, असंख्येयत्व, कर्तृत्व, भोक्तृत्व, ज्ञातृत्व, द्रष्टुत्व व चेतनत्व असे सामान्य गुण असतात; *पुद्गल* हा *रूपात्म* अजीव, तर *अरूपात्म* अजीवात *दिक्, काल, धर्म व अधर्म* यांची गणना केली जाते, अशी ही जैनांची तत्त्वे होत.

वैशेषिकांप्रमाणेच जैनांनीही *परमाणुवाद,* ज्यास ते *अणुवाद* असे म्हणतात, तो मान्य केला आहे. विश्वाचे व पुद्गलाचे अंतिम सूक्ष्मतम घटक अणू होत आणि त्यांच्या विविध संयोगापासून यच्चयावत वस्तू तयार होतात, असे त्यांचेही मत आहे. अणू नित्य असून त्यांना *स्पर्श, रुची, गंध व रूप (रंग)* हे गुण असतात. विश्वात होणारे सर्व प्रकारचे बदल हे या अणूंच्या संयोग-वियोगांमुळे होतात.

काल हे द्रव्य असून अनंत आहे; ते स्वतः निष्क्रिय आहे, पण गतिमानता प्रत्यक्ष करणारे आहे; *काल* सत्य आहे, भ्रमरूप वा मिथ्या नाही. *आकाश* वा *दिक्* आणि *काल* ही नित्य जोडी आहे. ती दोन्ही परस्परसापेक्ष अस्तित्वात असतात आणि त्यातील कोणत्याही एकाविना दुसऱ्याचे अस्तित्व मानणे अशक्यच आहे. जीव, पुद्गल,

धर्म व अधर्म ही सर्व बहुप्रदेशव्यापी असून त्यांच्या विस्तारासाठी व त्यांना सामावून घेण्यासाठी *दिक्* वा *आकाश* याचे अस्तित्व आहे.

धर्म व *अधर्म* ही आकाश व्यापणारी विशेष प्रकारची द्रव्ये होत. पाश्चात्यांच्या Etherसदृश काहीशी ही कल्पना आहे. विश्वातील पदार्थांची गती व स्थिरता यांसाठी ही द्रव्ये उपयोजक होत. *धर्म* गतीस व *अधर्म* स्थैर्य या गुणांच्या शक्यत्वास कारणीभूत आहेत. धर्माविना हालचाल, चलनवलन व गती अशक्यप्राय होत आणि *स्थैर्य व शांती* यांची अधर्मावाचून कल्पना केली जाऊ शकत नाही, असे जैनमत आहे. *पाप-पुण्य यांच्याशी, नीती-अनीती वा तादृश कल्पनांशी जैनांच्या या धर्म-अधर्म जोडीचा कोणताच संबंध नाही; पौराणिकांच्या धर्म व अधर्म यांच्याशी त्यांचे केवळ नामसादृश्य आहे, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे.* असो.

जीवाचे स्वरूप

जीव हा चैतन्यमय असतो, असे जैन म्हणतात. त्याला रंग, रुची, गंध, स्पर्श, रूप, शरीर इ.अजीवांचे गुणधर्म नसतात. तसेच त्यांना राग, द्वेष, मोह, कर्मबंधाची कारणे, वर्गवारी, स्पर्धक इ.नसतात. सर्व जीव मूलतः एकाच पातळीचे व सारखे असतात. त्यांना वेगवेगळे आध्यात्मिक स्तर नसतात.

जिवांतील दिसणारे भेद हे त्यांनी युक्त झालेल्या अजीव वा भौतिक आणि कर्मद्रव्यांमुळे होतात. कर्मावरणामुळे जीव *सोपाधिक* होतो आणि मूळच्या *अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंतवीर्य व अनंतसुखित्व* या स्वभावावर मर्यादा पडतात. ***निरुपाधिक* झाल्यावर जीव कर्ममुक्त होऊन आपला मूळ स्वभाव अनुभवतात. हाच त्यांचा *मोक्ष* होय.**

जैन आत्म्यास द्रव्य म्हणून समजतात. त्याला नाश वा अंत नाही. तो *चिन्मय* असतो. त्याला जन्ममृत्यूच्या चक्रातून फिरावे लागते. *आत्मा शरीर धारण करून जीवत्व पावतो. त्याचे मूळचे अनंतज्ञानादी गुण वा स्वभाव व जीवाचे मूळ गुण हे एकच होत.*

आत्मा व जीव यांत केवळ सूक्ष्मसा फरक आहे व तो शरीरधारणेसापेक्ष आहे. शरीरविरहित जीव म्हणजे आत्मा होय, असा निष्कर्ष आपणास काढावा लागतो. कर्म, आस्त्रव व संवर यांच्यायोगे *जीव-आत्मा व विश्वातील त्यांचे अस्तित्व* यांचा संबंध जैन स्पष्ट करतात. ते सर्व जैनमत मूळापासून अभ्यासल्याशिवाय कळणार नाही. हा सविस्तर विषय सांप्रतच्या लेखनमर्यादेत व्यक्त करणे सहज शक्य नाही. असो.

जैन आत्मोद्धारासाठी *कर्मवाद* मानतात. *मोक्ष* हा सुखप्राप्ती व दुःखनिवृत्तिदायक आहे, असे त्यांचेही मत आहे. *मुक्त* हा शरीरविरहित असतो व त्याला पुनर्जन्म नसतो. पण त्याचे अस्तित्व स्वतंत्र असते. त्याला भावना नसतात; द्वंद्वे नसतात; त्याला आकार व मर्यादा नसतात. तो उपाधींपासून सर्वार्थी मुक्त झालेला असतो. तो पूर्णत्व पावलेला आणि इच्छा व कर्म यांतून मुक्त झालेला असतो. तो अविरत शांत्यावस्थेत असतो.

मुक्तांस जैन ***सिद्ध*** ही संज्ञा वापरतात. जैनांनी सिद्धांचे पंधरा वर्ग वा प्रकार कल्पिले आहेत. *काही विद्वानांच्या मते जैनांचे निर्वाण वा मोक्ष बौद्धांप्रमाणे शून्य वा अभावात्मक नसून त्या केवली अवस्थात अनंतज्ञान, अनंतवीर्य, अनंतसुख व अनंतदर्शन यांची अनुभूती घेत जैन सिद्ध परमसुखात रममाण होतात.* पण त्या विद्वानांची बौद्धनिर्वाणविषयक ही धारणा वादग्रस्त आहे. ते नंतर पाहू.

मोक्षोपाय म्हणून जैनांनी कडकडीत व्रताचरण सांगितले आहे. पातञ्जलयोगातील विविध *यमनियम* वेगवेगळ्या स्वरूपात त्यांच्या व्रताचरणात समाविष्ट झालेले दिसून येतात. असो. आता आपण अवशिष्ट अवैदिक मतांपैकी प्रमुख अशा दुसऱ्या मताचा - बौद्धमताचा विचार करू या.

बौद्धमत::::

सिद्धार्थ गौतमबुद्ध आणि बौद्धधर्म

सिद्धार्थ, गौतम व ***बुद्ध*** या नावांनी विख्यात असलेल्या महापुरुषाने हे मत प्रसृत केले. जरी ते मत एकेकाळी भारतवर्षातून जवळजवळ नामशेष झाले होते, तरीही आज त्या मताला जागतिक पातळीवर एका विशाल धर्माचे रूप प्राप्त झाले आहे. वेदप्रामाण्य व वेदांचे अपौरुषेयत्व नाकारणारे हे मत आहे. ते म्हणूनच पाखंडी किंवा अवैदिक म्हणून समजले जाते. हा एक भाग आणि एतद्विषयक इतर मतमतांतरे सोडली, तर हे बौद्धमतसुद्धा भारतीय प्राचीन तत्त्वज्ञानाचा आणि वेदोपनिषदांतील अनुस्यूत विचारधारांचा एक प्रगतिबिंदूच आहे, असे म्हणावे लागते.

गौतमबुद्धांचा काळ निश्चित करता येत नसला, तरी तो इ.स.पूर्वी सहा ते सात शतके इतका प्राचीन आहे. कदाचित तत्पूर्वीही तो चार शतके मागे नेला जाऊ शकतो.

सिद्धार्थ हा एक राजपुत्र होता. मायादेवी व शुद्धोदन हे त्याचे मातापिता होत. जातकात त्यांस *बोधिसत्त्व* असेही नांव दिलेले आहे. सिद्धार्थास कोणत्या प्रकारे वाढवण्यात आले व अंती बोधिवृक्षाखाली ध्यानस्थ झाला असता त्यांस बोधाचा प्रकाश कसा प्राप्त झाला, ही अत्यंत रंजक अशी कथावस्तू सर्वांच्या परिचयाचीच आहे.

त्यांचा हा बोध सर्व आशियाखंडात, प्रामुख्याने चीन, जपान, मलाया, कंबोडिया व इतर अतिपूर्वेकडील देश, सिलोन, तिबेट, अफगाणिस्तान, मध्य आशियातील प्रदेश इ.ठिकाणी कसा पोहोचला, बौद्ध राजे व भिक्षू यांनी-विशेषतः सम्राट अशोक, सम्राट हर्षवर्धन, कनिष्क इ.नृपतींनी त्यासाठी मिशनरी उत्साहाने काय काय कष्ट घेतले व कार्य केले; बौद्ध पंडितांनी सहस्त्रो वर्षे आपले पुरातन धार्मिक ग्रंथ व वाङ्मय कसे जोपासले; भारतवर्षातून या प्रणालीचा अस्त

का व कसा झाला आणि त्याचे अलीकडील काळात पुनरागमन कसे झाले; एतद्विषयक इतिहासही बहुश्रुत असाच आहे. असो.

गौतम बुद्धांना पाश्चात्य पंडितांनी "Light of Asia" असे सार्थच म्हटले आहे!!! आपल्या मतप्रसारासाठी बौद्धांनी युक्तीवाद, परधर्मसहिष्णुता व शांतिपूर्ण मतपरिवर्तन यांचाच प्रयोग केला; त्यांनी इस्लाम वा ख्रिश्चन धर्मीयांप्रमाणे छळ, हिंसा, जुलूम, जोर-जबरदस्ती अशा प्रकारांचा, त्यांची राजसत्ता असतांनाही कधीच अवलंब केला नाही, हेही विशेष लक्षणीय आणि स्तुत्य असेच आहे!!

बौद्ध धर्मग्रंथ पाली भाषेत आहेत. त्यांना *सुत्त, विनय* व *अभिधम्म* अशी विषयवाचक नावे देतात. बुद्धांनी हिंसात्मक वैदिक यज्ञधर्माचा निषेध केला आहे. त्यांचा भर परमार्थावर आहे. स्वर्गादी भोगेच्छांचा ते विरोध करतात. असे असूनही हिंदूंच्या पुराणांत त्यांना श्रीविष्णूंचा *नववा अवतार* म्हणून मान्यता मिळाली आहे, हे त्यांच्या लोकप्रियतेचे गमकच समजावे लागते आणि त्यांचे विचारही तसे पाहता वैदिक तत्त्वज्ञानाच्या परस्परभिन्न विचारधारांचा समन्वय साधणारेच आहेत, असे काही अभ्यासक म्हणतात.

किंबहुना वैदिकांतील आत्यंतिक हिंसात्मक याज्ञिकी कर्मकांडांमुळे झालेली ही रक्तहीन वैचारिक क्रांतीच होती म्हणा ना! त्या विचारांनी वैदिकांचा पण हिंसात्मक यज्ञयागांचा आचारच संपूर्णपणे बदलून टाकला; इतका की यज्ञयागांच्या अध्वर्यु अशा सनातनी ब्राह्मणांनीसुद्धा अहिंसेस परमधर्म मानले आणि धर्मातील हिंसा केवळ प्रतिकात्मक स्वरूपात उत्क्रांत झाली; आणि जेथे पाश्विक हिंसा तग धरून राहिली आहे, तिला आता अहिंसक झालेल्या वैदिक हिंदू धर्मानुशासनात अद्यापही जेमतेम मान्यता द्यावी लागत आहे, ते केवळ तेथे लोकाचार व रूढी यांचेच प्राबल्य असल्याने, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

मध्यममार्ग

बोध प्राप्त करून घेणे हे एकमेव ध्येय बुद्ध मनुष्यांस देतात. त्यासाठी तत्त्वज्ञानाचा कालक्षेपक उहापोह करणे त्यांना मान्य नाही. आपल्या मार्गास ते म्हणूनच ***मध्यममार्ग*** असे संबोधतात. हा Golden Mean असा तत्त्वज्ञानप्राप्तीचा मार्ग असल्याचे त्यावरून सूचित होते. *आत्यंतिक शारीरिक क्लेश, उपास-तापास, देहदंड, अघोरी उपासना यांना ते वर्ज्य मानतात.*

विश्व आणि आत्मा यांसंबंधीची तत्त्वचर्चा यांची ते उपेक्षा करतात. *अनासक्ती, तृष्णानाश, समाधान, ज्ञान, प्रकाश व निर्वाण यांचे ते उद्गाते आहेत.* आत्मा याविषयी त्यांनी मौन पाळले आहे. जन्म, जरा, मरण, दुःख, शोक, तिरस्कार, निराशा असे या जगाचे स्वरूप असल्याचे ते मानतात व दुःखनिरास हे त्यांच्या जीवनाचे ध्येय आहे.

या दृष्टीने खरे तर ***"हेयं दुःखमनागतम्।।२-१६।। पा.यो.सू.।।"*** हे जे पुढे येणारे दुःख टाळावे व त्यासाठी उपाय करणे हेच मनुष्याचे जीवनध्येय असल्याचे पातंझलयोगसूत्रांचे घोषवाक्य आहे, त्याच्याशी गौतमबुद्धांची मतैक्यता असल्याचे दिसते. या सर्व विचारावरून गौतमांच्या तत्त्वप्रणालीस *यौगिक तत्त्वधारा* असे म्हटले तरी वावगे ठरू नये. आपणासही याच दृष्टीने हे तत्त्वविचार पाहणे उक्त आहे. असो.

आत्म्याप्रमाणेच बुद्धांनी *ईश्वर* या संकल्पनेविषयी मौन पाळले आहे, हा एक मोठा फरक ईश्वरवादी व आत्मवादी आणि बौद्ध विचारप्रणाल्यांत असल्याचे दिसते. ईश्वर व आत्मा आहे की नाही, या विचारास गौतम आपल्याजवळ फिरकूसुद्धा देत नाहीत. यावरून सुज्ञांनी काय ते समजून घ्यावे! गौतमबुद्ध हे एक महान अनुभवी व साक्षात्कार पावलेले द्रष्टे होते. त्यांना म्हणूनच अशाच द्रष्ट्या ब्राह्मणांबद्दल, भिक्षू व संन्यासी आणि श्रमण यांच्याएवढेच प्रेम व आदर वाटत असे!!

पुण्यपापांच्यापलीकडे गेलेला, अहिंसक मार्ग जाणणारा, बंधनांना छेदणारा, निर्भय, आसक्तिरहित, स्वर्ग व नरक पाहणारा, असंग्रही, विजेता, वीर, स्थिर, ज्ञानी व जो बुद्ध झालेला आहे, तो *ब्राह्मण* अशी परिभाषा वापरणारे गौतम, श्रीगोपालकृष्णांनी गीतेत ***"यावानर्थ उदपाने सर्वतः सम्प्लुतोदके। तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।२-४६।।"*** या श्लोकात ब्राह्मणाची जी व्याख्या सूचित केली आहे व ठिकठिकाणी स्थितप्रज्ञतेची, ज्ञान्याची, योग्याची, परमभक्ताची, नैष्कर्म्यसिद्धाची जी अनेक लक्षणे गीतेभर विखुरलेली आहेत, त्यांव्यतिरिक्त ब्राह्मणाविषयी काय सांगत आहेत!! गौतमबुद्ध हे आनुभविक भारतीय तत्त्वज्ञान व योगपरंपरेचे मेरुमणीच असावेत, तसेच नाही का दिसत!! असो.

गौतमबुद्धांनी सांगितलेली चार आर्यसत्ये अशी आहेतः *१)दुःख, २) दुःखसमुदाय, ३) दुःखनिरोध व ४) त्याचा मार्ग.* यांचा पातञ्जलयोगसूत्रातील विचारांशी फार निकटचा संबंध आहे, असे आपल्यास जाणवते.

जीवनात दुःखच दुःख आहे. जन्म हे दुःखाचे कारण आहे. आसक्ती हे जन्म-पुनर्जन्म या चक्राचे कारण आहे. इंद्रियांद्वारे वासनाभोग व इच्छा यांचा संबंध येतो. जाणीव वा विज्ञान यांचे संस्कार पुनर्जन्मास कारणीभूत आहेत. सर्व दुःखांविषयीचे मूळ कारण स्वतःविषयीचे असत्यज्ञान वा *अज्ञान* होय. *अहं*मुळे ही सर्व दुःखशोकमालिका उद्भवते.

हेच विचार थोड्याफार संज्ञाभेदाने पातञ्जलयोगसूत्रांच्या ***"क्लेशमूलःकर्माशयो दृष्टादृष्टजन्मवेदनीयः।।१२।। सति मूले तद्विपाको जात्यायुर्भोगाः।।१३।।अविद्यास्मितारागद्वेषाभिनिवेशाः क्लेशाः।।३।।अविद्या क्षेत्रमुत्तरेषां प्रसुप्ततनुविच्छिन्नोदाराणाम्।।४।। पाद २, पायो.सू.।।"*** यांतून असेच प्रकट झालेले दिसतात, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे, असेच आहे.

गौतम असे पण सांगतात की कर्मसिद्धांताप्रमाणे जन्म प्राप्त होतात. निष्काम कर्माने या जन्मचक्राचा भंग होतो. परंतु निष्काम कर्म म्हणजे

समूल कर्मांचा त्याग नसून आसक्ती-ममत्व-अहंतारहित कर्म असाच अर्थ तेही गीतेप्रमाणेच करतात, असे आपल्या लक्षात येते. संयम, तृष्णामुक्ती, ज्ञान, अवधान, निरहंकार वृत्ती, ***"सर्वं क्षणिकं"*** अशा या जगातील सर्व नश्वर वस्तूंविषयी उदासीन वृत्ती, सुखाचा मोह नसणे, अंतर्बाह्य वैराग्य आणि चित्तात समाधान यांचा यासाठी गौतम आग्रह धरतात.

या सर्व विचारांचे *गीता व पातञ्जलयोगसूत्रे* यांतील तत्सम विचारांशी पराकोटीचे साम्य आहे, हे विचारवंतांस जाणवावे असेच आहे! विशेषतः ***"सर्व क्षणिकं"*** हा गौतमविचार तर गीतेच्या ***"ऊर्ध्वमूलमधःशाखं अश्वत्थप्राहुरव्ययम्।...।।१५-१।।"*** या श्लोकावरील शाङ्करभाष्याशी आणि श्रीज्ञानदेवांच्या ओव्यातून केलेल्या ***("माशी पांख पाखडी। तंव हें सरे।।)*** विवेचनाशी जुळणारेच आहे.

अष्टांगयोगमार्ग सांगून गौतमांनी त्यासाठी करावयाचे आचरण स्पष्ट सांगितले आहे. त्यात *सम्यक्* अशी *१)दृष्टी, २) कर्मांत, ३) वाचा, ४) आजीव, ५) व्यायाम, ६) स्मृती, ७) संकल्प व ८) समाधी* ही अंगे आहेत. पतञ्जलींच्या अष्टांगयोगातील *यम, नियम, प्रत्याहार* या विचारांशी यातील काही अंगे सदृश वा समांतर असल्याचे दिसून येते. तसेच *प्रतिप्रसव* या योगकल्पनेशी जुळणारी चित्तवृत्ती जोपासणे, असाही काही भाग त्यांत दिसून येतो ***("ते प्रतिप्रसवहेयाः सूक्ष्माः।।२-१०।।पा.यो.सू।।").***

तसेच गीतेत व्यवसाय कसा करावा ही जी कल्पना अठराव्या अध्यायी मांडली आहे, तिच्याशी दूरान्वयाने संबंधित अशी कल्पना बुद्धांच्या *सम्यक् आजीव* - योग्य उपजीविका - या अंगात येते. *सम्यक्* या शब्दाने गीतेतील सर्व प्रकारच्या आचरणातील ***"युक्ताहार विहारस्य...।।६-१७।।"*** या श्लोकातून प्रतिपादिलेली व ज्ञानेश्वरांनी ***"युक्तीचेनि मापें मविजे।।६-३४१।।"*** या शब्दांत स्पष्ट केलेली कल्पनाच दृष्ट होत असल्याचे आपणास जाणवते.

सम्यक् समाधी हे बुद्धांच्या या अष्टांगमार्गाचे गंतव्य आहे. यासाठी १) *आलोचन* म्हणजे अखंड सावधानता - भ्रमविचारांपासून मनास दूर ठेवणे *(पतंञ्जलींचे विवेक व वैराग्य)*; २) *ध्यान* म्हणजे बुद्धाच्या सद्गुणांचे स्मरण करणे *(पतञ्जलींचे* ***"यथाभिमतध्यानाद्वा।।१-३९।।पा यो.सू.।।"****)*, मरणावर-दुःखांतावर विचार करणे ***("जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्।।१३-७।। गीतोक्त।।");*** ३) *एकाग्रता* म्हणजे एकतानता व इतर वृत्तींचा सर्वथा विसर ***("तत्र प्रत्ययैकाग्रता ध्यानम्।।३-२।।पा.यो.सू.।।*** *व* ***"तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः।।६-१२।।; आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत।।६-२५।।गीतोक्त।।");*** व ४) *विपस्सना* म्हणजे अंतर्दृष्टी***("संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-१३।। गीतोक्त।।)*** यांच्याद्वारे *सम्यक् समाधी* अभ्यासावी लागते.

सम्यक् समाधीचा व शून्यतेचा लाभ करून देणारी तीन मुक्तिद्वारे बौद्धमते सांगतात, ती अशी आहेतः *१) अंतिम मुक्ती (विमोक्ख) - शून्यता, २) प्रतीकहीनता - नित्यत्वाचा भ्रम नष्ट होणे* (पतञ्जलींची विवेकख्याति - ***"विशेषदर्शिन आत्मभावभावनाविनिवृत्तिः।।४-२५।।; तदा विवेकनिम्नं कैवल्यप्राग्भारं चित्तम्।।४-२६।।; तच्छिद्रेषु...।।"*** व ***"हानमेषां क्लेशवदुक्तं।।४-२७, २८।।; प्रसंख्याने ....विवेकख्यातेर्धर्ममेघःसमाधिः।।४-२९।।; ततःक्लेशकर्मनिवृत्तिः ।।४-३० ते ४-३३ इ.।। व "पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः।... ।।४-३४।।पा.यो.सू.।।")*** व ३) *अवांछित (अप्पणिहित) इच्छा -तृष्णामुक्ती* ***("यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्ष-परायणः। विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः।।५ -२८।। इ.श्लोक ।।गीतोक्त।।")***

बौद्धांचे निर्वाण

सम्यक् समाधी व *शून्यता* हेच बौद्धमते **निर्वाण** *(निब्बान)* होय!! बौद्धांचे निर्वाण अभावात्मक *(शून्यरूप)* आहे की भावरूप आहे, यावर पंडितांनी दीर्घ विचार केला आहे. निर्वाण हे परमसुख आहे, असे बुद्धवचन बऱ्याच ठिकाणी आहे. बुद्ध स्वतःही असेच म्हणतात की *"काही संन्यासी व ब्राह्मण आधार नसतांना खोटे, चुकीचे व बिनबुडाचे आरोप करतात की मी शून्यवादी व उच्छेदवादी आहे आणि मी विनाशाचे - जे जिवंत आहेत, त्यांच्या अस्तित्वाचा अंत करण्याचे प्रतिपादन करत आहे, असे ते सांगत सुटले आहेत. पण ते म्हणतात तसा मी नाही आणि मी तसे काहीच सांगत नाही. मी सर्वदा हेच सांगतो की सर्वत्र दुःख आहे व त्या दुःखांचा अंत करावयास पाहिजे; त्याचा व जन्मचक्राचा नाश या जन्मातच केला पाहिजे."*

"ज्याचे स्वरूप ठरवता येत नाही, त्याचे स्वरूप मी सांगत नाही. कारण ते समजावणे दुःखांताशी संबंधित नाही व त्या उहापोहाचा काही उपयोगही नाही. विरक्ती, विकारांचा अभाव, अंत, शांती, अंतर्दृष्टी, बोधि व निर्वाण यांजबाबतच मला आस्थापूर्वक सांगायचे आहे."

यावरून बुद्धांचे *निर्वाण* परमसुखशांतिप्रद आहे, हे स्पष्ट होते; ते गहन आहे, इ.त्याची वचने लक्षात घेता, टीकाकार म्हणतात तसे ते *अभावात्मक शून्य* नसून गीता-ज्ञानेश्वरीतील *परमधाम - शून्य-निःशून्य* इ.संकल्पनांसारखेच असले पाहिजे, असा जाणत्यांचा कयास चुकीचा नसावा!! *झेन* या नावाने विख्यात असलेला बौद्धांचा चिनी उपपंथ अभ्यासल्यास जिज्ञासूंना या निर्वाणाचे सत्य स्वरूप समजून येईल, अशी आशा आहे. त्यांचे *सातोरी* (Satori) म्हणजेच हे निर्वाण!! जीवन्मुक्ती ती हीच!!

बौद्धपंथ व उपपंथ

बौद्धमताचे *महायान* व *हीनयान* हे प्रमुख पंथ झाले. तसेच *वज्रयान* व *मंत्रयान* असे तांत्रिक व दैवताधिष्ठित उपासनापंथही त्यांत आहेत. लामापंथ, ताओ (Tao), झेन (Zen), Chan,

Tsung, Tien- t'ai, Liu, chu-she-sung, Lotus sect (Lien tsung), Hua-yen-Sung, San-Lun -tsung, Mi-tsung इ.अनेकविध चिनी, तिबेटी, जपानी बौद्ध उपपंथ सध्या प्रचुर आहेत. बुद्धाच्या उपदेशाचे अनुकरण कसे करावे, त्याच्या उपदेशाचा खरा अर्थ कोणता, भिक्षूंची चर्या कशी असावी, इ.वेगवेगळ्या मुद्द्यांवरून निर्माण झालेले विविध विचारप्रवाह हे या अनेक पंथोपपंथाचे मूळ होत, एवढेच ग्रथित केले म्हणजे पुरे! इत्यलम्।

बौद्धमत व गीता

जाताजाता बौद्धमताचे गीतेशी किती बाबीत साम्य आहे, ते निर्दिष्ट केलेच पाहिजे. बौद्धमत विचारात घेतांना तसे आपण ठिकठिकाणी *गीता* व *पातञ्जलयोगसूत्रे* यांचे बौद्धोक्तींशी असलेले साम्य दर्शविले आहेच. आता अजूनही काही विशेष साम्यस्थले पाहू याः

"अनित्यं" व *"असुखं"* असा हा मृत्युलोक असल्याचे गीता सांगते व त्यावर उपाय केलाच पाहिजे, असे श्रीकृष्ण म्हणतात. *"माझे ध्यान हाच तो उपाय आहे"* असेही ते स्पष्टच सांगतात ***("अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्।।९-३३।।").*** गौतमही हे जग दुःखव्याप्त असल्याचे, तसेच ते क्षणभंगुर असल्याचे सांगून ध्यान-विपस्सना यांचा उपाय सांगतात. त्यांचे ***"सर्वं क्षणिकं"*** हे वचन तर सुप्रसिद्धच आहे.

श्रीकृष्णांनी अर्जुनास अनेक प्रकारचे तत्त्वज्ञान विवेचिले. तेराव्या अध्यायात तर ***"ऋषिभिर्बहुधा गीतम्।।१३-४।।"*** अशी तत्त्वज्ञानाची बहुलता व मतभिन्नता त्यांनी सूचित केली आहे. *ज्ञानप्रकाश* हाच आत्मोद्धाराचा मार्ग त्यांनी सांगितला. गौतम हे तत्त्वज्ञानाचे बाहुल्य ओळखून त्या विषयात न पडता, जिज्ञासूंना आत्मोद्धाराच्या मार्गास त्वरित लागण्यास सांगतात.

वेदांचे स्वल्पत्व ***("त्रैगुण्यविषया वेदा ...।।२-४५।।"),*** स्वर्गकामी जनांचे संसारात आवागमन, पुनर्जन्ममरणचक्र, इच्छातृष्णा यांमुळे होणारा हाहाकार ***("रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम्। तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम्।।१४-७।।"),*** निर्वाणाचे सुशांत सुखकारक स्वरूप, पापपुण्यात्मक कर्मे न करता निष्काम कर्मे करणे, त्यासाठी योगमार्गाचा स्वीकार, त्यातही ***"नात्यश्नतस्तु ... युक्ताहार .. योगो भवति दुःखहा।।६-१६ व १७।।"*** या गीतोक्त मध्यममार्गाचे गौतमोक्त सम्यक् अष्टांगांशी असणारे साम्य, शीलसंवर्धन, अहिंसा-समता-शम-दम इ.सद्गुणांचे परिपालन, शांतिप्राप्ती, सम्यक् समाधी व जीवन्मुक्ती वा संजीवनसमाधी-स्थितप्रज्ञावस्था, नैष्कर्म्यसिद्धी इ.अनेक विषयात गीतेशी बुद्धांचे आचारविचार जुळतात, असे आपणास आढळून येते.

श्रीकृष्णांनंतरचा विष्णूंचा अवतार अशी मान्यता गौतमबुद्धांस मिळण्यामागे या विचारसदृशतेचाही मोठा हातभार लागला असणे शक्य आहे, असे आपणास जाणवणे साहजिकच आहे. याचप्रमाणे नाही का जैनांच्या तीर्थंकर ऋषभदेवांनाही वैदिक हिंदू धर्मात विष्णूंच्या चोवीस अवतारांमध्ये समावून घेतले गेले!

भारतीय तत्त्वज्ञान विषयाचा समारोप

गीतेवरील *द्वैती व अद्वैती* टीकांच्या संदर्भात हा *द्वैत व अद्वैतादी* तत्त्वज्ञानाचा संक्षिप्त परिचय आपण आताच करून घेतला. तसेच तर्क-न्याय इ.षट्दर्शनांची भूमिका, शैव तत्त्वज्ञान आणि जैन व बौद्धमते यांचाही धावता वृत्तांत आपण पाहिला. या सर्वांची अशी ही ओळख करून घेतल्याने या ग्रंथात पुढे जे काही विविध तात्त्वज्ञानिक व योगसंबंधित विषय येतील, ते समजून त्यांचे यथायोग्य मूल्यमापन करणे जिज्ञासूंना शक्य होईल असे वाटते.

या भारतीय तत्वज्ञानप्रणाल्यांच्या अल्पशा ओळखीनंतर आपण वळू या ***पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील विचारसरणी, आधुनिक विज्ञान आणि भारतीय अध्यात्मशास्त्र*** यांच्या संक्षिप्त तौलनिक अभ्यासाकडे. त्यातून आपणास गीता-ज्ञानेश्वरीतील अध्यात्मशास्त्राची आणखी एक मिती दृष्टीस येईल आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनासंबंधीच्या अभ्यासास परिपक्वता प्राप्त होईल. तर वळू या तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::ग्रन्थामागील भूमिका::

::मध्यरंग-२::

::वास्तववाद, विज्ञान व दर्शने::

पाश्चिमात्य तत्त्वज्ञान, आधुनिक विज्ञान व भारतीय अध्यात्मशास्त्र::::

Realism व Surrealism

तसे पाहू जाता आधुनिक विज्ञान -Modern Science - हे जीव व विश्व यांचे जे आकलन करू पहाते, ते Realism या सदरातील आहे. Realism means the practice of regarding things in their own true nature and dealing wth them as they are; fidelity to Nature in representation; the showing of life etc. as it is.

याच्याहून भिन्न कल्पना म्हणजे Surrealism. विसाव्या शतकातील Surrealism ही एक मुव्हमेंट *(Movement)* होती, जी कला व साहित्य यांच्या प्रांतात आविष्कारली. सुप्त मनाच्या *(subconscious mindच्या)* अभिव्यक्तीचे *(by irrational juxtaposition of images)* ते एक दालन होते . स्वप्नात दिसणारी दृश्ये जशी बुद्धीला, तर्काला व वास्तवतेला *(Reason and Conventionला)* धरून नसतात, त्याप्रमाणे कलाकार आपल्या सर्जनतेला, अभिव्यक्तीला मुक्त सोडतो. वास्तवाचे स्वप्नवत चित्रण करणे हा Surrealismचा विशेष आहे.

Pluralistic Realism म्हणजे ***अनेकांतात्मक वास्तववाद*** होय. कोणत्याही वस्तूकडे वा वास्तवाकडे पहाण्याचे वास्तववादी दृष्टिकोन एकाहून अधिक, अनेक असण्याचे मान्य करणे हाच या अनेकांतात्मक वास्तववादाचा गाभा होय.

मुळात मनुष्य हा कसा आहे, हे विश्व कसे आहे, याचा वास्तववादी दृष्टिकोनातून अभ्यास करणे हाच-Realism-***वास्तववाद*** आहे. या उलट जे जसे दिसते, भासते, जाणवते, तसे ते न पहाता स्वप्नसृष्टीतील कल्पकतेतून त्याच्याकडे पहाणे व सामान्य तर्कबुद्धी *(everyday reason)* व हरघडी येणारे अनुभव यांना डावलून, अंतर्मनातून उमटणाऱ्या संवेदना, तर्क, विचार इ.द्वारे दृष्याचा-वास्तवतेचा-अतिरंजित अर्थ *(interpretation)* करू जाणे व त्याची वास्तवाशी सरभेसळ करणे हा प्रकार Surrealismच्या सदरात मोडतो.

विज्ञानाचा दृष्टीकोन

या दृष्टीने पहाता आधुनिक विज्ञान - Modern Science हे जीव व विश्व यांचे जे आकलन करू पहाते, ते *Realism* या सदरातील जरी दिसले, तरी पण या विज्ञानाच्या सीमारेषेवरील *(borderline)* विचार व विषय यात थोडा Realism तर थोडा Surrealism अशी सरमिसळ आढळते. आईन्स्टाईनचा *सापेक्षतावाद* - Theory of Relativity - ही त्याने १९०५ साली मांडली. त्यावेळी तरी ती Surrealism या प्रकारात मोडली असती. Max Plankचे Quantum Mechanics, *हायझेनबर्गचे* Uncertainty Principle, *नील्स बोह्रचे* Atomic Model, *खगोलशास्त्रीय* Big Bang Theory, Steady State Theory *या उपपत्त्या,* Black Body Radiation *संबंधीची भौतिकशास्त्रीय उपपत्ती,* Unified Field Theory *संबंधी आईन्स्टाईन इ.शास्त्रज्ञांचे विचार, वैश्विक मूलकणांसंबंधीच्या विविध उपपत्ती,* String Theory *इ.अनेक गणिती - वैज्ञानिक अशा सिद्धांतविचारांचे मूळ स्वरूप असेच* Realism व Surrealism *यांच्या सीमारेषेवरीलच होते व अजूनही जवळ जवळ ते तसेच आहे हे विचारवंत ओळखतीलच!*

हायझेनबर्गच्या Uncertainty Principleने वास्तववादी विचारसरणीस मोठा धक्का दिला आहे. त्याच्या थिअरीचे एक फलित म्हणजे आपण ज्या वास्तवाच्या निरीक्षण-परीक्षणावर वास्तववादी सिद्धांत बांधतो, ते वास्तवच मुळी आपल्या निरीक्षणाने बदलत असते, ते निरीक्षणसापेक्ष असते हा निष्कर्ष. आपण इलेक्ट्रॉनची गती व त्याचे स्थान ही दोन्ही एकाच वेळी बरोबर निश्चित करू शकत नाही या अनुमानावर व प्रयोगावर हा सिद्धांत आधारलेला आहे. सध्यातरी हे Uncertainty Principle आण्विक कणांपुरते-Microcosm पुरते मर्यादित आहे. पण असाच अनिश्चितीचा प्रकार ब्रह्मांडास लागू होत नसेल असे कोणी नक्की सांगू शकत नाही.

ब्रह्मांड जाऊ द्या. मनुष्याच्या उपलब्ध निरीक्षणक्षमतेत विश्वाचा जेवढा भाग येतो, तो ब्रह्मांडाच्या - Macrocosmच्या तुलनेत एका अणुएवढाच म्हणावा लागेल. निदान जे जे मनुष्याच्या निरीक्षणात येते, ते ते असे ब्रह्मांडाच्या मानाने Microcosmicच ठरते, आण्विक पातळीचे ठरते. म्हणजेच आपली विश्वाबाबतची सर्व निरीक्षणे जी स्थल व काल यांच्याशी नेहमीच संबंधित असतात, गतीशी पूर्णपणे बांधलेलीच असतात, थोडक्यात आपली एकूण एक निरीक्षणे अशी अनिश्चित-uncertain-ठरू शकतात, ती या एका Uncetainty Principle मुळे.

आता असे जर असेल तर आपल्या निरीक्षणाच्या मर्यादांपलीकडचे जे विश्व आहे, जे हे जीव आहेत, ज्या अज्ञात

अशा अनंत घटना आहेत, त्या सर्वांचा वास्तववादी शोध घेणे जर मानवाला शक्य होणार नसेल; जेवढ्या गोष्टींचे निरीक्षण करून निष्कर्ष काढले आहेत, ते निरीक्षणही असे uncertain असेल; तर मग या विश्वाच्या अनंत भासणाऱ्या पसाऱ्याचे, जो दिवसागणिक संशोधनाच्या प्रगतीच्या अनेक पटीने वाढतांनाच दिसतो आहे, त्याचे आणि त्याच्यातील जैवशास्त्रीय *(Biological)* व जैविक उत्पत्ति, स्थिती व लयाच्या अकल्पनीय गूढाचे कोणी मानव केव्हा आणि कसे Realistic-वास्तववादी-निरीक्षण करू शकेल आणि त्यावरून वास्तववादी निष्कर्ष कसे बरे काढू शकेल असा यक्षप्रश्न पुढे उभा रहातो. हे सर्व अशक्यच आहे असे दिसते.

म्हणून आज ज्ञात असलेल्या किंवा होत जाणाऱ्या आधुनिक विज्ञानास आपल्या तर्कनिष्ठ आणि conventional observationद्वारे, *वास्तववादी निरीक्षण व परीक्षणाद्वारे* या विश्वाचे व या जीवाचे गूढ कधी उलगडेल असे वाटत नाही. आणि विज्ञानाने तर मूळातच वास्तववादी असण्याची प्रतिज्ञा केलेली आहे!

आधुनिक विज्ञानाच्या या एकांतिक वास्तववादास जे हे विश्वाचे कोडे उलगडू शकत नाही, ते इतर कोणत्याही वास्तववादी प्रणालीने म्हणूनच उलगडू शकणार नाही आणि मग जैन तत्त्वज्ञांनी मांडलेल्या सर्वसमावेशक अशा *अनेकांतात्मक वास्तववादास*ही हा विषय गूढच राहील. हे कोडे कधीतरी या पद्धतीने उलगडेल असे म्हणणे धाष्ट्यर्चिच वाटते.

केलेल्या निरीक्षणांचे बुद्धिगम्य अशा अनुमानाने, प्रत्यक्ष प्रमाणाने आणि प्रायोगिक पडताळणीने सिद्ध होणारे निष्कर्ष असे आधुनिक विज्ञानांतील सिद्धांतांचे स्वरूप असते, हे आपणास माहीत आहेच! रोजची निरीक्षणे आणि त्यांवरील अनुमाने यांच्या आधारेच आपण दैनंदिन जीवन जगत असतो. म्हणजे तसे हे जीवन विज्ञाननिष्ठ पद्धतीने जगण्याचा आपला प्रयत्न असतो हे खरे. पण आपल्या निरीक्षणांमागील वैज्ञानिक सत्य मात्र बऱ्याच वेळा वेगळे असते.

आकाशात फेकलेली वस्तू खालीच पृथ्वीवर पडणार हे रोजच्या जीवनातील सत्यच आहे. पण यामागचे वैज्ञानिक सत्य गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत-Law of Gravity-हे आहे. हे सत्य आकळून आल्यामुळेच मानवाने सोडलेली अवकाशयाने पृथ्वीवर येऊन न पडता पृथ्वीबाहेर फेकली जाऊन अति दूर interstellar spaceमध्ये जाऊ शकतात आणि त्याहीपलीकडे Galactic spaceमध्ये प्रवेश करून पृथ्वीकडे कधीही न परतण्याचा मार्ग धरू शकतात. अशा या गुरुत्वाकर्षणाच्या वैज्ञानिक सत्याचे जे रूप न्यूटनने मांडले होते, तेही आता पार बदलून टाकले आहे आईन्स्टाईनच्या Theory of Relativity ने.

या एकाच उदाहरणाने आमच्या रोजच्या जीवनातील निरीक्षण व rational अनुमान-everyday logic and reason - या प्रमाणाचे काय स्वरूप आहे, ते दिसून येईल. वर फेकलेली वस्तू परत खाली पडत नाही, ही सामान्य मनुष्यास फार अचंब्याची गोष्ट वाटू शकेल. पण आता असे आश्चर्याचे अनेक धक्के मनुष्यास वैज्ञानिक प्रगतीमुळे बसत आहेत.

गुरुत्वाकर्षणासारखी अनेकानेक वैज्ञानिक सत्ये आता उलगडली आहेत. पण अशा या समर्थ वैज्ञानिक प्रणालीसच जेव्हा या विश्वाचे कोडे उलगडणे अशक्य दिसू लागते, तेव्हा ते आमच्यासारख्या सामान्य अवैज्ञानिक पातळीवरील निरीक्षकास वास्तववादी तत्त्वज्ञानाने उलगडू शकेल असे वाटणे हा खरे तर भ्रमच असावा! Lord Rees, President, Royal Society, London, यांचेही आधुनिक विज्ञानाधारे वा अन्यथा मानवी बुद्धीस या विश्वाचे कोडे उलगडणे अशक्यच असल्याचे मत आपण यापूर्वी पाहिले आहेच *(पृ.क्र xix)*. असो.

आपल्या सर्व इंद्रियांची निरीक्षणशक्ती मर्यादित आहे. अल्ट्राव्हॉयोलेट, एक्सरेज किंवा इन्फ्रारेड हे प्रकाशकिरण आमच्या चक्षूंस दिसू शकत नाहीत. हे सर्व आपणांस दिसू शकणाऱ्या प्रकाशकिरणांसह भौतिकशास्त्रानुसार इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन आहे; ज्याचा बराचसा भाग मनुष्याच्या संवेदनेस आकळून येऊ शकत नाही. श्रवणेंद्रिये सर्वच्या सर्व ध्वनिलहरी ग्रहण करण्यास सक्षम नाहीत. अतिथंड किंवा अतिउष्ण पदार्थांचे तपमान आपली त्वचा अनुमानू शकत नाही. स्वादसुद्धा काही विशिष्ट प्रकारेच आपण अनुभवू शकतो. घ्राणेंद्रियासही कुत्र्यालासुद्धा जे सूक्ष्मातिसूक्ष्म गंध कळतात, ते कळू शकत नाहीत. हे आपल्या पंचज्ञानेंद्रियांबाबत सर्वसामान्य अशा निरीक्षण व ज्ञानशक्तीबाबत झाले.

मनुष्य अंधारात असला तर त्याला वस्तू दिसत नाहीत, जशा इतर काही प्राण्यांस दिसतात. एखादा डोळस मनुष्य जर नंतर आंधळा झाला, तर त्याला सूर्याचे स्वरूप माहिती असेल म्हणा. पण जन्मांधास ते कसे ज्ञात होऊ शकेल! एखाद्या मुंगीला म्हणा, सर्पाला म्हणा, पक्ष्याला म्हणा किंवा वाघासिंहाना म्हणा; आपणा मनुष्यांस हे विश्व जसे दिसते, भासते तसेच दिसत असेल का! मनुष्यनिर्मित आण्विक शस्त्रे, विज्ञान आणि त्यापासून होऊ शकणारा विनाश त्यांच्या बुद्धीच्या आवाक्यात येऊ शकेल का! असे जर होऊ शकणार नाही, तर त्याचे कारण काय ते आपण जाणतोच. या प्राण्यांची निरीक्षणशक्ती, तर्क व अनुमानशक्ती, बुद्धी, प्रयोगशीलता व उद्यमशीलता ही सर्व मनुष्याच्या मानाने फारच तोकडी असल्याने त्यांच्यात व मनुष्यात फार फरक पडतो. विश्वाचे गूढ उकलण्यास त्याचप्रमाणे मनुष्याची निरीक्षणशक्ती, तर्क व अनुमानशक्ती इ.अशाच अपर्याप्त ठरणार नाहीत का!

हायझेनबर्गने मांडलेल्या Uncertainty Principleप्रमाणे इलेक्ट्रॉनचे स्थान-spatial position-व वेग-velocity-ही दोन्ही कोणा निरीक्षकास-observerला एकाच वेळी अचूकपणे

ठरवता येत नाहीत. कारण निरीक्षक जेव्हा त्याचे स्थान पाहू जातो, तेव्हा या निरीक्षणाने झालेल्या interferenceमुळे धक्का बसून इलेक्ट्रॉनचा वेग बदलतो. वेगाचे निरीक्षण करू जाता तसेच होऊन त्याचे स्थान बदलते. म्हणजे निरीक्षकाच्या उपस्थितीमुळे इलेक्ट्रॉनचा जो वेग व जे स्थान निरीक्षक नसतांना असणार होते त्यांतच बदल घडून येतो. म्हणून विज्ञान ज्याला independent observation म्हणते, ते करणे शक्य होत नाही.

आपण करत असलेल्या विश्वाच्या निरीक्षणांना अशी अनिश्चितता आहे.नेमके काय घडत आहे याचे Spatial & Time dimensionsमधील अचूक निरीक्षण करणे असे असंभाव्य ठरू लागल्यामुळे हे विश्व आपणासाठी अनाकलनीय आहे असा विचार वैज्ञानिकांपुढे येऊ लागला.

पूर्वी Scientific Determinismचे वैज्ञानिकांवर वर्चस्व होते. Determinism म्हणजे "The doctrine that all events, including human action, are determined by causes regarded as external to the Will of human beings*(or otherwise)*." थोडक्यात Determinism म्हणजे निसर्गाचे नियम मनुष्याच्या उपस्थितीमुळे, त्याच्या निरीक्षणामुळे किंवा इच्छेमुळे बदलू शकत नाहीत; ते सदासर्वदा निश्चित - determined - असेच असतात आणि वैज्ञानिक पद्धतीद्वारे ते सर्व ज्ञात होऊ शकतात अशी वैज्ञानिक Philosophy आहे. ती मागे पडू लागेल अशी चिह्ने या Uncertainty Principleमुळे उजेडात येऊ लागली आहेत. म्हणून Determinism ऐवजी Uncertainty हाच विचार आता वैज्ञानिक जगतात मूळ धरू पहात आहे.

सामान्यांच्याच काय तर वैज्ञानिकांच्याही स्थल, काल, द्रव्य, ऊर्जा इ.(Space, Time, Matter & Energy)बाबतच्या कल्पनांना आईन्स्टाईनच्या Special & General Theory of Relativity*ने , बोह्रच्या* Atomic Model*ने, तसेच भौतिकशास्त्रातील* Brownian Motion, Quantum Theory, Nuclear & Particle Physics*मधील अद्यतन संशोधनामुळे आणि* Pulsars व Quasars, Black Holes इ.च्या शोधांमुळे नवनवीन ज्ञात होणारा विश्वाचा अफाट विस्तार वगैरेंद्वारे मोठा धक्का बसून त्यात आमूलाग्र परिवर्तन होत आहे. अजूनही या सगळ्या गोष्टींचा संपूर्ण वैज्ञानिक विचार झालेला नाही.

जैवशास्त्रीय कूटप्रश्न

जी गोष्ट भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र इ.ची, तीच जैवशास्त्रातही घडून आली आहे. दिवसेंदिवस त्यातही अनेक नवनवीन शोध लागत आहेत. डार्विनचा उत्क्रांतिवाद - Theory of Evolution - मागे पडून Neo-Darwinian Theory पुढे येऊ लागली आहे. मनुष्याच्या उत्पत्तीचा व विकासवादाचा हा जटील प्रश्न आज नवनवीन शोधांमुळे अधिकाधिक गुंतागुंतीचा होऊ लागला आहे. मनुष्याच्या Perception, Thinking, Memory, Reasoning, Cognition, Will Power इ.चा समाधानकारक उलगडा अजून होऊ शकलेला नाही.

संगणकाचा शोध लागला (*computer*); त्याची अत्यंत क्लिष्ट रचना व कार्यपद्धती यांची पूर्ण माहिती असलेल्या या युगात अवयव रचनेचा-Organic structure & Physiologyचा कितीही जरी उलगडा केला तरी मेंदूची ग्रहणशक्ती, विचारशक्ती, स्मरणशक्ती, तर्कशक्ती, ज्ञातृत्वशक्ती, इच्छाशक्ती इ. आणि मेंदूच्या ९० टक्क्याहूनही अधिक भागाचे कार्य व रचना यांचा अजूनही उलगडा झालेला नाही. मनोवैज्ञानिक - Psychological and Psyco-analytical - व मनोरुग्णचिकित्सेच्या - Psychiatric विशेषांचे, जागृत मन - Conscious Mind, सुप्त मन - Sub-conscious Mind, त्यांच्या क्रिया प्रतिक्रियादी व्यापारांचे गूढ अद्याप उकललेले नाही. त्यांविषयी फक्त काही कामचलाऊ-working hypothesis मांडल्या गेल्या आहेत, एवढेच!

जैविक उत्पत्तीचे गूढ अद्यापही कायम आहे. डार्विन व निओ-डार्विनियन थिअरी, Human Genome Projectद्वारा केलेले मनुष्याचे chromosomal & genetic mapping, self-replicating molecules & structuresसंबंधीचे सिद्धांत, मनुष्याचे व इतर प्राण्यांचे काही अवयव, रक्त इ.शरीराबाहेर जिवंत ठेवता येणे, अवयवरोपणाच्या शस्त्रक्रिया करण्याचे साधणे, भूलशास्त्रातील-Anaesthesiologyमधील प्रगती अशा कल्पनातीत गोष्टी मनुष्यास आज ज्ञात झाल्या आहेत व होत आहेत. Human surrogate babies, embryonic cloning, stem cell research, अनैसर्गिकपणे गर्भधारणेचे तंत्र हीसुद्धा खूप विकसित झाली आहेत.

पण अत्यंत महत्वाचे म्हणजे मुळात जीवाची उत्पत्ती कशी झाली, जडातून ती उत्क्रांतीवादानुसार झाली असे म्हणतात, त्याची प्रायोगिक पडताळणी करून पहाता येणे; जडावर जीवाची हुकुमत कशी चालते; जड व जीव यांचा दुवा मेंदू आहे का, की अन्य काही आहे; जीवास देहाशिवाय अस्तित्व असू शकते काय; मेंदूतच जर जीवाचे अस्तित्व मानले, तर जडामध्ये ही चेतना येते ती कशी व कोठून; पूर्वी ती कोठे होती, तिचे स्वरूप काय; तीही एक वैश्विक ऊर्जा आहे काय; चैतन्य ही काही वेगळी गोष्ट आहे काय, ते काय कार्य करते, त्याची कार्यपद्धती काय, मृत्यूनंतर त्याचे काय होते; इ.अनेक गोष्टी विज्ञानाच्या आजही आवाक्यात आलेल्या नाहीत.

म्हणजेच आज तरी वैज्ञानिक आघाडीवर Matter, Energy & Space इ.जड गोष्टी व जीव-Life-चैतन्यमय

पदार्थ, वस्तू व प्राणी यांच्या निश्चित स्वरूपाबद्दल अतिशय अनिश्चिती व अज्ञान - ignorance-आहे हे उघडच आहे.

अनेक नोबेल पारितोषिक विजेत्या आघाडीच्या वैज्ञानिकांनी लिहिलेल्या निबंधांचे संकलन करणारा "Encyclopaedia of Ignorance" हा ग्रंथ आहे. आपापल्या विज्ञान शाखेतील ज्ञानाचा, प्रगतीचा व त्या त्या विषयातील अज्ञानाचा पायाभूत विचार त्या निबंधांत केलेला आहे. त्यांच्यावरून आपणास विज्ञानविश्वातील अनिश्चिती - uncertainty *व अज्ञान* -Ignorance-यांची चांगली कल्पना येते.

वास्तवता (Reality)

विज्ञान व वास्तववादाशी संबंधित अजून एक महत्वाचा प्रश्न आहे. तो म्हणजे वास्तवतेचा-Realityचा. अनेकांतात्मक वास्तवतावादाने सुटणारा हा प्रश्न नाही. कारण त्यात एकाच वास्तवाचे -Realityचे अनेकविध पैलू असल्याचे धरले असले तरी *Reality* मात्र एकच धरलेली आहे. पण तत्त्वासाठी अनेक Realities धरल्या तर त्यास Plural Realismची कल्पना लावून पहाण्यास तर्कदृष्ट्या कोणतीही अडचण येऊ नये. आपण मागे ज्या हायझेनबर्ग प्रिन्सिपलचा विचार केला, त्यातून निरीक्षणाचे फलित निरीक्षकसापेक्ष असल्याचे आपण पाहिले, त्यातून हा Plural Realitiesचा प्रश्न उद्भवतो.

आता असे समजू या की एकाऐवजी दोन किंवा अधिक निरीक्षक एकाच वस्तुस्थितीचे - Realityचे निरीक्षण परीक्षण करीत आहेत. तर त्या Realityचे काय होईल; तिचे स्वरूप कसे असेल; त्या प्रत्येकाच्या निरीक्षणाचे फलित परस्पर सापेक्ष वेगळे असेल की त्या प्रत्येकाचे निरीक्षण फलित identical असेल; ते फलित प्रत्येकाने independently केलेल्या निरिक्षणांची Arithmetic sum असेल की Vector sum असेल की अजून काही वेगळेच असेल; असे प्रश्न या Hiesenberg's Principle of Uncertaintyमुळे पुढे येतात.

आता हे तर उघडच आहे की जर निरीक्षकाच्या निरीक्षण करण्याच्या कृतीचा किंवा इच्छेचा म्हणा, जर निरीक्षणावर परिणाम होत असेल तर वेगवेगळ्या निरीक्षकांच्या निरीक्षणांचे व्यक्तिगत परिणाम जरी भिन्नभिन्न व्हावेत असे असले, तरी जर Reality-वस्तुस्थिती ही केव्हाही एक-एकाच प्रकाराची-unidimensional or singular असेल तर, त्या व्यक्तिगत परिणामांची गोळाबेरीज करून ती Reality व्हायला हवी. जर तसे होणार नसेल किंवा याची काही इतर permutations & combinations होत असतील तर Reality ही Multiple or Plural or Multidimensional असल्याचे आपणास म्हणावे लागेल. म्हणजे वास्तवाला अनेक मिती आहेत किंवा अनेक वास्तवे अस्तित्वात आहेत असा निष्कर्ष निघतो.

समजा *अ, ब* व *क* असे तीन निरीक्षक आहेत. *अ*चे एकट्याचे निरीक्षण *(क्ष)* आहे; *ब*चे *(य)* आहे व *क*चे *(ज्ञ)* आहे. तर त्यांच्या एकत्रित, एकसमयावच्छेदेकरून केलेल्या निरीक्षणांचा परिणाम जर *(क्षयज्ञ)* असा असेल, तर Realityचे स्वरूप unidimensional or singular असेल. ते *(क्षय), (यज्ञ),* तसेच *(ज्ञक्ष)* किंवा *(क्ष), (य)* व *(ज्ञ)* असेही simultaneously असू शकेल. अशी Reality जर असेल तर ती Multidimensional *किंवा* Plural अशा प्रकारची ठरेल. अशी Multiple Reality जर आपणास माहीत असणाऱ्या सध्याच्या Space, Time, Mattter & Energy च्या Frameमध्ये घटत असेल, तर अशा अनेक Framesचे अस्तित्व मानावे लागेल आणि यातूनच Multiple Universes or Multidimensional Universeची कल्पना मान्य करावी लागू शकते. त्या प्रत्येकाच्या या Space,Time, Matter & Energy यांचे मग वेगवेगळे आविष्कार घडून येऊ शकतील. हे झाले *अ,ब* व *क* यांनी एकमेकांचे निरीक्षण न करता केलेल्या Realityच्या निरीक्षणाचे.

जर हे *अ,ब* व *क* एकमेकांचेही निरीक्षण करणार असतील तर या अनेक प्रकारच्या Multiple Universesचा एकमेकांशी संबंध जोडला जाऊन Realityचे स्वरूप अधिकच गुंतागुंतीचे होईल.आणि या सर्व Multiple Realityचे अस्तित्व *अ,ब व क*च्या परस्परसापेक्ष कृतींबाबत आणखीच किचकट होईल.

समजा *अ* ने *ब* ला *क* कडे जोराने ढकलले तर त्याचा कोणता परिणाम या तिघांवर होईल, तो कोणत्या Realityत कोणत्या प्रकारे घडेल, कोणत्या Space,Time, Matter & Energyच्या Frameच्या नियमांनुसार घडेल आणि तो *अ, ब* व *क* यांना कशा प्रकारे भोगावा लागेल इ.अनेक प्रश्न याबाबत उत्पन्न होतात, ते या अशा Multiple or Multidimensional Reality मधून.

जर या वेगवेगळ्या Multiple Realityमधून *अ, ब* व *क*ला असे वेगवेगळे अनुभव येणार असतील, क्रिया घडणार असतील, तर त्यांचा कोणता अनुभव खरा मानायचा; एकच व्यक्ती जर असे एकाच कृतीचे वेगवेगळे परिणाम अनुभवणार असेल, तर ते कसे आणि कोणत्या Realityत; हे अनुभव एकच व्यक्ती simultaneously कसे अनुभवू शकेल; तसे नसेल तर तीच व्यक्ती ते अनुभव वेगवेगळ्या विश्वात वेगवेगळ्या Space,Time, Matter & Energy Frameमध्ये घेणार काय; वेगवेगळ्या विश्वात असे अनुभव घेणारी व्यक्ती तरी तीच ती असेल काय किंवा तीच एक व्यक्ती आपण गृहीत धरतो तशी वेगवेगळ्या Space,Time, Matter & Energy Frameमध्ये हे वेगवेगळे अनुभव घेणार का; वेगवेगळ्या विश्वात असे अनुभव घेणारी व्यक्ती तरी तीच ती असेल का किंवा तीच एक व्यक्ती आपण गृहित धरतो तशी

Unidimensional individual अशी नसून Multidimensional, Multiple अशी आहे काय; मग त्या Multiple अशा व्यक्तीच्या एका विश्वातील अनुभवांचा दुसऱ्या विश्वातील अस्तित्वावर -existanceवर काय परिणाम होऊ शकेल असे अनेक प्रश्न उभे होतात.

तसेच हायझेनबर्गच्या प्रिन्सिपलमुळे *Free Will*च्या कल्पनेसही मोठा धक्का बसतो. *प्रत्येक मनुष्य आपापल्या कृतीस जबाबदार असतो अशी ही कल्पना आहे*. पण जर *ब व क* हे *अ*च्या कृतीवर आपल्या निरीक्षणाद्वारे परिणाम घडवू शकत असतील, तर*अ* च्या Free Willचे काय असा प्रश्न आहे. त्यामुळे आपला ***कर्मविपाकाचा*** जो ***सिद्धांत*** आहे, त्याबाबतही किचकट प्रश्न निर्माण होतील.

तसेच एकदा एका व्यक्तीचे Multidimensional अस्तित्व गृहित धरले की आपण जसे आपणास व इतरांस पहातो, त्यांचे व्यक्तिमत्व व अस्तित्व असल्याचे धरतो, तसे ते नाही असे मान्य करावे लागेल. Men are not what they see themselves and others as, nor are the things what they behold as; but everyone and everything is far too and unimaginably different from what one sees, अशी वस्तुस्थिती होईल आणि ती आपल्या रोजच्या आनुभविक विश्वाला- day-to-day Realityला छेद देणारी गोष्ट ठरेल. असो.

विज्ञान व दर्शने

आपण हा सर्व विचार का करत आहोत असा प्रश्न कोणा जिज्ञासूस पडेल. याचा गीता-ज्ञानेश्वरीशी काय संबंध आहे असेही कोणी विचारतील. मुळात गीतेने जीव-जगत-ईश्वर या Realityसंबंधी बरेच विचार मांडले आहेत, हे उघडच आहे. त्याबाबत तत्त्वज्ञान्यांनी ही Reality कशी आहे, त्याबाबत द्वैती, अद्वैती इ.विचार प्रस्तुत केलेले आहेत, हेही आपण जाणतोच. हे सर्व ज्या day-to-day Realityबाबत निर्णय करू पहातात, त्या Realityचे वास्तववादी स्वरूप कसे गुंतागुंतीचे आहे, हे समजावून घेण्याचा विचार वरील सर्व चर्चेमागे आहे. कारण सर्व तत्त्वज्ञान जे जीव-जगत-ईश्वर यांच्या स्वरूपाचा निर्णय करू जाते, त्याला Reality काय आहे याचा निश्चित निर्णय करणे भाग आहे. सध्याच्या वैज्ञानिक युगाने Realityबाबत आपणास एक नवीन दृष्टी दिली आहे, त्याबाबत नवीन जाणीव करून दिली आहे. त्या दृष्टीनेसुद्धा आपल्या जुन्या तत्त्वज्ञानाचा विचार होणे आवश्यक वाटते.

जीवाचे जे कोणते स्वरूप एक तत्त्वज्ञान सांगते, ते कोणत्या Realityतील आहे; जगाचे त्याने सांगितलेले स्वरूप असेच कोणत्या Realityतील आहे; ईश्वराचे स्वरूप, त्याचे अस्तित्व किंवा नास्तित्व जे काही त्या तत्त्वज्ञानास मान्य आहे, ते कोणत्या Realityतील आहे; या ज्या सर्व Realities समोर आहेत त्या unidimensional आहेत की Multidimensional आहेत; त्या co-existing in the same Space -Time -Matter - Energy Frame आहेत किंवा अन्यथा आहेत; असे अनेक गुंतागुंतीचे व पूर्वसूरींच्या तत्त्वज्ञान्यांनी विचार न केलेले प्रश्न आता आधुनिक विज्ञानाच्या प्रत्यक्ष व अनुमान तसेच शब्दप्रामाण्य *(वेदवाक्य व आप्तवाक्य)* यांद्वारे या पारंपारिक तत्त्वज्ञान्यांपुढे उभे आहेत, हे आपण या आधुनिक विज्ञानाच्या युगात लक्षात घेणे आवश्यक ठरते.

अन्यथा या प्रश्नांची उकल न करता आपले तत्त्वज्ञान सांगत गेलो, तर ते निव्वळ बौद्धिक चर्चेच्या स्वरूपाचे राहील; ते निर्णायक ठरणे तर दूरच, त्याचा वास्तवाशी-Realityशी काडीमात्रही संबंध असणार नाही. आणि मग ते काळाच्या या कसोटीस कसे उतरेल! आमच्या एका महान आचार्यांनी श्रुत प्रमाणाबद्दल काय म्हटले होते, ते पहा. ते स्पष्टच म्हणतात की ***"जरी श्रुतींचे प्रमाण अग्नि दाहक नाही असे असले, तरी मला जोवर तो दाहक आहे असा अनुभव आहे, तोवर मी ते श्रुतप्रमाण मानू शकत नाही."***

जी गोष्ट श्रुत प्रमाणाची, तीच वेगवेगळ्या दार्शनिक मतांची नाही का! तत्त्वज्ञान्याच्या मतास आपल्या दृष्टीने श्रुत प्रमाणाएवढी काही मान्यता नसते. म्हणजे आता आधुनिक विज्ञान वास्तववादातून ज्या प्रकारच्या Realityचे प्रत्यक्ष व अनुमान प्रमाण सादर करत आहे, त्या प्रमाणातून उघड होणाऱ्या प्रश्नांचे उत्तर ज्यात नाही, त्यांचे स्पष्टीकरण जे देऊ शकत नाही असे कोणतेही दर्शन म्हणा, तत्त्वज्ञान म्हणा, आचार्यांच्या या वास्तववादी दृष्टीकोनातून मान्य करणे कोणाही सुबुद्ध व्यक्तीस अवघड ठरेल. असो.

मूळ ग्रंथ जी गीता, तिचे तत्त्वज्ञान कोणते आहे आणि श्रीज्ञानेश्वर त्या तत्त्वज्ञानाची कोणत्या प्रकारे मांडणी वा उकल करतात, ते आपण मुख्यतः ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून या ग्रंथांतरी समजावून घेणार आहोत. त्यामागची अशी ही थोडी तात्त्वज्ञानिक पूर्वपीठिका आहे. ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथातून तत्त्वज्ञानविषयक जे विचार मांडले आहेत, ते बहुशः खंडणमंडणात्मक - पूर्वपक्ष- उत्तरपक्ष या धाटणीचे दिसून येत नाहीत. असा आविर्भाव त्यांच्या वाङ्मयात क्वचित् थोडाफार प्रत्ययास येतो पण कधी कधी.

कदाचित हे खंडनमंडनात्मक विचार त्यांच्या सांगण्यात अध्याहृतही असू शकतील, नाही असे नाही . क्वचित काही प्रसंगी त्यांनी ते तसे स्पष्टपणे मांडल्याचेही जाणवेल. पण अनेकदा त्यांचे म्हणणे ***विधेयात्मक*** **(statementlike)** असते आणि ***उपमान व अनुमान*** या प्रमाणांचा त्यात खूप प्रमाणात प्रयोग केलेला असतो. याचबरोबर न्यायशास्त्राच्या उर्वरित *प्रत्यक्ष प्रमाण, परःप्रमाण आणि शब्दप्रमाण (वेदवाक्य व आप्तवाक्य)* या प्रमुख प्रमाणपद्धतींचाही त्यात उपयोग केलेला दिसून येतो. तसेच आपल्या चर्चेच्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे *न्यायशास्त्र* ज्याला

योगज प्रत्यक्ष प्रमाण म्हणते, त्या अतींद्रिय अनुभूतींच्या प्रमाणाचा- ***यौगिक अनुभूतींचा*** -त्यांच्या वाङ्मयास फार मोठा आधार आहे हेही आपण लक्षात घेतले पाहिजे.

योगज प्रमाण व Surrealism

Realismमध्ये-वास्तववादात **योगज प्रत्यक्ष प्रमाणा**स तत्त्वत: काहीही मान्यता नाही. Altered states of consciousness - उदा.स्वप्न, निद्रा, मोहनिद्रा, वेड, बेशुद्धी, मादक व अमली द्रव्याच्या प्रभावाखाली उद्भवणाऱ्या मानसिक अवस्था यात मनुष्यास जे अनुभव येतात, *वास्तववादी* त्यांचा प्रमाणात व तोही प्रत्यक्ष प्रमाणात अंतर्भाव करीत नाहीत.

योग्याचे अतींद्रिय अनुभवही वास्तववादाच्या दृष्टीने असेच प्रमाण म्हणून धरले जात नाहीत. या सर्व प्रत्यक्ष अनुभवांस वास्तववादात काहीच किंमत नाही. यातील योगज अनुभव हे वैदिक तत्त्वज्ञाने व गीता-ज्ञानेश्वरी यांच्या दृष्टीने जसे मान्यतम प्रत्यक्ष प्रमाणात मोडतात, तसे ते इतर कोणत्याही Realistic तत्त्वज्ञानात धरले जात नाहीत. आधुनिक वैज्ञानिक विचारसरणीत तर अशा कोणत्याच प्रमाणास स्थानही नाही.

वैज्ञानिक दृष्टिकोन व वास्तववादी तत्त्वज्ञाने आणि वैदिक तत्त्वज्ञानप्रणालीत यामुळे फार अंतर पडते. वेद, श्रुति, स्मृती इ.वाङ्मय, ऋषिमुनींचे अनुभव यांस वैदिकात ***शब्दप्रमाण*** म्हणून मान्यता आहे. *वास्तववाद* व विज्ञानाचे मात्र तसे नाही. या गोष्टींचा तेथे विचारही केला जात नाही.

वास्तविक पहाता योगज प्रमाण व अनुभूती आणि शब्दप्रामाण्य हीच बऱ्याच अवैदिक, तसेच वास्तववादावर आधारित असणाऱ्या इतर भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानशाखा, इतर शास्त्रे आणि विज्ञान यांच्यात बहुतेक भारतीय तत्त्वज्ञानशाखा यांच्यापासून अंतर पाडणारी प्रमुख कारणे आहेत.

या सर्व विचारांवर एक दृष्टिक्षेप टाकल्यास आपण ज्या गीता-ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा विचार करीत आहोत, ते तत्त्वज्ञान Surrealistic असल्याचे आपणास जाणवेल. या तत्त्वज्ञानात थोडा Pluralistic भाग व बराच Surrealism आहे. त्यात जो वास्तववादाचा थोडाफार भाग आहे, तो मूलभूत स्वरूपाचा नाही, तर आनुषंगिक व दुय्यम महत्त्वाचा आहे.

सर्वसाधारणपणे हे तत्त्वज्ञान, इतर वैदिक तत्त्वज्ञानांप्रमाणेच प्रामुख्याने Surrealistic आहे आणि गीता-ज्ञानेश्वरी मिळून उपपन्न होणाऱ्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप Pluralistic Surrealism असे असल्याचे म्हणावे लागते. त्यात आत्मानुभूती, अलौकिक शब्दप्रामाण्य, वेदवाक्य, ऋषिमुनींची आप्तवाक्ये व त्यांचे योगज ज्ञान यांवर मुख्य भर असल्यामुळे असे हे तत्त्वज्ञान Realistic न ठरता Surrealistic ठरले तर काही नवल नाही.

भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रमुख भाग आणि गीतेचे तत्त्वज्ञान आणि त्यावरील ज्ञानदेवांचे मंडणात्मक तत्त्वज्ञान यांचा हा विशेष मनावर ठसवून घेतच आपण माझ्या या ग्रंथाचे परीक्षण करावे असे मला आवर्जून सांगावेसे वाटते!! तसेच वैदिक विचारधारा, गीता, उपनिषदे इ.वाङ्मय आधुनिक विज्ञानाच्या आधारे समजावून द्यावे असा जो एक आग्रह अलीकडे धरला जातो, त्यातील वैय्यर्थ्यही जिज्ञासूंच्या लक्षात येईल असे मला वाटते. ***आधुनिक विज्ञान आणि वैदिक तत्त्वज्ञान या अगदीच भिन्न अशा विचारधारा आहेत. एक आहे Realistic, तर दुसरी आहे Surrealistic. यांची परस्पर मेळणी करणे त्यामुळे शक्य होत नाही.***

तसेच मागे आपण आपले पारंपारिक तत्त्वज्ञान आधुनिक विज्ञानाच्या वास्तववादातून निर्माण होणाऱ्या Realityसंबंधीच्या प्रश्नांचे समर्पक उत्तर देण्यास समर्थ आहे का असा जो प्रश्न मांडला होता, त्याचेही उत्तर काहीसे असेच आहे.

पारंपारिक तत्त्वज्ञान वेद, आप्तवाक्य, योगज प्रमाणादींवर अतिरिक्त भर देते; ते *Surrealistic* आहे; अर्थातच Realityशी त्याचा वास्तववादी दृष्टिकोनातून असतो तसा संबंध नाही; ***गीता व ज्ञानेश्वरी तर आपणास मुख्य म्हणजे योगच सांगण्यास सिद्ध झाल्या आहेत, तेव्हा त्यांचा अजूनही अधिकच भर योगज अनुभूतींवर असणार, हे वेगळे सांगणे आवश्यक नाही; या प्रमुख गोष्टी लक्षात घेता आपणास या तत्त्वज्ञानातून Realityबद्दलचे Surrealistic योगानुभूत असेच उत्तर मिळेल आणि त्याचा Realismशी सांगण्यासारखा विशेषसा संबंध नसणार, हे स्पष्टच आहे.*** असो.

या पार्श्वभूमीवर आपण आता ***गीता व ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान व योग*** यांचा प्रारंभिक विचार करू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::ग्रन्थामागील भूमिका::

::उत्तररंग::

::गीता व ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान व योग::

गीता व ज्ञानेश्वरी: योग आणि तत्त्वज्ञान::::

योगशास्त्राचा विचार

तत्त्वज्ञान विषयाचा हा असा वेध घेत असतांनाच वास्तवाचा त्याच्याशी संबंध कसा जोडता येईल, जीवन आणि तत्त्वज्ञान यांचा मिलाप कसा करता येईल, या दृष्टीने मी भारतीय अध्यात्मप्रणालीतील योगशास्त्राचा परिचय करून घेत होतो. त्यानुसार योगशास्त्राचे ग्रंथ पाहणे आणि त्या शास्त्राचा शास्त्रोक्त पद्धतीनुसार एका सांसारिक मनुष्यास या धकाधकीच्या काळात, जबाबदारीच्या जागांवर व्यावसायिक काम संभाळून करता येईल तेवढा अभ्यास करणे, हेही मी अनेक वर्षे सातत्याने करत गेलो.

तसेच काही अनुभवसिद्ध योगधारक व्यक्तींचा सहवासही मला वेळोवेळी प्राप्त होत गेला. असलेच तर काही पूर्वसंचित म्हणा, मी योगसाधनेकडे आकर्षिला गेलो आणि त्यातून मला काही विशेष अनुभव प्राप्त झाले. ***"एका योग्याचे आत्मवृत्त"*** या परिशिष्टवजा उन्मेषात ते या ग्रंथात समाविष्ट केले आहेत.

या सर्वांमुळे *ज्ञानदेवीतील योगविषयक जो गूढ भाग आहे, विशेषेकरून जो तिच्या सहाव्या अध्यायाशी संबंधित असा आहे व ज्या यौगिक अनुभूती ज्ञानदेवांच्या अभंगवाणीतून प्रगटतात आणि अमृतानुभवाची जी एक अत्युच्च अशी समजली जाणारी अवस्था आहे; कुंडलिनी योगप्रक्रियेचे जे विशिष्ट टप्पे आहेत; त्या सर्वांचे कल्पनाचित्र अनुभवाधारित वास्तव असे माझ्या अंतर्यामी प्रगट होऊ शकले; तो ज्ञानेश्वर वाङ्मयाचा गूढातिगूढ भाग माझ्या आकलनात येऊ शकला आणि या अंतर्वेद्य अशा माझ्या आत्मजाणीवेच्या प्रकाशात त्या भागासंबंधीचे निश्चित असे लेखन मला विश्वासपूर्वक करता आले.*

तसेच योगशास्त्रावरील माझ्या हाती पडलेले पंडितांचे, योग्यांचे, शास्त्र्यांचे ग्रंथ व वाङ्मय पाहून त्यांची मिती व परिमाण यांचा विवेक करता येऊन माझ्या परीने निश्चित असे काही विवेचन मला करता आले. अर्थातच ज्या गोष्टींबाबत अनुभवभिन्नता असू शकते, त्या गोष्टींचा दोन्ही प्रकारचा विचार मांडून त्यांचा निर्णय मी सुज्ञ अनुभवी वाचकांवरही सोपविलेला आहे. योगाभ्यासी जिज्ञासूंनी त्यांची इच्छा असल्यास आपली अनुभवाधारित मते मला जरूर कळवावीत ही विनंती. असो.

तर या सर्व उपक्रमांचे व विचारांचे फलित म्हणजे हा ग्रंथ ज्या उद्देशाने मी लिहीत गेलो, तो म्हणजे ज्ञानेश्वरी व तिच्याद्वारे गीतेची उकल करावी, हा अधिकाधिक सिद्ध होत गेला. माझी या ग्रंथांविषयीची जाण वाढत जाऊ लागली आणि ते माझ्या अंतरीच्या समाधानाचे आजही एक मोठे प्रयोजन होऊन राहिले आहे. यात मला फार आनंद आहे आणि तोच समानशीलांपर्यंत पोहोचवता येतो कां याची मी या ग्रंथाद्वारे चांचपणी करूं गेलो.अन् मला हे नमूद करण्यास अत्यंत समाधान वाटते की जेव्हां मला असे कोणी ***भेटो मज जातीचे*** भेटले, तेव्हां त्यांनाही यातील विचारांनी आंतरिक आनंद दिला. याविषयी एक गोष्ट अशीही नमूद करावीशी वाटते की **या ग्रंथात जो विचार मांडला आहे, तो वास्तवाचा तत्त्वज्ञानाशी असणारा संबंध उलगडून दाखविण्याचा एक प्रयत्न आहे.**

नुसताच तत्त्वज्ञानाचा बौद्धिक विचार करणे, Armchair Philosophy मांडणे असा Ivory Tower धर्तीचा हा प्रयोग नाही. तर प्रायोगिक दृष्टी ठेवून हा विषय मांडणे हा माझा मूळ हेतू आहे. वास्तव व तत्त्वज्ञान यांची सांगड घालणारा विषय पारिभाषिक रीत्या योग या शब्दाने निर्देशिला जातो. म्हणूनच हा ग्रंथ अर्थातच योगशास्त्रसंबंधित आहे; म्हणून मी यात विशेष अशी ललित वाङ्मयीन दृष्टी ठेवली नाही.

ज्ञानेश्वरीतील साहित्यिक रसवत्ता, त्यातील कलाकृती, यांनी मला मोहवले नाही, असे नाही. पण ***माझ्या ग्रंथलेखनाच्या उद्दिष्टानुसार हा ग्रंथ तसा आमच्या वैज्ञानिक पार्श्वभूमीच्या दृष्टिकोनातून बराचसा matter of fact अशा पद्धतीने त्यास साजेशा भाषेत लिहीला गेला.***

पातञ्जल योगसूत्रे

योगशास्त्राच्या मध्यवर्ती कल्पनांसाठी मी ***पातञ्जलयोग*** सूत्रांचा अवलंब केला आहे. माझ्या अल्पमतीप्रमाणे या योगसूत्रांसारखे संक्षिप्त व सर्वंकष योगशास्त्र सांगणारे दुसरे कोणतेही ग्रंथ दिसून येत नाहीत. या पातञ्जलसूत्रांद्वारे योगशास्त्राचे मूल सिद्धांत स्पष्ट होतात. या सूत्रांवरील जे ग्रंथ मी पाहिले त्यात ***व्यासभाष्य,*** श्री. कृ.के. कोल्हटकर यांचे ***पातञ्जल योगदर्शन (भारतीय मानसशास्त्र),*** नानाभाई रेळे यांचा पातञ्जलयोगसूत्रावरील ग्रंथ, ओमानंद स्वामींचे पातञ्जल योगदर्शन, विष्णुतीर्थ महाराजांचे व स्वामी विवेकानंदांचे ***राजयोग*** हे या विषयावरील ग्रंथ इ.प्रमुख होत.

त्या सर्व ग्रंथांवरून मला असे दिसून आले की ***सर्व सशास्त्रीय अशा भारतीय योगप्रणाली मुळात पातञ्जलयोगसूत्रांनी निर्देशिलेल्या योगशास्त्राच्या अनुबंधावर आधारित आहेत. या सूत्रात सर्व योगधारांची मूलतत्त्वे समाविष्ट केलेली आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.***

आता हे पातञ्जलयोगशास्त्र द्वैती सांख्यशास्त्रावर आधारित आहे; त्यातील **ईश्वर** ही संकल्पना काही वेगळीच आहे; ते आद्य शंकराचार्यांकडून प्रत्युक्त ठरविले गेले आहे; ते सेश्वर आहे की निरीश्वर आहे, इ.तात्त्विक चर्चा बाजूला ठेवू या. पण ते एक *प्रायोगिक शास्त्र* आहे, हे मात्र निर्विवाद पटणारे आहे. त्याची *यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि* ही अष्टांगे पूर्ण प्रायोगिक आहेत.

यम कोणते; नियम कोणते; प्राणायाम कसा करावा; प्रत्याहाराचे प्रमाण किती असणे आवश्यक आहे; धारणा व ध्यान ही कशावर करावीत; ती सगुण का निर्गुण करावीत; समाधिस्थिती कोणती वाञ्छनीय आहे; कोणत्या अंतिमतत्त्वाचे ध्यान करावे; प्रत्येक तत्त्वप्रणालीला विवक्षित असणारे अंतिम तत्त्वाचे स्वरूप वेगवेगळे असल्याने पातञ्जल योगसूत्रांतील **प्रकृती *(प्रधान)* व पुरुष** या अंतिम तत्त्वांचा त्या विविध तत्त्वांशी समन्वय कसा करता येतो; इत्यादी तपशीलाबाबत विविध तत्त्वज्ञानाधिष्ठीत योगप्रणालींनुसार भिन्नभिन्नता आढळून येते.

तरीही ***शास्त्रदृष्ट्या पतञ्जलींनी जे सांगितले आहे, ते प्रयोगसिद्ध आहे आणि त्यांचे सिद्धान्त generalised form मध्ये सर्व विविध योगप्रणाल्यांच्या मूलगामी आहेत,*** असे आपणास जाणवते. ही योगसूत्रे जर एका broad generalised pattern मध्ये पाहिली तर अत्यंत succinct आहेत, असेच जाणवते आणि तारतम्य भावाने त्यांचे सार ग्रहण केल्यास त्यांचा गीता-ज्ञानेश्वरीची उकल करण्यास फार उपयोग होतो असे मला वाटते. म्हणूनच ***मी या योगसूत्रांचा गीता-ज्ञानेश्वरीचे योगविश्व समजावून घेण्यासाठी पूरेपूर उपयोग करून घेतला आहे.***

गीता-ज्ञानेश्वरी व योगसूत्रे

असा जो एक मुद्दा आहे की गीता ***भक्ती, ज्ञान, कर्म व ध्यान*** अशा ज्या चौविध मार्गांचा योगधारणेसाठी पुरस्कार करते, त्यांचा, ध्यानयोग सोडता, *पातञ्जल* योगसूत्रांशी कसा काय संबंध जोडला जाऊ शकतो, त्याचे उत्तर आणि या सर्व मार्गांचे समन्वयन जिज्ञासूंनी प्रस्तुत ग्रंथांतरी पहावे. ***ईश्वरप्रणिधान*** हा या सर्व गीतोक्त योगविशेषांचा पाया आहे; समाधि ही त्यापासून होणारी योगसिद्धी आहे. ती संप्रज्ञातातून असंप्रज्ञाताकडे कशी विकसित होते; संयम कशा प्रकारे सिद्ध होतो आणि हे सर्व गीतेच्या श्लोकांद्वारे कसे व्यक्त होते; हा सर्व विचार तपशिलासह तेथे सापडेल आणि तो जिज्ञासूंचे समाधान करणारा ठरेल असे वाटते.

आता *गीता व पातञ्जल योगसूत्रे* यांचा जरी असा संबंध असल्याचे दिसून आले, तरी ज्ञानेश्वरीतील योग ज्या ***कुंडलिनी*** या गूढ शक्तीवर आधारलेला आहे, त्याचा व त्या गूढ शक्तीचा पातञ्जलसूत्रांशी कसा संबंध जोडता येईल, अशीही एक शंका उद्भवते. कारण या योगसूत्रात कुंडलिनीचा कोठेही स्पष्ट वा पुसट असा निर्देशही नाही, असे बऱ्याच विद्वानांचे मत असल्याचे दिसते. त्याविषयी श्री. कृ. के. कोल्हटकर यांचे मत त्यांच्या *भारतीय मानसशास्त्र* या ग्रंथात पहावे. तसेच मी या प्रस्तुत ग्रंथांतरी माझ्यापरीने केलेला उलगडा पहावा.

श्री. कोल्हटकरांच्या मते धारणा, ध्यान इ.कुंडलिनीसंबंधित असणे हे अधिक वाञ्छनीय दिसते. अशा धारणादींच्या विशेष तपशिलात ते शिरत नाहीत, ही वेगळी गोष्ट*(सूत्र ३-१ व २)*. माझ्या या प्रस्तुत ग्रंथाच्या पातञ्जलयोगसंबंधित सहाव्या उन्मेषात *पा. यो. सू. क्र. १-४८ व ३-५* यातील ***प्रज्ञा वा ऋतंभरा प्रज्ञा*** हीच ***कुंडलिनी*** होय अथवा कुंडलिनी जागृतीचे फल होय असे म्हटले आहे. तसेच *योगविभवभांडार (उन्मेषः४४-२:योगविभवभाण्डार-कुंडलिनी जगदम्बा, पृ.क्र.७३४)* या चव्वेचाळिसाव्या आणि *लययोगसमालोचन* या पंचेचाळिसाव्या उन्मेषात ***पंथराज व पातञ्जल योगाचा समन्वय, प्रज्ञा व कुंडलिनी, कुंडलिनीचे ध्यान, धर्ममेघ समाधि*** इ.विषय येतात. त्यावरून जिज्ञासूंना हा विषय अधिक स्पष्ट होईल.

या विषयाबाबत थोडा खुलासा असा की प्रज्ञेच्या आधारे साधकाने कुंडलिनीचे उत्थापन करावे. त्यासाठी धारणा, ध्यान इ.मूलाधारचक्र व कुंडलिनी यांवर अशी असली पाहिजेत. प्रज्ञेच्या जागृतीने हा विषय असा अवगत व्हावा यातच प्रज्ञेचा योग्य विनियोग आहे. अथवा प्रज्ञा ही कुंडलिनी जागृतीचे फल आहे, असेही काहींचे मत आहे. *प्रत्यक्चेतनेला* पण काही अभ्यासकांनी *कुंडलिनी* म्हटले आहे.

प्रज्ञा व कुंडलिनी यांचा समन्वय करावा म्हटले तर ***"संयम -➤प्रज्ञाजागृती-➤कुंडलिनी उत्थापन"*** अथवा ***"संयम -➤(कुंडलिनीजागृतीची अध्याहृत स्थिती) -➤प्रज्ञेचा उदय"*** असा कोणतातरी एक क्रम धरण्याऐवजी:

संयम }-[-➤ प्रज्ञेचा उदय]
}-[-➤कुंडलिनी जागृती]

असा क्रम घेणे अधिक योग्य आहे.

दुसरे असे की ***ऋतंभरा प्रज्ञेची व प्रज्ञेची आणि तिच्या उदयाची लक्षणे; व कुंडलिनीची लक्षणे व तिच्या जागृतीची लक्षणे म्हणजे ज्ञान, बल व क्रिया ही विशेषत्वाने होणे; ही तशी समसमानच आहेत. म्हणून प्रज्ञा तीच ऋतंभरा प्रज्ञा व तीच म्हणजे कुंडलिनी असे समीकरण मांडणे अधिक उचित वाटते.***

या सर्वांचे सुसूत्रीकरण करावे यासाठी ***पा.यो.सू.३-५* मधील *प्रज्ञा* व १-४८ मधील *ऋतंभरा प्रज्ञा* ही दोन्ही एकच असून *निर्विचारवैशारद्य* म्हणजेच संयमाची उत्क्रांत अवस्था धरून ही प्रज्ञाच *कुंडलिनी* वा *देवात्मशक्ती* वा *सरस्वती* असल्याचे मी म्हणत आहे.**

या सर्व विषयाचे म्हणजे *वितर्क-विचारानुगत संप्रज्ञात समाधि, निर्विचारवैशारद्य, प्रज्ञाजागृती, सानंद व सास्मित समाधि, धर्ममेघ समाधि* व यांच्याशी कुंडलिनीचा आणि तिच्या सुषुम्ना व षट्चक्रे यातील मार्गक्रमणाचा असलेला संबंध यांचे अंतिम सर्वेक्षण शेहेचाळिसावा उन्मेष *योगपर अभंग* यांतील *मुक्ती व समाधिविचार*

आणि *धर्ममेघ समाधि* या *समाधि व मुक्ती यांचा समन्वय, समाधीचा अधिक विचार व मुक्तीचा अधिक विचार* या विभागात केलेले आहे. त्यावरून ***कुंडलिनी जागृती व तिच्या उत्क्रमणाचा पातञ्जलयोगसूत्रोक्त भूमिकांशी असणारा संबंध*** स्पष्ट होईल.

जिज्ञासूंना अजूनही एक प्रश्न पडतो. काही योगग्रंथातून कुंडलिनीला बलपूर्वक जागृत करून तिचे स्वसामर्थ्याने नियंत्रण करून हठात् चक्रक्रमण करण्याचे विधान आढळते. तर इतर काही सांप्रदायिकांचे मत असे करू नये, तर तिला स्वेच्छया आपली जागृती व मार्गक्रमण करू द्यावे, असे आहे. तसेच काही योगविद् म्हणतात की कुंडलिनीचा आरोह-अवरोह रोज साधनेच्या काळी करविला पाहिजे व साधनेनंतर तिला मूलाधारचक्री पुन: स्थापिले पाहिजे.

माझ्या मते या दोन भिन्न प्रणाली आहेत. ग्रंथांतरी ***ज्ञानदेवांचा पंथराज*** हा गुरुगम्य असा योगमार्ग असून गुरुकृपेने कुंडलिनीयोगाच्या प्रक्रिया स्वयेच घडतात असे दाखवून दिलेले आहे व त्यात स्वसामर्थ्यावर हठात् करण्याचा भाग नाही हे दिसून येईल.

अर्थातच *गुर्वेच्छा* हीच यात प्रमाण आहे आणि *कुंडलिनी* ही तर स्वयं गुरूची शक्ती-*इच्छा-बल-क्रियास्वरूप* असल्याने व ती चिन्मयी सर्व ज्ञानमयी शक्ती असल्याने योग्य त्या आरोहअवरोहादी व चक्रभेदनादी अनेकानेक सूक्ष्म व गुंतागुंतीच्या क्रिया ती स्वयमेवच घडवून आणील, हेच ज्ञानदेवांना अभिप्रेत असले पाहिजे. आणि अशा या कुंडलिनीचे जर कोणी हठात् नियंत्रण करू पहात असतील, तर तो त्यांचा भ्रमच असावा. असो.

हा एवढा विषयांचा उहापोह येथे करण्याचे कारण असे की हा सर्व भाग ग्रंथांतरी वेगवेगळ्या जागी विखुरलेल्या स्वरूपात आलेला आहे व पूर्ण ग्रंथ न पहाताच जर कोणी वाचक आपले मत निश्चित करू जातील तर त्यांनी तसे करू नये हेच आहे.

तसेच माझी बरीच मते अगदी स्वतंत्र असून ती पूर्वप्रस्थापित मतांशी सर्वार्थाने जुळतीलच अशी नाहीत. जिज्ञासूंनी संपूर्ण ग्रंथाचे परीक्षण करून आपले मत ठरवावे व शक्य झाल्यास ते अनुभवाद्वारे पारखून पहावे अशी नम्र सूचना यासाठीच करीत आहे. असो. या सर्व विषयाचे बृहदावलोकन करणाऱ्यांस गीता, ज्ञानेश्वरी यातील योग, *पंथराज* वा *क्रमयोग* आणि *कुंडलिनी* यांचा *पातञ्जलयोगा*शी कसा अतूट संबंध आहे, ते दिसून येईल.

गीतेमागील यौगिक दृष्टीकोन

दुसरी गोष्ट अशी की ***गीता*** ही मुळात तत्त्वज्ञान सांगण्याकरता आहे का! ***"इति श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायाम् योगशास्त्रे"*** असे घोषवाक्य प्रत्येक अध्यायांती दिमाखाने जी गीता मिरवते, तिच्यात उपनिषद्विचार असणे साहजिकच आहे. उपनिषदातील विचार दोन प्रकारांचे आहेत. एक तत्त्वज्ञानविषयक आणि दुसरा साक्षात्कारविषयक. पण ***ब्रह्मविद्यायाम् योगशास्त्रे*** या मुद्रेवरून हा ग्रंथ मुख्यत्वेकरून योगशास्त्रावरचा आहे असे दिसून येते.

ब्रह्मविद्या म्हणजे *ब्रह्मज्ञानविषयक विद्या*. हिचे दोन प्रमुख विभाग आहेत. एक म्हणजे ***तत्त्वज्ञान*** व दुसरा म्हणजे ***योगशास्त्र.*** एक तात्त्विक विवेचन तर दुसरे प्रायोगिक शास्त्र.

गीता हा ग्रंथ जर मुळातच साक्षात्कारपर योगशास्त्र सांगण्यास प्रवृत्त झाला आहे, तर त्यातील तत्त्वज्ञानाचा भाग आपोआपच गौण ठरतो. म्हणजे त्यात बरेचसे तत्त्वज्ञानविचार गृहीत धरलेले असणे, त्यांचे प्रसंगोपात्त योगशास्त्राच्या संदर्भात निर्देश येणे, त्या विचारांचा आवश्यक तो मागोवा घेणे, असा तत्त्वज्ञानाचा भाग त्यात येणार; पण तो योगशास्त्र नीट समजावून देण्यापुरताच, हे निश्चित!

त्याच अर्थी ***ज्ञानदेवांनी गीतेचे जे तत्त्वज्ञान मांडले आहे, तेही त्याच दृष्टीने त्यांच्या योगविषयक भूमिकेच्या निरूपणासाठी आणि आपल्या योगज अनुभूतींच्या आधारेच आहे हे कळून येते.*** आणि त्यासाठी योगनिरूपणास बाधक नसणाऱ्या तत्त्वज्ञानांचा समन्वय करणे आणि गीतेतील एतद्विषयक तत्त्वज्ञानाची उकल करतांना त्यांनी त्यासाठी गीतेव्यतिरिक्त इतर अक्षरवाङ्मयाचा विचार करणे हेही क्रमप्राप्त दिसते.

गीतेतील तत्त्वज्ञानाचा असा योगशास्त्राच्या दृष्टीने उपपन्न होणारा विचार आणि समन्वयन आपणास या ग्रंथांतरी दिसून येईल. आता आपणास या तत्त्वज्ञानविचारांकडून गीता-ज्ञानेश्वरींतील मुख्य विषयाकडे वळायला हवे. ***योग*** **हाच तो मुख्य प्रतिपाद्य विषय आहे.** भगवंतांना जर अर्जुनास निव्वळ तत्त्वज्ञानच सांगावयाचे असते, तर ते अनुभवण्यासाठी योगाचा जो भाग आहे तो सांगण्याची काय आवश्यकता होती! पण ***योगारूढ होऊन कर्म केल्यास प्रकृतीचा बंध राहणार नाही, हे अर्जुनाच्या मनावर बिंबवण्यासाठी भगवंत गीता सांगत आहेत.***

त्यात प्रकृती म्हणजे काय, तिच्या बंधाचे स्वरूप, जीव-जगत -ईश्वर यांचे स्वरूप इ.तत्त्वज्ञानविषयक भाग येणे साहजिकच आहे. पण अर्जुनाची मुख्य कर्माकर्माबाबतची जी विवंचना होती, तिचा सोक्षमोक्ष केवळ एवढेच सांगून होणार नव्हता, तर त्याला ***योगारूढ होण्याचे प्रायोगिक कौशल्य कसे मिळवावे, तेच सांगणे मुख्यत्वेकरून महत्त्वाचे होते.***

म्हणून आपणास *गीतेने योगशास्त्र कशा प्रकारे सांगितले आहे आणि ज्ञानदेवांनी त्याचे कोणत्या भूमिकेतून निरूपण केलेले आहे,* हे पहावेच लागते. *कारण* ***गीतेचा व म्हणून ज्ञानेश्वरीचा योगशास्त्र हाच प्रमुख विषय आहे.*** आपण नुकताच यामागच्या तत्त्वज्ञानविचाराचा एक overview घेतला आहे; विहंगावलोकन केले आहे. तेव्हा आता योगशास्त्राविषयी या ग्रंथांमधून आपणास काय प्रतीत होते, ते पाहू या.

गीतेतील प्रतिपाद्य योग व तत्त्वज्ञान

गीतेतील योगाचा पातञ्जल योगाशी असणारा संबंध आपण पाहिला. तसेच पातञ्जल योगसूत्रे व कुंडलिनी यांचा संबंध कशा

स्वरूपाचा आहे, तो ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांतर्गत विवेचिलेल्या, कुंडलिनीवर आधारित योगाच्या संदर्भात पाहिला. ज्ञानेश्वर जो ***पंथराज व क्रमयोग*** सहाव्या व अठराव्या अध्यायी अनुक्रमे वर्णितात; व जो त्यांच्या मते योगसाधनेचे सार आहे, त्याचा कुंडलिनीशी घनिष्ट संबंध आहे.

गीतेत तर कुंडलिनीचा स्पष्ट उल्लेख कोठेही नाही. म्हणून ***ज्ञानदेवांनी जो योग प्रमुख उपाय म्हणून सांगितला आहे, त्यास अवश्यंभावी असणाऱ्या कुंडलिनीजागृतीचा गीतेतील योगाशी कोणता संबंध आहे; हा प्रश्न आपणापुढे येतो.*** या प्रश्नाची उकल करण्यासाठी अनेक गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

त्यासाठी गीता मुळात कोणता योग सांगत आहे; ती एक की अनेक योगप्रकार सांगत आहे; कर्मयोग, ज्ञानयोग, ध्यानयोग, भक्तीयोग इ.अनेक योग भगवंतांस अभिप्रेत आहेत का; तसे असल्यास, किंवा अन्यथा पण, त्या सर्व योगविशेष म्हणून समजल्या जाणाऱ्या योगप्रक्रियांचे गीतोक्त स्वरूप काय आहे; ज्ञानदेवांचा या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टीकोन कोणता आहे; ज्ञानदेव कोणकोणते योगप्रकार गीतोक्त म्हणून सांगतात; त्यांचा ***कुंडलिनीयोग-पंथराज व क्रमयोग*** - गीतोक्त आहे की तो त्यांनी गीतेवर आरोपिला आहे; जर त्यांनी गीतेत नसलेला हा योग गीतेवर आरोपिला असेल, तर गीतेतील खरा योगमार्ग कोणता; व तो एक की अनेक व कोणते; इ.विषयांचा निर्णय करावा लागतो.

वरील सर्व विचार माझ्या या ग्रंथांतरी आलेला आहे. किंबहुना ***गीतेतील योगमार्गाची निश्चिती करणे; ज्ञानेश्वरीतील योगमार्गाची निश्चिती करणे; त्यांचे स्वरूप अवलोकिणे; त्या योगांचे मूलतत्व (Basic Principle) शोधणे; त्याद्वारे मुमुक्षूंना या ग्रंथांनी कोणता मार्ग उत्तम म्हणून निर्देशिला आहे, त्याचा सविस्तर विचार करणे; आणि या सर्वांचे परस्परानुरूपत्व गीता व ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात पाहत पाहत योगमूल अशा पातञ्जलयोगसूत्रांशी त्यांची सांगड घालून देणे; ही सर्व माझ्या या ग्रंथातील प्रमुख विचारधारा आहे.*** तिच्याकडे मी जिज्ञासू वाचकांचे येथे मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो.

गीतेत साधकानुरूप असे अनेक प्रकारचे योग सांगितले आहेत, असे काही विद्वानांचे मत आहे. त्याबाबत काही प्रमुख प्रमुख तत्त्वज्ञांची मते आपणास कशी कळली आहेत, ते पाहू या.

मा.स्व.लो.टिळक यांचा ***गीतारहस्य*** ग्रंथ सुप्रसिद्धच आहे. त्याच्या *उपसंहार* प्रकरणी अंतिम परिच्छेदात काय सांगितले आहे, ते वाचकांनी पहावे. गीताधर्म ज्ञान-भक्ती-कर्मयुक्त आहे; कर्म, बुद्धी व प्रेम या तिन्हीत विरोध न दिसावा त्यासाठी भक्तीची, ब्रह्मज्ञानाची व कर्तृत्वाची जोड हा धर्म घालून देतो, असे त्यांचे म्हणणे दिसते. आपल्या मते याचा अर्थ ***गीतेतील योगास ज्ञान, कर्म व भक्ती यांची जोड आहे व तोच गीतेतील प्रतिपाद्य योग आहे असे दिसते. हा योग ज्ञान-भक्ती-कर्मयुक्त आहे.***

योगी श्री अरविंद यांच्या Essays on the Gita या ग्रंथातून *गीतेतील योग हा कर्म, भक्ती व ज्ञान याचा त्रिवेणी संगम* असल्याचे निर्णायक मत ध्वनित होते. *गीता दैवी प्रेम व भक्तीची शिकवण देते; ज्ञान, कर्म व भक्ती यांचे पूर्ण एकत्व, त्यातील भिन्नतेचे व वैशिष्ट्यांचे एकमेकात अभिन्नतेने मिसळून जाणे, त्या तिन्हींचे धागे एकमेकात गुंफले जाऊन सामरस्य पावणे आणि या सर्वांची आत्मस्वरूपाविष्कारात सर्वंकष परिणती होणे; असा हा गीतेचा त्रिवेणीसंगमाचा योगमार्ग असल्याचे त्यांचे मत असल्याचे आपणास जाणवते.*

गीतेचा असा जो योगमार्ग आहे, त्यामागचे *तत्त्वज्ञान* कोणते आहे, हा विचारही त्यांनी आपल्या ग्रंथात केला आहे. आपणास त्यातून असे दिसून येते की पांचही प्रमुख आचार्यांनी प्रस्थानत्रयीतील गीतेचे महत्त्व ओळखून आपापल्या मतांच्या प्रस्थापनेसाठी व दुसऱ्यांच्या विरोधी मतांच्या पाडावासाठी गीतेस एक शस्त्र म्हणून वापरले; गीतेत जरी *केवलाद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत, द्वैताद्वैत, सांख्य, शुद्धाद्वैत* इ.मतातील विचार आहेत, तरी ती तशी मते जशीच्या तशी गीतेस मान्य नाहीत; पूर्वीची उपनिषदे जसे श्रुतींचे समन्वयन करतात, तसेच गीता पण तिच्या पूर्वकालीन वेदोपनिषदादी विचारधारांचे समन्वयन करते; गीतेचा उद्देश एकांगी तत्त्वज्ञान मांडणे हा नसून, विविध तत्त्वज्ञानधारांचे समन्वयन करणे हा आहे, असा त्यांच्या सर्व अभिप्रायाचा व चर्चेचा निष्कर्ष आहे.

केवलाद्वैतादी विविध तत्त्वज्ञानांचा, सांख्यादी षट्शास्त्रांचा, शैव, जैन, बौद्ध इ.मतांचा संक्षिप्त विचार मी अगोदरच ***"ग्रंथामागील भूमिका मध्यरंग-१ -भारतीय तत्त्वज्ञानप्रणाली"*** या विभागात समाविष्ट केलेला असल्याने त्यांच्याबाबत येथे अधिक विचार सांगणे आवश्यक नाही. असो.

आता विशिष्टाद्वैतवादी रामानुजाचार्य आणि त्यांचे पूर्वाचार्य यामुनमुनी यांचे मत काय आहे, ते पहा. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग हे तिन्ही अन्योन्य आहेत, असे त्यांचे मत आहे. *गीतार्थसंग्रह* या प्रकरणात यामुनाचार्य (मुनी) सांगतात :

"कर्मयोगस्तपस्तीर्थदानयज्ञादिसेवनम्। ज्ञानयोगो जितस्वान्तैः परिशुद्धात्मनि स्थितिः।। नित्यनैमित्तिकानां च पराराधनरूपिणाम्। आत्मदृष्टेस्त्रयोप्येते योगद्वारेण साधकाः।। निरस्तनिखिलाज्ञानो दृष्ट्वात्मात्मानम् परानुगम्। प्रतिलभ्य पराम् भक्तीम् तयैवाप्नोति तत्पदम्।।२४, २५ व २६।।"

नित्यनैमित्तिक कर्मांनी या तिन्ही योगात आत्म्याची उपासना केली जाते. आत्मसाक्षात्काराचे फल या तिन्ही योगांनी प्राप्त होत. अज्ञानाचा निरास झाला की पराभक्ती प्राप्त होते. कैवल्याची स्थिती या प्रत्येक योगाने प्राप्त होते. परंतु भक्तियोग हा सुलभ व सर्वैश्वर्य प्राप्ती करून देणारा आहे. सर्वभावाने ईश्वरास अनन्य शरण होणे*(प्रपत्ति)* या मार्गाने व कर्म-ज्ञान-भक्ती ही सर्व ईश्वरास प्रिय आहेत, हे जाणून त्याचे सेवाराधन करणे यामुळे मनुष्यास त्याचे पद प्राप्त होते, असा

गीतार्थसंग्रहाचा भावार्थ आहे. अर्थातच विशिष्टाद्वैत मतात ज्ञान- कर्म- भक्ती या तिन्ही मार्गांचा अन्योन्य संबंध असून भक्ती हे सुलभ साधन त्याचा अंगीकार करून इतर ज्ञानकर्मादी साधने अवलंबावीत असे सुचविलेले दिसून येते.

आता केवलाद्वैती श्रीमच्छंकराचार्य यांचे याविषयीचे मत थोडक्यात पाहू: आचार्यमते गीता निःश्रेयसप्राप्तीचे दोन मार्ग *(धर्म)* सांगते. ते म्हणजे प्रवृत्ति*(लक्षण)* पर धर्म आणि निवृत्ति*(लक्षण)* पर धर्म. वेदोक्त यज्ञदानतपादी वर्णाश्रमयुक्त धर्म हा प्रवृत्तिपर आचरणाचा मार्ग आहे, तर ज्ञान-वैराग्यलक्षणयुक्त धर्म निवृत्तिपर आचरणाचा आहे. स्वकर्म निष्काम भावनेने केल्याने चित्तशुद्धी होते व फलस्वरूप ब्रह्मजिज्ञासा निर्माण होते. नंतर नित्यानित्यविवेक होऊ लागून तो पक्व झाला की सुख व भोगांप्रती विरक्ती *(वैराग्य)* प्राप्त होते. वैराग्यामुळे शम, दम, तितिक्षा व कर्मत्याग घडून येऊन मोक्ष देणारे ज्ञान प्राप्त होते व त्या ज्ञानाने मोक्ष प्राप्त होतो असा हा *प्रवृत्तिलक्षणपर योगमार्ग* जनसामान्यांसाठी गीता सांगते.

निवृत्तिलक्षणपर संन्यासमार्ग फारच थोड्यांसाठी आहे. पण दोन्हींचे मुख्य ध्येय ***विद्वत्संन्यास*** आहे, ज्यात कोणताही भौतिक किंवा अभौतिक वस्तू वा भोगाचा त्याग न करता मनुष्य संसाराविषयी निरिच्छ होऊन अलिप्त होतो. लोक समजतात तसे हे मत अकटोविकट चतुर्थाश्रमी संन्यास सर्वांसाठी सांगत नाही, हे येथे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

स्व.डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आपल्या ***भगवद्गीता*** या ग्रंथात गीतेतील तत्त्वज्ञानाविषयी व्यक्त केलेले विचार असे दिसतातः "गीतेचे तत्त्वज्ञान अनेक दृष्टिकोन सामावून घेते व त्यांना एकसंध करण्याचा प्रयत्न करते. त्यात असलेल्या भिन्न भिन्न प्रवाहांमुळे कोणाकोणास त्यात वेगवेगळी तत्त्वज्ञाने प्रतिपादिली आहेत, असे जरी दिसत असले तरी तसे ते नाही. आणि ***गीतेतील योग हा ज्ञान, कर्म, भक्ती व ध्यान असे टप्पे घेणारा असा आहे. साधकाच्या स्थितीनुसार या सर्व प्रकारांचा वेगवेगळ्या टप्प्यात प्रयोग करणे, हे या योगात अभिप्रेत असून शेवटी या सर्वातून साध्य होणारे ध्येय हे एकाच प्रकारचे आहे,"*** असे त्यांचे मत दिसून येते. असो.

पौर्वात्य तसेच काही पाश्चिमात्य विचारवंतांनीही गीतेतील तत्त्वज्ञानाबाबत आपली मते मांडलेली आहेत. गार्बे, हॉपकीन्स, होल्ट्झमन, कीथ, बार्नेट, रुडॉल्फ ओटो, जाकोबी या पाश्चात्यांची मते अशी आहेतः

"गीता ही मुळात सांख्य तत्त्वज्ञानाचे विवेचन करणारी होती व नंतर तिच्यात वेदान्ताचा अंतर्भाव करून तिला आजचे स्वरूप प्राप्त झाले आहे;" "ती द्वैताद्वैत इ. एकांगी मते सांगणारी नव्हती; कदाचित गीता हे उपनिषत्कालाच्या अंती रचलेले उपनिषदच असावे; कृष्णाशी तिचा संबंध केव्हातरी नंतर जोडला गेला असावा; गीतेत अनेक दैवतवाद आहे;"

" विश्व व विश्वात्म्याचे ऐक्य गीतेचा गाभा आहे; गीता श्वेताश्वतर उपनिषदास जवळची आहे;"

"गीतेमध्ये अनेकविध पारंपरिक विचारस्त्रोतांची गोंधळात पाडणारी सरमिसळ आहे; गीता रचणाऱ्याचे स्वतःचे विचार स्पष्ट नसल्याने तिच्या प्रतिपादनात एकवाक्यता आढळत नाही;"

" गीता अर्जुनाला ईश्वरार्पण बुद्धीने कर्म म्हणून युद्धास प्रवृत्त करावे एवढ्याच हेतूने मुळात रचली होती आणि तत्त्वज्ञान किंवा योग यांबाबत त्यातून कोणताही सिद्धान्त मांडणे अभिप्रेत नव्हते, हा सर्व अवांतर भाग तिच्यात नंतर घातला गेला; गीतेच्या मूळ विचारांचा विवरणात्मक भाग तिच्यात नंतरच्या पंडितांनी घातला;" अशी बहुविध मते त्या अभ्यासकांनी व्यक्त केली आहेत.

अशी अनेकानेक मते गीतेतील प्रतिपाद्य विषय कोणता व तिचे तत्त्वज्ञान आणि मोक्षाचा मार्ग हे निश्चित करण्याबाबत आहेत. त्या सर्वांचा आढावा घेणे आपणास शक्य नाही. परंतु गीतेकडे बघून अनेक विचारवंतांना त्यातून काय प्रतीत होते; तिच्यात कोणकोणते भिन्नभिन्न विचारप्रवाहांचे धागे आढळतात, याची थोडी कल्पना या विषयाशी अनोळखी असणाऱ्या जिज्ञासूस यावी, यासाठी हा संक्षिप्त परिचय करून देत आहे. इतर तत्त्वज्ञानी व दार्शनिक यांच्या एकूणच मतांचा असाच परिचय संक्षेपाने *"ग्रंथामागील भूमिका - मध्यरंग१ व २"* या उपविभागांतून करून दिला आहे. तो आपणासाठी पुरेसा आहे.

स्व. गुरुदेव रानडे यांच्या मते गीता हे आत्मसाक्षात्काराचे दर्शन आहे व त्यात ज्ञान, कर्म, भक्ती व ध्यान या सर्व योगांचा परस्परपूरक असा प्रयोग अभिप्रेत आहे.

अलीकडील एक थोर तत्वचिंतक व साक्षात्कारी सत्पुरुष वै. प्रा. के.वि. बेलसरे यांचे या विषयाबाबत असे म्हणणे दिसते कीः

"गीतेवर भाष्य इ. बऱ्याच लोकांनी केले असले तरी आत्मदर्शनाचे सर्वोत्तम मूल्य पायाभूत धरून लिहिलेली भाष्ये दोनच आहेत. ती म्हणजे आद्य श्रीशंकराचार्यांचे भाष्य आणि श्रीज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी. गीता काय म्हणते ते या दोघांनाच विचारावे."

या सर्व विचारांवरून दोन गोष्टी प्रामुख्याने दिसून येतातः

१) गीतेतील तत्वज्ञान आनुषंगिक असून ते अनेकान्तात्मक आहे, समन्वयकारक आहे आणि कोणत्याही एकान्तिक वादास ते अनुकूल नाही. ते Surrealistic आहे आणि योगभूमिकेशी निगडित आहे. निव्वळ तत्त्वज्ञान सांगणे किंवा तत्त्वज्ञानाचे Text Book असणे असा गीतेचा खरा प्रकार नाही.

२) गीतेतील मुख्य प्रतिपाद्य विषय योगसाधना हाच आहे. जो योग गीता सांगते तो अनेक योगधारांचे समावेशन व समन्वयन करणारा असून ध्यान,

कर्म, ज्ञान व भक्ती या चार प्रमुख योगधारांचे समावेशन व समन्वयन करणारा असून ध्यान, कर्म, ज्ञान व भक्ती या चार प्रमुख अंगांस त्यात आपापले विवक्षित स्थान असून ती सर्व अंगे एकमेकांस पूरक म्हणून आहेत. परमात्मसाक्षात्कार हे त्या योगाचे साध्य असून संतत समाधि अवस्था ही स्थिती परम वाञ्छनीय आहे.

कुंडलिनी व गीतेचा योग

आपण माझ्या या ग्रंथाच्या अंतरंगात जेव्हा उतरू तेव्हा याच प्रमुख विचारधारांचा श्रीज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी व इतर अक्षर वाङ्मयाद्वारे मी वेध घेत आहे, असे आपणास दिसून येईल. योगसाधनेचा जो विचार त्यात आपण करणार आहोत, त्याच्यात ज्ञानेशांच्या कुंडलिनीयोग निर्देशास महत्त्वाचे स्थान आहे. त्याबाबत काही मुद्दे आपण पूर्वीच लक्षात घेतले होते. उर्वरित काही मुद्दे विचारात घेऊ या :

ज्ञानेशांनी सहाव्या अध्यायात व इतरत्र *पंथराज* म्हणून जो योग श्रीकृष्णाच्या अंतरीचे गूज-ध्वनित म्हणून सांगितला आहे, त्यात कुंडलिनीजागृती आणि त्यापुढील क्रिया-प्रक्रियांचा प्रमुख भाग आहे. तसेच अठराव्या अध्यायातील *क्रमयोगातसुद्धा* कुंडलिनीचे असेच वैशिष्ट्यपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते.

गीतेत कोठेही या योगप्रकाराचा निर्देश नसतांना ज्ञानदेव असे का करत आहेत असा जो प्रश्न नेहमी विचारला जातो, त्याबाबत

(१) गीता व पातञ्जलयोगाचा कसा घनिष्ट संबंध आहे, ते आपण विचारात घेतले आहेच.

(२) पातञ्जलयोगात कुंडलिनी आणि *प्रज्ञा व ऋतंभरा प्रज्ञा* यांचा संबंध कसा आहे आणि

(३) धारणा-ध्यानासाठी कुंडलिनी व चक्रेसंबंधित देश व ध्येय्य कशी वाञ्छनीय आहेत हा भाग आपण पाहिला आहे.

त्यावरून गीतेत कुंडलिनीविषयक विज्ञानाचा भाग अध्याहृत आहे असे दिसून येते.

दुसरे असे की गीता *चवथ्या* अध्यायात जे अनेक प्रकारचे प्राणयज्ञ सांगते; *श्लोक क्र.५-२७ व २८* यातून प्राणापान यांची गती सम करून अंतर्दृष्टी भ्रूमध्यामध्ये लावण्याचे जे विधान गीता करते; तसेच *आठवा* अध्याय *श्लोक क्र. १ ते १३* यातून अंतकाली योगधारणेने मनाचा संयम करणे, प्राण भ्रूमध्यस्थानी स्थापणे व त्यांना *(नाडीद्वारे)* मूर्ध्निस्थानी नेणे व ॐकारस्वरूपी अक्षरब्रह्माचे ध्यान करीत देह त्यागणे या क्रियांचा व योगबलाचा जो निर्देश गीतेत आला आहे; त्या सर्वांवरून ***गीतेतील योगास प्राणक्रियांवर आधारित योगाची अपेक्षा आहे,*** असे दिसून येते.

प्राण, चित्त व मन यांचा कुंडलिनीशी मूलभूत संबंध आहे असे योगशास्त्र सांगते. आपण ज्या गीता श्लोक क्र.(४-२७,२९, ३०), (५-२७) व (८-१०,१२) यांचा संदर्भ घेतला ते सर्व प्राणादी क्रियासंबंधी आहेत आणि त्यांचा असा कुंडलिनी व चक्रे यांच्याशी संबंध आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

गीतेने योगाचे सर्वच विज्ञान आणि त्यामागचे तत्त्वज्ञान जसेच्या तसे साकल्याने मांडलेले नसून त्यातील अनेक गोष्टी गृहीत धरल्या आहेत. ***आदिशंकराचार्यांच्या गीताभाष्यावरून गीतेने नाडिविज्ञान, योगप्रक्रिया इ.गृहीत धरून योगविषयक काही विधाने केली आहेत, हे दिसून येते.*** अर्थातच योगविज्ञानाचा हा जो अध्याहृत भाग आहे, तो जाणकारांकडून जाणून व शिकून घ्यावयाचा आहे, असाही यामागे अभिप्रेत भाव आहे. तेव्हा प्राणक्रियेसंबंधित योगविज्ञान कोणते आहे, यासाठी आपणास हठयोगाकडे निर्देश करावा लागतो.

हठयोग हा *सूर्य-चंद्रनाडी-पिंगला व इडा, सुषुम्ना व कुंडलिनीची चालनक्रिया* यांवर आधारलेला आहे, हे जाणकार ओळखतातच. तेव्हा गीतेतील प्राणक्रियांचा निर्देश असा हठयोगसंबंधित आहे आणि त्यासाठी कुंडलिनी ही आधारभूत आहे हे दिसून येते. म्हणूनच संक्षिप्तपणे ***पंथराज*** सांगून झाल्यावर ज्ञानदेव म्हणतात की:

"पिंडे पिंडाचा ग्रासु।
तो हा नाथसंकेतीचा दंशु।
परि दाऊनि गेला उद्देशु।
महाविष्णु।।
तेयां ध्वनिताचे केणें सोडूनि।
यथार्थाची घडी झाडूनि।
उपलविली म्यां जाणूनि।
ग्राहीक श्रोते।।६-२९१,२९२।।

कुंडलिनीप्रक्रियेवर आधारलेला असा हा जो ***पंथराज*** आहे, तो ज्ञानदेव आपणास या विषयाची जाण आहे, हे ओळखून मुद्दाम सांगत आहेत. श्रीमहाविष्णु म्हणजे श्रीकृष्णांनी याच योगाचे ध्वनित गीतेत केलेले असल्याने त्या संकेताचे अंतरंग उकलून त्याचे स्पष्ट विवेचन व निर्देशन त्यांनी ज्ञानेश्वरीत केले आहे, असे ज्ञानदेव म्हणतात.

त्यांच्या पंथराज व क्रमयोग यांचा विचार करतांना या योगात कुंडलिनीप्रक्रियांसह कर्म, ज्ञान, भक्ती व ध्यान या चार योगविशेषांचा त्याच्यात अभिन्नपणे अंतर्भाव केल्याचे आपणास दिसून येते.

गीतेचा खरा योग हाच असल्याचे ज्ञानदेवांचे मत आहे असे आपणास प्रतीत होते. तरी हा योग ते गीतेवर आरोपित आहेत, असे नसून, ते ज्ञानदेवांचे गीतेवरील स्वानुभवपूर्ण असे निरूपण आहे.

गीतेने योगाचा अध्याहृत धरलेला भाग ज्ञानदेव आपणास अशा रीतीने समजावून देत आहेत. या योगाचे विशेष गुरुकृपा, कुंडलिनीजागृती व प्रक्रिया, ईश्वरप्रणिधान व त्यास कर्म, ध्यान, ज्ञान व भक्तीची जोड, असे आहेत. ते सर्व या ग्रंथांतरी सविस्तर विवेचिलेले आपणास दिसेल. असो.

ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान व योगप्रणाली

तत्त्वज्ञानाचा तपशील ज्ञानेश्वरीद्वारे गीतेच्या अंतरंगात जाऊन पाहता पाहताच त्याची योगशास्त्राशी सांगड घालतघालत हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामुळे ***तत्त्वज्ञान व योग*** हे प्रमुख विषय या ग्रंथात विखुरलेले - interspersed - असे आले आहेत. गीतेचे तत्त्वज्ञान काय आहे, याचा ज्ञानेश्वरीद्वारे पाठपुरावा करत असता, काहीसे पूर्वसूरींचे पूर्वपरिचित तत्त्वज्ञान व काही ज्ञानदेवांचे स्वतःचे तत्त्वज्ञान अशी मिळून एक तत्त्वज्ञानप्रणाली सिद्ध होते. तिलाच आपण ***ज्ञानेश्वरांची तत्त्वज्ञानप्रणाली*** असे म्हणू या.

या तत्त्वज्ञानप्रणालीचा *योग* हा पाया आहे आणि *अमृतानुभव* व *ज्ञानदेवांचे अभंग* इ.रचनांमधील त्यांच्या विचारांचाही ज्ञानेश्वरीतील विचारांचासह तिच्यात समावेश होतो. हा सर्व ज्ञानेशवाङ्‌मयातील विचार मिळून ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान व योगप्रणाली अशी होतात व त्यातच त्यांची गीतेतील तत्त्वज्ञान व योग यांकडे पहाण्याची दृष्टी आहे, असे जाणवते. काही विद्वानांनी ज्ञानदेवांच्या या प्रकारे दृग्गोचर होणाऱ्या तत्त्वज्ञानप्रणालीस ***चिद्विलासवाद*** अशी संज्ञा दिली आहे. आणि ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञानविषयक व योगानुभूती प्रदर्शित करणारे सगळे विचार एकत्रित पाहिले, तर ही संज्ञा त्यासाठी योग्यच आहे, असे वाटते.

या संपूर्ण विश्वात एकच एक तत्त्व भरून राहिले असून तेच या विश्वरूपाने नटते व विलसते; विश्व व विश्वात्मा यात भेद नाही; जीव-जगत-ईश्वर ही वस्तुतः एकच एक सत्य आहेत; असे हे द्वैतातही अद्वैत पहाणारे; जडातही चैतन्य पहाणारे; जीव-जगत-ईश्‍वर या सर्वांस सत्य समजणारे; पण त्यांच्यात अभेद पहातांना ***"हे सर्वही वावो (६-६१)"*** असे समजणारे; त्या त्रयीच्या *जीव हा अंश* व *ईश्वर हा अंशी* अशा स्वरूपास जाणून घेत, जीव-जगत-ईश्वराच्या दृक्प्रत्ययी संबंधास गौण मानणारे; आणि त्या दृष्टीने जड व चैतन्य असा विभाग नाकारणारे; हा सर्व विश्वव्यापार त्या चैतन्याचा विलास आहे, ***चिद्विलास*** आहे; असे विचार ज्ञानदेवांच्या या *चिद्विलासप्रणालीत* मांडले जातात. ज्ञानेशांच्या या तत्त्वज्ञानासंबंधी मला झालेले आकलन या ग्रंथाच्या ***चिद्विलास*** या तिसऱ्या व ***शिव-शक्तीचा चिद्विलास*** या छत्तिसाव्या उन्मेषात मांडले आहे.

इतर काही विद्वानांच्या मते ज्ञानदेवांची तत्त्वज्ञानप्रणाली खरी तर आद्य श्री शंकराचार्यांच्या *केवलाद्वैत* मताशी जुळते; तर दुसरे काही विद्वान त्यात रामानुजांचे *विशिष्टाद्वैत* पहातात. कोणास ते *द्वैताद्वैती* किंवा *भेदाभेदवादी* ही वाटू शकतात. कसेही असले तरी ही कोणतीही मते निर्विवाद नाहीत. जसे गीतेच्या तत्त्वप्रणालीविषयी अनेक मतभेद आहेत, त्याचप्रमाणे ज्ञानदेवांच्याही तत्त्वप्रणालीविषयी मतभेद असणे साहजिकच आहे. कारण ज्ञानदेव पूर्णार्थाने गीतेलाच अनुसरत असतात.

अक्षरगणेशाचे रूपक

ज्ञानदेवांची तत्त्वज्ञानप्रणाली ठरवितांना त्यांच्या काही ओव्यांतून प्रकटलेली दिशा नक्कीच विचारात घेतली पाहिजे. मुख्य म्हणजे ***"ॐ नमो जी आद्या" ते "मियां श्रीगुरुकृपा । नमिलें आदिबीज।।"*** या प्रथमारंभीच्या *१ ते २१* ओव्यातून जे ***अक्षरगणेशरूपक*** त्यांनी रचले आहे, त्याचा विचार केलाच पाहिजे. जो आद्य आहे, वेदप्रतिपाद्य आहे, आत्मरूपा आहे, असा हा **अक्षरगणेश** त्यात ज्ञानेश निर्देशितात. त्याला नमन करणे हा तसा द्वैती भाव. पण हे नमन कसे करावे, ते आपण अमृतानुभवांतील गुरुस्वरूपास नमन करतांना ज्ञानदेवांनी जो अद्वैत भाव प्रकट केला आहे, त्यावरून समजून घेतले पाहिजे. यातूनच वर सांगितलेला ***चिद्विलास*** दिसून येतो. त्या आद्य तत्त्वाचे आत्मरूपत्व, स्वसंवेद्यत्व ही पण याच तत्त्वज्ञानविचाराकडे अंगुलिनिर्देश करतात.

नंतरच्या ओव्यातील या अक्षरगणेशाच्या पुढील वर्णनात शब्दब्रह्म *(वेद)*, स्मृति, पुराणे, इतर अक्षरवाङ्मय, विविध*प्रमेये (तत्त्वज्ञानप्रणाली)*, व्यासादी ऋषिमुनींचे तत्त्वविचार (*व्यासादिकांचिया मती*), विसंवादी षड्दर्शने (*विसंवादे धरिती । आयुधें हातीं*) - *तर्क, नीतिभेद, वेदांत, बौद्धमतसंकेतदर्शक वार्तिके, सत्कारवाद, धर्मप्रतिष्ठा (आत्मानात्मविवेक), मीमांसा, दशोपनिषदे* इ.नी अवतरलेले व सजलेले त्या तत्त्वाचे रूप दाखविले आहे.

या सर्व वाङ्मयातील तत्त्वविचारांचा एकमेकांशी पूरेपूर मेळ बसवणे फारच अवघड आहे. तो स्वानुभूतीवर अधिष्ठित असा मेळ जो बसवून दाखवितो, त्यासच खरे तर आचार्य म्हणावयाचे! सर्व महान पूर्वाचार्य याचसाठी प्रसिद्धआहेत. परंतु प्रत्येकाने बसवलेला असा मेळ दुसऱ्या आचार्यांस मान्य नाही हे सर्वांस अवगत आहेच. तसेच प्रमुख प्रमुख अशी जी षड्दर्शने आहेत, तीच मूळात परस्परविसंवादी आहेत, असे ज्ञानदेवही म्हणत आहेत. याचा एक अर्थ असा की हा मेळ घालणे शक्य नाही.

याचा दुसरा अर्थ असा की या सर्वांतील कोणताही तत्त्वविचार साकल्याने नाही, परिपूर्ण नाही, स्वयंपूर्ण नाही. तसेच ऋषींचे तत्त्वविचारही अनेक प्रकारचे भिन्न भिन्न असल्याचे व त्यांचा एकमेकांशी धड मेळ बसत नसल्याचे गीतेनेही ध्वनित केलेले आहेच.

"ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् । ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ।।१३-४।।" या गीतावचनावर ज्ञानदेवही म्हणतात की ***"हे बहु उखिविखि । ऋषी केली नैमिषी । पुराणे इयेविषीं । मतपत्रिका ।। .....वेदीचें बृहत्सामसूत्र । देखणेपणे अति पवित्र ।***

परी तेयांतेही हें क्षेत्र । नेणवेचि ।।.......हें कोणाही वरपडे । होयेचिना ।।१३-६६ते ७१ ।।" क्षेत्राचे स्वरूप, क्षेत्रज्ञ कोण व त्याचे स्वरूप आणि क्षेत्राशी संबंध कसे आहेत, या तत्त्वविचारांचा वरील ओव्यांतून निर्देश आहे. या सर्व पूर्वसूरींच्या विसंवादी तत्त्वज्ञानमतांचा निर्णय गीतेने केला आहे आणि तो सर्व समन्वयात्मक कसा आहे हे ज्ञानदेव त्यांच्या वाङ्मयातून आणि विशेषेकरून ज्ञानेश्वरीच्या *तेराव्या* अध्यायात उकलून दाखवतात. हा भाग ग्रंथांतरी मी स्पष्ट केला आहे.

या समन्वयविचाराचे मूळ प्रथमाध्यायीच्या ***अक्षरगणेश*** रूपकात गवसते. त्यात शुद्ध आत्मानात्मविवेक आहे*(विवेकवंतु सुविमळु); *सर्व तत्त्वज्ञानप्रणालींकडे निःपक्षपातीपणे-समत्वाने पहाण्याची दृष्टी आहे *(समता शुभ्र वर्णु);* सूक्ष्मातिसूक्ष्म अवलोकन व विचार करण्याची बुद्धी त्यात आहे*(देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु);* या सर्व विसंवादाचे मूळ ओळखून ते विघ्न नष्ट करण्याचे सामर्थ्यही त्याच्यात आहे*(विघ्नराजु);* उपनिषदातील ज्ञानमकरंद नेमका चाखण्याची रसिकता तेथे आहे; या सर्व समन्वयात्मक बोधामृताचा आस्वाद घेण्याची *योगप्रवणता* तेथे आहे; या सर्वांद्वारे ज्ञानेश साकारत आहेत त्यांच्या समन्वयात्मक अनुभवसिद्ध अशा तत्त्वज्ञानाचे एक बृहद्रूपक!

या रूपकाद्वारे जे आत्मतत्त्व त्यांनी साकार केले आहे, ते अखंड आहे *(शब्दब्रह्म अशेष);* अनेक प्रकारे ते कोणासही विसंवादी भासले, तरी ते निर्दोष आहे, अव्यंग आहे, त्यात कोणताही विसंवाद नाही *(वर्णवपु निर्दोष);* ते लावण्यपूर्ण आहे, प्रकाशमान आहे *(उजाळाचे);* अर्थपूर्ण आहे; रसपूर्ण आहे; अभयदायक आहे; परमानंदमय आहे; बोधमदामृताने परिपूर्ण आहे; नाना तत्त्वप्रणाल्यांनी *(प्रमेयांनी)* सजलेले आहे; धर्माचे माहेर आहे *(धर्मप्रतिष्ठा सिद्ध);* पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा या दोन्हींचे श्रवण करणारे आहे; वेदान्तरूपी मोदकाच्या आनंदरसाने आपूर्ण भरलेले आहे.

अशा या आत्मतत्त्वाच्या *चरणयुगुली अकार, उदरी उकार व मस्तकस्थानी मकार* आहेत; ते सप्रभ आहे, म्हणजे ही विश्वप्रभा त्याचीच आहे; ॐकाराच्या *अ,उ व म* या त्रिमात्रांनी मंडित असे हे विश्वच या आत्मतत्त्वाचा देह आहे. ***द्वैततत्त्व व अद्वैततत्त्व*** ही याची समसमानतेने एकवटलेली गंडस्थळे आहेत***(द्वैताद्वैत तेचि निकुंभ).***

असा हा विविध तत्त्वज्ञानप्रणालींनी विनटलेला, द्वैतास व अद्वैतास समानतेने मस्तकी विराजवणारा जो *अक्षर* असा गणेशरूपी परमात्मा आहे, असे जे तत्त्व आहे, जे आद्य आहे, वेदप्रतिपाद्य आहे, तेच संपूर्ण वेदांस***(शब्दब्रह्मास)*** कवळून आहे. अशा त्या आदितत्त्वास ***आदिबीजास*** श्रीज्ञानदेव गुरुकृपेने नमन करतात; म्हणूनच त्याचे वर्णन ते करू शकले आहेत. त्यांचे त्या तत्त्वास जे नमन आहे, ते म्हणजेच त्यांचे ज्ञानेश्वरी, अमृतानुभवादी अक्षर वाङ्मय!

अर्थातच असे सर्व प्रकारचे तत्त्वज्ञानविचार अंतर्बाह्य, एकरसपणे वागवणारे हे आत्मतत्त्व द्वैती आहे की अद्वैती, भेदाभेदवादानुसार आहे की या सर्वांच्या विविध मिश्रणांच्या छटेचे आहे, त्यातील कोणा एका विशिष्ट विचारांप्रमाणे आहे की इतर कोणत्या तत्त्वज्ञानानुसार आहे, ***हा प्रश्न या गणेशरूपकाद्वारे निखालस सुटतो*** असे मला वाटते आणि ते विचारवंतांना पटेल असे वाटते. असा हा ज्ञानदेवांचा जो तत्त्वविचार आहे, तो म्हणजेच त्यांचे ***चिद्विलासाचे तत्त्वज्ञान*** होय.

अनेकान्तवाद

आपण Pluralism, Singularism, Pluralistic Realism - *एकांतवाद, अनेकांतवाद, अनेकांतात्मक वास्तववाद* या तत्त्वज्ञानप्रणालींतील संकेतांचा अगोदरच विचार केला आहे. ज्ञानेशतत्त्वज्ञानाचा एकूण विचार करता या सर्वंकष ज्ञानेशतत्त्वज्ञानास व तसे पाहिले तर एकूणच वैदिकतत्त्वज्ञानास जैनतत्त्वज्ञानातील ***अनेकांतवाद (स्यादवाद)*** आणि उपनिषदातील रंग बदलणाऱ्या सरड्याची गोष्ट थोड्या फार फरकाने लागू पडते.

एका झाडाखाली एक माणूस बसलेला असतो. झाडावर एक सरडा असतो. तेथे आलेल्या एका मनुष्यास तो करड्या रंगाचा दिसतो. त्यानंतर दुसरा मनुष्य तो हिरवटसर रंगाचा आहे असे पाहतो. त्यानंतर तिसरा येतो. तर त्याला तो विटकरी लाल रंगाचा दिसतो. ते नंतर आपापसात त्या सरड्याचा रंग कोणता यावर वाद घालत बसतात. कोणालाच कोणाचे म्हणणे पटत नाही. तेव्हा तो झाडाखाली निवांत बसलेला मनुष्य त्यांना म्हणतो की "अरे बाबांनो! तुमचे प्रत्येकाचे म्हणणे सत्यच आहे. पण त्या सरड्याठायी हे तिन्ही रंग आहेत. तो सरडा आपले रंग बदलत असतो."

सत्यही असेच आहे. ते अनंत मितींचे आहे, अनंत परिणामांचे आहे, अनंत गुणधर्मांचे आहे. ते साकार आहे. ते निराकार आहे. ते द्वैती आहे. ते अद्वैती आहे. ते द्वैताद्वैती आहे. हे जे काही आहे, ते ते सर्व आहे; हे जे काही आहे, ते ते नाही; हे जे काही नाही, ते ते आहे. अशा अनेकानेक विरोधाभासात्मकतेस -contrary views ना आपल्याठायी समर्थतेने नांदवणारे ते सत्य आहे. ते तत्त्व एकाला असे दिसेल, तर दुसऱ्याला ते तसेही दिसेल. कोणाला ते अजूनही वेगळेच दिसेल. हे सर्व सार्वत्रिक सत्य आहे. ते तत्त्व असे अनेकरंगी, अनेकढंगी,बहुआयामी असे आहे.

जैन तत्त्वज्ञांचा *अनेकांतवाद* वा *स्यादवाद* म्हणतो की सत्य हे प्रत्येकाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळे दिसते. तरी सगळ्यांचे दृष्टिकोन हे सत्यच आहेत, वास्तवच आहेत. सत्य हे वस्तुतः खरे तर असेच आहे याचे साकल्याने दर्शन कोणा एका महाभागास कधीतरी क्वचितच होते. या सर्वंकष सत्याचे ज्यास खरेखुरे आकलन होते, तो मनुष्यच ***सर्वज्ञ*** किंवा ***केवलीसिद्ध*** होय. प्रत्येक वस्तु, सत्ता या अनंतधर्मी असतात. त्या वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या परिस्थितीत, वेगवेगळ्या संदर्भात लोकांना वेगवेगळ्या प्रकारे प्रतीत होतात. ते सर्व एकाच वेळी व एकाच व्यक्तीस कळू शकत नाही. ज्यास कळते, तो ***सिद्ध*** होय. त्याला ***अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतसुख व अनंतवीर्य*** यांचा लाभ होतो.

या अनेकांतवादानुसार आपले ज्ञान पूर्ण नसते, ते वस्तूच्या अनुरोधाने होते. ते असे सापेक्ष-relative असते. अनंत धर्म असलेल्या वस्तूच्या केवळ काहीच धर्मांचे *(facets चे)* ज्ञान व्यक्तीस होऊ शकते. प्रत्येक तत्त्वज्ञान, जे या वादास अनोळखी आहे, ते ते केवळ एका वा काही गुणधर्मांस मान्यता देते. आपल्याच तत्त्वज्ञानाचा आग्रह धरून तेवढेच सत्य आहे, असे हे लोक मानतात. याचमुळे ती तत्त्वज्ञाने *एकान्तिक, एकाच बाजूचे मंडन करणारी व इतर विचारांचा निषेध करणारी* अशी असतात.

याच एकांगी विचारसरणीमुळे तत्त्वज्ञानी वाद उद्भवतात आणि त्यांचा सोक्षमोक्ष होऊन अंतिम सत्य कधीच प्रस्थापित होत नाही. या सर्व वादांस बाजूला ठेवून प्रत्येकात काय सत्यांश आहे, त्याचा विचार करून, अतिरेकाचा त्याग करून जर कोणी सत्यशोधन करेल, तर त्याला या सर्व दृष्टिकोनांची सापेक्ष सत्यता जाणवून येईल आणि अंतिम सत्य कसे आहे,ते उलगडेल.

असे ते अंतिम सत्य म्हणजे या सर्व सापेक्ष दृष्टिकोनांची निव्वळ गोळाबेरीज-arithmetic sum नसून vector sumप्रमाणे बहुजिनसी, बहुआयामी, एकरस-homogeneous-असे काही तत्त्व होय. "Sum total of all the parts is the whole" हे विधान जरी बरोबर असले, तरी, "Sum total of all the parts known is not the whole, but it is something else, over and above the picture presented by the only known parts or facets ," असे ते अंतिम सत्य वा तत्त्व असते.

हे जो जाणतो, तोच ***सर्वज्ञ*** होय!! या तत्त्वज्ञानविषयक दृष्टीकोनास 'Pluralistic Realism' वा ***अनेकांतात्मक वास्तववाद*** असे म्हणतात. तो मला जसा समजला, तसा येथे ग्रथित केला आहे. जिज्ञासूंनी मूळ तत्त्वज्ञानग्रंथ पहावेत आणि योग्य काय ते स्वतःच ठरवावे ही विनंती. असो.

हा सर्व विचार येथे अशासाठी मांडला की ज्ञानेश्वरांचा उपरोल्लेखित ***चिद्विलासवाद*** हा एकप्रकारे असाच ***अनेकांतवादी दृष्टिकोन*** आहे; अनेक वादांचे समरसीकरण करून सत्याचे एक बहुआयामी-multifaceted-दर्शन घडविणारा आहे. याच दृष्टिकोनातून पाहिले असता कोणत्याही एकांतिक-singularistic-अशा तत्त्वज्ञानप्रणालीने, द्वैती, अद्वैती वा इतर कोणतीही घ्या, गीतेचा पूर्ण सुसंगत असा उलगडा सर्वांना पटेल अशा समाधानकारकरीत्या करणे कोणाही पंडितास जमलेले दिसत नाही. कारण प्रत्येक प्रकारच्या एकांतिकवादी विचारसरणीस अडखळवणारी अशी गीतेत काही प्रमुख स्थळे आहेत, हे सर्वत्र विद्वन्मान्य आहे. एकेक स्थळ एकेका वादास अनुकूल तर दुसऱ्या मतास प्रतिकूल असते. मग काही बौद्धिक कोलांटी उडी मारून ते स्थळ पार करावे लागते. पण त्याने जिज्ञासूंचे खरे समाधान होत नाही.

यासाठी या अनेकांतवादाच्या दृष्टिकोनातून या गीतेतील तत्त्वज्ञानाच्या विषयाकडे पाहिले म्हणजे त्यासंबंधीच्या विविध तत्त्वज्ञानप्रणालींचा समन्वय करता येऊन गीता कोणते सत्य खरे तर प्रतिपादिते, ते ओळखता येते; आणि ज्ञानदेवांच्या गीतेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून असेच होऊन त्यांचे चिद्विलासवादाचे तत्त्वज्ञान उभे रहाते. ***"एको सदविप्रा बहुधा वदन्ति"*** अशी श्रुतींचीहि साक्ष आहे. ते सत्य एकच असूनही ब्रह्मविदांना त्याची वेगवेगळी अनुभूती येऊन ही परस्परविसंवादी तत्त्वज्ञाने निर्माण झाली असल्याचे यात अभिप्रेत आहे. या सर्व तत्त्वज्ञानांचा मेळ घालणारे ज्ञानदेव हे एक महान समन्वयी म्हणून ओळखले जातात.

गीतेचाही मूळ रोख तसाच असल्याचे काही ऋषितुल्य अभ्यासकांचे मत आहे. ज्ञानदेवांस हे जाणवले आहे. त्यांना अंतिम सत्य या महासमन्वयातून गवसले आहे; त्याची त्यांनी साक्षात अनुभूती घेतली आहे आणि हे सर्व ते आपल्या अक्षरवाङ्मयातून तुम्हांआम्हास सांगत आहेत. आपण ते ऐकून सुखी होऊ अशी त्यांची ग्वाही आहे. ***"आधी अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासी पात्र होईजे । हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड आईक ।।"*** असे आश्वासन ते आम्हाला देत आहेत, ते काही उगीच नाही.

ज्ञानेश्वरांची स्वतंत्र प्रज्ञा

ज्ञानदेवांनी आपल्या स्वतःच्या आणि इतर आप्त म्हणजे गुरु, योगी, ऋषी, मुनी, इ.च्या योगज अनुभूतींच्या प्रत्यक्ष व परतः प्रमाणांवर आपले तत्त्वज्ञान बेतून ते ज्ञानेश्वरीद्वारे गीतेवर आरोपित (supplant) केले आहे का; अथवा गीतेतील तत्त्वज्ञानाच्या व तिच्यात दिलेल्या योगज अनुभूतींच्या वर्णनाच्या परिणामस्वरूप असे त्यांच्या ज्ञानेश्वरी व इतर वाङ्मयातून प्रतीत होणारे तत्त्वज्ञान आहे; असाही एक प्रश्न विचारता येईल.

असे समजा की ज्ञानेश्वरीस गीतेच्या तत्त्वज्ञान व योगविषयक कल्पनांच्या अनुबंधाचे बंधन असल्यामुळे तो ग्रंथ सर्वतः किंवा बव्हंशी तरी त्या मर्यादेत राहून रचला गेला असला, तर ज्ञानदेवांच्या अभंगांतून व अमृतानुभवातून ज्या योग व तत्त्वज्ञानविषयक कल्पना प्रकटतात, त्या ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान व योग यांहून काही वेगळ्या स्वरूपाच्या आहेत का, असाही दुसरा प्रश्न पुढे येतो.

म्हणजे आपल्या या वाङ्मयातून ज्ञानदेवांनी स्वतःचे असे काही स्वतंत्र तत्त्वज्ञान मांडले आहे की त्यांनी गीतेच्याच तत्त्वज्ञानाचे मंडण केले आहे, असे या प्रश्नांचे साधारण स्वरूप आहे आणि या प्रश्नांचे उत्तर योगाशी निगडीत आहे का याचा विचार करावा लागेल.

या प्रश्नांचा विचार करतांना आपणास प्रथम गीतेने कोणते तत्त्वज्ञान मांडले आहे , या विषयाचा विचार करावा लागेल. वैदिक तत्त्वज्ञानाच्या पाच प्रमुख अशा *केवलाद्वैत, द्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत व शुद्धाद्वैत* या शाखांनी, तसेच त्यांच्या काही उपशाखांनी, दुसऱ्या शाखांच्या तत्त्वविचारास मान्यता न देता, आपापले वेगवेगळे वैशिष्ट्यपूर्ण मत मांडलेले आहे.

या सगळ्यांनी आपापल्या तत्त्वज्ञानप्रणालींच्या आधारे गीतेतील तत्त्वज्ञानाचा आणि पर्यायाने योग आणि उपासनाप्रणालींचा आपापल्या प्रणालीस पोषक असा अर्थ घेतलेला असल्याचे विश्रुतच आहे. त्यामुळे गीतेचे सर्वमान्य तत्त्वज्ञान कोणते हा प्रश्‍न अनिर्णित आहे. खरे तर या सर्व प्रणालींचा परस्परातील मूलभूत (basic) अंतर्गत (intrinsic) विरोध पाहता या सगळ्या भिन्नभिन्न तत्त्वज्ञानप्रणालींचा समावेश करू शकेल असे सर्वमान्य तत्त्वज्ञान मांडणे शक्यच नाही.

म्हणून ज्ञानदेवांनी मांडलेले तत्त्वज्ञान कसेही असो, ते या सर्व व त्या अगोदरच्या व नंतरच्या अनेकविध तत्त्वज्ञानप्रणालींचा किंवा त्याचबरोबर इतर अवैदिक समजल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञानधारांचा *सर्वसमावेश* करू शकेल असे असणे संभवत नाही.

तसेच मूळात गीतेचे तत्त्वज्ञान कोणते हेच जेथे विद्वान निश्चित करू शकत नाहीत, तेथे ज्ञानदेवांनी आपले तत्त्वज्ञान गीतेतील तत्त्वज्ञानावर बेतले आहे का या प्रश्नाचे उत्तर देणे सोपे नाही. ***म्हणूनच ज्ञानदेवांनी जरी आपले तत्त्वज्ञान गीतेस अनुसरतच मांडले असले तरी त्यांनी गीता तत्त्वज्ञानाचे जे interpretation केले असेल, त्याच्याप्रमाणेच ते असणे अधिक सयुक्तिक वाटते.***

दुसरे असे की गीतेतील जो तत्त्वज्ञानविषयक विचार आहे तो गीतेत यत्रतत्र विखुरलेला असला तरी प्रामुख्याने तो विषय जेथे मांडला आहे, त्यात तेरावा अध्याय-*क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार* -हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यात ***"ऋषिभिर्बहुधा गीतं .... ।।१३-४।।"*** हा एक लक्षवेधी श्लोक आहे. त्यावर भाष्य करताना आद्य श्रीमच्छंकराचार्य काय म्हणतात पहा.

यातील ***"ब्रह्मसूत्र पदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः"*** या पदाविषयी ते म्हणतात :- "क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांबद्दल वसिष्ठादी ऋषींनी बऱ्याच प्रकारे कथन केले असून ऋग्वेदादी श्रुतींनी त्याचे नाना प्रकारे विवेचन केले आहे. तसेच ब्रह्मसूत्राच्या पदांनीदेखील त्याचे विवरण केले आहे. ***ज्या पदांनी ब्रह्म सूचित केले जाते, त्याला ब्रह्मसूत्र म्हटले जाते. त्यांच्याद्वारे ब्रह्म प्राप्त होते, सूचित होते, जाणले जाते, म्हणून त्यांना ब्रह्मसूत्रपदे असे म्हणतात.*** त्यांच्यातूनही या क्षेत्र-क्षेत्रज्ञ तत्त्वांचे विवरण आले आहे. त्यांद्वारे*(दर्शित)* युक्तीने निःसंशयरीत्या निश्चित प्रत्यय देणाऱ्या या *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* विचाराचे ज्ञान होते."

"सर्व काही आत्माच आहे असे जाणून त्याची उपासना करावी," असे *बृहदारण्यक उपनिषद* म्हणते.

वरील स्वैर भाषांतरित उताऱ्यावरून असे दिसून येते की आचार्यमते ब्रह्मसूत्रे, ऋषींची मते इ.तून जो ब्रह्मविषयक खल केला आहे, तो *निश्चयात्मक* असून *निःसंशय* आहे. अर्थातच हा सर्व विचार त्यांद्वारे *निर्णायक* स्वरूपाचा असा केलेला आहे. तसेच गीता तोच निर्णय पुढे निरूपिणार आहे, असे वरील विधानांवरून समजून येते.

परंतु ज्ञानेश्वरीतील *१३-३ व १३-४* ***("तत्क्षेत्रं यच्च ...... व ऋषिभिर्बहुधा ...")*** या श्लोकांवर ज्या ओव्या ज्ञानेश देतात, त्या अवलोकिल्या असता या कोणालाही, *ऋषींना, वेदांना, श्रुतींना, शास्त्रांना, वेदातील डोळस अशा बृहत्सामसूत्रालासुद्धा , असा निश्चित स्वरूपाचा निर्णय करण्यात अपयश आल्याचे त्यांनी म्हटले आहे,* असे दिसून येते.

ज्ञानेश स्पष्टच म्हणतात की, ***"वेदींचे बृहत्सामसूत्र। देखणेपणे अति पवित्र। परी तेयाही हे क्षेत्र। नेणवेचि।। आणिक आणिकींही बहुतीं। महाकवीं हेतुमंतीं।ययालागि मती। वेचिलिया।। परी ऐसे हे एवढे। किं अमुकयाचेंचि फुडे। हे कोणाही वरपडे। होयेचिना।। आता ययावरी जैसें। क्षेत्र हे असें। तुज सांगो तैसें। साद्यंतु गां।।१३-६८ ते ७१।।."***

ज्ञानात महत्तम आणि अनुभूतीत वरिष्ठ अशा वैदिक बृहत्सामसूत्रालासुद्धा या क्षेत्रासंबंधीचा निर्णय करता आलेला नाही. इतरही महान महान तत्त्वज्ञ होऊन गेले. याचा निर्णय करण्यासाठी आपली मती खर्चूनही त्यांना हा विचार नीट उमगला नाही. हा विचार आजवर कोणीच निश्चितपणे निर्णायक असा प्रकट केलेला नाही. आणि म्हणूनच हा क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार वस्तुतः जसा आहे, तसा निर्णायकरीत्या श्रीकृष्ण अर्जुनाला सांगणार आहेत, असे या ओव्यातून ज्ञानदेव ध्वनित करत आहेत.

आचार्य आणि ज्ञानदेव यांचा गीतोक्तीकडे व एकूणच पूर्वीच्या श्रुत्यादी पारंपरिक विचारांकडे बघण्याचा हा असा मूलतःच विभिन्न असा दृष्टिकोन आहे. संशोधकांना ज्ञानेश्वरीत अशी अजूनही काही स्थळे निश्चितच सापडतील.

यावरून मुख्य असे दिसून येईल की ***ज्ञानेश्वर स्वतंत्रपणे विचार करत आहेत आणि त्यांचे या तेराव्या अध्यायावरील निरूपण तर त्यांच्या स्वतंत्र विचारशक्तीचे द्योतकच आहे. याच स्वतंत्र विचारशक्तीच्या बळावर, सिद्धप्रज्ञेच्या आधारे ज्ञानदेवांनी गीतार्थ केलेला आहे,*** हे आपणास जाणवून येते. *सहाव्या* अध्यायातील **पंथराज** व अठराव्या अध्यायातील ***क्रमयोग*** यांचे वर्णन व त्यातील ***कुंडलिनीयोगाचे प्रामुख्य*** या कोणत्याही गीताभाष्यकर्त्यांशी न जुळणाऱ्या गोष्टी हेच दर्शवत नाहीत काय!

असा जो स्वतंत्र अर्थ ज्ञानदेवांनी केला, त्यामागे त्यांचे गुरु ***श्रीनिवृत्तिनाथ यांचे प्रातिभ सामर्थ्य*** ही आहे. गीतेच्या संस्कृत पदांची व अर्थाची फोड त्यांनीच करून दिली असल्याचे त्यांनी ज्ञानेश्वरीत ग्रथित केले आहे. ***"तीरें संस्कृताची गहनें। तोडोनियां मऱ्हाठियां शब्दसोपानें । रचिलीं धर्मनिधानें। निवृत्तिदेवें।।१३-१।।"*** अशी त्यांची साक्ष आहे. ज्ञानदेव जरी ***"व्यासांची पदें पाहाता पहाता।।१८-१७०८।। ... व्यासाचा मागोवा घेतु ... आणि .. भाष्यकारातें वाट पुसतु।।१८-१७२२।।"*** असे करत करत आपण गीतार्थ सांगितला आहे, असे म्हणत आहेत; तरी त्यामागे हे असे त्यांच्या गुरूंचे मार्गदर्शनही आहे.

आणि म्हणूनच ***आपल्या गुरुदत्त अशा स्वतंत्र स्वयंप्रज्ञेच्या प्रकाशात ज्ञानदेवांनी हा गीतार्थ ज्ञानेश्वरीद्वारे प्रकट केला आहे.*** त्यामागे व्यासांचा अभिप्राय जाणून घेण्याचा भाग आहेच. भाष्यकारांचे म्हणणे त्यांनी समजावून घेतले आहेच. या सर्वांचा साकल्याने विचार करून त्यांनी सरतेशेवटी आपल्या स्वयंप्रज्ञेने आपल्याच रसपूर्ण समर्थ शब्दातून गीतेचा अर्थ विशद केला आहे.

त्यामुळे काही ठिकाणी कोणा भाष्यकाराचे मत त्यांना पटले असले तर ते त्यांनी स्वीकार्य ठरविले असले पाहिजे आणि पूर्वसूरींच्या अनेक भाष्यांचा आणि अक्षरवाङ्मयाचा त्यांना ज्याप्रमाणे समन्वय करणे उचित वाटले असेल, तसा त्यांनी तो केला असला पाहिजे, असे म्हणावे लागते.

या समन्वयकौशल्यामुळेच त्यांच्या तत्त्वज्ञानात Pluralism - ***अनेकांतात्मकता*** आली आहे. त्याप्रमाणे आपण अक्षरगणेशाच्या रूपकावरूनही त्याचे ***अनेकान्तात्मक*** स्वरूप अवलोकिले आहेच. विविध श्रुति, उपनिषदे, शास्त्रमते इ.अक्षर वाङ्मयात सकृद्दर्शनी जो विसंवाद आहे, ***"श्रुतिर्विभिन्नः श्रुतयः विभिन्नः"*** असे ज्याविषयी म्हटले जाते, त्या सर्व विचारांचे समालोचन करून, अंतिम सत्याचा आविष्कार करतांना, याच अनेकांतात्मकतेचा आधार घ्यावा लागणे साहजिकच आहे. परंतु ***त्या सत्यदर्शनास प्रबळ पाठबळ आहे, ते त्यांच्या स्वानुभूतीचे.***

गीतेतील या सर्व रहस्योद्घाटनामागे ज्ञानदेवांची खरी भूमिका आहे ती **सर्वज्ञा**ची, ज्याने शब्दब्रह्मास कवळणाऱ्या त्या अक्षरगणेशास - *त्या आदिबीजास- त्या आद्यतत्त्वास* - गुरुकृपेने समर्थ होऊन जाणून घेऊन त्याच्याशी एकरस होत वंदन केले आहे.म्हणून **जसा त्यांच्या तत्त्वज्ञानात *अनेकान्तवाद* आहे, तसाच त्यात अनुभूतीचा भागही फार महत्त्वाचा असा आहे. अखिल अक्षरवाङ्मयालाही न गंवसलेले ते आदितत्त्व ज्ञानेशांना अनुभूतीद्वारे हस्तामलकवत् अवगत झाले आहे. आणि ही अनुभूती नक्कीच *योगज* आहे.**

म्हणजेच **प्रत्याक्षादी इतर नैय्यायिक प्रमाणांबरोबरच ज्ञानदेवांच्या गीतार्थ प्रकटनास *योगज प्रत्यक्ष प्रमाणाचा* प्रमुख आधार आहे; किंबहुना योगज प्रमाणापुढे इतर प्रमाणे दुय्यम ठरावीत असा त्यांचा एकूण आवाका आहे.**

आजच्या भाषेत हे सांगावयाचे तर सुप्त मनातून - Sub-conscious mindमधून उपपन्न होत असल्याने या योगज प्रमाणास Surrealistic असे म्हणणेच उचित होईल व त्या दृष्टीने ***ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान हे Surrealistic असून ते Pluralistic पण आहे*** असे आपण म्हणू शकतो.

ज्ञानदेवांची समन्वय दृष्टी

ज्ञानदेवांनी गीतेतील तत्त्वज्ञानाचा स्वतंत्र स्वानुभूत विचार ज्ञानेश्वरीतून मांडला आहे हे एकदा पटले, तर मग तोच विचार त्यांनी सातत्याने त्यांच्या अमृतानुभवादी रचनांतून मांडला असल्याचे जाणवू लागते. ज्या योगज अनुभूतीद्वारे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे मंडण झाले आहे, ती ***योगज अनुभूती*** ज्ञानेश्वरीप्रमाणेच त्यांच्या इतर अक्षर वाङ्मयातहि प्रकट होतेच. आणि आपण जेव्हा माझ्या या ग्रंथात प्रत्यक्ष अवगाहन करू, तेव्हा ज्ञानेश्वर त्यांचे हे तत्त्वज्ञान सतत आपल्या ज्ञानेश्वरी आणि इतर रचनांमधून कसे समर्पकरीत्या मांडतात, तेही दिसून येईल.

या संक्षिप्त विवेचनावरून आपणास जाणवेल की ज्ञानदेवांनी जे तत्त्वज्ञान मांडले आहे, ते त्यांच्या सर्वच वाङ्मयात एकसंधपणे दिसून येते. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान आणि अनुभूती काही वेगळी, तर अमृतानुभवातील तत्त्वज्ञान व अनुभूती त्याहून वेगळी, असा काहींनी जो समज करून घेतला आहे, तसे काही नाही.

ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान पूर्वसूरींच्या तत्त्वज्ञानाचा, योगज अनुभूतींचा, प्रत्यक्ष व परतः प्रमाणांचा, वेदशास्त्रादी सर्व अक्षरवाङ्मयाचा साकल्याने विचार करून, स्वतःच्या स्वयंसिद्ध प्रज्ञेने, आणि योगज अनुभूतींच्या आधारे सर्वसमन्वयात्मक असे मांडलेले आहे. *सर्वसमन्वय हा सर्वसमावेशक असेलच असे नाही.* हा सर्वसमन्वय त्यांना ज्यांचे जे पटले ते घेतघेत व न पटलेले सोडतसोडतच केला जाऊ शकतो, हे आपण पूर्वीच लक्षात घेतले आहेच.

काही महत्त्वाच्या बाबतीत म्हणजे क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचारात मात्र हा समन्वय अनेकांतात्मक दृष्टीने केला आहे, हेही आपणास ग्रंथांतरी दिसून येणार आहे. म्हणजेच ज्ञानदेवांनी केलेला हा जो समन्वय आपण चर्चित आहोत, तो **एका *सर्वज्ञाने (जैनांच्या परिभाषेत एका केवली सिद्धाने)* केलेला खरे तर एक *महासमन्वय* आहे, जो अनेकान्ततेस आपल्यात कवळून आहे.** हा विचार आपल्या मनात रूजला की ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान व गीता यांचा परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचा आहे, ते आपल्या लक्षात येते.

ज्ञानदेवांनी गीतेचा स्वतंत्र अर्थ घेतलेला आहे व म्हणूनच त्यांनी आपले तत्त्वज्ञान गीतेवर आरोपिले आहे असे म्हणणे उचित ठरत नाही. सर्व पूर्वाचार्यांनी आपापले अर्थच घेतले आहेत आणि म्हणूनच या ***सर्व आचार्यश्रेष्ठांप्रमाणे गीतेवर भाष्य करणारे एक महान आचार्य अशा दृष्टीने ज्ञानदेवांकडे पाहिले पाहिजे.*** त्यांचा हा तत्त्वज्ञानविचार माझ्यापरीने मी या ग्रंथांतरी मला दिसला तसा मांडण्याचा एक प्रयत्न केला आहे. असो.

समारोप

या ग्रंथलेखनात ज्या थोरामोठ्यांच्या विचारधारांचा व त्यांच्या ग्रंथपुण्यसंपत्तीचा माझे विचार समृद्ध करून घेण्यासाठी उपयोग झाला, त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्यांच्यातील अनेकांची नांवे व ग्रंथ कोणते, तेही आता इतक्या अनेक वर्षांनी विस्मृतीत गेले आहेत. ऋषिमुनी व हे इतर सर्व थोर विद्वान यांच्या विचारांचा मागोवा घेतांना माझ्या अपरिपक्व बुद्धीने त्यांचे विचार यथातथ्य समजण्यात आणि

त्यांचे हे असे मला जमेल तसे चित्रण करण्यात माझ्या हातून जर काही लहानमोठ्या चुका झाल्या असतील, तर त्यांबद्दल अत्यंत विनीत भावाने मी त्यांची क्षमा प्रार्थितो. दयाळू अंतःकरणाचे हे थोर, माझे कृतापराध नक्कीच पोटात घालतील अशी मला खात्री आहे.

अशा प्रकारे हा जो ग्रंथ मी लिहिला, त्यामागची माझी भूमिका स्थूलमानाने आपणा जिज्ञासू वाचकांच्या लक्षात आणून देत आहे. त्यामुळे ग्रंथाच्या लेखनाची दिशा व त्याचे सूत्र आपल्या नजरेपुढे राहील आणि त्यातील विवेचनामागे कोणता दृष्टिकोन आहे, तेही कळून येईल असे मला वाटते.

तसेच हे जे सर्व ग्रंथलेखन मी केले आहे, त्यावरून मला ज्ञानेश्वरी आणि तिच्या अनुषंगाने प्रमुखतया गीता आणि ज्ञानदेवांचे अमृतानुभव, अभंग इ.कसे आकळले आहेत, त्यामागे कोणकोणत्या विचारांचा सहभाग आहे, मला त्याद्वारे गीतेतील तत्त्वज्ञान आणि योगाचा कोणता परिचय झाला आहे आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे सारसर्वस्व माझ्या दृष्टीने कोणते आहे, हे निश्चित होईल.

हे ग्रंथलेखन एका जिज्ञासू ग्रंथप्रेमिकाचे आहे, हेसुद्धा परत आवर्जून सांगतो. जिज्ञासेपोटी केलेला हा एक लेखनप्रवास आहे. आणि माझ्यासारख्यांची जिज्ञासातृप्ती केव्हा तरी होईल; गीता - ज्ञानेश्वरीच्या अक्षरवाङ्मयाचा आणि योगानुभूतीचा प्रकाश माझ्यासारख्यांच्या अंतःकरणात कधी ना कधीतरी पडेल, मग त्यासाठी कितीही काळ का लागेना; ***"कालोह्यनन्तो विपुला च पृथिवी"*** या न्यायाने या ग्रंथात कोणा ना कोणा समानशीलास काही ना काही लभ्यांश कधी ना कधीतरी प्राप्त होईल, या महान आशेने प्रेरित होऊन, हे जे काही लेखन माझ्या हातून जसे काही त्या माउली आत्म्याने घडवले आहे, ते त्या हृदिस्थ श्रीकृष्णपरमात्म्याच्या चरणारविंदी ज्ञानेशमाउलीच्या करांगुलीस धरून, त्यांच्याच शब्दात अर्पण करतो व इत्यलम्!

"भरूनि सद्भावाची अञ्जुळी।
मियां वोवियां फुलें मोकलीं।
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं।
विश्वरूपाचां" ।।११-७०८ ।।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

सेवन्तिका बकुल चम्पक पाटलाब्दे।
पुन्नाग जाति करवी रसाल पुष्पैः।
बिल्व प्रवाल तुलसीदल मालतीभिः।
स्त्वां पूजयामि जगदीश्वर मे प्रसीद।।

✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡

त्वदीय वस्तु गोविन्द तुभ्यमेवसमर्पये।
तेन त्वदङ्घ्रिकमले रतिं मे यच्छ शाश्वतीम्।।

✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡✡

::परिशिष्ट::

::एका नाथ सिद्ध योग्याचे आत्मवृत्त::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::एका योग्याचे आत्मवृत्त::

योगानुभूतींचे प्रत्यक्ष प्रमाण::::

आवश्यकता

या ज्ञानेश्वरीवरच्या ग्रंथाच्या परिपूर्णतेसाठी अद्यापही एक योगानुभवांचा विषय हाताळणे आवश्यक आहे. आपण ज्ञानदेवांचे योगानुभूतीचे अभंग ठिकठिकाणी विषयोपात्त पाहिलेच आहेत. अनेक संतांच्याही अभंगादी रचनांमधून योगानुभूतीचे निर्देश येतात. प्रस्तुत ग्रंथलेखकानेही सुदैवाने अनेक प्रकारचे यौगिक अनुभव घेतलेले असल्याने त्यांच्या प्रकाशात त्याला या इतर संत-महात्म्यांच्या एतद्विषयक अनुभूतींची यथायोग्य जाण आली असल्याने त्यांचे प्रकाशन या ग्रंथात करणे उचितच ठरेल. या दृष्टीने या उन्मेषाची संरचना केली आहे. जिज्ञासूंना ती उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

आपण यौगिक चक्रे, कुंडलिनी, इडा-पिंगला-सुषुम्न्यादी योगनाड्या, योगपथ, पूर्वमार्ग-पश्चिममार्ग, आध्यात्मिक हृदय, अनाहतनाद, सगुणानुभूती, शिवशक्तीसामरस्य अशा अनेक बाबींचे ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** तून बृहत समालोचन केले आहे. त्यातील बहुतेक विवरणास ज्ञानदेवांच्या कृती आणि अन्य योगविषयक ग्रंथकारांनी योगशास्त्रावर लिहिलेल्या ग्रंथादींचा आधार आहे. या विषयावरची काही महत्त्वाची मतमतांतरे पण आपण तेथे चर्चिली आहेत. आपले स्वतःचे मतसुद्धा प्रस्तुत ग्रंथलेखकाने ठिकठिकाणी नमूद केले आहेच.

आता आपण जी चर्चा करणार आहोत, ती थोड्याफार प्रमाणात विस्कळीत स्वरूपाची असणार आहे. कारण ती पूर्वोक्त ग्रंथांच्या संदर्भात आणि प्रस्तुत ग्रंथात वेळोवेळी आलेल्या योगविषयाचे काही प्रमाणात विश्लेषण तर काही प्रमाणात संकलन आणि संश्लेषण अशा संकीर्ण स्वरूपाची आहे.

अनेकानेक योगशास्त्रादी ग्रंथांचे आलोडन केल्यावर असे आढळून आले की ज्या काही योगानुभूती येतात, त्यांचा स्तर साधकागणिक वेगवेगळा असू शकतो.

कुंडलिनीयोगाचेच घेतले तर प्रत्येक योगसाधकास त्याच आणि तशाच प्रकारच्या अनुभूती येतातच असे नाही. उदाहरणार्थ कोणाला मूलाधारादी अनेक चक्रांचे अनुभव न येता आज्ञा चक्र आणि केव्हा केव्हा त्यावरील प्रांतांच्याच अनुभूती येतात. दादू, कबीर इ.संतांनी चोखाळलेल्या विहंगममार्गात तर या पूर्वेकडील विशुद्ध चक्रापर्यंतच्या निम्न चक्रांना काहीच महत्त्व दिले जात नाही आणि त्यांची भेदनक्रिया आवश्यक समजली जात नाही.

श्रीगुरुदेव रानड्यांसारख्या अत्युच्च श्रेणीच्या आणि साधकांना नाम देणाऱ्या अनुभवी श्रेष्ठांना तर कुंडलिनी आहे की नाही याचा पण प्रश्न पडलेला त्याबाबतच्या लिखाणातून दिसून येतो. याचा स्पष्टच अर्थ असा होतो की ज्यांना अनाहतनाद-नामे ऐकण्याचा अनुभव आहे, प्रकाश किंवा वस्तू दिसते, त्यांनासुद्धा कुंडलिनीयोगाचा विशेष असा दुसरा कोणताच अनुभव नसू शकतो.

हे तर शास्त्रसिद्धच आहे की कुंडलिनी आपल्या पथक्रमणात अर्धमात्रेच्या प्रांतात म्हणजे आज्ञाचक्रावर पोहोचल्याशिवाय नाद प्रकट होत नाही. अजपाजपाची सिद्धीही तेव्हाच होते. नामसंप्रदाय चालवणाऱ्यांची येथपावेतो तरी प्रगती झाल्याशिवाय त्यांनी दिलेले नाम सबीज असू शकत नाही आणि तशा नामास विशेष अशी शक्ती ज्या नामधारकास मिळत नाही, त्याचे नाम निष्फळच असते.

दुसरी गोष्ट अशी की योगानुभूती या अव्यक्ताच्या प्रांतातील आणि अतींद्रिय असतात. त्या जाणिवेच्या किंवा ऋतंभराप्रज्ञेच्या विशिष्ट अशा पातळीवरील असतात. सामान्य प्रज्ञा किंवा सामान्य जाणिवेस त्या तशा अगम्य आणि अनाकलनीय असू शकतात. पण काही प्रमाणात त्यांचे इतरांसाठी प्रकाशन करणे शक्य आहे. तरीही आपल्या व्यावहारिक भाषेत हे अनुभव विशद करणे मोठ्यामोठ्या प्रज्ञावंतांसही शक्य नसते. असे आहे म्हणूनच तर ज्ञानदेवांची प्रतिज्ञा आहे की ***"अतिंद्रिय परी भोगवीन। इंद्रियांसि।।"*** असे असूनही त्यांना म्हणावें लागले की ***"एथ अंतरंगचि अधिकारिएं। एरु लोकु वाक्चातुर्यें। सुखिया होई।।"***

ज्ञानेश्वरी वाचणाऱ्या अनेक भोळ्याभाबड्या भाविकांना त्यांचे त्यातील अतींद्रियाच्या प्रांतातले बोल आकलनास अवघड आहेत, पण तरीही शास्त्रे आलोडणाऱ्या सामान्य प्रज्ञेच्या व्यक्तींना त्यांचे हे बोल ऐकून शास्त्रजिज्ञासापूर्तीचे ज्ञान होऊन ते सुखी होतील. पण त्या अनुभवांचे यथार्थ मूल्यमापन करण्यासाठी अंतरंग अधिकारीच हवा!

आपण वेदोक्त श्रुतींचेच उदाहरण जर घेतले तर काय दिसून येते पहा. द्रष्ट्या ऋषींनी आपल्या यौगिक अनुभूती शब्दप्रकटनातून आपल्यापुढे मांडल्या आहेत. अगदी यास्काचार्यांच्याइतक्या प्राचीन काळीही त्यांचे श्रुतिशब्द कोणासही समजेनासे झाले होते. एक असे कारण असू शकते की वैदिक ऋचांच्या काळातील जी भाषा होती, तिच्यात तोपावेतो पालट पडला असावा.

आजही आपणास ज्ञानेश्वरकालीन मराठी शब्द, त्यांचे अर्थ इ.आकलन होण्यास अवघडच वाटत नाहीत का! भाषाशास्त्र्यांनी कठोर परिश्रमांती अगदी इजिप्शियन फॅरोंच्या कालातील लिपी आणि लिखाणाचा शोध घेऊन त्या वेळच्या भाषेत बद्ध केलेल्या शिलालेखादी साधनांचे प्रकाशन आपल्याला समजेल असे जरी केले असले, तरी एक प्रश्न असा उरतो की त्यांचे तेव्हाच्या सामाजिक, शास्त्रीय, वैज्ञानिक इ.संदर्भातील ते लिखाण खऱ्या अर्थी आपणास कितपत उलगडू शकणार आहे.

असे आहे म्हणूनच ना वेदांतील ***सोम*** म्हणजे काय यावर आजतागायत मोठमोठ्या पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विद्वानांचे वादविवाद चालू आहेत.

वैदिक ऋचांचा अर्थ समजून घेण्यासाठी यास्काचा काळ मागे पडल्यावर मध्ययुगात शंकरादीप्रभृतींना आपली महामती वेचावी लागली. त्यानंतर सायणाला आपले भाष्य सिद्ध करावे लागले. एकेकाळी याचसाठी पाणिनीला आणि पतञ्जलींना आपले व्याकरण रचावे लागले. आणि तदनंतर त्या व्याकरणावरही अनेकानेक व्युत्पन्नमती पंडितांना आपापली भाष्ये रचावी लागलीत. ब्राह्मणे आणि आरण्यकेही मुख्यतः याचसाठी रचली गेलीत की त्या वेदोक्तीचा अर्थ समजू शकावा!

विद्वानांनी एवढे सायास करूनही आचार्या-आचार्यांमध्ये त्याच श्रुतींचा अर्थ करण्यावरून झालेले वादविवाद तर गेल्या एका सहस्त्रकाएवढ्या कालखंडास तरी व्यापून आहेत आणि तत्पूर्वीही तसे ते झाले नसतीलच असेही नाही.

सांगण्याचा इत्यर्थ असा की श्रुत्यादींचा सामान्य अर्थ लावतांनाच एवढ्या मोठ्या प्रमाणात जेथे बौद्धिक क्षमता प्रयोगात आणावी लागली, तेथे त्या अतींद्रिय अनुभवांच्या श्रुतींचा गूढार्थ उकलणे सामान्य प्रज्ञेच्या म्हणजे यौगिक अनुभूतींरहित विद्वानांस कसे असंभव आहे, ते आपल्याला आकळावे.

अजूनही एक मुद्दा आहे. तो असा की ज्या त्या द्रष्ट्यांना जे जे अनुभव आले, ते जरी त्यांनी प्रत्यक्षदर्शी या स्वरूपात घेतले असले तरी जेव्हा त्यांनी ते सामान्य भाषेत शब्दबद्ध केले, तेव्हा त्यांना ते त्या वेळच्या व्यावहारिक भाषेत कसे आणि कितपत सुसंबद्धरीत्या व स्पष्ट कळतील अशा प्रकारे उतरवता आले.

अनुभव असा आहे की यौगिक अनुभूती या आपण या ग्रंथामागील भूमिकेत सुचवल्याप्रमाणे surrealistic अशा दृश्य व श्रवणादींच्या असतात. नवचित्रकारांची चित्रे सामान्य आणि असामान्य प्रज्ञेच्या कलावंतांससुद्धा कितपत समजू शकतात! त्या त्या चित्रकाराला ती स्वतःच इतरांस समजावून द्यावी लागतात, तेव्हा कुठे उत्तम प्रज्ञेच्या कलावंतांना त्यातून जरा काही बोध होतो. पण मूळ चित्रकाराची अनुभूती काही कोणालाच घेता येत नाही ना उमजू शकते.

यावरून असे दिसून येईल की यौगिक अनुभूती घेणारा त्या समग्रपणे शब्दबद्ध करू शकत नाही; तसेच जेवढ्या काही प्रमाणात त्याने त्या केल्या असतात, त्याला आपल्या दैनंदिन भाषेचे माध्यम अपुरे असते, म्हणून त्यासाठी वेगळीच यौगिक परिभाषा प्रचारात आणावी लागते; एवढे करूनही तो अनुभव सामान्यांच्या आवाक्यातील नसल्याने तो त्यांना वस्तुतः कळू शकत नाही.

ही झाली सामान्य, मग कितीही बुद्धिमान का असेनात, अशा मनुष्यांची गोष्ट. पण स्वतः यौगिक अनुभव घेतलेल्या मनुष्यांनाही इतर योग्यांचे अनुभव जसेच्या तसे कळणे दुष्प्रायच आहे. यालाही कारण म्हणजे भाषेच्या अशा अनुभूतींस व्यक्तवण्याच्या मर्यादा आणि दोन योग्यांच्या अनुभवांचे वैविध्य - वेगळेपण! एका नवचित्रकाराने काढलेले चित्र दुसऱ्या नवचित्रकारास तंतोतंत काय पण बव्हंशी तरी समजेल असे असू शकत नाही. कारण त्या चित्रामागचा surrealistic अनुभव! यौगिक अनुभव तर surrealisticच्याही पार पलीकडचे असतात. तेव्हा योगानुभूती ज्याला येतात, त्याच्याशिवाय इतरांस त्या कळणे अवघडच!

थोडक्यात म्हणजे योगशास्त्र जरी योग्यांच्या यौगिक अनुभवांवरूनच रचलेले असले तरी ***"पिंडे पिंडे मतिर्भिन्ना"*** या न्यायाने प्रत्येकाचे योगशास्त्रमत दुसऱ्या मताशी जुळेलच असे नाही.

योगानुभूती-संदर्भग्रंथ

योग्यांचे प्रत्यक्ष अनुभव अनेकांनी लिहिले आहेत. संदर्भग्रंथसूचीत अशा बऱ्याच पुस्तकांचा उल्लेख केलेला आहे. त्यातही मुख्यत्वेकरून ज्या ग्रंथांचा जिज्ञासूंना

यासाठी उपयोग होऊ शकेल अशा ग्रंथांचा नामनिर्देश पुनः पुढे करत आहेः

Pandit Gopi Krishna:Kundalini - *path to Higher Consciousness*
:The Awakening of Kundalini
:Higher Consciousness *(The Evolutionary Thrust of Kundalini)*
श्री.वि.वि.लेले:कोणा एका योगसाधकाची डायरी *(स्वतःचे योगानुभव)*
B.S.Goel : Third Eye and Kundalini
Mahendranath Gupta (M):The Gospel of Sri Ramkrishna (2 vol.)
पं.गोपीनाथ कविराजःसाधुदर्शन एवं सत्प्रसंग
चित्रकार डी.डी.रेगेःश्रीसद्गुरू जंगलीमहाराज
श्री.पुरोहित स्वामीःमी एक संन्यासी
प्रा.डॉ.रा.द. तथा गुरुदेव रानडे
:मराठी संतवाङ्मयातील परमार्थमार्ग
:कन्नड संतवाङ्मयातील परमार्थमार्ग
डॉ.म.वि.पाटणकरः *श्री गुरुदेव लिखित* हिंदी परमार्थ सोपान *ग्रंथांतील निवडक पदांवरील प्रवचने*
श्री.ग.वि.तुळपुळेः *गुरुदेव रानडे* — साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान
डॉ.भगवतीप्रसाद सिंहःमनीषीकी लोकयात्रा
म.म.पं.गोपीनाथ कविराज का जीवन दर्शन
सिद्धयोग्यांच्या सहवासात *अनु.श्री.गणेश नीलकंठ पुरंदरे*
कै.जी.के.प्रधानः"साद देती हिमशिखरे" *अनु.डॉ.रामचंद्र जोशी*
:अंतरीचा मागोवा *अनु.म.ना.झोळ*
श्री.दिलीपकुमार रॉयःदैवी चमत्कार *आजही घडतात*
श्री गजानन महाराज गुप्तेःआत्मसाक्षात्कारमार्गप्रदीप
श्री.द.ल.निरोखेकरःआत्मप्रभा
सौ.मालती बाळःकोणा एकाची साधनगाथा
गोविंदसुत श्री.परशुराम गो.चिंचाळकरःआत्मानुसंधान
Shri J.Krishnamurti:Krishnamurti's Notebook
Swami Muktanand:Secret of The Siddhas
:Where Are You Going
:चित्शक्तिविलास

या सगळ्याच ग्रंथांना आणि इतरही काही ग्रंथांना माझ्या आयुष्यात एक विशेष स्थान आहे. मुक्तानंदांनी ***चित्शक्तिविलास*** या ग्रंथात त्यांचा एक अनुभव असा ग्रथित केला आहे की त्यांना जेव्हा एका यौगिक प्रक्रियेच्या माहितीची आवश्यकता भासली, तेव्हा ती माहिती देणारा एक जुना ग्रंथ त्यांना आकस्मिकरीत्या ते राहत असलेल्या कुटीतल्याच एका जुन्या कपाटात मिळाला.

मला तर असा अनुभव अनेकानेक वेळा आलेला आहे. वर नामनिर्देश केलेले ग्रंथ आणि तसेच इतरही अनेक ग्रंथ माझ्या हाती जेव्हा जेव्हा त्यांची आवश्यकता होती, तेव्हा तेव्हा नेमके पडत गेले. मी अकस्मात कोणत्यातरी जुन्यापान्या दुकानात जाई. तिथे त्या ग्रंथांची अगदी जुन्या आवृत्तींची, जी प्रत आता मिळणे दुस्तरच आहे, अशी प्रत हाती पडत असे.

कधीकधी तर परत आवृत्ती निघण्याची शक्यता नसलेल्या आणि कुठेही प्रती शिल्लक नसलेल्या ग्रंथाचीही उपलब्धी होत असे ती त्यांची नुकतीच काढलेली नवी आवृत्ती मिळून. अशा प्रकारे मला मिळालेले दोन प्रमुख ग्रंथ म्हणजे श्रीमत् शंकराचार्य खरेशास्त्र्यांचे मंत्रशास्त्र आणि Sir John Woodroffe चे The Serpent Power, Sakti and Sakta, Reflections on the Tantras-Principles Of Tantra (2 Parts).

संदर्भग्रंथसूचीतले बहुतेक सगळेच ग्रंथ आवश्यक तेव्हा हाती आलेले आहेत. म्हणून त्यांची वेगळी जंत्री देत नाही. साधनेबाबत विशेषतः शक्तिपात आणि लययोग यांवरचे ग्रंथही असेच मला वेळोवेळी मिळत गेले आणि त्यांचा माझ्या या साधकावस्था ते सिद्धावस्था यांच्या दरम्यान अनेकरीत्या उपयोग झालेला आहे.

याबाबत विशेष उल्लेख करावा असे दोन ग्रंथ आहेत. ते म्हणजे आचार्य श्रीशंकरभगवत्पाद यांचे ***योगतारावली*** आणि ***सौंदर्यलहरी!*** या ग्रंथांचा माझ्या वैयक्तिक योगानुभूती तपासून पाहण्यासाठी आणि त्यांच्या यथार्थ प्रकाशनासाठी सगळ्यात मोठा उपयोग झाला आहे. या ग्रंथांवरील पुढील टीकाग्रंथाचा या दृष्टीने मला खूप लाभ झालाः

१) श्री.चं.वा.दांडेकरःयोगतारावली व २) श्री१००८स्वामी विष्णुतीर्थ महाराजःसौंदर्यलहरी - श्रीविद्यातत्त्व और कुंडलिनी रहस्य सहित.

तसेच हे जे सगळे ग्रंथ मला मिळाले, त्यांद्वारे ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** च्या लिखाणाचीही एक प्रकारे पूर्वतयारीच होत होती, असेही म्हणावे लागते. कारण मला लिखाणासाठी लागणारे संदर्भग्रंथ शोधण्यासाठी नंतर कोणत्याही लायब्ररीत जावे लागले नाही. ते ते ग्रंथ माझ्या स्वतःच्या घरीच उपलब्ध होते, अगदी दुर्मीळ ग्रंथसुद्धा! नाही तर Sir John Woodroffe चा The Serpent Power हा माझ्या लिखाणासाठी अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ तर मला परत पहायलाही मिळाला नसता. पण तो अचानक

प्रसिद्ध होऊन सहजगत्या एकदा मुंबईच्या फोर्ट विभागातल्या सहसा कोणी जात नाही, अशा दुकानात मी उगीचच गेलो असता मला मिळाला असता का?

नादयोगासंबंधित श्रीशिवानंदांचाही ग्रंथ नेमक्या वेळी माझ्या हाती होता. नाद सुरू झाला तेव्हा त्या ग्रंथातून हवी ती माहिती मिळू शकली. तसेच माझ्या साधनेतल्या महत्त्वाच्या नादानुभूती आणि कुंडलिनीयोग यांची हवी असलेली माहीती देणारा आचार्यांचा ***योगतारावली*** (ले.श्री.चं.वा.दांडेकर) आणि ***सौंदर्यलहरी*** (ले.श्रीविष्णुतीर्थ महाराज), तसेच ***देवात्मशक्ती*** (तत्रैव) हे ग्रंथही असेच उपलब्ध झाले.

तसेच पं.गोपीनाथ कविराज यांचे काही अभ्यासपूर्ण ग्रंथ तर मला जन्मात कधीही मिळाले नसते. एक तर मी त्यांचे नावही कधी ऐकले नव्हते. गिरगावातल्या एका जुनाट हिंदी पुस्तकांच्या दुकानात रस्त्यावरून जाताजाता सहज शिरलो आणि त्यांचे हे अनमोल ग्रंथ माझ्या हाती पडले.

असेच मुद्दाम नमूद करण्यासारखे जे ग्रंथ मिळाले, ज्यांचा माझ्या साधनेत खूपच उपयोग झाला, ते म्हणजे नाथपंथाचे साहित्य, श्री.म.रा.जोशी, श्री.प्र.न.जोशी यांचे नाथसंप्रदायावरले ग्रंथ, गीता-ज्ञानेश्वरीवरचे अनेक ग्रंथ, एका नंगेबाबांकडून मिळालेली अवधूतगीता, ओमानंदस्वामींचा पातञ्जलयोगप्रदीप, श्री. कृ. के. कोल्हटकरांचा पातञ्जल योगदर्शनावरचा ग्रंथ, श्री.हंसराजस्वामींचा लघुवाक्यवृत्तीवरचा विस्तृत ग्रंथराज (हा फक्त वाचायला मिळाला, त्याची प्रत काढता येण्यासारखी असूनही ज्यांच्याकडे ती मिळण्यासारखी होती, त्यांच्याबाबत चांगले आध्यात्मिक reading न मिळाल्याने, मागितला नाही.), गणेशकोश, दत्तकोश, अमृतानुभवावरचे विस्तृत टीकाग्रंथ, शांकरदर्शनावरचे ग्रंथ, मंडूक्यकारिका - स्वामी श्रीचिन्मयानंदादींची विवेचनात्मक पुस्तके, श्रीमुक्तानंदांचे चित्शक्तिविलास, श्रीमाणिकप्रभू चरित्र, संतांचे चरित्रादी ग्रंथ, योग्यांच्या आत्मानुभवपर कहाण्या, असे काही प्रमुख ग्रंथ व पुस्तके त्या काळात आपोआप हाती येत गेले. असे ग्रंथ अनेक आहेत.

अर्थातच ग्रंथ पारखण्याची एक विशेष नजर मला आहे, ती पण योगसाधनेचाच एक भाग आहे. म्हणून मी आपोआप लागणाऱ्या ग्रंथांच्या दुकानात जातो आणि मला हवे असणारे ग्रंथ अचूक माझ्या हाती पडतात. त्या वेळी हवे तितके पैसेही माझ्याजवळ असतात आणि तो ग्रंथ सहजच आपण होऊन यावा तसा माझ्या घरी प्रवेशतो!

याला योगायोग म्हणावा तर तो इतक्या वेळा घडला आहे की हेच माझ्या पूर्वसंचिताचे भागधेय आहे, असेच म्हणावे लागते. म्हणूनच तर मी खऱ्या अर्थानेही ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** या प्रस्तुत ग्रंथाची ***"ग्रंथामागील भूमिका"*** लिहितांना ***"ग्रंथ माझे गुरू"*** असे म्हटले आहे.

संत श्रीगजानन महाराज गुप्ते यांचा ग्रंथ

या अशा महत्त्वाच्या ग्रंथांपैकी एक माझ्या दृष्टीने फारच महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ***श्री गजानन महाराज गुप्ते यांचा आत्मसाक्षात्कारमार्गप्रदीप.*** हे महाराज एक फार बोलके संत होऊन गेले. त्यांचे वैशिष्ट्य असे की मार्च १९४४ मध्ये त्यांनी त्यांचा हा चरित्रग्रंथ लिहवला आणि त्यातील सर्व घटनांचे अनुमोदन केले. साक्षात्कारमार्गावरच्या अनेक खाणाखुणा त्यात सांगितलेल्या आहेत, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य!

माझ्या जन्मानंतर चार एक महिन्यातच प्रसिद्ध झालेला हा ग्रंथ त्यानंतर तब्बल पासष्ट वर्षांनी माझ्या हाती पडला आणि त्यातून माझ्या काही विशेष अनुभूतींचे समर्थन मिळाले, हेच माझ्यासाठी त्या ग्रंथाचे महत्कार्य होय. म्हणून हे संत आणि त्यांचा हा ग्रंथ मला गुरुस्थानीच आहे, असे मी समजतो. त्यातील एका भागाचे प्रकाशन ले. द.रा.निरोखेकरविरचित ***आत्मप्रभा*** या शीर्षकाखाली स्वामी स्वरूपानंदांच्या पावस येथील विश्वस्तांकडून होत असते. या ग्रंथातील महत्त्वाच्या बाबी आणि माझ्या स्वतःच्या अनुभवासंदर्भातल्या बाबी योग्य तेथे नमूद करणार आहेच.

आपल्या ग्रंथात महाराजांनी काही विशेष ग्रंथ साधकांसाठी उपयुक्त म्हणून सांगितले आहेत, त्यातले काही असेः १) ब्रह्मसिद्धांतमाला -ले.श्री.बाबा गर्दे, २) श्री.महेंद्रकृत रामकृष्णांच्या गोष्टी, ३) श्री.गुलाबराव महाराज - संप्रदायसुरतरु, ४) श्री.सोहिरोबानाथ अंबिये - सिद्धांतसंहिता. महाराजांच्या म्हणण्यानुसार आत्मानुभव आलेल्या साधुसंतांनी इतरांच्या मार्गदर्शनासाठी आपले अनुभव लिहून ठेवले आहेत. असो.

स्वानुभवांची मीमांसा

या प्रकारच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत ग्रंथलेखकाचा जेव्हा या अज्ञाताच्या प्रांतात आकस्मिकरीत्या प्रवेश झाला तेव्हा त्याला आलेले अनुभव आणि त्यांची मीमांसा तो कशी करू शकला ते पाहणे स्वानुभूत शास्त्रनिरुपणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. म्हणून ग्रंथलेखक ही भूमिका थोडा वेळ विसरून ते अनुभव ***"कोणा एका योगसाधकाचे अनुभव"*** या शीर्षकाखाली पुढे ग्रथित केले आहेत. त्यात अर्थातच इतरही समानशील योगसाधकांचे आणि सिद्धांचे अनुभव

आवश्यक तेथे त्याच अवतरणाखाली दिलेले आहेत. म्हणजे यौगिक अनुभव सांगू नयेत हा दंडकही बऱ्याच अंशी पाळल्यासारखा होईल, कारण कोणते अनुभव स्वतः ग्रंथकर्त्याचे आहेत आणि कोणते अनुभव इतरांचे आहेत, ते कळू शकणार नाही.

तरीही निवेदनाच्या सोयीसाठी ते अनुभव आणि त्यांचे विश्लेषण ही सर्व प्रथमपुरुषी एकवचनी या स्वरूपात ***"स्वामी योगेश्वरानंद "*** या टोपणनावाखाली प्रसिद्ध करत आहे. तरी विचक्षण जिज्ञासूंनी ते सगळेच अनुभव प्रस्तुत ग्रंथकर्त्याचेच आहेत, असे कृपया समजू नये, ही विनंती!

कोणा एका योगसाधकाचे अनुभव::::

गीता काय सांगते

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति।।६-३७।।
कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि।।६- ३८।।

श्रीकृष्णांनी अर्जुनाला गुह्यातिगुह्य असा योगाचा अभ्यास कसा करावा, ते सांगितले. योगाभ्यासी साधक अंती शाश्वत शांती पावतो असे सांगून योगाची महती त्याला सांगितली. यावर अर्जुनास मोठी शंका आहे. तो भगवंतास विचारतो की "समजा! योगाभ्यास करत असता पुरेशा प्रयत्नांअभावी व चंचल स्वभावाच्या मनामुळे जर योगसिद्धी न होता एखादा साधक मृत्यू पावला, तर त्याला कोणती गती प्राप्त होते? असे तर नाही ना होत की *"ना अरत्र ना परत्र"* असे होऊन आकाशात फुटून नष्ट होणाऱ्या ढगाप्रमाणे उभयभ्रष्ट होऊन ब्रह्मप्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या त्याची स्थिती होते!"

अर्जुनास मनाचे चांचल्य फार छळते आहे. ते प्रमादशील आहे. कितीही केले तरी त्याचे मुळचे वळणच मोहग्रस्त होण्याचे आहे. क्षणात इथे तर क्षणात तिथे असे ते अचपळ धावत असते. त्याला निग्रहाचा वाराही सहन होत नाही आणि मनात नसेल तर काहीच करता येणार नाही. मग अशा मनाला संयमाच्या जाळ्यात पकडून त्याला सांगू तसे करायला लावायचे कसे! कोण आपण होऊन स्वतःला बंदिवान करून घेईल बरे! एवढे तर आपले मन नक्कीच चतुर असते.

त्यावर श्रीकृष्ण उत्तरतातः

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते।
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति।।६-४०।।

प्राप्य पुण्यकृतां लोकांनुषित्वा शाश्वतीः
समाः। शुचीनां श्रीमतां गेहे
योगभ्रष्टोऽभिजायते।।६-४१।।
अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्।।६-४२।।

भगवंत म्हणतात कीः "अर्जुना! त्या योगसाधकाचा कधीही नाश होत नाही. भगवत्प्राप्तीचा प्रयत्न करणाऱ्याची कधीच दुर्गती होत नाही. योग अपूर्ण राहिलेला तो मनुष्य आपल्या पुण्यफलाचा उत्तमोत्तम लोकांत भोग घेतो आणि तदनंतर शुचिश्मंत श्रीमान अशा कुलात तरी जन्म घेतो, नाही तर बुद्धिमंत अशा योग्यांच्या कुलात जन्म घेतो. हे असे जन्म या लोकी अत्यंत दुर्लभ समज!"

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन।।६-४३।।
पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।
प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।।६-४५।।

अशा प्रकारे होणाऱ्या पुनर्जन्मात त्याला पूर्वी केलेला योगाभ्यास स्मरतो व जेथून अभ्यास सुटला होता, तेथून पुढची प्रगती होत जाऊन त्याची इच्छा नसली तरी एकदा सुटलेल्या लक्ष्यवेधी बाणाप्रमाणे तो योगाभ्यासाकडे वळतो. अनेक जन्म असे प्रयत्न करत तो परमगतीस पावतो."

सातशे श्लोकी गीतेतील याच काही श्लोकांचा मी या आत्मवृत्ताच्या सुरवातीसच असा प्रपंच का मांडला आहे, याचे कोणालाही नवल वाटेल. मलासुद्धा तसेच काही वर्षांपूर्वी वाटले असते. अत्यंत नास्तिक असणाऱ्या मला त्या वेळी कोणा एकाने "गीता वाचता का" असे विचारले होते. मी सहजच काहीही विचार न करताच म्हणून गेलो की, "अहो! काय आहे त्या गीतेत एवढे! अठरा अध्याय अठरापगड व्यक्तींनी लिहिलेली ती गीता! कशाला ती वाचायची!"

मागे वळून पाहातो. आता मी नुकताच सदुषष्ट वर्षांचा झालो आहे. काय आहेत माझ्या भावना या आयुष्याबद्दल! Leopold Staff च ी एक कविता त्या बऱ्यापैकी व्यक्त करते:

I did not Believe -
Standing on the Bank of The River,
Which was Wide and Swift;
That I would Cross That Bridge -
Plaited from Thin Fragile Reeds,
Fastened with Bast.

I walked Delicately as a Butterfly
And Heavily as an Elephant;
I walked Surely as a Dancer
And Waved like a Blind Man.
I did not Believe that
I would Ever Cross That Bridge!
And Now That I am Standing
On The Other Side,
I don't Believe I Crossed It Ever!!

अज्ञाताच्या प्रांताला आकस्मिक प्रवेश

माझा या अज्ञाताच्या प्रांतात अगदीच आकस्मिकरीत्या प्रवेश झाला. त्याचेच हे माझ्या गतायुष्यातले इतिवृत्त! वयाच्या साधारणपणे पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंत अध्यात्म आणि योगशास्त्र या विषयांशी मी तसा अपरिचितच होतो. सायन्स आणि इंजिनीयरींगची माझी सर्वच पार्श्वभूमी असल्याने आणि पाश्चात्य वैज्ञानिक विचारसरणीचा मनावर पगडा असल्याने पौर्वात्य शास्त्रे, अध्यात्म, वेदोपनिषदे, गीता अशा अनेक बाबतीत मी निरुत्साही तर होतोच, पण वेळप्रसंगी त्यांची कुचेष्टा करण्याचा मोहही मला आवरता येत नसे! एकदा तर मी गीतेचीही निंदा केली होती.

त्याचे असे झाले की मी The Universe Within नावाचे एक पुस्तक नुकतेच वाचून संपवले होते. त्याने मी इतका काही प्रभावित झालो होतो की माझ्या एका मित्राकडे लागलीच जाऊन त्याला त्यातील विषय समजावून सांगू लागलो. मनुष्याच्या मेंदूविषयक त्यावेळपावेतो समजलेल्या आणि न समजलेल्या अशा अनेक वैज्ञानिक गोष्टींचा हे पुस्तक मनुष्याचे मन म्हणजे काय हे उलगडण्याच्या दृष्टीने उहापोह करणारे होते.

माझ्या त्यावेळपावेतोच्या विचारप्रवासात मला सृष्टीविषयी ज्या ज्या गूढ गोष्टी म्हणून आहेत, त्यांचे फारफार आकर्षण वाटत असे. म्हणून त्यासाठी मी गणित, आधुनिक विज्ञान, खगोलशास्त्र, जैवरसायनशास्त्र, शरीरविज्ञानशास्त्र आणि अशाच इतर अनेकविध विषयांचा सातत्याने बरीच म्हणजे उणीपुरी ३०-३५ वर्षे परामर्ष घेत असे. त्याचीच एक पायरी म्हणजे मनुष्याच्या मेंदूसंबंधी आणि डार्विन इ. वैज्ञानिकांच्या जैविक उत्क्रांतिवादासंबंधीच्या अद्यतन ग्रंथांचे वाचन करणे सतत बरीच वर्षे चालू होते. त्याच परीक्षणप्रवासात Arthur Koestler यांची Human Evolution संबंधित पुस्तके वाचण्यात आली. Science Fictionची तर अनेक पुस्तके वाचली होती.

गूढ शास्त्रसंबंधित ज्योतिषशास्त्रविषयक आणि Parapsychologyवरची पण बरीच पुस्तके असे इतरही अवांतर वाचन झालेले होते. पण तरीही पिंड मात्र त्या विषयांवर अंधविश्वास ठेवणारा कधीच नव्हता.

तर अशा वेळी मी आणि माझा मित्र The Universe Within या पुस्तकाची चर्चा करत असतांना तो वर सांगितलेला गीता वाचण्यासंबंधीचा प्रसंग घडला. मला नंतर असेही वाटले की आपल्यासारख्या विज्ञानविषयाच्या अभ्यासकाने गीता नीट न वाचताच त्या गृहस्थाला असे गीतेबद्दल सांगायला नको होते. ते सांगणे अवैज्ञानिक आणि अनभ्यस्त वृत्तीचे निदर्शन तर नव्हते ना करत!

नंतर मात्र असा अनुभव आला की त्यानंतर थोड्याच दिवसांनी मला आकस्मिकरीत्या मन शांत राहत नाही असे प्रकर्षाने वाटू लागले. त्या वेळी मी कायद्याच्या परीक्षा देण्यात गुंतलो होतो आणि परीक्षेला आता केवळ २-३ महिनेच राहिले होते. अभ्यास तर विशेष असा होत नसे.

कुंडलिनी-The Serpent Power

कधी कधी मी एका सर्जनकडे गप्पा मारायला जात असे. त्यांना गूढ विषयांचा फार नाद होता. एकदा ते एक ग्रंथ चाळत असतां मी तेथे गेलो. त्यांना सहज विचारले की कुठला ग्रंथ वाचता आहात. तो ग्रंथ The Serpent Power नावाचा Sir John Woodroffe यांचा होता. तो मीही थोडा चाळला आणि त्याने मला तत्काळ आकर्षित केले. त्यांच्याकडे तो वाचण्यास मागितला असता ते म्हणाले की तो ग्रंथ एका मोठ्या लायब्ररीतून त्यांच्या एका पेशंटने मोठ्या मिनतवारीने आणला आहे. तो देता येणे म्हणून शक्य नाही. सदर ग्रंथ सध्या तरी दुर्मीळ आहे, असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर एक दिवस मी सहज म्हणून माझ्या शालकांकडे गेलो असता त्याने एक कपाट उघडले, तर त्यातच तो ग्रंथ होता. मी त्यांना तो पाहण्यास मागितला असता सर्जनकडे हाच ग्रंथ पाहिल्याचे माझ्या लक्षात आले. त्यावर मी माझ्या शालकांना म्हटले की हा ग्रंथ दुर्मीळ आहे. त्यांना तो कोठे मिळाला. त्यावर त्यांनी तो आमच्या सर्जनसाहेबांसाठीच आणला असल्याचे सांगितले आणि ग्रंथ उद्याच परत करणार आहे, असे म्हणाले. त्यावर मी विचारले की, "हा ग्रंथ मला वाचायला हवा आहे, तर तो मिळू शकेल का?"

त्यावर ते म्हणाले की, "ग्रंथ हरवल्यास किंवा खराब झाल्यास त्यांच्यावर लायब्ररीचा मोठा ठपका येईल." त्यावर मी त्यांना म्हटले की, "ग्रंथ सुरक्षित, जसाच्या तसा राहील याची मी हमी देतो आणि जेव्हा परत मागाल, त्या क्षणीच तो परत करीन." त्यावर त्यांनी तो ग्रंथ मला वाचायला दिला.

हा ग्रंथ मी माझा LL.B.चा अभ्यास सोडून देऊन वाचत बसलो. तो मोठा चारेकशे पृष्ठांचा ग्रंथराज वाचायला मला सहजच २-३ महिने लागले. त्या ग्रंथाने मला फारच आकर्षून घेतले होते. जिज्ञासूंना माहीतच असेल की कुंडलिनीयोगावरचा Text book म्हणावा असा हा ग्रंथ आहे. त्यात ***षट्चक्रनिरूपण*** आणि ***गुरुपादुकापंचक*** हे उपविभाग आणि कुंडलिनीयोगावरील विस्तृत प्रस्तावना आहे. तसेच षट्चक्रांची आणि कुंडलिनीची उत्तम रंगीत छायाचित्रे आहेत. मी लागलीच त्यांचे फोटोग्राफ काढून घेतले.

त्यानंतर यथावकाश मी कायद्याची परीक्षा दिली अन चांगले गुण मिळवून पासही झालो. त्यानंतर कसा कोण जाणे मी ज्ञानेश्वरीकडे आकर्षित झालो. माझ्या आयुष्यात अनेक अतर्क्य घटना घडलेल्या मी पाहिल्या आहेत. ज्याला लोक चमत्कार म्हणतात, तेही मी अनुभवलेत.

सदृश काही कारण नसतांना वाल्याचा वाल्मिकी व्हावा, इतके जरी नाही, तरी पण एका पाखंडी, नास्तिक, विज्ञानवादी, भौतिकवादी अन् इतरही अनेक असेच गुण अंगी बाळगणाऱ्या माझे परिवर्तन होऊन आस्तिक, श्रद्धावान, विज्ञानवाद न सोडता तरीही अध्यात्मवादी असा मी कसा झालो, त्याची कथा म्हणजे हाच माझा साधनाप्रवास मी आपल्यापुढे मांडतो आहे. आणि त्यात श्रीगोपालकृष्णांच्या पुनर्जन्मासंबंधीच्या गीतेतील विचारांचा फारफार संबंध आहे. माझ्या अतर्क्य अशा अनुभवांचे स्पष्टीकरण देऊ शकतील असे हे श्लोक आहेत, जे मी या वृत्तांताच्या सुरुवातीला उद्धृत केले आहेत.

माझे पूर्वायुष्य

एका तटस्थाच्या भूमिकेतून पाहिले तर मी कोण होतो, कुठला हे सांगणे या विषयाच्या दृष्टीने तसे आवश्यक नाही. पण माझे हे एका योग्याचे आत्मवृत्त परिपूर्ण असावे म्हणून त्यात त्रोटक का होईना, त्याचा निर्देश करणे भाग आहे.

मी उत्तर हिंदुस्थानातला. आमचे घराणे पेशव्यांच्या एका घोडदळांच्या सेनापतींचे. पणजोबा देवास संस्थानचे मामलेदार. आजोबा अभियंता. वडील सुशिक्षित, यंत्रशास्त्रनिपुण आणि आमची जहागीर सांभाळणारे. आई गृहिणी आणि श्रद्धावान. मातुल घराणे एकाकाळचे इनामदार.

माझे शिक्षण घराबाहेर हॉस्टेलवर राहून झालेले. मी Science व Engineering चा द्विपदवीधर. वर्गातला एक वरच्या रांकेतला उत्तम बुद्धिमत्तेचा विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध. माझा खरा व्यासंग वाचनाचा. नोकरी व्यवसाय यांत्रिकीशी संबंधित उच्च अधिकाऱ्याचा. मध्यमवयात हौस म्हणून मी कायद्याची पदवी मिळवली. सर्वसाधारण मध्यमवर्गीयांच्या मूल्यव्यवस्थेत बसणारा.

पंचतारांकित हॉटेल्सपासून झोपडीपर्यंत कोठेही राहिलेला अन् राहू शकणारा. बैलगाडीपासून जेटपर्यंत सगळे प्रवास केलेला. देशविदेश फिरलेला. गृहस्थाश्रमी आणि कुटुंबवत्सल. वैदिक ब्राह्मणी संस्कार विशेष नसले तरी तसे कौटुंबिक वळण असलेला आणि समाजाची बांधिलकी मानणारा. म्हटले तर पाश्चिमात्य वळणाचा.

मला वाटते एवढी पूर्वायुष्याबद्दलची माहिती पुढले विवरण समजण्यासाठी पुरेशी ठरावी.

खोडकर मुलगा

इथे जाताजाता माझ्या लहानपणातल्या एकदोन गोष्टी सांगतो. मागेच सांगायला हव्या होत्या पण राहून गेल्या.

लहानपणी मी फार खोड्या करत असे. त्यातला एक प्रसंग माझ्या मनावर जणू कोरला गेला आहे. तेव्हा मी फार तर तीन–चार वर्षांचा असेन.

आमच्या उत्तर हिंदुस्थानातल्या घरामागे एक गावातले राममंदीर होते. मी खोड्या करण्यासाठी तिथे जात असे. काही काही माझ्या खोड्या भयानक असत. एकदा माझ्या हाती बंदुकीच्या काडतुसांचा खोका लागला. मांजराने माळ्यावरून जातांना तो खाली पाडला होता. मी तो कोणालाही नकळत उचलून घेतला आणि माझ्या आवडत्या खोड्यांच्या ठिकाणी गेलो. तिथे दुपारचे कोणीही नसायचे.

मी काही तरी युक्तीप्रयुक्तीने त्या काडतुसांवरले पुठ्ठ्याचे आवरण काढले. त्यातले छर्रे आणि दारू वेगवेगळी केली. छर्र्यांच्या आकारमानानुसार ते वेगवेगळ्या बाटल्यात भरून ठेवले. दारू पण तशीच भरली. बाटल्या घरून शोधून घेऊन आलो होतो.

हा सगळा माझा कारभार चालला असतांना माझे वडील गावातून जातांना तिकडून मंदीराकडे आले. माझा खोड्याळ स्वभाव माहीत असल्यामुळे ते मी काय करतो आहे, ते पहायला आले तिथे. पाहतात तो काय! मी कोणती भयानक खोडी करत होते ते पाहून ते चकीत झाले. त्यांनी मला एकदम उचलून घेतले आणि आम्ही घरी आलो.

मग त्यांनी बंदुक हातात घेतली. मला मांडीवर घेऊन ते आरामखुर्चीत बसले अन् बंदुक कशी उडते, काडतुसे कशी भरायची त्यात हे सगळे सप्रयोग मला दाखवले. आणि मी करत होतो तो कारभार किती घातक होता तेही मला

त्यांनी समजावून दिले. दगडावर आपटून मी ती काडतुसे फोडत होतो. जर चुकून त्यांची टोपी आपटली गेली असती दगडावर तर त्यांचा स्फोट होऊ शकला असता. अन् मोठा अनर्थ झाला असता!

माझ्या प्रयोगाच्या बाटल्या त्यांनी जपून ठेवल्या होत्या आणि माझ्या मोठेपणी त्या दाखवून ते माझी मजेने चेष्टाही करत असत की किती खोड्याळ होतो मी लहानपणी ते सांगत. असा हा एक खोडीचा किस्सा! असे अनेक आहेत. यावरून बालपणीच प्रयोगशीलतेचा आणि विश्लेषणात्मक बुद्धीचा माझा स्वभाव दिसून येत असेल बहुधा.

बालपण आणि देवाचे वेड

दुसरा एक प्रसंग आहे माझ्या बालपणीचा. माझ्या देववेडेपणाचा! बालपणापासूनच मला देवाचे आकर्षण होते. मी म्हटलेच आहे की आमच्या घरामागे गावकऱ्यांचे रामाचे देऊळ होते म्हणून. मी तिथे बऱ्याचदा एकटाच खेळायला जात असे दुपारचा. तेव्हा तिथे इतर कोणीही लोक नसत. उत्तर हिंदुस्थानात त्या काळात पापभीरू लोकांचा मोठा भरणा असे. चोऱ्यामाऱ्यांचे भय नसे फारसे. म्हणून लोक आपापली घरे कुलुपे न लावताच केवळ कडी लावून शेताच्या अन् इतर कामांवर जात. रामाचे देऊळ याला अपवाद नव्हते. त्याच्या दाराला तर कडी पण नसे. केवळ लोटलेले असे ते.

लोकांना त्यांच्या दिवसभराच्या शेतीवाडीच्या अन् इतर घरगुती कामांमुळे देवाकरता दिवसा फारसा वेळ नसे. पण संध्याकाळी उशीरा गाईगुरे परतली अन् त्यांना चारापाणी झाले करून की रात्री जेवण केल्यावर त्यांना वेळ मिळत असे. त्या वेळी ते आपापली कामे आटोपून देवळात येत. काही काही जण तर सुंभ वळणे अशी कामे हातात घेऊनही देवळात येत गप्पाटप्पा करायला अन् रोजचे प्रापंचिक अन् शेतीवाडीचे प्रश्न आपापसात बोलायला. त्याचवेळी त्यांचे बिडीकाडी अन् तंबाखुचे आदानप्रदान होत असे एकमेकात!

संध्याकाळी उशीरा देवळात आरती आणि प्रसाद होत असे. रात्री तिथे भजन-कीर्तन, तुलसीरामायणाचा पाठ वाचणे इ. होत असे. आमचे घर लागूनच असल्यामुळे ते सगळे आम्हाला घरबसल्या ऐकू यायचे. आम्ही लहान मुले तर त्यांच्या गाण्या–बजावण्याच्या, हार्मोनियम, मृदंग आणि ढोल आणि घंटांच्या नादात केव्हा झोपी जायचो कळतच नसे.

मी जेव्हा साधारण तीन ते चार वर्षांचा होतो तेव्हा एके दिवशी देवळात गेलो. तिथे नेहमीप्रमाणेच कोणीही नव्हते. देवळाचा दरवाजाही उघडाच होता. मी त्यातून आत गेलो तर समोरच काही देवांच्या लहान लहान मूर्ती होत्या राम, लक्ष्मण अन् सीतेच्या मुख्य मूर्तीसमोर. तसेच शंख, घंटा आणि देवांसाठीच्या इतर सटरफटर वस्तू समोर दिसत होत्या. माझ्या मनात तेव्हा काय आले असेल कोण जाणे. पण त्या गोष्टींनी आकर्षित होऊन मी ते लहान लहान देव आणि त्या छोट्या छोट्या वस्तु उचलून घेतल्या आणि सगळ्या घेऊन कोणाच्याही दृष्टीस न पडता घरी आलो.

ते देव आणि इतर सगळ्या गोष्टी मी घरातल्या एका अंधाऱ्या कोनाड्यात, जिथे कोणाचा फारसा वावर नसे तिथे स्थापन केल्या आणि त्यांची पूजाअर्चा करू लागलो. मिळतील ती झाडाझुडपांची पाने आणि मिळाल्यास फुले, मग ती रानवेलींची असो वा भाजीपाल्यांची असो, ती घेऊन माझा तो बालपणीचा पूजाविधी संपन्न होत असे. अगदी मोठेपणी गीता येऊ लागल्यावर माहीत झालेल्या "पत्रं पुष्पं फलं तोयम्" अशीच ती पूजा असे. फुलेही अगदी क्वचितच मिळत. नेहमी तर झुडपांच्या माझ्या लहान मुलाच्या हाताला लागू शकणाऱ्या पानोऱ्यावरच देवांना बिचाऱ्याना भागवून घ्यावे लागे!

असे किती काळ चालले होते कोणास ठाऊक. पण देवळातील देव आणि इतर वस्तु नाहीशा झाल्याची माहिती मिळून गावात हाहाकार झाला असेलच. देव कोण चोरील? आणि कशासाठी? गावातील ते गरीब बिचारे अडाणी लोक कसे समजू शकणार होते ते? गावात कधी चोऱ्या तर होत नसत.

एके दिवशी मी अशीच पूजा करत असतांना माझे वडील काही सामान घेण्यासाठी तिथे आले. शेतीवाडीच्या सामानाचे, धान्याधुन्याचे, बीबियाण्यांचे, ट्रॅक्टर आणि इतर शेतीच्या मशिनरीच्या अवजारादींचे आमचे घर म्हणजे एक संमेलनच होते म्हणा ना. बैलांचे जोत, गळ्यातल्या माळा, नांगरा-वखरांची पाती अन् काय अन् काय, घरात तर कधी कधी पायही ठेवायला जागा नसे.

घरात सुगीचे धान्यही मंडीत पोहोचवण्यापूर्वी बांबूंचे तिकट लावून भरून ठेवत. कधी कधी तर आम्हाला त्याच धान्यावर खाटा टाकून अंथरूण पसरावे लागे. आम्ही लहान मुलं तर त्या धान्यांच्या राशींवर लोळत असू, खेळत असू अन् झोपी पण जात असू. जणू धान्यलक्ष्मीच्या अंकावर तिच्या अंगाईगीतांच्या सुरांवर आमची निद्रा सुखात होत असे कधी कधी दुपारच्या वेळी.

घरात कधी कधी साप-विंचूही निघत. पण लहानपणी आम्हाला त्यांची भीती म्हणजे काय ते अजून कळले नसावे.

तर मी असे म्हणालो की मी पूजा करत असतांना माझे वडील त्या खोलीत आले आणि त्यांचे सहजच माझ्याकडे लक्ष गेले. इथे हा खोडकर मुलगा शांतपणे बसला आहे हे पाहून त्यांना आश्चर्यच वाटले असावे. चिरंजीवांचा इथे अंधाऱ्या कोपऱ्यात काय उद्योग चालला आहे ते पाहावे म्हणून ते माझ्याजवळ आले. आणि मी काय करत होतो ते पाहून अवाकच झाले. त्यांना आश्चर्यच वाटले असावे की हा इतका लहान मुलगा कोणीही न शिकवता, न सांगता-सवरता देवांची पूजा करतो आहे मन लावून हे पाहून.

आमच्या घरी देवांच्या काही फारशा मूर्ती नव्हत्या. एखाद-दोन असतील आईने माहेराहून लग्नात आणलेल्या. अन्नपूर्णा अन् बाळकृष्ण. ती एकदाची घरगुती कामातून मोकळी झाली, चूलवैल, दूधदुभते, लोणीपाणी, घर सारवणे, त्यात वडिलांना आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांना वेळोवेळी लागणारा चहा करून देणे, चुलीसाठी लाकडांचे पहाणे, आम्हा लहानलहान एकापाठच्या एक तिघा मुलांची तोंडे धुणे, दूधभात देणे, आंघोळीपांघाळी घालणे, कपडेलत्ते धुणे आणि आवरणे, घरातल्या नोकराचाकरांवर आणि आल्यागेल्यावर लक्ष ठेवणे, स्वतःची वेणीफणी, स्नानादी आवरणे, घरातल्यांची जेवणेखाणे, आम्हाला भरवणे, अशा अनंत कामातून ती जेव्हा मोकळी होई, तेव्हा दोन मिनिटात तिची देवपूजा आटोपत असे आणि मग ती स्वतःला वाढून घेऊन जेवत असे दुपारी उशीरा.

तिची देवपूजा म्हणजे देवापुढे दिवा लावणे, नमस्कार करणे अन् एखादे स्तोत्र म्हणणे एवढेच असे. आमचे वडील तर निव्वळ नास्तिकच होते. फक्त वर्षाकाठी ते दोन महाएकादशांचे अन् महाशिवरात्रीचा एक असे मोजून तीन उपास करत असत. आम्ही मुलं जेव्हा मोठी झालो तेव्हा आम्हाला त्यांच्या त्या उपासांचे गूढच वाटायचे की हे तर कधी चुकूनही देवळात जात नाहीत, देवापुढे नमस्कार-चमत्कार काहीच करत नाहीत. मग हे उपास तरी कशाला करतात.

कदाचित त्यांचा स्वभावच तसा असेल म्हणा. आतून ते आस्तिकही असतील. त्यांचे नाव **विठ्ठल** होते. पंढरपूरच्या पांडुरंगाचे! तोच त्यांचा धार्मिकतेशी जोडणारा दुवा असेल कदाचित! कोणास ठाऊक काय होते ते!

माझे उद्योग पाहिल्यावर त्यांनी गावातल्या देवळाच्या पुजाऱ्याला घरी बोलावून घेतले आणि माझा पराक्रम त्याला दाखवला. त्यानंतर पुजारी ते देवादीक घेऊन गेला आणि तिथेच माझ्या बालपणीच्या पूजाअर्चेची सांगता झाली. चोरून आणलेल्या देवांच्या! भगवंतालाच माहीत अशी चोरून आणून देवांची पूजा करणाऱ्या त्या लहान बालकाच्या मनात काय चालले होते ते!

पण एखाद्या पतंजलीला त्यात काय दिसले असते ते सांगतो. त्याला निश्चितच माझा देववेडेपणा दिसला असता त्यात आणि कोणी न सांगता सवरता मी करत असलेली पूजा पाहून त्याला नक्कीच स्वतःचे ***"संस्कार-साक्षात्कारकरणात् पूर्वजातिज्ञानम्"*** हे सूत्र कसे लागू पडते, ते पाहून समाधान झाले असते.

पूर्वजन्मीचे संस्कार चित्तात असतात. योगी त्यांच्यावर संयम करून पूर्वजन्मांची काही रहस्ये म्हणा, घटना म्हणा, प्रवृत्ती म्हणा, जाणून घेऊ शकतात. यावरून पाहिले असता असे दिसून येईल की माझी उच्चतम यौगिक अवस्था ही पूर्वजन्मकृत देणगी होती. हे सगळेच अगोदर सांगितलेल्या माझ्या यौगिक अनुभवांशी जुळणारे आहे. या ग्रंथारंभी तेच तर मी योगभ्रष्टाच्या गतिविषयक श्लोकांनी दर्शवले आहे.

ज्ञानेश्वरीचा परीसस्पर्श

त्याचे असे झाले की अशा या पार्श्वभूमीचा मी एकदा एका ओळखीच्या गृहस्थांना सहज भेटावे म्हणून गेलो असतांना त्यांच्याकडे ज्ञानेश्वरीचे पारायण चालू होते. मला असल्या विषयांत काहीच रुची नसल्याने लागलीच मागे फिरावे असे वाटले. पण त्या लोकांना त्याने कदाचित वाईट वाटेल, म्हणून उगीचच त्यांच्यात बसलो. ते पारायण नंतर अदमासे अर्धा तास चालू असेल.

त्या मंडळींची पारायणाची पद्धत मात्र अगदी वाखाणण्यासारखी होती. वाघच जसा काही मागे लागला आहे, अशी ती सगळी जणं भराभरा ओव्यांमागून ज्ञानेश्वरीच्या ओव्या घडाघडा म्हणत होती. अत्यंत रूक्ष आणि ओबडधोबड स्वरात. ज्ञानेश्वरी कशी मोठ्याने वाचू नये, त्याचा एक उत्कृष्ट वस्तुपाठच तेथे चालला होता म्हणा ना! ***"हंलुवारपण चित्ता आणूनियां"*** हे माउलीचे सांगणे कानाआड टाकूनच साधारणपणे बऱ्याच भाविकांची ज्ञानेश्वरीची अशी पारायणे संपन्न होतात. पण भाबडे जीव असल्याने माउलीला चालते! असो.

तेव्हा मला असा एक विलक्षण अनुभव आला की मी जेथे बसलो होतो, तेथेच मला चांगलीच तंद्रा लागली. ती झोप किंवा पेंग म्हणा नव्हतीच. डुलकीही नव्हती. मी तसा अर्धजागृतीत असेन तेव्हा! कारण मला कधीच - अगदी बस-रेल्वे प्रवासातही डुलक्या घेण्याची अजिबात सवय नाही. मला तशी बसल्याबसल्या कितीही थकलो असलो तरी सहसा नीज येत नाही.

आणि विशेष म्हणजे काहीतरी वेगळेच झाले आहे, असे माझ्या तेव्हाच लक्षात आले. एका अति प्रसन्न सुंदर मनोहारी अशा प्रशांत अवस्थेत मी गेलो होतो. लोक जिला trance समजतात, तशीच अवस्था! नंतर कधीतरी तशा अवस्थेला समाधि म्हणतात, असे कळले. हा कशाचा बरे प्रभाव!

खरे तर कोणत्याही ग्रंथाच्या पारायणावर माझा सुतराम विश्वास नव्हता. पण तरीही मला अपरिचित असणाऱ्या ज्ञानेश्वरीच्याही पहिल्याच संपर्कात हे असे घडले खरे! तर असा हा माझा ज्ञानेश्वरीशी जडलेला पहिलावहिला भावबंध! ना कधी मी तो ग्रंथ वाचला होता. ना सगळाच्या सगळा कधी पाने उलटवून कोठे पाहिला होता. म्हणावे तर वस्तुतः तो पूर्ण असा ग्रंथसुद्धा कधीही त्यापूर्वी माझ्या पाहण्यातदेखील आला नव्हता. तरीही ही अवस्था! सगळे नवलच! तर्कबुद्धी पांगुळावी असा हा प्रकार! हाच तर होता मला झालेला ज्ञानेश्वरीचा परीसस्पर्श!

त्यानंतर केव्हातरी कोणाच्यातरी सांगण्यावरून मी श्री.मामासाहेब दांडेकरांची वारकऱ्यात प्रचुर असणारी सार्थ व सटीप विस्तृत प्रस्तावना लाभलेली ज्ञानेश्वरी विकत घेतली. ती वाचण्याचा योग त्यानंतर कधीतरी आला. पण तिची प्रस्तावना वाच. विचार कर. समजून घेण्याचा प्रयत्न कर, असे काहीतरी करत असे. ज्ञानेश्वरीची जुनाट भाषा अनाकलनीय. मग निव्वळ अर्थच वाच, असे वेळ मिळेल तसे करू लागलो.

त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा इतर लेखकांची गीता व ज्ञानेश्वरीवरील पुस्तके-ग्रंथ मिळाले, ते वाचत गेलो. त्याचबरोबर वेद-उपनिषदादी वाङ्मयाचा जमेल तेवढा परिचय करून घेऊ लागलो. ही सगळी प्रेरणा अर्थातच त्या घडाघडा ऐकू आलेल्या एका वेळच्या त्या मंडळींच्या ज्ञानेश्वरीपारायणातूनच!

ज्ञानेश्वरीपारायणाची गोष्ट

जसजसा मी ज्ञानेश्वरी वाचत गेलो, तसतसा मी ती नीट वाचली पाहिजे म्हणून संकल्प दृढ करू लागलो. पण हे कसे होणार! त्यानंतर थोड्याच दिवसांनी तो योग आला. एका परिचित गृहस्थांकडे ज्ञानेश्वरीचे अर्थासह पारायण करण्याचे ठरले होते. त्यांनी मला त्यासाठी निमंत्रित केले. तेव्हा मी LL.M. करण्यासाठी मुंबई विद्यापीठात राजाबाई टॉवरला जात असे. ते वर्ग रात्रौ ८.३०पर्यंत चालत असत. कधीकधी तर १५-२० मिनीटे अधिकच वेळ!

त्यानंतर मी तेथून चर्चगेट-दादर-सेंट्रल रेल्वे असा प्रवास करत कल्याणला येत असे. घरी जाऊन स्वस्थचित्त होऊन जेवणखाण करून पानसुपारी चघळत आरामात ज्ञानेश्वरीपारायणस्थळी जात असे. विद्यापीठातून निघाल्यापासून तेथे पोहोचण्यास साधारणपणे कमीतकमी सव्वादोन तास तरी लागायला हवे होते. म्हणजे मी अगदी ८.३०ला जरी विद्यापीठ सोडले तरी पारायणस्थानी पोहोचायला मला १०.३० ते १०.४५ व्हायलाच हवे होते. पण नंतर जेव्हा केव्हा हे माझ्या ध्यानी आले तेव्हा मला कळले की अरे! मी तर तेथे ठीक ठीक ९.३०ला पोहोचत होतो. आणि कधीकधी तर त्याहीआधी ५-१० मिनीटे! म्हणजे एका तासातच मी हा सव्वादोन तासांचा काळ लंघीत असे!!

हे कसे शक्य आहे बरे! माझा विचार तर त्यावर चालेच ना! Science Fiction मध्ये Time Dilation संबंधी वाचलेले होते. विज्ञानास हे अशक्य वाटत नाही. पण त्यासाठी प्रकाशाच्या गतीसदृश वेग हवा! ते कसे येथे घडेल! आणि मी तर सहप्रवाशांसह, घरी पत्नी-मुलांसमवेत काळ काढून पारायणास वेळेआधी किंवा अगदी वेळेवर उपस्थित असे! असे हे एक अनाकलनीय गूढ मी प्रत्यक्ष अनुभवले. कमी वेळात जास्त वेळेचा प्रवास होणे इ.Science Fiction सारखे वाटले. नंतर तर कधीकधी आपल्याला हा अनुभव खराच आला होता का याचीही स्वतःची खात्री पटवून घ्यावी लागे. पण मला बरेच दिवसांची वेगवेगळ्या नोंद करण्यासारख्या गोष्टी डायरीत टिपून ठेवण्याची सवय आहे. त्यामुळे हे सर्व खरोखर घडत होते, असे माझ्या अति चिकित्सकबुद्धीलाही मान्यच करावे लागते!

त्यानंतर आत्मानंदाचे ***"अज्ञाताचा शोध आणि बोध"*** हे पुस्तक हाती आले. त्यांनी म्हटले होते की अनाहतनाद ऐकू येणे याबरोबर आत्मप्रक्षेपणाची सिद्धी प्राप्त होते. मनुष्य एकाच वेळी अनेक ठिकाणी जडदेहाने अथवा सूक्ष्मदेहाने उपस्थित होउन कार्य करू शकतो. या पारायणविषयक अनुभवाच्या आधीपासून मला ही अनाहतनादसिद्धी प्राप्त झालेली होती.

असे ते विशेष स्वरूपाचे पारायण ज्ञानेश्वरीचा महत्त्वाचा ध्यानयोग सुरू होईस्तोवरच मी करू शकलो. पुढचे मात्र काही गूढ कारणांमुळे माझ्याकडून केले गेले नाही. म्हणून नंतर दोनतिनदा माणसे बोलावून पारायण करून पाहिले. त्याची प्रगती दोनचार अध्यायांपलीकडे जात नसे. स्वतः एकट्यानेही करून पाहिले, तरी तसेच. वाटेत एकदा एक संतप्रेमी, आध्यात्मिक वृत्तीचे अन्

वेदांताचे अधिकारी असलेले उपासनीबुवा भेटले. त्यांना म्हटले की "बुवा! हे असे कसे होते? काय करावे?"

त्यावर ते म्हणाले की "तुमची खरी अडचण काय आहे?" म्हटले की "मला तर सगळे वाचन बेडवर आरामशीर पडून करण्याची सवय आहे. आता ज्ञानेश्वरीसारखा पवित्र ग्रंथ तसा कसा वाचावा?" तर ते म्हणाले की "अहो! तुम्हाला जसे वाचता येईल तसे वाचा. अमृत आहे. स्नान करून, सोवळे नेसून, चंदनी पाटावर बसून सोन्याच्या वाटीतून अमृत प्याले काय आणि झोपेत का होईना, वाकडे तोंड करत ती वाटी तोंडाला लावली काय! परिणाम काही वेगळा होईल कां?"

मग काय! एका उच्चाधिकारी व्यक्तीनेच तसे सांगितल्यावर मी पण तसेच केले. ऑफिसातून घरी आलो की हातपाय स्वच्छ धुवून Fresh होऊन जेवणखाण उरकायचे आणि मस्त मजेत पलंगावर पडून श्री.भिड्यांच्या ज्ञानेश्वरीची गुटिका आवृत्ती अर्थाकडे लक्ष देत न देत ओव्यांमागून ओव्या मनातल्या मनात वाचत बसायचे! साधारण तीन ते चार महिने लागून एक पारायण झाले. शेवटचा अध्याय मात्र स्फूर्ती येऊन खुर्चीत बसून वाचला. उपासनीबुवांच्या उपदेशगुटीचा परिणाम लवकरच दिसून आला!

गीता आणि मी::::

गीतारहस्य

माझा आणि गीतेचा प्रथम परिचय झाला तो शाळेत असतांना. पाचवी सहावीत असतांना स्व.प.पू.लोकमान्य टिळकांविषयी सर्व मुलांना असते तसे विलक्षण प्रेम! छत्रपती शिवाजीमहाराज, पहिले बाजीराव पेशवे, राणा प्रताप, अलेक्झांडरच्या वारसांचे मनसुबे उधळून लावणारी आर्य चाणक्य अन् चंद्रगुप्ताची लोकविलक्षण जोडी, समुद्रगुप्त, शकारी शालिवाहन, विद्यारण्यस्वामी-हरिहर-बुक्कराय आणि अशाच अनेकानेक दिव्य ऐतिहासिक विभूतीत आमच्या लेखी हल्लीच्यातली नावे होती ती म्हणजे स्वर्गीय लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, वल्लभभाई पटेल अशा दिग्गजांची. त्यातही लोकमान्यांबाबत फारच आदर वाटत असे. कोठेतरी त्यांना आवडणारे गीतावचन वाचण्यात आले:

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि।।२-४७।।

मुद्दाम वहीत हा श्लोक लिहून ठेवला होता आणि संस्कृत कळत नसतांनाही तो वळोवेळी लक्ष वेधून घेई. माझ्या अप्रबुद्ध मनाला त्याचा तेव्हा कळलेला अर्थ एवढाच - कर्म करत जावे. काहीही झाले तरी प्रयत्न सोडू नयेत. कर्मफल, त्याची अभिलाषा, संगयुक्त कर्म - अकर्म इ.आकलन होण्याचे ते वय नव्हतेच! पण लोकमान्यांबद्दल वाटणाऱ्या भावनेतून हा एक गीतेचा श्लोक माझ्या संग्रही राहिला.

त्यानंतर मी नववी-दहावीत होतो तेव्हा वडिलांना एक मोठे जाडजूड पुस्तक नेहमी वाचतांना बघत असे. आमच्या आजोबांच्या वेळेपासून ते घरी होते. लो.टिळकांच्या गीतारहस्याची १९१८ साली प्रसिद्ध झालेली ती साधारण नऊशे पानी आवृत्ती होती.

मला तर वाचनाचे वेडच होते. सतत लायब्ररीतून, मित्रांकडून, नातेवाईक व ओळखींच्याकडून तसेच वडिलांनी जमा केलेली अनेक पुस्तक मी वाचत बसायचो. तेव्हा आमच्याकडे वीज नव्हती. रात्री दोनदोन वाजेपर्यंत अभ्यास सोडून कंदिलाच्या उजेडात मी खूप पुस्तकं वाचली आहेत. पुस्तक जेवढे जाडजूड तेवढे ते मोठे. म्हणून अधिक आवडायचे. खूप वेळ ते पुरायचे म्हणून!

तर तेव्हा हा गीतारहस्य ग्रंथ हाती घेतला अन वाचू लागलो. आमच्या वेळी सायन्स साईडचे सिलेक्शन सातवीतच व्हायचे. म्हणजे संस्कृत, ड्रॉईंग या विषयांना फाटा! आजोबा एंजिनीयर होते आणि घरी बरीच मशिनरी होती. त्यामुळे कळत नकळत सायन्स साईडलाच प्राधान्य दिले गेले आणि संस्कृत देवभाषेला मुकलो. त्यामुळे संस्कृतातील गीतेवरचा मराठीत लिहिलेला असला तरी गीतारहस्य ग्रंथ वाचता आला नाही. शेदीडशे पानांनंतर त्यातले काही ओच्या ठो कळेना. म्हणून सरळ खाली ठेवून द्यावा लागला.

लिओ टॉलस्टॉयची ***वॉर अँड पीस*** ही कादंबरीही मी अशीच थोडीशी वाचून ठेवून दिली होती. त्यातील रशियन नावे आणि कथानकाचा पसारा आवाक्याबाहेरचा वाटला म्हणून! त्या काळी हाती घेऊन पूर्ण न वाचताच ठेवून दिलेली अशी ही दोनच पुस्तकं! पण गीतारहस्यातील एक गोष्ट मात्र कायम लक्षात राहीली. ***पीलवः*** म्हणजे परमाणू - कणादाचे! आणि डाल्टनच्या परमाणुवादाचा त्यासंबंधात त्या काळीही लोकमान्यांनी उल्लेख केला याचे सायन्सच्या विद्यार्थी असणाऱ्या मला फार अप्रूप वाटले!

ग्रंथ आणि मी

ग्रंथांबाबत सांगायचे झाले तर मी अफाट ग्रंथवेडा आहे. म्हणायचेच झाले तर मी एक bibliophile म्हणा, bibliomaniac म्हणा, आहे. माझ्या ग्रंथसंग्रहाची

थोडीफार कल्पना जिज्ञासूंना या प्रस्तुत ग्रंथाच्या संदर्भग्रंथसूचीवरून येईलच.

माझ्या या आध्यात्मिक प्रवासात आणि योगपथावर, तसेच जीवनप्रवासातही ग्रंथांची मोठी सोबत आहे. ते मला वेगवेगळ्या स्वरूपात भेटले आहेत. एक कवी म्हणतो त्याप्रमाणे आई,वडील, शिक्षक, तत्त्ववेत्ते आणि मी म्हणतो की मित्र, सहचर, योगोपदेशक, पथप्रदर्शक अशा अनेक रूपात ते माझ्या अवतीभवती आणि अनेकानेक विलोभनीय रूपात माझी संगतसोबत करताहेत. मी जो काही आहे, तो त्या ग्रंथांमुळेच आहे, एवढे सागितले तर संवेदनाशील मनुष्यांना पुरे!

आणि ग्रंथ कसे हाताळावेत याबाबत मी फारच संवेदनशील आहे. मला पुस्तकं नीटरीत्या न हाताळणारी माणसे आवडत नाहीत. माझ्या एका भाच्याने ***संचितदर्शन*** घेऊन एका रात्रीत वाचून काढले. ते त्याला कितपत कळले असावे, याबाबत मला शंकाच आहे. पण त्याने ते एका रात्रीत पार म्हातारे, खिळखिळे करून टाकले, हे मात्र खरे! अशांना मी अक्षरे वाचता येणारे अक्षरशत्रू असेच म्हणतो.

माझी बी.एस्सीची, बीई.ची आणि कायद्याची सगळी पुस्तकं जशीच्या तशी अत्यंत चांगल्या स्थितीत इतक्या वर्षांनंतर अजूनही आहेत. त्यांच्यावरून वर्षानुवर्ष अभ्यास केला असेल असे वाटू नये इतपत! क्वचित त्यांच्यावर मार्किंग केले असेल तर असेल, अन्यथा त्यांना काहीच धक्का लागलेला नाही.

पाने मोडणे, बोटाला थुंकी लावून ती उलटवणे, पुस्तकात खुणेसाठी म्हणून पट्टी, कंपासबॉक्स, इतर काहीतरी जाड वस्तू खुपसून ठेवणे, पाने मुडपून वाचणे, त्यांच्यावर घाणेरड्या अक्षरात काहीतरी लिहिणे, वेड्यावाकड्या खुणा करणे, ती उघडून पालथी घालणे, इ.ग्रंथविषयक व अप्रत्यक्षपणे सरस्वतीदेवीच्या दरबारात करू नयेत ते अपराध करणे मी कटाक्षाने टाळतो, असे म्हणण्यापेक्षा ग्रंथांची नीट निगा राखणे माझ्या रक्तातच आहे, असे म्हणा ना! मला अशा अपराधांची मनस्वी चीड आहे.

माझे पुस्तक मी शक्य तो कोणाला देत नाही. पण अगदीच द्यावे लागले तर सौजन्य, भीड सोडून मी हे सर्व त्याला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या समजावून देतो, तो पुस्तक कसे हाताळतो, ते पाहतो आणि मग पटलेच तर त्या मनुष्याला मोठ्या मिनतवारीने अनेक अटींवर - परतबोली धरून, ते मिळते. अर्थातच असे प्रसंग मात्र क्वचितच येतात.

पोटच्या मुलाबाळांना जपावे तेवढ्या निगुतीने मी पुस्तकं सांभाळतो. गोरे साहेब अशा माणसाला मगाच म्हटले तसे bibliophile असे म्हणतात. तर असो.

त्यानंतर बी.ई.झाल्यानंतर नोकरीचा शोध घेत होतो. वेळ जावा म्हणून घरी एक गीता होती. तिचा पहिला अध्याय पाठ करण्याचा प्रयत्न केला. संस्कृतचा आधीच उजेड आणि त्यात सामासिक शब्दांचा तो अध्याय! प्रयत्न अर्धवटच राहिला. नंतर असे कळले की गीता जशी लिहिली आहे, तशी पाठ करत नाहीत. तर त्या वाचनाचे - पाठांतराचेही एक शास्त्र आहे. ते शास्त्र माझ्या नशिबी तेव्हा नव्हते, झाले!

अशी ही गीता! ती माझ्या आयुष्यात नंतर खूप वर्षांनी भेटली ती वर सांगितलेल्या अठरापगड लोकांच्या अठरा अध्यायाबाबतच्या माझ्या अपरिपक्व वक्तव्याच्या वेळी. काय असेल ते असो. नंतर मात्र याच गीतेने माझी आतापर्यंतची पंचविसएक वर्षे व्यापून टाकली आहेत. आपण किती मूर्खासारखे गीतेबद्दल समजत होतो, तेही लक्षात आले. मुळात गीता न वाचताच तिच्याबद्दल काहीही मत तोंडाला येईल तसे भकणे हा एक कृतापराध झाला. श्रीगोपालकृष्ण दयाळू अंतःकरणाचा असल्याने त्याची क्षमा प्रार्थितो. तशी ती आतापर्यंत वेळोवेळी प्रार्थिलीच आहे.

सायन्सचे वैशिष्ट्य म्हणजे -पहा, प्रयोग करा, अनुमान काढा, तर्क वापरा, विचार करा, पुनःपुनः प्रयोग करा, आणि निष्कर्ष काढाः Observation - Experimentation - Inference - Logic यावर सायन्स आधारलेले आहे. अजिबात निरीक्षण - परीक्षण न करता कोणत्याही बाबतीत मत नोंदवणे हे वैज्ञानिकदृष्टीचे नाही. एकदा जरी एखादा निष्कर्ष आपण काढला असला तरी जर नवीन निरीक्षण-परीक्षणादींद्वारे तो चुकीचा दिसून आला, तर त्याचा त्याग करणे - त्यात सुधारणा करणे- त्याच्याहून अति भिन्न अशा, पण वैज्ञानिक कसोट्यांस उतरणाऱ्या नवीन निष्कर्षाप्रत येणे हे वैज्ञानिकाचे कर्तव्यच आहे.

माझ्यातील परिवर्तन

अशा पठडीतील - सायन्स, गणित, एंजिनीयरींग अन् कायदेशास्त्र यांचा अभ्यास केलेल्या - स्नातकीय पदव्या मिळवलेल्या माझ्यासारख्या अनुभवी उच्चपदस्थ मध्यमवयीन माणसाने गीतेबद्दल इतरांचे ऐकून जे सरधोपट विधान केले होते, ते किती चुकीचे आहे, हे माझे मलाच कळून यावे अशी त्या जगन्नियंत्या परमेश्वराची इच्छाच असावी. त्यानंतर केवळ पाचसहाच महिन्यांत माझे

ते अनाठायी मत बदलावे लागले अन् मी गीतेचा एक चाहता, अनन्यभक्त आणि प्रेमी झालो. ते कसे झाले याची एक मोठीच कथा होईल. ती पुढे कधीतरी! पण गीतेला अठरापगड लोकांनी रचल्याचे म्हणणारा मी त्यानंतर केवळ पाचसहाच महिन्यात इतका कसा बदललो, ही एक आश्चर्याचीच गोष्ट आहे.

माझा जन्म श्रीसखाराममहाराजांच्या अमळनेरचा. आमच्या टिळकपंचांगाप्रमाणे मकरसंक्रांतीचा. मातेला प्रसूतिसमयी खूप कष्ट देऊन मी जन्माला आलो, असे सांगितले जाते. एका सुईणीने, साळूबाई नावाच्या म्हणा, आणि डॉ.म्हस्करांच्या वैद्यकीय कौशल्यामुळे शेवटी आईची सुखरुप सुटका झाली. सखाराममहाराजांच्या समाधिस्थानी अमळनेर येथे ही घटना घडल्याला आता पासष्ट वर्षे होऊन गेलीत. पुण्यपावन संतांच्या क्षेत्री जन्म झाला. पण सखाराममहाराजांसारख्यांच्या पायरीवर नतमस्तक का व्हावे हे कळायला आयुष्याची पंचेचाळीस वर्षे उलटायला लागली.

जेव्हा कोण्या एकाला पूर्वीचे संस्कार नसतांना सहजच म्हणा, अकस्मात म्हणा, एखादे शास्त्र अवगत होते; एखादी कला - संगीत, शिल्प, गायन, नर्तन इ.फारसे वा अजिबात कोणीही न शिकवता, कोणाच्या कलेचे म्हणा, कसलेही म्हणा पण निरीक्षणादी न करताच चांगली अवगत होते, आपोआप येऊ लागते, तेव्हा त्यामागे काय कारण असावे हा प्रश्न उपस्थित होतो. हा प्रश्न ज्यांना born prodigies म्हणतात, त्यांच्याबाबत उपस्थित होतोच.

आजचे विज्ञान त्याचे उत्तर कदाचित Genetic Scienceमध्ये शोधू जाईल, तर ते सापडत नाही. आणि पर्यायी उत्तर दिले आहे श्रीकृष्णांनी गीतेत! अर्जुनास ते सांगतात की ***"इमं विवस्वते योगंप्रोक्तवानहमव्ययम्। विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत।।४-१।। एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः। स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप।।४-२।।"*** - "हा योग मी विवस्वानास सांगितला. तो त्याच्याकडून मनु-इक्ष्वाकु या परंपरेने राजर्षींना प्राप्त झाला. पण सुदीर्घ कालाने तो लुप्तप्राय झाला."

असा हा योग श्रीकृष्ण अर्जुनास सांगू जातात. त्या वेळी त्यांचा प्रिय सखा अर्जुन शंका घेतो की ***"अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः। कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति।।४-४।।"*** - "बाबा रे! विवस्वान तर किती पूर्वीचा! अन् तू तर माझा समकालीन, प्रत्यक्ष माझ्यापुढे आहेस! त्या पुराणपुरुष विवस्वानाला तू तो योग कसा उपदेशिला असणार बरे!" श्रीकृष्ण आपल्याला काहीतरीच सांगतो आहे अशी खरी तर अर्जुनाची भावना!

युगांपूर्वी होऊन गेलेला विवस्वान! अन् हा सांप्रतचा कृष्ण! ही गोष्ट कशी घडणार! त्यावर भगवंत स्पष्टच सांगतात: ***"बहुनि मे व्यतितानि जन्मानि तव चार्जुन। तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप।।४-५।।"*** - "हे अर्जुना! आपणा दोघांचे यापूर्वीही अनेक जन्म होऊन गेलेत. तू त्यांबद्दल अनभिज्ञ आहेस. पण मज सर्वज्ञास त्या सर्वांची जाण आहे." असा हा जन्म-मरण-पुनर्जन्म या चक्राचा स्पष्ट निर्देश भगवंत करतात.

आणि त्यातही पुनः सहाव्या अध्यायी योगभ्रष्टाच्या गतीसंबंधी प्रश्नाच्या वेळी सांगतात की पूर्वजन्मीचे योगकर्म या जन्मी प्राप्त होते. तेव्हा झाली होती तेवढी प्रगती हाती घेऊन या जन्मी पुढचा मार्ग क्रमण करायचा! जो न्याय योगाभ्यासकाला, तोच न्याय इतर कला इ.च्या अभ्यासकाला! कालीदासावर सरस्वती अकस्मात प्रसन्न होण्याचे कारण यातच आहे! पूर्वजन्मीची साहित्य-काव्याराधना त्याला या जन्मी अकस्मात वाटण्यासारखी उपलब्ध झाली. प्रज्ञा पालवली. आणि prodigy प्रकटली.

गीतेवर केलेल्या त्या अजाण मतप्रदर्शनानंतर लवकरच माझ्यात आंतर्बाह्य दिसून येईल असे एक आध्यात्मिक म्हणावे तर तसे परिवर्तन झाले. गीता-ज्ञानेश्वरी-अध्यात्म इ.विषयांत मला अकस्मात जाण प्राप्त झाली. वयाची पंचेचाळीस वर्षे उलटून जाईस्तोवर ज्या विषयांची मला काहीही आवड नव्हती, कधी त्यांचा अभ्यासच काय पण श्रवण-मनन-वाचनही केले नव्हते; ज्या या विषयांचा साधासा विचारही मी कधी केला नव्हता; ते मला अकस्मात माझेच म्हणावेत असे उपलब्ध कसे झाले, त्यांच्यात विलक्षण आवड आणि गती कशी प्राप्त झाली, त्याचे तर्कशुद्ध कारण शोधू जाता मला सापडले नाही.

बरे! अनेकांना या विषयांचा अभ्यास करण्यास तपेच्या तपे घालवावी लागतात. अभ्यास केला तरी त्यांच्यात विशेष रस म्हणा, आवड म्हणा, जाण म्हणा - नसते. निव्वळ घोकंपट्टी, मोठमोठ्या पदव्या मिळवणे, विद्वत्ताप्रदर्शन करणे यांपलीकडे विशेष काहीच घडत नाही. **प्रज्ञास्पर्श::::**

दिव्य ग्रंथांचे आकलन

अतिप्रसिद्ध अशा येथील, तसेच अमेरिका-इंग्लंडमधल्या विद्यापीठांतून अनेक उच्चतम अशा तत्त्वज्ञान व मराठी संतवाङ्मयातील दोन-तीन Doctorates मिळवलेले आणि ज्ञानेश्वरीवरील उच्चतम अधिकारी असणारे, अनेक ग्रंथ लिहिलेले

अन् संपादन केलेले अत्यंत प्रथितयश, अभ्यासू, विद्वान, ज्येष्ठ अन् श्रेष्ठ असे माझ्या कॉलेजचे एक प्राचार्य होते.

एकदा मी त्यांना मुद्दामच विचारले की "सर! (ते आमच्या कॉलेजच्या मराठीविभागाचे प्रमुख होते पूर्वी!) आपणास मी एक प्रश्न आदरपूर्वक विचारू इच्छितो. आपण एवढा ज्ञानेश्वरवाङ्मयाचा अभ्यास केलात. विद्यापीठातल्या ज्ञानेश्वरीअध्यासनपीठावर आपली निवड व्हावी, इतकी आपली योग्यता असल्याचे सगळे विद्वान नक्कीच मान्य करतील. अन् ती तशी कधीतरी होईलही! सहाव्या अध्यायातील पंथराजाचा अर्थ आपणास समजू शकला का? आपण तशी काही अनुभूती घेऊ शकलात का? आपणास निदान कोणी एखादातरी त्यातील क्रियांचा अनुभव घेतलेला, योगाचा अभ्यास करणारा कधी भेटला आहे काय?"

सर प्रामाणिक होते. बडेजावी नव्हते. माझ्या प्रश्नांचा रोख कळला तरी त्यांना अजिबात राग आला नाही. सरळसरळ त्यांनी माझ्या सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. आणि ज्ञानेश्वरीतला योगच जर आपल्याला जाणता येत नसेल, त्यातील अनुभूतींचा पुसटसाही स्पर्श जर आपणास होत नसेल, तर ज्ञानेश्वरीवाङ्मयावरील Doctorates किंवा तत्सम उपाध्यांचा लौकिकापलीकडे व अर्थार्जनापलीकडे काहीच उपयोग होऊ नये; ज्ञानेश्वर आकळून घेण्यासाठी एखाद्या साध्याभोळ्या साधकाएवढीही आपली पात्रता नसावी, अशी अप्रत्यक्ष जाणीव सरांना स्पर्शून गेली.

हे काही मी प्रौढी मिरवण्यासाठी सांगत नाही. माझ्या अंतर्यामीची सुस्पष्ट जाणीव मला आश्वासिते की अनेक जन्मांच्या पुण्यफलोदयामुळे, पूर्वजन्मीच्या सुकृतामुळे, साधनेमुळे म्हणा हवे तर, मला तादृश कोणतीही तर्कशुद्ध कारणपरंपरा नसता श्रीगोपालकृष्ण गीतेत सापडले! श्रीज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीत सापडले! श्रीमदाद्य शंकरभगवत्पूज्यपाद त्यांच्या भाष्य, सौंदर्यलहरी, योगतारावली अन् स्तोत्रांतून गवसले. अनेक ऋषी त्यांच्या ऋचांतून, अनेक संत त्यांच्या वचनांतून अन् जीवनालेखातून, ब्रह्मलीन साधू त्यांच्या स्मृतिस्थलांतून-समाध्यांतून आणि श्रीरामकृष्णपरमहंस त्यांच्या परिवाराने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांतून मला अकस्मात सापडले! कालपरवापर्यंत मी त्यांना अजिबात ओळखत नव्हतो आणि क्षणापूर्वीसुद्धा ते कोण हे मी जाणत नव्हतो.

काय घडले त्या एका क्षणात की मी त्या सगळ्यांना इतर कोणापेक्षाही, आईवडिलांपेक्षाही, माझ्यापेक्षाही अधिक ओळखू लागलो! अन् ही जी जाण म्हणा, प्रज्ञा म्हणा, मला अशी अकस्मात प्राप्त झाली, ती कशामुळे आली! त्याचे उत्तर मला शेवटी श्रीकृष्णांच्या पूर्वी उद्धृत केलेल्या गीतावचनांतून मिळाले. तेच उत्तर खरे आहे असे मानावे लागेल!

त्याच क्षणात माझ्यातील नास्तिक, अश्रद्धावानाचा लोप झाला. अकस्मात एक श्रद्धावान तेथे उभा झाला. अंधार लोपला. सर्वत्र ज्ञानप्रकाश झाला.या घटनेचा मीच काय तो एकमेव साक्षीदार आहे, असे नाही, तर जवळपासच्या काही सुज्ञ अशा मित्रांनी आणि इतरांनीही हे परिवर्तन ओळखले आणि अतींद्रिय प्रांताच्या जाणकारांनी, mediums and clairvoyants व संतसदृश काही व्यक्तींनी आणि भगवंतात स्वतःला लीन केलेल्या काही भक्तवर्यांनीसुद्धा ते जाणून त्याचे तेच कारण सांगितले, जे गोपालकृष्णांनी योगभ्रष्टाच्या गीताप्रसंगी दिले आहे. मलाही पूर्वजन्मकृत योगाभ्यासाची फळे मिळत आहेत आणि योग पूर्णतेकडे जात आहे, असेच त्यांचे सांगणे होते.

मला खरे तर संस्कृत भाषेची ओळखही नव्हती. व्याकरण तर ज्ञातच नव्हते असे म्हटले तरी चालेल. पण ज्योतिदर्शनाचा यानंतर पुढे सांगणार आहे तो प्रसंग एकदा घडून गेला आणि नंतर माझ्या वाचनात बरेचसे संस्कृतप्रचुर ग्रंथ येऊ लागले. पूर्वी तर स्तोत्रमंत्रादींच्या मी फारसा वाटेला जातच नसे. पण तीही माझ्या हाती पडू लागून मला वाचावीशी वाटू लागली. अशा ग्रंथांचा बऱ्यापैकी अर्थही मला समजू लागला. गीता तर नित्यपठनातली झाली.

नंतर एकदा श्री. धर्माधिकारी यांचे गीतेच्या व्याकरणावरील पुस्तक मिळून त्यायोगे आणि ॲनी बेझंट आणि भगवानदासांची गीता मिळाल्याने, तसेच इतरांचे गीतार्थविषयक ग्रंथ वाचून हे ग्रंथ नीट समजण्याची माझी कुवत झाली. एका गूढवादी स्त्रीने मला याबाबत प्रश्नही केला होता की, "तुम्हाला संस्कृत येत नव्हते, ते कळू लागले आहे ना?"

त्रिकुटी आणि सहस्त्रदलकमल

नंतर योगपथाचा जेव्हा अभ्यास घडू लागला, तेव्हा लक्षात आले की वेदवाङ्मय, उपनिषदादी, गीता-ज्ञानेश्वरी आणि संस्कृतातले ग्रंथ कळण्याची जी पात्रता माझ्यात आकस्मिक उद्भवलेली होती, तिच्यामागे माझी कुंडलिनीशक्ती आज्ञाचक्रावरील ***त्रिकुटी (द्विदल)*** या स्थानी असल्यामुळे हे सर्व आपोआपच घडत होते. या स्थानासच योगी ***ओम्, प्रणव, गगनब्रह्म, महत्, महाकाश, वेद, दिव्य ग्रंथ (ब्रह्म)*** इ.स्थानविशेषांनी ओळखतात. ***सहस्त्रदलकमला***नंतरच्या या पिंडातील महत्त्वाच्या स्थानी

सगळ्या दिव्य ग्रंथांचे प्रकाशन योग्यास घडते. अगदी त्याच्या जाणिवेत नसले तरी त्याला सगळ्याच दिव्य ग्रंथांचा, ऋषिवचनांचा, प्रेषित आणि द्रष्ट्यांच्या विचारांचा गुह्यार्थ स्वयंभच अंतर्मनात प्रकटतो.

श्रीज्ञानेश्वरमाउलीने तर या श्रीकृष्णवचनांवर लख्ख प्रकाशझोत टाकत म्हटले आहे कीः

मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पाहांट फुटे।
सूर्याफुडें प्रगटे। प्रकाशु जैसा।।६-४५२।।
तैसिं दशेचि वाट न पाहातां। वयसेचियां गांवां न एंता।
बाळपणींच सर्वज्ञता। वरी तेयांतैं।।४५३।।
तिएं सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वत दुभे।
मग सकल शास्त्रें स्वयंभे। निगति मुखें।।४५४।।
आणि माघिल जैं सद्बुद्धी। जेथ जिविता जाहाली होति अवधि।
मग तैंचि पुढति निरवधि। नवी लाहें।।४५५।।
तैसें दुर्भेद जैं अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय।
तेथ सौरसेविण जाएं। बुद्धी तेयाचि।।४५६।।

काही भाग्यवंतांना तर जन्म होताच निजज्ञान प्राप्त होते. बालपणीच सर्वज्ञता वरते. शास्त्रांत सहजच गती प्राप्त होते. आणि मागील जन्मी जेथे वाट फुटली होती, तेथून पुढे त्याचा योगाभ्यास सुरू होतो. गुरुच्याच मुखातून जे ज्ञान प्राप्त व्हावयाचे, ते त्याला प्रयत्नांशिवाय आपोआपच प्राप्त होते.

बलिएं इंद्रिएं एंति मना। मन एंकवटे पवना।
पवन साहजें गगना। मिळोंचि लागें।।६-४६०।।
आईसें नेणों काएं आपैसें। तयांतैंचि कीजे
अभ्यासें। समाधि घर पुसें। मानसाचें।।४६१।।

सहजच मनपवनाचा अभ्यास सुरू होऊन पवन केव्हाच गगनी लीन होतो आणि समाधी त्याच्या मनाचा ठाव विचारत तेथे स्वतःच येऊन दाखल होते.

म्हणौनि साधनजात आघवें। अनुसरें तेयां स्वभावें। मग आयतिएं बैसें राणिवे। विवेकाचिएं।।६-४६६।। ***..तेथ मनाचें मेहुडें विरे। पवनाचें पवनपण सरे। आपणपां आपण मुरे। आकाशही।।४६८।।***
प्रणवाचा माथा बुडे। **एतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे। म्हणौनि आधिचि बोलु बहुडें। तयालागीं।।४६९।।**

सर्व साधने त्याला आपोआप अवगत होतात. विवेक सहजच लाभतो. तोसुद्धा मागे पडतो आणि जेथे मनरूपी मेघ नाहीसा होतो, पवनाचे पवनत्व उरत नाही, आकाशसुद्धा स्वतःतच लय पावते, ॐकाराची अर्धमात्रासुद्धा जेथे बुडून जाते, त्याठायीचे - ब्रह्मत्वाचे अनिर्वाच्य सुख त्याला सगजगत्या लाभते. भगवंतांनी म्हटले आहे की ***"जिज्ञासुरपियोगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।"*** - योगजिज्ञासुसुद्धा शब्दब्रह्मापलीकडे जाऊन पोहोचतो, यात या सर्व विवेचनाची फलश्रुती संक्षेपाने सांगितली आहे. आता माझ्याबाबतीत हे कसकसे घडले ते सांगणार आहे. पण जरा सावकाशीने!

ज्ञानेश्वरमाउली

मला आज प्राणप्रिय असणारी श्रीज्ञानेश्वरमाउली मला केव्हा भेटली ते कळलेच नाही. त्यांचा माझा या जन्मी कसा संबंध आला, ते ऐका. अभियांत्रिकी महाविद्यालयात पुणे येथे मी हॉस्टेलमध्ये राहून बी.ई.चे प्रथम वर्ष करत होतो. रूममेट एक मराठवाड्यातला हुशार विद्यार्थी होता. कार्तिकात आळंदीला मोठी यात्रा भरते. त्यासाठी त्याचे वडील वारीबरोबर त्या वेळी आळंदीला येणार होते. त्यांना भेटावे म्हणून हा निघाला. मलाही विचारले की तुम्ही येता का. म्हटले एवढ्या भाऊगर्दीत याला वडील ठावठिकाणा न सांगता कसे भेटतील! पण तो काही ऐकेना. तो सायकल घेऊन आळंदीला एकटाच निघाला.

रात्रीबेरात्री हा एकटा एवढे अंतर जाणार म्हणून मित्रांना विचारले. तर त्याच्याबरोबर जायला इतर पाच-सात जण तयार झाले. सायकली काढून आम्ही सगळे रात्रीचे जेवणखाण उरकून निघालो. सायकलींचे दिवे आणि कार्तिकातील कृष्णपक्षाच्या द्वादशी-त्रयोदशीची कीर्र रात्र! तरीही हास्यमौज करत आमची कंपनी आळंदीला पहाटे चारच्या सुमारास ऐन थंडीत पोहोचली.

पाहिले तर आळंदीचे प्रवेशद्वार अडवून होते यात्रेचे टोलवाले. तेव्हा माणशी आठ आणे टोल होता, तो पण खूप वाटायचा. आम्ही सातआठ जण. त्यातून आडवेळ. त्या वेळी आमची आंघोळ कुठे होणार होती, कपडे कुठले बदलणार होतो अन् ज्ञानोबामाउलींचे दर्शन त्या तूफान गर्दीत कसे मिळणार होते! उगीचच यात्रेकरूंनी घाण केलेल्या रस्त्यांवरून फिरून यायचे. त्यापेक्षा विज्ञानवादी विचारांच्या आम्ही सगळ्यांनी असे ठरवले की माझा रूममेट आणि एकाजणाने असे फक्त दोघांनी आळंदीत शिरून त्याच्या वडलांना भेटून यावे. आम्ही इतर सगळे टोलनाक्यावरच सायकली घेऊन थांबलो.

तासाभराने ते दोघे परत आले. अपेक्षेप्रमाणेच घडले होते. त्याच्या वडलांचा तेथील भाऊगर्दीत पत्ता लागला नव्हता. सगळ्या धर्मशाळा तपासून झाल्या होत्या. म्हणून पुनः आम्ही सगळे पुण्याला परतलो. अशी ही माझी आळंदीची पहिली वारी!! श्रद्धावंत असतो तर आठ आणे टोल भरूनही आतमध्ये जाऊन ज्ञानेश्वरमाउलीच्या त्या

सहाशेसत्तराव्या समाधि भद्रदिनी किमान देऊळवाड्याचे तरी दर्शन घेऊन धन्य झालो असतो. पण तसे घडणार नव्हते! हे माझे ज्ञानोबामाउलींचे पहिले दर्शन!

संचितदर्शन::::

गणेश-गायत्री

त्यानंतर मध्यंतरी बी.ई.झाल्यानंतर काही काळ मला ज्योतिषशास्त्राचा नाद लागला. हे वाच, ते वाच, यात खरंच काही आहे की सगळंच थोतांड आहे? याचा विज्ञानसिद्ध मनोभूमिकेतून अभ्यास करणे, विचार करणे, अन् शोध घेणे चालू होते. हे थोतांडच असणार - असे कधीतरी असते का असा पूर्वग्रह होताच. पण आपण प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहू या, असे ठरवले.

त्या विषयाची पुस्तके घ्यावीत म्हणून गिरगावात बलवंत पुस्तकभांडारात गेलो. तेथे श्री.म.दा.भट यांचे ***संचितदर्शन*** मिळाले. त्यातून जे काही ज्योतिषशास्त्र समजायचे ते समजले. पण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षलाभ झाला दोन महत्त्वाच्या गोष्टींचा. अर्थातच त्या वेळी त्यांचे मोल मला नीट कळले नाही. पण अंत:प्रेरणेने म्हणा, काहीही म्हणा, मी त्या गोष्टी आजतागायत नीट जतन करून ठेवल्या आहेत.

एक म्हणजे त्या पुस्तकातील श्री.भटांचे सद्गुरू **स्वामी श्रीस्वरूपानंद**ांचा फोटो. पावसच्या या राजहंसाचे महिमान मला त्या वेळी कळू शकलेच नसते. पण जाणता-अजाणता हा फोटो गेली ४०-४२ वर्षे माझ्याकडे आहे. एका वाचकाने पुस्तक वाईटरीत्या हाताळून ते खिळखिळे करून टाकले. त्यामुळे तो फोटो पण सुटा झाला. तो सध्या मी माझ्या श्री.मामा दांडेकरांच्या ज्ञानेश्वरीत ठेवला आहे.

दुसरी गोष्ट **संचितदर्शन**ाने दिली. तिचेही मूल्य मला त्या वेळीतरी नीट उमजले नव्हते. ती म्हणजे श्री.भटांचे सांगणे की श्रीगणेशाथर्वशीर्ष व गायत्रीमंत्र यांचा जप केल्याने ज्योतिषाच्या वाचेला सिद्धी प्राप्त होते. त्यावर विश्वास बसो की न बसो, वैज्ञानिक दृष्टीकोनातून प्रयोग म्हणून त्या शास्त्रास अनुसरत मीही तसा तेव्हापासून नियमित जप करू लागलो.

मावसभावाकडे गणेशचतुर्थीनिमित्त सहस्त्रावर्तने करत असत. एक ब्राह्मण अधिक म्हणजे कमी वेळ हे गणित धरून तो मलाही बरोबर घेत असे. खरे तर मला अथर्वशीर्ष नीट काय, मुळीच येत नव्हते. पण जन्मसिद्ध व उपनयनात लाभलेले ब्राह्मणत्व धरून हे चालत असे.

संचितदर्शनमुळे मी गणेशाथर्वशीर्षाकडे वळलो. पठनासाठी म्हणून प्रभादेवीच्या सिद्धिविनायकाचे मुखपृष्ठ असलेले एक छोटेखानी सार्थ पुस्तक विकत घेऊन नित्य जवळ बाळगू लागलो. येताजाता ते मुखोद्गत करू लागलो. म्हणताम्हणता ते मला पाठ झाले. ते पुस्तक आणि तसेच गीतेचे पूर्वी पाठांतरानिमित्त हाती घेतलेले पुस्तक, काय कारण असेल ते असो, कायम माझ्या घरी असायचे. आहेही!

या सर्व गोष्टींचा काय संकेत होता, ते मला तेव्हा कळले नाही. आता लक्षात येते की नास्तिकाच्या पदरी ती आळंदीची वारी, ते स्वामी श्रीस्वरूपानंद, ती गीता, ते गीतारहस्य, ही गणेश व गायत्रीउपासना या काही निष्कारण पडलेल्या गोष्टी नव्हत्या. माकडाच्या गळ्यात कोणी का उगाच रत्नहार घालील! नियतीने पूर्वसंचितानुसार हे संचितदर्शन असे घडवले होते. पतञ्जली म्हणतात: ***"संस्कारसाक्षात्कारकरणात् पूर्वजातिज्ञानम्।।३-१८।।"*** या सर्व साक्षात झालेल्या चिह्नांवरून माझ्या पूर्वजन्मार्जित संस्कारांचे, अभ्यासाचे आणि साधनेचे ज्ञान विचक्षणांस नक्कीच होऊ शकेल! असे माझे मत आहे.

श्रीकृष्णांनी तर म्हटलेच आहे की ***"पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः। जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।"*** - त्याची इच्छा असो, नसो, पूर्वजन्मी योगाभ्यास-उपासना केलेला तो साधक या जन्मीही त्या अभ्यासाकडे - त्या उपासनेकडे वळतोच वळतो!

श्री.भटांच्या पुस्तकात सांगितल्याप्रमाणे गणेश व गायत्री उपासना करण्यामुळे एक झाले. त्यापूर्वी नास्तिकतेच्या भरात गळ्यात यज्ञोपवीत नसले, तर बरे वाटायचे. पण गायत्री उपासकास यज्ञोपवीताविरहित राहणे श्रेयस्कर नाही. म्हणून तेव्हापासून सतत यज्ञोपवीत धारण करण्याचा परिपाठ रूढ झाला. गायत्रीमंत्रजप करू लागलो खरा. पण त्याचे माहात्म्य नीट कळण्यास त्यानंतरही पंधरा-सोळा वर्षे जावी लागली. पण एकमात्र नक्की झाले. कसे का होईना, भविष्य वर्तवण्यात अचूकता येते या आमिषापोटी मी गणेश-गायत्री उपासनेच्या गळाला मात्र लागलोच! हाच पूर्वजन्मसंचिताचा संकेत!!

नंतर एकदा वेदमूर्ती श्री.घैसासगुरूजींचे दर्शन घेण्याचा योग अनाहतनादप्राकट्यानंतर दोनएक वर्षात आला. त्या ऋषितुल्य महनीयांना विधिवत प्रणाम करून मी माझ्या अध्यात्मातल्या काही शंका त्यांना विचारल्या आणि गायत्री मंत्र म्हणून दाखवून तो बरोबर म्हटला जातो का हे विचारले. त्यावर त्यांनी तो योग्य रीतीने म्हटला जातो आहे, याची खात्री करून दिली आणि सांगितले की गायत्रीजपकर्त्याला इतर कोणतीही उपासना करावी लागत

नाही. अभिचारादींपासून गायत्रीच त्याचे संरक्षण करते. त्यांचे आशीर्वाद मिळून माझ्या स्वतःजप केलेल्या गायत्रीमंत्राची उजळणी झाली.

स्वामी स्वरूपानंद

आता स्वामी श्रीस्वरूपानंदांबद्दल! ते ज्ञानेशपरंपरेतले नाथपंथी साधू! ते कोण हे मला १९८७-८८च्या सुमारास वाचनातून कळले. योगायोग असा की नंतर मी जेव्हा माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच आणि पत्नी व मुलांसमवेत आळंदीला गेलो अन् श्रीज्ञानोबारायांच्या चरणी मस्तक ठेवले - वरील यात्राटोलप्रसंगानंतर जवळजवळ सव्वीस वर्षांनी - तो दिवस होता **मार्गशीर्ष कृष्ण द्वादशी**चा - स्वामींच्या जयंतीचा! हा असा योग अचंबित करणाराच होता.

सांगायचे म्हणजे माउलींच्या आळंदीच्या वेशीवरून परत लोटलेला मी त्यानंतर सव्वीस वर्षांनी का होईना, त्यांच्या द्वारी क्षणभर तरी निवांत उभा राहिलो. मज पामरासाठी हेही नसे थोडके! आणि त्यापूर्वीच तीनचार वर्षे मी ज्ञानेश्वरीकडे आकर्षित झालो होतो. पारायणाचा प्रसंग तर मी सांगितलाच आहे. त्याही अगोदर तीनचार वर्षे मी उगीचच गोनिदांची ज्ञानेश्वरी घेतली होती. खरे तर तिच्या मुखपृष्ठावरील मोरपिसाने चित्त आकर्षून घेतले, कव्हरच्या निळ्याशार पार्श्वभूमीने मन लालचावले, म्हणून मी ते पुस्तक घेतले होते. पण वाचण्यात मजल दरवेळी फक्त पहिल्या काही पानांपलीकडे जात नसे. असे का व्हावे, ते मला समजत नाही. अमृतानुभवही घ्यायची मला एकदा बुद्धी झाली होती. पण आपल्याला तो काय कळणार आणि आपली आवड वेगळीच आहे, हे ओळखून मी तो मोह तेव्हा आवरला होता.

योगदा श्रीज्ञानेश्वरीप्रकटन::::

आळंदीचे पारायण

उण्यापुऱ्या चारपाच वर्षांच्या ज्ञानेश्वरीसहवासातून अन् माउलीच्या दर्शनानंतर जेमतेम एक-दीड वर्षानंतर माझ्या हातून ज्ञानेश्वरांवर काही उत्स्फूर्त लिखाण घडू लागले. एकदा पंधरावीस पाने इंग्रजीतून आणि एकदा दहाबारा पाने मराठीतून असे ते लिखाण झाले होते. पण त्याला काही नीट दिशा अन् आकार येत नव्हता.

पण मे १९९१पासून मात्र पुनः वेगळ्या प्रकारचे स्वतंत्र लेखन ज्ञानेश्वरीवर सुरू झाले. ते झाले माझ्या पंढरपुरच्या श्रीविठ्ठलदर्शनाच्या मे १९९१मधल्या पहिल्यावहिल्या प्रसंगानंतर लागलीच! तसेच त्याअगोदर फेब्रुवारीत महाशिवरात्रीला माझे ज्ञानेश्वरीचे एक पारायण माउलीच्या समोर बसून, तर कधी तिच्या उंबरठ्यावर बसून, तर कधी शिवालयातील नंदीजवळ बसून आणि कधीकधी अजानवृक्षांच्या बागेत बसून आळंदीला पूर्ण झाले होते.

ते मी वेळ मिळेल तसे आळंदीला वारंवार जाऊन कधी एकदोन दिवस तर कधी तीनचार दिवस तेथे राहून असे वेळोवेळी माउलीच्या समाधीशेजारच्या पैसात बसून अगदी निवांतपणे पूर्ण केले होते. सलग एका अखंड मुक्कामात काही ते घडले नव्हते.

तेथील पारायण पूर्ण होतेवेळी मी मुद्दामच कृष्णएकादशी पाहून गेलो होतो. नामदेवांनी अभंगांत असे म्हटले आहे की ज्ञानदेवांना श्रीविठ्ठलरायाने दिलेली एक देणगी म्हणजे ही कृष्ण एकादशी! माउली संजीवनसमाधी घेणार म्हणून जेव्हा ठरले, तेव्हा त्या पंढरीच्या दयाळाने सांगितले की "एकादशी मला फार प्रिय आहे. आतापावेतो भाविकांच्या दोन्ही एकादशा माझ्या दर्शनाने संपन्न होत आल्या आहेत. पण यापुढे मात्र त्यातली एक म्हणजे प्रति मासातली ***कृष्ण एकादशी*** मी तुझ्यासाठी राखून ठेवतो आहे. त्या दिवशी तुझे दर्शन घेणाऱ्यांस अगणित पुण्य लाभेल!"

असे त्या कृष्ण एकादशीचे माहात्म्य ठाऊक झाल्याने मला पारायणासाठी आणि ते पूर्ण करण्यासाठी माघी कृष्ण एकादशी आणि नाथसांप्रदायिकांस अति प्रिय असा महाशिवरात्रीचा योग फार पसंत होता. ज्ञानेदेवांशेजारीच सिद्धेश्वराचे प्राचीन स्थान आहे. त्याचेही शिवरात्रीला दर्शन घडेल आणि ज्ञानदेवांनाही भेटता येईल, असा विचार होता आणि झालेही तसेच मनासारखे!

त्यावेळी एक संस्मरणीय घटना घडली. महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी पारायण पूर्ण झाले होते. सिद्धेश्वराचे दर्शन घ्यावे म्हणून रांगेत उभा होतो. थोड्या वेळाने एक सामान्यशी व्यक्ती तेथे आली आणि मला दोन केळी देऊ लागली. मी नको म्हणून सांगितले, तरी त्याचा आग्रह चालूच होता. शेवटी त्याने माउलीचा प्रसाद आहे, असे म्हणून बळेबळेच माझ्या हातात ती दिली.

त्यानंतर मी जेव्हा समाधीदर्शनासाठी गेलो, तेव्हा ती व्यक्ती तेथेच बसलेली होती अन् मला पाहिल्यावर थोडे रागावल्यासारखे करून म्हणाली की "काय राव! माउलीचा प्रसाद पण घेत नाही वाटतं! आम्ही इथून उठून तिथे येऊन प्रसाद देतो आहोत. पण तुम्ही काही तो घेत नव्हता! असा कोणी मी आजपावेतो पाहिला नाही." त्यावर मी म्हटले की "बाबा! माझी चूक झाली. मला काय माहीत की माउलीने तुम्हाला माझ्यासाठी प्रसाद घेऊन पाठवले आहे म्हणून! क्षमा करा! मी ओळखले नाही हे!" तरीही ती व्यक्ती

माझ्याकडे काय चमत्कारिक मनुष्य आहे, असे वाटल्याप्रमाणे पाहत राहिली. माझे आळंदीचे पारायण माउलीला पोहोचल्याची ती पावती त्यांच्या दरबारातून पाठवली होती.

पैसचा खांब

त्याच सुमारास मी एकदा औरंगाबादला गेलो होतो आणि वेळात वेळ काढून मोहिनीराजांच्या नेवाशास जाऊन आलो. माउलींनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली, त्या खांबाचे डोळे भरून दर्शन घेऊन आलो. श्रीमती दुर्गाताई भागवत यांनी कुठेतरी असे म्हटले आहे की हा ***नेवाशाचा पैसचा खांब*** पाहिल्याशिवाय ज्ञानेश्वरीची किल्ली हाती येत नाही, असे भाविक समजतात म्हणून!

नाथमहाराज *(संतश्रीएकनाथ)* यांचे पैठण आणि वाडा, श्रीखंड्याचा खांब त्याआधीच कित्येक वर्षे मला पाहण्यास मिळाला होता. ज्ञानदेवांचे मूळ गाव आपेगाव-पैठण. तेही मी असेच त्या मार्गाने जातायेता पाहिले होते. पण हे सर्व ज्ञानदेवांशी आपले काही विशेष जवळीकीचे संबंध आहेत म्हणून नाही. सहजच ते घडले होते. त्यामागे कोणतीही भाविकता नव्हती. तर असो.

योगदा श्रीज्ञानेश्वरी:महद् ग्रंथलेखन

हे असे सर्व योग तेव्हापावेतो जुळून आलेले होतेच आणि मग मे१९९१मध्ये हे लेखन सुरू झाले. हे जे लेखन सुरू झाले होते, ते वीस-पंचवीस पाने करता करता दीडदोनशे पानांचे झाले व आपल्या अल्प बुद्धीची कुवत एवढीच असे जाणून मी *"इति लेखनसीमा"* असे म्हणून त्याची समाप्ती करून हातावेगळे ठेवून दिले. पण का कोण जाणे! नंतर चारपाच महिन्यांनी परत स्फूर्ती आली आणि शेवटचा परिच्छेद पुढे लिहिण्याच्या दृष्टीने बदलून ते मी पुढे लिहू लागलो. पण त्याची नक्की दिशा काय ती ज्ञात नव्हती. पण ज्ञानेश्वरमाउली आणि ज्ञानदेवी यांसंबंधी ते होत होते.

मध्यंतरी वाटू लागले की ज्ञानेश्वरीच्या सर्व ओव्यांचा भावार्थ आपण आपल्या शब्दात प्रकटवतो आहोत. पण ते केवळ तेवढेच नव्हते. माउली माझ्या हाताला धरून योगशास्त्रावर एक बृहत स्वरूपाचा ग्रंथ प्रकटवत होती. त्याचा पाया होता ज्ञानेश्वरीच्या अदमासे नऊ सहस्त्र ओव्या, गीतेचे सातशे श्लोक आणि उपनिषदादी वाङ्मय, योगसूत्रे, गीताभाष्यादी ग्रंथ आणि इतर बरेच काही! त्यात भर होती माउलीच्या अमृतानुभवाची अन् अभंगांची. त्या सर्वांचा उल्लेख मी पूर्वीच संदर्भसाहित्य म्हणून सूचीत आणि ग्रंथामागील भूमिकेत केला आहे. या सगळ्यांचा जो एक मी Bird's Eye-view घेतला होता, त्यानुसार वेगवेगळ्या आत्मदर्शनप्रांतांतील close view घेऊन ते लिखाण अंतःस्फूर्तीतून प्रकट होत होते.

न्यायमूर्ती श्री.राम केशव रानडे यांनी त्यांच्या ***अमृत ज्ञानेश्वरी*** या ग्रंथात असे मत व्यक्तवले आहे की श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाल्यावरच गीतेवर लिहावे. माझ्या दृष्टीने साक्षात्कार झाला होता की नाही, हे तेव्हा नीट माहीत नव्हते. पण हे असे अनुभव येत येत ते ज्ञानेश्वरीतील योगशास्त्रावरील लिखाण रूप घेत अवतरत होते खरे! खरे तर त्या सावळ्या घननीळाचेच - त्या अमृततुल्य ज्ञानाचेच माउलीने माझ्या हातून अवतरवलेले ते लिखाण म्हणजे एक सुंदर रूप आहे, अशी माझी धारणा आणि श्रद्धाही आहे!!

ज्ञानेश्वरीलिखाणाचा हा अनुक्रम जवळजवळ चौदापंधरा वर्षं चालला होता. सर्व लिखाण पहिल्या सहासातशे पानांनंतर फुलस्केपऐवजी काँप्युटरने नीट आखून घेतलेल्या, पानी तीस ओळी असलेल्या A-4 साईझच्या Executive Bond पेपरवर प्रथमपासूनच केले गेले. उरलेले लिखाणही त्याचप्रमाणे घडले. एकदा जे लिहिले त्यात विशेष फेरबदल नसत; खाडाखोड क्वचितच. एकटाकी म्हणावे तसे हे ग्रंथलेखन सतत इतकी वर्षं स्फूर्ती येईल तसे करत होतो. मुद्दाम लेखनकामाठीगिरीचा प्रकार मुळातच नव्हता.

अशा प्रकारे साधारण तीन सहस्त्र हस्तलिखित पृष्ठांचा हा ग्रंथ हातून लिहून संपन्न झाला. कल्पनातीत अशी ही घटना होती. अध्यात्मविचारात पामर अशा माझ्याकडून हे घडले कसे याचे मोठे नवल वाटते. जाणकारांनी तो ग्रंथ पाहून अचंबा व्यक्त केला. श्रद्धावान विद्वानांनी तो भगवत्प्रीतीचे प्रतीक समजून माथ्यावर ठेवून घेतला. माझी कुवत, माझा अभ्यासाचा आवाका ते सर्व जाणून होते. म्हणून त्यांना या लेखनाचे महदाश्चर्य वाटले. मलाही त्याचे मोठे अप्रूप वाटते. आणि ज्ञानदेवांचेच शब्द माझ्या ओठांवर येतात:

हा ग्रंथसागरु एवढा। उतरौनि पैलीकडां।
कीर्त्तिविजयाचां धेंडा। नाचे जो कां।।१८-१७८०।।
काएं बहु बोलों सकलां। मेलविलो जन्मफलां।
ग्रंथसिद्धीचा सोहोला। दाविला जो हा।।१८-१७८४।।
..किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्त्तन हें सिद्धी गेलें।
एथ माझें जी उरलें। पाईकपण।।।१७९२।।

माउलीने उगीचच का म्हटले आहे:

अहो सद्गुरुचिएं कृपादृष्टी। तुझें कारुण्य जयांतें अधिष्ठी।
तो सकल विद्यांचिएं सृष्टी। धाता होएं।।१२-९।।

माझ्या श्रीमंत ज्ञानेशअंबेने कल्पलता होऊन मला आज्ञापून स्वतःच्याच ग्रंथावर असे हे बृहत निरूपण माझ्याकडून करवून घेतले! केवढी ही कृपादृष्टी! मी कोण कोठला! पण त्याचाही त्याला काही कळू न देता असा अंगीकार केला. स्नेहाळपणे अंकावर लाळला, पाळला आणि हे मोठे कौतुक प्रकट करवले!!

आमचे उच्चविद्याविभूषित सर, ज्यांचा मी पूर्वी उल्लेख केला होता, त्यांनीही ही ग्रंथनिर्मिती पाहिली होती आणि तो वाचून ते मला अधिक काही सूचना करू इच्छित होते. पण दुर्दैवाने ग्रंथ पूर्ण होईस्तोवर ते परलोकवासी झाले.

एका उत्कृष्ट, सालस आणि निर्व्याज, पूर्वग्रहरहित, विद्वान, विद्याव्यासंगी, ज्ञानेश्वरी आणि तत्त्वज्ञान अभ्यासक अशा गेल्या पिढीतल्या अभ्यासू परीक्षकाला मी मुकलो याचे मला आजही फार वाईट वाटते. अशी माणसे पुनः होणे नाही आणि या ग्रंथाचे नीट परीक्षण होण्याचा योग दिसत नाही, असे मला सखेद म्हणावे लागत आहे. असो.

असे ते लिखाण करत असता काय बुद्धी झाली पहा! दर परिच्छेदामागे एक ओळ मी सोडत गेलो. लेखन त्यात खंड, प्रकरणे, उपप्रकरणे, विषय अशी मांडणी न करता सलग रुचेल तसे केले होते. लिखाण पूर्ण झाले अन् बाजूला ठेवून दिले. असेच दीडएक वर्ष गेले. त्यानंतर वाटले की तसा तर हा ग्रंथ आपोआपच विषयवार लिहिला गेला आहे.

ओवी क्र.१-१ ते १८-पसायदान अशा क्रमाने तो लिहिलेला नव्हताच. सहज येणाऱ्या विषयांच्या अनुषंगाने गीताश्लोक, ज्ञानेश्वरांच्या ओव्या, इतर संदर्भ अशा पद्धतीने तो लिहिला होता. म्हणून तो ओवी क्र.अ.१-१ ते अ.१८-पसायदान असा असणे शक्यच नव्हते. पण ज्ञानेश्वरीच्या संपूर्ण ओव्या त्यात आलेल्या आहेत - त्यांच्या सुगम अर्थासह आणि सगळे गीताश्लोक त्यांच्या सुलभ अर्थासह!

म्हणून मग ग्रंथ म्हणावा तसे त्याचे विभाग करायला लागलो, तर ते काम अगदीच सोपे होते. कोणत्याही लिखाणाची पुनर्रचना, मजकूर मागेपुढे, खाडाखोड, पुरवणी जोडणे इ.संपादकीय सोपस्कार न करता त्याचे एकूण १४स्कंध *(खंड)* अन् ५८ उन्मेष *(प्रकरणे)* असे त्या ग्रंथाचे स्वरूप झाले.

स्कंधांना, उन्मेषांना त्यांच्यामध्ये येत गेलेल्या विषयांना अनुरूप शीर्षके-उपशीर्षके सुचत गेली. दोन परिच्छेदांमध्ये सोडलेल्या ओळींचा उपशीर्षकांसाठी छान उपयोग झाला. मुख्य म्हणजे ग्रंथ पुनर्लेखन न करता माझ्या दृष्टीने तरी समाधानकारकरीत्या सिद्ध झाला. ज्यांनी ज्यांनी या ग्रंथाचे हस्तलिखित खंड पाहिले आहेत, त्यांना त्यांना हा ग्रंथ अत्यंत योजनाबद्ध रीतीने ग्रंथकारी कौशल्य पणाला लावून दोनतीनदा सुधारणा करत जाऊनच तो निर्मिला गेला असला पाहिजे असेच वाटले आहे. पण हा खुलासा ऐकल्यानंतर तेही अवाक झाले.

काहींना तर तो परत परत लेखन केल्याशिवाय अशा स्वरूपाचा झाला असणे शक्यच नाही, असेही वाटले आहे. पण त्यांना त्याच्या पृष्ठांवरील असलेल्या दिनांकांच्या नोंदींमुळे शेवटी खात्री पटली की तो जसा आणि जितक्या काळात लिहिला गेला, तशाच स्वरूपात त्यांना परीक्षणार्थ दिला आहे.

स्वामी स्वरूपानंदांचा माझ्या आयुष्यातला अजून एक coincidence पाहण्यासारखा आहे. त्यांच्या समाधीचे पावसला जाऊन दर्शन तर अगदी अलीकडे म्हणजे २००५ साली मी घेतले. त्यापूर्वी योग आला नाही. मी अगदी खेड,मंडणगड, दापोली इ.ठिकाणी सन १९६८-६९मध्ये जात असूनही या पावसच्या ज्ञानेश्वरप्रेमी महायोग्याची अन् माझी कधी भेट झाली नाही. पण तरीही त्यांची कृपादृष्टी मात्र मी अनुभवली आहे.

त्यांच्या जयंतीलाच मी माउलीचा उंबरठा ओलांडून तिच्या चरणी हे मस्तक ठेवले. एकदा त्यांच्या पायी ठेवलेले ते मस्तक अजूनही तिथेच आहे! चिकटूनच बसले आहे, म्हणा ना! दुसरे असे की ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** हा जो अदमासे तीन सहस्त्र पृष्ठांचा हस्तलिखित ग्रंथ मी लिहिला, त्याची ***लेखनसमाप्ती*** झाली ***दि.४.९.२००२ला स्वामी स्वरूपानंद पुण्यतिथीला श्रावण वद्य द्वितीया*** या पावनदिवशी! अनुक्रमणिका, ग्रंथामागची भूमिका, खंड पाडणे इ.कामे तदनंतरची. पण लेखनाचा मुख्य गाभा ***मे १९९१ ते ४.९.२००२*** या काळातला! असा हा स्वामींच्या कृपेचा वरदहस्त! त्यांच्या **ज्ञानेश्वरी नित्यपाठा**च्या ओव्या कामावर जातायेतांना लोकलमध्ये रोज वाचण्याचा माझा परिपाठ फळाला आला म्हणा!

असाच गीतेचा एक अध्याय मी रोज एका श्रीकृष्णाच्या अंतरंगभक्त अशा संतांच्या सांगण्यावरून त्यांनीच दिलेल्या गीताप्रतीवरून वाचत असे. त्या संतांचा अन् भगवंताचाही कृपाशीर्वाद कृतकृत्य करून गेला! त्याच्या गीतेवर अन् माउलीच्या ज्ञानेश्वरीवर मजसारखा अज्ञ कसा का होईना, एवढ्या मोठ्या आकाराचा बृहत आलोचनात्मक ग्रंथ लिहू गेला अन् तो लिहून पूर्णही केला, ही या आध्यात्मिक जगातील इतर अनेक घटनांपैकी एक! पण लौकिकात अलौकिक ठरणारीच गोष्ट नाही का! हा ग्रंथ

माझ्याकडून अशा प्रकारे प्रकाशित झाला, हा मी तरी एक चमत्कारच मानतो आणि तसेच माझे स्नेहीही समजतात!

Foot Prints on the Sands of Time

मजवर संत श्रीज्ञानदेव व स्वामी स्वरूपानंदांच्या कृपेचा हा महामेघु वोळतो आहे.

महान व्यक्तींच्या संदर्भात Longfellow म्हणतोः

Lives of Great Men all
remind us,
We can make our Lives
sublime
And departing, leave
behind us,
Foot Prints on the
Sands of Time.

अशी पावले - ***Foot Prints on the Sands of Time*** - आपण उमटवून ठेवू शकणार नाही कदाचित! ***Matthew Arnold*** च्या एका कवितेत चिरंतन असे स्वतःचे पुतळास्मारक उभारणाऱ्या एका पुरातन सम्राटाचे वर्णन आहे. शेवटी असे होते की काळाने झिजवलेला, भंगवलेला तो पुतळ्याचा पाषाण विद्रूप अन् ओळखू न येणाऱ्या अंगांगांचा छिन्नविच्छिन्न होऊन तुकड्यातुकड्यात विखरून एकेकाळच्या समृद्ध अशा पण आता वाळवंटात परिणत झालेल्या त्या भूमीवर इतस्ततः पडलेला असतो. त्याच्या पायावरील शिलालेख (plaque) जेमतेम कसातरी वाचावा लागतो.

सम्राट म्हणतोः

Here is One Who was
The King of Kings;
The Emperor Amongst
the Emperors;
The Ruler Divine;
The Greatest amongst
The Great....

आणि कवी अखेर मर्मभेद करत सांगतोः

Here lies He!
The King of Kings...
.... et al.

पण एका वेगळ्या अर्थाने आपणासारख्या सामान्य माणसांचेही ***Foot Prints on the Sands of Time*** जरूर उमटलेले राहतात. ते आहेत पूर्वजन्म व कर्माच्या सिद्धांताप्रमाणे. ***"Reap as you sow"*** प्रमाणेच पण कर्मांचे ठसे कालाच्या प्रवाहावर उमटवतच तुम्हाआम्हा सर्वांचा जन्मोनजन्म प्रवास चालू आहे. अगदी पंथराजातल्या शिवशंभूचाही! माउलीने म्हटलेच आहे की ***"तिएं मार्गीचां कापडी। महेशु आझुनि।।"*** कर्माकडून अकर्माकडे आणि विकर्माकडे, पण अंती नैष्कर्म्याकडे तुमचाआमचा आणि आपल्याबरोबर आपल्या साहाय्यकारी शिवशंभूचाही हा प्रवास जन्मांमागून जन्म चाललाच आहे. आपण सगळेच नाही का एका महान योगयात्रेचे - साधनामार्गाचे प्रवासी!

पण हा प्रवास आहे मात्र उलट्या मार्गावरचा! ***"नाथाघरची उलटी खूण"*** या न्यायाने! स्वामी रामदाससमर्थांच्या उगमाकडच्या उलट दिशेच्या प्रवासाप्रमाणे! ***प्रसवक्रम*** म्हणजे जगत्प्रकटनाचा - अव्यक्तातून व्यक्त होण्याचा प्रवास आणि साधना घेऊन जाते व्यक्तातून अव्यक्ताकडे, मूर्तातून अमूर्ताकडे, साकारातून निराकाराकडे, सगुणाकडून निर्गुणाकडे अन् तेही सगुणाच्याच माध्यमातून. कोणतेही अकटोविकट तत्त्वज्ञान आणि फापटपसारा न मांडता ***"हंसः सोऽहं"*** प्रकटवणारा प्रवास आहे हा. फक्त हा आहे ***प्रतिप्रसवक्रम!***

सद्गुरूंनी दिलेल्या मार्गावरून चालत जायचे, जातांना सद्गुरूउपासना हाच यम, हाच नियम आणि सर्व अष्टांगे सद्गुरूमय. हीच अवस्थातीत अवस्था, हेच ***Foot Prints on the Sands of Time !***

विज्ञान,ज्ञानेश्वरी आणि गूढवाद

१९८९साली जेव्हा ज्ञानेश्वरांचे दर्शन प्रथमच घेतले, तेव्हा तेथून - त्या अजानवृक्षांच्या बागेतून कधी उठूच नये असे वाटले. पण सोबत मुले होती. त्यामुळे पुण्यास परतलो. त्यानंतर मात्र एकदा पत्नीबरोबर आणि बऱ्याचदा एकटा मी आळंदीला जाऊन आलो. तिथे गेल्याशिवाय चैनच पडत नसे. त्यानंतर मागे सांगितल्याप्रमाणे आळंदीला जाऊनयेऊन श्री.भिड्यांच्या गुटिकाआवृत्तीवरून ज्ञानेश्वरी पारायण केले. त्याअगोदर ज्ञानेश्वरीचे एकच पारायण घरी झाले होते.

झाले होते असे की पारायणी मंडळींच्या सहवासाने आपणही आपल्याकडे एकदा ज्ञानेश्वरीपारायण करावे असे वाटू लागले. त्याअगोदर मागे म्हटल्याप्रमाणे एका परिचिताकडे पारायण चालू होते. रोज ज्ञानेश्वरीच्या पंचाहत्तर ओव्या अर्थासह वाचण्याची योजना होती. ते पारायण मी अर्धवटच केले होते. सहावा अध्याय सुरू झाला आणि काय योग होता, त्यानंतर मी तेथे फारसा जाऊ शकलो नाही. त्याप्रसंगी आलेला Time Dilationसदृश अनुभव मी सुरुवातीसच सांगितला आहे.

गोनिदांची ज्ञानेश्वरी घेतली त्याच्याही सातआठ वर्ष आधी माझ्या हाती Paul Bruntonची In Search of Secret India इ.पुस्तकं पडली होती. The Psychic Frontiers of Medicine, Telepathy by Andrija Puharich, MD, Arthur Koestler ची The Roots of Coincidence, Janus, The Case of Midwife Toad इ.पुस्तकं पण वाचनात आली होती. त्याचबरोबर Astrologyचीही काही पुस्तकं आवडीने वाचली होती. Leadbeaterचीही काही पुस्तकं पाहिली होती.

या सर्व विषयांचा कल आता गूढवाद, साक्षात्कारदर्शन - Mysticism - अज्ञेयवाद - Man and his Destiny अशांकडे नकळतच वळला होता. Autosuggestions/ Self Hypnotism याबाबतची पुस्तके हाती येत होती. Lobsang Rampa या तिबेटी लामाची The Third Eye इ.काही प्रायोगिक पुस्तके वाचून तसे प्रयोगही मी फावल्या वेळी करू लागलो. साधारणपणे हा सर्व काळ दहा वर्षांचा म्हणजे वयाच्या बेचाळिसाव्या वर्षापर्यंतचा.

त्याच काळाच्या शेवटीशेवटी, १९७८ साली म्हणा, पंडित गोपीकृष्ण या काश्मिरी लेखकांची कुंडलिनीविषयक Kundalini - *path to Higher Consciousness,* The Awakening of Kundalini, Higher Consciousness *(The Evolutionary Thrust of Kundalini)* इ.तीनचार पुस्तके मिळाली. ज्यूंचे Kabbala, त्यातील Seven Sepheroths, आणि Tarrots पण वाचनात आली.

मला तेव्हा कल्पनाही नव्हती की Science-Engineering-Law चा मी एक स्नातक झपाट्याने कोणीकडे वाहत जात आहे! एवढे मात्र खरे की अजूनही Modern Physics-Plasma-Quantum Mechanics -Astronomical Research - Neurology-Biochemistry - Genetics इ. विषयही मला सारखेच आकर्षून घेत होते. Mysticismचे आकर्षण तर होतेच होते. अन् सायन्स आणि अलीकडचे त्यातले नाविन्यपूर्ण शोध आणि Theories यांतही मला तरी Mysticism शिवाय इतर काहीच दिसत नाही.

त्यात भर पडली ती जेव्हा Encyclopaedia of Ignorance हा Nobel Laureatesच्या Essaysचा ग्रंथ माझ्या हातात पडला तेव्हा. विज्ञानाच्या सीमारेषा - The Known and The Unknown *(and also probably The Unknowable)* यांची Boundary Line स्पष्ट करणारे ख्यातनाम नोबेल पारितोषिकविजेत्या वैज्ञानिकांचे विस्तृत निबंध त्यात होते. ग्रंथ मोठा होता. सातआठशे मोठ्या लहान अक्षरातील मजकुरांच्या-closely printed पानांचा होता. तेव्हा त्याची किंमतही डॉलर्समध्ये म्हणून बरीच पडली होती.

माझा Biological Sciencesचाही pursuit चालूच होता. “What makes the difference between the Animate and the Inanimate?” हा प्रश्न नजरेसमोर असे. आधुनिक विज्ञान याचे उत्तर शोधत आहेच. इतरही अनेक गूढवादी याच प्रश्नाच्यामागे सहस्त्रो वर्षे आहेत. पण माझ्या या सर्व वाचनातून भौतिक विज्ञानाच्या (Modern Material Sciencesच्या) मर्यादा स्पष्टपणे जाणवून येत होत्या.

एके काळी वाटायचे की विज्ञानाला अशक्य असे काय आहे! पण नंतर लक्षात आले की विज्ञान या विश्वाचे रहस्य अत्यंत miniscule प्रमाणात जेमतेम उलगडू लागले आहे. अनंताचा अवकाश कवेत घेण्याची विज्ञानाची धडपड चालू आहे. पण चिलटाने आकाशाचा वेध घेण्यासारखे ते प्रयत्न आहेत. आत्यंतिक विज्ञानपंथी लोकांना माझे हे मत पटणार नाही. पण अनेक उत्तमोत्तम वैज्ञानिकांचेही असेच मत नाही का! Encyclopaedia of Ignorance मध्ये पण नोबेल पारितोषिकविजेत्या वैज्ञानिकांनी विज्ञानाची मर्यादा नाही का लक्षात आणून दिली!

यामागचे कारण जाणून घेतले तर विज्ञानाला अशी मर्यादा आहेच हे पटेल. मनुष्य काय करतो - नाक, कान, डोळे, जीभ, स्पर्शेंद्रिय, घ्राणेंद्रिय या पंचज्ञानेंद्रियांद्वारे मिळणाऱ्या संवेदना स्वीकारतो. त्यांच्यावर आपल्या मेंदूद्वारे वैद्युत-रासायनिक प्रक्रियांद्वारे काही संस्कार करतो. ठरावीक अनुभवांच्या साच्यावर हा सर्व मालमसाला ओतून त्यातून जुने-नवे असे एक मिश्रण काढतो. त्यातून आनुभविक गोष्टी सोडता जे उरते त्याच्यावर विचारप्रक्रिया करून नवीन काही शोधून काढतो. परत प्रयोग करून म्हणा - निरीक्षणांती म्हणा, ते नवे जर निश्चित कसोट्यांवर उतरले तर त्याला आपल्या पठडीत जागा देतो. विज्ञानाचा हा प्रवास मनुष्याच्या अस्तित्वाबरोबरच सतत चालू आहे. नवीन असे याच आधुनिक विज्ञानयुगातले म्हणून त्यात काहीही नाही.

नवीन असलेच तर सध्या होणारी विज्ञानाची तूफान प्रगती आणि सतत वाढत जाणाऱ्या शास्त्रांच्या शाखोपशाखा! नवनवीन शोध लागण्याचे जे प्रमाण गेल्या काही शतकात दिसून येते, ते उपलब्ध इतिहासावरून पूर्वी तसे असल्याचे दिसून येत नाही. म्हणून आज विज्ञानाचा मोठा गाजावाजा आहे. मी कोणी विज्ञानविरोधक नाही. पण Introspection करणारा Science चा विद्यार्थी मात्र नक्कीचआहे.

विज्ञानच सांगते की मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांच्या ग्रहणशक्ती मर्यादित आहेत. Electromagnetic Spectrumच्या सर्व लहरी आपण ग्रहण करू शकत नाही. एक छोटासा band तेवढा आपल्या आवाक्यातला आहे. परत ही क्षमता व्यक्तिपरत्वे भिन्नभिन्न असू शकते. उदा.colourblindness. जे चक्षू या इंद्रियाचे आहे, तसेच इतरही ज्ञानेंद्रियांचे. Potassium cyanide ची चव काय ते कोण सांगणार! सगळ्याच द्रव्यांना ज्ञानेंद्रिये स्पर्शू वा अनुभवू शकत नाही, हेच खरे!

या अल्पक्षम ज्ञानेंद्रियांना supporting systems आल्यायत. दुर्बिणी, मायक्रोस्कोप, रेडियोलहरींचे तंत्र, अल्ट्रासाउंड, सुपरसॉनिक, मायक्रोवेव्ह अन् अशा अनेक तंत्रांवर चालणारी विविध उपकरणे, संगणक इ.इ. यांचा उपयोग मनुष्यमात्रांची ऐंद्रिय ग्रहणशक्ती विस्तारित करण्याकडे पर्यायाने झालाच आहे. पण तरीही ही शक्ती मनुष्याची वैज्ञानिक झेप अनंतापर्यंत नेण्यास पुरेशी दिसत नाही.

ज्या वेगाने शोध लागत आहेत, त्याच्या अनेक पटींनी अज्ञाताचे क्षितिज दुरावत आहे हेही खरेच! परत मनुष्याची विचारशक्ती, computational skills इ.मर्यादितच आहेत. अगदी Supercomputers घेऊनसुद्धा. परत हे विश्व Logicच्या नियमांनुसारच चालते का हाही प्रश्न आहेच! तसे ते नसले तर आमचा खटाटोप अनंतास गंवसणी घालण्याऐवजी आमच्या मर्यादेपर्यंतच सीमित राहील नाही का!

तसेच आकलनशक्तीचाही प्रश्न आहेच! एका मुंगीला मनुष्याचे विश्व कधीतरी आकळेल का! आणि मनुष्याला हे अफाट आणि Everchanging विश्व! कधीतरी हे होईल का! आणि समजा झालेच तर Law of Probabilityप्रमाणे काय अंदाज व्यक्तवाल तसे होण्याचा!

तर असो. मला या गोष्टी समजून आल्या. त्यानंतर आत्यंतिक आणि आग्रही वैज्ञानिक श्रद्धेचा मी त्याग केला आणि open-mindedly खऱ्या विज्ञानवाद्याप्रमाणे सत्याचा शोध घेण्यास प्रवृत्त झालो - जरी ते सत्य मला या आयुष्यात गवसणार नसले तरी ते अल्पस्वल्प का होईना, जाणून घ्यावे या इच्छेने!

अगोदरच ज्योतिषादी गूढ शास्त्रांचा छंद होता. त्यात Westward ho!ऐवजी Eastward ho! झाले. Oriental Wisdomमध्ये या विश्वाचे रहस्य सापडते का याचाही नकळत शोध सुरू झाला. अगोदरच्या पाश्चिमात्य वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सुयोग्य वापर आणि Oriental Mysteriesचा मागोवा घेणे या प्रक्रिया सुरू होत्या. त्यातून मग वाचन अन् त्याद्वारे विचारविश्वात बहुआयामी विषयांनी प्रवेश केला.

त्यातूनच मला Kundalini, The serpent Power, Arthur Avlon (John Woodroffe)चे ग्रंथ, Anatomy & Physiology, Human Brain, Neurology इ.विषयांत आस्था निर्माण झाली. कोणास ठाऊक काय ते, पण अजाणताच कोणीतरी दिशादर्शन करावे तसा मी कळत-नकळत ज्ञानेश्वरी-गीता यांकडे वळू शकेन असा घडू लागलो. आता म्हणाल की हे परिवर्तन कशाचे द्योतक होते?

त्याचे असे आहे की आधुनिक विज्ञान जी प्रमाणे मानते, ती म्हणजे प्रत्यक्ष व अनुमान. ***“बाबावाक्यं प्रमाणम्”*** ला विज्ञानाची नाखुषीनेच थोडीफार मान्यता आहे. म्हणजे सायन्सचे विद्यार्थी जशी आईन्स्टाईनची Theory of Relativity मानतात तशीच. खरा भर प्रत्यक्ष, अनुमान आणि प्रयोगसिद्ध निरीक्षणांवरच!

आणि गीता-ज्ञानेश्वरी-वेद-उपनिषदे-योगशास्त्र अशा गूढतावादी प्रांतात प्रत्यक्ष व अनुमान यांचे प्रयोजन तर असतेच, पण त्याहूनही जास्त महत्त्वाचे आहे ते *“बाबावाक्यं प्रमाणम्”* हे! द्रष्ट्यांचे उद्गार, वचने खरी मानणे, त्यांचे सूक्ष्मातील अनुभव सत्य आणि प्रमाण मानणे असे हे प्रमाण आहे आणि त्यास ***योगज प्रमाण*** म्हणून मान्यता आहे. किंबहुना ***योगज अनुभूती*** **हा या गूढाच्या प्रांताचा पायाच आहे!** आणि विज्ञान तर त्या कधीच मानणार नाही!

आणि इथेच होते विज्ञान आणि अध्यात्माची फाटाफूट! दोघांच्या पायातच असा मूलभूत फरक असल्यावर त्यांचे जुळावे तरी कसे! विज्ञान आहे *Realism - Deteminism* वर आधारित, तर अध्यात्म आहे *Surrealistic*. एवढे लक्षात घेतले तर हे प्रांत अगदीच भिन्न आहेत, हे ध्यानी येते. म्हणूनच *“मी - एक विज्ञानवादी”* अन् तोच *“मी - एक अध्यात्मवादी”* या दोन्ही भूमिकांचा परस्पर छेद जाणारा नाही हे समजते.

मात्र तरीही हे Westward to Eastward असे जे परिवर्तन माझ्यात झाले, त्यात विज्ञान सपशेल टाकून देणे किंवा अध्यात्माला कचऱ्याची टोपली दाखवणे असा कोणताही आक्रस्ताळेपणा न करता जेथे विज्ञान आवश्यक आहे, तेथे तेच, तर जेथे अध्यात्मज्ञान आवश्यक तेथे तेच, अशी सामंजस्याची भूमिका मी माझ्यापुरती स्वीकारली आहे.

योग आणि मी::::

मोठ्या दु:खाचा आघात

कोणीही का असेना, मनुष्याला व्यावहारिक सत्य स्वीकारावेच लागते. हत्ती आणि वेदांती शिष्याची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. शेवटी अद्वैतवादी गुरूंना कसा का होईना व्यवहारवाद मान्य करावाच लागला! माझ्यावरही बिकट प्रसंग आलेत. त्यातून व्यावहारिक बुद्धीनेच मार्ग काढावा लागला. आध्यात्मिक दृष्टीने चालून वाणसौद्याचे दुकान कसे चालवता येईल! श्रीकृष्णांनीही गीतेत कुठेही अर्जुनाला व्यवहार सोडून वागण्याचा उपदेश सहज करता येण्यासारखा असूनही केला नाही. उलट ज्ञान्यानेही कर्तव्यकर्म केलेच पाहिजे असा गीतेत निर्देश असून त्याचे स्वत:च्या वर्तणुकीतून श्रीकृष्णांनी पालन केलेले आहे.

मोठी कहाणी आहे. थोडक्यात सांगतो. माझ्या पत्नीचा दुर्धर विकाराने मृत्यू झाला. पस्तीसचाळीस वर्षांचे साहचर्य आणि पंथक्रमणा झाल्यावर हा घाव मला झेलावा लागला. खरेच सांगायला हवे. मातापित्यांचा मृत्यू झाला तेव्हाही झाले नव्हते, एवढे पर्वतप्राय दु:ख अंगावर कोसळले. म्हणायचे तर मी एवढा आध्यात्मिक मार्गाचा योगपथिक! पण मीही collapse झालो. स्थिरबुद्धीची गणिते तेथे चालली नाहीत.

पूर्वी रामायण वाचतांना रामाला सीतेचा एवढा विरह का वाटत होता, तो वृक्षवल्लींना मिठी मारून सीतेसाठी एवढा शोक का करत होता, ते कधीच कळले नाही. स्वत:वर हा चिरविरहाचा प्रसंग आपातत: येऊन कोसळल्यावर त्या रामप्रभूचा शोकावेग समजू शकलो. ज्या प्रसंगातून मी जात होतो, त्याचे कोणी वर्णन करावे! *"जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे!"* हेच खरे.

दासबोधातला मृत्यूवरचा *"मृत्य न म्हणे लहानथोर"* इ.समास आठवतो आहे. राजा भर्तृहरी आणि पिंगलेची गोष्टही स्मरते आहे. गोरक्षनाथांनी शोकमग्न राजापुढे फोडलेले मडके आणि उभ्या केलेल्या अनेक पिंगला समोर दिसताहेत. आपली पिंगला त्या अनेकींतून ओळखू न शकलेला राजा आणि गतदेहास फुटलेल्या मडक्याची analogy देणारे श्रीनाथ या मानचित्रांतले तात्पर्य मन जाणून आहे; Logic समजून आहे. गीताही सांगते:

..अजो नित्य: शाश्वतोऽयं पुराणो-
न हन्यते हन्यमाने शरीरे।।२-२०।।

"हा अज, नित्य, शाश्वत व पुरातन आहे. शरीराचा घात केला असताही तो मरत नाही."

वासांसि जीर्णानी यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही।।२-२२।।

"जुनी वस्त्रे टाकून नवी धारण करवीत तसा हा शरीराचा स्वामी - हा अमर आत्मराज - एक शरीर टाकून देतो अन् दुसरे धारण करतो."

ऐकतांना हे सर्व खूप छान वाटते. श्रीगोपालकृष्णांचे हे समजावणारे बोल आहेत. आत्म्यास मृत्यू नाही; भय नाही.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक:।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुत:।।२- २३।।
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्य: सर्वगत: स्थाणुरचलोऽयं सनातन: ।।२-२४।।
अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ।।२-२५।।

भविष्यात रणांगणात धारातीर्थी पतन पावणाऱ्या आप्तादिकांच्या विचाराने शोक करणारा अर्जुन कुठे आणि तो उद्याचा प्रसंग आजच ज्याच्यावर येऊन कोसळला आहे, तो मी कुठे! त्याला पुढे होणाऱ्या शोकाचा धसका होता. पण माझ्यावर तर हे आभाळ अकस्मात म्हणावे असे येऊन कोसळले होते.

गोपाल म्हणाले:

अग्नी न जाळू शके ज्यास/
ना शस्त्रभय ज्यासी/
आपही ज्यास स्पर्शू न शके/
ना वात कंपवी ज्यासी/
जो न होई कधी छिन्नभिन्न/
न होई कधीच भस्म/
न बुडवी जल ज्यासी/
उडवू न शके मरुत जया/
सर्वगत जो नित्य/
अन् स्थिर/अचल अन् चिरंतन/
अव्यक्त जो/अचिंत्य जो/अविकारी जो/
जाणून घे त्यासी अन्/न करी शोक तू/या नश्वर देहाचा//

"त्यातूनही जर का तुझे समाधान होत नसेल तर ऐक पुढे अर्जुना:-

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि।।२-२७।।

"हा जो पुढे गेला आहे, त्याला परत जन्म आहे आणि हा जो जन्माला आला होता, तो बरोबर मृत्यू घेऊनच!

अपरिहार्य असे हे जीवनचक्र आहे. जन्मानंतर मृत्यू आणि पुनः जन्म अशी ही शृंखला अनादि कालसिद्ध अशी चालू आहे. कोणालाच ती चुकवता आलेली नाही. ज्याचे निवारण करता येत नाही अशा या चक्रास जाणून घे आणि व्यर्थ शोक करू नकोस - गेलेल्यांचा आणि पुढे जाणाऱ्यांचा!"

एवढे ऐकूनही अर्जुनासारख्या नरऋषींच्या अवतारालाही पुढे अजून सोळा अध्याय त्याची पूर्ण समजूत काढण्यासाठी भगवंतांना सतत सांगावे लागले! अनुपम गुरू अन् निरुपम शिष्य! अगदी निवृत्तिनाथ-ज्ञानदेवांसारखे! पण श्रीकृष्णांना अशा त्या थोर, संयमी, शूर, धीर, वीर, उदात्त, उदार अंतःकरणाच्या महामानव पार्थाची समजूत पटवून देतादेता खूप काही बुझावणी करावीच लागली. कारण पुढे उभा होता साक्षात मृत्यू! एकवेळ स्वतःच्या मृत्यूचे मनुष्यास भय वा शोक वाटणार नाही. पार्थही त्याचे भय बाळगत नव्हता. पण इतरांसाठी तो दुःखीकष्टी होत होता.

आपण सामान्य माणसं! अर्जुनाला जेमतेम आधार देणारी गीता स्वतः भगवंतांनी सांगितलेली. आपणापर्यंत तर ती कशीतरी हस्तेपरहस्ते आलेली. तुम्हाआम्हाला कसा आणि किती आधार देणार ती हा प्रश्नच आहे! पत्नीची रवानगी करण्यापूर्वी पंधरावा अन् आठवा अध्याय वाचणारा मी! त्यानंतर गीतावचनांद्वारे काही शोकातून सहज बाहेर पडू शकलो नाही! हे माझे उणे की अधिक हे तो एक गोपालच जाणे!

पण माउली ज्ञानदेवांनी स्थितप्रज्ञाबद्दल काय म्हटले आहे, ते जाणून त्याही स्थितीत माझे थोडेतरी समाधान झाले. अन्यथा आप्तवियोगाच्या वेळी अचल राहणाऱ्या विभूतींकडे पाहून गीता तसेच सांगते अशी समजूत पटलेल्या आम्हाला आणि तसे कधीच वर्तू न शकणाऱ्या सामान्यांना दुसरा आधार कोणता बरे! ज्ञानदेव म्हणतातः

तयाही देहु एकु कीर आथी।
लौकिकीं सुखदुःखी तेयातैं म्हणती।
परि आम्हांतैं ऐसीचि प्रतिती।
परब्रह्मचि हा।।६-४०८।।

श्रीगोपालकृष्णांच्या ***"आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन। सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः।।६-३२।।"*** या श्लोकाच्या निरूपणात माउलींची वरील ओवी आली आहे. श्रीकृष्ण म्हणतात की "सर्वत्र आत्मतत्त्वच पाहणारा योगी सुख व दुःख दोन्हीही आपलेच अविभाज्य अवयव आहेत, असाच वर्ततो."

ज्ञानेश म्हणतात की त्याला पण एक देह असतो आणि देहाबरोबर सुख व दुःख यांचा त्यालाही भोग घडत असतोच. लोकांना तो सुखाने सुखी व दुःखाने दुःखी झालेला दिसतोही. पण त्याची अंतर्यामीची आत्मतत्त्वावरची दृष्टी मात्र ढळत नाही. येशू ख्रिस्ताची क्रूसावर हातपाय ठोकल्यावेळी झालेली अवस्था अन् दुःख तर ज्ञातच आहे. पण "देवा! या अज्ञान्यांना ते काय करताहेत, हे ठाऊकच नाही. त्यांना क्षमा कर!" अशी विनवणी करत आत्मतत्त्वावर लागलेली त्याची अढळ दृष्टी मात्र आपणा सामान्यांस जाणवणारी नाही.

कर्तव्यकठोर अलिप्तता आणि इतरेजनांप्रमाणेच सुखीदुःखी होणे या दोन ध्रुवांवरील टोकांसारख्या अवस्थांचा एवढा बोध आपणासारख्यांना पुरेसा आहे. दोन्हीही अवस्था आपापल्या ठिकाणी श्रेष्ठ आहेत. ज्याला जे नैसर्गिक आहेत, त्याच्या प्रकृतीप्रमाणे आहे, त्याने तसे वागावे. शेवटी ***"प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति।।१८-५९।।"*** हेच खरे! मला दुःख झाले. आणि त्या दुःखाने माझ्यावर तसाच परिणाम केला यात गैर ते काय! सर्वज्ञानी पुरुषोत्तमालाही सीतेचा शोक झाला होता, तिथे आम्ही कोण बरे!

एकाने सहजच मला विचारले की "काहो! तुम्ही तर गीता-ज्ञानेश्वरीचे एवढे कौतुक करता! मोठा ग्रंथही तुम्ही लिहिलात म्हणे त्यावर! आणि तुम्ही तर असेही सांगता की त्या श्रीगोपालाने एकदा सगळी गीता तुम्हाला प्रत्यक्ष ऐकवली होती म्हणून! मग तुम्हाला काहीच कसे उमगलेले नाही! आणि हा शोक का आहे तुमचा!"

काय सांगू त्याला! म्हटले "बाबा रे! या विशाल पृथ्वीतलावर आणि कालाच्या अनंत पटावर तुला कोणी एकतरी अशी व्यक्ती दिसते का ज्याला गीता-ज्ञानेश्वरी सगळी उमगली आहे? एक तो श्रीगोपाल अन् दुसरे ज्ञानेश्वर सोडून! अन् इतर काही त्यांच्यासारखेच महाभाग महामानव वगळून! का मला पामराला उगाच त्यांच्या पंक्तीला बसवत काहीतरी विचारतोस! मी एक पथिक आहे. अजून काही मुक्कामाला पोहोचल्याची वल्गना मी करत नाही आहे."

योगविभूतिप्राकट्य

आणि त्या महामानवासारखा ***"लौकिकीं सुखदुःखी तेयांतैं म्हणती"*** असाच मी पण आता कशावरून झालो नसेन! असो. तर एका योग्याचे हे आत्मवृत्त सुखदुःखांच्या स्पर्शाविना कसे असेल, म्हणून हा अति दुःखाचा प्रसंग सांगावाच लागला.

परदुःख शीतल असते असे म्हणतात. कोणाही सामान्य माणसाला दुसऱ्याचे सुख वा दुःख तंतोतंत समजणे, अनुभवणे शक्यच नाही. ते मात्र शक्य आहे केवळ योग्याला. पतञ्जली म्हणतातः ***"प्रत्ययस्य परचित्तज्ञानम्।।३-१९।।"*** - आपल्या चित्ताच्या

वृत्तिप्रत्ययावर संयम केल्यास अन्य व्यक्तीच्या चित्तवृत्तींचा अनुभव होतो, त्यांचे ज्ञान होते. तसेच ***"बहिरकल्पिता वृत्तिर्महाविदेहा ततः प्रकाशावरणक्षयः।।३-४३।।पा.यो.सू.।।"*** याप्रमाणे महाविदेहावृत्ती प्राप्त झालेला योगी सर्वांतर्यामी होऊन कोणाच्याही सुखदु:खादी अनुभवांशी एकरूपत्वाने राहून त्यांच्या चित्तवृत्तीचा यथातथ्य अनुभव करू शकतो. अशा योग्यांच्या परदु:खादी जसेच्या तसे जाणू शकण्याचा संदर्भ गीतेतही लावता येतो. ***"आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।। सुखं वा यदि वा दुःखं...।।६-३२।।"*** ही भगवंतोक्ती याची प्रमाणच नाही का? योग्याला आपल्यासारखेच सगळे असतात, त्यांची सुखदु:खे ही त्याला स्वत:चीच असल्याचे जाणवते.

मलाही या अवस्था प्राप्त झाल्याचे अनुभव आले. इतर अनेक योगविभूतींचे त्या काळी माझ्याठायी प्राकट्य झाले होते. आपण परकायाप्रवेश करू शकतो, असेही अनुभव मी घेतले. पतञ्जलींच्या म्हणण्यानुसार ***"निर्माणन्यचित्तान्यस्मितामात्रात् ।।४-४।।पा.यो.सू.।।"*** प्रमाणे योगी सिद्धावस्थेत सूक्ष्म वासनांच्या रूपाने असलेल्या उपभोगेच्छांची परिपूर्ती करण्याकरता अनेक देह धारण करतो.

मी यापेक्षा अधिक महत्त्व देतो ते परचित्तावेश करून तेथील फलोन्मुख वासनांचा आपल्या चित्ताने उपभोग घेणे आणि आपल्या वासनाकोषातील उदित संस्कारांना लवकरात लवकर नि:शेष करणे याला. यात दोघांचाही फायदा आहे, ज्याचे चित्त योगी असे उपयोजतो त्याचा आणि योग्याचाही. यानिमित्ताने वासनांचा निचरा करता येतो, असा माझा अनुभव आहे.

स्वेच्छामृत्यू हीही एक महत्त्वाची योगविभूती आहे. एकनाथांनी भागवताच्या पंधराव्या अध्यायात म्हटले आहे:

जिणतां सुषुम्नेचें घर। भेदिलें साही चक्रांचे पदर।
उघडूनि काकीमुखाचें द्वार।ब्रह्मरंध्र ठाकिलें।।१५-१३६।।
...तो ब्रह्मचि होये स्वयंसिद्ध। ।१३९।।
...तें स्वच्छंदमृत्यूचें लक्षण। त्याअधीन कळिकाळ।।१४०।।

यातल्या स्वेच्छामृत्यूबाबतही मी काही विशेष अनुभव घेतले आहेत. चांगदेवांनी ब्रह्मांडात योगधारणा करून प्रत्येक वेळी मृत्यूला परतवून लावले होते, हे योगाच्या जिज्ञासूंना माहीत आहेच. माझ्यावरही जेव्हा एकदा एकाने मारणप्रयोग केला होता, तेव्हा आणि एका प्रसंगी जेव्हा मृत्यू माझ्याजवळ फिरतो आहे, असे वाटू लागले, त्या वेळी माझ्याकडूनही असेच स्वभावत: घडलेले आहे. काही सुहृदांचा कालही, जो सहसा टाळता येणारा समजला जात नाही, तोसुद्धा त्या श्रीहरीने माझ्या इच्छेखातर लांबवला आहे, अगदी मी आता चालेल असे म्हणेस्तोवर!

योगभूमीच्या प्रकाशनानंतर हळूहळू माझ्या आवाजात आणि complexionमध्ये इतरांनाही जाणवण्यासारखा फरक पडला. एक गृहस्थ तर माझा फोनवरचा आवाज ऐकून अशा विशेष आवाजाची ही व्यक्ती कोण आहे, हे जरा पहावे तरी म्हणून तातडीने निघून वीसपंचवीस मैलांवरून मला भेटण्यासाठी एकदा आले होते. त्याला काही अतीतअनागताचेही ज्ञान होते.

त्याच वेळी मला असेही जाणवून आले की आपल्याला अंतर्यामी समोरच्या व्यक्तीच्या अतीतअनागताचे ज्ञान आपोआप स्फुरते आहे. त्या व्यक्तीचा आध्यात्मिक वा अन्य कोणत्या प्रकारचा पिंड आहे, ते सहजच कळते आहे. त्या प्रमाणे एकदोन व्यक्तींच्याबाबत शहानिशा केल्यावर ते खरे निघाले. मग ते पाहणे सोडून दिले.

बराच काळ पूर्वजन्मांची उकल करण्याचे काम सुरू होते. पूर्जन्मसंस्कारांची अभिव्यक्ती पूर्वजन्म कशा प्रकारचा होता, हे दर्शवते. चित्तावरील वासनासंस्कारांवर संयम केल्यास पूर्वजन्म कळतो, कार्यावरून कारणाचा मागोवा घेता येतो तो असा. योगयुक्त चित्ताच्या या गुणधर्माचा उपयोग करून मला काही गोष्टींचा आजपावेतो बोध होऊ शकला आहे:

आमची कुलदेवता कोणती, हे कोणालाही नक्की माहीत नव्हते. तिचा मला शोध योगस्थ चित्ताने घेता आला. त्या कुलदेवतेची प्रतिमा घरात आणण्यासाठी घेताच तिची काही अत्यंत विशेष, जन्मजन्मांतरीच मिळू शकेल अशी एक योगानुभूतीही मी घेतली. त्यानंतर अनेक वर्षांनी आमचे एक लांबचे कुलबंधू कुलवृत्तांतासाठी आयुष्यात प्रथमच भेटायला आले. तेव्हा हा विषय निघाल्यावर त्यांनी सांगितले की एका जुन्या कागदावर मी सांगितलेल्या कुलदेवतेचे निर्देश होते आणि मग त्यांनी तसाच निर्देश आमच्या कुलवृत्तांतात केला. त्याचप्रमाणे कुलस्वामी कोण हा प्रश्नही अनिर्णितच होता. त्याचाही याच योगावस्थेतून समाधानकारकरीत्या उलगडा झाला आणि त्यालाही योग्य तो पुरावा नंतर साक्षात झाला.

आमच्या कुलवृत्तांतात लेखकाने एक मोठी चूक करून आमच्या काही पिढ्या नको तेथे जोडल्या होत्या. त्यांचेही असेच सुयोग्य निराकरण मला करता आले आणि तेही नंतर जुन्या कागदपत्रांवरून बरोबरच निघाले.

चित्पावन ब्राह्मणांचा अपरांतात प्रवेश केव्हा आणि कसा झाला, येथे येण्यापूर्वी त्यांची कुठून कुठे वाटचाल झाली, त्यांचा वेद कोणता इ.अनेक प्रश्न अंदाजधक्के

मांडले जातात. यावरही मला काही विशेष पुरावे उपलब्ध झाले आणि त्याबाबतचा एक विस्तृत शोधनिबंध मी Internetच्या माध्यमातून प्रकाशित केला आहे. शेकडो चित्पावनांनी त्याच्या प्रती माझ्याकडून मागून घेतल्या आहेत. ज्या ज्ञातीत मी जन्माला आलो, तिचे हे काही ऋण माझ्याकडून या जन्मात फेडले गेले, हाही वासनाकोषाच्या क्षयाप्रीत्यर्थ उपयोगी पडलेल्या योगाभ्यासाचा परिणाम होय, असे मी सांगू शकतो.

पूर्वजन्मांचे ज्ञान

एका psychicने मला सांगितले होते की तुम्ही तुमच्या कुळात पूर्वी जे जन्म घेतले होते, त्यांचा तुमच्या शक्तीने शोध घ्या म्हणजे तुम्हाला या जन्मातल्या या आकस्मिकशा वाटणाऱ्या योगसिद्धींचा खरा उलगडा होईल आणि आपले ध्येय तुम्ही नक्कीच गाठू शकाल. योगसिद्धींचा असाही काही उपयोग असेल याची पूर्वी मला काहीच कल्पना नव्हती. पण अनुभवांती तेही लक्षात आले यानिमित्ताने.

माझे दोन पूर्वजन्म आणि माझ्या वडिलांचा एक पूर्वजन्म आणि आमचे त्या वेळचे नाते यांचाही असाच उलगडा झाला. माझ्या या जन्मात प्रत्यक्ष विठ्ठलरुक्मिणींचा अंश माझ्या आईवडलांच्या रूपात प्रकटला आहे, याचाही अंदाज मला आला. तसेच माझे पूर्वजन्माचे सद्गुरू आणि दत्तउपासना यांचाही शोध मला लागला. त्यातून माझी या जन्मी केलेली दत्तउपासना आणि दत्तक्षेत्रांच्या वाऱ्या यांचाही बोध झाला. तसेच एका दत्तभक्तांची आणि माझी गाठभेट पडून माझ्या साधनेत त्यांचे साहाय्यही झाले.

ते असे. मी तेव्हा कोल्हापुरला महालक्ष्मीचे दर्शन घ्यावे म्हणून गेलो होतो. देवीचे दर्शन आणि अभिषेक इ.उपचार केल्यानंतर त्यांची कीर्ती ऐकून त्यांना भेटायला गेलो. ते एक वयोवृद्ध सत्शील गृहस्थ होते. त्यांना एकदा स्वप्नदृष्टांत होऊन त्यात विदर्भातल्या एका अडनिड्या ठिकाणी गुहेतल्या कोनाड्यात असलेल्या श्रीदत्तमूर्तीचे दर्शन झाले होतेआणि ती घेऊन यावी म्हणून ते जेव्हा तिचा शोध घेत गेले, तेव्हा त्यांना स्वप्नात दाखवलेली दत्तमूर्ती म्हटलेल्या ठिकाणी अंधाऱ्या कोनाड्यात सापडली. ती मूर्ती फार प्राचीन होती.

त्यांना भेटल्यावर ते म्हणाले की " तुमच्यावर अंबाबाईची कृपा आहे. तुम्हाला अंबाबाईचा साक्षात्कार होईल. संध्याकाळी तिचे दर्शन घेत समोर बसून राहा आणि पहा काय दिसते ते!" त्याप्रमाणे मी संध्याकाळी देवीच्या देवळात तिच्यापुढे सोळाखांबीत बसलो असता थोड्या वेळाने एकाएकी मला देवीच्या डोळ्यात विलक्षण तेज प्रकटलेले दिसले. मी काही वेळ अवाक होऊन ते बघितले. माझ्याबरोबर एकदोघेजण आलेले होते. त्यांना मात्र तसे काहीही दिसले नव्हते.

आमच्या काही पिढ्यांपूर्वीच्या एका खापरपणजोबांनी एका दत्तभक्त संतांच्या साक्षात्कारी विठ्ठलभक्त शिष्यांकडून दीक्षा घेतली होती. त्याबाबतही काही विशेष गोष्टी मला उमगल्या आणि काहीकाही गुरू शिष्यांची जन्मोजन्मी कशी पाठराखण करतात, त्यासाठी साध्यासुध्या व्यवहारी मानवाचाही जन्म ते कसा घेतात आणि शिष्याची नौका थडीला लावूनच आपण मुक्तीचा कसा उपभोग घेतात, तेही नीट अनुभवांती कळले. ***"गुरुस्तु मौनं व्याख्यानं। शिष्यस्तुच्छिन्नसंशयः।"*** ही उक्ती खरी आहे याचाही मी अनुभव घेतला आहे.

पूर्वसंचितः:::

सद्गुरूंचा शोध

माझी ही जी सगळी वाटचाल होत होती, त्यात एक प्रश्न नेहमीचाच उद्भवत असे. तो म्हणजे सद्गुरूंचा! माझे एक मित्रवर्य आहेत. परमगुरुभक्त! इतरही आहेत. गुरुमार्गी! सगळ्यांनाच वाटते की आपलेच गुरू सर्वश्रेष्ठ आणि सर्वज्ञ! त्या त्या गुरूंनाही वाटते की आपणच श्रेष्ठ! आपल्या कृपेविना कोणालाच आध्यात्मिक वाटचाल करता येणार नाही! माझा काही त्यावर विश्वास बसत नाही.

काहींचे सांगणे तर असे की मानवी रूपातल्या गुरूने स्पर्शिल्याशिवाय पंथराज किंवा शक्तिजागृती होऊ शकतच नाही! ते सगळे म्हणतात की "आम्हाला फार चांगले गुरू भेटले. आता तुमचे कसे होणार! तुम्हाला कोण गुरू मिळणार! उरलेला आणि हा सगळा जन्म वाया जाणार आता तुमचा."

हा मानवी गुरूचा प्रश्न गेली पंचवीसएक वर्षं, जेव्हापासून माझा या आध्यात्मिक प्रांतात कळत-नकळत शिरकाव झाला असे वाटते तेव्हापासून सतत अचंबित करून सोडतो आहे. ज्ञानदेवांनीही गुरूचे अपार माहात्म्य वर्णिले आहे आणि ते तसे खरेही आहेच! त्यांना बरे एक विश्वासाचे निवृत्तिनाथ मिळाले. मला तर हे मित्रवर्यादींचे गुरू एक तर भोंदू, स्वतःची कुवत किती ते न ओळखणारे तरी वाटतात आणि कदाचित भोळेपणाने हा मोठेपणा खुशाल अंगी मिरवणारे तरी वाटतात.

माउलींनी म्हटलेच आहे की ***"मठमुद्रादी मिखें। लाविलें आहेति फांसे। निःसंगा एणें।।"*** अशी ***"नवल अहंकाराचि गोठी"*** त्यांनी सर्वसंगपरित्यागी गुरूंबद्दलही सांगितली आहे. मग या सांसारिक गुरूंचे काय असेल बरे!

समर्थ म्हणतात तसे ते अडक्याच्या तीनातीलच नसतील का!

बरं! सद्गुरू म्हटला की पूर्णता -Perfection - असायलाच हवे नाही का! पण गुरुदेव रानडे तर म्हणतात की अध्यात्मातील Perfection गणितातील Hyperbola च्या Asymptoteप्रमाणे आहे. Hyperbola अनंताकडे जाते. पण Asymptoteला कधीही स्पर्शत नाही. दोन्हीतील अंतर कमीकमी होत जाते, एवढेच घडते. अध्यात्मातील Perfectionचेही तसेच आहे, असे ते म्हणतात. पूर्णता ही कधीच येत नाही. पण मनुष्य पूर्णत्वाच्या अगदी जवळात जवळ जात असतो सतत.

म्हणून मला हा प्रश्न पडतो की कितीही झाले तरी या मंडळींचे गुरू तरी ते म्हणतात किंवा हे शिष्य समजतात तसे Perfect कसे असू शकतील बरे! पण त्या सगळ्यांनी तर आपली श्रद्धा आणि भक्तिभाव त्या अशाच सांसारिक गुरूंठायी वाहिलेला आहे. जरा अतिरेकीपणानेच! आपले म्हणणे त्यांच्या गळी कसे उतरेल बरे! त्यांना हे काहीच पटणार नाही हेच खरे!

या समकालीन मानवी गुरूंचे पायही मातीचेच असतात आणि दिव्याखाली विश्वालाही झाकोळू शकणारा अंधार असतो हे मी अशा अनेकांच्या निरीक्षण-परीक्षणातून समजून घेतले आहे. प्रथमपासून मी स्वतः तरी अशा कोणाही गुरूच्या आहारी न जाण्याचे ठरवून आहे. पण तरीही असेही काही प्रसंग आले की मला त्याबाबत बराच विचार करावा लागला.

अध्यात्मग्रंथांच्या वाचनाने कळत होते की ***"बिन गुरु ग्यान कहाँ से पाऊँ!"*** बरं! ज्ञान तर मला आपोआप मिळत जात होतं! मग आपल्यावर एवढी कृपा करणारा गुरू कोणीतरी असला पाहिजे आणि तो गुप्त राहून हे कार्य करतो आहे असे वाटून मी त्याला शोधू लागलो. माझा *"आत एक बाहेर एक"* असा स्वभाव नसल्याने गोड बोलून घरात शिरलेल्या दोन वयाने ज्येष्ठ आणि आपल्या अध्यात्मज्ञानाचा डांगोरा पिटणाऱ्या व्यक्तींनी हा माझा weak point ओळखून मोहजाल पसरवण्यास सुरुवात केली. इतके की तेच माझे गुरू असावेत असे मी काही दिवस समजू लागलो - पण अंतर्यामी cautious राहूनच!

तसेच एका संत व्यक्तीने मला योगमार्गावरच्या काही विशेष आध्यात्मिक अवस्थात खूपच आस्थापूर्वक साहाय्य दिले होते. तिचाही मी गुरू म्हणून या संदर्भात विचार करू लागलो. पण त्या व्यक्तीने स्पष्ट शब्दात आपण तुमचे गुरू नाही असे सांगितले. पण ती भोंदू जोडी मात्र माझा पाठपुरावा करतच होती.

अज्ञातातून गुरूंची पाठवण

एकदा म्हणजे माझ्यात अनाहताचा उद्भव होण्याआधी काही महिने एका शक्तिपातयोगसंप्रदायाच्या गुरुपीठावरील व्यक्तींचा संदेश व माझ्या नावाचे पत्र घेऊन एक व्यक्ती माझा पत्ता शोधत घरी आली. त्या पत्रात मला त्यांच्याकडे येण्याचे बोलावणे होते.

मी म्हटले, "तुम्ही मला ओळखता का किंवा तुमच्यातला कोणीतरी मला ओळखतो का? मग हे आमंत्रण कसे आले आहे?" ती व्यक्ती म्हणाली की, "आम्हीच काय पण गुरुजीही तुम्हाला ओळखत नाहीत.त्यांना ध्यानावस्थेत तुमचे नाव व पत्ता मिळाला आणि तुम्हाला घेऊन येऊन दीक्षा द्यावी असा आदेश झाला. म्हणून हे पत्र घेऊन मी आलो आहे. तुम्ही माझ्याबरोबर आमच्या गुरुदेवांकडे चला."

पण मी त्यांना आता येत नाही असे सांगितले. नंतर मात्र का कोण जाणे, जाऊ नये असे ठरवले. अजूनही मला त्याचे आश्चर्य वाटते. मी त्यांच्याकडे गेलो असतो तर काय झाले असते, याचे नवलही करतो.

नाथपंथी भोंदू साधू

त्यात भर पडली ती एका नाथपंथी साधूची! हे गृहस्थ बराच शिष्यपरिवार बाळगून होते. मोठी नाथसांप्रदायिक परंपरा सांगत होते. उत्कृष्ट मनोरंजक योगानुभव आणि चमत्कारांच्या कथा लोकांना सांगत असत. वयानेही बरेच ज्येष्ठ होते. त्यांचे गुरू कोणी तरी नाथपंथीय पीर होते. त्यांना ज्ञानदेवांचाही आशीर्वाद आणि गुरुपरंपरा लाभल्याचे ते सांगत. नाथी आखाडाप्रमुखांची पत्रे आणि प्रमाणपत्रे ते बाळगून होते. भैरवाचे उपासक होते.

त्यांचा मोठा बंगला होता. त्यातच एक साधनाकुटीर होते. तेथे नाथसांप्रदायिकांची पात्रदेवता आणि अस्थिपूजनाची सामग्री पण होती. ज्यांनी कोणी त्र्यंबकेश्वर येथल्या गोरक्षमठास भेट दिली असेल आणि जरा चौकस नजरेने तेथील परिसर न्याहाळला असेल, त्यांना मी काय म्हणतो आहे, ते कळेल.

त्यांचा माझा परिचय एका गूढवादी संस्थेच्या कार्यक्रमात त्यांनी एक भाषण केले त्या वेळी झाला. असे कळले की त्यांचे शिक्षण अत्यंत सामान्य दर्जाचे होते. व्यवसायही तसा विशेष नव्हता. त्यांना मिळालेले शिष्य जरी बरेच असले तरी त्यांच्यात कोणी उच्चविद्याविभूषित असे नव्हते. त्यामुळे त्यांना एक आस होती. ती म्हणजे आम्हा सुशिक्षित पुणेकरांच्या नगरीतून कोणीतरी चांगले शिकलेले, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेले, समाजात

चांगला नावलौकिक असलेले आणि सुस्थितीतील शिष्य मिळावेत.

त्या दृष्टीने मी पण त्यांचा एक होतकरू अनुयायी असल्याचे त्यांना वाटले. मग आमची बरीच घसट झाली. त्यांच्या जळगावच्या मुक्कामी माझे अधूनमधून कामानिमित्त जाणेयेणे सुरू झाले. त्यातच त्यांना कोणीतरी जाणकाराने सांगितले की माझी कुंडलिनी जागृत झाली असून पुढली प्रक्रिया सुरू आहे. नाथपंथीय साधनेचे वैशिष्ट्य तर कुंडलिनीसाधना हेच आहे. मग काय! त्यांना माझे फार कौतुक वाटू लागले. प्रेमाने भररस्त्यात मिठी मारून माझे शुभ चिंतून त्यांनी विचारले की "आता पुढील मार्गदर्शनासाठी गुरू हवाच! आमच्याकडे येता का? आम्ही तुम्हाला शैलीशृंगी आताच देतो."

शैलीशृंगीचे हे एक मोठेच प्रलोभन होते. नाथपंथीय साधकास तो सिद्ध झाल्याची खूण म्हणून खरे तर ती गुरुहस्ते देण्याचा प्रघात आहे. सिद्धत्वाची एक खूण म्हणजे त्याला संतत नादानुभूती येत असली पाहिजे. तो गुरू या पदवीस पात्र झाल्याची ती निशाणी आहे. त्यानंतर त्याने आपल्या परंपराप्राप्त सद्गुरूंशिवाय इतर कोणासही नमस्कार करू नये असा दंडक मानला जातो. हे सगळे मला माझ्या नाथपंथाच्या अभ्यासातून माहीत झालेले होते.

त्यांनी इतके स्पष्ट सांगितले तरीही माझे मन मात्र त्यांच्याविषयी बरेच साशंक होते. आमच्या काही मित्रांमध्ये त्यांच्याबाबत ब-यापैकी मत होते. त्यातले काही त्यांचे शिष्यही झाले होते. माझा एक नाशिकचा आतेभाऊही त्यांचा शिष्य झाला होता. त्यांच्या घरी ते मुक्कामही करत असत. तसे बोलणेचालणे गैर नव्हते. अशिक्षित असले तरी वागणे सुसंस्कृत आणि प्रेमळ होते. पैशांचा लोभ नव्हता. म्हणजे इतर अनेक बाबतीत ते ब-याच भोंदू गुरूंपेक्षा चांगले होते. पण का कोण जाणे मला त्यांच्या पात्रतेविषयी काही खात्री वाटत नव्हती.

तशात ते एकदा घरी आले असता माझ्या वडलांशीही त्यांची भेट झाली होती. त्यानंतर काही महिन्यांनी माझ्या वडलांनी काहीही तादृश कारण नसता, मी त्यांच्यापुढे तसा कोणताही विचार प्रकट केलेला नसतांना मला एक खास पत्र पाठवले. त्यात त्यांनी स्पष्ट शब्दात कळवले होते की "हा मनुष्य मला काही ठीक वाटत नाही. तरी त्याच्यापासून सावध रहा. त्याला गुरू वगैरे काही करून घेऊ नकोस."

बरं! ते बोलण्यात कितीही चतुर असले तरी त्यांना अध्यात्मविज्ञान आणि योगशास्त्राचे आकलन नव्हते. माझ्यासारख्या अति जिज्ञासू साधकाचे शंकासमाधान नीट करू शकण्याची त्यांची कुवत नव्हती, म्हणूनही असेल. मी त्यांच्या आडंबरापासून अगदी अलिप्त राहिलो. असो.

नंतर असे ज्ञात झाले की वैश्विक गुरुतत्त्व असते आणि त्यातूनच साधकाला खरे मार्गदर्शन होत असते. हे आकळल्याने मग मानवी गुरूची काही उणीव भासेनाशी झाली आणि त्याचा शोध घेण्याची आवश्यकता उरली नाही. त्यातून ज्ञानेशांचे तर म्हणणे आहेच की ***"धरवणी वेंचे सरे। तैसें भोग प्राचीनें पुरें। नवें तंव नुपकरें। कांहींचि करूं।। आईसिं कर्मसाम्यदशा। होएं तेथ वीरेशा। मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गां।।१८-९६५,९६६।।"*** माझे अनुभवही याच संचिताकडे संकेत करत होते.

मागे म्हटलेल्या जोडगोळीच्याही कच्छपी मी फारसा लागलो नाही. कारण त्यांच्या एकूणएक चर्येचे आंतर्बाह्य निरीक्षण-परीक्षण मी माझ्या विज्ञानसिद्ध स्वभावाने करतच होतो. आणि त्यांचे उथळपण त्यातून प्रकट होत होते. स्वार्थी स्वभाव कितीही झाकून ठेवला तरी दृग्गोचर होत असे. कोठेतरी लबाडी आहे हे कळून येत होते. पण त्या मंडळींनी मात्र माझा पाठपुरावा करणे त्यानंतरही तीनचार वर्षं सोडले नाही.

एकदा मुंबईतल्या एका संतमार्गी गृहस्थांना भेटायला म्हणून गेलो होतो. अध्यात्माचा अभ्यास आणि अंतःस्फूर्ती यांबाबत ते प्रसिद्ध होते. त्यांनी मी आणि माझा मित्र बरोबर जाताच आम्हाला उद्देशून काहीही न विचारताच सांगायला सुरुवात केली की, " प्रपंच नीट करावा. प्रपंची दक्ष राहावे. प्रपंचाला बाधा येईल अशी कोणाचीही गोष्ट ऐकू नये. प्रपंच नीट केला तर परमार्थ आपोआप सुधारेल. कोणाच्याही आहारी जाऊ नये."

"जिवंत मनुष्यास सद्गुरू म्हणून मानू नये. विकल्प त्रासदायक आहे. सत्संगती असावी. संतांना गुरू मानावे व तसेच असावे. ते आशीर्वाद देतात. श्रीज्ञानेश्वरमाउली, गोंदवल्याचे महाराज हे तुमचा प्रपंच नीट ठेवून परमार्थ जरूर सुधरवून देतील. तुमची सर्वथैव काळजी वाहतील. देवावर विश्वास ठेवून सर्व कार्ये करावीत. त्याला आत्मनिवेदन करावे. तो जरूर मार्ग दाखवील व नीट सुखरूप नेईल."

"संतांच्या व सत्पुरुषांच्या समाधीवर अनुग्रह मिळतो. तो घ्यावा. उदा.ज्ञानेश्वरमाउली, गोंदवलेकर महाराज. आपण हार घेवून जावा. तो समाधीला स्पर्शून आपल्या गळ्यात घालतात. तो अनुग्रहच असतो. इतउपर कोणताही सद्गुरू शोधण्याची किंवा मानण्याची जरूर नाही."

तसेच एकदा त्यांच्याकडे गेले असता त्यांनी अभिचार करणाऱ्यांविषयी सांगितले की अशा व्यक्तींपासून सावध असावे. जर ती व्यक्ती आपल्या मागेच लागली असेल, तर सद्गुरूंचे सतत नामस्मरण करावे. अभिचारकृत्याचा निचरा होतो.

बलिदान

त्यानंतर एकदा एका अघोरी दंपतीचा संबंध आला. ते माझे मित्र म्हणून वागत. पण अंतरी त्यांचा इरादा मात्र काही वेगळाच होता. त्यांना माझा कोणत्यातरी दैवताला बळी द्यायचा होता. या युगातही अशा गोष्टी चालू आहेत. हा बळी उघडउघड दिला जात नाही. कायद्याच्या कक्षेत राहून हे केले जाते. संकल्पाने हा दिला जातो. विशिष्ट स्थळी व वेळी बळी ठरवलेल्या व्यक्तीला नेऊन ते आवश्यक तो मानस विधी व संकल्प करतात. त्यानंतर ते दैवत त्या बळी ठरवून दिलेल्या मनुष्याचा कोणत्यातरी मिषाने गूढरीत्या घात घडवून आणते. अशी ही सध्याची कार्यपद्धती आहे.

त्या वेळी मला कशी का होईना, त्यांची ही गोष्ट अंतर्ज्ञानाने कळली आणि आम्ही गेलो होतो, तिथल्या दैवताचीच मी प्रार्थना केली. ते अरिष्ट त्या दैवताच्याच कृपेने निवटले. ***"तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु।"*** चंद्रमौलीश्वराने संकट निवारले.

त्यानंतर एकदा एका गूढवाद्याकडे गेलो असता त्याने हा प्रसंग अचूक निर्देशून म्हटले की, "त्यांना जे वाटले तसे त्या दैवताचे स्वरूप नव्हते. म्हणून त्यांचा प्रयोग सफल होऊ शकणार नव्हता. ते दैवत तुम्हाला अनुकूलच असल्याने तुमचा बळी ते कसे स्वीकारील? आता त्या गृहस्थांवर काहीतरी अरिष्ट येईल!" श्रीशंकराचार्यांच्या चरित्रात असाच एका अघोरघंटाचा प्रसंग आला होता, त्याचीच आठवण करून देणारा हा प्रसंग मीही अनुभवला आहे.

त्या अघोऱ्यांचा हा प्रयत्न वाया गेला. कदाचित जडभरताच्या गोष्टीसारखे होऊन त्याला बळी देऊ पाहणाऱ्यांचाच जसा नाश झाला, तसाही त्यांचा झाला असेल. ***"ब्रह्म जानेति ब्राह्मणम्"*** अशा प्रकारचे ब्राह्मणत्व ज्याला प्राप्त झाले आहे, त्याचा बळी जात नाही. देऊ पाहणाऱ्याचे कमनशीब! त्यानंतर एकदोनदा त्या अघोरी स्त्रीने उघडउघड मला विचारले होते की "बळी का जात नाहीस?" त्यांचा उघड विचारण्याइतपत स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास होता! पण माझे रहस्य तिला कशाला सांगायचे! नंतर त्यांनी माझा नाद सोडला. त्यावरून त्यांच्याही हे सगळे लक्षात आले असावे!

त्या गूढवाद्याने मला असे पण सांगितले की, "तुमच्यावर अंबाबाईची कृपा आहे. जाणकारांना तुमच्यामागे तिचा हात दिसतो. तो तुमच्या पाठीशी सतत असणार आहे. महालक्ष्मीची कृपा आहे. ती तुम्हाला सगळे देईल."

या प्रसंगानंतर त्या दंपतीतील स्त्रीने नवऱ्याला माझ्यासमक्षच सांतिले की, "त्यांना सगळे कळले आहे. आता यापुढे काही करण्याचा फायदा नाही." इतके उघडउघड त्यांनी आपले कृत्य माझ्यापुढे जाहीर केले. कारण परिणामांची भीती बाळगण्याचे त्यांना कारण नव्हते. गूढविद्यांच्या काही उपासकांचे असेच असते. ते आपल्या विद्येच्या अहंकारात मग्न होऊन आपल्याला कोणाचीही भीती नसल्याचे समजत असतात.

यावर त्या गृहस्थांची प्रतिक्रियाही उद्बोधक होती. ते म्हणाले, "देवी देते त्याला खूप देते. आम्हाला काही देत नाही!"

ज्ञानेश्वरपरंपरेतील गुरूंचा लाभ

याच काळात मी एकदा आळंदीला नेहमीप्रमाणेच गेलो होतो. तिथे एक उत्तर हिंदुस्थानी आखाड्याचे नाथपंथी साधू आले होते. ज्ञानेश्वरांच्या समाधीला लागूनच ज्या दोनतीन समाध्या आहेत, त्यातल्या दोन त्यांच्या गुरुपरंपरेतल्या श्रीकेसरीनाथ आणि श्रीलक्ष्मीनाथ या महान नाथपंथीय साधूंच्या आहेत. त्या समाध्यांची दोन शिखरे, ज्ञानेशसमाधी आणि श्रीसिद्धेश्वरमंदीर यांची दोन शिखरे असा ज्ञानेशांच्या देऊळवाड्याचा मुख्य परिसर आहे.

ते साधू दरवर्षी त्या समाध्यांच्या पूजेसाठी श्रीकेसरीनाथांच्या समाधिदिनी येत असत, असे कळले. इतर अनेक जण त्यांचे दर्शन घेत होते. सहजच त्यांची भेट झाली. दर्शन घेतले आणि वयोमान आणि इतर पाहून त्यांना नमस्कार केला आणि इतरांप्रमाणेच काही पूजाद्रव्य दिले. तर त्यांचा प्रश्न *"नाम क्या है आपका?"* मी म्हटलं *"लेले!"* तर ते म्हणाले की *"आये हो, तो कुछ ले जाव!"*

यावर मला अशी बुद्धी झाली की मी त्यांना म्हटले, "तुम्ही जे काही द्याल ते चांगलेच द्याल! माझ्या मातापित्यांना जर ते मान्य होणार असेल अन् तशीच जर ईश्वरेच्छा असली तर मी त्याला नाही म्हणणारा कोण!" त्या नाथपंथी साधूंनी त्यानंतर स्पष्ट केले की त्यांनी मला त्यांच्या पंथात घेतले आहे आणि त्यांचा मी आता शिष्य झालो आहे. त्यांच्या ज्ञानेश्वरमहाराज-सत्यामलनाथ-केसरीनाथ-शिवदीननाथ यांच्या उज्ज्वल ज्ञानेश्वर-परंपरेतला मी आता झालो आहे. ते म्हणाले की माझा मी स्वतंत्र आहे. माझ्यावर त्यांचे कोणतेही बंधन नाही.

कर्मकांडांचा आग्रह नाही. मी त्यांचा फोटो ठेवला नाही, तरी त्यात काहीच वावगे नाही. त्यांचे माझे परस्परांचे काम पूर्ण झाले आहे, ज्या क्षणी आम्ही भेटलो त्याच क्षणी! उरला होता तो फक्त परंपरेचा उपचार! मला नाथपंथाची दीक्षा देण्याचे, शिष्य-प्रशिष्य करण्याचेही पूर्ण स्वातंत्र्य आहे. शैलीशृंगी आणि नाथपंथीयांच्या इतर बिरुदावल्या, रहनी आणि चिह्ने मी धारण करू शकतो, मी नाथसिद्ध आहे, इ.सांगून झाले.

मला घृणा वाटणारे गुरुसेवामृतप्राशन, पाद्यपूजन इ.प्रकार यांना या गुरु-शिष्यसंबंधांत बिलकुल थारा नव्हता. किंबहुना मी शिष्य आणि ते गुरू हा भावच मुळी अपेक्षित नव्हता. ते होते ज्ञानेश्वरांच्या समाधीचे जणू विश्वस्त आणि मी ज्ञानेशांच्याच पायरीजवळ बसलेलो आहे याची ओळख पटवून देण्याचे एक क्षुल्लक काम काय ते करत होते, असा त्यांचा भाव!

एखाद्या राजसेवकाने राजाज्ञेनुसार त्याच्या खजिन्यातून याचकास काही द्रव्यादी आणून द्यावे, तर आपण कोणाचे ऋणी होऊ! राजाचे की राजसेवकाचे! कोणाला नमस्कारू! कोणाची पाद्यपूजा करू! कोणापुढे नतमस्तक होऊ! द्रव्य राजाचे. राजा देणारा! त्यात सेवकाचे काय कर्तृत्व! तो तर त्या सेवेचा मेहनताना राजाकडून घेतोच आहे. याचकाने त्याला जन्मभर स्मरावे, त्याचे फोटो लावत बसावे, त्याची पूजा करत राहावी, त्याचा उदोउदो करावा, असे त्याचे काय कर्तृत्व की उपकार!

ते म्हणाले की, "तुम्हाला जे हवे होते, ते अगोदरच ज्ञानेश्वरमाउलीने दिलेले आहे. गुरू-गुरू करत उगाच संसाराच्या या वैराण रानोमाळी गुरांसारखे का हिंडत बसता आहात! मी तुमचा गुरू नाही, तर तुमचा अन् माउलीचा एक यःकश्चित सेवक! तुम्ही माउलीच्या गर्भागारात केव्हाचेच येऊन पोहोचला आहात, हे नक्की सांगणारा मी तिथला एक नगण्य चौकीदार आहे." एवढीच त्यांची भूमिका!

त्यांनी संकेत केला पूर्वसंचिताकडे! उगाच का मी ज्ञानेश्वरीचे गूढ अनुभव घेत होतो! उगाचच का मी गीता-ज्ञानेश्वरीकडे खेचला गेलो होतो! इच्छा असो वा नसो, ***"ह्रियते ह्यवशोऽपि सः"*** असा माझा प्रवास पूर्वपदाकडून पुढे होत होता, याचीच खूण त्या गुरुमहाराजांनी मला दिली. स्वतःकडे कोणताही मोठेपणा न घेता! यातच सर्व आले.

मी त्यांना लोक समजतात त्या अर्थाने गुरू मानत नाही आणि या पूर्वसंचिताच्या संकेताचा अर्थ नीट उमजून आहे. पण वारा प्यायलेल्या वासराप्रमाणे गुरूवरून उधळलेल्या लौकिक सहप्रवाशांना हा अलौकिक संकेत उमजणे कठीणच! म्हणून त्या गुरूंबाबत एवढीच आमची नाथसांकेतिक *रहनी अन् कथनी* पुरे! अवधूतांनी चोवीस गुरू केले. त्या प्रकारातलेच एक असे हे माझे गुरू म्हणावे लागतील हवे तर. आणि ते तसेच असोत!

जिज्ञासूंना हे गुरुपुराण मी सांगतो आहे, त्यामागे दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे साधकाच्या जीवनात गुरूचे आध्यात्मिकदृष्ट्या असणारे महत्त्व आणि दुसरे म्हणजे गुरू हा किती कळीचा विषय आहे हे सामान्य साधकांना नीट कळावे ही कळकळ! नाहीतरी मी आपणापुढे माझे आत्मवृत्त सांगण्याचे ठरवले आहेच. त्याचा हा एक अति महत्त्वाचा भाग न उलगडता तसाच ठेवणे प्रशस्त ठरत नाही. म्हणूनच हे आख्यान पुढे सांगतो.

बिहारी संन्यासीबाबा

या गुरुप्रसंगानंतर अजूनही एक गुरुमहाराज माझ्या नशिबी होते. एकदा पहाटे गावातल्या नाना-नानीपार्कमध्ये जाऊन बसलो होतो. शेजारी एक युपीतली भय्याटाईप व्यक्ती प्राणायाम करत होती. मी आपला योगप्रकारांचा अभ्यास मोकळ्या हवेत करत होतो. सूर्य उगवला. थोडा वेळ गेला. त्या गृहस्थांनी बोलणे सुरू केले. त्यांच्या त्या तशा जरा अगम्य बिहारी हिंदीत ते बोलू लागले.

उत्तर हिंदुस्थानात माझे बालपण आणि शालेय जीवन घालवलेले असल्याने राजस्थानी, अवधी, पुरभय्या, ब्रज, बिहारी ढंगाच्या हिंदीच्या बोलीभाषांना मी पण थोड्याफार प्रयत्नांनी समजू शकतो. त्यामुळे नीट लक्षपूर्वक ऐकल्यावर मला त्या गृहस्थांचे बोलणे समजू लागले.

"आपका शुभनाम? आप क्या करते हो?आप कहाँ के रहनेवाले हो?" इ.परिचयात्मक बोलणे झाले. असे दिसले की ते पण एक गुरुमार्गी गृहस्थ होते. म्हणाले की, "माझे गुरू विहंगममार्गी संन्यासी आहेत. आमची क्रिया भ्रूमध्यापासून सुरू होते." मला दादू, कबीर इ.च्या विहंगममार्गाचा परिचय असल्याने ते काय म्हणताहेत, ते कळायला वेळ लागला नाही. मी त्यांना म्हटले की "मीही या विषयात अनभिज्ञ नाही." मग ते म्हणू लागले की मी पण त्यांच्या गुरुदेवांचे दर्शन जरूर घ्यावे. बिहारमध्ये ते असतात. त्याने मला खूप लाभ होईल, असे त्यांचे सांगणे.

मी म्हटले की महाराष्ट्रात आळंदी आहे पुण्याजवळ. तिथे सगळ्या गुरूंचे महागुरू - ज्ञानियांचा राजा, गुरु महाराव बसले आहेत. त्यांना सोडून कुठे त्या बिहारातल्या कोणत्यातरी कुग्रामात वसलेल्या त्यांच्या गुरूंना जाऊन भेटायचे! आमच्या महाराष्ट्रातलेच काय पण इतरही अनेक

ठिकाणचे पाचपन्नास नाही तर लाखो लोक त्या माउलीचे आशीर्वाद घेतात अन् कोणत्याही लौकिक गुरूंची वाट न चालता विहंगमच काय पण कदाचित त्यापल्याडच्या आणखीही गूढ अशा कोठल्यातरी मार्गाने जाऊन हवे तिथे पोहोचतात!

पण इतर गुरुबाजांप्रमाणेच ते गृहस्थही थोर निघाले. सहज म्हणून आमच्या इतर काही गुरुपंथी मित्रांशी त्यांची ओळख करून दिली, तर त्यांनाही त्यांचे हेच सांगणे की आमचे गुरूच महान आहेत; तुमचे गुरू काय करणार! तुम्ही आमच्या गुरूंचे वरण करा! तरच तुमचे कोटकल्याण होईल! अन्यथा मनुष्यजन्म वाया जाईल! तर "चला आमच्या गुरूंकडे!"

पण आमचे हे मित्र त्यांच्याही पल्याडचे! ते आपापल्या गुरूंना घट्ट चिकटून बसलेले. ते काही त्यांना बधले नाहीत. सगळीच थोर माणसं! आपलाच झेंडा फडकवणारी! मग आपला चांगलाचुंगला आपसुकच मिललेला मोठा सद्गुरू बरा सोडतील त्या बिहारी बाबूंसाठी!

पण ते भय्या गृहस्थ मोठे चिकाटीचे. त्यानंतरही पाचसात वर्ष त्यांनी माझी पाठ पुरवलीच. आमची पहिली भेट झाल्यानंतर साधारणपणे एका वर्षानी त्यांचे पत्र आले. त्यात सध्याचे त्यांच्या गुरुपदावर पीठासनस्थ असलेले गुरुदेव मुंबईत येत असून त्यांचा पत्ता, मोबाईल नंबर, इ.माहिती पाठवली होती. त्या महनीयांना भेटावे आणि आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे अशी कळकळीची विनंती त्यात होती.

माझाही स्वभाव लोकांचे थोडेफार ऐकण्याचा आहे. मी गेलो त्या गुरुजींना भेटायला. हवा तसा उपहार घेऊन! गुरुदेव ऐश्वर्यशाली राहणीचे होते. भौतिकविज्ञान घेऊन M.Sc.Ph.D.झालेले. गुरूंच्या आदेशावरून चांगली प्राध्यापकाची नोकरी सोडून संन्यस्त जीवन कंठणारे आणि त्यांच्याच पीठावर त्यांच्याच समक्ष बसवलेले! बोलणेचालणे मोहक. विद्वत्तापूर्ण. मी ओशोंना पाहिले नाही. पण ऐकून आहे ते कसे होते ते. कदाचित त्यांचीच एक झलक असे ते बिहारी सद्गृहस्थ - नव्हे संन्यासी असावेत.

माझ्या एका परममित्रालाही बरोबर नेले होते. बिहारी भय्यांच्या सांगण्यावरून त्या गुरुजींना मी आम्हाला नाम देण्याची कृपा करावी असे म्हटले. तर मित्राने backout केले. त्याचा त्या राजस संन्याशाबद्दल फारसा चांगला ग्रह झाला नव्हता. दोन्ही हातांच्या बोटांत तीनतीन चारचार सुवर्णमुद्रिका अन् अंगाखांद्यावर रत्ने अन् आभूषणे वागवणारा तो संन्यासी म्हणजे एक अजब असामी वाटली त्याला. पण विरक्त पुरुष वरून कसाही दिसला तरी अंतर्यामी कसा असतो हे मला ठाऊक होते.

म्हणून मी त्यांच्या ऐश्वर्यपूर्ण राहणीचा विशेष बाऊ केला नाही. कदाचित सोबत एखादी रमा किंवा रामा असती, मदिरा-गांजा इ.असते, तरी त्याचा बाऊ करावा इतका काही मी त्या विषयातील अनभिज्ञ नव्हतो. शाक्त, अघोरी आणि तांत्रिकादी साधनापंथाचा मी अभ्यास केलेला आहे. अवधूतांची लक्षणे मला माहीत आहेत. आणि कोणाच्याही आहारी जायचे नाही, असा माझा दृढनिश्चय तर आहेच सोबतीला. म्हणून अशा अगदी विषधर वाटणाऱ्या त्या संन्याशाजवळ जाण्यास मी घाबरत नव्हतो.

महाराजांनी कृपा केली आणि नाम दिले. सांगितले की पलीकडच्या खोलीत स्वामी कुसुमानंद आहेत, ते तुम्हाला नाम कसे घ्यावे ते सांगतील. त्याप्रमाणे आम्ही पुढील माहिती घेतली व क्रिया जाणून घेतल्या. महाराज म्हणाले त्यांचा मुक्काम असेस्तोवर रोज यावे म्हणून. तसे मग तीनचार दिवस रोज गेलो.

त्यांचा एक फोटो आणि आश्रमाची माहितीपत्रिका पण मिळाली. या महाराजांचे नशीब असे की आमच्या घरी दुसऱ्या एका महाराजांची तसबीर आहे. त्यांच्या जागी हा फोटो बसवावा म्हणून प्रयत्न केला. त्यात फोटोफ्रेमची काचच फुटली. म्हटलं, हे जुने महाराज काही आपली जागा सोडायला तयार नाहीत. मग नव्या महाराजांना ठेवले टांगून एका खिळयाला. पण तिथेही ते कायम टिकले नाहीत. मग शेवटी त्यांना चक्क गुंडाळून ठेवले.

मजा अशी की १९८६त मी LL.M.चे क्लासेस राजाबाई टॉवर्समध्ये attend करत असे तेव्हाच सहज मला अनाहतध्वनी ऐकू येऊ लागला. सुरुवातीला काय ते कळले नाही. कधी हा ध्वनी गर्जणारा मोठा सागराप्रमाणे, कधी मोठ्या घंटानादाप्रमाणे, कधी भेरीप्रमाणे असा सतत दिवसरात्र चोवीस तास ऐकू यायचा. वाटायचे बाहेर कोणीतरी तसे काही आवाज करत आहे की काय! पण शोधू जाता तसे काहीच नसायचे. पूर्वसंचितप्रभावाने हे घडत होते.

त्याच वेळी स्वामी श्रीशिवानंदांचे नादयोग, लययोग, मंत्रयोग आणि तंत्रयोग यांवरील पुस्तक माझ्या हाती पडले. ते वाचता वाचता लययोग कसा असतो, अनाहतध्वनी म्हणजे काय इ.समजून आले आणि थोडा उलगडा झाला. असा तो अनाहतध्वनी तेव्हापासून आजतागायत गेली दोन तपं वेगवेगळ्या स्वरूपात माझी साथ देत आहे.

तर ज्या वेळी या बिहारी संन्यासी महाराजांना मी भेटलो तेव्हा त्यांना प्रश्न केला तो या अनाहतध्वनीबद्दलच!

तर ते म्हणाले की "वो तो बहुत आगेकी बात है। इससे आज आपको क्या लेनदेन! आप तो सिर्फ नाम लो हमने बताया जो।" तेव्हा महाराजांचे उथळपण थोडे नजरेत आले. मला अनाहतात बुडून तेव्हापर्यंत वीसएक वर्षं होऊन गेली होती. कोणी मनुष्य का पृच्छा करतो आहे ते जाणून न घेता - अंतर्ज्ञानाने वगैरे सोडून द्या - असे सांगणारे ते गृहस्थ M.Sc.Ph.D. असूनही खरे विज्ञानवादी नसावेत हे कळलेच! तरीही चिकाटीने उरलेले दोनतीन दिवस त्यांचा सत्संग केला.

शेवटच्या दिवशींचा खीरपुरीचा प्रसाद घेऊन परतलो. त्या दिवशी मी लिहिलेल्या ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** या ग्रंथाचा एक भाग त्यांना दाखवला आणि त्यांच्या पीठाचे आशीर्वाद मागितले. ते त्यांनी दिले आणि त्याचबरोबर थोड्या वेळाने त्यांचे एक पट्टे महाराजांच्या आजेगुरूंनी गीतेवर लिहिलेल्या योगपर व्याख्येचे एक पुस्तक मला महाराजांनी दिलेला प्रसाद म्हणून त्यांच्या वतीने देऊन गेले. हाच मला मिळालेला खरा प्रसाद असे मी समजतो.

गुरूपरंपरांचा लोप का होतो

ते गीतेचे पुस्तक उद्बोधक जरूर होते. पण आजेगुरू आणि प्रशिष्य यांच्या ज्ञानपरंपरेचा धागा तितकासा बळकट वाटला नाही. असेच असते या मंडळींचे. कोणीतरी एक मातब्बर गुरू असतो. त्याच्या नावावर - त्याच्या आशीर्वादानेही कधीकधी - ही काही अपात्र मंडळी त्यांचे शिष्य-प्रशिष्य, उत्तराधिकारी म्हणून मिरवू लागतात आणि तशीच परंपरा पुढे सरकते. सांगतात मात्र आम्ही अमुकांपासून, तमुकांपासून, अगदी शंकराचार्यांपासून म्हणा, ज्ञानदेवांपासून म्हणा अमुकावे अन् तमुकावे दीक्षित म्हणून इ.इ.

आता हे जे बिहारी महाराज होते, त्यांचीही परंपरा थोर होती. आद्य श्रीशंकराचार्यांच्या *आनंद* संप्रदायात ते मोडत होते. परमगुरू इ.चे चरित्र उज्ज्वल होते. पण महात्म्यांचा प्रभाव मर्यादितच दिसत होता. आद्य श्रीशंकरभगवानांच्या तोडीचा कोण पुढे झाला! आणि श्रीकृष्णांनी स्वतःच विवस्वान-मनु-इक्ष्वाकु या थोर परंपरेने प्रसृत केलेला योग ***"स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप।।४-२।।"*** असा कसा झाला, हे सर्वविश्रुतच आहे.

प्रत्यक्ष भगवंताचीच शिष्यपरंपरा पुढेपुढे अपात्र निघाली असा हा दाखला मानावा का? किंवा योग्य शिष्य न मिळाल्यामुळे ती खंडित झाली असेल. काहीही असो. गुरुशिष्यपरंपरा सत्शिष्य आणि सद्गुरूंद्वारे किती काळ चालू शकेल यालाही प्राकृतिक बंधने येतात म्हणावे. योग्य तो उत्तराधिकारी न मिळाला तर अशा थोरथोर परंपराही लुप्त होतात, तिथे आमच्या गुरुबाजांच्या त्याहूनही थोर परंपरांचे काय सांगावे!

योगाकर्षण::::

"मागील जें सद्बुद्धि"

इत्यर्थ असा की माझ्या नशिबी या मानवी गुरूंचा कितीही प्रयत्न केले तरी योगच नव्हता! ज्यांचा तो असेल ते धन्य होवोत! *"मला न असूया मला न हेवा!"* मी एक पथिक - अज्ञाताकडून दिग्दर्शित होणाऱ्या पथावर ***"अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः।।३-३६।।"*** असा खेचला जाणाराच असणार होतो!

मला ठाऊक आहे की आपण अभ्यासू गीताप्रेमी आहात. म्हणाल हा श्लोक इथे कसा घेता? हा तर अर्जुनाने पापमार्गावर खेचल्या जाणाऱ्या पुरुषांबद्दलच्या केलेल्या प्रश्नासंदर्भात येतो. अर्जुनाने तेव्हा विचारले होते की ***"अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः।।३-३६।।"*** - "इच्छा नसूनही बलात्कार केल्याप्रमाणे मनुष्य कोणत्या प्रेरणेने पाप करतो. ज्ञानीसुद्धा कोणत्या प्रेरणेने आपल्या मार्गापासून चळतो?"

बरोबर आहे तुमचे म्हणणे. पण मी फक्त इच्छा नसतांना बलात्काराने खेचून घेत नेण्याच्या संदर्भात या श्लोकाची ही अर्धेली वापरतो आहे - पापाच्या मार्गावर नाही, तर त्यापासून दूर पंथराजावर नेणाऱ्या माझ्याबाबतीत अनुभवल्या जाणाऱ्या बलाकर्षणाबद्दल सांगतो आहे मी हे - ***"ह्यवशोऽपि सः।।६-४४।।"*** च्या संदर्भात! शेवट एकच! पाप असो की पुण्य असो, पूर्वकर्मानुसारी प्रवृत्तीच तुम्हाला त्या त्या मार्गांवरून नेत असते - खेचत असते. म्हणूनच मनाला संयमाने शुभकर्माकडे वळवायला सांगते गीता. सोपे नाहीच ते. पण -

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।२-४०।।

थोडे जरी शुभकर्म करण्याचे योजले तरी मोठ्या पापभयापासून रक्षण होते. कारण की एकदा काही बुद्धी झाली की तिने आरंभलेल्या कर्माचा कधीच नाश होत नाही.

"जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते" यासारखेच आहे हे! एकदा तरी हो म्हणा भगवंताच्या सांगण्याला! पुढचा मार्ग नक्कीच चालाल! त्यासाठीच तर गीतेला ***व्यावसायात्मिका बुद्धी***चे अप्रूप आहे. गीता सांगतेः

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन।।२-४१।।

ईश्वराकडे बुद्धी वळवा! ती एकाग्र करा! तिला ओढ असू द्या एकच एक! त्या दुसऱ्या अव्यवसायात्मिका बुद्धीला ती दूर सारेल - जिला अनेक शाखा आहेत, जी अनेक ठिकाणी खेचली जाते - भोगगामी आहे ती! ***"बहुशाखा ह्यनन्ताश्च"*** असलेली ती ***अव्यवसायात्मिका बुद्धी!***

ज्ञानेश्वर व्यवसायात्मिकाबुद्धीलाच ***सद्बुद्धी*** म्हणतात.

तैसें ऐहिक तरी न नशे। आणि मोक्षु तो उरला असे।
जेथ पूर्वानुक्रम दिसे। चोखालत।।२-२३३।।
कर्माधारे राहाटिजे। परी कर्मफल न निरीक्षिजे।
जैसा मंत्रज्ञु न बधिजे भूतबाधा।।२३४।।
तियापरी जें सुबुद्धि। आपुलाल्या निरवधि।
हा असताचि उपाधि। आकळू न सकें।।२३५।।
जेथ न संचरे पापपुण्य। जें सूक्ष्म अति निष्कंप।
गुणत्रयादि लेप। न लगति जेथ।।२३६।।
अर्जुना तैं पुण्यवशें। जरी अल्पचि हृदयीं प्रकाशे।
तऱ्हीं अशेखही नाशे। संसारभय।।२३७।।

कर्मे सकळ करावीत. पण कर्मबंध बाधू नये. ऐहिक तर मिळावेच. पण मोक्षही आयता मिळावा. कर्म करावे पण कर्मफळ पाहूसुद्धा नये. ही खरी सद्बुद्धी! उपाधीत राहूनही उपाधिविरहित असण्याची हीच एकमात्र युक्ती आहे. पापपुण्यातीत ठेवणारी तीच बुद्धी जर पूर्वपुण्याईने थोडी जरी अंतरी प्रकटली तर ती संसाराचे सर्वच भय नष्ट करते.

जैसी दीपकलिका धाकुटी। परि बहु तेजांतैं प्रकटी।
तैसी *<u>सद्बुद्धि हे थेकुटी। म्हणू नये</u>।।२-२३८।।*
पार्था बहुतीं परी। हें अपेक्षिजे विचारशूरीं।
जैं दुर्लभ चराचरीं। सद्वासना।।२३९।।
आणिकासारिखा बहुं वसु। जैसा न जोडे परिसु।
कां अमृताचा लेसु। दैवगुणें।।२४०।।
तैसी *<u>दुर्लभ जैं सद्बुद्धि। जिएं परमात्माचि अवधि</u>।*
जैसा गंगेसि उदधि। *<u>निरंतर</u>।।२४१।।*
तैसी *<u>ईश्वरावांचूनि कांहीं। जिएं आणिक लाणी नाहीं</u>।*
तैं एकचि बुद्धि पाहीं। अर्जुना जगीं।।२४२।।

दीपज्योती लहान असते. पण प्रकाश मात्र खूप दूरवर पडतो. तशी ही सद्बुद्धी दिसतांना अल्पच वाटली तरी तशी नसते. बऱ्याच विचारमंतांना ती हवीहवीशी वाटते. पण तशी ती अति दुर्लभच आहे. इतर वस्तूंचे बाहुल्य असते. पण परीस म्हणा, एखादाच असतो; अमृत म्हणा, त्याचा एखादा थेंबसुद्धा दैवयोगानेच प्राप्त होतो; तशीच ती असते. गंगेचे जसे सागर हेच गंतव्य असते, तसेच हिचे परमात्मा हेच अंतिम ध्येय असते. ईश्वरावेगळे अस्तित्वच जिला नाही अशी ही सद्बुद्धी - जिला ***व्यावसायात्मिका बुद्धी*** म्हणून गीता गौरवते - ती मोठ्या भाग्यानेच प्राप्त होते.

आणि पूर्वजन्मी केव्हातरी अंतरात या बुद्धीचा उदय झालेला होता म्हणून म्हणा, दैववशात म्हणा, मला त्याच पंथावर ती *ईश्वराला लाणी करून* घेऊन जात होती. शरसंधान अचूक होते. सद्बुद्धीचा - व्यावसायात्मिका बुद्धीचा - शर धनुष्याच्या आत्मप्रत्यंचेवरून सुटला होता मागेच! तो आता नक्कीच परमात्म्यापर्यंत जाऊन त्यात रुतून बसणार होताच - अगदी एकजीव होऊन! आणि माझ्या विविध अनुभवांतून याचे स्पष्ट निर्देश सापडत गेले होते मला. मुण्डक सांगतेः

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्मतल्लक्ष्यमुच्यते।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत।।३६।।

ॐकाररूपी धनुष्यास जीवरूपी बाण जोडून ब्रह्म हे लक्ष्य चिंतून अत्यंत कौशल्याने त्याचा वेध करावा. बाण जसा लक्ष्यात जडून जातो, तसे मनाने ब्रह्माशी तन्मय व्हावे.

सद्बुद्धी - व्यावसायात्मिका बुद्धी - जीव व मन ही सगळी येथे एकार्थीच आहेत. ईश्वरप्रणिधानाचा आत्मा यांमध्येच वसतो. आणि ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।"*** असे सांगून पतञ्जलींनी योगसिद्धीचा एक सोपान दाखवून दिला आहे. याच सोपानोपक्रमावर मला नियती म्हणा, पूर्वसंचित म्हणा, हात धरून चालवत नेत होते - कोठे चालवत नेत होते, ते आता उघडच झाले आहे. स्वरूपाकडे!

अनाहतनाद::::

"सूत्र मरै"

बिहारीमहाराजांच्या संपर्काने आणिकही एका पूर्वसुकृताचा उलगडा झाला. हे महाराज आदिशंकराचार्यांच्या संन्यासपरंपरेतले. त्यांचा संपर्क दर्शवून गेला की जसा माझा पूर्वजन्मी माउली श्रीज्ञानदेव-श्रीज्ञानेश्वरी-श्रीगोपालकृष्ण-श्रीगीता यांच्याशी निकटचा संबंध होता, तसाच आदिशंकराचार्यांच्या संन्यासी वेदांती परंपरेशीही तो असला पाहिजे. उगीचच नव्हते या मंडळींनी माझे गुरुत्व स्वीकारू पाहिले अन् मला त्यांच्या गुरुपरंपरेतली अन्यथा दुर्मीळ अशी गीतेवरची यौगिक टीका दिली!

हे असो. पण बिहारी महाराजानी माझा अनाहतनादसंबंधित प्रश्न तसा अनुत्तरीतच ठेवला. पण बोलताबोलता संत कबीरांची ***"सूत्र मरै! अजपा मरै!***

अनहदही मर जाय।" ही पंक्ती उद्धृत केली. ती मला फार भावली.

नंतर ***मुग्ध कहाणी प्रेमाची*** हे ओशोंचे भाषांतरित पुस्तक वाचनात आले. त्यात ***"मरते मरते जग मुआ"*** हे कबीरांचे पद दिले होते. ते वाचून बराच प्रकाश प्राप्त झाला. कबीर म्हणतातः

मरते मरते जग मुआ। और समुआ न कोय।
दास कबीरा यों मुआ। बहुरि न मरना होय।।
मरते मरते जग मुआ। बहुरि न किया विचार।
एक सयानी आपनी। परबस मुआ संसार।।
मरिए तो मर जाईए। छुटी परै जंजार।
ऐसा मरना को मरै। दिनमें सौं सौं बार।।
जबलगि मरनेसे डरै। तबलगि प्रेमी नाहीं।
बडों दूर हैं प्रेमघर। समुसि लेहु मनमाहिं।।
सून्न मरै! अजपा मरै! अनहदही मर जाय।
रामसनेही ना मरै। कहैं कबीर समुझाय।।
जिस मरनेसे जग डरै। मेरो मन आनंद।
कब मरिहो कब भेटीहो। पूरन परमानंद।।

स्वतःला दास म्हणवणारे कबीर म्हणतातः "सगळेच मरतात, सगळं जगच मरतं. पण त्या रामात कोणीच सामावून जात नाहीत. कोणीही विवेकविचार करत नाहीत. दिवसातून शेकडो वेळा मरण्यात काय अर्थ आहे. मरावं तर एकदाच असं मरावं की या परवश करणाऱ्या संसाराचे जंजाळ कायमचे मागचे सुटून जाईल. जोपर्यंत मरणाचं भय वाटतं तोपर्यंत प्रेमाच्या घरात - त्या रामाच्या घरात प्रवेश कसा होईल कोणाचा! ते तर फारच दूर आहे."

"माझं मन तर अशाच मरणाची वाट पाहत आहे, ज्याच्यात मी रामाघरी जाईन. शून्य, अजपा, अनाहतनाद या स्थानांपलीकडे ते रामाचे घर आहे. तेथे जाणारा कधीच मरत नाही. या मरणाला मी घाबरत नाही, तर मला त्याच्या कल्पनेने उलटा अत्यानंद वाटतो आहे. केव्हा मी मरेन आणि मला तो पूर्ण परमानंद मिळेल बरं!"

शून्याच्याही पुढे अजपाजपाची स्थिती सोडून आणखी पुढे अनाहताचे स्थान आहे. कुंडलिनीची त्याहूनही उच्च स्थिती म्हणजे परमपद, असा या पदाचा अर्थ आहे. अनाहत ही योग्याची शेवटची अनुभूती. सर्वात उच्च अवस्था. उन्मनीचा अंत म्हणजे नादाचा शेवट! त्यापुढे तुर्यातीताचा प्रांत! आणि साधक जेव्हा सगुणात असतो तेव्हा त्याला नादानुभूती राहते आणि जेव्हा जेव्हा तो निर्गुणात जातो, तेव्हा तो आनंदातीत होतो. सच्चिदानंद पदाची अतिव्याप्ती म्हणजे अनाहतनाद! असे अनेक संकेत कबीरांचे हे पद देते.

बिहारी गुरूंना माझी ती अवस्था उमगू शकली नव्हती. पण त्यांचा संतसाहित्याचा बराच अभ्यास असावा. अनाहतनादावरला माझा प्रश्न ऐकून त्यांच्या स्मृतिमंजूषेतून नेमक्या कबीरांच्या उद्बोधक पंक्ती बाहेर पडल्या आणि मज पांथस्थास सहजच दिशादर्शन करून गेल्या. परतपरत, फिरूनफिरून ते अज्ञातच तर मला मार्ग दाखवत नव्हते का!

अनाहताचे स्थान निर्दिष्ट होते ते ज्ञानदेवांच्या सहाव्या अध्यायातील काही ओव्यांतून; त्या अशाः

जैं आकाराचें पैलतीर। जैं नादाची पैलमेर।
तुर्येचें माजघर। परब्रह्म जैं।।१३-१०७३।।
मोक्षासगट गति। जेथ येती विश्रांती।..।।१०७४।।

या ओव्यांतून नादाचा हा प्रांत परब्रह्मास लागून म्हणजे साधनापथाच्या वा योगपथाच्या अंती असल्याचे म्हटले आहे. तुर्यातीत अवस्था, मोक्ष इ.स्थितींच्या अलीकडेपलीकडे ही स्थिती असल्याचे निर्देशन येथे आहे. ***"नाद = तुर्यातीतावस्था = निवृत्तीची पहिली व शेवटची पायरी यातली अवस्था = मोक्षाची अंतिम पायरी, पलीकडेच परब्रह्म अशी स्थिती = विश्वस्थितीच्या अंतीची अवस्था"*** यावरून अनाहतनादाची व्याप्ती कळून येते.

मागे एका शेपाचशे शिष्य केलेल्या नाथपंथी साधूंची गोष्ट आली होती. त्यांच्या एका परमशिष्याने बोलताबोलता सहजच सांगितले की ज्याला अनाहतनाद प्राप्त झालेला असतो, त्यालाच नाथसांप्रदायिक शैलीशृंगी धारण करता येते. शैलीशृंगी - अनाहतनाद म्हणजे गुरुपदच!! शिष्य आणि गुरू आता वेगवेगळे नाहीत. ज्ञानदेव म्हणतात तसे अभिन्नच! मी त्यांच्यापासून अनाहतप्राकट्याची गोष्ट गुप्तच ठेवली.

दुसऱ्याही एका लहानशा परंपरेतील एका ज्येष्ठ अनुभवी शिष्याशी वार्तालाप करतांना त्याने पण सांगितले की त्यांच्या गुरूंना एका शिष्याला गुरुपद स्वीकारायला हवे होते. त्या शिष्याला जेव्हा अनाहत प्रकट झाला, तेव्हा त्यांनी त्याला गुरुपद देऊ केले. पण त्या शिष्याने नको म्हणून सांगितले! श्रीस्वामी नित्यानंद-मुक्तानंदांच्या परंपरा मानणाऱ्यांकडून अनेक यौगिक वार्ता कळल्या. त्या यथावकाश सांगीन.

अनाहताबाबत एक त्या बिहारी बाबांचा अनुभव जमेस होताच. अनभिज्ञ - पुस्तकी पांडित्यवादी साधकांस

अनाहताची बोली काय उमगणार! ऐकून कदाचित नव्हे, नक्कीच अविश्वास प्रकट होणार! पण एकूण मला माझ्या या अकल्पिता साधनेचा स्तर कोणता, ते कळावे अशीच नियतीची इच्छा असावी. अनाहताच्या श्रेष्ठ यौगिक स्तराबाबतच्या काही काही महत्त्वाच्या गोष्टी तर मला तो प्रकट झाल्यानंतर खूपच उशीरा कळल्या! असो. तसाच अज्ञाताचा संकेत असेल!

शिवानंदांच्या नादयोगावरच्या पुस्तकातून जेव्हा अनाहताची माहिती मिळाली, तेव्हा मग मला याबाबतचे दाखले पडताळून पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली. षट्चक्रांचे अनुभव, संतसाहित्य, योगविषयावरील ग्रंथ, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरादी संतांचे अनुभव आणि अभंग, कबीरांची पदे, श्रीमद्भागवत, एकनाथी भागवत, असे अनेक स्रोत त्यासाठी मी धुंडाळले. आणि मृगाच्या बेंबीतील कस्तुरीगंधाचा शोध लागला. एकेकाळी अनाहतनादासंबंधीच्या अज्ञानाने घाबरून जाऊन शेगावच्या श्रीगजाननमहाराजांसमोर हा त्रास काहीही करून थांबवा म्हणून सांकडे घालणारा मी आणि अनाहताचा यौगिक स्तर आणि परमरहस्य जाणल्यानंतरचा मी, ही माझीच दोन रूपे होती.

अनाहताच्या प्राकट्याने मुख्य यौगिक अनुभवांची सुरुवात केलेला मी प्रथमतः त्या अनोख्या अनुभवाने जरी बावरून गेलो होतो आणि योगप्रवासात हा गुरू - तो गुरू करत, पाहत, पडताळत माझा जो शोध चाललेला होता, ते सर्व या नवनवीन ज्ञानामुळे थांबले. कारण वीसबावीस वर्षांपूर्वीच हा अनाहतनाद, अन् तोही अखंड असा मला प्राप्त झाला होता. तेव्हा तर या सगळ्या व्यक्तींपैकी एकही माझ्या भावपरिसरात नव्हती. अगदी माउलीसुद्धा नव्हती म्हणा ना!! स्वयमेव गुरुपदाची प्रशस्ती सद्भाग्यवश लाभूनही माझा जो हा गुरूंचा शोध चालला होता, तो थांबायलाही अनेक वर्षांचा काळ लागला. माझी ही स्थिती जाणणाऱ्या ज्ञानेश्वर - सत्यामलनाथ - गैबीनाथ - गुप्तनाथ -उद्बोधनाथ-केसरीनाथ - शिवदीननाथ - नरहरीनाथ- महीपतीनाथ परंपरेतील श्रीगुरूंनी म्हणूनच तर मला भेटताक्षणीच गुरुपद देऊ केले होते! पण तरीही मी अनभिज्ञपणे ते न उमजून पुढे शोध घेतच गेलो होतो, त्याचे आता माझे मलाच नवल वाटते.

अजपाजप व परावाक

मला अजपाचा अनुभव कसा आला ते सांगतो. एका उंच ठिकाणाहून मी लटकतो आहे आणि आता खाली पडेन अशी भीती मनात आली. त्याबरोबर ***"हरि बोल हरि बोल। मुकुंद माधव गोपाल बोल। गोविंद बोल। राधे रमण हरि गोपाल बोल।।"*** हे स्वर मनात घुमायला लगले. ते इतके जोरजोरात उच्चारले जात होते की शेवटी मला थकवा आला. जरी वैखरी वाणीने हा जप होत नव्हता तरी घसा पण दुखू लागला. डोके मृदंगासारखे दुमदुमायला लागले आणि एक अत्यंत ecstatic feeling आले. परावाणीतून होणारा हा ***अजपाजप*** होता. कुंडलिनीचे अत्युच्च आरोहण झालेले होते आणि तिथून खाली उतरता येत नव्हते. त्यात हा जप सुरू झाला आणि मनाला शांत वाटले. हा मला जाणवलेला अजपाजप होता. पण तो अंतरात सतत कळत-नकळत चालूच असायचा.

श्री.गजाननमहाराज गुप्ते यांच्या सांगण्याप्रमाणे सोऽहंमंत्राने मन अंतर्मुख होते. त्यामुळे सर्व कल्पना सहस्त्रदलाच्या ठिकाणी तन्मय होऊन जातात. सहस्त्रदलाकडे जातांना काही देखावे प्रकाशरूपात आपोआप दिसत असतात. हे काल्पनिक नसून प्रत्यक्षात घडत असतात. त्या वेळी केलेली मानसपूजा ही खरोखरीचीच असते.

हे सर्व देखावे प्रयत्न न करता दिसतात. आणि ते पूर्ण प्रकाशमय असतात. कालांतराने हे देखावे आत्मरूपात लय पावतात आणि साधक परमानंदात मग्न होऊन जातो. थोडा वेळ समाधीचा अनुभव घेतो. ऐहिक व्यवहार करत असताही सहजसमाध्यवस्थेचा अनुभव तो घेत असतो. सोऽहं मंत्राचा जप करणाऱ्या सगळ्यांनाच प्रकाशाचे देखावे दिसतात, असे नाही. जे सोऽहंचा मंत्र अति उत्कट इच्छेने अथवा तीव्र संवेगाने जपतात, ते एकदम ध्वनीत (अनाहतनादात) मग्न होतात. जे नादात मग्न झाले आहेत, ते कोणतेही देखावे पाहात नाहीत, असेही होते.

महाराजांच्या मते शब्दब्रह्म हे नादाकडे घेऊन जाते. ***ॐ*** हा तो शब्द आहे. अजपा तो हाच. अनाहतनादाची प्राप्ती हेच अजपाचे उद्दिष्ट. आपण देवळात जातो. दर्शन घेतांना घंटानाद करतो. तसेच हे अनेकविध अनाहतनाद आहेत. त्यातील दहांचा शास्त्रांनी विशेष उल्लेख केला आहे. शंख, दुंदुभी, वीणारव, मृदंगनाद, मुरलीरव, सारंगीनाद इ.नाद साधकांना ऐकू येतात. हे नाद म्हणजे ब्रह्मनाद असतात. ते नाद ऐकू येऊ लागले की आपल्या मस्तकातील ब्रह्मरंध्रात जाऊन परब्रह्माचे दर्शन घ्यावयाचे, असे महाराज म्हणतात! ज्याला अखंड हे नाद ऐकू येतात, तो अत्यंत भाग्यवानच!

हा जो अजपाजपाचा किंवा सोऽहंचा मार्ग आहे, तो फार उच्च स्तरावरचा आहे. शांभवी विद्या ती हीच. सोऽहंने शांभवी विद्या किंवा विहंगम मार्ग प्राप्त होतो. यांच्या मानाने पिपीलिका, कपि व मीन हे मार्ग सावकाशीने

जाण्याचे आहेत. कोणत्याही मार्गाने गेले तरी प्राप्ती तीच आहे. पण साधकाच्या पिंडवश आणि पूर्वजन्मार्जित संस्कारवश त्याला योग्य तो मार्ग प्राप्त होतो. असो.

नियतीचा संकेत

माझी योगावस्था जर अशी इतकी उच्च आहे तर मग माझे सद्गुरू कोण हा प्रश्न उभा राहतो. कारण अनेकानेक साधकांचे अनुभव आणि ज्ञानेश्वरादी संतांचे सांगणे यांवरून तर परमार्थात सद्गुरूंची आवश्यकता आहेच आहे! अन् मला हा जो दीर्घ परमार्थ विनागुरूंच्या लाभलेला वाटत होता, त्याचे जनकत्व कोणाकडे द्यावे!

नियतीचे संकेत दर्शवत होते की गणेश-गायत्रीउपासना - गीता - ज्ञानेश्वरी - पांडुरंगाची भक्ती - श्रीकृष्णदैवताची प्रीती - श्रीज्ञानेश्वरमाउली - स्वामी श्रीस्वरूपानंदांची कृपा या सर्व प्रतीकांचा संदर्भ लावून पहा कोण तुझे सद्गुरू! यात्त्व संन्यासमार्गाची श्रीशंकराचार्यनिर्देशक बिहारीबाबांची भर पडली.

तसेच नित्यानंद-मुक्तानंद यांच्या परंपरेतील एका सद्गुरूंचाही स्नेह मला प्राप्त झाला. मुळात कोणतेही विशेष यौगिक अनुभव येण्यापूर्वी मी खरे तर नित्यानंद-मुक्तानंदांचेच दर्शन घेतले होते. माझ्या कामानिमित्त तर मी अनेकदा त्यांच्या कार्यकालातच गणेशपुरी येथील त्यांच्या आश्रमाअलीकडून कित्येकदा गेलो होतो. पण भेट घडली नव्हती. कारण मी तेव्हा अगदीच नास्तिक होतो. हीच गोष्ट स्वामी स्वरूपानंदाच्याही बाबत घडली होती. रत्नागिरी-पावसपासून केवळ शेसव्वाशे कि.मी.वर दोनदोन वर्षं राहूनही त्यांचा मला पत्ताही नव्हता.

या सगळ्या संकेतांचा जेव्हा विचार प्रकट होऊ लागला, तेव्हा Putting two plus two together म्हणतात, तसा एक Collage दृष्टीसमोर येऊ लागला. शांकराद्वैत - आद्यश्रीशंकराचार्यांचे ज्ञान-कर्म-भक्ति-योगसाधना /ज्ञानेश्वर - नाथपंथ - ज्ञानेश्वरी -पंथराज - योगधारणा/गणेश-गायत्री-पांडुरंग -श्रीकृष्णउपासना - गीता - भागवत /नित्यानंद-मुक्तानंद-शक्तिपातयोग / या सर्वांचा अनुबंध दिसू लागला. हीच आपली पूर्वपुण्याई, जिच्यायोगे वस्तुतः सहजच आपल्याला हे ***"अनेकजन्मसंसिद्धौ"*** असे योगफल दिसते आहे, योगानुभूती अन् अनाहतनादाच्या रूपाने!

म्हणून मग शेवटी शरण गेलो त्या जगद्गुरू श्रीकृष्णपरमात्म्याला! तोच तर सर्वांचा आदिगुरू आहे! ***"कृष्णं वन्दे जगद्गुरुम्।"*** पातञ्जलयोगसूत्रातही म्हटले आहे -***"स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ।।१-२६।।"*** स्थलकालातीत असा हा गुरू! प्राचीनतम ब्रह्मदेवादी सर्वांचा पूर्व! आणि हाच श्रीकृष्ण! हाच आत्मा! हाच परमात्मा! ब्रह्मही तोच आणि आदिमाया धारण करणाराही तोच! ज्ञानेश्वरही त्याचेच अवतार नाहीत का! आणि अवतार म्हणजे आमच्या लौकिक दृष्टीतून!

खरे तर जुनाट अशा त्या अश्वत्थाचे मूळ अन् खोड, पान अन् फांदी आपण पामरांनी शोधून कुठे सापडतील का! ***"पुरुषः पुराणः"*** असा हा परमात्माच नसतो का सगळ्यांचा गुरू! मग आपण कशासाठी हा व्यर्थ गुरूंचा शोध घेतो आहोत! अंतरी तोच तर वसतो ना! मग *"कुठे शोधीशी रामेश्वर अन् कुठे शोधीशी काशी!" "हृदयातील भगवंताला कुठे धुंडायचे"* असते का आत्मदेश सोडून!

पतञ्जली पुढे सांगतातः ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।। तज्जपस्तदर्थभावनम्।१-२८।।"*** त्या ईश्वराचा - त्या गुरूचा मंत्र प्रणव आहे. तो प्रणवस्वरूपच आहे आणि अशा भावनेने जप करावा. मनुष्यास परमधामापर्यंत नेऊन घालील. *प्रणवाचा एक गुह्यार्थ कुंडलिनी असाही आहे,* हे ज्ञानदेवांचे अभंग लक्षात घेतांना दिसते. कुंडलिनी हीच ईश्वराचे स्वरूप आहे. तिचा जप करावा म्हणजे कुंडलिनीलययोग, ज्याला ज्ञानदेव ***पंथराज*** असे म्हणतात, तो सिद्ध करावा. तोच नादानुसंधानांती परमतत्त्वाकडे नेऊन पोहोचवील, असे हे गुह्य आहे पातञ्जलसूत्रातील!

"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।" या सूत्रावर सर्व योगाची, भक्तीची आणि ही ज्ञानविरहित असत नाहीत, म्हणून ज्ञानाचीही मदार आहे. धन्य ते पतञ्जली!

माझ्यापुढे पतञ्जली होते, गीता होती, ज्ञानेश्वरी होती, योगशास्त्रावरचे अनेक उत्तमोत्तम अन् दुर्मीळ असेही ग्रंथ होते. माउलीने तर ***"अनाहताचा हल्लरु गाऊन समाधिबोधें बुझाविले"*** होते. पण ती आदिमाया -ती जगदंबा कुंडलिनी -तशी मला अज्ञानात ठेवू इच्छित नव्हती. ***"मी तुज हातिं। चिद्रत्न"*** असा सापडलो आहे, गारगोटी म्हणून दूर भिरकावून देऊ नकोस, हा बोध माझ्या मूढ मनापर्यंत पोहोचावा म्हणून तिचा अट्टाहास चालला होता.

लेकराला सज्ञान करावे, शहाणे करावे अन् त्याने तसे व्हावे म्हणून सगळ्याच मातृदेवतांचा अखंड प्रयत्न चालू नसतो का! मग ती जगदंबा - त्या सगळ्यांची आदिप्रेरणाच ती! ती कशी स्वस्थ बसेल! खेळ खेळत ती अंबाभवानी मला सहजच शांतपणे आणखीन शोध घेण्यासाठी उद्युक्त करत होती. काहीकाही clues देत होती. कधीकधी संतजनांकडून स्पष्टच सांगत होती - मी कोण आहे, कुठे

आहे, कोणीकडे जातो आहे - सगळे सगळे स्पष्ट होत गेले. पण त्याचा उगम मात्र पूर्ण अनभिज्ञतेतच होता, हे मात्र खरे!

बिहारी गुरूंचे चेले

मजेदार गोष्ट म्हणजे कालच बिहारी महाराजांच्या शिवतत्त्वानंदनामक एका संन्यासी शिष्याला त्यांच्या निमंत्रणावरून सत्संगासाठी जाऊन भेटून आलो. त्यांच्या गुरूंचे ते पट्टशिष्य! त्यांच्या गुरूंनी दिलेल्या नामाची साधना कशी चालू आहे, असे त्यांनी विचारले. त्यानंतर आजपर्यंत इतकी वर्षं संपर्क का केला नाही, असेही ते विचारत होते. बराच खच्चून उपदेश करणे सुरू होते. मला काही ते रुचले नाही.

या मनुष्याचे ज्ञान किती आहे, ते तपासावे, म्हणून मी त्याला पुनः त्याच्या गुरूंना केला तोच प्रश्न विचारला - अनाहतनादाचा. म्हटले की तुमच्या गुरूंकडे मी याचसाठी आलो होतो. पण माझे काही समाधान झालेले नाही. पण त्यांनाही अनाहताविषयी विशेष काहीच माहिती नव्हती. ते म्हणाले की त्यांच्या पद्धतीत अनाहताला काही स्थान नाही. म्हणून त्यांचा निरोप घेतला. नंतर दुसऱ्या दिवशी त्यांना एक SMS पाठवला:

"Thanks for yesterday's enlightenment. I cannot wish away Anahata - a constant companion of more than twenty two years which came uninvited to carry me on the Path. I came to your Guru in search of ONE who has Antarjnyan and does not see my experience of it as unbelievable.

I regret that I am yet to meet one so discreet. Met a few mystics who had the clairvoyance to see it clearly, even without my asking or hinting at Anahata experience.

I remain unsatisfied in my quest of a Guru who has this firsthand knowledge. Pl.do not think that I am deluded. Fact can be stranger than fiction. Will you pl.convey all this to the revered Guru Maharaj?"

त्यानंतर त्यांचा फोन आला. बरेच बोलणे झाले. त्यांना असलेली अनाहताची माहिती त्यांनी दिली. अनाहताच्यावर चढले की परमभक्ती आहे - राधाकृष्णाची - मीरा घननीळाची. पण हे सर्व त्या भगवंताच्या हाती आहे. मानवी प्रयत्नांची आणि जाणिवेची - ज्ञानाची ही परिसीमा आहे. पुढे काय घडते ते पाहत रहावे. माझ्या असे लक्षात आले की ते सांगताहेत तसेच कबीर-दादू इ.संतांचेही मत आहे.

मग त्यांना स्पष्टच विचारले की "आपणाला अनाहत नादानुभव आहे का? असा कोणी नादानुभवी आपल्या पाहण्यात आला आहे का?" तर ते म्हणाले की "आमचा गुरुपंथ आहे. सद्गुरूवर पूर्ण एकनिष्ठा ठेवणे व त्यांचा सत्संग व नामसाधना चालू ठेवणे यातच आम्हाला पुढे अनामी इ. *"न पुनरावृत्ति"* असे लोक मिळतात. आम्ही चक्रसाधना करत नाही." म्हणजे त्यांचा ***विहंगममार्ग*** असा आहे म्हणायचा! ज्ञानेश्वरांनीही सद्गुरुनिष्ठेस असामान्य महत्त्व दिलेले आहे. अनेकानेक प्रसंगी ठिकठिकाणी त्यांनी त्यावर रचलेल्या ओव्या याची साक्ष देतात. पण त्यांच्याही मार्गात हा अनाहतनाद आहेच!

दादू-दयाल-कबीर इ. संतांच्या मार्गदर्शनाने दाखवलेला आणि पं.गोपीनाथ कविराज यांचा विचार वेगळेच सांगतो या विहंगममार्गाबाबत. त्यानुसार ***"अनहद तुर्रई बाजे"*** असा हा मार्ग आहे. त्या सगळ्यावरून आमच्या मार्गात अनहद नाही, हे म्हणणे अपरिपक्वतेचे लक्षण वाटले.

श्री.शिवतत्त्वानंद असेही म्हणाले की बरेच साधू आपला अनाहताचा अनुभव लपवून ठेवतात. कारण तो समोरच्याला कळणार नाही आणि त्यासंबंधी त्याच्या काही ऐकीवात जरी असले तरी त्याचा पटकन विश्वास बसणार नाही की या समोरच्या ऐऱ्यागैऱ्याला असा उच्च स्तरावरचा अनुभव खरोखरच आला असेल किंवा येत आहे म्हणून!

मीसुद्धा कित्येक वर्षे अगदी अंतरंग मित्रांपुढेही त्याचे प्रकटन केले नव्हते. कधी विषय काढला तर त्यांचे त्याबाबतचे अज्ञान स्पष्टच दिसत असे. ज्ञानेश्वरसुद्धा म्हणतात की सुज्ञ अनुभवीच या अनुभवांचे मोल जाणू शकेल! इतरांना काय त्याचे!

अनाहत आणि आधुनिक वैद्यक

Medical Science ही या अनाहतनादाच्या अनुभवास Tinnitus या नावाच्या विकारात गणते. पण विशिष्ट योगानुभवांती ते तसे नाही, असेच मी पूर्ण विचारांती आणि या शास्त्राच्या अनुभवपूर्ण अभ्यासांती म्हणत आहे.

डॉ.रेळेप्रभृतींनी प्रसृत केलेल्या कुंडलिनी म्हणजे Vagus Nerve व चक्रे म्हणजे Ganglionic Complexes या स्तरावरच्या विचारवंतांना हे पटणार नाही. पण योगशास्त्राचा अनुभव असणाऱ्यांना ते पटेल. येथेही प्रश्न येतो तो प्रत्यक्षदर्शी आणि योगज प्रमाणांच्या फरकातला. योगानुभूती मानत नसल्याने सायन्स योग्यांचे अतींद्रिय अनुभव म्हणजे Hallucinations, physical

anomaly, organic dysfunction, madness, Schizophrenia इ.वर्गात त्यांना टाकते. हा एकूणच सायन्स आणि अध्यात्म यांच्या विचारसरणीत अत्यंत मूलभूत असा फरक आहे, जो आपण मागेच पाहिला होता.

☪ अनमोल रत्न

आता मात्र मी हे प्रकटन करत आहे. खरे तर काही chosen fewसाठीच. कारण माझ्या हृद्रोगाने वाजवलेली शेवटची घंटा मी नुकतीच ऐकली आहे. जाताजाता का होईना, कोणालातरी उपयोगी पडेल म्हणून आणि वैज्ञानिक वृत्ती स्वस्थ बसू देत नाही म्हणून, या आध्यात्मिक अनुभवांचे आमच्या विचारसरणीनुसार एक catalogued record असावे हाही उद्देश त्यामागे आहे.

आमचे एक महान गुरुवादी मित्र आहेत. त्यांनासुद्धा याच भावनेतून हे अनुभव सूचित केले, तर त्यांना आपला हा मित्र -इतरांसारखाच सामान्य - या उच्च आध्यात्मिक अवस्थांतून जात असेल, हे असंभाव्य वाटले. आपण इतके महान गुरू केलेत. पण अजूनही असे कोणतेच अनुभव आपल्याला येत नाहीत, तर या निगुऱ्या मनुष्याला कसले अनुभव येत असणार! काहीतरी सांगतो आहे, झालं, अशी त्याची भावना असल्यास न कळे.

गुरूंची नशा काही औरच! दीडदमडीच्या यांच्या गुरूंनी यांचे आयुष्य बायकामुलांसकट व्यापून टाकले आहे आणि त्यांच्या देव्हाऱ्यात भगवंताच्याच मांडीला मांडी लावून यांच्या गुरूंचे फोटो झळकतात आहेत! अशा आयुष्यात परमात्म्याला जागा ती कोठून असणार! आणि open enquiry and openmindedness या गोष्टींच्या अभावी तो अनंतवेषधारी त्यांना दिसणार तरी कसा!

नाथसंप्रदायाच्या मुख्य आखाड्याची प्रमाणपत्रे बाळगणाऱ्या ज्या नाथसांप्रदायिक सज्जन गृहस्थांचा मागे उल्लेख केला आहे, तेसुद्धा अनाहतनादाबाबत अनभिज्ञ असावेतसे दिसले. त्याचे मुख्य कारण असे की त्यांनी सांप्रदायिक संकेतास डावलून अशा काही शिष्यांना शैलीशृंगी दिली होती की ज्यांना अनाहताचा अनुभव नाही. कदाचित स्वतःसही ती पात्रता नसतांना गुरू म्हणून मिरवण्याच्या हौसेपोटी ते हा सांप्रदायिक प्रपंच करत असावेत किंवा त्यांच्या गुरूंनी या अपात्र शिष्यास केवळ आपले नाव चालावे म्हणून आपल्या जागी बसवले असेल; कदाचित ते गृहस्थ भोंदूही असतील!

काय सांगावे, या अध्यात्माच्या सूक्ष्मातल्या प्रांतात कोण कोणाला कसे फसवत असेल ते! कारण अशा भोंदू गुरूंचे प्रमाण सध्यातरी अत्यधिक आहे. किंबहुना श्रीस्वामी समर्थ रामदासांच्याही काळी ते तसेच असावे. म्हणूनच त्यांनी असे गुरू अडक्याचे तीन मिळतात, म्हणून साधकांना सावधगिरीने राहण्याविषयी बजावले आहे. असो.

अनाहताने कायम सोबत दिली - देत आहे. माझा त्याबाबतचा research चालूच आहे. अज्ञान्याच्या हाती हिऱ्याचे काय मोल! एक गोष्ट आहे: एका गुरूंनी शिष्याला एक दगड दिला. थोडाफार चमकत होता. पण बाकी निस्तेज! शिष्याला हसू आवरेना. एवढा मोठा गुरू! देऊन देऊन काय दिले, तर एक मोठी गारगोटी! नंतर फेकून देऊ या असे ठरवत होता. तोच अंतर्ज्ञानी गुरू म्हणाले की “फेकण्याआधी त्याची किंमत विचारून ये!”

गेला शहरभर शोधत. कोणी म्हटले, “दगड आहे. दे फेकून. कसली किंमत विचारतो आहेस!” कोणी नकली खडेवाले म्हणाले, घे हे दहा रुपये, दे मला.” पुढे जाता जाता एक जवाहिऱ्या म्हणाला, “देतो हजार रुपये.” अजून मोठ्या जवाहिऱ्याकडे गेला. तो म्हणाला,“घे एक लाख अन् देऊन टाक मला!”

शेवटी एक अत्यंत प्रामाणिक जवाहिऱ्या म्हणाला, “बाबा रे! हा एक अनमोल हिरा आहे. पैलू न पाडलेला! म्हणून प्रकाश फेकत नाही आहे! खात्रीच्या माणसाकडून पैलू पाडून घे आणि एखादा सम्राटच याचे योग्य ते मूल्य तुला देऊ शकेल. आमच्या कोणाकडेही एवढी संपत्ती कुठून बरे असणार!”

रत्न अनमोल ठरले! गारगोटी म्हणून समजलेले! भगवंताच्या साक्षात्कारस्वरूप चिद्रत्न असा हा अनाहतनाद! कोणी गारगोटी समजोत कोणी हिरा! पण सम्राटसुद्धा याचे मूल्य करू शकेल का! हे कळावे म्हणून माउलीने मला बुद्धी दिली ते पारखून घेण्याची! जवाहिरेही बरेच भेटले. सम्राटही भेटले. पण या अनाहतनादरत्नाची खरी पारख करणारे अस्सल जवाहिरे म्हणजे संतच!

ज्ञानदेव आणि अनाहतनाद

ज्ञानदेव त्यांच्या ***टिपरी*** या अभंगात म्हणतातः

भवाब्धिसागरीं मांडिली टिपरी।
परि <u>अनुहात वाजे गजरुवो</u>।।
ताळकछंदें उमटती पदे।
वरी टिपरें टिपरी वाजे वो।।
टिपरिया घाई गोपाळ भाई।
घुळुं घुळुं पाईं नादु वाजे वो।।
<u>सांडूनि ओऽहं धरिलें सोऽहं</u>।
तयासि टिपरे साधली वो।।

औटहात भूमिका नीट तालछंदें।
टिपरी धरी वो।।
विरुळा जाणे एथिंचे खुणें।
टिपरें वाजे शिरीं वो।।
एकटसंगें टिपरें वेगें।
ध्वनी गगनीं वाजे वो।।
बाप रखुमादेवीवरु टिपरी गाजती।
घाई जाली टिपरियाजोगी वो।।
।।अ.क्र.१०२०।।

"भवाब्धिसागरात पोहत असतांना टिपरीचा खेळ मांडला आहे. एकावर एक आघात करून वाजवायची ही टिपरी कसली आहे? प्राणापानाच्या या टिपऱ्या आहेत वाटतं! मनपवनाची ही टिपरी एकावर एक वाजते आहे. अन् त्यातून हा अनाहताचा गजर निघतो आहे वाटतं. या गोपाळांना हा टिपरीचा खेळ किती आवडतो आहे!"

"पावलापावलाला या खेळातून घुळुं घुळुं असा अनाकलनीय नाद प्रकटतो आहे. मनपवनाच्या या खेळात ***अहं*** सोडून ***सोऽहं*** ला पकडणाऱ्या गोपाळांना, कृष्णसख्यांनाच हा खेळ साधतो. औटहाताच्या या देहातच नीट लक्ष्यपूर्वक ताल अन् छंदावर ही टिपरी कशी खेळावी याचे रहस्य - कुंडलिनीचा हा लययोग, हा महायोग - कोणी विरळाच जाणतो! तो ही शिरी वाजणारी टिपरी कोणाची हे नीट जाणून असतो."

"मनपवनाची ही एकच एक टिपरी वेगाने गगनी ***(मूर्ध्याकाशात)*** ध्वनी कशी निनादवते, ***ब्रह्मरंध्री अनाहतनाद ताल धरून कसा प्रकटतो,*** हे तो विरळाच ओळखतो. बापरखुमादेवीवराच्या कृपेने ही अनाहतनादाची टिपरी जोराने दुमदुमते आहे आणि त्याने हा कृष्ण आणि गोपाळ यांतला हा टिपरीचा खेळ रंगात आला आहे."

हा अर्थ मी स्वानुभवावर देत आहे. श्री.प्र.न.जोशींनी दिलेला अर्थ जिज्ञासूंनी हवा तर त्यांच्या गाथ्यात पहावा. ज्ञानदेवांच्या सर्वच अभंगांचे स्वानुभविक अर्थ माझ्याद्वारे प्रकट होऊ लागले आहेत. पण ते काम म्हणावे त्या वेगाने पुढे सरकत नाही आहे. श्रीज्ञानेश्वरीच्या लेखनापेक्षाही हे लेखन फारच मंद गतीचे आहे. मला असे वाटते की कदाचित या अभंगांच्या योग्य त्या अर्थासाठी मला अनंताच्या - त्या महाशून्याच्या डोहात फारच खोल बुडी द्यावी लागत असावी; ज्ञानेश्वरीच्या लेखनावेळी दिली होती त्याहूनही!

पण एक गोष्ट अशी की त्यांच्या साधारणपणे तीनएकशे तरी योग व भक्तिपर अभंगांचे, निरूपण व प्रकाशन ज्ञानेश्वरीनिमित्ताने मी माझ्या या योगदा ज्ञानेश्वरीत करू शकलो आहे अन् तेही एका विशेष अवस्थेतून! या मनपवनाच्या, कुंडलिनीच्या अन् अव्यक्ताच्या योगभूमीत हेही नसे थोडके, हे जाणकारांना नक्कीच उमगेल! ही सर्व त्या माउलीचीच कृपा! असो.

महाशून्याच्या डोहात उडी दिली आहे, असे मी म्हटले आहे खरे. पण तो किती अथांग आहे, ते कोणाला कधी कळले आहे का! एक काळ असा होता की मी या डोहाच्या काठी जाऊनही त्याच्यात उडी मारायला बिचकत होतो. तेव्हा गोपाळकाल्यानिमित्त एका नाथसांप्रदायिक गूढवाद्यांची भेट झाली. सहज बोलता बोलता ते म्हणाले की, "किती काळ असा ओठंगून बसणार आहेस काठावर या ठिकाणी! भयरहित होऊन मार ना उडी त्या महाशून्याच्या समोरल्या डोहात!" ही अवस्था होती १९९०ची.

माझा संसार

फारफार पूर्वीची गोष्ट आहे. १९८६-८७ची वर्षे फार धामधुमीची गेली. सतत नादानुसंधान, सतत तंद्रा, सतत समाधी, सतत अमनस्कावस्था, सतत अज्ञाताच्या अनुभूतींत हरवून जाणे, चित्त व्यवहारात नसणे, असा तो काळ १९८८पर्यंत सातत्याने होता. १९८८त मात्र का कोणास ठाऊक, एका क्षणी थोडी जागृती आली. दिसू लागले की आपण संसारी असूनही आपली कुटुंबाप्रतिची तसेच व्यवसायातील कर्तव्ये पुरेशा दक्षतेने आणि लक्षपूर्वक पार पाडू शकलो नाही आहोत.

काय करावे, अवस्था तर अशी होती की पैसा-व्यवहार सर्व दूर सरले होते. सर्व गोष्टी अति यांत्रिकपणे केल्या जात होत्या. घरच्या लोकांनी, मुख्यतः पत्नीने कसे काय माझे हे moods सांभाळले असतील कोण जाणे! मुले तर लहानच होती. त्यात मोठ्या मुलीचे दहावीचे वर्ष आणि कॉलेज ॲडमिशन! उत्तम मार्क मिळवूनही तिचे वडील फार काही करत नव्हते. तीच गोष्ट तिच्या बारावीच्या वेळचीही, एवढेच काय तर तिच्या Medical Collegeच्या अन् MDच्या वेळीही माझी अवस्था थोड्याफार फरकाने अशीच होती. त्यातच मध्यंतरी इतरही दोघा मुलांची दहावीबारावी आणि कॉलेजची वेळ आलेली होती.

जवळजवळ १९९३पर्यंत सातएक वर्षं अशीच निघून गेली. पण भगवंताने वेळ राखली म्हणायला हवे. माझ्या कृतिशील सहभागाशिवाय, अन् वाटल्यास लौकिकात विचित्र वाटतील अशा moodsना सांभाळून माझे कुंटुंब

थोडेतरी रांगेला लागल्यासारखे झाले होते. मुलांचे नीट पार पडले. मोठी तर brilliant scholarच निघाली. MD ला Distinction आणि First Rank मिळवून आम्हाला खूप आनंद दिला. धाकटी पण बी. कॉम.ची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन CA करू लागली आणि धाकटा मुलगाही First Class मिळवून Engineeringला गेला.

मे १९८८त परिस्थितीने क्षण एक ताळ्यावर आणले. मनात जगदंबेची प्रार्थना केली. तीच तर हे सगळे खेळ रचत नव्हती का! त्या परमेश्वरी कुंडलिनीस्वरूप जगदंबेला म्हटले की, "आई! माझा संसार वाऱ्यावर पडतो आहे! सहकारी नाखूष आहेत. माझे सांसारिक कर्तव्यकर्म नीट पार पाडून दे! तू दिवसाचा वेळ हे आपले खेळ दाखवू नकोस! रात्री काय हवं ते कर!" तर अशी मनाने संकल्पपूर्वक तिची याचना केली. ही तिची मी केलेली माझ्या स्मरणातली पहिली आणि शेवटची याचना! अन्यथा मला हे दे, ते दे! असे तिला कधी मागितल्याचे मला स्मरत नाही.

मला भेटलेल्या संतांनीसुद्धा मला वेळोवेळी सांगितले होते की, "अरे! संसार सोडून देऊ नकोस. तुझं कर्तव्य नीट कर. तुला आईवडील आहेत, बायको, मुलंबाळं आहेत. अजून तुझी खूप जबाबदारी आहे. तिकडे लक्ष दे. आम्ही तुझ्याऐवजी देवाचं करू! ते तुला आपोआप मिळेल." पण कितीही केले तरी तसे काही माझ्या हातून घडत नव्हते ते नव्हतेच!

त्यानंतर कोणी कोणी जाणकार मला म्हणाले की,"काय हो हे असे मागितले! चांगली देवी प्रसन्न होती. तर अर्धावेळच प्रसन्न रहात जा, असे म्हणावे का तिला! तुमची मतीच भ्रष्ट झाली असावी तेव्हा!" बरोबर आहे त्यांचे म्हणणे! मला पण नंतर कधीकधी वाटले की ते बरोबर केले होते का मी!

पण जगदंबेवर माझी पूर्ण श्रद्धा असल्याने मी काहीही म्हणो, ती योग्य तेच करणार अशी माझी खात्री होती. नव्हे तसेच मी तिला वेळोवेळी आत्मनिवेदनात्मक सांगत असे. Law च्या भाषेत बोलायचे तर "I desire this thing, provided you deem it to be the right one!" असे असणारे ते मागणे म्हणजे न मागणेच असायचे. यातच सर्व काही आले. मी जे काही जगदंबेकडे या वेळी मागितले होते, तेही याच विचाराला धरून!

जगदंबेने ठरवलेच असावे. नंतर माझे सर्व व्यवहार साधारणपणे सुरळीत पार पडत गेले. १९९१पासून ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** चे लेखन सुरू झाले होते. ती सर्व माउलीची कृपाच! गीता-ज्ञानेश्वरीवर लिहिणारा मी कोण! ते सर्व तीन सहस्त्र पृष्ठांहूनही मोठे लिखाण उत्स्फूर्त आहे, ही माझी श्रद्धा अन् ठाम अनुभूती आहे.

हे सर्व प्रपंच व्यवसाय चालूच होते. पण अंती एक असा प्रसंग आला की मला व्यवसाय सोडावा की काय असे वाटू लागले. तोपर्यंत मुलाबाळांचे शिक्षण आटोपले होते. मला असे अनुभव येत होते की माझी विशेष प्रगत झालेली प्राणशक्ती माझ्याकडून कामात वापरली जात आहे. ती तशी किती वापरावी, यावर काही नियंत्रण असू शकत नव्हते. तेव्हा विचार येऊ लागला आणि त्याला परिस्थितीही तशीच निर्माण होऊ लागली की आता चालू व्यवसाय बंद करावा. त्यातून सुरुवातीला थोडे नुकसान होणार होते. पण ते सहन करायचे असे ठरवून व्यवसायातून निवृत्तीचा निर्णय घेतला.

निर्णयाची कार्यवाही सुरू केल्यानंतर ही सगळी कल्पना देऊन एका नाथसांप्रदायिक बाबाजींना एकांतात हा प्रश्न विचारला की, "असे करणे योग्य आहे का?" त्यावर त्यांना काहीच सांगता आले नाही. नंतर त्यांच्या एका शिष्याद्वारे कळले की बाबाजी म्हणत होते की "तुम्हा मंडळींचे पाहून ते अमुकतमुकही मला तसे विचारतात!"

यावरून लक्षात आले की बाबाजींना कोणी खाजगी गोष्ट सांगितली तरी ते आपला बडेजाव वाढवण्यासाठी ती लोकांना सांगण्यात अनमान करत नाहीत. तसेच सविस्तर सांगूनसुद्धा त्यांना माझ्या प्रश्नाचा रोखही नीट कळलेला नव्हता. त्यानंतर काही काळ गेल्यावर माझ्या व्यवसायनिवृत्तीच्या निर्णयाचे समर्थन श्रीमद्भागवतातून मिळाले. ते असे, भगवंत उद्धवाला म्हणतात:

य एतान्मत्पथो हित्वा। भक्तिज्ञानक्रियात्मकान्।।
क्षुद्रान्कामांश्चलैः प्राणैर्जुषन्तः संसरन्ति ते।।२१-१।।भा.।।

"हे उद्धवा! मला प्राप्त करून घेण्याचे जे भक्तिमय, ज्ञानमय व कर्ममय असे पंथ आहेत, त्यांना दुर्लक्षून क्षुद्र भोगांमध्ये आपली जीवनशक्ती *(प्राणशक्ती)* वापरणारे जन्ममृत्युरूपी चक्रात अडकतात." श्रेयसाची शक्ती प्रेयसासाठी संसारासाठी वापरल्यास तिचा नाश होतो.

उच्च आध्यात्मिक अवस्था::::

मीच सद्गुरू

माझे सद्गुरू कोण या प्रश्नाचा नंतर उलगडा ***"कृष्णं वन्दे जगद्गुरुम्"***या उक्तीने झाला खरा. पण त्याहीअगोदर काही प्रसंगी काही गूढवादी सज्जनांनी मला तसेच सांगितले होते. पण पुरेशी खात्री न पटल्याने मी तो शोध

त्यांनी तसे सांगूनही करतच गेलो. ज्यांना या विषयाची काही जाण होती अशा एका हितेच्छूंनी एकदा मला १९८७तच स्पष्ट सांगितले होते की, "तुम्ही कोणा गुरूबिरूंच्या मागे जाऊ नका. तुम्ही रेल्वेचे एंजिन आहात - मालगाडीचा डबा नाहीत. तुम्ही लोकांना आपल्यापाठी न्यायचे असा संकेत असता मालगाडीचा ओढला जाणारा passive डबा का होऊ पाहत आहात?"

त्यांनी माझ्या प्रबोधनार्थ एकदोन कविता पण पुढे केल्या. त्यातली एक अशीः

==============================

1. A Lone Traveler

It was stormy pitch dark Night.
A Traveler was cutting his way inside.
Black clouds were gathering fast.
The Traveler lost his Way in the Dark.
It was jet-black dark around.
There was Nobody anywhere to be found.
The Traveler was now full of Fright.
Standing still and holding him tight,
"I am Lost! I am Lost! At last he cried.
Prayed GOD with tears in his Eyes.
Fell down and flat he lay.
Wept and surrendered to The LORD for pray.
A VOICE suddenly came along:
"WHO are YOU and WHO is LOST!
YOU are The SOUL; HOLD FAST.
HE will save you from the Dangers Vast!"
The VOICE infused Courage in his heart.
The BLUE BRIGHT LIGHT spread very fast.
And MIGHTY PEACE engulfed the spot.
The TRAVELLER VANISHED IN THE LIGHT OF HIS HEART!

==============================

2.PEACE

From Age to Age we cry for peace.
No peace, no rest Day and Night.
The Saint says, "STOP !
BE STILL! ALL RIGHT!
The more you struggle,
the more you longue.
Away you go from the Centre
Strong.
Weaker and weaker you get along.
You have reached GOAL all along!!
YOU are the CENTRE of
What you longued!!
The LIGHT of The SELF
is Shining BRIGHT!
YOU are the CENTRE of
the EMITTING LIGHT.

==============================

ते स्पष्टच जे सांगत होते, तो बोध त्यांनी एवढे प्रबोधन करूनही माझ्या अजाण मनाला होऊ शकला नाही. जे काही त्यांना सांगायचे होते, ते त्यांनी सांगितले.

नंतर खूप काळाने श्री.गजाननमहाराज गुप्तेंचा चरित्रग्रंथ वाचनात आला. त्यात म्हटले होते की पूर्वजन्मीची भूमिका तयार असल्यास त्या तयारीच्या मानाने कमीजास्त अवधीने गुरुकृपेचे अनुभव आले पाहिजेत. आपला आपण साक्षात्कार झाल्यास नंतर गुरूची जरूरी उरत नाही. फक्त ***"अहं ब्रह्मास्मि"*** चा मार्ग दाखवून देण्याची गुरूची कामगिरी असते. साधकाने मार्ग सोडून दिला किंवा अभ्यास केला नाही, तर त्याला साक्षात्कार होणार नाही. मला तर कधीचाच अनाहतनाद प्राप्त झाला होता. त्यामुळे खरे तर कोणाही गुरूंची आवश्यकता नव्हती आणि सगळी अतींद्रिय शक्ती असणारी माणसे माझ्या कानीकपाळी ओरडून हेच तर सांगत होती.

त्यांच्या अतींद्रिय शक्तींना जाणवलेली माझी पूर्णावस्था आणि गुरूपण ही दोन्ही त्यांनी एवढे स्पष्ट करूनही काही वेळ ते मनात ठेवून मी स्वतःस अपूर्ण समजणारा पुनः एका कोणातरी पूर्ण व्यक्तीच्या म्हणजे गुरूच्या शोधात गुंतलो.

Dark Night of the Soul

तो काळच असा होता की ज्याला ***Dark Night of the Soul*** असे म्हणून Christanity ओळखते. गौतमबुद्धाचाही मायाने बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला होता. सगळ्या योगपथिकांना हा कालखंड असाच येतो. मलाही त्याचे बरेच प्रत्यंतर येत होते. त्यात भर पडली ती एका तांत्रिक अघोरमार्गी दंपतीची. त्यांच्या प्रभावाने मला बरेच काही भोगावे लागले होते. त्या आठवणीही नकोत असेच वाटते. पण आपल्या आत्मवृत्तासाठी अगदी आवश्यक तेवढा भाग मी वैज्ञानिक निरीक्षणाच्या भूमिकेतून मांडणार आहे.

वरून सोज्ज्वळ सज्जन कुटुंबवत्सल असणारे पण अंतरी नाना कळा वसणारी अशी ही दंपती. त्यांनी मला दिलेला त्रास आणि मधेमधे केलेली लुडबुड यांची एक मोठीच गाथा होईल. पण सदासर्वकाळ श्रीहरीने त्यांच्या उपद्रवापासून माझे रक्षण केले. त्यांच्या अभद्र कृत्यांचे वर्णन काही करत बसू नये, म्हणून टाळतो. पण या मंडळींच्या काळ्या विद्यांच्या कौशल्याचे झटके मला बसले होते.

त्यातून सुटकेचा मार्गही एका संतांनी आणि दुसऱ्या एका सद्गृहस्थांनी दाखवला होता. त्यांनीच या काही कविता माझ्यापुढे केल्या अन् दर्शवले की आपण कोण आहात अन्

कुठे आहात! तरी पण सर्व गोष्टींचे आणि माझ्या अवस्थेचे अधिकात अधिक confirmation मी मिळवू पाहत होतो. संशयातीत व्हावे म्हणून! त्यातूनच हा पुढचा प्रपंच सुरू झाला.

कदाचित गुरुचरित्रातल्या एका साधकाची गोष्टच घडत असेल तेव्हा. गुरूंनी शिष्याला गंतव्य निर्देशिले होते. इकडेतिकडे न जाता सरळ मार्गावरून ते गाठावे असे आज्ञापिले होते. पण वाटेत प्रलोभने असणारच! शिष्य तिकडे जाऊ नये म्हणून त्याला नकळत दोन काळसर्प त्याच्या वाटेच्या दोन्ही बाजूंना सोडून दिले त्यांनी. हा इकडे पाहतो, तर सर्प अन् तिकडे पाहतो तर सर्प! त्यांच्या भीतीने पुढे पुढे धावतो आहे तो. अन् शेवटी इकडेतिकडे न वळता सरळ सांगितलेल्या परमस्थानी पोहोचला पण! अशी असते श्रीगुरूंची लीला!

कदाचित ही अघोर दंपती अन् इतर कोणी असेच ज्यांचा तेव्हा घनिष्ट संबंध येत होता, ते पण आत्मया श्रीसद्गुरूंनी पंथराजभ्रष्ट होऊ नये म्हणून माझ्या आजूबाजूला सोडले नसतील कशावरून! आता हे असे वाटते. पण तेव्हा मी फार हैराण झालो होतो हेही खरेच!

परंतु काहीही झाले तरी भगवत आश्वासनामुळे मी अन्यथा निर्भयच होतो. त्या दंपतीतील गृहस्थाने एकदा त्याच्या जारणमारण शिकवणाऱ्या गुरूंची मोठी बढाई सांगितली की झाडाची तुटलेली फांदी पण ते परत जशीच्या तशी जागच्या जागी चिकटवू शकतात अशी! त्यावर *भगवंताने माझ्या तोंडून त्याला सांगितले की, “काय मोठे आहे त्याच्यात! पण आपणा करंट्यांचे लक्ष त्यातच असणार म्हणा! अरे! जो काहीच नसतांना एवढे ब्रह्मांड निर्माण करतो, त्याचे का नाही कौतुक करत! अशी अनंत झाडे आणि त्यांच्या अगणित फांद्या त्यानेच नाही का शून्यातून निर्मिल्या? होती ती फांदी परत जोडणारा आणि मोडलेले हाड सांधणारा यांचे काय ते कौतुक करायचे! काय ते मेलेल्याला संजीवन देऊ शकतील का?” मग स्वारी जरा गप्प बसली.

असेच एकदा ते काहीबाही सांगत बसले होते. सर्वसाधारणपणे रोख त्यांच्या जारणमारणादी विद्यांच्या सुप्त किंवा उघडउघड धमक्या देणे असाच असायचा. त्यावर *गोपाल माझ्या मुखाने म्हणाला, *“सब भूमी गोपालकी!* तुम्हाला जर *गोपाल नको असेल, तर जा ना हे विश्व सोडून कुठेही! आहे का कुठे जागा! विश्वामित्राला निदान त्रिशंकू तरी करता आला - ना धड इकडे ना धड तिकडे! पण तुमचे काय! तुमच्यात काही त्या थोर विश्वामित्राचे सामर्थ्य नक्कीच नाही. कशाला तंत्र-मंत्र-जारणमारणाच्या गप्पा मारता!तो काही खरा आणि चांगला मार्ग नाही. तुम्ही समजता तशी ही तुमची काळी विद्या Black Gold पण नाही.”

पण *गोपालाचे हे ऐकूनसुद्धा त्यांना आपला हेका सोडावासा वाटला नाही. दुर्योधनाला नव्हता का आपल्या सामर्थ्याचा अहंकार अन् त्यातूनच त्याने केला नव्हता का श्रीकृष्णाला राजसभेत बंदी बनवण्याचा प्रयत्न!

एक म्हणजे त्यांच्या विद्यांच्या *(खरे तर कुविद्यांच्या)* साहाय्याने त्यांना माझी प्रगती कळत होती, तसेच माझ्यासंबंधी इतरही अनेक गोष्टी कळत होत्या. त्याचे बरेच प्रत्यंतर मला मिळत होते. मनकवडेपणा तर होताच! *(एखाद्या मानसशास्त्राच्या अभ्यासकास हे सगळे मनोविकाराचे लक्षण वाटेलही. कारण त्याचे विज्ञान त्याला तसेच शिकवत असते. पण ही काही त्यातली गोष्ट नाही. अशा गूढ विद्यांचे मी अनेक अनुभव स्वतः घेतले आहेत.)*

कदाचित माझ्याठायी वाचासिद्धीही प्रकटली असेल. मग मागे लागले माझ्या! काहीही करून माझ्याकडून त्यांना हवे ते वदवून घ्यावे म्हणून! पण मग *श्रीगोपालाने त्यांना सांगितले की “त्रास देऊन माझ्याकडून जे काही वाटेल ते वदवून घ्याल तसे होणार नाही!” केवढा वकीली उतारा! केवढा डावपेच त्या *श्रीहरीचा! पण दैत्यविनाशाचे उपाय त्याच्याजवळ असतातच! सिद्धी प्रकट करू नयेत, असा दंडक का आहे ते या उदाहरणावरून साधकांच्या सहजच लक्षात येईल.

(टीपः *येथे व इतरत्र संदर्भानुसार गोपाल वा श्रीहरी, श्रीकृष्ण, जगदंबा, भगवंत इ.जे निर्देश येतात, ते ग्रंथलेखकाला स्वतःला उद्देशून त्याच्या तुर्येतल्या आविर्भावांना लक्षून म्हटले आहे. जाणकारांस वेगळे सांगावे लागणार नाहीच!)

त्या दंपतीच्या बाईंनी *(त्यांना आम्ही मावशी म्हणायचो.)* बरेचदा आम्हाला काहीतरी वर द्यावा अशी मागणी करायची. मी गप्प! वर देणारा मी कोण! काय माझे सामर्थ्य! शेवटी एक दिवस सांगितले की “मावशी! ही सगळी कृत्यं थांबावा! नाही तर फार वाईट परिणाम होईल!” त्या खूप वेळ माझ्याकडे रोखून पाहत होत्या. पण त्यांनी नंतर पकड ढिली केली अन् मी त्या दंपतीच्या जाळ्यातून सुटलो.

त्याआधी त्या गृहस्थाने एकदा एक मारणाचा प्रयोग केला, पण तो त्याच्यावरच उलटला. तेव्हापासून जाणेयेणे कमीकमी होत होत अखेर बंद झाले. तरीही त्यांचे चित्ताकर्षणाचे प्रयोग चालूच होते. पण एकदा तोंड पोळले असल्याने त्यांना टाळतच गेलो, ते आजपावेतो.

पण आमचे एक मित्र मात्र त्यांच्या जाळ्यात कायमचेच अडकले आहेत. दुर्दैव त्यांचे! जाणकार म्हणाले, "तुम्ही सुटलात ना! मरू दे त्यांना! त्यांच्या त्यांच्या कर्माची फळं म्हणा अन् सोडून द्या. तुम्ही कुठवर त्यांची पाठराखण कराल? त्यांनी तर खड्ड्यात पडायचे ठरवलेच आहे! द्या सोडून झालं!" मग नाईलाजाने मित्रकर्तव्यास आचवावे लागले. असे एक नव्हे दोन मित्र आहेत. पण *"ईश्वरेच्छा बलीयसि!"*

त्या मावशी एकदा म्हणाल्या,"अहो! आम्हाला काही सत्यलोक किंवा ब्रह्म थोडेच मिळणार आहे! पण आम्हाला निदान स्वर्ग तरी मिळावा!" *श्रीगोपालाचा आविर्भाव झाला! तो म्हणाला, ***"त्रिविधं नरकस्यैदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्॥१६-२१॥"*** त्यांची कृष्णकृत्ये पाहून त्या करुणानिधीलाही काही कीव आली नाही त्यांची!

त्या गृहस्थांनी एकदा माझ्याकडे *गोपाल मागितला. पण त्याने स्पष्ट नकार दिला. *जगदंबा पण म्हणाली, "अरे! हा तर निव्वळ दगड! धोंडा आहे झालं! तुझ्याकडून त्याला काय मिळणार आणि तू त्याला काय देणार! तो अति जडबुद्धीचा अन् मूढ आहे! तो तसाच राहणार!"

तर अशी होती ती **Dark Night of the Soul**! त्या वेळी झालेले भास - Hallucinations - अघोरशक्तिप्रयोग, ते गृहस्थ आणि त्यांच्या पत्नीची कारस्थाने या सगळ्यातून आई जगदंबेने बाहेर काढले - पण जग कसे आहे ते शिकवूनच!

ती म्हणाली, "सिद्धी असणारे सगळेच काही साधूसंत अन् सज्जन आणि अध्यात्ममार्गाचे पथिक नसतात, हे ओळख बाबा!" श्रीगुरुगोरक्षनाथांनाही अशा अघोरी सिद्धींचा सामना करायला लागला होता. त्यावरून माझे अनुभवही खरेच असले पाहिजेत, ते काही मनाचे खेळ किंवा निव्वळ आभास नसणार!

मला त्यांच्या विद्यांच्या साहाय्याने हाताळणे कठीण होऊ लागल्यावर ही दंपती माझ्यापासून दूर होऊ पाहत होती. पण काही अज्ञेय कारणांनी त्यांना तसे करता येत नव्हते. कदाचित ब्रह्मविद्येचे मोठे आमिष किंवा अन्य सिद्धिप्राप्तीचे प्रलोभन त्यांच्यासमोर असावे. वाचासिद्धीमुळे माझ्याकडून काही वदवून घेऊन फायदा झाला तर पाहावे, असाही त्यांचा हेतू असेल. या समोरच्याकडून कपटाने हवे ते प्राप्त करून घेऊ शकू असे त्यांची काळी विद्या त्यांना सांगत असावी. म्हणून ते एवढे इरेला पडले होते.

कदाचित काळी विद्या मरण्याआधी कोणाला तरी देऊन टाकावी लागते, नाही तर अखंड नरकयातना भोगाव्या लागतात, हे माहीत असल्याने ती दंपती माझ्याकडे त्यांची काळी विद्या pass on करण्याच्या प्रयत्नातही असू शकेल! अशा विद्यांनाही आपले स्थान नित्य राहावे असे वाटत असते आणि त्यासाठी तसा प्रयत्न त्या करत असतात.

पण त्यांना *श्रीगोपाल म्हणाले, "बाबांनो! त्या काळ्या अविद्येच्या उपयोगाने ब्रह्मविद्या कधीतरी हस्तगत होईल का! ही अविद्या त्यागा! तरच पुढचा मार्ग!" पण त्या दंपतीला ती सोन्याचे अंडे देणारी हातची अविद्येची - काळ्या जादूची कोंबडी सोडून पळत्या ब्रह्मविद्येच्यामागे लागायचे नव्हते, हेच खरे! सुखासुखी फुकट काही मिळाले तर पाहावे, असा त्यांचा हेतू होता.

त्यांनी पसरलेल्या मोहजालात मला कायम पाठराखण होती श्रीकृष्णाची! पुढे,मागे, सगळीकडे उभा राहून तोच दासाचे रक्षण करत होता अशी माझी अनुभूती आहे. परिक्षिताचे जसे त्याने गर्भात रक्षण केले तसेच! नाहीतरी *"रात्रीच्या गर्भात आहे उद्याचा उषःकाल!"* या *Dark Night of the Soul* मध्ये ब्रह्मविद्या गर्भातून बाहेर पडणार होती. आणि त्या गर्भाचा रक्षणकर्ता कोण असणार श्रीहरीवाचून! ***"परित्राणाय साधूनां"*** अन् ***"योगक्षेमं वहाम्यहम्"*** अशी कोणाची प्रतिज्ञा आहे बरं!

एकदा तर एक कमालच झाली. त्या मंडळींच्या घरी गेलो होतो. चहा करण्यासाठी सौ."क्ष" *(मावशी)* घरात गेल्या. मीही परगावाहून आल्याआल्या तडक त्यांच्या घरी गेलो होतो म्हणून त्यांच्या इथे हातपाय धुवून आरशात पाहत होतो *(मित्रच समजत होतो मी त्यांना!)*. इतक्यात काय झाले कोणास ठाऊक! जवळच एक रूपलावण्यसंपन्न मदनिका, अगदी अजिंठा-वेरुळटाईप उभी! मला खूप आश्चर्य वाटले की या मावशी असं काय करताहेत! एवढा मोह पाडूनही माझे चित्त काही विचलित झाले नाही. त्यांना मावशी म्हणून मी खरोखरच मानत होतो. म्हणून इतर काही निसर्गसुलभ आकर्षणबुद्धी झाली नाही.

त्यानंतर एकदा माझ्या जीवश्चकंठश्च मित्राशी हा विषय निघाला. तो कोकणातला होता आणि या प्रकारांची त्याला बरीच सखोल माहिती होती. तेव्हा त्याने खोदून खोदून विचारले की "तू नक्की काही केले नाहीस ना!" तर त्याला मी प्रामाणिकपणे म्हटले की, "तसे असते तर ते मी तुला सांगितलेच असते."

यावर तो म्हणाला, "नशीब तुझं! फार मोठ्या संकटातून वाचलास! जर मोहात पडला असतास तर

कायमचा त्यांचा गुलाम म्हणून राहावे लागले असते. या विद्यांचे लोक अशाच tricks करतात. तुला काहीच कसं माहीत नाही? आमच्याकडे कोकणात तर आम्ही या गोष्टी नीट ओळखून असतो. पुनः त्यांच्याकडे जात जाऊ नकोस." एवढे बोलून तो विषय संपला.

त्या दंपतीची जी कोणती असतील ती, जशा स्वभावाची असतील तशी दैवते(?) म्हणा, त्यांच्यावरील दुर्दैवी प्रभाव म्हणा, त्यांना विनाशाच्या मार्गाने नेत असल्यास आपला काय उपाय!

गीता म्हणतेः

उद्धरेदात्मत्मानं नात्मानमवसादयेत्।

आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः।।६-५।।

स्वतःचा आत्माच स्वतःचा उद्धार करील अथवा अवनतीला नेईल. आत्माच आहे आपला सुहृद आणि तोच आपला शत्रूही! आपण इच्छू तसे तो घडवत असतो म्हणा! पण पूर्वसंचिताच्या प्रभावाने त्या दंपतीला गीता वाचूनही हे उमजत नव्हते किंवा त्यांची ती काळी विद्या त्यांना तसे करू देत नव्हती म्हणा! इतर सुहृदांनाही मी कधीचेच त्यांनी मजप्रति केलेल्या प्रमादांतून मुक्त केले आहे. यांच्याप्रतिही विशेषसा कडवटपणा न ठेवता ही काळी कहाणी इथेच सोडून देऊ या.

आत्मानुभूती म्हणजे काय याचा उलगडा करून घेत असता असे दिसून येते की ती सर्वसाधारणपणे ज्याच्या त्याच्या वैयक्तिक पातळीवरची असते. क्वचित प्रसंगी असे दिसते की एक व्यक्ती ती दुसऱ्यास देऊही शकते. उदा.सुगंध, दृश्य, नाद, आवाज, स्वाद इ. पण असे प्रसंग विरळाच. क्वचित स्वप्नांद्वारेही अनुभूती दिली जाते. संत श्रीतुकाराममहाराजांना सद्गुरूंची स्वप्नानुभूती आली होती असे दिसते.

आत्मानुभूतीचा प्रांत मोठा विलक्षण आणि विस्तृत आहे. साध्यासुध्या घटनांपासून चमत्कृतिपूर्ण गोष्टीही घडू शकतात. अंतर्ज्ञान, सिद्धी आणि तर्क यांद्वारे अनुभूती कळून येऊ शकतात. पण कितीही झाले तरी हा अज्ञाताचा surrealistic प्रांतच आहे. म्हणून आत्मज्ञानसुद्धा अगदी ज्याची त्यालाच अशी अनुभूती असते. ती दुसऱ्याला वर्णन करून सांगता येईलच, दाखवता येईलच अशी नसते. रामकृष्ण परमहंसांनी विवेकानंदांना जी कोणती अनुभूती पहिल्याच भेटीत दिली होती, ती खरी तर वर्णनापलीकडील आहे.

मागेच मी म्हटले होते की ***योगज अनुभूती*** मान्य केली तर आधुनिक विज्ञान संपते, त्याचा आणि आपला याठायी मेळ बसणारच नाही. आणि म्हणून तार्किक मनुष्यांना या अनुभूतींत फारसे गम्य असू शकणार नाही.

योगदा श्रीज्ञानेश्वरीचे ग्रंथपूजन

मध्यंतरी घरी उदकशांत होती. ज्ञानप्रबोधिनीचे एक पुरोहित आले होते. उदकशांतीनिमित्त वेदपूजन, कलशपूजन, वैदिक ऋचांचा मंगलोच्चार असा कार्यक्रम होता. माझ्या मनात आले की गेली आठएक वर्षं आपण आळंदीला काही जाऊ शकलो नाही. दरम्यान माझा हा ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** हा ग्रंथ पूर्ण होऊन त्याची प्रस्तावना इ.पण लिहून झाली होती. आता तर ग्रंथसंदर्भसूचीसुद्धा तयार होती. एकच उणीव होती, ती म्हणजे Topicwise Index ची. पण विस्तृत अनुक्रमणिकेमुळे ती खरी तर भासू नये अशीच आहे. ग्रंथ पूर्ण होताच आळंदीला माउली श्रीज्ञानदेवांच्या चरणाशी तो नेवून लावून त्यांचे आशीर्वाद घ्यावेत, अशी खरे तर मनातली इच्छा. पण ती अद्याप पूर्ण होऊ शकली नव्हती.

आळंदीचे एक सज्जन श्री.निरंजननाथ महाराज आहेत. त्यांच्या हे कानी जाताच ते म्हणाले की, "तुम्ही या आळंदीला. आपण दोघं मिळून तुमच्या मनासारखं करू या." हे एक मध्यमवयीन नाथपंथी साधू असून त्यांचा बहुल शिष्यपरिवार आहे. आळंदीला माझे सद्गुरू मला भेटले होते, तेव्हा हे पण त्यांच्या दर्शनार्थ आले होते. म्हणून आमची थोडीफार ओळख झाली होती.

त्यानंतर एका गूढवादी संस्थेने केलेल्या समारंभास मी गेलो असता तेथे त्यांचे छोटेसे भाषण झाले होते व ओळखीला उजाळा मिळाला होता. आमच्या मित्रपरिवारातल्या काहींनी त्यांच्याकडून नुकतीच दीक्षाही घेतलेली होती. त्यांचे आमच्याकडे येणेजाणे होते. मी पण कधी आळंदीला गेलो तर त्यांना भेटत असे. म्हणून हा परिचय वृद्धिंगत म्हणावा इतपत बराच वाढलेला आहे. त्यांचे माझ्याप्रति मोठे सौहार्द्र आहे.

एकदा ते, मी आणि त्यांच्या सौ.असे आम्ही तिघे आळंदीला गेलो होतो. त्या भेटीत त्यांनी तेथील काही सिद्धबेट इ.विशेष माझ्या नजरेस आणून दिलेही होते. ज्ञानेश्वरांच्या समाधिस्थलाची काही वैशिष्ट्ये जी परंपराप्राप्त नाथसांप्रदायिकांनाच ज्ञात असतात, तीही त्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिली. परत येतांना येरवडा मेंटल हॉस्पिटलकडे बोट दाखवून ते म्हणाले होते की आपली ही अध्यात्माची वाट त्या तेथूनही जाते. त्यांच्या म्हणण्यात जरूर तथ्य आहे, हे मी सांगू शकतो. पण त्याविषयी नंतर.

असो. त्यांच्याबरोबर जाऊन ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** ला आळंदीची वारी करून आणण्याचा योग काही अद्याप आलेला नाही आणि पुढे कधी येईल ही शक्यताही तेव्हा मावळली होती. म्हणून मनात आले की अनायासे पुरोहित आलेच आहेत, तर वेदपूजनाबरोबरच ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** चेही पूजन करावे. त्या पुरोहितांना तसे म्हटले तर ते म्हणाले की, "वा! हे तर फारच छान! ज्ञानेश्वरी तर पंचम वेदच आहे. त्यातून हा ग्रंथ तुम्ही स्वतः लिहिला आहे. तर अवश्य करू त्याचे पूजन!"

माझे घरच आळंदी

त्या दिवशी मग त्या बृहत ग्रंथाचे वेदपूजनासह यथासांग पूजन पार पडले. काही काळ आपण आळंदीला माउलींच्या पायाशी आहोत अशा अनुभूतीत गेला. ग्रंथ प्रख्यात प्रकाशकांस दाखवला होता. तेव्हा त्यांनी चारएक लाखांचा खर्च त्यांना दिल्यास तो प्रकाशित करता येईल असे म्हटले होते. ते शक्य नसल्याने ग्रंथाचा प्रकाशनयोग सहजसाध्य नाही, हे कळलेलेच होते.

तरीही हस्तलिखित स्वरूपातला का होईना, हा ग्रंथ अशा रीतीने वेदपूजनासह साग्र पूजन होऊन आमच्या घराला श्रीक्षेत्र आळंदीचे स्वरूप देत दि.२०.७.२००८ला रविवारी प्रकाशित झाला, हे आमचे अहोभाग्य! जवळ जवळ सगळाच ग्रंथ आमच्या घरात बसून बेडरूममधल्या टेबलावर लिहिला गेला. एकटाकी, एकाच पेनने सर्व मजकूर लिहिला होता.

त्यामुळे मनीमानसी असे समाधान होते की हे घरच ***नेवासे*** तीर्थक्षेत्र आणि ही लिखाणाची जागाच तिथला ***पैसचा स्तंभ*** आहेत! पूजन केले तेव्हा तीच जागा ***आळंदी*** झाली आणि माउली श्रीज्ञानदेवांना आमच्या अंतःकरणासह जेथे आम्ही राहू तिथला सर्व अवकाश - सगळा पैस - मुक्त विहरायला मिळाला! ती सद्गुरूमाउली असे दाखवत आहे की, "तू जरी माझ्या दारी येऊ शकला नाहीस, तरी मीच तुझ्या इथे आले आहे! पुरे झाली वणवण! अन् शोधाशोध! आता तरी तुझे समाधान झाले ना!" असा हा भावपूर्ण प्रसंग!

कल्याणच्या एका कृष्णभक्त संतांनी एक छोटेखानी गीता माझ्या हाती ठेवली होती. खरं तर मीच त्यांच्याकडून मागून घेतली होती. ती रोज त्यांच्या सांगण्याप्रमाणे एक अध्याय वाचत असे. याचा आणि श्रीस्वामी स्वरूपानंदांच्या *नित्यपाठज्ञानेश्वरी* च्या नित्य वाचनाचा मागे उल्लेख केलेला आहे. या सर्वांचा परिपाक होऊन हा माझा ग्रंथ प्रकटला असावा! ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** चे असे हे ***"संपूर्ण"*** मी वेदपूजनप्रसंगी अनुभवले. यातही एक कृतार्थतेची भावना होती.

पूर्वी एकदा १९८६त याच वास्तूत मला रात्री अशी अनुभूती आली होती की ज्ञानेश्वरीतून अनेकरंगी पिवळी, हिरवी, जांभळी, चंदेरी, सोनेरी, लाल, निळी अशी प्रकाशशलाका निघून माझ्या अंतःकरणात प्रवेशत आहे. मी ज्ञानेश्वरीच्या पारायणात अनाहूत गेल्याच्या प्रसंगानंतर आणि ज्ञानेश्वरी घरी आणल्यानंतरच्या लगतच्या काळातील ही गोष्ट आहे.

आत्मानुभव व चित्रानाडी

मला जे ज्ञानदेवीतून अनेक वर्णी प्रकाशकिरण फाकतांना दिसत होते, ते गायत्रीचे रूप होते. सुषुम्ना नाडीत चित्रा नाडी असते. तिचेच गायत्री हे मंत्रस्वरूप आहे. ती पंचवर्णा, उज्ज्वल आणि शुद्ध असते. ती ब्रह्मरंध्राशी थेट जोडलेली असते. तिच्यात कुंडलिनीची गती झाल्यास जीवाला ब्रह्मैक्य अनुभवायला मिळते. या मार्गात दिव्यता, अमरत्व आणि आनंद असतो.

"जडातील शुद्धांश कौतुकें रिझाला," असे ज्या अनाहतनादास उद्देशून ज्ञानदेवांच्या अभंगात म्हटले आहे, तो म्हणजे हीच पंचवर्णा गायत्री वा चित्रानाडीचे स्वरूप असते. नंतर मला एकदा एक पंचरंगी बिंदू पण दिसला होता. मनाच्या अत्यंत निगूढ अवस्थेत ते दर्शन झाले होते. ती पण मंत्रचैतन्याची म्हणजे गायत्रीची आणि चित्रास्थित कुंडलिनीची प्रचिती होती.

माझी जी अनुभूती आहे, तिच्यात मूलाधारादी पूर्वमार्गीच्या चक्रांना विशेष स्थान नाही. त्यांचे एक कारण असे की त्यांची साधना गतजन्मीच केव्हातरी होऊन गेली. म्हणून या जन्मी मला सुरुवातीलाच हा दिव्य असा चित्रा नाडीचा मार्ग मिळाला. एका गूढवाद्याने याबाबत असे सांगितले होते की "आपको तो साक्षात आत्माही मिल गयी है। शक्तिसंचालनकी आपको क्या आवश्यकता?"

शक्ती स्वतःच जन्मतःच उत्थित झालेली असल्यास साधकाची साधना जन्मापासूनच स्वाभाविकतया होत राहते. त्याला मुद्दाम प्रयासपूर्वक साधना करायची आवश्यकता नसते.

नंतर मला मात्र आपणास कुंडलिनीची विशेष अनुभूती आल्याशिवाय हे सगळे अनुभव सत्य कसे मानायचे हा प्रश्न पडत असे. तोही कुंडलिनी जगदंबेने विहंगममार्गाची अनुभूती देऊन निःसंशय सोडवला आणि दाखवून दिले की कोणीतरी सांगताहेत म्हणूनच केवळ नव्हे, तर तूच प्रत्यक्ष पाहा काय आहे ते आणि घे तपासून शास्त्राधारे! माझी तीच शोधयात्रा तर मी इथे मांडतो आहे!

मणिपुराची अनुभूती

रात्री झोपलो असता एकदा मणिपूरस्थ विष्णुग्रंथीत जोरात टोचल्याची संवेदना झाली. अगदी कोणतीतरी टणक वस्तू तिथे जोराने दाबून धरली असावी तसे होत होते. त्यामुळे जीव कासावीस झाला. त्यावर शक्तीने हास्य केले. त्यानंतर चारच दिवसांनी दुपारी बारा वाजता शेषाचे दर्शन झाले. तो सहस्त्रशीर्ष होता. त्याने सर्व शरीर, मन, चित्त, अहंकार अन् अणूरेणू व्यापून टाकले. सर्व अंगाला तो डसला. त्याचे विष *(कुंडलिनीचे गरळ)* देहभर पसरले. ते आदिशक्तीचेच दर्शन होते.

त्या शेषाच्या अंतःस्थ भगवान श्रीविष्णूंचे दैदिप्यमान स्वरूप दृग्गोचर झाले. तो एक सुवर्णवर्णाचा पुरुष *(हिरण्यवर्णः)* होता. सर्व देह शेष भगवंताने व्यापला असून माझा जीव अंशत्वानेच आता उरलेला आहे, याचे ते सूचन होते.

प्रत्यक्ष गोपालाकडून गीताश्रवण

आणिक एकदा १९८८त असे झाले की श्रीगोपालकृष्ण माझ्या पलंगाच्या एका कोपऱ्यातून मला संपूर्ण गीता ऐकवत आहेत, असे दृश्य व श्रवण सतत तीनचार तास अनुभवत होतो. शब्द न शब्द स्वच्छ, स्पष्ट, सुरेल अन् अर्थपूर्ण येत होता. धन्य धन्य झालो होतो मी त्या वेळी. या सर्वच गीता-ज्ञानेश्वरीविषयक अनुभूतींची मिळणी मोठी आश्चर्यकारकच आहे.

मी अद्यापपर्यंत कोणालाही या अनुभूती सांगितलेल्या नाहीत. इतरही बहुतेक सर्वच अनुभूतींबाबतही तसेच आहे. हे सगळे अनुभव गुप्त ठेवावेत असा जो शास्त्रसीमा ओलांडू नये म्हणून संकेत आहे, तो योग्यच आहे. पण मागे उल्लेखलेल्या दंपतीपैकी त्या गृहस्थांना ही अनुभूती कोणी न सांगताच कशी कळली कोणास ठाऊक! त्या गोष्टीचा स्पष्ट निर्देश करून नंतर काही दिवस ते अत्यंत विद्वेषपूर्ण नजरेने माझ्याकडे पाहत असत. त्यांना मला आलेल्या त्या अनुभूतीचे फार फार वैषम्य वाटत होते बहुधा!

त्याआधी काही दिवस मला सारखा माझ्या अंथरूणाच्या गादीखाली एक विशालकाय सर्प वाटोळी विष्णुशय्या करून आणि माझ्यावर फडा धरून राहिल्याचे दृश्य दिसत होते. कळेना काय आहे ते! घाबरून जाऊन एक काठी घेऊन गादीवर धोपटत बसलो की त्यामुळे तो जाईल म्हणून. पण त्याने मला दंश केला नाही की तो काही तिथून हलला नाही! आश्चर्यच वाटले मला त्या दृश्याचे.

नंतर कृष्णाच्या या गीताकथनाच्या प्रसंगाने लक्षात आले की जिथे तो शंखचक्रगदापद्मधारी वसणार तिथेच त्याचा तो प्रिय भक्त सहस्त्रफणी शेषही असणारच ना! मी उगीचच घाबरून त्या भगवंताच्या सेवकाला धोपटले. मग त्याची प्रार्थना करून क्षमा मागितली, तेव्हा माझे मन शांत झाले.

असो. तर वेदपूजन आणि ***योगदा श्रीज्ञानेश्वरी***च्या पूजनप्रसंगानंतर तीनच वर्षांनी पुण्याला जाऊन राहण्याचा योग आला. नातीच्या वाढदिवसानिमित्त. तेव्हा १.८.२०१०ला रविवारी आषाढ कृष्ण षष्ठीला आळंदीला गेलो होतो आणि कॉँप्यूटरच्या पेनड्राईव्हवर ठेवलेल्या टंकलिखित झालेल्या ***योगदा श्रीज्ञानेश्वरी***ला ज्ञानराजमाउलींच्या चरणी लावून आणले. तोही एक अनुपम सोहोळा झाला. पण आता आळंदीच्या परिसरात ती मजा राहिली नाही. सुरक्षाव्यवस्थेच्या आडंबरामुळे प्रत्येक दर्शनार्थीला हाकलून काढण्याचीच घाई असते तिथल्या सेवकांना! असो.

तरीही अजानबाग, सिद्धेश्वरमंदीर, आमचे परंपराप्राप्त पूर्वसूरी गुरुमहाराज श्रीकेसरीनाथ यांची समाधी, एकनाथांची वापिका, सुवर्णपिंपळ, इ.ठिकाणांचे मनसोक्त दर्शन करून मी तिथे बराच वेळ रमलो. केसरीनाथांच्या समाधीपाशी घरून आणलेली पोळीभाजी खाल्ली. त्यांच्या समाधीचे फोटोही घेतले. आणि निवांत होऊन पुण्याला परतलो. अशी ही माझ्या दहा वर्षांनंतर घडलेल्या आळंदीवारीची कथा आहे.

ज्या कोणत्या अनामिक अंतःप्रेरणेतून मी हे अनुभवविश्व साकारू जात आहे, ती मला त्याचे कोणकोणते पैलू इथे प्रकट करायला लावील, ते मला माहीत नाही. ती जशी मला नेईल, तसा मी वाहत जाईन. अगदी पाटातल्या पाण्यासारखा! माळी नेईल तिकडे निवांत विनातक्रार ते जाते तसे! हे प्रकटन तसे उत्स्फूर्तच आहे.

या अनुभवांचे मोल पृथ्वीतोलाचे आहे, ते एक अनर्घ्य रत्न आहे, हे कळून येण्यात खूप काल व्यतीत झाला. आणि अजूनही होतो आहे. एकदोन अनुभवांनी *"पी हळद अन् हो गोरी"* अशी गुरुबाजी, महाराजगिरी किंवा भोंदूगिरी करायची नाही. म्हणून जातो आहे *"आहिस्ते कदम!"*

अनेक स्वप्नदृष्टांत

१९८६पासून जी ही अनुभूतिशृंखला विणली जात आहे, तिच्यात अनेक अगम्य स्वप्नदृष्टांतही आहेत. हे अनुभव एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रकट होण्यापूर्वी काही काळ एक दृश्य दिसले होते. त्यात तीन भव्यदिव्य ऋषी दिसले. मला त्यांना काही विचारायचे होते. म्हणून मी माझी

पत्रिका त्यांना सांगू लागलो. तर ते म्हणाले की "आम्ही सर्व जाणतो."

मग आपापसात काही चर्चा करून स्मितहास्य करत ते म्हणाले, "काळजीचे काही कारण नाही. उर्वरित आयुष्याची चिंता नको. उपासनामार्गे चालावे." त्यांचे आश्वासक मार्गनिर्देशनपर उद्गार मनाला खूप समाधान देऊन गेले.

कधीकधी भव्यदिव्य उत्तुंग देवळांची, प्राच्य प्राकारांची चित्तवेधक स्वप्ने पडत. त्यांच्यात चाललेले पूजाप्रसंग दिसत. बरीचशी स्वप्ने श्रीगणेशासंबंधी असत. कधी देवीसंबंधित. एकदा तर यल्लमादेवीचे देऊळ दिसले आणि दर्शनही झाले. पूर्वी कधी तिचा विचारही केला नव्हता. नंतर सहजच लक्षात आले की ही अतिप्राच्यकालीन आदिदेवता आहे. तिचेच एक रूप बनशंकरी किंवा शाकंभरी आहे. श्रीभगवान परशुरामांची माता देवी रेणुका ती हीच. माझा जन्मही त्या देवीच्या नवरात्रसमाप्तीच्या पौष पौर्णिमेला झालेला. तिचा काही वरदहस्त असावा माझ्यावर!

तिथे एक पुजारीण होती. तिला मी एक लाल फूल देवीला वाहायला दिले. पण तिने ते वाहिले नाही. मग मीच मनाशी संकल्प केला आणि मनोमनी ते फूल देवीला वाहिले. म्हटले देवीच्या पूजेत हवी कशाला कोणाची मध्यस्थी!

एकदा एका नदीकाठी एका आणि प्रवाहातल्या बेटावर एका अशा दोन शिवालयांचे दर्शन झाले. चढउताराचा नदीकाठ अन् प्रवाह दिसला. स्वप्नातच कळले की हे ओंकार-ममलेश्वराचे देऊळ आहे. नंतर विचार केला तर लक्षात आले की ओंकारेश्वर-ममलेश्वर या नर्मदाकाठीच्या ज्योतिर्लिंगांचे ते दर्शन असले पाहिजे.

बऱ्याचदा अजस्त्र सर्प-भुजंग-नागराजांचे दर्शन होत असे. एकदा एक सोनेरी कांतीचा नागसर्प दिसला. तो तसा वेगळ्या रूपात नंतरही काही वेळ दिसला. अगदी अलीकडे म्हणजे माझ्या धाकट्या मुलीला मुलगी झाली त्याच्या आदल्या रात्रीही एक सोनेरी वर्णाचा मोठा नागराज दिसला. त्याने जवळ जवळ पाचएक मजल्यांएवढे उंचच उंच ताठ उभे होऊन फणा उभारलेली होती आणि त्याचे सर्वांग सोनेरी पिंपळपानांनी विभूषित झालेले होते. मी हा एक शुभशकुनच समजतो माझ्या धाकट्या नातीच्या आगमनावेळचा! आणिकही काही त्याचा अर्थ असला तर तो मी अद्याप जाणलेला नाही.

एकदा एका मोठ्या कालसर्पाने सर्व शरीरास विळखा घातला आणि जबडा वासून माझ्या मस्तकाकडे फडा उभारली. त्या वेळी "हे शिवा!" असे म्हणत मी त्याच्या तोंडात मूठ घालताच तो अदृश्य झाला. एकदा एका काळ्याकुट्ट नागाचे शिर कोणीतरी ताडकन तलवारीने छेदून टाकल्याचे दिसले. ध्यानाला बसले असता आजूबाजूला एखादा खोलीभर पसरलेला मोठा सर्प असावा असा शेषाच्या वावरण्याचा आभास होई.

एकदा एका अजस्त्र कड्यावरून धावत होतो. विजांचा कडकडाट आणि लखलखाट यांनी सर्व आसमंत व्यापून गेला होता. धावतांना सतत आपण खाली पडून जाऊ की काय अशी भीती वाटे. शेवटी कड्याच्या टोकावर पायऱ्या खोदलेल्या दिसल्या. त्या चढून वर गेलो तर एक घर दिसले. कुलूप सहजच उघडून हाती आले. आत गेलो तर ते घर एका मांत्रिकाचे होते आणि काही माणसे तेव्हा तिथे आली. त्यांना मंत्रभारित गंडेदोरे हवे होते. पण मला काही माहीत नव्हते. त्यांचे काय करावे असा विचार करत होतो तेव्हा कुठूनसा एक ८-१०वर्षांचा लहान मुलगा आला आणि त्याने घरातून त्या वस्तू काढून दिल्या. त्या देताच ते लोक गेले. मी घरात फिरू लागलो. तर एका कोनाड्यात एक अजस्त्र नागराज बसलेला होता. तो मुलगा म्हणाला की हा इथे आहे, तोपर्यंत आपल्याला कोणतीच भीती नाही.

अशा या दृष्टांताचा अर्थ काय घ्यावा! श्री.गजाननमहाराज गुप्ते यांच्या मते **हठयोगा**ने कुंडलिनी जागृत झाली तर नागाचे दर्शन भयोत्पादक असते. पण **ध्यानयोगा**ने दर्शन प्राप्त झाले तर ते अत्यंत मनोहर असते. मला स्वतःला तर दोन्ही प्रकारची - रौद्र आणि चेतोहर अशी दर्शने झालेली आहेत. याचा अर्थ माझ्या कुंडलिनी जागृतीत हठयोग आणि ध्यानयोग दोन्हींचा प्रभाव आहे. महाराजांच्या मते संसार न सोडता व आपले नेहमीचे सर्व व्यवहार सांभाळून खऱ्या सुखाचा व आनंदाचा लाभ मिळण्याचा सोपा राजमार्ग आहे ***ध्यानयोग.*** यासच ***क्रममार्ग*** किंवा ***राजयोग*** अशाही संज्ञा आहेत. या मार्गाने गेल्यास खात्रीने ध्येय गाठता येते. कृष्णाताईंनी तर पहिल्याच भेटीत मी ध्यानयोगी असल्याचे ओळखले होते.

इतर जाणकारांस विचारले असता त्यांचे असे म्हणणे दिसले की ही सर्व गूढ स्वप्ने आहेत. त्यांचा संबंध तुमच्या पूर्वजन्मकृत उपासनेशी आणि कुंडलिनीशक्तिजागृतीशी आहे. नंतर वाचनातही आले की असेच अनुभव इतरही साधकांना आलेले आहेत. अशी अनेकानेक दृश्ये मी पाहिलीत. पण ती सर्वच ग्रथित करत नाही. एक तर ज्याचा अनुभव त्यालाच कळतो आणि त्यांचे यथातथ्य वर्णन करणे मला शक्य नाही म्हणून!

मोत्यांची, निळ्या आणि रंगीबेरंगी अशा बिंदूंची अनेक स्वप्ने मला पूर्वी आणि अगदी अलीकडेही पडलेली आहेत. वारंवार पडणारे एक स्वप्न असे की मी मुक्त स्वैर अवकाशगमन करत आहे. दुसरे स्वप्न असेच वारंवार पडले. त्यात मी एकतर कोणत्यातरी बिकट मार्गाने गिरीशिखरे, पर्वतकडा किंवा उंचच उंच पायऱ्यांचा खूप मोठा चढ चढतो तरी आहे किंवा उंचावर पोहोचलेला तिथून त्या उतारावरून खाली येतो तरी आहे. कधीकधी हे मार्ग अति निमुळते अरुंदही असत. कधीकधी एखाद्या निमुळत्या बारीक छिद्रातून मी बाहेर पडतो आहे. असेही दिसायचे.

दृष्टांतांचा अर्थ

या अशा दृश्यांचा अर्थ लावायचा तर मला तरी श्रीज्ञानेश्वरांच्या खालील ओव्या दिसतातः

आणि एर तेही पांडवा। जे आरुढोनि सोऽहंभावा।
झोंबती निरवयवा। आखरासिं।।१२-४०।।
मनाची नखी न लगे। जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे।
इंद्रिया कीर जोगे। काईं होईल।।४१।।
परि ध्यानासिही कुवाडें। म्हणौनि एकेठायीं न संपडें।
व्यक्तीसि माजिवडे। कवणेंही नोहें।।४२।।
जेया सर्वत्र सर्वपणें। सर्वांही कालीं असणें।
जैं पावूनि चिंतवणें। हिंपुटी जाहालें।।४३।।

बारावा गीता अध्याय अव्यक्त का व्यक्त, कोणाची उपासना करावी ते सांगतो. सोऽहंभाव धरून अव्यक्ताशी झोंबतांना जिथे मनाला ठाव नाही, जे बुद्धीच्या आवाक्यातले नाही, तिथे मग इंद्रियांना ते अव्यक्त कसे सापडणार! ध्यानासही ते सापडत नाही. आकारच नाही त्याचे ध्यान कसे करणार! त्याचे चिंतनही होऊ शकत नाही, अशी ती वस्तू आहे. तिच्याकडे जावे म्हणून योगी काय करतोः

पैं वैराग्यमहापावकें। जाळूनि विषयांचि कटकें।
अधपलीं तवकें। इंद्रिये धरिली।।१२-४६।।
मग संयमाचि धाटी। सूनि मुरडली उफराटी।
इंद्रियें कोंडिली कपाटीं। हृदयाचां।।४७।।
अपानाचियां कवाडा। लावोनि मुद्रा सुहाडा।
मूलबंधाचा हुडा। पन्नासिला।।४८।।

तो वैराग्यरूपी अग्नीत विषयांचे सैन्य जाळून टाकतो. इंद्रियांना संयमित करून त्यांना हृदयात बंदिवान करतो. अपानद्वारी मूळबंध लावून मग पुढची वाट आक्रमतो. नंतर कुंडलिनीच्या अग्नीत सप्तधातूंची होळी करून षट्चक्रे आक्रमून जातो. सहस्त्रारचक्रात जाऊन शक्तीचे शिवाशी मिलन होते.

उत्तरोत्तर हा सुषुम्नापथ अत्यंत सूक्ष्मातिसूक्ष्म होत जातो. गगन चढून जावे तसेच हे वाटते. कुंडलिनीयोगाच्या आज्ञाचक्रावरील अवकाशातील अशा ज्या वेगवेगळ्या अवस्था आहेत, त्यांच्या प्रतीकात्मक अशी ही मला दिसलेली दृश्ये साधकाला दिसतात. त्यांचा आशय कोणी योगमार्गाचा अनुभवी जाणकारच सांगू शकतो, असा माझा स्वतःचा अनुभव आहे.

सुषुम्नापथ पुढे पुढे अगदी एका केसाच्या शतांश, सहस्त्रांश ....असा सूक्ष्मातिसूक्ष्म होत होत शेवटी ब्रह्मरंध्रात मुंगीनेत्रतुल्य इतका बारीक होतो असे संतांच्या अनुभूतींवरून आणि योगशास्त्राच्या ग्रंथांवरून दिसून येते. अर्थात शतांश, सहस्त्रांश, मुंगीनेत्रतुल्य इ.केवळ तुम्हाआम्हाला समजावे या दृष्टीने वापरलेले शब्द आहेत. सुषुम्नादींचे द्रव्य आपण नेहमी अनुभवतो, तसे नसते. ते एका वेगळ्याच श्रेणीतील आणि मितीतील असते. म्हणूनच पदार्थविज्ञानशास्त्रास त्याचा अद्याप शोध घेता आलेला नाही. कदाचित पुढेमागे हे शास्त्र अधिकतम उत्क्रांत झाले तर त्याला हे द्रव्य काय आहे ते आकळून येईल.

अनाहतनादाच्यानिमित्ताने आणि इतरही यौगिक अनुभूतींच्या आकलनार्थ माझी जी एक शोधयात्रा सुरू झाली होती, त्यात हे सगळे उलगडत होते. काही अनुभव, काही अंतर्ज्ञान, काही प्रज्ञाशक्ती, तर काही शास्त्रादी अन् योग्यांचे अनुभव अशा रीतीने मी हा शोधप्रवास करत होतो.

मागे म्हटलेल्या बिहारी महाराजांच्या पंथाचे ***"सत्यम् शिवम् सुंदरम्"*** या शीर्षकाचे एक छोटेखानी पुस्तक मला त्यांच्याकडून मिळाले होते. त्यातील त्यांच्या गुरूंच्या मतानुसार उल्लेखनीय अशी आज्ञाचक्रावरील स्थानांची माहिती पूर्वी *उन्मेष ४६:योगपर अभंग पृ.क्र.८११वर* दिली होती. त्यातले दोन तक्ते शेवटच्या पृष्ठावर परत देत आहे. विहंगममार्गाची काही अधिक माहिती पुढे देत आहेः

{***विशेष आनुभविक टीपः*** **(१)आज्ञाचक्र, त्रिकुटी** व **भ्रमरगुंफा** ही तिन्ही चक्रे द्विदल आहेत. यांचे भेदन होतांना साधकाच्या भ्रूमध्यात दुखते आणि त्यांचा अनुभव भ्रूमध्यस्थानातच येतो. रुद्रग्रंथीभेदनाने आज्ञाचक्राचा जय होतो; त्रिकुटीभेदनाने ब्रह्मरंध्राचा मार्ग मोकळा होतो आणि भ्रमरगुंफाप्रवेशाने पुढचा सत्यलोकादींचा मार्ग सापडतो. या तिन्ही प्रसंगी साधकाला भ्रूमध्यसंबंधित अनुभूती येतात. याचे कारण खरे असे आहे की स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह आणि महाकारणदेह या सर्वांची जी सांधणी आहे ती भ्रूमध्याशी संबंध

ठेवून आहे. एका देहातून दुसऱ्या देहात प्रवेशाची ही आज्ञादी तीन स्थाने अनुभूतीच्या दृष्ट्या भ्रूमध्यसंबंधितच आहेत आणि त्यामुळे त्यांचा हा असा अनुभव येतो. हा सगळा अनुभव तृतीय नेत्रानेच घेतला जात असतो आणि हा नेत्र आज्ञाचक्राच्या थोडासा वरच्या बाजूला पण भ्रूमध्यातच असतो.

ही तिन्ही द्विदलस्थाने आपापसात एका गुह्य नाडीद्वारे जोडलेली आहेत.त्यामुळेही या आज्ञा, त्रिकुटी आणि भ्रमरगुंफेच्या साक्षात्कारानुभूतींच्या वेळी भ्रूमध्यस्थानी ठणकल्यासारखे दुखते आणि साधकाची दृष्टी सतत त्याच स्थानी लागलेली असते.

(२):*दयालदेश* -सत्यलोक, अलक्ष्यलोक,अगम (लोक)अनामी (लोक) यातच ***दिव्य सहस्रार, ऊर्ध्वसहस्रार वा कोल्हाटचक्र -सहस्त्रदळकमळ-२***-असते आणि तेथेच सत्यलोकात संतांचे आणि अनामीलोकात परमसंतांचे वास्तव्यस्थान आहे.

(३): कुंडलिनी - सिद्धसिद्धांतपद्धतीत लययोगात गोरक्षनाथांनी अधः, मध्या व ऊर्ध्व अशा तीन कुंडलिनींचे निर्देशन केले आहे. अधःकुंडलिनीचे आकुंचन, मध्या कुंडलिनीचे प्रसरण आणि ऊर्ध्वकुंडलिनीचा निपात अशा प्रक्रियांनी चक्रे आणि ग्रंथींचा भेद होऊन परमशिवाशी सामरस्य प्राप्त होते. या कुंडलिनींचे प्रांत वरील तक्त्यात दिले आहेत.

माझ्या अनुभवाप्रमाणे १९८६त ऊर्ध्वकुंडलिनीचे चालन होऊन मला भ्रमरगुंफेत स्थिती आणि अनाहतप्राप्ती झाली होती. १९८७त अधः कुंडलिनीची प्रक्रिया होऊन ज्योतदर्शन झाले होते. २००४मध्ये मध्या कुंडलिनीचा प्रवास विद्युद्रेषानुभव व अष्टदलकमलाचा अनुभव यातून झालेला दिसला होता. दोन्ही सहस्त्रदलांचे आणि इतर अनुभव इतरत्र सांगितले आहेतच.

असो. तर त्या बिहारी साधूंच्या विहंगममते स्थूल देह, सूक्ष्मदेह व कारणदेह आणि पाच तत्त्वे, तीन गुण यांची स्थाने आज्ञाचक्रापासून शून्यस्थानापर्यंत असतात. शून्यापासून पुढे महाकारण देह आहे. शून्यात पोहोचलेला तो ***"पूरा साधू"*** - त्याचे पुनरागमन नाही. त्यापुढे सत्यलोकात संतांची वसती असते. परमसंत असतात, त्यांचे अनामी लोक हे स्थान आहे. त्रिकूटीत निर्मल माया वसते. आज्ञाचक्र ते सहस्त्रदल हा प्रांत त्यांच्या मते ***चिदाकाश*** म्हणजे ज्ञान्याचे ब्रह्म होय.}

भ्रमरगुंफा

त्यांच्या या मताचा जेव्हा मी बिहारी गुरूंच्या पट्टशिष्य श्रीशिवतत्त्वानंदांकडे उल्लेख केला, त्या वेळी सहज म्हणून विचारले की, "जर तुमच्या मार्गात अनाहतनाद संभवत नसेल, तर तुमच्या पूर्वसूरींनी त्यांच्या *सत्यम् शिवम् सुंदरम्* या पुस्तकात हा उपरिनिर्दिष्ट योगपथ का दाखवला आहे? त्यात जे अत्युच्च अशा स्थानांपैकी एक स्थान म्हणून भ्रमरगुंफा दाखवले आहे, ते तर साधूसंतांत अन् योग्यांत अनाहतनाद अभिव्यक्तीसाठी सुप्रसिद्धच आहे. विहंगमपथ आज्ञाचक्रापासून सुरू होऊन या सर्व स्थानातून जातच असणार. मग आमच्या मार्गात अनाहतनाद नाही, हे तुम्ही कसे काय म्हणता?"

त्यावर त्यांच्याकडे काही सुयोग्य उत्तर नव्हते. हे आहेत एका उत्तर हिंदुस्थानी नावाजलेल्या विहंगमपंथाचे उत्तराधिकारी!

वास्तविकतः आधीच सांगितली तशी माझ्या आध्यात्मिक अनुभवांची पहाट झाली होती अनाहतदर्शनाने- श्रवणाने म्हणा खरे तर! आणि स्वामी शिवानंदांद्वारे एकदा त्याचे महत्त्व कळून आल्यावर पुढे काय, आपण येथपर्यंत आलोच कसे, लोक म्हणजे वेत्ते पुरुष म्हणतात की ही तर खूप वरची पायरी आहे, तर मग कोणतीही विशेष साधना न करता आपण इथे कसे येऊन पोहोचलो, इ.प्रश्न माझ्या जिज्ञासुबुद्धीपुढे उभे राहत.

भ्रमरगुंफा= भँवरगुफा काय आहे? तिथे भ्रमरध्वनी येतो म्हणून भ्रमरगुंफा वा भ्रमरगुहा हे नाव योग्यांनी ठेवले आहे त्या स्थानाला. अनाहतनादच हा भ्रमरध्वनीसारखा येऊ लागतो तिथे. विहंगमपंथाचे अध्वर्यू स्वामी अद्वैतानंदजी महाराज सांगतात की हे स्थान ***आज्ञाचक्रापुढे सहस्त्रदलकमल, पुढे शून्य, नंतर महाशून्य व नंतर भ्रमरगुंफा, त्यापुढे सत्यलोक आणि अलख-अगम व अनामीलोक*** अशा क्रमाने येते. महापुरुषांची वस्ती अनामीतच असते. ***अलखनिरंजनातील अलख म्हणजे अलक्ष्यस्थान*** ते यातच येते.

विहंगम मार्ग - प्रचलित संज्ञा (सुधारित तक्ता)

पिंड	स्थाननाम	स्थानीय अन्य विशेष	कुंडलिनी
पिंड	}**षट्चक्रे**}	मूलाधार, स्वाधिष्ठान,	अ
(**भ्रूमध्या** }	⇓ }	मणिपूर, अनाहत, विशुद्धी	धः
पर्यंतचा }	⇓ }	व आज्ञाचक्र	
भाग)	}**आज्ञाचक्र**	स्थूल देहाची मर्यादा,	
	}(**द्विदल**)	आत्म्याचे स्थान	

	}चतुर्दलकमल		**म**
(सूक्ष्म	}षट्‌दलकमल		
	}अष्टदलकमल	तृतीय नेत्र, पंचतत्त्वे व तीन गुण	
देह)	}द्वादशदलकमल	सहस्त्रदलकमलात अवस्थित	
	}दशदलकमल		
अंड	}**सहस्त्रदलकमल-१**	जोत, निरञ्जन, शिवशक्ती, निजमन	
(भ्रूमध्या-	}षोडशदलकमल	श्वेतवर्णाचे	**ध्या**
वरचा	}**त्रिकुटी (द्विदल)**	ओम्, प्रणव, गगनब्रह्म,	
भाग	}	महत्, महाकाश, वेद इ.	
	}	दिव्य ग्रंथ (ब्रह्म)	

	}चतुर्दल कमल		**ऊ**
	}षट्‌दलककमल		
(कारण	}**शून्यस्थान**	(७ शून्ये आहेत- अंतीचे शून्य	
देह)	}**(ब्रह्मरंध्र)**	दशमद्वार वा ब्रह्मरंध्राकडील	
ब्रह्मांड	}	सुषुम्नामुख),आत्मपद, परब्रह्म,	
	}	प्रकृति-पुरुष (मूल)	
(काल	}अष्टदलकमल		
प्रदेश)	}द्वादशदलकमल	(सहजदीप)	
	}दशदलकमल		
	}**महाशून्य**	(६ महाशून्य स्थाने)	
	}षोडषदलकमल	(शेवटचे महाशून्य)	
	}**भ्रमरगुंफा(द्विदल)**		**र्ध्व**

व्याल	}सत्यलोक }	}चैतन्यमय महाप्रकाशमान	**प**
-देश	} }	}निर्मल स्थानः संत येथेच	
(दयाल	} }	वसतात.	**र**
देश)	}**अलक्ष्य(अलख)**}		
महा	}**(लोक)** }	**(दिव्य सहस्त्रार ऊर्ध्व-**	**म**
कारण	}अगम (लोक)}	**सहस्त्रार वा कोल्हाटचक्र,**	**शि**
देह)	}**अनामी (लोक)** }	**सहस्त्रदळकमळ-२, परमसंतांचे वास्तव्यस्थान)**	**व**

अनाहताची पायरी - 'शून्य ते परमधाम'

"सत्यम् शिवम् सुंदरम्" हे बिहारीमहाराजांच्या परंपरेतील पुस्तक चाळल्यानंतर मला कळले की मला अनाहताची जी सतत अनुभूती येते, त्याबद्दल या मंडळींना कुतूहल जरी असले, तरी त्यांचा माझ्या अनुभवावर विश्वास बसणे कठीण आहे. तरीही अलीकडे त्या महाराजांनी मला त्यांच्याकडे जाण्यास प्रवृत्त करणाऱ्या सद्गृहस्थांस माझ्याकडे परत पाठवून चौकशी करायला सांगितली होते की पुण्याचे ते एंजिनीयर गृहस्थ पुनः आमच्याकडे का आले नाहीत म्हणून! त्या वेळी ते म्हणाले की, "त्या एंजिनीयरांना अनाहतनाद ऐकू येत असूनही ते आमच्याकडे नाम घ्यायला आले, हे एक आश्चर्यच आहे!"

त्यांनी प्रथम भेटीत म्हटलेल्या कबीरांच्या पदाप्रमाणे ***"सूत्र मरै" नंतर "अजपा मरै" व "अनहदही मर जाय", "राम सनेही ना मरै"*** या उक्तीतील रहस्य मात्र त्यांचे परम-परम-गुरू अद्वैतानंदांच्या वर्णनावरून मला समजू शकले. ओशोंनी तर ***अनहद म्हणजे "जिसकी कोई सीमा नहीं, वह"*** अशी अनाहतनादाची व्याख्या केली आहे.

इत्यर्थ असा की हा नाद शेवटपर्यंत येत राहतो. अगदी पूर्णत्वानंतरही अनाहतनाद मावळत नाही, असा ओशोंचा अभ्यास सांगतो. ओशोंबाबत काहींची मते वेगळी जरी असली, तरी अध्यात्माचे एक श्रेष्ठ दर्जाचे अभ्यासक म्हणून त्यांचे स्थान निर्विवादच आहे. अद्वैतानंदांच्या वर्णनावरुन मला काय कळले ते पाहू या:

१) सूत्र = शून्यस्थान {आज्ञानंतर सहस्त्रदलकमल नंतर त्रिकूटी मग शून्य अशी ही वाट (खरी तर गगनवाट आहे.)}

२) अजपा = महासूत्र (या सहा पायऱ्या आहेत.)

३) अनहद = अनाहतनाद = भँवरगुफा = भ्रमरगुहा = भ्रमरगुंफा

४) रामसनेही = रामाचे प्रिय = सत्यलोक व उपरांत अलख-अगम-अनामीलोक

आपण भ्रमरगुंजनात आहोत म्हणजे ***सूत्र-अजपा*** ही स्थाने सोडून पुढील अनहदस्थानात आहोत. बिहारी साधूही म्हणाले होते की ***"अनाहत = अनहद*** जिसे कोई हदही नहीं वहाँ चलो!" कबीर म्हणतात ***"अनहदही मर जाय।"*** चला त्याच्यापल्याड -सत्यलोकाला आणि पुढच्या लोकांत.

या बिहारी महाराजांच्या गुरुपरंपरेचे उपकारच आहेत माझ्यावर की मला त्यांनी माझी स्थिती अजाणताच दाखवून दिली - त्यांचा माझ्या अनुभवावर विश्वास बसो की न बसो! शेवटी आत्मानंद ज्याचा त्याच्यासाठीच असतो. *"इतरां टकमक"* असे माउली पण म्हणते.

श्री.गजाननमहाराज गुप्ते म्हणतात की आपण मनाने करत असलेला जप मनाचा शब्द आहे असे जरी वाटले तरी दीर्घकालपर्यंत सतत अभ्यास करत गेल्यास असा अनुभव येतो की आपले मन जप करत नसतांही गुप्त रीतीने जप केला जात असल्याचे कानाला ऐकू येते. पूर्वसंचितानुसार काही दिवसांनी, महिन्यांनी किंवा काही वर्षांनी अशी अवस्था होते. यात समाधिसुखाचा आस्वाद मिळतो. हाच ***अजपाजप*** होय.

तो परिणतावस्थेला पोहोचला की नाद ऐकू येऊ लागतात. हाच ***अनाहतनाद*** होय.**"सून्न मरै, अजपा मरै, अनहदही मर जाय"** असे कबीरांनी याच अवस्थांना उद्देशून म्हटले आहे.या स्थितीपर्यंत पोहोचल्यावर षट्चक्रे व कुंडलिनी मावळतात. त्यानंतर निव्वळ ***प्रकाश म्हणजे ज्योती*** आणि ***नाद म्हणजे अनाहतनाद*** हेच उरतात. हाच परमात्मसाक्षात्कार होय. गुरुकृपेने अजपा साधल्यास कोणत्याही चक्रावर ध्यान करण्याची जरूर उरत नाही. मुद्दाम म्हणून महाराजांनी हे आपल्या चरित्रात नोंदवले आहे.

खरे संत

पण एक मात्र खरे की अंतर्ज्ञानी महात्मे सापडणे अति दुर्मीळ आहे. शिष्याला गुरू हवा खरा, पण तो असला पाहिजे अंतर्ज्ञानी! आणि आताचा काळ आहे गादीदीक्षित गुरूंचा! परमगुरूंच्या पुण्याईने आणि स्वतःच्या वाक्चातुर्याने, तसेच गुरूवरच्या अंधश्रद्धेच्या बळावर त्यांनी दिलेली, आपले ज्ञान-अज्ञान *(खरे तर अज्ञानच!)* जे काही असेल त्याच्यासह आणि बऱ्याचदा तर ती गादी दिलेली नसताही आम्हीच त्यांचे उत्तराधिकारी म्हणत बळकावलेली गादी सांभाळणे एवढेच ते महाजन करतात!

त्यातल्या त्यात प्रामाणिक गादीस्थित तेच वाटतात की ज्यांना त्यांच्या सक्षम गुरूंनी तिथे हाताला धरून त्यांना बसवले असेल! पण तिथेही "मी कोणी आहे; मी अमुक अमुक परंपरेचा ... अमुकापासून अमुकावा ..." इ.अहंकार शिरायला वेळ लागत नाही. आणि मग काय म्हणावे या मंडळींना!

अशांकडे पाहिले की श्रीगजाननमहाराज गुप्ते यांचे संतत्व मनात भरते! ते म्हणत की, "मी एक संतांघरची वेडी केरसुणी आहे - दिसेल ते साफ करण्यासाठी त्यांनी हाती धरलेली" अशा थोर साधूंच्या पार्श्वभूमीवर ही "मी ज्ञानेश्वरांपासून तेरावा की चौदावा, अमुकापासून अमुकावा..." असा बडेजाव मिरवणारी मंडळी आपल्याजवळ नसलेलीच बरी नाहीत का! असो. पण माझ्या जिज्ञासेपोटी केलेल्या या साधनाप्रवासात आणि शोधयात्रेत त्यांचेही काहीतरी पूर्वनियोजित अन् ऋणानुबंधांचे नियतीने ठरवलेले स्थान नक्कीच असणार, नाही का! आपण काय रत्नं कुठूनही वेचावीत आणि गारगोट्या तिथेच राहू द्याव्यात! झालं!

कोणा गुरुप्रेमी साधकांना मी जी ही काही भोंदू गुरूंवर विधायक टीका करतो आहे, ती न आवडण्यासारखी वाटेल. पण साधकांना या मार्गातल्या अपप्रवृत्तींबद्दल सतर्क करणे हे माझे एक कर्तव्यच समजून मी स्पष्टपणे हे सगळे लिहिले आहे. त्याच्याशी त्यांच्या गुरूंचा काहीही संबंध नाही. कोणाच्याही गुरूंवर मुद्दामहून टीका करणे हा उद्देश नसून सत्यान्वेषणास साहाय्य करणे हा उद्देश आहे. मला जे काही अनुभव हस्तेपरहस्ते आले आणि संतांनी आणि इतर योगोपासकांनी त्यांचे जे काही अनुभव कथन वा ग्रथित केले, त्याची गोळाबेरीज म्हणजे माझे या गुरूंविषयीचे वक्तव्य!

खऱ्या सद्गुरूंबद्दल मी असे काही कसे बरे लिहीन! माझा तर त्यांचा शोध घेण्याचे कार्य गेली तीन दशके तरी जाणूनबुजून अन् त्याआधी कितीतरी जन्म अजाणताही चाललेच आहे, नाही का! कोणाला त्याचे असे सत्पात्र सद्गुरू मिळाले असतील, तर त्याचे करावे तितके अभिनंदन थोडेच! पण एक मात्र जरूर करा. ते सद्गुरू खरोखर ज्ञानदेव, रामकृष्ण परमहंसांच्यासारखे आहेत का हे नीट पारखून घ्या. जसे स्वामी विवेकानंदांनी रामकृष्णांना पारखले होते, अगदी तसेच! त्याच तोलामोलाचे असतील, तेच खरे सद्गुरू! इतर केवळ दगड! आणि शेवटी मनुष्यदेही गुरूंपेक्षा ते अंतिम गुरुतत्त्वच खरे तर सर्व काही करते, हे नीट ध्यानात ठेवावे!

जरी माझ्या आध्यात्मिकतेची मोठी पायरी ज्ञानदेवांची भेट होण्यापूर्वीच मी ओलांडली होती, तरी त्यांनाच मी माझे खरे सद्गुरू मानतो आणि त्यांचा उपदेश आणि व्यवहार यांची जमेल तितकी सांगड घालत माझा हा जीवनप्रवास चालू आहे. त्यांनी शिकवलेली विनम्रता आणि ऋजुता यांचा मी कसा बरे त्याग करू शकेन! एक मात्र आहे की सत्यान्वेषणापुढे इतर कोणाचीही आणि कशाचीही मातब्बरी नसते, असे आपल्या वेदोपनिषदांतील आर्यसत्य मात्र मी डोळ्यांआड करू शकत नाही. असो.

माझ्या कुंडलीनीची स्थिती

मागे १९८७-८८त एकदा पुणे स्टेशनवर गाडीची वाट पाहत होतो. तर भंडारी म्हणून एक सद्गृहस्थ भेटले. थोडी ओळख झाली. कोण कुठले विचारून झाले. गृहस्थ

एका एंजिनीयरींग कंपनीत अधिकारी होते. वयाने माझ्यापेक्षा दहाबारा वर्षं ज्येष्ठ. बरोबरच गाडीच्या डब्यात चढलो. ते पुढे जाणार होते. मला मध्येच उतरायचे होते. दोघंही जवळजवळच होतो.

ते एकदम माझ्याकडे रोखून बघू लागले अन् मग म्हणाले की, “तुम्ही ज्ञानेश्वरीचा सहावा अध्याय वाचत जा! तुम्हाला खूप फायदा होईल.” खरे तर ज्ञानेश्वरीचा सहावा अध्याय, पंथराज, कुंडलिनी इ.गोष्टी तोपर्यंत मला नीट माहिती झाल्या होत्या. तरी पण मी त्यांना उगीचच वेड घेतल्यासारखे करून विचारले की, “असे काय आहे ज्ञानेश्वरीत अन् त्या सहाव्या अध्यायात! आणि तुम्ही मला एकदम असं का सांगताहात? काय base आहे तुमच्या या म्हणण्याला?” तर ते म्हणाले की, “बघा! मला काहीकाही अदृष्ट दिसते. एक प्रकारची अतींद्रिय शक्ती आहे माझ्याजवळ! त्यावरूनच मी तुम्हाला हे सांगितले.”

त्यावर मी त्यांना काय दिसले ते सांगा असे म्हणालो. तर ते म्हणाले की, “ते सांगू नये असा संकेत आहे. सांगितल्यास आपली अतींद्रियशक्ती नाहीशी होते असे म्हणतात.” त्यानंतर एकदोन सेकंद माझ्याकडे रोखून पाहत ते म्हणाले,“तुम्ही माझ्याशी खोटं बोलता आहात! तुम्हाला कुंडलीनीशक्तीबाबत ज्ञान आहे. ज्ञानेश्वरी आणि तिच्यातला सहावा अध्याय तुम्ही वाचलेला आहे. का उगाच मला फसवायला बघता? मी तुम्हाला तुमच्या कल्याणाचीच गोष्ट तर सांगितली!” असे म्हणून माझ्याकडे पाठ फिरवून ते गृहस्थ उभे राहिले. ही गोष्ट आहे माझ्या नादानुभूती प्रकटनानंतर साधारणपणे एकदीड वर्षातली.

त्यानंतर त्यांची एकदोनदा भेट झाली. पण ते माझ्याशी काहीही बोलले नाहीत. पुढे खूप वर्षांनी म्हणजे अगदी अलीकडे २००६साली गणेशमंदिरात ते आले असतांना जवळ बसले होते. ते माझी ती गाडीतली ओझरती ओळख विसरले नव्हते. ते खूपच वयोवृद्ध झाले होते. त्यांचा बराच शिष्यपरिवार बरोबर होता. मी त्यांना नमस्कार केल्यावर त्यांनी इतक्या वर्षांनंतरही आठवणीने विचारले की “मी तुम्हाला गाडीत सांगितले होते, ते आठवते का?” मी होकार दिला. ते पुढे म्हणाले,“माझे सांगणे खरे निघाले ना! तुम्हाला कुंडलिनीशक्तीचा अनुभव आला ना!”

त्यावर मी त्यांना विचारले की, “तुम्ही मला त्या वेळी सगळे सांगितले नाही. तुम्हाला काय दिसले ते सांगाल का? मला त्याची मोठी शास्त्रीय जिज्ञासा लागून राहिलेली आहे. आता तरी तुम्ही मला काय ते सविस्तर सांगा ना! माझ्याचबद्दल ते गूढ असल्याने मला फार फार curiosity आहे.”

त्यावर ते म्हणाले की, “तुमच्या भ्रूमध्यस्थानी मला एक रक्तवर्णीय रेषा दिसत होती. ती कुंडलिनी होती. तेव्हा ती तुमच्या आज्ञाचक्री होती. ज्ञानेश्वरांनी सहाव्या अध्यायात ***“नागाचें पिलें। कुंकुमें नाहालें।”*** असे कुंडलिनीचे रूपवर्णन केले आहे ना! तशीच ती मला दिसत होती. म्हणून मला कळले की तुमची कुंडलिनी आज्ञाचक्रावर जाऊन पोहोचली आहे म्हणून. ही तुमची उच्च आध्यात्मिक योगावस्था पाहूनच मी तुम्हाला ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाकडे संकेत केला होता. आता आलं का तुमच्या लक्षात! तुम्हाला त्यानंतर ज्या काही योगानुभूती आल्यात, त्या याची साक्ष देतीलच की!”

त्या गृहस्थांना मी मनोमन नमस्कार केला. काही व्यक्तींची अंतर्गत ज्ञानशक्ती जागृत असते याचे असेच अजूनही काही अनुभव मी घेतले. पण ते कोणीही गुरू म्हणून मिरवणारे नाहीत. त्यांचा काही मोठा बडेजाव नाही की शेपाचशे शिष्य त्यांच्या मागेपुढे करताहेत!

माझ्यात कुंडलिनीशक्तीची अशी काही असामान्य क्रिया होत आहे, याचा असाच उलगडा सांगलीच्या एका कृष्णभक्त बाईंनी केला होता. वयाने माझ्यापेक्षा बऱ्याच मोठ्या, शांत. सोज्ज्वळ नंदादीपासारखे त्यांचे व्यक्तिमत्व मोठे लोभस होते. त्यांचे नाव कृष्णाताई भागवत**. माझी बदली ऑफीसने काही कामानिमित्त १९८७त सांगलीला केली होती. तिथे लॉजवर वेळ काढत असतांना एकाने तिथल्या हरीपूर म्हणून भागात अशा अशा एक संत स्त्री राहत असल्याचे मला सांगितले. त्यांचे दर्शन जरूर घ्या असे त्या गृहस्थांचे म्हणणे होते.

त्यांच्याबद्दल अधिक माहिती अशी की त्या नेहमी तुर्यावस्थेत असत. तसेच एकदा एका परिचिताने त्यांचे काही फोटो काढले होते, तर त्यांच्यात त्यांच्या अंगाला वेढा घालून बसलेला एक भुजंग आला. त्या भुजंगाने त्यांना वेटोळी घालून त्यांच्या डोक्यावर फणा उभारली होती. फोटोमध्ये असे दृश्य क्वचितच टिपता येते. पण हे नागवलय खरे तर तेजोवलय असून त्यांच्या कुंडलिनीशक्तीचा आविर्भाव होता.

यावरून असे वाटते की जे काही हे तेजोद्रव्य आहे, जे काही कुंडलिनी योगनाड्या -इडापिंगला-सुषुम्ना आणि षट्चक्रांचे द्रव्य आहे, ते काही विशिष्ट परिस्थितीत भौतिकशास्त्रीय द्रव्य किंवा ऊर्जेप्रमाणे घनीभूत होत असावे आणि योग्य ते तंत्रज्ञान सापडल्यास त्यांचे

Electro-magnetic Spectrumचे जसे आरेखन काढता येते, तसे कदाचित करता येईल.

तसेच माझा काही psychics /mediums चा अनुभव असा आहे की त्यांना हे द्रव्य दिसू शकते, पण त्यासाठी काहींना अंधार किंवा प्रकाशाचा विशिष्ट कोण असावा लागतो. मलाही कधीकधी ते दिसले आहे, पण घरातल्या नैसर्गिक प्रकाशातही.

माझ्यावर जे तांत्रिक अरिष्ट त्या एका अघोरसांप्रदायिक दंपतीमुळे कोसळले होते, तेव्हा एका psychic /medium कडे मी त्याबाबत पृच्छा केली होती की त्यानां काही दिसते आहे का माझ्याभोवती. त्या वेळी त्यांनी मला एका खोलीत नेऊन प्रकाशाकडे विशेष कोन करून उभे केले होते. त्यानंतर ते म्हणाले की, "तुमच्यावर तसे काहीतरी अरिष्ट आलेले आहेच. पण तुम्हाला चांगले संरक्षणही आहे. मला तुमच्याभोवती एक सर्प दिसला आणि त्याने तुमच्या डोक्यावर फणा धरलेली होती. तो तुमचे संरक्षण करील."

(**टीप: या अधिकारी संतस्त्रीचे नावगाव मी मुद्दामच बदलले आहे. इतरही जणांची या आत्मवृत्तात दिलेली नावेगावे काल्पनिक आहेत. क्वचित कुठे त्यांत आणि कोणा व्यक्तीत काही साम्य दिसलेच तर ते योगायोगाने आले आहे, असे समजावे. त्यांच्या अतिउत्साही अशा कोणी भक्तगणांनी उगीचच आक्षेप घेत बसू नये म्हणून हे असे करावे लागले. खरं तर मला त्यांचे खरे नाव सांगायला आवडलेच असते इतकं त्यांनी मला माझ्या या साधना आणि शोधयात्रेला साहाय्य केले आहे. ते सांगण्यात खरे तर त्यांची कीर्तीच वाढली असती. पण काही भक्तमंडळींच्या लहरी आणि हेकेखोर स्वभावापुढे व *"ही तर भगवंताची इच्छा"* म्हणून मान तुकवणे भाग आहे.

असाच प्रकार इतरही काही संतमहात्म्यांबद्दलसुद्धा घडतो आहे आणि घडलेला पण आहे. असो. *"कालाय तस्मै नमः।"* करुणामय अंतःकरणाच्या येशू ख्रिस्ताने स्वतःचे रक्त लोकांच्या कल्याणासाठी वाहू दिले. पण त्याच्याच काही धर्मांध अनुयायांनी लोकांना heretics म्हणून खुंट्यांना बांधून जिवंत जाळले नाही का! आणि Inquisition हा प्रकार त्याच येशूच्या अनुयायांनी वापरून कितीएक लोकांना छळले असेल, त्यांच्याबद्दल काय बोलावे! या गोष्टी काय त्या संताला कधीतरी मान्य झाल्या असत्या का? आणि अशांना त्याचे खरे अनुयायी असे तरी कसे म्हणावे!)

श्रीकृष्णाला आलिंगन

मी त्या संतस्त्रींना भेटायला गेलो. तो दिवस होता श्रीतुकारामबीजेचा! सन १९८८मधल्या. तर माझ्या चित्तात आनंदलहरींचे तूफान उठले. त्यांच्या घरी पोहोचलो तर पाहिले की त्या एका राधाकृष्णाच्या मूर्तीपुढे ध्यानस्थ बसलेल्या होत्या. ती मूर्ती तशी वेणुधारी होती. पण का कोण जाणे मला तिथे शंखचक्रगदाधारी अशा श्रीकृष्णाची मूर्ती दिसू लागली. अन् मी त्याच्याकडे धावत जातो आहे आणि तोही आपली शंखचक्रादी आयुधे टाकून देत माझ्याकडे आवेगाने येतो आहे, असे दृश्य निर्माण झाले तिथे. तो आणि मी एकमेकांना मिठीत घेऊन आलिंगून बसलो.

तेवढ्यात त्या कृष्णाताई ध्यानातून जाग्या होऊन मला जोरजोराने हाका मारू लागल्या. त्यांच्याजवळ गेलो तर त्या म्हणाल्या की, "अरे! इतक्यात त्याच्याशी एकरूप होऊ नकोस! त्या श्रीकृष्णाचे तेज तुला इतक्यातच सहन होणार नाही. धारणाशक्ती हवी. घाई नको."

पण मी म्हटले की, "मला काही त्याला भेटल्यावर राहवले नाही. आता तर त्याच्याशिवाय मी राहीनच कसा! जे काही व्हायचे असेल ते होऊ दे! माझ्या हातात काय आहे! त्याच्याशी एकरूप होणे न होणे काही माझ्या हाती थोडेच आहे? त्याच्या इतक्या जवळ आल्यावर मला काही परतता येणार नाही."

त्यावर त्या म्हणाल्या की, "आतून स्मरण चालेल. तो आत असेल. आतून ॐकारजप चालेल. ही एक उत्कृष्ट अवस्था आहे."

या एकरूपत्वाबाबत एकनाथी भागवतात एक हृद्य संदर्भ आहे. *अ.११श्लोक क्र.२४* वरल्या काही ओव्यांतून एकनाथ म्हणतात:

... ऐसें बोलत बोलतां श्रीपती।
उद्धव प्रीती उचलिला।।३०३।।
मागां टाकूनि पीतांबरें। *<u>सांडूनिया शंखचक्रें।</u>*
उद्धव उचलिला श्रीधरें। तरि प्रेम न सांवरें देवाचें।।३०४।।
हांव न बाणेचि दों करीं। *<u>मग चारी भुजा पसरी।</u>*
***<u>उद्धवातें हृदयावरी। प्रीती थोरीं आलिंगी</u>*।।३०५।।**
हृदया हृदय एक जाहलें। यें हृदयींचे तें हृदयीं घातिलें।
कृष्णें सर्वस्व जें आपुलें। तें हृदयीं सूदलें उद्धवाचें।।३०६।।

या ओव्या माझ्या वाचनात फारच अलीकडे म्हणजे हा कृष्णालिंगनाचा प्रसंग होऊन गेल्यानंतर जवळ जवळ बावीसएक वर्षांनी आल्या. माझ्या अनुभवाच्या विश्लेषणाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व किती आहे, ते मी न सांगताच कोणाही विचक्षणास जाणवावे असे आहे. ज्ञानेश्वरीत अर्जुनाला श्रीकृष्णांनी दिलेल्या आलिंगनाचाही असाच एक सोहोळा ज्ञानराजांनी ***"मग सांवला सकंकणु। बाहू पसरौनि दक्षिणु। आलिंगिला स्वशरणु।***

भक्तराजु ।।१८-१४१८।। हृदयां हृदय एक जाहाले। इयें हृदयींचे तियें हृदयीं घातिले। द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु ।।१४२१।।" अशा ओव्या आहेत. अतिशय उच्च अशी ही आध्यात्मिक अवस्था आहे. यापलीकडे कोणतीही योगस्थिती वा आध्यात्मिक अवस्था नाही!

श्रीकृष्णाच्या आलिंगनाचा हा सोहोळा अनुभवून मी धन्य झालो आणि त्याने मला काय दिले, ***"ये हृदयींचे तें हृदयीं काय घातिले"*** त्याचा विचार मी तरी फारसा कधी केला नाही. जे काही त्या भगवंताला आवडेल, तेच तो करणार आणि जे काही तो करणार ते माझ्यासाठीच असणार नाही का! असो.

त्या प्रसंगानंतर थोडा वेळ गेला. बरोबरची मंडळी पांगली. मग कृष्णाताईंनी सांगितले की, "काय करायचे ते सांगणारे आणि ठरवणारे तुम्ही कोण? ही तुझी कुंडलिनीची पठारावस्था आहे. माहीत आहे ना तुला? ती सहस्त्रारचक्रावरून मूर्ध्निस्थानी येत आहे. एकदीड वर्ष लागेल तिला तिथे पोहोचायला. त्यानंतर ती तिच्या मूलस्थानी ब्रह्मांडात पोहोचेल. तेव्हाच तिचे कृष्णाशी मिलन करायचे असा ध्यानयोगसंकेत असतो."

"आणि तू तर ध्यानयोगीच आहेस. तुला हे सगळे माहीत असायलाच हवे नाही का? तरी आता शांत रहा. स्वस्थ बस. कोणाकडे काही विचारायला जाऊ नकोस. तुला गुरूची काहीही जरूर नाही. याच्याकडे जा, त्याच्याकडे जा असे उगाच करत बसू नकोस! तो श्रीकृष्णच तुझा गुरू आहे. ***"कृष्णं वन्दे जगद्गुरुम्"*** तो हे सगळं करतो आहे. त्यालाच तू शरण जा म्हणजे झालं. ***"अन्यथा शरणं नास्ति"*** हे माहीत आहे ना तुला?" ही घटना आहे मे १९८७ची. म्हणजे नादानुभूतीप्राकट्यानंतर साधारणपणे आठएक महिन्यातली!

कृष्णाताईंनी ज्या पठारावस्थेचा निर्देश केला होता, ती अष्टांगयोगमार्गातही येते. अष्टांगयोग, हठयोग आणि पंथराज यांचा समन्वय कसा होतो, ते मी ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** या माझ्या ग्रंथात दाखवले आहेच! ज्ञानेश्वर योगाच्या अष्टांगांविषयी म्हणतातः

आतां योगाचलाचां निमथा। जन्हैं ठाकावा आथि पार्था।
तन्हैं सोपानाययां कर्मपथा। चुकां झणिं ।।६-५४।।
एणें यमनियमाचेनि तलुवटें। रिघे आसनाचिएं पाऊलवाटें।
येईं प्राणायामाचेनि आडकंठें। वरौता तो ।।५५।।
मग प्रत्याहाराचां आधाडा। बुद्धीचियां पायां निसरडा।
जेथ हटिये सांडिती होडा। कडेलग ।।५६।।
तन्हैं अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निराळें।
नखी लागेल ढाळें ढाळें। वैराग्याची ।।५७।।
आईसा <u>पवनाचेनि पाठारें</u>। एंतां धारणेचेनि पैसारें।
क्रमी ध्यानाचें चवरें। सांडें तंव ।।५८।।
मग तया मार्गाचि धांव। पुरेल प्रवृत्तिचि हांव।
जेथ साध्यसाधना खेंव। समरसें होएं ।।५९।।
जेथ पुढील पैस पारुखें। माघिल स्मरावें तैं ठाकें।
आईसिएं सरसिएं भूमिकें। समाधि राहें ।।६०।।

योगाचळाच्या शिखरापर्यंत नेणारी वाट यात वर्णिली आहे. पायथ्याशी यमनियम, आसनाची पाऊलवाट या मार्गाने प्राणायामाची कपारी अन् प्रत्याहाराचा कडा गाठावा. येथे बुद्धी चालत नाही. या मार्गाने वैराग्यप्रांत गाठल्यावर मग पवनाचे पठार आणि धारणेचा पैस क्रमून ध्यानाचे शिखर गाठावे, असे ज्ञानदेव सांगतात.

गूढभविष्यकथनाचा प्रसंग

या घटनेअगोदर दोन महिने मला सतत दीपज्योत दिसत असे. पहाटे गायत्रीजप करत असे. एका गूढवाद्यांकडे सहज म्हणून जबलपुरला गेलो होतो १९८५त. त्यांच्याकडे काही संहिताग्रंथ होते, त्यांचे वाचन करावे म्हणून. तशी ओळख वगैरे काहीच नव्हती. तर जाताच ते म्हणाले, "आईये श्रीमानजी! हम आपहीकी राह ताक रहे है। आपका संहितावाचन आजही नियुक्त है।"

मला आश्चर्यच वाटलं की आपण इथे येण्याचे आताच तर तासाभरापूर्वी ठरवले. मग हे कोणाची राह ताकतात आहेत. त्यांनी बैठकीच्या खोलीत बसवले आणि एक ग्रंथ काढला. तो हिंदीत होता. त्याचे मूळ संस्कृतातील लेखनही एका भूर्जपत्राच्या ग्रंथात असलेले त्यांनी मला दाखवले. ते म्हणाले की त्यांच्या आजोबांनी मूळ ग्रंथाचा हिंदीत अनुवाद करून ठेवला आहे. लोकांना आता संस्कृत फारसे समजत नाही म्हणून.

मग त्यांनी एक पान उघडले. माझ्या हातावरच्या रेषा अन् अंगठ्यावरची काही चिह्ने पाहून त्या पानांतून काही पडताळणी केली आणि म्हणाले, "देखिये. आपका नाम अमुकअमुक है? आपके मातापिता और पत्नीका नाम अमुक अमुक है? आपका गत इतिहास पढता हूँ। क्या ये आपके भूतसे मेल खाता है?" त्यांनी सांगितलेले खरेच होते. म्हणून मग ते म्हणाले की, "मै अब आपका भविष्य पढ लेता हूँ। आप सुनिये। चाहे तो मै आपको इसकी एक लिखित प्रत भी दे सकता हूँ।"

त्यानंतर बराच वेळ ते भविष्यकथन करत होते आणि मी अवाक होऊन ते ऐकत होतो. त्यात काळ्या विद्यांपासून काही त्रास संभवतो असाही एक निर्देश आला. उपाय सहज नाही, असेही ते म्हणाले. पण त्या ग्रंथातून, जो त्यांच्या मते किमान दोनतीन सहस्त्र वर्षांपूर्वी भृग्वादी अशा कोणीतरी ऋषींनी लिहिला होता, त्यांनी काही दैवी उपाय सांगितले. त्याचबरोबर त्यांनी वाचून सांगितले की, “तुम्ही भगवंताच्या दरबारातले एक उच्च दर्जाचे मानकरी आहात. तो हे अरिष्ट नक्कीच टाळेल. पण काही तरी त्रास होईलच. तसेच तुमचे पूर्वसंचित आहे.”

त्यानंतर त्यांनी मला तुम्हाला आणखी काही प्रश्न विचारायचे असतील तर विचारा म्हणून सांगितले. मग मी त्यांना माझ्या मात्यापित्यासंबंधी, त्यांच्या स्वास्थ्यासंबंधी काही प्रश्न विचारले. त्यावर त्यांनी सांगितले की, “ऋषींना तुमचे हे प्रश्न ऐकून फार भरून आले आहे. ते म्हणतात की आजच्या या कलियुगात कोण एवढी मातापित्यांची कळजी करतो आहे? जो आहे तो आपल्याच अन् बायकापोरांच्या आणि संपत्ती मिळवण्याच्या नादात! तुमचा प्रश्न अत्युत्तम आहे. ऋषींचा तुम्हाला आशीर्वाद आहे. तुमचे कल्याणच होईल. तुमचे मातापिताही तुम्हाला आशीर्वाद देऊन जातील. त्यांच्याबद्दल काळजी करू नये.”

हे सर्व तिथे लिहिलेले पाहून मला आश्चर्य वाटले आणि माझ्या विज्ञानवादी आग्रही भूमिकेला तो एक मोठा धक्काच बसला! असो.

आत्म्याचे तेजोदर्शन::::

मंत्रचैतन्य

कोणत्याही प्रकारची साधना सुरू करण्यापूर्वी मला काही दृष्टांत झाले होते. त्यातले काही स्वप्नावस्थेतले आणि काही ध्यानस्थ बसलेले असतांनाचे होते. एकदा असे दृश्य दिसले की एका अंधाऱ्या तळघरात मध्यभागी मी आहे. एक मनुष्य तेथे असलेल्या धूपदाणीची ज्वाला फुंकर घालून मोठी करतो आहे. ती मोठी होत जाते. तिचा प्रकाश खूप पडू लागतो. त्या वेळी मी त्या मनुष्यावर नाराज होत म्हटले की, “कशाला उगीच ती पेटवतो आहेस?”

या दृश्याचा अर्थ नंतर लक्षात आला. मूलाधारस्थ /कंदस्थ ज्योतीचे म्हणजे कुंडलिनीचे जागरण झालेलेच होते. तिच्या प्रवासाला ऊर्ध्वगती देण्याचा काळ जवळ आल्याचे सूचन या दृश्यातून झालेले होते.

“ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तराभावश्च।।१-२९।। पा.यो.सू.।।” - प्रत्यक्‌चेतना म्हणजे कुंडलिनी, तिची मंत्रजपाद्वारे जागृती होते. अचेतन मंत्राचा जप करता करता कालांतराने तो मंत्र चेतन होतो. मंत्रचैतन्यालाच कुंडलिनीशक्तीची जागृती असे म्हणतात. श्री.भटांच्या सूचनेप्रमाणे अथर्वशीर्ष व गायत्रीजपाने ही पूर्वजन्मार्जित साधना पुनः अवगत होऊन मंत्रचैतन्य प्राप्त झाल्याने कुंडलिनी जागृत झाली. त्याप्रसंगी मूलाधारस्थ / कंदस्थ धूपप्रज्वलनारंभी जो धूर निघत होता, तो या जागृतीचा निदर्शक होता.

अंतर्गत शक्तिजागृतीपश्चात साधकाला कोणत्याही आसन,मुद्रा, प्राणायामादींची आवश्यकता नसते. शक्तीच काय ते स्वतःच करवून घेते. शक्तिजागृतीलाच शास्त्रात ***शाक्तोपाय*** असे म्हणतात. महायोगाच्या क्रिया म्हणजे ***हठयोग, राजयोग, मंत्रयोग आणि लययोग*** या सगळ्यांच्या आवश्यक त्या क्रिया शक्ती स्वतःच करवते.

शास्त्र सांगते की कुंडलिनी स्वतःची स्वतःच जागृत झाल्यास साधकाने कोणातरी जाणकारास गुरू करावे. माझा गुरूंवर विश्वास नसल्याने मी ज्ञानदेवांनाच गुरू मानले आणि ते एका संतांच्या म्हणण्याप्रमाणे योग्यच होते. तरीही सांप्रदायिक असे एक गुरू मला नंतर मिळालेच.

त्याहीअगोदर काही काळ मी एका लांबलचक बोगद्यात प्रवेश केला असून तो अंधारा आहे. त्याच्या अंती निळा प्रकाश असून एक भृगू नामक ऋषी म्हणताहेत की “निर्भीडपणे पुढे हो! घाबरू नकोस. व्यवहार आणि परमार्थ दोन्हीही साधतील. श्रद्धा ठेव. विश्वास असू दे. काळजी करणे सोडून दे. सगळे ठीक होईल.”

लक्षात असे येते की तो बोगदा म्हणजे सुषुम्नाविवर असून त्याच्या अंती जो निळा प्रकाश दिसत होता, तो आत्म्याचा होता. भृगू हे महर्षी भगवंतांची विभूती आहेत. म्हणजे भगवंताचेच ते वचन होते. योगपथावर अग्रेसर होण्यासाठी त्यांचे सूचन होते. सुषुम्नाविवराच्या अंती पोहोचणे हे एका उच्च अवस्थेचे निदर्शक आहे, जेथे आत्मदर्शन होते.

इतर दृष्टांत

एकदा मोहिनी रूपातल्या सुंदर स्त्रीचे दर्शन झाले. अत्यंत सुंदर मनोहारी द्रुतपदविन्यास करणारे ते रूप होते. महाष्टमीच्या वेळी बायका घागरी फुंकतात, तिथे गेलो होतो. त्या वेळी हे रूप दिसले. ते कुंडलिनी जगदंबेचे स्वरुप होते.

एकदा भ्रूमध्यावर लक्ष लावले असता चंद्रमौली जटाजूटधर ध्यनस्थ शिवप्रतिमांची चलच्चित्रफीत दिसावी तसे दृश्य काही काळ दिसत होते. त्या वेळी भ्रूमध्यावर सहज एकाग्रता होत असे.

माझ्या माहितीतल्या एका नित्यानंद-मुक्तानंदसांप्रदायिक अधिकारी गुरूंनी आपल्या एका शिष्याला असे दृश्य दिसले आणि नाद प्रकट झाला, त्यानंतर आपण होऊन गुरुपद स्वीकारण्यास सांगितले होते. या दोन्ही गोष्टी माझ्याबाबतीत १९८६तच घडलेल्या आहेत.

त्यानंतर काही काळाने मला असे दिसले की मी भगवी वस्त्रे परिधान केलेला एक योगी आहे. हातात एक भलीमोठी माळ आहे. तेथे दुसरा एक योगी येतो व सूचना देतो की माळ उघड्यावर जपू नकोस, तर ती गोमुखीत ठेवूनच जपत जा. आणि त्यासाठी एक मोठी लांबलचक गोमुखीही मला मिळाली.

याचा अर्थ माझी जी काही साधना अंतर्यामी चालली होती, ती कोणातरी अतींद्रिय शक्ती प्राप्त झालेल्या व्यक्तींना समजत आहे, इतकी ती उघड चालली आहे. ती गुप्त ठेवावी, असा इशारा मिळालेला होता. साधना नको त्या व्यक्तींना जाणता आल्याने मला खूपच काही नंतर भोगावे लागले. ते पूर्वी मी सांगितले आहेच. तसेच गतजन्मी केलेली साधनासुद्धा या दृश्यातून सूचित होत होती.

त्यानंतर एकदा एक शेष माझ्यामागे अवतीर्ण झाला आणि त्याने मी तुझ्यात राहणार आहे असे सांगून माझ्या पाठीच्या कण्यात प्रवेश केला. त्यावर मी त्याला विनंती केली की तू रहा इथे. पण अदृश्य स्वरूपात राहा. म्हणजे आपल्याला कोणाचा त्रास होणार नाही. तरीही काही व्यक्तींना त्याचे अस्तित्व जाणवत असेच. त्यातल्या एकाने मला मुद्दामच विचारले की, "काहो! तुम्हाला एवढी मोठी शक्ती प्राप्त झाली आहे, तर तिचे काय करणार?" अर्थातच त्याला मी काहीच उत्तर दिले नाही.

एकदा एक छोटा सोनेरी सर्प दिसला होता. त्याच्या आजूबाजूला पाच सुंदर स्त्रिया होत्या. एका जाणकाराने हे दृश्य कुंडलिनीचे आणि पाच सिद्धी प्राप्त झाल्याचे निदर्शक असल्याचे सांगितले.

ज्ञानेश्वरमाउलीदर्शन

त्यानंतर काही काळाने ज्ञानेश्वरमाउलींचे दर्शन झाले. त्यांची आभा निळी होती. सर्वदूर electric blue प्रकाश पसरला होता. तो मी अजूनही विसरू शकत नाही.

ज्ञानेश्वरांच्या स्वरूपदर्शनाबद्दल एका जिज्ञासूंनी सांगितले की ते पूर्वी शंकरमहाराजांकडे पुण्याला जात असत. एकदा त्या काही जणांनी मिळून महाराजांना विचारले की माउलींचे आताचे स्वरूप कसे आहे, ते सांगा. त्यावर श्रीशंकरमहाराजांनी त्यांना सांगितले की पहा त्यांचे स्वरूप आणि योगबलाने त्यांनी माउलीचे रूप आपल्याठायी साकारायला सुरुवात केली. ते इतके काही चमत्कृतिपूर्ण निळ्याशार वर्णाचे झाले की विचारूच नका! नंतर महाराज पूर्वस्थितीवर येऊन म्हणाले की, "मी तुम्हाला जे काही रूप दाखवले, ते माउलीच्या रूपाच्या केसाएवढेही नाही!"

साधुसंतांचे अनुभव

हे जे काही दृश्ये, प्रकाश, नादादी दृष्टांत होत होते, अनुभूती येत होत्या, त्यांचा काय अर्थ होतो, याचा विचार मी करतो, तेव्हा साधूसंतांना कोणकोणते अनुभव येतात, त्याबाबत मला मार्गदर्शन झाले ते श्री.गुरुदेव रानडे यांच्या ग्रंथातून. त्यातले काही असेः

१) मराठी संतवाङ्मयातील परमार्थमार्ग, २) कन्नड संतवाङ्मयातील परमार्थमार्ग, ३) डॉ.म.वि.पाटणकरः *श्री गुरुदेव लिखित* हिंदी परमार्थसोपान *ग्रंथांतील निवडक पदांवरील प्रवचने* व ४) श्री.ग.वि.तुळपुळे:*गुरुदेव रानडे* - साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान, संतप्रणीत स्वरूप साक्षात्कार मार्ग.

श्री.गजाननमहाराज गुप्ते यांच्या ग्रंथाचा उल्लेख मागेच आलेला आहे. त्यांनी म्हटले आहे की भिन्नभिन्न लोकांचे भिन्नभिन्न अनुभव आहेत. काहींना निरनिराळे देखावे दिसतात. तर काहींना निरनिराळे ध्वनी ऐकू येतात. सद्गुरूंच्या मार्गांचे शोध एकदम लागणार नाहीत. ते फार गहन असतात. काहींना निरनिराळे सुवास येतात. काहींच्या शरीरातील निरनिराळ्या भागात प्राणवायूचे प्रसरण वा आकुंचन होऊन वेगवेगळ्या क्रिया होतात. काहींना षट्चक्रे भेदन करावी लागतात. असे निरनिराळ्या साधूंचे निरनिराळे अनुभव आहेत.

ते सगळे काही शास्त्रात नमूद केलेले नाहीत. अतींद्रिय शक्तीच्या मनुष्यांना कोणाची काय स्थिती आहे, ते कळते. सिद्धांनाही या गोष्टी सांगता येतीलच असेही नाही. ते ते त्यांच्या पूर्वसंचितावर अवलंबून असते. जरी त्यांना या गोष्टींचे अंतर्ज्ञान असले तरी प्रत्यक्ष काही सांगतीलच असे नाही. कळत नाही असेही ते म्हणतील. असो.

आत्मज्योतिदर्शन

या सगळ्या पार्श्वभूमीवर मला कळून आले की मला माउलींचे खरेच तर अंशात्मक का होईना, वास्तवदर्शन झाले होते! आणि त्यानंतर लगेचच काही काळाने पुढील आत्मज्योतिदर्शनाचा प्रसंग वास्तवात घडून आला.

माझ्या साधनेचा एक भाग म्हणून मी पहाटे गायत्रीजप करत असे. तेव्हा निरंजन लावत असे. जप संपला तरी एकदा ते खूप वेळ तेवत होते. त्यात तूप न घालता नेहमी एकाध तास तेवणारे ते निरंजन सतत बारातेरा तास तेवत होते. शेवटी मी फुंकर घालून ते शांत केले. त्यातले तूपही जसेच्या तसेच होते. आश्चर्यच ते!

(टीप:** एकनाथी भागवतात गायत्रीमंत्राचे सामर्थ्य निर्देशिलेले आहे *(ओ.क्र.१३-१०१ ते १०८).* ते म्हणतात: ***"गायत्रीचे गुह्य परम। चिन्मात्रैक परब्रह्म।.. एवं गायत्रीमंत्र ब्रह्मपूर्ण। सकळ सिद्धींचे कारण।... तेणें त्वरित जाण सत्त्वशुद्धी।।१०८।।")

एक जाणकार म्हणाले की हे ज्योतिदर्शन होते. घरातल्यांनाही ते दाखवले होते. पण त्यांना त्याचे कोणतेच रहस्य उलगडले नाही. ज्योतिदर्शनाच्या अंतरंगातील अनुभूतीचे हे असे बाह्य अवकाशावर - पदार्थावर स्थापित होणे, आणि ते इतरांनाही तास न तास दिसणे ही प्रत्यक्षात क्वचितच घडणारी घटना आहे. तसा कोणाचा अनुभव आजपावेतो माहितीत नाही.

या अनुभवानंतर माझ्या हातून गुरुचरित्र आणि गुरुगीतावाचन घडले. दोन दिवसांनी सत्यनारायणही करावासा वाटला म्हणून केला. आत्मयाराजाचे त्याच्या दर्शनार्थ आनंद साजरा कर म्हणून हे निर्देश असावेत तसे हे घडले.

असाच एक अनुभव सांगतो. एका सत्पुरुषांच्या शिष्यगणांनी त्यांचे काही video चित्रीकरण केले होते. त्यात ते सत्पुरुष जिकडे बसले होते तिकडे समई आणि निरंजनाच्या ज्योती आकर्षित होऊन त्यांच्याकडे झुकलेल्या दिसत होत्या. तसेच ते जेव्हा एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात होते, तेव्हा त्यांच्यामागोमाग ज्योतींची प्रकाशरेषा त्यांच्याकडे खेचली जात असल्याचेही दिसत होते. हे दृश्य मी स्वतः नीट निरखून पाहूनच हे सांगतो आहे. तेव्हा साधना आणि ज्योत्याकर्षण यांचा काहीतरी गूढ संबंध असला पाहिजे, हे माझ्या लक्षात आले.

ज्योतिदर्शनासंबंधी संत जनाबाईंचेही दोन अभंग लक्षणीय आहेत:

ज्योत पाहा चमकली। काय सांगू त्याची बोली।।१।।
प्रवृत्ति निवृत्ति दोघी जणी। लीन होती त्याच्या चरणीं।।२।।
परा पश्यंति मध्यमा। वैखरीची जाली सीमा।।३।।
चारी वाचा कुंठित होति। सोऽहं ज्योति प्रकाशली।।४।।
ज्योत परब्रह्मी जाणा। जनी म्हणे निरंजना।।५।।

प्रवृत्तिनिवृत्ति आणि चारी वाचा जेथे लीन होतात, ती सोऽहंज्योती असते. ती परब्रह्मातच असते, तेच निरंजन आहे. असे त्या म्हणतात. पुढे त्या असेही म्हणतात की:

ज्योत परब्रह्मी होय। खेचरी दर्पणीने पाहे।।१।।
इडा पिंगळा सुषुम्ना। तिन्हीं पाहें हृदयभुवना।।२।।
हळूं हळूं रीघ करी। सूक्ष्म तया अंतरीं।।३।।
हृदयकमलावरी जासि। जनी म्हणे मुक्त होसी।।४।।

ज्योत परब्रह्मातच असते, ती खेचरी मुद्रा लावून कळते. इडा-पिंगळा आणि सुषुम्ना या तिन्ही नाड्या ज्या हृदयभुवनात *(आज्ञाचक्रावरील)* प्रवेश करतात, त्या सूक्ष्म हृदयात सावकाश रीघून हृत्कमलाच्या वर गेला की साधक मुक्त होतो.

मला दिसलेल्या ज्योतीचे हे स्वरूप होते तर! परंतु त्या वेळी ते न कळल्यामुळे माझी मन:स्थिती मोठी द्विधा झाली होती. त्यामुळे माझी बावचळल्यासारखी आणि आंदोलित अशी मानसिक अवस्था झाली होती.

त्या वेळी त्याच कृष्णभक्त संतिणींची मला फार मदत झाली. ज्योतिदर्शनानंतर साधारणपणे एकवीस दिवस हा काळ गेला. त्यानंतर त्यांची भेट झाली. त्या दिवशी संत श्री रामकृष्णांची जयंती होती. त्यांना माझी अवस्था सांगितल्यावर त्यांनी मला एका खोलीत बोलावले. माझ्याकडे पाहात त्यांनी मला बराच उपदेश केला.

त्या म्हणाल्या: "तुला माझे *(कृष्णाचे)* संरक्षण आहे. घाबरू नकोस. तू ध्यानयोगी आहेस. तर मी दाखवते त्या मुद्रा करत जा. रोज सकाळ संध्याकाळ किंवा निजतांना ज्ञानमुद्रा आणि चिन्मुद्रा करत जा. रोज झोपण्यापूर्वी दहा मिनिटे पादांगुष्ठासन करत जा. सकाळी दहा मिनिटे रोज सुखासनात बसत जा. निष्काम कर्मयोग आचर. कर्मे करण्याचे सोडले आहेस, तसे करू नकोस. सर्व कर्मे ***"श्रीकृष्णार्पणमस्तु"*** अशी अंत:करणस्थ श्रीकृष्णपरमात्म्यास अर्पण करत जा. इतर काहीही करण्याची जरूरी नाही. कोणाकडेही काही विचारायला जाऊ नकोस. तुझा गुरू श्रीकृष्णच स्वयं आहे. मला साष्टांग नमस्कार कर."

त्याप्रमाणे मी त्यांना नमस्कार केला आणि सांगितले की आपण जे काही सांगता आहात, ते माझ्याकडून करवून घ्या. त्यानंतर त्यांनी त्यांच्या उजव्या हाताचा तळवा एका विशेष रीतीने माझ्या टाळूच्या अलीकडून केसांना स्पर्शिल्यासारखा करत फिरवला आणि म्हणाल्या की, "मी तुझ्यासाठी ध्यान करीन."

या प्रसंगानंतर साधारणपणे तीनएक महिन्यांनी जन्माष्टमीला मी त्यांना परत भेटायला गेलो होतो. तेव्हा म्हणाल्या की आज मला भेटणाऱ्यांसाठी श्रीकृष्णाचा हा संदेश आहे. लक्षात ठेवा, मी समुद्र नाही. तुम्ही पण नाही. आपण त्या चित्समुद्राचे बिंदू आहोत केवळ. तुमच्या नावेचे मी शीड आहे. तुम्ही मला देता, मी तुम्हाला देतो. मी तुमच्यात अडकत नाही. पण तुम्ही मात्र मझ्यात अडकता."

नंतर म्हणाल्या, ***"कर्मण्येवाधिकारस्ते..."*** आणि ***"योगक्षेमं वहाम्यहम्।"*** हे नीट लक्षात असू दे."

दासबोध आणि श्रीमद्भागवत

अनेक वर्षे माझ्याकडे श्री बेलसरे महाराजांचा मोठ्या कौतुकाने घेतलेला ग्रंथराज श्रीमत् दासबोध, एकनाथमहाराजांचे भागवत आणि संस्कृतातील हिंदीत भाषांतर केलेले गोरखपूर गीताप्रेसचे श्रीमद्भागवत महापुराण हे ग्रंथ थोडेफार चाळून ठेवून दिलेले असे पडून होते. त्यांच्याकडे अधून मधून लक्ष जायचे आणि चुटपुट लागायची की आपल्या प्रघाताविरुद्ध हे उत्तम ग्रंथ तसेच न वाचता का बर पडून आहेत.

बरीच वर्षे गेली आणि नंतर खूप दिवसांनी ते तिन्ही ग्रंथ वाचून आनंद मिळाला. त्यातील दासबोधाची ही गोष्ट. श्री शामराव चितळे म्हणून माझे एक ज्येष्ठ मित्र होते. त्यांच्या मंडळाने माझ्याकडून माझा ग्रंथ "**योगदा श्री ज्ञानेश्वरी**" हा वाचून आणि समजावून घेतला होता. ते एकदा म्हणाले की "आमचे मंडळ दरवर्षीप्रमाणे या वर्षीही दासबोध पारायणाचा सप्ताह करणार आहे. त्याच्यातर्फे मी तुम्हाला विशेष निमंत्रण देतो."

मी विचार केला की श्री रामदासस्वामींचे वाङ्मय आपण थोडेसे वाचून सोडून देतो. त्याऐवजी तेथे जाऊन नीट एकदा पारायण तरी होईल. मग श्री बेलसरे महाराजांचा भलामोठा दासबोध घेऊन मी तेथे हजर झालो आणि पारायणात भागही घेतला. पण इतर मंडळींसारखा नाही. ते लोक मोठ्याने वाचत जात होते आणि मी माझ्या ग्रंथातून त्या ओव्यांसह श्री बेलसरे यांचे भाष्यही मनातल्या मनात त्याचवेळी वाचत जात होतो आणि शिसपेन्सिलीने खुणाही करत होतो.

अशा रीतीने तो ग्रंथ एकदाचा माझ्याकडून अर्थासहित संपूर्ण वाचला गेला. अगदी समर्थ म्हणतात तसा, सार्थ आणि मननासहित! त्यानंतरही काही वर्षे मी तेथे नियमित जात असे. समर्थभक्तांच्या भेटीगाठी होत असत आणि सहजच समर्थवाङ्मयाचा संपर्क घडत असे.

माझे समर्थांच्या दासबोधावरले विचार

हा उपक्रम चालू असता प्रायोजकांनी एका वर्षी मला त्यावर काही मनोगत व्यक्त करा असे म्हटले. त्यास अनुसरत मी त्या पारायणी वाचकवृंदापुढे एक तीन मिनिटांचे मनोगत एकदा व्यक्त केले. त्याचा वृत्तांत पुढे दिला आहे. जाणकारांना त्याचे फार अप्रूप वाटले. मी त्यांना सांगितले:

प्रिय समर्थभक्त उपस्थित बंधू आणि भगिनींनो,

दिलेल्या तीन मिनिटात माझे विचार मांडतो. मी नाथसांप्रदायिक आहे. श्रीमत् ग्रंथराज दासबोधाकडे व आत्मारामाकडे मी आकृष्ट होऊन गेली पाच वर्षे सातत्याने येथे येत आहे. नेहमीप्रमाणेच पारायण नियोजनबद्ध व उत्तमरीत्या संपन्न झाले. याबद्दल सर्वत्रांस धन्यवाद!

श्रीरामदासस्वामीसमर्थांचा भर श्रवण, वाचन, मनन आणि प्रत्यय या साधनाचतुष्ट्यावर आहे. चित्तवृत्ती शुद्ध करत जा **श्रवण-मनन-निदिध्यास-साक्षात्कार-प्रत्यय** या मार्गाने साधकाने अद्वैतस्थिती प्राप्त करून घेण्याचा मार्ग ते त्यांच्या दासबोधादी ग्रंथांद्वारे सांगतात. त्यासाठी त्यांच्या ग्रंथांचा साधकांना मोठा आश्रय आहे. ते म्हणतातः

ग्रंथां नाम दासबोध । येथ बोलिला विशद भक्तिमार्ग।
येथ प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा।।

हा ग्रंथ दाशरथी श्रीरामाने केला आहे. त्याचे **स्तवन** करणे म्हणजे **अभ्यास** करणे आणि त्याप्रमाणे **श्रीरामाचा प्रत्यय घेणे**. यात साधकास सर्वस्व मिळेल. यासाठीच आपण सद्ग्रंथांचे पारायण करतो.

श्रीमत् दासबोधात या प्रत्ययाच्या पायऱ्या मला दिसल्या, त्या अशाः

संदर्भ – दशक–७वा, समास–३राः यात समर्थांनी चौदा ब्रह्मे सांगितली आहेत. माझ्या मते साधकांना, मग ते कोणत्याही मार्गाने का जाईनात, कर्म, भक्ती, ज्ञान वा योग, त्यांना या चौदा ब्रह्मांचा प्रत्यय आल्याविना राहणार नाही. अशी ही जाणत्यांची खूण आहे. ती आपण ओळखून घ्यावी. सुज्ञ ती ओळखतातच!

१. शब्दब्रह्म - दिसणारा प्रपंच
२. मितिकाक्षर ब्रह्म - एकाक्षर **ॐ** ब्रह्म
३. खं ब्रह्म - आकाशतत्त्व (चिदाकाश)
४. सर्व ब्रह्म - सत् तत्त्व
५. चैतन्य ब्रह्म - चित् तत्त्व
६. सत्ता ब्रह्म - अर्धनारीनटेश्वर - प्रकृतिपुरुषविवेक
७. साक्ष ब्रह्म - साक्षीभाव
८. सगुण ब्रह्म - जयापासूनि साक्षीभाव, ती अवस्था

९. निर्गुण ब्रह्म - गुणक्षोभरहित अवस्था

१०. वाच्य ब्रह्म - संतांचे शब्द/ श्रुति इ. तून ब्रह्मप्रत्ययाची वाक्ये, उद्गार इ. ची अनुभूती येणे

११. अनुभव ब्रह्म - प्रत्यय, तुर्या - उन्मनी अवस्था

१२. आनंद ब्रह्म - सच्चिदानंदातील आनंदाविष्कार - आनंदमय कोषातील स्थिती

१३. तदाकार ब्रह्म - **मी-तू**पण मावळून स्वरूपाकार होण्याची स्थिती - अद्वैतावस्था

१४. अनिर्वाच्य ब्रह्म - अहंकाराचा संपूर्ण लय - वाच्य-वाचकभावाचाही लय - अशी संपूर्ण स्वरूपाकार होण्याची स्थिती, जिच्यात अद्वैतही नाही अशी अवस्था. तुर्यातीतावस्था

या सर्व साधनामार्गावरील (कर्म-भक्ति-ज्ञान वा योग) साक्षात्काराच्या पायऱ्या आहेत. यातूनच आपला प्रवास पुढे होत जातो आणि अनिर्वाच्य स्थिती प्राप्त होते.

समर्थ रामदासस्वामी म्हणतातः

"आवाहन विसर्जन। हेचि भजनाचे लक्षण।।"

आवाहन म्हणजे विश्वोत्पत्तिक्रम - प्रसवक्रम - सृजन

विसर्जन म्हणजे लय, प्रतिप्रसवक्रम. यासच समर्थादी संतांनी **"मूळ शोधून पाहे"** असे लाक्षणिकरीत्या म्हटलेले आहे.

"उगमाकडचा प्रवास" तो हाच!

सर्व साधक, योगी आणि इतरही, **प्रसवक्रम** ते **प्रतिप्रसवक्रम** असा हा मार्ग घेतात.

"ज्ञात्यास अनुमान मानेना।" म्हणून समर्थ सांगतातः **"सिद्धाचियें खूणें। पावलें पाहिजे।।"**

श्रीमत् ग्रंथराज दासबोधातल्या याच **सिद्धांच्या खुणा** सद्गुरू श्री ज्ञानराजमाउलींच्या कृपेने मला जशा स्फुरल्या तशाच आपणापुढे निवेदित आहे. त्या गोड मानून घ्याव्यात, ही नम्र विनंती! त्यात काही चुकत असेल तर ते माझ्या पदरचे!

सर्व उपस्थितांप्रति सद्भाव व्यक्त करून हे मनोगत पूर्ण करतो. ।।श्रीराम समर्थ।।

बराच वेळ टाळ्यांचा कडकडाट होत होता आणि तेथील समर्थांना जीवन वाहिलेल्या श्रोतृवृंदाने श्रीमत् दासबोधाचे मी केलेले हे स्वल्प पण उत्कट रसग्रहण मान्य असल्याची पोचपावती दिली! ही सर्व माझ्यावरील ज्ञानेश्वरमाउलींची कृपा!

योगविज्ञान::::

तीन ग्रंथी

जोपावेतो तिन्ही ग्रंथींचा वेध होत नाही, तोपर्यंत कुंडलिनीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. ग्रंथींचा एकदा का वेध झाला की त्यांचे पुनर्गठन होऊ शकत नाही. एकदा हे झाले, कुंडलिनी आज्ञाचक्रावर गेली की तिला कुलकुंडलिनी असे म्हणतात. ती तेव्हा उपास्य देवतेचे स्वरूप धारण करते. षट्चक्रांच्या मार्गात ती सरळ उभी होऊन देवतास्वरुप घेते. कुलकुंडलिनी मूलाधार ते सहस्त्रार या अवकाशात कोठेही जाऊ शकते. तिला कसलेच बंधन नसते. कौलसिद्ध ***गोल्हाट, ललाट*** आणि ***ललना*** या शेवटच्या तीन चक्रात स्थित होतात.

ब्रह्मग्रंथि

आज्ञाचक्रावर ब्रह्मग्रंथी असते. तिचा वेध सगळ्यात शेवटी होतो. तिच्यावर पीत-श्वेत-अरुण व कृष्ण अशा रंगाची दीपशिखातुल्य ईश्वरकला असते. हीच ज्योती होय. ईश्वरकलेच्या शिखेवर अग्रभागवत सदाशिवकला असते, जी विद्युत सदृश आहे. याच कलेची अनुभूती मी अशीच घेतली आहे. विद्युतसदृश सरळ व दीपशिखावत दैदिप्यमान ज्योत भ्रूमध्यातून उठून वर मस्तकाकडे जातांना मी पाहिली होती. मस्तकावरील भ्रूमध्यबिंदूत त्याआधी भयंकर दुखले होते. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत असत की ईश्वर लांब असतो तेव्हा निळा दिसतो. जवळ आला की तो शुभ्रवर्णाचा होतो.

कुंडलिनी

"वाताशङ्कविमोहिनीती बलवच्छायापटोद्गामिनी संसाराब्दि-महासुखप्रहरिणी तत्रस्थिता योगिनी। सर्वग्रन्थिविभेदिनी स्वभुजगा सूक्ष्मातिसूक्ष्मा परा ब्रह्मज्ञानविनोदिनी कुलकुटीराघतनी भाव्यते।।५।। श्रीकुण्डलिनीस्तुतिस्तोत्र।।" - ब्रह्मा-विष्णु-रुद्र या ग्रंथींचा भेद स्वबलाने करणारी, इतर कोणाच्याही बलाची व आधाराची अपेक्षा नसणारी पराशक्ती आहे. ती स्वतःच्या भुजांनी सरपटणारी आहे. कोणाच्या सामर्थ्याने मार्गस्थ होण्याची तिला अपेक्षा नाही व ती कोणाच्याही बलाने मार्गात अवरुद्ध होऊ शकत नाही. ती योगिनी असल्याने ती सर्वतंत्रस्वतंत्र आहे.

उत्तम गायनवादन, संगीताने कुंडलिनीचा अनुभव होतो. मलाही हा अनुभव अनेकदा आला. अशा कार्यक्रमात मला नाभिस्थ प्राणशक्तीचे प्राणायामक्रियेद्वारे आज्ञा चक्र ते ब्रह्मरंध्रापर्यंत संचालन होत आहे, असे दिसून आले.

मुख्य अशा पंधरा योगनाड्या

१) सषुम्ना - गुदाजवळून निघून मेरुदंडातून मस्तकावरपर्यंत जाते. त्याच स्थानाहून निघून ***२) इडा*** ही नाडी डाव्या बाजूने आणि ***३) पिंगला*** ही नाडी उजव्या बाजूने नासिकामूलापर्यंत जातात. तेथ भ्रूमध्यांत या तिन्ही नाड्या एकमेकींशी मिळतात. कंदमूलातून त्या निघतात, त्याला मुक्त त्रिवेणी म्हणतात आणि आज्ञाचक्रात मिळतात, ते आहे युक्त त्रिवेणिस्थान.

सुषुम्नेच्या आत ***वज्रनाडी*** तिच्याही आत ***चित्रा*** आणि तिच्याही आत ***ब्रह्मनाडी*** असतात. या सर्व नाड्या कोळ्याच्या जाळ्यासारख्या अतिसूक्ष्म असतात. त्या सत्त्वप्रधान, प्रकाशमय आणि अद्भुतशक्तीने संपन्न असतात.

४) गांधारी व ***५) हस्तिजिह्वा*** -या क्रमशः वाम आणि दक्षिण नेत्रांपासून वाम आणि दक्षिण पादांगुष्ठांपर्यंत जातात. मला कृष्णाताईंनी ***पादांगुष्ठासन*** करायला सांगितले होते, त्यामागे हेच कारण असले पाहिजे.

६) पूषा व ***७) यशस्विनी*** - क्रमशः वाम आणि दक्षिणकर्णांत श्रवणार्थ असतात.

८) शूरा- गंधग्रहणार्थ नासिकाप्रांतात भ्रूमध्यापर्यंत जाते.

९) कुहू - मुखात जाते.

१०) सरस्वती - जिह्वेच्या अग्रापर्यंत जाऊन ज्ञान आणि वाक्य प्रकट करते.

११) वारुणी, १२) अलंबुषा, १३) विश्वोदरी, १४) शंखिनी व १५) चित्रा.

अनाहतध्वनी

षण्मुखी वा चतुर्मुखी मुद्रेत कानात बोटे घालून ऐकतात, तो काही अनाहतनाद नव्हे. तो केवळ रक्ताभिसरणाचा आवाज असतो. ***प्रणवरूप ज्ञातजप व हंसः हा अज्ञातजप*** यांचा समन्वय करून एक कोटी अजपाजप झाला असता हे अनाहतनाद ऐकू येतात. ***"स एवं जपकोट्यानादमनुभवति"*** असे श्रुतिवचन आहे. सुषुम्नानाडीने परमेश्वराची भेट घेण्यासाठी ब्रह्मरंध्राकडे जाणाऱ्या साधकाला हा नाद ऐकू येतो.

अनाहतध्वनीच सदाशिव आहे. सदाशिवच साक्षात ***शब्दब्रह्म*** आहे. त्रिगुणमय ॐकार तो हाच. ज्याच्याठायी अनाहतनाद प्रकटला आहे, त्याने ऐकलेले / केलेले मंत्र-अक्षरादी वाङ्मय चिन्मय असते. त्याचा त्याला व इतरांनाही लाभ होतो. याचसाठी अनेक संतमहात्मे कवने, ग्रंथ इ.रचतात. त्यांच्यात दिव्य शक्ती असते. माझाही या ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** चा हा प्रकल्प असाच तर आहे, याची मला खात्री आहे.

किंबहुना ज्याने ते परमपद एकदा पाहिले, तो त्याची अभिव्यक्ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात करणारच! तेही ***"स्वान्तःसुखाय" आणि "लोकहिताय च।"*** हाच ज्ञान्याचा लोकसंग्रह! त्याच्या देहपातानंतरही चालणारा! याचसाठी आहे ज्ञानेश्वरी आणि वेद, उपनिषदे आणि दासबोध-भागवतादी पवित्र अन् पूज्य ग्रंथ. ते अशाच द्रष्ट्यांनी याच कारणासाठी मागे ठेवले आहेत.

आज्ञाचक्र

सुगमता आणि शीघ्र सिद्धीसाठी आज्ञाचक्र आणि सहस्त्राराचे ध्यान करावे. आज्ञाचक्रच दिव्यदृष्टी प्रदान करणारा ***दिव्य शिवनेत्र*** होय. या ठिकाणी मन व प्राण स्थिर होतात आणि संप्रज्ञातसमाधिस्थित होण्याची योग्यता येते. त्यालाच ***हृदय*** असे सर्व शास्त्रात म्हटले जाते. श्रीरमणमहर्षींनी त्यांच्या गीतेत अनाहतनादाचे हेच स्थान असल्याचे सूचित केले आहे. कारणदेहाचे हे स्थान आहे. कुंडलिनी जेव्हा या स्थानावर पोहोचून स्थिर होते, तेव्हा संसारभय उरत नाही. जी वृत्ती उत्पन्न होते, ती यथार्थरूपात समोर येते. हीच वस्तुतः समाधी होय. वृत्ती समोर येईल तेव्हा गायत्रीचा जप करावा. वृत्ती मावळेल.

कुंडलिनी एकदा आज्ञाचक्रावर गेली की कर्माचे बंधन गळून पडते आणि साधकाचे संसारात लक्ष राहत नाही. आज्ञाचक्रात पोहोचले की पंचमहाभूतांचे अतिक्रमण होते. म्हणून असे होते. हा पुढचा अवकाश ***शून्य*** म्हणूनही ओळखला जातो.

आज्ञाचक्रात अर्धनारीनटेश्वराचे स्थान असते. त्यानंतर हळूहळू साधकाचे जगद्भान जात राहते.

ललना व गुरुचक्र

प्राणतोषिणी तंत्रानुसार ***ललनाचक्र*** ६४ पाकळ्याचे असते व ते तालुस्थानी असते. ***गुरुचक्र*** शतदल असून ते ब्रह्मरंध्रात असते.

स्वाधिष्ठान चक्र

स्वाधिष्ठान चक्राच्या जागी एक उलटा त्रिकोण दिसला. त्यातून एका पाईपमधून सतत पाणी वाहते आहे, असे दृश्य दिसले. त्या चक्राचा वेध होत होता. सर्वात शेवटी त्या चक्राचा वेध करावा असे कादिमार्गाचे मत आहे. म्हणजे वीर्यशक्तीचे तेजात सहज संक्रमण होते. माझ्या मार्गात हा वेध खूप खूप काळाने झाला असल्याचे दिसते.

चक्रांचे स्वरुप

माझ्या चक्रांच्या अनुभवावरून मी निश्चित असे सांगू शकतो की योगविषयक ग्रंथात जी वेगवेगळ्या चक्रांची छापील चित्रे असतात, तशीच काही ती चक्रे नसतात. यौगिक वा तांत्रिक पद्धतीत प्रत्येक कमलाला वा चक्राला काही विशेष असल्याचे समजले जाते. त्यांच्या प्रतीकात्मक अशी ती चित्रे असतात. वेगवेगळी अक्षरे त्यांच्या पाकळ्यांवर दाखवलेली असतात, तशी कोणतीही अक्षरे त्या चक्रांवर नसतात, ती अक्षरे म्हणजे त्या चक्राच्या नादाची म्हणा, कंपनांची म्हणा, सृष्ट्यभिव्यक्तीची म्हणा, प्रतीकाक्षरे होत. तेथील देवता इ.सर्व काही तांत्रिक प्रतीके होत.

चक्राच्या मधला बिंदू जो असतो त्यातून शक्तीचे संचलन होत असते आणि ती त्या चक्राच्या जेवढ्या पाकळ्या असतात, त्याच्या अर्धी इंग्रजी आठाच्या आडव्या केलेल्या आकड्याची (8) आवर्ते त्या बिंदूभोवती घेतघेत आपला त्या चक्रातून पुढचा मार्ग क्रमते. दोन पाकळ्या मिळून आठाचा आकडा होतो. अशा लंबवर्तुळाकृती आवर्तमार्गामुळेच त्याला कमलाचे दल आणि चक्राला कमळ असे रूपक यौगिक संज्ञांत मिळालेले आहे. हे यौगिक रहस्य जे आजपावेतो माझ्या पाहण्यात कोणाही योग्यांनी सांगितलेले दिसत नाही ते मी विशेष अनुभवांती आणि अत्यंत जाणिवपूर्वक योगसाधकांसाठी मुद्दाम सांगत आहे.

मला काही साधकांनी चक्रांचे अनुभव अगदी पुस्तकी थाटाचे सांगितले आहेत. त्याच्या गुरूंनीही वाहवा म्हणून माना डोलावल्या आहेत. पण ते तसे नाही आणि ते त्यांचे कथित अनुभव हे सगळे भ्रम आहेत, असे मी निश्चितपणे त्या त्या साधकांच्या आणि त्यांच्या गुरूंच्या कल्याणार्थ इथे नमूद करतो आहे. असो. हा जो मार्ग ती शक्ती क्रमते तोच सुषुम्ना मार्ग होय.

तळवा व चक्रे

एकदा माझी हाताच्या तळव्याकडे नजर गेली तर तो गर्द जांभळ्या रंगाचा दिसू लागला. तळहातावर सर्व मूलाधार ते सहस्त्रार चक्रे असतात. वेगवेगळ्या चोवीस हस्तमुद्रांचे जे प्रयोग गायत्रीच्या संध्यावंदनात करतात, त्यांचा चक्रे आणि कुंडलिनी उत्थानाशी शास्त्रोक्त संबंध असतो. यौगिक नाड्यांचाही असाच संबंध तळपायाशी असतो.

एकनाथी भागवत::::

महायोग

सतत ऐकू येणाऱ्या अनाहतनादाचा जसजसा मी वेध घेऊ लागलो, तसतसे वेगळेच योगविश्व माझ्यापुढे उलगडू लागले. नुकतेच मी श्रीएकनाथमहाराजांचे भागवत वाचू लागलो होतो. त्यातील खुणा केवळ जाणकारांसाठीच आहेत. संपूर्ण योगप्रक्रिया सांगत ते म्हणतातः

महामुद्रा म्हणजे ***भूचरी, खेचरी, अगोचरी, चाचरी व अलक्ष्य*** यांचा समन्वय करणारी मुद्रा. ही केली असता प्राणापानांचे सामरस्य होते. एकाग्र मनाने साधना करून सुषुम्नेद्वारे प्राणापान चालवावे. मग ***उल्हाटयंत्र*** म्हणजे कुंडलिनीशक्तीच्या बळाने षट्चक्रभेदन होते. नंतर सतरावीचे तळे गाठावे जेथून ब्रह्मरंध्रातील अमृतस्राव होतो. ते अमृत प्राशन होताच अनुहाताची गर्जना ब्रह्मरंध्रातून ऐकू येते. तेथे सोऽहंध्यानाची परिसीमा आहे. ***"प्राणापान=➢ पवन=➢ मन पवन =➢कुंडलिनीसह जीव व प्राण हे एकवटून - ➢ ब्रह्मरंध्र गाठताच" अनुहत निशाण*** योगदुर्गावर चढते आणि हा नाद म्हणजे आपणच हे अनुभवास येते. तन्मयता प्राप्त होऊन समाधी साध्य होते *(अध्याय क्र.१ ओव्या क्र.१०३ ते १५३)*. या ओव्यांतून दिसून येते की ***"सतरावी जीवनकला -➢ मनकर्णिका ओवरी -➢ब्रह्मरंध्र"*** अशी वाट आहे.

एकनाथमहाराजांच्या या सांगण्यावरून कळते की ***अनुहातनादप्राप्ती ही षट्चक्रभेदनानंतरची अवस्था आहे. प्रथम षट्चक्रभेदन, त्यानंतर सतरावी कला = अमाकला = अमृतकला=अमनस्का प्राप्त होते. त्यानंतर अनुहात नाद ऐकू येतो. मनकर्णिका ओवरी पार करून प्राण ब्रह्मरंध्री उसळतात, तेव्हाही तो ऐकू येत असतो. त्यात सातत्य असते. ब्रह्मरंध्री स्थिती होताच प्राण त्यापुढेही उसळतात —➢ते थेट पुढे -- -➢अलक्ष्याच्या प्रांतात. तेव्हाही अनुहात नाद असतो. तो आत्म्याची ओळखण आहे. अनुहतनादश्रवण हीच अंतिम समाध्यवस्था आहे.***

श्रीएकनाथांनी जवळजवळ ७०-७५ ओव्यांतून पुढे बाराव्या अध्यायातही या विषयावर बराच प्रकाश टाकला आहे. श्रीमद्भागवतातील ***"स एष जीवो विवरप्रसूतिः। प्राणेन घोषेन गुहा प्रविष्टः।। मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रूपं। मात्रा वर्ण इति स्थविष्ठः।। ११-१२-१७।।"*** या श्लोकावर विवेचन करतांना ते म्हणतातः

"जडात प्रवेशून त्याला जो जीववतो, तो जीव! तो चैतन्यरूप असतो. हा खरा तर शिवच होय. पर व अपर यांच्याही पलीकडे ***परा*** या नावाने प्रसिद्ध असा ***नाद*** असतो. आघाताविण वा वायूविना तो येतो म्हणून त्याला ***अनाहतनाद*** असे म्हणतात. त्या नादसुखाची गोडी सनकादिक आणि सदाशिव नित्य उपभोगतात."

अनाहतनाद

जीवाने विवरप्रवेश केला की हा नाद उत्पन्न होतो. प्राणांचा घोष तो हाच नाद. ज्ञानदेवांनी ***"घोषाचियां कुंडीं। नादचित्रांचि रूपडी। प्रणवाचिएं मोडी। रेखिली आईसि।।६-२७६।।"*** असे या हृदयस्थ अनाहतनादाचे वर्णन केले आहे. हे हृदय म्हणजे ***आध्यात्मिक हृदय*** होय. अनाहतचक्राजवळचे स्थूल हृदय ते हे नादसंबंधित हृदय नव्हे. या विषयाचा ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** च्या योगविषयक विभागात बराच उहापोह झालेला आहे. थोडक्यात म्हणजे ***अमात्रेचा प्रांत - आज्ञाचक्र ते ब्रह्मरंध्र*** **- हा विभाग हृदय म्हणून योगिजनांत ओळखला जातो.** तेथील खाणाखुणा आहेत या.

हा नाद ***भ्रमरगुंफा*** असते, तेथून ऐकण्यास सुरुवात होते. अनाहतनादरूपी चित्रे तेथे ॐकाराच्या वळणांनी स्पष्ट होतात किंवा ***ॐकाराचे मूळ द्रव्य तो हाच अनाहतनाद.***

महायोगावरील टीपा

एकनाथी भागवतातून अजूनही अनाहतनाद आणि योगशास्त्रसंबंधित बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतात. त्या पुढे पाहू या. पण त्या ओव्या बऱ्याच असल्याने आणि एकनाथी भागवत हा आपल्या चर्चेचा मूळ विषय नसल्याने त्यातल्या काही उल्लेखनीय ओव्यांचा निर्देश करून पुढे जाऊ या. त्यातूनही योगपथजिज्ञासूंना काहीतरी अधिक मिळेलच. ज्ञानेश्वरांच्या पंथराजाच्या खाणाखुणा सांगणाऱ्या काही ओव्या अशा:

करूनि धुरें। निरसी अज्ञानाचे अंधारें।
वैराग्याचें बळें पुरें। *महामुद्रेचेनि योगें*।।९-११७।।ए.भा.।।

टीप १: माझ्या स्वतःच्या अखंड दीपज्योतीच्या अनुभवास ***"निरसी अज्ञानाचें अंधारे ..महामुद्रेचेनि योगें।११८।।"*** या ओवीतून पुष्टी मिळते. महामुद्रा सिद्ध झाल्यामुळे तेज प्रकट झाले होते *(भूचरी, खेचरी, अगोचरी, चांचरी व अलक्ष्य मिळून ही मुद्रा सिद्ध होते.)* आणि त्या प्रकाशात अज्ञानाचा नाश झाला होता, असे तो प्रसंग दाखवतो.

प्राणापानाची चुकामुकी। झालीं होती बहुकाळीं।
केली वोळखी दोघेंसी। विवेकदीप।।९-११८।।
वोळखीसवेंचि जाण। पावली जुनाट पहिलीं खूण।
दोघां पडलें आलिंगन। समाधान सामरस्यें।।११९।।
दृढ बैसोनि आसनीं। ऐशी *प्राणापान मिळणी*।
***करूनी लाविली निशाणी। ब्रह्मस्थानी रिगावयां*।।१२०।।**

ब्रह्मगिरीचियां कडां। शमदमें घालूनियां वेढा।
प्रत्याहाराचा झगडा। पुढिलें कडां लाविला।।१२१।।
***प्राणापानांचां विवरीं*। पहिली ओळख होतीं खरी।**
***माळ* लाविली अभेद करीं। मन एकाग्र राखौनि।।१२२।।**

टीप २: माळ *(१२२,१२८)* हे ब्रह्मगिरी म्हणजे ब्रह्मरंध्रावर चढून जण्यासाठी लावलेल्या प्राणापानांच्या शिडीला म्हटले आहे.

एकाग्रतेचेनि कल्लोळें। पुढारें न ढळवें चालिलें।
***उल्हाटयंत्राचेनि मेळें। षट्चक्रपाळें भेदिलें*।।१२३।।**
वैराग्याची वज्रकवचें। निधडे वीर लेऊनी सांचें।
एकाग्रताबळें बळाचें। *झळकें ध्यानाचें करीं खड्ग*।।१२४।।
नवल खड्गाचा पाहो। लहानथोर निवटी पाहा हो।
संमुख आलिया संदेहो। न लगतां घावो छेदित।।१२५।।

टीप ३:"एकाग्रताबळे बळाचे। झळकें ध्यानाचें खड्ग ।। १२४, १२५।।" या ओव्यात ज्या ध्यानखड्गाचा उल्लेख आहे, त्याच ध्यानखड्गाचा माउलींनी आपल्या ***"आणि निवटी ध्यानाचें खांडें। तैं दुजें नाहींचि फुडें।।१८-१०७८ ते १०८३।।"*** या ओव्यातून निर्देश केला आहे. आणि ***"दुजे नाहीचि फुडें"*** याप्रमाणेच एकनाथही ***"शोधितां पारखें नाहीं कोणी।।१३७।।"*** असेच म्हणतात.

निर्दाळूनि आळसासी। दासी केली निद्रेसी।
ऐसें सावधान अहर्निशीं। योगदुर्गासीं झोंबत।।९-१२६।।
रणंगणीचें वीर गाढे। निजबळें चालले पुढें।
***सत्रावीचे पाणियाडें। जिंतिलें रोकडें* महावीरीं।।१२७।।**

टीप ४: उल्हाटयंत्र = कुंडलिनी; ज्ञानदेवांनीही ***"उल्हाटशक्तीचेनि उजियडें। मनपवनाचेनि सुरवाडें। सतरावियेचें पाणियाडें। बळियाविलें।।९-२१४।।"*** या ओवीत कुंडलिनीला ***उल्हाटशक्ती*** असे म्हटलेले आहे. त्यांच्या *ओवी क्र.२१२ ते२१९* यातून आपण आता पाहात असलेल्या एकनाथांच्या ओव्यांप्रमाणेच या कुंडलिनीप्रक्रियेचे वर्णन आहे.

तेथ युद्ध झालें। कामादिक अरिषड्वर्ग।
रणीं पाडिलें अमोघ। सतेज खड्ग झळकत।।१२८।।
ऐसें वैरी पाडूनि रणीं। *प्राशिलें सत्रावीचें पाणी*।
***तंव अनाहताची सुडावणी। दुर्गामधून उठली*।।१२९।।**

टीप ५: ज्ञानेश्वरीतल्या ***"तयावरी जैत रे जैत। म्हणौनि ध्यानाचें निशाण वाजत। दिसे तन्मयतेचें झळकत। एकछत्र।।२१७।। व पाठीं समाधिश्रियेचां अशेखां। पट्टाभिषेकु देखा। समरसें जाहाला।।२१८।।"*** या ओव्यांतून ध्यानाचे निशाण वाजते म्हणजे

अनुहतनादाचे प्राकट्य आणि पाठोपाठ योगाची इतिश्री यांचा सूचक निर्देश आहे.

या प्रक्रिया ***"सतरावियेचे पाणियाडें बळियावलें"*** यानंतर होणाऱ्या आहेत. यावरूनही अनुहतप्राकट्य इतर काही पढिक पंडित समजतात त्याप्रमाणे षट्चक्रांतल्या अनुहातसंज्ञक चक्रात प्राणांची /कुंडलिनीची गती झाल्यावर प्रकट होत नसून हा नाद निश्चितच अर्धमात्रेच्या एका अत्युच्च स्थानी प्रकटतो, हे दिसून येईल. आपण विचारात घेत असलेल्या एकनाथांच्या ओव्यांचाही तोच अभिप्राय आहे.

तेथ सोऽहंवीराची एकाग्रता होतां । भीतरील भेदु आला हातां।दुर्ग राखिती अहंममता। मरों टेकली सर्वथा।।१३०।।

<u>टीप ६:</u> *ओ.क्र.१२८* प्रमाणे एकाग्रतेमुळे प्राणापान न चळता तसेच पुढे घुसले आणि त्यांनी कुंडलिनीद्वारे धडाक्याच्या तोफांचा मारा करून षट्चक्रांचे बुरूज फोडून टाकले. ज्या एकाग्रतेवर एकनाथांनी भर दिला आहे, ही व्यावहारिक एकाग्रता नसून ***धारणा-ध्यान-समाधि-संयम*** या मार्गातली ***संयमसंज्ञित एकाग्रता*** आहे.

<u>(अ):</u> कुंडलिनी आज्ञाचक्रात स्थित झाल्यावर खरी एकाग्रता प्राप्त होते. हृदयात प्रवेश झाला किंवा आज्ञाचक्राचा पूर्ण वेध झाला की त्याखालच्या चक्रांचा आपोआपच वेध होतो. नादानुसंधानात हे घडत असते. हंसयुगुलाची वस्ती असलेल्या अष्टदलपद्मातून सुषुम्ना आत्मज्योतीत जाऊन मिळते. या अष्टदलपद्मात ***दहरविद्या,*** आज्ञाचक्रात ***शांभवी विद्या*** प्रकट होतात. या दोन्ही विद्या आणि ***अनुहातनादश्रवण*** ही तिन्ही साधने शुद्ध स्वरूपाची आणि अत्युच्च स्तरावरची आहेत. शांभवी मुद्रेने ऊर्ध्वरेतावस्था प्राप्त होते.

<u>(ब):</u> मला एकदा एका हितेच्छू स्त्रीने एका गूढवादी भक्तांकडे नेऊन सांगितले होते की यांची फार एकाग्रता होते, तरी ती होऊ नये असे करा. त्या गूढवादी भक्तांनी माझ्याकडे रोखून पाहात माझी काय इच्छा आहे, हे जोखून पाहिले. त्यावर मी त्यांना स्पष्टच सांगितले की माझ्या कार्यात मला ही एकाग्रता आवश्यकच आहे. त्यावर त्या भक्तांनी मान डोलावली. कुंडलीनी आज्ञाचक्रात असल्याचे ते एकाग्रता हे फळ होते. त्या बाईंची कळकळ प्रेमापोटी असली तरी त्यांना या यौगिक एकाग्रतेचे पूर्ण रहस्य माहीत नव्हते. तशा त्या पण एका विशेष पातळीवरच्या psychic/ medium म्हणावे तशा होत्या.

<u>टीप ७:</u> ***"सत्रावीचें पाणियाडें। जिंतिलें रोकडे।।१२७।।"*** यात ***सत्रावीचे पाणियाडे*** असे म्हणून ब्रह्मरंध्रातील अमृतस्त्रावाच्या साठ्याचा, जिला ***सतरावी जीवनकला*** असेही म्हणतात, तिचा निर्देश केला आहे. या ***अमृतप्राशनानंतरच अनाहताची प्राप्ती होते.*** त्याबाबत ***"प्राशिले सतरावीचें पाणी। तंव अनाहताची सुडावणी। दुर्गामध्ये उठली।।१२९।।"*** ही ओवी सूचक आहे. ***दुर्ग म्हणजे ब्रह्मरंध्र.*** यावरून ***अनाहतप्राकट्याचे स्थान हे ब्रह्मरंध्रच आहे,*** हे एकनाथांच्या सांगण्यावरून स्पष्ट व्हावे.

<u>टीप ८:</u> सोऽहंभावाने अहंममतादींना जिंकले जाते, असा निर्देश *ओ.क्र.१३०* मध्ये येतो.

कामक्रोधादि महाशूर। पुत्र रणीं पडिलें थोर।..।।१३१।।

...। *<u>जिंतोनि मनकर्णिका ओवरी</u>* ।.... *<u>माळ उसळली ब्रह्मगिरी</u>*। *<u>...ब्रह्मरंध्रीं उसळलें</u>*।।१३६।।

तेथ *<u>जैताची एक घायीं। अनुहत निशाण लागलें पाहीं।</u>* *<u>शोधितां पारखें नाहीं। केलें स्ववश</u>* ।।१३७।।

....। तन्मयतेचें छत्र धरूनि। समसाम्य सिंहासनीं। बैसला सहज समाधानीं।

त्यागी वोवाळूनी जीवभावो।।१३८।।

<u>टीप ९:</u> ब्रह्मरंध्रावरही प्राणापान उसळतात, म्हणजे तेथे कुंडलिनी पोहोचते आणि त्याच्या अगदी अलीकडे लागूनच ***मनकर्णिका ओवरी*** असते; तसेच त्याच वेळी योगसंग्राम पूर्ण होऊन जैत मिळते; अनुहाताचे निशाण फडकू लागते, तन्मयताप्राप्ती होते, जीवभाव नष्ट होतो, असा भाग *ओ.क्र.१३१ ते १३८* मध्ये येतो. यावरून एक स्पष्ट होते की जैत झाली की म्हणजे ***<u>साधकाचा सिद्ध झाला तरी त्या स्थितीचा निदर्शक असा अनुहतनाद त्यानंतरही वाजतच राहतो. अनाहताचा अंत नाही; असा यौगिक प्रचितीचा भाग यातून स्पष्ट होतो.</u>***

या ओव्यात निर्देशिलेली ***मनकर्णिका ओवरी*** कोणती, याचा विचार करता तिचे स्थान ***ब्रह्मरंध्राऐलीकडे*** च खेटूनच असले पाहिजे असे दिसते. आपण विचारात घेतलेल्या योगपथानुसार हे स्थान म्हणजे ***भ्रमरगुंफा*** च होय. त्या वेळी अनुहत निनादतच असतो यावरून या मनकर्णिका ओवरीची व्याप्ती तेथून ब्रह्मरंध्र अशी असल्याचे दिसून येईल. ज्ञानदेवांच्या अभंगातूनही हिचे उल्लेख आहेत.

<u>टीप १०:</u> या ओव्यांतून संत श्रीएकनाथनिर्देशित योगपथ प्रकटतो, तो असा: ***"महामुद्रा ->प्राणापानसामरस्य -> प्रत्याहार - >प्राणापानांची शिडी***

लावणे = सुषुम्नागमन = मध्यमामध्यविवरात प्रवेश -➢षट्चक्रभेदन -➢ ध्यान -➢ सत्रावीचे तळे जिंकणे (ब्रह्मरंध्राचा वेध घेण्याची प्रक्रिया सुरू होणे)- ➢ अमनस्का - उन्मनीअवस्था-➢अनुहातनादप्राप्ती (सोऽहंद्वारे) (ओ.क्र.१३०) -➢ मनकर्णिका ओवरी (मुक्तीचा घाट) -➢ प्राणापानांचे ब्रह्मरंध्री उसळणे = कुंडलिनीचे अत्युच्च शिखरारोहण = शिवशक्तीची मिळवणी (मुक्ती) -➢अनुहात निशाण ब्रह्मरंध्री फडकू लागणे (ब्रह्मरंध्री जो नाद उसळत होता (ओवीक्र.१२१), तो स्वत:चाच आत्मनाद होता, हे ध्यानात येणे -➢ तन्मयता= समाधी= समसाम्य"

टीप ११: या सर्व कुंडलिनीआरोहक्रमावरून विशेष असे कळते की अनुहातनादप्राप्ती ही षट्चक्रभेदनानंतरची अवस्था आहे. ती स्थूल हृदयप्रदेशनिर्देशित अनाहतसंज्ञक चक्रातली स्थिती नव्हे. ***सत्राव्या कलेतील अमृतप्राशन घडल्यानंतरच अनाहतनाद येतो.*** विशुद्ध किंवा इतर चक्रातून अमृतप्राप्ती होत नाही. मनकर्णिका ओवरी पार करून प्राण ब्रह्मरंध्री उसळतात, कुंडलिनी ब्रह्मरंध्री स्थिरावते, तेव्हाही अनाहतनाद येत राहतो, त्याचा लोप होत नाही. त्यात सातत्य असते. ब्रह्मरंध्री स्थिती होताच प्राण ब्रह्मांडात ***(विश्वकुंडलिनीत - अलक्ष्याच्या प्रांतात)*** उसळतात, तेव्हाही तो ऐकू येतच राहतो. तो आत्म्याची ओळखण आहे. त्यातच समाध्यवस्था आहे. संजीवनसमाधीचे लक्षण म्हणजे हेच अनाहताचे सातत्य.

नाद, आज्ञाचक्रादी

योगजिज्ञासूंसाठी एकनाथी भागवताच्या*अ.क्र.१२* मधल्या *ओव्या क्र.२११ ते ३७०* याही महत्त्वाच्या आहेत. या ओव्यांतून एकूण सगळाच ***प्रसवक्रम*** म्हणजे जिवाचा विवरप्रवेश, देहधारण तसेच ***प्रतिप्रसवक्रम*** म्हणजे उलटा प्रवास, तसेच योगपथ व त्यावरील मातृका इ.सह योगचक्रादींचे साद्यंत वर्णन केले आहे. त्यातला आपल्या विवरणासाठी लागणारा उत्तमांश पुढे उद्धृत करत आहे.

नाद उत्पत्तीसि ठावो। मुख्य वायो कां दुसरा घावो।
या दोहींवेगळा नित्य निर्वाहो। *तो नादु पहा हो अनुहात*।।३०३।।
अनुहताचा सोलीव शब्दू। परापरतीरीं पराख्य नादू।
ज्याचा योगियां सदा छंदू।
बोलिला अनुवादु न्व्हे ज्याचा।।३०४।।
ज्या नादाची सुखगोडी। सदाशिवूचि जाणे फुडी।
कां सनकादिकीं चोखडी। चाखिली गाढी ते चवी।।३०५।।

आज्ञाचक्र भ्रूस्थान। ते याहूनि वेगळे जाण।
तेथे वाचेसीं नाहीं गमन। हंसलक्षण योग्यांचे।।३३४।।
आज्ञाचक्र अति अवघड। नुघडे काकीमुखाचे कवाड।
न चले प्राणांची चडफड। मार्ग अतिगूढ। लक्षेना।।३४२।।
ते आज्ञाचक्र गा द्विदळ।केवळ हंसाचे राऊळ।
तेथ पावावयासाठी योगबळ। अतिप्रबळ पाहिजे।।३४३।।
हे स्थान पावावयासाठी। योगी झालें महाहटी।
अभ्यास करितां अतिसंकटी। तेही शेवटीं न पावती।।३४४।।
हे पावावया माझें स्थान। अतिगुह्य आहे अनुष्ठान।
सोहंऽहंसाचे साधन। सावधान जो साधी।।३४५।।
प्राणाचेनि गमनागमनें। सोहंहंसाचें स्मरणें।
सावधानें जो साधू जाणें। तेणें पावणें हें स्थान।।३४६।।
त्यासीचि पवनजयो घडे। तोचि आज्ञाचक्रामाजिं चढे।
तेथूनही मार्ग काढी पुढें। अतिनिवाडें अचूक।।३४७।।
तेथ नानाभोगसमृद्धी फळें। आणिती ऋद्धिसिद्धींचे पाळें।
तें डावलेनियां सकळें। निघे निर्मळें निजपंथें।।३४८।।
तैं औटपीठ गोल्हाट। सांडूनि भ्रमरगुंफा कचाट।
शोखूनि सहस्त्रदलाचें पाट।
मजमाजीं सुभट मिळालें।।३५१।।

या ओव्यांतून जिज्ञासूंचे समाधान करणाऱ्या बऱ्याच गोष्टी सापडतात. मुख्य म्हणजे अनुहातनाद, त्याचे स्थान आणि माहात्म्य निर्विवाद दिले आहे. प्रसवप्रवण नाद आणि वायू यांच्यापेक्षा वेगळा असा हा ***अनुहतनाद*** असतो. परेच्याही परतीरावर तो नांदतो. त्याचाच योग्याला अनुभव येतो. यावरून अनुहतनादासंबंधी इतर उत्पत्तीस्थानांची अनुमाने लंगडी पडतात. उदा.अनुहातनाद हा सुषुम्नेचा कुंडलीनी /प्राणप्रवेशानंतर होणारा *सूं सूं* शब्द आहे; तो स्थूल हृदयाजवळच्या अनाहतसंज्ञित चक्रावर उत्पन्न होतो, इ.इ.

रोधिनी

आज्ञाचक्रावरचा योगपथ ***आज्ञा ते बिंदू आणि पुढे बिंदूवर अर्धेंदु*** असा असतो. मला सहस्त्रारचक्राचे एक दर्शन झाले होते. त्यात हा अर्धेंदू पण होता. त्याच्याहीवर रोधिनीचे स्थान असते. तेथे ज्योत्स्ना, ज्योत्स्नावती, आदिशक्तीसमन्वित ***रोधिनी*** असते. रोधिनीत रूपनिरोध होतो, योग्यांना रूपाची अनुभूती येण्याचे हे शेवटचे स्थान आहे. ब्रह्मादी ईश्वर किंवा सिद्धवर्गांना गतिरोध करणारे हे स्थान असल्याने त्याला***रोधिनी*** असे म्हणतात. इथेच लोकपालांचा मुक्तीचा मार्ग अडवलेला असतो. त्यांना त्यांचे नियोजित कार्य जोपावेतो पूर्ण होत नाही, तोवर

पुढचा मार्ग मिळत नाही. मुक्ती आणि इतर विचारांचा परामर्ष आपण ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** त घेतलेलाच आहे.

मला आलेल्या मुख्य अनुभूती या आज्ञाचक्र आणि त्यापलीकडील होत्या. सहस्त्रदलाकडे आणि त्याहीवरच्या असंख्यदल कोल्हाटचक्राकडे मी गेलो आहे. त्यामुळे माझा मार्ग रोधिनीपाशी अडलेला नाही. परमतत्त्वाकडे प्रस्थान किंवा निर्वाणाकडे माझी संपूर्ण वाटचाल झालेली आहे, असे माझ्या अनुभूती, शास्त्रसिद्धांत आणि योग्यांचे अनुभव दर्शवतात, या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे . तसेच हरिपूरच्या कृष्णाताई आणि इतरही काही अंतर्ज्ञान्यांनी त्याला निःस्पृहतेने दुजोरा दिला आहे.

नाद व नादांत

निरोधिकेनंतर ***नाद व नादांत*** ही स्थाने असतात. नादाचे स्थान ब्रह्मरंध्राच्या मुखात असते. या ठिकाणी विशुद्ध आणि चिदाभासयुक्त त्रिगुणातीत शब्दाची अनुभूती येते. नादांत हे तिसरे शून्य आहे. त्याला ईश्वरपदरूपही मानतात. ***नादांत*** हा नाड्यांच्या आधारस्थानात - ब्रह्मबिळात लीन असतो. यांचे विवेचन ***योगदा श्रीज्ञानेश्वरा*** ँ त आलेले आहे. नादांताने मोक्षद्वार अडवलेले असते. हा ***नादांत*** आपल्या अधःशक्तीद्वारे सर्व जगताचा भेद करून ऊर्ध्वशक्तीत समाप्त होतो.

नादानुसंधान

पुढील ओव्यांतून एकनाथी भागवतात नाद आणि त्याच्या अनुसंधानाचे स्वरूप कसे आहे ते सांगितले आहे. भगवंत म्हणतात:

"मी निजानंद हृदयाआत। ..माझी योगमाया अनंतशक्ती.. । तिचेनि योगें मी चिन्मूर्ती... । त्या हृदयस्थ देवाचें ध्यान। नित्य योग्यासि निदिध्यासन। सम करोनि प्राणापान। सदा अनुसंधान नादाचें।। ... त्याचे स्वरूप निश्चित अवधारी।। जैसा कमळमृणालबिसतंत। तैसा सूक्ष्म नाद अत्यंत। नाभीपासोनि ब्रह्मरंध्राआंत। ओंकार स्वरात लक्षिती।। ऐसा ओंकाराच्या स्वराआंत। नाभिपासोनि ब्रह्मरंध्रात। सूक्ष्म नादाचा निजतंत। योग धारणा राखत महायोगी।।... योगी म्हणत अनाहत शब्द। वेदांती म्हणती सूक्ष्म नाद। आम्हीं म्हणो हा शुद्ध वेद। ...ऐशिया स्वतःसिद्ध वेदापाशीं। श्रद्धा नुपजे प्राणियांसि। यालागीं सूक्ष्म वेद स्थूलतेशिं। जनहितासी। म्यां आणिला।। २१-४०० ते ४४०।।"

योग्याला नित्य नादाचे अनुसंधान असते, ते भगवंताच्या योगमायेच्यामुळे. तीच अनाहतनादाच्या रूपाने प्रकट होऊन योग्याला भगवंताशी जोडून देते. नाभीपासून ब्रह्मरंध्रापर्यंत या अव्यक्त सूक्ष्म नादाचा तंतू जोडलेला असतो. कुंडलिनी ती हीच!

मुक्तीवरचा मोती म्हणजे भक्ती

अनाहतनादासंबंधी एका अलीकडच्या साक्षात्कारी पुरुषांचे - श्री.रामकृष्णमहाराज क्षीरसागर यांचे म्हणणे आहे की उपासना करायची ती स्वतःच्या ठिकाणचे ईश्वरी अधिष्ठान जागृत करण्यासाठी असते. त्यासाठी उपासना फार उच्च अवस्थेला पोहोचावी लागते व त्या अवस्थेला ती पोहोचल्यावर साधकाला अनाहतनाद ऐकू येऊ लागतात. हा अनुभव येणारी व्यक्ती षड्रिपूंच्यापलीकडे पोहोचलेली असते. म्हणजे ती व्यक्ती पूर्णतः निर्गुण अवस्थेत पोहोचलेली असते.या महाराजांच्या मताप्रमाणे विचार केला तर मला निर्गुणाचे ध्यान माझ्या साधनारंभीच प्राप्त झाले होते.

वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी. आणि काहीही विशेष न करता - गायत्री आणि अथर्वशीर्ष यांचा एखाद्या साध्या माणसाइतकाच साधा जप करून, मोठे अनुष्ठान इ.न करताच, मला अनाहतनादाची प्राप्ती झाली आणि निर्गुणापर्यंत गती झाली, हे विशेष लक्षणीय ठरते.

यावरून अनुमान असे की गतजन्मांमधली साधना या जन्मी सफळ झाली आहे. यावरून श्रीगोपालकृष्णांचे ***"तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।।६-४३।।," "अनेकजन्मसंसिद्धौ ततो याति परां गतिम्।।६-४५।।"*** आणि तत्सम अनेक वचने मला सत्यच असल्याचे स्वानुभवाने प्रतीत होते. गोपालकृष्णांवर माझी श्रद्धा असल्याने त्यांची वचने सत्य असत्य ठरवणारा मी कोण! पण सामान्य जिज्ञासूंच्या माहितीसाठी हे मुद्दाम नमूद करत आहे.

शास्त्रानुसार निर्गुणापुढे गती नाही. माझी उपासना पूर्ण होऊन मला साक्षात्कार झालेला आहे इ. लक्षात घेता हीच माझी परमगती आहे. तरीही एकनाथी भागवत मला सांगते आहे की ही जीवन्मुक्ती असली तरी ***मुक्तीवरची भक्ती*** हवी. ती म्हणजे मुक्तीवरचा मोती आहे. ती लाभल्यास ईश्वर म्हणजे श्रीकृष्णपरमात्मा आपले मायानियंत्रत्व प्रदान करतो व अवतारित्व प्राप्त होते.

हे मला कसे आणि केव्हा मिळेल, ते एक त्या श्रीकृष्णपरमात्म्याधीन आहे. आणि मला ते हवेच आहे, अशी काही माझी वांछा नाही. मी जसा आहे, त्या अनंताने मला काहीही न करताच जी ही उच्च समजली जाणारी अवस्था मला न कळताच प्रदान केली आहे, ती मला माझ्या अपेक्षेपेक्षा कितीतरी वरची आहे आणि मला तर अजूनही वाटते की माझ्या या सर्व दृष्टांतांबाबतची ही शास्त्र व

संतांची विधाने खरेच मला लागू आहेत का? मी तर अजूनही किती सामान्य आहे? श्रीगजाननमहाराज गुप्तेंसारखे संतमहात्मे स्वतःला जिथे संतांच्या हातातली *"वेडी केरसुणी"* असे म्हणवून घेतात, तिथे मी म्हणजे एक साधी मुंगीही नाही. आणि हत्ती होऊन लाकडे फोडावीत हा उपद्व्यापही मला आवडणारा नाहीच! असो.

आज्ञाचक्रजय

आज्ञाचक्रजयसुद्धा कसा होतो आणि तो किती अवघड आहे, तेही या ओव्यांतून *(१२-३०३ ते ३५१)* सांगितले आहे. त्याचे साधन एकच आहे - ते म्हणजे ***"हंसःसोऽहं"*** वा अजपासिद्धी. तेथे योग्याला ऋद्धिसिद्धींच्या प्रलोभनाचे संकट पडते. ते जो टाळेल, तोच आज्ञाचक्रावर चढू शकतो. आणि वर जाण्यासाठी अतिप्रबळ योगबळ पाहिजे. ***"आधारचक्र -➢ स्वाधिष्ठानचक्र -➢ मणिपूर -➢ अनाहतचक्र -➢ विशुद्धिचक्र -➢ काकीमुख (आज्ञाचक्र अति अवघड। नुघडें काकीमुखाचे कवाड.।३४२।।") -➢ आज्ञा -➢ गोल्हाट -➢ भ्रमरगुंफा ⇆ सहस्रदल -➢ परब्रह्म"*** असा योगपथक्रम तेथे सांगितला असल्याचे दिसते.

ऋद्धिसिद्धी

आज्ञाचक्रात साधकाला अनेक ऋद्धिसिद्धी प्राप्त होतात, असा या ओव्यांतून निर्देश आहे. याबाबत मला एक गोष्ट चांगली स्मरते. जेव्हा माझी एक विशिष्ट अवस्था होती, त्या वेळी मी पांडुरंगाला त्या सगळ्या सिद्धी, अष्टमहासिद्धींसकट, अर्पण करून टाकल्या होत्या. योग्याला हा संकल्प करावाच लागतो. पण माझ्याकडून अनभिज्ञपणे तो झाला. त्यामागे अर्थातच त्या कृष्णपरमात्म्याची कृपा आणि ज्ञानेश्वरांची वाणी होती. तो दिवस होता पांडवपंचमीचा.

"***तेथ ठाईं ठाईं होएं। आणिमादिकिं।।...पर्‍हैं तेणें काइं काज आपणपेयां।...।।६-२९७,२९८।।"*** या ओव्यांतून माउलींनी ऋद्धिसिद्धींबाबत साधकाने कसे असावे हे स्पष्टच सांगितले आहे. ते माझ्या नीट लक्षात होते. म्हणून योगभ्रष्ट होण्याचा प्रसंग टळला. असो. पांडुरंगाला अष्टमहासिद्धींसकट इतर सर्व सिद्धी समर्पण केल्यावर रेडिओवर स्वर आले ते "**ज्ञानदेव बाळ माझा। सांगे गीता भगवंता**" या गाण्याचे! थोडा वेळ जातो न जातो तो हिंदीतील पसायदान ऐकू येऊ लागले:

क्षमा मिले ज्ञानेश्वर। दया मिले ज्ञानेश्वर।।
हृदयमें जिनके सारे तीरथ और धाम।
ज्ञानेश्वरको करो प्रणाम।।
जब अज्ञान अनीती और अंधकारके काले बादल छाये।
तब प्रकाश बनकर ज्ञानेश्वर इस धरतीपर आये।।
सोयी आत्माओंको जगाकर। अमर स्वर्ग बनाया धरतीको।
ग्यानकी गीता बताके। ज्ञानका प्रकाश फैलाया।।
क्षमा मिले ज्ञानेश्वर। दया मिले ज्ञानेश्वर।।
मातपिताबिन बचपन बीता। यौवनके दिन आये।
घरसे बेघर फिर भटकते। सौ सौ कष्ट उठाये।।
अधरम हटाकर करमकी खातिर। किया धरमका संग्राम।
ग्यानकी गीताके गायक। ज्ञानेश्वरको सब करो प्रणाम।।
ज्ञानेश्वरको करो प्रणाम।।

या महासिद्ध्यादींच्या अर्पणाच्या दुसऱ्या दिवशी Times Of India मध्ये पुढील citation आले:

"The reincarnated being, the Yogi having churned the Four Wisdoms (The Vedas) and all scriptures, enjoys their cream, their essence. The learned get only the buttermilk"-Jnyanasankalini Tantra

आज्ञाचक्राबाबतची एक अनुभूती तर सांगितलीच पाहिजे, अशी आहे. एकदा श्री.उपळेकर महाराज यांचे चरित्र वाचनात आले होते. ते एक सिद्ध पुरुष होते. आज्ञाचक्रावर त्यांची सतत दृष्टी असे. त्यांच्या सहवासात आलेल्या एका व्यक्तीला त्यांच्याविषयी बरीच प्रत्यक्ष माहिती होती. म्हणून सहज त्यांना एक प्रसंग सांगितला आणि तशी काही अनुभूती महाराजांबाबत लक्षात आहे का म्हणून विचारले. पण त्यांना काही आठवत नव्हते.

माझी अनुभूती अशी होती की टॉर्चचा प्रकाश पडतो, तसा गोलाकार प्रकाशझोत माझ्या ललाटातून *(भ्रूमध्यस्थानातून)* बाहेर पडलेला दिसला. त्या प्रकाशात मी काहीतरी वाचत होतो.

या अनुभवाचे स्पष्टीकरण ***"शक्तीका जागरण और कुंडलिनी"*** या *पं.गोपीनाथ कविराज* यांच्या ग्रंथात काही काळ उलटल्यावर मिळाले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आज्ञाचक्रापासून किंचित वर अर्धबिंदु वा अर्धेंदु, त्यानंतर क्रमशः रोधिनी, नाद, नादांत, शक्ति, व्यापिका, समना व उन्मना असे जाणिवेचे स्तर असतात. प्रथम स्थान बिंदूचे असते. ललाटावर हा दीपाच्या आकाराने प्रतिभासित होतो.

या बिंदूचा प्रकाश दीपवत असूनही वृत्ताकार असतो. हा कोटिसूर्यसमप्रभ असतो. त्याच्या केंद्रात शांत्यातीत ईश्वर वसतो. त्याच्या आजूबाजूला निवृत्त्यादी कला असतात. त्याच्या वामांगी स्वतःची निजशक्ती असते.

यावरून कळून आले की मला झालेले दर्शन या बिंदूचे होते.

संतांची अनुभूती

माझ्या या आत्मवृत्तातील अनुभूती आणि इतर दृष्टांतांचे स्पष्टीकरण व अनुमोदन अनेकानेक संतांच्या अनुभूती, साक्षात्कार, लिखाणादींतून प्राप्त होते असे मला आढळून आले आहे. जागोजागी मी त्यांचे अनुभव इ. पुष्ट्यर्थ दिलेच आहेत. मी संतसाहित्याचा त्यासाठी मागोवा घेतला. श्रीज्ञानेश्वरांव्यतिरिक्त इतर अनेक संत आणि योग्यांचे अनुभव माझ्यासारखेच असल्याचे मला त्यावरून आढळून आले. विशेषतः गुरुदेव श्री. रा. द. रानडे यांच्या संतानुभूतिविषयक ग्रंथांतून, श्री गजाननमहाराज गुप्ते, तसेच कबीर इ. संतांच्या वचनांतून मिळालेली माहिती अत्यंत विचक्षक ठरली. त्यातील बरीच माहिती प्रामाणिक योगसाधकांच्या नित्योपयोगाची आहे. म्हणून ती पुढे संकलित केली आहे.

नादानुसंधान! नमोस्तु तुभ्यं।
त्वां मन्महे तत्त्वपदं लयानाम्।
भवत्प्रसादात् पवनेन साकं।
विलीयते विष्णुपदे मनो मे।। योगतारावली।।

श्रीमत् शंकराचार्य योगतारावली या ग्रंथात म्हणतातः हे नादपुरुषा! तुला माझे नमन असो! सर्वोत्कृष्ट लय प्राप्त करून देणारा तूच आहेस. तुझ्या प्रसादाने माझे मन पवनासह (प्राणांसह)विष्णुपदी विलीन होवो.

सर्वचिन्तां परित्यज्य सावधानेन चेतसा।
नाद एवानुसंधेयो योगसाम्राज्यमिच्छता।।
।।शिवसंहिता।।

योगसाम्राज्य इच्छिणारे सर्वचिंताविवर्जित होत सतत नादाचेच अनुसंधान राखतात.

नासनं सिद्धसदृशं न कुंभकसमं बलं।
न खेचरीसमा मुद्रा न नादसदृशो लयः।।
।।शिवसंहिता।।

सिद्धासनासारखे आसन नाही. कुंभकासारखे योगबल नाही. खेचरीसम मुद्रा नाही आणि नादासारखा लय नाही. नाद कसा प्रकट झाला ते पहाः ब्रह्माने **"एकोहं बहुस्याम्।"** ही इच्छा प्रकट केली. त्या सत्संकल्पातून स्पन्दनाची निर्मिती झाली. ते स्पन्दन ॐकाराचे होते. हाच तो विश्वोत्पत्तीस कारण असणारा नाद. शिवशक्तीची अर्धनारीनटेश्वर ही अवस्था म्हणजे नाद. नादापासून महाबिंदु प्रसवतो. शक्तितत्त्वाची प्रथमावस्था तो हा नादच होय. नाद आणि बिंदु या मंत्रचेतनेच्या प्रारम्भिक दोन स्थिती आहेत. त्या बीजमंत्रात अवस्थित असतात.

हठयोगप्रदीपिकेत म्हटले आहे की शिव हाच नाद, बिंदु आणि कलारूप आहे. निर्गुणब्रह्म हे कलातीत - निष्कल असते. शक्तीच्या आविर्भावाच्या वेळी तेच सगुण स्वरूपात शिवरूपाने आविष्कारते. हेच सकल ब्रह्म होय. त्याच्या एकूण सोळा कला म्हणजे आविष्कार असतात.

निर्गुण ब्रह्म अनुभवता येणे अशक्य असते. त्याचा नाद हा एकच असा उच्चतम आविष्कार आहे जो योगी अनुभवू शकतो. नाद हीच साक्षात्काराची अत्युच्च अवस्था आहे. नादासच ***अपरं ब्रह्म*** असे म्हटले आहे. महानाद हा ढगांच्या संयत गडगडाटाप्रमाणे असतो. त्यात इतर नाद विलीन होतात. सरतेशेवटी सर्व नाद संथ आणि संयत होतात.

दुसरे एक मत असे आहे की नादाविष्काराच्या तीन अवस्था आहेतः १. प्राण ब्रह्मरंध्रानिकट पोहोचतात. त्यावेळे समुद्रगर्जना, ढोलक बडवणे, ढगांचा गडगडाट इ. नाद प्रकटतात. २. प्राण ब्रह्मरंध्रात प्रवेशतात. त्यावेळी मृदंग, शंख, भेर्यादि नाद प्रकटतात. ३. ब्रह्मरंध्री अंतिमतः प्राण स्थिरावतात. तेव्हापासून किंकिणी, भ्रमरगुंजारवादि नाद प्रकट होतात. माझ्या अनुभूती याच प्रकारातील होत.

माझे याबाबतचे मत माझ्या अनुभवांवर आधारित आहे. सुरुवातीस मला अनाहतनादाचे हळुवार ध्वनी ऐकू येत असत. नंतर नंतर मात्र घोर समुद्रगर्जनेसारखे, ढोल बडवल्यासारखे ध्वनी येऊ लागले. अंतिमतः ते भ्रमरगुंजनात परिणत होत पुनः सौम्य झाले. याचे काही विशेष स्पष्टीकरण आहे.

माझ्या दोन अवस्था असू शकतात. एक म्हणजे मागील जन्मापासूनच सिद्ध योग्याची. मग सुरुवातीचे सौम्य अनाहत ध्वनी त्या अवस्थेतून ब्रह्मरंध्रातून खाली लिंगदेहात उतरण्याचे द्योतक होतात. काही कालाने आलेले घोर ध्वनी पुन:ब्रह्मरंध्राकडे उत्क्रमणाचे निदर्शक होत. सरतेशेवटी त्यांचे रूपांतर भ्रमरगुंजनात होणे हे पुनश्च ब्रह्मरंध्रप्रवेशाचे द्योतक होय.

दुसरी अवस्था अशी आहे की मी मागील जन्मातला पूर्ण योगसिद्ध पुरुष नसून जवळजवळ पूर्णत्वास पोहोचलेला योगी असेन. मग असे अनुमान निघेल की कोणताही योगी सुरुवातीस सौम्य अनाहतनाद ऐकतो. नंतर तो जसा सगुण साक्षात्काराच्या अवस्थेला पोहोचतो, तसा अनाहत नाद घोर होऊ लागतो. सरतेशेवटी तो आत्यंतिक गर्जणारा होतो, जसे माझ्या श्रीकृष्णाला आलींगन देण्याच्या प्रसंगात झाले होते. अगदी तसेच पंढरपुरला पांडुरंगाच्या प्रथम दर्शनप्रसंगी देवाकडे तोंड करून साष्टांग नमस्कार घातलेल्या स्थितीत पडून राहिलो असता पण झाले होते

आणि काळा योगी संदर्भातल्या अनेक प्रसंगातही तसेच घडले होते.

हे सर्व प्रसंग ब्रह्मरंध्रस्थित नेहमीच्या अवस्थेतून पुनः पुनः सगुण साक्षात्काराच्या अवस्थेकडे येण्याचे आहेत. अष्टौप्रहर दिवस अन् रात्र ऐकू येणारा ब्रह्मरंधातला भ्रमरगुंजनाचा सौम्य ध्वनी घोर ध्वनीरूपात परिणत होत होता दरवेळी. यावरून असे दिसून येईल की जेव्हा जेव्हा सगुण साक्षात्कार घडतो, तो नेहमीच निर्गुण निराकाराच्या अवस्थेहून खालच्या अवस्थेतला असतो. मग तो कितीही काळचा का असेना, थोड्या किंवा निरंतर, आणि तो ब्रह्मरंध्रातून निर्गुण निराकारातून खाली उतरून असो किंवा ब्रह्मरंध्रप्रवेशाच्या अगोदर असो. म्हणूनच निर्गुण निराकाराच्या अवस्थेचे माहात्म्य सगुण साक्षात्काराच्या अवस्थेहून अधिक सांगितले जाते.

आता दिलेले हे स्पष्टीकरण जनाबाई इ. संतांच्या अनुभूतींशी जुळणारे आहे. त्यांच्या अभंगांत जेव्हा जेव्हा त्यांना सगुण साक्षात्कार होतो तेव्हा तेव्हा मोठ्याने नाद करणाऱ्या घंटा, मृदंगध्वनी व आकाश चिरणारे शंखध्वनी इ. चे वर्णन येते. असे असले तरी श्री गजानन महाराज गुप्तेंच्या म्हणण्यानुसार अनाहतनाद हा सर्वकाळ येणारा असायला हवा.

असो. यावरून माझे म्हणणे असे की वर दिलेले अनुक्रमांक १, २ आणि ३ मधील मत इतर कोणत्याही मताहून अधिक प्रमाण आहे. फक्त त्यात सगुण साक्षात्काराचे वरील विधान अधिक जोडले पाहिजे म्हणजे झाले.

या बाबत अजून असे की एकदा माझ्या घनघोर भीषण अनाहतनादाने त्रस्त होऊन मी शेगावच्या श्री गजानन महाराजांकडे "तो नाहीसा करा" म्हणून गेलो होतो. ती अवस्था सगुण साक्षात्काराच्या प्रदीर्घ अवस्थेबरोबरच निर्गुण निराकाराचीही अवस्था एकत्र वागवणारी होती. त्या अवस्थेबाबत असे प्रतीत होते की तेव्हा निर्गुण निराकारापेक्षा माझ्यात सगुण साकाराचे अधिक प्राबल्य होते. कारण मला येणारे त्यावेळचे घनघोर अनाहत नाद.

शब्द आणि ***नाद*** यात भेद आहे. जगाची उत्पत्ति शब्दातून झाली. शब्द नादातून प्रकटला. संत सांगतात की हे जग शब्दब्रह्मात विलीन झाले पाहिजे. म्हणजे जीवात्मा परमात्म्यात मिळून गेला पाहिजे. दिक् व कालाने मर्यादित शब्द परमशब्दात (अनंतशब्दात) लीन झाला पाहिजे व तेथे ओंकाराचे सुस्वर संगीत अखंड ऐकू आले पाहिजे. हाच तो नाद वा अनाहतनाद होय.

बहुतेक साधकांना हा दिव्य अनाहतशब्द मुळीच ऐकू येत नाही. अनाहतनाद ऐकू येणे ही काही सामान्य गोष्ट नाही. योगी ब्रह्मरंध्रास पोहोचला की अखंड नाद ऐकू येतो. नादश्रवण व प्रकाशदर्शन ही समवेत घडतात आणि साधक महानिद्रेत मग्न होतो. योग्यांच्या साधनेत नादाचे अनुभव येतात त्याबाबत संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरांनी काय म्हटले आहे ते पहाः

अनाहताचेनि मेघे। आकाश दुमदुमों लागे।
ब्रह्मस्थानींचे बेगे। फिटे वेगें।।६-२७९।।ज्ञा।।

ब्रह्मसाक्षात्कार होतेवेळी चिदाकाशात अनाहतनाद प्रकटतो. त्याच्या घोषाने ते दुमदुमून जाते. नाद आणि विद्युत्स्वरूपात ब्रह्मसाक्षात्कार होतो. कन्नड संतस्त्री शिवलिंगव्वा म्हणतात की अंतःकरणाचे कपाट उघडले आणि देवास पाहिले की अत्यंत तीव्रतेने घुमणारा परनाद ऐकू येतो व साधक त्यात बुडून जातो.

कबीर म्हणतात की हा अनाहतनाद म्हणजे अनहदाची परिसीमा. त्यालाच उद्देशून त्यांनी ***"अनहदही मर जाय"*** असे म्हटले आहे. ते पुढे म्हणतात की देवाला शिर तोडून त्याच्या वेदीवर वाहिले व त्याची आहुती दिली तरच अमीरसाचा लाभ होतो.

माझाही असाच अनुभव आहे. तो संकल्पात्मक आहे. एके दिवशी माझे चित्त देवीने व्यापले आणि त्या भरात मी मनोकामनेने आपले मस्तक तिच्या चरणी अर्पिले. ही केवळ प्रतिकात्मक गोष्ट होती. प्रत्यक्षात कोणी मूर्खाने खरेच आपले शीर तोडून वाहण्याचा उपद्व्याप करू नये, हे सुज्ञांस सांगणे न लगे. योगशास्त्र अतिगूढ आहे आणि स्वयंप्रज्ञांशिवाय इतरांना ते वाचीव महितीच्या आधारे कळणार नाही.

साक्षात्कार

प्रथम प्रकाश अग्निरुपाने दिसतो. ***"जसा अग्नेर्ज्वलनम्।".*** मला त्याचे दर्शन असेच झाले होते. धूपदाणी पेटवणारा व त्यातून अग्निज्वाला प्रकट करू जाणारा योगी असे त्याचे दर्शन मला योगप्राकट्याच्या प्रथमावस्थेत झालेले मी पूर्वीच सांगितले आहे. त्यानंतर अनेक वर्षांनी अष्टदलकमलप्रसंगी उर्ध्वमस्तकभागी वीज प्रकट झाली होती.

संतमते आध्यात्मिक हृदय हेच अष्टदलकमल होय. भ्रूमध्यावरच्या द्विदलावर जो मन स्थिर करतो; षटचक्रे भेदून जो कुंडलिनीचा नाद ऐकतो; चंद्रमंडलातील अमृतरसपान जो सदैव करतो, तो खरा ब्रह्मज्ञानी होय. तो शिंसुमारचक्राप्रमाणे तीव्र वेगाने फिरणारे जे सहस्त्रदलचक्र

आहे, त्यात सहज प्रवेशतो आणि ब्रह्मरंध्रचक्रात जाऊन सुखाने झोपतो, असे संत श्री पुरन्दरदास म्हणतात.

संत श्रीरेवणसिद्ध म्हणतात की प्रकाश, रंग आणि नाद असे तिन्ही प्रकारचे अनुभव पूर्ण साक्षात्कारी पुरुषास आलेले असले पहिजेत. साक्षात्कारवेळी तारकब्रह्मात कपाळाच्या उर्ध्वभागी तारा चमकतो. पश्चिमपंथावर वीज चमकते, दिसते आणि गुप्त होते.

पश्चिमपथावर त्रिकूट, श्रीहाट आणि गोल्हाट ही चक्रे आहेत. शेवटचे चक्र म्हणजे सहस्त्रार. यालाच उर्ध्वगिरी वा ऋषिगिरी अशी यौगिक संज्ञा आहे. साक्षात्काराचा अनुभव नाभिकमल, ब्रह्मरंध्र आणि सुषुम्ना यात भरून गेला पहिजे. सिद्धलक्षण म्हणजे दिव्य प्रकाशाचा अनुभव आणि आत्मा व देव, किंवा भक्त व देव यांचे ऐक्य अनुभवणे.

सर्व प्रकारच्या लिंगांमध्ये प्राणलिंग सर्वश्रेष्ठ आहे. ते म्हणजे परमश्रेष्ठ अनाहतनाद होय. ते प्रकाश बाहेर फेकते. प्रकाश भिन्नभिन्न रंगांचे असतात. उदा. तांबडा, विजेची चमक, रत्नदीप्ति, चंचल अग्नि इ. ते सर्व चक्रांना व्यापून राहते.

शेष म्हणजे श्रीविष्णूंचा बिछाना किंवा शिवाच्या गळ्यातील हार. हीच दिव्य शक्ती **कुंडलिनी** म्हणून प्रसिद्ध आहे.

दीपकरहस्य

मला जे सतत दीपकदर्शन होत असे, त्याचा एक लाक्षणिक अर्थ असा आहे: साधकास जी दीपज्योती दिसते तिची वात ही विरक्ती, घृत हे भक्ती आणि ज्योति म्हणजे ज्ञानरूप जाणीव. हा ज्ञानदीप पेटवण्यासाठी हवी असते ती एकाग्रता.

मला आलेला श्रीकृष्णालिंगनाचा अनुभव हा दर्शन, स्पर्शन आणि ऐक्याचा एक अत्युच्च दिव्य अनुभव आहे असे संत म्हणतात. श्रीकृष्ण कोण आहे ते संत सांगतात. तो म्हणजे साक्षात ज्ञानस्वरूप, भक्तिसागर, प्राणेश्वर, सद्गुरू, परमसुंदर, भक्तवत्सल असा जीवाचा सखाच आहे.

साक्षात्काराचे स्वरूप संत सांगतात ते असेः १. दर्शन, २. स्पर्शन, ३. संभाषण व ४. ऐक्य. मला या चारही स्वरूपाचा ईश्वरसाक्षात्कार झालेला आहे. संत पुरंदरदास म्हणतात की आपला आध्यात्मिक अनुभव खरा आहे, यास तूफानी भयंकर अनाहतनाद ऐकणे हे एक प्रमाण आहे. सभोवती दिव्य प्रकाश दिसणे हे दुसरे प्रमाण. देव समोर प्रकट होणे हे तिसरे प्रमाण. ईश्वरदर्शन आंतर्बाह्य असले तर ते खरे. खरा भक्तिभाव असल्याशिवाय ईश्वरदर्शन होत नाही. गुरूकृपेने स्वतःची पूर्ण जाणीव किंवा उन्मनी अवस्था प्राप्त झाली की देवाचे अपरूप व सुंदररूप दिसते. ईश्वरदर्शनातच जीवन्मुक्तीचे मूळ आहे.

ईश्वरसाक्षात्काराचे तीन परिणाम होतातः १. संचित कर्मांचा पूर्ण नाश -जीवन्मुक्ती, २. सर्वत्र ईश्वरदर्शन व ३. देवाचे वेड. कन्नड संत श्री कुडलुरेश म्हणतात की इहलोकी असतांना संत अनंत ब्रह्मांड व्यापक अशा त्या परंज्योतीशी एकरूप होतात.

उन्मनीबद्दल संत चिदानंद म्हणतात की उन्मनीनिद्रेत जीव अत्यंत आनंदात ईश्वरज्ञानाने पूर्ण जागृत असतो. या इंद्रियातीत उन्मनीनिद्रेत साधकास घंटांचा घनघोर निनाद सतत ऐकू येत असतो. तो पुनःपुनः अमृतरस पितो. या ब्रह्मानंदाचे सुख भोगत असतांना संत बाह्यतः झोपी गेल्यासारखा दिसतो. पण तो खरोखर पूर्ण जागृत असतो. ईश्वराचे सांनिध्य त्याला सतत जागृत ठेवत असते. तो सहस्त्रदळपद्माचा बिछाना करून हंसाच्या पिसांच्या शऱ्येवर पहुडतो.

साक्षात्काराच्या तीन अवस्था संत सांगतातः १. साकार ईश्वर २. साकार-निराकार ईश्वर आणि ३. निराकार ईश्वर.

शिवदर्शन म्हणजे ज्ञानचक्षूचे उन्मीलन. तृतीय नेत्र तोच ज्ञानचक्षू होय. नादांमध्ये राहणारा जो शिव त्याचे ओझरते दर्शन नाद अनुभवणारे योगी घेत असतात. ते आत्यंतिक पवित्र करणारे असते. नादात विचरणारा व शिवदर्शन घेतलेला योगी स्वतः तर पवित्र असतोच, पण तो इतरांनाही आपल्या दर्शनाने पवित्र करतो.

स्वप्न वा दृष्टांतात आत्मज्ञानी संत व योगी व ऋषी दिसणे म्हणजे ब्रह्मदर्शन होय. मला स्वप्नात दिसलेले तीन ऋषी, गोमुखीबाबत उपदेशणारा योगी आणि अनेकदा दिसलेला काळा योगी ही दर्शने अशाच स्वरूपाची होत.

बालरूपात देवाचे दर्शन होणे हे फक्त जे देवास पूर्णरूपे शरण जातात त्यांनाच होते. ज्ञानदृष्टी असलेल्या, नम्र व गरीब स्वभावाच्या, विनयशील आणि देवदर्शनासाठी पात्र आणि उत्सुक असलेल्या अत्यंत निवडक आणि थोड्याच भक्तांना हे दर्शन होते. त्या बाळाचे खरे स्वरूप ज्याला तो दिसतो त्यांनाच कळते. इतरांना नाही. ते साकार असूनही निराकार आहे. ते दर्शन प्रत्यक्ष होते.

मला झालेली बालदर्शने म्हणजे रांगणारा बालकृष्ण आणि बालस्वरूपात श्रीहनुमंताचे दर्शन ही होत. त्यातच अलीकडे लोण्याचा गोल मटकावणारे त्याचे स्वरूपदर्शन झाले.

कन्नड संत निरुपाधिसिद्ध साक्षात्काराचे स्वरूप सांगतांना म्हणतात की डोळ्यांपुढे दिव्य ज्योती सदा उजळते; भ्रमरगुंजारवाचा नाद, पुरातन पुरुषाचे दर्शन इ.

श्रेष्ट अनुभव येतात. तेजाने तळपणारे रत्न, सोनेरी रंगाचे तारे, उन्मनी अवस्थेत ऐकू येणारा ॐकारध्वनि, आत्मरूपात विरून जाणे इ. उच्च अनुभव येतात.

उन्मनी अवस्थेत स्वतःस विसरले जाते. साधुपुरुषांचे, योग्यांचे दर्शन होते. ते मार्ग दाखवतात. ईश्वराचे पूर्ण आपादमस्तक दर्शन होते. ते लहान मुलासारखे खेळत, लपत-छपत, थोडेसेच डोकावून पहात खेळकरपणे डोळ्यांपुढे उभे राह्ते.

सच्चिदानंदः सत् - नित्य, चित् - ज्ञानपरिपूर्ण व आनंद - सुखात्मक. ***"सत्यं ज्ञानं अनंतं ब्रह्म"*** असे याच साक्षात्कारी स्वरूपास उद्देशून म्हटले जाते. संत, संन्यासी व भक्तिमान लोकांना साक्षात्काराचे रहस्य सहजच समजते.

जीवन्मुक्ती

जीवन्मुक्तीः मुक्तात्म्यास संचिताचीसुद्धा बाधा होत नाही. ब्रह्मसूत्रात म्हटले आहे की ***"प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः".*** पण संत श्रीएकनाथ म्हणतात की **"एका जनार्दनी, भोग प्रारब्धाचा। हरिकृपे त्याचा नाश आहे".** संत तीर्थक्षेत्रास गेल्याने तीर्थक्षेत्रे पवित्र होतात. नारदभक्तिसूत्रात म्हटले आहे की **"तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि, सुकर्मीकुर्वन्ति कर्माणि, सच्छास्त्रीकुर्वन्ति शास्त्राणि ।।६१।।"** - जीवन्मुक्तांच्या संगाने तीर्थे पवित्र होतात; कर्म सुकर्म होते आणि शास्त्रे फळ देतात.

साधकांच्या इच्छेप्रमाणे प्रकाशरूप ध्यान वा नादानुसंधान यांद्वारे शेवटचा लय प्राप्त होतो. परंतु नाद श्रेष्ठ आहे. स्वरूपसाक्षात्कार होऊन पूर्णावस्था जरी प्राप्त झाली तरी देह असेस्तोवर देहप्रारब्ध भोगण्याइतके व्यवहार चालू असतात. यावेळी सहजावस्था प्राप्त होते व त्या अवस्थेत नादानुसंधानच कायम टिकते.

देहप्रारब्धभोगासाठी शेवटची अवस्था सोडून तुर्यावस्थेत यावे लागते. या अवस्थेत ब्रह्मकार्य व मायाकार्य दोन्ही सुरू असतात. इच्छेप्रमाणे वृत्ती चटकन आत व बाहेर नेता येते. या स्थितीत प्रकाशापेक्षा नादानुसंधानच सहज राहू शकते. म्हणून, आणि शेवटच्या तत्त्वाशी म्हणजे आकाशाशी संबंधित म्हणून, नाद श्रेष्ठ आहे व तो शेवटचा साक्षात्कार आहे. तसेच साक्षात्कारोत्तर स्थितीही तीच आहे.

नाद हा सगुणाच्या पलीकडे असतो. जो तेथे जातो, त्यालाच ब्रह्माचे खरे स्वरूप अनुभवता येते. अंतिम ब्रह्म हे निराकार व चिह्नरहित आहे की नाही हे तोच एकटा सांगू जाणे.

संत महिपती म्हणतात की यानंतर आता मिळवायचे काय राहिले आहे ? कल्पनातीत मोठी इच्छा पूर्ण झाली. संचित नष्ट झाले. प्रारब्ध व क्रियमाण ईश्वराधीन झाली. म्हणून आता आगामी कर्मच राहिले नाही. सर्व कर्मबीजे जळून गेलीत. अंतःकरणात साक्षात्काराचे चिह्न प्राप्त झाले. देवाचे चिह्न पाहिले, म्हणजे पुनः जन्मास येणे नाही. यापुढे आता कोणी काय मिळवायचे ?

संत पुरंदरदासही म्हणतात की परमेश्वरप्राप्तीचा आनंद मिळाल्यावर संतास पुढे काहीही मिळवायचे राहत नाही. तो संशयातीत होतो. त्याला ईश्वरीकृपा झाल्याची पूर्ण खात्री होते.

परब्रह्माच्या पाळण्यात आत्मा म्हणजे एक तान्हे मूल आहे. हा पाळणा फार विलक्षण आहे. त्याच्या आधारासाठी खांब नाहीत. त्या खांबांना बांधलेले दोर नाहीत. त्याला बांधलेल्या घंटांचा नाद सतत होत असतो व त्यामुळे आत्माराम समाधीची झोप घेतो. आध्यात्मिक सद्गुरु त्या पाळण्यास झोके देतात व तो पाळणा हे जग अजिबात सोडून गगनात जातो; आत्मा पूर्णपणे ब्रह्मरूपात मिसळून जातो.

मुक्ती म्हणजे मनोनाश नव्हे. ब्रह्मानंद भोगणे हे जीवंत मुक्तीचे लक्षण आहे. सिद्धास नीलज्योतीचा अनुभव असला पाहिजे. त्याने अमृतरसप्राशन केलेले असले पहिजे. तरच तो मुक्त आणि सिद्ध!

शांति म्हणजे परमार्थात प्राप्त झालेल्या उच्चतम अनुभवानंतर स्थिर झालेली व त्यापलीकडे असलेली स्थिती होय.

नाद-बिंदु-कला-ज्योति

संतसंग व ध्यान केल्याने साधकास नाद, बिंदु व कला यांचे रहस्य उमगते आध्यात्मिक अमृतरस म्हणजे काय तेही कळते आणि निरवकाशशून्य पाळण्यात आनंदाने झोपी जाता येते.

नाद-बिंदु-कलाः नाद - अनाहतनाद, बिंदु - आकार (परमेश्वराचे अनुभूतीस येणारे साकार स्वरूप), कला - प्रकाश. प्रकाश म्हणजे जाणीव.

परा ही पण नाद म्हणून ओळखली जाते. बिंदु हाच पश्यंति म्हणजे स्वयंप्रकाश. मध्यमावाणी हे त्रिपुटीलयाच्या प्रारंभिक अवस्थेस म्हणतात. वैखरी म्हणजे त्रिपुटी सत्यतेने भासणारी अवस्था.

हंसयुगलातील हकार हा परमपुरुष आणि सकार ही परमाप्रकृति. पुरुष आणि प्रकृति ही अंती ब्रह्मच आहेत. हंस युगल = शिवशक्तिसामरस्यावस्था = गुरुपादुका (हे सहस्त्रदलस्थित द्वादशदलकमल आहे.).

"सोहं = हंसः = सोहं" ही शिवशक्तिविभाजन आणि सामरस्य यांची प्रक्रिया होय. सोहं मंत्राने सामरस्यप्रक्रिया गतिमान होते. नाथसांप्रदायिक संकेतानुसार सद्गुरूंच्या कृपेनंतरच चित्तविश्रांति प्राप्त होऊन सामरस्यप्रक्रिया सुरू होते. नाथपारंपारिक विचारानुसार **पिंडसिद्धी** म्हणजे **वज्रदेह** नव्हे, किंवा पतंजल्युक्त **कायसंपत**ही नाही. ती स्थिती केवळ परमपदाच्या दर्शनानेच प्राप्त होते.

त्यानंतर जीवन्मुक्तीची अवस्था होते. पिंडसिद्धी झाल्यावर देह प्रकाशमय होतो. काळाची गती क्षय पावते. योग्याचा देह चिरंतन होतो. तो एका अमर अविकारी प्रकाशदेहरूपे विद्यमान होतो. सामरस्यप्रक्रियेच्या अंती परममुक्ती प्राप्त होते.

शिवशक्ति = अर्धनारीनटेश्वर. जगताच्या प्रकटनाची प्रक्रिया म्हणजे 'परमशिव ⟶ हंसयुगल ⟶ विकृति (जगताचे प्रकटन).

श्रीमद्भागवतानुसार षोडष कला म्हणजे दशेंद्रिये, मन व पंचमहाभूते आणि ज्योति म्हणजे प्रकाश. कबीर याच ज्योतीस उद्देशून म्हणतातः **"नजर न आवे आतम ज्योति, जैसा निर्मल मोती "**. ज्योतीचा अनुभव म्हणजे योग्यांना आत्मस्वरूपाचा प्रकाशरूपे होणारा साक्षात्कार.

ज्योतिदर्शन ही कुंडलिनी स्फुरणाची प्राथमिक अवस्था आहे. ही भ्रूमध्यस्थानात दिसते. हिलाच प्रज्ञाज्योती असेही म्हणतात. ज्योतिपूर्व केवलकुंभकाचा उदय होतो. योग्यासाठी ज्योतिदर्शन अत्यावश्यक आहे. ब्रह्मांडातील सत्ता तिच्याच द्वारे अभिव्यक्त होते. तिच्यामुळे चिदाकाश क्रमाक्रमाने प्रकाशित होते. भ्रूमध्यात ज्योति दिसणे हे अत्युच्च स्थितिलक्षण आहे. त्या अवस्थेत वैखरीवाणी अंत पावते आणि देहात्मबोधही नष्ट होतो.

देहात्मबोधाच्या अंती इडा–पिंगला नाड्यांची वक्र गती सरल मार्गात परिणत होते. सुषुम्नेत गती होते. साधक आपल्याला ज्योतिस्वरूपात पाहू लागतो. तिच्यात स्वतःसह संपूर्ण योगीदेह प्रकाशित होतो. हेच आत्मदर्शन होय. आत्मदर्शनापुढेच विश्वदर्शनाची परिपूर्ण अवस्था आहे. त्यानंतर विश्वातीत अवस्था आहे.

त्यानंतर निजस्वरूपदर्शनाची अवस्था आहे. ती स्वयंप्रकाशावस्था म्हणजेच चैतन्याचा आत्मसाक्षात्कार. हेच ते सच्चिदानंद आत्मस्वरूप किंवा ब्रह्मस्वरूप. ते वर्णनातीत आहे. भ्रूमध्यस्थ ज्योती हीच तो दिव्यचक्षू आहे जो हे सर्व काही दाखवतो आणि पाहू शकतो. तिलाच म्हणून ब्रह्मसाक्षात्काराची प्रारंभिक अवस्था असेही काही योगी म्हणतात.

जोपर्यंत देश–काल विद्यमान असतात, तोवरच देहाची सत्ता असते. शक्तिक्रियाही तेव्हापर्यंतच चालते. शक्तीची क्रिया संपूर्ण झाली की काहीही शेष रहात नाही. तीच मग आत्मावस्था वा ब्रह्म वा परमगुरु इ. नामांनी संबोधली जाणारी स्थिती. त्या अवस्थेत साकार-निराकारादी विचार गैर आहेत. ती एक अत्यंत कल्पनातीत अवस्था आहे.

संत म्हणतात की शिवलिंग हे एक प्रतिकात्मक दर्शन आहे. पिंडी=नाद, साळुंका=बिंदु व गोमुख=कला.

आज्ञाचक्रावरील अर्धमात्रा[1]

हा प्रांत आज्ञाचक्रापुढे ब्रह्मरन्ध्र व तदुपरान्त आहे. ओंकाराची अर्धमात्रा याने निर्देशित होते. हिचे विभाग आणि अनुभूती पुढीलप्रमाणे होत.

१. बिंदुः निरालंबस्थिती, ईश्वरभावाचे पूर्वसूचन

२. अर्धेन्दुः भ्रूमध्य व ललाटचक्र या भागात सूर्य-चंद्र-अग्नि आदींची दिव्य दर्शने

३. रोधिनीः दिशा व काल (दिक्काल) यांचे भान नाहीसे होते. मला याचा अनुभव आहे.

४. नादः ब्रह्मरंध्राचे प्रारंभी नादस्थानी चिद्बोध होतो.

५. नादान्तः ब्रह्मरन्ध्रावरील शक्तिस्थानात दिव्य प्रभासंपन्न विश्वाधार महाकुंडलिनीचे दिव्यदर्शन व चतुर्दशभुवनज्ञान घडते.

६. शक्तिः नादांताप्रमाणेच अनुभूती येतात.

७. व्यापिनी (व्यापिका): साकार-निराकार हा भेद मावळतो. ही अद्वय अनुभूती असते. मी ही अनुभूती घेतली आहे.

८. समना (समनी): व्यष्टी-समष्टीभेद मवळतो. विश्वनादाचे दिव्य श्रवण घडते. ही परतत्त्वाची चिदात्मिका ईषणशक्ती (सिसृक्षा) प्रकट होते; तिच्या त्रिगुणात्मक प्रसवक्रियेतून पिंड-ब्रह्मांडरचना पूर्ण होते.

या अवस्थेतील जीवन्मुक्त सशक्तिक भगवत्स्वरूप असल्याने षड्गुणैश्वर्य व **"कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुं"** असे सामर्थ्य अशा महापुरुषात प्रकट होते. सृजन-पालन-संहरण-तिरोभाव व अनुग्रह अशी पंचशिवात्मक कृत्ये त्याच्या ठायी व्यक्त होत असल्याने असे सद्गुरू साक्षात शिवस्वरूप असतात.

---

[1] संदर्भः सर्पन्ट पॉवर - सर जॉन वुड्रफ; साधनासंहिता – बाबामहाराज आर्वीकर; देवयानमार्ग – श्री ल. म. जोशी; प्रकाशदीपिका - दासबोधाचा सोलीव अर्थ (सोलीव सुख)–समर्थकृत; श्री बाबामहाराज आर्वीकर आणि तांत्रिक वाङ्मयमे शाक्तदृष्टी -पं. गोपीनाथ कवीराज

माझ्याठायी ही अवस्था प्रकट होती. म्हणूनच मला नाथसिद्धांनी सद्गुरुत्व देऊ केले होते, जे मी नाकारले.

९. उन्मना (उन्मनी): ही शिवशक्तिसामरस्यस्थिती आहे. ती अमेय, अनिर्देश्य, विकल्परहित व केवल अशी स्वरूपस्थिती आहे. हिलाच ***महाशून्य*** असे म्हणतात. "महाशून्याच्या डोहाकाठी का ओठंगून बसला आहेस", असे मला एका नाथसिद्धाने एकदा या अवस्थेत असतांना विचारले होते, हे मी पूर्वीच सांगितले आहे.

याच स्वयंप्रकाश अवस्थेला परब्रह्म व परमाद्वैत परमपद म्हणून सिद्ध ओळखतात. ज्ञानेश्वर ज्या अवस्थेला **"पिंडे पिंडाचा ग्रासु"** असे म्हणतात, ती हीच अवस्था होय. महाशक्तीचा हा **प्रतिप्रसव** आहे. तिची परिसमाप्ती पुनः निजरूपात म्हणजे **"निर्गुणं निष्कलं शान्तं व्योमातीतं निरंजनं"** अशा परमशिवस्वरूपात होते.

म. म. पं. गोपीनाथ कविराज म्हणतात की हे जे नऊ स्तर[२] आहेत, त्यातील बिंदूत अर्धमात्रा असते. तिच्यात विशुद्ध चैतन्याचा अधिक प्रकाश असतो. हा अर्धमात्रेचा मार्ग नादमय आहे. मन व काल हे नेहमी एकत्र असतात. मनाच्या अंती कालही अंत पावतो. नादाच्या या मार्गात मन व कालाचा अंत होण्याची क्रिया पार पडते. उन्मनीपदावर पोहोचले की कालाचा अंत होतो. वस्तुतः मन, काल व नाद हे एकदमच अंत पावतात.

आज्ञाचक्रावर दिव्यनेत्र वा ज्ञानचक्षू आहे. तो एकदा उघडला की कधीही मिटत नाही. कुंडलीनी जेव्हा तेथे पोहोचते, तेव्हा त्याच्यापुढे दिव्य सृष्टीसोहोळा प्रकट होऊ लागतो. त्रिपुटी एकरस होऊ लागते. भ्रूमध्यस्थानी जी दिव्य संवेदना असते, ती होते व ललाटमध्यस्थानी प्रेरणा देते. ही स्फुरणसंवेदना म्हणजे चैतन्याचे स्पष्ट प्रमाण होय. हे माझ्याठायी प्रकटल्याचे मी मागेच सांगितले आहे. हे आत्मतेजाचे प्रकाशस्पंदन आहे. त्रिपुटी चैतन्यमय होते. त्यावेळी विश्वाचे भान असत नाही. माझीही अशीच अनुभूती आहे.

सुषुम्नानाडी आणि साधक ते सिद्धावस्था

पतंजली म्हणतातः

"प्रयत्नशैथिल्यानन्तसमापत्तिभ्याम् ।।२–४७।।".

संत याचा अर्थ असा करतातः शेष आपला फणा जेव्हा वर करून साधकाच्या दृष्टीसमोर स्थिर राहतो, तेव्हा खरे ध्यान सुरू होते. हा शेषच सुषुम्नानाडीच्या प्रतिकात्मकरूपात साधकास दृष्ट होतो.

सुषुम्नानाडीतील प्रकाशाचे प्रतिबिंब पुरीतती या नाडीत पडते. वस्तुतः ही नाडी नाही. ती केवळ एक प्रकाशप्रतिमा आहे. सुषुम्नेचा मध्यभाग म्हणजे अतिवाहक अशी ब्रह्मनाडी. ती पिंडातील प्राणांचे मूलबंधन आहे. या नाडीचे स्वरूप केवळ विद्युत्प्रवाहरूप असते. जसे प्रकाशात प्रकाशाचे वेढे असावेत तसे (आज्ञाचक्रापासून पुढे) या नाडीचे स्वरूप दिसते जिचे पिंडांतर्गत अनेक प्रवाह आहेत, पण जिच्या केंद्रभागी जाणारी एकच एक सरळ वाट आहे, ती ही नाडी म्हणजे पिंडातील जणू रत्नदीप अशा जीवाचे स्वगृह होय.

याच नाडीतील विद्युतप्रवहण मी अष्टदलकमलाप्रसंगी अनुभवले होते. **काळा योगी** दिसलेल्या सर्व प्रसंगात माझी गती याच नाडीद्वारे ब्रह्मरन्ध्र व तदुपरांत झालेली होती. कशी त्याचे वर्णन मी करणारच आहे.

नाभिस्थान हे कुंडलिनीशक्तीचे राहण्याचे ठिकाण आहे. कुंडलिनीजागृतीमुळे पीतवर्णाची सूर्यनाडी (पिंगला) आणि लालरंगाची चंद्रनाडी (इडा) तिच्याशी एकरूप होऊ लागतात. नाडीकंद भंग पावतो. श्रीज्ञानेश्वरांनी याच स्थितीला उद्देशून म्हटले आहे:

मार्ग मोडिती नाडींचे । नवविधपण वायुचे ।
जाय म्हणौनि शरीराचे । धर्मु नाहीं ।।
इडा पिंगला एकवटती । गांठी तिनही सुटती ।
साही पदर फुटती । चक्रांचे हे ।।
मग शशी आन भानु ।
आईसे कल्पिजे जो अनुमानु ।
तो वातीवरी पवनु ।
गिंवसितां न दिसे ।।ज्ञा६–४३ते४५ ।।

सुषुम्नेद्वारे भालप्रदेशात कुंडलिनी आली की ती शांत होते. सुषुम्नेद्वारी ती येताच ज्ञाननेत्र उघडते. त्याद्वारे तिला ऊर्ध्वमार्ग दिसतो. त्या वाटेने ती पुढे चालू लागते. नाडीत्रयसंयोगस्थानी येताच एक प्रकाशमय अवस्था येते. ती तेजस्वी ज्योतीप्रमाणे दिसू लागते. तिच्या ठायीचे शक्तीचे दिव्य तेज प्रकट दिसते. तिची गती त्यावेळी सुवर्णकिरणांप्रमाणे होते. माझा अनुभवही हेच सांगतो.

जेव्हा कुंडलिनीची ही स्थिती होते, तेव्हा तिला हृदयस्थ प्राणेश्वर दिसू लागतो. त्याला पाहताच दिव्य

[२]. या नऊ स्तरांच्या तांत्रिक महितीसाठी Sir John Woodroffe यांचा Sepent Power हा ग्रंथ पहावा.

अनाहतनाद प्रकटतो. तेथे ॐकारनाद जो निर्माण होतो, ती जणू घनगर्जनाच असते. श्रीज्ञानेश्वरही म्हणतात की:

घोषाच्या कुंडी। नादचित्रांची रूपडी।
प्रणवाचिएं मोडीं। रेखिली ऐसीं।।६–२७६।।
विसरौनि गेलो अर्जुना। जंव नाशु नहीं पवनां।
तंव वाचा आथी गगना। म्हण घुमे।।
तया अनाहताचेनि मेघें। आकाश दुमदुमों लागे।
तंव ब्रह्मस्थानींचे बेगें। सहजें फिटे।।
आईकें कमलगर्भाकारें। जैं महदाकाश दुसरें।
जेथ चैतन्य आधातुरें। हो असिजें।।
तयां ह्रदयांचां परिवरीं। कुंडलिनियां परमेश्वरीं।
ते जाची सिदोरी। विनियोगिली।।
।।ज्ञा।।६–२७८ ते २८१।।

तो घनघोर नाद ऐकताच कुंडलिनी परमेश्वरी लुब्ध होते. सर्वेश्वर प्राण आवेशाने बाहेर उसळी घेतो. तो ह्रदयकमलात सांठवतो. प्राणेश्वरास पाहून, उपास्यदर्शनाने मग त्या ठिकाणी अनाहताचे मधुर निनाद निर्माण होतात. साधकाचे प्राण मग समष्टीरूप होतात.

चिदाकाशशिखरी ज्ञानसाक्षात्कार होतो.
चित्ताकाश=आज्ञाचक्रांतर्गत अवकाश
चिदाकाश=त्रिकुटीअंतर्गत अवकाश
महदाकाश=भ्रमरगुंफेतील अवकाश

महदाकाशात स्थिती होताच त्रिगुणातीत अशी उन्मनी अवस्था होते. ही अवस्था प्राप्त झालेल्या साधूने मग अंतःकरण नेहमी निग्रही ठेवावे. भगद्भजनात तल्लीन होऊन रहावे. कोणाच्या घरी मुद्दाम जाऊ नये. मठमंदिरात रहावे. अध्यात्मज्ञानाशिवाय इतर बोलूच नये. कोणाचीही सेवा घेऊ नये. त्याने साधनासागरातील मुक्तिरूप मोत्याकडेच लक्ष द्यावे.

महदाकाशप्रवेशाने साधक धुंद होतो. शब्दज्ञान आणि जड विश्वाचा आभास मावळत जातो. ब्रह्माकार भावस्थिती होते. श्रीगणेश व गायत्री यांसारख्या मोक्षसुखदायिनी देवतांची भेट होते. त्यांना वंदन करावे; पूजन करावे; पण अलौकिक सामर्थ्य अपेक्षू नये.

आत्मस्थितीत मग्न व्हावे म्हणजे तदाकारता येते. स्त्रीसंग घडतांना येणारी धुंदी जशी असते, तशी धुंदी अन् मूढतेची संवेदना येते. ज्ञात्याच्या भूमिकेतून धुंद करणारा हा सुखानुभव असतो. या स्वानंदप्राप्तीच्या वेळी योगिजन सामोरे येतात. योगमार्गातील सूक्ष्म कला ते सप्रयोग समजावून सांगतात. त्यामुळे शब्दज्ञानाचे धागे तुटून पडतात. अहंभाव पळून जातो. चिज्जडग्रंथी नाश पावते.

या स्वर्गीय स्थितीच्या शेवटी तेजोमय दर्शने घडतात. दिव्यस्पर्श होतो. त्यामुळे ब्रह्मज्ञानाचा गुंजारव सुरू होतो. त्या स्थितीत आकाश न दिसता सर्वत्र प्रकाशच प्रकाश दिसू लागतो. जागृती, स्वप्न, सुषुप्ती व ध्यान हे अवस्थाभेद मवळतात. उन्मनीस्थिती येते. अशा भ्रांतचित्त साधकाचा सांभाळ श्रीगुरुदेव/देव करतात. सर्व सिद्धिवैभव प्राप्त होते. मलाही या स्थितीचा अनुभव आहे आणि देवानेच त्या वेळी माझा सांभाळ केला होता.

त्या सिद्धपुरुषाचे जीवन म्हणजे आनंदपौर्णिमा होते. त्याच्या जागृत्यादी अवस्था स्वानंदमय शिवस्वरूप असतात. साक्षीभावाने त्याचा एकाच वेळी सर्व ठिकाणी निवास होऊ लागतो. महासिद्धी हात जोडून मागेपुढे धावत राहतात. कारणदेह ओलांडून तो दिव्यप्रकाशाने संशुद्ध होतो. महदाकाशात चित्सूर्याचे स्वयंतेज झळाळून येते.

त्याला याच ठिकाणी सद्गुरू उचलून घेतात, जसे उद्धवाला श्रीकृष्णाने उचलून घेतल्याचा प्रसंग श्रीमद्भागवतात आहे. सद्गुरू आलिंगन देतात आणि ब्रह्मभावात निमग्न अशा त्या ब्रह्महंसावर आत्मप्रकाशाची पखरण घालतात. मीही हा श्रीकृष्णालिंगनाचा प्रसंग अनुभवलेला आहे. अलखनिरंजनाच्या ठायी वेडावलेल्या त्या सिद्धयोग्याची अशी स्थिती असते.

गुरुप्रेमाचे, ईशकृपेचे माहात्म्य तो गाऊ लागतो. द्वंद्वातीत उन्मन अशा स्वप्रकाश आत्मस्थितीत रममाण होतो. अशा तुर्यावस्थेत शुद्धज्ञानासह त्याचा विहार घडतो. तो आकाशरूपच होतो. श्रीज्ञानेशही म्हणतात की:

गगनीं गगन लयां जाएं। आईसें जैं काईं आहे।
तैं अनुभवें जो होएं। तो हो ठाकें।।
।।६–३१०।।ज्ञा।।

त्या परमप्रेमस्थितीतील त्या भगवद्भक्तास गुरुपद प्राप्त होते. ब्रह्मस्वरूप गुरुमाऊली/ईश्वराशी तो एकरूप होऊन जातो. ही परमस्थिती आहे. मलाही असेच गुरुपद आणि स्थिती प्राप्त झाली होती. त्याचे वर्णन मी कृष्णाताई प्रसंगात सांगितले आहेच.

ही स्थिती मोक्षावस्थेचे लावण्यभांडार आहे. याच अवस्थेला उद्देशून श्रीज्ञानेश्वरांनी म्हटले आहे:

जैं उन्मनियेचे लावण्य। जैं तुर्येचे तारुण्य।
अनादि जैं अगण्य। परमतत्त्व।।६–३२०।।ज्ञा।।

ही स्थिती सर्व पापांचा परिहार करणारी गंगा आहे. पूर्वजांचा उद्धार करणारी ही गया आहे. त्याच्या मुखातून जे शब्द उमटतात, ते पवित्र असतात आणि ऐकणारेही त्यामुळे पवित्र होतात. ते खरे तर शब्द नसून ब्रह्मनादच असतात आणि ते आत्मस्थित शिवस्वरूपात विलीन होतात.

शुद्ध अहंकार जसजसा विरून जाऊ लागतो, तसतसा एकच प्रकाशस्त्रोत जाणवू लागतो व त्यातून ***"शिवोहं"***भाव प्रकट होतो. अंतर्यामी शिव प्रकट होतो. त्यानंतर असह्य तेज प्रकट होते. महदाकाशाच्या अफाट विस्ताराचे दर्शन घडते, जसे की अर्जुनाला गीतेतील विश्वरूपदर्शनप्रसंगी घडले होते. मलासुद्धा कृष्णाताई हेच सांगून एकरूपतेपासून परावृत्त करू पहात होत्या. त्या प्रसंगाचे वर्णन मी करणारच आहे.

अशा वेळी पूर्वसंस्कार जागृत झाल्यास साक्षात शिवस्थिती प्राप्त न होता काही काल आत्मसंमुख प्रकृतीचा प्रभाव पडतो व सद्भावाचा लोकव्यवहार घडतो. त्याचे अंतरंग अनाहतनाद, सोहंस्फुरण व चित्प्रभादर्शन यांनी उजळून निघते. पुढे निर्विकल्पस्थिती येते.

साधकाच्या अंतर्यामी समष्टी अहंकारस्वरूप प्रकटल्यास सगुण परमात्म्याची भेट घडते. **"भक्ताचा आकार। स्वयें जो जगदाकार।"** असा भक्तवत्सल भगवन्त जेव्हा साधकास प्रेमालिंगन देतो, तेव्हांची आनंदकल्लोळ अवस्था असते. सहस्त्रदलाच्या परमशिवाशी संपूर्ण सामरस्य अशी ही परमोच्च स्थिती आता उरते. साक्षात श्रुतीही आता निःशब्द होते.

अनाहताची धून वाजू लागते. सोहंध्वनीचे हुंकार निर्माण होतात. दिव्य वेणुनाद अखंड ऐकू येऊ लागतो. सर्व भाव चिदानंदात विलीन होतात. प्रकाशच आकाशरूप होतो. आदिपीठस्थान लाभते. ब्रह्मरूपी राऊळात (शिवमंदिरात) स्पंदने दाटतात. जीवभाव चैतन्यात लय पावतो. विश्वरूप झाल्याचे आपणास आपणच कळते.

गोल्हाटातील स्वानंदानुभव कितीही भोगला तरी तृप्ती होत नाही. कर्मकर्तृत्व संपून जाते. त्यावेळी आत्मशिव साकार होतो व स्पर्श करतो. साधक निश्चिंत, निरामय, निष्काम व आनंदस्वरूप होतो. निर्द्वंद्व, शांत आणि प्रेममय विहार करतो. याच्याही पुढे शिवगोसावी (केवल) आहे. तेथे दिव्यनादच शब्दाला झाकून टाकतो. केवळ स्वयमेव परमशिवच उरतो. जो कोणी या अवस्थेला जातो, तो निष्कलंक असा शिवस्वरूपच होतो. हे सर्व अनुभव आणि अनुभूती मी घेतलेल्या आहेत. ***देव नसलेल्या देवाचे अंतराळीचे देऊळ*** हे आणि इतर वृत्तांत पहावा.

गोल्हाटस्थानी सिद्धसंघ असतो. अभंग प्रकाशवर्तुळ असते. ते कुंडलिनीजगदंबेचे मूळ पीठ आहे. तेथेच ***शिवगोसावी*** वसतो. जीव तेथे पोहोचून सिद्ध होतो. स्वानंदसाम्राज्याचा चक्रवर्ती राजा होतो. जीव निराकार होतो. सहजसमाधिस्थित होतो. निर्विकल्प अवस्था होते. त्यासाठी ब्रह्मरंध्रात प्रवेशून मूळमायेचा संबंध तोडावा लागतो.

ब्रह्मरंध्रगोल प्रकाशित होताच त्यामधील सहस्त्रदलकमल उमलून येते. त्यामध्ये प्रवेश करून चिदात्मा निजस्थानी विश्रांती घेतो. (पहाः माझा सुवर्णकमलाचा अनुभव) त्यावेळी तो निर्विकल्प समाधी व ब्रह्मानंदाची सहजावस्था यांची सजीव मूर्ती असतो. त्याला प्रकृतिधर्म व शास्त्रमर्यादा यांची बंधने उरत नाहीत. सकळधर्मी समाधी हेच त्याचे स्वरूप असते.

सच्चिदानंद स्थितीतील तो म्हणजे भगवद्विभूति असते. नामरूपात व्यक्त झालेले ब्रह्मचैतन्यच तो असतो. जीवाशिवाचे ऐक्य, शिवशक्तीचे सामरस्य त्याच्या रूपाने मूर्त होते. त्याचा महिमा संगतांना शब्द आणि वाणी स्तब्ध होतात. ज्याने त्याने या परमस्थितीचा अनुभव घ्यावा आणि परमपदी (ब्रह्मपदी)आरूढ व्हावे हेच उत्तम. त्याच्या चैतन्यस्पर्शाने ठिकठिकाणी अनेक जीवज्योती प्रकाशमान होत जातात. तो दयाघन या जीवसृष्टीचा उद्धारकर्ता होतो. तो म्हणजे जणू आदिनाथच!

या स्थितीबद्दल श्री रामदासस्वामी समर्थ **सोलीव सुख** या त्यांच्या ग्रंथात काय म्हणतात, ते पाहू याः

हंस पदें ऐक्य झाली। सुख सुखातें निमग्न।
शांति ये माळ घाली। अलक्ष सेजें निजली।।
. . . आला मार्ग ते क्षणीं। दिसेनासा झाला की।।
त्रिकूट श्रीहाट गोल्हाट। बुडालें तें औटपीठ।
इडा पिंगला सुषुम्ना तट। विरालें तें आत्मसुखें।।
स्थूळ सूक्ष्म कारण।
नेणों काय झालें महाकारण। . .।।३१ ते ३३।।

यातून स्पष्टच होते की अर्धमात्रेच्या प्रांतातील योगचक्रांचा क्रम **त्रिकूट - श्रीहाट - गोल्हाट - औटपीठ** असाच आहे. माझेही मत असेच आहे. काही लेखक तो त्याहून वेगवेगळा सांगतात, तसा तो नाही.

सहस्त्रदलकमल हेच त्या सनातन शिवाचे निवासस्थान आहे. वेद हा त्याचा निःश्वास आहे. शिवरूप होणे हीच तेथील परमावधीची अनुभूती आहे. त्या वेळी अमृतबिंदुसेवन सलग जास्तीत जास्त २१ दिवस घडते.

माझी ही स्थिती ही कालमर्यादा ओलांडून सतत दोन वर्षांहूनही अधिक काळ टिकली होती, त्याचा उल्लेख आणि त्याबाबत ज्ञात्यांनी दर्शवलेले आश्चर्य माझ्या या आत्मवृत्तात वेळप्रसंगी आलेले आहेच.

सुषुम्नादी नाड्यांचा पथ

विशुद्ध चक्राअंती सुषुम्नादी नाड्यांचा पथ कसा असतो याबाबत भिन्न भिन्न मते आहेत. तिबेटी लामांच्या मते सुषुम्नादी नाड्या उपस्थ मूलाधारचक्रापासून निघून थेट ब्रह्मरंध्रापर्यंत जातात. त्यानंतर त्या वाकून भ्रूमध्यस्थ आज्ञाचक्राकडे जाऊन तृतीय नेत्रात मिळतात. सुषुम्नाअंत तेथेच होतो. पण इडा व पिंगला या नाड्या तेथून पुढे नाकपुड्यांपर्यंत जातात.

परंतु हे मत कितीही आकर्षक जरी वाटले तरी संतमत आणि इतर योग्यांचे मत याविरुद्ध आहे. कुंडलिनी ही आज्ञाचक्रावरून पुढे सहस्त्रारचक्राकडे जाते हेच सर्वमान्य आहे. इडा व पिंगला या आज्ञाचक्रातून पुढे नाकपुड्यांपर्यंत जातात, हेही सर्वमान्य आहे. त्या सहस्त्रारचक्रावर जात नाहीत.

लामांच्या मते त्या सहस्त्रारचक्र अथवा ब्रह्मरंध्रात पोहोचून नंतर आज्ञाचक्रात जातात असे आहे. ते सयुक्तिक आणि अनुभवसिद्ध दिसत नाही. आज्ञाचक्र हा योगपथाचा अंतिम टप्पा असल्याचे मत एक परमहंस योगानंद सोडले तर इतर योगी समजत नाहीत. इतरांचीही तशीच मते संदिग्ध आहेत. कारण कोणी कोणी आज्ञाचक्राच्या अवकाशासच पुढील ब्रह्मरंध्रादी अवकाश समजून तशी विधाने करतात.

माझा अनुभवही हे लामादींचे मत आणि योगानंदांचे मत चुकीचे आहे असे दर्शवतो. माझी याविषयाची अनुभूत धारणा पुढीलप्रमाणे आहे.

पथ क्र.१ : ब्रह्मनाडीद्वारे मूलाधारचक्र ते थेट सहस्त्रारचक्र. माझा अनुभव आहे की या थेट मार्गावर मधली कोणतीही चक्रे घेतली जात नाहीत. (पहावे: माझे **काळा योगी** इ. अनुभव)

पथ क्र.२ : मूलाधार ते आज्ञाचक्र (विशुद्ध्यादी षट्चक्रांतून होत होत पश्चिमपथाद्वारे), तेथून पुढे तारकस्थान-मस्तकसंधी ते सहस्त्रारचक्रादी ब्रह्मरंध्रादी विभाग घेत घेत. (पहावे: माझे **अष्टदलकमल** आदी अनुभव)

चक्रमार्गक्रमणेबाबत अनेकानेक मते व पद्धति संगितल्या जातात. कोणी योगी मूलाधारापासून आज्ञाचक्रापर्यंतचा मार्ग सांगतो, तर कोणी पुढे सहस्त्रदलकमलात जावे असे सांगतो. इतर कोणी त्याऐवजी ब्रह्मरंध्रास जावे असेही सांगतो. ब्रह्मरंध्र व सहस्त्रदल ही वेगवेगळ्या मार्गांवर असल्याचेही श्री बाबामहाराज आर्वीकर आणि पं. गोपीनाथ कविराजादींची मते आहेतच! कोणी विहंगममार्गी सरळच आज्ञाचक्राची वाट दाखवतात. त्याखालच्या चक्रांना कोणतेही महत्त्व देत नाहीत.

या पार्श्वभूमीवर स्वामी श्री शिवानंद काय म्हणतात, ते पाहणे उद्बोधक आहे. माझे अनुभव त्यांच्या निवेदनाशी जुळणारे असल्याने मी ते उद्धृत करत आहे.[३] जे योगी फक्त ॐ जपतात आणि महासंयम साध्य करू शकतात, त्यांचा सद्गुरू तो प्रत्यक्ष ॐ हाच असतो. महासंयम म्हणजे ध्यानवस्तूशी एकरूपता. ॐशी त्याच्या ध्यानाने अशी एकरूपता, तादात्म्य प्राप्त झाले की योगी त्या दिव्याक्षराशी नित युक्त होतो. अशा योग्याला उच्च आध्यात्मिक प्राप्तीसाठी इतर कोणाही सद्गुरूंची आवश्यकता उरत नाही.

अशा योग्याचा मार्ग इतर नेहमीच्या योगमार्गांपेक्षा निराळा असतो. तो नेहमीच्या मूलाधार ते ब्रह्मरंध्र या मार्गाच्या उलट असतो. असा योगी प्रथम ब्रह्मरंध-सहस्त्रदळ येथे पोहोचून नंतर खालील चक्रांकडे उतरतो.

सर्व योग्यांना स्वाधिष्ठानचक्रजय (कामवासनाजय) प्रारंभीच करावा लागतो. पण ॐकारयोग्यांना तसे करणे आवश्यक नसते. त्यांना योगसाधनेसाठी कामवासनात्याग, विषयत्याग, सर्वसंगपरित्याग, इ. योगविषयक निर्बंध पाळावे लागत नाहीत. असे योगी संसारात राहूनही इतर सर्वसामान्यांसारखे जगत, लोकव्यवहाराचे बंधन पाळत राहूनही योगाचे पूर्णत्व पावतात.

श्री रमणमहर्षीही असे सांगतात की ज्ञानयोग्याला योगप्राप्तीसाठी चक्रजय आदी करावे लागत नाहीत. त्याचे चित्त परमात्म्याशी नित्य युत होते आणि कुंडलिनी आपोआपच ब्रह्मरंध्री जाऊन तेथे स्थिरावते.

माझाही हाच अनुभव आहे. त्यामुळेच एका विचक्षक दृष्टीच्या जाणकाराने मला असे म्हटले होते की "आपको कुंडलिनीशक्तीचालनकी क्या आवश्यकता है? आप तो वैसेही पोहोच चुके हो । आपको तो साक्षात शिवजी मिल गये है । जहां शिव साक्षात होते है, माता कुंडलिनी भी तो वहां होती ही है!"

स्वामी शिवानंद आणि श्री रमणमहर्षी यांची ही मते साधारण सारखीच आहेत. माझ्या मते ज्ञानयोग्याची विवेकसाधना ही एका प्रकारची ॐ या तत्त्वावर केलेली ध्यानधारणाच आहे. त्यामुळे त्यालाही ॐचा जप करण्याचेच फल मिळणे साहजिकच आहे. कुंडलिनीची

[३] संदर्भ: जपयोग (चक्रे) - स्वामी श्री शिवानंद

वेगळी उत्थापनादी क्रिया त्यामुळे त्याच्यासाठीही आवश्यक नाहीत.

श्रीरमणमहर्षी असेही संगतात की सुषुम्नानाडी कंदातून निघून मेरुदंडनिर्देशित मार्गाने ब्रह्मरंध्रात जाते आणि तदनंतर थोडी वाकडी होऊन जीवनाडीद्वारे ह्रदयस्थ होते. तेथेच ती विराम पावते. जीवनाडी एक वेगळी नाडी आहे असे म्हणण्यापेक्षा तो सुषुम्नेचाच शेवटाचा भाग आहे असे म्हणणे जास्त योग्य आणि माझ्या मते अनुभवसिद्ध आहे.

जीवनाडीस ***अमृतनाडी** वा **प्राणनाडी*** असेही म्हणतात. योगी जेव्हा ह्रदयात पोहोचतो, तेव्हा समाधिस्थिती सदाची चिरंतन होते. ह्रदय हे स्थान सर्वात शेवटचे आहे. सुषुम्नेच्या या वाकण घेण्याच्या व तेव्हाच्या तिच्या मार्गास ***जीवनाडी*** म्हणून संबोधण्याच्या उल्लेखावरून कबीरादी विहंगममार्गीयांच्या ***बंकनाल*** या सुषुम्नापथाअंतीच्या नाडीविशेषाचा बोध होतो, असे माझे अनुभवसिद्ध निरीक्षण आहे. विशेषतः तिला ***अमृतनाडी*** म्हणणे अति उद्बोधक आहे. कारण कबीर म्हणतात की **"बंकनाली अमृतरस पीजे, मनुवा"।**

संजीवनसमाधिरहस्य

योग्यांसाठी यज्ञांचे स्वरूप भिन्न आहे. ते असेः

गोमेध = कुंडलिनीचे उत्थापन आणि तिची जागृति

अश्वमेध = नाभिकुंडलिनीची जागृति.

श्रीगोरक्षनाथ 'सिद्धसिद्धांतपद्धति' या ग्रंथात नाभिकुंडलिनीलाच 'मध्या कुंडलिनी' असे संबोधतात.

श्वेनवाजपेय = उच्चावस्थित कुंडलिनीचे ह्रदयप्रदेशात गमन (हे आध्यात्मिक ह्रदय आहे. ते म्हणजे ह्रद्-मांसपिंड, शारिरीक ह्रदय, नव्हे.)

सोमयाग = कुंडलिनीने द्विदलचक्र (आज्ञाचक्र) यातून निघून सहस्त्रार (दल/पद्म)कुंडात पोहोचणे. हीच योगसिद्ध पुरुषाची शेवटची प्रांतभूमी आहे.

कुंडलिनीशक्ती सचेत झाल्यावर देहशुद्धी आपोआपच होते. नामयोगानेही देहशुद्धी होते. मातृऋण फेडले जाते. प्रकृतिशुद्धीला 'मातृऋणपरिशोध' अशी संज्ञा दिली जाते. तसे न झाल्यास जीव ब्रह्मलोकात जातो. पण तो इतरांवर कृपा करू शकत नाही. कारण तसे करण्यासाठी त्याला ज्ञानभूमीतून पुनश्च अज्ञान आणि अद्वैतातून पुनः द्वैतात उतरावे लागते. देहशुद्धी न झाल्याकारणाने अनेक जीव अद्वैतातच अडकून राहतात. देह शुद्ध झाला की तो अविनाशी होतो. हेच संजीवन समाधीचे रहस्य आहे.

देहशुद्धीचा अर्थ आहे देहाचे शून्यत्व. कण्ठप्रदेशाखालचा भाग शून्यत्व पावतो. पंचतत्त्वे शून्यावस्थेत जातात. देह ***शून्यता*** प्राप्त न झाल्याने योग्यास परब्रह्मावस्था प्राप्त होत नाही. त्याचे ब्रह्मलोकातच निधन होते.

देहशुद्धी म्हणजेच जीवनमुक्ती. प्रकृति-पुरुषांचे सामरस्य आणि ज्ञान यांच्या योगाने साधक आपल्या स्थितीविषयी निःसंदेह होतो. याच स्थितीला उद्देशून ***मातृऋणपरिशोध*** असे संबोधन आहे. महावतार बाबाजीमहाराजसंप्रदायानुग्रहित योग्यात हिचे फार माहात्म्य आहे. अनाहतनादानंतरच्या अवस्था पुढीलप्रमाणे असतात, असे ते सांगतातः

अनाहतनाद ⟶ तादात्म्यबोध ⟶ महास्थिति ⟶ अभेदभाव ⟶ शाम्भवीमुद्रा ⟶अखंड नामजप (अजपास्थिति) ⟶ आराध्याचे भक्तदेहात पूर्णागमन ⟶ रसाविष्कार ⟶ जगत स्वप्नवत भासणे व अंतर्यामी अखंड दिव्य ज्योतीचे प्राकट्य.

या अवस्थेत साधकदेहात भक्तिरसात्मक सिद्ध चिन्मय अमृतरसाचा आविष्कार होतो आणि तो सिद्धत्व पावतो. तो स्वतः सच्चिदानंदस्वरूप पावतो.

कुंडलिनीशक्तीचे कार्य पूर्ण झाले की ती अंतर्लीन होते. त्यानंतर ती ब्रह्मांडात जाते. ब्रह्मांडदेहदेखील नरदेहासमानच असतो. त्यातील चक्रांचे भेदन करून ती शून्यातून महाशून्यात जाते. त्यानंतर ती विश्वापार निघून जाते. तीच तिची अंतिम गती आहे. महाशून्यातून परमव्योम ही गती भ्रमरगुंफेतून जाऊन प्राप्त होते.

मी गुरु होतो

आतापावेतो योगशास्त्रविषयक अनुभव आणि तदनुषंगिक माहिती आपण पाहिली. आता काही योग्यांचे अनुभव पाहू या. सिद्धिमाता या एक बंगाल/आसामातील योगिनी होत्या. त्यांच्या पंथातील योग्यांचे अनुभव माझ्या स्वतःच्या योगानुभवांशी बरेच मिळते-जुळते आहेत हे सुज्ञ वाचकांच्या लागलीच लक्षात येईल.

अलीकडेच मी जुलै–सप्टेंबर २०१४त ब्रिटीश लायब्ररी, लंडन, येथे गेलो असतांना म. म. गोपीनाथ कविराज, मेमोरियल लेक्चर्स, यांचे त्याबाबतचे ग्रंथ वाचनात आले. ब्रिटीश लायब्ररी, लंडन, जुलै, २०१४ यांच्या सौजन्याने ग्रंथवाचनास आणि टीपा घेण्यास मला परवानगी मिळली. त्यातील माहीती (पृ. क्र. १५४ व १५५) माझ्या स्वतःच्या अनुभवांस अनुलक्षून स्वतःच्या पूरक टीप्पण्यांसह देत आहे.

कुंडलिनीजागृती

कुंडलिनीजागृती होते तेव्हा एक सूक्ष्म अतींद्रिय द्रव्य निघून विशुद्धचक्रावर जाते. त्यांतर ते आज्ञाचक्रावर जाते. तेथे पोहोचल्यावर ते प्रकाशात परिणत होते. तो प्रकाश योग्याच्या देहाएवढ्याच आकाराचा असतो. कुंडलिनीची खरी जागृती ती चिदाकाशात पोहोचल्यावरच होते. वर आधी उल्लेख केलेला आहेच की 'चिदाकाश' म्हणजे त्रिकुटीसंबंधित आकाश होय.

आज्ञाचक्रावर गेल्यानंतर योग्याच्या तृतीय नेत्राचे उन्मीलन होते. त्यानंतर तो कधीही बंद होत नाही. त्याच्या दिव्यदृष्टीने योगी आत्म्यास पाहू लागतो. पुढे सहस्त्रारचक्रावर जाऊन त्यानंतरच्या महाशून्यावकाशात गेले की सूक्ष्म योगीदेहास एक प्रकारचे तीव्र अनुल्लंघनीय ऊध्वाकर्षण होऊ लागते. त्यामुळे तो परमव्योमात पोहोचतो. हा मार्ग महाशून्यातून भ्रमरगुंफेत जातो आणि नंतर परमव्योमात.

तेथे परमशिवाची 'ह्लादिनीशक्ती' (विश्वकुंडलिनी) असते. तिच्या प्रभावाने योग्यास 'शिवशक्तिसामरस्य' (मिलन) होऊन परमानंद प्राप्त होतो. त्या अवस्थेत तो आलटून-पालटून **आत्मा** आणि **परमात्मा** यांच्या स्वरूपात विराजतो. **आत्मावस्था** ही शक्तीची प्रसरणक्षम स्थिती, तर **परमात्मावस्था** ही शिवाची स्वानंदमग्नस्थिती असते. **आत्मा-परमात्मा (शक्ति–शिव)** हे युगलस्वरूप असतात आणि त्यातील एक प्रकटला की दुसरा दिसत नाही. ही स्थिती आलटून-पालटून योगी अनुभवू लागतो.

यापाठोपाठ पूर्णत्वप्राप्ती होते. हीच योग्याची अत्युच्च अवस्था. त्या वेळी केवळ एकच एक तत्त्व उरते. तेच प्रकाशते. ते म्हणजे परब्रह्म म्हणा, परमशिव म्हणा किंवा परमात्मा म्हणा, सगळी नामे एकाच एका त्या अंतिम तत्त्वाची, जे योगी अनुभवतो आणि स्वतः होतो. हेच ते ***स्वसंवेद्य*** तत्त्व ज्याला माउली श्रीज्ञानदेवांनी **"ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।"** असे गौरवाने म्हटले आहे.

योगसिद्धीचा गूढ पूर्णानुभव जेव्हा येतो तेव्हा योग्याचे मन संपूर्णपणे प्रशांत होते. पतञ्जलींना अभिप्रेत असणारी चित्ताची निरुद्धावस्था ती हीच. हिलाच कोणी 'मनोनाश' असे म्हणतात, तर इतर 'अमनस्का', 'उन्मनी' इ. नावांनी ओळखतात. पण ही स्थिती सदाचीच राहत नाही. योगी समाधिस्थितीतून जेव्हा जेव्हा व्युत्थानावस्थेत येतो तेव्हा तेव्हा ही अवस्था भंग पावते.

वारंवार ही स्थिती उपभोगून झाली की योगी मग कायम त्या अवस्थेत राहू शकतो आणि व्यवहारी जगातही वावरू शकतो. ही जी एक उच्चावस्था आहे. तिच्यात 'परमसंवित' पूर्णत्वाने प्रकाशमान होते. पण या स्थितीला केवळ काही अति भाग्यवान योगीच पोहोचू शकतात. हीच खरी ***चालतीबोलती समाधी*** जिला ***संजीवन समाधी*** असेही म्हणतात. हीच परमानंदप्राप्तीची अंतिम श्रेणी. हिलाच योगशास्त्रात ***पूर्ण स्वातंत्र्य*** असे म्हणतात.

तांत्रिक ग्रंथ

योगशास्त्रात साधनेच्या ज्या विविध पद्धती आहेत, त्यातील ***अर्धकाली*** तंत्रात द्वादशाक्षरी मंत्राची साधना अनुस्यूत आहे. तो मंत्र म्हणजे गुरुदेवांचा पूर्ण ***पादुकामंत्र*** असतो. ***गुरुपादुकामंत्र*** म्हणजे परमतत्त्वाच्या ***समनी*** आणि ***उन्मनी*** अशा दोन्ही अवस्थांचे संमिलन होय.

यानंतरचे काही परिच्छेद **The Selected Writings of MM Gopinatha Kaviraja (MM Kaviraja Centenary Celebration Committee, Varanasi)** या ग्रंथातून घेतले आहेत. तसेच सर जॉन वुड्रॉफ यांचा **The Serpent Power** हा ग्रंथ पहावा.

उन्मनी

उन्मनी (***उन्मना***) ही अवस्था कुंडलिनीची ***परमशिव–शक्ती***त झालेली उच्च स्थिती होय. तर ***समनी*** (***समना***) म्हणजे ***मूलाप्रकृतिवस्था***, जिचा उगम परब्रह्माच्या ईक्षणातून म्हणजेच उन्मनीतून होतो. ***समनी*** आणि ***उन्मनी*** याच दोन गुरुपादुका.

आपण गुरुदेवांच्या पादुकांना अति महत्त्वाचे समजतो. त्यांची अभिषेकादी उपचारांनी पूजा करतो. गुरुदेवांचे पाद्य तीर्थ म्हणून मस्तकी धारण करतो आणि जठरात धारणही करतो. त्याचा खरा लाक्षणिक अर्थ असा आहे की आपणास ती अवस्था लाभावी, जिच्यात ***समनी*** आणि ***उन्मनी*** दोन्ही विराजतात. याचसाठी अध्यात्मशास्त्रात गुरुपादुकांचे एवढे माहात्म्य आहे.

गुरुपादुका

सर जॉन वुड्रॉफ यांना हे **गुरुपादुकामाहात्म्य** अवगत झाले होते. म्हणूनच त्यांच्या **The Serpent Power** या ग्रंथाचा उत्तरार्ध ***पादुकापंचक*** या गुरुपादुकाप्रशस्तिपर तांत्रिक ग्रंथाच्या विवेचनाने सजला आहे. एका पाश्चिमात्यास जे हे ज्ञान प्राप्त झाले, ते आपणासारख्या एतद्देशियांसाठी नक्कीच स्पृहा वाटावी असेच आहे.

या अत्युच्च गुरुपादुकात अवस्थित होण्यासाठी ***अर्धकाली*** तंत्रात सांगितलेल्या द्वादशाक्षरी मंत्राचा जप साहाय्यक होतो, असे ते तंत्र सांगते. योगमार्गानेही ती स्थिती प्राप्त होते. ही स्थिती म्हणजे ***अनुल्लंघनीय*** कालाचे

अतिक्रमण होय. समनास्थितीतून उन्मनास्थितीत अवस्थित झाले की ***शिवशक्तिसामरस्य*** होते आणि कालाचे बंधन तुटते.

ही एकूणएक योगप्रक्रिया तशी खासच आहे. १०८१७ सूक्ष्म नादांच्या समरसीकरणातून अनाहतनाद प्रकटतो. हाच मूळ नाद जो विश्वोत्पत्तीचे कारण आहे. त्याही नादाच्या अंतिम स्थितीला योगी जेव्हा पोहोचतो तेव्हा विश्वलय होऊन नादलय प्रकटतो. संपूर्ण प्रशान्तावस्था अवतरते आणि पूर्णावस्था प्राप्त होते.

श्री महावतार बाबाजीमहाराज-लाहिडीमहाशयांच्या ***क्रियायौगिक*** परंपरेचे मूळ याच प्रक्रियेत असले पाहिजे, असे मला वाटते.

समना ही प्रणवमंत्राची ***अकरावी कला*** आहे. तीच कालावरोधन आणि काल प्रकट होण्याच्या अवस्थांतराची स्थिती होय. समनेतच***कालगति*** आहे. ही कालगतीच प्रकृतीचे रहस्य आहे. ***काल*** आणि***प्रकृति*** यांचे साहचर्य असते. ***काल*** आणि ***प्रकृति*** एकसमयावच्छेदेकरुन प्रकट होतात, तसेच ***लय*** पण पावतात. हे प्रकटीकरण आणि लय म्हणजे ***समना. समना ते उन्मना*** ही त्या दोन्हींची ***लयावस्था,*** तर ***उन्मना ते समना*** ही ***प्रकटीकरणावस्था.***

उन्मनाशक्तिसंबंधित अनुभूती या **क्षण–प्रतिक्षण** या क्रमक्रमाने येत नसून त्या निखळ यौगिक अनुभूती असतात.

अनुभूती आणि **अनुभव** यांच्यात जमीन-अस्मानाचे अंतर असते. **अनुभव** हे कालानुगामी असतात, तर **अनुभूती** या निखळ **योगानुवर्ती** असतात. त्यांच्यात तादृश कालसापेक्षता भासली तरी नसते आणि उन्मनीनंतरच्या अनुभूतीत तर ही कालतादृशतासुद्धा नसते. वस्तुतःउन्मनीचे रूपांतर अथवा उर्ध्वीभवन होत नाही. केवळ एकमात्र चिन्मय तत्त्वच तेथे स्वयंप्रकाशात विराजते. कालाचे अस्तित्व तेथे उरत नाही. पण ती स्थिती खरी तर शब्दातीत आहे. तिचे कोणत्याही प्रकारे वर्णन करणे शक्य नाही. ती स्वयेच अनुभवावी अशी एकमात्र अवस्था आहे. संतश्रेष्ठ श्रीज्ञानदेव म्हणतात तशी ती स्थितीः

"तें वि पिंडाचेनि मिखें। पदीं पद प्रवेशे। तें एकत्व होएं तैसें। पांडुकुमरा।। आतां दुजें हन होतें। कीं एकचि हें आइतें। ऐशियें विवंचनेपुरतें। उरेचिना।। गगनीं गगन लयां जायें। आइसें जें काईं आहें। तें अनुभवें जो होयें। तो होऊनि ठाकें।। म्हणौनि तेथींचि मातु। न चढेचि बोलाचां हातु। जेणें संवादाचियां गांवांआंतु। पैठी कीजे।।६-३०८ ते ३११, ज्ञानेश्वरी।।"

"***पिंड*** म्हणजे ***जीवात्मा.*** तो ***पद*** म्हणजे शिवात प्रवेशतो, असे म्हणतात खरे. पण मूलत तो शिवावेगळा खरे तर कधी असतो? ***पिंड*** म्हणून जो ***पदीं प्रवेशतो***, तो म्हणजे वस्तुतः ***पदच पिंड होऊन पदात विलीन होते*** असे म्हणावे लागते. त्या अवस्थेत तेथे **द्वितीय** (***दुजे***) कणभर तरी कोठून उरणार? एकमेवाद्वितीय परमात्माच तेथे विराजतो. ***गगनी गगनाची मिळवणी होते*** अशी जी ती अवस्था आहे, तिच्यात तो योगिराज विराजतो. अनुभवच अनुभव होऊन राहतो. त्या अवस्थेचे शब्दांकन करणे अशक्य आहे. म्हणून ती स्थिती वर्णनातीत आहे, असे म्हणून उगी राहावे, हेच बरे!"

या निगूढ स्थितीचा एक परिपाक म्हणजे आत्मतत्त्व ***प्रबुद्ध*** ते ***सुप्रबुद्ध*** अशा स्थितीत जाते. ***उन्मनी*** ते ही ***शांत्यातीत अवस्था*** यात म्हटले तर एवढाच फरक आहे. तुर्यावस्थेचे संपूर्णात विलिनीकरण म्हणावे तर हे असे असते. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थातच ही विशेष अवस्था प्रकट होते, जिच्यात आत्मभानाचे सातत्य लवमात्रही भंग पावत नाही.

आणि मेहेरबाबा हे सुफी संत म्हणत असत की त्याही अवस्थेपलीकडे आहे ते ***परमपद*** किंवा ***परमशिव*** म्हणून ओळखले जाते. त्याला आपण काय हवे ते म्हणावे! आणि त्याच्याहीपलीकडे आहे तो, ज्याला तुम्हीआम्ही ***परमात्मा*** म्हणतो तो.

माझे गुरुपद

माझ्या आत्मवृत्तात मी असे म्हटले आहे की माझ्या सद्गुरूंनी मला गुरुपद देऊ केले होते, पण मी ते नाकारले होते. पण तरीही त्याअगोदर तसेच नंतरही अनेक साधक माझ्याकडे मार्गदर्शनार्थ येत असत. त्यातल्या अनेकांना ते माझ्याकडे का आले आहेत हेही जाणवत नसे. ते मला योग आणि अध्यात्माविषयी बरेच प्रश्न विचारत. त्यांच्या साधनेबाबतही त्यांना अधिक माहिती हवी असे. हे लोक माझ्याकडेच का येताहेत हे मला नंतर केव्हातरी उलगडले. दैव माझ्यावर माझी इच्छा नसतांनाही गुरुत्व थोपू पहात होते.

अज्ञात जणु मला वाकुल्या दाखवून म्हणत होतेः "अरे! तुला गुरु व्हायचे नाही ना? बरे तर मग आता कर हे फुकटचे कष्ट! हे कोणीही तुला गुरु म्हणून मानणे तर राहूच दे! पण तू कोण आहेस हे कणभरही कधीही ओळखणार नाहीत अशी मी व्यवस्था केली आहे. अगदी जरी तुला कधी वाटले की मला हा मानमरातब मिळावा असे, तरीही तू एक त्यांच्यासारखाच एक अतिसामान्य

म्हणूनच त्यांच्या स्मरणात रहिलास तर राहशील! माझे जरा ऐकले असतेस अन् गुरुत्व स्वीकारले असतेस तर बरे झाले असते. पण तुझा अहंकार आड आला. "नाही! मी कोणी अमुकतमुक म्हणून ओळखला जायला नको आहे मला." मोठा आला आहेस माउलीची वचने उद्धृत करणारा! म्हणे ***"मठमुद्रादि मिखें । लाविलें आहेति फांसे । निसंगा एणें ।।"*** उगाच मोठेपणा नको म्हणत होतास ना? मग आता कर ही फुकटची उठाठेव!"

असो. पण माझ्या अनुभवातून ***गुरुतत्त्व*** हे कसे कार्य करते ते मला नीट समजले. माझ्या त्या अनुभवांचे ध्रुवीकरण होण्यास काही ग्रंथ कारणीभूत झालेत, जे मला मागे सांगितलेल्या ब्रिटीश लायब्ररी, लंडन, येथील माझ्या जुलै-सप्टेंबर २०१४ च्या भेटीदरम्यान पाहण्यास मिळाले.

आता उमगते आहे की माझे दैव मला या गुरुत्व-विषयाबाबतही मार्गदर्शन करू पाहत होते. तिकडे सिद्धत्व प्राप्त होऊन मी जाणूनबुजून दुर्लक्ष करत होतो. मला आता दिसते आहे की सिद्धत्वप्राप्तीचा एक महत्त्वाचा आनुषंगिक भाग आहे मुमुक्षु आणि जिज्ञासु साधकांना आणि गरजवंतांना मार्गदर्शन करणे. हे कार्य अभावितपणे चालतच असते. पण प्रत्यक्ष ***गुरु*** म्हणून सिद्धपुरुषाने आपण होऊन हे कार्य केले, तर त्याची रसवत्ता, उपयुक्तता आणि परोपकारक्षमता वाढतात.

सद्गुरु

सामान्य ***गुरु*** आणि ***सद्गुरु*** यात फार फरक आहे. द्रोणाचार्य हे कौरवपांडवांचे गुरु होते, सद्गुरु नव्हते. अर्जुनाचा श्रीकृष्ण हा ***सद्गुरु*** होता. सर्वसामान्य किंवा विशेष विषयांचे जो ज्ञान देतो, तो ***गुरु*** आणि अध्यात्मविषयाचे प्रत्यक्ष ज्ञान देणारा तो ***सद्गुरु***. तो श्रेयसाचा मार्ग दाखवतो आणि शिष्याला सत्यदर्शन घडवून देण्यास अंतिमतः उपकारक ठरतो. ***सत + गुरु = सद्गुरु.***

सत् तत्त्वाची - आत्मतत्त्वाची प्राप्ति केवळ सद्गुरुकडूनच होऊ शकते, साधारण गुरूकडून नाही. तरीही सामान्यतया अध्यात्मातही सद्गुरूला आपण ***गुरु*** असेच म्हणतो. खरा भेद काय ते कळावे म्हणून हे विवेचन.

सद्गुरु हा साधकाचा सिद्धत्वाचा मार्ग प्रकाशित करतो. तो शिष्यावर ***कृपा*** करतो. त्याची कृपा आणि परमात्म्याची कृपा ही एकच.

ती करणारा गुरु हा स्वतःच एक सिद्ध पुरुष असावा लागतो. ते काम येरागबाळ्याचे नाही. एका सद्गुरुविना गुरु म्हणवणाऱ्या इतरांच्या सहानुभूतीचा, मार्गदर्शनाचा उपयोग फक्त आत्मप्राप्ति सोडून अध्यात्मातील इतर गोष्टींसाठी होऊ शकतो. पण अध्यात्मप्राप्तिसाठी एका सद्गुरुवाचून इतरांचा कवडीमात्रही उपयोग नाही.

योगमार्गीयांना, ज्यात भक्त्यादी विशेष अंतर्भूत असतातच, कधी ना कधी ***आत्म्याच्या काळोख्या रात्री***चा (Dark Night Of The Soul) अनुभव घ्यावाच लागतो. जगभरच्या कानाकोपऱ्यात पाहिले तरी कोणाही सधकाला, योगी म्हणा, सिद्धपुरुष, भक्त, हवे तर ज्ञानी आणि तथाकथित कर्मयोगी घ्या, कोणा-कोणालाही ही ***अंधारी काळोखी रात्र*** चुकलेली नाही. त्या काळात साधकाला बराच छळ आणि त्रास भोगावा लागतो. तो भोगून त्यातून पार पडल्याविना साधकाचा सिद्ध होतच नाही. त्यानंतरच ***प्रकाश*** दिसतो.

म्हणूनच संत श्रीतुकाराम म्हणतात की ***चणे खावे लोखंडाचे, तंव ब्रह्मपदीं नाचे।*** महात्मा गौतमबुद्धही स्वतः ज्ञानदीप्ती प्रकाशण्यापूर्वी या स्थितीतून गेला होता. मयाची प्रलोभने आणि उपद्रव त्यालाही सहन करावे लागले होते. ख्रिस्तानुयायी संत तर या अंधाऱ्या कालखंडास ***Dark Night Of The Soul*** म्हणूनच म्हणतात.

कृपा

आत्मतत्त्वाचा प्रकाश प्राप्त होण्याचे तीन स्रोत आहेत. १. दैवी २. आर्ष ३. पौरुष.

१. **दैवी** = अर्जुनाप्रमाणे दिव्यस्वरूपाच्या, कृष्णाच्या, ध्यानाने. यात कृपेचा अंतर्भाव असेल किंवा नसेल. कृपेत त्या स्रोतापासून व्यक्तिशःप्राप्त होणाऱ्या साहाऱ्याचा भाग असतो, जसा अर्जुनाच्या बाबतीत होता.

व्यक्तिगत कृपा – हिचेही तीन प्रकार आहेत. ते कृपेच्या प्रमाणाप्रमाणे असेः

अ) **प्रत्यक्ष कृपा** - हिच्यात कृपाळुकडून प्रत्यक्ष हस्तादी स्पर्श वा बोलणे इ. द्वारे होणारी कृपा असते. जशी श्रीकृष्णाने प्रत्यक्ष अर्जुनावर गीता उपदेशून केली.

ब) **अप्रत्यक्ष कृपा** - दैवी माध्यमाच्या दृष्टांतातून. बऱ्याच सिद्ध पुरुषांना हिचा अनुभव आलेला आहे. यासाठी संत श्रीतुकाराम महाराजांचे सद्गुरूंच्या स्वप्नदृष्टांताचे उदाहरण देता येते.

क) **परोक्ष कृपा** - सिद्धाच्या अथवा सद्गुरूंच्या केवळ मनात कृपा करावी, या स्फुरलेल्या विचारातून साधकावर ही कृपा होऊ शकते.

या तिन्ही प्रकारांच्या कृपेतही गुणात्मकदृष्ट्या अजूनही कमीजास्त प्रकारची कृपापातळी संभवते. म्हणजे सद्गुरूने किती कृपा केली आणि ती कोणत्या भावनेने केली याचेही या कृपाविषयात असाधारण महत्त्व आहे.

कृपा कितीही आणि कोणत्याही प्रकारची का असेना, अंती साधकाचा उद्धार करण्यास ती सक्षमच असते. प्रश्न फक्त त्या कृपेचे फळ किती लवकर किंवा उशीरा मिळते, एवढाच भाग व्यक्ती आणि त्याच्यावर झालेल्या कृपेसंबंधित भिन्न असतो. एका प्रकारची कृपा साधकाला कृपास्त्रोताशी एकत्व देते. पण अन्य खालच्या दर्जाच्या कृपेत ती शक्ती नसते.

कृपेमुळे जे ज्ञान प्राप्त होते त्यातही भिन्नता असते. वरुणाच्या कृपेमुळे भृगुऋषींना आत्म्याच्या पंचकोषांचे ज्ञान मिळले. पण आत्मज्ञान मिळाले नाही. तसेच नचिकेताचेही झाले. त्याला यमाने आत्मतत्त्वप्राप्तिविषयक ज्ञान दिले. पण प्रत्यक्ष आत्मप्राप्ति करून दिल्याचे दिसत नाही. येथे ***विद्या*** (विज्ञानात्मक) आणि ***ज्ञान*** (आत्मलब्धि) यातील भेद साक्षात दिसतो.

२. **आर्ष** - या कृपास्त्रोतामुळे स्वयमेव प्रतिभा (प्रज्ञा) जागृत होते. उदा. कालीदासावर सरस्वतिदेवी प्रसन्न झाली, त्यामुळे त्याला अलौकिक प्रतिभा प्राप्त झाली, हे देता येईल.

३. **पौरुष** - यात सद्गुरूने दिलेल्या ब्रह्मज्ञानाचा अंतर्भाव होतो, जसे श्री शुकदेवांनी राजा परीक्षितास दिले.

या कृपास्त्रोताचे अजून दोन प्रकार आहेत: अ) शक्तिपातासह आणि ब)शक्तिपाताविना. पहिल्या प्रकारात साधकास ***अपरोक्षज्ञान*** मिळते, तर दुसऱ्यात ***परोक्ष.***

कृपेविषयी अजूनही एक विशेष आहे. ईश्वराची कृपा केवळ जडत्वविरहित अवस्था प्राप्त केलेल्यांवरच होते. ती साधकाच्या देहत्यागोपरांत होते किंवा अंतिम लयाच्या वेळी होते, जशी ब्रह्मलोकातील सिद्धांवर त्यावेळी होते. त्यासाठी ***विदेहावस्था*** आवश्यक असते.

याचे मूळ कारण असे आहे की जडदेहात ती कृपा धारण करण्याची क्षमता क्वचितच असते. साधकाचे मन आणि देह ती दैवी कृपा झेलण्यास असमर्थ असतात. माझी स्वतःची वैयक्तिकरीत्या त्या प्रकारची तयारी झालेली नव्हती. म्हणून दैवी कृपा लाभूनही मला ती पेलायला पुरेसे बळ नसल्याने ते मिळवण्यात काळ घालवावा लागला.

नशीब माझे की अशा अवचित कृपेमुळे देहपात होतो, तो माझ्याबाबतीत घडून आला नाही. कालमानेकरून ती कृपा मी धारण करू शकलो. यासाठीच तर कृष्णाताई मला सांगत होत्या की "धीर धर, त्या श्रीकृष्णाशी एकरूप होण्याची घाई नको करूस!" पण माझे कर्मभोग तसेच विपरित होते म्हणा किंवा माझे ग्रह उच्चीचे होते म्हणा, ती कृपा मला अंतिमतः पेलवली आणि देह-मन-बुद्धि-चित्त आणि इंद्रिये ही सगळी व्यवस्थित निभावली.

देहावस्थित साधकावर जन्मल्यानंतर होणारी कृपा ही कोणत्यातरी माध्यमातून होते. त्या माध्यमाचे अथवा **ओघ** वा स्त्रोताचेही तीन प्रभेद आहेत:१. दैवी - देव अथवा इतर दिव्य शक्ती वा व्यक्ती २. सिद्ध - अमानवी ३. मानव्य - मानुषगुरु किंवा आचार्य.

यातील मानुषगुरुप्रकारात दोन उपप्रकार आहेत: १. **चैतन्यदेही** गुरु २. **जड चैतन्य**देही गुरु. स्वाभाविकच दुसऱ्या प्रकारचा गुरु हा प्रथम प्रकारच्या गुरुपेक्षा हीन दर्जाचा असतो.

यांव्यतिरिक्त कृपेचे अजूनही तीन प्रकार आहेत. ती कशा प्रकारे झाली त्यानुसारः १. अहैतुकी - गुरूंच्या इच्छेविना झालेली कृपा (अनुग्रह) २. विशिष्ट - मुद्दामहून केलेली: यामुळे शिष्याला अंतिम तत्त्वाची प्राप्ति होते. ज्ञानी भक्त यात मोडतात. ३. सामान्य - हिच्यामुळे आत्मप्राप्तिव्यतिरिक्त इतर उपलब्धी होतात, जशा आर्त, अर्थार्थी आणि जिज्ञासु भक्तांना ईश्वरकृपेमुळे होतातः आर्तिहरण, अर्थप्राप्ति अथवा इच्छित ज्ञानप्राप्ति.

गुरुतत्त्व

गुरुतत्त्वः हे कृपेमागचे मूळ तत्त्व आहे. **कृपा = गुरुतत्त्व**. हे गूढतत्त्व आहे. ते कालातीत आहे. पतञ्जली म्हणतात तसे, ***"कालेनानवच्छेदात् ।।१–२६, पा.यो.सू.।।"*** ते म्हणजे साक्षात ईश्वरतत्त्वच होय. गुरु म्हणजे परमात्मा. कोणताही मनुष्य गुरु म्हणून तेव्हापर्यंतच कार्य करू शकतो, जेव्हापावेतो त्याच्याकडे तशी शक्ती असते. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ गुरूला त्याला आपली जागा द्यावी लागते.

माझा स्वतःचाही असाच वैयक्तिक अनुभव आहे. काही काही वेळा मला अनिच्छेने का होईना, पण काही इतर गुरूंच्या शिष्यांचा स्वीकार करावा लागला. त्यातील एक गुरु तर गुरु म्हणण्याच्या पात्रतेचाही नव्हता. तो निव्वळ साधकदशेत होत. तरीही त्याने आपल्याभोवती शिष्य गोळा करून ठेवले होते.

दुसरे एक गुरू ज्यांचे शिष्य मला स्वीकारावे लागले ते होते एक कुंडलिनीसिद्धगुरु! उच्चावस्थेतील. पण त्यांचे देहावसान झाले होते आणि शिष्यगण आधारहीन झालेले होते. त्यामुळे ते शिष्यांना व्यक्तिशःमार्गदर्शन करू शकत नव्हते. त्यांचे उर्वरित कार्य माझ्या क्षमतेनुसार मला पुढे चालवावे लागले.

ज्यावेळी प्रतिभाशक्ती जागृत होते त्यावेळी बाह्यसाधनांशिवायच सिद्धयोग्याला ऋतंभराप्रज्ञासामर्थ्याने कार्यकारणविशेषाखेरीज प्राप्त विषयाचे सर्वंकष ज्ञान होते. असा सिद्ध हा आध्यात्मिकक्षेत्रातील प्रत्येक अवस्थेचा धनी असतो. त्याला वाटेल त्याला द्यायची ती अवस्था तो प्रदान करू शकतो. त्याला उद्देशूनच माउली श्री ज्ञानदेवांनी **"मोक्षाची सोडी बांधी करी"** - "तो मोक्षाचे गाठोडे त्याला वाटेल त्या कोणाहीसाठी सोडतो किंवा नको असेल त्याला देत नाही" असे म्हटले आहे."

अशा स्वयंसिद्ध व्यक्तीला प्राप्त होणारे आत्मज्ञान हा वस्तुतः इंद्रियजयाचा भाग असतो. त्याचा **कुंडलिनी-प्रतिप्रसवक्रम** स्वयंसिद्ध असतो. अंतिमतः तो त्याचे मिलन आत्मतत्त्वाशी करवून देतो. त्याला इतर कोणाही गुरूची आवश्यकता नसते. तो स्वतःच आपला आपण **शब्दातीत** होतो. त्याला कोणीही वेदादी समजावून देण्याची आवश्यकता नसते. ते त्याचे त्यालाच आपल्या आपण समजतात. श्री रमणमहर्षींची हीच तऱ्हा होती. त्यांना वेदांचे ज्ञान स्वयमेव झाले होते आणि बरेच शास्त्री-पंडित आणि विद्वान वेदार्थासाठी त्यांच्याकडे येत असत.

या स्वयमेव प्रातिभशक्तीचे उदाहरण दाखवून देते की विशुद्ध आत्मतत्त्वाचा ***प्रकाश, चैतन्यप्रकाश,*** आपला आपणच स्वयमेव कसा प्रत्यक्ष होतो. त्याला त्यासाठी कोणत्याही बाह्यसाधनांचा, माध्यमांचा अथवा गुरूंचा आश्रय घ्यावा लागत नाही. तो ***प्रकाश*** बुद्धिगम्य नाही. तत्त्वज्ञान त्याला समजू शकणार नाही. त्याचा तोच अशा स्वयंसिद्धांच्या अंतरंगात प्रकटतो आणि त्यांचे जे काय जीवितकार्य असेल ते संपन्न करतो.

त्या सिद्धाचे खरे जीवितकार्य म्हणजे आत्मज्ञानाचे इतर मोक्षेच्छुंना दान! ते तो करत राहतो. तो मुक्त दान देणारा दाता असतो. दान मात्र घेणाऱ्याच्या स्वतःच्या पात्रतेनुरूप मिळत असते. ती पात्रता वाढवावी म्हणूनच तर शास्त्रांचा अट्टाहास असतो स्वाध्याय–ईश्वरप्रणिधानादि, कर्मयोगादि आणि यम-नियम-धारणा-ध्यानादींसाठी. पण अमुक एक पात्रता आली की कृपा होणारच असे काही कोणतेही गणित तेथे लागू पडत नाही.

पात्रता किती महत्त्वाची असते, ते माझ्या आत्मवृत्तातील अघोरीद्वयीबाबतच्या प्रसंगी स्पष्टच कळले होते. त्या अघोरी पति-पत्नींनी जंगजंग पछाडूनही त्यांच्यावर जगदंबेची कृपा झाली नाही. सरतेशेवटी ती जगदंबा मला म्हणाली की "अरे बाळा! सोडून दे त्या मूर्खांचा नाद! ते निव्वळ दगड आहेत शुद्ध! कोणी काहीही करू शकत नाही त्यांच्यासाठी. अन् तुला छळून तर त्यांना जे सहजच मिळणार होते, तेही आता गेले आहे दूर त्यांच्यापासून. साधुपुरुषांना छळण्याच्या अशाच वृत्तीमुळे कंसासारख्यांचा विनाश ओढवला होता ना?"

जर कृपाग्रहणकर्त्याचे मन विशुद्ध झालेले असेल तर सिद्धगुरूचा निव्वळ संकल्प त्याच्यात आत्मजागृती करू शकतो. पण ते जर अपेक्षेनुसार विशुद्ध झालेले नसेल तर शिष्याला पूर्णत्वप्राप्तिसाठी अधिक साधना आणि उपायांची आवश्यकता असते. ते त्या त्या व्यक्तिसापेक्ष असतात.

स्वयंसिद्ध सद्गुरु

स्वयंसिद्ध सद्गुरूंचेही दोन प्रकार आहेत:

१. **अकल्पित** गुरु - हा एक अतिविशेष असा **स्वतःचा स्वतःच गुरु** असणारा गुरु असतो. तो पूर्णज्ञानी असतो. त्याचे ज्ञान आणि गुरुत्व अंतर्यामातून प्रकटते.

२. **अकल्पित कल्पित** गुरु - परंतु ज्या स्वयंसिद्ध गुरूचे ज्ञान आणि गुरुत्व अपूर्ण आसते, त्याला ते काहीही करून परिपूर्ण करावे लागते. त्यासाठी तो काही साधना करतो. मग ती ध्यान असो, जप असो, योग असो किंवा अन्य इतर.

आपल्या स्वतःच्या आंतरिक स्फूर्तीतून उद्भवणाऱ्या ***"मी पूर्णब्रह्म आहे" - "अहं ब्रह्मास्मि"*** या विचाराचे ध्यान केल्याने म्हणा, अथवा कोणत्या तरी सिद्धमंत्राचा जप केल्याने म्हणा, काहीही करून तो पूर्णत्व प्राप्त करून घेतो आणि सद्गुरुत्व पावतो. अशा व्यक्तीला **अकल्पित कल्पित गुरु** असे म्हणतात.

या दोन्ही प्रकारच्या गुरूंमधील खरा फरक असतो तो **उपजत** पूर्णसिद्धत्वात. अकल्पित गुरूला ते स्वयंसिद्धच असते. त्याला ध्यान, जपादींची आवश्यकता नसते. त्याचे **ज्ञान** आणि **गुरुत्व** ही दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे **अकल्पित कल्पित गुरू**पेक्षा वरच्या प्रतीची असतात. याउलट दुसऱ्या प्रकारात मन-बुद्धी-चित्त-प्राण-इंद्रिये आदींचे समन्वयन आणि उन्नयन केल्यानंतरच पूर्णसिद्धी प्राप्त होते. अर्थातच या दोन्हीही प्रकारात बाह्यगुरूची जरूरी नसते.

अशा दोन्ही प्रकारच्या गुरूंची उदाहरणे भारतात, तसेच अन्यत्रही आढळतात. आनंदमयी मा या प्रकारच्या गुरु होत्या. जेकब बोह्मे (इ. स. १५७५ ते १६२४) हाही असाच एक जर्मन गुरु होता. त्याला **ईश्वरशिक्षित तत्त्वज्ञ** (God-taught Philosopher) असे म्हणत असत. या दोघांतही ज्ञान आतूनच म्हणा किंवा ईश्वराकडून म्हणा, आपोआप उत्स्फूर्त होत होते.

ते परिपूर्ण व्हावे म्हणून त्य दोघांनीही जप, योग, पूजादी साधना अवलंबल्या होत्या. मूलतःच त्यांच्यात एक अपरिपूर्णतेची भावना असे आणि त्यामुळे त्या दोन्ही व्यक्ती अंतर्यामीच्या आनंदापासून दुरावलेल्या असत. त्यांचे ज्ञान

रूक्ष असे वाटत असे. ते पूर्णानंदात परिवर्तित होण्यासाठीच त्यांचा साधनेचा खरे तर खेळ चालत असे.

आनंदमयी मांकडे पाहिले की वाटे की त्या उगीचच साधनेचे नाटक रचताहेत. पण त्या तितक्याच गंभीरतेने साधनेचे त्यांच्यासाठी असलेले महत्त्व विषद करत असत.

अवतार

अवतारांचे वैश्विकशक्तीशी असणारे सांघष्ट्य कधीच भंग पावत नाही. परंतु ज्ञान्याच्या बाबतीत तसे नसते. त्याचे वैश्विकशक्तीशी असलेले संबंध तुटलेले असतात. **अवतार** आणि **ज्ञानी** यांची कार्येही भिन्न असतात. तेही यामागचे मुख्य कारण आहे.

समाधि

योग्यांच्या समाधिस्थितीत दोन अवस्था एकेच वेळी असतातः

१. **निमिलन** - या अवस्थेत योगी आणि परब्रह्म यात काहीच फरक नसतो. त्या दोघांत एकरूपता असते. त्या अवस्थेत शक्तीचे कार्य पूर्णतया स्तंभित असते.

२. **उन्मिलन** - या अवस्थेत शक्तिकार्य अविरत चालू असते.

या दोन्ही समाधिअवस्था आत्म्याच्या मूळ स्थितीस अनुसरतात. त्याचेही **निमिलन-उन्मिलन** असे कार्य एकेच वेळी चालू असते. त्या दोन्ही अवस्थांना वेगवेगळे म्हणणे तसे अयोग्यच आहे. कारण त्या एकाच आत्मततत्त्वाच्या एकसमयावच्छेदेकरुन प्रकट होणाऱ्या स्थिती आहेत.

संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर हे या दोन्ही अवस्थांना अनुलक्षून असे म्हणतात की ईश्वर हा **सगुण**ही आहे आणि **निर्गुण**ही आहे. पण खरे तर तो **सगुण**ही नाही आणि **निर्गुण**ही नाही, तर तो **अगुण** आहे. **"तुज सगुण म्हणू की निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।"** आणि **"सगुण निर्गुण। गुणाचे अगुण।"** त्यांच्या मते **सगुण** आणि **निर्गुण** ही दोन्ही तेच ते एकमात्र तत्त्व आहेत.

निमिलन आणि **उन्मिलन** या अवस्थांबाबत ते म्हणतात की एकच आत्मतत्त्व **द्वैत** आणि **अद्वैत** या दोन्ही अवस्था एकाच वेळी समर्थपणे प्रक्षेपित करत असतेः **"द्वैताद्वैत तचि निकुंभ। सरिसेंपणें एकवटत। इभमस्तकावरी' ।।१–१७।।ज्ञानेश्वरी।।"**

त्यांनी असेही म्हटले आहे की **"दैविकी दिठी पाहतां सानी। तऱ्ही मीलनोन्मीलनीं। उत्पत्तिप्रळयो दोनीं। लीलाचि करिसि।।१७–५।।ज्ञानेश्वरी।।"** - गुरूला **जीवरूपी गणांचा स्वामी** असा **गणपती** म्हणून झाल्यावर संत श्री ज्ञानेश्वर सांगतात की त्याचे नेत्र बारीक आहेत. पण त्यांच्या **मीलन** (मिटणे, **निमिलन**) आणि **उन्मिलन** (उघडणे) यांमुळे विश्वाची उत्पत्ति आणि प्रलय होतात.

कृपासामर्थ्य

साधकावर सिद्धगुरूद्वारे झालेल्या कृपेचे सामर्थ्य व्यक्तिपरत्वे भिन्न असते. त्याच्या तीन पातळ्या आहेतः १. उच्च २. मध्यम आणि ३. निम्न. त्या प्रत्येकाचेही पुनश्च भावानुवेगानुसार अजूनही तीन उपविभाग होतातः तेही १. तीव्र २. मध्यम आणि ३. साधारण असे आहेत. असे एकूण ९ प्रकार कृपेच्या अनुरोधाने आणि साधकाच्या क्षमतेनुसार आहेत. ह्यातही अजून उपविभाग करता येतात. पण ती सर्व चर्चा एकूण निव्वळ सैद्धांतिक पातळीवरली आहे.

कृपेच्या अवतरणामध्ये जेव्हा पराशक्ती स्वयमेव परब्रह्माच्या इच्छेनुसार अवतीर्ण होते त्या अवतरणाला **शांभव उपाय** असे म्हटले जाते. सर्व प्रकारच्या कृपांमध्ये ही सर्वश्रेष्ठ दर्जाची कृपा असते.

समाध्यवस्था

श्री रामकृष्णांची समाध्यवस्था खरी कशी होती हा प्रश्न विचारात घेता ते असे म्हणत असत की आईने (कालीमातेने) त्यांना **भवमुख** (भावमुख) रहा असे सांगितले आहे. **भवमुख** म्हणजे **संसाराभिमुख** आणि **भावमुख** म्हणजे **भावसन्मुख** - त्यांचे भावात असणे सुप्रसिद्धच आहे. त्यांची एकूण चर्या पाहता ते सतत **भावमुख** तर असतच. पण लोकसंग्रहासाठी ते **भवमुख**ही असत असे दिसते.

कधी कधी जगद्भान नसलेले ते असायचे तेव्हा त्यांना जेवण्याखाण्याची, कपड्यालत्त्यांची, आजूबाजूची कोणतीही शुद्ध नसे. ते अगदी बेहोष असल्यासारखे दिसत. अन् केव्हाही सहज बोलताबोलता, चालताचालता त्यांना समाधि लागत असे. ते स्तब्ध होऊन जात आणि तसेच उभे असले तर उभे किंवा बसलेले असले तर बसूनच राहात.

या त्यांच्या अवस्थाविशेषांचा विचार करता मला रूपके सुचतात ती अशीः दही घुसळतांना ते प्रथम एकजीव असते. लोणी निघाले की ते मात्र ताकापेक्षा वेगळे दिसते आणि त्यावर अर्धे तरंगते. म्हणजे अर्धे ताकात तर अर्धे हवेत! **भवमुख** समाधिस्थिती त्यासारखीच असते. सिद्ध पुरुष थोडा संसारात तर थोडा परब्रह्मात वावरत असतो. दोन्हीकडचे भान ठेवून असतो. ही झाली एक अवस्था!

काही काही सिद्धपुरुष मात्र मध्यंतरी पाण्यातील देवमाशासारखे होतात आणि बराच काळ समुद्रात व्यतीत करून अल्प काळ श्वास घेण्यापुरते त्याच्या पृष्ठभागावर

येऊन हवेत तोंड उघडतात आणि परत खोल समुद्रात डुबी देतात. अगदी जरूरीपुरता जगाशी संबंध आणि सतत परब्रह्मात आपली अलगता ठेवत संचार हे त्यांचे वैशिष्ट्य असते. त्यानंतर मात्र ते इतर जलचरांप्रमाणे कायम समुद्रात वावरतात.

पण अशीही एक अवस्था आहे की जिला पाण्यावर तरंगणाऱ्या हिमखंडाची (iceberg) उपमा देता येते. तो नववा हिस्सा हवेत तर आठ भाग पाण्यात असतो. असाच काही काळ गेला की त्याचेही पाणी होऊन जाऊन तो होत्याचा नव्हता होतो आणि पाण्यात एकजीव होऊन मिसळून जातो. सिद्ध पुरुषही थोडा जगात आणि थोडा आत्ममग्न राहत राहत हळूहळू आत्म्यात विलीन होत जातो आणि शेवटी जगद्भान पूर्ण हरवून बसतो. शेवटी ही स्थिती अशी हिमखंडात परिवर्तित होते आणि अंतिमतःएकरूपतेत!

संत श्री रामकृष्ण परमहंस

कुंडलिनीयोग

संतांची अनुभूती हा विषय दीडशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या श्री रामकृष्ण परमहंस या महान आणि बोलक्या संतांच्या वचनांचा विचार केल्यावाचुन अपूर्णच राहील. जरी मी त्यांच्यासारखा कोणी महान सिद्धपुरुष नाही, एक सामान्य साधक आहे, तरीही त्यांचे विचार आणि अनुभूती माझ्या स्वतःच्या अनेक अनुभूतींशी जुळणाऱ्या आहेत, म्हणून मला त्यांचे अप्रूप आहे. त्यांच्या समकालीन आणि निकटच्या शिष्यपरिवारातील श्री.**म** उर्फ श्री. महेन्द्रनाथ गुप्त यांनी ग्रथित केलेल्या श्री रामकृष्ण वचनामृत, भाग (२) यातून स्पष्ट होणारा काही भाग लेखकाच्या स्वानुभविक टिपांसह येथे दिला आहे.

ग्रंथातून श्री रामकृष्णांचे काही बोल वाचकांपर्यंत ते विचार आणि अनुभूती पोहोचवावेत म्हणून येथे उद्धृत करत आहे. श्री **म** नी आम्हा साधकजनांवर त्यांचे ग्रथन करून मोठेच उपकार करून ठेवले आहेत, असा ऋणनिर्देश करून तिकडे वळू या. या ग्रंथातून पुढील भाग स्पष्ट होतो. तो भाग असाः

ते म्हणतात की कुंडलिनीजागृतीशिवाय खरी भक्ती आणि प्रेम नाही.

कुंडलिनीशक्तीचे आरोहण शरीराच्या खालच्या भागातून होते. ती मस्तकापर्यंत चढते. तिची गती कधी सरसर, तर कधी उड्या मारत, कधी मुंगीसारखी, तर कधी सर्पासारखी आणि कधी कधी तर पक्ष्यासारखी असते. त्यांना एकदा एक साधू भेटला होता. तो म्हणाला की एकाच शरीरात या सर्व प्रकारे कुंडलिनीची गती त्याने केवळ श्रीरामकृष्णांच्या ठायीच पाहिली आहे. श्री रामकृष्णांना असे अनुभव नित्य येत असत.

ते म्हणतात की कुंडलिनी जोवर निद्रिस्त राहते, तोवर ज्ञान होत नाही. पुस्तके वाचून, वेदांतविचार करून विचाराने, श्रवणाने, मननाने खरे ज्ञान होत नाही.

भाव, भक्ती, प्रेम इ. सारे कुंडलिनीशक्ती जागृत झाल्यावरच होतात. कर्मयोग मोठा कठीण आहे. निष्काम कर्म करणे महाकठीण! म्हणूनच भक्तियोगाचा आसरा घ्यायला सांगितले आहे.

खरे पूर्ण ज्ञान कुंडलिनीयोगानेच प्राप्त होते. माणूस चोवीस तत्त्वांपलीकडे निघून जातो. म्हणून त्या अवस्थेत अहंतत्त्व राहत नाही. हे केवळ कुंडलिनीच करू शकते.

समाधीत काय अनुभव येतो ते तोंडाने सांगता येत नाही. त्या अवस्थेतून खाली आल्यावर फक्त पुसटशी कल्पना देता येते.

पुस्तकं वाचून नीट अनुभव येत नाहीत. पुस्तकं वाचणं आणि अनुभव यांच्यात खूप फरक आहे. खरा अनुभव मिळाला की शास्त्र, पुस्तकं, सायन्स सारं काही काडीकचरा वाटू लागतं.

गीता साऱ्या शास्त्राचे सार आहे. संन्याशाजवळ काहीच नसावं; एक गीता मात्र जरूर असावी.

कुंडलिनी जेव्हा अंतिम स्थानात पोहोचते आणि तिचे शिवाशी सामरस्य होते, त्यानंतर ती आराध्याचे स्वरूप घेते आणि तशा तिच्या अवस्थेला **कुलकुंडलिनी** अशी संज्ञा आहे. ही सिद्धावस्था प्राप्त केलेला तो कौलसिद्ध. त्याची शक्ती मूलाधार ते सहस्त्रार कोठेही विनाप्रतिबंध जाऊ शकते. श्री रामकृष्णांची ही अवस्था होती. त्यामुळे त्यांची कुंडलिनी मूलाधार ते सहस्त्रार अशी आवागमन करू शकत असे.

टीप १: **महावायू, वायू, महाप्राण, प्राण, प्राणशक्ती** इ. संज्ञा व्यापक अर्थी कुंडलिनीला उद्देशून वापरल्या जातात. श्री रामदास स्वामी समर्थांच्या ग्रंथात असे **वायु**नामे कुंडलिनीशक्तीचे उल्लेख आहेत. ती संज्ञा सर्वसाधारणपणे **वायु** हे तत्त्व आणि **प्राणतत्त्वा**साठी प्रयोगात येते. विशेषत्वाने तिचा अर्थ **कुंडलिनी** असा आहे.

ते सांगायचेः"कधी वायू उठतो आणि वरवर मुंगीसारखा सरसर चढतो, तर कधी भावसमुद्रामध्ये आत्ममीन आनंदाने क्रीडा करतो."

"कधी कुशीवर पहुडलेला असतो तेव्हा महावायू मला वानराप्रमाणे ढकलू लागतो. माझ्याशी मस्ती करतो. मी चूप

राहतो. तो वायू एकाएकी वानराप्रमाणे उडी मारून सहस्त्रारी चढून जातो."

"परत कधी कधी, या फांदीवरून त्या फांदीवर, अशा उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणे महावायू उठत राहतो. ज्या ठिकाणी तो विसावतो ती जागा अग्नीसारखी वाटत राहते."

"कधी तरी मूलाधारातून स्वाधिष्ठानी, तिथून निघून हृदयात अशा क्रमाने उड्या मारत मारत तो मस्तकात चढतो. तर कधी कधी महावायू तिर्यक गतीने चालतो वेडावाकडा! अशा रीतीने सर्पासारखा नागमोडी गतीने जाताजाता शेवटी तो मस्तकात पोहोचून समाधी लागते."
टीप २: **मस्तक** ही संज्ञा येथे आज्ञाचक्र आणि त्यापुढील सहस्त्रार चक्रापर्यंतच्या यौगिक अवकाशाला दिली आहे.

श्री रामकृष्णांच्या कुंडलिनीची जागृती

श्री रामकृष्ण परमहंस म्हणतातः "माझी ही अवस्था झाली त्याआधी मला वयाच्या २२–२३व्या वर्षी असे दाखवून दिले कुंडलिनीशक्ती कशा प्रकारे जागी होते ते. क्रमाक्रमाने सगळी पद्मे उमलून जायला लागली आणि मला समाधी लागली. ही अति गुह्य गोष्ट आहे. बघितले की कुंडलिनीशक्ती एक सर्पिणी आहे; सुषुम्नानाडीच्या आत जाऊन जिभेने पद्मांना स्पर्श करत आहे. आधी गुह्यस्थानीच्या, नंतर लिंग, नाभी वगैरे स्थानींच्या पद्मांना ती स्पर्श करत गेली. त्या स्थानीची चतुर्दल, षट्‌दल, दशदल पद्मे सगळी अधोमुख होती, ती तिच्या स्पर्शाने ऊर्ध्वमुख होऊन गेली."

"चांगले आठवते की ती जेव्हा हृदयस्थानी आली तेव्हा तिच्या जिव्हेने स्पर्श केल्यानंतर तेथील द्वादशदल अधोमुख पद्म ऊर्ध्वमुख होऊन उमलले. त्यानंतर षोडषदल अन् कपालस्थानी द्विदल. शेवटी सहस्त्रदल पद्म प्रस्फुटीत झाले अन् तेव्हापासून माझी ही अवस्था आहे."

श्री रामकृष्णांना ती एका स्वतःसारख्याच एका बावीस-तेवीस वर्षांच्या छोकऱ्याच्या रूपात दिसली. हा छोकरा हे खरे तर कुंडलिनीचे प्रतीक आहे. म्हणून त्याला आपण कुंडलिनीच म्हणू या. आणि त्याने जिभेने पद्मांना स्पर्श केला हे तर कुंडलिनीचे सर्पिणी रूपाचे प्रतीक आहे.

कुंडलिनी, चैतन्य आणि समाधी

"कुंडलिनी जागृत झाल्याशिवाय चैतन्य जागे होत नाही. चैतन्य जागृत झाले की ती सुषुम्ना नाडीतून स्वाधिष्ठान, मणिपूर इ. साऱ्या चक्रांचा भेद करून शेवटी मस्तकात जाऊन पोहोचते. यालाच म्हणतात महावायूची गती. तसे झाले तरच अखेर समाधी लागते."

"समाधीत आपला आत्मा पक्ष्यासारखा उडत फिरतो असेही कोणीकोणी म्हणतात. समाधीत काय अनुभव येतो ते तोंडाने सांगता येत नाही. त्या अवस्थेतून खाली आल्यावर फक्त पुसटशी कल्पना देता येते."

"नुसते शास्त्रग्रंथ वाचून चैतन्य जागे होत नाही. व्याकुलतेने प्रार्थना केल्यासच कुंडलिनी जागृत होते."

कुंडलिनी आणि विविध साधना

हे विचार आणि या अनुभूती आहेत एकोणिसाव्या शतकातील एका बोलक्या सिद्धांच्या! त्यांनी अगदी स्पष्ट शब्दात कुंडलिनीशक्तिचे साधनेतील अति महत्त्वाचे आणि एकमेवाद्वितीय स्थान अगदी सोप्या शब्दात व्यक्तवले आहे. मूढालाही ते कळेल असेच आहे.

त्यांचे अनुभवसिद्ध मत अगदी स्पष्ट आहे की कोणतेही खरे अध्यात्म म्हणा, आत्मदर्शन म्हणा, ज्ञान म्हणा, अगदी सोपी म्हणून वारकरी समजतात ती भक्ती म्हणा आणि गहनगूढ असे केवळ वेदांतविचारानेच होईल असे समजले जाणारे ज्ञान म्हणा, हे सगळे कुंडलिनीजागृतिशिवाय शक्यच नाही. आणि निष्काम कर्मयोगही, जो लोकमात्रांना साधा आणि सरळ असल्याचे गीताप्रेमी मोठ्या तावातावाने सांगतांना आढळतात, तोही तसा साधासोपा नाहीच नाही. त्याच्याही मागे जागृत कुंडलिनीचे सामर्थ्य असावेच लागते. **"योगयागविधी। येणें नोहें सिद्धी।"**

थोडक्यात म्हणायचे झाले तर कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग आणि ध्यानयोग हे कुंडलिनीजागृतिविना शक्य नाहीत आणि कोणत्याही प्रकारच्या साधनामार्गास तिच्याविना काहीही उपलब्धी नाही. संतश्रेष्ठ श्रीज्ञानदेवांनी हे सगळे लक्षात घे पंथराजाचे मोठे माहात्म्य विशद केले आहे. पण काही अजाण मंडळी त्यांच्या **"योगयागविधी। येणें नोहें सिद्धी। .....।।"** या अभंगाचा खरा अर्थ न कळल्याने योगास गौण लेखतात, किंबहुना तिरस्कारतात, आणि भक्ती आणि कर्माचा मार्ग सोपा असल्याचे सांगतात, ते किती निरर्थक आहे हे श्री रामकृष्ण परमहंसांच्या स्वमुखीच्या उद्गारातून सहज स्पष्ट होते.

संतांचे बोल समजून घ्यावे लागतात ते संतमुखेच किंवा खऱ्याच ज्ञानवान महात्म्यांकडून! येरागबाळ्याने त्यांचा अर्थ करावा ही त्यांची कुवत नाही. पण तरीही कोणीही प्रवचनकार उठतो आणि अगदी आपणच शुक-सनक-वामदेव असल्यासारखा सांगू लागतो की **"योगयागविधी। येणे नोहें सिद्धी। वायाचि उपाधि। दंभधर्म।।"**

ते प्रवचनकार म्हणतात तसे जर माउलींना खरेच म्हणायचे असते तर कुंडलिनीयोगासारखा महायोग सांगून झाल्यावर त्यांनी अर्जुनाच्या योग किती कठीण वाटतो आहे

आणि तो कसा काय जमणार या प्रश्नावर (ज्ञा. ६–३२८ ते ३३८) **"योगासारिखे सोहोपें । आहे काईं ।ज्ञा. ६–३६३ ।।"** असे कसे म्हटले असते? माउली काय एका वेळी एक आणि दुसऱ्या वेळी त्याविरुद्ध सांगेल काय?

"योगयागविधी । येणे नोहें सिद्धी । वायाचि उपाधि । दंभधर्म ।।" आणि **"योगासारिखे सोहोपें । आहे काईं ।"** या दोन परस्परविरोधी भासणाऱ्या माउलीच्या विधानांचा समन्वय त्यांना नीट करता येत नाही, यात कोणाचे अजाणपण! माउलीचे की आम्हा त्यांच्या अडाणी लेकरांचे?

कुंडलिनीयोग (पंथराज, ६वा अध्याय/क्रमयोग, १८वा अध्याय, ज्ञानेश्वरी) हा खरे तर **महायोग** म्हणून विख्यात आहे. त्याची निर्भत्सना करण्याचा तुम्हाआम्हाला काय अधिकार? आपल्या डोळ्यात झणझणीत अंजन घालावे म्हणून श्री रामकृष्णदेवांसारख्या महान संतांकडे जाऊन शिकावे लागते, तेव्हा कोठे माउली काय सांगते आहे ते आपल्या अल्प बुद्धीत थोडेफार उतरेल! असो.

श्रीगुरुदत्तपादुका आणि माझे इष्ट

साधकांना इष्ट म्हणजे काय हे इतर पुस्तके वाचून समजलेच असेल. इष्टाचीच उपासना करायची असते. तीच सफळ होते, असा उपासनाशास्त्राचा अलिखित नियम आहे. गुरू उपासना देतात त्यावेळी त्यांचे स्वतःचे इष्ट दुसरे असले तरी साधकाचे जे इष्ट असेल ते, त्यांनी जाणले असेल तर, त्याचीच उपासना सांगतात करायला. कारण जसे कुलदेवतांचे असते तसेच इष्टदैवताचेही असते.

कुलधर्मानुसार जे कुलदैवत असते त्याची उपासना पूर्वापार कुलात चालत आलेली असते. म्हणून तिच्यासह केलेली त्याच दैवताची पुढली उपासना आपणास लवकर फलप्रद होते असा भाग आहे त्यात.

त्याचप्रमाणे इष्टदैवताचेही असते. आपण जन्मोजन्मी तेच प्रामुख्याने उपासलेले असते. त्यामुळे त्याचीच उपासना लवकर फल देणारी असते, असा हा भाग आहे.

ज्यांना हा माहीत नसतो किंवा ज्यांना आपले इष्ट माहीत नसते कोणते आहे ते, त्यांच्यासाठी योग्य जाणकार किंवा चांगला गुरू भेटेस्तोवर ते कळत नाही. पण कधी कधी आपोआपच साधक पूर्वसंचितप्रभावाने इष्टाच्या उपासनेकडे कधी ना कधी वळतोच. मग ते या जन्मी असो नाही तर नंतरच्या. अनेक इष्टे सुद्धा कोणा कोणा साधकांची असतात. तो वेगळा भाग आणि त्यामागचे शास्त्रही आहे वेगळे!

माझी अर्चना अनेक दैवतांची आणि मंत्रांची होती असा उल्लेख केलेला आहे. त्यातून माझे इष्ट कोणते हा विचार एकदोनदा माझ्या मनात येऊन गेला. ते जाणणे आवश्यक असते. साधना पूर्णत्वास जाते तेव्हा तरी, ते आपोआपच प्रकट होते आपल्यापुढे संस्कारांतून! पण ते जाणण्याइतके अंतर्ज्ञान असावे लागते उघडउघड. ते सुप्त असले तरीही क्रिया-प्रतिक्रिया त्याच अनुषंगाने अन् त्याच्याच माध्यमातून घडत असतात.

माझे इष्ट कसे कळले ती एक गूढ कथा आहे. शक्यतो समजेलशा शब्दात सांगतो. इष्ट ओळखण्याची एक मोठी खूण आहे अतिप्रगत साधक आणि सिद्धांसाठी. जर ते आपल्या इष्टाच्या अतिविशेष महत्त्वाच्या जागृत स्थानी गेले तर देहपात होतो किंवा अति विचित्र परिस्थिती प्राप्त होते. ते मग तेथून परतू शकत नाहीत, तिथेच वास्तव्य करतात. हे सगळे त्यांच्या त्यावेळच्या प्रगतीवर ठरते.

अतिप्रगत असल्यास देहपात आणि काही साधना थोडीच अपूर्ण असल्यास तिथेच मुक्काम असा हा नियमच आहे उपासनाक्रमाचा! तो ज्ञाते जाणतात. स्वामी विवेकानंदांच्या बाबत श्री रामकृष्ण परमहंस म्हणत असत की तो कोण आहे हे त्याला जेव्हा कळेल तेव्हा तो या जगात राहणार नाही. यावरून त्यांचे इष्ट काय असावे ते कळून येते. असो.

आता माझे इष्ट कोणते ते पाहू या. खरे तर ही माहिती गुप्त राखतात. पण मला आता कोणाची भीती नाही. आणि माझे आयुष्य आता संपत आले आहे म्हणून सांगायला हरकत नाही. कळिकाळायेवढी अजून कोणाची भीती असणार माणसाला?

एकदा एका अघोरीने मला आग्रह केला की "आमच्याबरोबर गिरनारला चला. दत्तपादुकांचे दर्शन घेऊ या." त्यावेळी तो अघोरी आहे हे समजले नव्हते. ते नंतर उघड झाले. मीही भोळेपणाने कबूल झालो, जाऊन येऊ या म्हणून. त्या मनुष्याने रेल्वे रिझर्व्हेशनही केले जाण्यायेण्याचे. पैसे त्यानेच भरले. पण ऐन वेळी माझा का कोण जाणे बेत फिरला आणि मी येत नाही असे त्याला कळवले. तो फार नाराज झाला. पण मी ठाम होतो. मग तो गेला त्याच्या इतर मित्रांबरोबर. मी त्याला त्याने खर्चलेले तिकीटाचे पैसे पण देऊन टाकले.

हा वृत्तांत आहे माझ्या अनाहतनादप्राकट्यापूर्वी अंदाजे तीनचार वर्षांपूर्वीचा. मला माझ्या आध्यात्मिकतेची म्हणा, योगसिद्धीची म्हणा, तेव्हा काहीच जाणकारी नव्हती. निव्वळ अडाणी होतो मी या सगळ्या अज्ञाताच्या प्रांतात!

नंतर अदमासे दहा वर्षांनी मी एकटाच गुजरातेत गेलो तेव्हा गिरनारचा योग जुळला. थंडीचे दिवस ऐन भरात होते डिसेंबरचे. एक कार करून मी एका मल्याळी कुटुंबासमवेत जुनागढला गेलो. रात्री सराईत मुक्काम केला आणि सकाळी आठ वाजता स्नानादी आटोपून त्या कुटुंबासह निघालो गिरनार चढायला. त्यांची पत्नी आणि दोन कन्यकाही होत्या बरोबर. पत्नीचे नुकतेच सहा महिन्यांपूर्वी ऑपरेशन झाले होते आणि कन्या ६ वर्षे अन् बारा वर्षे वयाच्या होत्या अगदी अवखळ.

खरे तर आम्हाला इतरांसारखे पहाटेच पाच वाजता निघायला हवे होते जर वेळेत अंधार पडण्यापूर्वी परतायचे तर. पण माहिती नव्हती आणि रात्री उशीर झाला होता जुनागढला पोहोचायला म्हणून येवढा उशीर झाला. कारचा मुसलमान ड्रायव्हर तर चकीतच झाला. त्याच्या म्हणण्याप्रमाणे जाऊन येऊन १०००० चढणीच्या पायऱ्या आणि अंदाजे १० ते १५ कोसांचा फेरा अशी ती गिरनारयात्रा होती. ती आम्ही करायला कसे धजतो आहोत याचे नवल करत बसला आणि त्याचेही खरेच होते, जेव्हा आम्ही प्रत्यक्ष वाटेला लागलो तेव्हा कळले की गड अति अवघड आहे, गिरनारचा! गुजराथी लोक त्याला **गढ**च म्हणतात.

वाटेत चढाच्यापूर्वी डोलीवाले आणि वजनाचे काटे होते. माणसाचे वजन जसे असेल त्याप्रमाणे डोलीवाल्यांचे पैसे! म्हणजे गलेलठ्ठ गुजराथ्यांना खूपच पडत असतील! भाड्याने किंवा विकत काठ्या पण मिळत होत्या. चढण चढतांना लागतात म्हणून. पण ते काहीही आमच्या गावीही नव्हते. आम्ही लागलो आपले चढणीला, पुण्याची पर्वतीच आहे जशी काही असे समजून! पण थोड्याच वेळात कळून आले की ही तर फारच अवघड वाट आहे म्हणून.

त्यात मेनन तर म्हणू लागले की "आम्ही काही पुढे येत नाही. तुम्ही जाऊन या. आम्ही थांबतो सराईमध्ये." पण त्यांच्या बालिका तेव्हापर्यंत सुसाट वेगात खूपच पुढे गेल्या होत्या. त्यांच्या काळजीने आम्हा सगळ्यांना पुढे जाणे भागच होते. पण आमच्याने त्यांना गाठणे दुरापास्त होते. मला आम्ही लहानपणी सप्तशृंगगड चढून गेलो ते आठवले. मी आणि आणखी माझ्याच वयाची एक मुलगी, दोघे सर्वांपूर्वी देवीपुढे दाखल!

शेवटी रडतखडत अंबामातेचे पहिले शिखर आहे त्याच्यापाशी पोहोचलो. शेवटच्या पन्नास पायऱ्या चढाव्याशा वाटत नव्हत्या आणि एव्हाना आमच्यापूर्वी पहाटे निघालेले लोक परतू लागलेले दिसत होते. काही जणांनी पोटऱ्याना पट्टे पण बांधले होते पाय दुखणे थांबावे म्हणून. शेवटी धीर बांधून वर गेलो. जाणे भागच होते त्या मुलींकरता आणि मातेला प्रार्थना करत होतो की "अंबामाते, त्या पोरींना तिथेच थांबवून घे! आणखी पुढे जाण्याची आमची ताकद नाही."

मातेने ऐकले असावे. त्या दोघी पोरी तिथेच थांबून राहिल्या होत्या. मग अंबामातेचे दर्शन घेऊन सगळे कृतकृत्य झालो. अन् काहीतरी पोटात टाकावे म्हटले. सगळेच सकाळपासून उपाशीपोटी निघालो होतो म्हणून. तर तिथे काहीच नव्हते. होते ते गुजराथी फरसाण, गुजराथ्यांचा जीव की प्राण! पण आमचा जीव खाणारे! ते खाऊन का आम्ही पोट भरणार होतो? पण मग घेतले तेच आणि गुळमट चहा.

त्यानंतर मेनन म्हणाले की परत जाऊ या. पण मला उत्साह आला होता. म्हटले येवढे आलोच आहोत तर पुढच्या दीडदोन हजारच तर पायऱ्या आहेत, जाऊन येऊ या की! मग त्यांची परवानगी घेऊन जायला निघालो, तर त्यांची मोठी कन्या, वय वर्षे १२, माझ्यामागेच लागली की "अंकल, मै भी आऊ तुम्हारे साथे!" म्हटले "नको. तू पुढे निघून जाशील अन् आतासारखेच मला धावडावे लागेल." पण ऐकेच ना. मग तिला सांगितले की माझ्यापुढे एकही पाऊल टाकलस तर लगलीच परत फिरेन. तर कबूल झाली. मग निघालो पुढे तिला बरोबर घेऊन!

वाटेत अगोदरच चार सौराठी भेटले. त्यांच्याशी जरा गप्पा मारल्या अन् विचारले की पुढे जाणार आहात का. तर तिघे जण म्हणाले, "चला आमच्याबरोबर! आम्ही नेऊ तुम्हाला." उरलेला एक जण म्हणाला, "माझी काठी घ्या. मी पुढे जात नाही." बरे म्हणून निघालो. तर त्या रांगड्यांची चाल! मी काय त्यांच्याबरोबर चालणार? त्यांना म्हटले की "जा बाबांनो पुढे. आमच्या चालीने तुम्हाला फार उशीर लागेल."

जाता जाता गोरक्षपादुकाशिखर लागले. त्यांना वंदन करून पुढे झालो. मेननकन्या मात्र आता पुढे पळत नव्हती. तिच्या मनासारखे होत होते. मैत्रीणींना सांगायला मिळणार होते आपण कशी शूराई केली ते! त्या आनंदात माझे सगळे ऐकत होती.

त्यानंतर गोरक्षशिखर उतरतांना काही पायऱ्यानंतर रिकाम्या हाती परतणारे डोलीवाले भेटले. ते अपेक्षेने पाहत होते की हा बाबा आता आपल्याला विचारतो का? पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आम्ही पुढे गेलो. अर्ध्याअधिक पायऱ्या उतरलो न उतरलो तर मला मळमळून आले. ओकारी होऊ लागली. अंगाला दरदरून घाम सुटला. चकरा येऊ लागल्या.

मग थांबलो तिथेच. तर प्रीती - मेननकन्या - पुढे धावू लागली कसेबसे रागावत तिला रोखले आणि म्हटले, "थांब इथेच! मला बरं वाटत नाही." आणि तिचा जबरदस्तीने हात धरून खाली पायऱ्यावर बसलो. तिला तंबी दिली की एकटी पुढे गेलीस आणि सिंहाने धरले तर काय करशील! हे जंगल आहे. तुझे आणंद नाही. आणि माणसं पण काहीही करतील तुला. अशी भीती घालून तिला रोखले तिथे अन् त्या तिरप्यातारप्या पायऱ्यावर आडवा कसातरी पडून राहिलो तासेक.

प्रीतीची चुळबुळ आणि नाराजी होतीच. पण रागावून तिला तिथेच बसायला लावले. नंतर हळूहळू उठलो आणि परतीची वाट धरली. कन्या अतिशय नाराज झाली. पण इलाज काय? मी तर कसातरी चालत होतो परतीच्या वाटेवर तिला बरोबर ठेवत. असे आम्ही पुनःगोरक्षांना पार करत अंबामातेच्या तिथे परत आलो. आणि प्रीतीला तिच्या आईबाबांच्याकडे सोपवून निश्चिंत झालो.

तिथून हळूहळू परतत संध्याकाळ झाल्यावर पुनः सराईला आलो आणि तिथल्या मुचकुंदगुहा, तीर्थे आणि नरसी मेहतांचे घर पाहून वीरपूरला जलारामबाबांचे दर्शन आणि भल्यामोठ्या लाडवाचा प्रसाद घेऊन मार्गस्थ झालो. वाटेत एका ढाब्यात बाजरीना रोटला आणि बैंगनभरता, दही, पापड खाऊन आणंदमार्गे बडोद्याच्या हॉटेलात पोहोचलो. मेनन कुटुंबीय आणंदला उतरले. वाटेत त्यांची महाशूर कन्या माझ्या मांडीवर डोके टेकून झोपी गेली होती.

तर अशी ही माझी गिरनारयात्रा. गुरुपादुकांजवळ पोहोचूनही तिथेच हार्टअटॅक येऊन दर्शन न घेताच परतावे लागले. तेव्हा फार वाईट वाटले. पण झाले ते बरेच झाले. घरी परतल्यावर डॉक्टर इ. सोपस्कार मेडिकलला असलेल्या कन्येने करायला लावले अन् त्यांना मी सांगितलेली सर्व लक्षणे क्लासिकल हार्टअटॅकची वाटली आणि कन्येची मेडिकलची पुस्तक वाचून मनावर परिणाम झाल्यामुळे मी काहीतरीच सांगतो आहे असे वाटून जुजबी औषधोपचार करून घरी पाठवले.

त्यानंतर महिनापंधरा दिवसात मी चालत्या लोकलमध्ये बेशुद्ध झाल्यावर त्याच डॉक्टरची जी धावपळ झाली विचारू नका. अर्थात आम्हालाही ते भोगावे लागले. पण गिरनारला हार्टअटॅक आला होता असा मग निष्कर्ष निघाला. असो परमेश्वराने राखले. जर पुढे तसाच गेलो असतो तर पादुकांचे दर्शन अन् तेव्हाच प्राणत्याग होऊन मोठीच आपत्ती ओढवणार होती. अन् त्या अंधाऱ्या रानावनात प्रीतीचे माझ्यानंतर काय झाले असते या कल्पनेनेही जीवाचा थरकाप होतो.

तेव्हा मात्र तो विचार अर्थातच परिस्थितीच्या अज्ञानामुळे लक्षात आला नव्हता. नंतर मात्र नीट विचारांती लक्षात आला. आणि कोणा अडाणी अतिउत्साह्यासारखे दामटून पुढे गेलो असतो तरी तसेच भयंकर घडले असते. गुरू दत्तांनी पाठ राखली म्हणायची!

त्याअगोदरची एक गोष्ट पण या संदर्भात नंतर लक्षात आली ती नरसोबाच्या वाडीला गेलो होतो ती. विस्मृतीत गेलेली. तेव्हा असाच संगमावर एकटा गेलो होतो पत्नीला नृसिंहसरस्वतींच्या पादुकामंदिराशी बसवून. तिथेही निर्मनुष्य स्थान होते, आणि संगमाच्या पाण्यात पाय बुडवावे म्हणून काठावरून खाली गेलो तर सगळे निसरडे होते अन् घसरगुंडी झाली होती तिथे. पाण्यात जाणारच होतो. अन् मला पोहताही येत नाही. बुडून मृत्यूच होता त्या एकांतस्थली आणि कोणालाही कळले नसते काय झाले ते.

पत्नीबरोबर कारड्रायव्हर आणि एक परिचित आला होता. पण त्या कोणालाही कल्पना न देता मी अवचितच असा संगमाकडे गेलो होतो. नशिबाने तेवढ्यात एका झुडपाची तकलुपी फांदी हाताला लागली अन् ती मुष्कीलीने पकडून तिच्या आधाराने वरची जरा भक्कम फांदी पकडली अन् घसरत जाणारे शरीर त्यांच्या आधाराने कसे तरी वर खेचत नदीसंगममाहात्म्यातून सुटका करून हाशहुश करत परत मंदीराजवळ आलो.

पत्नी देवळाजवळच होती. तिला मी बुडताबुडता कसा वाचलो ते कधीच सांगितले नाही. आंघोळ वगैरे घाटावर केली अन् परतलो सांगलीच्या लॉजवर.

अजून तिसरी घटना वाईट नाही, चांगली, आहे. ज्योत प्रकटली, आत्मदर्शन झाले आणि वेड्यासारखी अवस्था झाली ते आहेच या आत्मवृत्तात. त्याच्या दुसऱ्या दिवशी आत्मराजाच्या सन्मानार्थ सत्यनारायण केला होता, पण महत्त्वाचे म्हणजे अखंड देवापुढे बसून पहाटेपासून दुसऱ्या दिवशीच्या पहाटेपर्यंत श्रीगुरुचरित्रपारायण केले. त्यानंतर वड्यांचा नैवेद्य दाखवून पारणे केले. या सगळ्यात माझ्या आई अन् पत्नीचा हातभार मोठा होता.

या घटनांचा विचार केल्यावर आपोआप लक्षात आले की आपण गुरूचा इतका शोध घेतला, तसा इष्टाचा घ्यायला हवा होता हे माहीत झाल्यावरही का घेतला नाही? अर्थात माझी दशा इतकी उच्च आहे हे कोणाला माहीत होते? मला तर नाहीच नाही. अन् नंतर हा संबंध कधी तरी लक्षात आला की दोन्ही ठिकाणी श्रीगुरुदेवदत्तांच्या निर्गुण पादुकाच आहेत. एक होती गिरनारच्या

दत्तपादुकाशिखरावर आणि दुसरी होती नरसोबावाडीला श्रीनृसिंह सरस्वतींच्या पावन नामाची! काय विलक्षण आहे हे योगायोग! माझा मोक्ष त्या दोन्ही ठिकाणी लिहिलाच होता आणि केवळ चमत्कारिकरीत्या मी त्यातून वाचलो होतो.

नंतर डॉक्टरांनी आश्चर्य व्यक्तवले होते की येवढा हार्टअटॅक येऊन मी गिरनारचा परतीचा प्रवास कसा काय करू शकलो अन् ट्रेनने परत येऊन रेल्वेचे जिने वगैरे चढून सामान हातात घेऊन मुंबईच्या भयाण लोकलच्या गर्दीतून सुखरूप घरी कसा काय आलो! ती सगळी ईश्वराची कृपाच म्हटली पाहिजे.

तसेच आत्मदर्शनानंतरच्या गुरुचरित्र परायणावरूनही समजते की माझे इष्ट गुरुपादुकाच आहेत. आणि त्या निर्गुण आहेत. पण हे स्पष्ट व्हायला किती तरी काळ लागला! कारण विज्ञानाचे अज्ञान!

इतरत्र सांगितले आहे की **समना** आणि **उन्मना** याच त्या दोन गुरुपादुका असतात म्हणून. The Serpent Power (by Sir John Woodroffe) यातील **पादुकापंचक** या प्रकरणात **सहस्त्रदलकमल** आणि **द्वादशदलकमल** ही दोन्ही शुभ्रवर्णीय कमले ब्रह्मरंध्रस्थित असतात असे म्हटले आहे. तीच श्रीसद्गुरूची दोन चरणकमले. इथेच हंसपीठ असते. कुंडलिनी आदिशक्तीचे हेच मूलस्थान आणि शिवाचेही. जीवाचे अंतिम गंतव्यस्थानही हेच आहे असे **पादुकापंचका**तून दिसते.

श्रीगुरूंच्या **सगुण** आणि **निर्गुण** पादुकांचे सान्निध्य असणारे हे स्थान आहे. स्थूलमानाने म्हणायचे तर या **पादुकापंचका**नुसार **ब्रह्मरंध्र** हेच अंतिम स्थान आहे आणि इथेच गुरु आणि त्यांच्या पादुका वसतात. नाद, बिंदु आणि प्रकाश (विमर्श) हेही इथेच असतात. एकूण सगुणातील आणि निर्गुणातील सर्वोच्च अनुभूतींचे हे स्थान म्हणता येते. हे जरी मागे दिलेल्या **"पिंड ते ब्रह्मांड"** या कोष्टकाशी जुळत नसले, तरी योगिक संज्ञांच्या बृहद् व्याख्यांना अनुसरून समजावून घेता येते.

या सर्व विवरणावरून आपल्याला कळून येते की हेच पादुकास्थान माझे इष्ट होते आणि त्याच अनुरोधाने माझी पूर्वजन्मींची साधना झालेली होती. त्यामुळेच मला पहिली पायरी नादाची मिळाली. असो.

त्यातून मुख्य बोध असा की योगशास्त्र खरेच आहे. अतिप्रगत सिद्धाचे इष्टाठायी प्राणोत्क्रमण होते निर्वाणाचे! माझे इष्टही या दोन प्रसंगातून कळले हे बरे झाले अन् तो अघोरी माझ्या मागे का लागला होता येवढा की गिरनारला चला म्हणून तेही कळले! गेलो नाही म्हणून किती नाराज झाला होता तो माझ्यावर! पण तेव्हा गेलो असतो तर माझे काय झाले असते आणि त्याचे काय साध्य होते त्यात हे अजूनही कळू शकले नाही. काही तरी विशेष गूढातलेच असणार! त्याची काही साधना माझ्या मृत देहाधारे त्या भयाण जंगलाच्या एकांतात सिद्ध होणार असल्यास न कळे!

श्रीगुरुपादुकास्तोत्र

गुरुपादुकांचे एक प्रसिद्ध स्तोत्र आहे.

अनंतसंसारसमुद्रतार नौकायिताभ्यां गुरुभक्तिदाभ्यां।
वैराग्यसाम्राज्यदपूजनाभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां।।१।।

मत्प्राणप्रिय श्री गुरुदेवा! तुमच्या पवित्र पादुकांना वंदन असो. तुम्ही मला संसाराच्या या अथांग समुद्रातून तुमच्यावरील भक्तिरूपी नावेने तारून नेलेत आणि मला वैराग्याचा मार्ग दाखवलात.

कवित्ववाराशिनिशाकराभ्यां दौर्भाग्यदावांबुदमालिक्याभ्यां।
दूरीकृतानम्रविपत्तिताभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां।।२।।

तुम्ही ज्ञानसागरास भरती आणणारे पूर्णचंद्र आहात. संसाराच्या दु:खांनी पोळणाऱ्यांसाठी तुम्ही म्हणजे ओलीचिंब भिजवणारी सुखद अशी वर्षणारी आनंदधारा आहात. तुम्ही आपल्या शरणागतांना त्रितापापासून मुक्त करता.

नता ययोः श्रीपतितांसमीयुः कदाचिदप्याशुदरिद्रवर्याः।
मूकाश्चवाचस्पतितां हि ताभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां।।३।।

तुमच्या पवित्र पादुकांनाही माझे नमन असो. त्यांच्या कृपेने आम्हाला अज्ञानाच्या शापातून शीघ्रातिशीघ्र मुक्त केले आहे आणि अमाप ज्ञानाचे धन आम्हाला मुक्त हस्ते वाटले आहे.

नालीकनीकाशपदाहृताभ्यां नानाविमोहादिनिवारिकाभ्यां।
नमज्जनाभीष्टततिप्रदाभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां।।४।।

तुमच्या पवित्र आणि सदैव वंदनीय अशा चरणकमलांच्या ध्यानाने सर्व प्रकारच्या आशांचे निराकरण होते आणि मोक्षेच्छा पूर्ण होते.

नृपालिमौलिव्रजरत्नकांति सरिद्विराजज्झषकन्यकाभ्यां।
नृपत्वदाभ्यांनतलोकपंक्तः नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां।।५।।

सम्राटाच्या मुकुटावरील दैदिप्यमान रत्नाप्रमाणे तुमच्या पादुका आहेत. मकरांनी वेढलेल्या नदीत अवतरलेल्या सुंदर वरुणकन्येप्रमाणे त्या राजाधिराज अन् सम्राटादिकांच्या समुद्रात शोभायमान होत अवतरतात.

त्यांना पाहून त्या भूपालांच्या नजरा आदरपूर्वक खाली झुकतात.

पापांधकारार्कपरंपराभ्यां पापत्रयाहीन्द्रखगेश्वराभ्यां। जाड्याब्धिसंशोषणवाड्वाभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां॥६॥

शिष्यांची मने धुवून काढून त्यांच्या सकल पापांचा अंधकार निवारण करणारा सूर्यच जशा त्या आहेत. त्रितापरूपी नागराजास गिळंकृत करणारा दिव्य गरुडच त्या आहेत. अज्ञानसागरास शोषून टाकणारा वडवानलच जशा काही त्या आहेत.

शमादिषट्कप्रदवैभवाभ्यां समाधिदानव्रतदीक्षिताभ्यां। रमाधवांघ्रिस्थिरभक्तिदाभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां॥७॥

तुमच्या पादुकांच्या कृपेने आम्हाला शमदमादिक षट्संपत्ती प्राप्त होते. त्यांच्या आशीर्वादाने आम्हाला समाधिसुख लाभते. भगवान श्रीविष्णुंच्या चरणकमली आमची भक्ती निरंतर दृढ करणाऱ्या तुमच्या पादुकांना आम्ही कृतज्ञतापूर्वक सदैव वंदन करतो.

स्वार्चापराणामखिलेष्टदाभ्यां स्वाहासहायाक्ष धुरंधराभ्यां। स्वान्ताच्छभावप्रदपूजनाभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां॥८॥

आमच्या मनोकामना पूर्ण करणाऱ्या अशा या तुमच्या पादुका आहेत. त्या आम्हाला सदाच वंदनीय आहेत. आम्ही सर्वदा त्यांच्या सेवेत आणि भक्तीत रत राहू असा आशीर्वाद, हे गुरुमाउली, तू आम्हाला दे. त्यांच्यामुळेच आमच्या हृदयात भक्तीचा उमाळा फुटतो अन् आत्मसाक्षात्कार झाल्याच्या दैवी खुणा लाभून आमचा जीव धन्य धन्य होतो.

कामादिसर्पव्रजगारुडाभ्यां विवेकवैराग्यनिधिप्रदाभ्यां। बोधप्रदाभ्यांदृतमोक्षदाभ्यां नमो नमः श्री गुरु पादुकाभ्यां॥९॥

या तुमच्या अलौकिक पादुका आमच्या मनातल्या कामसर्पांसाठी वैनतेय गरूडच आहेत. त्या आम्हाला अमूल्य अशा विवेक आणि वैराग्याचे अमाप धन देतात आणि या भीषण संसाराच्या शृंखलांतून त्वरित मुक्त होण्याचे ज्ञान आम्हाला देतात. हे गुरुदेवा! मी त्यांना सर्वभावेकरून संतत वंदन करतो.

कुंडलिनी जगदंबा

सरतेशेवटी **कर्म असो, ज्ञान असो, भक्ती असो की कोणताही ध्यानादी योग असो, किंवा इतरही कोणता साधनामार्ग असो, त्या सर्वांची वाट कुंडलिनी जगदंबेच्या महाद्वारातूनच जाते आणि आपण जेव्हा त्यातून जाऊ त्यानंतरच आपले गंतव्य प्राप्त होते, हे अगदी सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे!**

सुज्ञांस अधिक सांगावे लागणार नाही आणि अज्ञान्यास कितीही टाहो फोडून सांगितले तरी उपयोग नाही, हेच खरे! एवढे स्पष्ट केल्यावरही ज्यांना **योगयागविधी** हेच म्हणत राहायचे असेल, तर ते तसेच राहू देत! आपला विचार तेथे पोहोचणार नाही, असे म्हणावे अन् उगी राहावे!

संजीवन समाधी

योग्याची आत्मदर्शनानंतरची विमूढावस्था

भागवताच्या तेराव्या अध्यायात समाधी म्हणजे काय आणि तेव्हा काय होते, ते स्पष्ट सांगितले आहे:

सर्व संकल्पांची अवधी। त्या नांव निर्विकल्प समाधि। सकळ शास्त्र हेंचि प्रतिपादी। समाधि त्रिशुद्धी त्या नांव ॥६६९॥

..अकस्मात अवचितां।
दिव्य स्वरूप देखतां। आश्चर्यें झाली तटस्थता।
तेथ जाणावी तत्त्वतः। वृत्ती आहे॥६७१॥
स्वस्वरूप देखतां प्रथमदृष्टी। न संवरतु विस्मयो उठी।
तोही जिरवूनियां पोटीं। दशा उठी तैं समाधि॥३७२॥

या ओव्यांतून मला होणारा बोध सांगतो. मागे एकदा अखंड दिसणाऱ्या दीपज्योतीचा प्रसंग सांगितला होता. त्या वेळी माझ्या मनात काही विभ्रम निर्माण झाले. हे काय अक्रीत घडले आहे, याची अध्यात्मशास्त्र आणि योगशास्त्राची पुरेशी जाण नसल्यामुळे आणि माझी इतकी उच्च स्थिती असू शकेल हे मनीमानसी नसल्याने मला त्या प्रकरणाचा मोठा शॉक बसला होता. त्यात भर पडली ती आमच्या त्या अघोरी दंपतीदुक्कलीची. नाही ते सुचवण्यात त्यांचा हातखंडा! त्या सगळ्या प्रसंगात हीच स्थिती होती.

साधकाला आत्मदर्शन होते, तेव्हा अत्यंत अतर्क्य घटना घडतात. त्या व्यावहारिक नसल्याने त्यांना शॉक बसतो. काहींना त्यातूनच वेडासारखी मानसिक अवस्था होते. म्हणूनच मागे एक महाराज मला म्हणाले होते की आपला मार्ग येरवड्यातूनही जातो असे.

तसे त्यांच्या एका शिष्यालाही वेडाचे झटके येऊन गेले असे म्हणतात. पण तो अतिरेकी त्राटकाचा परिणाम होता. परंतु पं.गोपीकृष्ण यांचे: Kundalini -Path to Higher Con- sciousness, श्री.बी.एस.गोयल यांचे: Third Eye and Kundalini ही पुस्तके वाचल्यास त्यांनाही अशा अवस्थांतून जावे लागले होते, असे दिसते.

तसेच अनेक सिद्ध पुरुष, साधू, बाबा यांच्याही जीवनक्रमात हे प्रसंग आलेले होते, असे दिसते. काहींना

त्यातून सावरताही आलेले नसून जन्मभर ते तसेच वेड्यासारखे वागत असत, असेही दिसून येते. The Dark Night of the Soul मध्ये आणि ती जेव्हा संपते, तेव्हा हा असा Madness of God Seekers प्रकट होतो. याला अध्यात्मात God Madness असे म्हणतात, जो मीराबाईसारख्या अनेक संतांत दिसून आला आहे. लोकांनी संतांना पगला, पगली अशा उपाधी बऱ्याचदा दिलेल्या आहेत.

अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ, श्रीगजाननमहाराज इ.काही मोठ्या संतांच्या चरित्रातून याचा बोध होतो. श्रीरामकृष्ण परमहंसांची अवस्था कशी होती, हे तर सर्वज्ञातच आहे. त्यांना मथुरबाबूंसारखा कोणीही सामान्य मनुष्य शहाणा समजायला तयार नसे, असे त्यांच्या चरित्रग्रंथांवरून दिसते.

गीतेतल्या **"आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः। आश्चर्यवच्चैनमन्यः श्रृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।।२-२९।।"** या श्लोकातून माझ्या मते खरं तर याच आत्मानुभूतीनंतर होणाऱ्या अवस्थेचे वर्णन आहे. ज्या कोणाला हा आत्मा दृग्गोचर होतो, तो आश्चर्यविमूढ होऊन जातो आणि तो काय पाहील, काय बोलेल, काय ऐकतो आहे असे दिसेल, याचा सामान्य जनांना बोध होणे शक्य नाही.

त्याचे एकूणच वागणे मूढ मनुष्यासारखे होऊन जाऊ शकते आणि अशांना समाजातील कंटकांचा मारणे, झोडणे, दगड मारणे इ.प्रकारचा उपद्रवही खूप झालेला आहे. हल्लीच्या काळात तर Schizophrenia आणि इतर मानसिक आजार म्हणूनही त्याची Psychiatric चिकीत्सा झालेली असल्याचे पं.गोपीकृष्ण आणि श्री.गोयल यांच्या अनुभवावरून दिसते.

मीही जेव्हा या अवस्थेतून जात होतो, तेव्हा काहींची अशीच समजूत झाली होती आणि काही सहकारी तर मी LSD इ.मादक द्रव्ये घेत असतो असे समजत असत. वास्तविक अशा द्रव्यांना मी आजपावेतो डोळ्यांनीही पाहिले पण नाही.

आत्मदर्शन झालेल्या अशा व्यक्तींच्या अवस्थेचे **"बालोन्मत्तपिशाच्चवत"** असे वर्णन शास्त्र करते. ते विमूढ होऊन बालकासदृश वागतात, तर काही वेड्यासारखे करतात आणि काही तर पिशाच्चासारखे हिडीस वर्तनही करतात. हा आत्मानुभूतीचा परिणाम आहे, तो धक्का नीट पचवता आलेला नसतो आणि म्हणूनच जनसामान्यांच्या दृष्टीने या व्यक्ती विमूढ असल्याचे दिसते.

माझ्या वेळी हरिपूरच्या त्या संतिणींनी, ज्या कायम तुर्येत असायच्या त्यांनी मुद्दाम कळवले होते की, "कोणाही Psychiatrist कडे जाऊ नकोस. ही तुझी अवस्था त्यातली नाही. त्यांचे औषधोपचार घेतल्यास त्यांचे विपरीत परिणाम होऊन आणखी काहीतरी गुंतागुंत निर्माण होईल," असे त्या म्हणाल्या. त्यांचा सल्ला योग्यच असल्याचे मला आढळून आले.

त्या वेळी असे झाले होते की ज्योतिदर्शनामुळे माझी मानसिक स्थिती आत्यंतिक भावविभोर झाली होती. केव्हाही डोळ्यातून आसवे गळणे, कोणालाही लोटांगण घालणे, नमस्कार करणे, अतींद्रिय शक्तींबाबत विचार करणे इ.रामकृष्ण परमहंसांच्या चरित्रात वर्णन केलेल्या आहेत, तशा प्रकारच्या अवस्थांतून मी जात होतो. लौकिक दृष्ट्या ते पगलापनच होते.

त्यातच माझ्या वडलांना त्याच वेळी एकवीस दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले होते. त्याचाही माझ्या मनावर परिणाम झालेला होता. त्या वेळी एका हितेच्छूंनी माझी त्या संतिणींशी भेट घडवून आणली. त्या ज्या खोलीत होत्या, तिथे मी गेलो असतांना त्यांना सागितले गेले की, "याच्याकडे पाहा. याची फार वाईट अवस्था झाली आहे."

त्यावर त्या माझ्याकडे रोखून पाहू लागल्या आणि म्हणाल्या "आधी कृष्णाला नमस्कार कर साष्टांग!" मी तसे केल्यावर त्यांनी थोड्या वेळाने माझ्याकडे रोखून पाहात ***"यदा यदा हि धर्मस्य...।।"*** आणि ***"यत्र योगेश्वरो कृष्णो ..।।"*** हे गीताश्लोक म्हटले. नंतर कृष्णाने मुरली धरलेली आहे अशी pose घेऊन त्या समाधिस्थ झाल्या. नंतर परत माझ्याकडे पाहात त्यांनी गणेशभक्ती चालूच ठेव असे सांगितले. "कृष्ण तुझा पाठिराखा आहे," असेही त्या म्हणाल्या.

काही काळाने मी त्या अवस्थेतून बराचसा बाहेर पडलो आणि लोकांना काहीतरी थोडेफार विचित्र वागण्यापलीकडे मी काही विशेष विक्षिप्तासारखे वागत नसे. आणि माझी नेमून दिलेली व्यावसायिक कामेही मी उत्तमरीत्या पार पाडत असे. त्या वेळी श्रीएकनाथांचे श्रीमद्भागवत नव्हते माझ्यापुढे. म्हणून त्या अवस्थांचे वैशिष्ट्य सर्व काही लक्षात आले नाही. याचसाठी सद्गुरू लागतात आणि ते ***"शाब्दे पारे च"*** निष्णात असायला लागतात.

निद्रानाश

हे सर्व झाले तरी ज्योतिदर्शनाचा परिणाम ती अंतर्मनापुढे सतत दिसत राहणे असा झालेला होता. त्यामुळे वेड्यासारखीच अवस्था झाली होती. गोळ्या घेऊनही नीट झोप लागत नसे. म्हटलं या गोळ्या काय

कायमच्या घ्याव्या लागणार काय? डॉक्टरना विचारले तर म्हणाले की, "निद्रानाश झाला आहे, गोळ्या घ्याव्याच लागतील. त्यांची सवय लागते. सुटत नाहीत या गोळ्या सहसा." म्हटले हे असे आणखी किती दिवस चालायचे!

दोन वर्षं झाली तरी हे तसेच चालू होते, गोळी अर्धी, पाव करत कमी केली. पण निद्रानाश तसाच्या तसाच होता. हा आध्यात्मिक निद्रानाश होता. म्हणायला सोपे आहे ***"या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।... ।।२-६९।।"*** आत्मज्ञान, आत्म्याचे दर्शन झाल्यावर होणारी देहाची अवस्था हा श्लोक नीट स्पष्टपणे सांगत नाही, असे मला वाटले. हे तर सक्तीचे जागरण होत होते!

दोन वर्षांनी एकदा शेगावला श्रीगजाननमहाराजांच्या दर्शनाला जाण्याचा योग आला. डब्यात बसल्यावर झोपतांना आठवले की आपण तर गोळ्या घ्यायला विसरलोच! मग मनात आले की आता तर चांगली दोन दिवस झोपेला सुट्टी! जी काही अपुरी झोप गोळ्यांमुळे मिळत होती, ती पण नाही आणि वर प्रवास! कसे होणार कोण जाणे! पण काय असेल ते असो! मी बर्थवर पडलो आणि जागा झालो तो शेगाव येत असतांना आमच्या यात्रावाल्यांनी जोरजोराने हलवून जागे केल्यामुळे. रात्रभर चांगली झोप लागली होती.

तोच प्रकार दुसऱ्या रात्री आणि परतीच्या प्रवासातही. चांगली झोप लागत होती. घरी आल्यानंतर विचार केला की दोन रात्री जर गोळ्यांशिवाय झोप लागली तर आताही का लागणार नाही? मग मनात गजाननमहाराजांचे स्मरण करत झोपलो. तर हातांच्या बोटांची एक विशिष्ट मुद्रा आपोआप झाली अन् झोप लागली. तेव्हापासून काही काल ती मुद्रा करत गजाननमहाराजांचे स्मरण केले की हमखास झोप लागत असे. आणि आता नंतर तर मला कोणतीही गोळीबिळी न घेताच तशीच आपोआप गाढ झोप लागते, अगदी बारा बारा तासही! मी तरी हा सगळा श्रीगजाननमहाराजांच्या कृपेचा प्रभावच समजतो!

एकवीस दिवसांच्याहीपलीकडची समाध्यवस्था

ज्योतिदर्शनानंतर जी अवस्था झाली होती, ती किती दिवस टिकावी? एका जाणकाराने सांगितले की ती अवस्था जर एकवीस दिवसांवर टिकली तर साधकाचा देहपात होतो. प्राणांचे ब्रह्मांडी संचरुन तेथेच राहणे याची ही शेवटची मर्यादा आहे. मोठ्या मोठ्या योग्यांनाही काही तासांपेक्षा जास्त काळ प्राण ब्रह्मांडी ठेवणे म्हणजे मोठे संकट असते. तर अशा परिस्थितीत मला एका clairvoyant ने सांगितले की, "तुम्ही किती दिवस राहाणार आहात या अवस्थेत? एकवीस दिवस तर कधीच होऊन गेले आणि वर्षामागून दोन वर्षही उलटून गेलीत. हे आश्चर्य कसे घटते आहे?"

मी म्हटले, "मला त्यातले काही कळत नाही. तो श्रीहरी ठेवील तसं मी राहतो आहे झालं! त्यालाच हवं तेव्हा हवं ते तो करील. मी त्याला तसेच सांगितलं आहे की मला यातलं काही समजत नाही आहे. तूच काय ते योग्य असेल तसं करवून घे!" त्यावर ते गृहस्थ खूपच अचंबित झाले. मलाही शास्त्रमर्यादेच्या एकवीस दिवसांचे हे अतिक्रमण कसे घडले याचे नवल वाटले.

नंतर मनात आले की त्या अघोरी जारणमारणवाल्या दंपतीच्या प्रयोगांना आळा बसावा म्हणून त्या श्रीकृष्णानेच हे घडवले असणार! त्याला काय अशक्य आहे? ब्रह्मदेवाचा गर्व हरण करण्यासाठी ज्याने एक संवत्सर गोपबालक अन् गाईवासरांसह त्यांचे खरेखुरे रूप घेऊन गोकुळी लीला केली, तो काय करणार नाही आपल्या भक्तांसाठी! ब्रह्मांडी प्राण नेऊन ठेवणे आणि व्यवहारातही मला चालवणे या दोन्ही गोष्टी त्याने केल्या माझ्यासाठी या दोन वर्षांहूनही मोठ्या काळात!

या प्रसंगावरून एका योगजिज्ञासूने त्याच्या योगी गुरूंबद्दल सांगितलेली गोष्ट स्मरते. त्या गुरूंची टाळू लहान शिशूची टाळू भरण्यापूर्वी जशी मऊ लागते, तशी होती. ते म्हणायचे, "आओ गंगानाथ! आओ! भगवानके लिये मक्खन लाये हो ना! खिलाओ उसे प्यारसे!" त्यानंतर तो शिष्य त्यांच्या टाळूवर हळूवार हातांनी लोणी लावत असे. ते सगळे लोणी त्या टाळून जिरून जात असे.

गोपालकृष्णाला असे लोणी खायला घालणाऱ्याचा गोपाल कुठे असला पाहिजे, ते जिज्ञासूंना उमगलेच असेल! ब्रह्मरंध्री असणार तो नाही का! योग्याचे वारंवार ब्रह्मरंध्रातून प्राणोत्क्रमण होऊन तो भाग नरम पडत जातो आणि अशी शिशुसारखी टाळू होते. आमच्या गावी आलेल्या एका योग्यांची टाळू पण अशीच होती आणि ते दिवसेंदिवस समाधिस्थ राहात असत, अगदी एखाद्या जागेत त्यांना गाडून ठेवले तरी!

मला याबाबत असा अनुभव आला होता की एकदा मी सहज म्हणून माझ्या टाळूला हात लावला तर एक अगदी लहानशी खपली तिथे धरली होती. ब्रह्मरंध्राच्या जागीच! म्हणावे तर मुंगीनेत्रतुल्यच! ब्रह्मरंध फोडून प्राणांनी तेथून ब्रह्मांडात उत्क्रमण केल्याची ती पावती होती. पण देह हठयौगिक क्रियांनी शुद्ध करून योगसिद्ध केलेला नसल्याने ते तेवढ्यावरच निभावले तेही एका अर्थी ठीकच

होते. श्रीहरीला ब्रह्मरंध्र न फोडताही प्राणांचे उत्क्रमण करणे अशक्य नसल्याचे मला दिसून आले या घटनांवरून!

आणि सामान्य मनुष्याचे प्राण व्यावहारिक दृष्ट्या प्रेताची टाळू फुटेस्तोवर शरीराला सोडत नाहीत, ही लौकिक समजूतही चुकीची नसल्याचेही स्पष्ट होते, यावरून. तसेच लहान शिशूची टाळू सुरुवातीस मऊ असते. त्याची Fontanel bones भरून आलेली नसतात. याच मार्गे आत्म्याची श्रीमद्भागवतात बाराव्या अध्यायात सांगितलेली ***"स एष जीवो विवरप्रसूतिः"*** होते. तो जीव टाळू भरून येईस्तोवर आत्मानंदात असतो. कारण त्या द्वारातून *(दशमद्वारातून)* जिवाचे बाहेरील आत्म्याशी अनुसंधान चालू राहाते, असा काही यौगिक भाग यामागे आहे.

सगुण ध्यानाचा उपाय

या अशा असाधारण अवस्थांना नीट निभावता यावे या दृष्टीने भागवत चौदाव्या अध्यायात सांगते की ***"साधनांमाजीं मुख्य भक्ति। ध्यानयोगस्थिती समाधियुक्त।।१४-३८।।"*** - "ध्यानयोगस्थिती आणि समाधी यांनी युक्त अशी भक्ती हीच सर्व साधनांत मुख्य आहे." म्हणूनच तर सर्व संतांनी सगुणावर भर दिला आहे आणि श्रीकृष्णांनीही गीतेत व्यक्तोपासनेचे माहात्म्य सांगितले आहे. सगुण उपासना साधकाला या व्यावहारिकाशी मेळ घालायला उपयुक्त ठरते. कारण कितीही झाले तरी त्याच्या इष्टदेवतेचे - रामाचे म्हणा, कृष्णाचे म्हणा, जगदंबेचे म्हणा, तेथे थोडेफार तरी भान असते आणि साधक पूर्णपणे निर्गुण निराकाराच्या डोहात बुडलेला असूनही तसा वर्तताना दिसत नाही. एकनाथमहाराजांनीही या अध्यायाच्या *ओवी क्र.४३२* इ.मध्ये हे सगुण ध्यान कसे करावे, ते स्पष्ट केलेले आहे.

पुनः योगपथ

त्यांच्या शब्दात जो योगपथ ते परत सांगतात, तो असाः

... । *जिणोनियां साही चक्रें।*
तो प्रणवू सूनि धुरें। निजनिर्धारिं चालिजे।।१४-४४५।।
तेथ उल्हाटशक्तीचे लोट। वैराग्याचा नेटपाट।
जिणोनि काकीमुखाची वाट। सवेगें त्रिकूट घेतले।।४४६।।
तेव्हां अनुहताच्या घायीं। निशाण लागलें पाहीं।
तंव पुढील जें योगभूयी। तैं आपैती सरली पाहीं।।४४७।।
तेथ हरिखें अति उद्भट। *औटपीठ गोल्हाट*।
तेहीं जिणोनियां वाट। घडघडाट चालिला।।४४८।।
मागील ठेली आठवण। झाली विकल्पाची बोळवण।
***सत्रावी वोळली* जाण। स्वानंदजीवन जीवाचें।।४४९।।**
तें *सहस्त्रदळाचे पाट। वरूनि उतरलें घडघडाट।*
स्वानंद जीवन निकट। नीट वाट पैं आलें।।४५०।।
***तें सेवितां संतोषें पाणी* । निवली संतप्त अवनी।**
इंद्रियांची पुरली धणी। *गुणांची त्रिवेणी बुडाली।।४५१।।*
तंव भ्रमरगुंफेआंत। जीवाशिवाचा एकांत।
तेणें जीवपणाचा प्रांत। वृत्तीसी घात हो सरिसा।।४५२।।
तेथ शिवशक्तिसंयोग। निजऐक्यें झाला चांग।
परमानंदें कोंदलें आंग।
सुखाचा सुखभोग। सुखरूप जाला।।४५३।।

आपणास मागे एकनाथांनी नवव्या आणि बाराव्या अध्यायातून जो योगपथ निर्देशिला होता, त्याचे या ओव्यांतून पुनःसमर्थन प्राप्त होते. त्यामुळे पुनः ते विवेचन करत नाही. फक्त महत्त्वाच्या खाणाखुणा सांगतो. ***"जिणोनियां साही चक्रें। तो प्रणवू सूनि धुरें। निजनिर्धारें चालिजे।।१४-४४५।।"*** या ओव्यातून सांगितलेला प्रणव म्हणजे प्राणांसह कुंडलिनीशक्ती ***(उल्हाटशक्ती)*** होय.

एकनाथी भागवतातून प्रकटणारा योगपथ आपण पूर्वी एकदा लक्षात घेतला होता. आता या ओव्यांच्या संदर्भात तो कसा आहे, ते पहाः

"षट्चक्रे(आज्ञेसहित) -➢ काकीमुख -➢ त्रिकूट- ➢ औटपीठ -➢ गोल्हाट -➢ सत्रावी कला -➢ सहस्त्रदल (ब्रह्मरंध्र) -➢ भ्रमरगुंफा - जीवशिवसंयोगाचे स्थान(सोहंहंसाचे पीठ)"

यातल्या **त्रिकूटास** ***सत् ब्रह्म*** अशी संज्ञा देतात. ***ब्रह्मरंध्रीचे कपाट म्हणजे आज्ञाचक्रावरील प्रांत.*** सहस्त्रदलापर्यंत त्रिगुणावस्था आणि तेथून पुढे त्रिगुणातीतावस्था. ***भ्रमरगुंफा म्हणजे आनंदब्रह्म, जीवशिव / शिवशक्तिसंयोगाचे स्थान, सोहंहंसाचे पीठ, चित् ब्रह्म.*** त्रिकूटापासून पुढे सलोकतादी चारी मुक्ती. हा असा योगपथाचा साधारणतया आलेख असल्याचे यावरून दिसून येते.

अनहद-अनाहतनाद

श्री.बाबामहाराज आर्वीकरांच्या मते ***नाद, बिंदु व कला*** **यांचा अर्थ असा आहेः नाद म्हणजे अनुहतनाद. हाच पूर्णरूप आनंद, कला म्हणजे चिद्रूपता आणि बिंदु म्हणजेअहंता-अहम् रूप, हेच सत् ब्रह्म होय** *(दिव्यामृतधारा, पृ.क्र.४२०).* त्यांच्या मते सर्व बोध

विशुद्धिचक्रावरच होतो. ते सांगतात त्यानुसार ***अनाहतनादात सगुणाचा साक्षात्कार आहे, निर्गुणाची सीमा आहे, कृतकृत्यता आहे.***

अनुहतनादाबाबत ज्ञानदेव म्हणतातः

जडांतील शुद्धांश कौतुकें रिझाला।
निवृत्तीने दाविला कृपा करूनि।।१।।
अनुहात भेद दाविला कृपेने।
सर्व हे चैतन्य गमलें तेव्हां।।२।।
ज्ञानदेव नयनीं निवृत्तीचें पदीं।
आनंद ब्रह्मपदीं एक जाला।।३।।अ.क्र.७८३।।

अनाहतनाद म्हणजे जडातला शुद्धांश. तो पावून ज्ञानदेव कृतार्थ झाले. त्यांना नयनी म्हणजे डोळ्यात - तृतीय नेत्री दिसले की हा जडातला शुद्धांश, आनंद आणि ब्रह्मपद एकच आहेत. ही सगळी निवृत्तीच्या पदी म्हणजे सद्गुरूपदी सामावलेली आहेत.

ध्वनीपासून शब्द उत्पन्न होतो आणि त्याचा लयही ध्वनीतच होतो. सद्गुरू किंवा सत्पुरुषांचे साकार रूप हाच ध्वनी होय. सगुण साकारातून ध्वनी आणि शब्दाचे अवतरण आहे. अनाहतध्वनीद्वारे साधक आपली चेतना सत्पुरुषाठायी सामावून टाकतो. या शब्दाचा उच्चार होत नाही. म्हणून तो अजपास्वरूप आहे.

तो शून्यातून उत्पन्न होतो, त्याला सीमा नसते, म्हणून त्याला ***अनहद - हद्द नसलेला*** असे हिंदी संत म्हणतात. तो ऐकणे हेच योग्याचे मुख्य ध्येय असते. तो ऐकू आला की परमपुरुषाचा साक्षात्कार आणि त्याच्याशी तादात्म्य होते. एवढी या अनाहताची महती शास्त्र सांगते आणि योग्यांचे अन् संतांचे अनुभवही त्यास पुष्टी देणारेच आहेत.

भ्रमरगुंफा आणि सहस्त्रदल यांची सापेक्ष स्थाने::::

पथक्रमणा

आतापर्यंतच्या विवेचनातून एक मुद्दा थोडा संदिग्ध राहतो. तो म्हणजे ***भ्रमरगुंफा आणि सहस्त्रदलांची सापेक्ष स्थाने.*** आपण योगपथाचे आतापावेतो जे निरीक्षण केले त्यात काहींच्या मते भ्रमरगुंफेनंतर सहस्त्रदल असते, तर काहींच्या मते सहस्त्रदलानंतर भ्रमरगुंफा आहे. पण एकूण सम्यक विचार करता मला तरी उमजले आहे की भ्रमरगुंफेतच अंतिम अनुभूती आहे. ज्ञानदेवांच्या वर उद्धृत केलेल्या अभंगावरून याची पुष्टीही होते. काही स्थानांची अतिव्याप्ती सांगण्याच्या योग्यांच्या पद्धतीत सहस्त्रदल आणि आज्ञाचक्र यांच्यातला हा सगळा अर्धमात्रासंबंधित प्रांत निर्देशिला जातो. त्यांतून ही संदिग्धता निर्माण होते. संत जनाबाई भ्रमरगुंफेसंबंधी काय म्हणतात,ते पाहू:

रक्तवर्ण त्रिकूटस्थान। श्रीहाट पाहा श्वेतवर्ण।
श्यामवर्ण ते गोल्हाट। निळबिंदु औटपीठ।।३।।
वरी भ्रमरगुंफा पाहे। दशमद्वारी गुरू आहे।।
नवद्वारांतैं भेदूनी। दशमद्वारी गेली जनी।।४।।

या अभंगातून सहस्त्रदलाचा नामोल्लेख नाही. हा अर्धमात्रेतला योगपथ आहे - विहंगममार्गातला. तो असा सांगताहेत जनाबाईः ***"त्रिकूट -➢ श्रीहाट -➢ गोल्हाट -➢ औटपीठ -➢ भ्रमरगुंफा -➢ दशमद्वार(ब्रह्मरंध्र)."*** याच जनाबाई म्हणतात की ***"अनुहात घंटा श्रवणीं। ऐकुनी विस्मित जालीं जनी।।"***

आपण आतापर्यंत ज्या अनुभूती पाहिल्या त्या सगळ्या आहेत, पश्चिममार्गासंबंधी. पश्चिममार्गाबाबत एक सूचक अभंग आहे संत श्रीनामदेवांचाः

काळ देहासि आला खाऊं। आम्हीं आनंदें नाचूं गाऊं।।१।।
कोण वेळें काय गाणें। हे तो भगवंता मी नेणें।।२।।
टाळ मृदंग दक्षिणेकडे। माझे गाणे पश्चिमेकडे।।३।।
नामा म्हणे बा केशवा। जन्मोजन्मीं द्यावी सेवा।।४।।
।।अ.क्र.१६६४।।शास.गाथा।।

अनाहतनाद हा भगवंताची विभूती आहे. अनाहताबाबत एकनाथ सोळाव्या अध्यायात म्हणतातः

चंद्रसूर्यतारांच्या ठायी। जे तेज ते माझे पाहीं।
अनाहतशब्द तो मीही। जो गगनासीं कंहीं नातळे।।२६२।।

तसेच विसाव्या अध्यायात एकनाथांनी म्हटले आहे की, ***"ठाकतां सारुप्यादी बंदरें। तारुवामाजिं अति गजरें। लागलीं अनुहाताची तुरें। जयजयकारें गर्जती।।१८०।।"*** यात गुरू कर्णधार नरदेहाचे तारू सलोकतादी मुक्तीच्या बंदराला लावतो. तेव्हा अनाहतनाद प्रकट होतो. मुक्तीच्या अवस्थेत हा नाद प्रकटतो.

खेचरी मुद्रा

एकनाथी भागवतातील विसाव्या अध्यायातल्या *ओवी क्र.२५० ते २६८* यातून पुनः एकदा ते हा महायोगाचा पथ निर्देशितात. त्यात खेचरी मुद्रेचे लक्षण सांगत ते म्हणतातः

तो पवनाची करोनि पायरी। सुखें चालें गगनावरी।
या नांव परमखेचरी। सिद्धेश्वरीं बोलिजे।।२६५।।

त्यांच्या या अध्यायीच्या ओव्यांतून *(क्र.२५०ते २६८)* प्रकट होणारा योगपथक्रम असा आहेः

१) वैराग्य-विवेक २) यमनियम ३) आसन ४) मूलाधारमुद्रा

५) मूलाधार-स्वधिष्ठानातील अपान ऊर्ध्वमुख होऊन विशुद्धीचक्र ते अनाहत यांमध्ये असणाऱ्या प्राणांशी मणिपूर चक्रात मिळतात. तेथे त्यांचे समत्व वा सामरस्य होते. तसे झाले की स्थूल देहाचे म्हणजे पिंडाचे क्षालन आणि सूक्ष्म-कारण-महाकारणदेहांचे हणजे ब्रह्मांडाचे क्षालन होते; कफपित्तनाश होतो; नाडीशोधन होऊन संचित कर्माचा नाश होतो. वायू म्हणजे प्राण. सर्व कर्ममळाचा असा नाश होत असता रोग, महाविघ्ने, विकल्प व सिद्धी यांचे प्राकट्य होते. तरीही साधकाने स्थिर राहावे.

६) प्राणापान सम झाले की षट्चक्रे मावळतात.

७) कुंडलिनीजागृती होते आणि तिचा प्राणापानांसह सुषुम्नेत प्रवेश होतो. ती पश्चिमेचा घाट चढू लागते म्हणजे षट्चक्रांनंतरचा ब्रह्मरंध्राकडील प्रवास सुरू करते. थोडक्यात कुंडलिनीच्या ऊर्ध्वचालनाचा परिणाम असा होतो: ***"आधिव्याधी, विकल्प व महाविघ्नादींचा नाश होतो. -➢ काकीमुख (ब्रह्मरंध्राचे कपाट) उघडते. -➢ सहस्रदळावरून अमृताचा वर्षाव होतो (चंद्रामृत स्रवणे) -➢ कुंडलिनीचे गरळवमन (इंद्रियांस शक्ती प्रदान करणे) -➢ दिव्यदेहप्राप्ती -➢ खेचरीमुद्रा"***

यात आणि पूर्वी उल्लेख केलेले ***काकीमुख*** म्हणजे काय याचा विचार करता आज्ञाचक्रावरील ***मकाराची नड*** म्हणतात तेथून अमात्राप्रवेश होतो. **हा <u>आज्ञाचक्रानंतरचा *अर्धेंदु*चा मार्ग आहे. त्यालाच एकनाथ *काकीमुख* असे म्हणताहेत</u>.**

८) ***खेचरीमुद्रा*** म्हणजे काय ते आपण पाहिले आहे. पवनाची पायरी करून कुंडलिनी प्राणांसह सुषुम्नेत संचरून गगनमार्ग म्हणजे आज्ञाचक्रावरचा अवकाश क्रमून जाते. ज्ञानदेवही त्या वेळी तिला ***खेचरी*** असे म्हणतात ***(तैं तैं म्हणिजे खेचर।।२१६।।").***

संत गोरा कुंभारांचा खेचरीविषयक एक अभंग असा आहे:

निर्गुणाचे भेंटी आलो। सगुणासंगें।
तंव झालों प्रसंगीं गुणातीत।।१।।
मज रूप नाहीं नांव सांगू काहीं।
झाला बाई काहीं बोलों नयें।।२।।
बोलतां आपुली जिह्वा पैं ठाकलीं।
खेंचरी लागली पाहतां पाहतां।।३।।
म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी खेंचरी।
सुखासुखीं मिठिलीं पडलीं कैसीं।।४।।

खेचरीमुद्रा ही सगुणातून निर्गुणात होणाऱ्या स्थित्यंतरावस्थेची द्योतक आहे. नामरूपातीत गुणातीत अवस्था ही खेचरी लागल्यावरच होत असते. ***"यतो वाचा निवर्तन्ते"*** अशी स्थिती खेचरीमुळेच प्राप्त होते.

९) ***"आज्ञा -➢ खेचरीमुद्रेच्या योगाने पुढील प्रांत (गगन) क्रमणे -➢ काकीमुख -➢ औटपीठ -➢ गोल्हाट -➢ (सहस्रदल) -➢ भ्रमरगुंफा (शेवटची स्थिती) = (शिवशक्तीसामरस्य) = सोहंहंसाचे पीठ (परमात्मा) (सद्गुरू)"***

योगपथाचे हे असे अनेक निर्देश एकनाथमहाराजांच्या ग्रंथात आहेत. ते सगळे आपण इथे पाहू शकत नाही. जिज्ञासूंनी स्वतःच्या समाधानासाठी ते मूळ ग्रंथातूनच पाहावेत.

ज्योतिदर्शन

श्री.रामकृष्ण परमहंस म्हणत की जसजसा साधक पुढे जातो, तसतशी ईश्वराच्या ऐश्वर्यावरील त्याची रुची कमीकमी होत जाते. साधकाला प्रथम दर्शन होते दशभुजा ऐश्वर्यमूर्तीचे. त्या मूर्तीत ऐश्वर्याचा प्रकाश अधिक असतो. त्यानंतर द्विभुजा - त्या वेळी दहा हात नाहीत की अस्त्रशस्त्रांचे लटांबर नाही. त्याहीनंतर गोपालमूर्तीचे दर्शन. ऐश्वर्याचे नाव नाही. केवळ कोवळ्या मुलाची मूर्ती! यानंतरही एक अवस्था आहे. त्या वेळी फक्त ज्योतिदर्शन!

माझेही उपास्य होते दशभुज मूर्ती आणि नंतर द्विभुज पांडुरंग. त्याच्या हाती ना शस्त्र ना अस्त्र! आणि साक्षात्कारकाळात तर मला नित्यच रांगणारा बाळकृष्ण दिसत असे. त्यातच शेवटी शेवटी आज्ञाचक्रावरील ज्योतिदर्शनाची भर पडली. असा हा साक्षात्कार मी अनुभवला आहे.

विद्युद्रेखा व अष्टदलपद्म

श्री.गजानन महाराज गुप्ते यांच्या ग्रंथातली एक महत्त्वाची मला आलेली अनुभूती म्हणजे *पृ.क्र. १६ (तत्रैव)* मधील मथुरे प्रकरणातली. महाराजांनी मथुरेंना म्हटले होते की जेव्हा ध्यान परिपक्व होते, तेव्हा आत्मा ब्रह्मरंध्रात शिरण्यापूर्वी थोडा वेळ विजेच्या रेषेसारखा सुषुम्नेत कसा चढतो, ते दिसू शकते. पण तो इतका जलद जात असतो की पूर्ण लक्ष नसले, तर हे कळतही नाही. सूक्ष्म दृष्टीने पाहिले तरच तो दिसतो. माझा हाच अनुभव खाली दिलेला आहे.

एकदा मला एक पद्मासनस्थ योगी दिसू लागला. मी त्याच्याकडे पाहताच आमची दृष्टी एकमेकांत मिसळली. त्याने माझ्या भ्रूमध्यात आपली भ्रूमध्यदृष्टी मिळवली. आमच्या दोघांच्या भ्रूमध्यदृष्टींचे एकमेकीत जसे काही locking झाले होते. अकस्मात माझ्या भ्रूमध्यात एक तेजस्वी विद्युल्लतेसमान शुभ्र प्रकाश देणारा बिंदू दिसू लागला. त्या ठिकाणी बिंदूत तीव्र वेदना होऊ लागली.

बघताबघता त्यातून एक गतिमान शक्ती जी तशाच शुभ्र प्रकाशवर्णाची होती आणि आकाशातल्या वीजेच्या स्वरूपाची होती, ती निघून इंग्रजी आठाच्या आडव्या आकड्याच्या आकाराची (8) काही चक्राकार वळणे अति शीघ्रगतीने त्या बिंदूभोवती घेत घेत अंती त्या बिंदूतून पुढे मस्तकसंधीकडे ज्याला ***तारकस्थान*** म्हणतात, तेथपर्यंत जाऊन पुढील आसमंतात दिसेनाशी झाली.

ही ललाट व गोल्हाटचक्रासंबंधित अनुभूती होती. आज्ञाचक्राच्या वर चार अंगुले ललाटचक्राचे स्थान असते. त्याहीवर गोल्हाट असते. सर्व जीवांना याच्यामुळे आपल्या व्यक्तित्वाची जाणीव सांभाळता येते.

भ्रूमध्यस्थ तेजोबिंदूतून वर चढतांनासुद्धा भ्रूमध्यस्थानात पुनः एकदा जोराने टोचल्यासारखे दुखले. तो भ्रूमध्यस्थ बिंदू हा त्या आठाच्या आकड्याच्या दोन्ही पाकळ्यांचा मिलनबिंदू होता जेथून त्या दोन्ही पाकळ्या जेथपावेतो पापण्या कानशीलाला मिळतात, तेथपावेतो गेल्या होत्या. हे वेढे इतक्या शीघ्र गतीने घेतले गेले होते की ते किती आहेत, ते पटकन कळत नव्हते. ते तीन किंवा चार असावेत असे मला जाणवले. अष्टदलकमलाचे ते निदर्शक असून ते खरेखुरे ***अष्टदलकमल*** होते.

नारायणोपनिषदात या प्रकारची अनुभूती पुढील शब्दांत दिली आहे. ***"तस्यमध्ये वह्निशिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थिता। नीलतोयद्मध्यस्था विद्युल्लेखेव भास्वरा।। नीवारशूकवत्तन्वी पीता भास्वत्यणूपमा। तस्या शिखाया मध्ये सः परमात्मा व्यवस्थितः।।"***- अग्निज्वाळेसम प्रकाशमान अत्यंत सूक्ष्म विद्युद्रेषा असे हे आत्मदर्शन असते. त्या शिखेमध्ये म्हणजे विद्युद्रेषेत परमात्मा अवस्थित असतो. श्वेताश्वतरोपनिषदात या दर्शनासच ***अव्ययज्योतिदर्शन*** ***("ज्योतिरव्ययः।।३-१२।।")*** असे म्हटले आहे. निवृत्तिनाथांनीही आपल्या एका अभंगात ***"सर्व घटीं वसे तो आत्मा प्रकाशे। प्रत्यक्ष आम्हा दिसे गुरुकृपा।।"*** असे म्हटले आहे.

पूर्ण ईश्वरभक्त झाल्याशिवाय हा आत्मा दिसत नाही. हे दर्शन झाले की साधक सच्चिदानंद परमेश्वराशी एकरूप होतो. स्थूल दृष्टीने तो पाहता येत नाही, तर त्यासाठी अंतर्दृष्टी हवी. ज्ञानचक्षूंनीच तो पाहता येतो. अहंकार गलित झाल्याशिवाय त्याचे दर्शन नाही. हे दर्शन झाले की त्या साधकाचे ऐहिक जीवन दुसरे तिसरे काहीच नसून केवळ ब्रह्मरूपच असते. गाढ झोपेतले सुख अनुभवणे आणि ते नंतर सांगणे हे जसे घडते, त्याच प्रकारे मनुष्य हा ईश्वरसाक्षात्कार अनुभवून तो जागृतीत सांगू शकतो.

हृत्संवित्कमल आणि उन्मनीमहामुद्रा

या अष्टदलकमलालाच ***हृत्संवित्कमल*** असेही म्हणतात. छांदोग्य उपनिषदानुसार हे दहराकाशात असते. हेच हंसोपनिषदातील ***अष्टदलकमल*** होय. याचा त्याग करून त्याच्याहीवर कुंडलिनीने गती घेतली तर ***तुरिया समाध्यवस्था*** प्राप्त होते, असे श्री.विष्णुतीर्थमहाराजांनी त्यांच्या ***सौंदर्यलहरी***वरील टीकाग्रंथात म्हटले आहे. माझ्या उक्त अनुभूतीत मी हे कमल पार केले आणि त्याहीवरच्या अवकाशात - **तारकब्रह्मा**च्यावर गेलो.

पं.गोपीनाथ कविराज यांच्या मते दोन्ही *(दिव्य)* नेत्रांत मिळून आठ अवयव असतात. त्यांना ***अग्रनख*** म्हणतात. हेच अष्टदलकमल होय. ***तृतीय नेत्र*** अथवा ***सुरति /ज्ञाननेत्र*** याच्याकडे वळवला असता ***उन्मनी महामुद्रा*** प्राप्त होते. या मुद्रेत मन स्थिर होते.

याच उन्मनी महामुद्रेचा संकेत मला आलेला अष्टदलकमलाचा अनुभव सूचित करत होता. याला मनश्चक्र पण म्हणता येते. उन्मनीप्राप्ती ही स्थिती सहस्त्रदलकमलानंतरची आहे. माझा नंतरचा अनुभव भ्रमरगुंफा व तदनंतरचा काळ्या पुरुषाचे दर्शन हे ऊर्ध्वसहस्त्रारसंबंधित *(असंख्यदलांचे कोल्हाटचक्र किंवा दिव्य सहस्त्रारसंबंधित)* आहेत. या दिव्य सहस्त्रारात तेहतीस कोटी देवांचा प्रकाश असतो.

या अनुभूतींनंतर नेहमी ललाटस्थानी दृष्टी एकाग्र होत असे. काहीही करत असले तरी त्या स्थानाची सहज जाणीव असे. ललाटचक्रावर ही स्थिती राहत असे. ***"आज्ञाचक्र ⇨ ललाटचक्र सहस्त्रार ⇨ निर्वाणचक्र"*** असा योगपथ तेथे आहे.

मस्तकसंधी

फार फार पूर्वी कोणतीही विशेष योगानुभूती नसतांना मला मस्तकसंधीतून एखादे प्रक्षेपण करावे तसे तीव्र स्पंदन व संवेदन होत असे. ***"ललाट ⇨ ललाटसंधी ⇨ मस्तक ⇨ मस्तकसंधी ⇨ टाळू ⇨ ब्रह्मरंध्र"*** असा हा प्रांत आहे. याच प्रांतातल्या मस्तकसंधीतून हे जोरदार प्रक्षेपण होत असे. एका अघोरी दांपत्यास हे कळल्यावर ते ते प्रक्षेपण

बंद करण्याच्या प्रयत्नात होते. हे प्रक्षेपण म्हणजे फार पूर्वीपासून माझी कुंडलिनीशक्ती मस्तकसंधीत असल्याची खूण होती. ती पुढचा मार्ग चढू पाहात होती. त्यामुळेच या लहरी निर्माण होत होत्या. कदाचित जन्मजातच ती स्थिती असावी.

सहस्त्रदलकमल वा शून्यचक्र

नाना रंगांच्या प्रकाशाने युक्त असे सहस्त्रदलांचे हे कमल तालुच्या वरती मस्तकातील ब्रह्मरंध्रावर सर्व शक्तींनी युक्त असे असते. सहस्त्रारचक्रात प्राण व मन स्थिर झाले की सर्व वृत्तींचा निरोध होऊन असंप्रज्ञात समाधिस्थिती होते. सहस्त्रदलात जाऊन साधक मुक्त होतो.

मला याचे दर्शन अनेकरंगी पूर्णचंद्राकृती आणि बाजूला शुभ्रवर्ण चंद्रकोर या प्रकारचे झाले होते. त्याच्या केंद्रात एक शून्य दिसत होते. खालून किंवा वरून पाहावे असे ते भासत होते. हे खरे तर असंख्य पाकळ्यांचे कोल्हाटचक्र होते. यालाच *दिव्य ऊर्ध्वसहस्त्रार (सुवर्णकमळ-२)* असे आपण म्हणत आहोत.

भ्रमरगुंफा, सहस्त्रदल व ब्रह्मरंध्र

साधारणपणे सहा वर्षांपूर्वी मी काही विशेष अनुभव घेतले. ते साधारणपणे एका वर्षाच्या फरकाने होते.

पहाटे पहाटे मला दिव्य अवकाशात जागृती आली. मी एका सुवर्णकमळात होतो. जाणवले की हे तेच कमळ आहे. आजूबाजूला पाहाता गडद छटेची दिव्य सुवर्णमय आभा दिसत होती. आसमंतच सुवर्णमय होता. तो सुवर्णवर्ण आल्हाददायक होता.

एकदा माझ्या मोठ्या मुलीने मला एक चंदनी गणपती बंगलोरहून आणून दिला होता. तो हातात घेताच खालपासून वरपर्यंत उजळून जात प्रकाशमय शुभ्र संगमरवरी वर्णाचा होतांना दिसला होता, त्या शुभ्र वर्णाचीच अशा सुवर्णमय कांतीत परिणती झाली असावी.

त्यात केंद्रस्थान समजावे अशा ठिकाणी एक दिव्य वस्तू होती. त्या वस्तूचे आकारमान भुंगा किंवा छोटे अर्धवट उमललेले गुलाबपुष्प असावे तसे होते. ती सतत कंपन पावत होती. एखाद्या कलिकेत भ्रमर अडकून पडावा आणि त्याने तिच्यात गुंजारव करावा तशा कलिकेची होतील अशी कंपने त्या वस्तूची होत होती. ती पण सुवर्णमय आभेची होती. प्रकाशमय होती. पण तो प्रकाश तिच्या सुवर्णमय आभेतून आणि आतूनही यावा असा होता. अंगुष्ठमात्र पुरुषाप्रमाणे ती होती.

हिरण्मय असा भ्रमर, छोटे पुष्प, कलिका, पिंडी अशी ती वस्तू दिसत होती. दुसऱ्या दिवशी लोकसत्तेत कमलासनस्थ अशा सुवर्णवर्ण गणेशाचे चित्र आले होते. तशी ती वस्तू भासत होती. एकाच वेळी भ्रमर व अर्धोन्मिलीत कलिका अशी व भ्रमर गुंजारव करत असतांना एकाच जागी स्थिर असूनही जसा थरथरतांना दिसतो तशी ती वस्तू दिसत होती. थोडक्यात ती दिव्य हिरण्मय वस्तू स्पंदमय होती.

It was all quiet around. There was lucidity in the picturesque scene. The mind was fully at peace, without anxiety, fear, rush and other plethora of feelings. It was in a transcendental state, riveted upon this Divine Thing which it beheld. When that thing was taken into the fold of the hands, it did not manifest as any earthly one or with any mass, weight, matter or any other grossness.

It was purely Ethereal and the surrounding Golden Glow and the Golden transparent wall-like petals of it did not have any corporeal or material elements within them. The Golden hue, the Golden Vase or the Golden Lotus or the surrounding enclosure was limitless - it was not an enclosure truly speaking, not an enclosure at all, but a very vast space (which appeared say like fog in the surroundings) which was somewhat appearing limiting the space up to a distance as beyond it lay the vast expance which was filled with the Golden Light everywhere obliterating the expanse beyond and thus making the space,though limitless, to appear limited.

The Golden hue was in all the directions, including up and down. The Light was very very soft like full Moon night but it was much more luminescent.

ती वस्तू त्या अवकाशात अधांतरी होती. लांबून ती मोठी दिसत होती. पण हातांच्या ओंजळीत घेते वेळी तिचा आकार तळव्याच्या ब्रह्मतीर्थाएवढा झाला. ती वस्तू हातात पळभरच राहिली. मनात शब्द उमटले, "हे ब्रह्मकमल आहे." आपण त्यातच आहोत असे जाणवले. असे शब्द उठताच आणि ती वस्तू हातात घेतली न घेतली तोच ती व हातांसह स्वतः असा तो सर्व दिव्य अवकाश विलीन होऊन पूर्ण जागृती आली. वस्तूकडे आकर्षित होऊन त्या दिव्य अवकाशात दोनतीन पावले पुढे जाऊन ती हातात घेण्याची कृती घडली होती.

वस्तू हातात आल्याचे corporeal feeling आलेच नाही. मीही नव्हतो. सर्व आसमंत प्रकाशाचाच होता. मी, हात, ती वस्तू आणि ते पद्म (त्या पद्माचा अंतपार लागत नव्हता) सगळे प्रकाशच प्रकाश होते. प्रकाशाने प्रकाशासच ओंजळीत घ्यावे तशी ती वस्तू हातांनी हातात घेतली.

ती वस्तू म्हणजे हंस, परमहंस, ज्योती, परब्रह्म. परिसर मानससरोवराचा. आणि पुष्पात मकरंद चाखणारा

भ्रमर आणि पुष्पाचे स्पंदन अशी ती वस्तू ही सगळी अक्षराची प्रतीके होती.

माझे सगळे लक्ष त्या दिव्य हिरण्मय वस्तूकडे लागले होते. ती दिव्य वस्तू हातात घ्यावी असे वाटून ती हातात घेतली. एखादे उडणारे फुलपाखरू हलक्या हातांनी दोन्ही हातांच्या ओंजळीत घेऊ जावे, तशी ती अर्धवट मिटलेल्या ओंजळीत घेतली गेली. ती हाती घेताच अत्यंत आनंद आणि शांतीचा अनुभव झाला. हे सुवर्णकमलातील इष्ट देवता दर्शन ध्येयप्राप्तीचे निदर्शक, परमशिव व शक्तीचे मिलन यांचा संकेत दर्शवणारे दृश्य होते.

सतत आंदोळणारी ती दिव्य वस्तू हे भ्रमरगुंफेतल्या अनाहतनादाचे एक प्रतीकही होते. दिव्य सहस्त्रारात म्हणजे आपल्या मते असंख्यदल कोल्हाटचक्रात हा नाद असतो. तिथेच परमात्मा वसतो. ज्ञानदेव हा अनाहत केव्हा प्रकट होतो, ते एका अभंगातून सांगतात, तो असा:

आकाश हें असे माझें शिर बापा।
कर्ण दिशा चिद्रूपा नाद उठती। ।१।।
आधारापासूनि सहस्त्रदळावरी।
निःशब्द निरंतर नारी एक। ।२।।
ज्ञानदेव म्हणे अनुभव ऐसा जेथें।
तोचि जीवन्मुक्त संत योगी।।३।।अ.क्र.७१८।।

"योग्याचे शिर हे आकाश म्हणजे गगन असते. त्यात दिशारूपी अतींद्रिय कर्णांना चिद्रूपाचा नाद ऐकू येतो. ***मूलाधारचक्रापासून तो थेट सहस्त्रदळ चक्र यांच्यात अनाहतनाद नसतो, तर एकलीएक निःशब्द असणारी कुंडलिनीच तिथे विराजते.*** चिद्रूपात स्थिती झाल्याशिवाय नाद ऐकू येत नाही. जीवन्मुक्ताची हा अनाहतनाद हीच खरी ओळखण आहे."

या अभंगातून ज्ञानदेवही अनाहतनादाभिव्यक्तीचे स्थल मूलाधार ते सहस्त्रदळ नसून त्याच्याहीवर असणाऱ्या आकाशात नाद उठतो आणि तो चिद्रूपाचा नाद योगी अनुभवतो, असे स्पष्ट म्हणत आहेत.

सुवर्णकमल

असो. माझ्या अनुभवाकडे वळू या. ***आज्ञाचक्र*** (शुभ्रवर्णाचे) ते ***ब्रह्मकमल*** (सुवर्णमय आभेचे) अशा अवस्थांतराचे त्याद्वारे निर्देशन होत होते. सुवर्णकमल कर्णिका मूर्ध्नीकडे होती की खाली, कमळ उलटे होते का सुलटे हे न जाणवता त्याची आभा व अति दिव्य द्रव्याच्या प्रकाशासमान पारदर्शक दिसणाऱ्या पाकळ्या केंद्राच्या वर व खाली दोन्हीकडे होत्या. त्यावरून ते सहस्त्रारपद्म आणि त्याहीवरील कोल्हाटचक्रपद्म असे मिळून झाले होते. त्यांच्या कर्णिका एकमेकांत मिळालेल्या असतात. कर्णिकेला जोडून एक कमळ वर अन् एक कमळ खाली असावे अशी त्यांची ब्रह्मांडातली स्थिती असते.

काही काही योग्यांना फक्त खालच्याच पद्माचे म्हणजे सहस्त्राराचे दर्शन होते. तर काहींना मात्र ही अशी दोन सहस्त्रारसदृश पद्मे असल्याचे दसते. एक पद्म खालचे तर एक वरचे. कोल्हाटचक्राला असंख्य पाकळया असतात, तर सहस्त्रदलाला सहस्त्रावधि. अनुभूतीच्या दृष्टीने पाहिले तर दोन्ही पद्मे सारखीच वाटतात. फक्त त्यांची कर्णिका मूर्ध्नीकडे आहे की सुषुम्नापथाकडे खालच्या बाजूला आहे, एवढाच फरक असतो. आणि तोही जर दोन्ही पद्मांचे एकत्र दर्शन झाले तर कळून न येता मला दिसले तसे दर्शन होते.

नित्यानंदांच्या परंपरेतील एका माहितीच्या सद्गुरूंना त्यातले वरचे पद्म दिसले होते, तर त्यांच्या गुरूंना खालचे पद्म दिसले होते. परमगुरूंना म्हणजे नित्यानंदांना मात्र वरच्या पद्मात स्थिती होती आणि त्यांनी तेथेच स्थिती घे, असे त्यांच्या प्रशिष्याला मार्गदर्शन केले होते, याची मला कल्पना आहे. ही यौगिक वार्ता मला माझ्या या दर्शनानंतर चारएक वर्षांनी कळली.

हा वरचा अंतिम यौगिक पथ ***"ऊर्ध्वसहस्त्रार (नेहमीचे सहस्त्रारपद्म) ⇨ ब्रह्मरंधस्थ (जीवपरमात्मऐक्यस्थान वा भ्रमरगुंफा) ⇨ दिव्य सहस्त्रार (कोल्हाटचक्र वा असंख्य पाकळ्यांचे कमल)"*** असा असल्याचे माझ्या अनुभवावरून मी सांगतो आहे.

आपण पाहिलेच आहे की ही सुवर्णकमळे दोन असतात. मला झालेले दर्शन दोन्ही सुवर्णकमळे मिळून होते.

सुवर्णकमळ (१) - मूर्ध्नीवर उपडे पडलेले दाखवतात, ते हेच कमल होय. त्याचा देठ आकाशाकडे असतो आणि पाकळ्या मस्तकावर उपड्या असतात. यालाच सगळे ***सहस्त्रदलपद्म, सहस्त्रारचक्र*** या नांवानी ओळखतात. हे ब्रह्मरंध्राच्या अलीकडे स्थित असते. त्याच्या कर्णिकेवर किंवा कर्णिकेत ब्रह्मरंध्रस्थान असते. आज्ञाचक्रानंतर त्रिकुटीच्या अलीकडे सहस्त्रदलकमल असते आणि त्रिकुटीपुढे भ्रमरगुंफा व कोल्हाटचक्र असते. ***"आज्ञाचक्र ⇨ सहस्त्रदल(१) ⇨ त्रिकुटी ⇨ ब्रह्मरंध्र ⇨ भ्रमरगुंफा"*** असा योगपथ आहे.

सुवर्णकमळ (२) - हे मूर्ध्नीवर उभे असे असते. त्याचा देठ डोक्याकडे असतो आणि पाकळ्या आकाशाकडे

असतात. हे ब्रह्मरंध्रानंतर भ्रमरगुंफेच्याहीपुढे शिखास्थानी कोल्हाटचक्री असते. हे निराकार ब्रह्मांडाचे अवबोधक स्थान आहे. सत्यलोक, अलक्ष्य लोक यांपुढील अनामी लोकाचे हे स्थान आहे. परमसंतांचे स्थान आहे. ***"आज्ञाचक्र ⇨ सहस्त्रदल(१) ⇨ त्रिकुटी ⇨ ब्रह्मरंध्र ⇨ तालुचक्र (परमशून्य)⇨ भ्रमरगुंफा ⇨ (कोल्हाटचक्र-असंख्यदलकमल) = (शिखास्थान) = सहस्त्रदलपद्म (२)"*** असा हा योगपथ आहे.

या दोन्ही कमळांची सुवर्णमय आभा एकमेकात मिसळते. दोघांचे देठ एकमेकांपेक्षा वेगळे दिसतही नाहीत कारण ब्रह्मरंध्रातल्या सूक्ष्म अवकाशात ते अवस्थित असतात, एकूण दृश्य असेच दिसते की दोन्ही कमळे असण्याऐवजी एकच कमळ असून त्याच्या पाकळ्या ऊर्ध्व व अध अशा दोन्ही दिशांकडे फैलावलेल्या आहेत. थोडक्यात म्हणजे दोन कमळे त्यांचे देठ कापून त्या देठांच्या बाजूला वरखाली चिकटवली तर जशी दिसतील तसे या दोन्ही कमळांचे मिळून दर्शन होते.

अर्थातच ज्या भाग्यवंताला वरच्या सुवर्णकमळात जायला मिळते त्यालाच ही कल्पना येते. अन्यथा खालच्या सुवर्णकमळात पोहोचलेल्यांना त्याचा देठ आकाशाकडे असल्याचेच फक्त कळते. ***कोल्हाटचक्र*** हे ***गोल्हाट*** म्हणूनही अतिव्याप्त यौगिक संज्ञांत ओळखले जाते. याच अर्थी ज्ञानदेवांच्या अभंगात ***"गोल्हाटाचे मुळी ज्ञानदेव बैसला। सहस्त्रदळीं शोभला काळा बाई।।"*** असे म्हटले आहे.

जे हे वरचे ***कोल्हाटचक्र*** सांगितले ज्याला ***ऊर्ध्वमुख किंवा दिव्य सहस्त्रारकमल*** असेही काही म्हणतात, त्यात ***उन्मनी कला*** वसते. दशमद्वारी ब्रह्मरंध्रात नादाचा प्रकाश व बिंदु असतात. या अवस्थेत ***"ज्योति = प्रकाश = नाद = बिंदू".*** थोडक्यात ती नादबिंदूकलातीत अशी ***"नेणे नादबिंदूकलाज्योति"*** अशी ज्ञानेशांनी म्हटलेली अवस्था असते. यापुढे योगपथ नाही, तो इथेच संपतो. हा आसमंत मात्र अति विशाल, अनंतच म्हणा, व्याप्तीचा असतो. मला हे अंतिम ध्येय साध्य झाल्याची खूण म्हणून हे दर्शन झाले होते.

या अनुभूतीची अजूनही एक विशेष ओळखण सांगितल्याशिवाय तिचे हे विश्लेषण पूर्ण होणार नाही. श्रीमद्भागवतात मार्कंडेय ऋषींच्याबाबतचा एक प्रसंग आहे. त्यात ते भगवंताला आपली माया मला दाखव असे विनवतात. नंतर घडणाऱ्या प्रसंगात ते एक विश्वप्रलय अनुभवतात. त्यातून ते कसेबसे सावरतात. या प्रसंगावर भागवताचे काही विशेष उल्लेखनीय श्लोक असे आहेत:

न्यग्रोधपोतं ददृशे फलपल्लवशोभितम्।।१२-९-२०।।
प्रागुत्तरस्य शाखायां तस्यापि ददृशे शिशुम्।
शयानं पर्णपुटके ग्रसन्तं प्रभया तमः।।२१।।

त्यांना एका वडाच्या झाडाच्या एका फांदीवर एका पानावर सुशांत झोपलेले एक सुंदर दिव्य दैदिप्यमान अर्भक दिसते. भोवतालच्या प्रलयजळाच्या लाटांवर ते त्या पानासह आंदोळत होते.

महामरकतश्यामं श्रीमद्वदनपङ्कजम्।
कम्बुग्रीवं महोरस्कं सुनासं सुन्दरभ्रुवम्।।२२।।
श्वासैजदलकाभातं कम्बुश्रीकर्णदाडिमाम्।
विद्रुमाधरभासेषच्छोणायितसुधास्मितम्।।२३।।
पद्मगर्भारुणापाङ्गं हृद्यहासावलोकनम्।
श्वासैजब्दलिसंविग्ननिम्ननाभिदलोदरम्।।२४।।

त्याच्या द्युतीने आजूबाजूचा घोर अंधार दूर झाला होता. त्याची कांती मरकतमण्याप्रमणे तेजस्वी श्यामल होती. मुखकमल सौंदर्याने डंवरलेले होते. मान शंखासारखी सुरेख होती. छाती रुंद होती. पोपटाच्या चोचीसारखे नाक आणि मनोहर भुवया होत्या. गूंजेसारखे लाललाल ओठ आणि त्यांच्या आभेमुळे त्याचे लोभस स्मितहास्य त्याच्या मुखकमलावर रक्तिमा पसरवत होते.

शंखाकृती कानात घातलेली डाळिंबाची छोटीछोटी लाललाल फुले शोभून दिसत होती. डोळ्यांचे कोपरे कमळातील अंतर्भागाप्रमाणे किंचितसे लालसर होते. त्याचे मुखकमल आणि हास्य विलोभनीय होते. नवजात पिंपळपानासारखे दिसणारे त्याचे उदर सारखे श्वासोच्छ्वासाबरोबर नाजूकपणे वरखाली होत होते. त्याच्या इवलाल्या हातांची बोटे सुंदर दिसत होती. काळेकुरळे केस त्याच्या कपालावर आणि मानेवर रुळत होते.

चार्वङ्गुलिभ्यां पाणिभ्यामुन्नीय चरणाम्बुजम्।
मुखे निधाय विप्रेन्द्रो धयन्तं वीक्ष्य विस्मितः।।२५।।

त्याने आपल्या दोन्ही हस्तकमलांनी एक पदकमल धरला होता आणि त्या पदकमलाचा देखणा अंगठा तोंडात घालून ते बाळ अंगठा चोखत मजेत पहुडले होते.

त्याच्या श्वासाबरोबर मार्कंडेय ऋषी त्याच्या शरीरात ओढले जातात आणि तेथे सर्व विश्वाचे दर्शन करून त्याच्या उच्छ्वासाबरोबर पुनः बाहेर येतात.

तस्मिन् पृथिव्याः ककुदि प्ररूढं
वटं च तत्पर्णपुटे शयानम्।
तोकं च तत्प्रेम सुधास्मितेन
निरीक्षितोऽपाङ्गनिरीक्षणेन।।३१।।
अथ तं बालकं वीक्ष्य
नेत्राभ्यां धिष्ठितं हृदि।
अभ्ययादतिसंक्लिष्टः
परिष्वक्तुमधोक्षजम्।।३२।।
तावत् स भगवान् साक्षाद् योगाधिशो गुहाशयः।
अन्तर्दध ऋषेः सद्यो यथेहानीशनिर्मिता।।३३।।

त्या अर्भकाकडे त्यांची दृष्टी जाते, तेव्हा ते त्यांच्याकडे पाहून गोडसे स्मित करते. त्या हृदयंगम शिशुमुळे मोहून गेलेले ते त्याला जवळ घ्यावे या इच्छेने हात पुढे करतात, तोच ते भगवत्स्वरूप अर्भक अंतर्धान पावते. ते बाळ म्हणजे साक्षात भगवंत असतात.

या प्रसंगात आणि माझ्या अनुभूतीत असणारे साम्य म्हणजे ती सुवर्णकमलातील भ्रमरसदृश आंदोळणारी वस्तूही त्या बालकाप्रमाणेच आंदोलत होती, तितकीच मोहक अन् सुंदर होती आणि मी तिला जशी हातात घेतली तत्क्षणीच एक सुशांत प्रेमानंद मला देऊन ती वस्तू त्या सुवर्णकमलासह अदृश्य झाली. म्हणून म्हणावे तर हे मला झालेले त्या वटपत्रस्थ शिशु भगवंताचे मोहक दर्शनच होते!

गोल्हाट आणि योगासनस्थ काळा पुरुष

अष्टदलपद्मदर्शन झाल्यानंतर दोनेक वर्षांनी आणि सहस्त्रारचक्र आणि कोल्हाट चक्रांच्या दर्शनाचा प्रसंग होऊन गेल्यानंतर साधारणपणे एकाध वर्षानी मला पुनः एकदा तो अष्टदलप्रसंगातला योगी दिसला. तो ध्यानस्थ बसला होता. तो काळ्या वर्णाचा होता. काळा म्हणजे काळाकुट्ट नव्हे, तर श्यामल तेजस मेघांच्या वर्णाचा होता.

मी त्याच्यामागून अर्धा फेरा घालून त्याच्या समक्ष आलो. हा अर्धा फेरा बंकनाल नाडीचा निदर्शक आहे. त्याच्याकडे पाहताच पूर्वीप्रमाणेच भ्रूमध्यात दृष्टीचे locking होऊन मी त्याच्यापुढे साष्टांग नमस्काराच्या स्थितीत पडलो. पाहता पाहता माझ्या मेरुदंडाच्या टोकातून ज्याला coccix म्हणतात, त्यातून शक्तीचा मोठा स्त्रोत निघून तो मेरुदंडातून वर चढला आणि ब्रह्मरंध्रस्थानी जाऊन पोहोचला. तो अत्यंत शीघ्रगतीने वर चढला. पळभरात ही क्रिया घडून आली.

तसे होताच मला समाधिसदृश आत्मविभोर अवस्था प्राप्त झाली अन् त्या अवस्थेत मी किती काळ होतो, त्याचे काहीही भान राहिले नाही. अगदी मृत्यूच असेल म्हणाना! पण त्यानंतर घोड्यांच्या टापांसारखा आवाज येऊन मी हळूहळू भानावर आलो. तो आवाज माझ्या स्वतःच्या हृदयाच्या ठोक्यांचा होता, असे मला जाणवले. पण हे आपले ठोके आपण कधी ऐकतो का?

अनाहतनादात परत आणून सोडल्यामुळे तो आवाज येत होता. अत्यंत supreme trance अशी ती अवस्था मी अनुभवली आहे. Loss of consciousness - जाणिवेचा अतिलय होऊन मूलाधारातून कुंडलिनी निघून सरळ कोणतीही चक्रे इ.तून न जाता सहस्त्रारादी पार करून ब्रह्मरंध्रावरील अवकाशात गेल्यावर आलेला out-of-body experience असा तो अनुभव होता.

नंतर ज्ञानदेवांचा ***"जागृति स्वप्न सुषुप्ति जेथे उद्भव तिचा। योगिराम ज्याचा अधिकारी।। गोल्हाटाच्या मुळी ज्ञानदेव बैसला। सहस्त्रदळी शोभला काळा बाई।।"*** हा अभंग वाचल्यावर आपली अनुभूती हीच होती असे लक्षात आले. दोनदा दिसलेला हा काळा योगिपुरुष कोण हे रहस्यही उलगडले! ***"आप आपणासी पाहे"*** - योग्याला स्वतःचेच दर्शन होते, असे सांगितले आहे. ही अनुभूती हे खरे असल्याचे स्पष्ट करत होती.

काळा पुरुष व नाद

कृष्णाताईंच्या त्या प्रसंगात जेव्हा मी त्या सावळ्या मनमोहन कृष्णाला आलिंगन दिले होते, तेव्हा मला सतत मोठमोठ्याने घंटानाद ऐकू येत होता. अनाहताचा तो नाद कितीतरी वेळ घुमत होता.

मी १९९१मध्ये पंढरपुरला पहिल्यांदाच गेलो होतो. तिथे मला आलेले अनुभव विशेष होते. पांडुरंगाशेजारी बराच वेळ बसायला मिळाले. त्याचा प्रसाद बडव्याने अत्यंत भारावलेल्या अवस्थेत मला दिला, इ.गोष्टी लक्षणीय होत्या. मुख्य म्हणजे मी पांडुरंगाचे दर्शन होताच फारच भारावून जाऊन त्याच्यापुढे कितीतरी वेळ लोटांगण घातलेल्या उन्मनी स्थितीत पडून होतो. तेव्हाही अनाहताने टीपेचा आवाज गाठला होता. तिथल्या बडव्यांनीही मला तसेच पडून राहू दिले. अन्यथा ते इतरांना हाकलून लावत असतात. ***संतांना गवसलेला प्रत्यक्षातला काळा पुरुष तो हाच!*** पांडुरंग ही त्याचीच तर जागृत प्रतिमा आहे. नंतर मला त्याचेच योगानुभूतीत दर्शन झाले, कसे ते सांगितलेच आहे.

त्या काळ्या पुरुषाबद्दल - या पांडुरंगाबद्दल ज्ञानदेव काय म्हणतात पहा:

दिव्यरूप चक्षू कशापरी जाहाला।
ठंसा हा उमटला कवण्यापरी।।१।।
चहूं देहांचा वर्ण अवर्ण देखिलें।
विश्व म्यां पाहिलें तयामध्ये।।२।।
ज्ञानदेओ म्हणे सर्वांचे जे मूल।
सत्रावी केवल शुद्धरूप।।३। ।अ.क्र.७६९।।

"मी दिव्य चक्षूने त्या काळ्याचे रूप पाहिले. त्याच्यामध्ये मी विश्व पाहिले. सगळ्या विश्वाचे ते मूळ आहे. तो काळा पुरुष म्हणजे साक्षात ***सत्रावी कला*** आहे."

गुजगुजीत रूप सांवळे सगुण।
अनुभवतां मन वेडें होय।।१।।
भ्रमरगुंफा ब्रह्मरंध्र तें सुरेख।
पाहतां कौतुक त्रैलोक्यीं।।२।।
आनंदस्वरूप देखिलें प्रसिद्ध।
निजरूप संचलें सर्वांठाईं।।३।।
ज्ञानदेओ म्हणे या सुखाचि गोडी।
अनुभवचि आवडीं सेवि।।४।।
अ.क्र.७७२।।

ज्ञानदेव म्हणतात की ब्रह्मरंध्र आणि भ्रमरगुंफा यांच्याठायी जे गुजगुजीत सांवळे रूप दिसते, ते पाहून मन वेडं होतं. तेच तर प्रसिद्ध आनंदस्वरूप आहेजे निजरूपाने सर्वांठायी संचलेले आहे. त्या काळ्याचे सुख अवीट आहे." हे रूपदर्शन होते, तिथल्या परिसराचे ***"ब्रह्मरंध्र आणि भ्रमरगुंफा"*** असे निर्देश या अभंगातून आहेत. ***"गोल्हाटाच्या मुळीं ज्ञानदेओ बैसला। (अ.क्र.७६७)"*** या ओवीतून हे रूप जिथे असते तिथे गोल्हाटचक्रही नजिकच असते, असे आपण पाहिलेच आहे.

काळा पुरुष तो हा गगनांतैं जो नांदें।
अनुभवाचां भेदें भेदिला जो।।१।।
भेदूनि अभेद अभेदूनि भेद।
सच्चिदानंद जेथ नाहीं।।२।।
ज्ञानदेओ म्हणे तेथे अक्षय्य राहिला।
आत्मा म्यां पाहिला या दृष्टीसि।।३।।
अ.क्र.७७०।।

"हा काळा पुरुष गगनात नांदतो. सच्चिदानंद पदाच्याही पलीकडे तो आहे. ज्ञानदेव त्या पुरुषात अक्षय्य होऊन राहतात. त्यांना आत्माच दृष्टीने पाहायला मिळतो आहे त्या काळ्या पुरुषाच्या रूपे!" हा काळा पुरुष खरा कोण आहे, ते ऐका:

विश्व ब्रह्म भासे ऐक्य येतां देहीं।
अनुहातिं पाहीं अपार नाद।।१।।
देखिला परि संयोगें व्यापिला।
विश्व तरीच जाहाला बाईयांनो।।२।।
पिंडब्रह्मांडाचा विस्तार विस्तारिला।
माझा मीच जाहाला कोणापरी।।३।।
ज्ञानदेओ म्हणे या अर्थाची सोय।
धरी माझे माय मुक्ताबाई।।४।।अ.क्र.७७१।।

"सामरस्य होताच योगी विश्व आणि ब्रह्माचे ऐक्य पावतो. तेव्हाच त्याला अनुहात नाद प्राप्त होतो. तो काळा पुरुषच विश्व झाला आहे. त्यानेच हा पिंड आणि ब्रह्मांडाचा विस्तार केला आहे. तो आहे तरी कोण? मुक्ताबाई! मीच तो आहे, हे लक्षात आहे ना?"

तो काळा पुरुष म्हणजे योगी स्वतःच असतो. स्वतःचेच रूप तो असे पाहतो आणि त्याबरोबर त्याच्यात लीन होऊन जाऊन उन्मनीत रंगून जातो, असे ज्ञानदेवांचे ही योगानुभूती घेणाऱ्यांना सांगणे आहे. योगी जेव्हा महाकारणदेहात स्थित होतो, तेव्हा अद्वैतबोधात्मक स्थिती त्याला प्राप्त होते.

१९८६पासून ही स्थिती मी उपभोगतो आहे. महाकारण आणि त्याहीवरची ही अवस्था आहे, असे शास्त्र सांगते. उन्मनी ते ब्रह्मरंध्र, औटपीठ ते महाशून्य, भ्रमरगुंफा असा शास्त्र त्या स्थितीचा नामनिर्देश करते.

या सगळ्या अवस्थांचे मी अनुभव घेतलेले आहेत, हे आतापर्यंत जिज्ञासूंना कळलेच असेल. आज्ञाचक्रदृष्टी, काळा पुरुष दिसणे, तुर्यातीत अवस्थेत जाणे या सगळ्यांचा अर्थ चारी देहाचे ओझे निवारून केवळ शुद्धरूप सत्रावी प्राप्त झाल्याच्या या यौगिक खुणा आहेत.

गगनातला आत्मा गवसला. भ्रमरगुंफेत स्थिती होऊन अपार अनुहातनाद प्राप्त झाला. काळा पुरुष होऊन माझा मीच झालो, असे ज्ञानदेवांचे उद्गार माझ्या स्थितीचे निदर्शक असून ते मला मुक्ताईला त्यांनी केले त्यासारखेच मार्गदर्शन करताहेत!! ही त्यांची असीम कृपाच नाही का माझ्यावर!! निदान माझी तरी तशी दृढ श्रद्धा आहे!

"झाले सारे प्रकाश, प्रकाश" - प्रकाशदर्शने

मागे जो भ्रूमध्यातून एक प्रकाशझोत बाहेर पडल्याचे सांगितले, तसा प्रकाशझोत प्रत्येकच वस्तूवर पडतो आहे,

अशी त्यानंतर नेहमीच अनुभूती येत असे. ज्या ज्या वस्तूकडे, ज्या ज्या दृश्याकडे नजर जाते, ते ते असेच प्रकाशमान दिसू लागते, अशी ही अवस्था आहे. कधीकधी हे जाणवत असे तर कधी जाणवत नसे. सर्वच असे प्रकाशमान आहे, अशी अनुभूती नेहमीच येत असे. अशा विशुद्ध सत्त्वाचा प्रकाश पडतो तेव्हा वाचासिद्धी आपोआपच प्राप्त होते.

स्वामी विवेकानंदांना त्यांच्या साधनाकालाअगोदरही झोपण्यापूर्वी भ्रूमध्यभागी कपाळापाशी ज्योती दिसत असे.

गायत्री मंत्रात सांगितलेले ***"भर्गो देवस्य"*** असे सर्व दृश्याला, संस्कारांना भाजून जाळून टाकून संस्कारांचे बीज नाहीसे करून टाकणारे ***("भर्जनं भवबीजानां")*** असे जे तेज असते, त्याचीच कालांतराने अशा प्रकाशमानतेत परिणती होऊन त्याचे सर्वत्र ***"धीमहि"*** म्हणजे होणारे हे प्रकाशध्यान आहे, अशी माझी अनुभूती आहे.

हे तेज भाजणारे आहे, अशीही मला आलेली अनुभूती सांगते. दीपज्योती आणि कृष्णाताईंचा प्रसंग मी सांगितला आहे. त्या प्रसंगी ज्योतिप्रकटनानंतर किमान काही महिने तरी मला सर्वांगाचा दाह होणे, हातांची जळजळ होणे अशा संवेदना होत असत. सर्व उपाय केले. पण त्यांचा काही उपशम होत नव्हता.

एकदा रात्री हातांची अशीच जळजळ झाली असता काय वाटले, कोणास ठाऊक, मी ज्ञानेश्वरी हातात घेतली आणि थंडथंड वाटले. मग ज्ञानेश्वरी हातांवर फिरवली आणि तीच उराशी कवटाळून झोपी गेलो. झोपही लागली. त्यानंतर कित्येक दिवस अशी दाहसंवेदना झाली की मी ज्ञानेश्वरी हातात घेत असे आणि तिला जवळ घेऊन झोपून जात असे. स्वतःबरोबर बॅगेत नेहमी ज्ञानेश्वरी पण मी बाळगत असते बराच काळ!

कृष्णाताईंना हे मी न सांगताही कळले असावे. म्हणून माझ्या त्यांच्या नंतरच्या भेटीत या गोष्टीचा निर्देश करून त्या म्हणाल्या की, "चांगलाच उपाय शोधून काढला आहे तू, या आध्यात्मिक तापातून! ज्योतिदर्शन असेच असते. म्हणून तर मी तुला सांगत होते की त्याच्या इतक्या जवळ आतांच जाऊ नकोस म्हणून! त्याचे तेज तुला सहन होणार नाही आता असे काही मी उगीचच नव्हते म्हटले!"

एकदा भजनासाठी गेलो होतो. एका सिद्धपुरुषांच्या भक्तांचे ते मंडळ होते. त्यांच्या गुरूंच्या फोटोकडे सहज पाहिले तेव्हा त्यांच्याकडून एक अनंत अशा शक्तीचा मोठा स्रोत माझ्यामध्ये ओतला गेला. आत्यंतिक आनंदाची स्थिती झाली.

आत्मतेजाचा प्रकाश

दुसऱ्या एका वेळी त्या स्वामींचे दर्शन होऊन सर्वत्र प्रकाश भरलेला दिसला आणि त्या प्रकाशाचा प्रपात ऊर्ध्वदिशेकडून टाळूकडे येत ब्रह्मरंध्राद्वारे सगळ्या शरीरात भरभरून पसरला. स्वामींचे शब्द ऐकू आले, "तू पूर्ण योग पावलास. निःसंदेह! निःसंदेह!"

त्यानंतर त्याच संतांचे भजन करत असता असा अनुभव येत असे की आपण आत्म्याच्या महान प्रकाशात बुडून गेलो आहोत आणि तो प्रकाश आपले मूर्ध्निस्थान, ललाट आणि सगळे शरीर भरून राहिला आहे आणि आसमंतातही तोच भरलेला आहे.

खरे तर नाद आणि प्रकाश वेगवेगळे नाहीतच. नाद तर सुरुवातीलाच प्रकटला. आता या प्रकाशाचे अनुभव येत आहेत. वस्तुतः ***ज्योतिदर्शन*** हा अशाच महान प्रकाशाचा प्रसंग कधीचाच घडून गेला होता. पण त्या प्रकाशाने डोळे दिपून जाऊन अंधत्वच आले होते जसे. नंतर कृष्णाताई म्हणाल्या की अजून एकरूपता नको. तेज सहन होणार नाही. पण त्या तेजाने आधीच आपला प्रभाव पाडला होता. त्यांचे म्हणणे खरेच होते.

भगवंताचे तेज धारण करणारे नेत्र धारणाबळाने तसेच झालेले असावे लागतात. कदाचित पुरेसे धारणाबळ नसल्याने किंवा तो प्रकाश शेवटी ज्ञाननेत्रांनाच दिसणारा असल्याने मला इतके दिवस तोच सतत डोळ्यांपुढे असूनही त्याची जाणीव होत नव्हती. ती आता होऊ लागली आहे. हा प्रकाश म्हणजेच ज्ञान. ज्ञान झाले म्हणजे एकरूपता झाली. योगी प्रकाशात विलीन झाला. योगाची परिसीमा म्हणजे ज्ञान वा हा प्रकाश!

"प्रकाश! प्रकाश! सर्वत्रच प्रकाश"

सृष्टी म्हणजे त्या प्रकाशाचा अथवा ज्ञानाचा विमर्श अथवा विसर्ग! ज्ञान म्हणजे कर्मलोप, खरी नैष्कर्म्यावस्था. ***प्रकाशाची जाणीव = नादाची जाणीव = भक्ती = भगवंताची जाणीव, हीच अद्वैतभक्ती;*** प्रथम एकरूपता आणि नंतर त्या एकरूपतेची जाणीव ही भक्ती होय. सतत भगवंताचे अनुसंधान म्हणजेच प्रकाशाचे, नादाचे अनुसंधान, म्हणजेच भक्ती!

कबीर या स्थितीला उद्देशून म्हणतातः

वेद कहै सरगुनके आगे, निरगुन को विसराय।
सरगुन निरगुन तजही सोहागिन, देख सबही निजधाम।।
<u>नूरै ओढन नूरै डासन, नूरै सिरहान</u>।
कहै कबीर सुन भाई साधो, <u>सतगुरु नूर तमाम</u>।।

"वेद म्हणतात की सगुणाच्या पुढे आहे ते निर्गुण. आणि ती दोन्ही टाकून पुढे चला, तेथे आहे निजधाम! पण मी कबीर तर म्हणतो की हा प्रकाशच माझा बिछाना आहे, वस्त्र आहे, तोच माझे पांघरूणही आहे, एवढेच काय तो सद्गुरूही तर हा प्रकाशच आहे!"

खोली प्रकाशमय होणे

माझ्या सुरुवातीच्या काळात ज्योतिदर्शनानंतर जेव्हा माझी अवस्था फार चमत्कारिक झाली होती, तेव्हा एकदा पालट म्हणून मी माझ्या मामेभावाच्या घरी जाऊन राहिलो होतो. त्याची पत्नी थोडी psychic होती. तिला कधी कधी अतींद्रिय विश्वातील असे काही दिसत असे.

दुसऱ्या दिवशी उठल्यावर ती विचारत होती,"रात्री तुम्हाला झोप नीट लागली नाही का?" का विचारते आहे म्हटले तर ती म्हणाली की "मी रात्री झोपल्यावर एकदा खूप प्रकाश आला तुमच्या खोलीतून म्हणून जागी झाले आणि पाहिले तर तुमची खोली प्रकाशाने भरून गेली होती." नंतर ती म्हणाली की, "तुमच्या डोक्यातून प्रकाश येत होता. असं कसं शक्य आहे ? बराच वेळ तुम्ही जागे होता वाटतं ?" तिने काय पाहिले तिला माहीत नव्हते. तो माझ्या अवतीभोवती काही गूढवाद्यांना जाणवलेला मोठा प्रकाशाचा परिसर होता. ती psychic असल्याने तिला तो जाणवला.

काहीकाहींना संतांच्या मस्तकाभोवती प्रकाशवलय दिसते. तेच त्यांच्या चित्रातही दाखवण्याची प्रथा आहे. योग्याची पूर्णावस्था झाली की हा प्रकाश फैलावून psychics ना दिसू लागतो. काही विशेष अशा परिस्थितीत तो सामान्य माणसांनाही जाणवू शकतो. ***"मूर्धज्योतिषि सिद्धदर्शनम्।।३-३१।।"*** असे पातञ्जलयोगसूत्रांतून याचे वर्णन केलेले आहे. सिद्धांच्या मूर्धिनस्थानातल्या ब्रह्मरंध्रावर असे प्रकाश वलय दिसते. म्हणूनच सिद्ध, योगी, संत आणि दिव्य विभूती अन् देवादिकांच्या चित्रांत त्यांच्या मस्तकासभोवती एक अभामंडल दाखवण्याची पद्धत पडली आहे.

पांडुरंगाचे दर्शन आणि प्रकाशाचा हार

रात्री अनेक रंगी दैदिप्यमान प्रकाशमय असा एक अत्यंत हलका, अजिबात वजन नसलेला नवरत्नहार हाती आला. स्वहस्ते तो गळ्यात घालतांना "अरे! हा तर पांडुरंग विठ्ठलाचा हार आहे! तो त्याने आपल्याला दिला वाटते!" असे ध्यानात आले आणि पांडुरंग विठ्ठलाचे सुवेषभूषित, अनेकरंगी वस्त्रप्रावरणांनी नटलेले दर्शन झाले. पांडुरंगाचा पंढरपूरचा नवरत्नहार भौतिक स्वरूपाचा वजनदार असला तरी त्याचा खरा नवरत्नहार हा असा चैतन्यमय प्रकाशरूपाचा आहे व तोच त्याने आपणास दिला अशी अनुभूती आणि त्याचबरोबर ***"धाव धाव विठू आता चालू नको मंद। बडवे मज मारिती आतां। विठोबाचा हार तुझ्या कंठी कैसा आला।।"*** ही संत श्रीचोखोबांची कथा त्वरित ध्यानी आली, अनुपम रमणीय असा हा प्रसंग!!

दैदिप्यमान प्रकाशाचा झोत

ते त्र्यंबकेश्वर होते. जुनं मंदिर, विस्तृत पटांगण. त्यात लहान बाळाप्रमाणे रांगत दुडूदुडू जात पटांगण ओलांडून पायऱ्या चढून आत गाभाऱ्यात ज्योतिर्लिंगासमोर उभे राहून दर्शन घेतले. आत कोणीही नव्हते. अंगारा घ्यावा असे वाटले. त्यासरशी तिथे एक पाठमोरी आकृती (मागील दोन दृष्टांतात जो योगी दिसला होता, त्याचीच) तेथील लिंगात बसलेली प्रकट होऊन तिने भस्म, नैवेद्याचा लाडू इ.एकत्र बादलीत भरून दिली.

दर्शनासाठी गेलो होतो, ते दिगंबर अवस्थेत. गळ्यात जानवे फक्त होते. परत येतांना हातात कोणीतरी पुनः ती बादली दिली, तेव्हा अंगावर धोतर व शर्ट होता. ते कोणी दिले ते दिसले नाही. त्र्यंबकेश्वराने देऊन कोणालातरी पाठवले होते, असे दिसते.

तेवढ्यात एक मनुष्य म्हणाला "पुढच्या जन्माची काही सोय करू का?" म्हटले "तुमचं काहीच नको. पुढचा जन्मही नको. काहीच करू नका तुम्ही."

मंदिर सोडण्यापूर्वी विचार आला की माझी पत्नी कुठे भेटेल बरं? तिला हा प्रसाद दिला पाहिजे. गाभारा सोडण्यापूर्वी भक्तिभावाचा उमाळा येउन शाळुंकेच्या कडेवर मस्तक टेकवले, तेव्हा फार प्रसन्न आणि शांत वाटले. ***"ॐ नमः शिवाय"*** हा मंत्र जपत होतो. पण तो मंत्र जपायचा थांबवून शाळुंकेच्या कडेवर मस्तक टेकवले न टेकवले तोच समाध्यवस्था, अगदी त्या काळ्या पुरुषाच्या दर्शनावेळी प्राप्त झाली होती, थेट तशीच झाली. अत्यंत शांतावस्था आणि अत्यानंदावस्था!

त्या दिगंबर अवस्थेत संसार नसता हा भक्तिभाव किती उत्तम आहे व त्यातच निरंतर राहावे, असे वाटले. तिथेच असतांना भ्रूकुटीमध्यापासून निघून कपालापर्यंत एक प्रशस्त मोठा असा प्रकाशाचा पट्टा निघाला - साधारणपणे चार अंगुले रुंदीचा. तो पट्टा तिथून निघून थेट ब्रह्मशिखरावर गेला. सुषुम्नानाडीचा अथवा योगपथाचा आत्यंतिक विकास झाल्याचे ते दर्शन होते.

कोणाही योगसिद्धांच्या कथनात असा वृत्तांत ऐकलेला नाही.

दिव्य स्पर्शानुभूती

गीता म्हणतेः

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दन्त्यात्मनि यत्सुखम्।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्ष-यमश्नुते।।५-२१।।

याचा अर्थ करू या.

यःविन्दन्ति आत्मनि यत् सुखम्। यःब्रह्मणि योगेन् युक्तः। सःसुखम् अक्ष-यम् अश्नुते।। - (तो) मिळवतो आत्मस्वरूपामध्ये जे सुख। (जो) ब्रह्मात योगसिद्धीमुळे युक्त (झालेला असतो)। (तो)सुख अक्षय (चिरंतन) प्राप्त (होते) करतो।।

योगसाधना परिपूर्ण झाल्यामुळे योगी ब्रह्मतत्त्वाशी एकरूप होतो. आत्मस्वरूपात लीन झाल्यामुळे त्याला जे सुख प्राप्त होते, ते पराकोटीचे असते. असा सिद्धयोगी ते अक्षय सुख चिरंतन काळ उपभोगतो.

ज्ञानेश्वरमाउली म्हणतातः

सहजें स्वसुखाचेनि अपारें। सुरवाडलेनि अंतरें।. . . तैसें आत्मसुख उपाइलें। जयासि आपणपेंचि फांवलें।।६-१०६–१०९।।ज्ञा।।

गीता पुढे म्हणतेः

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ।।५-२७।।

ब्रह्मस्वरूपात लीन होऊन योग्याचे मन (रजोगुणादी शांत - सम - होऊन) प्रशांत होते. (पूर्ण शांत होते.) त्या अवस्थेत त्याला जे सुख मिळते, ते अति उत्तम असते. त्याविना मोठे असे दुसरे कोणतेही सुख नाहीच!

ज्ञानेश्वरमाउली सांगतातः

तैसें चित्त लयां जाएं। आणि चैतन्यचि आघवें होएं।
ऐसी प्राप्ती सुखोपाएं। आहे येणें।।६-३८६।।ज्ञा।।

गीता पुढे सांगतेः

युञ्जनेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते।।६-२८।।

याचा अर्थ करू याः

(यः युञ्जन (एवम्) सदा आत्मानम् योगी विगतः यस्य कल्मषःसः । सुखेन ब्रह्मणा संस्पर्शःयस्य तत्। अत्यन्तम् सुखम् अश्नुते।। - तो सिद्धयोगी सतत आत्मतत्त्वाशी एकरूप असतो. त्याचे सर्व दोष नाश पावलेले असतात. (प्रकृतिदोष, संगदोष, गुणदोष, संसारदोष, आसक्त्यादी दोष इ. सर्व प्रवृत्तिपर दोष); कल्मष = पाप = दोष; ब्रह्माशी एकरूप होण्यात जे आत्यंतिक सुख असते, ते त्याला ब्रह्मस्पर्शात लीन झाल्यामुळे सतत मिळत असते.

ज्ञानेश्वरमाउली म्हणतातः

या सोपिया योगस्थिती। उकलु देखिला गां बहुतीं।
. . . तें सुखाचेनि सांगातें। आलें परब्रह्मा आंतौतें।
तेथ लवण जैसे जलांतें। सांडूं नेणें।।
तैसें होएं तियें मेळीं। मग सामरस्याचियां राऊळीं।
जगेंसि दिसें।।६:३८६-३८९।।ज्ञा।।

एकुण गीता काय, ज्ञानेश्वरी काय, एकच अनुभूती श्रेष्ठ म्हणून सांगतात. ती म्हणजे **ब्रह्मसंस्पर्श** आणि "त्यातले अक्षय चिरंतन सुख"! मीही ही ब्रह्मसंस्पर्शाची अत्युच्च अशी समजली जाणारी साक्षात अनुभूती घेतली आहे. ती अशीः

कोणी एक ललना माझ्याजवळ आली. ती पूर्वपरिचित होती असे वाटले. ती म्हणजे विश्वशक्तीचे - कुंडलिनीचे रूपक होय. मी वाटेने जात असता तिने माझा खांदा गच्च धरला. त्याची जाणीव म्हणा, बोंच म्हणा, माझ्या मनात उमटली आणि तिने मला आपल्याबरोबर एका दिव्य अवकाशात नेले.

तेथे गेल्यावर ती कोणाशीतरी बोलत बसली. मी तिच्याकडे नीट निरखून पाहिले. ती एक साधारणशी दिसणारी सावळी दाक्षिणात्य वाटणारी युवती असावी अशी दिसली.

त्यानंतर मी तेथे बसल्याबसल्या पेंगून झोपी गेलो आणि हळूहळू तेथल्या मंचकावर पहुडलो. त्यानंतर हलकासा शुभ्रगौरवर्णी लहान स्त्रीसदृश प्रकाशमय बोटांचा स्पर्श मला जाणवू लागला. तो तिचाच स्पर्श आहे, हे स्पष्ट जाणवत होते. तिची ती बोटे अगदी स्पष्ट आणि शुभ्र दिव्य प्रकाशाचीच असावीत अशी दिसत होती.

प्रथम तो हात - ती बोटे - माझ्या डोक्यावरून, केसांतून मायेने फिरू लागली. अत्यंत मायाळू असा तो स्पर्श होता. नंतर माझ्या चेहऱ्यालाही तो स्पर्श होऊ लागला. ती बोटे माझ्या चेहऱ्याला पण कुरवाळू लागली. माझा चेहरा त्या हातात होता आणि सतत त्यांचा मोरपंखी स्पर्श मला कितीतरी वेळ होत राहिला. ती बोटे माझ्या चेहऱ्याला स्पर्शत हळूवार अशी फिरत होती. मला अगदी शांत–शांत असे वाटू लागले.

त्यामुळे होणारे स्पर्शसुख आत्यंतिक शांतिपूर्ण तंद्रीत नेणारे व त्यापलीकडचे होते. मला त्यामुळे तुर्यातीतावस्था प्राप्त झाली. वास्तवाची कोणतीही जाणीव उरली नाही आणि मी आनंदघन समाधीत स्थित झालो. ती तुर्यावस्था खूप वेळ टिकली.

नंतर तिने आपला चेहरा माझ्या चेहऱ्यावर ओणवला आणि तिच्या चेहऱ्याने माझा चेहरा संपूर्ण झाकून गेला.

एखादा मुलायम सुस्पर्श मादक सुगंधी आणि अत्यंत पारदर्शक असा एखादा द्राव असावा तसा तिच्या चेहऱ्याचा द्राव होत तो माझ्या चेहऱ्यावर पसरत गेला. तो तसाच सगळ्या अंगावर पसरला आणि सर्वांगात झिरपत गेला. माझ्या देहमनचित्ताचा संपूर्ण अवकाश त्या द्रावाने व्यापून टाकला. ते त्या द्रावाचे असे पसरणे, झिरपणे आणि मला अंतर्बाह्य व्यापून टाकणे अत्यंत सुखदायी होते. तिचा चेहरा आणि देह अशा द्रावरूपाने माझ्या चेहऱ्याशी अन् देहाशी एकरूप झाला.

ती तशाच अवस्थेत माझ्याशेजारी पहुडली. हळूहळू तिचे सगळे शरीर चेहऱ्यासकट माझ्याशी मिसळत एकरूप झाले. नंतर आम्ही दोघे कितीतरी वेळ त्या तशाच माझ्या चेहऱ्याशी अन् देहाशी एकरूप झालेल्या अवस्थेत पडून राहिलो.

आमच्या दोघांचे चेहरे आणि शरीरे एकरूप होऊन तशीच राहिली. अत्यंत संस्मरणीय अशी प्रशांत सुखदायक आत्यंतिक अवस्था होती ती! मला कोणतेही जगद्भान नव्हते.

त्या अवस्थेत नंतर अनेक वाद्ये वाजू लागली. संगीत आणि सुस्वर पण तारस्वरात मनमोहक असा गाण्यांचा जल्लोष उठला. बराच वेळ त्या संगीत-गायनाचा तो आनंद मी उपभोगत होतो. सभोवती सुंदर प्रकाश होता. त्यानंतर अकस्मात ती अवस्था भंग पावली आणि अर्धजागृती आली.

त्या सुखाच्या, त्या दिव्य स्पर्शाच्या, नादमयी संगीत अन् गीत-गायनाच्या सुंदर प्रकाशमय अवकाशाच्या स्मृतीत मन आता हरखून गेले आहे आणि मनात बोल उमटतात आहेत ते श्रीकृष्णांचे: **“सुखमुत्तमम्”- “सुखेन ब्रह्मसंस्पर्शं अत्यन्तं सुखम् अश्नुते।”**

किती दिव्य ही स्पर्शसुखानुभूती! किती दिव्य होते ते संगीत आणि गायन! मी अजूनही त्या अनुभूतींमध्ये बुडूनच आहे! हाच तो त्या ब्रह्माचा दिव्य संस्पर्श! अत्यंत सुखदायी! आणि ते दिव्य ब्रह्मगान! त्यात वेणु-सारंगी आणि इतर अनेक मंजुळ वाद्यांचे नाद मिसळलेले होते! स्वर्गीय संगीतच होते ते ब्रह्माचे!

गजाननमहाराज गुप्ते सांगायचे तो दिव्य असा ब्रह्मनाद माझ्या परमभाग्यवश मला कितीतरी वेळ ऐकू येत होता. ते सुस्वर संगीत अजूनही माझ्या कानांत भरून आहे. ख्रिश्चन आणि सुफी साधुसंत त्या संगीतास **Music Of The Golden Spheres** किंवा **Music in The Golden Octave** असे म्हणतात. सुफी दरवेश तर त्याच्याच तालात मग्न होऊन स्वतःभोवती गिरक्या घेत नाचतात!

गीतागोविंदांचे **“सुखेन ब्रह्मसंस्पर्शं अत्यंतं सुखमाप्नुयात्”** हे वचन साक्षात अनुभवण्याचे हे श्रेष्ठतम भाग्य माझ्याकडे स्वतःच चालत आले! धन्य त्या घननीळ परमात्म्याची कृपा!

वटवृक्ष आणि नागराज

मी अत्यंत निगूढ समाधिसुखात मग्न असतांना झालेला हा एक दृष्टांत आहे. अकस्मात मला कोणीतरी जागवतात. मी अत्यंत अनिच्छेने व्युत्थितावस्थेत येतो. मी तेव्हा एका विशाल वटवृक्षाच्या पारावर त्याच्या बुंध्याला टेकून रेलून बसलेला असतो.

समोर काही माणसे उभी असतात. त्यातील प्रमुख अशी एक उच्चकुलीन दिसणारी दंपती दोघंजणं मिळून मला जागे करत असतात.

ते म्हणतात, “अहो इथे बसू नका. हे मोठ्या नागराजाचे वारुळ (स्थान) आहे. तो बघा तिथे दिसतो आहे. लागलीच उठा इथून.” समाधिभंग होऊन मी व्युत्थितावस्थेत येतो आणि आजूबाजूला पाहू लागतो की कुठे आहे तो नागराज. पण मला काही तो दिसत नाही.

मी अत्यंत सावकाश तिथून उठून पाराखाली येतो. अकस्मात तो नागराज माझ्यात येतो आणि त्यांना सांगू लागतो: “मी नागराज आहे, हे माझे स्वस्थान आहे. त्याची पूजाअर्चा नीट करत जा. कोणी वा त्यांच्या पूर्वजाने नागाची नाहक हत्या केली असेल तर त्याने त्याचे परिमार्जन करावे. माझी पूजाअर्चना करावी. मीच शेषशायी भगवंताचा सहस्त्रफण्यांचा नागराज आहे.”

त्यानंतर मी भानावर येतो. तेव्हा तो नागराज मला सांगू लागतो: “मी प्रसन्न आहे तुझ्यावर आणि तुझ्या कुटुंबावर अन् वंशावर! तुमचे सगळे चांगले होईल. समृद्धी, धन-संपत्ती, सुखसंपदा कुळात राहील. तुझा वंश पुढे चालेल. भगवंताची तुझ्यावर आणि तुझ्या कुटुंबावर प्रसन्नता आहे. माझी छाया (कृपेची सावली) तुमच्यावर सदैव राहील. सदैव तुमचे रक्षण करील. माझे अंतःकरणापासून पूजन करत जा.”

त्यानंतर मी पूर्ण जागृतावस्थेत आलो. या दृष्टांताचा अर्थ काय असावा याचा विचार करू लागलो. नक्कीच तो महाकुंडलिनीचा आवेश आणि दृष्टांत होता. कदाचित नागप्रतिमापूजन, नारायण-नागबली या विधानाचा, नागपंचमीव्रताचाही त्याला संदर्भ असावा.

त्यानंतर दोन दिवसांनी सोमवारी आषाढी महाएकादशी होती. श्रीविठ्ठलावर छत्र धरणारा तो आदिशेष होता. कोल्हापूरनिवासिनी जगदंबेवर आणि पंढरपूरवासिनी माता रुक्मिणीदेवीवर तोच छत्र धरतो.

आमची पंढरपूरयात्रा

याच शेषराजाचा एक वेगळाच दृष्टांत मी प्रथम जेव्हा पंढरपूरला गेलो तेव्हा झाला होता. मी आणि माझी पत्नी असे दोघेजण पंढरपूरला पहिल्यांदीच माझ्या वयाच्या सत्तेचाळिसाव्या गेलो होतो आणि तिथल्या माहेश्वरी धर्मशाळेत उतरलो होतो. पत्नी कॉलेजात असतांना अगोदर एकदा आईवडलांबरोबर तिथे जाऊन आलेली होती. मीच पहिल्यांदा जात होतो.

राजेंद्र बडव्याला देवालयाच्या संस्थानाने आमच्याकडून विठ्ठलरखुमाईची पाद्यपूजा आणि कुंकुमार्चन करून घेण्यासाठी नियुक्त केले होते. अवचित शेषराज माझ्या मुखाने राजेंद्र बडव्याला सांगू लागला होता की "मी किती फडांचा आहे, ते तुमच्यातल्या नास्तिक दुष्टांना काय माहीत असणार! देवाचा मोठा विक्रा मांडला आहे त्यांनी! तो अनंतनाग तुम्हाला त्याचा हिसका दाखवणार आहे!"

योगायोग असा की त्यानंतर वीस वर्षांनी पंढरपूरक्षेत्री मोठी क्रांतिकारक घटना घडली. वंशपरंपरा पांडुरंगाचे धनी म्हणवणाऱ्या त्याच्या सेवाकरी बडव्यांवर सरकारी संक्रांत आली आणि त्यांचे शेकडो वर्षांचे पांडुरंगावरचे आणि त्याच्या देवळावरचे असलेले स्वामित्व सरकारी आणि न्यायालयीन निवाड्याने संपुष्टात आले. आता तेही तेथील सामान्य लोकांसारखे झालेत!

पंढरपूरला पोहोचल्यापासून सगळे वातावरण दिव्य आणि भारलेलेच होते. त्या वेळी पंढरपूरला मला अजूनही अनेक अनुभूती आल्या. त्यातील एक म्हणजे राजेंद्र बडव्याने मला श्रीविठ्ठलाच्या शेजारील खणात, जिथे अभिषेकाच्या पाण्याच्या घागरी आणि पूजेचे उपचारसाहित्य ठेवतात तिथे, खूप वेळ दर्शन घेत बसायला दिले. त्याला काही कोणतीही विशेष दक्षिणा आम्ही दिली नव्हती.

त्याच्या अंगातच आले होते. तो सगळ्यांना सांगत होता की हे यजमान देवाच्या नात्यातले फार जवळचे आहेत म्हणून. जवळजवळ चार तास मी त्याच्याबरोबर देवळाच्या गाभाऱ्यात होतो. त्यावेळचेही सगळे वातावरण अति रम्य अन् पूर्णपणे भारलेले होते. मी पण एका विशेष तंद्रीत होतो.

पहाटेच्या काकड्यापासून तर थेट महानैवेद्यापर्यंत. दुपारचे देऊळ जेव्हा बंद झाले तेव्हा मी त्याच्याबरोबरच बाहेर पडलो. काकड्याअगोदर मी माहेश्वरी धर्मशाळेत जेथे उतरलो होतो तिथे स्नान वगैरे केले आणि तसाच घाटावर जाऊन पुंडलिकाचे दर्शन घेऊन देवळात जात असता राजेंद्र बडव्याने मला गाठले आणि देवळात वेळेअगोदर घेऊन गेला.

तिथेही तो मला **श्री विठ्ठलाचे संबंधी** म्हणून संबोधत होता. श्री विठ्ठल हे आमच्या कुळाचे आराध्यदैवत आहे, अगदी कुलदैवत म्हटले तरी चालेल असे. आमच्या काही पिढ्यांपूर्वीच्या खापरपणजोबांच्या सद्गुरूंनी त्यांना दिलेले. त्याची कृपा अशी प्रत्यक्ष दिसली. विठ्ठलाजवळून जेव्हा मी उठलो तेव्हा राजेंद्रने मी काहीच न सांगता भारावलेल्या अवस्थेत पांडुरंगाचा प्रसाद म्हणून एक नारळ विठ्ठलासमोर मंत्रून मला दिला.

महायात्रेचा नैवेद्य म्हणून एक मोठा हाराभर लाडू, बत्तासे, नारळ इ. चा महाप्रसादही आणून दिला त्याने आपण होऊन धर्मशाळेत. तो इतका होता की शेवटी मीच त्याला म्हटले की या एवढ्या प्रसादाचे आम्ही दोघं पतिपत्नी काय करणार! थोडा ठेवून बाकी सगळा त्याला दिला की तुम्ही वाटून टाका भक्तांना म्हणून!

देवळातून बाहेर पडतांना तो मला परत भेटला आणि त्याने सरळ पांडुरंगाचा आवेश येऊन म्हटले की "हे सगळं तुम्ही कसं नेणार! हा नारळ आणि इतर गोष्टी मला देऊन जा." मी पण त्याला होकार दिला आणि तो मंतरलेला नारळ त्याला इतर तीनचार नारळांसह देऊन टाकला.

अजूनही एक गोष्ट अनुभवली. राजेंद्र बडव्याला नारळ परत दिल्यानंतर मी देवळात सहजच इकडेतिकडे हिंडत राहिलो. शेवटी मला एक दार दिसले. मला वाटले की देवळाबाहेर जायचा रस्ता तिथूनच असावा. म्हणून मी ते उघडलं. तर तो एक गाईगुरांचा गोठा होता. अतिशय गोजिरवाणी गाईवासरे त्यात होती. मी पण त्यांना प्रेमाने आंजारले-गोंजारले आणि आल्या वाटेने मागे देवळात येऊन दुसऱ्या एका दाराने बाहेर पडलो.

नंतर एकदोघा नेहमी पंढरपूरला जाणाऱ्या मित्रांना ही गोष्ट सांगितली. ते तर मुळचे तिथलेच होते. तर ते दोघे म्हणाले की "काय सांगता आहात तुम्ही नवीनच! तिथे कोणताही गोठा नाही आणि तुम्ही म्हणता तसले दारही नाही. आणि बडवा देवळात परत जिथे भेटला असं म्हणता, तसाही भाग देवळात नाही. तुम्हाला काही तरी भ्रम झालेला दिसतो."

मी म्हणतो, बरं! भ्रम तर भ्रम! पण मी जे दृश्य गाईगुरांचं पाहिलं ते खरंच तर होतं. आणि राजेंद्रने माझ्याजवळून मंतरलेला नारळ इतर नारळांसह घेतला ही तर खरीच घटना होती! मग तो परिसर कोणताही का असेना!

येथे श्री रामकृष्ण परमहंसांची एक गोष्ट आठवते. त्यांना अशी जी काही लोकविलक्षण दृश्ये दिसत असत, दृष्टांत होत असत, कालीमाता स्वतः त्यांच्याशी बोलत

असे, ते सगळे त्यांचे पट्टशिष्य स्वामी विवेकानंद आणि तेव्हाचा नरेंद्र भ्रम समजत असे. हे ऐकून ते अत्यंत व्यथित चित्ताने जगदंबेपुढे जाऊन विचारत की "आई! हा नरेंद्र तर या सगळ्यांना भ्रम म्हणतो आहे." आणि जोरजोराने हमसून हमसून रडू लागत. म्हणत, "आई! का तू हे असे खोटे खेळ खेळतेस! मला तर ते सगळं खरंच वाटतं ना! का मला असा वेडा ठरवतेस!"

ही सगळी हकीकत माझ्या एका भाविक मित्राला सांगितली तर तो म्हणाला की "तुम्ही त्याला तो नारळ द्यायला नको होता. मी तरी दिला नसता." त्यावर मी म्हटले की "न मागता देणारा तोच होता! त्याने परत घेतला तर आपण त्याला नकार देणे मला बरोबर वाटत नाही. नाहीतरी मी सर्व महासिद्धी कधीच्याच तर त्याच्या चरणी अर्पण केल्या आहेतच. कदाचित तो पांडुरंग त्याच्या रूपाने माझी परीक्षा पाहात असेल आणि सगळा वेळ तर तो पांडुरंगाच्याच आवेशात होता माझ्याबरोबर! तेव्हा जे झाले त्यात काहीही वावगे नाही. मला सिद्धींऐवजी त्याचा आशीर्वाद महत्त्वाचा आहे."

नंतर पुनः जेव्हा मी पंढरपूरला गेलो तेव्हा मुद्दाम लक्षपूर्वक तो देवळाचा परिसर नीट निरखून पाहिला. तर खरंच तिथे ना तर ते दार होते, ना गोठा! ना गाईवासरं, ना जिथे राजेंद्र बडवा मला भेटला ती जागा वा परिसर! ना मी देवळाबाहेर ज्यातून पडलो ते दार! एकदोघांजवळ गोठ्याची चौकशी केली तर ते "हा कोण खुळा आला आहे विचारत" असे माझ्याकडे पाहत म्हणाले, "अरं बाबा! कुटला गोट्हा म्हन्तो हाईस तूं! इथं नाय बा तुह्या गोह्टान्गाईगुरं! जाय की घरला वापस!"

अधिक विचार केला तर मला असे वाटते की तो बडवा तरी खरा होता का? माझी तर अंतर्यामीची अशी खात्री आहे की श्रीविठ्ठलानेच ती आमची सगळी दर्शनाची हौस आणि तीर्थयात्रा संपूर्ण सुफळ आणि सफळ केली स्वतःबडव्याचे रूप घेऊन. हाही एक महान साक्षात्कार होता म्हणा!

आणिक एक! मला जसा विठ्ठल राजेंद्र बडव्याच्या रूपात भेटला तसाच तो अणखीही इतर भक्तभाविकांना कोणत्या ना कोणत्या रूपाने दर्शन देतो असा लोकप्रवादही आहे आणि काहींची साक्षात अनुभूती!

आणि अजूनही एक गोष्ट घडली. पहिल्या दिवशी जेव्हा आम्ही विठ्ठलाचे दर्शन घेतले, त्यानंतर मी सोळाखांबीत त्याच्याकडे डोके करून पालथा पडून राहिलो होतो बराच वेळ. सर्व काळ तंद्रीतच. त्यावेळीही अनाहतनाद टीपेला पोहोचला होता, अगदी जसा कृष्णाताईंकडे गेल्यावर श्रीकृष्णालिंगनप्रसंगी पोहोचला होत तसाच! त्यावेळी तिथल्या बडव्यांनी लोकांना मला उठवू नका असे सांगितले. नाही तर ते भाविकांची वर्दळ हटवण्यामागेच असतात, तरीही!

अशी ही सगळी पंढरपूर तीर्थयात्रेची कथा आहे.

पुतळ्यांची माळ आणि इतर

हा एक लहानसा दृष्टांत आहे. समाधिमग्न असतांना माझ्या गळ्यात एक विठ्ठल-रखुमाईंच्या पुतळ्या असलेली सोन्याची माळ पडली. फार हर्ष झाला होता त्यावेळी. त्यातल्या पुतळ्या किती सुंदर होत्या. बराच वेळ निरखत होतो.

एकदा दोन mystics भेटले होते एका रात्री एके ठिकाणी. ते दोघेही पतिपत्नी होते आणि वामाचारीही! त्या वेळी मी बहुधा तंद्रेत असे. त्यामुळे आजूबाजूला लक्ष यथातथाच, देह चालवण्यापुरतेच. थोडा वेळ आम्ही त्या जुनाट १००० वर्ष पुरातन मंदिरातील शिवलिंगाच्या गाभाऱ्यात बसलो होतो. तिथे मी समाधिमग्न झालो.

ते पाहून थोड्या वेळाने त्या दंपतीचा एकमेकांशी संवाद सुरू झाला. विषय होता हा बाबा (म्हणजे मी) कोण आहे आणि त्याच्याशी आपल्या शक्तींचे चाळे केले तर काय काही त्रास होईल का असा. कुजबुज चालली होती एकमेकात. अशी की "हा बाबा आता समाधीत आहे, याला हलवून जागे केल्याशिवाय काही हा उठणार नाही. त्याला काय ऐकू येणार आपण काय काय बोललो ते?"

पण त्या अवस्थेतही माझे एक सजग इंद्रिय काम करत होते. ते त्यांना माहीत नसावे. असेच इतरही काही वेळी घडले आहे आणि त्यांचे असेच अनेक संवाद आणि मनसुबे माझ्या कानांवर पडले होते. ते त्यांना मी कधी दर्शवले नाही.

त्यावेळी तो वामाचारी म्हणाला की "हा तर संत आहे. संत क्षमाशील असतात. आपण काहीही केले तरी तो आपल्याला काहीही करणार नाही. आपलं काम झालं तर होऊनही जाईल आणि समजा त्याला कळलं तरी काही फरक पडणार नाही. तो काय शिक्षा करील का आपल्याला?"

त्यावर त्याची पत्नी म्हणाली की "अहो! अशी चूक नका करू या बाबाला ओळखण्याची! तो संत नाही काही. त्याच्या आत कृष्ण आहे. तो तसाच वागेल जसा श्रीकष्ण वागत असे! पाहता पाहता चक्र सुटेल अन् मग आपल्याला कोण वाचवील? नको बाबा याच्या भानगडीत पडणं. दिसतो

भोळा पण आतनं एकदम **परित्राणाय साधुनां**..।। असा भयानक आहे हा आपल्यासारख्यांसाठी."

तेवढे त्यांचे संभाषण मी ऐकले आणि थोडया वेळानी पूर्ण देहभानावर आलो. जसे काही झालेच नाही असे भासवत ती दंपती आणि मी गावात परतलो आणि आपापल्या घरी निघून गेलो. अशी मजा आली होती मला त्यांचा तो संवाद ऐकतांना! ती बाई थरारली होती ते सांगतांना इतकी की आम्ही परत येतांनाही ती माझ्या तोंडाकडे वारंवार वळून बघत होती.

मी विचारलेही की "काय मावशी! काय सारखं सारखं बघता आहात माझ्याकडे वळून वळून," तर म्हणाली, "नाही हो! तुमचा चेहरा समाधीतून बाहेर पडल्यावर येवढा काही निखरला आहे की सारखं बघतच राहावसं वाटतं आहे मला आणि यांना!" हे आणखीनच काही तरी! असो. ते वामाचारी मग माझ्यापासून लांब झाले हळूहळू. मी कधी गेलो त्यांच्या घरी तर अनुत्सुक असत बोलाभेटायला! मग मीही जाणे सोडून दिले त्यांच्याकडे. पण त्यानंतर त्यांनी कधी एका शब्दानेही चौकशी केली नाही कधी की "काका हल्ली भेटत नाही हो" म्हणून!

महालक्ष्मीचे दर्शन

देवीच्या देवळाचा गूढगर्भ गाभारा, प्राच्य वातावरण. देवी दिसत नव्हती. पण होती तिथेच कुठेतरी. माझा मुलगा पण बरोबर होता. पण तोही दिसत नव्हता. मी त्याला देवीपुढे नारळ अर्पण करायला सांगितला. त्यानंतर पुजारी म्हणा, इतर कोणी म्हणा, त्याच्या ताटलीत खोबऱ्याचे तुकडे ठेवले. पण त्यांच्यातले कोणीच मला दिसत नव्हते. हे सगळ फक्त जाणवत होतं.

त्यानंतर माझी तंद्रावस्था सुरू झाली. तेव्हा तिथे देवीचा एक गण आला. त्यानंतर देवीचे अस्तित्व प्रकट जाणवू लागले. ती अष्टभुजा होती. अष्टादशभुजाही असेल. कारण तिथे प्रकाश नव्हता. ती नीट दिसत नव्हती. तिच्या हातांमध्ये अनेक आयुधे अन् शस्त्रास्त्रं होती. त्रिशूळ, धनुष्य इ. खड्ग पण होते. मी ग्लानीत होतो. अनेक प्रकारच्या जखमा झालेलो होतो. मरणोन्मुख होतो.

त्या अवस्थेत पुजाऱ्याने माझ्याजवळ येऊन मला देवीच्या हातातली तलवार देऊ केली. मी त्याला नको म्हणालो. ती तलवार रत्नजडीत होती. सुवर्णमंडित होती. अति मौल्यवान होती.

मी त्याला नको म्हटले. आणि म्हणालो की "सकाळी लोक येतील. तेव्हा माझ्या हातात ही तलवार पाहून त्यांना काय वाटेल? माझ्यावर चोरीचा आळ येईल. त्यांना मी काय सांगू?" तो म्हणू लागला की देवीनेच ती तलवार मला दिली आहे. ती मीच ठेवून घ्यावी लागेल! माझ्या मनात येत होते की मला आता त्या तलवारीचा काय उपयोग! मी तर आसन्नमरण झालो आहे? अगोदर दिली असती तिने तर जीव तरी वाचवता आला असता!

मी नाही म्हणालो. तेव्हा देवीने त्या पुजाऱ्याला सांगितले की शेजारीच तिचे शस्त्रागार आहे. त्यात अनेकानेक शस्त्रास्त्रं आहेत. त्यातील एक मोठे दैत्यांनाही भय उत्पन्न करणारे खाण्ड आहे, ते घेऊन ये आणि तिच्या हातात दे, भयानक अवजड होते ते. दहा माणसं काय उचलतील इतकं!

तो पुजारी शस्त्रागारात गेला आणि त्याला ते उचलून घेता आलं नाही. पण तरी ते शस्त्र आपल्या आपण होऊन आलं आणि देवीच्या हातात विसावलं! ते अवजड खड्ग देवीने आपल्या नजूक हाताने सहजच उभे पेलले. त्याच्यातून वीजेचा कल्लोळ आणि मोठा प्रकाशझोत सभोवार पसरला. त्या प्रकाशात मला देवळात येण्याचा रस्ता दिसू लागला. ते देऊळ होते कोल्हापूरच्या अंबाबाईचे.

त्या देवळातली सोळाखांबी अन् सभामंडपात तो प्रकाश सर्वदूर फाकला. मला देवी दिसू लागली. ती जरी सौम्यमूर्ती होती तरी त्या ठिकाणी तिचे उग्र कालीस्वरूप प्रकटले. त्या प्रकाशात मी पाहिले तर माझे शरीरावरचे घाव भरून निघाले होते. मी पुनःनवचैतन्याने युत झालो होतो. आणि प्रकाशाच्या त्या मार्गावर तिने दिलेली तिची तलवार घेऊन मी सभामंडपामार्गे पुढे निघालो.

तेव्हा तिथे देवीचा गण नव्हता की आणखी कोणीही नव्हते. देवीने मला आणि माझ्या मुलालाही अभय दिले अन् शाश्वत समाधान, सार्वत्रिक कल्याण आणि शत्रुनाश आश्वासिले. प्रसाद मिळाला. तलवार मिळाली. देवीने रक्षणार्थ मोठे खाण्ड धारण केले आपल्या हातात. एकूण अपूर्व दृष्टांत झाला. देवीच्या हातातील भल्यामोठ्या खाण्डातून सर्वत्र दूरवर प्रकाश पसरला! अन् सगळे आसमंत प्रकाशात न्हाऊन निघाले. अति दिव्य प्रकाश होता तो! सदैव संस्मरणीय!

परमज्योतिदर्शन

अलीकडेच मला भगवंताच्या परमज्योतीचे दर्शन झाले. मर्यादापुरुषोत्तम श्रीरामचंद्रप्रभू ही भगवंतांची एक विभूती आहे. ***"रामः शस्त्रभृतामहम्।।१०- ३१।।"*** असे गीता म्हणते. भगवंताच्या दशावतारांपैकी आणि कृष्णाइतक्याच उत्कटतेने ज्या अवताराची आपण भक्ती

करतो, ते हे श्रीरामचंद्रप्रभू! आता आयुष्य सरत आले आहे. वयाच्या सदुषष्टाव्या वर्षी त्या श्रीरामप्रभूने स्वतःच्या शक्तिसह - सीतादेवीसह - त्या आदिमाया जगदंबेसह सुंदर दर्शन देऊन मला कृतार्थ केले.

संतश्रेष्ठ तुलसीदासांच्या रामायणाचा ग्रंथ काही निमित्ताने काढला होता. तो पायाकडल्या बाजूला, म्हणजे त्याच्याकडे पाय करून नव्हे, पण त्या दिशेला लांब एका स्टूलावर ठेवून रात्री झोपलो होतो. गुरुवार भाद्रपद शुद्ध नवमी होती. गौरीगणपतीचे दिवस होते. त्याआधी काही दिवस काही कारणाने श्रीहनुमंताच्या वीरविग्रहाचा जप करत असे.

रात्री अचानक श्रीकृष्णाच्या बालरूपाचे दर्शन झाले. तो रांगत येऊन लोण्याचा गोळा रांजणातून काढून खातो आहे, असे प्रथम दिसले. परत दुसऱ्या बाजूने पाहिले तर तसेच दिसले. अत्यंत साजिरे आणि मोहक असे ते रूप होते. त्याच्याकडे दृष्टी खिळून राहिली.

काही काळाने त्याच्या जागी एक तेजस्वी दर्शन झाले. धनुर्धारी श्रीराम आणि सौभाग्यलक्ष्मी रत्नमंडिता श्रीसीतादेवींचे. युगुलकिशोर, राधाकृष्ण अशा स्वरूपाचे ते मनमोहक रूप होते. श्रीरामांच्या वामभागी सीतादेवी असे ते दोघे उभे होते. दोघांचेही पूर्णाकृती दर्शन झाले. श्रीरामांच्या वामस्कंधावर पूर्ण पुरुषभर उंचीचे कोदंड असून ते त्यांच्या थेट पायापर्यंत पोहोचत होते. तेही लक्षणीय होते. रविवर्मा काय चितारील असे ते प्रतिमादर्शन होते. पण जिवंत, लालित्यपूर्ण आणि सौभाग्यदायी!

ते श्रीरामसीताच होते, हे निश्चित. पण मला कृष्णभावना होती आणि त्याआधीच तर मी त्या गोकुळीच्या नंदलालाला त्याचा आवडता व्यवसाय करतांना - लोणी चोरतांना बघितले होते. म्हणून क्षणभर मी ते युगुल अति माहितीच्या राधाकृष्णांचे - मथुरेच्या देवळात आहे, तसेच समजून गेलो. पण नंतर ध्यानात आले की अरे! हे तर स्वतः रामप्रभू आणि सीतामाई!

माझ्याकडून श्रीरामचंद्रांची सेवा काही तशी फारशी घडलेली नाही. पण गेली काही वर्षे दासबोधाचे सामूहिक पारायण प्रतिवर्षी करतात, त्यात सहभागी होतो. पूर्वी कधीतरी रामचरितमानस आणला होता, पण अद्याप त्याचे इच्छा असूनही वाचन घडलेले नाही. फक्त प्रश्नशलाका पाहिली. श्रीहनुमंताची सर्वसाधारण भाविक करतात, तेवढीच प्रार्थना मी केलेली आहे. श्रीरामप्रभू हे माझा आदर्श नसून योगेश्वर श्रीकृष्णच माझे आराध्य असल्याचा माझा समज होता.

केवळ उत्तर भारतात अर्धा जन्म गेला म्हणून कधीकधी तुलसीरामायणाच्या छंद-दोहा-चौपाया कानांवरून गेलेल्या. त्याही अर्थ न कळताच! एक म्हणायचे तर आमच्या उत्तर भारतातल्या राहत्या घराच्या मागे गावकऱ्यांचे राम-लक्ष्मणसीतेचे एक साधेसे देऊळ मात्र होते आणि रात्री झोपी जातांना त्यांचे भजन-कीर्तन कानांवर पडत असे. त्या देवळातील मूर्तींचे पण कधीतरी मी दर्शन घेत असे. आमच्या घरच्या झाडांचे चंदन चोरट्यांनी झाडे तोडल्यावर उरलेले होते, ते मात्र मी एका श्रीरामाच्या देवळात नेऊन दिले होते, एवढेच असले तर पुण्य माझ्या गाठी होते. पण संचिताचे कोण जाणू शकेल! त्याच श्रीरामाने मला दर्शन दिले अन् कृतार्थ केले. ***"पूर्णासही लागे अवस्था ज्याची"*** असे ते दर्शन!

दशमद्वार

दहावे द्वार म्हणजे षट्चक्रांपेक्षा वेगळे सातवे, सर्वात महत्त्वपूर्ण ***सहस्त्रारचक्रस्थ ब्रह्मरंध्र.*** हेच ***"देवाचियां द्वारी। उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी। साधियेल्या।।"*** असे असणारे योग्यांत परमोच्च समजले जाणारे स्थान. सहस्त्र पाकळ्यांचे उगवत्या सूर्याप्रमाणे तेजस्वी, सुवर्णलाल आभेचे असे हे चक्र असते. जर चेतना या सहस्त्रारात पोहोचली तर निश्चितपणे मुक्ती मिळते. आवागमन होत नाही. हे चक्र हाच आनंदमय कोष. याच स्थळी म्हणा किंवा त्याहीपलीकडच्या असेल ते माहीत नाही, मला हे श्रीरामसीता आणि बालकृष्णांचे दर्शन झाले होते. ही तर नादाच्याही पलीकडची अवस्था. ज्ञानदेव ज्याला **"जैं आकारचे पैलतीर। जैं नादाची पैलमेर। तुर्येचे माजघर। परब्रह्म जैं।.. मोक्षासगट गती। जेथ येती विश्रांती।।"** असे म्हणतात, ती हीच स्थिती.

याच स्थितीला उद्देशून श्रीकृष्ण श्रीमद्भागवतात म्हणतातः

पिण्डे वाय्वग्निसंशुद्धे हृत्पद्मस्था परां मम।
अण्वीं जीवकलां ध्यायेन्नादान्ते सिद्धभाविताम्।।२७-२३।।
तयाऽऽत्मभूतया पिण्डे व्याप्ते संपूज्य तन्मयः।
आवाह्यार्चादिषु स्थाप्य न्यस्ताङ्गं मां प्रपूजयेत।।२७-२४।।

भगवंत सांगतात की, "कुंडलिनीशक्तीने परिशुद्ध झालेल्या पिंडातील हृत्पद्मात माझी ***परा*** अशी जी सूक्ष्म जीवनकला आहे, तिचे ***नादांती*** ध्यान करावे. सर्व भूतमात्रांना व्यापून असलेल्या त्या कलेचे अशी पूजनअर्चनादी तन्मय होऊन माझ्या भक्ताने करावे."

योगदा श्रीज्ञानेश्वरी या माझ्या प्रस्तुत ग्रंथात योगपथाचे सविस्तर विवेचन आहे. ***"आज्ञा ⇨ बिंदू ⇨ अर्धेंदु ⇨ निरोधिनी ⇨ नाद ⇨ नादांत ⇨ व्यापिनी (शक्ती) ⇨ समना ⇨ उन्मना"*** या स्तरांचे तिथे विवेचन केलेले आहे. तसेच सर जॉन वुड्रॉफच्या ***"द सर्पंट पॉवर"*** या ग्रंथात यांचे विस्तृत विवेचन येते.

श्रीनाथमहाराज भगवंत काय म्हणतात ते सांगतातः

.....। त्याच्या हृदयपद्मा आंत।
अण्वी जीवकला **तेथ। पाहावी माझी।।२७-१८७।।**
माझी जीवनकळा परम। सूक्ष्माहूनी अतिसूक्ष्म।१८८।।
अकार उकार मकारस्थिती। यांतैं प्रकाशे अण्वी जीवज्योति।
तें तंव *शब्दाहूनी परती। योगी नादांती लक्षिजे*।।१८९।।
तें देहीं सबाह्य परिपूर्ण। असोनि सूक्ष्मत्वें अलक्ष्य जाण।
तीतें *हृत्पद्मीं योगिजन। लक्षिति* आसनप्राणायामें।।१९०।।
तें अण्वी जीवकळा अव्यक्त। तीतें करोनियां व्यक्त।
योगी निजभावनायुक्त। हृदयीं चिंतित महामूर्ती **।।१९१।।**
नार जीवसमूह जाण। त्यांचे जे आयतनस्थान।
महामूर्ती श्रीनारायण। हृदयीं सज्जन चिंतिती **।।१९२।।**

"सर्व जगताला प्रकटवणारी ही जीवनज्योती आहे. हीच ***जीवकला.*** हिचेच योगी हृत्पद्मात ध्यान करतात. ***अलक्ष्य*** असे म्हणतात, ती हीच! हिलाच शब्दांच्या पलीकडची अव्यक्त असे म्हणतात. योगी हिलाच व्यक्त करून तिचे ध्यान करतात. ***संत म्हणतात ते हेच खरे निर्गुणापलीकडचे सगुण ध्यान!*** चौदा भुवने आणि तिन्ही लोकांना त्यातल्या जनसमुदायांसह धारण करणाऱ्या नारायणाची महामूर्ती ती हीच! आपापल्या इष्टाच्या स्वरूपात योग्यांना आणि भक्तांना हिचेच दर्शन होते."

हिच्याच भक्तीला भगवंत ***अभेदभजन*** असे म्हणतात.गृहातल्या दीपाप्रमाणे ही कला जीवन उजळवत असते. तिच्या चिन्मात्र तेजाचे तिला सगुणरूपात आणून योगी ध्यान करतात.

पुढील ओव्यांतून नाथमहाराज सांगतात की, "याच कलेची अभिव्यक्ती भक्तांना आणि योग्यांना प्रकाश, ज्योती, आणि नादरूपाने होते." दिव्य प्रकाश आणि तेजोदर्शन म्हणजे भगवंताचे तेजाने लखलखणारे सुदर्शनचक्र. अनाहतनाद म्हणजे त्यांचा पाञ्चजन्य शंख, प्रकाशाने लखलखणारी विद्युल्लतेसमान चक्रे आणि सुषुम्ना हीच त्याची कौमुदकी गदा, आणि ***"अति मनोहर केवळ। देखतां उपजति सुखकल्लोळ। परमानंदें आमोद बहळ। तैं लीलाकमळ ।।अ.२१, एक.भाग.।।"*** असे लीलाकमळ म्हणजे सहस्त्रार किंवा कोल्हाटपद्म! योग्यांना यांचेच तर दर्शन होते आणि ही ज्याच्याजवळ असतात तो भगवंतही मग आपले दर्शन अशा श्रीराम -श्रीकृष्णांच्या स्वरूपात देतोच!

"आणि भगवंताच्या द्वारावरचे द्वारपाल म्हणजे जयविजय तेच जीवशिव! त्याची निजाशक्ती श्रीराधामाई किंवा जानकीदेवी हीच तर त्याचे निरंतर चरण सेवणारी अर्धांगिनी! त्याच्या कृपाकटाक्षाने भक्तांना न लक्षिले जाणारे अलक्ष्य लक्षवते. साम्यतेचे त्याचे सिंहासन सायुज्यमिषाने त्यांना मिळते. ऐक्यतेची त्याची गादी त्यांनाही मिळते. त्यावर ते सहजासनात विराजमान होतात भगवंताच्याच कृपेने. तोच त्यांच्यावर तन्मयतेचे निजछत्र धरतो. संतोषाचे अबदागिरआणि ज्ञानविज्ञान चामर ढाळणारे दुसरे कोण आहेत तिथे! (अ.२१)"

बंकनाल

विहंगमयोगात ***बंकनाल*** या नाडीचे स्थान अत्यंत विशेष असे आहे. कबीरांनी आपल्या एका पदात हिलाच उद्देशून ***"बंकनाल रस पीजैं"*** असे म्हटले आहे. परमधामाच्या शेवटच्या टप्प्यात ही एक विशेष नाडी आहे. हठयोगात मेरुदंडस्थित सुषुम्नेचे जे महत्त्व आहे, तेच ध्यानयोग्यासाठी बंकनालचे आहे. पं.गोपीनाथ कविराजांनी या मार्गावर एक विशेष टिप्पणी त्यांच्या ***भारतीय संस्कृति और साधना*** या ग्रंथात दिली आहे.

माझ्या सध्याच्या जन्मातला योगपथ काही हठयोग तर महत्त्वाची वाटचाल ध्यानयोगाच्या मार्गाने झाली आहे. आज्ञाचक्रावरच्या अवकाशाचे आणि विहंगमपथाचे यात विलक्षण महत्त्व असते. बंकनाल ही नाडी मूलाधारातून निघून नाभिकमलाच्या डाव्या बाजूने जात स्थूल हृदय व वक्षस्थल यांना स्पर्श करत आज्ञाचक्रातल्या रुद्रग्रंथीला जाऊन मिळते. तेथून ती ब्रह्मरंध्रात जाऊन पोहोचते. मग मस्तकाच्या मागल्या भागास एक अर्धवर्तुळाकृती *(अर्धचंद्राकृती)* वळसा घालून महाशून्याच्या पुढे भ्रमरगुंफेत जाऊन मिळते. हेच परमात्म्याच्या परमधामाचे प्रवेशद्वार! याच अर्धचंद्राकारामुळे या नाडीला ***बंकनाल*** असे नांव मिळाले आहे.

हा बंकनाल या नाडीचा अवकाश अथवा योगपथ असा आहेः ***"मूलाधार ⇨ नाभि(कंद-कुंडलिनी) ⇨ स्थूल हृदयानिकटचा अवकाश ⇨ आज्ञाचक्र ⇨ रुद्रग्रंथी ⇨ त्रिकुटी ⇨ ब्रह्मरंध्र (शून्य) ⇨ महाशून्य ⇨ भ्रमरगुंफा ⇨ परमात्मधाम"***

माझा प्रवास याच मार्गाने झाला होता. म्हणून मला इतर चक्रांचे विशेषसे अनुभव न येता ***"मूलाधारस्थ धूपदाणीतील ज्योतीचे प्रज्वलन ⇨ मणिपुराला कुंडलिनीचे साडेतीन वेढे उकलण्याचे चार झटके बसणे ⇨ आज्ञाचक्र व रुद्रग्रंथीचे भेदन ⇨ भ्रमरगुंफा (अनाहतनादप्राकट्य)"*** या मार्गाची प्रचिती अगदी सुरुवातीलाच आली होती.

याच काळात जेव्हा माझी विकल अवस्था झाली होती, तेव्हा हरिपूरच्या त्या संतिणींनी मला आश्वस्त केले होते आणि आपल्या हाताचा तळवा एका विशिष्ट पद्धतीने मस्तकसंधीपासून ते ब्रह्मरंध्रापर्यंत अलगद नेला होता. त्यांची ही क्रिया सुप्त अशा आज्ञाचक्रस्थ उर्वरित प्राणापानादींना आणि शक्तीस्त्रोताला पुढचा मार्ग प्रदर्शित करणे आणि तेथे नेऊन पोहोचवणे अशा स्वरूपाची होती. त्याच वेळी दुसऱ्या एका गूढवाद्यानेही मला म्हटले होते की, "तुम्हाला चक्रांचे काही इतर अनुभव आले नाहीत. कारण तुम्हाला विमानातून इथे आणले आहे." ही माझी अवस्था होती १९८६ सालची.

पं.कविराजांनी विहंगमपथाबाबत असे म्हटले आहे की या योगमार्गात षट्चक्रभेदन करावे लागत नाही. कुंडलिनी कंदावर उठते आणि मूलाधारात प्रवेशून तेथून बंकनालनाडीमार्गाने आज्ञाचक्रात प्रवेशून सहस्त्रदल गाठते. त्रिकूटी इ.शून्ये पार करून महाशून्यातून गमन करून शेवटी भ्रमरगुंफेत प्रवेशते आणि पुढे चैतन्यतत्त्वात प्रवेश होतो.

या मार्गात षट्चक्रातील स्थूलहृदयाच्या निकटच्या अनाहतचक्राचा भेद करावा लागत नाही. म्हणजे तिथून अनाहतनाद उद्भवतो ही उपपत्ती लटकी पडते. नाद हा भ्रमरगुंफेचाच विशेष आहे, असे माझ्या प्रत्यक्ष अनुभूतींवरूनही प्रकट होते. असो.

याबाबत एक विशेष उल्लेखनीय गोष्ट सांगतो. माझी ही सगळी प्रगती आपल्या अतींद्रिय शक्तींनी निरीक्षणाऱ्या एका गृहस्थाने त्याबद्दलच्या विद्वेषातून एकदा मला फार विश्वासात घेऊन असे सांगितले की "तुमची कुंडलिनी तिथे सहस्त्रारात ठेऊ नका. गृहस्थाश्रम्याने आपली कुंडलिनी हृदयात (अनाहतात) ठेवावयाची असते." तो गृहस्थ मित्र म्हणून वावरत होता. नंतर त्याचे खरे स्वरूप कळले.

पण तेव्हा त्याच्या सूचनेप्रमाणे मी कुंडलिनीला हृदयात ठेवावी कारण तेच तर परमात्म्याचे स्थान आहे, असे पुराणे सांगतात. म्हणून तिला हृदयात आणण्याचा संकल्प केला. त्यासरशी माझ्या आज्ञाचक्रात खूप जोरात ठणकले आणि असे वाटले की कुंडलिनी आज्ञाचक्र उतरते आहे आणि त्या मनुष्याने सांगितलेल्या ठिकाणी आपण तिची स्थापना करतो आहोत.

पण नंतर आलेले अनुभव आणि शास्त्राधारे आता लक्षात येते की त्या गृहस्थाने जरी काहीही सांगितले असले तरी शक्ती स्वतंत्र आहे. ती आपल्या सांगण्यानुसार मार्ग घेईलच असे नाही. तिला ज्या ज्या वेळी ज्या ज्या क्रिया आवश्यक असतात, त्या त्या ती करते.

दुसरे असे की त्या मनुष्याला सर्वसामान्य हृदयच माहीत होते. वरचा अवकाश आणि आध्यात्मिक हृदय त्याच्या माहितीत नव्हते. तसेच वरच्या अवकाशातील आज्ञाचक्र, त्रिकुटी आणि भ्रमरगुंफांना जोडणाऱ्या गुह्य नाडीमार्गाचीही त्याला केवळ पुस्तकी वाचनामुळे आणि अननुभवामुळे कल्पना नव्हती. पण झाले असे की आध्यात्मिक हृदयाच्या अवकाशात म्हणजे आज्ञाचक्रावरच्या अवकाशात ती कुंडलिनी तेव्हा आली असावी. किंवा तिने आज्ञाचक्रावरच्या अष्टदलपद्मावरून वरच्या दहराकाशाकडे *(हृदयाकडे)* प्रस्थान केले असावे. किंवा सहस्त्रदलपद्मातून गुह्निनीनाडीद्वारे आज्ञाचक्रात उतरून पुढे बंकनालनाडीमार्गे भ्रमरगुंफेत गेली असेल. एकदा आज्ञाचक्र पार केले की पुनः आज्ञाचक्राखाली येणे होत नाही, असे शास्त्र सांगते. काय असेल, ते असो पण माझा अनाहतनाद तेव्हाही आणि नंतरही अखंड चालूच होता.

यावरून त्या गृहस्थाच्या इच्छेप्रमाणे माझी अधोगती झाली नाही किंवा प्रगतीत अडथळे आले नाहीत. कुंडलिनीची गती गहन असते. ती केव्हा कोणती क्रिया करील, ते आपल्याला समजत नाही, हेच खरे! जसे त्या गृहस्थालाही कळत नव्हते. असो.

योगपथाचे अंतिम विवेचन::::

गुह्निनी नाडी

कुंडलिनी अवरोहाचा आताच एक प्रसंग सांगितला होता. मी त्या वेळी त्या गृहस्थाच्या सांगण्यावरून हृदयात *(अनाहतचक्रात)* कुंडलिनी आणण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळी ती तेथे न येता आध्यात्मिक हृदय म्हणजे आज्ञाचक्रात कशी आली ते आताच सांगितले. याबाबत पं.गोपीनाथ कविराजांनी उद्धृत केलेले योगविज्ञान असे आहे (संदर्भग्रंथ-तत्रैव):

योग्याला गुह्निनी नाडीच्या साहाय्याने हृदयात येता येते. हृदय हे ज्ञान व कर्माचे, तसेच पिंड व ब्रह्मांडाचे,

संधिस्थान आहे. सुषुम्ना ही ज्ञाननाडी आहे. सहस्त्रार शिवस्थान आहे. खरी शांती हृदयातच असते. संवितचे मूलस्थान हृदय अथवा ज्याला दहराकाश म्हणतात, तेच आहे. हेच आपण म्हणतो ते आध्यात्मिक हृदय! गोपीनाथमते तसेच श्री.बाबामहाराज आर्वीकरांच्या मते सहस्त्रार आणि ब्रह्मरंध्रांचा पथ वेगळा आहे. ब्रह्मरंध्र हे हृदयाशी संबंधित असल्याचे पं.गोपीनाथांचे मत आहे, हे लक्षात घेता त्यांचे असे म्हणणे आहे की योग्याने ***संवित*** म्हणजे कुंडलिनीला सहस्त्रारातून गुह्यिनीनाडीद्वारे खाली आणून आज्ञाचक्राद्वारे हृदयात स्थापन करावे.

याचाच अर्थ असा होतो की योग्याने ***"सहस्त्रार ⇨ गुह्यिनीनाडीद्वारे ⇨ आज्ञा ⇨ हृदय, पुढे सुषुम्नाद्वारे (ब्रह्मरंध्रादी,) ⇨ भ्रमरगुंफा ⇨परमधाम"*** या मार्गाने जावे.

दोन योगपथ

पं.गोपीनाथांचे म्हणणे योग्य असल्यास त्यांच्या मते असणारा योगपथ असा होतो:

१)विशद्धचादी षट्चक्रे ⇨ आज्ञाचक्र ⇨ चंद्रचक्र ⇨ अमृतचक्र ⇨सत्रावी कला ⇨ सहस्त्रदलकमल

२)विशद्धचादी षट्चक्रे ⇨ आज्ञाचक्र ⇨त्रिकूटी ⇨शून्य(ब्रह्मरंध्र) ⇨ अष्टदलकमल ⇨ महाशून्य ⇨ भ्रमरगुंफा ⇨परमधाम (सत्यलोक, अलक्ष्य, अगम, अनामी लोक)

षट्चक्रे ते सहस्त्रदलासकट त्रिकूटी ही स्थाने पिंडात येतात. त्रिकुटीवरची शून्य(ब्रह्मरंध्र), भ्रमरगुंफा इ.स्थाने ब्रह्मांडात येतात. आज्ञाचक्राला हृदयस्थान असे अतिव्याप्त यौगिक संज्ञात म्हणतात.

योगपथाबाबतचे अंतिम मत::::

ज्ञानदेवांचा योगपथ

योगपथाबाबतचे अंतिम मत निर्धारतांना ज्ञानदेवांचा एक अभंग पाहू या. जोपावेतो त्या चिन्मय वस्तूला पाहिले नाही, तोपावेतो याचा निश्चय करणे कठीण आहे, असे ते म्हणताहेत या अभंगातून.

<u>सहस्त्रदळ</u> साजिरें <u>नयना</u>चें शेजारीं।
<u>अर्धमातृका</u> अंतरीं <u>चिन्मय वस्तू</u>।।१।।
ॐकार नादीं कीं नाद ॐकारीं।
दैवीं निरंतर प्रणवीं पाहा।।२।।
<u>मकार अर्धमात्रा शून्या</u>चा निश्चय।
आत्मा एक असें स्वयें रया।।३।।
ज्ञानदेओ म्हणे कैवल्याचा दाता।
कोण पत्रीं हें कविता नाहीं ऐसिं ।।४।।
अ.क्र.८०१।।

"आज्ञाचक्रावर ते सुंदर सहस्त्रदळ असते. तेथल्या अर्धमात्रेच्या आत ती चिन्मय वस्तू असते. तिथेच ॐकार आहे आणि नादही आहे. त्यातला कोण कोणाच्या अंतरी आहे, दैवी कळा म्हणजे उन्मनी कुठे विराजते, मकार कुठे संपतो, अर्धमात्रा कोठून सुरू होते, शून्यस्थान कोणते, इ.गोष्टींचा निश्चय या चिन्मय वस्तूच्या (प्रणवाच्या) स्थानात पोहोचले की होतो. आत्माच हे ॐकार, सहस्त्रदळादी सर्व झाला आहे, हे तेथे गेले की समजते. जी ही गोष्ट मी सांगतो आहे, ती कोणीच यापूर्वी सांगितलेली नाही," असे ज्ञानदेव म्हणताहेत.

ज्ञानेशांच्या पद्धतीत योगस्थाननामनिर्देशानुसार ***"त्रिकूट ⇨श्रीहाट ⇨गोल्हाट ⇨औटपीठ ⇨सहस्त्रदळ ⇨ब्रह्मरंध्र ⇨भ्रमरगुंफा (अनुहातनादस्थान) ⇨ब्रह्मस्थान"*** असा योगपथ आहे. ही सगळी ब्रह्मांडातील स्थाने आहेत, असे त्यांचे निर्देशन आहे *(अ.क्र.७३५, ७३९, ७४४,७४८, ७४९, ७६७, ७७२, ७७३, ७७४, ७७७,७७९,७८०,७८२,७८४,७८६, ७८८, ७९४, ७९८, ८०१,८०२,८०३, ८०५,८०६, ८०७,८१३, ८१६, ८१७, ८२०, ८२२,८२३,८२५,८३०,८३३, ८३५,८३६, ८३७, ८४१ इ.)*.

ज्ञानदेवांच्या उपरोल्लेखित अभंगांतील काही ओव्या वानगीदाखल पाहू या:

"ब्रह्मरंध्रीं निःसंदेहीं निजवस्तू। सांवळे सुकुमार बिंदूचें अंतरीं। अर्धमात्रेवरी। विस्तारलें।।त्रिकूट श्रीहट गोल्हाट तिसरे। औटपीठादि सारे। ब्रह्मांडासीं।।७३५।।"; "महाकारण मसुरामात्र सदोदित। ब्रह्मरंध्र साद्यंत वसे। .. सहस्त्रदळीं निश्चय आत्मा असे।।७३९।।"; "जागृतीच्या ठायीं। निजतो सहस्त्रदळीं। बिंदूच्या समेळीं उच्चार होतो।।७४४।।"

महाकारण देहात मसुरेच्या आकाराचा बिंदू असतो. तो ब्रह्मरंध्री वसतो. त्याच्या आत ब्रह्मरंध्रात निजवस्तू असते. त्रिकूट, श्रीहट, गोल्हाट आणि औटपीठादी स्थाने ब्रह्मांडातील आहेत. हा सगळा अर्धमात्रेचा विस्तार आहे. सहस्त्रदळातल्या ब्रह्मरंध्रात आत्मा असतो.

"नयनाचें शेजारीं दशवें द्वार बापा। अग्नीचक्र भ्रुवांग शोभतें प्रकाशत्व। प्राणासीं उलथावें तयावरी।सहस्त्रदळीं ब्रह्मरंध्र शोभतसे निळें। प्रकाशाचें उमाळें जेथें असती।।७४८।।"

आज्ञाचक्र भ्रूमध्यात प्रकाशाने उजळलेले असते. त्याच्याहीवर तृतीय नेत्रावर सहस्त्रदळात निलवर्णाचे ब्रह्मरंध्र म्हणजे दशमद्वार असते. तेथूनच आत्मप्रकाशाचे उमाळे फुटत असतात.

"गोल्हाटाचें मुळीं ज्ञानदेव बैसला। सहस्त्रदळीं शोभला काळा बाई।।७६७।।"; "गुजगुजीत रूप सांवळें सगुण। अनुभवितां मन वेडें होय।। भ्रमरगुंफा ब्रह्मरंध्र तें सुरेख..।।७७२।।"; "सहस्त्रदळ बिंदु त्यात तेज दिसे।..तें रूप बा रे चैतन्य बा।।७७३।।"

गोल्हाटाच्य मूलस्थानी सहस्त्रदळावरील ब्रह्मरंध्र आहे. त्याच्यावरल्या भ्रमरगुंफेवरच्या बिंदूत ते गुजगुजीत सांवळे रूप वसते. तेच चैतन्य होय. काळ्या पुरुषाच्या त्या मूळ स्थानी ज्ञानदेव बसलेत.

"..गोविंद हा ध्यावा याचि देहीं। .. सहस्त्रदळीं उगवला सूर्य जैसा। ज्ञानदेव म्हणे नयनांतील रूप। या नांव चित्पद तुम्हीं जाणा।।७७४।।";"परेचें शिखरावरी वस्ती माझीं झाली। ब्रह्मरंध्र पाहीं सत्पद तें।.. शून्य गगना तेज दिसे।निरंतर वसे निरंतर।। ज्ञानदेव म्हणे वृत्ति सहस्त्रदळीं लावा। मसुराकार बरवा ध्यायी जाई।।७७७।।"

सहस्त्रदळी सूर्यासारखा उगवतो, तो गोविंद ध्यायावा. तृतीयनेत्रात जी ज्योती दिसते, ती चित्पद होय. परेच्या पलीकडे ब्रह्मरंध्र आहे. तेच सत्पद आहे. तिथल्या सहस्त्रदळावरल्या या शून्य गगनात म्हणजे ब्रह्मरंध्रात मसुराकार तेज दिसते. तेच परब्रह्म आहे. त्याचेच ध्यान करावे.

"सहस्त्रदळावरी तेज शुद्ध असे। त्या तेजें प्रकाशें चंद्र बापा।। उन्मनीचें ध्यासे सहस्त्रदळ गाजे।..।।७७९।।"; " सहस्त्रदळीं वरुतें परेजवळीं। अनुहातनाद ब्रह्मस्थानीं असे। ।७८०।।"; "दशमद्वार अग्र शून्य सूक्ष्म गगनीं। जेथ असे उन्मनी अखिल रूपें।।७८२।।"; "नवा आंत ओवरी औटपीठाजवळीं। शून्यातीत काळीं सुकुमार। उन्मनीचा मार्ग तेंचि ठायीं।।७८४।।"

सहस्त्रदळावरल्या परेजवळच्या ब्रह्मस्थानी उन्मनीतून प्रकटणाऱ्या अनाहतनादाने सहस्त्रदळ गर्जते आहे. दशमद्वाराच्या अग्रावरल्या सूक्ष्म गगनात उन्मनी वसते. नवद्वारापुढच्या औटपीठावरच्या ओवरीजवळ शून्याच्याही अतीत असलेला काळा जिथे वसतो त्याच ठिकाणी उन्मनीचा मार्ग असतो.

"सहस्त्रदळ ब्रह्मरंध्र एकें नेत्रीं देखें। देखणा पारुखें तें ठायीं बा।। नादीं नाद भेद भेदुनी अभेद । पश्चिममार्गीं आनंद देखुनी राहें।।८०३।।"; "आत्माराम देखें सहस्त्रदळावरी। उन्मनी हें पाहीं आरुतें तेंही।।८०६।।"

तृतीयनेत्रावरचे सहस्त्रदळ आणि ब्रह्मरंध्र पाहणारा पाहण्याचे विसरून जातो. भेदाच्या अतीत होऊन भ्रमरगुंफा या नादस्थानातला नाद ऐकून सहस्त्रदळावरच्या उन्मनीच्याही पल्याडच्या आत्मारामाला पाहून आनंदात स्थिती होते.

"शून्याचा उद्भव सांगतो..।औटपीठीं वहिला सूक्ष्म मार्ग।। मनपुराचें वरी द्वादश अंगुळें। तयावरी गेलें अव्हाटेनें।। आतां तया सदनीं उफराटे मार्गें। वळंघितां सवेग पश्चिमपंथीं।। पश्चिमपंथीं नाडी घोष जिचा गाहे। तेथूनी ध्वनीचा विस्तार गां।। ध्वनीचेही वरी शुद्ध तेज असे। चंद्रमा प्रकाशे तेंच ठायीं।।.. ज्ञानदेव म्हणे मज त्रिकुटाची गोडी। धरितां आवडी ब्रह्म लाभ।।८२२।।"

त्रिकुटापुढल्या औटपीठावर एक सूक्ष्म मार्ग आहे. आज्ञाचक्रावरल्या मनश्चक्रापुढे बारा अंगुळे अंतरावर मूर्ध्निस्थानी जाऊन उफराटे म्हणजे अर्धचंद्राकृती बंकनाल नाडीच्या उलट्या प्रदक्षिणामार्गाने वेगाने पश्चिमपंथ ओलांडून जावे. तेथून पुढे सुषुम्ना नाडीचा अनाहतनादघोष सुरू होतो. त्या ध्वनीचा विस्तार ओलांडून गेलात की पुढे शुद्ध तेज असते. त्रिकुटापुढच्या या मार्गाची आवड धरावी आणि त्यामार्गे जाऊन ब्रह्माचा लाभ करून घ्यावा.

योगपथाबाबतचे माझे मत

आपण आता योगपथाबाबतचे माझे अंतिम मत माझ्या अनुभवांच्या प्रकाशात निर्धारू जात आहोत, पण अर्थातच ज्ञानदेवांनी या सगळ्या अभंगांतून दर्शवलेल्या मर्यादांमध्ये राहूनच!

माझ्या मते गोपीनाथ, बाबामहाराजादींनी दाखवलेले दोन मार्ग समजा असलेच तरी त्यांच्यातही सहस्त्रार ते त्रिकूटी असा सुषुम्नापथ नक्कीच आहे. सहस्त्रारातून त्रिकुटीत येण्यासाठी आज्ञाचक्रावर उतरून आलेच पाहिजे असे जे त्यांचे मत आहे, ते माझ्या मते बरोबर नाही. तसेच सहस्त्रदलकमल bypass करून साधक आज्ञाचक्रातून बंकनाल या नाडीद्वारे थेट त्रिकूटीत जाऊ शकतो. म्हणजे होणारे योगपथ असे आहेत:

(१) सुषुम्नापथ:सहस्त्रदलासकट सर्व योगपथ ***"विशुद्ध्यादी षट्चक्रे ⇨आज्ञा ⇨ सहस्त्रदल ⇨ त्रिकुटी ⇨ब्रह्मरंध्र(शून्य) ⇨अष्टदलकमल***

⇨महाशून्य ⇨ भ्रमरगुंफा ⇨परमधाम" हा सुषुम्नेद्वारे क्रमला जाऊ शकतो.

(२) **बंकनालपथ:** ***"मूलाधार ते आज्ञाचक्र ⇨रुद्रग्रंथी ⇨ब्रह्मरंध्र"*** ते पुढे इतर स्थाने घेत तो ***"⇨भ्रमरगुंफा ⇨परमधाम"*** असा बंकनालाद्वारे जाऊ शकतो.

(३) **गुह्यिनीपथ:** ***"आज्ञाचक्रातून ⇨सहस्रार"*** असा पथ गुह्यिनीनाडीद्वारेही क्रमला जाऊ शकतो. ही नाडी आज्ञेखाली पिंडात जाते म्हणजे मूलाधारादी चक्रात जाते. हाही एक योगपथ आहे.

(४) **गुह्यपथ आणि इतर पथ :** आज्ञाचक्र, त्रिकूटी व भ्रमरगुंफा या एका गुह्य नाडीद्वारे जोडलेल्या आहेत, असे मी मागेच स्वानुभूतीच्या आधारे सांगितले आहे. या पथाने जातांना मधली इतर सहस्त्रदळादी स्थाने न घेता साधक सरळच भ्रमरगुंफेत जाऊ शकतो. तसेच दुसऱ्या एका गुह्य नाडीद्वारे आज्ञाचक्र हे भ्रमरगुंफेला जोडलेले आहे. तोही एक पथ आहे. कंद ते भ्रमरगुंफा ते व्यालदेश असा पण एक थेट जाण्याचा मार्ग आहे.

योग्यांना येणारे अनुभव बहुशः एकाच पथाचे असल्याने आणि बऱ्याच योग्यांना ही सूक्ष्म गुंतागुंत त्यांच्या आत्मविभोर अवस्थेत जाणवत नसल्याने, आणि बऱ्याच जणांना ***"शाब्दे पारे च निष्णात"*** असे गुरू लाभत नसल्याने ही आज्ञाचक्रानंतर दोन वेगवेगळे एकमेकांशी संबंध न ठेवणारे पथ असल्याची कविराजादी मते प्रचुर झाली आहेत.

आपण इथे सादर केलेले स्पष्टीकरण या सर्वाचा निश्चितच खुलासा करणारे आहे आणि ते माझ्या योगानुभवांवरसुद्धा आधारलेले आहे. असो.

म्हणून माझे हे योगमत लक्षात घेता योगपथ कसा होतो, ते पाहू याः

१)सुषुम्नापथः मूलाधार ⇨ विशुद्ध्यादी चक्रे ⇨ आज्ञा ⇨सहस्रार ⇨त्रिकूटी ⇨ब्रह्मरंध्र (शून्य) ⇨ अष्टदलकमल ⇨ महाशून्य ⇨भ्रमरगुंफा ⇨परमधाम (सत्य, अलक्ष्य, अगम, अनाम्यादी लोक)

२) बंकनालपथः "मूलाधार ⇨ नाभि(कंद-कुंडलिनी) ⇨ स्थूल हृदयानिकटचा अवकाश ⇨आज्ञाचक्र ⇨ रुद्रग्रंथी ⇨त्रिकुटी ⇨ ब्रह्मरंध्र (शून्य) ⇨ महाशून्य ⇨ भ्रमरगुंफा ⇨परमात्मधाम"

३) गुह्यिनीपथः मूलाधारादी षट्चक्रे ⇨ आज्ञा ⇨सहस्रार

४) इतर गुह्यपथः (अ) कंद ⇨ (आज्ञा) ⇨(त्रिकूटी) ⇨ भ्रमरगुंफा ⇨ दयालदेश; (ब) कंद ⇨ आज्ञा ⇨ भ्रमरगुंफा ⇨ दयालदेश; (क) कंद ⇨ भ्रमरगुंफा ⇨ दयालदेश आणि

(ड) कंद ⇨दयालदेश (हा सगळ्यात सरळ मार्ग आहे आणि खरा विहंगमपथ किंवा ज्ञानमार्ग तो हाच!)

मला वाटते की प्रगत योगजिज्ञासूंसाठीही एवढे गुह्यप्रकाशन पुरे ठरावे.

अंतिम निर्वाण

पं.गोपीनाथ कविराज (तत्रैव) यांचे असे मत आहे की जेव्हा योग्याचे अंतिम पथक्रमण चालू असते, तेव्हा तो शून्याकाशात विहार करतो. निरंतर अमृतपान करतो. त्या वेळी त्याची दृष्टी अष्टदलकमलात अवस्थित असणाऱ्या सुईच्या अग्रासमान द्वाराकडे लागते. ते भेदून तो त्रिवेणीस्नान करून वर चढतो. काही काळाने त्याचा भ्रमरगुंफेत प्रवेश होतो. तिथे निरंतर अनाहतशब्दाचे गुंजन होत असते. सुंदर रूप आणि दिव्य गंध यांचाही साक्षात्कार त्याला घडत असतो.

भ्रमरगुंफेत शब्द ऐकू येतो, ती पण ब्रह्मांडातीत आहे. ***सुरति, निरति, मन व प्राण*** यांची एकाग्रता झाली की ***अनाहतशब्द*** ऐकू येतो, असे ते म्हणतात. मागे एकदा एकाग्रतेविषयक प्रश्न कृष्णाताईंपुढे निघाला होता. त्या वेळी माझ्या कार्यासाठी मला एकाग्रतेची जरूरी आहे, असे मी त्यांना सांगितले होते. त्यावर त्या स्तब्ध होऊन माझी ती प्रगत अवस्था पाहून माझ्याकडे काहीशा चकित नजरेने पाहत होत्या, असे मला आठवते.

भ्रमरगुंफेत प्रवेश केल्यानंतर यथावकाश योग्याला अलौकिक आणि निर्मल दिव्य दर्शनशक्ती प्राप्त होते. तेथून परमधामात प्रवेश करणे सोपे आहे. सत्यस्वरूप निराकार चिन्मय पुरुषाचे ते निवासस्थान आहे. त्याही अवस्थेची एक परावस्था आहे. तिथे शब्द असूनही निःशब्द असतो. त्यातल्या केंद्रातल्या प्रवाहमार्गाने योग्याचे वरती आरोहण होते. तेथे जाणे अत्यंत कठीण आहे. त्याला अगमलोकही म्हणतात. तेथे परमानंद असतो.

"मुंगी उडाली आकाशीं"

अशा या अवघड स्थानाबद्दल श्रीज्ञानदेव काय म्हणतात, ते पाहू याः

स्थूलदेह सूक्ष्म कारण तिसरा देह।
चौथा महाकारण ऐक बापा।।१।।

औटपीठाचें उदरीं कर्पूर वर्णावरी।
श्यामाचें अंतरीं महाकारण।।२।। अ.क्र.८०२।।

काळा पुरुष कोठे आहे त्याबाबत वरील अभंग आणखी काय निर्देशितो, पाहा. "चार देह आहेतः स्थूल, सूक्ष्म आणि कारण यांवरचा महाकारणदेह असे ते असतात. औटपीठाआत महाकारणदेह असतो."

..महाकारणीं आतुला लक्षावा पुतळा।
उन्मनी हें कळा दैवी वरी।।३।।
सहस्त्रदळ तेंचि कीं आन नाहीं ऐसें।
महातेज वसे त्याचे अंतरीं।।४।।.. ।।अ.क्र.८०२।।

"त्या महाकारणदेहाच्या आत असणारा तो काळा पुतळा लक्षावा, सहस्त्रदळकमळाच्या अंतरी हे महातेज (काळापुरुष) वसते. त्यातच त्याची उन्मनी ही दैवी कळा असते," असे ज्ञानदेव म्हणतात.

..पश्चिममार्ग तेथूनि ऊर्ध्व ऊंच गगनीं।
जेथ एक कामिनी एकलीचि।।५।।
मार्ग नाहीं तेथ कोणे रीतीं जावें।
सुषुम्नेसीं वळघावें सामर्थ्येसि।।६।। अ.क्र.८०२।।

सहस्त्रदळावर जाणारा मार्ग पश्चिममार्ग आहे. तो तिथून ऊर्ध्वस्थ आहे आणि खूप उंचावर आहे. या ठिकाणी कोणीही इतर जाऊ शकत नाही. फक्त एक ती कुंडलिनीच तिथे जाऊ शकते. सुषुम्नेला ओलांडून तिथे जावे लागते. पण एवढे सामर्थ्य कसे आणावे?"

..तेथूनि ऊर्ध्व छिद्र मुंगी नेत्रातुल्य।
त्यातून उडणें भलें चपलत्वेंसिं।।७।।
जडतां वळंधितां बरी नारी आपण एक।
नरनारी नपुंसक एकरूप।।८।।
ज्ञानदेओ म्हणे जो उडुनी जाय तेथ।
परब्रह्मींचि मात तोचि जाणें।।९।। अ.क्र.८०२।।

"त्या ऊर्ध्वस्थानी जण्याकरता एक मुंगीच्या नेत्रासारखे सूक्ष्म छिद्र (ब्रह्मरंध्र) असते. त्यातून चपळतेने उडून वर जावे. जडत्व (पिंडदेह) खाली सोडून आपल्याला एका कुंडलिनीसह तिथे जाता येते, ज्या ठिकाणी नर (जीव), नारी (कुंडलिनी) आणि नपुंसक (आत्मा, परब्रह्म) हा भेद उरत नाही. जो तिथे उडून जाऊन पोहोचतो, तोच परब्रह्माला जाणणारा असतो," असे ज्ञानदेव म्हणतात.

अंगुष्ठमात्र पुरुषाचे स्थान हृदय म्हणजे आज्ञाचक्र ते ब्रह्मरंध्रच होय. तेथे महाकारणदेहाचे स्थान आहे. एकदा अतिसूक्ष्म अशा मुंगीनेत्रतुल्य छिद्रातून आपण प्रवेश केलेला असून त्याच्याही वर जात आहोत असे दिसले. हे ब्रह्मरंध्रातून वर जाणे होते.

ज्ञानदेवांचा एक अभंग याबाबत लक्षणीय आहेः

अनुहात ध्वनी वरि चंद्रमा वर्तुळ।
तेजाचें उमाळें अनंत तेथें।।१।।
ब्रह्मशिखरीं निराळ्या मार्गावरी।
अविनाश कर्णकुमरी एकलीच।।२।।
तेथुनी महाद्वार उन्मनीची वार्ता।
त्यावरी चढतां रीग नसे।।३।।
अणूचें जें अग्र ऐसा तेथ मार्ग।
औटपीठीं सवेग जावें वरी।।४।।
पंचदेव तेथें एकरूपा देखती।
औटपीठीं वसती आरुतें तेंहीं।।५।।
तयाचेही वर रश्मिअग्रामधूनी।
शुद्ध ब्रह्म निर्वाणिं असे तेथ।।६।।
ज्ञानदेव म्हणे ब्रह्मांडाचा अंत।
नाहीं ऐसीं मात बोलतसें।।७।।
अ.क्र.८०५।।

"ब्रह्मगिरीच्या शिखरावर जाण्याचा एक निराळा मार्ग आहे. त्यावर आज्ञाचक्र आहे. त्याच्याहीवर उन्मनीचे स्थान आहे. तिथे जाणे अत्यंत कठीण आहे. अणूच्या अग्राएवढा सूक्ष्म असा मार्ग तिथे असतो. हेच ब्रह्मरंध्र होय. औटपीठावरून वेगाने त्या ठिकाणी जावे लागते. औटपीठावरच पंचदेवांची एकरूपत्वाने वस्ती असते. त्याच्याहीवर या रश्मिअग्रतुल्य अशा ब्रह्मरंध्रातून गेले की उन्मनी असते. तिथे अनंत तेजाचे उमाळे फुटत असता. अनुहात नाद असतो. आणि त्या तेजाची जी ज्योती (चंद्रमा वर्तुळ) त्यातच हे शुद्ध ब्रह्म असते. हे स्थानच ब्रह्मांडाचे उगमस्थान आहे. ब्रह्मांडाचा अंत नाही," असे ज्ञानदेव म्हणतात.

आणखी काही वेळा अशीच दृश्ये मी पाहिली आहेत. त्यात असे दिसे की मी अवघड उंचच उंच बेलाग कड्यांवरून, पायऱ्यांवरून चढून जातो आहे. शेवटी शेवटी हे मार्ग इतके आकुंचित होत असत की आपण यातून कसे वर जाणार अशी मनाला धास्ती वाटू लागे. पण शेवटी तिथे जाऊन पोहोचत असे.

ही सगळी दृश्ये ब्रह्मरंध्राच्या अवकाशाची होती. तिथे जाणारी सुषुम्नेची वाट अवघडच आहे. अशा या अनुभवांनाच उद्देशून मुक्ताबाईंनी ***"मुंगी उडाली***

आकाशीं। तिने गिळिलें सूर्यासीं।" असे आपल्या अभंगात म्हटले आहे.

सगुण साकारातून निर्गुणनिराकाराकडे::::

माझी अनुभूती

अगदी अलीकडे मी सगुणातून निर्गुणात गेलो होतो. तो अनुभव येथे ग्रथित करत आहे. ते दृश्य असे होते:

मी एका अधांतरी असलेल्या देवळाच्या प्रदक्षिणामार्गात उभा आहे. मागचा मार्ग दिसत नाही. पण मी उभा आहे तिथून फक्त अर्धीच प्रदक्षिणा करावयाची आहे. प्रदक्षिणामार्ग अत्यंत चिंचोळा आहे. अगदी कबीर म्हणतात तशी ***"सँकडी गली"*** आहे. देऊळ आणि हा मार्ग अतिशय उंच ठिकाणी अधांतरी असल्याने त्या मार्गावरून एक पाऊलही बाजूला पडले तर एकदम खोल कुठेतरी जाऊन पडेन अशी भीती मनात आहे. पण तरीही मी धैर्यपूर्वक मंदिराच्या भिंतीला डावे अंग चिकटवून तो अर्धा प्रदक्षिणामार्ग उलट्या दिशेने पार करून देवळाच्या दारापुढे उभा राहतो.

तेव्हा असे दिसले की देवळात बाहेरून यावयाचा मार्गही तसाच अधांतरी आहे आणि तोही अरुंदच आहे, पण मी आलेल्या मार्गापेक्षा बराच प्रशस्त! पण हे दोन्ही मार्ग अधांतरी असूनही ते पारदर्शक होते. कुठेही *Gross / Corporeal Matter* नव्हता. उलट ते सर्व दृश्य ***Ethereal*** असल्यासारखे दिसत होते. देवळात येण्याचा मार्ग काही अंतरानंतर धुक्यात गुरफटून अंधुक झालेला दिसत होता. हातात उदबत्त्या घेऊन देवळात प्रवेश केला. देवाचे दर्शन घ्यायचे म्हणून पुढे जाऊ लागलो. तर पाहिले की देवळाच्या साधारणपणे दोन तृतीयांश भागात काळाभोर सुंदर गालिचा पसरलेला होता. आत कोणीही नव्हते.

पुढे होऊन गर्भागारातली मूर्ती पाहावी म्हणून पाहिले, तर तिथे मूर्ती नव्हती. रिकामी जागा फक्त होती. ते पाहताच जरा आश्चर्य वाटले. आजूबाजूला काहीही नव्हते. स्तब्धता आणि अतीव शांतता यांनी तो स्वप्नरम्य परिसर व्यापलेला होता. नंतर लक्षात आले की ज्या देवाची पूजा करण्याकरता आपण हे पूजाद्रव्य घेऊन एवढ्या चिंचोळ्या धोकादायक मार्गाने अधांतरी चालत आलो, तो देव तर इथे नाहीच. पण ***हे तर देव नाही त्याचे देऊळ आहे.***

मग पटकन लक्षात आले की संतांनी तो ***निर्गुण निराकार*** आहे, असेच तर सांगितलेले आहे. म्हणजे हे त्याचे देऊळ आहे तर. इथे आपल्याला गणपती, देवी अशी कोणाची मूर्ती कशी दिसेल? आणि हे पूजाद्रव्य तरी काय कामाचे? त्याला अशी कोणती पूजा पोहोचेल? तो तर अनामी आहे. आणि मी अशा या अगमलोकातल्या त्याचे हे असे दर्शन घेतो आहे. मग काही मी तिथे उदबत्ती लावली नाही. बराच वेळ त्या ठिकाणी निरखून पाहात उभा होतो, झालं!

हा होता दृष्टांत सगुणातून निर्गुणाकडे जाण्याचा! ***बंकनाल*** अर्धचंद्राकार असते, तिच्यावरून हा उलट्या अर्ध्या प्रदक्षिणेचा प्रवास. महाशून्यातून निरशून्याचा प्रवास! भ्रमरगुंफाही मागे टाकून जाणारा योग्याचा अंतिम प्रवास!

निरंजनाची भेट

त्यानंतर काहीच दिवसांनी दुसरा एक अनुभव आला. वेड्यावाकड्या पायऱ्यांचा मार्ग. उंचच उंच जिने. अंधाऱ्या अंधुक प्रकाशाच्या गल्लीबोळातून प्रवास. बरोबर लोक जातयेत आहेत. शेवटी लागतो एक अति उंच जिना. जवळजवळ उभ्या कड्यासारखा. मी मोठ्या कष्टाने तो चढतो आणि त्याच्या शेवटी लागतो एक उंचच उंच कडा. मी त्याच्यावर कसा बरं चढू शकणार! पण तरीही प्रयत्नपूर्वक चढतो. तर असा अनुभव की मी तो चढत नसून मला कोणतीतरी अदृश्य शक्ती वर ओढून घेत आहे. लोखंडाला जसे एखाद्या चुंबकाने ओढून घ्यावे तसे. प्रकाशाचा एखादा किरण आपल्याबरोबर मला घेऊन जातो आहे, मी पण प्रकाशच आहे, असे जाणवून तितकेच अल्लद वाटत होते. तो कोणतातरी Force मला जाणवतो आहे. पण मी तरीही इतक्या सहजतेने वर जातो आहे की जसा काही मागे असणाऱ्या लोकांनी मला वर ढकलावे आणि त्यांच्या अंगाखांद्यांच्या शिड्या बनवून ते मला वर ढकलत आहेत असा.

शेवटी मात्र साधारण काही फूट अंतर राहिले असता मला माझ्याच बळावर वरती जावे लागले. कड्यावर हात पोहोचताच त्यांच्या जोरावर मी स्वतःला वरती ओढून घेतले आणि जरा निवांत होऊन आजूबाजूला बघू लागलो. मनात आले आता नको बुवा त्या तिथे परत खाली जाणे. एवढे कष्ट कोणी परत परत करायचे इथे पुनः वर येण्यासाठी. आपण आता इथेच राहू या!

मी वर पोहोचताच तिथे असलेल्या काही लोकांनी माझे आनंदाने स्वागत केले आणि मी पण तिथे येऊन पोहोचल्याबद्दल माझ्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला.

"दुजेवीण संवादु"

एकदा तिथे पोहोचलो खरा. पण अजूनही पुढे कुठे जायचे आहे का याबद्दल मी विचार करू लागलो. त्या वेळी तिथे आता कोणीही नव्हते. पण मला असे जाणवले की मी

कोणातरी अदृश्य अव्यक्त अशाबरोबर आहे. ते कोण ते मला दिसत नसले तरी त्याचा माझा संवाद सुरू झाला.

मी म्हणतो: "मी कुठे आलो आहे? एवढा उंचच उंच चढ चढून मी तर अगदी थकून गेलो आहे. मी परत मागे जाणार नाही. उगाचच मला हा एवढा जीवघेणा चढ परत चढायला लागेल ना?"

त्यावर त्याचे उत्तर आले: "इथून आता पुढे कुठेच जायचे नाही आहे तुला. हाच या मार्गाचा शेवट आहे. तू तर आता त्या अंतिम तत्त्वापाशी, त्या परमधामात, त्या परब्रह्माला येऊन पोहोचला आहेस, हे जे काही इथे आहे, ते तूच तर आहेस! परब्रह्म, परमतत्त्व, परंधाम हे सगळे कोण आहे तुझ्यावाचून! सगळं विश्वच तर इथे आहे आणि नाहीही! तूही तर नेहमीचाच इथे होतास, अगदी तिथे जरी होतास तरी पण!"

मी कोण आणि तू कोण::::

"तत्त्वमसि"

मी विचारले: "काय तुम्ही आत्मा आहात काय?" त्याचे उत्तर: "होय आणि नाहीही! हेच ते ***"तत्"*** आहे ज्याची उपनिषदे वाखाणणी करतात. ***"तत्त्वमसि"*** हेच ते तिथेही आहे आणि इथेही आहे. बाहेरच्या जगातही तेच भरलेले आहे, जर का तुझ्या कल्पनेत असणारे असे काही बाहेरचे जग खरोखरच अस्तित्वात असले तर! तुझ्या मनात ते जग असते आणि त्यात तू असतोस, तेव्हाही तू इथेच असतोस!"

सद्गुरू

मी विचारतो, "तुम्ही सद्गुरू आहात का? श्रीज्ञानदेवमहाराज सद्गुरू आहेत का माझे? मी तर ***"सद्गुरू, सद्गुरू"*** असा घोष लावला होता हा चढाचा जीवघेणा मार्ग चढतांना सगळा वेळ! त्यांचीच कृपा की मी इथपर्यंत चढू शकलो!"

त्याचे उत्तर: "नाही! मी सद्गुरू नाही! आणि तुम्हाला वाटलं तरी ज्ञानदेवही सद्गुरू नाहीत तुमचे कोणाचे! सगळ्यांनाच वाटते की माझे सद्गुरू कोणीतरी आहेत. तुलाही तसेच वाटते आहे ना!"

मी: "हे जर कोणीही आमचे सद्गुरू नाही म्हणता, तर मग कोण आहेत आम्हा सगळ्यांचे सद्गुरू? आम्हाला हा मार्ग दाखवून इथपर्यंत आणणारे? मला तर हा मार्गही माहीत नव्हता. मग कोणी तरी आणलेच आहे ना मला इथे?"

"हे सगळे आणि ज्ञानदेव आमचे सद्गुरू आहेत असे म्हणणे हे खरे तर आहे लाक्षणिक अर्थाने! Notional! पण तुम्हाला त्या सद्गुरूंचे खरे स्वरूप इथे येऊनही कळत नाही. ते समजावून द्यायला लागते! म्हणून म्हणायचे की ते कोणीतरी तुझे सद्गुरू आहोत म्हणून!"

"ज्ञानदेवांचा अमृतानुभव वाचलास ना? कोणाला म्हणतात ते सद्गुरू श्रीनिवृत्तिराजा म्हणून! सगळ्यांचा सद्गुरू तर मीच आहे! मीच आहे तो! आणि माझ्याशिवाय दुसरा कोणीतरी असेलच कसा?"

"I AM THAT! NONE ELSE! I AM THOU! THOU ART ME! ALL THAT YOU CALL THE WORLD AND THE PEOPLE ART BUT ME AND YOU!"

"मीच तूही आहेस. आपण दोघे कोणी वेगवेगळे का आहोत? आपण दोघेही एकच नाही का? हे सगळे विश्वच आणि त्यातले सगळे लोकादी आपणच दोघे तर आहोत! आपल्याशिवाय इथे कोण आहे इतर? आणि मी आणि तू असे तरी इथे कोण आहेत? एकच एक आपलेच आपल्याला विचारते आहे अन् उत्तर देते आहे. आणि मला सद्गुरू आणि आपल्याला अज्ञानी समजते आहे."

अज्ञानाचे कारण

मी: "पण जर हे असे आहे तर सगळ्यांना हे का कळत नाही? आता जे कळते आहे, ते आम्ही हे सगळे इतर का जाणू शकत नाही? काय आहे हे अज्ञान?"

उत्तर: "ते जाणू इच्छित नाहीत, म्हणून अजाण आहेत, अज्ञानी आहेत. तू मला जाणून घेऊ इच्छिलेस म्हणून मी हा असा तुझ्या कल्पनेपलीकडला तुला द्रष्ट झालो आहे. माझे खरे स्वरूप तुला कळलेले आहे कारण तुझी जिज्ञासा!"

"They, the people you talk about are not the Seekers; YOU Are The One who is seeking. Hence the Ultimate stands revealed to You! The SOUGHT AFTER is here with you by This REVEALATION!"

"असे केव्हाही नव्हते की तू इथे नव्हतास किंवा ते इथे नव्हते! पण तुला हे कळले आहे आणि त्यांना हे कळलेले नाही! This is TIMELESSNESS! The TIME there, is too TIMELESS! But their minds create TIME! इथे काळ नाही! तिथेही काळ नाही. पण त्यांचे मन काळ निर्माण करते. त्यांचा तो काळ हा अज्ञानाचा गाभा आहे."

निरंजनाची ओळख::::

निरंजन निराकार अनामी

मी: "तुम्ही निरंजन आहात का?" त्याचे उत्तर: "***निरंजन*** म्हणजे काय हे तुला माहीत आहे का? शब्दकोशात त्याचा अर्थ जरा पहा! त्याचा अर्थ

stainless - शिव असा आहे. ते आहे अव्यक्त, निराकार, निर्गुण, निरंजन. या सगळ्यांचा अर्थ तोच आहे. तू सत्यलोकातून अगम लोक चढून वर इथे आलास. अगमलोकात येणे कठीण आहे, म्हणून तुला तसे कष्ट वाटले आणि नको बाबा परत ही चढण चढणे, असे तू म्हणालास."

"हा अगमलोक असल्याने तू किंवा कोणीही इथे स्वेच्छेने किंवा कष्टाने चढून म्हणा, कोणत्याही प्रकारे येऊ शकत नाही. तुला जाणवलेली शक्ती अथवा तो Force हाच तुला इथे घेऊन आला. कोणीतरी तुला ढकलत होते, तू अधांतरी आपोआप वर खेचला जात होतास असे जे तुला जाणवले ते हेच तर होते. ती शक्ती आपण होऊनच तुला इथे घेऊन आली."

"हा अक्षयलोक आहे, जर असा कोणता लोक तुझ्या कल्पनेत असला तर! तुला वाटते तसे खरे तर ***"भ्रमरगुंफा ⇨ सत्यलोक ⇨ अलक्ष्य ⇨ अगम ⇨ अनामीलोक"*** असे काहीही नाही. सगळेच हे अलक्ष्य आहे. तू अगम लोकात आहेस."

अनाहतनाद

मीः "मग अनामीलोक कुठे आहे? आणखी वर?" उत्तरः "हाच तर अनामीलोक आहे. अगमही हाच, भ्रमरगुंफा पण हीच जिथला अनाहतनाद तू ऐकतोस! हा अनाहतनादच तर तुला माझ्याशी सतत जोडून ठेवत होता ना! ***It keeps you tuned to ME. I AM HERE AND EVERYWHERE.*** मी तर सगळीकडेच आहे. संसारात गुंतलेल्या तुम्हाला मी दिसतच नाही किंवा मी तुमच्यात आहे हे जाणवतही नाही कधी!"

"तुम्ही जेव्हा मला पाहता तेव्हा हा ***अनाहतनाद*** प्रकट होतो. पण हे पाहणे आणि न पाहणे यात काहीच फरक नसतो! खरं तर या पाहण्याला पाहणे न म्हणता इंद्रियातीत असा ***"अहं ब्रह्मास्मि"*** चा साक्षात्कार, तत्त्वाचा साक्षात्कार असेच म्हटले पाहिजे. ***"मनसस्तु पराबुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः।"*** अशा तत्त्वाचा ***"इंद्रियातीत परि भोगवीन। इंद्रियांसि"*** असा हा साक्षात्कार आहे."

उगमाकडे परत?

"असे आहे म्हणूनच तर कोणतीही अनुभूती नाही, अनुभव नाही! द्रष्टा नाही, दृश्यही नाही! हे सगळे माझ्यात जाऊन मिळाले की तुला मी दिसतो. अनाहतनाद ऐकणे म्हणजे मला पाहणे आहे. प्रकाशापलीकडचा प्रकाश पाहणे म्हणजे मला पाहणे आहे. तू स्वतःच तर प्रकाशाचा एक किरण आहेस, त्याच्या मुळाकडे परतणारा! प्रकाशकिरणाला कधी कुठे जाण्यासाठी कोणी ढकलावे लागते का? तो कुठेही जातो आणि तसाच परत येतो जसा होता तसाच मुळाशी जोडलेला. तुलाही तर असेच जाणवले होते की आपण प्रकाशाच्या किरणाद्वारे प्रकाशासारखे वर वर खेचले जात आहोत म्हणून!"

"आणि खरं तर तो प्रकाशकिरण कधी कुठे जातो तरी का तर त्याने परत यावे? तो केवळ एक प्रकाशकिरण म्हणून अस्तित्वात असतो, एवढेच काय ते! आणि तो तर सगळीकडेच असतो. तो नाही असे काही तरी आहे का? तो कुठे आत जात नाही की बाहेर जात नाही, वर जात नाही की खाली जात नाही. तो काही कुठे हरवून जात नाही की कोणी त्याचा शोध घ्यावा आणि त्याला उगमापाशी सुखरूप आणून घालावे परत!"

"तुला सूर्यप्रकाशाचा साधा किरण वाटला का तो? जो एकदा निघाला की जातच राहतो, जगाच्या अंतापर्यंत, परत कधीही परतून न येण्यासाठी? असा काही हा प्रकाशकिरण नाही अन् हे त्याचे मुळही तसे सूर्यासारखे नाही. हा किरण म्हणजेच तो सूर्य आणि तो सूर्य तो हा किरणच! तू कोण आहेस? आणि मी कोण आहे? अस्तित्वात आहोत म्हणून आहोत आपण! ***YOU EXIST BECAUSE YOU EXIST!"***

सत्य ज्ञान

"सगळे तत्त्वज्ञान आणि दर्शने व्यर्थच आहेत या जगातली! त्यांना काही हे तत्त्व गवसू शकत नाही कधीही, जे सर्वदूर आहे! शब्दांपलीकडल्या शब्दालाही - श्रुतिवचनाच्याही हे पलीकडचे आहे जे सर्व ज्ञानप्रकाशक आहे!"

"It is The WORD beyond The Word (whether Sacred or otherwise) that lights up this Knowledge! हेच तर खरे ज्ञान आहे आणि हेही तसे पाहता खरे ज्ञान नाही! बघ तुला जमते का मला पाहूनही मी कोण कसा आहे ते सांगणे! आणि तू कोण आहेस हे माहीत असूनही तू प्रयत्न करून तर पहा तुला ते सांगता येते का? आणि तत्त्वज्ञान ज्याचा विचार करते ते जग तरी काय आहे, हे सांगता येईल का तुला, ज्याला सर्व ज्ञानाचा उगम सापडला आहे?"

एकदा का या ठिकाणी आलास की तुला परत फिरून कुठेही जावयाचे नाही, किंवा तू कुठे खाली वगैरेही पडणार नाहीस! इतर आहेच काय, जिथे तू जाशील किंवा जिथे तू जाऊन पडशील!! हे सगळेच ते आहे आणि तेच

हे सगळे आहे. एकच एक आहे सगळे!! ते, तू अन् मी! ***ALL IS ONE AND ONE IS ALL!!!"***

"कहै कबीर दिवाना"

माझे हे असे सगळे अनुभव कबीरांच्या शब्दात सांगावे तर असे आहेतः

अवधू गगनमंडल घर कीजै।
अमृत झरै, सदा सुख उपजै, बंकनाली रस पीजै।।
मूल बांधी सर गगन समाना, सुख मनि यों तन लागी।
कामक्रोध दोऊ भया पलिता, तहाँ जोगणी जागी।।
मनवा आई दरिबे बैठा, मगन भया रसि लागा।
कहै कबीर जिय संसा नहीं, सबद अनाहद बागा।।

ते म्हणतात, "हे अवधूता! गगनमंडळात घर कर. तेथे अमृत झरत असते. सदा सुख असते. बंकनाळातला रस पी आणि मस्तीत राहा. मूलाधारातून बंध लावून ब्रह्मरंध्रातल्या गगनात जाऊन मिळ. कामक्रोधांचे दोन जळते पलिते करून घे हातात आणि त्यांच्या प्रकाशाने निद्रिस्त जोगिणीला म्हणजे कुंडलिनीला जागवून तिथे पोहोच जिथे परमपद आहे. तिथे अनाहत शब्द गाजतो आहे."

"मला तर परमात्म्याचा तो शब्द ऐकून इतकी निःसंशय खात्री पटली आहे की मला परमात्मा मिळालाच आहे आता. त्यात मी इतका मग्न झालो आहे की अगदी भरबाजारात बसलो तरी मला संसाराची आठवणही येत नाही. हे संसाराच्या आवागमनाचे चक्र तो अनाहतशब्द ऐकल्यापासून माझ्यामागचे कायमचेच सुटले आहे आता!"

आत्मवृत्ताचा अंतिम चरण::::

सत्य वृत्तांत

तर असे आहे हे एका योग्याचे आत्मवृत्त! यात माझ्या आत्मस्तुतीचा काही भाग नाही. आहे ते एक सत्यानुभूतींचे अन्वेषण! मग ते कोणाला कितीही अतिरंजित वाटे ना का! हा आहे अज्ञाताचा प्रांत आणि इथे अधिकारी आहेत केवळ ज्ञानदेवांसारख्या ***"ज्ञानियांचा राजा गुरु महाराव।"*** अशा प्रज्ञावान व्यक्ती! आणि त्यांचे दाखले मी आपल्याला माझ्या ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** या प्रस्तुत ग्रंथातून आणि या आत्मवृत्तातून वेळोवेळी पुरवलेच आहेत. तेथे ***"इतरांचा लेखा कोण करी"!*** जिज्ञासूंसाठी ते समर्पक ठरतील अशी आशा आहे.

सांगाव्यात अशा अजून कितीतरी गोष्ट आहेत. पण त्यातल्या त्यात साधकांना उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टींचे प्रकटन इथे केलेले आहे. योगमार्गावर चाचपडणाऱ्या जिज्ञासूंना आणि ज्यांचे गुरू परलोकवासी झाल्याने त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शनापासून वंचित व्हावे लागले आहे आणि गुरू असूनही ते ***"शाब्दे पारे च"*** असमर्थ असणाऱ्यांच्या शिष्यांनाही त्यापासून काहीतरी लाभ व्हावा, या इच्छेने प्रेरित होऊन मी हे आत्मकथन शास्त्र आणि संप्रदायाच्या मर्यादेत राहून आणि तरीही शक्य त्या प्रांजळपणाने आणि आत्मीयतेने केले आहे.

ग्रंथाचे प्रयोजन

ग्रंथामागील सविस्तर भूमिकेत मी ग्रंथाचा आराखडा मांडलेला आहेच. आता या ग्रंथाचे प्रयोजन कोणासाठी आहे, ते सांगतो.

सर्वसामान्य भाविक आणि ज्ञानेश्वरभक्त, ज्ञानेश्वरवाङ्मयाचे जिज्ञासू आणि प्रामाणिक अभ्यासक, शक्तिपातसांप्रदायिक, योग आणि भक्तिमार्गीय, अनेकानेक पंथांचे आणि उपपंथांचे पथिक साधक, संन्यासी, गृहस्थ, वानप्रस्थी, कृष्णाचे असो की पांडुरंगाचे, रामाचे असो की जगदंबेचे, जे जे कोणी भगवंताचे भक्त आहेत, योगी आहेत, कोणीही का असेनात, पारमार्थिक आहेत, अध्यात्माच्या मार्गावरून वाटचाल करणारे किंवा करू इच्छिणारे आहेत, त्या त्या सगळ्यांना माझ्या या ***योगदा श्रीज्ञानेश्वरी*** या ग्रंथाधारे आणि त्यातल्या या माझ्या आत्मवृत्ताद्वारे यथायोग्य मार्गदर्शन होईल, अशी माझी श्रद्धा आहे.

भगवंतांनी हे कार्य माझ्या हातून त्यासाठीच तर पार पाडून घेतले आहे. यात माझे कर्तृत्व ते काय? मला या ग्रंथाचे श्रेय त्यानेच द्यायचे ठरवून हा ग्रंथ माझ्या असमर्थ हातांतून प्रकट केला आहे.

ज्ञानदेव म्हणतात, तसेच ***पसायदान*** त्या विश्वात्मक देवाने आपणा सर्वांच्या हाती द्यायचे ठरवलेच आहे, तिथे मी कोण! एक यकश्चित साधक! अकस्मात या योगमार्गात ओढला गेलेला! ज्या काही दिव्य अनुभूती मला आल्या आणि सुदैवाने त्यांचा अर्थ कळण्याइतपत बुद्धीही मला त्याने दिली, त्यातूनच या ग्रंथाचा हा प्रपंच झालेला आहे, हे मी आपणासारख्या संत सज्जनांना पुनः पुनः सांगत आहे. ***"एथ उरले जी माझें। पाईकपण!"***

माझा पुढचा मार्ग

हे सगळे वाचणाऱ्या जिज्ञासूंना साहजिकच प्रश्न पडेल की आता या एवढ्या सिद्धावस्थेला पोहोचलेल्या योग्याचे पुढे काय होणार आहे, तो इतरांसारखाच जन्म-पुनर्जन्म या चक्रात राहील की मुक्तीचा पाईक होईल, असे विचार

त्यांच्या मनात येत असतील. या प्रश्नांची उत्तरे मला अजूनही मिळालेली नाहीत.

"मुक्ती, मुक्ती" असे अध्यात्मवादी जे म्हणत असतात, तिचे स्वरूप काय हा प्रश्न अद्यापही अनुत्तरित आहे. सिद्धावस्थेत पोहोचून पुढे काय करायचे याचे कोणी उत्तर दिलेले नाही. मच्छिंद्रनाथांचे उदाहरण असे दाखवते की ***"तैं समाधि अव्यया। भोगावीं वासना इयां। तैं मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं।।१८-१७५४।।"*** आणि श्रीगोरक्षनाथांचे चरित्र सांगते की त्यांनी त्याच समाधिधनाचा विनियोग अपार जीवजंतूंना सोडवण्यासाठी केला आणि त्यांचे शिष्य-प्रशिष्य तेच करताहेत अजूनही. ज्ञानदेवांनी तर याच कारणासाठी संजीवनसमाधी घेतली हे सर्वविश्रुतच आहे! आपणही ***उन्मेष क्र.५२-संजीवन समाधि*** यातून ते सविस्तर पाहूच.

शास्त्र सांगते की जीवन्मुक्त अवशिष्ट प्रारब्धानुसार वर्ततात. धनुष्यातून एकदा सुटलेला बाण जसा परत फिरून हाती येत नाही, तद्वतच जीवन्मुक्त जरी झाले तरी त्यांचे जे कर्म आरब्ध आहे, म्हणजे ज्या कर्माचा या जन्मात उपभोग घेणे उरलेले आहे, त्याचा उपभोग झाल्याशिवाय त्यांचा देहपात होत नाही.

संत श्रीतुकाराममहाराजांसारख्या काही संतांचे तर असेही म्हणणे आहे की ***"आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासि," "तुका म्हणे गर्भवासी। सुखें घालावें आम्हासिं।"*** लोकसंग्रहासाठी त्यांना जन्मोजन्मी गर्भवास घ्यायला लागलेत, तरीही ते आवडीने घेतील.

भगवंत तर म्हणतातच की ***"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।।४-७।।"*** - धर्माची पताका उंच ठेवण्याचे युगानुयुगींचे महत्कार्य आणि साधुसंतांचे परित्राण करणे यांसाठी भगवंतही पुनःपुनः जन्म घेत असतात. त्यांचे ते जन्म दिव्यातिदिव्य असतात, असेही त्यांनी सांगितले आहेच!

तेव्हा पुनः जन्म असलाच तर तो भगवंताच्या कार्यासाठी असावा एवढीच माझी इच्छा आहे. ते कार्य काय, त्याचे स्वरूप काय हे मी जाणून घेऊ इच्छित नाही. तो काय करील ते खरे, अशी माझी श्रद्धा आहे! एका गूढभविष्यवाद्याने मला अलीकडेच सांगितले आहे की, "तुम्हाला अजून एक जन्म घ्यावा लागेल. त्यानंतर तुम्ही श्रीविष्णूंच्या परमपदाला जाल. त्या श्रीकृष्णपरमात्म्याच्या चरणी नंतर तुमचा अक्षय्य वास राहील"

मी एक संन्यासी

पूर्वीपासूनच संन्यासाश्रम स्वीकारावा अशी एक वृत्ती माझ्या अंतःकरणात उठत आली आहे. छापरा (बिहारस्थित) संन्यासी श्रीसत्यदेवानंद सरस्वति महाराजांनी नाम देतांना इच्छा व्यक्तवली होती की संन्यास घ्यायचा झाला तर त्यांच्याकडूनच दीक्षा घ्यावी.

संन्यासाश्रम स्वीकारावा ही इच्छा असली आणि ती शास्त्रोक्तही जरी असली, तरी सध्याच्या अवैदिक राज्ययंत्रणेत आणि स्मृतिविहीन समाजधारणेत तो घेणे कितपत उपयुक्त ठरेल असा प्रश्न उद्भवतो. दंड, कमंडलु, छाटीशिवाय इतर वस्तूंचा अपरिग्रह आणि मुख्य म्हणजे कोणत्याही निवाऱ्यावाचून परिव्राजक राहून मुक्त विचरण करणे यांच्याशिवाय खरा संन्यासाश्रम असू शकत नाही. ईश्वरप्रणिधान तर त्यातले प्रमुख कर्तव्य आणि नियम आहे.

माझ्यासारख्या दुर्धर व्याधिग्रस्त शरीराच्या मनुष्याला तो स्मृत्युक्त असा संन्यास निभावेल का? आणि सध्याच्या समाजपरिस्थितीत तो कोणाला तरी तसा खरेच जमेल का?

छापऱ्याचे बाबाजी म्हणाले होते की, "तुम्ही संन्यास घेऊन आमच्या आश्रमात येऊन राहा. चांगला गंगाकिनारी आहे तो. तिथे उरलेले आयुष्य भगवद्चिंतनात घालवा. नाहीतरी पत्नीच्या आकस्मिक निधनाने तुमचा गृहस्थाश्रमी संसार संपलेलाच आहे. मग उशीर कसला? मुलेबाळे मोठी झाली आहेत. तुमच्याकडून आता त्यांचे अधिक काय होणार आहे? आणि आता वेळही किती उरलेला आहे? आयुष्याच्या अंतिम चरणात आहात तुम्ही."

माझे गुरुदेव श्री वासुदेवानंदनाथ यांना माझे हे विचार कळले. त्यांचे म्हणणे असे की आपल्या नाथसंप्रदायात असा विधिवत वेगळा संन्यासाश्रम स्वीकारावा लागत नाही. तुमचा विद्वत्संन्यास तर आपोआपच भगवत्कृपेने सिद्ध झालेला आहेच. मग ते नको असणारे संन्यासाश्रमाचे अवडंबर कशाला हवे आहे? आणि कुठेही अगदी आश्रमात जरी राहिलात, तरी तिथल्या संन्याशांतले हेवेदावे आणि वर्तणूक आदर्श नसणारच! त्याला उबगून जाईल तुमचा जीव. नकोच तो तसला संन्यास."

मलाही त्यांचे म्हणणे पटले. त्यांचे सांगणे तर्कशुद्ध होते. नाहीतरी परमगुरु ज्ञानदेवांनी मला परमहंसपदावर नेऊन घातलेले होतेच. ते पुढे असेही म्हणाले की, "तुमची इच्छा आडंबरमुक्त राहण्याची होती. म्हणून तुम्ही आपली नाथसांप्रदायिक शैलीशृंगी, रहनी आपल्या पहिल्या भेटीच्या वेळी स्वीकारली नाहीत. मी देऊ केलेले

गुरुपदही तुम्ही नाकारलेत. अनाम राहण्याची तुमची प्रबळ इच्छा होती. मग आता या आडंबरात कशाला उगीच गुरफटता?" छापऱ्याच्या बाबाजींचा "भेस ले लो अब"चा आग्रह सुरूच होता.

गीतेच्या सहाव्या ध्यानयोगाध्यायात भगवंतांनी तर म्हटलेलेच आहे, ***"अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः। स सन्न्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः।।६-१।।"*** - खरा संन्यासी होण्यासाठी कर्मफलाचा त्याग पुरे होतो. संन्यासवेष धारण करायला हवाच असे नाही. या सगळ्यांची परिणती जसे आहे, तसेच रहावे या विचारात झाली असल्यास काय नवल!

गुरुदेव आणि ग्रंथप्रकाशन

माझा हा ग्रंथ आता प्रकाशनाची वाट चालू लागलेला आहे, असे दिसताच परत एकदा श्रीगुरुदेव म्हणाले,"हे फारच छान झाले की त्या श्रीगोपालकृष्णाने तुमच्या ग्रंथाला प्रसिद्ध करायचे ठरवले आहे, हे कळल्याने फार आनंद झाला. पण ग्रंथ तुम्ही कोणत्या नांवाने प्रसिद्ध करणार?" म्हटले, "माझ्याच व्यावहारिक नावाने करावा लागेल तो."

ते म्हणाले, "ते तर आहेच. पण तुम्ही तुमचा ***"योगदा श्रीज्ञानेश्वरी"*** हा ग्रंथ तुमच्या लौकिक नावाने प्रसिद्धीला देऊ नका. त्या नावाला नाही म्हटले तरी अनेक वर्षांच्या व्यवहार आणि संसारातील वासना संस्कारांचे आवरण आहे. आपण कितीही म्हटले आणि आपला वासनाकोष शुद्ध केला तरी, तिथे पूर्वार्जित संस्कारांची निदान राख तरी असतेच! आणि आपला हा ग्रंथ तर शुद्धातिशुद्ध भूमिकेवर नेऊन त्या श्रीगोपालाने प्रकटवला आहे. मग त्याच्या या विशुद्ध भूमिकेला साजेलशा नामानेच तो प्रसिद्ध व्हायला हवा."

"आपापल्या दीक्षितांचे नामकरण गुरूच करतात. मी तुम्हाला पूर्वीच तुमची स्थिती पाहून गुरुदत्त नाम दिले आहे. तेव्हा त्याच गुरुदत्त नामाने आध्यात्मक्षेत्रातला हा तुमचा ग्रंथ प्रसिद्ध करणे उचित होईल. तुम्ही लेखक म्हणून आपला हा ग्रंथ त्याच नामाने प्रसिद्धीस द्यावा."

त्यावर मी श्रीगुरूंची आज्ञा प्रमाण असे म्हटले. त्यानंतर ते म्हणाले की, ***"श्रीमत् स्वामी योगेश्वरानंद "*** हेच तुमचे गुरुदत्त नाम यापुढे पारमार्थिक क्षेत्रात तुम्ही प्रचलित करावे आणि याच नामाने ग्रंथ प्रसिद्ध करावा. नाहीतरी हा ग्रंथ हे त्या योगेश्वराचेच कार्यकर्तृत्व आहे. त्यातल्या त्रुटी तेवढ्या तुमच्या समजा हवे तर! जे काही भगवत्कार्य तुमच्या हातून घडत जाईल, त्याचे कर्तृत्व आणि श्रेय आता यापुढे संप्रदाय घेईल. त्यायोगे तुमचे कार्य भगवदर्पण पण होईल. कारण तुमचे हे जे नाम मी सांगितले आहे, ते भगवन्नाम आहे. पूर्वाश्रमातील नांवाने कोणतेही आध्यात्मिक कार्य तुम्ही करू नये, अशी माझी इच्छा आहे." त्यांच्या या स्पष्टोक्तीपुढे मला दुसरा काय पर्याय उरला होता? ते तर माझ्या भल्यासाठीच होते.

या नांवाने माझ्या हातून जे काही कार्य घडेल ते त्या नावाला साजेसेच घडावे, हीच त्या माउली श्रीज्ञानदेव आणि योगेश्वर श्रीकृष्ण भगवंताप्रति माझी सविनय नम्र प्रार्थना! आणि माउलीने म्हटल्याप्रमाणे ***"मठमुद्रादी मिखें। लाविलें आहेति फांसे। निःसंगा एणें।।"*** अशी ***"नवल अहंकाराचि गोठी"*** माझ्याबाबतीत तरी होऊ नये, हीच इच्छा!

भगवंतांनी सांगितले आहे की, ***"यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्।।९-२७।।"*** - "आपल्या हातून जे काही घडते आहे, ते सगळे त्या धन्यनाम परमात्म्याला अर्पण करत जावे." भगवदादेशाचे तंतोतंत पालन करण्याचा हा केवढा सुरेख मार्ग दाखवला माझ्या श्रीगुरुदेवांनी!

देहाचे काय?

आणि मी आता इथे असणार तोपर्यंत कसा राहीन? कोणास ठाऊक कसा राहीन ते? माझ्या देहाची त्याच्या अवसानानंतर काय स्थिती होईल? ती पण मला सांगता येत नाही. काय व्हायचे असेल ते होवो! ***"ईश्वरेच्छा बलीयसि"*** हेच खरे! जीवन्मुक्तांनाही त्याच्या योजनेत फार ढवळाढवळ करता येत नाही आणि कोणाला ती शक्ती असली तरी त्याने तसे करू नये असे शास्त्र सांगते.

देहाचे काय होईल, तेही त्याच्या प्रारब्धानुसार ठरते, असे शास्त्र सांगते. जीवन्मुक्ताला त्याच्या देहाचे काय होईल याच्याशी काय देणेघेणे! ज्याने आपला देह आताच त्याच्या प्रारब्धावर सोडून दिला आहे, त्याने त्याचे अवसानानंतर काय होईल, याचा विचार तरी कशाला करावयाचा! शास्त्राने सांगितलेल्या अवसानापश्चातच्या देहाच्या ज्या अवस्था आहेत त्या म्हणजे पाण्यात पडून किंवा मातीत गाडला जाऊन जलचर वा कृमीकीटकांनी किंवा न गाडला तर अन्यथा पक्षी, श्वापदे यांनी तो भक्षण करून त्याची माती होऊन जाणे, तो अग्नीत जाळून त्याची राख होणे. पंचमहाभूते पंचमहाभूतात विलीन होतात आणि लिंगदेह आपल्या पुढच्या गतीला जातो, असे शास्त्र सांगते.

योगानंदांसारख्या काही योग्यांचा देह मृत्यूनंतरही सतेज राहतो, तर कबीर-साईबाबा यांच्यासारख्या काही

संतांच्या देहाची फुले होतात. कोणी कोणी विरळे प्रभु श्री रामचंद्र ***"पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं"*** असे आपणासकट सगळ्यांना घेऊन सदेह वैकुंठाला जातात, तर कोणी जिवंत असतांनाच चिरकालासाठी संजीवन समाधी घेतात. त्यांचा देह नंतरही विद्यमान असतो. कारण देहातल्या चेतनेचा त्यांनी त्याग केलेला नसतो.

"कडाडली वीज निरंजनीं जेव्हां"

मुक्ताईचे निरंजनाशी एकरूप होणे मात्र वेगळे आहे. मुक्ताई विजेसारखी निमिषार्धात अदृश्य झाली असे नामदेव म्हणतात:

१) *मुक्ताई म्हणे जावें येवें कोठें। अवघें निघोट स्वरूप स्वामी।।२।।* गर्जतां गगन कडाडली वीज। स्वरूपिं सहज मिळयेली।।३।। मावळला दीप ज्योत होति कोठें। सहज सामावति निरंजनीं।।४।। अ.क्र.११७३।।ना.गा.।।

२) उदयु अस्तु नाहीं स्वरूपासिं। आम्हीं कधीं आलों स्वरूप सोडोनि। जावें पालटूनि जेथिल तेथें।।३।।आंत बाहेर स्वरूप स्वामीचें। स्वयें नंदादीप उजळिला।।४।।अ.क्र.११७४।।

"घटाकाश आकाशापासून वेगळे केव्हा असते, तर त्याने त्याच्यात मिसळून जावे! स्वरूप सोडून आपण कोठे गेलोच नाही, तर स्वरूपी पुनः मिळावे असे कसे म्हणावे!"

"दीपाबरोबर ज्योतही मिटून जाते, तसेच सहजपणे निरंजनी सामावणे आहे. त्यासाठी वेगळा खटाटोप नकोच! चर व अचर सगळेच प्रकाशाने भरलेले आहे. आपल्या स्वस्थानी अंधार नाही. मग तो येथे तरी कसा असेल! वस्तूला उदय आणि अस्त दोन्ही नाहीत. वीज कडाडते, गर्जते, आकाशी प्रकट होते आणि तशीच आकाशीच्या आकाशीच मिळून जाते!"

हे सर्व अवगत असणारा माझ्यातला योगी देहाचे पुढे काय होईल याचा फारसा विचार करत नाही.

पुढली गती

जातांना शुक्ल गती मिळेल की कृष्ण याचाही विचार तो करत नाही. शास्त्र सांगत असले की मृत्यूच्या वेळच्या स्थितीवर ते अवलंबून आहे आणि कृष्ण गती मिळाल्यास परत आवागमन आहे, त्याचीही मी भीती बाळगत नाही. एकच जन्म काय पण अनेक जन्म जरी पुनः घ्यावे लागले तरी माझे एकच मागणे असेल की "तू सतत माझ्याबरोबरच राहा!" आणि तो बरोबर राहीलच याची आता निश्चिती झालेली आहे. मग संसाराचे भय ते कशाला! जो इथेच आताच मुक्त झाला तो पुनः बद्ध होईलच कसा!

आणि माझ्या त्या काळ्या पुतळ्याच्या दोन्ही अनुभवांनी मला सतर्क केले आहे की माझा अंतकाळ कसा असेल ते! त्या वेळी घेतलेल्या मार्गाने जावे याची ती रंगीत तालीमच तर होती ना! मूलाधारातून निघून सहजच सहस्त्रदल- ब्रह्मरंध्र - कोल्हाटात अंतिम गती घेत शेवटी सर्व चक्रांच्या अतीत निघून जायचे तर ठरलेलेच आहे माझ्या बाबतीत! याही एका कारणाने मी भगवंताकडून आश्वस्त आहे!

त्यानी गीतेत सांगितलेही आहेच की:

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः।।८-५।।

"ज्या ज्या वस्तूचे स्मरण करत मनुष्य अंतकाली देहास त्यागतो, त्या त्या वस्तूठायी त्याचे चित्त नित्य एकाग्र झालेले असल्याने, तो तिच्याप्रत जातो."

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।।८-८।।

"असा अभ्यास करून योग साधलेल्या पुरुषाचे चित्त अन्यत्र कोठेही जात नाही. अशा चित्ताने सतत त्या परमपुरुषाचे चिंतन करणारा साधक त्या दिव्य पुरुषाप्रत सहजच जातो."

कविं पुराणमनुशासितारम-
णोरणीयांसमनुस्मरेद्यः।
सर्वस्य धातारमचिन्त्यरूपमा-
दित्यवर्णं तमसः परस्तात्।।८-९।
प्रयाणकाले मनसाचलेन
भक्त्या युक्तो योगबलेन चैव।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्
स तं परं पुरुषमुपैतिदिव्यम्।।८-१०।।

"सर्वज्ञ, पुरातन, नियंता, अणूहूनही लहान, सर्वांचा आश्रय, अचिंत्य रूप असलेला, आदित्यसम वर्णाचा, अंधकारापलीकडील प्रकाशमान असा जो परमपुरुष आहे, त्याचे जो सतत स्मरण करतो, तो मृत्युसमयीसुद्धा एकाग्र मनाने, भक्तियुक्त अंत:करणाने व योगबलाने युक्त होत आपल्या **भ्रूमध्यात प्राणांचे सम्यक धारण करत** त्या तेजस्वी परमपुरुषाप्रत जातो."

यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये।।८-११।।
सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितोयोगधारणाम्।।८-१२।।
ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।८-१३।।

"ज्या परमपदास वेदवेत्ते **अक्षर** असे म्हणतात, विरक्त महात्मे ज्या पदात प्रवेशतात, ज्याची इच्छा धरणारे **ब्रह्मचर्य** पाळतात, ते परमपद अंतकाली कसे प्राप्त होते, ते मी तुला संक्षेपाने सांगतो. ऐक! **सर्व द्वारांचे संयमन करून, मन हृदयामध्ये स्थिर ठेवून व आपल्या प्राणांस मूर्ध्निस्थानी स्थापन करून योगधारणेत स्थित होत जो पुरुष ॐ या एकाक्षराने निर्दिष्ट केलेल्या ब्रह्माचे स्मरण करत देह त्यागतो, तो माझ्या परमगतीला प्राप्त होतो**."

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।८-१४।।
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।८-१५।।

"हे पार्था! जो माझे सतत अनन्यचित्त होऊन नित्य स्मरण करतो, त्या माझ्याशी नित्य एकवटून राहिलेल्या योग्याला मी त्याच्या अंतकालीही सुलभतेने प्राप्त होतो आणि मला येऊन मिळाल्यावर त्यास या दुःखाचे आगरच असणाऱ्या व अशाश्वत अशा संसारात पुनः कधीही जन्म मिळत नाही. त्यास अशी श्रेष्ठ सिद्धी व माझी गती प्राप्त होते व तीही अत्यंत सुलभतेने!"

या सर्व आश्वासनांचा विचार आपण ***उन्मेष ५१: प्रयाणकाल व गती*** यात करणारच आहोत. म्हणून पुनः नको. माझे प्रयाण असेच होणार हे पूर्वनियुक्त असल्याची माझी खात्रीच आहे.

माझी मनीषा

मी आता कसली वाट पाहतो आहे बरं! योगतारावलीतील श्रीशंकरभगवत्पादांच्या शब्दात सांगतोः

सिद्धिं तथाविधमनोविलयां समाधौ।
श्रीशैलशृंगकुहरेषु कदोपलप्स्ये।
गात्रं यदा मम लताः परिवेष्टयन्ति।
कर्णे यदा विरचयन्ति खगांश्च नीडान्।।२८।।यो.ता.।।

"माझी इच्छा आहे त्या श्रीशैलपर्वताच्या रमणीय स्वर्गतुल्य नंदनवनात जाण्याची अन् तिथल्या गिरिकुहरात शांतपणे राहून त्या चिरस्थायी मनोविलयात नेणाऱ्या निर्विकल्प समाधीत प्रवेशून राहण्याची! माझ्या अध्यात्मसाधनेची, या योगसाधनेची परिपूर्ती करणाऱ्या त्या समाधीत मी केव्हा बरं स्थित होईन आणि केव्हा बरं अशा अविचल समाधीत असणाऱ्या माझ्या शरीराची गात्रे अन् गत्रे लता वेढून टाकतील! आणि काडीकाडी जमवून पक्षिगण आपली घरटी माझ्या कर्णकुहरात केव्हा बरं रचतील!"

आणि आतातरी माझे उर्वरित आयुष्य कसे जावे याची इच्छा परत योगतारावलीतील श्रीशंकरभगवत्पादांच्याच शब्दात सांगतोः

विश्रांतिमासाद्यतुरीयतल्पे।
विश्वाद्यवस्थात्रितयोपरिस्थे।
संविन्मयीं कामपि सर्वकाले।
निद्रांसखे निर्विश निर्विकल्पाम्।।२६।।यो.ता.।।

"माझ्या आयुष्यातला हा विश्रांतीचा काल त्यासाठी योग्य अशा तुरीय अवस्थेच्या पलंगावर शांत निद्रिस्त अवस्थेत जावो. जागरित, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांच्या अतीत अशी ही जी तुरियेची अवस्था आहे, विश्व, तैजस आणि प्राज्ञ या आत्म्याच्या तिन्ही पादांच्या पलीकडची जी ती स्थिती आहे, आत्म्याच्या निरुपाधिक स्वरूपाशी एकरूप असणाऱ्या निर्विशेष अशा ज्ञानावस्थेत ठेवणारी ती जी अवर्णनीय तुरियनिद्रा आहे आणि या अपरोक्षज्ञानाचे सतत सर्वकाल जिच्यात स्फुरण होत असते, अशा त्या अनिर्वचनीय, संविन्मयी, सर्वविकल्पशून्य तुरियसंज्ञक चिन्मय निद्रेत प्रवेश करून त्या पलंगावरच मी चिरकाल विश्रांती घ्यावी."

आणि आता हा देह तर आहेच! त्याचे काय करायचे, त्याला कसे वागवायचे, त्याने काय करावे, याचाही विचार मी नियतीवर सोडून दिलेला आहे. पण मनीषा तरी अशी आहे की सतत त्या कृष्णपरमात्म्याचे या देहमनचित्ताने स्मरण व्हावे, चिंतन व्हावे, त्याच्यात मी बुडून जावे आणि उर्वरित आयुष्यातले माझे या जगतातले विचरण श्रीमत् आचार्य शंकर भगवत्पाद योगतारावलीत म्हणतात तशा दृष्टीने व्हावे . त्यांची जी मनीषा होती, तीच मी कितीही सामान्य असलो तरी माझीही आहे. मी तीच व्यक्तवतो आहे त्यांच्याच शब्दांत अशीः

विचरतु मतिरेषा निर्विकल्पे समाधौ।
कुचकलशयुगे वा कृष्णसारेक्षणानाम्।।
चतुरजडमते वा सज्जनानां मते वा।
मतिकृतगुणदोषा मां विभुं न स्पृश्यंति।।२९।।यो.ता.।।

"माझी मती निर्विकल्प समाधीत मग्न होऊन राहो, नाही तर कृष्णमृगांच्या शरीरावरील ठिपक्यांसारखे विशाल मोहक नेत्र असणाऱ्या सुंदरींच्या ठिकाणी ती जडून राहो! किंवा प्रमत्त प्रमदांच्या कुंभांप्रमाणे विशाल अन् उत्तुंग स्तनयुग्मात ती गुंतून राहो; विद्वानांच्या विचारांशी सारूप्य पावो किंवा मूढांच्या मतांमध्ये गुंगून जावो! तरीसुद्धा त्या बुद्धीतून त्या सर्व दृश्यांपासून, त्या त्या भावनांपासून, त्या त्या संवेदनांपासून प्रकट होणारे गुणदोष मला स्पर्श न

करोत!! मी जसा आहे तसाच, सर्वव्यापी विभु आत्माच असावे आणि प्राकृत गुणधर्मांपासून अलिप्त असेच राहावे!"

आचार्यांची ही मनीषा माझ्याही ठिकाणी सफल संपूर्ण व्हावी आणि या अवस्थेतच तर्कापलीकडील अज्ञाताचा स्पर्श झालेल्या माझ्या या बुद्धीचे, मगाशीच निर्देशिलेल्या भगवंतांच्या ***"अन्तकाले च मामेव ... / ... संसिद्धिं परमां गताः /"*** या सगळ्या गीतावचनांप्रमाणे शेवटचे प्रस्थान घडावे हीच माझी मनीषा!

आणि त्यातूनही मुक्ताईचे जसे प्रयाण घडले तसे माझेही झाले तर ती माझ्या या मनीषेची परिसीमाच होईल. नामदेव मुक्ताईचे प्रयाण कसे झाले ते सांगतांना म्हणतातः

कडाडली वीज निरंजनीं जेव्हां। मुक्ताई तेव्हां गुप्त जालीं।।३।। वैकुंठीं लक्ष घंटा वाजति एकघाई। जालीं मुक्ताई स्वरूपाकार।।४।। एक प्रहर जाला प्रकाश त्रिभुवनीं। जेव्हां निरंजनीं गुप्त जालीं।।५।। गेलें निवारूनि आकाश अभूट। नामा म्हणे कोठें मुक्ताबाई।।६।। अ.क्र.११७७।।

अंतर्बाह्य नंदादीपाचा प्रकाश असणारी आत्मस्वरूपाकार अशी ती मुक्ताई खरेच तशीच अदृश्य झाली! एक लक्ष घंटांचा एकदम नाद झाला! मुक्ताई स्वरूपाकार झाली तेव्हा एक प्रहरभर तिन्ही लोकी प्रकाश पसरला! पुनः आकाश जसेच्या तसे अफूट झाले!

नामदेव म्हणतातः "आता मुक्ताईचे दर्शन पुनः कसे होणार! ती तर कोठच्या कोठे निघून गेली!"

हे मुक्ताईसारखे महद्भाग्य आहे का माझ्या प्रारब्धात? आणि माझ्या या मनीषा जोपावेतो पूर्ण होत नाहीत, श्रीमत् भगवत्पाद श्रीशंकराचार्य म्हणतात, तशी ती संविन्मयी समाधी आणि तो तुरियतल्प जोपावेतो मला लाभत नाही, तोपर्यंत आणि तदनंतरही माझा निवास सतत त्या ***"ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय जी स्वसंवेद्या। आत्मरूपा।।"*** अशा असणाऱ्या माउली श्रीज्ञानदेवांच्या चरणांशीच असावा, यापलीकडे कोणती आस बाळगावी मी ? माझे सातत्याने आळंदी या तीर्थक्षेत्री वास्तव्य व्हावे, ही साधीशी इच्छा तरी पुरवली जाईल का माझी ? नियतीकडून? जिने जाणता अजाणता मला या मार्गावर आणून सोडले आहे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

पसायदान

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोखावें।
तोखौनि मज देयावें। पसायदान हें ।।१८-१७९३।।

ग्रंथसिद्धीच्या या सोहोळ्याने आनंदी झालेले ज्ञानदेव या संपूर्णाच्या प्रसंगीही तुम्हाआम्हासारख्या त्यांच्या लेकरांना विसंबत नाहीत. आपणा सर्वांसाठी ते त्या विश्वेशाकडून, गुरुदेव श्रीनिवृत्तिनाथांकडून, पसायदान मागत म्हणताहेतः

जैं खलांचिं वेंकटी सांडों। तेयां सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें पडों। मैत्र जीवाचें।।१८-१७९४।।
दुरिताचें तिमिर जाओ। विश्वस्वधर्मसूर्यें पाहों।
जो जें वांछील तो तैं लाहों। प्राणिजात।।१७९५।।

परमात्म्यापासून विमुख, अज्ञानात रत असणारे ते खल होत. आपल्या या ग्रंथाद्वारे त्यांच्या अंगीचे हे दुर्गुण नष्ट व्हावेत, त्यांना ईश्वराची भक्ती लाभावी, त्यांचे अज्ञान दूर व्हावे, उत्तरोत्तर त्यांच्या हातून ईश्वराच्या अनुसंधानाचे सत्कर्म मोठ्या प्रेमाने घडून यावे, त्यांची बुद्धी परमात्मध्यानात चढत्या श्रेणीने रत व्हावी, अशी इच्छा ज्ञानेश प्रकट करतात.

सर्व भूते, सर्व जीव एकच आहेत; सर्वांतर्यामी तो प्रभू दयाघनच विनटलेला आहे; हा सर्वात्मक ईश्वराचा भाव त्यांच्याठायी प्रकट व्हावा, अद्वैताचा त्यांना बोध व्हावा; अज्ञानांधःकार दूर व्हावा; विश्वात स्वधर्मरूपी - परमात्मपरायणतारूपी आत्मसूर्याचा प्रकाश पसरो; प्राणिजातांच्या सकळ सदिच्छा पूर्ण होवोत; त्यांना ईश्वरसाक्षात्कार होवो, असे ज्ञानेश सर्वांसाठी मागणे मागतात.

वर्षत सकल मंगलीं। ईश्वरनिष्ठांचिं मांदियाली।
अनवरत भूमंडलीं। भेटतु भूतां।।१८-१७९६।।
चलां कल्पतरूंचें आरव। चेतनाचिंतामणिंचें गांव।
बोलतें जैं आर्णव। पियूखाचें।।१७९७।।
चंद्रमें जैं अलांछन। मार्तंड जैं तापहीन।
तैं सर्वांहीं सदा सज्जन। सोएरें होतु।।१९८।।
किंबहुना सर्व सुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित ।।१७९९।।

ईश्वरनिष्ठ संतांची या भूतळावर भूतमात्रांस अनवरत भेटी घडो; त्यांच्याकडून सर्वांचे सदा कल्याण होवो; कल्पतरूंची चालतीबोलती उद्याने, चैतन्यचिंतामणींची गावेच, अमृताचे वाक्सागरच, निर्दोष चंद्रमे, तापहीन मार्तंड, असे ते सज्जन सर्वांचे प्रेमाचे अन जीवाभावाचे सोयरे होवोत; आणि सर्वत्रांनी पूर्णत्वास पावून, सर्व प्रकारे सुखी होत, त्या आदिपुरुषास अखंडित भजावे, असे **पसायदान** ज्ञानेशांनी मागितले आहे.

आणि ग्रंथोपजीविएं। विशेखें लोकीं इयें।
दृष्टादृष्ट विजएं। होआवें जी।।१८-१८००।।
एथ म्हणे विश्वेशराओ। हा होईल दानपसाओ।
एणें वरें ज्ञानदेओ। सुखियां जाहाला।।१८०१।।

तसेच ज्यांची गीतेवर, त्यांच्या या निरूपणावर, अत्यंत श्रद्धा आहे, त्या सर्वांचे विशेषेकरून **"याचि देहीं याचि डोळां"** कल्याण व्हावे, जीवन्मुक्तीचा सोहोळा संपन्न व्हावा! अशी ज्ञानदेवांची आसही येथे प्रकट होते.

ज्ञानदेव त्यांच्या लेकरांचे - तुमचे आमचे, सर्व भूतमात्रांचे जे हे कल्याण करू इच्छितात, त्यासाठी जे हे **पसायदान** त्यांनी प्रार्थिले आहे, ते भरभरून त्यांच्या ओंजळीत घालत तो विश्वेशराया श्रीनिवृत्ती त्यांना म्हणतो, **"हा होईल दानपसाओ!!!"**

हे **पसायदान** त्यांच्याकडून पावलेले ज्ञानदेव अति प्रसन्न होतात, सुखी होतात!!!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

इत्यलम्। इति शम।।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने।
प्रणतःक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः।।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा
बुद्ध्याऽऽत्मना वानुसृतस्वभावात्।
करोमि यद् यत् सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयामि।।
।।११/२/३६।।श्रीमद्भागवत।।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

पश्चिमपथ स्थाने व शून्ये / देहसंकेत / समाधि / मुक्ती

समाधि	**१)विष्णुतीर्थमत**	**२)गोपीनाथमत**	**३)वुड्रॉफमत**	**४)ज्ञानेशवाङ्मयाधारे**	**देह**	**मुक्ती**
सं}	आज्ञा	आज्ञा	आज्ञा	प्रथमशून्य-त्रिकूटी	**स्थूल** }	
}	बिंदू (संप्रज्ञात सवितर्क	बिंदू	बिंदू	द्वितीयशून्य-श्रील्हट	**सू** }	सलोकता
}	समाधि)				}	
}	अर्धेंदु (संप्रज्ञात सविचार	अर्धेंदु	अर्धेंदु	-➢ -➢ -➢ -➢	}	-➢ समीपता
}	समाधि)				}	
प्र}	निरोधिका(संप्रज्ञात	रोधिनी	बोधिनी	-➢ -➢ -➢ -➢	}	-➢ सरूपता
}	निर्वितर्क समाधि)				} **क्ष्**	
}	नाद	नाद	नाद		}	
ज्ञा}	नादांत (संप्रज्ञात निर्विचार	नादांत (मोक्षद्वार)	महानाद		}	
}	समाधि)				}	
}	शक्ति	शक्ति	-		} **म**	
}	व्यापिका (सानंद समाधि)	व्यापिका	व्यापिका	तृतीयशून्य -गोल्हाट} -➢	**का** -➢	**सा**
त}	समनी (सास्मिता समाधि)	समना	समनी	}	**र**	**यु**
				}	**ण**	**ज्य**
अ}	उन्मनी	उन्मना	उन्मनी	चतुर्थशून्य -औटपीठ}**भ्र** -➢	**म** -➢	**जी**
}			(शिवतत्त्वाधीन)	}		
}	प्रतिष्ठा	-	-	}**म**	**हा**	
सं }	गुह्यचक्र	-	-	}		**व**
}	-	महाबिंदू	-	}**र**	**का**	
}	सहस्त्रारचक्र	-	-	}		
ज्ञा}	ब्रह्मरंध्र	ब्रह्मरंध्र	ब्रह्मरंध्र	महाशून्य }**गुं**	**र**	**न्मु**
}			पराबिंदू	}		
त}			(परमशिव)	}**फा**	**ण**	**क्ती**
				निरशून्य -➢-➢ -➢ -➢	**कैवल्य देह**	**-➢विदेहमुक्ती**

विविध योगमतांनुसार योगचक्रस्थाने

चक्रक्रम-१	**चक्रक्रम-२**	**चक्रक्रम-३**	**चक्रक्रम-४**
आज्ञाचक्र		**आज्ञाचक्र**	**आज्ञाचक्र**
		त्रिकूट	त्रिवेणीचक्र (भ्रूमध्यस्थान)
चंद्रचक्र	ललाटचक्र	श्रीहट्ट	चंद्रचक्र (ललाटस्थान)
ब्रह्मरंध्र	**सहस्त्रदलकमल**		**ब्रह्मरंध्रचक्र (मूर्धास्थान)**
तालुचक्र	तालुचक्र		ऊर्ध्वरंध्रचक्र (तालुस्थान)
भ्रमरगुहा	**भ्रमरगुहा**		**भ्रमरगुंफा (अलक्ष्यचक्र)**
ब्रह्मचक्र			पुण्यागारचक्र
कोल्हाटचक्र		कोल्हाट	**कोल्हाटचक्र**
		औटपीठ	
		भ्रमरगुंफा	
		ब्रह्मरंध्र	

प्रथम स्कंध::पूर्वरंग
(पृ.क्र.१ ते ११९)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१-१::
::विषयप्रवेश-१::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष १-१:

२:७,७१

४:१०

६:२२,२८-३१

७:३,,१९

८:१४

९-२२,३४

१०:१०,११

११:३३,४७,५४,५५

१२:७,१३-२०

१३:१८,२३,३०,३४

१४:१९,२०,२३-२५

१५:५,६,१९

१६:२२

१८:३६,३७,४९-५८,६१,६२,६५,६६,७८

ज्ञानेश्वरी:

१:१,५६-७१

२:१-५,५५-८०

६-१४,२८-३०,३२-३६,४९२,४९३

७:१२०-१२२,

९:१,५३४

१०:४३,४५

११:९,१०

१३:११५३,११५४,११५८-११६१,१८००

१७:८४,८६

१८:९८१-९८३,१११-१११७,११२४-

११३१,११३३,११४७,११४९,११५१-११५७,११६१-

११६३,११६८,११७१-११७४,११७६-११८२,११८५-

११८७,११९२-१२००,१२०४,१२०५,१२०९,१२१०,

१२१९,१२२२,१२५८,

१३२०-१३२२,१४१७-१४२०,१४२२-

१४२५,१५७४,१५७५,१५९०-

१६०१,१६३२-१६५९,१६६१,१६६२,१६६७,१६८०-

१६८४,१६८९,१६९४,१६९५-९७,१७४४,१७४७,१७४९-

१७६१,१७९९,१८०१,१८०७,१८०९

उद्धृत:गीता गोरखपूर(७,८)

ॐ श्री ॐ

योगदा श्रीज्ञानेश्वरी

चिद्भ्रमरविलास

प्रथम स्कंध::::पूर्वरंग

उन्मेष १-१:::::विषयप्रवेश-१

आध्यात्मिक कृपा::::

कृपा

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।

श्रीज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीत माउली श्रीज्ञानदेवांनी सर्व आत्मानुभूतीचा रस ओतला आहे. संत श्रीनामदेवांनी ***"नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरि ओवी अनुभवावी।।"*** असे म्हटले आहे. संपूर्ण ज्ञानेश्वरीच्या जवळ जवळ ९००० ओव्यांपैकी कोणतीही एक ओवी परमात्म्याची पूर्णानुभूती देण्यास समर्थ आहे. त्यामुळे जे एका ओवीत आहे, तेच सर्व ज्ञानेश्वरीत आहे. किंबहुना एका ओवीच्या एका शब्दात अथवा एकाच अक्षरातूनही भाग्यवंतास पूर्ण बोध होऊ शकतो. यामागे अर्थात भगवंताच्या कृपादृष्टीचे सामर्थ्य असेल, तरच हे होऊ शकते. श्रीनामदेवांनी याप्रमाणे खरे तर श्रीहरीच्या कृपामय करुणापूर्ण दृष्टीचेच महिमान गाईलेले आहे, हे आपण जरूर लक्षात घेतले पाहिजे.

आत्मकृपा

आत्मसाक्षात्कार व परमात्मोपलब्धी केवळ त्याच्याच कृपेने होऊ शकतात; अन्यथा नाही; हे श्रुतिसंमत आहे. ***"यमेवैष वृणुते तेन लभ्यः"*** असे कठोपनिषद म्हणते - म्हणजे ज्याच्यावर आत्मराजाची कृपा होते, त्यालाच तो प्राप्त होतो.

संतकृपा

"मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा।। नारदभक्तिसूत्र।।"

आत्मप्राप्ती ही मुख्यतया महापुरुषांच्या अथवा भगवंताच्या कृपेनेच होते. महापुरुष हे आत्मस्थित असतात व भगवंताशी अभेद असतात. म्हणजेच आत्मोपलब्धीचे खरे साधन म्हणजे एकच व ते श्रीप्रभुकृपाच होय. अन्य प्रकारची साधने ही खऱ्या अर्थाने साधने नव्हेतच! इतर जी साधने म्हणा, मार्ग म्हणा, पंथाचरण म्हणा, ही सर्व गौण साधने होत. या साधनांद्वारा मनुष्य फक्त आण्विक प्रयत्नच करू शकतो. अर्थात हे आण्विक प्रयत्नसुद्धा महत्त्वाचेच होत. कारण मनुष्यजन्म प्राप्त होणे हे दुर्लभ असून त्यात आत्मप्राप्तीची इच्छा निर्माण होणे हे तर अतिदुर्लभ आहे.

विवेकचूडामणि

जन्तूनाम् नरजन्म दुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता।
तस्मात्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्वमस्मात्परम्।।
आत्मानात्मविवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थिति-।
-र्मुक्तिर्नो शतजन्मकोटिसुकृतैः पुण्यैर्विना लभ्यते।।

विवेकचूडामणी च्या दुसऱ्याच श्लोकात श्रीमच्छंकराचार्यांनी सूचित केले आहे की ***नरजन्म, पुरुषत्व, पुरुषार्थ साधू इच्छिणारा ब्राह्मणवर्ण आणि वैदिक धर्मोपदिष्ट मार्गावर चालणे म्हणजेच आत्मप्राप्तीचा मार्ग चोखाळणे*** - ही सर्व एकापेक्षा एक दुर्लभ आहेत.

जो मनुष्य आत्मप्राप्तीचा इच्छुक आहे त्याला, त्याच्या सदिच्छेच्या तीव्रतेनुसार वैश्विक पातळीवर प्रतिसाद मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण होत असते व यातूनच जर तो आपल्या उत्कटतेचे भाव स्पंदित करू शकला आणि आपल्या इच्छेची तीव्रता वाढवू शकला, तर त्याला आत्मराजाची कृपा लाभू शकते.

असे असले तरी पण आत्मयाची कृपा ही ***अहैतुकी*** च असते हे नीट लक्षात घेण्याजोगे आहे. अमुक केले असता कृपा होईल व तमुक केले असता कृपा मिळणार नाही, अशी मानवी बुद्धीची गणिते तेथे चुकतात. परंतु **नारदभक्तिसूत्रा**त सांगितल्याप्रमाणे महापुरुषांचा आश्रय मिळाल्यास नरजन्म सार्थकी लागू शकतो. पण असा आश्रयसुद्धा अत्यंत दुर्लभ होय.

श्रीकृष्णकृपा

ईशकृपेच्या संमार्जनाने मानवाची दृष्टी जर नियतीने ***श्रीमद्भगवद्गीता व श्रीज्ञानेश्वरी*** यांजकडे वळवून केंद्रित केली व ***श्रीगोपालकृष्ण - श्रीज्ञानेश्वर*** या महापुरुषांच्या उदारकृपेचा वर्षाव जर अनुभवण्यास मिळाला, तर ते परमभाग्यच होय. अन्यथा आत्मप्रांतात साधा विचारसुद्धा व्यक्त करण्यास मनुष्यमात्र असमर्थच आहे. पण केवळ या महापुरुषांच्या आश्रयाने जर तो काही प्रमाणात का होईना, आत्मविचार करू शकला, तर ते मानवी मर्यादेत त्याच्या समाधानाचे मुख्य कारणच होऊन राहील. त्या महापुरुषांचे विचारधन आपल्या नजरेस किंचिन्मात्र जरी दृग्गोचर झाले तरी खरी धन्यता प्राप्त होईल. अस्तु!

महापुरुषांची कृपा ही विश्वातील एक अतिशय सामर्थ्यशाली शक्ती आहे व तिच्या आधाराने एखादा क्षुल्लक मनुष्यही अत्यंत अतर्क्य कार्य करू शकतो:

श्रीज्ञानेश्वरकृपा

गीताध्यानश्लोकात म्हटले आहे:

मूकं करोति वाचालम् पंगुं लंघयते गिरिम्।
यत्कृपा तमहं वन्दे परमानंद माधवम्।।

ज्याच्या कृपेने मुका वाचाळ होतो, पंगु पर्वत ओलांडून जाऊ शकतो अशा त्या साक्षात जगद्गुरू श्रीकृष्ण परमात्म्याचा पूर्ण अवतार, ज्यांनी वरदहस्त मस्तकी ठेवताच रेड्याच्या मुखातूनसुद्धा वेदवाणी अस्खलित स्वरूपात बाहेर पडली, त्या महाज्ञानी, अशा श्रीज्ञानराजांना शतशतकोटी प्रणाम!!!

त्यांच्या प्रज्ञेचा सुधांशु *श्रीज्ञानदेवी* रूपाने मानवांवर करुणामय प्रेमकृपा वर्षवण्यासाठी, दिक्कालातीत अशा दिव्य चिदाकाशात अनंत कालापर्यंत प्रकाशमान राहील असे त्यांचे सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांचे विशेषेकरून समस्त कलिग्रस्त जीवांसाठी आशीर्वादपर अभिवचनामृत आहे. श्रीज्ञानदेवीच्या रूपाने संसारश्रांत जीवास विरंगुळा प्राप्त होईल अन त्याला परमनि:श्रेयसाच्या प्राप्तीचा मार्ग खुला होत राहील; हीच त्या महापुरुषाने विश्वावर केलेल्या महत्कृपेची खूण आहे आणि केवळ एका ***गीता-ज्ञानेश्वरीच्या सेवनाने*** साधकांचे मनोवांछित परमात्मप्राप्तिसुख मिळते.

म्हणून इतर ग्रंथांबद्दल आदर ठेवूनही असे म्हणता येईल की जर कुठलाही केवळ एकच ग्रंथ अध्यात्मासाठी जवळ बाळगायचा असेल तर बिनदिक्कत ***नि:शंक मनाने श्रीज्ञानेश्वरीचेच अवलंबन करावे.*** अस्तु!

श्रीज्ञानदेवी प्रारंभ

आता श्रीज्ञानदेवीच्या प्रथम ओवीचा भावार्थ पाहू या! श्रीगीतेचा प्रतिपाद्य विषय कोणता आहे अथवा श्रीज्ञानदेवांस त्याबद्दल काय म्हणावयाचे आहे; हे रहस्य माउलीने हातचे काही राखून न ठेवता या पहिल्याच ओवीत प्रकट केले आहे.

"ॐ नमो जी आद्या"

ॐ हे परमात्याचे ***अक्षर स्वरूप*** म्हणून आहे. ***नमो*** हे नमनाचे रूप आहे. ***नमन करणे म्हणजे न -मन होणे - अमनस्क होणे.*** ही योगशास्त्राची एक मोठी निशाणी समजली जाते. ***योगशास्त्र हे जीव व परमात्मा यांचा मिलाप करून देणारे सर्वोत्कृष्ट शास्त्र आहे.*** ***आद्या*** म्हणजे ***आदितत्त्व***- सर्व विश्वाच्या मूलस्थानी जे तत्त्व तेच ते! ***जी*** हे आत्म्याला **राजा** म्हणून केलेले गौरवपूर्ण संबोधन आहे.

वेदप्रतिपाद्या - वेद म्हणजेच परमात्म्याचे नि:श्वसन! परमात्म्याची चाहूल ज्यांनी लागते ते. त्यांचा *प्रतिपाद्य* म्हणजे वर्ण्य विषय स्वयं भगवंतच! ***जय जय*** हे मंगलनिदर्शक संबोधन आहे; जयत्कार आहे. ***"एकोऽ हम्। बहुस्याम्।।":*** सृष्टीचे जे आदितत्त्व त्याला आपण एकच आहोत, ते *बहु* म्हणजे अनेक व्हावे अशी इच्छा झाली व विश्व उदयाला आले.

या विश्वाच्या रूपाने आत्माच आहे व विश्व जाणणारा, त्याचा उपभोग घेणारा, त्याला रस-रूप- गंध-शब्द-स्पर्श या पंच तन्मात्रांनी अनुभवणाराही आत्माच आहे. साखरेला स्वत:ची गोडी स्वत:च अनुभवता येत नाही. परंतु आत्मा हा स्वत:च स्वत:ला वेगवेगळ्या प्रकारे विषय होतो. तो स्वत:ला जाणून घेऊ शकतो. म्हणून तो ***स्वसंवेद्य!! आत्मरूपा*** म्हणजे ज्याचे रूप-स्वरूप आत्माच आहे, तो!

परमवस्तुनिर्देश

या प्रथमारंभीच्या ओवीच्या प्रत्येक शब्दात निखळ आत्मतत्त्वाचाच निर्देश केलेला आहे. त्याचेच गुणगान आहे. त्यालाच संबोधले आहे. त्याचीच स्तुती केलेली आहे. त्याचेच स्वरूप वर्णिले आहे. थोडक्यात म्हणजे या एकाच ओवीतून, ***परमवस्तू जो आत्मा आहे, जो श्रीहरी आहे,*** त्याच्यापर्यंत श्रीज्ञानदेव ओवीच्या प्रत्येक शब्दागणिक आपल्याला घेऊन जात आहेत.

येथे आता कुठले मार्ग अन कुठले पंथ! कोण मार्गिक अन कोण पांथिक! जेथे सर्व मार्ग अन पंथ विराम पावतात; जेथे पोहोचल्यावर साधकास तो कोणत्या मार्गाने आला याची साधीशी जाणीव पण रहात नाही; तेथे गीता-ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांना पडलेल्या अनेक प्रश्नांवर -गीतेचा मुख्य भर ज्ञानमार्गावर आहे की कर्ममार्गावर आहे, योगमार्गावर आहे की भक्तिमार्गावर आहे; नाथपंथोपदिष्ट योग प्रतिपादिला आहे की श्रीपतञ्जलींचा अष्टांगयोग अभिप्रेत आहे; संन्यास श्रेष्ठ की कर्म श्रेष्ठ; इत्यादी विषयांवर जे हजारो वाद आजपावेतो अहमहमिकेने घातले गेले आहेत, त्या सर्व विषयांतरावर ज्ञानदेवांच्या या प्रथमारंभीच्या ओवीतून पडदाच पडतो. अन तो तसाच पडावा! खरा मार्ग-खरे तत्त्व बुद्धीला प्रकट व्हावे अन मार्गस्थांची दिशाभूल होऊ नये हीच सदिच्छा!

परमात्मसाक्षात्कार

श्रुतीनुसार मनुष्यजीवनाचे परम सार्थक म्हणजे परमात्म्याचा साक्षात्कार करून घेणे व त्याच्याशी एकरूपता पावणे यातच आहे. मनुष्यमात्राचे सर्व प्रयत्न जाणीवपूर्वक याच दिशेने व्हायला हवेत. त्याकरता धर्मशास्त्राने जे वेगवेगळे उपाय सुचविले आहेत, त्यांची बहुशः आण्विक उपायात गणना होते. मुख्य उपाय म्हणजे महापुरुषांची सेवा, त्यांना अनन्यभावाने शरण जाणे, त्यांची कृपा मिळणे . महापुरुष हे परमकारुणिक असल्याने असे संतमहात्मे त्यांच्याकडे याचनादृष्टीने पाहणाऱ्या मुमुक्षू जीवांस विविध मार्गांनी बोध करून देतात आणि अंतिम अवस्था म्हणजे आत्मस्थिती त्यांना प्राप्त करून देण्यास साहाय्यभूत होतात.

उपदेश

हे कार्य करण्याची सर्वमान्य पद्धत म्हणजे उपदेशात्मक होय व त्या उपदेशाची सुरुवातच आत्मवस्तूचा निर्देश मुमुक्षूस करून देण्यापासून होते. या पहिल्याच नमनाच्या ओवीत ज्ञानदेवांनी *आत्मवस्तू*

म्हणजे श्रीहरीचा बोध अल्पज्ञ जिज्ञासू जीवात्म्यास त्यासाठी वेगवेगळी संबोधने वापरून करून दिला आहे. विष्णुसहस्त्रनामात तर त्याच आत्मवस्तूचा बोध सहस्त्र नामांनी करून दिला आहे; तर संपूर्ण धर्मशास्त्रातून अनंतरीत्या त्याचा परिचय करून देणारी शतशत वाक्ये आढळतात.

विभूतिविशेष

श्रीगीतेच्या दहाव्या अध्यायात भगवंतांनी आपल्या काही मुख्यमुख्य विभूती गायिल्या आहेत. गीतेद्वारे इतरत्रही त्यांनी आपल्या अन्य विभूतितत्त्वांचा निर्देश केलेला आहे. श्रीज्ञानदेवांची बहार म्हणजे त्यांनी या प्रथम ओवीतच महान आत्मतत्त्वाचा त्वरित आत्मबोध करून देण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त अशाच विभूतिनामांचा गौरव करून मुमुक्षूस सन्मानप्राप्तीचे थोर आश्वासन ***"ॐ नमो जी आद्या वेद-प्रतिपाद्या जयजय स्वसंवेद्या आत्मरूपा"*** या विशिष्टगुणसंपन्न सार्थ शब्दांच्या दिव्य प्रयोगाने दिले आहे.

ज्ञानदेवांचे वैशिष्ट्य

श्रीज्ञानेश्वरीच्या केवळ या प्रथमारंभीच्या ओवीच्याच अनुसंधानाने त्वरित दिसून येते की श्रीज्ञानदेव हे अतिउच्च कोटीचे महापुरुष आहेत. विवेकचूडामणीत म्हटल्याप्रमाणेः

दुर्लभं त्रयमेवैतद्देवानुग्रहहैतुकम्।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः।।३।। वि. चू.।।

म्हणजे मनुष्यत्व, त्यातून मुमुक्षुत्व व तदउपरी महापुरुषांचा आश्रय -कृपा-सहवास ही तिन्ही की ज्यांच्यामुळे भगवत्कृपा प्राप्त होते, ही सर्व उत्तरोत्तर दुर्लभ आहेत.

श्रीज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या मिषाने मनुष्याचे परमोच्च भाग्यच प्रकट होते, मनुष्यत्व तर आहेच; त्यातून कुठल्याही निमित्ताने का होईना, ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा व त्यारूपाने श्रीज्ञानदेवांसारख्या परमश्रेष्ठ भागवतोत्तमाचा सङ्ग शतकोटी जन्मांच्या शुभपुण्यकर्मांच्या फलोदयानेच प्राप्त होऊ शकतो.

महावाक्योपदेश

विश्वाचे आदितत्त्व जो नारायण, त्याचा परोपरीने निर्देश करतांनाच या प्रथम मंगलाचरणाच्या ओवीतून ***"अहं ब्रह्मास्मि"*** या महावाक्याचा पण मोठ्या खुबीने मुमुक्षूस बोध करून दिला जातो - जसे त्या तत्वाला ***आत्मरूपा व स्वसंवेद्या*** म्हणून गौरविले आहे. आत्मरूपाने तो व मी वेगवेगळे नसून एकच आहोत; ***आत्म*** म्हणजे ***स्व*** म्हणजे स्वतः व स्वरूप आणि आत्म्याचे रूप ही वेगवेगळी नाहीत असा बोध ***आत्मरूपा*** या श्रुतीने होतो. तसेच ***स्वसंवेद्या*** यामध्ये दोन अर्थ एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे ध्वनित होतात - एक म्हणजे ***स्व - स्वतःला संवेद्य असणारे ब्रह्म*** व दुसरा अर्थ ***ब्रह्माला संवेद्य असलेले व त्याच्याच रूपाचा अविभाज्य भाग असलेले विश्वरूप, ज्यात स्व - स्वतःचा म्हणजे मुमुक्षूचा पण समावेश होतो.***

स्वसंवेद्या या अर्थवाही शब्दातून ***मुमुक्षू जीव आणि ब्रह्म*** यांचा अभेद आहे असे स्पष्ट होते. या प्रथमारंभीच्या ओवीतून साधकांची माउली आपणास त्वरित ***सोऽहम् बोध*** करून देते व त्या बोधाला स्थिरता प्राप्त व्हावी - पक्वता यावी - म्हणून पुढे वेगवेगळे दृष्टांत देऊन श्रीगीतेच्या माध्यमातून तत्त्वविवेचन करते.

संपूर्ण ज्ञानेश्वरी ग्रंथाचे आलोडन करतांना ***सोऽहम्*** बोधाची वेगवेगळी लक्षणे, वेगवेगळ्या अवस्था, ***सोऽहम्***रूप जाणणाऱ्या जीवात्म्याची स्थिती आणि तदनुषंगाने येणारे इतर उपमुख्य विषय माउलीने अत्यंत समर्थपणे हाताळले आहेत हे वारंवार जाणवते. आणि हे सर्व एकदा करून दिलेला ग्रंथारंभीचा जो ***सोऽहम्*** बोध आहे, त्याची घडी बिघडू न देता होते, यातच या महान श्रेष्ठ पुरुषाचे - त्या ज्ञानदेवांचे अनिर्वचनीय विश्वकार्य करण्याचे सामर्थ्य दृग्गोचर होते.

साधकांची माउली

श्रीज्ञानेश्वरांच्या प्रज्ञासामर्थ्यामुळे मुमुक्षूंचे कष्ट फार मोठ्या प्रमाणावर वाचतात. कारण केवळ एका ज्ञानदेवीच्याच अंगिकाराने त्याला सर्व श्रुती-स्मृती-धर्मग्रंथांचे सार प्राप्त होते. माउलीने म्हटल्याप्रमाणेः

तो न कां पढो ब्रह्मसूत्र। नालोडो सर्व शास्त्र।
सिद्धान्तु न होतु स्वतंत्र। तेयां हातीं।।१७-८४।।
परि श्रुतिस्मृतींचे अर्थ। जैं आपण होऊनि मूर्त।
अनुष्ठानें जगां देत। वडिल जैं गां।।८६।।

असे फळ त्याला अनायासे प्राप्त होते, ते केवळ एका ज्ञानदेवीच्या म्हणजेच श्रीज्ञानदेवांच्या चरणस्पर्शाने!!! धन्य तो त्या महापुरुषाचा सङ्ग की ज्याच्या केवळ एकाच ओवीत - किंबहुना त्या ओवीच्या एकाच अक्षरात - एकाच शब्दात येवढे अपार सामर्थ्य साठविलेले आहे आणि अधिकारी - अनधिकारी असा वादंग न घालता, धेनू जशी वत्साला कासेखाली घेते, तशी ही साधकांची माउली सर्व लहानथोर मुमुक्षूंना आपल्या कृपेच्या पदराखाली सामावून घेते.

यानिमित्ताने हे जरूर लक्षात घेणे आवश्यक आहे की या मातेने आपल्याला पदराखाली घ्यावे असे वाटत असेल तर वत्साचा धेनूप्रति जसा भाव असतो, तोच आपला पण श्रीज्ञानदेवांप्रति असला पाहिजे. तसे झाले म्हणजे या माउलीस श्रीकृष्ण भगवंत म्हणतात त्याप्रमाणे प्रेमपान्हा फुटेलः

पाहे पां दुभतेयाचिया अशा। जगचि धेनु करितसे फासा।।
परि दोरेवीण कैसा। वत्साचा बली।।७-१२०।।
कां जैं तनुमनुप्राणें। तैं आणिक कांहींचि नेणे।
देखे तियां तैं म्हणे। हें मायचि कीं।।१२१।।
तैं येणें माने अनन्यगति। म्हणौनि धेनूही तैसीचि प्रीति।
यालागीं लक्ष्मीपति। बोलिले साच।।१२२।।

दुभते मिळावे म्हणून गायीला पाळणारे बरेच लोक जगात असतात. परंतु आपण होऊन गाय पान्हा सोडते ती केवळ वत्सासाठीच! कारण ते वासरू आईशिवाय इतर काहीच जाणत नाही. गाय दिसली की ते तिच्याकडे धांव घेते, हे जाणून की त्याची आईच आली आहे. वत्साच्या मनीमानसी मातेशिवाय दुसरा विचारच नसतो. इतके ते अनन्यचित्त व अनन्यगतिक असल्यामुळे धेनूसही वत्साची तेवढीच ओढ वाटत असते.

अनन्यशरणता

म्हणून भक्त जर अनन्यशरण झाला तर प्रभूला पण त्याला आपल्या पदराआड घ्यावेच लागते. आपणही ज्ञानदेवांप्रती असाच भाव ठेवला तर तेही आपली माउली होतात. अर्जुनाचाही श्रीकृष्णांप्रती असाच भाव होता व त्यातूनच गीतेसारखा परमात्मकृपानिदर्शक ग्रंथ प्रसवला गेला.

मुळात श्रीमद्भगवद्गीता हा भगवत्कृपेचा मुख्य शास्त्रग्रंथ आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. श्रीकृष्णाने अर्जुनावर केलेल्या महत्तम कृपेचे औदार्य ठायीठायी ज्यात भरून राहिलेले आहे, असा हा ग्रंथ आहे. युद्धप्रसंगी अर्जुनाची मोठी केविलवाणी मन:स्थिती झाली होती. तेव्हा त्याच्यावर श्रीकृष्णांची कृपा झाली. माउलीने ती पुढील शब्दात स्वरबद्ध केली आहे:

मग सञ्जयो म्हणे रायाते। आईके तो पार्थु तेथे।
शोकाकुल रुदनाते। करितु असे।।२-१।।
तैं कुल देखौनि समस्त।स्नेह उपनले अद्भुत।
तेणे द्रवले असे चित्त। कवणेपरी।।२।।
जैसें लवण जलें झलंबले। ना तरी अभ्र वाते हालले।
तैसें सधीर परी विरमले। हृदय तेयाचे।।३।।
म्हणौनि कृपा आकलिला। दिसतसे अति कोमाईला।
जैसा कर्दमीं रुपतला। राजहंसु।।४।।
तेयापरी तो पाण्डुकुमरु। महामोहे अति जर्जरु।
देखौनि श्रीशार्ङ्गधरु। काय बोले।।५।।

"युद्धप्रसंगी पापपुण्याच्या व जिवलग नातेवाईकांस मारण्याच्या कल्पनेने संभ्रमित झालेला सर्वश्रेष्ठ धनुर्धर अर्जुन अतिशय शोकग्रस्त होऊन केविलवाणा झाला. ज्याप्रमाणे पाण्यात मीठ विरघळून जाते अथवा वाऱ्यामुळे हलके ढग सहजच इतस्ततः विखरून जातात, त्याप्रमाणे समस्त कुरुकुलाच्या नाशाच्या कल्पनेमुळे द्रवित झालेले त्याचे चित्त गतधैर्य होऊन विरमले. आप्तस्वकीयांबद्दल कारुण्याने विरघळलेला व मोहग्रस्त अर्जुन चिखलात रुतलेल्या कोमेजून गेलेल्या राजहंसाप्रमाणे दीन दिसू लागला."

अशा मोहफणिग्रस्तु व्याकुळ मन:स्थितीत अर्जुनाने भगवंतापुढे संपूर्ण शरणागती पत्करली. त्या व्याकुल भावाचे वर्णन श्रीगीतेच्या पुढील श्लोकात आहे, ते असे:

कार्पण्यदोषोपहतस्वभावः
पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः।
यच्छ्रेयःस्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।

"करुणाव्याप्त आणि दैन्यामुळे मूळ विरश्रीयुक्त स्वभाव नष्ट झालेला व धर्म काय, अधर्म कोणता, याविषयी मूढचित्त झालेला असा मी आपणाला विचारतो आहे की जे निश्चित कल्याणकारक साधन असेल ते मला सांगा. कारण मी आपला शिष्य आहे. म्हणून आपणांस शरण आलेल्या मला सुयोग्य उपदेश करा."

अर्जुनाचा हा भाव व्यक्त करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आम्हां काय उचित। तैं पाहतां न स्फुरे एथ।
जैं मोहें येणे चित्त। व्याकुल माझें।।२-५५।।
तिमिराविरुद्ध जैसे। दृष्टीचे तेज भ्रंशे।
मग पासीं असतां न दिसे। वस्तुजात।।५६।।
देवा तैसे मज जाहले। जैं मन हें भ्रांतीं ग्रासिले।
आतां हित काय आपुलें। तैंही नेणें।।५७।।

"आम्हा पाण्डवांना या निर्णायक युद्धप्रसंगी काय करणे उचित आहे; युद्ध करावे की प्राप्त झालेले युद्ध सोडून समरांगणाकडे पाठ वळवावी हे मला आता कळेनासे झाले आहे."

अर्जुन पुढे म्हणतो, "ज्याप्रमाणे अंधारात दृष्टीचे तेज लोपते व पायाशी असलेली वस्तुसुद्धा दिसत नाही तसेच, हे श्रीकृष्णा! मोहाने व्याकुळलेल्या चित्तामुळे माझे मन भ्रांतीग्रस्त झालेले आहे व आपले हिताहित जाणण्यास मी असमर्थ झालेलो आहे."

तऱ्ही कृष्णा तुवां जाणावें। निके तैं आम्हां सांगावे।
जैं सखा सर्वस्व आघवें। आम्हासीं तूं।।२-५८।।
तूं गुरु बंधु पिता। तूं आमुचि इष्ट देवता।
तूंचि सदा रक्षिता। आपदीं आमुतें।।५९।।
जैसा शिष्यातें गुरु। सर्वथा नेणें अव्हेरु।
कीं सरितांतैं सागरु। त्यजी केवीं।।६०।।
ना तऱ्हीं अपत्यातें मायें। सांडूनि जऱ्हीं जाये।।
तऱ्हीं तैं कैसेनि जिये। ऐकें कृष्णा।।६१।।

तरी तूच आता आम्ही काय करावे, योग्य काय, अयोग्य काय, हे सांगावेस. कारण तूच आमचा गुरू, बंधू, पिता, इष्ट देवता व आमचे सदासर्वदा आपत्काळातही रक्षण करणारा भर्ता आहेस. शिष्याला गुरू कधीच अव्हेरीत नाहीत; सागर सरितेचा कधी त्याग करीत नाही; अपत्याला टाकून देऊन माता कधीच जात नाही अन जर तिने अपत्य वाऱ्यावर सोडून दिले तर ते जगेल तरी कसे!"

तैसा सर्वांपरी आम्हां। देवा तूंचि येक आहासि।
आणि बोलिले जऱ्हीं न मानिसी।मागील माझें।।२-६२।।
तऱ्हीं उचित काय आम्हां। जैं व्यभिचरेना धर्मा।
तैं झडकरीं पुरुषोत्तमा।सांगे आतां।।६३।।

हें सकल कुल देखौनि। जो शोकु उपनलासे मनीं।
तो तुझिया वाक्यावाचौनि। न जाय आणिकें।।६४।।

"हे श्रीकृष्णा! तूच आम्हाला एकमेव आधार आहेस. माझे बोलणे व युद्ध न करण्याचा निश्चय जरी तुला आवडला नसेल, तरीसुद्धा आमचे हिताहित पाहणाऱ्या गोविंदा! काय योग्य असेल ते तूच सांग. आम्ही युद्ध करावे की नको; धर्माधर्माचा निर्णय करून लवकर काय ते आम्हाला सांग. हे पुरुषोत्तमा! विनाशाच्या काठावर उभे असलेले हे समस्त कुळ पाहून माझ्या मनात जो शोकाग्नी उसळला आहे, तो तुझ्या मुखीचे बोल ऐकल्यावाचून शांत होणार नाही."

एथ पृथिवीतल आपु होईल। हें महेंद्रपदही पाविजेल।
परी मोह हा न फिटेल। मानसीचा।।२-६५।।
जैसीं बीजें सर्वथा आहालिली। ती सुक्षेत्रीं जऱ्हीं पेरिली।
तऱ्हीं न विरूढती सिंचिली।आवडे तैसीं।।६६।।
ना तऱ्हीं आयुष्य पुरले आहे। तऱ्हीं ओखदें कांहीं नोहे।
एथ एक उपेगा जाये। परमामृत।।६७।।
तैसें राज्यभोगसमृद्धी। उज्जीवन नोहे बुद्धीं।
एथ जिव्हाला कृपानिधी। कारुण्य तुझें।।६८।।

"हा अंतःकरणात उपजलेला मोह इतका दारुण आहे की एकवेळ पृथ्वीच्या पृष्ठभागींची जमीन आपोआप जलात परिणत होईल; किंवा दुर्लभ असे इंद्रपदही कदाचित सहज प्राप्त होईल; परंतु हा मोह मात्र तुझ्या उपदेशावाचून नष्ट होणार नाही. भाजलेले बीज जरी कितीही चांगल्या जमिनीत पेरले आणि वर हवे तेवढे पाणी पण पाजले, तरी कसे वाढेल! मेलेला मनुष्य औषधाने कधीतरी जिवंत होईल काय! त्याला तर फक्त अमृतसिंचनानेच संजीवनी प्राप्त होऊ शकेल. राज्य,भोग आणि समृद्धी जरी हे युद्ध जिंकून आम्हाला प्राप्त झाली, तरी हा जो शोकाचा धिंवसा माझ्या अंतःकरणात उपजला आहे, त्यातून मला मुक्ती मिळणार नाही. केवळ तुझ्या कारुण्याचा, तुझ्या बोलांच्या जिव्हाळ्याचा, तुझ्या कृपामृताचा वर्षाव माझ्यावर केलास, तरच माझे मन शोक व मोह यांपासून मुक्त होईल."

अर्जुनाचा असा हा अगतिक भाव, त्याची अनन्यशरणागती, श्रीकृष्णार्जुनांचा गुरुशिष्यभाव यामात्रेकरून तो कृपेचा महामेघ - तो श्रीगोपाल - अर्जुनाच्या शोकसंतप्त भूमीवर कसा अनवरत वर्षतो याचे श्रीज्ञानेश्वरीत मोठे बहारदार वर्णन आहे.ते पहा पुढील ओव्यातून:

ऐसे अर्जुनु बोलिला। जंव क्षण एक भ्रांती सांडिला।
मग पुनरपि व्यापिला। उर्मी तेणें।।२-६९।।
की मज पाहाता उर्मी नोहे। हें अनारिसे गमत आहे।
तो ग्रासिला महामोहे। कालसर्पें।।७०।।
सवर्म हृदयकल्हारीं। तेथ कारुण्यवेलेचियां भरीं।
लागला म्हणौनि लहरी। भांजेचिना।।७१।।
हें जाणौनि ऐसी प्रौढी। जो दिठीसवेंचि विख फेडी।
तो धांवया श्रीहरी गारुडी। पातला कीं।।७२।।
तैसियां पाण्डुकुमरा व्याकुलां। मिरवितसें श्रीकृष्ण जवलां।
तो कृपावशें अवलीला। रक्षील आतां।।७३।।
म्हणौनि तो पार्थु। मोहफणिग्रस्तु।
म्यां म्हणितला हा हेतु।जाणौनियां।।७४।।

"याप्रमाणे श्रीकृष्णाची विनवणी करतांना क्षणभर अर्जुनाची भ्रांती फिटली. परंतु लागलीच पुन्हा त्या मोहाच्या उर्मीने त्याला ग्रासलेच!"

श्रीज्ञानदेव म्हणतात की "ती मोहाची उर्मी नसून मला वाटते की महामोहरूपी काळसर्पानेच अर्जुनाला ग्रासले असावे. कोमल हृदयकमलाच्या नाजूक जागीच त्या कालसर्पाने अर्जुनाला दंश केला असावा. म्हणून काही केल्या ते जालीम विष उतरत नव्हते. परंतु अर्जुनाच्या सद्भाग्याने त्यावेळी तेथे हे सर्व मर्म जाणणारा आणि केवळ दृष्टिक्षेपानेच त्या कालसर्पाचे विष उतरविणारा निष्णात गारुडी श्रीहरी उपस्थित होता. तो आता त्या व्याकुळ पाण्डुकुमाराचे कृपाळुपणे सहजच रक्षण करील. हे सर्व जाणूनच मी हा दृष्टांत देत म्हटले की, ***पार्थ मोहफणिग्रस्त झाला*** म्हणून!"

मग देखा तेथ फाल्गुनु। घेतलासे भ्रांति कवलुनु।
जैसा घनपटलीं भानु। आच्छादिजे।।२-७५।।
तेयापरी तो धनुर्धरु। जाहलासे दुःखें जर्जरु।
जैसा ग्रीष्मकालीं गिरिवरु। वणवला कीं।।७६।।
म्हणौनि सहजें सुनिलु। कृपामृतें सजलु।
तो वोललासे श्रीगोपालु। महामेघु।।७७।।
तेथ सुदर्शनांची द्युति। तैंचि विद्युल्लता झलकति।
गंभीर वाचा तैं आयतीं। गर्जनेचीं।।७८।।
आतां तो उदारु कैसा वरुषैल। तेणें अर्जुनाचलु निवैल।
मग नवी विरूढी फुटैल। उन्मेखाची।।७९।।

"ज्याप्रमाणे घनमेघांनी सूर्यास आच्छादून टाकावे, त्याप्रमाणे भ्रांतीने अर्जुनास घेरले होते. ग्रीष्मऋतूत नगाधिराजास वणव्याने व्याप्त करावे, तसे त्या धनुर्धरास दुःखरूपी दावानलाने होरपळवून टाकले होते. वणव्याने दग्ध झालेल्या भूमीवर पर्जन्यवृष्टी व्हावी व त्या होरपळलेल्या गिरिवरास शीतलता मिळावी तसाच तो कृपेचा महामेघ - तो घननीळ श्रीगोपाळु - आपल्या कृपामृताच्या जलधारांचे अर्जुनाच्या शोकसंतप्त दग्ध चित्तभूमीवर सिंचन करील. त्याचे घनगंभीर बोल मेघांप्रमाणे अर्जुनाच्या अंतःकरणांत गरजतील. त्या श्यामसुंदराच्या मुखांतील दंतपंक्ती म्हणजे निळ्यासांवळ्या मेघातून चमचमणारी जणूं वीजच! असा तो उदारु गोपाळु महामेघ कसा वर्षतो; त्यामुळे मोहदावानलग्रस्त अर्जुनरूपी पर्वतराजी कशी शांत-शीतल होते आणि त्यातून युद्धोत्साहाचे अंकुर नव्याने कसे परत फुटतात; ते तुम्ही श्रोतेहो! आता प्रशांत चित्ताने ऐका."

आणि यानंतर तो श्रीगोपाळु महामेघ संपूर्ण गीतेभर आपल्या अमृतकृपेच्या संततधारेचा अर्जुनावर सतत जो वर्षाव करीत राहतो, त्याविषयी ज्ञानदेव सूतोवाच करीत म्हणतात:

तैं कथा आईका। मनाचिया आराणुका।
ज्ञानदेओ म्हणे देखा। निवृत्तिदासु।।२-८०।।

माउलीची अमृतवृष्टी

जसा श्रीगीता म्हणजे श्रीकृष्णपरमात्म्याचा अर्जुनावर झालेला भगवत्कृपावर्षाव, तसाच श्रीज्ञानेश्वरी म्हणजे अल्पज्ञ जिज्ञासू जिवात्म्यावर होणारा श्रीज्ञानेश्वरमाउलीचा स्नेहपूर्ण वात्सल्यमय मङ्गलकृपावर्षाव! अर्जुनावर भगवंतांनी जसा करुणापूर्ण कृपावर्षाव श्रीगीतेद्वारे केला, तसाच श्रीज्ञानदेवीचा कृपापूर्ण वर्षाव जीवैकमात्रावर गेली सातशे वर्षे अविरत चालूच आहे. आपल्याकडून अपेक्षा आहे ती फक्त त्या माउली ज्ञानेशांस अनन्यभावे शरण जाण्याची! वत्स जसा धेनुकडे नैसर्गिक ओढीने प्रेमापोटी धाव घेतो, तसे आपणाकडून झाल्यास श्रीज्ञानेश्वररूपी कृपामेघ अविलंब आपल्यावर वर्षून त्याच्या अमृतधारांनी आपणास तृप्त करतो.

असे आहे म्हणून श्रीगीता जशी भगवत्कृपानिदर्शक आहे, तशीच श्रीज्ञानदेवी ही संतकृपादर्शक आहे. भक्तिप्रेमशास्त्राच्या मूलभूत सिद्धांताप्रमाणे संतांची कृपा ही परमात्म्याची कृपा प्राप्त करण्याचा रामबाण उपाय आहे. अशी ती संतकृपा व त्यायोगे परमात्मकृपा प्राप्त करण्यासाठी साधकाने कसे असावे, हे जाणून घेण्यासाठी ज्ञानदेवीचा आधार घेत पुढे जाऊ या.

साधकाचा भाव

ज्ञानेश म्हणतात ते असे:

जैसे शरदीयेचे चंद्रकले -। माजीं अमृतकण कोंवलें।
तैं वेंचितीं मनें मवालें। चकोरतलगें।।१-५६।।
तियापरी श्रोतां। अनुभवावी हें कथा।
अति हलुवारपणा चित्ता। आणूनियां।।५७।।
शब्देंवीण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे।
बोलाआधीं झोंबिजे। प्रमेयासीं।।५८।।
जैसें भ्रमर परागु नेती। परी कमलदलें नेणती।
तैसीं परी आहे सेवतीं। ग्रंथीं इयें।।५९।।

"ज्याप्रमाणे शारदीय चंद्रकलेतील कोंवळे अमृतकण मवाळ मनाची चकोरांची पिल्ले वेचतात, त्याप्रमाणे चित्ताला हळुवारपणा आणून श्रोत्यांनीही श्रीकृष्णार्जुनसंवादरूपी कथा साक्षात अनुभवावी. शब्दांवाचून होणारा मूक हृदसंवाद किंवा इंद्रियातीत भावविश्व, अथवा आपसुकच प्रतीत होणारे वर्णनातीत परतत्त्व, वा कमलदलातून अलगद पराग उचलून घेण्याची भ्रमरलीला ही जशी असतात; त्यांच्याचप्रमाणे या ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सेवन करण्याची पद्धती आहे."

कां आपुला ठाओं न सांडितां। आलिंगिजे चंद्रु प्रकटितां।
हा अनुरागु भोगितां। कुमुदिनी जाणें।।१-६०।।
ऐसेनि गंभीरपणें। स्थिरावलेनि अंत:करणें।
आथिला तोचि जाणें। मानूं इयें।।६१।।
अहो अर्जुनाचियें पांतीं। जैं परिसणया योग्य होती।
तिहीं कृपा करूनि संतीं। अवधान द्यावे।।६२।।

"प्रशांत जलाशयातील कुमुदिनी आपल्याच ठिकाणी राहून गगनातील चंद्रम्यास आलिंगन देत अनुरागाने प्रफुल्लित होते. त्याचप्रमाणे आपल्या चित्तात गांभीर्य आणून व स्थिर अंत:करणाने ही कथा श्रवण करणाराच या ज्ञानदेवीचा खरा रसिक होय. असे जे अर्जुनासारखे संत सज्जन आहेत, त्यांनी हे गीतामृत अवधानपूर्वक सेवावे."

नि:श्रेयसप्राप्ती::::

परमलाभ

ज्ञानेश्वरीच्या विशिष्ट ओव्यातून आतापावेतो अर्जुनाच्या श्रीकृष्णाला शरण जाण्याच्या मन:स्थितीचे वर्णन एवढ्या विस्ताराने सांगण्याचा, तसेच ज्ञानेश्वरी-गीतासेवनाची हातोटी कशी असावी हे दर्शवण्याचा मूळ हेतू हा की ज्ञानदेवीकडे पाहण्याची व संत श्रीज्ञानदेवांकडे कृपायाचना करतांनाची आपली भूमिका कशी असावी याचे अल्प दिग्दर्शन करून, साधकांना त्याचा जमेल तितका लाभ घेण्याची संधी मिळावी. या योगे होणाऱ्या लाभाचे वर्णन ***"यं लब्ध्वा ना परं लाभं"*** असेच करतात. हा लाभ कसा आहे याचे मनोहर वर्णन नारदभक्तिसूत्रात पुढीलप्रमाणे सापडते:

यल्लब्ध्वा पुमान सिद्धो भवति,
अमृतो भवति, तृप्तो भवति।।४।।
यत्प्राप्य न किञ्चिद्वाञ्छति, न शोचति,
न द्वेष्टि, न रमते, नोत्साही भवति।।५।।
यज्ज्ञात्वा मत्तो भवति, स्तब्धो भवति,
आत्मारामो भवति।।६।।ना. भ. सू.।।

"भगवंताच्या परमप्रेमरूप व अमृतरूप भक्तीचा हा असा लाभ होतो. त्याने मनुष्य सिद्ध होतो; अमर होतो; तृप्त होतो; कोणत्याही वस्तूची इच्छा करीत नाही; कसलाही शोक करीत नाही; कोणाचा किंवा कसलाही द्वेष करीत नाही; कोणत्याही वस्तूत आसक्त होत नाही. त्याला विषयभोगांच्या प्राप्तीकरता उत्साह वाटत नाही. तो आनंदाने मत्त होतो; प्रशांत होतो; आत्माराम होतो."

श्रीमद्भागवतात तर स्वत: भगवंतांनीच म्हटले आहे की:

न पारमेष्ठ्यं न महेंद्रधिष्ण्यं
न सार्वभौमं न रसाधिपत्यं।
न योगसिद्धीरपुनर्भवं वा
मय्यार्पितात्मेच्छति मद्विनान्यत्।।
।।११-१४-१४।।श्री. म. भा.।।

"मला अनन्य भावाने स्वत:स अर्पण करणारा माझा भक्त मजवाचून अन्य कशाचीही - परमश्रेष्ठ पदाची, महेंद्रपदाची, सार्वभौमत्वाची,रसाधिपतीची, योगसिद्धीची, संसारसुखाची वा इतर कसलीही इच्छा ठेवत नाही."

ही जी सर्वोत्तम निःश्रेयसप्राप्ती आहे; हा जो अद्वितीय लाभ आहे; ज्ञानदेवांच्या व ज्ञानेश्वरीच्या, गीतेच्या व भगवंतांच्या अन संतमंडळींच्या कृपेने हा जो पूर्णतेस नेणारा निधानतुल्य ठेवा प्राप्त होतो; त्याबाबत श्रुतीत पुष्कळच स्तुती आढळते. श्रीगीतेत भगवंतांनी त्याचे अनेकानेक श्लोकातून वर्णन केले आहे. साधकांनी आपणास जो पथ क्रमावयाचा आहे, त्याच्या अंतिम गंतव्याची माहिती करून घेण्यासाठी ते श्लोक नजरेखालून घालणे उचितच होईल.

मुक्तावस्था

भगवंत म्हणतातः

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः।
निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति।।२-७१।।
वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः।।४-१०।।
यं लब्ध्वा चा परं लाभं मन्यते नाधिकं ततः।
यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।।६-२२।।

"सर्वश्रेष्ठ लाभ पावलेला मनुष्य अमृतत्व म्हणजे भगवंताची प्राप्ती करून घेतो. त्याच्या मार्गात येणाऱ्या अडचणींचा निरास स्वतः परमात्मा करतो. तो पुरुष सर्व कामनारहित, ममता व अहंकाररहित, तसेच स्पृहाशून्य होऊन शांती पावतो."

"प्रीती, भय व क्रोधविवर्जित असा हा पुरुष अनन्य भावाने भगवंतात स्थिर होतो. भगवंताला शरण जाऊन ज्ञानरूप तपाने पवित्र झालेला तो श्रीहरीच्या दिव्य परमस्वरूपाला जाऊन मिळतो. त्याला हा जो परमेश्वरप्राप्तीरूपी लाभ होतो, त्यापेक्षा दुसरा श्रेष्ठ लाभ कोणता! त्या पुरुषास अति दारुण दुःखही आपल्या अवस्थेपासून विचलित करू शकत नाही."

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते।।६-२८।।
सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।६-२९।।
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति।।६-३०।।
सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते।।६-३१।।

"तो निष्पाप झालेला पुरुष योगी असतो. नेहमी तो आत्म्याला परमात्म्याशी युक्त करून सहजच आनंदात रममाण होतो. त्याचा आत्मा सर्वव्यापी अनंत चैतन्यात ऐक्य पावून त्यायोगे समदृष्टी होतो. त्याला सर्वभूतैकमात्रांत एकाच परमात्मतत्त्वाची अनुभूती येते. आणि सर्व भूते ही परमात्म्याचीच रूपे आहेत हे पण जाणवते."

"परमात्म्याठायी ऐक्यभावाने स्थित झाल्यामुळे त्याला भूतमात्रांना व्यापून असलेला वासुदेवच सतत दृग्गोचर होतो व वासुदेवाला पण त्याचीच सतत आवड वाटते. सर्वत्र परमात्म्याचे दर्शन घेणाऱ्या त्याला सदासर्वकाळ भगवंताच्याच स्वरूपात मिसळून राहता येते."

पुढे भगवान म्हणतातः

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः।।७-३।।
बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।।७-१९।।
अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।८-१४।।
अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।

"परंतु अशा प्रकारे भगवंताला पूर्णतया जाणणारा भक्त विरळाच! हजारो मनुष्यांपैकी कोणी एखादाच भगवत्प्राप्तीसाठी प्रयत्न करतो आणि त्यांच्यातूनही खरी प्राप्ती होणारा पुरुष क्वचितच सापडतो. पुष्कळ जन्मांतरी त्या दुर्लभ पुरुषाला खऱ्या तत्त्वज्ञानाची प्राप्ती होते व त्याला सर्वच काही वासुदेव आहे असे प्रतीत होते."

"भगवंतामध्ये अनन्यचित्ताने स्थित झालेल्या त्या महात्म्याला सतत भगवंताचे स्मरण होत असते व त्याला त्याच्याप्रत पावणे अति सुलभ होते. वासुदेवाचे अहर्निश चिंतन करणाऱ्या त्या निष्काम भक्तांचा योगक्षेम स्वतः भगवंतच चालवितात; त्यांनी भगवत्प्राप्तीसाठी चालवलेल्या साधनाचे रक्षणही ते स्वतःच करतात व त्यांना भगवत्स्वरूपाची प्राप्ती पण ते स्वतःच करून देतात."

भगवंताचे रूप निर्गुण निराकार आहे, तसेच ते सगुण साकारही आहे असे या वचनांवरून जाणवते. **म्हणूनच गीतेचा प्रतिपाद्य विषय *त्या सगुण साकार रूपाला भजत निर्गुण निराकारास आपले कसे करावे* हा योग असल्यास नवल नाही.**

भगवंत पुढे महत्त्वाचा संदेश देतात, तो असाः

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।

पं.जयदयालजी गोयन्दका यांच्या वाणीतून या श्लोकाचा भावार्थ पाहण्याजोगा आहे. ते या श्लोकावर उत्तम रूप करीत सांगतातः

"केवळ सच्चिदानंद वासुदेव परमात्म्याच्या ठिकाणीच अनन्यप्रेमाने नित्य, निरंतर, अचल मन ठेवणारा होऊन; फक्त त्या विभु परमेश्वरालाच श्रद्धायुक्त प्रेमासह निष्काम भावाने त्याच्या नाम, गुण व अतुल प्रभावांचे श्रवण, कीर्तन व मनन, त्यालाच वन्दन, त्याचेच पादसेवन, त्याचीच अर्चना, त्याच्याप्रतीच दास्यत्व वा सख्यत्वभाव ठेवणारा व केवळ त्यालाच आत्मनिवेदन करणारा होऊन; या व अशाच प्रकाराने केवळ भगवंताप्रीत्यर्थच सर्व कर्मे करणारा तो पुरुष त्याचा भक्त होऊन राहतो."

"शङ्ख, चक्र, गदा, पद्म आणि किरीट कुंडले इ.आभूषणांनी युक्त असून पीतांबर, वनमाला, कौस्तुभमणी, वैजयंतीमाला हे धारण

करणाऱ्या परमप्रिय श्रीविष्णुभगवंताचे निरंतर मन, वाणी व शरीराद्वारे सर्वस्वाने आणि निरतिशय श्रद्धा, भक्ती व प्रेम यांनी परमविह्वल होऊन तो भक्त सदासर्वदा भजन करतो."

"सर्वशक्तिमान, विभूति, बल, ऐश्वर्य, माधुर्य, गंभीरता, उदारता, वात्सल्य आणि सुहृदता इत्यादी अनंत गुणांनी परिपूर्ण असलेल्या व सर्व भूतांचा जो एकमेव आश्रय आहे अशा त्या वासुदेवास अत्यंत विनीत भावाने भक्तिपूर्वक तो भक्त सर्वत्र वन्दन व नमस्कार करतो."

"याप्रमाणे सर्वत्र व सर्व भूतांमध्ये सम भरून असलेल्या त्या वासुदेवास नित्य पाहणारा, त्याचे निरंतर भजन करणारा, त्याच्याशिवाय अन्य आश्रय नसणारा, त्याला सर्वभावे शरण गेलेला,आत्मतत्त्वात निरंतर वास्तव्य करणारा, भगवंतातच सर्वकाळ योगबुद्धीचा आश्रय घेऊन राहणारा तो भक्तोत्तम त्यालाच जाऊन मिळतो."

जिवाशिवाचे मिलन होते. पदपिण्डाचे सामरस्य होते. प्रकृति-पुरुष एक होतात. भक्त-भगवंत एकरूप होतात. योगाचे जे गूढ रहस्य म्हणून ओळखले जाते, ते हेच! याच योगमार्गाचे साङ्ग दर्शन गीता व ज्ञानेश्वरी आपणांस घडवितात, ते कसे ते सावकाश योग्य वेळी पाहू. पुढे अजून भगवद्वचने उद्धृत केलेली आहेत. त्यांच्याद्वारे त्या महान लाभ झालेल्या भक्तोत्तमाचे – त्या ज्ञानी पुरुषाचे यथार्थ दर्शन आपणास होईल.

ज्ञानी पुरुष - भक्त

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते।।१०-१०।।
तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।१०-११।।
तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून्भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्।।११-३३।।
मया प्रसन्नेन तवार्जुनेदं-
रूपं परं दर्शितमात्मयोगात्।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं-
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम्।।११-४७।।
भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप।।११-५४।।
मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।

"निरंतर भगवंताच्या ध्यानात रमलेल्या त्या प्रभुप्रेमी भक्तांना तत्त्वज्ञानरूपी योग देऊन व त्यांच्या अंतःकरणातल्या अज्ञानजन्य अंधकाराचा प्रकाशमय तत्त्वज्ञानरूपी दीपकाने नाश करून प्रभू स्वतः त्यांच्यावर अनुग्रह करतात. अशा भक्ताच्या शत्रूंचा प्रभुसंकल्पाने अगोदरच नाश केलेला असतो. भक्तांना केवळ सुयश मिळावे, त्यांची कीर्ती व्हावी अशीच भगवंताची योजना असते."

"इतर कोणत्याही साधनाने कधीही पाहण्यास न मिळणारे असे भगवंताचे विराट रूप भगवत्कृपेने त्या भक्ताला सहज दाखविले जाते. आणि भगवंताचे सगुण, साकार, चतुर्भुज, माथी किरीट धारण केलेले आणि हातात गदा व चक्र धारण केलेले रूपदर्शन केवळ अनन्यभक्तीमुळेच त्या महात्म्यास होते. भगवंताला यथार्थ जाणून पाहणे व भगवत्तत्त्वात ***याचि देहीं याचि डोळां*** विलीन होणे केवळ अशा भक्तालाच साध्य आहे. असे भक्त भगवंताच्या प्राप्तिप्रीत्यर्थच केवळ कर्तव्यकर्म करत, आसक्तिरहित राहून, सर्व प्राणिमात्रांशी निर्वैरबुद्धीने वर्ततात व आपल्या अनन्य भक्तिद्वारे भगवंतास प्राप्त करून घेतात."

अशा भक्तांचे भगवान सर्व काही करतात आणि ते भगवंताला अतिप्रिय असतात, असे पुढील गीतावचने निर्देशितातः

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्।।१२-७।।
अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखक्षमी।।१२-१३।।
सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः।।१२-१४।।
यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः।।१२-१५।।
अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतव्यथः।
सर्वारम्भ परित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः।।१२-१६।।

"भगवंताठायी अनन्यचित्त असणाऱ्या त्या भक्तांचा भगवान त्वरित मृत्युरूप संसारसागरांतून उद्धार करतात. भगवंताप्रमाणेच ते भक्त सर्व भूतांशी द्वेषरहित, स्वार्थरहित,सर्वांवर प्रेम करणारे, अहैतुक दयाळू, ममत्वरहित, अहंकाररहित, सुखदुःख समान मानणारे व क्षमाशील असतात. सर्वदा संतुष्ट राहणारा, मन व इंद्रियांना वश केलेला तो ध्यानयोगपरायण, दृढनिश्चयपूर्वक भगवंताला मन व बुद्धी अर्पिणारा असा भक्त भगवंताला फार प्रिय असतो. सर्व भूतमात्रांवर प्रेम करणारा व सर्व जीवांना प्रिय असलेला असा भक्त भगवंताचे प्रियनिधानच असतो. भगवत्प्राप्तीसाठी दक्ष असा तो भक्त भगवंतापायी सर्व कर्मांचा न्यास करणारा असतो. त्यामुळे दुःखमुक्त होऊन प्रकृतिधर्माबाबत उदासीन व भगवंताला अति प्रिय असाच होतो."

आंतरबाह्य शुद्ध अशा त्या प्रिय भक्ताबद्दल प्रभूची अजून काही वचने पहाः

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः।।१२-१७।।
समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः।।१२-१८।।
तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः।।१२-१९।।

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्तांस्तेऽतीव मे प्रियः।।१२-२०।।

"शुभ व अशुभ कर्मांच्या फलांचा त्याग केल्यामुळे हर्ष, द्वेष व शोकापासून मुक्त झालेला तो भक्त भगवंताला प्रेमाने आपला करतो. शत्रू व मित्र समान मानणारा, मान व अपमान यांबद्दल उदास असणारा, शीत व उष्ण द्वंद्वे समान समजणारा, आसक्तिरहित, निंदा व स्तुतीने मनाचा तोल ढळू न देणारा, शरीर दैवाधीन समजून मिळेल त्याच्यात निर्वाह करणारा, सतत संतुष्ट वृत्ती धारण केलेला, स्थिरबुद्धीचा अशा तो भक्त संसारात ममता न ठेवता केवळ भगवंताचा ध्यास घेऊन त्याचे प्रेमपात्र होतो. भगवंतांच्या वचनामृतावर धर्मश्रद्धा ठेवून सतत भगवत्परायण असणारा तो भक्त श्रीहरीचा अंतरंगसखा होतो."

त्या पुरुषास ***क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान व ज्ञेय*** यांची अनुभूतिजन्य ओळख असते. त्याविषयी पहाः

ज्ञान

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते।।१३-१८।।

शरीररूपी क्षेत्रात कर्मसंसाररूपी बीजांचे फल यथाकाल प्राप्त होते असे जाणणारा क्षेत्रस्थ, विद्यमान आणि जीवात्मारूपी असा जो ***सनातन अंश*** तो ***क्षेत्रज्ञ*** म्हणून प्रसिद्ध आहे. त्या ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** म्हणजे ***प्रकृति-पुरुष***, या स्पंदित युग्माला तत्त्वतः जाणणे म्हणजे ***ज्ञान.*** या क्षेत्राचे संघटक म्हणजे ***पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, त्रिगुणात्मक अव्यक्त मूळ प्रकृति अशी माया, पांच ज्ञानेंद्रिये, पांच कर्मेंद्रिये, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, स्थूल देहाचा पिंड व या सर्वांना धारण करणारी चिदाभास अशी धारणाशक्ती*** हे सर्व क्षेत्राचे विकार म्हणून प्रसिद्ध आहेत.

या क्षेत्र - क्षेत्रज्ञ संयोगामुळे उद्भवणाऱ्या अभिमान, दंभ, हिंसावृत्ती, इहपारलौकिक भोगासक्ती, अहंकार, पुत्र-स्त्री-धनादिकांची आसक्ती, ममत्वबुद्धी व विषयासक्त जनांच्या सहवासाची ओढ या सर्वांचा अभाव असणे; क्षमावृत्ती, मनाची व वाणीची सरलता, श्रद्धाभक्तीसह गुरूची सेवा, आंतरबाह्य शुद्धी, अंतःकरणाची स्थिरता, जन्म-मृत्यु-जरा व व्याधी इ. दुःखदोषांबद्दल जागरुकता, इष्ट - अनिष्ट यांच्या प्राप्तीत चित्ताची समता :या सर्वांचा परिपोष असणे; तसेच प्राप्त झालेल्या या जन्मात एकान्त व शुद्ध देशी राहून नित्य आत्मानात्मविवेक करून परमेश्वरावर अनन्य श्रद्धा ठेवून त्याचे सतत ध्यान करणे व परमतत्त्व जो कृपाळू भगवंत त्याला सर्वत्र पाहणे; याला ज्ञान म्हणतात. ज्ञानाच्या विपरीत जे त्याला ***अज्ञान*** अशी संज्ञा आहे.

"जे जाणण्यायोग्य आहे व जे जाणून जीवात्म्यास परमानंद प्राप्त होतोः जे आदिरहित परब्रह्म सत् किंवा असत् म्हणून वर्णिता येत नाही; जे सर्वत्र हात, पाय, डोळे, डोकी, तोंडे व कान असलेले आहे; जे विश्वाला व्यापून आहे; जे सर्व इंद्रियांच्या विषयांना जाणणारे आहे, परंतु आसक्तिरहित व सर्व इंद्रियरहित आहे; जे गुणातीत असूनही आपल्या योगमायेने सर्वांचे धारण व पोषण करते व गुणांचा उपभोगही घेते; जे सर्व चराचर भूतांच्या आंतबाहेर परिपूर्ण भरलेले आहे व चर तसेच अचरही आहे; जे श्रद्धावान पुरुषाच्या अतिनिकट तर अश्रद्ध अज्ञानी पुरुषास अति दूर आहे; जे विष्णुरूपाने भूतांचे धारण व पोषण करते आणि रुद्ररूपाने सर्वांचा संहार करते, तसेच ब्रह्म्याच्या रूपाने सर्वांस उत्पन्न करते; जे महाकाशासारखे विभागरहित एकरूप असे असूनही जसे घटाघटात आकाश पृथकपृथक वाटते, तसे चराचर भूतात वेगवेगळे आहे असे भासते; जे आकाशापेक्षाही सूक्ष्मतत्त्व आहे; जे चंद्र,सूर्य व अग्नी या तेजरूप ज्योतींचीही निजज्योती आहे व मायेच्या पलीकडील असे म्हटले जाते; अशा त्या ब्रह्माला——

ज्ञानम् —— म्हणजे बोधस्वरूप आणि
ज्ञेयम् ——— म्हणजे जाणण्यायोग्य, तसेच
ज्ञानगम्यम् ——म्हणजे तत्त्वज्ञानाने प्राप्त होणारा असा सर्वांच्या हृदयांत स्थित असलेला परमात्मा म्हणून जाणले जाते. अशा या ***क्षेत्र, ज्ञान व ज्ञेय*** यांना तत्त्वतः जाणणारा भगवंताचा भक्त असतो व तो भगवत्स्वरूपच होतो.

त्याचप्रमाणेः

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते।।१३-२३।।
यदाभूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति।
तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा।।१३-३०।।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम्।।१३-३४।।

"***प्रकृतीला गुणांसहित व पुरुषाला तत्त्वतः जाणणारा*** तो भाग्यवान सर्व प्रकारे संसारात वर्तत असूनही पुनर्जन्माच्या चक्रात अडकत नाही. परमेश्वराच्या संकल्पाने विस्तार पावलेल्या भूतांच्या भिन्नभिन्न भावाचे अधिष्ठान परमात्म्यास आहे हे जाणणारा तो श्रीमान सच्चिदानन्दघन ब्रह्माशी एकरूप होतो. ***क्षेत्र जड, विकारी, क्षणिक आणि नाशवान आहे; तसेच क्षेत्रज्ञ चेतन, अविकारी व अविनाशी आहे;*** हे जाणून प्रकृति व तिचे विकार यांपासून सुटण्याचा उपाय ज्ञानचक्षूंनी ओळखणारा तो महात्मा अत्यंत भाग्यवान असून ईश्वरीकृपाबलाने परब्रह्म परमात्म्याच्या परमधामाप्रति जाऊन त्याच्याशी एक होऊन राहतो. गुणांचे स्वरूप जाणून गुणातीत असा तो होतो."

त्याबाबत गीता म्हणतेः

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति।।१४-१९।।
गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान्।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते।।१४-२०।।

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते।
गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते।।१४-२३।।
समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः।।१४-२४।।
मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः।
सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते।।१४-२५।।

"तो भगवद्भक्त स्थूल शरीराच्या ***उत्पत्ति-स्थिति-नाशरूप*** तिन्ही गुणांना कर्ता म्हणून जाणतो; गुणच गुणात वर्तून जगदाभास निर्माण करत आहेत व सच्चिदानन्दघन परमात्मा या सर्वांपलीकडील आहे या नित्य श्रद्धेने राहून देहाच्या जन्म-मृत्यु-जरा-दुःख या दोषांना उल्लंघून त्रिगुणातीत अवस्थेत मुक्त परमानन्दाचा उपभोग घेत तो परमात्मस्वरूपाला प्राप्त होतो."

"तो सत्पुरुष गुणांचा गुणांशी व्यापार चालू आहे असे जाणून गुणांनी विचलित न होता, मान-अपमान, निन्दा-स्तुती, प्रिय-अप्रिय, माती-दगड व सोने यांच्याबाबत सम राहून सर्व कार्यारंभाबाबत कर्तेपणाचा अभिमान न ठेवता, तिन्ही गुणरूपी प्रकृतीला उल्लंघून केवळ साक्षिरूप राहून सच्चिदानन्दघन परमात्म्याच्या ठिकाणी ऐक्य भावनेने धैर्यपूर्वक स्थित राहून त्या भावातून कधीही चळत नाही. केवळ त्या एका सर्वशक्तिमान परमेश्वर वासुदेव भगवंतालाच आपला स्वामी मानून, स्वार्थाचा व अभिमानाचा त्याग करून, श्रद्धा व भक्तियुक्त परम प्रेमाने भगवंताचे निरंतर चिन्तन करीत, अव्यभिचारी भक्तीच्याद्वारे तो महात्मा सच्चिदानन्दाशी एकरूप होतो."

पुढे त्या परमोच्च लाभ पावलेल्या भक्तवर्याविषयी गीता म्हणते:

निर्मानमोहा जितसङ्गदोषा-
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञै-
र्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत्।।१५-५।।
न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।१५-६।।
यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।
एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः।
आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम्।।१६-२२।।

"मान व मोह यांच्यातून सुटून आसक्तिदोषाला जिंकून कामना समूळ नष्ट झालेला व सुखदुःखरूप द्वन्द्वापासून विमुक्त झालेला तो ज्ञानी सतत परमात्म्याच्या स्वरूपात दृढ स्थित होतो. परमेश्वराचे सर्वज्ञान प्राप्त झालेला तो पुरुष, भगवंत हाच पुरुषोत्तम आहे असे जाणून त्याचे सर्व भावांनी नित्य भजन करतो. ज्या स्वयंप्रकाशमय परमपदाला सूर्य, चंद्रमा वा अग्नी प्रकाशित करू शकत नाहीत व ज्या ठिकाणी जाऊन पोहोचल्यावर जन्ममरणरूपी पुनरावृत्तीच्या संसारात परत यावे लागत नाही अशा त्या भगवंताच्या नित्य व अविनाशी परमपदाला - त्या परमधामाला तो महात्मा पावतो. काम, क्रोध व लोभ या नरकाच्या त्रिविध द्वारांपासून तो मुक्ती पावून कल्याणाचे आचरण करत परमगती मिळवितो."

गीतेच्या अठराव्या अध्यायी याबाबत अजूनही महत्त्वाचे आख्यान मिळते. ते असे:

(सुखं.........त्रिविधं...........भरतर्षभ।)
अभ्यासद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति।।१८-३६।।
यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्।।१८-३७।।
असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति।।१८-४९।।

"भगवंताच्या भजन, ध्यान व सेवा इ.च्या अभ्यासाने दुःखापासून मुक्ती मिळवून देणारे सुख, जे परिणामी अमृततुल्य पण साधनारंभी विषासारखे भासते; अभ्यासाने प्राप्त झालेल्या भगवद्विषयक बुद्धीच्या प्रसादाने उत्पन्न झालेल्या त्या सात्त्विक अशा सुखात तो योगी सतत रममाण होतो. त्या महात्म्याला अत्यंत दुर्लभ अशी आसक्तिरहित बुद्धी, निःस्पृहत्व व स्ववश अंतःकरण ही सर्व सहजच प्राप्त होतात. त्यायोगे ज्ञानपूर्वक सर्वकर्मसंन्यास लाभून त्यास सर्वोत्कृष्ट अशी आत्मस्वरूपावस्थानरूपी नैष्कर्म्यसिद्धी मिळते."

त्या सिद्धाचे अजून विस्तृत असे वर्णन पहा:

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा।।१८-५०।।
बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च।।१८-५१।।
विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः।।१८-५२।।
अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते।।१८-५३।।
ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्।।१८-५४।।
भक्त्यामामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्।।१८-५५।।
सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्।।१८-५६।।
चेतसा सर्व कर्माणि मयि सन्न्यस्य मत्परः।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव।।१८-५७।।
मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि।
(अथ .... श्रोष्यसि.....विनङ्क्ष्यसि) ।।१८-५८।।
(ईश्वरः ....हृद्देशेऽर्जुन............तिष्ठति।)
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।१८-६१।।

(तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत)
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।१८-६२।।
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे।।१८-६५।।
सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच।।१८-६६।।

"शरीररूपी यंत्रावर आरूढ झालेल्या सर्व प्राण्यांना आपल्या मायेने तो अंतर्यामी ईश्वर त्यांच्या कर्मानुसार भ्रमण करवत त्यांच्या हृदयात स्थित आहे. त्या ईश्वराला अनन्यभावाने शरण गेलेल्या, तसेच ज्याचे मन भगवंतातच आहे; जो केवळ त्याचाच भक्त आहे; जो केवळ श्रीहरीचेच यजनपूजन करतो; जो गोपालकृष्णालाच एकमात्र समजून नमस्कार करतो; ज्याने सर्व धर्म व अधर्म यांचा परित्याग केलेला आहे व भगवंताचाच आश्रय घेतलेला आहे; त्यालाच भगवंताचा प्रसाद प्राप्त होतो. परिणामस्वरूप अत्यंत निष्कपट बुद्धीने युक्त होत्साता तो धैर्याने शरीरेंद्रियसंघाताचे नियमन करून शब्दस्पर्शादी विषयांचा व रागद्वेष यांचा पूर्णतया त्याग करून एकान्तसेवन करत, केवळ हितकर, परिमित व हलके असे पवित्र अन्नच भक्षण करीत वाक, शरीर व मन यांचे नियंत्रण करतो."

"ऐहिक व पारलौकिक विषयांबाबत विरक्त होऊन देहादिकांच्या ठिकाणी अहंभाव, काम व राग यांच्या सामर्थ्याचा ज्याच्यावर प्रभाव चालत नाही असा तो होतो. इच्छा, द्वेष, मद व शरीरधारणपरिग्रह टाकून ममत्वरहित होऊन अतिशय शांत झालेला तो पुरुष ज्ञाननिष्ठा प्राप्त करून परमशांतिरूप शुद्ध पापरहित अशा अंतःकरणाने युक्त होऊन भगवंताच्या शाश्वत ब्रह्मभावरूपी ज्ञानभक्तीचे अनमोल रत्न मिळवतो."

"आत्मानंदात सदैव विहरणारा तो भगवत्प्रेमी भक्त सच्चिदानन्दघन ब्रह्माशी एकरूप होतो व सर्व प्रकारचा शोक आणि आकांक्षारहित होतो. प्राणिमात्रांच्या ठिकाणी समभाव होऊन भगवंत जसे आहेत, जेवढे आहेत, त्यांना तसेच यथार्थपणे जाणून घेऊन तो त्यांच्याठायी प्रवेश करतो. सर्व कर्मे नेहमी करीत असतांनादेखील ज्याने आपली सर्व वृत्ती भगवच्चरणीच अर्पिलेली असते व ज्याने केवळ त्याच्याच आश्रयाने सर्व कर्मे भगवत्परायण होऊन विवेकबुद्धिपूर्वक त्यालाच अर्पण केली आहेत; ज्याचे चित्त सदैव भगवंताच्याचठायी जडलेले आहे; त्याला भगवत्प्रसाद होऊन बुद्धियोग प्राप्त होतो. त्याच्या कृपेमुळे परमार्थशील होऊन, संसाराला कारण होणाऱ्या अज्ञानादी सर्व निमित्तांना उल्लंघून त्या महान भक्ताला भगवंताच्या नित्य अशा अक्षय पदाची महत्प्राप्ती होते."

अद्वयभक्ती::::

भक्ताची सर्वश्रेष्ठ अवस्था

मोक्षप्राप्ती झालेला तो भक्त श्रीकृष्णाचा सखाच होतो. कसा तो पहाः

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।१८-७८।।

"अमृतत्त्व प्राप्त झालेला तो भक्त महापुरुषांच्या व श्रीगोपालकृष्णाच्या कृपेमुळे भगवंतांना अर्जुनाप्रमाणेच जीवश्चकंठश्च असा प्राणप्रिय होतो. अशा त्या महापुरुषानुगामी धन्य महात्म्याला निरंतर योगेश्वर श्रीकृष्णांचा सङ्ग असल्यामुळे ***"जिथे तो - तिथे तो"*** अशी परमोत्कृष्ट अवस्था प्राप्त होते. ***जीवु व शिवु*** एक होतात. त्याच्याविना भगवंताला व भगवंतावाचून त्याला निमिषमात्रसुद्धा करमत नाही. ***अर्जुन-श्रीकृष्णस्वरूप असा तो सर्वश्रेष्ठ भागवतोत्तम जिथे असेल तिथे श्री, विजय व ऐश्वर्य ही सर्व निश्चल - अढळ असणारच!!!"***

ही जी जिवाची सर्वश्रेष्ठ अवस्था आहे, ती त्याला श्रीहरी - सद्गुरूकृपेमुळे अनायासेच प्राप्त होते. श्रीमद्भगवद्गीतारूपी *श्रीकृष्णपरमात्मा* आणि त्याचा अनन्यभाव असे श्रीज्ञानदेवीरूपी *निवृत्ति - ज्ञानदेव - सोपान - मुक्ताई* हे संत ज्यांच्यावर आपल्या परमकृपेचा वरदहस्त ठेवतील, ते त्यांच्याशी अभिन्नच होऊन राहतील.

देव - भक्ताचे, जीवा -शिवाचे हे ऐक्य म्हणजे भक्तिरूपी मेरूचे अत्युच्च शिखरच! संपूर्ण गीता - ज्ञानेश्वरीचे गंतव्य ते हेच! हाच तो अत्युत्कृष्ट लाभ ज्याचे आपण आतापावेतो वर्णन पाहिले. हे निःश्रेयस - ही अद्वैतभक्ती - हा ठेवा अर्जुनास प्राप्त झाल्याचे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. व्यासशिष्य सञ्जयाच्या मुखातून त्यांनी ज्ञानेश्वरीत साकारविलेल्या शब्दातून याचे स्पष्ट चित्र त्यांनी रेखाटले आहे. श्रीकृष्णार्जुनऐक्य हे देव-भक्त ऐक्याचे प्रातिनिधिक स्वरूप आहे. या जिवाशिवाच्या एकरूपतेविषयी श्रीज्ञानदेवांनी ग्रथित केलेले खालील उद्गार कसे परिपूर्ण आहेत, पहाः

(जैं मज तुम्हांआड। होते भेदाचे कवाड।
तैं फेडूनि केलें गोड। सेवासुख।।१८-१५७४।।)
मग म्हणे पैं कुरुराजा।ऐसें भ्रातृपुत्र तो तूझा।
बोलिला तैं अधोक्षजा। गोड जालें।।१५८७।।

अर्जुन म्हणतो, "हे श्रीकृष्णा! तुझ्या व माझ्यामध्ये असणारे द्वैत ओलांडून आता हे अद्वयभक्तीचे गोड सेवासुख तू मला मिळवून दिलेस."

यावर सञ्जय धृतराष्ट्रास म्हणतो, "हे कुरूंच्या राजा! तुझ्या पुतण्याने अधोक्षजास - त्या श्रीहरीस असे सांगून त्या दोघांच्या एकरूपतेची स्वतःस अनुभूती मिळाल्याची जी ग्वाही दिली, ती ऐकून तो परमात्मा अत्यंत संतोषला."

अगा पूर्वापर सागर। इयां नांवाचा सिनार।
एर आघवेंचि नीर। एक जैसें।।१८-१५८८।।
तैसा श्रीकृष्णु पार्थु ऐसें। हें आंगचि पासीं दिसें।
मग संवादीं जी नसे। काहींचि भेदु।।१५८९।।

"पूर्वसमुद्र व पश्चिमसमुद्र हे नांवाने जरी वेगळे असले, तरी त्यांच्यात असणारे पाणी जसे एकाच प्रकारचे असते; ते जसे त्याच त्या पाण्याने भरलेले असतात आणि पाण्याव्यतिरिक्त त्या दोघांत इतर काहीही नसते; त्याप्रमाणे श्रीकृष्ण व पार्थ हे दोघे जरी शरीराने भिन्न दिसत असले, तरी एकमेकांच्या अंतरंगात झालेल्या त्यांच्या गूढ आत्मसंवादामुळे ते दोघे एकात्मच झाले होते."

दर्पणाहूनि चोखे।दोन्हीं होती सन्मुखें।
तेथ एरी एर देखें। आपणपें जैसें।।१८-१५९०।।
तैसा देवेंसि पाण्डुसुतु। आपणपें देवीं देखतु।
पाण्डवेंसीं देखें श्रीअनन्तु। आपणपें पार्थीं।।१५९१।।
देवो देव-भक्तालागीं। जियें विवरूं न देखें आंगीं।
एरुही तियेचि भागीं। दोनीं देखें।।१५९२।।
आणिक कांहींचि नाहीं। म्हणौनि करिती काई।
दोघें येकपणें पाहीं। नांदत आहाति।।१५९३।।

"एकासमोर एक अशा ठेवलेल्या आरशात जशी दोन्ही आरशांची प्रतिबिंबे स्पष्टपणे उमटतात, त्याप्रमाणे अर्जुनास श्रीकृष्णाकडे पाहतांना तेथे ***श्रीकृष्णार्जुन*** दोघेही दिसत होते व श्रीकृष्णांनाही अर्जुनाकडे पाहतांना तेथे ***श्रीकृष्णार्जुनद्वयी*** दिसत होती. म्हणून त्या दोघांनी स्वत:कडे पाहिले तो तेथेही त्यांना आपापल्या जागी श्रीकृष्ण व अर्जुन असे दोघेही दिसू लागले."

सामरस्य

सामरस्याच्या त्या अद्भुत अवस्थेचे वर्णन करत ज्ञानदेव पुढे म्हणतात:

आता भेदु जऱ्ही मोडे। तऱ्ही प्रश्नोत्तर का घडे।
ना भेदुचि तऱ्ही जोडे। संवादसुख कीं।।१८-१५९४।।
ऐसें बोलतां दुजेपणें।संवादें द्वैत जैं गिळणें।
तैं आइकिलें बोलणें। दोघांचे मियां।।१५९५।।
उटूनि दोनी आरिसे। वोडविलेयां सरिसे।
कोण कोण्हां पाहांतसे। जाणवे ना।।१५९६।।
कां दीपा सन्मुखु। ठेविलियां दीपकु।
कोण कोण्हां अर्थिकु। कोणु जाणे।।१५९७ ।।
हें निर्धारूं जातां फुडें। निर्धारासीं टक पडे।
तैं दोघैं जालें एवढें। संवादें सरिसे।।१५९९।।

"देव भक्तीने भुलले व भक्त देवाला भुलून दोघे एकरूपच झाले. त्याना आता प्रश्नोत्तररूपी संवाद करण्याची काहीच गरज उरली नाही. कारण देव भक्तरूप झाला तर भक्त देवरूप झाला. त्यामुळे ***"इयें हृदयींचे तियें हृदयीं घातलें"*** ही जी अवस्था त्यांना प्राप्त झाली, त्यात संवादाची काय मातब्बरी! तरीही त्या अवस्थेतील त्यांचा द्वैतातीत संवाद मी ऐकला व धन्य झालो."

सञ्जय पुढे सांगतो:

"एकमेकांसमोर ठेवलेल्या आरशात कोण कोणास पहात आहे, ते कळत नाही; किंवा दिव्यासमोर दुसरा दिवा ठेवला, तर कोण कोणावर प्रकाश पाडत आहे, हे समजू शकत नाही. त्याचप्रमाणे श्रीकृष्ण व अर्जुन एकमेकांजवळ होते. पण ते इतके काही एकरूप झाले होते की त्यांच्यातला श्रीकृष्ण कोण व अर्जुन कोण, हे मला ओळखता येईना!"

अद्वयभक्ती

सञ्जयाने हे असे त्या एकमेवाद्वितीय ***अद्वैतभक्ती***प्रसंगाचे जे वर्णन केले आहे, ते त्यास व्यासकृपेने जी दिव्यदृष्टी मिळाली होती तिच्यामुळे! व्यासप्रसादामुळे त्याला हे असे युगायुगांमध्ये क्वचितच प्रकटणारे श्रीकृष्णार्जुनाद्वयदृश्य पाहण्याचे भाग्य लाभले. श्रीव्यासप्रसादाने श्रीकृष्णार्जुनांचा असा हा रोमहर्षक आत्मसंवाद श्रवण केल्याने सञ्जयाची स्थिती अतिशय बहारीची झाली. त्याचे ज्ञानदेवकृत वर्णन ऐका. म्हणजे संतसंगतीने - श्रीकृष्णार्जुन या नरनारायणऋषींच्या सतत ऐकू येणाऱ्या संवादाने व त्यांच्या प्राप्त झालेल्या अशा सहवासाने सञ्जयास कसे अद्वैतसुख मिळाले ते आकळून येईल:

जीं मिलतां दोनीं उदकें। माजीं लवण वारूं ठाकें।
कीं तेयांही निमिखें। तैंचि होये।।१८-१६००।।
तैसें श्रीकृष्ण पार्थू दोनीं। संवादिलें तैं मनीं।
धरितां मज ही वानी। तैंचि हो पांतसे।।१६०१।।

"दोन जलाशय एकमेकांत जेव्हा मिळतात, तेव्हा त्यांना मिठाचा बांध अडवू शकतो काय! उलट तो बांधसुद्धा विरघळून जाऊन त्यांच्या जळाशी जसा एकरूप होऊन जातो, त्याचप्रमाणे श्रीकृष्णार्जुनांचा संवाद ज्या सञ्जयाने ऐकला त्याचे पण झाले. त्यांचा तो संवाद मनात उमटताच त्यालासुद्धा तो श्रवण करता करताच श्रीकृष्णार्जुनत्व प्राप्त झाले. तोही त्यांच्याशी एकरूप होऊन गेला."

अवधान दीजे::::

गीता - ज्ञानेश्वरीचा भाव

ज्ञानेश्वरीच्या मंगलाचरणाच्या प्रथम ओवीच्या अवलोकनापासून आपण सुरुवात केली आणि त्या ओवीच्या अनुषंगाने येणाऱ्या विषयांचा मागोवा घेत गेत आपण अवचितच असे श्रीगीता-ज्ञानेश्वरी मिषाने स्वयं साक्षात श्रीकृष्णभगवंत व ज्ञानेश्वरांनी उघडून दिलेल्या त्यांच्या कृपारूपी अशा या प्रत्यक्ष मोक्षस्वर्गाच्या अद्वयभक्तीद्वारी आलो आहोत.

या मोक्षस्वर्गात प्रवेश करण्यासाठी आपणास श्रीगीता-ज्ञानेश्वरीतील भाव अंत:करणात जागवून ठसवून घ्यावा लागेल. तो भाव या दिव्य ग्रंथांचे अनुशीलन करतांना आपणास कसा भावेल, याची गुरुकिल्ली श्रीज्ञानदेवच आपल्या हाती देत आहेत. हा भाव आपणास सुगम व्हावा, तर आपणास कोणती भूमिका स्वीकारावी

लागेल, त्याचे हृदयंगम चित्र माउली श्रीज्ञानेश कसे रेखाटतात, ते अनुभवण्यासाठी त्यांच्या पुढील ओव्या कशा लक्षणीय आहेत, ते पहाः

अहो अर्जुनाचिये पांतीं। परिसणया योग्य होती।
तिहीं कृपा करूनि संतीं। अवधान देयावें।।१-६२।।
हें सलगी म्यां म्हणितलें। चरणां लागौनि विनविलें।
प्रभु सखोल हृदय आपुलें। म्हणौनियां।।६३।।
जैसा स्वभावो मायबापांचा। अपत्य बोले जऱ्हीं बोबडी वाचा।
तऱ्हीं अधिकुचि तेयाचा। संतोषु आथी।।६४।।
तैसा तुम्हीं मी अंगिकारिला। सज्जनी आपुला म्हणितला।
तऱ्हीं उणें साहाजु उपसाहला। प्रार्थूं काईं।।६५।।

"**ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मुळात अर्जुनाच्या योग्यतेचे जे असतील, त्यांच्याकरता - *अंतरंग अधिकारी* जनांसाठी आहे.** परंतु याची गोडी काही औरच आहे की ज्यातील वाक्चातुर्यामुळे सामान्यांसही आनंद मिळेल."

मुळात श्रीगीतेच्या चिरंतन नित्यनाविन्याबद्दल श्रीज्ञानदेव म्हणतातः

या गीतार्थाची थोरी। स्वयें शंभु विवरी।
तेथ भवानी प्रश्नु करी। चमत्कारौनि।।१-७०।।
तेथ हरु म्हणे नेणिजे। देवी जैसें कां स्वरूप तुझें।
तैसें हें नित्यनूतन देखिजे। गीतातत्त्व।।७१।।

गीतार्थाला इतकी थोरवी का आहे असे भवानीने आश्चर्य व्यक्तवत विचारले. तेव्हा ते सांगत स्वतः श्रीशंभु महादेव म्हणतात की "हे देवी! तू साक्षात प्रकृतीच जसे नित्यनूतन रूप धारण करणारी आहेस, तसेच या गीतातत्त्वाचे पण स्वरूप आहे. दरएकवेळी तत्त्वचिंतकास त्याचे वेगवेगळे अनोखे पैलू दाखवून ते तुझ्यासारखेच मोहवून टाकते!"

सुकृपेचे वैभव::::

ज्ञानेश्वरीची प्रासादिकता

अशा या गीतार्थाला कवळण्याचे धाडस खुद्द श्रीज्ञानदेवही गुरुकृपाशीर्वादानेच करतात व वर त्यांचे श्रोत्यांना विनवणे आहे की, "प्रभू, मी तुमचा बालक! बोबडे बोल बोलतो. ते तुम्हां मायबापांना अधिकच आवडतील."

म्हणून आपण नम्र भूमिका स्वीकारून बालकासारख्या निर्मळ नर्म मनाने त्या विश्वेश्वराची आपल्यावर कृपा व्हावी म्हणून अंतःकरणापासून प्रार्थना करावी. म्हणजे त्या दयाघन भगवंताच्या प्रसादाने या ग्रंथाचा भाव आपल्याला कळू शकेल. ज्ञानेश्वरीचा भाव आपल्याला उत्तमरीत्या अवगत व्हावा असे वाटणाऱ्यांनी पुढील मतितार्थ जरूर लक्षात ठेवला पाहिजे. मुळात हा ग्रंथ कसा निर्माण झाला व त्यामागे ज्ञानेशांच्या गुरुपरंपरेचे किती ऋण आहे, याचा निर्देश करत त्यांनी काय म्हटले आहे, ते येथे ध्यानी घेणे आवश्यक आहे; ते असेः

ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें। गौरव असें जी साचें।
ग्रंथु नोहें सुकृपेचें। वैभव तियें।।१८-१७५०।।
क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीचां कर्णकुहरीं।
नेणों कैं श्रीत्रिपुरारी। सांघितलें जैं।।१७५१।।
तैं क्षीरकल्लोळाआंतु। मकरोदरीं गुप्तु।
होतां तेयाचां हातु। पैठें जालें।।१७५२।।
तो मत्स्यप्रसव श्रृंगीं। भग्नावयव चौरंगी।
भेटला तो सर्वांगीं। संपूर्ण जाला।।१७५३।।
मग समाधि अव्यया। भोगाचा वास न इयां।
तैं मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं।।१७५४।।
तेणें योगाब्जिनीसरोवरु। विषयविध्वंसैकवीरु।
तियें पदीं कां सर्वेश्वरु। अभिषेकिला।।१७५५।।

श्रीज्ञानेश्वर हे निवृत्तिनाथरूपी शङ्कराचे परमशिष्य होत. ***यांची सद्गुरुपरंपरा वरील ओव्यांत दिल्याप्रमाणे - आदिनाथ - (उमा) -मत्स्येंद्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ - निवृत्तिनाथ - ज्ञानदेव अशी आहे.*** नाथपंथीय म्हणून हे सर्व ओळखले जातात. नाथपंथाच्या श्रद्धेप्रमाणे श्रीमत्स्येंद्रनाथ, श्रीगोरक्षनाथ व श्रीगहिनीनाथ हे श्रीहरीच्या आज्ञेने जे नवनारायणांचे अवतार झाले, त्यांपैकी होत. कलियुगातील आर्त जीवांची सोडवणूक करण्यासाठी यांचे अवतार झाले.

मग तिहीं तैं शांभव। अद्वयानन्द वैभव।
संपादिलें सप्रभव। श्रीगयनीनाथीं।।१८-१७५६।।
तेणें कलीकलितभूतां। आला देखौनि निरुता।
आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा। दीधली ऐसीं।।१७५७।।
अनादिगुरु शंकरा। पासौनि शिष्यपरंपरा।
बोधाचा हा संवसारा। जाला आमुतें।।१७५८।।
तो हा घेऊनि आघवा। कली गिलेतयां जीवां।
सर्वप्रकारीं धांवा। करि पां वेगां।।१७५९।।
आथीं तो तंव कृपालु। वरि गुरुआज्ञेचा बोलु।
जाला जैसा वर्षाकालु। खवलणें मेघां।।१७६०।।
मग आर्ताचेनि वोरसे। गीतार्थग्रंथनमिषें।
वरिखला शांतरसें। तो हा ग्रंथु।।१७६१।।

श्रीगहिनीनाथांनी त्यांचे शिष्योत्तम श्रीनिवृत्तिनाथ यांना आदिगुरू श्रीशंकरापासून प्राप्त झालेला आत्मबोध - ते समाधिधन घेऊन त्वरित कलिग्रस्त जीवांना सोडविण्याची आज्ञा दिली.

त्या गुर्वाज्ञेनुसार आधीच कनवाळू असलेल्या श्रीनिवृत्तिनाथांनी त्यांच्या श्रीज्ञानदेव या परमशिष्याकडून गीतार्थ प्रकट करण्याच्या निमित्ताने ***श्रीज्ञानदेवी*** हा प्रासादिक ग्रंथ कलिग्रस्त जीवांचा उद्धार करविण्यासाठी प्रकट केला. श्रीज्ञानेश्वरी ही वस्तुतः श्रीनिवृत्तिनाथरूपी मेघाने आर्त जीवांवर केलेली अमृतवृष्टीच होय. म्हणून श्रीज्ञानदेवीचा भावार्थ उमगण्यासाठी मुळात आपण या संतांचे त्यांच्या कृपाळुपणासाठी, तसेच त्यांच्या दयार्द्र दृष्टिकोनासाठी सर्वभावाने ऋण मानले पाहिजे.

गीता व ज्ञानेश्वरीचे महिमान

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ श्रीगोपालकृष्णांच्या अंतरंगीचे बोल गीतेच्या माध्यमाद्वारे प्रकट करतो. खरे तर तत्त्वतः या ग्रंथात व गीतेत तसा कोणताच भेद नाही. म्हणून श्रीज्ञानेश सांगताहेत कीः

मूल ग्रंथीचियां संस्कृता-। सवें नीट पढतां।
अभिप्रायें मानलिया उचितां।
कवणीं भूमिका तैं नेणवें।।१०-४३।।
तैशीं देशी आणि संस्कृत वाणी।
एका भावार्थाचियां सुखासनीं।
शोभती तैं आयणीं। चोखटा आईकां।।४५।।
तीरें संस्कृताची गहनें। तोडौनि मऱ्हाटियां शब्दसोपानें।
रचिली धर्मनिधानें। निवृत्तिदेवें।।११-९।।
म्हणौनि भलतेणें एथ नाहावें। प्रयागमाधव विश्वरूप पाहावें।
येतुलेनि संसारा देयावें। तिलोदक।।१०।।

गीता व ज्ञानेश्वरी हे दोन्ही ग्रंथ म्हटले तर संपूर्ण स्वतंत्र व म्हटले तर एकमेकांना पूरक असे आहेत. श्रीज्ञानदेव मात्र असेही म्हणतात की ज्ञानेश्वरी हा गीतेवर केलेले देशीकार लेणे म्हणजे प्राकृत मराठी भाषेतील रचनारूपी अलंकार आहे. हा चढवल्याने गीतेचे मुळचे अतीव सौंदर्य अधिकच खुलून आले आहे. गीतार्थग्रंथनमिषे श्रीज्ञानदेवांकरवी श्रीनिवृत्तिनाथांनी कलिपीडित जीवांना धर्मनिधान - परमश्रेयस - प्राप्त व्हावे म्हणून रचलेला हा ज्ञानदेवीरूप सोपान आहे. तो जीवांस सहजच ***मुक्ताई***ची भेट घडवून देतो!

गीतेतील संस्कृत भाषेचे दुर्गम वाटणारे कडे तोडून श्रीनिवृत्तिदेवांनी सामान्य जीवांकरता ही ज्ञानदेवीची गङ्गा प्रकट केली आहे. वाटेल त्याने हिच्यात मनसोक्त डुंबावे, स्नान करावे, पवित्र व्हावे आणि प्रयाग-माधव-विश्वरूपाचे दर्शन घेऊन संसारास हिच्याच जळाने तिलोदक द्यावे अन मुक्त व्हावे असा हिचा महिमा आहे. आणि ज्ञानदेवांनीही ती अक्षरगङ्गा प्रकटवितांना केवढे शब्दलाघव वापरले आहे, ते पहा व नीट अवधान द्या!

माझा मराठाचि बोलु कवतिकें। परि अमृतातेंहीं पैजा जिंके।
ऐसीं अक्षरेंचि रसिकें। मेळविन।।६-१४।।
तऱ्हीं अवधान एकलें दीजे। मग सर्व सुखासी पात्र होईजे।
हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड आईका।।९-१।।
अहो अलुमालु अवधान देयावें।
इतुलेनि आनन्दरासीवेरी बैसावें।
बाप श्रवणेंद्रियां दैवें। घातली माल।।९-५३४।।

"मऱ्हाटी प्राकृत भाषेत ही ग्रंथरचना केली असली तरी तिचे शब्द अमृतालाही जिंकणारे आहेत. अनन्त शब्दब्रह्म व वेदान्ताचे जे साररूपी सव्वालक्ष श्लोकांचे महाभारत आहे, त्याच्यांतील सार अशी मोहमहिषाला मुक्ती देणारी सातशें श्लोकरूपी भगवतीच तशी ही सप्तशती श्रीगीता संस्कृतात आहे."

तिचा ग्रंथार्थ गुरुकृपेने श्रीज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथात प्राकृत मराठी भाषेत लोककल्याणार्थ प्रकटविला आहे. त्याकडे अवधान द्यावे व सर्वसुखाचा कुंभ प्राप्त करून घ्यावा अशी त्यांची उघडउघड प्रतिज्ञा आहे.

"साधे सोपे अवधान दिल्याने महासुखाच्या आनंदराशीवर लोळण्याचे सुदैव या ग्रंथश्रवणामुळे लाभते. याचे श्रवण करणे म्हणजे कर्णेंद्रियांना दैवयोगे हत्तिणीने माळ घालून राज्यपद अकस्मात मिळवून देण्यासारखेच आहे."

जिहीं आत्मबोधाचियां आवडी। केली स्वर्गसंसाराची कुर्वंडी।
तैंवाचूनि एथिंची गोडी। नेणती आणिक।।६-२८।।
जैसा वायसीं चंद्रु नोलखिजे। तैसा प्राकृतीं हा ग्रंथु नेणिजे।
आणि तो हिमांशु जेवीं खाजें। चकोराचें।।२९।।
तैसा सज्ञानासी तऱ्हीं हा ठाओ। आणि अज्ञानासीं आन गांवो।
म्हणौनि बोलावेयां पाहो। विशेख नाहीं।।३०।।

ज्ञानदेव असेही सांगण्यास विसरत नाहीत की ज्यांनी आत्मबोध व्हावा म्हणून स्वर्गसंसार ओंवाळून टाकले आहेत, त्यांनाच या ग्रंथाची खरी गोडी कळेल.

"हिमांशु जसा चकोरासाठीच खाऊं असतो, तसा हा ग्रंथ सुज्ञ जनांसाठीचा मेवा आहे. अज्ञ जनांना याची गोडी कळत नाही. चंद्र जसा नेत्ररोग्यास ओळखता येत नाही, त्याप्रमाणे संसारासक्त जनांस या ग्रंथाची खरी ओळख होणे मोठे अवघड आहे. याहून अधिक काय सांगावे! बुद्धीला कळण्यास कठीण असा हा विषय आहे."

पण निवृत्तिकृपेने ज्ञानदेव त्यात अवगाहन करूं शकले आहेत. म्हणून ते म्हणतात कीः

तैं बुद्धी कवलितां सांकडें। म्हणौनि बोलीं विपायें सांपडें।
परि निवृत्तिकृपाउजियेडें। देखैन मी।।६-३२।।
जैं दिठीही न पविजें। तैं दिठीवीण देखिजे।
जऱ्हीं अतिंद्रिय लाहिजे। ज्ञानबल।।३३।।
तैसीं सद्गुरुकृपा होये। तऱ्हीं करितां काय आपु नोहे।
म्हणौनि तैं अपार मातें आहे। ज्ञानदेओ म्हणे।।३५।।
तेणें कारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचे रूप दावीन।
अतींद्रिय परि भोगवीन। इंद्रियांकरवीं।।३६।।
ज्ञानदेओ म्हणे मी चाडें। सद्गुरूं केला कोडें।
माथां हात ठेविला तैं फुडें। बीजचि वाइलें।।४९२।।
म्हणौनि येणें मुखें जैं जैं निगे।
तैं संतांच्या हृदयीं लागे। ..।।४९३।।

मुळांत गीतार्थ साधारण बुध्दिगम्य विषय नाही. हा विषयच वाणी जेथे विराम पावते अशा त्या निःशब्द शारदेच्या प्रांतातला आहे. असे असले तरी श्रीनिवृत्तीनाथांचा कृपाहस्त मस्तकी असल्यामुळे ज्ञानदेवांच्या मुखांतून हे *मऱ्हाटी* शब्दांकित असे अमृतरसालाही लाजविणारे बोल बाहेर पडताहेत.

श्रोत्यांनी पूर्ण अवधानपूर्वक त्यांच्या बोलांत आपले चित्त गुंतविले तर त्यांनी दाखविलेले अरूपाचे रूप पहायला मिळेल. अतीन्द्रिय आनंद इंद्रियांनासुध्दां भोगायला मिळेल. तो आनंद उपभोगण्यासाठी इंद्रियांत आपापसांत अहमहमिका निर्माण होईल, जीवाला ते बोल आनंदराशी प्राप्त करुन देतील. संतांचे हृदय तर या बोलांनी अति प्रसन्न होईल असे श्रीज्ञानदेवांचे उघड प्रतिज्ञोत्तर आहे.

हे बोल, या स्वर्गीय स्वरधुनी ऐकण्याचा योग म्हणजे मोक्षरूपी हत्तिणीच्या सोंडेंतील ब्रह्मानंदरूपी माळच! श्रवणेंद्रियांचे भाग्य उघडले अन ही माळ अवधानाच्या मार्गाने आपल्या गळयांत पडली तर केवढे आपले भाग्य! ही माळ गळयांत पडतांच जीवाला स्वानंदसाम्राज्याच्या सुखसिंहासनावर अभिषेक होतो !!

श्रीगीतेची थोरवी::::

गीतामाहात्म्य

सर्व जीवांना साक्षात्कार व्हावा या उद्देशाने जी ज्ञानेश्वरीची रचना केली आहे; गीता जिचे मूळ आहे; तत्संबंधी ज्ञानेश असे म्हणतात की :

एवं जैं महाभारतीं। व्यासें अप्रांतमति।
भीष्मपर्वीं शांती। म्हणितली कथा।।१३-११५३।।
तो कृष्णार्जुनसंवादु। नागरीं बोलीं विशदु।
सांगो दाऊं बंधु। वोवियेचा।।११५४।।
खेचराचियाही मना। आणी सात्त्विकाचा पान्हा।
श्रवणासवें सुमना। समाधि जोडे।।११५८।
तैसा वाग्विलासु विस्तारूं। गीतार्थें विश्व भरूं।
आनंदाचे आवारूं। मांडूं जगां।।११५९।।
फिटो विवेकाची वाणी। हो काना मना जिणी।
देखो आवडे ते खाणी। ब्रह्मविद्येची।।११६०।।
दिसो परत्तत्त्व डोलां। पाहो सुखाचा सोहोला।
रिगो महाबोधसुकाला-। माजीं विश्व।।११६१।।
आणि ग्रंथोपजीविये। विशेषें लोकीं इये।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।।१८००।।

"या ज्ञानदेवीरूप वाग्विलासाने संपूर्ण विश्वात गीतार्थ भरो; ज्यांच्या बुद्धीचा ठांव लागत नाही अशा महामती व्यासांच्या वाणीतून महाभारताच्या भीष्मपर्वी श्रीकृष्णार्जुनांची जी गोठी झाली, ती नागर बोली, प्राकृत ओवीरूप प्रबंधातून समजून येऊन खलप्रवृत्तीच्या जीवांनाही सात्त्विकतेचा पान्हा फुटो; ही कथा ऐकताक्षणीच ***सु-मन, शुद्धमती, अनिंदक व अनन्यगती*** अशा श्रीहरिभक्तांना समाधि लाभो; सर्व विश्वात ब्रह्मानंदाची खाणच उघडो; परमतत्त्वाचा साक्षात्कार होऊन संपूर्ण विश्वच महाबोधात बुडून जावो."

अनन्त अशा शब्दब्रह्माची गीतासंपुष्टात सांठवण केलेली आहे. म्हणून श्रीज्ञानदेव म्हणतातः

तैसें शब्दब्रह्म अनंत। जालें सवालक्षु भारत।
भारताचें शतें सात। सर्वस्व गीता।।१८-१६६१।।
तेयांही सातां शतांचा। इत्यर्थु हा श्लोक शेषींचा।
व्यासशिष्य सञ्जयाचा। पूर्णोद्गारु हा।।१६६२।।
म्हणौनि मनें कायें वाचा। जो सेवकु होईल इयेचां।
तो स्वानन्दसाम्राज्यींचा। चक्रवर्त्ती करी।।१६६७।।
तैसें पहिलें आणि सरतें। श्लोक न म्हणावें गीतें।
जुनीं नवीं पारिजातें। असती काईं।।१६८०।।
आणि श्लोकां पाडुं नाहीं। हें कीर समर्थूं काईं।
एथ वाच्य आणि वाचकुही। भागु न धरी।।१६८१।।
जैं इयें शास्त्रीं येकु। श्रीकृष्णचि वाच्य वाचकु।
हें प्रसिद्धी जाणे लोकु। भलतेही।।१६८२।।
एथ अर्थें तैंचि पाठें। जोडे येवढेनि धटे।
वाच्य वाचक एकवटें। साधितें शास्त्र।।१६८३।।
म्हणौनि मज काहीं। समर्थनीं आतां विषो नाही।
गीता जाणा हे वाङ्मयी। श्रीमूर्त्ती प्रभूची।।१६८४।।

अशा या गीतेचा संपूर्णतेचा निदर्शक असा श्लोक म्हणजे अठराव्या अध्यायाअंतीचा व्यासशिष्य सञ्जयाचा पूर्णोद्गारः

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।१८-७८।।

या एकाच श्लोकात संपूर्ण गीतेचे सार आहे. श्रीज्ञानदेव म्हणतात की "गीतेचे श्लोक एकापेक्षां एक उत्कृष्ट आहेत. त्यांच्यात निवड करणे सुज्ञांस कठीणच! त्यांतून हे श्लोक आत्मबोध करून देणारे असल्याने त्यांच्यात पूर्व-उत्तर अनुक्रम - पहिला, नंतरचा, अखेरचा - असा लावणे शक्य होत नाही. श्लोकांमध्ये कमीजास्तपणा - विषमता पण नाही. कारण वाच्य व वाचक दोघेही श्रीकृष्णपरमात्माच आहे. एवंच काय! श्रीगीता ही श्रीहरीची साक्षात वाङ्मयी मूर्तीच आहे."

श्रीगीतेचे महिमान पुढे ऐकाः

तैसें हें गीतेचे दुभतें। वत्स करूनि पार्थातें।
दुभिनली जगापुरतें। श्रीकृष्ण गाय।।१८-१६८९।।
कां जैं श्रवणें पाठें अर्थें।गीता नेदी मोक्षाआरौतें।
समर्थु दाता कोण्हांतें। नास्ति न म्हणे।।१६९४।।
म्हणौनि जाणतेयां सवा। गीताचि एकीं सेवा।
काईं कराल आघवां। शास्त्रीं येरीं।।१६९५।।

"गीताशास्त्राच्यायोगेच इतर शास्त्रांतील सर्व लभ्यांश मिळूं शकतो; तर मोक्षदानी अशा या श्रीगीतेव्यतिरिक्त इतर शास्त्रांचे सेवन करण्याची काय आवश्यकता! त्यातूनही इतर शास्त्रांना अधिकारीभेद, साधनचतुष्ट्य, इ. गोष्टींची जरूरी असते. त्याशिवाय त्यांचे यथार्थ अवलोकन करता येत नाही. पण श्रीगीतेच्या श्रवणाने, पाठांतराने किंवा अर्थ समजण्याने, यांपैकी कोणत्याही एका पण पद्धतीने मोक्षापेक्षा काहीही कमी मिळत नाही. इतर शास्त्रे केवळ व्युत्पन्नमती अधिकारी

पुरुषासच उपयुक्त ठरतात. तसे येथे नाही. त्याचप्रमाणे इतर शास्त्रे त्यांच्या अभ्यासाने जे फळ मिळायला हवे होते, ते दिल्यावर निवृत्त होतात. पण श्रीगीतेचे तसे नाही. मोक्षदानी गीताशास्त्र हे साधन तसेच साध्य असल्याने आणि श्रीगीता व परमात्मा यांत अभेद असल्याने, परमभक्तीचे अवश्यमेव फळ दिल्यनंतर हे गीताशास्त्र निवृत्त होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही."

गीतेचा प्रसाद व पसायदान

परमानन्दाचे एक लक्षण संत श्रीकबीराने ***"दिन दिन बढत सवायो।"*** म्हणजे तो प्रतिदिनी सव्वापटीने वाढत असतो असे सांगितले आहे. गीताभ्यासाचा आनंदही त्याच प्रतीचा आहे. तो दिवसेंदिवस वाढतच जातो. कमी कधीही होत नाही. असा आनंद देणारी ***परमभक्ती*** हे गीतेचे फळ आहे. म्हणून ज्ञानेश म्हणतातः

आणि कृष्णार्जुनीं मोकली। गोठी केली निराली।
तैं व्यासें दाविली करतलीं। घेवों ये ऐसी।।१८-१६९६।।
बालकांतैं वोरसें। मायें जेवऊं बैसे।
तेव्हेली तेयां ठाकती तैसे। घांस करी।।१६९७।।
तैसा प्रबंधु हा श्रवणीं। लागतखेवों समाधि आणी।
आइकलेयां वाखाणीं। वेसन न लवी।।१७४४।।
हे स्वानंदभोगाची सेल। भलतेयांसीचि देईल।
सर्वेंद्रिये पोसवील। श्रवणाकरवीं।।१७४७।।
तैसें अध्यात्मशास्त्रीं इयें। अंतरंगचि अधिकारिये।
येरी लोकु वाक्चातुर्यें। होईल सुखिया।।१७४९।।
किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।१७९९।।
एथ म्हणे श्रीविश्वेशराओ। हा होईल दानपसाओ।
एणें वरें ज्ञानदेओ। सुखिया जाला।।१८०१।।

"अशा या श्रीगीतेत अनंतमती श्रीव्यासांनी केवळ सातशे श्लोकात संपूर्ण महाभारताचे सार तळहातावर आंवळा दिसू शकेल अशा रीतीने आणले आहे. त्याचे लहान लहान घांस करुन माउली श्रोत्यांस भरवत आहे. या ग्रंथरूपी अमृताच्या सेवनाने श्रोत्यांस सर्वसुख मिळून त्यांनी पूर्णत्व मिळवावे व अखंडितरीत्यां आदिपुरुषाची भक्ती करावी. या ग्रंथाच्या आधाराने भूलोकींच्या जीवांनी ***विजय*** म्हणजे अर्जुनाप्रमाणे श्रीहरीच्या सन्मुख होऊन ***देव-भक्त एकच*** या त्रिपुटीविरहित अवस्थेत त्याचे दर्शन घ्यावे, असे श्रीनिवृत्तिदेवांनी - विश्वेशरावाने - श्रीज्ञानदेवांस प्रसाददान दिले; जेणेकरून श्रीज्ञानदेवांस अत्यंत सुख झाले."

ज्ञानेश्वरी आपणांस अवगत व्हावी, या इच्छेने प्रेरित होऊन आपण ही सर्व भूमिका अवलोकन केली. त्यानिमित्ताने गीतेचे श्रेष्ठत्व व अलौकिकत्वही आपल्या नजरेसमोर मूर्त झाले. साक्षात प्रभूची वाङ्मयी मूर्ती असे गीतेस ज्ञानदेवांनी गौरविले आहे.

ही मूर्ती मऱ्हाटमोळ्या साजशृंगाराने नटविण्याचे अभिजात कौशल्य त्याच्याकडे आहे, हे पण आपणांस त्यांच्या या ओव्यांच्या आधारे जाणवत आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या नाथपरंपराप्राप्त गुरुधनाचा सर्वसामान्य जीवांसाठी विनियोग करण्यासाठी गीताच का निवडली याचे थोडे स्पष्टीकरण त्यांनी गीतेचा जो गौरव ज्ञानेश्वरीमध्ये गायिला आहे, त्यावरून लक्षात येते. त्यांना सर्वांना संपूर्ण करावयाचे आहे, म्हणून जे परमहंसांच्या आवडीचे बागडण्याचे तीर्थ आहे, ते हे गीताशास्त्र आपल्यालाही त्यानी मुक्त करून दिले आहे.

ॐपूर्णमदः:::

पूर्णत्व

यासाठी ते म्हणतातः

जैं उपनिषदांचे सार। सर्व शास्त्रांचे माहेर ।
परमहंसीं सरोवर। सेविजे जैं।।१८-१८०७।।
पुढुती पुढुती पुढुती। इया ग्रंथपुण्यसंपत्ति।
सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजो।।१८०९।।

"एवं सर्व उपनिषदांचे जे सार व सर्व शास्त्राचे जे माहेरच आहे; ज्या मानससरोवरात परमहंस योगी आनंदाने क्रीडा करीत असतात; अशा अष्टादश अध्यायरूपी श्रीभगवद्गीतेचा हा अमृतरसाने भरलेला कुंभ श्रीज्ञानदेवांनी रचलेल्या ज्ञानदेवीच्या रूपाने प्रकट झाला आहे. या ग्रंथाच्या पुण्याईच्या अपार बलाने सर्व भूतमात्रांस सकलसुखनिधान श्रीहरी परमात्म्याचा साक्षात्कार होवो व ते उत्तरोत्तर चढतावाढता आनंद उपभोगत पूर्णत्वास प्राप्त होवोत, असा आशीर्वाद ज्ञानेश्वरमाउलीने श्रीआदिनाथसांप्रदायिक अशा त्यांच्या श्रीगुरु निवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादाच्या बळावर सर्व ***कळिकळितु*** भूतांना दिला आहे. हे जे पूर्णत्वाचे निधान त्यांनी आपल्याला बहाल केले आहे, त्याची व्याख्या ***"ॐ पूर्णमदः। पूर्णमिदम्। पूर्णात् पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।"*** अशी केली जाते.

"हे पूर्ण आहे; हे ब्रह्मतत्त्व आहे; यातूनच संपूर्ण विश्व निर्माण झाले; तरीही ते ब्रह्म पूर्वी होते तसेच्या तसेच पूर्ण राहिले."

पूर्णत्व कसे असते त्याचा पूर्णावस्थेचा द्योतक असा एक दृष्टांत श्रीज्ञानदेवांच्या शब्दात पाहू याः

देऊलाच्या कामा कलसु। परमु गङ्गे सिंधुप्रवेशु।
कां सुवर्णसिद्धी कसु। सोलावा जैसा।।१८-९८१।।
तैसें आपुलें नेणणें। फेडी जैं कां जाणणें।
तैंही गिळूनि असणें। ऐसीं जैं दशा।।९८२।।
तियेपरौतें कांहीं। निफजणें एथ नाहीं।
म्हणौनि म्हणिपे पाही। परमसिद्धी तैं।।९८३।।

"देवळाचे बांधकाम जसे कळसाने पूर्णत्वास जाते; गंगेला सिंधुप्रवेशाने जशी परमसीमा प्राप्त होते; सुवर्ण शुद्ध करतांना जशी सोळाव्या कसास पोहोचल्याने परिपूर्णता येते; त्याचप्रमाणे आत्मसुखाला वंचित अशा अज्ञानी पुरुषाचे अज्ञान नष्ट होऊन त्याला ज्ञान प्राप्त

होणे व ज्ञानाचाही आत्मतत्त्वात ***"सोऽहम् तेही अस्तावले"*** अशा दशेत निरास होणे, हीच जीवात्म्याची खरी पूर्णावस्था होय. हिलाच परमसिद्धी म्हणतात."

या पूर्णावस्थेत जीवात्म्यास ***अद्वयभक्ती, अद्वैतभक्ती, अभेदभक्ती, ज्ञानभक्ती, पराभक्ती, स्वसंविति, शक्ति, परमभक्ति, सहजाभक्ति, नैष्कर्म्यसिद्धी,*** इ. विविध नामाभिधानांनी प्रसिद्ध असलेली संयोगावस्था प्राप्त होते.

योगसिद्धी

जीवाशिवाचे जे हे ऐक्य घडून येते; जो हा एकमेवाद्वितीय योग प्राप्त होतो; त्याविषयी श्रीज्ञानदेवांच्या पुढील ओव्या प्रसिद्ध आहेत. ही अवस्था कशी असते, पहाः

तैसा मी वांचौनि कांहीं। तेयां तेयांही सगट नाहीं।
हे चौथी भक्ती पाही। माझी तो लाहे।।१८-१११११।।
येर आर्त जिज्ञासु अर्थी। हे भक्ती जिहीं पंथीं।
तैं तिन्हीं पावोनि चौथी। म्हणत आहो।।१११२।।
येऱ्हवी तिजीं ना चौथी। हे पहिली ना सरती।
पैं माझिया सहजस्थिती। भक्ती नांव।।१११३।।

भक्ती, भक्ती म्हणून जिचा गौरव केला जातो; जी विविध नामांनी ओळखली जाते; अजाणतेपणी जी ज्ञान, कर्म व योग यांच्याहून कांही वेगळीही समजली जाते; ती खरी कशी असते, याचे सुंदर चित्र ज्ञानदेवांनी येथे प्रकट केले आहे. भगवंताच्या या भक्तीचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले आहे, ते असेः

"त्या भक्ताला त्याच्यासकट सगळे विश्वच हरीमय दिसते. त्याला आपण भगवत्स्वरूपच दिसतो व त्याचा अहंकार नाहीसा होतो.असे ज्या अवस्थेला ***चौथी भक्ती*** म्हणून गौरवतात, ती त्याला प्राप्त होते. आर्त, अर्थार्थी व जिज्ञासू यांव्यतिरिक्त ज्ञानी भक्तांची ही भक्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणून मी हिला ***चौथी भक्ती*** असे म्हणतो आहे. वास्तविक पाहता भक्तीचे पहिली, दुसरी किंवा तिसरी असे प्रकारच नसतात.***भक्ताच्या माझ्यात होणाऱ्या सहज स्थितीलाच भक्ती असे खरे तर म्हणतात.***"

भक्ती व ज्ञान

भक्ती हा *सहज प्रकाश* आहेः

जैं नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथ्वातें मातें दाऊनि।
सर्वही सर्वी भजौनि। बुझावितसे।।१८-१११४।।
जो जेथ जैसें पाहों बैसें। तियां तेथ तैसेचि असे।
हें उजिवडे कां दिसे। अखंडे जेणें।।१११५।।
सप्नींचे दिसणें न दिसणें। जैसें आपुलेनि असिलेंपणें।
विश्वाचें आहें नाहीं जेणें। प्रकाशे तैसें।।१११६।।
ऐसा सहजु माझा। प्रकाशु जो कपिध्वजा।
तो भक्ती या वोजा। बोलिजै गां।।१११७।।

तैसें सर्वत्र मीचि मियां। घेपतसे भक्ती इयां।
परि दृश्यत्वें हें वायां। अज्ञानवशें।।११२४।।

"माझ्याच प्रकाशाने प्रकटणाऱ्या विश्वाभासाला सत्य मानून मला विसरायला लावणारे अज्ञान जेव्हा सर्वांतर्यामी असलेल्या मला जाणल्याने नष्ट होते; माझ्यावर आभासरूप दिसणाऱ्या वस्तुजातातील मी जेव्हा अखण्ड एकरसपणे दिसतो; स्वप्नांत वस्तुजात दिसणे किंवा त्यांचे नाहीसे होणे जसे स्वतःच्या अस्तित्वावर अवलंबून असते, तसे या विश्वाचे होणेजाणे ज्या माझ्यामुळे होते, त्या **माझ्या स्वरूपींचा सहजसिद्ध असा जो ज्ञानप्रकाश आहे, तो जेव्हा प्राप्त होतो, तेव्हाच्या स्थितीला *ज्ञान* म्हणावे. भक्त, भक्ती व भगवंत हे एकच आहेत हे ज्ञानी भक्तास अनुभूतीने जाणवलेले सत्य असते.** पण अज्ञानी भक्त भगवंताचे हे स्वरूप जाणत नाहीत."

तैं अज्ञान आतां फिटलें। माझें द्रष्ट्टत्व मज भेटलें।
निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें।।१८-११२५।।
पैं जेधवां ईं असे कीडाल। तेधवां ईं सोनेचि अढल।
परि तैं गेलियां केवल। उरे तैसें।।११२६।।
हां गां पुनवेआदि कांहीं। चंद्रु सावेव नाहीं।
परि तिये दीं भेटें पाही। पूर्णता तेयां।।११२७।।
तैसा मीचि अज्ञानद्वारें। दिसे परि हस्तांतरें।
मग द्रष्ट्टत्व तैं सरे। मियांचि मी लाभे।।।११२८।।

"वास्तविक पाहता आर्त, अर्थार्थी व जिज्ञासूंच्या कामनेचे फलस्वरूप म्हणुन मीच त्यांच्या वांछिलेल्या व मिळालेल्या दुःखनिवारण,अर्थप्राप्ती व ज्ञानप्राप्ती यांच्या रूपाने असतो. पण ते भक्त अज्ञानी असून त्यामुळे हे जाणत नाहीत. परंतु हे अज्ञान जेव्हा जाते, तेव्हा भक्त उमगतो की प्रतिबिंब हे निजबिंबाचे जसे स्वरूप असते, तसेच भक्त व भगवंत हे वास्तविक एकच असून त्यांचे वेगळेपण केवळ आभासमात्र असते. सोन्यातील हीण गेल्यावर चोख सोने उरते; पौर्णिमेस चंद्र पूर्णत्वास गेलेला दिसतो, एरवीहीं तो तसाच असतो; अज्ञानामुळे विश्वरूपाने वैविध्याने दिसणारा जो **मी**, **तो**, दृश्याभास सरल्यानंतर दृष्यास स्वतःच्या रूपाने गंवसतो. असा ***मीला मीच*** भेटतो."

म्हणौनि दृश्यपंथा-। अतीतु माझा पार्था।
भक्तियोगु चौथा। म्हणितला गां।।१८-११२९।।
येयां ज्ञानभक्ती सहज। भक्तु एकवटला मज।
तो मी केवळ तुज। श्रृतही आहे।।११३०।।
जैं उभूनियां भुजा। ज्ञानिया आत्मा माझा।
हें बोलिलो कपिध्वजा। सप्तमाध्यायीं।।११३१।।

"आर्त, अर्थार्थी व जिज्ञासू भक्तांची उपलब्धी दृश्यरूपाने मिळणाऱ्या वांच्छित वस्तूत असते. मात्र दृश्यरूपापलीकडील जो भक्तिपंथ, त्यालाच मी ***चौथा भक्तियोग*** म्हणतो. कारण त्या भक्तांना होणारी उपलब्धी म्हणजे साक्षात मी स्वतःच असतो आणि तो मी

दृश्य वस्तूंसारखा नाही. अशा ***ज्ञानभक्ती***द्वारे म्हणजे ***अद्वयभक्ती***द्वारे वा ***सहजभक्ती***द्वारे माझ्याशी एकरूप जालेला भक्त केवळ मीच होऊन असतो. अर्जुना! तुला हे विदितच आहे. कारण मागे (सातव्या अध्यायांत - ***"उदारा: सर्व एवै ते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।...।।७-१८।।")*** बजावून सांगितलेले स्मरतच असशील की "***ज्ञानी माझा आत्माच आहे.***"

अद्वैतात्मक भक्ती ::::

अद्वैतभक्ती

अशा ज्ञान्याच्या भक्तीस **अद्वैत भक्ती** म्हणून ज्ञानदेव वाखाणतातः

ज्ञानियें इयेंते स्वसंवित्ति। म्हणती शैव शक्ती।
आम्हीं परमभक्ती। आपली म्हणो गां।।१८-११३३।।
येयालागीं तो क्रमयोगी। मी जालाचि मातें भोगी।
तारुण्य कां तरुणांगी। जियापरी।।११४७।।
तैसा रूप होऊनि माझें। मातें क्रियेविण तो भजे।
अलंकारु कां साहाजें। सोनियांतैं जेवीं।।११४९।।
तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्हीं अद्वैतीं भक्ती आहे।
हें अनुभवाजोगे नोहे। बोला ऐसें।।११५१।।

"या ***ज्ञानभक्तीलाच ब्रह्मज्ञानी स्वसंवित्ति*** म्हणतात; तर ***शैव तिला शक्ति*** म्हणून संबोधतात. परंतु हे पार्था! मी तिला माझी ***परमभक्ती*** म्हणतो. ही भक्ती लाभलेला **क्रमयोगी** परमात्मरूप होऊन परमात्मसुख भोगतो. ज्याप्रमाणे तरुणी स्वतःच्या तारुण्याच्या मस्तीत राहते; सुवर्णाचे अलंकार जसे सुवर्णपण भोगतात; तसेच मद्रूप होऊन तो भक्त कोणतीही क्रिया किंवा उपचार न करतां मला भजतो. अद्वैतांत क्रियांना - पूजादी उपचारांना जागाच नाही. तरीही अद्वैतात भक्तीची क्रिया जरूर आहे. हे बोलणे कदाचित समजणार नाही. परंतु अनुभूती घेणारासच त्याची सत्यता पटेल."

ही अनुभूती कशी असते, ते सांगतांना ज्ञानेश काही लक्षणीय ओव्याचा संभार रचतातः

तेधवां पूर्वसंस्कारछंदे। जैं काहीं तो अनुवादे।
तेणें आळवलेनि वो दें। बोलतां मीचि।।१८-११५२।।
बोलतेया बोलताचि भेटे। तेथ बोलिले हें न घटे।
तैं मौन तंव गोमटें। स्तवन माझें।।११५३।।
म्हणौनि तेयां बोलतां। बोलीं बोलतां मी भेटतां।
मौन होये तेणें तत्त्वतां। स्तवीं तो मातें।।११५४।।

"असा मद्रूप झालेला तो माझा भक्तोत्तम पूर्वसंस्कारवश जे काही बोलतो, जी काही स्तोत्रे म्हणतो, मला जशी काही हांक मारतो, त्याला ***ओ*** देणारा व त्याच्या मुखातून बोलणारा मीच असतो. बोलणारा व ऐकणारा हे एकच असले तर बोलणे कसे उपजेल! ते तर मौनच होईल. अशा त्या गोमट्या मौनाने तो भक्त माझे स्तवन करतो. याप्रमाणे माझे स्तवन म्हणून जे बोल तो भक्त बोलतो ते असल्याने, त्याचे ते असे करणे म्हणजे मौनरूपाने माझे स्तवन होते."

तैसीचि बुद्धीं कां दिठीं। जैं देखो जाय तो किरीटी।
तैं देखणेयां दृश्य लोटी। देखतेंचि दावी।।१८-११५५।।
आरिसेया आदि जैसें। देखतेचि मुख दिसे।
तेयांचे देखणें तैसें। मेळवी द्रष्टें।।११५६।।

"त्याचप्रमाणे बुद्धीने अथवा दृष्टीने जर तो काही अनुमान करील किंवा पाहूं जाईल, तर त्याला दिसणारे दृश्य बाजूला राहून त्यांत मीच दिसतो. ज्याप्रमाणे आरशांत पहाणाऱ्याला स्वतःचेच मुख दिसते व त्यायोगे द्रष्ट्याची स्वतःशीच भेट होते, त्याचप्रमाणे अशा भक्तास तो जे काही पाहील किंवा अनुभविल, त्यांत त्याला स्वतःचेच व पर्यायाने माझेच दर्शन होते."

दृश्य जाऊनियां द्रष्टें। द्रष्टयासीचि जैं भेटें।
तैं येकलेपण न घटें। द्रष्टेपणाही।।१८-११५७।।
तैसा मी होऊनि देखतें। तो घेऊं जाय दृश्यातें।
तेथ दृश्य नेथिलें तैं। द्रष्टत्वेंसीं।।११६१।।

"असे जेव्हा दृश्य जाऊन द्रष्टेपण द्रष्ट्यासच भेटते, तेव्हा द्रष्टा एकटा असतो तसाच राहतो व द्रष्टेपणाही जसाच्या तसाच राहतो. म्हणून असा भक्त मी झालेला असतो व जर तो दृश्य विश्वात काही पाहू लागला, करूं लागला किंवा अनुभवूं लागला, तर तो त्या दृश्यासह, पहाण्यासह, करण्यासह, अनुभवासह मद्रूप होतो."

रवि आंधारुं प्रकाशितां। नुरेचि जेवीं प्रकाश्यता।
तेवीं दृश्या नाहीं द्रष्टता। मी जालेयां।।१८-११६२।।
मग देखिजे कां न देखिजे। ऐसीं जैं दशा निफजे।
तैं तैं दर्शन माझें। सांचोकारें।।११६३।।

"रवीने अंधारात प्रकाश पाडला की प्रकाश्यता हा रवीचा गुण जसा नाहीसा होतो, त्याचप्रमाणे मद्रूप झालेल्या त्या भक्ताबाबत दृश्य व द्रष्टत्व ही उरत नाहीत. अशा भक्ताने दृष्टीने काही पाहिले अथवा न पाहिले तरी माझे खरे दर्शन त्यालाच होत असते."

म्हणौनि सर्व मी जालेपणें। ठेलें तेयां जाणेंयेणें।
हेंचि गां यात्रा करणें। अद्वया मज।।१८-११६८।।
गेलेयां भलतेउतां। उदकपणें पण्डुसुता।
तरंगाचि उदकात्मता। न मोडेचि जेवीं।।११७१।।
तैसा मीपणें हालों ठेला। तो आघवेयाचि मज आंतु आला।
इयां यात्रा होय भला। कापडी माझा।।११७२।।

"तो अद्वयभक्त सर्वत्र मद्रूप झालेला असल्याने तो कोठेही गेला तरी गेला असे होत नाही व कोठेही आला ते येणे होत नाही. अशी त्याची माझ्याकरता होणारी तीर्थयात्रा होय. तरंग ज्याप्रमाणे पाण्याच्या पृष्ठभागावर कसाही धावत गेला किंवा नाहीसा झाला तरी त्याचे उदकपण न मोडता तसेच राहाते, त्याचप्रमाणे जो मद्रूप झालेला

आहे व संपूर्णपणे माझ्यात प्रवेशला आहे, तो कोठेही गेला वा न गेला तरी त्याने माझी यात्रा केली असे होते."

त्याच्या कर्तृत्वाविषयी ज्ञानेश म्हणतातः

आणि शरीरस्वभाववशें। काहीं एक करूं बैसे।
तऱ्हीं मीचि तेवीं तेणें मिषें । भेटें तेयां।।१८-११७३।।
तेथ कर्म आणि कर्ता। हें जाऊनि पण्डुसुता।
मी आत्मेनि मातें पाहतां। मीचि होयें।।११७४।।
दीपातैं दीपें प्रकाशिजे। तैं न प्रकाशणेंचि निफजे।
तैसें कर्म मियां कीजै। तैं करणें कैंचें।।११७६।।
तैं होतचि आहे। जैं करावें भाष जायें।
ऐसें न करणेंचि होये। तेयाचे केलें।।११७७।।
क्रियाजात मियां जालेपणें। घडे काहींचि न करणें।
तेयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें।।११७८।।
म्हणौनि करतियां वोजा। न करणें कपिध्वजा।
निफजे तेयां महापूजा। पूजी तो मातें।।११७९।।

"जर शरीरस्वभावामुळे तो काही क्रिया, कार्य वा कर्म करत असेल, तर त्या त्या क्रिया-कार्य-कर्माच्या रूपाने मीच त्याला भेटत असतो. हे अर्जुना! यायोगे कर्ता व कर्म यातला भेद नाहीसा होऊन कर्ताही मीच व कर्मही मीच होतो. ज्याप्रमाणे एका दिव्यास दुसरा दिवा प्रकाश देऊं शकत नाही, त्याप्रमाणे जे कर्म मीच करतो, तेथे कर्तेपणा उरत नाही. कर्म आपोआप होत असते अन कर्तेपणा उरत नाही, असे भक्ताचे कर्म करणे हे नैष्कर्म्यच होते. ***ही नैष्कर्म्यावस्था हीच माझी खरी पूजा होय.*** अशा प्रकारे तो भक्त जे जे कर्म करतो, ते ते नैष्कर्म्य असल्यामुळे त्याद्वारे तो माझी महापूजाच करतो."

महाबोधात रममाण झालेल्या त्या भक्ताचे पुढे वर्णन करत ज्ञानदेव उद्गारतातः

एवं तो बोले तैं स्तवन। तो देखें तैं दर्शन।
अद्वया मज गमन। तो चाले तैंचि।।१८-११८०।।
तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जपु माझा।
तो असे तैंचि कपिध्वजा। समाधि माझी।।११८१।।
जैसें कनकेसीं कांकणें। असिजे अनन्यपणें।
तो भक्तियोगें येणें। मासीं तैसा।।११८२।।
इयां अनन्यसिद्धां भक्तीं। इयें आघवींचि दृश्य जाती।
मज आपणपेयां सुमती। द्रष्ट्यातें जाणें।।११८५।।
तिहीं अवस्थाचेनि द्वारें। उपाधि उपाहिताकारें।
भावाभाव स्फुरें। दृश्य जैं हें।।११८६।।
तैं हें आघवेंचि द्रष्टा। ऐसां बोधाचा माजिवठा।
अनुभवाचां सुभटा। धेंडा तो नाचे।।११८७।।

"परत सांगावयाचे तर असा भक्त जे काही बोलतो, ते माझे स्तवन असते; जे काही तो पाहातो, त्यांत माझे दर्शन घेणे असते; त्याचे चालणे हे माझी यात्रा करणे होय; तो जे काही करतो ती माझी पूजा असते; तो जो संकल्प करतो, तो माझा जपच असतो; ***एवढेच काय! पण तो जेथे कोठे ज्या काही स्थितीत असतो, तीच त्याची समाधीची अवस्था होय!!! हीच सहजसमाधी आहे.*** ज्याप्रमाणे सुवर्णकंकण सुवर्णाशी अभिन्न असते, तसाच माझा भक्त या भक्तियोगाने माझ्याशी अभेद असतो."

"या अनन्यभक्तीद्वारे तो सिद्धी पावून सर्व दृश्यजातात मला पाहातो. जागृती-स्वप्न-सुषुप्ति या तिन्ही अवस्थातून स्थूल, सूक्ष्म व कारण या तिन्ही देहांच्या उपाधीच्या आकाराने व विश्व-तैजस-प्राज्ञ या तीन सोपाधिक जीव-चैतन्यांच्या रूपाने व उत्पत्ति-स्थिति-नाशाच्या रूपाने जे हे दृश्य अनुभवास येते, ते अवघेच मी आहे - ***"वासुदेवः सर्वमिती"*** - अशा अनुभूतीच्या मदाने मत्त होऊन मद्रूप झालेला तो भक्त मस्तीत नाचतो-गातो -बागडतो-खेळतो- विहरतो."

जीवनमुक्ती म्हणतात ती हीच!

"वासुदेवः सर्वम्"

मी कोण आहे याची साक्षात अनुभूती घेणाऱ्या त्या भक्ताचे वर्णन अत्यंत हृदयंगम शब्दात करतांना ज्ञानेश असे म्हणतात कीः

तैसीं जैं काहीं आथिनाथि-। पणें जैं होय स्फूर्ती।
तैं ज्ञाताचि मी हें प्रतीति। होऊनि तो भोगी।।१८-११९२।।
जाणें अजु मी अमरु। अक्षयु मी अक्षरु।
अपूर्वु मी अपारु। आनन्दु मी।।११९३।।
अचलु मी अच्युतु। अनन्तु मी अद्वैतु।
आद्यु मी अव्यक्तु। व्यक्तुही मी।।११९४।।
ईश्य मी ईश्वरु। अनादि मी अमरु।
अभय मी आधारु। आधेय मी।।११९५।।

"या विश्वात जे काही आहे व नाही या रूपाने ज्ञेयाचे ज्ञान होते, त्या ज्ञेयाचा व्यष्टिज्ञाता जीव जो **मी** म्हणून असतो, तोच त्या ज्ञेयाचा समष्टिज्ञाता **ईश्वर** म्हणून आहे आणि **तो मीच** या प्रतीतीने हे सर्व दृश्यजात तो भक्त उपभोगतो. ***ईश्वर तो मीच अशी ही अनुभूती त्या भक्तास येते."***

तो भक्त जाणत असतो की "जे परमात्मतत्त्व अज, अजर, अक्षय, अक्षर, अपूर्व, अपार, आनन्दघन, अचळ, अच्युत, अनन्त, अद्वैत, आद्य, अव्यक्त आणि व्यक्तही, ईश्य व ईश्वर, अनादी, अमर, अभय, आधेय व आधाररूप असे आहे, ते सर्व मीच आहे."

स्वामी मी सदोदितु।सहजु मी संततु।
सर्व मी सर्वगतु। सर्वातीतु मी।।१८-११९६।।
नवा मी पुराणु। शून्यु मी संपूर्णु।
स्थूलु मी अणुरेणु। जैं काहीं तैं मी।।११९७।।
अक्रियु मी एकु। असंगु मी अशोकु।
व्याप्यु मी व्यापकु। पुरुषोत्तमु मी।।११९८।।

अशब्दु मी अश्रोत्रु। अरूपु मी अगोत्रु।
समु मी स्वतंत्रु। ब्रह्मु मी परु।।११९९।।

त्याची अनुभूती अशीही असते की, "मीच सदाकाळचा स्वामी आहे; मी सतत आहे; मी सहजस्वरूप आहे; सर्वरूपाने मीच विलसत आहे; सर्वांतर्यामी मीच आहे; सर्वांपलीकडील तत्त्व तेही मीच आहे; नित्यनूतन विश्वही मीच आहे; आदि पुराणपुरुषही मीच आहे; स्थूळ व अणूरेणू सर्व काही मीच आहे; मीच एकमेवाद्वितीय पुरुषोत्तम आहे; मीच अक्रिय आहे; असंग व अशोक असा मीच आहे; सर्व व्यापलेला व व्यापणाराही मीच आहे; अशब्द व अश्रोत्र असाही मीच आहे; अरूपाही मीच आहे; अगोत्रही मीच आहे; समही मीच आहे; स्वतंत्रही मीच आहे; ब्रह्मही मीच आहे; आणि परमात्मा तोही मीच आहे."

ऐसें आत्मत्वें एकें मातें। इयां भक्ती जाणे निरुते।
आणि इयां बोधां जाणणें तैं। तैंही मीचि जाणें।।१८-१२००।।
तेयां अद्वयपण आपलेयां। जाणती ज्ञप्ति जैं धनंजया।
तैं ईश्वरूचि मी हें तेयां। बोधासीं ये।।१२०४।।
मग द्वैताद्वैतातीतु। मीचि आत्मा एकु निभ्रांतु।
हें जाणौनि जाणणें जेथु। अनुभवीं रिगे।।१२०५।।
तैसा मी तो हें जैं असें। तैं स्वानंदानुभवैकरसें।
कालवौनि प्रवेशें। मजचि माजीं।।१२०९।।
आणि तो हें भाख जाये। तेथ मी हें कोण्हासीं आहे।
ऐसा मी ना तो तिये समाये। माझांचि रूपीं।।१२१०।।

"याप्रमाणे माझ्याशी एकरूप झालेला तो भक्त निश्चित जाणत असतो. तसेच हा जो बोध त्याला होत असतो, त्यामागची जी जाणीव असते, तीही **मीच** आहे हे तो जाणत असतो. या अद्वयबोधाची जी अशी **ज्ञप्तिमात्र** अवस्था वा ईश्वरस्वरूप, ते **मी स्वत:च** आहे, हा बोध त्याला होतो. अशा त्या ज्ञप्तिमात्र ईश्वरावस्थेतील द्वैत व अद्वैत यांच्या अतीत असणारा भ्रांतीरहित जो आत्मा, तोही मीच आहे, हे त्याला कळून येते व तो अनुभव दृढ झाला की तो भक्त **मीच तो** व **तोच मी** या स्वानंदानुभवरसाच्या डोहात बुडून जातो. तो असा एकरूप होऊन माझ्या आंतच प्रवेशतो. अशा त्या अवर्णनीय स्थितीत तोच जर राहात नाही, तर मी तरी कोठून असणार! तो भक्त माझ्याच स्वरूपात सामावून जातो."

परमभक्ती::::

क्रमयोगसोपान

क्रमयोगमार्गाने जाणाऱ्या साधकाची अंतिम चिरंतन अवस्था याप्रमाणे उकलून सांगतांना श्रीज्ञानदेव पुढे म्हणतात:

पैं क्रमयोगियां किरीटी। चक्रवर्त्तीचां मुकुटीं।
मी चिद्रत्न तैं साटोवाटीं। होएं तो माझां।।१८-१२१९।।
ऐसा क्रमयोगुबोधें। तेणें भक्तिचिद्गांगें।
मी स्वानन्दोदधि वेगें। ठाकिला गां।।१२२२।।
देशें कालें स्वभावें। वेंचु जेयां न संभवें।
तैं पद माझें पावें। अविनाश।।१२५८।।

"त्या क्रमयोग्याला स्वानन्दसाम्राज्याचे चक्रवर्तीपद प्राप्त होते. हे अर्जुना! त्याच्या मुकुटावरचे चिद्रत्न मी **श्रीकृष्णपरमात्मा** स्वत:च असतो व तो माझाच झालेला असतो. अशी अमची परस्परात देवाणघेवाण होते. अशा रीतीने ***क्रमयोगाच्या काठांकांठाने त्यातून वाहणाऱ्या भक्तीरूपी चिद्गंगेच्या ओघाबरोबर प्रवास करतकरत तो भक्त लवकरच परमात्मस्वरूप स्वानन्दसिंधूत प्रविष्ट होतो.*** त्या ठिकाणीं प्रवेश केल्यावर तेथे देश, काल वा स्वभाववैचित्र्य ही उरतच नाहीत. देश, काल व स्वभाव यांच्या स्थितीवर ज्या पदाचे अस्तित्व अवलंबून राहत नाही, असे ते माझे अविनाश पद तो पावतो. हे पाण्डुपुत्रा! यात विशेष असे ते काय आहे! **कारण मी जो *आत्मा - त्याची प्रसन्नता - त्याचा प्रसाद* - लाभलेल्यास अलभ्य असे काहीतरी असेल काय!"**

श्रीकृष्ण पुढे त्या पदाचे वर्णन करतात:

मग तेयाचेनि प्रसादें। सर्वोपशांतिप्रमदें।
कान्तु होऊनि स्वानन्दे। स्वरूपीं रमसी।।१८-१३२०।।
संभूति जेणें संभवें। विश्रांति जेथ विसंबे।
अनुभूति अनुभवे। अनुभवा जेयां।।१३२१।।
तियें निजात्मपदींचा राओ। होऊनि ठांशीं अव्ययो।
म्हणे लक्ष्मीयेचा नाहो। पार्था तूं गां।।१३२२।।

"हे अर्जुना! हृदयस्थ ईश्वराचे प्रणिधान करून त्याचा कृपाप्रसाद मिळव. त्यायोगे अहंकार, वाणी, चित्त व देह या स्वरूपभावांची शांती होते; ते भाव निवृत्त होतात. मग त्या शांतिस्वरूप चिरयौवना तरुणीशी तिचा पती होऊन तूं सुखेनैव स्वस्वरूपीं विलास कर. विश्वोत्पत्ती जेथून होते; विश्वलय ज्याच्यात होतो; अनुभूती ज्या अनुभवास अनुभवते; त्या अविनाशी निजात्मपदाचा राणा होऊन, हे पार्था! तूं त्या अव्यय स्थितीत रममाण हो."

लक्ष्मीपती श्रीकृष्णांचा हा उपदेश आहे. ते परमभक्ती प्राप्त करून घेण्यास सांगत आहेत.

परमभक्ती

श्रीज्ञानदेवांनी ही जी *परमभक्ती* वरील ओव्यातून शब्दबद्ध केली आहे, ती प्राप्त होण्यास श्रीहरिआत्मयाची कृपाच आवश्यक असते. अर्जुनाला ती कृपा प्राप्त झाली. भगवंताच्या त्या कृपाप्रसादाने त्याला जी परम अवस्था प्राप्त झाली, ती आपण आकळून घेऊ या माउलींच्या पुढील ओव्यांतून:

ऐसें सर्वरूपरूपशें। सर्वदृष्टीडोलसें।
सर्वदेशनिवाशें। बोलिले कृष्णें।।१८-१४१७।।
मग सांवला सकंकणु। बाहु पसरूनि दक्षिणु।
आलिंगला स्वशरणु। भक्तराजु तो।।१४१८।।

न पवतां जेयांतैं। काखेसूनि बुद्धीतैं।
बोलणें माघौतें। वोसरलें।।१४१९।।
ऐसें जैं काईं एक। बोला बुद्धीही अटक।
तैं देवावेयां मीख। क्षेमाचें केलें।।१४२०।।
दीपें दीपु लाविला। तेसा परिष्वंगु तो जाहला।
द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु।।१४२२।।

"मग शरणागत आलेल्या पार्थावर पूर्ण अनुग्रह करण्यासाठी त्या सर्व जगद्रूपाने प्रकटणाऱ्या - त्या सर्वांतर्यामी वास करणाऱ्या - द्रष्ट्या श्रीकृष्णांनी आपला कंकणांनी सुशोभित झालेला सांवळा उजवा हात पसरला व भक्तराज अर्जुनाला आलिंगन दिले. वेदवाणीलासुद्धा अप्राप्य असणारे असे जे तत्त्व वाचातीत व बुद्धीच्याही पलीकडील आहे, ते त्या अर्जुनाला देण्यासाठी श्रीहरीने हे असे त्या आलिंगनाचे केवळ निमित्त केले. एका दिव्याच्या ज्योतीने दुसरा दीप उजळावा, तसाच तो प्रसंग होता. अर्जुनाचे द्वैतभान तसेच ठेवून त्याला श्रीहरीने आपल्यासारखाच निजात्मपदींचा *राव* केले."

तेधवां सुखाचा मग तेयां। पूरूं आला धनञ्जेया।
तेथ वाडु तऱ्हीं बुडौनियां। ठेलां देओ।।१४२३।।
सिंधु सिंधुतैं पावों जाये। तैं पावणें ठाकणें दूण होये।
वरि रिगे पुरवणिये। आकाशही।१४२४।।
तैसें दोहींचे तेयां मिलणें। दोघां नावरे जाणावें कवणें।
किंबहुना नारायणें। विश्व कोंदलें।।१४२५।।

"अर्जुनाला तत्त्वप्रदान केल्यामुळे देव इतका आनंदित झाला की गगनाहूनही विशाल असा तो श्रीहरी त्या सुखाच्या महापूरात जणू बुडून गेला. एक सागर जर दुसऱ्या सागराच्या भेटीस आला तर दुपटीने पाण्याचे कल्लोळ उसळून वर भर म्हणून ते आकाशासहि उसळी मारून व्यापतात. तशीच पार्थ व श्रीकृष्ण यांच्या आलिंगनाची गोष्ट झाली. त्या दोघांमध्ये असलेल्या *नारायणतत्त्वाने* या निमित्ताने अवघे विश्वच व्यापून टकले असावे."

देवभक्तांचे मिलन::::

श्रीकृष्णार्जुन अद्वैत

श्रीव्यासमहर्षींनी दिलेल्या दिव्यदृष्टीने हे श्रीकृष्णार्जुन ऐक्याचे - त्या दोघांच्या अद्वयत्वाचे - त्यांच्या सामरस्याचे हे दृश्य टिपणाऱ्या सञ्जयाच्या तोंडून म्हणूनच गीतेच्या कलशाध्यायींचा सार्थ असा पूर्णोद्गार बाहेर पडला:

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजय भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम।।१८-७८।।

"जेथे तो योगेश्वर कृष्ण आहे, तेथेच तो पार्थ धनुर्धरही आहे. हे दोघे ज्या बाजूस आहेत, तेथेच श्री, विजय आणि अचल धर्मनीती असणार असे माझे दृढ मत आहे."

सञ्जयास श्रीकृष्णार्जुनांचे ऐक्य कसे जाणवले आणि तो असे का म्हणतो, ते अत्यंत काव्यमय शब्दात ज्ञानेश निवेदितात. ते म्हणतात:

चंद्रु तेथ चंद्रिका। शंभु तेथ अंबिका।
सन्त तेथ विवेकां। असणें कीं जी।।१८-१६३२।।
रावो तेथ कटक। सौजन्य तेथ सोयरीक।
वह्नि तेथ दाहक। सामर्थ्य पां।।१६३३।।
दया तेथ धर्मु। धर्मु तेथ सुखागमु।
सुखीं पुरुषोत्तमु। असे जैसा।।१६३४।।
वसंतु तेथ वनें। वनें तेथ सुमनें।
सुमनीं पालिंगनें। सारंगांचीं।।१६३५।।
गुरु तेथ ज्ञान। ज्ञानीं आत्मदर्शन।
दर्शनीं समाधान। आथीं जैसें।।१६३६।।
भाग्य तेथ विलासु। सुख तेथ उल्हासु।
हें असो तेथ प्रकाशु। सूर्यो जेथ।।१६३७।।
तैसें सकल पुरुषार्थ। जेणें स्वामी कां सनाथ।
तो श्रीकृष्णराव जेथ। तेथ लक्ष्मी।।१६३८।।

"ज्याप्रमाणे शिव तेथे भवानी, सन्त तेथे विवेक, राजा तेथे सैन्य, सौजन्य तेथे मैत्री, अग्नी तेथे दाहकता, दया तेथे धर्म, धर्म तेथे सुखाचे अस्तित्व ही असणारच; सुख तेथे पुरुषोत्तम, वसंत तेथे वने, वने तेथे पुष्पे, पुष्पे तेथे भ्रमरांचे थवे ही असतातच; जसे गुरू तेथे ज्ञान असतेच अणि ज्ञान तेथे आत्मदर्शन व आत्मदर्शन तेथे प्रसन्नता असतेच; भाग्य तेथे विलास, सुख तेथे उल्हास, प्रकाश तेथे सूर्य ही असतातच; त्याचप्रमाणे ज्या श्रीकृष्णरावस्वामीमुळे सकल पुरुषार्थ प्राप्त होतात, तो जेथे असेल तेथे ती लक्ष्मीही असतेच."

आणि आपुलेनि कान्तेसीं। तैं जगदम्बा जेयांपासीं।
अणिमादिकीं दासी। नोहोतु तेयांतें।।१८-१६३९।।
कृष्ण विजयस्वरूप निजांगें। राहिलासें जेणें भागें।
तैं जयो लागवेगें। तेथेंचि आहे।।१६४०।।
विजय नामें अर्जुनु विख्यातु। विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु।
श्रियेंसीं विजयो निश्चितु। तेथचि असे।।१६४१।।

"आणि आपल्या पतीसह ती जगदंबा ज्याच्याजवळ राहते, त्याच्या दासी म्हणून अणिमादी महासिद्धी राहाणार नाहीत कां! श्रीकृष्ण स्वतःच विजयस्वरूप आहेत; ते ज्या बाजूला आहेत तिकडे जयसुद्धा लगबगीने हजर होणारच! अर्जुन हासुद्धा *विजय* या नावाने प्रसिद्ध आहे. त्यामुळे श्रीकृष्णार्जुन ज्यांच्या बाजूला लक्ष्मीसह आहेत,त्याच पक्षाला विजय निश्चितच मिळणार!"

सञ्जय पुढे उद्गारतो की:

तेयांचियां देशिचां झाडीं। कल्पतरूंतैं होडीं।
न जिणावें काईं एवढीं। मायबापें असतां।।१८-१६४२।।
तैं पाषाणही आघवें। चिन्तारत्नें कां नोहावें।
तियें भूमी कां नैय्यावें। सुवर्णत्व।।१६४३।।

तेयाचियां गांवीचियां। नदी अमृतें वाहावियां।
नवल काईं राया। विचारी पां।।१६४४।
तेयांचे बिसाट शब्द। सुखें म्हणो येती वेद।
सदेह सच्चिदानन्द। कां न व्हावें तैं।।१६४५।।
पैं स्वर्गापवर्ग दोनीं। इयें पदें तियें आधीनी।
श्रीकृष्ण बापु जननी। कमला जेयां।।१६४६।।
म्हणौनि जियां बाहें उभा। तो लक्ष्मियेचां वालभा।
तेथ सर्वसिद्धी स्वयंभा। येर नेणो।।१६४७।।

"त्यांच्या देशातील झाडेसुद्धा कल्पतरूंना लाजवतील अशी असणार! कारण श्रीकृष्ण व लक्ष्मी त्या अर्जुनाचे आईवडील आहेत. त्याच्या देशातील सगळे दगडसुद्धा चिन्तामणी होतील; जमीन सुवर्णाची असेल; त्याच्या गांवांतील नद्यांतून अमृतप्रवाहच वाहाणार! आणि यांत नवल ते काय आहे! हे राजा धृतराष्ट्रा! त्या अशा सौभाग्यशाली अर्जुनाचे स्वैर शब्दसुद्धा वेदवाणीइतकेच समर्थ असणार! कारण तो सदेह सच्चिदानन्द परब्रह्मच झालेला आहे. *स्वर्ग अणि मोक्ष* ही दोन्ही ज्यांच्या अधीन आहेत, ते श्रीकृष्ण ज्याचा बाप म्हणून व ती कमला ज्याची जननी म्हणून आहेत, अशा त्या अर्जुनासह तो श्रीहरी ज्या पक्षाकडे आहे, त्यांना सर्व सिद्धी प्राप्त आहेतच."

अणि समुद्राचा मेघु। उपेगें तेयाहूनही चांगु।
तैसा पार्थीं आजि लागु। असे तियें।।१८-१६४८।।
कनकत्वदीक्षागुरु। लोहा परिसु होय कीरु।
परि जगां पोखितां व्यवहारु। तैंचि जाणें।।१६४९।।
एथ गुरुत्वा येतसें उणें। ऐसें झणें कोण्हें म्हणें।
वह्नि प्रकाशु दीपपणें। प्रकाशीं आपुलां।।१६५०।।
तैसा देवाचियां शक्ती। पार्थु देवासीचि बहुतीं।
परि माने इयें स्तुती। गौरव असे।।१६५१।।
आणि पुत्रें मी सर्वगुणीं। जिणावा हें बापु श्रियाणी।
करी तैसा शार्ङ्गपाणि। फला आली।।१६५२।।

"ज्याप्रमाणे समुद्रापासून निर्माण झालेला मेघ समुद्रापेक्षां जास्त उपयुक्त असतो, तसाच हा श्रीकृष्ण-कमला या जनक-जननीचा पुत्र अर्जुन त्यांच्याहूनही सरस असणारच! परीसस्पर्शाने लोखंडाचे सोने झाले तर जगाला खरा उपयोग सोन्याचाच होतो व सोन्याच्या रूपाने परिसाचा मोठेपणाही आपोआपच प्रकट होतो. अग्नी जसा दीपाच्या रूपाने आपलाच प्रकाश पाडतो, त्याचप्रमाणे अर्जुनाचे मोठेपण म्हणजे वस्तुतः देवाचेच मोठेपण होय. आपल्या पुत्राने सर्व गुणात आपल्यावर मात करावी अशी पित्याची आकांक्षा असते. शारंगपाणी श्रीकृष्णाच्या बाबतीत ती पार्थरूपाने सफळ झाली."

भारताचे सार

सञ्जय पुढे धृतराष्ट्रास निर्वाणीचे म्हणून सांगतोः

किंबहुना ऐसा नृपा। पार्थु जाला असे कृष्णकृपा।
तो जियाकडे साक्षेपा। रीती पाहे।।१८-१६५३।।
तोचि गां विजयासी ठाओ। एथु कोण तुज संदेहो।
तेथ नये तऱ्हीं वावो। विजयोचि होये।।१६५४।।
म्हणौनि जेथ श्री तेथ श्रीमन्तु। आणि जेथ पाण्डुचा सुतु।
तेथ विजयो समस्तु। अभ्युदयो तेथ।।१६५५।।
जऱ्हीं व्यासाचेनि सांचे। मानीं मन तुमचें।
तऱ्हीं या बोलाचें। ध्रुवचि माना।।१६५६।।
जेथ तो श्रीवल्लभु। जेथ तो भक्तकदंबु।
तेथ सुख आणि लाभु। मङ्गलाचा।।१६५७।।
या बोलां आन होये। तऱ्हीं व्यासाचा अंकु न वाहे।
ऐसें गाजौनि बाहें। उभिली तेणें।।१६५८।।

"हे नृपा! असा हा पार्थ ज्या पांडवांच्या पक्षात आहे, त्यांनाच विजय निश्चित मिळणार. याबद्दल जर तुला भ्रम असेल व तुला तुझ्या पुत्रांच्या विजयाबाबत खात्री वाटत असेल, तर विजयाचे *विजय* हे नांवच व्यर्थ ठरेल! म्हणून जेथे श्री तिच्या पतीसह व पांडुपुत्र अर्जुन आहेत, तेथेच समस्त विजय व अभ्युदय आहेत. जर तुमचा श्रीव्यासांवर विश्वास असेल, तर हे माझे बोलणे अटळच समजा. जेथे तो श्रीवल्लभ त्या भक्तकदम्ब अर्जुनासह आहे, तेथे सुखलाभ व मङ्गल निश्चितच आहे. हे माझे शब्द असत्य ठरले, तर मी व्यासांचा शिष्य म्हणवून घेणार नाही," असे म्हणून सञ्जयाने आवेशाने आपला बाहू उभारला.

समारोप

ज्ञानेश म्हणतातः

एवं भारताचा एवांका। आणूनि श्लोकां एकां।
सञ्जयें कुरुनायकां। दिधला हातीं।।१८-१६५९।।

महाभारताचे सारसर्वस्व या एका श्लोकात आहे. श्रीगीतेच्या एकूण सातशें श्लोकरत्नांतील अठराव्या कलशाध्यायाअखेरचा हा श्लोक - सञ्जयाचा पूर्णोद्गार - संपूर्ण गीतेचा अभिप्राय *एकलाच* दाखवतो. जेथे भक्ती तेथे श्रीकृष्ण; जेथे श्रीकृष्ण तेथे लक्ष्मी; जेथे लक्ष्मी तेथे विजय; किंबहुना जेथे भक्तकदंब तेथे तो श्रीवल्लभु आपल्या सर्व ऐश्वर्यासह प्रकटच असणार! तेथे सुख, लाभ आणि मङ्गलाची काय कमतरता असणार!

श्रीकृष्णार्जुनांच्या हृद्य संवादास अवतरवणाऱ्या गीतेच्या या एकाच श्लोकाची एवढी महति आहे, तर त्या संपूर्ण गीतेचे माहात्म्य किती असेल! म्हणूनच आपले मनोगत व्यक्त करावे व कळिपीडित जीवांना उद्धरावे या हेतूने ज्ञानदेवांनी आपल्या विचारांच्या अभिव्यक्तीसाठी गीतेची निवड केली असावी.

अशा गीतेचे विविध पैलू ज्ञानेशांच्या मुखातून आपण अवगत करून घेण्यासारखे आहेत. त्यातील काही विशेष पैलू आपण पाहू या आता **उन्मेष क्र.-१-२-विषयप्रवेश-२** या भागातून.

::उन्मेष::१-२::
::विषयप्रवेश-२::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष १-२:

गीता:
२-१६,१७,२०,२१,२४,२५,३१-३८,४०,५१
३:३,१४,१५,१९,२०,३०,३१,३५,३६-
४०,४१,४२,
४-१,४-९,२४
११-४३,४४
ज्ञानेश्वरी:
१:१
३:२३२-२७१
४-४१-५९
११-५५९-५७८
१८-१४२६-१४६६,१७९३-१८०१

पूर्वरंग

::उन्मेष::१-२::
::विषयप्रवेश-२::

गीता अनुबन्ध::::

ज्ञानदेवीतील गीताध्यायसंगती

मागील भागात म्हटल्याप्रमाणे आपण आता ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून गीतेचे काही विशेष पैलू पाहू याः

अठराव्या अध्यायानिमित्त ज्ञानदेवांनी श्रीगीतेचे अध्याय व वेदविहित ***कर्मकांड - ज्ञानकांड - उपासनाकांड*** यांचा जो मेळ दाखवला आहे, तो गीताभ्यासकांनी जरूर ध्यानी घेण्यासारखा आहे. किंबहुना गीतेचा अभ्यास करण्यासाठी ज्ञानेशांचे बोट धरावे, ते या स्थलापासूनच! ते काय म्हणतात ते पाहू याः

एवं वेदाचे मूलसूत्र। सर्वाधिकारैकपवित्र।
श्रीकृष्णें गीताशास्त्र। प्रकट केलें।।१८-१४२६।।
एथ गीता मूल वेदां। ऐसें केवीं पां आलें बोधा।
हें म्हणा तऱ्हीं प्रसिद्धा। उपपत्ति सांगो।।१४२७।।
तऱ्हीं जेयाचें निश्वासीं। जन्म जालें शब्दराशी।
तो सत्यप्रज्ञु पैजेंसीं। बोलिला हें।।१४२८।।
म्हणौनि वेदां मूलभूत। गीता म्हणो हें होय उचित।..।।

"ज्याच्या निश्वासातून प्रत्यक्ष वेदराशी प्रकटल्या, त्या सत्यवचनी श्रीकृष्णाने गीताशास्त्र स्वमुखाने सांगितले आहे. म्हणून श्रीगीता ही वेदांना मूलभूत आहे. वेदांचे मूलसूत्रच असे श्रीमद्भगवद्गीताशास्त्र सर्व भूतमात्रांच्या हितासाठी श्रीकृष्णभगवंतांनी स्वतः प्रकट केले."

गीतामाहात्म्य स्पष्टच म्हणतेः

गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः।
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिसृता।।
भारतामृतसर्वस्वं विष्णोर्वक्त्राद्विनिःसृतम्
गीतागङ्गोदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते।।
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतम् महत्।।

"स्वतः श्रीपद्मनाभांच्या मुखकमलातून प्रकट झालेले गीताशास्त्र म्हणजे सर्व शास्त्रे जे त्यांच्या साररूप कर्तव्यकर्म करण्यास सांगतात, त्याचे सुमधुर सुस्वर गीत आहे. ते महाभारताचा उत्तमांश आहे. श्रीविष्णूंच्या मुखातून प्रकट झालेली ही गङ्गाच होय. हिच्या सेवनाने जीवास जन्ममरणरूपी दुश्चक्रातून मुक्ती मिळते. सर्व उपनिषदूपी गोमातांचे गोपालनन्दन श्रीकृष्णाने दोहन करून आपल्या पार्थरूपी वत्सास त्या उत्कृष्ट गीतामृतरूपी दुग्धसुधेचे पान करवले. तरीही ते जेवढेच्या तेवढे, जसेच्या तसे अवशिष्ट राहिले. असे ते गीताशास्त्र सर्व भूतमात्रांचे कल्याण करणारे आहे. म्हणून एकमात्र गीता सोडली तर अन्य शास्त्रांची मुमुक्षू-जिज्ञासू जिवांना काय आवश्यकता आहे!"

..। आणिकही एकीं एथ। उपपत्ति असे।।१८-१४२९।।
जैं न नशतु स्वरूपें। जेयांचा विस्तारु जेथ लपे।
तैं तेयाचे म्हणिपे। बीज जगीं।।१४३०।।
तऱ्हीं काण्डत्रयात्मकु। शब्दराशी अशेखु।
गीतेमाजीं असे रुखु। बीजीं जैसा।।१४३१।।
म्हणौनि वेदांचे बीज। श्रीगीता होय हें मज।
गमें आणि सहज। दिसतही असे।।१४३२।।
जैं वेदांचें तीनीं भाग। गीतें उमटलें असती चांग।
भूषणरत्नीं सर्वांग। शोभलें जैसें।।१४३३।।
तियेंचि कर्मादिकें तीनहीं। काण्डें कोण्हें कोण्हें स्थानीं।
गीतें असती तियें नयनीं। दाऊं आइका।।१४३४।।

"वेदांची जी तीन काण्डे आहेत ती - कर्म, उपासना व ज्ञान - याप्रमाणे प्रसिद्ध आहेत. वेदांची ही तिन्ही अंगे श्रीगीतेठायीं उत्तमरीत्या बिंबित झाली आहेत व वेदातील काण्डत्रय म्हणजे श्रीगीतेचे प्रतिबिंबच आहे. महान अशा वेदराशीरूप वृक्षाचे सूक्ष्म तत्त्व जे बीज तेच श्रीगीता होय." कसे ते पहाः

तऱ्हीं पहिला जो अध्यावो। तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो।
द्वितीयें सांख्यसद्भावो। प्रकाशिला।।१८-१४३५।।
मोक्षदानीं स्वतंत्र। ज्ञानप्रधान हें शास्त्र।
येतुलालें दुजीं सूत्र। उभारिलें।।१४३६।।
मग अज्ञानें बांधलेयां। मोक्षपदीं बैसावेयां।
साधना आरंभु तो तृतीयां। अध्यायीं बोलिला।।१४३७।।
जैं देहाभिमानबंधें। सांडूनि काम्य निषिद्धें।
विहित परि अप्रमादें। अनुष्ठावें।।१४३८।।
ऐसेनि कर्म करावें। हा तीजा अध्यायीं जो देवें।
निर्णय केला तो जाणावें। कर्मकाण्ड एथ।।१४३९।।

"प्रथम अध्यायात भगवंतांनी गीताशास्त्राचा प्रस्ताव केला आहे. ***बीजरूपाने त्या शास्त्राचे कथन द्वितीयोध्यायात केले आहे. मोक्ष देण्यास केवळ हे योगशास्त्र स्वयंपूर्ण आहे, हे सांगत त्यामागील तत्त्वज्ञान सूत्ररूपाने या अध्यायात मांडले आहे.*** ज्ञानानेच मोक्षाची सिद्धी होते. अज्ञानबद्ध जीवांस मोक्ष प्राप्त करून देणारे जे कर्मयोगाचे प्रसिद्ध साधन आहे, ते तृतीयाध्यायी निरूपिले आहे. देहाभिमानाने बद्ध झालेल्या जीवांनी देहाभिमान टाकून द्यावा व काम्य-निषिद्धादी कर्मे न करता केवळ शास्त्रविहित कर्मे सद्भावाने करावीत, असे भगवंतांनी निश्चयपूर्वकरीत्या या अध्यायी प्रतिपादिले आहे. हे त्यांचे सांगणे म्हणजे ***गीतेचा गाभारा*** आहे. हा तृतीयाध्याय म्हणजे गीतेतील ***कर्मकाण्ड*** सांगणारा भाग आहे."

आणि तैंचि नित्यादिक। आचरितां आवश्यक।
अज्ञानाचे मोचक। केवीं होये पां।।१८-१४४०।।
ऐसीं अपेक्षा जालेयां। बद्ध मुमुक्षुतैं आलेयां।
देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया। सांगितली।।१४४१।।
जैं देहवाचामानसें। विहित निफजे जैसें।
तैं एकचि ईश्वरोद्देशें। कीजै म्हणितलें।।१४४२।।
हेंचि ईश्वरीं कर्मयोगें। भजनकथनाचेनि खागें।
आदरिलें शेख भागें। चतुर्थाचेनि।।१४४३।।
तैं विश्वरूप अकरावा। अध्यायो संपे जंव आघवा।
तंव कर्मी ईशु भजावा। हें जैं बोलिलें।।१४४४।।
तैं अष्टाध्यायी उघड। जाणा एथ देवताकाण्ड।
शास्त्र सांगतसे आड। मोडूनि बोलें।।१४४५।।

"अज्ञ जनांना आवश्यक असणारी नित्य-नैमित्तिक कर्मे बंधविमोचक कशी होतील, ही जिज्ञासा उत्पन्न झालेले जीव जेव्हा मुमुक्षुदशेपर्यंत येऊन पोहोचतात, तेव्हा त्यांच्याकरता चतुर्थाध्यायापासून सुरुवात करून थेट अकरावा अध्याय संपेपर्यंत एकूण आठ अध्यायातून* देवताकाण्ड अथवा उपासनाकाण्ड *प्रसृत केले आहे. कर्मयोग आचरणें; काया, वाचा व मन यांजकडून घडलेली सर्व विहित कर्मे भगवंतास अर्पण करणे; ईश्वराचे भजन-पूजन इ.सर्व क्रियाकर्मांना ब्रह्मार्पण करत कर्म कसे करावे; इ.भाग चवथ्या अध्यायात व मुख्यत: त्याच्या अंतिम भागात प्रकट केला आहे. या चवथ्या अध्यायापासून ते तहत विश्वरूपास व्यक्त करणाऱ्या अकराव्या अध्यायापर्यंत स्वकर्मकुसुमांनी ईश्वराची भक्ती कशी करावी याचे सुलभ मार्गदर्शन गीतेच्या या देवताकाण्डात केले आहे."

आणि तेणेंचि ईशप्रसादें। श्रीगुरुसंप्रदायोपलब्धें।
साच ज्ञान उद्बोधें। कोवळें जैं।।१८-१४४६।।
तैं अद्वेष्टादिप्रभृतिकी। अथवा अमानित्वादिकीं।
वाढविजें म्हणौनि लेखीं। बारावा गणूं।।१४४७।।
तो बारावा अध्यावो आधीं। आणि पंधरावा अवधीं।
ज्ञानफलसिद्धी। निरूपणासीं।।१४४८।।
म्हणौनि चहूं इहीं। ऊर्ध्वमूलान्तीं अध्यायीं।
ज्ञानकाण्ड इयें ठायीं। निरूपिजे।।१४४९।।
एवं काण्डत्रयनिरूपिणी। श्रुति हे कोडिसवाणी।
गीता पदरत्नांची लेणीं। लेईलीं असे।।१४५०।।

"बाराव्या अध्यायापासून ते पंधराव्या *(पुरुषोत्तमयोग)* अध्यायापर्यंतच्या चार अध्यायात श्रीगीतेचे **ज्ञानकाण्ड** आहे. ईश्वराची कृपा होऊन श्रीगुरुसंप्रदाय प्राप्त होऊन श्रीगुरुकृपेने सत्यज्ञान प्राप्त होते. आरंभी ते कोवळे असते. अद्वेष्टादी भक्तलक्षणे व अमानित्वादी ज्ञानलक्षणे मिळून ते उदित झालेले कोवळे ज्ञान परिपक्व कसे करावे, हे सांगण्यासाठी *बारा ते पंधरा* हे अध्याय सांगितले आहेत.या चार अध्यायातून भगवंत परिपक्व आत्मज्ञानाचे निरूपण करतात. हेच ते गीतेचे ज्ञानकाण्ड! श्रीगीतारूपी भुवनात पदरत्नांची लेणी ल्यायलेली गोजिरवाणी अशी त्रिकाण्डात्मक वेदमूर्तीच साक्षात प्रकटलेली आहे आणि याच देहात असता मोक्षफळ प्राप्त करा असा संदेश ती अखिल विश्वास देत आहे."

हें असो काण्डत्रयात्मक। श्रुति मोक्षरूपफल येक।
बोबायें जैं आवश्यक। ठाकावें म्हणौनि।।१८-१४५१।।
तेयाचेनि साधनें ज्ञानासीं। वैर करी जो प्रतिदिवसीं।
तो अज्ञानवर्गु षोडशीं। प्रतिपादिजै ।।१४५२।।
तोचि शास्त्र बोलावा। घेऊनि वैरी जिणावा।
हा निर्णयो तो सत्रावा। अध्यायो एथें।।१४५३।।
ऐसा प्रथमालागौनि। सतरावा लाणी करूनि।
आत्मनिश्वास विवरौनि। दाविला देवें।।१४५४।।
तेयां अर्थजातां अशेखां। केला तात्पर्याचा एवांका।
तो अठरावा देखा। कलशाध्यावो।।१४५५।।
एवं सकलसाङ्ख्यसिंधु। श्रीमद्भगवद्गीताप्रबंधु।
हा औदार्यें आगला वेदु। मूर्त जाण।।१४५६।।

"ज्ञानयोगाच्या साधनेशी नित्य वैर करणारा अज्ञानवर्ग *सोळाव्या* अध्यायाच्या निमित्ताने प्रकट करून, शास्त्रसहाय्याने अज्ञानाचा पराजय करा असा संदेश *सतराव्या* अध्यायी भगवंत सर्व प्राणिमात्रांसाठी देतात. श्रीविष्णूंच्या निश्वसनरूप असे जे वेदस्वरूप आहे, ते अशा प्रकारे श्रीगीतेच्या सतरा अध्यायात निरूपिले असून त्या सगळ्याचे तात्पर्य सर्वार्थाने *अठराव्या* अध्यायात वर्णिले आहे. म्हणूनच तो अध्याय श्रीगीतामन्दिरावर कलशाप्रमाणे शोभून दिसतो. हे ***असे सकल तत्त्वज्ञानरूपी महोदधी असलेले श्रीगीताशास्त्र म्हणजे आगळा वेगळा असा मूर्तिमंत वेदच होय!"***

गीतेची सुसेव्यता::::

वेद आणि गीता

परंतु वेदांची कृपणता गीतेजवळ नाही. वेदांचा अधिकार फक्त त्रैवर्णिकांनाच आहे, तर गीता मोक्षमार्गाचे प्रकाशन स्त्री, शूद्र, चाण्डाल, पापयोनी इ.सर्वांसाठी करते. किंबहुना आपल्यावरील वर्णविषयक पक्षपाताच्या आरोपाचे निरसन व्हावे म्हणून वेदाने श्रीगीतेचा आश्रय केला आहे, असे सूचित करत ज्ञानदेव म्हणतात:

वेदु संपन्न होये ठायीं। परि कृपणु आन नाहीं।
जैं कानीं लागला तिहीं। वर्णांचाचि।।१८-१४५७।।
एरां भवव्यथा ठेलेयां। स्त्रीशूद्रादिकां प्राणियां।
अनवसरु मांडूनियां। राहिला असे।।१४५८।।
तऱ्हीं मज पातां तैं उणें। फेडावेयां गीतापणें।
वेदु वेठला भलतेणें। सेव्यु होआवेयां।।१४५९।।

"एवढेच नव्हे तर श्रीगीतारूपाने सर्वत्रांसाठी प्रकट झालेला वेदनारायण अत्यंत साधनासुलभ झाला. वेदविहित आचरणाचे

कर्तव्यकठोर पालन अपेक्षित आहे. त्यानुसार वागल्यासच वेदविहित उपासनेचे कर्मफल प्राप्त होते; अन्यथा नाही. परंतु गीतामाउली इतकी उदार आहे की मोक्षसाधकास अनंत सोप्या सोप्या मार्गांनी ती साध्याप्रत नेऊन सोडते;" जसे:

ना हें अर्थे रिगौनि मनीं। श्रवणे लागौनि कानीं.
जपमिखें वदनीं। वसौनियां।।१८-१४६०।।
गीतेचा पाठु जाणें। तेयाचेनि सांगातीपणें।
गीता लिहुनु वाहाणें। पुस्तकमिखें।।१४६१।।
ऐसेसा मिसकटां। संसाराचां चौहटां।
गवांदि घाली चोखटां। मोक्षसुखाची।।१४६२।।
परि आकाशीं वसावेयां। पृथिवीवरी बैसावेयां।
रविदीप्ती राहाटावेयां। आवारु नभ।।१४६३।।
तैंवीं उत्तम अधम ऐसें। सेवितां कव्हणांतेंहीं न पुसे।
कैवल्यदानें सरिसें। निववी जगु।।१४६४।।
यालागीं मागील कूटी। बिहाला वेद गीतेच्या पोटीं।
रिगाला आतां गोमटी। कीर्त्ति पातला।।१४६५।।
म्हणौनि वेदांची सुसेव्यता। तैं हें मूर्त्ति जाणा गीता।
श्रीकृष्णें पाण्डुसुता। उपदेशिली।।१४६६।।

"वेदांतील मोक्षमार्ग अतिगहन व लौकिक बुद्धीस अगम्य असा आहे. परंतु गीतेने फार सोपी वाट दाखवली आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर वरील ओव्यांतून सूचित केल्यानुसार गीतार्थाचे मनन करणे; गीता श्रवण करणे; गीतापठण करणे; गीतापाठकाच्या सान्निध्यात, त्याच्या संगतीत राहणे; गीतापाठ लिहून काढणे; गीताग्रंथ जवळ बाळगणे; इ.अनेक मिषांनी संसारी जीवांकरता श्रीगीता अस्सल मोक्षसुखाचे अन्नसत्र चालवित आहे."

"गीतामाउलीजवळ उत्तम - अधम असा अधिकारीभेद नाही. त्रैवर्णिकांसच फक्त मोक्षान्न वाढावयाचे व पतित, स्त्री-शूद्रादी इतरांस त्यापासून वंचित ठेवायचे असा भेदभाव तिच्याजवळ बिलकुल नाही. आकाश ज्याप्रमाणे अंतरिक्षात संचरणाऱ्यास, भूमीवर बसणाऱ्यास किंवा अवकाशात मुक्तपणे विखुरणाऱ्या रविप्रकाशास सारखाच आधार देते, त्याचप्रमाणे श्रीगीता सर्वत्रांस आपल्या अमृतमय पयधारांनी तृप्त करत कैवल्य सुखाचे दान देते."

"श्रीगीतेच्या रूपाने सुसेव्य असे वेदच श्रीकृष्णपरमात्म्याने अर्जुनास उपदेशिले. श्रीकृष्णाच्या स्वमुखातून प्रकट झालेले गीतारूपी वेद सुसेव्य होऊन ***"बहुजनहिताय। बहुजनसुखाय।"*** या भावाने संक्रमित होऊन भेदभावनाविरहित असे सर्वत्रांस उपलब्ध झाले; किंबहुना ***वेद भेदप्रमाण वर्तणारे आहेत*** या दोषारोपाने घाबरून गेलेले वेद गीतामाउलीच्या पोटी लपून बसले आहेत. तिच्याद्वारे प्रसृत होऊन वेदांनी अलभ्य कीर्ती मिळवली आहे. अशा प्रकारे खरे तर वेदांचा गीतामाउलीच्या पोटी तिच्या श्लोकरत्नरूपाने पुनर्जन्मच झाला आहे!"

प्रस्थानत्रयी

अशा या निरूपम श्रीगीतादेवीची स्तुती व वर्णन करावे तितके थोडेच आहे. ज्याप्रमाणे गीता गाणाऱ्या भगवान श्रीकृष्णाचे अपार गुणनिधान वाचातीत असून शब्दांनी त्या भगवंताचे परिपूर्ण वर्णन जसे होऊं शकत नाही, त्याप्रमाणे अलौकिक असे हे गीताशास्त्र त्या कमलनाभाचे चिद्रत्नच असल्याने त्या शास्त्राचे परिपूर्ण वर्णन करणे मानवासाठी अशक्यप्राय आहे. जर कोण्या धन्य भाग्यवंत पुरुषास भगवत्कृपेने हे अप्रमेय शास्त्र प्राप्त झाले, तर त्याची गणना भगवंतांचा अत्यंत निकटवर्ती म्हणूनच केली पाहिजे.

आजपावेतो श्रीगीतेवर कित्येक पंडितांनी, कित्येक मान्यवर विद्वानांनी, कित्येक सत्पुरुषांनी व कित्येक साधुपुरुषांनी आपापले विचारधन प्रकट केले आहे. त्या सगळ्यांमध्ये हे विचारधन पूर्णपणे व्यक्त करणारा एकमेव प्रासादिक ग्रंथ म्हणजे श्रीज्ञानेश्वरी! श्रीगीतेचा म्हटला तर उभयपूरक पण तसा स्वतंत्र शैलीचा असा दुसरा ग्रंथ आहे श्रीमद्भागवत!

श्रीगीता, श्रीमद्भागवत व श्रीज्ञानेश्वरी या तीन लोकोत्तर ग्रंथांना श्रीगोपालकृष्णऋषींची प्रस्थानत्रयी समजण्यासही प्रत्यवाय नसावा. श्रीगीता हा वेद; श्रीमद्भागवत हे ब्रह्मसूत्र तर श्रीज्ञानेश्वरी ही दशोपनिषद्रूपी रत्नावली असेही स्थूलमानाने विवेचन करता येईल. सूक्ष्म तत्त्वदृष्ट्या पाहिले तर मात्र या प्रत्येक ग्रंथाची स्वयमेवपूर्णताच प्रकट होईल. कारण वेद, ब्रह्मसूत्रे व उपनिषद्रत्ने यातील प्रत्येकाची परिपूर्णता श्रीगीता, श्रीमद्भागवत व श्रीज्ञानेश्वरी या प्रत्येक अध्यात्मग्रंथात भरून राहिली आहे.

गुरुपरंपरेचे ग्रंथधन

अप्रमेय अशा या तीन ग्रंथांचे आणिकही एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे एकेका अलौकिक अशा गुरुशिष्यद्वयीशी हे तिन्ही ग्रंथ जोडलेले आहेत. श्रीगीता ही श्रीकृष्णार्जुनांशी; तर श्रीमद्‌भागवत हे श्रीव्यास-शुकमुनींशी व श्रीज्ञानेश्वरी ही श्रीनिवृत्तिनाथ-ज्ञानदेवांशी असाधारण अशा भावबंधाने जोडलेले आहेत. त्यामुळे या असामान्य अशा ग्रंथांचे परिशीलन करणाऱ्या सद्बुद्ध जीवांवर या गुरुशिष्यप्रभावळीचा गुरुसांप्रदायिक प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही. अशा प्रकारे हे ग्रंथ वाचकांस अनायासेच ती ती गुरुपरंपरा प्राप्त करून देतात, असे म्हटले तरी चालेल.

वेद, ब्रह्मसूत्रे व दशोपनिषदे या प्रस्थानत्रयीपेक्षा अजूनही एक आगळेवेगळे वैशिष्ट्य गीता, श्रीमद्भागवत व ज्ञानेश्वरी या उपरोक्त प्रस्थानत्रयीत दिसून येते. ते म्हणजे श्रीकृष्णांचे अनेक महान भक्तवर्य या तिन्ही ग्रंथरत्नांशी पूर्णतया संबंधित झाले आहेत. ते श्रीव्यास, शुकदेव, परिक्षित, उद्धव, अर्जुन, संजय, निवृत्तिनाथ व ज्ञानदेव हे होत! हे सर्व भक्तोत्तम व तो देवकीनन्दन एकमेकात परमभक्तीच्या अतूट बंधनाने अभेदभावाने मिसळलेले आहेत. **भक्तीरसामृताची परिसीमा हाच *अभेदभाव* वा *अद्वयभाव* वा *अद्वैतभाव* होय.**

अद्वैतभक्तीची चिद्गङ्गा प्रकट होते ती या भक्तोत्तमांच्या हृदयांतून प्रकटलेल्या त्यांच्या भावमधुर अनाहत शब्दकुसुमांच्या अञ्जलीरूप गंगोत्रीतून!

आणि त्यांचा सदैव पाठीराखा असणाऱ्या त्या परमेशाच्या चैतन्यरसाने प्रशांत वाहणारी भक्तिरसाची ही चिद्गङ्गा या अद्वितीय ग्रंथांच्या रूपाने आपल्या अंतरंगात प्रवेशते ती दु:ख-ताप-दौर्मनस्य यांचा नाश करतच! त्या भक्तोत्तमांना एवढे यश प्रदान करणाऱ्या; त्यांचा मान वाढविणाऱ्या; त्यांची सुकीर्ती अक्षय्य करणाऱ्या; सदैव भक्तांची चिंता वाहाणाऱ्या; भक्तांना सदैव क्षेम देणाऱ्या; त्यांच्या भक्तिरससुधेचे आकंठ पान करणाऱ्या; सर्वत्रांना आनंद देणाऱ्या; जगताची उत्पत्ति-स्थिति-लय यांचे एकमेव कारण असणाऱ्या; सकलगुणनिधान, प्रेममय, मातृ-पितृ-बंधु-सखा-सुहृद-भगिनी-इष्टसंबंधित आप्तकाम, भागवतोत्तम, उदारधी, श्रीमान अशा त्या श्रीकृष्णपरमात्म्यास काया-वाचा-मनाने सर्वैकभावशरण होऊन आपणां साधकांचे कोटिकोटी साष्टाङ्ग प्रणिपात!!!

गीतोपदेष्टा श्रीहरी::::

श्रीहरीचे महिमान

गीतेसारख्या महान ग्रंथाच्या रूपाने प्रत्यक्ष वेदच आपल्या हाती देणाऱ्या गीतागायक अशा त्या श्रीहरीचे वैभव अगणित आहे; त्याचे प्रेम दिव्य व अलौकिक आहे; त्याची कृपा अवर्णनीय आहे; तो श्रीकृष्ण भक्तांचा सर्व काही आहे व भक्त त्याचे सर्व काही आहेत. त्या दयाघन प्रभूला पुनश्च वारंवार मनोभावे वन्दन करू या!!! कारण तोच आपले सर्व काही आहे:

त्वमेव माता च पिता त्वमेव। त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देवदेव।।

विद्यारूप, द्रव्यरूप, भ्रातृरूप, माता-पिता-सखा सर्व काही जो आपला आहे, त्याला नमन करणाऱ्या भक्तवर्य अर्जुनाची नेमकी हीच मनोभावना श्रीगीतेत विश्वरूपदर्शनाच्या प्रसंगी व्यक्त केली आहे. अर्जुन स्पष्टच म्हणतो की:

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं-
प्रसादये त्वामहमीशमीड्यम्।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम्।।११-४४।।

परमात्मा कोण आहे; कसा आहे; त्याचा आपला काय संबंध आहे; आपला त्याचा कोणता ऋणानुबंध आहे; तो आपल्यासाठी काय काय करतो; या जगात आपले ध्येय काय आहे; भगवंत किती क्षमाशील आहे; या गोष्टींची कल्पना काहीच नसल्याने मनुष्यमात्रांच्या हातून कळतनकळत अनेक प्रमाद होतात. परमेश्वराचा महिमा अगाध आहे. त्याची लीला अतर्क्य आहे. हे सर्व न उमजल्याने एका प्रकारे मनुष्य भगवत्शक्तीचा अपराधच करतो.

म्हणून आपणांसारख्या जिज्ञासू साधकांनी अर्जुनाप्रमाणे त्या परमपूज्य परमेश्वरास साष्टांग प्रणिपात करून त्याच्या प्रसन्नतेसाठी त्याची कृपायाचना केली पाहिजे. पिता जसा पुत्राच्या कल्याणासाठी, मित्र जसा मित्राच्या हितासाठी, सुहृद जसा आवडत्या व्यक्तीच्या प्रेमापोटी त्यांचे सर्व अपराध सहन करतो, त्यांना क्षमा करतो, त्याप्रमाणे आपणांस सर्वथैव शरण आलेल्या प्रिय भक्तांस तो भक्तकामकल्पद्रुम फळतो व कृपाप्रसाद देतो. गीता-ज्ञानेश्वरी म्हणजे भक्त-भगवंत, भगवंतांची कृपा, प्रभूचे स्वरूप या सर्वांचे प्रकटीकरण आहे. भगवंतांचा असा हा महिमा हे गीतेच्या वैशिष्ट्यातील प्रमुख आहे. अर्जुनही त्यांचा हा महिमा आळवतांना म्हणतो की:

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव।।११-४३।।

भगवंत या चराचर विश्वाचा पिता आहे. तो सर्वांचा पूज्य गुरुवर्य आहे. म्हणूनच त्याची ***"कृष्णं वन्दे जगद्गुरुम्।"*** अशी ख्याती आहे. संपूर्ण त्रैलोक्यात त्याच्यासारखा अतुल प्रभावशाली कोणीच नाही; मग त्याच्याहून मोठा महिमा कोणाचा असणार! हा भाव व्यक्त करत ज्ञानेश्वर म्हणतात की:

आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा। आधारु जाली आहे भूतग्रामा।
म्हणौनि जी पुरुषोत्तमा। विनवूं तैं थोडें।।११-५५९।।
तऱ्हीं आतां अप्रमेया। शरणागता आपुलियां।।
क्षमा कीजो ययां। अपराधांसीं।।५६०।।
जी जाणितलें मियां साचे। महिमान आतां देवाचें।
देवो होय चराचराचे। जन्मस्थान।।५६१।।
हरिहरादि समस्तां। देवा तूं परदेवता।
वेदांतैंहीं पढविता। आदिगुरु तूं।।५६२।।
गंभीर तूं श्रीरामा। नाना भूतैकधामा।..।।५६३।।

अर्जुन म्हणतो,"भगवंता! तुझ्यामुळे क्षमेस म्हणजे पृथ्वीस क्षमत्व प्राप्त झाले आहे. त्या तुझ्या क्षमेच्या आधाराने भूतमात्रे जगतात. हे पुरुषोत्तमा! तुला विनवावे ते थोडेच आहे. अद्वितीय अशा तुझे महिमान न जाणून आम्ही तुझा मोठाच अपराध केला आहे. तरी तुला शरण आलेल्या आम्हास तूं उदार मनाने क्षमा कर. आता मला नीट उमजले आहे की या संपूर्ण चराचर विश्वाचे जन्मस्थान तूच आहेस. हरिहरादी देवांचाही देव तूच आहेस. वेदांना शिक्षापिणारा आदिगुरू तूच आहेस. अनेकानेक भूतमात्रांमध्ये वसणारे चिरंतन तत्त्व तूच आहेस."

..। सकलगुणीं अप्रतिमा। अद्वितीया।।११-५६३।।
तुजसीं नाहीं सरिसें। हें प्रतिपादन काइसें।
तुवां जालेनि आकाशें। सामावलें जग।।५६४।।

तेयां तुजेनि पाडें दुजें। ऐसें बोलितांचि जी लाजिजे।
तेथ अधिकाची कीजे। गोठी केवीं।।५६५।।
म्हणौनि त्रिभुवनीं तूं एकु। तुजसारिखा न अधिकु।
तुझा महिमा अलौकिकु। नेणिजे वानूं।।५६६।।
आइसें अर्जुनें म्हणितलें। मग पुढुती दंडवत घातले।
तेथ सात्त्विकाचे आलें। भरतें तेयां।।५६७।।

"सकळगुणात अद्वितीय असणारा तुझ्यासारखा या विश्वात कोणीही नाही. तुला उपमा कशाची द्यावी! कारण तुझ्यासारखा तूच आहेस. तू निर्मिलेल्या आकाशाने हे सगळे जगत व्यापले आहे. अशा तुझ्यासारखे इतर कोणी असेल अशी कल्पनासुद्धा हास्यास्पद आहे. मग तुझ्यापेक्षा कोणी सरस आहे, हे म्हणणे म्हणजे तुझा महिमा अजिबात न ओळखण्यासारखे ठरेल तर नवल नाही. म्हणून या त्रिभुवनी तुझ्यासारखा तूच आहेस. तुझ्याहून ***वाड*** असा कोणीच नाही. तुझा असा अलौकिक महिमा कसा वर्णावा तेच मला कळेनासे झाले आहे." असे म्हणून सात्त्विक भावाने उचंबळून आलेल्या अर्जुनाने भगवंतापुढे साष्टांग नमस्कार घातला.

अर्जुनाची अनन्यशरणता

ईश्वरास न ओळखणाऱ्या आपणां समस्त जनांच्या वतीनेच जणूं त्याची करुणा भाकणाऱ्या अर्जुनाचे वर्णन करत ज्ञानेश पुढे म्हणतातः

म्हणतां प्रसीद प्रसीद। वाचा होतसे सद्गद।
काढी जी अपराध-। समुद्रौनियां।।११-५६८।।
तुज विश्वसुहृदातैं कंहीं। सोयरेपणें न मनूंचि पाहीं।
तुज ईश्वरेश्वराचियां ठाईं। ऐश्वर्य केलें।।५६९।।
तूं वर्णनीय परि अति लोभें। मातें वानितां सभे।
तैं मियां साहिजे क्षोभें। निवांताचि।।५७०।।
आतां ऐसैसियां अपराधा। मर्यादा नाहीं मुकुन्दा।
म्हणौनि रक्ष प्रमादा। पासौनियां।।५७१।।
जी हेंचि विनवावेयालागीं। कैंची योग्यता माझियां आंगीं।
परि अपत्य जैसीं सलगीं। बापेंसीं बोले।।५७२।।
पुत्राचें अपराध। जऱ्हीं जाहलें अगाध।
तऱ्हीं पिता साहे निर्द्वंद्व। तैसें साहिजो जी।।५७३।।
सख्याचें उद्धत। सखा साहे निवान्त।
तैसें तुवां समस्त। साहिजो जी।।५७४।।

सात्त्विक भावाने उचंबळून गेलेला अर्जुन म्हणू लागतो, "हे *अनंता! तूं प्रसन्न हो!* असे म्हणत असता माझी वाचा सद्गदित झाली आहे. मला तुझी विस्मृती झाली होती हा केवढा घोर अपराध घडला आहे. अशा अपराधरूपी अथांग सागरात बुडणाऱ्या मज दीनास तूं तार! तूं विश्वसुहृद सगळ्यांचा सखा आहेस. पण तुला इतर नातेवाईकांप्रमाणे समजून मी वेळोवेळी तुझा नीट मान ठेवला नाही. तुला सामान्यांसारखे लेखले. ईश्वराचाही खरा तूं ईश्वर! पण तुला माझे सारथ्य करायला लावले. स्तुती करण्यायोग्य खरे तर तुझ्यावाचून इतर कोणीच नाही. अशा तू जेव्हा माझी भरसभेत स्तुती करत असस, तेव्हां उगीचच मी गर्वाने फुगून जात असे."

"हे मुकुंदा!माझ्या या अशा अनंत अपराधांची गणतीच करता येत नाही. म्हणून मी तुला कळकळीने विनवतो की या सर्व प्रमादांपासून मला वांचव! तुला अशी विनवणी करण्यासही मी अपात्र आहे. पण अपत्य जसे मायबापांना सलगीने बोलते, तसे मी तुला विनवतो आहे. पुत्राकडून कितीही मोठे अपराध घडले , तरी पिता ते जसे शांतपणे सहन करतो, तसे हे दयाघना! तूं पण माझे असीम अपराध पोटात घाल. मित्राने उद्धटपणा केला तरी मित्र जसे ते खपवून घेतो, त्याप्रमाणे हे विश्वामित्रा श्रीहरी! तूं पण माझे औद्धत्य सांभाळून घे."

प्रियाचियां ठाईं सन्मान। प्रियु न पाहे सर्वथा जाण।
तेवीं उच्छिष्ट काढिलें आपण। तैं क्षमा कीजो।।११-५७५।।
ना तऱ्हीं प्राणाचें सोयरें भेटें। मग जीवें जियें भूतलीं संकटें।
तियें निवेदितां न वाटे। संकोचु काईं।।५७६।।
कां उखितें आंगें जीवें। आपणपें दिधलें जियां आघवें।
तियां कांतु मिनलियां न राहवे। हृदय जेवीं।।५७७।।
तियापरी जी मियां। तुमतें विनविलें गोसांवियां।
(परि आणिकही एक म्हणावेयां। कारण असे।।५७८।।)

"प्रिय व्यक्ती आपल्या प्रेमळाकडून मानसन्मानाची अपेक्षा करत नाही. त्याचप्रमाणे , आमच्या राजसूययज्ञात तूं सगळ्यांची उच्छिष्ट पात्रे उचलली होतीस; त्या आमच्याकडून अजाणता घडलेल्या प्रमादासाठी क्षमा कर. आपल्या जीवाभावाचा सोयरा भेटल्यावर जशी भोगलेली सुखदु:खे संकोच न करता त्याला सांगितली जातात; किंवा ज्या प्रियकरास आपले सर्वस्व वाहिलेले असते, तो भेटल्यावर प्रियतमेला जसे मनातील काहीच राखून ठेवता येत नाही; त्याचप्रमाणे हे स्वामी! मला पण तुम्हाला हे सर्व न लपवता सांगायची इच्छा झाली आहे. मी तुम्हाला सर्वथैव शरण आलो आहे. तुमच्यावाचून मला अन्य कोण आहे! तरी माझी ही विनंती लक्षात घेऊन माझ्या कृतापराधांची दयाळूपणे मला क्षमा करा!"

श्रीहरीचे विभूतिमत्त्वः:::

प्रभुस्वरूप व विभूती

भगवंताला शरण जावे तर अर्जुनासारखे! अनन्यभक्ती करावी तर त्याच्याचसारखी! पण अर्जुनाचे भाग्य थोर की त्याला तो अनन्त साक्षात श्रीकृष्णाच्या स्वरूपात प्राप्त झाला. आपणांसारख्या साधकांना मात्र तेवढे भाग्य प्राप्त होण्यासाठी योगाच्या मार्गाने जावे लागते.

साक्षात श्रीहरीची साजिरी मूर्ती आपणांसमवेत अर्जुनाप्रमाणे नसते. म्हणून सर्वप्रथम त्या अनादी - अनन्त - अपार - अपरिमेय - विश्वरूपाची ओळख त्याच्या विभूतींद्वारे करून घेतली पाहिजे. भगवंताची अनन्यभक्ती करण्यास, त्याला अर्जुनाप्रमाणे अनन्यशरण होण्यास साहाय्यक म्हणून त्याचे रूप-गुण-यशोवर्णन, त्याच्या विभूति

व त्याचे माहात्म्य अत्यंत उपयुक्त ठरते. संपूर्ण भगवद्गीतेत भगवंताच्या रूप-गुण -यश-ऐश्वर्य-विभूति यांची गाथाच संग्रहित केलेली आहे. आणि प्रतिश्रीगीताच अशी जी ***श्रीज्ञानदेवी,*** तिच्या तर प्रथमारंभीच्या ओवीतून प्रभूच्या रूप-यश-विभूतितत्त्व यांसच आळविले आहे. भगवत्स्वरूपाचा हा परिचय करून घेणे जिज्ञासूंसाठी फार उपकारक ठरेल. तिकडे वळूं याः

ज्ञानदेवीची पहिली ओवीच सांगते कीः

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। विश्वरूपा।।१-१।।

"ॐकारस्वरूपा, आद्य अशा त्या स्वसंवेद्य, विश्वरूप आणि वेदाचे प्रतिपाद्य तत्त्व असणाऱ्या महनीय भगवत्स्वरूपाचा जयजयकार असो! त्याला आम्ही नमन करतो." अशा या तत्त्वाचा आविष्कार करत त्या भगवंताचे रूप-यश-गुण-स्वरूप-विभूतिमत्त्व महत्तेने प्रकट करत गीता काय सांगते, ते पाहूं याः

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः।।२-१६।।
अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति।।२-१७।।
....अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो-
न हन्यते हन्यमाने शरीरे।।२-२०।।

"परमात्मतत्त्वाठायी असत् वस्तूचे अस्तित्व नसते व सत् वस्तूचे नित्यत्व असते; परमात्मा म्हणजे ज्याने सर्व विश्व व्यापून सोडले आहे असे ***अविनाशी तत्त्व*** होय. प्रभू ***अजन्मा, अमृत्यु, नित्य शाश्वत, पुरातन, देहाहून निराळा, नाशरहित, अव्यय*** असा आहे. तो शरीराचा घात करत नाही आणि त्याचा शरीराबरोबर नाशही होत नाही."

वेदाविनाशिनं नित्यं य एनजमव्ययम्।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम्।।२-२१।।
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।।२-२४।।
अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते।
(तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि।।२-२५।।)
कर्मजं बुद्धीयुक्त्त्वा हि फलं त्यक्त्वा मनीषिणः।
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम्।।२-५१।।

"ज्याला तोडता येत नाही; जाळता येत नाही; भिजवता येत नाही;सुकवता येत नाही; जो नित्य सर्वत्र भरलेला आहे; जो अचल व स्थिर राहणारा आहे; असा आत्मा हाच भगवंत आहे. तो इंद्रियांना अगोचर आहे; म्हणून त्याला *अव्यक्त* असेही म्हणतात. तो मनाने जाणून घेता येत नसल्याने त्यास *अचिंत्य* असे म्हणतात. कधीही न बदलणारा म्हणजे ***अविकारी*** असा हा आत्मा आहे. हा सर्वेश्वर ***जन्मबंधविनिर्मुक्त*** म्हणजे जन्मबंधातून सुटलेला असा आहे. त्याचा निर्देश ***अनामय पद*** म्हणजे अमृतमय परमपद म्हणून सार्थ आहे. हेच भगवंतांचे ***परमधाम*** आहे. हेच मनुष्यमात्राचे, किंबहुना सर्व जीवभूतांचे, प्राप्तव्य आहे."

भगवत्स्वरूपाच्या अनेकानेक विभूती गीतेत ठिकठिकाणी प्रकटतात. ***विभूतियोग*** म्हणून ख्यातनाम असणाऱ्या *दहाव्या* अध्यायात तर प्रमुखतः त्यांचेच वर्णन आहे. त्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी ज्या भगवत्तत्त्वनिर्वाचक विभूति विखुरलेल्या आहेत, त्या ओळखण्यास थोडी अधिक साक्षेपी दृष्टी मात्र हवी. ***यज्ञ*** म्हणून विख्यात अशी जी संकल्पना आहे, तिचे उदात्त स्वरूप व विभूतिमत्त्व गीतेने जसे प्रकट केले आहे, तसे इतरत्र क्वचितच आढळेल. ***यज्ञ*** संकल्पनेचा गीतोक्त गोषवाराही ज्या निमित्ताने आपणास पहाण्यास सापडतो, ते गीताश्लोक पहाः

अन्नाद्भवति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः।।३-१४।।
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम्।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।।३-१५।।
तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः।।३-१९।।
कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः।
लोकसङ्ग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि।।३-२०।।

"भूतमात्रांच्या वाढीला पोषक असे जे ***अन्न*** असते, ते साक्षात ब्रह्म होय. ***"अन्नं ब्रह्म"*** असे श्रुतिवचनसुद्धा आहे. अन्नास कारणीभूत असणारा ***पर्जन्य*** हे पण म्हणूनच परब्रह्माचे रूप मानावे लागते. आणि मुळात ज्या यज्ञापासून हा पर्जन्य उद्भवतो, तो ***यज्ञ तर परब्रह्माचे अतिउदात्त रूप आहे!*** श्रीहरी हाच खरा ***यज्ञपुरुष*** म्हणून प्रसिद्ध आहे."

"यज्ञकर्म हे ब्रह्मापासून निर्माण झाले आहे. यज्ञकर्म व त्याची ज्या परात्पर वेदांपासून उत्पत्ति झाली आहे, ते ***वेद*** ही सर्व त्या श्रीमुकुंदाची अत्यंत आदरणीय रूपे आहेत. वेदसुद्धा ***अक्षर*** अशा परमात्म्यापासून प्रकटले आहेत. म्हणूनच प्रभू सर्वदा यज्ञमय आहे. ***यज्ञ व ब्रह्म यांचा भगवंताशी अभेद आहे.*** म्हणूनच आसक्तिरहित अंतःकरणाने जे साधक कर्माचा अवलंब करतात, त्यांना परमपदाची प्राप्ती होते. अशाच मार्गाने जनकादी राजर्षी परमपद प्राप्त करून धन्य झाले. जनकासारखे ऋषिवर्य हे तर भगवंताचे सगुण साकार रूपच होत!"

अशा त्या महान ऋषिवरांचे आजीवन चालणारे एकमेव कार्य म्हणजे ***लोकसंग्रह.*** यासही भगवंतांची दिव्य विभूती असे समजण्यास प्रत्यवाय नसावा. ***"त्रिन्लोकान्पालयाम्यहम्।"*** असे भगवंतच म्हणतात. भगवंतांनी पोषण केलेल्या त्या त्रैलोक्याच्या उद्धाराचे जे महत्कार्य संत-ऋषी-मुनिवरादी करतात, ते लोकसंग्रह म्हणून प्रसिद्ध आहे. ते कार्य भगवत्स्वरूप आहे. म्हणून कित्येक आत्मवान पुरुष

प्रभु-जगन्नियंत्याची सेवा म्हणून या लोकसंग्रहाचे कार्य अत्यंत चिकित्सकरीत्या व सूक्ष्मबुद्धीचा आश्रय करून चालवितांना दिसतात. ***लोकसंग्रह हा खरा तर एक प्रमुख प्रकारचा यज्ञच आहे.***

स्वधर्मरूपी कर्म हा तर गीतेचा प्राण आहे आणि त्याचे खरे विभूतिमत्त्व प्रकट करत आत्मोद्धाराचा मार्ग उपदेशीत गीता म्हणते:

मयि सर्वाणि कर्माणि सन्न्यस्याध्यात्मचेतसा।
निराशीर्निर्ममोभूत्वा युध्यस्व विगतज्वरः।।३-३०।।
ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः।।३-३१।।
श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।३-३५।।
तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्।।३-४१।।
इंन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः।।३-४२।।

सर्व कर्म जे की वास्तविक ब्रह्मस्वरूपच आहे, ते ब्रह्मीभूत चित्ताने निष्काम म्हणजे फलाशारहित व ममत्वरहित होऊन भगवंताच्याठायी समर्पित करणे, हाही एक प्रकारचा यज्ञच आहे. या अंतर्यागानिमित्त प्रायोजित होणारे सर्व काही भगवंताच्या विभूतिस्वरूपच आहे. म्हणून ***कर्म, ब्रह्मीभूत चित्त, निष्काम भावना, निर्ममत्व*** या सर्व त्या दामोदराच्याच विभूती होत.

मानवी जीवास यातना देणारे ताप तीन प्रकारांचे असतात. **आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक** असे जे त्रिताप आहेत -ज्वर आहेत, त्यांच्या विरहित होऊन अर्जुनास ***युद्धकर्म*** करण्याचा भगवंत आदेश देतात. त्रितापविरहित अवस्था अशीतशी प्राप्त होत नसते. ती केवळ भगवदनुग्रहानेच संभवते. ***निष्काम कर्म*** करण्यासाठीआवश्यक अशी ही अवस्था म्हणूनच भगवंताच्या विभूतीसमान समजायला हवी.

अर्जुनासाठी त्यावेळी प्राप्त झालेले ***युद्धकर्म*** हे धर्म्य कर्तव्यच होते. म्हणून अर्जुनासाठी ते भगवत्स्वरूप कर्म होते. ***असे जे जे कर्म भगवत्प्रीत्यर्थ केले जाते, ते सर्व यज्ञ या संकल्पनेत बसते.***

यज्ञीय विभूती

अशा केवळ यज्ञिय कर्मांबाबत व त्यांच्या भगवत्स्वरूपाबाबत श्रीविष्णुसहस्त्रनामांत येणारे काही श्लोक विशेष उल्लेखनीय आहेत:

.। यज्ञो यज्ञपतिर्यज्वा यज्ञाङ्गो यज्ञवाहनः।।११७।।
यज्ञभुक् यज्ञकृद् यज्ञी यज्ञभुग् यज्ञसाधनः।
यज्ञान्तकृद् यज्ञगुह्यमन्नमन्नाद् एव च।।११८।।वि.स.ना.।।

श्रीविष्णु ***यज्ञस्वरूप*** आहेत. ते ***यज्ञ*** च आहेत. यज्ञांचे स्वामी तेच असल्याने ***यज्ञपति*** त्यांनाच म्हणतात. ***"अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।"*** असे पण श्रीगीतेच्या *नवव्या* अध्यायात स्वतः श्रीकृष्ण सांगतात. यज्ञाचे ***यजमानपण*** प्रभूंकडेच जाते. यज्ञ हा प्रभूचे अंग असल्याचे ***हरिवंश*** म्हणतो. श्रीमद्भागवतात (३-१३-३४ ते३९) मध्ये ***यज्ञमूर्ती वराहस्वरूप*** भगवंताचे येणारे ते वर्णन ऐकण्यासारखे आहे:

"त्यांचे चरण ***वेद*** रूप, दाढा ***यूप*** रूप, हात ***क्रतु*** रूप, मुख ***चिति*** रूप, जिह्वा ***अग्नि*** रूप, रोमावली ***दर्भ*** रूप व मस्तक ***ब्रह्म*** रूप आहे असे दिव्य स्वरूपवर्णन तेथे आढळते. यज्ञरूपी भगवंत महान तपस्वी असून ***रात्र व दिवस*** त्यांचे नेत्र आहेत; ***सहा वेदाङ्गे*** त्यांची कर्णभूषणे आहेत; ***घृत*** ही नासिका, तुण्ड ही ***स्रुवा, सामवेद*** घोष असून ते भगवंत महान धर्माने युक्त असून सत्यमय व श्रीसंपन्न आहेत. ***क्रमविक्रम*** ही सत्क्रिया, ***प्रायश्चित्त*** ही त्यांची नखे असे ते अजानुबाहु आहेत. ***यज्ञपशु*** म्हणजे त्यांची आंतडी, ***उद्गाता*** हा त्यांचे लिङ्ग, ***होम*** ही औषधि, ***बीज*** हे महान फल, तसेच ***वायु*** हा त्यांचा अंतरात्मा, ***मन्त्र*** ही त्वचा, ***सोमरस*** म्हणजे त्यांचे रक्त असून त्यांनी ***विशेष क्रम*** हे वस्त्र धारण केले आहे."

"त्यांचा स्कंध ही ***यज्ञिय वेदी*** असून गन्ध ***हवि*** आहे. त्यांचे शरीर ***हव्यकव्यरूप*** आणि ***वेगवान व प्राग्वंश*** स्वरूपाचे आहे. ते अत्यंत द्युतिमान असून नाना प्रकारच्या दीक्षांनी अर्चित आहे. हे यज्ञभगवान ***महासत्रमय महायोगी*** आहेत. ***दक्षिणा*** त्यांचे हृदय, ***उपाकर्म*** त्यांचे ओष्ठ व दंत असून ते ***प्रवर्ग्यरूप*** रोमसंस्थेने विभूषित आहेत. नाना प्रकारचे ***छंद*** त्यांचा येण्याजाण्याचा मार्ग असून अतिगुह्य उपनिषदे त्यांचे बसण्याचे आसन आहे. मेरुशृंगाप्रमाणे उत्तुंग काया असणारे ते यज्ञभगवान आपल्या छायारूपी पत्नीसह विराजित आहेत." प्रभूंच्या यज्ञस्वरूपाचे असे उत्कृष्ट काव्यात्म वर्णन हरिवंशाने केले आहे. असो.

"फलहेतुभूत यज्ञांचे वाहक भगवंतच आहेत. म्हणून त्यांना ***यज्ञवाहन*** असे विष्णुसहस्त्रनामात म्हटले आहे. यज्ञास धारण करणारे श्रीमुकुंद त्याचे रक्षक पण असल्याने त्यांना ***यज्ञभृत*** म्हटले आहे. जगताच्या आरंभापासून अंतापर्यंत यज्ञ करणारे प्रभूच असल्याने त्यांना ***यज्ञकृत*** असे म्हटले आहे. तसेच प्रभूंच्या आराधनात्मक यज्ञातील अवशिष्ट भागाची पूर्ती ते स्वतःच करत असल्यामुळे त्यांना ***यज्ञी*** असे म्हणतात. यज्ञ भोगणारे म्हणून ***यज्ञभुक,*** यज्ञाने प्राप्त होतात म्हणून ***यज्ञसाधन,*** पूर्णाहुतीने यज्ञ पूर्ण करून त्यांच्या फलप्राप्तीने यज्ञ समाप्त करून देतात म्हणून त्या परमात्म्यास ***यज्ञान्तकृत*** असेही म्हणतात. सर्व प्रकारच्या यज्ञांमध्ये खरा यज्ञ ***ज्ञानयज्ञ*** अर्थात फलाकांक्षारहित केलेला यज्ञ हाच श्रेष्ठ स्वरूपाचा आहे व तो अत्यंत गुह्य असून ब्रह्मस्वरूपच असल्याने श्रीनारायण पुरुषोत्तम हे ***यज्ञगुह्य*** समजले जातात."

हेही लक्षात घेण्यासारखे आहे की ***अन्न*** हे ब्रह्माची विभूती असून अन्न देणाराही प्रभुपरमेश्वरच असल्याचे विष्णुसहस्त्रनामानेसुद्धा आवर्जून म्हटले आहे. असो.

ब्रह्मयज्ञ

यज्ञ म्हणजे काय व त्याचे खरे स्वरूप असे आपण विविध प्रकारे जाणून घेतले आहे. यज्ञांमध्ये महत्तम समजला जातो, तो ***ब्रह्मयज्ञ*** होय. यज्ञाचे जे स्वरूप आपण अवलोकिले आहे, त्याद्वारे भगवंत गीतेत ***ब्रह्मयज्ञ*** प्रकटवतांना काय म्हणतात, ते आकळून घेणे सुलभ जाते. त्यांनी म्हटले आहे की:

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।

श्रीकृष्णांच्या या शब्दांस साजिरे मऱ्हाटी रुप चढवत मोरोपंत कवि समश्लोकी आर्या रचित सागतातः

अर्पण हवि हुत वह्नी सर्वहि हे ब्रह्मरूप जो मानी।
ब्रह्मक्रिया समाधि करूनी ब्रह्मास पावतो ज्ञानी।।४-२४।।

"सर्वं खल्विदं ब्रह्म" ही आर्य उपनिषत्कारांची प्रचिती आहे. जे जे कर्म ब्रह्मच आहे असे मानून ब्रह्मास अर्पण करत केले जाते, ते ते कर्म साधकास ही प्रचिती प्राप्त करुन देण्यास समर्थ असते. प्राप्त कर्तव्यकर्मासच ***स्वधर्म*** अशी संज्ञा गीतेने दिली आहे. स्वधर्मरत पुरुषास मोक्ष हा ठेवलेलाच आहे असे श्रीकृष्णांचे मत आहे. सर्वधर्मसमालोचन करून श्रीराधारमणांनी आपले ***उत्तम मत*** अशा प्रकारे प्रकटवले आहे.

उत्कृष्ट पुरुषार्थ असा मोक्ष सहज कसा मिळेल याचे मार्गदर्शन श्रीगीतेद्वारे त्यांनी केले आहे. हे मार्गदर्शन करणारे ***भगवंतांचे उत्तम मत*** हीसुद्धा त्यांची अत्यंत श्रेष्ठ अशी विभूतीच आहे. हे ***मतोत्तमम्*** मानवास निःश्रेयसाची, अमृतत्वाची, अविनाशित्वाची, परमपदाची, परमकल्याणाची म्हणजेच प्रत्यक्ष भगवंताची प्राप्ती करून देणारे आहे व स्वतः श्रीमुखाने आग्रहपूर्वक प्रतिपादित केलेले आहे. म्हणून मनुष्यमात्राने श्रद्धायुक्त अंतःकरणाने आणि दोषरहित बुद्धीने युक्त होऊन त्या उत्तम मतास नित्यनियमाने अनुसरावे. म्हणजे सर्वश्रेष्ठ धर्माची त्यास उपलब्धी होऊन त्याची सर्व प्रकारच्या कर्मअकर्मादींतून मुक्ती होईल.

श्रेयस्कर धर्म कोणता::::

स्वधर्म

श्लोक क्र.(३-३१) गीता येथे निर्देशिलेल्या दोषरहित बुद्धी आणि श्रद्धावंत अंतःकरण ***(श्रद्धावन्तोऽनसूयन्तो)*** यांची भगवंतांच्या त्या उत्तम मताचे आचरण करण्यास नितांत आवश्यकता आहे. म्हणून तसे अंतःकरण आणि तशी बुद्धी यांस विभूतिमत्त्व आपोआपच प्राप्त होते. भगवंतांच्या मतानुरूप जो धर्म श्रीपरमात्म्याने गीताशास्त्राद्वारे प्रकट केला आहे, तो यांच्याद्वारे सुलभतेने आचरता येतो. त्यासच वस्तुतः ***स्वधर्म*** अशी संज्ञा आहे. त्या धर्माचे अल्पस्वल्प आचरणसुद्धा मानवाचे महाभयापासून संरक्षण करण्यास पूरेपूर समर्थ आहे असे श्रीगीता म्हणतेः

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।२-४०।।

या निष्कामकर्मयुक्त स्वधर्मरूपी यज्ञाचे थोडेही आचरण मानवास अत्यंत कल्याणकर आहे. हे जाणूनच भगवन्मताची प्रतिष्ठा लोकमानसात पुनश्च प्रतिष्ठापित व्हावी, या संकल्पाने आदरणीय लोकमान्य टिळकांनी स्वबांधव व स्वदेश यांच्या प्रेमापोटी मंडाले येथील कारागृहातील खडतर बंदिवासातही ***गीतारहस्य*** नामक आपल्या परमश्रेष्ठ ग्रंथराजाची रचना केली असल्याचे जिज्ञासूंस विदित आहेच!

स्वधर्माचरणासारखा श्रेष्ठ यज्ञ इतर कोणताच नाही, हे जाणून त्याचे आचरण करणाऱ्याचे भाग्य थोरच म्हटले पाहिजे. कारण या यज्ञाचा कधीच नाश होत नाही. तसेच यज्ञसंकल्पाचे फळ निश्चित प्राप्त होते. कारण स्वधर्मरूप यज्ञ म्हणजे स्वरूपी असलेला साक्षात सत्यसंकल्प भगवंतच होय!!

भगवंतांनी अशा रीतीने प्रकट केलेल्या या सर्वोत्कृष्ट म्हणून गणलेल्या मताविरुद्ध वागणे म्हणजे ***परधर्म*** आचरणे. असा परधर्म आचरतांना कितीही छान वाटला, तरी त्याचे फल म्हणजे ***भगवन्विमुखता*** - आसुरी संपदा - नाममात्र यज्ञकर्म! फलाभिलाषेने केलेल्या कर्माचे फल भगवन्विमुखता असल्याने साहजिकच त्यास ***पापकर्म*** म्हटले जाते. त्याच्या फलस्वरूप प्राप्त होणारी अधोगती भयावहच असल्याने ***"परधर्मो भयावहः"*** असे गीतेचे म्हणणे आहे.

अर्जुनाचा स्वधर्म

स्वधर्माचे स्वरूप विशद केल्यानंतर भगवंतांनी अर्जुनास प्राप्त परिस्थितीत त्यांच्या आज्ञेनुसार युद्ध करणे हाच त्याचा स्वधर्मरूप यज्ञ असून तो पाळतांना जरी मरण आले तरी ते श्रेयस्कर आहे असे सांगितले; परधर्म म्हणजे भगवंताच्या मताचा अवमान करून युद्धविन्मुख होणे. अशा परधर्मास मान दिला तर तो अकीर्तिकर व अकल्याणप्रद ठरेल, असेही त्यावेळी श्रीकृष्णांनी अर्जुनाच्या मनावर बिंबवले असल्याचे गीतावाचकांस माहीत आहेच. सांख्यनिष्ठेचे ज्ञान सांगून झाल्यावर स्वधर्माची महती सांगतांना भगवंत अर्जुनास म्हणूनच सागतात की :

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते।।२-३१।।
यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम्।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम्।।२-३२।।

श्रीकृष्ण म्हणतात,"हे पुथापुत्रा! मी स्पष्ट निर्देशिलेला स्वधर्म नीट जाणून घे. म्हणजे तुझे युद्धजन्य परिणामांविषयीचे भय नष्ट होईल. समोर उभ्या ठाकलेल्या या धर्मयुद्धाहून तुजसारख्या तेजस्वी क्षत्रियास अन्य काय श्रेयस्कर असणार! केवळ दैवयोगाने उघडे लाभलेले हे स्वर्गात प्रवेश करण्याचे युद्धरूपी द्वार तुझ्यासारख्या भाग्यवन्त क्षत्रियासच लाभायचे! या युद्धप्रसंगाचा योग्य तो आदर

कर. स्वकर्मकुसुमांनी ईशपूजनच असे हे युद्ध कर आणि सोलीव सुख प्राप्त करून घे."

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं सङ्ग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि।।२-३३।।
अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते।।२-३४।।
भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः.
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम्।।२-३५।।

"जर तू आपला स्वधर्म सांडशील आणि युद्ध न करशील, तर त्या उत्तम श्रेयापासून वंचित होऊन पापाप्रत पावशील. अधर्माप्रत गेल्याने अपकीर्ती होऊन लोक तुझी निंदा करतील. तुझ्यासारख्या सन्मान्य पुरुषाला त्यांचे ते बोल मरणापेक्षा अधिक तापदायक ठरतील. आज ज्या महारथ्यांमध्ये तूं वीराग्रणी म्हणून आपल्या सामर्थ्यामुळे मान्यता मिळवली आहेस, ती सर्व धुळीला मिळेल आणि तूं भिऊन गेल्याने रणांतून निवृत्त झालास असे समजून ते तुझ्या सामर्थ्याची अवहेलना करतील."

अवाच्यवादांश्च बहुन्वदिष्यन्ति तवाहिताः।
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम्।।२-३६।।
हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः।।२-३७।।
सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।..।।२-३८।।

"तुझे शत्रू तुझी घोर निंदा करतील. ते तुला सहन होणार नाहीत अशी भलभलती विशेषणे बहाल करतील. तेव्हा तू हे मनाचे दौर्बल्य वेळीच झटकून टाक. अपकीर्तीकर, श्रेष्ठांनी आचरण्यास अयोग्य व स्वर्गसुखापासून वंचित करणारे हे अज्ञान टाकून; सुखदुःख, लाभहानी, जयापजय हे सारखेच मानून; निष्काम बुद्धीने युक्त होऊन युद्ध करण्यास सज्ज हो. हे पुरुषश्रेष्ठा! युद्ध केल्यानेच तूं परधर्म व अधर्मरूप पापांपासून वाचशील. युद्ध जिंकल्यास पृथ्वीपती होशील आणि जर यदाकदाचित हे स्वधर्मरूप कर्तव्याचरण करत असतां रणांगणावर तुझा देह पडला, तरीही तुला स्वर्गीय अमृताचा लाभ होईल."

..। ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि।।२-३८।।

"म्हणून हे कौन्तेया! युद्ध करण्याचा निश्चय करून शस्त्रास्त्रसज्ज हो अन् युद्धासाठी माझ्या या धर्मरूपी पवित्र रथावर त्वरित आरूढ हो! तुझ्या जीवास ग्रासणारे सर्व दुर्बलपण झटकून जागा हो अन स्वसामर्थ्याची सिंहगर्जना करत या युद्धात सहभागी हो!"

भगवद् अवतारांचे प्रयोजन::::

श्रीकृष्णावताररहस्य

महाभारतीय युद्ध हे असे तसे युद्ध नसून त्याचे प्रयोजन साक्षात श्रीकृष्णासारख्या युगपुरुषाने केलेले होते. स्वतः भगवंतांची इच्छा हे युद्ध व्हावे व पृथ्वीवरील पापांचा भार नष्ट व्हावा अशीच होती. भगवान श्रीकृष्णांनी या मेदिनीवर अवतार घेतला. त्या अवताराचे जे कार्य होते, त्याचा एक भाग म्हणजे हे युद्ध होते.

अर्जुनाने अशा प्रकारच्या एकमेवाद्वितीय युद्धात भगवंतांचा सहकारी म्हणून भाग घेण्यासारखा देवदुर्लभ स्वधर्म त्याला प्राप्त झाला होता. परंतु मोह-तमांधकाराने अर्जुनाच्या मनाचा निर्मल चिदामय प्रकाश प्रसवणारा ज्ञानदीप झांकोळून गेला होता. तो स्वत्व विसरून गेला होता. श्रीकृष्णरूपी आत्मस्वरूप निकट असूनही त्याला ते दिसत नव्हते. आपल्या अवतारकार्याचा सहकारी असणाऱ्या अर्जुनाची ही केविलवाणी अवस्था न पाहवून भगवंतांनी त्याच्या डोळ्यांत ज्ञानांजन घातले.

पूर्वजन्म, भगवंतांची अवतारधारणा, अवतारकर्तव्य यांची स्पष्ट जाणीव त्याला करून देत कर्मयोगाचे विश्लेषण त्यांनी केले. श्रीगीतेच्या चवथ्या अध्यायात हा सर्व भाग येतो. आपल्या दिव्यत्वास प्रकटवणारे भगवंताच्या मुखीचे ते दिव्य श्लोक पहाः

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप।।४-५।।

"हे अर्जुना! तुझे आणि माझे बरेच गतजन्म झाले. त्या सर्वांची मला जाणीव आहे. पण तुला त्यांचे विस्मरण झाले आहे."

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया।।४-६।।

"मी अज ***(जन्मरहित)***, अव्यय ***(अविनाशी)*** आणि भूतमात्रांचा ईश्वर ***(स्वामी)*** असूनही प्रकृतिठायी अधिष्ठित होऊन आपल्या योगमायेने जन्म घेतो."

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।।४-७।।

"जेव्हां जेव्हां धर्मरूपी यज्ञ मंद होऊन त्याला ग्लानी येते, तेव्हां तेव्हां मी अवतार घेतो व धर्माचे संरक्षण करतो."

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।४-८।।

"साधुसंतांचा कैवार घेऊन त्यांचा मान वाढविण्यासाठी, पापपर्वतांचा लोप करण्यासाठी व धर्मास पुनःप्रतिष्ठित करण्यासाठी मी युगीं युगीं अवतार घेतो."

गीतोपदेश हे अवतारकर्तव्यच!

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन।।४-९।।

"भगवंताचा जन्म म्हणजे अवतार व कर्म म्हणजे अवतारकार्य यांचे दिव्यत्व जो तत्त्वतः जाणतो, त्याला देहत्यागानंतर पुनर्जन्म प्राप्त होत नाही." श्रीकृष्ण म्हणतात,"हे अर्जुना! असा तत्त्वज्ञ मत्स्वरूप पावतो."

हा सर्व जन्म-अवतारादींचा विषय योगाशी अविच्छिन्नपणे गीतेत कसा गुंफला आहे, ते पाहणे तसे मनोरंजकच आहे. भगवंतांनी आपले अवतारकार्य म्हणूनच अर्जुनास गीता उपदेशिली. विषण्णचित्त झालेल्या अर्जुनास समजावण्याकरता प्रथमतः द्वितीय अध्यायी त्यास ***ज्ञानयोगाचे म्हणजे सांख्ययोगाचे*** निरूपण केले. त्यांनी तृतीय अध्यायी स्पष्टच सांगितले आहे की भगवंताप्रत पोहोचण्याचे ***मार्ग अथवा निष्ठा*** मुख्यत्वे दोनच आहेत. त्या म्हणजे ***ज्ञानयोग*** व ***कर्मयोग***. ते म्हणतातः

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ।
ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।

यातील कर्मयोगाच्या निष्ठेचे वर्णन तृतीय अध्यायापासून सुरू केले आहे. चतुर्थाध्यायाच्या प्रारंभी योगधारा व तिची परंपरा स्पष्ट करण्यासाठी भगवंत म्हणतातः

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।४-१।।

"हा योग अविनाशी आहे. तो मी प्रथम विवस्वानास - सूर्यास उपदेशिला. त्याने त्याचा पुत्र जो वैवस्वत मनु, त्यास तो उपदेशिला आणि मनूने आपला पुत्र राजा इक्ष्वाकु - त्यास, अशा क्रमाने या योगाचा उपदेश पसरला." यावर अर्जुनाची मूलभूत शंका अशी की:

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः।
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति।।४-४।।

"तुमचा जन्म तर अलीकडच्या काळात झाला.आपण दोघे तर समकालीनच आहोत. आणि विवस्वानाचा जन्म तर कल्पारंभी झाला. असे असतांना तुम्ही पूर्वसूरी अशा त्या विवस्वानास योगाचा उपदेश करणे कसे संभवनीय आहे ?"

अर्जुनाने उपस्थित केलेल्या या प्रश्नाची उकल करण्यासाठी तदनंतर भगवंतांनी वर उल्लेख केलेले आपल्या दिव्य अवतारांचे रहस्य त्याला विदित केले आणि आपल्या सांप्रतच्या अवतारकार्यात नियोजिलेले महाभारतीय धर्मयुद्ध करणे अर्जुनाच्या दृष्टीने कसे श्रेयस्कर आहे, ते सांगितले. त्याचा गोषवारा आपण यापूर्वी पाहिलाच आहे. भगवंतांच्या अवतारकार्याचा व दिव्य जन्मांचा परामर्ष ज्ञानदेवांनीही आपल्या ओव्यांतून घेतला आहे. तोही आता पाहू याः

तंव कृष्ण म्हणे पाण्डुसुता। तो विवस्वतु जैं होता।
तैं आम्ही नसो ऐसीं चित्ता। प्रतीती तुज।।४-४१।।
तऱ्हीं तूं गां हे नेणसीं। पैं जन्में आम्हां तुम्हांसीं।
बहुतें गेली परि न स्मरसी। आपुली तूं।।४२।।
मी जेणें जेणें अवसरें। जैं जैं होऊनि अवतरे।
तैं समस्तही स्मरे। धनुर्धरा।।४३।।
म्हणौनि हें आघवें। मागील मज आठवें।
मी अजही परि संभवें। प्रकृतियोगें।।४४।।
माझें अव्ययत्व न नशें। परि होणें जाणें एक दिसे।
तैं प्रतिबिंब मायावशें। स्वस्वरूपीं।।४५।।
माझी स्वतंत्रता न मोडे। परि कर्मधीनु ऐसा आवडे।
तैं हीं भ्रान्तिबुद्धी तऱ्हीं घडे। येऱ्हवीं नाहीं।।४६।।
जैं येकचि दिसे दुसरे। तैं दर्पणाचेनि आधारें।
येऱ्हवीं काईं वस्तुविचारें। दुजें आहे।।४७।।
तैसा अमूर्तचि मी किरीटी। परि प्रकृतितैं जैं अधिष्ठीं।
तैं साकारपणें नटी। कार्यालागीं।।४८।।
जैं धर्मजात आघवें। युगीं युगीं म्यां रक्षावें।
ऐसा ओघु हा स्वभावें। आद्यु असे।।४९।।

भगवंतांच्या अवतारांचे रहस्य सुंदर शब्दात व्यक्तवणारे ज्ञानेश म्हणतातः

श्रीकृष्ण तेव्हा सांगू लागले, "हे पाण्डुसुता! विवस्वताच्या काळी मी नव्हतो अशी तुझ्या चित्ताला प्रतीती आहे काय! याचे कारण असे की जरी तुझे आणि माझे खूप जन्म झाले असले तरी तुला त्यांचे विस्मरण झाले आहे. हे धनुर्धरा! ज्या ज्या वेळी मी जे जे अवतार धारण करतो, त्या सर्वांची मला पूर्ण स्मृती असते. मी ***अज*** असलो तरी प्रकृतीच्या योगाने जन्म घेतो. पण तरीही माझे ***अव्ययत्व*** लोप पावत नाही. केवळ मायावशें माझ्या ठायी जन्ममरण तेवढे प्रत्ययास येते. खरे तर माझे स्वतंत्रपण कधीच लोपत नाही. पण लोकांना मात्र मी कर्माधीन असल्याचे भासते. अर्जुना! मी तत्त्वतः अमूर्त असूनही मायायुक्त झाल्याने जगत्कल्याणार्थ देहधारी होतो. हे भ्रांतीमुळे लोकांस कळत नाही."

म्हणौनि अजत्व परतें ठेवीं। मी अव्यक्तपणही नाठवी।
जैं वेळीं धर्मातें अभिभववी। अधर्मु हा।।४-५०।।
तैं वेळीं आपुलेयाचेनि कैवारें। मी साकार होऊनि अवतरे।
मग अज्ञानाचेनि आंधारें। गिळूनि घाली।।५१।।

"धर्माचे युगीं युगीं रक्षण करण्यासाठी, अधर्म जेव्हां जेव्हां धर्मावर आक्रमण करतो, तेव्हां तेव्हां माझे अजत्व दूर लोटून, अव्ययत्व विसरून मी भक्तांचा कैवारी होऊन साकार रूपाने अवतरतो. त्यावेळी विशषेकरून मी अज्ञानरूपी अंधकार गिळून टाकून ज्ञानाची उषा उदेजतो."

अधर्माची अवधी तोडी। दोखांची लिहीलीं फाडी।
सज्जनाकरवीं गुढी। सुखाची उभवी।।४-५२।।
दैत्याची कुलें नाशी। साधूंचा मानु गिंवसी।
धर्मासी नीतीसीं। शेंस भरी।।५३।।
मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीपु उजळीं।
तैं योगियां पाहे दिवाळी। निरंतर।।५४।।

"साकारलेला भगवंत दोषांचे लिहिलेले कर्मलेख फाडून टाकतो आणि सज्जनांच्या हातून सुखाची गुढी उभवतो. आसुरी संपत्तीचे मालक काम-क्रोधरूप, मोह-वासना-फलाशारूप जे दैत्य, त्यांच्या

कुळीच्या कुळी नष्ट करतो. साधूंचा मान वाढवतो. स्वधर्मरूप नीती जी मी सांगितली आहे, ती दृढ करतो. अविवेकाची काजळी झाडून टाकून विवेकदीप उजळतो; त्या योगे योगिजनांसाठी नित्य दिवाळीच होते."

स्वसुखें विश्व कोंदें।धर्मचि जगीं नांदे।
भक्तां निघती दोंदें। सात्त्विकाची।।४-५५।।
तैं पापाचा अचलु फिटे। पुण्याची पाहांट फुटे।
जैं मूर्ती माझीं प्रकटे। पाण्डुकुमरा।।५६।।
यया ऐसियां काजालागीं। अवतरे मी युगीं युगीं।
परि हेंचि ओलखे जो जगीं। तो विवेकियां।।५७।।

" भक्तांशी पुनश्च दृढ संबंध जोडला गेल्याने स्वात्मसुखाने विश्व कोंदते. ***"किंबहुना नारायणें विश्व कोंदले"*** अशी विश्वभर सुखाची व्याप्ती होऊन सर्व भक्त तृप्त होतात. ते सत्त्वगुणपरिपूर्ण होतात. जगात सर्वत्र फक्त धर्मच नांदतो. अधर्माची नांवनिशाणीही उरत नाही. पापांचे पर्वत लोपतात. पुण्याची पहांट फुटते. ज्यावेळी माझी अवतारी मूर्ती प्रकट होते, तेव्हां हे सर्व घडते. याच कार्यासाठी मी युगायुगांत अवतार घेत असतो, हे जाणणारा भाग्यवंत खचितच विवेकी पुरुष असतो."

माझें अजत्वें जन्मणें। अक्रियताची करणें
हा अविकार जो जाणें। तो परममुक्त।।५८।।
तो चालिला संगें न चलें। देहींचा देहां नाकले।
मग पञ्चत्वीं तंव मिले।माझांचि रूपीं।।५९।।

"अजन्मा असूनही माझे जन्म घेणे; अकर्ता असूनही माझे कर्मी रत असणे; यातही माझे अविकारीपण यथातथ्य जो जाणतो,तो देहात असूनही खराखुरा विदेही आहे. मृत्यूपरांत तो माझ्या रूपात येऊन मिळतो."

संतांचे कार्य ::::

संतांचे अवतार

अशा प्रकारे भगवंतांचे अवतारकार्य ज्ञानेश वर्णितात. सूक्ष्मपणे निरीक्षिणाऱ्यास हा भगवत्कार्याचा घटनाक्रम भगवंतांच्या सर्व प्रकारच्या अवतारात दिसून येतो, मग तो पूर्णवतार असो किंवा अंशावतार!

तसेच ज्या वेळी साधुपुरुषांची साधना सफळ होते; भगवंत त्यांच्यावर कृपा करतो आणि त्यांच्या भक्तीची अमृतवेल वैकुंठापर्यंत चढते; तेव्हा पण भगवत्स्वरूप - भगवदावतार - होत्साते ते साधुसंत सर्व अवतारलक्षणे प्रकटवितात. हीच परमात्म्याची कृपा होय.

पसायदान

श्रीज्ञानदेवांनी पसायदानांत असेच साधु-संत-सत्पुरुष-भगवंताचे अवतार या भूलोकी निरंतर प्रकट होवोत अशी विश्वात्म्याची प्रार्थना केली आहे. भगवंतांचे अवतार असे हे पुण्यश्लोक आत्मे या अवनीतलावर सतत प्रकटून दीन जनांना त्यांनी उद्धरावे, ही कामना प्रकट करत पसायदान मागणारे ज्ञानेश संतांचे हे अवताररहस्य जाणून आहेत. ते म्हणतात की:

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज देयावें। पसायदान हें।।१८-१७९३।।

श्रीगीतेचे निरूपण करण्याच्या उद्देशाने श्रीज्ञानेशांनी या दिव्य ***श्रीज्ञानदेवी*** ग्रंथाची रचना केली. कलिग्रस्त भूतांस बोध होऊन त्यांची संसारार्णवांतून मुक्तता व्हावी; त्यांना आत्मयोग प्राप्त व्हावा; अपार जीवजंतूंना तरण्यास नौका मिळावी; या लोकसंग्रहार्थ ज्ञानेशांनी हा ग्रंथ प्रकट केला आहे. त्यांचा हा ज्ञानयज्ञ ***वाग्यज्ञ*** म्हणून प्रसिद्ध आहे. या त्यांच्या महायज्ञाने प्रसन्न होऊन त्या विश्वात्मकाने - त्या सर्व विश्वाच्या आत्मरूप श्रीहरीने प्रसाद द्यावा; असे ***अमृतमय पसायदान*** माउली ज्ञानेशांनी ***सर्व जीवातळीं आपुला जीऊ अंथरवीत*** मागितले आहे.

जैं खलाची व्यंकटी सांडो। तेयां सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचे।।१८-१७९४।।
दुरितांचे तिमिर जावो। विश्वस्वधर्मसूर्यें पाहो।
जो जैं वांच्छील तो तैं लाहो।प्राणिजात।।१७९५।।
वर्षत सकल मंगलीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाली
अनवरत भूमंडलीं। भेटोतु भूतां।।१७९६।।
चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणींचे गांव।
बोलते जैं अर्णव। पियूषाचें।।१७९७।।

"दुष्कृते नष्ट होवोत. खलांच्या दुष्ट भावनाविश्वाचा विनाश होवो. त्यांचे खलत्व नाहीसे होऊन सत्कृत्ये करण्याची बुद्धी त्यांस प्राप्त होवो. प्राणिमात्रात मैत्रीची भावना वाढो. पापांधकार नाहीसा होवो. त्या तमांधकारामुळे दृष्टीपुढे आलेले आसुरी संपत्तीचे पडळ नाहीसे होवो. संपूर्ण विश्वात स्वधर्मसूर्य प्रकटून सत्प्रकाशाने विश्व कोंदाटून जावो. त्या सूर्याचे दर्शन घेऊन धन्य झालेल्या सर्व प्राणिमात्रांच्या मनोकामना पूर्ण होवोत. ईश्वरनिष्ठ साधुसंतांचे भूतलावर वारंवार आगमन होत राहो. त्यांच्या सततच्या अवतारांमुळे सर्व भूतमात्रांवर सकल मङ्गलाची वृष्टी होवो!"

चन्द्रमें जैं अलांच्छन। मार्तण्ड जैं तापहीन।
तैं सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु।।१८-१७९८।।

"कलंक नसलेल्या चंद्राप्रमाणे सुखाची अमृतधारा वर्षवणारे ते सज्जन संत तेजस्वी पण तापहीन ज्ञानसूर्यच होत. ते चालतीबोलती विवेकरूपी कल्पतरूंची उद्यानेच होत. चैतन्यचिंतामणी रत्नांच्या सजीव खाणीच असे ते संत होत. त्या सज्जनांची मैत्री-त्यांची सोयरीक -सर्व प्राणिमात्रांस अखण्ड लाभो!!"

किंबहुना सर्वसुखी। पूर्ण होऊनि तिनीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।१८-१७९९।।
आणि ग्रंथोपजीविये। विशेखें लोकीं इयें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवें जी।।१८००।।

"अशा अवतारी पुरुषांच्या संतत धारेमुळे त्रैलोक्यभर महासुखाचा महार्णव उसळून जावो. सर्व लोक परिपूर्ण होऊन त्या आदिपुरुषाच्या चिन्तनात अखण्ड रममाण होवोत."

"आणि विशेषेंकरून या ज्ञानदेवी ग्रंथातील बोधावर आपले जीवन ओवाळून टाकणाऱ्यांना ***"याचि देहीं याचि डोळां"*** याच जन्मी त्या अदृष्ट अशा श्रीहरीआत्मयाची भेट होवो! त्यांना जीवन्मुक्ती लाभून श्रीहरीशी अभेद अशी त्रिपुटीविरहित ऐक्यावस्था प्राप्त होवो!!!"

गीतेतील योगाचा परिचय::::

परमात्म्याची ओळख

एथ म्हणें श्रीविश्वेशराओ। हा होईल दानपसाओ।
एणें वरें ज्ञानदेओ। सुखिया जाला।।१८-१८०१।।

ज्ञानदेवांचे हे सर्व प्राणिमात्रांसाठी कळकळीचे मागणे ऐकून श्रीनिवृत्तिनाथरूपी विश्वेशराऊ प्रसन्न झाले. आणि त्यांनी प्रार्थिलेले पसायदान त्यांच्या पदरात टाकले. मिळालेल्या या वरदानाने ज्ञानदेवांना अपार सुख झाले.

सर्व भूतांना ज्या श्रीहरिआत्मराजाची कृपा प्राप्त व्हावी अशी श्रीज्ञानेशांस तीव्र तळमळ लागून राहिलेली आहे, त्या परब्रह्म परमात्म्यास ओळखण्याच्या मुख्य खुणांचे वर्णन श्रीगीतेच्या *दहाव्या* अध्यायात त्याच्या प्रमुख विभूतींचे सविस्तर विवेचन करतांना केलेले आहे. अशाच इतर अनेक विभूतींचा गीतेतील इतर अध्यायात स्पष्ट अथवा अध्याहृत उल्लेख आहे. स्पष्टच ज्या विभूती म्हणून उल्लेखिल्या आहेत, त्यांच्याशिवाय अध्याहृत अशा ज्या अनेकानेक विभूती गीतेत निर्देशिल्या आहेत, त्या कोणत्या हे ओळखण्यासाठी मात्र आपणास चिकित्सक दृष्टीचा व अंतःकरणाचा कौल लावावा लागतो.

अशाच काही विभूती आपण अगोदर जाणून घेतल्या आहेत. योगिजनांस जी एक विशाल दृष्टी त्यांच्या साधनेद्वारां प्राप्त होते, तिच्या योगें अशा ज्या विभूती जाणवून येतात, त्यांचाही थोडा विचार अजून पुढे करूं याः

गीतेच्या तृतीय अध्यायात ज्यांचा उल्लेख येतो ती ***इंद्रिये,मन, बुद्धी, अंतःकरण व आत्मा*** या एकाहून एक उत्तरोत्तर व्यापक अशा विभूती आहेत. आत्मा हा शब्द तसा द्व्यर्थी आहे. ***एका अर्थी आत्मा म्हणजे त्रिपुटीविरहित द्रष्टा-दृष्य-दर्शन यांच्या ऐक्यावस्थेत असणारी स्थिती होय.*** असा आत्मा म्हणजे स्वयमेव श्रीहरीच होय. परंतु जोवर त्रिपुटीचा लोप होत नाही, तोवर ***आत्मा*** ही प्रभूची सर्वश्रेष्ठ विभूतीच म्हणावी लागते. म्हणूनच श्रीकृष्ण म्हणतात कीः

इंद्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः।।३-४२।।

सर्वांपलीकडील जो आत्मा आहे, तो प्रभूची सर्वश्रेष्ठ विभूती आहे. ही विभूती दृश्यमान व्हावी यासाठी गीता योगमार्गाचा संदेश देते. कर्मयोगाचे साधन तृतीय अध्यायी निरूपिले आहे. स्वधर्माचरणाचा उपदेश तेथे केला आहे. आत्माच सर्व विश्व व्यापत असतो असे गीता मानते.

अज्ञानाचे आवरण

असे असतांनाही मनुष्य आत्मतत्त्वापासून विचलित झालेला जो दिसतो, त्याचे कारण काय आहे असा अर्जुनाला प्रश्न पडतो. त्यावेळी तो विचारतो कीः

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः।।३-३६।।

"परधर्म भयावह आहे; भगवन्विन्मुख होऊ नये; हे कळत असूनही व स्वतःची इच्छा नसतांनाही, हे वृष्णिकुलभूषणा! बलात्कार केल्याप्रमाणे मनुष्य कोणाच्या प्रेरणेने पापाचरण करतो, ते सांगा!"

अर्जुनाच्या या प्रश्नाचे उत्तर देत श्रीकृष्ण गीतोक्त योगमार्गावर अग्रेसर होत आहेत. ते स्पष्ट करतात कीः

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणाम्।।३-३७।।

श्रीकृष्णाचे हे उत्तर वामनपंडितांच्या सुश्राव्य काव्यपंक्तीद्वारे असे प्रकटले आहेः

कृष्ण म्हणे पार्था हा रजोगुणोद्भवचि काम हा क्रोध।
ग्रासक बहु पापी हा वैरी तूं जाण करूनियां शोध।।

हे काम व क्रोधच मनुष्यास आत्मस्वरूपापासून विलग करणारे मांग आहेत. कारणः

धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च।
यथाल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृताम्।।३-३८।।

"धुराने अग्नी किंवा धुळीने आरसा जसा आच्छादलेला असतो किंवा गर्भ जसा वारेने वेष्टिलेला असतो, तसे काम व क्रोध यांपासून निर्माण होणाऱ्या अज्ञानाने आत्म्यास गुरफटून आणि झांकोळून टाकले आहे."

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा।
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च।।३-३९।।

"हे कौन्तेया! कधीही तृप्त न होणारा अग्नी व ज्ञान्यांचा नित्य वैरी असणाऱ्या या कामाने ज्ञानास झांकून टाकले आहे."

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्।।३-४०।।

"इंद्रिये, मन व बुद्धी ही त्याची आश्रयस्थाने होत. या सर्वांचा आश्रय करून काम हा ज्ञानास आवृत करतो आणि जीवाला मोहवतो." म्हणून या इंद्रियांचे प्रथम नियमन करून ज्ञान व विज्ञान यांचा नाशक जो काम त्याला दूर सारणे अत्यावश्यक असते."

गीतेतील खरा योग

इंद्रिये ही देहापेक्षा सूक्ष्म म्हणून श्रेष्ठ व बलवान आहेत. इंद्रियांपेक्षा मनस्तत्त्व अधिक सूक्ष्म आहे. मनापेक्षा बुद्धी सूक्ष्म व श्रेष्ठ आहे.

आणि बुद्धीपेक्षा अंतःकरण सूक्ष्म अर्थात श्रेष्ठ आहे. जर इंद्रियांचे नियमन केले तर कामक्रोधादींना मन, बुद्धी व अंतःकरणात थारा मिळणार नाही. ***इंद्रियांचे नियमन करून; मन, बुद्धी व अंतःकरण यांचे संयमन करून; आत्मप्राप्ती करून घेणे हा गीतेचा खरा योग आहे.*** याचे विशिष्ट व महत्त्वपूर्ण विवेचन *सहाव्या* अध्यायातील ***आत्मसंयमयोग*** सांगण्यानिमित्त भगवंतांनी केलेले आहे.

आत्मसंयमयोगाची वैशिष्ट्ये स्पष्ट करतांना भगवंत त्याचे ध्यानयोगाशी असणारे अभिन्नत्व स्पष्ट करतात. ***ध्यानयोग*** म्हणजे शुद्ध झालेल्या अंतःकरणाने परमात्म्याचे स्वरूपध्यान करणे. **आत्मसंयम व ध्यान यांचा एकत्र अभ्यास करणे म्हणजे *अभ्यासयोग.***

या संज्ञांचा असा परस्पर अभिन्न संबंध असल्याने वेगवेगळ्या विद्वानांनी सहाव्या अध्यायाचे नामकरण कोणी ***आत्मसंयमयोग***, तर कोणी ***ध्यानयोग,*** तर कोणी ***अभ्यासयोग*** असे केले आहे. कामक्रोधरूपी ज्ञानवैरी अशा दुरासद शत्रूंवर विजय मिळवण्यासाठी म्हणजेच अभ्यासयोगात साफल्य मिळवण्यासाठी भगवत्कृपा हवीच.

भगवत्कृपेने पाषाणही समुद्रात तरून त्यांचा लङ्केवर स्वारी करण्याकरता सेतू बांधला गेला. भगवंतांच्या प्रेमळ दृष्टिक्षेपाने त्या पाषाणांच्या जणूं भवार्णवास तरून जाऊन कामक्रोधरूपी राक्षसांची लङ्का नष्ट करण्यास साहाय्यकारी ठरलेल्या नौकाच झाल्या! ***"श्रीरामप्रभूचा बाण लागता। झाला पावन हो रावण।।"*** असे भक्त मानतात. श्रीरामप्रभूच्या कृपेने पाषाणही पावन झाले! रावणही पावन झाला! त्यांचे उदात्तीकरण झाले. काम व क्रोध यांना नीट रीतीने जाणून घेऊन प्रभूची कृपादृष्टी मिळवून त्याद्वारे त्यांच्यावर विजय मिळवता आला तर एकप्रकारे काम व क्रोध हेही भगवत्स्पर्शाने पावनच होतील आणि त्यांच्याप्रत नेऊन सोडणारे होऊन भगवंतांच्या विभूतिरूप ठरतील. अन्यथा मात्र ते भगवत्स्वरूपापासून दूर नेणारे मांग होत.

राग - द्वेषांचे मोहसाम्राज्य::::

काम व क्रोध

काम - क्रोध या ऊर्मी अशा अति महत्त्वाच्या असल्याने त्यांच्याबाबत ज्ञानेश्वरीतील सखोल विवेचन जिज्ञासू व साधकांसाठी फार मोलाचे ठरते. ज्ञानेश्वर अर्जुनाचा प्रश्न ग्रथित करत म्हणतातः

तऱ्हीं देवा हे ऐसें कैसें। जैं ज्ञानियांही स्थिति भ्रंशे।
मार्ग सांडूनि अनारिसें। चालत देखो।।३-२३२।।
सर्वज्ञही जैं होती। हेय उपादेय जाणिती।
तैंही परधर्मे व्यभिचरती। कवणें गुणें।।२३३।।
बीजा आणि भुसा। अंधु निवाडु नेणे जैसा।
नावेक देखणाही तैसा। बरले कां पां।।२३४।।

अर्जुन म्हणतो,"देवा! ज्ञानीजनसुद्धा आपला मार्ग सोडून गैरमार्गाने जर कधीकधी जातांना दिसतात, त्याचे काय कारण आहे! सर्वज्ञ आणि संसारतापातून कसे सुटावे हे ज्यांस उत्तम रीतीने आकळलेले असते, असे लोक पण मार्ग सोडून भ्रमिष्टासारखे कां वागतात, ते मला कळत नाही. स्वधर्म सोडून ते भयावह अशा परधर्माचा अंगीकार कां बरे करतात! आंधळ्याला जसे धान्य व भुसकट वेगवेगळी कळत नाहीत, तशीच कधीकधी ती डोळसालाही नीट कळत नाहीतसे असावे तसेच ना हे!"

जैं असतां संगु सांडिती। तैंचि संसर्गु करतां न धाती।
वनवासीही सेविती। जनपदांतैं।।३-२३५।।
आपण तऱ्हीं पलती। सर्वस्वें पाप चुकविती।
परि बलात्कारें सुईजती। तेयाचिमाजीं।।२३६।।
जेयांची जीवें घेती विवसी। तैंचि जडोनि ठाकें जीवेंसी।
चुकवितां तैं गिंवसी। तेयांतेचि।।२३७।।
ऐसा बलात्कारु एकु दिसे। तो कवणाचा एथ असे।
हे बोलावें हृषिकेशें। पार्थु म्हणे।।२३८।।

"जे संसारासक्तीला त्यागण्यासाठी घरदार, दारादिक सोडून वनवासी झालेले असतात, ते कोणत्या कारणामुळे पुनः जनसंपर्कात येऊन इंद्रियोपभोग घेण्यात दंग होतात! सर्वतोपरी पापापासून दूर राहाण्यासाठी विजनवासात जाऊन लपतात, तरी बलात्काराने पापे त्यांच्यावर कां जाऊन लादली जातात! ज्याची त्यांना मनातून धास्ती वाटते, त्या संसारासच ते कां जाऊन चिकटतात! आणि जे ते टाळूं पहातात, ते विषय त्यांना कसे पकडून ठेवतात! हा जो एकप्रकारे बळेबळेच संसार त्यांच्यावर लादला जातो तो कशामुळे!"

हे श्रीकृष्णानी आपणांस सांगावे असे पार्थाचे म्हणणे आहे. त्यावर तो हृदयकमलांत रमणारा हृषिकेश काय म्हणतो पहाः

तंव हृदयकमलारामु। जो योगियांचा निष्कामु।
तो म्हणतसे पुरुषोत्तमु। सांघैन आइकें।।३-२३९।।
तऱ्हीं हे कामक्रोधु पाहीं। जेयांतें कृपेचि सांठवण नाहीं।
हे कृतान्ताच्या ठाईं। मनिजती।।२४०।।
हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरांचे वाघ।
भजनमार्गीचे मांग। मारक जैं।।२४१।।

तो पुरुषोत्तम - तो योग्यांचा वांच्छित असा श्रीकृष्ण म्हणतो की, "ऐक! त्याचे कारण तुला सांगतो पहा! काम आणि क्रोध हे यमधर्मासारखे निष्ठुर आणि आपल्याठायी कृपेचा लवलेशही नसणारे, हेच खरे तर त्या निःसंगांचे वाटमारे होत. ज्ञानरूपी मूल्यवान खजिन्यावर असलेले महाभयंकर भुजङ्ग ते हेच कामक्रोध होत. विषयरूपी दऱ्यात वावरून साधकांचा घात करणारे हे वाघच म्हणेनास! भक्तिमार्गातील वाट मारणारे मांग ते हेच!"

हे देहदुर्गींचे धोंड। इंद्रियग्रामींचे कोंड।
यांचे व्यामोहादिक बंड। जगावरी।।३-२४२।।
हे रजोगुण मानसाचें। समूल आसुरियेचें।
धायपण ययांचे। अविद्या केलें।।२४३।।

हे रजाचें कीर जाहलें। परी तमासी पढियंते भले।
तेणें निजपद यां दिधलें। प्रमादमोहीं।।२४४।।

"देहरूपी डोंगरी किल्ला मजबूत करणारे चिरे ते हेच आहेत. इंद्रियरूपी गांवाची तटबंदी म्हणजे कामक्रोधच होत. अविवेकाच्या रूपाने हे जगावर आपली दांडगाई करतांना दिसतात. अविद्येचे दूध पिऊन हे खूप मस्तवाल झालेले आहेत. रजोगुणाने अंतर्बाह्य भरलेले हे कामक्रोध आसुरी संपत्तीचे ठाणेच आहेत. तमोगुणास ते अतिप्रिय झाले आहेत. इतके की या दोघांना त्याने आपली प्रमाद आणि मोहरूप गादी चालविण्यास दिली आहे. असे ते तमोगुणाचे वारसदार आहेत."

त्यांचे अधिक वर्णन करून साधकांस चेतावणी देत ज्ञानदेव पुढे सांगतात की:

हें मृत्यूचां नगरीं। मानिजती नीकियापरी।
जैं जीविताचें वैरी। म्हणऊनियां।।३-२४५।।
जेयासीं भुकेलियां आमिषा। हें विश्वचि न पुरेचि घांसा।
कुलवाडी ययांची आशा। चालवित असे।।२४६।।
कौतुकें कवलितां मुठीं। जियें चवदा भुवने थेंकुटीं।
तैं भ्रांती तियें धाकुटी। वाल्हीदुल्ही।।२४७।।
जैं लोकत्रयाचें भातुकें। खेलतांची खाय कवतुकें।
तिच्या दासीपणाचेनि बिकें। तृष्णा जिये।।२४८।।
हें असो मोहें मानिजे। यांते अहंकारें घेपे दीजे।
जेणें जग आपुलेनि भोजें। नाचवीत असे।।२४९।।

"मृत्युरूपी नगरीत हे काम-क्रोध जीविताचे हाडवैरी म्हणून प्रसिद्ध आहेत. यांच्या भुकेपुढे हे अवघे विश्व म्हणजे एक घांस मात्र आहे. आशा यांची कुळवाडी चालवीत असते. भ्रांती ही आशेची धाकली बहीण! तिच्या तान्हेल्या मुठीस विश्वाची चवदाही भुवने तोकडी पडतात. तिने भातुकलीचा खेळ मांडला की त्यात लोकत्रयाचा केवळ भातुके म्हणून बघताबघता ती फडशा पाडते. अशा भ्रांतीची दासी म्हणून तृष्णेचा जन्म झाला आहे. काम - क्रोध - आशा - तृष्णा - भ्रांती यांना मोह पण सामील असतो. यांच्याशी जगाला आपल्या तंत्राने नाचविणाऱ्या अहंकाराचे निकटचे संबंध असतात."

जेणें सत्याचा भोकसा काढिला।
मग अकृत्य तृणकुटा भरिला।
तो दंभु रूढविला। इहीं जगीं।।३-२५०।।
साध्वी शांति नागविली। मग माया मांगी शृंगारिली।
तियेंकरवीं विटालविली। साधुवृंदें।।२५१।।
इहीं विवेकाचि त्राय फेडिली। वैराग्याची खाल काढली।
जितेयां मान मोडिली। उपशमाची।।२५२।।

"या सर्वांनी दंभाला या जगात नांवारूपाला आणले आहे. सत्याचे कातडे काढून त्यांत अकर्माचा भुसा भरवणारा दंभ तो हाच! या कामक्रोधादींनी शांतीरूप साध्वीची वस्त्रे फेडून त्यांनी मायारूपी मांगिणीस शृंगारले आणि त्या पापिणीकडून साधुवृंदांना विटाळवले.इतके नीच कृत्य या पापी काम - क्रोधादींनी सहजच केले आहे. यांनी विवेकातले त्राण नाहीसे केले आणि वैराग्याची चामडी उतरवून घेतली आहे. उपशमाची तर त्यांनी मानच मोडून टाकली आहे."

इतके हे निर्दय काम - क्रोधादी आहेत. एवढेच करून ते थांबले नाहीत, तर ज्ञानेश म्हणतात की त्यांनी अजून पुढे असे केले आहे:

इहीं संतोषवन खांडिलें। धैर्यदुर्ग पाडिलें।
आनन्दरोप सांडिलें। उपडूनियां।।३-२५३।।
इहीं बोधाचि रोपें लुंचिलीं। सुखाची लिपी पुसिलीं।
जिव्हारीं आगी सूदलीं। तापत्रयाची।।२५४।।
हें आंगां तंव घडिलें। जीवेंचि आथी जडिलें।
तऱ्हीं नातुडति गिंवसिलें। ब्रह्मादिकां।।२५५।।

"या काम - क्रोध - मोह - दंभ - अहंकार - आशा - तृष्णा - इ.नी साधकांचे संतोषरूपी वन तोडून टाकले आहे. त्यांचे धैर्यरूपी दुर्ग यांनीच पाडून टाकले आहेत. आनंदवल्ली तर या क्रूरकर्मी कामादींनी उपटून टाकली आहे. यांनी बोधाची रोपे ओरबाडून टाकली आहेत; सुखाची अक्षरे पुसून टाकली आहेत; तापत्रयाचा वणवा हृदयाला यांनीच लावला आहे. जीवाबरोबरच हे त्याच्या अंगाला चिकटले आहेत. ब्रह्मादिकांनीही यांना नष्ट करावे म्हणून शोधले, तरी त्यांना हे गिंवसत नाहीत. देवादिकांनाही यांनी छळले आहे."

हें चैतन्याचें शेजारीं। वसतीं ज्ञानाचियां एका हारीं।
म्हणौनि प्रवर्तलें मारीं। सांवरती ना।।३-२५६।।
हें जलेंविण बुडविती। आगीविण जालिती।
न बोलतां कवलिती। प्राणियांतें।।२५७।।
हें शस्त्रेंवीण साधिती। दोरेंविण बांधिती।
ज्ञानियां तऱ्हीं वधिती। पैज घेऊनि।।२५८।।
हें चिखलेंविण रोंविती। पाशेंविण गोंविती।
हें कोण्हाहींजोगें नव्हती। आंतुवटपणें।।२५९।।

"हे चैतन्याच्या शेजारीच वस्ती करून आहेत. ज्ञानाच्या पंगतीत हे त्याच्या मांडीला मांडी चिकटवून बसतात. असे हे खोलवर रुजलेले असल्याने कितीहि झोडपले तरी त्यांचा नाश होत नाही. हे जळाविण बुडवणारे, आगीविण जाळणारे आणि आवाज न करता, चाहूलही न लागू देतां, प्राण्यांवर झेंप घेऊन त्यांना ठार करणारे निष्ठुर असे आहेत. शस्त्राविना घात करणारे अन दोरावांचून प्राण्यांना बांधणारे हे कामादी तर ज्ञानी जनांना ठार करण्याचा विडाच उचलून बसले आहेत!! हे दलदलीवाचून प्राण्यांना आंत गाडतात. पाशावाचून हे प्राण्यांना अडकवितात. यांचा सामना करणे कोणालाच शक्य नाही, इतके हे मायावी आहेत."

पुढे ज्ञानेश यांचे ज्ञानास वेष्टिण्याचे सामर्थ्य वर्णितांना म्हणतात की:

जैसीं चंदनाची मुळीं। गिंवसूनि घेपे व्यालीं।
ना तऱ्हीं उल्बाची खोली। गर्भस्थासी।।३-२६०।।

कां प्रभाविण भानु। धूमेंविण हुताशनु।
जैसा दर्पणु मलहीनु। कंहींचि नसे।।२६१।।
तैसें इहींविण एकलें। आम्हीं ज्ञान नाहीं देखलें।
जैसें कोंडेनियां गुंतलें। बीज निफजे।।२६२।।
तैसें ज्ञान तन्हीं विशुद्ध। परि इहीं असे प्ररुद्ध।
म्हणौनि तें अगाध। होऊनि ठेलें।।२६३।।

"सर्प जसा चंदनाच्या खोडास वेढून बसतो; वार जशी गर्भास वेष्टून असते; किंवा प्रभा जशी सूर्याबरोबर नित्य असते; धूम जसा अग्नी जेथे असतो तेथे असतोच असतो; अथवा धुळीविरहित आरसा जसा सांपडत नाही; त्याचप्रमाणे या कामक्रोधादींवाचून असणारे ज्ञान कोठेही पहाण्यास सांपडत नाही. बीज जसे कोंड्यात झांकलेले असते, तसे ज्ञान कितीही विशुद्ध असले तरी या कामादींनी आवृत्त आहे. या कारणानेच ज्ञान दुरापास्त होऊन बसले आहे."

आधीं ययांते जिणावें। मग तैं ज्ञान पावावें।
तंव पराभव न संभवें। रागद्वेषां।।३-२६४।।
ययातें साधावेयालागीं। जैं बल आणिजे आंगीं।
तैं इंधन जैसें आगी। सावावो होय।।२६५।।
तैसें उपावो कीजती जैं जैं। तैं येयांसीचि होती विरजे।
म्हणौनि हटियांतें जिणिजे। इहींचि जगीं।।२६६।।

"या कामक्रोधांना आधी जिंकून घ्यावे तेव्हा कुठे ज्ञान प्राप्त होणार! पण यांना जिंकावे तरी कसे! हे तर अजेय होऊन बसले आहेत! यांचा पराभव करण्यासाठी अंगांत सामर्थ्य आणावे तर ते त्यांच्याच उपयोगी पडते. जळण जसे अग्नीला साहाय्यकारी ठरते, तसे या कामादींचा नि:पात करण्यासाठी जे जे उपाय करावे ते ते सगळे यांच्याच बाजूचे होतात. स्वसामर्थ्यावर यांना जिकण्याची शर्थ करणाऱ्या हटयोग्यांना म्हणूनच केवळ यांच्याकडूनच जगात पराजय स्वीकारावा लागतो."

असे असले तरी यांना जिंकण्याचा एकमेव उपाय ज्ञानदेव सांगतातः

ऐसेयांही सांकडा बोला। एकु उपायु असें भला।
तो करितां जन्हीं आंगवला। सांगेन तुज।।३-२६७।।
ययांचा पहिला कुरुठा इंद्रियें। जेथौनि प्रवृत्ति कर्मातें वियें।
आधीं निर्दाळूनि घालीं तियें। सर्वथैव।।२६८।।
मग मनाची धांव पारुषैल। आणि बुद्धीची सोडवण होईल।
एतुलेनि थारा मोडेल। पापियांचा।।२६९।।
हें आंतरौनि जन्हीं फिटलें। तन्हीं निभ्रांत जाण निवटलें।
जैसें रश्मीविण उरलें। मृगजल नाहीं।।२७०।।
तैसें रागद्वेष जन्हीं निमालें। तन्हीं ब्रह्मींचे स्वराज्य आलें।
मग तो भोगीं सुख आपुलें। आपणचि।।२७१।।

"जिंकण्यास दुरासाध्य असणाऱ्या या कामक्रोधादी शत्रूंवर मात करण्याचा उपाय ऐक आणि अर्जुना! तुला तो भावतो कां पहा." असे श्रीकृष्ण सांगताहेत. "यांचे मुख्य ठाणे म्हणजे ही इंद्रिये आहेत. त्यांद्वारेच प्रवृत्ती कर्मांना प्रसवते. तरी या इंद्रियांचेच प्रथम संपूर्ण निर्दाळण कर. म्हणजे मग मनाची धांव कुंठित होऊन बुद्धीची या इंद्रिये व मनाच्या तावडीतून सुटका होईल. एवढे झाले की या कामक्रोधादींना थारा उरणार नाही. यांना असे कां एकदां अंत:करणातून पळवून लावले की मग ते कायमचे निघून जातात. सूर्यकिरण अस्तंगत झाले की मृगजळ जसे विरून जाते, तसे रागद्वेष निमाले की संसाराचा भ्रम नाहीसा होऊन ब्रह्मसाम्राज्य प्राप्त होते. स्वानन्दसाम्राज्याची ही प्राप्ती मग अखंड उपभोगता येते."

इंद्रियनियमन

श्रीकृष्णांनी असा ***"तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।"*** हा उपाय कामक्रोधादींचा नि:पात करण्यासाठी सुचवला आहे. या उपायाने अशा रीतीने काम *(राग)* व क्रोध *(द्वेष)* यांची इंद्रिये, मन व बुद्धी यांच्या पलीकडील सूक्ष्मातिसूक्ष्म अशा अंत:करणातूनच जर हकालपट्टी झाली; तरच त्यांचा बुद्धी, मन व इंद्रियांवरील पगडा आपोआप हटेल.

हा अभ्यासयोगाचा भाग आहे. आत्मसंयमयोगाने इंद्रिये ताब्यात घेणे व अंत:करणांत भगवंतांचे ध्यान करणे या एकाच उपायाने मन हळूहळू निवते; बुद्धीची भ्रांती मिटते;आणि भगवत्कृपेचा सूर्य उगवून मोहमहिषासुराचे साम्राज्य अज्ञान अंधकारासह त्यापुढे वितळून जाते.

रागद्वेषरूपी मोहसाम्राज्य जेव्हां परास्त होऊन ब्रह्मसाम्राज्य प्रस्थापित होते तेव्हां ***योगियां दिवाळी होते; स्वसुखें विश्व कोंदते; पापाचा अचळु फुटून पुण्याची पहांट होते;*** आणि आत्माराम हृषिकेश श्रीगोपालकृष्णाच्या साजिऱ्या मूर्तीने अंत:करण व्यापून मन, बुद्धी, अहंकारासह पंचमहाभूतात्मक देह संपूर्ण शुद्ध होऊन चिन्मय होतो. मग स्वांतर्यामींचे सुख स्वत:सच उपभोगता येते. हीच स्वसंवेद्य आत्म्याची साक्षात अनुभूती असते. हीच ***गुरुशिष्यांचे गुह्य*** म्हणून ज्ञानदेवांनी वाखाणलेली ***पदपिण्डाची गांठी*** होय.

एवढया प्रास्ताविकानंतर वळू या ज्ञानदेवांच्या लाडक्या अशा ***आत्मरूपा सद्गुरूं***च्या ज्ञानेश्वरीतून घडणाऱ्या दर्शनाकडे! त्यासाठी वळू या आता ***उन्मेष क्र.२- आत्मरूपा सद्गुरु*** कडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष::२::आत्मरूपा सद्गुरु::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

गीताः
४:३३
११:३८
१३:१,७
१५:१५
ज्ञानेश्वरीः
१:१-५५,६६-८४
१०:१-१५,१७-२२
३:२७२,२७३
१०:२३-४०
१२:१-१९
१३:१-६,३६८-४६०,११५३-११६९
१५:५७०-५९२
१८:१६६१-१६६६

:::उन्मेष-२:::

:::आत्मरूपा सद्गुरू:::

गुरुशिष्यांचे रहस्य::::

पद-पिण्डाची गांठी

याविषयी ज्ञानदेवांचे शब्दांकन असे आहे:

तैं गुरुशिष्यांची गोठी। पदपिंडाची गांठी।
तेथ स्थिर राहौनि नुठी। कवणें कालीं।।३-२७२।।
ऐसें सकलसिद्धांचा राओ। देवी लक्ष्मियेचां नाहो।
राया आईकें देवदेओ। बोलतां जाला।।२७३।।

पद-पिण्ड यांची एकदां कां गुरू अनुग्रहाने गांठ भेट झाली की शिष्य आत्मपदी स्थिर होतो. त्यानंतर त्याला कदापिही व्युत्थानदशा प्राप्त होत नाही. हीच समाधि होय. ***संजीवन समाधि*** ती हीच!! हीच ***अव्यय समाधि !*** हाच चिरंतन असा ***दासबोध! जीवन्मुक्तावस्था*** ती हीच! हीच ***परमभक्ती*** होय; हीच ***संवित्ती*** आहे. हीच ***निजाभक्ती*** होय; हीच ***पराभक्ती*** होय; हीच ***शक्ती*** होय. ***अद्वैतभक्ती, ज्ञानभक्ती, नैष्कर्म्यसिद्धी*** इ.नामांनी हिचाच बोध होतो.

हीच ती ***सहजा समाधी*** किंवा ***सहजाभक्ती.*** हीच चैतन्यशंभूच्या मस्तकींची पुण्यसलिला, अमृततोया मन:प्रसादना, अध्यात्मिका - नित्या अशी श्रीहरीच्या पादांगुष्ठापासून प्रकटलेली चिद्गङ्गा! हिच्या प्रवाहात मनसोक्त डुंबून, हिच्या पवित्र जलात क्रीडा करत करत आत्मया श्रीहरी विविध लीला प्रदर्शित करतो आणि हे अवघे विश्वच चेतोहर चैतन्यमय आहे याचा साक्षात्कार जीवावर कृपा करून त्याला करून देतो!!

श्रीगुरूंचे महिमान

अशा श्रीहरिआत्मचैतन्याची भेट होण्याचा मुख्य मार्ग म्हणजे श्रीगोपालाची कृपा! या कृपेचा एक भाग म्हणजे श्रीगुरुकृपा! श्रीगुरुकृपेने काय होणार नाही ? प्रत्यक्ष परमात्म्याची भेट करून देण्याचे सामर्थ्य श्रीगुरूत आहे. त्या श्रीगुरूंवर ज्ञानराजांनी ऋणनिर्देशपर ओव्या वारंवार रचल्या आहेत. श्रीज्ञानेश्वरीतील अत्युत्कृष्ट ओव्यांमध्ये त्या मोडतात. अर्थात श्रीज्ञानदेवीच्या ओव्यांमध्ये उत्कृष्ट व निकृष्ट असा भेद वर्तणे सयुक्तिक खरे तर नाहीच; परंतु श्रीज्ञानदेवांची सदगुरूंप्रती असलेली भावना त्या ओव्यांमध्ये प्रकट झाल्याने व श्रीसद्गुरु हेही प्रत्यक्ष आत्मरूप असल्याने असे म्हणण्याचा मोह होतो.

"मज हृदयीं सद्गुरु"::::

आदिबीज गणेश

आदिबीजस्वरूप अशा स्वात्मरूपी श्रीगणेशाला जाणून घेऊन त्याला नमन करण्याचे महद्भाग्य आपल्याला श्रीगुरूंनी केलेल्या कृपेमुळेच लाभले असे श्रीज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील प्रथमच्याच कांही ओव्यांतून म्हटल्याचे सूज्ञांस माहीत आहेच. साक्षात आत्मा अशा त्या चिन्मय अक्षरमूर्ती श्रीगणेशाचे वर्णन करणाऱ्या त्यांच्या ओव्या आपल्यापुढे साकारतात, त्या अशा:

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।
देवा तूंचि गणेशु। सकल मतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।२।।
हे शब्दब्रह्म अशेष। तैंचि मूर्ती सुवेष।
तेथ वर्णवपु निर्दोष। मिरवित असे।।३।।
स्मृति तैंचि अवयव। रेखा आंगिक भाव।
तेथ लावण्याचीं ठेव। अर्थशोभा।।४।।

आत्मरूप, स्वसंवेद्य, वेदप्रतिपाद्य, ॐकारस्वरूप अशा त्या विश्वाच्या ***आदितत्त्वास*** नमन करून श्रीज्ञानदेव दुसऱ्या ओवीपासून ते विसाव्या ओवीपर्यंत ***गणेशरूपक*** रचून त्या परमतत्त्वाची शोभा शब्दवाङ्मयरूप अलङ्कारांनी वर्णन करतात. ते म्हणतात:

"जिच्यायोगे परमात्मस्वरूपाचे ज्ञान होते, ती ***सकलमती,*** हे आदिदेवा श्रीगणेशा! तुझ्याचपासून प्रकाशते. संपूर्ण ***शब्दब्रह्म अक्षरवाङ्मय*** हीच त्या गणेशाची सुवेष परिधान केलेली मंगलमूर्ती आहे. ***परावाणीरूप वर्णस्वरूप मातृका*** याच त्याची निर्दोष वपु होत. ***स्मृतींमधील ज्ञान*** हेच त्याचे रेखीव अवयव होत. त्या ज्ञानात भरून असणाऱ्या अर्थाचे सौंदर्य धारण करणारे ते अवयव मनोरम लावण्यमय दिसत आहेत."

अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें।
पदपद्धति खेंवणें। प्रमेयरत्नांचीं।।१-५।।
पदबंध नागर। तैंचि रंगाथिलें अंबर।
जेथ साहित्य वाणें सपूर। उजालाचें।।६।।
देखा काव्यनाटका। जैं निर्धारितां सकौतुकां।
त्याचि रुणझुणति क्षुद्रघंटिका। अर्थध्वनी।।७।।

"अठरा पुराणे हीच त्याच्या अंगावरील मणिभूषणे असून त्यात प्रतिपादिलेली तत्त्वज्ञानविषयक प्रमेये हीच रत्ने त्या गणेशाने धारण केली आहेत. पुराणाच्या पदबद्ध रचनांच्या कोंदणात ती रत्ने बसविल्याने त्यांची प्रभा अतिदिव्यच भासत आहे. नाना काव्यातील छंदोबद्ध शब्दरचना हे तर त्या गणेशाने परिधान केलेल्या छंदबद्ध साहित्यरूपी तलम भरजरी दिव्यद्युतीमय वस्त्राचे चेतोहर रंगच होत! आणि या मङ्गलमूर्तीच्या पायात रुणझुणणाऱ्या क्षुद्रघंटिका आणि छुनछुन वाजणारेवाळे म्हणजे त्या काव्यनाटकातील अर्थाचा मनमोहक ध्वनीच आहे!"

नाना प्रमेयांची परीं। निपुणपणें पाहातां कुसरी।
दिसती उचित पदें माझारीं। रत्नें भलीं।।१-८।।
तेथ व्यासादिकांचियां मति। तैंचि मेखला मिरवती।
चोखालपणे झलकती। पल्लवसडका।।९।।
देखा षड्दर्शनें म्हणिपती। तैंचि भुजांची आकृति।
म्हणौनि विसंवादें धरिती। आयुधें हातां।।१०।।

श्रीनिवृत्तिनाथांचे शिष्य श्रीज्ञानदेव त्या वाङ्मयगणेशाचे अधिक मनोहारी रूप दाखवत म्हणताहेत की, ***"व्यासादिकांची मती*** हीच त्या गणेशाने परिधान केलेली मेखला आहे. त्या मेखलेतील निर्दोष पदप्रमेयादिक रत्नांच्या झळाळीत त्याने ल्यायलेला ***व्यासादिकांच्या मतीतील उन्मेषांच्या*** स्वरूपाचा शेला झळकतो आहे. जीव-जगत-जगदीश्वर यांच्या परस्परसंबंधांवर विविध मतांचा प्रकाश पाडणारी ***षड्दर्शने*** या त्या गणेशाच्या सहा भुजा असून त्यांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वज्ञानातील विसंवाद त्या भुजात धारण केलेल्या वेगवेगळ्या आयुधे व मुद्रांद्वारे प्रदर्शित होत आहे."

तऱ्हीं तर्कु तोचि परशु। नीतिभेदु अङ्कुशु।
वेदान्तु तो महारसु। मोदकु मिरवे।।१-११।।
एकें हातीं दंतु। जो स्वभावता खंडितु।
तो बौद्धमत संकेतु। वार्तिकांचा।।१२।।
मग सहजें सत्कारवादु। तो पद्मकर वरदु।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु। अभयहस्तु।।१३।।
देखा विवेकवन्तु सुविमलु। तोचि शुण्डादण्डु सरलु।
जेथ परमानन्दु केवलु। महासुखाचा।।१४।।

"एका हातात ***तर्क*** रूप परशु असून दुसऱ्या हातात ***नीतिभेद*** रूप अङ्कुश आहे. एका हाती **वार्तिका**तून प्रतिपादन केलेल्या बौद्धमताचे खण्डण करणारा त्या वक्रतुण्डाचा दन्त आहे. त्याचा वरदमुद्राप्रदर्शक पद्महस्त म्हणजे ***सत्कार्यवाद*** आहे. अभयमुद्राप्रदर्शक असा त्याचा सहावा हस्त असून तो ***धर्मप्रतिष्ठा*** सिद्ध करतो. असा हा श्रीगणराज आपल्या ***आत्मानात्मविवेकचतुर*** अशा अकुटिल सुविमल शुण्डेने परमानन्दस्वरूप महासुखाचा आस्वाद घेण्यात रममाण झालेला दिसतो."

पुढे ज्ञानेश काय म्हणतात, पहा:

तऱ्हीं संवाद तोचि दशनु। जो समता शुभ्रवर्णु।
देओ उन्मेषसूक्ष्मेक्षणु। विघ्नराजु।।१-१५।।
मज अवगमलियां दोनीं। मिमांसा श्रवणस्थानीं।
बोधमदामृत मुनि-। अली सेविती।।१६।।
प्रमेयप्रवाल सुप्रभ। द्वैताद्वैत तैंचि निकुंभ।
सरिसेंपणें एकवटत। इभ मस्तकावरी।।१७।।
उपरीं दशोपनिषदें। जियें उदारें ज्ञानमकरंदें।
तियें कुसुमें मुक्तिसुगंधें। शोभतीं भलीं।।१८।।

"तत्त्वजिज्ञासापूर्ती करणारा संवाद हाच समताबुद्धिदर्शक असा त्या विघ्नराजाचा एक दांत आहे. त्या विघ्नहराचे नेत्र सूक्ष्मज्ञानरूप आहेत. ***पूर्वमीमांसा*** व ***उत्तरमीमांसा*** ही शास्त्रे त्या श्रीचे कर्णद्वय आहेत. सर्व वाङ्मयसाहित्यातील कांतिमान प्रमेयरूपी प्रवाळरत्ने त्याने धारण केली आहेत. ***द्वैत - अद्वैत*** ही दोन्ही तर त्या गजाननाच्या गण्डस्थलीं सारखेपणे प्रकटत असतात. त्या द्वैताद्वैतरूपी गण्डस्थलातून पाझरणाऱ्या बोधरूपी मदाचे मुनिरूपी भ्रमर आकण्ठ सेवन करण्यात मग्न झालेले दिसत आहेत. या श्रीमूर्तीने मस्तकी ***ईशावास्यादी दशोपनिषदरूप पुष्पांचा*** शोभायमान मुकुट धारण केला असून त्या पुष्पांतील ज्ञानरूप मकरंदाची व मुक्तिरूप सुगंधाची दशदिशांना विश्वभर मुक्तहस्ते उधळण होत आहे."

अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल।
मकार महामण्डल। मस्तकाकारें।।१-१९।।
हे तिहीं एकवटलें। तेथ शब्दब्रह्म कवलिलें।
तैं मियां श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज।।२०।।

"ॐकाराच्या तीन मात्रा - अकार चरणयुगुलांठायी; ***उकार*** विशाल उदरस्थानी; व ***मकार*** महामंडलाने परिवेष्टित मस्तकस्थानी; असे धारण करून संपूर्ण ***शब्दब्रह्म*** कवळणाऱ्या त्या ***आदिबीजस्वरूप*** श्रीमङ्गलमूर्तीला मी श्रीगुरुकृपांकित असल्यानेच नमन करूं जातो आहे," असे श्रीज्ञानदेव म्हणतात.

ॐकार गणेश

वेदांनीही जेथे ***"नेति, नेति"*** असे म्हणत ज्याचे वर्णन करण्याबाबत असमर्थता प्रकट केली; षड्दर्शने व शास्त्रांच्या अवलोकनानेही ज्याचा शोध घेतांना मती गुंग होऊन जाते; ***द्वैत-अद्वैत*** दोन्हीही ज्याच्याठायी सारखेपणानेच प्रकट होते - म्हणजेच जो ***द्वैताद्वैतविलक्षण*** आहे; ज्याला जाणून घेतल्यानंतर केवळ इतरांनाही ज्ञानमकरंद व मुक्तिसुगंध प्राप्त व्हावा म्हणून जाणत्या ज्ञान्यांनी उपनिषदे प्रकट केली; संपूर्ण विश्वाच्या***व्यष्टी -समष्टीरूप: वैश्वानर -विराट - तैजस - प्राज्ञ -ईश्वर या पादरूप: बहि: - आंतर - घनप्रज्ञारूप: स्थूल - सूक्ष्म - आनन्द भोगरूप: तसेच तृप्तिरूप*** - अशा माण्डूक्योपनिषद विवेचित अकार - उकार - मकार मात्रांसह जो आत्मन् - तुरियावस्थित अमात्रादर्शक ॐकारस्वरूप ब्रह्मरूप आहे; त्याच्या त्या इंद्रियातीत अवस्थेतील ***आदिबीज*** स्वरूपातील ध्यान करणे हे केवळ गुरुकृपेच्या सामर्थ्यानेच शक्य आहे." इतका गुरुकृपेचा महिमा ज्ञानेशांनी या वरील ओव्यांतून वर्णिला आहे.

ज्ञानदेवातील *कवि*

सर्वसाधारण सन्मान्य ग्रंथकारांची पद्धत ग्रंथारंभी गणेश, देवता, गुरू व इतर मान्यवर पूज्य श्रेष्ठींस नमन करणे अशी आहे. श्रीज्ञानदेवांनीही श्रीज्ञानेश्वरीच्या आरंभी तीच प्रथा सिद्ध केली आहे.

त्या प्रथेस अनुसरत विश्वबीजरूप अक्षर चिन्मय अशा तत्त्वावर श्रीगणेशरूपक रचून त्यास श्रीज्ञानराजांच्या प्रज्ञेतून प्रकट झालेले नमन आपण आतांच सविस्तर अवलिकिले. नमनांचा मुकुटमणी शोभावे असे ते आहे. या नमनातून ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथात जे प्रमेय ते सिद्ध करणार आहेत, त्याचा चतुरपणे निर्देशही केला आहे. ***स्वसंवेद्य आत्मरूपाची अनुभूती घेणे व त्याचा साक्षात्कार करून घेणे*** ही त्यांची उद्दिष्टे या नमनावरून सूज्ञांस ओळखता येण्यासारखी आहेत. आपल्या **चिद्विलासवादा**चा उल्लेख स्पष्टपणे त्यांच्या नमनातील ***"ॐ नमो जी आद्या...."*** या ओवीत आढळतो. अर्थातच ग्रंथ पूर्ण न्याहाळला तरच याची प्रतीती आपणांस घेता येईल. असो.

ज्ञानेशांची श्रीशारदा - *विश्वमोहिनी*

आत्मरूपास वन्दन केल्यावर ज्ञानेश ***श्रीशारदा*** व तदनंतर ***श्रीसद्गुरू*** यांनाही नमन करत आहेत. ते आपल्या नादमधुर शब्दात म्हणतातः

आतां अभिनव वाग्विलासिनी। जैं चातुर्यार्थकलाकामिनी।
तैं श्रीशारदा विश्वमोहिनी। नमिली मियां।।१-२१।।
मज हृदयी सद्गुरु। जेणें तारिलो हा संसारपूरु।
म्हणौनि विशेषें मतीं आदरु। विवेका वरी।।२२।।

ज्याप्रमाणे श्रीज्ञानदेवांनी आत्मरूप श्रीगणेशवाङ्मयमूर्तीस नमन केले, तसेच श्रीशारदादेवी या विद्येच्या स्वामिनीला त्यांनी विश्वमोहिनी आदिमायेच्या ***शुद्धा*** तसेच ***लीला*** स्वरूपांना आवाहन करत नमन केले आहे. "ही शारदा परावाणीरूप वाक्‌च होय. तिचा सदैव ***परा - पश्यंती - मध्यमा व वैखरी*** यांच्या रूपाने वाग्वैभवात्मक विलास चालूं आहे. अशी ती कामिनी चातुर्य, अर्थ व कला यांची स्वामिनी होऊन विश्वमोहन करत आहे; तिला ज्ञानेशांचे वन्दन असो."

श्रीमहालयेच्या देवळात श्रीमोहिनीरूपासमोरच बसून हे आख्यान *नेवासे* येथे श्रीज्ञानदेवांनी आरंभिले आहे. त्यामुळे तेथे प्रकटलेल्या त्या विश्वमोहिनी जगदंबेच्या स्वरूपातील आदितत्त्वास त्यांनी या ओवीने नमन केले असणे साहाजिकच वाटते. या तत्त्वासच ***शिव व शक्ती*** या अद्वयीत ज्ञानेश पहातात, हे त्यांच्या वाङ्मयाची - मुख्यतः ***अमृतानुभव*** या ग्रंथाची ओळख असणाऱ्या विचक्षण जिज्ञासूंस अवगत असेलच! असो.

"मियां वन्दिला श्रीगुरुचि" ::::

सद्गुरुस्वरूप परमात्मा

आता पुढे सद्गुरुस्वरूप परमात्म्यास वन्दन करतांना तर त्यांच्या गुरुप्रेमास उधाणच येते. हा त्रितापमय संसारपूर केवळ हृदिस्थ सद्गुरूंच्या कृपेने आपण तरून गेलो आहोत या जाणीवेतून त्यांनी श्रीगुरूंस अत्यादरपूर्वक नमन केले आहे. आत्मप्रिय अशा या सद्गुरुमूर्तीचे कौतुक करण्यात रंगलेले ज्ञानेश पुढे म्हणतातः

जैसें डोलियां अञ्जन भेटे। तैं वेळीं दृष्टीसीं फाटा फुटे।
मग वास पाहिजे तेथ प्रकटे। महानिधी।।१-२३।।
कां चिंतामणि जालयां हातीं। सदाविजयवृत्ती मनोरथीं।
तैसा पूर्णकाम मी श्रीनिवृत्ति। ज्ञानदेओ म्हणें।।२४।।

"पायाळू मनुष्याने डोळ्यात दिव्य अंजन घातले की दिव्यदृष्टी लाभून ती जेथे जाईल तेथे द्रव्याचा ठेवा सापडतो. हाती चिंतामणी असला की मन वांच्छील ते सर्व काही प्राप्त होते. तसेच श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंच्या कृपाकटाक्षामुळे माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. सद्गुरूंच्या कृपेचे असे सामर्थ्य असल्यामुळे सर्व जाणकार गुरूंना भजतात आणि कृतार्थ होतात."असे ज्ञानदेवांचे स्वानुभवाचे बोल आहेत.

म्हणौनि जाणतेनि गुरु भजिजे। तेणें कृतकार्य होईजे।
जैसें मूलसिंचनें सहजें। शाखापल्लव संतोखती।।१-२५।।
कां तीर्थें जियें त्रिभुवनीं। तियें घडती समुद्रावगाहनीं।
ना तऱ्हीं अमृतरसास्वादनीं। रस सकल।।२६।।

"वृक्षाच्या मुळांना पाणी घातले की ते जसे सहजच शाखापल्लवांना पोहोचते किंवा समुद्रस्नान केले की जसे सर्व तीर्थांचे स्नान केल्याचे पुण्य आपोआपच प्राप्त होते; अथवा अमृताची गोडी चाखली की जसे सर्व रस भोगल्याची तृप्ती मिळते; त्याचप्रमाणे सर्व कामना सहजच पूर्ण करणारे सद्गुरू असतात. एका सद्गुरूंच्या सेवनाने अनायासच मनुष्य प्राप्तकाम होतो. असे सदगुरूंचे महिमान असल्याने मी पुनः पुनः त्यांना वन्दन करूं जात असतों." असे ज्ञानेश म्हणताहेत.

या बोलांची प्रचिती आपण जेव्हा ज्ञानेश्वरी वाचतो तेव्हा दर अध्यायागणिक येत रहाते. गुरुऋणाचे उतराई होण्याची एकही साहित्यिक संधी हा ग्रंथ रचणारे ज्ञानेश वांया दवडत नाहीत, हे ज्ञानेश्वरीतून आपणांस पावलोपावली जाणवून येते.

जय नांवाचा इतिहास::::

महाभारत - *काव्यारावो*

सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपाबळावर ***हा होडेचा प्रबंधु*** रचूं पाहणारे ज्ञानेश या उपरांत श्रीगीता व भारतकर्त्या व्यासमुनींची अलौकिक स्तुती करत नम्रपणे सांगतात की व्यासांनी रचलेल्या अपूर्व अशा गीताग्रंथावर प्रासादिक अशी ही ज्ञानदेवी रचना करण्याचे धाष्टर्य ते केवळ श्रीसद्गुरुमाउलीच्या कृपाप्रसादानेच करत आहेत. त्याप्रसंगी श्रीगीतेची व गीता ग्रथित करणाऱ्या श्रीव्यासदेवांची थोरवी त्यांनी वर्णिली आहे, ती त्यांच्याच शब्दात पाहू या. ते ***महाभारत*** या श्रेष्ठ आणि पवित्र ग्रंथाचे महिमान सांगतात, ते असेः

आतां अवधारा कथा गहन। जैं सकलां कौतुकां जन्मस्थान।
कीं अभिनव उद्यान। विवेकतरूंचे ।।१-२८।।
ना तऱ्हीं सर्व सुखाची आदि। जैं प्रमेय महानिधी।
ना ना नवरससुधाब्धि। परिपूर्ण हे।।२९।।

कीं परमधाम प्रकट। सर्व विद्यांचे मूलपीठ।
शास्त्रजातां वसौट। अशेषांचे।।३०।।

"आतां काव्यराज असा जो ***महाभारत*** म्हणून ओळखला जाणारा ग्रंथ आहे त्याचे कौतुक पहा कसे आहे ते! अद्भुतता आणि नवरसांनी जेथून जन्म घेतला आहे असा तो ग्रंथश्रेष्ठ आहे. विवेकतरूंचे नवलाईचे उद्यानच जणूं त्यांत प्रकटले आहे. महासुखाचे मूर्तिमंत चिरंतन धामच असा हा ग्रंथ आहे. त्याच्या रूपाने प्रमेयरत्नाकर जणूं या भूलोकीं प्रकटला आहे. नवरससुधासागराच्या उचंबळून येण्याने हा जसा कांहीं साहित्यिक परिपूर्णतेचा समुद्रच झाला आहे. कैवल्याचे साक्षात धाम असा हा ग्रंथ आहे. समस्त विद्यांचे आदिपीठ कोणते म्हणाल तर ते याच ग्रंथीं आहे. सकल कला आणि शास्त्रे यांचे हे माहेरघरच आहे जणूं!"

ना तऱ्हीं सकल धर्मांचे माहेर। सज्जनांचे जिव्हार।
लावण्यरत्नभांडार। शारदेचे।।१-३१।।
ना ना कथारूपें भारतीं। प्रगटलीं असें त्रिजगतीं।
आविष्करौनि महामतीं। व्यासाचियें।।३२।।
म्हणौनि हा काव्याराओ। ग्रंथ गुरुवतीचा ठाओ।
एथौनि रसा जाला आओ। रसालपणाचा।।३३।।

"संतसज्जनांना प्राणप्रिय असे हे धर्माचे निजस्थान आहे. शारदेचे लावण्यभांडार या ग्रंथातून मुक्तहस्ते उधळलेले आहे; किंबहुना ती त्रिगुणात्मिका त्रिपुरसुंदरी आदिमायाच नाना कथांचे रूप घेऊन व्यासांच्या महामतीद्वारे या ग्रंथात अवतरली आहे असे मला वाटते. तत्त्वसिंधु अशा या महाभारतापासून खरे तर नवरसांना रसाळपणा प्राप्त झाला आहे म्हणाना!"

तेंविंचि आईका आणिक येक। एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक।
आणि महाबोधीं कोंवलीक। दुणावेली।।१-३४।।
एथ चातुर्य सिहाणें जालें। प्रमेय रूचीसि आले।
आणि सौभाग्य पोखलें। सुखाचें एथ।।३५।।
माधुर्यी महुरता। शृंगारीं सुरेखता।
रूढपण उचितां। दिसें भलें।।३६।।
एथ कलाविदपणें कला। पुण्यासीं प्रतापु आगला।
म्हणौनि जनमेजयाचें अवलीला। दोखु हरिलें।।१-३७।।

"महाभारताची थोरवी आणि वैशिष्ट्य अजूनही असे आहे की यांच्यापासून शब्दश्रीला शास्त्राची जोड मिळाली; महाबोधाची सुकोमलता यायोगेच वाढली; चातुर्यास शहाणपणाचा लाभ यापासूनच झाला; तत्त्वबोधप्रमेयादींना अवीट गोडी महाभारतानेच प्रदान केली आहे. सुखाचे तर सद्भाग्यच या ग्रंथरूपे उदयास आले आहे व ते पुष्ट झाले आहे. माधुर्यास मधुरता, शृंगाररसास सौंदर्य, नीतिमत्तेस शिष्टमान्यता, ही सर्व महाभारताची देणगी आहेत. कलाविष्कारास कलाभिज्ञतेची आणि रसिकतेची वाखाणणी या ग्रंथापासूनच मिळूं लागली. पुण्याचा अखंड प्रताप सर्व त्रैलोक्यात याच ग्रंथाने गाजतो आहे. एवढ्या कीर्तीचा हा ग्रंथ आहे म्हणून तर त्याच्या श्रवणाने जनमेजयाचे सर्पसत्रामुळे वर्धित झालेले पाप सहजच निवारले गेले!"

आणि पाहतां नांवेक। रंगीं सुरंगतेची आगलीक।
गुणांस सगुणपणाचें बीक। बहुंवस एथ।।३८।।
भानुचेनि तेजें धवलिलें। जैसें त्रैलोक्य दिसे उजललें।
तैसें व्यासमति कवलिलें। मिरवें विश्व।।३९।।
कां सुक्षेत्रीं बीज घातलें। तैं आपुलियां परी विस्तारलें।
तैसें भारतीं सुरवाडलें। अर्थजात।।४०।।
ना तऱ्हीं नगरांतरीं वसिजे। तऱ्हीं नागरचि होईजें।
तैसें व्यासोक्तितेजें। धवलित सकल।।४१।।

"आणि पहा! रंगसौंदर्यात रंगदारपण या महाभारतानेच भरलेले दिसते. गुणांना गुण म्हणून ओळखण्याचा ओनामा या ग्रंथापासूनच होतो. सूर्य आपल्या दीप्तीने संपूर्ण विश्वच जसे प्रकाशवितो, तसेच व्यासांच्या मतीने प्रकाशलेले हे सगळे विश्वडंबर महाभारतीं सामावलेले आहे. सुक्षेत्री पेरलेले बीज जसे वाढते, तसेच त्रैलोक्यातील सर्व विषय या ग्रंथात पेरून वर्धिष्णु होऊन मिरवत आहेत. म्हणूनच ***व्यासोच्छिष्टम् जगत्सर्वम्।*** अशी लोकोक्ती रूढ झाली आहे, नाही कां! नगरात वस्ती केली की सुसंस्कृतता जशी प्रकट होते, त्याप्रमाणे या व्यासोक्तीच्या प्रकाशात सर्व विषय प्रकाशून आपले सर्वस्व जिज्ञासूंसाठी उघडे करत आहेत. महाभारताचा आश्रय करणाऱ्यास अभिजात वाङ्मयदृष्टी अशी अनायासे प्राप्त होते."

व्यासोच्छिष्टम्.....।

पुढे ज्ञानेश असेही म्हणतात कीः

कीं प्रथम वयसाकालीं। लावण्याची नव्हाली।
प्रगटे जैसीं आगलीं अंगनाआंगीं।।१-४२।।
ना तऱ्हीं उद्यानीं माधवी घडें। तेथ वनशोभेची खाणी उघडे।
आदिलापासौनि अपाडें। जियापरी।।४३।।
ना ना घनीभूत सुवर्ण। जैसें न्याहालितां साधारण।
मग अलंकारीं बरवेपण। निवाडु दावीं।।४४।।
तैसे व्यासोक्तिं अलंकारिलें। आवडे तैं बरवेंपण पातलें।
तैं जाणौनि का ईं आश्रयिलें। इतिहासीं।।४५।।

"वयात आल्यावर नवयुवतीच्या अंगप्रत्यंगांवर लावण्याची नव्हाळी जशी विलक्षण प्रकटते, अंगें तीच पण जशी आकर्षक दिसूं लागतात; किंवा वनराजीवर वसंताची छाया पडली की त्याच त्या वृक्षवल्लींचे रूप कसे आगळेवेगळे खुलून दिसू लागते; सुवर्ण तेच ते, पण जेव्हा अलंकारांचे रूप धारण करते तेव्हा कसे चित्तवेधक दिसू लागून सामान्य सुवर्णापेक्षा वेगळीच झळाळी दाखवते; त्याचप्रमाणे व्यासांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या कोणत्याही शब्दांना भारदस्तपणा, लौकिक, सन्मान ही मिळणारच हे जाणूनच जणूं काही इतिहासाने त्यांच्या वाणीचा आश्रय घेतला आहे. अथवा आपणांस खूप प्रतिष्ठा प्राप्त

व्हावी या उद्देशाने तर नाही ना पुराणांनी आपल्याकडे सानपणा घेऊन महाभारतात येणे केले आहे!"

ना ना पुरतिये प्रतिष्ठेलागीं। सानिव धरूनि आंगीं।
पुराणें आख्यानरूपें जगीं। भारतां आलीं।।१-४६।।
म्हणौनि महाभारतीं नाहीं। तैं नोहेचि लोकीं तिहीं।
येणें कारणें म्हणिपें पाहीं। व्यासोच्छिष्टम् जगत्त्रयम्।।४७।।
ऐसीं जगीं सुरस कथा। जैं जन्मभूमी परमार्था।
मुनि सांगें नृपनाथा। जनमेजया।।४८।।

पुराणांनी लघुरूप धारण केले आहे आणि ती आख्यानांच्या रूपाने महाभारतात प्रकट झाली आहेत, हे जाणून ज्ञानदेव पुढे म्हणतातः "महाभारतात ज्या विषयास स्पर्श केलेला नाही असा कोणताच विषय समस्त त्रैलोक्यात शोधूनही मिळत नाही. त्रैलोक्य हे व्यासांनी उष्टावलेले आहे, त्यास व्यासोक्तीचा स्पर्श झालेला आहे, असे उगीचच काही म्हटले जात नाही. महाभारत ही परमार्थ प्रसवणारी खाणच अशी सुरस कथा होय. जनमेजयाचे पापक्षालन व्हावे म्हणून व्यासदेवांनी त्याला महाभारताचे आख्यान ऐकवले होते, हे सर्वविश्रुतच आहे."

गीता ही महाभारतांतर्गतच आहे, हे जाणून परमार्थाची उघडी जन्मभूमी महाभारतच असणार नाही कां!

परमार्थाची उघडी जन्मभूमी::::

श्रीमद्भगवद्गीता

एवढी ***महाभारत***स्तुती करून ज्ञानेश त्यांच्या प्रतिपाद्य विषयाकडे - व्यासप्रज्ञेचा मूर्तिमंत आविष्कार करणाऱ्या; जनमेजयाचे अवलीळा दोष हरणाऱ्या; सर्व पुराणांचे साररूप असणाऱ्या; सर्व विद्यांचे मूलपीठ असणाऱ्या; सर्व धर्मांचे माहेर; संतसज्जनांच्या जिव्हाळ्याचे; विवेकतरूंचे उद्यान; शारदेचे लावण्यरत्नभांडार; नवरसांनी परिपूर्ण भरलेला सागर, तत्त्वमहानिधी; सर्वसुखकारक अशा आदितत्त्वाचे परममंगलधाम प्रकाशविणाऱ्या;अपूर्व रसात्मक अशा महाभारत या काव्यारावोच्या उदरी जन्म घेतलेल्या ***श्रीगीता***माउलीकडे सादर पाहत ज्ञानदेव म्हणतातः

जें अद्वितीय उत्तम। पवित्रैक निरूपम।
परममंगलधाम। अवधारिजो।।१-४९।।
आतां भारतकमलपरागु। गीताख्यु प्रसंगु।
जो संवादला श्रीरंगु। अर्जुनेसीं।।५०।।
ना तऱ्हीं शब्दब्रह्माब्धि। मथियला व्यासबुद्धि।
निवडिलें निरवधि। नवनीत हें।।५१।।

ज्ञानदेव हे किती अपूर्वाईने सांगत आहेत! व्यास, महाभारत आणि श्रीगीतादेवी यांची यानिमित्त जी नमने ज्ञानेशांनी रचली आहेत, ती अदृष्टपूर्व अशी एकमेवाद्वितीय नसती तरच नवल! ज्ञानेश तर गुरुऋणाबरोबर या तिघांचेही ऋण मानून धन्य होतात.

सर्वगुणपरिपूर्ण अशा महाभारताच्याही ***हृदयींचे गूज*** म्हणून समजल्या जाणाऱ्या श्रीगीतामाउलीची योग्यता सांगून तिचे स्तवन करणारे ज्ञानदेव म्हणूनच म्हणतात कीः "जे अद्वितीय, एकमात्र पवित्र, निरुपम असे गीतामय परममंगलधाम आहे, त्याचे वर्णन ऐका. ***गीताख्यानाचा प्रसंग म्हणजे श्रीरंग-अर्जुनांचा महाभारतकमलपरागरूपी संवादच आहे.*** श्रीव्यासांनी शब्दब्रह्मरूप महासागराचे मंथन करून काढलेले हे नवनीत आहे."

मग ज्ञानाग्नीसंपर्कें। कडिसलेनि विवेकें।
पद आलें परिपाकें। आमोदासीं।।१-५२।।
जैं अपेक्षिजें विरक्ती। सदा अनुभविजें संतीं।
सोऽहंभावें पारंगतीं। रमिजें जेथ।।५३।।
जैं आकर्णिजे भक्तीं। जैं आदिवंद्य त्रिजगतीं।
तैं भीष्मपर्व सांगाती। म्हणितली कथा।।५४।।
जैं भगवद्गीता म्हणिजे। तैं ब्रह्मेशांनी प्रशंसिजे।
जैं सनकादिकीं सेविजे। आदरेंसीं।।५५।।

"ज्ञानाग्नीच्या तीव्रतेने कढवून त्याचे हे विवेकरूप आमोदप्रद परिपक्व असे घृतच जणू झाले आहे. याच गीतारूप घृताची संतसज्जनांना अपेक्षा असते; विरक्त झालेले सोऽहंभावस्थित अध्यात्मपारंगत निष्णात संत या गीताख्यरूप घृताच्या सेवनाने धन्य धन्य होतात! ब्रह्मा व ईश यांनी जिला वाखाणले आहे; सनकादिकांनी जिचे आदरपूर्वक सेवन केले आहे अशी भक्तांनी हृदयात साठवून ठेवण्याजोगी कथा म्हणजेच ही महाभारताच्या भीष्मपर्वात सांगितलेली भगवद्गीता होय!"

गीतातत्त्वाचा आविष्कार

अशा या अप्रमेय-प्रमेय गीतारत्नाचे तेज निरखून पहाण्याचे कौतुक आपण श्रीगुरूंच्या सानुकुलतेमुळेच करूं शकलो असे ज्ञानेश्वरमाउली पुढील ओव्यांतून अत्यंत हृद्यरीत्यां कथन करतात; ते पहाः

परी अपराधु तो आणिकु आहे। जैं मी गीतार्थु कवळूं पाहे।
तो अवधारा विनवूं लाहे। म्हणौनियां।।१-६६।।
हे अनावर विचारितां। वायांचि धिंवसा उपनला चित्ता।
एऱ्हवीं भानुतेजीं खद्योतां। शोभा आथीं।।६७।।
कीं टिटिंभू चांचूवेरीं। माप सूयें सागरीं।
मी नेणतु तियेपरि। प्रवर्त्ते ऐथ।।६८।।

"अगाध गीतातत्त्व कसे आहे पहाः टिटवीने चोचीने समुद्र आटवण्याचा खटाटोप करावा; किंवा चोचीएवढ्या मापाने समुद्राचे मापन करण्याचा एखाद्याने प्रयत्न करावा; काजव्यांनी आपल्या तेजाचे सूर्याला दान देऊन त्याचे तेज वाढवण्याचा अट्टाहास करावा; त्याचप्रमाणे मी नेणता असूनही आकाशाएवढ्या विस्तीर्ण अशा गीतातत्त्वाला कवळण्याचा प्रयत्न करतो आहे. यावरही कडी म्हणजे

तुम्हां सज्जनांना *"मी काय सांगतो आहे तिकडे लक्ष द्या"* असे सांगण्याचा मोठा अपराधही करतो आहे."

आईका आकाश गिंवसावें।
तऱ्हीं आणिकें तेयांहूनि थोर होआवें।
म्हणौनि अपाडु हे आघवें। निर्धारितां।।१-६९।।
तेयां गीतार्थाची थोरी। स्वयें शंभु विवरी।
जेथ भवानी प्रश्नु करी। चमत्कारौनि।।७०।।
तेथ हरु म्हणे नेणिजे। देवी जैसें कां रूप तुझें।
तैसें नित्यनुतन हे देखिजे। गीतातत्त्व।।७१।।
हा वेदार्थसागरु। जेयां निद्रिताचा घोरु।
तो स्वयें सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादिला।।७२।।
ऐसें जैं अगाध। जेथ वेडावती वेद।
तेथ अल्प मी मतिमंद। काईं होए।।७३।।
हे अपार कैसेनी कवलावें। महातेज कवणें धवलावें।
गगन मुठीं सुवावें। मशकें केवीं।।७४।।

"चिलटाने आकाश मुठीत कवळण्याचा प्रयत्न करावा असा हा माझ्यासारख्या मतिमंद मूर्खाचा प्रयत्न आहे. आकाश कवळायचे तर त्याहूनही मोठे झाले पाहिजे. ज्या गीतार्थाची थोरवी साक्षात शिव गातात; भवानीलाही ज्या नित्यनूतन गीतातत्त्वाचा अचंबा वाटतो; प्रकृति जी नित्य नवीन रुपे धारण करते त्यापेक्षाही सरस असे नित्यनवल प्रकट करणारे हे गीतातत्त्व आहे; वेदार्थसागर ज्याच्या झोपेतील निव्वळ बरळ वा घोरणे आहे अशा त्या सर्वेश्वराने स्वमुखाने प्रत्यक्ष प्रसृत केलेले जे हे गीतातत्त्वरूपी महातेज आहे, ते माझ्यासारख्या दुर्बलाने कसे धवलावे!"

गीतार्थ हा गुरुप्रसाद

परी एथ असें एकु आधारु। तेणेंचि बोलें मी सधरु।
जैं सानुकुळू श्रीगुरु। ज्ञानदेओ म्हणे।।१-७५।।
एऱ्हवीं तऱ्हीं मी मूर्खु। जऱ्हीं जाहला अविवेकु।
तऱ्हीं संतकृपादीपकु। सोज्जलु असे।।७६।।
लोहाचें कनक होए। हे परिसीं सामर्थ्य आहे।
कीं मृतही जीवित लाहे। अमृतसिद्धि।।७७।।
जऱ्हीं प्रगटे सिद्धसरस्वति। तऱ्हीं मुकयां आथि भारतीं।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती। नवल काईं।।७८।।
जेयांतें कामधेनु माये। तेयांसीं अप्राप्य काईं आहे।
म्हणौनि मी प्रवर्तु लाहे। ग्रंथीं इयें।।७९।।

"परंतु हे धाष्ट्र्य करण्यामागे श्रीगुरूंची कृपा हाच माझा एकमात्र पण भक्कम आधार आहे. मी अविवेकी जरी असलो; तत्त्वाची मला ओळख पण नसली; तरीही संतकृपादीपाने माझे अंतरंग उजळले आहे. लोखंडाला परिसाचा स्पर्श व्हावा; अमृत मिळून मृत जीवित व्हावा; कामधेनुरूप माता मिळावी; अशाला मग अप्राप्य ते काय असणार! म्हणूनच नम्रता धारण करून या तत्त्वज्ञानपर ग्रंथाची रचना करण्यास मी उद्युक्त झालो आहे." असे ज्ञानदेव म्हणतात.

तऱ्हीं न्यून तैं पुरतें। अधिक तैं सरतें।
करूनि घेयावें हे तुमतें। विनवितु असे।।१-८०।।
आतां देईजो अवधान। तुम्हीं बोलविल्या मी बोलेन।
जैसें चेष्टें सूत्राधीन। दारुयंत्र।।८१।।
तैंसा मी अनुगृहितु। साधूंचा निरोपितु।
तैं आपुलियापरी अलंकारितु। भलतेयापरी।।८२।।
तंव श्रीगुरु म्हणती राही। हे तुज बोलावे न लगे काईं।
आतां ग्रंथा चित्त देईं। झडकरी गां।।८३।।
इयां बोलां निवृत्तिदासु। पावूनि परमउल्हासु।
म्हणे परिसा मना अवकाशु। देऊनियां।।८४।।

साधूंच्या वतीने – निवृत्तिनाथांच्या आशीर्वादाने ज्ञानेश गीतार्थाचे निरूपण करत आहेत. ते विनम्र भावाने म्हणतात की, "मी त्या गुरुदेवांचा अनुग्रहित असून सूत्राधीन काष्ठपुतळीप्रमाणे ते बोलवतील तेच बोलेन." हे सांगून ज्ञानदेव श्रोत्यांनी अवधान द्यावे असे विनवत आहेत. हे त्यांचे विनम्र बोल ऐकून प्रसन्न झालेले श्रीनिवृत्तिनाथ म्हणतात, *"हे आतां पुरे झाले. तूं सत्वर ग्रंथनिरूपणास प्रारंभ कर!"*

श्रीगुरूंचे हे कृपादर्शक बोल ऐकून ज्ञानदेवांचे चित्त उल्हसित झाले अन ते गीतार्थग्रंथनास अत्युत्साहाने प्रवृत्त झाले.

गीतेची श्लोकसंख्या सातशेंच कां

अशा ज्या गीतेवर जवळ जवळ नऊ हजार ओव्यांची रचना ज्ञानेश करणार आहेत, तिचे स्थूल स्वरूप जिज्ञासूंनी लक्षात घेणे आवश्यक आहे. सव्वालक्ष श्लोकांचे मूळ महाभारत होते असे अभ्यासू समजतात. महाभारताच्या साररूप अशी गीता ***भीष्मपर्व*** या महाभारताच्या भागात येते. हिचे मूळ श्लोक किती हा प्रश्न विद्वानांनी उपस्थित केला आहे. म्हणजे ज्या गीतेवर ज्ञानेश्वर आपले भाष्य करत आहेत, त्या गीतेची संहिता निश्चित होण्यासाठी या प्रश्नाची उकल होणे आवश्यक आहे.

सर्वसाधारणपणे श्रीगीता ही सातशें श्लोकांची आहे असे मानले जाते आणि आजकाल उपलब्ध असणाऱ्या गीताप्रतीही सातशें श्लोकीच असतात. परंतु विद्वानांनी गीतेत मूळ सातशें श्लोक होते की सातशेंएक श्लोक होते ही जिज्ञासा प्रकट केली आहे.

हा प्रश्न उद्भवण्याचे कारण आहे गीतेच्या तेराव्या अध्यायारंभी काही जुन्या प्रतीत आढळणारा एक श्लोक, जो इतर प्रतीत सापडत नाही. तेरावा अध्याय अर्जुनाच्या प्रश्नाने सुरु होत असावा असे समजून हा श्लोक उद्धृत केला जातो. तो असा आहे:

अर्जुन उवाच:

प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्र क्षेत्रज्ञमेव च।
एतद् वेदितुमिच्छामि ज्ञानं ज्ञेयं च केशव।।१३-१।।

अर्जुनाने *प्रकृति-पुरुष व क्षेत्र-क्षेत्रज्ञ* विचार जाणून घेण्यासाठी श्रीकृष्णाला ही विनंती केली असे गृहीत धरल्यास तेराव्या अध्यायी चौतीस श्लोकाऐवजी पस्तीस श्लोक येतील आणि गीतेत

सातशें श्लोकाऐवजी सातशेंएक श्लोक धरावे लागतील. उपरोक्त श्लोक सोडला तर मात्र गीतेच्या इतर सातशें श्लोकांबाबत विशेष असा कोणताही मतभेद विद्वन्मान्य असल्याचे दिसत नाही. मतभिन्नता प्रकटते ती त्या सातशें श्लोकीं संहितेचा अर्थ लावतांना आणि त्याप्रमाणे गीतेचे विविध अर्थ आचार्यांसह अनेक मान्यवरांनी प्रकट केले आहेत.

वर दिलेला अर्जुनाचा विनंतीवजा पृच्छा असलेला श्लोक खरे तर मान्यवंत टीकाकार व भाष्यकार प्रक्षिप्त समजून श्रीगीतेत घालत नाहीत असे दिसते. ज्ञानदेवसुद्धा गीतेस सातशें श्लोकी समजत असावे असेच वाटते. कारण ज्ञानेश्वरीत एक तर सदर श्लोकावर आधारित ओव्या ना तर *बाराव्या* अध्यायाअंती येतात, ना *तेराव्या* अध्यायाच्या आरंभी! दुसरे कारण म्हणजे ज्ञानेश्वरीत *अठराव्या* अध्यायी ***सप्तशतिप्रतिपाद्य भगवती*** वर एक रूपक रचलेले आहे. श्रीगीता ही ती भगवती असून ती सातशे श्लोकी आहे असा स्पष्ट निर्वाळा ज्ञानेश देतात. तो असाः

तैसे शब्दब्रह्म अनन्त। जालें सवालक्षु भारत।
भारताचें शतें सात। सर्वस्व गीता।।१८-१६६१।।
तेयांही सातां शतांचा। इत्यर्थु हा श्लोक शेषींचा ।
व्यासशिष्य सञ्जयाचा। पूर्णोद्गरु हा।।१६६२।।
एणें एकेचि श्लोकें। राहे तेणें असिकें।
अविद्याजाताचें निकें। जिंतिलें होएं।।१६६३।।

"अनन्त शब्दब्रह्मास व्यासप्रज्ञेद्वारे सव्वालक्ष श्लोकी महाभारतरूप प्राप्त झाले. त्या महाभारताचे सर्वस्व गीतेच्या सातशें श्लोकात सामावलेले आहे. त्याही सातशें श्लोकांचे सार व्यासशिष्य सञ्जयाच्या पूर्णोद्गारात आहे. गीतेच्या अंती येणारा हा श्लोक म्हणजे ***"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम।।१८-७८।।"*** असा व्यासशिष्य सञ्जयाचा धृतराष्ट्रास दिलेला युद्धविषयक निर्णय होय. ज्ञान आणि अविद्या यांच्या घनघोर संग्रामातही अंती विजय ज्ञानाचाच होणार आहे; अविद्याजात समूळ जिंकले जाणार आहे; अशी ग्वाही देणारा हा एकुलता एक श्लोक गीतेचाही सर्वार्थ सांगतो." असे ज्ञानेश म्हणत आहेत.

गीता ही सातशें श्लोकाचीच आहे हे परत स्पष्ट होते ते त्यांच्या पुढील रूपकांतूनः

ऐसियां श्लोकां सें सात। गीतेची पदें आंगें वाहात।
पदें म्हणो कीं अमृत। गीताकाशींचे।।१८-१६६४।।
कीं आत्मराजाचियें सभें। गीतें वोडविलें खांभें।
मज श्लोक प्रतिमें । ऐसें येती।।१६६५।।
कीं गीता हे सप्तशती। मंत्रप्रतिपाद्य भगवती।
मोहमहिषामुक्ती। आनंदली असें।।१६६६।।

"हे सातशे श्लोक म्हणजे गीतारूपी विश्वपुरुषाचे पद्यरूप अवयवच होत." आणि त्या श्लोकांना पद म्हणावे की गीताकाशींचे अमृत म्हणावे असाही गोड संभ्रम ज्ञानदेवांच्या मनात प्रकटला आहे. त्यांच्या प्रातिभ दृष्टीला हे सातशे श्लोक म्हणजे आत्मराजाच्या दरबारमंडपाचे सातशे खांबच वाटतात, यांत नवल नाही.

ज्ञानेश म्हणतात की,"ही सातशें श्लोकी गीता म्हणजे जशी काही सप्तशतीच्या मंत्रांनी प्रतिपादिलेली मोहमहिषमर्दिनी मुक्तिदात्री अशी जगदंबा भगवतीच आहे!"

हे असो. गीतेचे सातशें श्लोकच ज्ञानेश मानतात, याबाबतचा अजूनही एक स्पष्ट निर्देश दहाव्या अध्यायाच्या पुढील ओवीतून मिळतोः

जियें आघवांचि महाभारतीं। तैं लाभे कृष्णार्जुनोक्तीं।
आणि गीतार्थु सातें शतीं। तो एकला नवमीं।।१०-३१।।

"संपूर्ण महाभारताचे साररूप तत्त्व श्रीकृष्णार्जुनांच्या सातशे श्लोकांच्या संवादात आहे व या श्रीगीतेच्या सातशेही श्लोकांचा अभिप्राय एकट्या नवव्या अध्यायात आहे." असे ज्ञानदेव म्हणतात.

हे असो. ज्ञानदेवांना सातशे श्लोकी गीतेचे तात्पर्य नवव्या अध्यायात दिसले आणि म्हणूनच की काय सञ्जीवन समाधी घेतांना त्यांच्या मांडीवर *नववा* अध्याय उघडलेली ज्ञानेश्वरी होती, असे म्हणतात. या अध्यायाचे इतके माहात्म्य असल्याचेही आपणांस या निमित्ताने जाणवते. असो.

आत्मरूप श्रीसद्गुरुंची कृपा::::

गुरुऋण

गीतार्थग्रंथन करण्याएवढी योग्यता आपणांस प्रदान करणाऱ्या श्रीगुरुदेवांचे श्रेय व गुरुऋण ज्ञानेशांनी वारंवार गायिले आहे. श्रीगुरुकृपामृताच्या अमृतवर्षावाने संजीवन मिळालेल्या, प्रातिभज्ञानउन्मेष प्रकटवणाऱ्या आपल्या प्रज्ञासामर्थ्यामुळेच गहनातिगहन अशा गीतेचा अर्थ सुलभरीत्या प्रसृत करण्याचे धाष्टर्च आपण करत आहोत असे ज्ञानेश स्वतः होऊन सांगतात. आपल्या ग्रंथाला प्रासादिकता गुरुकृपेनेच प्राप्त झाली असा विश्वास त्यांना वाटतो आहे आणि आपणांसारख्या सामान्यांना पण हे विदितच आहे की त्यांचा हा प्रासादिक ग्रंथ केवढी योग्यता पावला आहे!!

या गुरुऋणाचे अल्पस्वल्प उतराई होण्यासाठी त्यांनी वेळोवेळी गुरुस्तवनपर ज्या ओव्या रचल्या आहेत, त्या पाहिल्यास त्यांचा गुरुप्रतिचा भाव आपल्या ध्यानी नीट ठसतो. तसेच गीताग्रंथाची थोरवी व असामान्यत्व यांच्याशीही त्यांचे त्या ओव्यातील उद्गार खूप निगडित आहेत. या आणि तदनुषंगिक विषयांचे अवलोकन करावे म्हणून आपण जरा तिकडे वळू याः

ज्ञानेश्वरीचे पूर्व व उत्तरखण्ड

श्रीज्ञानेश्वरीचा ***पूर्वखंड*** म्हणजे श्रीगीतेचे पहिले नऊ अध्याय असे ज्ञानेश समजतात. गीतातत्त्वाचा हा मोठा विभाग निरूपण करून

झाल्यावर समाधान पावणारे ज्ञानेश त्याचे श्रेयप्रदान श्रीगुरूंना करत दशमाध्यायाकडे वळतात. त्याप्रसंगी पहिल्या नऊ अध्यायांपैकी प्रत्येक अध्यायाची मूळपीठिकाही त्यांनी स्पष्ट केलेली आहे.

तसेच पूर्वखंडांतीचा *नववा* अध्याय म्हणजे ***राजविद्या-राजगुह्ययोग.*** त्यावर निरूपण करतांना ते मनीमानसी कसे धास्तावले होते, ते पण त्याप्रसंगी त्यांनी सूचित केले आहे. अप्रतिम अशा गीतारत्नांच्या खाणीवर ओवीप्रबंध रचण्यास आपण केवळ गुरुकृपेनेच समर्थ झालो हे मनीमानसी वागविणाऱ्या ज्ञानदेवांनी *नवव्या* अध्यायासारख्या अवघड अध्यायाचे निरूपण सांग होण्यास कारणीभूत झालेल्या श्रीगुरूंवर म्हणूनच पुढील ओव्या रचल्या असाव्यात. त्यांचे सांग स्वरूप जिज्ञासू आणि भाविकांनीही खासच अवलोकावे असे नसले तरच नवल!

आत्मा तोच गणेश व गुरु

ज्ञानेश म्हणतातः

ॐ नमो विशदबोधविदग्धा। विद्यारविंदप्रबोधा।
पराप्रमेयप्रमदा-। विलासिया।।१०-१।।

श्रीज्ञानेश्वरांनी गीतेच्या **पूर्वखंडरुप** अशा पहिल्या नऊ अध्यायांचे निरूपण पूर्ण केले आहे आणि त्यानंतर दशमोध्यायापासून गीतेच्या **उत्तरखंडा**स प्रारंभ होत आहे. त्याप्रसंगी या ओव्या ज्ञानेशमुखातून प्रकटतात. जणू ***पूर्वखंड*** हा एक स्वतंत्र ग्रंथ व ***उत्तरखंड*** हा पण एक स्वतंत्र ग्रंथ असावा या कल्पनेने, जसे प्रथमोऽध्यायारंभी श्रीज्ञानदेवांनी ***ॐ कार*** रूपी प्रणवाचे मङ्गल केले होते, तसेच त्यांनी दशमोऽध्यायारंभीसुद्धा ***ॐ कार*** स्वरूपाचेच मङ्गल केले आहे.

पहिल्या अध्यायारंभीचा ***ॐ कार*** परमात्म्याला नमन करण्याकरता योजिला आहे; तर या अध्यायारंभीचा ***ॐ कार*** श्रीसद्गुरूंना नमन करावे म्हणून उपयोजिला आहे. सद्गुरू आणि परमात्मा हे दोन्ही भिन्न नाहीत, असे यावरून सूचित होते. हे साम्यस्थल लक्षात घेण्यासारखे आहे. म्हणून त्यावेळच्या दोन्ही ओव्या परत उद्धृत करू याः

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।। -

ही प्रथमाध्यायारंभीची ओवी

व

ॐ नमो विशदबोधविदग्धा। विद्यारविंदप्रबोधा।
पराप्रमेयप्रमदा। विलासिया।।१०-१।। -

ही दशमाध्यायारंभीची ओवी या ओव्यांचा विचार करतांना आपल्या लक्षात एक गोष्ट येते की ***श्रीज्ञानेश्वरांचे बोधसूत्र म्हणजे श्रीगुरुकृपेने आत्मबोध प्राप्त करून घेणे .*** पहिल्या अध्यायाच्या पहिल्या ओवीतून ज्ञानेशांनी ज्या तत्त्वाचा स्पष्ट निर्देश केला आहे, त्या आत्मतत्त्वाचा बोध करून देणाऱ्या श्रीगुरूंचे रूपदर्शन दहाव्या अध्याय प्रसंगी पहिल्या ओवीत ते आपणांस घडवतात.

अध्यात्मविद्येस ***विशद*** अशी संज्ञा आहे. आत्मरूपाचा बोध करून देण्यात चतुर; आत्मविद्यारूपी कमलाचा विकास करणारा चित्सूर्य; असे श्रीज्ञानदेवांचे गुरू आहेत. ***पराप्रमेय*** म्हणजे ***परतत्त्व*** अथवा ***पराविद्या-आत्मविद्या-ब्रह्मविद्या.*** अशा ब्रह्मविद्यारूपी प्रमदेशी विलास करणाऱ्या-आत्मरत असणाऱ्या-श्रीगुरूंना ज्ञानदेवांनी या ओवीत नमन केले आहे.

नमो संसारतमसूर्या। अपरिमितपरमवीर्या।
तरुणतरतुर्या। लालनलीला।।१०-२।।
नमो जगदाखिलपालना। मंगलमणिनिधाना।
सज्जनवनचन्दना। आराध्यलिंगा।।३।।
नमो चतुरचकोरचन्द्रा। आत्मानुभवनरेन्द्रा।
श्रुतिसारसमुद्रा। मन्मथमन्मथा।।४।।
नमो स्वभावभजनभाजना। भवेभकुंभभंजना।
विश्वोद्भवभुवना। गुरुराया।।५।।

या गुरुरायांचे वर्णन ते पुढे असे करतातः "संसारतमाचा नाश करणारा सूर्य; ***वीर्य*** म्हणजे ब्रह्मलाभ करून देण्याचे सामर्थ्य - ते अपरिमित असणारे; तुर्यावस्थारूपी चिरतरुणीशी लीलया क्रीडा करणारे; अखिल जगताचे पालन करणारे; कल्याणरूपरत्नांचा निधी; असे हे गुरुदेव आहेत. ते सज्जनांच्या वनातील चंदन आहेत. शिष्याचे आराध्यदैवत; आत्मानुभवामृताचे रसपान करण्यात चतुर असणाऱ्या शिष्यरूपी चकोरांचा चंद्र; आत्मानुभवाचा सम्राट; श्रुतिसागराचा अगाध समुद्र; मन्मथाचेही चित्तहरण करण्यात कुशल असणारा प्रतिमन्मथः भवरूप हत्तीच्या गंडस्थलाला फोडणारा सिंह; सद्भावाने भजन करण्यायोग्य अशी ही ज्ञानदेवांची गुरुमूर्ती आहे. विश्वोत्पत्ती जेथून होते, ते परमभुवनही हे श्रीगुरूच होत; म्हणजे आत्मरूप असेच ते आहेत," हे ज्ञानेशांचे अनुभूतीचे सांगणे आहे.

अशा प्रकारे श्रीगुरुदेवांचे यथार्थ वर्णन करून श्रीज्ञानेश त्यांना म्हणतात कीः

तुमचा अनुग्रहगणेशु। दे आपुला सौरसु।
तैं सारस्वतीं प्रवेशु। बालकां आथी।।१०-६।।
जीं दैविकी उदार वाचा। जैं उद्देशु दें नाभिकाराचा।
तैं नवरससुधाब्धीचा। थाऊं लागे।।७।।
आपुलें स्नेह तैंचि वागीश्वरी। जेयां मुकेयांतें अंगिकारीं।
तो वाचस्पतीशी करी। प्रबंधु होडा।।८।।

"तुमच्या अनुग्रहरूपी श्रीगणेशाची कृपा लाभल्यास सामान्य बालकाचीहि मती सारस्वतात म्हणजे ब्रह्मविद्येत प्रवेशते. एवढी तुमची महती आहे. तुमच्या मोक्षप्रबोध करण्यात उदार असणाऱ्या दिव्य वाचेने जेव्हा परावाणीच्याही पलीकडल्या आत्मतत्त्वाचा बोध करून दिला जातो, तेव्हा शिष्यास नवरसामृताने भरलेल्या अथांग सागराचाही ठांव लागतो आणि तो आत्मरस भोगण्यात समरस होतो. आपला स्नेहाळपणा ही तर जणू साक्षात सरस्वतीच! ती ज्याच्यावर प्रसन्न

होते तो जरी मुका असला तरी वाचस्पतीवरही ताण करणारी वाङ्मयरचना सहजच करतो!"

कृष्णार्जुनसङ्गमींचा *प्रयागवटु*

पुढे ज्ञानेश म्हणतात की:

हे असो दिठी जेयांवरी झलके।
हा पद्मकरु जियें माथीं पारुखे।
तो जीवचि परी तुके। महेशेंसीं।।१०-९।।
एंवढें जियें महिमेचे करणें। तैं वाचाबळें वानावें कवणें।
काईं सूर्याचियां आंगां उटणें। लागतसे।।१०।।
केऊतां कल्पतरुवरी फुलौरा। काईसेनि पाहुणेरु क्षीरसागरा।
कवणें वासीं कापुरां। सुवास देवों।।११।।

"हे असो! श्रीगुरूंचा केवळ कृपाकटाक्ष ज्याच्यावर पडतो; ज्याच्या मस्तकी त्यांचा पद्मकर विराजतो; तो साधा जीव असला तरी महेशाची योग्यता पावतो. ज्या सद्गुरूंची एवढी महती आहे, त्यांचे कितीही वर्णन केले तरी अपुरेच ठरेल. सूर्याच्या अंगाला कुठले उटणे लावले म्हणजे तो जास्त कांतिमान दिसेल! कल्पतरू तर सदैव बहरलेलाच असतो; त्याला आणखी मोहर तो कोणी आणावा! क्षीरसागराला कोणी पाहुणचार तो कसला करावा! कापुराला अधिक सुवासिक करण्यासाठी कोणता सुगंध वापरावा!"

चंदनातें काईंसेनि चर्चावें। अमृतां केऊतें रांधावें।
गगनावरी उभावें। घडे केवीं।।१०-१२।।
तैसें श्रीगुरुचें महिमान। आकलितें कैं असे साधन।
हे जाणौनि मियां नमन। निवांता केलें।।१३।।
जऱ्हीं प्रज्ञेचिनि आथिलेपणें। गुरुसामर्थ्या रूप करूं म्हणे।
तऱ्हीं मोतियां भिंग देणें। तैसें होईल।।१४।।
कां पन्हरेयां रजतवणी। तैसीं स्तुतीची बोलणीं।
उगेयाचि माथां ठेविजे चरणीं। हेंचि भलें।।१५।।

"चंदनाच्या अंगी उटी ती कसली लावावी! अमृताला पाहुणचार करावा म्हणावे तर त्याला कोणते पक्वान्न वाढावे! गगनाला मंडप कोणता घालावा! ज्याप्रमाणे या गोष्टी आहेत; सूर्यापुढे दीप उजळणे जसे आहे; तसेच श्रीगुरूंचे महिमान वर्णन करण्याचा प्रकार आहे. त्यांचे वर्णन समग्र आणि सार्थ करू शकणारे साधन सांगा तरी कोणते आहे ते! आणि नुसत्या वाचासामर्थ्यावरच जर श्रीगुरूंची महती गाण्याचे आपण ठरवले तर ती वाचा अन तिचे सामर्थ्य दोन्ही पण त्यांच्याच कृपेची निशाणी नाहीत कां!" श्रीगुरूंचे हे थोरपण अवेद्य असल्याचे जाणवून श्रीज्ञानदेव अंती गुरुदेवांस समचित्त होऊन नमस्कारितात!

ज्ञानदेवांनी गुरूंचे केलेले हे अवेद्य दर्शन पाहून या ठिकाणी त्यांची अमृतानुभवातील एक ओवी स्मरते:

आतां ज्ञानदेओ म्हणें। श्रीगुरुप्रमाणें येणें।
फेडिली वाचाऋणें। चौहीं वाचांची।।२-८०।।

वाचातीत अशा श्रीगुरूंना प्रणाम करून; त्यांच्याशी एकत्व पावूनच श्रीगुरूंची वाच्यप्रमाणापलीकडील महत्ता कळू शकेल. अशा रीतीने श्रीसद्गुरू त्यांना साधे नमनही न करूं शकणाऱ्या शिष्यासही आत्मोपलब्धी करून देण्यास समर्थ असतात!! अशा सद्गुरूंच्या चरणी केवळ नतमस्तक होणे हेच भले!

दूध मागितलेयासाठी। उपमन्यूपुढां धूर्जटी।
क्षीरसागराचीचि वाटी। करूनि ठेविली।।१०-१७।।
ना तऱ्हीं वैकुंठपीठनायकें। रुसला ध्रुव कवतिकें।
बुझाविला देऊनि भातुकें। ध्रुवपदाचें।।१८।।
तैसा तो ब्रह्मविद्याराओ। सकल शास्त्रां विसंवतां ठाओ।
तैं भगवद्गीता वोवियें गाओ। ऐसें केलें।।१९।।

"ज्याप्रमाणे वाटीभर दूध मागणाऱ्या उपमन्यू बाळकापुढे त्या चंद्रमौलीश्वराने क्षीरसागराचीच वाटी ठेवली; वडिलांच्या मांडीवर साधे कौतुकाने बसायला मिळावे या इच्छेने घोर तपश्चर्या करणाऱ्या ध्रुवबाळाला त्या श्रीविष्णुने तर त्रैलोक्यीचे अढळपदच दिले; तितक्याच उदारपणे, ममत्वदृष्टीने पाहून या श्रीगुरुदेवांनी गीतेचे साधे ग्रथन करूं पाहणाऱ्या मला एवढा उत्कृष्ट प्रबंध रचण्याचे सामर्थ्य दिले."

मग म्हणितलें स्वामी। भलेनि ममत्वें देखिला तुमीं।
म्हणौनि कृष्णार्जुनसङ्गमीं। प्रयागवटु जालो।।१०-१६।।

"कृष्णार्जुनसंवादाचे असे ग्रथन करूं पाहणाऱ्या मज असमर्थाचाही माझ्या श्रीगुरूंनी कृष्णर्जुनसंवादरूपी धारांच्या पवित्र संगमावरील खुणेचा वटवृक्ष करून सोडला आहे!***<u>हा संवाद आकळायचा असेल तर माझ्या या ग्रंथरूपाची भेट घेतलीच पाहिजे सगळ्यांनी!</u>*** सकल शास्त्रे जिच्यापाशी विसंबतात, त्या ब्रह्मविद्येची स्वामिनी अशी ही जी गीता आहे, तिच्यावर ओवीबद्ध सुगीत अशी ही *ज्ञानदेवी* रचण्याचे सामर्थ्य मला त्या श्रीगुरूंच्या कृपेचेच दान म्हणून मिळाले आहे."

गीतेवर अलौकिक अशी जी रचना ज्ञानदेवांनी केली, ती काय तोलाची आहे व कशी आहे, तिचे स्वरूप स्पष्ट करतांना ज्ञानदेव पुढे सांगतात:

जैं बोलणेयाचें रानीं हिंडतां।
नायकिजे फललियां अक्षराची वार्ता।
तैं वाचा केली कल्पलता। विवेकाची।।१०-२०।।
होती देहबुद्धि एकसरी। आनंदभांडारा केली वोवरी।
मन गीतार्थुसागरीं। जलशयनु जालें।।२१।।

"<u>श्रीगीतेवर आख्यान करणाऱ्यांच्या शब्दरूपी वनांतील एकही वृक्ष कधीच फल देऊं शकलेला नाही. श्रीगीतेचा सार्थ बोध करून देणारे एकही सफल प्रवचन अद्यापपावेतो झाल्याचे ऐकीवांत नाही</u>. असे असता श्रीगुरूंनी मजसारख्या सामान्याच्या वाचेला मात्र आत्मोपलब्धी करून देणाऱ्या विवेकरूपी फळभाराने लगडलेली कल्पलता केली. माझी देहबुद्धी एकजीव करून त्यांना स्वात्मानंदाचे केवळ भांडारच असे त्यांनी केले आहे आणि माझ्या मनाला तर

गीतार्थसागरीं योगनिद्रेत पहुडलेला जणू लक्ष्मीनारायणच केले आहे. अशी श्रीगुरूंची एकेक करणी आहे."

ऐसें एकेक देवाचें करणें। तैं अपार बोलों केवीं मी जाणें।
तऱ्हीं अनुवादलों धीटपणें। तैं उपसाहिजो।।१०-२२।।

"त्यांची किती म्हणून मी वाखाणणी करावी! त्यांच्या प्रसादाने मी धिटुकलेपणाने श्रीमद्भगवद्गीतेच्या अवघड अशा पूर्वखंडाचाही लीलया अनुवाद करू शकलो. तुम्ही सज्जनांनी हे माझे धाष्ट्र्य कृपाळुपणे सहन करावे, अशी माझी आपणा श्रोत्यांना नम्र विनंती आहे."

गीताख्यानाची विशेषता::::

गीतेची अपूर्वता व फल

या ठिकाणी थोडे विषयांतर अभिप्रेत आहे. पूर्वखंडाच्या नऊ अध्यायांची पूर्वपीठिका पहाण्यापूर्वी श्रीगीता कशी आहे, तिच्या व्याख्यानाची फलनिष्पत्ती काय होते व काय असावी,याबाबत ज्ञानेशांचे विचार आपण आधी जाणून घेऊ या.

काहींच्या मनात एक जिज्ञासा असते. ती म्हणजे ज्ञानेश्वरांनी आपल्या प्रतिभेच्या आविष्कारासाठी गीताविषयच कां निवडला असावा. या विषयावर त्यांच्याच मुखाने जो प्रकाश पडतो, तो पाहण्यासाठी आपण त्यांनी *पंधराव्या* अध्यायी श्रीकृष्णांच्या तोंडी घातलेल्या ओव्यांकडे वळू या. त्या ओव्यात श्रीगीताख्यानाची फलश्रुती येते. तसेच धृतराष्ट्रासारख्या महामोहाने मूढ झालेल्या व गीताख्यानात कोणताही रस न घेणाऱ्या तमोव्याप्त चित्ताच्या अनधिकारी पुरुषासही श्रीव्यासदेवांच्या कृपेने सञ्जयाद्वारे गीता नवनीताचा स्पर्श झाल्याने अंतकाळ कसा तरता आला याचे समर्पक वर्णन आहे.

एवं कथलेयादारभ्य। जैं हे सर्वशास्त्रैकलभ्य।
उपनिषदां सौरभ्य। दशदलांचे।।१५-५७०।।
हे ब्रह्माचेनि नवनीतें। व्यासप्रज्ञेचिनि हातें।
मथुनि काढिलें आयतें। सार आम्हीं।।५७१।।
जैं ज्ञानामृतींची जाह्नवी। जैं आनन्दचन्द्रींची सतरावीं।
विचारक्षीरार्णवींची नवी। लक्ष्मी जैं हे।। ५७२।।

"उपनिषद्रूपी दशदलपुष्पातील परिमळ असे हे सर्वशास्त्रलाभरूपी गीतानवनीत व्यासप्रज्ञारूपी अरणीने शब्दब्रह्माचे मंथन करून भगवंतांनी काढले. श्रीगीता म्हणजे जणू ज्ञानामृताची गङ्गाच! परमानन्दरूप चंद्राची सतरावी कलाच! विचाररूप क्षीरसागरींची नित्य नूतन स्वरूप धारण करणारी श्रीलक्ष्मीदेवीच!"

म्हणौनि आपुलेनि पदें वर्णें। अर्थाचेनि जीवेंप्राणें।
मी वांचौनि होवो नेणें। आन काईं।।१५-५७३।।
क्षराक्षरत्वें समोर आलें। तैं पुरुषत्वें वालिलें।
मग मज सर्वस्व दिधलें। पुरुषोत्तमीं।।५७४।।
म्हणौनि जगीं गीता। मियां आत्मेनि पतिव्रता।
जैं हे प्रस्तुतीं आतां। तुवां आकर्णिलीं।।५७५।।

"ज्याप्रमाणे श्रीलक्ष्मीदेवीच्या हृदयी एका जनार्दनाशिवाय कोणीच असू शकत नाही; त्याप्रमाणे या गीतारूपी मोक्षलक्ष्मीच्या वर्ण-पद-अर्थरूप हृदयांतरी जीवप्राण अशा श्रीवासुदेव परमात्म्यावाचून दुसरे काहीही नाही! गीताहृदयींचा ठेवा म्हणजे हा पुरुषोत्तम! ***क्षर पुरुष व अक्षर पुरुष*** या मोक्षलक्ष्मीची प्राप्ती व्हावी म्हणून पुढे झाले असता त्यांना न वरता तिने सत्यपुरुष श्रीहरी यालाच माळ घातली. श्रीहरी आत्मयाची म्हणूनच श्रीगीता ही पतिव्रता आहे."

तिच्या हृदयारविंदी असणाऱ्या स्वसंवेद्य आत्मतत्त्वाचा उत्कृष्ट बोध श्रीकृष्णांनी अर्जुनास कसा करून दिला, ते आपणांस विदित आहेच! गीताशास्त्राचे प्रासादिकत्व आपल्या मनावर ठसावे म्हणून ज्ञानेश असेही म्हणतात कीः

सांचचि बोलाचें नोहे शास्त्र। पैं संसारु जिणतें हे शस्त्र।
आत्मा अवतरविते मन्त्र। अक्षरें इयें।।१५-५७६।।
परि तुजफुढां सांगितलें। तैं अर्जुना आईसें जालें।
जैं गोप्यधन काढिलें। माझें आज।।५७७।।
मज चैतन्यशंभूचां माथां। जो निक्षेपु होता पार्था।
तेयां गौतमु जालासि आस्था-। निधी तूं गां।।५७८।।

"श्रीगीतेची दिव्य अक्षरे मंत्ररूप असून प्रत्यक्ष आत्मराजास अवतरवणारे मंत्र म्हणजे तिचे श्लोक होत. संसारावर विजय मिळवण्याचे श्रीगीता हे परमोत्कृष्ट असे भगवत्कृपारूपी अमोघ शस्त्र आहे. हे निव्वळ शब्दपांडित्य मिरवणारे दिमाखी शास्त्र नव्हे. गुह्यातिगुह्य असणाऱ्या श्रीहरीच्याही निजहृदयीचे गुज म्हणजे ही श्रीगीता! ते रहस्य, ते गुज, तो आत्म्याच्या अंतरीचा निधी प्रकट करण्यास अर्जुन कारण झाला आहे. श्रीहरीरूप चैतन्यशंभूच्या मस्तकावरील गुप्त असलेली श्रीगीतारूपी गङ्गा प्रकट करणारा जणू गौतमऋषी म्हणजे अर्जुनच! गौतमांच्या प्रार्थनेवरून श्रीधूर्जटी त्र्यंबकाने त्रिंबकेश्वर पर्वतराजींच्या माथी आपला जटासांभार आपटून लोकपावनी गोदावरीगङ्गा जशी प्रकट केली, तसेच अर्जुनाच्या कळवळ्याने द्रवून श्रीकृष्णांनी हे गुह्यातिगुह्य असे गीताशास्त्र प्रकट केले आहे."

चोखटियां आपुलियां। पुढिला उगाणा घेयावेयां।
तेयां दर्पणाची परी धनन्जेयां। केली तुवां।।१५-५७९।।
कां भरलें चंद्रतारांगणीं। नभ सिन्धु आपणेयां आणी।
तैसा गीतेसीं मी अंतःकरणीं। सूदला तुवां।।५८०।।
जैं त्रिविध मलकटां-। आंतु सांडिलासि सुभटा।
म्हणौनि गीतेसीं वसौटा। जालासि गां।।५८१।।

"उपमा त्या किती कराव्या यावर! पण अर्जुन म्हणजे श्रीकृष्णांचे आत्मबिंब प्रकाशवणारा जणू निर्मळ आरसाच! विशाल सागरात जसे अतिविस्तीर्ण असणारे नभोमंडल आपल्या अंगीच्या चन्द्र-तारांगणासह प्रतिबिंबित होते, तसाच तो अनन्त असलेला श्रीहरी आपल्या सकल कलांसह अर्जुनाच्या विश्वमय झालेल्या हृदयात प्रकटला. अंतरीच्या

तिन्ही मलांचा त्याग करून अर्जुनाने आपले निर्मळ अंत:करण त्यांत श्रीहरीने येऊन रहावे म्हणून उघडे केले. म्हणूनच त्याच्या अंत:करणात त्या श्रीहरीने येऊन गीतेसह निवास केला," असे श्रीज्ञानदेवांचे उद्गार आहेत.

कर्माचे गन्तव्य - *ज्ञान*

गीतासेवनाने मनुष्यास मोक्ष प्राप्त होतो; आत्मज्ञान प्राप्त होते; नैष्कर्म्यसिद्धी तर त्याचे घर पुसत येते; असे श्रीकृष्ण अर्जुनाला सांगताहेत. त्यांचे ते बोल ज्ञानदेवांच्या अंतरंगी उमटतात, ते असे:

परि हे काईं बोलों गीता। जैं हे माझी उन्मेखलता।
जाणें तो समस्तां। मोहां मुके।।१५-५८२।।
सेविलीं अमृतसरिता। रोगु दवडूनि पाण्डुसुता।
अमरपण उचिता। देऊनि घालीं।।५८३।।
तैसीं गीता हे जाणितलियां। काईं विस्मो मोहो जावेयां।
परि आत्मज्ञानें आपणपेयां। मिलिजे एथ।।५८४।।
जेयां आत्मज्ञानाचां ठाईं। कर्म आपुलेयां जीवितां पाहीं।
होऊनियां उतराईं। लया जायें।।५८५।।

"श्रीहरीची ज्ञानलताच अशी ही गीता ऐकणारा सर्व मोहापासून मुक्त होतो. ज्याप्रमाणे अमृताचे सेवन केले असता रोग पळून जातो आणि अमृताची पण प्राप्ती होते, त्याप्रमाणे श्रीहरीच्या आत्मरूप अशा या गीतेचे अर्थ जाणून सेवन केले असता मोहाचा नाश तर होतोच होतो. पण शिवाय आत्मज्ञानही प्राप्त होते आणि आत्मस्वरूप होता येते. आत्मरूप झाल्यावर हातून घडणारी कर्मे, कर्मे म्हणून होतच नाहीत. ती कर्मे निष्कर्म होतात आणि नैष्कर्म्यत्व पावून कृतार्थ झालेले कर्म लयाला जाते. हरवलेल्याचा माग घ्यावा, तर हरवलेली वस्तू दाखवून माग जसा लयाला जातो; तसेच ज्ञानाचा ठेवा सांपडवून देऊन कर्ममार्ग अदृश्य होतो," असे अनाथांचा सखा सांगत आहे.

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो-
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो-
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्।।१५-१५।।

भगवंत म्हणतात की "सर्वांच्या हृदयात मी प्रविष्ट होऊन राहिलो आहे. माझ्यापासूनच स्मृती, ज्ञान, तर्क किंवा त्यांचा अभाव ही सर्व होतात. सर्व वेदांच्या योगाने मीच जाणला जातो. मीच सर्व वेदांना जाणणारा आणि वेदांचे अंतिम तत्त्वज्ञान प्रकट करणाराही मीच आहे."

भगवंतांनी श्रीगीतेच्या *पंधराव्या* अध्यायात वरील श्लोकांतून जे आत्मज्ञान उल्लेखले आहे, ते झाल्यावर सर्व कर्मे समाप्त होणारच! हे ज्ञानसुद्धा हृदिस्थ जनार्दनामुळेच प्राप्त होते, हे वेगळे सांगायला नको! कर्माचे अंतिम साध्य ज्ञान आहे.

हारपलें दाऊनि जैसा। मागु सरे वीरविलासियां।
ज्ञानें कलसु वलघे तैसा। कर्मप्रासादां।।१५-५८६।।
म्हणौनि ज्ञानियां पुरुखा। कृत्य करूं सरलें देखा।
ऐसा अनाथांचा सखा। बोलिला तो।।५८७।।

ज्ञान ही हरवलेली वस्तू आहे. तिचा माग लावून देणारे *सत्कर्म* आहे. ज्ञानाचा लाभ करून दिल्यावर कर्माचे प्रयोजन उरत नाही. त्यानंतर ज्ञान्याने हवे तर परत ज्ञान हरवले आहे असे भासवून पाहिजे तर कर्माचा खेळ परत परत खेळावा. ती त्याची लीला ठरेल. कारण ज्ञानाचे विलक्षण लक्षण म्हणजे ते एकदां कां प्राप्त झाले की ते पुन: हरवत नाही. आणि जी वस्तू कधीच हरवत नाही, तिचा शोध उगीचच पुन: पुन: घेऊ पहाणारा ज्ञानी पहायला मिळणेही दुर्लभच!

खरे तर ज्ञान ही एकमेव अशी वस्तू आहे की ती गंवसायला परमभाग्य लागते; परंतु ती कधीही नष्ट होऊ शकत नाही.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।।२-२३।।

शस्त्राने जसा आत्मा नष्ट होत नाही; अग्नीने तो जसा जाळला जाऊं शकत नाही; पाण्याने तो जसा विरघळून जात नाही; वायूने जसा तो विघटित होत नाही; तसेच त्याचे ज्ञानही नष्ट न होणारे आहे. असे हे ज्ञान प्राप्त झाले की कर्माचे वारे सरणारच! कर्मयज्ञाची सांगतासुद्धा ज्ञानयज्ञाने होते, ती याचसाठी. याच अर्थी भगवंत म्हणतात:

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परन्तप।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।४-३३।।

परन्तप म्हणजे ***पर-अन्त-प !!*** परतत्त्वाचा अंत पाहूं शकणारा म्हणजेच परमपदापर्यंत पोहोचणाऱ्या अर्जुनाला उद्देशून भगवंत त्याला सांगत आहेत की त्यांना जाणून घेण्याच्या सर्व प्रकारच्या साधनांपेक्षा, सर्व प्रकारच्या यज्ञांमध्ये पण ज्ञानयज्ञ श्रेष्ठतम आहे. इतर सर्व प्रकारची साधने-यज्ञादी इतर सर्व कर्मे ज्ञानात विलीन होतात. म्हणून ***ज्ञानी पुरुषास कर्म उरत नाही असे म्हटले जाते.***

गीतेचे ***ज्ञानकाण्ड*** *पंधराव्या* अध्यायी सांगून पूर्णत्वास जाते, असे ज्ञानेश म्हणतात. श्रीगीतारूपी कर्मप्रासादावर पंधराव्या अध्यायी भगवंतांनी निरूपिलेला ***पुरुषोत्तमयोग*** रूपी ज्ञानकलश चढवल्याने कर्मयोगास परिपूर्णता येते. कर्मच ज्ञानात प्रविष्ट होते. ***कर्मयोगाची भक्ती व योग या अंगांसह ज्ञानयोगात परिणती होते. कर्म - योग - भक्ती - ज्ञान या चारही उपांगांना जपत, सांवरत, गीतेचा हा सर्वश्रेष्ठ योग संपन्न होतो.*** असो. याबाबत अधिक विचार नंतर करूं या.

धृतराष्ट्राचे सद्भाग्य

तूर्त गीतासेवनाची फलप्राप्ती किती उत्कृष्ट प्रतीची असते हे ज्ञानेशमुखे श्रवण करण्याचे भाग्य अनुभवू या:

तैं कृष्णवदनामृत। पार्थीं भरूनि वोसंडत।
तंव व्यासकृपा येत। सञ्जयासीं।।१५-५८८।।
तो धृतराष्ट्र राया। सूतसें पान कराया।
म्हणौनि जिवितान्तु तेयां। नोहेचि भारी।।५८९।।

एऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं। आवडो लागतां अनधिकारी।
परि सेखीं तैंचि उजिरी। पांती लाभे।।५९०।।

"याप्रमाणे तो अनाथांचा सखा दीनदयाल श्रीकृष्ण आपल्या मुखींचे अमृत पार्थाला देतां झाला. ते अमृत पार्थरूपी कलशांतून ओतप्रोत भरून ओसंडून वाहूं लागले. तेव्हां व्यासकृपेने त्यांच्या शिष्योत्तम सञ्जयाने ते अमृत ओंजळ भरून घेतले व अंध-वृद्ध-गलितगात्र अशा धृतराष्ट्रास बळेंच पाजले. त्या अनधिकारी अडाणी मोहग्रस्त अशा राजास जरी ते आवडले नाही, तरी त्याचा अंतकाल त्यामुळेच सुखाचा झाला व शेवटी कां होईना, त्याला ज्ञानप्रकाश लाभला."

जेधवां द्राक्षीं दूध घातलें। तेधवां वायां गेलें गमलें।
परि फलपाकीं दुणावलें। देखिजे जेवीं।।१५-५९१।।
तैसीं हरिवक्त्रींची आखरें। सञ्जयें सांगितलीं आदरें।
तीहीं अंधु तो अवसरें। सुखियां जाला।।५९२।।

"द्राक्षवेलीस दूध घातले असता ते वाया गेले असे वाटेल; परंतु माधुर्याने परिपूर्ण अशा बहुल द्राक्षांनी ती वेल जेव्हा लगडलेली दिसते, तेव्हा ते दूध खूपच उपयोगी होते, हे सिद्ध होते. तसेच श्रीकृष्णमुखीची अमृतमय गीतावचने अत्यादरपूर्वक सश्रद्ध सञ्जयाने धृतराष्ट्रास विदित केली. तेव्हा जरी त्याची ती कृती निष्फळ वाटली, तरी त्यामुळेच कालांतराने मृत्यूसमयी तो अंध सुखी झाला."

"भाष्यकारांतें वाट पुसतु"::::

***पूर्वसूरी* वाटाडे कोण**

एवढे फल देणारी गीता ही अमृतमधुर अशी द्राक्षलताच आहे जणू! अशा अप्रतिम गीतेच्या अर्थाचे रसग्रहण करण्यास आपण केवळ गुरुकृपेनेच समर्थ झालो असे ज्ञानदेव म्हणतात. नाही तर त्यांच्याच म्हणण्यानुसार आतापावेतो ***"जैं बोलणेयाचें रानीं हिंडतां। नायकिजे फळलियां अक्षराची वार्ता।।१०-२०।।"*** असे पूर्वसूरींच्या गीताभाष्यांबाबत झाले होते.

गीतेवर भाष्य करणारे, टीका करणारे, रहस्य उद्घाटन करू इच्छिणारे अनेकानेक मान्यवर-आचार्य-विद्वान-टीकाकार- वाचस्पती असे जे होऊन गेले, त्यांच्या ग्रंथांतरींची अक्षरे म्हणजे त्यांच्या आख्यानरूपी वनातील फल न देऊं शकलेले शब्दरूपी वृक्षच केवळ ठरले. ज्ञानदेवांची ही परखड स्पष्टोक्ती आपण सर्वांनी पण ध्यानी घेणे महत्त्वाचे आहे. ***"भाष्यकारांतें वाट पुसतु"*** या त्यांच्या ओवीतील *(१८-१७२२)* भाष्यकार *(आचार्य)* कोणते, याचा शोध अहमहमिकेने घेऊ पहाणाऱ्या विद्वज्जनांनी हे ज्ञानेशांचे विधान खरेच लक्षात घेण्यासारखे आहे.

विनयसंपन्न ज्ञानेशांनी पूर्वसूरींच्या अनेकानेक गीताभाष्यकारांस व विद्वानांस जरूर गीताविचारांची दिशा जाणून घेण्यासाठी वाट पुसली असणारच! एकासही ती वाट नीट माहित नसल्याचे जाणवून बहुधा आपणच आपली वाट शोधून काढली असावी. या आपल्या गीतेचा शोध घेणाऱ्या प्रबंधाचे -ज्ञानेश्वरीचे-श्रेय ते समस्तांना देतात, हा त्यांचा थोरपणा!

खरे तत्त्वज्ञानी व विचारवंत हे नेहमीच मान्य करत आले आहेत की पूर्वसूरींच्या खांद्यांवर उभे रहाण्याचे भाग्य त्यांना लाभल्यामुळे त्यांचे क्षितिज अधिक विस्तारलेले दिसते. या गोष्टीचे श्रेय पूर्वसूरींना देण्याची सौजन्यबुद्धी ज्ञानेशांनी निर्विवाद दाखवलेली आहे. तसेच आपल्या गुरूंनाही हे श्रेय त्यांनी दिले आहे आणि केवळ गुरुकृपेमुळेच त्यांचा हा गीताशोध पूर्णत्वास गेला असल्याची निःसंदिग्ध ग्वाही पण ते देतात.

त्याचबरोबर आपल्या गीताख्यानातील शब्दतरू हे सुमधुर फलांनी संपन्न असल्याचेही आपणांस जाणवून देण्याइतके उदारही ते आहेत. त्यांची इच्छा कृपणत्वाने त्या गीतार्थरूपी फलोद्यानापासून आपणांस वंचित करण्याची नाहीच. उलट सगळ्यांनी त्या उपवनांतील सुमधुर फलांचा यथेच्छ उपभोग घ्यावा या मनीषेने ते आपणांस तेथील प्रत्येक फलसंपन्न वृक्षातळी आपले बोट धरून घेऊन जातात व स्वहस्ते तेथील फळे तोडून आपणांस भरवतात, असे दृष्य संपूर्ण ज्ञानेश्वरीभर दिसून येते.

श्रीगीता पूर्वखंड::::

गीताध्याय विषयसंगती

हे करणे त्यांना सुलभ जावे म्हणून हे निरूपण करतांना त्यांनी गीताध्यायांची संगती लावली आहे, ती ऐकवत ते म्हणतात:

आतां आपुलेनि प्रसादें । मियां भगवद्गीता वोवी प्रबंधें।
पूर्वखंड विनोदें। वाखाणिलें।।१०-२३।।
प्रथमीं अर्जुनाचा विषादु। दुजीं बोलिला योगु विशदु।
जैं सांख्यबुद्धि भेदु। दावूनियां।।२४।।
तिजीं केवल कर्म प्रतिष्ठीलें। तेंचि चौथां ज्ञानेसीं प्रगटिलें।
मग पंचमीं गव्हरिलें। योगतत्त्व।।२५।।
तैंचि षष्ठामाजीं स्पष्ट। आसनालागौनि प्रगट।
जीव परमात्मभाव एकवट। होती जेयांपरी।।२६।।
तैसीं जैं योगस्थिती। आणि योगभ्रष्टांची जैं गती।
तैं आघवींचि उपपत्ती दाखविली।।२७।।
मग तेयांवरी सप्तमीं। प्रकृति परिहारु उपक्रमीं।
करूनि भजती जैं पुरुषोत्तमीं। तैं म्हणितलें।।२८।।

अष्टमाध्यायापर्यंतच्या प्रत्येक अध्यायाचा ज्ञानदेव थोडक्यात असा अभिप्राय सांगतात. म्हणजेच त्यांच्या शब्दात म्हणायचे तर प्रत्येक अध्यायाला जी मुद्रा ते लावतात, ती अशी आहे:

"पहिल्या अध्यायात अर्जुनाला झालेला विषाद व्यक्तवलेला आहे." ***अर्जुनविषाद*** नांवाचा योग मात्र त्यात नाही हे जिज्ञासूंनी या ज्ञानेशशब्दांचा अर्थ करतांना ध्यानी घेण्याजोगते आहे. काही विद्वानांनी असा कांही योग असल्याचे विधान केले आहे. म्हणून ही सूचना!

योग म्हणजे काय हे खरे तर *दुसऱ्या* अध्यायी स्पष्ट केले आहे. योगाचे जे दोन प्रकार गीता करते, त्यातील ***सांख्ययोग*** वा ***ज्ञानयोग*** म्हणून ज्यास म्हणतात, त्याचे रहस्य या अध्यायी दाखविले आहे.

तिसऱ्या अध्यायी कर्म म्हणजे काय याचे विश्लेषण व प्रतिपादन ज्ञानेश करतात. सांख्ययोगमार्गाव्यतिरिक्त ***कर्मयोग*** हा जो दुसरा योगमार्ग गीतेला अभिप्रेत आहे, त्याअंतर्गत येणाऱ्या कर्माचे ते येथे निरूपण करतात, तर *चौथ्या* अध्यायात तेच कर्म ज्ञान प्राप्त करून देण्यास कसे उपकारक ठरते, ते ज्ञानवर्णनासह प्रकट करतात. योगमार्गाचे रहस्य उद्घाटन करण्यास खरी तर या अध्यायाच्या ***"इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।.."*** या प्रथम श्लोकापासून सुरुवात होते.

पांचव्या अध्यायांतून त्यांनी गुह्यतम असे जे योगतत्त्व आहे, त्याचे बीजारोपण केले आहे. तेच योगतत्त्व आसनादींसह त्यांनी *सहाव्या* अध्यायात स्पष्टपणे प्रकट केले आहे. या अध्यायात त्यांनी योगरहस्य पूर्णपणे विशद केले आहे, अशी स्पष्ट ग्वाही आहे. जीव-परमात्मभाव योगाद्वारे कसे एकजीव होतात, ते, योग्यास जी अशी स्थिती प्राप्त होते, तिच्या वर्णनासह त्या अध्यायात दाखवले आहे.

या योगविषयक उपपत्तींमध्ये योगभ्रष्टास प्राप्त होणाऱ्या गतीचाही अंतर्भाव झालेला आहे. योगविषयक हा जो निर्वाळा ज्ञानदेव देत आहेत, त्यावरून आपणांस प्रथमदर्शनी असे अनुमान बांधता येते की आतापावेतो आलेल्या व नंतर येणाऱ्या प्रत्येक गीता अध्यायाच्या समाप्तीची मुद्रा ***कर्मयोग, कर्मसंन्यासयोग इ.*** अशी काहीही प्रचलित असली तरी गीतेत त्या त्या मुद्रांइतके म्हणजे कमीत कमी अठरापगड वेगवेगळे योगमार्ग प्रतिपादिले आहेत असे जे एक मत आहे, ते अपरिपक्व असले पाहिजे. असो.

यानंतर येणाऱ्या *सातव्या* अध्यायात ***प्रकृति आणि तिचा उपक्रम व उपसंहार*** हे दाखविले आहेत. ***विश्वाची उभारणी व उपसंहार*** हे विषय त्यात आहेत असे जरी दिसत असले, तरी योगमार्गीयांना अभिप्रेत असे एक रहस्य त्यात दडलेले आहे. ***प्रकृतीची उभारणी ज्या आदितत्त्वापासून होते, त्यातच ती लीन होते, लय पावते, हा योगविशिष्ट महत्त्वाचा भाग तेथे निरूपिला आहे.***

प्रकृतीचा परिहार म्हणजे उपसंहार करणारे योगी त्यांनी *सहाव्या* अध्यायी त्यांच्या योगक्रियेसह वर्णिले होते. त्या योगसाधकांचे पुरुषोत्तमास चतुर्विधरीत्या भजण्याचे प्रकार म्हणजे त्या योगसाधकांचे चतुर्विध भक्तिप्रकार वा ***ईश्वरप्रणिधानाचे प्रकार*** *सातव्या* अध्यायात स्पष्ट केले आहेत. भक्ती ही योगाशी अशी अभिन्न असल्याचा निर्देश या विवेचनाद्वारे जिज्ञासूंना मिळतो. असो.

अष्टम अध्याय व नवमाची मुद्रा

पुढे ज्ञानदेव म्हणतात कीः

पाठीं सप्तप्रश्नसिद्धि। बोलौनि प्रयाणशुद्धि।
एवं सकलवाक्यअवधि। अष्टमाध्यायीं।।१०-२९।।

आठव्या अध्यायात अर्जुनाने विचारलेल्या सात प्रश्नांची उत्तरे भगवंतांनी सविस्तर दिली आहेत. ते प्रश्न म्हणजे ***(१) किं तत् ब्रह्म (२) किम् अध्यात्मम् (३) किम् कर्म (४) किं च प्रोक्तम् अधिभूतम् (५) किम् अधिदैवतम् उच्यते (६) अधियज्ञः कथम् कः अत्र अस्मिन् देहे व (७) प्रयाणकाले च कथं ज्ञेयः असि नियतात्मभिः*** असे आहेत.

(१) ब्रह्म म्हणजे काय ? (२) अध्यात्म म्हणजे काय ? (३) कर्म म्हणजे काय ? (४) अधिभूत कशाला म्हणावे ? (५) अधिदैव म्हणजे काय ? (६) या देहीं अधियज्ञ कोण आहे व तो कसा आहे ? (७) युक्तचित्त पुरुषाला अंतकाळी तुमचे ज्ञान कसे राहते ? हेच ते अर्जुनाचे प्रसिद्ध प्रश्न ! या प्रश्नांची उत्तरे मधुसूदनांनी अष्टम अध्यायी दिली आहेत. तसेच योग्यांना प्रयाणकाली शुद्ध गती कशी प्राप्त होते, हे कथन पण त्याच प्रसंगी केले आहे.

नवमाध्यायाचे महत्त्व

मग शब्दब्रह्मीं असंख्याकें। जेतुला काई अभिप्रायु पिकें।
तेतुला महाभारतीं एकें। लक्षें जोडे।।१०-३०।।
तियें आघवांची महाभारतीं। तैं लाभे कृष्णार्जुनोक्तीं।
आणि गीतार्थु सातें शतीं। तो एकलाचि नवमीं।।३१।।
म्हणौनि नवमीचियां अभिप्राया। सहसा मुद्रा लावावेयां।
बिहाला मी वायां। गुरुवती बोलो।।३२।।

असंख्य शब्दराशी जे ब्रह्म आहे, त्याचे वर्णन वेदांनी ***"नेति, नेति"*** असे केले आहे. वेदांचा अभिप्राय व्यासांनी एक लक्ष श्लोकी महाभारतातून सांगितला आहे. त्या प्रचंड महाभारताचाही संपूर्ण अभिप्राय केवळ सातशें श्लोकरूपी श्रीकृष्णार्जुनसंवादात म्हणजे श्रीगीतेत व्यक्तविलेला दिसतो असे ज्ञानेश पूर्वसूरींप्रमाणेच म्हणताहेत. पण त्यापेक्षा महत्त्वाचा अभिप्राय सांगतांना ते म्हणतात की ***संपूर्ण गीताख्यानाचाही अभिप्राय एकल्या नवम अध्यायातच आहे.*** असे हे अपूर्व असल्याने ***नवव्या*** अध्यायाचा अभिप्राय सांगण्यास आपण खरोखरीच पात्र आहोत कां याबाबत ज्ञानदेव साशंक आहेत !!

ज्ञानदेवांचा हा विनीत भाव अप्रतिम आहे, यात आपणास शंकाच नाही ! अनंत रंगा-रूपांची उधळण करून अनंत विश्वात अनंत छटा अभिव्यक्त करणाऱ्या त्या अनंताचे वर्णन-त्याचा महिमा -त्याचा अभिप्राय कोण शब्दात व्यक्त करू शकेल ! श्रीगीता ही ज्याचा आंगिक भाव आहे; ज्याची लावण्यशोभा आहे; ज्याच्या अर्थाची खाण आहे; अशा त्या गीतार्थरूपी अमृतकुंभाचा अभिप्राय व्यक्तविणारा आहे हा ***नवम अध्याय!!!***

गीतार्थ करतांना भिन्नभिन्न भाष्यकारानी व टीकाकारांनी आपापल्या व्युत्पन्न मतीस अनुसरून श्रीगीतेचा वेगवेगळा मतितार्थ व्यक्त केला आहे. तो सगळाच एकमेकांशी जरी सुसंबद्ध नसला तरी त्या अनंतवेषधारी पुरुषोत्तमाने मोठ्या कौतुकाने, मोठ्या प्रेमाने, मोठ्या आवडीने हा सगळा कांहीसा विसंवादी अर्थसंभार परिधान केला आहे.

गीतेत वर्णिलेल्या:

त्वमादिदेवः पुरुषः पुराण-
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप।।११-३८।।

अशा या पुराणपुरुषोत्तमाने, अखिल ब्रह्मांडाच्या परम आश्रय, सर्वज्ञात्या आणि परमज्ञेय, परमधाम अशा या अनन्तरूप आदिदेवाने संपूर्ण विश्व व्यापले आहे; त्या विश्वरूपाचा अभिप्राय व्यक्त करायचा तर श्रीतुकोबारायांनी म्हटल्याप्रमाणे :

तुका म्हणें जें जें बोला। तें तें साजे या विठ्ठला।।

-अशा या चिदानन्दस्वरूप-चिद्घन-चिद्रूप श्रीविठ्ठलाचे; जो या जीवरूप चिन्मय विटेवर ***"त्यत्तिष्ठत् दशांगुलम्"*** असा ***"ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः"*** म्हणत ***"युगें अठ्ठावीस कर कटेवरी ठेवूनियां"*** अधिष्ठित आहे; त्याचे सामर्थ्य, त्याचे अलौकिकत्व वर्णन करून त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा, त्याच्याशी एकरूप होण्याचा रहस्यपूर्ण मार्ग प्रकाशवणाऱ्या *नवव्या* अध्यायास मुद्रा लावतांना श्रीज्ञानदेव *बिहाले* असले, तरीही श्रीसमर्थ प्रभू सद्गुरूंच्या आशीर्वादाने अन मार्गदर्शनाने त्यांनी अनिर्वाच्य असणाऱ्या त्या नवम अध्यायाचे निरूपण सांग संपन्न केलेच !! असो.

गीताध्यायांविषयी ते पुढे असेही म्हणतात की:

अहो गूळसाखरें मालयाचें। बांधें तऱ्हीं एकाचि रसाचें।
परि स्वाद गोडियेचें। आन आन जैसें।।१०-३३।।
एक जाणौनियां बोलती। एक ठायें ठाओं जाणविती।
एक जाणौनियां हारपती। सिहाणेपणें जैं।।३४।।
तैसे अध्याय हे गीतेचें। परि अनिर्वाच्य नवमाचें।
तऱ्हीं वाखाणिलें एतुलें तुमचें। सामर्थ्य प्रभू।।३५।।

"गूळ व साखर हे जरी गोड असले तरी त्यांची गोडी वेगवेगळी आहे. त्याचप्रमाणे श्रीगीतेच्याही प्रत्येक अध्यायात निरनिराळ्या प्रकारांची किमयाशक्ती आहे. काही अध्याय परमात्मस्वरूपास जाणून त्याचे निरूपण करतात; तर काही अध्याय परमात्मस्वरूपाचे निरूपण करत असतांनाच त्याची जाणीव प्रकाशवतात; तर इतर कांही अध्यायात परमात्मस्वरूप जाणण्याबरोबरच त्याच्याशी एकरूपता मिळवण्याची युक्ती पण सांगितलेली असते."

अध्यायांची अशी तीन प्रकारे ज्ञानेश्वर वर्गवारी करतात. यावरून स्पष्ट होते की ***गीता हा योगग्रंथ आहे आणि त्यातील काही अध्याय तत्त्वज्ञान सांगतात; तर काही अध्याय तत्त्वाचे ज्ञान करून देतात आणि काही अध्याय साधकास अध्यात्म म्हणजे तत्त्वज्ञान व तत्त्व या दोघांचाही योग साध्य करून देणारे आहेत.***

म्हणजेच काही अध्यायात फक्त योगरहस्य वा जीव-शिवैक्य साधण्याची युक्ती सांगितली आहे, हे स्पष्ट होते,ते ज्ञानेशांच्या वरील उद्गारांवरून! सरसकट प्रत्येक अध्याय कोणता ना कोणता योग कथन करतो हे म्हणणे सयुक्तिक ठरत नाही, ते यावरूनसुद्धा स्पष्ट होते. असो. पुढे नवम अध्यायाबाबत ज्ञानेश काय म्हणतात, ते पाहू:

हां हो एकाची शाटी तापिन्नली। एकीं सृष्टीवरी सृष्टी केली।
एकीं पाषाण वाऊन उतरविली। समुद्रीं कटकें।।१०-३६।।
एकीं आकाशीं सूर्यातें धरिलें। एकीं चूळींचि समुद्रां शोखिलें।
तैसें मजकरवीं बोलविलें। अनिर्वाच्य तुमीं।।३७।।

"वसिष्ठांनी आपला दंड तपःसामर्थ्याने सूर्याप्रमाणे प्रकाशमान केला; तर विश्वामित्राने वेगळी सृष्टी रचली. नल-नीलांनी समुद्रावर दगडाचा सेतू बांधून वानरसैन्य पार नेले; तर सती अनुसूयेने स्वसामर्थ्याने सूर्यास मार्गी अवरुद्ध केले. अगस्तिऋषींनी एका घोटात समुद्र शोषून घेतला. त्या प्रकारचीच अलौकिक कृती श्रीसद्गुरूंनी अनिर्वाच्य असा श्रीगीतेचा जो ***नवम अध्याय*** आहे, त्यावर मजकडून निरूपण करवून केली आहे," असे ज्ञानेश म्हणतात.

परि असो हे एथ ऐसें। राम रावण जुझिनलें कैंसें।
ना राम रावणु जैसें। मीनलें समरीं।।१०-३८।।
तैसें नवमीचें कृष्णाचें बोलणें। तैं नवमीयाचि ऐसें मी म्हणें।
येयां निवाडु तत्त्वज्ञु जाणें। जेयां गीतार्थु हातीं।।३९।।
एवं नवही अध्याय पहिलें। मियां मतीसारिखें बोलिलें।
आतां उत्तरखंड आदरिलें। ग्रंथींचे आईका।।४०।।

"असो. तरीही नवम अध्यायाचा अभिप्राय सांगायचा राहिलाच. तो कसा तर, राम रावण झुंजले कसे! तर, राम रावणासारखेच! ***यासम हा*** याप्रमाणे ***म्हणजे नवमाध्यायींचे श्रीकृष्णांचे निरूपण म्हणजे नवमाध्यायासारखेच;*** असे म्हणावे लागते! श्रीज्ञानदेवांचा हा अभिप्राय किती समर्पक आहे, हे फक्त हाती गीता असणारा तत्त्वज्ञच आकलन करूं जाणे!

ते पुढे म्हणतात:"अशा रीतीने श्रीगीतेचे पहिले नऊही अध्याय मी आपल्या बुद्धीप्रमाणे निरूपिले आहेत; ते कसे कसास उतरतात, हे गीतार्थ जाणणारेच सांगू शकतील!" असे श्रीगीतेचा **उत्तरखंड** निरूपिण्यास सिद्ध झालेले ज्ञानदेव गुरुकृपेने उत्तीर्ण होऊन श्रोत्यांना विनवतात.

गुरुदर्शन::::

गुरुतत्त्व

श्रीगीतेचा गूढतम असा अभिप्राय सांगण्यात पूर्वासूरींचे भाष्यकार, टीकाकार, विद्वान आणि आचार्यादी इतरांना अपयश आले असे ज्ञानेशांचे उद्गार आपण पाहिलेच आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांना स्वतःला याबाबत जे यश मिळत आहे, त्याचे सर्व श्रेय त्यांनी आपल्या सद्गुरू निवृत्तिनाथांना प्रदान केले आहे. त्यातूनही श्रीगीतेच्या अत्यंत गहन आशय असणाऱ्या नवव्या अध्यायाचे निरूपण करण्यास आपण गुरुस्नेहांकित असल्यानेच समर्थ झालो असे आपल्यावर झालेल्या गुरुकृपेचे महत्तम फल श्रीज्ञानदेव दर्शवतात.

सद्गुरूंच्या या ऋणातून उतराई होणे काहीही केले तरी किती अशक्य आहे, हे ज्ञानेश पूर्णपणे जाणतात. सदा सर्वदा मनी मानसी हे गुरुऋण वागविणारे ज्ञानदेव आपणास ज्ञानेश्वरीच्या अध्यायागणिक दिसतात. सद्गुरूंवरील त्यांचे प्रेम व श्रद्धा आणि सद्गुरूंचे कौतुक व सामर्थ्य दर्शविणाऱ्या अनेकानेक ओव्या त्यांनी जवळ जवळ सगळ्याच अध्यायातून रचल्या आहेत. विशेषतः नवव्या अध्यायानंतर तर त्यांच्या या गुरुस्तवनास भरतेच येते. त्यांच्या इतरही वाङ्मयातून गुरूंचा विविध प्रकारे निर्देश असाच येत रहातो.

सद्गुरू म्हणजे प्रत्यक्ष आत्मतत्त्वच अशी त्यांची धारणा आहे. योगशास्त्रानुसारसुद्धा गुरुतत्त्व हे परमतत्त्वच समजले जाते. किंबहुना तो परमात्माच साधकांचा गुरू होऊन त्यांना आपला परिचय करून देतो, हे सर्वविश्रुतच आहे. श्रीज्ञानदेवांना अशा या आपल्या आत्मवत् सद्गुरूंची फार अपूर्वाई वाटत असते. त्या भावनेतून त्यांनी रचलेल्या ओव्या प्रसंगोपात्त पाहणे उचित होईल. कारण ***श्रीज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान सुगम व्हावयाचे असेल तर त्याला हा गुरुभक्तीचा सोपान चढून जाणे आवश्यक ठरते.*** जिज्ञासूंना अत्यंत उद्बोधक ठरणाऱ्या अशा त्या ओव्यांचा यथोचित परामर्ष घेणे म्हणूनच क्रमप्राप्त आहे. आता तिकडे वळू या.

गुरुमाउली दर्शन

बाराव्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानेशांनी गुरुकृपेचे यथार्थ वर्णन करणाऱ्या एकोणीस ओव्या रचल्या आहेत. गुरुकृपेने योगसिद्धी किती सुलभ होते, हे त्यात उल्लेखिलेले आहे. त्या ओव्या अशा आहेत:

जय जय वो शुद्धे। उदारें प्रसिद्धें।
अनवरत आनंदें। वर्षतियें।।१२-१।।
विषयव्याले मिठी। दिधलियां नुठीं ताठी।
तैं तुझेनि कृपादृष्टी। निर्विष होय।।२।।
तऱ्हीं तापु कवणातें पोलीं। शोक कैसेनि जालीं।
जऱ्हीं प्रसादरसकल्लोलीं। पूरें येसीं तूं।।३।।
योगसुखाचें सोहालें। सेवकां दाविसि स्नेहालें।
सोऽहंसिद्धीचें ललें। पालिसि तूं।।४।।
आधारशक्तीचियां अंकीं।वाढविसि तूं कवत्तुकीं।
हृदयाकाश पालकीं। हालविसि निजें।।५।।

या सुप्रसिद्ध ओव्या गुरुमाउलीचे यथार्थ वर्णन करणाऱ्या आहेत. अत्यंत सरस अशा या ओव्यातून गुरुकृपेचा महिमा वर्णन केला आहे.

गुरूस माउली समजणारे ज्ञानदेव आपल्याकडे अजाण बालकाची भूमिका घेत म्हणतात की,“ हे अनवरत आनंद वर्षवणाऱ्या, उदार, शुद्ध, प्रसिद्ध गुरुदेवते! विषयसर्पाच्या विळख्यात सापडलेल्या जीवास निर्विष करणारी तुझी कृपादृष्टी सुप्रसिद्धच आहे. तुझा प्रसादरस प्राप्त झालेल्याला त्रिताप कसे पोळू शकणार! त्याला शोक कसा जाळू शकणार! हे गुरुमाउली! तुझ्या प्रेमास्पदांना तू योगसुखाचे सोहाळे दाखवतेस. त्याचे सोऽहंसिद्धीचे लळे पाळतेस! कुण्डलिनीशक्तीच्या अंकीं वाढवून निजात्मबोधशक्तिरूपी हृदयाकाशींच्या पाळण्यात त्यांना तू झोके देतेस!”

प्रत्यग्ज्योतीचि वोवालणी। करिसि मनपवनाची खेलणीं।
आत्मसुखाची बाललेणीं। लेवविसीं मायें।।१२-६।।
सतरावियेंचें स्तन्य देसीं। अनुहताचा हल्लरु गासी।
समाधिबोधें निजविसीं। बुझाऊनि।।७।।

“त्यांचे केवढेकेवढे कोडकौतुक तू करतेस! त्यांना तू आत्मसुखाच्या निरञ्जनाने ओवाळतेस. मनपावनाची खेळणी देतेस. तुझ्या भक्तबालकांना आत्मसुखाची लेणी तू लेववतेस! ममतेने त्यांना आपल्या सतराव्या अमृतकलेचे स्तनपान देणारी तूच आहेस! ***अनाहतध्वनीचे अंगाईगीत गाऊन त्यांना तूं समाधिबोधाच्या महानिद्रेत झोपवतेस!”***

योगसुखाच्या आनन्दात विभोर करणाऱ्या आपल्या गुरुमाउलीचे पुढे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

म्हणौनि साधकां तूं माउली।
पिकें सारस्वत तुझियां पाऊलीं।
या कारणें मी साऊली। न संडीं तुझी।।१२-८।।
अवो सद्गुरुचिये दिठी। तुझें कारुण्य जेयांतें अधिष्ठी।
तो सकल विद्यांचियें सृष्टी। धात्रा होय।।९।।
म्हणौनि अंबे श्रीमंतें। निजजनकल्पलते।
आज्ञा दे पां मातें। निरूपणीं।।१०।।

“आपल्या लाडक्या शिष्यबालकांचे एवढे लालनपालन व कोडकौतुक करणारी तूं साधकांची अशी मायमाउली म्हणूनच आहेस. तुझ्या मङ्गलमय पावलांच्या मागे दुडुदुडु धावतांनाच साधकांना विनासायास अध्यात्मविद्या प्राप्त होते. म्हणून बालक जसे मातेचा पदर घट्ट धरून ठेवते आणि तिच्यामागेमागे ती जाईल तेथे जात असते, तसाच मी ज्ञानदेवही तुझी सावली सोडून कुठेही जाऊ शकत नाही. कारण तूं माझे सर्वस्वच आहेस. हे माते! तुझी कारुण्यमय गुरुकृपादृष्टी ज्याला न्याहाळते, तो सर्व विद्या निर्मिणारा ब्रह्मदेव होतो! म्हणून हे अम्बे! श्रीमंते! निजजनकल्पलते! उदार होऊन गीतार्थ निरूपणाचा मला आदेश दे!”

नवरसां भरवी सागरु। करवीं उचित रत्नांचे आगरु।
भावार्थाचे गिरिवरु। निफजवीं मायें।।१२-११।।

“हे अम्बे! माझ्या निरूपणात नवरसांचे सागर भरव! अलंकाररत्नांचे आगर अन भावार्थांचे गिरिवर त्यांत निर्माण कर आणि माझे गीतार्थनिरूपण भव्यदिव्य, उदात्त, उत्तुङ्ग करव! घनदाट विवेकवल्लींनी माझे हे आख्यान सुशोभित व्हावे!”

साहित्यसोनियांचियां खाणी। उघडवी देशीचियां अक्षौणी।
विवेकवेलीची लावणी। हो दे सैंध।।१२-१२।।
संवादफलनिधानें। प्रमेयाची उद्यानें।
लावीं म्हणें गहनें। निरंतर।।१३।।

पाखांडाचें दरकुटें। मोडी वाग्वाद आव्हांटे।
कुतर्कांची दुष्टें। सावजें दवडीं।।१४।।

"साहित्यसुवर्णाच्या खाणी या माझ्या प्राकृत मराठी बोलातून प्रकटाव्यात आणि त्यांचा चमचमाट सर्वदूर दिसेल असे तू कर! आत्मसंवादाच्या उद्दंड फळांनी लगडलेल्या प्रमेयतरूंची सुंदर मनोहारी उद्याने माझ्या या निरूपणात असावीत. गीतार्थाचे बिकट अरण्य अन त्यातल्या पाखंडी मतांच्या दरडी, वितण्डवादाच्या आडवाटा आणि कुतर्क रूपी दुष्ट श्वापदे ही नष्ट करून तिथे माझे हे गीतार्थरूपी सुंदर मनोहर उद्यान प्रकटावे!"

श्रीकृष्णांनी जे वचनामृत अर्जुनाला पाजले, ते आपल्या निरूपणात पूर्णत्वाने अन प्रकर्षाने पाझरावे असे म्हणणारे ज्ञानेश त्यासाठी गुरुमाउलीस आळवत पुढे म्हणतात की:

श्रीकृष्णगुणीं मातें। सर्वत्र करीं सरते।
राणिवें बैसवी श्रोते। श्रवणाचियां।।१२-१५।।
इयें मऱ्हाटीचियें नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकालु करी।
घेणे देणें सुखचि वरिं। जगां हो देईं।।१६।।
तूं आपुलेनि स्नेहपल्लवें। मातें पांघुरविसीं सदैवें।
तऱ्हीं आतांचि हे आघवें। निर्मिन मी।।१७।।

आपली मनीषा प्रकटवत ज्ञानेश्वर विनवितात की," हे माते! श्रीकृष्णगुणवर्णन करण्यात मला सदैव प्रवीण करून श्रोत्यांना अखण्ड श्रवण सुख मिळवून दे! या मराठी भाषेच्या नगरीत नित्य ब्रह्मविद्येचा सुकाळ कर आणि तिच्यात सुखाचीच देवाणघेवाण होऊं दे! हे जगच आनंदाने भरून जावो असे माझ्या निरूपणास सामर्थ्य प्रदान कर! तूं जर आपल्या कृपेचा पदर माझ्यावर पांघुरवशील तर हे असे संपन्न गीतार्थनिरूपण मी आताच्या आताच करू शकेन!"

इयें विनवणियेसाठीं। अवलोकिलें गुरुदृष्टी।
म्हणें गीतार्थेंसीं उठी। न बोले बहु।।१२-१८।।
येथ जी जी महाप्रसादु। म्हणौनि सांवियां जाला आनंदु।
आतां निरूपिजैल प्रबन्धु। अवधान दिजो।।१९।।

श्रीज्ञानदेवांची ही बालभावाची विनवणी ऐकणारी त्यांची गुरुमाउली श्रीसद्गुरू निवृत्तिनाथ कृपादृष्टीने त्यांना अवलोकिते अन सांगते की, "हे पाल्हाळ आता पुरे कर अन तुला आवडेल असा गीतार्थ निरूपण करायला प्रारंभ कर!"

श्रीगुरूंचे हे कृपापूर्ण महाप्रासादिक बोल कानी पडताच ज्ञानदेव आनंदित झाले आणि श्रोत्यांनी आपले गीतानिरूपण पुढे ऐकण्यासाठी अवधान द्यावे अशी त्यांना विनंती करून ते या ओव्या पूर्ण करतात.

या ओव्यांचे अवलोकन केले असता आपणास ज्ञानदेवांचा गुरुप्रतिचा माता-बालकभाव स्पष्ट दिसतो. ज्ञानराजांनी गुरुदेवतेचे ***अम्बे, श्रीमंते*** असे संबोधन करून त्यांचे हे मातृस्वरूप आपणांस दाखवले आहे. बालकास जशी माता,तशी साधकास गुरुमाउली असते. ती त्याचे सर्व लाड करते; कोड पुरवते; त्याच्यासाठी ती काय काय करते हे न कळण्याचे त्याचे अजाणपण असले तरी त्याला सुख आनंद मिळेल, इतरांनाहि आपले बालसंगोपन अन वात्सल्य प्रकट दिसेल अशी ती उपजत प्रेमाने वागते. त्या शिष्यबालकांचे सर्व काही असेच ती गुरुमाय करते!

"तेयांचियां काईंसेनईं। न लजे मी।" असे श्रीकृष्ण आपल्या भक्तांबाबत नेमक्या याच मातृत्वभावनेने म्हणतात. भगवंत म्हणतात की, "माझे काही भक्त तर इतके निरागस अजाण बालकाप्रमाणे असतात की त्यांचे सर्व काही मलाच करावे लागते. शिशु जसे मातेवर अवलंबून असतात, तितक्याच निरागसपणे ते पण माझ्यावर विसंबून असतात. त्यांचे कोणतेही काम करण्यात मला काहीच लाज वाटत नाही." गुरुमाउलीच्या रूपाइतकेच श्रीकृष्णपरमात्म्याचे हे मातृस्वरूपसुद्धा अविस्मरणीय आहे, याची या प्रसंगी ज्ञानेश्वरीच्या वाचकांस आठवण होणे स्वाभाविक आहे.

श्रीगुरू हे पण परमात्म्याची सानुली मूर्तीच असतात. म्हणून भगवंतांचा हा मातृभाव त्यांच्याही अंगी स्वभावतः असतो. ज्ञानदेवांना कृष्णाप्रमाणेच जगद्गुरू मानणारे सर्वदूरचे साधक म्हणूनच ***ज्ञानाईमाउली - ज्ञानोबामाउली*** अशी त्यांना वत्सल भावाने लडिवाळ हाक मारतात, हे वारकरी जनांचे अवलोकन करतांना दिसून येते. बाराव्या अध्यायी ज्ञानदेव याच वत्सल जाणिवेतून गुरुदेवतेची मातृभावना ओळखतांना दिसतात.

श्रीगुरुभक्ती::::

गुरुचरणांचे महिमान

त्या अशा गुरुमाउलीचे चरण वंदन करणारे ज्ञानेश आपल्याला तेराव्या अध्यायारंभी कसे दिसतात, ते पाहू या!

जेयांचे केलियां स्मरण। सकल विद्यांचे अधिकरण।
तैं वन्दूं चरण। श्रीगुरूंचे।।१३-१।।
जेयांचेनि आठवें। शब्दसृष्टी आंगवें।
सारस्वत आघवें। जिव्हेसीं ये।।२।।
वक्तृत्व गोडपणें। अमृतातैं पारु म्हणे।
रस होती वोलंगणें। अक्षरांसीं।।३।।
भावांचे अवतरण। अवतरवितीं खूण।
हातां चढे संपूर्ण। तत्त्वबोधु।।४।।
श्रीगुरूंचे पाय। हृदय गंवसूनि ठाय।
तैं एवढें भाग्य होय। उन्मेखासीं।।५।।
तैं नमस्कारूं आतां। पितामहाचा पिता।
लक्षुमियेचा भर्ता। आईसें म्हणें।।६।।

"आत्मरूप श्रीगणेशाचे स्मरण करून श्रीसद्गुरूंचे चरण वन्दन करूं; हेच सर्व विद्यांचे परमपवित्र अधिष्ठान आहत. श्रीगुरुचरणांचे स्मरण करताच सर्व शब्दसृष्टी - सकळ अक्षरवाङ्मय स्वाधीन होऊन जिव्हाग्री नवरसात्मक सारस्वतब्रह्माचा निमिषार्धात उन्मेष होतो. अक्षरसंपदेत परमामृताचे कल्लोळ निर्माण होतात. त्यातील रसाचे

माधुर्य अमृतालाही मागे सारणारे असते. नाना तत्त्वांचे भेद आकळून आत्मरहस्य स्पष्ट करणारे सारे भाव त्यात प्रकट होतात. प्रातिभशक्ती नवनवोन्मेषशालिनी होते; श्रीगुरूंचे पाय स्वहृदयाकाशात ध्याऊन जणू तिचे सद्भाग्य उदय पावते."

श्रीगुरुभक्ती

गुरुचरणांचे असे स्मरण करत ज्ञानेश श्रीलक्ष्मीप्रसाद रमारमण, पितामहांचेही पिता, अशा श्रीकृष्णांनी अर्जुनास केलेला तत्त्वोपदेश निरूपण्यास प्रारंभ करतांना दिसतात. याच तेराव्या अध्यायात गीतेतील ***आचार्योपासन*** याबद्दलचा श्लोक आहे तो असा:

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।१३-७।।

चित्ताचे चैतन्याशी सामरस्य पावण्याची स्थिती म्हणजे ***आत्मविनिग्रह.*** आत्मज्ञान पावण्याची पात्रता असणाऱ्याजवळ ***अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षान्ति, आर्जव, आचार्योपासन, शौच, व स्थैर्य*** इ.गुणसंपदा असणे आवश्यक आहे.***आचार्योपासन*** म्हणजे श्रीगुरूंची सेवा - परिचर्या! हा तर ज्ञानदेवांचा अत्यंत आवडीचा विषय! साहजिकच या विषयावर त्यांनी ज्ञानदेवीत बऱ्याच ओव्या या प्रसंगी रचल्या आहेत. त्या ओव्यांद्वारे त्यांची ***गुरुभक्ती*** तर प्रकट होतेच; पण इतर जिज्ञासू जीवांस गुरुप्रति कोणता भाव असावा याचे मार्गदर्शनसुद्धा मिळते. ज्ञानेशांच्या त्या ओव्या म्हणूनच पाहू या; वरील श्लोकावर निरूपण करतांना त्या रचलेल्या आहेत.

आतां ययावेरीं। गुरुभक्तीची परि।
सांगो अवधारी। चतुरनाथा।।१३-३६८।।
आघवियांची दैवां। जन्मभूमी हे सेवा।
जैं ब्रह्म करीं जीवां। शौच्यातें।।३६९।।
तैं आचार्य उपास्ति। सांघिजैल तुजप्रति।
बैसो सहस्त्रां एकाचि पांती। अवधानाची।।३७०।।
तऱ्हीं सकल जलसमृद्धि। गङ्गा रिगाली उदधि।
कां श्रुति हे महापदीं। पैठीं जाली।।३७१।।
ना ना वेटाळूनि जीवितें। गुणावगुण उखितें।
प्राणनाथां उचितें। दीधलें प्रियां।।३७२।।
तैसें सबाह्य आपुलें। जेणें गुरुभक्तीं दिधलें।
आपणपें केलें। भक्तीचें घर।।३७३।।

श्रीकृष्ण म्हणतात," हे चतुर अर्जुना! आता गुरुभक्तीची लक्षणे सांगतो. ऐक! जीवांना ब्रह्मपदीं बसण्याचे भाग्य गुरुसेवेने मिळते. म्हणून नीट अवधानपूर्वक ही ***आचार्योपासनाभक्ती*** ऐक! सर्वजलसंपत्ती घेऊन गंगा जशी सागरात प्रविष्ट होते; वेद जसे ब्रह्मपदात लीन होतात; पतिव्रता जशी जीवेप्राणे पतीशी समरस होते; त्याचप्रमाणे तो शिष्य गुरूस आपले सबाह्याभ्यंतर अर्पण करतो आणि गुरुभक्तीचे जणू निवासस्थान होतो."

गुरुगृह जियें देशीं। तो देशुचि वसें मनीं।
विरहिणी जैशीं। वल्लभातें।।१३-३७४।।
तियेकडौनि येतसें वारा। देखौनि धांवे सामोरा।
आड पडे म्हणे घरां। बीजें कीजो।।३७५।।
सांच प्रेमाचियां भुलीं। तियां दिशाचि वोवाळीं।
जीव थानापति करूनि घालीं। गुरुगृहीं जैं।।३७६।।

"विरहिणी जशी वल्लभाची आतुरतेने जीवप्राण मनात गोळा करून, त्याच्याकडे चित्त लावून प्रतिक्षा करते; त्याप्रमाणे या गुरुभक्ताच्या मनी गुरुगृह असते ते ठिकाण, त्या देशींचा वारा अन त्या वाऱ्याची दिशा ही वसत असतात. त्या दिशेकडून येणाऱ्या वाऱ्याला पण तो विनवतो की "माझ्या घरी चलावे." गुरुगृहाच्या दिशेला तो वंदन करतो. त्याचा जीव नित्य गुरुगृहाच्या स्मरणातच रमतो."

ज्ञानदेवांचे हे वर्णन पाहून असा विचार मनात येतो की ज्यांनी अळंदीची ज्ञानदेवांची समाधी पाहिली असेल; किंवा पंढरपूरचे श्रीविठ्ठलाचे मंदिर पाहिले असेल; त्यांना त्यानंतर वारंवार त्या ठिकाणांचे, त्या मंदिराचे, तेथील प्राकारांचे, नदीचे, तीराचे, तेथील झाडाझुडपांचे, तेथील इतर गोष्टींचे स्मरण कसे सतत घडत राहत असते! ज्यांनी हा अनुभव घेतला असेल, त्यांना वरील ओव्यात व्यक्त केलेली भावना समजू शकेल!! असो. पुढे ऐका:

गुरुआज्ञां धरिलें। देह गांवीं ऐसें ऐकलें।
वासरुवां लाविलें। दावें जैसें।।१३-३७७।।
म्हणें कैं हे बिरडें फीटेल। कैं तो स्वामी भेंटैल।
युगाहूनि वडिल। निमिख मानीं।।३७८।।
ऐसें गुरुग्रामींचे आलें। कां स्वयें गुरुंनीच धाडिलें।
तऱ्हीं गतायुषां जोडिलें। आयुष्य जैसे.।।३७९।।

"भगवंताचा वियोग घडला की तो परत कधी भेटेल याची भक्त अत्यंत आतुरतेने वाट पहातो. वासरू दाव्याला बांधले, गाय रानात चरायला गेली की वासराला एक एक क्षण कसा युगायुगासारखा वाटतो! गुरूपासून दूर रहावे लागलेल्या गुरुभक्ताचा अंत:करणाचा उमाळा असाच असतो. केव्हा एकदा सद्गुरू भेटतील असे त्याला होऊन जाते. गुरूंच्या गावाहून येणारा कोणी भेटला किंवा गुरूंचा सांगोवा घेऊन कोणी आला, तर त्याला आयुष्याचा जणू पुनर्लाभच होतो."

कां सुकतेयां अंकुरां। वरी पडिलियां पियूखधारा।
कां निर्जलींचा सागरां। आला मच्छु।।१३-३८०।।
ना तऱ्हीं रंकें निधान देखिलें। आंधलियां डोलें उघडिलें।
भणगाचियां आंगां आलें। इन्द्रपद।।३८१।।
तैसें गुरुकुलींचेनि नांवें। महासुखें थोरावें।
जैं कोडी हीं न पोटलवें। आकाशाचियां।।३८२।।
पैं गुरुकुलीं ऐसीं। भक्ति जेयां देखसीं।
जाण ज्ञान तेयांपासीं। पाइकियां।।३८३।।

आणि अभ्यंतरिलीकडें। प्रेमाचेनि पवाडें।
श्रीगुरूचें रुपडें। उपासीं ध्यानीं।।३८४।।
हृदयशुद्धीचियां आवारीं। आराध्य तैं धूर करीं।
मग सर्व भावेंसीं परिवारीं। आपण होय।।३८५।।

"सुकलेल्या अंकुरावर अमृतधार पडावी; पाण्याशिवाय तडफडणारा मासा महासागरात जाऊन पडावा; रंकास इंद्रपद प्राप्र व्हावे; त्याप्रमाणे गुरुसंप्रदायाच्या नांवानेही गुरुभक्तास इतके महासुख प्राप्त होते, सुखाची इतकी परमावधी होते की आकाशास कवळण्याची उपमाही त्या सुखाचे मोजमाप करण्यास अपुरी पडते. गुरुविषयी व गुरुसंप्रदायाविषयी इतकी भक्ती ज्याच्या अंतरी वसते, त्याच्याचपाशी ज्ञान नित्य चाकरी करते, असे निश्चित समजावे."

श्रीगुरूंची अंतरंगभक्ती

त्याच्या हृदयांतरी नित्य गुरूचे अत्यंत प्रेमभावाने कसे ध्यान चालते, त्याचे वर्णन ऐका:

कां चैतन्याचियां पोवली-। माजीं आनंदाचियां राऊलीं।
श्रीगुरुलिंगा ढालीं। ध्यानामृत।।१३-३८६।।
उदैजतां बोधार्की। बुद्धीची डाल सात्त्विकीं।
भरौनि त्रिंबका। लाखौली वाहे।।३८७।।
कालशुद्धी त्रिकालीं। जीवदशा धूप जालीं।
सोऽहंभावें दीपें वोंवालीं। निरंतर।।३८८।।
सामरस्याची रससोये। अखंड अर्पितु जाये।
आपण भराडी होये। गुरु लिङ्ग।।३८९।।
ना तऱ्हीं जीवाचिये सेजें। गुरु कान्तु करूनि भुंजें।
ऐसीं प्रेमाचेनि भोजें। बुद्धि वाहे।।३९०।।

"अंतराकाशात सद्गुरू हीच आराध्यदेवता व आपण त्या देवतेप्रीत्यर्थ तिचे गंध , पुष्प, पूजात्मकादी सर्व परिवार तो शिष्यच होऊन जातो. चैतन्याकाशीं आनंदाचे राऊळ रचून त्यातील श्रीगुरुरूपी ज्योतिर्लिङ्गाला तो ध्यानामृताच्या धारेचा संतत अभिषेकच जणू करत असतो. ज्ञानसूर्याच्या उदयाबरोबर गुरुरूप त्र्यंबकेश्वराला सात्त्विक बुद्धीचा बेल लक्ष लक्ष त्रिदले तो मनाच्या परडीतून आणून वाहतो. दिक्कालातीत सद्गुरुरूपास जीवदशेचा धूप जाळून स्वतः शिवरूप होऊन तो निरंतर सोऽहं स्मरणाच्या दीपाने ओवाळतो. गुरुरूपी लिङ्गाचा अखंड अर्चक होऊन तो त्याला जीव-शिव सामरस्यरूपी रसाने युक्त असलेली पाकसिद्धी नैवेद्य म्हणून अर्पण करतो. गुरुप्रति आत्यंतिक प्रेमाचा आविष्कार करून तो जीवाच्या शेजेवर गुरूशी ***कान्तासक्ती*** भावाने रममाण होतो."

मधुराभक्ति संप्रदायाच्या उगमामागे हीच भावना आहे, हे सुज्ञांस सांगणे न लगे! असो.

पुढे ज्ञानेश म्हणतात की:

कोण्हीं एकीं अवसरीं। अनुरागु भरें अंतरीं।
कीं तेयां नाम करीं। क्षिराब्धि।।१३-३९१।।
ते ध्यान बहु सुख। तैं शेषतुलिका निर्दोख।
वरीं जलशयनु देख। भावीं गुरु।।३९२।।
वोलगती पायें। लक्ष्मी आपण होये।
गरुड होऊनि राहे। आपणचि।।३९३।।
नाभीं आपण जन्में। ऐसीं गुरुमूर्ती प्रेमें।
अनुभवीं मनोधर्मे। ध्यानसुखें।।३९४।।
एकाधियें वेलें। गुरु माय करीं भावबलें।
मग स्तन्यसुखें लोलें। अंकावेरीं।।३९५।।
ना तऱ्हीं गां किरीटी। चैतन्यतरुतलुवटीं।
गुरु धेनु आपण पाठीं। वत्स होये।।३९६।।

"त्या शिष्योत्तमाच्या हृदयी गुरुप्रेमाचा असा काही कल्लोळ उसळतो की जसा तो भावक्षीरसागरच! तेथे ध्यानरूपी शेषशय्येवर गुरुरूपी नारायणच जणू अवतीर्ण होतो. त्या नारायणाच्या पायाची दासी श्रीलक्ष्मी तो आपणच होतो. पायी तिष्ठणारा दास्यभावनारूपी गरुडही तो स्वतःच होतो. श्रीगुरुरूपी नारायणाच्या नाभिकमलातील ब्रह्मा पण आपणच असल्याचे सुख तो अनुभवतो. असे मनोमय ध्यानसुख तो भोगतो. ***भक्तीचे नवरस वा नवविध प्रकार अन अष्टसात्त्विकभाव*** हे सगळेच त्याच्याठायी अवतीर्ण होतात. शिशुभाव उदित झाल्यावर त्याला गुरु ही माउली आणि तिचे स्तन्य चुरुचुरु सेवणारे बालक आपण आहोत, असे वाटते. तसेच कधीकधी गुरुरूपी धेनुच्या मागे मागे तो वत्सरूपाने हिंडतो. असे अनुपम वात्सल्यभाव त्याच्या ठायी प्रकटतात."

गुरुस्नेहसलिलीं। आपण होये मासोली।
कोण्हीं एकें वेलीं। हेंचि भावीं।।१३-३९७।।
गुरुकृपामृताचें वडप। आपण होये ल्हासतें रोप।
ऐसैसें संकल्प। वियें मन।।३९८।।

"गुरुस्नेहाच्या जलातील मत्स्य कधी तो होतो; तर कधी तो गुरुकृपामृताने सिंचित झालेले रोपटे होतो. असे नाना प्रकारचे त्या भक्ताचे अखंड मनोराज्य चालत असते. त्याच्या ध्यानी-मनी आणि चित्ती श्रीसद्गुरू हाच एकमात्र विषय असतो."

"विषय तो आम्हा जाला नारायण" या संत श्रीतुकोबारायांच्या उक्तीप्रमाणे ***नारायणच त्याचा विषय होतो किंवा सर्व विषयच त्याला नारायणस्वरूपात दिसतात.*** गुरुदेवांशी इतका जो शिष्य एकरूप होतो, त्याला भगवंत कसा भेटणार नाही! असो.

पुढेही ज्ञानदेवांच्या वाणीतून गुरुप्रेमाचे अमृत पाझरते, ते असे:

चक्षुपक्षेंवीण। पिलूं होये आपण।
ऐसें पैं अपारपण। आवडीचें।।१३-३९९।।
गुरुतैं पक्षिणी करीं। चारा घें चांचूवेरीं।
गुरु तारु कांस धरीं। आपण जलीं।।४००।।
ऐसें प्रेमाचेनि थावें। ध्यानचि ध्यानातैं प्रसवें।
पूर्ण सिंधु हेलावें। सुटती जैसें।।४०१।।

किंबहुना इयापरि। गुरुमूर्ती अंतरीं।
भोगीं आतां अवधारीं। बाह्य सेवा।।४०२।।

"कधीकधी अनाथ, दीन, डोळे अजूनही न उघडलेले, पंख न फुटलेले, असे पिलू होऊन तो शिष्य आपल्या सद्गुरुरूपी पक्षिणीमाउलीच्या चोचीतून वात्सल्यरूपी चारा भरवून घेतो. कधी आपण संसारभवाब्धीत गटांगळ्या खातो आहोत असे जाणवून आल्यावर सद्गुरूंना तो आपले तारू कल्पितो आणि त्यांची कांस घट्ट पकडून संसारसागर तरून जाण्याची चेष्टा करतो. गुरुमूर्तिव्याप्त अशा त्या भक्तअंतःकरणरूपी सागराच्या कल्लोळी प्रेमभराने अशा अनंत ध्यानरूपी लाटा उठत असतात."

या अंतरंग प्रेमवर्णनानंतर श्रीज्ञानदेव श्रीगुरुवरील प्रेमाचा बाह्य आविष्कार वर्णितातः

तऱ्हीं जीवीं ऐसें आंवांकें। म्हणे दास्य करीन नीकें।
जंव गुरु कवतिकें। माग म्हणति।।१३-४०३।।
तैसियां सांचा उपास्ति। गोसांवी प्रसन्न होती।
तेथ मी विनंति। ऐसीं करीन।।४०४।।
म्हणेन तुमचा देवा। परिवारु आघवां।
तेतुलीं रूपें होआवा। मीचि येकु।।४०५।।
आणि देव्हराची आपुलीं। उपकरणें तेतुलीं।
माझीं रूपें तेतुलीं। होआवी स्वामी।।४०६।।
आईसा मागेन वरु। तेथ हो म्हणती श्रीगुरु।
मग तो परिवारु। मीचि होईन।।४०७।।
उपकरणजात सकलिक। तैंही होईन एकैक।
मग उपास्तिचें कवतिक। देखिजैल।।४०८।।
श्रीगुरु बहुतांची मायें। परि एकलौति होऊनि ठाये।
तैसें करौनि आण वायें। कृपें तियें।।४०९।।

"श्रीगुरूंचे जीवाभावाने दास्य करून ते प्रसन्न झाले की *माग* म्हणतील. तेव्हा मी विनवीन की, "हे देवा! तुमचा समस्त परिवार मीच एकाने व्हावे; तितकी सर्वांची रूपे मीच धारण करावीत. पूजेची उपकरणी मीच व्हावे."

"असा वर मला श्रीगुरूंनी प्रसन्न होऊन दिला आणि *तथास्तु* म्हटले की मग मीच तो समस्त परिवार होऊन राहीन. सकळ पूजा-उपकरणेही मीच होईन आणि श्रीगुरूंच्या उपास्तीचे समग्र कौतुक मला पूर्णपणे पहाता येईल. असो. श्रीगुरू जरी बहुत साधकांची मायमाउली असले तरी मी त्यांच्यापाशी हट्ट धरीन की *तू फक्त माझी एकट्याचीच माउली हो!* आणि त्यांना तसे करायला भाग पाडीन."

गुरुशिष्याद्वैत

आपली मनीषा एवढ्यानेसुद्धा पूर्ण होणार नाही, हे जाणवून ज्ञानदेव अजून आपले मनोराज्य चालवीत पुढे म्हणतातः

तियां अनुरागा वेधु लावी। एकपत्नीव्रत घेववीं।
क्षेत्रसंन्यासु करवीं। लोभापायीं।।१३-४१०।।
चतुर्दिशु वारा। न लागें निघों बाहिरा।
तैसा गुरुकृपे पांजिरा। मीचि होईन।।४११।।
आपुलियां गुणांची लेणीं। करीन गुरुसेवे स्वामिणी।
हे असो होईन गंवसणी। गुरुभक्तीसीं।।४१२।।
गुरुस्नेहाचीं वृष्टी। मी पृथिवी होईन तलुवटीं।
ऐसियां मनोरथांची सृष्टी। अनंतां रची।।४१३।।

"गुरुप्रेमास मी वश करून घेईन आणि केवळ माझ्याठायीच वसवून त्या प्रेमास मी *क्षेत्रसंन्यासवृत्ती* धरायला लावीन. त्या क्षेत्रस्थास स्वहृदयकमलात स्थापून त्याला केवळ माझा एकट्याचाच असा करून सोडीन. वारा कसाही वाहिला तरी चतुर्दिशांचा पिंजरा त्यास ओलांडता येत नाही. गुरुप्रेमालाही मी असेच माझ्या अंतःकरणरूपी पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवीन, जेणेकरून ते केवळ माझेच होऊन राहील. गुरुसेवा ही माझी स्वामिनी करीन. तिला स्वगुणांची लेणी लेववीन. किंबहुना मी स्वतः गुरुभक्तिरूपी तंबोऱ्याची गंवसणी होऊन राहीन. गुरुस्नेहरूपी जलधारा जेथे वर्षतील तेथील पृथ्वी होऊन त्या स्नेहधारांनी मी चिंब भिजून जाईन."

म्हणे श्रीगुरूंचे भवन । आपण मी होईन।
आणि दासु होऊनि करीन दास्य तेथींचे।।१३-४१४।।
रिगतां रिगतां दातारें। वोलांडिजती उंबरें।
तैं मी होईन आणि द्वारें। द्वारपालु।।४१५।।
मी पाऊवां होईन। तियां मीचि लेववीन।
छत्र मी होईन। बारी मीचि।।४१६।।

अशी वेगवेगळी मनोराज्ये करत ज्ञानेश म्हणतात की "मला वाटते की श्रीगुरुदेवांचे भुवनमंदिर मी स्वतःच व्हावे आणि त्यांचा द्वारपालही मीच व्हावे; द्वारही मीच व्हावे आणि दाराचा उंबरठाही मीच व्हावे. म्हणजे श्रीगुरूंच्या चरणकमलांचा जातायेता मला नेहमी स्पर्श होऊन मी पावन होईन! श्रीगुरूंचा दास होऊन त्यांचे सर्व प्रकारे मी असे दास्य करीन. किंबहुना त्यांच्या पादुका पण मीच होईन आणि त्यांच्या पावलात पादुका घालणारा पण मीच होईन. मी स्वतःच छत्र होईन व ते त्यांच्या मस्तकावर धरणारा पण मीच होईन."

त्या सद्गुरूंचे दास्य करण्याची भावना पूरेपूर व्यक्त करत ज्ञानेश पुढे अजून म्हणतातः

मी तलु उपरूं म्हणितां। चंवरधरूं हातु देतां।
स्वामीपुढें खोलता। होईन मी।।१३-४१७।।
मीचि होईन सागला। करूं सुईन गुरुलां।
सांडिती तो नेपाला। पडिया मीचि।।४१८।।
हडपु मी वोलगेन। उगालु मीचि घेईन।
उलिग मी करीन। आंघोलीचें।।४१९।।

"श्रीगुरूंचा चोपदार मी होईन. चवरी ढाळणाराही मीच होईन. त्यांना घोड्यावरून पायउतार करतांना हात देणाराही मीच होईन.

त्यांची स्वारी निघाली असता त्यांच्यापुढे धांवणारा आणि ते आल्याची वर्दी देणारा मीच होईन. श्रीगुरूंच्या जलाची झारी मीच होईन. त्यांचे तस्तपात्र पण मीच होईन. त्यांनी त्या पात्रात टाकलेली गुळणी पण मीच होईन. श्रीगुरूंचे आंघोळीचे पाणी आणि स्नानाचे उटणे मीच होईन. त्यांच्या स्नानाची सिद्धता करणारा चाकरही मीच होईन."

होईन गुरूचें आसन। अलंकार परिधान।
चंदनादि होईन। उपचारु मी।।१३-४२०।।
मीचि होईन सुआरु। वोगरीन उपचारु।
आपणपें श्रीगुरु। वोंवालीन।।४२१।।
मग देओ आरोगिती। तेधवां पांतिकरूं पांतीं।
मीचि होईन पुढती। देईन विडा।।४२२।।

"श्रीगुरूंचे बसायचे आसन मीच होईन. त्यांनी धारण केलेले अलंकार आणि परिधानलेली वस्त्रे यांचे रूप मीच घेईन. त्यांनी चर्चिलेल्या चंदनाची उटी पण मीच होईन. श्रीगुरूंचा स्वयंपाक रांधणारा बल्लवाचार्य मीच व्हावे. सिद्ध केलेले अन्न वाढणारा वाढपीही मीच असावे. त्यांना ओवाळणारी अन औक्षण करणारी दासीही मीच असावे. सद्गुरू जेव्हा भोजन करतील तेव्हा त्यांच्या पंक्तीचा लाभ घेणारे सर्व जण मीच असेन. त्यांना भोजनोत्तर विडा देणारा सेवक पण मीच असेन."

मग ताट मी काढीन। सेज मी झाडीन।
चरणसेवा करीन। मीचि देखें।।१३-४२३।।
सिंहासन होईन आपण। वरि श्रीगुरु करिती आरोहण।
करीन खरेंपण। वोलगेचें।।४२४।।

"त्यांचे उष्टे मीच काढीन. त्यांची भोजनोत्तर वामकुक्षीची शय्या पण मीच होईन. ती शय्या झाडणाराही मीच होईन. ते त्या शय्येवर पडले की त्यांची चरण चुरणारी दासी पण मीच होईन. श्रीगुरूंचे हे सर्व कौतुक करणारा अन आनंदाने न्याहाळणारा मीच व्हावे."

अशा प्रकारे ज्ञानदेव श्रीगुरूंशी अभिन्न होऊन अद्वैत साधू पहातात. श्रीगुरूंशी हा अनन्यभाव जो ते येथे प्रकट करतात, तो पाहून त्यांच्या अमृतानुभवाची गाढ आठवण येते. ***त्रिपुटीरहित अवस्था - द्रष्टा, दृष्य व दृष्टी; ध्याता,ध्यान व ध्येय्य; ज्ञाता - ज्ञेय - ज्ञान; जीव - शिव - सृष्टी; आत्मा - परमात्मा - विश्वरुप; स्थूल - सूक्ष्म - आनन्द; अ - उ - म या ॐकारमात्रा; जाग्रत - स्वप्न - सुषुप्ति; या सर्वांची समन्वयकारक आणि त्याच्याही पलीकडील जी अद्वैत स्थिती अन त्यातही -ज्ञप्तिमात्र चैतन्य - बिन्दुस्थित अवस्था जी आहे; तितून केलेले हे सर्व गुरु-शिष्य सामरस्यभावाचे वर्णन आहे,*** असे आपणास तत्काळ जाणवते.

हा भाव इंद्रियांना अगम्य असला तरी श्रीज्ञानदेवांच्या प्रातिभशक्तीने आपणास इंद्रियांद्वारेच असा उपभोगण्यास मिळू शकतो! या गोष्टीची प्रतीती सुज्ञांस सतत त्यांच्या या गुरुभक्तिपर ओव्या ऐकतांना येते.

ही आनन्ददायी प्रतीती पुन:पुन: घ्यावीशी वाटते. प्रतीतीपूर्ण अशा या ओव्यांतून ज्ञानेश पुढे म्हणतात:

श्रीगुरूंचे मन। जेयां देईल अवधान।
तो मी फुढां होईन। चमत्कारु।।१३-४२५।।
तेयां श्रवणाचें आंगणीं। होईन शब्दांचियां श्रोणी।
स्पर्श होईन घंसणी। आंगाचियें।।४२६।।
श्रीगुरूंचे डोळें। अवलोकनें स्नेहाळें।
पाहाती तियें सकळें। रूपें होईन।।४२७।।
तियें रसनें जो रसु रुचैल। तो आपुणचि होईजैल।
गंधरूपें कीजैल। घ्राणसेवा।।४२८।।
एवं बाह्यमनोगत। गुरुसेवा समस्त।
वेटालीन वस्तुजात। होऊनियां।।४२९।।
जंव देह असेल। तंव ऐसीं सेवा कीजैल।
मग देहान्ती नवल। बुद्धि असैल।।४३०।।

"श्रीगुरूंच्या मनात जी जी गोष्ट येईल, ती ती मीच होईन! ते ऐकतील तो शब्द अन त्यांना होईल तो स्पर्श मी होईन. श्रीगुरू जे जे पाहतील, ते ते सर्व मी होईन. त्यांना जो रस आवडेल तो मीच होईन. त्यांना आवडणारा गंध होऊन त्यांची घ्राणसेवा मीच करीन. अशा तऱ्हेने श्रीगुरूंच्या अंवतीभंवती असणारे सर्व वस्तुजात होऊन मी देह आहे तोवर त्यांची सर्व प्रकारे सेवा करून त्यांना सुख देईन व सुखी होईन. एवढेच काय पण अशी सेवा केल्याचे फळ म्हणून मला देहपातानंतरही त्यांची कशी सेवा करायला मिळेल, ते पण ऐका."

असे नवल अदृष्टपूर्व आहे, कसे ते पहा:

इयें शरीरींची माती। मेळवीन तियें क्षितीं।
जेथे श्रीचरण ठातीं। श्रीगुरूंचें।।१३-४३१।।
माझा स्वामी कवतिके। स्पर्शेल जियें उदकें।
तेथ लयां नीकें। नेईन आप।।४३२।।
श्रीगुरु वोंवालती। कां भुवनें जियें उजालिजती।
तियां दीपांचियां दीप्ती। ठेवीन तेज।।४३३।।
चवरी हन वीजणा। तेथ लयो करीन प्राणा।
मग आंगाचा वोलगणा। होईन मी।।४३४।।
जियें जियें अवकाशीं। श्रीगुरू असती परिवारेंसीं।
आकाश लया आकाशीं। नेईन तियें।।४३५।।
परि जितु मेला न संडीं। निमिख वांया न धाडी।
ऐसेनि गणावेयां कोडी। कल्पांचियां।।४३६।।

"जेथे श्रीगुरूंची पाऊलें जातील, तेथील मातीतील पृथ्वीतत्त्व या देहातील असेल; माझ्या देहातील आपतत्त्वाचे श्रीगुरू वापरतील ते जल झाले असेल. या देहातील तेजतत्त्व श्रीगुरूंना ओवाळणाऱ्या भुवनदीपक दीपाच्या दीप्तीत लय पावेल. तसेच या माझ्या देहातील वायुतत्त्व त्यांना वारा घालणारी चवरी अन पंखा असतील, तेथे ठेवीन; म्हणजे त्यांच्या शरीरास स्पर्शून सुख देणारा वायु मी होऊ शकेन.

श्रीगुरू आपल्या परिवारासह नित्य ज्या ठिकाणी राहतात, तेथील आकाशतत्त्वसुद्धा माझ्या देहातीलच असेल. अशा प्रकारे जिवंतपणी आणि मृत्यूनंतरही श्रीगुरुदेवांची निमिषही न दवडतां मी कोटिकल्पांतरीसुद्धा सेवा करत राहीन."

येतुलेवरी धिंवसा। जेयांचियां मानसा।
आणि करुनही तैसा। अपारुचि।।१३-४३७।।
राति दिवो नेणें। थोडें बहु न म्हणें।
म्हणियाचेनि दाटपणें। साजा होये।।४३८।।
तो व्यापारु एणें नांवें। गगनाहूनि थोरावें।
एकला करीं आघवें। एकींचि कालीं।।४३९।।

श्रीकृष्ण अशा सेवारत शिष्याचा महिमा सांगतांना म्हणतात की," हे पार्था! अशा प्रकारे श्रीगुरूंची अखंड सेवा करण्याचे मनोगत असणारा; त्यांच्या सेवेत कष्टाचे काही न मानणारा; रात्रंदिवस सेवारत असणारा असा जो शिष्य असतो, त्याच्या श्रीगुरूंची एकट्याने सेवा करत रहाण्याच्या मनोरथांना गगनाचीही गंवसणी अपुरी पडेल. त्या मनोरथांना अंत नाही."

अशा शिष्याचे वर्णन कितीही केले तरी पुरेसे होणार नाही. पण तरीही ज्ञानदेवांना त्याचे अधिकाधिक वर्णन करण्याचा मोह आवरता न येऊन ते म्हणतातः

हृदयवृत्ति फुडां। आंगचि घे दवडा।
काज करीं होडा। मानसेंशीं।।१३-४४०।।
एकाधियां वेलां। श्रीगुरुचियां खेलां।
लोण करी सकलां। जिविताचें।।४४१।।
गुरुदास्यें कृशु। जो गुरुप्रेमें सपोषु।
गुरुआज्ञें आवासु। आपण जो।।४४२।।
जो गुरुकुलें सुकुलिनु। जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु।
जो गुरुदास्यें सव्यसनु। निरंतर।।४४३।।

"श्रीगुरूंच्या लीलेसाठी तो हृदय अर्पण करून मनापेक्षाही जास्त वेगाने धावत जाऊन आपला प्राणही पणाला लावायला मागेपुढे पाहत नाही. गुरूंची सेवा करण्यात तो आपले शरीर झिजवतो. गुरूंच्या प्रेमपूर्ण कृपादृष्टीचा वर्षाव झाला की तो आनंदित होतो. त्याचे अंतःकरण म्हणजे श्रीगुरूंच्या आज्ञेचे जणू निवासस्थानच असते. आणि गुरुसंप्रदाय तर त्या भाग्यवंताचे कुल-शील-गोत्रच असते. तो शिष्यच खरा सुजन! त्याला निरंतर एकच व्यसन असते - ते म्हणजे गुरुसेवेचे!"

गुरुसंप्रदायधर्म। तैं जेयां वर्णाश्रम।
गुरुपरिचर्या नित्यकर्म। जेयांचे गां।।१३-४४४।।
गुरुक्षेत्र गुरु देवता। गुरु माता गुरु पिता।
जो गुरुसेवापरौता। मार्गु नेणें।।४४५।।
श्रीगुरुचें द्वार। तैं जेयां सर्वस्वसार।
गुरुसेवकां सहोदर। प्रेमें भजें।।४४६।।

"गुरुसांप्रदायिक आचारधर्म हाच त्याचा वर्णाश्रमधर्म व गुरूंची परिचर्या हेच त्याचे नित्यकर्म! गुरू हेच त्याचे एकमेव क्षेत्रस्थान व त्यातील दैवतही त्याचे सद्गुरूच! त्याची मातापिता म्हणजे श्रीगुरूच! त्याला गुरुसेवेशिवाय इतर मार्ग - पंथोपपंथ - उपासनाक्रम नसतातच! श्रीगुरूंच्या आवासाचे महाद्वार हेच त्याचे सर्वस्व होय."

जेयांचें वक्त्र। वाहे गुरुनामाचे मंत्र।
गुरुवचनावाचौनि शास्त्र। हातीं न शिवे।।१३-४४७।।
शिवतले गुरुचरणीं। भलतैसें जैं पाणी।
तेयां तीर्थें यात्रें आणी। त्रैलोकींची।।४४८।।
श्रीगुरुचें उशीटें। लाहें जैं अवचटें।
तैं तेणें लाभें वीटें। समाधीसीं।।४४९।।
कैवल्यसुखासाठीं। परमाणु घे किरीटी।
उधलती पायांपाठीं। चालतां जैं।।४५०।।

"तो गुरुभक्त श्रीगुरूंच्या सेवेकऱ्यांना बंधुत्वप्रेमभावनेने भजतो. त्याच्या मुखींचे मंत्र म्हणजे केवळ गुरुनामच! श्रीगुरुवचनाव्यतिरिक्त इतर शास्त्रात त्याला अर्थ वाटत नाही. श्रीगुरूंच्या चरणांस स्पर्शिलेल्या पाण्यात त्याच्या दृष्टीने सर्व तीर्थे सामावलेली असतात; एवढेच नव्हे तर त्या पाण्यात न्हाऊनच जणू काही यच्चयावत तीर्थांना पावनता येते. श्रीगुरूंच्या उच्छिष्टाचा अवचित लाभ हा त्याला समाधीसुखाहूनही श्रेष्ठ वाटतो! श्रीगुरूंच्या चालण्याने उडणाऱ्या धूलिकणाच्या स्पर्शानेच त्याला कैवल्यसुख प्राप्त होते!"

हे असो सांगो किती। नाहीं पार गुरुभक्तीं।
तऱ्हीं गां क्रान्तमतीं। कारण हे।।१३-४५१।।
जेयां इयें भक्तीची चाड। जेयां इयेंचि विखीचें कोड।
जो सेवेवांचूनि गोड। न मनीं कईं।।४५२।।
तो तत्त्वज्ञानासीं ठाओ। ज्ञाना तेणेंचि आओ।
हे असो तो देओ। ज्ञान भक्तु।।४५३।।
हे जाण पां सांचोकारें। तेथ ज्ञान उघडेनि द्वारें।
नांदतसें जगां पुरें। इयां रितीं।।४५४।।

"हे असो! अर्जुना! असे किती आणि काय काय सांगावे बरे! त्या गुरुभक्ताच्या गुरुसेवेला आणि भक्तिभावाला पारच नाही. अर्जुना! त्या गुरुभक्ताच्या गुरुसेवेला आणि भक्तिभावाला पारच नाही. हे परमबुद्धियुक्त परंतपा! ज्याला अशा भक्तीचीच आवड असते; असा तो शिष्योत्तमच तत्त्वज्ञानाचा आधार असणारा परमपुरुष होय! ज्ञान त्याच्याच द्वारी तिष्ठत असते; एवढेच काय पण तो स्वतःच देव असून ज्ञान त्याची भक्ती करते. जगाला पुरून उरेल एवढ्या मोठ्या ज्ञाननिधीचे मुक्तद्वार म्हणजे तो गुरुभक्तच होय!"

गुरुसेवेचे इतके महिमान सांगून आपली मनोभिलाषा प्रकटवत ज्ञानेश काय म्हणतात, पहा! गुरुसेवेची अन गुरुभक्तीची उज्ज्वल परंपरा त्यांच्या पाठीशी अहे. तरीही ती त्यांना कमीच वाटते आहे. ते म्हणतातः

जियें गुरुसेवेविखीं। माजा जीवु अभिलाखी।
म्हणौनि सोयचुकीं। बोलीं केलीं।।१३-४५५।।
एऱ्हवीं असतां हातीं खुळा। भजन अवधानीं आंधला।
परिचर्येलागीं पांगुला। पासौनि मंदु।।४५६।।
गुरुवर्णनीं मुका। आलशी पोखिजो फुकां।
परि आथी निका। सानुरागु।।४५७।।
तेणेंचि कारणें। हे स्थल पोखणें।
पडिलें मज म्हणें। ज्ञानदेओ।।४५८।।

ज्ञानदेव म्हणतात:" अशा गुरुसेवेची मला फार आवड आहे. नित्य निरंतर अशी गुरुभक्ती करता यावी ही माझी अभिलाषा आहे. ही माझ्या मनींची आंस कोणालातरी सांगावी म्हणून तर मी गुरुभक्तीचे हे एवढे मन:पूर्वक वर्णन केले! पण खरे तर मी स्वत: स्वामींची सेवा कशी करावी हे मुळीच जाणत नाही। मी इतका नबळा आहे की माझे सर्वच अवयव-हात, पाय, इ.सगळे त्यांच्या सेवेत राबण्याइतके समर्थ नाहीत. पण खरी गुरुसेवा तरीही आपल्याकडून घडावी या प्रबळ आशेने मी हा एवढा गुरुसेवावृत्तीचा वाङ्मयीन परिपोष केला. निदान ही वाक्सेवा तरी माझ्या गुरुचरणी रुजूं होऊं द्या!!"

तऱ्हीं तो बोलु उपसाहावा। वोलगें अवसरुं देयावा।
आतां म्हणेन बरवा। ग्रंथार्थुचि।।१३-४५९।।
तऱ्हीं परियेसा श्रीकृष्णु। जो भूतभारसहिष्णु।
तो बोलतसे विष्णु। पार्थु आइकें।।४६०।।

"अशा समर्थ गुरुसेवकाचा आदर्श पुढे ठेवीत मी आता सर्व भूतांचा भार सहिष्णुपणे वागवणारा तो श्रीकृष्णराणा त्या शिष्योत्तम पार्थाला काय उपदेश करीत आहे, ते सांगतो. तो ऐका. तुम्हाला ज्याची फार उत्सुकता लागून राहिली आहे, तो गीतार्थ मी आता सांगणार आहे."

ज्ञानदेवीचे अंतरंग म्हणजे *गुरुभक्ती*

श्रीज्ञानदेवविरचित गुरुभक्तीवर्णनपर अशा या बऱ्याच ओव्या आपण ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायातून ***"अमानित्वमदम्भित्वमहिंसा-क्षान्तिरार्जवम्। आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।१३-७।।"*** यातील ***आचार्योपासन*** या विषयानिमित्त अवलोकिल्या आहेत. श्रीज्ञानदेवांच्या या ओव्यांचे खरेखुरे रहस्य समजावून घ्यावयाचे तर आपण अर्जुनाचा श्रीकृष्णाप्रति, श्रीज्ञानदेवांचा त्यांचे गुरु श्रीनिवृत्तिनाथ यांच्याप्रति वा भक्तांचा भगवंताप्रति असणारा भाव, उत्कट प्रीती, अनन्यत्व ही चित्तात आणून त्या ओव्यांचा खरा अर्थ आकळून घेतला पाहिजे. या गुरुभक्तांच्या - या गुरुशिष्यशिरोमणींच्या - भूमिकेतूनच या ओव्या कळू शकतील; अन्यथा नाही.

या ओव्यातून एका प्रकारे संपूर्ण ज्ञानेश्वरीचे अंतरंगरहस्यच उद्बोधित झाले आहे. जिज्ञासूंनी तर श्रीज्ञानदेवीचा अभ्यास करतांना त्यातील श्रीगुरूंवरील व त्यांच्या सेवा, भक्ती इ.विषयांशी संबंधित असणाऱ्या अशा सर्वच ओव्यातील लाक्षणिक अर्थ लक्षात घेतला पाहिजे, इतकी त्या ओव्यांची थोरवी आहे.

या ज्या ओव्या आपण नुकत्याच पाहिल्या, त्यात ज्ञानेश आपली एक आंस प्रकट करतांना दिसतात. ती म्हणजे ***श्रीगुरूंच्या आवासाचे महाद्वार हे आपले सर्वस्व असावे*** ही! या आंसेपोटीच - या आत्यंतिक निष्ठेपायीच श्रीनामदेवांनी पंढरपूरला सर्व गुरूंचाही गुरू असणाऱ्या श्रीविठ्ठलाच्या महाद्वारी आपल्या कुटुंबियांसह समाधी घेतली हे सर्वविश्रुतच आहे! संतश्रेष्ठ श्रीचोखामेळ्यांच्या अस्थी पण याच ***जीवींच्या आवडीने*** शेवटी त्याच पाण्डुरंगाच्या महाद्वारी येऊन विसांवल्या!!

श्रीहैबतीबाबा हे जणू प्रति श्रीनामदेवच! त्यांनी पण श्रीज्ञानदेवांच्या महाद्वारी समाधी घेतली; तसेच ***श्रीभोजलिंगकाका,*** ज्यांनी श्रीज्ञानदेवादी भावंडांना अंगाखांद्यावर खेळवले, त्यांनीसुद्धा माउलीच्या समाधिद्वारीच समाधी घेण्यात धन्यता मानली. तीच गोष्ट आहे ***श्रीकेसरीनाथ व श्रीलक्ष्मीनाथ*** या श्रीज्ञानदेवांच्या शिवदिन-केसरीनाथादी शिष्यपरंपरेतील धुरीणांच्या समाधिस्थानांची! यांनीही श्रीमाउलीच्या पायाशी समाधिस्थ होण्याची हौस पूर्ण करून घेतली. असो.*(प्रस्तुत लेखकासही ज्ञानदेवांच्या याच संप्रदायपरंपरेचा अकस्मात लाभ झाला, हे येथे अनाहूतपणे सांगत आहे.)* हा असा आहे गुरुशिष्यऋणानुबंधाच्या चिरंतनत्वाचा सोहळा!

श्रीगुरुकृपेने ग्रंथनिर्मिती::::
"गीतार्थे विश्व भरूं"

नवल नाही की असा अप्रतिम भाव - इतकी जीवापाड निष्ठा ज्या गुरुचरणांशी ज्ञानदेव ठेवतात, त्यातून ते आपणास ज्ञानदेवीचे जे अलौकिक ग्रंथकर्तृत्व प्राप्त झाले आहे, त्याचे श्रेय आपल्या श्रीगुरु निवृत्तिनाथांच्या कृपेसच देतात. *तेराव्या* अध्यायाचे निरूपण संपवतांना ज्ञानेश ही संवेदना - हा भाव असा प्रकट करत आहेत:

एवं जैं महाभारतीं। व्यासें अप्रान्तमती।
भीष्मपर्वीं शांतीं। सांगितलें जैं।।१३-११५३।।
तो कृष्णार्जुनुसंवादु। नागरीं बोलीं विशदु।
सांगो दाऊं बंधु। वोवियेंचा।।११५४।।
नुसधीचि शांतीकथा। आणिजैल कीर वाक्पथा।
जैं शृंगाराचां माथां। पावो ठेविती।।११५५।।
दाऊं वेल्हाल देशी नवी। जैसीं साहित्यातें वोजावी।
अमृतांही चुकी ठेवी। गोडिसपणें।।११५६।।
बोलु वोल्हावतेनि गुणें। चंद्रासि घे उमाणें।
रसरंगीं भुलवणें। नादु लोपी।।११५७।।
खेचरांचियांही मना। आणी सात्त्विकाचां पान्हा।
श्रवणासवे सुमना। समाधि जोडे।।११५८।।

"श्रीव्यासदेवांच्या अपार मतीतून महाभारत कथेच्या भीष्मपर्वी याप्रमाणे कृष्णर्जुनसंवादरूपी जी गीताभारती प्रकटली, तिलाच ओवीछंदात गुंफत मराठी भाषेतून मी विशद करत आहे. ही सुरस

कथा शांतरसाने परिपूर्ण असेल. एवढेच नव्हे तर रसराज शृंगाराच्याही माथ्यावर पाय देऊन ही कथा उभी ठाकेल. मधुर अशी ही देशी भाषेतील साहित्यकृती सुसंस्कृत वाङ्मयास सौंदर्य देणारी आणि अमृताचाही गर्वपरिहार करेल अशी अमर ठरेल. या बोलरूपी चंद्राने सज्जनांच्या चंद्रकांतमणिरूप अंतःकरणास पाझरच फुटेल; या बोलांच्या रसरंगात नादब्रह्मही लोपेल! उन्मत्ताच्या मनालासुद्धा सात्त्विकतेचा पान्हा फुटेल; आणि ही कथा श्रवण करणारे सज्जन तर ती ऐकता ऐकताच समाधिमग्न होऊन जातील."

यानंतर ज्ञानदेव गुरुऋण गातातः

तैसा वाग्विलासु विस्तारूं। गीतार्थे विश्व भरूं।
आनंदाचें आवारुं। मांडूं जगां।।१३-११५९।।
फिटो विवेकाची वाणी। हो कानामनां जिणीं।
देखो आवडे तो खाणी। ब्रह्मविद्येची।।११६०।।
दिसो परतत्त्व डोलां। पाहों सुखाचा सोहला।
रिगो महाबोधसुकाला-। माजीं विश्व।।११६१।।

श्रीगुरुदेव निवृत्तिनाथांच्या कृपेमुळे मी असा वाङ्मयविलास करीन की ज्यामुळे अखिल विश्वच गीतार्थाने भरून जाईल; जगाभोवती सर्व प्राणिमात्रांना नाचण्या बागडण्यासाठी मी आनंदाचे आवार उभारीन; विवेकाचे दैन्य फेडून, श्रवणी - मननी सुख देणारी अशी ब्रह्मविद्येची खाणच उघडीन! या कथानिरूपणातून विश्वभर महाबोधाचा सुकाळ होईल; सर्वत्रांस परतत्त्व प्रत्यक्ष पहायला मिळेल; महासुखाचा सोहोळा होईल!"

हे निफजे आतां आघवें। ऐसें बोलिजैल बरवें।
जैं अधीष्ठिला असे परदेवें। निवृत्ति मी।।१३-११६२।।
म्हणौनि आखरीं सुभेदीं। उपमाश्लेष कोंदाकोंदीं।
झाडा देईन प्रतिपदीं। ग्रंथार्थासीं।।११६३।।
हा ठावोवेरी मातें। पुरतियां आहे सारस्वतें।
केलें असें श्रीमंतें। गुरुरायें।।११६४।।

"हे सर्व नक्कीच घडेल! कारण माझ्या हृदयात परमदेव श्रीगुरू निवृत्तिनाथ अधिष्ठित आहेत. त्यामुळे येथील माझ्या या ग्रंथातल्या प्रत्येक अक्षरात उपमा-दृष्टांतांची रेलचेल होईल. श्रीगीतेच्या प्रत्येक श्लोकातील गूढार्थ सुस्पष्ट होईल. माझे गुरुदेव अत्यंत श्रीमंत आहेत. त्यांनी दिलेल्या या सारस्वत धनामुळे मी हे सुंदर आख्यान करू शकत आहे."

श्रीगुरुकृपेमुळे ***"येथ सुगरणीं उदारें। रसज्ञें जेवणारें। मिळती मग अवतरें। हातु जैसा।।१३-११४९।।"*** असा अलभ्य प्रसंग श्रीज्ञानदेवांस प्राप्त झाला आहे. श्रीगीतार्थाचे निरूपण करणारे ज्ञानदेव आणि अपार गुणग्राहक ज्ञानी असे संतसज्जन श्रोते म्हणजे जणू कपिलाषष्ठीचा योगच! म्हणून श्रीज्ञानदेव म्हणतात की "गुरुकृपेच्या मेघातून आता मी नवरसांचा वर्षाव करवीन!" आणि गुरुकृपेबरोबरच संतसमागम मिळाला की केवढा प्रातिभ आविष्कार अवतरेल, ते ऐकाः

तेणें जी कृपासावायें। मी बोलें तेतुलें सामायें।
आणि तुमचियें सभे लाहे। गीतार्थु म्हणो।।१३-११६५।।
वरि तुम्हां संतांचे पायें। आजि मी पातला आहे।
म्हणौनि जी नोहे । अटक काईं।।११६६।।
प्रभु काश्मीरीं मुकें। नुपजे जी कवतुकें।
नाहीं उणीं सामुद्रिकें। लक्ष्मीयेंसीं।।११६७।।
तैसीं तुम्हां संतांपासीं। अज्ञानाची गोठी कायसीं।
यालागीं नवरसीं। वरिखैन मी।।११६८।।
किंबहुना आघवां। मज अवसरुं देयावा।
ज्ञानदेओ म्हणे बरवा। सांगेन ग्रंथु।।११६९।।

"माझ्या गुरूंच्या कृपाबळाने मी जे जे काही बोलतो, ते ते तुम्हा संतांना आवडते. तुम्हा संतांच्या सभेत माझे बोल सर्व गीतार्थ स्पष्ट करू शकतात. माझ्या प्रतिपादनास कोणताही अटकाव होत नाही. ही सर्व तुमच्या चरणांचीच कृपा! सरस्वतीचे बालक कधी मुके निपजेल कां! लक्ष्मीमातेस कधी सामुद्रिक लक्षणांची कमतरता असेल काय! तुम्हा संतांपाशी पण म्हणूनच कधी अज्ञानपूर्ण प्रलाप उमटतील कां! हे सज्जन श्रोत्यांनो! माझे हे गीतार्थनिरूपण पुढे चालू ठेवण्याचा मला अवसर द्याच! म्हणजे हा ग्रंथनिरूपणाचा सोहोळा मी नवरसांच्या वर्षावाने संपन्न करीन!"

श्रीपरमात्मकृपा आणि श्रीगुरुकृपा यांजबरोबरीने श्रीसंतसज्जनांच्या कृपेचेही महत्त्व ज्ञानदेवांना फारफार जाणवते; याच्या वरील ओव्या साक्षिरूप आहेत. जिज्ञासूंनी सुद्धा श्रीहरिकृपा व श्रीगुरुकृपा यांच्याप्रमाणेच संतकृपेचेही महत्त्व ओळखावे आणि त्या सत्संगतीचा लाभ घ्यावा म्हणून संसारार्णवात बुडणाऱ्या जीवरूपी तारूस श्रीज्ञानदेवांनी या ओवीरूपी दीपस्तंभाची प्रकाशकिरणे पोहोचवून हा जीवनसागर तरून जाण्याचा मार्गच जणू प्रकट केला आहे. असो.

समारोप

ज्ञानदेवांनी सद्गुरूंवर रचलेल्या ओव्या पाहत असतांना त्यातून त्यांच्या चिद्विलासवादाच्या तात्त्वज्ञानिक भूमिकेचे पैलू स्पष्ट दिसून येतात. **गुरुरूपकात्मक अशा त्या ओव्यांकडे आणि त्यातून प्रकटणाऱ्या चिद्विलासाकडे आपण आता वळणार आहोत पुढील *उन्मेष क्र.३-चिद्विलास* यातून!**

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::३::

::चिद्विलास:::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३:

गीता:
२:७
१८:७८
ज्ञानेश्वरी:
१:१-३
२:५५-६३
६:३१९-३२८
१३:१-२
१४:१-३१
१५:१-२८
१६:१-३१
१७:१-२०
१८:१-२९,१३२३,१७९४-१८०१,१८०७-१८०९
चां.पा.१,६१-६५
अमृतानुभव:
पंचश्लोकी:१-५
१०:२८-३१
अभंग:२२१,५४४

::उन्मेष ३::
:::चिद्विलास:::

चिद्विलासवाद::::

श्रीगुरुंवरील रूपके

ज्ञानेश्वरीतील गुरुसंस्तुतीपर ओव्या अभ्यासणाऱ्यास असे जाणवते की ज्ञानदेवांना गुरूशिवाय जगात कोणीच नाही. त्यांचे विश्व, त्यांचा विश्वात्मक देव, त्यांचे माता-पिता, बंधु-भगिनी, सुहृद-सहचर, संत-सज्जन हे सगळे ते एक गुरुदेवच आहेत. गुरु या एकमेवाद्वितीय अशा अवाच्य विषयावर त्यांनी प्रत्येक अध्यायात गीतार्थाच्या बरोबरीने सारस्वतमौक्तिके मुक्त हस्ताने उधळली आहेत.

चौदाव्या अध्यायारंभी त्यांचे हे श्रीगुरुदेव ***प्रज्ञाप्रभातसूर्य*** होतात; तर *पंधराव्या* अध्यायात ते ***तान्ह्या ज्ञानुल्याबाळाची माता*** होतात. *सोळाव्या* अध्यायात ते ***अद्वयाब्जिनीविकाशु चित्सूर्य*** होतात; तर सतराव्या अध्यायात ***सर्वविश्ववंद्य गणेन्द्र*** होतात. आणि अठराव्या अध्यायी तर त्यांचे ***गीतार्थाची मुदी ज्ञानराय बालकाच्या तोंडी लावणारे माउलीरूप*** साक्षात होते. ज्ञानेश्वरांचे हे सर्व गुरुचिंतन म्हणजे अलौकिक प्रतिभेचे महान दिव्यतम अवतरण आहे. हे प्रातिभसामर्थ्य हीच खरी तर ज्ञानदेवांच्या प्रज्ञासृष्टीतील ***वाग्ऋद्धी*** होय! असो.

प्रज्ञाप्रभातसूर्य

श्रीगुरूंचे असे हे विविध स्वरूपात विनटलेले रूप आपणही पाहिलेच पाहिजे. चौदाव्या अध्यायारंभीचे ***प्रज्ञाप्रभातसूर्य*** अशा श्रीगुरूंचे ज्ञानेशांनी साकारविलेले ओवीछंदबद्ध गुणगान ऐका:

जय जय आचार्या। समस्त सुरवर्या।
प्रज्ञाप्रभातसूर्या। सुखोदया।।१४-१।।
जय जय सर्व विसांवयां। सोऽहंभाव सुहावयां।
नाना लोक हेलावेयां। समुद्रा तूं।।२।।
आईकें गां आर्तबंधु। निरंतर करुणासिंधु।
विशदविद्यावधु। वल्लभा जी।।३।।
तूं जेयाप्रति लपसि। तेयां जग हे दाविसि।
प्रकट तैं करिसि। आघवें तूं।।४।।

"हे समस्त सुरवरांतील वरिष्ठ आचार्या! तू तर मूर्तिमंत *प्रज्ञाप्रभातसूर्य* आहेस. तुझ्याबरोबरच सुखाच्या उषेचा उदय होतो. प्रज्ञेची पहाट फाकवणारा सूर्य, हे गुरुदेवा! तुम्हीच आहात. हे गुरुदेवा! तुम्ही सर्व विश्वाचे आदिस्थान म्हणजे विश्रांतिस्थान आहात. सर्व लोकांचे अधिष्ठान असणारे विश्वरूपी क्षीरसागर तुम्हीच आहात. सर्वांचे दीनबंधु, हे जगन्नाथा! तुम्हीच आहात. ब्रह्मविद्यारूपी लक्ष्मीचे पतिदेवही तुम्हीच आहात! तुम्हाला आमचे वंदन असो. हे प्रज्ञाप्रभातसूर्या! तुम्ही जेव्हा लपता, तेव्हा तेथे अंधकाराचे साम्राज्यच असा जगदाभास प्रकट करता आणि जेव्हा तुम्ही प्रकटता, तेव्हा जगदाभास नष्ट होऊन तुम्हीच सर्वेश्वर आहात हे स्पष्ट होते."

चिद्विलास

"तूं जेयापासि लपसि।...." या ओवीच्या संदर्भात ***श्रीअमृतानुभवा***ची पुढील ओवी लक्षणीय आहे.

अविद्येचे काळवखें। कीं स्वबोधसुदिनीं फांके।
सीतलें प्रसादार्कें। जेयाचेनि।।२-१०।।अमृ.।।

अर्थ असा की गुरुकृपाप्रसादरूपी सूर्यामुळे अविद्येची काळोखी रात्रच आत्मबोधाच्या दिवसात परिणत होत प्रकाशते. गुरुकृपा ही सूर्य आहे. ती ज्याच्या जीवनात प्रकटली नाही, त्याला गुरुकृपेची प्राप्ती होईपर्यंत अज्ञानाची काळोखी रात्रच वावरायला मिळणार! अविद्येची सारी रात्र उजळवून टाकत तिचाच आत्मज्ञानाचा दिवस करण्याचे, हे आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य एका गुरुकृपेतच आहे.

गुरुकृपेच्या सूर्योदयाने सारे विश्व उजळून निघाले की तेच विश्व ***चैतन्यप्रकाश*** म्हणून प्रकाशू लागते. दृश्यरूपाचे चैतन्यात रूपांतर होते. दृश्याभास चैतन्य म्हणून विलसू लागतो. पण गुरुकृपेअभावी तेच चैतन्य जड विषयाप्रमाणे भासते व जगदाभासास कारण होते. ज्ञानेशांचे हे विवरण म्हणजे त्यांच्या चिद्विलासवादाची जणू नांदीच आहे. ***जग आणि चैतन्य ही कोणी दोन नसून एकच एक आत्मतत्त्व होत; जग भासणे हा चैतन्याचा विलास वा लाघव वा क्रिडा आहे; असे त्या चिद्विलासाचे मूलभूत सैद्धान्तिक स्वरूप आहे.***

ज्ञानेश हा ***चिद्विलासवाद*** आपल्या रचनांतून-वाङ्मयीन कृतीतून अनेकदा प्रकट करतांना दिसतात. उदाहरणार्थ त्यांची ***चांगदेवपासष्टी***तील पहिली ओवी पण या दृष्टीने मननीय आहे.

स्वस्ति श्रीवटेशु। जो लपोनि जगदाभासु।
दावी मग ग्रासु। प्रगटला करी।।१।।चां.पा.।।

ज्ञानेश चांगदेवास लिहितात की ***"आदिदेव असा हा वटेश्वर - हा परमात्मा - हा अश्वत्थाचा पिता - जेव्हा लपतो, तेव्हा जगदाभास प्रकटतो आणि त्या जगताचा ग्रास करून कोण प्रकटतो म्हणाल तर तोही हाच परमात्मा!"*** अशी ***चिद्विलास*** विषयक अनेक उदाहरणे त्यांच्या प्रासादिक कृतीतून देता येतात.

खरे म्हणजे श्रीज्ञानदेवांनी त्यांच्या **श्रीज्ञानदेवी, श्रीअमृतानुभव, श्रीचांगदेवपासष्टी आणि विविध अभंगरचना** या सर्व अक्षरवाङ्मयीन निर्मितीद्वारे साधकांपुढे सतत हे एकच जिवन्त तत्त्वज्ञान मांडले आहे. ज्याला जसे रुचेल, त्याने ते तेथून घ्यावे.

ऐतिहासिक दृष्ट्या जरी त्यांच्या प्रत्येक वाङ्मयीन कृतीचे प्रयोजन वेगवेगळे भासले, तरी जेव्हा आम्ही त्या सर्व कृतींतील एकमेव आशय – एकुलती एक अभिव्यक्ती आकलन करूं शकू, तेव्हाच आम्हाला त्यांच्या ज्ञानसूर्याचा प्रकाश – तो चित्सूर्यप्रकाश मिळू शकेल! असो.

पुढीलांची दृष्टी चोरिजे। हा दृष्टिबंधु निफजे।
परि नवल लाघव तुझें।जैं आपणपें चोरे।।१४-५।।
जैं तूचि तूं सर्वां ययां। कवणा बोधु कवणा माया।
ऐसें आपे आपु लोपावेयां। नमो तुज।।६।।

अमृतानुभवसदृश या ओवीतून ज्ञानेश पुढे सांगतातः "हे आत्मप्रकाशा! गुरुराया! गारुडी आपले इंद्रजाल पसरवत स्वतःस अदृश्य करतो; पण ते केवळ समोरच्या प्रेक्षकांची दृष्टी बांधून, मने संमोहित करूनच तो साध्य करत असतो. असल्या जागी नाहीसे होण्याचे खरे लाघव मात्र तुझ्याठायीच आहे. गारुडी तर जेथला तेथेच असतो. हे गुरुदेवा! तूं खरेच नाहीसा झालास तर द्रष्ट्यास विश्व दिसते, म्हणजेच ***बंध*** निर्माण होतो. आणि तूं पुनः प्रकट झालास की विश्वाभास नाहीसा होऊन ***मोक्ष*** होतो. ***म्हणूनच बंध आणि मोक्ष या दोहींचेही कारण तूच आहेस!*** तुझी इच्छा असेल तेव्हा कोणाला तूं आपले ***मायारूप*** दाखवतोस; तर कोणापुढे तूं आपले ***चिद्बोधस्वरूप*** प्रकट करतोस. स्वतःचा स्वतःच असा हवा तेव्हा लोप करविणाऱ्या श्रीगुरुदेवा! तुम्हाला वन्दन असो!"

चिद्विलासाचे आणखी दृष्टान्त देतांना ज्ञानदेव काय म्हणतात, पहाः

जाणो जगीं आपु बोलें। तैं तुझियां वोलां सुरस जालें।
तुझेनि क्षमें क्षमत्व आलें। पृथिवीयेसीं।।१४-७।।
रविचन्द्रादि शुक्ती। उदो करिती त्रिजगतीं।
तैं तुझियां दीप्ती। तेज तेजा।।८।।
चावलिजे अनिलें। तैं देविकेचिनि जी बलें।
नभ तुजमाजीं खेलें। लपाथपी।।९।।
किंबहुना माया असोस। ज्ञान तुझेनि डोलस।
असो वानणे सायास। श्रुतीसि हें।।१०।।

विश्व हे कसे चैतन्याचा विलास आहे, ते ज्ञानेश सांगत आहेत. "पंचमहाभूतात्मक सृष्टीला कर्तृत्वशक्ती केवळ तुझ्यापासूनच प्राप्त होते. जलाला जलत्व, त्याचे प्रवाहित्व, त्याचा ओलेपणाचा गुणधर्म इ.सर्व तुझ्यातल्या ओलेपणानेच प्राप्त होतात. हे आत्मदेवा! पृथ्वी तुझ्यामुळेच क्षमत्व धारण करण्यास समर्थ होते. रविचंद्रादी तेजोगोलांसही तूच प्रकाशवितोस. अनिलाला अमर्याद बळ तुझ्यापासूनच मिळते. आणि आकाशतत्त्व तर तुझ्यातल्या चिदाकाशाशी प्रत्यक्ष लपंडाव खेळते. किंबहुना ***मायेचे दुरत्यत्व - दुस्तरत्व - दैवी शक्तित्व*** ही तुझ्यापासूनच प्राप्त झाल्याने ती उल्लंघण्यास कठीण झालेली आहे. मायेला हे ***शबल बल*** तुझ्याच बळाने लाभलेले आहे."

म्हणून तर स्वतः भगवंतांनी म्हटले आहे की ***"दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते।।७-१४।।"*** - "जे भगवंतांना शरण जातात तेच केवळ ही माझी माया तरून जातात."

श्रीगुरुदेवांना – भगवंतांना निरंतर भजले तरच त्यांच्या बळावर ही अद्भुत त्रिगुणमयी अशी दुस्तर असलेली अलौकिक मायानदी ओलांडून प्रकाशरूपी किनारा लागतो. मायेचे दुस्तरत्व आणि तिला तरून जाण्याचा उपाय हे सर्व आत्मरूपाचाच गौरव आहेत. ***"चित्प्रकाशरूपा। नेणे वेद। नेणे वेद। नेणे वेद।"*** अशा या आत्मरुपाचा निर्देश करत ज्ञानेश तत्स्वरूप गुरुदेवांचे महिमान कसे गात आहेत, ते पुढे ऐकाः

वेद वाणूनि तंवचि चांग। जंव न दिसे तुझे आंग।
मग आम्हां तेयां मूग। एकां प्रांतीं।।१४-११।।

"अशा श्रीगुरुदेवस्वरूप प्रभूची स्तुती करणे – त्यांचे वर्णन करणे – त्यांना जाणणे हे जेथे वेदांनाही अशक्यप्राय झाले, तेथे मी अल्पज्ञ कशा प्रकारे श्रीगुरूंचे यथार्थ वर्णन करू शकणार! श्रुतींचाही त्यांचे रूप वर्णन करण्याचा हट्ट जोपर्यंत त्यांचे दर्शन होत नाही, तोवरच चालतो. नंतर श्रुतीही आमच्याप्रमाणे मौन धारण करतात."

जी एकार्णवाचां ठाईं। पाहातां प्रलयमेघाचा पाडु नाहीं।
मग महानदी काईं। जाणिजती।।१४-१२।।
कां उदैलियां भास्वतु। चंद्रु जैसा खद्योतु।
आम्हां श्रुति तुजआंतु। तेतुला पाडु।।१३।।

"अथांग विश्वसमुद्रात प्रळयमेघधारांनी कितीही वर्षाव केला, तरी त्यात पाण्याची कितीशी भर पडणार! आणि प्रळयधारांपेक्षा महानदी काय समुद्रात जास्त जलाची भर घालणार आहे कां! महानदीने समुद्रात अखंड पाणी ओतले तरी त्याची कोण महती असणार! सूर्य उगवल्यानंतर चंद्रच जेथे काजव्यासारखा भासतो, तेथे काजवे ते काय मोठा सूर्यापुढे प्रकाश पाडणार! जेथे प्रत्यक्ष वेदरायच मौनावले, तेथे मज अल्पज्ञ जीवाचा काय पाड लागेल!"

आणि दुजेयां थाऊं मोडे। जेथ परेसि वैखरी बुडे।
तो तूं मां कवणें तोंडें। वानावासीं।।१४।।
येयांलागीं आतां। स्तुति सांडूनि निवांता।
चरणीं ठेविजे माथां। हेंची भलें।।१५।।

"द्वैत ज्यात लय पावते, त्या परेशाचे वर्णन मी कोणत्या तोंडाने करू! द्वैत जाऊन अद्वैत होते, तेव्हा परेसहित पश्यंति, मध्यमा अन वैखरीही त्यांत बुडून जातात;तेव्हा त्या अद्वैत स्थितीचे वर्णन कोणत्या वाचेने करायचे! म्हणून आता त्या गुरुदेवांची स्तुती करण्याचा प्रयत्न सोडून देऊन त्यांच्या पायीं माथा ठेवावा हेच भले!"

गुरुसंस्तुतिः:::

गीतादान

गुरुदेवांचे असे स्वरूपवंदन केल्यावर त्या प्रज्ञाप्रभात सूर्यास शरणागत होत ते विनवत आहेत की गीतार्थनिधान त्यांच्या दृष्टीसमोर प्रत्यक्ष व्हावे म्हणून कृपाळू होऊन मनाला स्नेहांजन लावावे. ज्ञानेशांचे मन हे जणू गीतार्थनिधीचा पुरलेला खजिना पाहू जाणारे ज्ञाननेत्र

आणि गुरुकृपा हे जणू त्या मनरुपी चक्षूंना घातलेले स्नेहपूर्ण अञ्जन! या अंजनाच्या प्रभावाने ज्ञानेशांचे प्रज्ञावंत मन गीतार्थ प्रकट करणार आहे आणि त्यांच्या ***प्रज्ञासूर्याची प्रभात*** होणार आहे!

ज्ञानदेवांचे मागणे

गुरुदेवांची मनधरणी कशी करावी हे जाणणारे ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्ही तूं जो होसीं तेयां। नमो श्रीगुरुराया।
मज ग्रंथउद्यमीं फलावेयां। वेव्हारा होई।।१४-१६।।
आतां कृपाभांडवल सोडी। भरीं मती माझी पोंतडी।
करी ज्ञानपद जोडी। थोर मातें।।१७।।
मी संसरेन तेणें। संतांसीं करी कर्णभूषणें।
लेववीन सुलक्षणें। विवेकाची।।१८।।
जी गीतार्थु निधान। काढों माझें मन।
सुई स्नेहांजन। आपुलें तूं।।१९।।

"हे गुरुराजा! तूं जसा असशील तसा अस! तुला प्रणिपात असो! ज्ञानरूप धनाचे भांडवल मला देऊन हा ग्रंथ रचण्याचे माझे उद्यम तूं सफळ कर. मला ज्ञानपदावर बसवून कृतार्थ कर! म्हणजे मी संतांच्या कर्णांना ऐकण्यास भूषणावह अशी उत्कृष्ट ग्रंथरचना करीन; त्यांना विवेकाची सुलक्षण वस्त्रे लेववीन. तुझ्या स्नेहाचे अंजन माझ्या मनरूपी नेत्रात घाल. म्हणजे दिसण्यास अगोचर असणारा गीतार्थ मी सहजच विशद करीन. गीतेच्या गव्हरीचे गुप्तधन काढून ते संतसज्जनांना वाटावे आणि त्यांना संतुष्ट करावे ही माझ्या मनींची आकांक्षा आहे. हे गुरुमाउली! तूं ती आंस पुरव!"

हे वाक्सृष्टी एकें हेलें। देखती बुद्धिचें डोलें।
तैसा उदैजो निर्मलें। कारुण्यबिंबें।।१४-२०।।
माझी प्रज्ञावेली वेल्हाल। काव्ये होती सुफल।
तो वसंतु होई स्नेहाल। शिरोमणी।।२१।।
प्रमेयमहापुरें। हे मतिगंगा भरे।
तैसा वरिष उदारें। दिठीवेना।।२२।।
अगां विश्वैकधामा। तुझा प्रसादु चंद्रमा।
करूं मज पूर्णिमा। स्फुर्तीची जी।।२३।।
जियां पाहिलें मातें। उन्मेखसागरींचे भरतें।
वोसंडैल स्फूर्त्तीतें। रसवृत्तीचें।२४।।

"बुद्धीच्या डोळ्यांना परावाक्‌रूपी शब्दसृष्टी सार्थ दिसू शकेल असा आपल्या ज्ञानकिरणांचा निर्मळ प्रकाश फांकवून, हे कारुण्यसूर्या, माझ्या प्रज्ञावेलीला वेल्हाळ व काव्यरसपूर्ण सुफला अशी करणारा स्नेहाळ वसंत तूच हो! तुझ्या कृपामेघातून होणाऱ्या अमृतदृष्टिवर्षावाने उपनिषदसिद्धांतांचा महापूर येऊन माझी मतिगंगा दुथडी भरून वाहू दे. हे विश्वाच्या परमधामा! तुझ्या प्रसादरूपी चंद्रम्याच्या ज्योत्स्नेमुळे स्फूर्तिप्रकाशाची उधळण होऊ दे! त्या प्रसादचंद्रम्याच्या प्रेमाने ज्ञानसागरास भरती येऊन त्याच्या गीतार्थसाररूपी जलाच्या लाटा उचंबळून येऊ दे! मतिगंगा आणि ज्ञानसागर यांच्या त्या पुनीत संगमक्षेत्री गीतार्थकल्लोळरूपी लाटांचे उन्मेषनृत्य होऊ दे!"

ज्ञानेशांच्या विनवणीने प्रसन्न होत त्यांचे गुरुदेव म्हणू लागले:

तंव तोखौनि गुरुराजें। म्हणितलें विनतिव्याजें।
मांडिलें देखो दुजें। स्तवनमिखें।।१४-२५।।
हे असो आतां वाजटा। तो ज्ञानार्थु करी गोमटा।
ग्रंथु दावी उत्कंठा। भंगो नेदी।।२६।।

श्रीज्ञानदेवांचे प्रेममय बोल ऐकून प्रसन्न होऊन त्यांचे श्रीगुरु निवृत्तिनाथ म्हणू लागले की, " तू माझी स्तुती करणे म्हणजे आपणा दोघात दुजेपण आणणेच होय! गुरुशिष्य खरे तर एकरूपच असतात. तेव्हा आपले मूळचे अद्वैत सांडून द्वैत निर्मिणारा हा स्तुतीचा व्यर्थ उपक्रम आता पुरे झाला. आता तू विनाविलंब उत्कृष्टपणे खुलवत गीतार्थ सांगण्यास आरंभ कर! श्रीकृष्णमुखातून ओसंडणारी ती गीतारूपी वाग्गङ्गा तू त्वरित या उत्कंठ संतसज्जन श्रोतृवृंदाच्या श्रवणरूपी ओंजळीत ओतून त्यांना कृतार्थ कर!"

गुरुपादसेवा::::

श्रीगुरुपादपद्मपराग

श्रीगुरुनिवृत्तिनाथांचे हे बोल ऐकून ज्ञानराज हर्षित झाले. ते म्हणू लागले:

हो कां जी जी स्वामी। हेचि पाहातु असे मी।
जैं श्रीमुखें म्हणा तुम्हीं। ग्रंथु सांगें।।१४-२७।।
सहजें दुर्वेचा हीरु। आंगेचि तंव अमरु।
वरि आला पुरु। पियूखाचा।।२८।।

" हे स्वामी! आपल्या श्रीमुखाने तुम्ही मला गीतार्थ सांगण्याची आज्ञा द्यावी याचीच मी उत्सुकतेने वाट पहात होतो. वरून जरी दुर्वादलाचा अंकुर वाळलेला वाटला तरी साध्या जलाच्या शिडकाव्यानेसुद्धा हिरवाचार होतो. त्यातून वर त्याच्यावर जर अमृत वर्षले, तर काय बहार होईल, नाही!"

तऱ्हीं आतां येणें प्रसादें। विन्यासें विदग्धें।
मूल शास्त्रपदें। वाखाणीन।।१४-२९।।
परी जीवा आंतुलीकडें। जैसीं संदेहदोणी बुडें।
मग श्रवणचाडें। आवडी दिसें।।३०।।

"तुमच्या कृपाप्रसादामुळे माझे गीतार्थगौरववर्णन असेच अत्यधिक सुरेख होईल. श्रीगीतेच्या पदांचा मूळ शास्त्रार्थ मी आतां विनायास स्पष्ट करून सांगेन. त्यामुळे श्रोतृजीवांची संशयसंदेहनिवृत्ती होईल आणि ही शिवस्वरूप परमानन्दमयी श्रीगीताधारा चाखण्याची आत्यंतिक आवड त्यांच्यात प्रकट होईल."

तैंसा बोलीं साचारीं। अवतरो माझी माधुरी।
मालै मागैन घरीं । गुरुकृपेचां।।१४-३१।।

"माझ्या बोलात असे माधुर्य भरून वाहो, हीच गुरुकृपा मी तुम्हाकडे मागतो आहे."

याप्रमाणे या चौदाव्या अध्यायी ***प्रज्ञाप्रभातसूर्य*** अशा श्रीगुरुदेवांकडे श्रीज्ञानदेव आशेने डोळे लावून बसतांना दिसतात.

गुरुदेवांकडून आपले लळे पुरवून घेण्याची ज्ञानेशांची ही हौस मग पंधराव्या अध्यायी आणखी वेगळे रूप घेते अन त्या ***प्रज्ञाप्रभातसूर्या***स ते आता गुरुमाउलीच्या रूपात पाहू लागतात. त्या माउलीचे आपण तान्हे अपत्य आहोत असे वाटणारे ज्ञानेश तेव्हा प्रकट होतात. गुरुदेवांची सेवा करावी या अभिलाषेने ज्ञानदेव म्हणतातः

आतां हृदय हे आपुलें। चौफालूनि भलें।
वरीं बैसऊं पाऊलें। श्रीगुरुची।।१५-१।।
ऐक्यभावाची आंजुली। सर्वेंद्रिय कुडमलीं।
वरि भरौनि पुष्पांजली। अर्घ्यु देवो।।२।।
अनन्योदक धुंवट। वासना तैं तन्निष्ठ।
तैं लागलेसें अबोट। चन्दनाचें।।३।।

श्रीगुरूंची मनस्वी पूजा ज्ञानेश बांधू पाहत श्रीगुरूंच्या अलौकिक आध्यात्मिक मानसपूजनाचा अप्रतिम विधी ज्ञानेश वर्णित आहेत, तो असा! "आपल्या हृदयाचा चौरंग करून त्यावर श्रीगुरूंच्या पादपद्मांची स्थापना करू! ब्रह्मैक्यभावरूपी जळाची अंजुळी घेऊन तीत सर्वेंद्रियरूपी कमलकलिका भरून घेऊ आणि ते अर्घ्य श्रीगुरूंच्या चरणांवर समर्पित करू! अनन्यशरणतेच्या तीर्थोदकाने त्या गुरुपादुकांवर अभिषेक करूं आणि श्रीगुरुनिष्ठारूपी चंदनाने त्यांना चर्चित करू."

प्रेमाचेनि भांगारें। निर्वाळूनि नुपुरें।
लेअऊं सुकुमारें। पदें तियें।।१५-४।।
घनावली आवडी। अव्यभिचारें चोखडीं।
तियें घालूं जोडीं। आंगुलियां।।५।।
आनन्दमोदबहल। सात्त्विकाचें मुकुल।
तैं उमललें अष्टदल। ठेऊं वरी।।६।।
तेथ अहंधूप जाळूं। सोऽहंतेजें वोवाळूं।
सामरस्यें पोटाळूं। निरंतर।।७।।

"भक्तिप्रेमरूपी सुवर्णाचे नूपुर घडवून ते त्यांच्या सुकुमार पावलात लेववू! श्रीगुरुविषयक आर्तभावाची एकनिष्ठरूपी जोडवी त्यांच्या पादांगुलिकात घालू. अष्टसात्त्विकभावांच्या पाकळ्या फुलल्याने त्यातील प्रभुअनुरागाचा सुगंध चिदाकाशात दरवळत आहे; असे ते आनन्दकन्द अष्टदलहृदयकमळ त्या श्रीसद्गुरुरूप श्रीहरीच्या पादपद्मांवर वाहू! देहात्मैक्यबुद्धिरूपी अहंभावाचा धूप जाळू! संसारनिवृत्तिपर ***नाऽहं*** भावज्योतीने त्या गुरुपादकमलास ओवाळू! त्या पाऊवा सोऽहंभावाच्या सामरस्यात्मक वृत्तीने पोटाशी कवटाळून ठेवून धन्य होऊ!"

माझी तनु आणि प्राण। इयां दोहीं पाऊवां लेअवूं श्रीगुरुचरण।
करूं भोगमोक्ष निंब लोण। पायां तेयां।।१५-८।।
इयां गुरुचरणसेवा। हों पात्र तेयां दैवां।
जैं सकलार्थाचा मेळावा। पाटु बांधो।।९।।
ब्रह्मींचे विसंवणेवेन्हीं। उन्मेखु लाहे उजरी।
जैं वाचेंतैं ईयें करी। सुधासिंधु।।१०।।

"आपला देह आणि प्राण या दोन खडावा श्रीगुरूंच्या पावलात घालून त्यांवरून भोग आणि मोक्ष यांचे लिंबलोण उतरवून त्या दोघांचाही त्याग करू! गुरुचरणसेवेचे भाग्य मिळाल्यावर त्यापुढे भोगसुख आणि मोक्षसुख यांची काय मातब्बरी!"

अशी ही श्रीगुरुपादपद्मसेवा अर्पण केल्यानंतर श्रीज्ञानेश्वर त्या सेवेचे पारितोषक म्हणून जी श्रीगुरुकृपा प्राप्त होते, तिचे वर्णन करतातः

"श्रीगुरुचरणसेवेच्या योगामुळे परमभाग्यनिधान प्राप्त होऊन जीवास ब्रह्मानन्दसाम्राज्याचा लाभ होतो. त्याला ब्रह्मैक्यभावाचे सोज्ज्वळ ज्ञान होते. त्यामुळे त्याची वाचा म्हणजे जणू अमृतसिंधूच होते."

पूर्ण चंद्राचां कोडीं। वक्तृत्वा घापे कुरौंडी।
तैसीं आणी गोडी। अक्षरांतैं।।१५-११।।
सूर्यें अधिष्ठिलीं प्राची। जगां राणीव दे प्रकाशाची।
तैसीं वाचा श्रोतयां ज्ञानाची। दिवाली करी।।१२।।
नादब्रह्म खुजें। कैवल्यही तैसें न सजे।
ऐसा बोलु देखिजे। जेणें दैवें।।
श्रवणसुखाचां मांडवीं। विश्व भोगी माधवी।
तैसीं सासिन्नली बरवी। वाचावेली।।१४।।

"कोट्यवधी पूर्णचंद्र ज्याच्यावरून ओवाळून टाकावेत असे आल्हाददायक सुधारसपूर्ण वक्तृत्व त्यास प्राप्त होऊन त्याच्या अक्षरा-अक्षरातून माधुर्य भरून ओसंडते. पूर्व दिशेला सूर्य पातला की उषादेवतेमुळे सर्व जगाला प्रकाशसाम्राज्याचा लाभ होतो; तद्वतच त्या गुरुसेवकाची वाग्देवता ज्ञानसूर्याचा उदय होताच सर्व श्रोत्यांना ज्ञानप्रकाशरूप साम्राज्याचे दीपदान करते. अशा गुरुसेवारूप परमभाग्योदयामुळे जी सारस्वतनिधाने प्रकटतात, त्यांच्यापुढे नादब्रह्म ठेंगणे आहे व प्रत्यक्ष कैवल्याचाही साज त्यांच्यापुढे फिका पडेल. श्रवणसुखाच्या मांडवावर विश्वैक्यबोधरूप माधवीच्या - वसंताच्या आगमनाने बहरून कुंद करणारी वाचालता तरारून वाढते."

वाचालतेस असा बहर येतो कीः

ठावो न पवतां जेयांचां। मनेंसीं मुरडिली वाचा।
तो देव होये शब्दाचा। चितिकारु।।१५-१५।।
जैं ज्ञानासि न चोजवें। ध्यानासीही न आंगवें।
तैं अगोचर फावें। वोवीमाजीं।।१६।।
एवढे एक सौभग। वलघे वाचेचे आंग।
गुरुपादपद्मपराग। लाहे जेणें।।१७।।

"तो मी वैकुंठीं नसें। एक वेळीं भानुबिंबीहीं न दिसें। वरी योगियांचीही मानसें। उमरडोनि जाय।।९-२०७।।" या ओवीत ज्ञानेशांनी भगवंत सापडण्यास कसा दुर्लभ आहे, ते सांगितले आहे. एकापरीने भगवंत योगियांनाही दुर्लभ आहे. तो त्यांच्या ध्यानातही सापडत नाही. वेदांनी त्याचे वर्णन करण्याचा वाचिक प्रयत्न बहु केला. परंतु ***"नेति! नेति!"*** यापलीकडे त्याचे वर्णन करणे त्यांना जमले नाही; तो सापडणे तर लांबच राहिले!

"मन, बुद्धी, ध्यान वा वर्णन या सर्वांपलीकडील असणारा असा हा आत्मा आहे. त्याचा ठांव घेतांना मन व वाचा स्तब्ध होतात; मनासहित वाचा परतून फिरते. पण श्रीगुरुसेवेच्या द्वारे अशा त्या भगवंतासही शब्दरूपात गिंवसतां येते. ज्याला आकळून घेण्यास ज्ञानीही असमर्थ ठरते; जो ध्यानातही सापडू शकत नाही; अशा त्या इंद्रियातीत परमात्मस्वरूपाचे ओवीरूपात गुणगान करणे मला केवळ श्रीगुरुकृपेनेच शक्य होत आहे." असे श्रीज्ञानदेव म्हणतात.

पुढे ते असेही म्हणतात की:"श्रीगुरुपादरूपी कमलातील परागकणांचे सेवन करणारी वाचा सर्वांगी परमात्मोपलब्धिरसाने भिजून चिंब होते."

तऱ्हीं बहु बोलो काईं।आजि तैं अनाठाईं।
मातें वांचूनि नाहीं। ज्ञानदेओ म्हणें।।१५-१८।।
जें तान्हेनि मियां अपत्यें। आणि माझें गुरु एकलौते।
म्हणौनि कृपेसि एकें हातें। जालें तेयां।।१९।।
पाहां पां भरोवरीं आघवीं। मेघु चातकासीं रिचवी।
मजलागीं गोसावीं। तैसें केलें।।२०।।

"आता जास्त काय सांगावे! ज्याप्रमाणे मेघमालिका चातकांसाठी अपार जलसंपत्ती दूरवरून भरून आणतात आणि त्यातले जलबिंदु त्या चातक पक्ष्यांच्या चोचीत भरवावे म्हणून ती आघवी जलराशी धरातलावर वाहवितात; त्याप्रमाणे त्या ज्ञानमेघ निवृत्तिनाथांनी पार परेच्याही पलीकडील अशा प्रांतातून ज्ञाननिधि वाहून आणून अपार मातृवात्सल्याने माझ्या सानुल्या मुखी त्यातील कृपापायस ओतले आहे. कारण त्यांचे एकुलते एक तान्हुले अपत्य मीच आहे. त्यांच्या या उदार वत्सलतेने कृतार्थ झाल्याने अतिदुर्लभ म्हणून ओळखले जाणारे ते परब्रह्म आजच्या घटकेस या सर्व अवनीतलावर केवळ मज एकाच्याठायीच अवतीर्ण झाले आहे. परब्रह्माचा असा साक्षात आविर्भाव त्या गुरुमातेने माझ्याठायी केला असल्याने मला आता काय उणे असणार!"

ज्ञानेश्वरांना हा जो परमात्मसुखाचा ठेव सापडला आहे, त्यानिमित्त जाताजाता त्यांच्या एका अभंगातून त्या निधीचे अप्रूप दर्शन घेऊ व मग पुढे जाऊ! ते म्हणतात:

योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी।
पाहतां पाहतां मना न पुरेचि धणी।।१।।
देखिला देखिला माये देवाचा तो देओ।
फिटला संदेहो निमाले दुजेपण।।२।।
अनंतरूपें अनंतवेषें देखिलें म्यां त्यासीं।
बापरखुमादेवीवरु खूण बाणली कैसीं।।३।।अ.क्र.५४४।।

अनंतरूपांनी अनंतवेषांनी नटलेला हा ज्ञानेशांचा जगदीश, बापरखुमादेवीवर श्रीविठ्ठल, तो त्या अनंतरूपात आणि अनंतवेषात विनटलेल्या या जगाहून दुजा नाही; हे ज्ञानेशांचे चिद्विलासाचे तत्त्वज्ञान आहे. हा अभंग म्हणूनच त्या तत्त्वज्ञानाचा दर्शक आहे.

ज्ञानेशतत्त्वज्ञानाची ही खूण मनी ठसवत, त्यांना त्याद्वारे जे परमसुखनिधान प्राप्त झाले आहे, त्याच्या आंसेने आपणही पुढील ओव्यांकडे वळू या!

म्हणौनि रिकामें तोंड। करूं गेलें बडबड।
कीं गीता ऐसें गोड । आंतुडलें।।१५-२१।।
होय अदृष्ट आपैतें। तैं वाळूचि रत्नें परतें।
उजूं आयुख तैं मारितें। लोभु करी।।२२।।
आधणीं घातलें हरळ। होती अमृताचें तांदूळ।
जऱ्हीं भुकेची राखें वेळ। जगन्नाथ।।२३।।
तियांपरी श्रीगुरु। करितिं जैं अंगिकारु।
तैं होऊनि ठाकें संसारु। मोक्षमयु।।२४।।

देवदुर्लभ असा परब्रह्म साक्षात्कार ज्या गुरुमाउलीच्या कृपेने ज्ञानेशांना झाला आहे, त्याच्याबद्दल श्रीज्ञानदेव पुढे म्हणत आहेत की: "हे परमात्मनिधान गुरुमाउलीच्या वात्सल्यातिरेकाने माझ्याठायीं प्रकट झाले आहे. म्हणूनच वेड्याविद्र्या मुखाने मी जे काही वायफळ बडबडत बसलो आहे, त्या निरर्थक प्रलापातूनसुद्धा श्रीगीतेतील मधुर रसाने आपूर्ण भरलेली, अवीट गोडीने संपन्न अशी अनुपम वाग्फले बाहेर पडत आहेत. भाग्य जर सानुकूल असेल तर वाळूची रत्ने होतात; आयुष्याची दोरी जर बळकट असेल तर जीवावर उठलेला मारेकरीसुद्धा मोहित होऊन प्राण घ्यायचे विसरतो. जगन्नाथानेच जर क्षुधाशमन करायचे ठरवले असेल, तर आधणाच्या पाण्यात टाकलेल्या खड्यांचेही अमृतोपम चवीचे तांदूळ होतील! सद्गुरूंनी एकवार ज्याचा अंगिकार केला आहे, त्याचाही याचप्रमाणे अवघा हा संसार मोक्षमय होऊन जातो."

आणि असा मोक्षमय संसार उपभोगणाऱ्याचे स्वप्न जगालाही आनन्दाचे आवार घालण्याचे कां नसावे! एका अभंगात ज्ञानेश असेच काही म्हणत आहेत, पहा:

अवघाचि संसार सुखाचा करीन।
आनंदे भरीन तिन्हीं लोक।।१।।
जाईन गे माये तेयां पंढरपूरा।
भेटेन माहेरा आपुलियां।।२।।
सर्व सुकृतांचे फळ मी लाहीन।
क्षेम मी देईन पांडुरंगीं।।३।।
बापरखुमादेवीवरु विठ्ठलेशीं भेटी।
आपुलें संवसाटी करूनि ठेला।।४।।अ.क्र.२२१।।

श्रीगुरूंच्या कृपेने तिन्ही लोक आनंदाने भरून टाकू इच्छिणारे ज्ञानेश माहेरी आलेल्या माहेरवाशिणीच्या प्रेमभावाने ओसंडून आईबाप अशा त्या परमात्म्या पांडुरंगास उराउरी भेटत आहेत! घट्ट मिठी मारून बापरखुमादेवीवर विठ्ठलपरब्रह्माशी ते एकरूप होत आहेत. हे सुख त्यांना ज्या श्रीगुरूंच्या कृपेने प्राप्त झाले आहे, त्यांच्याबाबत ते पुढे अजून काय म्हणतात, पहा:

पाहां पां काईं नारायणें। तेयां पांडवांचे उणें।
कीजेचि ना पुरें। विश्ववंद्यें।।१५-२५।।
तैसें श्रीनिवृत्तिराजें। अज्ञानपण हे माझें।
आणिलें वोजें। ज्ञानाचियें।।२६।।
परि असो हे आतां। प्रेम रुलतसें बोलतां।
कें गुरुगौरवु वर्णितां।उन्मेखु आथीं।।२७।।
आतां तेणेंचि पसायें। तुम्हां संतांचे पायें।
वोलगेन मी अभिप्रायें। गीतेचेनि।।२८।

"असो! श्रीगुरूंचे वर्णन करण्याच्या उत्साहामुळे व त्यांच्याबद्दल उफाळून आलेल्या या प्रेमापुढे या गुरुस्तुतीला अंतच नाही; त्यांच्याच प्रसादामुळे तुम्हा संतांच्या आशिर्वादांनी मी श्रीगीतेचा अभिप्राय आता पुढे सांगणार आहे."

चिद्‌भ्रमर रूपक::::

चिद्‌भ्रमरविलास

या प्रत्येक अध्यायात असेच श्रीगुरूंची कृपा व त्यांचा प्रसाद यांचे अवीट वर्णन श्रीज्ञानदेव करतात. प्रत्येक वेळी निरनिराळी उपमाने योजून मोठ्या नवलाईची साहित्यलेणी ते आपल्या श्रीगुरूंवर चढवीत असतात. सोळाव्या अध्यायाच्या आरंभी त्याचे गुरुदेव ***चण्डांशु*** होऊन उदित होतात आणि त्यांच्या उदयाबरोबरच जो अद्वयाब्जिनीचा विकास होतो, त्या वेळी **लिङ्गदेहकमळा**त विलासमग्न असणाऱ्या **चिद्‌भ्रमरा**चा बंधच मोक्षात परिणत होतो. या काव्यविलासाचे सुख सेववणाऱ्या श्रीज्ञानरायांच्या त्या सुमधुर ओव्या अशा आहेत, पहाः

मावलवितु विश्वाभासु। नवल उदैजेला चंडांशु।
अद्वयाब्जिनी-विकाशु। वंदू आतां।।१६-१।।
जो अविद्यारातीं रुसौनियां। गिळीं ज्ञान अज्ञान चांदणियां।
जो सुदिन करीं ज्ञानियां। स्वबोधाचां।।२।।

साहित्यिक गुणसंपन्नतेचे अतीव वरदान गुरूंनी दिलेले ज्ञानेशच अशा ओव्या रचू शकतात. श्रीगुरुनिवृत्तिनाथांवर चित्सूर्याचे रूपक करत ज्ञानदेव म्हणतातः "विश्वाचा आभास नाहीसा करणारा आणि अद्वयबोधाच्या कमलिनीचा विकास करणारा नाविन्यपूर्ण नवलाईचा हा प्रतापसूर्य श्रीगुरुदेवांच्या रूपाने उदित झाला आहे. अविद्यारूप रात्रीच्या तमोंधकाराने जीव जेव्हा ग्रस्त होतो, तेव्हा श्रीगुरुआदित्य आपल्या तेजस्वी प्रकाशाने *ज्ञान-अज्ञानरूप* चांदण्यांचा लोप करून ज्ञानीजनांसाठी आत्मबोधरूपी सुदिन प्रकट करतो. त्या गुरुस्वरूप भास्करास वंदन असो!"

जेणें विवलतियें सवलें। लाहूनि आत्मज्ञानाचे डोलें।
सांडिती देह अहंतेचें अविसालें। जीवपक्षी।।१६-३।।
<u>लिंगदेहकमलाचां। पोटीं वेंचतयां चिद्‌भ्रमराचा।</u>
<u>बंदिमोक्षु जेयांचा। उदैला होय</u>।।४।।

"त्याचा प्रकाश फाकला की जीवरूप पक्षी आत्मज्ञानाची दृष्टी प्राप्त झाल्याने देहाहंकाराची घरटी सोडून चैतन्याचा चारा खाण्यासाठी चिद्गगनात भरारी घेतात. त्या श्रीगुरुस्वरूप चित्सूर्याचा उदय झाला की अविद्यारात्रीच्या प्रभावाखाली लिंगदेहरूपी कमलिनीत मायाममतारूपी स्नेहल पाशांनी गुंतून पडलेल्या जीवात्मरूपी चिद्‌भ्रमराचे ते बंधच मोक्षात परिवर्तित होतात."

ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश पडतो तो या ओव्यातून! तत्त्वज्ञान्यात जे विविध वाद प्रचुर आहेत, त्यापैकी कोणता वाद श्रीज्ञानेशांस मान्यताप्राप्त ठरतो, याविषयी ही वरील चौथी ओवी बरेच काही सांगून जाते.

विश्व हा आभास आहे व श्रीगुरूंच्या कृपेने तो मावळतो; तसेच त्या वेळी अविद्येची रात्र सरून आत्मबोध प्रकटतो. देह म्हणजेच आत्मा असे मानणाऱ्या जीवाला सत्य आत्मदृष्टी प्राप्त होते व त्या मिथ्या ज्ञानातच अडकून पडलेल्या जीवास तो आहे त्याच स्थितीत म्हणजे देह न सोडता विश्वांतर्यामी होता येऊन मोक्ष प्राप्त होतो. म्हणायचे झाले तर येथे ज्या स्थितीला ***जीवन्मुक्ती*** असे नामाभिधान आहे, ती अभिप्रेत आहे; पण ही जीवन्मुक्तीसुद्धा विदेहावस्थेशी अभिन्न आहे.

जीवन्मुक्ती व विदेहावस्था एकत्र वागविणाऱ्या या स्थितीला जर <u>चिद्विलास</u> म्हणायचे असेल, तर तेही योग्यच ठरेल. ज्ञानदेवांना खरे तर ***अजातवाद, चिद्विलासवाद, मायावाद, ब्रह्मवाद, चित्तचैतन्यवाद*** इ.वादात गुंतवून ठेवण्याचे काहीच कारण नाही. सर्व वाद ज्यातून निर्माण होतात; प्रतिभासित होतात; प्रभावित होतात; ज्यात सर्व वाद अंती निवृत्त होतात; असा म्हणायचाच झाला तर ***श्रीगुरुनिवृत्तिकृपावाद*** च, म्हणजे ***आत्मवाद***च आपल्या अथांग प्रातिभ सामर्थ्याद्वारे श्रीज्ञानदेवांनी त्यांच्या सर्व प्रासादिक वाङ्मयातून प्रकट केला आहे, असे आपणास जाणवते. किंबहुना ज्ञानेशांना वादातीत वादच मान्य आहे असे म्हणावे लागते.

सर्व वादांचा महासमन्वय श्रीज्ञानदेव करतात, हे आपणास त्यांचे एकूणएक तत्त्वज्ञान पाहिल्यावर उमगते. या गोष्टीची विशेष प्रतीती त्यांच्या तेराव्या अध्यायावरील ***"ऋषिभिर्बहुधा गीतं...।।१३-४।।"*** या श्लोकाच्या निरूपणानिमित्त येते. ते नंतर योग्य प्रसंगी पाहू या. असो.

"लिंगदेहकमलाचां। पोटीं वेंचतेयां चिद्‌भ्रमराचा। बंदिमोक्षु जेयांचा। उदैला होय।।१६-४।।" या ओवीत संकेत असा आहे की लिंगदेहकमलातील मकरंद चाखण्यात धुंद झालेल्या जीवचैतन्यरूपी चिद्‌भ्रमरास त्या नादात अविद्यारात्र झालेली कळत नाही व तो तसाच पराग वेचण्यात मग्न राहिल्याने त्या लिंगदेहकमलिनीत बंदिवान होतो. तरीही आपण बंदिस्त झालो आहोत याची साधी जाणीवही त्याला

होत नाही. कारण तो इंद्रियजन्य सुखोपभोगाचा मकरंद सेवण्यात गर्क असतो. परंतु जेव्हा श्रीगुरुकृपेचा चित्सूर्य उदित होतो, तेव्हा त्याच्या प्रकाशकिरणांनी लिंगदेहकमलास जाग येऊन उमलावेसे वाटतेच!

आणि त्या लिंगदेहकमलाच्या अशा उमलण्याबरोबर आपसुकच मुक्त झालेल्या त्या चिद्‌भ्रमरास मुक्ततेची जाणीवही न होता पुनश्च भ्रमण करण्यास चिदाकाश मोकळे होते; पुनश्च त्याला ज्या आवडेल त्या चिद्‌अद्वयाब्जिनीशी मधुर विलास करण्याचे स्वातंत्र्यही मिळते. ***श्रीगुरुकृपारुपी चित्सूर्याने त्या चिद्‌भ्रमररूपी जीवास तो आहे त्या स्थितीतच म्हणजे बंधाचीच मुक्तीत परिणती करून दिली आहे आणि तीही अत्यंत सहजपणे व त्यास या अवस्थांतराची जाणीवही न होता!*** एवढी अतर्क्य शक्ती एका श्रीगुरुकृपेतच आहे आणि हेच तत्त्वज्ञान - हीच ब्रह्मविद्या - हाच योगमार्ग ज्ञानेशांच्या वाङ्‌मयातून दिग्दर्शित होतो.

ज्ञानेश्वरीच्या *सहाव्या* अध्यायी सविस्तर वर्णिलेला ***कुंडलिनीयोग*** तो हाच योगमार्ग आहे. ***लिंगदेहकमलातील योगचक्रे वा कमले मिटलेली असतात. ती गुरुकृपेने कुंडलिनीशक्तीची किरणे पडून विकसित होतात. लिंगदेहकमल त्यायोगे उमलते आणि जीवरूपी भ्रमर हा चिदाकाशात जाऊन शिवासह विहार करू लागतो.*** वरील या चार ओव्यातून संक्षेपाने व लाक्षणिकरीत्या हा ***कुंडलिनीयोग*** सांगितला आहे असे जिज्ञासूंना जाणवून येते.

त्या योगधारेचे विस्तृत विवेचन आपण यथावकाश पाहणार आहोच. पण हा योगमार्ग ज्ञानेशपंथप्रणित आहे आणि त्यात गुरुकृपेचे असाधारण व एकमेवाद्वितीय असे माहात्म्य आहे. म्हणून गुरुकृपा आणि गरुशिष्यसंबंध यांकडे सध्या वळणे इष्ट आहे.

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी::::

चिद्विलासवाद

<u>चिद्विलासवाद म्हणजे जीव व शिव यांचा मूलत: असणारा अभेद कधीही न मोडताच ही जगतक्रीडा अव्याहतपणे चालू असते, असा सिद्धान्त</u>. *परब्रह्म, परमात्मा, भगवंत* वा तत्सम कोणत्याही संज्ञेने संबोधले जाणारे परमसत्य हेच या असत्य म्हणून मानल्या जाणाऱ्या जगतात पूरेपूर भरून असते. ते नाही असा देश नाही; कालही नाही. जीव बद्ध नसतो व मुक्तही होत नाही. बद्धता हाही चित्तत्त्वाचा विलास आहे आणि मुक्ततासुद्धा चिद्विलासच आहे. अद्वयत्व ते हेच!

गुरुशिष्य असणारे हे अद्वयत्व विशेषेकरून गुरुशिष्य संबंधातून दृग्गोचर होते. गुरुरूपाने हे अद्वयत्व दृष्टीस पडते. अनेकानेक गोष्टीत भरून असणारे हे अद्वयत्व विशेषेकरून गुरुशिष्यसंबंधातून दृग्गोचर होते. गुरु म्हणजे शिष्य आणि शिष्य म्हणजेच गुरु! देवभक्तांचा जसा अभेद असतो, तसाच गुरुशिष्यातही अभेदभावच असतो. त्रिपुटीतून पाहिले तर कदाचित गुरु व शिष्य द्वैतरूपाने भासतील; परंतु त्रिपुटीविरहित ज्ञप्तीला मात्र गुरुशिष्य यांच्यात ब्रह्मावेगळे काहीच दिसू शकणार नाही.

अमृतानुभवातील तत्त्वज्ञान

गुरुशिष्यांचे खरे स्वरूप पहावयाचे तर आपणास अमृतानुभवाकडे वळावे लागते. या त्रैलोक्यात ***शंभु व भवानी*** ही आदर्श अशी गुरु-शिष्य युती आहे. ***अर्धनरीनटेश्वर*** हे त्यांचे खरे रूप आहे. नाथपंथाच्या ***आदिनाथ-उमा*** या आद्य गुरु-शिष्यद्वयीचे ***अर्धनारीनटेश्वर*** हे स्वरूप गुरुशिष्यसंबंधाबाबत फारच सूचक आहे. शिवशक्तीच्या या समावेशनास आपल्या अप्रतिम अशा ***अमृतानुभव*** या ग्रंथाचे पहिले प्रकरण श्रीज्ञानेशांनी अर्पण केले आहे, इतके या गुरुशिष्यसंबंधाचे माहात्म्य आहे.

गुरु आणि शिष्याशी त्याचे असणारे नाते यांवर उत्कृष्ट प्रकाश टाकणारे काही श्लोक अमृतानुभवाच्या प्रारंभी येतात. ते पाहणे या दृष्टीने उद्बोधक ठरेल. सद्‌सद्विलक्षण अशा गुरुस्वरूपाला वन्दन म्हणून अमृतानुभवाची सुरुवातच होते ती अशी:

यदक्षरमनाख्येयमानंदमजमव्ययम्।
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये।।१।।अ.।।

"श्रीगुरुनिवृत्तिनाथ हे साक्षात अविनाशी *(अक्षर)*, अवर्णनीय *(अनाख्येय)*, आनन्दस्वरूप *(आनन्दम्)*, अनादि *(अजम् - अव्ययम्)* असे जे तद्रूप परब्रह्म आहेत, त्या दैवताचा मी सर्वस्वी शरण होऊन आश्रय घेत आहे," असे श्रीज्ञानराज म्हणत आहेत. असा परब्रह्मस्वरूप श्रीगुरूस अनन्यशरण झालेला शिष्य आणि त्याचे परब्रह्मरूप गुरु यात भेदच कोणता आणि कसा उरणार! ती द्वयी तर मूर्तिमंत ***भेदाभेदविलक्षण*** परब्रह्मच असणार!

पुढील श्लोकात ज्ञानदेव म्हणतात:

गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्या हि शाङ्करी।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम्।।२।।अ.।।

"सर्व विद्यात श्रेष्ठ असलेली, ज्ञानस्वरूप आणि जगदुद्धार करण्यास समर्थ अशी त्या गुरुशिष्यांची चिद्‌घन - चिद्धन असणारी मूर्तिमंत परब्रह्मस्वरूप अशी जी अत्यंत दयाशील व साक्षात गुरुआज्ञास्वरूप चिन्मय शक्तिरूपिणी ब्रह्मविद्या आहे, ती***शाङ्करी विद्या*** या नामाभिधानाने त्रैलोक्यात प्रसिद्ध आहे. संतत कीर्तीकर अशा त्या शांकरी विद्येचा जयजयकार असो! तिला नमन असो!"

ही ***शांकरी विद्या*** पण परब्रह्माहून वेगळी नाही. तिला असे वंदन करून परब्रह्माचे जगतात प्रतिभासित होणारे, ज्ञानमय चिन्मात्र ज्ञप्तीस जाणवणारे जे रूप आहे,त्यास वर्णित ज्ञानेश म्हणतात:

सार्धं केन च कस्यार्धं शिवयो: समरूपिणो:।
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहु:।।३।।अ.।।

"गुरुशिष्य ही द्वयी त्यांच्या शांकरीविद्येसह होणाऱ्या अपूर्व अशा समवायाने अर्धनारीनटेश्वर रूपाने विलसते. त्यातील शिवाचे *(गुरूचे)*

अर्धे अंग कोणते अन शक्तीचे *(शिष्येचे)* अर्धे अंग कोणते, हे ओळखता येऊ नये इतक्या विलक्षण नर्तनगतीने जो त्यांचा स्पंद विश्वांतर्यामी विराजमान होतो, त्या स्फुरणातून द्वैताचा भास होतो न होतो, तोच त्यातले अद्वैत प्रकट होते."

हे अद्वैततत्त्व आकळावे या इच्छेने प्रेरित होऊन त्यास वंदन करत श्रीज्ञानराज म्हणतात:

अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम्।
तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये।।४।।अ.।।

"अद्वैत हेच त्या गुरुशिष्याद्वयीचे - शिवशक्तीचे जगदादि आत्मतत्त्व असून जगत् हा निव्वळ आभास आहे, हे ज्ञान करून देणाऱ्या त्या गुरुशिष्येच्या शिवशक्तिरूप आदिपरंपरेस माझे नमन असो."

आदिनाथ-उमा ही ज्ञानेशांच्या नाथसंप्रदायाची आदिपरंपरा आहे, हे येथे जसे सूचित होते, तसेच जगताचे जे स्वरूप दिसते, ते आभासात्मक असून सत्य स्वरूप वेगळेच आहे, असे या श्लोकातून प्रतीत होते. ते खरे स्वरूप कोणते, परमात्मा कसा आहे, हे त्यानंतरच्या श्लोकातून ज्ञानेश सांगत आहेत आणि त्या ***"पूर्णमदः। पूर्णमिदं। पूर्णात् पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।"*** अशा परब्रह्म शंभूस पुनश्च नमन करतात:

मूलाग्रायाय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये।
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शांभवे।।५।।अ.।।

"जगताच्या आदि-मध्य-अंती असूनही नसणाऱ्या आणि नसूनही असणाऱ्या परिपूर्ण शंभुस्वरूप परब्रह्मास वंदन असो."

या श्लोकातच ज्ञानेशांचा चिद्विलासवाद समावलेला आहे आणि संपूर्ण अमृतानुभवाचे त्रिपुटीरहस्य याच श्लोकात सांठविलेले आहे, हे जिज्ञासूंस वेगळे सांगायला नको. अशा या ***ज्ञप्तिमात्र*** जाणिवेतून जाणवणाऱ्या गुरुशिष्यस्वरूप आदिनाथ-उमा वा शिव-शिवा वा शिव-शक्ती या आदियुगुलास आपणही ज्ञानेश करतात तसेच वंदन करू या! त्रिपुटीविरहित जीवन्मुक्तिलक्षणस्वरूप अवस्था प्राप्त व्हावी ही प्रार्थना त्यांच्या चरणी करण्याची सद्बुद्धी आपणास लाभावी हीच प्रत्येक प्राणिमात्राची सदिच्छा असावी, यापरते आपण काय म्हणू शकणार! असो.

चित्सूर्य

गुरुशिष्यांच्या अंतरंग संबंधावर अमृतानुभवाद्वारे पडणारा एवढा प्रकाश पाहून आपण पुनश्च *सोळाव्या* अध्यायातील **चिद्भ्रमरविलासा**कडे वळू या.

बंधासच मोक्षात परिणत करून देणाऱ्या श्रीगुरुरूपी चित्सूर्याचे दर्शन आपणास सोळाव्या अध्यायाच्या पहिल्या चार ओव्यातून घडलेले आहेच. गुरुशिष्यांना ***चित्सूर्य-चिद्भ्रमर*** या रूपकातून क्रीडतांना ज्ञानेश पहातात, असे आपणास या चार ओव्या सांगून जातात.

पुढील ओव्यात ते म्हणतात:

शब्दाचियां अशंकडीं। भेदनदीचां दोहीं थडीं।
आरडत विरहवेडी। बुद्धिबोधु।।१६-५।।
तेयां चाकाचें मिथुन। सामरस्याचें समाधान।
भोगवी जो चिद्गगन। भुवनदिवा।।६।।

"बुद्धि आणि बोधरूपी चक्रवाक पक्ष्याचे मिथुन शब्दजंजाळरूप शास्त्ररूपी प्रवाहाच्या भेदनदीने फारकत करून आपल्या दोन तीरांवर नियुक्त करून ठेवले होते. त्या युग्मास विभक्त करून भेददारुण प्रवाहाने व्याकुल विरहवेदना भोगावयास लावल्या होत्या. अशा त्या चक्रवाक युगुलास पुनश्च एकत्र आणून सामरस्याचे समाधान भोगविणारा चिद्भुवनातील दिवाकर म्हणजे श्रीगुरूच होत! भुवनदीपक अशा त्याच्या प्रकाशाने त्या बुद्धी व बोधांस एकमेकांची भेट होते व शब्दजंजाळरूप शास्त्रप्रवाहाची भेदनदी नाहीशी होते. ***बुद्धी व बोध म्हणजेच शक्ती व शिव किंवा जीव व शिव. शिवशक्तिसामरस्य*** प्राप्त करवून जीवाला परब्रह्मपद प्राप्त करवून देणारा एकमात्र चित्प्रकाश म्हणजे सद्गुरूच!"

जेणें पाहालेनि पाहांटें। भेदाची चोरवेळ फिटे।
रिगती आत्मानुभव वाटे। पांथिक योगी।।१६-७।।

"विश्व आणि विश्वात्मा यांच्यात द्वैताचा भास उत्पन्न करणारी भेदरूपी रात्र लयास जाऊन या चिद्गगन विभाकराचे दर्शन होताच योगियांस आत्मानुभव प्राप्ती करून देणाऱ्या पंथराजाची वाट सापडून ते मार्गस्थ होतात."

जेयांचेनि विवेककिरणसंगें। उन्मेखसूर्यकान्तस्फुल्लींगें।
दीपलें जालिती दांगें। संसाराची।।१६-८।।
जेयांचा रश्मिपुंजु निबरु। होतां स्वरूपउखरीं थिरु।
ये महासिद्धिचां पूरु। मृगजलाचां।।९।।

"या चित्सूर्य सद्गुरूच्या विवेक किरणांनी ज्ञानरूप सूर्यकांतमणी आपले स्फुल्लींग प्रकट करतो आणि त्याच्या प्रखर दीप्तीने संसाररूप अरण्याला जाळून भस्मसात करून टाकतो. त्या चित्सूर्याचा स्वरूपमरुभूमीवर अष्टमहासिद्धिरूप मृगजळाचा पूरच लोटतो."

जो प्रत्यग्बोधाचियां माथयां। सोऽहंतेचां मध्याह्नीं आलियां।
लपे आत्मभ्रांतिछाया। आपणपां तलीं।।१६-१०।।
तेव्हलीं विश्वस्वप्नसहितें। कोण अन्यथामतिनिद्रेतें।
सांभालीं नुरेचि जेथें। मायाराती।।११।।

"*प्रत्यग्बोध* रूपी गगनाच्या माथ्यावर जेव्हा तो सूर्य तळपू लागतो, जेव्हा प्रकाश फाकतो, तेव्हा त्याच्या प्रखर किरणांमुळे तेव्हा *सोऽहंभावा*ची ऐन मध्याह्न होते. त्यावेळी जीवाला झालेल्या आत्मविस्मृती व भ्रम यांची सावली आत्मपदांच्या पायातळी लपून जाते. अशा ऐन मध्याह्नवेळी विश्वस्वप्न विलयास जाते. हे स्वप्न प्रकटवणाऱ्या अज्ञानरूपी मायारात्रींचाच जेथे ठावठिकाणा उरत नाही तेथे विपरीत ज्ञानरूपिणी निद्रेला कोण जवळ करील!"

चित्प्रकाश देणाऱ्या त्या *ज्ञानमार्तंड* गुरुदेवांचे पुढे तर ज्ञानेश फार बहारीचे वर्णन करतात. ते म्हणतात:

म्हणौनि अद्वयबोध पाटणीं। महानंदाचियां दाटणीं।
मग सुखानुभव तिहीं घेणीं। मंदावों लागे।।१६-१२।।
किंबहुना ऐसैसें। मुक्तातैं कैवल्य सुदिवसें।
सदा लाहिजे कां प्रकाशें। जेयाचेनि।।१३।।
जो निजधामव्योमींचा राओ। उदैलाचि उदैजतखेवों।
फेडीं पूर्वादि दिशांचा ठावों। उदोअस्तूंचां।।१४।।

"असा सुदिन प्राप्त झाला की जीवास अद्वयबोधाच्या राजसिंहासनावर पट्टाभिषेक होतो; महानंद उफाळून येतो आणि त्या आत्मसुखाच्या महानंदापुढे विषयसुख नीरस वाटू लागते. असा तो श्रीगुरुरूप चित्सूर्य एकदा उगवला की पुनः उदय अस्त पावत नाही. म्हणून पूर्वपश्चिम इ.दिशाभेद उरत नाहीत."

न दिसणें दिसणेंनसीं मावलवीं। दोहों झाकलें सैंघ पघलवी।
काईं बोलो तैं आघवीं। उखाचि आणी।।१६-१५।।

"तो गभस्ती एकदा उगवला की अंधार आणि रात्र या शब्दांना, तसेच उजेड व दिवस या द्वयीलाही काही कर्तव्य उरत नाही. कारण तो हिरण्यगर्भ परत कधीही मावळत नाही. तो उगवला की ज्ञान आणि अज्ञान यांनी झाकलेले ज्ञानाज्ञानातीत स्वरूपच प्रकट करतो. त्याच्या उदयाबरोबरच स्वसंवेद्य आत्मरूपाचे मङ्गलस्वागत करणाऱ्या सुभद्रा ***कुंडलिनीस्वरूपा*** उषादेवतेचे आगमन होते."

तो अहोरात्रांचा पैलकडु। कोणें देखावा ज्ञानमार्तंडु।
प्रकाश्येवीण सुरवाडु। प्रकाशाचा।।१६-१६।।
तेयां चित्सूर्या श्रीनिवृत्ति। आतां नमोचि म्हणो पुढुती।
जैं बाधका येईजतां हे स्तुती। बोलाचियां।।१७।।

"अशा त्या परब्रह्मधाम चिदाकाशातील श्रीसद्गुरुनाथ चित्सूर्याच्या संतत प्रकाशशलाकांनी मुक्तांना सदा कैवल्यरूप सुदिन अनुभवण्यास मिळतो. प्रकाशाचा अनुभव येण्यासाठी प्रकाशाबरोबर प्रकाश्य वस्तूही असायला हवी. परंतु हा अहोरात्रांच्याही पलीकडील दिक्कालातीत असा सद्गुरुरूप ज्ञानमार्तंड मात्र प्रकाश्य वस्तू नसतांनाही प्रकाशाची केवढी लयलूट करून टाकतो, पहा! असे ते चित्सूर्यरूप निवृत्तिनाथ पहाण्यास मिळणे म्हणजे अहोभाग्यच! त्यांना केवळ नमनच करावे, हे भले! कारण शब्दस्तुतीने ते निखळ सद्गुरुरूप उणावले नाही का जाणार!"

"मी तुझा गुणीं। लांचावलां।"

शाब्दिक स्तुतीचा गुरुस्वरूपी लाग लागत नाही, हे सांगत ज्ञानदेव म्हणतातः

वेदांचे मान पाऊनियां। स्तुति तऱ्हीं ये चांगावेयां।
जरी स्तव्यबुद्धीसीं लयां। जाईजे कां।।१६-१८।।
जो सर्व नेणावा जाणिजे। मौनाचियां मिठियां वर्णिजे।
कहींचि न होनि आणिजे। आपणपेयां जो।।१९।।

"वेदातील जी परब्रह्मस्वरूपाची - त्या गुरुस्वरूपाची स्तुतिस्तोत्रे आहेत, ती ऐकून जर आपणास श्रीगुरुंची स्तुती करावी अशी ऊर्मी येऊ लागली तर लक्षात घ्यावे की जेव्हा ***स्तविता, स्तुती आणि स्तवन करणारा स्तावक*** ही त्रिपुटी नष्ट होईल, त्याचवेळी श्रीगुरुंचे खरेखुरे स्तवन करणे शक्य होईल! अन्यथा हे जाणून घ्या की त्या स्वरूपाचे खरे स्तवन पूर्णत्वाने करता येत नाही म्हणून वेदही मौनावले आहेत, असे समजले जाते. श्रीसद्गुरू असा सर्व वर्णनातीत आहे आणि ***"नेति! नेति!"*** याच शब्दांनी वेदांकडून ओळखला जाणारा आहे. तरीही ***"न इति; न इति"*** असा तो नाही. तो असा नाही म्हणूनच जगद्रूपाने भरून राहिलेला दिसतो."

जेयां तुझियां उद्देशासाठीं। पश्यंति मध्यमा पोटीं।
सूनि परेसीही पाठीं। वैखरी विरे।।१६-२०।।

"परा - पश्यंती - मध्यमा - वैखरी यांसह जेव्हा चारी वाचा उत्क्रण होतातः लयास जातात; त्यावेळी प्रकटणारे मौनच खरे तर या अशा सद्गुरुस्वरूपास अर्थस्तुतिबोधक असे आलिंगन देऊन धन्य होते! जेव्हा ***वाच्य - वाचक -वाचन*** या त्रिपुटीचा अंत होतो, त्यावेळी मौनावस्था प्रकट होते. याच खऱ्याखुऱ्या मौनावस्थेत श्रीसद्गुरूंचे यथार्थ दर्शन होते."

तेयां तूतें मी सेवकपणें। लेववीं बोलकेयां लेणें।
हे उपसाहावें हे म्हणतां उणें। अद्वयानंदा।।१६-२१।।
परि रंके अमृतसागरु। देखिलियां पडे उचिताचा विसरु।
मग करूं धांवे पाहुणेरु। शाकांचा तेयां।।२२।।
तेथ शाकु कीर बहुतु म्हणावा।
तेयाचां हरिखवेगु तोचि घ्यावा।
उजळू दिव्यतेजा हातिवा। तैं भक्ति पाहावी।।२३।।
बालां उचित जाणणे होयें। तऱ्हीं बालपणचि कें आहे।
परि सांचचि येरीं मायें। म्हणौनि तोखे।।२४।।

"अशा तुम्हा सद्गुरूंना बोलरूपी स्तोत्रांचे अलंकार अर्पण करावे व या सेवकाच्या प्रेमाखातर तुम्ही ते ल्यावे अशी विनंती करावी तरी कशी! असा हट्ट धरणे म्हणजे श्रीगुरु व शिष्य ज्या अद्वयबोधात नांदतात, त्यात द्वैतरूप उणेपणा आणण्यासारखेच ठरेल! परंतु अमृतसागरस्वरूप अतिथी जर घरी पातला तर रंकसुद्धा जसा हर्षवेगाने औचित्य विसरून त्याला शाकभाजांचा पाहुणचार करू जाईल; किंवा दिवा जसा आपल्या तेजाने सूर्याला ओवळू जावा; तसा हा श्रीगुरूंचे स्तवन करू पहाण्याचा माझा प्रयत्न आहे."

"ज्याप्रमाणे अमृतसागर अतिथी त्याला पाहुणचार करू पाहणाऱ्या रंकाचा भाव पाहून प्रसन्न होतो; अथवा भास्करराय जसा हातातील दीपज्योतीने त्याला ओवाळणाऱ्या भक्ताची भक्ती ग्रहण करून तोषतो; त्याप्रमाणे मज बालकाचे हे उचित अनुचित न जाणणारे बाल्यबुद्धीचे रिकामे स्तुतिरूप बोल ऐकून माझ्या श्रीसद्गुरुमाउलीने तोषावे आणि *"बाळा! तुझे माझ्याठायी किती प्रेम आहे!"* असे तिने म्हणावे ही माझ्या मनीची आंस आहे." या अशा शब्दात आपली स्तवनपूर्तीची आकांक्षा श्रीज्ञानदेवांनी प्रकट केली आहे.

श्रीगुरूंचे अवर्णनीयत्व व अनुपमेयत्व सांगत हे गुरुस्तवन ज्ञानेश पूर्ण करतात, ते असेः

जी चांगु केवीं कैंचा उपकारु। कीं तो मानूनी प्रिय उपकारु।
तोखेचि ना शार्ङ्गधरु। गुरुत्वासीं।।१६-२५।।
कीं अंधारेनि खतैलें अंबर। जालेयां दिवसनाथासमोर।
तेणें तेयां परतें सर। म्हणितलें काईं।।२६।।
तेवीं भेदबुद्धिचियें तुलें। घालूनि सुर्यश्लेषाचें कांटालें।
तुकिलासि तैं येकें वेले। उपसाहिजो जी।।२७।।

अवर्णनीय व अप्रमेय अशा आत्मतत्त्वास गुरुमायेचे वात्सल्य प्रकटविण्यास भाग पाडणारे ज्ञानेशच त्याची स्तुती करण्याचा हा हट्ट धरू जाणोत! ते म्हणतातः

"भृगुमहर्षींनी श्रीविष्णूंच्या वक्षःस्थली जरी लत्ताप्रहार करून औचित्यभंग केला, तरी त्या अपकारासच उपकार मानून ते प्रसन्न झाले. तेव्हापासून त्या सर्ववर्णगुरू भृगुब्राह्मणाचे पदचिह्न ते मोठ्या आवडीने आपल्या वक्षावरील उत्तम सामुद्रिक लक्षण म्हणून मिरवतातच आहेत ना! सूर्यनारायण समोर अंधाराने माखलेले काळेकुट्ट अवलक्षणी आकाश आले तरी त्याला दूर सरण्यास सांगत तर नाही ना! हे श्रीगुरुमाउली ! त्यांच्याचप्रमाणे तुला चित्सूर्याच्या श्लेषाने भेदबुद्धिरूप ताजव्यात मोजू जाणाऱ्या माझे हे अपराध तू आपल्या पोटात घाल!"

जिहीं ध्यानाचा डोला पाहिलासि। वेदासि वाचा वानिलासि।
जैं उपसाहिलें तेयांसि। तैं आम्हां करी ।।१६-२८।।
परि आजि मी तुझां गुणीं। लांचावला अपराधु न गणी।
भलतें करी आधधणीं। नुठीं कदां।।२९।।
मियां गीता एणें नांवें। तुझें यश हे अमृत सुहावें।
वानूं लागलो तैं दुणेनि थांवें। दैवलें दैव।।३०।।

"इंद्रियातीत असणाऱ्या तुला काही योगी ध्यानरूपी चक्षूंनी पाहतात. वाचातीत असणाऱ्या तुझी शब्दरूपाने वेदांनी स्तुती रचली आहे. हे त्यांचे द्वैतापराध तू जसे क्षम्य मानतेस, तसेच हे गुरुमाये! माझाही हा अपराध तू मनात आणू नकोस. कारण आज मी तुझ्या गुणांवर एवढा लुब्ध झालो आहे की तुझी अशी मनसोक्त स्तुती केल्याशिवाय रहाणार नाही; अपुऱ्या समाधानाने मी अजिबात मागे फिरणार नाही; मग वाटेल तेवढा मोठा अपराध यामुळे माझ्या हातून घडेना का! तुझे गुणगायन मी माझी तृप्ती होईस्तोवर करणारच आहे!"

गीताख्यानाच्या प्रसंगाने ज्ञानदेव आपली ही कामना पूर्ण करून घेऊ पहात आहेत. पुढे ते काय म्हणतात, पहाः

माझियां सत्यवाचे तप। केलें बहुत कल्प।
तेयां फलांचे हे महाद्वीप। पातली प्रभू।।१६-३१।।
पुण्यें पोसिलीं असाधारणें। तियें तुझें गुण वानणें।
देऊनि मज उत्तीर्णें। जालीं आजि।।३२।।

"हे गुरुमाउली! तू श्रीकृष्णपरमात्मस्वरूप आहेस! तुझे हे श्रीगीतानामक यशोदायक अमृत सेवन करायच्या इच्छेने मी तुझी स्तुती करण्यास नुसती सुरुवात केली न केली, तोच माझे भाग्य एकदम दुपटीने उत्कर्ष पावले! माझ्या सत्यवाचेने बरेच कल्प केवळ भगवंताचे यश व कीर्ती गाण्यातच व्यतीत करण्याचे तपःसाधन केले असले पाहिजे. त्यामुळेच मला या संसारमहासागरात या जन्मी तुझ्यासारख्या महाद्वीपाचा आश्रय मिळाला आहे. हे गुरुमाउली! हे प्रभो! तुझे गुणगान करण्याच्या असीम प्रेमातून निर्माण झालेल्या अद्वितीय पुण्यसंभाराचे फळ म्हणून आज मला हे गीताख्यानरूपी निःश्रेयस प्राप्त झाले आहे!"

जी जिविताचां आडवीं। आंतुडलेयां मरणगांवीं।
तैं अवदशाचि आघवीं। फिटली हे।।१६-३३।।
जैं गीतापणें नावाणिगी। जैं अविद्या जिणौनि दाटुगी।
तैं कीर्ती तुझी आम्हांजोगी। वानावयां जालीं।।३४।।
पैं निर्धना घरीं वानवसें। महालक्ष्मी येऊनि बैसें।
तेयांही वरती निर्धन आईसें। म्हणो ये काईं।।३५।।
अंधकाराचियां ठायां। दैवें सूर्यो आलियां।
तो अंधारुचि जगां यया। प्रकाशु नोहे।।३६।।

"जन्ममरणरूप चक्रातून फिरवणारी जीवदशेची आडवाट अविद्येस जिंकणाऱ्या तुझ्या कीर्तिरूपा श्रीगीतेच्या प्रभावाने आता सरली आहे. त्या अशा पुण्यशीला श्रीगीतारूपी भगवत्कीर्तीचे विवरण व वर्णन करण्यास पुरसे ठरेल इतके बळ गुरुमाउलीने माझ्या वाचेत निर्माण केले आहे. निर्धनाच्या घरी सहजच म्हणून जरी श्रीमहालक्ष्मी आली तरी त्याचे दारिद्र्य त्वरित फिटते. अंधकारव्याप्त अवकाशात अकस्मात सूर्यदेवाने पदार्पण केले तर तेथील अंधाराचे प्रकाशात परिवर्तन होऊन जगास उजेड मिळतो."

गीतार्थ निरूपण करण्याचे सामर्थ्य देणाऱ्या गुरुदेवांविषयी ज्ञानदेव जाता जाता असेही म्हणतात कीः

जेयां देवाची पाहातां थोरी। विश्व परमाणु ही दशा न धरी।
तो भावाचियें सरोभरीं। नव्हेंचि काईं।।१६-३७।।
तैसे मी गीता वाखाणीं। हे खपुष्पाची कीर तुरंबणी।
परि समर्थें तुवां सिरियाणी। फेडिली तैं।।३८।।

"ज्याच्यापुढे संपूर्ण ब्रह्मांडगोलसुद्धा परमाणूहूनही लहान भासतो, तो परमात्मा आपल्या भक्ताच्या आवडीप्रमाणे इवलेसेही रूप धारण करून त्यात समाविष्ट होतो व भक्ताला अतीव आनंद देतो. सगुण साकार असे रूप तो निर्गुण निराकार अनन्त धारण करतो, ते केवळ भक्ताच्या आवडीसाठी! आकाशपुष्प मस्तकी खोवावे ही आवड जशी असावी तितकीच गीतेवर व्याख्यान करण्याची आणि गीतार्थ विशद करून सांगण्याची माझी ही हौस पुरवायला फार अवघड आहे. परंतु हे गुरुदेवा! परमात्म्याप्रमाणेच कृपाळू होऊन तुम्ही ही माझी हौस पुरविता आहात."

म्हणौनि तुझेनि प्रसादें। मी गीतापद्यें अगाधें।
निरूपिन जी विशदें। ज्ञानदेओ म्हणे।।१६-३९।।

"तुमच्या सान्निध्याने मला हे गीतार्थबोधनाचे धन प्राप्त होऊन मी श्रीमान झालो आहे. तुमच्या कीर्तीतील प्रकाशात त्याचा गूढार्थ आकलन करण्याचे सामर्थ्य माझ्या बुद्धीला प्राप्त झाले आहे. अशा मेधावी बुद्धीमुळेच गीतार्थाची थोरवी मला स्पष्टपणे निरूपिता येत आहे. तुमच्या प्रसादामुळे अगाध अगम्य अशा गीतापद्यरत्नांचे तेजोखचित आत्मबोधपर निरूपण करण्याचे सामर्थ्य मला प्राप्त झाले आहे!"

याप्रमाणे श्रीसद्गुरू निवृत्तिराजांना वारंवार कृतज्ञतापूर्वक वन्दन करत, त्यांच्या ऋणाचा सतत निर्देश करत, श्रीज्ञानदेवांची अगाध रसपूर्ण वाणी श्रीगीतादेवीचा मराठी आविष्कार घडविण्यात मग्न होते.

जीवगणेन्द्र

तदुपरांत परत *सतराव्या* अध्यायाच्या मिषाने ज्ञानदेव श्रीसद्गुरुमाउलीस ***जीवगणेंद्र*** म्हणजे जीवांचा उद्धारकर्ता श्रीगणेश म्हणून आळवतांना दिसतात. यापूर्वीच त्यांनी तेराव्या अध्यायारंभी श्रीगुरुचरणांना ***आत्मरूप गणेश*** म्हणत केलेले वंदनही तसे संस्मरणीय आहे. ज्ञानेश्वरीच्या प्रथमाध्यायी प्रकटलेल्या ***सकलमतिप्रकाशु*** अशा गणेशाचे रूपही या संदर्भात आठवून पहावे असेच आहे.

ज्ञानेशांनी प्रकटवलेली श्रीगुरूंची गणेशरूपे जिज्ञासूंनी विचारात घ्यावीत अशी आहेत. प्रथम अध्यायारंभीचे व तेराव्या अध्यायीचे ते गणेशरूप पाहत सतराव्या अध्यायी ते कसे रंगवले आहे, ते पहाणे मनोरंजक आहे.

ज्ञानेश म्हणतात कीः

ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय जी स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।
देवा तुचि गणेशु। सकलमतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।२।।
हे शब्दब्रह्म अशेष। तेंचि मूर्ति सुवेष।
तेथ वर्णवपु निर्दोष। मिरवत असे।।३।।

आणि पहाः

आत्मरूप गणेश स्मरण। सकल विद्यांचे अधिकरण।
तैंचि वंदू श्रीचरण। श्रीगुरुचें।।१३-१।।
जेयांचेनि आठवें। शब्दसृष्टी आंगवें।
सारस्वत आघवें। जिव्हेसि ये।।२।।

या ओव्यातून आणि *सतराव्या* अध्यायारंभीच्या ओव्यातून असा स्पष्ट भावार्थ दिसून येतो की ***वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य, अशेष शब्दब्रह्म, सकलमतिप्रकाशक, सकळ विद्यांचे आश्रयस्थान असा जो आत्मा तोच श्रीज्ञानराजांचा श्रीसद्गुरुस्वरूप गणेश होय.***

याच्याच स्मरणाने जीवत्वदुर्गी अडकलेल्या चिद्भ्रमराची सोडवणूक करण्याचे सामर्थ्य श्रीशंभूंना प्राप्त होते व बंधच मोक्षात परिणत होतो. ज्ञानेशांची ही कल्पकता अति आनंद देणारी आहे. त्यांचा हा प्रतिभाविलास मुळातूनच पाहू याः

विश्वविकासिनी मुद्रा। जेयां सांडे तुझी निद्रा।
तेयां नमो जी गणेन्द्रा। गुरु तुज।।१७-१।।

"हे साक्षात आत्मस्वरूप परब्रह्म अशा श्रीगुरुरूप गणेन्द्रा! श्रीगणेशा! महानारायणा! तू जेव्हा योगनिद्रेचे सुख अनुभवत असतोस, त्यावेळी विश्व विकास पावते आणि तुझ्या नाभिकमलातील स्रष्टा आपल्या हाती सूत्रे घेऊन तुझ्या वतीने विश्व वर्धित करतो. हे सद्गुरू! योगनिद्रेचे असे अपार सामर्थ्य धारण करणाऱ्या तुला मी नमन करतो."

त्रिगुणत्रिपुरारी वेढिला। जीवत्वदुर्गी अडकला।
तो आत्मा श्रीशंभु सोडविला। तुझियां स्मृती।।१७-२।।

"सत्त्व-रज-तमात्मक त्रिगुणरूपी त्रिपुरात अडकून संकोचून जीवत्वरूप पावलेल्या आत्म्यास त्या जीवत्वरूपी दुर्गम दुर्गातून सोडवण्याचे कार्य श्रीशंभू केवळ तुझ्याच स्मरणाने सफळ करू शकतो. हे गुरुगणेंद्रा! असे हे अवघड कार्य करण्यासाठी त्याला आपल्या हातातील त्रिशूलाचाही उपयोग त्या जीवाला विंधण्यासाठी करावा लागतो. क्षणैक यातना अन मग मुक्ती असा तो मुक्तीचा उपक्रम आहे."

म्हणौनि शिवेसीं कांटाला। गुरुत्वें तूंचि आगला।
तऱ्हीं हलुं मायाजाला। तारितां।।१७-१।।

"परंतु हे सद्गुरवे! त्या शंभूशी तुलना केली तर मायाजालातून शिष्याची हळुवार हाताने मुक्तता करणाऱ्या तुझे आगळेवेगळे माहात्म्य दृग्गोचर होते. सकल विश्वातील जीवांचा उद्धार करणारा श्रीशंभू आपली सर्वश्रेष्ठ विभूती आहे. असे असूनही, ज्या मुक्कामी पोहोचण्याची मुमुक्षू पांथिक इच्छा ठेवतात, तो मुक्काम स्वयमेव असणाऱ्या हे आत्मरूप गणेंद्रा! तो शंभू अजूनही तुमच्या अद्वयमार्गावर चालणारा प्रवासी असा कापडीच आहे!"

जैं तुझयाविखीं मूढ। तेयांलागीं तूं वक्रतुण्ड।
ज्ञानियां तऱ्हीं अखंड। उजूचि असिसि।।१७-२।।

"जे तुझ्या स्वरूपाविषयी मूढ असतात, त्यांच्यासाठी तुझे वक्रतुंडरूप आहे. त्यांच्या अज्ञानामुळे ते संसाराच्या वेड्यावाकड्या वाटेने भ्रमत फिरतात. पण ज्या ज्ञानी पुरुषांनी तुझ्या स्वरूपास जाणले आहे, त्यांना तू सुमुख असा दिसतोस! त्यांना सन्मुख राहून संसारबंधातून मुक्त करण्याचे तुझे सामर्थ्य पहाता तुला शिवाची उपमा अपुरी पडते. कारण तुझ्यात अलौकिक गुरुत्व आहे, जे शिवातसुद्धा नाही.

दैविकीं दिठी पाहतां सानी। तऱ्हीं निमिषोन्मीलनीं।
जगां आदि प्रलयो दोनीं। लीलाचि करिसि।।१७-३।।

"तुझे ज्ञानरूप चक्षू, हे सुमुखा! सूक्ष्म दिसत असले तरी त्यांच्या निमिषोन्मेषात तू जगाचा आदि व अंत करण्यास समर्थ आहेस! योगनिद्रेत तू आपले चक्षू मिटून घेतलेस की या विश्वाचा विकास होतो आणि तेच ज्ञानचक्षू तू जेव्हा उघडतोस, तेव्हा विश्वाचा पसारा त्या उन्मेषात नाहीसा होऊन सर्व विश्व तुझ्याठायी लय पावते."

हे गणेशरूपक रचत पुढे ज्ञानेश म्हणतातः

प्रवृत्तिकर्णाचां चालीं। उठिला मदगंधानिलीं।
पूजिजसि नीलोत्पलीं। जीवभृंगाचां।।१७-६।।
पाठीं निवृत्तिकर्णतालें। आहालीं तैं पूजा विधुलें।
तेव्हलीं मिरविसि मोकलें। आंगाचें लेणें।।७।।

"हे विश्वरूपा श्रीगुरुगणेशा! तुझे दोन कर्ण ***प्रवृत्तिरूप*** व ***निवृत्तिरूप*** आहेत. त्यातील प्रवृत्तिरूप कर्ण जेव्हा तू चाळवतोस, तेव्हा त्याच्या मदगंधाला प्रकृतिरूप वायु वाहून नेतो आणि त्यामुळे आकर्षित होऊन जीवरूपी निळेसांवळे चिद्भ्रमर मोहविले जातात. ते तुझ्या मस्तकी येऊन बसतात व त्यामुळे जणू काही नीलकमलांनी पूजा केल्यासारखी तुझी शोभा दिसते. अन जेव्हा तू आपल्या निवृत्तिरूप कर्णाचा झणत्कार त्या जीवभृंगांना ऐकवतोस, तेव्हा त्या **अनाहत नादा**ने लुब्ध होऊन ते जीवभ्रमर त्वरित चिद्भ्रमररूप पावून तुझ्या हृदयकमलातील मकरंद आस्वादण्यास निघून जातात. अशा त्या दृग्गोचर न होणाऱ्या निर्गुण निराकार चिद्भ्रमररूपी पुष्पानी शृंगारित मोकळ्या अवयवांचे निर्गुण निराकार स्वरूप मिरवणाऱ्या हे आदिगणेशा! माझे तुला वंदन असो!"

वामांगीचा लास्यविलासु। तो हा जगद्रूपु आभासु।
तो ताण्डवमिसें कलासु। दाविसि तूं।।१७-८।।

"हे श्रीगुरुगणेंद्रा! तुझ्या वामांगी विराजणारी माया आपल्या लास्यनृत्यलाघवाने जीवमात्रांना मोहविणारा हा जगद्रूप आभास निर्मिते! ही लास्यविलासिनी जगदंबा म्हणजे तुझे अर्धनारीरूपच होय! त्याचप्रमाणे तू जेव्हा तुझे नटेश्वर हे पूर्णरूप धारण करून तांडवनृत्य करतोस, तेव्हा या जगाचा अंत होतो. हे जगदाभास निर्मिणारे आणि त्याचा लोप करणारे असे अर्धनारीनटेश्वररूप अत्यंत विलोभनीय आहे."

या संदर्भात *श्रीचांगदेवपासष्टी* या ज्ञानेशांच्या रचनेतील नमनाची ओवी लक्षणीय ठरते.

स्वस्ति श्रीवटेशु। जो लपोनि जगदाभासु।
दावी मग ग्रासु प्रकटला करी।।१।।चां. पा.।।

त्याचप्रमाणे वामांगी जी माया ती व नटेश्वररूपी युगुलाचे रूपक मोठ्या मनोज्ञ रीतीने ***अमृतानुभवा***तील एका ओवीत येते. ***शिवशक्तिसमावेशन*** या प्रकरणातील ती ओवी अशी आहे:

जेयां एकसत्तेचे बैसणें। दोहां एका प्रकाशाचें लेणें।
जैं अनादि एकपणें। नांदती दोघे।।८।।अ.।।

श्रीवटेश - श्रीशिव - श्रीगुरुगणेश लपला की जगदाभास दिसतो आणि तो प्रकट झाला की जगदाभास लोपतो. जगदाभास निर्मिणे व त्याचा लोप करणे ही दोन्ही एकाच सत्तेने होतात. ***शिवशक्तियुगुल*** हे त्या सत्तेचे रूप आहे. ते अनादि आहे. ते त्याच प्रकाशात न्हायले आहे. एकत्र नांदणारी ही द्वयी म्हणजे मूर्तिमंत ***चिद्विलास*** होय!

गणेन्द्रगुरूचे पुढे ज्ञानेश असेही वर्णन करतात कीः

हें असो दातारा। तू होसि जगाचां सोयरा।
सोयरिकेचियां वेव्हारां। मुकेचि तो।।१७-९।।
फेडितां बंधनाचां ठाओ। तू जगद्बंधु आईसा भाओ।
धरूं वोलगे उवावो। तुझांचि आंगीं।।१०।।
दुजेयाचेनि नांवें तेयां। देहही नुरेचि देवराया।
जाणो आपणपेयां। केलासि दुजा।।११।।

"हे असो! आपल्या भक्तांस स्वतःसही देऊन टाकणाऱ्या हे विश्वरूप दातारा! तू ज्याच्याशी सोयरीक करतोस, त्याला सोयरा म्हणून असलेला जगदाभास उरूच देत नाहीस! म्हणून तो सोयरिकीच्या बंधातून म्हणजे व्यवहारातून मुक्त होतो. जीवांना बंधमुक्त करणारा तूच एकमात्र जगद्बंधु आहेस, हे जाणून आनंदाने तुझीच सेवा करणाऱ्यांचा तू देहभावही उरूं देत नाहीस; मग दुजेपणाने त्यांनी तुझी सेवा करणे दूरच राहिले. तू त्यांना तर आपल्या स्वस्वरूपी सामावून घेतोस!"

तूतैं करौनि पुढें। जैं उपायें घेती दवडें।
तेयां ठाकसी बहुवें पाडें। मागाचि तूं।।१७-१२।।
जो ध्यानें सूयें मानसीं। तेयांलागीं तूं नाहीं देसीं।
ध्यानेंचि सरे तेणेंसी। वालभ तुज।।१३।।
तूतैं सिद्धचि जो नेणें। तो नांदे सर्वज्ञपणें।
वेदाचें येवढें बोलणें। नेघसी कानीं।।१४।।

"परंतु जे स्वकर्तृत्वाभिमानाने युक्त होत्साते तुझी आराधना करू पहातात, त्यांना तू कितीही प्रयत्न केले तरी सापडत नाहीस! जे योगी तुला ध्यानात पहाण्याचा प्रयत्न करतात, त्यांनादेखील त्यांचे ध्यान सरल्यावरच तू प्रेमाने आलिंगन देतोस! ध्यान करण्याच्या अवस्थेत तुझी भेट होणे अशक्यच आहे! जेव्हा ***ध्याता-ध्यान- ध्येय*** ही त्रिपुटी सरते, तेव्हा तू भेटतोस! जो सिद्धपुरुष तुला जाणण्यापलीकडील म्हणून ओळखतो, तो सर्वज्ञ म्हणून प्रसिद्धी पावतो. पण ज्या वेदांनी बोलघेवडेपणाने तुझे अमाप वर्णन केले आहे, ते तुझ्या स्वरूपाच्या जवळपासही फिरकू शकत नाहीत! तू वेदांना असे अल्पज्ञत्व देणारा आहेस!"

नेति! नेति!

मौन गां तुझें राशिनांव।आतां स्तोत्रीं कें बांधो हांव।
दिससि तेतुली मावो। भजो काईं।।१७-१५।।
दैविकें सेवक हो पाहों। तऱ्हीं भेदितां द्रोहो लाहो।
म्हणौनि आतां कांहींचि नोहो। तुजलागीं जी।।१६।।
जैं सर्वथा सर्वही नोहिजे। तैं अद्वया तूतैं लाहिजे।
हे जाणें मी वर्म तुझें। आराध्यलिंगा।।१७।।

"हे श्रीगुरु गणराया! तुझे मूळनावच मौन आहे! तुझी स्तुतिस्तोत्रांनी भजन करण्याची हांव मी काय बाळगूं! देवा मी तुमचा सेवक होण्याचेसुद्धा मनात आणत नाही! कारण अद्वयत्वाने माझ्याशी

एकरूप असणाऱ्या तुझा त्यामुळे द्रोह केला असेच व्हायचे! म्हणून मी आतां तुझा कोणीच होऊ इच्छित नाही! ना सेवक - ना शिष्य! ना सोयरा - ना सखा! कारण की हे गुरुस्वरूप आराध्यलिंगा! काहीही न करणे; काहीही न होणे; काहीच न इच्छिणे; म्हणजेच तुझी प्राप्ती करून घेणे, हे तुझे वर्म आता माझ्या नीट लक्षात आले आहे.''

तन्हीं नुरौनि वेगळेपणे। रसीं भजिनलें लवणें।
तैसें नमन माझें जाणें। बहु काईं बोलो।।१७-१८।।
आतां रितां समुद्रीं रिगें। तो उचंबलतु कुंभ निगें।
कां दशी दीपसंगे। दिपुचि होये।।१९।।
तैसां तुझियां प्रणति। मी पूर्णू जालां श्रीनिवृत्ति
आतां आणीन व्यक्तीं। गीतार्थु तो।।२०।।

''पण तरीसुद्धा ***अद्वैतातील भक्ती*** म्हणून मी तुला नमन करू इच्छितो! कारण हे महारावा! मीठ जरी पाण्यात विरघळले तरी रसरूपाने आपले आस्तित्व राखून ठेवतेच की नाही! मीसुद्धा तुझ्याशी तसाच एकरूप होऊन प्रेमरसभक्तीचे आकंठ रसपान करू इच्छितो! आता जास्त काय बोलावे! कारण सागरात चुबकळलेला कुंभ जसा सागरजलाने परिपूर्ण भरला जातो; किंवा दिव्याची वात जशी दिव्याच्या संगतीने ज्योती होऊन दीपरूप पावते; तसाच तुला शरण जाऊन, हे श्रीगुरु निवृत्तिदेवा! मी तुझ्याप्रमाणेच परिपूर्ण होऊन गीतार्थ व्यक्त करण्यास समर्थ झालो आहे! तरी पुढे त्याचे निरूपण करण्याची आज्ञा मला मिळावी ही तुझ्या चरणी जाता जाता विनवणी आहे!''

सद्गुरूंचे यथार्थ स्वरूप:::

अद्वयानन्ददाता श्रीगुरू

सद्गुरूंचा महिमा असा श्रीज्ञानेश्वरीच्या माध्यमातून तिच्या ओव्या न् ओव्यातून परत परत वर्णन करतांना श्रीज्ञानेशांना अद्वयानंदाचे महासुख प्राप्त होत असते; त्यांची वाचा त्या सद्गुरू श्रीनिवृत्तींवर स्तोत्रे रचण्यात समाधिमग्न होते. आणि त्या समाधिस्थितीत असणारे ज्ञानेश श्रीगीतेच्या अठराव्या म्हणजे कलशाध्यायावर ओव्या रचतांना त्याच्या प्रारंभी पुनः त्या गुरुदेवांचे स्तवन करत काय म्हणतात, ते पहाः

जय जय देव निर्मल। निजजनाखिलमङ्गल।
जन्मजराजलदजाल-। प्रभञ्जन।।१८-१।।
जय जय देव प्रबल। विदलितामङ्गलकुल।
निगमागमद्रुम फल। फलप्रद।।२।।

''साधकांचे सिद्ध करणाऱ्या; आत्मविदांना थोरपणा प्राप्त करून देणाऱ्या; आपल्या प्रियजनांचे सर्वमङ्गल करणाऱ्या हे हनुमन्तरूपी मारुतस्वरूप श्रीगुरो! तुझ्या जयजयकाररूपी झणत्काराने जन्म-जरा-मृत्यु यांच्या मेघडंबरीने निर्मिलेल्या चित्रविचित्र गंधर्वनगरींच्या मोहजालात अडकलेल्या जीवांचा परमउद्धार करणारा तूच आहेस! संपूर्ण अमङ्गलाचे मूळ कुळ जी ***अविद्या*** आहे, तिचे निर्दालन करणाऱ्या हे सामर्थ्यशाली सद्गुरो! तूच निगम आणि आगमादिक वेदशास्त्र - श्रुतिस्वरूप अशा कल्पद्रुमाचे सुमधुर असे श्रेयसरूपी फल पक्व करून आपल्या भक्तांना प्रदान करतोस!''

''हे विश्वचि माझें घर। ऐसीं जेयाचि मति स्थिर।'' अशा; विषय ज्याला सोडून गेले आहेत; विश्वरूपी आत्मस्वरूपात जो स्थित आहे, अशा भक्तांवर कृपेची सावली धरणाऱ्या हे वत्सला! हे गुरुदेवा! ज्या मार्गाचे निव्वळ दिग्दर्शन तुझ्याकडून झाले असता ***पंथराजाचे पांथिक योगी*** तहानभूक हारपतात, रात्री व दिवस ज्याच्यावर नाहीत त्या कालातीत पंथावर सदैव वास्तव्य करणाऱ्या तुला वंदन असो!''

जय जय देव सकल। विगतविषयवत्सल।
कलितकालकौतूहल। कलातीत।।१८-३।।

''ब्रह्मा-विष्णु-महेश या विश्वनियंत्रक त्रयीलासुद्धा ज्याने आपल्यात समाविष्ट करून ठेवले आहे; जो अन्यथा सार्वत्रिक आहे; त्या कालालासुद्धा तू आपल्या स्वस्वरूपात लीलया अवस्थित करून ठेवले आहेस! विश्वरूपी कला तुझ्याच महत्तेने उदय पावते! चिद्विलासात रमणाऱ्या हे श्रीगुरो! कलातीत - निष्कल - निरंजनस्वरूप असे परमात्मतत्त्व तूच आहेस!''

मराठी भाषाप्रभू असणारे ज्ञानेशच का हे व्युत्पन्न पंडिताप्रमाणे संस्कृतातल्या गुरुमहतीच्या या ओव्या रचित आहेत, हे पाहून आपण आश्चर्यविमूढ होऊन जातो!

ते पुढे म्हणतातः

जय जय देव निश्चल। चलितचित्तपानतुंदिल।
जगदुन्मीलनाविरल। केलीप्रिय।।१८-४।।

''हे जगदाभास निर्मिण्याच्या खेळाची आवड असणाऱ्या अढळ आत्मरूपी श्रीगुरुदेवा! भक्तांचे चंचल चित्त पिवून तुष्टणाऱ्या हे चिद्भ्रमरा! भक्तांच्या चित्ताचे आकंठ पान करत करतच तू त्यांना पण आत्मस्वरूपात अवस्थित करतोस! तुझा जयजयकार असो! तुझ्या कृपेच्या स्रोताने साधकांना अवर्णनीय अशी जी महदानंदकंदसमान स्थिती प्राप्त होते, त्या अवस्थेचे वर्णन करण्यास शब्द फार अपुरे पडतात.''

पंथराजाचे फल

असे असले तरी त्या ***महदानंदकंद*** स्थितीचे वर्णन ज्ञानेशांनीच स्वतः कसे केले आहे, हे पहाः

ऐसें शब्दजात माघौतें फिरें। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे।
वाराही जेथ न शिरे। विचाराचा।।६-३१९।।
जैं उन्मनियेचें लावण्य। जैं तुर्येचें तारुण्य।
अनादि जैं अगण्य। आत्मतत्त्व।।३२०।।
जैं विश्वाचें ययां मूल। जैं योगद्रुमाचें फल।
जैं आनंदाचें केवल। चैतन्य गां।।३२१।।

''वेद ज्या अवस्थेला पाहून माघारे फिरतात; संकल्पाचे आयुष्य ज्याठायी सरते; विचाराचा वाराही ज्या स्थितीपर्यंत पोहोचू शकत नाही; ***उन्मनी स्थितीचे लावण्य*** आणि ***तुर्यावस्थेचे यौवन*** असे

असणारे ते अनादी व अगण्य परमतत्त्व आहे. विश्वाचे ते अढळस्थान आहे. योगवृक्षाला सुगडलेले ते मधुर फळ आहे."

जैं आकाराचां प्रान्तु। जैं मोक्षाचां एकान्तु।
जेथ आदि आणि अन्तु। विरौनि गेलें।।६-३२२।।
जैं महाभूताचें बीज। जैं महातेजाचें तेज।
एवं पार्था जैं निज-। स्वरूप माझें।।३२३।।
हे चतुर्भुज कोंभैलीं। जेयांची शोभा रूपां आली।
देखौनि नास्तिकीं नोकिलीं। साधुवृंदें।।३२४।।
तैं अनिर्वाच्य सुख। पैं आपणचि जालें जैं पुरुष।
जेयांचे कां निष्कर्ष। प्राप्तिवेरीं।।३२५।।

"आनंदाचे निव्वळ चैतन्य असे ते परमतत्त्व ***अ*** काराच्या म्हणजे जगाच्या अंती आहे. तेथे उत्पत्ति आणि लय हेही लय पावतात. मोक्षस्थितीचा एकान्त भोगण्याचे ते रम्य स्थान आहे. पंचमहाभूतांचे बीज आणि महातेजाचेही तेज असे ते माझे निजस्वरूप आहे. साधुसज्जनवृंदांचा, ऋषिमुनींचा मदमस्त नास्तिक जेव्हा छळ मांडतात, तेव्हा माझे हे चतुर्भुज रूप तेथूनच अवतार पावते."

श्रीगुरुदेवांच्या कृपेने ***आनन्दाचा कन्द असा हा श्रीरंग*** च त्या कृपांकित शिष्यांना साक्षात गंवसतो आणि ते महासुखाचेही सुख होऊन राहतात.

पुढे त्या भाग्यवंतांच्या या स्थितीला गुरुकृपेद्वारे जे साधन कारणीभूत होते, त्याविषयी ज्ञानेश म्हणतातः

आम्हीं साधन जैं हे सांगीतलें।
तैंचि शरीरीं जिहीं केले।
तैं आमुचेनि पाडे आलें। निर्वाललेयां।।६-३२६।।
परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचेनि मुसें।
वोंतीव जालें तैसें। दिसती आंगें।।६२७।।
जऱ्हीं हे प्रतीति हन फांकें। तऱ्हीं विश्वचि हे आघवें झांकें।
तंव अर्जुन म्हणे नीकें। साचचि जी हें।।३२८।।

"पंथराजाचे भगवंतांनी प्रसृत केलेले साधन करून ते ***याच देहीं*** सच्चिदानन्दस्वरूप निश्चित पावतात. त्यांचा देहच मग परब्रह्मरसाने ओतलेल्या मुशीसारखा होतो. जेव्हा ही स्थिती प्राप्त होते, तेव्हा हे विश्व पूर्णपणे लयाला जाते; संसाराचा पसारा मागे पडतो अणि त्रिपुटीविरहित दृष्टी प्राप्त होते."

श्रीहरीचे हे बोल अर्जुनाच्या मनात चांगलेच ठसतात, असा अभिप्राय देत ज्ञानेश त्या महदानंदकंद महासुखावस्थेचे वर्णन संपन्न करतात. शब्दातीत अशा त्या अवस्थेला शब्दात पकडून ***बोलातून अरूपाचे रूप दाखवणे*** केवळ ज्ञानेशांनाच शक्य आहे!

ज्ञानदेवांच्या वाचेला लागलेले पिसें

बहुल अशा त्या अरूप आनन्दकन्दघन श्रीविश्वरूप चैतन्यास ज्ञानेश वंदितात. श्रीगुरूंचे हे रूप अविद्या-अज्ञानादी समस्त दोषांचा परिहार करणारे आहे. अशा त्या आदिस्वरूप निष्कल - कलातीत श्रीविश्वचेतोहराला वंदित ज्ञानदेवांचे बोल साकारतात, ते असेः

जय जय देव निष्कल। स्फुरदमंदानन्दबहुल।
नित्यनिरस्ताखिलमल। मूलभूत।।१८-५।।
जय जय देव सप्रभ। जगदम्बुदगर्भनभ।
भुवनोद्भवारंभस्तंभ। भवध्वंस।।६।।

"विश्वरूपी मेघाला धारण करणाऱ्या चिदाकाशस्वरूप आत्मदेवा! हे श्रीगुरो! सर्वभुवनाचा आधारस्तंभ तुम्हीच आहात. भवांधकाराचा स्वलीलया नाश करणाऱ्या हे स्वयंज्योती स्वप्रकाशित आत्मतत्त्वा! तुझा जय जयकार असो!"

जय जय देव शुद्ध। अविद्याउद्यानद्विरद।
शम दम मदन भेद। दयार्णव।।१८-७।।
जय जय देवैकरूप। अतिकृतकंदर्पदर्प।
भक्तभावभुवनदीप। तापापह।।८।।

"हे विशुद्धबुद्धी श्रीगुरुदेवा! अविद्येच्या उद्यानात मस्तपणे झुलत असतांना उन्मादातिरेकाने ज्याच्या गंडस्थलातून मदनरूप मद पाझरतो आहे अशा संसाररूपी गजराजाला शमदमादी अंकुशांनी आपल्या स्वाधीन करून घेण्यास समर्थ असणारे तुम्हीच आहात. अल्पज्ञ जीवांना त्या संसाररूपी गजाच्या मोकाट माऱ्यातून वाचवणाऱ्या हे दयासागर परमात्मरूपा! तुम्हाला कृतज्ञतापूर्वक वंदन असो! कामेच्छारूप कालसर्पाचा विळखा एकाच तडाख्यात सोडवून भक्ताचें त्रितापदुःख हरणाऱ्या हे प्रभो! तुमच्या अद्वयानुभवप्रकाशाचा नन्दादीप भक्तहृदयमंदिरात ***महाभावसमाधी*** ला उजळवीत सतत नांदत असतो!"

जय जय देव अद्वितीय। परिणतोपरमैकप्रिय।
निजजनजित भजनीय। मायागम्य।।१८-९।।
जय जय देव श्रीगुरो। अकल्पनाख्यकल्पतरो।
स्वसंविद्द्रुमबीज प्ररो-। हणावनी।।१०।।

"आपल्या स्वजनांकडून तुमचे हृदय सदाच जिंकले जाते. मायेने वेष्टिलेल्या संसारापासून उपरत झालेले तुमचे अत्यंत प्रिय भक्तजन तुमच्या अद्वितीय प्रेमभावाचे नेहमी प्रेमपूर्वक स्मरण व चिंतन करत असतात. तुमचा असा अहर्निश निदिध्यास घेत राहण्यातच त्यांच्याकडून तुम्हा स्वात्मरूपी श्रीगुरूंचे खरेखुरे भजन घडत असते. कल्पनातीत फल देणाऱ्या स्वसंवित्तिरूप कल्पतरूचे बीज धारण करणाऱ्या सुयोग्य अशा वसुंधरे! हे श्रीगुरुदेवा! तुम्हाला सहस्त्रधा प्रणाम असो! सर्वभावे वंदन असो!!"

पुढे ज्ञानेश म्हणतातः

हे एकैक ऐसें। नाना परिभाषावेषें।
स्तोत्र करूनि तुज उद्देशें। निर्विशेषां।।१८-११।।
जिहीं विशेषणीं विशेषिजे। ते दृश्य नोहे रूप तुझें।
हे जाणें म्हणौनि मी लाजे। वानणां इहीं।।१२।।

"हे शब्दब्रह्मातीत श्रीगुरो! वेगवेगळ्या विशेषणांनी अणि रूपकांनी जरी मी माझी वाचा तुझ्या गुणगायनी सेवेत लावली तरी तू ***निर्विशेष, निर्विकल्प, निरालंब, निरञ्जन असे आत्मतत्त्व*** असल्याने आणि दृश्यातीत असे तुझे अरूप असल्याने, तुझे हे असे शब्दांकित स्तोत्र रचण्यास मी पामर कसा बरे समर्थ होईन!"

परि मर्यादेचां सागरूं। हा तंवचि तेयां डगरूं।
जंव न देखें सुधाकरूं। उदयां आला।।१८-१३।।
सोमकांतु निज निर्झरीं। चन्द्रा अर्घ्यादिक न करीं।
तैं तोचि अवधारीं। करवीं कीं जी।।१४।।
नेणों कैसें वसंतसंगें। अवचितीं झाडांचीं आंगें।
फूटती तैं तेयांहीं जोगें। धरणें नोहे।।१५।।
पद्मिनी रविकिरण। लाहे मग लाजें कवण।
कां जळें सिवतलें लवण। आंग भुलें।।१६।।
तैसा तूंतैं मी जेथ स्मरे। तेथ मीपण विसरे।..।।१७।।

"पण तरीही ज्याप्रमाणे आपली मर्यादा न सोडणारा सागर सुधाकराच्या प्रकाशाने उचंबळतो; चंद्राचे दर्शन होताच सोमकांत रत्नाच्या स्वत:च आपोआप द्रवण्यामुळे त्याच्याकडून अनायासे चंद्रास जसे अर्घ्यप्रदान घडते; वसंतऋतु जसा आपल्या आगमनाने वृक्षवल्लींना बहर आणून खुलवतो; किंवा लाजाळू पद्मिनी आपले सर्व अवयव लपवून ठेवण्यात चतुर असूनही जशी रविकिरणांसमोर आपोआप प्रफुल्लीत होते; अथवा पाण्याचा अंगास स्पर्श होताच लवणास जसे स्वतंत्र अस्तित्व राहूच शकत नाही; त्याचप्रमाणे हे श्रीगुरो! मी जेव्हा तुला स्मरणरूप स्पर्श करतो, तेव्हा आपोआपच माझे मीपण नाहीसे होऊन ते तुझ्या ठायी विलीन होते!"

...। मग जाकलिलां ढेंकरें। तृप्तु जैसा।।१८-१७।।
मज तुवां जी केलें तैसें। माझें मीपण दवडूनि देशें।
स्तुतिमिषें पां पिसें। बांधलें वाचे।।१८।।

"तुझ्यामध्ये सामावून गेल्यामुळे मला जी आनंददशा प्राप्त होते; जे समाधान मिळते; त्याने माझ्या वाचेस वेड लागून ती तुझी स्तुतिस्तोत्रे बडबडत बसते!"

मौन हीच स्तुती

पुढे ज्ञानेश म्हणतात:

ना एऱ्हवीं तऱ्हीं आठवीं। राहूनी स्तुती जैं करावीं।
तैं गुणागुणियां धरावीं। सरोभरीं।।१८-१९।।
तऱ्हीं एकरसाचें जी तूं लिंग। केवीं करूं गुणागुणीं भाग।
मोती फोडूनि सांधितां चांग। कीं तैसेंचि भलें।।२०।।

"अन्यथा जागेपणी म्हणजे द्वैतावस्थेत राहून जर तुझी स्तुतिस्तोत्रे रचावी म्हणावे तर ते त्रिगुणमय विश्वाची गुणातीत परमतत्त्वाबरोबर तुलना केल्यासारखे निरर्थकच होते. म्हणून तुझ्याशी सामरस्य करून तुझे वर्णन करणे हेच शहाणपणाचे व सार्थ ठरते. एकरसात्मक अमृतलिंगाचे सेवन करतांना घोटागणिक त्याची वेगवेगळी चव व गुणधर्म असल्याचे कल्पिणे चूकच नाही का ठरणार! मोती एकसंध चांगला दिसतो. तो फोडून पुन: सांधण्यात कोणता शहाणपणा!"

जी जालेनि पाईकें आलें। तैं गोसांवीपण केवीं बोलें।
ऐसें उपाधि उसटिलें। काईं वानूं।।१८-२१।।
आणि बापु तूं माय। इहीं बोलीं ना स्तुति होयें।
डिंभोपाधिकु आहे। विटालु तेथ।।२२।।
तऱ्हीं आत्मा तूं येकसरा। हेंही म्हणो जातां दातारां।
आंतौनि बाहिरा। घापतासि ।।२३।।

"हे श्रीगुरुस्वरूपा! आत्मदेवा! तू आणि मी यातले ***मीपण आणि तूपणा*** ही दोन्ही जेव्हा नाहीशी होतात, त्यानंतर जे एकरसत्व उरते तेच चांगले! द्वैतावस्थेपेक्षा त्या एकसंधावस्थेत जे जे घडेल ते तेच चांगले! त्या सहजावस्थेत उगीचच ***"मी तुझा पाईक आहे व तू माझा स्वामी आहेस"*** किंवा ***"तू माझा माय-बाप आहेस अन मी तुझे लेकरु आहे"*** अशी भाषा कशी वापरावी! ***"अंतर्बाह्य भरलेला आत्मा तूच आहेस"*** असे म्हटले की तुज अंतरात्म्याला बाहेरच्या जगदाभासाची वाट दाखवली असेच नाही का होणार! या प्रकारांनी निरुपाधिक अशा श्रीगुरूंना उपाधि चिकटवणेच होईल!"

तरी पण गुरुदेवांनी आपला हा शब्दालाप साहून घ्यावा असे विनवितांना ज्ञानदेव म्हणतात की:

म्हणौनि सांच तुजलागीं। स्तुति न देखें जगीं।
मौनावांचूनी लेणें आंगीं। सूंसि ना मां।।१८-२४।।
स्तुति कांहीं न बोलणें। पूजा काहीं न करणें।
संनिधि कांहीं न होणें। तुजां ठायीं।।२५।।
तऱ्हीं जिंतलें जैसें भुलीं। पिसें आलापु घालीं।
तैसें वानूं तैं माउली। उपसाहे तूं।।२६।।

"म्हणून जगामध्ये ज्या प्रकारानी तुझी स्तुती करता येईल, असे काहीच दिसत नाही. तू तर केवळ मौनाशिवाय दुसरे आभूषण धारण करतच नाहीस! अशा हे परब्रह्मलिंगा! मौन हीच तुझी स्तुती होय! काहीही न करणे-***सहजावस्था***-हीच तुझी पूजा करणे होय! तुझ्या सान्निध्यात तुझ्याशिवाय न उरून रहाणे हेच तुझ्याठायी श्रद्धा असणे होय! याप्रमाणे जरी असले तरीही भ्रमाने भुललेला माणूस जसा वेड्यासारखी बडबड करतो, तसा तुझ्यासारख्या अतुल सामर्थ्यशाली भ्रामकाच्या चुंबकार्षणामुळे भ्रमलेला माझा हा लोहसदृश जीव तुज वाचातीताचे वर्णन करण्याचा मोह टाळू शकत नाही."

पसायदान::::

गीतार्थाची *मुदी*

आतां गीतार्थाची मुदी। लाविं माझियां वाग्ऋद्धी।
जियां माने सभासदीं। सज्जनांसीं।।१८-२७।।

"हे श्रीगुरू! निवृत्तिनाथा! प्रेमळ माउली ज्याप्रमाणे आपल्या चिमण्या बालकाच्या मुखी दहीभाताची मुदी लावते तशी तूही गीतार्थाची

मुदी माझ्या वाग्रूपी चिमण्या तोंडी लाव! म्हणजे गीतार्थ परिसण्यासाठी आलेल्या या संतसज्जनांना श्रीगीतारूपी वाग्‍ऋद्धी प्राप्त होऊन अतीव संतोष व आनंद मिळेल!"

तंव म्हणितलें श्रीनिवृत्ति। नको हें पुढुत पुढुतीं।
परिसिं लोहघृष्टी किती। वेळां कीजे गां।।१८-२८।।
तंव विनवी ज्ञानदेओ। म्हणे हो कां जी पसावो।
तऱ्हीं अवधान देतु देओ। ग्रंथां आतां।।२९।।

या ज्ञानदेवांच्या बोलांनी निवृत्तिनाथ संतोषले व म्हणाले की, "हे तू सारखे सारखे तेच ते मागणे काय मागत बसतोस! तुला तीच ती गोष्ट कितीवेळा पुनः पुनः द्यायची! परीसाला लोखंड सारखे सारखे किती वेळा घासत बसावे!"

श्रीगुरूंचे हे आश्वासनपर बोल ऐकताच ***अमृतखूण*** पावून धन्य झालेले श्रीज्ञानदेव म्हणतातः "हे माउली! म्हणजे माझ्या ***जीवरूपी लोह*** ाचे तुझ्या अंगभूत परीसस्पर्शाने ***शिवरूप सुवर्ण*** केव्हाचेच झाले तर! तुझ्या या ***अमृतमयी पसायदानाने*** धन्य होऊन मी आता पुढील ग्रंथनिरूपण सुरू करतो बरं!"

गुरुकृपेचे याप्रमाणे पुनश्च आश्वासन मिळून श्रीज्ञानेशांची वाग्वैजयंती श्रीगीतेच्या अठराव्या ***मोक्षसंन्यासयोग***पर कलशोऽध्यायाचे निरूपण करण्यास मुक्त होते. गुरुकृपांकित ज्ञानदेवांनी गुरूंच्या सामर्थ्याची अशी जोड मिळाल्याने हातीचे गीतार्थनिरूपणाचे महत्कार्य सिद्धीस नेले. ***कलशोऽध्याय*** हा तर गीतेचा मेरुमणीच! गीतेचे सारस्वरूप असा हा अठरावा अध्याय निरूपित केल्यावर त्या अध्यायाअंती त्याही अध्यायाच्या सारभूत असा सञ्जयाचा पूर्णोद्गारु येतोः

"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम।।१८-७८।।"

"जेथे योगेश्वर कृष्ण व जेथे धनुर्धर पार्थ ही दुयी आहे, तिकडे श्री, विजय, इ.असणारच" असे सञ्जय म्हणतो.

आपल्यालाही असेच म्हणावे लागते की ***जेथे श्रीनिवृत्तिनाथ व श्रीज्ञानदेव ही गुरुशिष्यांची जोडी आहे, तेथे सर्व विश्वातील अध्यात्मसंपदा असणारच!***

श्रीगीतानामें विख्यात। सर्व वाङ्मयाचे मथित।
आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय।।१८-१३२३।।

अशी श्रीगीतेची कीर्ती आहे. ती गीता जशी गोपालकृष्णांशी अन अर्जुनाशी आपले अतूट नाते सांगते, तशीच ती श्रीनिवृत्ति-ज्ञानदेव यांच्याशी असाच अद्वयभावबंध मराठमोळ्या भाषेतून सांगते, यात काय नवल!

अर्जुनाची ***चित्कलिका उजळून उखा*** करणाऱ्या श्रीगीतावल्लभ गोविंदाच्या ***श्रीमुखौंचि ब्रह्मसाम्राज्यदीपिकारूप*** अनुपम अद्वितीय अशा अक्षरांचे तेजोमय अमृतोपम निरूपण करत; ***कर्म तोच संन्यास*** व ***संन्यास तेच कर्म*** हा बोध जाणीवेच्या अंतरंगी पूर्णपणे उतरविणारे ज्ञानदेव, श्रीगीतेचा अर्थ जवळ जवळ नऊ सहस्त्र ओव्यांच्या रूपाने प्रतिमारेखित करून; तो ***"घोषांच्या कुंडीं। नादचित्रांची रूपडीं। प्रणवाचियां मोडीं। रेखिलीं ऐसीं।।६-२७६।।"*** इतक्या मूर्तिमंत स्वरूपात आविष्कृत करून; स्वतःच प्रत्यक्ष ***श्रीगीतेची वाङ्मयी मूर्ती*** होतात!!! श्रीगीतारूप गोविंदप्रभूबरोबरच या ज्ञानदेवरूपी गीतेच्या मराठमोळ्या वाङ्मयी मूर्तीला कृतानेक अनन्यशरणभावाने प्रणिपात करू या!!!

पसायदान::::

जगासाठीचे मागणे

श्रीज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या रूपाने ***साधकां तूं माउली*** अशा आपल्या सद्गुरू निवृत्तिराजांकडून आपणा सर्वांसाठी हे ज्ञानदेव स्वतःच आमची माउली होऊन जे पसायदान मागतात, ते त्या ग्रंथपूर्णत्वप्रसंगी अवलोकन करून धन्य होऊ या! ज्ञानदेवीच्या दुसऱ्याच ओवीत स्वतःला ***निवृत्तिदासु*** म्हणवून घेणारे ज्ञानेश शेवटच्या ओव्यात त्या ***विश्वेशराओ*** अशा सद्गुरूंना सांकडे घालत आहेत, ते अखिल विश्वाच्या मङ्गलासाठी! आदिपुरुषाशी अद्वैत सांगणारी ही गुरुशिष्याची जोडी ज्ञानदेवीतील **पसायदाना**च्या रूपाने चिरंतन झाली आहे. ज्ञानेश सद्गुरूंपुढे पदर पसरत आहेत.

पसायदान

ते म्हणतातः

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोषावें।
तोखौनि मज देयावें। पसायदान हें।।१८-१७९३।।

विश्वात्मा तोच सूत्रात्मा; तोच अंतरात्मा; तोच प्रकट विश्व; तोच प्रकृति; तोच शिव; शक्तीही तोच! सर्वत्र हेच ते ***एकमेवाद्वितीय - अमृत - अविनाशी - चिन्मय - आनन्दरसपरिपूर्ण - चिदैकघन - नवनवोन्मेषशाली - नित्य - निरञ्जन - साक्षिभूत - कूटस्थ - चिदात्मक - चिद्अव्यय - शांभवाद्वय - सूक्ष्मातिसूक्ष्म*** असे परमात्मतत्त्व परिपूर्ण भरलेले आहे. अशा त्या विश्वात्म्याकडून ज्ञानदेव हे पसायदान आपणा सर्वांसाठी मागत आहेत.

जैं खलांची व्यंकटी सांडो। तेयां सत्कर्मे रति वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचे।।१८-१७९४।।
दुरितांचे तिमिर जाओ। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जो जैं वांछिल तो तैं लाहो। प्राणिजात।।१७९५।।

श्रीज्ञानदेवांनी समस्त रसिकवर्य श्रोत्यांमोर श्रीनिवृत्तिनाथांसारख्या शिवस्वरूप अध्वर्यु गुरुदेवांच्या साक्षीने जो हा श्रीगीताख्यानरूपी वाग्यज्ञ संपन्न केला, त्यायोगे विश्वात्मक भगवंताने प्रसन्न व्हावे व श्रीनिवृत्तिरूपाने प्रकटलेल्या त्या ज्ञानसूर्याने दुष्कर्मांच्या संगतीत जगदाभास सत्य मानणाऱ्या अंधकारमय तमोबुद्धीचा भेद करावा आणि आपणच ***"अमृतस्य वै पुत्राः"*** आहोत हे जाणून घेण्याचे, स्वात्मानुभूती देणारे सत्कर्म त्यांच्याकडून संपन्न व्हावे अशी मङ्गलकामना श्रीज्ञानेश करत आहेत.

वर्षते सकलमंगलीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाली।
अनवरत भूमंडळीं। भेटोतु भूतां।।१७९६।।

"***प्रकृति व पुरुषाच्या सामरस्याचा - पदपिंडाच्या स्थिर गाठीचा अनुभव*** घेऊन भूतमात्रैक सर्वांनी ***"एकोऽहं"***ची अनुभूती घ्यावी. ही अनुभूति घेत असतांनाच संपूर्ण सृष्टीच्या कल्याणाचा महामंत्रघोष करत करत त्यांनी संतुष्ट व्हावे. अशा आत्मसंतुष्ट व आत्मतृप्त, चिद्विलासी, ईश्वरावर श्रद्धा असणाऱ्या, ***साङ्ख्य*** व ***कर्मयोग*** यांवर निष्ठा ठेवणाऱ्या श्रीगोपालप्रेमी भागवतोत्तमांची घनदाट तरुराजींनी भरलेल्या अरण्याप्रमाणे या अवनीतलावर सुशीतल छाया व्हावी; असे ज्ञानेशांचे मागणे आहे. नित्यतृप्त अशा त्या योगीराजांच्या रूपाने या भूमंडलाचे खरेखुरे ***आनन्दवनभुवन*** व्हावे!"

चलां कल्पतरूंचे आरव। चेतनाचिंतामणींचे गांव।
बोलतें जैं अर्णव। पियूषाचें।।१८-१७९७।।
चंद्रमें जैं अलांछन। मार्तंड जैं तापहीन।
तैं सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु।।१७९८।।
किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।१७९९।।

"त्या संतसज्जनरूपी कल्पवृक्षांच्या चालत्याबोलत्या वनराईनी ही अमला वसुंधरा विभूषित व्हावी! त्या संतचिंतामणींनी परिपूर्ण होऊन ही धरा सुशोभित, सुमङ्गला व्हावी! त्या भक्तवर्यरूपी पीयूषाच्या सागराच्या लाटांच्या कल्लोळात येथील जीवमात्र बुडून जावेत आणि सुखी व्हावेत! चंद्रम्याप्रमाणे ***सुधाकर*** पण तरीही अकलंकित मतीच्या अन मार्तंडरायाप्रमाणे तेजस्वी पण तरीही तापहीन असणाऱ्या त्या आप्तांमुळे सारे विश्वच आनंदाने भरून जावो आणि पूर्णत्वास पावो!" असे ज्ञानेश निवृत्तिनाथांकडे मागणे सांगत आहेत.

आणि ग्रंथोपजीवियें। विशेषें लोकीं इयें।
दृष्टदृष्ट विजयें। होआवें जी।।१८-१८००।।
एथ म्हणे विश्वेशराओ। हा होईल दानपसाओ।
एणें वरें ज्ञानदेओ। सुखियां जालां।।१८०१।।

या स्वसंवेद्य आत्मरूप अनुभूतिस्वरूप अशा श्रीगणेशाच्या चिदाकाशपट्टावर रुणझुणणाऱ्या क्षुद्र घंटिकांच्या कोमल मञ्जुळ नादांत साधकांना रममाण होण्याचा आशीर्वाद आपल्या विश्वरूपा श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंकडून देववित ज्ञानदेव पुढे स्वतःच आपली सद्भावना ज्ञानदेवी या ग्रंथरूपात प्रसारित करत म्हणतात कीः

पुढुति पुढुति पुढुति। इयें ग्रंथपुण्यसंपत्ति।
सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजे।।१८-१८०९।।

सर्व भूतमात्रांना असे पूर्णत्व प्राप्त करून देणारा असा हा आपला ग्रंथ ठरावा आणि पूर्णत्व प्राप्त झालेल्या त्या जीवांनी - त्या सर्व भूतमात्रांनी मग त्या आदिपुरुष श्रीनारायण भगवंताचे अखंड स्वरूपी भजन करावे!

हे जीवांचे शिवाशी ऐक्य करून देणारा; आत्मा-परमात्मा यांचे अद्वैत प्रस्थापित करणारा; आपला हा ग्रंथ ***चिद्विलासानुभव*** सिद्ध करून देण्यासाठी विशेषेकरून या भूतलावर सुप्रतिष्ठित व्हावा; असे ज्ञानेश इच्छितात.

आपल्या बोधात्मरूपी ***गीताभावार्थदीपिकेद्वारे*** समस्त विश्व उजळून जावे आणि हा ग्रंथ***"श्रीकृष्णाचि एथें। वाच्य आणि वाचकु।।"*** असे स्वरूप पावावा, अशी विश्वात्मरूपी गुरुचरणी श्रीज्ञानदेव प्रार्थना करत आहेत. त्यांच्या भूतमात्रांप्रती दिसणाऱ्या या कणवेमुळे त्यांचे श्रीगुरूही प्रसन्न होऊन आशीर्वाद देतात तो *"तथाऽस्तु"* असेच म्हणत!!

"चांगदेवा तुझेनि व्याजें"

सद्गुरुकृपेचा सोहोळा असा ज्ञानदेवी ग्रंथाद्वारे संपन्न होतो. गीतार्थ विशद करून सांगण्याचे काम गुरुकृपेने पार पडले. त्यासाठी अभिप्रेत असलेले आत्मविशदत्वही ज्ञानेशांना गुरूमुळे प्राप्त झाले. सर्व श्रोत्यांसाठी ***माउलियां श्रीनिवृत्तिराजे*** यांनी श्रीज्ञानदेवीरूप रसाळ खाजे ज्ञानदेवांच्या हाती दिले. हे असेच ***पूर्णान्न*** त्यांनी श्रीगुरूंकडून परमप्रिय चांगदेवांसाठीही मिळविले होते. चांगदेवपासष्टीच्या ओव्यांद्वारे स्वानुभवाचे रसाळ खाजे चांगदेवांच्या हाती देतांना म्हणूनच ज्ञानेश गुरूंना गौरवित म्हणतांना दिसतात कीः

चांगदेवा तुझेनि व्याजें। माउलियां श्रीनिवृत्तिराजे।
स्वानुभव रसाळ खाजें। दिधलें लोभें।।६१।।चां.पा।।

या स्वानुभवरूपी रसाळ खाऊमुळे मिळणारी स्वात्मानुभूती पसायदानाच्या कृतार्थतेसारखीच धन्यत्व देणारी आहे. ती कशी आहे ते प्रकट करणारे ज्ञानदेवांचे बोल पहाः

एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसें। दोहीं डोलस आरिसे।
परस्पर पाहातां कैसें। मुकलें भेदां।।६२।।
तियेंपरी जो इयां। दर्पण करील वोंवीयां।
तो आत्माएवढीया। मिलेल सुखां।।६३।।
नाहीं तैंचि नेणों असें। दिसें तैंचि कैसें नेणो दिसें।
असें तैंचि नेणों आपैसें।तैं कीं होईजे।।६४।।
निदेपरौतें निदेजणें। जागृति गिलौनि जागणें।
केलें तैसें गुंफणें। ज्ञानदेओ म्हणें।।६५।।चां.पा।।

"सणु भोगिजे सणें"

याप्रमाणे आत्मलाभसंतुष्टी प्राप्त होणे ही परमावधीची फलश्रुती श्रोत्यांस प्राप्त व्हावी; चिद्विलासाचा साक्षात अनुभव त्यांना मिळावा; तुर्यातीत अवस्थेत त्यांनी सञ्जीवन समाधी उपभोगावी हाच उद्देश श्रीज्ञानदेवी ग्रथित करतांना ज्ञानदेवांपुढे होता. चांगदेवांना हेच श्रेयस प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी त्यांच्यासाठी पासष्ट ओव्या रचल्या होत्या. किंबहुना हाच समउद्देश **श्रीअमृतानुभवा**च्या रचनेतूनही स्पष्ट होतो. त्यातही त्यांनी असे म्हटले आहे कीः

तैसें जैं या आखरां। भेटती गाभारां।
तैं वोघु जैसे सागरां। आंतु आलें।।१०-२८।।
जैशा अकारादि अक्षरां। भेंटती पन्नासही मात्रा।
तैसे इयां चराचरां। दुसरें नाहीं।।२९।।
तैसीं इयें ईश्वरीं। अंगुली नव्हेचि दुसरी।
किंबहुना सरोभरीं। शिवेंसीचि।।३०।।
म्हणौनि ज्ञानदेओ म्हणें। अनुभवामृतें येणें।
सणु भोगिजे सणें। विश्वाचेनि।।३१।।अ.।।

अभंग घ्या, ***ज्ञानेश्वरी*** घ्या, ***चांगदेवपासष्टी*** घ्या किंवा ***अमृतानुभव*** घ्या! ज्ञानदेवांचा एकमेव उद्देश सकळ जनांना अनुभवसंपन्न करून सोडणे हाच दिसतो! जीवमात्रांविषयी त्यांना जी ही कळकळ वाटते, ती त्या महान ज्ञानदेवांचे अंतरंग स्पष्ट करते. गुरूंजवळ सामान्य जीवांसाठी पसायदान मागून मिळालेल्या गुरूंच्या वरप्रसादाने जणू श्रीज्ञानदेवीरूपी विश्वात्माच संतुष्टी पावतो; तृप्त होतो.

माउलीची दिव्यामृतधारा::::
ज्ञानेश्वरमाउली

"म्हणौनि साधकां तूं माउली। पिकें सारस्वत तुझ्या पाऊलीं।" असे गुरूंना म्हणणारे ज्ञानदेवच स्वतः ***अंबे श्रीमंते, निजजनकल्पलते, शुद्धे, प्रसिद्धे, उदारे*** या भूमिकांशी तादात्म्य पावतांना दिसतात आणि अत्यानंदाचा अविरत वर्षाव करत ते म्हणतातः

पुढुति पुढुति पुढुति। इयें ग्रंथपुण्यसंपत्ति।
सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजो।।१८-१८०९।।

ही भक्तवत्सला ज्ञानेश्वररूपी माता अंतःकरणपूर्वक आशीर्वाद देते आहे की या ग्रंथांतरीच्या त्यांच्या वाङ्‌मयीन महान पुण्यसंपत्तीच्या अधारे सर्वांनी संपूर्ण सुखी व्हावे! ***ज्ञानदेवी*** म्हणजे या मातेचे पुण्यपायस स्तन्यच! ते सेवावे! त्यायोगे ती ***श्रीमंत अंबा*** आपल्या वत्सलांचे सर्व ***योगसुखाचे सोहोळे*** पूर्ण करील! ***आधारशक्तीच्या अंकी*** कौतुकाने वाढवीत ती माता ***हृदयाकाशपल्लकी निज*** येण्यासाठी ***परिये*** देईल! ***प्रत्यग्ज्योतीची ओंवाळणी, मनपवनाची खेळणी, आत्मसुखाची बाळलेणी*** आपणास लेवविणारी ती स्नेहल मातृदेवता ***सतरावियेचे स्तन्य देऊन, अनाहताचा हल्लरु गाऊन, समाधिबोधे बुझावून*** आपले ***सोऽहंसिद्धीचे लळे*** पुरवील!

आपल्या ***स्नेहपल्लवाखाली*** सदैव घेणाऱ्या अशा या साधकांच्या अनादिसिद्ध ***स्नेहला*** जगदंबेची कृपादृष्टीयुक्त साऊली सतत निरंतर त्या प्रेमळांना – त्या साधकांना – मिळून ते धन्य होतात!! श्रीज्ञानदेवीच्या माध्यमातून घडणाऱ्या श्रीगीतेच्या अंतरंगरहस्य दर्शनाने साधकांना ज्ञानेश्वरमाउली कृतार्थ करते!

योगाचा आविष्कार आणि तत्त्वदर्शनाची अनुभूती, तसेच आपल्या गूढ संवेदना ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून ज्ञानदेव आपणा साधकांना चाखवितात!

या ज्ञानदेवीगीतेची आपणास सार्थ उपलब्धी व्हावी ही इच्छा बाळगणाऱ्याने त्या एतद्गुणविशिष्ट सर्वगुणसंपन्न अशा श्रीज्ञानदेवांच्या रूपे साकारलेल्या पुरुषोत्तमाला त्यांच्याचसारख्या विनीत भावाने शरण जावे! अनन्यगतिक व्हावे! म्हणजे आपल्या तमोमय तिमिरदृष्टीपुढे चित्सूर्याचा उदय होऊन त्यांच्या या ग्रंथपुण्यसंपत्तीचा ओघ, श्रीधूर्जटीच्या मस्तकावरील जटाभूषण पायसलिला गङ्गौघाप्रमाणे मुक्त होऊन स्वच्छंदाने आपले पाप-ताप-दैन्य-दुःख हरण करत आपल्या अंतःकरणहृदयाकाशरूपी निर्मल भूमीला सुजलां सुफलां सश्यश्यामलाम् असे आनन्दवनभुवन करून टाकून, तेथे श्रीगोपालनन्दनाची वृन्दावनरूपी नित्यक्रिडामंदिरात प्राणप्रतिष्ठा करील!

चिदाकाशातल्या त्या मंदिरातील मोहन मुरलीवाल्याच्या दिव्य बांसुरीची मुग्ध मंद मधुर अशी स्वर्गाहूनही पर आह्लादिनी स्वरमञ्जुषा, कालौघाला विलीन करत, युगांचे - कल्पांचे मायाजाल नाहीसे करत, चेतनाधिगम अशा त्या शाश्वत पदापर्यंत नेऊन आपणास स्थित करील!

"आघवें सर्वस्व। आम्हांसि तूं।।"

तो ज्ञानदेवरूपी पुरुषोत्तम भगवंत आपणास काय उचित असेल ते देईल! त्यासाठी अर्जुनाचा जो भाव श्रीकृष्णाप्रति होता, तसाच आपला भाव त्या जगद्गुरू - बंधू - माता - पिता - सुहृद अशा ज्ञानदेव माउलीप्रति असायला हवा! त्यांच्याच शब्दात हा भाव आपण ग्रहण करू याः

आम्हां काय उचित। तैं पाहातां न दिसें एथ।
जैं मोहें येणें चित्त। व्याकुल माझें।।२-५५।।
तिमिराविरुद्ध जैसें। दृष्टिचें तेज भ्रंशे।
मग पासींचि असतां न दिसें। वस्तुजात।।५६।।
देवा मज तैसें जाहलें। जैं मन हें भ्रांति ग्रासिलें।
आतां काय हित आपुलें। तेंहीं नेणें।।५७।।
तऱ्हीं श्रीकृष्णा तुवां जाणावें। निकें तैं आम्हां सांगावें।
जैं सखासर्वस्व आघवे। आम्हांसि तूं।।५८।।

"जेव्हा मोहरूपी दोषाने स्वाभाविक सहजानंद अवस्था नष्ट झालेला पृथापुत्र अर्जुन कर्तव्याविषयी चित्त मोहल्यामुळे आत्यंतिक नैराश्य पावून विषादग्रस्त होतो, तेव्हा सहस्त्रों सूर्यांप्रमाणे तेज धारण करणाऱ्या दिव्य कांतिमान अशा साक्षात आनंदकंद असणाऱ्या श्रीगोपालकृष्णास शरण जातो. त्या धर्माधर्माचा निर्णय करण्यास पूर्णतया समर्थ असलेल्या एकमेवाद्वितीय पुरुषोत्तमाला गुरुपदी बसवून आपला सर्व प्रकारचा संशयच्छेद व्हावा म्हणून विनवितो कीः

कार्पण्यदोषोपहतस्वभावः
पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।

"शिष्यस्तेऽहं शाधिमां त्वां प्रपन्नम्।।" या अर्जुनाच्या उद्गारांनी प्रसन्न झालेला तो यदुनाथ श्रीगोपालु मग आपल्या कृपेच्या पुण्यपावन दृष्टीने अर्जुनाच्या समस्त संशयाचे जाळे क्षणार्धात छेदून टाकत त्याच्या चित्तवृत्तींना निरामय परमपदी विराजमान करतो. अर्जुनास उचित काय ते सांगतो. मोहाने व्याकुल झालेल्या त्याच्या चित्ताला शांती प्राप्त करून देतो.

अज्ञानतिमिरात चाचपडणाऱ्या व दृष्टीचे तेज हरवल्यासारख्या वागणाऱ्या अर्जुनाला स्वत:तील आत्मतत्त्व जवळ असूनही सापडत नव्हते. ती त्याची मूला वस्तू श्रीकृष्ण त्याला गवसवून देऊन निजात्मपदी बसवितात. त्याच्या मनाला ग्रासणारी भ्रांती तेव्हा निघून जाते. आपले हित तो जाणू लागतो.

तूं गुरु बंधु पिता। तूं आमुचि इष्ट देवता ।
तूंचि सदा रक्षितां। आपदीं आमुतें।।२-५९।।
जैसा शिष्यातें गुरु। सर्वथा नेणें अव्हेरु।
कीं सरितांतें सागरु। त्यजें केवीं।।६०।।
ना तऱ्हीं अपत्यातें मायें। सांडूनि जऱ्हीं जायें।
तऱ्हीं तैं कैसेनि जियें। सांगें कृष्णा।।६१।।
तैसा सर्वापरी आम्हांसि। देवा तूंचि एक आहासि।
आणि बोलिलें जऱ्हीं न मानिसि। मागील माझें।।६२।।
तऱ्हीं उचित काय आम्हां। जैं व्यभिचरेना धर्मा।
तैं झडकरीं पुरुषोत्तमा। सांघें आतां।।६३।।

त्याच्या सखा व सर्वस्व आणि गुरु -बंधू - पिता - इष्ट देवता असणाऱ्या श्रीहरीने त्याचे हिताहित पाहून योग्य काय ते अर्जुनास उपदेशिले. त्याचे सदैव रक्षण करणाऱ्या वासुदेवाने त्या आपद्प्रसंगी आत्मबोध करवून त्यास महामोहापासून वाचविले. सरितेस सागर कधीही त्यागत नाही. अपत्याला वाऱ्यावर सोडून आई कधी जात नाही! पार्थाचे सर्वस्वच असणाऱ्या त्या श्रीकृष्णाने आपल्या शिष्याचा अव्हेर केला नाही! अव्यभिचारी भक्तीचा धर्म शिष्योत्तम पृथापुत्रास त्या जगद्गुरू श्रीवल्लभाने उपदेशिला व त्याचे संसारासक्तीच्या महान आपदेपासून रक्षण केले.

आपल्या कृपापूर्ण करुणामय दृष्टिक्षेपाने अर्जुनाकडे पहात संतत कृपादृष्टीचा महापूर वर्षणारा तो श्रीगोपालरूपी महामेघ संपूर्ण गीतेतून घनगंभीर गर्जना करत अविरत वर्षतच रहातो!! आणि हा मेघवर्षाव - हा महापूर शांत्यातीत भावाने स्मरत स्मरत श्रीज्ञानदेवांची वाणी - ती अभिनव वाग्विलासिनी विश्वमोहिनी श्रीशारदा आपल्या कलाविद्कलारूप चातुर्याने सकल गीतार्थ सतत प्रकट करत नित्यनूतनरूपाने विश्वचेतोहरालाही मोहित करत जो महारसाविष्कार स्पंदित करते, तो आपण प्रारंभापासूनच मुदित चित्ताने ग्रहण करावा म्हणूनच!!

अशा या अनवरत वर्षणाऱ्या त्या श्रीगोपालुरूपी मेघाचा शांतरसाने परिपूर्ण असणारा सोहोळा भोगण्याचा अमृतानुभव आपणा सर्वांना चाखविणाऱ्या त्या तत्त्वज्ञ - संत - कविवर्य अशा श्रीज्ञानदेवमाउलीला शतशः हार्दिक प्रणाम!!!

"ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।" या ग्रंथारंभीच्या ओवीपासून उगम पावून श्रीज्ञानदेवांच्या अमोघ अमृतवाणीचा गङ्गौघ आपल्या तीरावरील साधकपादपांना नवजीवन प्रदान करत; सभोवतालच्या तपोभूमीत ***सुजलां सुफलां करत; सश्यश्यामलां*** असे नन्दनवन निर्मित; श्रोत्यांच्या तन-मन-चित्ताला मंत्रमुग्ध करत; श्रीगीतेच्या आमोदरसाचे आकंठ पान घडवीत वाहत जातो, तो त्यांच्या *अठराव्या* अध्यायातील ***पसायदानाच्या मंत्रपुष्पाञ्जलीस्वरूप*** संपूर्णाच्या महासागरास जाऊन मिळेतोवर!!!

ओवीरूप असा हा प्रशांत महासागर ज्ञानदेवीच्या संपूर्णाच्या प्रसंगी प्रकटत निनादतो:

उपनिषदांचे सार। सर्व शास्त्रांचे माहेर।
परमहंसीं सरोवर। सेविजे जैं।।१८-१८०७।।
तियें गीतेचां कलशु। संपूर्णु हा अष्टादशु।
म्हणे निवृत्तिदासु। ज्ञानदेओ।।१८०८।।
पुढुति पुढुति पुढुति। इयां ग्रंथपुण्यसंपत्ति ।
सर्वसुखीं सर्वांभूतीं। संपूर्ण होईजो।।१८०९।।

ज्ञानदेवीची दिव्यामृतधारा

ज्ञानदेवांनी जसे आपणास प्रथम अध्यायाच्या दुसऱ्या ओवीत ***निवृत्तिदासु*** असे म्हणवून घेतले आहे; तसेच ते शेवटच्या या अध्यायाच्या शेवटून दुसऱ्या ओवीतही आपणास ***निवृत्तिदासु*** म्हणवून घेतले आहे. ग्रंथारंभ ते ग्रंथसंपूर्णात अशी चातुर्यपूर्ण रचना ज्ञानदेवच करू जाणोत!! त्यांच्या वाणीतील या गङ्गौघाचे दोन थेंब आपल्याही मुखात पडून आपणास कृतार्थता प्राप्त होईल!! अविरत वर्षणाऱ्या त्या ज्ञानदेवीरूप मेघांतून दोन ज्ञानतुषार साधकचातकांच्या चोचीत पडले, तरी त्यांचा आत्मा तृप्त होईल!!

समारोप

कर्म - योग - ज्ञान व भक्ती यांचा अपूर्व सङ्गम करणाऱ्याअशा या पवित्र ग्रंथराजाचे स्वैर मुक्त पान करता यावे या अनिवार्य इच्छेने साधक आणि जिज्ञासू जनांनी गेली सात शतके या ज्ञानदेवीचा उदार आश्रय घेतला आहे. ***त्या देवदुर्लभ अशा या ग्रंथाकडे आपणही वळू या!!***

निवृत्तिनाथ आणि ज्ञानदेव या गुरुशिष्यांचा आशीर्वाद मागत आपणासही त्यांच्या या दिव्य ग्रंथाच्या अंतरीचे अमृत प्राप्त व्हावे असे त्यांना विनवत, त्याच्याच साहाय्याने आपण त्या सहजसमाधीच्या ठेव्याकडे जाऊ या!!!

त्यासाठी आपण आता वळणार आहोत या ग्रंथाच्या पुढील ***योगानन्दविलास*** या भागातील ***उन्मेष४- ब्रह्मविद्या व योगशास्त्र*** या प्रभागाकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष:४::
::ब्रह्मविद्या व योगशास्त्र::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५
गीता:
१:१

ज्ञानेश्वरी:
१:१-२०
६:१६-२५,१८६,१८७,४५२-४५९
१२:२०७-२२९
१८:४४-४९,१६८२, १६८५, १६९४,१६९५, १७०७-१७०९,१७२०-१७२२,१७२७,१७२८,१७३४-१७६५,१७७९,१७८०,१७८४,१७९१-१७९३,१७९९-१८०१,१८०७,१८०९

::उन्मेष:५::
::ज्ञानदेवांची भूमिका::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

योगदा श्रीज्ञानेश्वरी

::योगानन्दविलास::

::::उन्मेष४::::

ब्रह्मविद्या व योगशास्त्र

अध्यात्मविद्या -श्रीगीता ::::

प्रस्तावना

ज्ञानदेवीचा संपूर्ण रसस्वाद घ्यावयाचा तर आपणांस श्रीगीता-ज्ञानेश्वरीची योगशास्त्रविषयक भूमिका पाहणे अगत्याचे ठरते. संपूर्ण गीता-ज्ञानेश्वरीतून योगाव्यतिरिक्त काहीही सागितलेले नाही. मुळातच श्रीगीतेचा शास्त्रप्रवृत्तिनिर्देशच ***"श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे........योगो नाम.......अध्याय:"*** या प्रत्येक अध्यायाच्या उपसंहारार्थ लावलेल्या मुद्रेने होतो.

अध्यायमुद्राविचार

या मुद्रेचे निरनिराळे अर्थ करण्याकडे विचारवंतांची प्रवृत्ती आहे. या शास्त्रप्रवृत्तिनिर्देशाचा योग्य अभिप्राय मनात आणून जर श्रीगीता व ज्ञानेश्वरी अभ्यासली तरच योग्य तो बोध होऊ शकेल.

"श्रीकृष्णार्जुनसंवादे"

सर्वसाधारणपणे हे तर मान्यच आहे की श्रीव्यासविरचित महाभारतांतर्गत कौरवपाण्डवांच्या युद्धप्रसंगी जो श्रीकृष्णार्जुनसंवाद झाला, तोच ***श्रीमद्भगवद्गीता*** या नामाभिधानाने प्रसिद्ध आहे व सद्य:प्राप्त सर्वच प्रतीत या गीतेचे एकूण अठरा अध्याय असतात. तेव्हा ***"श्रीकृष्णार्जुनसंवादे.... .....अध्याय:"*** या पदाचा अर्थबोध त्वरित होतो.

आता अध्यायांना जी वेगवेगळी ***योग*** या शब्दाने शेवट होणारी नांवे दिली आहेत, त्याबद्दल विद्वानांत व गीतेच्या विविध प्रतीत जरी साम्य आढळत नसले, तरी ती नांवे सर्वसाधारणपणे त्या त्या अध्यायांतर्गत असणाऱ्या विषयाचे दिग्दर्शन जरूर करतात. यासाठी सर्वसामान्यतया प्रचलित *अध्यायनामे (मुद्रा)* पुढे संकलित केलेली आहेत.

प्रचलित अध्यायमुद्रा

अध्याय	*नाममुद्रा*
प्रथम	अर्जुनविषादयोग
द्वितीय	साङ्ख्ययोग; ज्ञानयोग
तृतीय	कर्मयोग; निष्कामकर्मयोग
चतुर्थ	कर्मब्रह्मार्पणयोग; ज्ञानकर्मसंन्यासयोग; ज्ञानसंन्यासयोग
पंचम	कर्मसंन्यासयोग; संन्यासयोग; योगगर्भयोग
षष्ठ	अभ्यासयोग; ध्यानयोग; आत्मसंयमयोग
सप्तम	ज्ञानविज्ञानयोग; विज्ञानयोग
अष्टम	अक्षरब्रह्मयोग; तारकब्रह्मयोग; ब्रह्माक्षरनिर्देशयोग; महापुरुषयोग
नवम	अनन्यभक्तियोग; राजविद्याराजगुह्ययोग
दशम	विभूतियोग
एकादश	विश्वरूपदर्शनयोग
द्वादश	सगुणभक्तियोग; भक्तियोग
त्रयोदश	क्षेत्रक्षेत्रज्ञयोग; क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग; प्रकृतिपुरुषविवेकयोग
चतुर्दश	गुणत्रयविभागयोग; गुणातीतयोग
पंचदश	पुरुषोत्तमयोग; पुराणपुरुषोत्तमयोग
षोडष	दैवासुरसंपद्विभागयोग; दैवासुरसंपत्तियोग
सप्तदश	श्रद्धात्रयविभागयोग; श्रद्धादिनिरूपणयोग
अष्टाऽदश	अर्जुनोत्थानयोग; मोक्षसंन्यासयोग; सर्वगीतार्थसंग्रहयोग

गीतेचे मान्यवर टीकाकार

त्याचप्रमाणे श्रीगीतेचे मान्यवर संस्कृत टीकाकार व त्यांच्या टीकांची नांवे, त्यांच्या त्यांच्या मतांचा निर्देशही जिज्ञासूंस त्वरित उपलब्ध व्हावा म्हणून येथे देत आहे:

अनु क्रमांक	*टीकाकार*	*मत*	*भाष्य / टीकाग्रंथनाम*
१	श्रीमच्छंकराचार्य	केवलाद्वैत	भाष्य
२	श्रीआनन्दगिरी	"	शाङ्करभाष्यव्याख्या
३	श्रीमद्रामानुजाचार्य	विशिष्टाद्वैत	भाष्य
४	वेदान्तदेशिकाचार्य	विशिष्टाद्वैत	तात्पर्यचन्द्रिका
५	श्रीवेंकटनाथ	"	राष्ट्रीयभाष्य

६	श्रीमद्‌आनन्दतीर्थ	द्वैत	माध्वभाष्य
७	जयतीर्थ	”	प्रमेयदीपिका
८	श्रीमद्‌हनुमान	केवलाद्वैत	पैशाचभाष्य
९	श्रीवेंकटनाथ	”	ब्रह्मानन्दगीर्याख्यान
१०	श्रीमद्वल्लभाचार्य	शुद्धाद्वैत	तत्त्वदीपिका
११	श्रीपुरुषोत्तमजी	”	अमृततरङ्गिणी
१२	श्रीनीलकण्ठ	अद्वैत	भारतभावदीप
१३	श्रीयामुनमुनि	विशिष्टाद्वैत	गीतार्थसंग्रह
१४	महादेशिकाचार्य वेंकटनाथ	”	गीतार्थसंग्रहरक्षा
१५	श्रीनिम्बार्काचार्य	द्वैताद्वैत	तत्त्वप्रकाशिका
१६	श्रीमधुसूदन	अद्वैत	भावप्रदीपिका
१७	श्रीशङ्करानन्द	”	तात्पर्यबोधिनी
१८	***श्रीधर***	***”***	***सुबोधिनी***
१९	सदानन्द	”	भावप्रकाश
२०	धनमतिसुरी	”	भाष्योत्कर्षदीपिका
२१	श्रीसूर्यदैवत	”	परमार्थप्रभा
२२	धुपकरशास्त्री	”	अविगीता
२३	राघवेन्द्र	द्वैत	गीतार्थसंग्रह

या टीकांपैकी श्रीधरांची **सुबोधिनी (अपभ्रंश - *संबोधिनी*)** ही टीका श्रीज्ञानराजांजवळ पैठण मुक्कामी सतत असे, असे म्हणतात. असो.

“उपनिषत्सु”

प्रत्येक अध्यायाच्या समाप्तीच्या मुद्रेत ***उपनिषद*** हा शब्द येतो. ***श्रीगीता*** हे उपनिषद म्हणून तेथे उल्लेखिलेले आहे. वास्तविक गीतेला शास्त्रकारात ***स्मृति*** म्हणून मान्यता आहे. असे असता ही अध्यायमुद्रा मात्र गीतेचा उपनिषद म्हणून उल्लेख करते, हे वैशिष्ट्य ध्यानी घेण्यासारखे आहे.

तसे पाहता सर्वसामान्य निकषाप्रमाणे *उपनिषद* हे महाबोध झालेल्या द्रष्ट्याने रचलेले असते. त्यातील सूत्रे व श्लोक तो ***महाबोध*** वेगवेगळ्या मिति-प्रमाणांनी दिग्दर्शित करतात. या सर्व कसोट्या तसे पाहिले तर गीता पार करते यात संशय नाही. म्हणूनच कदाचित श्रीगीता ही अपवाद अशी उपनिषद म्हणून मुद्रेमध्ये उल्लेखिली असावी. अर्थात या तात्त्विक चर्चेचा आपल्या अभ्यासास तसा काही उपयोग नाही. आपला खरा उद्देश गीता काय सांगते ते पहाणे हा आहे; तिची ग्रांथिक वर्गवारी करणे हा नाही. म्हणून गीतेस *उपनिषद* किंवा *स्मृति* काहीही समजल्याने आपल्या विचारात काही फरक पडत नाही!

तदुपरांत आपल्या श्रद्धेनुसार श्रीगीता म्हणजे ***श्रीनर व श्रीनारायण*** या ब्रह्मज्ञानी ऋषींचे अवतार जे ***अर्जुन व श्रीकृष्ण,*** त्यांचा महाबोधपर संवाद होय. सर्वसामान्य श्रद्धेनुसार श्रीकृष्ण हा परमात्म्याचा पूर्णांशाने झालेला दिव्यातिदिव्य अवतार!

त्यामुळे श्रीगीता हे उपनिषद असो वा नसो; परंतु उपनिषदांपलीकडील वाचातीत, दिव्यातिदिव्य अशी ही साक्षात प्रभूची सहधर्मचारिणी श्रीगीता आपल्या रूपाने प्रभूचे परम मङ्गलधाम, प्रभूचे दिव्यातिदिव्य गुह्यज्ञान, प्रभूचे स्वहृदयच असे सर्व काही जनहितार्थ प्रकटवते. म्हणूनच ज्ञानदेव म्हणतात की श्रीगीता ही श्रीहरीची साक्षात वाङ्‌मयी मूर्तीच होय.

“योगशास्त्रे”

योगशास्त्र* म्हणजे जीव व ब्रह्म यांचा संयोग घडवून आणणारे शास्त्र होय.** योगशास्त्र प्रायोगिक युक्त्या व योगलक्षणे सांगते. ते मानवी अनुभूतींच्या दालनातील एकमेव उच्चतम कोटीचे विज्ञान आहे. काही लोक ***योग या शब्दाचा अर्थ निव्वळ ***युक्ती*** असाच करत असतात व ***कर्मयोग म्हणजे कर्म करण्याची युक्ती*** एवढाच अर्थ काढतात.

परंतु श्रीगीतेच्या संदर्भात तरी ***योगशास्त्र*** या शब्दाचा अर्थ “आत्मा व परमात्मा, जीव व शिव, जीव व ब्रह्म, भक्त व भगवंत, ध्याता व ध्येय्य, स्वरूप आणि चिद्रूप, पिण्ड आणि ब्रह्माण्ड, पद व पिण्ड यांचे मिलन - सामरस्य - एकीभूतता - एकरूपता यासंबंधी युक्ती सांगणारे शास्त्र” असाच केला जातो. ***योगशास्त्र* म्हणजेच ब्रह्मस्वरूप होण्याची, आत्मबोधाची विद्या शिकवणारे शास्त्र.**

“ब्रह्मविद्यायां”

त्याचप्रमाणे ***ब्रह्मविद्या*** म्हणजे ज्यायोगे ब्रह्म जाणले जाऊ शकते, ते ज्ञान होय. विद्यार्जनाचा हेतू वस्तुतः तिचा यथायोग्य विनियोग करणे हाच असतो. ब्रह्मविद्येचा योग्य विनियोग म्हणजे ब्रह्मरूप अवस्था प्राप्त करून घेणे. म्हणजेच ***जीव व ब्रह्म*** यांचा संयोग घडवून आणणे. ब्रह्मविद्या म्हणजे आत्माविष्काराची विद्या - ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे ***“आत्मा अवतरविते। मंत्रें इयें।।”*** अशी विद्या!

या पार्श्वभूमीवर ***“ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे”*** या पदाचा अर्थ केला पाहिजे. काही लोक या पदाचा अर्थ ***ब्रह्मविद्या व योगशास्त्र यासंबंधी*** असा करतात; तर इतरेजन ***ब्रह्मविद्येच्या अंतर्गत योगशास्त्रातील*** असा करतात. काहींनी या पदाचा अर्थ ***ब्रह्मविद्येने निश्चित केलेल्या योगशास्त्रविषयक*** असाही केला आहे. ***ब्रह्मज्ञान व योगविज्ञान*** यांच्या संगमातून जीवास परमात्मपद प्राप्त होत असते. तेव्हा ***योगशास्त्र व ब्रह्मविद्येविषयी*** हा ठळक मुद्दा लक्षात घेऊनच पुढील परीक्षण सावधानतेने करावयास हवे.

अनन्तोक्ती

ब्रह्मविद्या* व *योगशास्त्र यांच्या अर्थाकडे, श्रीगीता जी त्रिपुटीविरहित अवस्था प्राप्त करून देते, त्या दृष्टीने पाहिले तर असे दिसते की:

“श्रीमद्भगवद्गीता - उपनिषद - ब्रह्मविद्या - योगशास्त्र - श्रीकृष्णार्जुनसंवाद .... ज्ञानयोग ... भक्तियोग ... कर्मयोग ... मोक्षसंन्यासयोग ... पुरुषोत्तमयोग .. राजविद्याराजगुह्ययोग .. ... विश्वरूपदर्शनयोग ... विभूतियोग ... अभ्यासयोग ..... ज्ञानविज्ञानयोग ... ज्ञानकर्मसंन्यासयोग .. दैवासुरसंद्विभागयोग ...गुणत्रयविभागयोग ... श्रद्धात्रयविभागयोग.....” इ.सर्व नामाभिधाने एकमात्र त्या नामरूपातीत परब्रह्माचीच आहेत. येथे एकोक्ती, द्विरुक्ती, अनेकोक्ती इत्यादीच केवळ नसून *अनन्तोक्ती* आहे!

मार्गामार्ग, श्रेयाश्रेय, लाभालाभ, मी-तू, ज्येष्ठ-कनिष्ठ, इ.सर्वांचा मनातून त्याग करून ही जी दुर्लभ नरतनु मिळाली आहे, तिचा परमात्मप्राप्तीसाठी कसा उपयोग होईल याचाच फक्त विचार करावा म्हणून गीतारूपी भगवंत प्रत्येक अध्यायाच्या समाप्तीस आपल्याला *"ॐ इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे .... अर्जुनविषाद .....ज्ञान ...कर्म ....ज्ञानकर्म .. .. ज्ञानकर्मसंन्यास ... अभ्यास ... ज्ञानविज्ञान . .. अक्षरब्रह्म ... राजविद्याराजगुह्य .... विभूति ... विश्वरूपदर्शन ... भक्ति ... क्षेत्रक्षेत्रज्ञ .... गुणत्रय ... पुरुषोत्तम ... दैवासुरसंपद्विभाग ... श्रद्धात्रयविभाग ... मोक्षसंन्यास ....योगो नाम ...प्रथम ..द्वितीय ... तृतीय ... अष्टाऽदशोध्याय:"* अशी परवलीचे अनेक शब्द असलेली अनन्तोक्ती स्पष्ट स्वरात उद्घोषितो. त्याचा उद्देश ***"उत्तिष्ठत्। जाग्रत्। प्राप्यवरान्निबोधत्।"*** असा आहे. ***"उठा! जागे व्हा! श्रेयस परमप्राप्ती करून घ्या!"*** असे या अध्यायसमाप्तिमुद्रांद्वारे श्रीगीता आपणास सांगते.

कृपा व अनन्यशरणत्व

आणि हे प्राप्त करण्याचे राजमान्य राजमार्ग श्रीगीता आपल्या वारंवार निदर्शनास आणून देते, ते म्हणजे श्रीहरी आत्मराजाची कृपा -श्रीसद्गुरूंची कृपा - करुणामय दृष्टी - श्रीगोपालरुपी मेघाचे अनवरत वर्षणे .... कृपासिंधु करुणाकरु बापरखुमादेवीवरु अशा त्या जगन्नियंत्याला स्वाभाविक अनन्यशरण होणे!! हाच आपला ***राजविद्याराजगुह्ययोग;*** हाच आपला ***कर्मयोग;*** हाच आपला ***भक्तियोग;*** हाच आपला ***पुरुषोत्तमयोग;*** किंबहुना हाच आपला ***मोक्षसंन्यासयोग;*** अथवा हेच आपले श्रीगीतेचे तत्त्वज्ञान जे श्रीज्ञानदेवांसारख्या अवतारी महात्म्याने श्रीज्ञानेश्वरीरूपाने अखिल भूतमात्रांस वारंवार आवर्जून सांगितले आहे.

संतांचे व गुरुंचे कर्तव्य::::

संतांचे तत्त्वज्ञान

साक्षात्कारी संतांचे तत्त्वज्ञान सामग्र्याने पाहिले म्हणजे वरकरणी न समजणारे अवघड विषय सहज समजू शकतात.***श्रीज्ञानदेवी, श्रीअमृतानुभव, श्रीचांगदेवपासष्टी व श्रीज्ञानेश्वरांचे अभंग*** या रचनांद्वारे असे विषय समजून घेण्यास परस्पर साहाय्य होते. त्या उपरांत श्रीगोपालकृष्णमय श्रीमाउलीची कृपा मिळाली तर ***"यं लब्ध्वा चापरं लाभं"!!***

गीता-ज्ञानेश्वरीतून श्रीगोपालकृष्ण व ज्ञानेश्वर यांनी कोठे काय सांगितले आहे याबद्दलसुद्धा विचारवंत बऱ्याचदा चर्चा करतात. विवादाचे मूलभूत मुद्दे असे की , *"माउलीने श्रीज्ञानेश्वरीत मुख्यत्वेकरून सहाव्या अध्यायात पातञ्जलयोग - अष्टांगयोग - षडङ्गयोग वा इतर कोणते योगप्रकार सांगितले आहेत"; "भगवंतांनी गीतेत जे काही सांगितले आहे, तेच ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरीत सांगतात का वेगळेच इतर काही सांगतात"; "योग श्रेष्ठ का ज्ञान श्रेष्ठ; का भक्ती श्रेष्ठ; का कर्मच श्रेष्ठ";* इत्यादी एक ना अनेक विषयांची प्रसंगोपात्त बरीच चर्चा होत असते.

या व तत्सम इतर अनेकानेक प्रश्नांचे केवळ एकांगी विश्लेषण करण्याऐवजी व त्याबाबत माउलीने किंवा श्रीगोपालकृष्णांनी कोठे काय सांगितले आहे, याचा केवळ संख्यात्मक व एककल्ली अभ्यास करण्यापेक्षा, त्यांनी संपूर्ण गीता-ज्ञानेश्वरीचे विवेचन कोणत्या दृष्टीने केले आहे, हे जर मन:पूर्वक अभ्यासले, तर हे विवाद अनावश्यक आहेत असे जरूर वाटेल!

श्रीकृष्णांचे गुरुकर्तव्य

मूळ म्हणजे जेव्हा अर्जुनाने श्रीकृष्णापुढे ***"शिष्यतेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्"*** या भावाने शरणागती पत्करली तेव्हा गुरू म्हणून श्रीकृष्णपरमात्म्यांचे शिष्याप्रति जे कर्तव्य होते, तेच त्याने श्रीगीतानिरूपणाद्वारे पूर्ण केले. त्याचप्रमाणे परमात्मा म्हणून सर्व जगताचा वंद्य सद्गुरू असल्याने यच्चयावत जीवमात्रांसही ज्यापासून शाश्वत बोध होईल, असे वचनामृत त्याने गीतेद्वारे प्रदान केले आहे.

आपल्यावर नितांत श्रद्धा ठेवणाऱ्या, अनन्यशरण, अनन्यगतिक अशा शिष्याला पटेल अशा सर्व मार्गांनी उपदेश करून, जरूर तर वेगवेगळे मार्ग चोखाळून, संसारदु:खापासून मुक्त करण्याचे परमकर्तव्य सद्गुरू श्रीकृष्णांनी श्रीगीताख्यानरूपाने केले आहे. जेव्हा त्यांची कृपा अर्जुनाला प्राप्त झाली, तेव्हा हे घडले आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊनच गीतांतर्गत वर्णन केलेल्या योगविशेषांचा जिज्ञासूंनी तारतम्य राखूनच विचार करणे योग्य!

गीतेतील मुख्य विषय

श्रीगीतेतील सर्व योग जरी नामाभिधानांनी भिन्न दिसले तरी त्यांच्या मुळाशी आवश्यक असे एकमात्र योगतत्त्व आहे. ते म्हणजे ***श्रीहरीकृपा!*** श्रीहरीकृपा ही गुरुकृपेशी सर्वार्थाने अभिन्न आहे. म्हणून ज्ञानदेव जेव्हा श्रीगुरुमहिमान ज्ञानेश्वरीत ठायीठायी वर्णितात, तेव्हा ते श्रीहरीचेच तर गुणगान करत नाहीत ना असेच वाटते!

म्हणून ***"इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ..... श्रीकृष्णार्जुनसंवादे .... योगोनाम .... ऽध्याय:"*** असे म्हणतांना ***श्रीकृष्णार्जुनसंवादे*** हे पदच मुख्य ***उपनिषदसूत्र वा ब्रह्मविद्यामंत्र किंवा योगशास्त्रयुक्ती*** होय! *गीतेभर* ***श्रीकृष्णपरमात्माकृपांकित योगशास्त्र - ब्रह्मविद्याच सर्वत्र आहे.*** त्याव्यतिरिक्त अन्य गोष्टींना वा विवादांना तेथे स्थान नाही.

<u>ब्रह्मविद्या व योगशास्त्र हेच श्रीगीतेचे खरे प्रतिपाद्य विषय आहेत व म्हणूनच भगवंत त्यांना गुह्यातिगुह्य ज्ञानविषय असे म्हणतात.</u>

गीतेचा मुख्य विषय ***ब्रह्मविद्या व योगशास्त्र*** आहे, हे आपण जाणून घेतले आहे. अशा या श्रीगीतेवर आपली ज्ञानेश्वरी ही टीका रचणाऱ्या ***श्रीज्ञानदेवांच्या तद्विषयक भूमिकेचा*** आपणास परिचय करून घ्यावासा वाटणे साहाजिकच आहे. तर पाहू या आपणास त्याबाबत काय उमगते ते! त्यासाठी प्रयोजन आहे ***उन्मेष ५ - ज्ञानदेवांची भूमिका*** याचे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::::उन्मेष ५::::
ज्ञानदेवांची भूमिका

ज्ञानेश्वरांची श्रद्धास्थाने::::

ज्ञानेश्वरांची आराध्यदैवते

श्रीज्ञानेश्वरीतील योगविषयक भूमिका समजावी म्हणून आणखी एका विषयाचा विचार करू या. तो म्हणजे श्रीज्ञानेश्वरांची लौकिकातील अराध्यदैवते! नाथसांप्रदायिक श्रद्धेनुसार त्यांना प्राप्त झालेली ***श्रीगुरुदत्तात्रेय-आदिनाथ*** यांपासून आलेली गुरुपरंपरा व त्या परंपरेतील ***शिवशक्त्यैद्वैताधिष्ठित तत्त्वप्रणाली*** ही त्यांची मूळ स्फूर्तिस्थानेच होत.

तसेच वैष्णवांची ***श्रीकृष्णभक्ती*** ही त्यांना गुरुपरंपरेने लाभली होती. म्हणूनच श्रीकृष्णपरमात्म्यावर व पर्यायाने महाराष्ट्राच्या अधिदैवताच्या म्हणजे **गोपालकृष्ण-बालकृष्णरूप श्रीविठ्ठला**च्या चरणी अनन्यश्रद्धा ठेवून श्रीगीता-ज्ञानेश्वरीचे परिशीलन करणाऱ्या जिज्ञासूंना श्रीगीतार्थातील गुह्यातिगुह्य अभिप्राय सुलभरीत्या आकलन होऊ शकतो.

श्रीविठ्ठल

श्रीविठ्ठलाचा या ठिकाणी उल्लेख केला. जरी ज्ञानेश्वरीत कोठेही पांडुरंग-विठ्ठलाचा प्रत्यक्ष उल्लेख नसला, तरीही श्रीज्ञानेश्वरांनी आपल्या अभंगांवर जी ***"बापरखुमादेवीवरु श्रीविठ्ठलाची"*** नाममुद्रा उमटवली आहे, तिकडे आपले लक्ष जाणे साहजिकच आहे. या गोष्टीमुळे तर काही अभ्यासकांना ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव या वेगवेगळ्या व्यक्ती असाव्यात असे वाटते. या विषयाचा नीट उलगडा करण्यासाठी श्रीज्ञानेश्वरीतील काही स्फुट उल्लेख ***दोन ज्ञानेश्वर***वादासंबंधी लक्षात घेण्यासारखे आहेत.

उदा. भक्तवर्याचे पुढील वर्णन पहा. हे श्रीशंभूशी संबंधित आहे. ***"विठोने वाहिला शिरीं देवराणा"*** हे पांडुरंगमूर्तीचे लक्षण ***"तेयातें मी माथां। मुगुट करीं"*** या ओव्यातून प्रतिभासित होते. विठ्ठलाच्या मस्तकी ***शिवलिंग*** आहे, असे मान्यवरांचे मत आहे. हीच समजूत पंढरपूरच्या सर्व भक्तात रूढ आहे. त्याचप्रमाणे श्रीविठ्ठलमूर्तीच्या उरी ***भृगुपदचिह्न*** आहे हे सर्वविख्यातच आहे. पंढरपूरचा बाळकृष्णरूप विठोबाच आपणास ज्ञानेश्वरांच्या पुढील ओव्यातून दिसल्यास नवल नाही, इतके हे वर्णन चपखल आहे.

विठ्ठल व त्याचे भक्तवर्य

जो निंदेतें ने घे । स्तुति न श्लाघे।
आकाशा न लगे। लेपु जैसा।।१२-२०७।।
तैसा निंदे आणि स्तुती। मानु करूनि एकें पांती।
विचरे प्राणवृत्ती। जनीं वनीं।।२०८।।
साच लटिकें दोन्हीं। बोलौनि न बोले जाहला मौनी।
जैं भोगितां उन्मनी। आरायेना।।२०९।।
जो यथालाभें न तोखें। अलाभा न पारुखे।
पाऊसेंवीण न सुके। समुद्रु जैसा।।२१०।।
आणि वायूसि एकें ठायीं। बिढार जैसें नाहीं।
तैसा न धरीचि केंहीं। आश्रयो जो।।२११।।
आघवाचि आकाशस्थिती। जेवीं वायूसि नित्य वसति।
तेवीं जगचि विश्रांति-। स्थान जेयां।।२१२।।
हे विश्वचि माझे घर। ऐसीं जेयांची मति स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहला।।२१३।।
मग ययाहीवरी पार्था। माझियां भजनीं आस्था।
तऱ्हीं तेयातें मी माथां। मुगुट करीं।।२१४।।

"अर्जुना! जो निंदेने खिन्न होत नाही आणि स्तुतीने फुशारत नाही; आकाशाला जसा कसलाही लेप चिकटत नाही, तद्वत ज्याच्यावर स्तुती आणि निंदा यांचा काहीही परिणाम होत नाही; त्या दोन्ही ज्याच्याठायी सारख्याच असतात; जो प्राणांसमान उदास वृत्तीने सर्व लोकांतरी, जनीवनी विचरतो; जो खरेखोटे काहीच न बोलता मौनी वृत्तीने राहतो; ज्याला अखंड उन्मनी अवस्था हवीहवीशी वाटते; जो हवे ते मिळाले की तृप्तताभाव मनी धरत नाही; अथवा अनिष्ट प्राप्तीने ज्यास वैषम्य वाटत नाही; पावसावाचून समुद्र जसा कोरडा पडत नाही, तसा जो काहीही न मिळाले तरी अप्रसन्न होत नाही; वायूस जसे कोणतेही वसतिस्थान नसते, त्याप्रमाणे जो कोठेही आश्रय घेत नाही; ज्याप्रमाणे गगनासच वायू आपले वसतिस्थान मानून राहतो, त्याप्रमाणे जो या सगळ्या जगासच विश्रांतिस्थान मानतो; जो विश्वासच आपले घर मानून राहतो; जो अशा प्रकारच्या मनोधारणेत स्थिरावला आहे; किंबहुना जो हे चराचर आपण स्वतःच होऊन गेला आहे; याप्रमाणे असूनही ज्याला माझ्या भक्तीची अत्यंत आवड आहे; ***त्याला मी माझ्या मस्तकीं मुकुटाप्रमाणे धारण करतो."***

भक्तोत्तमाचे भाग्य

उत्तमासीं मस्तक। खालविजे हे काय कवतुक।
परि मानु करिती तिन्हीं लोक। पायवणियां।।१२-२१५।।
तऱ्हीं श्रद्धावस्तूसि आदरु। करितां जाणें प्रकारु।
जऱ्हीं होय श्रीगुरु। सदाशिव।।२१६।।
परि हे असो आतां। महेशांतैं वानितां।
आत्मस्तुति होतां। संचारु असे।।२१६।।

येयालागीं हे नोहे। म्हणितलें रमानाहें।
अर्जुना मी वाहें। शिरीं तेयांतें।।२१८।।

"हे पार्था! श्रेष्ठापुढे मस्तक लववले जाते, त्यात आश्चर्य ते कसले! लोक तर माझ्या चरणोदकासही मान देतात, इतके गंगेचे भाग्य थोर आहे. परंतु श्रद्धेय वस्तूचा कसा आदर करावा हे ज्याला सदाशिवच गुरू म्हणून लाभेल, त्यालाच नीट कळेल! त्या शंभूने तर माझे चरणोदक आपल्या मस्तकीच धारण केले आहे! पण हे असो! महेशाचे असे वर्णन करणे म्हणजे आत्मस्तुतीच होईल. कारण तो आणि मी काही दोन नाहीत. म्हणून महेशाची वाखाणणी आता अधिक करत नाही. पण त्याच्या भक्तीने प्रसन्न होऊन मी त्याला माझ्या शिरी धारण केले आहे, हे काय वेगळे बोलायला हवे का!"

जैं पुरुषार्थसिद्धी चौथी। घेऊनि आपुलां हातीं।
रिगालां भक्तिपंथीं। जगां देत।।१२-२१९।।
कैवल्याचां अधिकारी। मोक्षाची सोडीबांधी करी।
कीं जलाचियें परी। तलवटु घे।।२२०।।
म्हणौनि गां नमस्कारूं। तेयांतैं आम्हीं माथां मुगुट करूं।
तेयांचि टांच धरूं। हृदयीं आम्हीं।।२२१।।

"असा तो शिवशंभू मोक्षसिद्धी आपल्या हाती घेऊन जगाला भक्तिमार्गाने घेऊन जात आहे; सर्व जगाचा तो उद्धारकर्ता झाला आहे, हे तुला माहीत असेलच! माझे भक्त मोक्षाचे अधिकारी आहेत; ते कोणालाही मोक्ष देऊ शकतात, असा त्यांचा अधिकार आहे. पण असे असूनही ते जलाप्रमाणे नम्र असतात; ताठरपणा त्यांच्या अंगीं कसा तो नसतोच! अशा भक्तांना मी नमस्कारितो. ***त्यांनी मारलेली लाथही भूषण म्हणून वक्षस्थली भृगुपादचिह्नरूपाने मिरवितो!"***

तेयांच्याही गुणांची लेणीं। लेववूं आपुलियें वाणीं।
तेयांचीं कीर्त्ती श्रवणीं। आम्हीं लेऊं।।१२-२२२।।
तो पाहावा हे डोहालें। म्हणूनि अचक्षूसि मज डोलें।
हातींचेनि लीलाकमलें। पुजूं तेयांतें।।२२३।।
दोंवरी दोनीं। भुजा आलो घेऊनि।
आलिंगावयालागौनि। तेयांचें आंग।।२२४।।
तेयां संगाचेनि सुरवाडें। मज विदेहा देह धरणें घडे।
किंबहुना आवडे। निरुपम।।२२५।।

"त्या भक्तोत्तमांच्या गुणांचे अलंकार माझ्या वाणीस भूषवितात; त्यांच्या कीर्तीचे अलंकार माझ्या कानात शोभतात;त्या भक्तास पहावे या उत्कट इच्छेने मज अचक्षूस डोळे उत्पन्न होतात; हातातील लीलाकमलाने मी त्यास पूजितो! त्यास सर्वांगालिंगन देतां यावे म्हणून मी दोन हातांवर आणखी दोन हात घेऊन अवतार घेतो. त्याच्या संगतीचे सुख भोगण्यासाठी मज विदेहास देह धारण करणे भाग पडते. फार काय सांगू! तो मला इतका आवडतो की त्यास काही उपमा देता येत नाही."

तेणेंसि आम्हां मैत्र। एथ कायसें विचित्र।
परि तेयांचे चरित्र। आइकिती जैं।।१२-२२६।।
तेंहीं प्रणापरौतें। आवडती हे निरुतें।
जैं भक्तचरित्रांतैं। प्रशंसिती।।२२७।।
जैं हे अर्जुना साद्यंत। सांधितलें प्रस्तुत।
भक्तियोगु समस्त। योगरूप।।२२८।।
जैं मी प्रीती करीं। कां मनीं शिरसां धरीं।
एवढियें थोरी। जेयां स्थितीयें।।२२९।।

"त्याच्याशी माझी मैत्री असते. आमच्यात सख्यत्व असते, यात कसले आश्चर्य! हे असो! अशा भक्ताचे चरित्र जे ऐकतात, तेही मला प्राणाहून अधिक प्रिय असतात. भक्तचरित्राची प्रशंसा करणारे ते सर्व माझे भक्तच असतात, हे काय सांगायला हवे! अर्जुना! असा हा माझा ***भक्तियोग*** आहे. त्याचे साद्यंत वर्णन मी तुला सागितले आहे. ***हा भक्तियोग योगपर आहे.*** यामुळे प्राप्त होणारी योगस्थिती इतकी श्रेष्ठ असते की अशा योग्यांवर मी प्रेम करतो; त्यांना मस्तकी धारण करतो; किंबहुना मीच त्यांचे ध्यानही करतो!"

"हे विश्वचि माझें घर। ऐसीं जेयांचि मति स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।।" असे भक्तवर्य या ओव्यातून जसे दिसून येतात, तसेच त्यांच्यावर स्वतःहूनही अधिक प्रेम करणारा, त्यांच्याशी एकात्मभावाने वागणारा, त्यांच्या आपदा स्वतः झेलणारा, त्यांचा ऋणी झालेला श्रीहरीही त्यातून दिसून येतो! हा श्रीहरी म्हणजे पांडुरंगच, असेही का म्हणू नये! कारण त्यांच्यातून केलेले हे श्रीहरीचे वर्णन तंतोतंत भक्तजनप्रियवल्लभ अशा विठ्ठलाचेच आहे! पूर्वीच्या काळी श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतांना त्याला आलिंगत असत; उराउरी कवटाळत असत. याचे प्रमाण ***"दोवरीं दोन्हीं। भुजा आलो घेऊनि। आलिंगावयालागौनि। तेयांचे आंग।।"*** या ओवीत निखालस मिळते.

महायोग व ज्ञानेश्वरी

पंढरपूर क्षेत्र हे श्रीविठ्ठलाचे ***महायोगपीठ*** म्हणून सुप्रसिद्ध आहे. श्रीशंकराचार्यविरचित ***पाडुरंगाष्टकम्*** या स्तोत्रात श्रीविठ्ठलाचे वर्णन ***"महायोगपीठे तटे भिमरथ्यां"*** असे केले आहे. हा ***महायोग*** म्हणजे सर्व योगांचा समन्वय करणारा, सर्व योगांचा आधारभूत, सर्व योगांची सिद्धी प्राप्त करून देणारा असा श्रीहरीकृपायोगच होय. ***हरीकृपा म्हणजे गुरुकृपाच!*** हे आपण प्रथम उन्मेषांत पाहिलेच आहे. आणि तृतीय उन्मेषात सूतोवाच केल्याप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या अंतरंगाकडे - सहजसमाधीच्या ठेव्याकडे - आपण वळतो आहोत. हा महायोगच ज्ञानेश्वरीचा मूळ गाभा आहे. त्याबाबत अधिक विवेचन यापुढील भागात आपण करणार आहोत. तूर्त आपण दोन ज्ञानेश्वरवाद पहात आहोत.

गीतेचा महायोग

श्रीहरीकृपायोगाचे मुख्य साध्य म्हणजे वाटेल त्या मिषाने निःश्रेयस प्राप्त करून देणे. म्हणूनच पुराणांतरीच्या अजामिळ, गणिका, इ.च्या

कथा सुप्रसिद्ध झाल्या. गीतेचेही असेच असल्याचे ज्ञानदेव म्हणतात. गीतामंदिरात जाणाऱ्या उपासकांच्या विविध परी आहेत. पण कोणत्याही मार्गाने का असेना, गीतामंदिरी रिघणाऱ्यांसाठी मोक्ष हा ठेवलेलाच आहे.

ज्ञानेश म्हणतातः

ऐसा व्यासें विंदाणियें। गीताप्रासादु सोडवणीये।
आणूनि रक्षिलें प्राणियें। नाना परीं।।१८-४४।।
एक प्रदक्षिणा जपाचियां। बाहेरौनि करती येयां।
एक श्रवणमिसें छाया। सेविती येयांची।।४५।।
एक अवधानाचा पुरा। विडा पाऊडा भितरां।
देऊनि रिघती गाभारां। अर्थज्ञानाचां।।४६।।

महायोगप्राप्ती देणारे ***गीतावैष्णवप्रासादरूपी*** हे मंदिर म्हणजे श्रीहरिपांडुरंगाचेच होय! त्याला प्रदक्षिणा घाला; त्याच्या सावलीत उभे राहून भजनकीर्तनाचे श्रवण करा; अवधानरूपी विडापैसा समोर ठेवून गाभाऱ्यात जा आणि दर्शन घ्या! कोणत्याही का मार्गाने होईना - या श्रीहरीआत्मराजाची - पांडुरंगाची - त्या श्रीविठ्ठलाची सेवा, अर्चना वा भक्ती करा; तो सर्वांना मोक्षप्रदच होतो!

तैं निजबोधें उराउरीं । भेटतीं आत्मेयां श्रीहरी।
परि मोक्षप्रासादीं सरी। सर्वांही आथी।।१८-४७।।
समर्थाचेनि पंक्तिभोजनें। तलिलां वरिलां एकचि पक्वान्नें।
तेवीं श्रवणें अर्थें पठणें। मोक्षुचि लाभे।।४८।।
ऐसा गीतावैष्णवप्रासादु। अठरावा कलसु विशदु।
मियां म्हणितला हा भेदु। जाणौनियां।।४९।।

पांडुरंगाच्या - त्या श्रीहरीच्या या गीतामंदिरातील श्रीमूर्तीस - त्या आत्मराजास भक्त उराउरी भेटू शकतात! ही भेट घडते ती त्या मंदिरावरील कलशाला - *अठराव्या* गीता अध्यायास साक्षीला ठेवून! पंढरपूरच्या श्रीविठ्ठलाला उरी भेटण्याची पूर्वी प्रथाच होती. ही भेट नच घडू शकली तर वारकरी देवळावरील कळसाला साक्षी ठेवून मनोमनी पांडुरंगास उरी कवटाळून धन्य होतात! वरील ओव्यातून ***"निजबोधें उराउरीं। भेटती आत्मेयां श्रीहरी।"*** असा जो अर्थप्रद उल्लेख केला आहे, तो फारच महत्त्वाचा आहे. या भेटीतच श्रीगीता व ज्ञानेश्वरीमाउलीचे सर्व रहस्य साठविलेले आहे. ते जिज्ञासूंनी जरूर जाणून घ्यावे असेच आहे. असो.

दोन ज्ञानेश्वरवाद

बाराव्या अध्यायाच्या प्रारंभीच्या ओव्यातून महायोगाची स्पष्ट लक्षणे दाखवली आहेत. महायोगप्रशस्तिपर असे जे सर्व उल्लेख ज्ञानेश्वरीत दिसून येतात, लौकिकातील श्रीविठ्ठलमूर्ती व तिचे मंदिर यांवर अधारलेली अलंकारिक उपमा इ.ची जी रचना आपण वर पाहिली, त्यांवरून असे वाटते की ***महायोगाचा अधिष्ठाता*** असे श्रीशंकराचार्यांनी ज्यास म्हटले आहे, तो ***श्रीविठ्ठल*** ज्ञानेश्वरीकार ज्ञानदेवांस नक्कीच सुपरिचित होता.

श्रीविठ्ठल त्यांचे अराध्यदैवत होते असेही म्हणता येऊ शकते आणि आपल्यापुरते हे दोनही ज्ञानदेव - ***ज्ञानेश्वरीकर्ते आणि अभंगकर्ते*** - एकच जाणून आपण हा वाद मिटवून टाकू या! आणि विद्वानांसाठी तो तसाच चालू राहिला तरी आपणास त्याची काही अडचण भासू नये!

जाताजाता सांगावेसे वाटते की मुळात हा वाद विठ्ठलाचा उल्लेख ज्ञानेश्वरीत सापडत नसल्याने उभा केला आहे. परंतु लेखकाने आपल्या प्रत्येक कृतीत विशिष्ट नाममुद्रा उठवलीच पाहिजे असे कसे म्हणता येईल! उलटपक्षी ज्ञानेश्वरांच्या पश्चात त्यांची शिष्यपरंपरा आजतागायत अखंडितपणे चालू आहे. तशीच त्यांच्या सोपानदेव व मुक्ताई या भावंडांचीही शिष्यपरंपरा बराच काळ चालू होती. ***त्या सर्व शिष्य-सांप्रदायिकात ज्ञानेश्वरी धरून ज्ञानेश्वरांचे अभंग व अमृतानुभवादी कृती एकाच एका ज्ञानेश्वरीकर्त्या श्रीज्ञानदेवांच्याच आहेत अशी धारणा आहे.*** वाद निर्माण करणाऱ्यांस जसा दोन ज्ञानेश्वर असावेत, असा किंतु निर्माण झाला, त्यातील अंशमात्रही किंतु सांप्रदायिकांत नाही.

उघडच आहे की ज्ञानेश्वर हे एकच होते ज्यांनी सदर ग्रंथादी वाङ्मयसंपदा रचली. ज्ञानदेवांचे योगपर, भक्तिपर व हरिपाठादी अभंगसुद्धा त्यांच्या निवृत्तिनाथादी भावंडांच्या अभंगांशी सोयरीक सांगणारे आहेत; अनुभवांच्या दृष्टीने त्यांच्यात साधर्म्य दिसून येते; ज्ञानेश्वरीबाबतही असेच आहे. या गोष्टीही या वादासंदर्भात बोलक्या आहेत!!

सप्तशृंगनिवासिनी श्रीजगदंबा

श्रीविठ्ठल हे ज्ञानदेवांचे आराध्य दैवत होते, असे अभंगातील त्यांच्या ***"बापरखुमादेवीवरें विठ्ठलें"*** अशा प्रकारच्या नाममुद्रांवरून अनुमान काढले गेले आहे. याप्रमाणेच ***दुसरी एक महत्त्वाची गोष्ट कुंडलिनीशक्तिरूप योगाशी संबंधित अशी आहे. ती म्हणजे श्रीज्ञानदेवांची कुलस्वामिनी सप्तशृंगनिवासिनी श्रीजगदंबा होय!***

या सप्तशृंगनिवासिनी जगदंबेच्या पीठास ***साडेतीन पीठातील अर्धे पीठ*** म्हणून मान्यता आहे. ***अर्धपीठ*** म्हणजेच ***अमात्रा पीठ*** अथवा ***ॐकाराची औटावी मात्रा!!*** ॐकाराशी संबंध दाखवणाऱ्या या अर्धमात्रासंज्ञक गौरवनामाने सप्तशृंगी श्रीअंबेचे पीठ मंडित आहे. ***कुंडलिनी जगदंबासुद्धा एकूण साडेतीन वेढ्यांची समजतात.***

हे साडेतीन वेढे ॐकाराच्या ***जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या*** या साडेतीन मात्रांनीसुद्धा ओळखले जातात. तुर्यावस्था ही अमात्रा वा अर्धमात्रादर्शक आहे. अर्धपीठाधिष्ठात्री सप्तशृंगनिवासिनी जगदंबा, जी ज्ञानदेवांची कुलदेवता आहे, ती अशी ***तुर्येची देवता*** आहे.

त्याचप्रमाणे ज्ञानदेवांच्या ओव्यासुद्धा साडेतीन चरणांच्या आहेत. ॐकारनिदर्शक अशा या साडेतीन चरणांच्या ओव्या रचून ज्ञानदेवांनी मोठे औचित्य साधले आहे, असे आपणांस वाटते!! आणि एक महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे सप्तशृंगी जगदंबा अष्टादशभुजारूपा आहे आणि श्रीगीता-ज्ञानेश्वरी यांचेही अष्टादश अध्यायच आहेत. केवढा अलौकिक आहे हा योगायोग!

या सप्तशृंगी श्रीमंत अंबेनेच सद्गुरू निवृत्तिरूप धारण करून ज्ञानराज बाळाचे सर्व लळे पुरविले असावेत. ज्ञानेश्वरीच्या *बाराव्या* अध्यायातील स्पष्ट ***महायोगदर्शक ओव्या*** तिने त्यांच्यासाठी काय केले, ते दर्शवितात. त्याच सप्तशृंगपीठाधिष्ठीत कुंडलिनीभवानीनेच आपल्या अष्टादश भुजांचे सामर्थ्य अष्टादशाध्यायी श्रीगीतेवरील व्याख्यानरूपी अष्टादशाध्यायी श्रीज्ञानदेवीच्या रूपाने प्रकट केले असले पाहिजे! ही स्थूल पाश्‍र्श्वभूमी ध्यानात ठेवून श्रीगीता व श्रीज्ञानदेवीचा योगशास्त्रविषयक अभिप्राय पाहिला पाहिजे. तिकडे आता वळू याः

गीता उपोद्घातः:::

गीता प्रथम अध्यायारंभ

श्रीगीतेचा पहिला अध्याय- ज्याला ***अर्जुनविषादयोग*** असे नामाभिधान मिळाले आहे - तो ज्ञानेश्वरांच्या दृष्टीने ***श्रीगीताशास्त्राचा प्रस्ताव*** आहे. मुख्य म्हणजे श्रीगीता रचण्याचे प्रयोजन काय; या शास्त्राचा विनियोग कसा करावा; याची मूळपीठिका या अध्यायाच्या निमित्ताने प्रकटली आहे. श्रीकृष्णार्जुन या गुरुशिष्यांचा संवाद त्यातून निर्माण होऊन या शास्त्राचा विस्तार होत होत, *अठराव्या* अध्यायात विषयनिरूपणाचा समारोप होतो.

सर्वसाधारणपणे या पहिल्या गीता अध्यायात कौरव पांडव, त्यांच्या सेना व त्यातील प्रमुख योद्धे इ.वर्णन राजा दुर्योधनाने अचार्य द्रोणांस संबोधून केलेल्या भाषणातून केले आहे. राजा धृतराष्ट्राने व्यासशिष्य संजयास केलेला प्रश्न या अध्यायाचा प्रथमारंभीचा श्लोक आहे. तो असाः

धृतराष्ट्र उवाचः

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय।।१-१।।

श्रीज्ञानेश्वर मात्र या अध्यायाच्या प्रथमारंभीच्या ओवीतच स्पष्टपणे शास्त्रनिर्देश देतात, तो त्यांच्या सुप्रसिद्ध ओवीनेः

ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।

यामुळे "हे संजया! धर्मभूमीरूप कुरुक्षेत्रात जमलेल्या माझ्या आणि पांडुच्या युद्धेच्छु पुत्रांनी काय केले?" या धृतराष्ट्राच्या काहीशा रूक्ष भासणाऱ्या प्रश्नाला सोयिस्करपणे विलंबाने मांडण्याची उत्कृष्ट साहित्यिक संधी श्रीज्ञानदेवांनी घेतली असल्याचे स्पष्टच दिसते.

ज्ञानदेवांचा मराठी बोल

काव्यारावो म्हणजे काव्यांचा राजा असलेल्या ज्ञानेश्वरीसारख्या उत्कृष्ट ग्रंथारंभी धृतराष्ट्राचा रटाळ प्रश्न न मांडण्याचे अभिजात साहित्यिक कौशल्य त्यांनी किती सहजपणे वापरले आहे ते पाहून त्यांच्या प्रतिज्ञोक्तीची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीः

माझा मराठाचि बोलु कवतिकें। परी अमृतातेंहीं पैजासि जिंके।
ऐसीं अक्षरें। रसिकें मेळवीन।।६-१४।।
जियें कोंवळिकेचेनि पाडें। दिसतीं नादींचे रंग थोडे।
वेधें परिमळाचें। बीक मोडे।।१५।।

श्रीज्ञानदेवांचा स्पष्ट, उघडपणे रहस्य प्रतिपादन करणारा मराठा बोल रसवत्तेत अमृतालाही नक्कीच जिंकतो. त्यांनी ग्रंथबद्ध केलेली अक्षरे म्हणजे श्रीशारदेची आत्मरसिक श्रोत्यांच्या इंद्रियांना कळंभा लावणारी अक्षर दिवाळीच!! या अक्षरात काय नाही! शब्द-स्पर्श-रस-रूप-गंध ही पंचेंद्रियांची आवडी हे शब्द सहजपणे पुरवतात.

या शब्दजातांच्या श्राव्य ओघातही अशी काही प्रकाशदीप्ती आहे की त्यामुळे डोळ्यांचेही पारणे फिटते. त्या प्रकाशातून प्रकट होणारी तेजोमय विश्वरूपाची दर्शने तर मनालाही आपल्या कोषाबाहेर काढून त्याला त्या चित्प्रकाशास आलिंगन देण्यासाठी भाग पाडतात. नाद आणि रंग त्या शब्दांच्या लावण्यापुढे अचंबित होतात. परिमळासही त्या शब्दांचा परिमळ मोहवून टाकतो.

ऐका रसालपणाचियां लोभा। कीं श्रवणींचि होती जीभा।
बोलें इंद्रियां लागे कलंभा। एकमेकां।।६-१६।।
सहजें शब्दों तरी विषो श्रवणाचा।
परी रसना म्हणे हा रसु आमुचा।
घ्राणासि भावो जाय परिमलाचा। हा तोचि होईल।।१७।।
तैं म्हणती उघडिली खाणी। रूपाची हे।।१८।।

ते त्यांचे शब्द इतके रसाळ आहेत की श्रवणेंद्रियांना त्यातला रस चाखणाऱ्या जिव्हा निर्माण व्हाव्यात! रसनेलाही या श्रवणेंद्रियांच्या विषयाचा रस चाखावासा वाटावा! या शब्दांचा परिमळ इतका सुटला आहे की घ्राणेंद्रियास तो घेतघेत त्या शब्दांचे रूप प्राप्त होते. हे शब्द म्हणजे मुखाद्वारे प्रकटणाऱ्या जणू रेखांकित अक्षराकृतीच! त्या पाहून नेत्र धन्य होतात! त्यांच्यासाठी रूपाच्या खाणीच जणू या शब्दातून प्रकटतात!"

जेथ संपूर्ण पद उभारे। तेथ मनचि धांवें बाहिरें।
बोलु भुजाही अविष्करें। आलिंगावेयां।।६-१९।।
ऐशीं इंद्रियें आपुलालियां भावीं।
झोंबती परी तो सरिसेपणेंचि बुझावी।
जैसा एकला जग चेववीं। सहस्त्रकरु।।२०।।

"आणि शब्दाशब्दांनी जेव्हा पद बांधले जाते, तेव्हा आपले ठाण सोडून मन त्यांना बाहू पसरून आलिंगन देण्यासाठी उत्सुक होऊन धावत सुटते. सहस्त्ररश्मी जसा एकटाच सगळ्या जगास चेतवतो, तशी या शब्दांची रचना त्यांना झोंबण्यासाठी आपापसात स्पर्धा करणाऱ्या या सर्वच्या सर्व इंद्रियांना समर्थपणे संतोष देते.

तैसें शब्दाचें व्यापकपण। देखिजे असाधारण।
पाहतयां भावज्ञा फावती गुण। चिंतामणीचें।।६-२१।।
हे असोतु या बोलांची ताटें भलीं। कैवल्यरसें वोगरिलीं।
ही प्रतिपत्ति मियां केली निष्कामासीं।।२२।।

या शब्दांतरीचे गूढ भाव जाणणाऱ्या रसिक श्रोत्यांना तर जणू चिंतामणीच हाती लागला आहे असे वाटते. त्यायोगे शब्दांची फोलकटे टाकून देऊन त्यांच्या आतील ब्रह्मरूपी अर्थात अवगाहन करणाऱ्याला तर सुखामध्येच सुखरूप होऊन राहण्याचे भाग्य प्राप्त होते. या बोलांनी भरलेली ताटे कैवल्यरसाने ओसंडत आहेत. ज्ञानदेवांनी हे निष्काम निरञ्जन आत्मराजास घातलेले सुग्रास भोजनच आहे.

आतां आत्मप्रभा नीच नवी। तैंचि करूनि ठाणदिवीं।
जो इंद्रियांतें चोरूनि जेवीं। तेयांसिची फांवे।।६-२३।।
येथ श्रवणाचेनि पांगें-। वीण श्रोतयां व्हावें लागें।
हे मनाचेनि निजांगें भोगिजे गां।।२४।।
आहांच बोलाचि वालीफ फेडिजे।
आणि ब्रह्माचियां आंगां घडिजे।
मग सुखेंसि सुरवाडिजे। सुखाचिमाजि।।२५।।

"त्या अन्नाचे दोन घास आपल्याही मुखी पडावे असे ज्या श्रोत्यांना वाटत असेल, त्यांनी श्रवणेंद्रियांचे साहाय्य न घेता, सर्व इंद्रियांना न समजू देता, आत्मप्रभेस उजाळा देऊन तिचा दीप करून त्या प्रकाशात मनाच्या अंतरंगाने ते सेवावेत!" असे ज्ञानेश म्हणत आहेत.

ॐकारस्वरूपा::::

"ॐकारस्वरूपा। तुज नमो "

नित्यनूतन अशा या आत्मसुखाचा आविष्कार अत्यंत रसाळपणे करणाऱ्या ज्ञानदेवांच्या प्रज्ञेला ग्रंथारंभी आकर्षून घेते ते श्रीगणरायाचे रम्य-मोहक ॐकारस्वरूप! आणि ओवीमागून ओवी त्या मङ्गलमूर्तीला त्यांच्या वाणीतून साहित्यसाज चढवतच जाते. या वीस ओव्या आणि श्रीशारदास्तवनाची एकविसावी ओवी म्हणजे जणू त्या विश्वात्मक श्रीगणेशरूपास वाहिलेल्या एकवीस दूर्वाच! ज्ञानदेव म्हणतातः

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।
देवा तूंचि गणेशु। सकल मतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।२।।
तेथ लावण्याचीं ठेव। अर्थशोभा।।४।।
हे शब्दब्रह्म अशेष। तैंचि मूर्ती सुवेष।
तेथ वर्णवपु निर्दोष। मिरवित असे।।३।।
स्मृति तैंचि अवयव। रेखा आंगिक भाव।
अष्टादश पुराणें। तीचि मणीभूषणें।
पदपद्धति खेंवणें। प्रमेयरत्नांचीं।।५।।

जगाचे आदितत्त्व - वेदांचे प्रतिपाद्य तत्त्व - स्वसंवेद्य आत्मरूपी सकलमतिप्रकाशक श्रीगणेशाला वंदन करून ज्ञानदेव हा ***अक्षरगणेश*** आहे, हे स्पष्ट करतात. संपूर्ण शब्दब्रह्मच अशी त्याची मूर्ती आहे. सुवेष अशी ती मूर्ती निर्दोष अशा वर्णाची आणि शरीराची आहे. स्मृति हेच त्या गणेशाचे अवयव आहेत. त्यांवरील विविध टीका हेच त्याचे लावण्य होय. अष्टादश पुराणांची मणिभूषणे ही मुर्ती ल्यायलेली आहे. त्यातील प्रमेयरत्ने त्या आभूषणातील पदके होत.

पदबंध नागर। तैंचि रंगाथिलें अंबर।
जेथ साहित्य वाणें सपूर। उजाळाचें।।१-६।।
देखा काव्यनाटका। जैं निर्धारितां सकौतुकां।
त्याचि रुणझुणति क्षुद्रघंटिका। अर्थध्वनी।।७।।
नाना प्रमेयांची परीं। निपुणपणें पाहातां कुसरी।
दिसती उचित पदें माझारीं। रत्नें भलीं।।८।।
तेथ व्यासादिकांचियां मति। तैंचि मेखला मिरवती।
चोखाळपणे झलकती। पल्लवसडका।।१-९।।

सुसंस्कृत रचनेतील पदे म्हणजे त्य मूर्तीने परिधान केलेले रंगीबेरंगी वस्त्र होय. त्या वस्त्राची झळाळी म्हणजे साहित्याचा साज! उत्तमोत्तम काव्यनाटके म्हणजे त्या मूर्तीच्या पायातील घागऱ्या! त्यांचा अर्थ म्हणजे त्या घागऱ्यांचा रुणझुण करणारा ध्वनी! अलंकारातील रत्नखचित पदके म्हणजे अनेकानेक तत्त्वज्ञाने होत! व्यासादिक मान्यवरांच्या मतीच्या मेखला त्या मूर्तीने घातल्या आहेत. असे अनेकविध अलंकार त्या मूर्तीने घातले आहेत.

देखा षड्दर्शनें म्हणिपती। तैंचि भुजांची आकृति।
म्हणौनि विसंवादें धरिती। आयुधें हातां।।१-१०।।
तऱ्हीं तर्कु तोचि परशु। नीतिभेदु अङ्कुशु।
वेदान्तु तो महारसु। मोदकु मिरवे।।११।।
एकें हातीं दंतु। जो स्वभावता खंडितु।
तो बौद्धमत संकेतु। वार्तिकांचा।।१२।।
मग सहजें सत्कारवादु। तो पद्मकर वरदु।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्ध। अभयहस्तु।।१३।।
देखा विवेकवन्तु सुविमलु। तोचि शुण्डादण्डु सरलु।
जेथ परमानन्दु केवलु। महासुखाचा।।१४।।

षड्दर्शने हेच त्या गणेशाचे हस्त होत. त्यातील विसंवाद त्याने हाती धारण केलेली आयुधे प्रकट करतांना दिसतात. तर्काचा परशू, नीतीभेदाचा अंकुश, वेदांताचा महारसपूर्ण मोदक, वार्तिकातील बौद्धमतसंकेतरूपी खंडित दंत, सत्कारवादाचे पद्म, वरदअभयमुद्रादर्शक धर्मप्रतिष्ठा अशी त्या हातातील आयुधे व भूषणे आहेत. सुविमल अशा विवेकाने त्याची सरळ उभी सोंड घडवली आहे.

तऱ्हीं संवाद तोचि दशनु। जो समता शुभ्रवर्णु।
देओ उन्मेषसूक्ष्मेक्षणु। विघ्नराजु।।१-१५।।
मज अवगमलियां दोनीं। मिमांसा श्रवणस्थानीं।
बोधमदामृत मुनि-। अली सेविती।।१६।।
प्रमेयप्रवाल सुप्रभ। द्वैताद्वैत तैंचि निकुंभ।
सरिसेंपणें एकवटत। इभ मस्तकावरी।।१७।।

उपरीं दशोपनिषदें। जियें उदारें ज्ञानमकरंदें।
तियें कुसुमें मुक्तिसुगंधें। शोभतीं भलीं।।१८।।

ती मूर्ती महासुख अशा परमानंदाचा साकारलेला आविष्कारच आहे! समतारूपी शुभ्र वर्णाचा संवाद हे त्याचे दंत आहेत. मीमांसा हे त्याचे कान आहेत. प्रमेयरत्नांची प्रभा हेच त्या मूर्तीचे आंगिक तेज आहे. वेद, उपनिषदे, पुराणे, षड्दर्शने इ.पासून ज्याची आंगोपांगे घडलेली आहेत; दशोपनिषदांची ज्ञानमकरंदाने घमघमलेली कुसुमे ज्याने मस्तकी धारण केली आहेत; त्या सर्व अक्षर साहित्यलेण्यांनी ज्याचे सुमनोहर रूप विकसित व अलंकृत केले आहे; असा हा ज्ञानदेवांचा ***चैतन्यगणेश***!

त्याच्या गंडस्थलातून वाहणाऱ्या बोधमदामृताचे मुनिरूप भृंगराज आकण्ठ पान करत आहेत. ***द्वैत व अद्वैत*** अशी दोन्ही तत्त्वे सारखेपणाने वागवणाऱ्या या चैतन्यमूर्तीचे परमानंद भक्तिसुख केवळ विवेकवंतच प्राप्त करू शकतात व त्या कालातीत अशा आणि उन्मेषाहूनही सूक्ष्म नेत्र असलेल्या - ***कालाच्या स्पंदाहूनही सूक्ष्म तत्त्व असलेल्या*** - गणेशाशी श्रेष्ठ अशी साम्यावस्था प्राप्त करून घेऊन केवळ महदानंदात राहू शकतात!!

अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल।
मकार महामण्डल। मस्तकाकारें।।१-१९।।
हे तिहीं एकवटलें। तेथ शब्दब्रह्म कवलिलें।
तैं मियां श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज।।२०।।

जागृति-स्वप्न-सुषुप्ति या त्रिक अवस्थातून अथवा उत्पत्ति, स्थिती व लय यांना सामावून घेणाऱ्या - ***अकार, उकार व मकार या ॐकाराच्या माण्डूक्योपनिषदाने वर्णिलेल्या तीन मात्रातून साकारलेल्या या आदिबीज श्रीगणेशाचे शब्दब्रह्मरूपी चिद्रूप*** साहित्यचित्रांकित करण्याचे भाग्य ज्ञानदेवांस त्यांच्या श्रीगुरूंच्या कृपेनेच प्राप्त झाले आहे!

या गणेशरूपकानिमित्ताने ज्ञानदेवांनी बरेच काही सूचित केले आहे. विश्वाला गंवसणी घालणारी त्यांची प्रज्ञा या वेळी नुकतीच कुठे पालवू लागली आहे. पण तरीही ज्ञानदेवीच्या सुरुवातीसच रसिक श्रोत्यांना ***साहित्यसोनियांची ही खाणच*** आपल्या हाती गवसली आहे याचे अकल्पनीय महासुखच लाभले आहे हे ज्ञानदेवांचे प्रथमारंभीचे बोल ऐकून!

सिद्धप्रज्ञा::::

श्रीज्ञानदेवांचा व्यासंग

श्रीगणेशरूपकाच्या निमित्ताने प्रथमदर्शनीच श्रोत्यांना श्रीज्ञानदेवांच्या गाढ्या व्यासंगाची कल्पना येते. अध्यात्माच्या प्रांतातल्या एकजात सर्व अक्षरवाङ्मयाची खाणच त्यांनी सार्थ अभ्यासलेली दिसते. ***वेद - शास्त्र - पुराणे - स्मृति - ब्राह्मणे - आरण्यके - न्याय - तर्क - वेदान्त - वार्तिके - बौद्धमत - सत्कारवाद - पूर्व व उत्तर मीमांसा - षड्दर्शने - द्वैत व अद्वैतवाद - दशोपनिषदे - काव्य -नाटके*** इ.साहित्यकृती - ही त्यांची वानगीदाखल ठळकठळक उदाहरणे या ओव्यातून प्रकट झाली आहेत. श्रीज्ञानदेवांचा एकंदर आवाका ध्यानात घेता ही यादी संक्षिप्तच म्हटली पाहिजे.

त्यांच्यासारखा विनयशील तत्त्वज्ञ जेव्हा इतक्या उघडपणे आपला व्यासंग प्रथमारंभीच्या ओव्यात सूचित करू धजतो, त्या अर्थी त्यांच्या अध्यात्मशास्त्राच्या अभ्यासाची खोली अंतरिक्षाच्या मापानेही मोजता न येणारी असली पाहिजे!

अध्यात्मशास्त्रग्रंथांचा हा ओझरता नामनिर्देश असेही सुचवून जातो की ज्ञानदेवांची प्रज्ञा सर्वंकष आहे. त्यांनी लौकिकार्थाने या सर्व ग्रंथांचे अध्ययन कधी केले असावे हा प्रश्न जिज्ञासूंच्या मनात तत्काळ उभा राहतो.

आख्यायिकात याचा तसा काही उल्लेख सापडत नाही. धर्मबाह्य असा गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या संन्याशाच्या मुलाला त्या काळी तरी एवढे शिक्षण प्राप्त होणे दुरापास्तच दिसते. त्यातून त्यांचे वडील स्वतःच प्रकांड पंडित असते तर गोष्ट वेगळी! त्यातूनही लहानपणीच ज्ञानदेवादी भावंडांना मातापित्याचा वियोग घडला हे सर्वश्रुतच आहे. एवढ्या बालपणी त्यांच्याकडून हे ज्ञान मिळणे व ते आत्मसात करणे या गोष्टीही असंभवच दिसतात. म्हणजे विठ्ठलपंत जरी अगदी प्रकांड पंडित असते, तरीही त्यांच्याद्वारे हे सर्व ज्ञान ज्ञानदेवांना मिळाले असणे अशक्य कोटितलेच वाटते.

ज्ञानेश्वर व शंकराचार्य

इतउपरांत ज्ञानदेवीची रचनाच त्यांनी स्वतःच्या वयाच्या ऐन सोळाव्या वर्षाच्या सुमारास पूर्ण केली असे समजले जाते. ज्या महापुरुषाने हे सर्व करून वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षीच संजीवन समाधी घेतली, त्याच्या अलौकिकतेचे मोजमाप लौकिकाच्या मोजपट्टीने कसे करता येईल! त्यासाठी अलौकिक पुरुषांच्या प्रतिभेनेच कदाचित तुलना करता येईल!

सहज म्हणून समानधर्मा श्रीमदाद्यशंकराचार्यांचे चरित्र डोळ्यांसमोर उभे राहते. त्यांनी सर्व धर्मशास्त्र वयाच्या दहाव्या वर्षापर्यंतच आत्मसात करून तेवढ्या बालवयातच संन्यास घेतला होता. वयाच्या सोळाव्या वर्षीच त्यांनी वादविवाद, सभा, संमेलने गाजवली होती आणि केवळ बत्तिसाव्या वर्षीच वैदिक धर्माची दृढ अशा सैद्धान्तिक आणि व्यवहारशुद्ध पायावर उभारणी करून; चारही शांकरपीठांची प्रस्थापना करून; अगणित विद्वान व्यासंगी असा शिष्यसमुदाय मागे ठेवून परलोकगमन केले.

जातांना आपली ***प्रस्थानत्रयीवरील भाष्ये, अनेक वार्तिकग्रंथ, अनेकानेक स्तोत्रे, स्फुट प्रकरणग्रंथ, लघुवाक्यवृत्तिसारखे केवळ अठरा श्लोकात अध्यात्मदर्शन करविणारे तत्त्वचिंतनपर उत्कृष्ट लेखन, सौंदर्यलहरी, योगतारावली असे योगविषयावरील उत्तमोत्तम मौलिक ग्रंथ व इतर अनेकानेक श्रेष्ठ वाङ्मयसंपदेचा***

ठेवा आपणासारख्या जिज्ञासूंस आपल्यामागे मार्गदर्शन करण्यासाठी सोडला.

"बालपणींच सर्वज्ञता। वरी तेयांतें।।"

या महापुरुषांच्या चरित्रावलोकनातून एक गोष्ट निखालस सिद्ध होते. ती म्हणजे श्रीज्ञानेश्वर काय किंवा श्रीशंकराचार्य काय! अवतारी महामानव होते. त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा पाड सामान्य मनुष्यास लागणे कठीणच आहे.

आपल्यासारख्यांच्या मनात याविषयी जो संभ्रम निर्माण होऊ शकेल त्याची ज्ञानदेवांसारख्यांना बहुधा कल्पना असावी. म्हणूनच *सहाव्या* अध्यायानिमित्ताने बालवयातच असे आश्चर्यकारक ज्ञान व तेही परतत्त्वस्पर्शी कसे प्राप्त होऊ शकते, याचे वर्णन श्रीज्ञानदेवांनी पुढील शब्दात केले असावे असे वाटतेः

मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पाहांट फुटे।
सूर्यापुढे प्रगटे। प्रकाशु जैसा।।६-४५२।।
तैसीं दशेचीं वाट न पाहातां। वयसेचियां गांवां न येतां।
बालपणींच सर्वज्ञता वरीं तेयांतें।।४५३।।

"जन्मतेवेळीच त्या योगभ्रष्टास अथवा अवतारी पुरुषास शरीर प्राप्त होण्याआधीच आत्मज्ञान प्राप्त होते. सूर्यापूर्वीच त्याचा प्रकाश पहाटे जसा फुटतो, त्याचप्रमाणे त्याचे पार्थिव शरीर आपल्यापुढे आत्मज्ञानाचा प्रकाश जगात पसरवत प्रकट होते. प्रौढदशेची वाट न पाहताच बालपणीच तो सर्वज्ञता प्रकट करतो."

तियें सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वतें दुभें।
मग सकल शास्त्रें स्वयंभें। निघति मुखें।।६-४५४।।
आणि मागील जैं सद्बुद्धि। जेथ जीवितां जाहली होती अवधि।
मग तैंचि पुढुति निरवधि। नवीं लाहें।।४५७।।
तेथ दैवां आणि पायालां। वरि दिव्यांजन होय डोलां।
मग देखें जैसीं अवलीला। पातालधनें।।४५८।।
तैसें दुर्भेद जैं अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय।
तेथ सौरसेंवीण जाय। बुद्धि तेयांचीं।।४५९।।

"जन्मजात प्राप्त असलेल्या सिद्धप्रज्ञेच्या बळाने त्याचे मन सारस्वतवाङ्मयरूपी दुधाने भरगच्च भरून जाते व त्याच्या पयोष्ण धारा सकळशास्त्रमिषाने त्याच्या मुखातून आपसुकच बाहेर येऊन जगाला तोषवतात. मागील जन्मींची ***सद्बुद्धी*** म्हणजे ***आत्मविषयक विवेक*** त्या लहान वयातच प्रकट होतो व गुरूपाशी अध्ययन न करताच किंवा शास्त्रांचे आलोडन न करताच शास्त्रातील गहन आणि कठीण सिद्धान्त अनायासेच त्याला आकलन होतात."

गुरुकृपा::::

"गुरुकृपा काय नोहे"

अशी सिद्धप्रज्ञा बालवयातच प्राप्त केलेल्या श्रीज्ञानराजांचा ग्रंथ परतत्त्वदर्शनावरचा एकमेवाद्वितीय ठरला नसता, तरच नवल! ज्ञानदेव म्हणतात त्याप्रमाणे अध्यात्मशास्त्रात केवळ अंतरंग अधिकारच चालतो; लौकिक बहिरंग अधिकार -निव्वळ अनुभूतिरहित विद्वत्तादर्शक पांडित्यप्रचुर शब्दलाघव किंवा परोक्ष अधिकार तेथे चालत नाही. फारच झाले तर अशा लौकिक अभ्यासपूर्ण व्यासंगप्रदर्शनाने लोकांना वाक्चातुर्याचे समाधान मिळू शकेल. पण ***वस्तुसामर्थ्यशक्ती*** प्राप्त करून देणारा ***भावार्थदीपिके*** सारखा ***होडेचा प्रबंध*** एखादाच ज्ञानदेव गुरुकृपेचे ऋण मान्य करत निःश्वसित करू शकतो.

म्हणूनच श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका म्हणा किंवा निव्वळ अध्यात्मावरील परतत्त्वस्पर्शी ग्रंथ म्हणा; श्रीज्ञानदेवांनी आपल्या गुरुकृपेच्या वैभवाची खूण आणि आपल्या आत्मसाक्षात्काराचे प्रतीक असा हा ज्ञानदेवीसारखा अलौकिक ग्रंथ प्रकटवला आहे.

श्रीकृष्णमय गीता

याबाबत आपली भूमिका स्पष्ट करणाऱ्या त्यांच्या पुढील ओव्या प्रसिद्धच आहेत . ज्ञानेश्वरी आणि गीता यांचा अनुबंध, भाष्यकारांचे ऋण, गुरुऋण, ज्ञानेश्वरीग्रंथगौरव, या ग्रंथानिमित्त मागितलेले पसायदान, नाथपंथाचे वैभव असे विषय या अनुषंगाने त्यात येतात. आपण त्या ओव्या मुळातूनच पाहू याः

जो इयें शास्त्रीं एकु। श्रीकृष्णचि वाच्य वाचकु।
हे प्रसिद्ध जाणे लोकु। भलताही।।१८-१६८२।।
शास्त्र वाच्यें अर्थें फलें। मग आपण मावले।
तैसें नोहे हे सगळें। परब्रह्मचि।।१६८५।।
जैं हे श्रवणें पाठें अर्थें। गीता नेदी मोक्षाआरौतें।
जैसा समर्थ दाता कोण्हातें। नास्ति न म्हणे।।१६९४।।

"गीताशास्त्रातून श्रीकृष्णाचाच बोध होतो; सांगणारा आणि ऐकणारा पण श्रीकृष्णस्वरूपच होत, हे जगात प्रसिद्धच आहे. इतर शास्त्रे जो बोध करून देतात, तो झाल्यावर त्या शास्त्रांचे काहीच प्रयोजन उरत नाही. पण गीताशास्त्र मात्र असे नाही. गीता म्हणजे साक्षात मूर्तिमंत परब्रह्मच! म्हणून समर्थ दाता जसा कोणाही याचकाला विन्मुख पाठवीत नाही, तशीच गीताही कोणासही हवे ते देतेच! गीतेच्या श्रवणाने, पाठांतराने किंवा तिचा अर्थ समजावून घेण्याने मोक्षच मिळतो; त्याहून कमी असे फल नाहीच!"

म्हणौनि जाणतेयांसवा। गीताचि एकीं सेवा।
काय कराल आघवां। शास्त्रीं येरीं।।१८-१६९५।।
म्हणौनि व्यासाचा हा थोरु। विश्वासि जाला उपकारु।
श्रीकृष्ण-उक्ति-आकारु। ग्रंथाचां केला।।१७०७।।
आणि तोचि हा मी आतां। व्यासांचि पदें पाहतां पाहतां।
आणिला श्रवणपथा। मऱ्हाटियां।।१७०८।।

"म्हणूनच ज्ञाते केवळ गीतेचीच उपासना करतात. इतर अनेक शास्त्रे घेऊन काय करायचे! आपणासाठी गीताच पुरेशी आहे. श्रीकृष्णोक्तीला असा गीताग्रंथरूप आकार देऊन व्यास महर्षींनी अखिल विश्वाचे कल्याण केले आहे. त्यांच्या विश्वावर केलेल्या या

महान उपकारांना स्मरत स्मरत, गीतेची पदे न्याहाळीत मी गीतेस प्राकृत रसाळ भाषेत आणले आहे, ते या सुलभ ज्ञानदेवीच्या रूपाने!"

"श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे"

व्यासादिकांचे उन्मेख। राहाटती जेथ साशंक।
तेथ मीही रंकु एक। वाचाली करी।।१८-१७०१।।
यालागीं आम्हां प्रकृतां। देशिकारें बंधें गीता।
म्हणणे हे अनुचिता। कारण नोहे।।१७२०।।

"कृष्णार्जुनांचा गीतारूपी संवाद ग्रथित करत असता व्यासादिक महामुनींची प्रतिभाच जेथे अडखळत होती, तेथे मजसारख्या पामराचा काय पाड लागणार म्हणा! मी रसाळ ग्रंथरचना करतो आहे, असे म्हणणे म्हणजे व्यर्थ प्रौढी आहे झाले! पण समुद्रात मोठेमोठे जलचर वावरतात. म्हणून काय इवलाल्या माशांनी त्यात पोहूच नये कां! म्हणून व्यासांसारख्या थोरांनी गीतेस ग्रंथरूप द्यावे आणि आम्ही प्राकृत जनांनी मऱ्हाटमोळ्या भाषेत ती ओवीबद्ध करूच नये कां! आणि त्यात इतके अनुचित असे आहे तरी काय!"

आणि बापु पुढां जाये। तैं घेत पाऊलाची सोयें।
बाल एं तऱ्ही न लाहे। पावो कायीं।।१८-१७२१।।
तैसा व्यासाचा मागोवा घेतु। *<u>भाष्यकारांतें वाट्ट पुसतु</u>*।
अयोग्य मी न पवतु। कें जाईन।।१७२२।।

"वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवीत लहान बाळही ते जेथे जातात, तेथपावेतो जाऊन पोहोचतेच कीं नाही! मीसुद्धा अशाच प्रकारे व्यासांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत, भाष्यकारांना वाट विचारत जातो आहे. मग मला माझे ते अंतिम गंतव्य का लाभू नये! इतका का मी या कामासाठी अयोग्य आहे!"

वेद जेणें सुभाष। सुख जेणें सोल्लास।
हे असो रूपस। विश्व जेणें।।१८-१७२७।।
तो सर्वोपकारी समर्थु। सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु।
राहाटत असे मजही आंतु। रिघौनियां।।१७२८।।
म्हणौनि माझें नीच नवें। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे।
गुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेओ म्हणें।।१७३४।।

" आणि पहा! वेदांसही ज्याने आत्मबोधाची सुंदर भाषा शिकवली; सुखास ज्याने सुखत्व प्रदान केले; हे विश्व ज्याच्यामुळे रूप-आकार इ.पावले आहे, तो अत्यंत समर्थ आणि सर्वांवर उपकार करणारा सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथ तर माझ्या अंतरी शिरून तेथे वस्ती करून राहिला आहे. मग तर माझे साधे श्वासोच्छ्वासही प्रबंधांचे रूप सहजच धारण करतील, नाही कां! आत्मराज अशा त्या माझ्या गुरूंच्या कृपेने हा ग्रंथच काय, इतर कोणतीही अशक्यप्राय गोष्ट मी सहजच करू शकेन!"

या कारणें मियां। गीतार्थु मऱ्हाटियां।
केलां लोकां येयां। दिठीचा विषो।।१८-१७३५।।
परी मऱ्हाटे बोल रंगें।कवलितां पैं गीतांगें।
तैं गायनाचेनि पांगें। एकाढतां नोहें।।१७३६।।
म्हणौनि गीता गावो म्हणें। पैं गाणिवें होती लेणें।
ना मोकळीं तऱ्हीं उणें। गीताही आणित।।१७३७।।

"श्रीगुरूंच्या कृपेमुळे गीतेचे अगाध तत्त्वज्ञान कोणालाही सहज कळेल अशा साध्यासोप्या शब्दात सांगून, गीतार्थ लोकांना स्पष्ट दिसेल असे मी केले आहे. पण तरीही माझे हे प्राकृत बोल गीतेच्या अंगांगावर अलंकार झाले आहेत. गीतेची सुस्वरता आणि माधुर्य यांच्यात त्यांच्यामुळे उणे न येता उलट भरच पडली आहे. गीतेच्या अंगोपांगी हे बोल जसे अलंकारांप्रमाणे शोभून दिसताहेत, तसेच नुसतेही पण ते सुंदरच दिसत आहेत."

ना ना गुंफिलीं कां मोकलीं। उणीं न होती परिमलीं।
वसंतागमींची वाटोलीं। मोगरीं जैसीं।।१८-१७४०।।
तैसा गाणीवेने मिरवी। गीतेवीणही रंगु दावी।
तो लाभाचा बंधु वोवीं। केला मियां।।१७४१।।
तेणें आबालसुबोधें। वोवीयेचेनि प्रबंधें।
ब्रह्मरससुस्वादें। अक्षरें गुंफिलीं।।१७४२।।

"वसंतात बहर येतो तो मोगऱ्याच्या फुलांचा. ती फुले गुंफलेला गजरा घ्या किंवा त्यांची ओंजळ भरून घ्या; त्यांचा परिमळ जसा सारखाच उत्कृष्ट असतो, त्याप्रमाणेच गीतेसह हा माझा प्रबंध वाचला तर उत्तमच! पण जरी तो नुसताच वाचला तरीही तो तितकाच उत्तम वाटेल! गीतार्थ स्पष्ट करून दाखवणारा हा असा महत्त्वपूर्ण प्रबंध मी ओवीरूप करू शकलो ते माझ्या गुरूंच्या सामर्थ्यानेच! आबालवृद्धांना सहज कळू शकेल अशा या ओवीबद्ध प्रबंधात मी ब्रह्मरसास्वादयुक्त अशी उत्तमोत्तम सुंदर अक्षरे गुंफली आहेत."

"ग्रंथु नोहे, हे कृपेचे वैभव"

आतां चंदनाचां तरुवरीं। परिमलालागौनि फुलवरी।
पारुखणें जियापरी। लागेना कां।।१८-१७४३।।
तैसा प्रबंधु हा श्रवणीं। लागतखेंवों समाधि आणी।
ऐकिलियांही वाखाणीं। काय व्यसन न लावीं।।१७४४।।
पाठ करिता व्याजें। पांडित्यें येती वेषजें।
तैं अमृतांतैं नेणिजे। फावलियां।।१७४५।।
तैसेनि आईतेपणें। कवित्व जालें हे उपेणें।
मनन निदिध्यास श्रवणें। जिंतिलें आतां।।१७४६।।

"चंदनाचे झाड पारखण्यासाठी त्याला फुले येईस्तोवर थांबावे लागते कां! त्याच्या परिमळावरून क्षणार्धातच तो चंदनाचा वृक्ष आहे हे जसे समजून येते, तसेच या ग्रंथाच्या गुणवत्तेबाबत आहे. हा ओवीमय प्रबंध ऐकताक्षणीच समाधी लागते! एकदा याचे निरूपण ऐकले की श्रोत्यास त्याचे व्यसनच लागते!! याचा पाठ करू गेले की पाण्डित्यच समोर साकार उभे ठाकते. त्याच्यापुढे अमृताचीसुद्धा आठवण उरत

नाही. इतक्या सहजतेने हा प्रबंध तत्त्वज्ञानाची प्राप्ती करून देतो की याच्या निव्वळ श्रवणानेच ते प्राप्त होते. मनन-निदिध्यासनादी उपायांची कोणतीच जरूर आता उरली नाही."

हे स्वानंदभोगाची सेल। भलतेयासीचि देईल।
सर्वेंद्रियां पोषवील। श्रवणाकरवीं।।१८-१७४७।।
चंद्रातें आंगवणें। भोगूनि चकोर सिहाणें।
परि फांवे जैसें चांदिणें। भलतेयां।।१७४८।।
तैसें अध्यात्मशास्त्रीं इयें। अंतरंगचि अधिकारिये।
परि लोकु वाक्चातुर्यें। होईल सुखियां।।१७४९।।
तैसे श्रीनिवृत्तिनाथाचें। गौरव आहे जी सांचें।
ग्रंथु नोहे हे कृपेचे। वैभव तियें।।१७५०।।

"श्रवणाद्वारे सर्व इंद्रियांना हा प्रबंध तोषवतो आणि कोणालाही स्वानंदोपभोगाचा शेलका भाग प्रदान करतो. चंद्रामृताची खरी गोडी चतुर चकोरच जाणतात. पण तरीही चंद्राची ज्योत्स्ना कोणालाही लुटण्यास मिळतेच ना! अध्यात्माच्या अंतरंग अधिकाऱ्यांना हा ग्रंथ नक्कीच तोषवील! पण इतरेजनांनाही त्यातील वाग्विलास सुख देईल. हा ग्रंथ म्हणजे श्रीनिवृत्तिनाथांचे खरे महिमान आहे. त्यांच्या कृपेचे वैभव म्हणजे हा प्रबंध!!"

नाथपंथाचा वारसा ::::

"वरिखला शांतरसें। तो हा ग्रंथु"

क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीचां कर्णकुहरीं।
नेणौं कैं श्रीत्रिपुरारी। सांघितलें जैं।।१७५१।।
तैं क्षीरकल्लोळाआंतु। मकरोदरीं गुप्तु।
होतां तेयाचां हातु। पैठें जालें।।१७५२।।
तो मत्स्यप्रसव श्रृंगीं। भग्नावयव चौरंगी।
भेटला तो सर्वांगीं। संपूर्ण जाला।।१७५३।।
मग समाधि अव्यया। भोगाचा वास न इयां।
तैं मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं।।१७५४।।
तेणें योगाब्जिनीसरोवरु। विषयविध्वंसैकवीरु।
तियें पदीं कां सर्वेश्वरु। अभिषेकिला।।१७५५।।
मग तिहीं तैं शांभव। अद्वयानन्द वैभव।
संपादिलें सप्रभव। श्रीगयनीनाथीं।।१७५६।।

"क्षीरसागराच्या परिसरात शक्तीच्या कर्णपुटात त्या शिवाने जे गूज सांगितले, ते कसे कोण जाणे, क्षीरोर्मीमध्ये मत्स्योदरी गुप्त जो होता, त्या मत्स्येंद्रास अवगत झाले. ही कथा विश्रुतच आहे. तो मत्स्येंद्र जेव्हा सप्तशृंगावर भग्नावयव झालेल्या चौरंगीनाथाला भेटला, तेव्हा त्याने आपल्या कृपाकटाक्षाने त्यास सर्वांगपरिपूर्ण केले. अक्षय समाधीचा उपभोग श्रीगोरक्षनाथास लाभावा या इच्छेने मग त्या मत्स्येंद्राने आपल्या गुरुपरंपरेचे ते गूज गोरक्षास कथिले; आणि योगरूपी कमलिनींचे सरोवर व विषयविनाश करणाऱ्या एकमेवाद्वितीय वीरश्रेष्ठाचे जे पद, त्यावर त्याला प्रस्थापिले. शिवापासून प्राप्त झालेले ते ***अद्वयानंदवैभव*** - ते अक्षय समाधिसुख - मग त्याच्याकडून पूर्णत्वाने श्रीगहिनीनाथांनी प्राप्त करून घेतले."

तेणें कली कलितु भूतां। आला देखौनि निरुता।
आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा। दीधली ऐसीं।।१८-१७५७।।
अनादिगुरु शंकरा। पासौनि शिष्यपरंपरा।
बोधाचा हा संवसारा। जाला आमुतें।।१७५८।।
तो हा घेऊनि आघवा। कली गिलेतयां जीवां।
सर्वप्रकारीं धांवा। करि पां वेगां।।१७५९।।

"त्या गहिनीनाथांना कली भूतमात्रांना ग्रासत असलेला दिसला. त्यांनी श्रीनिवृत्तिनाथांना आदेश दिला की "अनादिगुरू शंकरापासून शिष्यपरंपरेने जे हे आत्मबोधाचे भांडार प्राप्त झाले आहे, ते स्वतः घेऊन या कलीग्रस्त जीवांना सोडवण्यासाठी तू त्वरा कर आणि धाव घे. त्यांची मुक्तता करण्यासाठी या योगविभवभांडाराचा तू मुक्त हस्ताने उपयोग कर!"

आथीचि तो तंव कृपालु। वरि गुरुआज्ञेचा बोलु।
जाला जैसा वर्षाकालु। खवलणें मेघां।।१८-१७६०।।
मग आर्ताचेनि वोरसें। गीतार्थग्रंथनमिषें।
वरुषला शांतरसे। तो हा ग्रंथु।।१७६१।।

"अगोदरच दयेची मूर्ती असा तो निवृत्तिनाथ होता. त्यात वर्षाकाळी मेघांना जसा जोम येतो, तशी गुर्वाज्ञेची भर पडली. मग आर्त जीवांसाठी गीतार्थग्रंथनाचे मिष करून, शांत रसाचा वर्षाव करणारा हा ग्रंथ प्रकटला!"

"धर्मकीर्त्तन हे सिद्धी गेले"

निवृत्तिनाथांनी भूतमात्रांचे कल्याण व्हावे म्हणून ज्ञानदेवांकडून ज्ञानदेवी प्रकटविली, असे श्रीज्ञानदेव सांगतात!

तेथ पुढां मी बापियां। मांडिला आर्त्तीं आपुलियां।
कीं यासाठी येवढीयां। आणिलो यशा।।१८-१७६२।।
एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जैं आपुले।
तैं ग्रंथें बांधौनि दिधलें। गोसावीं मज।।।१७६३।।
वांचूनि पढे ना वाची। ना सेवाही जाणें स्वामीची।
ऐसियां मज ग्रंथाची। योग्यता कें असें।।१७६४।।
परि सांचचि गुरुनाथें। निमित्त करूनि मातें।
प्रबंधव्याजें जगातैं। रक्षिलें जाणा।।१७६५।।

"मी बापडा चातक तर केवळ माझी आर्ती निववावी म्हणून श्रीगुरूंकडे आलो. तोच त्यांनी माझ्या हातून एवढ्या यशाचे हे ग्रंथन करवून घेतले. गुरुपरंपरेने त्यांना जे समाधिधन लाभले होते, ते या ग्रंथात बांधून माझ्या स्वामींनी दिले आहे. ना मला धड वाचता येते, ना काही या विषयातले समजते! स्वामींची सेवा कशी करावी, हे पण मला माहीत नाही. माझ्यासारख्याला असा ग्रंथ निर्मिण्याची क्षमता कोठे आहे! खरे तर माझ्या गुरुदेवांनी माझे निमित्त करून हा प्रबंध

प्रकटवला आणि जगाचे रक्षण केले आहे. त्यांना झालेल्या कलिग्रस्त जीवांचा उद्धार करण्याच्या गुर्वाज्ञेमुळे हा ग्रंथ माझ्याकडून त्यांनी रचून घेतला आहे."

तो मी एकु सर्व मुका। बोलौनि मऱ्हाटियां भाखा।
करीं डोलेवरी लोकां। घेवों ये ऐसें जैं।।१८-१७७९।।
हा ग्रंथसागरु एव्हढा। उतरौनि पैलीकडां।
कीर्त्तिविजयाचां धेंडा। नाचे जो कां।।१७८०।।
काएं बहु बोलों सकलां। मेळविलो जन्मफलां।
ग्रंथसिद्धीचां सोहोला। दाविला जो हा।।१७८४।।

"गीतेच्या अर्थाचे खरे मर्म कळणे फार अवघड आहे. थोरामोठ्यांची मती तेथे गुंग होते. मी तर सर्वस्वी मुका आहे. कसे बोलावे हे पण मला कळत नाही. पण तो अगम्य गूढ गीतार्थ सर्व लोकांच्या दृष्टीसमोर स्पष्ट होईल अशा तऱ्हेने साध्या सोप्या प्राकृत शब्दात मी मांडू शकलो; हा अफाट ग्रंथविस्ताररूपी समुद्र पार करून त्याच्या पैलतीरी कीर्तिविजयाची पताका मी फडकवतो आहे; ते केवळ तुम्हा संतसज्जनांच्या कृपेनेच! अधिक काय सांगू! तुम्ही हा ग्रंथ पूर्णतेला नेऊन मला अनुपम यशाचे धनी केले." असे ज्ञानेश उद्‌गारतात.

म्हणौनि तुम्हीं मज संतीं। ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं।
उपयोग केला तो पुढुति। निरूपम जी।।१८-१७९१।।
किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्त्तन हें सिद्धीं गेलें।
येथ माझें जी उरलें। पाईकपण।।१७९२।।

पुढे ते म्हणतातः "हे स्वामी! तुम्हांसारख्या संतश्रेष्ठांनी माझ्याकडून त्रैलोक्यात निरूपम अशा या ग्रंथाची रचना करून घेतली, हे माझे परमभाग्यच! तुम्ही मजकडून करवून घेतलेले हे धर्मकीर्तन सिद्धीस पावले. आता केवळ माझे सेवकपण उरले आहे. तुमचे माझ्यावरील हे ऋण कल्पांतीही न फिटणारे आहे."

"इयें ग्रंथपुण्यसंपत्ति"

ते पुढे म्हणतातः

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोखावें।
तोखौनि मज देयावें। पसायदान हें।।१८-१७९३।।
किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।१७९९।।
आणि ग्रंथोपजीवियें। विशेषें लोकीं इयें।
दृष्टदृष्ट विजयें। होआवें जी।।१८००।।

"हे विश्वात्मका देवा! हे श्रीगुरो! या प्रबंधरूपी वाग्यज्ञाने आपण तोषावे. तोषून मला हे पसायदान द्यावे की त्रैलोक्यमात्रातील सर्व भूतमात्र सुखाने परिपूर्ण व्हावेत आणि त्यांच्याकडून आदिपुरुषाची - त्या परम स्वसंवेद्य आद्यतत्त्वाची - अखंड भक्ती घडावी. आणि विशेषेकरून या लोकी ज्यांनी या गीता - ज्ञानेश्वरी ग्रंथांवर अपार श्रद्धा ठेवून त्यांच्याच आश्रयाने आपली जीवनक्रमणा चालविलेली आहे, त्यांचे इह व पारलौकिक असे सर्व प्रकारचे कल्याण व्हावे."

एथ म्हणे विश्वेशराओ। हा होईल दानपसाओ।
एणें वरें ज्ञानदेओ। सुखियां जालां।।१८-१८०१।।
उपनिषदांचे सार। सर्वशास्त्रांचे माहेर।
परमहंसीं सरोवर। सेविजे जैं।।१८०७।।
पुढुति पुढुति पुढुति। इयें ग्रंथपुण्यसंपत्ति।
सर्वसुखीं सर्व भूतीं। संपूर्ण होईजो।।१८०९।।

ज्ञानदेवांचे हे मागणे श्रीगुरू निवृत्तिनाथ आनंदाने मान्य करत म्हणतातः *"तू मागितलेले पसायदान आम्ही तुला दिले!"* हा त्यांचा वरप्रसाद पावून ज्ञानेश सुखी झाले. उपनिषदांचे सार असा हा ग्रंथ आहे. सर्व शास्त्रांचे माहेरघरच अशी जी गीता आहे, तिच्यावर मार्मिक टीका करणारा हा ग्रंथ आहे. परमहंस योगी ज्यात विहार करतात, ते सरोवर म्हणजे हाच ग्रंथ! येणाऱ्या अनंत भविष्यकालात या ग्रंथीं ठेवलेल्या पुण्यसंपत्तीच्या आधारे सर्व भूतमात्रांनी सुखी व्हावे! परिपूर्ण व्हावे!" विश्वाच्या परिपूर्णतेची अशी संकल्पना ज्ञानदेवच करू जाणोत!

ज्ञानदेवांची भूमिका व सत्कार्य

गीतार्थग्रंथनाचे मिष करून ऐकताक्षणीच समाधी प्राप्त करून देणारा हा ***ज्ञानेश्वरी*** नामेकरून होडेचा प्रबंध रचणाऱ्या ज्ञानदेवांनी त्यामागची आपली भूमिका विशद करण्यात काहीही हातचे राखून ठेवलेले नाही. तरीसुद्धा त्यांच्या त्यामागच्या भूमिकेचे वेगवेगळे पैलू कल्पून रंगतदार प्रश्नांचे तरंग वैचारिक विश्वात वेळोवेळी उठले आहेतच!

"ज्ञानदेवांनी गीतार्थाला धरूनच ओव्या रचल्या आहेत की आपल्या पदरचे नाथांघरीचे काही त्यात घातले आहे;" "ज्ञानदेवांनी उल्लेख केलेले भाष्यकार कोण होते - एक, दोन की अनेक असावेत;" " ज्ञानेश्वरी विवेचनात वेगवेगळ्या ठिकाणी विसंगती आहे का; तशी ती असल्यास ते सर्वसामान्य प्रतिभेच्या व केवळ शब्दलाघव जाणणाऱ्या भाष्यकारांपैकीच गीतेचा नीट अर्थबोध न झालेले सामान्यप्रतीचे टीकाकार असावेत का;" "सर्वसामान्य मानव ज्या प्रकारच्या लौकिक अनुभवांवर आणि श्रुत अनुमान प्रमाणावरच आधारित अशा कल्पनाविश्वाचे प्रवासी असतात, त्यातलेच एक श्रीज्ञानदेवही असतील का;" अथवा "त्यांना अलौकिक विश्वाचे कल्पनातीत असे अनुभव आल्याने व ऋतंभरा प्रज्ञेच्या जोरावर त्यांनी हा जो ग्रंथराज रचला, तो काही वेगळ्याच दृष्टिकोनातून समजावून घेणे अगत्याचे आहे;" "गुरुपरंपरा व सद्गुरूंकडून विचारसंक्रमण झाल्याने एवढे अनघड अध्यात्मविचार त्यांनी मांडले असतील का;" "ज्ञानेश्वरी हा एक निव्वळ अलंकारिक भाषेचा काव्यात्मक सोपान आहे; की त्यातील प्रतिपाद्य विषय सत्य आहे - अनुभूतिगम्य आहे;" "ज्ञानेश्वरांनी केवळ आपले पाण्डित्य प्रदर्शन करण्यासाठीच या ग्रंथाचा चतुर उपयोग करून घेतला आहे; की त्यांनी वेळप्रसंगी सूचित केल्याप्रमाणे आणि

पसायदानात उघड उघड दर्शवल्याप्रमाणे हा ज्ञानेश्वरी नामे ग्रंथराज सर्वसाहित्यगुणसंपन्नतेप्रमाणेच मुख्यत्वे प्रासादिक आहे;" "प्रासादिक ग्रंथ असल्यास तो निव्वळ ज्ञानदेवांच्या आत्मोपलब्धीचा निदर्शक आहे; की त्या ग्रंथात इतरांसही आध्यात्मिक अनुभूती प्रदान करण्याचे सामर्थ्य आहे;" असे एक ना दोन, कितीतरी प्रश्नतरंग वाचकांच्या, अभ्यासकांच्या आणि विद्वानांच्या मनाच्या डोहात उठतात अन् जो तो आपापल्यापरीने त्यांची उत्तरे शोधत राहतो. आणि भाग्यवंत जिज्ञासूंची पावले कळत नकळत अनंताच्या पाऊलवाटेवर पडायला लागतात!

त्यातूनच कोणाकोणाला अनंताचा शोध लागतो; कोणाला ज्ञानेश्वर समजतात; तर कोणाकोणाला हा शोध जन्मजन्मांतरी करतच राहावे असे वाटते. कसेही असो! अज्ञान्याला ज्ञानवंत करण्याचे; अश्रद्धाला सश्रद्ध बनवण्याचे; सश्रद्धाला परमार्थसोपानाच्या परमध्येयाप्रत पोहोचविण्याचे माउली श्रीज्ञानदेवांचे सत्कार्य गेली सात शतके अव्याहतपणे चालू आहे. इतकी शतके उलटल्यानंतरही या ग्रंथाची नवलाई ओसरलेली नाही; ग्रंथ कालबाह्य झाला नाही. विद्वत्तम महानुभाव आजही या ग्रंथावर संशोधनपर लिखाण करतच आहेत! या घटना ज्ञानदेवांनी सदर ग्रंथाविषयी ज्या काही अपेक्षा व्यक्त केल्या होत्या, तदनुसारच आहेत; हे मात्र निर्विवाद!

ज्ञानदेवांनी जी भूमिका आपल्या ग्रंथनिर्मितीबाबत व्यक्तवलेली आहे, तिला धरून म्हणायचे तर सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने आदिनाथ - उमादेवी - मत्स्येंद्रनाथ - चौरंगीनाथ व गोरक्षनाथ - गहिनीनाथ या परंपरेतून प्राप्त झालेले समाधिविचाररूपी धनच त्यांनी श्रीज्ञानेश्वरीरूपाने प्रकट केले आहे.

इतर भाष्यकारांनी गीतेचे जे विविध ध्वन्यर्थ प्रतिपादित केले आहेत, ते जरी ज्ञानदेवांच्या समोर असले तरीसुद्धा त्यांचा पूर्ण विचार करूनही त्यांनी आपल्या अनुभूती व परंपरेच्या आधाराने पटलेल्याच गोष्टी उचलून धरल्या असल्या पाहिजेत; असे "***भाष्यकारांतें वाट पुसतु***" या त्यांच्या विधानाबाबत म्हणावेसे वाटते. असो.

अर्थातच गीतेचे भाष्य करण्याच्या मिषाने त्यांनी हे जे अक्षरवाङ्मय प्रकटवले आहे, त्यात गीतेचा भावार्थ त्यांनी आपल्या गुरुपरंपरानिर्दिष्ट अनुभूतींच्या आणि तत्त्वज्ञानाच्या आधारेच प्रकाशित केला आहे. आवश्यक तेथे इतर मतांचा समन्वयही त्यांनी केला असल्याचे वाचकांना दिसून येते. **म्हणूनच *श्रीज्ञानेश्वरी* ही गीतेचा यथार्थ भाव प्रकाशविणारी *भावार्थदीपिका* होय!** आपणही ही पूर्वपीठिका पूर्णपणे ध्यानात ठेवूनच ज्ञानदेवांच्या वाङ्मयी मूर्तीची - या श्रीज्ञानदेवीची - योग्य उपासना केली पाहिजे.

योगप्रवेश::::

योगविषयाची प्रस्तावना

एवढ्या प्रस्तावनेनंतर आता योगविषयाकडे वळू या. सर्वसाधारण मतानुसार श्रीज्ञानेश्वरीतला योगमार्गनिदर्शक असा अत्यंत महत्त्वाचा म्हणून गणला जातो तो *सहावा* अध्याय होय. त्यातील ***पंथराज***वर्णन आणि ***कुंडलिनी उत्थापनक्रिये***चे वर्णन ही अत्यंत ठळक अशी वैशिष्ट्य आहेत. गीतेच्या सहाव्या अध्यायी यांचा उल्लेख नाही. तसेच कोणाही मान्यवर टीकाकारांनीही या प्रकारे सहाव्या अध्यायावर भाष्य केलेले दिसत नाही.

लययोग हा या पंथराजाचा गाभा आहे. ***लययोग, कुंडलिनी, सगुण भक्ती वा ईश्वरप्रणिधान, चक्रभेदन इ.शी संबंधित असा हा पंथराज योगमार्ग ज्ञानदेव सहाव्या अध्यायी निवेदितात.*** त्यांच्या म्हणण्याप्रमाणे गीतागोविंदास हाच मार्ग अभिप्रेत होता.

याविषयी विद्वानात खूपच चर्चा झालेली आहे. अनेकानेक वाचकांनी, जिज्ञासूंनी, अभ्यासकांनी व विद्वानांनी या अध्यायातील व इतर ठिकाणच्या योगमार्गसूचक उल्लेखांचे परिशीलन केल्यावर प्रकट केलेली काही मते पुढीलप्रमाणे आहेत:

१) श्रीगीतेचा सहावा अध्याय साधकांस परमात्मतत्त्वाप्रत घेऊन जाणाऱ्या योग व ज्ञान यांपैकी प्रायः योगमार्गाचेच अनुसंधान ठेवून त्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींचा उहापोह करतो. परंतु त्या गीतोक्त योगमार्गाचा आणि ज्ञानदेवीत स्पष्ट करून सांगितलेल्या कुंडलिन्यधिष्ठित लयप्रधान योगमार्गाचा वा पंथराजमार्गाचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. श्रीआदिशंकराचार्यांसकट माहितीतील इतर कोणत्याही भाष्यकारांनी या अध्यायातील योगाचा कुंडलिनी उत्थापनादी प्रक्रियांशी कोणताही संबंध जोडलेला दिसत नाही.

त्यामुळे कुंडलिनीजागृतीचा जो मार्ग अथवा साधनाक्रम श्रीज्ञानदेवांनी मुख्यत्वेकरून सहाव्या अध्यायातून आणि इतरही अनेक ठिकाणी आणि विशेषेकरून बाराव्या व अठराव्या अध्यायातील ओव्यातून प्रकट केला आहे; त्याचा व गीतारूप व्यासोक्तीचा अर्थाअर्थी काहीच संबंध नाही.

२) श्रीगीतेतील सहाव्या अध्यायातील योगविषयक भाग मुख्यत्वे पातञ्जलयोगाशी पूर्णतया संबंधित आहे. हा पंथराज योगमार्ग आणि पतञ्जलीप्रणित योगमार्ग एकच होत; असे एक मत आहे. परंतु श्रीज्ञानदेव आपल्या ग्रंथराजात कुंडलिनी जगदंबेच्या सामर्थ्यावर आधारलेला जो योगमार्ग प्रकट करतात; त्याची पातञ्जलयोगाशी नीट सांगड जुळवता येत नाही; असे इतर काही विद्वान म्हणतात.

३) ज्ञानदेवांनी आणि गीतेनेही सहाव्या अध्यायी एकापेक्षा अधिक योगप्रकार वर्णिले आहेत. गीतेबाबतच म्हणायचे तर तिच्यात अनेकानेक योगमार्ग सांगितले आहेत आणि ज्ञानयोग, भक्तियोग, ध्यानयोग व कर्मयोग हे त्यातील चार मुख्य प्रकार आहेत. ज्ञानदेवसुद्धा हे योगप्रकार मान्य करतात; असे हे म्हणणे दिसते.

४) पातञ्जलयोग निरीश्वरमतवादी असून त्याची गीतोक्त योगमार्गाशी भिन्नता आहे. ***पातञ्जलयोगशास्त्र*** हे श्रीशंकराचार्यांनी खंडण केलेल्या निरीश्वरसांख्यमतानुसारी आहे. म्हणून ते शास्त्र गीताकारांस मान्य असणे शक्यच नाही.

५) योगाच्या सफलतेसाठी पतञ्जलींनी अनेक युत्त्या सांगितल्या असून ***"ईश्वरप्रणिधानद्वा" (१-२३ पा.यो.सू.)*** या सूत्रानुसार एक युक्ती म्हणून ईश्वराचा आधार घेतला असल्याने ते शास्त्र सेश्वरसांख्यमतानुसारी असले पाहिजे. म्हणून त्यास गीतेचा आधार असणे किंवा गीतेचा व त्याचा योग एकच असणे शक्य आहे.

६) पतञ्जलींचा भर योगसाधनार्थ स्वसामर्थ्यावरच आहे. म्हणून पातञ्जलयोग हा निरीश्वरवादी आहे. गीतेत बाराव्या अध्यायी गोपालकृष्णांनी जो कठीण योगमार्ग म्हणून म्हटला आहे; तो म्हणजे हाच पातञ्जलयोगमार्ग होय.

गुरुकृपांकित कुंडलिनीयोग

वरील प्रकारच्या व इतरही योगासंबंधीच्या मतांचा परामर्ष घेण्यासाठी एक महत्त्वाची गोष्ट पाहू या. ती म्हणजे ज्ञानेश्वरीच्या उपरोल्लेखित सहाव्या अध्यायांतर्गताच्या आपल्या निरूपणात कुंडलिनीयोगनिदर्शक अशा ओव्यांच्या आरंभीच श्रीज्ञानदेव या योगसाधनेस मूलभूत अशा सद्गुरुस्मरणाचे माहात्म्य दर्शवून देतात, ते असे:

मग तेथ आपण। एकाग्र अंत:करण।
करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे।।६-१८६।।
तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्त्विकें भरें।
जंव कठीणपण विरे। अहंभावाचें।।१८७।।

सद्गुरुस्मरणाने आपोआप प्रशस्त होत जाणारा हा ***कुंडलिनीयोगमार्ग*** त्यानंतर ज्ञानदेवांनी सविस्तर वर्णन केला आहे, हे जिज्ञासूंस विदित आहेच! येथे लक्षात घेण्याजोगी एक गोष्ट म्हणजे नाथपंथीयांस हा ***कुंडलिनीशक्तियोग*** सद्गुरुकृपेने साधना करत असता अनायासे प्राप्त होतो व तोही त्या मार्गातील धोके टाळून अथवा त्यांची योग्य ती तरतूद करूनच!

इतर मार्गांनी जेव्हा कुंडलिन्युत्थापनप्रक्रिया होते, तेव्हा त्यात अनंत धोके असतात. तसेच साधकाचा देहपातही होण्याचा मोठा धोका पण त्यात असतो. पण सद्गुरुकृपांकित मार्गाने कुंडलिनीयोग साध्य होऊन साधकाचे ***सोऽहंसिद्धीचे लळे*** कसे पुरविले जातात, त्याकरता ज्ञानेश्वरीचा *बारावा* अध्याय साक्ष आहे, इकडे जिज्ञासूंचे लक्ष वेधणे आवश्यक आहे. असो.

बहुतेक सत्पुरुषांच्या मते कोणत्याही मार्गाने जर ध्येयसिद्धी शक्य असेल, तर त्यात कधी ना कधी ***कुंडलिन्युत्थापन*** व ***सामरस्यक्रिया*** घडल्याशिवाय तत्त्वोपलब्धी होणे अशक्यच आहे.

"याचि देहीं याचि डोळां" **मुक्तीचा जिवंत सोहोळा उपभोगणाऱ्या भाग्यवंताचा योगमार्ग जरूर त्या कुंडलिनी जगदंबेच्या महाद्वारातूनच जातो!** ज्ञानदेवांच्या मते गीतेचा सहावा अध्याय याच रहस्याकडे अंगुलिनिर्देश करत आहे. या दृष्टिकोनातून पाहिले असता सहाव्या अध्यायाच्या निरूपणाच्या निमित्ताने ज्ञानदेवांनी आपल्या गुरुकृपेच्या पंथराजवैभवाची ग्राहीक श्रोत्यांना गूढ रहस्य उलगडत जी झळाळी दाखवली आहे, ती गीतार्थाचा गहन अभिप्राय स्पष्टपणे घोषित करण्यासाठीच!! असो.

समारोप

ज्ञानदेवांची योगविषयक ही भूमिका न्याहाळल्यानंतर आपण आता पाहू या पातञ्जलयोगसूत्रांची आणि गीतेची सांगड कितपत जुळते ती. योगशास्त्रात पतञ्जलींच्या सूत्रांचे स्थान अनन्यसाधारण आहे. म्हणून योगशास्त्रजिज्ञासूंना ती सूत्रे अभ्यासणे अति आवश्यक ठरते. तर वळू या आता ***उन्मेष क्र.६ - श्रीगीता व पातञ्जलयोग*** याकडे!

ॐॐॐ

::उन्मेष६::
::श्रीगीता व पातञ्जलयोग::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ६:

गीताः
२:५३-५५,५६-६५,६७-६९,७१
३-७,१२,१३,३४,४१
४:१,६,१४,२१,२२,२९,३०
६:१०-१५,१८,२०,२१,२३-३०,३२
८:८,१३,२८
१०:१०,११
१२:१३-२०
१३:७-११
१८:५४,५५

ज्ञानेश्वरीः
६:३४२,३४५-३५२

अमृ.:९:९,१०

पा.यो.सू.:
१:२,३,२३-२९,४१-५१
२:२८,२९,३५,४४,४५,४६,४९,
५२,५४,५५
३:१-३,११,३५,४९,५५
४:२९,३४

उन्मेष ७:

ज्ञानेश्वरीः
१:१,२,२८,५३,५८
२:१५९,१८७,१८८२१६,२२६,२२८,
२६५-२६९,२७१,२७३,३३८-३४१
३:७६,८०-८३,१४५,
१५२,१५५,१५६,१५८,१५९
१८८
४:१०४,१०५,१६५-१७२
५:४९,५०
६:४०८,४६०,४६१
७:५९,१३६
८:७९
९:४०,४१,४९,१७१,१७२,२०७,
२०८,२१०,३९५,३९६
४४५,४४६,४४९,
४५७,४५८,४६०,४७४,
५१७-५१९,
१०:११७
११:७०८
१२:१०४-१०६,१०८,१०९,११३,
२१३,२१४
१३:४८५,११०३,११०४,
११०७,११०८,११११,११४३
१६:४४४
१७:४०१
१८:९०६,९११,९१७,४००,
१३२३,१४००,१४०५,१४१७,
१४६७,१५१२,१५१३,१७९३,
१७९४

उद्धृतःनित्यपाठ ज्ञानेश्वरीःस्वामी स्वरूपानंद

::::उन्मेष ६::::
श्रीगीता व पातञ्जलयोग

योगश्चित्तवृत्तिनिरोधः ::::

गीता व पातञ्जलयोग

श्रीगीतेतील योगाविषयी बरीच मतमतांतरे आढळतात. एक विचार असाही दिसून आला की ज्याला सर्वानुमते ***अष्टांगयोग*** म्हणतात त्यावर पातञ्जलयोगसूत्रांनी प्रतिपादित केलेल्या श्रीपतञ्जलिकृत अधिकारी ग्रंथातून साक्षेपाने विवरण केलेल्या योगांगांचे व योगानुभूतींचे श्रीमद्भगवद्गीतेत वेगवेगळ्या अध्यायातून आलेल्या श्रीकृष्णांच्या योगविषयक वक्तव्यांशी बरेच साम्य आहे. त्यामुळे काही जाणकार मंडळी तर ***श्रीगीता*** **व** ***पातञ्जलयोगसूत्रे*** **या दोन्ही शास्त्रात प्रतिपादन केलेले योग एकच आहेत** या मतापर्यंत येऊन पोहोचणेही तसे शक्य आहे, असे वाटते. कारण बरेच ठळकठळक मुद्दे दोन्ही शास्त्रात जुळवता येतात.

अष्टांगयोगात ***यम - नियम - आसन - प्राणायाम - प्रत्याहार - धारणा -ध्यान - समाधी*** अशा आठ योगांगांचा समावेश होतो. ***पातञ्जलयोगसूत्रे*** व श्रीमद्भगवद्गीतेतील साम्यदर्शक श्लोकांचा यापुढे विचार करू या. त्यानिमित्ताने आपणास योगविषयक महत्त्वाच्या श्लोकांच्या व पातञ्जलयोगसूत्रे या महत्त्वाच्या योगदृष्टिप्रदायक शास्त्राच्या विचारधारेच्या परीक्षणाचा लाभ होऊ शकेल. म्हणून आाता तिकडे वळू या.

पातञ्जलयोगसूत्रे हा योगशास्त्रावरचा एक सर्वसमावेशक असा उत्कृष्ट ग्रंथ समजला जातो. श्रीव्यासांनी याच सूत्रांवर स्वतः भाष्य केल्याचे समजले जाते. ***व्यासभाष्य*** या नावाने ते प्रचुर आहे. योगानुभूती घेणाऱ्या योग्यांनाही या शास्त्राप्रमाणे अनुभव आल्याचे समजले जाते.

योगशास्त्रावर तसे पाहता इतर बरेच ग्रंथ आहेत. उदाहरणार्थ ***योगवासिष्ठ, योगयाज्ञवल्क्य, अहिर्बुघ्नसंहिता,*** **तंत्रविषयास वाहिलेली अनेकानेक तंत्रे व ग्रंथ,तंत्रशास्त्रावरील विविध टीकाग्रंथ; श्रीआदिशंकराचार्यांचे** ***योगतारावली, सौंदर्यलहरी*** **इ.ग्रंथ व प्रकरणे;** ***श्रीमद्भागवत*** **व त्याचा मुख्यत्वे एकादश स्कंध आणि त्यावरील श्रीएकनाथमहाराजांची टीका; वेदवाङ्मयात ठिकठिकाणी विखुरलेल्या योगविषयक ऋचा, श्लोक, विवरणे इ.;उपनिषदातून होणारे योगशास्त्राचे ज्ञानात्मक व प्रायोगात्मक विवरण; योगकुंडल्योपनिषद; संत व योगिजनांचे ग्रंथ; आणि इतर ग्रंथ.** योगशास्त्राच्या लिखित व पठित वाङ्मयाच्या अभ्यासकांना ही यादी खूपच विस्तारित करता येईल इतके अमाप सारस्वत धन या विषयावर सापडते.

त्यातून सर्व प्रकारच्या योगविषयक ज्ञानाचे संकलन व आकलन करून, त्या कल्पनांचा आनुभूतिक परामर्ष घेऊन,योगारूढ भूमिकेतून एतद्विषयक सुसंबद्ध साररूप ज्ञानात्मक व प्रयोगात्मक भूमिका विशद करून जिज्ञासूंस यथायोग्य मार्गदर्शन करणारे ***श्रीगीता*** व ***श्रीज्ञानेश्वरी*** हे या सर्वांचे मुकुटमणीच शोभतील असे श्रीगोपालकृष्ण व श्रीज्ञानेश्वरमाउली यांचे योगशास्त्रावरील गुह्यातिगुह्य आणि सर्वोत्कृष्ट अत्युच्च कोटीचे ग्रंथ तर अति सुप्रसिद्धच आहेत.

गीता-पातञ्जलयोगसूत्रे-ज्ञानेश्वरी अनुबंध

या दोन ग्रंथांच्या म्हणजे *श्रीगीता व श्रीज्ञानदेवी यांच्या संदर्भात पातञ्जलयोगसूत्रे आपण आता अभ्यासणार आहोत.* त्यामागचा उद्देश असा आहे की एक तर पातञ्जलयोगसूत्रे या ग्रंथात कमीत कमी पण अर्थवाही शब्दात संगठन करून संपूर्ण योगशास्त्र संग्रहित केले आहे आणि खरे तर श्रीगीतारूपाने श्रीकृष्णभगवंतांनी याच शास्त्राचा सविस्तर उपदेश केला आहे. त्याहूनही अधिकतररीत्या श्रीज्ञानेश्वरीद्वारे श्रीज्ञानदेवांनी याच योगशास्त्राचा परमोत्कर्ष केलेला आढळून येतो. या तिन्ही योगशास्त्रविषयक ग्रंथांतील योगशास्त्रविषयक विचारांचे एकरूपत्व लक्षात घेणाऱ्या योगजिज्ञासूंना अशा समन्वयकारक अभ्यासापासून अवर्णनीय आनंद प्राप्त होतो. म्हणून आता तिकडे वळू या.

"योगश्चित्तवृत्तिनिरोधः"

योगाची व्याख्या व परिणती पतञ्जली पुढील शब्दात सूत्रबद्ध करतातः

योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।।
तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।।१-३।।पा .यो. सू .।।

चित्ताच्या वृत्तींचा निरोध म्हणजेच ***योग*** होय व चित्तवृत्तींचा निरोध सफल झाला की योग्यांची ***स्व-रूपी*** स्थिती होते. ही दोन सूत्रे आपण पातञ्जलयोगसूत्रांच्या समाधिपादातून घेतली आहेत. योगशास्त्राचे सार अशी ही दोन सूत्रे आहेत, असे म्हटल्यासही उचित होईल. श्रीगीतेतही योगाविषयी अनेक ठिकाणी विधाने येतात. त्यातल्या त्यात *सहाव्या* गीताध्यायी भगवान योगाभ्यासाबद्दल निरूपण करतांना काय म्हणतात, ते पहाण्यासारखे आहे. ते म्हणतातः

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति।।६-२०।।
सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम्।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः।६-२१।।
तं विद्याद् दुःखसंयोगंवियोगं योगसञ्ज्ञितम्।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा।।६-२३।।

"ज्या अवस्थेत **योगाभ्यासाने निरुद्ध झालेले चित्त** उपरम पावते आणि ज्या स्थितीत शुद्ध झालेल्या सूक्ष्म बुद्धीने ***("द्रष्ट्यास")*** परमेश्वराचा साक्षात्कार होऊन सच्चिदानंदघन परमात्म्यातच ते संतुष्ट होते; इंद्रियातीत व केवळ बुद्धिग्राह्य असा जो अपार आनंद आहे, तो ज्या अवस्थेत अनुभवाला येतो; ज्या अवस्थेत स्थित झालेला ***(स्वरूपात स्थित झालेला-"स्वरूपेऽवस्थानम्")*** योगी भगवत्स्वरूपापासून मुळीच विचलित होत नाही ; अशी जी अवस्था दुःखरूप संसाराच्या संयोगापासून रहित आहे; ***("द्रष्टृदृश्ययोः संयोगो हेयहेतुः।।२-१७।।" व "तदभावात्संयोगाभावो हानं तद् दृशेः कैवल्यम्।।२-२५।।पा.यो.सू.।।");*** अशी जी अवस्था आहे, तिला ***योग*** असे म्हणतात." भगवान श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात की "असा योग जाणून घे व त्यात निष्णात हो!"

भगवंतांनी वरील श्लोकात योगाची जी व्याख्या केली आहे; ती *पातञ्जलयोगसूत्रे अनुक्रमांक १-२, १-३, २-१७ व २-२५* यातून जी योगाची व्याख्या व योगस्थितीचे वर्णन पतञ्जलींनी केले आहे, त्याच्याशी मिळणारी आहे. तसेच ***ही स्थिती प्राप्त करून घेण्याच्या साधनांचे निर्देशन गीता व पातञ्जलयोगसूत्रे मूलतः एकाच रीतीचे करत आहेत. ते म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध करणे होय.*** द्रष्टा व दृश्य यांचा संयोग झाला की भविष्यकालीन संसारदुःख निर्माण होते. चैतन्यमय पुरुष वा आत्मा आणि इंद्रियगोचर विश्व यांचा असा संयोग संसारभ्रम निर्मितो, असे हे *२-१७ पा. यो. सू.* म्हणते.

अशा संयोगाचे कारण ***अविद्या*** आहे असे ***"तस्य हेतुरविद्या।।२-२४।।"*** हे *पा.यो.सू.* सांगते. अविद्या नष्ट झाली की द्रष्टा व दृश्य यांचा हा संयोगही नष्ट होतो. यासच ***हान*** असे म्हणतात. *हान* साध्य झाले की दृशिरूप आत्म्याचे म्हणजे ज्ञानरूप द्रष्ट्याचे केवळ ज्ञानरूपाने अस्तित्व जाणवते. द्रष्ट्याची ***कैवल्यावस्था*** ती हीच होय.

हान हाच कैवल्याचा मार्ग असल्याचे *२-२५* या पा.यो.सूत्राप्रमाणे दिसून येते. *गीता श्लोक क्र. ६-२३* अनुसारही दुःखरूप संसाराचा वियोग होणे हीच योगस्थिती आहे. अशा प्रकारे या चार पा.यो.सूत्रांची व वरील तीन गीताश्लोकांची *(पा.यो.सू.१-२,१-३,२-१७ व २-५ आणि गीता श्लोक क्र. ६-२०,२१ व २३)* किती एकवाक्यता आहे, ते सहज दिसून येते. योगाचा हा गाभा अशा रितीने गीता व पातञ्जलयोगसूत्रात अनन्यसाधारणतया समानच आहे हे आपण पाहिले. असो.

यमनियमादी अष्ट योगांगे

पातञ्जलयोगसूत्र क्र. २-२९ अनुसार ***"यमनियमासन-प्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाधयोऽष्टाङ्गानि।।"*** अशी योगांगे आहेत. ***१) यम, २) नियम, ३) आसन, ४) प्राणायाम, ५) प्रत्याहार, ६) धारणा, ७) ध्यान व ८)समाधि*** अशी ही आठ अङ्गे आहेत. म्हणून पातञ्जलयोगाच्या साधनाक्रमास ***अष्टाङ्गयोग*** असेही म्हणतात. गीतेचे *श्लोक क्र. ६-२४ ते २८ व ८-८* हे पण याचप्रमाणे योगाङ्गे प्रकाशित करतांना दिसतात. म्हणून वरील सूत्रांस समांतर असणारे हे गीताश्लोक पाहू याः

सङ्कल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानषेशतः।
मनसैवेन्द्रिग्रामं विनियम्य समन्ततः।।६-२४।।
शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत्।।६-२५।।
यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम्।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत्।।६-२६।।
प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम्।
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम्।।६-२७।।
युञ्जनेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते।।६-२८।।
अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।।८-८।।

अष्टांगयोगाच्या *यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार या पाच बाह्य अंगांच्या* अभ्यासाने शरीर, मन व इंद्रिये स्वाधीन करून घेतल्यानंतर पुढील *धारणा, ध्यान व समाधि या तीन अंतरंग योगांगांचा* अभ्यास सुरू होतो.

श्रीगीताही असाच अभ्यासाचा क्रम सूचित करत आहे. उपरोक्त श्लोकातून भगवंत सांगतात कीः "संकल्पाने उत्पन्न होणाऱ्या सर्व कामनांचा, वासना व आसक्ती यांचा निःशेष त्याग करावा व मनाद्वारे सर्व इंद्रिये सर्व बाजूंनी चांगल्या प्रकारे वश करून घ्यावीत. असा अभ्यास करता करता मन, शरीर व इंद्रिये शांत म्हणजे वश होत जातात. त्यानंतर अस्थिर व चंचल प्रवृत्तीच्या मनाला सांसारिक विषयांपासून आवरून धरावे. असा वारंवार अभ्यास करावा. हा अभ्यास साध्य करतांना मनाला परमात्म्याच्या चिंतनात गुंतवून ठेवावे व इतर विषयांपासून मनाला निवृत्त करत जावे."

पातञ्जलयोगसूत्रात सांगितलेल्या *यम - नियम - आसन - प्राणायाम - प्रत्याहार* या अंगांबरोबरच *धारणा व ध्यान* ही अंगेही गीतेनुसारही या प्रकारे साध्य होऊ लागून योग्यास परब्रह्मात समाधि प्राप्त होतो आणि कैवल्यप्राप्ती होते; तो परमपुरुषाप्रत जातो.

तप व स्वाध्याय

गीता असेही म्हणते कीः

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्।।४-२१।।
यदृच्छालाभसन्तुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते।।४-२२।।

"शरीर व अंतःकरण वश करून घेऊन सर्व प्रकारच्या भोगांच्या सामग्रीचा परिग्रह त्यागणारा संतोषी पुरुष शरीरासंबंधीचे कर्म करत राहूनही तपच करतो. तसेच यदृच्छेने जे काही प्राप्त होईल त्यात

संतुष्ट रहात हर्ष - शोक, सुख - दु:ख या द्वंद्वांच्या अतीत होण्याचा स्वाध्याय करत परमात्म्याशी योग प्राप्त करतो." पतञ्जलींनी म्हटलेले ***तप व स्वाध्याय*** हे नियम अशा प्रकारे गीतेत प्रकट होतांना दिसतात.

आसन व ईश्वरप्रणिधान

तसेच ***आसन व ईश्वरप्रणिधान*** याविषयी पुढील गीताश्लोक पहा:

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थित:।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह:।।६-१०।।

"सुहृद, मित्र, वैरी, उदासीन, मध्यस्थ, द्वेष्टे, बांधव, साधुपुरुष व पापीजनांविषयी योग्याने समान बुद्धी ठेवावी व आपण एकटेच एकांतातील स्थानी बसून नेहमी आपल्या आत्म्याला म्हणजे चित्ताला परमेश्वराच्या ध्यानात लावावे." हेच गीतेचे ***आसन*** सांगणे आणि ***ईश्वरप्रणिधान*** हा पातञ्जलसूत्रकृत नियम सांगणे होय.

गीतेतील अष्ट योगांगे

पतञ्जली ***१) अहिंसा, २) सत्य, ३) अस्तेय, ४) ब्रह्मचर्य व ५) अपरिग्रह*** असे ***यम*** म्हणून सांगतात. तसेच त्यांच्या मते ***१)शौच, २)संतोष, ३)तप, ४)स्वाध्याय व ५) ईश्वरप्रणिधान*** हे पाच ***नियम*** होत. तसेच ***"स्थिरसुखमासनम्।।२-४६।।"*** म्हणजे स्थिर व सुखकारक अशा शरीर व मनाच्या स्थितीला ते ***आसन*** असे म्हणतात. *पा.यो.सू. २-३०,३२ व ४६* यात या गोष्टी सांगितल्या आहेत.

गीता उघडपणे असे यम व नियम सांगत नाही. पण या गोष्टी जरा आडपडदा राखून सांगितल्याचे गीतेवरून दिसते. उदा. श्रीगोपालकृष्ण *तेराव्या* अध्यायी ज्ञानी पुरुषास आवश्यक असणाऱ्या गुणांचे जे वर्णन करतात, त्यातून हे यमनियमादी अध्याहृत असल्याचे दिसून येते. ते म्हणतात:

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह:।।१३-७।।
इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहङ्कार एव च।
जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम्।।१३-८।।
असक्तिरनभिष्वङ्ग: पुत्रदारगृहादिषु।
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु।।१३-९।।
मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि।।१३-१०।।
अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।१३-११।।

ज्ञानी पुरुषांच्या या लक्षणांत गीता पुढील गुणांचा अंतर्भाव करते: *१)अमानित्व - श्रेष्ठता व अभिमान यांचा अभाव, २)दंभाचरणाचा अभाव (यासच **सत्य** म्हणता येईल., ३) **अहिंसा**, ४) क्षमावृत्ती, ५)आर्जव - मन व वाणी यांची सरलता, ६)श्रद्धाभक्तीसह गुरूंची सेवा, ७) **शौच** म्हणजे आंतर्बाह्य शुद्धी, ८)अंत:करणाची स्थिरता, ९)मन व इंद्रियांसह शरीराचा निग्रह म्हणजे आत्मविनिग्रह व इहपारलौकिक भोगासक्तीचा त्याग व अभाव (हेच **तप** होय.), १०) अहंकाराचा अभाव, ११) जन्म, मृत्यु, जरा व रोग यांपासून मुक्त होण्याची इच्छा, १२) पुत्र - स्त्री - गृह - धनादिकात अनासक्ती, १३) ममत्वभावनेचा अभाव (१२ व १३ हे गुण **अपरिग्रह** या सदरात मोडतात.), १४) इष्टानिष्टप्राप्तीत चित्ताचा समतोल (**संतोष** असे यास म्हणता येते.), १५) एकांत व शुद्ध देशी राहणे व विषयासक्त जनांपासून दूर राहण्याची आवड, १६) परमेश्वराच्या ठिकाणी ऐक्यावस्थेने ध्यानयोगाच्या अभ्यासाने अनन्य होऊन राहणे (हेच **ईश्वरप्रणिधान** होय.), १७)अध्यात्मज्ञानात नित्य स्थिती व १८)सर्वत्र परमेश्वराला पाहणे **(१७ व १८ हे गुणही ईश्वरप्रणिधानाचेच भाग होत.)***

याचप्रमाणे वर सांगितलेल्या गुणांपैकी *४,५,६,१०,११, १५,१६,१७ व १८* यांचा म्हणजे क्षमावृत्ती, आर्जव, गुरूसेवा, अहंकाराचा अभाव, जन्म, मृत्यु, जरा व रोग यांपासून मुक्त होण्याची इच्छा, एकांत व शुद्ध देशी राहणे व विषयासक्त जनांपासून दूर राहण्याची आवड, परमेश्वराच्या ठिकाणी ऐक्यावस्थेने ध्यानयोगाच्या अभ्यासाने अनन्य होऊन राहणे, अध्यात्मज्ञानात नित्य स्थिती व सर्वत्र परमेश्वराला पाहणे या गुणांचा ***स्वाध्याय*** या अंतर्गत विचार करणे शक्य आहे.

असा विचार केल्यास वरील गीतोक्त अठरा गुणात पातञ्जलयोगसूत्रातील बऱ्याचशा यम-नियमांचा समावेश झाला असल्याचे स्पष्ट होते. ***सत्य, अहिंसा, शौच, तप, अपरिग्रह, संतोष, ईश्वरप्रणिधान व स्वाध्याय*** अशा आठ यम-नियमांचा खुलासा गीतेत असा आहे.

अस्तेय व ब्रह्मचर्य यांचा विचार फक्त करावयाचा उरतो. गीतेस स्तेयवृत्ती तर मान्य नाहीच. यज्ञ न करता उपभोग घेणाऱ्यांबद्दल गीतेत स्पष्टच म्हटले आहे की ***".. तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव स:।। .... भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्।।३-१२व १३।।"***

ब्रह्मचर्यसुद्धा गीतेस मान्य आहे. ***ध्यानयोग*** करण्यासाठी आसनादी सांगतांना ब्रह्मचर्यव्रताचा उल्लेख ***"प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थित:।।६-१४।।"*** असे योग्याच्या चर्येबाबत गीता म्हणते. असो. याप्रमाणे **श्रीगीता व पातञ्जलयोगसूत्रातील *यम* व *नियम* उभयपक्षी मान्य असल्याचे दिसून येते आणि या विषयात दोन्ही शास्त्रे एकमताची असावीत हे कळून येते.**

आसन व प्राणायाम::::

गीतेचा आसनविचार

आता ***आसन*** या योगांगाचा विचार करू या. पतञ्जली आपल्या योगसूत्रात ***"स्थिरसुखमासनम्"*** *(२-४६ पा.यो.सू.)* असे सांगतात.

सुखाने ज्यात बराच काल स्थिर राहता येईल, असे आसन असावे. आसन म्हणजे शरीराची स्थिती व बसण्याचे स्थान. आसनाविषयी श्रीकृष्णभगवान म्हणतात की:

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम्।।६-११।।
तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः।
उपविश्यासनेयुञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये।।६-१२।।
समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः।
सम्प्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-१३।।
प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।६-१४।।

पतञ्जलींचे ***"स्थिरसुखमासनम्"*** कसे आहे, ते जणू विशद करत भगवान सांगतात: "शुद्ध भूमीवर दर्भासन घालून त्यावर मृगचर्म व त्यावर धूतवस्त्राची घडी ठेवावी. आसन अत्युच्च किंवा अति खोल नसावे. त्यावर स्थिर बसावे. शरीर, डोके व मान सरळ रेषेत ठेवावी. तसेच ब्रह्मचर्यव्रताचे पालन करत जावे. निर्भय व शांत अंतःकरण करून सावधपणे त्या आसनात*(स्थितीत)* बसून मनाला एकाग्र करावे."

असे मन एकाग्र करणे हा खरे तर पतञ्जली म्हणतात तो ***"देशबन्धश्चित्तस्य धारणा"*** *(३-१ पा.यो.सू.) असा* ***धारणा****विधी होय.*

पुढे श्रीकृष्ण म्हणतात की "चित्त व इंन्द्रियांच्या क्रियांना वश करून ***(मनः संयम्य)*** परमात्म्याच्या ठिकाणी ध्यान करण्याचे सातत्य ***(मच्चित्तो)*** म्हणजे *ध्यान* आणि ध्येय्य वस्तुशी चित्ताची एकरूपता ***(युक्त, मत्परः)*** साधण्याचा अभ्यास दृढ करावा (म्हणजे ***पातञ्जलसूत्रोक्त समाधि)***." *हाच पतञ्जली म्हणतात तो* ***ध्यान व समाधि****विधी होय.*

पातञ्जलयोगसूत्रांनुसार ***ध्यान म्हणजे "तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्"*** *(३-२ पा.यो.सू.) व* ***"तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः"*** *(३-३ पा.यो.सू.)* होय. ***परमेश्वराशी चित्तैकाग्र्य साधणे, त्याच्याशी एकरूप होणे असा गीतेचा धारणा-ध्यान- समाधिविधी होय.*** पातञ्जलयोगसूत्रांना हा मान्य असाच आहे. फक्त ***देशबन्ध*** म्हणून ***"मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।६-१४।।"*** यातून सगुणाचे म्हणजेच परमेश्वराचे आलंबन घेण्यास गीता सांगत आहे, एवढे विशेष लक्षात घेतले म्हणजे झाले.

या विवेचनावरून दिसेल की पतञ्जलींच्या ***आसन,धारणा, ध्यान व समाधि*** यांविषयींच्या सूत्रांचे बृहत स्पष्टीकरण भगवान श्रीकृष्णांच्या गीतावचनांतून साधकांच्या मार्गदर्शनासाठी केलेले आहे.

प्राणायाम

आता प्राणायामाविषयी पतञ्जली काय म्हणतात, ते पहाः

तस्मिन्सति श्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः।।२-४९।।पा.यो.सू.।।

श्वास व प्रश्वास यांच्या गतीचा विच्छेद म्हणजे *प्राणायाम.* हा प्राणायाम नाकपुड्या दाबून करावयाच्या *(घ्राणपीडनम्) ("प्राणस्य न वैकृताख्यौ "१०-योगतारावली-इति आचार्य)* प्राणायामासारखा स्थूल स्वरूपाचा नसून तो अति सूक्ष्म आहे.त्याचे खरे स्वरूप कसे आहे याचा निर्देश आपल्याला पुढील गीताश्लोकांतून मिळतो:

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे।
प्राणपानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः।।४-२९।।
अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः।।४-३०।।

भगवंत प्राणायामक्रियेचा यज्ञात अंतर्भाव करतात. *१) अपानवायूचा प्राणात होम करणे; २) प्राणवायूचा अपानवायूत होम करणे; ३) प्राण व अपान यांच्या गतीचा निरोध करणे व ४) प्राणांचा प्राणांतच नियत आहार करून होम करणे;* अशा चार प्रकारच्या सूक्ष्म प्राणायामक्रिया श्रीकृष्णभगवान सांगतात.

याप्रमाणे श्रीगीता पतञ्जलिऋषींची उपरोक्त सूत्रकल्पना उलगडून दाखवते. त्यावर ज्ञानेश्वरांचे व्याख्यान काय आहे, ते आपण योग्य वेळी पाहूच! पण ज्यांना ***प्राणायामाचे सूक्ष्मत्व*** ही कल्पना पटवून घ्यावयाची आहे, त्यांनी सहज म्हणून तरी आद्य श्रीशंकराचार्यांचा ***योगतारावली*** हा ग्रंथ व त्यातील ***केवलकुंभक*** ही संकल्पना समजावून घेतल्यास उचितच होईल असे वाटते! असो.

प्रत्याहारादी अंगे::::

प्रत्याहार

पतञ्जली ***प्रत्याहार*** या प्राणायामानंतरच्या अंगाची व्याख्या कशी करतात, ते पाहू या. ते म्हणतात:

स्वविषयाऽसंप्रयोगे चित्तस्वरूपानुकार इवेन्द्रियाणां प्रत्याहारः।।२-५४।।पा.यो.सू.।।

पाच इंद्रियांचे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पाच विषय होत. त्यांच्याशी त्या त्या इन्द्रियांचा ***संप्रयोग*** म्हणजे संबंध होऊ दिला नाही म्हणजे ती इंद्रिये चित्ताच्या स्वरूपाचे जणू अनुकरण करणारी होतात. या त्यांच्या स्थितीला ***प्रत्याहार*** असे म्हणतात. या स्थितीत चित्ताचे बाह्यगामित्व थांबून ते केवळ स्व-स्वरूपातच स्थिर होते.

यम, नियम, आसन व प्राणायाम यांच्या साधनाने व अभ्यासाने *प्रत्याहार* साधला की अष्टांगयोगाचे *बाह्यसाधन* पूर्ण होते व त्यानंतरच *अंतरंग साधना* म्हणजे *धारणा, ध्यान व समाधि* यांचा अभ्यास सुरू होतो. प्रत्याहाराचे पूर्ण फल म्हणजे इंद्रिये पूर्णपणे स्वाधीन होतात. म्हणूनच पतञ्जली म्हणतात की ***"ततः परमा वश्यतेन्द्रियाणां।।२-५५।।पा.यो.सू.।।***

प्रत्याहाराविषयी गीतेचे काय म्हणणे आहे, ते पाहू या. त्यासाठी गीतेचे पुढील काही श्लोक व विशेषतः *श्लोक क्र. ३-३४ व ४१; २-*

६०,६१,६४ व ६८ आणि ३-७ इ.अत्यंत उद्बोधक आहेत. ते श्लोक पाहू याः

ध्यायतो विषयान्पुसः सङ्गस्तेषूपजायते।
सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते।।२-६२।।
क्रोधाद्भवतिसम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति।।२-६३।।

श्रीगीतेच्या या सर्व श्लोकातून भगवंतांनी प्रत्याहाराचा विषय खूपच उकल करून दाखवला आहे: "विषयांच्या चिंतनाने त्यांचा इंद्रियांशी संग ***(संप्रयोग)*** होतो. ***संग*** हा शब्द गीता वापरते तर त्याऐवजी ***संप्रयोग*** असा शब्द पतञ्जलींनी वापरला आहे. अशा संगामुळे कामना निर्माण होते व कामना पूर्ण न झाल्यास क्रोध उत्पन्न होतो. त्यायोगे चित्त क्षुभित होते. क्रोधामुळे संमोहित झालेले चित्त आत्मस्वरूपापासून ढळते. त्यामुळे ***व्यवसायात्मिका बुद्धी*** - जी आत्मानात्मविचार समर्थपणे करू शकते, तिचा क्षय होऊन आत्मस्वरूपस्थिती भंग पावते.

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।।२-६०।।
इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि।।२-६७।।
इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वैषौ व्यवस्थितौ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ।।३-३४।।

अभ्यासदृढ साधकांचे मनसुद्धा उच्छृंखल इंद्रिये बळेच विषयांकडे ओढून नेतात. इंद्रिये विषयात संचरत असतांना जे मन त्यांच्यामागे जाते, ते वारा ज्याप्रमाणे नाव पाण्यात ओढून नेतो त्याप्रमाणे पुरुषाची प्रज्ञा हरण करते. इंद्रिये आणि त्यांचे विषय यामधील प्रीती व द्वेष ही ठरलेली आहेत. त्यांच्या ताब्यात मनुष्याने जाऊ नये. कारण इंद्रिये व विषय यांचा संयोग आत्मप्राप्तीच्या मार्गात शत्रूच होय."

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्।।३-४१।।
यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्य तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५८।।
तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।
वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-६१।।
रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति।।२-६४।।

"म्हणून इंद्रियांचे प्रथम नियमन करून ज्ञान आणि विज्ञान यांच्या नाशक अशा विषय व इंद्रिये यांचा संयोग घडवणाऱ्या व बुद्धीला संमोहात पाडणाऱ्या कामरूप शत्रूला नष्ट करावे. कासव ज्याप्रमाणे आपले अवयव सर्व बाजूंनी आंखडून घेते, त्याप्रमाणे इंद्रिये त्यांच्या विषयापासून आवरून घेतली की बुद्धी स्थिर होते. *(यामागील क्रियेस पतञ्जली **प्रत्याहार** अशी संज्ञा देतात.)* अशा प्रकारे स्थिर बुद्धी प्राप्त करून घेऊन ती परमात्म्याच्या ध्यानात लावणारा योगी रागद्वेषरहित होतो."

विषया विनिवर्तन्ते निरहारस्य देहिनः।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते।।२-५९।।
यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते।।३-७।।
तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-६८।।

"तो स्वाधीन इंद्रियांनी जरी सर्व विषय उपभोगतांना दिसला तरी प्रसन्नच असतो. याप्रमाणे मनाने इंद्रियांचे नियमन करून आसक्तिरहित चित्ताने कर्मेंद्रियांकडून जो कर्मयोग आरंभतो म्हणजे नियत व प्राप्त कर्मे करून घेतो, तो श्रेष्ठ होय."

पुढे याविषयी गीता म्हणतेः

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते।।२-६५।।

"याप्रमाणे विषयांपासून इंद्रिये सर्व प्रकारे आवरून बुद्धी स्थिर ठेवणाऱ्या आत्मसंयमी पुरुषाचे चित्त प्रसन्न होते आणि त्याच्या सर्व दुःखांचा नाश होतो." *यासच पतञ्जली **हान** असे म्हणतात.* "त्या पुरुषाची बुद्धी परमात्मतत्त्वाशी संयोग पावते."

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।२-६९।।
विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः।।
निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति।।२-७१।।

"सर्व लोकांना जी ***रात्र*** म्हणजे रागद्वेषामुळे होणारी आत्मज्ञानविस्मृतीची अवस्था असते, तेथे संयमी योग्यास जागृती असते. म्हणजे ***स्व-स्वरूपात*** स्थिती असते - विषयोपभोग घेत असतांनाही स्वस्वरूपापासून ढळणे होत नाही आणि सर्व लोक जेथे जागृत असतात, तेथे या मुनीला रात्र असते - म्हणजे स्वस्वरूपात स्थित असल्यामुळे विषयांत वावरूनही विषयांचा संसर्ग होत नाही; त्याला विषय दृग्गोचर होत नाहीत; सर्वत्र एकमात्र परमात्मतत्त्वच दृग्गोचर होते. याप्रमाणे सर्व कामना सोडून जो पुरुष निःस्पृहपणे वागतो, ज्याला ममत्व आणि अहंकार नाहीत; त्यालाच शान्ती प्राप्त होते."

ज्ञानेशांचे प्रत्याहारविषयक मार्गदर्शन

प्रत्याहाराविषयी एवढे सविस्तर विवेचन श्रीगीता करते. याविषयी श्रीज्ञानदेवांच्या अत्यंत सूचक अशा पुढील ओव्या हे इंद्रियनियमन कसे व किती प्रमाणात करावे, हे दर्शवतातः

जो रसनेंद्रियाचा अंकिला। कां निद्रेसि जीवें विकला।
तो नाहीं एथ म्हणितला। अधिकारिया।।६-३४५।।
अथवा आग्रहाचिये बांदोडी। क्षुधा तृषा कोंडी।
आहारातैं तोडी। मारूनियां।।३४६।।

निद्रेचियां वाटां न वचे। ऐसा हठिवेचेनि अवतरणें नाचें।
तैं शरीरचि नोहे तेयाचे। मां योगु कवणाचा।।३४७।।
म्हणौनि अतिशो विषयो सेवावा। तैसा विरोधुही न व्हावा।
कां सर्वथा निरोधु करावा। हेहीं नको।।३४८।।

"इंद्रिये व विषयोर्मींना जीव वाहिलेला पुरुष योगाचा अधिकारी नव्हेच! त्याचप्रमाणे हट्टाने व बलात्काराने इंद्रिये कोंडणारा - क्षुधातृषेचा कोंडमारा करणारा पण योगाधिकारी नसतो. ज्या शरीराच्या अधारावर योगदुर्ग उभा राहतो, ते शरीरच अशा हट्टाग्रह्याचे नसते, तर योगसिद्धी कशाच्या आधारावर करणार! म्हणून अतिरिक्त विषयसेवन किंवा इंद्रियांचा सर्वप्रकारे निरोध या गोष्टी योगमार्ग दुर्गमच करतात."

आहार तऱ्हीं सेविजे। परी युक्तीचेनि मापें मविजे।
क्रियाजात आचरिजे। तेयाचि स्थिती।।६-३४९।।
मितलां बोलीं बोलिजे। मितलां पाऊलीं चालिजे।
निद्रेंही मानू दीजे। अवसरें एकें।।३५०।।
जागणें जऱ्हीं जाहलें। तऱ्हीं व्हावे तैं मितलें।
येतुलेनि धातुसाम्य संचलें। असेल सुखें।।३५१।।
ऐसें युक्तीचेनि हातें। जैं इंद्रियां वोपिजे भातें।
तैं संतोषासि वाढतें। मनचि करी।।३५२।।
नावेक विरक्तु। जाहला देहधर्मी नियतु।
तऱ्हीं तोचि नव्हे व्यवस्थितु। अधिकारिया।।३४२।।

"म्हणून विषयसेवन व इंद्रियनियमन हे युक्ती वापरून मित असावेत. म्हणजे ते प्रकृतीला मानवणारे व चित्त प्रसन्न राखून परमात्म्याच्या ध्यानासाठी उपकारक ठरतील आणि त्यात अडथळा उत्पन्न करणार नाहीत. योग्य प्रमाणात इंद्रियनियमन केले व अतिरिक्त विषयसेवन टाळले तर शरीरांतर्गत धातुसाम्य संचरून नाडीकोष शुद्ध होतो व त्यामुळे संतोष वाढून मनच आपण होऊन इंद्रिये व विषयसेवन यांचा प्रत्याहार समर्थपणे पूर्णत्वास नेते. त्या युक्तीची हातवटी एकदा साधली व यथायोग्य विरक्तपणा अंगी बाणला, देहधर्म नियत झाले म्हणजे असा पुरुष सहजच योगमार्गाचा अधिकारी होतो."

धारणा

यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार या पाच बहिरंगांचा अभ्यास झाला की साधकाचे चित्त धारणाक्षम होते. त्याबाबत पतञ्जली सांगतात कीः

देशबन्धश्चित्तस्य धारणा।।३-१।।पा.यो.सू.।।

तसेच ध्यानासंबंधी ते म्हणतातः

तत्रप्रत्ययैकतानता ध्यानम्।।३-२।।पा.यो.सू.।।

चित्तास कोण्या एका विवक्षित देशावर बांधून ठेवल्याप्रमाणे स्थिर - अचल राखणे म्हणजे ***धारणा*** होय. ***देश*** ही संज्ञा व्यापक आहे. शरीरस्थ चक्रे, गोरक्षसंहितेनुरुप वर्णन केलेले आधारादी *(**सिद्धसिद्धान्तपद्धती**नुसार जे **आधार** आहेत, त्यांचे संक्षेपाने विवेचन नंतर केलेले आहे. ते यथावेळी पाहू.)* व यांच्याप्रमाणेच वेगवेगळ्या यौगिकप्रणालींनुसार विशिष्ट असे इतरही *देश* असतात.

लक्ष्य म्हणून धारणेसाठी कोणतेही देश घेता येतात. प्रतिमादी लक्ष्ये, ज्योती-बाहेरील वा *(शरीरस्थ प्रांतात कल्पिलेली)* अंतर्ज्योतीसुद्धा घेता येते. आकाशादी महाभूते, प्रकृति इ.सूक्ष्म तत्त्वे हीसुद्धा यात अभिप्रेत आहेत. सूर्य-चंद्र-नक्षत्रादी ज्योती, एखादी संकल्पना यासुद्धा धारणेचा देश होऊ शकतात. ***देश ही संज्ञा अशी सर्वसमावेशक आहे.*** असो. ***ईश्वर*** हा धारणेचा विषय नंतर सविस्तर विचारात घेणार आहोत. तेव्हा याबाबत अधिक विचार करू!

चित्तास असे अचल राखले की त्यास त्यावेळी येणारा विवक्षित अनुभव सातत्याने टिकवणे म्हणजे पतञ्जलीमते ***ध्यान*** होय. थोडक्यात ***धारणा सातत्याने टिकवणे म्हणजे ध्यान ही अवस्था होय.***

धारणा व ध्यान यांविषयी गीतेचा जो विचार आहे, तो गीता *श्लोक क्र. ६-१२,१३ व१४* यात आला आहे. ते श्लोक असेः

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः।
उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये।।६-१२।।
समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-१३।।
प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।६-१४।।

"आसनावर बसून चित्त व इंद्रिये यांचे व्यापार नियमित करावे." याचाच अर्थ पतञ्जल्युक्त ***आसन व प्रत्याहार*** ही सिद्ध करावीत असा आहे. *"मन एकाग्र करावे," म्हणजे **धारणा** करावी.* "अंतःकरणाच्या शुद्धीसाठी योगाचा अभ्यास करावा." हा मन एकाग्र करण्याचा अभ्यास म्हणजेच *पतञ्जल्युक्त ध्यान* होय, हे जिज्ञासूंच्या सहज लक्षात येईल! असो.

धारणा व ध्यान साधण्यासाठी गीतेने सांगितलेली युक्ती अशी आहेः "शरीर, पाठीचा कणा, शिर व मान ही *सम* म्हणजे उभी ताठ एका सरळ रेषेत राहतील अशी निश्चल धारण करून स्थिर व्हावे आणि दिशांकडे म्हणजे इतरत्र न पाहता नासाग्री दृष्टी लावून मनास शांत व निर्भय ठेवून, बह्मचर्यव्रताने राहून, मनाचे संयमन करून, भगवंताच्या ठायी चित्त ठेवावे. भगवत्परायण होऊन *युक्त* म्हणजे योगाभ्यासी रत असावे."

नासाग्रदृष्टी म्हणजे काय ते नंतर पाहू. पण ते नंतर योग्य वेळी! भल्याभल्यांचा याबाबत गोंधळ होतो! *धारणा व ध्यान* या अष्टांगप्रचुर योगांगावर अशा प्रकारे गीतेतून प्रकाश पडतो.

श्रीगीतेच्या या धारणा-ध्यान मार्गाने अशा प्रकारे पतञ्जलींच्या सूत्रांप्रमाणेच, चित्त कोणत्या तरी देशावर म्हणजे लक्ष्यावर जणू बांधून ठेवल्यासारखे स्थिर करणे हा ***धारणा*** विधी व एका क्षणाला चित्तात जी भावना असेल, तीच पुढील अनेक क्षणात सातत्याने टिकवणे, ही त्या *प्रत्ययाची एकतानता* म्हणजे ***ध्यान*** सिद्ध होतात.

भगवंत हाच गीतेचा धारणा व ध्यान विषय

श्रीगीतेने इंद्रियांचे व्यापार किमान व्हावेत म्हणून शरीर निश्चल ठेवून दृष्टी नासाग्री केंद्रित करण्यास सांगितले आहे. ***चित्तातील भगवंतास* धारणेकरता देश म्हणून गीता निवडते आणि ध्यानाकरता त्याचेच सतत स्मरण करणे हा एकतानतेचा विषय म्हणून गीता सांगत आहे, हे जिज्ञासूंस कळून येईलच!*(मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।६-१४।।गी.।।)***

श्रीगीतेला धारणा व ध्यानासाठी भगवंत हाच एकमेव उत्तम विषय वाटतो. नवल नाही की श्रीगीतेचा प्रतिपाद्य योग सिद्ध झालेल्या पुरुषास ***"वासुदेवः सर्वमिति"*** अशीच अनुभूती येते. पतञ्जलींनुसार समाधि सिद्ध होतो तो धारणा- ध्यानविषयक ध्येय्य वस्तुशी तादात्म्य होऊनच! म्हणून ***गीतोक्त योगाची परिणती समाधीत होतांना साधक भगवत्स्वरूपी समाधिस्थ होतो!***

धारणा-ध्यान-समाधि *या त्रयीसाठी* म्हणजे चित्ताच्या***संयमा***साठी अशा प्रकारे गीतेने अंतःस्थ भगवंतासच निवडलेले दिसते. म्हणूनच पातञ्जलयोसूत्रांना अनुसरून संयमाचे फल म्हणून सर्वत्र भगवंताची अनुभूती येणे हेच होय. ***धारणा-ध्यान-समाधि-संयम*** यांचे लक्ष्य भगवंत असणे हेच खरे तर पतञ्जल्युक्त ***ईश्वरप्रणिधान*** आहे, असे म्हणता येते. पतञ्जलींनीही ***"समाधिसिद्धिरीश्वर-प्रणिधानात्।।२-४५।।पा.यो.सू.।।"*** असे म्हटले आहे. त्याचा विचार नंतर करू.

गीतेतील योग व भक्ती

येथे अजूनही एक मुद्दा स्पष्ट होतो. गीतेने योगमार्ग सांगत वरील श्लोकातून *(६-१२,१३ व१४)* योग व भक्ती यांची छान सांगड जुळवली आहे. भगवंताठायी चित्त ठेवून तत्परायण असण्याचा या योगाशी संबंध असल्याचे हे श्लोक स्पष्ट दर्शवतात.यास ***भक्ती*** असेच म्हटले जाते. ***धारणा-ध्यान-समाधि* यांचा हा योग असा भक्तिमार्गाचा अंतर्भाव करून जात असल्याचे आपणास यावरून सहजच दिसून येते.** ज्ञानमार्ग व कर्ममार्गसुद्धा याच गीतोक्त योगात कसे गुंफले आहेत व ज्ञान, कर्म,योग व भक्तिसह संपूर्ण होणारा हा योग कसा आहे, हे पुढे आपण सविस्तर पाहणार आहोतच. इत्यलम्!

ध्येय्यवस्तू भगवंतच का

*धारणा- ध्याना*संबंधी मुख्यत्वेकरून असे दिसून येते की साधकाने इतर कोणतेही ध्यानविषय वा ध्येय्य वस्तू घेतली तर त्याची स्थिती दोलायमान होण्याचा संभव असतो व लांबचा पल्ला गाठल्यावरच त्याला उच्चतम ध्येय - म्हणजे कैवल्य अथवा भगवत्साक्षात्कार मिळेल असे विलंबाचे कारण त्यात असते.

हे सर्व लक्षात घेऊनच भगवंत हा धारणा-ध्यानाचा विषय उपरोक्त गीताश्लोकांद्वारे उकलून दाखवत आहेत. अर्थातच ही विलंबाची कारणे त्यांचे हे उत्तम मत यथार्थ रितीने जाणून आचरणात आणणाऱ्या साधकांच्या मार्गातून आपोआपच दूर केली जातात. भगवंताच्या सांगण्यानुसार योगमार्ग आक्रमणाऱ्या साधकांस त्यांचे ***"योगक्षेमं वहाम्यहम्"*** हे आश्वासन विदित आहेच!!!

योगशिखर::::

समाधि

आता ***समाधि*** या अष्टांगयोगाच्या अत्युच्च शिखरासंबंधी पतञ्जली काय म्हणतात, ते पाहू याः

तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः।।३-३।। पा.यो.सू.।।

सर्वार्थतैकाग्रतयोः क्षयादयौ चित्तस्य समाधिपरिणामः।।३-११।।पा.यो.सू.।।

धारणा स्थिर झाली की चित्ताच्या ठिकाणी ध्येय्य वस्तूच भासमान होते. त्यामुळे ध्येय्यवस्तूशिवाय अन्य कशाचेही भान असत नाही. चित्ताची ही अवस्था म्हणजेच समाधि जिच्यात चित्त ध्येयरूप होते. चित्ताची सर्व विषयांकडची प्रवृत्ती नष्ट होऊन चित्त एकाग्र होणे हा समाधीचा परिणाम होय.

धारणेने चित्ताला स्थिरता प्राप्त झाल्यावर कोणत्याही भाव्य वस्तुवर चित्तैकाग्र्य करणे हे ध्यानाचे स्वरूप होय. ध्यानाचीच पक्वावस्था म्हणजे *समाधि* होय. समाधिकाली वृत्तीचा प्रवाह चालू असूनही तो अज्ञातसा असतो.म्हणून त्या वेळच्या ध्यानाला ***"स्वरूपशून्यं इव"*** म्हणजे ***स्वरूपशून्य*** असे म्हणतात. ***समाधि*** अशी संज्ञा या ध्यानावस्थेस देतात.

भाव्य वस्तुव्यतिरिक्त इतर कोणताही अर्थ चित्तात न स्फुरणे हीच चित्ताची ***"अर्थमात्रनिर्भासता"*** होय. या अवस्थेत *"मी ध्याता अमुक विषयाचे ध्यान करत आहे"* हे अनुसंधानही राहत नाही; तर चित्त केवळ ध्येयैकगोचर होते. म्हणून *(३-११)* या सूत्रात पतञ्जली सांगतात की चित्ताचे सर्व अर्थांकडे म्हणजे विषयांकडे धावत असणे ही जी ***"सर्वार्थता"*** - तिचा क्षय होणे आणि चित्त एकाच आलंबनावर स्थिर राहणे म्हणजे ***एकाग्रता*** - तिचा उदय होणे ही जी अवस्था आहे, ती ***"समाधिपरिणाम"*** आहे.

समाधीचे वर्गीकरण

त्या समाधींचेही पतञ्जली पुढीलप्रमाणे वर्गीकरण करतातः

वितर्कविचारानन्दास्मितारूपानुगमात् संप्रज्ञातः।।१-१७।।पा.यो.सू.।।

समाधीचे ***संप्रज्ञात व असंप्रज्ञात*** असे मूल वर्गीकरण करतांना संप्रज्ञात समाधीचे परत ***१)सवितर्क, २)सविचार, ३) सानन्द व ४)सास्मित*** असे चार प्रकार सांगितले आहेत. *संप्रज्ञात* समाधीत चित्तास जर स्थूल विषयाचे आलंबन असेल तर ***सवितर्क*** समाधि होतो. तेच जर सूक्ष्माचे असेल तर ***सविचार;*** जर सत्त्वगुणाची सुखात्मकता हे असेल तर ***सानन्द*** व जर मी आहे एवढेच आलंबन

असेल - हेच स्फुरण होत असेल तर ***सास्मित*** - असा समाधिविभाग चित्ताच्या तदाकारतेच्या आलंबनविषयांनुसार पतञ्जली सांगतात.

तसेच *समाधिपाद सूत्रे क्र.४१,४२,४३,४४, ४५ व ४६* यात या समाधिविषयक जे पुढील व्याख्यान आहे, त्यात *सवितर्क व निर्वितर्क, सविचार व निर्विचार,* व त्यानंतर निर्विचार समापत्तीचे ***अलिंग*** समापत्तीत होणारे पर्यवसान यांचा निर्देश केलेला आहे. पुढे जाण्यापूर्वी त्याचा थोडा विचार करू याः

समापत्ति

१) क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेर्ग्रहीतृग्रहणग्राह्येषु तत्स्थतदञ्जनता समापत्तिः।।१-४१।।पा.यो.सू.।।

ग्रहीता *(पुरुष)*, ग्रहण *(ज्ञानेंद्रियांसह चित्त)* व ग्राह्य *(सर्व सूक्ष्म-स्थूल विषय)* यांच्याशी संपूर्ण वृत्ती क्षीण झालेले चित्त जेव्हा स्वच्छ स्फटिकमणी जसा त्याच्याजवळ ठेवलेल्या वस्तूच्या रंगाशी तदञ्जनता म्हणजे तद्रूपता पावतो, तसे एकरूप होते - तदाकार होते - तादात्म्य पावते, तेव्हा चित्ताच्या त्या अवस्थेला ***समापत्ति*** असे म्हणतात. स्थूलमानाने पाहिले तर ***समापत्ति*** म्हणजे ***समाधि*** होय. ***द्रष्टा-दृश्य-दर्शन*** **ही त्रिपुटी लय पावणे ही *समाधि* होय.**

२) तत्र शब्दार्थज्ञानविकल्पैः संकीर्णा सवितर्का समापत्तिः।।१-४२।।पा.यो.सू.।।

शब्द व त्याचा अर्थ आणि त्यानुसार होणारा वस्तूचा बोध यात एकरूपतेचा भ्रम आपणास होत असतो. वस्तू व तिचे ज्ञान ही अशी एकरूप समजून ती आलंबन विषय झाल्यावर सिद्ध होणारा समापत्ति ***सवितर्क*** म्हणून ओळखला जातो.

निर्वितर्क

३)स्मृतिपरिशुद्धौ स्वरूपशून्येवार्थमात्रनिर्भासा निर्वितर्का।।१-४३।।पा.यो.सू.।।

शब्दाच्या साहाय्याशिवाय चित्तात अर्थाचे स्फुरण होणे या समापत्त्यावस्थेस ***निर्वितर्क*** असे म्हणतात.

सविचार व निर्विचार

४)एतयैव सविचारा निर्विचारा च सूक्ष्मविषया व्याख्याता।।१-४४।।पा.यो.सू.।।

सवितर्क व निर्वितर्क समापत्तींना स्थूल विषयाचे आलंबन असते. त्याचप्रमाणे सूक्ष्म विषयांच्या आलंबनामुळे सिद्ध होणारे समापत्ति ***सविचार व निर्विचार*** असे ओळखले जातात.

अलिंग समापत्ति

५)सूक्ष्मविषयत्वं चालिंगपर्यवसानम्।।१-४५।।पा.यो.सू.।।

सूक्ष्मातिसूक्ष्म अशा संकल्पित विषयांचे उत्तरोत्तर आलंबन घेत गेल्याने अपार्थिव अशा आलंबनावर चित्त मोहित होते. त्यास नंतर आलंबनाची जरूरी राहत नाही. तेव्हा अशा प्रकारे आकार व उपाधि नसलेल्या ***महत्तत्त्वात*** समापत्ति साधते. चित्त आनंदमय आत्म्याशी एकरूप होऊन, याच्या विभागस्वरूप ***सानन्द व सास्मित*** अशा समापत्ति होतात.

सबीज व निर्बीज समाधि

६)ता एव सबीजः समाधिः।।१-४६।।पा.यो.सू.।।

या सूत्रात म्हटले आहे की हे सर्व समापत्ति वा समाधि ***सबीज*** आहेत. म्हणजे त्यायोगे हानोपाय पूर्णत्वास जात नाही व जन्ममरणाचा फेरा चुकत नाही. म्हणून साधकाने त्यापुढील पायरी म्हणजे ***उपायप्रत्यय*** असा ***असंप्रज्ञात समाधि*** प्राप्त करून घेतला पाहिजे. म्हणून पतञ्जली पुढचे व्याख्यान चालवित म्हणतात कीः

निर्विचारवैशारद्येऽध्यात्मप्रसादः।।१-४७।।पा.यो.सू.।।

निर्विचार समाधीचा अभ्यास पूर्ण झाला की आत्म्याचा प्रसाद प्राप्त होतो. त्यातून ***"ऋतम्भरा तस्य प्रज्ञा।।१-४८।।पा.यो.सू.।।"*** या सूत्रात म्हटलेली यथार्थ ज्ञान प्राप्त करून देणारी ***ऋतंभरा प्रज्ञा*** जागृत होते. पतञ्जली म्हणतातः

श्रुतानुमानप्रज्ञाभ्यामन्यविषया विशेषार्थत्वात्।।१-४९।।पा.यो.सू.।।

ही ऋतंभरा प्रज्ञा प्रत्यक्ष वा अनुमान याच्या साहाय्यावाचून सर्व विषयांचे विशेष ज्ञान करून देते.

तज्जः संस्कारोऽन्यसंस्कारप्रतिबंधी।।१-५०।।पा.यो.सू.।।

ही प्रज्ञा स्फुरण पावू लागल्यानंतर चित्तावर अन्य विषयांचे संस्कार होऊ देत नाही. अशा रितीने *१-४८, ४९ व ५०* या सूत्रात ऋतंभरा प्रज्ञेचा उदय, विकास व परिणाम सांगून नंतर *१-५१* या सूत्रात पतञ्जली निर्बीज समाधिलक्षण सांगतातः

तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजःसमाधिः।।१-५१।।पा.यो.सू.।।

स्वरूपावस्था

ऋतंभरा प्रज्ञेच्या संस्कारांचाही निरोध झाला म्हणजे सर्व वृत्तींचा निरोध होतो व ***निर्बीज*** समाधि सिद्ध होतो. या निर्बीज समाधीच्या परिणामी पुढील सूत्रात निर्दिष्ट केलेली अवस्था प्राप्त होते.

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।।१-३।।पा.यो.सू.।।

चित्तातील सर्व वृत्तींचा अशा प्रकारे निरोध झाला की द्रष्टा स्वतःच्या रूपाने अवस्थित असतो. स्फटिकमणी ज्या रंगाच्या सान्निध्यात असेल त्याप्रमाणे रंग धारण करतो.

पतञ्जली म्हणतातः

क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेर्ग्रहीतृग्रहणग्राह्येषु तत्स्थतदञ्जनता समापत्तिः।।१-४१।।पा.यो.सू.।।

स्फटिक जेव्हा वस्तुमात्रांच्या संपर्कात ठेवला जात नाही; तो जेव्हा वेगळा ठेवला जातो; तेव्हा त्याचे शुद्ध, खरे, निराभास स्वरूप प्रकट होते. त्याचप्रमाणे वृत्तींच्या सान्निध्यामुळे चित्त जसे वेगवेगळे भाव धारण करते, तसेच वृत्तिविरहित चित्त स्व-स्वरूपाने प्रकटते. हाच उच्चतम कोटिचा साक्षात्कार होय.

सत्त्वपुरुषान्यताख्याति

याप्रमाणे साक्षात्कार झालेल्या पुरुषास तत्पूर्वी समाधिसन्निकट जी एक महत्त्वाची अवस्था प्राप्त होते, तिचे पुढील सूत्रातील वर्णन पाहणेही गीताभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे:

सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्त्वं सर्वज्ञातृत्वं च।।३-४९।।पा.यो.सू.।।

सत्त्व म्हणजे अंत:करण आणि त्याचा ***द्रष्टा*** म्हणजे पुरुष! या उभयतात असलेले वेगळेपण म्हणजे ***अन्यता.*** त्या अन्यतेची प्रतीती म्हणजे ***सत्त्वपुरुषान्यताख्याति*** होय. हिलाच ***विवेकख्याति*** असे म्हणतात. ही प्रतीती ज्याच्या ठिकाणी स्थिर झाली असेल त्या योग्यास ***"मीच सर्व भावांचा अधिष्ठाता आहे व म्हणून सर्वज्ञानीही मीच आहे."*** अशी ईश्वरीभावाची प्रतीती येऊ लागते. याबाबत सविस्तर विचार योग्य वेळी करू. असो.

साम्यावस्था

आता श्रीगीता व ज्ञानेश्वरी यांच्या दृष्टीने साम्यावस्थेचे निदर्शक असे अत्यंत महत्त्वाचे पुढील पातञ्जलयोगसूत्र पहा:

सत्त्वपुरुषयो: शुद्धिसाम्ये कैवल्यम्।।३-५५।।पा.यो.सू.।।

चित्ताचे उपादानभूत कारण म्हणजे सत्त्व म्हणजे अंत:करण असते. त्यातून रजोमल व तमोमल नाहीसे होतहोत ते पूर्णतया शुद्ध झाले आणि त्याच्यात आणि द्रष्टया अशा पुरुषात ***शुद्धिसाम्य*** झाले, म्हणजे चित्ताठायी ***कैवल्य*** सिद्ध होते. विवेकख्यातीमुळे पुरुष ज्ञाता, कर्ता वा भोक्ता नसून हे सर्व त्रिगुणांचे कार्य आहे अशी त्या पुरुषाविषयी प्रतीती येणे, ही त्या पुरुषाची ***शुद्धि*** होय.

प्रतिप्रसव

पातञ्जलयोग सिद्ध झाला की अंतिम परिणाम म्हणजे :

पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसव: कैवल्यं स्वरूपप्रतिष्ठा वा चितिशक्तिरिति।।४-३४।।पा.यो.सू.।।

जीवाला भोग आणि अपवर्ग *(मोक्ष)* ही प्राप्त करून दिल्यामुळे त्रिगुणांना आता कार्य उरलेले नसते; त्यांना नंतर कोणताही ***अर्थ*** साध्य करावयाचा नसतो. ही त्यांची ***पुरुषार्थशून्यता*** होय. अशा रितीने पुरुषार्थशून्य झालेले गुण आपापल्या ***उपादानकरणा***त विलीन होतात. हा त्यांचा ***प्रतिप्रसव*** होय. हीच ***कैवल्यावस्था*** होय; किंवा ***चितिशक्ति*** म्हणजे ***चेतनपुरुष*** अविद्येच्या नाशामुळे वृत्तीशी सारूप्य पावत नाही आणि अशा प्रकारे तो आपल्या नित्यसिद्ध स्वरूपाने प्रतिष्ठित होत असतो. हीच ***कैवल्यावस्था*** होय. हेच योगशास्त्राचे अंतिम परिणामफल असल्याचे पतञ्जलीमुनी सांगत आहेत.

गीतेतील समाधिविचार

समाधि या मेरुशिखराप्रमाणे उत्तुंग अशा योगांगाचे याप्रमाणे पतञ्जलीऋषिप्रणीत विहङ्गम अवलोकन आपण केले. यानंतर याविषयी श्रीगोपालकृष्ण गीतेतील आपल्या सुवचनांद्वारे काय सांगतात ते पाहू या:

समाधि म्हणजे ***योगसंसिद्धि*** अथवा ***परमतत्त्वलाभ.*** समाधिस्थित योग्यांकरता वेगवेगळे शब्दप्रयोग करत श्रीगीता त्यांच्या स्थितीचे विविध प्रकारे वर्णन करते. समाधिस्थ पुरुषाच्या स्थितिविषयी मूळ प्रश्न अर्जुनाने पुढीलप्रमाणे विचारला होता:

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधी: किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्।।२-५४।।

"हे केशवा! ज्याची बुद्धी स्थिर झाली आहे; जो समाधीत स्थित झालेला आहे; त्याचे वर्णन कसे करता येईल, ते सांग. ज्याची बुद्धी स्थिर झालेली असते,तो कसा बोलतो; कसा बसतो; तो कशा प्रकारे व्यवहार करतो ?"

यापूर्वीच्या श्लोकात भगवंतांनी असे म्हटले आहे की:

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि।।२-५३।।

समाधीत जेव्हा बुद्धी अचल होऊन स्थित होईल, तेव्हा योगाची प्राप्ती होईल, असे ते म्हणतात. बुद्धीचे समाधीत स्थित होणे म्हणजे आत्मस्वरूपात स्थिती होणे आणि योगाची प्राप्ती म्हणजे आत्मतत्त्व प्राप्त होणे होय. या श्लोकात *समाधीत स्थित होणे; बुद्धी निश्चल होणे व योगाची प्राप्ती होणे* या संज्ञा वापरलेल्या आहेत.

समाधि व योग हे दोनही शब्द गीता व पातञ्जलयोगसूत्रे वापरतात. स्थूलमानाने त्यांचा अभिप्रेत अर्थ दोन्हीत सर्वसाधारणरीत्या एकच आहे. परंतु संदर्भानुसार तो थोडाफार बदलू शकतो. योगशास्त्र विशद करण्यासाठी दोन्हीत वेगवेगळी परिभाषा वापरली आहे. परंतु परिभाषा बाजूला सारून जर या दोन्ही शास्त्रातील योगप्रणालींचा सम्यक बुद्धीने समन्वय केला, तर दोन्ही शास्त्रांचे साध्य एकच आहे, असे दिसून येते. असो.

समाधिस्थिती

श्रीगोपालकृष्ण समाधिपरिणाम काय होतो, ते गीतेच्या अनेक श्लोकांतून व्यक्तवितांना दिसतात. त्यातील काही श्लोक वानगीदाखल पाहू या:

१) प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्।
आत्मन्येवात्मना तुष्ट: स्थितप्रज्ञस्तदोच्यते।।२-५५।।

"मनुष्य जेव्हा मनातील सर्व इच्छा सर्वथा टाकून देतो व आत्म्यामध्ये आत्मस्वरूपानेच संतुष्ट होऊन राहतो; तेव्हा त्याला *स्थितप्रज्ञ* असे म्हणतात."

२) दु:खेष्वनुद्विग्नमना: सुखेषु विगतस्पृह:।
वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते।।२-५६।।

दु:खामध्ये ज्याचे मन उद्विग्न होत नाही; सुखाविषयी ज्याला स्पृहा नाही; राग, भय व क्रोध ज्याला सोडून गेली आहेत; त्याला बुद्धी स्थिर झालेला मुनी असे म्हणतात."

३) य: सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्।
नाभिनन्दन्ति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५७।।

"सर्व गोष्टीत अनासक्त असलेल्या, शुभ व अशुभ प्राप्त झाले असता त्यात आनंद वा दुःख न मानणाऱ्या पुरुषाची प्रज्ञा स्थिर झालेली असते."

४) यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः।
इंद्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५८।।

"स्थिर प्रज्ञेच्या पुरुषाची इंद्रिये विषयांपासून कांसव जसे आपले अंग बाहेरील संज्ञेपासून आखडून घेते, त्याप्रमाणे आपणास लपवतात."

५) विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते।।२-५९।।

"संयम पाळून इंद्रियांना त्यांचा विषय म्हणजे आहार न देणाऱ्या पुरुषाची विषयासक्ती वस्तुतः सुटत नाही; परंतु परतत्त्वदर्शन झालेल्या महाभागाचे विषय व इंद्रियांची त्यासंबंधीची आवड ही आपोआपच निवृत्त होतात."

६) युञ्जन्नेवं सदात्मनं योगी नियतमानसः।
शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति।।६-१५।।

"मनाचा सदैव समतोल राखणारा योगी मोक्षात परिणत होणारी व केवळ माझ्याठायीच असणारी शांती प्राप्त करून घेतो."

७) यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते।
निस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा।।६-१८।।

"पूर्णपणे संयमित केलेल्या चित्ताची जेव्हा आत्म्यात स्थिती होते, तेव्हा सर्व इच्छांपासून अलिप्तता होते. अशा पुरुषास युक्त म्हणजे योगयुक्त म्हणतात."

८) सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम्।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः।।६-२१।।

"अशा योग्यास बुद्धिगम्य व इंद्रियांना अगोचर असे जे आत्यंतिक सुख असते, त्याचा तेव्हा अनुभव घडतो व तेथे तो एकदा स्थिरावला म्हणजे तत्त्वापासून कधीही ढळत नाही.

९) युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते।।६-२८।।

"निष्पाप झालेला तो योगी आत्म्याशी युक्त होऊन ब्रह्मतत्त्वस्पर्शाने प्राप्त होणारे आत्यंतिक सुख उपभोगतो."

१०) सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।६-२९।।

"योगयुक्त झालेल्यास सर्व भूतात आपण व आपणात सर्व भूते प्रतीत होतात. असे त्याला सर्वत्र आत्म्याचेच दर्शन होत असते."

११) यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति।।६-३०।।

"सर्वत्र आत्मदर्शन होणाऱ्या व परमात्म्यात विश्व पाहणाऱ्या त्या योग्यास नेहमी परमात्मस्थिती राहते."

१२) आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः।।६-३२।।

"सर्वांतर्यामीचे सुख वा दुःख हे स्वात्मसुखवत वा दुःखवत जाणणारा योगी परम होय." *पातञ्जलयोगसूत्र क्र.३-४९* मध्ये उल्लेखिलेले ***सर्वभावाधिष्ठातृत्व*** ते हेच! याचा अधिक खुलासा नंतर येईल.

१३) ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्।।१८-५४।।

"तो योगी ब्रह्मच होतो. तो प्रसन्नात्मा इच्छा व दुःखे यांपासून मुक्त असतो. सर्व भूतमात्रांशी स्वतःचे ऐक्य आत्मसात केलेल्या त्या योग्यास माझी परमभक्ती लाभते."

१४) भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्।।१८-५५।।

"ज्ञानभक्तिद्वारे भगवंत कोण आहे व कसा आहे, हे तत्त्वतः जाणून तो योगी भगवंताशी एकरूप होतो." खरे तर ज्ञानभक्ती ही ***योग-भक्ति-ज्ञान*** या त्रयीच्या एकीकरणाचा योगच आहे. त्याबाबत अधिक विवेचन नंतर येईल. येथील जी स्थिति आहे, ती म्हणजे *पातञ्जलयोगसूत्र क्र.३-४९* मधील ***सर्वज्ञातृत्व*** असलेली अवस्था होय. त्याचाही खुलासा योग्य वेळी पाहू. असो.

पातञ्जलयोग व गीतेतील योगाचे साम्य

याप्रमाणे समाधीविषयी पतञ्जली व गीता यांचे काय मत आहे, ते आपण संक्षेपाने पाहिले. त्या अगोदर योगाची व्याख्या, अष्टांगयोगाची यम-नियमादी अंगे व श्रीगीतेचे पातञ्जलयोगसूत्रांशी समानत्वनिदर्शक असे काही श्लोक यांचेही आपण परीक्षण केले होते. आता याव्यतिरिक्त योगानुभूतिविषयक श्रीगीता व पातञ्जलयोगसूत्रे यातील साम्यस्थळांचे परिशीलन करणे उचित ठरेल. तिकडे वळू या.

ऋतंभरा व कुंडलिनी::::

इतर साम्यस्थले

ततःक्षीयते प्रकाशावरणम्।।२-५२।।पा.यो.सू.।।

या सूत्रात पतञ्जली म्हणतात की "प्रकाशरूप असा जो सत्त्वगुण असतो, त्यावरचे रज व तम या गुणांचे आवरण प्राणायामामुळे नष्ट होते." सत्त्वगुण उज्ज्वल स्वरूपात प्रकट होतो. *सूत्र क्र.२-२८* मध्ये पतञ्जलींनी म्हटले आहे की:

योगाङ्गानुष्ठानादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिरविवेकख्यातेः।।२-२८।।पा.यो.सू.।।

"यम-नियमादी अष्टांगांनी युक्त अशा योगाच्या अनुष्ठानाने चित्तातील अशुद्धीचा म्हणजेच अविद्येचा जसजसा क्षय होत जातो, तसतशी ज्ञानशक्ती प्रदीप्त होत जाते आणि चित्तास ***विवेकख्याति*** म्हणजे ***द्रष्टा व दृष्य यातील भिन्नता*** जाणण्याची शक्ती प्राप्त होते." कोणी कोणी ***ज्ञानशक्ती हीच कुंडलिनी*** असल्याचे म्हणतात व ***विवेकख्याती म्हणजे ज्ञान*** असे समजतात. आता पुढील योगसूत्र पहाः

सत्त्वपुरुषयोरत्यन्तासंकीर्णयोः प्रत्ययाविशेषो भोगः परार्थत्वात् स्वार्थसंयमात्पुरुषज्ञानम् ।।३-३५।।पा.यो.सू.।।

सत्त्व म्हणजे अंतःकरण आणि पुरुष म्हणजे आत्मा हे वस्तुतः अत्यंत ***असंकीर्ण*** म्हणजे भिन्न आहेत. पण त्या भिन्नतेचा अनुभव न येणे म्हणजे ***भोग!*** भोग म्हणजे अंतःकरणात मीपणाचे स्फुरण होणे! "हे मीपणाचे स्फुरण ज्या आत्म्यामुळे होते, त्याच्या ठिकाणी संयम केला म्हणजे पुरुषाचे *(आत्म्याचे)* ज्ञान होते; चित्तापेक्षा *(अंतःकरणापेक्षा)* आत्मा वेगळा आहे, तो चैतन्य आहे, हे ज्ञान होते."

यानंतर -

सत्त्वपुरुषयोः शुद्धिसाम्ये कैवल्यम्।।३-५५।। पा.यो.सू.।।

यात म्हटल्याप्रमाणे *सत्त्व (चित्त)* व *पुरुष (आत्मा)* यांचे *शुद्धिसाम्य* निर्माण झाले म्हणजे चित्ताला ***कैवल्य*** प्राप्त होते. परमधाम, मोक्ष, निर्वाण इ.म्हणजे हे कैवल्यच होय.

मीपणाने स्फुरणारा आत्मा वस्तुतः नित्यशुद्ध असूनही चित्तावरील रजतमावरणामुळे मलिन भासतो. रजतमावरणाचा क्षय झाल्यावर चित्त शुद्ध होते व सत्त्वगुणाच्या प्रकर्षामुळे आत्मा शुद्धस्वरूपात प्रकट होऊ लागतो. चित्त व आत्मा यांची शुद्धता समान झाली की उपाधिरहित आत्मदर्शन होते व कैवल्य प्राप्त होते. ***चित्त व पुरुष यांचे शुद्धिसाम्य व कैवल्यप्राप्ती*** **यांचा हा जो असा संबंध आहे**, तो श्रीगीतेच्या पुढील श्लोकांतूनही कसा प्रकट होतो, ते पहाः

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।।८-८।।
वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परं स्थानमुपैति चाद्यम्।।८-२८।।

"योगाभ्यासाने चित्त त्या परमपुरुषाचे सतत चिंतन करत त्याच्याशी अनन्यभावाने युक्त होते. वेद, यज्ञ, तप व दान यांचे जे पुण्यफल श्रुतीने सांगितले आहे, त्याचेही उल्लंघन करून परमपुरुषाचे ज्ञान झालेला योगी परमधाम ***(कैवल्य, निर्वाण इ.)*** पावतो."

चित्त व पुरुषाचे शुद्धिसाम्य पतञ्जलींस अभिप्रेत आहे; त्यापासून ***कैवल्य*** प्राप्त होते. याचप्रमाणे गीता चित्ताचा पुरुषाशी अनन्यभाव झाला की ***परमधाम*** प्राप्त होते असे म्हणते. ***शुद्धिसाम्य व अनन्यभाव*** अशा वेगवेगळ्या पारिभाषिक शब्दांनी पतञ्जली व गीता एकच गोष्ट सूचित करतांना दिसत आहेत. अशा प्रकारे अंतिम योगफलाबाबतही या दोन्ही शास्त्रांचे कसे जुळते, ते जिज्ञासूंस सहजच दिसून येते. असो.

ऋतंभरा प्रज्ञा व बुद्धी

आता ***प्रज्ञे*** बाबतची पातञ्जलयोगसूत्रे व बुद्धीचा गीतेतील उल्लेख पाहू या. पतञ्जली म्हणतातः

१) निर्विचारवैशारद्येऽध्यात्मप्रसादः।।१-४७।।
२) ऋतम्भरा तस्य प्रज्ञा।।१-४८।।
३) श्रुतानुमानप्रज्ञाभ्यामन्यविषया विशेषार्थत्वात्।।१-४९।।
४) तज्जःसंस्कारोऽन्यसंस्कारप्रतिबंधी।।१-५०।।
५) तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः।।१-५१।।पा.यो.सू.।।

निर्विचार समाधीचा अभ्यास दृढ झाला की चित्तात आत्म्याची प्रसन्नता स्फुरण पावते. चित्त विशुद्ध आनंदमय झाले की साधकाची ***ऋतंभरा प्रज्ञा*** म्हणजे वस्तुमात्राचे यथार्थ वास्तव ज्ञान करून देणारी शक्ती जागृत होते. योगी जिला ***कुंडलिनी शक्ती*** असे म्हणतात, ती हीच होय! याचा परिणाम म्हणजे वेद, शब्द, अनुमान किंवा तर्क यांच्या साहाय्याशिवाय साधकाला सर्व विषयांचे विशेष म्हणजे वास्तव ज्ञान होते.

या प्रज्ञेचा विशेष म्हणजे ती स्फुरण पावली की विश्वातील वस्तुमात्राचे आत्मरूपाने - परब्रह्मरूपाने - ज्ञान होते; आत्मभिन्न वस्तुरूपाने त्यांचे ज्ञान होत नाही. भिन्नत्वाचे संस्कार शेष राहत नाहीत. ***"वासुदेवः सर्वमिति"*** अशी अनुभूती येते.

चित्तावरल्या ऋतंभरा प्रज्ञेच्या संस्कारांचाही निरोध झाला की बीजभूत सर्व वासनांचा निरोध होतो. ती अवस्था म्हणजे ***निर्बीज समाधि*** वा ***कैवल्य*** होय. सबीज समाधीत ***"अहं आनन्दमयः अस्मि"*** असे भान असते. निर्बीज समाधीत केवल आनंदमयताच असते; अहंता - अस्मिता लोप पावलेली असते.

समाधीची हीच किमया श्री भगवान गोपालकृष्ण गीतेच्या श्लोकांतून कशी व्यक्त करतात, ते आता पाहू याः

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतीपूर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते।।१०-१०।।
तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।१०-११।।

"सतत परमात्मचिंतनात व ध्यानात मग्न राहणाऱ्या त्या भक्तांना मी *बुद्धियोग* प्रदान करतो, जेणेकरून त्यांच्या सद्बुद्धीवरचे आवरण नाहीसे होऊन ते मजपावेतो येतात. त्यांच्यावर अनुकंपा करण्यासाठी त्यांच्या चित्तातील अज्ञानरूप अंधकाराचा नाश ज्ञानदीप प्रज्वलित करून मी करतो."

अशा प्रकारे योग्यांच्या अज्ञानाचा ***(अविद्येचा)*** भगवत्कृपेने लेशही उरत नाही व ते सतत आत्म्याशी युक्त होऊन राहतात.

अध्यात्मप्रसाद ही संज्ञा ज्याला पतञ्जलींनी वापरली आहे, ती अशी गीतोक्त ***प्रसाद*** *(२-६४,६५,१८-५६,५८,६२)* वा ***भगवत्कृपा*** हीच होय, हे जिज्ञासूंच्या सहजच लक्षात येईल! असो. ***प्रज्ञा वा ऋतंभरा प्रज्ञाप्राप्ती म्हणजे गीतेचा असा बुद्धियोग होय, जो भगवत्कृपेमुळे प्राप्त होतो.***

ईश्वरप्रणिधान :गीतेतील समाधीची किमया::::

चित्ताचा आलंबनविषय व ईश्वरप्रणिधान

यानंतर एक महत्त्वाची बाब म्हणजे पतञ्जली आपल्या सूत्रातून चित्ताच्या आलंबनाचे वेगवेगळे विषय घेऊन धारणा-ध्यान इ.केले असता प्राप्त होणारे परिणाम सांगतांना दिसतात. ते बव्हंशी ***विभूतिपाद*** या सूत्रविभागातून दिलेले आहेत. क्रमाक्रमाने उत्तरोत्तर सूक्ष्मातिसूक्ष्म अशी आलंबने घेत घेत ***निर्बीज*** समाधि सिद्ध होतो.

या सर्व आलंबनविषयांपैकी ***ईश्वरप्रणिधान*** हाच गीतेचा ध्यानासाठीचा मुख्य प्रतिपाद्य असा आलंबनविषय आहे. कारण साधकास जर परमात्मतत्त्वाशी युक्त व्हावयाचे असेल, तर त्या तत्त्वासंबंधीची रूप-गुण-नामविशेष अशी जी ***ईश्वर*** म्हणून संकल्पना आहे, तीच ध्यानासाठी घेतल्यास लवकरात लवकर कार्यसिद्धी होईल, हे स्पष्टच आहे.

सगुण व निर्गुण उपासना

या ठिकाणीच *सगुण* व *निर्गुण* उपासनेतील मुख्य फरक ध्यानात घेणे आवश्यक आहे. ***सगुण-साकार-रस-रूप-गंध-स्पर्श -श्रवण-मनन-चिंतन-कल्पनादर्शी* ईश्वराच्या आलंबनावर *सगुण* उपासनेचा भर आहे; तर *निर्गुण-निराकार-अतींद्रिय* अशा ईश्वराच्या - तत्त्वाच्या आलंबनावर *निर्गुण* उपासना आधारलेली आहे.** ईश्वराची ही दोन्ही *सगुणविशिष्ट* व *निर्गुणविशिष्ट* अशी आलंबने पतञ्जली तसेच श्रीकृष्णभगवान या दोघांनीही ध्यानासाठी निर्दिष्ट केलेली आहेत. पण श्रीगीतेत मात्र निर्गुणापेक्षा सगुणाची उपासना सुलभ व म्हणून श्रेष्ठ आहे, असे भगवंतांनी म्हटले आहे.

"ईश्वरप्रणिधानाद्वा"

ईश्वराचे आलंबन घेण्याची उपासना ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।पा.यो.सू.।।"*** या सूत्राप्रमाणे करावयाची आहे. निरिच्छ व निर्मळ मनाने ईश्वराचे नामस्मरण करणे, मनन-चिंतनादी करणे, नवविधा भक्तिमार्गे त्यास भजणे, सर्व व्यवहार ईश्वरार्पणबुद्धीने करणे इ.चा ***ईश्वरप्रणिधान*** या क्रियेत समावेश होतो. या उपायाने शीघ्रतया ***असंप्रज्ञात समाधि*** प्राप्त होतो.

भक्तिमार्ग व भागवतधर्म यांचा पाया याच सूत्रावर आधारलेला आहे. यावरून हेही दिसून येईल की ***भक्ती व भागवतधर्म यांचे योगाशी अभिन्नत्व आहे*; तसेच भक्ती इ.उपासना या अष्टांगयोगाचाच एक** विभाग होत. याविषयी पुढील विवेचन अधिक सुयोग्य प्रसंगी पाहू. असो.

ईश्वराचे स्वरूप

ईश्वराचे स्वरूप वा गुणविशेष पतञ्जली पुढील सूत्रातून प्रकट करतात:

१) क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः।।१-२४।।

२) तत्र निरतिशयं सार्वज्ञ बीजम्।।१-२५।।

३) स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्।।१-२६।।

४)तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।।

५)तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।

पतञ्जलींच्या म्हणण्याप्रमाणे अविद्या-अस्मितादी *क्लेश;* चांगले-वाईट-मिश्र असे तिन्ही प्रकारचे *कर्म;* जाति, आयुष्य व भोग हा *कर्मांचा विपाक;* आणि या विपाकाला कारण असलेला *चित्तातील* प्रकट, सुप्त व प्रसुप्त *वासनांचा आशय* या सर्वांनी ***अपरामृष्ट*** म्हणजे त्यांच्याशी कसलाही संबंध नसलेला असा जो पुरुषविशेष तो ***ईश्वर*** होय.

निर्गुण, निराकार, निर्मल, सच्चिदानंदमय *शक्तिविशेष - व्यक्तिविशेष* म्हणजे परमेश्वर. तो सर्वज्ञ आहे. उत्पत्तिपूर्वी व प्रलयकालीही त्याचे ठिकाणी ***सार्वज्ञत्व*** बीजरूपाने असते. ***स्थलकालमर्यादातीत*** असा तो ईश्वर आहे. तो सर्वात प्राचीन मानलेल्या ब्रह्मादिक देवांचाही गुरू आहे. म्हणजेच ***"कृष्णं वन्दे जगद्गुरुम्"*** अशा श्रीकृष्णासारखाच हाही पतञ्जल्युक्त गुरू आहे.

गुरुतत्त्व म्हणजे सर्वांपेक्षा महान तत्त्व अथवा सर्वांचे उपदेशक तत्त्व! ते तत्त्व असे पतञ्जल्युक्त ईश्वराहून भिन्न नाही आणि तसेच गीतेच्या कृष्ण ईश्वराहूनही वेगळे नाही.

"कृष्णं वन्दे जगद्गुरुम्"

आपले असे हे स्वरूप स्पष्ट करत भगवंत अर्जुनाला सांगतात कीः

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया।।४-६।।
न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते।।४-१४।।
इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।४-१।।

त्रिकालाबाधित योगतत्त्वाचे सूर्याला ज्ञान देणारा; ज्ञानपरंपरेचे सर्जन करणारा; जन्मरहित; अविनाशी; सर्व प्राणिमात्रांचा प्रभू असणारा; अजन्मा असूनही समयावश होत्साता अवतार धारण करणारा; कर्मफलांची आसक्ती नसणारा; कर्मांनी बद्ध न होणारा असा हा ***ईश्वर*** आपणच असल्याचे श्रीकृष्ण सांगत आहेत.

कृष्ण हा असा ईश्वर गुरूंचाही गुरू व प्राचीनतम होय. तो असा आद्यवंद्य जगद्गुरू असल्यानेच, मोहग्रस्त होऊन सारासार विवेक नष्ट झालेल्या पार्थाने आपणास त्याने योग्य मार्ग दाखवावा म्हणून त्याची ***"शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।"*** अशी काकुळतीने विनवणी केली होती, हे आपणा गीताभ्यासकांस विदित आहेच! असो.

"तस्य वाचकः प्रणवः"

पतञ्जली म्हणतात की अशा या ईश्वराचा वाचक **ॐकार म्हणजे प्रणव** होय*(१-२७,पा.यो.सू.)*. ज्याने ईश्वराची स्तुती केली जाते - त्यास स्तविले जाते; ज्याने ईश्वराची ओळख होते; त्याचा बोध होतो;

तो प्रणव! या प्रणवाचा म्हणजे ॐकाराचा जप करावा व ॐकाराने निर्देशिलेला - ॐकाराचा *अर्थमात्र* - असा जो ईश्वर आहे; त्याचे भावन करावे. ***भावन करणे म्हणजे "तो माझ्या अंतर्यामी आहे; व तो व मी दोघे एकच आहोत"*** अशी सतत भावना ठेवावी; या भावनेचे चित्तास ध्यानविषय म्हणून सातत्याने आलंबन ठेवावे.

पतञ्जलींनी ईश्वराचा बोध ***ॐ*** काराने म्हणजे प्रणवाने करून दिला आहे. यावरून सहजच आपले लक्ष श्रीज्ञानदेवांच्या ***"ॐ नमो जी आद्या।"*** या ओवीकडे वळते. ज्ञानदेवीची ही पहिलीच ओवी किती सूचक आहे ते पहा! ज्ञानेश्वरीच्या मूलारंभी ॐकाराची योजना करून माउलींनी श्रीगीतेचा वास्तव अभिप्राय सहजच प्रकट केला आहे.

ॐकार हेच आद्यतत्त्व होय. *ॐकार* च ईश्वराचा वाचक असून त्याचा जप ईश्वराप्रत नेणारा आहे. **ईश्वरप्रणिधान करणे म्हणजे ईश्वरास नमन करणे. *"ॐ नमो जी आद्या"* म्हणून त्यास नमस्कार करत, *ईश्वरप्रणिधान* हाच श्रीगीतेचा सुस्पष्ट योगमार्ग असल्याचे दाखवत, श्रीज्ञानदेव आपणा सर्वांवर अतीव कृपा करण्यासाठी आपला सद्गुरुकृपांकित राजयोगाचा गगनमार्ग विशद करून सांगतात!!** त्यासाठीच त्यांनी आपल्या ज्ञानेश्वरी या अलौकिक ग्रंथाची रचना केली आहे. असो.

ॐकार आणि ईश्वर

श्रीकृष्ण भगवान या ॐकाराच्या अनुसंधानाचा ***अक्षरब्रह्मयोग*** श्रीगीतेच्या आठव्या अध्यायातून सांगतांना ***ॐकार (प्रणव)*** व ***ब्रह्म*** यांचा वाचक-वाच्यभाव स्पष्ट करत म्हणतात की:

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।८-१३।।

"***ओम् - ॐ*** या एकाक्षरी ब्रह्माचा उच्चार करून भगवंतांचे स्मरण करत देह सोडणाऱ्या योग्यास परमपद प्राप्त होते."

"१) तस्य वाचकः प्रणवः।।; २) तज्जपस्तदर्थभावनम्।। २-२७ व२८।।पा.यो.सू.।।" या पातञ्जलयोगसूत्रांचा जसा या गीताश्लोकात प्रत्यय येतो, तसाच *ॐकार* व ईश्वरसंबंधित पुढील योगसूत्रांचा प्रकाशही त्याच श्रीकृष्णोक्तीतून प्रस्फुटित होतांना दिसतो. ती सूत्रे अशी:

१) ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च।।१-२९।।पा.यो.सू.।।

"ईश्वरप्रणिधानामुळे प्रत्यक्‌चेतन बुद्धिसाक्षी अशा चैतन्यमय पुरुषाचा म्हणजे आत्म्याचा साक्षात्कार म्हणजे ***अधिगम*** होतो; त्याचे ज्ञान होते. योगमार्गातील अडथळे नष्ट होतात."

२) समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।।२-४५।।पा.यो.सू.।।

"ईश्वराच्या प्रणिधानाने आत्मसाक्षात्कार करून देणारा समाधि सिद्ध होतो."

यांवरून स्पष्ट होते की ***प्रणव* म्हणजे *ॐकार* आपणास ईश्वराचा साक्षात्कार घडवून आणतो, हे श्रीगीता व पातञ्जलयोगसूत्रे या दोन्ही शास्त्रांस उभयमान्यच आहे.**

योगयुक्त चित्त

या सर्व विवरणावरून ***पातञ्जलयोगसूत्रे* व *श्रीगीता*** या दोन्ही शास्त्रातील महत्त्वाच्या योगासंबंधित बाबी किती एकसारख्याच आहेत, हे स्पष्ट होईलच. तसेच श्रीगीता हीसुद्धा मूळ म्हणजे योगशास्त्राच्या उपासकांकरताच पातञ्जलयोगसूत्रांप्रमाणेच सांगितलेली असल्याचे पण आपणांस सहजच दिसून येते.

खरे तर समरप्रसंगी गीता सांगितली गेली. त्या घाईगर्दीच्या वेळी श्रीकृष्णांनी ती स्वमुखाने अर्जुनास उद्बोधली आहे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे नंतर *शांतिपर्वा*त म्हटल्याप्रमाणे श्रीकृष्णानी गीता अत्यंत योगयुक्त चित्ताने सांगितली होती. योगयुक्त चित्तास सर्वसामान्यांच्या क्षिप्त-विचलित चित्ताच्या मापाने तोलून, युद्धाच्या भाऊगर्दीत एवढे प्रत्ययकारी अध्यात्मज्ञान कसे प्रदान केले जाऊ शकेल, असा आक्षेप घेणे म्हणूनच योग्य नाही.

स्थलकालाच्या मर्यादा लागू नसणाऱ्या योगयुक्त चित्तासाठी अशक्य असे काहीच नाही ही गोष्ट याविषयी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. श्रीमद्भागवतातील श्रीकृष्ण व ब्रह्मदेव यांच्याविषयींची गोप- धेनु-वत्सहरण कथा लक्षात घेतल्यास हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. असो.

योगसिद्धी::::

ज्ञप्तिमात्र अवस्था

श्रीगीता ज्या प्रसंगी सांगितली त्यावरून आणखी एक मुद्दा स्पष्ट होतो. **श्रीगीतेचा भर काष्ठ समाधीवर नसून चालतीबोलती साक्षात अद्वय अवस्था असलेली सजीव साक्षात्कारी समाधि अर्जुनास प्राप्त करून देऊन त्याच अवस्थेत त्याच्याकडून निकराचे युद्ध करून घेण्यावर तो होता.**

प्रसंगविशेषाने जरी अर्जुनाला अशी समाध्यवस्था प्राप्त करून देणे भगवंतांना आवश्यक वाटले असले, तरी त्यांचे गीतेतील एकूण मत व उपदेश लक्षात घेता हीच समाध्यवस्था त्यांना उत्तम वाटते, असेच दिसते. अशा या समाध्यवस्थेविषयी श्रीपतञ्जली व श्रीगीता यांचे विचार अधिक साक्षेपाने पाहू.

ईश्वरप्रणिधानामुळे चैतन्यमय पुरुषाचा वा आत्म्याचा साक्षात्कार होतो असे पतञ्जली म्हणतात ***("ततः प्रत्यक्चेतना...।।१-२९।।पा.यो.सू.।।")***.

कैवल्यप्राप्तीबाबत ते म्हणतात:

तद्भावात्संयोगाभावो हानं तद् दृशेः कैवल्यम्।।२-२५।।पा.यो.सू.।।

"द्रष्टा व दृष्य यांचा संयोग अविद्येमुळे होतो. ती अविद्या नष्ट झाली म्हणजे द्रष्टा व दृश्य यांचा संयोगही नष्ट होतो. यालाच ***हान***

असे म्हणतात. या **हानामुळे दृशिरूप आत्म्याचे म्हणजे ज्ञानरूप द्रष्ट्याचे केवळ ज्ञानरूपाने अस्तित्व जाणवते. याच अवस्थेसाठी ज्ञानदेव *ज्ञप्तिमात्र* उरणे किंवा राहणे असा शब्दप्रयोग करतात. असो.**

त्रिपुटीचा लोप

दृश्य व द्रष्टा या दोन्हींचाही अभाव म्हणजे *समाधि* ***("तद्‌भावात्संयोगा.... ।।२-२५।।पा.यो.सू.।।").*** श्रीगीता व ज्ञानेश्वरी यातही हीच कल्पना अध्याहृत आहे. तसेच श्रीज्ञानदेवांनी अमृतानुभवातून ही संकल्पना पूर्णांशाने विकसित केली आहे व परिपूर्णतेला गेलेला समाधि कसा असतो, त्याचे समग्र वर्णन त्यात येते. वानगीदाखल ***स्वामी स्वरूपानंद***ांच्या अमृतानुभवावरील पुढील ओव्या पहा:

तैसें भोग्य - भोक्ता। दृष्य आणि द्रष्टा।
अफूट अद्वैता-। माजी एक।।९-९।।
भोग्य आणि भोक्ता। ऐसा नाही भेद।
एकचि अखंड। ज्ञप्तिमात्र।।९-१०।।

।।अभंग अमृतानुभव, स्वामी स्वरूपानन्द।।

"दृश्य, द्रष्टा व दर्शन ही त्रिपुटी लोपली म्हणजे कैवल्याशिवाय काही उरत नाही."

याच कैवल्यावस्थेचा पतञ्जली अत्युत्कृष्ट समाध्यवस्था म्हणून सन्मान करतात! हीच कैवल्यावस्था माउली श्रीज्ञानदेव गीता-ज्ञानेश्वरी व आपले अनुभव यांद्वारे प्रकाशित करतात!! असो.

धर्ममेघ समाधि व धर्म्यामृत

यानंतर पातञ्जलयोगसूत्रे व गीता यातील अजून एक साम्यस्थल पाहू या:

१) प्रसंख्यानेऽप्यकुसिदस्य सर्वथा विवेकख्यातेर्धर्ममेघः समाधिः।।४-२९।।पा.यो.सू.।।

२) ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।१२-२०।।

विवेकख्यातीमुळे प्राप्त झालेला धर्ममेघरूप समाधि ज्या सुखाचा वर्षाव करतो, त्याचा योगी व्यक्तिगत स्वार्थासाठी फायदा करून घेत नाही; किंबहुना त्यातून काही स्वार्थ साधावा अशी इच्छाही त्यास स्पर्शत नाही, असे पतञ्जली म्हणतात. पण या कल्पनेचा खरा अर्थ गोपालकृष्ण गीतेत सांगतात तो असा:

"धर्मरूपी धारामृत प्राप्त झालेला योगी माझा परम श्रद्धावान भक्त होतो. तो मला अतिशय प्रिय असतो. धर्ममेघाची अमृतधारा बरसू लागली की तिचा स्वत:करता उपभोग घेण्याचे भक्तांच्या मनातही येत नाही. त्या अमृताचा केवळ एकच विनियोग करणे ते जाणतात. तो म्हणजे ते अमृत भगवंतालाच श्रद्धापूर्वक अर्पिणे आणि त्या अमृतधारेने भगवंतावर संतत अभिषेक करणे!"

"तत्कुरुष्व मदर्पणम्।"

भक्तांचे सर्व भगवंताप्रीत्यर्थच असते. त्यामुळे ते जे काही करतात, त्यात त्यांना भगवंतांचे दर्शन होत असते. म्हणून त्यांची कोणतीही कृती किंवा इच्छा स्वत:चीच असल्यासारखे लौकिक जनांना सकृद्दर्शनी दिसले, तरी ती एकमात्र प्रभुसाठीच असते. भक्त भगवंत एकरूप झाल्यावर भक्ताची इच्छा किंवा कृती म्हणजे भगवंताचीच इच्छा व कृती होते. भगवंत भक्तांच्याच रुपाने सगुण साकार होत कर्मे करतांना तेव्हा दिसतो. भगवंतांचे अपार गुणनिधान भक्तांना स्वाभाविकतयाच प्राप्त होत असते व म्हणूनच विश्वाच्या चालक ईश्वराची सत्ता, ऐश्वर्य व सामर्थ्य आपोआपच त्यांच्या ठायी दृग्गोचर होतात.

पतञ्जलींच्या सूत्राप्रमाणे ***प्रसंख्यान*** म्हणजे इतर सर्व तत्त्वाहून आत्मा वेगळा आहे असे निश्चित ज्ञान होणे ; तसा अनुभव येणे. तो अनुभव आल्यानंतरही त्या अनुभवाचा स्वत:च्या किंवा इतरेजनांच्या लाभाकरता उपयोग न करता योगी निव्वळ आत्मानंदात मग्न असतो. या अवस्थेला पतञ्जली ***विवेकख्याति*** किंवा ***धर्ममेघ समाधि*** म्हणून संबोधतात.

श्रीकृष्णभगवानही गीतेच्या बाराव्या अध्यायातील *श्लोक क्र. १३ ते १९* ***(अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः कारुण.........।......अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः।।)*** मध्ये शान्ति प्राप्त झालेल्या भक्तांची - योग्यांची लक्षणे वर्णन करून ***"ये तु धर्म्यामृत.....।।१२-२०।।"*** या श्लोकात भगवंत म्हणतात की "माझे भक्त मी सांगितलेल्या स्थितीत प्रेमादरपूर्वक राहून या धर्म्यामृतधारेचे मजप्रीत्यर्थ निष्काम अंत:करणाने सेवन करतात; ते मला अत्यंत प्रिय होतात."

अद्वेष्टादी भक्तलक्षणे हेच सूचित करतात की हे भक्त निरहंकारी असतात. त्यामुळे स्वार्थ कसा तो ते ओळखतच नाहीत. अर्थातच ही धर्म्यधारा ते सेवतात, ती केवळ त्या अंत:स्थ परमेश्वराच्या तृप्तीसाठीच!!

ईश्वरप्रणिधान हाच योगाचा गाभा

याप्रमाणे श्रीपतञ्जली त्यांच्या योगसूत्रांद्वारे जे सांगतात त्याची स्थूलरूपाने श्रीकृष्णांच्या गीतोक्तीशी आपण तुलना करून पाहिली. त्यावरून असे दिसून येते की दोघांच्या योगदर्शनात व मतात विलक्षण साम्य आहे.

संपूर्ण गीतेचे परिशीलन केले की कळून येते की पतञ्जलिप्रणीत समाधि प्राप्त करण्याचे आणि कैवल्यप्राप्तीचे जे आलंबनवषयक वेगवेगळे उपाय अथवा प्रयोजने आहेत; त्यातील ***ईश्वरप्रणिधान*** हा उपाय सर्वात सुलभ असल्याने व स्त्री-शूद्रादिकांनाही सहज चोखाळता येण्यासारखा असल्याने भगवंतांनी प्रशंसिला आहे आणि सर्व प्राणिमात्रांनी याच मार्गाने जावे असे आग्रहपूर्वक त्यांनी प्रतिपादिले आहे.

या दृष्टिकोनातून पाहिले तर पतञ्जलींनी योगशास्त्राची सूत्रात्मक विज्ञानशलाका निर्मिली आणि तिची उकल करून त्यातले कोणते प्रयोग लवकर सफल होणारे आहेत, हे अर्जुन व सञ्जय यांचे गीतोपदेशाने जे शाश्वत कल्याण केले त्यावरून भगवंतांनी सोदाहरण सिद्ध करून दाखवले आहे. ***ईश्वरप्रणिधान*** **हा योगोपाय सुलभ व सर्वोत्कृष्ट असल्याचे आपणास त्यावरून दिसून येते.**

याच ईश्वरप्रणिधानातून श्रीगीतेचे व श्रीज्ञानदेवीचे कर्मयोग, कुंडलिनीयोग, ज्ञानयोग व भक्तियोग उगम पावतात. ते तसे वेगवेगळे नाहीतच. मूलतः *ईश्वरप्रणिधान* हाच भक्तिप्रधान मार्ग असल्याने व पातञ्जलयोगदर्शनानुसार हा योगांतर्गतच येत असल्याने या योगांना *कर्मभक्ती, योगभक्ती, ज्ञानभक्ती व अद्वयभक्ती* असेही म्हटले तरी चालेल.

श्रीगीतेचा हा जो भावार्थ आहे, तो कालमानाने विद्वानांच्या तसेच लोकांच्या स्मृतीतून नाहीसा झाल्याने श्रीज्ञानदेवांच्या मुखाने परत एकदा श्रीज्ञानदेवी ही ***लोकगीता*** प्रसृत करून तो श्रीकृष्ण परमात्म्याने पुनः आपल्यापर्यंत आणून पोहचवला आहे. ज्ञानदेवीस्वरूपा अशी या धर्म्यामृताची ही ओजस्वी धारा ज्या कोणाच्या मुखी पडेल, तोच खरा भाग्यवंत!! असो.

समारोप

यानंतर गीता व ज्ञानेश्वरीच्या ठळकठळक विषयांचा परिचय करून घेण्यासाठी पुढल्या ***उन्मेष:७ -गीता व ज्ञानेश्वरी परिचय*** याकडे वळू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष:७::
::गीता व ज्ञानेश्वरी परिचय::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::::उन्मेष ७::::
::गीता व ज्ञानेश्वरी परिचय::

गीता अध्यायगत विचार::::

गीतेचा अनुबंध

यानंतर पुढील विवेचनाकडे वळण्याआधी श्रीगीतेच्या सर्व अध्यायातील ठळक ठळक विचारचित्रांची धावती पटशलाका पाहू याः

अध्याय(१) - कौरव पांडव रणांगणावर युद्धोन्मुख होऊन उभे राहिले. त्या प्रसंगी आप्तस्वकीयांशी युद्ध करून कुलक्षय व धर्मबाह्य वर्तन होईल या भीतीने अर्जुन धनुष्यबाण टाकून शोकाकुल झाला व आपणास कोणत्याही परिस्थितीत ***युद्ध करावयाचे नाही*** या निर्णयाप्रत पोहोचून हताश होऊन बसला.

अध्याय(२) - अर्जुनाचा शोक पाहून श्रीकृष्ण त्याला वेदान्त सांगतात की ***"आत्मा शाश्वत आहे."*** देह नश्वर आहे हे ओळखून त्याने युद्धासाठी परत सज्ज व्हावे; ज्ञानी मनुष्य जसा कोणत्याही भावनावेगापासून अलिप्त असतो, तसे होऊन लाभहानीचा विचार न करता त्याने युद्ध करावे; असा श्रीकृष्ण त्याला उपदेश करतात.

अध्याय(३) - ***लोकसंग्रह*** करण्यासाठी ज्ञान्यानेही कर्म करणे जरूर आहे. फलेच्छा सोडून ते कर्म त्याने केल्याने धर्माचे रक्षणच होते.

अध्याय(४) - परमेश्वराच्या अवतारांचे प्रयोजन म्हणजे दुष्टांचा विनाश व साधुसंतांचे परिपालन असते. ***अवतारी पुरुष*** जे जे कर्म करतात, ते ते फलासक्ती नसल्याने त्यांना बंधनकारक होत नाही. भूतांचा एकमात्र नियंता जो परमेश्वर, त्याला ***अनासक्त बुद्धीने केलेली सर्व कर्मे अर्पण करावी.***

अध्याय(५) - सर्व कर्मे निरहंकारी होऊन, सर्व भूतांप्रती समता बाळगून, रागद्वेषांचा त्याग करून करावीत. भूतकाळाची वा भविष्याची चिंता मनात न बाळगणाऱ्या व स्थिरमती आणि निःसंकल्प अशा पुरुषासच ***खरा संन्यासी*** म्हणावे.

अध्याय(६) - ***चित्ताचा निरोध*** करून परमात्म्याशी एकरूपत्व प्राप्त करण्याचा ***योगमार्ग*** सांगून जो पुरुष आपपर भावरहित आहे; जो सर्वदा भगवंतास सप्रेम भजतो व सर्वांभूती सम राहून भगवंतातच चित्त लावतो, तोच ***उत्तम योगी*** होय, असे निरूपण केले आहे. ***योग - भक्ती - ज्ञान*** या त्रयीचे अतूट संबंध यातून स्पष्ट होतात.

अध्याय(७) - सारी ***सृष्टी*** भगवंताच्या ***प्रकृती***ने झाली. सर्वांतर्यामी परमेश्वरच आहे. परंतु मायाग्रस्त जीवांस त्याची ओळख पटत नाही, हे जाणून सतत भगवंताचे चिंतन जे करतात, ते त्यालाच प्राप्त होतात.

अध्याय(८) - मन स्थिर, शुद्ध व निःशंक ठेवून जे आपल्या ***हृदयरूपी कमळात (आध्यात्मिक हृत्कमलात)भगवंताचे ध्यान*** करतात, त्यांची गती अंती भगवंतातच होते.

अध्याय(९) - भक्तीने भगवंतास जे काही ***जल, पुष्प, पत्र, फल अर्पिले जाते,*** त्याचा तो मोठ्या आवडीने स्वीकार करतो. भगवंताच्या कीर्तनात रंगलेले व ज्यांच्या मुखी सतत विष्णु, कृष्ण, हरी, गोविंद, माधव, मुकुंद, नारायण असे नाम असते, ते धन्य होत.

अध्याय(१०) - ***भगवंताचे चिंतन, स्मरण, कीर्तन*** इ.करण्यासाठी आलंबनविषय म्हणून त्याच्या मुख्यमुख्य ***विभूति*** वर्णन केलेल्या आहेत. सर्वांभूती असणारा,माता, धाता, विष्णु, शिव, रवी इ.सर्व तोच आहे. विश्वरूपाने प्रभूच नटला आहे. सर्व जगात त्याचीच सत्ता असून ***त्याचे रूप दिव्याद्भुत आहे.***

अध्याय(११) - पार्थाने श्रीकृष्णास विनविल्यामुळे त्याला आपले ***विश्वरूप*** दाखविले. अर्जुन ते पाहून भयाकुल झाला; म्हणून त्याला परत आपले गोजिरे रूप दाखविले. पण विश्वरूपाचे महत्त्व त्याने विसरू नये, असे उपदेशिले. यज्ञ, दान, तप, क्रिया या कशानेही विराट विश्वरूपाचे दर्शन होऊ शकत नाही. भगवंताच्या अनन्य भक्तांसच फक्त ते होऊ शकते.

अध्याय(१२) - ***सगुण*** म्हणजे नाना प्रकारच्या विभूतिमत्त्वांच्या उपासनेचा मार्ग चांगला की ***निर्गुण, निराकार, विराट, अव्यक्त*** अशा विश्वरूपाची उपासना - पर्यायाने निरुपाधिक ब्रह्माची ***उपासना*** सोपी हे स्पष्ट करतांना योगप्राप्ती जरी दोन्हीद्वारे शक्य असली, तरीही ***सगुण, साकार ईश्वराचीच भक्ती सुलभ व विनासायास फल देणारी आहे*** असा श्रीकृष्णांनी तिचा गौरव केला आहे.

अध्याय(१३) - ***क्षेत्र - क्षेत्रज्ञ, प्रकृति - पुरुष यांचे ज्ञान*** होऊन जो प्रकृतीपलीकडील पुरुषास जाणतो व सर्वांठायी समत्व बाळगतो; त्याला कर्मे बाधक होत नाहीत; तो ***भगवत्स्वरूप पावतो.***

अध्याय(१४) - सत्त्वरजतमात्मक ***त्रिगुणी*** मायेने जीवांच्या सर्व संसारचेष्टा चालतात. त्रिगुणातीत परमेश्वराला जाणून त्याची अव्यभिचारी भावाने भक्ती करणाऱ्यास ब्रह्मभाव प्राप्त होतो.

अध्याय(१५) - **संसाररूपी अश्वत्थवृक्षा**स असंग होऊन तोडून टाकावे. क्षराक्षरापलीकडील **आदितत्त्व उत्तम पुरुषा**स शरण गेले असता मनुष्य कृतार्थ होतो.

अध्याय(१६) - ***दैवी आणि आसुरी संपत्ती***ची लक्षणे, तसेच दैवी संपत्ती मोक्षकारक व आसुरी बंधनाचे कारण आहे, असे सांगून धर्मशास्त्रविहित आचरणाचा मार्गच प्रशस्त असून तो वाखाणला आहे.

अध्याय(१७) - मनुष्यांची ***श्रद्धा,*** त्यांची उपासना व तप, त्यांचे यज्ञ, त्यांनी केलेली दाने व त्यांचे आहारविहारादी हे सर्व व्यापार कर्त्याच्या प्रकृतीनुसार ***सात्त्विक, राजसी वा तामसी*** असतात. उत्तम सात्त्विक बुद्धीने युक्त होऊन ***सर्व कर्मे ईश्वराशी युक्त करून ईश्वराप्रीत्यर्थ करून ईश्वरार्पण करावीत.*** म्हणजे श्रेष्ठ गती प्राप्त होते.

अध्याय(१८) - अर्जुनाच्या विनंतीनुसार त्याला सर्व ज्ञान-विज्ञान सांगितले; त्याला विराट रूपही दाखवले. यामुळे त्याचा मोह गेला का म्हणून श्रीकृष्णांनी खात्री करून घेतली. ***अर्जुन कृष्णप्रसादाने कृतार्थ झाला व पुन: युद्धासाठी सज्ज झाला.*** त्याच्या सर्व शंका फिटल्या. असा ***भक्त व त्याचा भगवंत जेथे आहेत, तेथेच वैभव, विजय, संपत्ती, अढळ नीती व धर्म यांचा निवास असतो.***

एकशे नऊ ओव्यातून ज्ञानेश्वरी सार::::

नित्यपाठज्ञानेश्वरी

गीतेचे असे हे संक्षिप्त मानचित्र आपण पाहिले. त्यावरून गीतेतील मूलभूत विषय आपल्या निदर्शनास आले. गीता समजावून घेण्यासाठी श्रीज्ञानदेवीसारखा समर्थ ग्रंथ आढळणे दुष्करच आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ जवळ जवळ *१०३३* ओव्यांचा आहे. त्याच्या अंतरंगात आपण आता प्रवेशत आहोत.

ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या स्वामी स्वरूपानंदांनी आपल्या ***नित्यपाठज्ञानेश्वरी*** या वेच्यात संकलित केल्या आहेत. गीतार्थप्रबोधक आणि योगमार्गाचे निर्देशन करणाऱ्या वेचक अशा त्या आहेत. ज्ञानेश्वरीच्या सारांशरूप अशा त्या ओव्या आहेत. त्यांच्या आधारे पण आपल्या क्रमानुसार आपण ज्ञानेश्वरीचा अभिप्राय आपण प्रथम पाहू या. म्हणजे पुढील विषयात अवगाहन करणे सुलभ होईल. अर्थातच या ओव्या आपण आपल्या विषयानुक्रमानेच घेणार आहोत. स्वामींचा क्रम सर्वत्र तसाच राहील असे नाही. तसेच प्रस्तुत ग्रंथकर्त्याने केलेला या ओव्यांचा अर्थ व त्यांवरील निरूपण सर्वथैव स्वतंत्र असेच आहेत.

नमन

ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।
देवा तूचि गणेशु। सकल मति प्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।१-२।।
आतां अभिनव वाग्विलासिनी। जैं चातुर्यार्थकलाकामिनी।
तैं श्रीशारदा विश्वमोहिनी। नमिली मियां।।१-२१।।
मज हृदयीं सद्गुरु। जेणे तारिलो हा संसारपुरु।
म्हणौनि विशेषें अत्यादरु। विवेका वरी।।१-२२।।

"जो देव ***ॐकारस्वरूप,*** वेदप्रतिपाद्य, आद्य, स्वसंवेद्य व आत्मरूप असा आहे, त्याचे स्मरण करू. हाच सर्वार्थप्रकाशक असा ***श्रीगणेश*** आहे. नित्यनवनिर्माणकर्त्री, सर्जनाने विश्वसंभ्रम निर्माण करणारी व प्रसन्न झाल्यास विश्वरूपात्मक ईश्वराचा साक्षात्कारही करून देणारी आणि ***कुंडलिनी*** स्वरूपाने देहात विद्यमान असणारी जी श्रीशारदा आहे, तिचेही स्तवन करू या. भक्तहृदयनिवासी श्रीजगन्नाथाच्या कृपेने संसारमहानदाचा पूर ओसरतो व आत्मज्ञान प्रकटते. हाच ***सद्गुरू*** आहे."

याप्रमाणे ओंकारयुक्त परब्रह्मतत्त्व, नवनवोन्मेषशालिनी कुंडलिनीस्वरूपा श्रीशारदा जी प्रकृतीच आहे आणि प्रतिभावान श्रीगणेश यांचे हृदयस्थ श्रीकृष्ण परमात्मरूपी श्रीसद्गुरू यांसह स्मरण करत श्रीज्ञानदेव गीतार्थ प्रकट करण्यास उद्युक्त होतात.

कुंडलिनी जगदंबा

यानिमित्ताने एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घतली पाहिजे. ती म्हणजे श्रीज्ञानदेवांनी *सहाव्या* अध्यायात वर्णन केलेला ***अष्टांगयोग*** वा ***ध्यानयोग*** हा निव्वळ **स्वकेंद्रित *हठयोग*** नसून ईश्वरप्रणिधानाने व सद्गुरुकृपेने साधलेला कुंडलिनी जगदंबेचा आत्मकृपायोगच होय. निव्वळ हठयोगी ईश्वरप्रणिधानाचा आधार घेत नसतो, तर तो अंतःस्थ नाडिचक्रांच्या केवळ यौगिक प्रक्रियांद्वारे प्राणापानाचा जय साधून ब्रह्मरंध्राचे गौरीशिखर जिंकून घेणारा; निरीश्वर, निराकार, निर्गुण ब्रह्माचा उपासक असतो.

परंतु सगुण साकार देहाच्या मदतीने ही उपासना करणे जड व दु:खद होते. म्हणून सगुण देहधाऱ्यांसाठी ***ईश्वरप्रणिधान व सद्गुरुकृपायुक्त कुंडलिनीअधिष्ठीत योगमार्ग*** च, जो साधकांच्या सायासावाचून व आपोआप प्रकटतो, तोच श्रीकृष्ण *बाराव्या* अध्यायी प्रशंसितात. असो.

चैतन्य

यानंतर ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकणाऱ्या काही समर्थ ओव्या पाहू:

या उपाधिमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत।
तैं तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।२-२१६।।
उपजें तैं नाशे। नाशिलें पुनरपि दिसे।
हे घटिकायंत्र तैसें। परिभ्रमें गां।।२-१५९।।

"विश्व म्हणजे उत्पत्तिविनाशाचे संतत भ्रमण करणारे एक चक्रच होय. यातच सहजासहजी दृग्गोचर न होणारे चैतन्यतत्त्व, जे विश्वाचे मूळ आहे, ते गुप्तरीत्यां वसते. त्या चैतन्याशी एकरूपता पावून तत्त्वज्ञानी संत अद्वयानुभूती प्राप्त करून घेतात."

कर्मयोग

ही अद्वयानुभूती प्राप्त करून घ्यावी; कर्म तर अटळच आहे; मग ही अनुभूती कर्मबंधात न पडता कशी यावी, यासाठी पुढील कर्मयोगाचे रहस्य स्पष्ट करणाऱ्या ओव्या पाहा:

जैसें मार्गेचि चालतां। अपावो न पवे सर्वथा।
कां दीपाधारें वर्ततां। नाडळिजे।।२-१८७।।

तेयापरी पार्था। स्वधर्मे राहाटतां।
सकलकामपूर्णता। सहजें होय।।२-१८८।।
सुखीं संतोषा न यावें। दुःखें विषादा न भजावें।
आणि लाभालाभ न धरावें। मनामाजीं।।२-२२६।।

"ज्याप्रमाणे रूळलेल्या वाटेने जातांना काही त्रास होत नाही; अथवा दिवा घेऊन अंधारात वावरतांना माणूस अडखळत नाही; त्याप्रमाणे स्वधर्माचरण करण्याने सहजगत्या सर्व कामना सफळ होतात. ***स्वधर्माचरण*** करतांना लाभालाभाची पर्वा करू नये. सुख झाल्यास संतोष मानू नये. दु:ख झाल्यास विषाद करू नये."

आपणयां उचितां। स्वधर्मे राहाटतां।
जैं पावें तैं निवांता। साहौनि जावें।।२-२२८।।
आम्हीं समस्तही विचारिलें। तंव ऐसेंचि हे मना आले।
जैं न सांडिजे तुवां आपुलें। विहित कर्म।।२-२६५।।
परि कर्मफलीं आंस न करावी। आणि कुकर्मीं संगति न व्हावीं।
हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूविण।।२-२६६।।

"स्वधर्माचरणाचे जे काही भलेबुरे फळ प्राप्त होईल, ते शांतपणे सहन करावे. ***मानवाच्या कल्याणाकरता निर्मिलेली सर्व शास्त्रे एकमुखाने हेच सांगतात की मनुष्यमात्राने आपले विहित - नियत कर्म करणे सोडू नये.*** निषिद्ध म्हणजे अविहित कर्मे करू नयेत. कर्मफलाची आसक्ती धरू नये."

तूं योगयुक्तु होऊनि। फलाचा संगु टाकूनि।
मग अर्जुना चित्त देऊनि। करी कर्मे।।२-२६७।।
परि आदरिलें कर्म दैवें। जऱ्हीं समाप्तितैं पावे।
तऱ्हीं विशेषें तोखावें। हेही नको।।२-२६८।।
कीं निमित्तें कोणें एकें। तैं सिद्धि न वचतां ठाकें।
परि तेथिचेनि अपरितोखें। क्षोभावें ना।।२-२६९।।

"पण तरीही प्राप्त कर्मे कौशल्यपूर्वक पार पाडावीत. ***कर्मे योगयुक्त चित्ताने दक्षतापूर्वक करावीत.*** परंतु कार्यसिद्धी झाली तर विशेष आनंद मानू नये व न झाली तर विषादही वाटून घेऊ नये."

देखें जेतुलालें कर्म निफजें। तेतुलें आदिपुरुखीं अर्पिजें।
तऱ्हीं परिपूर्ण सहजें। जाहले जाण।।२-२७१।।
म्हणौनि जैं जैं उचित। आणि अवसरें करूनि प्राप्त।
तें कर्म हेतुरहित। आचरें तूं।।३-७८।।

"जे जे कर्म प्राप्त होईल ते ते फलासह आदिपुरुषाला - भगवंताला अर्पण करावे. म्हणजे ते आपोआपच पूर्णत्वास जाते. म्हणून अवसरेकरून जे जे विहित कर्म प्राप्त होते, ते ते हेतुरहित होऊन आचरावे."

स्वधर्माचरण

देखे अनुक्रमाधारें। स्वधर्मु जो आचरे।
तो मोक्षु तेणें व्यापारें। निश्चित पावे।।३-८०।।
स्वधर्मु जो बापा। तो नित्ययज्ञु जाण पां।
म्हणौनि वर्ततां तेथ पापा। संचारु नाही।।८१।।
हा निजधर्म जैं सांडें। आणि कुकर्मीं रति घडे।
तैंचि बंध पडें। सांसारिक।।८२।।
म्हणौनि स्वधर्मानुष्ठान। तैं अखंड यज्ञयाजन।
जो करीं तेयां बंधन। कहींचि न घडे।।८३।।

"परंपरागत युक्तीने स्वधर्माचे आचरण करण्याने मनुष्याला निश्चितच मोक्ष प्राप्त होतो. स्वधर्माचरण हा नित्य उपासण्याचा ***यज्ञ*** आहे. तो म्हणजे अखंड यजन आहे. स्वधर्मानुष्ठान करणाऱ्यास संसारबंधन पडत नाही. परंतु निष्कामकर्माचा हा स्वधर्ममार्ग सोडून कामनायुक्त कर्मे करणाऱ्यास संसारबंधन पडते."

"स्वकर्मकुसुमां"नी ईश्वरपूजा

कर्मयोगाचे सिद्धान्त अधिक स्पष्ट करणाऱ्या या पुढील ओव्या पहा:

अगां जेयां जैं विहित। तैं ईश्वराचें मनोगत।
म्हणौनि केलियां निभ्रांत। सापडेचि तो।।१८-९११।।
तैं विहित कर्म पांडवा। आपुला अनन्य बोलावा।
आणि हेंचि परमसेवा। मज सर्वात्मकाचीं।।१८-९०६।।
तेयां सर्वात्मकां ईश्वरां। स्वकर्मकुसुमांची वीरा।
पूजा केली होय अपारा। तोषालागीं।।१८-९१७।।

"ईश्वराने प्रत्येकासाठी कर्मे विहित केली आहेत. वर्ण-आश्रम-प्रकृति यांद्वारे निर्दिष्ट केलेली कर्मे हीच प्राणिमात्रांचा जीवनाधार - मूलाधार होत. निभ्रांत मनाने म्हणजे कर्मफलांचा लोभ न धरता ती केली म्हणजे ईश्वराची प्राप्ती होते. ***निष्काम कर्माचरण हीच सर्वात्मक ईश्वराची परम सेवा होय.*** स्वविहित कर्मरूपी कुसुमांनी विश्वरूप चैतन्याची पूजा करण्याने ते आत्मचैतन्य अपार संतोषते."

तैं क्रियाजात आघवें। जैं निफजैल जैसें स्वभावें।
तैं भावना करूनि करावें। माझियां मोहरां।।९-४००।।
आणि हे कर्म मी कर्ता। कां आचरैन या अर्था।
ऐसा अभिमान झणें चित्ता। रिगों देसीं।।३-१८७।।

"ही पूजा करण्याचा विधी असा आहे: जे जे काही कर्म आपल्यापुढे उभे ठाकेल, ते ते कोणत्याही प्रकारचे असले तरी ईश्वराप्रीत्यर्थ आपण करतो आहोत ही भावना ठेवून ईश्वरार्पण बुद्धीने करावे. कर्म करत असता कर्मही ईश्वरच व कर्ता पण ईश्वरच असे समजून वागावे ."

तुवां शरीरपरां नोहावें। कामनाजात सांडावे।
मग अवसरोचित भोगावें। भोग सकल।।३-१८८।।
तूं मानसीं नियमु करीं। निश्चलु होय अंतरीं।
मग कर्मेंद्रियें व्यापारीं। वर्ततु सुखें।।३-७६।।
परिस पां सव्यसाची। मूर्त्ति लाहूनि देहाचि।
खंती करिती कर्माची। तैं गांवढें गां।।३-१४५।।

"सर्व प्रकारच्या कामनांचा त्याग करून देहबुद्धी सांडून जे काही भोग शरीराला व मनाला प्राप्त होतील, ते उपभोगावे. पण त्या वेळी मी उपभोक्ता, मी कर्ता, ही भावना ठेवू नये. अंतर्यामी निश्चल होऊन तटस्थ वृत्तीने मन विषयात आसक्त होऊ न देता कर्मेंद्रियांना सुखाने त्यांचा धर्म आचरू द्यावा. कारण ***नैष्कर्म्य*** म्हणजे कर्मत्यागच ही चुकीची कल्पना धरून बसून कर्म करण्याची खंत बाळगणारे लोक अज्ञानी होत."

देख पां जनकादिक। कर्मजात अशेख।
न सांडितां मोक्षसुख। पावते जाहलें।।३-१५२।।

"देहधारी प्राण्यांस कर्म हे आवश्यक कर्तव्य आहे. जनकादिक महाज्ञानी असूनही कर्मे करणे न सोडताच सर्व व्यवहार उत्तमरीत्या पार पाडून मोक्षाचे धनी झाले. त्यांचा आदर्श समोर ठेवून मनुष्याने **आपले विहित कर्म आदरपूर्वक *ईशसेवा* म्हणून करावे.**"

जीवन्मुक्तांचे कर्म व कर्तव्य

देहतादात्म्यबुद्धी नष्ट झालेल्या जीवन्मुक्तांनाही कर्तव्यकर्मे करतच राहावे लागते.

देखे प्राप्तार्थ जाहलें। जैं निष्कामता पावलें।
तेयांही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं।।३-१५५।।
मार्गी अंधासरिसा। पुढें देखणाही चालें तैसां।
अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा। आचरौनि।।१५६।।

"आत्मरूप झाल्याने जे कृतार्थ झाले त्या महात्म्यांनादेखील लोकशिक्षण व लोकसंग्रहासाठी कर्तव्य करावे लागते. म्हणायचे झाल्यास हे कर्तव्य म्हणजेच त्यांचा उर्वरित प्रारब्धभोग समजावा. कारण भगवद्दर्शन झालेल्यास संचित, क्रियमाण व प्रारब्ध उरत नाही, असे म्हटले जाते. तरी देह असेस्तोवर, अंधांना जसा डोळस मनुष्य पुढे चालून मार्ग दाखवतो, त्याप्रमाणे अज्ञानी संसारी लोकांना सद्धर्म कळावा म्हणून, ***ज्ञान्यांस कर्म करण्याची युक्ती प्रकट करावी लागते."***

एथ वडील जैं जैं करिती। तेयां नामु धर्मु ठेविती।
तैंचि येर अनुष्ठिती। सामान्य सकल।।१५८।।
हे ऐसें असें स्वभावें। म्हणौनि कर्म न संडावें।
विशेषें आचरावें। लागें संतीं।।१५९।।

"अनुभूती प्राप्त झालेले जीवन्मुक्त जे आचरण करतात, त्यालाच धर्म समजून इतर सामान्य जन त्याचे आचरण करतात. याप्रमाणे कर्माची व्यवस्था जीवन्मुक्त महात्म्यांसाठी विहित केलेली असल्यामुळे कर्म करण्याचे न सोडता ***सामान्य जनांसाठी अनुकरणीय उदाहरण म्हणून संतांना त्यांची कर्मे कुशलतेने करून दाखवावी लागतात."***

जीवन्मुक्तांना तसे कोणतेच शास्त्रनियम लागू नसतात. त्यांच्या वर्तनास मर्यादा नाही. याबाबत सामान्य जनांनी व्यर्थ उहापोह करू नये, म्हणून श्रुती सागते: ***"ततो न विचिकित्सति।"*** - त्या जीवन्मुक्तांसंबंधी विशेष चिकित्सेने काही सांगता येत नाही. त्यांच्या कर्तव्याबाबत काही प्रमाणच पाहिजे असल्यास श्रीगोपालकृष्णांची उक्ती व त्यावरील श्रीज्ञानदेवांचे वरील भाष्यच ग्राह्य धरले पाहिजे. असो.

योगी भक्त

याप्रमाणे ***कर्मयोग*** अथवा कर्मभक्तिपर ओव्या पाहिल्यावर आपण ***योग*** अथवा योगभक्तिपर ओव्या पाहू या.

दीपाचेनि प्रकाशें। गृहींचे व्यापार जैसें।
देहीं कर्मजात तैसें। योगयुक्ता।।५-४९।।
तो कर्मे करीं सकलें। परि कर्मबंधा नाकळें।
जैसें न सिंपे जलीं जलें। पद्मपत्र।।५-५०।।

"दिव्याच्या प्रकाशात घरातील सर्व व्यापार घडतात. पण दिवा ते करत नाही. त्याचप्रमाणे योग्याच्या देहाकडून सर्व कर्मे घडतात. पण तो ती करत नाही. ज्याप्रमाणे पाण्यात राहूनही कमलपत्रास पाण्याचा ओलावा चिकटत नाही, त्याप्रमाणे ***सर्व कर्मे करत असूनही योग्यास कर्मबंधन प्राप्त होत नाही. कारण तो सर्व कर्मे योगयुक्त चित्ताने करत असतो."***

तेयांही देह एक कीर आथी।
लौकिकीं सुखदुःखी तेयातैं म्हणती.
परि आम्हातैं ऐसीं प्रतीति। परब्रह्मचि हा।।६-४०८।।
देह तऱ्हीं वरचिलीकडें। आपुलियां परी हिंडें।
परि बैसका न मोडे। मानसींचि।।१३-४८५।।

"योग्याच्या देहास जरी लौकिक दृष्ट्या सुखदुःखे होतांना दिसली तरी त्याचे चित्त परब्रह्मात लीन झाल्यामुळे त्यास त्याचे काहीच नसते व तो जरी देहधारी असला तरी मनुष्यरूपाने वावरणारे परब्रह्मच असतो. त्याचा देह कोणतीही कर्मे करत असला तरी त्याचे मन, देहाने कोणताही उपभोग घेत असतांना भगवंताच्या ध्यानात लीन असते."

अर्जुना समत्व चित्ताचें। तैंचि सार जाण योगाचें।
जेथ मन आणि बुद्धीचें। ऐक्य आथी।।२-२७३।।
देखें अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता।
तेथ रिगणें नाहीं समस्तां। संसारदुःखा।।२-३३८।।
जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जेयाचा जठरु।
तेयां क्षुधातृषेचा अडदरु। कंहिंचि नाहीं।।२-३३९।।
तैसें हृदय प्रसन्न होये। तऱ्हीं दुःख कैंचें कें आहे।
तेथ आपैसीं बुद्धी राहे। परमात्मरूपीं।।२-३४०।।

"मन प्रभुध्यानमय व बुद्धी परमात्मबोधमय अशी होऊन चित्तास सर्वत्र परमात्मदर्शन होणे, हेच योगाचे रहस्य आहे. त्यामुळे चित्तात संसारचित्र उमटत नाही व ते सदासर्वदा प्रसन्न राहते. ज्याप्रमाणे जठरात अमृताचा निर्झर स्त्रवत असला तर क्षुधा-तृषा

आपोआपच शांत होतात, त्याप्रमाणे अंतर्यामी प्रसन्नता असली तर संसारदु:ख कसे राहील!"

जैसा निर्वातींचा दीपु। सर्वथा नेणें कंपु।
तैसा स्थिरबुद्धी स्वस्वरूपु। योगयुक्तु।।२-३४१।।

"मग ज्याप्रमाणे वारा नसलेल्या जागी दीपज्योती न हलतां स्थिर राहत, त्याप्रमाणे ***मन - बुद्धी - चित्त ही स्थिर होऊन परमात्मरूपाशी युक्त होऊन राहतात. हीच योगस्थिती!*** ती प्राप्त झालेला योगी स्व-स्वरूपी निमग्न होऊन राहतो." योगी भक्ताचे हे असे वर्णन करून झाले.

ज्ञानयोग

आता ज्ञानी भक्त किंवा ज्ञानयोगी कसा असतो ते पहाः

आणि हे कर्म मी करीन। अथवा आदरिलें सिद्धि नेईन।
येणें संकल्पेंहीं जेयांचें मन। विटालेना।।४-१०४।।
ज्ञानाग्नीचेनि मुखें। जेणें जालिलीं कर्में अशेखें।
तो परब्रह्मचि मनुष्यवेखें। वोलख तूं।।४-१०५।।

"हे कर्म मी करीन किंवा हे हाती घेतलेले कर्म पूर्ण करीन अशा संकल्पांचा ज्याच्या मनाला स्पर्शसुद्धा होत नाही; ज्याने अंतरी ज्ञानाग्नी प्रज्वलित करून त्यात सर्व कर्म-अकर्म-विकर्म जाळून टाकले आहे; ज्याला कर्तव्यकर्म अजिबात उरलेले नाही; तो मनुष्यरूपाने वावरणारा परंतु परब्रह्मस्वरूपच होय. तोच खरा संत होय."

तैं ज्ञान पैं गां बरवें। जऱ्हीं मनीं आथीं जाणावें।
तऱ्हीं संतां या भजावें। सर्वस्वेंसीं।।४-१६५।।
जैं ज्ञानाचा कुरुठा। तेथ सेवा हा दारवंठा।
तो स्वाधीन करी सुभटा। वोलगोनि।।४-१६६।।
तऱ्हीं तनुमनुजीवे। चरणासि लागावें।
आणि अगर्वता करावें। दास्य सकल।।४-१६७।।
मग अपेक्षित जैं आपुलें। तैंही सांघती पुसिलें।
जेणें अंत:करण बोधिलें। संकल्पा न ये।।४-१६८।।

"ज्ञान जाणून घेण्यासाठी सर्वस्वाने संतांचे भजन करावे. त्यांना शरण जावे. कारण संत हेच ज्ञानाचे भांडारघर आहेत. त्यांच्या अंतरंगात प्रवेश करण्याच्या दरवाजाची चौकट म्हणजे सेवा. तरी संतांना सेवाभावाने शरण जावे; तन-मन-प्राण त्यांच्या पायाची सेवा करण्यासाठी अर्पण करावेत; त्यांचे सदासर्वकाळ निरहंकारी वृत्तीने दास्य करावे. म्हणजे संतांची कृपा प्राप्त होऊन ते आपल्याला ज्ञानोपदेश करतात. त्यांच्या उपदेशामुळे ***बोध प्राप्त केलेल्या अंत:करणास संकल्पांचा वाराही शिवू शकत नाही."***

तैं वेळीं आपणपेयां सहितें। इयें अशेखेंहीं भूतें।
माझ्या स्वरूपीं अखंडितें। देखसीं तूं।।४-१६९।।
ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल। तैं मोहांधकारु जाईल।
जैं गुरुकृपा होईल। पार्था गां।।४-१७०।।
जऱ्हीं कल्मषाचां आगरु। भ्रांतीचां सागरु।
व्यामोहाचां डोंगरु। होऊनि अससि।।४-१७१।।
तऱ्हीं ज्ञानशक्तीचेनि पाडें। हे आघवेंचि गां थोकडें।
ऐसें सामर्थ्य असें चोखडें। ज्ञानीं इयें।।४-१७२।।

"ज्ञानयोगाने स्वत:सकट सर्व भूतमात्र ही भगवंताशी एकरूप दिसतात. ***"वासुदेव: सर्वमिति स महात्मा सुदुर्लभ:"*** हीच ती अनुभूती! गुरुकृपेने संसारतमाचा - मोहभ्रमांचा निरास होतो व ज्ञानप्रकाशदीप्ती प्राप्त होऊन जरी मनुष्य पापांचा आगर, भ्रांतीचा सागर, संशयाचा डोंगर असला तरीसुद्धा निष्पाप, निभ्रांत व नि:संशय होऊन परम श्रेयस प्राप्त करतो. हे एवढे सामर्थ्य ज्ञानशक्तीत असते!"

मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे। हृदयीं स्वयंभचि असे।
प्रत्यक्ष फावों लागें तैसें। आपैसयाचि।।९-४९।।

"ती ***ज्ञानशक्ती*** श्रीगुरूंच्या महावाक्योपदेशरूपाने थोडक्या अक्षरात व्यक्त होतांना दिसते. प्रत्यक्षात तर ती अंतरंगात ***स्वयंभू***च असते. तिचा साक्षात्कार झाल्याबरोबर ती आपोआपच सकल प्राणिमात्रांचे अंतरंग दर्शवते व ***विश्वरूप आत्म्याचे दर्शन*** घडवते."

ज्ञान

यानंतर ज्ञानदर्शक अशा ज्या ओव्या आहेत, त्यांचा परामर्ष घेऊ याः

सांग अग्नीस्तव धूम होये। तियें धूमीं काय अग्नी आहे।
तैसा विकारु हा मी नोहे। जऱ्हीं विकरिला असे।।७-५९।।
देह तंव पांचांचें जालें। हे कर्माचें गुणीं गुंथलें।
भंवतसें चाकीं सूदलें। जन्ममृत्यूचां।।१३-११०३।।
हे कालानलाचां तोंडीं। घातलीं लोणियाचि उंडी।
माशी पांख पांखडी। तंव हे सरे।।१३-११०४।।

"जसा अग्नीपासून धूर निर्माण होतो; परंतु धूर म्हणजे जसा अग्नी नव्हे; तसेच हे विश्व माझ्यापासून झालेले दिसले, तरी ते म्हणजे मी नव्हे. देह पंचमहाभूतांचा झालेला आहे व कर्माच्या सूत्रात बांधून जन्ममरणाच्या चक्रावर फिरतो आहे. ***देहरूपी लोण्याचा गोळा ही काळरूपी अग्नीच्या मुखात दिलेली आहुती आहे.*** माशीस पंख फडफडवण्यास जेवढा वेळ लागतो, तेवढ्या वेळात तो नष्ट होतो, इतका तो ***नश्वर*** आहे!"

या देहाची हे दशा। आणि आत्मा तो एथ ऐसा।
पैं नित्यसिद्ध आपैसा। अनादिपणें।।१३-११०७।।
सकलु ना निष्कलु। अक्रियु ना क्रियाशीलु।
कृशु ना स्थूलु। निर्गुणपणें।।१३-११०८।।
आनंदु ना निरानंदु। एक ना विविधु।
मुक्तु ना बद्धु। आत्मपणें।।१३-११११।।

"परंतु आत्मा मात्र अनादी, नित्य आहे. तो उपाधिरहित म्हणजे देहादिकांपेक्षा वेगळाच आहे. निर्गुण आत्म्यास देह आहे किंवा देह नाही असे म्हणता येत नाही. तसेच तो क्रियाशील वा अक्रिय आहे, असेही म्हणता येणार नाही. आत्म्याची अवस्था आनंदी अथवा आनंदरहित, एक वा अनेक, मुक्त किंवा बद्ध अशी कल्पिता येत नाही."

ज्ञानी भक्त

ज्ञान व ज्ञानी यांचा संबंध स्पष्ट करणाऱ्या ओव्या पुढे येतातः

तैं परमतत्त्व पार्था। होती तैं सर्वथा।
जैं आत्मानात्मव्यवस्था। राजहंस।।१३-११४३।।
ऐसेनि जें निजज्ञानी। खेलत सुखें त्रिभुवनीं।
जगद्रूपा मनीं सांठवूनि मातें।।१०-११७।।

"आत्मा हा श्रुति म्हणते त्याप्रमाणे *"नेति, नेति"* म्हणजे वर्णनातीत आहे. आत्मा हेच परमतत्त्व आहे व ***ज्ञानी प्रत्यक्ष आत्माच होय.*** आत्मरूपी दूध व अनात्मरूपी पाणी यांना वेगवेगळे करणारे तो जणू राजहंसच होय. याप्रमाणे तो आत्मरूपाशी एकरूप होऊन आत्मसाक्षात्कारी होतो व जगद्रूपात मलाच पाहात त्रैलोक्यात खुशाल विहरतो."

याप्रमाणे जे ज्ञानी भक्त असतात, त्यांचे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

हे विश्वचि माझें घर। ऐसीं जयाची मति स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहला।।१२-२१३।।
मगययाहीवरी पार्था। माझियां भजनीं आस्था।
तऱ्हीं तेयांतैं मी माथां। मुगुट करी।।१२-२१४।।

"अशा त्या ज्ञानी भक्तांस सर्व विश्वच आपले स्वगृह वाटते. तसे पाहिले तर ते स्वयेच संपूर्ण चर व अचर सृष्टिरूप झालेले असतात. असे विश्वात्मक होऊनसुद्धा जो मी अनादी, अगम्य, अनाकलनीय, अरूप, अचिंत्य, अव्यय, निराकार, निर्गुण असा विश्वात्मा आहे; त्याच्यावर प्रेमादरपूर्वक भक्तिरसाचा वर्षाव करणाऱ्या ***त्या ज्ञानी भक्तांस तर मी माझ्या मूर्ध्निस्थानी मुकुटाच्या जागी बसवतो.*** पण माझे भक्त मात्र इतके नम्र असतात की ते तरीही माझ्या पादांगुष्ठातून प्रकट झालेल्या गङ्गौघास स्वतःच्या शिरी श्रीशंकराप्रमाणे धारण करण्यातच धन्यता मानतात."

तो मी वैकुंठीं नसे। वेलु एक भानुबिंबीं न दिसें।
वऱ्हीं योगियांचीहीं मानसें। उमरडौनि जाय।।९-२०७।।
परि तेयापाशीं पांडवा। मी हांरपला गिंवसांवा।
जेथ नामघोषु बरवा। करिती माझा।।९-२०८।।

"त्या ज्ञानवान भक्तांच्या मी सतत जवळ असतो. एकवेळ मी वैकुंठात सगुण रूपाने नसेन; अथवा विश्वाची कर्मराहटी चालविणाऱ्या सूर्यनारायणरूपातही नसेन; तसेच योग्यांच्या हृदयकमलातूनही नाहीसा होईन! परंतु ***सतत माझे कीर्तन करणाऱ्या त्या ज्ञानी भक्तांजवळ मात्र मी माझी निवासाची उत्तमोत्तम आणि प्रिय स्थाने सोडून निःशंकपणे नांदतो."***

ते भक्तयोगी कसे असतात, पहाः

कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचें निखल प्रबंध।
माजीं आत्मचर्चा विशद। उद्दंड गाती।।९-२१०।।
जेयांचियें वाचें माझें आलाप। दृष्टि भोगी माझेंचि सुख।
जेयांचे मन संकल्प। माझाचि वाहे।।९-४४५।।
माझियां कीर्त्तिवीण। जेयांचे रिते नाही श्रवण।
जेयां सर्वांगीं भूषण। माझी सेवा।।९-४४६।।

"कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद अशा नामघोषाने आसमंत गर्जून टाकणारे ***माझे भक्त सतत माझी गुणकीर्ती गात आत्मचर्चा करत असतात.*** त्यांची वाणी सदैव माझ्याच नामस्मरणात व वर्णनात रत असते. त्यांच्या दृष्टीसमोर सदैव माझेच निजरूप असते. त्यांचे मन सर्वदा माझीच प्राप्ती व्हावी हाच एकमेव संकल्प करत असते.

तैं पापयोनीही होतु कां। तैं श्रुताधितही न होतु कां।
परि मजसि तुकितां तुकां। तुटी नाही।।९-४४९।।

"***ते भक्त जरी पापयोनी असले; श्रुतीचे अधिकारी नसले; कसेही जरी असले; तरी मोलाने ते माझ्याच योग्यतेचे असतात.*** ताजव्याच्या एका पारड्यात त्यांना व एका पारड्यात मला घालून तोलले, तर त्यांचे पारडे माझ्यापेक्षा जडच भरेल. कारण त्यांच्या पारड्यात त्यांच्याबरोबर मी पण असतोच ना! शिवाय माझ्याच मोलाचे भक्तसुद्धा त्याच पारड्यात असतात. म्हणून निव्वळ **मी** आणि **माझ्यासह ते** यात त्यांचेच वजन जास्त भरते."

भक्त व भगवंत

भक्त-योग्यांची अशी थोरवी आहे. सत्यभामा व रुक्मिणीच्या वादप्रसंगी श्रीकृष्णांची तुला करण्यात आली. श्रीकृष्ण एका ताजव्यात व रुक्मिणीने दुसऱ्या ताजव्यात भक्तिभावाने टाकलेले एक तुलसीदल यांपैकी श्रीकृष्णांपेक्षा जास्त तोलाचे ठरलेल्या तुलसीदलाचे व त्याद्वारे प्रकट होणाऱ्या भक्तांच्या अपरिमेय भावाचे मूल्य स्पष्ट आहे. भक्तीचे भगवंतास फार आकर्षण आहेः

तैंचि भलतेणें भावें। मन मज आंतु येते होआवे।
आलें तऱ्हीं आघवें। माघील वावो।।९-४५७।।

"माझें भक्त मला कोणत्याही भावाने भजोत, ते मद्रूपच होतात. गोपिकांनी कामभावनेने, कंस-शिशुपालादींनी वैरभावाने, पांडवांनी सख्यभावाने, वसुदेव-देवकी-यशोदा-नंदांनी वात्सल्य भावनेने मला प्राप्त करून घेतले." असे श्रीकृष्ण म्हणतात.

जैसें तंवचि वहाल वोहल। जंव न पवति गंगाजल।
मग होऊनि ठाकती केवल। गंगारूप।।९-४५८।।
तैसें क्षत्रीं वैश्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यजादि इयां।
जाती तंवचि वेगलालियां। जंव न पवती मातें।।९-४६०।।

ययालागी पापयोनीही अर्जुना। कां वैश्य शूद्र अंगना।
मातें भजतां सदना। माझियां येती।।९-४७४।।

"ते पुढे म्हणतात की,"एकदा भक्त मद्रूप जाला की त्याची जात, वर्ण, आश्रम, योनी *(पाप वा पुण्य)*, कर्मे यांचा काहीही पत्तासुद्धा लागत नाही. गंगेस मिळालेले नदी-नालेसुद्धा गंगाच होतात ना! तसेच क्षत्रिय, वैश्य, शूद्र, स्त्रिया, अंत्यज, एवढेच काय, पक्षी आणि पशूसुद्धा एकदा भक्तीने मद्रूप जाले की त्यांचा जन्म कृतार्थ होतो आणि रजस्तमोमलविशिष्ट त्यांचे जातिविषयक गुणधर्म नाहीसे होऊन ते माझ्या परंधामात प्रविष्ट होतात."

पैं भक्ति एक मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणें।
आम्हीं भावाचें पाहुणें। भलतेयां।।९-३९५।।
एर पत्र पुष्प फल। हे भजावयां मिष केवल।
वांचूनि आमुचा लाग निष्कल। भक्तितत्त्व।।९-३९६।।

"मी फक्त भक्तिभाव जाणतो. भक्तिभावापुढे सान-थोर, पापात्मा-पुण्यात्मा, इ.काहीच मी जाणत नाही. <u>*मला प्रसन्न करून घेण्यासाठी कुठलेही साधन चालते - अगदी पत्र, पुष्प, फळ किंवा साधे पाणीसुद्धा; मी ते आनंदाने ग्रहण करतो.*</u> पण तेथे ***भक्ताचा भाव*** मात्र असला पाहिजे. खरे म्हणजे कोठलेही उपचार हे माझी भक्ती करण्याकरता केवळ प्रासंगिक आहेत. माझी खरी आराधना शुद्ध भक्तितत्त्वाने होते. मनापासून मला भजणाऱ्या कोणासही मी प्राप्त होतो."

"हे समस्तही श्रीवासुदेओ"

याप्रमाणे भक्तिभावाने आपणास येऊन मिळणाऱ्या भक्तांचा अधिकार सांगून त्यांची कृती आणि वृत्ती कशी होते, याचे पुढील ओव्यात वर्णन आहे:

हे समस्तही श्रीवासुदेओ। ऐसा प्रतीतीरसाचा वोतला भावो।
म्हणौनि भक्तांमाजी रावो। आणि ज्ञानियां तो।।७-१३६।।

"मद्रूप व म्हणूनच विश्वात्म झालेले माझे भक्त भूतमात्रात सर्वत्र मलाच पाहतात व त्यांना विश्वातील भूते स्वतःहून भिन्न दिसत नाहीत. कारण द्रष्टा, दृश्य म्हणजे मद्रूप विश्व व दृष्टी म्हणजे प्रतीतिभावही मीच! दृश्यरूप सृष्टी म्हणजे श्रीवासुदेव ही त्यांची प्रतीती! सर्वत्र श्रीवासुदेव पाहणारी त्यांची दृष्टी व द्रष्टाही स्वतःच श्रीवासुदेवरुप असणारे ते भक्त असे असल्यामुळे ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** ही श्रुती त्यांच्याकरता मूर्त रुपच धारण करते. असे ते भक्त हे खरे ज्ञानी आणि भक्तोत्तम असतात. ***"वासुदेवः सर्वम्"*** ही उक्ती त्यांच्याबाबतीत सार्थ असते."

अभ्यास

अशी ही प्रतीती येण्यासाठी कसा अभ्यास करावा, हे पुढील ओव्या सांगतात:

तूं मन हे मीचि करी। माझियां भजनीं प्रेम धरीं।
सर्वत्र नमस्कारी। मज एकांतैं।।९-५१७।।
माझेनि अनुसंधानें देख। संकल्पु जालणें निःशेख।
मद्याजि चोख। याचि नांव।।९-५१८।।

"तू मन माझ्या विचाराने भरून टाक. त्याला माझाच ध्यास लाव. अंतःकरणापासून माझी भक्ती कर. सर्व विश्वात मीच भरून उरलो आहे, असा भाव ठेव. याप्रमाणे ***स्वांतर्यामी, तसेच विश्वांतर्यामी जो मीच आहे, त्याचे सतत अनुसंधान ठेव. या अनुसंधानरूपी यज्ञात मनाचे सर्व संकल्प यजन करणाराच खरा यज्ञकर्ता होय.*** कारण त्याचे सर्व कर्म, सर्व संकल्प, सर्व प्रेरणा या भगवद्भक्तीने परिपूर्ण असतात."

ऐसा मियां आथिला होसी। तेथ माझांचि स्वरूपीं पावसीं।
हे अंतःकरणीचे तुजपासीं। बोलिजत असें।।९-५१९।।
तूं मन-बुद्धि सांचेसीं। जऱ्हीं माझियां स्वरूपीं अर्पिसीं।
तऱ्हीं मातेंचि गां पावसीं। हे माझी भाख।।८-७९।।

"याप्रमाणे माझ्या स्वरूपाने जेव्हा तुझे तन, मन, बुद्धी, चित्त अन अंतःकरण व्याप्त होईल; जेव्हा तुझे सर्वस्व मला अर्पण करशील; तेव्हा तू मलाच येऊन मिळशील, मद्रूप होशील."

अभ्यास करून हे प्राप्त होते असे भगवंत अर्जुनाला प्रतिज्ञापूर्वक सांगत आहेत.

योगयुक्ती

जर एकदम हा अभ्यास जमत नसला; सर्वस्वी भगवंताला शरण जाता येत नसेल; तर श्रीकृष्णानी पुढील युक्ती सुचविली आहे:

अथवा हे चित्त। मनबुद्धिसहित।
माझां हातीं अचुंबित। न शकसीं देवो।।१२-१०४।।
तऱ्हीं गां ऐसें करीं। ययां आठां पाहारांमाझारीं।
मोटकें निमिखभरी। देतु जाये।।१०५।।
मग जैं जैं कां निमिख। देखैल माझें सुख।
तेतुलें अरोचक। विषयीं घेईल।।१२-१०६।।

"जर तू आपले चित्त,मन व बुद्धिसह सर्वकाळ मला देऊ शकत नसशील, तर असे कर की दिवसाच्या अष्टौप्रहरांपैकी ***केवळ एक निमिषमात्र ते तू मला देत जा!*** तेवढ्या एका निमिषात त्या चित्ताला माझे जे सुख प्राप्त होईल, त्यामुळे त्याची संसाराविषयीची ओढ कमी कमी होत जाईल."

पुनवेंहूनि जैसें। शशिबिंब दिसें दिसें।
हारपत अंवसें। नाहींचि होय।।१२-१०८।।
तैसें भोगा आंतुनि निगतां। चित्त मजमाजीं रिगतां।
हलूं हलूं पांडुसुता। मीचि होईल।।१२-१०९।।
म्हणौनि अभ्यासासीं काईं। सर्वथा दुष्कर नाहीं।
ययालागीं माझां ठायीं। अभ्यासें मील।।१२-११३।।

"ज्याप्रमाणे पौर्णिमेला प्रकटलेले पूर्णचंद्रबिंब त्यानंतर दिवसागणिक हळू हळू कमी होत होत अमावास्येला दिसेनासे होते; त्याप्रमाणेच भोगात पूर्णपणे आसक्त झालेले तुझे चित्त मन-बुद्धिसह हळू हळू भोगांपासून विरक्त होत होत माझ्यामध्ये स्थिर होत होत शेवटी मद्रूप होईल. अशा रीतीने ***अल्पकाळ का होईना, पण सातत्याने माझ्याशी***

एकरूप होण्याचा अभ्यास केल्यास माझ्यात पूर्णतया मिसळून जाणे कठीण नाही. तूही असेच कर!"

"समाधि घर पुसे।"

याप्रमाणे अभ्यास करत असता आपोआपच समाधि प्राप्त होते, याचा निर्देश करणाऱ्या ओव्या अशाः

कां जैं ययां मनाचें एक निकें। जैं देखिलें गोडीचियें ठायां सोके।
म्हणौनि अनुभवसुखचि कवतुकें। दावित जाईजें।।६-४२०।।

"रोज नित्यनेमाने एक एक निमिषभर जरी या मनाला परमात्म्याठायी लीन होण्याचे सुख अनुभवायला देत गेले की ते आपोआपच त्या सुखाची चटक लागून सारखे मग तेच सुख मागत बसते. मग कोणत्याही सुखाची गोडी चाखली की ते परमात्मलीन होऊ लागते."

बलियें इंद्रियें येती मना। मन एकवटें पवना।
पवन सहजें गगनां। मिळोंचि लागें।।६-४६०।।

"याप्रमाणे अभ्यासयोगयुक्त होणाऱ्या योग्यास पूर्वानुभवाच्या व पूर्वाभ्यासाच्या ओढीमुळे जन्मजन्मांतरी केलेल्या अभ्यासाचे फळ प्राप्त होते. बलवान इंद्रियेही देहांतरी पूर्वाभ्यासामुळे त्याच्या मनाला वश होतात; मन सहजच प्राणापानाचा जय करते; त्यामुळे प्राणापान हे मूर्ध्न्याकाशात विलीन होऊ लागतात. ***अभ्यासामुळे या सर्व यौगिक देहप्रक्रिया आपोआपच होऊ लागतात.*** त्याला स्वतःलासुद्धा कळत नाही की आपला योगाभ्यास आपोआपच कसा काय होतो आहे."

ऐसें नेणों काय आपैसें। तेयांतेंचि कीजे अभ्यासें।
समाधि घर पुसे। मानसाचें।।६-४६१।।

"पण या आपोआपच होणाऱ्या योगाभ्यासाचा परिणाम म्हणजे खूप कष्ट करूनही जी मिळण्यास अत्यंत दुर्लभ असते, ती ***समाधि स्वतः होऊन त्याला शोधत येते व त्याचे मन सहजच समाधिस्थ होऊन जाते."***

ऐसा जो कामक्रोधलोभां। झाडी करूनि ठाके उभा।
तोचि येवढियां लाभा। गोसावी होए।।१६-४४४।।
पाहें पां ॐतत्सत् ऐसें। हे बोलणें तेथ नेतसे।
जेथूनि कां हे प्रकाशे। दृश्यजात।।१७-४०१।।

"वास्तविक पाहिले तर काम-क्रोध-लोभ हे त्रिवर्ग बलवान वैरी ज्याने जिंकले आहेत, त्यालाच एवढा मोठा समाधिश्रियेचा लाभ होतो. परंतु रोज मोटके क्षणभरसुद्धा श्रीहरीच्या ठायी चित्त लावणाऱ्या त्या योगाभ्यासी साधकास पण हा समाधिलाभ होऊ शकतो आणि तोही सुलभपणे!"

सुवर्णमणी सोनियां। ये कल्लोलु जैसा पाणियां।
तैसा मज धनञ्जया। शरण ये तूं।।१८-१४००।।
म्हणौनि मी होऊनि मातें। सेवणें आहे आयितें।
तैं करी हातां येतें। ज्ञान एणें।।१८-१४०५।।

"समाधिश्री प्राप्त जालेला तो योगिराज अद्वय भक्त होतो. ज्याप्रमाणे सुवर्णराशी व तिच्यापासून घडवलेला सुवर्णमणी, अथवा पाणी व त्याची लाट, यांच्यात तत्त्वतः कोणताही भेद नसतो; सुवर्णमणीही सुवर्णच व लाटही पाणीच; तशा मला शरण आलेल्या तुझी अवस्था पण माझ्यासारखीच होईल. ***एकदा का तू व मी यांची एकरूपता झाली की अद्वयभक्तीतील खरे सुख तुला प्राप्त होईल."***

चतुर्विध उपासनांचा संगम

कर्म, ज्ञान, भक्ती व योग **यांचे अभिन्नत्व आहे. त्यांना योगमार्ग म्हणा की भक्तिमार्ग म्हणा, त्यांपैकी कोणत्याही मार्गाने गेले तरी साधकास अंती गीताप्रणीत अद्वयभक्तियोगच प्राप्त होतो.** कारण हे चतुर्विध उपासनामार्ग सुरुवातीस जरी अज्ञानी साधकास भिन्नत्वाने दिसत असले, तरी एकदा का प्रगतिपथावर तो अग्रेसर झाला की ते सर्व मार्ग कसे एकरूप आहेत, ते त्याला उमगून येते.

गीतेचा योगमार्ग वा भक्ती हा या चतुर्विध साधनाप्रणालींचा सुरेख संगम करणारा आहे. त्याविषयी अधिक विवेचन योग्य वेळी पाहू. असो. अद्वयभक्तियोगाचे हे रहस्य श्रीकृष्णांनी गीतेद्वारे अर्जुनास व त्यानिमित्ताने सर्व जगताच्या उद्धरणासाठी स्वमुखाने प्रकट केले आहे.

"पार्थो वत्सः"

शुद्धांतःकरणाच्या सर्व उपासकांचे गीता कल्याणच करते. श्रीकृष्ण म्हणतातः

ययालागी सुमनु आणि शुद्धमति। जो अनिंदकु अनन्यगति।
पैं गां गौप्यही परी तयाप्रति। चावलिजे सुखें।।९-४०।।

"जो कोणी सरळ मनाचा, निष्कपट भावाने श्रीकृष्णास शरण आलेला, भगवंतांचा आदर करणारा असा शुद्धमती भक्त असेल व जो अनन्यभावाने प्रार्थना करील, त्याला हे गीतातत्त्व जरी अत्यंत गुप्त असले तरी सुखेनैव सांगावे."

तऱ्हीं प्रस्तुत आतां गुणीं इहीं। तूंवाचूनि आणिकु नाही।
म्हणौनि गुज तऱ्हीं तुज ठायीं। लपवूं नये।।९-४१।।
वत्साचेनि वोरसें। दुभतें होय घरोद्देशें।
जालें पांडवाचेनि मिषें। जगदुद्धरण।।१८-१४६७।।

"हे गुज श्रीकृष्णांनी अर्जुनानिमित्ताने सर्व जगाच्या उद्धारासाठी सांगितले आहे. ज्याप्रमाणे गाय वत्साच्या प्रेमापोटी पान्हा सोडते, पण वत्साबरोबरच घरभरच्या लोकांसाठीही ते दूध मिळून दुभत्याची रेलचेल होते; तसेच अर्जुनाकरता भगवंतांनी प्रकट केलेल्या या गीतारूपी पायसधारेचे अखिल संसारासाठी अमृत प्रकटले आहे!"

म्हणूनच श्रीकृष्ण म्हणतात कीः

तै हे मंत्ररहस्य गीता। मेलवी जो माझियां भक्ता।
अनन्यजीवना माता। बालका जैसीं।।१८-१५१२।।
तैसीं भक्तां गीतेसीं। भेटी करी जो आदरेंसीं।
तो देहापाठीं मजसि। एकचि होय।।१८-१५१३।।
ऐसें सर्वरूपरूपसें। सर्वदृष्टिडोलसें।
सर्वदेशनिवासें। बोलिलें श्रीकृष्णें।।१८-१४१७।।

"गीतेचे हे जे गुह्यातिगुह्य रहस्य आहे, ते माझ्या भक्तांना जो उकलून दाखवतो, तो जणू काही मातेपासून दुरावलेल्या तान्ह्याची

मातेशी गांठच घालून देतो. माझ्या भक्तांची अशी गीतेशी भेट घालून देणारा श्रद्धावान पुरुष देहांतरी माझ्यातच मिळून जातो." हे आश्वासन त्या अखिल विश्वरूपाने प्रकटलेल्या, अनंत सृष्टीच्या चक्षूंद्वारे स्वतःच स्वतःस निरीक्षिणाऱ्या, सर्वांतर्यामी निवास करणाऱ्या, दृश्य-दृष्टी-द्रष्टा या त्रिपुटीरूपाने असे व्यक्त होणाऱ्या चिन्मय भगवंताने स्वतः दिलेले आहे, असे ज्ञानेश म्हणतात.

"आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय।।"

ते पुढे गीतेविषयी काय म्हणतात, ते पहाः

गीता नामें विख्यात। सर्व वाङ्मयाचें मथित।
आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय।।१८-१३२३।।
हे शब्देंवीण संवादिजे। इंद्रियां नेणतां भोगिजे।
बोला आदि झोंबिजे। प्रमेयासीं।।१-५८।।
जैं अपेक्षिजे विरक्तीं। सदा अनुभविजे संतीं।
सोऽहंभावें पारंगती। रमती जेथ।।१-५३।।

"आत्मोपलब्धी साक्षात करून देणारे हे ***श्रीगीता*** नांवाने विख्यात असलेले अमूल्य रत्न सर्व अक्षरवाङ्मयाचे मंथन करून मी हस्तगत केले आहे. ***हे गीतातत्त्व शब्दातीत आहे.*** म्हणून त्याचा शब्दरूप आविष्कार होण्याआधीच ते आत्मसात होते; त्याचा आनंद इंद्रियातीत आहे. विरक्तांनाही हवेहवेसे वाटणारे, संतांच्या अनुभूतिरूप असे हे गीतामृत आहे. परमात्मरूप झालेले योगी त्यात नित्य रममाण होतात."

ओवीफुलांची अञ्जुली

या अशा निरुपम गीतेवर रचलेली आपली ओवीपुष्पे श्रीविश्वेश्वराच्या चरणकमलदलांवर वाहतांना श्रीज्ञानदेवांची दैवी वाणी उद्घोषिते कीः

भरौनि सद्भावाची अञ्जुली। मियां विवीयांफुलें मोकलीं।
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं। विश्वरूपाचां।।११-७०८।।

"ओवीपुष्पे ओंजळीत भरून ती सद्भावपूर्वक विश्वरूपाच्या चरणदलांवर वाहून कृतार्थ झालेले श्रीज्ञानदेव समस्त विश्वाच्या कल्याणासाठी त्या विश्वात्मकाकडून सर्वसामान्यांसाठी प्रसादाची विनवणी करत म्हणतातः

पसायदान

आता विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषौनि मज देयावें। पसायदान हे।।१८-१७९३।।
जैं खळांची व्यंकटी सांडो। तेयां सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचे।।१७९४।।

"हा गीतार्थरूपी ज्ञानदेवीरूप वाङ्मययज्ञ जो मी चालवला, त्याने विश्वांतर्यामीच्या परमात्म्याने तोषावे व विश्वातील अमंगळ नाहीसे करावे; अज्ञान दूर सारावे; प्राणिमात्रांना गीतेने आदरलेल्या सत्कर्माची गोडी लावावी आणि सर्वांना अंतर्यामी व विश्वातील भूतमात्रात वसणाऱ्या श्रीवासुदेवाचा साक्षात्कार घडवून आणावा."

ही ज्ञानदेवांनी सर्वांकरता विनम्रभावाने केलेली प्रार्थना मान्य करतांना त्यांच्या वाग्यज्ञाने प्रसन्न झालेला विश्वरूपात्मक भगवंत श्रीनिवृत्तिनाथांच्या मुखाने म्हणतोः

तेथ म्हणे विश्वेशराओ। हा होईल दानपसावो"

"हा प्रसाद तुला नक्कीच मिळेल! या तुझ्या ज्ञानेश्वरीने अखिल जगताचे निश्चितच कल्याण होईल. श्रीज्ञानेश्वरीरूप तुझ्या या वाग्गंगेत नाहणारे जीव कृतार्थ झाल्याशिवाय कदापि राहणार नाहीत." आणि

एणें वरें ज्ञानदेओ। सुखिया जाला।।

सर्व विश्वातील प्राणिमात्रांसाठी मिळवलेल्या विश्वात्मक देवाच्या या ***"कल्याणमस्तु"*** वराने आणि :

सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सन्तु सर्वे निरामयः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःखमाप्नुयात्।।

या आशीर्वादाने सर्वांतर्यामी वास्तव्य करणारे श्रीज्ञानदेव कल्पनातीत सुखी झाले!!! असो.

ज्ञानेश्वरी व गीता सार

आतापर्यंत आपण ***श्रीगीतेच्या अठराही अध्यायांचा सारांश*** व श्रीज्ञानेश्वरीच्या स्वामी स्वरूपानंदांनी वेचलेल्या निवडक ओव्या यांच्या आधाराने ***श्रीगीता-ज्ञानेश्वरीच्या चिंतनाच्या विषयाचे संक्षेपाने अवलोकन*** केले. ***श्रीगीता व पातञ्जलयोगसूत्रे*** यांच्या तुलनात्मक विवेचनाने योगाविषयीच्या काही कल्पनांचा आढावा घेतला.

ईश्वरप्रणिधानाद्वारे समाधिप्राप्ती करून घेण्याचा मार्ग श्रीगीता विशेष प्रशंसिते, हे आपल्याला कळून आले आहे. ***हाच भक्तिमार्ग होय; तो योगमार्गाशी अभिन्न आहे.*** श्रीज्ञानदेवांच्या एकूण तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात पाहिले तर हीच ***अद्वयभक्ती*** त्यांनी प्रकाशित केली आहे.

कर्म-भक्ति-ज्ञान-योग समन्वायक अद्वयभक्ती

अद्वयभक्तीचे साधनप्रणालीनुसार १) कर्ममार्गाने ***कर्मयोग*** अथवा कर्मभक्ती; २) योगमार्गाने गुरुपरंपराप्राप्त ***कुंडलिनीयोग*** अथवा ***ध्यानयोग*** म्हणजेच योगभक्ती; ३) ज्ञानमार्गाने ***ज्ञानयोग*** अथवा ज्ञानभक्ती आणि ४) भक्तिमार्गाने ***भक्तियोग*** अथवा भक्ती असे भेद सकृद्दर्शनी होतात. कोणतीही साधनप्रणाली अनुसरली तरीही ***अद्वयभक्ती*** हेच तिचे मेरुशिखर होय. याच भक्तीने विनटलेला जीव जेव्हा सर्वभावाने परमात्म्याचे भजन करतो, तेव्हा त्याच्या भक्तीला तोडच नसते.

श्रीज्ञानेश्वर जेव्हा या अवस्थेला पोहोचलेल्या भक्ताचे वर्णन करतात, तेव्हा तो प्रारंभी कर्ममार्गाने, योगमार्गाने की ज्ञान वा भक्तिमार्गाने निघून तेथे पोहोचला याचे भान अक्षरशः विसरून जातात व त्याला कधी ***ज्ञानी भक्त,*** तर कधी त्याला ***योगी भक्त,*** तर कधी त्याला ***नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त झालेला भक्त,*** तर कधी त्याला ***अनन्यभक्त*** असेही गौरवितात. कारण ***कर्ता-कर्म-कार्य*** ही कर्मयोग्याची त्रिपुटी किंवा ***ज्ञाता-ज्ञान व ज्ञेय*** ही ज्ञानयोग्याची त्रिपुटी, किंवा ***ध्याता-ध्यान-ध्येय*** ही ध्यानयोग्याची त्रिपुटी अथवा ***भक्त-भक्ति-भगवंत*** ही भक्तियोग्याची त्रिपुटी यांचा जेव्हा लोप होऊन जातो आणि ***त्रिपुटी जेव्हा परमात्मस्वरूपात परिणत होते; तेव्हा भक्ता-भक्तांत तो कोणत्याही मार्गाचा असला तरी कोणताच भेद उरत नाही व सगळेच भक्त त्या अवस्थेत अद्वयभक्तियोगाचे धनी होतात!!!*** सर्वांतर्यामी तेव्हा अद्वयभक्ती प्रकाशते!!!

गीतेचा *ज्ञानयोग व कर्मयोग*

अद्वयभक्तियोग प्राप्त होण्याचे श्रीगीतेनुसार खरे तर दोनच प्रमुख मार्ग आहेत-**१) ज्ञान *(सांख्य)* योग व २) आत्मसंयमयोग *(कर्म) (क्रिया) (योग).*** ***"ओळखीसवेंचि पाविजे। तद्रूपता।।"*** म्हणून ज्ञानयोगमार्गाचा ज्ञानदेवांनी जरी गौरव केलेला असला, तरी हा मार्ग कोण्या एखाद्याच भाग्यवंतासाठी आहे, हेही त्यांनी सूचित केले आहे!!

"कर्मयोगेन योगिनाम्"

इतर सगळे मुमुक्षू मात्र ***क्रियायोग - कर्मयोग*** वा ***आत्मसंयमयोग*** याच मार्गाचे पथिक होत. ज्यांना गुरुवाक्यासरशी बोध पूर्णत्वास नेता येत नाही, त्यांना या मार्गानेच जाऊन बुद्धीचा मळकटा धुवून टाकल्यावर मग ***अद्वयभक्तियोग*** साधतो.

सगुण व निर्गुण उपासक

या ***आत्मसंयमयोग*** मार्गाचेही पुनः उपासनाभेद आहेत. निर्गुण निराकाराची उपासना करून ब्रह्मस्वरूपी मिळणारे ते ***निर्गुणोपासक*** व सगुण साकाराची उपासना करून तेच परमपद प्राप्त करणारे ते ***सगुणोपासक.*** भगवत्तत्त्वास नाम-रूप नाही, गुण नाही; ते शून्यात्मकच आहे; असा ज्याच्या बुद्धीने निश्चय केला आहे व त्या स्वरूपीच मिळून जाण्याची उपासना जे करतात; त्यांना भगवंत ***अव्यक्तोपासक*** असे म्हणतात. भगवंतास नाम-रूप-गुण आहेत; तो जरी अव्यक्त असला, तरी तो विविध रूपांनी या विश्वमात्रात भरून राहिला आहे; अशीज्यांची श्रद्धा आहे व विश्वरूप भगवंतांची जे उपासना करतात, ते ***सगुणोपासक*** होत.

सगुण ध्यानयोग

यातल्या **सगुणोपासकांवरच भगवंत खऱ्या अर्थाने प्रेम करू शकतात व तेच *भक्त* व तेच *योगी* होत. त्यांच्याचकरता भगवंत सद्गुरुरूपाने अवतीर्ण होतात.** गीता-ज्ञानेश्वरीतील योगमार्गाचे दिग्दर्शन करणारा *सहावा अध्याय* जरी ***सगुण*** व ***निर्गुण*** अशा दोन्ही प्रकारच्या उपासकांसाठी सांगितला गेला असला, तरी त्यातील ***सगुण ध्यानयोग*** हा म्हणूनच ज्ञानदेवांच्या खऱ्या आवडीचा विषय होय.

गीतेतील ज्ञानदेवनिरूपित खरा योग

श्रीज्ञानदेव या ध्यानयोगाची उकल करतांना ***गुरुपदिष्ट, कुंडलिनीसिद्ध, लयप्रधान, सामरस्यात्मक अशा सगुण ध्यानयोगास मान्यता दर्शवतात.*** हाच त्यांच्या मते ***राजयोग*** होय. राजयोग हा ***सहज सोपानमार्ग*** असल्याचे योगी समजतात. त्याप्रमाणेच हा ज्ञानेश्वरप्रणित योगमार्ग आपोआपच कार्यरत होणारा साधनामार्ग आहे. तो सर्वस्वी गुरू अथवा ईश्वराच्या कृपेवर अवलंबून आहे.

शास्त्रांतरी हाच योगसाधनामार्ग ***महायोग*** या नांवाने प्रसिद्ध आहे. या दृष्टीने पाहता ***कृपा*** हाच मुख्य केंद्रबिंदु असणाऱ्या त्यांच्या योगमार्गाच्या वाटचालीत त्यांना गुरुकृपेचे महत्त्व सर्वाधिकच वाटते. गुरुकृपेसंबंधीच्या त्यांच्या मुख्य मुख्य ओव्यांचा आपण पूर्वीच विचार केलेला आहे.

कृपा व योग

संतकृपा, गुरुकृपा व ईश्वरकृपा* या मार्गांनी योगसिद्धी सुलभ व लवकर होणारी असल्याने साधकांनी हाच राजमार्ग चोखाळावा असे ज्ञानदेवांना वाटते.** म्हणूनच ***संतकृपादीपक् अशा श्रीज्ञानेश्वरीच्या रूपाने त्यांनी अशा सर्व साधकांना आपला आशीर्वाद चिरंतन कालासाठी देऊन ठेवलेला आहे!!

अव्यक्तोपासना

मागे स्पष्ट केलेच आहे की पतञ्जलिकृत योगसूत्रांवर श्रीगीता अधिक प्रकाश टाकण्याचे कार्य करते. योगशास्त्रदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या श्रीगीतेच्या *सहाव्या* अध्यायात तसे पाहता सगुण ध्यानयोग वा निर्गुण ध्यानयोग यासंबंधी स्पष्ट विवेचन नाही. परंतु श्रीकृष्णांनी बाराव्या गीता अध्यायी उपासकांचे हे दोन भिन्न भाव प्रकट केलेले आहेत.

पतञ्जलींच्या योगसूत्रातही हे दोन्ही मार्ग समाविष्ट होतात असे त्यातील ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।"*** या सूत्रानुषंगाने प्रकट होते. या दोन्ही योगमार्गांनी जरी त्याच एका परमात्मतत्त्वाची प्राप्ती होत असली तरी त्यातील निर्गुण निराकाराच्या उपासनेचा मार्ग क्लिष्ट व क्लेशदायक असतो असे भगवंतांनी अर्जुनास सांगितले आहे.

याबाबत त्यांचे ***"क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्। अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते।।१२-५।।"*** हे वचन तर सुप्रसिद्धच आहे. अव्यक्त ब्रह्माठायी ज्यांचे चित्त आसक्त आहे, अशा मनुष्यांची साधना अधिक परिश्रमाची आहे. कारण देहाभिमानी मनुष्यप्राण्यांस अव्यक्त ब्रह्माच्या प्राप्तीचा मार्ग कष्टाने साध्य होणारा आहे.

सगुणोपासक

परंतु जे भगवत्परायण भक्त सर्व कर्मे ईश्वराच्याठायी अर्पण करून त्याच्या सगुण रूपाचीच अनन्यभक्तियोगाने निरंतर चिंतन करत उपासना करतात, त्या भगवत्स्वरूपातच आपले चित्त स्थिर करणाऱ्या भक्तांचा ईश्वर तत्काळ मृत्युरूपी संसारसागरातून उद्धार करतात. गीतेचे ***"ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्परा। अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासत।।"*** व ***"तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसार-सागरात्। भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ।।(१२-६ व ७)"*** हे श्लोक हेच सांगतात.

समारोप

गीता व ज्ञानेश्वरी अनुबंध पाहतापाहता आपणांस गीतेतील खऱ्या उपासनामार्गाचे - खऱ्या योगधारेचे दर्शन घडले. या योगमार्गासच ज्ञानेश ***पंथराज*** असे *सहाव्या* अध्यायी गौरवितात. तर आता त्या पंथराजाकडेच वळू या. येथे आपल्या विवेचनाचा ***पूर्वरंग*** संपून **योगसाधना** नामक **द्वितीय स्कंध**ास सुरुवात होणार आहे. त्याचा ***उन्मेष क्र.(८) - पंथराज*** आपण आता पाहणार आहोत. तरी ***"एकलें अवधान दीजे"!!***

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::द्वितीय स्कंध::

::योगसाधना::

(उन्मेष ८-१५) (पृ.क्र.१२० ते २४२)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष(८)::पंथराज (१२०-१३९)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेषः८

गीताः
३:२६
५:२७,२८
६:११,१६,१७,४४,४५
ज्ञानेश्वरीः
५:१५१-१६०
६:५३-६०,१५३-१६०,१६३-१९१,१९२-१९९,२०१-२०६-२११,२९१,२९२,३१०,३२०-३२३,३२८-३४३,३४५-३५३
११:११०
१२:१५८-१६९,१७४
१३:८२५,८२६
१८:११३०-११३४, १२२१-१२२३,१८०९
पा.यो.सू.:
२:१२,३९
३:१८
४:९
सि.सि.प.:
२:३२-३४

द्वितीयस्कंध:::योगसाधना

उन्मेष ८::::::पंथराज

गीतेचे मर्म::::

गीतेचे रहस्य - पंथराज

"तेषामहं समुद्धर्ता.......(१२-७)" हे सगुणध्यानयोग्यांस दिलेले श्रीकृष्णवचन लक्षात घेऊनच तो योग साध्य करण्याची साधनगाथा श्रीज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या *सहाव्या* अध्यायी प्रकट केली आहे. ***कुंडलिन्यधिष्ठीत, गुरुपदिष्ट, लयप्रधान, सामरस्यात्मक, सगुणध्यानयोग* हाच प्रत्यक्ष अनुभूती प्राप्त करण्याचा ज्ञानदेवींचा एकमेव साधनमार्ग होय.** हा मार्ग म्हणजेच श्रीकृष्णांनी गीतेद्वारे प्रकट केलेले गुह्य होय, असे दर्शवत ज्ञानदेवांनी म्हटले आहे की:

पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतीचा दंशु।
परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९१।।

श्रीगीतेचा रहस्यपूर्ण योगमार्ग तो हाच होय जो श्रीकृष्णांनी गीतेभर गुंफून सांगितला आहे. त्या ***ध्वनिताचे केणें*** श्रीज्ञानदेवांनी खऱ्या ***ग्राहीक*** श्रोत्यांसाठी आपल्या सहाव्या अध्यायावरील भाष्यांतरी उपलवून दाखविले आहे. म्हणून ते म्हणतात:

तेयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाची घडी झाडूनि।
उपलविली मियां जाणूनि। ग्राहीक श्रोते।।६-२९२।।

हाच योगमार्ग आदिनाथप्रणीत असून विष्णुरूपी मत्स्येंद्रास प्राप्त झाला व तोच गुरुपरंपरेने श्रीज्ञानदेवांपर्यंत चालत आला. आदिनाथ ते विष्णु *(मत्स्येंद्र)* अशी परंपरा लाभलेला हा योगमार्ग म्हणूनच ***महाविष्णु*** म्हणजे श्रीकृष्णांनी गीतेत प्रतिपादलेला योगमार्ग होय, असे श्रीज्ञानदेव ध्वनित करतात. असो.

अष्टांगादी योगांचा अनुबंध::::

पंथराज व पातञ्जलयोग

या विषयाचा पुढे विचार करण्यापूर्वी श्रीगीतांतर्गत सहाव्या अध्यायातील ***ध्यानयोग*** अथवा ***अभ्यासयोग*** यांचा पातञ्जलयोग वा अष्टांगयोग याच्याशी कसा संबंध आहे, हे अभ्यासणे उचित ठरेल. हा संबंध स्पष्ट होण्यासाठी त्या विषयावरील सूचक असे गीताश्लोक व ज्ञानेशांच्या काही ओव्या पाहू या. योगविषयाचा प्रारंभ करत *पांचव्या* अध्यायी श्रीकृष्ण गीतेद्वारे म्हणतात की:

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो:।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ।।५-२७।।
यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायण:।
विगतेच्छाभयक्रोधो य: सदा मुक्त एव स:।।५-२८।।

"बाह्य विषयांचा बाहेरच त्याग करून; दृष्टी भ्रूमध्यात स्थिर ठेवून व नासिकेतून विचरणाऱ्या प्राण व अपानास सम करून; ज्याने इंद्रिये, मन व बुद्धी यांना जिंकले आहे असा, मोक्षप्राप्ती हेच जीवनाचे ध्येय ठेवणारा आणि इच्छा, भय व क्रोध यांविरहित असणारा मुनी हा निरंतर मुक्तच असतो."

यावर ज्ञानदेव म्हणतात:

तऱ्हीं वैराग्याचेनि आधारें। जिहीं विषय दवडूनि बाहिरें।
शरीरीं एकंदरें। केलें मन।।५-१५१।।
सहजें तिहीं संधी भेटीं। जेथ भ्रूपल्लवां पडे गांठीं।
तेथ पाठिमोरी दिठी। पारुखोनिया।।१५२।।
सांडूनि दक्षिण वाम। प्राणापानसम।
चित्तेंसीं व्योम-। गामियें करिती।।१५३।।

"देहात असतांनाच जीवन्मुक्त ब्रह्मत्वास पोहोचलेले असतात. योगाने हे साध्य होते. वैराग्याच्या जोरावर अंत:करणातील विषयवृत्ती उपटून काढून त्यांना समूळ शरीराबाहेर फेकून द्यावे. मनाच्या वृत्ती एकाग्र कराव्या. ***इडा, पिंगळा व सुषुम्ना*** या योगनाड्या आज्ञाचक्रात येऊन मिळतात. भुवया जेथे मिळतात, त्या ठिकाणी हे चक्र असते. त्या ठिकाणी उफराटी दृष्टी *(अंतर्दृष्टी)* करून ध्यान करावे. इडा-पिंगला यातून वाहणारे प्राण व अपान यांचा सुषुम्नेत प्रवेश करावा. कुंडलिनीस जागवून ऊर्ध्वस्थ करावी आणि तिला मूर्ध्न्याकाशात घेऊन जावे. तिच्याबरोबर आपोआपच **चित्त *(मन)* व पवन *(प्राण)*** हेही गगनात जाऊन पोहोचतात. तेथे त्यांचा लय करावा."

तेथ जैसीं रथ्योदकें सकळें। घेऊनि गंगा समुद्रीं मिळें।
मग एकैक वेगळें। निवडूं नये।।५-१५४।।
तैसीं वासनांतरींची विवंचना। मग आपैसीं पारुखे अर्जुना।
जैं वेलीं गगनीं लयो मना। पवनें कीजे।।१५५।।
जेथ हे संसारचित्र उमटे। तो मनोरुपु पटु फाटे।
जैसें सरोवर आटे। मग प्रतिमा नाहीं।।१५६।।
तैसें मनपण मुदल जायें। मग अहंभावादिक कें आहे।
म्हणौनि शरीरेंचि ब्रह्म होये। अनुभवी तो।।१५७।।

"म्हणजे मग ज्याप्रमाणे इतस्तत: धावणाऱ्या सर्व जलप्रवाहांना आपल्यात सामावून घेऊन गंगा समुद्री मिळाली की त्या वेगवेगळ्या प्रवाहांना समुद्राहून भिन्न असे अस्तित्व उरत नाही, त्याप्रमाणे वासनांना अस्तित्व उरत नाही. ज्यावर हे संसारचित्र उमटते, तो पट म्हणजे

मन! तो जेव्हा फाटतो, त्यावेळी जसे सरोवर आटले की त्यातील प्रतिबिंबे पण नाहीशी होतात, त्याप्रमाणे मनःपटलावर उमटलेले संसारचित्र पण नाहीसे होते. मनच जेथे असे लय पावून अस्तित्वहीन होते, तेथे त्याच्या आश्रयाने राहणारे अहंकारादी कसे उरतील! त्यावेळी मग एकच एक अवस्था उरते - ती म्हणजे तो योगी पुरुष देहधारी असतांनाच देहासकट परब्रह्म होतो!"

आम्हीं मागां हन सांगितलें। जैं देहींचि ब्रह्मत्वा आलें।
तैं एणें मार्गें पावलें। म्हणऊनियां।।५-१५८।।
आणि यमनियमांचे डोंगर। अभ्यासाचे सागर।
क्रमौनि हे पार। पातलें तैं।।१५९।।
तिहीं आपणपें करूनि निर्लेप। प्रपंचाचे घेतलें माप।
मग सांचाचेचि रूप। होऊनि ठेलें।।१६०।।
ऐसा योगयुक्तीचा उद्देशु। जेथ बोलिला हृषीकेशु।
तेथ अर्जुनु सुदंशु। म्हणौनि चमत्कारिला।।१६१।।

श्रीकृष्ण म्हणतात कीः "जीवन्मुक्ती ती हीच! आणि ती पावण्याचा मार्ग तोही हाच! **यमनियम**ांचे डोंगर लंघून आणि अभ्यासाचे सागर पार करून योगी त्या ठिकाणी पोहोचतो. संसारात निःसंग होऊन तो ब्रह्मरूप होऊन तेथे राहतो."

योगमार्गाची युक्ती श्रीकृष्णांनी अशी संक्षेपाने सांगितली आणि अर्जुन मर्मज्ञ असल्याने विस्मित झाला व त्यास ते योगरहस्य पूर्णपणे जाणून घ्यावे असे वाटू लागले.

अर्जुनास हा **पंथराजाचा *दंशु*** *पाचव्या* अध्यायींच श्रीकृष्णांनी असा घडवला आहे. हा ***दंशु*** हेच दाखवितो की **ज्ञानेश्वरांच्या पंथराजउपक्रमात आणि पतञ्जलींच्या अष्टांगयोगात *यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार* ही समान अंगे आहेत.** वरील ओव्यातून ती सर्व अंगे स्पष्ट होतांना दिसून येतात. तसेच ***धारणा-ध्यान*** हे विधीही त्यातून स्पष्ट होतांना दिसतात. कैवल्यप्राप्ती वा ब्रह्मप्राप्ती हे ***समाधि***शिखरही त्यांतील योगस्थितीवरून स्पष्ट होते.

अशा प्रकारे **पंथराज, गीतेतील योगमार्ग व पातञ्जलयोग हे समान असल्याचे दिसून येते.** पतञ्जली चित्तवृत्तींचा निरोध सांगतात. ती मनाची एकाग्रता केल्याने साध्य होते. ज्ञानदेवही मन एकाग्र करण्यास सांगतात; तसेच विषयवृत्ती निरोधण्यास सांगतात; हेही साम्यस्थळ लक्षात घेण्यासारखे आहे.

ज्ञानेश्वर अधिक स्पष्टपणे **मनाला कुंडलिनी व पवनासह गगनात नेण्याची व चित्तासह त्यांचा लय करण्याची *योगयुक्ती*** सांगतांना दिसतात. या सर्वांचा अधिक खुलासा करण्यासाठी आपणांस *सहाव्या* अध्यायाच्या काही ओव्यांकडे वळावे लागते. कारण *पांचव्या* अध्यायी वरील ओव्यांतून श्रीकृष्णांनी जे सांगितले आहे, त्याची उकल त्या अध्यायी केलेली आहे.

जेथ संन्यासिला संकल्पु तुटें। तेथेंचि योगाचें सार भेटें।
ऐसें हे अनुभवाचेनि धटें। सांचें जेयां।।६-५३।।
आतां योगाचलाचां निमथा। जऱ्हीं ठाकावा अर्जुना।
तऱ्हीं सोपाना या कर्मपथां। चुका झणीं।।५४।।
एणें यमनियमांचेनि तलवटें। रिगें आसनाचियें पाऊलवाटें।
येईं प्रणायामाचेनि आडकंठें। वरौतां गां।।५५।।

पातञ्जलयोगाची अष्टांगे या ओव्यातून स्पष्ट शब्दात निर्देशिली आहेत. कर्माची रेखा न ओलांडतां, गृहस्थाश्रमाचा त्याग न करता, योगाचे सुख प्राप्त करून घ्यावयाचे आहे.

ज्ञानेश म्हणतात, "संन्यास करण्याचा संकल्प जेथे पूर्ण होतो, तेथेच योगाचे सर्वस्व प्राप्त होते. अनुभवाच्या ताजव्यात हे जोखून पाहता येणारे आहे. त्यासाठी योगरूपी पर्वताचे शिखर आधी गाठले पाहिजे. त्यासाठी कर्मयोगपथच आक्रमला पाहिजे. त्या मार्गाने क्रमणा करत असता साधक यमनियमरूपी पायथ्यापर्यंत जाऊन पोहोचतो. तेथून तो योगमेरु चढून जाणारी ***आसन*** रूपी पायवाट लागते. ती चालत जाऊन ***प्राणायाम***रूपी कडा चढून योगरूपी डोंगराच्या मध्यभागी पोहोचावे लागते."

मग प्रत्याहाराचां आधाडा। बुद्धीच्याहीं पायां निसरडा।
जेथ हठियें सांडिती होडां। कडेलग।।६-५६।।
तऱ्हीं अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निसलें।
नखीं लागेल ढाळें ढाळें। वैराग्याचीं।।५७।।
ऐसा पवनाचेनि पाठारें। येतां धारणेचेनि पैसारें।
क्रमीं ध्यानाचें चवरें। सांडें तंव।।५८।।

"नंतर ***प्रत्याहार*** रूपी तुटका अधांतरी ओटंगलेला कडा लागतो. बुद्धिरूपी पावले त्यावरून निसटतात. योगपर्वत चढून जाण्याची आपली प्रतिज्ञा - आपला हट्ट त्या निसरड्या कड्याचा लाग पाहतांच हठयोगी विसरतात. पण अभ्यासबळाने हळूहळू वैराग्यरूपी नख्या त्या निरालंब निसरड्या प्रत्याहाररूपी कड्यावर चिकटू लागून, तो चढून जाता येतो. प्रत्याहाररूपी कडा चढून वर गेले की ***धारणा***रूपी प्रशस्त वाटेने पवनाच्या बळाने ***ध्यान*** रूपी शिखर ओलांडून जावयाचे असते."

"पवन म्हणजे ***मरुत वा मारुत, प्राण, शक्ती, कुंडलिनी*** या संज्ञांनी पुढील ओव्यांतून सहाव्या अध्यायी उल्लेख केलेली ***जगदंबा*** होयः ***"तैं कुंडलिनी जगदंबा" (६-२७२);"मग प्राणुचि केवल जाहली" (६-२८३);"तैसें शक्तीचें रूप मावळे" (६-२८७); "एऱ्हवीं तो प्राणु केवल जाणिजे" (६-२८८);"कां पवनाचां धरु" (६-२८९); "तेजातैं पवनु हारवी" (६-२९९); "तैं वेळीं कुंडलिनी हे भाख जाये। मारुत ऐसें नाम होये। परि तैं शक्तीपण आहे। जंव न मिळें शिवीं।।(६-३०१)."***

मग तेयां मार्गाची धांव। पुरेल प्रवृत्तीची हांव।
जेथ साध्य आणि साधना खेंव। समरसें होय।।६-५९।।
जेथ पुढील पैस पारुखें। मागील स्मरावें तैं ठाकें।
ऐसियें सरसियें भूमिके। समाधि राहे।।६०।।

"हे ध्यानरूपी शिखर ओलांडून गेले की साधक ***समाधि*** रूपी मेरुशिखर गाठतो. साध्य-साधनभेद तेथे उरत नाही. पुढे कोठेही जावयाचे उरत नाही. योगपर्वत चढून आल्याचे अनिर्वाच्य सुख तेथे लाभते. सामरस्य प्राप्त होते. ध्याता-ध्यान-ध्येय्य ही त्रिपुटी विरूनजाते. प्रवृत्ति-निवृत्ति नाठवतात. अशा उत्कृष्ट भूमिकेची ही समाध्यवस्था असते.

"अव्यक्तासक्तचेतसाम्"

संकल्प तुटणारी जी समाधीची सरस भूमिका आहे व अशा रीतीने मनाला ***अमनस्क*** करणारी जी भूमी आहे, तेथे जाण्यासाठी ज्ञानदेव पातञ्जलयोगाप्रमाणेच ***यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि*** या सर्वांचाच आपल्या या ***पंथराज*** अथवा ***क्रमयोग*** मार्गात *(अ.१८वा)* समावेश करतात.

ते हेही सूचित करतात की हा योग साधणे हटियांस म्हणजे हठयोग्यांना कठीण आहे; त्यांना प्रत्याहार साधतांनाच कष्ट होतात व योगाचळाचा निमथा स्वाधीन करून घेण्याची आपली प्रतिज्ञा येथेच सोडून द्यावी लागते. त्यातील क्वचितच कोणी शून्यात प्रवेश करण्यात सफल होतो.

या संदर्भात लक्षात घेण्याची बाब म्हणजे भगवंतांनी बाराव्या अध्यायी ***"क्लेशोऽधिकतरस्तेषां अव्यक्तासक्तचेतसाम्।।१२-५।।"*** म्हणून ज्या निर्गुण निराकाराची उपासना करणाऱ्या ध्यानयोग्यांचा उल्लेख केला आहे, ते व हे ***हटिये*** एकच होत. श्रीज्ञानदेवांचा तसा हठयोगास विरोध तर नाहीच; उलट तो त्यांच्या योगसाधनेचे एक महत्त्वाचे अंग आहे. पण भक्तिविना योग साधणारे हठयोगी मात्र क्लेष पावतात, असे त्यांचे अनुभवसिद्ध मत दिसते. त्यांना उद्देशून ते म्हणतातः

वांचूनि योगाचेनि बळे। अधिक कांहीं मिळे।
ऐसें नोहें आगळें। कष्टचि तेयां।।१२-१५९।।
आपुलियां साटोवाटीं। शून्य घेती उठाउठीं।
तैंहीं मातेंचि किरीटी। पावती गां।।१५८।।
जिहीं सकल भूतांचां हितीं। निरालंबीं अव्यक्तीं।
पसरलियां <u>*आसक्ती। भक्तीवीण*</u> ।।१६०।।
तेयां महेन्द्रादि पदें। करिताती वाटवधें।
आणि ऋद्धिसिद्धिचीं द्वंद्वें। पडोनि ठाति।।१६१।।

"अव्यक्ताच्या योगोपासनेने अधिक असे काही प्राप्त होत नाही. त्यात वेगळे कष्ट मात्र असतात. ते कष्ट उपसून ज्यांनी शून्य आपलेसे करून घेतले आहे, तेही मलाच पावतात." असे श्रीकृष्ण म्हणतात.

"भक्तिविना ज्यांनी सर्व भूतांचे मूळ असणाऱ्या निरालंब अव्यक्ताची आसक्ती धरून हा असा योग आचरला असतो, त्यांचे असे होते. त्यांना देवेंद्रादी पदांचा मोह होतो; ऋद्धिसिद्धिंचा लोभ पडतो; कामक्रोधाचे उपद्रव होतात. त्यामुळे त्यांची वाट अडवली जाते."

पातञ्जल योगसूत्रातील **विभूतिपाद**ात हे धोके स्पष्ट दाखविले आहेत. ***"स्थान्युपनिमंत्रणे संगस्मयाकरणं पुनरनिष्टप्रसंगात्।।३-५१।।पा.यो.सू.।।"*** - देव दिव्य उपभोगांची योगसाधकास निमंत्रणे देतात. त्याबद्दल आसक्ती व अहंभाव वाटल्यास योगच्युती होते; तसेच ***"ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः।।३-३७।।पा.यो.सू.।।"*** –या सूत्रांतून योगमार्गात मिळणाऱ्या सिद्धी समाधिप्राप्तीतील अडथळे असल्याचा इशारा मिळतो. असो.

कामक्रोधांचे विलग। उठावति अनेग।
आणि शून्येंसीं आंग। जुंझवावें कीं।।१२-१६२।।
ताहानें ताहानचि पियावीं। भुकेलियां भूकचि खावीं।
अहोरात्र वावीं। मवावा वारा।।१६३।।
किंबहुना पांडवा। हा अग्निप्रवेशु नीच नवा।
भातारेंवीण करावा। तो हा योगु।।१६५।।

"या अव्यक्तनिष्ठ भक्तिहीन योगप्रकारात निराकाराशी लढाई करावी लागते. ती देहधारी मनुष्यास तापदायक ठरते. तहान लागली तर तहानच प्यावी. भूक लागली तर भूकच गिळावी. रात्रंदिवस वावांनी वारा मोजावा. थंडीपासून बचाव म्हणून थंडीच नेसावी. उन्हापासून संरक्षण करण्यासाठी उन्हच पांघरावे. पावसापासून वाचावे म्हणून पर्जन्यवृष्टीच्याच घरात राहावे. किंबहुना नवरा नसतांनाच सती जाण्याचे दिव्य या योगात नित्य करावे लागते."

ऐसें मृत्यूहूनि तीख। कां घोटें कढत विख।
डोंगर गिळितां मुख। न फाटे काईं।।१२-१६८।।
एथ स्वामीचें काज। ना बापिकें व्याज।
परि मरणेंसीं जूंझ। नीच नवें।।१६७।।
म्हणौनि योगाचियां वाटां। जैं निगालें सुभटा।
तेयां दुःखाचा वांटा। भागां आला।।१६९।।
ऐसाहीं जऱ्हीं धिंवसा। बांधोनियां आकाशां।
झोंबती तऱ्हीं क्लेशा। पात्र होती।।१७४।।

"धन्याचे काम किंवा पितृऋण असे काहीच कारण नसता मरणाशी रोज झुंज द्यावी, तसे या योगाचे आचरण करणे आहे. ते मृत्यूहून तीक्ष्ण आहे. असा हा योगाचा डोंगर कोणी गिळावा! त्यात तोंडच फाटून जाणार नाही कां! म्हणून भक्तिविना निरालंबाच्या योगोपासनेचा असा हव्यास धरणाऱ्यांच्या वांटी दुःखाचे शेलके भोगच येतात. असे असूनही जर कोणी साधक धैर्य एकवटून निराकाराचा असा भक्तिविना पिच्छा पुरवील, तर तो क्लेशाचाच धनी होईल."

इतक्या स्पष्ट शब्दात ज्ञानदेवांनी हा अव्यक्तोपासकांसाठी व तेही भक्ती म्हणजे ईश्वरप्रणिधानविरहित करावयाच्या योगाबद्दल इशारा दिलेला आहे. सूज्ञांस अधिक बोलणे न लगे!

आताच ज्या योग्यांचे आपण वर्णन पाहिले तेसुद्धा **कुंडलिनी जागवून, मध्यमा *(सुषुम्ना)* विकाशून, षट्चक्रभेदन क्रमानेच शून्यांत जाण्याचा खटाटोप** करणारे आहेत. **त्यांच्या व *पंथराज* मार्गाच्या कुंडलिनीप्रक्रियेत वस्तुतः काही भेद दिसत नाही.** परंतु ***पंथराज*** योगमार्गास ज्ञानेश ***सोहोपा*** म्हणून गौरवितात, तर या हठयोग मार्गास ते दुःसह म्हणतात.

त्यातूनही या हठयोग्यांस योगसिद्धी होतच नाही असे नाही. पण त्यांना पंथराजाच्या पांथिकासारखे सुख नाही, तर दु:खाचाच शेलका वांटा त्यांच्या नशिबी येतो. या भेदाचे खरे कारण अखेर योग्याने ध्यानाकरता कोणते आलंबन घेतलेले असते व गुरुपदिष्ट मार्गाने योगसाधना केली किंवा नाही यातील भिन्नतेतच शोधावे लागते.

गुरुपदिष्ट मार्गाने जाणारा सगुणध्यानयोगमार्गी ईश्वरप्रणिधानाचे सूत्र धरून जात असतो. त्यामुळे त्याला मन-बुद्धी-चित्त यांचा ताबा मिळवणे सोपे जाते. हठयोग्यांना मात्र निरालंब निराकाराचे आलंबन घेणे अत्यंत दु:साध्य ठरते. तसेच त्यांच्या मार्गातले श्रम गुरूच्या मार्गदर्शनाविना भौमितिकश्रेणीनेच वाढतात.

त्यांच्या मार्गात त्यांच्या निरालंबाच्या प्राप्तीच्या उद्दिष्टाचे रूपांतर ऋद्धिसिद्धी व देवादिकांची पदे मिळवण्यात होऊ शकते किंवा इतर यौगिक सामर्थ्याच्या मोहात ते गुंतून पडून पथभ्रष्ट होण्याची दाट शक्यता असते. यासारख्या अनेक कारणांनी हा हठयोग्यांचा योगमार्ग दुर्गम आहे, परंतु पंथराज सोपा मार्ग आहे, असेच श्रीज्ञानेश्वरांचे बोल सांगतात.

परमभक्तीचा सोपा मार्ग

याप्रमाणे हठिये वा हठयोगी व जे पातञ्जलयोगी ईश्वरप्रणिधानाचा आधार घेत नाहीत, त्यांना योगमार्ग दुरापास्त ठरतो, असे श्रीज्ञानेशांचे मत दिसते. जे योगी भक्तीशिवाय योग साध्य करू पाहतात, त्यांना योगमार्ग दु:सहच ठरतो. परंतु ज्ञानेशांचा जो **पंथराज**नामे योगमार्ग आहे, त्यात असे क्लेश नाहीत; कारण तो ***सद्गुरुकृपाधिष्ठीत, कुंडलिनीसिद्ध, सामरस्यात्मक, सगुणभक्तिसोपानाचा योगमार्ग*** आहे. याच मार्गास ***अद्वयभक्तिमार्ग-अद्वैतभक्तिमार्ग*** किंवा ***परमभक्तिमार्ग*** असे पण म्हणतात. त्याबाबत ज्ञानेशांच्या ओव्या पाहू या:

इयां ज्ञानभक्ति सहज। भक्तु एकवटला मज।
तो मीचि केवळ हे तुज। श्रुतही आहे।।१८-११३०।।
जैं उभवुनियां भुजा। ज्ञानियां आत्मा माझां।
हें बोलिलो कपिध्वजा। सप्तमाध्यायीं।।११३१।।
तैं हें कल्पादि भक्ती मियां। भागवतमिषें ब्रह्मेयां।
उत्तम म्हणौनि धनंजेया। उपदेशिली।।११३२।।

"त्रिपुटीविरहित अवस्था प्राप्त करून देणारा हा माझा भक्तियोग आहे." ***ज्ञानभक्ती*** म्हणतात ती हीच! हिला कोणी ***चतुर्थ भक्ती*** पण म्हणतात. हीच ***सहजस्थिती*** होय*(१८-११२३,११०७)*. ही दृश्यमार्गापल्याडची भक्ती आहे*(१८-११२३)*.

"या भक्तिद्वारे जो भक्त माझ्याशी एकरूप होतो, तो म्हणजे मीच असतो, हे तुला माहित आहेच. हे कपिध्वजा! ***ज्ञानी हा माझा आत्माच आहे***, असे मी तुला आवर्जून म्हटले होते!" असे श्रीकृष्ण *सातव्या* अध्यायाचा दाखला देत अर्जुनास सांगत आहेत.

ज्ञानी इयेंतैं स्वसंवित्ति। शैव म्हणती शक्ति।
आम्हीं परमभक्ति। आपुली म्हणो।।१८-११३३।।
हे मज मिलतियें वेलें। तेयां क्रमयोगियां फलें।
मग समस्तही निखिलें। मियांचि भरे।।११३४।।

"हीच भक्ती उत्तम म्हणून कल्पारंभी मी भागवतधर्माच्या नांवाने ब्रह्मदेवास उपदेशिली होती. ज्ञानी हिला ***स्वसंवित्ती*** म्हणजे आत्मानुभूती म्हणून ओळखतात; शैव हिला ***शक्ती*** असे नाम देतात; तर ***परमभक्ती*** असे आम्ही तिला म्हणतो. हीच त्या क्रमयोगी पुरुषाला प्राप्त होते. ती पावून तो मला प्राप्त होतो. त्यावेळी हे सर्व विश्व मद्रूप झालेले त्याला दिसते."

आसन-मुद्रा-बंध::::

गोरक्षमते अष्ट योगांगे

श्रीज्ञानदेवप्रणित ***पंथराज*** हा योगमार्ग सर्व प्रकारे कर्म, ज्ञान, योग व भक्ती यांचा उत्कृष्ट समन्वय करणाराच आहे, हे यावरून लक्षात घेता येईल. ***पंथराज म्हणजेच क्रमयोग होय.*** असो. अशा या ज्ञानेशप्रणित योगमार्गाचा पुढे विचार करण्याआधी त्यांच्या गुरुपरंपरेतील नाथसिद्ध ***श्रीगोरक्षनाथ*** हे योगाच्या अष्टांगांबाबत त्यांच्या ***सिद्धसिद्धान्तपद्धति*** या ग्रंथात काय म्हणतात, ते पाहू या:

१) "यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यान-समाधयोऽष्टाङ्गानि। यम इति उपशमः सर्वेन्द्रियजयः आहार-निद्रा–शीत -वातातपजयश्चैवं शनैः शनैः साधयेत्।।२-३२।।सि.सि.प.।।

"यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि" अशी योगाची आठ अंगे आहेत. यम म्हणजे उपशम वा शांती होय. सर्व इंद्रिये, आहार, निद्रा, शीत, वात, उष्णता*(आतप)* यांवर हळूहळू जय प्राप्त करून घ्यावा."

मनाची मनसोक्त धांव थांबवून गुरुप्रेमात नित्य स्थिर राहण्याचा जो धर्म, तोच यम होय. या प्रकारे धर्मानुशीलतेने जीवन ठेवणे हे यमाचरण होय.

२) नियम इति मनोवृत्तीनां नियमनमिति एकान्तवासो निःसङ्गतौदासिन्यं यथाप्राप्ति - सन्तुष्टिवैराग्यं गुरुचरणावरूढत्वमिति नियमलक्षणम्।।२-३३।।सि.सि.प.।।

"नियम म्हणजे मनोवृत्तीचे नियमन, एकांत, नि:संगता, औदासिन्य, वैराग्य, दैवाप्रमाणे अनायासे जे मिळेल त्यात संतोष मानणे व गुरुचरणांशी निरंतर राहणे."

यातील खास नाथसांप्रदायिक लक्षणे म्हणजे गुरुचरणांची उपासना, गुरुप्रेम व नित्य होत असलेले गुरुस्मरण यांना सर्वाधिक महत्त्व आहे. नाथ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने गुरुचरणांच्या नित्य सेवेत वा स्मरणात राहण्यात साधकाने बाकीचे सर्व नियम पाळल्यासारखे होते. उगीच नाही ज्ञानदेव वारंवार गुरूंचे स्मरण करतांना दिसत!! असो.

३) आसनमिति स्वस्वरूपे समासन्नता। स्वस्तिकासनं पद्मासनं सिद्धासनमेतेषां मध्ये यथेष्टमेकविधाय सावधानेन स्थातव्यं इति आसनलक्षणम्।।२-३४।।सि.सि.प.।।

"स्वस्वरूपात स्थिर राहणे म्हणजे आसन! स्वस्तिकासन, पद्मासन वा सिद्धासन यांमधील एक आसन स्वेच्छेप्रमाणे सिद्ध करून सावधानतेने बसणे हे आसनाचे लक्षण आहे."

यातील सिद्धासनाची माहिती गोरक्षनाथांनी ***गोरक्षशतक*** या ग्रंथाच्या पुढील श्लोकात दिली आहे:

"योनिस्थानङ्कमङ्घ्रिमूलघटितं कृत्वा दृढं विन्यसेनमेढ्रे पादपथैकमेव नियतं कृत्वा समं विग्रहम्। स्थाणु संयमितेन्द्रियोऽचलदृशा पश्यन्भ्रुवोरन्तरमेतन्मोक्षवाटभेदजनकं सिद्धासनं प्रोच्यते।।"

"योनिस्थानी चरणतल मांडीपाशी घट्ट घेऊन बसावे. एक पाय मेढ्रस्थानी बसवावा. सम म्हणजे अचल व ताठ बसावे. संयमित इंद्रियांनी राहावे व भ्रूमध्यात अंतर्दृष्टी लावावी." मोक्षप्रद असे हे ***सिद्धासन*** असल्याचे गोरक्षनाथ म्हणतात.

वज्रासन

याच गोरक्षमताचा ***वज्रासन*** म्हणून थोडाफार फरक करून श्रीज्ञानदेवांनी सहाव्या अध्यायी ***मुद्रा*** म्हणत गौरव केला आहे. नाथसंप्रदायात ***आसन, बंध व मुद्रा*** ही योगासनाची उपांगे आसनात अंतर्भूत असतात.

श्रीज्ञानेश्वरी हा वस्तुतः महायोगशास्त्रावरील प्रमाणग्रंथच समजला जावा. तशी श्रीज्ञानदेवमाउलीचीही उत्कट इच्छा असावी असे पण त्यांच्या वेळप्रसंगी काढलेल्या उद्गारांवरून सूचित होते. प्रश्न आहे तो केवळ त्यांना यौगिक दृष्टिकोनातून समजावून घेण्याचा व योगानुभूतींद्वारे त्यांच्या सत्य उद्गारांची सर्वमङ्गल अनुभूती घेण्याचा!!

पुढील ओव्यांमधून सर्वोत्तम असे ***वज्रासन*** श्रीज्ञानदेव आपणांस ***मूळबंध व महामुद्रा*** यांसह विदित करत आहेत.

मुद्रेची प्रौढी ऐशी । तैंचि सांधिजैल आतां परियेसीं।
तऱ्हीं उरु या जघनासीं। जडौनि घाली।।६-१९२।।
चरणतळे देव्हडीं। आधारद्रुमाच्या बुडीं।
सुघटित गाढीं। संचरीं पां।।१९३।।
सव्य तो तळीं ठेविजे। तेणें सिवणीमध्य पीडिजे।
वरी बैसें तो सहजें। वामचरणु।।१९४।।
गुदमेढ्रांआंतौतीं। चारीं अंगुलें निगुतीं।
तेथ सार्ध सार्ध प्रांतीं। सांडूनियां।।१९५।।

"गुह्यद्वार व उपस्थ यात शिवण म्हणजे त्वचेचा सांधा असतो. तो सहज स्पर्शाने कळण्यासारखा असतो. दोन्ही मांड्यांना पोटऱ्या चिकटवून बसावे. उजव्या पायाची टांच शिवणमध्यभागी एक अंगुळ जागेत रोवून बसवावी व डाव्या पायाचा घोटा उजव्या पायाच्या घोट्यावर सहज बसेल असा ठेवावा."

माजीं अंगुल एक निगे। तेथ टांचेचेनि उत्तरभागें।
नेहटिजे वरी आंगें। पेललेनि।।६-१९६।।
उचलिजे कां नेणिजे। तैसें पृष्ठांत उचलिजे।
गुल्फद्वय धरिजे। तेणेंचि मानें।।१९७।।
मग शरीरसंचु पार्था। अशेषुहि सर्वथा।
पार्ष्णीचा माथां। स्वयंभु होय।।१९८।।
अर्जुना हे जाण। मूलबंधाचें लक्षण।
वज्रासन गौण। नाम यासीं।।१९९।।

वज्रासनाची क्रिया या ओव्यात वर्णिली आहे ती अशी: "याप्रमाणे चरणतळांना मूलाधार व स्वाधिष्ठान चक्रांच्या भागात बसवून, उचलले न उचलले इतके शरीर त्यांच्यावर अलगद तोलून धरावे. पोटऱ्या व माकडहाडही अशीच अलगद तोलून धरावीत; त्यायोगे संपूर्ण शरीराचा टांचांवर तोल सांवरल्यासारखे होईल, पण ते उचलले न उचलले इतपतच. शरीर एखाद्या पर्वतशिखराप्रमाणे असे बसलेले दिसेल, अशी ही स्थिती असते." हीच ***महामुद्रा*** होय. या स्थितीत बसून गुरुस्मरण करणाऱ्या साधकास आपोआपच ***मूळबंध*** साधतो व त्यामुळे ***कुंडलिनी उत्थापन*** क्रियेसाठी आवश्यक असणारा ***महावेध*** साध्य होतो. अशा शरीरबैसकेमुळे हातांचे बावखे उचलल्यासारखे होतात व पुढे ***वोढियाणा*** व ***जालंधर*** बंध साध्य होण्यास मदत होते, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे. असो.

वज्रासन, महामुद्रा व मूळबंध अशी तीन लक्षणे जीत स्पष्ट दिसतात, ती स्थिती **महावेधा**ची असते, असे योगशास्त्रमत आहे. त्यासाठी करावयाच्या उर्वरित नाथसांप्रदायिक क्रियांचे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतात:

तंव करसंपुट आपैसें। वामचरणीं बैसें।
बाहूमुलीं दिसे। थोरीव आली।।६-२०१।।
माजीं उभारलेनि दंडें। शिरकमल होय गाढें।
नेत्राद्वारींचीं कवाडें। लागूं पाहती।।२०२।।

"करसंपुष्टांची अशी ठेवण झाली की दंड व बावखे उचलल्यासारखे होऊन खांद्यात शिरकमळ गच्च बसवल्यासारखे दिसते. नेत्रद्वारांची कवाडे म्हणजे पांपण्या मिटू पाहातात."

वज्रासनात बसले की महामुद्रा लागून आपोआपच ***"ऐसीं आधारीं मुद्रा पडें। आणि अधींचा मार्गु मोडें। तेथ अपानु आंतुलीकडें। वोहोटों लागें।।६-२००।।"*** याप्रमाणे पिंडस्थ अपानप्राणाची व्याप्ती मर्यादित होऊन तो मूलाधार ते स्वाधिष्ठान या चक्रांदरम्यानच्या अवकाशाकडे सरकू लागतो. हे होत असतांनाच करपल्लवांची विशिष्ट आकाराची अंजुली तयार होऊन ती डाव्या चरणावर बसते. ***करसंपुष्ट*** म्हणजे (१) ओंजळी दोन्ही एकउताणी व तिच्यावर दुसरी उपडी - डाव्या हातावर उजव्या हाताची आणि (२) ब्रह्मांजली म्हणजे (अ) डाव्या हाताच्या ओंजळीत उजवा हात पण दोन्ही उताणे ठेवणे व (ब) उजव्या हाताच्या ओंजळीत डावा हात- हेही उताणेच ठेवणे असे होय.

वरचिलें पातीं ढळती। तलींचीं तलीं पुंजालती।
तेथ अर्धोन्मिलित स्थिती। उपजे तेयां।।६-२०३।।
दिठी राहूनि आंतुलीकडें। बाहेर पाऊल घाले कोडें।
तैं ठायीं ठाओ पडे। नासाग्रपीठीं।।२०४।।

"पापण्यांच्या पाती खालील बाजूस झुकतात. खालच्या पापण्या व त्यांच्यातून अर्धोन्मीलित दृष्टी बाहेर फाकू लागते. अशी दृष्टी अंतर्मुखच होते. त्यातूनही सहजच ती जर पांपण्यातून बाहेर पडली तर ती नासाग्रपीठाकडेच वळते."

ही दृष्टी ***नासाग्रपीठी*** म्हणजे आज्ञाचक्रावर लावतात व जेव्हा ती बहिर्मुख होते, तेव्हा फार तर नासाग्रापर्यंतचाच तिचा पल्ला असतो. त्यापलीकडचे काहीही ती पाहात नाही.

ऐसें आंतुचा आंतुचि रचे। बाहेरीं मागुतें न वचे।
म्हणौनि राहणें आधिये दिठीचें। तेथेंचि होये।।२०५।।
आतां दिसांची भेटी घ्यावी। कां रूपाची वास पाहवी।
हे चाड सरे आघवीं। आपैसियां।।२०६।।

"असा तो साधक अंतर्लक्ष्य साधतो. ते एकदा साधले की पुनः त्याचे लक्ष बाह्य विषयांकडे वळत नाही. नंतर ती दृष्टी सतत अंतर्मुख अशीच राहते. दिशांची भेट घ्यावी, रूप निरखावे, या इच्छा मग उरत नाहीत. अशी ती अर्धोन्मीलित दृष्टी असते."

गीतेचे आसन

आपण आताच ज्या आसनविषयक ओव्या पाहिल्या, त्या श्रीगीतेच्या पुढील श्लोकांवरील आहेत:

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः।
उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये।।६-१२।।
समं काय शिरोग्रीवं धारयेन्नचलं स्थिरः।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-१३।।

"मृगाजिनादींचे आसन मांडून त्यावर बसावे. मन एकाग्र करावे. चित्त व इंद्रिये यांच्या क्रियांचे नियमन करावे आणि अंतःकरणाच्या शुद्धीसाठी योगाभ्यास करावा. शरीर, मस्तक व मान ही सम धारण करून अचल ठेवावी. स्थिर राहून नासाग्री (नासाग्रपीठी) दृष्टी लावावी. इकडे तिकडे इतर दिशांकडे दृष्टी वळवू नये."

पतञ्जलींनी केवळ ***"स्थिरसुखमासनम्।।२-४६।।पा.यो.सू.।।"*** एवढेच त्रोटकरीत्या ज्याबाबत सांगितले होते, त्याबाबत भगवंतांनी थोडक्या श्लोकांत ***("शुचौ देशे प्रतिष्ठाप्य...। ...... स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-११-१३।।)*** आसन कोठे व कसे मांडावे; शरीरस्थिती कशी असावी; इ.महत्त्वपूर्ण निर्देश केला. परंतु ज्ञानदेवांनी मात्र या सर्वच बाबींविषयी सखोल असे मार्गदर्शन करून, पतञ्जलींचे सूत्र व भगवंतांची उक्ती यांचा मेळ घालून, आपल्या नाथसिद्ध संप्रदायाच्या अनुभवांती परंपरेने चालत आलेल्या योगमार्गाचे रहस्य हातचे काहीही राखून न ठेवता जिज्ञासूंसाठी उघड करून दाखविले आहे. हीच ज्ञानदेवांची खास शैली असल्याचा अनुभव आपणांस ज्ञानेश्वरीचा जसजसा सखोल अभ्यास करावा, तसतसा वारंवार येत जातो.

गोरक्षमते आधारादी::::

आधार व चक्रे

आपण गोरक्षविरचित ***सिद्धसिद्धान्तपद्धति*** या ग्रंथातील यमनियमादी पहात आहोत. आता यम, नियम व आसनानंतर पुढे ते काय सांगतात, ते पाहू.

४) नाथसंप्रदायात श्रीगोरक्षनाथमतानुसार ध्यानासाठी ***नऊ चक्रे, सोळा आधार, तीन लक्ष्ये व पंचव्योम (पांच आकाशे)*** यांची संपूर्ण माहिती योग्यास असावी लागते. त्या ग्रंथाच्या द्वितीय उपदेशांतर्गत *श्लोक क्र.१ ते ३१* मध्ये याचेच वर्णन आहे. त्याप्रमाणे थोडक्यात सांगावयाचे तरः

(अ) षोडष आधार म्हणजे - *१) पादांगुष्ठाधार, २) मूलाधार, ३) गुदाधार, ४) मेढ्राधार, ५) उड्याणाधार, ६) नाभिआधार, ७) हृदयाधार, ८) कंठाधार, ९) घंटिकाधार, १०) तालुआधार, ११) जिह्वाधार, १२) भ्रूमध्याधार, १३) नासाधार, १४) नासामूलकवाटाधार, १५) ललाटाधार व १६)ब्रह्मरंध्राधार* हे होत. यांपैकी प्रत्येक आधारावर ध्यान करण्याची वेगवेगळी फले आहेत. ती साधक जिज्ञासूंनी प्रमाणित ग्रंथांतून समजावून घ्यावीत.

(ब) नऊ चक्रे अशी आहेतः *१) मूलाधारस्थ ब्रह्मचक्र, २) स्वाधिष्ठानचक्र, ३) नाभिचक्र, ४) हृदयाधारमष्टदलकमलम् (आठ पांकळ्यांचे हृदयाधार चक्र), ५) कण्ठचक्र, ६) तालुचक्र, ७) भ्रूचक्र, ८) ब्रह्मरंध्रनिर्वाणचक्र व ९)आकाशचक्र.* या सर्व चक्रांच्या गोरक्षविरचित माहितीचा तक्ता सोबत या उन्मेषाअंती (पृ.क्र.१३९वर) जिज्ञासूंच्या उपयोगासाठी दिलेला आहे.

या पद्धतीत अनेक योगपद्धतींना मान्य असणारे सहस्त्रदलचक्र वा कमल दाखवलेले नाही. तसेच बारा दलांचे अनाहतचक्रही नाही. ब्रह्मरंध्रानंतरही सोळा दलांचे आकाशचक्र गोरक्ष सांगतात.

(क) तीन लक्ष्येः *१) अंतर्लक्ष्य, २)बहिर्लक्ष्य व ३)मध्यलक्ष्य*

(ड) पंचव्योमः *१) आकाश, २) पराकाश, ३) महाकाश ४) तत्त्वाकाश व ५)सूर्याकाश* हे आहेत.

गोरक्षनाथांचे ***षोडष आधार*** हे पातञ्जलधारणेचे देश यांच्याशी समान आहेत; तर ***लक्ष्ये व चक्र*** ही ध्येय्यवस्तुसंबंधित होत; ***व्योम*** हे सूक्ष्म तत्त्वावरील धारणा-ध्यानविषय होत, असे स्थूलमानाने म्हणता येईल. असो. पातञ्जलोक्त धारणाविधी कसा करावा, याचे संक्षिप्त दिग्दर्शन या आधारादींमधून होते. आता चक्रांबाबत अधिक माहिती पाहू याः

आकाशचक्र

या गोरक्षपद्धतीप्रमाणे ***आकाशचक्र*** हे ***ब्रह्मरंध्रनिर्वाणचक्र*** यानंतर दाखवले आहे. त्यात **ऊर्ध्वशक्ती**चे वास्तव्य दाखवलेले आहे. नाथसिद्ध गोरक्षमते ***अधःशक्ती* चे आकुंचन होऊन, *मध्यशक्ती* चा विकास करून व *ऊर्ध्वशक्ती*च्या अवतरणाने व गुरुकृपेने हा**

कुंडलिनीयोग* साध्य होतो.** म्हणून ***ऊर्ध्वशक्तिस्थान - पूर्णागिरीपीठस्थ आकाशचक्र हे **ब्रह्मरंध्रानंतरच्या अवकाशात** असले पाहिजे. ते चक्र **पिंडब्रह्मांडा**च्या **संधिस्थाना**त समजले तरी चालेल.

लययोगात सर्व तत्त्वांचा उपशम आकाशतत्त्वीच होतो आणि आकाशतत्त्वाचा लय आकाशात होतो. त्या दृष्टीने: ***"गगनीं गगन लयां जाये। ऐसें जैं कांईं आहे। तैं अनुभवें जो होये। तो होऊनि ठाके।।६-३१०।।"*** ही ओवी ज्ञानेश्वरांचे नाथपरंपरासिद्ध योगरहस्य व्यक्तवणारी आहे; हे आकाश किंवा गगनच - पाहिजे तर त्याला ***सहजियां***च्या भाषेतला ***गगनमहाल*** असे म्हणू या - ज्ञानेशांनी पुढील ओव्यांत वर्णिले आहे:

जैं उन्मनियेचें लावण्य। जैं तुरियेचें तारुण्य।
अनादि जैं अगण्य। परमतत्त्व।।६-३२०।।
जैं आकाराचां प्रांतु। जैं मोक्षाचां एकान्तु।
जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलें।।३२१।।
जैं विश्वाचें मूळ। जैं योगद्रुमाचें फळ।
जैं आनंदाचें केवळ। चैतन्य गां।।३२२।।
जैं महाभूतांचे बीज। जैं महातेजाचें तेज।
एवं पार्था जैं निज। स्वरूप माझें।।३२३।।

"उन्मनीस जेथून लावण्य प्राप्त होते; तुरियेस जे तारुण्य देते; असे अनादी, अगण्य जे परमतत्त्व आहे - जे ब्रह्मांडाच्याही पलीकडील आहे - जेथे केवळ मोक्षच वसतो; ज्यात विश्वाचे आदि आणि अंत लय पावतात; जे विश्वाचे मूळ आहे; जे योगवृक्षाचे फळ आहे - साध्य आहे; जे पंचमहाभूतांचे बीज आहे; महातेजास ज्यातून तेज प्राप्त होते; किंबहुना जे माझे - ईश्वराचे - निजस्वरूप आहे; त्या स्वरूपाची, जेव्हा गगनात गगनाची मिळवणी होते, तेव्हा तो योगी अनुभूती घेतो आकाशरूप होतो; मद्रूप होतो!!"

याच आकाशाला उद्देशून संत श्रीतुकाराममहाराजांनी आपल्या स्थितीचे वर्णन करतांना म्हटले आहे की:

अणुरेणियां थोकडां। तुका आकाशाएवढा।
गिळूनि सांडिलें कलेवर। भवभ्रमाचां आकार।।
सांडिली त्रिपुटी। दीप उजळिला घटीं।.....
तुका म्हणे आतां। उरलो उपकारापुरतां।।

जीवनमुक्ती ती हीच! **त्रिपुटी सांडून श्रीतुकाराम महाराज आकाशाएवढे जे झाले, तेच *गगनीं गगन लयीं जाणें* होय.** असो.

योगशास्त्रानुसार व मूलतः नाथसंप्रदायसिद्ध योग्यांच्या तत्त्वप्रणालीप्रमाणे विविध योगांगांची, चक्रांची व तदनुषंगिक इतर महत्त्वाची माहिती अभ्यासण्यासाठी जिज्ञासूंनी ***श्री. बाबामहाराज आर्वीकर*** यांच्या ***दिव्यामृतधारा*** या बृहत ग्रंथाचे सूक्ष्म परिशीलन करावे. म्हणजे याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध होईल.

या ठिकाणी एवढाच निर्देश करणे उचित ठरेल की श्रीज्ञानदेवांनी ***आत्मसंयमयोग*** या सहाव्या अध्यायातील आपल्या पंथराजाच्या वैभवात ***गोरक्षविरचित सोळा आधार, नऊ चक्रे, तीन लक्ष्ये व पंच व्योम*** यांची अत्यंत गुह्यरीत्या गुंफण केली आहे. ती योगपथिकांना सूक्ष्म विचारांती व आपापल्या अनुभूतींद्वारे समजून घेता यण्यासारखी आहे. निव्वळ विवेचन करून नीट समजण्यासारखा हा विषय नाही, एवढेच येथे सूचित करणे भाग आहे! असो.

लक्ष्य व दृष्टी

ज्ञाने. ६-२०१ ते २०६ या ओव्यांतून कर, चरण व बाहू यांची आसनस्थ स्थिती वर्णन केली आहे. त्यात लक्ष्य व दृष्टीचा प्रांत लागतो. ही दृष्टी अर्धोन्मीलित अशी नासाग्रपीठी असावी अशी ज्ञानेशांची योजना आहे. वरील पांपण्या मिटण्याच्या अवस्थेत व खालच्या पांपण्या खालीच ठेवून दृष्टी आपोआपच नासाग्रक्षेत्री स्थिरावते. गोरक्षमते ***"नासाधारं तस्याग्रं लक्षयेत् मनः स्थिरः भवति।।२-२२।।सि.सि.प.।।".***

नासाग्रदृष्टी ठेवून मन स्थिर करण्याचीच ही सूचना आहे. ही अंतर्लक्ष्य दृष्टी आहे, हे ***"दिठी राहौनि आंतुलीकडें"*** व ***"ऐसें आंतुचां आंतुचि रचे"*** या शब्दांनी व्यक्तवले आहे. गोरक्षमतें ***(गोरक्षशतक)*** हे लक्ष्य भ्रूकुटींच्या आंतरभागी म्हणजे आज्ञाचक्रात स्थिर केले पाहिजे. ***गुरुपादुकापंचक (Serpent Power- Arthur Avlon)*** या ग्रंथाच्या योगप्रणालीनुसार सद्गुरूंच्या पादुका, सद्गुरुचरण, सद्गुरुमूर्ति किंवा सदाशिव, महेश, शंभू ही या ठिकाणची लक्ष्ये वा ध्येय असू शकतात. असो.

बंध

याप्रमाणे ज्ञानदेवांची वाणी श्रीगोपालकृष्णांचे गुह्य अभिप्राय उलगडून दाखवत जाते. आता बाह्यांगांची स्थिती पूर्णपणे प्रकट करणाऱ्या पुढील शेष ओव्या पहा:

मग कंठनाल आटे। हनुवटी हे हडौति दाटे।
तैं गाढी होऊनि नेहटें। वक्षःस्थलीं।।६-२०७।।
माजि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपें।
तो जालंधरु म्हणिपे। पांडुकुमरा।।२०८।।
नाभी वरी पोखे। उदर हें थोके।
अंतरी फांकें। हृदयाकाशु।।२०९।।
स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं। नाभिस्थानातलुवटीं।
बंधु पडें तो किरीटी। वोढियाणा।।२१०।।
ऐसीं शरीराबाहिरीलीकडें। अभ्यासाची पांखर पडे।
तंव आंतु त्राय मोडे। मनोधर्माची।।२११।।

"करसंपुट वामचरणावर ठेवल्याने व हातांचे बावखे पुढे आल्याने आपोआपच शिरकमळाच्या भाराने हनुवटी वक्षःस्थलावर विसावते व घंटिका आत दाबली जाऊन ***जालंधरबंध*** सिद्ध होतो. कुंभक प्राणायामाची अवस्था साधण्यासाठी या सर्व शरीररचनाकौशल्यामुळे स्वाधिष्ठानावरच्या व नाभिस्थानाखालच्या क्षेत्रावर ***वोढियाणाबंध*** पडतो व त्यामुळे नाभिकमल शरीराच्या पूर्वेकडे म्हणजे पुढील भागाकडे

आपोआप ढकलले जाऊन नाभि ऊर्ण होते. म्हणजे कोळ्याचे जाळे जसे मध्यातून ताणून ओढावे, तसे नाभिस्थान नाभीशी पुढच्या बाजूला ओढल्यागत होते. या सर्व अवस्थेत पोटाचा इतर भाग खपाटीला म्हणजे पश्चिमेला जाऊन या अंतर्गत घडामोडींमुळे हृदयाकाश आत प्रफुल्लित होते."

हृदयाकाश प्रफुल्लित होण्याचा अर्थ चित्त प्रसन्न होणे असाच केला पाहिजे. ज्ञानेशांच्या या महायोगमार्गातच प्रकृतीच्या देह-पिंडांतर्गत असलेल्या सर्वच पसाऱ्याची यथायोग्य नोंद घेऊन ***लययोग*** साधण्याची योजनाबद्ध आखणी केलेली दिसते, ती अशी! असो.

योगसाधनास्थल::::

"शुचौ देशे"

शरीर ***सहजसुखमासना***त प्रविष्ट करून, प्राणांची स्थिती व्यवस्थित करून, मनाला नासाग्रदृष्टीने स्थिर करून व चित्ताला प्रसन्न करून या योगाची पुढील क्रिया आचरली जाते. त्याविषयी विचार करण्यापूर्वी या स्थितीत योग्याला शरीरस्थितीप्रमाणे मानसिक स्थितीचेही सुयोग्य अधिष्ठान असले पाहिजे.

ज्ञानदेव सांगतात की "शरीराचे बाह्य व आंतरस्वरूपअभ्यासामुळे असे झाले की मनोव्यापारांचे सामर्थ्य लटके होते. कल्पना लोपतात; बाह्य विषयांकडे मनाचे धावणे पांगुळते. मन स्वतःच्याच ठायी विराम पावते. क्षुधा-निद्रांची आठवणही उरत नाही."

अशा अवस्थेत बराच काळ शरीराला, मनाला व चित्ताला ताण न देता योग्याला बसता यावे म्हणून व देहधर्मांच्या आवश्यकता जनसंपर्कापासून दूर राहून नीट भागवता याव्यात म्हणून ज्ञानेशांनी दूरदृष्टीने केलेली स्थळ व बैठकीची स्थान इ.व्यवस्था अवलोकणे फारच उपयुक्त ठरेल.

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम्।।६-११।।

या गीतेच्या श्लोकावरून भगवंतांचे याबाबतचे विचार स्पष्ट दिसून येतात. "शुद्ध पवित्र अशा स्थळी आसन मांडावे. ते आसन अत्यंत उंच वा खोलगट ठिकाणी नसावे. दर्भावर मृगाजिन व त्यावर वस्त्र आंथरून आसन तयार करावे."

ज्ञानेश यावर सहजच सांगून जातातः

तऱ्हीं विशेषें आतांचि बोलिजैल। परी तैं अनुभवें उपेगा जाईल।
म्हणौनि तैसे एक लागेल। स्थान पाहावे।।६-१६३।।
जेथ आराणुकेचेनि कोडें। बैसलियां उठो नावडे।
वैराग्यासीं दुणीव चढे। देखिलियां जैं।।१६४।।
जो संतीं वसविला ठावो। संतोषासि सावेव।
मना होय उत्सावो। धैर्याचां।।१६५।।
अभ्यासुचि आपणयांतैं करी। हृदयांतैं अनुभव वरी।
ऐसीं रम्यपणाची थोरी। अखंड जेथ।।१६६।।
जेयां आड जातां पार्था। तपश्चर्या मनोरथा।
पाखंडियांही आस्था। समूल होय।।१६७।।
स्वभावें वाटे येतां। जऱ्हीं वरपडा जालां अवचितां।
तऱ्हीं सकामुही परि माघौतां। निघों विसरें।।१६८।।
हे राज्य वर सांडिजै। मग निवांत एथेचि असिजै ।
ऐसें शृंगारियांही उपजैं। देखतखेवों।।१७०।।

या ओव्यातून ज्या ठिकाणी योगसाधना करावयाची त्या स्थळाचे सुरम्य दर्शन होते. हे सर्व सविस्तर सांगून ज्ञानेशांनी आपल्या अनुभवांच्या बोलांनी साधकसज्जनांस अत्युत्कृष्ट मार्गदर्शनच केले आहे.

"या अभ्यासाला योग्य ठिकाण शोधावे; जे पाहिल्याबरोबर वैराग्याला भर येतो व ज्या ठिकाणी सहज बसले तरी त्याची आवड निर्माण होते व उठावेसे वाटत नाही; जेथे संतांनी वास्तव्य केले आहे; ज्या ठिकाणी मन उत्साहाने ओसंडून वाहते; संतोषाला कोंब फुटतात; ज्या ठिकाणी गेल्यानंतर नास्तिकालाही मनापासून तपश्चर्या करण्याची दुर्दम्य इच्छा निर्माण होते. संसारास तन-मन-धन यांनी विकलेला एखादा जीव जर चुकून का होईना, तेथे आला तर त्याचे पाऊल परत फिरायला मागणार नाही; एखाद्या विलासी पुरुषालासुद्धा ज्या स्थानाचा इतका मोह होईल की तो राज्यसुद्धा त्यावरून ओवाळून टाकण्यास उद्युक्त होईल!"

ऐसें न राहातयांतेही राहावीं। भ्रमतयांतेंही बैसवीं।
थोपटोनि चेववी। विरक्तीतैं।।६-१६९।।
जैं एणें मानें बरवंट। आणि तैसेंचि अति चोखट।
जेथ अधिष्ठान प्रकट। डोलां दिसें।।१७१।।

"असे जे सुंदर व पवित्र स्थान असेल की तेथे सहज म्हणून गेलेल्याला पण राहावेसे वाटेल व ज्याचे पाऊल कोठेही स्थिर राहत नाही, अशाला पण तेथे ठेववून घेतले जाईल! ज्या ठिकाणी अभ्यासच स्वतः होऊन घडतो व अनुभूती केवळ तेथील वास्तव्यानेच येते, इतके ते स्थान नितांत रमणीय असावे. अशा स्थानी आत्मदर्शन चर्मचक्षूंनाही सहज घडू शकावे! असे ते स्थान असावे."

अशा ठिकाणी साधकाला जनसंपर्काचा त्रास होऊ नये व निर्जन असूनही, त्याच्या वैयक्तिक गरजा इतरत्र कोठेही न जाता पूर्ण व्हाव्यात आणि त्यामुळे अखंडपणे योगाभ्यासास चालना मिळावी, या दृष्टीनेही ते स्थान सोयीस्कर असले पाहिजे. विचक्षण दृष्टीचे ज्ञानेश म्हणूनच सांगतात कीः

आणिकही एक पाहावे। जैं साधकीं वसतें होआवें।
आणि जनाचेनि पायरवें। मैलेचि ना।।६-१७२।।
जेथ अमृताचेनि पाडें। मुलाहिसकट गोडें।
जोडिती दाट झाडें। सदा फलती।।१७३।।
पाऊलां पाऊलां उदकें। परि वर्षाकालींही चोखें।
निर्झरें कां विशेषें। सुलभें जेथें।।१७४।

"रम्य, पवित्र व सुंदर अशा स्थळाची अभ्यासासाठी निवड करतांना साधकाने तेथे संसारी जनांच्या संपर्काचा उपद्रव होणार नाही; तसेच तेथे इतर समानधर्मा साधकांचे वास्तव्य आहे का; हेही निरखून घ्यावे."

प्रत्यक्ष योगाभ्यासात जरी त्या साधकांची मदत होण्यासारखी नसली, तरी अडीअडचणी, आजार, रोगराई, श्वापदे इत्यादींपासून संरक्षण करण्यात त्यांची मदत जरूर होऊ शकेल.

"तेथे सुमधुर फलांनी परिपूर्ण असे वृक्ष असावेत व ठिकठिकाणी स्वच्छ, शीतल व चवदार पाण्याची तळी, विहिरी आणि पावसाळ्यातही गढूळ न होणारे निर्झर असावेत."

हेतू हा की साधकांना योगाभ्यासासाठी आवश्यक असणारा योग्य तो आहार व शुद्ध निर्जंतुक पाणी इ.ची नैसर्गिकरीत्याच आपोआप व्यवस्था व्हावी आणि त्यासाठी वेगळे कष्ट व अधिक वेळ लागू नये.

हा आतपुही अलुमालु। जाणिजैं तऱ्हीं शीतलु।
पवनु अति निश्चलु। मंद झुलुकें।।६-१७५।।
बहुतकरूनि निःशब्दु। दाट न रिगे श्वापदु।
शुक हन षट्पदु। तेऊंतें नाहीं।।१७६।।

"त्या स्थानी कडक उन्हाळा तर नसावाच; पण जे उन्ह असेल, ते सर्वदा सौम्य असावे. सुसाट वाऱ्यावादळाचा तो भाग नसावा; तर तेथे सतत शीतल मंद पवनाच्या झुळुका येत असाव्यात. हा परिसर शांत व निःशब्दच असावा. त्यात पोपट, भ्रमर व इतर किडेकीटक नसावेत. त्याचप्रमाणे तेथे श्वापदेही नसावीत." हे सगळे कोलाहल तर करतातच. पण श्वापदे व विषारी कीटक जीवनास अपायकारकही ठरू शकतात.

पाणिलगें हंसें। दोनीं चारीं सारसें।
कवणें एकें वेळें बैसें। तऱ्हीं कोकीलु हे।।१७७।।
निरंतर नाहीं। तऱ्हीं आली गेली कंहीं।
होतु कां मयूरेंही। आम्हीं ना न म्हणो।।१७८।।
परि आवश्यक पांडवा। ऐसा ठाओ जोडावा।
तेथ निगूढ मठ होवावा। कां शिवालय।।१७९।।
दोनींमाजि आवडे तैं। जैं मानिलें होय चित्तें।
बहुतकरूनि एकांतें। बैसिजें गां।।१८०।।

"असे असले तरी तेथे पक्षिसृष्टी अजिबातच नसावी, असे मात्र नाही. तेथे पाण्यात विहरणारे हंस, दोनचार सारस पक्षी, मधूनच कधी तरी *कुहूऽऽ कुहूऽऽ* अशा मधुर पंचम स्वरात आलाप घेणारा कोकीळ व नेहमीच नाही पण मधून मधून दिसणारे मयूरही असायला हरकत नाही. या पक्षिगणांमुळे तेथील रम्य वातावरणात अधिकच भर पडणार! एक मात्र खरे की अशा स्थानी साधकाला राहता येईल व थंडी-वारा अन ऊनपावसापासून आणि रात्रीबेरात्री आसरा घेता येईल असे एखादे उदात्त शिवालय किंवा साधकाच्या आवडीनुसार एखादा मठ असावा. त्या ठिकाणी साधकाने शक्यतोवर एकांतातच बसून योगसाधना करत जावे."

बैठक::::

बैसका वा आसन

याप्रमाणे बाह्य परिसरविषयक बाबींची आवश्यक ती सोय करून झाली. आता योगसाधना करण्यासाठी कोठेतरी आसन मांडणे जरूर आहे. त्याची सोय कशी करावी, हे सांगतांना ज्ञानदेवांची विचक्षण दृष्टी अधिकाधिक प्रत्ययास येते:

म्हणौनि तैसें तैं जाणावें। मन राहातें पाहावें।
राहेल तेथ रचावें। आसन ऐसें।।६-१८१।।
वरी चोखट मृगसेवडी। माजीं धूतवस्त्राची घडी।
तलुवटीं अमोडीं। कुशांकुर।।१८२।।
सकोमल सरिसें। सुबद्ध राहती आपैसें।
एक पाडें तैसें। वोजा घालीं।।१८३।।
परि सांवियांचि उंच होईल। तऱ्हीं आंग हन डोलेल।
नीच तऱ्हीं पावेल। भूमिदोषु।।१८४।।
म्हणौनि तैसें न करावें। समभागें धरावें।
हे बहु असो होआवें। आसन ऐसें।।१८५।।

"आपले मन प्रसन्न होईल अशा ठिकाणी - मठात, शिवालयात किंवा इतर जागी, पण एकांतात योग्य जागा शोधून बैसका म्हणजे आसन रचावे. सखल जमिनीवर कोवळे दर्भांकुर एकावर एक बांधून रचावे. जमीन गोमयाने सारवलेली असल्यास उत्तमच! दर्भांकुरांची साधारण चटईप्रमाणे रचना करून त्यांवर मृगचर्म घालावे. आसनाची उंची जास्त नसावी." अन्यथा मुद्रा - वज्रासन इ.प्रयोग करतांना ते उंच सखल होऊन नीट बसता येणार नाही.

"तसेच ते अगदी जमिनीसरपटसुद्धा नसावे. कारण त्यामुळे भूमिदोष-शीत-उष्ण-काठिण्य इ.कारणांमुळे देह सुखात आसनस्थ होणार नाही." तसेच वज्रासन नीट करता येणार नाही व आसनप्रयोग कष्टप्रद होईल.

"अशा प्रकारे आसन रचून त्यावर धूतवस्त्राची घडी करून ठेवावी. शक्यतोवर हिवाळ्यात मऊ लोकरीचे व उन्हाळ्यात मऊ सूती वस्त्र वापरावे. आसनावर बसतांना मन समाधानी असावे."

हे वस्त्र धूता येण्यासारखे असल्याने रोजच्या वापरातले मृगचर्म घामाने खराब होणार नाही; तसेच हठयोगाच्या ज्या काही क्रिया पंथराजाशी संबंधित असल्यामुळे केल्या जातील, त्यांद्वारे जो शरीरस्थ विद्युतप्रवाह संचरित होईल, त्याचे भूमिमार्गे निःसरण होण्यापासून रोधन केले जाईल व त्यायोगे योगाभ्यासातील व्यत्यय टळेल. असो.

"करूनि सद्गुरु स्मरण। अनुभविजे।।"

त्यानंतर साधना कशी करावी याचे मार्गदर्शन पुढील ओव्यातून येते:

मग तेथ आपण। एकाग्र अंत:करण।
करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे।।६-१८६।।

"अंतःकरण एकाग्र करून सद्गुरुस्मरण करावे." यात मागे सागितलेला पंथराजाचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे सद्गुरुपदिष्ट साधनमार्ग अनुस्यूत आहे. हा सगळाच मार्ग इतर योगमार्गापासून भिन्न आहे तो त्यातील सद्गुरुकृपेच्या अधिष्ठानाने! ***सद्गुरुकृपेचे नाथसंप्रदायात अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण माहात्म्य आहे. सिद्धसिद्धान्तपद्धति*** या गोरक्षकृत ग्रंथात गोरक्ष गर्जून सांगतातः

न गुरोरधिकं। न गुरोरधिकं। न गुरोरधिकं।
शिवशासनतः। शिवशासनतः। शिवशासनतः।।

"आदिनाथ शिवाचा या मार्गियांस असा आदेश आहे की गुरुपेक्षा महत्तर असे काहीच नाही!!!"

तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्यसात्त्विकें भरें।
जंव कठिणपण विरे। अहंभावाचें।।६-१८७।।

"तर अशा कृपासिंधु करुणाकरु सद्गुरूंचे पुण्यस्मरण केल्याबरोबरच नाथपंथीय साधकाला योगाचा अनुभव येण्यास सुरुवात होते. त्याला कष्टपूर्वक काहीच क्रिया, कृती, वृत्तिनिरोध, प्राणप्रक्रिया, प्रत्याहार इ.करावे लागत नाहीत. केवळ सद्गुरूंच्या स्मरणानेच त्याचा मार्ग प्रशस्त होतो. त्याचा अहंभाव सहजच नाहीसा होतो. बाह्याभ्यंतरी सात्त्विकता भरून जाते."

विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। हृदयामाजि।।६-१८८।।
ऐसें ऐक्य हे सहजें। फांवें तंव राहिजे।
मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी।।१८९।।
आतां अंगातैं अंग धरी। पवनातैं पवनुचि वरी।
ऐसीं अनुभवाचीं उजरी। होंचि लागे।।१९०।।

"विषय आठवेनासेच होतात. मग इंद्रियांना खेचून धरून प्रत्याहार करण्याची गरज काय! इंद्रिये पण तृप्त होत्साती त्यांच्या त्यांच्या गोलकात स्थिर होतात. असा इंद्रियजय अनायासेच होतो. देहेंद्रिये, मन, बुद्धी, चित्त व अहंकाराचे असे आपोआपच ऐक्य होऊन साधक प्रसन्न अंतर्यामाने व सद्गुरू हेच परमात्मा - परब्रह्म - परमपद आहेत या बोधपूर्वक श्रद्धेने आसनावर बसतो न बसतो तोच काय - आपोआपच मुद्रा-बंध-वेध इ.क्रिया होऊ लागून प्रणापानगती सम होते. ***अनुभवाची उजरी*** म्हणजे ***कुंडलिनीशक्ती*** स्वयेंच प्रबुद्ध होऊन पुढील योगपथ आक्रमण्यास सावधान होते."

प्रवृत्ति माघौति मोहरे। समाधि ऐलाडीं उतरें।
आघवें अभ्यासूं सरे। बैसतखेंवों।।६-१९१।।

"असे सर्व काही आपैसे होत असल्याने साधकाचे प्रवृत्तिकार्य सहजच थांबते व योगाचळाचा निमथा ठाकण्यातल्या दुःसाध्य कष्टातून निवृत्त होत्साता तो ठायीच समाधि पावतो. ज्या समाधिसुखाच्या दिवाळीसाठी योग अभ्यासावयाचा, ते अनिर्वाच्य सुख स्वयेच त्याचे घर पुसत येते व म्हणून आसनावर सद्गुरूंचे स्मरण करून बसताक्षणीच त्या भाग्यवंत साधकाचे अभ्यासाचे कष्ट सरून जातात. पुढे सर्व पंथराज प्रवास सुखानेच सुखात विचरण्याचा!!"

पंथराजाचे विशेषत्वः:::

पंथराजाची प्रौढी

अशा या सद्गुरुकृपेच्या महतीमुळेच पंथराजाची प्रौढी गात ज्ञानदेव म्हणतात कीः

तेथ प्रवृत्तितरूंच्या बुडीं। दिसती निवृत्तिफलांचियां कोडीं।
जियें मार्गींचा कापडी। महेशु आझुनि।।६-१५३।।
पैं योगीवृंदे वहिलीं। आडवीं आकाशीं निघालीं।
कीं तेथ अनुभवाच्या पाऊलीं। धोरणु पडिला।।१५४।।

प्रवृत्तितरु म्हणजे गुरुगोरक्षांनी जिला ***परपिंडस्थ कुंडलिनीशक्ती*** असे म्हटले आहे, तिच्या प्रपंचरूप विस्ताराचा वृक्ष. हाच श्रीगीतेत ***अश्वत्थ*** म्हणून प्रसिद्ध आहे *(अ.१५).*

"या कुंडलिनीच्या ***आधारचक्रापासून सुरू होणाऱ्या पंथराज***मार्गाने जाणाऱ्या साधकास आरंभापासूनच निवृत्तिपरमानंदरसमय फळांचा सडाच त्या प्रवृत्तितरूच्या तळी पडलेला सापडतो. कुंडलिनीच्या मुखाशीच साधकास एवढी फळे मिळतात की जे अनिर्वाच्य सुख इतर मार्गात पूर्ण मार्गक्रमणा झाल्याशिवाय दृष्टीसही पडत नाहीः ते त्याला या मार्गास लागतांनाच लाभते. नवल नाही की त्याला हा मार्ग चालतच जावे असे वाटत राहते."

"पूर्वकालीन योगिवृंदांनी सायासपूर्वक आकाशरूपी अरण्यातून हा मार्ग शोधला."

समर्थ रामदासस्वामींनी म्हटलेलाः

आकाशमार्गी गुप्त पंथ। तो जाणिती योगिये समर्थ।
इतरांस हा गुह्यार्थ। सहसा ना कळे।।दासबोध।।१-९।।

असा हा तो ***आकाशगमनपथ*** बहुत अनुभवांती त्या योग्यांना कळून आला.

तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतलीं एकसरें।
कीं एर सगळें मार्ग निदसुरें। सांडूनियां।।६-१५५।।

"इतर मार्गातील खांचाखोचा जाणणाऱ्या त्या पूर्वसूरींच्या समर्थ योग्यांनी हा सरळ योगपथ सोपान शोधून काढला. इतर सर्व अज्ञानी मार्गांचा त्याग करून त्या सर्वांनी हाच ***पंथराजमार्ग*** अवलंबिला. त्यामुळे वनांतरी रूळलेल्या पाऊलवाटेप्रमाणे ही ***सुषुम्नापथाची वाट***सुद्धा वेगवेगळ्या खाणाखुणांनी सुस्पष्ट झाली. त्या वाटेवरील विश्रांतिस्थळे, तहानभूक भागवण्याच्या सोयी, वाटचालीचे कष्ट विसरायला लावणारी मनोरंजन स्थळे इ.ची माहिती झाली."

"वस्तुतः हा पंथ दृष्टिक्षेपात आला की साधक सगळे देहधर्मच विसरून जातो; कालाचेसुद्धा त्याला भान उरत नाही. तो जेथे पाऊल टाकतो तेथे पावलागणिक मोक्षसुखाची खाण उघडते. वाटेत जर तो विसावला तर हवे ते स्वर्गसुख त्याला मिळते; ऋद्धिसिद्धी हात जोडून समोर त्याच्या सेवेसाठी उभ्या असतात."

निगिजें पूर्वीलियां मोहरां। कीं येईजे पश्चिमेचियां घरां।
निश्चलपणें धनुर्धरा। चालणें येथिंचे।।६-१५९।।
येणें मार्गें जेयां ठायां जाईजे। तो गांवो आपण होईजे।
हे सांगो काय सहजें। जाणसीं तूं।।१६०।।

"या मार्गाने जाणारा त्यास जेथे जावयाचे ते गंतव्य म्हणजे परमात्मरूप स्वतःच होऊन जातो. ***पूर्वीलियां मोहरां*** म्हणजे योगशास्त्रींचा ***पूर्वमार्ग*** आक्रमण करून मग ***पश्चिमेचियां घरां*** म्हणजे **पश्चिममार्गातील *आज्ञाचक्र ते आकाशचक्र*** ही चक्रस्थाने ओलांडून साधक ***पश्चिमेचे घर म्हणजे महाशून्य*** सहजच गांठू शकतो. ***पूर्वमार्ग म्हणजे मूलाधार ते आज्ञाचक्र यापर्यंतचा भाग होय.*** ही सर्व मार्गक्रमणा अत्यंत निश्चलतेने होते."

पाठीं महर्षि येणें आले। साधकांचे सिद्ध झालें।
आत्मविद थोरावलें। येणेंचि पंथें।।६-१५६।।
हा मार्गु जैं देखिजे। तैं तहानभूक विसरिजे।
रात्रिदिवस नेणिजे। वाटें इयें।।१५७।।
चालतां चालतां पाऊल जेथ पडे।
तेथ अपवर्गाची खाणी उघडे।
आव्हांटलियां तऱ्हीं जोडे। स्वर्गसुख।।१५८।।

"याच मार्गाने योगक्रमणा करतकरत कित्येक योगसाधक सिद्धत्व पावले; आत्मज्ञानीसुद्धा याच मार्गाने जाऊन मान्यवर झाले. महर्षींनी पण ब्रह्मप्राप्तीसाठी हाच मार्ग चोखाळला. अशा या मार्गाचा एक मोठा मान्यवर पांथिक म्हणजे महेश! या मार्गाची त्याला इतकी गोडी लागली की तो प्रत्येक साधकाबरोबर त्याचा आदिगुरू म्हणून परतपरत या मार्गाची यात्रा करतकरतच युगानुयुगे अविरत असीम आनंद उपभोगत आहे. हा महेश तर खरा परमभक्त! तो अजूनही परमानंदरूप भक्तीच्या चंद्रभागेत डुंबतच बसला आहे! त्याचा भक्तिभाव अक्षय्य आहे!"

"ना आदिगुरु शंकरा"

या आदिगुरू शंकरापासूनच श्रीज्ञानदेवांची गुरुपरंपरा ***आदिनाथ - उमादेवीनाथ - मत्स्येंद्रनाथ*** या क्रमाने त्यांच्यापर्यंत येऊन पोहोचली आहे व या त्याच्या परंपराप्राप्त पंथराज योगमार्गाचे-या गुरुकृपेचे-वैभव त्यांचा हा ज्ञानेश्वरी नामे चिद्रत्नस्वरूप ग्रंथ आपणांस उपलवून दाखवत आहे; साधकांस अखंड मार्गदर्शन करत आहे.

"जियें मार्गींचा कापडी। महेशु आझुनि।।" ही ओवी बरेच काही सांगून जाते. ज्या शंभूचा गौरव ***चैतन्यशंभू*** म्हणून श्रीकृष्ण करतात; जो म्हणजे त्यांचा परमभक्त, ज्याला वाखाणतांना स्वतःचीच स्तुती करण्याचा दोष लागेल, असे ते म्हणतात; ज्याला त्यांनी आपल्या शिरीं धारण केले आहे; जो गीतातत्त्वाची नित्यनूतन गोडी जाणणारा आहे; जो ज्ञानेश्वरांच्या गुरुपरंपरेचा आदि आहे; ***"ना आदिगुरु शंकरा-। लागौनि शिष्यपरंपरा।"*** असा जो आहे; ज्याच्यापासून हा ***बोधाचा संवसारा*** त्यांच्या परंपरेत प्रसृत झाला, तोच हा **सर्वकल्याणकारी शिवशंभू *पंथराज* परंपरेचा खरा पाईक आहे,** असे श्रीज्ञानेश्वर येथे सूचित करत आहेत. हा महेश स्वतः योगी आहे. एवढेच काय त्याने योगाचे किमान सव्वा लक्ष मार्ग प्रवर्तित केले आहेत. आणि तो परमज्ञानीसुद्धा आहे.

तसेच प्रलयकाली सर्व सृष्टीचा संहारकर्ता असा एक उत्कृष्ट कर्मयोगी पण तो आहे. ***त्याच्यात कर्म, ज्ञान, योग व भक्ती या सर्व तत्त्वांचा सुंदर संगम झाला आहे.*** जर या शंभूला जिज्ञासूंनी पंथराज -ज्ञानेश्वरी-गीता यांचे रहस्य प्रकट करणारी विभूति म्हणून मानले, तर ज्ञानेशांचे तत्वज्ञान व गीता-ज्ञानेश्वरीतील योगशास्त्राचा अभिप्राय त्यांच्या लक्षात यथार्थ येण्यास विलंब लागणार नाही!!

महेशाच्या या एकाच उल्लेखावरून आपल्या सहज लक्षात येते की ***गीता-ज्ञानेश्वरीद्वारे श्रीगोपालकृष्ण व ज्ञानेश्वर यांना आपणांस कर्म-ज्ञान-भक्ति-योग या चतुष्टीचा समन्वय करणारा एकच योगमार्ग दाखवायचा आहे.*** तो मार्ग उत्कृष्ट व सहज असल्याने इतर मार्गांच्या चक्रव्यूहात न शिरता व साधकांचा बुद्धिभेद न करता त्यांनी हा ***पंथराज***च उत्कृष्ट मार्ग म्हणून जगाला विदित केला आहे. लोकसंग्रहाचे कार्य अत्युत्तमरीत्या करणारे श्रीकृष्ण व ज्ञानेश्वर हे महाज्ञानी सामान्य जनांचा बुद्धिभेद कदापिही होऊ देणार नाहीत; कारण भगवंतांचे वचनच आहे की:

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिणाम्।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन्।।३-२६।।

"ज्ञानी लोकांनी कर्माठायी आसक्त असणाऱ्या अज्ञानी लोकांच्या अंतःकरणात कर्माविषयी अश्रद्धा उत्पन्न करू नये. उलट स्वतः योगयुक्त होऊन सर्व कर्मे उत्तम प्रकारे आचरावीत व लोकांकडूनही उत्तम कर्माचरण करवून घ्यावे," अशी श्रीकृष्णोक्ती आहे.

"बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊलें।" असे श्रीतुकाराम महाराजांचे म्हणणे आहे. ज्ञानेश व श्रीकृष्ण या विभूति तुम्हाआम्हा सामान्य जनांचे अल्प प्रज्ञासामर्थ्य जरूर लक्षात घेऊन होते. आमचा बुद्धिभेद कसा होऊ शकेल हे त्यांना नीट माहीत होते. म्हणून स्वतःच्या आचरणातूनही त्यांनी कैवल्याच्या खुणा त्यांच्या अतरंगीचे रहस्य आम्हापुढे प्रकटवण्यासाठी आविर्भूत केल्या.

त्यांच्या जीवनचरित्राचे नीट परीक्षण केले तर आपल्याला गीता - ज्ञानेश्वरीतील या योगरहस्याचा -कर्म-योग-ज्ञान-भक्ती समन्वित करणाऱ्या योगाचा-बोध व्हायला जरूर मदत होईल. महापुरुषांच्या ग्रंथांचा नीट बोध होण्यासाठी त्यांच्या चरित्राचे अवलोकन फारच उपयोगी ठरते.

महापुरुषांचे कार्य व संदेश

उदाहरणच द्यावयाचे झाले तर आद्य श्रीमच्छंकराचार्यांचे घ्या. ***"सर्व कर्मांचा जाणीवपूर्वक समूल त्याग म्हणजेच संन्यास"*** हाच जर त्यांच्या गीताभाष्याचा खरा संदेश अता तर वयाच्या अवघ्या

बत्तीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी एवढे कर्तृत्व गाजवले असते काय! आचार्यांनी तर बोलूनचालून बालवयातच चतुर्थाश्रम स्वीकारला होता!

ज्ञानेश्वरांना जर योगमार्ग अवघड आहे व तो त्याज्य आहे हा संदेश जर खरोखरच द्यायचा असता; ***"योगयागविधि। येणें नोहें सिद्धि। वायांचि उपाधि। दंभधर्म।।"*** या त्यांच्या हरिपाठातील विशेष उक्तीचा जनांपुढे काही विद्वान जो योगास गौण व अवांच्छनीय लेखणारा अर्थ प्रकट करतात, तोच ज्ञानेशांना जर अभिप्रेत असता, तर योगविभवभांडारच असा योगानुभवरहस्य प्रकट करणारा, पंथराजास स्पष्ट करून सांगणारा, केवळ योगशास्त्रच ज्यात सांगितले आहे अशा गीतेवरचा हा ज्ञानेश्वरीरूप ग्रंथ - ***भावार्थदीपिका*** असे ज्याचे त्यांनी नामकरण केले आहे तो - ही आपली संजीवन खूण म्हणून कां बरे मागे ठेवली असती! योगशास्त्रावर विपुल प्रकाशझोत टाकणारी अभंगरचना का केली असती! ***द्रष्टा, दृश्य व दर्शन या त्रिपुटीचा लोप*** हेच सर्वोत्कृष्ट *दर्शन* म्हणून प्रकटविणारे **अमृतानुभव**रूप दीपगृह आमच्या मार्गदर्शनासाठी का बरे निर्मिले असते! हे असो! ज्ञानदेवांनी समस्तांसाठी अक्षय्य अशी ***संजीवन समाधी*** जी ग्रहण केली ती काय योगशास्त्र न रुचणाऱ्यांसाठीच की काय!

ज्ञानेशांचा ***योगशास्त्रनिर्दिष्ट संजीवन समाधी*** घेण्यामागील उद्देश जरूरच आपल्या तत्त्वज्ञानावर व आचरणावर प्रकाश टाकण्याचा व साधकांना मार्गदर्शन करण्याचाच असला पाहिजे.

संजीवन समाधी ही ज्ञानेशांनी आपल्याकरता दिलेल्या संदेशाची जितीजागती निशाणी आहे. जोपर्यंत आम्हाला संजीवन समाधीचे रहस्य योगशास्त्रदृष्ट्या उलगडणार नाही, तोपर्यंत ज्ञानेश आम्हाला गूढच राहतील! गीतेचे रहस्योद्घाटन करणारी एकमात्र ***भावार्थदीपिका*** ज्ञानेश्वरी आम्हाला तोपर्यंत अगम्यच राहील. योगशास्त्राबद्दल प्रेम, आवड, रुचि जोपर्यंत आमच्यात निर्माण होत नाहीत, तोपर्यंत ज्ञानेश्वरीचे अंतरंग आम्हापुढे प्रकट होणार नाही! ती केवळ ***"परंतु लोकु वाक्चातुर्यें। होईल सुखियां।।"*** असा एक ग्रंथ म्हणूनच उरेल आमच्यासाठी!

"जियें मार्गीचा कापडी। महेशु अझुनि।।"

म्हणून गीतेतील योगशास्त्राची आपण आवड धरून त्याबद्दल ***महेशु कापडी*** च्या निमित्ताने ज्ञानेशांना काय संदेश द्यावयाचा आहे, हे जरूर लक्षात घेतले पाहिजे. ***योग - ज्ञान - कर्म - भक्ती* यांचा चतुर्वेणी संगम साधणाऱ्या पंथराजाकडे ज्ञानेश आपले लक्ष तो साधणाऱ्या त्या महेशाच्या निमित्ताने वेधीत आहेत.** हे ध्यानी घेतले तर मात्र आपणांस ***"जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।"*** या भगवंताच्या आश्वासनाचा जरूर प्रत्यय यावा! अन ज्ञानेश्वर तर ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्यासाठी उत्सुकच झाले आहेत. ***पंथराज*** हा तर सर्व मार्गात सोपा असा योगाचा मार्ग असल्याचे माउलीने म्हटले आहे. त्यांचे हे वचन ज्ञानेशभक्तांना दुर्लक्षिता येण्यासारखे खासच नाही!

ज्ञानेश्वरीभर पसरलेला पंथराज

तसेच संपूर्ण ज्ञानेश्वरीचे परिशीलन करतांना हेही लक्षात ठेवले पाहिजे की **पंथराजदर्शन केवळ ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायापुरतेच मर्यादित नाही; तर त्याचे *उल्लेख, संबंध, अनुबंध, पुनर्दर्शन, स्पष्टीकरण, विस्तृतिकरण, उकल, आलेखन, समन्वयन व समावेशन* ही ज्ञानेश्वरीत सर्वत्र जागोजाग येत राहतात;** फक्त हे सर्व समजावून घेण्याची आमची दृष्टी मात्र असली पाहिजे!

उदाहरणच द्यावयाचे झाले तर गीतेच्या अठराव्या अध्यायावर ***मोक्षकलशु*** चढवितांना ज्ञानेश्वर *ओवी क्र.८८५ पासून १२५१* पर्यंत सुमारे २७५ ओव्यांतून***क्रमयोग*** सांगण्याचे निमित्त करून पुनः एकदा या पंथराजाचेच अथपासून इतिपर्यंत बरेच सविस्तर वर्णन करतात. या मार्गाने जाणाऱ्या साधकांना जी स्थिती प्राप्त होते तिची तर जवळ जवळ प्रत्येक अध्यायातच ठिकठिकाणी वर्णने आहेत.

मुळात हे जरूर लक्षात घेतले पाहिजे की **ज्ञानेशांच्या मते *पंथराज* हाच गीतेचा योगसोपान मार्ग आहे व याच *ध्वनिताचे केणे* त्यांनी ध्यानयोगावरील आपल्या निरूपणात उपलवून दाखविले आहे.**

या मार्गात *कर्म* (म्हणजे काही वेगळा *कर्मयोग* व त्याचे अभिन्न अंग म्हणून नव्हे); *ज्ञान* (म्हणजे काही वेगळा *ज्ञानयोग* व त्याची फलप्राप्ती असे नव्हे); व *भक्ती* (*भक्तियोग* म्हणजे काही योगतदितरच आगळे वेगळे आहे, असे नव्हे):या सर्वांचा योगाशी (सर्वसाधारणपणे ज्याला *ध्यानयोग* असे म्हणतात त्याच्याशी) सर्वोत्कृष्ट संगमयोग होऊन तो *पंथराज* या महातीर्थरूपाने समस्त साधकांचे सर्वमङ्गल - सर्वकल्याण करण्यासाठी ज्ञानदेवांनी अवतरवला आहे!!

या पुण्यसलिला महायोगाच्या तीर्थराजात कोणीही नहावे व विश्वरूपदर्शनाने कृतार्थ व्हावे! ज्ञानदेव तर म्हणतातच कीः

म्हणौनि भलतेनि एथ सद्भावें नाहावें।
प्रयागमाधव विश्वरूप पाहावें।
येतुलेनि संसारासीं देयावें। तिलोदक।।११-११०।।

असे असल्यानेच ज्ञानदेव ग्रंथसमाप्तिवेळी आश्वासन देतात कीः

पुढुति पुढुति पुढुति। इयें ग्रंथपुण्यसंपत्तीं।
सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजो।।१८-१८०९।।

"योगयागविधि। येणें नोहे सिद्धि।।"

असा हा जो पूर्णत्वाकडे नेऊन पोहोचवणारा पंथराजनामे योगशास्त्रींचा मार्ग ज्ञानेश सांगतात, त्याबद्दल आस्था नसलेल्या पण कर्मकांड उत्तमरीत्या जाणणाऱ्या जनांची ते अज्ञान्यांत गणना करण्यास चुकत नाहीतः

आणि आत्मा गोचरु होये। ऐसीं जैं विद्या आहे।
तैं आइकोनि डौरु वाहे। विद्वांसु जो।।१३-८२५।।
उपनिषदांकडे न वचे। योगशास्त्र न रुचे ।
अध्यात्मज्ञानीं जेयांचें। मनचि नाहीं।।८२६।।

"एक अध्यात्मज्ञान सोडले तर इतर सर्व शास्त्रात प्रतिबृहस्पतीच असा जो हा अज्ञानी असतो, त्याला ***ब्रह्मविद्या*** म्हणजे स्वतःच्या अविद्यामय विद्यांपुढे क:पदार्थच वाटते. उपनिषदातील व ***योगशास्त्रातील ज्ञानाची त्याला रुचि नसतेच*** व अध्यात्मज्ञान हवेहवेसे असे तर त्याला कधीच वाटत नाही."

योगशास्त्र न रुचणाऱ्या अशांची माउलीने अज्ञानी म्हणून गणना केली आहे, हे *"योगयागविधि।येणें नोहें सिद्धि।।"* या त्यांच्या उद्गारांचे संदर्भहीन अर्थ काढणाऱ्यांनी अवश्य ध्यानी घेण्यासारखे आहे! असो.

यमनियमादी::::

यम व नियम पुनर्विचार

प्राणायाम व प्रत्याहाराचा विषय आता चर्चेला घ्यावयाचा आहे. तत्पूर्वी आपण एकदा यम-नियमांविषयी ज्ञानेश्वरांचे काय म्हणणे आहे, ते पाहू या. त्यासाठी पतञ्जल्युक्त यमनियमादींची एक उजळणी करू या.

पतञ्जलींनी सांगितलेले **यम** पुढीलप्रमाणे होतः **१) अहिंसा, २) सत्य, ३) अस्तेय, ४) ब्रह्मचर्य व ५)अपरिग्रह;** तसेच **नियम** म्हणजे **१) शौच, २) संतोष, ३) तप, ४) स्वाध्याय व ५) ईश्वरप्रणिधान** हे होत.

अहिंसा इ.यम

पतञ्जलींच्या मते *अहिंसे*च्या पालनाने साधकाप्रत कोणाही भूताची वैरभावना राहात नाही. *सत्य* त्याच्या ठिकाणी स्थिर झाले म्हणजे योग्याच्या इच्छेमात्रेकरून कोणतीही विशेष क्रिया न करताच इच्छेप्रमाणे फल प्राप्त होते. *अस्तेयवृत्ती*चे फल म्हणजे जगदुपकारार्थ योग्यास हवी असलेली संपत्ती त्याच्यापुढे उपस्थित होऊन लोककल्याण साधता येते. *ब्रह्मचर्यपालना*ने वीर्यलाभ होतो. वीर्यातूनच ओज प्रकट होते. हे ओजच ब्रह्मप्राप्तीसाठी लागणारी अमोलिक साधनसंपत्ती आहे. *अपरिग्रहव्रता*ने पूर्वजन्म व पुढे प्राप्त होणाऱ्या जन्मांचे ज्ञान होते. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटण्याची प्रबल इच्छा त्यामुळे निर्माण होते. यमपालनाची ही फले आहेत.

शौचादी नियम

बाह्य शौचामुळे विषयासक्त माणसांचा संसर्ग आपोआपच कमी होतो व साधकाभोवतीचे वातावरण साधनेस योग्य असे पवित्र राहते. तसेच मानसशौचामुळे चित्तातील रजोतमोमल नाहीसे होऊन मनाची प्रसन्नता वाढते; चित्ताची एकाग्रता साधते; इंद्रिये आपल्या स्वाधीन राहू लागतात व या अनुकूलतेमुळे आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होण्यासाठी साधक अधिकाधिक पात्र होत जातो.

संतोषामुळे ज्याच्याहून श्रेष्ठ व उत्तम असे दुसरे कोणतेही सुख नाही, असा आत्मस्वरूपभूत सहजानंद प्राप्त होतो. तपामुळे शरीर व इंद्रिये यातील मल नाहीसा होऊन शरीर योगासाठी योग्य होते. स्वाध्यायामुळे इष्ट देवतेचा संग, साक्षात्कार, संभाषण इ.प्राप्त होतात. यामुळे चित्ताचे प्रसादन होते व देवतेचा अनुग्रह लाभून पुढील मार्गक्रमाणा कळते. योगाभ्यासातील विघ्नांचे निवारण होते.

ईश्वरप्रणिधान

ईश्वरप्रणिधानाने आत्मसाक्षात्कार करून देणारी निर्विकल्प समाधि प्राप्त होते. ईश्वरप्रणिधानात ***भक्तिसूत्रे, भागवत व इतर रससांप्रदायिक*** यांनी उचलून धरलेल्या भक्तीच्या ***नवविधा*** भक्तिप्रकारांचा समावेश सहजच करता येतो. विष्णूच्या भक्तीचे ***स्मरण, कीर्तन, भजन, पूजन, अर्चन, दास्य, सख्यत्व, वंदन व आत्मनिवेदन*** या प्रकारांतर्गत मोडणारे मुख्य नऊ स्तर किंवा पायऱ्या आहेत. सर्वात श्रेष्ठ भक्ती म्हणजे *आत्मनिवेदन* व त्याखालोखालची *सख्यभक्ती* समजली जाते. योगाचे जसे शास्त्र निर्माण केले गेले, तसेच या भक्तिमार्गाचेही विख्यात असे शास्त्र प्रसृत झालेले आहे. त्याचा योग्य वेळी परामर्ष घेऊ!

ज्ञानदेवांच्या हरिपाठाच्या एका अभंगात ***"भावेंवीण देव न कळे नि:संदेह। गुरुवीण अनुभव। कैंचां कळें।।"*** असे म्हटले आहे. भक्ती हीही खरे तर सद्गुरूंच्या आश्रयानेच प्राप्त होते. भक्ती भावाधिष्ठीत आहे आणि हा भावसुद्धा गुरुगम्यच आहे! खरे तर हा **भावसुद्धा *कुंडलिनीशक्ती*च्या एका प्रबुद्ध अवस्थेतच जिला *ह्लादिनी* असे म्हणतात, त्यातच प्राप्त होतो. *रामकृष्ण परमहंस, मीराबाई, कबीर*** इ.संतांची भक्तिप्रेमरूपा अशी अवस्था प्रसिद्धच आहे!

त्यात कडी म्हणजे ***कबीर*** हे तर भक्त होते, तसेच एक महान योगी पण होते. त्यांचे योगशास्त्रानुभूतीपर अनेक अभंग प्रसिद्ध आहेत. ***श्रीरामकृष्ण परमहंस, मीराबाई, नामदेव, गोरा कुंभार, चोखा मेळा, शेख महंमद, निळोबा,*** इ.अनेक भक्तिमार्गीय संतांचे अनुभव व योगानुभूतिपर अभंगादी रचना पाहिल्या तर आपणास कुंडलिनीच्या या ***ह्लादिनी*** स्वरूपाचा साक्षात्कार होतो आणि योग व भक्ति यांचे केवळ नाममात्र भिन्नत्व असल्याचे दिसून येते!

पतञ्जली म्हणतात: ***"समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।।२-४५।।पा.यो.सू.।।"*** म्हणजे ईश्वरप्रणिधानाने समाधि सिद्ध होतो. पतञ्जली ईश्वरप्रणिधानाचा नियमांमध्ये समावेश करतात व ईश्वरप्रणिधानाद्वारे निर्विकल्प समाधिलाभसुद्धा होतो, असे म्हणतात. यातच भक्तीचे महत्त्व योगमार्गीयांस पटलेले होते, हे दिसते. जिज्ञासूंनी हा मुद्दा लक्षात ठेवण्यासारखाच आहे.

भक्ती, योग व ज्ञान हे सर्व एकमेकांपासून पूर्णपणे भिन्न आहेत व त्यांचे एकमेकांना वावडे आहे असा जो एक समज पसरलेला आहे, तो किती चुकीचा असला पाहिजे, हे संतांची वचने नीट अभ्यासली असता कळून येते. सर्वच शास्त्रांचे आलोडन संतसंगतीत केल्याने या गोष्टी नीट समजतात. ज्ञानदेव तर संतसंगतीचे महत्त्व सांगतांना मोठ्या कळकळीने म्हणतात की ***"साधुचे संगती तरणोपाय।।".*** असो!

योगाची बाह्यांगे

यमनियमांबाबत एवढा खुलासा पुरे! यमनियमांनंतर योगाचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे ***आसन !*** आसन स्थिर करण्यासाठी शरीराची व्यग्रता कमीकमी करत जावे व अनंताशी तन्मयता संपादन करावी. स्थिर आसनाचे फल म्हणजे राग-द्वेष इ.द्वंद्वांपासून साधकास पीडा होत नाही.

पतञ्जलिमते ***यम-नियम-आसनस्थैर्य*** ही सर्व योगाची ***बाह्यांगे*** होत. ही साध्य केल्याशिवाय पुढील ***प्राणायाम - प्रत्याहारादी*** अभ्यास करण्याची पात्रता अंगी येणार नाही. हे खरेच आहे की शरीर, इंद्रिये, मन व चित्त ही साधकाला वश झाल्याशिवाय प्राणायामाच्या अभ्यासाला सुरुवात करता येत नाही.जर बलात्काराने स्थूल अशा बहि:प्राणायामाचा प्रयत्न केला तर तो फलदायी न होता क्लेशकारकच ठरतो. त्यातूनही दैववशात थोडाफार प्राणायाम जरी साधला तरी तो अभ्यास खंडित होतो.

अष्टांगयोग हा पायरीपायरीने चढत जात समाधीचे शिखर पादाक्रांत करण्याचा प्रयोग आहे. एकदम शिखरावर उडी मारणे सर्वसामान्य साधकांना शक्य नाही. असो.

गीतेतील दोन मार्ग

गीतेप्रमाणे साधकास योगाचे दोन मार्ग उपलब्ध होतातः

१) **ज्ञान वा सांख्यमार्ग** - जेथे ***ओळखीसवेंचि तद्रूपता*** प्राप्त होते. यात पायरीपायरीने योगक्रम आचरण्याचा काही प्रश्नच उद्भवत नाही. ***विहंगम मार्ग*** असेही या मार्गास म्हणतात.

२)**योगमार्ग** - यात साधकांना पायरीपायरीने ***क्रमयोग*** वाटेने - ***पंथराज*** उपक्रमाने गंतव्य प्राप्त होते.

खरे तर ***ज्ञानमार्ग*** हा योगमार्गाचाच अति शीघ्र फल पावणारा उपप्रकार आहे. पूर्वजन्मीची नाममात्र अपूर्ण राहिलेली योगसाधना आणि साधकाच्या कुंडलिनीचे पूर्वार्जित संस्कार यांनी थेट ब्रह्मांडात आज्ञाचक्रापलीकडील संक्रमण यांच्या प्रभावाने साधक या मार्गाने शीघ्र समाधिशिखर गाठतो. ज्ञानदेवांचे ***क्रमयोग*** या विषयावरील विवेचन जेव्हा आपण पाहू, तेव्हा त्याबद्दल अधिक खुलासा करता येईल. असो.

पंथराज व यमनियम

योगमार्गातही गुरुपदिष्ट मार्गाने जाणाऱ्या साधकांसाठी ज्ञानदेवांनी बरीच रहस्ये ग्रंथांतरी प्रकट केली आहेत. त्यांच्या मते ***गुरुशिष्य*** हा संप्रदायच योगमार्गाकरता निर्माण झाला आहे. ते सांगतातः

ना ना संसारआडवीं। क्रमयोगवाट बरवीं।
जोडिली ती मदैक्यगांवीं। पैठीं जाली।।१८-१२२१।।
हे असो क्रमयोगबोधें। तेणें भक्तिचिद्गांगें।
मी स्वानंदोदधी वेगें। ठाकिला कीं गां।।१२२२।।
एक शिष्य एक गुरु। हा रूढला सांच वेवहारु।
तो मत्प्राप्तिप्रकारु। जाणावेयां।।१२२३।।

"***संसाराच्या अरण्यातून भगवंतांच्या ऐक्यरूपी गांवी जाण्यासाठी ही क्रमयोगाची वाटच चांगली!*** गुरुशिष्यव्यवहाराची परंपरा ही त्याच्या प्राप्तीचा हा मार्ग जाणून घेण्यासाठीच रूढ झाली आहे. हे असो. भक्तिरूपी चिद्गंगेच्या ओघावरून क्रमयोगरूपी नावेत बसून स्वानंदाचा समुद्रच असा जो भगवंत आहे, त्याला त्वरेने जाऊन मिळता येते."

अशा रीतीने ज्ञानेशांनी योग आणि भक्तीची सांगड बांधली आहे. ***योगरूपी नाव आणि भक्तीचा प्रवाह असे समीकरण जुळवत हा प्रवासी स्वानंदसागरास जाऊन मिळतो.*** याप्रमाणे साधन करणाऱ्या शिष्याला ज्ञानेश्वरांच्या मते यम-नियम-आसन-प्रत्याहारादींची पतञ्जलींच्या प्रणालीयेवढी कडक जांचणी नाही.

हा गुरुभक्त साधक केवळ गुरुस्मरणानेच सर्व अडथळे आणि विघ्ने पार करतो. किंबहुना श्रीगुरु हे सदाशिवरूपच असल्याने शिष्याकडून योग साधून घेण्याचे काम ते स्वतःच जातीने करत असतात. शिष्याने फक्त सद्गुरूंवर निरंतर प्रेम व श्रद्धा ठेवून उपदिष्ट मार्गाने केवळ साधना करावयाची; इतर सर्व श्रीगुरू पाहून घेतात.

या सर्व यमनियमादी उपचारांचा समर्थ गुरूंच्या शिष्याला काहीच उपसर्ग कसा नसतो, याचे एक उदाहरण रामकृष्ण परमहंस व विवेकानंदांचे देता येईल. रामकृष्णांनी विवेकानंदांच्या शरीराला स्पर्श केल्याकेल्या विवेकानंद समाधिस्थ झाले ही गोष्ट त्यांच्या चरित्रावरून सर्वांना अवगत आहेच. त्यावेळी विवेकानंद यमनियमांमध्ये कोठे स्थिरावले होते! ते तर शुद्ध नास्तिकच होते, तेव्हा तर ईश्वरप्रणिधानाचा प्रश्नही उद्भवत नव्हता आणि ईश्वरप्रणिधानाविना योगमार्ग तर दुष्करच आहे. रामकृष्ण व विवेकानंद यांचे हे उदाहरण यमनियमांबाबत गुरुशिष्यपरंपरेत किती सूट आहे, ते स्पष्ट करण्यास पुरेसे आहे.

किंबहुना ईश्वरप्रणिधानाशिवाय योगमार्ग आचरूच नये, असेच ज्ञानेश्वरांचे मत दिसते. याबाबत त्यांनी स्पष्टच म्हटले आहे की ***"योगयागविधि। येणें नोहें सिद्धि। वायांचि उपाधि। दंभधर्म।।"*** **भक्तिविना योग आचरणे म्हणजे कांटेरी वाटेवरून चालणे आहे!**

तरीही गुरुसंप्रदायक्रमे जाणाऱ्या साधकांना मुद्दाम म्हणून जरी ***पंथराज*** यमनियमांची कडसणी लावत नसला, तरी ते गुण ***दैवीसंपत*** म्हणून सत्शिष्याठायी बाणणे आवश्यकच आहे, असे ज्ञानेश समजतात; हे ज्ञानेश्वरीच्या अध्ययनांती आपणांस जाणवून येते.

यासाठीच या दैवी गुणसंपदेवर त्यांनी ***तेरा, सोळा, सतरा व अठरा*** या अध्यायातून बऱ्याच ओव्या रचल्या आहेत. त्या ओव्या म्हणजे ज्ञानेश्वरीतील योगाचरणाचे दर्शन घडवणारा एक महत्त्वाचा भागच समजल्या पाहिजेत. योगावर श्रद्धा असणाऱ्या साधकांनी त्या एकाएका गुणसंपदेनुरूप क्रमाक्रमाने अभ्यासणे फार आवश्यक आहे. तिकडे वळण्यापूर्वी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेऊ या.

आहारविहार::::

योग्याचा आहार

पतञ्जलींच्या योगसूत्रात योग्याचा आहार कसा असावा, याबद्दल खरा म्हणजे काहीच उल्लेख नाही. त्याचप्रमाणे शरीरादींचे व्यवहार व वर्तणूक कशी ठेवावीत याचेही निर्देशन त्यांच्या सूत्रात नाही. यमनियम पाळण्यासाठी युक्त असलेला आहारविहार मात्र जरूर अभिप्रेत असला पाहिजे. त्यामुळे ज्यात प्राण्यांना वा इतर सेंद्रिय जीवांना दुखवूनच जो आहार सिद्ध होतो, तो मांसाशनादी प्रकारचा आहार *अहिंसक* आचरणाविरुद्ध असून त्याज्यच समजला पाहिजे.

अन्न चोरी करून आणलेले नसले पाहिजे हे *अस्तेय* हा यम सांगतो. *ब्रह्मचर्य* पालन करण्यासाठी राजसिक व तामसिक आहार चालणार नाही. म्हणून आहार सात्त्विकच असला पाहिजे, हे सुज्ञ व विचारी साधकांच्या सहजच लक्षात येईल.

अपरिग्रहाचे व्रत पाळण्यासाठी मिळेल तेवढ्या आहारात संतुष्ट रहायला हवे. तसेच अन्नसंचय करता येणार नाही. जर सुयोग्य आहार न मिळाला,तर त्याबद्दल तितिक्षा बाळगून निराहारी राहिले पाहिजे. कारण अयोग्य आहाराचे परिणाम मन व शरीर या दोहोंवर होऊन त्यामुळे नाडिशुद्धीस विलंब लागून योगाभ्यासाचे श्रम व वेळ वृथा जाण्याची शक्यता असते.

अपरिग्रहाचे व्रत पुढे न्यावयाचे म्हटले तर आपल्या योगसाधनेसाठी आवश्यक असेल तितकेच अन्न भुकेच्या वेळी ग्रहण करणे योग्य ठरेल. कारण योग्याला भरपेट, मनमुराद आहार करून त्याच्या परिणामस्वरूप शरीरात साठणाऱ्या दोषांचा व चरबीचा पण परिग्रह करून चालणार नाही.

नियमांचे नीट परिपालन व्हावे म्हटले तर अन्न हे शुद्ध, ताजे व रोगजंतूंच्या संसर्गापासून मुक्त असले तरच बाह्य व आंतरशुद्धी वा शौचासाठी उपयोगी ठरेल. तसेच ते अन्न शिजवतांना स्वच्छ पात्रांचा उपयोग करणे; योग्य प्रमाणात ते शिजविणे; जास्त करपलेले, जळलेले असे ते नसणे व पवित्र अंत:करणाच्या व्यक्तीनेच ते शुद्ध हेतूने शिजवलेले व वाढलेले असले पाहिजे; या गोष्टी निर्विवादपणेच अपेक्षित आहेत. अन्न तयार करणारी व वाढणारी व्यक्ती ही रोगांपासून मुक्त व स्वतः आंतर्बाह्य - शरीराने व मनाने *शौच* पाळणारी असली पाहिजे, हे सांगायला नकोच! आणि ज्या पात्रांतून अन्न शिजवायचे व ग्रहण करावयाचे तीसुद्धा स्वच्छ, शुद्ध व निर्जंतुक असली पाहिजेत. एवढ्या सगळ्या गोष्टी *शौच* या नियमांतर्गत येतात.

अन्न जर भिक्षा मागून आणावयाचे असेल तर एवढ्या सगळ्या गोष्टींची पूर्तता होणे कठीणच! अशा वेळी त्यातल्या त्यात उत्तम उपाय म्हणजे कोरड्या अन्नाचीच भिक्षा घेणे उचित ठरेल. ते नंतर स्वतः रांधून घेणे जास्त योग्य. असो.

आपल्या यमनियमांच्या आचरणासाठी जे सुयोग्य अन्न मिळेल, त्यातच साधकाने संतोष मानला पाहिजे व जर कधी पुरेसा व योग्य आहार मिळाला नाही, तर अर्धपोटी किंवा निराहार राहणे स्वीकारले पाहिजे. हे **संतोष**ांतर्गत येते. अशा प्रकारे झालेला रसनानिग्रह हाही शारीरिक तपाचा एक भाग म्हणून स्वीकार्य ठरतो.

आता *स्वाध्याय* म्हणजे योगासाठी उपयुक्त आचरण ठेवणे, त्यासाठी पवित्र ग्रंथांचे परिशीलन करणे , उपनिषदांचा व्यासंग वाढवणे, शास्त्रसंपत्तीचे आलोडन करणे, त्यासाठी आवश्यक ती बुद्धिमत्ता वापरणे, शरीराला स्वाध्यायाचे कष्ट न वाटू देणे इ.गोष्टी अंतर्भूत आहेत.

तपात वेगवेगळी व्रताचरणे, परमात्मदर्शनाचाच एकमेव हेतू ठेवून, अनुस्यूत आहेत. तर ईश्वरप्रणिधानात प्रभुदर्शनार्थ नामजप, मंत्रजप, भजन, कीर्तन, ईश्वराच्या प्रतीकस्थानांची स्वच्छता राखणे, गुरुसेवा करणे, गुरूंच्या सद्ग्रंथांचा अभ्यास करणे, सद्गुरूंवर श्रद्धा असणाऱ्या समानधर्मा साधकांना योग्य ती मदत करणे, त्यांचे योगमार्गातील व इतर कष्ट हलके करणे, आपल्यासारख्या इतरांना ईशभक्ती करता यावी म्हणून साधने निर्माण करणे इ.गोष्टींचा अंतर्भाव होतो.

या सर्व नियमांच्या पालनासाठी साधकाचे चित्त व मन नित्य शांत, प्रसन्न व मुदित राहील; साधकाचा भार इतरांवर पडणार नाही, अशी दक्षता साधकास बाळगायला लागेल. ईश्वरप्रणिधानाचे योगमार्गात अतीव महत्त्व असल्याने त्यासाठी योग्य असा आहार व विहार साधकाला सुनिश्चित करावा लागेल.

तसेच साधकाला तो आहे तेथेच राहून योगसाधना करण्यासाठी योग्य ती साधनसामग्री - षट्गुणसंपत्ती - अर्जित करावी लागेल. त्यासाठी जर तो साधक गृहस्थ असेल तर त्याला फारच काळजीपूर्वक योजनाबद्ध आराखडा तयार करून त्याचे कटाक्षाने पालन करावे लागेल. आपल्या योगसाधनेत व्यत्यय येऊ नये व गृहस्थाश्रमाचे कर्म सांग पार पाडता यावे म्हणून योग्य ती आर्थिक, व्यावसायिक व इतर प्रकारची तरतूद त्याने करणे योग्यच ठरेल.

थोडक्यात म्हणजे पतञ्जलींनी जरी या सर्व गोष्टी आपल्या योगसूत्रात बारकाईने सांगितल्या नसल्या, तरी त्या सूत्रांचे नीट परिशीलन करून व त्यावर नीट विचार करून योगसाधकांस स्वत:च आपल्याला ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असा आहार-विहार-आचार ठेवावे लागतील. त्यासाठी योगसाधकाजवळ सारासार विचार नीट करणे, अचूक निर्णय घेणे, चांगली बुद्धिमत्ता व तिचा योग्य वापर करणे इ. पात्रता आवश्यक आहे.

भारतीय दर्शनांचे वैशिष्ट्य::::

भारतीय दर्शनांचा अभ्यास

भारतीय दर्शन जेव्हा सूत्ररूपाने ग्रथित केले जाते, तेव्हा मोजक्याच पण परिणामकारक शब्दातून त्याची अभिव्यक्ती होत असते.

दर्शनाचा अभ्यास करणाऱ्याजवळ एक विशिष्ट पात्रता अपेक्षित आहे व ती म्हणजे स्वत: अभ्यास करून व विचार करून आपल्या सम्यक बुद्धिद्वारे त्या सूत्रांमागे दर्शनकर्त्याची कोणती विचारसंपदा दडलेली आहे, त्याचा शोध घेणे. परिश्रम, अभ्यास, व्यासंग व विचक्षक बुद्धिमत्ता यांच्या अभावी भारतीय दर्शनांचा अभ्यास करणे अत्यंत कठीणच समजले पाहिजे.

तसेच भारतीय दर्शने ही निव्वळ तार्किक किंवा बौद्धिक काथ्याकूटीची क्षेत्रे नव्हेत; प्रत्येक दर्शनकर्ता जी प्रमेये मांडत असतो; जी सूत्रे ग्रथित करत असतो; ज्या मतांना प्रमाण म्हणून मान्यता देत असतो; त्या सर्वांच्या वास्तविक आणि प्रायोगिक अनुभवांचे व अनुभूतींचे संपन्न भांडारच त्याच्याजवळ असल्याचे गृहीतकृत्य आहे व ते तसे असल्याशिवाय भारतात तरी कोणत्याही दर्शनास जाणत्यांची मान्यता प्राप्त होणे जवळजवळ अशक्यच समजले पाहिजे.

या दृष्टिकोनातून आपण पातञ्जलयोगसूत्रे, भगवद्गीता व इतर उपनिषदादी वाङ्मय आणि ज्ञानेश्वरी अभ्यासली पाहिजेत, तरच त्यांचा खरा अर्थ आपल्याला गंवसेल. कोणत्याही दर्शनाचा खरा अभ्यास होण्यासाठी अभ्यासकाजवळ आणखी एक पात्रता हवी; ती म्हणजे तो मनाने, देहाने अन बुद्धीने त्या दर्शनात जी अनुभवसिद्ध प्रमेये मांडलेली आहेत, त्यांची अनुभूती व अनुभव घेण्यास समर्थ असला पाहिजे. जर योगदर्शनाचा अभ्यास करावयाचा असल तर तो अभ्यासू योगाभ्यासास पात्र म्हणजे समर्थ असला तरच त्याला योगदर्शन नीट कळेल; हे एक प्रायोगिक दर्शन आहे.

ज्याला सांख्यदर्शनाचा अथवा ज्ञानमार्गाचा अभ्यास करावयाचा आहे, त्याची ***व्यावसायात्मिका बुद्धी*** अशी असावी की जेणेंकरून त्याला ***"ओळखीसवेंचि पावें। तद्रूपता।।"*** असे होता आले पाहिजे.

अभ्यासकांना लागू पडणाऱ्या या कसोट्या सर्वसामान्यांस अतिशय कठीण व दु:साध्यच वाटतील. पण जिज्ञासू अभ्यासकांना श्रीगीतादर्शन असे आश्वासन देत की:

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि स:।।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।
प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिष:।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।६-४५।।

"प्रयत्न करा! अभ्यास करा! केव्हातरी जन्मजन्मांतरी पण निश्चितच तुम्हाला आवश्यक ती श्रद्धा व सामर्थ्य मिळून ज्ञान प्राप्त होईल; योगसिद्धी होईल."

योगशास्त्राचा अभ्यास करावयाचा तर आपल्याला ही अर्हता प्राप्त करावीच लागेल. तसेच हे शास्त्र श्रद्धेय असल्यामुळे नास्तिकतेचा त्याग केला तरच पुढे जाता येईल. अन्यथा आपण या प्रपंचात पडू नये हेच उत्तम! कारण आपल्याला जर अश्रद्ध दृष्टिकोनातून हे शास्त्र अभ्यासावयाचे अले तर त्याचे फल दिसणार नाही. मग भलेही आपण शास्त्रास नांवे ठेवा ना कां! शास्त्राचे आपल्यावाचून काही अडलेले नाही. पण आपणच एक दुर्मीळ संधी हातची घालवून बसू! असो.

पुनर्जन्माचा सिद्धान्त

या गीतेच्या वरील आश्वासनामागे *(६-४४,४५)* पुनर्जन्माचा सिद्धांत आहे. गीतेप्रमाणेच पतञ्जलीमुनींनाही पुनर्जन्म ही संकल्पना मान्य होती असे त्यांच्या पुढील सूत्रांवरून दिसून येते:

अपरिग्रहस्थैर्ये जन्मकथयन्तासम्बोध:।।२-३९।।पा.यो.सू.।।

जातिदेशकालव्यवहितानामप्यानन्तर्यंस्मृतिसंस्कार-योरेकरूपत्वात्।।४-९।।पा.यो.सू.।।

क्लेशमूल: कर्माशयो दृष्टादृष्टजन्मवेदनीय:।।२-१२।। पा.यो.सू.।।

संस्कारसाक्षात्करणात् पूर्वजातिज्ञानम्।।३-१८।। पा.यो.सू.।।

मुळातच चित्त हे अनेक जन्मांचा आशय म्हणजे वासना व वृत्तींच्या परिणामाचे द्योतक आहे. हे चित्ताचे संस्कार लवकर भोगून संपविता यावे व त्यासाठी पुन: जन्म घ्यावा लागू नये यासाठी कित्येकदा योगी ***"निर्माणचित्तान्यस्मितामात्रात्।।४-४।।"*** या पातंञ्जलयोगसूत्राने दर्शविलेली अन्य चित्ते निर्माण करतो व आपले भोग त्यांद्वारे लवकर उपशमवतो. अशा प्रकारे तो मुक्तिद्वाराजवळ शक्य तितक्या त्वरेने मार्गक्रमण करून जातो, असे त्या सूत्रांचे अभ्यासक म्हणतात.

अपरिग्रहाचे फल

अपरिग्रह या यमाचे पालन करत तो पराकाष्ठेस गेला की योग्यास पूर्वजन्मस्मृती लाभतात. जाति-देश-काल यासंबंधीच्या अनंत स्मृतींचा संस्काररूप संचय चित्तात असतो. **कर्माशयाचे मूल हे रागद्वेषादी पंचक्लेशच असतात.** त्यापासूनच दृष्ट व अदृष्ट अशा जन्मांची फले उदित होत असतात. चित्त एकाग्र झाले की समाधिपरिणाम म्हणून हे सर्व काही योग्यास जाणून घेता येते.

तसेच हे स्मृतिसंस्कार ओळखून योग्यास आपल्या पूर्वजन्मांचे ज्ञान प्राप्त होते. त्यानुसार आपणांस कोणते भोग फलस्वरूप भोगायचे आहेत, ते कळून येते. योगी ***अस्मितासिद्धी*** मिळवून ते भोग भोगण्यासाठी अनेक चित्ते निर्माण करून तो कर्मसंचय याच जन्मी उपभोगून मुक्तिपथावर अग्रेसर होतो, असे पतञ्जली म्हणतात. पूर्वजन्म व पुनर्जन्मविचार हा गीता व पातञ्जलसूत्रे यांना असा उभयमान्य असल्याचे स्पष्टच दिसते. असो.

पातञ्जलयोगसूत्रांच्या विचाराच्या निमित्ताने भारतीय दर्शनांच्या एका आर्वाचीन ऋषितुल्य अभ्यासकांचा नामनिर्देश करणे उचितच ठरेल! तो म्हणजे ***भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातञ्जल योगदर्शन*** या पातञ्जलयोगदर्शनावरील उत्कृष्ट अशा ग्रंथाचे कर्ते ***कै.श्री.कृष्णाजी केशव कोल्हटकर*** यांचा! सर्वच योगशास्त्रजिज्ञासूंनी त्यांचा ग्रंथ जरूर अभ्यासावा असाच आहे.

भारतीय दर्शनाचे खरे रहस्य कोणत्या पद्धतीने जाणता येते, त्याचा श्री. कोल्हटकर म्हणजे अलीकडच्या काळातील प्रयोगशील आदर्शच! तसेच पातञ्जलयोगसूत्रांवर त्यांनी टाकलेला अनुभवसिद्ध प्रकाश जरूरच साधकांस योग्य ते मार्गदर्शन करणारा आहे. इत्यलम्!

योगाधिकार::::

योगाभ्यासासाठी पात्रता

योगासन ग्रहण करणाऱ्या व त्यापुढील योगाभ्यास करून पूर्णत्वाप्रत जाऊ इच्छिणाऱ्या साधकास कोणती पूर्वतयारी करावी लागते व कोणती पात्रता प्राप्त करून घ्यावी लागते, असा प्रश्न अर्जुनाने सहाव्या अध्यायप्रसंगी श्रीकृष्णास विचारला होता. या योगाविषयीच्या मूलभूत प्रश्नाकडे वळू या. योगामुळे विश्वाभास झाकला जातो व अंतरात्म्याचा प्रकाश फांकतो, असे योगफल असते हे पटलेला अर्जुन काय म्हणतो ते ज्ञानेशांच्या वाणीतून श्रवण करू या:

जऱ्हीं हे प्रतीती हन अंतरी फांकें।
तऱ्हीं विश्वचि हे आघवें झांके।
तंव अर्जुन म्हणे निकें। सांचचि जी हे।।६-३२८।।
कां जैं आपण आतां देओ। हा बोलिला उपावो।
तो प्राप्तीचां ठाओ। म्हणौनि घडे।।३२९।।
इयें अभ्यासीं जैं दृढ होती। तैं भरंवसेनि ब्रह्मत्वा येती।
हे सांगतियाचि रीती। कळली मज।।३३०।।
देवा गोठीचि हे ऐकतां। बोधु उपजतसे चित्ता।
मां अनुभवें तल्लीनता। नव्हेल काईं।।३३१।।
म्हणौनि एथ काईं। अनारिसें नाहीं।
परी नावेकभरी चित्त देईं। बोलां येका।।३३२।।

भगवंतांनी सांगितलेला *पंथराज योगमार्ग* अर्जुनाला पटला व आवडला पण. या मार्गाने जाऊन त्रिपुटीरहित अवस्था प्राप्त होते व साधकास ब्रह्मत्व प्राप्त होते. श्रीकृष्णांनी खरे तर या पंथराज योगमार्गाचे साधे वर्णनच केले होते. तरीही पार्थाच्या मनात साक्षात तत्त्वबोध प्रकटला! जर मग अभ्यास केला तर तत्त्वप्राप्ती कां बरे होणार नाही! पण योग्यतेच्या अभावी हा योग साधेल का; आपल्या अंगी जेवढी योग्यता आहे ती पुरेशी आहे का! असे असेल तर हाच योग आचरण्यास तो आनंदाने तयार आहे. जर नसेल तर त्याच्या योग्यतेला अनुरूप असा मार्ग श्रीकृष्णांनी सुचवावा, असे त्याला वाटते आहे. म्हणून त्याने श्रीकृष्णांना विचारले की:

आतां कृष्णा तुवां सांघितला योगु।
तो मना तऱ्हीं आला चांगु।
परि न शके करूं पांगु। योग्यतेचां।।६-३३२।।
सहजें आंगिक जेतुलीं आहे। तेतुलियांचि जऱ्हीं सिद्धि जाये।
तऱ्हीं हाचि मार्गु सुखोपायें। अभ्यासीन।।३३४।।
ना तऱ्हीं देओ जैसें सांघतिल। तैसें आपणपां जऱ्हीं ठकेल।
तऱ्हीं योग्यतेवीण होईल। तैंचि पुसों।।३३५।।
जीविंचियां ऐसें धारण। म्हणून पुसावेयां जाहलें कारण।
मग म्हणें तऱ्हीं आपण। चित्त देईजो।।३३६।।
हां हो जी अवधारिलें। हे जैं साधन तुम्हीं निरूपिलें।
आवडतयाही अभ्यासिले। फांवो शके।।३३७।।

"हे जे साधन तुम्ही सांगितले, त्याचा कोणीही अभ्यास केला तर चालेल का; किंवा काही विशिष्ट पात्रता असल्याशिवाय त्याचा अभ्यास करता येणारच नाही."

यावर श्रीकृष्णांनी जे उत्तर दिले, ते ऐका:

कीं योग्यतेवीण नाही। ऐसें हन आहे कांहीं।
तेथ कृष्ण म्हणती काईं। धनुर्धरा।।६-३३८।।
हें काज कीर निर्वाण। परि आणिकही जैं काईं साधारण।
तैंहीं अधिकाराचेनि वोडवेंवीण। काईं सिद्धि जायें।।३३९।।
पैं योग्यता जैं म्हणिजे। तैं प्राप्तीचें आधीन जाणिजे।
कां जैं योग्य होऊनि कीजे। तैं आरंभीं फळे।।३४०।।
तऱ्हीं तैसीं एथ काईं। सांवियाची केणी नाहीं।
आणि योग्यतेची काईं। खाणी असे।।३४१।।

श्रीकृष्णांनी अर्जुनाचे शंकानिरसन केले. "योग्यतेशिवाय प्राप्त होईल अशी जगात कोणती तरी गोष्ट आहे का! ही तर निर्वाण प्राप्त करण्याची गोष्ट आहे! तर ती अधिकाराविना कशी मिळेल! पण योग्यता तरी त्यालाच असते ना जो इच्छित फल प्रयत्नपूर्वक प्राप्त करून घेतो! आणि योग्यता असतांनासुद्धा जी गोष्ट करावी ती काय लागलीच फळ देते का! अन योग्यता काय बाजारात मिळणारी वस्तू आहे का! किंवा योग्यतेची काही खाण असते की काय!"

नांवेक विरक्तु। जाहला देहधर्मीं नियतु।
तऱ्हीं तोचि नव्हें वेवस्थितु। अधिकारियां।।६-३४२।।
येतुलालियें आयणीमाजीं एवढें। योग्यपण तूतेंहीं जोडें।
ऐसें प्रसंगें सांकडें। फेडिलें तेयांचे।।३४३।।

योग्यता प्राप्त करूनच मग मी हा मोठा अभ्यास करीन असे जर ठरवले तर योगाभ्यास केव्हा सुरू होणार, असा येथे ध्वनितार्थ आहे. म्हणून भगवंत म्हणतात की: "या अभ्यासासाठी काही फार मोठी योग्यता लागते असे नाही; थोडीफार विरक्ततेची भावना निर्माण झाली व देहधर्म, आचार-विचार, आहार-विहार इ.थोडे संयत व नियमित केले तर कोणीही योगमार्गाचा अधिकारी होऊ शकतो. अर्जुना! तूसुद्धा या सोप्या युक्तीने हा योगमार्ग - पंथराज - चालण्यास सहजच योग्य होशील!"

<u>याप्रमाणे योगमार्ग अवघड आहे व तो साध्यासुध्या साधकांस जमणारच नाही असा जो या पंथराजावर काही अभ्यासकांचा आरोप आहे, त्याला परस्पर ज्ञानदेवांनीच सहज उत्तर दिले आहे</u>.

श्रीकृष्ण पुढे सांगतात:

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः।
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन।।६-१६।।

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा।।६-१७।।

"अति खाणाऱ्याला वा निराहार राहून उपासतापास करणाऱ्याला, झोपाळूला वा झोप अजिबात न घेणाऱ्या हट्टाग्रह्याला हा योग प्राप्त होणार नाही. ज्याचा आहार-विहार-कर्मे करणे इ.नियत व परिमित आहेत; ज्याची निद्रावस्था व जागणे नियमित आहेत; त्याला हा योग साध्य होऊन संसाररूपी दुःखाचा नाश करणारा ठरतो."

पतञ्जलींनी इंद्रिये व मन नियत करण्यासाठी जे यमनियमादी सांगितले आहेत, त्याप्रमाणे आचरण करणे साधकांस सुरुवातीस फारच जड जाते. परंतु ज्ञानदेवांनी योगाभ्यासास पोषक अशी याबाबतची साधी सोपी युक्ती पुढील ओव्यातून सांगितली आहे. याद्वारे सहजच योगाभ्यास घडतो व साधक योग्यता-पात्रता इ.भ्रमातून बाहेर निघाल्यामुळे त्याचा योगमार्ग आपोआपच सुगम होतो.

माउलींच्याच शब्दात म्हणायचे तरः

जो रसनेंद्रियाचा अंकिला। कां निद्रेसीं जीवें विकला।
तो नाहीं एथ म्हणितला। अधिकारियां।।६-३४५।।
अथवा आग्रहाचियें बांदोडीं। क्षुधा तृषा कोंडीं।
आहारातैं तोडीं। मारुनियां।।३४६।।
निद्रेचियां वाटां न वचे। ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचें।
तैं शरीरचि नोहें तेयाचें। मां योगु कवणाचां।।३४७।।

"निरोधाच्या हट्टी मार्गाने जाणाऱ्याचे शरीरच वस्तुतःत्याच्या शत्रुवत होते. कारण या हट्टीपणामुळे एक वेळ जरी त्याचे आहार-निद्रा-तृष्णा आदी देहधर्म ताब्यात आल्यासारखे दिसले, तरी देह व मन तडफडत असतात व त्या साधकाला पुढील महत्त्वाची अशी प्रणायामाची पायरी चढणे निव्वळ अशक्यप्राय होते."

म्हणौनि अतिशो विषयो सेवावा। तैसा विरोधुही न होआवा।
कां सर्वथा निरोधु करावा। हेहीं नको।।६-३४८।।
आहार तऱ्हीं सेविजे। परि युक्तीचेनि मापें मविजैं।
क्रियाजात आचरिजै। तेयांचि स्थिती।।३४९।।
मपितलां बोलीं बोलिजै। मितलां पाऊलीं चालिजैं।
निद्रेही मानु दीजै। अवसरें एकें।।३५०।।
जागणें जऱ्ही जाहले। तऱ्हीं होआवें तैं मितलें।
येतुलेनि धातुसाम्य संचलें। असेल सुखें।।३५१।।

म्हणून ज्ञानदेव साधकांना सांगतात की त्यांनी अतिशय विषयसेवन तसेच त्यांचा अतिरिक्त विरोध ही दोन्हीही टाळावीत. तसेच विषयवासना ओढूनताणून दडपूनसुद्धा टाकू नये. आहार, निद्रा, चालणे, बोलणे, वागणे, जागणे, उठणे, बसणे, विषयसुख घेणे इ.सर्व युक्तीने नियमित करावीत. हे सर्व परिमित ठेवावे. म्हणजे शरीराची नाडीशुद्धी सहजच होत जाते.

ऐसें युक्तीचेनि हातें। जैं इंद्रियां वोपिजै भातें।
तैं संतोषासीं वाढतें। मनचि करी।।६-३५२।।
बाहेर युक्तीची मुद्रा पडे। तंव आंत सुख वाढे।
तेथ सहजुचि योगु घडे। नाभ्यासितां।।३५३।।

शरीराला, मनाला व इंद्रियांना असे युक्तिपूर्वक संयत केले की अंतरी सुख वाढू लागते आणि योगातील सायास टाळून सहज अभ्यास घडतो. योगाभ्यासकास साधना करत असता कष्ट वाटण्याऐवजी सुख वाटून त्याचे मन संतोषाने भरून जाते.

सामान्य साधकांसाठी योगः:::

माउलीची निरूपणशैली व पंथराज

याप्रमाणे ज्ञानदेवांनी श्रीकृष्णाचे ***"युक्ताहारविहारस्य"*** हे वचन साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यातील युक्ती पूर्णपणे उपलवून दाखविले आहे. श्रीमाउलींची ही शैली संपूर्ण ज्ञानेश्वरीभर वारंवार प्रकट होत असते. काही ठिकाणी तर ज्ञानदेव स्वतःच सांगतात की श्रीहरीच्या मनातील गूज, त्याच्या अंतरीचा भाव, त्याचा उद्देश व प्रत्येक गीतोक्तीमागचा त्या परम विभु आत्म्याचा संदेश ही ***"तेयां ध्वनिताचे केणे"*** सोडून व ***"यथार्थाची घडी झाडून"*** ते ***"ग्राहीक"*** श्रोत्यांपुढे उपलवून दाखवत आहेत.

ज्ञानेश्वरीचे या भावनेने परिशीलन केल्यास जिज्ञासूंना जरूरच जाणवेल की ***पंथराज*** किंवा ***"क्रमयोग वाट बरवी"*** असे ज्ञानेश्वर ज्या योगमार्गाला म्हणतात, तो त्यांच्या खास आवडीचा विषय असून सर्वसामान्य जनांना तारण्यासाठी इतर भिन्नभिन्न मार्गांच्या वाटेसन लागता ते हाच मार्ग अत्यंत सुलभ असल्याचे स्पष्ट करून दाखवतात!!!

या महापुरुषाने सर्वसामान्य जनांची निकड लक्षात घेऊन त्यांना परमार्थमार्ग कसा सुलभ होईल त्याचे आपल्या विचारधारांतून वारंवार दिग्दर्शन केले आहे. सर्वसामान्यांस संसार पूर्णतया सोडून चालणार नाही म्हणून आणि देहवानास कर्मे अजिबात सोडणे शक्य नाही हे सत्य लक्षात ठेवून, तसेच सांख्ययोगमार्गाचे तीव्रवेगी साधक अत्यंत विरळाच सापडतात हे पण ध्यानी धरून, त्यांनी सकळ कर्मे करत असतानांच ज्या योगमार्गाची वाटचाल करता येईल; ज्या मार्गात चालत असता गृहस्थाश्रमाचे ओझे आधीच कपाळी असलेल्यांच्या डोक्यावर यज्ञयाग, तप, संन्यास-यतिधर्म इ.चा व देहवानास साधण्यास अत्यंत अवघड, किंबहुना अशक्यच असा अव्यक्तोपासनेचा योगमार्ग यांचे वजन न लादता, ज्यात कष्टच नाहीत असा ***हा पंथराज किंवा क्रमयोग सुस्पष्टपणे श्रीकृष्णांचे गीतोपदेशामागचे खरे मनोगत म्हणून प्रकट केला!!!***

या मार्गात ***सद्गुरुसेवन-ईश्वरप्रणिधान-अनन्यशरणता*** ही सन्मार्गत्रयी अनुस्यूत आहे व त्या निमित्ताने नवविधा-चतुर्दशविधा-चतुर्धा वा इतर सर्व प्रकारची भक्ती हा या योगाचा अविभाज्य व प्राथमिक भाग आहे, हे ज्ञानदेव प्रसंगोपात्त स्पष्ट करतांना दिसतात. ***कर्म व भक्ती*** **यांचा हा योगपर मळा फुलवत असता त्याला**

सद्गुरुकृपेने आपोआपच ज्ञानफळ लागते. पण ज्ञानार्जनाचे आणि ज्ञान पचविण्याचे कष्ट मात्र या मार्गात नाहीत.

कर्मभक्ती, ज्ञानभक्ती व ईश्वरभक्ती **यांचा हा सुरम्य चेतोहर योगसंगमच या पंथराज वा क्रमयोग मार्गाचा अद्वयभक्तीयोग होय. म्हणूनच त्याला *पंथराज* म्हणजे सर्व पंथांचा - योगांचा - राजा म्हणून ज्ञानदेव गौरवितात, ते उचितच होय!!!** योगशास्त्रात जसे राजयोगाचे श्रेष्ठत्व मानलेले आहे किंवा महायोगाचे जे असामान्यत्व समजले जाते, तेच या पंथराजात सामावलेले आहे. किंबहुना ***पंथराज** हाच खरा राजयोग वा महायोग होय!*

सामान्य साधक, पंथराज व सद्गुरुप्राप्ती

या पंथराजास सर्वसामान्यांच्या जीवनात ज्ञानदेव असाधारण स्थान देतात. या मार्गाने जाणाऱ्या साधकांना सद्गुरू आपैसेच भेटतात व त्यामुळे आध्यात्मिक क्षेत्रात सामान्य जनांची जी फसवणूक व लुबाडणूक गुरुबाज मंडळी करतात, त्यांपासून या मार्गाच्या साधकांचे आपोआपच रक्षण होते. त्यांना कोणालाही गुरू करून घेण्याची अजिबात जरूर नसते, हे पण पंथराजाचा विचार करतांना लक्षात घेतले पाहिजे.

कर्मसाम्यदशा प्राप्त झाली की सद्गुरू कसे *आपैसेच* भेटतात, हासुद्धा प्रत्येक साधकाच्या व्यक्तिगत अनुभूतीचा विषय आहे. ***पण ज्ञानेशांच्या शब्दांवर निष्ठा ठेवणाऱ्या साधकांनी हा क्षण केव्हा ना केव्हा तरी नक्कीच उगवणार व शास्त्रांतरी वर्णन केलेल्या सार्वभौम लक्षणांनी युक्त अशा सद्गुरूंशी आपली भेट होईलच हा विश्वास जरूर बाळगावा!!***

रामदासांनी ज्या गुरूंबद्दल *अडक्याचे तीन* मिळतात असे म्हटले आहे, तसले लोक अशा साधकांच्या मार्गातून काट्याप्रमाणे दूर फेकून दिले जातात, हेसुद्धा अनुभूतिगम्यच आहे. म्हणूनच लौकिक अर्थाने ज्याला ***गुरुवरण*** किंवा ***गुरू करणे*** असे म्हणतात, ते ज्ञानेशसंप्रदायदृष्ट्या फारसे सुसंगत नाही. सद्गुरू व शिष्य यांचे नाते गोवत्स वा मातालेकरू या स्वरूपाचे असते. वासराला जशी गाय शोधायला किंवा *करून घ्यायला* लागत नाही; लेकराला माता शोधून काढायला जशी लागत नाही; त्याचप्रमाणे शिष्याला पण सद्गुरू हा *करून घ्यायला* किंवा *शोधून काढायला* लागत नाही.

शास्त्रांतरीच्या कसोट्यात न बसणाऱ्या, किंबहुना त्यातील कोणत्याही एका कसोटीत नापास होणाऱ्यास साधकाने गुरुपद अजिबात बहाल करू नये. कारण गुरुपद हे स्वयंसिद्ध आहे; आणि शिष्याने ते बहाल केले म्हणून गुरूला मिळत नसते किंवा वाटेल त्याला ते पद ग्रहण करण्याचा अधिकारही नाही की त्याने म्हणावे ,*"मला गुरू करा"* किंवा *"मी तुमचा गुरू आहे."* सर्वसाधारण साधकांच्या दृष्टीने एवढे विवेचन पर्याप्त आहे.

असो. मुख्य मुद्दा ज्ञानेशांच्या शब्दांवर श्रद्धा व संपूर्ण विश्वास ठेवणे; त्यांना अनन्यशरण होऊन राहणे हाच आहे व त्याबाबत जिज्ञासूंचे व जाणकारांचे एकमतच होईल. या अनन्यशरणतेतूनच ज्ञानेशवाणीचा प्रकाश अंतरंगात प्रकट होतो. हाच त्याचा गुरू होय व साधकाला या प्रकाशात *नाडळिजतां* सर्व संसार सुखाने करत असताच परमधाम गंवसते.

साधकांना सूचना

आतापावेतो ***यमनियम, आहार-विहार व आचरण*** यांचे विवेचन आपण गोरक्षमत, पतञ्जलींची योगसूत्रे, श्रीगीतोक्त गोपालकृष्णांची सुवचने व त्यांवरील ज्ञानेश्वरांचे स्पष्टीकरण यांद्वारे पाहिले. या सर्वांतून एक गोष्ट प्रमुख्याने लक्षात येते की प्रत्येक साधकाने आपल्या पात्रतेनुसार प्रयत्न करण्यास सुरुवात करावी. त्याला त्याचे आहारविहार, आचरण इ.जितक्या उच्चतर पातळीवर नेता येईल, तितके त्याने न्यावे.

सुरुवातीलाच त्याला सर्व आदर्शांचे पालन करता येईल असे नाही. परंतु त्याने धीर न सोडता ज्ञानेशांनी सांगितलेला मार्ग आचरून युक्तिप्रयुक्तीने इंद्रिये व मन ही वश करून घ्यावीत; धातुसाम्य व नाडीशुद्धी करून घ्यावी; ईश्वरावर श्रद्धा ठेवून ईश्वरप्रणिधानाद्वारे व संतवचनांवर विश्वास ठेवून ईश्वर व संत-महापुरुष यांची प्रेरणा प्रार्थावी. या रीतीने वागून परमेश्वर आणि संतांस आपली निष्ठा पूर्णतया अर्पण करणाऱ्या साधकांस त्यांच्या कृपेने आपोआपच मार्ग मिळत जातो. असो.

समारोप

पंथराजाचे हे प्राथमिक दर्शन घेतल्यावर आपण आता त्याला पायाभूत असणाऱ्या यमनियमांकडे वळू या. गीतेत हेच ***ज्ञानगुणलक्षणे*** या संज्ञेआड दडलेले आहेत, एवढी सूचना सध्या पर्याप्त आहे.

हा विषय पाहण्यासाठी आपणास आता वळावे लागणार आहे **उन्मेष ९-१::ज्ञानगुणलक्षणे-१** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

गोरक्षविरचित सिद्धसिद्धान्तपद्धति : चक्रविवरणाचा तक्ता

अनुक्र.	चक्र	स्थान	पीठ	ध्येय	फल	इतर माहिती
१	**ब्रह्म (मूलाधार)चक्र**	मूलाधार (पाठीच्या मणक्यातील माकड-हाडा जवळ) (गुदाधार)	कामरूप	अग्नीच्या आकाराची ***शक्ती***	सर्व कामना सफल होणे	भगमंडलाकारात त्रिवळ्यांचा मूलकंद (त्रिकोणांत शक्तीचे तीन वेटोळे असलेले लिङ्ग)
२	**स्वाधिष्ठान (मेढ्राधार)**	मूलाधार (लिङ्गा-जवळ -उपस्था -सन्निकट)	ओडियाण	पश्चिमाभिमुख लिङ्ग	जगताचे आकर्षण	पश्चिमाभिमुख प्रवाळांकुरांच्या रंगाचे लिङ्ग
३	**नाभिचक्र (मणिपूरचक्र)**	नाभिआधार व उडियाण आधार यांमध्ये	-	उदित सूर्याप्रमाणे अरुण रंगाची ***कुंडलिनी*** नामक *मध्या शक्ती*	सर्वसिद्धिप्रदायक	सर्पासारख्या पांच वेटोळ्यांनी वेढलेले लिङ्ग
४	**हृदयाधारचक्र** (हे अनाहत नावाचे चक्र नव्हे.)	वक्षप्रदेश(हृदयाधार)	-	हंसकला	सर्व इंद्रिये वश होणे	अधोमुख अष्टदलकमल व त्याच्या कर्णिकेत लिङ्गाकार ज्योति -जिला *हंसकला* म्हणतात.
५	**कण्ठचक्र (विशुद्धचक्र)**	कंठाधार ते घंटिकाधार	-	अनाहतकला (अन्यत्र अनाहतावरील विवरणात पहावे.)	अनाहतसिद्धी	चार अंगुळ व्याप्तीचे (कंठ ते घंटिकेपर्यंतचा भाग); चक्राच्या डाव्या अंगात इडा व उजव्या अंगात पिङ्गला (सूर्यनाडी) व मध्यभागी *सुषुम्ना (अनाहतकला)* आहेत.
६	**तालुचक्र**	तालुआधार व जिह्वाधार यांमध्ये	-	शून्य	चित्तलय	यात अमृतधाराप्रवाह, मूलरंध्र, घंटिकालिङ्ग, राजदन्त, शंखिनीविवर व दशमद्वार आहेत.
७	**भ्रूचक्र (आज्ञाचक्र)**	भ्रूमध्याधार	-	ज्ञाननेत्र	वाचासिद्धी	यामध्ये अंगुष्ठमात्र दीपशिखाकार *ज्ञाननेत्र* आहे
८	**ब्रह्मरंध्र (निर्वाणचक्र)**	ब्रह्मरंध्राधार	जालन्धर पीठ	पीठ व चक्रध्यान (धूमशिखाकार,सूक्ष्म पण टोकदार)	मोक्षप्रदायक	सुईच्या अग्राप्रमाणे तीक्ष्ण व सूक्ष्म, धूम्रशिखेच्या आकाराचे
९	**आकाशचक्र**	मूर्ध्न्याकाश	पूर्णागिरी पीठ	त्रिकुटाकारात *ऊर्ध्व शक्ती*	सर्व इच्छा पूर्ण होणे	षोडषदल ऊर्ध्वमुख कमल व त्याच्या कर्णिकेत त्रिकुटाकार शक्ती

(टीप:या गोरक्षपद्धतीत अनाहतचक्र व सहस्त्रदलचक्राचा उल्लेख दिसत नाही. तसेच ब्रह्मरंध्रानंतर सोळा पाकळ्यांचे आकाशचक्रही गोरक्ष सांगतात.)

::उन्मेष::९-१::
::ज्ञानगुणलक्षणे-१::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेषः९-१

गीताः
२:५४,५६,५७
११:५५
१२:१३,१४,१७-१९
१३:७-११
ज्ञानेश्वरीः
१३:१८४-३६७,४६१-५०५,६५६-६६०
१८:१२४२-१२४४
पा.यो.सू.:
२:६५
अपः
११२,११३
उद्धृतः
पं.सातवळेकरःपुरुषार्थबोधिनी गीताटीका

::उन्मेष ९-१::
::ज्ञानगुणलक्षणे-१::

अष्टादशगुण::::

साधकांची गुणसंपदा

पुढील विचारांचा मागोवा घेण्यापूर्वी जे यमनियम, आहारविहार, आचरण इ.चे अधिक तपशीलवार विवेचन ठिकठिकाणी आणि विशेषतः गीता-ज्ञानेश्वरीत जागोजागी विखुरलेले आहे, ते मुळातूनच पाहणे आपल्या या स्वाध्यायासाठी उचितच ठरेल; ते पाहू या. त्यातील सर्वच तपशील ज्ञानेश्वरीत यमनियमांतर्गत स्पष्ट निर्देशिलेला नसला, तरी त्यातील यमनियम, आहार-विहार-आचरण यांचे बहुतेक वर्णन साधकांसाठी आदर्शवत आहे. तसेच सिद्धांसाठी तर त्यातील मापदंडांची परिपूर्ती अत्यावश्यकच ठरते. म्हणून हा गुणसंपदेचा विस्तृत विषय हाताळणे आवश्यक आहे. तिकडे वळू याः

अमानित्वादी लक्षणे

प्रथम श्रीगीतेच्या *तेराव्या* अध्यायात श्रीकृष्णांनी ज्ञानी पुरुषांची जी लक्षणे सांगितली आहेत, ती पाहू या; ते म्हणतातः

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।१३-७।।
इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहङ्कार एव च।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्।।१३-८।।
असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु।
नित्यं च समचित्तत्त्वमिष्टानिष्टोपपत्तिषु।।१३-९।।
मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि।।१३-१०।।
अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।१३-११।।

१) अमानित्व (नम्रता), २) दंभशून्यता *(अदंभित्व)*, ३) अहिंसा, ४) क्षान्ति (ऋजुता), ५) क्षमा *(आर्जव)*, ६) गुरुसेवा *(आचार्योपासन)*, ७) पावित्र्य *(शौच)*, ८) स्थिरता, ९) आत्मसंयम, १०) विषयवैराग्य, ११) निरहंकारित्व, १२) जन्ममरणादींचे स्मरण *(व मानवी जन्म सार्थकी लावण्याची बुद्धी)*, १३) देहाबाबत अनासक्ती, १४) समचित्तत्त्व, १५) अनन्य भगवद्भक्ती, १६) एकांतवासाची आवड व जनसंपर्काची नावड, १७) अध्यात्मज्ञानाची आवड १८)परतत्त्वाचे आकलन अशी ही अठरा प्रकारची ज्ञानसंपत्ती असल्याचे श्रीकृष्ण सांगतात. मुमुक्षूंनी ती अर्जित करणे आवश्यक ठरते.

अज्ञानलक्षणे

तसेच या ज्ञानसंपत्तीच्या विरोधी लक्षणांनी युक्त असे ***अज्ञान*** असते, ज्याचा मुमुक्षूंनी त्याग केला पाहिजे. ती ***अज्ञानचिह्ने*** अशी आहेतः

१) सन्मानाची अपेक्षा, २) दांभिकता, ३) हिंसा, ४) मनाचे क्षुद्रत्व, ५) कुटिलपणा, ६) गुरुद्रोह, ७) निर्लज्जपणा, ८) लोभ, ९) भ्याडपणा, १०) चित्ताचे चंचलत्व, ११) मर्यादाहीनत्व, १२) विषयासक्ती , १३) परिवारासक्ती, १४) ज्ञानाहंकार, १५) जन्ममरणाचा विसर *(व याच देहात कल्याण करून घेण्याच्या बुद्धीचा अभाव)*, १६) वार्धक्याचा विसर, १७) भावी आपत्तींचा विसर, १८) अविवेक, १९) गृहासक्ती, २०) स्त्रीलंपटत्व, २१) स्वार्थबुद्धी, २२) एकांताची नावड व २३) आत्मविद्येची नावड व परतत्त्वदर्शनाची असमर्थता ही चिह्ने ज्ञानेश्वरीत ***अज्ञान*** या नांवाने प्रकट केलेली आहेत. असो.

अमानित्वादी लक्षणे::::

आता या सर्व ज्ञान व अज्ञानलक्षणांवर तेराव्या अध्यायातून ज्ञानेश्वर जो प्रकाश टाकतात व त्यानिमित्त आपणांस यांचे जे विस्तृत विवेचन पाहण्यास मिळते, तिकडे वळू याः

१)अमानित्व

तऱ्हीं कवणेंही विषयींचें। साम्य होणें न रुचे।
संभावितपणाचें। वोझें जेयां।।१३-१८४।।
आथिलाचेनि गुण वानितां। मान्यपणें मानितां।
योग्यतेचें येतां। रूप आंगां।।१८५।।
तैं गजबजो लागे कैसा। व्याधें रुंधला मृगु जैसा।
कां बाहीं तरतां वलसा। दाटला जेवीं।।१८६।।
पार्था तेणें पाडें। सन्मानें जो सांकडे।
गरिमेंतें आंगाकडे। येवोचि नेदीं।।१८७।।

अमानित्व व नम्रता या गुणांची व्याख्या करतांना माउली म्हणतेः "कोणाची बरोबरी करावी; मोठेपणा मिळावा; आपले गुण वाणले जावेत; नांवलौकिक व्हावा; अशी इच्छा त्या मनुष्याला नसते. त्याने केलेले महत्कार्य व त्याची योग्यता लोकांच्या लक्षात आल्यास तो मानसन्मान न आवडणारा मनुष्य, पारध्याने जाळ्यात अडकवलेल्या हरणासारखा तडफडू लागतो. पोहणाऱ्या मनुष्याची पाण्यातील भोवऱ्यात अडकल्यावर जशी गडबड उडून जाते, तशी लौकिक झाला असता त्या मनुष्याची गडबड उडून जाते. त्याला सन्मान म्हणजे संकट वाटते व तो आपल्याकडे मोठेपणा येऊच देत नाही."

पूज्यता डोलां न देखावीं ।स्वकीर्त्ती कानीं नायकावीं ।
हा अमुका ऐसीं नोहावी । सेंचि लोकां ।।१३-१८८ ।।
तेथ सत्काराची गोठी । कें आदरां देईल भेटी ।
मरणेंसीं साटी । नमस्कारितां ।।१८९ ।।

"आपण एवढे मोठे आहोत याची लोकांना आठवणही होऊ नये यासाठी तो दक्ष असतो. लोकांनी आपल्याला पुजावे; त्यांनी गायलेली आपली कीर्ती ऐकून धन्य व्हावे; असे त्याला वाटतच नाही. सत्कारसमारंभ झाल्यास, आदराने कोणी नमस्कार केल्यास त्यापेक्षा मरणच अधिक श्रेयस्कर आहे, असे त्याला वाटते, यात काही नवल नाही."

वाचस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता जऱ्हीं जोडें ।
परि वेडिवेमाजीं दडे । महिमेभेणें ।।१३-१९० ।।
चातुर्य लपवीं । महत्त्व हारवीं ।
पिसेपण मिरवीं । आवडीने ।।१९१ ।।
लौकिकाचां उद्वेगु । शास्त्रांवेरी उबगु ।
उगेपणीं चांगु । आथी भरू ।।१९२ ।।

"त्याला अगदी जरी बृहस्पतिसमान सर्वज्ञता लाभली तरी मोठेपणाला घाबरून तो अज्ञान्याचे वेड पांघरून वावरतो. तो आपल्या अंगीचे चातुर्य प्रकट होऊ देत नाही; उलट लोकांनी आपला अनादर करावा म्हणून वेडाचारही करतो. त्याला नांवलौकिक झालेला आवडत नाही. शास्त्रचर्चेची त्याला गोडी नसते. या सर्वांऐवजी उगीच स्वस्थ राहणे हेच त्याला अति प्रिय असते."

जगें अवज्ञाचि करावी । संबंधीं सोयचि न धरावी ।
ऐसीं ऐसीं जीवीं । आवडी बहु ।।१३-१९३ ।।
तळोटेपण बाणें । आंगीं हिणावो खेंवणें ।
तैं तैंचि करणें । बहुतकरूनि ।।१९४ ।।
हा जीतु ना नोहे । लोक कल्पी येणें भावें ।
तैसें जीणें होआवे । ऐसीं आशा ।।१९५
पैल चालतु कां नोहें । कीं वारेनि जातु आहे ।
जना ऐसां भ्रमु जाये । तैसें होईजे ।।१९६ ।।
माझें असतेपण लोपो । नांवरूप हारपो ।
मज होणें वासिपो । भूतजात ।।१९७ ।।
ऐसीं जेयाचीं नवसिये ।.. ।।१९८ ।।

"लोकांनी आपले म्हणणे मनावर घेऊ नये; सोयऱ्यांनी आपल्याला टाळून द्यावे; अशी त्याच्या मनात फार इच्छा असते. ज्यायोगे आपल्याकडे कमीपणा येईल व लोक आपल्याला तुच्छ समजतील अशा कृती तो आवर्जून करतो. लोकांच्या दृष्टीने आपले जीणे इतके क्षुद्र व्हावे की हा जगला की मेला याची त्यांना खिजगणतीही नसावी, असे त्याला वाटते. आपल्या अंगी अकर्तृत्व इतके असावे की आपण काही जरी केले तरी वाऱ्याच्या वेगाने ढकलला जाणारा माणूस जसा स्वतः न चालताही लोकांना चाललेला दिसतो, तसे योगायोगानेच ते कार्य घडले असे लोकांना भासावे; आपले अस्तित्व लोकांच्या नजरेआड व्हावे; नांवरूप शिल्लक राहू नये; प्राणिमात्रांनी, सगळ्यांनी आपल्याला क्षुल्लक समजावे, असे तो नवस करत असतो."

एकांतसेवन

.... । जो नित्यु एकांता जातु जाये ।
नामेचि जो जिये । विजनाचेनि ।।१३-१९८ ।।
वायू आणि तेयां पढें । गगनेंसि बोलों आवडे ।
जीवें प्राणें झाडें । पढियंतीं जेयां ।।१९९ ।

"लोकांमध्ये आपले स्तोम माजू नये म्हणून तो नित्य एकांत सेवतो. वनाचे नांवसुद्धा त्याला नवजीवन देते; वायू त्याचा मित्र असतो; त्याला आकाशाशी संभाषण करणे प्रिय वाटते; वृक्षादी तर त्याला जीवाभावाचे सोयरे वाटतात." तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे ***"वृक्षवल्ली आम्हां सोयरें वनचरें । पक्षिणी सुस्वरें आळविती ।।..."*** अशी त्याची अंतर्यामीची वृत्ती असते.

किंबहुना ऐसीं । चिन्हें जेया देखसीं ।
जाण तेयां ज्ञानेंसीं । सेज जाहली ।।१३-२०० ।।
पैं अमानित्व पुरुषीं । तैं जाणावें इहीं मिषीं ।
आतां अदंभाचियां वोलखीसीं । सौरसु देवों ।।२०१ ।।

"ही लक्षणे अंगी बाळगणाऱ्या पुरुषाठायी अमानित्व वास्तव्य करत आहे, हे ओळखावे." किंबहुना ज्ञानाच्या बाजेवर तो पहुडलेलाच आहे, असे म्हटले तरी चालेल, असे ज्ञानेश्वर सांगतात.

ही लक्षणे जिज्ञासू साधकांच्या मनावर नीट बिंबवावीत म्हणून पुढे ते त्याविरुद्ध वागणाऱ्या, मानसन्मानाची हांव असणाऱ्यांचे पण वर्णन करतातः

तऱ्हीं संभावनें जियें । जो मानाची वाटु पाहे ।
सत्कारें होये । तोषु जेयां ।।१३-६५६ ।।
गर्वें पर्वताची शिखरें । तैसा महत्त्वावरुनि नुतरे ।
तेयांचां ठायीं पुरे । अज्ञान आहे ।।६५७ ।।

"लोकांनी आपला आदरसत्कार केला तरच ज्याला जगल्यासारखे वाटते; पर्वतशिखरे जशी सदैव उन्नतच असतात, तशी ज्याची मान मानीपणाने ताठच राहते; जो कधीही नम्र होत नाही; त्याच्याठायी अज्ञान वसते."

ज्ञानदेवांनी मानीपण व अमानित्व अशा परस्परविरोधी गुणविशेषांच्या निरूपणाद्वारे साधकांचा आदर्श कसा असावा याचे उत्तम मार्गदर्शन केले आहे.

२)अदंभित्व (दंभराहित्य)

या गुणाचे वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

..आतां अदंभाच्या वोलखीसीं ।सौरसु देवों ।१३-२०१।।
तऱ्हीं अंगित्व ऐसें । लोभियाचें मन जैसें ।
जीवु जावो परि नुमसे । ठेविला ठेवो ।।२०२ ।।

तेयापरी किरीटी। पडिलाही प्राणसंकटी।
परि सुकृत न प्रकटी। आंगें बोलें।।२०३।।
खडाणें आला पान्हा। पलवी जेवीं अर्जुना।
कां राहे पण्यांगना। वडिलपणें।।२०४।।
आढ्यु आंतुडे आडवी। मग आढ्यता हारवी।
ना तऱ्हीं कुलवधु लपवी। अवेवांतैं।।२०५।।
ना ना कृषिवलु आपुलें। पांघुरवी पेरिलें।
तैसें झांकी निफजलें। दानपुण्य।।२०६।।

ज्ञानेश्वर सांगतात की "आता अदंभ म्हणजे काय ते ओळखता यावे म्हणून त्याची लक्षणे पहा. लोभी मनुष्य जीव गेला तरी आपल्या धनाचा ठावठिकाणा सांगत नाही. त्याचप्रमाणे अदंभी मनुष्य अगदी प्राणसंकट जरी आले तरीही आपले पुण्यकर्म वाचेने किंवा खुणांनी कशानेही प्रकट करत नाही. जशी खोड्याळ गाय पान्हा चोरते; वेश्या आपले वय लपवते; बिकट प्रसंग येताच आढ्य मनुष्य अंगीचे मोठेपण लपवून दीनवाणेपण जसे दाखवतो; कुलवधू जसे आपले अवयव झांकून असते; अथवा जमिनीत पेरलेले बी शेतकरी मातीने जसे झाकून ठेवतो; त्याचप्रमाणे अदंभी मनुष्य आपल्या हातून झालेले दान-पुण्य इ.कर्म प्रकट होऊ देत नाही."

वरि वरि देह न पूजी। लोकातैं न रंजी।
स्वधर्म वाग्ध्वजीं। बांधो नेणें।।१३-२०७।।
परोपकारु न बोलें। न मिरवीं अभ्यासिलें।
न शके विकूं जोडलें। स्फीतीसाठी।।२०८।।
अंगभोगाकडे पाहातां। कृपणु आवडे।
एऱ्हवीं धर्माविषयीं थोडें। बहु न म्हणे।।२०९।।
घरीं दिसें सांकड। देहींची आयती रोड।
परी दानीं जेयां होड। सुरतरूंसी।।२१०।।

"असा मनुष्य स्वत:चा देह गंध-माळा-टिळे यांनी भूषवून घेत नाही; कारण त्यामुळे हा पुण्यवान आहे, अशी लोकात जाहिरात होणे त्याला नको वाटते. तो लोकांना रंजवण्यासाठी शास्त्रादींवर प्रवचन करणे इ.मिषांनी स्वत:ला प्रकट करत नाही; स्वत:च्या धर्माचरणाची ग्वाही मिरवत नाही; केलेला उपकार बोलून दाखवत नाही; आपण केलेला अभ्यास मिरवत नाही; द्रव्यार्जन करण्यासाठी व श्रीमंती मिळवण्यासाठी तो आपली विद्या वापरत नाही; स्वत:च्या देहविषयक बाबी पुरवण्यात तो कृपणापेक्षाही कृपण असतो; परंतु धर्मार्थ कार्यासाठी अति उदार असतो. त्याच्या घरात सर्व वस्तूंची वाण आहेसे दिसते. त्याचे शरीरसुद्धा रोड दिसते. सुखवस्तुपणाची कोणतीही खूण त्याच्याकडे सुबत्ता असूनही दिसत नाही. असे असले तरी दातृत्वात मात्र त्याची कल्पवृक्षाशीच बरोबरी होऊ शकते."

किंबहुना स्वधर्मी थोरु। अवसरीं उदारु।
आत्मचर्चे चतुरु। एऱ्हवीं वेडा।।१३-२११।।

"तो स्वधर्माचे पालन अत्यंत दक्षतेने करतो व त्याप्रीत्यर्थ खर्च करण्यास मागे पुढे पहात नाही. फक्त अध्यात्मचर्चा करतांनाच त्याच्या अंगीची विद्वत्ता प्रकट होते. एरवी मात्र तो निव्वळ वेडाखुळा असावा असे दिसते."

केलीचें दलवाडें। हलूं पोकल आवडे।
परि फलौनियां गाढें। रसालु जैसें।।१३-२१२।।
कां मेघांचे आंग झील। दिसें वारौनि जैसें जाईल।
परि वर्षती नवल। घनवट तैं।।२१३।।
तैसां जो पूर्णपणीं। पाहातां धाती आयणी।
एऱ्हवीं तऱ्हीं वाणी। तोचि ठाओ।।२१४।।
हे असो इयां चिन्हांचा। नटनाचु ठायीं जेयां।
जाण ज्ञान तेयांचियां। हातां चढलें।।२१५।।
पैं गां अदंभपण। म्हणितलें तैं हे जाण।...।।२१६।।

"केळफुल पोकळ दिसते. परंतु ते फळले की मात्र त्याचे भरीव व रसाळ केळ्यात रूपांतर होते; वाऱ्याने सहज विस्कटून जातात इतके विरविरीत असे ढग असतात, पण त्यातूनच घनदाट अशी पर्जन्यवृष्टी होते; त्याचप्रमाणे त्या दंभहीन पुण्यात्म्यात इतर सर्व गोष्टी तोटक्या दिसल्या तरी त्याच्या अंगी पूर्णत्वाच्या खुणा इतक्या पुरेपूर बाणलेल्या असतात की त्या पाहून जिज्ञासूंचे आणि मुमुक्षूंचे अंत:करण पूर्ण तृप्त व्हावे. या चिन्हांचा परिपोष ज्याच्यात झालेला असतो तो, हे अर्जुना! अदंभाची लक्षणे प्रकट करणारा पूर्ण ज्ञानी होय."

आणि स्वधर्माची मांगली। बांधे वाचेचां पिंपलीं।
ऊभिलां जैसां देऊलीं। जाणौनि कुंचा।।१३-६५८।।
घालीं विद्येचां पसारा। सूये सुकृताचां डांगोरा।
करी तेतुलें मोहरां। स्फीतीचियां।।६५९।।
आंग वरीवरी चर्ची। जनांतैं अभ्यर्चितां वंची।
तो जाण पां अज्ञानाची। खाणी एथ।।६६०।।

"आपल्या हातून केलेल्या धर्माची जो स्वमुखाने सदैव स्तुती करत असतो; मोरचेल जसे देवावरून सतत वारत असतात, त्याप्रमाणे जो आपल्या विद्येचा पिसारा सर्वांना फुलवून दाखवत असतो; जे काही त्याच्याकडून होते, ते सर्व जो कीर्ती मिळवण्यासाठीच करतो; जो केलेल्या पुण्यकर्माचा डांगोरा आपला आपणच पिटत जगाला सांगत असतो; सर्वांग भस्माने चर्चून जो लोकांपुढे आपण धार्मिक असल्याचा बहाणा करतो; असा मनुष्य साधकाने कसे नसावे, त्याचे मूर्तिमंत रूपच होय. तो दांभिक गृहस्थ म्हणजे अज्ञानाची खाणच असतो."

विस्तृत निरूपण::::

ज्ञानदेवांची निरूपणामागील भूमिका

यानंतर ज्ञानेश अहिंसेबाबत विवेचन करण्याकडे वळतात. ते बरेच विस्तृत आहे. तिकडे वळण्यापूर्वी या सर्व विषयाचे सांगोपांग बृहत विवेचन करण्यामागचा त्यांचा उद्देश पाहणे योग्य ठरेल.

ज्या ओव्यांतून ते आपला हा उद्देश प्रकट करतात, त्या ओव्या एका प्रकारे त्यांच्या ग्रंथामागील भूमिकेवरही प्रकाश टाकणाऱ्या आहेत. म्हणून म्हटले तर थोडे विषयांतर करुनही तिकडे प्रथम वळू या. नंतर क्रमानुसार ***अहिंसा*** या विषयावरील ओव्या आपण पाहणारच आहोत. असो.

ज्ञानेश काय म्हणतात, ते ऐका:

ऐसें म्हणितलें देवें। तैं बोलें एकें सांगावें।
परि फांकला हे उपसाहावें। तुम्ही मज।।१३-३१३।।
म्हणाल हिरवें चारुं गुरुं। विसरे मागील मोहर धरुं।
कां वारेलगें पांखिरु। गगनीं भरे।।३१४।।
तैसियां प्रेमाचियां स्फूर्ती। फांवलियां रसवृत्ती।
वाहविला मती आंकलेना।।३१५।।

ज्ञानदेव श्रोत्यांना सांगतातः "देवांनी म्हणजे श्रीकृष्णांनी ***अहिंसा*** या केवळ एका शब्दात जे व्यक्त केले ते थोडक्यात सांगण्याऐवजी *"हा ज्ञानदेव किती बडबडतो आहे"* असे तुम्ही श्रोते म्हणाल. तुम्हाला वाटेल की हिरवा चारा पाहिला की गुरे जशी तो विषारी असला तरी मागलापुढला विचार न करता त्याच्यावर तुटून पडतात; किंवा पंख फुटलेले पांखरू जसे आपल्या कुवतीचा विचार न करता वारा पिऊन नभात उंच उंच स्वच्छंद विहरू पाहते; तसाच हा निरूपण करण्याच्या भरात रसवृत्तींना बहर येऊन भान विसरून मतीला सुचतील ते आणि आवडतील तसे प्रलाप करत सुटला आहे."

तऱ्हीं तैसें नोहें अवधारा। कारण आहे विस्तारां।
एऱ्हवीं पद तऱ्हीं अक्षरां। तिहींचेचि।।१३-३१६।।
अहिंसा म्हणतां थोडी। परि तैंचि होये उघडी।
जैं लोटीजती कोडीं। मतांचियां।।३१७।।
एऱ्हवीं प्राप्तें मतांतरें। थांतवूनि आंगभरें।
बोलिजैल तैं न सरे। तुम्हापासीं।।३१८।।

"पण हे सज्जनांनो! खरेच तसे काही पण नाही. ***अहिंसा*** हे पद आहे फक्त तीन अक्षरी! पण त्या पदाचा एवढा विस्तार करून सांगण्यामागे सबळ कारण आहे. दिसतांना स्वल्पशा वाटणाऱ्या या शब्दाचा अर्थ करून सांगतांना मतामतांचा मोठा गलबला माजलेला आहे. त्या मतमतांतरांचा निर्देशही न करता जर मी माझेच मत तुम्हावर लादले तर ते तुम्हाला अजिबात रुचणार नाही."

रत्नपारखियांचियां गांवीं। जाईल गंडकी तऱ्हीं सोडावीं।
काश्मिरीं न करावीं। मिडगणें जैं।।१३-३१९।।
काइसां वासुं कापुरा। मंद जेथ अवधारा।
पिठाचां विकरा। तियें सातें।।३२०।।
म्हणौनि इयें सभें। बोलकेपणाचेनि क्षोभें।
लागसर न लभे। बोलां प्रभु।।३२१।।

"रत्नपारख्यांच्या गावात गंडकी शिळेला कोण बरे विचारील! रत्ने समोर असतांना कांचेच्या स्फटिकाकडे कोण लक्ष देईल! ज्या ठिकाणी कापराचा परिमळसुद्धा मंद समजला जातो, तेथे कापूर म्हणून उग्र वासाचे पीठ कोण बरे विकत घेईल! म्हणून तुमच्यासारख्या जाणकार अशा श्रोत्यांपुढे मी जर वाह्यात बडबड कितीही केली तरी तिचा काही तरी लाग लागेल का!"

सामान्या आणि विशेखा। सकले कीजैल देखा।
तऱ्ही कानाचेयां मुखा-। कडे नेयाल ना तुम्ही।।१३-३२२।।
शंकेचेनि गदलें। जैं शुद्ध प्रमेय मैलें।
तैं मागुतां पाऊलीं पले। अवधान येतें।।३२३।।

"अहिंसेबाबत जी इतर मते आहेत व श्रीकृष्णांचे जे स्वमत आहे, त्यांची कालवाकालव होईल असे जर मी काही बोललो तर तुम्ही त्याच्याकडे लक्ष देणार नाही. चोख शुद्ध सिद्धांतरूपी सुवर्णावर जर शंकेचा मळ जमू दिला, तर चौकस मनुष्याचे अवधान खऱ्या सिद्धांतावर ठरणार नाही."

कां करुनि बाबुलियेची बुंथी। जलें जियें ठातीं।
तेयांचि वाट पाहाती। हंस काईं।।३२४।।
कां अभ्रांपैलीकडें। येत चांदिणें कोडें।
तैं चकोर चांचुवडें। उचलती ना।।३२५।।
तैसें तुम्हीं वास न पाहाल। ग्रंथु नेघा वरी कोपाल।
जऱ्हीं निर्विवाद नोहेल। निरूपण।।३२६।।
न बुझवितां मतें। न फिटे आक्षेपाचे लागतें।
तैं व्याख्यान जी तुमतें। जोडूनि ने दी।।३२७।।

"जळ जरी शुद्ध असले पण त्याच्यावर शेवाळे सांचलेले असले तर त्या पाण्यावर हंस कधी तरी उतरतील का! चांदण्याची आवड असलेले चकोरसुद्धा अभ्राआड दडलेल्या मलूल प्रकाशाच्या चंद्राकडे चोंच उघडून पाहायला तयार नसतात . जर मी निर्विवाद असणारे निरूपण केले नाही, तर तुम्ही माझ्या बोलण्याकडे लक्ष तर देणार नाहीच; उलट या ग्रंथाचा स्वीकार करणे तर राहोच, पण माझ्यावर कोपाल! गीता निरूपणाच्या निमित्ताने तुमचा सुखद सहवास प्राप्त व्हावा ही माझी इच्छा मी जर सर्व मतांचे व आक्षेपांचे निराकरण न करता गीतेवर व्याख्यान केले तर सफळ होणार नाही."

आणि माझें तंव आघवें। ग्रथन एणेंचि भावें।
जैं तुम्हीं संतीं होआवें। सन्मुख सदा।।१३-३२८।।
एऱ्हवीं तऱ्हीं सांचोकारें। तुम्हीं गीतार्थाचें सोईरे।
जाणौनि गीता जीवसरें। धरिली मियां।।३२९।।
जैं आपुले सर्वस्व देयाल। मग इयेतें सोडवून नेयाल।
म्हणौनि ग्रंथु नोहे वोल। सांचचि हे।।३३०।।
कां सर्वस्वाचां लोभु धरा। वोलीचा अव्हेरु करा।
तऱ्हीं गीते मज अवधारा। एकचि गती।।३३१।।

"तुम्ही संतांनी नेहमी मला सन्मुख राहावे, याच एका उद्देशाने मी हा ग्रंथ करत आहे. तुम्ही गीतार्थाचे उत्कृष्ट जाणकार आहात, हे मर्म जाणून मी गीतेला जाणीवपूर्वक धरून ठेवले आहे. मी ओलीस

म्हणून ठेवलेली आपली गीता परत मिळावी असे जर तुम्हाला वाटत असेल, तर तुमचे सर्वस्व असा जो गीतार्थ, तो तुम्ही माझ्या या ग्रंथात प्रकट करवावा आणि गीतेला सोडवून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. जर तुम्ही आपल्याजवळील गीतार्थरूपी धनाचा लोभ धरून माझ्या या ग्रंथात उणीव राहू द्याल तर तुमची गीता माझ्याजवळच राहील व तुम्हाला ती परत मिळणार नाही!"

किंबहुना मज। तुमचियें कृपेचें काज।
तियेंलागीं व्याज। ग्रंथाचे केले।।१३-३३२।।
तऱ्हीं तुम्हां रसिकांजोगे। व्याख्यान शोधावे लागे।
म्हणौनि मतांगें। बोलो ठेलो।।३३३।।
तंव कथे पसरु जाहला। श्लोकार्थु दूरी गेला।
कीजो क्षमा या बोलां। अपत्या मज।।३३४।।

"तुमची कृपा मिळावी या उद्देशानेच प्रेरित होऊन मी हा ग्रंथ करण्यास प्रवृत्त झालो आहे. तुमच्यासारख्या चोखंदळ रसिकांना आवडेल असेच निरूपण करण्यासारखे विषय निवडून बोलावे लागते. म्हणून अहिंसेविषयक मतांचा परामर्ष घेण्यास मी उद्युक्त झालो. ते करत असतांना हे विवेचन इतके विस्तृत झाले. त्याची मज लेकराला क्षमा करावी."

आणि घांसाआंतील हरलु। फेडितां लागे वेलु।
तैं दूषण नोहे खडलु। सांडावा कीं।।१३-३३५।।
कां संवचोरां चुकवितां। दिवस लागलीयां मातां।
कोपावे कीं जीविता। जिताणें कीजे।।३३६।।
परि यावरील हे नोहे। तुम्ही साहिले तैंचि बरवें।
आतां अवधारिजो देवें। बोलिलें आईसें।।३३७।।

"अन्नाचा घांस गोड लागत असल्याने त्यात जरी खडा लागला तर तो काढून टाकून तो घांस खातात. वाटेतील चोरांना चुकवून येतांना मुलाला घरी परतण्यास वेळ झाला तर माता काही त्याच्यावर कोपत नाही. तर अरिष्ट टळले म्हणून त्याच्यावरून निंबलोण उतरवून टाकते. तसेच माझे हे निरूपण तितके निर्दोष नसले तरी तुम्ही संतसज्जनांनी मोठ्या उदार अंत:करणाने त्यातले सगळे दोष सहन केलेत. तर आता श्रीकृष्ण काय म्हणाले ते बघू या;" असे श्रीज्ञानदेव आपल्याकडे कमीपणा घेत म्हणतात.

समीक्षकांना ज्ञानदेवीत जी वेगवेगळ्या निमित्ताने पाल्हाळीक अशी वाटण्याचा संभव असलेली ओवीरचना दिसून येते, त्यामागील श्रीज्ञानदेवांचा वरील भाव व स्पष्टीकरण ग्रंथप्रेमी वाचकांनी व टीकाकारांनीसुद्धा जरूर लक्षात घेतला पाहिजे. ज्ञानदेवांचा हा दृष्टिकोन ध्यानी ठेवून ज्ञानदेवीचा अभ्यास केल्यास जिज्ञासूंना या ग्रंथाचे खरे आकलन होण्यास मदत होईल, असा विश्वास प्रकट करून आता पुढील अहिंसाविषयक विवेचनाकडे वळू या:

३)अहिंसा::::

अहिंसेविषयक अन्य मते

अहिंसेबाबतचे विवेचन ज्ञानदेवांनी *तेराव्या* अध्यायातील *ओवी क्र. २१६ ते ३३८* यातून केलेले आहे. उण्यापुऱ्या १२० ओव्यातून श्रीज्ञानदेव अहिंसेविषयीच्या ***पूर्वमीमांसक, जैनाचार्य*** आणि इतरांच्या मतांचा परामर्ष घेऊन नंतर श्रीकृष्णांचे म्हणजे स्वत:स भावलेले अहिंसेविषयक मत प्रकट करतात. ज्ञानदेवांनी नोंद घेतलेली अहिंसेविषयीची वेगवेगळी मते व विचार असे आाहेत. ***पूर्वमीमांसक*** मताबाबत ते म्हणतात:

पूर्वमीमांसा

..आता आईक खूण। अहिंसेची।।१३-२१६।।
तऱ्हीं अहिंसा बहुती परीं। बोलिलीं असे अवधारीं।
आपुलालां मतांतरीं। निरूपितां।।१३-२१७।।
परि तैं ऐसीं देखा। जैसा खांडूनियां शाखा।
मग तेयाचा बुडुखा। कुंप कीजै।।२१८।।
कां बाहु तोडोनि विकीजे। मग भुकेची पीडा राखिजे।
ना ना देऊळ मोडौनि कीजै। पोली देवां।।२१९।।
तैसी हिंसाचि करूनि अहिंसा। निफजविजे हा ऐसा।
पैं पूर्वमीमांसा। निर्णो केला।।२२०।।

श्रीकृष्ण म्हणतात,"आता अहिंसा म्हणजे नक्की काय ते ऐक. अर्जुना! आपापली मते प्रकट करतांना अनेकांनी अहिंसेची अनेक प्रकारे व्याख्या केली आहे. पूर्वमीमांसकांचा निर्णय ऐक. एखाद्या झाडाच्या फांद्या तोडून त्यांचेच त्याच्या बुडख्याभोवती कुंपण करावे; किंवा भुकेची पीडा निवारण्यासाठी आपलाच बाहू तोडून त्याचे मांस विकावे; देऊळ मोडून त्याचाच कोट त्याच्याकरता उभारावा; अशा प्रकारचे त्यांचे मत आहे. ते म्हणतात की हिंसा केल्यानेच अहिंसेचे पालन होते."

ये अवृष्टीचेनि उपद्रवे। गादलें विश्व आघवें।
म्हणोनि पर्जन्येष्टी करावे। नाना याग।।१३-२२१।।
तंव तिये इष्टीचां बुडीं। पशुहिंसा रोकडी।
मग अहिंसेची थडी। कैंचीं दिसे।।२२२।।
पेरिजे नुसधी हिंसा। तेथ उगवेल काय अहिंसा।
परि नवल बापा धिंवसा। या याज्ञिकांचा।।२२३।।

"उदाहरणच द्यायचे तर पर्जन्येष्टीचेच घे. भूतमात्रांचे अवृष्टीने जे हाल होतात - ज्या यातना होतात, त्या दूर व्हाव्यात म्हणून वृष्टीसाठी हा यज्ञ करावयाचा. पण त्या यज्ञात पशूंचा मात्र बिनदिक्कत बळी द्यायचा, अशी त्या पूर्वमीमांसक याज्ञिकांची अहिंसेची मिती आहे. अर्जुना! हिंसा करणाऱ्या कृत्यातून अहिंसेचे पालन होणे कसे शक्य आहे! हिंसा पेरून कधीतरी त्यातून अहिंसा उगवेल का! पण पूर्वमीमांसकांचे असे जे मत आहे, ते मोठेच नवलाईचे आहे."

आयुर्वेद

आयुर्वेदाची जीवरक्षणरूपी अहिंसा पण हिंसा करण्यावरच आधारलेली आहे, त्याबाबत ज्ञानेश म्हणतातः

आणि आयुर्वेदुही आघवा। याचि मोहरां पांडवा।
जैं जीवाकारणे करावा। जीवघातु।।१३-२२४।।
नाना रोगी आहालली। लोलती भूतें देखिलीं।
तैं हिंसा निवारावेयां केली। चिकित्सा कीं।।२२५।।

"आणि अर्जुना! आयुर्वेद तोसुद्धा या याज्ञिकांसारखाच आहे. एकाचा जीव वाचवण्यासाठी त्यात जी औषधे आहेत, ती दुसऱ्या जीवांचा घात करूनच सिद्ध होतात. नाना रोगांनी संत्रस्त झालेल्या भूतांची त्यापासून होणारी जीवहिंसा टळावी म्हणून तर आयुर्वेदाची चिकित्सा आहे."

तंव चिकित्से पहिलें। एकाचें कंद खणविलें।
एका उपडविलें।समूल सपत्रीं।।१३-२२६।।
एकें आड मोडविली। अजंगमाची खाल काढविली।
एकें गर्भीं उकडविली। पुटामाजीं।।२२७।।
अजातशत्रु तरुवरां। सर्वांगीं देवविलीयां चिरां।
ऐसें जीव घेऊनि धनुर्धरा। कोरडे केले।।२२८।।
आणि जंगमाही हात। लाऊनि काढलें पित्त।
मग राखिलें शिणत। आणिक जीव।।२२९।।

"त्या चिकित्साशास्त्रानुसार औषधयोजना करतांना काही झाडांचे कंद खणून काढतात; तर काही झाडे मूळांसकट व पानांसकट उपटतात; काहींचा बुंधा तोडून तो औषधीसाठी वापरतात; तर काही वृक्षांची सालच सोलून घेतात; फळे देण्याच्या अवस्थेत असलेले गाभे क्षारांची पुटे देऊन उकडवतात. सर्वांप्रती निर्वैर भाव असणाऱ्या तरुवरांच्या सर्वांगावर चिरे देऊन त्यांचा चीक काढून औषधी तयार करतात. असे करून त्या वृक्षांचा जीवनरस आटवून त्यांना शुष्क करून सोडतात. प्राणिमात्रांचेसुद्धा हालहाल करून त्यांच्यापासून रसायने सिद्ध करतात. हे सर्व कशासाठी, तर रोगांनी जर्जर झालेल्या मानव प्राण्यांचे हाल कमी व्हावेत म्हणून!"

जैनाचार्य

पूर्वमीमांसक व आयुर्वेदीय चिकित्सापद्धती यातील अहिंसाविषयक विचारांचा परामर्ष घेतल्यावर ज्ञानेश्वर अहिंसावादी इतर जैनाचार्यांची अहिंसा कोणत्या श्रेणीची आहे, ते सांगतात. ज्ञानेश म्हणतातः

एकीं धर्माचियां वाहणी। गाळूं आदरिलें पाणी।
तंव गालतियां आहालणी। जीव मेले।।१३-२३४।।
एक न पचतीचि कण। इयें हिंसेचें भेण।
तेथ कदर्पिले प्राण। हेंचि हिंसा।।२३५।।

" काही लोक - जैन यती इ.पाण्याद्वारे पोटात जंतू जाऊन त्यांची हिंसा होऊ नये म्हणून पाणी गाळून पितात. तसेच अन्न शिजवतांना त्यातल्या जीवांची हिंसा होऊ नये म्हणून त्यातले जीवजंतू - किडे इ.काढून टाकून मग ते धान्य कच्चेच खातात. पण ते पाणी गाळतांना त्यातले कितीतरी सूक्ष्म जीव फडक्यात अडकून मरतात. त्यातले अनेक जीव पाण्यावाचून जगू शकत नाहीत, तेही तडफडून मरतात. तसेच अन्न कच्चेच खाल्याने ते न पचल्यामुळे अंतरात्म्यास दुःख पोहोचते! हिंसा टळावी म्हणून त्यानी केलेली अशी ही कृत्ये पण हिंसात्मकच ठरतात."

अहो वसतीं धवलारें। मोडूनि केलें देऊल देव्हारे।
नागौनि वेव्हारें। गवांदी घातली।।१३-२३०।।
मस्तक पांघुरविलें। तंव तलवटीं उघडें पडिलें।
घर मोडौनि केलें। मांडव पुढें।।२३१।।
ना ना पांघुरणें। जालूनि जैसें तापणें।
जालें आंगधुणें। कुंजराचें।।२३२।।
बैल विकौनि गोठा। पुंसा लावोनि बांधिजे गांठा।
इयां करणीं कीं चेष्टा। काईं हंसो।।२३३।।

"वसलेली घरे मोडून त्यांपासून देऊळ बांधावे; लोकांना लुबाडून अन्नसत्रे घालावीत; शिरोभूषण म्हणून कमरेचे नेसते वस्त्र काढून डोक्याला गुंडाळावे; घर मोडून त्यापासून मांडव उभारावा; थंडीपासून बचाव व्हावा म्हणून पांघरुणे जाळून त्यांची ऊब घ्यावी; अंग धुवावे म्हणून एखाद्या हत्तीने पाण्याऐवजी सोंडेने अंगावर चिखलच उडवून घ्यावा; बैल विकून त्या पैशांनी त्याच्यासाठी गोठा बांधावा; पोपटाला सोडून दिल्यानंतर त्याच्यासाठी पिंजरा आणावा; अहिंसावाद्यांच्या अशा तऱ्हेच्या त्या मर्कटचेष्टा पाहून हसावेसे वाटते."

ज्ञानेशांचे स्वमत

या सर्व ओव्यांवरून एकवार जरी आपण नजर फिरवली तर माउलींनी नंतर श्रीकृष्णांचे म्हणून जे अहिंसाधर्माविषयी मनोगत सांगितले आहे, ते सहज समजेल. ते म्हणतातः

एवं हिंसाचि अहिंसा। कर्मकांडीं हा ऐसा।
सिद्धान्तु सुमनसा। वोलखे तूं।।१३-२३६।।
पहिलें अहिंसेचे नांव। आम्हीं केले जंव।
तंव स्फूर्ती बांधली हांव। इयें मतीं।।२३७।।
तऱ्हीं कैसेनि ययांतैं गालावें। म्हणौनि पडिलें बोलावें।
एरवींचि तुवांही जाणावें। ऐसाचि भावो।।२३८।।
बहुत करूनि किरीटी। हाचि विषयो इये गोठी।
एऱ्हवीं कां आडवाटीं। धांविजैल।।२३९।।

पूर्वमीमांसा, आयुर्वेद व इतर मतांचा परामर्ष घेतल्यावर ज्ञानदेव त्यांची गणना कर्मकांडात करतात. ते म्हणतातः "हिंसेलाच हे कर्मकांडी अहिंसा असे गोंडस नांव बहाल करतात. अहिंसेचे मी विवेचन करण्यास सुरुवात केली, तेव्हांच माझे लक्ष या मतांकडे वेधले गेले. कारण ही मते त्याज्यच असल्याने त्यांचा निर्देश करून त्यातील विसंगती ही दाखवणे भागच होते. हे अर्जुना! तू माझा हा

भाव जाणून घे. म्हणजे या आडमार्गाच्या विषयावर मी एवढे विवेचन का केले, ते तुला कळून येईल."

आणि स्वमताचियां निर्धारा। लागौनियां धनुर्धरा।
प्राप्तां मतांतरां। निर्वेचु कीजै।।१३-२४०।।
ऐसीं हे अवधारीं। निरूपिती परी।
आतां ययांवरी। मुख्य जैं गां।।२४१।।
तैं स्वमत बोलिजैल। अहिंसे रूप कीजैल।
जेणें उठिलियां आंतुल। ज्ञान दिसे।।२४२।।
परि तैं अधिष्ठिलेनि आंगें। जाणिजे आचरतेनि बगें।
जैसीं कसवटी सांगें। वानियांतैं।।२४३।।
तैसें ज्ञानामनाचियें भेटी। सरिसेंचि अहिंसेचें बिंब उठी।
तैंचि ऐसें किरीटी। परिस आतां।।२४४।।

"तसेच अहिंसेबाबत स्वमत सांगतांना इतर मतमतांतरांचा सोक्षमोक्ष लावणे तर्कदृष्ट्या आवश्यकच असते. म्हणून हे निरूपण करणे रास्तच होते. आता मी माझे मत तुला सांगतो. हे अर्जुना! ते फार महत्त्वाचे आहे. ते ऐकल्यावर अहिंसा म्हणजे काय ते तुला मूर्तिमंत प्रतीत होईल. मग तुला ***अहिंसा व ज्ञान यांच्या अंतरीचा खरा भावबंध*** आकळेल. जसे सोने पारखायला ते कसोटीला लावावे लागते; त्याप्रमाणे अहिंसा ज्याच्याठायी वसते, त्याच्या आचरणावरून अहिंसेची खरी ओळख होते. खरी अहिंसा ज्ञानवानाच्या मनाच्या अवकाशात पूर्ण चंद्रबिंबाप्रमाणे प्रकाशत राहते. कसे ते ऐक!"

कायिक अहिंसा

यानंतर भगवंतांच्या स्वांतरीचा अहिंसाविषयक भाव व मत प्रकट करण्यासाठी ज्ञानदेव असे म्हणतात की:

तऱ्हीं तरंगु नोलांडितु। लहरी पाएं न फोडितु।
सांचलु न मोडितु। पाणियाचां।।१३-२४५।।
वेगें आणि लेसा। दिठी घालूनि आंविसा।
जळीं बकु जैसा। पाऊल सूयें।।२४६।।
कां कमलावेरी भ्रमरु। पाय ठेविती हलुंवारु।
कुचुंबैल केसरु। इयां शंका।।२४७।।
तैसें परमाणु पां विगुंतलें। जाणुनि जीव सानुलें।
कारुण्याची पाऊलें। लपऊनि चालें।।२४८।।

"बगळा जसा आमिषावर नजर ठेवून संथ पाण्यात तरंगही न उठू देता, लाटांचा खळबळाट न माजविता, जलद गतीने पण अलगद पाण्यात पाऊले टाकतो; किंवा कमलदलातील सुकोमल पराग चुरगळतील या भीतीने भ्रमर जसा कमलावर अल्हाद पाय ठेवतो; तसाच ज्याचा मनोधर्मच अहिंसा झाला आहे असा मनुष्य जमिनीवर चालतांना भूमीच्या कणाकणातून राहणारे सानुले जीव चिरडून जाऊ नयेत म्हणून त्यांच्यावरील करुणेने क्रांत होत पाऊले जणु नसल्यासारखाच चालतो."

तो कृपेची वाटु करितु। तैं दिशाचि स्नेहें भरितु।
जीवातळीं आंथरितु। आपुला जीवु।।१३-२४९।।
ऐसियां जतनां। चालणे जेयां धनुर्धरा।
हें अनिर्वाच्य परिमाणा। पुरिजेना।।२५०।।

"त्या सानुल्या जीवांजवळून जातांना तो त्यांच्यावर आपल्या कृपादृष्टीचा वर्षाव करत त्यांच्याकडे प्रेमभरित नजरेने पाहात, आपल्या जीवाच्या उबेचे त्यांच्यासाठी पांघरूण पसरत वाट चालतो. त्याच्या त्या अलौकिक चालीचे वर्णन करण्यास उपमा तरी कोठून आणावी!"

पैं मोहाचेनि सांगडे। लासी पिलें धरी तोंडें।
तेथ दातांचें आगरडे। लागती जैसें।।१३-२५१।।
कां स्नहालु माएं। तान्हयाची वाट पाहे।
तियें दिठी आहे। हंलुवार जैं।।२५२।।
ना ना कमलदलें। डोलविजती ढालें।
तो जेणें पाडें बुबुलें। वारा घेपें।।२५३।।
तैसेनि मार्दवें पाएं। भूमीवरी न्यसितु जाएं।
लागती तेथ होएं। जनां सुख।।२५४।।
ऐसियां लघिमा चालतां। कृमिकिटक पंडुसुता।
देखें तऱ्हीं माघौतां। हलूंच निघे।।२५५।
म्हणे पाओ धडपडैल। तऱ्हीं स्वामीची निद्रा मोडैल।
रचलेपण पडैल। झोती हन।।२५६।।
इयां काकुलुती। वाहाणी घे माघौती।
कोण्हेही व्यक्ती। न वचे वरी।।२५७।।

"मांजरीने पिलांना धरून नेत असता तिचे दांत जसे त्यांना लागत नाहीत; माता प्रेमाने जशी आपल्या तान्हुल्यावर स्नेहाळ वात्सल्यपूर्ण दृष्टीचा वर्षाव करते; कमलदलाने ढाळलेला वारा जसा डोळ्यांच्या बुबुळांनाही हळुवारपणे सुखावतो; तसाच मार्दवाने तो भूमीवर पदन्यास करतो. त्याच्या तशा चालण्याने आजूबाजूच्या सर्व प्राणिमात्रांना अतीव सुख होते. अशा लाघवाने जरी तो चालत असला तरी वाटेत कृमिकीटक दिसले तर त्यांच्या अंतरी वास्तव्य करणाऱ्या प्रभूची आपल्या पावलांच्या आवाजाने निद्रा भंगून त्यांच्या आरामात व्यत्यय येईल या भीतीने तो उलट पावली माघारा फिरतो."

यापूर्वी ज्ञानदेवांनी कायिक अहिंसेचे रूप दाखवून दिले. आता त्यांच्या व्यक्तिमात्रांशी असणाऱ्या वर्तणूकीचे वर्णन करत ते म्हणतात:

जीवाचेनि नांवें। तृणातेंही नोलांडवें।
मग न लेखितां जावें। हें कें गोठी।।१३-२५८।।
मुंगियें मेरु नोलांडवें। मशका सिंधु न तरवे।
तैसा भेटिलियां न करवें। अतिक्रमु।।२५९।।
ऐसीं जेयांचि चाली। कृपाफलीं आली।....।।२६०।।

"क्षुल्लकशा जीवजंतूंसाठीही ज्याचे अंत:करण एवढे तुटते; जो कोणाही प्राण्यावर पाऊलसुद्धा पडू नये म्हणून दक्ष असतो; ज्याला साधे तृणाचे पातेही ओलांडून जाता येत नाही; तो मनुष्य त्याला कोणी

व्यक्ती भेटली तर तिचा अनादर करून जाईल हे कसे संभवेल! मुंगीला कधीतरी मेरु पर्वत ओलांडता येईल का! चिलट कधी समुद्र पार करून जाईल का! त्या दयार्द्र अंतःकरणाच्या महामानवास वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तिमात्राचे क्षेमकुशल पाहिल्याविना पुढे चालताच येत नाही, हे निःसंशय समज! तो मनुष्य म्हणजे वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक जीवमात्रास कृपाफळ देणारा कृपाफळांनी लगडलेला जणू चालताबोलता वृक्षच असतो."

वाचिक अहिंसा

"चलां कल्पतरूंचे आरव" ही उक्ती सार्थ पूर्ण करणाऱ्या त्या महात्म्याविषयी ज्ञानदेव पुढे म्हणतातः

...देखसि जियाली। दया वाचे।।१३-२६०।।
स्वयें श्वसणेंच सुकुमार। मुख मोहाचें माहेर।
माधुर्या जाहले अंकुर। दशन तैसें।।२६१।।
पुढां स्नेह पाझरे। मागां चालती अक्षरें।
शब्द पाठीं अवतरें। कृपा आथी।।२६२।।
तंव बोलणेंचि नाही। बोलो म्हणे जऱ्हीं काईं।
तऱ्हीं बोलु कोण्हाहीं। खुपैल काईं।।२६३।।

"त्याची वाचा म्हणजे मूर्तिमंत दयाच असते. त्याचे श्वसनसुद्धा सुकुमार, हळुवार भासते. त्याचे मुख शांती व आनंदाने इतके मंडित असते की त्याच्यावरून आपली नजर क्षणैकसुद्धा हटू नये, असे मोहाचे माहेरच ते असते. त्याची दंतपंक्ती म्हणजे माधुर्याला फुटलेले जणू अंकुरच! त्याच्या रूपाने चालताबोलता जिव्हाळाच प्रकटतो आणि नंतर त्याच्या मुखींचे स्नेहाळ बोल ऐकू येतात. आधी त्याची कृपा प्राप्त होते आणि नंतर कृपादर्शक शब्द अवतरतात. भूतमात्रांशी एकरूप झालेल्या त्या कृपावंतास कोणाशी काही बोलून वेगळे असे आणखी काय सांगता येईल! पण जरी तो काही बोललाच तर ते कोणाला खुपेल असे कसे बरे असेल!"

बोलतां अधिकुही निघे। तऱ्हीं कोण्हाहीं वर्मीं न लगे।
कोण्हासि न रिघे। शंका मनीं।।१३-२६४।।
मांडिली गोठी हन मोडैल। वासिपैल कोण्ही उठैल।
आइकोनिचि वोवांडील। कोण्ही जऱ्हीं।।२६५।।
तऱ्हीं दुवालीं कोण्हां न होआवी। कंवणाची भुंवई नुचलावी।
ऐसा भाओ जीवीं। म्हणौनि उगा।।२६६।।

"यदाकदाचित आपल्याकडून बोलतांना अधिकउणा शब्द गेला तर तो कोणाच्या वर्मी लागेल; कोणाला त्याच्या हेतूबद्दल शंका निर्माण होईल; कोणी भीतीने दचकेल; कोणी सांगण्याकडे दुर्लक्ष करील; कोणाला आपल्या बोलण्याने क्लेश होतील; कोणाला आपल्या बोलण्याचा राग येईल; या भीतीने तो सहसा उगाच राहतो."

मग प्रार्थिला विपायें। जऱ्हीं लोभें बोलों जाये।
तऱ्हीं परिसे तेयां होये। मायबापु।।१३-२६७।।
कां नादब्रह्मचि मुसें आलें। की गंगापय असललें।
पतिव्रतें आलें। वार्धक्य कां।।२६८।।
तैसें सांच आणि मवाल। मितलें परि रसाल।
बोले जैसें कल्लोल। अमृताचें।।२६९।।

"त्यातून कोणी त्याने बोलावे अशी विनंती केलीच तर त्याचे मन राखावे या हेतूने तो जे काही बोलतो ते इतके कळवळ्याचे असते की ऐकणाऱ्याला आपण जणू आईवडिलांचेच जिव्हाळ्याचे मृदुमधुर गंभीर बोलणे ऐकत आहोत, असे वाटावे. त्याचे बोलही मोजकेच पण इतके साक्षेपी व मवाळ असतात की जसे काही अमृताचे रसाळ कल्लोळच कानावर पडताहेत; जसे काही साक्षात नादब्रह्मच अवतरले आहे; जणू गंगेचे पवित्र तोयच दुथडी भरून कल्लोळ करते आहे; जणू अत्रिपत्नी अनसूयामातेचे पातिव्रत्य पवित्र वार्धक्य पावले आहे."

विरोधु वादबलु। प्रणुपापढालु।
उपहासु चालु। वर्मस्पर्शु।।१३-२७०।।
आटु वेगु विंदाणु। आशा शंका प्रभारणु।
हे संन्यसिलें अवगुणु। जियां वाचा।।२७१।।

"त्याच्या वाचेने उपरोधिक बोलणे, तंट्यास उत्तेजना देणे, प्राण्यात पापभावना निर्माण करणे, टाकून बोलणे, वर्मी लागतीलसे शब्द वापरणे, अट्टाहास करणे, आवेशाने बोलणे, खोटी आशा दाखवणे, संशयात पाडणे, कपटाने बोलणे, प्रतारणा करणे, इत्यादी जे अवगुण असतात, त्यांचा पूर्णतया त्याग केलेला असतो."

दृष्टीतील अहिंसा

वाचिक अहिंसेचे निरूपण केल्यानंतर अहिंसा पूर्णपणे अंगी बाणलेल्या मनुष्याची दृष्टी कशी असते, ते वर्णितांना ज्ञानदेव म्हणतात कीः

आणि तेयाचि परी किरीटी। थाऊ जेयाचिये दिठी।
सांडिलीयां भ्रूकुटी। मोकलियां।।१३-२७२।।
भूतीं वस्तू आहे। तियें रूपों शके विपायें।
म्हणौनि वास न पाहे। बहुतकरूनि।।२७३।।

"त्याचप्रमाणे अर्जुना! त्याची दृष्टी स्थिर व आर्द्र असते. त्याची भुवईसुद्धा कधी उचलत नाही.त्याच्या ललाटी कधी त्रासिकपणा किंवा राग दाखवणारी बारीकशीही आठी नसते; जरी त्याची दृष्टी इतकी मार्दवपूर्ण असते, तरीही तो कोणाही भूताकडे डोळे उघडून पाहणे टाळतो. कारण न जाणो! सर्वांतर्यामी वास्तव्य करणाऱ्या भगवंताकडे चुकून रोखून पाहिले गेले तर त्या भूतेशास ती नजर बोचेल व कष्ट पोहोचतील!"

ऐसाही कोण्हे एकें वेळें। आंतुली कृपेचेनि बळें।
उघडोनियां डोळे। दिठी घाली।।१३-२७४।।
तऱ्हीं चंद्रबिंबौनि धारा। निघतां नव्हती गोचरा।
परि एकसरां चकोरां। निघती दोंदें।।२७५।।

तैसें प्रणियांसीं होये। जऱ्हीं तो वासु पाहे।
तेयां अवलोकनाची सोये। कूर्मीही नेणें।।२७६।।

"अशी त्याची मनोधारणा असली तरी जर का एखादे वेळी त्याच्या अंतरीची कृपा ओसंडून येऊन त्याने डोळे उघडून कोणावर दृष्टिक्षेप टाकला, तर ज्याप्रमाणे चंद्रबिंबाहून निघणाऱ्या सुधामृताच्या धारा डोळ्यांना दिसत नसतांनाही त्या पिऊनच जसे चकोर पक्षी पुष्ट होतात, त्याप्रमाणेच प्रणिमात्रांस ती दृष्टी आह्लाददायक ठरते. त्याने कोणाकडे सहज पाहिले तर त्या दृष्टीची सर कासवीच्या आपल्या पिलांकडे पाहण्याच्या दृष्टीलाही नसते; इतकी त्याची दृष्टी प्रेमभरित असते."

अहिंसक वृत्ती व कृती

बोलणे, चालणे व बघणे यांद्वारे अहिंसा प्रकट करणाऱ्या त्या मनुष्याचे हस्तस्पर्शादी कृती कशा तशाच अहिंसामय असतात, पाहा:

किंबहुना आईसीं। दिठी जेयांची भूतांसीं।
करही देखसी। तैसेचि तैं।।१३-२७७।।
होऊनियां कृतार्थ। राहिले सिद्धाचे मनोरथ।
तैसें जेयाचे हात। निर्व्यापार।।२७८।।

"याप्रमाणे ज्याची दृष्टी सर्व भूतांप्रती दयार्द्र व कारुण्यपूर्ण असते, त्याचे हात व स्पर्श दोन्हीही प्रणिमात्रांस क्लेशहारक व सुखकारक असतात. सिद्धांचे मन जसे त्यांच्या मनोरथपूर्तीने स्तब्ध होते, तसेच त्या कृपाळूचे हस्त काहीच करणीय न उरल्याने चेष्टारहित - निर्व्यापार झालेले असतात."

अक्षमें आणि संन्यासिलें। कीं निरींधन आणि विझाले।
मुकेनि घेतलें। मौन जैसें।।१३-२७९।।
तेयां परी काईं। जेयां करां करणें नाहीं।
जैं अकर्तयाचियां ठाईं। बैसो येती।।२८०।।
आसुडैल वारा। नख लागेल अंबरा।
इयां बुद्धी करां। चाळवो ने दी।।२८१।।
तेथ आंगावरील उडवावी। का डोलां रिगतां झाडावीं।
पशुपक्ष्यां दावावी। त्रासमुद्रा।।२८२।।
इयां केऊतियां गोठी। नावडे दंडु काठी।
मग शस्त्रांचे किरीटी। बोलणें कें।।२८३।।

"कर्मेंद्रियेही अक्षम असावीत आणि वर संन्यासही स्वीकारावा; अग्नी काष्ठरहितही असावा आणि विझूनही जावा; मुक्याने मौनव्रत अंगीकारावे; त्याप्रमाणे कृतिरहित असलेले हातच त्याच्या निर्व्यापार राहण्यासाठी जणू आलेले असतात. वाऱ्याला फटका बसेल; आकाशाला आपली नखे रुपतील आणि पंचमहाभूतीं वस्ती करून असणाऱ्या भगवंताला कष्ट पोहोचतील या भीतीने जो मनुष्य आपले हातसुद्धा चळू देत नाही; तेथे अंगावर बसलेल्या माशा वाराव्या, डोळ्यांभोवती घोंघावणारी चिलटे हाकलावीत, किंवा पशुपक्ष्यांना भिववण्यासाठी आविर्भाव करावेत, हे त्याच्याकडून कसे बरे होईल! हे अर्जुना! ज्याला हाती साधी काठी किंवा दंड घेणे पण रुचत नाही, त्याने हाती शस्त्र घेण्याची काय वार्ता!"

लीलाकमलें खेलणें। पुष्पमाला झेलणें।
न करी म्हणे गोफणें। ऐसें होईल।।१३-२८४।।
हालती रोमावली। ययालागीं आंग न कुरवालीं।
नखांची गुंडाली। बोटांवरी।।२८५।।

"सहज मजेत म्हणून कमळांशी खेळावे किंवा पुष्पमाळा हातात झेलाव्या, तर ती कृती हवेतून वावरणाऱ्या सूक्ष्म चिलटादिकांना गोफणीने मारल्यासारखे प्राणघातक होईल; म्हणून तो तसे कधीही चुकून पण करत नाही. अंगावरील रोमावलीच्या आश्रयाने राहणारे सानुकले जीव दुखावतील या भयाने तो सहज म्हणूनही अंगसुद्धा कधी कुरवाळत नाही. नखांवर वसणाऱ्या सूक्ष्म जंतूंना उपद्रव होऊ नये म्हणून कधी तो नखे कापत नाही; म्हणून नखांच्या गुंडाळ्या त्याच्या बोटांवर वाढलेल्या असतात."

तंव करणेयायाचि अभावो। परि ऐसाही पडे लावो।
तन्हिं हातां हाचि सरावो। जैं जोडिजतां।।१३-२८६।।
कां नाभिकारां उचलिजै। हातु पडिलियां देईजै।
आर्त्तातैं स्पर्शिजै। अलुमालु।।२८७।।
हेहीं उपरोधें करणें। तऱ्हीं आर्त्तभय हारणें।
नेणती चंद्रकिरणें। जिव्हाला तो।।२८८।।
पावोनि तो स्पर्शु। मलयानिलु खरपुसु।
तेणें मानें पशु। कुरवालणें।।२८९।।

"नमस्कार करण्यासाठी हात जोडणे; अभय दर्शवण्यासाठी हात उचलणे; पडलेल्या, अडखळणाऱ्या मनुष्यास हात देणे; आर्तांचे दु:ख निवारून त्यांना दिलासा देणे, त्यांना हळुवार कुरवाळणे; अशासाठीच हातांचा वापर करण्याची त्याची सवय असते. पीडितांच्या वेदना शमविण्यासाठी तो त्यांना स्पर्श करण्यासाठी नाईलाजाने हस्तादी अंगांचा उपयोग करतो; पण त्या स्पर्शाची शीतलता चंद्रकिरणस्पर्शांसही उणे आणणारी असते. पशूंना गोंजारणाऱ्या त्याच्या हातांचा स्पर्श मलय पर्वतावरून वाहत येणाऱ्या चंदनगंधाने सुगंधित झालेल्या वायुस्पर्शासही नाजुकपणात मागे टाकतो."

जैं सदा रितें मोकलें। जैसीं चंदनांगें निसलें।
न फलतांही निष्फलें। होतीचि ना।।१३-२९०।।
आतां असो हे वाग्जाल। जाणें तैं करतल।
सज्जनाचें शील। स्वभाव जैसें।।२९१।।

"चंदनाचे सर्वांग उपयोगी असते. त्याला केवळ स्वादिष्ट फळे येत नाहीत, म्हणून कोणी कधी त्याला निष्फळ म्हणेल का! त्याचप्रमाणे त्या महानुभावाचे हस्त रिक्त असले तरी त्यांना कोणी रिक्त वा निरुपयोगी कसे म्हणेल! ते तर भूतमात्रांच्या करुणेने भरलेलेच असतात! हे असे किती वर्णन करावे! सज्जनांचे शील स्वभाव जसे

असतात, त्याच तोडीचे त्याचे करतल, हस्त, स्पर्श आदीही असतात, हे निश्चित समज.''

मनाचे महत्त्व::::

मानसिक अहिंसा

यानंतर त्या महामानवाच्या अंतःकरणात अहिंसा कशी बिंबलेली असते; तो मानसिक अहिंसेचे कसा पुतळाच असतो, त्याचे वर्णन करत ज्ञानेश म्हणतातः

आतां मन तेयाचें। सांगो म्हणो जऱ्हीं सांचें।
तऱ्हीं सांगितले कोण्हाचें। विलास हे।।१३-२९२।।
काईं शाखा नव्हे तरु। जलेंवीण असे सागरु।
तेज आणि तेजाकारु। आन काईं।।२९३।।
अवयव आणि शरीर। हे वेगळालें काईं कीर।
कीं रसु आणि नीर। सिनीं आथी।।२९४।।
म्हणौनि जैं हे सर्व। सांगितले बाह्य भाव।
तैं मनचि गां सावयव। ऐसें जाणें।।२९५।।

मानसिक अहिंसेचे बहारदार वर्णन ऐका! ''अहिंसकाच्या मनाची वृत्ती व आचार कसे असतात, हे सांग म्हणून तू म्हणतो अहेस, तर हे अर्जुना! आतापावेतो काया, वाचा, चक्षू, हस्त, स्पर्श, पाद, चलनवलन इ.विषयींचे त्या अहिंसक मुनीचे जे विलास वर्णन केले, ते मनाचेच नव्हेत काय! शाखांविण तरू कोणी कधी पाहिला आहे का! जलावाचून सागर असतो का! तेज हेच तेजोराशीचे अस्तित्व - निधान नव्हे काय! अवयव मिळूनच शरीर होते ना! ओलावा हा पाण्याचाच गुण नाही का! त्याचप्रमाणे मी जी आतापर्यंत काया, वाचा, चक्षुरादिंद्वारे प्रकटणारी अहिंसालक्षणे निरूपिली, त्यांचे बाह्य भाव वर्णिले; ते सर्व त्या इंद्रियांचे अध्वर्यू जे मन असते, त्याचेच नाहीत काय! इंद्रिये म्हणजे सावयव मनच!''

मन व योग

भगवंतांनी ***''इन्द्रियाणां मनश्चास्मि''*** म्हणून ज्याला आपली विभूति असे म्हटले आहे; जे योगाभ्यासाचे मूलद्वार आहे; संकल्पविकल्पाचे माहेरघर आहे; ज्याच्या पायावर भक्तिप्रासाद उभा केला जातो; जे निमिषार्धात ब्रह्मांड पालथे घालू शकते; जे जगाची साक्षात उत्पत्ती करणारे ब्रह्मयास्वरूप आहे; ज्याच्यापुढे ***हटियांची होड*** माघार घेते; जे दृढ विश्वास धरला असता प्रत्यक्ष परमात्म्याची प्राप्ती करून देऊ शकते; जे श्रद्धामूल आहे; ज्याच्या बलापुढे विश्वामित्रासारखे ऋषीही परास्त झाले; खरे तर जे विश्वाच्या साम्राज्यपदी विराजमान होण्याची आकांक्षा धरून जीवास जन्ममृत्यूच्या अनंत आरींच्या चक्रावर अनंत कालापर्यंत फिरवते; जे सागराहूनही अथांग आहे, मेरुशिखरापेक्षाही उन्नत आहे, भागवतोत्तम बलीराजाहूनही बलवान आहे; आकाशाहूनही गहन आहे; पक्षिराज वैनतेयापेक्षाही उंच भराऱ्या जे घेते; नागराज वासुकीहूनही जे चपल आहे; विद्युल्लतेसरस जे दीप्तिमान आहे; मेघगर्जनेपेक्षाही जे गंभीर आहे; अनंत ज्ञानअज्ञानाचे जे भांडार आहे; विश्व ज्याने होते-जाते; त्या मनाचा इंद्रियांशी असणारा योगशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचा असा संबंध पुढील ओव्यातून सांगत ज्ञानदेव म्हणतातः

जैं बीज भुईं खोंविलें। तैंचि वरी रुखु जाहले।
तैसे इंद्रियांद्वारीं फांकलें। अंतरचि।।१३-२९६।।
पैं मानसींचि जऱ्हीं। अहिंसेची अवसरी।
तऱ्हीं कैंची बाहेरी। वोसंडेल।।२९७।।
आवडे तैं वृत्ती किरीटी। आधी मनौनी उठी।
मग तैं वाचे दिठी। करांसीं ये।।२९८।।
वांचूनि मनींचि नाहीं। तैं वाचेनि उमटेल काईं।
बीजेवीण भुईं। अंकुर असे।।२९९।।
उगमींचि वाळूनि जाये। तैं वोधी कैंचें वाहे।
जीवु गेलियां आहे। चेष्टा देहीं।।३००।।
म्हणौनि मनपण मोडे। तैं इंद्रियां आधींचि उबडे।
सूत्रधारेवीण साईखडें। वावो जैसें।।३०१।।
तैसे मन हे पांडवा। मूळ ययां इंद्रियभावां।
हेचि राहाटे आघवां। इहीं द्वारीं।।३०२।।

मन व इंद्रिये

''वृक्षाद्वारे जमिनीत पेरलेले बीजच जसे शाखांच्या रूपाने पसरते, त्याचप्रमाणे इंद्रियवृत्तींच्याद्वारे मनच प्रकटते. मनातच जर अहिंसेची वाण असेल, तर ती इंद्रियांतून कशी अवतरेल! इंद्रियांद्वारे भासणारी वृत्ती मूळ मनातच स्फुरण पावते व दृष्टी, वाचा, हस्तादिंद्वारे आकार घेते. ज्याप्रमाणे बीज नसतांना भूमीतून रोप अंकुरत नाही, त्याचप्रमाणे जे मनातच नसते, ते वाचेद्वारे प्रकटेलच कसे! उगमापाशीच आटून जाणारा झरा जसा नदीच्या पात्रातून वाहत जाऊ शकत नाही; जसा जीव गेल्यावर देहाच्या चेष्टा बंद पडतात; किंवा सूत्रधाराविना कळसूत्री बाहुल्यांची हालचाल जशी थांबते; तद्वतच मनाचा मनपणा नष्ट होत असतांनाच इंद्रियांची शक्ती पण नाहीशी होते. हे मनच इंद्रियभावांचे मूळ असल्याने तेच सर्व इंद्रियांद्वारे राहाटत असते.''

मन व अहिंसा

परि जिये वेलीं जैसें। जैं होऊनि आंतु असे।
बाहेरीं ये तैसें। व्यापाररूपें।।१३-३०३।।
ययालागीं सांचोकारें।मनीं अहिंसा थांवे थोरे।
पिकली द्रुती आदरें। बोभात निघे।।३०४।।
म्हणौनि इंद्रियें तैंचि संपदा। वेचितांही उदावादा।
अहिंसेचा धंदा। करिते आहाति।।३०५।।
समुद्रें दाटें भरितें। तैं समुद्रचि भरी तरियांतैं।
तैसें स्वसंपत्ती चित्तें। इंद्रियां केलें।।३०६।।

''मनात जी वासना असेल तीच इंद्रियांच्या व्यापाररूपाने बाहेर पडते. पक्व झालेल्या फळाचा किंवा धान्याचा सुवास जसा आजूबाजूला

फैलावतो, तशीच मनात घर करून बसलेली अहिंसाच इंद्रियांद्वारे बाहेर उफळून येते. अहिंसारूपी वृत्तिभांडवल इंद्रियांनी कितीही खर्चले तरी त्यांचा सतत पुरवठा त्याच मनातून होतो व त्या द्रव्याचे कधीही उणे पडत नाही. अहिंसारूपी संपत्तीने भरलेल्या चित्ताचा, सागर ज्याप्रमाणे भरतीच्या लाटांद्वारे खाड्यात-खाजवणांत पाणी भरतो; त्याप्रमाणे इंद्रियांद्वारे आपल्या अहिंसाधनाचा विनियोग मनच करते."

हे बहु असो पंडितु। धरुनि बालकाचां हातु।
वोली लिही व्यक्तु। आपणचि।।१३-३०७।।
तैसें दयालुत्व आपुलें। मनें हातांपायां आणिलें।
मग तेथ उफजविलें। अहिंसेतैं।।३०८।।
ययाकारणें किरीटी। इंद्रियांचियां गोठी।
मनाचियां राहाटीं। रूप केलें।।३०९।।

"बालकाला लिहायला शिकवणारे पंतोजी जसे त्याच्या हाताला धरून स्वतःच लेखन करत असतात, तसेच आपले दयालुत्व इंद्रियांना देऊन मनाने त्यांच्यात अहिंसा उपजवलेली असते. हे अर्जुना! याप्रमाणे वाचा-चक्षू-हस्तपादादी इंद्रियांद्वारे होणाऱ्या अहिंसेचे वर्णन करणे म्हणजेच मनाच्या अहिंसात्मक वृत्तींचे दर्शन घडवणे आहे."

ऐसा मनें देहें वाचा। सर्व संन्यासु दंडाचा।
जाहलां ठायीं जेयाचां। देखशील।।१३-३१०।।
तो जाण वेल्हाल। ज्ञानाचे वेलाउल।
हे असो निखल। ज्ञानचि तो।।३११।।
जैं अहिंसा कानें आईकिजैं। ग्रंथाधारें निरूपिजै।
तैं पाहावी हें उफजै। तैं तोचि पाहावा।।३१२।।

साधारणपणे १२० ओव्यातून केलेल्या या अहिंसेवरील निरूपणाअंती ज्ञानदेव म्हणतातः "अशा प्रकारे मन, वाचा व देह यांद्वारे ज्याने हिंसेचा त्याग केलेला असतो, तो म्हणजे ज्ञानाचे मोठे मंदिरच आहे; किंबहुना तो म्हणजे मूर्तिमंत ज्ञानच होय! ग्रंथांतरी निरूपण केलेली व श्रवणाद्वारे ऐकलेली अहिंसा प्रत्यक्ष पाहावी, अशी इच्छा झाल्यास त्या मनुष्याचेच दर्शन घ्यावे. तो म्हणजे साक्षात अहिंसाच!" असो.

फलनिष्पत्ती::::

अहिंसेचे फल

अहिंसा हा सर्वश्रेष्ठ यम मानला जातो. त्याचे फल पतञ्जली सांगतात ते असे आहेः

अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः।।२-३५।।पा.यो.सू.।।

या यमाच्या पालनाचे फलस्वरूप सर्व भूतमात्रांची साधकाप्रती निर्वैर वृत्ती होते. तसेच योगसाधना निर्विघ्नपणे करता येते. सर्व भूतांप्रति निर्वैर भाव असल्याने त्याला गीतेत सांगितल्याप्रमाणे परमात्मप्राप्ती होते. त्याविषयी श्रीकृष्णांचे वचन आहेः

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः।
निर्वैरःसर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।

"हे अर्जुना! कोणाही भूतमात्राशी वैर न करणारा, माझ्याचसाठी कर्मे करणारा, माझ्यात परमभाव ठेवणारा, वासनेचा संग सोडलेला तो माझा भक्त मलाच येऊन मिळतो."

ज्ञानेशांनी आपल्या उपरोल्लेखित १२० ओव्यातून अहिंसेची जी लक्षणे प्रकट केली आहेत, त्यांनी जो युक्त असतो, तो निश्चितच भगवंत सांगतात तसा भक्त असतो आणि तो व भगवंत काही वेगळे नसतात.

"अद्वेष्टा सर्वभूतानाम्"

सर्व भूतांप्रती द्वेषबुद्धी न ठेवणारा व त्यांच्यावर प्रेम करणारा हा भक्त भगवंत म्हणतात की त्यांना प्रिय असतोः

अद्वेष्टा सर्वभूतांनां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी।।१२-१३।।
संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः।।१२-१४।।

"भूतांप्रती अद्वेष्टा, त्यांच्यावर प्रेम करणारा, त्यांचा मित्र, त्यांच्यावर दया वर्षवणारा, ममतारहित, अहंकारविवर्जित, सुखदुःख समान मानणारा, सर्व द्वंद्वे सहन करणारा, क्षमाबुद्धीचा, संतुष्ट अंतःकरणाचा, मनाचा सुनिश्चय केलेला, अंतःकरणाचे नियमन केलेला व मला मन आणि बुद्धी अर्पण केलेला,सतत माझे ध्यान करणारा तो माझा योगी भक्त मला अतीव प्रिय आहे."

निरूपणाचे सूत्र::::

ज्ञानेश गीतेचे सूत्र धरून असतात

अद्वेष्टादी गुणांचे वर्णन करतांना श्रीज्ञानदेव गीतेचे सूत्र धरूनच सर्व विवेचन करत असल्याचे आपणांस दिसून येतात. ***अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षान्ति*** इ.गुणांचे उल्लेख वा विवरण ***दैवी संपदा*** या दृष्टीने पण महत्त्वाचे आहे. श्रीकृष्णांनी मनुष्याने दैवी संपदा अर्जित करावी असे उपदेशिले असल्याने या *अठरा* गुणांचे तेराव्या अध्यायाच्या निमित्ताने वर्णन करतांना साधकांच्या मनावर ते बिंबवण्यासाठी ज्ञानेश्वर सजग आहेत, हे आपल्याला दिसून येते.

श्रीज्ञानदेव गीतेचे मूळ सूत्र व तिच्या प्रमेयाचा आंवाका लक्षात ठेवूनच आपले निरूपण करतात, हे ज्ञानेश्वरीचे अध्ययन करत असता आपणास वारंवार जाणवून येते. असो.

आतापावेतो ज्ञानेश्वरांचे जे अहिंसेविषयीचे विवेचन आपण पाहिले, त्यात अभ्यासकांच्या दृष्टीने दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आपणांस आढळतात. त्या अशाः

१) श्रीज्ञानेश्वरांनी ठिकठिकाणी श्रीगीतेच्या श्लोकांवर ओव्या रचतांना अनेकदा सढळ हस्ताने वैपुल्याची शब्दसंपत्ती उधळलेली दिसते. हे केवळ काव्यरसाचा परिपोष करण्यासाठीच केलेले असावे असा कोणाचा गैरसमज होण्याची शक्यता त्यांच्या नजरेसमोर असावी. त्याचा उलगडा त्यांनी वर उल्लेखलेल्या या भागातील काही ओव्यांद्वारे केला आहे.

कृतार्थ महाभागांस हे जरूर जाणवेल की ***ज्ञानेश्वरीतील एकही शब्द अधिकउणा नाही.*** प्रत्येक ओवीला, प्रत्येक शब्दाला, एवढेच काय पण ज्ञानेश्वरीतील प्रत्येक अक्षरालासुद्धा स्वतंत्र मूल्य आहे असे मानणारे अनेक ज्ञानेश्वरीप्रेमी सहृदय अभ्यासक, साधक, वाचक आणि असंख्य भोळेभाबडे वारकरी अन ज्ञानेश्वरभक्त आहेत.

त्यांचे मत जरी एकवेळ बाजूला ठेवू म्हटले तरी ज्ञानदेवांची स्वतःची साक्ष असेच सांगते की ज्ञानेश्वरीमध्ये गीतार्थ स्पष्ट करण्यासाठी, भगवंतांची उक्ती उलगडून दाखवण्यासाठी, श्रीहरीच्या अंतरीचे भाव प्रकट करण्यासाठी, अज्ञ व सुज्ञ अशा सर्व साधकांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि हे सर्व रसाचा परिपोष करत करत, नाजुकपणे मराठी भाषेवर अलंकारांचा साज चढवत चढवत, जी नवरसांच्या क्षीराब्धीतून आरस्पानी अक्षर वाङ्मयरत्ने प्रकट झालेली आहेत, त्यातील कोणतेच रत्न दुसऱ्या रत्नांपेक्षा कमी दीप्तीचे-कमी तेजाचे वा निस्तेज नाही. कारण त्या प्रत्येक अक्षररत्नात ब्रह्मतेजाचा ओनामाच ग्रथित केलेला आहे!!!

२) योगसाधनेत असणारे मनाचे अतीव महत्त्व

संपूर्ण योगसाधनेचा पाया म्हणजे मनच होय. तसे पाहिले तर मनुष्यमात्राच्या सुखदुःखांना वस्तुतः मनच कारण असते. बंध अन मोक्षाचे कारणसुद्धा मन हेच आहे. चित्तातील वासनाकोष व मनाचे संकल्पविकल्पसामर्थ्य या दोन्हींच्या संयोगाने इंद्रिये क्रिया करतांना दिसतात. सर्व क्रियांच्या मागे मनच असते. म्हणूनच भगवंत म्हणतात की ***"इंद्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः।।३-४२।।"*** : इंद्रियांहून मन श्रेष्ठ आहे, पर आहे; त्यांच्या क्रियांचे मनच नियमन करते.

इंद्रिये दमन करणे हे हटियांस, तडीतापसांस, मोठमोठ्या ऋषिमुनींना पण कठीण वाटलेले आहे. हट्टाने जो इंद्रिये वश करू पाहतो, त्याने योगदुर्गावर जाणारा मार्ग न चालताच सोडून दिल्यासारखा आहे. म्हणून ***श्रीगोपालकृष्ण व ज्ञानदेव सांगतात की इंद्रियांमागे ज्या मन, चित्त व बुद्धी या प्रेरणा आहेत, त्या कशा वश करून घेता येतील याचा खरे तर अभ्यास केला पाहिजे.***

भगवंतापर्यंत नेणाऱ्या मार्गात कोणत्या ना कोणत्या प्रकारे मनाला आपलेसे करून घेणे, चित्तातील कुवासना संस्कार घालवणे व चित्ताच्या सुसंस्कारशक्तीचा साधनेला अनुकूल असा उपयोग करून घेणे; तसेच बुद्धीला सुसंस्कारित करून या त्रयीचा भगवद्दर्शनासाठी उपयोग करून घेणे, या उपायांचा अंतर्भाव असतोच. गीता-ज्ञानेश्वरीद्वारे योगसाधनेचे भक्तमनोवृत्त्यानुकूल असे जे विविध क्रमसोपान व टप्पे प्रकटले आहेत, ते या युक्त्यांचा अधिकृत उपयोग कसा करावा याचेच मार्गदर्शन करतात.

योगसाधनेसाठी असणारे हे मनाचे अतीव महत्त्व सर्वच संतांनी मान्य केलेले आहे. विशेष म्हणजे श्रीरामदासस्वामी समर्थांनी***मनाचे श्लोक*** रचून साधकांना याविषयी उत्कृष्ट मार्गदर्शन केलेले आहे.

ज्ञानदेवांचा हरिपाठही याचसाठी आहे. मनाला ईशप्राप्तीसाठी सतर्क करणे या उद्देशाने ज्ञानेश्वरीतही आगेमागे प्रसंगोपात्त अनेक विधाने येतात. त्यासाठी अहिंसेचे निरूपण करतांना इंद्रिये व मन यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणाऱ्या ज्ञानदेवांनी रचलेल्या उपरोल्लेखित ओव्या साधकांना उत्तम मार्गदर्शन करतात. असो.

द्वंद्वराहित्य::::

४)क्षान्ति (क्षमावृत्ती, द्वंद्वे सहन करणे)

ज्ञान्यांची लक्षणे सांगतांना ज्ञानदेवांनी ***क्षान्ति*** या गुणसंपदेचे वर्णन केले आहे. साधकांसाठी आदर्श ठरणाऱ्या गुणनिधानांचे या मिषाने आपोआपच वर्णन होत आहे. त्यांचे ***अनाक्रोश*** क्षमेविषयींचे सांगणे ऐकाः

म्हणे उन्मेखलोचना। सावध होई अर्जुना।
करू तुज ज्ञाना। वोलखी आतां।।१३-३३८।।
तऱ्हीं ज्ञान गां तैं एथें। वोलखे तूं निरुते।
आक्रोशेविण जेथें। क्षमा असे।।३३९।।
अगाध सरोवरीं। कमलिणी जियांपरी।
कां सदैवाच्या घरीं। संपत्ति जैसीं।।३४०।।
पार्था येणें पाडें। क्षमा जेयांतैं वाढे।
तैंही लक्षे फुडें। लक्षण सांगो।।३४१।।

श्रीकृष्ण म्हणतातः "हे ज्ञानग्रहणासाठी उत्तम दृष्टी असणाऱ्या अर्जुना! तुला ज्ञानाची ओळख करून देतो; तिकडे अवधान दे. सुखदुःखादी द्वंद्वांचे आघात जो सहज सहन करतो; म्हणजेच ज्याच्या ठिकाणी ***अनाक्रोश क्षमा*** असते, त्याच्याजवळच ज्ञान असते, असे समज. अथांग सरोवरात ज्याप्रमाणे कमलांचे विपुल वेल पसरतात किंवा भाग्यवंतांच्या घरी जशी अमाप संपत्ती असते; त्याप्रमाणे त्या ज्ञानवानाचे ठिकाणी अपार क्षान्ति असते. त्याची लक्षणे आकळून घे."

तऱ्हीं पढिये तैं लेणें। आंगीं भावें जेणें ।
धरिजै तैचि साहणें। सर्वचि जेयां।।१३-३४२।।
त्रिविध मुख्य आघवें। उपद्रवांचें मेळावें।
वरी पडिलियां नव्हे। वांकुडा जो।।३४३।।
अपेक्षित पावे। तैं जेणें तोषें मानावें।
अनपेक्षिताही करवे। तोचि मानु।।३४४।।

"आवडता अलंकार जसा अंगावर कौतुकाने धारण करतात, त्याप्रमाणे सर्व द्वंद्वे तो सहन करतो. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक हे जे त्रिताप मनुष्याला दुःखसागरात लोटतात, तेसुद्धा तो शांतपणे सहन करतो. वांछित वस्तूच्या प्राप्तीने जेवढा हर्ष व्हावा, तेवढाच त्याला न आवडणाऱ्या गोष्टी वाट्याला आल्या असता होतो."

जो मानापमानातैं साहे। सुखदुःख जेथ सामायें।
निंदास्तुती नोहे। दुखंडु जो।।१३-३४५।।

उन्हालेनि जो न तापे। हिमवंतीं न कांपे।
कायिसेनिही न वासिपे। पातलेयां।।३४६।।
स्वशिखरांचा भारु। नेणें जैसा मेरु।
धरा यज्ञसुकरू। वोझें न म्हणे।।३४७।।
ना ना चराचरीं भूतीं। दाटणी नोहे क्षिती।
तैसा नाना द्वंद्वीं प्राप्तीं। घामेजे ना।।३४८।।

"मानपमान, सुखदुःख, निंदास्तुती ही द्वंद्वे तो स्थितप्रज्ञतेने सारखीच मानतो. शीतउष्ण त्याला समानच भासतात. निसर्गातील कोणत्याही संकटाला तो घाबरत नाही. वराहावतार श्रीविष्णूंना जसे पृथ्वीगोलाचे ओझे वाटत नाही; मेरुपर्वत जशी लीलया स्वशिखरे धारण करतो; नाना भूतांच्या भाराने पृथ्वी जशी दडपली जात नाही; तसाच तो महापुरुष वेगळाल्या द्वंद्वांच्या सान्निध्यात क्लेशरहित मनाने राहतो."

घेऊनि जलाचें लोट। आलियां नदीनदांचे संघाट।
करी वाड पोट। समुद्रु जेवीं।।१३-३४९।।
तैसें जेयाच्या ठाईं। न साहणें कंहींचि नाहीं।
आणि साहतु असे ऐसेंहीं। स्मरणु नुरे।।३५०।।
अंगां जै पातलें। तैं करुनि घालीं आपुलें।
एथ साहतेनि नवलें। घेपिजेना।।३५१।।
हे अनाक्रोश क्षमा। जेयापासीं प्रियोत्तमा।
जाण तेणें महिमा। ज्ञानासि गां।।३५२।।
तो पुरुषु पांडवा। ज्ञानाचा वोलावा।.....।।३५३।।

"नदीनदांचे समुदाय पाण्याचे लोट घेऊन आल्यावर समुद्र सहजच जसे मोठे पोट करतो; तसे तो सर्व काही सहजच सहन करतो; पण आपण काही सहन करत आहोत, असे त्याला स्मरणही होत नाही. जे काही भोग वाट्याला येतात, ते आपलेच स्वरूप समजून तो विनातक्रार भोगतो. आपण काही द्वंद्वे अनुभवतो आहोत, सहन करतो आहोत, अशी त्याला भावनाच नसते; तेथे त्या सहनशीलतेचा अहंकार त्याला कोठून असणार! अशी क्षान्ति ज्याच्या अंगी सहजच असते, तो ज्ञानसखा असतो; किंबहुना त्याच्या साहचर्याने ज्ञानास महत्ता प्राप्त होते, हे तू जाणून अस."

स्थितप्रज्ञ

अशी ही ***क्षान्ति*** म्हणजे अनाक्रोश क्षमेची – द्वंद्वे सहन करण्याच्या शक्तीची लक्षणे ज्ञानदेवांनी प्रकट केली आहत. ***अमानित्वादी अष्टादशगुण संपत्ती***चे विवेचन करतांना त्यांच्या डोळ्यांसमोर गीतेच्या दुसऱ्या अध्यायी अर्जुनाने विचारलेला प्रश्न असला पाहिजे असे वाटतेः

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्।।२-५४।।

"समाधीत असलेल्या स्थितप्रज्ञाची लक्षणे कोणती असतात; तो बोलतो काय; राहतो कसा आणि वागतो कसा," हे अर्जुन जाणून घेऊ इच्छितो. त्याच्या पृच्छेस उत्तरादाखल भगवंत जे सांगतात, त्यांपैकी पुढील दोन श्लोक लक्षणीय आहेतः

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते।।२-५६।।
यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्।
नाभिनन्दन्ति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५७।।

"दुःख प्राप्त झाले असता ज्याचे मन उद्विग्न होत नाही; सुख प्राप्त झाले असता जो त्याच्याविषयी निरिच्छ असतो; प्रीती, भय व क्रोध हे ज्याचे नष्ट झालेले असतात; ज्याची कोठेच आसक्ती नसते; शुभ आणि अशुभ प्राप्त झाले असता जो ना तर प्रसन्न होतो, ना द्वेष करतो, ना खिन्न होतो; त्याची बुद्धी स्थिर झालेली असते. तोच स्थितप्रज्ञ होय; तोच मुनी होय."

अशा ज्ञानी भक्ताची स्थिती सांगतांना व त्याची स्तुती *बाराव्या* अध्यायी करत असता भगवान काय म्हणतात, ते ऐकाः

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः।।१२-१७।।
समः शत्रौ च मित्रे च तथा मानपमानयोः।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः।।१२-१८।।
तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः।।१२-१९।।

"जो कशातही आनंद वा दुःख मानत नाही; जो कशाचाही द्वेष करत नाही; शुभ व अशुभ या दोन्ही भावनांचा ज्याने त्याग केला आहे; जो शत्रू व मित्र, मान व अपमान यांच्या ठिकाणी सम असतो; तसेच शीत व उष्ण, सुख व दुःख ही ज्याला सारखीच असतात; जो आसक्तिरहित आहे; निंदा व स्तुती ज्याला समसमानच वाटतात; जो मननशील असतो; जो प्राप्त परिस्थितीत संतोषाने राहतो; जो कोठेच ममता ठेवत नाही; असा स्थिरबुद्धी असलेला, भक्तियुक्त अंतःकरणाचा मनुष्य मला प्रिय आहे."

ज्ञानदेवांचे वैशिष्ट्य::::

ज्ञानदेवांच्या गीतार्थनिरूपणाचे विशेषत्व

या विवेचनावरून जिज्ञासूंस अवगत होईल की गीतेचे निरूपण करत असता ज्ञानदेव सतत संपूर्ण गीताच आपल्या डोळ्यांसमोर ठेवतात. भगवंतांच्या उपदेशाचे सूत्र सातत्याने त्यांच्या नजरेसमोर असते. सर्वसामान्यांस गीतार्थ नीट समजावा या तळमळीपोटी ते वारंवार तीच तीच गोष्ट न कंटाळता वेळोवेळी वेगवेगळ्या संदर्भात पुनःपुनः मांडण्यास कधीही बिचकत नाहीत.

काही विचारवंतांना यात पुनरुक्तीचा दोष कदाचित दिसेल. पण तसा दोष ज्ञानेशांच्या पदरी घालणे म्हणजे ज्ञानदेवांचा हे गीतानिरूपण करण्यामागचा उद्देश आणि त्यांना ज्यांचा अति कळवळा आहे, ते सामान्य जन व त्यांचे पारमार्थिक कल्याण आपल्या नजरेआड करण्यासारखे ठरेल! तसेच वस्तुतः गीतातरी एकच एक गोष्ट पुनःपुनः वेगवेगळ्या प्रकारे सांगत नाही का!

गीतेचा उद्देश श्रीकृष्णांचा साधा सोपा उपदेश सामान्य माणसाच्या मनावर पूर्णपणे बिंबवणे हा असल्याने गीतेला जसा पुनरुक्तिदोष देता येत नाही, तसाच तो ज्ञानदेवीलाही देता येत नाही. गीताकारांचा हा उद्देश, गीतेतील उपदेशाचा केंद्रबिंदू व गीतेच्या परिघाची व्याप्ती, गीतेचे तत्त्वज्ञान व ते प्रत्यक्ष अनुभवण्याचा योग यांचे अनुशीलन करत ज्ञानदेवांनी काय म्हटले आहे, तिकडे जिज्ञासूंनी लक्ष द्यावे.

ज्ञानेश असे म्हणतातः

तैं महासिद्धांताचा आंवाका। सिद्धान्तकक्षा अनेका।
भिडऊनि आरंभु देखा। दावितु असे।।१८-१२४२।।
एथ अविद्यानाशु हे स्थल। तेणें मोक्षोपादान हे फल।
या दोहीं केवल। साधन ज्ञान।।१२४३।।
हे इतुलेंचि नाना परी। निरुपिलें ग्रंथविस्तारीं।
तैं आतां दोहीं अक्षरीं। अनुवादावें।।१२४४।।

ज्ञानेश्वरीत जो महासिद्धांत गीतार्थ म्हणून प्रतिपादिला आहे, त्याअंतर्गत अनेक सिद्धांत व उपसिद्धांतांच्या कक्षा आहेत. हा महासिद्धांत म्हणजे गीतार्थ हे जर एक अपरिमित व्यासाचे वर्तुळ समजले तर इतर सिद्धांत व उपसिद्धांत ही त्यातील छोट्या मोठ्या परिमितीची अनेक वर्तुळे समजली पाहिजेत. अविद्येचा नाश हा या महासिद्धांताचा उद्देश समजला पाहिजे व मोक्षप्राप्ती हे त्याचे फळ समजावे. या दोन्ही साध्यांसाठी ज्ञान हेच केवळ एकमात्र साधन आहे. हाच तो महासिद्धांत!!

प्रसंगोपात्त तसेच वेगवेगळ्या निमित्तांनी संपूर्ण ज्ञानेश्वरीतून श्रीज्ञानदेव हेच अनेक प्रकारे प्रतिपादितात, असे वरील ओव्यांद्वारे त्यांनी स्पष्ट केले आहे. गीतादर्शनातील उपपत्त्या, समीकरणे, युत्त्या व उपाय यांचा सम्यक विचार करून, या दर्शनाने प्राप्त होणारे फल साधकांना सहज चुंबिता यावे, म्हणून ही साधकांची माउली त्यांच्या योग्य असे ज्ञानामृताचे घास करून त्यांच्या मुखी भरवते; हेच मनोरम दर्शन आपणांस वारंवार सर्वत्र ज्ञानेश्वरीभर दिसते!!!

पंडितांच्या *(Scholars of Philosophic Thought)* भाषेत म्हणायचे तर गीतार्थाचे विश्लेषण *(Analysis)*, परीक्षण *(Examination)* व समन्वयन *(Synthesis)* या ज्ञानक्रिया इतक्या सहजपणे, समर्थपणे व सामान्य जनांच्या पचनी पडतील अशा समंजसपणे हाताळणारी अलौकिक विभूती केवळ ज्ञानदेवच असू शकतात.

सूज्ञ ते अज्ञ सर्व जीवांना गीतार्थ स्पष्ट करून दाखवणे हे जर ज्ञानदेवांचे उद्दिष्ट समजले, तर त्याच्या पूर्तीसाठी त्यांनी ***गीता व तत्सबंधी अनेकानेक धर्मग्रंथ, वेद-शास्त्रे-पुराणे- स्मृतिवाङ्मय व यांवरच्या टीका आणि भाष्ये; प्रकरणग्रंथ, दीपिका इ.लिखित रचना; मौखिक वाङ्मय व आख्यायिका, दंतकथा; इतर मतानुयायांचे व प्रमुख वैदिक व अवैदिक परंपरांशी संबंधित असणाऱ्यांचे सिद्धांत, ग्रंथ व विचारप्रणाल्या; गीतेच्या मुख्य प्रतिपादनाचा विषय जो योग व योगशास्त्र त्यासंबंधीची सर्व सैद्धांतिक व प्रयोगिक अनुभूतिपूर्ण माहितीः स्वतःच दिव्य सिद्धयोगी असल्याने योगशास्त्रासंबंधी अनधिकारी वा कमी अधिकारी व्यक्तींस क्वचितच ज्ञात असू शकणारे अधिकृत ज्ञान व विज्ञान; नाथसंप्रदाय, त्याचे तत्त्वज्ञान व नाथांची योगप्रणाली; स्वतःच श्रीकृष्णमय झालेले असल्याने भगवंतांच्या दिव्यातिदिव्य पूर्णपुरुषोत्तम श्रीकृष्ण अवताराचे अंतरंग रहस्य; भक्त, ज्ञानी व योगी असा उत्कृष्ट त्रिवेणीसंगम प्रकटवणारी अप्रमेय सर्वंकष सिद्धप्रज्ञा; स्वतंत्र कल्पनाशक्ती व बुद्धिविलास; आपल्या अंतर्यामीची सर्व जीवांचे कल्याण करू इच्छिणारी करुणामय सजग चिच्छक्ती; स्वतःस प्राप्त झालेले ब्रह्मज्ञान व ब्रह्मविद्या; सर्वज्ञातृत्व व सर्वभावाधिष्ठातृत्व यांद्वारे प्राप्त होणारी भगवदैश्वर्यसूचक यश, श्री, कीर्ती, औदार्यप्रभृती षट्गुणसंपत; योग्यांस प्राप्त होणाऱ्या विभूति (सिद्धी) व प्रामुख्याने अष्टमहासिद्धी; आदिनाथांपासून प्रवाहित झालेली व श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने प्राप्त झालेली गुरुपरंपरोपदिष्ट संप्रदायाची गङ्गोत्री; सद्गुरू व संतांचा आशीर्वाद*** :: या ***सर्व साधनसंपत्तीचा विश्वाच्या इतिहासात युगानुयुगात क्वचितच घडून येणारा अभूतपूर्व विशाल महासंगम*** करून आपले व आपल्या ***सद्गुरूंचे हे उद्दिष्ट - हे जीवनध्येय*** पूर्ण केले आहेः एवढेच नव्हे तर सामान्यातल्या सामान्य मनुष्याससुद्धा तो ***गीतार्थ पचनी पडण्यास उपकारक ठरणारा सकळ जीवमात्रांस आशीर्वादरूप असा हा ज्ञानदेवी नामक एकमेवाद्वितीय प्रासादिक ग्रंथराजाधिराज*** निर्माण करण्याचे श्रेय एकमात्र श्रीज्ञानदेवांनाच द्यावे लागते!!! असो.

आर्जवादी लक्षणे::::

५)आर्जव

आता आर्जव ही ज्ञानगुणसंपदा अवलोकू. आर्जवाचे निरूपण करतांना ज्ञानदेव म्हणतातः

...आता परीस आर्जवा। रूप करूं।।१३-३५३।।
तऱ्हीं आर्जव तैं ऐसें। प्राणांचे सौजन्य जैसें।
आवडे तेयांही दोषें। एकाचें गां।।३५४।।
कां तोंड पाहूनि प्रकाशु। न करी जेवीं चंडांशु।
जगां एकचि अवकाशु। आकाश जैसें।।३५५।।
तैसें जेयाचें मन। माणसाप्रति आन आन।
नव्हे आणि वर्तन। ऐसें पैं तैं।।३५७।।
जैं जगचि सनोलख। जगेंसीं जुनी सोयरीक।
आपपर हे भाख। जाणणे नाही।।३५७।।

"चांगल्या आणि वाईट, सुष्ट आणि दुष्ट, आवडत्या वा नावडत्या अशा सर्व प्राण्यांशी तो सारख्याच सौजन्याने वागतो - जसे प्राण प्रत्येक प्राण्याशी समबुद्धीने वागतात तसेच! सूर्य जसा सुरूप तशाच कुरूप चेहऱ्यांवर सारखाच प्रकाश पाडतो किंवा सर्व जगतास व त्यातील यच्चयावत प्राणिमात्रांस वा वस्तुजातास ज्याप्रमाणे आकाश

एकाच अवकाशात व्यापून असते; त्याचप्रमाणे आर्जवाचे मूर्तिमंत रूपच असलेला तो पुरुष सर्व मनुष्यमात्रांशी समानच वागणूक ठेवतो व त्याची प्रत्येक मनुष्याप्रत एकच सद्भावना असते – ती म्हणजे आर्जवपूर्ण सौजन्याची! समस्त जगतजातांशी त्याची मैत्री असते; त्यांच्याशी त्याची जणू काही जुनी सोयरीक असते. म्हणून आपला व परका असा भेदभाव त्याच्यापाशी नसतो."

भलतेणेंसींही मेलु। पाणिया ऐसा ढालु।
कवणेविखीं आडलु। नेघे चित्त।।१३-३५८।।
वारियाची धांव। तैसें सरल भाव।
शंका आणि हांव। नाही जेयां।।३५९।।
मायेपुढां बालकां। रिघतां न पडे आवाका।
तैसें मन देतां लोकां। नालोचि जो।।३६०।।

"पानी तेरा रंग कैसा! जिसमें मिलाओ वैसा!" अशी हिंदीत म्हण आहे. "पाणी जसे कोणत्याही द्रावात आपला वेगळेपणा न ठेवता मिसळून जाते, त्याचप्रमाणे त्या मनुष्याच्या चित्तात कोणाहीबद्दल विकल्प नसतो. तो सर्व लोकात सहज समरस होऊन राहतो–जसा काही त्यांच्यातलाच एक! वारा वाहू लागला की जसा एका वेळी एकच दिशा धरतो, तितक्याच सरळपणाचे त्या आर्जवी पुरुषाचे वागणे असते. हावरेपणा व शंकेखोरपणा अशा वाकड्या मनोवृत्तींना त्याच्याजवळ थाराच नसतो. मातेसमोर उघडेवाघडे येतांना बालक जसे संकोचत नाही, त्याचप्रमाणे तो मनुष्य लोकांसमक्ष आपल्या मनातील गुह्य गोष्टीसुद्धा निर्व्याज अंतःकरणाने सांगतो."

फांकलियां इंदिवरां। परिवारु नाहीं धनुर्धरा।
तैसा कानाकोपरा। नेणें जीव।।१३-३६१।।
चोखालपण रत्नाचें। रत्नावरी किरणाचें।
तैसें पुढां मन जेयाचें। करणें पाठीं।।३६२।।

"ज्याप्रमाणे उमललेले कमलपुष्प आपला परिमल लपवून ठेवू शकत नाही, त्याप्रमाणे त्या सज्जनाला स्वतःच्या अंतःकरणातील भाव लपवता येत नाहीत. रत्नावरून परावर्तित होणारे किरण जसे त्या रत्नाच्या तेजस्वितेची पारख करून देतात; त्याप्रमाणे त्या सज्जन गृहस्थाची कृत्ये त्याच्या निर्मळ मनाचे मूल्यांकन करून दाखवतात."

आलोचूं जो नेणें। अनुभवचि जोगावणें।
धरीं मोकलीं अंतःकरणें। नव्हेचि जेयां।।१३-३६३।।
दिठी नोहे मिणधी। बोलणें नाहीं संदिग्धीं।
कवणेंसीं हीनबुद्धी। राहाटिजे ना।।३६४।।

"तो कोणताही संकल्प करत नाही; सर्वदा आत्मानुभवी निमग्न असतो; तसेच त्याच्या अंतःकरणवृत्ती सर्वथा परमात्म्यास अर्पिलेल्या असल्याने त्या इतर कोणत्याही विषयोर्मींनी लिप्त होत नाहीत व हा विषय सोड, तो धर, अशी त्याच्या चित्ताची चलबिचल होत नाही. त्याची दृष्टी निष्कपट असते. त्याचे संभाषण कधीही आडवळणाचे नसते. तो कोणाही प्राण्याला तुच्छ, हीन लेखत नाही."

दाहाहीं इंद्रियें प्रांजलें। निप्रपंचें निर्मलें।
पांचही पालव मोकलें। आठही प्रहर।।१३-३६५।।
अमृताची धार। तैसें उजूं अंतर।
किंबहुना जो माहेर। ययां चिन्हांचें।।३६६।।
तो पुरुषु सुभटा। आर्जवाचा आंगवठा।
जाण तेथेचि घरटा। ज्ञानें केला।।३६७।।

"चित्तवृत्ती निष्प्रपंच झाल्यामुळे त्याची दशेंद्रिये त्याच्या अंतःकरणातील सरळ भाव व निर्मलत्व प्रकट करतात. चित्तात क्लिष्टता नसल्याने सर्व काल त्याचे पंचप्राण उजू वाहतात. किंबहुना त्याचे अंतःकरणच अमृतधारेसारखे उजू असते, म्हणा ना! हे सुजाण अर्जुना! ही सकल चिह्ने प्रकट करणारा तो पुरुष आर्जवाची मूर्तीच असतो. त्याच्याच ठायी ज्ञान वास्तव्य करून राहाते."

याप्रमाणे ज्ञान्याठायी वसणाऱ्या ***आर्जव*** या गुणसंपदेचे वर्णन ज्ञानदेव संपन्न करतात.***अष्टादशगुणसंपत्ती*** वर्णन करतांना ते प्रत्येक ठिकाणी ते ते गुणनिधान ज्ञानी पुरुषाठायी स्वयंभूच असते, हे सूचित करतात. यावरून साधकांसाठी ते असा एक बोध प्रदर्शित करतात की ज्ञानी पुरुषांचे हे गुण जर कोणी साधक साधनांतर्गत आपल्या अंगी बाणवण्याचा प्रयत्न करील, तर त्याची साधनपथावर जरूर उन्नती होत जाईल.

किंबहुना बुद्धीचा मळकटा धुवून टाकून, ***कर्मसाम्यदशा*** प्राप्त करून घेऊन, गुरुभेट घडविण्याच्या ***क्रमयोग*** वाटेवरच्या प्रवासात नित्य बाळगावी लागणारी शिदोरी म्हणजे ही ***अमानित्वादिप्रभृती अष्टादशगुणसंपत*** म्हटले तरी चालेल! हीच शिदोरी गुरुउपदेशानंतर जे *कोवळे सांच ज्ञान* उद्बोधित होते, तेव्हा त्या कोमल ज्ञानांकुराची जपणूक करून त्याची वाढ करण्यासाठी आवश्यक ठरते.

६) आचार्योपासना (गुरुभक्ती)

आचार्य म्हणजे श्रीगुरू! त्यांची उपासना करण्याचे संपूर्ण रहस्य श्रीज्ञानदेवांनी तेराव्या अध्यायाच्या निमित्ताने प्रकट केले आहे. तसे त्यांनी ***ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी*** या ग्रंथांतरी, तसेच श्रीनिवृत्तिनाथांच्या स्तुतिपर अशा गुरुनिर्देशपर काही अभंगांतूनही श्रीगुरूंचे ऋण व त्यांचे महिमान हातचे काही न राखता प्रकट केलेच आहे; आणि तेही इतक्या परोपरीने की त्यांच्या श्रीगुरूंबद्दलच्या समस्त भावभावनांचे मनोरम प्रतिबिंब प्रकटवणारे हे साहित्य म्हणजे जणू बिलोरी आरशांनी निर्मिलेला शिशमहालच!

श्रीगुरु-सद्गुरु हा शब्दच ज्ञानदेवांना एका अलौकिक अवकाशात घेऊन जातो. त्यांची सर्वगामी प्रज्ञा जेव्हा या एकाच विषयावर केंद्रित होते, तेव्हा तर अलंकारिक साहित्यनिर्मिती करणाऱ्या या भाषाप्रभूचा अंतःकरणसागर गुरुरूपी चंद्रम्यास पाहून उचंबळून येतो व श्रीगुरूचा महिमा किती सांगू व कसा सांगू, याचे त्यांना भानही राहत नाही याची स्पष्ट कबुली त्यांनी ज्ञानेश्वरीत जागोजाग दिली आहे.

गुरुनिष्ठा या संपूर्ण विषयाचे अवलोकन आणि *तेराव्या* अध्यायातील ***"आतां ययावरी। गुरुभक्तीची परी।सांगो गां अवधारी। चतुरनाथा।।१३-३६८।।"*** या ओवीपासून ते ***"परि तो बोलु उपसाहावा। आणि वोलगे अवसरु देयावा। आतां म्हणेन जी बरवा। ग्रंथार्थुचि।।१३-४५९।।"*** या कबुलीच्या ओवीपर्यंतच्या उण्यापुऱ्या १०-१२ ओव्यातून विशेष विस्तारपूर्वक केलेले ***गुरुभक्ती*** वा आचार्योपासनेचे सविस्तर विवेचन आपण पूर्वीच अवलोकिले आहे.*(उन्मेषः२ :आत्मरूपा सद्गुरू - पृ.क्र. ५५ ते६०)*

अशा रीतीने श्रीकृष्णांच्या ***"आचार्योपासनम्"*** *(अ.१३श्लोक ७)* या उक्तीवर श्रीज्ञानेश्वरांनी कोटिकोटी सूर्यांचा प्रकाश टाकला आहे. किंबहुना श्रीगीतेच्या संप्रदायासंदर्भात हा शब्द किती महत्त्वाचा आहे, हे रहस्यच जणू त्यांनी आपल्यापर्यंत ज्ञानेश्वरीच्या समग्र ग्रंथरचनेद्वारे आणि आपल्या गुरुसंप्रदायाच्या उदाहरणाद्वारे आणून पोहोचवले आहे, म्हणा ना!

७) शुचित्व (पावित्र्य)

यानंतरच्या काही ओव्या ***"शौचम्"*** या श्रीकृष्णोक्तीबाबतच्या आहेत. शरीर व अंतःकरण यांचे पावित्र्य म्हणजेच बाह्य व अंतःशुद्धी यांचा बोध ***शौचम् - शौच वा शुचित्व*** या शब्दांनी होतो. श्रीज्ञानदेवांनी केलेले विवेचन पाहाः

म्हणे शुचित्व गां ऐसें। जेयापासीं दिसें।
आंग मन जैसें। कापुराचें।।१३-४६१।।
कां रत्नाचें दलवाडें। तैसें सबाह्य चोखडें।
आंत बाहेरीं एकें पाडें। सूर्यु जैसा।।४६२।।
बाहेरीं कर्मे क्षालिला। भितरीं ज्ञानें उजलिला।
इहीं दोहीं परी आला। पाखाला एका।।४६३।।

श्रीकृष्ण म्हणतात, "कापूर जसा अंतर्बाह्य धवलशुभ्र असतो, तसेच ***शुचित्व*** अंगी असणाऱ्या मनुष्याचे शरीर *(बाह्यांग)* व मन *(अंतरंग)* ही दोन्हीही पवित्र व शुद्ध असतात. जशी रत्नाची दीप्ती त्याच्या आत व बाहेर दोन्हीकडे फाकते; किंवा सूर्य जसा अंतरीही व बाहेरूनही प्रकाशमय असतो; त्याचप्रमाणे विहित कर्मे परमात्म्याप्रीत्यर्थ केल्यामुळे त्या मनुष्याचे शरीर म्हणजे कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांचा बहिरंगसंघात नाडीशुद्धी झाल्याने पूर्णतया शुद्ध होतो व अंतरी ***ज्ञानउजरीची*** दीप्ती फाकल्याने मन, चित्त, अंतःकरण व बुद्धी या सूक्ष्म अंतरंग संघाताचीही शुद्धी होऊन त्यांना प्रभुकृपेने पावित्र्य प्राप्त होते."

मृत्तिका आणि जलें। बाह्य एणें मेलें।
निर्मलु होएं बोलें। वेदाचेनि।।१३-४६४।।

"शास्त्राज्ञेनुसार देहाची बहिरंग शुद्धी मृत्तिका व जळ यांच्या वापराने होते व अंतरंग ***(मन, बुद्धी, चित्त व अंतःकरण)*** श्रुति *(वेदवाणी)* ऐकून निर्मळ होते"-असाही शुद्धीचा एक प्रकार ज्ञानदेव येथे सांगतात.

भलतेथ बुद्धी बलीं। रजें आरिसा उजलीं।
सौंदणी फेडी थिगली। वस्त्रांचियां।।१३-४६५।।
किंबहुना इयापरी। बाह्य चोख अवधारीं।
आणि ज्ञानदीपु अंतरीं।म्हणौनि शुद्ध।।४६६।।

"ज्याप्रमाणे मनुष्य रांगोळी *(रजःकण)* वापरून आरसा स्वच्छ करतो; किंवा बाहेरून काळपट व बेढब दिसणारे परटाच्या भट्टीचे भांडे त्याच्याखाली आंच लावल्यावर आतील भट्टीच्या कपड्यांवरचा मळ व डाग स्वच्छ करते; त्याचप्रमाणे बुद्धीचा योग्य वापर करून प्रकृतीशी संबंधित ***कर्मेच पण ती युक्तीने केल्याने व ज्ञानाग्नीने अंतरंग उजळून टाकल्याने*** तो मनुष्य अंतर्बाह्य शुद्ध व पवित्र होतो."

संन्यास म्हणजे काय

या ओव्यातून ज्ञानदेव कर्मे न टाकण्याचा - ***संन्यासग्रहणाच्या अनुचित मार्गाने कर्मसंन्यास साध्य करण्याचा निष्फळ प्रयत्न न करण्याचा***- भगवंतांचा विचार पुनश्च सूचित करतात. आरशावरचा मळ जसा रांगोळी म्हणजे एक प्रकारची धूळ वापरूनच दूर केला जातो, त्याचप्रमाणे प्रकृतीच्या क्षेत्रात राहूनही प्रकृतिनियोजित कर्मेच योगयुक्तीने केल्याने मनुष्यास सहजच ज्ञानरूपी आरशावर बसलेले प्रकृतीचे प्रवृत्तीरूपी रजःकण दूर करता येतात, असा अभिप्राय येथे आहे.

तसेच कर्मे करणे जरी बुद्धिप्रामाण्यवादी संन्याशांच्या दृष्टिकोनातून गांवढळ वा ओबडधोबड वाटले, तरी परटाचे ओबडधोबड व काळेकुट्ट काजळीने माखलेले भट्टीचे भांडे जसे कपड्यांवरचे डाग व मळ नाहीसा करते; तशीच ती कर्मे योग्य युक्तीने म्हणजे परमेश्वराप्रीत्यर्थ व फलाकांक्षारहित होऊन केल्याने खरा ***कर्मसंन्यासयोग*** प्राप्त करून देतात हा श्रीकृष्णांचा अभिप्राय श्रीज्ञानदेवांनी येथे रोजच्या व्यवहारातील दोन समर्पक दृष्टांत देऊन श्रोत्यांच्या मनावर यथार्थ बिंबवला आहे.

विद्वान म्हणतात की श्रीमद् आद्य शंकराचार्यभागवतांनी त्यांच्या *गीताभाष्यात* चतुर्थाश्रमाची अर्थात संन्यासाश्रमाची भलावणी केलेली आहे. मा.लो.टिळकांचा किंबहुना याचसंबंधी मोठा आक्षेप होता व त्याचकरता त्यांच्या ***गीतारहस्य*** या ग्रंथाची उभारणी झाली होती. ***"भाष्यकारातें वाट पुसतु"*** या ज्ञानदेवीतील ओवीची संगती लावतांना बऱ्याच विद्वानांनी ते भाष्यकार म्हणजे शंकराचार्यच होत, असे आग्रहाने प्रतिपादिले असल्याचे जाणकार म्हणतात.

आता आपण ज्ञानेश्वरीतील ज्या ओव्या अभ्यासत आहोत, त्यांच्यावरून स्पष्टच दिसून येते की ज्ञानदेवांनी **चतुर्थाश्रमा**ची अर्थात सामान्य जन ज्याला ***संन्यास*** म्हणतात व जो ***परिव्राजकावस्था, दंडधारणा*** इ.विधींनी मंडित आहे, त्यासंबंधी अत्यंत प्रतिकूल मत येथे व्यक्त केले आहे. याचाच अर्थ ***"भाष्यकारातें वाट पुसतु"***मधले ते भाष्यकार आचार्य शंकरभागवत नसले पाहिजेत! आणि

जर का ज्ञानदेव सांगतात तशी साधकाची खरी संन्यस्तवृत्ती झालीच तर त्याला त्या बाह्य देखाव्याची - चतुर्थाश्रमी दंड, कमंडलूची अन परिव्राजकावस्थेची काय जरूर!

ज्ञानदेवांचे या संबंधातले हे सर्व विचार म्हणूनच मुद्दाम लक्ष देण्यायोग्यच आहेत.

विफल संन्यास

हा संन्यासविषयक अभिप्रायच स्पष्ट करत ते पुढे म्हणतातः

एरवीं तऱ्हीं पांडुसुता। आंतु शुद्ध नसतां।
बोहरी कर्म तो तत्त्वतां। विटंबु गां।।१३-४६७।।

"हे पांडुपुत्रा! बाह्यतः संन्यास स्वीकारून कर्मे जाळण्याचा प्रयत्न करून नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त करू पाहणारे त्या कर्मप्रवृत्तीचा मुळातूनच नाश करू न शकल्याने अंतःशुद्धी मिळवू शकण्यास केवळ असमर्थ असतात, असेच नव्हे तर कर्मे न करण्याचे ढोंग झाल्याने कर्मसंन्यासमार्गाची अशा प्रकारे घोर विटंबनाच करतात."

मृत जऱ्हीं शृंगारिला। गाढव तीर्थी नहाणिला।
कटु दुधियां माखिला। गुळें जैसा।।१३-४६८।।
वोस गृहीं तोरण बांधिलें। कां उपवासीं अन्ने लिंपिलें।
कुंकू सेंदूर केलें। कांतहीनें।।४६९।।
कलस ढिमाचें पोकल। जलो वरीलें झलाल।
काय करूं विचित्र फल। आंतु शेण।।४७०।।

"मृत शरीर शृंगारावे; उकिरडा फुंकणाऱ्या गर्दभाला तीर्थजलाने स्नान घालावे व त्याने परत उकिरड्यावर लोळून घाण व्हावे; कडू भोपळा त्याचा कडुपणा घालवण्यासाठी गुळाने चोपडावा; ओसाड घराच्या प्रवेशद्वारी मंगल तोरण बांधावे; उपाशी तडफडणाऱ्या माणसाला अन्न खायला न घालता ते त्याच्या अंगावर थापावे; पतिविहीन स्त्रीने सौभाग्यचिह्ने ल्यावीत; हुबेहूब फळासारखे दिसणारे पण आत शेण भरलेले फळाचे खेळणे करावे; किंबहुना आत भरीव सोने नसलेल्या, दगडाच्या किंवा पितळेच्या पोकळ कळसावर सोनेरी मुलामा फासून कृत्रिम झळाळी आणावी; हे सर्व जसे बाष्कळपणाचे चाळे होतील, त्याचप्रमाणे वरवर संन्यास करू पाहणाऱ्याचे मनोरथ होत."

तैसें कर्म वरिचिलें कडां। न सरे थोर मोलें कुडा।
नव्हे मदिरेचां घडा। पवित्र गांगें।।१३-४७१।

"ज्याप्रमाणे कुडाकचऱ्याला मोलाने विकता येत नसते; वा मदिरेने भरलेला घडा त्याच्यावर पवित्र गंगाजल शिंपडल्याने पवित्र होऊ शकत नाही; त्याचप्रमाणे योगयुक्ती न साधता निव्वळ वरवरचा कर्मसंन्यास करण्याचा प्रयत्न सफल होऊ शकत नाही."

म्हणौनि अंतरीं ज्ञान होआवें। मग बाह्य लाभेल स्वभावें।
वरी ज्ञान कर्मे संभवें। ऐसें कें जोडे।।१३-४७२।।

"म्हणून अंतर्यामी ज्ञान व्हावे व आपोआपच कर्मसंन्यास घडावा; तसेच कर्म करतांनाच ज्ञानही प्राप्त व्हावे; कर्मांचा त्याग करून नव्हे! आणि अशा रीतीने अंतर्बाह्य शुद्धी व्हावी."

ते झाल्याची लक्षणे कोणती, ती पाहाः

ययालागीं बाह्य विभागु। कर्मे धुतला चांगु।
आणि ज्ञानें फेडिला वंगु। अंतरींचा।।१३-४७३।।

"बाह्यविभाग म्हणजे ***दशेंद्रिये, पंचप्राण, व शरीरस्थ नाडिसमूह*** यांचे शुद्धिकरण कर्मयोगाच्या आचरणाने - विहित कर्मे ईश्वराप्रीत्यर्थ व फल ईश्वरार्पण करण्याच्या क्रमयोगमार्गांतर्गतच्या साधनप्रणालीने होते. तसेच ***मन-चित्त-बुद्धी-अंतःकरण-अहंकार*** या सूक्ष्मविभागाची शुद्धी त्याच्यावर आलेल्या अज्ञानावरणाच्या निरसनाने - तमोमय अविद्यारूप प्रकृतिस्वरूप बंधनाच्या निवृत्तीने - ज्ञानाने होते."

शुद्ध सत्त्वगुणाचा परिपोष

तेथ अंतर्बाह्य गेलें। निर्मलत्व एक जाहालें।
किंबहुना सरलें। शुचित्वचि।।१३-४७४।।
म्हणौनि सद्भाव जीवगतु। बाहेरीं दिसें फांकतु।
जैं स्फटिकगृहींचे डोलतु। दीपु जैसें।।४७५।।

"असे आंतर व बाह्य या दोन्ही प्रकारांचे शुद्धिसाम्य झाले म्हणजे त्यांच्यात काहीच भेद उरत नाही. मनुष्य सर्वथा निर्मळ होतो. त्यानंतर उरते ते केवळ एकसंध शुचित्वच! या अवस्थेत एका शुद्ध सत्त्वगुणाचाच केवळ परिपोष होतो व तो त्याच्या देह व अंतर्यामातून स्फटिकाच्या दिव्याआतून प्रकटणाऱ्या प्रकाशलहरींप्रमाणे आंदोळतांना दिसतो!"

खरा संन्यास

आता खरा संन्यास म्हणजे काय ते ज्ञानदेवांच्या शब्दात ऐकाः

विकल्प जेणे जेणें उपजे। नाथिलीं विकृति निफजे।
अप्रवृत्तीचीं बीजें। अंकुर घेती।।१३-४७६।।
तैं आईकें अथवा भेटें। परि मनीं काईंचि नुमटें।
मेघरंगें न काटे। व्योम जैसें।।४७७।।

"ज्या ज्या योगाने मनात विकल्प निर्माण होऊन अविकृत मन विकृत होऊ शकते; ज्या गोष्टींमुळे परमात्म्यात चित्त लावण्यास बाधा उत्पन्न होते; अशांच्या दर्शनाने वा श्रवणाने त्याच्या मनावर काहीही परिणाम होत नाही. मेघ काळेकुट्ट जरी असले तरी त्यांच्यामुळे आकाश काही डागाळत नाही, त्याचप्रमाणे त्या जीवन्मुक्तास इंद्रियांच्यासंबंधामुळे जरी अगदी पराकोटीचे विषयोपभोग घडले, तरी त्या विकारी इंद्रियोपभोगांचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नाही."

एऱ्हवीं इंद्रियांचेनि मेलें। विषयांवरीं तऱ्हीं लोलें।
परि विकाराचेनि विटालें।
लिंपिजेचि ना।।१३-४७८।।
भेटलियां वाटेवरी। चोखी आणि माहारी।
तेथ नातले तियापरी। राहाटो जाणें।।४७९।।

"ज्याप्रमाणे वाट चालतांना एखाद्या ब्राह्मण स्त्रीला महारीण भेटली तरी त्या जशा एकमेकींना स्पर्शितही नाहीत, त्याचप्रमाणे देहयात्रा

घडतांना व विषयभोगांचा व्यापार घडत असतांनासुद्धा त्या पुरुषाच्या अंतःकरणास ते विषय स्पर्श करत नाहीत, अशी त्याची वर्तणूक असते."

कां पतिपुत्रांतैं आलिंगीं। एकचि तैं तरुणांगी।
तेथ पुत्रभावाचां आंगीं। न लगेचि काम।।१३-४८०।।
तैसे हृदय चोख। संकल्पविकल्पीं सनोलख।
कृत्याकृत्य विशेख। फुडें जाणें।।४८१।।
पाणिये हिरा न भिजे। आधणीं हरलु न शिजे।
तैसीं विकल्पजातें न लिंपिजे। मनोवृत्ती।।४८२।।
तेयां नांव शुचित्वपण। पार्था गां संपूर्ण।
हे देखसि तेथ जाण। ज्ञान आहे।।४८३।।

"तरुणी जरी पतीप्रमाणेच पुत्रालाही कवटाळत असली, तरी पुत्राविषयी तिला जशी कामवासना उपजत नाही; तसेच त्या पुरुषाचे हृदय जरी संकल्पविकल्प जाणत असले, तरी कर्म कोणते व अकर्म कोणते हे पूर्णपणे ओळखून असते. पाण्याने हिरा भिजत नाही किंवा उकळत्या पाण्यात टाकला म्हणून काही दगड शिजत नाही. त्याचप्रमाणे त्या शुद्ध पुरुषाच्या मनोवृत्ती कधीही विकल्पांनी लिप्त होत नाहीत. हे पार्था! शुचित्वाची ही लक्षणे जेव्हा दृष्टीस पडतील, तेव्हा तेथे ज्ञानाचे अस्तित्व आहे, असे नक्की समज."

पतञ्जली, श्रीकृष्ण व ज्ञानदेव

याप्रमाणे श्रीज्ञानदेवांनी ***शुचित्व*** या श्रीगोपालकृष्णांच्या संकल्पनेची समग्र उकल करत असतांनाच पतञ्जलीकृत ***शौच*** या नियमावर साधकांच्या हितार्थ प्रकाश टाकला आहे. योगमार्गाची पतञ्जलिकृत सूत्रे संक्षिप्त आहेत. कारण ती बोलूनचालून सूत्रेच आहेत. सूत्रकर्त्यास सूत्रातील एक अक्षर जरी अर्थ न बदलता कमी करता आले तरी पुत्रजन्माएवढा आनंद होतो, असे म्हणतात.

भगवद्गीताकर्त्यास श्रीगोपालकृष्णांची दिव्य वाणी तिच्या अलौकिकतेसाठी भगवत्कार्यार्थ ग्रथित करून ठेवण्याची इच्छा होती. अर्जुन हा ***नर*** ऋषींचा अवतारच असल्याने त्याला वस्तुतः अगम्य असे काहीच नव्हते. परंतु अवतारकार्यार्थ व लोकांना उद्धरण्यासाठी परम भावोत्कट असा श्रीकृष्णार्जुनांचा दिव्य आत्मसंवाद प्रकटला. परंतु तोही उण्यापुऱ्या ७०० श्लोकातच ग्रथित केला गेला.

ज्ञानदेवांनी मात्र हे मागील सर्व उणे फेडण्यासाठी शब्दांची कृपणता न दाखविता, त्याउलट शब्दसंपत्तिभांडाराची मुक्त हस्ते उधळण करून, सर्व साधकांसाठी योगशास्त्रीय साधनसामग्री खुल्या दिलाने प्रकट करून, श्रीपतञ्जलिमुनी, तसेच श्रीगोपालकृष्ण यांचे मनोगत आपल्यापावेतो समर्थपणे आणून पोहोचविले आहे, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी, तेवढी थोडीच!!

८)स्थैर्य

यानंतरच्या ओव्यांतून ज्ञानदेव ***स्थैर्यम्*** या श्रीकृष्णांनी वाखाणलेल्या गुणाची उकल करून सांगतात. योगशास्त्राच्या जिज्ञासूंना ***स्थैर्य*** म्हटले की ***"स्थिरसुखमासनम्।।२-४६।।"*** या पातञ्जलसूत्राची व त्याद्वारे अभिप्रेत असलेल्या साधनाभूत स्थिर आसनाची त्वरित आठवण होणे स्वाभाविकच आहे. परंतु श्रीज्ञानदेवांनी *सहाव्या* अध्यायातच आसन डोलणारे नसावे, हा अभिप्राय यावर व्यक्तविलेला आहे. तेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर ***"शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः। नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ।।६-१०।।"*** हा गीतेचा श्लोक होता.

अपरोक्षानुभूतीतील आसन व स्थैर्य

आता मात्र ते ज्या स्थिरतेचा व तत्संबंधित आसनाचा परामर्ष घेत आहेत, ते योगारूढ मुनीच्या - ज्ञान्याच्या संदर्भात आहे. साहजिकच त्यांची दृष्टी साधनामार्गाच्या प्रारंभीच्या बाह्यात्कारींच्या टप्प्यांकडून थेट साधनाची व साध्याची जेथे ***खेंव*** म्हणजे मिठी पडली आहे, त्या उत्तुंगाचल अशा साधनेच्या मेरुशिखराकडे वळली आहे. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी त्यांच्या ***अपरोक्षानुभूति*** या प्रकरणग्रंथात निर्दिष्ट केलेले ***आसनस्थैर्य*** या बाबतीत त्यांच्या समांतर विचारसरणीचे प्रतीक आहे.

आचार्य म्हणतातः

सुखेनैव भवेद्यस्मिन्नजस्त्रं ब्रह्मचिन्तनम्।
आसनं तद्विजानीयान्नेतरत्सुखनाशनम्।।११२।।
सिद्धं यत्सर्वभूतादि विश्वाधिष्ठानमव्ययम्।
यस्मिन सिद्धाः समाविष्टास्तद्वै सिद्धासनं विदुः।।
।।११३।।अप.।।

"ज्या अवस्थेत सुखपूर्वक निरंतर ब्रह्मचिंतन करता येईल, तिलाच ***आसन*** म्हणता येईल; याव्यतिरिक्त इतर सर्व आसनप्रकार म्हणजे ब्रह्मसुखाचा नाश करणारे समजावेत. ***जे समस्त भूतांचे आदिकारण आहे, जे विश्वाचे अविनाशी अधिष्ठान आहे व ज्यातच सिद्धजन स्थित असतात, त्यालाच सिद्धासन म्हणतात."***

साधनेच्या प्राथमिक अवस्थेत असलेल्या मुमुक्षूंस आचार्यांची ही विचारसरणी धक्का देणारी वाटली तरी साधनेचे गंतव्यस्थान स्पष्ट करून दाखवणारी त्यांची ही वाणी म्हणजे साधनापथावरील शतकानुशतके मार्गदर्शन करणारी दीपमालिकाच म्हटली पाहिजे. यानिमित्ताने आचार्य व ज्ञानदेव विचारांच्या बाबतीत एकमेकांजवळ खरोखरच किती येतात, हे ज्ञानदेवीच्या पुढील ओव्यातून स्पष्ट दिसून येतेः

आणि स्थिरता सांचे। घर रिगाली जेयाचें।
तो पुरुष ज्ञानाचें आयुष्य गां।।१३-४८४।।
देह तऱ्हीं वरचिलीकडें। आपुलिया परी हिंडे।
परि बैसका न मोडे। मानसींची।।१३-४८४।।
वत्सावरूनि धेनुचें। स्नेह राना न वचे।
नव्हती भोग सतियेचें। प्रेमभोग।।४८६।।

कां लोभियां दूर जाये। परि जीव ठेव्याचियें ठायें।
तैसा देह चलितां नव्हे। चलु चित्तां।।४८७।।

"ज्याच्याठायी स्थिरता संचली तो महापुरुष ज्ञानाच्या आयुष्यरूप होय. तोच ज्ञानाचे जीवन होतो. त्याचा देह प्रकृतीवशे काहीही कर्म करत असेना का! पण त्या मनुष्याच्या मनास खरेखुरे ***स्थैर्य*** प्राप्त झालेले असते. कारण तो सदा ब्रह्मलीन असतो. गाय जशी वनात चरायला गेली तरी तिचे वासरावरचे प्रेम नाहीसे होत नाही; किंवा सती जाणाऱ्या स्त्रीने जरी शृंगार केला तरी तो जसा पतीशी रममाण होण्यासाठी नसतो; लोभी मनुष्य कोठेही गेला तरी जसा त्याचा जीव त्याने जपून ठेवलेल्या संपत्तीतच गुंतलेला असतो; त्याप्रमाणे त्या स्थैर्य प्राप्त झालेल्या पुरुषाचे चित्तही कर्मानुसार देहचेष्टा करत असतांनासुद्धा परमात्मस्वरूपीच अढळ असते."

जातयां अभ्रासवें। जैसें आकाश न धांवें।
भ्रमणचक्रीं न भ्रमें। ध्रुवु जैसा।।१३-४८८।।
पांथिकाचियां येरझारां। सवें पंथु न वचे धनुर्धरा।
कां नाही जेवीं तरुवरां। येणें जाणें।।४८९।।
तैसा चलनवलनात्मकीं। असोनि ये पांचभौतिकीं।
भूतोर्मी एकीं। चलिजेना।।४९०।।

"ढग वाऱ्याबरोबर धावत जातात, तेव्हा आकाशही त्यांच्याबरोबर धावल्यासारखे भासले तरी ते स्थिरच राहते; तारकाचक्र ध्रुवाभोवती फिरतांना दिसते, पण ध्रुवतारा आपल्या जागी अचल राहतो; पांथस्थांच्या वाटचालीने वाट सरतांना जरी भासली तरी ती काही जागची हलतसुद्धा नाही; किंवा आपण वाटेने धावत असता आजूबाजूची झाडे मागेमागे जातांना दिसतात, तरी मुळात ती जागीच जशीच्या तशी स्थिर असतात; त्यांचप्रमाणे पंचमहाभूतांनी बनलेला त्या पुरुषाचा देह जरी त्या त्या महाभूताच्या उर्मीप्रमाणे चलनवलन करत असलेला दिसला, तरी त्याची त्या एकमात्र आदितत्त्वाशी झालेली एकतानता मात्र कधीही भंग पावत नाही."

वाहुटलीचेनि बळें। पृथिवी जैसीं न ढळे।
तैसा उपद्रवउमाळें। न लोटे तो।।१३-४९१।।
दैन्यदु:खीं न तपे। भवशोकीं न कंपे।
देहमृत्यु न वासिपे। पातलेनि।।४९२।।
आर्त्तिआशापडिभारें। वय व्याधी गजरें।
उजूं असतां पाठिमोरें। न हो चित्त।।४९३।।

"वादळाच्या जोराने पृथ्वी जशी ढळत नाही; तसाच तापत्रयांच्या उमाळ्याचा त्याला उपद्रव होत नाही. दैन्यदु:ख त्याला ताप देऊ शकत नाही. देह मृत्युवश होतांना त्याची भयाने गाळण उडून जात नाही. दु:खाच्या आर्ततेने किंवा आशेच्या नादी लागून, किंवा म्हातारपण वा व्याधींच्या जोरानेसुद्धा त्याचे आत्मसन्मुख असलेले चित्त पुनश्च देह व प्रपंच यांच्याकडे बहिर्मुख होत नाही."

निंदा निस्तेज दंडीं। कामलोभा वरपडीं।
परि रोमां नव्हे वांकुडी। मानसाची।।१३-४९४।।
आकाश हें वोसरो। पृथिवी वरी विरो।
परि नेणें मोहरों। हृदयवृत्ती।।४९५।।

"निंदा व अपमान यांच्या तडाख्यांनी वा काम आणि लोभ यांच्या माऱ्यानेसुद्धा त्याच्या त्या मनाचा केसही वाकडा होत नाही. आकाश नाहीसे होवो व आणखी पृथ्वी पण विरून नाहीशी होवो; त्या पुरुषाच्या परमात्मसमर्पित चित्तवृत्ती परत म्हणून संसारी पदार्पण करत नाहीत."

हातीं हालां फुलीं। पासवणा जेवीं न घालीं।
तैसा नोहोटे दुर्वाक्यशेलीं। सेलिलां सांतां।।१३-४९६।।
क्षीरार्णवाचां कल्लोलीं। कंपु नोहें मंदराचलीं।
कां आकाश न जले जालीं। वणवियाचां।।४९७।।
तैशा आल्यागेलियां उर्मी। नव्हे गजबज मनोधर्मी।
किंबहुना धीरु क्षमीं। कल्पांतीही।।४९८।।

"हत्तीवर खंडीभर फुलांचा वाटेल तितका मारा केला तरी तो जसा आपला मोहरा मागे वळवत नाही; तसाच तो स्थिरमतीचा पुरुष अगदी शेलक्या अपशब्दांच्या माऱ्यानेही आपली मूळची शांती भंगू देत नाही. क्षीरसमुद्रातील लाटांचे तांडवनृत्यही जसे मंदराचलास कंप पाववू शकत नाही किंवा आकाश जसे वणव्याच्या ज्वाळांमध्ये जळून जात नाही; तसेच चित्ताला विषयोर्मींनी कितीही ग्रासण्याचा प्रयत्न केला तरी त्याची मनोवृत्ती न ढळता, न चळता अखंड परमात्म्यातच लीन असलेली जशीच्या तशीच राहते; किंबहुना कल्पांतसमयसुद्धा तो सहज धैर्यपूर्वक साहून जातो."

पैं स्थैर्य ऐसीं भाख। बोलिजे जैं सविशेख।
तैं हे दशा गां देख। देखणेयां।।१३-४९९।।
हे स्थैर्य निधडें। जेथ आंगें जीवें जोडे।
तैं ज्ञानाचें उघडें। निधान सांचें।।५००।।

"हे सुजाण अर्जुना! ***स्थैर्य*** या संज्ञेने विशेषत्वाने वर्णन करावी ती हीच दशा होय. अढळ असे हे ***स्थैर्य*** त्याच्या उपरोक्त लक्षणांनी ज्या पुरुषाच्या अंगी प्रकट पावते, तेथेच ज्ञानाचा खराखुरा शाश्वत निधी असतो."

आत्मविनिग्रह::::

महापुरुषांची विचारसंपदा

यात्प्रमाणे ***स्थैर्यम्*** या गुणविशेषाचे श्रीज्ञानेश्वरकृत साद्यंत वर्णन आपण आताच अवलोकिले आहे. श्रीशंकराचार्यांच्या ***अपरोक्षानुभूति*** संदर्भातील ***स्थिर आसन व सिद्धासन*** या कल्पनांचाही या निमित्ताने आपण थोडक्यात परामर्ष घेतला. आचार्यांच्या एतद्विषयक कल्पनांचा पाठपुरावा जिज्ञासूंनी केला तर त्यांना यानंतर वर्णिलेल्या ***आत्मविनिग्रह*** या गीतोक्त गुणसंपदेचे आकलन होतांना काही अडचण येणार नाही.

वस्तुतः तत्त्ववेत्ते महापुरुष हे देश-कालादी भेदांमुळे पृथक व्यक्ती आहेत असे जरी लौकिकार्थाने भासत असले, तरी सकल महापुरुष हे निरंतर ब्रह्मातच स्थित असतात. ब्रह्मसापेक्ष दुसऱ्याचे अस्तित्व श्रुतींना मान्य नाही. म्हणून सर्व महापुरुष एकच होत व त्यांनी आपणांस सांगितलेल्या सत्याचेही कसे एकत्वच दिसून येते, हे ***स्थैर्य*** या गुणाच्या निमित्ताने या ***अपरोक्षानुभूती*** व ज्ञानदेवांच्या ओव्यांच्या उदाहरणावरून कळून येते. असो.

गीतेचे निर्देशन आणि त्यावर ज्ञानदेवांचे भाष्य ही जर आपण प्रसंगोपात्त श्रीशंकराचार्यांच्या विविध वाङ्मयरचनांद्वारा एकमेकांशी ताडून पाहिली, तर श्रीकृष्णोक्ती व श्रीज्ञानदेवांचा त्यावरील अभिप्राय समजण्यास खूपच साहाय्य होते, हेही जिज्ञासूंस जरूर जाणवण्याजोगे आहे.

कोणाही महापुरुषांच्या विचारसंपदेचा व त्यांच्या वचनांच्या खऱ्या अर्थाचा शोध घ्यावयाचा असला, तर इतर महापुरुषांच्या उक्तींच्या व विचारदीपाच्या प्रकाशातच तो करणे सुयोग्य ठरते. अन्यथा पुरेशा सामग्रीअभावी तो शोध केवळ स्वतःच्याच बुद्धीने केला तर तो पूर्णत्वास नेता न येऊन आपण त्या महापुरुषांच्या तत्त्वज्ञानाच्या अमोलिक ठेव्यास कदाचित पारखे होऊ शकतो, हे पण या निमित्ताने जाणवते. महापुरुषच खऱ्या अर्थाने दुसऱ्या महापुरुषांची ***भाख*** ओळखण्यास समर्थ असतात.

हा विचार लक्षात ठेवून आपण आपली जिज्ञासा तृप्त करण्याच्या कामी अग्रेसर होऊ या. तत्पूर्वी परत एकदा ज्ञानास आवश्यक त्या ***अष्टादशगुण*** लक्षणांचा एक धावता आढावा घेऊ या.

अष्टादशगुणांचा आढावा

या ठिकाणी जिज्ञासूंचे लक्ष जाता जाता ***पं. वि.दा.सातवळेकर*** यांच्या ***पुरुषार्थबोधिनी टीका*** या श्रीमद्भगवद्गीतेवरील ग्रंथाकडे वेधणे योग्य ठरेल. त्यांच्या ग्रंथात तेराव्या अध्यायात भगवंतांनी सांगितलेल्या ज्ञानलक्षणांचा व तद्विरोधी अज्ञानलक्षणांचा अभ्यासकांस उपयुक्त असा उहापोह केलेला आहे. श्री. सातवळेकरांनी गीतेच्या *श्लोक क्र. १३-८ ते १३-१३* मध्ये वर्णिलेल्या लक्षणांना पुढीलप्रमाणे वीस लक्षणात विभागले आहेः

(अ)ज्ञानाची लक्षणे	**(ब) अज्ञानाची लक्षणे**
१)अहिंसा, अक्रूरत्व	हिंसा, क्रौर्य
२)अमानित्व	मानित्व, घमेंड
३)अदंभित्व	दंभित्व, दंभ
४)क्षान्ति, क्षमा	अशान्ति, असमाधान, क्षमा न करणे
५)आर्जव, सरलता	कुटिलता
६)आचार्योपासना, गुरुसेवा	*(गुरुहीनत्व)*, गुरूशी विरोध
७)शौच, शुद्धता, पवित्रता	अपवित्रता, मलिनता
८)स्थैर्य, स्थिरता	चंचलता, अस्थिरता
९)आत्मविनिग्रह, आत्मसंयम,मनोनिग्रह, इंद्रियदमन	असंयम, स्वैराचार,इंद्रियांची उच्छृंखलता
१०)इंद्रियार्थांच्या ठिकाणी वैराग्य, भोगविषयासंबंधी उदासीनता	इंद्रियभोगाविषयी अत्यंत आसक्ती
११)अनहंकार	अहंकार
१२)जन्म, मृत्यू, जरा आणि व्याधीत दुःख आणि दोष पाहणे	यातील दुःख आणि दोष यांचा विचार न करणे
१३)अनासक्ती	आसक्ती
१४)पुत्र, दारा, गृहादींच्या ठिकाणी मोह, ममता न ठेवणे	पुत्र, स्त्री, गृहादींवर मोह ठेवणे, यांच्यावर ममत्व ठेवणे
१५)एकांतसेवन करणे	एकांतसेवन न करणे
१६)जनसमूहात जाण्याची नावड	जनसमूहात वावरण्याची आवड
१७)इष्ट व अनिष्टाविषयी सदैव समचित्त असणे	इष्टाबद्दल प्रेम व अनिष्टाचा द्वेष; इष्टानिष्टाच्या प्राप्तीविषयी विषमचित्त असणे
१८)ईश्वराच्या ठिकाणी अनन्य चित्ताने अव्यभिचारिणी भक्ती	ईश्वराला न मानणे, अनन्य भाव न धरणे, सर्वांना परस्परभिन्न मानणे; अथवा भक्तीच न करणे; वा अव्यभिचारिणी भक्ती न करणे
१९)अध्यात्मविचारात नित्य मग्न असणे	अध्यात्माचा विचार न करणे
२०)तत्त्वज्ञानाच्या मोक्षरूप हेतूचे दर्शन करणे	तत्त्वज्ञान न ऐकणे आणि त्याच्या हेतूचाही विचार न करणे
।	।
(याचे नांव **ज्ञान**)	(याचे नांव **अज्ञान**)

यापूर्वीच आपण अष्टादशगुणसंपत्तीचे श्रीज्ञानेश्वराभिमुख वर्णन करण्यासाठी सुरुवातीला ज्ञानाची अठरा लक्षणे व त्याविरोधी गुणांचा उल्लेख केला होता. *कै.अण्णा मोरेश्वर कुंटे* यांच्या ज्ञानेश्वरीच्या प्रतीत *(कुंटेप्रत)* गीताश्लोकांशी ज्ञानेश्वरीच्या ओव्या ताडून दाखविलेल्या आहेत. तसेच श्री. साखरेमहाराजांच्या ज्ञानेश्वरीच्या सांप्रदायिक प्रतीतही याच कुंटेपद्धतीप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या संबंधित ओव्या, तसेच गीताश्लोकपदविच्छेद समर्पकरीत्या निर्देशिलेले आहेत. ज्ञानेश्वरांच्या गीतार्थनिरूपणविषयक ***"पदाची कोरही न सांडिता"*** या आश्वासनाचा मागोवा घेण्यास अभ्यासकांना या दोन्ही प्रतींचे उत्कृष्ट साहाय्य होते, हे यानिमित्ता नमूद करावेसे वाटते.

हे सर्व लक्षात घेता व ज्ञानेश्वर स्वतः म्हणतात, त्याप्रमाणे ***"एवं इयें अवधारा। ज्ञानलक्षणें अठरा। श्रीकृष्णें धनुर्धरा। निरूपिली।।१३-६४९।।"***; ज्ञानलक्षणे अठराच आहेत. पण *श्रीमद्भगवद्गीता - पुरुषार्थबोधिनी टीका* -यात ती वीस आहेत, असे पं.सातवळेकर सुचवितात. यात खरे तर तसा काही विरोध नाही. कारण *(अ)(१३ व १४) - अनासक्ती व पुत्रदारागृहाठायी मोह न ठेवणे* यांचा श्रीज्ञानदेव *अनासक्ती* या एकाच गुणलक्षणात समावेश करतात. अनासक्तीने त्यांना देह, पुत्र, दारा, गृह इ.ची अनासक्ती अभिप्रेत आहे.

तसेच *(अ)(१५ व १६) - एकांतसेवनाची आवड व जनसंपर्काची नावड* या दोन्ही लक्षणांचा ज्ञानेश्वरीत एकाच गुणलक्षणात समावेश केलेला आहे. असे एकूण अठरा गुणच प्रमुख ज्ञानलक्षणे म्हणून ज्ञानेश्वरीत वर्णिले आहेत. असो.

९) आत्मविनिग्रह व प्रत्याहार

आत्मविनिग्रह या शब्दाची उकल ***आत्म-वि-निग्रह*** म्हणजे ***आत्म्याचा विशेष निग्रह*** म्हणून केली जाते. यालाच समानार्थी व समावेशक शब्द म्हणजे ***आत्मसंयम, मनोनिग्रह, इंद्रियदमन*** इ.धरले जातात. विरोधार्थी शब्दांत असंयम, स्वैराचार, इंद्रियांची उच्छृंखलता इ.चा समावेश होतो. म्हणून ***आत्मविनिग्रह*** म्हणजे ***प्रत्याहार*** असा अर्थ निघतो.

आता ज्ञानदेवांना आत्मविनिग्रहाविषयी काय सांगावयाचे आहे, ते पाहू याः

आणि इसालु जैसा घरां। कां दंडियां हातियेरां।
न विसंबे भांडारां। लुब्धकु जैसा।।१३-५०१।।
एकलौतियां बालका-। वरी पडौनि ठाके अंबिका।
मधुविखीं मधुमक्षिका। लोभिणी जैसीं।।५०२।।
अर्जुना जो ययापरी। अंतःकरण जतन करी।
नेदी उभें ठाकों द्वारीं। इंद्रियांचां।।५०३।।

"धनलोभाने सर्पयोनीत गेलेला जीव जसा आपले धन ठेवलेले ठिकाण सोडत नाही; योद्धा जसा हत्यारास विसंबत नाही; कवडीचुंबक जसा आपल्या धनसंग्रहास क्षणमात्रही नजरेआड होऊ देत नाही; मधाच्या साठ्याच्या जतनासाठी मधमाशी जशी सतत दक्ष असते व त्याला कोणी हातही लावल्यास हल्ला चढवून आपला प्राणही पणास लावते; किंवा एकुलत्या एक बालकावर घाला पडला असता माता त्याच्या अंगावर आपले आंग झोकून देऊन स्वतःचा जीवही धोक्यात घालून जसे बाळाचे संरक्षण करते; त्याप्रमाणे, हे अर्जुना! तो ज्ञानी पुरुष आपल्या अंतःकरणाचे विषयांपासून संरक्षण करतो आणि इंद्रियांच्या उंबरठ्यावरही त्याला उभे राहू देत नाही."

म्हणे काम बागुल ऐकेल। हे आशा सियारी देखैल।
तऱ्हीं जीवा टेकेल। म्हणौनि बिहे।।१३-५०४।।
बाहेरी धीट जैसीं। दाटुगा पति कलासि।
करी टेहणी तैसीं। प्रवृत्तीसीं।।५०५।।

"विषयांची द्वारे जी इंद्रिये आहेत, त्यांच्या समीप अंतःकरण आले आहे, असे कळले तर कामाचे फावेल आणि अशारूपी कोल्हीने जर ते पाहिले, तर तिला अंतःकरणाचा फडशा पाडण्याची आयतीच संधी मिळेल; या भीतीने तो स्वतःला जाणीवपूर्वक जपतो. स्वैराचारी स्त्रीला तिचा दांडगा पती बळेच जसा घराबाहेर फिरकूही देत नाही, त्याचप्रमाणे तो ज्ञानी पुरुष आपल्या मनोवृत्तींना विषयांजवळ फिरकण्यास मज्जाव करतो."

समारोप

आतापर्यंत आपण ***ज्ञानगुणलक्षणे*** या उन्मेषाचा पहिला भाग पाहिला. उर्वरित लक्षणांसाठी आपण आता वळू या ***उन्मेषः९-२::ज्ञानगुणलक्षणे-२*** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१-२::
::ज्ञानगुणलक्षणे-२::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेषः१-२

गीताः

२:६९

९:२२,३४

११:५४,५५

१२:२,६,७

१४:११,२६,२७

ज्ञानेश्वरीः

११:६७६,६८५,६८७,६८८,६९४

१३:५०६-५११,५३५-६४८

१४:३७१,३७७,३८०,३८२,३८६-३८९,३९२,३९५,३९७,४०१-४०७,६१५,६९७-६९९

पा.यो.सू.:

२:१४,३२,४५

३:१-४

सि.सि.प.:

२-३६-३९

अप.:

१०४,१०५,११४-११६,११८-१२६

अमृ.:

८:१०,१२,१८,१९

::उन्मेष::१-२::
::ज्ञानगुणलक्षणे - २::

पंथराजातील अष्टांगयोगनिर्देश::::

१३-५०६ ते ५११ या ओव्यात प्रकटणारा पंथराज

आपण पाहत असलेल्या *आत्मविनिग्रह* या ज्ञानगुणलक्षणाच्या संदर्भात पतञ्जलीप्रणीत अष्टांगयोगाची ज्ञानेश्वरांच्या पंथराजाशी सांगड घालणाऱ्या काही ओव्या तेराव्या अध्यायातून आपणास गवसतात, त्या अशाः

सचेतनीं वाणेंपणें। देहासगट आटणें।
संयमावरी करणें। बुझौनि घालीं।।१३-५०६।।
मनाच्या महाद्वारीं। प्रत्याहाराचियां ठाणांतरीं।
जो यमदम शरीरीं। जागवीं उभे।।५०७।।
आधारीं नाभीं कंठीं। बंधत्रयांचीं घरटीं।
चंद्रसूर्यसंपुटीं। सूयें चित्त।।५०८।।
समाधीचें सेजेपासीं। बांधौनि घालें ध्यानेंसीं।
चित्तचैतन्यसमरसीं। आंतु रते।।५०९।।
अगां इंद्रियनिग्रहो जो। तो हा जाणिजो।
हा आथी तेथ विजयो। ज्ञानाचां पैं।।५१०।।
जेयांचि आज्ञा आपण। शिरीं वाहे अंतःकरण।
मनुष्याकारें जाण। ज्ञानचि तो।।५११।।

या ओव्यांतून ज्ञानदेव ***आत्मविनिग्रह*** म्हणजे काय हे स्पष्ट करतांना योगाच्या अष्टांगांचा निर्देश करण्यास विसरत नाहीत. ***१) यम, २) नियम व ३) आसन*** या तीन अंगाचा विचार आपण पूर्वीच केला आहे. यांतील यमनियम व उर्वरित अंगांबाबत या ओव्यांत काय म्हटले आहे, ते पाहू याः

यम व नियम

"सचेतनीं......बांधौनि घाले..।।१३-५०९।।" असे ज्ञानदेव म्हणतात. तो पुरुष जिवंतपणीच देहासकट विषयांची आटणी करतो आणि इंद्रियांना संयमाच्या सामर्थ्याने मिटवून टाकतो. भावार्थ असा की यम व नियमांच्या व्रताचरणाने तो पुरुष इंद्रियांची त्यांच्या विषयांसंबंधीची जाण नाहीशी करतो. थोडक्यात इंद्रिये विषयांबाबत जागी न राहता झोपी जातात.

४)प्रत्याहार

"मनाचां महाद्वारीं ।.....उभे।।१३-५०७।।" या ओवीतून ज्ञानदेव काय सूचित करतात, पहा. यमनियमांच्या पालनाने व इंद्रियप्रवृत्तींच्या दमनाने प्रत्याहार साध्य करण्यासाठी तो पुरुष मनाच्या महाद्वारी - जेथून सर्व प्रवृत्तींचा उगम होतो, तेथेच त्या विषयांबाबत निद्राधीन असलेल्या पण अंतर्यामी सचेतन असलेल्या इंद्रियांवर यमदमांचे पहारेकरी उभे करून मनातील विषयोपभोग वासनांचा लगाम खेचून ठेवतो.

भावार्थ असा आहे की जो विषयांबाबतीत झोपला आहे, तो अध्यात्मज्ञानोपार्जनार्थ जागाच आहे व जो विषयांच्याबाबत जागा आहे, तो अध्यात्मज्ञान संपादन करण्याबाबत निद्रिस्त आहे. भगवंतांनी म्हटलेलेच आहे कीः

या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।२-६९।।

या महापुरुषाने इंद्रियांना संयमाच्या शिस्तीने वागवून त्यांची विषयांबाबतची जाग नष्ट करून त्यांना त्याबाबत निद्रिस्त केले आहे व म्हणून ती आत्मज्ञानार्थ जागी आहेत. म्हणूनच असे पण म्हणता येईल की याच इंद्रियांना त्याने विषयप्रवृत्ती जेथून वीते, त्या मनाच्या महाद्वारी पहारेकरी म्हणून नेमले आहे. हे असे जागरूक पहारेकरी मनाला विषयवृत्तींकडे फिरकण्यास प्रतिबंधच करतात व खरा ***प्रत्याहार*** - ज्याची परिणती मनाची विषयभोगप्रवृत्ती मोडण्यात होते - तो साध्य करण्यास ही अशी निर्वाळून घातलेली इंद्रियेच साहाय्य करतात.

पतञ्जली व गोरक्ष यांचा प्रत्याहार

प्रत्याहाराची व्याख्या पतञ्जली अशी करतातः

"स्वविषयाऽसंप्रयोगे चित्तस्वरुपानुकार इवेन्द्रियाणां प्रत्याहारः।।२-५४।।पा.यो.सू.।।"

म्हणजे आपापल्या विषयांचा संसर्ग न करता इंद्रियांनी चित्ताच्या स्वरूपास अनुसरून राहणे, मूलस्वरूपात लीन होणे, यास ***प्रत्याहार*** असे म्हणतात.

श्रीगुरुगोरक्षनाथ ***प्रत्याहार*** म्हणजे काय ते सांगतांना आपल्या ***सिद्धसिद्धान्तपद्धति*** या ग्रंथात म्हणतात कीः

"प्रत्याहारमिति चैतन्यतरङ्गाणां प्रत्याहरणा यथा नानाविकार ग्रसनोत्पन्नविकारस्यापि निवृत्तिः निर्भातीति प्रत्याहारलक्षणम्।। सि.सि.प.।।२-३६।।"

चैतन्यतरंगांचे अंतर्मुखीकरण व नाना विकारांचा ग्रास, उत्पन्न झालेल्या विकारांची निवृत्ती व विषयवासना आणि विषयोपभोग यांविषयी निर्भीडपणा म्हणजे ***प्रत्याहार*** असे या नाथपंथाच्या अध्वर्यूचे मत आहे.

मुळात पतञ्जलिप्रणीत प्रत्याहार व गोरक्षमते प्रत्याहार यात तशी भिन्नता नाही. दोघांनाही प्रत्याहारानें इंद्रियांचे विषयापासून निवृत्त होणे, मनाचे व चित्ताचे विषयवृत्तींपासून हटणे व परमात्मरूपी लीन होणे हेच अभिप्रेत आहे. परंतु गोरक्षनाथ एक पाऊल पुढे जाऊन आपला खास नाथपंथीय बाणा दाखवत म्हणतात की साधकाने विषयांविषयी

भिडस्त राहू नये. प्रारब्धवशात जे काही विषयभोग प्राप्त होतील, त्यांना त्याज्य मानून दूर राहणे म्हणजे विषयांबाबत भीती वाटणे वा भीडस्त राहणे, हा बळजबरीचा प्रत्याहार आहे.

उलट चित्त सदैव स्वस्वरूपीच रमल्यामुळे विषयवृत्तीही तदाकारच होतात. ही जी सहजस्थिती आहे, तिच्यावरच नाथसंप्रदायाचा भर आहे व साधक विषयोपभोगात बाह्यात्कारी मग्न असलेला दिसला तरी अंतरी नित्य परमात्मस्वरूपी राहण्याची त्याची स्थितीच खरा ***प्रत्याहार*** होय, असे नाथसंप्रदायाचे मत दिसते. आपणही आताच पाहिले आहे की ज्ञानदेवांचेही मत या मताशी किती तंतोतंत जुळते ते!

५)प्राणायाम

"आधारीं नाभीं कंठीं। ......सूयें चित्त।।१३-५०८।।" ही ओवी अष्टांगयोगातील प्रणायामाविषयी लक्षणीय आहे. बहिःप्राणायाम म्हणजे श्वासप्रश्वासादी रेचक, पूरक, कुंभकादी प्रक्रियांनी केला जातो. येथे ज्ञानेश भर देत आहेत, तो **सूक्ष्म वा आंतर प्राणायाम**वर! बहिःप्राणायाम करणाऱ्यांचा हेतू जरी सूक्ष्म प्राणायाम साध्य करण्याचा असला, तरी तो प्रत्यक्षात आणणे हे सामान्यतया कठीणच समजले पाहिजे.

ज्ञानदेवांचा योगमार्ग उपरांगी काही वेळा हटियांच्या प्रणालीशी साम्य असलेला जरी दिसला, तरी त्यांच्यात आणि हठयोगी वा हटिये यांच्यात खरा फरक पडतो, तो ज्ञानदेवांच्या प्रणालीतील योग कुंडलिन्यधिष्ठीत असला तरी प्रमुखतःगुरुपदिष्ट आहे या मूळ मुद्यावर आणि त्यांच्या योगास असलेल्या क्रमयोगाच्या अधिष्ठानावर! आपणांस या योगभिन्नतेविषयी फारसा विचार करणे अभिप्रेत नाही. केवळ ***"हटिये सांडती। होडा कडेलग।।६-५६।।"*** या *सहाव्या* अध्यायातील ज्ञानेशोक्तीतच या हटियांचा विचार करणे प्रस्तुत आहे.

हटियांना प्रत्याहार साध्य करणेसुद्धा अशक्य होते, हे त्यांच्या ***"मग प्रत्याहाराचां आधाडा। बुद्धिचियांही पायां निसरडा। जेथ हटिये सांडती होडा। कडेलग।।६-५६।।"***या ओवीत म्हटले आहे. तसेच हठयोगी जे अंतःस्थ प्राणायाम साध्य करून, ***चंद्रसूर्य बुझावणी करून, शून्य साध्य करू पाहतात,*** त्यांचा मार्ग जरी कुंडलिनीवर आधारित असला आणि अगदी गुरुपदिष्ट असला, तरी तो ईश्वरप्रणिधानाशी विन्मुख असल्याने व निव्वळ स्वप्रयत्नाधिष्ठीत असल्याने, त्यांना तो योग क्लेशदायक ठरतो; कारण तो सगुण भक्तिविरहित असतो.

याबाबतचे विवेचन आपण पूर्वी एकदा केलेले आहे *(उन्मेषः८::पंथराज-पृ.क्र.१२६,१२७)*. तेव्हा ज्ञानदेवांच्या योगमार्गाची वैशिष्ट्ये व त्यांच्या पंथराजप्रणालीची मूलभूत अंगे म्हणजे गुरुपदिष्ट, कुंडलिनीसिद्ध, लयप्रधान, सामरस्यात्मक, सगुणध्यानयोग ही आहेत, असे सूचित केले होते. असो.

आता उपरोक्त ***"आधारीं नाभीं कंठीं। बंधत्रयांची घरटीं।"*** या ओवीच्या पहिल्या अर्धेलीत ज्ञानदेव सरळसरळ ***पंथराज*** संकल्पनेशी संबंधित व *सहाव्या* अध्यायी सांगितलेला प्राणायाम कसा सुचवत आहेत, पहा. ***आधारीं*** म्हणजे मूलाधारी ***मूलबंध, नाभीं*** म्हणजे नाभिस्थानी ***वोढियाणा*** बंध व ***कंठीं*** म्हणजे कंठस्थानी ***जालंधरबंध*** असे तीन बंध योगमार्गात लावले जातात. या बंधांचा सविस्तर उद्देश त्यांच्या पंथराजसंबंधित ओव्यांतून प्रकट होतो.

तरीही या बंधत्रयांचे प्रमुख उद्दिष्ट प्राणापानांचे नियमन करून ***कुंडलिनीजागृती*** व विकासप्रक्रियेस साहाय्य करणे व लययोग साधण्यास मदत करणे हेच असते.

६) कुंडलिनीशक्ती प्रबुद्ध करणे व धारणा

"चंद्र सूर्यसंपुटीं। सूयें चित्त।।१३-५०८।।" या ओवीच्या उत्तरार्धात बराच गूढ अर्थ आहे. वरवर पाहणाऱ्याला व कुंडलिनीविषयी अनभिज्ञ असणाऱ्याला येथील गूढ समजणे कठीण आहे. ***चंद्र*** व ***सूर्य*** यांनी अनुक्रमे ***इडा*** व ***पिङ्गला*** या योगशास्त्रोक्त नाड्यांचा बोध होतो. ***"इडा पिंगला जेथ एकवटति"*** व ***"चंद्रसूर्यसंपुटीं "***या दोन्ही ज्ञानेशोक्तीत अभिप्रेत असलेले स्थान म्हणजे त्रिवेणीसंगमाचे स्थान, जेथे ***इडा, पिंगला व सुषुम्ना*** या तिन्ही नाड्या मिळतात ते ***भ्रूमध्यस्थान*** तसेच ***मूलाधारस्थान.*** या दोन्ही स्थानी या तिन्ही नाड्या एकत्र येतात. कुंडलिनी जागृत झाली की मूलाधारचक्री उभी होते व सुषुम्नामार्गे तिचे चलन भ्रूमध्यचक्रापर्यंत होते. ***म्हणून या ओवीच्या उत्तरार्धाने कुंडलिनीजागृती ते तिचे मूलाधारचक्रापासून भ्रूमध्यस्थान वा आज्ञाचक्र येथपर्यंतचे संक्रमण सूचित केलेले आहे.***

चंद्रसूर्यांचे संपुष्ट (संपुटी) म्हणजे इडा व पिंगला या नाड्यांनी दोन्ही बाजूंनी वेष्टिलेली ***सुषुम्ना*** नाडी होय. त्यात तो योगी आपले चित्त ***सूयें*** म्हणजे घालतो; म्हणजे चित्ताचा सुषुम्नेत प्रवेश करतो. चित्त सुषुम्नेत प्रवेश करते, ते सुषुम्नामार्ग कुंडलिनीशक्तीने जागृत्युपरांत खोलून मोकळा केल्यानंतरच, हे योगशास्त्र जाणकारांस अवगत आहेच! येथे ***चित्त*** हा शब्द ***जीव*** संज्ञक पण समजता येतो. ***जीव व शिव*** यांची गांठभेट - ***पद-पिंडाचे सामरस्य*** - कुंडलिनीच्या मध्यस्थीने होते, असाही एक संकेत या योगमार्गाच्या जाणकारांमध्ये प्रसिद्ध आहे.

चित्तास हा जो वेध लागतो, जीवाचा शिवाकडे हा जो प्रवास सुरू होतो, तीच ***धारणा*** होय. अष्टांगयोगांतर्गत ***"यमनियमासन-प्रत्याहारप्राणायामादीं"*** नंतरचे स्थान धारणेचे आहे. या ओवीतून ज्ञानदेवोपदिष्ट पंथराजाचे आणखी एक वैशिष्ट्य प्रकट होते. ते म्हणजे त्यांच्या ***धारणेस लौकिकतः साफल्य प्राप्त होते, ते कुंडलिनीशक्तीच्या प्रबुद्ध होण्यामुळेच!***

पतञ्जली व धारणा

धारणेविषयी पतञ्जलींचे मत पाहणे येथे उचित ठरेल.

"देशबंधश्चित्तस्य धारणा।।३-१।।पा.यो.सू.।।"

चित्ताला कोणत्या तरी देशावर म्हणजे स्थानावर जणू बांधून ठेवल्यासारखे स्थिर करणे ही ***धारणा*** होय. धारणेत चित्ताची एकाग्रता साधण्याचा अत्यंत प्राथमिक अभ्यास केला जातो. धारणा, ध्यान व समाधि ही पातञ्जलयोगाची जी तीन अंतरंग साधने आहेत, त्यात ***चित्तैकाग्र्य हेच लक्ष्य असते.***

वेगवेगळ्या देशावर धारणा करणे व तिचा अभ्यास वाढवत जाणे या उपायांनी वेगवेगळी फले प्राप्त होतात. **सहस्रारचक्रा**वर धारणा केल्यास ***महाविदेहावृत्ती*** प्राप्त होते. तिच्या योगाने चित्तातील जो सात्त्विक प्रकाश असतो, त्यावर असलेले रजस्तमोगुणांचे आवरण क्षय पावते. या योगे तो शुद्ध सत्त्वप्रकाश सर्व इंद्रियांद्वारे प्रकट होऊ लागतो. गीतेत हे कार्यकारण लक्षणांद्वारे सांगितले आहे:

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत।।१४-११।।

श्रीकृष्ण म्हणतात: "या देहामध्ये सर्व इंद्रियांच्या ठिकाणी प्रकाश म्हणजे ज्ञान जेव्हा उत्पन्न होते, तेव्हा सत्त्वगुणाची विशेष वृद्धी झाली आहे, असे समजावे."

ज्ञानेश व धारणा

आपण पाहिलेच आहे की <u>*सुषुम्नेत चित्त प्रविष्ट करून धारणा साधावी असे ज्ञानदेवांनी सूचित केले आहे. या धारणापद्धतीने स्वाभाविकतया साधकास त्यापुढचा म्हणजे **सहस्रारचक्रा**कडे जाण्याचा मार्ग निर्देशित केला जातो व अशा प्रकारे पतञ्जलींनी वाखाणलेल्या **महाविदेहावृत्ती**कडे त्याची वाटचाल व्हावयास हवी.*</u>

तत्फलस्वरूप पतञ्जली म्हणतात तसा प्रकाशावरणाचा क्षय होऊन ज्ञानप्रकाश फाकला पाहिजे. याविषयी श्रीगोपालकृष्णांनी सत्त्वगुणाची विशेष वृद्धी व ज्ञानप्रकाशाचे प्रस्फुटीकरण सांगून या पातञ्जल योगसूत्रावर उत्तम प्रकाश टाकला आहे. एवंच ***"पातञ्जलयोगसूत्रे -➤ गीता -➤ ज्ञानेश्वरी "*** असा हा योगमार्गाची उकल करणारा क्रमयोगच आहे, असे म्हणावेसे वाटते. असो.

गोरक्ष व धारणा

यानिमित्ताने ज्ञानराजांच्या गुरुपरंपरेतील वरिष्ठ आचार्य श्रीगोरक्षनाथांचे मत पाहू या:

"धारणेति सबाह्याभ्यन्तर एकमेव निजतत्त्व-स्वरूपामेवान्तःकरणेन साधयेत् यथा यद्यदुत्पद्यते तत्तन्निराकारे धारयेत् स्वात्मानं निर्वातदीपमिव धारयेदिति धारणालक्षणम् ।।२-३७।।सि.सि.प.।।"

गोरक्ष म्हणतात की, "धारणा म्हणजे बाह्यजगतात किंवा अंतर्जगतात एकच निजतत्त्वस्वरूप आहे, अशी वृत्ती अंतःकरणात धारण करणे. जे जे उत्पन्न होते, ते ते निराकाराने धारण केले आहे असा भाव चित्तात धरून, त्या निराकार आत्मतत्त्वावर निर्वात प्रदेशातील दीपज्योती जशी निष्कंप व स्थिर असते, त्याप्रमाणे अचल वा स्थिर अशी चित्ताची एकाग्रता साधावी."

समन्वयन

यावरून समजून येते की जेव्हा गोरक्षसंपादित धारणेचा अवलंब केला जातो, तेव्हा धारणा ही आत्मतत्त्वावर अंतःकरणदेशात केली जाते. हा ***अंतःकरणदेश म्हणजे पिण्ड व ब्रह्माण्ड यांचा संधिदेश होय.*** या ठिकाणी निराकारावर धारणा केली असता फलस्वरूप पतञ्जलीप्रणीत ***महाविदेहावृत्ती*** प्राप्त होणार आणि तत्फल म्हणून ज्ञानप्रकाशाचीच प्राप्ती होणार, हे मानायला काही हरकत नाही.

या दृष्टीने विचार केला असता ज्ञानदेवांचे ***धारणा*** या विषयाबाबतचे मत आपण ***"चंद्रसूर्यसंपुटीं। सूयें चित्त।।"*** या अर्धेलीच्या आधारे वर पाहिले आहे, ते नीट कळण्यास बरेच साहाय्य होते व अंत्य अष्टांगांचा विचार करणे सुलभ जाते.

७) ध्यान व ८) समाधि

"समाधीचे सेजेंसीं। बांधूनि घालीं ध्यानेसीं। चित्त चैतन्यसमरसीं। आंतु रते।।१३-५०१।।" या ओवीत ***ध्यान*** व ***समाधि*** या उर्वरित अष्टांगांचा निर्देश आहे. पतञ्जलीप्रणीत अष्टांगयोगाची शेवटच्या टप्प्याची अंतरंगसाधने म्हणजे ***ध्यान व समाधि.*** तसे पाहिले तर ***धारणा, ध्यान व समाधि*** या तिन्ही अंतरंग साधनांतर्गत टप्प्यात शास्त्रीय दृष्टीने जरी भिन्नता असली, तरी प्रायोगिक स्तरावर धारणाच ध्यानात परिवर्तित होते व ध्यानच समाधीत परिवर्तित होते.

धारणा ते ध्यान ते समाधि हा वस्तुतः एकच क्रमसोपान जरी दिसत असला, तरी जोपावेतो समाधि निर्विकल्प अवस्थेचे टोक गाठत नाही व त्याही अवस्थेत अखंड राहत नाही, तोपावेतो साधकाला ***धारणा व ध्यान*** ही अंगे वारंवार हाताळावी लागतात. परंतु सतत अभ्यासल्यामुळे ***धारणा व ध्यान*** तसेच समाधीचा पूर्व भाग म्हणजे ***सविकल्प समाध्यवस्था*** ही सर्व साधणे त्याला अति सोपे व सहज जाते.

साधकाने एकदा जरी ***निर्विकल्प समाधि*** साधला तरी त्यापूर्वीचे टप्पे त्याला केव्हाही विनासायास आक्रमता येतात. त्याची कारणे म्हणजे अभ्यास दृढ होतो आणि निर्विकल्पावस्थेतील चित्ताचा अनुभव व त्या अनुभवाचे आलंबन घेता येणे, ही होत. असो.

पातञ्जल विचार

पतञ्जली ध्यानासंबंधी म्हणतात:

"तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्।।३-२।।पा.यो.सू.।।"

<u>***धारणेत चित्त कोणत्यातरी देशावर स्थिर करणे अनुस्यूत असते, तर ध्यानात विशिष्ट देशावर स्थिर केलेल्या चित्ताला कोणतीही भावना आलंबनार्थ घ्यावयाची असते***</u> आणि त्या भावनेचा ***प्रत्यय*** म्हणजे अनुभव विलीन न होऊ देता पुढील व त्यापुढील

क्षणात असा उत्तरोत्तर अधिकाधिक काल टिकवत जायचा असतो. असा तो टिकवणे म्हणजे त्याच ***प्रत्ययाची एकतानता*** होय.अशी ***प्रत्ययैकतानता*** टिकू लागली म्हणजे त्या अवस्थेला ***ध्यान*** म्हणतात. एवंच चित्त कोठे तरी स्थिर करणे ही ***धारणा,*** तर स्थिर केलेल्या चित्ताचा विशिष्ट वृत्तिपरिणाम सारखा टिकवणे हे ***ध्यान*** होय. असो.

समाधि

समाधि लक्षण सांगतांना पतञ्जली म्हणतातः

तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः।।३-३।।पा.यो.सू.।।

धारणेने चित्ताला स्थिरता प्राप्त झाल्यावर कोणत्याही भाव्य वस्तूवर चित्तैकाग्र्य करणे हे ध्यानाचे स्वरूप असते. ***ध्यानावस्था पक्व झाली की तीच समाध्यवस्था होय.*** भाव्य वस्तूखेरीज इतर कोणताही अर्थ चित्तात न स्फुरणे हीच त्या भाव्य वस्तुची ***अर्थमात्रनिर्भासता*** होय. या अवस्थेत ***"मी ध्याता अमुक एका ध्येयाचे ध्यान करत आहे"*** हे अनुसंधानही रहत नाही; तर चित्त केवळ ध्येयैकगोचर होते.

अशा वेळी चित्तवृत्तींचा प्रवाह ध्येयाकारतेने अखंडपणे चालला असतो. पण यामुळेच तो अज्ञातसा भासतो. समाधिकाली जो असा वृत्तिप्रवाह असतो, त्यामुळेच त्या वेळच्या ध्यानाला ***"स्वरूपशून्यं इव"*** म्हणजे जणू काय स्वरूपशून्य असे म्हटले आहे.

समाधिकाली चित्ताची भाव्य वस्तूशी इतकी तन्मयता होणे, ध्येय केवळ अर्थरूपाने भासमान होणे व त्याच्या स्वरूपाचे अनुसंधान न होणे हाच *समाधि* होय.

संयम

पतञ्जलींनी संयमाविषयी आपल्या सूत्रात जे सांगितले आहे, ते समजून घेतल्याशिवाय या ***धारणा, ध्यान व समाधि*** विषयक कल्पना पूर्ण स्पष्ट होणार नाहीत. ते म्हणतातः

त्रयमेकत्र संयमः।।३-४।।पा.यो.सू.।।

म्हणजेच धारणा, ध्यान व समाधि हे तिन्ही एकत्र प्रवृत्त झाले म्हणजे तो ***संयम*** होय. थोडक्यात ज्या देशावर धारणा करावयाची तो देश, ज्या भाव्य वस्तूचे ध्यान करावयाचे ती भाव्य वस्तू हे एकच असून यांवरच जेव्हा ध्यान पक्व होते; तेव्हा समाधि प्राप्त होऊन ***संयम*** सिद्ध होतो. धारणेचा देश व ध्यानातील भाव्य वेगवेगळे असता समाधि सिद्ध झाल्यास, तो ***संयम*** नव्हे. ***ध्यान व समाधि*** हे द्वय नेहमीच एकत्र प्रवृत्त असतात. पण त्यात ***धारणा*** ही पण प्रवृत्त झाल्याशिवाय संयम सिद्ध होत नाही. *ध्यान व समाधि यांसोबत धारणा प्रविष्ट झाली पाहिजे म्हणजे **संयम** होतो.*

ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाची पूर्वतयारी::::

ज्ञानेश्वरीचे आकलन करून घेणे

गीता व ज्ञानेश्वरी यांनी प्रायोगिकरीत्या भगवत्प्राप्तीसाठी - आत्मज्ञानासाठी - निःश्रेयसप्राप्तीसाठी हा पतञ्जलीप्रणित ***संयम*** उत्कृष्टरीत्या हाताळलेला असल्याने त्याचे हे योगशास्त्रीय स्वरूप साधकांस उत्तम प्रकारे ज्ञात असले पाहिजे.

पातञ्जलयोगसूत्रातील ***धारणा, ध्यान,समाधि व संयम*** या संकल्पनांचे एवढे आकलन करून घेतल्याशिवाय ज्ञानदेवांची योगशास्त्रविषयक भूमिका तंतोतंत समजणे दुःसाध्य असल्यामुळे आणि आपल्या आकलनार्थ तोच विषय घेतलेला असल्याने या पारिभाषिक शब्दांची नेमकी माहिती असणे आवश्यक आहे.

ज्ञानेश्वरांच्या ***योगशास्त्र व भक्तिमार्ग*** यासंबंधीच्या संकल्पना त्यांच्या वाङ्मयात ठिकठिकाणी येतात. ***ज्ञानेश्वरी*** घ्या किंवा ***अमृतानुभव*** घ्या; वा त्यांची ***अभंगसंपदा*** अभ्यासा; आपणांस ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानविषयक तात्त्विक व योगपर प्रायोगिक भूमिकेचे आकलन होण्यासाठी श्रीकृष्णार्जुनसंवादपर भगवद्गीतेचे रसग्रहण त्यांनी ज्या ***कर्म, योग व भक्ती*** यांची ज्ञानाशी विशिष्ट गुंफण करत केले आहे; ते मूलतः समजावून घेण्याशिवाय पर्यायच नाही!

योगशास्त्राचा अभूतपूर्व उत्कर्ष भारतीय संस्कृतीच्या पूर्वसूरींनी केला होता; त्याचा जो वाङ्मयीन वारसा आपणांस विविध साधनांद्वारे उपलब्ध होतो, तो जरी विशाल असला तरी प्रायोगिक माहितीअभावी व प्रयोग करण्यासाठी जी जन्मजन्मांतरीची तयारी लागते, त्याअभावी विस्मृत गुप्तधनासारखा आहे.

हे गुप्तधन जर आपल्याला उपलब्ध व्हावे असे वाटत असेल तर त्या शास्त्राच्या आपल्यापर्यंत पोहोचलेल्या वाङ्मयाचा कसून अभ्यास केला पाहिजे आणि तो अत्यंत कष्टप्राय वाटला तरी त्यात पारंगतता प्राप्त केल्याशिवाय ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाची सैद्धान्तिक तसेच प्रायोगिक पार्श्वभूमी कळणे अवघडच ठरेल.

साधेच उदाहरण घेऊ या. एखाद्या लेखकाने लिहिलेले त्यातल्या त्यात सोपेसे पुस्तक घ्या. जोवर आपल्याला त्या लेखकाला अवगत असलेले त्या पुस्तकातील विषयासंबंधी ज्ञान उपलब्ध होत नाही व त्या ज्ञानाचे आपण अधिकारी होत नाही, तोवर त्या पुस्तकाचा साधासा विषयसुद्धा आपल्या दृष्टीने दुर्बोधच वाटतो. हे जर सर्वसामान्य अर्वाचीन ज्ञानप्रकाराचे असते, तर अत्यंत गूढ, पुरातन, सर्व तत्त्वज्ञानाचा मुकुटमणी शोभणारे जे आत्मज्ञान - त्याच्याविषयी ज्ञानदेवादी ज्ञात्यांची भूमिका समजून घेणे किती अवघड ठरेल, हे जिज्ञासूंना त्वरित उमगावे.

त्यातून ज्ञानदेवांचा एकंदर आवाकाच अतिविलक्षण असल्याने आपण कितीही प्रयत्नपूर्वक त्यांची वाङ्मयसंपदा अभ्यासली, तरी आपण ज्ञानदेव नसल्याने वारंवार त्या क्षेत्रात थिटेच पडतो. किंबहुना ज्ञानदेवांसमोर आपण लहानच राहणे आपल्या परम श्रेयाचे आहे. तुकाराम महाराजांची ***"लहानपण दे गां देवा। मुंगी साखरेचा रवा।।"*** ही उक्ती परमार्थक्षेत्रात व तद्विषयक तत्त्वज्ञानाच्या अध्ययनक्षेत्रात फारच चपखल बसते!!

आपण ज्ञानदेवांपुढे बालकच राहिलो तर त्यांना मातृस्वरूपात पाहणे आपल्याला सोपे वाटते व तेव्हाच ही ज्ञानेश्वरमाउली - ही चैतन्यचक्रवर्ती साम्राज्ञी - आपल्यासारख्या अजाण बालकांस स्वतःच्या अंकावर घेऊन, विद्वज्जनांस अति जड असणारी ज्ञानेश्वरी स्वमुखाने आपल्याला समजावून सांगते आहे, असे अनुभवण्याचे भाग्य लाभते.

किंबहुना तसेच आश्वासन त्यांनी सूचकरीत्या ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायारंभीच्या ***"जय जय वो शुद्धे। उदारें प्रसिद्धे।...।। ते ...आतां निरोपिन प्रबंधु। अवधान दीजे।। (१२-१ ते १२-१९)*** **"** या ओव्यातून ग्रथित केले आहे. त्याचा परामर्ष आपण गुरुभक्ती, गुरुप्रेम व गुरुमहिमा यांच्या एका वेगळ्या संदर्भात घेतला होता. असो.

गोरक्षविचार::::

गोरक्षमत

पतञ्जलींचा ***धारणा, ध्यान व समाधि***विषयक अभिप्राय पाहिल्यानंतर गुरु गोरक्षांच्या त्याबाबतच्या विचारांचाही परामर्ष घेणे उचित ठरेल. धारणाविषयक त्यांच्या व्याख्येचा उहापोह आपण अगोदरच केला आहे. आता ते ध्यानासंबंधी काय म्हणतात, ते पहाः

"अथ ध्यानमिति। अस्ति कश्चन परमाद्वैतस्य भावः स एव आत्मेति यथा यद्यत्स्फुरति तत्तत्स्वरूपमेवेति भावयेत् सर्वभूतेषु समदृष्टिश्चेति ध्यानलक्षणम्।।२-३८।।सि.सि.प.।।"

"परम अद्वैत हाच आत्मा आहे, असा भाव चित्तात धरून जे जे स्फुरण पावते, ते ते आत्मस्वरूप आहे अशी भावना करणे व सर्वभूतांप्रत समदृष्टी ठेवणे; हे त्यांच्या मते ध्यानलक्षण होय."

समाधिलक्षण सांगतांना श्रीगोरक्षनाथ म्हणतातः

"अथ समाधिलक्षणम्। सर्वतत्त्वानां समावस्था निरुद्यमत्वमनायासस्थितिमत्त्वमिति समाधिलक्षणम्।।२-३९।। सि.सि.प.।।"

"समाधि म्हणजे सर्वतत्त्वांची समावस्था - तद्रूपता - इंद्रियविषयांचा त्याग -नैष्कर्म्यसिद्धी - अनायास स्थितीचा भाव - ***सहजावस्था वा सहजसमाधि वा संजीवनसमाधि*** वा चालती बोलती समाधि!"

गोरक्षांचे सगुण व निर्गुण ध्यान

ध्यानाचे ***सगुण*** व ***निर्गुण*** ध्यान असे प्रकारभेद गोरक्षांनी सांगितलेले आहेतः

"सर्वचिन्तासमावर्ति योगिने हृदि वर्तते। यत्तत्वे निश्चितं चेतस्तत्तु ध्यानं प्रचक्षते। द्विधा भवति तद्ध्यानं सगुणं निर्गुणं तथा। सगुणं वर्णभेदेन निर्गुणं केवलं विदुः।।गो.श.।।"

"योग्याच्या अंतःकरणात सर्व तऱ्हेचे विचार असतात. परंतु जेव्हा त्याचे चित्त आत्मवस्तूवर दृढ झालेले असते - स्थिर होते - त्या स्थितीला ***ध्यान*** असे म्हणतात. या आत्मवस्तूचे ध्यान दोन प्रकारांनी करतात - एक ***सगुण*** व एक ***निर्गुण. सगुण ध्यान हे वर्णभेदाने म्हणजे विश्वात्मक रूपाने व निर्गुण ध्यान केवलभावाने केले जाते."***

सगुण ध्यानासाठी जरी भगवंतांच्या कोणत्याही विभूतीची वा अवताराची उपासना केली तरी तोच विश्वात्मक वा विश्वरूपाने नटलेला आहे व विश्वाचे आदितत्त्व तोच आहे, ही धारणा करणे योगमार्गात अभिमत आहे.

सगुण ते निर्गुण

एकदा हा दृष्टिकोन समजावून घेतला म्हणजे आपल्या पुराणवाङ्मयातून जी त्या त्या विशिष्ट देवतेच्या तीच ब्रह्मांडाची चालक देवता आहे, विश्वाची सर्वेसर्वा आहे, आद्यतत्त्व आहे, इ.ज्या संकल्पना आढळतात, त्यांचा उलगडा होतो. उदा.शिवपुराणात शिवच अनादी, अनंत, नामरूपांनी विश्वांतर्यामी नटलेला आहे इ.जी त्या देवतेची एकांतिक वर्णने केली जातात; तशीच गणेशपुराणातून किंवा मुद्गलपुराणातून श्रीगणेशाची, देवीपुराणातून देवीची, श्रीमद्भागवतातून श्रीविष्णूची वर्णने केलेली आढळतात.

किंबहुना अशी एकांतिक व अतिशयोक्तिस्वरूप वर्णनेच त्या त्या दैवताभिमान्यांचे परस्परात कलह निर्माण करण्यास कारणीभूत झाल्याची इतिहासाची साक्ष आहे. शैव व वैष्णवांचे दाक्षिणात्यांमध्ये झालेले वितण्डवाद व संघर्ष याकरता प्रसिद्ध आहेत.

वेगवेगळ्या पंथोपपंथांमध्ये आपलाच मार्ग सर्वात श्रेष्ठ व आपलीच दैवते सर्वश्रेष्ठ असा जो अहंकार दिसून येतो; त्यामागे खरे तर याच स्वरूपाची अनिष्ट भावना असते व त्यामुळे सगुण ध्यानोपासनेचा खरा उद्देश म्हणजे सान्ताकडून अनन्ताकडे साधकाने करावयाचा प्रवास, विभूतिउपासनेतून विश्वरूपी परमेश्वराची अर्चना करणे व निरंजन, निष्कल, अनादी, अपरिमेय, इ.गुणबोधात्मक स्वरूपाची - निर्गुणाची– जाणीव करून घेणे व त्याचा साक्षात्कार करून घेणे , हा नजरेआड होत असतो. असो.

मनपवनशून्यता

ध्यान व समाधि यांचे एकूण स्वरूप कळून घेण्यासाठी गोरक्षनाथांच्या ***गोरक्षशतक*** या रचनेतील पुढील श्लोकही फार उपयुक्त ठरतोः

"यदा संक्षीयते प्राणो मानसं च विलीयते। तदा समरसैकत्वं समाधिरभिधीयते।।गो.श.।।"

"जेव्हा प्राण क्षीण होतो, त्याची गती थांबते, तेव्हा मन लय पावते व ***सामरस्य*** प्राप्त होऊन समाधीत स्थिती होते."

प्राण व मन पांगुळणे ही प्रथमावस्था धरली तर ***मनपवनशून्यता*** ही समाधीसाठी आवश्यक अवस्था धरली पाहिजे. या कल्पनेचा, जी पूर्णपणे नाथपंथीय विशेष आहे, तिचा आपणांस ज्ञानेश्वरांचे योगविषयक विचार समजून घेण्यास फारच उपयोग होणार आहे.

सूत्रक्रमणा

आतापावेतो ज्ञानेश्वरप्रणीत ***अद्वयभक्ति*** योगाचे वा ***अद्वय - कर्म - ज्ञान - भक्ति*** योगाचे, ज्यास ***पंथराज*** अथवा ***क्रमयोग*** असे नांव आहे, त्याचे जे थोडेथोडके विवेचन आपण पाहिलेले आहे, ते यापुढे येणाऱ्या ओव्या पाहिल्यानंतर कोणत्या दिशेने चालले आहे, ते जिज्ञासूंस लागलीच उमजेल.

सगुणोपासना::::

गीतेतील भक्ती व सगुणोपासना

सगुण ध्यान व समाधिविषयक विचार स्पष्ट करतांना श्रीकृष्णांनी सांगितले आहे की:

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।१४-२६।।
ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च।।१४-२७।।

"अव्यभिचारी भक्तियोगाने जो माझी उपासना करतो, म्हणजे अभेद विश्वात्मक स्वरूपात जो माझे ध्यान करतो; तो या गुणांपलीकडे जाऊन म्हणजे वृत्तितरंगरहित होऊन, त्यास ***ब्रह्मत्वप्राप्ती*** होते. ***अमृत, अव्यय, शाश्वत, धर्मरूप, सुखरूप व अद्वितीय*** असे जे ब्रह्म आहे, ते मीच आहे."

धारणा, ध्यान व समाधि हे विषय श्रीज्ञानदेवांच्या योगशैलीने हाताळतांना त्यांना ***कर्म, ज्ञान, योग व भक्ती*** ही सगळी किती अभिन्न वाटतात, हे त्यांनी वरील गीतोक्त श्लोकांचा आधार घेऊन ज्या ओव्या रचल्या आहेत, त्यांवरून सहज दिग्दर्शनास येते.

गीतेच्या या श्लोकावरील ज्ञानेशांच्या ओव्या हा उपासनेचा विषय समर्पकरीत्या स्पष्ट करतात. त्यातील महत्त्वाच्या ओव्यांचा तूर्त उल्लेख करून आपण पुढे जाऊ या:

तऱ्हीं व्यभिचाररहितें चित्तें। भक्तियोगें मातें।
सेवी तो गुणांतैं। जाकलूं शके।।१४-३७१।।
तैसें विश्व येणें नांवें। हे मीचि पैं आघवें।
घेईं चंद्रबिंब सोलावें। न लगे जेवीं।।३७७।।
म्हणौनि विश्वपण जावें। मग मातें घेयावें।
तैसा नोहे आघवें। सकटचि मी।।३८०।।
ऐसेनि मातें जाणिजे। तैं अव्यभिचार भक्ति म्हणिजे।
एथ भेदु काईं देखिजे। तऱ्हीं व्यभिचारु तो।।३८१।।

ते म्हणताहेत: "माझ्यावाचून दुसरीकडे कोठेही चित्त गुंतू न देता भक्तियोगाने जो माझी उपासना करतो, तो गुणांना ताब्यात ठेवू शकतो. गुण म्हणजे नामरूपात्मक विश्वातील मायेचा खेळ वा पसारा! विश्व म्हणजे वेगळे दुसरे काही नसून मीच आहे. चंद्राहून त्याच्या चंद्रकला वेगळ्या का असतात! ***म्हणून विश्वाचा पसारा बाजूला सारून माझी उपासना करता येईल असे नव्हे; तर विश्वात्मक असा जो मी आहे, त्याचीच तू उपासना कर. हीच अव्यभिचारी भक्ती होय;*** अन्यथा भक्ती केलीस तर तो मज परमात्म्याप्रति व्यभिचारभाव होईल व तुला माझी प्राप्ती होणे दूर राहील."

ययाकारणे भेदांतैं। सांडुनि अभेदें चित्तें।
आपणांसगट मातें। जाणावें गां।।१४-३८२।.
हो कां तरंगु लहान। परी सिंधुसीं नाहीं भिन्नु।
तैसा ईश्वरी मी आनु। नोहेचि गां।।३८६।।
ऐसेनि समरसें। दृष्टी जैं उल्हासें।
तैं भक्ति पैं ऐसें। आम्हीं म्हणो।।३८७।।

"म्हणून हे अर्जुना! ***"आपणांस मीच आहे असे समजून व हे विश्व जे दिसते, भासते, प्रकाशते; ते सर्व मीच आहे"*** अशी भावना ठेवून त्याच्याहीसकट त्यातल्या माझीच तू उपासना करत जा. तरंग वा लाट ही समुद्राहून फारच लहान असते. पण ती समुद्रापेक्षा वेगळी का असते! तसाच तू हे जाणून अस की ***"तू स्वत:सुद्धा ईश्वराहून भिन्न असा कोणीही नाहीस."*** हीच ***सोऽहंवृत्ती*** होय. "

ज्ञान, योग व भक्ती यांचा समन्वय

श्रीकृष्ण म्हणतात: "हीच समरस दृष्टी होय. या ध्यानावस्थेचा जो परिपाक किंवा समाध्यवस्था असते, तिलाच मी ***भक्ती*** असे म्हणतो."

ते पुढे म्हणतात:

आणि ज्ञानाचें चांगावें। इयेंचि दृष्टी नांवें।
योगाचेही आघवें। सर्वस्व हे।।१४-३८८।।
सिंधू आणि जलधारा। माजीं लागली अखंड धारा।
तैसीं वृत्ती वीरा। प्रवर्ते तैं।।३८९।।

"ज्ञानाचे रहस्य वा परिपक्व अवस्था ती हीच ! योगसर्वस्वसुद्धा हीच अवस्था होय. ***ज्ञान, योग व भक्ती या त्रिधा नांवांनी ही समाध्यवस्था ओळखली जाते.*** परंतु वस्तुत: तिच्यात या नामांपरत्वे काहीही भेद नसतो, हे तू जाणून अस. अर्जुना! समुद्रावर मेघांतून अखंड धारा वर्षू लागली असता समुद्र, मेघ व पर्जन्यधारा या तिहीतही असते ते एकमात्र जलच! मेघ, जलवृष्टिधारा व समुद्र हे नामरूपाने भिन्नभिन्न वाटतात; तरी त्यांचा आधार जलच आहे. त्याचप्रमाणे मी, तू व हे विश्व वेगवेगळे भासलो तरी अंतरी आपण एकच आहोत, हे जाणणे आणि तशी अखंड वृत्ती धारण करणे हेच या ***भक्ती, ज्ञान वा योग*** यांचे सार आहे."

ऐसेनि मग परस्परें। जैं सोऽहंवृत्ती अवतरे।
तैं तियेहिसकट सरे। आपैसेयां।।१४-३९२।।
माझें पैलपण जाये। भक्त हें ऐलपण ठायें।
अनादि ऐक्य जैं आहे। तैंचि निवडे।।३९५।।

"अशी ही ***सोऽहंवृत्ती*** वर सांगितलेल्या उत्कृष्ट प्रकारच्या उपासनेने - अव्यभिचारी भक्तीने प्रकट होते आणि *उपासक व उपास्य, ध्याता व ध्यान, जीव व ब्रह्म* यात *अभेदभाव* निर्माण होतो. ही *सोऽहंवृत्ती* सुद्धा मग आपोआप लयाला जाते. मिठाचा कण जसा

समुद्रात विरून त्याच्याशी एकरस होऊन जावा; त्याप्रमाणे उपासक व मी यातला भेदभाव विसर्जित केल्यावर *मी तोच आहे* या ज्ञानाचा - *सोऽहं* भावाचाही -अस्त होतो. मायेच्या वा विश्वापैलीकडे मी असतो व भक्त त्याच्या इकडल्या कांठावर असतो; किंवा तो भक्त आहे व मी कोणी त्याच्याहून वेगळा आहे; अशा सगळ्या चित्तवृत्तींचा अस्त होऊन जीव व ब्रह्म यांत जे अनादी ऐक्य आहे, ते प्रकट होते."

याच स्थितीचे वर्णन व्यासमहर्षींच्या ब्रह्मसूत्रावरील भाष्यातून श्रीमच्छंकराचार्यांनी ***"जीवो ब्रह्मैव ना परा।"*** या उक्तीने केले आहे.

अव्यभिचारी भक्ती

किंबहुना ऐसीं जैं दशा। तैं ब्रह्मत्व गां सुदंशा।
हे तो पावें जो ऐसा। मातें भजे।।१४-३९७।।
यया ब्रह्मत्वासिचि पार्था। सायुज्य ऐसीं वेवस्था।
याचि नांव चौथा। पुरुषार्थु गां।।४०१।।

श्रीकृष्ण पुढे म्हणतातः "याचे मर्म नीट ओळखणाऱ्या अर्जुना! *(सुदंशा!)* हीच दशा म्हणजे ब्रह्मत्व! मला अव्यभिचारी भक्तीने भजणारा भक्त त्यायोगे याच अवस्थेला प्राप्त होतो. ज्ञान, भक्ती वा योग यांद्वारे अशा प्रकारे दिव्यदृष्टीने माझी उपासना करणारा श्रेष्ठ पुरुष म्हणजे ब्रह्मत्वाच्या मुकुटी अग्रभागी झळाळणारे दीप्तिमान रत्नच होय! ***चौथा पुरुषार्थ*** वा ***मोक्ष*** म्हणून लोकात प्रसिद्ध असणारी ***सायुज्यमुक्ती*** म्हणजेच ही ***ब्रह्मत्वदशा*** होय."

परी माझे आराधन। ब्रह्मत्वीं होय सोपान।
येथ मी हन साधन। गमेन हो।।१४-४०२।।
तऱ्हीं झणें झणें ऐसें। तुझियां चित्तीं पैसें।
पैं ब्रह्म आन नसें। मीवांचौनि।।४०३।।
अगा ब्रह्म या नांवा। अभिप्रावो मी पांडवा।
मीचि बोलिजे आघवां। शब्दीं इहीं।।४०४।।

"परंतु माझे आराधन हे ब्रह्मप्राप्तीचा सोपान आहे, असे जर समजशील आणि त्याकरता मी साधन आहे, असे जर तुला वाटले असेल, तर तशी चुकीची कल्पना तू करून घेऊ नकोस. हे पार्था! माझ्यापेक्षा ब्रह्म काही निराळे नाही. *ब्रह्म* या नांवाने मलाच संबोधित करतात. *अमृत, अव्यय, शाश्वत, धर्म, सुख, अद्वितीय* इ.शब्द मलाच उद्देशून योजिले जातात."

पैं मंडल आणि चंद्रमा। दोन नव्हती सुवर्मा।
तैसा मज आणि ब्रह्मा। भेदु नाहीं।।१४-४०५।।
अगां नित्य जैं निष्कंप। अनावृत्त धर्मरूप।
सुख जैं उमप। अद्वितीय।।४०६।।
विवेकु आपुलें काम। सारूनि ठाकी जैं धाम।
निष्कर्षाचें निःसीम। किंबहुना मी।।४०७।।

"हे सुवर्म्या! हे चतुर अर्जुना! चंद्रमा आणि त्याची प्रभा एकमेकांपासून विभक्त नसतात; त्याचप्रमाणे मी आणि ब्रह्म अभेद आहोत. हे सुजाणा! जे ब्रह्म ***नित्य, निष्कंप, स्पंदरहित व स्फुरणरहित, प्रकट धर्मरूप, अमर्याद सुख व आनंदरूप आणि एकमेवाद्वितीय*** आहे; जे ***महासिद्धान्ताचा आवाका वा पराकोटीचे स्थान आहे;*** ते मीच होय!"

"माझां साक्षात्कारीं "

धारणा, ध्यान व समाधि विषयक सिद्धान्त, लक्षणे व इतर विवेचन ज्ञानेश्वरीत कित्येक ठिकाणी केलेले आहे. मूळातच ***श्रीमद्भगवद्गीता*** हा ग्रंथ योगविषयक असल्याने कित्येक श्लोक या अंतरंग योगांगांशी संबंधित आहेत. श्रीकृष्णांनी सांगितलेल्या समाध्यवस्थेच्या निदर्शक अशा बऱ्याच गीताश्लोकांचा एकजिनसी आढावा आपण पूर्वीच एकदा घेतला होता. समाधिपरिणाम उत्कृष्टरीत्या प्रकट करणारे अनेक श्लोक गीतेत आहेत. सध्याच्या विवेचनाला अनुसरून भगवंतांचा आणखी एक श्लोक आपल्या दृष्टीसमोर सहज येतोः

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप।।११-५४।।

श्रीकृष्ण म्हणतातः "हे अर्जुना! अशा विश्वात्मक स्वरूपाचा जो मी आहे, त्या मला तत्त्वतः जाणणे, पाहणे आणि माझ्यातच लीन होणे, केवळ या ***अनन्यभक्ती*** च्या योगानेच शक्य आहे."

श्रीज्ञानदेवांच्या यावरील काही सुंदर व मर्मग्राहक ओव्या बघाः

तऱ्हीं विश्वात्मक रूपडें। जैं दाविलें आम्हीं तुजफुडे।
तैं शंभुही परी न जोडे। तप करितां।।११-६७६।।
तैसा मी एकचि परी। आंतुडें मां अवधारीं।
जऱ्हीं भक्ती येऊनि वरी। चित्तातैं गां।।६८५।।
कां सकल जलसंपत्ति। घेऊनि समुद्रातैं गिंवसितीं।
गंगा जैशीं अनन्यगती। मिलालीचि मिळें।।६८७।।
तैसे सर्वभावसंभारें। न धरत प्रेम एकसरें।
मजमाजीं संचरें। मीचि होऊनि।।६८८।।

श्रीकृष्ण म्हणतातः "अरे आंधळ्या अर्जुना! तुला जे हे माझे विश्वात्मक विश्वरूप दाखवले, ते शंभुसारख्या अचाट तप करणाऱ्यांनासुद्धा अनुभवायला मिळत नाही. यज्ञ, दान, वेदाध्ययन यांनीसुद्धा मला या स्वरूपात पहायला मिळत नाही. फक्त अनन्यभक्तीच्या योगाने - त्या भक्तीने चित्तात प्रवेश केला तरच माझे हे खरे स्वरूप दृष्टीस पडण्याचे भाग्य लाभते. गंगा जशी आपली सकल जलसंपत्ती घेऊन अनन्यगतिक होऊन सागराला मिळाल्याखेरीज राहत नाही; त्याचप्रमाणे सर्वभावसंभार माझ्यावर वर्षवून म्हणजे सर्व ठिकाणी मीच आहे, ही भावना ठेवून माझ्यावर अनावर प्रेम करणारा भक्त मद्रूप होऊन माझ्यातच प्रवेशतो."

तैसें माझां साक्षात्कारीं। सरे अहंकाराचीं वारी।
अहंकारलोपीं अवधारीं। द्वैत जाये।।६९४।।

मग मी तो हे आघवें। एक मीचि आथि स्वभावें।
किंबहुना सामावें। समरसें तो।।६९५।।

"माझा असा साक्षात्कार झालेल्या भक्ताचा अहंकार नाहीसा होतो; म्हणजे तो, विश्व आणि मी हे पृथग्पृथक आहोत, ही त्याची जाणीव नष्ट होते. अहंकार लोपताच त्यामुळे द्वैताची जी प्रतीती येत होती, ती नाहीशी होऊन त्याला सर्वत्र अद्वैत वा अद्वय दृष्टी प्राप्त होते. तेव्हा मी, तो व हे सर्व विश्व हे स्वभावत: एक मीच आहोत, हे त्याच्या प्रत्ययास येते. पण खरे म्हणजे त्याला याचीही जाणीव उरत नाही. हे ज्ञानसुद्धा लोपते. कारण तो माझ्यातच समरस होऊन सामावून जातो."

दृष्टादृष्ट सकल। जेयांचें मीचि केवल।
जेणें जिणयाचें फल। मजचि नाम ठेविलें।।६९७।।
भुतें हे भाख विसरला। जैं दिठीं मीचि आहे सूदला।
म्हणौनि निर्वैर जाहला। सर्वत्र भजे।।६९८।।
ऐसा जो भक्तु होये। तेयांचे त्रिधातुक हे जायें।
तैं मीचि होऊनि ठायें। पांडवा गां।।६९९।।

"ज्याचा इहपरलोक सर्व काही मीच होऊन राहिलो आहे व ज्याने आपल्या जगण्याचे प्रयोजन केवळ माझीच प्राप्ती होणे असे निश्चित ठरवले आहे; ज्याच्या दृष्टीस भूतमात्रे मत्स्वरूपच दिसतात; तो सर्व भूतांवर सारखेच प्रेम करतो. त्याची दृष्टीही माझ्याव्यतिरिक्त इतर काहीही कशातही पाहू शकतच नाही. कारण तिच्यात मीच भरून राहिलेला असतो. असा जो भक्त असतो, तो मायेच्या - त्रिगुणांच्या - पंचमहाभूतात्मक शरीरापल्याड जातो व केवळ मीच होऊन या देहात वास्तव्य करतो. त्याचा देह, मन, बुद्धी व इंद्रिये, पंचप्राण व शरीरकोष इ.सर्व समुदाय सर्वस्वी मद्रूपच म्हणजे चैतन्यस्वरूप होतो, हे तू निश्चित जाणून अस."

आत्मरती::::

समाधि व आत्मरती

ज्ञानदेवांचे समाधिविषयक जे सविस्तर विवेचन आपण वर पाहिले आहे, त्यावरून ***समाधि*** म्हणजे काय याबाबतची त्यांची कल्पना आपल्याला कळून येते. तसेच ***पतञ्जली, गोरक्षनाथ*** आणि ***ज्ञानदेव*** यांचे याविषयींचे हे सर्व विवेचन पाहिल्यावर ज्ञानदेवांच्या ***"समाधिच्या सेजेंसीं। बांधौनि घालीं ध्यानेंसीं। चित्त चैतन्यसमरसीं। आंतु रते।।१३-५०९।।"*** या समाधिविषयक ओवीचा अर्थ ग्रहण करण्यास मदत होते. ज्ञानदेवांच्या एकेका ओवीचा विचार करावयाचा म्हणजे कधीकधी जिज्ञासूंना कोठेकोठे शोधावे लागते, याची स्वल्प कल्पना जाणकारांस येण्यासाठी ही ओवी म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

यम-नियम-आसन-प्रत्याहार-प्राणायाम या मार्गाने पुढे जाणारा साधक जेव्हा ***ध्यान-धारणा*** या अंतरंग प्रांतात प्रवेशतो, त्यावेळी ***कुंडलिनीप्रबोधन*** आवश्यक ठरते. ***कुंडलिनीशक्ती***च्या साहाय्याने व गुरुप्रभावाने साधक धारणा-ध्यान यात दृढ होत जातो व त्याला अद्वय वा अद्वैत बोधाची जीतीजागती खूण असणारा समाधि प्राप्त होतो.

असा तो साधक ध्यानरत झालेले - ध्येयाकार प्राप्त झालेले चित्त ***समाधीच्या शेजेवर*** म्हणजे शय्येवर आणून सोडतो. तेथे आत्मरती प्राप्त होते म्हणून रतिसुखनिर्देशक उपमा येथे ज्ञानदेवांनी वापरल्या आहेत. ***समाधि*** ही जणू कोणी भोगलोलुपा स्त्री आणि ***चित्त*** जणू कोणी चंचल नर असे कल्पून समाधीच्या सेजेपाशी तिला पाहिजे तेव्हा आत्मरती मिळावी म्हणून साधनाक्रम आचरून बळेच ध्येयाकार झालेले चित्त तेथे आणून त्याला तेथेच बांधून ठेवण्याची कल्पना येथे अध्याहृत आहे.

खरे तर चित्त हे मुक्तछंदी नरासारखे आहे. या वृत्तीवरून त्या वृत्तीवर असे ते स्वच्छंद विहरत असते. अखंड त्याला एकाच वृत्तीचा आकार देणे फार अवघड आहे. मुक्तछंदी नराला कोणा एकाच स्त्रीजवळ बांधून ठेवणे किती कठीण असते! या सर्वांची जाण ठेवूनच येथे ***चित्त व समाधि*** यांचे साहचर्य या उपमा प्रकाराने सूचित केले आहे.

अशा त्या चित्ताला समाधीशी ***रति*** म्हणजे ***सामरस्य*** प्राप्त झाल्यावर अंतर्यामी ***आत्मसुख*** म्हणजे ***आत्मरति*** प्राप्त होते, ही कल्पना येथे मांडली आहे. यालाच ***आत्मविनिग्रह*** अशी संज्ञा श्रीकृष्ण देतात, हे सांगतांना *ओवी क्र.१३-५११* मध्ये ज्ञानदेव म्हणतात:

"अंत:करणविनिग्रह तो हाच! जेथे अंत:करणनिग्रह म्हणजे ***आत्मविनिग्रह*** असेल, तेथेच ज्ञान सुप्रतिष्ठित असते. जेथे ***ज्ञान*** असते, तेथे चित्त लीन होते. हे अर्जुना! अशा प्रकारे ब्रह्मत्व प्राप्त झालेला तो पुरुष म्हणजे मनुष्यरूपाने प्रकटलेले साक्षात ज्ञानच आहे; ब्रह्मच आहे; हे तू नक्की समजून अस."

अपरोक्षानुभूति::::

शंकराचार्य व अष्टांगयोग

आत्मविनिग्रह म्हणजे काय हे स्पष्ट करण्यासाठी श्रीज्ञानेश्वरांनी या ठिकाणी*(१३-५०६ ते ५११)* दहाबारा ओव्या रचल्या आहेत. त्यांचा अर्थ व त्यामागची भूमिका आतापावेतो आपण वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकत पाहिली.

ज्ञानदेवांची अष्टांगयोगाच्या विविध अंगांबाबतची कल्पना *श्रीमदाचार्य शंकर* भगवानांच्या भूमिकेशी किती मिळतीजुळती आहे, हे आपण आसनाच्या निमित्ताने पाहिलेच आहे. तेच साम्य इतरही अंगांबाबत अभ्यासण्याजोगे असल्याने यमनियम ते समाधिविषयक जे विचार आचार्यांच्या ***अपरोक्षानुभूति*** या प्रकरणग्रंथाद्वारे दिग्दर्शित होतात, त्यांचा एकदा संक्षिप्त आढावा घेऊ या:

अपरोक्षानुभूति व अष्ट योगांगे

१)यम:- **सर्वं ब्रह्मेति विज्ञानादिन्द्रियग्रामसंयमः।**

यमोऽयमिति सम्प्रोक्तोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः ।।१०४।।अ।।

"हे विश्व ब्रह्मरूपच आहे असे जाणून इंद्रिये वश करून घेण्यास यम म्हणतात. हा अभ्यास वारंवार केला पाहिजे."

२)नियम:-**सजातीयप्रवाहश्च विजातीयतिरस्कृतिः।**

नियमो हि परानन्दो नियमात्क्रियते बुधैः।।१०५।।अ.।।

"सजातीय वृत्तीचा प्रवाह चालू ठेवणे व विजातीय वृत्तिप्रवाहांची उपेक्षा करणे हाच परानंदप्राप्तीसाठी नियम आहे. बुद्धिमान मनुष्ये याचे कटाक्षाने पालन करतात."

सजातीय प्रवाह म्हणजे सर्व काही ब्रह्मच आहे या ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** या वृत्तीचा चित्तप्रवाह आणि *विजातीय प्रवाह* म्हणजे स्वतः व विश्वातील इतर वस्तू पृथग्पृथक आहेत असा इंद्रियगोचर आभास. अभ्यासकांस सजातीय चित्तप्रवाहास उत्तेजन देणे व विजातीय प्रवाहाची उपेक्षा करणे, हा उपाय आचार्य सुचवत आहेत.

३)मूलबन्ध:- याबाबत आचार्य म्हणतातः

यन्मूलं सर्वभूतानां यन्मूलं चित्तबन्धनम्।

मूलबन्धः सदा सेव्यो योगोऽसौ राजयोगिनाम्।।११४।।अ।।

"जे समस्त भूतांचे आदिकारण आहे व ज्याने साधकाचा अंगीकार केला असता चित्त स्थिरता पावते; त्याचे सदा सेवन करणे हाच मूलबंध होय व असा मूलबंध प्राप्त होणे हाच राजयोग्यांचा योग होय."

४) नासाग्रदृष्टी:- नासाग्रपीठी दृष्टी कशी लावावी, हे पहाः

दृष्टीं ज्ञानमयीं कृत्वा पश्येद ब्रह्ममयं जगत्।

सा दृष्टिः परमोदारा न नासाग्रावलोकिनी।।११६।।अ.।।

"दृष्टी ज्ञानमय करून सर्व जगत ब्रह्ममय आहे, असे अवलोकन करणे हीच अति उत्तम दृष्टी आहे. केवल नासाग्रावर अवरुद्ध केलेली दृष्टी कनिष्ठ प्रकारची आहे. नासिकाग्रावर दृष्टी ठेवण्यापेक्षा जेथे द्रष्टा, दर्शन व दृश्य ही त्रिपुटी लोप पावते, तेथेच दृष्टी ठेवणे हे योग्याचे परम कर्तव्य आहे."

गीतेत भगवंतांनी ***"समं काय शिरोग्रीव धारयन्नचलं स्थिरः। संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-१३।।"*** असे सांगितले आहे. गीताभाष्यात आचार्यांनी केलेला खुलासा व ***समं काय*** या शब्दाची व *नासिकाग्रदृष्टी*ची *अपरोक्षानुभूति* द्वारे केलेली व्याख्या जिज्ञासूंनी ताडून पाहिली की आचार्यांचे प्रमाणग्रंथ इतर वाङ्मयाच्या अनुरोधाने का अभ्यासले पाहिजेत, हे लवकर समजते.

समं काय याबाबत ते काय म्हणतात, ते पहाः

अङ्गानां समतां विद्यात्समे ब्रह्मणि लीयते।

नो चेन्नैव समानत्वमृजुत्वं शुष्कवृक्षवत्।।११५।।अ.।।

"चित्त जेव्हा ब्रह्मासम होऊन लीन होते, तेव्हाच कायेची समता प्राप्त होते. वाळलेल्या वृक्षाप्रमाणे अंगाची समता वा निश्चलता खरी समकायता नव्हे."

५) प्राणायाम:-**चित्तादिसर्वभावेषु ब्रह्मत्वेनैव भावनात्।**

निरोधः सर्ववृत्तीनां प्राणायामः स उच्यते।।११८।।अ.।।

"सर्व प्रकारच्या चित्तवृत्ती ब्रह्मरूपच आहेत, अशी भावना केल्याने सर्व वृत्तींचा निरोध होऊन खरा प्राणायाम साध्य होतो."

निषेधनं प्रपञ्चस्य रेचकाख्यः समीरणः।

ब्रह्मैवास्मिति या वृत्तिः पूरको वायुरीरितः।।११९।।अ.।।

ततस्तद्वृत्तिनैश्चल्यं कुम्भकः प्राणसंयमः।

अयं चापि प्रबुद्धानामज्ञानां घ्राणपीडनम्।।१२०।।अ.।।

"प्रपंच म्हणजे जगत आभास आहे, असे वाटणे म्हणजेच प्रपंचाचा निषेध करणे. हाच *रेचक* होय. *पूरक* म्हणजे मीच ब्रह्म आहे, ही वृत्ती धारण करणे. अशा रीतीने ब्रह्माकार वृत्तीने स्थित - निश्चल राहणे म्हणजेच *कुंभक* प्राणायाम होय. प्राणायाम म्हणून रेचक, पूरक व कुंभक साधण्यासाठी नाकपुड्या दाबणे हे निव्वळ अज्ञान्यांचे लक्षण आहे."

६) प्रत्याहार:- आचार्य म्हणतातः

विषयेष्वात्मतां दृष्ट्वा मनसाश्चिति मज्जनम्।

प्रत्याहारः स विज्ञेयोऽभ्यसनीयो मुमुक्षुभिः।।१२१।।अ.।।

"विषयांना आत्मरूप पाहणे व मनाला चैतन्यात डुबवून देणे हाच ***प्रत्याहार*** असून मुमुक्षूंनी तोच अभ्यासावा."

७)धारणा:-

यत्र यत्र मनो याति ब्रह्मणस्तत्र दर्शनात्।

मनसो धारणां चैव धारणा सा परा मता।।१२२।।अ.।।

"मन जेथे जेथे ओढ घेते, तेथे तेथे ब्रह्माचेच दर्शन करत मनाला स्थिर करणे हीच सर्वोत्तम ***धारणा*** होय."

८)ध्यानः

ब्रह्मैवास्मिति सद्वृत्त्या निरालम्ब तया स्थितिः।

ध्यानशब्देन विख्याता परमानन्ददायिनी।।१२३।।

"मी ब्रह्मच आहे, या सद्वृत्तीच्या परिपोषाने जी परमानंददायक निरालंब स्थिती प्राप्त होते, तीच ***ध्यान*** शब्दाने विख्यात आहे."

९) समाधि:- याबाबत आचार्य म्हणतातः

निर्विकार तया वृत्त्या ब्रह्माकार तया पुनः।

वृत्तिविस्मरणं सम्यक् समाधिरर्ज्ञानसंज्ञकः।।१२४।।

एवं चाकृतिमानन्दं तावत्साधु समभ्यसेत्।

वश्यो यावत्क्षणात्पुंसः प्रयुक्तः सम्भवेत् स्वयम्।।१२५।।

ततः साधननिर्मुक्तः सिद्धो भवति योगिराट्।

तत्स्वरूपं न चैकस्य विषयो मनसा गिराम्।।१२६।।

"निर्विकार व ब्रह्माकार या वृत्तीतून जी वृत्तीहीन स्थिती प्राप्त होते, तीच ***ज्ञानसमाधि*** होय. यातून प्राप्त होणाऱ्या आनंदाचा पुनःपुनः प्रत्यय घेत घेत जेव्हा क्षणभरातच मनुष्याचे चित्त समाधिमग्न होऊन जाते, तेव्हा सिद्धत्व प्राप्त होते. तो सिद्ध सर्व साधनांच्या आचरणापासून मुक्तछंद असतो. त्याचे हे गुह्य स्वरूप कोणाच्याही वाणीचा किंवा मनाचा विषय होऊ शकत नाही."

"वाचो यस्मिन्निवर्तन्ते तदवक्तुं केन शक्यते।...... ।।१०८।।अपरो.।।"

- "ज्या स्वरूपापासून वाचा परत फिरते व जे मनाच्या मुठीत सामावले जाऊ शकत नाही; अशा त्या ब्रह्मीभूत योगिराजाचे वर्णन कोण करू शकेल!"

श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या ***अपरोक्षानुभूति*** या स्फुट प्रकरणग्रंथाचा आपण ***अष्टांगयोग*** साधनेसंदर्भात विचार केला. साध्य डोळ्यांसमोर ठेवल्यावर साधनांचे स्वरूप मूढ मनुष्यापासून योग्यांपर्यंत कसे बदलत जाते, हेसुद्धा यावरून स्पष्ट होते.

ब्रह्मस्वरूपाचा वेध घेऊ इच्छिणाऱ्या साधकाची यमनियमादी चर्या कशी असावी, त्याचे आचार्य थोडक्यात पण उत्कृष्ट असे मार्गदर्शन येथे करतात. अन्यथा त्यांचे भाष्यादी जडजंबाल ग्रंथ त्यातील पूर्वपक्ष-उत्तरपक्षादी तार्किक व शास्त्रीय विचारसरणीमुळे केवळ विद्वान पंडितांचेच होऊन राहिले आहेत. ज्ञानदेवांच्या काळी याच विद्वज्जनांनी आचार्यांच्या या सारस्वतधनाचे बासन स्वतःच्या घराच्या खुंटीवर लटकावून ठेवले होते. म्हणून सर्वसामान्य जन त्या मौलिक विचारांना पारखे झाले होते.

या सकल जनांना उद्धाराचा मार्ग दाखवावा, म्हणून कळवळ्याने व अंतरीच्या उमाळ्याने सर्व संतसज्जनांनी प्राकृतात ***ब्रह्मविद्यातत्त्वविचार व योगसाधना*** विषयक प्रबोधन मांडण्यास सुरुवात केली. मुकुंदराजांपासून ही प्रथा रूढ झाली असे समजतात. या सर्वात ज्ञानेशांचे स्थान मुकुटमण्याचे आहे.

ज्ञानेशांच्या ग्रंथसंपदेचे अध्ययन व विशेषतः त्यांच्या लोकमानसात प्रेमाने प्रचलित असणाऱ्या ***श्रीज्ञानेश्वरी*** या अमृतोपम ग्रंथाच्या सेवनानेच त्या जनताजनार्दनास गेली सात शतके अनमोल मार्गदर्शन केले आहे, हे सर्व सूज्ञांस विदित आहेच. लोकमान्य टिळकांनी ***गीतारहस्य*** या आपल्या ग्रंथात प्रतिपादिलेल्या लोकसंग्रहार्थ ज्ञानोत्तर कर्माचे केवढे हे उदात्त उदाहरण आहे! असो.

वैराग्यादी लक्षणे::::

१०) विषयवैराग्य

आता पुढील भागाकडे वळू या. ***अमानित्वादी*** अष्टादशगुणांचे ज्ञानेशकृत विवरण आपण पाहत आहोत. त्यातील ***वैराग्य*** या गुणाबाबत ज्ञानराजांच्या ओव्यांपासून आपल्याला काय बोध होतो, ते पाहू याः

ज्ञानदेव म्हणतातः

आणि विषयांविखीं।वैराग्याची निकी।
पुरवणी मानसीं कीं। जिती आथी।।१३-५१२।।
वमिलेयां अन्ना। लाल न घोंटीं जेवीं रसना।
आंग न सूयें आलिंगना। प्रेताचियां।।५१३।.
विष खाणें नागवें। जलत घरीं न रिगवें।
व्याघ्रविवरां न विचवे। वस्ती जेवीं।।५१४।।
धडाडीत लोहरसीं।उडी न घालवें जैसीं।
न करवे उशी। अजगराची।।५१५।।
अर्जुना तेणे पाडें। जेयासीं विषयवार्ता नावडे।
नेदी इंद्रियांचेनि तोंडे। कांहींच जावो।।५१६।।

"आणि त्याच्या मनावर विषयांबाबतचे वैराग्य पुरेपूर बिंबलेले असते व ते त्याच्या कृतीतून प्रकट होते. ओकून टाकलेल्या अन्नाची जशी शिसारी येते किंवा प्रेताला कवटाळायला जसे कोणीही पुढे होत नाही; विष जसे कोणालाही खाववत नाही; जळत्या वास्तूत प्रवेश करायला जसा कोणी धजावत नाही; वाघाच्या गुहेत ज्याप्रमाणे कोणी वस्ती करायला तयार नसतो; उकळत्या लोहरसात जशी उडी घालवत नाही; अजगराची उशी करायला जसा कोणीही धजावत नाही; हे अर्जुना! या सगळ्यांप्रमाणेच त्या ज्ञानी पुरुषाला विषयांची समूळ नावड असते; तो इंद्रियभोगांद्वारे मनाला विषयसुख पुरवत नाही."

पुढे ज्ञानेश्वर सांगतातः

जेयांचां मनीं आलस्य। देहीं अति कार्श्य।
यमदमीं स्वारस्य। जेयांसीं गां।।१३-५१७।।
तपोव्रतांचां मेलावा। जेयांचां ठाईं पांडवा।
युगांतु जेया गांवा-। आंतु येतां।।५१८।।
बहु योगाभ्यासीं हांव। विजनाकडे धांव।
न साहे जो नांव। सांघाताचें।।५१९।।
नाराचाचि आंथुरणें। पूयपंकीं लोलणें।
तैसें लेखी भोगणें। ऐहिकींचें।।५२०।।

"ज्याच्या मनात विषयोपभोगांबाबत पूरेपूर आळस भरलेला असतो; देह पण मनापासून यमनियमादी पाळल्याने व इंद्रियनियमन केल्याने कृश झालेला असतो; ज्याने तप व व्रतांचे बहुल आचरण केलेले असते; ज्याला विजनवासाची इतकी आवड असते की लोकवस्तीत प्रवेश करतांना युगांत ओढवल्याइतके त्याला दुःख होते; ज्याला योगाभ्यासाची हाव असते; जो सतत वनांतरीच वास्तव्य करणे पसंत करतो व मनुष्यसमुदायाचे नांवही कानी पडू देत नाही; ऐहिक भोग ज्याला तीक्ष्ण बाणांच्या शय्येप्रमाणे दुःखद आणि घाणीत लोळण्यासारखे किळसवाणे वाटतात;" आणि

स्वर्गातैं मानसें। ऐकोनि मानीं ऐसें।
कुहिलें पिशित जैसें। श्वानाचें कां।।१३-५२१।।
तैं हे विषयवैराग्य। जैं आत्मलाभाचें भाग्य।
येणें ब्रह्मानंदायोग्य। जीव होती।।५२२।।
ऐसा उभयभोगीं त्रासु। देखसीं जेथ बहुंवसु।
तेथ जाण रहिवासु। ज्ञानाचां तूं।।५२३।।

"स्वर्गातील उपभोगांचे साधे वर्णनही ज्याला मेलेल्या कुत्र्याच्या सडलेल्या मांसाप्रमाणे घाणेरडे वाटते; अशा प्रकारचे जे विषयवैराग्य असते, ते म्हणजे आत्मप्राप्ती करून देणारे सुदैवच जणू साक्षात

अवतरलेले असते. हे प्राप्त झालेले जीव ब्रह्मानंद मिळवण्यास पात्र ठरतात. ऐहिक व पारलौकिक अशा दोन्ही प्रकारच्या सुखोपभोगांविषयी ज्याचे मन पूर्णतया विरक्त झालेले असते, त्याच्याठायी ज्ञानाचे वास्तव्य असते; अर्जुना! हे तू नीट जाणून अस."

११)अनहंकारित्व

असा तो ज्ञानाचा पुतळा असलेला पुरुष कसा ***अनहंकारी*** असतो, त्याचे गुणवर्णन पहाः

आणि सचाडाचिएं परी। इष्टापूर्तें करी।
परि केलेपण शरीरीं। वसों ने दी।।१३-५२४।।
वर्णश्रमपोषकें। कर्में नित्यनैमित्तिकें।
तेयांमाजीं काई न ठकें। आचरितां।।५२५।।
परि हे मियां केलें। कीं हे माझेनि जाहलें।
ऐसें नाहीं ठेविलें। वासनेमाजीं।।५२६।।
जैसें अवचितपणे। वायूसि सर्वत्र विचरणें।
कां निरभिमान उदैजणें। सूर्याचें जैसें।।५२७।।
कां श्रुति स्वभावता बोले। गंगा काजेंविण चालें।
तैसें अवष्टंभहीन भलें। वर्तणें जेयाचें।।५२८।।

"आणि सकाम पुरुषाप्रमाणे इष्ट व आपूर्त शास्त्रसंमत कर्मे तो करतो. पण त्या कर्मांच्या फलात आसक्ती ठेवत नाही व आपण काही विशेष कर्म केले आहे, ही भावनासुद्धा अंगी वागवत नाही; वर्णाश्रमधर्मास अनुसरून करावयाची नित्यनैमित्तिक कर्मेसुद्धा तो काहीही त्रुटी न ठेवता करतो. परंतु या सर्व कर्मांचा कर्ता आपण आहोत किंवा आपण केल्यानेच हे कार्य झाले, असा अहंकार त्याच्याजवळ नसतो. वायू जसा स्वभावतःच सर्वत्र विचरतो; सूर्य जसा आपले उगवण्याचे नित्यकर्तव्य निरहंकारी वृत्तीने पार पाडतो; वेद स्वभावतःच जसे बोलके आहेत; गंगा जशी काहीही प्रयोजन मनात न ठेवता वाहत जाऊन प्राणीमात्रांना जीवनदायी होते; तसेच त्या ज्ञान्याचे सर्व कर्म अहंकाररहित असते."

ऋतुकालीं तऱ्हीं फलती। परि फललीं हे नेणती।
तेयां वृक्षांचिये ऐसीं स्थिती। कर्मीं सदा।।१३-५२९।।
एवं मनीं कर्मीं बोलीं। जेथ अहंकारा उखी जालीं।
एकावलीची काढिली। दोरी जैसीं।।५३०।।
संबंधेवीण जैसीं। अभ्रें असती आकाशीं।
देहीं कर्में तैसीं। जेयासि गां।।५३१।।

"वृक्षांस योग्य ऋतुकाळी फले लगडतात; पण आपल्या फळांचा स्वाद कसा आहे, ते वृक्ष जसे जाणत नाहीत; तशीच त्या पुरुषाची कर्मांबद्दलची सदा प्रवृत्ती असते. त्याने केलेल्या कर्मालाही यथाकाल फळ प्राप्त होते; पण तो कर्मफलाची अपेक्षा करत नाही. आणि त्याकडे ढुंकूनही पाहत नाही. किंबहुना त्याला कर्मफलात अजिबात गोडी नसते. माळेस गुंफणारा धागा काढून घेतल्यावर त्यातील मणी जसे गळून पडतात, त्याचप्रमाणे मन, वाचा व कर्म यांना गुंफणारा अहंकाररूपी सर त्याने काढून टाकलेला असतो. ढग जरी आकाशात दिसले तरी आकाशाचा जसा त्यांच्याशी काहीही संबंध नसतो, तसाच त्याचा देहाद्वारे होणाऱ्या कर्मचेष्टांशी कोणताही संबंध नसतो."

मद्यपाआंगीचें वस्त्र। लेपाहातींचें शस्त्र।
बैलावेरी शास्त्र। बांधलें आहे।।१३-५३२।।
तेयां पाडें देहीं। आहे हे सेंचि नाहीं।
निरहंकारता पाही। नांव तेयां।।५३३।।
हे संपूर्ण जेथ दिसें। तेथेंचि ज्ञान असे।
इयें विखीं अनारिसें। बोलों नये।।५३४।।

"मद्यप्याला जशी वस्त्राची शुद्ध नसते; चित्रातील मनुष्याला किंवा शिल्पाकृतीला जसे त्यांच्या हाती दाखवलेल्या शस्त्रांचे भान नसते; किंवा बैलावर लादलेल्या ओझ्यात जरी शास्त्र इ.विषयांवरील ग्रंथ खच्चून भरलेले असले, तरी तो जसा त्यातील ज्ञानाला पारखाच राहतो; त्याचप्रमाणे त्या थोर पुरुषाला आपण देहात वास्तव्य करत आहोत, याची साधीशी जाणिवही नसते. याच वृत्तीला खरे तर ***निरहंकारता*** म्हणतात. ही वृत्ती जेथे आपल्या संपूर्ण ऐश्वर्याने प्रकट होते, तेथेच ज्ञान असते. याबाबत दुमत असणे शक्य नाही."

साधकांची द्वैत व अद्वैत अनुभूति

अशा रीतीने श्रीज्ञानदेव ***निरहंकारी*** पुरुषाचे समुचित वर्णन करतात. त्यांचा आत्मतत्त्वविवेकासंबंधीचा विचार उमगण्यास याने फार साहाय्य होते. देहात असूनही त्याची जाणीवही नसणे हे एक निरहंकारितेचे प्रमुख लक्षण लक्षात ठेवण्यासारखे आहे. ***देह म्हणजेच मी*** ही मिथ्याभावना असल्याचे त्यांनी सूचित केले आहे. प्रपंचाचे वा विश्वाचे अस्तित्व ते केवळ द्वैतात्मक दृष्टीनेच मान्य करतात, हेही लक्षात ठेवले पाहिजे. अद्वैत दृष्टिसापेक्ष असे पृथक अस्तित्व ते मान्य करत नाहीत.

ज्ञानदेवांचे वाङ्मय अभ्यासतांना आपणांस असे जाणवते की तत्त्वविचार करतांना सर्वसामान्य साधकांच्या पातळीवर द्वैताचा आविष्कार ***विश्व व मी*** या पृथक बोधाने होत असतो, हे लक्षात ठेवूनच ते अद्वैताचा विचार प्रतिपादितात. ***"अहं ब्रह्मास्मि", "तत् त्वम् असि", अयमात्मा ब्रह्म", "सर्वं खलु इदं ब्रह्म"*** इ.महावाक्येसुद्धा अशीच द्वैतपर भाषा वापरत सामान्य जनांस *अद्वैत* सांगतांना दिसतात.

खरे तर ज्ञानदेवांचा ***चिद्विलास*** हासुद्धा तत्त्वज्ञान होण्याच्या मार्गावरचा एक अनुभूतिपूर्ण असा टप्पा आहे. अज्ञान्यास द्वैताची प्रतीती येत असते. सर्व जग खरोखरच अस्तित्वात आहे; जे दिसते, भासते, प्रकाशते, ते सर्व सत्यच आहे; मी कोणी विश्वाहून वेगळा आहे; इंद्रियगोचर अशा या विश्वाच्या पसाऱ्यात किंवा त्यामागे कोणतेही सूक्ष्म तत्त्व नाही; अथवा समजा तसे काही तत्त्व असलेच तर ते, मी व विश्व ही पृथग्पृथक आहोत; मीच कर्ता, भोक्ता आहे; सर्व वस्तू

माझ्या सुख वा दु:खाकरता आहेत; अशा प्रकारचे विचार अज्ञान्याच्या पातळीवरील द्वैताच्या प्रतीतीत मोडतात.

त्याहूनही प्रगत झालेल्या साधकासही ही द्वैत प्रतीती येतच असते. पण तो ***मी, विश्व व तो*** असे तिन्ही आहोत आणि हे तिन्ही जरी पृथग्पृथक भासलो तरीही हे सर्व तोच आहे; हा सर्व त्याचाच विलास आहे; त्याची इच्छा आहे म्हणून मी व विश्व त्याच्याहून वेगळे भासतो किंवा असतो; तोच या अखिल ब्रह्मांडाच्या व त्यातील ***मी***च्या रूपाने विनटला आहे; तोच वस्तुतः कर्ता, भोक्ता व सर्व काही आहे; ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** हाच तत्त्वविचार आहे; अशा प्रकारच्या ***चिद्विलास***पर निष्कर्षावर येतो.

अजूनही पुढे प्रगत झालेल्या साधकास हाच ***चिद्विलास*** प्रत्यक्ष अनुभूतीस येतो; तो तत्त्वविचार केवळ वैचारिक किंवा सैद्धान्तिक पातळीवर राहत नाही, त्याच्या प्रत्यक्ष कृतीतून प्रकट होतो. याच पातळीवर त्याला परमात्म्याचा विश्वात्मक पातळीवर साक्षात्कार घडतो. अनन्यशरणतेची खरी भावना याच पातळीवर प्रकटते. विश्वात तो त्यातीलच एक व त्याच्याशी अभिन्न असा होऊन विचरतो. खऱ्या आनंदाची स्थूल मानाने व उत्तरोत्तर सूक्ष्मतेने त्याला ओळख होत जाते, ती याच विशिष्ट पातळीवर!

"सर्वं खलु इदं ब्रह्म" या श्रुतीचा साक्षात अनुभव त्याला सर्वकाळ येत असतो. ***सोऽहं*** भावाची उपासना करण्याची पातळी याच भावात प्रकटते. महावाक्यांचा - ***"अयमात्मा ब्रह्म", अहं ब्रह्मास्मि"***, इ.चा प्रत्यक्ष बोध त्याला तेव्हाच होतो.

निरहंकारिता

यानंतरच्या अंतिम पातळीवर वृक्षावरची वाळलेली पाने जशी आपोआपच गळून पडावी तसा त्या साधकाचा अहंकार गळून पडतो व त्याला ***निरहंकार*** वृत्ती प्राप्त होते. खरे तर ही वृत्ती चित्ताची वृत्ती म्हणून नाहीच! ज्ञानदेवही म्हणूनच या अवस्थेला निरहंकार वृत्ती वा भावना न म्हणता ***निरहंकारिता*** असा शब्दप्रयोग करतात. ***"सोऽहं" तेही अस्तावते*** - ते याच भूमिकेवर! या स्थितीत विचरणाऱ्या जीवास साक्षात ***अद्वैत प्राप्ती*** होते.

हाच ***अद्वयभाव*** होय - अर्थातच केवळ सामान्य तत्त्वविचारक साधकांस अर्थबोध व्हावा याच दृष्टिकोनातून या स्थितीला भाव, वृत्ति, प्राप्ती, इ.सामान्य शब्दांचा प्रयोग केला जाऊ शकतो. वस्तुतः तो पुरुष ब्रह्मच होतो. ब्रह्माचे वर्णन कोण करू शकेल! ज्ञानदेवच ते वर्णन करू जाणोत!

ज्ञानदेवांचे ऋण समाजावर खरे तर हेच आहे की जे ब्रह्म वाचातीत म्हणून तत्त्वज्ञान्यात विख्यात आहे; मनाला जेथे विचार करण्यासाठी म्हणून पोहोचताही येत नाही; बुद्धीचा जेथे लाग लागत नाही; अशा त्या ब्रह्माला शब्दांकित करून त्यांनी तुमच्याआमच्यापुढे ते करतलामलकवत् स्पष्ट केले आहे.

ही ज्ञानदेवांची करणी अनुभवण्यासाठी आपल्याला ज्ञानेश्वरी व त्यांच्या *अमृतानुभव, अभंगमाला*, इ.वाङ्मयाचे परिशीलन, अध्ययन, चिंतन व मनन करणे उचितच ठरते. असो.

जन्मादी दोषलक्षणे::::

१२) जन्म - मृत्यु - वार्धक्य - रोग - दु:ख या मानवी देहाच्या दोषांपासून योग्य बोध घेणे

आता ते ***"जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम्"*** या भगवंतोक्तीकडे वळतात, ते पाहू या. ज्ञानेश्वर म्हणतातः

आणि जन्ममृत्युदु:खें। व्याधिवार्धक्यकलुषें।
इयें आंगां न येती देखें। दुरुनि जो।।१३-५३५।।
साधकु विवसियां। कां उपसर्गु योगियां।
पावे उणेयां पुरेयां। वोथंबा जेवीं।।५३६।।

जन्ममृत्युचक्र

"सतत येणारे जन्म-मृत्यू, शरीराला प्राप्त होणारे व्याधी, वार्धक्य व दु:ख, मन आणि शरीर यांची दु:खे व पातके ही आपल्यावर येऊन पडण्याआधीच तो सावध होतो व आत्मतत्त्वविवेकशील असतो. साधक जसा साधनाकाली होणाऱ्या पिशाच्चादी भ्रमांविषयी दक्ष राहून त्यापासून स्वत:ला जपतो; योगी जसा योगाला उपसर्गकारक अशा अडथळ्यांपासून बाजूस सरतो; गवंडी जसा भिंत वेडीवांकडी बांधली जाऊ नये म्हणून आधीपासूनच ओळंबा बाळगून त्याचा दक्षतेने वापर करतो; त्याचप्रमाणे आता तरी पुनः जन्म घ्यायला लागू नये म्हणून याच जन्मात तो अति दक्ष असतो."

वैर जन्मांतरींचें। सर्पा मनौनि न वचे।
तेवीं अतीतां जन्मांचें। उणें जो वाहे।।१३-५३७।।
डोळां हरलु न विरे। घायीं कोत न जिरे।
तैसें कालींचें न विसरे। जन्मदु:ख।।५३८।।

"सर्प जन्मोजन्मी मागील वैरभावना वागवतो. पूर्वजन्मांचे - पुन:पुनः जन्म घ्यायला लागण्याचे शल्यही त्याच्या मनात असेच सलत असते. डोळ्यात गेलेली धूळ जशी अश्रूंनी विरघळून जात नाही किंवा शरीरावर वार करणारे शस्त्र जसे जखमेत जिरून तिच्यासकट नाहीसे होत नाहीः त्याचप्रमाणे वारंवार जन्म घेण्याच्या दु:खाचे त्याला कधीच विस्मरण होत नाही."

म्हणे पुयगर्ते रिगाला। अहा मूत्ररंध्रे निगाला।
कटां मियां चाटिला। कुचस्वेदु।।१३-५३९।।
ऐसि ऐसियां परी। जन्माचां कांटाला धरी।
म्हणे आता न करीं। जेणें ऐसें होय।।५४०।।
परि जन्मती तैं लाज। न संडीं जेयाचें निज।
संभावितां निस्तेज। न जिरें जेवीं।।५४३।।

"त्याला असे वाटते की पुंवाने भरलेल्या गर्भाशयाच्या खोळीत मी का राहिलो व मूत्रमार्गाने - योनीद्वारे - मला का बरे यावे लागले! स्तन्य म्हणून मी आवडीने स्तनांवरील स्वेद कसा बरे चाटला! त्याच्या

वाटेला ही जी सर्व घाण आली, ती आता पुनः दुःखाला कारणीभूत होऊ नये म्हणून तो पुनर्जन्म घेण्याबाबत कंटाळलेला असतो. यासाठी या जन्मी त्याने कृतनिश्चय केलेला असतो की काहीही झाले तरी पुनः जन्माला यायला लागू नये."

हारी उमचावेयां। जुवारी जैसा ये डायां।
कीं वैरा बापाचेयां। पुत्र जचे।।१३-५४१।।
मारिलियाचेनि रागें। पाठींचा जेवीं सूड मागे।
तेणें आक्षेपें लागे। जन्मापाठीं।।५४२।।

"ज्याप्रमाणे जुगारात हरलेला मनुष्य गेलेले जिंकण्याच्या ईर्षेने नवा डाव खेळण्यास सज्ज होतो; पित्याला मारणाऱ्यांचा सूड घेण्यासाठी पुत्र जसे आकाशपाताळ एक करून सोडतो; किंवा ठार मारलेल्या माणसाच्या पाठचा भाऊ सूडकरी होऊन संधीसाठी जसा टपून बसतो; तसाच तो मनुष्य पुनर्जन्म टाळण्यासाठी झटतो. संभावित मनुष्यास ज्याप्रमाणे अपमान सहन होत नाही, त्याचप्रमाणे बुद्धिमान मनुष्यास पुनःपुनः जन्म घ्यावा लगण्याचे शल्य डांचत असते."

आणि मृत्यु फुडां आहे। तोच कल्पांती कां पाहे।
परि आजचि होये। सावधु जो।।१३-५४४।।

"कल्पांती येणारा मृत्यू का असेना! हे अगोदरच जाणून घेऊन तो पुरुष मृत्यूनंतर पुनः जन्म घ्यावा लागू नये म्हणून वेळीच सावध होऊन, पुनर्जन्म टाळण्यासाठी जे काही साधन करावयाचे, त्यासाठी फारच थोडा वेळ बाकी उरला आहे हे जाणून असतो व जे काही उचित असेल, ते करायला प्रारंभ करतो."

माजीं अथाव म्हणतां। थडियेचि पांडुसुता।
पोहोणार आयतां। कासें जेवीं।।१३-५४५।।
कां न पवतां रणाचां ठाओ। सांभालिजे जैसा आवो।
वोडण सुइजे घावो। न लगतांचि।।५४६।।
पाहेचा पेणा वाटवधां। तंव आजिचि होईजे सावधा।
जीव न निगतां औषधां। धांविजे जेवीं।।५४७।।

"जसे पुढे अथांग पाणी आहे हे जाणल्यावर पोहणारा मनुष्य आधीपासूनच त्याप्रमाणे याच तीरावर तयारी करून पाण्यात उतरतो; किंवा युद्धावर निघतांना शूर वीर जसे आपले अवधान व शस्त्रास्त्रे सांभाळून पुढचे पाऊल टाकतो; अथवा शस्त्राचा वार अंगावर पडण्याआधीच जशी ढाल पुढे करून तो झेलला जातो; उद्या ज्या वाटेवरून मार्गक्रमणा करावयाची आहे, तिच्यावर वाटमारे असल्याचे जाणण्याची दक्षता आदल्या मुक्कामीच सावध वाटसरू जशी घेतो; जीव जाण्यापूर्वीच तो वाचविण्यासाठी औषधाकरता वेळीच धावाधाव जशी करावी; या सर्वासारखीच मृत्यू प्राप्त होण्यापूर्वीच तो मनुष्य पुढला जन्म घ्यावा लागू नये याची तजवीज करून ठेवण्याची दक्षता बाळगतो."

एरवीं ऐसें घडे। जो जलतां घरीं सांपडे।
तो मग न पवाडे। कुहा खणों।।१३-५४८।।
चोंढियें पाथरु गेला। तैसेनि जो बुडाला।
तो बोंबेहीसकट निमाला। कोण सांगें।।५४९।।
म्हणौनि समर्थेसीं वैर। जेयां पडिलें हाडखईर।
तो जैसा आठहीं पाहर। परजूनि असे।।५५०।।
ना तऱ्हीं केलवलीं नोवरी। कां संन्यासी जियापरी।
तैसा न मरतां जो करी। मृत्युसूचना।।५५१।।

"नाही तर असे होईल की जळत्या घरात सापडल्यावर विहीर खणणे सुरू करणे जसे मूर्खपणाचे ठरते; किंवा खोल पाण्यात दगड जसा बुडतो, तसे बुडाल्यावर आरडाओरडा करून काय उपयोग! म्हणून ज्याप्रमाणे समर्थ माणसाशी हाडवैर आले असता मनुष्य जसा सर्वदा शस्त्रसज्ज राहतो; किंवा गडगनेर झालेली कुमारी नोवरी सासरी जाण्यासाठी जशी मनाची तयारी करते; अथवा संन्यासी संन्यास घेऊन जशी संसाराची आसक्ती सोडण्यास सिद्ध होतो; त्याप्रमाणेच तो धीर पुरुष प्रत्यक्ष मरण येण्यापूर्वीच पुनः जन्ममृत्यूच्या चक्रात सापडावे कागू नये याची तयारी करून ठेवतो."

पैं गां जो ययापरी। जन्मेंचि जन्म निवारी।
मरणें मृत्यु मारी। आपण उरे।।१३-५५२।।
तेयां आथीं ज्ञानाचें। सांकडें नाहीं सांचें।
जेयां जन्ममृत्युचें। हृदयीं शल्य।।५५३।।

"जन्ममृत्युचक्रात सापडल्याचे ज्याच्या मनात शल्य डाचत असते, तो या जन्मातील कर्तृत्वानेच पुढे येणारे जन्म टाळतो व येणाऱ्या मृत्यूनेच पुढील मृत्युमालिकेचा भंग करतो; जन्ममृत्यातीत अशा स्वरूपाने तो उरतो. हे अर्जुना! उद्दंड ज्ञानाचे वास्तव्य त्याच्याच घरी असते."

याप्रमाणे जन्ममृत्युरूपी प्रपंचातील दोष ज्ञात असणारा पुरुष जन्म व मृत्यूचे चक्र निवारण्यात दक्ष असतो.

वार्धक्यदोषविचार

यानंतर ***जरा*** म्हणजे ***वार्धक्य*** या दोषाचे ज्ञानेश्वर वर्णन करतातः

आणि तेयांचिपरी जरा। न टेकतां शरीरां।
तारुण्याचियां भरा-। माजीं देखें।।१३-५५४।।
म्हणे आजिचां अवसरीं। पुष्टी जैं शरीरीं।
तैं पाहे होईल कांचरी। वाललीं जैसीं।।५५५।।
निदैवाचें वेवसाए। तैसें ठाकिती हातपाए।
अमंत्रियां राज्याची परी आहे। बलां येयां।।५५६।।
फुलांचियां भोगां-। लागीं प्रेम टांगा।
तैं करेयांचां गुडघा। तैसें होईल।।५५७।।

"आणि तरुणपणीच तो हे ओळखून असतो की आज पुष्ट दिसत असणाऱ्या शरीराला वार्धक्य प्राप्त होताच ते वाळलेल्या काचरीप्रमाणे होईल. कमनशिबी माणसाचा कोणताही व्यवसाय जसा आतबट्ट्याचा ठरतो, त्याप्रमाणेच वार्धक्य आले की हातापायांतील बळ ओसरून त्यांना मंत्रणाहीन राज्याप्रमाणे अवकळा येईल. फुलांचा सुवास घेण्यास

चटावलेल्या या नाकाचा सुरेख आकार बिघडून जाऊन ते उंटाच्या गुडघ्यासारखे बेढब दिसू लागेल."

वोढालांचां खुरीं। आखरु आतें बुरीं।
तैं दशा माझां शिरीं। पावेल गां।।१३-५५८।।
पद्मदलेंसि इसालें। भांडताती जैं हे डोलें।
तैं होती पडवळें। पिकलीं जैसीं।।५५९।।
भंवईंचीं पडलें। वोमथती सिनसालें।
उरु कुहिजैल जलें। आंसुवांचेनि।।५६०।।

"गोठ्याच्या ओढीने सायंकाळी परतणारी गुरे आपल्या खुरांनी वाटेवरल्या तृणाची जशी दशा करून टाकतात, तशीच दशा माझ्या सुंदर मस्तकी सुशोभित दिसणाऱ्या आजच्या केशकलापाची होईल. कमळाशी स्पर्धा करणारे माझे नेत्र पुढे पिकल्या पडवळाप्रमाणे निस्तेज दिसू लागतील. तारुण्योन्मादाने चढणाऱ्या या धनुष्याकृती भुंवयांचे केस वाळलेल्या झाडांच्या फांद्यांसारखे वेडेवांकडे लोंबू लागतील. कारणाशिवाय डोळ्यातून सतत वाहणाऱ्या अश्रूंनी ऊर भिजून जाईल."

जैसें बकुलिंचें खोड। गिरबडूनि जाती सरड।
तैसें पिचडी तोंड। सरकटिजैल।।१३-५६१।।
रांधवणी वोलीफुडें। पन्हें उन्मादिती खातवडे।
तैसीचि यें नाकाडें। लिडबिडतील।।५६२।।
तांबुलें ओठ राऊं। हांसतां दांत दाऊं।
सनागर मिरऊं। बोल जेणें।।५६३।।

वार्धक्यात होणारी तोंडाची अवदशा वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः "ज्याप्रमाणे बाभळीचे खोड सरडे गिरबडून टाकतात, तसे सगळे तोंड थुंकीच्या फवाऱ्याने लडबडून जाईल. स्वयंपाकाच्या चुलीपुढील चरात खरकटे, पाणी इ.सांठून जशी दुर्गंधी येऊ लागते, तशीच नाकात शेंबूड लिडबडून जाऊन घाण येऊ लागेल. ज्या मुखाचे ओठ आज मी तांबुलाने रंगवीत आहे; हसतांना शुभ्र, बळकट दंतपंक्ती अभिमानाने मिरवतो आहे; जिभेने सुसंस्कृत शैलीदार भाषा बोलतो आहे आणि आपल्या वक्तृत्वाने बोलणे बहारीचे करतो आहे; ते सर्व कळाहीन होईल."

तेयांचि पाहे या तोंडा। येईल जलंबटाचां लोंढा।
इयां उमलती दाढा। दांतांसहही।।१३-५६४।।
कुलवाडी रिणें दाटलीं। कां वांकडियां ढोरें बैसलीं।
तैसें नुठेल काईं केली। जीभचि हें।।५६५।।
कुसलें कोरडीं। वारेनि जातीं बरडीं।
तैसीं आपत्ति तोंडीं। दाढियेंसीं।।५६६।।
आखाडीचेनि जलें। जैसीं झिरपती शैलाची मौलें।
तैसें खांडीहूनि लालें। पडती पूर।।५६७।।

"म्हातारपणी याच मुखातून लाळेचा लोंढा येत राहील आणि लोकांना किळस येईल. दाढा व दांत पडून जातील. अफाट कर्जाने शेतकीचा उदीम जसा ठप्प बसावा; किंवा पावसाची झड लागली की आडोशाला बसलेली गुरे जशी जागचे उठण्याचे नांवही घेत नाहीत; त्याचप्रमाणे म्हातारपणी काही केल्या जीभ जागच्या जागी वळणारसुद्धा नाही, मग सुश्राव्य बोलणे कुठले! माळरानात गवताची कुसे अस्ताव्यस्त पडावी तशी अवस्था आज नीट निगा राखलेल्या या दाढीच्या केसांची तेव्हा होऊन जाईल. आषाढाच्या पावसाच्या झडीत पर्वतांची शिखरे जशी पाणलोटांनी पाझरतात, तसे दातांच्या खिंडारातून लाळेचे लोटच्या लोट वाहू लागतील."

वाचेसि अपवाडु। कानीं अनघडु।
पिंडु गरुवा माकडु। होईल हा।।१३-५६८।।
तृणाचें बुजवणें। आंदोलें वारेगुणें।
तैसें येईल कांपणें। सर्वांगासीं।।५६९।।
पायें पडती वेंगडीं। हात वलतील मुरकुंडी।
बरवेपण बागडी। नाचविजैल।।५७०।।
मळमूत्रद्वारें। होऊनि ठाकती खोंकरें।
नवसियें होती इतरें। माझां निधनीं।।५७१।।
देखोनि थुंकील जगु। मरणाचां पडैल पांगु।
सोयरियां उबगु। येईल माझां।।५७२।।

"पेंढा भरून केलेले बुजगावणे वाऱ्याच्या जोराने जसे हलते, तशीच म्हातारपणाच्या भराने माझी ही काया थरकापेल. बोलतांना जीभही लडखडेल. लोकांचे बोलणे ऐकण्यास कान अक्षम होतील. शरीराकृती माकडासारखी दिसू लागेल. चालतांना पावले वेडीवाकडी पडू लागतील. हातांना कापरे भरेल. सध्या दमदार दिसणारे हे शरीर मग सोंगासारखे हलताडुलतांना दिसेल. मलमूत्रद्वारे फुटक्या भांड्यासारखी होतील आणि लोक मला उबगून जाऊन मी केव्हा मरतो म्हणून वाट पाहत बसतील. माझे शरीर घाणीने अस्वच्छ होऊन दुर्गंधी सुटेल आणि लोकांना माझी किळस येईल. अगदी जवळचे नातेवाईकही मला कंटाळून जातील!"

स्त्रियां म्हणती विवसीं। बालें जाती मूर्च्छीं।
किंबहुना चिलसीं। पात्र होईन।।१३-५७३।।
उभलीचां उजगरा। सेजेयां साइलियां घरां।
शिणवील हा म्हातारा। बहुतांतैं।।५७४।।

"लोकांच्या किळसेला मी पात्र होईन. माझे भयाण रूप पाहून बायकांना मी पिशाच्चासारखा वाटेन आणि मला पाहून लहान मुले बेशुद्ध होतील. खोकल्याच्या उबळीने शेजारपाजारच्यांची झोपमोड होऊन ते म्हणू लागतील की हा थेरडा लोकांना फार शिणवणार आहे. आपले वार्धक्य स्वतःला आणि इतरांना कसे त्रासदायक होणार आहे, याचा तरुणपणीच असा विचार करून शरीरसुख किती नश्वर आहे हे त्याला वेळीच कळून येते."

ऐसीं वार्धक्याची सूचणीं। आपणियां तरुणपणीं।
देखें मग मनीं। विटे जो गां।।१३-५७५।।

म्हणें पाहें हे येईल। आणि आतांचें भोगितां जाईल।
मग काय उरेल। हितालागीं।।५७६।।
म्हणोनि नाईकणें पावें। तंव आइकौनि घालीं आघवें।
पंगु न होतां जावें। तेथ जाये।।५७७।।

"उपभोगांना तो विटून जाऊन म्हणू लागेल की हे तारुण्य भोगताभोगता कधीच सरून जाईल आणि वार्धक्य जेव्हा दार ठोठावू लागेल, तेव्हा मला स्वहिताकरता काहीच करता येणार नाही. म्हणून बहिरेपणा येण्याआधीच जे काही परमार्थपर विचार श्रवण करावयाचे ते तो करून घेतो. तसेच पंगुपणा येण्याआधीच देवदर्शन, तीर्थयात्रा वगैरे जे काही करावयाचे ते करून घेतो."

दिठी जंव जाये। तंव पहावें तेतुलें पाहे।
मूकत्वा आधी वाचा वाहे। सुभाषितें।।१३-५७८।।
हात होती खुलें। हे पुढील मोटकें कलें।
आणि करूनि घालीं सकलें। दानादिक।।५७९।।
तेधवां ऐसीं दशा येईल फुडें। तैं मन होईल वेडें।
तंव चिंतूनि ठेवीं चोखडें। आत्मज्ञान।।५८०।।

"दृष्टी अधू होण्यापूर्वीच जे काही वाचन, पारायण, अध्यात्मग्रंथ परिशीलन करावयाचे ते तो करून घेतो; जे काही पहावयाचे, ते सर्व तो पाहून घेतो. जीभ नाठाळ होण्याआधीच जे काही स्तोत्र, मंत्र, जप, पठन इ.करावयाचे ते तो करून घेतो. हात खुळे होण्याआधीच दानादी पुण्यकर्मे करून ठेवतो. अशी घोर दशा म्हातारपणी प्राप्त होणार, हे आधीच जाणून तो आताच योग्य तसा वागतो. तेव्हा मनाला नीट विचार करण्याचे सामर्थ्य राहणार नाही, हे जाणून आताच चांगली तत्त्वज्ञाने अभ्यासून आत्मज्ञानाचे चिंतन करून ठेवतो."

जैसें चोर पाहे झोंबती। तंव आजिचि रुसिजै संपत्ती।
कां झांकाझांकीं वाती। न वचतां कीजे।।१३-५८१।।
तैसें वार्धक्य यावें। मग जैं वायां जावे।
तैं आतांचि आघवें। सवतें केलें।।५८२।।
आतां मोडूनि ठेलीं दुर्गे। कां वलित धरिलें खगें।
तेथ उपेक्षूनि जो रिगे। तो नागवला कीं।।५८३।।

"चोर उद्या आपल्यावर तुटून पडतील, म्हणून जशी आजच आपली संपत्ती आपल्यापासून दूर करावी; किंवा दिवा गेला नाही तोच झाकपाक करून ठेवावी; त्याप्रमाणे वार्धक्य आल्यावर अवघेच आयुष्य वाया जाऊ नये म्हणून जो आजच तरुणपणी परमार्थाची काळजी घेतो, तो संध्याकाळी जो किल्ल्याचा आसरा घेत नाही तसा किंवा पक्षी घरट्यात न परतता रात्री झाडाझुडपात बसून राहिले तर जसे नागवले जातात, तसा फसत नाही."

तैसें वृद्धाप्य होये। आलेंपणें वायां जाये।
जो तो शतवृद्ध आहे। नेणों कैंचां।।१३-५८४।।
झाडिलीं कोलें झाडी। तेयां न फलें जेवीं बोंडीं।
जाहला अग्नि तऱ्हीं राखोंडी। जालील काईं।।५८५।।
म्हणौनि वृद्धाप्याचेनि आठवें। वृद्धाप्या जो नागवें।
तेयांचां ठायीं जाणावें। ज्ञान आहे।।५८६।।

"वार्धक्य आले की मनुष्य शतायुषी जरी असला तरी ते व्यर्थच आहे. एकदा तिळाचे बोंड तिडकले की त्यातले तीळ इतस्ततः विखरून जातात; अग्नी झाला तरी राखेला जाळू शकत नाही; हे लक्षात ठेवून तारुण्य आहे तोवरच त्याचा परमार्थसाधनासाठी उपयोग करून घेणारा, वृद्धापकाळाची जाणीव ठेवून आयुष्य विखरून जाऊ देत नाही व म्हणून वार्धक्याकडून नागवला जात नाही. खरे तर असा मनुष्य वृद्धाप्यासच नागवतो."

व्याधिदोष

यानंतर **व्याधिदोषा**चे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

तैसेंचि नाना रोग। पडिघाती फुडां आंग।
तंव आरोग्याचां उपेग। करूनि घाली।।१३-५८७।।

"त्याचप्रमाणे तो सुबुद्ध माणूस नाना रोगांनी शरीर ग्रासले जाण्यापूर्वीच आरोग्याचा उपयोग परमार्थप्राप्ती करून घेण्यासाठी करून घेतो."

आता दुःख या दोषाबद्दल ऐकाः

सापाचां तोंडीं। पडिली जैं उंडी।
तैं लाऊनि सांडीं। प्रबुद्ध जैसा।।१३-५८८।।
तैसा वियोगु जेणें दुःखें। विपत्ति शोक पोखें।
तैं स्नेह सांडूनि सुखे। उदासु होये।।५८९।।

"सापाचे तोंड लागलेले खाद्यपदार्थ शहाणा मनुष्य जसे टाकून देतो, त्याप्रमाणे ज्या ममतेच्या योगाने वियोग, दुःखे व शोक प्राप्त होतात, ती ममताच टाकून देऊन समाधानी वृत्ती ठेवणारा व सर्वत्रांप्रत उदासीन राहणारा मनुष्य सुखात राहतो."

अशा प्रकारे जरा-वार्धक्य-दुःख इ.विविध दोष प्राप्त झाले असता निग्रह करणाऱ्या प्रबुद्ध पुरुषाला उद्देशून ज्ञानदेव म्हणतात कीः

आणि जेणेंजेणेंकडे। दोष सूदतील तोंडें।
तेयां कर्मरंध्रां गुंडे। नियमाचें दाटी।।१३-५९०।।
ऐसिसियां आइती। जेयाची परी असती।
तोचि तो ज्ञानसंपत्ति। गोसांवी गां।।५९१।।

"आणि ज्या ज्या इंद्रियांच्या आचरणाद्वारे परमार्थमार्गापासून दूर भटकण्याचा दोष निर्माण होतो, त्या त्या इंद्रियाचे तोंड नियमाचा धोंडा त्यात कोंडून तो बंद करतो. अशा प्रकारे सर्वदा जो दक्षता बाळगतो व सर्व प्रकारच्या नागवणुकीपासून जपतो, तोच ज्ञानरूप संपत्तीचा धनी असतो असे, हे अर्जुना! तू निश्चित समज."

विस्तृत विवेचनामागील ज्ञानदेवांची धारणा

असे जवळ जवळ ८० ओव्यांमधून ज्ञानदेव श्रीकृष्णांच्या ***"जन्म-मृत्यु-व्याधि-दुःखदोषानुदर्शनम्"*** या पदाचे विवरण करतात. ***अहिंसा, आचार्योपासन*** यांचे याचप्रमाणे बऱ्याच ओव्यातून वर्णन

केलेले आपण मागेच पाहिले आहे. त्यात आचार्योपासनेकरता जवळजवळ नव्वद ओव्यातून, तर अहिंसेबाबत अदमासे शंभर ओव्यातून विवेचन केलेले आढळते. अहिंसा प्रकरणी एवढ्या ओव्या रचण्यामागचे ज्ञानदेवांचे स्पष्टीकरण आपण पूर्वीच पाहिले आहे.

आचार्योपासन हा तर ज्ञानदेवांचा अत्यंत आवडीचा विषय - त्यांचे सर्वस्वच! तेराव्या अध्यायांतर्गत केलेल्या उण्यापुऱ्या शंभर ओव्यांव्यतिरिक्त इतर अध्यायातील त्यांच्या अंदाजे अडीचशे गुरुप्रशस्तिपर ओव्याही आपण पहिल्या स्कंधात अवलोकिल्या होत्याच. ज्ञानेश्वरीच्या अंदाजे एकूण *नऊ सहस्त्र* ओव्यांपैकी *पाचशे ते सहाशे* ओव्या ***गुरुभक्ती, गुरुप्रशस्ती वा गुरुशिष्य*** संबंधावर प्रकाश पाडणाऱ्या अशा धरता येतात.

म्हणजे काहीकाही अध्यायांच्या वाटेला आलेल्या ओव्यांच्या संख्येच्या जवळजवळ दुपटीहूनही जास्त ओव्या *(अ.क्र. १,३,४,५,७, ८,१० व १२)* व काहीकाही मोठ्या अध्यायांच्या ओवीसंख्येहूनही जास्त ओव्या *(अ. क्र. २,६,९,११,१४,१५,१६व १७)* किंवा तेवढ्याच ओव्या ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत ***गुरू*** या एकाच विषयास अर्पण केलेल्या दिसतात.

उरलेले *तेरावा* अध्याय*(११६९ओव्या)* व *अठरावा* अध्याय *(१८१०ओव्या)* हे ज्ञानेश्वरीतील सर्वात मोठे अध्याय आहेत. त्यांच्या पण अनुक्रमे १/२ व १/३ एवढ्या संख्येच्या या ओव्या होतात. एकूण गुरुभक्तिपर ओव्यांची ज्ञानेश्वरीतील संख्या नक्कीच लक्षणीय आहे.

या सर्व विवेचनावरून लक्षात येईल की जेव्हा ज्ञानदेव एखाद्या विषयाला पन्नास किंवा अधिक ओव्या देत असतील, तर त्यामागे काही विवक्षित हेतू किंवा त्या विषयाचे अनन्यसाधारण महत्त्व असलेच पाहिजे. गीतेच्या *(१३-७,८,९,१० व ११)* या पाचच श्लोकांवर त्यांनी जवळजवळ *सातशे* ओव्या रचल्या आहेत व गीतेची एकूण श्लोकसंख्या *सातशे* आहे, तर ज्ञानेश्वरीची ओवीसंख्या जवळजवळ *नऊ सहस्त्र* आहे. *यावरून श्रीकृष्णोक्त **अमानित्वादी** गुणांस ज्ञानदेवांच्या लेखी किती महत्त्व आहे, हे कळून येते.*

असाच काहीसा भाग त्यांनी ***पंथराज*** व ***क्रमयोग*** या आणि ***कुंडलिनीसंबंधित*** *योगाच्या* वर्णनाकरता बऱ्याच ओव्यांचा प्रयोग करून केलेला दिसतो. त्यावरून ज्ञानदेवांच्या जिव्हाळ्याच्या तसेच साधकांच्या हिताच्या दृष्टीने कोणते विषय ते अत्यंत महत्त्वाचे समजतात, त्याची कल्पना सुजाण जिज्ञासूंना सहजच येते.

गुरु, कुंडलिनी व पंथराज-क्रमयोग, ज्ञानी पुरुष व त्याची कथनी-रहनी-सहनी, कर्म, ज्ञान, भक्ती व योग हे त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय असल्याचे आपणांस यावरून प्रतीत होते. यांव्यतिरिक्त इतर कोणत्या विषयांस ते अधिक महत्त्व देतात, ते प्रसंगोपात्त पुढे येईलच. सुज्ञ तर त्यांचा अधिक शोध आपल्या स्वतंत्र बुद्धिमत्तेने स्वतःच घेऊ शकतात. पण हा एक अति महत्त्वाचा विद्वानांनी सहसा दुर्लक्षिलेला मुद्दा मनावर नीट ठसवून घेत आपल्या अभ्यासाच्या पुढील भागाकडे वळू या!

आणखीही एक गोष्ट विसरता कामा नये. ज्ञानदेव जरी या विशिष्ट विषयांना अधिक महत्त्व देत असले तरी त्यांचा एकूण ओघ या सर्वच विषयांचे सामरस्य साधण्याकडे आहे. योगविषयक कोणतीही साधीसुधी बाब अनुल्लेखित राहू नये याची त्यांनी पुरेपूर दक्षता घेतली आहे. परमार्थाच्या प्राप्तीसाठी जे जे आवश्यक आहे, ते ते त्यांनी कोठे ना कोठे नक्कीच सांगितले आहे. तसे म्हटले तर **ज्ञानदेवांचा एकूण गीतानिरूपणाचा अवकाश विस्तृत असूनही समन्वयात्मक व एकसंधच - *Holistic, Unified, Symbiotic* - असा असल्याचे आपणास जाणवते. असो.**

"बुडतां हे जन। देखवे ना डोळां "

जन्म-मृत्यु-जरा-व्याधि व दुःख या दोषांचे येवढे सविस्तर वर्णन करण्यामागचा ज्ञानेशांचा उद्देश स्पष्टच दिसतो. सर्व प्राणी कर्मफलाच्या आसक्तीमुळे व कर्मचक्रात सापडल्यामुळे जन्ममृत्यूच्या व तदनुषंगाने जरा, व्याधि व दु:ख यांच्या आवर्तनात अडकलेले आहेत. पण त्यांना त्यामागची कारणपरंपरा अवगत नाही. मनुष्यजन्मातच त्यांना सारासारविवेकबुद्धी प्राप्त होऊ शकते. परंतु तोही जन्म पशुपक्ष्यादी प्राण्यांप्रमाणे उपभोग व देहादींसाठीच खर्च केल्याने जनसामान्यांस तो सार्थकी लावता येत नाही.

एवढ्या चौऱ्यांशी लक्ष योनींतून फिरून आल्यावर मिळालेल्या या दुर्लभ नरजन्माचा लोकांकडून होणारा नाश या संतश्रेष्ठांना पाहवत नाही. त्यांना खडबडवून जागे करण्यासाठीच या दोषांचे वास्तव दर्शन करून देणाऱ्या सविस्तर ओव्यांची त्यांना रचना करणे भाग पडलेले आहे. निदान ज्ञानेश्वरांवर श्रद्धा ठेवणाऱ्या व ज्ञानेश्वरीचे यथासांग परिशीलन करणाऱ्या जिज्ञासूंना तरी यापासून योग्य तो बोध व्हावा हीच त्यांच्या अंतरीची अपेक्षा असली पाहिजे.

सर्वच जन जर या ओव्या मनापासून ग्रहण करतील, तर लवकरच ते परमार्थाच्या मार्गाला झडझडून लागतील, असे त्यांना वाटत असावे. जरी या ओव्या ज्ञानी म्हणजे साधनेची परिपूर्ण सांगता केलेल्या सिद्धांच्या गुणसंपदेचे वर्णन करणाऱ्या असल्या तरी त्याद्वारे सामान्य जनांना जो बोध करून घेता येतो तो पाहिला की ज्ञानेशांच्या प्रज्ञेचे हे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात येते.

अनासक्ती इ.लक्षणे::::

१३) अनासक्ती

जन्म-मृत्यू इ.चे विवेचन केल्यावर ते गीतेच्या ***"असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु। नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ।१३-९।।"*** या श्लोकांतर्गतच्या ***आसक्ती*** या विषयाकडे वळतात. ***आसक्ती*** दोन प्रकारची असते. एक म्हणजे *स्वतःच्या देहादीसंबंधी* ची व दुसरी *पुत्र-कांता-वित्त-गृह-संपत्ती* इ.संबंधीची!

ज्ञानेश्वर म्हणतातः

आतां आणिकही एक। लक्षण अलौकिक।
सांगेन आईक। धनञ्जेया।।१३-५९२।।
तऱ्हीं जो यया देहावेरी। उदासु ऐसियां परी।
उखितां जेसा बिढारीं। बैसविला आहे।।५९३।।

"एखादा उपरा मनुष्य जसा एखाद्याच्या घरी आला तर त्याला यजमानाच्या घराबद्दल जेवढी ममता वाटेल, तेवढीच ममता ज्ञानी पुरुष आपल्या देहाबाबत बाळगतो. देहाबद्दल एवढी उदासीनता बाळगणाऱ्यास पुत्र-दारा-संपत्ती इ.जी त्या देहाशीच संबंधित असतात, त्यांची काहीच तमा नसणार"; हे उघड करतांना ते म्हणतातः

कां झाडाची साउली। वाटे जातां मिनली।
घरावरी तेतुली। आस्था नाही।।१३-५९४।।
साउली सरिसीचि असे। परि असे हे नेणिजे जैसें।
स्त्रियेचे तैसें। लोलुप्य नाही।।५९५।।

"वाट चालत असता लागणाऱ्या झाडाच्या सावलीवर वाटसरूची जेवढी आस्था असते, तेवढीसुद्धा तो घरादारावर ठेवत नाही. घर म्हणजे एकाप्रकारे देहाकरता झाडासारखा एक आश्रयच असते. तसेच आपल्याबरोबर आपली सावली नेहमीच असते. पण आपण काही तिचे फार कौतुक करत बसत नाही. त्याचप्रमाणे ज्ञानी पुरुषाला आपल्या पत्नीचे जी त्याच्या छायेप्रमाणे साथ देत असते, तिचे अजिबात आकर्षण नसते. "

आणि प्रजा तैं जालीं। तियें वस्ती कीर आली।
कां गोरुवें बैसलीं। रुखातलीं।।१३-५९६।।
जो संपत्तीमाजीं असतां। ऐसा गमे पांडुसुता।
जैसा कां वाटे जातां। साक्षी ठेविला।।५९७।।

"तसेच पुत्र-कन्यादी संतती झाली, तर ती त्याला आपल्याकडे एक रात्र वसतीला आलेल्या आगंतुकाप्रमाणे वाटते. जेवढे प्रेम झाडाला आपल्या सावलीला बसलेल्या गुराबद्दल वाटेल, तेवढेच तो ज्ञानी त्या संततीबद्दल बाळगतो. आणि दैववशात जर त्याला अगणित संपत्ती प्राप्त झाली, तर तो तिच्याकडे इतक्या अलिप्ततेने पाहतो, जसे काही वाटेवर दिसलेल्या दृश्यांबद्दल वा घटनेबाबत त्रयस्थ वाटसरूने पाहावे."

किंबहुना पुंसा। पांजरियांमाजीं जैसा।
वेदाज्ञेसीं तैसा। बिहूनि असे।।१३-५९८।।
येऱ्हवीं दारा गृह पुत्रीं। नाहीं जेयां मैत्री।
तो जाण पां धात्री। ज्ञानासि गां।।५९९।।

"पिंजऱ्यातला पोपट जसा स्वैर स्वातंत्र्य उपभोगू शकत नाही, त्याचप्रमाणे तो ज्ञानी आपणांस वेदशास्त्रादींच्या आज्ञांचे बंधन मानून त्यांच्या सांगण्याबाहेर जाऊन स्वैराचरणी होत नाही. आत्मा हा देहरूपी पिंजऱ्यात वस्तीला आला आहे व वेदाज्ञारूपी गज त्या पिंजऱ्याला बसवले आहेत. पिंजऱ्यात राहूनच पोपट जसा काय ते करतो, त्याचप्रमाणे तो ज्ञानी वेदाज्ञांचे बंधन पाळतो. कारण त्याला हे पक्के माहीत असते की पिंजऱ्याबाहेर उडून जाऊन स्वैर संचार करण्यास ते गज प्रतिबंध करतात व तसा प्रयत्नसुद्धा अपायकारक ठरून देहाला क्लेश होतात."

"याप्रमाणे देह, दारा, पुत्र, गृह इ.वर ममता न ठेवणाऱ्या त्या ज्ञान्याचे हेच अलौकिक लक्षण आहे. पृथ्वी जशी प्राणिमात्रांना आधार देते, तसा तो साक्षात ज्ञानाला आधारभूत असतो, म्हणा ना!"

१४) सुख व दुःखात समचित्तत्व

यानंतर सुख वा दुःख प्राप्त झाले असता समचित्तत्व ठेवणाऱ्या ज्ञान्याची अवस्था सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणि महासिंधु जैसें। ग्रीष्मवर्षीं सरिसें।
इष्टानिष्ट तैसें। जेयाचां ठायीं।।१३-६००।।
कां तिन्हीं काल होतां। त्रिधा नोहें सविता।
तैसा सुखदुःखा चित्तां। भेदु नाहीं।।६०१।।
जेथ नभाचेनि पाडें। समत्वा उणें न पडें।
तेथचि ज्ञान रोकडें। वोलख तूं।।६०२।।

"महासमुद्र जसा वर्षाकाळी भरून जात नाही, त्याचप्रमाणे तो महापुरुष इष्टाची प्राप्ती झाली असता हर्षोत्फुल्ल होत नाही वा अनिष्टाची झाली असता चित्ताची शांती ढळू देत नाही. सकाळ, दुपार व संध्याकाळी सूर्यकिरणांचा प्रकाश जरी वेगवेगळ्या मात्रेचा असला व सकाळी उदयाला येणारा रवी जसा मध्यान्ही उच्चपदास पोहोचला व सायंकाळी अस्तंगत झाला, तरी जसा तो त्रिधा होत नाही; त्याची जशी तीन प्रकारची अवस्था होत नाही - तो तसाच अढळ, अचल राहतो, फक्त पृथ्वीच्या भ्रमणानेच त्याचे आकाशात चलन वलन झालेले दिसते - त्याचप्रमाणे सुख वा दुःख कशाच्याही प्राप्तीने त्या महापुरुषाचे चित्त दोलायमान होत नाही. काहीही झाले तरी त्याची शांती अढळच राहते."

"आकाश जसे सदासर्वकाळ -दिवसा व रात्री, वर्षा व ग्रीष्मात, ढग असतांना व नसतांना आपले गुणधर्म न बदलता तसेच्या तसेच राहते, त्याचप्रमाणे कोणत्याही प्रसंगी अचल व शांत राहणाऱ्या चित्ताच्या पुरुषाजवळच खरेखुरे ज्ञान असते, असे हे पार्था! तू निश्चित ओळख."

चित्ताचे समत्व हा गीतेत बऱ्याचदा येणारा विषय आहे. स्तुती व निंदा, लाभ व हानी, इष्ट व अनिष्ट, प्रिय व अप्रिय, सुख व दुःख, अशा कोणत्याही द्वंद्वात स्थिरचित्त राहणाऱ्या पुरुषाचे वर्णन गीतेत प्रसंगोपात्त येत राहते. समाधिस्थिती प्राप्त झालेल्या पुरुषाच्या चित्ताचा हा गुणधर्म आहे व गीतेचे मूळ उद्दिष्टच समाधिप्राप्ती हेच असल्याने याविषयी ज्ञानेश्वरीतही वेगवेगळ्या संदर्भात अनेक ओव्या येतात. त्याविषयींचे जिज्ञासूंचे समाधान त्या त्या ओव्यांचा विचार करतांना करता येईल. या ठिकाणी मात्र ज्ञानदेवांनी हा विषय संक्षेपतःच वर्णन केला आहे, असे म्हटले पाहिजे. असो.

काही महत्त्वाची परमार्थलक्षणे::::

१५) अनन्यभक्ती

यानंतर ज्ञानदेवांचा एक अत्यंत आवडीचा व गीताभ्यासकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय येतो -तो म्हणजे ***अनन्यभक्ती!*** ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी या विषयीचे पुरेपूर वर्णन केलेले आढळते. किंबहुना ***अनन्यभक्ती*** म्हणजेच ***अव्यभिचारिणी भक्ती, अद्वयभक्ती, अद्वैतभक्ती, ज्ञानभक्ती, अनन्यसिद्धाभक्ती, चौथी भक्ती, परमाभक्ती*** वा तत्सम इतर नामाभिधानांनी ओळखली जाणारी भक्तीच होय.

ही भक्ती हाच ***पंथराजुचा निमथा*** वा ***क्रमयोगाचे गंतव्य स्थान*** होय. ***भक्तियोग खरा तो हाच!*** हा ज्ञानदेवांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. इतर ठिकाणी खूपच वर्णिलेल्या या भक्तीचे सध्याचे वर्णन त्या मानाने स्वल्पच पण सरस आहे. या अनन्यभक्तीची मूळपीठिका ***ईश्वरप्रणिधान*** या पतञ्जलिप्रणीत संकल्पनेशी निगडीत झालेली आहे. *ईश्वरप्रणिधान* हा पतञ्जली नियम म्हणून सांगतात तो पुढील सूत्रातून:

शौचसन्तोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः।।२-३२।।पा.यो.सू.।।

ईश्वरप्रणिधान

ईश्वरप्रणिधानाचा हा विषय आपण काही अंगांनी पूर्वीच एकदा हाताळलेला आहे. *चित्ताच्या ध्यानादी अवस्थात प्रणवादी नाममंत्रांचा वैखरी, मध्यमा वा पश्यंती वाणीतून जप करणे; प्रणव किंवा इतर नामे तद्रूप होऊन जपणे व स्वतः आणि ईश्वर हे अभिन्नच आहोत या भावनेने त्याच्याशी एकरूप एकचित्त होणे; यांचा ईश्वरप्रणिधानात जसा समावेश करतात, तसाच व्यवहारावस्थेत सर्व कर्मे ईश्वराप्रीत्यर्थ करणे; ईश्वरार्पण बुद्धीने निष्काम अंतःकरणाने कर्म करणे; हेसुद्धा त्याच्यात मोडते.*

ईश्वरप्रणिधानाने असंप्रज्ञात समाधि पण प्राप्त होतो, असे पतञ्जलींनी सांगितले आहे:

समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।।२-४५।।पा.यो.सू.।।

ईश्वरप्रणिधानाचे हे महत्त्व पूर्णपणे जाणणाऱ्या पतञ्जलींच्या सूत्रांचा आशयच श्रीकृष्णांनी गीतेत वारंवार व प्रमुखतः बाराव्या अध्यायात प्रकट केलेला आहे, हे आपणांस गीताचिंतन करतांना जरूर जाणवते:

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि युक्तैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।
मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।
मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमो मताः।।१२-२।।
ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्न्यस्य मत्पराः।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते।।१२-६।।
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्।।१२-७।।

इ.अनेक भगवद्वचने यासाठी उद्धृत करता येतात. भक्तांना भगवंतांनी दिलेली ही आश्वासने आणि अशी वक्तव्ये जेथे जेथे येतात, तेथे तेथे त्यांच्यावर ज्ञानदेवांनी पण आपल्या वक्तृत्वाने साज चढवल्याचे प्रसंग ज्ञानेश्वरीत असंख्य आहेत व ते आपण प्रसंगोपात्त पाहूही! असो.

अनन्यभक्ती

आता अनन्य भगवद्भक्तीविषयी ज्ञानेश काय म्हणतात, ते पाहू या:

आणि मीवांचूनि काईं। आणीक गोमटे नाईं।
ऐसा निश्चयो तिईं। जेयाचां केला।।१३-६०३।।
शरीर वाचा मानस। पियाली कृतनिश्चयाचां कोश।
एक मीवांचूनि वास। न पाहती आन।।६०४।।
किंबहुना निकट निज। जेयाचें जाहलें मज।
तेणें आपणपेयां आम्हां सेज। एकी केली।।६०५।।
रिगतां वल्लभाफुडें। नाहीं आंगीं जीवीं सांकडें।
तियें कांतेचेनि पाडें। एकसरला मज।।६०६।।

"हे अर्जुना! त्या श्रेष्ठ पुरुषाच्या काया, वाचा व मन या तिहींनीही मज एका भगवंतावाचून दुसरे चांगले काहीच नाही, असा कृतनिश्चय केलेला असतो आणि त्याने अशी प्रतिज्ञा केलेली असते की तो माझ्याशिवाय आणखी कशाचीही इच्छा करणार नाही. किंबहुना त्याने आपल्या अंतर्यामी माझीच मूर्ती बसवलेली आहे; तो पूर्णतः माझ्या स्वरूपी तल्लीन होऊन राहतो. पतीजवळ कांतेला जसा काहीच संकोच वाटत नाही आणि मन व शरीरसुद्धा त्याच्यापुढे उघडे करायला ती जशी लाजत नाही, तसेच त्या भक्ताचेही असते. तो मला एकनिष्ठेने अनुसरतो आणि माझ्यापासून काहीच लपवून न ठेवता त्याच्या अंतरीचे सर्व भाव व त्याची सर्व सुखदुःखे आणि इतर सर्व काही मला न संकोचता विदित करत असतो."

मधुराभक्ती

सख्य व आत्मनिवेदन अशा ज्या भक्तिपंथाच्या दोन सर्वश्रेष्ठ अशा अंतिम भूमिका आहेत, त्या याच होत. ज्ञानदेव जेव्हा भगवंत आणि भक्त यांना अशी वल्लभ व कांतेची भूमिका कल्पून तशी उपमा देतात, तेव्हा काही अभ्यासकांचा कल त्यात ***मधुराभक्ती*** शोधण्याकडे होऊ शकतो. परंतु ज्ञानदेवांनी या प्रकाराला उत्तेजन दिले असेलच किंवा तो पुरुषांसाठी भक्ती करण्याचा सर्वश्रेष्ठ भाव आहे अशी मान्यता दिली असेलच, आणि सर्वसामान्य साधकांनी हा साधनाप्रकार चोखाळावा अशी त्यांची संमती असेलच, असे काही म्हणवत नाही.

त्यांचे गौळणी, विरहिणी या प्रकारात मोडणारे बरेच अभंगही हा मधुराभक्तिभाव प्रकट करतात. खरे तर व्रजातील गोपिका, मीराबाई, जनाबाईसारख्या भक्तोत्तमा स्त्रियांनी हा मधुराभक्तिभाव भगवंताप्रत सहजच धारण केलेला असतो.

या अर्थीच **नारदभक्तिसूत्रा**त भक्तीची व्याख्या करतांना ***"यथा व्रजगोपिकानाम्"*** असे म्हटले आहे. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. गौळण व विरहिणी या प्रकारात मोडणाऱ्या अभंगांतून ज्ञानदेवांप्रमाणेच इतर अनेक संतांनी हा भक्तिभाव प्रकट केला आहे. पण तरीही कोणा पुरुषाने हा भाव समर्थपणे पेलणे कठीणच! संत श्रीगुलाबराव महाराज आणि श्रीरामकृष्ण परमहंसांसारख्या अत्युच्च आध्यात्मिक अधिकाराच्या व्यक्तींनी अंगीकारलेला मधुर भाव अपवादात्मकच समजला पाहिजे.

अलीकडच्या काळात काही पंथोपदेष्ट्यांनी स्वतःस श्रीकृष्ण व आपल्या स्त्रीशिष्यांस राधा-गोपी असा भाव कल्पून रासक्रिडा इ.शृंगारप्रधान साधना करण्यास प्रवृत्त केलेले असावे असे दिसते. पण शाक्त वाममार्गाच्या आचरणाप्रमाणेच अशा अनधिकाऱ्यांनी ही साधना करू पाहिली तर भौतिक व आध्यात्मिक अवनतीपेक्षा आणि दुर्लौकिकाव्यतिरिक्त त्याचे फल काय असणार!

भगवंतसुद्धा असा केवल बाह्य अवडंबरात्मक वृथा मधुरभक्तिभाव त्याज्यच मानतात हे त्यांच्या ***"पत्रं पुष्पं फलं तोयं ये मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।"*** या वचनावरुन स्पष्ट कळून येईल. भगवंतांना भक्ताच्या अंतरीची भावना प्रिय आहे, न की बाह्य वेषभूषा किंवा आडंबर!

कांताभक्तीच्या श्रेष्ठतम भावावस्थेत पोहोचलेल्या भक्ताला स्त्रीवेष, तदृश आभूषणे व आवेश येणे साहजिकच असले, तरी अशा पुरुषभक्तांना स्त्रीसदृश अवयव निर्माण होणे व स्त्रीसदृश इतर भावना निर्माण होणे, अशी लक्षणे पण दिसणे कदाचित श्रीरामकृष्ण परमहंसांच्या उदाहरणावरून आवश्यक ठरू शकेल. अशी लक्षणे या तथाकथित मधुराभक्तीच्या किती आचार्यांठायी प्रकट झाली होती, हा एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे. अर्थात मधुराभक्तीचा हा विषय अति गूढ असल्याने त्याबाबत काही नियम ठरवता येणे कठीण आहे.पण आपण त्याबद्दल वर म्हटल्याप्रमाणे काही अटकळ मात्र करू शकतो. असो.

अद्वैतभक्ती

अनन्यभक्तीविषयी ज्ञानदेव म्हणतातः

मिळौनि मिळतचि असे। समुद्रीं गंगाजळ जैसें।
मी होऊनि मज तैसें। सर्वस्वें भजती।।१३-६०७।।
सूर्याचां होणा होईजे। कां सूर्यासवेंचि जाईजे।
हें विकलेपण साजे। प्रभेसि जेवीं।।६०८।।
पैं पाणियाचियें भूमिकें। पाणी तळपे कौतुकें।
तैं लहरी म्हणती लौकिकें। एऱ्हवीं तैं पाणी।।६०९।।
जो अनन्य यया परी। मी जाहलाहीं मातें वरी।
तोचि तो मूर्तधारी। ज्ञान पैं गां।।६१०।।

"गंगेचे उदक जसे सागराला एकदा मिळाले की सतत त्याला मिळतच राहते. त्याचप्रमाणे तो भक्तही मत्स्वरूप झाल्यावरही सर्वस्वाने माझे भजन करणे म्हणजे माझ्यात चित्त लावणे करतच राहतो. सूर्याबरोबर उदय पावावे आणि सूर्याबरोबरच अस्तंगत व्हावे हा एकनिष्ठ भाव जसा त्याच्या प्रभेला शोभायमान करतो; किंवा पाण्याच्या पृष्ठभागावर उल्हासाने खळाळणाऱ्या लाटा वस्तुतः पाण्यापासून जशा अभिन्नच असतात; त्याचप्रमाणे माझ्याशी अनन्य झाल्यावरही जो भक्त माझी उपासना करत राहतो, तो मूर्तिमंत ज्ञानच आहे!"

अनन्यभक्तीचा हा लाडका विषय त्यांनी इतरत्र खूपच विस्तारला असला तरी या स्थळी केवळ आठ समर्थ ओव्यांतून तो व्यक्त केल्यावर ज्ञानदेव ज्ञानी पुरुषाच्या आणखी एका गुणसंपदेकडे श्रोत्यांचे लक्ष वेधतातः

१६) एकान्तप्रियता

तो ज्ञानी ***एकांतप्रिय*** असतो याबद्दल **अमानित्वा**च्या शीर्षकाखाली त्याचे वर्णन करणाऱ्या ओव्या आपण पूर्वीच पाहिल्या आहेत (१३-११८,११९). *एकांतप्रियतेचा* विषय पुनः एकदा सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणि तीर्थे धौतें तटें। तपोवनें चोखटें।
आवडती कपाटें। वसवूं जेयां।।१३-६११।।
शैलकक्षांची कुहरें। जलाशय परिसरें।
अधिष्ठी जो आदरें। नगरां न ये।।६१२।।
बहु एकांतावेरी प्रीती। जेयां जनपदावेरी खंती।
जाण मनुष्याकारें मूर्ती। ज्ञानाची तो।।६१३।।

"तीर्थे, तपोवने, पवित्र गुहाकंदरे व नद्या वा समुद्राचा कांठ अशा शुद्ध जागी ***एकांतसेवन*** करण्याची त्या ज्ञानी भक्तास फार आवड असते. त्याला नगरात येणेसुद्धा आवडत नाही. लोकांपासून दूर असलेली पर्वतराजी, त्यातील कुहरे, सरोवरे व तलावांचा परिसर ही त्याची आवडीची वास्तव्यस्थाने असतात. अशी जनसहवासाची नावड व एकांतावर अतिशय प्रीती ज्याच्या ठिकाणी असते, तो मनुष्य म्हणजे मनुष्याकाराने अवतीर्ण झालेले ज्ञानच होय!"

सहाव्या अध्यायाच्या निरूपणातही श्रीज्ञानेश्वरांनी योगसाधनेसाठी उपयुक्त असणाऱ्या सुयोग्य परिसराचे रम्य वर्णन केलेले होते. ते व हे वर्णन ताडून पाहिले की भक्तांना व साधकांना एकांतवास किती अतीव प्रिय असतो, ते सहज लक्षात येते. ***"विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि"*** या श्रीकृष्णोक्त पदावर केलेले हे ज्ञानदेवांचे विवेचन पाहिल्यानंतर आतापर्यंत वर्णिलेल्या गुणसंपदेव्यतिरिक्त उरलेल्या दोन गुणांचा विचार करू या. हे दोन गुण कमालीचे महत्त्वाचे आहेत.

१७)अध्यात्मज्ञानाची एकांतिक आवड

ज्ञानदेव म्हणतातः

आणिकही पुढुति। चिह्ने गां सुमती।
ज्ञानाचियें निरुती-। लागीं सांगो।।१३-६१४।।
तऱ्हीं परमात्मा ऐसें। जैं एक वस्तु असें।
तैं जेयां दिसें। ज्ञानास्तव।।६१५।।
तैं एकवांचूनि आनें। जियें भवस्वर्गादी ज्ञानें।
तैं अज्ञान आईसें मनें। निश्चयो करी।।६१६।।
स्वर्गा जाणें हे सांडीं। भवाविखीं कान झाडीं।
दे आत्मज्ञानीं बुडीं। सद्भावाची।।६१७।।

"हे सुमती अर्जुना! ज्ञानलक्षणांचा नीट बोध व्हावा म्हणून मी अजूनही काही लक्षणे तुला सांगतो. परमात्मवस्तूचा अनुभव ज्या ज्ञानाने येतो, ते अध्यात्मज्ञान वगळता स्वर्ग प्राप्त करून देणारी वा संसारात सुखाने कालक्रमणा करता यावी म्हणून उपयोगी पडणारी इतर सर्व ज्ञाने त्याच्या दृष्टीने अज्ञानात मोडतात. स्वर्गाला जाण्याची अभिलाषा तो सोडून देतो व संसाराबद्दलही तो निर्मम होतो. तो खरा ज्ञानवंत फक्त आत्मज्ञानातच आनंदाने रममाण होतो."

भंगलिएं वाटें। शोधूनियां आव्हांटें।
निघिजे जेवीं नीटें। राजपंथें।।१३-६१८।।
तैसें ज्ञानजातां करी। आघवेंचि एकीकडें सारी।
मग मन बुद्धी मोहरी। आत्मज्ञानीं।।६१९।।
म्हणे एक हेचि आथी। येर जाणणे तैं भ्रांती।
ऐसीं निकुरेंसीं मती। मेरु होएं।।६२०।।

"एखाद्या प्रवाशाने जसे जेथे वाटा फुटतात, तेथे आल्यावर आडवाटा त्यागून राजमार्ग स्वीकारावा, तसेच तो महाभाग सर्व ज्ञानांच्या बाबतीत करतो. आत्मज्ञानाव्यतिरिक्त इतर सर्व ज्ञान तो एका बाजूला सारून टाकतो व मन आणि बुद्धी केवळ अध्यात्मज्ञानाकडेच लावतो. अध्यात्मज्ञानच फक्त खरे ज्ञान आहे व इतर ज्ञाने ही संसारासंबंधी वा स्वर्गासंबंधी असल्याने प्रपंचाइतकीच भ्रांतिमान आहेत, या निश्चयास त्याची मती मेरुप्रमाणे आधारभूत होते."

एवं निश्चयो जेयाचां। द्वारीं अध्यात्मज्ञानाचां।
ध्रुव देवो गगनींचां। तैसा राहिला।।६२१।।
तेयांचां ठाईं ज्ञान। यया बोलां म्हणसी वेवधान।
जैं ज्ञानीं बैसलें मन। तेव्हांचि तो तैं।।६२२।।
तऱ्हीं बैसलेपणें जैं होये। तैं बैसतांचि बोलें न होये।
तऱ्हीं ज्ञाना तेयां आहे। सरिसा पाडु।।६२३।।

"ज्याने असा दृढनिश्चय अध्यात्मज्ञानाच्या द्वारी आणून स्थिर केला, त्याच्याठायी ज्ञान असते. माझे हे बोलणे तुला आडवळणाचे वाटत असेल तर तसे मानू नकोस. त्या पुरुषाचे ज्ञानावर जेव्हा प्रेम बसले तेव्हाच तो प्रत्यक्ष ज्ञानरूप झाला. असे ज्ञान झालेल्या त्या पुरुषाला ज्ञान होताच आपणांस काहींच ज्ञान झालेले नाही, असे वाटते व हेच ज्ञान खरे की ज्यास सरस म्हणता येईल."

अमृतानुभवातील ज्ञानखंडन

या शेवटच्या ओवीतून ज्ञानदेव ज्ञान झाल्याचे एक अतिशय महत्त्वाचे लक्षण सांगतात. ज्ञान्यास ज्ञान झाल्याचे जाणिवेतच नसते. हेच लक्षण त्यांनी *अमृतानुभवाच्या* ***ज्ञानखंडन*** या प्रकरणात विस्तारून वर्णिले आहे. ***अज्ञानखंडन*** प्रकरणी २१५ ओव्या रचून अज्ञानाचे यथातथ्य वर्णन केल्यावर ***ज्ञानखंडन*** प्रकरणी केवळ १९ ओव्यातून ज्ञानदेवांनी सदर लक्षणाचे विवेचन केले आहे. त्यासंबंधातील त्याच्या अमृतानुभवातील काही लक्षणीय ओव्यांचा निर्देश केलाच पाहिजेः

अज्ञानाचां प्रवर्त्तु। नाहीं जेयां गांवाआंतु।
तेथ ज्ञानाची तऱ्हीं मातु। कोण्ह जाणें।।८-१०।।अ।।
म्हणौनि अज्ञान नाहीं। तेथेंचि गेलें ज्ञानहीं।
आतां निमिषोन्मेषां दोहीं। ठेली वाट।।८-१२।।
आणि जाणें तोचि नेणें। नेणें तोचि जाणें।
आतां कें असें जिणें। ज्ञाना-अज्ञाना।।८-१८।।
एवं ज्ञानाज्ञानें दोन्हीं। पोटीं सूनि अहनीं।
उदैला चिद्गगनीं। चिदादित्यु हा।।८-१९।।

"ज्या गावात अज्ञानाची वार्ताच नाही, तेथे ज्ञानाची कोण कथा सांगेल! म्हणून अज्ञान नाही तेथे ज्ञानही नाही व जाणणे तसेच नेणणे या दोन्ही क्रियांना अजिबातच वाव नाही. कारण जो जाणतो तोच जाणत नाही व नेणता असतो तोच जाणतो. ज्ञान व अज्ञान यांची ही तऱ्हा असल्यामुळे त्यांना अस्तित्त्वच उरत नाही. अशा प्रकारे ज्ञान आणि अज्ञान ही दोन्ही पोटात घालून चिदाकाशात चित्सूर्य उगवला आहे."

अमृतानुभवावरील मौलिक ग्रंथ

ज्ञान्याच्या अवस्थेचे असे बोलके वर्णन ज्ञानदेव अमृतानुभवात करतात. जाताजाता जिज्ञासूंसाठी सांगावयास हवे की *अमृतानुभव* अभ्यासण्यासाठी मध्यकालीन नाथपरंपरोपदिष्ट *श्रीशिवकल्याणस्वामीं*ची अमृतानुभवावरील ***नित्यानंदैक्यदीपिका ही*** प्रासादिक रचना, अर्वाचीन संत *प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज* यांची ***अमृतानुभवकौमुदी*** व *श्रीरंगनाथ महाराज परभणीकर* यांचे सुबोध अर्थासह वेदांतपर असे ***अमृतानुभवविवरण*** हे ग्रंथ फार उपयुक्त आहेत. असो.

१८) परतत्त्वाचे आकलन ("तत्त्वज्ञानार्थदर्शनम्")

"अध्यात्मज्ञाननित्यत्वं" या पदाचे ज्ञानेश्वरकृत दर्शन घेतल्यावर आता अठराव्या ज्ञानगुणाचा - ***"तत्त्वज्ञानार्थ दर्शनम्"*** या पदाचा परामर्ष घेऊ या. ज्ञानदेव म्हणतातः

आणि तत्त्वज्ञान निर्मल। फलें जैं एक फल।
तैं ज्ञेयही वरी सरल। दिठी जेयां।।१३-६२४।।
येऱ्हवीं बोधां आलेनि ज्ञानें। जऱ्हीं ज्ञेय न दिसेचि मनें।
तऱ्हीं ज्ञानलाभुही मने। जाहला सांता।।६२५।।

आंधलेनि हातीं दिवा। घेऊनि काय करावा।
तैसा ज्ञाननिश्चयो आघवा। वायां जाय।।६२६।।
जऱ्हीं ज्ञानाचेनि प्रकाशें। परतत्त्वीं दिठी न पैसें।
तैं स्फूर्तीचि असे। अंध होऊनि।।६२७।।
म्हणौनि ज्ञान जेतुलें दावीं। तेतुलीं ही वस्तूचि आघवीं।
तैं देखें ऐसीं होआवी। बुद्धि चोख।।६२८।।

"तसेच ज्या शुद्ध आत्मतत्त्वाचे निर्मळ तत्त्वज्ञानाद्वारे ज्ञान होते, त्या ज्ञेय वस्तूलाच - परमात्मतत्त्वालाच तो थेट जाऊन भिडतो. वास्तविक **ज्ञानाने जो बोध व्हावयाचा तो होऊनही जर ज्ञेय वस्तूची प्रतीती येत नसेल तर ज्ञानलाभ होऊनही मनाला खरे समाधान मिळू शकत नाही.** आंधळ्याच्या हाती दिवा दऊन काय उपयोग! म्हणून मनाला समाधान न देऊ शकणारा ज्ञानलाभ होऊनही काही उपयोग नाही. तो वायाच जाणार! ज्ञानाच्या प्रकाशाने परमात्मतत्त्वावर जर दृष्टी स्थिर होऊ शकत नसेल, तर तो बोध आंधळाच म्हटला पाहिजे. ज्ञानाच्या उजेडात जे जे दिसते, ते ते परमात्मत्त्वच आहे, असा बुद्धीचा एकदा निश्चय झाला की ती निर्दोष होते."

ययालागीं ज्ञानें निर्दोखें। दाविलें ज्ञेय देखें।
तैसेनि उन्मेखें। आथिला जो।।१३-६२९।।
जेव्हढीं ज्ञानाची वृद्धि। तेव्हढीच जेयाची बुद्धी।
तो ज्ञान हे शब्दीं। करणें न लगे।।६३०।।
पै ज्ञानाचेनि प्रभेसवें। जेयाचीं मती ज्ञेयीं पावें।
तो हातधरणिया शिवें। परतत्त्वातें।।६३१।।
तोचि ज्ञान हे बोलितां। विस्मो कवण पांडुसुता।
काय सवितयांतैं सविता। म्हणावें असे।।६३२।।

"याकरता निर्मळ ज्ञानाने दाखवलेले ज्ञेय जी पाहते, त्या शुद्ध बुद्धीने जो संपन्न आहे, तोच खरा ज्ञानी! निव्वळ ज्ञानाएवढीच ज्याची बुद्धि आहे, त्याचा लाग खरे तर ***ज्ञान*** या शब्दापावेतोसुद्धा पोहोचत नाही. परंतु ज्ञानाची प्रभा पसरल्याबरोबरच ज्याची बुद्धी परतत्त्वाप्रत जाऊन पोहोचते, तो हातोहात परतत्त्वाला जाऊन भेटतो. असा पुरुष साक्षात ज्ञानच असतो, यात काय नवल! हे अर्जुना! सूर्याला जसे सूर्यच म्हटले पाहिजे, तसे त्या पुरुषालासुद्धा ज्ञानच म्हटले पाहिजे."

ज्ञान्यांच्या श्रेणी

ज्ञानराजांनी ***"तत्त्वज्ञानार्थदर्शनम्"*** या गीतोक्त पदावर असा प्रकाश टाकला आहे. यानिमित्ताने त्यांनी ज्ञान्यांच्याही दोन श्रेणी केलेल्या दिसतात. एकाला ज्ञान होते पण परतत्त्वाचा साक्षात्कार होत नाही. उघडउघड परतत्त्वाचा आविष्कार होत असतांना पण त्याच्या बुद्धीचे डोळे अंध असल्याने त्याला तो कळत नाही. अशा व्यक्तीस ज्ञानदेव ज्ञानी म्हणायला तयारच नाहीत. त्याच्या पुढल्या पायरीवरल्या पुरुषास ज्ञान झाल्याबरोबरच परतत्त्वाचे खरे स्वरूप दिसते; साक्षात्कार होतो; दर्शन घडते. ज्ञानदेव त्यालाच ज्ञानी म्हणतात.

एवढेच काय, तर तोच प्रत्यक्ष ज्ञान आहे, असे त्याला गौरवतात. त्यांच्याजवळ उधारीउसनवारीचा कारभार नाही. सारे कसे रोखठोक आहे. त्यांची ज्ञान्याबाबतची स्पष्टोक्ती पाहिल्यावर आपणांस जाणवते की ज्ञानेश्वर नेहमी साधकांच्या हिताचाच विचार करून योग्य तेच सांगतात आणि त्यांचे सांगणे प्रसंगी परखड असल्याने ते कोणास बोचूही शकते; परंतु साधनापथावरील प्रगतीसाठी ही स्पष्टोक्तीच उत्तम; उगीच गुळमट भाषा वापरण्यापेक्षा जे योग्य असेल, ते सरळ स्पष्ट सांगणें अध्यात्माच्या प्रांतात श्रेयस्कर ठरते.

श्रोतृवृंदाची भूमिका::::

श्रोत्यांचा प्रतिसाद

यानंतर ज्ञानदेव ***"एतज्ज्ञानमिति प्रोक्तम्"*** नंतरच्या ***"अज्ञानं यदतोऽन्यथा"*** या पदाच्या विकासासाठी ***अज्ञानलक्षणे*** निरूपितात. त्या आधी ज्ञानपदांचा एवढा विकास कशाकरता करायला लागला हे श्रोत्यांमुखे सांगायला मात्र ते चुकत नाहीत. ते म्हणतातः

तंव श्रोता म्हणितलें असो। न सांगतियाचा अतिसो।
ग्रंथोक्ती तेथ आडसो। घालिसीं कां।।१३-६३३।।
तुझा हाचि आम्हां थोरु। वक्तृत्वाचां पाहुणेरु।
जैं ज्ञानविखो फारु। निरुपिला।।६३४।।

काहीसे संक्षिप्त असेच ***"अध्यात्मज्ञाननित्यत्वं"*** आणि ***"तत्त्वज्ञानार्थदर्शनम्"*** या महत्त्वाच्या पदांवरचे ज्ञानदेवांचे भाष्य ऐकून श्रोत्यांनी त्याबाबत जरा नापसंती दाखवली आहे. श्रोते म्हणतातः

"याबाबत वर्णन करतांना एवढा कृपणपणा करण्याची तुला खरी तर काही आवश्यकता नव्हती. श्रीकृष्णांनीच गीतेत जे सांगितले आहे, ते स्पष्ट करतांना तू उगीचच टंगळमंगळ का करतोस! अध्यात्मज्ञान व तत्त्वज्ञान विषयींचे निरूपण तू जर आणखी विस्तारपूर्वक सांगितले असतेस तर आम्हाला फार आवडले असते. असो. पण तुलाही दोष देण्यात अर्थ नाही. कारण खरे तर आत्मज्ञानविषयक गुणसंपदेचे एकूण सविस्तर वर्णन करून तू सर्वरससंपन्न अशा आपल्या वक्तृत्वाचा आम्हास पाहुणचारच केला आहेस!"

रसु होआवा अल्पमात्रु। हा घेतसे कविमंत्रु।
तऱ्हीं आंवतुनि शत्रु। करितोसि कां गां।।१३-६३५।।

कवि म्हणजे तत्त्वज्ञ. सर्वसामान्यतः तत्त्वज्ञाचे बोल दुर्मीळच असतात व तो आपले आत्मानुभव प्रकट करतांना सूत्रात्मक शैलीत थोडक्यात व रसपरिपोषाकडे लक्ष न देता ते सांगतो - तेही कोणा थोड्या भाग्यवंतांसच! त्याचे बोल इतरांना प्रायः दुर्बोधच ठरतात.

श्रोते म्हणतात की, "हे ज्ञानेशा! तूसुद्धा त्या कवींपासून मंत्रणा केव्हापासून घेऊ लागलास! आत्मज्ञानाचे बोलणे इतक्या लवकर का आवरते घेतलेस! अशा रीतीने आम्हाला गीतेचा अर्थ सुंदर, परिपूर्ण व रसात्मकरीत्या सांगण्याचे आश्वासन देऊन आमंत्रण करणाऱ्या तुझ्यासारख्याने कवींप्रमाणे जिज्ञासापूर्ती न केल्याच्या दुःखात आम्हाला लोटून देऊ नये."

ठायीं बैसतियें वेळें। जैं रससोये घेऊनि पळें।
तियेंचां एरु वोडव मिळें। कोणां अर्थां॥१३-६३६॥
आघवांचि विखीं भादी। परि सांजवणी टेकों नेदी।
तैं खुरतोडी नुसधी। पोखी कवण॥६३७॥
तैसीं ज्ञानें मती न फांके। येर जल्पती नेणों केतुकें।
परि तैं असो नीकें। केलें तुवां॥६३८॥

"एखाद्या सुगरणीने चांगला स्वयंपाक सिद्ध करून अतिथींना जेवायला बसवावे व वाढण्यापूर्वीच अन्न घेऊन पळून जावे, तर त्या आदरातिथ्याला काय अर्थ! सर्वगुणसंपन्न पण दूध देतेवेळी कांसेला हात पण न लावू देणाऱ्या व लाथा मारणाऱ्या गायीला नुसती पोसण्यात काय हंशील! काही जण खूप बाष्कळ बडबड करतात किंवा चटकदार व्याख्याने देतात. पण त्यात ज्ञानाचा अंशही नसतो. त्यांच्याप्रमाणे बरिक तू आम्हाला एकदम निराश करत नाहीस. पण तुझे उत्कृष्ट ज्ञानसंपन्न व्याख्यान कितीही ऐकले तरी पुरेसे वाटत नाही. म्हणून आम्ही तुझ्यावर थोडा रोष जरी दाखवला असला, तरी तू तो मनावर घेऊ नको बरे!"

जेयां ज्ञानलेशोद्देशें। कीजती योगादि साधनें।
धणीचें आणि तुझियां ऐसें। निरूपण॥१३-६३९॥
अमृताचि सांतवाकुडी। लागों कां अनुघडीं।
सुखाचां दिसीं कोडी। गणिजतु कां॥६४०॥

"ज्या ज्ञानाच्या अल्पशासुद्धा प्राप्तीसाठी योगादी साधनांचे कष्ट करतात, त्या ब्रह्मज्ञानाचे तुझ्यासारखे आणि सुरेख असे निरूपण कसे करावे, हे तूच जाणोस. सुखाचे दिवस कोट्यवधी गेले तरी त्यांची कोणी मोजदाद करील काय!"

पूर्णचंद्रेसीं रातीं। युग एक असो न पाहती।
तऱ्हीं काय पाहत आहाति। चकोरें तैं॥१३-६४१॥
तैसें ज्ञानाचें बोलणें। आणि येणें रसालपणें।
आतां पुरें कोण म्हणे। आकर्णितां॥६४२॥
आणि सभाग्यु पाहुणा ये। सुभगाचि वाढती होये।
तैं सरो नये रससोयें। ऐसें आथी॥६४३॥

"एक युग अवधीची पूर्णचंद्राची रात्र उपभोगावयास मिळालेल्या चकोरांना दिवस उजाडावा असे कधीतरी वाटेल का! तसेच तू हे जे ज्ञानासंबंधी इतक्या रसाळपणे बोललास, ते ऐकतांना आम्हाला कंटाळा कधी तरी येईल का! प्रेमाचा पाहुणा भाग्यवशात घरी आला असता आदरातिथ्यशील सुगृहिणी त्याला वाढू लागली की तेही अन्नाचे सद्भाग्यच म्हणावे लागेल. अशा वेळी अन्नब्रह्मालासुद्धा असे वाटेल की त्या सुभगेचे वाढप करणे व त्या भाग्यवान सोयऱ्याचे जेवण करणे ही कधी संपूच नयेत."

तैसा जाहला प्रसंगु। जैं ज्ञानी आम्हांसि लागु।
आणि तुजही अनुरागु। आथि येथ॥१३-६४४॥
म्हणौनि यया वाखाणा-। पासीं सें आली चौगुणा।
ना म्हणो नये देखतां। होसी ज्ञानी॥६४५॥

"तुझ्या वक्तृत्वाचा हा ज्ञानविषयक प्रसंगही तितकाच रोमांचकारी आहे. आम्हाला पण ज्ञानाची फार गोडी आहे आणि तुझीही ज्ञानावर खूप प्रीती आहे. म्हणून तुझ्या या निरूपणाला चौपट जोश चढला आहे. ज्ञानदेवा! तू खराखुरा डोळस ज्ञानी आहेस. म्हणूनच तुला ज्ञानावरचे एवढे हे सुरस प्रवचन करता आले." आता हे श्रोते ज्ञानदेवांना पुढील निरूपण करण्याचा आग्रह करत म्हणतातः

तऱ्हीं आतां ययावेरी। प्रज्ञेचा माजु धरी।
पदें सांच करी। निरूपणीं॥१३-६४६॥
या संतवाक्यासरिसें। म्हणितलें निवृत्तिदासें।
माझेंही जी ऐसें। मनोगत॥६४७॥
ययावेरी आतां तुम्हीं। आज्ञापिला स्वामी।
वायां वाग् मी। वाढों नेदी॥६४८॥

"ज्ञानदेवा! हे असो! ईशकृपेने तुला जी ही सर्वंकष प्रज्ञा प्राप्त झाली आहे, तिच्या सामर्थ्याचा आदर कर व गीतेची पदे यथार्थ उकलवून दाखव."

हे संतसज्जनांचे प्रेमळ बोल ऐकून निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणाले, "महाजन हो! माझ्याही मनात तुमच्यासारखीच इच्छा आहे की गीतार्थ स्पष्ट करावा. आता तुम्ही आज्ञा दिलीच आहे, तर मी व्यर्थ लांबण न लावता पुढल्या श्रीकृष्णार्जुनसंवादाचे यथार्थ निरूपण करीन."

समारोप

श्रोत्यांना दिलेल्या या अभिवचनाप्रमाणे पुढे ज्ञानदेव **अज्ञानपदा**चे निरूपण करणार आहेत, त्यासाठी आपण वळू या ***उन्मेष क्र.१०-अज्ञानलक्षणे (१)*** याकडे. नवव्या उन्मेषात वर्णिलेल्या ज्ञानगुणलक्षणांच्या अत्यंत विरोधी अशी ती लक्षणे ओळखून साधकाने निश्चयपूर्वक त्यांचा त्याग करणे, हिलाच यमनियमांची खरी पहिली पायरी म्हटले पाहिजे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:: उन्मेष १०::
::अज्ञानलक्षणे (१)::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ११::
::अमृतानुभवातील गुरुदर्शन::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष १२::
::अज्ञानलक्षणे (२)::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष:१०
ज्ञानेश्वरीः
१३:६७७-६९०,६९२-८५८

उन्मेष:११
अमृ.:१-६;ओव्या:२:१-८०;३:३२

उन्मेष:१२
ज्ञानेश्वरी:१३:६४९-६५५,६६१-६७५

::::उन्मेष१०::::

:::अज्ञानलक्षणे(१):::

अज्ञान::::

अज्ञान

ज्ञानदेव सांगतात; श्रीकृष्णांनी अर्जुनाला अमानित्वादी अठरा ज्ञानलक्षणे याप्रमाणे सांगितली. ते म्हणाले की,

एवं इयें अवधारा। ज्ञानलक्षणे अठरा।
श्रीकृष्णे धनुर्धरां। निरोपिलीं।।१३–६४९।।
मग म्हणे या नांवें। ज्ञान एथ जाणावें।
हे स्वमत आणि आघवें। ज्ञानियें म्हणती।।६५०।।
करतलवरी वाटोला। डोलतु देखिजे आंवला।
तैसें ज्ञान आम्हीं डोलां। दाखविलें तुज।।६५१।।
आतां धनञ्जया महामती। अज्ञान ऐसीं वदंती।
तेंहीं सांगों व्यक्तीं। लक्षणेंसीं।।६५२।।

"सर्व ज्ञानी पुरुष व माझे स्वमत असेच आहे की ज्याच्या ठिकाणी ही अष्टादश ज्ञानलक्षणे दृग्गोचर होतात, त्यालाच ज्ञान झालेले असते, असे जाणावे. तळहातावर आवळा ठेवला तर त्याचा आकार वाटोळा आहे, हे स्पष्टच दिसते. त्याचप्रमाणे तुला ***ज्ञान*** आम्ही प्रत्यक्ष केले. हे महामती अर्जुना! ज्याला ***अज्ञान*** म्हणून संबोधतात, त्याची पण लक्षणे तुला आता स्पष्ट सांगतो."

याप्रमाणे ***अज्ञानलक्षणे*** सांगण्यास बद्धपरिकर झालेले श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की ***"..........एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।१३-११।।"*** आतापर्यंत सांगितलेल्या ज्ञानलक्षणांव्यतिरिक्त व विरोधी लक्षणांनी ***अज्ञान*** म्हणजे काय याचा बोध होतो.

एरवीं ज्ञान फुडें जालियां। अज्ञान जाणावें धनञ्जया।
जैं ज्ञान नव्हें आपैसयां। अज्ञान तैंचि।।१३-६५३।।
पाहें पां दिवसु आघवा सरे। मग रात्रीची बारी उरे।
वांचूनि कांहीं दुसरें। नाहीं जेवीं।।६५४।।
तैसें ज्ञान जेथ नाहीं। तैंचि अज्ञान पाहीं।
तऱ्हीं सांगों काईं काईं। चिह्नें तियें।।६५५।।

"हे धनञ्जया! ज्ञान म्हणजे काय हे स्पष्ट कळले की अज्ञान म्हणजे काय ते आपोआपच कळेल. जे ज्ञान नाही, ते सर्व अज्ञानच होय. जसा दिवस मावळला की रात्र व रात्र नसली की दिवसच असतो, यांव्यतिरिक्त तिसरे काही अस्तित्वात नाही; त्याचप्रमाणे जेथे ज्ञान नाही, तेथे अज्ञानाचे वास्तव्य असते. असो. पण तुला हा विषय स्पष्ट कळावा म्हणून अज्ञानाची काही लक्षणे सांगतो."

मानदंभादी लक्षणे

ज्ञानदेव अष्टादशगुणांच्या संदर्भात अज्ञानलक्षणे वर्तवतांना प्रथम अमानित्वादी विरोधी अज्ञानलक्षण प्रकट करतात:

१) मानसन्माची हांव व अपेक्षा व २)दंभ

यासंबंधीचे विवेचन आपण पूर्वीच *(ओवी क्र. १३-६५६ ते ६६०)* पाहिले आहे. ज्ञानदेव ज्ञानसंपदेच्या गुणांचा व लक्षणांचा विचार करतात, तेव्हाच त्यांची दृष्टी तद्विरोधी म्हणजे अज्ञानवृत्तीच्या प्रकाशनावरही असते, हे त्यानिमित्त आपण पाहिले होते. आता पुढील अज्ञानलक्षण पाहू या:

ज्याप्रमाणे अमानित्व व अदंभित्व हे गुण ज्ञानदेवांनी ज्ञानलक्षणे सागतांना स्पष्ट केले आहेत, तसेच अज्ञानलक्षणे प्रकट करण्याच्या निमित्ताने ते मानसन्मानाची हाव व दंभ यांची चर्चा करतात. हेतू हा की श्रीकृष्णांनी ज्ञानाव्यतिरिक्त बाकी लक्षणे असणारे ते ***अज्ञान*** असे जे सांगितले, ते सर्वसामान्य साधकांना स्पष्ट व्हावे. याचप्रमाणे अष्टादशज्ञानलक्षणांपैकी इतरही प्रत्येक लक्षणानुरूप अज्ञानलक्षण यापुढे सांगतांना ते प्रथम ***हिंसक वृत्ती*** म्हणजे अहिंसेविरोधी लक्षण प्रकट करतात:

३) हिंसक वृत्ती

आणि वह्नी वनीं विचरें। तेथ जलती जैसीं स्थावर जंगमें।
तैसें जेयाचेनि आचरें। जगां दुःख।।१३-६६१।।
कवतुकें जैं जैं जल्पें। तें सबलाहूनही तीखे रूपें।
विषाहूनि संकल्पें। मारकु जो।।६६२।।
तेयांतैं बहु अज्ञान। तोंचि अज्ञानाचें निधान।
हिंसेसीं आयतन। जेयाचें जिणें।।६६३।।

"वनांतरी पेटलेला वणवा सर्व वृक्ष व प्राणिमात्र यांस दारुण यातना देत जाळून टाकतो. त्याप्रमाणे त्या हिंसकाचे आचरण जगातील सर्व प्राणिमात्र व वृक्षवल्लींस दु:खदायक ठरते. तो सहज म्हणून जरी काही बडबडला तरी तीक्ष्ण शस्त्रांहूनही जास्त वेदनादायक असे त्याचे बोल लागतात व त्याच्या मनातील विचार व धारणाबुद्धी तर विषापेक्षाही अति घातक असतात. किंबहुना ज्याचे जीवन म्हणजे हिंसेचे चालतेबोलते घरच होय, तो मनुष्य अति अज्ञानी आहे. एवढेच काय तर तो म्हणजे अज्ञानरूपी धनाचा साक्षात खजिनाच असतो, असे का समजेनास!"

४) अक्षान्ति

हा क्षान्तिच्या विरोधी गुण आहे. त्यासंबंधी पुढील ओव्या पाहा:

आणि फुंके भाता फुगें। रेचिलियां सवेंचि उफगें।
तैसा संयोगवियोगें। चढे वोहटें।।१३-६६४।।
पडलीं वारियाचां वलसा। धुलीं चढें आकाशां।
हरिखा वलघे तैसा। स्तुतीवेलें।।६६५।।

निंदा मोटकीं आईकें। आणि कपालु धरूनि ठाकें।
थेंबें विरे वारेनि शोखें। चिखलु जैसा।।६६६।।
तैसा मानापमानीं होए। जो कोण्हीही उर्मी न साहे।
तेयाचां ठायीं आहे। अज्ञान पुरें।।६६७।।

"लोहाराचा भाता जसा त्यात वारा फुंकल्याने फुगतो, तसा तो लाभाने चढून जातो व भाता जसा त्यातील हवा निघून गेली की चेपटून जातो, तसा जो हानीमुळे म्लान होतो; वावटळीत सापडलेली धूळ जसी गगनाला जाऊन भिडते, तसा जो स्तुती केल्याने हर्षोत्फुल्ल होऊन जातो व स्वतःची थोडीफार जरी निंदा ऐकायला आली, तरी कपाळ धरून बसतो; तसेच जसा चिखल पावसाच्या शिंतोड्यांनी ओला होतो व वाऱ्याने लगेच वाळूनही जातो, त्याप्रमाणे ज्याची अवस्था मानापमानाने क्षणात आनंदी तर क्षणात दीन होते आणि ज्याला तापत्रयांचा थोडाही त्रास सहन होत नाही, त्या मनुष्याच्या ठिकाणी पुरेपूर ***अज्ञान*** असते."

क्षान्तिच्या निमित्ताने श्रीगोपालांची भूमिका गीतेच्या *श्लोक क्र.२-५४,५६ व ५७* द्वारा आपण विचारात घेतली होतीच. ***अक्षान्ति***च्या निमित्ताने गोपालकृष्णांच्या ***"सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।........।।२-३८।।"*** या उक्तीचा परिचय एका वेगळ्या संदर्भात ज्ञानेश आपणांस करून देत आहेत!

५) अनार्जव (कुटिलता)

या लक्षणाबाबत ज्ञानेश म्हणतातः

आणि जेयांचां मनीं गांठीं। वरिवरि मोकलीं वाचा दिठीं।
आंगें मिळे जीवें पाठीं। भलतेयां दे।।१३-६६८।।
व्याधाचें चारा घालणें। तैसें प्रांजल जोगावणें।
चांगांची अंतःकरणें। विरु करी।।६६९।।
गार शेंवालें गुंडाटलीं। कां निंबोली जैसीं पिकली।
तैसीं जेयाचीं भलीं। बाह्यक्रिया।।६७०।।
अज्ञान तेयाचां ठायीं। ठेविलें असे पाहीं।
यया बोलां आन नाहीं। सत्य मानीं।।६७१।।

"जो आतल्या गाठीचा असतो; जो वरवर मोकळेपणाने व प्रेमाने वागतांना दिसतो; एखाद्याशी मित्रत्वाचे नाटक करत असतांनाच जो त्याला शत्रूहाती सोपवण्यास कचरत नाही; पारधी पशुपक्ष्यांना चारा घालून त्यांचा जीव राखतांना दिसला, तरी त्याचा अंतःस्थ हेतू जसा त्या प्राण्यांचा घातच करण्याचा असतो, त्याप्रमाणे ज्याचे वागणे वरकरणी सज्जनपणाचे व कनवाळू वृत्तीचे भासले, तरी ज्याच्या अंतर्यामी कुटिल हेतू असतो; जो आपल्या वर्तनाने सज्जन लोकांच्या अंतःकरणास क्लेश देतो; दगड खरा तर स्थिर आधार देतो, पण तो शेवाळ्याने लिपटला की जसा फसवा होऊन जीवास घातकही ठरू शकतो; लिंबोळी जरी पिकली, तरी खाण्यास जशी कडुजहरच लागते; त्याप्रमाणेच ज्याच्या क्रिया बाह्यतः कितीही सोज्ज्वळ दिसल्या तरी अंतर्यामी निर्घृणताच असते; तो मनुष्य अज्ञानाला आधार असतो, हे मात्र सत्यच आहे!"

६) आचार्यद्रोह

यानंतर ***गुरुभक्ती*** वा ***आचार्योपासन*** याविरुद्धच्या ***आचार्यद्रोह*** या अज्ञानी मनुष्याच्या लक्षणाचा विचार करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणि गुरुकुलें लाजे। जो गुरुभक्ती उमजे।
विद्या घेऊनि माजे। गुरुसींचि।।१३-६७२।।
तेयाचें नांव घेणें। हें वाचें शूद्रान्न होणें।
परि घडलें लक्षणें। बोलतां इयें।।६७३।।
आतां गुरुभक्ताचें नांव घेवों। तेणें वाचें प्रायश्चित्त देवों।
गुरुसेवकां नांव पाहा हो। सूर्यु जैसा।।६७४।।
येतुलेनि पांगु पापाचा। निस्तरेल हे वाचा।
जो गुरुतल्पगाचां। नामीं आला।।६७५।।
हा हायवेरी। तेयां नांवाचें भय हारी।
मग म्हणे अवधारीं। आणिकें चिह्नें।।६७५।।

"आपली गुरुपरंपरा सांगतांना ज्याला कमीपणा वाटतो; गुरुसेवा करण्यास जो कंटाळतो; गुरुकडून विद्या ग्रहण केल्यावर गुरुविषयी कृतज्ञ राहण्याऐवजी *"गरज सरो, वैद्य मरो"* या न्यायाने जो गुरुद्रोह करण्यासही मागेपुढे पाहत नाही; त्याची लक्षणे सांगण्यासाठी येथे त्या गुरुद्रोह्याचे नाव घ्यावे लागले खरे; पण त्याच्या नामाचा उच्चार करणे म्हणजे जिव्हेला अपवित्र -अमंगल पदार्थाने विटाळणेच होय. त्याचे परिमार्जन आता गुरुभक्ताचेच नाव घेऊन केले पाहिजे. सूर्य जसा अंधःकाराचा नाश करतो, त्याप्रमाणे गुरुसेवकाचे नावसुद्धा गुरुनिंदकाच्या नावाच्या उच्चारामुळे लागलेल्या पापाचा उपशम करील. गुरुसेवकाच्या नामाचेसुद्धा केवढे महत्त्व आहे, पहा. हे पार्था! गुरुद्रोह हे घोर अज्ञानांधकाराचे साक्षात रूप आहे. अजूनही अज्ञानलक्षणे सांगतो, ती ऐक!"

या ठिकाणी ज्ञानेश्वर असा ***गुरुद्रोह*** या खऱ्याखुऱ्या अज्ञानलक्षणाचा उल्लेख नाईलाजास्तव करतात. कारण गीतेच्या पदाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी तो सांगितलाच पाहिजे. पण हा विषय त्यांचा साफ नावडता आहे. म्हणून ते तो *२-३* ओव्यांतच संपवतात व तोसुद्धा गुरुभक्ताचे माहात्म्य वर्णन करतच!

गुरुभक्ताच्या नामाने गुरुद्रोहाची लक्षणे निरूपण्याचे पातक दूर व्हावे या हेतुनेच ते म्हणतात की ***"येतुलेनि पांगु पापाचा। निस्तरेल हे वाचा।।"***

आतापावेतो काही ***अज्ञानलक्षणे*** आपण पाहिली. जाताजाता या गुरुमहतीच्या दृष्टीने पुढील ***उन्मेष क्र.११ -अमृतानुभवातील गुरुदर्शन*** यातून आपण प्रथम अमृतानुभवातील एक अपूर्व पाहू या. ते आहे ज्ञानेशांनी घडवलेले ***गुरुदर्शन !*** तिकडे वळू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष११::
::अमृतानुभवातील गुरुदर्शन ::

गुरू::::

गुरुदर्शन

ज्ञानेश्वरीभर विखुरलेल्या *सात-आठशे* गुरुनिष्ठापर ओव्यांपैकी बऱ्याच ओव्या आपण पूर्वीच अवलोकिल्या आहेत. खुद्द *तेराव्या* अध्यायातही या विषयावर सुमारे *नव्वद-पंचाण्णव* ओव्या तरी आहेत. गुरुभक्तीचे ज्ञानराजांना वाटणारे अपूर्व माहात्म्य श्रुतिसंमतच आहे.

मातापिता जन्मदाते व्यवहारशिक्षक गुरू होत. पण ***सद्गुरू*** साक्षात जीवनमरणाच्या अनंतकालीन चक्रनेमिक्रमातून जीवास कायमचा मुक्त करणारा परम सुहृद होय. गुरू म्हणजे तमनाशक, संसारभयहारक! गुरू म्हणजे ज्याच्यापुढे विश्वसुद्धा लघु ठरते तो! गुरू म्हणजे मूर्तिमंत ब्रह्म! गुरुगीता व इतरत्र गुरूची जी अफाट स्तुती आढळते, ती गुरू हा परमेश्वरच असल्याच्या जाणीवेतून केलेली आहे.

गुरू व अमृतानुभवाचा अधिकार

गुरू हाच ज्ञानदाता व अज्ञानांधकार घालवणारा प्रभादीप! नामदेवांनी सगुण साक्षात्कार करून घेतला. त्यांना भावसमाधी प्राप्त झाली. पण ज्ञानप्राप्तीसाठी अखेर विसोबा खेचरांना शरण जावे लागले व तेही पांडुरंगाच्या प्रेरणेने! एवढे सद्गुरूचे माहात्म्य आहे.

सत्पुरुषांचे सांगणेच आहे की ***ज्या साधकांची सगुण साक्षात्काराची व समाधिसिद्धीची उपासना पूर्ण झाली असेल, तेच ज्ञानाचे म्हणजे अमृतानुभवाचे अधिकारी होत.*** नामदेव ज्ञानाचे अधिकारी झाले होते आणि ते त्यांना नंतर झालेही. हा फार मोठा अधिकार आहे.

सगुणप्राप्ती व समाधिसिद्धीनंतर नामदेवांचा ***अहंकार*** शिल्लक राहिला होता. सामान्य माणसे ज्याला ***अहंकार*** म्हणतात, तो हा नसतो. साधकाच्या उन्नतिमार्गावरील ओलांडावयाची अखेरची पायरी ही पारमार्थिक परिभाषेत ***अहंकार*** म्हणून ओळखली जाते. पातञ्जलयोगशास्त्रात हीच अस्मिता म्हणून ओळखली जाते.

ही पायरी ओलांडल्याखेरीज साधकाला विश्वात्मक देवाची खरी सेवा घडत नसते. ही पायरी ओलांडून जाण्यास मदत करतो, तोच खरा सद्गुरू! आणि शिष्यसुद्धा एकदा ही पायरी ओलांडून गेला की गुरूचा अधिकार धारण करतो. सद्गुरूचे व साधकाच्या अंतिम अवस्थेचे असे हे हृदयंगम चित्र आहे.

अमृतानुभवातील गुरुदर्शन

ज्ञानदेवांनीही सद्गुरूचे मोठे बहारदार वर्णन अमृतानुभवात केले आहे. त्यावरून आपोआपच साधकाच्या सिद्धावस्थेचेही निरूपण झालेले दिसते. अमृतानुभवाचे दुसरे प्रकरण **गुरुस्तवन** म्हणूनच प्रसिद्ध आहे. तसेच अमृतानुभवारंभीच्या श्लोकांतूनही सद्गुरूंचे स्वरूप स्पष्ट होते. आपणांस ज्ञानेश तत्त्वज्ञान अभ्यासतांना त्या सर्वांचा परामर्ष घेतला पाहिजे. तो घेतल्याशिवाय जे ***"साधकांचे सिद्ध झाले"***, ते कोणत्या अवस्थेला पोहोचले, हे कळणे अवघड आहे.

या संदर्भात अमृतानुभवावर सुंदर विवेचन करणारी **श्रीशिवकल्याण**स्वामींची ***नित्यानंदैक्यदीपिका*** ही प्रासादिक रचना व **श्रीरंगनाथ महाराज परभणीकर** यांचे ***अमृतानुभवविवरण*** हे ग्रंथ साधकांना मार्गदर्शक व बोधपर ठरतात, हे पूर्वीच जिज्ञासूंच्या निदर्शनास आणून दिलेले आहेच. तसेच पावसच्या **श्रीस्वामी स्वरूपानंदां**चा साकी वृत्तातील अर्वाचीन मराठी भाषेतला अमृतानुभवसुद्धा या दृष्टीने अप्रतिम आहे, हे नमूद केलेच पाहिजे. असो.

पंचश्लोकी::::

नाथनिरञ्जन ब्रह्माची ब्रह्मविद्या

अमृतानुभवाच्या प्रथमारंभी ***शिवशक्तिसमावेशन*** या प्रकरणापूर्वी जे श्लोक येतात, त्यात ज्ञानदेव ***नाथनिरञ्जन ब्रह्म*** म्हणजे सद्गुरूंसंबंधी काय म्हणतात, ते पहाः

यदक्षरमनाख्येयमानन्दमजमव्ययम्।
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये।।१-१।।अ.।।

"जे अक्षर म्हणजे नष्ट न होणारे, अनाख्येय म्हणजे वाणीला विषय न होणारे, आनन्दस्वरूप, उत्पत्तिरहित, नाशरहित, ***श्रीमन्निवृत्तिनाथ*** या नांवाने प्रसिद्ध असलेले दैवत साक्षात ***नाथनिरञ्जन*** ब्रह्मच आहे, त्या श्रीगुरुंना मी शरण आहे."

असे हे केवलब्रह्मस्वरूप गुरू! त्यांची विद्या ब्रह्मविद्या ***शाङ्करी*** म्हणजे आदिनाथ श्रीशंकरांपासून उगम पावलेली वा साक्षात मोक्षसुखदाती! तिला वन्दन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्या हि शाङ्करी।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरन्तरम्।।२।।अ.।।

"समस्त विद्यांमध्ये गुरू म्हणजे श्रेष्ठ म्हणून ***ब्रह्मविद्या*** प्रसिद्ध आहे. ती साक्षात सुखदायक*(शांकरी)* आहे. तिचा जयजयकार असो. ही विद्यादेवीसुद्धा गुरू श्रीनिवृत्तिनाथांप्रमाणेच उदार व दयार्द्र अतःकरणाची असून साधकाचे नित्य निरंतर कल्याणच करते."

ज्ञानेशांची पंचसूत्री

अमृतानुभवाच्या श्लोकपंचकापैकी हे पहिले दोन श्लोक गुरू व त्यांची विद्या - ***ब्रह्मविद्या*** - यांविषयी ज्ञानेशांची काय भूमिका आहे, याबद्दल खूपच सांगून जातात. हे श्लोक लक्षात न घेताच जर आपण

ज्ञानेश्वरीचा अर्थ उलगडवत बसलो, तर आपल्या हाती फार काही लागणार नाही असे वाटते, इतके ज्ञानेश वाङ्मयात त्यांचे महत्त्व आहे. आणि तसे पाहिले तर हे संपूर्ण श्लोकपंचक म्हणजे ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान, श्रद्धा, परंपरा, आचार व योगप्रणाली यांची पंचसूत्रीच म्हणा ना!

ज्ञानेश फार पाल्हाळ लावतात असा समज करून घेतलेल्यांनी हे पाच श्लोक जर नीट समजावून घेतले तर त्यांच्या लक्षात येईल की भारतीय सूत्रकारांच्या सूत्ररचनेच्या आदर्शाबरहुकूम रचलेले हे श्लोक म्हणजे ज्ञानेशदर्शनाची सूत्रे आहेत आणि ज्ञानेश विषय सविस्तर समजावून देण्यात जे विलक्षण चातुर्य दाखवतात, त्याहूनही अतीव बुद्धिमत्ता व प्रज्ञासामर्थ्य त्यांनी आपले तत्त्वज्ञान थोडक्या शब्दात मांडतांना या पंचश्लोकीद्वारे प्रकट केले आहे. किंबहुना टीकाकार व आक्षेपक यांच्याजवळ ज्ञानदेवांचे हे दिग्गज सामर्थ्य अवलोकण्याइतकी स्वतंत्र प्रज्ञा व दिव्य दृष्टी असली, तरच त्यांना या सूत्रांचे रहस्य व ज्ञानेश तत्त्वज्ञान उलगडू शकेल! असो.

ज्ञानेशांचे तत्त्वज्ञान

ज्ञानेश तत्त्वज्ञान व अध्यात्मवाङ्मयाची गुरुकिल्ली म्हणता येतील, अशा या श्लोकपंचकातील इतर तिन्ही श्लोकांवर दृष्टिक्षेप टाकत पुढे जाऊ याः

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः।
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः।।३।।
अद्वैतात्मनस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम्।
तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये।।४।।अ.।।

"समरूप अशा ***शिव*** व ***शिवा*** वा ***शक्ती*** या संज्ञांनी जाणल्या जाणाऱ्या आदियुगुलाचा कोणता भाग कोणाचा व त्या दोघांचे मिलन कोणत्या प्रकारे झाले आहे, हे आकलन करण्यापलीकडील द्वैत आहे. हे द्वैत अनाकलनीय असल्याने त्यांच्यामध्ये - ***शिव व शिवा यांच्यात मूलतः अद्वैत असले पाहिजे.*** अशा प्रकारे अद्वैत प्रकाशवणाऱ्या त्या विश्वाच्या आदियुगुलास, त्यातील परम अद्वैततत्त्वाचे मला यथार्थ दर्शन व्हावे म्हणून मी अभिवादन करत आहे."

अद्वैतात्मक युगुल

जड - चेतन विश्वाचा पसारा पाहून ज्ञात्यांनी ***प्रकृति-पुरुष*** असे त्यामागचे आदितत्त्व असावे म्हणून म्हटले. काहींनी पुढे जाऊन प्रकृतीचे ***परा व अपरा प्रकृति*** असे सूक्ष्म भेद कल्पिले. त्याचप्रमाणे पुरुषाचेही ***क्षर, अक्षर व उत्तम*** असे विकल्प जाणले जातात. विश्व जर प्रकृतीचा पसारा मानले तर त्याला पुरुषाचे अधिष्ठान आहे. पुरुषाशिवाय प्रकृति व प्रकृतीशिवाय पुरुषाचे अस्तित्व कल्पिता येणार नाही, असे अभिन्न असणारे हे जोडपे आहे. त्यामुळे विश्वातील कोणताही प्रपंच त्या दोघांवरच आधारित असतो.

एकमेकाला सतत आलिंगून राहणाऱ्या, एक दुसऱ्याला स्वतःच्या अंगाने अवगुंठीत करणाऱ्या, या विश्वाचे आदिकारण असणाऱ्या या युगुलातील कोणाही एकास स्वतंत्ररीत्या पाहणे ज्ञात्यांनासुद्धा शक्य होत नाही, इतकी ती दोघे एकमेकात संयोग पावलेली आहेत. या संयोगामुळे बोध होतो तो त्यांच्यामधील एकमात्र अद्वैततत्त्वाचा! हे अद्वैततत्त्वसुद्धा त्या युगुलाच्या अनंत कालापासून चालत आलेल्या रासक्रीडेने नजरेआड करून ठेवले आहे.

त्या आदितत्त्वाचे आकलन व्हावे व त्याचा साक्षात्कार व्हावा म्हणून या आदितत्त्वाच्या आशीर्वादानेच पलीकडे डोकावून पाहता येते. कालाच्या सीमारेषेबाहेर डोकावून पाहण्यासाठी त्या आदियुगुलास म्हणून वन्दन करावयाचे! म्हणजेच या युगुलास ते जसे आहे, तसेच स्वीकारायचे! असे हे ज्ञानदेवांचे थोडक्यात सांगितलेले तत्त्वज्ञान आहे.

विश्व व परिपूर्ण शंभू

या तत्त्वज्ञानाला प्रकट करणारा पाचवा श्लोक असा आहेः

मूलाग्रायाय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये।
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शांभवे।।५।।अ.।।

"जो सर्व विश्वाच्या मूलारंभी, अंती व मध्यंतरी आपल्याच मूर्त रूपाने विलसतो व विश्व नसतांना - ते प्रलयस्थ झाले असतांही - आपल्या पूर्ण रूपाने असतो, त्या उत्पत्ति, स्थिती व लय या उपाधींनी लिप्त न होणाऱ्या एकमेवाद्वितीय परमसुखकारक, अनादी, परिपूर्ण शंभूस मी पुनःपुनः वन्दन करतो."

ज्ञानदेवांचे चिद्विलासाचे तत्त्वज्ञान

अशा रीतीने ज्ञानेशांच्या दृष्टीने विश्वाच्या आदि, मध्य व अंत या अवस्थांपासून ते थेट विश्व नसण्याच्या अवस्थेपर्यंत सर्वदा - सर्व ठिकाणी त्या एका परमात्मतत्त्वावाचून काहीच नाही. म्हणून ***शिव-शक्ती*** हे आदियुगुलसुद्धा तेच एक तत्त्व आहे व ***विश्व*** हासुद्धा त्याच तत्त्वाचा विलास आहे. याच कल्पनेतून ***चिद्विलास*** ही संज्ञा निर्माण झाली आहे.

ते तत्त्व आनंददायक आहे; सुखकर आहे; स्वसंवेद्य आहे. त्या तत्त्वाचा सत्-चित्-आनन्दरूप आविष्कार सर्वदूर भरून राहिलेला आहे; या अर्थाने काही लोक अमृतानुभवात पुढील श्लोक असल्याचे धरतातः

दिवि भूमौ तथाकाशे बहिरन्तश्च मे विभुः।
यो विभात्यवभासात्मा तस्मै भानात्मने नमः।।६।।अ.।।

"विश्वाला अंतर्बाह्य व्यापून उरलेल्या व त्याला प्रकाशित करणाऱ्या आत्मरवीस माझा नमस्कार असो."

जाणकार व जिज्ञासूंस उपरोल्लेखित श्लोकरचना नक्कीच आवडतील अशाच आहेत. ज्याप्रमाणे ज्ञानेश म्हणतात की गीतेचा संपूर्ण अभिप्राय ***"एकला"*** **नवम अध्याय** सांगतो व गीतेच्या *सातशे* श्लोकांचा आवाका *अठराव्या* अध्यायाचा शेवटचा एकटा श्लोक - सञ्जयाचा पूर्णोद्गार - ***"यत्र योगेश्वरः कृष्णो ..।।१८-७८।।"*** दाखवतो; त्याचप्रमाणे आपणांस असे जाणवते की ज्ञानेश तत्त्वज्ञान

व रचनांचे मार्मिक अभिप्रायदर्शन अमृतानुभवाच्या आरंभीचे हे केवळ पाच वा सहा श्लोक उत्तमरीत्या प्रकट करतात. असो.

अद्वयत्व::::

अमृतानुभवातील गुरुरूपी आत्मतत्त्व

आपणास अमृतानुभवाच्या *द्वितीय* प्रकरणातील गुरुमाउलीची स्तुती व वर्णन आता पाहवयाचे आहे. त्याकडे वळू या. ज्ञानदेव म्हणतातः

आतां उपायवनवसंतु। जो आज्ञेचा आहेवतंतु।
अमूर्तचि परि मूर्तु। कारुण्याचा।।२-१।।अ.।।

"मोक्षोपायरूपी वनाला बहर आणणारा जो वसंत; ब्रह्मविद्येच्या कंठातील जो सौभाग्यालंकार; अव्यक्त असूनही प्राणिमात्रांच्या उद्धारासाठी करुणाव्याप्त होऊन अवतार घेणारा जो सद्गुरू त्याचे स्मरण करू या."

मोडोनि मायाकुंजरु। मुक्तमोतियाचा वोगरु।
जेववितां सद्गुरु। निवृत्ति वंदु।।२-२।।

"मायारूप हत्तीवर झडप घालून त्याचे गंडस्थळ फोडून त्यातून निघालेल्या आत्ममुक्तिरूप मोत्यांचा घास आपल्या शिष्यशावकांना भरवणाऱ्या सद्गुरुरूप नरसिंहास - निवृत्तिनाथांस - वन्दन करू या."

अविद्येचे आडवें। भुंजीत जीवपणाचें भवें।
तेयां चैतन्याचें धांवे। कारुण्यें जो कीं।।२-३।।

"अविद्यारूप अफाट अरण्यातून जीवपणा धारण करून दुःख भोगणाऱ्या चैतन्यकणांच्या करुणेने तो सद्गुरू धावून येतो."

जेयाचेनि आपांगपातें। बद्ध मोक्षपणी आते।
भेटे जाणतेयां जाणतें। जेयापासीं।।२-४।।

"ज्याच्या केवळ अर्धोन्मीलित अशा दृष्टिपातानेही बंध मोक्षात परिणत होतो व ज्याच्या सान्निध्यानेही ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान या त्रिपुटीचा लय होतो, त्या सद्गुरूसारखा त्राता त्रिभुवनातही कोणी नाही."

कैवल्यकनकाचियां दाना। जो न कडसी सानथोरा।
द्रष्ट्याचियां दर्शना। पाढाऊ जो।।२-५।।

"कैवल्य म्हणजे मोक्षसुख. ब्रह्मविद्येच्या भांडारातील सुवर्णराशी म्हणजे कैवल्यकनक. त्याचे दान करणारा सद्गुरू लहानथोर असा भेदभाव करत नाही. आत्मराजाचे दर्शनसुख घ्यावे तर त्याच्याच संगतीने!"

सामर्थ्याचेनि बिकें। जो शिवाचेहीं गुरुत्व जिंकें।
आत्मा आत्मसुख देखें। आरिसां जियें।।२-६।।

"शिव हा सर्वांचा आदिगुरू आहे. त्याचेही गुरुत्व धारण करण्याचे सामर्थ्य सद्गुरूंजवळ असते. ज्या शिष्याला सद्गुरूरूप आरसा प्राप्त होतो, तो विनासायास आत्मसुख न्याहाळतो."

बोधचंद्राचियां कला। विखुरल्या एक वेळां।
कृपापुनिव लीलां। करी जेयाची।।२-७।।

"स्वात्मबोध हाच जणू कोणी चंद्र. त्याचे चांदणे सर्वदूर पसरते. त्या चंद्राच्या आत्मबोधरूप सप्तदश कला इतस्ततः विसकळीत होऊन गेल्या होत्या. श्रीसद्गुरूंच्या कृपापूर्ण कटाक्षानेच त्या लिलया पुनः पौर्णिमेच्या पूर्णचंद्ररूपाने प्रकट होऊन जीवावर आत्मसुखाच्या चांदण्याचा वर्षाव करू लागतात."

जो भेटलियांचि सवें। पुरति उपायाचें धांवें।
प्रवृत्तिगंगा स्थिरावें। सागरीं जियें।।२-८।।

"जन्ममरणाच्या चक्रात सापडलेला जीव त्या संकटातून सुटून जाऊ इच्छितो व त्यासाठी नाना साधने व उपाय करू पाहतो. सद्गुरूंची भेट झाली की उपाय शोधणे व करणे संपते आणि त्याबरोबरच जीव प्राकृतिक बंधनातून मुक्त होतो. प्रवृत्ति हीच जणू काही गंगा. ती ज्या सागरास मिळते व त्यानंतर पुढला मार्ग तिला शोधत जावे लागत नाही, तो म्हणजे सद्गुरूरूप कारुण्यसिंधु! गंगोदक जसे सिंधुजलात मिळाल्यानंतर वेगळे करता येत नाही, तसेच जीवाचे सद्गुरुभेटीनंतर वेगळे अस्तित्व उरत नाही. तो परमात्मरूप होऊन जातो."

जेयांचेनि अनवसरें। द्रष्टा ले दृश्याचें मोहिरें।
जो भेटतखेंवो सरे। बहुरूपचि हें।।२-९।।

"सद्गुरुस्वरूपापासून विन्मुख झाल्यामुळेच जीवपणा येतो व द्रष्टा विश्वप्रतीती घेण्यात स्वतःला विसरून त्यात रममाण होऊन जातो. परंतु सद्गुरू आत्मराजाची पुनर्भेट झाली की हे बहुनामरूपध्वन्यात्मक विश्व मावळते. जीवास शिवाची भेटी घडते. जीव विश्वात्म्याशी एकरूपता अनुभवतो."

अविद्येचें कालवखें। कीं स्वबोधसुदिनीं फांकें।
सीतलें प्रसादार्कें। जेयाचेनि।।२-१०।।

"अविद्या हाच घनघोर अंधकार! सद्गुरुप्रसादरूप सूर्याचा स्पर्श होताच तोच अविद्यामय तम जीवाकरता बोधमय दिवसाच्या प्रकाशात परिवर्तन पावतो."

गुरुप्रसाद

जेयाचेनि कृपासलिलें। जीवू हा ठाववेरी पांखालें।
जैं शिवपणही वोंविलें। आंगीं न लावीं।।२-११।।

"सद्गुरूंच्या कृपास्वरूप पवित्र जलाने स्नान केल्यावर जीव इतका शुद्ध होतो की त्याला शिवाचे शिवपणसुद्धा ओंवळे वाटते व तो त्याला स्पर्शसुद्धा करू इच्छित नाही. कारण शिव हा शक्तीच्या उपाधीने सद्वस्तूसापेक्ष अशुद्धच ठरतो."

राखों जातां शिष्यातें। गुरुपणहीं धाडिलें थितें।
तऱ्हीं गुरुगौरव जेयातें। सांडिचिना।।२-१२।।

"शिष्याला आत्मज्ञान प्रदान केल्यावर गुरूचे गुरुपणसुद्धा संपते. परंतु अशा प्रकारे शिष्याला गुरुपदवी मिळाल्याने त्या सद्गुरूंचा गरिमा वाढतोच, कमी काही होत नाही."

एकपण नव्हे सुसास। म्हणोनि गुरुशिष्याचे करूनि मिस।
पाहणेंचि आपुली वास। पाहतचि असे।।२-१३।।

"एकाकी न रमते" या श्रुतिवचनाप्रमाणे एकटेपणाचा कंटाळा येऊनच की काय, त्या आत्मवस्तूने स्वत:ला गुरू व शिष्यरूपात विभक्त केले व त्या निमित्ताने ती आपल्याला न्याहाळू लागली."

जेयाचेनि कृपातुषारें। परतलें अविद्येचें मोहिरें।
परिणमें आपारें। बोधामृतें।।२-१४।।

"सद्गुरूंच्या कृपातुषाराच्या सिंचनाने जीवाच्या अंतरीची अविद्या हटते व ते कृपातुषारच बोधामृतात परिणत होतात."

वेद्या देतां मिठी। वेदकूही सूयें पोटीं।
तऱ्हीं नोहेंचि उशिटी। दिठी जेयाची।।२-१५।।

"सद्गुरू जेव्हा मूर्त रूप धारण करतात, तेव्हा ते जगत *(विश्व)*, जीव व ईश या सर्वांचे कल्याण करतात. परंतु हे करत असतांनासुद्धा त्यांना ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान /कर्ता, कर्म, क्रिया /द्रष्टा, दृश्य, दर्शन या त्रिपुटीचा स्पर्शही होत नाही. अवतार धारण केला तरी त्यात त्यांची दृष्टी त्रिपुटी जेथे विलय पावते, त्या अनंत तत्त्वातच लीन असते."

जेयाचेनि सावायें। जीव ब्रह्मउपर लाहे।
ब्रह्म तृणातलीं जायें। उदास जेणें।।२-१६।।

"ब्रह्म या नामाचासुद्धा ज्या तत्त्वाला स्पर्श होऊ शकत नाही, त्या तत्त्वात ज्यांची कृपादृष्टी लाभलेला जीव प्रविष्ट होतो; पण ते जर उदासीन असतील - त्यांनी जर कृपादृष्टी केली नाही - तर जीवच काय पण ब्रह्मसुद्धा कवडीमोल - गवताच्या काडीहूनही क्षुल्लक ठरते. इतके त्यांच्या सहज दृष्टिक्षेपाचे महत्त्व आहे."

उपास्तीवेरी राबतीया। उपायफलीं येती मोडूनियां।
वरिवंडिलें जेयाचियां। अनुज्ञा कां।।२-१७।।

"त्याच्या अनुज्ञेने अनुष्ठिलेला कोणताही उपाय किंवा साधन सिद्धींनी लगडून गेलेल्या कल्पवृक्षाप्रमाणे अमूप मोक्षफळ साधकाच्या पदरात टाकतो."

जेयाचां दिठिवा वसंतु। जंव न रिगे निगमवनाआंतु।
तंव आपुलियें फलीं हातु। न घेपती ही।।२-१८।।

"वेदरूप वनराजीत जोपावेतो सद्गुरुकृपादृष्टिरूपी वसंताचे आगमन होत नाही, तोवर अपार मोक्षफलदाते ते वन फळें धरत नाही."

पुढे दृष्टिचेनि अलगें। खोची कीं निवटें मागे।
येवढेयां जैता नेघे। आपणपें जो।।२-१९।।

"शिष्याच्या देहास त्यांच्या दृष्टीने स्पर्श करताक्षणीच त्याचे देहबंधन गळून पडते व दृष्टी उफराटी होऊन थेट आत्मवस्तूस जाऊन भिडते. एवढे सामर्थ्य अंगी वागवणाऱ्या त्या सद्गुरूंना मात्र आपण शिष्याचा देहभाव जिंकला असा साधा विचारही स्पर्शत नाही।"

लघुत्वाचेनि मुदलें। बैसला गुरुत्वाचें सेलें।
नासूनि नाथिलें। सदैव जो।।२-२०।।

"जीवाने लघुत्व घेतले, तर सद्गुरू गुरुत्व घेतात. वास्तविक पाहता लघुत्व व गुरुत्व या उपाधीच चैतन्याला नसतात. त्यामुळे लघुत्वाचा बोध घालवून गुरुत्वाचा बोध करून द्यावे असे काही नसते. त्यामुळे जे सदैव असते, तेच एकमात्र चैतन्यच आपल्याठायी विलसत असते.

नाहीं तऱ्हीं जलीं बुडिजे। तैं घनवट जेणें तरिजे।
जेणे तरिलियांही नुरिजे। कवणीं ठाईं।।२-२१।।

"प्रपंच हा नाहीच. केवळ आभासमात्र प्रपंचसागराच्या जलात जडदेहात्मक बुद्धीचा जीव बुडत असतांना सद्गुरूंच्या साहाय्याने तरतो. पण तो तरलेला जीव ना तर प्रपंचात असतो ना तारणाऱ्याजवळ."

कारण मूलत:च प्रपंच, जीव व सद्गुरू हे सर्व मायाजाळ आहे. चैतन्याची तद्रूपावस्था कधी भंगलीच नाही; विश्व होणे-जाणे-असणे हे सर्व मृगजलाप्रमाणे मायिक वा मिथ्या असते, असा या ओवीचा आशय आहे.

आकाश हे सावेव। न बंधे आकाशाची हांव।
ऐसें कोण्हीं एक भरीव। आकाश जो।।२-२२।।

"सर्वत्र आकाश भरून राहिलेले आहे. ते जाणीवेला विषय होत असते. सद्गुरुसंज्ञित चिदाकाशाच्या तुलनेला हे गुणभासात्मक आकाश पासंगालाही पुरत नाही."

चिन्मय आकाशासारखे तत्त्व सर्वत्र सम पसरले आहे व त्याचेच एक रूप सद्गुरू म्हणून या लोकी प्रसिद्ध आहे; असा या ओवीचा भाव आहे.

चंद्रादि सुशीतलें। आडलीं जेयाचेनि मेलें।
सूर्यु जेयाचेनि उजालें। कडवसेना।।२-२३।।

"त्या सद्गुरू आत्मराजाच्या तेजापासूनच चंद्रादी सुशीतल ज्योती तसेच सूर्यादी प्रखर प्रकाश निर्माण झाले आहेत."

साधकाला साधनाकाली होणारी प्रकाश व ज्योतिदर्शने ही त्या सद्गुरूच्याच आगमनखुणा व आत्मराजाच्या अनुभूतिसूचक निशाण्याच असतात, हा संकेत ही ओवी दिग्दर्शित करते.

जीवपणाचेनि त्रासें। यावया आपुलियें दशें।
शिवही मुहुर्त पुसे। जेयां जोशियांतैं।।२-२४।।

"जीव उत्क्रांत दशेत शिव होतो. तरीही त्याची भवदशा संपत नाही. शिवपणाची शींव ओलांडून ब्रह्मत्वप्राप्ती केव्हा होईल, याची शिवसुद्धा सद्गुरूंजवळ उतावळेपणाने विचारणा करत असतो." त्यालासुद्धा सद्गुरू तारक असतात, हा भाव येथे दर्शवला आहे.

चांदिणें स्वप्रकाशाचें। लेईला द्वैतदुणितें।
तऱ्हीं उघडेपण न वचे। चांदाचें जेयां।।२-२५।।

"सद्गुरू जणू पौर्णिमेचा सुंदर आल्हादकारक चांदण्यात झाकलेला - द्वैतवस्त्राने आच्छादलेला - चंद्रमाच आहे - जो एवढे वस्त्रप्रावरण घेऊनही उघडाच दिसतो; झाकला जात नाही. "

द्वैतभावाने विश्वात संचरतांना दिसणारे सद्गुरू आपले स्वरूप यत्किंचितही लपवू शकत नाहीत, हा भाव ही ओवी प्रकट करते.

जो उघड कीं न दिसें। प्रकाश कीं न प्रकाशें।
असतेपणेंचि नसे। कव्हणीकडें।।२-२६।।

"चंद्रम्यासारखा दिसणारा हा जो सद्गुरू तो इतका उघडपणे वावरत असतांनाही ओळखू येत नाही. तो स्वप्रकाशित असूनही त्याचा प्रकाश डोळ्यांना दिसत नाही." त्याच्याकडे पाहणाऱ्याच्या द्रष्टा-दृश्य व दर्शन या त्रिपुटीचा अस्तच होत असल्याने तो इंद्रियांना विषय होत नाही असे ज्ञानदेवांचे म्हणणे आहे.

आतां जो तो इहीं शब्दीं। कें मेळवूं अनुमानाची मांदी।
हा प्रमाणाही वो नेदी। कोणाही मां।।२-२७।।

"याप्रमाणे शब्दातीत, विषयातीत, इंद्रियातीत असा जो आत्माराम सद्गुरू आहे, त्याला तर्कादी अनुमानांनी किंवा प्रमेयादी प्रमाणांनी सिद्ध करावे म्हटले तर तो त्या प्रत्ययांना दाद न देता, केवल -स्वयंसिद्ध - स्वसंवेद्य असाच राहतो." त्याचे वर्णन कसे करावे हाच मला प्रश्न पडतो, असे ज्ञानदेव उद्गारतात.

जेथें शब्दाची लिपी पुसे। नेणेंसीं चावलें बैसें।
दुजयाच्या रागीं रुसें। एकपणा जो।।२-२८।।

"शब्द जेथे मौनावतात, तेथे त्याचे स्वरूप प्रकट होते. जेथे द्वैतभाव प्रकट होतो, तेथून तो रुसून जातो इतका एकलेपणाचा अभिमानी तो सद्गुरू आहे."

प्रमाणाची सरी सरे। तैं प्रमेयेचि आविष्करें।
नवल मेचु ये धुरें। नाहीपणाचें।।२-२९।।

"अनुमान तर्कादी प्रमाणांनी जो आहे म्हणून सिद्ध करतात, तो त्या प्रमाणांना ***ओ*** सुद्धा देत नाही. त्या प्रमाणादींना निष्प्रभ केल्यावर मात्र हा आपला आपणच *अप्रमेय-प्रमेय* म्हणून साक्षात होतो. या त्याच्या असणे-नसणेपणाची कमालच आहे. बुद्धीच्या - मनाच्या - तर्काच्या - इंद्रियांच्या अतीत असलेल्या त्या तत्त्वाचा साक्षात्कार इंद्रिये, मन, बुद्धी, तर्क ही सगळी पांगुळल्यावर होतो, हे त्याचे वैशिष्ट्य आहे."

काहीबाही अलुमालु। देखें एकादें वेलू।
तऱ्हीं देखें तेहीं विटालू। जेयां गांवीं।।२-३०।।

"असा त्याचा साक्षात्कार होणे हे साधकाचे महद्भाग्य आहे. परंतु त्या तत्त्वाच्या दृष्टीने हा साक्षात्कारस्पर्शसुद्धा त्याच्यापासून लांबचा आहे. कारण इंद्रिये, मन, तर्क, बुद्धी इत्यादींना पेंग आल्यावर होणारा आत्मतत्त्वाचा साक्षात्कार हासुद्धा द्वैतात मोडणारा आहे व तो तर साक्षात अद्वैत तत्त्व आहे. द्वैताच्या दोराने चढून जाऊन अद्वैताचा बालेकिल्ला कसा जिंकता येईल! तर हा साक्षात्कार जो म्हणतात, तो अहंकार न जिरताच होत असल्याने तत्त्वसापेक्ष अस्पर्श्यच म्हटला पाहिजे!"

तेथें नमनें कां बोलें। केऊतीं सूयें पाउलें।
आंगीं लाऊनि नाडिलें। नांवचि येणें।।२-३१।।

"इतके सोंवळें जे सद्गुरू असतात, त्यांना प्रणिपात करावा किंवा त्यांची स्तुती करावी वा त्यांची मूर्ती ध्यानी धरावी अशा देह-वाचा-मन-चित्तादी उपकरणांच्या साहाय्याने त्यांच्यापावेतो कसे बरे पोहोचता येईल! त्यांच्या नामाचा जयजयकार विश्व करते. त्या नामात ते हमखास गंवसतात, असा श्रुतींचा पण सूर आहे. पण खरे पाहिले तर श्रुतींनासुद्धा आपले नाम सागून त्या आत्मयाने फसवलेच आहे. कारण त्या अनाम्याला नाम ते कुठले असणार!"

नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति। वाढवितां कें निवृत्ति।
या नांवाची वाय बुंथी। सांडिचिना।।२-३२।।

"आत्मा शुद्ध आहे. तो प्रवृत्तीच्या प्रवाहात ओढला जाईलच कसा! प्रवृत्तीच्या प्रवाहात न सापडलेल्या आत्मयाने आत्माभिमुख व्हावे हा साधनसंकेतही व्यर्थच आहे. प्रवृत्ती ज्याच्याठायी नाही, त्याला ***निवृत्ति*** या सापेक्ष वृत्तीशी काय मतलब! तरीही या आत्मराज सद्गुरूंनी निवृत्तिनाथरूपाने ***निवृत्ति*** या नांवाची खोळ पांघरली आहेच."

निवर्त्य तंव नाहीं। मां निवर्तवीं हा कांहीं।
तऱ्हीं कैसा बैसे ठाईं। निवृत्तिनामाचां।।२-३३।।

"निवृत्तीशी जर याला काहीच कर्तव्य नाही व हा कशापासूनही निवृत्त होण्याचा जर प्रश्नच उद्भवत नाही, तर निवृत्ति नाम धारण करून हा का राहतो!"

परि सूर्यासि अंधकारु। कैं जाहला होता गोचरु।
तऱ्ही तमारी हा डगरु। आलाचि कीं।।२-३४।।

"सूर्याने कधी अंधकार पाहिला होता कां! तरीही अंधाराचा नाशक म्हणजे शत्रू म्हणून ***तमारी*** हे नांव त्याला देतातच ना! त्याचप्रमाणे ठायी प्रवृत्तीचा लेशही नसणाऱ्या आत्मरूपी सद्गुरूंनी प्रवृत्तीचा निरास करणारे अशा अर्थाचे हे ***निवृत्ति*** नाम धारण केलेले दिसते."

तैसें लटिकें येणें रूढें। जड येणें उजिवडें।
न घडे तेहीं घडें। याचियां मावा।।२-३५।।

"विश्व आभास आहे, तोही याच्याच मायेने प्रकाशतो. जड प्रपंच त्या चेतनाच्या साक्षित्वात विराजमान झालेला भासतो. घटना कोणतीही घडत नाही, घडलेली नाही व घडणारही नाही. तरी याच्या मायेच्या आडवस्त्राने छायापटदृश्याप्रमाणे त्या घडतांना दिसतात."

हां गां मायावशें दाविसी। तैं माईक म्हणूनि वालिसीं।
अमाइक तंव नव्हसी। कवणाहीं विखो।।२-३६।।

"स्वतःच्या मायेने जे दृश्य तुम्ही दाखवता, तेच आभास आहे; मिथ्या आहे; असे म्हणत श्रुतिमुखाने तुम्हीच त्याचा निषेध करता आणि स्वतः मायेच्यापलीकडील आहोत असा निर्देश करून त्याउपर आपण कशाचाही विषय नसतो, हे सांगून, हे सद्गुरो! हे राया! तुम्ही आम्हा सगळ्यांना फार बुचकुळ्यात टाकले आहे."

शिव शिवा सद्गुरू। तुजला गूढा काय करूं।
एकाही निर्धारा करूं। देतोसि कां।।२-३७।।

"***शिव व शिवा*** या अंतरीच्या युगुलात्मक सद्गुरुदेवा! तू इतका गूढ झालास तर आम्ही दीनांनी काय करावे! तुझे दर्शन कोणत्या आधाराने घ्यावे! काहीच कळेनासे होते. कारण कोणत्याही उपायाने तुझे स्वरूप आकळून घेता येत नाही."

नामे रूपें बहुंवसें। उबारूनि पाडिलीं वोसें।
सत्तेचेनि आवेशें। तोषलासि ना।।२-३८।।

"***एकोहम्। बहुस्याम्।।***" अशा स्फूर्तीच्या आवेशाने नामरूपात्मक बहुविधता असलेल्या या विश्वाची निर्मिती तू केलीस. पण त्या विश्वात स्वतः न राहून - त्या नामरूपांच्या अतीत असे स्वतःला ठेवून तू त्यास ओस पाडलेस. असा विलास करून - हा खेळ खेळून तुला संतोष वाटतो ना!"

जीवु घेतलियां उणें। चालों नेदिसी साजणें।
भृत्यु उरे स्वामीपणे। तैंहीं नव्हे।।२-३९।।

"ज्याच्यावर तू कृपा करतोस, त्याचा देहभाव तू नाहीसा करतोस. अशा प्रकारे त्याच्या जीवभावाची ओवाळणी घेऊन झाल्याशिवाय तू त्याच्यावर लोभ व्यक्त करत नाहीस. पूर्वी तो तुझ्या सेवकाचा भाव तरी धारण करून आनंदात राही; पण तू त्याला ना धड सेवक, ना धड धनी अशा अवस्थेला नेऊन ठेवतोस. म्हणजे त्याला भावाभावातीत स्थितीत तू पोहोचवून देतोस!"

विशेषाचेनि नांवें। आत्मत्वही न साहवें।
किंबहुना नव्हे। कोण्ही यया।।२-४०।।

"तूं सच्चिदानंदस्वरुप आत्मा आहेस, असे म्हटलेलेसुद्धा तू चालवून घेत नाहीस.किंबहुना तू म्हणजे कोणीही नाहीस, असे म्हणणेच भाग पडते."

राती नुरेचि सूर्या। ना तऱ्हीं लवण पाणियां।
नुरे जेवीं चेईलियां। नीद जैशी।।२-४१।।
कापुराचें थलीव। नुरेचि आगीची बरव।
नुरेचि रूपनांव। तैसें तेयां।।२-४२।।

"सूर्योदयानंतर रात्र उरत नाही; पाण्याच्या संपर्कात मीठ शिल्लक राहत नाही; कापुराचे अलंकार आगीची झळ पचवून टिकत नाहीत; त्याचप्रमाणे हे सद्गुरुराया! तुझ्याठायी नामरूप शिल्लक राहू शकत नाही."

याच्या हातां पायां पडे। तंव वंद्यत्वें पुढें न मंडें।
न पडेचि हा भिडे। भेदाचियां।।२-४३।।

"या अशा सद्गुरू आत्म्याला नमस्कार करावा म्हटले तर हा तो करून घेण्यासाठी समोर येईल तर ना! कारण त्याला भेद - भिन्नत्व स्पर्शत नाही."

आपणांप्रति रवी। उदो न करी जेवीं।
हा वंद्य नव्हे तेवीं। वन्दनासीं।।२-४४।।
कां समोरपण आपुलें। न लाहिजे काईं केलें।
तैसें वंद्यत्व घेतलें। हिरोनि येणें।।२-४५।।
आकाशाचा आरिसा। नुठी प्रतिबिंबाचां ठंसा।
हा वंद्य नव्हे तैसा। नमस्कारासीं।।२-४६।।
परि नव्हे तऱ्हीं न हो। हे वेखासि कां घेवो।
परि वंदितयांहीं ठावों। उरों नेदी।।२-४७।।

"रवी जसा स्वतःप्रति उदित होत नाही, तसाच हा गुरुराजा वंदनाने वंद्य होत नाही. ज्याप्रमाणे आपणच आपल्याला सामोरे येऊ शकत नाही, त्याचप्रमाणे याला हाच वंदन कसे बरे करू शकेल! आकाशाचा आरसा केला तर त्यात प्रतिबिंब उमटेल का! तसाच याला नमस्कार केल्याने नमस्कार होईल कां! असो."

"जर त्याला वंदन करणे शक्य नसेल तर नसो. आपण तरी त्याच्याविरुद्ध भावाने का वागावे! परंतु असे असले तरी याला वंदन करणाऱ्याचा थांगपत्तासुद्धा तो सद्गुरू राहू देत नाही."

आत्मा हा सद्गुरू. त्याच्याशी सर्वथा अभिन्न! त्याला भिन्नभावाने वंदन करणे कोणालाही शक्य नाही. पण हे लक्षात आले की आपणच आत्मा आहोत हे कळून येते. त्यानंतर साधकाला आत्म्याहून भिन्नत्वाने राहता येत नाही. हेच आत्म्याला केलेले खरे वंदन! असे वंदन करणाऱ्याचा जीवभाव तो सद्गुरू आत्मराजा नाहीसा करतो, हा या ओवीचा भावार्थ!

आंगौनि एकुणा झोलु। फेडितांचि तऱ्हीं तो बाहिरीलु।
कडु फिटे आतुलु। न फेडितांचि।।२-४८।।
नाना बिंबपणासरिसें। घेऊनि प्रतिबिंब नासे।
नेलें वंद्यत्व येणें तैसें। वंदलेनसीं।।२-४९।।

"नेसूच्या धोतराचा एक पदर फेडला तर सर्वच धोतर सुटते व मनुष्य विवस्त्र होतो; किंवा डबकें आटले की प्रतिबिंब नाहीसे होते व बिंब एकटेच उरते. त्याचप्रमाणे याला वंदन करू पाहणाऱ्या जीवाचे होते. याच्यापावेतो वंदनाकरता जो पोहोचतो, तो वेगळा असा उरतच नाही; उरतो तो एकमात्र उघडा आत्मा!"

नाही रूपाची जेथे सोयें। तेथ दृष्टीचें काईंचि नोहे।
आम्हां फललें हे पायें। ऐशियां दशा।।२-५०।।
गुणातेलाचियां सोयरिकां। निर्वाहिलीं दीपकलिका।
तैं कां होईल पुलिका। कापुराचियां।।२-५१।।
तेयां दोहों परस्परें। होय ना जंव मेल्हेरें।
तंव हीचेहीं सरें। सरिसेंचि।।२-५२।।
तेवी देखेन मी येयातैं। तंव गेलें वंद्य वंदितें।
चेईलियां कांतें। स्वप्नींचि जेवीं।।२-५३।।
किंबहुना इयां भाखा। द्वैताचां जेथ उपखा।
फेडूनियां स्वसखा। श्रीगुरु वंदिला।।२-५४।।

ज्याला रूप नाही, त्याच्याठायी दृष्टीचा लाग लागणे संभवत नाही. अशा या सद्गुरूंना वंदन करण्यासाठी त्यांची पावले आम्हास आता सापडलीत. कशी ते पाहाः

"तेल वात यांना अग्नीचा संपर्क झाला की दिवा उजळत राहतो व बराच वेळ टिकतो. परंतु कापराच्या खड्याला जर अग्नीचा स्पर्श झाला तर कापूर व अग्नी दोन्हीही नाहीसे होतात. कापूर तेलवातीच्या दिव्याप्रमाणे काही निर्वाह करू शकत नाही. श्रीसद्गुरू आत्मयाची पावले जेव्हा मी पाहू गेलो, तेव्हा कापराचा अग्नीशी संयोग घडावा, तसेच अगदी झाले. वंद्य, वंदिता व वंदन ही त्रिपुटीच तेथे समूळ लोप पावली."

"स्वप्नात स्त्री दिसावी व जाग येताच पाहावे, तो आपल्याशिवाय कोणीच नाही; सद्गुरूला वंदन करायला जावे तर अशीच स्थिती झाली. द्वैतभावनेचे पाहणे सामान्यांस नेहमीचेच असते. परंतु सद्गुरूंकडे द्वैतभावाने पाहणे म्हणजे निव्वळ कष्ट अन सायास! किंबहुना त्यांच्या पावलांना वंदन करू म्हटले तर आपण आपल्यालाच - आपल्या सुहृदास म्हणजे आत्मराजास वंदन करतो आहोत, असे होते."

श्रीगुरूंना वंदन करण्याचा प्रकार हा असा आहे, असे ज्ञानदेव स्पष्ट करतात.

याच्या सख्याची नवाई। अंगीं एकपण रूप नाही।
आणि गुरुशिष्या दुवालीहीं। पवाडु केला।।२-५५।।
कैसा आपणां आपण। दोंवीण सोयरेपण।
याहूनि विलक्षण। नाहीं हा नोहें।।२-५६।।

"या सद्गुरूच्या व शिष्याच्या सख्यत्वाचे नवल तर पाहा. यांच्यात द्वैत तर नाहीच नाही; पण अद्वैत वा एकत्व तरी आहे म्हणावे तर तेसुद्धा द्वैतसापेक्ष असल्याने अद्वैतही नाही. एकत्वाच्या या विशेष लक्षणाने मंडित असे हे तत्त्व गुरू-शिष्य या जोडगोळीच्या रूपाने विस्तारते, विलसते व चिद्विलास करते. स्वतःतच दोन भिन्न व्यक्ती कल्पिता येत नाहीत; तरीही स्वतःची स्वतःशीच विलक्षण सोयरीक गुरुशिष्यरूपाने हा महान आत्मदेव करतो."

जग आघवेंचि पोटीं माये। गगनाएवढें होऊनि ठायें।
कीं तैंचि निसीं साहे। नाहींपणाचीं।।२-५७।।
कां पूर्णतें आधारू। सिंधु जैसें दुर्भरू।
तैसा विरुद्धा पाहुणेरू। ययाचां दारीं।।२-५८।।
तेजा तमातैं काईं। परस्परें नीकें नाहीं।
परि सर्वांचां ठाईं। सूर्यूचि असे।।२-५९।।
एक म्हणतां भेदें। तें कीं नानात्वें नांदे।
विरुद्धें आपणयां विरुद्धें।होतील काईं।।२-६०।।
म्हणौनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोन्हीं शब्दांचा अर्थु।
श्रीगुरुचि परि होतु। दोंहों ठाईं।।२-६१।।

"याच्या पोटात सर्व विश्व सामावलेले आहे. हा गगनाहूनही विशाल आहे. कारण गगन सर्वंकष असूनही त्या आत्म्यातच असते. असा हा गुरुराज आत्मा अव्यक्तदशेत नाहीपणाने असतो, हे केवढे आश्चर्य! सिंधू जलाने परिपूर्ण असतो. किंबहुना जगातील सर्व जलाचा उगमबिंदू सिंधूच असतो. असे असले तरी वर्षाकाली कितीही मेघधारा वर्षोत, वा सतत दुथडी भरून वाहणाऱ्या विस्तीर्ण पाटाच्या कितीही महानद्या त्याला का न मिळोत; तो त्या जलाने कधीच भरून जात नाही. अशाच प्रकारचा विरोधाभास दाखवणारा देखावा या आत्म्याठायी निपजतो."

"तेज व तम यांचे परस्परात पटत नाही; प्रकाश असतो तेथे अंधार असत नाही व अंधार असतो तेथे प्रकाश वसत नाही. असे असले तरी तेज व तम यांना आधार व अस्तित्वप्रदाता एकमेव सूर्यच नसतो का!"

"श्रुतीने आत्मरूप एकत्वाने असते, अद्वितीय असते, असे प्रतिपादन केले आहे. पहायला जावे तर तृणापासून शिवापर्यंत ते आत्मतत्त्व अनेकत्वाने विराजते. तर हे अनेकत्व वा द्वित्व मूळ आत्म्याच्या एकत्वाचेच होत असल्याने ती दोन्ही म्हणजे अद्वैत व द्वैत ही एकमात्र अद्वैतच असली पाहिजेत. सिद्धांतापासून उपजणारे प्रमेय जरी भिन्न वाटले तरी ते त्या विरोधी असू शकत नाही. म्हणून शिष्य व गुरुनाथ हे दोन्ही शब्द समानार्थी व एकाच एकाचे निर्देशक असले पाहिजेत. दोन ठिकाणी असणारे ते एकले एक आत्मतत्त्व वा गुरुतत्त्वच असते."

कां सुवर्ण आणि लेणें। वसतें एकें सुवर्णें।
वसतें चंद्र चांदिणें। चंद्रीचि जेवीं।।२-६२।।
ना ना कापुर आणि परिमलु। कापुरचि केवलु।
गोडी आणि गुलु। गूळुचि जेवीं।।२-६३।।
तैसा गुरुशिष्यमिषें। हाचि एकु उल्हासें।
जऱ्हीं काईं दिसें। दोनीपणें।।२-६४।।

"सुवर्ण आणि त्याचा बनवलेला अलंकार या दोघात एक सुवर्णमात्र जसे असते; किंवा चंद्र आणि चांदणे यांना कारण मूळ चंद्रच जसा असतो; किंवा गूळ व त्याची गोडी जशी अभिन्न असतात; तसाच शिष्य व गुरू यांच्या रूपाने दोन ठिकाणी दिसत असला, तरी हा एकमात्र आत्मराजच तेथे उल्हसत असतो - विलसत असतो."

आरिसा आणि मुखीं। मी दिसे ही उखी।
हे आपुलिये ओलखी। जाणें मुख।।२-६५।।
पाहा पां निरञ्जनीं निदैला। तो निर्विवाद एकला।
परि चेतां चेववितां जालां। दोनीं तोचि।।२-६६।।
तैं तोचि चेता तोचि चेतवीं। तेवीं हाचि बुझें बुझावीं।
गुरुशिष्यत्व नांदवीं। ऐसेनि हा।।२-६७।।

"दर्पणामध्ये दिसणारे मुख नसून त्याचे प्रतिबिंब असते. म्हणजे आभासमात्र असते, हे जाणणारा मनुष्यसुद्धा आरशातल्या प्रतिबिंबास

माझे मुख म्हणून जसा ओळखतो; किंवा निर्जन अरण्यात जो निजला, तो स्वत:सच निजवतो व जागा झाला की स्वत:चा स्वत:च जागा होतो; त्याला निजवणारे व जागवणारे इतर कोणीही जसे तेथे नसते, त्याप्रमाणेच आत्मराजच गुरू व शिष्य अशी रूपे दाखवतो व त्यांची एकीसुद्धा तोच दाखवतो. अशा प्रकारे सद्गुरू आत्मा गुरू-शिष्यरूपाने विलास करतो."

दर्पणेवीण डोलां। आपुलें भेटीचा सोहोला।
भोगितां तर्‍हीं लीला। सांगतो हें।।२-६८।।
एवं द्वैतासीं उमसो। नेदी ऐक्यासीं विसकुसो।
सोईरिकीचां अतिसो। पोखितसे।।२-६९।।

"डोळ्याला जर आरशाविना आपली स्वत:ची भेट झाली असती, तर सद्गुरूची ही लीला आपण समजून घेऊ शकलो असतो. द्वैतत्वाने वावरूनही ऐक्यास अजिबात धक्का लागू न देता व अद्वैतातून किंचिन्मात्रही न ढळता गुरुशिष्य द्वैतभावाचा परिपोष करण्याची ती सद्गुरूंची लीला अतर्क्यच अहे."

निवृत्ति जेयां नांव। निवृत्ति जेयां बरव।
जेयां निवृत्तिचि राणीव। निवृत्तिची।।२-७०।।

"ज्याचे नांव निवृत्ति आहे; ज्याची शोभा पण निवृत्तिच आहे; ज्याचे साम्राज्य पण निवृत्तिच आहे, असा माझा सद्गुरू आहे - तोच आत्मा आहे!"

वांचौनि प्रवृत्तिविरोधें। कां निवृत्तिचेनि बोधें।
आणिजे तैसा वादें। निवृत्ति नोहें।।२-७१।।

"अशा प्रकारे, ना तर प्रवृत्तीच्या विरोधाने वा ना निवृत्तीच्या बोधाने निवृत्ति मिळवावी, तर तशी आत्मराज सद्गुरूंची निवृत्ति नाही. ती प्रवृत्ति-निवृत्तिसापेक्ष नसून सहजच निवृत्तिस्थिती आहे."

आपणां देऊनि राती। दिवसा आणि उन्नती।
प्रवृत्ति वारी निवृत्ति। नव्हे तैसा।।२-७२।।

"रात्र स्वत: नाहीशी होऊन दिवसाला दाखवते, तसा प्रवृत्ति घालवून निवृत्ति आणणारा माझा सद्गुरू दातार नाही."

आपेसराचें बळ। घेऊनि मिखें कील।
तैसें रत्न नव्हें निखिल। चक्रवर्त्ति हा।।२-७३।।

"रत्नाखाली त्याचे तेज चमकावे म्हणून घासून गुळगुळीत केलेला धातूचा पत्रा घालतात. त्यायोगे रत्न दिमाखात झळकू लागते. तसे काही या निवृत्तिचे नाही. तो निखिल चक्रवर्ती आत्मराज दिमाखात स्वानंदसाम्राज्यावर विराजमान झालेला आहे."

गगनही सूनि पोटीं। जैं चंद्रमेचीं पघलें पुष्टी।
तैं चांदिणें तेणेंसि उठी। आंग जेयाचें।।२-७४।।
तैसें निवृत्तिपणासीं कारण। हाचि आपणयां आपण।
घेवावेयां फूलचि झालें घ्राण। आपुली दृति।।२-७५।।

"चंद्र प्रकाशला की गगनभर त्याचे चांदणे विखुरते; ते चांदणे जसे बचकभर चंद्रबिंबापासूनच फुटलेले असते; किंवा आपलाच गंध घेण्यासाठी फुलाने आपणच जसे नाक व्हावे; त्याचप्रमाणे स्वत:च स्वत:ला भोगावे म्हणून हा निवृत्ति झाला."

या योगे हे तत्त्व ***स्वसंवेद्य*** आहे, असे ज्ञानदेव सांगतात. चिद्विलासाचा हा ***मानबिंदू*** आहे.

दिठी मुखाचियां बरवें। पाठीकडूनि जैं पावें।
तैं आरिसा धांडालावें। लगती काई।।२-७६।।
कीं रातीं हन गेलियां। दिवस हन पातलियां।
काय सूर्यपण सूर्या। होआवें लागें।।२-७७।।
म्हणौनि बोध्य बोधौनि। घेपें प्रमाणें साधौनि।
ऐसा नोहें भरंवसेनि। गोसावी हा।।२-७८।।
ऐसें करणियेवीण। स्वयंभचि जैं निवृत्तिपण।
तेयांचि श्रीचरण। वंदिलें ऐसें।।२-७९।।

"दृष्टी वळवून जर आपल्याच मुखावर टाकता आली असती तर आरशाची गरज उरली नसती; त्याचप्रमाणे स्वत:चे रूप स्वत:ला आकलन होत नसल्याने श्रीगुरुरूप आरशाची त्याकरता आवश्यकता असते *(७६)*. रात्र निमाली व दिवस पातला म्हणजेच सूर्याला सूर्यपण येते असे नाही; तर सूर्यपणा सूर्याठायी स्वत:सिद्धच असतो. त्याचप्रमाणे श्रीगुरूंनी प्रकाशित केलेले म्हणूनच शिष्याचे आत्मरूप सिद्ध होते असे नसून ते त्याच्याठायी स्वयमेवच असते *(७७)*. म्हणून बोध झाला किंवा श्रीगुरूंनी बोध केला म्हणून शिष्यास आत्मतत्त्वाची प्राप्ती झाली असे नसून ते तत्त्व त्या दोघांठायी सारखेपणानेच विराजते, यात काय संशय! असे गुरुशिष्यसंबंधविवर्जित जे सद्गुरू आत्मराजाचे श्रीगुरुत्व, त्याचे श्रीचरण ज्ञानराज वंदितात *(७८,७९)*."

गुरुप्रसाद

आतां ज्ञानदेओ म्हणे। श्रीगुरुप्रमाणें येणें।
फेडिली वाचाऋणें। चौंहीं वाचांचीं।।२-८०।।

ते म्हणतात: "याप्रकारे श्रीगुरूंना वंदन केल्यामुळे मी चारही वाचांच्या ऋणातून मुक्त झालो - उऋण झालो."

वाचाऋण

चारही वाचा म्हणजे ***परा, पश्यंति, मध्यमा व वैखरी*** वा ज्ञानदेवांच्या शब्दात ***भारति.*** बोध प्राप्त करून देण्यासाठी या वाचांचा उपयोग असतो. *वैखरी ते परा* हा बोधाचा प्रवास उत्तरोत्तर सूक्ष्म होत जातो. वैखरीमध्ये तो केवळ वरवरचा असतो. तर परेमध्ये तो***सोऽहं*** या अनुसंधानाने व्यक्त होतो. श्रीगुरु वा आत्मा हा परेच्याही पल्याड नांदतो. तो परादी चारही वाणी प्रकाशित करतो. या चारही वाचांच्या द्वारे झालेला बोध ***अविद्या वा अज्ञान*** या प्रांतातीलच असतो. जेव्हा अविद्येचा प्रांत ओलांडावा म्हणजेच चारही वाचांचा प्रदेश क्रांत करून जावे, तेव्हा खरी आत्मदशा अनुभवायला मिळते.

या चारही वाचांचा प्रांत म्हणजे ***ॐकाराच्या अ, उ, म व अर्धमात्रा.*** यांचा उल्लेख ***जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या*** यांद्वारे

पण केला जातो. चारही वाचा निवृत्त होणे वा यांच्या ऋणातून मुक्त होणे याचा अर्थ या चारही अवस्था, ज्या विश्वाभिव्यक्तीच्या निदर्शक अशा आहेत, त्यांच्यापलीकडील आत्मतत्त्वाची अनुभूति घेणे - ज्याला ***स्वसंवेद्यता*** म्हणतात, ती अनुभवणे. वाचाऋणाचे स्वरूप व ते किती लागट असते, ते ज्ञानदेव ***वाचाऋणपरिहार*** या अमृतानुभवाच्या *तृतीय* प्रकरणात स्पष्ट करतात.त्यांची त्याबाबतची एक लक्षणीय ओवी अशी आहे:

तैं ऋणशेष वाचा इयां। ने फेडवेचि मरोनियां।
तैं पायां पडौनि मियां। सोडविलें।।३-३२।।

मृत्यूपरांतही मागे लागणारे, जीवाला जन्मामागून जन्म घ्यायला लावून संसाराच्या फेऱ्यात जखडणारे असे जे या संसाराचे बंधन म्हणजे ऋण असते, त्याला ***वाचाऋण*** म्हणतात. ते केवळ एकाच उपायाने फिटते. ते म्हणजे अपार आत्मधनसंपत्तीने युक्त असणाऱ्या श्रीगुरूंनी जर मेहरबानी करून ते फेडले तरच! अन मग तो उपकृत शिष्य त्या श्रीगुरूचाच तर केवळ होऊन राहणार नाही का!

"एकोऽहम्"

हे लागट ऋण आदिकालपासून - जेव्हा ***"एकोऽहम्। बहुस्याम्।।"*** ही ***आदिप्रवृत्ति*** व्याली - जीवापाठी जन्ममृत्यू लागले, तेव्हापासूनचे आहे. हे अज्ञानजन्य आहे. म्हणजे खरे तर ऋणही नाही व त्या वाचाही नाहीत. म्हणून कितीही जन्ममृत्यू झाले तरी ते फिटत नाही. जन्मोजन्मी जीवासोबत येणारे ***अज्ञान*** म्हणजेच ***वाचाऋण.*** त्याची जाणीव जीवास ***जगत वा विश्वाची अनुभूति*** या रूपाने होत असते.

आत्मस्थिती प्राप्त होताच हे ऋण शेष राहत नाही. ते नाहीसे होते. याच अर्थाने ज्ञानदेव म्हणतात की *(अ.२-८०)* :

"स्वसंवेद्य आत्मतत्त्वास *(अमृतानुभवाच्या द्वितीय प्रकरणी वर्णन केल्याप्रकारे)* वंदन करून, त्याचे श्रीचरण उराशी कवटाळून घेतल्यानेच मी चारही वाचांच्या ऋणांची फेड करू शकलो; माझा जीवभाव - जगतप्रतीती निमालीत; त्रिपुटी सांडून माझ्या अंतरीचा दीप उजळला; मी दृश्य- द्रष्टा-दर्शन यांच्या अतीत झालो; जीव व शिव या दोन्ही भावांतून मुक्त झालो; माझे अंतःस्वरूप मला गंवसले; ***मी परत मी झालो;*** मी आता आत्मानुभवात निमग्न झालो आहे."

हाच तो अमृतानुभव! आणि हीच ती ज्ञानदेवांची अनुभूति! हीच तर संपूर्ण ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी आणि त्यांच्या विविध अभंगरचनांतून सतत उमटत राहते!

या अनुभूतीचे स्वरूप आपणांस आकळल्याखेरीज ज्ञानदेव आपणांस *परेच्याही पल्याडचे* राहतील! म्हणून गुरुवंदनाच्या निमित्ताने त्यांनी अमृतानुभवात प्रकटविलेली आत्मानुभूती आपण अवलोकिली.तिचे स्वरूप जाणून घेण्याचा एक प्रयत्न आपण केला. ***तसेच आत्म्याचे स्वरूप, जीव-जगत- ईश्वर यांचा संबंध व त्याबाबतचे ज्ञानदेवांचे साक्षेपी तत्त्वज्ञान यांचाही पुरेसा परिचय आपण त्यांच्या अमृतानुभवातील पंचश्लोकी व गुरुस्तवनाच्या ऐंशी ओव्यातून करून घेतला.***

गुरू हाच आत्मा आणि तोच ईश्वर! आत्मा तोच गुरू आणि तोच ईश्वर! गुरू, आत्मा आणि ईश्वर यांचे असे अभिन्नत्व आहे. ***"गुरु, आत्मा, परेशु"*** हे एकच! असे संतांनी या गुरू-ईश्वर-आत्मतत्त्वासंबंधी म्हटलेले आहेच! पतञ्जली ईश्वराविषयी व त्याच्या गुरुत्वाबाबत ***"स एष पूर्वेषामपि कालेनानवच्छेदात्।।१-२६।।"*** असे जे म्हणतात ते असे ज्ञानेश्वरांच्याही वाणीतून उमगते. या दृष्टीने पाहिले की त्यांच्या व्यापक तत्त्वज्ञानाचा आणि सर्वंकष आत्मानुभूतीचा अर्थ अमृतानुभवाद्वारे कसा उलगडू लागतो, ते आपणांस समजू लागते. असो.

कितीही गोड असला तरी अमृतानुभवावरील व्याख्यान हा आपला मूळ विषय नाही. ज्ञानेश्वरांना समजावून घेण्यासाठी आपण ज्ञानेश्वरीची कांस धरली आहे. त्यात प्रसंगोपात्त त्यांचे इतर वाङ्मयही डोकावणारच! कारण त्यांच्या इतर वाङ्मयकृतींचा आस्वाद घेतघेतच आपणांस खरे ज्ञानदेव आकळून येणार आहेत.

असो. आता मूळ विषयाकडे परतू या; ***अज्ञानलक्षणांचा उर्वरित भाग*** पुढील ***उन्मेष क्र.१२ - अज्ञानलक्षणे (२)*** यात पाहू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१२::
::::अज्ञानलक्षणे (२)::::

अशुचित्वादी लक्षणे::::

अज्ञानलक्षणातील ***गुरुद्रोह*** या ***आचार्योपासना*** विरोधी गुणाचा परामर्ष आपण मागे घेतला होता *(उन्मेष क्र.१०)*. आता ज्ञानदेव ***शुचित्वा*** च्या विरोधी ***अशुचित्व*** लक्षण सांगतात, ते पाहू या;

७)अशुचित्व

अशुचित्वाचे वर्णन करतांना ते म्हणतातः

तर्‍हीं आंगें कर्में ढीला। जो मनें विकल्पें भरला।
अडवींचा अवगलला। कुहां जैसां।।१३-६७७।।
तेयां तोंडीं कांटवडे। आंतु नुसधीं हाडें।
अशुचिचि तेणें पाडें। सबाह्यु जो।।६७८।।
जैसें पोटालागीं सूणें। उघडें झांकिलें न म्हणें।
तैसें आपुलें परावें नेणें। द्रव्यालागीं।।६७९।।
एयां ग्रामकुलाचां ठायीं। जैसा मिळणीं ठाओ अठाओ नाहीं।
तैसा स्त्रीविषयीं काहीं। विचारीना।।६८०।।

ज्ञानदेव म्हणतातः "जो कर्मे करण्याचा आळस करतो; ज्याचे मन सांसारिक विकल्पांनी भरलेले असते; तो म्हणजे काटेरी झुडुपांनी आच्छादलेला आणि घाण व हाडके यांनी भरलेला जसा काही आडरानातला आडच होय. तो अंतर्बाह्य अपवित्र असतो. कुत्रे जसे उघड्यावर पडलेले पदार्थ व झाकलेले पवित्र अन्न यातील फरक न जाणता वाटेल तेथे तोंड घालते, तसाच हा अज्ञानी मनुष्य आपले व परके असा धनातील फरक जाणत नाही. कोणत्या मादीशी संभोग करावा याविषयी श्वानकुलात जसे कोणतेच नीतिनियम नसतात; कोणताच विधिनिषेध नसतो; तसेच या मनुष्यास कोठल्याही स्त्रीशी संग करण्यात दिक्कत वाटत नाही."

कर्माचां वेळु चुके। कां नित्यनैमित्तिक ठांकें।
तैं जेयां न दुखे। जीवामाजीं।।६८१।।
पापी जो निसगु। पुण्याविखीं अति निलागु।
जेयाचां मनीं वेगु। विकल्पाचां।।६८२।।
तो जाण निखलां। अज्ञानाचा पुतला।
जो बांधौनि असे डोलां। वित्तशेतें।।६८३।।

"कर्मांची ठरवून दिलेली वेळ ते ते कर्म न करताच टळली किंवा नित्य वा नैमित्तिक कर्मे करण्याचे राहिले, तरी ज्याला काहीच दुःख वाटत नाही; पापाविषयी जो निर्लज्ज असतो व पुण्याविषयी बेगुमान असतो; ज्याच्या मनात विकल्पांचे जाळे पसरलेले असते; ज्याचे चित्त धनदौलतीत, शेतीवाडीत, घरादारात अडकलेले असते; तो मनुष्य म्हणजे निव्वळ अज्ञानाचा पुतळाच समजावा."

८)अस्थिरता व मनाचे चांचल्य

यानंतर ***स्थैर्य*** या ज्ञानगुणसंपत्तीच्या विरोधी अज्ञानलक्षण जे ***अस्थैर्य,*** त्याचे विवेचन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणि स्वार्थे अलुमालें। जो धैर्यापासूनि चले।
जैसें तृणबीज ढले। मुंगियेचेनि।।१३-६८४।।
पावो सूदलिया सवें। जैसें थिल्लर कालवे।
तैसा भयाचेनि नांवें। गजबजे जो।।६८५।।
वायूचेनि सावायें। धू दिगंता जायें।
दुःखवार्ता होये। तैसें जेयां।।६८६।।
मनोरथांचियां धरसा। वाहणें जेयाचियां मानसां।
पूरीं पडलियां जैसा। दुधियां पाहीं।।६८७।।

"आणि हे अर्जुना! ज्याप्रमाणे गवताचे बी मुंगीच्या धक्क्यानेसुद्धा हलते, त्याप्रमाणे थोड्याशा स्वार्थानेसुद्धा जो केलेल्या निश्चयापासून ढळतो; डबक्यात पाऊल पडले, तर ते जसे त्यातील चिखल व पाणी कालवून जाते, तसे भयाचे नांव ऐकूनच ज्याच्या चित्तात कालवाकालव होते; वायूच्या झोक्याने धूर जसा थेट क्षितिजापर्यंत फेकला जातो अन् आसमंतभर पसरतो, तसे ज्याचे मन दुःखवार्ता ऐकताच पूर्ण व्यापले जाते; पुरात पडलेला वाळका भोपळा ज्याप्रमाणे पाण्याच्या लाटेबरोबर वाटेल तिकडे वाहत जातो, तसे मनोरथांच्या पुराने ज्याचे मन इतस्ततः दिशाहीन भटकत असते; तो मनुष्य अज्ञानी असतो."

वाउधणाचियां परी। जो आश्रो केंहींचि न धरी।
क्षेत्रीं तीर्थीं पुरीं। थारों नेणें।।६८८।।
कां मातलियां सरडा। पुढती बुड पुढती शेंडा।
हिंडणवारा कोरडा। जैसा जेयां।।६८९।।
जैसा रोंविल्याविणें। रांजणु थारों नेणें।
तैसा पडे तैं राहाणें। एर्‍हवीं हिंडें।।६८९।।
तेयाचां ठायीं उद्दंड। अज्ञान असे वितंड।
जो चांचल्यें भावंड। मर्कटाचें।।६९०।।

"आणि वावटळीप्रमाणे जो कोठेही स्थिर राहात नाही व कोणत्याही क्षेत्रात, तीर्थस्थानी वा अयोध्यादी मोक्षदायक सप्त पुऱ्या यात राहू इच्छित नाही; माजलेला सरडा जसा झाडाच्या बुडापासून शेंड्यापर्यंत व पुनः शेंड्यापासून बुडख्यापर्यंत व्यर्थ खेपा करत असतो, त्याप्रमाणे जो निरर्थक भटकंती करतो; जमिनीत रोवलेला रांजणच एका ठिकाणी जसा नाईलाजास्तव पडून राहतो, तसा जो मनुष्य बळेच बसवला तरच एका जागी थांबतो, अन्यथा उगीचच सर्वदूर हिंडत राहतो; त्या माणसाठायी माकडासारखे चांचल्य असते आणि तो उद्दंड अज्ञानी असतो."

९) आत्मविनिग्रहाचा अभाव

अस्थैर्यसूचक ओव्यांनंतर ज्ञानदेव ***असंयम*** वा ***आत्मविनिग्रहाचा अभाव*** या अज्ञानलक्षणाचा निर्देश करतातः

आणि पैं गां धनुर्धरा। जेयाचियां अंतरा।
नाहीं वोढवारा। संयमाचा।।१३-६९२।।
लेंडियें आला लोंढा। न मनीं वालुवेचां वरंडा।
तैसा निषेधाचियां तोंडां। बिहेना जो।।६९३।।
व्रतातैं आड मोडी। धर्मातैं पायें वोलांडीं।
नियमाचीं आंस तोडी। जेयाचि क्रिया।।६९४।।
नाहीं पापाचां कांटाला। नेदी पुण्यासीं जिव्हाला।
लाजेचां पेंडवला। खाणौनि घालीं।।६९५।।
कुलेंसीं जो पाठिमोरा। वेदाज्ञेसीं दुऱ्हा।
कृत्याकृत्यव्यापारां। निवाडु नेणें।।६९६।।

"आणि हे अर्जुना! ज्याच्या अंतःकरणाला संयमाचा धरबंध नाही; ओहोळाला पूर आला की जसा तो वाळूच्या बांधाला जुमानत नाही, तसा विधिनिषेधपर वेदवचनांना जो घाबरत नाही; जो व्रते अर्धवट टाकून देतो; स्वधर्म ओलांडून जातो; नियमांना थारा देत नाही; ज्याला पुण्याचा जिव्हाळा नाही अन पापाचा कंटाळा नाही; जो मर्यादाहीन अन लज्जाहीन आहे; जो कुलधर्म कुलाचार मानत नाही; जो वेदाज्ञेस बासनात गुंडाळून ठेवतो; जो योग्यायोग्य कर्म जाणत नाही; तो अज्ञानी असतो."

वसों जैसा मोकाटु। वारा जैसा अफाटु।
फुटला जैसा पाटु। निरञ्जनीं।।६९७।।
आंधळें हातिरु मातलें। डोंगरीं जैसें पेटलें।
तैसें विखीं सुटलें। चित्त जेयाचें।।६९८।।
पैं उबडा काइं पडे। मोकाटु कोण्हांच नातुडे।
ग्रामद्वारींचें आडें। नोलांडी कोण्ह।।६९९।।
जैसें सत्रीं अन्न जालें। कीं सामान्या बीक आलें।
वासणियेचें उभलें। कोण्ह न रिगे।।७००।।
तैसें जेयाचें अंतःकरण। येयाचां ठायीं संपूर्ण।
अज्ञानाची जाण। ऋद्धि आहे।।७०१।।

"सोडलेला पोळ जसा मोकाट असतो; वारा जसा बेफाम वाहतो; अरण्यातील पाण्याचा प्रवाह जसा वाट फुटेल तिकडे धावतो; किंवा आंधळा हत्ती जर माजला तर जसा बेभान अन दिशाहीन होऊन वाटेल तो प्रळय माजवतो; डोंगरावर पेटलेला वणवा जसा कोणीकडेही पसरतो; त्याप्रमाणे ज्या मनुष्याचे चित्त वासना व उपभोगात स्वैर संचार करते; अन्नसत्रात जसा कोणालाही प्रवेश असतो; सामान्य माणूस मिळालेला थोडाही अधिकार जसा वाटेल तसा गाजवत सुटतो; वेश्येचे दार जसे सर्वांना खुले असते; त्याप्रमाणे ज्याचे अंतःकरण सर्व प्रकारच्या विषयांना मुक्तद्वार ठेवते, चांगले-वाईट, कृत्य-अकृत्य काही जाणत नाही; त्या मनुष्याच्या ठिकाणी अज्ञानाची पुरेपूर भरभराट आहे, असे जाणावे."

१०)विषयासक्ती, भोगासक्ती वा अवैराग्य

विषयवैराग्य या ज्ञानगुणाच्या विरोधी गुण म्हणजे ***अवैराग्य*** वा ***विषयासक्ती*** . त्याबद्दल ज्ञानदेवांचे विवेचन पाहाः

आणि विषयांची गोडी। जो जीतु मेला न संडीं।
स्वर्गीहीं खावया जोडी। येथौनिचि।।१३-७०२।।
जो अखंड भोगां जचे। जेयां व्यासन काम्यक्रियेचें।
मुख देखौनि विरक्ताचें। सचैल करी।।७०३।।
विखो शिणौनि जाये। परि न शिणे सावधु नोहे।
कुहिलां हातीं खाये। कोढी जैसा।।७०४।।

"आणि ज्याला विषयांची खूप आवड असते; जिवंतपणीच काय पण मेल्यानंतरही स्वर्गात उपभोग मिळावेत म्हणून जो मुद्दाम इष्टापूर्त कर्मे करतो; जो अखंड विषयात रममाण होतो; ज्याला काम्य कर्मांचे व्यसनच आहे; जो विरक्त व निष्काम पुरुषाला पाहिल्यावर अमंगलाचा स्पर्श झालासे मानतो; विषय ज्याच्या उपभोगांनी शिणतील पण जो काही केल्या विषयांनी शिणत नाही; विषयोपभोगांआडले धोके ज्याला अजिबात कळत नाहीत; महारोगी जसा सडलेल्या हातांनी जेवतो, पण त्याची त्याला किळस वाटत नाही, तशी ज्याला विषयवासनांची किळसच वाटत नाही, तो अज्ञानीच असतो."

खरी टेंकों नेदी उडै। लातौनि फोडी नाकाडें।
तऱ्हीं जेवीं न काढे। माघौता खरु।।७०५।।
तैसा जो विषयालागीं। उडी घाली जलतियें आगी।
व्यसनाचीं आंगीं। लेणीं मिरवी।।७०५।।

"गाढवाला गाढवी अंगस्पर्श करू देत नाही, वर लाथांनी त्याचे नाकाड फोडून काढते, तरी ते जसे गाढवीचा माग सोडत नाही, त्याप्रमाणे विषयोपभोगांनी ज्याचे शरीर शिणले किंवा शरीरावर क्षते पडली, अंग दुर्धर रोगांनी ग्रासले गेले, तरीसुद्धा जळत्या आगीत उडी घेण्यासारखा विषयांचा लाग न सोडण्याचा मूर्खपणा जो करतो व त्या व्याधींच्या खुणा जो लेण्यांसारख्या मिरवतो, त्याची आणखी कितीतरी अज्ञानलक्षणे सांगता येतील."

फुटौनि पडे तंव। मृग वाढवी हांव।
परि न म्हणे तैं माव। रोहिणीचीं।।१३-७०७।।
तैसा जन्मौनि मृत्यु वरी। विषय त्रासितां बहुतीं परीं।
तऱ्हीं त्रासु नेघे धरी। अधिकु प्रेम।।७०८।।
पहिलियें बालदशें। आई बा हेंचि पिसें।
तै सरे मग स्त्रीमांसें। भुलौनि ठाकें।।७०९।।
मग स्त्री भोगितां धावों। वृद्धाप्य लागे येवों।
तेव्हां तोचि प्रेमभावो। बालकासि आणी।।७११।।

"मृगजळाच्या मागे तहानलेले हरीण लागते, ते जसे उर फुटला तरी हे मृगजळ आहे असे मानायला तयार नसते, तसा जन्मापासून

तो अंतापर्यंत ज्याला विषयांनी कितीही छळले तरी त्यांच्याविषयी वैराग्य बाळगणे तर दूरच राहिले, उलट त्या विषयांवर अधिकच प्रेम ठेवून जो असतो; बाळपणी आई वडिलांविषयी लोभ व मायेने जो वेडा झालेला असतो अन तरुणपणी स्त्रीच्या देहाला भुलून तिचाच होऊन जो राहतो; स्त्रीसंगसुख भोगतांना म्हतारपण आले की तोच लोभ व प्रेमभाव मग मुलाबाळांच्याविषयी जो धरून राहतो, तो खराच अज्ञानी असतो."

आंधलें व्यालें जैसें। तैसा बालें परिवसे।
परि जी मरेतो न त्रासें। विषयांसीं जो।।७१२।।
जाण तेयाचां ठाईं। अज्ञानासीं पारु नाहीं।
आतां आणिकें काईं। चिह्नें सांगो।।७१३।।

"आंधळ्या बाईला मूल झाले तर त्याचे सर्व करणे जरी तिच्या आवाक्याबाहेरचे असले तरीही मायेने वेडी होऊन मरेस्तोवर ती जशी त्याची काळजी करते अन त्याच्यासाठी जशा खस्ता खाते, तसाच जो कष्टकारक विषयांना आणि मुलेबाळे, स्त्री यांना अजिबात न त्रासता त्यांचा अति लोभ धरतो; त्या माणसाठायी अज्ञानाचा कधीच तुटवडा नसतो. अज्ञान्याची आणखीही काही लक्षणे तुला सांगतो, ती ऐक."

११) अहंकार

निरहंकार वृत्तीच्या विरुद्ध अज्ञानलक्षणे सांगतांना ***अहंकारी*** वृत्तीचे वर्णन पाहा:

तऱ्हीं देह हेंचि आत्मा। ऐसेयां जो मनोधर्मा।
वलघोनियां कर्मा। आरंभु करी।।१३-७१३।।
आणि उणें कां पुरे। जैं जैं काईं आचरे।
तेयाचेनि आविष्कारें। कुंथो लागे।।७१४।।
डोईये ठेविलें भोजें। देवलविसें जेवीं फुंजे।
तैसा विद्यावयसा माजें। उताणा चालें।।७१५।।
म्हणे मीचि एकु आथी। माझांचि घरीं संपत्ती।
माझी आचरती रीती। कोण्हां आहे।।७१६।।
नाहीं माझेनि पाडें वाडु। मी सर्वज्ञु एकुचि रूढु।
ऐसा गर्वतुष्टीगंडु। घेऊनि ठाकें।।७१७।।

"जो देहालाच आत्मा समजून कर्मे करतो; हातून घडलेल्या छोट्यामोठ्या गोष्टींच्या अभिमानाने जो गर्वाने फुगतो; देवर्षी जसा डोक्यावर ठेवलेल्या देवाच्या देव्हाऱ्याने माजून जाऊन घुमू लागतो, तसा जो विद्या व तारुण्य यांच्या माजाने मस्त होऊन छाती पुढे काढून चालतो; जो स्वत:लाच सर्वांपेक्षा श्रेष्ठ समजतो; ज्याला केवळ आपल्या एकट्याच्याच घरी जणू संपत्ती आहे आणि इतर सगळे जणू भिकारीच आहेत, असा गर्व वाटतो; जो स्वत:चे आचरणच सर्वश्रेष्ठ आहे, असे समजतो; जो आपल्या तोडीचा जगात दुसरा कोणीच नाही असे समजतो; जो स्वत:च स्वत:ला सर्वज्ञ व लोकमान्य असल्याचे समजतो; असा तो मनुष्य अशाप्रकारे गर्वालाही संतुष्ट करील, इतक्या अहंकारी मनोवृत्तीचा असतो."

व्याधि लागलियां माणसा। नये भोग दाऊं जैसा।
नीकें न साहे जो तैसा। पुढीलांचें।।१३-७१८।।
पैं गुणु तेतुला खायें। स्नेह जालितु जाये।
जेथ ठेविजे तेथ होये। मसीऐसें।।७१९।।
जीवनें सिंपितला तिडपीडीं। विजिलां प्राण सांडीं।
लागला तऱ्हीं काडी। उरों ने दीं।।७२०।।
आलुमालू प्रकाश करी। तेतुलेनिचि उबारा धरी।
तैसियां दीपाच्या परी। सुविद्यु जो।।७२१।।

"व्याधिग्रस्त माणसाला विषय उपभोगता तरी येत नाहीत वा वर्ज्य तरी करावे लागतात. त्याला उपभोग्य वस्तू जर दाखवली तर त्याची जशी तडफड होते, तसे ज्याला दुसऱ्याचे चांगले अजिबात पाहवत नाही. लहान दिवली जशी वात खाऊन टाकते, तूप जाळून टाकते; जेथे ठेवावी तेथे काजळी करते, थोडेसे पाण्याचे थेंब ज्योतीवर उडाले तर तडतड असा आवाज करते, वाऱ्याच्या झुळकेसरशी मालवून जाते, जेमतेम मिणमिणता प्रकाश देते व तो देतांनासुद्धा जळफळत असते; आणि चुकून जर तिच्या ज्योतीची झळ आजूबाजूला लागली तर सर्वस्वाची जाळून राखरांगोळी करते आणि तेव्हा गवताची एखादी काडीसुद्धा सोडत नाही; अशा त्या लहान दीपासारखी अल्पप्रकाशक आणि सर्वनाशक अशी त्याची बुद्धिमत्ता अन विद्वत्ता असते."

ओखदाचेनि नांवें अमृतें। नवज्वरु जैसा अंबुथे।
कां विखचि होऊनि परतें। सर्पां दूध।।१३-७२२।।
तैसा सद्गुणीं मत्सरु। व्युत्पत्ति अहंकारु।
तपो ज्ञानें अपारु। ताठा चढे।।७२३।।

"जो थोड्याशाही ज्ञानाने बडबडू लागतो; ज्याच्या सहवासाने इतरांच्या पदरात ज्ञान जेमतेमच पण त्रास मात्र भरपूर पडतो; दूध अमृतासारखे जरी असले तरी नवज्वर झालेल्या माणसाला ते जसे कुपथ्याचे व विषासारखे मारक असते; तसेच सर्पाला जर दूध पाजले तर जसे त्याचे विषात रूपांतर होऊन ते मारक ठरते, असेच ज्या मनुष्याचे सद्गुणही दुर्गुणात जमा होतात, तो अज्ञानीच होय."

अंत्यु राणिवें बैसविला। आरें धारणु गिलिलां।
तैसा गर्वें फुगला। देखसीं जो।।७२४।।
जो लाठणें ऐसा न लवें। पाथरु जेवीं न द्रवें।
गुणियासीं नागवें। फोडसें जैसा।।७२५।।
किंबहुना तेयापासीं। अज्ञान आहे वाढीसीं।
हे निकरें गां तुजपासीं। बोलतु असों।।७२६।।

"त्याला जर शास्त्रज्ञान असले, तर त्याने अहंकार वाढतो. तप व ज्ञान जर त्याच्याजवळ असलीत तर त्यांनी त्याला अपार गर्व चढतो. राज्यपदावर बसलेला हीन वृत्तीचा मनुष्य किंवा लाकडाचा

खांब गिळलेला अजगर जसे व्यर्थच फुगतात, तसा जो गर्वाने फुगलेला असतो; जो दगडासारख्या कठीण काळजाचा असतो; फुरसे चावले असता त्याचे विष उतरवणे जसे मांत्रिकाच्याही आवाक्याबाहेरचे असते; तसेच अशा मनुष्याला ताळ्यावर आणणे शहाण्यासुरत्या ज्ञात्यांनाही अशक्यप्राय अते. हे धनञ्जया! अशा मनुष्याचे अज्ञान वाढीला लागलेले असते, हे मी तुला निक्षून सांगतो.'' या प्रमाणे त्या अहंकारी मनुष्याचे अज्ञान ज्ञानदेवांनी प्रकटविले आहे.

१२) जन्म-मृत्यु-जरा-व्याधि-दुःख यातील दोष न दिसणे (मनुष्यजन्माचे सार्थक करण्याची बुद्धी नसणे)

ज्ञानलक्षणे पाहतांना यापूर्वीच आपण या विषयावरील सुमारे ऐंशी ओव्यांचा परामर्ष घेतला होता. अज्ञानलक्षणांच्या निमित्ताने परत हा विषय ते विस्तारपूर्वक हाताळतात.

संसारप्रवृत्ती

प्रथमतः ज्याला जन्म घेण्याबाबत वाईट वाटत नाही त्याचे वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणिक पाहीं धनंजया। जो गृहदेहसामग्रियां।
न देखे कालाचेयां। जन्मातैं गां।।१३-७२७।।
कृतघ्ना उपेगु केला। कां चोरा वेव्हारु दिधला।
निसुगु स्तविला। विसरे जैसा।।७२८।।
वोढालितां लाविलें। तैं तैसेंचि कान पूस वोलें।
कीं पुढतें वोढालु आलें। सूणें जैसें।।७२९।।
बेडुक सापाचां तोंडी। जातसे सबुडबुडीं।
तो मक्षिकांचियां कोडीं। स्मरेना काईं।।७३०।।
तैसीं नवही द्वारें स्रवती। आंगीं देहाचीं लुती जितीं।
जेणें जालीं तैं चित्तीं। स्मरेना जेयां।।७३१।।

''आणि हे अर्जुना! जो गृहदेहादी संपत्तीच्या नादाने संकटमय पूर्वजन्ममालिका विसरतो; कृतघ्न मनुष्य जसे उपकार स्मरत नाही किंवा लबाड मनुष्य जसे दुसऱ्याकडून घेतलेले ऋण सोयिस्करपणे विसरतो; उद्दाम पुरुष जसा त्याला केलेल्या विनंतीचा अव्हेर करतो; लागट कुत्र्याचे कान व शेपूट कापून जरी त्याला हाकलून लावले, तरी ते सर्व विसरून ते परत लागटपणा करत जसे जवळ येते; आपण सापाच्या तोंडात गिळले जात आहोत, हे विसरून बेडूक जसा आजूबाजूला घोंगावणाऱ्या माशांना खाण्यासाठी जीभ हवेत फलकारत असतो; त्याप्रमाणेच या जन्मी जे हे शरीर प्राप्त झाले आहे, त्याची दुर्दशा पाहूनही, त्याची सर्व द्वारे मलमूत्राने भरलेली दिसूनही व त्वचेला लागणारी रोगराई पाहूनही ज्या ***''पुनरपि जननं पुनरपि मरणं''*** परंपरेच्या कारणाने हे नरकसदृश शरीर प्राप्त होत आले आहे; ते सर्व तो अज्ञानी पुरुष विसरतो.''

मातृकोदरकुहरीं। सूनि विष्ठेचां दाठरीं।
जठरीं नवमासवेरी। उकडला जो।।७३२।।
तैं गर्भीचीं वेथा। कां जैं जालें उपजतां।
तैं काईंचि सर्वथा। नाठवीं जो।।७३३।।
मलमूत्रपंकीं। लोलते बाल अंकीं।
तैं देखौनि न थुंकीं। त्रासु ने घे।।७३४।।
कालचि ना जन्म गेलें। पाहेंचि पुढुति आलें।
हे ऐसें काईं वाटलें। नाहीं जेयां।।७३५।।

''जन्म घेतल्यामुळेच शरीर व ही संकटपरंपरा आपल्यामागे लागली आहे, ही गोष्ट त्याच्या मनाला अजिबात सलत नाही. मातेच्या उदररूपी अंधकारमय गुहेत नऊ महिने पिचून मलमूत्रात उकडला गेला, तेव्हा झालेली व्यथा जो जन्म घेताच विसरून जातो; आईच्या मांडीवर मलमूत्रात लोळणारे बालक पाहून ज्याला शिसारी येत नाही व ज्याच्या मनाला *''नको ते बालपण अन नको तो हा जन्म सरल्यावर येणारा तितकाच कष्टप्रद दुसरा जन्म!''* असा विचारसुद्धा स्पर्शत नाही; तो जन्मपरंपरेविषयी विस्मरण झालेला जीव अज्ञान्याचाच असतो.''

मृत्युभय

यानंतर मृत्युभयाविषयी बेपर्वा असणाऱ्या मनुष्याचे वर्णन ज्ञानदेव करतातः

आणि पैं तेयांचि परी।जीविताचीं फरारी।
देखौनि जो न करी। मृत्युचिंता।।१३-७३६।।
जिणेयाचेनि विश्वासें। मृत्यु एक येथें असे।
हे जेयाचेनि मानसें। मानिजेना।।७३७।।
अल्पोदकींचा मासा। हे नाटें ऐसियां आशा।
न वचेचि कां जैसा। अगाध डोहां।।७३८।।

''आणि त्याचप्रमाणे जो मनुष्य शरीरसुखात मश्गुल होऊन आयुष्य उपभोगण्यात दंग राहतो आणि अटळ मृत्यूचा व त्यानंतर पुनः प्राप्त होणाऱ्या जन्माचा किंचितही विचार करत नाही; मनुष्यदेह नश्वर आहे व जो जन्माला आला आहे, तो कधी ना कधीतरी मरणारच, हे आपण जणू काही अमरच आहोत अशा विश्वासाने जो मनातही येऊ देत नाही; छोट्या डबक्यातली मासोळी त्यातले पाणी कधीच आटणार नाही या भ्रमात राहून ज्याप्रमाणे खोल डोहात जाण्याचा विचारही करत नाही;'' आणि

कां गोरीचियां भुलीं। मृग व्याधा दिठी न घालीं।
गलु न पाहतां गिलिलीं।मीनें उंडी।।७३९।।
दीपाचियां झगमगा। जालील हे पतंगा।
नेणवेंचि पैं गां। जेयापरी।।७४०।।
गव्हारु निद्रासुखें। घर जलत असे तैं न देखें।
नेणतां जेवीं विखें। रांधिलें अन्न।।७४१।।
तैसा जीविताचेनि मिषें। हा मृत्युचि आला असे।
हे नेणेचि राजसें। सुखें जो गां।।७४२।।

"हरीण जसे पारध्याच्या शीळेला भुलून जाऊन त्याच्या रूपाने आलेला आपला काळ ओळखू शकत नाही; किंवा गळाकडे लक्ष न देता मासा जसे आमिष गिळतो; दीपकांच्या झगमागाटाकडे आकर्षिलेला पतंग जसा तो आपल्याला जाळून टाकील इकडे ध्यान देत नाही; जसा एखादा आळशी माणूस घर जळत असले तरी निद्रासुखास आंचवावे लागू नये म्हणून तिकडे लक्ष देत नाही; अथवा अन्नात विष घातलेले आहे, हे माहीत नसलेला मनुष्य जसे ते आनंदाने खातो; त्याचप्रमाणे राजस सुखोपभोगांनी धुंद झालेला मनुष्य अशा जगण्याच्या रूपाने आपण साक्षात मृत्यूस म्हणजे अज्ञानांधकारास कवटाळतो आहोत, हे लक्षात घेऊ शकत नाही."

शरीरींचि वाढी। अहोरात्रांची जोडी।
विषयसुख प्रौढी। सांचचि मानीं।।१३-७४३।।
परि बापुडा ऐसें नेणें। जैं वेश्येचें सर्वस्व देणें।
तैंचि नागवणें। रूप एथें।।७४४।।
सांवचोराचें साजणें। तैंचि तैं प्राण घेणें।
लेपा स्नपन करणें। तैंचि मरण।।७४५।।
पांडुरोगें आंग सुटलें। तैं तेयाचि नांव खुंटलें।
तैसें नेणें भुललें। आहारनिद्रा।।७४६।।

"शरीरसामर्थ्य, बळ आणि विषयसुखांचा अविरत भोग घेण्याची क्षमता ही चिरंतन आहेत, अशा विश्वासाने तो मनुष्य जगत असतो. पण त्या बापड्याला कळत नाही की वेश्या सर्वस्वाचे दान करण्याच्या मिषानेच आपल्या गिऱ्हाईकांना जशी लुबाडत असते; त्याचप्रमाणे अशा ऐषात जगण्याच्या रूपानेच त्याचा मृत्यू त्याला कवेत घेत असतो. ठगाशी मैत्री करणे हे प्रवाशाला जसे प्राणघातक ठरते; किंवा चितारलेल्या देहाकृतींना स्वच्छ करावे म्हणून त्यांना पाण्याने घातलेले स्नान जसे त्या चित्राकृतींचा नाश करणारे ठरते; पांडुरोगामुळे शरीराची झालेली वाढच त्या शरीराला जशी घातक असते; त्याचप्रमाणे शरीरसामर्थ्य व विषयोपभोग यांच्यामुळे आपला घात होत आहे, हे त्यांच्यात दंग झालेला तो मूर्ख मनुष्य जाणून घेत नाही."

सन्मुख शूला। धांवतेयां पायें चपलां।
प्रतिपदीं ये जवलां। मृत्यु जेवीं।।१३-७४७।।
तेवीं देहां जंव जंव वाढु। जंवजंव दिवसाचां पवाडु।
जंव जंव सुरवाडु। भोगांचा हा।।७४८।।
तंव तंव अधिकाधिकें। मरण आयुष्यातैं जिंकें।।
मीठ जैसें उदकें। घांसिजत असे।।७४९।।
तैसें जीवित जायें। तेयास्तव कालु पाहे।
हे हातोंहातींचें नोहें। ठाऊकीं तेयां।।७५०।।
किंबहुना पांडवा। हा आंगींचा मृत्यु नीच नवा।
न देखे जो मावा। विषयांचां।।७५१।।
तो अज्ञानदेशींचा राओ। ययां बोलां महाबाहो।
न पडे गां वाटावो। आणिकांचां।।७५२।।

"शूलाकडे नेला जाणारा कैदी भरभर चालला तर त्याचा मृत्यू जसा पावलागणिक त्याच्याजवळ लवकर येतो; त्याचप्रमाणे शरीरसामर्थ्याची दिवसागणिक होत जाणारी वृद्धी, एकामागून एक जाणारे दिवस व वाढणारे वय आणि विपुल विषयोपभोग यांच्या रूपाने मृत्यु शरीराला ग्रासत चालला आहे, हे स्पष्ट होते. मीठ पाण्याच्या संपर्कात आले की जसे हळूहळू विरघळत जाऊन नष्ट होते, त्याचप्रमाणे आयुष्याच्या जात असलेल्या दिवसागणिक चोरपावलांनी मृत्यू आपल्याकडे पुढेपुढे सरकत असतो ही नित्याची अनुभवातली गोष्टसुद्धा ज्याला कळत नाही; किंबहुना विषयांच्या भ्रांतीमुळे शरीराची पाण्यात टाकलेल्या मीठासारखी रोज होणारी झीज जो आकळून घेऊन सावध होत नाही; तो अज्ञानदेशींचा राजाच असतो. त्याकरता आणखी लक्षणे पाहण्याची जरूरीच नाही," असे श्रीकृष्ण महाबाहू अर्जुनाला सांगतात.

वार्धक्याची जाणीव

यानंतर ***जरा*** म्हणजे ***वार्धक्यदोष*** पुनः एकदा न्याहाळतांना श्रीज्ञानदेव म्हणतातः

पैं जीविताचेनि सुखें। जैसा कां मृत्यु न देखें।
तैसाचि तारुण्यतोषें। जरा न गणी।।१३-७५३।।
कडाडीं लोटला गाडा। शिखरौनि सुटला धोंडा।
तैसा न देखें जो फुडां। वृद्धाप्य आहे।।७५४।।

"तो जसा सुखोपभोगात रंगून जाऊन मृत्यूची पर्वा करत नाही, तसाच तारुण्याच्या उर्मीने धुंद होऊन वार्धक्याचाही विचार करत नाही. डोंगराच्या कड्यावरून लोटलेला गाडा जसा भग्न होतो, किंवा पर्वतशिखरावरून सुटलेला धोंडा जसा दरीतच कोसळतो; त्याचप्रमाणे तारुण्याच्या जोमानंतर म्हातारपणीचे दुर्बलत्व येणारच आहे, हे तो जाणत नसतो."

कां आडवोहलां पाणी आलें। म्हैसयाचें झुंज मातलें।
तैसें तारुण्याचें चढलें। भुररे जेयां।।१३-७५५।।
पुष्टी लागें विघरो। कांति पाहे निसरो।
माथां आदरीं शिरो-। भागीं कंपु।।७५६।।
दाढी साऊल धरी। मान हालौनि वारी।
तऱ्हीं जो करी। प्रियेचां पैसु।।७५७।।
पुढील उरीं आदलें। तंव न देखें जेवीं आंधलें।
कां डोल्यावरील निगलें। आलशी तोषें।।७५८।।
तैसें तारुण्यपण आजीचें। भोगितां वृद्धाप्य पोहोंचें।
न देखें तोचि साचें। अज्ञानु गां।।७५९।।

"एरवी कोरड्या वाहणाऱ्या नाल्यांना तुफानी पावसामुळे आलेला लोंढा जसा गर्जत असतो किंवा रानरेड्यांच्या झुंजीत जसा उन्माद असतो; त्याप्रमाणे त्याला आजचे तारुण्य उपभोगतांना पुढे येणारे वार्धक्य - ज्यावेळी अंगावरील चरबी व पुष्टी नाहीशी होते, शरीरकांती मलीन दिसते, दाढी डोक्याचे केस पांढरे होतात, मान नन्ना करू

लागते, मस्तकाला कंप सुटू लागतो, आणि तरीही प्रिय वस्तू व मुलामाणसांचा लोभ कमी न होता वाढतच जातो - ते वार्धक्य, उरावर आदळू पाहणारी वस्तू जशी आंधळ्यास दिसत नाही किंवा झोपाळूस जशी डोळ्यांवरची चिपाडे दिसत नाहीत, त्याप्रमाणे दिसत नाही. तो मनुष्य खरोखरीचे अज्ञानच होय."

देखें अक्षमें कुब्जें। कीं विटावूं लागे फुंजें।
परि न म्हणे पाहें माझें। हेंचि भवे।।१३-७६०।।
आणि आंगीं वृद्धतेची। संज्ञा ये मरणाची।
परि जेयां तारुण्याची। भुली न फिटे।।७६१।।
तो अज्ञानाचें घर। हें सांचचि घे उत्तर।
तेवींचि परियेसी थोर। चिह्ने आणिकें।।७६२।।

"पांगळ्या आणि कुबड्या दीन माणसांची दशा पाहिल्यावर आपणही असे होऊ शकतो, हे ध्यानात न घेता तारुण्यमदाने बेहोष होऊन जो त्यांना वेडावून दाखवतो व वृद्धत्वाची मृत्युदर्शक चिह्ने अंगावर दिसू लागली तरी ज्याच्यावरील तारुण्याची भूल काही केल्या उतरत नाही, तो मनुष्य अज्ञानाचे साक्षात वसतिस्थान असतो. अज्ञान्याची आणखीही काही लक्षणे ध्यानात घे."

व्याधी व दुःखपरंपरा

वार्धक्यदोष अदर्शनानंतर ***व्याधी व दुःख*** यांचे दोष-अदर्शनाबाबतच्या ओव्या पाहा:

तऱ्हीं वाघाचियें आडवें। चरूनि एकवेल आलां दैवें।
तेणें विश्वासें फुडां धांवें। वसों जैसा।।१३-७६३।।
कां सर्पघरांआंतु। अवचटें ठेवा आणिला स्वस्थु।
येतुलियासाठीं निश्चितु। नास्तिकु होये।।७६४।।
तैसेनि अवचटें हें। एकदोनीं वेलां लाहे।
एथ रोग एक आहे। हे मानीना जो।।७६५।।
वैरियां नीद आली। आतां द्वंद्वें माझीं सरलीं।
हें मानीं तो सपिलीं। मुकला जेवीं।।७६६।।
तैसी आहारनिद्रेची उजरी। रोग निवांतु जोंवरी।
तंव जो न करी। व्याधीचिंता।।७६७।।

"तसेच वाघाच्या रानातून एकदा चरून सुरक्षित राहिलेला पोळ त्या रानात वाघ नाहीच या गैरसमजुतीने जसा तेथे चरत हिंडतो; किंवा सापाच्या बिळात असलेले धन अवचित काढून घ्यायला मिळालेला मनुष्य जसा तेथे सर्पाचे वास्तव्य असते हे मानायला मुळीच तयार नसतो; त्याचप्रमाणे काही काळ उत्तम आरोग्य लाभले, रोगांचा उपद्रव झाला नाही हे पाहून जो मनुष्य आपला देह पुढेमागे रोगग्रस्त होऊ शकेल, हे लक्षात घेत नाही; वैरी झोपलेला आहे म्हणून आपले भय सरले असे मानून निष्काळजी राहणारा मनुष्य जसा मुलाबाळांसह वैऱ्याहातून नाश पावतो, तसा रोग प्रसुप्तावस्थेत असतांना आणि आहारनिद्रा नियत ठेवता येत असतांना व्याधीवर योग्य तो उपचार करून न घेतल्यामुळे रोगाला बळी पडतो."

आणि स्त्रीपुत्रादिमेलें। संपत्ती जंव जंव फलें।
तेणें रजें डोलें। जाती जेयाचें।।७६८।।
सवलेंचि वियोगु पडैल। विलैनि विपत्ती येईल।
हे दुःख पुढील। देखेना जो।।७६९।।
तो अज्ञान गां पांडवा।........।।७७०।।

"आणि स्त्रीपुत्रादींच्यासह संपत्तीच्या आधारे सुखेनैव जीवनक्रमणा करीत असतांना जसजशी संपत्ती मिळत जाते, तसतसा कनक व कांता या रजोदोषरूपी धुराने डोळे मिटून घेतलेला जो मनुष्य केव्हाही ही सुखे नष्ट पावून आपण दुखाच्या गर्तेत लोटले जाऊ शकतो, हे कळून घेण्यास असमर्थ असतो, तो, हे पांडवा! अज्ञानच असतो."

१३) आसक्ती (देह, गृह, स्त्रीसंबंधीची)

याप्रमाणे ***जन्म-मृत्यु-जरा-व्याधि-दुःखदोष-अदर्शन*** म्हणजे हे सर्व न जाणण्याच्या अज्ञानलक्षणाचा विस्तृत विचार केल्यावर ज्ञानराज पुढील अज्ञानलक्षणाचा तितकाच विचार करतात. ***आसक्ती*** या लक्षणाचा विचार ते ***देहासक्ती, गेहासक्ती व दारासक्ती*** अशा तीन प्रकारे करतातः

देहासक्ती (वा इंद्रियलोलुपता)

तो अज्ञान गां पांडवा। आणि तोही तोचि जाणावा।
जो इंद्रिये अव्हांसवा। चारीं एथ।।१३-७७०।।
वयसेचेनि उवायें। संपत्तीचेनि सावायें।
सेव्यासेव्य जानें। सरकटितु।।७७१।।
न करावें तैं करी। असंभाव्य मनीं धरी।
चिंतू नयें तैं विचारी। जेयाची मती।।७७२।।
रिघे जेथ न रिघावें। मागे जैं न घेयावें।
स्पर्शे जेथ न लागावें। आंग मन।।७७३।।

"आणि अर्जुना! जो इंद्रियांना मनसोक्त विषय पुरवतो, तोसुद्धा साक्षात अज्ञानच असतो. जो तारुण्याच्या भराने मदमस्त होऊन व संपत्तीच्या बळावर विषयोपभोग घेतो आणि त्याच्यात योग्य-अयोग्य असे काही जाणत नाही; जे करू नये ते करतो; ज्यांची इच्छा धरू नये त्या गोष्टींची आंस बाळगतो; ज्यांचा विचारही मनात आणू नये अशा त्याज्य कृत्यांचे चिंतन करतो; जेथे जाऊ नये तेथे जातो; जे घेऊ नये ते मागतो; ज्याला मनाने वा अंगाने स्पर्शसुद्धा करू नये, त्या ठिकाणी घसट करतो;" आणि

न वचावें तेथ जाये। न पाहावें तैं जो पाहें।
न खावें तैं खाये। तेवींचि तोषे।।७७४।।
न धरावा तो संगु। न लगावें तेथ लागु।
नाचरावा तो मार्गु। आचरे जो।।७७५।।
नायकावें तैं आयकें। न बोलावें तैं भुंके।
परि दोष होईल हे न देखें। प्रवर्त्ततां।।७७६।।

"जेथे रिघू नये तेथे रिघतो; जे पाहू नये ते पाहतो; जे खाऊ नये ते खातो आणि अशा आचरणाने संतोष पावतो; ज्याची सोबत

धरू नये त्याच्याबरोबर राहतो; जेथे मन लावू नये, तेथे मन लावतो; ज्या मार्गाने जाऊ नये, त्याच मार्गाने जातो; जे ऐकू नये, तेच ऐकतो; जे बोलू नये, तेच बडबडतो; आणि हे सर्व केल्याने आपल्या अंगीं दोष चिकटतात, याचा काहीच विचार त्याच्या मनात येत नाही."

अंगां मनासि जैं रुचि यावे। येतुलेनि कृत्याकृत्य नाठवें।
जो करणेयाचेनि नांवें। भलतैंचि करी।।७७७।।
परि पाप मज होईल। कां नरकयातना येईल।
हे काईंचि पुढील देखेना जो।।७७८।।
तेयाचेनि आंगलगें।अज्ञान जगीं दाटुगें।
जैं सज्ञानाही संगें। झोंबो सके।।७७९।।
परि असो हें आईक। अज्ञानचिह्न आणिक।
कां तुज सम्यक। जाणवें जैं।।७८०।।

"देहेंद्रिये व मन यांना जे जे आवडेल ते ते कृत्याकृत्याचा विधिनिषेध न बाळगता जो बेगुमानपणे करतो आणि अशा कृत्यांनी आपल्याला पाप लागेल, नरकयातना भोगाव्या लागतील, याबद्दल ज्याला थोडीही शंका येत नाही, त्या मनुष्याच्या आश्रयाने जगात अज्ञानाची वाढ होत असते व ते अज्ञान नष्ट करणे ज्ञानी पुरुषांनासुद्धा जड असते. असो. तुला आणखी काही लक्षणे सांगतो, ज्यामुळे त्या अज्ञानास तू नीट ओळखू शकशील."

गृहासक्ती

तर्‍हीं जेयाची प्रीती पुरी। गुंतली देखसि घरीं।
नवगंधकेसरीं। भ्रमरी जैसीं।।१३-७८१।।
साकरेंचियां रासीं। बैसली नुठे माशी।
तैसेनि स्त्रीचित्त आवेशीं। जेयाचें मन।।७८२।।
ठेलां बेडूक कुंडीं। मशक गुंतला शेंबुडीं।
ढोर सबुडबुडीं। रुतला पंकीं।।७८३।।

"आणि नवोन्मीलित कमलाच्या केसराच्या गंधाकर्षणाने भ्रमरी जशी लुब्ध होते, तशी ज्याची घरादारावर प्रीती असते; साखरेच्या राशीला माशी जशी चिकटून बसते, त्याप्रमाणे ज्याचे मन व चित्तवृत्ती स्त्रीच्या आसक्तीने भरून जाऊन विषयोपभोगांना चिकटून बसतात; बेडूक जसा कूप सोडून जाऊ शकत नाही; चिलट जसे शेंबडात अडकून बसते; किंवा चिखल दलदलीत फसलेले ढोर जसजसे बाहेर पडण्याची तडफड करू लागते, तसतसे त्यात आणखीआणखी रुतत जाते; त्याप्रमाणे त्याची मन, चित्त व देह ही सगळीच्या सगळी घराच्या आसक्तीत अडकलेली असतात." आणि

तैसें घरींहूनि निघणें। नाहीं जीवितें मरणें।
जेयां साप होऊनि असणें। भाटीं जियें।।७८४।।
प्रियोत्तमाचां कंठीं। प्रमदा घे आंटी।
तैशीं जीवेंसी कोंपटी। धरूनि ठाके।।७८५।।
मधुरसोद्देशें। मधुकरी जचे जैसें।
गृहसंगोपन तैसें। करी जो गां।।७८६।।
म्हातारपण जालें। माणिक एक विपाईलें।
तेयाचें कां जेतुलें। मातापितरां।।७८७।।
तेतुलेनि पाडें पार्था।
घरीं जेयां प्रेमआस्था।.....।।७८८।।

"किंबहुना जो जिवंतपणीच काय पण मेल्यावरही गेहासक्तीने त्या घरात सर्प होऊन वावरतो; प्रियकराच्या गळ्याला तरुणी जशी घट्ट मिठी मारते, तसाच ज्याने आपला जीवप्राण खोपटात गुंतवलेला असतो; मधाच्या लोभाने मधमाशी जसे अविरत परिश्रम करते, त्याप्रमाणे जो घरादाराची देखभाल वाटेल तेवढे कष्ट घेऊन करतो; आणि उतारवयात झालेल्या एकुलत्या एक पुत्रावर मातापित्यांचे जेवढे प्रेम असते, तेवढेच प्रेम जो आपल्या गृहावर करतो, तो मनुष्य अज्ञानी असतो."

दारासक्ती, कांतासक्ती वा स्त्रीलोलुप्य

महापुरुषांचें चित्त। जालियां वस्तुगत।
ठाके वेव्हारजात। जेयापरी।।१३-७८९।।
तैसा स्त्रीदेहें जो जीवें। पडौनियां सर्वभावें।
कोण मी काय करावें । काईं नेणें।।७९०।।
हानि लाज न देखें। परापवादु नायकें।
जेयाची इंद्रियें एकमुखें। स्त्रियां केलीं।।७९१।।

"आणि हे पार्था! त्याला स्त्रीशिवाय काहीच सुचत नाही. महापुरुषांचे चित्त जेव्हा स्वस्वरूपी लीन होते, तेव्हा त्यांचे सर्व व्यवहार विराम पावून जसे केवळ स्वरूपानुसंधानच उरते; त्याप्रमाणे तो स्त्रीलोलुप स्त्रीदेहाशी जिवाभावाने चित्तवृत्ती एकवटून तल्लीन होतो व आपण कोण व आपले कर्तव्य काय याचा त्याला पूर्ण विसर पडतो. स्त्रीचा उपभोग घेण्यातच ज्याने आपली सर्व इंद्रिये एकवटलेली असतात, त्याला त्यायोगे प्राप्त होणारे लोकापवाद, लोकलज्जा व नुकसान यांची काहीच क्षिती नसते."

चित्त आराधी स्त्रियेंतैं। स्त्रियेचेनि छंदें नाचें।
माकड गारुडियाचें। जैसें होय।।७९२।।
आपणपें शिणवीं। इष्टमित्र दुरावी।
मग कवडाचि वाढवी। लोभी जैसा।।७९३।।
तैसा दानपुण्यें खांची। गोत्रकुटुंबा वंची।
परि गारी भरी स्त्रियेचीं। उणीं हो नेदीं।।७९४।।

"त्याचे चित्त सतत स्त्रियांची आराधना करते; तो स्त्रियांच्या तालावर नाचतो; गारुडी जसा माकडास खेळवतो, तशा स्त्रिया त्याला आपल्या इशाऱ्यावर खेळवतात; लोभी मनुष्य जसा स्वतः संपत्तीसाठी वाटेल ते कष्ट उपसतो, इष्टमित्रांचीही पैशांपुढे तमा बाळगत नाही व केवळ संपत्ती वाढवण्याकडेच जसे आपले सर्व चित्त वेचतो, त्याचप्रमाणे तो स्त्रीलंपट पुरुष स्त्रियांचे लाडकोड पुरवण्यासाठी इष्टमित्र व कुटुंबीय यांची वंचना करून आणि दानादी गोष्टींतून बचत करून तो सर्व पैसा तिच्यावर लावतो."

पूजितिं दैवतें जोगावीं। गुरुतैं बोलें झकवीं।
मायबापां दावीं। निडारपण।।१३-७९५।।
स्त्रियेचां तऱ्हीं विखीं। भोगुसंपत्ती अनेगीं।
आणि वस्तु निकीं। जैं जैं देखें।।७९६।।
प्रेमाथिलेनि भक्तें। जैसेनि भजिजे कुलदैवतें।
तैसा एकाग्रचित्तें। स्त्री जो उपासीं।।७९७।।
सांच आन चोख। तैं स्त्रीयेसेचि विशेख।
येरांविखीं जोगावणूक। तैंही नाहीं।।७९८।।

"दैवतांची पूजासामग्री जेवढ्या कमी खर्चात व काटकसर करून घेता येईल, तेवढी तो घेतो; गुरूंना दक्षिणा देतांना जेवढा कंजूषपणा करता येईल तेवढा तो करतो. आईवडिलांसाठी खर्च करतांना जेवढा म्हणून हात आखडता घेता येईल, तेवढा तो घेतो; पण स्त्रीला हवी असणारी वस्तू अन भोगसामग्री मात्र तो काहीही करून आणून देतो. खरा भक्त प्रेमभावाने आपल्या आवडत्या कुलदैवताशी एकचित्त होऊन त्याची पूजाअर्चनादी करतो, तसाच तो कामलुब्ध एकाग्रचित्ताने सर्वभावेकरून स्त्रियेची उपासना करतो. स्त्रीला उत्तमोत्तम वस्त्रे, आभूषणे देऊन तिचे खाण्यापिण्याचे हवे ते लाड तो कौतुकाने पुरवतो. पण कुटुंबातील इतर व्यक्तींचा उदरनिर्वाहही तो मोठ्या चिकटपणे करतो किंवा त्यांच्याकडे अजिबात लक्ष देत नाही."

इयैंतैं हन कोण्ह देखेल। इयेंसीं वेखासें जाईल।
तऱ्हीं युगचि बुडैल। ऐसें जेयां।।१३-७९९।।
नायटेयां भेण। न मोडिजै नागाची आण।
तैसीं पालीं उणखूण। स्त्रियेची जो।।८००।।

"आपल्या स्त्रीकडे कोणी वाकडे पाहिले किंवा तिच्या मनाविरुद्ध कोणी वागले, तर त्याला युगांत व्हावा तसे दुःख होते. नागदेवतेच्या नांवाने वाहिलेली शपथ जर मोडली ते नायटा होतो या भीतीने जशी ती कोणी मोडत नाही, त्याचप्रमाणे स्त्रियेचा कोप होईल या भयाने ता जे जे म्हणेल, जे जे इच्छिल, ते ते तो मनुष्य करतो."

किंबहुना धनंजया। स्त्रीचि सर्वस्व जेयां।
आन तियेंचियां जालियां। -लागीं प्रेम।।१३-८०१।।
आणिकही जैं समस्त। तेथिंचें संपत्तीजात।
तैं जीवाहूनि आप्त। मानी जो गां।।८०२।।
तो अज्ञानासीं मूल। अज्ञाना तेणें बल।
हे असो केवल। तो तैंचि रूप।।८०३।।

"फार काय तर हे धनंजया! स्त्री म्हणजेच त्याचे सर्वस्व असते. तिच्यापासून झालेल्या पुत्रपौत्रादी प्रजेवर जो जीवापाड प्रेम करतो, स्त्रीचे आवडते व प्रिय जे जे काही असते, त्याबद्दल ज्याला कमालीचे सौहार्द्र असते, स्त्रियेचे चित्ताकर्षक असे रूप-लावण्य-अवयवादी धनसंपत्तीचे ज्यास जीवापलीकडे प्रेम असते, तो मनुष्य अज्ञानवृक्षाचे मूळ असून त्या वृक्षाचे पोषण करतो.एवढेच काय! तर तो मनुष्य खरे तर अज्ञानरूपच असतो."

१४) इष्ट व अनिष्ट प्राप्तीने हेलावणे (सुखदुःखांच्या आघाताने गजबजून जाणे)

आसक्ती या विषयाचे सविस्तर वर्णन केल्यावर ***"नित्यं च समचित्तत्वं इष्टानिष्टोपपत्तिषु"*** या गुणाविरुद्ध असणाऱ्या मनोवृत्तीचे अज्ञानाच्या संदर्भात वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणि मातलेयां सागरीं। मोकललियां तरी।
लाटांचां येरझारीं। आंदोलें जेवीं।।१३-८०४।।
तेवीं प्रिय वस्तू पावें। आणि सुखें जो उंचावें।
तैसाचि अप्रियासवें। तलवटु घे।।८०५।।
ऐसेनि जेयाचां चित्तीं। वैषम्यसाम्याचीं वोखती।
वाहे तो महामती। अज्ञान गां।।८०६।।

"आणि अथांग खवळलेल्या दर्यावर तराफा सापडला तर तो जसा लाटांबरोबर क्षणात वर तर क्षणात खाली असा हेलकावे खात इतस्ततः तरंगतो, त्याप्रमाणे जो प्रिय वस्तू प्राप्त झाली असता सुखाच्या अत्युच्च शिखरावर आरूढतो आणि अप्रिय वा अनिष्ट प्राप्त झाले असता धाडकन दुःखाच्या दरीत कोसळतो; ज्याच्या चित्ताला याप्रमाणे सुखदुःख प्राप्तीने हर्षशोक होतात, तो मनुष्य म्हणजे, हे महामती अर्जुना! साक्षात अज्ञान होय."

व्यभिचारी भक्ती इ. लक्षणे::::

१५) व्यभिचारी भक्ती

भगवंतांनी ***"मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी।"*** असे ज्ञानी पुरुषांच्या भक्तिभावाचे - अनन्य अंतःकरणातून स्फुरलेल्या निष्ठेचे - गुण गायिले आहेत. ***ही ज्ञानवानाची भक्ती होय.*** याउलट अज्ञान्याची भक्ती ही ***व्यभिचारिणी भक्ती*** या सदरात मोडते. तो अनन्य तर नसतोच पण कधी हा देव तर कधी तो देव, असे समयानुरूप, त्याच्या गरजेप्रमाणे उपासितो. ज्ञानदेव म्हणतातः

आणि माजां ठायीं भक्ती-। फलालागीं जेयां आर्त्ती।
धनोद्देशें विरक्ती। नटणें जेवीं।।१३-८०७।।
कां कांताचां मानसीं। रिगौनि स्वैरिणी जैसीं।
राहाटें जारेसीं। जावयालागीं।।८०८।।
तैसा मातें किरीटी। भजती गां पाऊटीं।
करूनि जो दिठी। विखो सूयें।।८०९।।
आणि भजिन्नलियांसवें। तो विखो जऱ्हीं न पावें।
तऱ्हीं सांडीं म्हणें आघवें। टवाल हे।।८१०।।

"धनप्राप्तीचा हेतू ठेवून अनेकांना ठकवण्यासाठी जसे बैराग्याचे सोंग काढावे, तसे जो माझ्याकडून त्याची नड भागवली जावी या फलप्राप्तीसाठी माझ्या भक्तीचे ढोंग रचतो; अथवा जाराशी बिनबोभाट प्रणय करता यावा व नवऱ्याला जराही संशय येऊ नये म्हणून जारिणी स्त्री जशी आपल्या पतीच्या अंतःकरणात शिरून त्याला आपल्या मुठीत ठेवू पाहते, त्याप्रमाणे ज्याच्या दृष्टीपुढे माझ्या भजनाचे ढोंग करून त्यायोगे विषयच प्राप्त करून घेण्याची अनावर कामना असते;

भजन केल्याबरोबर जर त्याला वांच्छित विषय प्राप्त झाला नाही तर जो मला टाकून देऊन देव वगैरे सर्व थोतांड आहे, असे म्हणू लागतो;" आणि

कुणबट कुलवाडी। तैसा आन आन देव मांडीं।
आदिलाचीं परवडीं। वरी तेयां।।८११।।

"अडाणी अंधश्रद्ध कुणबी जसा वेगवेगळ्या हलक्यासलक्या दैवतांकडे व देवर्षांकडे सारखा वेगवेगळ्या निमित्तांनी धावत सुटतो, हा देव पावतो, तो देव नवसाला पावतो, याच्यापुढे कोंबडे काप, त्याच्यापुढे बकऱ्याचा बळी दे, अशा हलक्या धारणांची नवससायाससरूप त्याच्या मते उत्कृष्ट असलेली *भगती* करतो; जो मनुष्य सुशिक्षित असूनही व शास्त्राचार माहीत असूनही त्या कुणब्यासारखाच वेगवेगळ्या दैवतांची निरनिराळ्या फलप्राप्तीसाठी अर्चना करतो व त्यापाठी आपल्या कुलदेवतेची आणि कुलाचारांची परवड होऊ देतो; आणि मुख्य म्हणजे देवाधिदेव जो मी, त्यालाही सरळ विसरून जातो;" आणि

तेयां गुरुमार्गा टेंकें। जेयाचां सुगरवा देखें।
तऱ्हीं तेयाचां मंत्र शिके। एरुं नेघे।।८१२।।
प्राणिजातेंसीं निष्ठुरु। स्थावरीं बहु भरु।
तेवींचि नाहीं एकसरु। निर्वाहो जेयां।।८१३।।

"ज्या गुरूचा थाटमाट, बोलबाला फार असतो, त्या गुरूच्या संप्रदायावर ज्याचे मन सहजच बसते व त्याचाच मंत्र जो हव्यासाने घेतो आणि इतर सत्पुरुषांच्या वचनांस कवडीचेही मोल ज्याच्या लेखी नसते; जो प्राणिमात्रांशी निष्ठुरपणे वागून दैवतांना प्रसन्न करावे या हेतूने त्यांचे बळी देणे इ.निर्घृण कृत्ये निर्दयी होऊन करतो; ज्याची पाषाण, प्रतिमा इ.तून देवाचे वास्तव्य असते, अशी खुळचट श्रद्धा असते व ज्याच्या वागण्यात भूतांतर्यामीच्या परमात्म्यावरची निष्ठा अभावानेच व्यक्त होते; तो अज्ञानी कसा वागतो, ते पाहा:"

माझी मूर्त्ती निफजवी। तैं घराचां कोनीं बैसवीं।
आपण देवोदेवी। यात्रें जायें।।१३-८१४।।
नित्य आराधन माझें। काजीं कुलदैवतां भजे।
पर्वविशेखें कीजे। पूजा आवा।।८१५।।

"तो माझी मूर्ती वा प्रतिमा तयार करून घराच्या दर्शनी भागात वा कोपऱ्यात बसवतो आणि मला टाकून स्वत: मात्र नाना दैवतांच्या तीर्थयात्रा करत बसतो. दररोज माझी पूजा करतो, तसाच प्रसंगविशेषी तो कुलदेवतेस पूजतो आणि विशेष पर्वण्या साधून अन्य दैवतांची पूजा घालतो; घरात माझी स्थापना केली तरी दुसऱ्या देवतांची अर्चना करत बसतो."

माझें अधिष्ठान घरीं। आणि वोंवसें आनाचें करी।
पितृकार्यावसरीं। पितरांचा होये।।१३-८१६।।
एकादशीचां दिवसीं। जेतुला पाडु आम्हासीं।
तेतुलाचि नागांसीं। पंचमीचां दिवसीं।।८१७।।
चौथ मोटकीं पाहे। आन गणेशाचां होये।
चवदसीं म्हणे माये। तुहांच वो दुर्गे।।८१८।।
नित्य नैमित्तिकें कर्मे सांडीं। मग बैसें नवचंडी।
आदित्यवारीं वाढीं। भैरवां पात्रीं।।८१९।।

"श्राद्ध, पितृकार्य निघाले की तो पितरांचा भक्त होतो, एकादशीच्या दिवशी जितका मान मला *(म्हणजे श्रीविष्णुला)* तो देतो, तेवढाच मान नागपंचमीला तो नागदेवतांना देतो. चतुर्थी पाहून त्या दिवशी तो गणेशाचे व्रत करतो, तर चतुर्दशीला दुर्गेला भजतो. नित्य व नैमित्तिक कर्मे करायचे सोडून तो नवचंडी याग करतो. रविवार आला की त्याने बहिरोबासठी पात्र वाढलेच समजा."

यात्प्रमाणे नाना दैवतांची काम्य पूर्तीसाठी अर्चना करणाऱ्याचे पुढे वर्णन ऐका:

पाठीं सोमवार पावें। आणि बेलेंसीं लिंगें धांवें।
ऐसा एकलाचि आघवें। जागवी जो।।१३-८२०।।
ऐसा अखंड भजन करी। उगा नसे क्षणभरी।
आघवेनि गांवद्वारीं। अहेव जैसीं।।८२१।।
तैसेनि जो गां भक्तु। सैरा देखसीं धांवतु।
जाण अज्ञानाचां मूर्त्तू। अवतारु तो।।८२२।।

"आणि सोमवार आला की जो बेल घेऊन शंकराच्या देवळाकडे धाव घेतो आणि लिंगार्चन करतो; अशा प्रकार जो आपल्या माथीं नाना देवतांची उपासना घेऊन ती कशीबशी पार पाडण्यात समाधान मानतो; सतत देवदेव करत बसतो व क्षणभरही स्वस्थचित्त होऊन एकाग्रता करत नाही; ज्याप्रमाणे गावकुसावर पाल ठोकून बसलेली वेश्या आल्यागेल्या सर्वांचीच पत्नी होते, त्याप्रमाणे जे जे म्हणून देव असतील, त्या सर्वांची भक्ती करू पाहणाऱ्या व त्यापायी व्यर्थ धावपळ करणाऱ्या व कष्ट पदरात बांधणाऱ्या भक्ताच्या रूपाने अज्ञानच मूर्तिमंत अवतरते असे म्हणेनास का!"

भगवंतांशी याप्रमाणे अनन्य - एकाग्र चित्त न करणाऱ्या देवभोळ्या व स्वार्थी भक्तांच्या बेगडी स्वभावाचे जे वर्णन ज्ञानदेव करतात, त्यावरून आणखी एका गोष्टीस पुष्टी मिळते - ती म्हणजे ***चित्तैकाग्र्य*** ही योगशास्त्रातली अत्यंत महत्त्वाची श्रेणी. चित्तैकाग्र्यास त्यांनी दिलेले हे महत्त्व त्यांनी केलेला योगमार्गाचा पुरस्कार स्पष्ट करते.

१६) एकांतवासाची नावड व जनसंपर्काची आवड

व्यभिचारी भक्तीचे याप्रमाणे वर्णन केल्यावर ज्ञानदेव ***"विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदी"*** या गुणाविरुद्धचे अज्ञानलक्षण म्हणजे ***एकांतवास नावडणे व लोकांमध्ये राहण्याची आवड*** यांचे वर्णन करत म्हणतात:

आणि एकांता चोखटें। तपोवनें तीर्थें तटें।
देखौनि जो गां विटें। तोही तोचि।।१३-८२३।।
जेयां जनपदीं सुख। गजबजेचें कवतिक।
वानूं आवडे लौकिक। तोहीं तोचि।।८२४।।

"आणि तपोवने, तीर्थांची स्थाने, पवित्र नद्यांचे काठ अन प्रसन्न शांत परिसरात ज्याला कंटाळा येतो, तो आणि ज्याला लोकात, समाजात वावरण्यात व जनांच्या गलबल्यात राहायला आवडते व आपला लौकिक लोकांनी गायलेला आवडतो, तोसुद्धा अज्ञानी असतो."

१७) अध्यात्मज्ञानाची नावड

"अध्यात्मज्ञाननित्यत्वं" या ज्ञानगुणविरोधी असलेल्या ***अध्यात्मज्ञानाची नावड* वा *अजिबात त्याची गोडी नसणे***, या अज्ञानगुणलक्षणाचे ज्ञानदेव आता वर्णन करतातः

आणि आत्मा गोचरु होये। ऐसीं जैं विद्या आहे।
तैं ऐकौनि डौरु वाहे। विद्वांसु जो।।१३-८२५।।
उपनिषदांकडे न वचे। योगशास्त्र न रुचे।
अध्यात्मज्ञानीं जेयाचें। मनचि नाहीं।।८२६।।
आत्मचर्चा एकीं आथीं। ऐसियें बुद्धीचीं भिंती।
पाहूनि जेयाचि मती। वोढालु जालीं।।८२७।।

इतर शास्त्रे, कला, कौशल्य, व्यावहारिक आडाखे यात चतुर असूनही जो अध्यात्मात अडाणीच असतो, त्याच्याबद्दल विस्तृत वर्णन या ओव्यातून आढळतेः

"आणि आत्मसाक्षात्कार होईल असे ज्या ब्रह्मविद्येचे सामर्थ्य आहे, ती ऐकून तिची निंदा करण्याइतका जो पराकोटीचा मूर्ख असतो; जो उपनिषदांकडे ढुंकूनही पाहत नाही; ***ज्याला योगशास्त्र आवडत नाही;*** अध्यात्मज्ञान करून घेण्यात ज्याचे मनच लागत नाही; आत्मचर्चेचा प्रांत मूर्खांसाठी किंवा भोळसटांसाठीच आहे, अध्यात्म म्हणजे निव्वळ खुळचटपणा आहे, ते आपल्यासारख्या शहाण्यासुरत्यांसाठी नाही, असा निश्चय करून ज्याची बुद्धी प्रपंचातील विषयोपभोग उत्तम तऱ्हेने घेता यावेत या लालसेने सर्व अविद्यामय क्षेत्रात मुक्त संचार करते;"

कर्मकांड तऱ्हीं जाणें। मुखोद्गत पुराणें।
ज्योतिषीं तो म्हणें। तैंसेंचि होये।।८२८।।
शिल्पीं अति निपुण। सूपकर्मीही प्रवीण।
विधि अथर्वण। हातीं आथीं।।८२९।।
कोकीं नाहीं ठेलें। भारत तऱ्हीं म्हणितलें।
आगम आफविलें। मूर्त होती।।८३०।।

"जसे कर्मकांड तर तो उत्कृष्टच जाणतो; त्याला पुराणे मुखोद्गत असतात; ज्योतिषात उत्तम गती असते - अगदी तो वर्तवील तसेच होते; शिल्पशास्त्रात तो निपुण असतो; पाककौशल्य त्याला उत्तम अवगत असते; अथर्ववेद व मंत्रतंत्र त्याच्या हातचा मळ असतो; कोकशास्त्रातले काहीही त्याने जाणावयाचे ठेवलेले नसते; महाभारतादी ग्रंथ त्याला पाठ असतात; वेदांच्या ऋचापठणाचे फळ अशा मंत्रदेवता त्याच्यापुढे साकार होतात, असा तो वाचस्पतीही असतो;"

नीतिजात सुझे। वैद्यकही बुझे।
काव्यनाटकीं दुजें। चतुर नाहीं।।८३१।।
स्मृतींची चर्चा। दंशु जणें गारुडियाचां।
निघंटु प्रज्ञेचां। पाईकु करी।।८३२।।
व्याकरणीं चोखडा। तर्कीं अति गाढा।
परि आत्मज्ञानीं फुडां। जात्यंधु जो।।८३३।।

"नीतीविषयक सर्व शास्त्रे त्याला उत्कृष्टरीत्या आकलन होतात; वैद्यकशास्त्र त्याला समजते; काव्य आणि नाटके यात तर त्याच्याइतका मर्मज्ञ कोणीच नसतो; स्मृतींचा अर्थ त्यालाच कळतो; इंद्रजाल तसेच विषविद्येचे रहस्य तो जाणतो; वैदिक व्याकरण कोष *(निघंटु)* त्याच्या प्रज्ञेचा चाकर होऊन राहतो; व्याकरणात तो मर्मज्ञ असतो; तर्कशास्त्रातही त्याला उत्कृष्ट गती असते - हे सर्व येत असले तरी मुख्य म्हणजे जे ***अध्यात्मज्ञान*** त्याबाबत मात्र तो जसा काही जन्मांधच असतो."

"परि एकली, दिठी नसे।"

अशा अध्यात्मज्ञानी पूर्णपणे पंगु असलेल्याबद्दल पुढे ऐकाः

तैं एकावांचूनि आघवां शास्त्रीं। सिद्धांतनिर्माणधात्री।
परि जले तैं मूलनक्षत्रीं। न पाहें गां।।१३-८३४।।

"इतर सर्व शास्त्रे, कला, विज्ञान यातील समग्र ज्ञान असणारा, त्यांचे उत्कृष्ट आकलन करणारा, त्यातील प्रमेये व सिद्धांतांचा जन्मदाता व मूर्तिमंत आधार असा तो बुद्धिमंत, मुख्य जे अध्यात्मज्ञान ते जाणत नसल्याने इतर सुलक्षणांनी संपन्न असलेल्या पण मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या बालकाचा मातपिता मुखावलोकनसुद्धा न करताच जसा त्याग करतात, त्याप्रमाणेच त्याज्य असतो."

मोराचां आंगीं असोसें। पिसें आहाति डोलसें।
परि एकलीं दिठी नसे। तैसें तैं गां।।१३-८३५।।

"मोराच्या अंगावर खूप पिसांचा मनोहर फुलोरा असतो. त्या प्रत्येक पिसाला डोळा असतो. पण तो मोर अंध असेल तर हे अनेक शोभेचे नेत्र त्याच्या काय कामाचे! ते काय त्याच्या डोळ्यांची जागा थोडीच घेतील! त्याचप्रमाणे अनेकानेक शास्त्रे माहित असूनही अध्यात्मशास्त्र जर अवगत नसेल तर ते ज्ञान व्यर्थ होय."

जऱ्हीं परमाणुएवढें। संजीवनीमूल जोडे।
तऱ्हीं बहु काय गाडें। भरणें येरें।।१३-८३६।।

"आयुर्वेदात अनेक उत्तमोत्तम जडीबुटी, वनस्पती इ.औषधी भयानकातल्या भयानक, घातक अशा रोगांवर रामबाण म्हणून प्रसिद्ध आहेत. परंतु संजीवनी वनस्पती किंवा कल्पतरूच्या मूळाचा परमाणूएवढा तुकडासुद्धा मोठ्यातल्या मोठ्या रोगावर, एवढेच काय मृत्यूवरही मात करून मुक्ती देणारा असल्याने तो एवढासा जरी मिळाला, तर गाडा भरून ठेवलेल्या त्या इतर आयुर्वेदीय इतर वनौषधींची काय गरज!"

आयुष्येंवीण लक्षणें। सिसेंवीण अलंकरणें।
वोहरेंवीण वाधावणें। तो विटंबु गां।।१३-८३७।।

तैसें शास्त्रजात जाण। आघवेंचि अप्रमाण।
अध्यात्मज्ञानेंवीण। एकलेनि।।८३८।।

"उत्कृष्ट सामुद्रिक चिह्ने शरीरावर वागविणाऱ्या मनुष्याला जर आयुष्यरेषाच नसेल; शिरच्छेद केलेल्या कबंधावर कितीही उत्तम असे अलंकार- आभूषणे घातलेली असतील; किंवा विवाहमंडप खूपच उत्कृष्ट असा सजवलेला दिसला तरी त्याला जशी वधूवर आल्याशिवाय खरी शोभा येत नाही; त्याचप्रमाणे इतर सर्व शास्त्रे जर अध्यात्मज्ञान नसले तर अप्रमाण ठरतात."

ययालागीं अर्जुना पाहीं। अध्यात्मज्ञानाचां ठाईं।
जेयां नित्यबोधु नाहीं। शास्त्रमूढा।।८३९।।
तेयां शरीर जैं जाले। तैं अज्ञानाचें बी रुजलें।
तेयाचें व्युत्पत्तित्व गेलें। अज्ञानवेलीं।।८४०।।

"म्हणूनच हे अर्जुना! ज्याची मती इतर शास्त्रादींच्या संपदेने मूढ झालेली आहे, ज्याला काडीइतके पण ज्ञान वा अध्यात्माचे प्रेम नाही, त्या माणसाला प्राप्त झालेला नरदेह निव्वळ अज्ञानांकुरच होय; आणि त्याचे पांडित्य म्हणजे गगनाच्या मांडवावर पसरलेली अज्ञानवेलच होय."

तो जैं जैं बोले। तैं अज्ञानचि फुललें।
तेयाचें पुण्य जैं फललें। तैं अज्ञानचि गां।।१३-८४१।।

"तो कितीही चातुर्याने संभाषण करो; प्रवचन देवो; त्याची सगळी भाषा कितीही सालंकृत असली, त्याचे बोल म्हणजे केवळ अज्ञानवेलीस आलेली, दुरून आकर्षक दिसणारी पण घाणेरीच्या फुलांपेक्षाही अति उग्र दर्पाची अज्ञानपुष्पेच होत. एवढेच काय, तर यथासांग संपन्न केलेल्या वेदविधींपासून त्याला जे जे पुण्य प्राप्त होते, तेसुद्धा त्याला त्याच्या शास्त्रोक्त कर्मांचे मिळालेले अज्ञानफलच असते की ज्याचा शहाणी माणसे दुरून पाहिल्यावरसुद्धा त्याग करतात."

पुण्यात्मक पापाचा मार्ग

याप्रमाणे परत एकदा वेदविहित कर्मे कर्मफलाच्या आशेने करणाऱ्या आशाळभूत याज्ञिकांचा ज्ञानदेव अधिक्षेप करतात. कारण त्यांना वेदांचा खरा गूढ अर्थ अजिबात कळत नाही. यज्ञपती जो परमात्मा तो त्यांच्या यज्ञकर्मात अधिष्ठित नसतो. त्याचे आवडते ***अध्यात्मशास्त्र*** - त्याने स्वत: सांगितले हे ***योगशास्त्र उपेक्षिणाऱ्या कर्मठांचा मार्ग*** ज्ञानदेवांनी ***पुण्यात्मक पापाचा मार्ग*** मानला आहे. ***पुण्यात्मक पाप*** केल्याने मनुष्य स्वर्गाला जातो; ***पापात्मक पाप*** केल्याने तो नरकात जातो!

केवळ पुण्य म्हणजे भगवत्सेवेने, निष्काम कर्मयोगाने, ज्ञानीभक्तीने - म्हणजे ***पंथराज***मार्गानेच मनुष्य मुक्त होतो; असे ज्ञानदेवांचे सर्वांना व विशेष म्हणजे बुद्धिमंत पंडितांना सांगणे आहे. याप्रमाणे ***"अध्यात्मज्ञाननित्यत्वं"*** या ज्ञानसंपदेच्या ऋणात्मक पैलूचे म्हणजे अध्यात्मज्ञानाबाबत काडीमात्रही जिव्हाळा नसण्याचे त्यांनी सर्व लोकांना खडबडवून जागे करणारे हे विस्तृत वर्णन केले आहे.

१८) परतत्त्वदर्शनास - आकलनास - अक्षमता

"तत्त्वज्ञानार्थदर्शनम्" या पदात अभिप्रेत असलेल्या ज्ञानलक्षणाचा विवेक आपण पूर्वीच पाहिला आहे. ज्ञानदेव आता थोडक्यातच तद्विरोधी अज्ञानगुणाचा म्हणजे ***परतत्त्वाचे आकलन करून घेण्यात अक्षमता*** या अज्ञानलक्षणाचा परामर्ष कसा घेतात, ते पाहाः

आणि अध्यात्मज्ञान कंहीं। जेणें मानिलेंचि नाहीं।
तो ज्ञानार्थु न देखे काईं। हे बोलावें असे।।१३-८४२।।
ऐलीचि थडी न पवतां। पले जो माघौता।
तेयां पैलद्विपींची वार्ता। काय होये।।८४३।।
कां दारवंठाचि जेयाचें। शरीर रोंविलें खांचें।
तो केंवीं परिवारीचें। ठेविलें देखे।।८४४।।
तेवी अध्यात्मज्ञानीं जेयां। अनोलख धनंजया।
तेया ज्ञानार्थु देखावेयां। विखो काईं।।८४५।।
म्हणौनि आतां विशेखें। तो ज्ञानाचें तत्त्व न देखे।
हे सांगावें आंखेलेखें। न लगे तुज।।८४६।।

"आणि ज्याला अध्यात्मविषयाचा स्पर्शसुद्धा नाही, तो अध्यात्माने साक्षात अनुभवावयास मिळणारा परमात्मा जाणूच शकणार नाही, हे काय सांगायला हवे! नदीच्या ऐलतीरापर्यंतसुद्धा न जाता जो मागल्या पावली नदी पाहताच लांबूनच पळून जातो, त्याला पैलतीरावरील प्रदेशाची जाणकारी कशी असणार! ज्याला घराचा उंबरासुद्धा ओलांडायला आला नाही, तो त्या घरातील संपत्ती न्याहाळू शकेल तर मोठेच आश्चर्य घडेल! त्याचप्रमाणे अध्यात्मविषयात अनभिज्ञ असणारा परतत्त्व आकलन करण्यास अक्षम असणारच हे काही मुद्दाम सांगायला नको; किंवा त्याची ही अक्षमता मोजण्यासाठी गणिती परिमाणाची काही वेगळी गरज नाही."

समारोप::::

ज्ञानदेवांची गीतार्थविषयक स्पष्टोक्ती

अठरा ज्ञानगुणलक्षणांचे वर्णन केल्यावर त्यापाठोपाठ याप्रमाणे *अठरा* अज्ञानलक्षणांचा परामर्ष घेण्यामागील आपला उद्देश स्पष्ट करत ज्ञानदेव म्हणतातः

जेव्हा सगर्भे वाढिलें। तेव्हांचि पोटीचें धालें।
जैसें मागील पदें बोलिलें। हेचि होये।।१३-८४७।।
वांचौनियां वेगळें। रूप करणें हे न मिळें।
घेईं अवंतिलें आंधळें। तैं दुजनेसि ये।।८४८।।
एवं इयें उपरती। ज्ञानचिह्नें मागुतीं।
अमानित्वादिप्रभृति। वाखाणिलीं।।८४९।।
जैं ज्ञानपदें अठरा। केलियां येरी मोहरां।
अज्ञान यया आकारा। सहजें येती।।८५०।।

"पदाची कोर न संडीं"

श्रीकृष्णांनी भगवद्गीताच्या तेराव्या अध्यायातील *७,८,९,१०* *व ११* या श्लोकांद्वारे ***ज्ञानपदे*** सांगून *अकराव्या* श्लोकाच्या उत्तरार्धातील अर्ध्या ***"अज्ञानं यदतोऽन्यथा"*** या श्लोकचतुर्थपादात ***अज्ञान म्हणजे जे ज्ञान नव्हे ते,*** अशी अज्ञानाची व्याख्या केली आहे. त्याबद्दलची आपली भूमिका स्पष्ट करतांनाच ज्ञानदेव परत आश्वासन देतात की ते गीतेच्या पदाचा भावार्थ सांगतांना त्या पदाची कोरही सोडून बोलत नसतात. ते म्हणतातः

"जेव्हा गर्भवती स्त्रीस जेवण वाढावे तेव्हा आपोआपच तिच्या उदरातील गर्भास ते पोहोचल्याचे जसे समाधान मिळते, तसेच ज्ञानपदांचे सविस्तर वर्णन जे केले त्यातच आपोआप तद्विरोधी अज्ञानपदांचे विवरण अभिप्रेत होते. खरे तर ज्ञानपदे वर्णिल्यावर अज्ञानपदे पुनः विस्तारून सांगण्याचे प्रयोजन उरत नाही. आंधळ्या माणसाला निमंत्रण केले असता, तो जसा डोळस वाटाड्याला सोबत घेऊन येतोच, त्याचप्रमाणे अमानित्वादी ज्ञानचिह्ने जी निरूपिली, तीच उलट अर्थाने फिरवली म्हणजे त्याविरोधी जी चिह्ने तीच अज्ञानाची लक्षणे होत, असे समजण्यात कोणताच प्रत्यवाय नाही."

मागां श्लोकाचेनि अर्धार्धें। ऐसें सांगितलें मुकुंदें।
ना उफराटी ज्ञानपदें। तैंचि अज्ञान।।८५१।।
म्हणौनि इयां वाहणीं। केली म्यां उपलवणी।
वांचूनि दूधा मेलवूनि पाणी। फार कीजे।।८५२।।
तैसें जी न बडबडी। पदाची कोर न सांडीं।
परि मूलध्वनीचियें वाढीं। निमित्त जालों।।८५३।।

"एवंच ज्ञान आणि अज्ञान चिह्ने वेगळाली सांगण्याची गरज नसते, म्हणूनच मुकुंदाने *(म्हणजे श्रीकृष्णांनी)* ***"अज्ञानं यदतोऽन्यथा"*** इतक्या संक्षेपाने अज्ञानाचे वर्णन केले आहे. म्हणून तुमचा जर असा समज झाला असेल की हा ज्ञानदेव दुधात पाणी मिसळून ते वाढवावे, तसे उगीचच बडबड लावून अज्ञानलक्षणांचे लंबेचवडे वर्णन करत बसला आहे, तर मी तुम्हाला निश्चित आश्वासन देतो की ते तसे नाही आणि गीतेच्या पदाच्या यथार्थाला सोडून मी काहीही सांगत नाही. किंबहुना मुकुंदाचे जे मनोगत गीतेत आहे, तेच मी तुम्हाला या अज्ञानलक्षणांचा विस्तार करून सांगण्याच्या निमित्ताने अधिक स्पष्ट करून दाखवतो आहे."

विद्वज्जन व ज्ञानेश्वरी

ज्ञानदेव सांगतात की ***"गीतेच्या पदाची कोरही न सांडता"*** म्हणजे गीतार्थ यत्किंचितही न डावलता व त्यात पदरचे काहीही अधिकउणे न करता ते तो फक्त अधिक स्पष्ट करून दाखवत आहेत. त्यांचे हे आश्वासन लक्षात न घेताच त्यांच्या ज्ञानेश्वरी या प्रासादिक ग्रंथाचा अर्थ शोधू पाहणाऱ्या किंवा गीतेचे विवेचन करतांना अथवा गीतेचे रहस्योद्घाटन करू पाहतांना ज्ञानेश्वरीस डावलणाऱ्या कथित विद्वज्जनांच्या हाती यथार्थ गीतार्थ सापडणे दुर्लभच म्हटले पाहिजे. असो.

श्रोत्यांचे आश्वासन

श्रोत्यांना कदाचित आपण केलेला हा ज्ञानपदांचा विस्तार मानवणार नाही, या आशंकेने बावरलेल्या ज्ञानदेवांस अभय देत श्रोते काय म्हणतात, पहाः

तंव श्रोते म्हणति राहे। के परिहारा ठाओ आहे।
बिहिसीं कां वायें। कविपोषका।।१३-५८४।।
तूतैं श्रीमुरारी। म्हणितलें प्रकट करी।
जैं अभिप्राय गव्हरीं। झांकिलें आम्हीं।।५८५।।
तैं देवाचें मनोगत। दावित आहासि मूर्त।
हेही म्हणता चित्त। दाटेल तुझें।।८५६।।

श्रोते म्हणतातः "ज्ञान आणि अज्ञान पदांचा एवढा विस्तार का केला त्याचे स्पष्टीकरण करत बसू नकोस. तत्त्वज्ञानदर्शक ज्ञानदेवा! तुझे विवेचन आम्हाला आवडेल का नाही अशी व्यर्थ शंका मनात बाळगू नकोस. आम्हाला समजून चुकले आहे की तुला श्रीकृष्णांनी स्वतःच गीतारूपी गुहेत गुप्त राखून ठेवलेले अभिप्राय स्पष्ट करून सांगण्यास आज्ञापिले आहे व म्हणूनच तू या गीतार्थज्ञानयज्ञानिमित्त ते देवाचे मनोगत आमच्यापुढे मूर्तिमंत साकार करतो आहेस. पण तुझ्या विनयशील स्वभावामुळे याची स्पष्ट कबूली देतांना तुझे चित्त भारावून जाईल."

म्हणौनि असो हें न बोलों। परि सांवियां गां संतोषलो।
जैं ज्ञानतरियें मेलविलो। श्रवणसुखाचियां।। ८५७।।
आतां इयावेरी। जैं तो श्रीहरी।
बोलिला तैं करी। कथन वेगीं।।८५८।।

"म्हणून याविषयी अधिक काही तू आम्हाला सांगावेस असा आम्ही तुला आग्रह करणार नाही. पण तू आम्हाला तुझ्या वाग्गंगेच्या ज्ञाननौकेतून हिंडवून जे गीताज्ञानरूपी जलाशयात मनसोक्त विहार करण्याचे अमूप सुख दिले आहेस, त्यामुळे आम्ही खूपच संतोषलो आहोत. तू आता पुढे श्रीहरींनी अर्जुनाला काय उपदेश केला तो लवकर कथन कर. तो ऐकण्यास आम्ही फार आतुरलो आहोत."

पुढील अनुसंधान

याप्रमाणे यमनियम ओळखण्यास उपयुक्त आणि अत्यावश्यक अशी ***ज्ञान*** आणि ***अज्ञान*** या गुणांची लक्षणे ज्ञानदेव *तेराव्या* अध्यायात निरूपितात. याचाच शेष विचार *सोळाव्या* अध्यायी गीतेत ***दैवासुरसंपदे***च्या निमित्ताने केलेला आहे. तरी विषयाच्या सातत्यासाठी व पूर्ततेसाठी पुढील ***उन्मेष क्र.१३ःदैवासुरसंपद्विभाग*** यात आपण तो विचार पाहू या. इत्यलम्।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१३::
::दैवासुरसंपद्विभाग::

ज्ञानोपायःदैवासुरसंपद्विभाग-२०६
ज्ञानोपायाचे महत्त्व
ज्ञानप्राप्तीचा मार्ग
द्विविध संपदाःदैवी व आसुरी संपदा-२०७
दैवी संपदा
आसुरी संपदा-२०८
साधुकथा-२०९

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१४::
::दैवी संपदा::

अभयादी दैवी संपदाःअभय-२१०
सत्त्वसंशुद्धी
ज्ञानयोगव्यवस्थिती
दानयज्ञतपादीःदान-२११
सतराव्या अध्यायातून दान
यज्ञ, दान व तप -२१२
दम (इंद्रियदमन)
याग
स्वाध्याय-२१३
तप
तप व पंथराज-२१४
आर्जव
अहिंसा
सत्य
सत्य व परतत्त्वदर्शन
सिद्धसिद्धान्तपद्धति व सत्य-२१५
अक्रोध
त्याग
अति महत्त्वाची एक संपदाःशान्ति-२१६
शान्ति म्हणजे त्रिपुटीचा लोप
शान्ति व पसायदान
गीतेतील शान्तीचा अर्थ
गीताश्लोक (१२-१२)तील "त्यागाच्छान्तिरनन्तरम्"-२१७
गीताश्लोक १२-१२ वरील ज्ञानेशांच्या ओव्या
या ओव्यांचा सरलार्थ
ज्ञान या शब्दाचा अर्थ -२१८
ज्ञान शब्दाचे दोन अर्थ
गीता श्लोक १२-१२ मधील ज्ञान हा एक प्रगतिदर्शक टप्पा
साधकाच्या प्रगतीचा आलेख
ज्ञानेश्वरी ही तर गीताज्ञानप्रकाशशलाकाच!-२१९
अपैशून्यादी दैवी गुणःअपैशून्य
कृपादृष्टी-२२०
भूतदया
अलोलुपत्व-२२१
वैराग्य
मार्दव
ऱ्ही (जन्म-मरणाची लाज)-२२२
अचापल्य
प्रत्याहार
तेज
शून्याचा मार्ग व "क्षुरस्य धारः" -२२३
क्षमा
धृति
शुचित्व
अद्रोह -२२४
अमानित्व
सव्वीस गुणः सव्वीसें गुणज्योतींचे निराञ्जन व आत्मराजाचे औक्षण
समारोप

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष १३:

गीताः
९:१२-१५;१५:१९,२०;१६:१-३
ज्ञानेश्वरीः९:१७२-१९६;१६:४७-६७

उन्मेष १४:

गीताः२:६६,७०,७१;३:२५;४:३९;५:१,४,५,१२;६:७,१४,१५,२०;
९:३१;१२:४,१२;१७:२०-२८;१८:५३,६२
ज्ञानेश्वरीः३:१६९;११:९;१२:१४१-१४३;१६:६८-२१२;
१८:१७९४-१७९९
सि.सि.प.:६:६१

::उन्मेष१३::
::दैवासुरसंपद्विभाग::

ज्ञानोपाय::::

दैवासुरसंपद्विभाग

आतापर्यंत आपण ज्ञानेश्वरीच्या *तेराव्या* अध्यायात वर्णिलेली ***ज्ञानगुणसंपत्तिलक्षणे*** पाहिली. यांचा साधकांच्या ***आहार-विहार-आचरण-विचार-यम-नियम-साधनेची दिशा व गंतव्य*** इत्यादी जीवनशैलीशी घनदाट संबंध आहे, याचे पूर्वीच सूतोवाच केले होते, हे जिज्ञासूंना स्मरत असेलच.

त्याचप्रमाणे *सोळाव्या* अध्यायांतर्गत गीतेने केलेले ***दैवासुरसंपत्ती***चे विवेचन अभ्यासणेसुद्धा साधकांच्या दृष्टीने अत्यावश्यकच आहे. ***दैवी संपदा*** व ***आसुरी संपदा*** यांचे निर्देशन श्रीगोपालकृष्णांनी त्या ठिकाणी केले आहे. ***दैवी संपदा*** ग्राह्य व ***आसुरी संपदा*** अग्राह्य असे त्यांचे मुमुक्षूंना सांगणे आहे.

दैवी संपतगुणलक्षणे व त्याविरोधी आसुरी संपतगुणलक्षणे यांचे ज्ञानदेवांनी त्यानिमित्त केलेले विवेचन या दृष्टीने अभ्यासणे आवश्यक आहे. त्याकडे आपण आता वळणार आहोत. *सोळाव्या* अध्यायातील हा जो विषय आपण आता हाताळणार आहोत, तत्पूर्वी थोडी पूर्वपीठिका पाहणे उचित ठरेल.

ज्ञानोपायाचे महत्त्व

पंधराव्या अध्यायात वृक्षावर रूपक करून संसार किती क्षणभंगुर व असार आहे हे गीतेत स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे ***क्षर, अक्षर*** व ***उत्तम*** पुरुषांचे स्पष्ट निदर्शन त्या अध्यायात आले आहे. पुरुषोत्तमाची भेट व्हावी असे वाटणाऱ्यांना, आत्मतत्त्वाची प्राप्ती व्हावी, यासाठी ***ज्ञान*** हेच साधन आहे, हे तेथे स्पष्ट केले आहे.

त्या वर्णनामुळे जाणत्यांना खूप संतोष झाला. आत्मतत्त्वाची प्राप्ती व्हावी ही आकांक्षा मुमुक्षूत निर्माण झाली. त्यांच्या तृप्तीसाठी ज्ञानदेव ***दैवासुरसंपदे***च्या वर्णनानिमित्त परत ***ज्ञान व अज्ञान*** यांचा मागील विषयच एका अर्थी पुढे चालवतात.

पंधराव्या अध्यायातील अध्यात्मज्ञानविषयक निरूपण ऐकून ज्ञाते अपार सुखावले, तर इतर मुमुक्षूंची जिज्ञासा जागृत झाली. "हे मर्मज्ञ अर्जुना! जो मला पुरुषोत्तमाला जाणतो व माझ्याशी एकरूप होतो, तोच खरा सर्वज्ञानी आणि तोच खरा पराकोटीचा भक्त!" असे उद्गार *पंधराव्या* अध्यायाच्या शेवटल्या दोन श्लोकात भगवंतांनी काढले:

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।
इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत।।१५-२०।।

"हे भारता! जो ज्ञानी या प्रकारे मला - पुरुषोत्तमाला - जाणतो, तो सर्वज्ञ होय. तो स्वतःहीसकट सर्व विश्व हे माझेच स्वरूप आहे, अशा धारणेने सर्वांतर्यामी असणाऱ्या माझी सर्व प्रकारच्या भावाने भक्ती करतो. हे पापाचा स्पर्शही न झालेल्या भारता! याप्रमाणे हे अत्यंत गुह्य शास्त्र मी तुला कथन केले. याचे ज्ञान करून घेऊन बुद्धिमान मनुष्य कृतकृत्य होतो."

पुढे *सोळाव्या* अध्यायी त्याप्रसंगी श्रीहरींनी उल्हासाने ज्ञानाचे खूप वर्णन केले. ते म्हणतात:

एवं इयेंविखीं कीर। जाणतें बुझाविलें अपार।
परि मुमुक्षु इतर। साकांक्ष जालें।।१६-४७।।
त्या मज पुरुषोत्तमा। ज्ञानें भेटे जो सुवर्मा।
तो सर्वज्ञु तोचि सीमा। भक्तीचिही।।४८।।
ऐसें हे त्रैलोक्यनायकें। बोलिलें अध्यायांत श्लोकें।
तेथ ज्ञानचि बहुतेकें। वानिलें तोषें।।४९।।
भरूनि प्रपंचाचां घोंटु। कीजे देखतयाचि देखतां द्रष्टु।
आनंदसाम्राज्यीं पाटु। बांधिजे जीवां।।५०।।
येवढेयां लाठेपणाचां उपावो। आनु नाहींचि म्हणे देवो।
हा सम्यग्ज्ञानाचां रावो। उपावांमाजीं।।५१।।

"हे ज्ञान सर्व संसाराचा एका घोटात निरास करून, सहजतया द्रष्टा-दृश्य मिळवणी करून, त्रिपुटीरहित अवस्था प्राप्त करून देते व जीवाला स्वानंदसाम्राज्याचा मुकुट चढवते. ज्ञानाएवढा समर्थ उपाय दुसरा नाहीच! हा उपायांचा राजाच म्हणा ना!"

ऐसें आत्मजिज्ञासु जैं होते। तिहीं तोषलेनि चित्तें।
आदरें तेयां ज्ञानातैं। वोवालिलें जीवें।।५२।।
आतां आवडीं तेथ पडे। तेयांचि अवसरें पुढे पुढें।
रिगों लागें हे घडें। प्रेम ऐसें।।५३।।
म्हणोनि जिज्ञासूंचांपैकीं। ज्ञानीं प्रतीती हो ना जंव निकीं।
तंव योगक्षेम ज्ञानविखीं। स्फुरेलचि कीं।।५४।।

"हे ऐकून आत्मजिज्ञासू जे होते त्यांनी आनंदाने व अत्यादराने ज्ञानोपायावरून आपला जीव ओवाळला. इतके प्रेम ज्या वस्तूच्या ठिकाणी निर्माण होते, ती वस्तूच सतत मनात भरून राहते, हा प्रेमाचा नियमच आहे. याच आवडीने ज्ञानोपायाच्या ठिकाणी प्रेम वसलेले मुमुक्षू, जोपर्यंत दृढ ज्ञानप्राप्ती व ज्ञानप्रतीती होत नाही, तोपर्यंत सतत ज्ञानाविषयी विचार करणारच ना!"

ज्ञानप्राप्तीचा मार्ग

आता हे ज्ञान कसे होईल त्याविषयी ज्ञानदेव म्हणतात:

म्हणौनि तैंचि सम्यग्ज्ञान। कैसेनि होये स्वाधीन।
जालियां वृद्धियत्न। घडेल केंवीं।।१६-५५।।

कां उपजोचि जैं न लाहे। जैं उपजलेंहीं आंव्हांटा सूयें।
तैं ज्ञानीं विरुद्ध कें आहे। हे जाणावें कीं।।५६।।
मग जाणतेयां जैं विरू। तेयाची वाट वाहती करूं।
ज्ञाना हन तैंचि विचारूं। सर्व भावें।।५७।।

"म्हणून ते सम्यग्ज्ञान कसे प्राप्त होईल व झालेले ज्ञान दृढ कसे होईल, तसेच ते ज्ञान होण्यास जे प्रतिबंध करतात व झालेल्या ज्ञानाचा विपर्यास करून दाखवतात, ते ज्ञानाचे शत्रू कोण आहेत, हे सर्व जाणून घेतले पाहिजे. मग ज्ञानास प्रतिरोध करणाऱ्यांना घालवून देऊन ज्ञानमार्ग मोकळा करण्याचा उपाय मनोभावे ऐकू या."

ऐसा जिज्ञासू तुम्हीं समस्तीं। भावो जो धरिला असेल चित्तीं।
तो पुरवावया लक्ष्मीपती। बोलिजैल।।१६-५८।।
ज्ञानासीं सुजन्म जोडें। आपुली विश्रांतीही वरी वाढें।
तैं संपत्तीचें पवाडे। सांघिजैल दैवी।।५९।।
आणि ज्ञानाचियें कामाकारें। जैं रागद्वेषासीं दे थारें।
तियें आसुरियेंही घोरें। करील रूप।।६०।।

"असा जो तुमच्या जिज्ञासू अंत:करणातील भाव आहे. तो पूर्ण करण्यासाठी भगवंत *सोळावा* अध्याय कथन करत आहेत. जिच्या योगाने उत्तम ज्ञान निर्माण होते व सुखप्राप्ती होते, त्या ***दैवी संपदे***चे ते गुणवर्णन करून ज्ञानास जाळून टाकणाऱ्या व रागद्वेषादींना थारा देणाऱ्या घोर ***आसुरी संपदे*** चे पण रूपदर्शन त्यानिमित्त घडेल."

द्विविध संपदा::::

दैवी व आसुरी संपदा

नवव्या अध्यायाच्या *बाराव्या व तेराव्या* अशा दोन श्लोकातून आसुरी व दैवी संपत्तींना कारण असणाऱ्या दैवी व आसुरी प्रकृतींचा जो निर्देश गोपालकृष्णांनी केला होता, तो असा आहे:

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः।।९-१२।।
महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम्।।९-१३।।

"जे विवेकशून्य लोक राक्षसी व आसुरी प्रकृतीवर जातात, त्यांच्या इच्छा निष्फळ होतात; त्यांची कर्मे निष्फळ होत व त्यांचे ज्ञानही निष्फळच असते. पण हे पार्था! दैवी प्रकृतीचा आश्रय करणारे महात्मे भूतांचे आदिकारण व अव्यय अशा मला जाणून माझे अनन्य भक्त होतात."

हाच विषय आता *सोळाव्या* अध्यायात घेत ज्ञानदेव म्हणतात:

सहज इष्टानिष्टकरणीं। दोघीचि इयां कवतुकिणी।
हे नवमाध्यायीं। उभारणी केली।।१६-६१।।
तेथ साऊमा घेवाया उवावौ। तंव वोडवला आन प्रस्तावो।
तरि तेयां प्रसंगें आतां देवो। निरूपित असे।।६२।।
यया निरूपणाचेनि नांवें। अध्यायपद सोलावें।
लावणी पाहतां जाणावें। मागिलावेरी।।६३।।

"अशा या दैवी व आसुरी प्रकृतींचे *नवमाध्यायी* निरूपण केले होते. वास्तविक तेथेच त्यांचे विवेचन पूर्ण करावयास हवे होते. पण तितक्यात इतर मुद्दे उपस्थित झाल्यामुळे ते राहून गेले. ते वर्णन आणि त्या प्रकृतींनी उपार्जित केलेल्या संपत्तींचे विवेचन आता *सोळाव्या* अध्यायाच्या निमित्ताने श्रीकृष्ण निरूपित आहेत, हे जाणकारांनी लक्षात घ्यावे," असे ज्ञानदेव सांगत आहेत. असो.

परि हे आतां असो प्रस्तुतीं। ज्ञानाचां हिताहितीं।
समर्थां संपत्ति। इयांचि दोनी।।१६-६४।।
जैं मुमुक्षुमार्गीचीं बोलावीं। जैं मोहरात्रीचीं धर्मदिवीं।
तैं आधी तंव दैवी। संपत्ती ऐको।।६५।।
जेथ एक एकांतैं पोखीं। ऐसें बहुत पदार्थ येकीं।
संपादिजती तैं लोकीं। संपत्ति म्हणिजे।।६६।।
तैं दैवी सुख संभवीं। तेथ दैवां गुणां एकोपजीवी।
जालीं म्हणौनि दैवी। संपत्ती हे।।६७।।

"आता ज्ञान मिळवणे वा अज्ञान पोसणे याकरता या दैवी व आसुरी संपदाच कारणीभूत असतात. मुमुक्षूंना आत्मप्राप्तीच्या मार्गाला लावणारी व संसारमोहरूपी निशा घालवणारी धर्ममशालरूपच अशी जी दैवी संपदा असते, तिचे प्रथम अवलोकन करू या. जिच्या योगाने इतर पदार्थ मिळवता येतात, तिला या लोकी *संपत्ती* असे म्हणतात. दैवी सुखप्राप्ती करून देणारी व दैवी गुणांचे पोषण करणारी म्हणून हिला ***दैवी संपत्ती*** असे म्हणतात."

दैवी संपदा

याप्रमाणे ज्ञानदेव दैवी संपदेचे वर्णन करण्यास बद्धपरिकर होतात. दैवी संपत्तीचे निर्देशन श्रीगीतेच्या *१६-१,२ व ३* या श्लोकातून केलेले आहे, ते असे:

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्।।१६-१।।
अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम्।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्लीरचापलम्।।१६-२।।
तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहोनातिमानिता।
भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत।।१६-३।।

सव्वीस प्रकारच्या ***दैवी गुणसंपत्ती*** याद्वारे सांगितल्या आहेत, त्या अशा:

१) अभय, २) सत्त्वसंशुद्धी, ३) ज्ञानयोगव्यवस्थिती, ४) दान,५) दम, ६) यज्ञ, ७) स्वाध्याय, ८) तप, ९) आर्जव, १०) अहिंसा, ११) सत्य, १२) अक्रोध, १३) त्याग, १४) शान्ति, १५) अपैशून, १६) दया, १७) अलोलुपत्व, १८) मार्दव, १९) ह्री, २०) अचापल्य, २१) तेज, २२) क्षमा, २३) धृति, २४) शौच, २५) अद्रोह व २६) अमानित्व

अहिंसा, आर्जव, शौच, क्षमा, अमानित्व यांसारखे गुण पूर्वी तेराव्या अध्यायातील *ज्ञानगुणलक्षणे* पाहतांनाही आपण अभ्यासले

होते. त्याचप्रमाणे *अहिंसा, स्वाध्याय, सत्य, तप*, इ.काही गुण पतञ्जलीप्रणीत यमनियमांतर्गत येतात, हेही आपणास विदित आहेच. ***तेराव्या व सोळाव्या अध्यायातील ज्ञान व दैवीसंपदलक्षणे* बहुतेक अष्टांगयोगातील यमनियमांचा समावेश करतात,** असे आपल्याला दिसून येते.

पतञ्जलींच्या सूत्ररूपाने कथन केलेल्या योगशास्त्रातील ईश्वरप्रणिधानाद्वारे समाधि प्राप्त करण्याचा प्रमुख हेतू समोर ठेवून त्यांच्या विचारसरणीचा श्रीकृष्णांनी गीतेद्वारे विस्तार व स्पष्टीकरण केल्याचे दिसते. ज्ञानेश श्रीकृष्णांचा विचार नीट समजावा म्हणून व स्वतःच्या विस्तृत अनुभवाचा आपणाला लाभ करून देण्यासाठी ज्ञानेश्वरीद्वारे हा सर्व विषय अतिशय सौकर्याने आपणापुढे मांडतात, हे जिज्ञासूंना परतपरत सांगायला नकोच! असो.

आसुरी संपदा

या सव्वीस गुणी ***दैवीसंपत्ती***चे ज्ञानदेवांनी केलेले वर्णन पाहण्यापूर्वी ***आसुरी*** संपत्तीचे व नंतर ***दैवी*** संपत्तीचे *नवव्या* अध्यायात *श्लोक क्र. ९-१२ व १३* यांवर त्यांनी केलेले विवेचन पाहू या:

ययालागी जन्मलेचि तैं मोघ। जैसें वार्षियेंवीण मेघ।
कां मृगजलाचें तरंग। दुरूनिचि पाहावें।।९-१७२।।
अथवा काल्हेरीचें असिवार। ना तऱ्हीं वोडंबरीचें अलंकार।
कीं गंधर्वनगरींचें आवार। आभासती कां।।१७३।।
सांवरी वाढिन्नल्या सरलां। वरी फल ना आंतु पोकला।
कां स्तन जालें गलां। शेलिये जैसें।।१७४।।
तैसें मूर्खाचें तेयां जियालें। आणि धिक् कर्म तेयांचे निफजे।
जैसें सांवरी फल आलें। घेपे ना दिजें।।१७५।।

"म्हणून अशा तमोगुणी माणसांचे - आसुरी संपदेचे धनी होणाऱ्यांचे जन्माला येणे व्यर्थच आहे. ज्याप्रमाणे पर्जन्यवृष्टी न करणारे मेघ वा मृगजळाचे तरंग दुरूनच बरे दिसतात; किंवा मातीचे घोडेस्वार, इंद्रजालाने निर्मिलेले अलंकार किंवा गंधर्वनगरीचा दाखवलेला स्वप्निल आभास जसे मिथ्या असतात वा जसा कांड्यानिवडुंग सरळसोट वाढतो - त्याला ना शेंड्यावर फळ असते ना आत गाभा! किंवा शेळीचे अजागळ स्तन जसे दूध देण्याच्या उपयोगाचे नसतात; तसेच त्या मूर्खाचे जीवन व्यर्थ निरुद्योगी असते. सांवरीच्या झाडाला आलेले फळ जसे हाती न लागताच फुटून त्यातल्या म्हाताऱ्या वाऱ्यावर विरून जातात, त्याचप्रमाणे त्यांचे कोणतेही कर्म उपयुक्त फल देत नाही."

मग जैं कांहीं तैं पढिन्नलें। तैं मर्कटें नारळ तोडियले।
कां आंधल्याहातीं पडिन्नलें। मोती जैसें।।९-१७६।।
किंबहुना तेयाचीं शास्त्रें। जैसीं कुमारीहातीं दिधलीं शस्त्रें।
कां अशौच्या मंत्र-। बीजें कथिलीं।।१७७।।

"आणि ते जे काही पांडित्य मिळवतात, ते म्हणजे माकडाने नारळ तोडून घ्यावा पण त्याला तो कसा फोडावा व खावा हे माहीत नसल्यामुळे तो वाया जावा; किंवा आंधळ्याच्या हाती अजाणतेपणे मोती यावा अन त्याने तो खडा म्हणून फेकून द्यावा, त्याप्रमाणे वायफळच असते. किंबहुना त्याने पढलेली शास्त्रे म्हणजे अबलेच्या हाती दिलेली शस्त्रे किंवा अशुचिर्भूत माणसाला केलेला मंत्रोपदेश जसे त्यांच्या उपयोगाचे नसून उलट त्यांचा घातच करतात, त्याप्रमाणे असतात.

तैसें ज्ञानजात तेयां। आणि जैं काई आचरिलें धनंजया।
तैं आघवेंचि गेलें वायां। जैं चित्तहीन।।१७८।।
पैं तमोगुणाचीं राक्षसी। जैं सद्बुद्धितें ग्रासीं।
विवेकाचां ठाओचि पुसी। निशाचरी।।१७९।।
तियें प्रकृति वरपडें जाहलें। म्हणऊनि चिंतेचेनि कपोलें गेलें।
वरि तामसियेचें पडिलें। मुखामाजीं।।१८०।।

"त्यांचे चित्त तमसांधकाराने भरून गेलेले असल्याने व मोहाने लिप्त झालेले असल्याने त्यांनी जे काही ज्ञान संपादन केलेले असते व ते जे काही कर्मकांड करतात, ते सगळेच वाया जाते. सद्बुद्धीला गिळून टाकणाऱ्या व विवेकाचा ठावठिकाणा नष्ट करणाऱ्या अंधाऱ्या तमोगुणाच्या राक्षसी प्रकृतीच्या अधीन झाल्यामुळे ते तिच्या प्रपंचचिंता अन मोहरूपी गालफडे असलेल्या तामसी मुखात अलगदच जाऊन पडतात."

जेथ आशेचियें लालें। आंतु हिंसा जिभ लोलें।
तेवींचि संतोषाचें चाकलें। अखंड चघलीं।।९-१८१।।
जैं अनर्थाची कानवेरी। अवालुवे चाटित निघे बाहेरी।
जैं प्रमादपर्वतींची दरी। सदाचि मातलीं।।१८२।।
जेथ द्वैषाचियां दाढा। खसखसां ज्ञानाचां करिती रगडा।
जैं अगस्तिगंवसणी मूढां। स्थूलबुद्धी।।१८३।।
ऐसें आसुरिये प्रकृतीचां तोंडीं। जै जालें गां भूतोंडीं।
तैं बुडौनि गेलें कुंडीं। व्यामोहाचां।।१८४।।

"ज्या राक्षसीच्या मुखातील आशारूपी लाळेत हिंसारूपी जीभ संतोषाचे खांडके करून नित्य चघळत असते, जी अनर्थरूपी विषय मनसोक्त खात असते व जी ओठांना लागलेले विषयसुख चाटत बसते; व जी प्रमादरूपी पर्वतातील माजलेली दरी आहे; जिच्या तोंडातील द्वेषरूपी दाढा क्षणात ज्ञानाचा भुगा पाडतात व अगस्तींनी ज्याप्रमाणे इल्वल राक्षसाला चावून खाऊन उदरात पचवून टाकले, त्याप्रमाणे जी राक्षसी स्थूलबुद्धीच्या मूढांना चावूनचावून खाते व आपल्या विशाल उदरात सदाकरता गडप करते, अशा आसुरी प्रकृतीच्या तोंडी जे जीव भूताला टाकलेल्या बळीप्रमाणे जातात, ते भ्रांतीच्या कुंडात ठार बुडून जातात."

एवं तमाचियें पडिलें गर्तें। न पविजतिची विचाराचेनि हातें।
हे असो तैं गेलें जेथें। तैं शुद्धीचि नाहीं।।१८५।।
म्हणौनि असोतु इयें वायाणी। कायशीं मूर्खांची बोलणीं।
वायां वाढवितां वाणी। शिणेल हन।।१८६।।

ऐसें बोलिलें देवें। तेथ जी म्हणितलें पांडवें।
आइक जेथ वाचा विसंवें। तैं साधुकथा।।१८७।।

"याप्रमाणे जे तमोगुणाच्या गर्तेत पडले ते ज्ञानवानाच्या हाती प्रपंचातून सोडवण्यासाठी सापडतसुद्धा नाहीत. कारण ते अशा ठिकाणी पोहोचतात की जेथे त्यांचा पत्ताच लागत नाही. असो! हे वर्णन करून काय उपयोग! त्या मूर्खांची कथा सांगणे म्हणजे व्यर्थ वाणीला शिणवणेच होय," असे श्रीकृष्णांचे म्हणणे अर्जुनाला पटले. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, "तर आता ज्यांच्या वर्णनाने वाचेचे श्रमपरिहार होतील, ती ***साधुकथा*** – दैवी संपत्तिमान महाभागांचे भाग्य – श्रवण कर."

साधुकथा

आसुरी संपदा धारण करणाऱ्या व राक्षसी प्रकृतीचा पगडा असणाऱ्यांचे वर्णन केल्यावर दैवी प्रकृतीचा आश्रय घेणाऱ्या महात्म्यांचे वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं जेयांचियें चोखटें मानसीं।
मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी।
जेयां निजेयांतैं उपासी। वैराग्य गां।।९-१८८।।
जेयाचेनि आस्थेचियां सद्भावा। आंतु धर्मु करी राणीवा।
जेयांचें मन वोलावा। विवेकासीं।।१८९।।
जैं ज्ञानगंगें नाहालें। पूर्णता जेऊनि धालें।
जैं शान्तिसी आलें। पालव नवे।।१९०।।

क्षेत्रसंन्यासी म्हणजे एकाद्या क्षेत्रात संन्यास घेऊन नेहमीकरता राहणे – जसे **सद्गुरु श्री स्वामी स्वरूपानंदां**नी एका विशेष कालानंतर सतत पावसक्षेत्री संन्यस्त वृत्तीने शेवटपर्यंत वास्तव्य केले.

श्रीकृष्ण म्हणतातः "हे अर्जुना! महात्मे दैवी प्रकृतीचा आश्रय करून असतात. त्यांच्या शुद्ध चित्तात मी ***क्षेत्रसंन्यासी*** होऊन राहतो. ते माझे भक्त असतात. त्यांची उपासना वैराग्य स्वतःच करते. त्यांच्या सद्वृत्तीपूर्ण अंतःकरणात धर्माचे साम्राज्य असते. विवेकाबद्दल खरे प्रेम - खरा स्नेह - त्यांच्या मनात सतत वसत असतो. ज्ञानगंगौघात स्नात झालेले ते जीव सदा परिपूर्ण असतात. ते म्हणजे शांतिरूपी वृक्षाला नावीन फुटलेली पालवीच!"

जैं परिणामा निगालें कोंब। जैं धैर्यमंडपाचें स्तंभ।
जैं आनंदसमुद्रीं कुंभ। चुबकलौनि भरलें।।९-१९१।।

"पूर्णमदः। पूर्णमिदं। पूर्णात् पूर्णमुदच्यते।। पूर्णस्य पूर्णमादाय। पूर्णमेवावशिष्यते।।" या श्रुतीने बोध होणाऱ्या परिपूर्ण अवस्थेला कोंब फुटावेत, तसे ते महात्मे असतात. ब्रह्मत्व स्थिरपणे पेलणाऱ्या धैर्यरूपी मंडपाचे ते जणू आधारस्तंभ असे खांबच असतात! आनंदसमुद्रात चुबकळून भरलेले ते जसे काही कुंभच होत!"

जेयां भक्तीचि येतुलीं प्राप्ती। जैं कैवल्या परौतें सर म्हणती।
जेयांचियें लीलेमाजीं नीती। जियालीं दिसे।।९-१९२।।
जैं आघवांचि करणी। लेईलें शांतीचीं लेणीं।
जेयांचें चित्त गंवसणी। व्यापका मज।।१९३।।

"पराकोटीची भक्ती त्यांना प्राप्त झालेली असल्यामुळे मोक्षाचीसुद्धा त्यांना तमा नसते. त्यांचे सहज कर्माचरण म्हणजेच मोक्षमार्ग प्रकट करणारी नीती वा युक्तीच होय. सर्व इंद्रियांना त्यांनी शांतिस्वरूप अलंकारांनी मंडित केलेले असते. त्यांचे चित्त म्हणजे जो मी प्रभू सर्वव्यापी, त्यालासुद्धा व्यापणारी गंवसणी असते म्हणा ना!"

ऐसें जैं महानुभाव। जैं दैविये प्रकृतीचें दैव।
जैं जाणौनियां सर्व। स्वरूप माझें।।९-१९४।।
मग वाढतेनि प्रेमें। मातें भजति जैं महात्मे।
परि दुजेपण मनोधर्में। शिवतलें नाही।।१९५।।
ऐसें मीचि होऊनि पांडवा। करिती माझी सेवा।
परि नवलावो तो सांगावा। असे आईक।।१९६।।

"असे जे महानुभाव असतात, ते दैवी प्रकृतीच्या अंगीचे गुणच असतात म्हणा ना! जे माझे स्वरूप जाणणारे असतात, तरीही अखंड अन उत्तरोत्तर वाढत्या प्रेमाने माझी भक्ती करतात; आणि ती भक्तीसुद्धा माझ्याशी एकरूप होऊन करतात; याप्रमाणे मत्स्वरूप होऊन माझी उपासना करणाऱ्या त्या महात्म्यांच्या भक्तीचा प्रकार अति उत्कृष्ट असतो; तो, हे पार्था! तू ऐकच!"

याप्रमाणे दैवी संपत बाळगणाऱ्या महाजनांचे वर्णन केल्यानंतर

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते।।९-१४।।
ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते।
एकत्वेन पृथकत्वेन बहुधा विश्वतोमुखम्।।९-१५।।

या श्लोकातून भगवंतांनी त्यांच्या भक्तीचे स्वरूप विशद केले आहे. ज्ञानदेवांच्या त्यावरील ओव्या व एकूणच हा विषय आपण भक्तीसंबंधी विशेष विषयविवेचन करतांना पाहू या.

तूर्त आपण *सोळाव्या* अध्यायाच्या ***"अभयं सत्त्वसंशुद्धि.....।"*** या प्रथम श्लोकावरील ज्ञानदेवांनी केलेले भाष्य पाहू या. त्यासाठी पुढील ***उन्मेष क्र. १४ - दैवी संपदा*** याकडे वळू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष१४::
::दैवी संपदा:::

१)अभय::::

अभय म्हणजे ***सम्यग्ज्ञान*** -अद्वैतावस्था प्राप्त झाल्यावर जी निर्भयता येते, त्या सद्गुणाबद्दल ज्ञानदेव म्हणतातः

आतां तेयांचि दैवी गुणा- । माजीं धुरेचां बैसणा ।
बैसें तेयां आकर्णा । अभय ऐसें ।।१६-६८ ।।
तऱ्हीं घालूनि महापुरीं । न घेपे बुडणेयाचि शियारी ।
कां रोगु न गणिजे घरीं । पथ्याचियां ।।६९ ।।
तैसा कर्माकर्माचियां मोहरां । उठूं नेदूनि अहंकारा ।
संसाराचां दरारा । सांडणें येणें ।।७० ।।
अथवा ऐक्यभावाचेनि पैसें । दुजें मानूनि आत्मा ऐसें ।
भयवार्ता देशें । दवडणें जैं ।।७१ ।।
पाणी बुडऊं एं मीठातैं । तंव मीठचि पाणी आतें ।
तेवीं आपण जालेनि अद्वैतें । नाशें भय ।।७२ ।।
अगां अभय येणें नांवें । बोलिजे तैं हे जाणावें ।
सम्यग्ज्ञानाचें आघवें । धांवणें हे ।।७३ ।।

निरहंकार वृत्ती झाल्यावर, अद्वैतभावाने संसारात वावरतांना जन्म-मृत्यूची वार्ता नसणे; त्यांचे भय नाहीसे होणे म्हणजे ज्ञानदेवांच्या मते ***अभय*** होय. त्यासंबंधी माउली म्हणतेः

"समस्त दैवीगुणसंदेत श्रेष्ठ व प्रथम क्रमांकाच्या स्थानाचा जो गुण, त्याला ***अभय*** असे म्हणतात. ज्याप्रमाणे महापुरात उडीच घेतली नाही तर बुडण्याचे भय अजिबात नसते किंवा नियत आहारविहारादी वागणूक ठेवल्यास रोगाची बाधा होत नाही; त्याचप्रमाणे कर्म व अकर्म यांच्या निमित्ताने अहंकारवृत्ती उत्पन्न न होऊ दिल्याने संसारभय टळते. पाणी मिठाला बुडवू गेले तर मिठाचा नाश न होता ते जसे पाण्याशी एकरूप होऊन बुडण्याच्या भयापासून मुक्त होते, त्याप्रमाणे अद्वैतस्थितीत राहिल्याने व सर्व विश्व आत्मवृत्तीने पाहण्याने संसाराचे भय नष्ट होते. हे अर्जुना! सम्यग्ज्ञानाबरोबर असणारा व त्याला जपणारा हा ***अभय*** नावाचा रक्षकच आहे, म्हणेनास!"

२)सत्त्वसंशुद्धी::::

संसारात वावरूनही त्याची बाधा न होणे हा जो ***अभय*** नावाचा दैवी गुण आहे, त्याचे वर्णन केल्यानंतर ज्ञानदेव ***सत्त्वसंशुद्धी*** म्हणून गीतेत निर्दिष्ट केलेल्या दैवी गुणासंबंधी म्हणतातः

आतां सत्त्वशुद्धि जैं म्हणिजे । तैं ऐंसा चिह्नीं जाणिजे ।
तऱ्हीं जळें ना विझे । राखोंडी जैसीं ।।१६-७४ ।।
कां पाडिवां वाढी न मगे । अवसें तुटौनि मागें ।
माजीं अतिसूक्ष्म आंगें । चंद्रु जैसा राहे ।।७५ ।।
ना तऱ्हीं वार्षियां सांडिली । ग्रीष्में नाहीं मांडिली ।
माजीं निजरूपें निवडली । गंगा जैसी ।।७६ ।।

"आता सत्त्वशुद्धी कशाला म्हणावे, ते ऐक. राख जशी जळत नाही व म्हणून ती विझतसुद्धा नाही असे म्हणावे लागते; प्रतिपदेला असणारी चंद्रकला वाढती असते, तर अमावास्येला कलांचा लोप होतो, पण चंद्र मात्र कलांचा स्पर्श न होता जसा प्रतिपदेपासून अंवसेपर्यंत आपल्या सूक्ष्म स्वरूपात बदल न होऊ देता आपले अस्तित्व जसेच्या तसे राखून ठेवतो; वर्षाकाली महापुराने दुथडी ओलांडणारा गंगौघ व ग्रीष्मकाळीं काहीसा संकुचित झालेला तोच प्रवाह, हे पाहतांना जरी भिन्न वाटले, तरी त्या दोन्हीतही ज्याप्रमाणे गंगाच प्रकट होते;"

तैसी संकल्पविकल्पाची वोढी । सांडूनि रजतमाचीं कावडी ।
भोगितां निजधर्माची आवडीं । बुद्धी उरे ।।१६-७७ ।।
इंद्रियवर्गे दाविलियां । विरुद्धा अथवा भल्या ।
विस्मयो कांहीं केल्या । नुठे चित्तीं ।।७८ ।।
गांवां गेलियां वल्लभु । पतिव्रतेचां विरहक्षोभु ।
भलतेसणि हानिलाभु । न मनीं जेवीं ।।७९ ।।
तेवीं सत्स्वरूप रुचलेपणें । बुद्धि जैं ऐसें अनन्य होणें ।
तैं सत्त्वशुद्धि म्हणिजे । केशीहंता ।।८० ।।

"त्याचप्रमाणे जी बुद्धी ***संकल्प-विकल्प*** हे जे मनाचे गुणधर्म आहेत, त्यांची ओढ सोडून व रजोतमोगुणांचे ओझे टाकून स्वस्वरूपी निमग्न होऊन जाते, ती मग इंद्रियांच्या चांगल्या व त्याज्य विषयांनुसार वर्तन करण्याने चित्तात कोणताही क्षोभ उत्पन्न होऊ देत नाही. पती गांवाला गेला असता त्याच्या विरहाने व्याकुल झाली तरी पतिव्रतेला त्यात आपले काही सुख बुडाल्याचे दुःख नसते व ती ते सुख प्राप्त करून घेण्यासाठी वाटेल त्याच्याशी पतीसारखी जवळीक जशी करत नाही; त्याचप्रमाणे सत्स्वरूपी लीन झालेली बुद्धी आत्मरूपी अनन्य होऊन स्थिर राहते." श्रीकृष्ण अशा बुद्धीच्या अनन्यत्वाला ***सत्त्वशुद्धी*** म्हणून वाखाणतात.

३) ज्ञानयोगव्यवस्थिती::::

गीतेच्या पाचव्या अध्यायाच्या

सन्न्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ।।५-१ ।।

या अर्जुनाच्या शंकेचे समाधान करतांना भगवंतांनी काही श्लोकात असे म्हटले होतेः

साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः ।
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ।।५-४ ।।
यत्साङ्ख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ।।५-५ ।।

साङ्ख्य-ज्ञान-संन्यास आणि ***योग-कर्मयोग*** या दोन निष्ठा ***"ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम् (३-३)"*** या शब्दात भगवंतांनी सांगितल्या होत्या. त्यांचे काही वर्णन त्यांनी नंतर केले. ते ऐकून अर्जुनाने श्रीकृष्णांना विनवले की या दोन्ही मार्गातील श्रेयस्कर कोणता, ते सांगावे. त्यावर श्रीकृष्णांनी या दोन्ही मार्गांचे सारखेच महत्त्व असल्याचे सांगितले आणि तत्त्वत: व परिणामस्वरूप ***योग व ज्ञान*** यांचे एकत्व प्रकट केले. ही पार्श्वभूमी ध्यानात घेऊन ज्ञानदेवांनी श्रीकृष्णोक्त ***ज्ञान-योग-व्यवस्थिती*** या गुणाची केलेली व्याख्या न्याहाळणे मनोरंजक ठरते. ते म्हणतात:

आता आत्मलाभाविखीं। ज्ञानयोगामाजीं एकीं।
जैं आपुलियां ठाकीं। हांवे भरे।।१६-८१।।
तेथ सगलियें चित्तवृत्ती। त्यागु करणें ऐशां रितीं।
निष्कामें पूर्णाहुती। हुताशीं जैसीं।।८२।।
कां सुकुलिनें आपुलीं। आत्मजा सत्कुलींच दिधलीं।
हे असो लक्ष्मी थिरावली। मुकुंदीं जैसीं।।८३।।
तैसेनि विकलेंपणें। जैं योग ज्ञानींच या वृत्तिक होणें।
तो तिजा गुणु म्हणे। श्रीकृष्णनाथु।।८४।।

श्रीकृष्ण सांगतात: "तर ***ज्ञान वा योग*** या दोन्ही निष्ठातील जी एक आपल्या मनात भरेल, तिला आत्मलाभाच्या उद्देशाने वाहून घेऊन त्याप्रीत्यर्थ व त्या निष्ठेठायी आपल्या सर्व चित्तवृत्तींचा संन्यास करणे; जसा कुलीन पुरुष आपली कन्या सुकुळातच देतो; किंवा चंचल असणारी लक्ष्मी जशी मुकुंदापाशी स्थिर होऊन राहते; त्याचप्रमाणे योग किंवा ज्ञान या कोणत्याही एका निष्ठेला आपले चंचल चित्त - आपले अंत:करण अर्पण करणे, या तिसऱ्या गुणाला ***ज्ञान-योग-व्यवस्थिती*** असे म्हणतात."

अध्यात्माचे हे जे दोन मार्ग आहेत, त्यातील आपणास जो योग्य असेल त्याला तन,मन व अंत:करण देऊन त्याचे अखंड आचरण करणे, असे या गुणाचे लक्षण आहे.

दान-यज्ञ-तपादी::::

४)दान

दान या सद्गुणसंपत्तीचे दैवी स्वरूप वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतात:

आतां देहवाचाचित्तें। यथासंपन्नें वित्तें।
वैरी जालियांही आर्त्तातैं। न वंचणें जे कां।।१६-८५।।
पत्र पुष्प छाया। फलें मूलें धनंजया।
वाटेचां न चुकें आलियां। वृक्षु जैसा।।८६।।
तैसें मनौनि धनवरी। विद्यमानें आल्या अंवसरीं।
श्रांताचियां मनोहारीं। उपयोगां जाणें।।८७।।
तेयां नांव जाण दान। जैं मोक्षनिधानाचें अंजन।
हे असो.....।।८८।।

"विवंचनेत असलेल्यांना, मग तो शत्रू का असेना, मदत करण्यासाठी यथाशक्ती धन, एवढेच काय तर आपला देह, वाचा, मनसुद्धा वेचण्यास मागेपुढे न पाहणे; वाटेवरचा वृक्ष जसा आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक वाटसरूला अन् प्राणिमात्राला आपल्याजवळचे सर्व काही म्हणजे पत्रे, पुष्पे, फळे, मूळे व सावली देऊन तोषवतो; त्याचप्रमाणे ज्यावेळी जे जे देता येईल ते ते, तन- मन-धनासहित देऊन श्रांत जिवांना तोष देण्यासाठी उपयोगी पडणे या दैवी गुणाला ***दान*** म्हणतात. असा हा गुण म्हणजे मोक्षरूपी ठेवा पाहण्यासाठी दैवी दृष्टी प्राप्त व्हावी म्हणून डोळ्यात घालावयाचे जणू अंजनच होय!"

सतराव्या अध्यायातील दान

दानाविषयी पुढेही सतराव्या अध्यायात *२०,२१ व २२* या दानश्लोकत्रयीतून भगवंतांनी ***सात्त्विक, राजस व तामस*** दानप्रक्रियांचे वर्णन केले आहे.श्रीकृष्णांनी सांगितले आहे की:

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्।।१७-२०।।

"स्वधर्माने मिळवलेल्या धनातून दान करणे हे कर्तव्य आहे अशा बुद्धीने, जे दान योग्य स्थली, काळी व पात्रता पाहून, ज्याच्यापासून परतफेडीची वा प्रत्युपकाराची अपेक्षा नाही अशाला दिले जाते, त्या दानाला ***सात्त्विक दान*** असे म्हणतात."

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुन:।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्।।१७-२१।।

"जे दान उपकार करण्यासाठी किंवा उपकारांची परतफेड करण्यासाठी अथवा फलाची अपेक्षा धरून अनमान करत दिले जाते, त्या दानाला ***राजस दान*** असे म्हणतात."

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते।
असत्कृतवमज्ञातं तत्तामसमुदाहृतम्।।१७-२२।।

"जे दान अयोग्य स्थली, अयोग्य काळी व अयोग्य व्यक्तीला, सत्काररहित व अवहेलनापूर्वक, हेटाळणी करून दिले जाते, त्याला ***तामस दान*** असे म्हणतात."

सात्त्विक दानसुद्धा मोक्षार्थी माणसाने कसे करावे, याचा भगवान श्रीकृष्ण पुढील श्लोकात निर्देश करत म्हणतात:

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतप:क्रिया:।
प्रवर्तन्ते विधानोक्ता: सततं ब्रह्मवादिनाम्।।१७-२४।।

"म्हणून ब्रह्मवाद्यांच्या आणि मोक्षार्थी पुरुषांच्या शास्त्राला अनुसरत होणाऱ्या यज्ञ, दान, तप इ.क्रिया ***ॐ*** या अक्षराचा उच्चार करत नेहमी सुरू होत असतात."

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतप:क्रिया:।
दानक्रियाश्च विविधा: क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभि:।।१७-२५।।

"मोक्षाची इच्छा करणारे मनुष्य फलाची अपेक्षा न ठेवता यज्ञ, दान आणि तप या विविध क्रिया ***तत्*** या अक्षराचा उच्चार करून ब्रह्मार्पण बुद्धीने करत असतात."

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते।।१७-२६।।

"कर्ता सद्रूप होण्यासाठी व सदोष कर्म निर्दोष व पूर्ण होण्याकरता ***सत्*** या ब्रह्मवाचक शब्दाची योजना करतात."

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते।।१७-२७।।

"यज्ञ, दान व तप यांच्यामधील न्यूनता जाऊन संपूर्णता प्राप्त होणे, यालाही ***सत्*** म्हणतात. याच्याकरता केलेल्या व म्हणून तद्रूप झालेल्या कर्माला ***तत्*** म्हणतात."

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।१७-२८।।

"हे पार्था! अश्रद्धेने केलेले हवन, दिलेले दान, आचरलेले तप अन केलेले कर्म जे असेल, त्याला ***असत्*** असे म्हणतात; मृत्यू पावल्यावर म्हणजे परलोकी त्याचे फल नाही व इहलोकीही नाही."

यज्ञ, दान व तप

सव्वीस प्रकारच्या दैवी गुणसंपदेतील ***दान, यज्ञ व तप*** या तीन गुणांचे विस्तृत वर्णन वरील श्लोकांतून *सतराव्या* अध्यायी भगवंतांनी केलेले आहे. ते आपण नंतर ब्रह्मवाद्यांची ज्ञानेश्वरीत विवेचिलेली चर्या अवलोकतांना पाहणार आहोतच. त्यानिमित्त ज्ञानेशांनी केलेले स्पष्टीकरण पण तेव्हाच आपणांस पाहायला मिळणार आहे.

तूर्तास ***दान*** या गुणाचे व तन्निमित्ताने ***यज्ञ व तप*** या दोन गुणांचे जे दर्शन *सोळावा* अध्याय घडवतो, ते पाहणे उचित ठरेल. ते पुढे एका एका गुणसंपदेच्या वर्णनाच्या वेळी आपोआप प्रकट केले जाईल.

५) दम (इंद्रियदमन)::::

इंद्रियदमन करणे म्हणजे ***दम.*** याचे गुणस्वरूप वर्णितांना ज्ञानदेव म्हणतातः

...........ऐक चिह्न। दमाचें तैं ।।१६-८८।।
तऱ्हीं इंद्रियविषयीं मिळणीं। करूनि घापे वितुटणी।
जैसें तोडिजे खड्डु पाणी। पारकेयां।।८९।।
तैसा विषयजातांचां वारा। वाजो नेदिजे इंद्रियद्वारां।
इयें बांधौनि प्रत्याहारा।-हातीं वोपी।।९०।।

"तर आतां दमाची लक्षणे ऐक. ज्याप्रमाणे गढूळ पाण्यात निवळीचे बी घातले की माती तळाला बसून स्वच्छ पाणी तेवढे वर राहते, त्याप्रमाणे ***दम*** हा इंद्रियांची विषयांशी झालेली एकतानता भंग करून इंद्रियांना विषयांपासून वेगळे करतो; तो कोणत्याही इंद्रियाचा विषयाशी संबंध जडू देत नाही, तर इंद्रिये बांधून त्यांना प्रत्याहाराच्या स्वाधीन सुपूर्त करतो".

आंतुलां चित्ताचें आंगवरी। सांडौनि प्रवृत्ती पले बाहेरी।
आंगीं सुईजे दाहींहीं द्वारीं। वैराग्याची।।९१।।
श्वासोश्वासाहुनी बहुंवसें। व्रतें आचरें खरपुसें।
वोसंतितां रात्रिदिवसें। नाराणकु जेयां।।९२।।
पैं दमु ऐसें म्हणिपे। तो हा जाण स्वरूपें।....।।९३।।

"तसेच तो वैराग्याचा अग्नी दहाही इंद्रियांच्या प्रवेशद्वारी पेटवून मनचित्तापासून सर्व ठिकाणच्या ***प्रवृत्ति*** नामक हडळीला बाहेर पळवून लावतो. सतत श्वासोच्छ्वास करणे हे जर एक व्रत समजले तर ते जितक्या सातत्याने चालवले जाते, त्यापेक्षाही कडक निष्ठेने ***दम*** इंद्रियदमनाचे व्रत क्षणमात्रही उसंत न घेता चालवितो. ***दम*** ज्याला म्हणतात, त्या दैवी गुणसंपदेचे स्वरूप हे असे आहे."

६) याग (यज्ञ)::::

त्यानंतर ***यज्ञ*** या दैवी गुणाचे वर्णन करतांना ज्ञानेश्वर लोकमानसात रूढलेल्या ***यज्ञ*** म्हणजे होमकुंड - अग्नि - ब्राह्मण - होम - हवन - मंत्र या वैदिक परंपरेतील कल्पनेला अगदी अनपेक्षित असे यज्ञाचे सार्वत्रिक, सर्वमंगल स्वरूप पुढील ओव्यातून सांगतातः

.....। यागार्थुही संक्षेपें। सांघो ऐक।।१६-९३।।
तऱ्हीं ब्राह्मण करूनि धुरें। स्त्रियादिक पैल मेरें।
माझारीं अधिकारें। आपुलालेनि।।९४।।
जेयां जैं सर्वोत्तम। भजनीय देवताधर्म।
तैं तेणें यथागम।-विधी कीजे।।९५।।
जैसा द्विजु षट्कर्मे करी। शूद्र तेयातैं नमस्कारीं।
कीं दोहोंसिही सरोभरी। निफजे यागु।।९६।।

"आता तुला यज्ञाचे स्वरूप संक्षिप्तरीत्या सागतो, ते ऐक. ब्राह्मणापासून तो तहत स्त्रीशूद्रादींपर्यंत जे सर्व विविध अधिकारी आहेत, त्यांनी आपापल्या वर्णाश्रमधर्मास अनुसरून योग्य ती अनुरूप देवतार्चनादी व इतर कृत्ये यथाशास्त्रोक्त व वेदाज्ञेनुसार करावीत. शूद्राने वेदानुसारी षट्कर्मे करण्यात तत्पर असलेल्या ब्राह्मणांना वंदन करावे, हे शास्त्रोक्त आहे. असे केल्याने त्यांना दोघांनाही ***यज्ञ*** उत्कृष्टरीत्या संपन्न केल्याचे फळ प्राप्त होते."

तैसें अधिकारपर्यालोचें। हे यज्ञ करणे सर्वांचें।
परि विशेष फलाशेचें। न घापे माजीं।।९७।।
आणि मी कर्ता ऐसा भावो। नेदिजे देहाचेनि द्वारें जावों।
ना वेदाज्ञेसीं तऱ्हीं ठावो। होईजे स्वयें।।९८।।
अर्जुना एवं संज्ञु। सर्वत्र जाण यज्ञु।
केवल्यमार्गीचां अभिज्ञु। सांघति हा।।९९।।

"अशा रीतीने आपापल्या अधिकारपरत्वे, मी कर्ता असा भाव मनात न धरता व फळाशेचे विष त्यात न कालविता जो नियत कर्मस्वरूप यज्ञ केला जातो, त्यांचा कर्ता स्वयेच वेदाज्ञेचे मूळ ठिकाण - म्हणजे नारायण -होऊन जातो. याप्रमाणे हे जे सर्वांनी आचरण्यास योग्य व सर्वमंगल करणारे यज्ञाचे स्वरूप तू जाणून घेतलेस, ते,

हे अर्जुना! कैवल्यमार्गाच्या साधकांसाठी अत्युत्तम श्रेयस्कर आहे, असे जाणते म्हणतात."

या ठिकाणी ज्ञानदेवांनी हा ***कैवल्यमार्गीचा यज्ञ*** आहे, हे स्पष्ट केले आहे. त्यापासून भिन्न असा याज्ञिकांचा वा वैदिकांचा स्वर्गप्राप्तीच्या आशेने किंवा इतर कामनापूर्तीसाठी केलेला यज्ञयाग समजावा. त्याचे प्रत्यंतर ज्ञानदेवीच्या अभ्यासकांना इतरत्र येईलच. कारण त्यांचा उपहास करतांना ज्ञानदेव ***"धिक् त्या याज्ञिकांचे जीणें"*** असे उद्गार काढतांना आपल्याला आढळतात. त्याचप्रमाणे यज्ञाची विस्तृत कल्पना आपणांस ज्ञानदेवीच्या *तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या* अध्यायात आढळून येते.

७) स्वाध्याय::::

आता चेंडुवें भूमी हाणीजे। हे नव्हे तो हातां आणिजे।
कीं शेतीं बी विखुरिजै। परी पिकें लक्षें।।१६-१००।।
ना तन्हीं ठेविलें देखावेयां। आदर कीजे दिवियां।
कां शाखा फलें यावया। सिंपिजे मूल।।१०१।।
हे बहु असो आरिसा। आपणपें देखावेयां जैसा।
पुढत पुढती बहुंवसा। उटिजे प्रीती।।१०२।।
तैसा प्रतिपाद्यु जो ईश्वरु। तो होआवेयालागीं गोचरु।
श्रुतीचा निरंतरु। अभ्यासु करणें।।१०३।।
तैं द्विजांसीचि ब्रह्मसूत्र। एरां स्तोत्र कां मंत्र।
आवर्तनें पवित्र। पावावेयां तत्त्व।।१०४।।
पार्था गां स्वाध्यावो।
बोलिजे तो हा म्हणे देवो।......।।१०५।।

ज्ञानदेवांनी पूर्वी *तेराव्या* अध्यायात ज्ञानगुणलक्षणांचे वर्णन करतांना ***"अध्यात्मज्ञाननित्यत्वं"*** व ***"तत्त्वज्ञानार्थदर्शनम्"*** या गुणांसंबंधी जे विवेचन केले होते, ते ***स्वाध्याय*** म्हणजे काय हे पाहतांना आपण लक्षात ठेवणे आवश्यक ठरते.

आता ज्ञानदेव स्वाध्यायाविषयी म्हणतात: "ज्याप्रमाणे चेंडू जमिनीवर आपटण्यामागे तो उसळून परत हातात यावा असा हेतू असतो; किंवा शेतात बी विखुरण्यामागे धान्याने समृद्ध पीक हाती यावे असा उद्देश असतो; अथवा दिवा लावण्याचा हेतू ठेवलेल्या वस्तू त्याच्या प्रकाशात पाहाव्यात असा असतो; किंवा वृक्षास शाखा-फळे यावीत, म्हणून त्याच्या मुळास पाणी घातले जाते; किंवा स्वत:चे रूप निरखण्याच्या आवडीसाठी आरसा वारंवार स्वच्छ केला जातो; त्याप्रमाणे श्रुतींनी प्रतिपादित केलेला ईश्वर गोचर व्हावा म्हणून त्यांचा निरंतर अभ्यास करणे; तसेच ब्राह्मणांनी ब्रह्मसूत्रांची व इतरांनी स्तोत्रे वा नाममंत्रांची आवर्तने करणे यास, हे अर्जुना! ***स्वाध्याय*** म्हणतात," असे श्रीकृष्णांनी सांगितले.

या ओव्यांच्या निमित्ताने ***परतत्त्वदर्शन*** होण्यासाठी अध्यात्मज्ञानाची आवड धरून करावयाच्या स्वाध्यायाचे आपणांस दर्शन होते. त्यातून अत्यंत सोपा मार्ग म्हणजे द्विजांनी श्रुतींचा -ब्रह्मसूत्रांचा अभ्यास करणे व इतरांनी स्तोत्रे-नाममंत्र यांचा आधार घेऊन त्यांचा नित्य जप करणे, हा दृग्गोचर होतो.

यातून ज्ञानदेव श्रुतिसंमत मार्गच प्रतिपादन करतांना दिसतात. ***"वेदांचा तो अर्थ आम्हांसिचि ठावा"*** या संत श्रीतुकोबारायांच्या उक्तीचे खरे मूळ आपणांस असे ज्ञानेश्वरीत सापडते. त्यांनीही हा नामजपाचा उपासनाक्रम लोकांपुढे ठेवला, हे आपणांस ज्ञात आहेच! असो.

स्वाध्यायाचा अंतर्भाव पतञ्जलीमुनी नियमांमध्ये करतात. तसेच स्वाध्यायात ***ईश्वरप्रणिधान*** हाच मुख्य हेतू असल्यास प्राप्तव्य ***समाधि*** हा असतो. जिज्ञासूंना हे त्यातील गुह्य ज्ञानदेवांनी वर केलेल्या स्वाध्यायाच्या परिभाषेशी ताडून पाहतांना लागलीच लक्षात येईल.

८) तप::::

तपांसंबंधी ज्ञानदेव म्हणतात:

.. आतां तप शब्दाभिप्रावो। आईक सांघो।।१६-१०५।।
तन्हीं दानें सर्वस्व देणें। वेंचणें तैं वेर्थ करणे।
जैसें फलौनि स्वयें सुकणें। औषधीचें जेवीं।।१०६।।
नाना धूपाचां अग्निप्रवेशु। कनकीं तुकाचां नाशु।
कां पितृपक्षु पोखितां ऱ्हासु। चंद्रासीं जेवीं।।१०७।।
तैसा स्वरूपाचियां प्रसरा-। लागीं प्राणेंद्रियशरीरां।
आटणी करणें जैं वीरा। तैंचि तप।।१०८।।

"आता ***तप*** म्हणजे काय ते ऐक. जरी दान म्हणून सर्वस्व दिले तरी फलाशा ठेवल्यामुळे ते जसे व्यर्थ ठरते; किंवा रोगावर उपचार म्हणून औषधीचा उपचार करतांना ती स्वत: जशी नाहीशी होऊन रोगप्रतिरोधास साहाय्य करते; किंवा अग्नी प्रज्वलित करून धूर जसा नाहीसा होतो; सुवर्ण होतांना मळाचा जसा नाश होतो; पितृपक्षाची *(तो वद्य पक्ष असल्याने)* जसजशी वृद्धी होत जाते, तसतसा तिला कारण असणाऱ्या चंद्रम्याचा जसा ऱ्हास होत जात अंती लोप होतो; त्याचप्रमाणे आत्मस्वरूप प्रकटावे म्हणून प्राण-इंद्रिये-शरीर यांची आटणी करणे यास ***तप*** म्हणतात."

अथवा अनारिसें। तपाचें रूप जन्हीं असें।
तन्हीं जाण दुधीं हंसें। सूदलीं चांचूं।।१६-१०९।।
तैसें देहजीवाचियें मिलणीं। जो उदयजत सूयें पाणी।
तो विवेक अंत:करणीं। जागविजे।।११०।।
पाहतां आत्मयाकडें। परि बुद्धीचां पैसु सांकडें।
सनिद्र स्वप्न बुडे। जागणीं जैसें।।१११।।
तैसा आत्मपर्यालोचु। प्रवर्ते जो सांचु।
तपाचां हा निर्वेचु। धनुर्धरा।।११२।।

"अथवा तपाचे स्वरूप दुसऱ्या प्रकारे सांगायचे म्हटले तर दुधात हंस चोच घालतो, तेव्हा तो जसे पाणी दुधापासून अलगद वेगळे करतो; त्याप्रमाणे जीव जेव्हा देहाशी जडतो म्हणजे ज्यावेळी जन्म होतो, त्याचवेळी अंत:करणात विवेक जागृत ठेवून जी देहबुद्धी, म्हणजे

अनात्मबुद्धी, ती आत्मबुद्धीपासून वेगळी करणे त्यास ***तप*** म्हणतात. आत्मा पहावा म्हणून बुद्धीचा जेव्हा अनात्मपदार्थांतून संकोच होऊन आत्मवृत्तीत एकाग्रता होते, तेव्हा स्वप्न व ते दाखवणारी निद्रा यांचा जागृतीमुळे एकाच वेळी नाश व्हावा, तसे होऊन ***आत्मदर्शन*** घडते, ते याच तपामुळे, असे, हे अर्जुना तू जाण!"

तप व पंथराज

याप्रमाणे ***तप* म्हणजे मुख्यत्वे अनात्मपदार्थांची म्हणजे *प्राण-देह-इंद्रिये यांची आटणी*** असा ज्ञानदेवांचा जो अभिप्राय आहे, तो त्यांनी ज्ञानेश्वरीत ठिकठिकाणी व मुख्यत्वे *सहाव्या* अध्यायात ***नाथपंथींचा दंशु ("तो हा नाथसंकेतींचा दंशु")*** जाणवून देतांना प्रकट केलेला आहे. ***राजयोग* वा कुंडलिन्यधिष्ठित सद्गुरुकृपांकित लययोगात्मक राजयोगांतर्गत जी तत्त्वे, प्राण इ.ची आटणी म्हणजे *लय* तीच ज्ञानेशमते *तप* होय**,असे दिसते.

९)आर्जव::::

आतां बालाचां हितीं स्तन्य। जैसें नानाभूतीं चैतन्य।
तैसें प्राणिमात्रीं सौजन्य। आर्जव तैं।।१६-११३।।

"बाळाला स्तनातील दूध जसे हितकारक असते किंवा सर्व भूतांना चैतन्य जसे उपकारक असते, त्याप्रमाणे सर्व प्राणिमात्रांप्रती अनन्यभाव असणे म्हणजे ***आर्जव*** होय."

जिज्ञासूंनी यानिमित्ताने पुनः एकदा यापूर्वी *तेराव्या* अध्यायत ***आर्जवास रूप*** करतांना ज्ञानदेवांनी रचलेल्या ओव्यांचे परिशीलन करणे हितावह ठरेल. असो.

१०) अहिंसा::::

यापूर्वीच *तेराव्या* अध्यायात अहिंसेचे विवरण बऱ्याच विस्ताराने केले असल्याने ज्ञानदेव आता संक्षेपाने सांगतातः

आणि जगाचियां सुखोद्देशें। शरीरें वाचा मानसें।
राहाटणें तैं अहिंसे। रूप जाण।।१६-११४।।

"आणि जगाला सुख व्हावे म्हणून शरीर, मन व वाचा यांनी वागणे ही ***अहिंसा*** होय."

या ठिकाणी जाताजाता आणिकही एक जाणवते- ते म्हणजे ज्ञानदेव एखादी गोष्ट संक्षेपाने पण तरीही समर्थपणे सांगू शकतात - अन हे त्यांच्यावर पघळपणाचा मिथ्यारोप करू धजणाऱ्या अश्रद्धांसाठी डोळ्यात अंजन घालणारे ठरावे! तुम्हाआम्हां सामान्यांच्या बुद्धीत नीट उतरावे म्हणूनच ज्ञानदेव केवळ विस्तार करतात. त्यांच्या स्वतःच्या कल्पना तर अगदी सुस्पष्ट *(या टीकाकारांच्या भाषेत सांगायचे तर succinct, lucid and crystal-clear)* अशा असतात, हे निर्विवाद! असे असतांना त्यांच्या ज्ञानदेवी सांगण्यामागील उद्देशांची व्यर्थ गफलत करून घेऊन त्यांच्यावर वाटेल ते असंमजसपणे वृथारोप करणे याचा अर्थ टीकाकारांची बालबुद्धी हेच धरावे लागेल! असो.

११) सत्य::::

तसे पाहिले तर ***सत्य*** हा पतञ्जलिप्रणीत यम आहे व त्याचा रूढार्थ खरे बोलणे असा घेतला जातो. म्हणजे एका अर्थी पतञ्जलींचे ***सत्य*** म्हणजे ज्ञानेश म्हणतात तसे ***वाचिक तप*** होय.

सत्याचा येथे अभिप्रेत असणारा अर्थ पुढील ओव्यातून पाहू या. ज्ञानदेव सत्याविषयी म्हणतातः

सत्य व परतत्त्वदर्शन

आतां तीख होऊनि मवाल। जैसें जातीचें मुकुल।
कां तेज परि शीतल। शशांकाचें।।१६-११५।।
शके दावितांचि रोगु फेडु। आणि जिभें तऱ्हीं नव्हे कडु।
तैं वोखदु नाहीं मां घडु। उपमा कैंचीं।।११६।।

"कमलकलिका स्पर्शाला मृदू व सुखद असली तरी तिचे टोक तीक्ष्ण असते व ती पाणी भेदून जलाशयातून वर येते; किंवा चंद्राचे तेज म्हणावे तर ते शीतल चांदणेच असते; किंवा पाहिल्याबरोबरच रोग नाहीसा करणाऱ्या व स्वादही कडू नसणाऱ्या औषधाची उपमा द्यावी म्हटले, तर तसे औषध जगात नसल्याने त्याचीही उपमा या गुणाला देता येणार नाही."

तऱ्हीं मऊपणें बुबुळें। झगडतांहीं परि नाडलें।
येऱ्हवीं फोडी कोंराळें। पाणी जैसें।।१६-११७।।
तैसें तोडावेयां संदेहो। तीख जैसें कां लोहो।
श्राव्यत्वें तऱ्हीं माधुर्य। पायीं घालीं।।११८।।

"परंतु पाणी जसे बुबुळांना लागले तर त्याचे सलिलत्व त्यांना काही खुपत नाही; तरी तेच पाणी जेव्हा विक्राळ कडेकपारींवर कोसळते, तेव्हा त्यांना झिजवून फोडून काढते; त्याप्रमाणे सत्य भाषण ***आत्मानात्मसंदेह*** नाहीसे करण्यासाठी लोखंडाच्या तीक्ष्ण टोकाप्रमाणे असले, तरीही त्याचे श्राव्यत्व माधुर्याला मागे टाकणारे असते."

आईकतां कौतुकें। कानातैंचि निघति मुखें।
जैं साचारवेचेनि नीकें। ब्रह्महीं भेदीं।।१६-११९।।
किंबहुना प्रियपणें। कोण्हातेंहीं झकवूं नेणें।
यथार्थ तऱ्हीं खुपणें। नाहीं कव्हण्हा।।१२०।।

"किंबहुना ते इतके आवडीचे असते की ऐकणाऱ्याला ते सतत ऐकतच रहावेसे वाटते. ते इतके सत्याने ओतप्रोत भरलेले असते की त्याद्वारे प्रत्यक्ष ब्रह्माचा पण वेध घेतला जातो. असे असले तरी त्यामुळे कोणालाही फसवले जात नाही व ते यथार्थ जरी असले तरी कोणालाही खुपत नाही."

एरवीं गोरी कानीं गोड। परि साचाचां पाखालीं कीड।
आगीचें करणें उघड। परि जलो तैं सांच।।१६-१२१।।
कानीं लागतां महुर। अर्थे विभांडीं जिव्हार।
तैं वाचा नव्हे सुंदर। लावचि पां।।१२२।।

"तसे पाहिले तर पारध्याचे सावजांना भुलवण्यासाठी म्हटलेले गाणे कानाला जरी गोड लागत असले तरी ते वस्तुतः घातक असते; अग्नी परखड आहे, कारण त्याचे जाळणे चोरूनलपून होत नसते, तर ज्वाळांच्या पूर्ण प्रकाशात होत असते. पण जळो तसले सत्य! कानांवर गोड शब्द पडले तरी जर त्यांच्या अर्थात विष लपलेले असले, तर ती वाचा नव्हे; तर सुंदर दिसणारी लावच होय."

परि अहितीं कोपौनि सोप। लालनीं मऊ जैसें पुष्प।
तियें मातेचें स्वरूप। जैसें कां होय।।१६-१२३।।
तैसें श्रवणसुखचतुर। परिणमौनि साचार।
बोलणें जैं अविकार। तैं सत्य एथें।।१२४।।

"म्हणून मातेचे स्वरूप जसे मुलाच्या हितासाठी कृतक कोपाचे परंतु अंतरी मात्र फुलासारखे सुकुमार असते; त्याप्रमाणे रागद्वेषादी विकारांना थारा न देणारे पण श्रवणाचे पूर्ण सुख प्राप्त करून देणारे, तसेच ब्रह्मप्राप्ती करून देण्यात चोख असते, तेच बोलणे खरे ***सत्य*** म्हणता येते."

याप्रमाणे ***सत्य*** म्हणजे सत्याचे - परतत्त्वाचे साक्षात दर्शन करून देण्यास समर्थ असणारे कृपावंतांचे बोल असे ज्ञानदेवांचे मत दिसते. याव्यतिरिक्त व्यावहारिक सत्य-असत्य यांचा विचार त्यांच्या दृष्टीने ***तप*** या संकल्पनेशी संबंधित असल्याचे ज्ञानेश्वरीचे परिशीलन करतांना आपणांस जाणवते.पतञ्जलिप्रणीत ***सत्य*** हा यम असाच ***तप*** या सदरात ज्ञानेश्वरदृष्ट्या मोडतो.

सिद्धसिद्धान्तपद्धति व सत्य

यानिमित्ताने श्रीगुरुगोरक्षनाथांनी ***सिद्धसिद्धान्तपद्धति*** या ग्रंथात ***सत्य*** याची केलेली व्याख्या अवलोकण्यासारखी आहे. ते म्हणतातः

सत्यमेकमजं नित्यमनन्तश्चाक्षयं ध्रुवम्।
ज्ञात्वा यस्तु वदेद्धीरः सत्यवादी स कथ्यते।।६-६१।।
।।सि.सि.प.।।

"***सत्य*** एका अज, नित्य, अनंत, अक्षय, ध्रुव अशा वस्तूला जाणून त्याविषयीचे धीर पुरुषाचे बोलणे होय. असा पुरुष म्हणजे सत्यवादी!" ही श्रीगुरुगोरक्षनाथांची सत्याची व सत्यवाद्याची व्याख्या ज्ञानेश्वरांच्या व्याख्येशी किती मिळतीजुळती आहे, हे जिज्ञासूंच्या त्वरित लक्षात येईल.

१२) अक्रोध::::

अक्रोधाविषयी ज्ञानदेव म्हणतातः

आतां घालितांही पाणी। जैसी पाषाणीं न निघे आणी।
कां मथिलियां लोणी। कांजी नेदी।।१६-१२५।।
त्वचा पायें शिरीं। हालेयांहीं फडे न करी।
वसंतीही अंबरी। न होती पुष्पें।।१२६।।
नाना रंभेचेनि रूपें। शुकीं नुठिजेचि कंदर्पें।
कां भस्मीं वह्नी उद्दीपें। घृतेंही जेवी।।१२७।।

"ज्याप्रमाणे दगडाला पाणी दिले तरी त्याच्यातून अंकुर फुटत नाही; कांजी घुसळली तर लोणी मिळत नाही; सर्पाच्या कांतीच्या शिरोभागी लाथ हाणली तरी ती फडा उभारत नाही; जरी वसंतऋतू असला तरी आकाशाला फुले उमलत नाहीत; रंभेसारख्या लावण्यवतीला पाहूनही श्रीशुकदेवांना कामप्रेरणा होत नाही; जसा भस्मावर तुपाचा सडा शिंपडला तरी त्यात अग्नी प्रदीप्त होत नाही;"

तेवींचि कुमरें क्रोधें भरे। तैसियां मंत्रांची बीजाक्षरें।
तियें निमित्तेंही अपारें। मीनलीयां।।१२८।।
परि धातयांही पायां पडतां। नुठी गतायु पांडुसुता।
तैसी नुपजे उपजवितां। क्रोधोर्मि गां।।१२९।।
अक्रोधत्व ऐसें। नांव तैं ये दशे।
जाण श्रीनिवासें। म्हणितलें तेयां।।१३०।।

"अजाण मुलाबाळांनासुद्धा क्रोध उत्पन्न करतील अशा शेलक्या शब्दांच्या भडिमाराने व तत्सम अन्य इतर कितीही निमित्ते असली, तरी ज्याप्रमाणे आयुष्य संपलेल्याला प्रत्यक्ष विधातासुद्धा जीवन देऊ शकत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या ठिकाणी क्रोधोर्मी प्रकट होत नाही, त्याच्या दशेला ***अक्रोधत्व*** असे म्हणतात," हे पार्थाला श्रीकृष्ण सांगते झाले.

अक्रोधत्व या दैवी गुणाचे आपण अवलोकन करत असतांना *तेराव्या* अध्यायात निरूपिलेल्या ***क्षान्ति (ऋजुता)*** या गुणासंबंधी आपणास स्मरण होणे साहजिकच आहे. ***क्षान्ति व अक्रोधत्व*** हे परस्परपूरक गुणच आहेत.

१३) त्याग::::

आतां मृत्तिकात्यागे घटु। तंतुत्यागें पटु।
त्यजिजे जेवीं वटु। बीजत्यागें।।१६-१३१।।
कां त्यजूनि भिंतीमात्र। त्यजिजे आघवेंचि चित्र।
कां निद्रात्यागें विचित्र। स्वप्नजाल।।१३२।।
ना ना जलत्यागें तरंग। वर्षात्यागें मेघ।
त्यजिजती जैसें भोग। धनत्यागें।।१३३।।
तेवीं बुद्धिमंतीं देहीं। अहंता सांडूनि पाहीं।
सांडिजे अशेषही। संसारजात।।१३४।।
तेयां नांव त्यागु। म्हणे तो यज्ञांगु।...।।१३५।।

त्यागाविषयी ज्ञानदेव म्हणतात, "ज्याप्रमाणे मृत्तिका नसली तर घट निर्माण करता येत नाही; तंतू नसले तर वस्त्र विणले जाऊ शकत नाही; किंवा भिंत उद्ध्वस्त केली तर तिच्यावरची चित्रे नष्ट पावतात; निद्रात्याग केला, तर चित्रविचित्र स्वप्ने लोप पावतात; जलच जर उरले नाही तर तरंग नाहीसे होतात; धनाच्या त्यागाने सर्वच भोगांचा त्याग घडतो; त्याप्रमाणे बुद्धिमान मनुष्य ***अहंकार*** त्यागून ***अवघ्या संसाराचा त्याग*** करतो व हाच ***खरा त्याग*** होय," असे ***यज्ञांग*** *(सं.श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्र)* नावाने सुविख्यात असलेले भगवान श्रीकृष्ण सांगतात."

या ठिकाणी आपणांस *तेराव्या* अध्यायी वर्णन केलेल्या अष्टादशगुणनिधानांपैकी ***निरहंकारित्व*** या गुणाचे स्मरण होते. खरा त्याग केवळ *अहंकार* त्यागल्यानेच आविर्भूत होतो. ***अहंकार त्यागणे*** म्हणजे ज्यायोगे हे संसारचित्र मनोरूपी पटावर उमटते, तो मनोरूप पटच फाडणे असे ज्ञानदेवांचे सांगणे आहे.

हा विलक्षण त्याग साधावा म्हणूनच सर्व उपाय - आध्यात्मिक ध्यास - उपासना - योग इ.प्रयत्न असतात आणि अहंकाराचा त्याग साधणे यातच त्यांची इतिकर्तव्यता असते. पंथराजाचा मार्ग याच त्यागासाठी उपयोजिला आहे. आणि कुंडलिनीचे अंतिम गंतव्य म्हणजे अहंकारलोपच नाही कां! जीवभावाचा शिवभावात लय होणे व त्यापलीकडील जे चिदाकाश आहे, ज्यात आकाशतत्त्वासह सर्व उत्पत्ति-स्थिति-लयादीही लय पावणे ***(गगनी गगन लया जाये। ऐसें जै कांईं।।६-३१०।।),*** अशी स्थिती ज्ञानेश आपणां सर्वांसाठी वांच्छितात.

अति महत्त्वाची संपदा:शान्ति::::

१४) शान्ति

.....हे मानूनि सुभगु। पार्थु पुसे।।१६-१३५।।
आतां शांतीचें जैं लिंग। तैं व्यक्त मज सांग।
देवो म्हणति चांग। अवधान देई।।१३६।।
तऱ्हीं गिळौनि ज्ञेयातैं। ज्ञाता ज्ञानही माघौतें।
हारपे निरुतें। तैं शान्ति पैं गां।।१३७।।
जैसा प्रलयांबुचां उभडु। बुडवूनि विश्वाचा पवाडु।
होय आपणपें निबिडु। आपणपांचि।।१३८।।
मग उगम ओघ सिंधु। हा नुरेचि वेव्हारभेदु।
परि जलैक्याचां बोधु। तोहीं कवणां।।१३९।।
तैसीं ज्ञेया देतां मिठी। ज्ञातृत्वही पडे पोटीं।
मग उरे तैंचि किरीटी। शांतीचें रूप।।१४०।।

देवांचे म्हणणे ऐकल्यावर ते आवडले म्हणून अर्जुन म्हणतो "देवा! मला ***शांती*** या गुणसंपदेची लक्षणे स्पष्ट करून सांगा."

त्यावर देवांना समाधान वाटून ते म्हणतात, "बरे तर ऐक. नीट लक्ष दे!"

शान्ति म्हणजे त्रिपुटीचा लोप

"ज्ञेयाला गिळून त्यामागोमाग ज्ञाता व ज्ञानदेखील जेथे खरे तर नाहीसे होतात, तीच वस्तुतः ***शांती*** होय. जसा प्रळयकाळींचा अथांग अगाध जलसमुच्चय सर्व विश्व बुडवून आपल्या ठिकाणी एकमात्र दाटतो; आणि त्याच्यात पाण्याचे ओहोळ, नदी व समुद्र असा वेगवेगळ्या भावांचा भेदसुद्धा उरत नाही; त्या एकला एक, स्वतःचा स्वतःच असलेल्या जलधीठायी जलभावाचासुद्धा जसा उदय होऊ शकत नाही; कारण त्यावेगळे असे दुसरे काही अस्तित्वातच नसते; त्याचप्रमाणे ***ज्ञेय*** म्हणजे जे ***अद्वैत*** आहे, त्याला कवळल्यावर त्यातच ज्ञातृत्वाचासुद्धा लय होतो - जीवाशिवाच्या भेटीअंती ना जीव वेगळेपणाने राहतो, ना शिव त्या भिन्न असतो. अशा स्थितीत जी निष्कल अवस्था प्राप्त होते, तीच ***शांती*** होय."

शान्ति व पसायदान

एवंच ***शांती* ही सर्वश्रेष्ठ दैवी गुणसंपत म्हणजे *ज्ञाता- ज्ञेय- व ज्ञान* ही त्रिपुटी लोप पावलेली अवस्था होय.** ज्ञानदेवांचा ***शांति*** हा फार आवडता विषय आहे. किंबहुना संपूर्ण ***अमृतानुभव*** त्यांनी - ***शान्ति म्हणजे त्रिपुटीविरहित अवस्था*** -याच एका विषयावर रचला आहे!

<u>**ज्ञानदेवीचे सारभूत असे जर काही एका शब्दाने व्यक्त होत असेल, तर तो शब्द म्हणजे *शान्ति* हाच म्हटला पाहिजे**</u>!!! या शांतीचे सर्वात्मक, सर्वमंगल, शुभंकर स्वरूप -ते पूर्णत्व - सर्वांना प्राप्त व्हावे, असे त्यांचे पसायदानाच्या ओव्यांतून मागणे आहे. ***शान्ति*** या स्वल्प शब्दाचा विस्तार सुखदपणे प्रकट करणारी त्यांची ओवी म्हणजेच:

किंबहुना सर्वसुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकिं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित।।१८-१७९९।।

गीतेतील शांतीचा अर्थ

शान्तीचे ***लिंग*** प्रकटवण्यानिमित्त त्यांनी आताच *सोळाव्या* अध्यायात जे सांगितले आहे, तोच शान्तीचा अर्थ गीतेच्या पुढील श्लोकांत अभिप्रेत आहे:

युक्तः कर्मफलंत्यत्तवा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम्।...।।५-१२।।

"योगी कर्मफलाचा त्याग केल्याने ***शान्ति*** प्राप्त करतो."

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः।
शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति।।६-१५।।

"नियतचित्त केलेला योगी सदा माझ्याशी युक्त होतो व परमनिर्वाणरूप ***शान्ति*** प्राप्त करतो आणि माझ्यातच विलीन होतो."

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।९-३१।।

"दुराचारीसुद्धा सतत मला भजल्याने लवकरच धर्मात्मा होतो व ***शान्ती***ला सर्वकाळ प्राप्त करून घेतो."

गीतेत ***शान्ति*** वा ***शान्तिम्*** वा तत्संबंधित शब्द *ॲनी बेझंट व भगवानदास* यांच्या गीतेतील शब्दसारिणीनुसार पुढील ठिकाणी आलेले आहेत:

शान्ति: *२-६६ (अशान्ति या शब्दासह),१२-१२*
शान्तिम्:*२-७० व ७१, ४-३९,५-१२ , ६-१५, ९-३१ व १८-६२*
शान्तः-*१८-५३*
शान्तरजसम् व प्रशान्तमनसम्:*६-२७*
प्रशान्तस्य:*६-७*
प्रशान्तात्मा:*६-१४*

ते श्लोक असे:

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना।
न चाभावयतः __शान्ति__रशान्तस्य कुतः सुखम्।।२-६६।।
आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं-
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे
स __शान्ति__माप्नोति न कामकामी।।२-७०।।
विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः।
निर्ममो निरहंकारः स __शान्ति__मधिगच्छति।।२-७१।।
श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः।
ज्ञानं लब्ध्वा परां __शान्ति__मचिरेणाधिगच्छति।।४-३९।।
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा __शान्ति__माप्नोति नैष्ठिकीम्।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।५-१२।।
जितात्मनः __प्रशान्त__स्य परमात्मा समाहितः।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः।।६-७।।
__प्रशान्ता__त्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।६-१४।।
__प्रशान्त__मनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम्।
उपैति __शान्त__रजसं ब्रह्मभूतमकल्मषम्।।६-२७।।
अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः __शान्तो__ ब्रह्मभूयाय कल्पते।।१८-५३।।
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां __शान्तिं__ स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।१८-६२।।

उपरोक्त श्लोकातील *क्र.५-१२, ६-१५ व ९-३१* या श्लोकांप्रमाणेच *श्लोक क्र. २-६६,७० व ७१, ४-३९ व १८-६२* या श्लोकात ***शान्ति*** या शब्दाचा अर्थ तोच आहे, असे थोड्या विचारांती आपणांस जाणवते. इतर ठिकाणी ***शान्त, प्रशान्त*** या शब्दांचा प्रयोग गीता मनाच्या व चित्ताच्या अविचलतेसंबंधात, वृत्ति न उठण्यासंबंधात व शांत होणे *(६-२७)* या अर्थी करतांना दिसते.

गीताश्लोक(१२-१२)मधील "त्यागाच्छान्तिरनन्तरम्"::::

आता एका अत्यंत महत्त्वाच्या ***शान्ति*** या शब्दाशी संबंधित अशा श्लोकाच्या अर्थाकडे वळू या. हा गीतेतील श्लोक विद्वानांनी फारच वेगवेगळ्या प्रकारे अर्थ केलेला अन बहुचर्चित असाच आहे. तो म्हणजे ***__गीता श्लोक क्र.१२-१२:__***

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।

शान्ति चा आतापर्यंत स्पष्ट केलेला अर्थ लक्षात घेऊनच व त्याचा त्यागाशी असलेला उपरोल्लेखित संबंध ध्यानात घेऊन हा श्लोक आपणांस कसा सुगम होतो, ते पाहू या:

या श्लोकाचा संस्कृत व्याकरणाधारे अर्थ लावतांना विद्वानांत एकमत होत नसल्याचे दिसते. तसेच ***अभ्यास, ज्ञान, ध्यान, कर्मफलत्याग वा त्याग आणि शान्ति*** अशा उत्तरोत्तर श्रेष्ठ-श्रेष्ठतर पायऱ्या साधकांच्या वर्गवारीकरता व प्रगतीचा आलेख ठरवण्यासाठी केल्याचे जे सकृद्दर्शनी वाटते, त्याच्या यथार्थतेबद्दलही या श्लोकात येथे वापरलेल्या या शब्दांचे गीतेतील इतर ठिकाणी जे वेगवेगळे अर्थ वेगवेगळे विद्वान घेतात, त्या दृष्टीने प्रश्नचिह्न उपस्थित होते. त्याबाबतची चर्चा आपण नंतर करू या. सध्या श्रीज्ञानदेवांनी हा विषय स्पष्ट व्हावा म्हणून ज्या ओव्या रचल्या आहेत, त्या पाहू या.

गीता श्लोक (१२-१२) वरील ज्ञानेशांच्या ओव्या

श्रीज्ञानदेवांच्या या श्लोकावर रचलेल्या ज्या ओव्या विद्वानांनी दाखवलेल्या दिसतात, त्या प्रथमदर्शनी आपल्याला हा श्लोक उकलण्यास मदत करण्याकरता कठीणप्रायच वाटतात. एका पक्षी वै.श्री.शं.वा. तथा मामासाहेब दांडेकर आणि इतर अनेकांच्या तत्सम ज्ञानेश्वरीप्रमाणे या श्लोकाखाली दिलेल्या ओव्या अशा:

अभ्यासाहूनि गहन। पार्था मग ज्ञान।
ज्ञानापासौनि ध्यान। विशेषिजे।।१२-१४१।।
मग कर्मफलत्यागु। तो ध्यानापासौनि चांगु।
त्यागाहूनि भोगु। शांतिसुखाचां।।१४२।।
ऐसियां इयां वाटां। इहींचि पेणें सुभटा।
शांतीचा माजिवठा ठाकिला तेणें।।१४३।।

या ओव्यांचा सरलार्थ

या ओव्यांचा सरळ अर्थ केला तर ज्ञानदेवांच्या म्हणण्यानुसार "अभ्यासाहून ज्ञान गहन आहे; ज्ञानापेक्षा ध्यान विशेष आहे; ध्यानाहून कर्मफलत्याग चांगला असतो; व कर्मफलत्यागापेक्षा शांतिसुखाचा भोग चांगला आहे. हे अर्जुना! याच वाटेने व हेच मुक्काम घेत त्याने शांतीचा मध्य गांठला आहे."- अशा त्याच्याठायी पुढच्या *१२-१३ते १९* या श्लोकात वर्णिलेली लक्षणे आढळतात व तोच कृतकृत्य होतो.

हा अर्थ थोडासा ढोबळच आहे. *ओवी १२-१४३* नुसार ***अभ्यास, ज्ञान, ध्यान, कर्मफलत्याग व शांति*** असे टप्पे असल्याचे अनुमान करता येते. तदनुसार पूर्वीच्या ओव्यातील ***अभ्यासाहूनि, ज्ञानापासौनि***, इ.शब्दातील ***(हूनि)*** आणि ***(पासौनि)*** या शब्दांचा अर्थ ***(पेक्षा)*** असा करण्याऐवजी ***(त्यातून)*** असा केला असता ***"अभ्यास -➤ ज्ञान -➤ ध्यान -➤ कर्मफलत्याग -➤शान्ति"*** असा हा साधनाक्रम निर्दिष्ट होऊ शकतो. त्याचा विचार करू या.

अगोदरच म्हटल्याप्रमाणे वर दिलेला सरलार्थ ढोबळच वाटतो व विशेष म्हणजे ***अभ्यास, ज्ञान, ध्यान व कर्मफलत्याग*** या चार पायऱ्यांचा नीट उलगडा झाला नाही तर आणि ***कर्मफलत्याग - त्याग - शान्ति*** या पायऱ्यांचे यथार्थ आकलन होऊ शकले नाही तर जिज्ञासूंना ठेचकाळल्यासारखे वाटते. म्हणून या गोष्टींचा नीट उलगडा झाला पाहिजे. त्या दृष्टीने आपल्या अल्पमतीनुसार विचार करून खरा अर्थ आकळून घेण्याचा प्रयत्न आपल्याला करायलाच लागेल.

_ज्ञान_ या शब्दाचा अर्थ

ज्ञानदेवांनी श्रीगीतेची जी अध्यायसंगती लावली आहे, ती स्वतंत्र आहे. त्यांच्या मते *पहिला* अध्याय हा ***शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव*** करणारा आहे. *दुसऱ्या* अध्यायात मोक्षदानी स्वतंत्र असणारे ***"ज्ञानप्रधान हे शास्त्र"*** या सूत्राची उभारणी केली आहे. दुसरा अध्याय वास्तवतः ***साङ्ख्ययोग वा ज्ञानयोग*** या त्वरित फलप्राप्ती करून देणाऱ्या ***विहंगम*** मार्गाचा पण अध्वर्यु समजावा लागेल.

तिसऱ्या अध्यायात केवळ ***कर्म*** प्रतिष्ठिले आहे. *चौथ्या* अध्यायापासून ते *बाराव्या* अध्यायाच्या उपरोक्त ***"...श्रेयो हि ज्ञान.... ।।१२-१२।।"*** या श्लोकापर्यंत **उपासनाकांड** आहे, हे लक्षात घेणे प्रस्तुत महत्त्वाचे आहे. तेथपासून *(१२-१३) ते तेरा, चौदा व पंधरा* हे अध्याय गीतेचे ***ज्ञानकांड*** आहेत. *अध्याय १६, १७ व १८* हे पुस्तीवजा आहेत. तसे पाहिले तर *अठरावा* अध्याय हा ***कलशाध्याय*** असून त्यात गीताशास्त्र परत संक्षिप्तरीत्या प्रमुख मुद्द्यांचा उल्लेख करत उजळणीवजा सांगितले आहे, असे ज्ञानदेवांचे मत दिसते.

उपरोल्लेखित चर्चित *श्लोक १२-१२* हा बरोबर **उपासना**कांडाच्या अखेरचा ठरतो. यानंतर १२-१३ या श्लोकापासून ***ज्ञानकाण्ड*** विवेचनास प्रारंभ होतो. दुसऱ्या अध्यायातील ***ज्ञान म्हणजेच साङ्ख्य व संन्यास म्हणजेच त्याग*** या गोष्टी स्पष्ट आहेत. त्यातील ***ज्ञान*** व १२-१२ या श्लोकातील ***ज्ञान*** या शब्दांचा अर्थ वेगळा लावला पाहिजे. कारण दुसऱ्या अध्यायानुषंगाने वापरला जाणारा ***ज्ञान*** हा शब्द अंतिम स्थितिसूचक आहे, तर १२-१२ या श्लोकातील ***ज्ञान*** हा शब्द एक ***टप्पा*** *(stage)* दाखवतो.

_ज्ञान_ शब्दाचे दोन अर्थ

आता गीतेतील ***ज्ञानकांड*** म्हणून जे *१३, १४ व १५ अध्याय,* तसेच *बाराव्या* अध्यायाचा उत्तरार्ध धरले आहेत, त्यातील बराचसा भाग ***ज्ञानी पुरुषांची लक्षणे - म्हणजे अंतिम अवस्था प्राप्त झालेल्या महापुरुषांची लक्षणे, ज्ञान प्राप्त होण्याच्या मार्गातील बाधा, त्यासाठी प्रकृति-पुरुष इ.प्रपंचविचार व तत्त्वविचार वा विवेक यांचा उहापोह, क्षेत्रक्षेत्रज्ञविचार, त्रिगुणातीत परमात्मस्वरूप, संसारवृक्ष व त्याच्या छेदनाचा विचार, मुक्तांचे स्वरूप, अद्वैतस्थिती, क्षर-अक्षर-उत्तम पुरुषविचार व अद्वैतज्ञानी भक्त तसेच ज्ञानोत्तर कर्म*** यांचा विचार करण्यासाठी विवेचिला आहे. या विषयसारिणीनुसार ***ज्ञानकांड*** यातील ***ज्ञान*** हा शब्दसुद्धा साधकाच्या अंतिम प्रगतीबाबत वापरला आहे, असे कळून येते.

परंतु गीतेच्या उपरोक्त १२-१२ या श्लोकामधील ***ज्ञान*** हा शब्द अंतिम स्थितीचा निदर्शक नाही, तर ज्ञानकांडातील ***ज्ञान*** याविषयीच्या प्रारंभीच्या एका प्रगत अवस्थेचा सूचक आहे, असे समजावे लागते.

गीताश्लोक १२-१२ मधील _ज्ञान_ हा एक प्रगतिदर्शक टप्पा

म्हणून असे म्हणावेसे वाटते की प्रगतीचा केवळ एक टप्पा म्हणून जो ***ज्ञान*** शब्दाचा वापर केला आहे व तोही ***अभ्यास*** या टप्प्यानंतर प्राप्त होणारी अवस्था म्हणून, तेव्हा येथे ***ज्ञान*** म्हणजे ***आत्मानात्मविवेकपर ज्ञान;*** तसेच ते केवळ पुस्तकी ज्ञान नाही तर वेदांती ज्यास ***परोक्ष ज्ञान*** म्हणतात, ते ***ज्ञान*** होय, हेसुद्धा स्पष्ट होते. हे ***ज्ञान*** प्राप्त करण्याचे साधन ***अभ्यास*** होय.

अभ्यास* म्हणजेसुद्धा कर्मयोगाचे आचरण, ज्ञानयोगाचे आचरण व योगाचे आचरण** यांचा निदर्शक समजावा लागेल. हा ***अभ्यास म्हणजे *सहाव्या* अध्यायात निव्वळ जो ***ध्यानयोग*** अथवा ***अभ्यासयोग*** म्हटला आहे, त्याचाच केवळ समजता येणार नाही.

निष्काम कर्मयोगाचा साधकावस्थेतील अभ्यास हा कर्मयोग्यांसाठी, आत्मानात्मविचार व विवेक यांचा बुद्धियोगाचा आश्रय घेऊन केलेला अभ्यास हा ज्ञानयोगाच्या साधकांसाठी, ध्यानयोगाचा अभ्यास सर्व योग्यांसाठी - म्हणजे ***क्रमयोगी, ध्यानयोगी, भक्तियोगी, ज्ञानयोगी, कर्मयोगी*** इ.प्रकारे जे ओळखले जातात, त्या सर्वांसाठी सांगितला आहे.

साधनेच्या ***अभ्यास*** या टप्प्यात साधकांची विशिष्ट मनोभूमिकेनुरूप व्यक्त होणारी साधनक्रिया साधारणपणे ठळक व वैशिष्ट्यपूर्ण वाटत असली, तरी पुढे जाऊन ***ज्ञान*** व तदनंतरच्या टप्प्यात ती पुसटपुसट होत जाऊन अंतिम टप्प्यात म्हणजे ***शान्ति*** या भूमिकेवर भेदविवर्जितच होते, हे आपण पूर्वी ***अद्वैतभक्ती***च्या विवेचनात पाहिलेच आहे.

साधकाच्या प्रगतीचा आलेख

अभ्यासातून ***ज्ञान*** हा टप्पा येतो. येथे ***ज्ञानशक्ती*** जागृत होते. जाणिवेचा असा एक प्रांत लागतो की तेथे व नंतर साधकास कोणी अतींद्रिय शक्ती, परमात्मा वा ब्रह्म ही आहेत व आपणसुद्धा त्याच्याशी अभिन्न आहोत, असा महावाक्योपदिष्ट बोध प्राप्त होतो.

ज्ञानशक्ती* जागृत झाली की ध्यानावस्थाप्राप्तीचा मार्ग सुकर होतो.** महावाक्योपदिष्ट ***"सोऽहं" वा तत्सम ***"अयमात्मा ब्रह्म"*** इ.भावना खऱ्या अर्थाने मूर्त होऊ लागतात. साधकाला हा केवळ भास होतो किंवा मोहनिद्रागत अवस्था प्राप्त होते, असे नव्हे तर साधक खरोखरच त्याच्याशी एकरूप होऊ लागतो. **म्हणून ज्ञानोत्तर अवस्था म्हणून हे *ध्यान* विशिष्ट आहे, असे या *१२-१२* या श्लोकात म्हटले आहे.**

खरी ध्यानावस्था म्हणजे *मी-तूपणा* चा भाव नाहीसा होत जातो व त्याच्या कडून घडणारी कर्मे कर्तृत्वमदरहित होतात. कर्तृत्वराहित्यामुळेच खरा ***कर्मफलत्याग वा संन्यास वा निरहंकारिता*** प्राप्त होतात. यालाच ***त्याग*** असे म्हणता येते. याच त्यागाचे वर्णन दैवी गुणसंपदेचा तेरावा गुण जो पाहिला, तेव्हा आपण निरीक्षिले आहे.

याच ***त्याग*** म्हणजे ***निरहंकार*** या भूमिकेची परिणती साधकाला ***शान्ति*** प्राप्त होण्यात होते. शान्तिचेच दुसरे नांव ***ब्रह्म*** आहे. हीच *ब्राह्मी स्थिती, स्थितप्रज्ञावस्था, परमधाम* इ.नामांनी ओळखली जाणारी सिद्धावस्थेतील अंतिम परिणती होय.

आताच ***शान्ति*** या दैवी गुणसंपदेचे *सोळाव्या* अध्यायांतर्गतचे जे त्रिपुटीविरहित अवस्थादर्शक वर्णन आपण पाहिले, त्यानुसार म्हणजे **त्यागामधून अहंकार नाहीसा झाल्यावर *शान्तिचा माजिवठा* - ठिकाण कसे प्राप्त होते**, हे आपल्या सहज ध्यानात येईल. म्हणूनच भगवंतांनी ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।"*** असे म्हटल्याचे स्पष्ट दिसून येते.

ज्ञानेश्वरी ही तर गीताज्ञानप्रकाशशलाकाच!

"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्.....।।" या श्लोकाची प्रसंगोपात्त उकल करतांना आपल्याला ज्ञानदेवीचा किती मार्गदर्शनपर उपयोग होतो, हे लक्षात आले. **गीतेचा भावार्थ यथार्थ प्रकट करणारी व तो स्पष्ट करणारी *ज्ञानप्रकाशशलाका* म्हणजेच ज्ञानेश्वरी** हे यानिमित्ताने पुनः प्रकर्षाने जाणवते.

संस्कृत भाषेतील ***गीता*** मुख्यत्वे आर्ष*(archaic)* वा आर्षप्रयोगाशी घनिष्ट संबंध असणारी आहे, असे पण काही जाणकारांचे मत आहे. तसेच ती बोलीभाषेतील संवादपर आहे. त्यामुळे आधुनिक संस्कृत व्याकरणाचे वा प्रामुख्याने ज्याला ***पाणिनीय*** असे म्हणतात, जरी ते तसे प्राचीन असले तरी, त्या व्याकरणाचे कांटेकोर नियम लावून गीतेच्या श्लोकांचा अर्थ शोधू पाहणाऱ्यांना फार निराशा पत्करावी लागते, असाही मतप्रवाह विद्वानांत प्रचुर आहे.

या सर्व गोंधळातून बाहेर पडण्यासाठी निवृत्तिनाथांनी बरेच कष्टसायास करून संस्कृतातील गीता सुलभ व्हावी म्हणून जी उकल करून दिली, त्या आधारेच आपण ज्ञानदेवीची रचना केली आहे, असे ज्ञानदेव म्हणतात.त्यांचे ते उद्गार लक्षणीय आहेतः

तीरें संस्कृताचीं गहनें। तोडौनि मऱ्हाटियां शब्दसोपानें।
रचिलीं धर्मनिधानें। श्रीनिवृत्तिदेवें।।११-९।।

"श्रीगीतागंगौघाकांठच्या संस्कृत पदावल्यांच्या, शब्दार्थाच्या व अन्वयार्थाच्या कठीणतर अशा उंच डगरींचे कडेकिनारे तोडून श्रीनिवृत्तिनाथांनी त्यांच्या ठिकाणी मराठी शब्दसोपानांचा ज्ञानेश्वरीरूपाने पायऱ्यापायऱ्यांचा घाट बांधून तो जनांना प्रकट करण्याची प्रेरणा ज्ञानदेवांस दिल्याने, प्रत्येक आबालवृद्ध स्त्रीपुरुषादी गीताप्रेमींना त्या ज्ञानदेवीच्या प्रयागरूपी गीतार्थतीर्थात मनसोक्त डुंबून माधवाचे म्हणजे श्रीकृष्णाचे विश्वरूपदर्शन करण्याचे धर्मनिधान प्राप्त झालेले आहे," असे ज्ञानदेव म्हणतात.

सदैव विनम्रवृत्तीच्या ज्ञानदेवांनी तरीसुद्धा अभिमानपूर्वक दिलेले हे आश्वासन किती सार्थ आहे, हे गीतार्थाच्या समुद्रात डुब्या मारून गोते खाण्याची वेळ आली की समस्त जिज्ञासूंच्या सत्वर ध्यानात येते. असो.

अपैशून्यादी दैवी गुण::::

१५) अपैशून्य (परदोष न पाहणे - असलेले नाहीसे करणे)

नंतर ***अपैशून्य*** या शब्दाने व्यक्तवलेली गुणसंपदा सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः

आतां कदर्थवित व्याधी। बलीकरणाचियें आधीं।
आपपरू न शोधी। सद्वैद्यु जैसा।।१६-१४१।।
कां चिखलीं रुपतलीं गायें। धडभाकड ना पाहे।
जो तियेंचियां ग्लानी होये। कालाभुला।।१४२।।
ना ना बुडतयातें सकरुणु। न पुसें अंत्यजु कीं ब्राह्मणु।
काढूनि राखें प्राणु। हेंचि जाणें।।१४३।।

"रोग बळावण्यापूर्वीच त्याचा नाश करण्यात दक्ष असलेला जातिवंत वैद्य योग्य ती औषधयोजना करतांना जसा आपला व परका असा भेदभाव वर्तत नाही; चिखलात रुतलेली गाय धडधाकट आहे की भाकड हे तिच्या कासाविशीने चित्त व्याकुळ झालेला जसे पाहत नाही, तर काहीही करून तिला चिखलातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो; पाण्यात बुडणारा मनुष्य अंत्यज आहे की ब्राह्मण आहे, हे न पाहता दयावान जसा त्याचा प्राण वाचवण्यावरच आपले लक्ष केंद्रित करतो;

कीं महावनीं पापियें। उघडीं केली विपायें।
ती नेसविल्यावीण न पाहे। शिष्टु जैसा।।१६-१४४।।
तैसें अज्ञानप्रमादादिकीं। कां प्राक्तनींहीं सदोखीं।
निंद्यत्वाचां सर्वविखीं। खिलिलें जैं।।१४५।।
तेयां आंगिक आपुलें। देऊनियां भलें।
विसरजती सलें। सलतीं तियें।।१४६।।

"किंवा आडरानात पापिष्टांनी अत्याचार केलेल्या स्त्रीला सोडवणारा सभ्य गृहस्थ जसा तिला वस्त्र नेसवल्याशिवाय तिच्याकडे पाहत नाही; त्याचप्रमाणे अज्ञान, उन्मत्तपणा वगैरेंमुळे किंवा कमनशिबामुळेही निंद्य वर्तन करणाऱ्यांचे दोष न पाहता त्यांच्यात असलेले एकाटदुकट गुणच पाहणे व आपल्या कृपादृष्टीचा त्यांच्यावर वर्षाव करून त्यांचे ते सलणारे दोष नाहीसे करणे, ही वृत्ती दैवीगणसंपन्नांचीच असते." तसेचः

अगां पुढीलाचां दोखु। करूनियें आपुलियें दिठीं चोखु।
मग घापें अवलोकु। तेयावेरी।।१६-१४७।।
जैसा पुजूनि देवो पाहिजे। पेरूनि शेतां जाईजे।
तोखौनि प्रसादु घेईजे। अतिथीचा।।१४८।।
तैसें आपुलेनि गुणें। पुढीलाचें उणें।
फेडूनियां पाहाणें। तेयाकडें।।१४९।।
वांचूनि न विंधिजे वर्मी। नातुडविजे अकर्मी।
न बोलविजे नामीं। सदोखीं तिहीं।।१५०।।

"इतरांचे दोष आपल्या दृष्टिक्षेपमात्रें नष्ट करून मग त्यांना सन्मार्गाला लावणारा तो सज्जन असेच वागतो, जसे दैवतांची पूजादी उपचार केल्यावर मग प्रसन्न चित्ताने त्यांचे दर्शन घ्यावे; किंवा शेतात धान्य पेरून ते उगवल्यावर हर्षित दृष्टीने त्याकडे पाहावे; किंवा प्रथम अतिथीची सेवा करून त्याला प्रसन्न करावे व मग त्याचा आशीर्वाद घ्यावा. आपल्या अंगीच्या कृपादृष्टीने इतरांचे उणे फेडून मग त्यांच्याकडे पहावे; कारण कोणाचे वर्म काढणे, त्याला पापकर्मामध्ये गुंतलेला राहू देणे व त्याच्या दोषांचा उल्लेख करणें हे तिन्ही दोष आपल्याकडेच येतात."

वरि कोण्हे उपायें। पडिलें तैं उभें होये।
तैंचि कीजे परि घायें। नेदावें वर्मीं।।१६-१५१।।
पैं उत्तमाचियांसाठीं। नीच मानिजे किरीटी।
हे वांचूनि दिठी। दोखु न घेपे।।१५२।।
अपैशून्याचें लक्षण। अर्जुना हे फुडें जाण।
मोक्षमार्गींचें सुखासन। मुमुक्षूं हे।।१५३।।

"तसेच कोणी वाईट स्थितीत वा अधमावस्थेत असला तर त्याला उर्जितावस्थेत आणणे वा त्याचा उद्धार करणे, त्याला पापापासून वाचवणे व त्याच्या वर्मावर प्रहार न करणे, हे सज्जनांचे कर्तव्यच ठरते. अर्जुना! अधमासही उत्तम मनुष्यासारखेच वागवणे व त्याच्या दोषांचा नामनिर्देशही न करणे, हेच **अपैशून्या**चे लक्षण आहे आणि ते मुमुक्षूंसाठी मोक्षमार्गावर चालण्यासाठी असलेली सुखासीन पालखीच आहे, असे समज."

कृपादृष्टी

***अपैशून्य* म्हणजे परदोषावलोकन, निर्देशन व त्याप्रति तिरस्कार यांचा अभाव.** तसेच त्या दोषांवर आपल्या दैवी कृपादृष्टीचा प्रभाव पाडून ते नष्ट करणे व प्राणिमात्रांना आत्यंतिक दोषांपासून मुक्त करून पवित्र करणे. ही साधनेची अत्युत्तम अवस्थेतील एक पायरी आहे. या अवस्थेतील साधक हा सिद्धावस्थेतच पोहोचलेला असतो.

तो जेथे जातो तेथील दोष नाहीसे करून आसमंत पावित्र्याने व माङ्गल्याने भरून टाकतो. याच दैवी गुणसंपत्तीचा अप्रत्यक्ष उल्लेख ज्ञानदेवांनी पसायदानाच्या पुढील ओव्यातून केलेला आहे:

जैं खलांची व्यंकटी सांडो। तेयां सत्कर्मीं रती वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचें।।१८-१७९४।।
दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्यें पाहो।
जो जैं वांच्छील तो तैं लाहो। प्राणीजात।।१७९५।।
वर्षत सकल मंगलीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाली।
अनवरत भूमंडलीं। भेटोतु भूतां।।१७९६।।
चलां कल्पतरूंचें आरव। चेतनाचिंतामणींचें गांव।
बोलतें जैं अर्णव। पियूषाचें।।१७९७।।
चंद्रमें जैं अलांछन। मार्तंड जैं तापहीन।
तैं सर्वांही सदा सज्जन। सोयरें होतु।।१७९८।।

अशा प्रकारे पतितांना पावन करून त्यांचा उद्धार करणारे ते ***अपैशून्य*** या गुणाचे मूर्तिमंत प्रतीक असणारे सज्जन सोयरे सर्वत्रांना सुखी करून, त्यांना पूर्णत्व प्रदान करत, आदिपुरुषाच्या भजनात रत करून सोडतात. संतांचे कार्य ते हेच!!

१६) भूतदया::::

भूतदया या दैवी गुणसंपदेबाबत ज्ञानदेव म्हणतातः

आतां दया तैं ऐसीं। पूर्णचंद्रिका जैसीं।
निववितां न कडसीं। सानथोर।।१६-१५४।।
तैसें दुःखितांचें शिणणें। हिरतां सकणवपणें।
उत्तमाधम नेणें। विवंचू गां।।१५५।।

"***भूतदया*** म्हणजे समस्त प्राणिमात्र, भूतजात यांच्याप्रति करुणेचा भाव व कृपाळू वृत्ती. पूर्णचंद्र ज्याप्रमाणे लहानथोर असा भेदभाव न करता सर्व जगावर आपल्या सुखद चांदण्याची वृष्टी करून आल्हाद देतो, त्याचप्रमाणे समस्त दुःखितांचे दुःख दूर करणाऱ्या त्या करुणावंताच्या दृष्टीला उत्तम व नीच असा भेद दिसत नाही."

पैं जगीं जीवनासारिखें। वस्तु अंगावरी उपखें।
परि जाते जीवित राखें। तृणाचेहीं।।१६-१५६।।
तैसा पुढीलाचेनि तापें। कलवललियें कृपें।
सर्वस्वेंसीं दिधलें आपणपें। तऱ्हीं थोडेचि गमें।।१५७।।
निम्न भरलियां उणें। पाणी ढलोंचि नेणें।
तेवीं श्रांता तोखौनि जाणें। सामोरेयां।।१५८।।

"ज्याप्रमाणे तृणाला जीवनदान करतांना जळ स्वतः नाहीसे होते, त्याचप्रमाणे इतरेजनांच्या दुःखाने अंतःकरण कळवळणाऱ्या त्या कृपावंताने त्यांचे ताप हरण्यासाठी जरी स्वतःच्या सर्वस्वाचे दान केले, तरी कमीच केले असे त्याला वाटते. पाण्याचा ओहोळ जसा वाटेत आलेल्या खांचखळग्यांत पुरेपूर पाणी भरल्याशिवाय पुढे सरकत नाही, तसाच तो दयावंत समोर आलेल्या श्रांतांचे श्रमपरिहार व दुःखनिवृत्ती केल्याविना बाजूला सरत नाही."

पैं पायीं कांटा नेहटे। तंव व्यथा जीवीं उमटे।
तैसा पोळें संकटें। पुढिलांचेनि।।१६-१५९।।
कां पावो शीतलता लाहे। कीं डोल्यांचिलागीं होये।
तैसा परसुखें जायें। सुखावतु।।१६०।।

"पायात जरी काटा रुपला तरी त्याची वेदना जशी जिवांतरी उमटते, तसेच त्या कृपाळूस इतरांच्या संकटांनी स्वतःच पोळल्यासारखे वाटते. पायांना शीतलता प्रदान केली, तर डोळेही जसे निवतात, तसाच इतरांच्या सुखाने तो सज्जन सुखावतो."

किंबहुना तृषितालागीं। पाणी आरायिलें असें जगीं।
तैसें दुःखितांचां सेलभागीं। जिणें जेयाचें।।१६-१६१।।
तो पुरुखु वीरराया। मूर्त्तिमंत जाण दया।
मी उदयजतांचि तेयां। ऋणियां लाभे।।१६२।।

"किंबहुना तृषार्ताची तृषा हरण करण्यासाठीच जसे पाणी असते, तसेच दुःखितांचे दुःख हरण करण्यासाठीच ज्या महाभागाचे जीवित

असते, तो पुरुष म्हणजे, हे वीरश्रेष्ठा! मूर्तिमंत दयाच असतो. माझी अशी भक्ती करून तो मला ऋणी करतो. **त्या भाग्यवंताच्या जन्मापासून त्याला *भूतदया* व *मी म्हणजे सर्वेश्वर* प्राप्त होतात**, असे निश्चित समज."

भूतदयेसंबंधी एवढे विवेचन आपण पाहिले. त्यात एक महत्त्वाचे ज्ञानदेवांचे सांगणे आहे. ते म्हणजे जेथे खरी ***भूतदया*** तेथे तो महापुरुष व जेथे ते दोन्ही तेथे भगवंताचे कायम अधिष्ठान असते. ही गोष्ट त्यांनी ***"तो पुरुखु वीरराया। मूर्त्तिमंत जाण दया। मी उदयजतांचि तेयां। ऋणियां लाभे।।"*** या ओवीत स्पष्ट केली आहे.

१७) अलोलुपत्व::::

अलोलुपत्व किंवा विषयाभिलाषेचा अभाव या दैवी गुणसंपत्तीबाबत ज्ञानदेव म्हणतातः

आतां सूर्यासि जीवें। अनुसरलेयां राजीवें।
परि तो तैं न शिवे। सौरभ्य जैसें।।१६-१६३।।
कां वसंताचियां वाहाणी। आलियां वनश्रीचियां अक्षौहिणी।
तैं न करीतुचि घेणी। निगाला तो।।१६४।।
हे असो महासिद्धीसीं। लक्ष्मीही आलियां पासीं।
परि महाविष्णु जैसीं। गणीचिना।।१६५।।

"जरी सूर्याला त्याच्या उदयाबरोबर उमलणाऱ्या व त्याच्या अस्ताबरोबर मिटणाऱ्या कमळासारखा सुहृद असला, तरी तो जसा त्याच्या सुवासाचाही लाभ घेत नाही; किंवा वसंतऋतूच्या सहवासाने वनश्रीचे वैभव जरी खुलून मोहवणारे असते, तरीसुद्धा तो त्यातील काहीच न उपभोगता जसा आाला तसाच निघून जातो; हे असो! अष्टमहासिद्धींसह प्रत्यक्ष लक्ष्मी जरी त्याच्यापाशी असली तरी महाविष्णू जसे तिच्यात गुंतत नाहीत;

तैसें ऐहिकींचें कीं स्वर्गींचें। भोग पाईक जालियां इच्छेचें।
परि भोगावें हे न रुचे। मनामाजीं।।१६-१६६।।
बहुवें काय कौतुकीं। जीवु नोहे विषयाभिलाखी।
अलोलुपत्वदशा लाडकी। जाण तैं हे।।१६७।।

"त्याचप्रमाणे ऐहिक व स्वर्गलोकीचे भोग जरी इच्छिल्याप्रमाणे प्राप्त होऊ शकत असले, तरी ते उपभोगावे ही मनात इच्छाच नसणे, एवढेच काय तर सहज कौतुकानेसुद्धा जीवाला विषयाभिलाषा उत्पन्न न होणे, हीच खरीखुरी ***अलोलुपत्वदशा*** होय."

वैराग्य

यापूर्वी तेराव्या अध्यायात ***अष्टादशज्ञानलक्षणे*** सांगतांना ***विषयवैराग्य*** या संदर्भात ज्ञानदेवांनी केलेले विवेचन वाचकांना आठवत असेलच. विषयोपभोग व विषयाभिलाषा याविषयी इतरही ठिकाणी ज्ञानदेवांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्याचप्रमाणे ज्ञानी व परिपूर्ण माणसांची व्यवहारलक्षणे सांगतांनासुद्धा ***त्रिपुटीरहित*** अवस्थेत त्या मनुष्यात व्यवहारतः विषयासक्ती जरी दिसत असली, तरी अहंकाराचा अभाव असल्याने तो विषयात वस्तुतः आसक्त नसतो, असे ज्ञानदेवांनी वर्णन केलेले आहे. तसेच गीतेतील पुढील श्लोकही या संदर्भात लक्षणीय आहेः

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत।
कुर्याद्विद्वांस्तथासक्ताश्चिकिर्षुर्लोकसङ्ग्रहम्।।३-२५।।

"ज्याप्रमाणे कर्माच्या फलासक्तीने अज्ञानी लोक कर्म करतात, त्याचप्रमाणे अनासक्त मनुष्याने लोकसंग्रहार्थ कर्म करावे." माउली ज्ञानदेवांची याविषयीची ओवी अशी आहेः

देखें फलाचियां आशा। आचरे कामुकु जैसा।
कर्मी भरु होआवा तैसा। निराशाही।।३-१६९।।

याविषयी सिद्ध व आप्तकाम पुरुषांची लक्षणे वर्णितांना आणखी विचार केला जाईल. असो.

१८) मार्दव::::

यानंतर ***मार्दव*** या दैवी गुणाचे वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आतां माशियां जैसें मोहोल। जलचरां जेवीं जल।
कां पक्षियां अंतराल। मोकलें हे।।१६-१६८।।
ना तऱ्हीं बालकोद्देशें। मातेचें स्नेह जैसें।
कां वसंतीचां स्पर्शें। मऊ मलयानिलु।।१६९।।
डोलयां प्रियाची भेटी। कां पिलियां कूर्मीची दिठी।
तैसीं भूतमात्रीं राहाटी। मवाल तैं।।१७०।।

"मधुमक्षिकांना मोहोळ जसे आरामदायी असते व त्यांना त्याची जशी मोठी ओढ असते; जलचरांना जल जसे प्रिय व अत्यावश्यक असते; पक्षांना अंतराळ जसे आनंदविभोर करणारे असते; दृष्टीला प्रिय व्यक्तीचे दर्शन जसे प्रसन्न करते; किंवा कासवीच्या पिल्लांना तिची दृष्टी जशी पोषक असते; त्याप्रमाणे ज्याची दृष्टी भूतमात्रांप्रति प्रेमळपणाची असते;" आणि

स्पर्शें अति मृदु। मुखीं घेतां सुस्वादु।
घ्राणासीं सुगंधु। उजालू अंगें।।१६-१७१।।
तो आवडे तेव्हढा घेतां। भलतेयां विरुद्ध जऱ्हीं न होतां।
तऱ्हीं उपमें येतां। कापुर कीं।।१७२।।
परि महाभूतें पोटीं वाहे। तेवींचि परमाणूमाजीं सामाये।
या विश्वानुसार होये। गगन जेवीं।।१७३।।
काय सांगों ऐसें जिणें। जैं जगाचेनि जीवें प्राणें।
तेयां नांव म्हणें। मार्दव ऐसें।।१७४।।

"अथवा जो स्पर्शाला मृदु असणाऱ्या, सुगंधी व पांढऱ्याशुभ्र, स्वादिष्ट अशा कापरासारखाच, परंतु त्याचा वाटेल तेवढा उपयोग केल्यास अपायकारक ठरण्याचा गुणधर्म सोडून, मार्दवपूर्ण, कलंकरहित निर्मळ अशा अंतःकरणाचा, सर्वांना आनंद प्रदान करणारा व ज्याचा कितीही सहवास प्राप्त झाला तरी प्राणिमात्रांना अतीव उपकारकच ठरणारा असा असतो; जो महाभूतेसुद्धा पोटात घालणाऱ्या आकाशतत्त्वाप्रमाणे विश्वव्यापी असतो व ज्याचे जीवन म्हणजे जगातील

यच्चयावत वस्तुमात्रांचा अंतरात्मा असतेः त्या पुरुषाचे हे गुणजात म्हणजे खरे ***मार्दव*** होय," असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

हे ***मार्दव* म्हणजे खरे विश्वबंधुत्व.** हे ज्याच्याठायी वास्तव्य करते, तो खरा प्राणिमात्रांचा सुहृद व विश्वात्माच असतो. ***मार्दव*** हा गुण ज्ञान्यांच्या ***आर्जव*** *(अ.१३)* या गुणाचा सहचरच समजला तरी चालेल.

१९) ऱ्ही (जन्ममरणाची लाज)::::

वारंवार जन्ममरण या चक्रात पडून राहावे लागत असल्याची जाणीव व त्यातून मुक्त होण्याची इच्छा यांना ज्ञानदेव ***ऱ्ही*** असे म्हणतात. त्यांच्या पुढील ओव्या पाहाः

आतां पराजयें राजा। जैसा कदर्थिजे काजां।
कां मानियां निस्तेजा। निकृष्टास्तव।।१६-१७५।।
ना ना चांडाल मंदिराशी। अवचटें आलियां संन्याशी।
मग लाज होय जैसीं। उत्तमा तेयां।।१७६।।
क्षत्रियां रणीं पलौनि जाणें। तैं कोण्ह साहे लाजिरवाणें।
कां वैधव्यें पाचारिणें। महासतियेंतैं।।१७७।।

"युद्धात पराजित झालेला राजा जसा मानहानीमुळे लज्जित होतो; अथवा मानी पुरुष हीन दशा प्राप्त झाल्यावर कष्टी होतो; तमोगुणी मनुष्याच्या घरी चुकून जाण्याचा योग आल्यास संन्यस्तास जसे चुकल्याचुकल्यासारखे वाटते; क्षत्रियाला रणांगणातून पाठ दाखवून पळून जाणे जेवढे मानहानीचे वाटते; महापतिव्रतेस वैधव्यसूचक शब्दांनी पाचारण केले तर जसे सहन होत नाहीः" किंवा

रूपसां उदैलें कुष्ट। संभावितां कुटीचें बोट।
तेयां लाजा प्राणसंकट। होये जैसें।।१६-१७८।।
तैसें औटहातपणें। जैं शव होऊनि निजणें।
उपजों उपजों मरणें। नावां नावां।।१७९।।
तियें गर्भमेदमुसें। रक्तमूत्ररसें।
वोतींव होऊनि असणें। तैं लाजिरवाणें।।१८०।।
हे बहु असो देहपणें। नांवारूपासि येणें।
नाहीं लाजिरवाणें। याहूनि।।१८१।।
ऐसैसियां अवकला। घेपें शरीराचां कांटाला।
तैं लाज पैं निर्मलां। निसुगा गोड।।१८२।।

"रूपवानास कुष्ट झाले तर त्याची जशी कुचंबणा होते; तसेच साडेतीन हाताचे शरीर होऊन राहणे व जन्ममरणाच्या दुश्चक्रात सापडणे, गर्भाच्या रूपाने मेद, स्त्रीरज व वीर्य यांचा गोळा होऊन राहणे, हे अत्यंत लाजिरवाणे होय. एवढेच काय, त्यापरत्वे ***"देह हा मीच,"*** अशा भावनेने नामरूपास येणे, हे निर्लज्ज माणसास प्रिय असले तरी सुज्ञ मनुष्याला अशा लाजिरवाण्या जिण्याचा कंटाळाच येतो."

बुद्धिमानांच्या याच दैवी संपद्गुणास ***ऱ्ही*** म्हणजे लज्जा - जन्ममरणाच्या चक्राबाबत उदासीनता वा व्यथा बाळगणे - असे श्रीहरी म्हणतात. हेच त्यांनी यापूर्वी *तेराव्या* अध्यायात ***"जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्"*** यांद्वारे सूवित केले होते; एवढेच काय पण त्यावर ज्ञानदेवांनी केलेले विस्तृत आख्यान पण आपणांस स्मरतच असेल.

२०) अचापल्य (इंद्रियांचे नियमन वा दमन, इंद्रियजय)::::

यविषयी ज्ञानदेव म्हणतातः

आतां सूत्रतंतू तुटलियां। चेष्टाचि ठाके सायखडियां।
जैसीं प्राणजयें कर्मेंद्रियां। खुंटें गती।।१६-१८३।।
कीं मावललियां दिनकरु। सरे किरणांचा पसरु।
तैसा मनोजयें पसारु। बुद्धींद्रियांचां।।१८४।।
एवं मनपवननियमें। होतीं दाहीं इंद्रियें अक्षमें।
तैं अचापल्य वर्मे। येणें होय।।१८५।।

"ज्याप्रमाणे कळसूत्री बाहुली नाचवण्याची दोरी तुटली की तिची हालचाल थांबते; त्याप्रमाणे प्राणजय साधला की कर्मेंद्रियांचे व्यापार सहजच बंद पडतात. सूर्य मावळला की त्याचे किरण जसे समेटले जातात, त्याचप्रमाणे प्राणजयाबरोबर मनोजय होऊन ज्ञानेंद्रिये इंद्रियविषयांपासून निवृत्त होतात व आत्मरतीत समेटतात. याप्रमाणे मन व पवन यांचे नियमन करून - त्यांच्यावर विजय मिळवल्यावर - जी दशेंद्रियांची निवृत्ती होते, तीच खरी इंद्रियांची स्थिरता वा ***अचापल्य*** होय."

प्रत्याहार

अचापल्य हा गुण असा पतञ्जल्युक्त ***प्रत्याहार*** या योगांगाशी निगडीत आहे. *हठयोगप्रदीपिकेत* ***"पवनो लीयते यत्र मनस्तत्र विलीयते।।४-२३ ह.यो.प्र.।।"*** असे म्हटले आहे. ***पवन, मन आणि बिंदु*** यांचा योगशास्त्रात घनिष्ट संबंध आहे. या दृष्टीने योगाभ्यास करू इच्छिणाऱ्या साधकांनी ज्ञानदेवांच्या वरील ओव्या अभ्यासल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या योगाभ्यासाच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या ओव्या ज्ञानेश्वर अनेक प्रसंगी रचतात आणि प्रचलित विषयांवरील रूढ एकमार्गी कल्पनांना धक्का देतात.

या गोष्टीवरूनही गीतेचा अर्थ करतांना त्यांचा योगशास्त्राकडे किती ओढा आहे, हे पण आपल्या लक्षात येते आणि गीतेचा अर्थ योगपरच कां लावला पाहिजे, ते जिज्ञासूंना जाणवून येते. अशी कित्येक स्थळे ज्ञानेश्वरीत आहेत की ज्यांच्यावरून हे विधान सिद्ध होते. ती आपण वेळप्रसंगी प्रत्यक्षच पाहू आणि पाहतही आहोत.

प्राणायामाने ***केवलकुंभकसिद्धी*** व ***प्राणजय व मनोजय,*** तसेच ***प्राणलय व मनोलय*** व आपसुकच **इंद्रियजय** किंवा ***प्रत्याहार*** अथवा ***अचापल्य*** यांची सिद्धी होणे या विषयावर बरेच लिखित यौगिक वाङ्मय आहे. श्रीमदाद्यशंकराचार्यांचा ***योगतारावली*** हा तर या विषयावरला अत्यंत अधिकारी ग्रंथच आहे. आपण जेव्हा ***पंथराज*** अभ्यासू तेव्हा या विषयावर प्रसंगोपात्त प्रकाश पाडूच! तूर्त इत्यलम्।

२१) तेजः:::

"तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहोनातिमानिता। भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत।।१६-३।।" या श्लोकाद्वारे व्यक्तविलेल्या दैवी संपदेचे वर्णन करतांना ***तेज*** या गुणासंबंधी ज्ञानदेव म्हणतातः

वोखटें मरणाऐसें। तैंहीं आलें अग्निप्रवेशें।
परि प्राणेश्वरोद्देशें। न गणीचि सती।।१६-१८६।।
तैसा आत्मनाथाचियां आधी। लाऊनि विषयविषाची बाधी।
धांवो आवडें पाणधी। शून्याचियें।।१८७।।
न ठाके निषेधु आड। न पडे विधीची भीड।
नुपजेंचि जीवीं कोड। महासिद्धीचें।।१८८।।
ऐसें ईश्वराकडे निज। धांवें आपैसयां सहज।
तेयां नांव तेज। आध्यात्मिक जैं।।१८९।।

"अग्निप्रवेश करून मरण पत्करावे लागण्यासारखी काळीज पिळवटून टाकणारी अवस्था प्राप्त झाली, तरी पतीसह सहगमन करणाऱ्या पतिव्रतेच्या ते खिजगणतीतही नसते. त्याचप्रमाणे आत्मनाथाच्या - परमात्म्याच्या प्राप्तीसाठी विषयविषरूपी काटे पसरलेल्या शून्याच्या संकुचित मार्गाने धाव घेण्यास तो महाभाग कचरत नाही. विधिनिषेध, शास्त्राशास्त्र, महासिद्धींचा मोह हे त्याच्या लेखी काहीच नसतात. अशा प्रकारे स्वात्म्याची परमात्म्याकडे जी सहज ओढ असते, तिलाच ***आध्यात्मिक तेज*** असे म्हणतात."

शून्याचा मार्ग व *"क्षुरस्य धार:"*

शून्याच्या योगमार्गावरून चालून जाण्याचा हा जो दैवीसंपदेच्या संदर्भात ज्ञानदेव उल्लेख करतात, त्यावरूनसुद्धा मघाशीच सांगितल्याप्रमाणे आपणांस त्यांचा गीतोक्त योगमार्ग कोणता आहे, याविषयीचा दृष्टिकोन जाणून घेण्यास मदत होते. ज्ञानेश्वरांनी योगमार्गाचा जो पुरस्कार केला आहे, तो ***वदतोव्याघात*** असा नसून त्यांच्या समग्र विचारप्रणालीचे ते प्रमुख सूत्रच मानावे लागते.

याच ***तेज*** या गुणसंपदेस अनुलक्षून श्रुतीत ***"क्षुरस्य धार:"*** म्हणजे वस्तऱ्याच्या पात्यावरून चालण्याइतका सुतीक्ष्ण असा अध्यात्ममार्ग निर्देशिला जातो. ***शून्याचा काटेरी मार्ग* योगमार्गांतर्गत समजला जातो.** याद्वारे निर्देशिलेला सुतीक्ष्ण धारदार मार्ग *ज्ञानमार्गाचे* गमक पण दर्शवतो. एवं च काय, *ज्ञान व योग* हे दोन्ही मार्ग - या दोन्ही निष्ठा क्रमण्यास किती अवघड आहेत, हेच याद्वारे स्पष्ट होते. म्हणूनच उत्तम अधिकारी पुरुषांनाही त्यांवरून जन्मचे जन्म चालत राहिल्यावरच श्रीगीता सांगते, त्याप्रमाणे ***"... बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।।७-१९।।"*** असे प्राप्तव्यस्थान गवसते.

भक्तिमार्तंड संत श्रीतुकाराम महाराजांनी पण या सर्व अटीतटीच्या मार्गक्रमणेस - भक्तीसह इतर सर्वच मार्गांना उद्देशून ***"चणे खावे लोखंडाचे। तेव्हा ब्रह्मपदीं नाचे।।"*** असे म्हटले आहे, ते आपणा सर्वांना ठाऊकच आहे! त्यामुळे हा विषय इथेच संपवू या.

२२) क्षमा::::

आतां सर्वही साहतियां गरिमा। गर्वा न ये तैंचि क्षमा।
जैसें देह वाहौनि रोमा। वाहणें नेणें।।१६-१९०।।

"ज्याप्रमाणे देहावरचे सर्व रोम सतत वाहूनही देहाला त्यांची साधी वार्तासुद्धा नसते; त्याप्रमाणे सर्व दु:खे सहन करूनही आपल्या सहनशीलतेच्या गर्वाच्या स्पर्शविरहित मनाचे असणे, म्हणजेच ***क्षमा*** हा गुण होय."

२३) धृति::::

आणि मातलीयां इंद्रियांचें आवेग। कां प्राचीनें खवळलें रोग।
अथवा योगवियोग। प्रियाप्रियांचें।।१६-१९१।।
येयां आघवियांचाचि थोरु। एकें वेळें आलेयां पुरु।
तऱ्हीं अगस्ति कां होऊनि धीरु। उभा ठाके।।१९२।।
आकाशीं धूमाचीं रेखा। उठिली बहुधां आगलिकां।
तैं गिलीं एकीं झुलुकां। वारा जेवीं।।१९३।।
तैसें आधिभूताधिदैवतां। आध्यात्मादी उपद्रवां।
पातलेयां पांडवा। गिळुनि घालीं।।१९४।।

"आणि इंद्रियांच्या विषयसेवनाची ओढ अनिवार निर्माण झाली असता; किंवा जुनाट बळकट रोग उफाळून आले असता; अथवा अप्रिय वस्तूंचा योग वा प्रिय वस्तूंचा वियोग झाला असतांनाही जे धैर्य अगस्ति ऋषींप्रमाणे निश्चल स्तंभासारखे होऊन उभे ठाकते; वारा ज्याप्रमाणे आकाशात उठलेली धूम्ररेखा क्षणात विरवून टाकतो; त्याप्रमाणे जे धैर्य आधिभौतिक,आधिदैविक व आध्यात्मिक असे त्रिताप एकाच वेळी प्राप्त झाले असतांनासुद्धा त्यांना सहज गिळून स्वस्थ राहते;" आणि

आतां ईश्वरप्राप्तीलागीं। प्रवर्त्ततां ज्ञान योगीं।
धिंवसेयांचि आंगीं उणीव नोहे।।१६-१९५।।
ऐसें चित्तक्षोभाचां अवसरीं। उचलौनि धेर्या जैं चांगावें करी।
धृति म्हणे अवधारी। तियेंतैं गां।।१९६।।

"ईश्वरप्राप्तीसाठी ज्ञान वा योगमार्गी योगधारणा करू पाहतांना ज्या धैर्याची अंगी उणीव नसली पाहिजे; याप्रमाणे चित्तक्षोभ होणाऱ्या बिकट प्रसंगातसुद्धा जे धैर्य सहनशीलतेची परिसीमा गाठतांनाही सहज शांतवृत्ती धारण करण्यास कारणीभूत होते, त्यालाच ***धृति*** असे म्हणतात."

धृतीचे सत्त्व, रज व तम या त्रिगुणांच्या योगे उद्भवणारे त्रिप्रकार भगवंतांनी शेवटी *अठराव्या* अध्यायी सांगितले आहेत. येथे मात्र सात्त्विक धृतीच्या उत्तमांशासच ते ***धृति*** अशी संज्ञा देतात. असो.

२४) शुचित्व (पावित्र्य)::::

यानंतर ***शुचित्व*** या दैवी गुणसंपत्तीचे वर्णन शब्दांकित करत ज्ञानदेव म्हणतात:

आतां निर्वाळूनि कनकें। भरिला गांगें पियूखें।
तेयां कलशाचियांसारिखें। शौच असे।।१६-१९७।।
जैं आंगीं निष्कामु आचारु। जीवीं विवेकु साचारु।
तो सबाह्यु घडिला आाकारु। शुचित्वाचां।।१९८।।

"आणि शुद्ध सोन्याच्या उजळलेल्या कलशात गंगेचे विशुद्ध अमृततुल्य जल भरावे, त्याप्रमाणे जो शरीराने निष्काम आचरण करतो व अंतरी आत्मानात्मविवेकाने परिपूर्ण असतो, तो भाग्यशाली पुरुष म्हणजे अक्षरश: आकारास आलेले - मूर्त झालेले **शुचित्व**च होय." *तेराव्या* अध्यायात घेतलेला या गुणाचा परामर्ष आपण पूर्वीच अवलोकला आहे.

२५) अद्रोह (सर्वभूतहितैरत:):भूतमात्रांचे हित करणे::::

बाराव्या अध्यायात भगवान म्हणतातः

सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः।।१२-४।।

"सर्व इंद्रियांना वश करून सर्वांभूतीं एकाच समभावाने राहणारे सर्व भूतांचे हित पाहण्यात गुंतलेले ते महात्मे मलाच प्राप्त होतात." याच श्लोकातून व्यक्तवलेला भाव ***अद्रोह*** या दैवीगुणाचे वर्णन करतांना डोळ्यांपुढे असलेले ज्ञानदेव म्हणूनच म्हणतात कीः

कां फेडित पाप ताप। पोखित तीरींचें पादप।
समुद्रा जाय आप। गंगेचें जैसें।।१६-१९९।।
कां जगाचें आंध्य फेडितु। श्रियेचि राऊळें उघडितु।
निघे जैसा भास्वतु। प्रदक्षिणें।।२००।।

"ज्याप्रमाणे गंगेचे पाणी जगाचे पाप व ताप नाहीसे करत, काठांवरील झाडाझुडपांना जीवनदान करत स्वतः शेवटी समुद्रात विलीन होऊन स्वतःचे स्वतंत्र अस्तित्वसुद्धा उरू देत नाही; अथवा सूर्यनारायण जसा जगातील अंधकार नाहीसा करत, कमला म्हणजे लक्ष्मीची निवासस्थाने असणाऱ्या कमलदलांना प्रफुल्लित करत, निरपेक्षतेने जगाच्या प्रदक्षिणेस रोज निघतो;"

तैसीं बांधिलीं सोडीत। बुडालीं काढीत।
सांकडीं फेडीत। आर्त्तांचियां।।१६-२०१।।
किंबहुना दिवसरातीं। पुढिलांचें सुखउन्नती।
आणित आणित स्वार्थी। प्रवेशिजे।।२०२।।
वांचूनि आपुलियां काजालागीं। प्राणिजाताचां अहितभागीं।
संकल्पाचिही आडवंगी। न करणें जैं।।२०३।।
पैं अद्रोहत्व ऐशियां गोठी। ऐकसीं जियां किरीटी।
तैं सांगितलें हे दिठी। पाहों ये तैसें।।२०४।।

"त्याप्रमाणे मायाबद्ध जीवांना सोडवत, संसारदुःखात बुडालेल्यांना वाचवत, आर्तांच्या संकटाचे निवारण करत, एवढेच काय! पण रात्रंदिवस इतरांचे सुख वाढवण्यासाठी झटत असतांनाच आत्मोपलब्धी करून घेणे व आपल्या आत्मरतीस बाधक ठरणाऱ्या प्राणिमात्रांच्या अहिताचा विचारसुद्धा मनात न आणणे हीच ***अद्रोहत्व*** या दैवी गुणाची प्रकट लक्षणे समज."

२६) अमानित्व::::

अमानित्व या गुणाविषयी यापूर्वीच *तेराव्या* अध्यायात ज्ञानलक्षणांच्या निमित्ताने सविस्तर चर्चा केलेली होती. त्यासंबंधी निर्देश करून ज्ञानदेव म्हणतातः

आणि गंगा शंभूचां माथां। पावोनि संकोचें जेवीं पार्था।
तेवीं मान्यपणें सर्वथा। लाजणें जैं।।१६-२०५।।
तैं हे पुढत पुढुति। अमानित्व जाण सुमती।
मागां सांधितलें किती। तैंचि तैं बोलों।।२०६।।

"संपूर्ण जगतास वंद्य अशा श्रीशंभूच्या मस्तकीं विराजमान व्हायला मिळाले तरी गंगा जशी त्या सन्मानाने संकोचून जाते, त्याचप्रमाणे, हे पार्था! मानमान्यता प्राप्त झाल्यावर निगर्वी राहणे हाच दैवी गुणसंपदेचा शेवटचा सव्वीसावा ***अमानित्व*** नांवाचा गुण होय. याचे पूर्वीच खूप वर्णन केलेअसल्याने परत तेच ते सांगत बसत नाही."

सव्वीस गुण::::

***सव्वीसें* गुणज्योतींच्या निरांजनाने आत्मराजाचे औक्षण**

याप्रमाणे समस्त दैवी संपत्तीच्या सव्वीस गुणांचे वर्णन केल्यावर तिचे महिमान सांगतांना ज्ञानेश्वरांचे बोल उमटतात, ते असेः

एवं इहीं सव्वीसें। ब्रह्मसंपदा हे वसत असे।
मोक्षचक्रवर्तीचें जैसें। अग्रहार होये।।१६-२०७।।
नाना हे संपत्ती दैवी। या गुणतीर्थांची नीच नवी।
निर्विण्णसगरांची दैवी। गंगाचि आली।।२०८।।

"हे अर्जुना! एवं च काय की या सव्वीस दैवी गुणांच्या रूपाने प्रत्यक्ष ब्रह्माचे ऐश्वर्यच प्रकट होते, म्हणेनास कां! हे सव्वीस दैवी गुण म्हणजे जणू काही चक्रवर्ती मोक्षराजाने महापुरुषांना दिलेले अग्रहारच होय! किंवा या सव्वीस दैवीगुणरूपी तीर्थक्षेत्रांनी मंडित झालेली नित्यनूतन दैवी गंगाच त्या विरक्तपुरुषरूपी सगरांनी महाप्रयत्नाने या अवनीतलावर आवाहन करून अवतरित केली आहे, असेही म्हटले तरी योग्यच होईल!"

कीं गुणकुसुमांची माला। हे घेऊनि मुक्तीबाला।
वैराग्यनिरपेक्षांचा गला। गिवंसित असे।।१६-२०९।।
कीं सव्वीसें गुणज्योती। इहीं उजलूनि आरती।
गीता आत्मयां निजपती। नीरंजनां आली।।२१०।।
उगळितीं निर्मलें। गुण इयेंचि मुक्ताफलें।
दैवी शुक्तिफलें। गीतार्णवींची।।२११।।
काय बहु वानूं ऐसीं। अभिव्यक्ती ये आपैसीं।
केलें दैवी गुणराशी। संपत्तिरूप।।२१२।।

"फार काय वानूं! या सव्वीस दैवी गुणरूप कुसुमांची माला हाती घेऊन जणू काही सौभाग्यकांक्षिणी मुक्तियुवतीच वैराग्याने मंडित अशा पुरुषाच्या शोधात असते, म्हणेनास!"

ज्ञानदेव म्हणतातः " याच सव्वीस दैवी गुणांच्या ज्योती उजळून श्रीगीता आपल्या पतीला - आत्मराजाला - ओवाळीत असते. हे सव्वीस गुण म्हणजे जणू काही गीतारूपी समुद्रातले दैवी संपत्तिरूपी शिंपल्यातून बाहेर पडलेले ओजस्वी मोतीच होत. आणिक किती वर्णन करावे! दैवी गुणराशीच्या संपत्तीचे महिमान व्यक्तवणाऱ्या या ओव्या सहजच माझ्या मुखाने प्रकट झाल्या आहेत."

याप्रमाणे *दैवी गुणसंपत्ती*चे सुरेख वर्णन करून त्या गुणांना आपल्या अतीव शुद्ध काव्यरसात विभोर करणाऱ्या ज्ञानदेवांच्या प्रज्ञेने आपण दिङ्मूढ न झालो, तरच नवल!

समारोप

असो. आता पुढील ***उन्मेष क्र. १५ - आसुरी संपदा*** यात आपण आसुरी संपदेचे विशेष पाहू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष::१५::आसुरी संपदा::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेह १५:

गीताः
१६:४-२४
१७:१
१८:५३,६७
ज्ञानेश्वरीः
१६:२१७-२६३,२६५-४७३

::::उन्मेष१५::::

:::आसुरी संपत्ति:::

आसुरी संपदालक्षणे::::

अज्ञानाच्या सहा ऐश्वर्यराशी

मागील उन्मेषातून आपण दैवी संपदेचे दर्शन घेतले. त्यानंतर ज्ञानेश अज्ञानाच्या राशीच अशा आसुरी गुणसंपदेचा परामर्ष घेण्यासाठी वळतात, तेव्हा त्यांच्यासमोर श्रीगोपालकृष्णांचे-

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम्।।१६-४।।

हे वचन असते. यात उल्लेखिलेल्या सहा प्रकारच्या आसुरी संपत्ती- ***१) दम्भ, २) दर्प, ३) अभिमान,४) क्रोध, ५) कठोरता व ६) अज्ञान*** यांचे वर्णन ज्ञानदेव करतात.

१) दम्भ::::

आपण केलेल्या धर्माचरणाचा डांगोरा पिटणे अधर्माला कसे कारण होते, हे ***दम्भ*** या आसुरी गुणसंपत्तीच्या वर्णनानिमित्त स्पष्ट होते. ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं तेयां आसुरां। दोषांमाझीं जेयां वीरा।
वाडपणाचां डांगोरा। तो दंभु ऐसा।।१६-२१७।।
जैसीं आपुलीं जननी। नग्न दाविलियां जनीं।
तैं तीर्थचि परि पतनीं। कारण होय।।२१८।।
कां विद्या गुरुपदिष्टा। बोभाईलियां चोहाटां।
इष्टदा परि अनिष्टा। हेतु होती।।२१९।।

"सर्व प्रकारच्या आसुरी गुणसंपदेमध्ये दोषांची खाणच असा सर्व दोषांच्या वडिलकीने मिरवणारा गुण म्हणजे, हे वीरा अर्जुना! दंभ होय. माता ही साक्षात तीर्थरूप असते. ती पुत्रादिकांना पावन करून देणारी असली व मातृभक्तीने मोठमोठी पातके जरी नाश पावत असली तरी, आपणच तिला गर्ह्य वर्तनाची ठरवणे हे पुत्राच्या पतनाचे मोठे कारण जसे होते; अथवा गुरुपदिष्ट विद्या - ब्रह्मविद्या - जरी इष्ट तेच देणारी असली- निःश्रेयस प्राप्त करून देणारी असली तरी तिची चव्हाट्यावर प्रसिद्धी केल्यास म्हणजे सर्वांना तिचे सवंग दान केल्यास ती जशी साधकाच्या - शिष्याच्या अनिष्टास कारणीभूत होऊ शकते;"

पैं आंगें बुडतां महापुरीं। जैं वेगें काढी पैलतीरीं।
तैं नावचि बांधिलियां शिरीं। बुडवी जैसीं।।१६-२२०।।
कारण जैं जीवितां। तैं वानिलें तऱ्हीं अति सेवितां।
तऱ्हीं अन्नचि पांडुसुता। होए विख।।२२१।।
तैसा दृष्टादृष्टाचां सखा। धर्मु जाला जैं फोखारिजे देखा।
तऱ्हीं तरिता तोचि दोखा-। लागीं होये।।२२२।।
म्हणौनि वाचेचां चौबारा। घातलियां धर्माचां पसारा।
धर्मुचि तो अधर्मु होये वीरा। तो दंभु जाणें।।२२३।।

"किंवा जी नाव बुडत्याला महापुरातूनसुद्धा वाचवू शकते, तीच नाव जर डोक्यावर बांधून पाण्यात उडी मारली तर जशी बुडवण्याला निमित्त होते; वा अन्न जरी जीवनाला धारण करणारे व पोषक असले तरी तेच अतिसेवन केले तर प्रकृतीला विषासमान अपायकारक ठरते; त्याचप्रमाणे इहपरलोकी आपले कल्याण करणारा म्हणून जो धर्म प्रसिद्ध आहे, त्याचे अवडंबर माजविल्याने व त्याचा डांगोरा पिटल्याने तो दोषास व अधर्मास जन्म देतो; या वृत्तीला ***दंभ*** म्हणून जाणावे.

२)दर्प::::

ऐहिक संपत्ती, मानमरातब, सुखोपभोग व त्यांची सामग्री यांच्या योगाने जो***दर्प*** निर्माण होतो, त्या आसुरी गुणाचे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

आतां मूर्खाचियां जिभें। अक्षराचां अंबुखा सुभे।
आणि तो ब्रह्मसभे। न रिझे जैसा।।१६-२२४।।
कां मादुरी लोकांचा घोडा। गजपतिही मानी थोडा।
कां कांटियेवरिलियां सरडा। स्वर्गुही नीचु।।२२५।।
तृणाचेनि इंधनें। आगी धांवे गगनें।
थिल्लरबळें मीनें। न गणिजे सिंधु।।२२६।।

"ज्याप्रमाणे पंडितांच्या सभेत बोलण्यासही चार अक्षरे शिकलेला अल्पशिक्षित मूर्ख सहज धिटावतो; किंवा तबेल्यात राहण्यास मिळालेला ठाणबंद घोडा ऐरावतालाही तुच्छ मानतो; किंवा काटेरी कुंपणावरला सरडा जणू काही स्वर्गसुखच मिळाल्याच्या आनंदात व्यग्र असतो; ज्याप्रमाणे शुष्क अशा क्षुद्र गवताच्याही संसर्गाने आगीचे लोळ गगनाचा ग्रास करण्यासाठी धावण्याचे अचाट साहस करतात; वा डबक्यात सुखाने कालक्रमणा करत असलेली मासोळी समुद्रालाही तुच्छ लेखण्यास धजावते;" आणि

तैसा माजे स्त्रिया धनें। विद्या स्तुती बहुतें मानें।
एकें दिवसीचेनि परान्नें। अल्पकु जैसा।।२२७।।
अभ्रच्छायेचियां जोडी। निदैवु घर मोडी।
मृगांबु देखोनि फोडी। पाणियाडें मूर्खु।।२२८।।
किंबहुना ऐसेसें। उतणें जैं संपत्तिमिसें।
तो दर्पु गां अनारिसें। न बोलें घेईं।।२२९।।

"जसा एका दिवसाच्या परान्नानेही दरिद्री मनुष्य माजतो; त्याप्रमाणे स्त्रिया, धन, विद्या, स्तुती वा बहुमान मिळाल्याने जो मूर्खपणाचा माज चढतो व त्या इहलौकिक सामग्रीच्या संपादणीने शाश्वत आत्मसुखालाही तुच्छ लेखण्याची जी प्रवृत्ती उपजते - मूर्खाने

जसे ढगाची सावली मिळाली की घराची गरज सरली म्हणून घर मोडावे; किंवा मृगजळाचा विस्तार पाहून पाणवठ्याची गरज काय म्हणून तो नष्ट करावा - तशा वृत्तीला ***दर्प*** याशिवाय दुसरे काय म्हणावे!

३)अभिमानः:::

अहंकारी - ईश्वरतत्त्वात लीन न होणाऱ्या ***अभिमान*** या आसुरी गुणप्रवृत्तीचे ज्ञानदेवांचे वर्णन पाहाः

आणि जगा नेदीं विश्वासु। जाणीं विश्वासीं पुज्यु ईशु।
जगीं एकु तेजसु। सूर्यूचि हा।।१६-२३०।।
जगस्पृहें आस्पद। एक सार्वभौमपद।
न मरणें निर्विवाद। जगां पढियें।।२३१।।

"समस्त जगातील मनुष्यमात्रे वेदवाक्य प्रमाण मानतात व म्हणून वेदांनी वंदिलेला ईश्वर त्यांना अत्यंत पूज्य असतो. कारण समस्त विश्वात ईश्वर हाच खरा तेजस्वी सूर्य समजावा - त्याच्यापुढे लाखो सूर्यांचे तेज फिकेच ठरते. आत्मविदांना प्राप्त होणारे सार्वभौमपद म्हणजे ***ईशत्व*** सर्व जगताच्या स्पृहेस खरे तर एकमेव कारण असले पाहिजे."

म्हणौनि जन्हीं उत्साहें। यांतें वानूं जायें।
कीं तैं आइकोनि मत्सरु वाहें। फुगों लागें।।१६-२३२।।
म्हणें ईश्वरातें खायें। तेयां वेदां विख सूयें।
गौरवामाजीं जायें। भंगीत असें।।२३३।।

"ते ईश्वरपद म्हणजे खरे अमरत्वच! म्हणून अशा सार्वभौम ईश्वराची - आत्मतत्त्वाची लोक स्तुतिस्तोत्रे गातात. पण ती दुरभिमान्यास आवडत नाहीत. तो ईश्वराचाही मत्सर करतो व त्याला वेद म्हणजे विषासमानच वाटतात. तो स्वतःच आपण ईश्वर आहोत असा गर्व वाहतो व आपला मोठेपणा मिरवण्यात सगळे बळ खर्च करत राहतो."

पतंगा नावडे ज्योती। खद्योता भानूची खंती।
कां टिटिभेंतैं आपांपति। वैरी केला।।१६-२३४।।
तैसा अहंनामाचेनि मोहें। ईश्वराचें नामही न साहे।
वेदांतैं म्हणे हे। मज सवती जाली।।२३५।।
ऐसा मान्यतेचां पुष्टीगंडु। तो अभिमानी परमलंडु।
रौरवाचां रूढु। मार्गुचि तो हा।।२३६।।

"ज्याप्रमाणे पतंगात ज्योतीचे तेज सहन न होऊन ती विझवावी म्हणून तिच्यावर आत्मघातकी उडी घेण्याची प्रवृत्ती उपजतच असते; किंवा काजव्यांना जसा सूर्याच्या तेजाचा मत्सरच वाटतो; अथवा इवल्याशा टिटवीने अमाप, अथांग सागराशी व्यर्थ अभिमानाने जसे वैर आरंभावे; त्यांचप्रमाणे तो अभिमानी नास्तिक मानमरातबाने फुगून जाऊन अहंतेच्या मोहात गुरफटल्यामुळे ईश्वराचे नांवसुद्धा आपल्यापुढे काढू देत नाही आणि ईश्वराचे नित्य प्रणिधान करणाऱ्या वेदांना तो आपल्या सवतीसमान लेखतो. तो मनुष्य म्हणजे रौरव नरकाचा मूर्तिमंत मार्गच समज ना!"

यावरून असेही दिसते की वेदप्रणीत ***ईश्वरप्रणिधान*** या दैवी गुणाविरुद्ध असे या ***अभिमान*** या आसुरी गुणास ज्ञानेश्वर समजतात.

४)क्रोधः:::

इतरांचे भाग्य, सुख सहन न होणे; इतरांबद्दल हेवा वाटणे; ईर्ष्या असणे व परक्यांचे सुदैव पाहून रोष प्राप्त होणे, हा ***क्रोध*** नावाचा आसुरी गुण होय. त्याबद्दल ज्ञानदेव म्हणतातः

आणि पुढिलांचें सुख। देखणियाचें होय मिस।
चढे क्रोधाचें विख। मनोवृत्तीं।।१६-२३७।।
शीतलाचियें भेटीं। तातलां तेलीं आगी उठी।
चांदु देखौनि जळें पोटीं। कोल्हे जैसें।।२३८।।
विश्वाचे आयुख जेणें उजळें। तो सुर्यू उदैला देखौनि सवले।
पापियां फुटती डोळें। डुडुलाचें।।२३९।।

"आणि इतरांचे सुख दृष्टीला पडताच ज्या मनोवृत्तीवर क्रोधाचे विष चढते; तापलेल्या तेलावर जरी थंड पाणी शिडकले, तरी त्यात ज्वाळा जशी उठते; शीतल आह्लाददायी चंद्रम्यासही पाहून कोल्ह्याचे काळीज जसे मत्सरग्रस्त होते; विश्वाला मार्गदर्शक असा सूर्य उगवताच घुबडाचे डोळे जसे पाण्यासारखे दृष्टिहीन होतात;" आणि

जगाची सुख पाहांट। चोरां मरणाहूनि तीख।
दुधाचें कालकूट। होय व्यालीं।।१६-२४०।।
अगाधें समुद्रजलें। प्राशितां अधिकें जलें।
वडवाग्नि न मिलें। शांति कंहीं।।२४१।।
तैसा विद्याविनोदविभवें। देखें पुढिलांची दैवें।
तंव तंव रोष दुणावें। क्रोधु तो जाण।।२४२।।

"जगाला पहाट जरी सुखकारक वाटते तरी चोराला तीच जशी मरणाहूनही दुःखद वाटते; दूध जरी इतरांस अमृततुल्य असले तरी सर्प मात्र जसे त्याचे कालकूटात रूपांतर करतो; समुद्राएवढे अगाध जळ प्राशन करूनही वडवानळ जसा शांत तर होत नाहीच, तर उलट भडकतच राहतो; त्याचप्रमाणे दुसऱ्यांचे विद्या, सुख, वैभव इ.सुदैव दृष्टीस पडले की मनोवृत्ती रुष्ट होणे, ही ***क्रोध*** या आसुरी संपदेची लक्षणे आहेत."

५) पारुष्य (कठोरवृत्ती):::

आता ***पारुष्य*** म्हणजे कठोरवृत्ती या आसुरी गुणसंपदेचे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

आणि मन सर्पाची कुटी। डोले नाराचांचीं सुटी।
बोलणें तैं वृष्टी। इंगलांची।।१६-२४३।।
येर तैं क्रियाजात। तैं तिखयाचें कर्वत।
ऐसें सबाह्य खासासित। जेयांचें गां।।२४४।।
तो मनुष्यात अधमु जाण। पारुष्याचें अवतरण।..।।२४५।।

"ज्याचे मन सर्पाप्रमाणे सतत घातक संकल्प वाहते; डोळे सतत जणू तीक्ष्ण बाणांची वृष्टी केल्यासारखे इतरांचे अंतःकरण विदीर्ण करू पाहतात; बोलणे तर जणू इंगळ्याच डसाव्यात इतके जहरी

असते; ज्याच्या इतर क्रिया शरीरावर करवत चालवावी तशा इतरांना कष्टदायक वाटतात; अशा अंतर्बाह्य कठोरपणाने वर्तणारा मनुष्य अधमाधम असतो. तो म्हणजे ***पारुष्याचा - कठोरतेचा -*** अवतारच असतो!"

६) अज्ञान::::

या आसुरी संपदेचे वर्णन केल्यानंतर ज्ञानदेव आता शेवटच्या पण मुख्य आसुरी गुणाकडे वळतात. तो म्हणजे ***अज्ञान !:***

.....आतां आईक खूण। अज्ञानाची।।१६-२४५।।
तऱ्हीं शीतोष्णस्पर्शा। निवाडु नेणें पाषाणु जैसा।
कां रात्री आणि दिवसा। जात्यंधु तो।।२४६।।
आगी उठिला आरोगणें। जैसा खाद्याखाद्य न म्हणें।
कां परिस पाडु नेणें। सोनयां लोहां।।२४७।।
ना तऱ्हीं नाना रसीं। रिघौनि दर्वी जैसीं।
परि रसास्वादासीं। नेणें जेवीं।।२४८।।

"पाप-पुण्य, कर्म-अकर्म, विधि-निषेध यांना न जाणणाऱ्या अज्ञान या आसुरी गुणलक्षणाचे वर्णन ज्ञानदेव असे करतातः

"आता अज्ञानाची लक्षणे ऐक. दगडाला जसा शीतोष्णातील स्पर्शभेद कळत नाही; वा जन्मांध जसा रात्र व दिवस यातला फरक जाणण्यास अक्षम असतो; अग्नी प्रफुल्ल झाला की जे मिळेल त्याचा योग्यायोग्य असा विचार न करता ग्रास करतो; किंवा परीस जसा लोखंड व सोने यातील फरक जाणत नाही; स्वयंपाकातली पळी जशी सर्व प्रकारच्या अन्नपदार्थात बुडूनही रसारसांतील स्वादभेद जाणत नाही;" आणि

कां वारा जैसा पारखीं। नव्हेचि गां मार्गामार्गाविखीं।
तैसें कृत्याकृत्यविवेकीं। अंधपण जैं।।१६-२४९।।
हे चोख हे मैल। ऐसें नेणोनियां बाल।
देखें तैं केवल। मुखेंचि घाली।।२५०।।
तैसें पापपुण्याचें खिचटें। करौनि खातां बुद्धिचेष्टें।
कडु महुर न वाटें। ऐशीं जैं दशा।।२५१।।
तियें नांव अज्ञान। ययां बोलां नाहीं आन।...।।२५२।।

"किंवा वारा जसा कोणत्या मार्गाने जावे याची पारख न करता वाट फुटेल तसा वाहत जातो; त्याप्रमाणे कुठली गोष्ट करावी अन कुठली करू नये, याचा विवेक जी बुद्धी जाणत नाही; स्वच्छ-अस्वच्छ याचा विचारही मनात न आणता बालक जसे मिळेल ती वस्तू तोंडात घालत असते; त्याप्रमाणे पाप व पुण्य यांचा विवेकसुद्धा जी बुद्धी जाणत नाही व चांगले वाईट हे तारतम्य नसण्याने कोणत्याही कामात प्रवृत्त होते, ती प्रवृत्तिदशा म्हणजे मूर्तिमंत ***अज्ञान*** होय."

आसुरी संपदेचे पाशवी बल::::

याप्रमाणे आसुरी संपदेच्या मोजक्याच सहा गुणांची लक्षणे सांगून झाल्यावर ज्ञानदेव आसुरी संपदेचे पाशवी बल वर्णन करतांना म्हणतातः

....एवं साही दोखांचें चिह्न। सांघितलें।।१६-२५२।।
इहींचि साहीं दोखांगीं। हे आसुरी संपत्ती दाटुगी।
जैसें थोर विषय सुभगेआंगीं। अंग सानें।।२५३।।
कां तिघां वह्नींचीं पांती। पाहतां थोडें ठाय गमती।
परि विश्वही प्राणाहुती। करूं न पुरे।।२५४।।

"याप्रमाणे आसुरी संपत्तीच्या सहाही दोषांचे वर्णन केले. ज्याप्रमाणे अटकर बांधा असलेल्या लहानखुऱ्या स्त्रीच्या ठिकाणी बलवत्तर मदनराज ठाण मांडून बसलेला असतो व सर्व लोकांस भुलवतो; त्याप्रमाणे दिसायला सहाच जरी हे दोष असले, तरी त्यांच्याठायी आसुरी संपत्तीचे सर्व बल एकवटून ठिय्या देऊन बसलेले आढळते. प्रलयाग्नि, विद्युदग्नि व कालाग्नि हे सर्व अग्नी जरी तीनच असले तरी ते पंक्तीने बसले तर त्यांना प्राणाहुतीस अवघे विश्वसुद्धा कमीच पडते;" किंवा

धातयांही गेलियां शरण। त्रिदोषीं न चुके मरण।
तेयां तिहींची दुणी जाण। साही दोख हें।।१६-२५५।।
इहीं साहीं दोखीं संपुर्णी। जाली इयेंचि उभारणी।
म्हणौनि आसुरी उणी। संपदा नोहे।।२५६।।

"कफ, पित्त व वात या फक्त त्रिदोषांनी ज्याच्या शरीरास ग्रासले आहे, त्या जीवाला प्रत्यक्ष ब्रह्मदेवही वाचवू शकत नाही; अशा त्या घातक त्रिकपेक्षाही दुपटीने महाघातक असे हे *तीन दुणे सहा* आसुरी संपत्तीदोष आहेत. दैवी संपत्तिगुणांच्या विरोधात असणाऱ्या या सहांना गुण कसे म्हणावे! त्यांना दोष म्हणणेच योग्य! फक्त सहा दोषांवर आधारलेली आहे असे म्हणून नगण्य समजण्याइतकी क्षुल्लक अशी ही आसुरी संपदा नाही; तर ती अतीव बलाढ्य आहे."

आसुरी संपत्तीचे फळ::::

आता ज्ञानदेवांच्या मुखाने आसुरी संपत्तीचे फल ऐकाः

परि क्रूर ग्रहांची जैसीं। मांदी मिळें एकेंचि राशी।
कां येती निंदकापासीं। अशेखें पापें।।१६-२५७।।
मरणाराचें आंग। पडिघाती आघवें रोग।
कां कुमुर्तीं दुर्योग। एकवटती।।२५८।।
कां आयुष्य जातियें वेळें। शेलिएं सातवेउलीं मिळें।
तैसे नाहीं दोख सगळें। जोडती तेयां।।२५९।।

"सर्व क्रूर ग्रहांचा दुर्योग जसा एकाच राशीला एकवटून ते राशिक्षेत्र दूषित होते; किंवा निंदकाजवळ जशी सर्व पापे येतात; मरणोन्मुख झालेल्या मनुष्याच्या शरीरातील सर्व सुप्तप्रसुप्त रोग त्याला जसे ग्रासतात; किंवा कुमुहुर्तावर जसे सगळे दुर्योग एकदम जुळून येतात; अथवा मृत्युसमयीच्या वेदनांत भर म्हणून शेळीला सात नांग्यांची इंगळी पण डसावी; त्याप्रमाणे ज्या मनुष्याचे दुर्भाग्य असेल, त्याला हे आसुरी संपत्तीचे साहीच्या साही दोष चिकटतात."

विश्वासिला आंतुडवीजे चोरा। शिणला सुइजे महापुरा।
तैसें दोष इहीं नरा। अनिष्ट कीजे।।१६-२६०।।

मोक्षमार्ग्याकडें। जैं ययांचां अंबुखा पडे।
तैं न निघेचि ऐसें म्हणोनि बुडे। संसारी तो।।२६१।।
अधमां योनीचां पाउटीं। उतरत जो किरीटी।
स्थावरांहीं तलुवटीं। बैसणें घे।।२६२।।
हे असो तेयांचां ठाईं। मिलौनि साही दोखीं इहीं।
आसुरी संपत्ती पाहीं। वाढविजे।।२६३।।

"ज्याच्यावर संकटाच्या वेळी विश्वास टाकावा, तो चोर निघावा; किंवा दमलाभागलेला मनुष्य महापुरात सापडावा; त्याप्रमाणे त्या मनुष्याचे हे सहा आसुरी संपदादोष अनिष्ट करतात. त्यांची नजर जर मुमुक्षूवर पडली तर संसाराची अतीव प्रवृत्ती निर्माण होते व तो संसारगर्तेत खोलवर बुडतच जातो. त्याच्यामुळे इतका अध:पात होतो की अधमाधम योनींच्या उतरंडीवरून घसरत घरंगळत मनुष्य सर्व नीचतम मूढ योनीत शेवटी जन्म घेतो. सगळ्या लोकांमध्ये अशा प्रकारे हे सहा दोष आसुरी संपत्ती वाढवतच जातात."

दैवासुरसंपत्ति::::

दैवी व आसुरी संपद्विभाग

यांप्रमाणे ***दैवी*** व ***आसुरी*** अशा दोन्ही संपदांचे वर्णन करून झाले. जाणकार व सुज्ञ या प्रकारच्या गुणभेदलक्षणांनी दैवी व आसुरी संपत्ती नीरक्षीरन्यायाने वेगळाल्या करतात. यातील दैवी संपदा मोक्षप्रद असते, तर आसुरी संपदा बंधनात पाडून भवचक्रात फिरवत राहते. म्हणूनच श्रीगोपालकृष्ण म्हणतात:

दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता।
मा शुचः सम्पदं दैवीमभिजातोऽसि पाण्डव।। १६-५।।

दैवी संपदलक्षणांनी अर्जुन संपन्न होता. म्हणून त्याला श्रीकृष्णांनी अभयवचन दिले व "भिऊ नकोस" असे म्हटले. त्याचप्रमाणे या लोकी दैवी व आसुरी या दोन्ही प्रवृत्तींची मनुष्ये व प्राणी कसे उत्पन्न होतात, हेही कथित केले. ते असे:

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे श्रुणु।।१६-६।।

तेराव्या अध्यायात पूर्वी दैवी संपद्गुणांचे ज्ञानलक्षणांच्या निमित्ताने विस्तारपूर्वक वर्णन केलेच होते. आता यापुढे ज्ञानदेव आसुरी गुणांचे व त्यांपासून प्राप्त होणाऱ्या स्थितीचे विस्तृत वर्णन करतात. ते म्हणतात:

इयां दोहींमाजीं पहिली। दैवी जैं म्हणितली।
तैं मोक्षसूर्यें पाहिली। उखाचि जाण।।१६-२६५।।
येरी जैं दुसरी। संपत्ति कां आसुरी।
तैं लोभमोहाची खरी। साखली जीवां।।२६६।।
परि हे आइकोनि झणें। भय घेसी हो मनें।
काय रात्रींचा दिनें। धाकु धरिजै।।२६७।।
हे आसुरी संपत्ति तेयां। बंधालागीं धनंजया।
जो साही दोखां ययां। आश्रो होए।।२६८।।

श्रीकृष्ण सांगतात: "या दोन्ही संपत्तींपैकी मुख्य जी दैवी संपत्ती आहे, ती म्हणजे मोक्षरूपी सूर्याच्या आगमनाची नांदी देणारी उषाच समजेनास कां! आणि इतर म्हणजे दुसरी जी आसुरी संपदा, ती म्हणजे लोभमोहरूपी लोहशृंखला होय - ती जीवाला संसारबंधनात अडकवते. आसुरी संपत्तीची ही भयानक परिणती पाहून कोणालाही भयच वाटेल. परंतु सर्वच्या सर्व सहाही आसुरी दोषांचा जो स्वामी होतो, त्यालाच हे लागू पडते."

तूं तंव पांडवा। सांगितलेयां दैवा।
गुणनिधि बरवा।जन्मलासि।।२६९।।
म्हणौनि पार्था तूं या। दैवी संपत्ति स्वामिया।
होओनि यावें उवाया। कैवल्याचियां।।२७०।।

"तू तर अर्जुना! दैवी गुणांचा उत्कृष्ट ठेवाच प्रकटला आहेस. तुला आसुरी संपत्तीचा धाक बाळगण्याचे कारणच नाही. अरे! सूर्याला रात्र कधी धाक घालू शकेल काय! तू तर दैवी संपत्तीचा स्वामी आहेस. तिच्या योगाने कैवल्यसुखाला सामोरे जा!"

आणि दैवां आसुरां। संपत्तिवंतां नरां।
अनादिसिद्ध उजरा। राहाटीचा आहे।।१६-२७१।।
जैसा रात्रीचां अवसरीं। व्यापारिजे निशाचरीं।
दिवसा सुव्यवहारीं। मनुष्यादिकीं।।२७२।।
तैसियां आपुलालियां राहाटीं। वर्तती दोनीं सृष्टी।
दैवी आणि किरीटी। आसुरी एथ।।२७३।।
तेवींचि विस्तारूनि दैवी। ज्ञानकथनादि प्रस्तावीं।
मागील ग्रंथी बरवीं। सांगितलीं ।। २७४।।

"आता दैवी व आसुरी संपत्तिमान लोकांच्या वागणुकीच्या अनादिसिद्ध रीती आहेत. जसे रात्रीच्या वेळी निशाचर व दिवसा सन्मान्य मनुष्यमात्रे व्यवहार करतात; त्याप्रमाणे दैवी व आसुरी सृष्टी आपापले व्यापार वेगवेगळ्या प्रकारे करतात. हे अर्जुना! *(तेराव्या* अध्यायाच्या वेळी ज्ञानगुणांचा उत्कर्ष करतांना) पूर्वीच दैवी गुणसंपदेचा विस्ताराने परामर्ष घेतला होता."

आसुरी सर्ग::::

आसुरी सृष्टी

श्रीकृष्ण सांगतात:

आतां आसुरी जैं सृष्टी। तेथिंचि उपलऊ गोठी।
अवधानाची दिठी। दे पां निकीं।।१६-२७५।।

"आता आसुरी सृष्टीचे सविस्तर वर्णन पाहू या. तरी अवधान देऊन नीट ऐक."

तऱ्हीं वाद्येंवीण नादु। नेदी कवणाही सादु।
कां अपुष्पीं मकरंद। न लभे जैसा।।१६-२७६।।
तैसीं प्रकृति हे आसुर। एकलीं नोहें गोचर।
जंव एकादें शरीर। माल्हाती ना।।२७७।।

मग आविष्करला लांकुडें। पावकु जैसा जोडे।
तैसीं प्राणिदेहीं सांपडें। आटोपली हे।।२७८।।
तैं वेळीं जैं वाढी उंसा। तैंचि आंतुलां रसां।
देहाकारु होये तैसा। प्राणियांचां।।२७९।।
आतां तेयांचि प्राणियां। रूप करूं धनंजया।
घडिलें जैं आसुरियां। दोखवृद्धी।।२८०।।

"जसा वाद्याशिवाय नाद होत नाही; पुष्पाशिवाय सुवास येत नाही; तशीच देहाचा आश्रय केल्याशिवाय ही ***आसुरी प्रकृति*** आपले गुण दाखवू शकत नाही. लाकडाच्या साहाय्याने अग्नी जसा प्रकटतो, त्याचप्रमाणे प्राणिदेहाच्या संसर्गाने ती प्रकृति प्रकटते. आतील रस व ऊस ही जशी एकाच आकारानी वाढत जातात, त्याप्रमाणेच आसुरी प्रवृत्ति व तिने आश्रय केलेला प्राणिदेह ही दोन्ही एकाच स्पंदाने स्फुरतात. अशा आसुरी संपदेने पोसलेल्या व आसुरी दोषांच्या वृद्धीस कारण होणाऱ्या प्राण्यांची आता लक्षणे पाहू या."

आसुरी अवगुण::::

आसुरी दोष

यांप्रमाणे ज्ञानदेवांचा आसुरी संपददोषांबद्दल पुढील उहापोह सुरू होतो. श्रीगोपालांनी म्हटलेल्या :

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते।।१६-७।।

या श्लोकावर भाष्य करतांना ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं पुण्यालागीं प्रवृत्ति। कां पापाविखीं निवृत्ति।
या जाणणेयाची राती। तेयांचें मन।।१६-२८१।।
निगणेयां आणि प्रवेशा। चित्त नेदितु आवेशा।
कोषकीटु जैसा। जाचिन्नला पैं।।२८२।।
कां दिधलें मागुती येईल। कीं नये हे पुढील।
न पाहातां दे भांडवल। मूर्ख चोरां।।२८३।।
तैसियां प्रवृत्ति निवृत्ति दोनीं। नेणिजती आसुरी जनीं।
आणि शुचित्व स्वप्नीं। न देखती तैं।।२८४।।

"पुण्याविषयी प्रवृत्ती असावी अथवा पापापासून निवृत्त व्हावे, हे जाणण्याचा प्रकाश त्यांच्या मनात कधीच पडत नाही. कोशकीटक जसा प्रवेशद्वार व निर्गमद्वार न ठेवताच आपला कोश विणण्याच्या नादात त्यात बंदिस्त होऊन जातो, त्याप्रमाणे प्रवृत्ति व निवृत्ति न जाणणारे आसुर जन अज्ञानांधकारात गडप होतात. त्यांना स्वप्नातही शुचित्वाचा स्पर्शसुद्धा होत नाही."

कालीमा सांडील कोलसा। वरी चोखी होईल वायसा।
राक्षसही मांसा। विटो शके।।१६-२८५।।
परि आसुरियां प्राणियां। शौच नाहीं धनंजया।
पवित्रत्व जेवीं भांडियां। मद्याचियां।।२८६।।
वाढविती विधीची आंस। कां पाहाती वडिलांची वास।
आचाराची भाष। नेणतीचि तैं।।२८७।।

"कोळसा एकवेळ काळेपणा टाकेल; कावळा पांढराशुभ्र होईल; राक्षसालाही मांसाचा कंटाळा येऊ शकेल; परंतु मद्याच्या पात्रास जसे पावित्र्य कदापिही स्पर्श करणार नाही, तसेच आसुरी प्रवृत्तीच्या माणसांना शुचित्व येणे शक्य नाही. धर्मशास्त्राने घालून दिलेल्या आचाराच्या मर्यादा न जाणणारे ते मूढ, वडीलधाऱ्यांच्या उत्तम आचरणाचे अनुकरण करतील हे तर संभवतच नाही; तर त्यांच्या आचरणाने शास्त्रोक्त विधींचा गौरव उंचावेल अशी आशा कशी बाळगता येईल!

जैसें चरणें शेलियाचें। कां धांवणें वारियाचें।
जालणें आगीचें। भलतेउतें।।१६-२८८।।
तैसें पुढां सूनि स्वैर। आचरिती तैं आसुर।
सत्येंसि वैर। सदाचि तेयां।।२८९।।

"शेळी जशी समोर जो काही पानोराझाडोरा येईल तो विचार न करता चरत जाते; किंवा वारा जसा वाट फुटेल तसा वेडावाकडा धावत जातो व अग्नी जसा वाटेत येईल ते ते जाळत सुटतो; त्याप्रमाणेच स्वेच्छेनुसार आचरण करणाऱ्या त्या आसुरांचे वागणे स्वच्छंदी असते; स्वैर असते आणि सत्याशी म्हणजे आत्मज्ञानाशी त्यांचे सदाचेच वैर असते."

जऱ्हीं नांगियां आपुलियां। विंचू करी गुतकुलियां।
तऱ्हीं सांचां बोलियां। बोलती तैं।।१६-२९०।।
अपानाचेनि तोंडें। जऱ्हीं सुगंधा येणें घडे।
तऱ्हीं सत्य तेयां जोडे। आसुरांतैं।।२९१।।
ऐसें तैं न करिती काईं। आंगेंचि वोखटें पाही।
आतां बोलती तैं नवाई। सांघिजैल।।२९२।।
एऱ्हवीं करेयांचां ठायीं चांग। तैं तेयासि कैंचें नीट आंग।
तैसा आसुरांचा प्रसंग। प्रसंगें परिस।।२९३।।
उधवणीचें जेवीं तोंड। उगलीं धुंवाचें उभड।
हे जाणिजैं तेवीं उघड। सांगो तैं बोल।।२९४।।

"विंचवाच्या नांगीने जर डंखाऐवजी गुदगुल्या होतील; तरच ते आसुर सत्याला मानतील. अपानद्वाराने सरणाऱ्या वायूस सुगंध जसा येऊ शकत नाही, तद्वतच त्या आसुरांना सत्य प्राप्ती कधीच होऊ शकत नाही. त्यांना सत्याची काहीच चाड नसते. कारण ते सर्वथा अमंगळ असतात. आणि वरती त्यांचे विचार कसे असतात, ते सांगतो पहा. ज्याप्रमाणे उंटाचे सर्वच अंग वेडेवाकडे असते, तसेच त्या आसुरांच्या विचारसरणीचे असते. तिच्यात सरलत्व अजिबात सापडत नाही. धुराड्याचे तोंड जसे काळेकुट्ट असतेच, वर ते सतत काळाकुट्ट धूर पण ओकत असते; तसेच त्या मूर्ख आसुरांचे मूर्खत्वाचे प्रलाप असतात. ते मी सांगतो; तू ऐक."

आसुरी विचारसरणी

यांप्रमाणे आसुरांचे तत्त्वज्ञान *(???)*, खरे तर विचारसरणी सांगतांना गीता म्हणतेः

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम्।
अपरस्परसम्भूतं किमन्यत्काहैतुकम्।।१६-८।।

"हे जग असत्य, धर्माधर्मव्यवस्थारहित आहे; ते ईश्वररहित आहे; ते काममूलक व स्त्रीपुरुषांच्या परस्परसंयोगाने उत्पन्न होणारे आहे; दुसरे काय!"असे ते म्हणतात.

थोडक्यात सांगायचे तर अर्वाचीन विषयोपभोगवाद्यांची *(Materialists)* व प्राचीन चार्वाकवाद्यांची *(लोकायतांची)* ***"ऋणं कृत्वा घृतं पिबेत्। यावज्जीवं सुखं जीवेत्।।"*** अशा ज्या विचारसरण्या होत, त्यांचे उत्कृष्ट प्रतिबिंबच आसुरी प्रवृत्तीच्या लोकाचारात अन विचारात आढळते.

श्रीज्ञानदेव आसुरी संपत्तीचे केवळ वर्णन करूनच थांबत नाहीत; तर त्या आसुरांच्या विचारसरणीचे निकृष्टत्व पटवून देण्यासाठी, तसेच साधकांनी त्या मोहमय तमापासून सर्वथैव दूर राहावे हे बिंबवण्यासाठी, हे सर्व वर्णन विस्तारपूर्वक करत आहेत. आता ते वरील श्लोकाबाबत काय काय म्हणतात, ते पाहू या:

तऱ्हीं विश्व हा अनादि ठाओ। एथ नियंता ईश्वरराओ।
चावडियें न्याओ अन्याओ। निवडु वेदु।।१६-२९५।।
वेदीं अन्यायीं पडें। तो निरयभोगें दंडे।
संन्यासी तो सुरवाडें। स्वर्गी जिये।।२९६।।
ऐसीं हे विश्वव्यवस्था। अनादि जैं पार्था।
इयेंतैं म्हणती तैं वृथा। आघवेंचि हे।।२९७।।
यज्ञमूढ ठाकलें यागीं। देवपिसें प्रतिमालिंगीं।
नागविलें भगवें योगी। समाधिभ्रमें।।२९८।।

आसुर काय म्हणतात, ते पाहा: "विश्व अनादी असून त्याचा नियंता कोणी ईश्वर आहे व तो वेदाज्ञेद्वारे अनुशासन चालवतो; वेदबाह्य वर्तनास नरक अन वेदविहित आचरणास स्वर्ग जोडतो अशी जी अनादी विश्वव्यवस्था आहे; असे म्हणतात, ते सर्व काही थोतांड आहे. यज्ञावर श्रद्धा असणारे मूढ असून ते यज्ञकर्मांच्या फलांच्या खोट्या भ्रमाने ठकवले गेले आहेत. तसेच देवपूजा करणारे, मूर्ती व लिंगार्चना करणारे पिसेच होत. समाधीचा भ्रम होणारे योगी व संन्यासी व्यर्थच संसारातील सुख भोगणे सोडून नागवले गेले आहेत."

तेथ आपुलेनि बलें। भोगिजे जैं जैं वेंटालें।
हेवांचूनि कैं वेगळें। पुण्य आहे।।१६-२९९।।
ना अशक्तपणें आंगिकें। वेगलवेंटालीं न टके।
ऐसा गादिजे वीण विषयसुखें। तैंचि पाप।।३००।।

त्या आसुरांचे असे म्हणणे आहे की: "आपल्या सामर्थ्याने जे जे उत्कृष्ट ऐहिक सुखोपभोग भोगता येतात, त्यांवाचून वेगळे पुण्य व पुण्यफल ते कोणते असणार! दुर्बलाला विषयोपभोग प्राप्त करून घेता येत नाहीत व त्याची त्यांवाचून जी तगमग होते, तेच पापाचे फळ नाही कां!"

म्हणजेच सामर्थ्य ही पुण्याई व देहाची वा मनाची दुर्बलता हेच पापफल असल्याचे ते मानतात. पुढे ते असेही म्हणतात की:"

प्राण घेती संपन्नांचे। तैं पाप जऱ्हीं सांचें।
तऱ्हीं सर्वस्व हातां ये तेयांचें। हे पुण्यफल कीं।।१६-३०१।।

आसुरी लोक म्हणतात: "संपन्न माणसांचे जीव घेऊन त्यांचे सर्वस्व लुबाडणे हे जर खरोखरीच पापकर्म असते, तर त्यांची संपत्ती लुबाडणाऱ्यांच्या हाती उपभोगासाठी पडते, हे कसे बरे झाले असते! पापकर्माचे एवढे चांगले फळ इहलोकीच जर भोगायला मिळत असेल, तर ते पापच कसे असेल!"

बली अबलातैं खायें। हेचि बाधित जऱ्हीं होये।
तऱ्हीं मासयां कां न होय। निसंतान।।१६-३०२।।
आणि कुले शोधूनि दोनीं। कुमारांचें शुभलग्नीं।
मेलवीजती प्रजासाधनीं। हेतु जऱ्हीं।।३०३।।
तऱ्हीं पशुपक्ष्यादी जाती। जेयां मिती नाही संतती।
तेयां कोण प्रतिपत्तीं। विवाह केलें।।३०४।।

"बलवानाने अबलाचा घात करणे व त्याला खाणे हे जर का पापच असेल तर मोठे मासे छोट्या माशांना जिवंत गिळतात, त्यांचे नि:संतान कां होत नही! आणि उत्तम कुले शोधून शुभमुहूर्तावर वर आणि वधू यांचा विवाह जर सुप्रजननासाठीच केला जातो, तर ज्या पशुपक्ष्यादींना अमाप संतती होते, त्यांचे विवाह कोणत्या विधिविधानाने संपन्न होतात बरे!"

चोरियेंचें धन आलें। तऱ्हीं कोण्हा तैं विख जालें।
वालभें परद्वार केलें। कोढी कोण्हीं होये।।१६-३०५।।
म्हणौनि देवो गोसांवी। तो धर्माधर्मु भोगवी।
आणि परत्राचां गांवीं। करी तो भोगी।।३०६।।

"चोरीचे धन कोणाला विष होऊन मारते का! व्यभिचार करणाऱ्यांस खरेच कधी कुष्टरोग होतो का! जगात दृश्य तर वेगळेच दिसते. म्हणूनच कोणी ईश्वर म्हणून विश्वाचा नियंता आहे व तो पापपुण्याची फले स्वर्गनरकादिद्वारे जीवास मृत्युपश्चात भोगवितो, असे समजणे मूर्खपणाचेच नाही का!"

परि परत्र ना देवो। न दिसे म्हणौनि तैं वावो।
आणि कर्ता निमे मा ठाओ। भोग्यासि कवणु।।१६-३०७।।

"आणि तो ईश्वरही तर दिसत नाही; ते स्वर्गनरकलोकही दिसत नाहीत आणि हे पापपुण्य ज्याने भोगायचे तो जीवही तर देहाबरोबरच मरतो! मग ते भोग भोगण्यासाठी जीवच जर उरत नाही, तर तो नसणारा ईश्वर, नसणाऱ्या स्वर्गनरकांमध्ये जीवास इहलोकींच्या पापुण्यांचे भोग देववतो असे म्हणणे धादांत खोटेच नाही का!"

एथ उर्वशियां इंद्र सुखी। जैसा कां स्वर्गलोकीं।
तैसाचि कृमिही नरकीं। लोलुतु श्लाघें।।१६-३०८।।
म्हणौनि नरकु स्वर्गु। नव्हे पाप पुण्यभागु।
जैं दोहीं ठायीं सुखोपभोगु। कामाचाची तो।।३०९।।

ययाकारणें कामें। स्त्रीपुरुषयुग्में।
मिलती जेथ जन्में। आघवें जगु।।३१०।।

आणि ते आसुर असेही म्हणतात की: "अहो! तुमचा तो पुण्यप्रतापी इंद्र जसा स्वर्गातल्या उर्वशीला भोगून सुख घेतो, तसेच घाणीतले नारकी किडेसुद्धा स्वतःला सुखी समजत नाहीत काय! म्हणून नरक व स्वर्ग ही पापपुण्याच्या फलाने प्राप्त होतात, हे म्हणणे व्यर्थच ठरते. कारण स्वर्ग व नरक या दोन्ही ठिकाणी कामोपभोग तर सारखाच मिळतो. काम आणि विषय यांव्यतिरिक्त प्राणिमात्रांना दुसरे मोठे सुख ते काय असणार! आणि कामेच्छेने एकत्र आलेली नर आणि मादी यांची जोडी हीच सर्व जगताच्या उत्पत्तीचे कारण नव्हे काय! त्या सृजनामागे ईश्वरी हेतू आहे, असे म्हणणे म्हणजे निव्वळ भंपकपणाच नाही का!"

आणि जैं जैं अभिलाखें। स्वार्थालागीं हे पोखें।
पाहीं परस्परें द्वेखें। कामचि नाशी।।१६-३११।।
एवं कामावांचूनि कांईं। जगा मूलचि नाईं।
ऐसें बोलती पाहीं। आसुर तैं।।३१२।।
आतां असो हे किडाल। बोली न करूं पघल।
सांगतांचि सफोल। होतसे वाचा।।३१३।।

"काम हाच याप्रमाणे जग निर्मितो; त्याच्या पूर्तीसाठीच जगाची वृद्धी होते व काम संपादतांना निर्माण होणाऱ्या जीवघेण्या स्पर्धेतच प्राण्यांचा मृत्यू व जगाचा नाश होतो, हेच वस्तुतः खरे आहे! जगाचा निर्माता, पोषण करणारा व नाश करणारा कोणी कपोलकल्पित ईश्वर आहे, असे नाही; तर केवळ कामच सर्व काही करतो. याप्रमाणे कामाविना जगताचे दुसरे आदिकारण असूच शकत नाही."

ज्ञानदेव म्हणतातः "या प्रकारची अश्लाघ्य बडबड करणे, ते, ते आसुरच जाणोत! त्यांच्या त्या वर्तणुकीचे वर्णन केल्याने वाचेला श्रमच होतात. म्हणून हे वर्णन आता पुरे झाले!"

आसुरांचे वर्तन

अशी विचारसरणी असणाऱ्या आसुरांची वागणूक कशी असते, ते पुढील श्लोकात दर्शविले आहेः

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः।।१६-९।।

"अशा आसुरी दृष्टिकोनाचा अंगीकार करून ज्ञान नष्ट झालेले अल्पबुद्धी, उग्रकर्मी व जगताचे अहितकारक असे ते नष्ट आसुर जगताचाही विध्वंस करण्यास प्रवृत्त होतात."

या श्लोकावर भाष्य करतांना ज्ञानदेव म्हयणतातः

आणि ईश्वराचियां खंती। नुसधियाचि करिती चांथी।
हेही नाहीं चित्तीं। निश्चयो एकु।।१६-३१४।।
किंबहुना उघड। आंगीं भरौनियां पाखांड।
नास्तिकपणाचें हाड। रोंविलें जीवीं।।३१५।।
तैं वेळीं स्वर्गालागीं आदरु। कां नरकाचां अडदरु।
या वासनांचां अंकुरु। जळौनि गेला।।३१६।।
मग केवल ये देहखोडां। अमेध्योदकाचां बुडबुडा।
विषयपंकीं सुहाडा। बुडालें गां।।३१७।।

"आणि ईश्वराच्या अस्तित्वाविषयी निव्वळ तर्कटे रचत बसणाऱ्या त्या आसुरांच्या चित्ताचा *"ईश्वर नाहीच!"* असा दृढनिश्चय झालेला असतो. किंबहुना ते उघड उघडच नास्तिकपणाचा अंगीकार करतात व ईश्वराविषयी अनादराचा जाहीर स्वीकार करतात. अशा मनोधारणेमुळे त्यांना स्वर्गाची ईप्सा वा नरकाची श्लाघा कशी ती अजिबात उरत नाही. म्हणून विषयरूपी दलदलीतील घाणेरड्या बुडबुड्याप्रमाणे त्यांचा देह तिरस्करणीय होतो."

जैं आटावे होती जलचर। तैं डोहीं मिलती धींवर।
कां पडावें होय शरीर। तैं रोगां उदयो।।१६-३१८।।
उदैजणें केतूचें जैसें। विश्वा अनिष्टचि दोखें।
जन्मती तैं तैसें। लोकां आटु।।३१९।।
विरूढलियां अशुभ। फुटती तैं तैं कोंभ।
पापाचें कीर्त्तीस्तंभ। चालते तैं।।३२०।।
आणि मागां फुडां जालणें। वांचूनि आगी काईं नेणें।
तैसें विरूचि एक करणें। भलतेयां।।३२१।।
परि तैंचि गां करणें। आदरिती संभ्रमें जेणें।
तो आईक पार्था म्हणे। श्रीनिवासु।।३२२।।

"जसा जळचरांचा संहारसमय प्राप्त झाला की कोळी जाळे घेऊन आपोआपच डोहावर येतो; किंवा देहपात होण्याच्या समयी शरीरात रोगांचा प्रादुर्भाव होतो; विश्वाचे अनिष्ट व पापांचा सुकाळ होण्याच्या वेळीच धूमकेतूचा उदय होतो; त्याचप्रमाणे लोकांचा क्षोभ करण्यासाठीच अशा आसुरांचा जन्म होतो. अशुभाला फुटणारे कोंभच असे ते आसुर म्हणजे पापाचे चालतेबोलते कीर्तिस्तंभच म्हणा ना! ज्याप्रमाणे अग्नी सर्वत्र जे मिळेल ते जाळत सुटतो, त्याचप्रमाणे सर्वांना पीडा देणारे ते आसुर कसे वागतात ते, हे पार्था! लक्षपूर्वक ऐक."

ईश्वरप्रणिधान या क्रियेचे फल पतञ्जलींनी समाधि सांगितले आहे. तद्विरोधी ***ईश्वरद्वेष*** हाच ज्यांच्या पाचवीला पूजलेला आहे, त्या आसुरांची वर्तणूक साध्वी शांती नागविण्याचीच असणार, हे काय सांगायला हवे!

आसुरांची कामलिप्सा

भगवान श्रीकृष्ण पुढे म्हणतातः

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः।
मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः।।१६-१०।।

"दुर्भर अशा कामाचा आश्रय करून दांभिकपणा, मान व गर्व यांनी युक्त होत्साते व मोहाने दुराग्रह धरणारे ते आसुर पापकर्मात प्रवृत्त होतात."

या पापाचरणास प्रवृत्त झालेल्या आसुरांची वर्तणूक ज्ञानदेव ग्रथित करतात, ती अशीः

तऱ्हीं जाल पाणियें न भरे। आगी इंधन न पुरे।
तेयां दुर्भरांचियें धुरे। भुकालु जो।।१६-३२३।।
तेयां कामाचा वोलावा। जीवीं धरूनियां पांडवा।
दंभमानांचा मेला। मेलविती तैं।।३२४।।
मातलियां कुंजरा। आगलीं जालीं मदिरा।
तैसा मदाचां ताठा तंव जरा। चढतां आंगीं।।३२५।।

"जसे मासे धरण्याचे जाळे पाण्याने भरले जाऊ शकत नाही; कितीही इंधन घातले, तरी अग्नी सदैव अतृप्तच राहतो; त्याचप्रमाणे ***"उपभोग्येन न शम्यते"*** अशा सदैव वखवखलेल्या कामाशी जीवेभावे मैत्री करणारे ते आसुर दंभ व मानाचा डौल न मिरवतील तरच नवल! माजलेल्या हत्तीला पाजलेल्या दारूप्रमाणे त्यांच्या अंगी मदाचा ताठा चढतो व वार्धक्य एकदा आले की मागे पाऊल न घेता जसे वृद्धिंगतच होत जाते, तसा तो ताठा सतत वाढतच जातो."

आणि आग्रहां तोचि ठाओ। वरि मोळ्या ऐसा सावावो।
मग काय वानू निर्वाहो। निश्चयाचां।।१६-३२६।।
जिहीं परोपतापु घडे। परावा जीवु रगडे।
तिहीं कर्में होऊनि गाढे। जन्मवृत्ती।।३२७।।
मग आपुलें केलें फोकारिती। आणि जगातैं धिक्कारिती।
दाहीं दिशीं पसरिती। स्पृहाजाल।।३२८।।
ऐसेनि गां आटोपे। थोरियें आणिती पापें।
धर्मधेनू खुरपें। सुटलें जैसें।।३२९।।

"कामाचा असा आश्रय केल्यामुळे त्यांच्या हट्टीपणाला, दुराग्रहाला व मूर्खपणाला सीमाच नसते. त्यामुळे ते जणू दृढनिश्चय केल्याप्रमाणे दुर्वृत्त होतात. ज्या कारणे परपीडा होईल, इतर जीवांचे हाल होतील, असा दुष्ट प्रवृत्तींचा जन्मजात वारसाच जसा काही त्यांना मिळालेला असतो. त्यांच्या दुष्कृत्यांचाही त्यांना गर्व असतो. आणि जनांची काहीही लज्जा नसणारे ते दाही दिशांना आपले हावरूपी जाळे पसरतात. अशा प्रकारे ते पापी, देवाला सोडलेली गाय जशी उभी पिकेसुद्धा वाट फुटेल तशी खुरपल्यागत खाऊन फस्त करत सुटते, तसे पापकर्म करत मोकाट सुटतात."

सतत कामोपभोगांची वांच्छा करणाऱ्या त्या आसुरांबाबत गीता म्हणतेः

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः।।१६-११।।

"कामोपभोग हेच परमसुख व उद्दिष्ट मानणारे ते आसुर आमरणांत ग्रासणाऱ्या कामलिप्सेने वेडेपिसेच होऊन तो मिळवण्यासाठी सतत धडपड करतात."

यावर भाष्य करतांना ज्ञानदेव म्हणतातः

याचि एका आयती। तेयांचियां कर्मप्रवृत्ती।
आणि जिणियांही परौती। वाहती चिंता।।१६-३३०।।
पातालाहूनि निम्न। जियेचियें उंचियें सानें गगन।
जैं पाहतां त्रिभुवन। अणुही नोहें।।३३१।।
तैं योगपटाची मवणी। जीवीं यमनियम चिंतवणी।
जैं सांडू नयें मरणीं। वल्लभा ऐसीं।।३३२।।
तैसीं चिंता अपार। वाढविती निरंतर।
जीवीं सूनि असार। विषयादिक।।३३३।।

"आणि केवळ कामोपभोगांच्या मागे लागणे याच एका धारणेने त्यांच्या कर्मांचा सोस असतो. कामाभिलाषा शमवण्यासाठी ते आसुर जीवापाड प्रयत्न करतात. पाताळापेक्षाही जी सखोल व जिला गगनही ठेंगणेच भासेल; जिचा विस्तार पाहिला तर त्रिभुवनही थोकडे वाटेल; योगमार्गातील यमनियमादींचे जसे अहर्निश चिंतन व पालन करावे लागते, तशी क्षणाचाही खंड न पडणारी व पत्नी जशी पतीचा देह पडला तरी त्याला सोडणे जाणत नाही, तशी मृत्यूनंतरही सोडून न जाणारी कामोपभोगांची परम लालसा व असार विषयांची अहर्निश विवंचना ते आसुर वाहतात."

आसुरांचे स्त्रीलोलुप्य

स्त्रियां गाईलें आईकावें। स्त्रीरूप डोलां देखावें।
सर्वेंद्रियें आलिंगावें। स्त्रियेतेंचि।।१६-३३४।।
कुरवंडी कीजे अमृतें। ऐसें सुख स्त्रियेपरौतें।
नाहींचि म्हणौनि चित्तें। निश्चयो केला।।३३५।।
मग तेयां स्त्रीभोगा-। लागीं पातालस्वर्गा।
धावती दिग्विभागा-। परौतेही।।३३६।।

"स्त्रियांचे गायन ऐकावे; स्त्रियांना डोळे भरून पाहावे; त्यांना सतत निरखत राहावे; सर्व इंद्रियांनी स्त्रियांना आलिंगन द्यावे; स्त्रीसुखापुढे अमृतही लाजेल; असा त्यांच्या चित्ताचा निश्चयच झालेला असतो. आणि असे अनुपम स्त्रीसुख व स्त्रियांचा भोग आपल्याला मिळावा या इच्छेने ते आसुर स्वर्ग, पाताळ व त्यांच्याही पलीकडे दशदिशांना धाव घेतात."

आसुरांचे अर्थोपार्जन

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः।
ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान्।।१६-१२।।

"शतशः आशापाशांनी जखडलेले व कामक्रोधांचा पगडा बसलेले असे ते आसुर आपली कामलिप्सा तृप्त करण्यासाठी वाटेल त्या मार्गाने द्रव्यसंचय करण्यास प्रवृत्त होतात."

ज्ञानेश सांगतातः

आमिषकवलु थोरी आशा। न विचारितां गिली मासा।
तैसें कीजे विषयाशा। तेयांसी गां।।१६-३३७।।

वांछित तंव न पवती। मग कोरडियेचि आशेचे संतती।
वाढऊं वाढऊं होती। कोशकीडे।।३३८।।
आणि पसरला अभिलाखु। अपूर्णु होये तोचि द्वेखु।
एवं कामक्रोधाहूनि अधिकु। पुरुषार्थु नाही।।३३९।।

"आमिषाला भुललेला मासा जसा विचार न करता गळात अडकतो; तसेच विषयाभिलाषेने त्या आसुरांचे होते. कोश विणणारा रेशीमकीडा जसा त्या कोशातच गुरफटून राहतो, त्याप्रमाणे वांछित कामोपभोग प्राप्त न झाल्यास ते आसुरी लोक आपल्याच अतृप्त वासनांच्या गुंफलेल्या कोशात कोंडले जातात. त्यांच्या वाढत्या अभिलाषांची तृप्ती होत नसल्याने त्यांना द्वेषभावना ग्रासते व त्यातूनच कामक्रोधांची वाढ होत असते. त्या कामोर्मी व क्रोधोर्मींच्या पोटीं वाटेल ती कृत्ये करणे, या पलीकडे त्यांना दुसरा पुरुषार्थच उरत नाहीं"

दिहा खोलणें रातीं जागोवा। ठाणांतरियां जैसा पांडवा।
अहोरात्रींहीं विसांवा। भेटेचिना।।१६-३४०।।
तैसें उंचौनि लोटिलें कामें। नेहटती क्रोधाचियें ढेमें।
तऱ्हीं रागद्वेष प्रेमें। न माती केंहीं।।३४१।।

"अर्जुना! दिवसा अंगरक्षक म्हणून वावरणाऱ्या व रात्री जागता पहारा करणाऱ्या शिपायास जसा कधीही विसावा नसतो व स्वस्थताही मिळत नाही, त्याप्रमाणे कामाच्या वखवखलेल्या लाटेवर उंचावलेल्या व क्रोधाच्या खडकावर सतत फेकले जाऊन आपटणाऱ्या त्यांच्या चित्ताला रागद्वेष सतत ग्रासत असल्याने प्रेम व शांतीचा आनंद कसा तो मिळतच नाही."

तेवींचि जीवींचियां हांवा। विषयवासनांचा मेलावा।
केला परि तो भोगावा। अर्थे कीं ना।।१६-३४२।।
म्हणौनि भोगावेयाजोगा। पुरता अर्थ पैं गां।
आणावेयां जगा। झोंबती सैरा।।३४३।।
एकातैं साधूनि मारिती। एकाचें सर्वस्व हारिती।
एकालागीं उभारिती। अपाययंत्रें।।३४४।।

"चित्तात कामोपभोगांची अतीव आसक्ती धरल्याने ती पूर्ण करावयाची तर धन तर पाहिजे ना! म्हणून विषयवासना पूर्ण व्हाव्यात यासाठी पैकापैका गोळा करण्यासाठी ते जगाला लुबाडत सुटतात. तसे करतांना ते कोणाला संधी साधून ठार करतात; तर कोणाचे सर्वस्व पळवून नेतात; तर कोणासाठी घातकी योजना आखतात."

पाशिकें पोतीं वागुरा। सुणी ससाणे चिकाटी खोंचरा।
घेऊनि निघती डोंगरा। पारधी जैसें।।१६-३४५।।
तैं पोसावेयां पोट। मारूनि प्राणियांचें संघाट।
आणिती ऐसें निकृष्ट। तैहीं करिती।।३४६।।
परप्राणघातें। मेलविती वित्तें।
मिनलियां चित्तें। तोषणें कैसें।।३४७।।

"फासे, पोती, जाळी, कुत्री, ससाणे, चिमटे, भाले इ.घेऊन पशुपक्षी पकडण्यासाठी जसे पारधी डोंगरदऱ्या, रानेवने पालथी घालतात व परततांना जसे प्राण्यांचे समुदाय मारून आणून उपजीविका करतात; तेवढीच नीच कृत्ये ते आसुरी प्रकृतीचे लोक सरसकट करत असतात. दुसऱ्यांच्या प्राणांचाही घात करून ते द्रव्योपार्जन करतात व त्यायोगे मिळणारे धन त्यांच्या चित्ताला किती संतोषवते, पाहा."

आसुरी मनोरथांचे जाळे

त्यांना वाटते:

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम्।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम्।।१६-१३।।

"मी आज हे मिळवले; उद्या अधिक मिळवीन! आतापावेतो मी इतके धन गोळा केले आहे आणि पुढेसुद्धा मी याहून किती तरी अधिक धनद्रव्य गोळा करीन," असे मनोरथ ते सतत करत असतात.

संपूर्ण विश्वातील धनसंपत्तीच्या हावेने आसुसलेल्या त्या आसुरांबाबात ज्ञानदेव म्हणतात:

म्हणे आजि मियां। संपत्ति बहुतेकांचियां।
आपुलां हातीं केलियां। धन्यु ना मी।।१६-३४८।।
ऐसा श्लाघो जंव जाये। तंव मनीं आणिकही वाहे।
सवेंचि म्हणे पाहे। आणिकांचेही आणू।।३४९।।
हे जेतुलें असे जोडिलें। तेयाचेनि भांडवलें।
लाभा घेईन उरलें। चराचर।।३५०।।
ऐसेनि धना विश्वाचियां। मीचि होईन स्वामियां।
मग दिठी पडे तेयां। उरो नेदी।।३५१।।

तो म्हणतो:"बहुतेकांचे द्रव्य मी हस्तगत केले आहे. माझ्यासारखा धन्य मीच!" अशी धन्यता मानतांना त्याला वाटते की "आता मी इतरांचेही धन जिंकून घेईन आणि हे एवढे सगळे मिळवले की त्या धनसंपदेच्या जोरावर संपूर्ण विश्वच पादाक्रांत करून त्यातील सगळ्या धनद्रव्याचा स्वामी मी एकटाच होईन. आणि ज्याच्या ज्याच्यावर माझी दृष्टी जाईल ते ते माझ्या अंकित करून घेईन."

संतांची दृष्टी

अशा रीतीने हावेने ग्रासलेल्या त्या आसुरांची दृष्टी हपापलेली असते व ज्याच्यावर ती पडते, त्याचा विनाश मात्र लिहिलेला असतो. याउलट संतांची दृष्टी म्हणजे ***"हे असो दिठी जेयावरी झळके। कीं हा पद्मकरु माथां पारुखे। तो जीवुचि परि तुके। महेशेंसीं।।१०-९।।"*** अशी कृपापूर्ण असते. संतसज्जन - दैवी गुणसंपत्तिमान व तद्विरोधी आसुर, दुष्ट, खलांचे जे वर्णन ज्ञानेश्वर करू शकतात, ते खरोखरच कौतुकास्पद नाही कां!

आसुरी अहंकार

त्या आसुरांना काय वाटते, ते पाहा:

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी।।१६-१४।।

"हा माझा शत्रू मी मारला; इतरही शत्रूंना मी ठार मारीन! माझ्यासारखा उपभोगांचा लाभ कोणालाही मिळत नाही; मीच सामर्थ्यशाली आहे! माझ्यासारखा सुखी कोणी तरी आहे काय! मीच खरा ईश्वर आहे!"

ज्ञानदेव म्हणतातः

हे मारिलें तैं वर थोडें। आणीकही साधीन गाढे।
मग नांदेन पवाडें। एकलाचि मी।।१६-३५२।।
माझीं होतील कामारीं। तियेवांचूनि एरें मारीं।
किंबहुना चराचरीं। ईश्वरु तो मी।।३५३।।
मी भोगभूमीचा राओ। आणि सर्वसुखासीं ठाओ।
म्हणूनि इंदुही वावो। मातें पाहूनि।।३५४।।

"आतापर्यंत मी थोडेच शत्रू मारले म्हणा! अजूनही मोठे मोठे बलवान शत्रू मी ठार करीन व नंतर अखिल विश्वात मी एकटाच महान ऐश्वर्यशाली होऊन सुखाने राहीन. जे माझी आज्ञा मानतील व दासानुदास होतील, तेवढे सगळे सोडून इतर सर्व लोक मी ठार मारीन. सर्व चराचराला व्यापणारा ईश्वर तो मीच आहे; मी समस्त उपभोग घेणारा सम्राट आहे; माझ्याठायीच समस्त सुख व ऐश्वर्य यांचा संगम झाला असल्याने चंद्रसुद्धा मला पाहून काळवंडून जाईल."

मी मने वाचा देहें। करी तैं कैसें नोहे।
कैं मजवांचूनि आहे। आज्ञासिद्ध आन।।१६-३५५।।
तंवचि बलिया कालु। जंव न दिसे मी अतुर्बलु।
सुखाचा कीर निखलु। रासिवा मी।।३५६।।

"मन, वाचा व देह यांद्वारे मी जे जे काही इच्छेन, सांगेन व करीन ते ते सगळे फलद्रूप झालेच पाहिजे - कारण माझ्यावाचून इतर कोणाची आज्ञा या चराचर सृष्टीवर चालते का! माझ्यासारख्या अतुल बलशाली नरशार्दूलाची जोवर गाठ पडत नाही, तोवरच काळाची महत्ता आहे. एकदा माझ्यासमोर उभा केला की प्रत्यक्ष काळाचाही थरकाप उडेल! असा सर्व प्रकारे यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यशाली व सुखोपभोग घेणारा माझ्यासारखा कोणीही पूर्वी झाला नाही अन पुढेही होणार नाही."

अशी दर्पोक्ती वाहाणाऱ्या आसुरांना वाटते कीः

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः।।१६-१५।।

"मी मोठा धनवान आहे; थोर कुलातील आहे;माझ्यासारखा दुसरा कोण आहे बरे! मी अनेक उत्तमोत्तम यज्ञ करीन; दाने देईन व मजेत आमोदप्रमोद करीन," अशा अज्ञानाने ते आसुर मोहित झालेले असतात.

यावर ज्ञानदेव म्हणतातः

कुबेरु आथिला होये। परि तो नेणें माझी सोयें।
संपत्ती मजसम नोहे। श्रीनाथाहीं।।१६-३५७।।
माझियां कुलींचां उजालू। कां जातिगोतांचां मेलु।
पाहातां ब्रह्माही हलुं। उणाचि दिसे।।३५८।।
म्हणोनि मिरविती नांवें। वायां ईश्वरादि आघवें।
नाईं मजसि सरी पावे। ऐसें कोण्हीं।।३५९।।
आतां लोपला अभिचारु। त्याचा करीन मी जीर्णोद्धारु।
प्रतिष्ठीन परमारु। यागावेरी।।३६०।।

"कुबेर ऐश्वर्यवान आाहे; पण माझी सर त्याला नाही! लक्ष्मीपती भगवानसुद्धा संपत्तीच्या बाबतीत माझ्याहून उणाच आहे! माझ्या उच्च कुळापुढे आणि मोठमोठ्या नावाजलेल्या नात्यांपुढे ब्रह्मदेवाचे मोठेपण अन श्रेष्ठता पासंगालाही पुरणार नाही. उगाचच त्यांची नावे वाखाणली जातात. खरे तर माझ्यासारखे श्रेष्ठ कोणीच नाही. आता सध्या अभिचार, तंत्रशास्त्रे लोप पावली आहेत. अभिमंत्रण प्रयोगांनी संपन्न करावयाचे यागही नष्टच झाले आहेत. त्या सर्वांचा मी जीर्णोद्धार करून त्या परंपरा पुनः प्रतिष्ठीन. "

मातें गाती वानिती। नटनाचें रिझविती।
तेयां देईन मागती। तैं तैं वस्तु।।१६-३६१।।
माजिरां अन्नपानीं। प्रमदांचां आलिंगनीं।
मी होईन त्रिभुवनीं। आनंदाकारु।।३६२।।

"माझे गुणगान करणारे, माझ्यावर स्तुतिसुमने उधळणारे, माझे भाट होऊन जे राहतीलः मला नृत्यगायनाने व आंगोपांगांची दर्शने देऊन ज्या प्रमदा रिझवतील, त्या सर्वांना जे जे पाहिजे असेल, ते ते मी देईन. धुंद करणाऱ्या अन्नपेयांनी व मत्त स्त्रियांच्या आलिंगनांनी बेहोष होणाऱ्या माझी जगातील आनंदमूर्ती अशी त्रिभुवनात कीर्ती गाजेल."

काय बहु सांगों ऐसें। तैं आसुरप्रकृतिपिसें।
तुरंबिती असोसें। गगनिलें तियें।।१६-३६३।।

"फार काय सांगावे! आसुरी प्रकृतीच्या उन्मादाने वेडेपिसे होऊन ते आसुर असे मनोरथांच्या डोलाऱ्यात मग्न होतात. आणि जे कधीच असू शकत नाही, अशा आकाशपुष्पाचा सुवास घेण्याचा व्यर्थ ध्यास घेण्यात दंग होऊन बसतात."

आसुरांचे नरकगामित्व

अशा नाना आसुरी प्रकृतिविभ्रमांनी संमोहित झालेल्या त्या आसुरांची काय गती होते, पाहाः

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ।।१६-१६।।

"अशा अनेकानेक प्रकारे भ्रमित चित्त झालेले व प्रकृतीच्या मोहरूपी जाळ्यात फसलेले, तसेच कामोपभोगात अत्यंत आसक्त झालेले ते अज्ञानी आसुर महा अपवित्र अशा नरकात पडतात." आणि नंतरच्या १६-१९ या गीताश्लोकात सांगितल्याप्रमाणे भगवान त्यांना कायमच घोर अशा आसुरी योनीत ढकलून देतात.

नरकगामी अशा त्या आसुरांबद्दल ज्ञानदेव काय म्हणतात, पाहाः

ज्वराचेनि आटोपें। रोगी भलतैसें जल्पें।
चावलती संकल्पें। जाण तैं तैसें।।१६-३६४।।
अज्ञान आंतुलें धुली। म्हणौनि आशा वाहुटली।
भोवंडिजती अंतरालीं। मनोरथांचां।।३६५।।
अनियम आषाढमेघ। कां समुद्रोर्मि अभंग।
तैसें कामिती अनेग। अखंड काम।।३६६।।

"ज्वर चढलेला रोगी जसा काहीबाही बरळत सुटतो, तसे ते आसुरीसंपदाग्रस्त लोक अखंड स्वैर मनोरथ चालवतात. वाटेल ते कामसंकल्प सतत केल्याने अज्ञानाची जणू धूळच त्यांच्या मनोरथांच्या अंतराळात सदा भोवंडत असते व तिच्या भोवऱ्यात त्यांचे चित्त सदाचेच अडकलेले असते. आषाढातले मेघ जसे वाटेल तेवढे सारखे बरसतात; किंवा समुद्राच्या लाटा जशा वाटेल तशा सतत येतजात असतात; त्याप्रमाणे ते आसुरी स्वभावाचे लोक अखंड अनेकानेक कामेच्छा करत सुटतात."

मग पैं कामनाचि तेयां। जीवीं जाल्या वेलरियां।
वोरपिलीं कांटियां। कमलें जैसीं।।१६-३६७।।
मग पाहाडाचियां माथां। हांडी फुटली पार्था।
जीवीं तैसें सर्वथा। कुटकें जालें।।३६८।।
तेधवां चढतिये रजनी। तमाचीं होएं पुरवणी।
तैसें मोहो अंतःकरणी। वाढोचि लागे।।३६९।।

"मग त्या कामनांच्या वेलीरूपी जाळ्यांवरची त्यांची अंतःकरणरूपी कमळे आशानिराशेच्या काट्यांवरून खेचली जाऊन चिरफाडली जातात; किंवा दगडावर माठ आपटून त्याच्या जशा ठिकऱ्याठिकऱ्या व्हाव्यात, तसे अशा निराशेच्या खडकावर आपटून त्यांच्या कामोर्मीग्रस्त अंतःकरणाचे शतशः तुकडे होतात. जशी निशा वाढत जाते, तशी तमाची चढती कमान असते; त्याचप्रमाणे कामेच्छा प्रबल व्हायला लागल्या की अंतःकरणात मोह वाढीला लागतो."

आणि जंव जंव वाढे मोहो। तंव तंव विषयीं आरोहो।
विषय तेथ ठाओ। पातकांसीं।।१६-३७०।।
पापें आपुलेनि थांवें। जंव करिती मेलावे।
तंव जितांचि आघवें। येती नरकीं।।३७१।।
म्हणौनि गां सुमती। जैं कुमनोरथां पालिती।
तैं आसुर येती वस्ती। तेयां ठायां।।३७२।।

"आणि जसजसा अंतःकरणातील मोह वाढीला लागतो, तसतसे विषय तेथे ठाण मांडून बसतात. अन् विषयवासना म्हणजे पापाचे वसतिस्थानच! पापे जशी एकवटू लागतात, तसा जिवंतपणीच नरक भोगावा लागतो, म्हणेनास! नरकरूपाने समस्त दुःखेच त्या माणसाच्यावर लोटतात. म्हणून हे सुमती अर्जुना! कुवासनांना आश्रय देणारे ते आसुर घोर अशा नरकात पतन पावतात."

जेथ असिपत्रतरुवरु। खदिरांगाराचें डोंगरु।
तापलां तेलीं सागरु। उततातीं।।३७३।।
जेथ यातनांची श्रेणी। हे नित्य नवी यमजाचणी।
पडती तियें दारुणींच। नरकलोकीं।।३७४।।

"त्या नरकात तलवारीच्या तीक्ष्ण पात्यांची पाने असलेली झाडे असतात; खैराच्या जळजळीत निखाऱ्यांचे डोंगर असतात; अन तापलेल्या तेलाचे सागर उसळत असतात. ज्या ठिकाणी यातनांच्या नित्य नव्या जाचण्या यमराज भोगवीत असतो; अशा त्या दारुण नरकलोकातील यातना याच जन्मी जिवंतपणी भोगाव्या लागतात. म्हणूनच ***"आशा व्याली दुरितांतैं"*** या उक्तीप्रमाणे कामोपभोगांना परम मानणारे ते आसुर नरकगामी होतात."

आसुरी उपासनाः:::

दांभिकता

ऐसें नरकाचियें सेले। भागीन जैं जन्मलें।
तेही देखो भुललें। यजिती यागीं।।१६-३७५।।
एऱ्हवीं यागादिक क्रिया। लाहणें तैंचि धनंजया।
परि विफलती आचरौनियां। नाटकी जैसा।।३७६।।
वल्लभाचियां उजरिया। आपणयां पति कुस्त्रिया।
जोडौनि तोषती जैसियां। आहेवपणें।।३७७।।

"नरकाचाच केवळ आश्रय असणाऱ्या अशा त्या आसुरांनी केलेल्या यज्ञयागांविषयी काय सांगावे! दंभ व माज यांच्यासाठीच केवळ आसक्त होऊन ते यज्ञयागादी क्रिया करतांना दिसतात. खरे तर यज्ञयाग याच खऱ्या वांछनीय क्रिया आहेत. परंतु नाटकी स्वभावाचे ते आसुर त्या दंभपूर्वक करतात व त्यांचे यज्ञयागसुद्धा निष्फळ होतात. वेश्या जशा गिऱ्हाईकाला पति मानून तोषतात व अखंड सौभाग्यवती म्हणून अभिमानाने मिरवतात, त्याप्रमाणे कामवासनांचा स्वीकार करून केलेले त्या आसुरांचे यज्ञ लटकेच होत."

आसुरी यज्ञप्रकार

अशा आसुरांचा यज्ञप्रकार कसा असतो, हे सांगतांना भगवान श्रीकृष्ण म्हणतातः

आत्मसम्भाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः।
यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्।।१६-१७।।

"ते आपणालाच श्रेष्ठ मानणारे अहंमन्य घमेंडखोर आसुर धनमदाने, मानाने उन्मत्त होऊन शास्त्रविधिविहीन असा केवळ नावाचा व देखाव्यापुरता यज्ञ पाखंडीपणे करतात."

याचे वर्णन ज्ञानदेव असे करतातः

तैसें आपणयां आपण। मानितां महंतपण।
फुगती असाधारण। गर्वें तेणें।।१६-३७८।।
मग लवो नेणती कैसें। आटिवा लोहाचें खांब जैसें।
कां उधवलें आकाशीं। शिलारासी।।३७९।।

तैसें आपुलियें बरवें। आपणांचि रिझतां जीवें।
तृणाहूनही आघवें। मानिती नीच।।३८०।।

"आणि आपण कोणी मोठे धार्मिक आहोत, असा बडेजाव करून ते आसुर गर्वाने फुगून जातात, ते इतके की ओतीव लोहस्तंभ किंवा आकाशाशी भिडू पाहणाऱ्या पर्वताप्रमाणेच ते नम्र होणे जाणत नाहीत. स्वतःच्या अहंमन्यतेने सुखी झालेले ते प्राणी इतर सर्वांना कस्पटाप्रमाणे लेखतात."

वरी धनाचियां मदिरा। माजूनि धनुर्धरा।
कृत्याकृत्यविचारां। सवतें केलें।।१६-३८१।।
आंगीं आयती ऐसीं। तेथ यज्ञाची गोठ कायसी।
तऱ्हीं काय काय पिसीं। न करिती गां।।३८२।।

"आणि धनद्रव्याची धुंदी चढल्याने उन्मत्त झालेल्या त्या आसुरांना कृत्याकृत्यविवेक, बरेवाईट इ.चा विचार शिवत नाही. मदमोहगर्वाभिमानाने दृष्ट झालेल्या अशांकडून यज्ञ होईल हे संभवनीय तरी आहे का! पण अंगी पिसे भरले की माणसे काय करत नाहीत!"

म्हणौनि कोण्हें एकें वेलें। मौढ्यमद्याचेनि बलें।
यागाचिही टवाली। आदरिती।।१६-३८३।।
ना कुंड मंडप वेदी। ना उचित साधनसमृद्धी।
आणि तेयांसीं तंव विधि। द्वंद्वचि सदा।।३८४।।
देवां ब्रह्मणांचेनि नांवें। आडवारेनही नोहावें।
ऐसें आथी तेथ यावें। लागे कवणा।।३८५।।

"म्हणूनच कधीकधी ते आसुर मूढतेच्या धुंदीत यज्ञ करण्याची नक्कल करतात. कुंड, मंडप व वेदीविरहित, तसेच उचित यज्ञसामग्री नसलेला आणि विधिविधानरहित असा त्यांचा यज्ञप्रकार असतो. देव आणि ब्राह्मण यांच्याशी सदाचेच वैर असणाऱ्या त्यांच्या वाऱ्यालासुद्धा ते कसे उभे राहतील!"

पैं वासरुवाचां भोंकसा। गाईपुढां ठेवूनि जैसा।
उगाणा घेती क्षीररसा। बुद्धिवंत।।१६-३८६।।
तैसें यागाचेनि नांवें। जग वाऊनि हांवें।
नागविती आघवें। अहेरावेरी।।३८७।।
ऐशा कांहीं आपुलियां। होमिती जैं उजरियां।
तेणें कामिती प्राणियां। सर्वनाशु।।३८८।।

"परंतु वासरू मेलेल्या गाईपुढे दुसरे वासरू उभे करून हिकमती लोक जसे तिच्या कासेत असलेल्या नसलेल्या सर्व दुधाचा झाडा घेतात, त्याप्रमाणे ते दांभिक आसुर यज्ञाचे निमित्त करून अहेर गोळा करण्याच्या हेतूने जगालाच लुबाडत सुटतात. केवळ स्वार्थापोटी ते जे काही अविधिपूर्वक होमहवन करतात, त्यातसुद्धा इतरांच्या सर्वनाशाचाच संकल्प त्यांनी सोडलेला असतो."

आसुरांचा ईश्वरविद्वेष

स्वतःच्या व इतर प्राणिमात्रांच्या रूपाने नटलेला अंतर्यामी जो आत्मा असतो, त्याला कष्ट पोहोचवणाऱ्या त्या आसुरांची वृत्ती प्रकट करतांना श्रीगोपालकृष्ण सांगतातः

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः।।१६-१८।।

"अहंकार, बल, दर्प, कामना आणि क्रोधादींना थारा देणारे ते आसुर आपल्या व इतर प्राणिमात्रांच्या देहांस व्यापून असणाऱ्या मज अंतर्यामीचा द्वेष व निंदा करणारे असतात."

अहंकारादी वृत्तींना थारा देणाऱ्या व परमात्म्याचा द्वेष व निंदा करणाऱ्यांना यज्ञाचे पवित्र फल कधीच प्राप्त होत नाही. एवढेच काय तर हे सर्व अवगुण म्हणजे त्यांच्या परमात्मप्राप्तीच्या मार्गातील आसुरी संपदारूप धोंडच आहे. अशा पुरुषांना गीताशास्त्र सांगू नये, या अर्थाचे मधुसूदनाचे गीतेतील वाक्य पाहाः

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति।।१८-६७।।

अतपस्वी, अभक्त, ज्यांना गीताशास्त्राविषयी आस्था नाही वा जे ईश्वराची असूया करतात, त्यांना हे शास्त्र सांगू नये, असे भगवंत सांगतात.

अहंकारादी अवगुणांपासून निवृत्त होणाऱ्या उदात्त पुरुषाबद्दल गीता सांगतेः

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते।।१८-५३।।

"अहंकार, बल, घमेंड, काम, क्रोध व परिग्रह म्हणजे अर्थसंचयादी यांचा त्याग करून ममतारहित व शांत अंतःकरणाचा पुरुष सच्चिदानंदघन ब्रह्मात ऐक्य पावण्यास पात्र होतो." असो.

आसुरी गुणप्राबल्य

आसुरांचे अविधिपूर्वक केलेले यजनयाजन व त्यांचा प्राणिमात्रांशी असलेला उपजत वैरभाव यांचे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातःमग

फुडां भेरी निशाण। लाऊनि तैं दीक्षितपण।
जागीं फोकारती आपण। वावो वावो।।१६-३८९।।
तेव्हां महत्त्वें तेणें अधमां। गर्वा चढे महिमा।
जैसें लेवें दिधलें तमा। काजलाचें।।३९०।।
तैसें मौढ्य घणावें। औद्धत्य उंचावें।
अहंकारु दुणावें। अविवेककुहीं।।३९१।।
मग दुजेयांचि भाख। नुरवावयां निःशेख।
बलियेपण अधिक। होएं बल।।३९२।।
ऐसा अहंकारबलां। जालियां एक वेलां।
दर्पसागरु वेलां। सांडूनि उते।।३९३।।

"आणि खूप गाजावाजा करून आपल्या धार्मिकपणाचा व्यर्थ डांगोरा पिटण्यात त्या आसुरांना फार संतोष होतो व त्या प्रसिद्धीने

त्यांचा गर्व व अहंकार पोसला जातो. आधीच काळ्याकुट्ट असलेल्या अंधाराला वर जसे काजळाचे लेप द्यावेत, त्याप्रमाणे अशा कृतींनी त्यांचा मूर्खपणा वाढतो; उद्धटपणा वाढीला लागून अहंकार व अविवेक दुणावतात. मग ते आपल्याला कोणी प्रतिस्पर्धी असावा, हेसुद्धा सहन करू शकत नाहीत व त्याचा निःपात करण्यासाठी सर्व बळ एकवटून उभे राहतात. अहंकार असा बळी झाला की मग त्यांचा दर्पसागरही मर्यादा ओलांडतो."

मग वोसंडलेनि दर्पे। कामाहीं पित्त कुरुपें।
तेयां धगीं सैंध पलिपे। क्रोधाग्नी तो।।१६-३९४।।
तेथ उन्हाला आगी खरमारा। तेलातुपाचियां कोठारा।
लागला आणि वारा। सुटिला जैसा।।३९५।।
तैसा अहंकारु बलां आला। दर्पु कामक्रोधीं गुढिला।
या दोहींचा मेलु जाहला। जेयांचां आंगीं।।३९६।।
तैं आपुलियां सवेशा। मग कोणी कोणी हिंसा।
या प्राणियांतैं वीरेशा। न साधिती गां।।३९७।।

"दर्पाने अशी परिसीमा गाठली की कामाचेही पित्त खवळते आणि त्या दर्प व कामांच्या अग्नीने त्यांच्या क्रोधाग्नीत भर पडते. आधीच प्रखर उन्हाळा असावा आणि त्यात तेलातुपाने भरलेल्या कोठारास आग लागावी, तसे त्यांच्या अहंकाराला रूप येते. वर त्यात काम व क्रोध, तसेच दर्प यांचीही भर पडते. असा या आसुरी गुणांचा मिलाप ज्यांच्याठायी झालेला असतो, ते लोक आपल्या स्वतःच्या देहासकट इतर सर्व प्राणिमात्रांची कोणतीही हिंसा करण्यात कशाचीही कमतरता भासू देत नाहीत."

पहिलें तंव धनुर्धरा। आपुलियां मांसरुधिरा।
वेंचु करिती अभिचारा-। लागौनियां।।१६-३९८।।
तेथ जालिती जिएं देहें। यांमाजीं जो मी आहे।
तेयां आत्मेयां मज घायें। वाजती तैं।।३९९।।
आणि अभिचारिकीं तिहीं। उपद्रविजैं जेतुलें काईं।
तेथ चैतन्य मी पाहीं। शिणु पावें।।४।।

"हे धनुर्धर अर्जुना! ते आसुर सर्वप्रथम स्वतःच्याच रक्तमांसाचा अभिचारासाठी वेचा करतात. त्यांच्या त्या पीडल्या जाणाऱ्या देहांतर्यामी जो मी आहे, त्या मजलासुद्धा अशा रीतीने पीडा देण्यास ते कचरत नाहीत. त्यांच्या अशा अघोरी कृतींनी मज आत्मराजास किती तडाखे बसतात, त्याची त्यांना कदापिही परवा नसते."

आणि अभिचारावेगलें। विपाएं जैं अवगलें।
तेयां टाकिती इटालें। अपैशून्याची।।१६-४०१।।
सती आणि सत्पुरुख। दानशील याज्ञिक।
तपस्वी अलौकिक संन्यासी जैं।।४०२।।
कां भक्त हन महात्मे। ईयें माझीं निजाचीं धामें।
निर्वालिलीं होमधर्मे। श्रौतादिकीं।।४०३।।
तेयां द्वेषाचेनि कालकूटें। बसटौनि तिखटें।
कुबोलांची सदटें। सूति कांडें।।४०४।।

"आणि जारणमारणाच्या तडाख्यातून जे जीव त्यांच्या हातून वाचतात, त्यांच्यावर आपल्या विखारी दोषदृष्टीचा मारा करून त्यांचे अहित करण्यात ते आसुर तत्पर असतात. पतिव्रता, सत्पुरुष, दानशील पुरुष, याज्ञिक वा यज्ञवेत्ते, लोकोत्तर तपस्वी व संन्यासी, तसेच माझे भक्त आणि महात्मे ही जी माझी श्रौतादिक यज्ञक्रियांनी शुद्ध झालेली निवासस्थाने होत, त्यांनासुद्धा ते आसुरी प्रवृत्तीचे लोक आपल्या कुशब्दांच्या तीक्ष्ण धार लावलेल्या आणि द्वेषरूप कालकूटाने चोपडलेल्या बाणांनी विंधतात."

आसुरी संपदाफल::::

आसुरी प्रवृत्तीचे फल

भगवंतांच्या भक्तांना आणि महात्म्यांनासुद्धा अशा पीडणाऱ्या त्या दुष्टांना भगवान काय शिक्षा करतात, ते गीतेने पुढील श्लोकात व्यक्त केले आहेः

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान्।
क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु।।१६-१९।।

"त्या आत्मद्वेष्ट्या, क्रूरकर्मा नराधमांना मी अमंगळ आणि पापाचारी अशा आसुरी योनींमध्ये अनंत कालासाठी ढकलून देतो."

त्याबद्दल ज्ञानदेव म्हणतातः

ऐसें आघवेंची परी। प्रवर्त्तलें माझां वैरीं।
तऱ्हीं तेयां पापियां जैं मी करी। तैं आईक पां।।१६-४०५।।
तऱ्हीं मनुष्यदेहाचां तागा। घेऊनि रुसती जैं जगां।
पदवी हिरौनि पैं गां। ऐसें ठेवी।।४०६।।
जैं क्लेशगांवींचा उकरडा। भवपुरीचां पानवडा।
यैं तमयोनी तेयां मूढां। वृत्तिचि दें।।४०७।।
मग आहाराचेनि नांवें। तृणही जेथ नुगवें।
तैं व्याघ्रवृश्चिक आडवें। तैसियें करी।।४०८।।
तेथ क्षुधादुःखें बहुतें। तोडूनि खाती आपणयांतैं।
मरोंमरों मागुतें। होतचि असती।।४०९।।

"अशा प्रकारे सर्वभूतस्थ अशा माझ्याशी नित्य वैर करणाऱ्या त्या पापी लोकांची काय गती होते, ते ऐक. मनुष्यदेहाचा आश्रय करून जगाच्या सर्वनाशास प्रवृत्त होणाऱ्या त्यांना मी मनुष्यत्वापासून पूर्णतया वंचित करतो. आणि नित्य क्लेशरूप गावांचा उकिरडा असणारी व संसारातील चिखलराडच अशी जी तमोयोनी, ती त्या मूर्खांना मी वतन म्हणून बहाल करतो. ज्या अरण्यात तृणादिकही उगवत नाही, अशा अरण्यात त्यांना मी जन्माला घलतो. तेथे अतीव दुःखाने पीडित होऊन ते स्वतःचेच अवयव तोडतोडून खातात व मरमरूनसुद्धा परतपरत तेथेच उत्पन्न होतात."

कां आपुलां गरलजालीं। जलतयां आंगाचीं पेंदलीं।
तैं सर्पचि करी बिलीं। निरुंधला।।१६-४१०।।

परि घेतला श्वासु घापे। येतुलेनि मापें।
विसंवा तेयां नाटोपे। दुर्जनासीं।।४११।।
ऐसेनि कल्पांचियां कोडी। गणितांही संख्या थोडी।
तेतुलां वेलु न काढी। क्लेशौनि तेयां।।४१२।।
तऱ्हीं तेयांसि जेथ जाणें। तेथिंचें हे पहिलें पेणें।
तैं पावौनि एरें दारुणें। न होती दुःखे।।४१३।।

"अथवा आपल्याच विषाच्या दाहाने ज्यांची त्वचा सतत दग्ध होत असते, असे बिळात राहणारे सर्प ते होतात. अशा रीतीने निःश्वास टाकण्यास लागतो तेवढ्या वेळेचाही विसावा त्या दुष्टांच्या जीवाला लाभत नाही. कोटिकल्पसुद्धा कमी पडतील, इतक्या अनंत काळ त्या नराधमांची त्या क्लेशातून मी सोडवणूक करत नाही. त्या मूढांना जेथे कायमचे मुक्कामाला जायचे आहे, त्या प्रवासाचा हा केवळ पहिला टप्पा होय. ही दुःखे म्हणजे त्यांच्यापुढे वाढून ठेवलेल्या इतर दारुण दुःखांच्या मानाने काहीच नव्हेत!"

आसुरी योनींची प्राप्ती

त्या मूढांना भगवंतांची प्राप्ती होत नाही, हे सांगतांना गीता म्हणतेः

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि।
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्।।१६-२०।।

"हे अर्जुना! असे ते मूढ पुरुष जन्मोजन्मी आसुरी योनी प्राप्त होऊन त्याहूनही अधम गतींना जातात व मला प्राप्त होणे त्यांना दुरापास्तच आहे."

या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे - ती म्हणजे आसुरी योनीचा जो उल्लेख या श्लोकात केलेला आहे, त्याने काय सूचित होते ते. आसुरी संपत्तिमान प्राण्यांना आसुरी जन्मच मिळतो. त्यांना दैवी जन्म प्राप्त होत नाहीत. आशा, आकांक्षा, मोह व तृष्णा, काम व क्रोध इ.ना स्थानच असणारा नरक व त्या प्रकारचे भोग प्राप्त होणाऱ्या योनीच त्यांना मिळतात, असे पुढील संदर्भावरून सूचित होते.

या श्लोकावर भाष्य करतांना ज्ञानदेव म्हणतातः

हा ठायवेरी। संपत्ति जैं आसुरी।
अधोगती अवधारीं। जोडिली जैं।।१६-४१४।।
पाठीं व्याघ्रादि तामसां। योनी जैं आलुमालू ऐसा।
देहाधाराचा उसासा। आथी जो हा।।४१५।।
तोही मी वोल्हावा हिरे। मग तमचि होती एकसरें।
जेथे गेले अंधारे। कालवंडैजे।।४१६।।

"त्या आसुरी संपत्तीच्या जोडीने जी अधोगती त्यांनी जोडली आहे, ती ऐक! प्रथम ते व्याघ्रादी तामस योनीत जन्मतात आणि नंतर त्याही योनीत देहाधाराच्या रूपाने माझा जो ओलावा व संयोग घडत असतो, तोही मग आटून जाऊन ते अशा योनीत पडतात की जेथे तमांधकारच असतो. त्या ठिकाणी प्रकाशाला जागा तर नसतेच पण अंधारसुद्धा काळवंडून जाईल, इतकी भयाण गर्ता असते."

जेयाचि पापा चिलसी। नरक घेती विवसी।
शीण जाय मूर्च्छी। शिणें जेणें।।१६-४१७।।
मलु जेणें मैलें। तापु जेणें पोलें।
जेयांचेनि नांवें सले। महाभय।।४१८।।
पापा जेयाचा कांटाला। उपजे अमंगल अमंगला।
विटालुही विटाला। बिहे जेयां।।४१९।।
ऐसें विश्वाचेयां वोखटेया। अधम तैं धनंजया।
तैं तैं होती भोगूनियां। तामसा योनी।।४२०।।

"ज्यांच्या पापप्रवृत्तीला पाहून पापालासुद्धा किळस वाटेल; नरकालासुद्धा ज्याची भीती वाटेल; ज्याच्या अवजडपणामुळे शीणाला पण मूर्च्छा येईल; मळसुद्धा ज्याच्यामुळे मळेल; ज्या योनींच्या नावाने महाभयही थरकांपेल; पापही ज्याच्या पापी प्रवृत्तीला कंटाळेल; अमंगळालाही ज्याच्या अमंगळाबद्दल भीती वाटेल; विटाळसुद्धा ज्याच्या विटाळाला घाबरेल; असे विश्वातील अधमाधम निकृष्ट जे जन्म व योनी, त्यात ते प्राणी व्याघ्रादी तामस योनी भोगल्यानंतर पडतात."

अहा सांगतां वाचा रडे। आठवितां मन खिरडें।
कटारें मूर्खी केवढें। जोडिलें निरय।।१६-४२१।।
कायिसयां तैं आसुर। संपत्ति पोखिती वाऊर।
जियां दिधलें घोर। पतन ऐसें।।४२२।।
म्हणौनि तुवां धनुर्धरां। नोहावें गां तियां मोहरां।
जोडितां वासु आसुरां। संपत्तिवंता।।४२३।।
आणि दंभादि दोखीं साहीं। हे संपूर्ण जेयांचां ठायीं।
तैं त्यजावें हे काई। म्हणो कीर।।४२४।।

ज्ञानदेव म्हणतात की, "हे अर्जुना! त्या आसुरांनी मूर्खपणाने केवढी ही अधोगती व कसा हा नरक प्राप्त करून घेतला, हे सांगतांना वाचासुद्धा रडकुंडीला येते; त्या गोष्टींच्यामुळे मन हाय खाऊन मागे हटते; ज्या आसुरी संपदेमुळे त्यांना इतकी वाईट गती प्राप्त होते व ते असे घोर पतन पावतात, त्या अशा संपत्तीला ते का बरे पोसून वाढवतात! म्हणून हे अर्जुना! ज्या ठिकाणी त्या आसुरी संपत्तिमानांचे राहणे असेल, त्या बाजूला तू फिरकूसुद्धा नकोस! आणि दंभादीकरून सर्व सहाच्या सहा आसुरी दोष ज्यांच्याठायी वसतात, त्यांचा त्याग करावा, हे खरे तर सांगायची गरज तरी आहे का!"

नरकप्राप्तीची तीन द्वारे

त्यानंतर श्रीगोपालकृष्ण म्हणतातः

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः।
कामः क्रोधस्तथा लोभस्तमादेतत्त्रयं त्यजेत्।।१६-२१।।

"हे अर्जुना! काम, क्रोध व लोभ ही तिन्ही नरकाची द्वारे होत व त्याद्वारे आत्म्याचा नाश होतो - म्हणजे आत्म्याची अधोगती होते. म्हणून या तिहींचा त्याग केला पाहिजे."

परि काम क्रोध लोभ। या तिहींचेंही थोंब।
थांवें तेथ अशुभ। पिकलें जाण।।१६-४२५।।
सर्व दुःखीं आपुलियां। दर्शन धनंजया।
पाढाऊ हे भलतेयां। दिधलें आहाति।।४२६।।
कां पापियां नरकभोगीं। सुवावेयालागीं जगीं।
पातकांची दाटुगी। सभाचि हे।।४२७।।

तैं रोख गां तंवचिवरी। आईकिजती पटांतरीं।
जंव हे तिहीं अंतरीं। उठती ना।।४२८।।

"परंतु काम-क्रोध-लोभ या त्रयीचे पेवच जेथे फुटले आहे, तेथे पापांची खाणच उत्पन्न झाली असे समजण्यास हरकत नाही. अर्जुना! कोणासही आपणांस सहज भेटता यावे म्हणून दु:खाने ठेवलेले जणू वाटाडेच असे हे तिघे होत. पापिष्टांना हमखास नरकात लोटणारी मंडळी म्हणजे हे दांडगे काम, क्रोध व लोभच होत. जोवर या तिघांनी अंत:करण काबीज केले नाही, तोवरच पुराणातल्या रौरवादी कथांची मातब्बरी!"

अपाय इहीं असलग। यातना इहीं सवंग।
हाणी हाणी नोहें हे तिघ। हेचि हाणी।।१६-४२९।।
काय बहु बोलों सुभटा। सांगितलियां निकृष्टा।
नरकाचां दारवंठा। त्रिशंकु हा।।४३०।।
या कामक्रोधलोभां-। माजीं जीवें जो होय उभा।
तो निरयपुरीची सभा। सन्मान पावे।।४३१।।
म्हणौनि पुढत पुढती किरीटी। हे कामक्रोधादिदोख त्रिपुटी।
त्यजावीचि गां वोखटी। आघवां विखीं।।४३२।।

"सहजगत्या अपाय करणारे, यातना स्वस्तात मिळवून देणारे व हानीसुद्धा हानी म्हणवून घेण्यास अपात्र ठरावी, इतके हे तिघे हानीकारक आहेत. फार काय सांगावे! हे धनंजया! तीन खिळे ठोकलेल्या उंबऱ्यासारखे हे तिघे नरकपुरीचे प्रवेशद्वारच होत. या कामक्रोधादींमध्ये जो मनापासून आस्था बाळगून असतो, तो नरकपुरीचा प्रतिष्ठीत नागरीकच होय म्हणेनास! म्हणूनच ही कामादी त्रिदोषांची त्रिपुटी सर्वथैव निंद्य असल्याने पूर्णतया त्यागावी."

अधोगती टाळण्याचा उपाय::::

नरकापासून मुक्तीचा उपाय

श्रीकृष्ण म्हणतात की कामक्रोधलोभरूपी तीन दारांच्या नरकापासून लांब राहणारा मनुष्य श्रेष्ठ गतीला जातो.

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः
आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम्।।१६-२२।।

श्रीगीता म्हणते "या तीन प्रकारच्या नरकद्वारांपासून मुक्त असणारा पुरुष आपल्या आत्मोद्धारार्थ माझ्या आज्ञेनुसार वर्तन करतो व त्यायोगे तो परमगती प्राप्त करतो आणि मलाच येऊन मिळतो."

याविषयी ज्ञानदेवांचा खुलासा पाहा:

धर्मादिकां चौहीं आंतु। पुरुषार्थाची तैंचि मातु।
करावी जैं सांघातु। सांडील हा।।१६-४३३।।
हे तिहीं जीवीं जंव जागती। तंववेरी निकयाची प्राप्ती।
हे माझे कान नायकती। देओ म्हणे।।४३४।।

"जो मनुष्य या तिन्हींच्या - कामक्रोधलोभरूपी त्रिकूटाचा संघ सोडून देतो, त्यानेच धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांची सांग अपेक्षा करावी. ही त्रयी जोपावेतो हृदयात वसते, तोपावेतो उत्तम पुरुषार्थ म्हणजे जो मोक्ष, तो प्राप्त होऊ शकेल, असे मीसुद्धा कधीच ऐकलेले नाही," असे श्रीकृष्णांचे म्हणणे आहे.

जेयां आपणपें पढिये। आत्मनाशा जो बिहे।
तेणें न धरावी हे सोयें। सावधा होईजे।।१६-४३५।।
पेटी बांधोनि पाषाण। समुद्रीं बाहीं आंगवण।
कीं जिवावेयां जेवण। कालकूटाचें।।४३६।।
इहीं कामक्रोधलोभेंसीं। कार्यसिद्धी जाण तैसीं।
म्हणौनि ठाओचि पुसी। ययांचां गां।।४३७।।

"जो स्वात्म्यावर प्रीती करतो व आत्मनाशाला भीतो, त्याने या तिघांची संगत कधीच धरू नये. सदैव सावधचित्त असावे. उराशी धोंडा बांधून घेऊन समुद्रात अंग लोटून देणे किंवा काळकूट विषाचे जेवण करणे, यांचा अंतिम परिणाम जसा देहाचा नाश होणे हाच असतो, तसाच या काम, क्रोध व लोभांच्या योगे आत्मनाश होतो. म्हणून हे अर्जुना! यांचा ठावठिकाणाच समूळ नष्ट कर."

"तो भेटे माउली आत्मा"

जैं काईं अवचटें। हे तिकडीं सांखल तुटे।
तैं सुखें आपुलियें वाटें। चालो लाभे।।१६-३३८।।
त्रिदोखीं सांडिलें शरीर। त्रिकुटीं फिटलियां नगर।
त्रिदाह निमालियां आंतर। जैसें होय।।३३९।।
तैसा कामदिकीं तिघीं। सांडिला सुख पावोनि जगीं।
संगु लाहे मोक्षमार्गीं। सज्जनांचा।।३४०।।

"जेव्हा कधी एकसमयावच्छेदेकरून या काम-क्रोध-लोभरूपी तीन कड्यांची संसारास जखडणारी अज्ञानशृंखला - ही अवजड बेडी तुटते, तेव्हाच आपल्याला सुखासुखी आत्मानुभवाची आनंदमय वाट चालता येते. कफ-पित्त-वात या त्रिदोषांपासून शरीराची सुटका झाली की ते जसे निरामय होते; चोरी, शिंदळकी व चहाडी या त्रिकूटांचा नाश झाल्यावर नागरिकांना जशी खरी शांतता अनुभवता येते; अथवा आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक असे त्रिताप नाहीसे झाल्यावर अंतरंगी खरी निर्मलता प्राप्त होते; त्याचप्रमाणे या काम-क्रोध-लोभरूपी त्रिकूटाने जो पुरुष टाकून दिला, तोच या जगात खरा सुखी होतो. त्यालाच मोक्षमार्गी क्रमणा करण्यासाठी सज्जनांची संगत लाभते."

मग सत्संगें प्रबलें। सच्छास्त्राचेनि बलें।
जन्ममृत्युचीं निमालें। निस्तरें रानें।।१६-४४१।।
तैं वेळीं आत्मानंदें आघवें। जैं सदा वसतें बरवें।
तैं तैसेंचि पाटण पावें। गुरुकृपेचें ।।४४२।।
तेथ प्रियाची परिसीमा। तो भेटें माउली आत्मा।
तयें खेंवें आटे डिंडिमा। सांसारिक हे।।४४३।।
ऐसा जो कामक्रोधलोभां। झाडी करूनि ठाके उभा।
तो एवढियां लाभां। गोसांवी होय।।४४४।।

"त्यायोगे प्रबळ सत्संग घडून येऊन सच्छास्त्राची प्राप्ती होते व तो जन्ममृत्युरूपी घनदाट काननातून सुखरूप बाहेर पडतो. त्यावेळी मग त्याला जेथे सदैव आत्मानंदाची वस्ती असते, ते गुरुकृपारूपी नगर लागते. त्या नगरातच ***त्याला प्रियोत्तम अशा माउली आत्म्याची चरमभेट होते*** आणि प्रेमळ आत्मराजाच्या आलिंगनाने त्याच्यामागचा जन्म-मृत्यु-संसारादी त्रापांचा ससेमिरा नाहीसा होतो. हे अर्जुना!

जो मनुष्य कामक्रोधलोभांना पार नाहीसे करून टाकतो, तो एवढ्या मोठ्या लाभाचा - आत्मानंदाचा स्वामी होऊन जातो."

आत्मभेटीची वाटचाल

या ओव्यांद्वारे श्रीज्ञानदेवांनी आत्मयाच्या भेटीची जी वाटचाल प्रकट केली आहे, ती अत्यंत मनोरंजक आणि जिज्ञासूंना मार्गदर्शक आहे. काम-क्रोध व लोभ या त्रयीवरच या जगताचा सारा कारभार चालतो. त्या त्रयीचा त्याग करणारा - खरे तर ज्याला त्या त्रयीनेच पूर्णपणे कंटाळून सोडून दिले आहे अशाला संसाराचे व त्यातील सुखदु:खादी, जन्ममृत्युरूपी दोषांचे पुन: मुखावलोकन करावे लागत नाही. तो मनुष्य संसाररूपी घोर अरण्यातून बाहेर पडतो व संतसज्जनांची संगत धरून व श्रीगीतेद्वारे प्रकटविलेल्या सच्छास्त्राची कास धरून त्याप्रमाणे उद्दिष्ट व वर्तणूक ठेवत ठेवत मोक्षरूपी आनंदनगरीत जाऊन पोहोचतो.

तेथेच त्याला मातेप्रमाणे प्रेमळ अशा अत्यंत लाडक्या आत्म्याची भेट होते व त्याच्या मिठीत विसावून सर्व संसाराची दगदग व भुणभुण यातून तो कायमचा मुक्त होतो. मग केवळ आत्मानंदात मग्न होऊन उरलेले आयुष्य जीवन्मुक्तावस्थेत व्यतीत करत, नित्यतृप्त होऊन सदैव राहतो. जे परमधाम, जे नि:श्रेयस, प्रेयसाची जी चरमसीमा, भगवंताची जी साक्षात भेट - ती त्याला कायमची प्राप्त होतात. कल्याणाचा हा अंतिम टप्पा घेत घेत तो परमानंदात विलीन होतो!

काममोहितांची गती

कामादींपासून मुक्त असणाऱ्या पुरुषाची श्रेष्ठ गती सांगतांनाच श्रीगोपालकृष्ण तद्विरोधी वागणाऱ्यांची किती हीन अवस्था होते, ते पण सांगतात. ते असे:

य: शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारत:।
न सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्।।१६-२३।।

"जो शास्त्रोक्त मार्गाने न वागता कामादींचा दास होतो, त्याला आत्मलाभ कसा होणार! त्याला आत्मलाभ, परमगती वा परमसुख ही प्राप्त होणे दुरापास्तच आहेत. एवढेच काय! त्याला साधे ऐहिक सुखोपभोग मिळणे पण कठीण आहे."

याबद्दल ज्ञानदेव म्हणतात:

ना हे आवडौनि काईं। कामादिकांचाचि ठाईं।
दाटिली जेणें डोई। आत्मचोरें।।१६-४४५।।
जो जगीं समान सकृपु। हिताहित दावितां दीपु।
तो अमान्य केला बापु। वेदु जेणें।।४४६।।
न धरीचि विधिची भीड। न करीचि आपुली चाड।
वाढवीत गेला कोड। इंद्रियांचें।।४४७।।
कामक्रोधलोभांची कांस। न सोडीचि पालिलीं भाख।
स्वैराचारांचें असोस। वलघला रान।।४४८।।
तो सुटकेचियां वाहाणीं। मग पिवों न लाहें पाणी।
स्वप्नींहि तैं काहाणी। दूरीचि तेयां।।४४९।।

"आणि हे आत्मलाभाविषयीचे माझे सांगणे न आवडणाऱ्या ज्याने कामादींच्या ठिकाणी आत्मघातकीपणाने बुडी दिली आहे; सर्वांवर सारखीच कृपा करणारा, सर्वत्रांस हिताहित दाखवणारा जो पितृतुल्य वेदराजा - त्याचेही सांगणे जो जुमानत नाही; जो ब्रह्मदेवाने मनुष्यादिकांना शास्त्ररूपाने केलेली आज्ञा पाळत नाही; ज्याला आत्महिताची कवडीइतकीसुद्धा काळजी नाही; जो इंद्रियांचे कोडकौतुक करण्यातच मश्गुल आहे; असा जो पूर्णपणे कामाच्या आहारी गेलेला आहे व त्यांचे सांगणे मनापासून ऐकतो; तो मनुष्य म्हणजे निव्वळ स्वैराचाराच्या आडरानात वाट चुकलेला पांथस्थ होय. त्याला मुक्तिरूपी निर्झराचे पाणी, प्रत्यक्ष तर दूरच! पण स्वप्नात तरी चाखायला मिळेल काय!"

आणि परत्र तंव जाये। हे कीर तेयां आहे।
पऱ्हीं ऐहिकही न लाहे। भोग भोगूं।।१६-४५०।।
तऱ्हीं माशालागीं भुलला। ब्राह्मणु पाणबुडां रिगलां।
कीं तेथही पावला। नास्तिकवादु।।४५१।।
तैसां विषयांचेनि कोडें। जेणें परत्रा केले उघडें।
तंव तोचि आणिकीकडें। मरणें नेला।।४५२।।
एवं परत्र ना स्वर्गु। ना ऐहिकही विषयभोगु।
तेथ केऊता प्रसंगु। मोक्षाचां तो।।४५३।।

"आणि त्याचे पारलौकिक कल्याण होत नाही, हे तर निर्विवादच! पण त्याला ऐहिक सुखोपभोगही धड मिळत नाहीत. मासे खाण्यास लाचावलेला ब्राह्मण कोळ्यांच्या जातीत सामावून जायला पाहील, तर त्यालासुद्धा ते कोळी असला नास्तिक आपल्यात नको म्हणून आपल्यात घेणार नाहीत. तसेच विषयसुखाच्या आवडीने आत्मकल्याणाचा मार्ग ज्याने सोडून दिला, त्याला वेदविरुद्ध वर्तणुकीने जिवंतपणीच मृत्यू प्राप्त झाला. त्याला ना आत्मोद्धार ना स्वर्ग! ना ऐहिक विषयोपभोग! तर मोक्षाची काय वार्ता!"

म्हणौनि कामाचेनि बळें। जो विषय सेऊं पाहे सलें।
तेयां विषयो ना स्वर्गु मिळे। ना उद्धरे तो।१६-४५४।।

"म्हणून कामाच्या प्रभावाने मोहित होऊन जो मनुष्य विषयांचे सेवन करण्यास उद्युक्त झाला आहे, त्याला विषयसुखही मिळत नाही - स्वर्ग मिळणे वा आत्मोद्धार होणे ही तर त्याला केवळ अशक्यच!"

शास्त्रनिष्ठेचे महत्त्व

अशी व्यवस्था कामक्रोधादींची असल्याने श्रीकृष्ण उपदेशितात:

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।।१६-२४।।

"म्हणून हे अर्जुना! काय करणे योग्य आहे व काय करणे अयोग्य आहे, याचा उलगडा केवळ सुशास्त्रच करू शकते व तुला शास्त्रोक्त कर्मे करणेच उचित आहे."

यावर ज्ञानदेव म्हणतात:

याकारणें बापा। जेयां आथी आपुली कृपा।
तेणें वेदाचियां निरोपा। आन न कीजे।।१६-४५५।।
पतीचियां मतां। अनुसरौनि पतिव्रता।
अनायासें आत्महितां। भेटेचि तैं।।४५६।।
ना तऱ्हीं गुरुवचना। दिठी देतु जतना।
शिष्य आत्मभुवना-। माजीं पैसें।।४५७।।

हे असो आपुलां ठेवा। हातां आथी जऱ्हीं यावा।
तऱ्हीं आदरें जेवीं दिवा। पुढां कीजे।।४५८।।
तैसें अशेषांहीं पुरुषार्थां। जो गोसांवी हो म्हणे पार्था।
तेणें श्रुतिस्मृति माथा। बैसणें घापें।।४५९।।

"म्हणूनच बाबा अर्जुना! ज्याला स्वहिताची काळजी असेल त्याने वेदांचे सांगणे दुर्लक्षू नये. ज्याप्रमाणे पतीच्या मताप्रमाणे वागून पतिव्रता आत्मकल्याण पावते; श्रीगुरूंचे सांगणे जिवापाड जतन करणारा शिष्य आत्मराजात प्रवेशतो; गुप्त ठिकाणी असलेला आपला खजिना हाती घेण्यासाठी आदरपूर्वक दिव्याला पुढे करावे; त्याचप्रमाणे समस्त पुरुषार्थांचा - काम-धर्म-अर्थ -मोक्ष यांचा स्वामी जो होऊ इच्छितो, त्याने श्रुति आणि स्मृति यांना आदराने आपले मस्तक लववावे."

शास्त्र म्हणेल सांडावें। तैं राज्यही तृण मानावें।
जैं घेववीं तैं न म्हणावें। विखोहीं विरुद्ध।।१६-४६०।।
ऐसियां वेदैकनिष्ठा। जालियां जऱ्हीं सुभटा।।
तऱ्हीं कें आहे अनिष्टा। भेटणें गां।।४६१।।

"शास्त्राने त्याज्य ठरविले असता राज्यही तृणवत टाकून द्यावे व विषप्राशन करावे असे सांगितले असता तेही प्यावे! हे अर्जुना! ज्याची वेदांच्याठायी एवढी निष्ठा असेल त्याचे अहित कसे होईल!"

पैं अहितापासूनि काढती। हित देऊनि वाढविती।
नाही श्रुतिपरौती। माऊली जगां।।१६-४६२।।
म्हणौनि ब्रह्मेसीं मेळवीं। तंव हे कोण्हें न संडावी।
अगां तुवांही ऐसीचि भजावी। विशेषेंसीं।।४६३।।
जै आजि अर्जुना तूं एथें। करावेयां सत्य शास्त्रे सार्थें।
जन्मलासीं बलार्थें। धर्माचेनि।।४६४।।
आणि धर्मानुज हे ऐसें। बोधेंचि आलें आपैसें।
म्हणौनि अनारिसें। करू नयें।।४६५।।

"मनुष्यमात्रांना अकल्याणापासून वाचवणारी व स्वतःचे स्तन्य पाजून वाढवणारी श्रुतीसारखी प्रेमळ माउली दुसरी कोण असेल! ती जिवाला ब्रह्मप्राप्ती करून देते. म्हणूनच तिची कोणी हेळसांड करू नये, हेच उत्तम! आणि अर्जुना! तू तर तिची विशेषच आदराने सेवा करावीस. कारण धर्मानुज म्हणजे धर्माचा पाठीराखा भाऊ म्हणून तू जन्मतःच प्रसिद्धीस आलास आणि सर्व सत्य शास्त्रांना सार्थ करण्यासाठी तुझा म्हणजे ***नर*** नामक ऋषींचा हा जन्म आहे. म्हणूनच कर्तव्य आणि अकर्तव्य यांचा निवाडा करतांना, आपले हित व अहित पाहतांना, तू केवळ सच्छास्त्राच्या कसोटीवर पारख करत जा. असे केल्यावर जे अकरणीय वा त्याज्य वा हीन कृत्य असेल, ते तू दक्षतापूर्वक टाळत जा."

कार्याकार्यविवेकीं। शास्त्रेंचि करावी पारखी।
अकृत्य कुडें तैं लोकीं। वालावें गां।।१६-४६६।।
मग कृत्यपणें खरें निगे। तैं तुवां आपुलेनि आंगें।
आचरौनि आदरें चांगें। सारावें गां।।४६७।।
जैं विश्वप्रामाण्याची मुदी। आजि तुवां हातीं असे सुबुद्धी।
लोकसंग्रहासीं त्रिशुद्धी-। योग्यु होसी।।४६८।।

एवं आसुरवर्गु आघवां। सांगौनि तेथींचां निगावा।
तोही देवें पांडवा। निरूपिला।।४६९।।

"आणि जे सत्कृत्य म्हणून कसाला उतरेल, ते तू स्वतः उत्तम रीतीने आचरून लोकांकरता आदर्श घालून द्यावास. शुद्धसत्त्वगुणाने तू संपन्न आहेस व म्हणून जो विश्वप्रमाण असा मी हृषीकेश आहे, तोही तुला वश आहे. म्हणून तू जे काही करशील, तेच इतरेजनही आचरतील आणि विश्वाला प्रमाण असे तुझे वागणे ठरेल. त्रिवर्गशत्रूंपासून मुक्त झालेल्या तुझ्यासारख्या महाभागांचा***लोकसंग्रह*** करणे हाच तर खरा धर्म आहे. म्हणून तू शास्त्र जे म्हणते, तेच प्रमाण धरून वागत जा. म्हणजे इतर लोकही तुला अनुसरून जगाची घडी विस्कटू देणार नाहीत व मोक्षधर्माला अनुकूल असे वर्ततील."

कृत्याकृत्यविवेक

ज्ञानदेव उद्बोधितातः "अशा प्रकारे आतापर्यंत श्रीकृष्णांनी आसुरी संपत्ती व दोषसमुदायांची सर्व लक्षणे साद्यंत वर्णन करून सांगितली आहेत व त्या दोषांपासून जलातील पद्मपत्राप्रमाणे अलिप्त कसे राहावे, याबाबतचा संपूर्ण उपदेशही केलेला आहे."

याप्रमाणे ***दैवासुरसंपद्विभाग*** निर्देशित करून सांगतांना *नवम* अध्यायापासून सुरू झालेला विषय प्रसंगोपात्त *तेरावा अध्याय व सोळावा अध्याय* यात विशेष खुलासा व उहापोह करत करत ज्ञानदेव *सोळाव्या* अध्यायी तो पूर्ण करतात.

मोक्षमार्गी मुमुक्षूंनी व जिज्ञासूंनी हे जीवन जगत असता कसे वागले पाहिजे, काय केले पाहिजे व काय टाळले पाहिजे, याचे आसुरी संपत्तीच्या सर्व धोक्यांसह स्पष्ट विवेचन या सगळ्यातून येते.

तसेच पातञ्जलयोगनिर्दिष्ट यमनियमादी आचरणाचे खरे प्रज्ञावाही दिग्दर्शनसुद्धा यातूनच केले आहे, असे विचारांती आपल्या नजरेस येते. राजयोगाची समस्त भूमिका मनोभूमीवर आधारलेली असल्याने ***मन व संसार अथवा जगत*** यांचा योग्य तो मेळ साधकाने कसा घालावा, याचा आदर्श या विवेचनाद्वारे सांग चित्रित केलेला आढळतो.

वास्तविकतः हा संपूर्ण भाग नाही म्हटले तरी हजार-बाराशे ओव्यातून वर्णिलेला आहे. म्हणजे ज्ञानदेवीच्या *सप्तमांश* तरी त्याची व्याप्ती समजण्यास प्रत्यवाय नसावा. संसारमार्गी व मोक्षमार्गी अशा दोघांनाही अत्युत्तम उपदेश अशा या ओव्या आहेत. साधकाला जे जे करणीय आहे व जे जे अकरणीय आहे, त्याचा संपूर्ण कृत्याकृत्यविवेक या ओव्यांतून दर्शविलेला दिसतो. असो.

समारोप::::

पुढील विषयाचे अनुसंधान

१)यम, २) नियम, ३)आसन, ४) प्राणायाम, ५)प्रत्याहार, ६) धारणा, ७)ध्यान व ८)समाधि ही जी पातञ्जलयोगशास्त्राने निर्देशिलेली अष्ट योगांगे आहेत, त्यांचा समस्त साग्र विचार आपल्याला करण्यास मदत व्हावी म्हणून आपल्या ग्रंथाच्या या भागाचा आतापर्यंतचा रचना आलेख केलेला असल्याचे विचक्षण जिज्ञासूंच्या त्वरित ध्यानात आलेच असेल.

हे विवेचन आपण श्रीज्ञानदेवींच्या आधारे, तसेच पातञ्जलयोगसूत्रांचा पाठपुरावा करतकरत आणि मुख्यत: गीतोक्तीच्या सूत्रदर्शनपर शैलीतून अवलोकले आहे. तोच मुख्य अनुबंध कायम राखून यापुढेही आपण यमनियमादी आचरणाने शुद्ध झालेल्या, आसन-प्राणायाम यात स्थिर होऊ पाहणाऱ्या व प्रत्याहारात कमालीची निष्णातता प्राप्तव्य समजणाऱ्या साधकांसाठी ज्ञानदेवांच्या शैलीदार समर्थ ओव्यांद्वारे प्रकटलेले मार्गदर्शन यापुढेही अवलोकू!

त्याचप्रमाणे साधकाचे गंतव्य म्हणजे **धारणा-ध्यान-समाधिरूपी अंतरंग योगांगां**कडे आपल्याला अनिवार्यपणे वळावेच लागणार आहे, हे या विवेचनाच्या वळणावाकणांद्वारे अनुस्यूतच आहे. हा गूढतम विषय तारतरम्याने आपणास विशद करता यावा म्हणून श्रीज्ञानदेवांकडे सामर्थ्याचे मागणे मागत आपण पुढे जाऊ या!

सोळाव्या अध्यायाचा समारोप

सोळाव्या अध्यायाचा समारोप करतांना ज्ञानदेव म्हणतात:

इयावरी तो पांडुचा। कुमरु सद्भावो जीवींचां।
पुसेल तो चैतन्याचां। कानीं आईका।।१६-४७०।।
संजयें व्यासाचियां निरोपा। तो वेलु फेडिला तेयां नृपां।
तैसा मीही निवृत्तिकृपा। सांघौन तुम्हां।।४७१।।
तुम्हीं संत माझियां कडां। दिठीचां कराल बहुडा।
तऱ्हीं तुम्हां मानें एवढा। होईन मी।।४७२।।
म्हणौनि निज अवधान। मज वोलगे पसायदान।
दीजो जी समर्थ होईन। ज्ञानदेवो म्हणे।।४७३।।

"संजयाने व्यासकृपेने ज्याप्रमाणे त्या धृतराष्ट्र नृपाचा वेळ महाभारतीय युद्धाचा चक्षुर्वैसत्यं वृत्तांत कथन करण्याच्या मिषाने त्याला गीता ऐकवून सार्थकी लावला, त्याचप्रमाणे श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने समर्थ झालेला हा ज्ञानदेव पण तुम्हा संतसज्जनांना गीतार्थ स्पष्ट करून सागण्यास निमित्तमात्र होत आहे."

"तुम्ही संतांनी जर माझ्यावर कृपादृष्टीचा वर्षाव केला, तर तुम्हाला पसंत पडेल इतके छान वक्तृत्व मलासुद्धा करता येईल. आपण आपल्या अवधानाचे ***पसायदान*** माझ्या पदरी टाका. म्हणजे मी श्रीकृष्णोक्ती स्पष्ट करून सांगण्याने धन्य होईन!" असे पुन:पुन: ज्ञानदेव आर्जवाने श्रोत्यांना विनवतांना आपल्याला दिसतात.

ते पुढे सांगतात: "या उपरांत पंडुराजाचा तो सुपुत्र अर्जुन आपल्या अंत:करणातील प्रश्न श्रीकृष्णांना विचारील. तो तुम्ही जीवाभावाने चैतन्यरूपी श्रवणेंद्रियांद्वारे अवधानपूर्वक ऐका."

सतराव्या अध्यायाचा प्रारंभ

याप्रमाणे *सोळाव्या* अध्यायाचा समारोप केल्यावर सतराव्या अध्यायाच्या सुरवातीला अर्जुनाने केलेला प्रश्न असा आहे:

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विता:।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तम:।।१७-१।।

"हे कृष्णा! जी मनुष्ये शास्त्रविधीला जाणत नाहीत, परंतु केवळ स्वाभाविक श्रद्धेने युक्त होऊन देव, राक्षस, यक्ष वा भूतगणांचे पूजन करतात, त्यांची गती काय बरे होते - सात्त्विकी, राजसी की तामसी?"

या ठिकाणी नमूद करावेसे वाटते की *अध्याय१६ श्लोक क्र.२३*मध्ये भगवंतांनी स्पष्ट केले होते की "शास्त्रविधीला सोडून केवळ कामाने प्रेरित होऊन वागणाऱ्यांना ऐहिक वा पारलौकिक कोणतेच सुख वा परमगती यांपैकी काहीच प्राप्त होत नाहीत."

त्यामुळे या अध्यायारंभी अर्जुनाने हा प्रश्न उपस्थित केला आहे, जो सामान्य जनांसाठी उपयुक्त ठरावा. कारण शास्त्रनिर्देश समजून घेण्याची कुवत नसणारी माणसे जगात खूप असतात. त्यामुळे त्यांची शास्त्रावर श्रद्धा असली तरी त्याप्रमाणे वर्तन घडत नाही. तरी अशांची गती कोणती असे अर्जुन श्रीकृष्णांना विचारतो.

सतराव्या अध्यायाचा विषयविशेष

यासंबंधी सतराव्या अध्यायात बरेच स्पष्टीकरण आहे. मुख्य म्हणजे पूर्वजन्मांच्या संस्कारांमुळे स्वभावत: निर्माण झालेली श्रद्धा ***सात्त्विक, राजस व तामस*** या तीन प्रकारची असते. त्रिगुणांच्या कमीअधिकतेमुळे त्यात दुसऱ्या दोन प्रकारांचे थोडेबहुत मिश्रणही दिसून येते. त्याप्रमाणे त्याची भगवंत आपल्यासारखाच असावा, अशी श्रद्धा असते व तो आपल्या प्रकृतीगुणांनुसार भगवंताला देवादी, यक्षराक्षसादी वा भूतपिशाच्चादी रूपात कल्पून त्यांची भक्तिपूर्वक पूजा करतो.

परंतु प्रकृतीच्या अटळ नियमांना उल्लंघता न आल्यामुळे तो त्या त्या पूजित देवादी भावांना प्राप्त होतो. यातील केवळ सात्त्विक श्रद्धा सोडून इतर दोन्ही श्रद्धा मनुष्याचा अभ्युत्कर्ष करण्यास समर्थ नसतात. तसेच स्वशरीरास पीडा देत घोर तपाचरण करणारे व इतरांचा घात करून यज्ञयागादी करणारे हे सर्व हीन योनींप्रत जातात.

याप्रमाणे शास्त्रविधी न जाणता नुसत्याच श्रद्धेच्या आधारे परमपदाला झोंबू पाहणाऱ्यांची गती होते. म्हणून श्रीकृष्णांनी अशा लोकांना सुयोग्य मार्गदर्शनपर उपदेश *सतराव्या* अध्यायात केलेला आढळतो. त्यात यज्ञ-दान-तपादी क्रिया कशा प्रकारे संपन्न कराव्यात याबाबत सुबोध माहिती आहे. असो. पण ती पाहण्यापूर्वी आपण आता विश्वव्यापार कसा चालतो, प्रकृति-पुरुषविचार, इ.विषय पाहू या. गुण हे प्रकृतीचेच उपविभाग असल्याने, मनुष्यांचा गुणांधारे वर्तणारा व्यापार पुढे समजण्यासाठी प्रकृतीचे खरे स्वरूप व कार्य इ.काय आहे, ते आधी पाहिले पाहिजे.

त्यासाठी आपण आता पुढील ***तृतीय स्कंध - विश्वव्यापार*** याच्या ***उन्मेष क्र. १६ - प्रकृतिविचार*** याकडे प्रथम वळू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::तृतीय स्कंध::विश्वव्यापार::
(उन्मेष १६-२२) (पृ.क्र.२४३ ते ३४३)

::उन्मेष::१६::
::प्रकृतिविचार::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१७::
::अर्जुनाचे सप्तप्रश्न::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष १६:

गीताः

७:१-१५

ज्ञानेश्वरी::

७:१-१०८

पा.यो.सू.:

१:२९-३२

उन्मेष १७:

गीताः

७:२९,३०

८:१-५

ज्ञानेश्वरीः

८:१-६८

पा.यो.सू.:

१:४१,४२

तृतीयस्कंध:::विश्वव्यापार

उन्मेष१६::::::प्रकृतिविचार

प्रास्ताविक::::

साधकांची चर्या

आतापावेतो आपण यमनियमादींच्या दृष्टीने साधनापथाचा विचार केला. साधकांना साधनारंभी व नंतरच्याही काळात, तसेच सिद्धावस्थेतील सिद्धांनीही अवलंबन करवयाची ***चर्या*** अवलोकणे आपल्या दृष्टीने उपकारक ठरेल. म्हणून योगाच्या मनोज्ञ अशा ***धारणा -ध्यान*** या अंतरंगांचा मागोवा घेण्यापूर्वी आपण *सतराव्या* अध्यायातील ही चर्या अभ्यासणे श्रेयस्कर आहे. परंतु त्यातील बराचसा भाग त्रिगुणांच्या संकल्पनेशी संबंधित असल्याने ***त्रिगुण*** म्हणजे काय याचा श्रीकृष्णांनी *चौदाव्या* अध्यायी जो विचार केलेला आहे, त्याकडे आपणांस प्रथम वळावे लागेल.

मुख्य म्हणजे श्रीगीतेचा कर्मे करण्याच्या विचारासंबंधीचा जो निर्देश आहे, त्याचे अवलंबन नीट करण्यासाठी व योगांगांचा प्राणायाम-प्रत्याहारादी जो भाग आहे, तो साध्य होण्यासाठी जी देह-वाचा-मनाची शुद्धी अपेक्षित आहे, ती ***क्रमयोग*** सोपानाद्वारे प्राप्त करून घेण्याचे रहस्य यात म्हणजे *चौदाव्या* व *सतराव्या* अध्यायात प्रकट झालेले दिसून येते.

विश्वसंकल्पना::::

प्रकृतिविचाराचे महत्त्व

या समस्त सूत्राचे मुख्य म्हणजे ***प्रकृतिविचार.*** कारण ***गुण*** हे प्रकृतिधर्म आहेत. त्या प्रकृति-पुरुषांचा विचार वेळोवेळी ***ज्ञान-विज्ञान*** सांगण्याच्या निमित्ताने *सातव्या व आठव्या* अध्यायात सांगून *तेराव्या* अध्यायातही वर्णिला आहे. त्यामुळे प्रसंगोपात्त ठिकठिकाणी विखुरलेला असा हा विषय आहे व त्याचा मुळापासून समग्र मागोवा घेणे तसे दुरापास्तच आहे. हे सर्व विज्ञान जाणून घ्यावयाचा प्रयत्न आपणांस करावयाचा आहे. कारण कर्मयोग्यांसाठी हा भाग माहीत असणे तसे आवश्यकच आहे. लययोगाचे रहस्यही त्यातच आहे. हे सूत्र धरून आपण सांकेतिक दृष्ट्या गीतेतील ***प्रकृति-पुरुष*** विचाराचा जमेल तितका परामर्ष घेऊ या.

गीतेची विश्वसंकल्पना

श्रीगीतेची ही ***विश्वसंकल्पना*** जाणून घ्यावयाची म्हटले तर तिच्या वेगवेगळ्या अध्यायातील श्लोकांचा मागोवा घ्यावा लागतो. ***विश्वाची संरचना, विश्वोत्पत्ती व स्थिती, तसेच लय*** इ.जाणून घेणे जिज्ञासूंच्या दृष्टीने तसे आवश्यकच आहे. किंबहुना विश्वाची धारणा कशी झाली आहे, हे विश्वातील आद्यतत्त्वाचा शोध करणाऱ्यांसाठी वा साधकांसाठी समजणे सारखेच महत्त्वाचे ठरते.

श्रीज्ञानदेवांनी जो विश्वात्मक देव संकल्पिला आहे व ज्याच्याच चरणी आपले पसायदान मागणे विनीत भावाने गायिले आहे, त्याचा पुरावा ज्ञानेश्वरीभर विखुरलेला आहे. ***विज्ञान म्हणजे संसार - जगत, वा विश्व यांचे ज्ञान किंवा प्रकृतिसंबंधी मूलभूत स्वरूपाचे ज्ञान.*** वर उल्लेखलेले विषय विज्ञानांतर्गत येतात व गीतेत याविषयी श्रीगोपालांची कोणती भूमिका आहे, हे समजून घेणे अगत्याचे आहे.

तत्त्वज्ञानाचा शोध

बऱ्याच भारतीय तत्त्वज्ञान्यांनी वास्तवतः संपूर्ण विश्व हा ***चिद्भ्रम*** - मायेचा पसारा - असत्य - क्षणभंगुर - जिवाला भ्रमात पाडून त्याच्यामागे जन्ममृत्यू लावणारा आहे असेही मानले आहे. तर इतर काही तत्त्वज्ञांच्या मते विश्व हे ***चिद्विलास*** - आत्मतत्त्वाचा विलास - लीला - आत्म्याच्या दृष्टीने मायिक वा असत्य, पण सत्यतः वास्तविक - जिवाला जन्ममृत्यूंच्या पाठशिवणीत ढकलणारे, तसेच त्याला शिवत्व प्राप्त करून घेण्यास उत्सुक करणारे असेही समजले आहे.

स्वप्नावभासाप्रमाणे मिथ्या वाटणारे हे जगत जडजीवांसाठी मात्र पूर्णतया सत्य व वास्तविक असते व आशा- कामना- चिंता इ.च्या वश होत्साते ते जीव या जगतास चिरंतनत्व बहाल करण्यास प्रवर्ततात. कल्पांती विश्वप्रलय होतो. तरीसुद्धा या अगणित जीवांशांच्या योगाने पुन:पुनः सर्जन पावणारे जगत आत्म्याप्रमाणेच अनादी व अगम्य होऊन राहते.

या विश्वाचा व त्यातील सजीव योनींचा आणि प्रमुख्याने मनुष्यप्राण्यांचा पुरातन संबंध काय आहे, हे जाणून घेण्याची इच्छा सर्वच विचारवंतांना कधी ना कधी झालेली आहे. परंतु खूप शोध घेऊनही व बौद्धिक परिश्रमांची कमाल करूनसुद्धा या संबंधांचा निश्चित असा बोध होऊ शकत नाही, हे तसे माहितीतलेच आहे. किंबहुना हा असा प्रयत्न जाणतेपणी करणाऱ्या व एककल्लीपणे त्यास स्वत:चे जीवित वाहून घेणाऱ्या प्रज्ञावंतांच्या हाती बहुतेक वेळा शून्यापेक्षा अधिक काहीच लागले नाही, असाही खेदपूर्वक निर्णय करावा लागतो. किंबहुना एका विशिष्ट मर्यादेपलीकडे मनुष्य या विचाराचा आपल्या सीमित बुद्धीने पाठपुरावा करण्यास असमर्थच आहे, असाही निश्चय करावा लागतो.

ज्ञानदेवांच्या प्रज्ञेने उकलणारे विश्वाचे गूढ

म्हणून मानवी बुद्धीला अगम्य होऊन बसलेले हे विश्वाचे गूढ गीतेचे माध्यम स्वीकारून श्रीज्ञानदेव कसे स्पष्ट उकलतात, हे पाहणे

मनोरंजक आणि बोधप्रद ठरते. योगनिष्ठेने प्राप्त झालेली ***असामान्य प्रज्ञा*** या विश्वाच्या संरचनेचा व त्याच्या रहस्याचा शोध लावण्यास समर्थ असते, असा एक आनुभविक सिद्धांत पौर्वात्य तत्त्ववेत्त्यांपैकी काहींनी स्वीकारला आहे. पतञ्जली तर योगाच्या निष्ठापूर्वक आचरणाने ***भुवनज्ञान, तारकाज्ञान*** इ.मानवी बुद्धी व दृष्टीसामर्थ्यापलीकडील ज्ञान संयमादींनी प्राप्त होते, याबाबत ठामपणे सूत्रांची उभारणी करून सांगतांना आढळतात.

सततच्या परमात्मचिंतनाने एकाग्र व विशुद्ध झालेली ***व्यावसायात्मिका बुद्धी*** लाभलेल्या मान्यवर ऋषी, मुनी, योगी व तत्त्वज्ञ यांनी जे या सृष्टीचे मनोरम गूढ उकलून स्पष्ट केले आहे, ते आधुनिक विज्ञानवाद्यांच्या समजूती पटविण्यासाठी नसून, साधकांना साध्यापर्यंत - भगवंतापर्यंत - पोहोचण्यास उपकारक ठरावे याच हेतूने प्रेरित होऊन केलेले आहे.

तशी दृष्टी सततच्या आत्मपरीक्षणाने व चिंतनाने ज्या आधुनिक विज्ञानवाद्यांस प्राप्त झालेली नाही, त्यांचे भौतिकी शास्त्रातील यश व व्यक्तिमत्त्व जरी न्यूटन वा आईन्स्टाईनसारखे उत्तुंग असले, तरी साधुसंत, योगी, ऋषी, मुनी, तत्त्वज्ञ यांची ही तत्त्वज्ञानप्रणाली आकलून घेण्यासाठी त्यांची कुवत निखालस थिटीच पडणार, हे तसे पाहिले तर या अध्यात्मशास्त्रातील वेचक निर्विवाद सत्यच मानावे लागते, असे आर्जवपूर्वक सांगावेसे वाटते.

भौतिकीशास्त्रांची अल्पतया जुजबी माहिती असणाऱ्या कोणीही उठावे व आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतावर अधिकारी वाणीने वक्तव्य करावे, किंवा आक्षेप नोंदवावेत, हे ज्याप्रमाणे विद्वन्मान्य होणार नाही; त्याचप्रमाणे ज्याने भारतीय तत्त्वज्ञानदृष्टीचा सांगोपांग विचार तसेच प्रायोगिक अभ्यास त्या त्या पातळीवर केलेला नाही, त्यानेसुद्धा भारतीय तत्त्वज्ञांच्या विचारधनाबाबत काहीही अपलाप काढू नयेत, हेच उचित व शास्त्रदृष्टीनेही तर्कसंगत ठरते.

जे अध्यात्मशास्त्र व्यवहारी तर्कशास्त्रास जुमानीत नाही, त्याला तार्किक कसोट्या लावून खोटेपणाचे ठरवू पाहणारे जे काही आधुनिक विज्ञानाने डोळे विस्फारलेले महाभाग आहेत, त्यांनी याचा जरूर विचार केला पाहिजे व व्यर्थ *वदतोव्याघाता*चा दोष स्वतःच्या तर्ककुशल बुद्धीच्या पदरी बांधून घेऊ नये, अशी विनंती यासाठीच आवर्जून करावीशी वाटते. असो.

ध्यान-धारणा–समाधि या अंतरंग योगांगांत प्रवेशलेल्या साधकास *भ्रान्त* दर्शनापासून सावध राहण्यासाठी पातञ्जल योगसूत्रांतूनसुद्धा सूचना आहेत. म्हणजेच या मार्गाने जाणाऱ्या साधकांच्या स्वमोहनिद्रा *(self-hypnosis)* वा तत्सम आधुनिक मानसविज्ञानास *(Psychology)* परिचित असलेल्या स्थितीसंबंधी पतञ्जली केवळ जाणकारच होते असेच नव्हे, तर दक्षतापूर्वक त्या अवस्थेचा कसा त्याग करावा, याचेही मार्गदर्शन त्यांनी आपल्या सूत्रांद्वारे केलेले आढळते.

त्यामुळे समाधिस्थित योग्यांना धारणा-ध्यानादींतून प्राप्त झालेले विश्वज्ञान व विज्ञान यांना केवळ कपोलकल्पित वा असंतुलित मनाचे खेळ समजणे योग्य ठरत नाही. आणि तसे पाहिले तर आपले स्वतःचे अस्तित्वच जेथे आभासात्मक आहे व या विश्वाचा *स्व* शिवाय इतर कोणीच दुसरा जाणकार संभवत नसल्याने, दुसऱ्याचा *चक्षुर्वैसत्यं* असा पुरावा तरी कोणी आणि कोणाला द्यावयाचा! आणि तशी अपेक्षा पण भारतीय तत्त्ववेत्ते व योगवेत्ते यांच्या केवळ प्रातिभ पातळीवरील ज्ञानविशेषांबद्दल करणेही योग्य ठरणार नाही.

स्वसंवेद्यतेचे प्रमाण

वस्तुतः जगतात स्वतःच्या अनुभूतीची प्रचिती वा पुरावा देणारा दुसरा कोणी मनुष्य असू शकेल, असे मानणेसुद्धा खरे पाहिले तर मोठाच भ्रम होय. कारण जर कोणी मी जे पाहिले, मी जे ऐकले, किंवा मला करतांना पाहिले, तरच तो त्याचा पुरावा देऊ शकेल ना! जर मी पाहिलेल्या, ऐकलेल्या किंवा केलेल्या गोष्टीला पुरावा म्हणून समजली जाणारी स्थिती अस्तित्वात उरली नाही, तर मी जे केले, पाहिले वा ऐकले, ते माझ्या दृष्टीने कितीही खरे असले, तरी त्याचा पुरावा कसा देता येईल!

त्याचप्रमाणे जेव्हा मलाच दुसऱ्याने दिलेल्या पुराव्यासदृश प्रतिसादाची काही कारणाने जरूरी भासते, तेव्हा जर तसा प्रतिसाद मिळाला, तरी तो ग्रहण करणारा शेवटी मीच आहे ना! म्हणजे शेवटी असा पुरावाही ***मीला मी*** **च प्रमाण अथवा *स्व* ला *स्व* च प्रमाण** अशा अंतिम स्वरूपाचा असल्याचा निष्कर्ष काढावा लागतो. आता *स्व* चे अस्तित्वच जर असे परदर्शी पुराव्यासाठीही *स्व* वरच अवलंबून आहे, तर *स्व* हीसुद्धा कोणतीतरी भ्रामक स्थिती वा अवस्था नसेल, हे कशावरून निर्विवाद सिद्ध करता येईल!

अशी स्थिती असल्याने तर्कशास्त्र वा आधुनिक विज्ञान ही शेवटी *स्व* वरच आधारलेली शास्त्रे आहेत, असेच दिसते. सर्व अनुभूती, सर्व संवेदना, सर्व विचार असे स्वाधिष्ठीत असल्याने, *स्व* वर अधिष्ठित असलेले अध्यात्मशास्त्र व त्याच्या अनुभूती खोट्या ठरवायच्या तर कोणत्या आधाराने! फारच झाले तर असे म्हणू या की कदाचित एका मुंगीची अनुभूती वा *स्व* ही जर मनुष्याची अनुभूती वा *स्व* जाणून घेण्यास अक्षम असेल, तर मुंगीला माणसाची अनुभूती वा *स्व* समजू शकता येणार नाही.

तसेच अशीच भिन्नता माणसामाणसातही असू शकेल. म्हणूनच एखाद्या तार्किक विद्वानास वा आधुनिक विज्ञानवाद्यास ऋषिमुनींच्या अध्यात्मविचारांचे आकलन होणे दूर राहून, तो सगळा भ्रम वा खुळेपणा आहे, असे त्याला वाटणेही स्वाभाविकच आहे. तरीही ज्यांना ऋषिमुनींच्या *स्व* ची अनुभूती येत आहे, अशा साधकांसाठी त्यांचे ते ऋतंभरा प्रज्ञेच्या सामर्थ्याने प्राकट्य पावलेले विचार बहुमोल व सत्यच समजले पाहिजेत. परंतु असे भाग्यवंत थोडेच असतात!

अध्यात्मदर्शनाची दुर्लभता

अध्यात्मदर्शन किती दुर्लभ आहे, हे याप्रकारे जाणवल्यामुळेच किंबहुना श्रीगोपालांना म्हणावे लागले असावे कीः

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः।।७-३।।

"हजारो लाखो मनुष्यांपैकी कोणी एखादाच मनुष्य माझ्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो आणि तसा प्रयत्न करणाऱ्या योग्यांमध्येसुद्धा एखादाच पुरुष मला यथार्थ तत्त्वदृष्ट्या जाणतो."

श्रीगोपालांचेच असे म्हणणे असल्याने या विषयावर व आधुनिक विज्ञानवाद्यांसाठी म्हणून मुद्दाम अधिक काही सांगण्याची आवश्यकता उरत नाही. म्हणून आता आपण गीतेद्वारे उपदेशिलेल्या व ज्ञानदेवांनी साजशृंगारलेल्या त्या ***विश्वमोहिनी*** चा - **प्रकृति-पुरुषां**च्या लीलांचा परिचय करून घेऊ या.

"श्रीशारदा विश्वमोहिनी। नमिली मियां"

मनुष्याने प्राप्त जन्मात कर्तव्यकर्मे करत असतांनाच परमात्म्याकडे बुद्धी वळवावी व त्यासाठी योगाभ्यासाचे दृढ प्रयत्न करावेत, असे सांगितल्यावर श्रीगीतेचा रोख *सातव्या* अध्यायापासून प्रामुख्याने ***आत्मा व जगत*** यांच्या परस्परसंबंधांकडे वळतांना दिसतो. म्हणूनच श्रीशारदेचा हा विश्वविलास अर्जुनाकरता म्हणून जरी म्हटले, तरी त्यानिमित्ताने श्रीकृष्णांनी आपण होऊन समस्त जिज्ञासूंसाठी गीतेच्या पुढील श्लोकाद्वारे हा विचार सांगण्यास सुरुवात केलेली दिसते.

प्रकृतीपलीकडील भाव

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु।।७-१।।

"हे पार्था! माझ्या ठिकाणी आपले मन अनन्यप्रेमाने आसक्त ठेवून व केवळ माझाच आश्रय करून योगसाधन करतांना सर्व विभूति, बल, ऐश्वर्य, यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्यादी गुणांनी युक्त व सर्वांचे मूलस्थान अशा मज आत्म्यास ज्या रीतीने संशय न उरता जाणता येते, ते ऐक."

श्रीकृष्ण पुढील श्लोकात म्हणतातः

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।।७-२।।

"मी तुला **हे *तत्त्वज्ञान* रहस्यासह - *जगत -विश्व - प्रपंचाच्या आतील गाभ्यासह - आत्मज्ञाना* सह** पूर्णपणे सांगतो की जे जाणले असता जगात आणखी काहीही जाणावयाचे शेष राहत नाही."

"असे हे माझे ज्ञान हजारो लाखोंपैकी कोणा एखाद्याच माणसास प्राप्त होते*(७-३गी.).*"

पतञ्जलींचा भ्रांतदर्शन विचार::::

योगातील अंतराय व विक्षेप

याप्रमाणे या विषयाचा उपोद्घातच श्रीकृष्णांनी केला आहे, तो ***प्रकृति-जगत-विश्व-प्रपंच*** या संकल्पनेपलीकडील ***सत्य* वा आत्मदर्शनासाठी!** या ठिकाणी थोडेसे विषयांतर करून भ्रांतदर्शनासंबंधीचा पातञ्जल विचार पाहू या. पतञ्जलींनी आपल्या सूत्रात ***भ्रांतदर्शना***चा धोका निर्देशित केलेला आहे. योगात येणारे अडथळे - ***अंतराय*** त्यांनी सांगितले आहेत; तसेच विक्षेपही सूचित केले आहेत. ते म्हणतातः

१)व्याधिस्त्यानसंशयप्रमादालस्याविरतिभ्रान्ति-दर्शनालब्धभूमिकत्वानवस्थितत्वानि चित्तविक्षेपास्तेऽन्तरायाः।।१-३०।। पा.यो.सू.।।

२)दुःखदौर्मनस्याङ्गमेजयत्वश्वासप्रश्वासा विक्षेपसहभुवः।।१-३१।। पा.यो.सू.।।

हे अडथळे म्हणजे -१) भिन्नभिन्न व्याधी, २) योगसाधना करू नयेसे वाटणे, ३) संशय - स्वतः करत असलेल्या साधनाच्या फलद्रूपतेसंबंधी वा गाठावयाच्या उद्दिष्टांसंबंधी - म्हणजे आत्मा आहे का येथपासून तो त्याचे योगसाधनेद्वारा दर्शन होईल का, येथपावेतो कोणतीही शंका असणे, ४) योगसाधनेस अनुकूल सर्व साधनसंपत्ती असता तिचा उपयोग न करणे वा योगसाधन संपूर्णपणे उपेक्षिणे, ५) योगसाधनेचा आळस, ६) अतृप्ती - विषयादिकांचा ओढा कमी न होणे, ७) योगसाधना करतांना साक्षात्कारादी वा आत्मदर्शन होण्याच्या भूमिकेपर्यंत न पोहोचताच आपणांस साक्षात्कार वा आत्मदर्शन झाले आहे असा वृथा संभ्रम निर्माण होणे, ८) उत्तरोत्तर श्रेष्ठ योगभूमीवर आरूढ होण्याचा वारंवार प्रयत्न करूनसुद्धा चित्ताचे तसे साम्य न झाल्याने ती भूमिका अप्राप्त राहणे व ९) वरची योगभूमिका जरी प्राप्त झाली तरी तेथे निश्चल राहता न येणे. योगसाधकांच्या चित्तात विक्षेप निर्माण करणारे ***अंतराय*** ते हेच होत.

त्याचप्रमाणे त्रितापदुःखे, मनाची अस्वस्थता, हातापायांना कंप सुटणे, श्वासोच्छ्वास नीट न करता येणे हे इतरही विक्षेप साधकांना भेडसावू शकतात.

एकतत्त्वानुसंधान::::

एकतत्त्वाभ्यासाचा उपाय

या सर्वांवरील उपाय पतञ्जलींनी सांगितला आहे, तो असाः

१) ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च।।१-२९।।पा.यो.सू.।।

२) तत्प्रतिषेधार्थमेकतत्त्वाभ्यासः।।१-३२।।पा.यो.सू.।।

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ***प्रत्यक्चेतन*** बुद्धिसाक्षी चैतन्यमय पुरुषाचा म्हणजे आत्म्याचा जेव्हा साक्षात्कार होतो, त्याचे जेव्हा ज्ञान होते, तेव्हा योगसाधनेत अडथळे निर्माण होत नाहीत व जरी तसे अडथळे आले, तरी त्यांचा सहजच नाश होतो - परिहार होतो. त्यासाठी

साधकाने पुन पुनः त्याच त्या एका तत्त्वाचा एकाग्रतेने योगाभ्यास करावा, असे म्हणतात.

गीतेच्या साधनाप्रणालीच्या संदर्भात ***एकतत्त्वाभ्यास* म्हणजे ईश्वरप्रणिधानाद्वारे प्राप्त करावयाच्या आत्मतत्त्वाचा धारणा-ध्यान-समाधि इ.अभ्यास होय.** यानंतरच्या काही पातञ्जलयोगसूत्रांतून आणखी काही उपाय सांगून साधकाने वरील सर्व अडथळ्यांवर कशी मात करावी ते सुचविले आहे.

सकृद्दर्शनी श्रीकृष्णांनाही हे एकतत्त्वाभ्यासाबाबतचे पातञ्जलमत अभिप्रेत असावे असे गीता वाचतांना सतत वाटत राहते. श्रीकृष्णांनी *सहाव्या* अध्यायाद्वारे योगसाधनेचा मेरूपर्वत सविस्तर वर्णिला आणि तोच ज्ञानदेवांनी स्वतःच्या चातुर्याने ***"न भूतो न भविष्यति"*** अशा स्वरूपात प्रकट केला आहे, हे आपण पूर्वी थोड्याफार प्रकारे पाहिलेच होते.

योगसाधनेचा उत्तुंग सोपान आक्रमणाऱ्या साधकाला साधनाकाली येणारे अडथळे ध्यानी घेऊनच त्याचा अभ्यास परिपक्व व्हावा म्हणून विज्ञान सांगण्याच्या निमित्ताने श्रीगोपालकृष्णांनी *सातव्या* अध्यायाच्या प्रारंभापासूनच अर्जुनाला ज्ञानसुद्धा सांगण्यास मनोरंजक सुरुवात केलेली आढळते.

अशा प्रकारे पतञ्जलींनी सुचवल्याप्रमाणे त्यांनी अर्जुनाची दृष्टी पुनःपुनः त्यानंतरच्या अध्यायात त्याच त्या एका तत्त्वावर-आत्मतत्त्वावर केंद्रित करवलेली आहे. आपल्याला मात्र हा पूर्वापर संबंध लक्षात न आल्याने उगीचच वाटत राहते की श्रीकृष्ण आता आसुरी संपदा वर्णन करत आहेत आणि आता कर्म कसे करावे एवढेच सांगत आहेत, इ.इ.

खरे तर श्रीकृष्णाच्या ध्यानीमनी अर्जुनाला सतत आत्मतत्त्वच कसे दिसत राहील हाच विचार संपूर्ण गीता उपदेशितांना आहे. पण आपण अल्पज्ञ त्याला अन्यथा समजतो व श्रीज्ञानदेवांसारखा पट्टीचा मर्मज्ञ जेव्हा ही रहस्ये आपणांसमोर उलगडून ठेवतो, तेव्हाच हे जाणवून आल्याने आपण हर्षनिर्भर होतो!!!

साधकाची दृष्टी कशावर असावी

त्यामुळे विज्ञानानंदात रमतांना आपण केवळ ज्ञान आणि विज्ञान यांच्या व्याख्यांत किंवा इतर फापटपसाऱ्यात न सापडता केवळ ***जे निखिल-निरञ्जन आत्मतत्त्व आहे, त्याचाच या निमित्ताने मागोवा घेणे उचित होईल!!!***

ज्ञानदेवांच्या ***"मय्यासक्त मनाः पार्थ....।।"*** व ***"ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं......।।७-१,२।।"*** या गीताश्लोकांवरील ओव्यासुद्धा आपणांस साक्षेपाने हाच विचार व्यक्त करतांना दिसतातः

आईकां मग तो अनंतु। पार्थातें असे म्हणतु।
पैं गां तु योगयुक्तु। जालासि आतां।।७-१।।
मज समग्रातें जाणिसीं ऐसें। आपुलियां तळहातीचें रत्न जैसें।
तुज ज्ञान सांघेन तैसें। विज्ञानेंसीं।।२।।

मग तो अनंत पार्थाला म्हणाला, "तू आता योगज्ञानयुक्त झाला आहेस. योगसाधना करत करत जेव्हा मी तुला प्राप्त होईन, तेव्हा तळहाती घेतलेले रत्न जसे त्याच्या दीप्तीवरून ओळखून घ्यावे, तसे तू मला पूर्णपणे ओळखू शकशील असे खुणेचे वर्म असलेले ***ज्ञान*** मी तुला ***विज्ञानासह*** सांगतो."

एथ विज्ञानें काय करावें। ऐसें घेसीं जऱ्हीं मनोभावें।
तऱ्हीं पैं आधीं जाणावें। तैंचि लागे।।७-३।।
मग ज्ञानाचियें वेळें। झांकती जाणिवेचें डोले।
जैसा तीरीं नाव न ढळे। टेकलीं सांतीं।।४।।

"आता विज्ञानाचे येथे काय काम असे जर तुला वाटत असेल, तर एक लक्षात घे की तेच प्रथमतः जाणून घेतले पाहिजे. म्हणजेच तुला ***ज्ञान व अज्ञान यांचा खरा निवाडा*** करता येईल. कारण की ***जेव्हा ज्ञानप्राप्ती होते, त्यावेळी जाणीव शिल्लक राहत नाही. एखादी नाव जशी तीरावर गच्च बांधून घातली असता पाण्याच्या ओढीने वाहत जात नाही, तसा त्यावेळी हाच ज्ञानविज्ञानाचा अभ्यासिलेला तरतमभाव अंतरंगात राहून साधकाला अढळ आधार देतो व त्याला सत्याची प्रचिती सज्ञानपणे घेता येते."***

तैसीं जाणीव जेथ न रिगे। विचार मागुतां पाउलीं निघे।
तर्कु आयणी नेघे। आंगीं जेयाचां।।७-५।।
अर्जुना तेयां ज्ञान₁। एर प्रपंचु हे विज्ञान₂।
तेथ सत्यबुद्धी तैं अज्ञान₃। हेहीं जाण।।६।।
आतां अज्ञान आघवें हारपें। विज्ञान निःशेख करपें।..।।७।।

"स्वरूपप्राप्ती होते, तेव्हा बुद्धीचे डोळे झाकले जातात. विचार तेथून मागल्या पावली परत फिरतो आणि तर्क ज्यापावेतो पोहोचू शकत नाही, असे ते ***ज्ञान₁*** असते - असा तो आत्मा असतो. त्याच्याशिवाय इतर ***प्रपंच*** वा ***संसार*** हे ***विज्ञान₂*** होय आणि हा प्रपंच - संसार वा जगत हीच अंतिम सत्ये आहेत, असे समजणे खरेखुरे ***अज्ञान₃*** आहे."

...। आणि ज्ञान तैं स्वरूपें। होऊनि जाईजे।।७-७।।
ऐसें वर्म जैं गूढ। तैं कीजैल वाक्यारूढ।
जेणे थोडेन पुरे कोड। बहुतां मनींचें।।८।।
जेणें सांगतयाचें बोलणें खुंटे। ऐकतयाचें व्यसन तुटे।
हे जाणणे सानें मोठें। उरो नेदी।।९।।

"आता तुझ्या मनात निर्माण झालेले कुतूहल शमवण्यासाठी, ज्यायोगे ***अज्ञान*** निःशेष नाहीसे होईल, ***विज्ञान*** म्हणजे ***संसारभाव*** करपून जाईल व ***ज्ञान*** तेवढे स्वरूपाने प्रकट होईल, असे गूढ वर्म तुला सांगतो. ते ऐकल्यावर पुढे काही सांगावयाचे वा ऐकावयाचे शिल्लक उरत नाही व सांगणारा व ऐकणारा असा भेदही उरत नाही."

अ.२ श्लोक क्र. ५२ मध्ये भगवंतांनी ***"...तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।"*** असे म्हटले होते. त्याची आठवण ज्ञानदेवांची वरील उक्ती करून देते. सांगणारे वेद व ऐकणारे वेदज्ञ

यांच्यापलीकडील ही स्थिती येथे निर्देशिली आहे. ***वेदातीत असे ब्रह्म येथे अनुस्यूत आहे.***

प्राप्तीचा पैलतीर गाठणारा *विपाइलं*

पैं गां मनुष्यांचिया सहस्रशां- ।
माजि विपाइलेयाचि एथ धिंवसा ।
तैसयां धिंवसेकरां बहुवसां- ।
माजि विरला जाणे ।।७-१०।।
जैसा भरलेयां त्रिभुवना । आंतु एक एक चांगु अर्जुना ।
निवडूनि कीजे सेना । लक्षवरी ।।११।।
कीं तेयांही पाठीं । जैं वेलीं लोह मांसातैं घांटी ।
तैं वेळीं विजयश्रियेचां पाटीं । एकुचि बैसें ।।१२।।
तैसें आस्थेचां महापुरीं । रिघताती कोटीवेरी ।
परी प्राप्तीचां पैलतीरीं । विपाइलं निगे ।।१३।।
म्हणौनि सामान्य गां नोहे । हे सांगतां वडिल गोठी गां आहे ।
परि तैं बोलों येईल पाहें । आतां प्रस्तुत आइकें ।।१४।।

"अरे अर्जुना ! हजारो मनुष्यांपैकी एखाद्यालाच हे जाणण्याची इच्छा होते व त्या हजारो इच्छुकांपैकी विरळाच स्वरूपज्ञानास जाणतो. ज्याप्रमाणे त्रिभुवन धुंडूनधुंडून एक एक वीर गोळा करत लक्षावेरी सेना उभी करावी आणि त्यातूनही रणकंदन झाल्यावर उरलेल्यातील कोणी एखादाच वीर विजयश्रीच्या सिंहासनावर अधिष्ठित व्हावा; त्याचप्रमाणे स्वरूपज्ञानापासून निर्माण झालेल्या जीवांच्या महापुरातील ***कोणी एखादाच जीव अपवादात्मक ठरून परत स्वरूपास जाऊन मिळतो.*** म्हणून ***स्वरूपज्ञानप्राप्ती जीवास होणे वा जीवन्मुक्ती प्राप्त होणे, ही काही सामान्य गोष्ट नाही;*** तर ते एक मोठे गूढ आहे. परंतु तेसुद्धा मी तुला उकलून सांगतो. ते नीट ऐक."

असे अपवादात्मक जीवच मुक्ती पावतात आणि म्हणूनच त्या स्तरावरील गुरूही ज्ञानदेवांसारखे विरळाच असतात; गांवगन्ना गुरूंचे जे पेंव फुटलेले दिसते, ते गुरू कोणत्या प्रकारचे असले पाहिजेत, ते यावरून सहज स्पष्ट व्हावे.

प्रकृति व चिद्विलास::::

प्रकृतीचे अष्टधा स्वरूप

यानंतर गोपालकृष्ण प्रकृतीचे अष्टधा स्वरूप सांगतातः

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहङ्कारं इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ।।७-४।।

"१) पृथ्वी, २) आप, ३) अग्नि, ४) वायु व ५) आकाश ही पंचमहाभूते, तसेच ६) मन, ७) बुद्धि व ८) अहंकार ही अशी मिळून आठ प्रकारात विभागलेली माझी प्रकृति आहे."

अपरा व परा प्रकृति

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ।।७-५।।

"ही अष्टधा भेद असणारी तर माझी ***अपरा*** अर्थात जड प्रकृति आहे. हे महाबाहो ! तिच्यापेक्षा अन्य अशी माझी दुसरी प्रकृति जीवरूप असून तिला ***परा*** वा चेतन प्रकृति म्हणून जाण. या ***परा***प्रकृतीनेच हे संपूर्ण जगत धारण केले जात आहे."

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ।।७-६।।

"आणि असे समज की सर्व भूते या दोन्ही प्रकृतींपासूनच उत्पन्न झालेली आहेत व मी सर्व जगताचे उत्पत्ति व प्रलयरूप अर्थात मूलकारण आहे."

चिद्विलासाचे गीतेतील मूळ

मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।।७-७।।

"म्हणून हे धनंजया ! माझ्याशिवाय किंचितमात्रही दुसरे काहीही नाही. हे सर्व जगत दोऱ्यात जसे दोऱ्याचेच मणी ओवावेत, तसे माझ्याठायी ओवलेले आहे."

अशा प्रकारे गीता *श्लोक क्र.७-४ ते ७* या केवळ चारच श्लोकांद्वारे भगवान या संपूर्ण विश्वाची संरचना; त्याची उत्पत्ती, स्थिती व लय; जीव, विश्व व विश्वात्मा यांचा परस्परसंबंध सूत्ररूपाने प्रस्तुत करतात. ***विश्व*** म्हणजे जणू सोन्याच्याच दोऱ्यात सोन्याचेच मणी ओवावेत, तशी आत्म्याठायी आत्मरूपाची सृष्टी होय. ज्ञानदेवांचा ***विश्वात्मक देव*** याच स्वरूपाचा आहे. किंबहुना त्यांचा सबंध ***अमृतानुभव*** पण याच स्वरूपावर आधारलेला आहे.

अपरा* प्रकृतीचे अष्टधा भाग व *परा (जीव)* प्रकृति यात विभागलेले हे जग जरी वैज्ञानिकतया असे असले, तरी ज्ञानदृष्टीने यांच्यात व विश्वाच्या मूलतत्त्वात काहीच भेद नाही; हेच *अभेदज्ञान* यातून प्रकट झालेले आहे. *श्रीज्ञानदेवांच्या चिद्विलासवादाची स्फूर्तिदात्री गंगोत्री या चार श्लोकातून उगम पावते, असेही म्हटल्यास वावगे ठरू नये. किंबहुना श्रीगीतेवर या विषयासंबंधी प्रकांडपंडितांनी ***जीव, जगत व ईश*** वा तत्सम कल्पनांविषयी जे विविध वाद उपस्थित केलेले आहेत, त्यांचे समर्पक उत्तर जाणकारांनी या चार श्लोकांत शोधल्यास त्यांचे श्रम जरूर सार्थकी लागतील, असे हे *श्लोकचतुष्टय* आहे. असो.

विश्वामागचे रहस्य

या श्लोकांवरील ज्ञानदेवांचे भाष्य पाहू याः

तऱ्हीं अवधारीं गां धनंजया । हे महदादिक माझी माया ।
जैसीं प्रतिबिंबें छाया । निजांगाची ।।७-१५।।
आणि इयेंतें प्रकृति म्हणिजे । जैं अष्टधा भिन्न जाणिजे ।
लोकत्रय निफजे । इयेंस्तव ।।१६।।
हे अष्टधा भिन्न कैसीं । ऐसा ध्वनी जऱ्हीं धरिसीं मानसीं ।
तऱ्हीं तैंचि गां परियेसीं । विवंचना ।।१७।।

आप तेज गगन। महीं मरुत मन।
बुद्धि अहंकार हे भिन्न। आठै भाग।।१८।।

ज्ञानदेवसुद्धा जवळ जवळ श्रीकृष्णांच्याच भाषेत हे सांगतात. इतर ठिकाणी बहुतप्रकारे श्रीकृष्णोक्तीचा विचार करणाऱ्या ज्ञानदेवांना येथे मात्र हा विषय थोडक्यात आवरलेला दिसतो. सामान्यपणे असे म्हणावेसे वाटते की शास्त्रीय दृष्ट्या विश्वाची जी महत्तत्त्वादींमध्ये रचना दाखवता येते, तिलासुद्धा येथे ज्ञानदेव एका महदादिक या शब्दात व्यक्तवितात.

वास्तविक पाहता ज्ञानदेवीत इतस्ततः हा विषय बहुल ओव्यांतून वर्णिलेला आहे आणि त्यावरून ज्ञानेश्वरांचे या विषयावरील सखोल ज्ञान व विचारधाराही दृष्टीस पडतात. परंतु येथील स्वल्प विवेचनावरून विश्वाची ***भौतिक संरचना*** हा अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने विश्व व तद्विषयक संकल्पनांच्या प्रस्तुत संदर्भात - ज्ञानविज्ञानाविषयी - त्यांच्या दृष्टीने सध्यातरी गौण भागच दिसतो. जिज्ञासूंनी याची नोंद घ्यावी. असो. ते म्हणतातः

"हे अर्जुना! महत्तत्त्वादी ही माझी माया आहे. आपल्या अंगाची जशी छाया पडते, तशी ही माझ्या सावलीप्रमाणे आहे. हिलाच प्रकृति असे म्हणतात. ही आठ प्रकारात विभक्त आहे. हिच्यामुळेच त्रैलोक्याची उत्पत्ती होते. ही आठ प्रकारात कशी विभागलेली आहे ते ऐकः

१) आप, २) तेज, ३) गगन, ४) पृथ्वी, ५) वायू, ६) मन, ७) बुद्धी व ८) अहंकार हेच ते भिन्नभिन्न आठ विभाग होत.

जीवरूपा परम प्रकृति

आणि या आठांची जैं साम्यावस्था। तैं माझी परमप्रकृति पार्था।
तियें नाम व्यवस्था। जीवु ऐसें।।७-१९।।
जैं जडातैं जीववी। चेतनेंतैं चेतवी।
मनाकरवी मानवी। शोक मोहो।।२०।।
पैं बुद्धीचां आंगीं जाणणें। तैं जियेचियें जवलिकेचें करणें।
जियां अहंकाराचेनि विंदाणें। जगचि धरिजे।।२१।।

"या आठांना धारण करणारी माझी श्रेष्ठ प्रकृति जी आहे, तिला ***जीव*** *(परा)* असे म्हणतात. ती जडाला जीवन देते, चेतना भरते आणि मनाकडून संसार भोगवते. बुद्धीमध्ये जाणीव तिच्यामुळेच आहे. ती अहंकाररूपाने समस्त जग धारण करते."

तैं सूक्ष्म प्रकृति कोडें। जैं स्थूलाचियां आंगां घडे।
तैं भूतसृष्टीची पडे। टांकसाल।।७-२२।।
चतुर्विधु ठंसा। उमटो लागे आपैसा।
मोला तऱ्हीं सरिसा। परि थरचि आनान।।२३।।
होती चौऱ्यांशी लक्ष थरा। येरां मिती नेणिजे भांडारा।
भरे आदिशून्याचां गाभारा। नाणेयांसीं।।२४।।

"ती ***जीवरूप सूक्ष्म परा प्रकृति*** जेव्हा सहजच स्थूळात म्हणजे ***अपरा प्रकृति*** म्हणून रूप पावते, तेव्हा समस्त भूतादींचा उगम होतो; अंडज, जारज, उद्भिज व स्वेदज या चार प्रकारांची जीवसृष्टी प्रकटते. हे चार प्रकार सारखे असले तरी जीव मात्र भिन्नभिन्न प्रकारांचे निर्माण होतात. चौऱ्यांशी लक्ष योनी व त्यांव्यतिरिक्त आणिक कितीतरी कोट्यवधी जीव त्या प्रकृतीच्या भांडारात असतात, त्यांची गणनाच नाही. त्या टांकसाळीतून निघालेल्या जीवरूपी नाण्यांनी आदिशून्याचा गाभारा भरून जातो."

ऐसें एकतुकें पांचभौतिक। पडती बहुवंस टांक।
मग तियें समृद्धीचें लेख। प्रकृतीचि धरीं।।७-२५।।
जैं आंखूनि नाणें विस्तारीं। पाठीं तेयांची आटणी करी।
माजीं कर्माकर्माचियां व्यवहारीं। प्रवर्त्तु दावी।।२६।।
हे रूपक परि असो। सांगो उघड जैसें परियेसों।
तऱ्हीं नामरूपाचां अतिसो। प्रकृतीच कीजे।।२७।।
आणि प्रकृति तंव माझां ठायीं। बिंबें येथें आन नाहीं।
म्हणौनि आदि मध्य अवसान पाहीं। जगेंसीं मी।।२८।।

"पाचभौतिक छापाची अशी बरीच नाणी तयार होतात आणि त्यांची व्यवस्था पण प्रकृतीच पाहते. ज्या नाण्याचा एकदा आकार निर्माण केला, त्याची आटणीसुद्धा तीच करते व या दरम्यान प्राण्यांकडून कर्माकर्मव्यवहार तीच घडवून आणते. असो. हे रूपक राहू दे! स्पष्टच सांगायचे तर ***नामरूपात्मक*** सृष्टीचा विस्तार केवळ ती प्रकृतीच करणे जाणो! आणि प्रकृति तर माझ्याठायीच प्रकटते. म्हणून या जगाचा आदि, मध्य व अंत ही सर्व मीच आहे."

"सूत्रे मणिगणा इव"

हे रोहिणीचें जल। तेयाचें पाहतां येईल मूल।
तैं रश्मि नव्हती केवल। होय तो भानु।।७-२९।।
तेयाचिपरी किरीटी। इयां प्रकृति जालेयां सृष्टी।
जैं उपसंहरौनि कीजैल ठी। तैं मीचि आहे।।३०।।
ऐसें होय दिसें ना दिसें। हे मजचि माजिवडें असे।
मियां विश्व धरिजे जैसें । सूत्रें मणी।।३१।।
सुवर्णाचें मणी केलें। तैं सोनियाचां सुतीं वोविलें।
तैसें म्यां धरिलें। सबाह्याभ्यंतरीं।।३२।।

"जसे मृगजळाचे मूळ पाहू गेले तर ते प्रकाशकिरण नसून त्यांना प्रसविणारा सूर्य ठरते, त्याचप्रमाणे हे अर्जुना! सृष्टीचे उत्पत्ती व प्रलय हे जरी प्रकृतीमुळे होतांना दिसले तरी ते सर्व माझ्याचमुळे होतात, हे तुझ्या लक्षात येईल. सृष्टी असते, दिसते वा नसते, तेव्हा तरी मीच असतो ना! मी सूत्राने जसे मणी धरावे तसा सृष्टीला धारण करतो. ***सुवर्णाचे मणी करून ते सुवर्णाच्याच तारेत ओवावेत, तसे माझ्याठायी हे विश्व अंतर्बाह्य सर्व तऱ्हेने ओवलेले आहे.***"

याप्रमाणे सूत्रात्मा व सृष्टी, विश्वात्मा व विश्व, प्रकृति व आत्मा यांचे भिन्नत्व नाही; ते केवळ एकच होत; असा सिद्धांत प्रस्थापन करणाऱ्या श्रीकृष्णांची अन प्रज्ञावान श्रीज्ञानदेवांची प्रशंसा आपण

विश्वव्यापार

अल्पमती किती करणार! याच सिद्धांतावर - या **अभेददर्शना**वर - संपूर्ण गीता व ज्ञानेश्वरीचा साधकानुकूल व्यापार उभारलेला आहे. असो.

विभूतींची एक चुणूक

यानंतर श्रीकृष्ण आपण स्वतःच विश्वात कसे सर्वत्र भरून राहिलो आहोत, हे स्पष्ट करण्यासाठी विभूतिदर्शनाची एक चुणूक अर्जुनास दाखवतांना म्हणतातः

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु।।७-८।।
पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु।।७-९।।
बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्।।७-१०।।
बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम्।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।।७-११।।

"हे अर्जुना! पाण्यातील ***रस*** मी आहे; चंद्रसूर्य यातील ***प्रकाश*** मी आहे; सर्व वेदांतील ***ॐ कार*** मी आहे. आकाशातील ***शब्द*** आणि पुरुषातील ***पौरुष*** मी आहे. तसेच पृथ्वीतत्त्वातील सार म्हणजे ***गंधतन्मात्रा*** मीच आहे. अग्नीतत्त्वातील ***तेज*** मी आहे. सर्व भूतातील ***जीवन*** मी आहे. तपस्वी पुरुषांतील ***तप*** मी आहे. हे पार्था! सर्व भूतांचे ***आदिकारण*** मीच आहे. मीच बुद्धिमतांची ***बुद्धी*** व तेजस्वी पुरुषांचे ***तेज*** आहे. हे भरतश्रेष्ठा! आसक्ती व कामनारहित बलवान पुरुषांचे ***सामर्थ्य*** मी आहे.आणि धर्मानुकूल ***काम*** म्हणून सर्व भूतात मीच आहे."

यावर ज्ञानदेव म्हणतातः

म्हणौनि उदकीं रसु। कां पवनीं स्पर्शु।
शशिसूर्यीं जो प्रकाशु। तो मीचि जाण।।७-३३।।
तैसाचि नैसर्गिकु शुद्ध। मी पृथिविचां ठाईं गंधु।
गगनीं मी शब्दु। वेदीं प्रणवु।।३४।।
नराचां ठायीं नरत्व। जैं अहंभाविये सत्त्व।
तैं पौरुष मी हे तत्त्व। बोलिजत असे।।३५।।
अग्नि ऐसें आहाच। तेजां नामाचें आहे कवच।
तैं परौतें केलियां सांच। निजतेज तैं मी।।३६।।

"हे अर्जुना! म्हणूनच या सृष्टीचे आदिकारण मीच असल्याने, ***पृथ्वीतत्त्वाची तन्मात्रा*** मी आहे; ***आकाशतत्त्वाची तन्माात्रा*** मीच आहे. वेदाचे मूल म्हणजे ***प्रणव*** मी आहे. पुरुषांचे ***वीर्य*** मीच आहे व त्यांच्या ***पराक्रमाचा व सर्जनशक्तीचा कारक*** मीच आहे. महदादी तत्त्वांपैकी ***अहंकाराचे सत्तत्त्व*** मी आहे. तेजतत्त्व अग्नीरूपाने आविर्भूत होते. त्या ***तेजाचे निजतेज वा तन्मात्रा*** मीच आहे."

आणि नानाविध योनीं। जन्मौनि भूतें त्रिभुवनीं।
वर्ततें आहाति जीवनीं। आपुलालां।।७-३७।।
एकें पवनेंचि पिती। एकें तृणास्तव जिती।
एकें अन्नाधारें राहाति। जलें एकीं।।३८।।
ऐसें भूतांप्रत आनान। जैं प्रकृतिवशें दिसें जीवन।
तैं आघवां ठायीं अभिन्न। मीचि एकु।।३९।।

"आणि नाना प्रकारच्या योनीत जी जी म्हणून भूतमात्रे आहेत, ती ती आपल्या शरीरधारणेस अनुरूप असा जो जो आहार सेवितातः जसे कोणी वायू पिऊन जगतात; तर कोणी गवत खाऊन उपजीविका करताता; तर कोणी अन्न सेवन करतात; तर कोणी जलपानच करतात व त्यायोगे त्यांच्या जीवनास आधार जरी प्रकृतिवश वेगवेगळा दिसत असला तरी, त्या **सर्व जीवनाधारांठायी मीच एक अभिन्न असा *मूलाधार* आहे.**"

अशा प्रकारे भगवंतांनी यानिमित्ताने आपल्या मुख्य ***विभूति*** निरूपिण्यास सुरुवात केली आहे. यानंतरच्या काही श्लोकातून त्यांचा निर्देश करून त्यानंतर पुनश्च गीतेच्या *दहाव्या* अध्यायात त्या विस्तारपूर्वक सांगितल्या आहेत. या विभूति निरूपणाचा एक धावता आढावा आपण यापूर्वी ***चिद्भ्रमरविलास*** *(उन्मेषः१-२::विषयप्रवेश-२ पृ.क्र.२७-३०)* या भागात घेतला होताच! असो. यापुढील ओव्यात ज्ञानदेव भगवंतांचे वचन स्पष्ट करत म्हणतातः

पैं आदिचेनि अंवसरें। विरूढें गगनाचेनि अंकुरें।
जैं अंतीं गिळीं आखरें। प्रणवपटींचीं।।७-४०।।
जंव हा विश्वाकारु असे। तंव जैं विश्वाचिसारिखें दिसें।
मग महाप्रलयदशें। कैसेही नोहें।।।४१।।
ऐसें अनादि जैं सहज। तैं मी गां विश्वबीज।
हे हातातळीं तूझ। देईजत असे।।४२।।

"विश्वोत्पत्तीच्या वेळी आकाशरूपी अंकुराने - गगनतत्त्वाने - जे उगवते आणि प्रळयकाळी, प्रणवातून विस्तारलेल्या या **अक्षररूपी जगत् पटा**चा जे ग्रास करते; जोपावेतो हा विश्वाकार दिसतो, तोपावेतो जे विश्वरूपाने विलसते व महाप्रळयकाली जे अव्यक्तरूपाने समेटते; असे जे विश्वाचे **अनादी सनातन *बीज*** आहे; ते, हे अर्जुना! मीच आहे. हेच ***आदिबीज*** मी तुझ्यादेखत आता प्रकट केले आहे, ज्यायोगे तुझ्या बुद्धीचा सर्व प्रकारच्या विविध सैद्धांतिक विवादांचा संभ्रम नाहीसा होईल! "

याच आदिबीजाला उद्देशून त्यांनी प्रथमाध्यायी ***"तैं मियां नमिलें। आदिबीज"*** असे नमन केले आहे, हे आपण जाणतोच!

मग उघड करूनि पांडवा। जैं हे आणिसिल सांख्यांचियां गांवा।
तैं तेयाचां उपेगु बरवा। देखशील।।७-४३।।
परि हे अप्रासंगिक आलाप। आतां असतु न बोलों संक्षेप।
जाण तपियांचां ठायीं तप। तैं स्वरूप माझें।।४४।।
बलियांमाजी बल। तैं मी जाण अढल।
बुद्धिमंतीं केवल। बुद्धि तैं मी।।४५।।

"सांख्यांनी निरूपिलेला जो प्रकृति-पुरुषादी तत्त्वांचा या विश्वाबाबतचा सिद्धांत आहे, त्याचाही निखालस विचार करून सत्य काय ते पडताळण्यासाठी तुला माझ्या या विचारांचा फार उपयोग होईल. तुला खरा तत्त्वज्ञ होता यावे म्हणून मी हे एवढे विस्ताराने सांगत आहे. पण असो. तुला आता थोडक्यात माझी रूपे वा विभूति सांगतो. ***बळवंतांचे बळ*** मी आहे आणि ***बुद्धिमंतांची बुद्धी*** पण मीच आहे."

धर्म्य असा काम ही पण एक विभूतीच!

धर्म्य असा कामही आपणच आहोत, असे भगवंत म्हणतातः

भूतांचां ठायीं कामु। तो मी म्हणे आत्मारामु।
जेणें अर्थास्तव धर्मु। थोरु होये।।७-४६।।
एरवीं विकाराचेनि पैसें। करी कीर इंद्रियांचेयांचि ऐसें।
परि धर्मासीं वेखासें। जावो नेदीं।।४७।।

"प्रणिमात्रांठायी असणारा ***काम*** मीच आहे,"असे आत्माराम श्रीकृष्ण म्हणतात. "कामामुळेच अर्थ व धर्म हे पुरुषार्थ संपन्न होतात. म्हणजे कामाच्या पायावर अर्थ व त्यच्या पायावर धर्म हे पुरुषार्थ रचलेले आहेत. विधीस - शास्त्राज्ञेस - अनुसरून उपभोगलेल्या कामाच्या प्रेरणेने इंद्रियांना हवे ते पुरवले जाते; परंतु शास्त्रविहित आचरणास तडा जाऊ दिला जात नाही."

जैं अप्रवृत्तीचां आव्हाटा। सांडूनियां विधीचियां निघे वाटा।
तेवींचि नियमाचां दिवटा। सवें चालें।।७-४८।।
कामु ऐशियां वोजा प्रवर्ते। म्हणौनि धर्मासीं होये पुरतें।
मोक्षतीर्थींचें मुक्तें। संसारु भोगी।।४९।।

"अपप्रवृत्तीचा मार्ग सोडून विधीने दाखविलेल्या मार्गाने शास्त्रनियमरूप मशालजी बरोबर घेऊन चालतांना जरी त्याला काम असेच संबोधले जाते, तरी तो *काम धर्मास धारण करणारा होऊन, संसारात राहूनही, परमहंसांप्रमाणे मोक्षरूपी मानससरोवरातील मोत्यांचा चाराच सेवन करणारा होतो."*

जो श्रुतीगौरवाचां मांडवीं। कामु सृष्टीचा वेलु वाढवी।
जंव कर्मफलेंसीं पालवी। अपवर्गीं टेकें।।७-५०।।
ऐसा नियतु कां कंदर्पु। जो भूतां या बीजरूपु।
तो मी म्हणे बापु। योगियांचां।।५१।।

"श्रुति म्हणजे जणू मांडव व सृष्टी म्हणजे त्यावर चढवलेली एक वेल! अशा या वेलीला जोपासणारा, वाढवणारा व वाढवून तिची पालवी श्रुतिविहित कर्मफलांच्यासह थेट मोक्षाकाशात नेऊन भिडवणारा असा तो हा कामच होय! याप्रकारे संतुलित असणारा जो काम, तो या सृष्टीस बीजरूप असणारा मीच आहे," असे योग्यांमध्ये श्रेष्ठ असलेले सर्ववरिष्ठ श्रीकृष्ण म्हणतात.

हे एकेक किती सांगावें। आतां वस्तुजातचि आघवें।
मजपासूनि जाणावें। विकरलें असे।।७-५२।।

"असे किती आणि काय तुला सांगावे! अरे अर्जुना! या समस्त वस्तुजाताची निर्मितीच माझ्यापासून झाली आहे."

"न त्वहं तेषु ते मयि"

त्यानंतरच्या श्लोकात श्रीगोपाल त्रिगुणमयी मायेच्या ***सत्त्व, रज व तम*** या भावांचा निर्देश करतांना म्हणतातः

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि।।७-१२।।

"त्याचप्रमाणे जे सत्त्व, रज व तमोगुणांपासून निर्माण होणारे भाव आहेत, ते सर्व माझ्यापासूनच उत्पन्न होतात. परंतु वस्तुतः मी त्या कशांतही नाही, हे तू समजून घे."

श्रीगोपालकृष्णांचे **हे विधान *सृष्टी* व *विश्वात्मा* यांचा संबंध सूत्ररूपाने दर्शवते.** आतापावेतोच्या श्लोकांत समस्त विश्व व त्यातील यच्चयावत पदार्थ, तसेच त्रिगुणादी भाव हे सर्व विश्वबीज आत्मतत्त्वापासून निर्माण होतात व ते तत्त्वच त्या सर्वांचे आदिकारण असल्याचे सांगितले गेले आहे. परंतु ***आत्मतत्त्व*** त्या सर्वांपासून तरीही अलिप्त असल्याचे येथे स्पष्ट केले आहे.

वटवृक्षाचे बीज रुजल्यावर ते नाहीसे होते, परंतु ते वटवृक्षात रूपांतरीत होते; तसा हा दृष्टांत नाही, तर तद्विरुद्ध आहे. विश्वाला सर्जन करणारे तत्त्व विश्वसर्जन, स्थिती वा लय यांच्याशी जरी निगडित असले, तरी त्यायोगे ते विश्वात परिणत होत नाही, असे विधान येथे दिसते. आकाशाच्या आधाराने मठाकार दिसतो. पण आकाशतत्त्व मठात नाही, असे म्हटल्यास याबाबत थोडीफार कल्पना येऊ शकते.

"विकारु मी नोहें। जन्हीं विकारिला असे "

वायूच्या योगाने सागरात पाण्याच्या लाटा निर्माण होतात, परंतु त्या लाटात वायुतत्त्व काही नसते; अशा प्रकारची ही कल्पना आहे. यासंबंधी ज्ञानदेव म्हणतातः

जैं सात्त्विक हन भाव। कां रजतमादि सर्व।
तैं ममरूपसंभव। वोलख तूं।।७-५३।।
हे जालें जन्हीं माझां ठाईं। परि यामाजीं मी नाही।
जैसीं स्वप्नीचां डोहीं। जागृति न बुडे।।५४।।

"जे सत्त्वरजतमादी भाव वा पदार्थ आहेत,ते सर्व माझ्याच स्वरूपापासून उत्पन्न झाले आहेत. ते सर्व माझ्याठायी जरी उत्पन्न झाले, तरी मी मात्र त्यांच्यात नाही. ज्याप्रमाणे स्वप्नातल्या डोहात बुडणारा मनुष्य खरा तर जसाच्या तसाच असतो, त्याप्रमाणे रूपक रचायचेच तर असे म्हणता येईल की विश्वोत्पत्ती हे आत्मस्वरूपास पडलेले जणू काही स्वप्नच आहे व विश्वातील यच्चयावत पदार्थ, घटना इ.त्या स्वप्नांतर्गत असल्याने त्यात होणाऱ्या हालचाली आणि त्या सर्वांमध्ये विश्वात्मा नाही; तो अलिप्तच आहे."

ना तन्हीं रसाचीचि सुघट। जैशीं बीजकणिका तन्हीं घनवट।
परि तियेंस्तव होय काष्ठ। अंकुरद्वारें।।७-५५।।

मग तेयां काष्ठाचां ठाईं। सांग पां बीजपण काईं।
तैसा मी विकारी नाहीं। जऱ्हीं विकरला दिसें।।५६।।

"वृक्षाचे किंवा वनस्पतीचे बीज जरी घन पदार्थरूप दिसत असले, तरी वस्तुतः ते म्हणजे गोठलेला द्रवरसच असते. पण त्याच्या अंकुरापासून निर्माण झालेल्या झाडाचे लाकूड मात्र कठीण असते. अशा त्या लाकडाच्या ठिकाणी बीजाचा जो मूळ गुणधर्म - ती द्रव्यता - थोडीतरी असते का! मीसुद्धा विश्वरूपाने विस्तारलेला दिसत असलो, तरी त्या विस्तारातील कशातही मी नाही, हे तू लक्षात ठेव."

पैं गगनीं उपजे आभाल। परि तेथ गगन नाहीं केवल।
अथवा आभालीं होय सलिल। तेथ अभ्र नाहीं।।७-५७।।
मग तेयां उदकाचेनि आवेशें। प्रगटलें तेज जैं लखलखित दिसें।
तियें वीजुमाजीं असे। सलिल काईं।।५८।।
सांगें अग्निस्तव धूम होये। तियें धूमीं काय अग्नी आहे।
तैसा विकारु हा मी नोहें। जऱ्हीं विकरला असे।।५९।।

"अर्जुना! आकाशात ढग निर्माण होतात. पण त्या ढगांत आकाश जसे नसते; किंवा पाण्यापासून ढग उत्पन्न होतात, पण त्या पाण्यात ढग नसतात; किंवा ढगात पाणी असते, पण त्यापासून वर्षणाऱ्या पर्जन्यधारात जसे ढग नसतात; किंवा ढगातील पाण्याच्या प्रभावाने जी विद्युल्लता अंगींच्या लखलखीत तेजाने नभोदीप्ती करत प्रकटते, तिच्यात जल जसे नसते; किंवा अग्नीपासून धूर निर्माण होतो, त्या धूरात अग्नी जसा नसतो; त्याचप्रमाणे हा विश्वाकार जरी माझ्यातून निर्माण होत असला, तरी त्यात मी नाही."

मायेचे स्वरूप::::

त्रिगुणमयी माया

याप्रमाणे विश्वाकारनिर्मितीचे रहस्य सुस्पष्टपणे सांगितल्यावर श्रीकृष्ण या विश्व प्रसविणाऱ्या व विश्वाचा खेळ चालवणाऱ्या आपल्या मायेविषयी यानंतरच्या तीन श्लोकांतून वास्तव ज्ञान प्रकट करत म्हणतातः

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम्।।७-१३।।

येथे *त्रिगुणरूपी मायेबाबत* प्रथमच उल्लेख येतो. यापूर्वी भगवंतांनी ***परा*** व ***अपरा*** प्रकृतींसंबंधी केलेले विवेचन वाचक-जिज्ञासूंना स्मरतच असेल. ते आता म्हणतात कीः

"सत्त्व, रज, तमादी त्रिगुणाच्याद्वारे रागद्वेषादी विकारांनी हे सर्व जगत मोहित होऊन राहिले आहे; व म्हणून या त्रिगुणांच्या पलीकडे असणाऱ्या मज अविनाशी अशा आत्मरूपास ते तत्त्वतः जाणत नाहीत."

अपरा* -जड व *परा* -चेतन** अशा प्रकृतिस्वरूपांच्या जडणघडणीतून आविष्कारलेली ही ***त्रिगुणमयी माया म्हणजे विश्वच होय. हिलाच कोणी ***आदिमाया*** म्हणजे ***आदिकारणाची माया*** असे संबोधतात; तर कोणी ***मूलमाया*** म्हणजे ***मूलकारणाची माया*** म्हणूनही जाणतात.

मायेचा प्रभाव

या मायेमुळे हे जगत भगवंतापासून कसे दुरावते, ते सांगतांना श्रीकृष्ण म्हणतातः

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते।।७-१४।।

"कारण की ही अत्यद्भूत अशी माझी त्रिगुणमयी माया मोठी दुस्तर आहे; परंतु जे साधुपुरुष मलाच निरंतर भजतात, ते या मायासागरातून तरून जातात."

याप्रमाणे समस्त जगातील प्राणिमात्रांची मायामोहाने लिप्त अवस्था सांगून ***दैवी*** गुणसंपत्तिमान साधुपुरुष मायातीत कसे होतात, हे रहस्य येथे स्पष्ट केले आहे.

याविरुद्ध ***आसुरी*** संपदेचा आश्रय केलेल्या आसुरांची कशी फसगत होते, हे सांगतांना भगवंत उद्गारतातः

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः।
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः।।७-१५।।

"मायेच्या योगाने ज्ञान हरपलेले व आसुरी भाव धारण करणारे मनुष्यातील नीच आणि दुष्कर्मी मूढ मात्र मला भजत नाहीत व मायेत गुरफटून जातात."

उपरोक्त तिन्ही श्लोकांवरील ज्ञानदेवांचे भाष्य पाहू याः

परि उदकीं बाबुली। तैं उदकांतैं जैसीं झांकोली।
कां वायांचि आभालीं। आकाश लोपें।।७-६०।।
हां गां स्वप्न हे लटिकें म्हणों ये। वरि निद्रावशे बाणलें होये।
तंव आठवं काय देत आहे। आपणपेयां।।६१।।
हे असो डोल्यांचें। डोलांचि पडल रचे।
तेणें देखणेंपण डोलियांचें। न गिलिजे काईं।।६२।।
तैसीं हे माझींचि बिंबलीं। त्रिगुणात्मक साऊली।
कीं मजचि आड वोडवली। जवनिका जैसीं।।६३।।

"परंतु पाण्यात उत्पन्न झालेले गोंडाळ जसे पाण्याला झाकून टाकते; किंवा आभाळ आल्यामुळे आकाश दिसेनासे होते; स्वप्न जरी मिथ्या असले, तरी ते पाहतांना जशी स्वतःच्या जागेपणाची आठवण उरत नाही; हे राहू दे! जशी आसवे डोळ्यात दाटून आली की दृष्टी चांगली असलेल्याला पण दृश्य नीट दिसत नाही; त्याचप्रमाणे ही ***त्रिगुणात्मक माया*** जरी माझीच सावली असली, तरी ती मलाच झाकोळून टाकते."

म्हणऊनि भूतें मातें नेणती। माझीच परि मी नव्हती।
जैसीं जलींचि जलीं न विरती। मुक्ताफलें।।७-६४।।
पैं पृथिवियेचां घटु कीजे। सवेंचि पृथ्वीसीं मिलें जऱ्हीं मेलविजे।
एऱ्हवीं तोचि अग्निसंगें असिजे। तऱ्हीं वेगला होये।।६५।।
तैसें भूतजात सर्व। हे माझेंचि कीर आवयव।
परि मायायोगें जीव-। दशें आलें।।६६।।

म्हणौनि माझेंचि मी नव्हती। माझेंचि मज नोलखती।
अहंममताभ्रांती। विषयांध झालें।।६७।।

"म्हणून प्राणिमात्र मला पारखे होतात; माझ्यापासूनच उत्पन्न झालेले असले तरी माझ्यात एकरूप न होता अहंकाराने पृथक राहतात. ज्याप्रमाणे पाण्यापासून तयार झालेले मोती पाण्यापासून पृथक राहतात व पाण्यात परत विरून एकरूप होऊ शकत नाहीत; किंवा कच्च्या मातीचा घट मोडला तर तो पुनः मातीत मिसळून जातो, पण तो जर अग्नीत भाजला तर वेगळेपणाने मिरवतो व परत मातीत मिसळणे जसे जाणत नाही; तसेच हे भूतमात्र माझेच अवयव जरी असले तरी मायेच्या प्रभावाने ते जीवदशा भोगतांना माझ्याहून भिन्नत्वाने वावरतात. जरी माझ्यापासून ते उत्पन्न झाले असले तरी ते माझ्यावेगळे राहतात आणि अहंकार व ममता यांच्या भ्रांतीने विषयांध होऊन मला ते जाणत नाहीत."

मायानदीचे रूपक

आतां महदादि हें माझी माया। उतरौनियां धनंजया।
मी होईजे हें आया। कैसेनि ये।।७-६८।।
जियें ब्रह्मचलाचां आधाडा। पहिलियां संकल्पजलाचां उभडा।
सवेचि महाभूतांचां बुडबुडा। साना आला।।६९।।
जैं सृष्टिविस्ताराचेनि वोघें। चढत कालकलनेचेनि वेगें।
प्रवृत्तिनिवृत्तींची तुंगें। तटें सांडिली।।७०।।

मायानदीला कसा महापूर आला आहे व त्यात सापडलेल्या जीवांना माया पार करणे किती दुस्तर आहे, हे वर्णन करतांना श्रीज्ञानदेवांच्या प्रतिभेला चढतावाढता बहर येतोः

"हे धनंजया! ही महत्तत्त्वादी जी माझी माया आहे, ती पार करून माझ्याशी एकरूप होणे फार अवघड आहे. ब्रह्मरूपी पर्वताच्या उत्तुंग कड्यावरून कोसळणारी ही मायानदी आदिसंकल्पाच्या जळाने भरलेली आहे. तिच्यावर हा पंचमहाभूतांचा बुडबुडा दिसतो. सृष्टिविस्ताराच्या क्रमानुसार व काळाच्या अफाट गतीनुसार पूर येऊन ही मायानदी ***प्रवृत्ति*** व ***निवृत्ति*** या तटांची मर्यादा उल्लंघून अपार व अथांग वाहत असते."

जैं गुणघनाचेनि वृष्टीभरें। भरली मोहाचेनि महापुरें।
घेऊनि जात नगरें। यमनियमांची।।७-७१।।
जेथ द्वेषाचां आवर्त्ती दाटत। मत्सराचें वलसे पडत।
माजीं प्रमदादी तलपत। महामीन।।७२।।
जेथ प्रपंचाची वलणें। कर्माकर्मांची वोभाणें।
वरी तरताती वोसाणें। सुखदुःखांची।।७३।।

"त्यात त्रिगुणात्मक मेघांच्या बेफाट वृष्टीने तिला मोहाचा महापूर येतो व त्यात तर यमनियमादी साधनांची महानगरे वाहून जातात. या नदीच्या जळात द्वेषरूप भोवरे ठिकठिकाणी आहेत. तिला मत्सराची वळणेवाकणे आहेत. अन् मत्त स्त्रियांच्या रूपाने तिच्यात प्राणिमात्रांचे ग्रास करणारे महामकरच वावरत आहेत. प्रपंचाची वळणे घेत भोवंडणाऱ्या या मायानदीत कर्म-अकर्मादींची पाण्याखाली लपलेली जाळी आहेत. तिच्या पूराने उद्ध्वस्त केलेल्या सुखदुःखादी घरांचे वासे हिच्या लाटांवर हिंदकळत इतस्ततः वाहत जातात."

रतीचियां बेटा। आदलती कामाचियां लाटा।
जेथ जीवफेन संघाटा। सैंघ दिसें।।७-७४।।
अहंकाराचियां चलियां। वरी मदत्रयाचिया उकलियां।
जेथ विषयोर्मीचियां आकलियां। उल्लालें घेती।।७५।।
उदोअस्ताचें लोंढे। पाडित जन्ममृत्युचें चोंढें।
तेथ पांचभौतिक बुडबुडें। होत जाती।।७६।।

"तिच्यातील रतीच्या बेटावर कामाच्या लाटा आदळून जीवसमुदायरूपी फेस अखंड पसरत असतो. अहंकाराच्या धारा वाहत असतांना त्या पाण्यातून विद्या, धन व कुल या मदत्रयांच्या उकळ्या फुटत असतात व विषयोर्मीच्या लाटा उसळ्या घेत असतात. दर दिवसागणिक त्यात जन्ममृत्यूचे खळगे पडत असतात अन् त्यांवर पंचमहाभूतांचे देह बुडबुड्यांसारखे कित्येक होतजात फुटत असतात."

संमोह विभ्रम मासे। गिलित धैर्याची आंविसें।
तेथ देव्हडे भोंवत वलसे। अज्ञानाचें।।७-७७।।
भ्रांतीचेनि खडुलें। खेलें आस्थेचें अवगालें।
रजोगुणाचेनि खलालें। स्वर्गु गाजें।।७८।।

"संमोह व विभ्रम हे मत्स्य अज्ञानाच्या भोवऱ्यात गवसलेला विवेकाचा गळच सहजगत्या गिळून निसटतात. तिच्या काठावरील भ्रांतिरूप गळात अन आशेच्या चिखलात असंख्य जीव अडकतात व तडफडून मरतात. रजोगुणाच्या तिच्या खळखळाटाने तर स्वर्गसुद्धा गाजला आहे."

तमाचें धारसें वाड। सत्त्वाचें स्थिरपण जाड।
किंबहुना हे दुवाड। मायानदी।।७-७९।।
पैं पुनरावृत्तिचेनि उभडें। झलंबती सत्यलोकींचें हुडे।
घायें गडबडती धोंडें। ब्रह्मगोलकाचें।।८०।।
तेयां पाणियाचेनि वहिलेपणें। अझुनि न धरिती वोभाणें।
ऐसा मायापूर हा कवणें। तरिजैल गां।।८१।।

"या मायानदीच्या तमोगुणरूपी धारेने सत्त्वगुण्यांचे स्थिर आसनसुद्धा वाहून जाते, अशी ही तरण्यास बिकट अन द्वाड मायानदी आहे. कल्पांमागून असंख्य कल्पे होत राहणाऱ्या पुनरावर्तनाच्या कालचक्ररूपी भोवऱ्यांच्या लाटात सापडून सत्यलोकाचे बुरूजसुद्धा ढासळून त्यांचे धोंडे या नदीत धडाधड कोसळतात. त्या पाण्याच्या तीव्र वेगवान धारेत अद्यापपावेतो कोणाचाही तराफा टिकलेला नाही; तर असा हा दुस्तर पूर आलेला मायानद कोण बरे तरून जाईल!"

मायेस उल्लंघण्याच्या उपायांचे विफलत्व

या दुस्तर मायानदीला तरून जाण्यासाठी केलेले विविध उपाय कसे निष्प्रभ ठरतात, ते ज्ञानेश सांगतातः

एथ एक नवलावो। जो जो कीजे उपावो।
तो तो अपावो। होय तैं ऐक।।७-८२।।
एक स्वयंबुद्धीचां बाहीं। रिगालें तेयांची शुद्धीचि नाहीं।
एक जाणीवेचां डोहीं। गर्वेंचि गिळिलें।।८३।।
एकीं वेदत्रयाचियां सांगडी। घेतलियां अहंभावाचियां धोंडी।
तैं मदमीनाचां तोंडीं। सगळेंचि गेलें।।८४।।

"आणि नवल पहा. ही मायानदी तरून जाण्यासाठी जो जो म्हणून उपाय करावा, तोच कसा अपायकारक ठरतो बघ! स्वतःच्या **बुद्धिबल**ाने ही नदी पोहून जाण्यास जे निघाले, ते कोठे बुडाले, त्याचा पत्ताच नाही. **ज्ञान**मार्गाने जाऊ पाहणारे गर्वाने गिळले गेले. काहींनी वेदत्रयीरूप सांगडीचा आधार घेतला. पण त्याचबरोबर ***"अहं ब्रह्मास्मि"*** या अहंभावाचे धोंडे पण घेतले व मदरूप माशाने त्यांना केव्हाच फस्त केले."

एकीं वयसेचें जाड बांधिलें। मग मन्मथाचियें कांसें लागलें।
तैं विषयमगरीं सांडिलें। चघळूनियां।।७-८५।।
आतां वृद्धाप्याचियां तरंगा-। माजीं मतिभ्रंशाचा जरंगा।
तेणें कवळजताती पैं गां। चहूंकडें।।८६।।
आणि शोकाचां कडा उपडत। क्रोधाचां आवर्त्तीं दाटत।
आपदागिधीं चुंबिजत। उधवलां ठाईं।।८७।।
मग दुःखाचेनि बरबटें बोंबलें। पाडी मरणाचियें रेवें रेवलें।
ऐसें कामाचिये कांसे लागलें। तैं गेलें वायां।।८८।।

"**शाक्तपंथीयां**नी व तत्सम काहींनी तरून जावे म्हणून बांधलेला भोपळा इ.कांसपेट्या कमरेला बांधून कामाचा पंचमकाररूपी कासोटा धरून ही नदी पोहून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांना विषयरूपी मगरीने चघळून चघळून खाल्ले. मतिभ्रंशाच्या जाळ्यात वृद्धापकाळी सापडून जे ते कवटाळू पाहतात, ते न गवसता शोकाच्या कड्याकपाऱ्यांवर आपटत, क्रोधाच्या भोवऱ्यात गिरक्या खात ते बुडू लागले. त्यातूनही जेव्हा कधी ते पाण्यावर येत, तेव्हा आपत्तीरूपी गिधाडांकडून टोचून टोचून खाल्ले जात दुःखरूपी चिखलात बरबटत मरणाच्या गालफडात रुतले. असे ते कामाच्या कांसेला लागून ही मायानदी तरून जाऊ पाहणारे व्यर्थ आयुष्य घालवून नष्ट झाले."

एकीं यजनक्रियेची पेटी। बांधौनि घातली पोटीं।
तैं स्वर्गसुखाचां कपाटीं। रिगौनि ठेलें।।७-८९।।
एकीं मोक्ष लागावयाचियां आशा। केला कर्मबाह्यांचा भरवंसा।
परि तैं पडिलें वलसां। विधिनिषेधांचां।।९०।।
जेथ वैराग्याची नाव न रिगे। विवेकाचां तागा न लगे।
वरी काईं तरो ये योगें। तरी विपाएं तो।।९१।।
ऐसें जिवाचियें आंगवणें। इयें मायानदीचें तरणें।
हे कासयासारिखें बोलणें। म्हणावें पां।।९२।।
जऱ्हीं अपथ्यशीलां व्याधी।....।।९३।।

"किती एकांनी **यज्ञक्रिया**रूपी पेटाऱ्याचा भरवसा करून ही मायानदी तरून जाण्याचा प्रयत्न केला, ते सगळे स्वर्गरूपी कपारीत अडकून पडले. किती जणांनी या नदीच्या मोक्षरूप परतीरी जाण्यासाठी **कर्मयोगा**चा आश्रय केला, ते विधिनिषेधांच्या वळणात सापडले. येथे वैराग्याची नाव टिकत नाही; विवेकाचे तारु चालत नाही; ***<u>अष्टांगयोगादी उपायांनी कोणीतरी एखादा महाभाग कधी तरी अपवादात्मक असा या नदाला तरतांना दिसतो</u>.*** याप्रमाणे स्वतःच्या भरवशावर ही मायानदी तरून जाण्याचा प्रयत्न करणे म्हणजे कुपथ्य करून व्याधी घालवता येईल असे समजणे होय."

..........।......कले साधुसीं दुर्जनाची बुद्धी।
कीं रागी सांडीं रिद्धी। आली सांतीं।।७-९३।।
जऱ्हीं चोरां सभा दाटे। अथवा मीना गलु घोटे।
ना तऱ्हीं भेडा उलटे। विवसी जऱ्हीं।।९४।।
पाडस वागुर करांडी। जऱ्हीं मुंगी मेरु वोलांडी।
तऱ्हीं मायानदी पैलथडी। देखती जीव।।९५।।
म्हणऊनि गां पांडुसुता। जैसीं सकामा न जिणवेंचि वनिता।
तैसीं मायामय हे सरिता। न तरवे जीवां।।९६।।

"किंवा साधूला जर दुर्जनाची बुद्धी आकळू शकली असती; लोभी मनुष्याला आयत्या चालून आलेल्या ऐश्वर्याचा त्याग करता आाला असता; चोरांना न्यायाधीश राजरोस घाबरत असतील; माशाला जर आमिषासह गळ गिळता येईल; अथवा भित्रट माणसाला जर पिशाच्चावर हल्ला चढवता येईल; जाळ्यात अडकलेले हरणाचे पाडस जर जाळे तोडून सुटू शकेल; किंवा मुंगी मेरुपर्वत ओलांडू शकेल; तरच या दुथडी भरलेल्या मायानदीचा पैलतीर जीवांना दिसू शकेल. हे पांडुपुत्रा! विषयासक्त पुरुषाला स्त्रीमोह जसा जिंकता येत नाही, त्याचप्रमाणे ही मायामय नदी जीवांना तरून जाता येत नाही."

मायेला तरून जाण्याचा एकमेव उपाय

परंतु असे असले तरी भगवंतांचे भक्त मायानदी कशी पार करतात, ते सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः

एथ एकचि लीला तरले। जैं सर्व भावें मज भजले।
तेया ऐलीच थडी सरले। मायाजाल।।७-९७।।
जेयां सद्गुरु तारु फुडें। जैं अनुभावाचियें कांसें गाढें।
जेयां आत्मनिवेदन तरांडे। आकललें।।९८।।
जैं अहंभावाचें वोझें सांडूनि। विकल्पाचियां झुलुका चुकऊनि।
अनुरागाचां निरु ताऊनि। पाणीढालु।।९९।।
जेयां ऐक्याचियां उतारां। बोधाचां जोडिला तारा।
मग निवृत्तिचियां पैलतीरां। झेंपावलें जैं।।१००।।
तैं उपरतीचां वांवीं सेलत। सोऽहंभावाचेनि थावे पेलत।
मग निघालें अनकलित। निवृत्तितटीं।।१०१।।
एणें उपायें मज भजलें। तैं हे माझी माया तरलें।
परि ऐसें भक्त विपाईलें। बहुवंस नाहीं।।१०२।।

"असे असले तरी जे सर्वभावाने मजला भजले, ते ही मायानदी सहज तरून गेले. त्यांना याच तीरावर त्या नदीचे पाणी संपून गेले. ज्यांना अनुभवी सद्गुरू तारणारा आहे; जे आत्मनिवेदनाच्या तराफ्यावर आरूढ झाले आहेत; जे अहंकाराचे ओझे टाकून देऊन, विकल्पाच्या वादळवाऱ्याला चुकवत, संसारप्रेमाची ओहोटी करून, मदैक्यबोधाच्या ताऱ्याला मार्गदर्शक करून, जे ऐक्यस्वरूपी पाणउतारापर्यंत पोहोचून निवृत्तीच्या पैलतटावर झेपावले, ते वैराग्यरूपी वावांनी सपासप या मायानदीचे पाणी कापत व ***सोऽहंभावा*** च्या आत्मबळावर कोणत्याही संकटांत न सापडता, निवृत्तीतटावर जाऊन पोहोचतात. अशा उपायाने माझी भक्ती करणारेच ही माझी माया तरून जातात. पण असे भक्त विरळेच असतात."

अज्ञजनांची स्थिती

परंतु इतरेजन मात्र मायेने अज्ञानग्रस्त होऊन परमात्म्यास आकलन करू शकत नाहीत:

जैं बहुतां अवांतरु। अहंकाराचां भूतसंचारु।
जाहला म्हणौनि विसरु। आत्मबोधाचां।।७-१०३।।
तैं वेळीं नियमाचें वस्त्र नाठवें। पुढिलें अधोगतीची लाज नेणवें।
आणि करिताती जैं न करावें। वेदु म्हणे।।१०४।।
पाहें पां शरीराचियां गांवां। जेयालागीं आलें पांडवा।
तो कार्यार्थु आघवा। सांडूनियां।।१०५।।
इंद्रियग्रामीचां राजबिदीं। अहंममतेचियां जल्पवादी।
विकारांतरीचीं मांदीं। मेलविताती।।१०६।।
दुःखशोकाचां धाईं। मारिलियाचि सेंचि नाहीं।
हे सांगावेयां कारण काईं। जैं ग्रासिलें माया।।१०७।।
म्हणौनि तैं मातें चुकलें।.........।।१०८।।

"विरळे भक्त सोडले तर इतर बहुतेक जणांना अहंकाराचे भूत भरते व म्हणून आत्मबोधाचा विसर पडतो. अशा वेळी ते नियमाचे वस्त्र नेसण्याचे विसरून पुढील अधोगतीची तमाही न बाळगता, वेदनिषिद्ध कर्मे व विषयोपभोग यात दंग होतात. आत्मबोध साधावा याकरता मनुष्यदेह मिळवलेले ते, आपले परम कर्तव्य व जीवितकार्य विसरून इंद्रियरूपी गावाच्या राजपथावर अहंममतेच्या मंत्रांचा उच्चरवाने घोष करत, विकारांचे संघात गोळा करतात. यामुळे त्यांना जे दुःख व शोक प्राप्त होतात, त्याची त्यांना तमासुद्धा वाटत नाही, इतके ते मायाग्रस्त होतात."

यानंतरच्या ओव्यात भगवंतांच्या चतुर्विध भक्तांचे वर्णन आहे. ते आपण ***"हे समस्तही श्रीवासुदेओ। ऐशा प्रतीतीसाचा वोतला भावो।"*** अवलोकन करतांना अवश्य पाहू.

"मुंगी उडाली आकाशी"

याप्रमाणे *सातव्या* अध्यायांतरी ज्या ज्ञानविज्ञानाचा श्रीगणेशा केला, ते ज्ञान विज्ञानमिषे भगवंत पुनःपुनः अर्जुनाला सांगतच राहतात. आणि त्यांचे ते अमृतमय बोल रसराज श्रीज्ञानदेव आपल्या कर्णसंपुटात त्यातल्या रहस्यासह ओतत असतांना आपल्याला ना कधी येतो कंटाळा, ना आळस!

नित्य हवेहवेसे वाटणारे, नित्यरमणीय रूप धारण करणारे, श्रीशंभूला अतिप्रिय असणारे; सर्व तत्त्वज्ञ, संत, ऋषि-मुनी-सनकादिकांनाही लोभावणारे हे गीतातत्त्व अशा विलोभनीयरीत्या प्रकट करणाऱ्या ज्ञानेशांची प्रतिभा क्षणाक्षणाला उत्तुगोत्तुंग अशा मेरु पर्वताहूनही उंच चिद्गगनात झेपावते आणि प्रथमारंभीच्या ओवीतील ॐकाराच्या नमनासाठी प्रकटलेली त्यांच्या चिमुकल्या बालमुखातील सूक्ष्म वैखरीरूप मुंगी त्या चिदाकाशात उडत जाऊन त्यातील आत्मरवीला केव्हा मुखोद्गत करते, हेसुद्धा आपणांस कळून येत नाही! मुक्ताबाई तर म्हणतेच की ***"थोर नवलाव जाला"*** अन्:

मुंगी उडालीं आकाशीं। तिने गिलिलें सूर्यासीं!!!

असो. यानंतर नुकताच सुरू केलेला हाच ज्ञानविज्ञानाचा भाग आपण अजूनही काही उन्मेषातून पाहणार आहोत. त्यासाठी वळू या पुढील ***उन्मेष क्र १७- अर्जुनाचे सप्तप्रश्न*** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१७::
::अर्जुनाचे सप्तप्रश्न::

प्रास्ताविक::::

अर्जुनाचे सप्त प्रश्न व अष्टम अध्याय

मागील उन्मेषात सप्तम अध्यायातील ज्ञानविज्ञानाचा श्रीगणेशा करून झाला. हे विश्वरहस्य उकलतांना आपणांस श्रीगीतेच्या *आठव्या* अध्यायाकडे वळणे क्रमप्राप्तच आहे. अर्जुनाच्या त्यातील प्रश्नांचे निमित्त करून भगवंत पुन: जे ज्ञानदान करतात, ते अतीव सुंदर आहे.

अर्जुन विचारत आहे की:

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते।।८-१।।
अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः।।८-२।।

अर्जुनाने ***ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत व अधिदैव तसेच अधियज्ञ*** या संज्ञा कशासाठी वापरल्या जातात, याबद्दल ही जी पृच्छा केली आहे, तिचा उगम *सातव्या* अध्यायात समाप्तिप्रसंगी श्रीमधुसूदनांनी जे आपल्या प्राप्तीचे पुढील श्लोकोक्त रहस्य प्रकट केले होते, त्यात आहे:

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये।
ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम्।।७-२९।।
साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः।।७-३०।।

भगवंतांनी म्हटले होते की, "जे मला शरण होऊन जरा व मरण यांपासून सुटण्याकरता प्रयत्न करतात, ते पुरुष त्या ब्रह्माला, तसेच संपूर्ण अध्यात्माला आणि संपूर्ण कर्माला जाणतात आणि जे पुरुष ***अधिभूत* व *अधिदैव***, तसेच ***अधियज्ञ*** यांसह सर्वांच्या आत्मरूप असणाऱ्या मला जाणतात, ते मजशी युक्तचित्त असणारे पुरुष अंतकालीदेखील मलाच प्राप्त होतात."

यातील एक प्रश्न युक्तचित्त पुरुष अंतकाली भगवंताप्रत कसे जातात, याबद्दलही आहे. तूर्त त्या प्रश्नाचा विचार बाजूस ठेवून आपण अर्जुनाने केलेल्या इतर प्रश्नांविषयी ज्ञानदेव काय विचार मांडतात, ते पाहू या:

मग अर्जुनें म्हणितलें। हां हो जी अवधारिलें।
जें म्यां पुसिलें। तें निरूपिजो।।८-१।।
सांगां कवण तें ब्रह्म। कायसया नाम कर्म।
अथवा अध्यात्म। काय म्हणिपे।।२।।
अधिभूत तें कैसें। एथ अधिदैव तें कवण असे।
हे उघड मी परियेसें। तैसें बोला।।३।।
देवा अधियज्ञु तो काई। कवण पां इयें देहीं।
हे अनुमानासीं काई। दिठी न भरे।।४।।
आणि नियंता अंत:करणीं। तूं जाणिजसीं देहप्रयाणीं।
तें कैसेनि हे शार्ङ्गपाणि। परिसवा मातें।।५।।

"हे श्रीकृष्णा! मी विचारतो, ते मला स्पष्ट कळेल अशा शब्दात सांग. ***ब्रह्म* कोण आहे? *कर्म* कशाला म्हणतात? आणि *अध्यात्म* कशाला म्हणावे? *अधिभूत* म्हणजे काय? *अधिदैव* कोण आहे? देवा! या देही *अधियज्ञ* कोण आहे**, याचे अनुमान मला करता येत नाही. आणि **चित्त नियत केलेल्या पुरुषाकडून देह ठेवते वेळी तू कसा जाणला जातोस**, ते, हे शार्ङ्गपाणि! मला ऐकव."

"मग स्तन्य दे येरीं।"

अर्जुनाचे हे बोल ऐकून श्रीकृष्ण कसा कृपाळूपणे त्याची जिज्ञासा पूर्ण करतो, याचे ज्ञानदेवांनी केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे:

देखा धवलारीं चिंतामणीचां। जऱ्हीं पहुडला होय दैवाचां।
तऱ्हीं वोसणतांही बोलु तेयाचां। परि सोपु न वचे।।८-६।।
तैसें अर्जुनाचियां बोलासवें। आलें तैंचि म्हणितलें देवें।
परियेसीं गां बरवें। जें पुसिलें तुवां।।७।।

"एखादा भाग्यवान पुरुष चिंतामणीच्या घरात निजलेला असला व स्वप्नात काही जरी बरळला, तरी त्याचा बोल व्यर्थ जात नाही. श्रीकृष्ण चिंतामणीसवे अर्जुनाने भाबडेपणाने जे प्रश्न केले, ते कळायला कितीही गहन असले, तरीसुद्धा श्रीकृष्णांनी लागलीच त्याची जिज्ञासा शामविण्यास सुरुवात केली."

किरीटी कामधेनूचा पाडा। वरी कल्पतरूचा आहे मांदोडा।
म्हणौनि मनोरथसिद्धीचियां चाडा। तो नवल नोहें।।८-८।।
कृष्ण कोपौनि ज्यासीं मारी। तो पावे ब्रह्मसाक्षात्कारीं।
मां कृपेने उपदेशु करी। तो कैशापरी न पवेल।।९।।

"अर्जुन हा कामधेनूचा वत्स असून तो त्याउपर कल्पतरूच्या मांडवाखालीच बसलेला आहे जणू! म्हणून त्याचे सकळ मनोरथ तत्क्षणी सिद्धीस न पावतील तरच नवल म्हणावयाचे! आणि प्रश्न तरी कोणाला विचारले पहा! तर ज्या श्रीकृष्णाने कोपून एखाद्याला ठार मारले, तरीसुद्धा तो प्राणी ब्रह्मसाक्षात्कार पावतो, त्या कृष्णाला! मग तोच भगवंत ज्याला कृपाळूपणे उपदेश करील, तो ब्रह्मसाक्षात्कारी होईल यात काय विशेष!"

जें कृष्णाचियां होईजे आपण। कृष्ण होय आपुलें अंत:करण।
तें संकल्पाचें आंगण। वोलगती सिद्धी।।८-१०।।
परि ऐसें जें प्रेम। तें अर्जुनीचि आथी निस्सीम।
म्हणऊनि तेयाचें काम। सदा सफल।।११।।

"आपण जर श्रीकृष्णाचे झालो व श्रीकृष्ण आपले अंत:करण झाला, तर आपल्या संकल्पाच्या प्रांगणात अष्टमहासिद्धी राबतात. असे जे श्रीकृष्णावरचे नि:सीम प्रेम, त्याची कमाल मर्यादाच खरे तर अर्जुनरूपाने प्रकटली आहे. मग त्या अर्जुनाचे मनोरथ सदा सफल होणार नाहीत काय!"

या कारणें अनंतें। तैं मनोगत तेयाचें पुसतें।
होईल जाणूनि आइतें। वोगरूनि ठेविलें।।८-१२।।
जैं अपत्य थानाहूनि निगे। तेयाचि भूक तैं मायेसीचि लागे।
एऱ्हवीं तैं शब्दें काय सांगें। मग स्तन्य दे येरीं।।१३।।
म्हणौनि कृपालुवा गुरुचियां ठाईं। हे नवल नोहे काईं।
परि तैं असो आईका काईं। जैं देओ बोलता जाहला।।१४।।

"अर्जुनाने हे प्रश्न विचारावे या हेतूनेच श्रीकृष्णांनी त्याला प्रवृत्त केले व त्याची जिज्ञासा आधीच ओळखून ती शमवण्यासाठी आयते संभाषणरूपी पक्वान्न त्याच्यापुढे वाढून ठेवले! मातेचा स्तन सोडून मजेत खेळणारे बालक त्याला भूक लागली की ते काय मातेला दूध मागते का! त्याला तर बोलतासुद्धा येत नाही! खरे तर बाळाची भूक आईलाच आपोआप जाणवते व ती त्याची सोय करून देते, तसेच हे नाही का! कृपाळू गुरू म्हणजे अशा मातेसारखाच असल्याने श्रीकृष्णांनी अर्जुनाची जिज्ञासा मनोमन जाणली, यात आश्चर्य ते कसले! असो. आता देवांनी काय उत्तर दिले ते ऐकू या."

पृच्छाशमन::::

श्रीकृष्णांचे उत्तर

श्रीकृष्ण म्हणतातः

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसञ्ज्ञितः।।८-३।।

"जे परम अविनाशी आहे, ते ***ब्रह्म.*** ब्रह्माची जी सहज स्वरूपस्थिती, तिला ***अध्यात्म*** असे म्हणतात. आणि भूतमात्रादी चराचर पदार्थांची उत्पत्ती करणारा जो सृष्टीव्यापार, त्याचे नांव ***कर्म.***"

ब्रह्म::::

मग म्हणितलें सर्वेश्वरें। जैं आकारीं इयां खोंकरें।
कोंदलें असत ना खिरे। कवणें कालीं।।८-१५।।
एऱ्हवीं सपूरपण तेयाचें पाहावें। तऱ्हीं शून्यचि नोहें स्वभावें।
परि गगनाचेनि पालवें। गाळूनि घेतलें।।१६।।
जैं ऐसेंहीं परी विरुलें। इयें विज्ञानाचियें खोलें।
हालवलेंहीं न गळें। परब्रह्म।।१७।।

सर्वेश्वर श्रीकृष्ण म्हणाले,"या नाशिवंत विश्वाच्या आकारात जे भरगच्च दाटून भरले आहे; तरीही जे कोणत्याही काळी क्षरण पावत नाही; ज्याचा सूक्ष्मपणा पाहता जे शून्यच प्रत्यक्ष वाटेल, पण जे शून्य नाही; जे इतके सूक्ष्म आहे की ज्याच्यातून सूक्ष्मातिसूक्ष्म आकाशसुद्धा गाळून घ्यावे आणि इतके सूक्ष्म असले तरी या संसारप्रपंचादी वस्त्राच्या गाळणीतून कितीही गाळायचा प्रयत्न केला तरी गाळले जात नाही, ते ***परब्रह्म*** होय."

या ओव्यांवरून स्पष्ट होते की **ज्ञानदेवांचे *परब्रह्म हे अभावात्मक शून्य* नाही, तर ते *भावात्मक* आहे. बौद्ध दर्शन**ातील *शून्य* हे अंतिम तत्त्व भावात्मक आहे की अभावात्मक आहे, अशी जी एक चर्चा विद्वज्जन करतात, त्यासंदर्भात हे लक्षणीय आहे. **नासदीय सूक्त**ातून पण या तत्त्वाच्या स्वरूपासंबंधीचे विचार आहेत. सत् नाही, असत्ही नाही; सत्-असत् नाही असेही नाही; असे काहीसे त्या सूक्तातील मत आहे.

ज्ञानदेवांच्या वाङ्मयातून शून्याचे सर्रास उल्लेख येतात. त्यातील वेगवेगळ्या ठिकाणी शून्याचे निरनिराळे अर्थही प्रतीत होतात. त्याबाबत चर्चा नंतर योग्य वेळी करूच! पण या ठिकाणी ***"तऱ्हीं शून्यचि नोहें स्वभावें।"*** या ओवीतून तरी **ज्ञानेश्वरांच्या मते *परब्रह्म* या अंतिम तत्त्वाचे स्वरूप *अभावात्मक -शून्यात्मक* नसल्याचे दिसून येते**, याची जिज्ञासूंनी नोंद घ्यावी. असो.

ज्ञानदेवांनी या ओव्यातून ब्रह्माच्या स्वरूपावर टाकलेल्या प्रकाशाचे जिज्ञासूंनी नीट विचार, चिंतन व मनन करणे इष्ट आहे. सर्व विश्वात भरून राहिलेले सूक्ष्मातिसूक्ष्म तत्त्व, सर्व विश्वाची उत्पत्ती ज्याच्यापासून झाली, समस्त विश्वात सतत असणारे व विश्वाचा प्रलय झाला तरी आपल्या मूळ स्थितीला काहीही उणेपणा येऊ न देणारे, असे हे ***ब्रह्म*** वा ***परब्रह्म*** आहे.

अध्यात्म::::

आणि आकाराचेनि जालेपणें। जन्मधर्मातें नेणें।
आकारलोपीं निमाणें। नाहीं कहीं।।८-१८।।
ऐशियां आपुलियाचि सहजस्थिती।
जेयां ब्रह्माची नित्यता असती।
तेयां नाम सुभद्रापती। अध्यात्म गां।।१९।।

"विश्वाकार प्राप्त झाला तरी जे जन्म पावत नाही आणि विश्वाकार नाहीसा झाला तरी जे नाश पावत नाही, अशी जी ब्रह्माची ***सहज नित्य स्थिती***, तिला, हे सुभद्रापती! ***अध्यात्म*** अशी संज्ञा आहे."

परब्रह्माची नित्यता, अखंडता, चिदानंदैक्यरसता, अक्षरत्व, मूळ स्थिती ती ***अध्यात्म*** म्हणून प्रसिद्ध आहे.

कर्म::::

मग गगनीं जेवीं निर्मलें। नेणों कैंचीं एकें वेलें।
उठती घनपटलें। नाना वर्णें।।८-२०।।
तैसीं अमूर्त्तीं तियें विशुद्धें। महदादी भूतभेदें।
ब्रह्माचें बांधें। होचि लागती।।२१।।
पैं निर्विकल्पाचियें बरडीं। कीं आदिसंकल्पाची फुटे विरुढी।
आणि तैं सर्वेंचि मोडूनि ये ढोंढीं। ब्रह्मगोलकांची।।२२।।

तेयां एकेका भीतरीं पाहिजे। तंव बीजाचाचि भरिला देखिजे।
माजीं होतियां जातियां नेणिजे। लेख जीवां।।२३।।
मग तेयां गोलकांचें अंशांश। प्रसवती आदिसंकल्प असमास।
हे असो ऐसीं बहुंवस। सृष्टी वाढे।।२४।।

"अशा त्या विशुद्ध परब्रह्माच्या ठिकाणी स्वच्छ निरभ्र आकाशात जसे नाना वर्णच्छटांचे ढग गोळा व्हावेत, त्याप्रमाणे महत्तत्त्वादी भूतसमुदाय प्रकटतो. निर्विकल्प ब्रह्माठायी, ओसाड माळरानावर वृष्टी होऊन जसे तृणांकुर उत्पन्न व्हावेत तशी, आदिसंकल्पाच्या योगे ब्रह्मगोलकांची दाटीवाटीने उत्पत्ती होते. पाहिले तर प्रत्येक ब्रह्मांड त्या ***"एकोऽहं। बहु:स्याम्।।"*** या आदिसंकल्पाने भरलेले दिसते व त्यांच्या ठायी अगणित राशी जीवोत्पत्ती होते. त्या अगणित जीवोत्पत्तीनेही पुन: आदिसंकल्पाचा उच्चार करत गेल्याने या जीवगणनेला काही मितीच राहिली नाही. इतकी अपरिमित ब्रह्मांडे व जीवोत्पत्ती केवळ एका मूळ आदिसंकल्पामुळे झाली."

परि दुजेनविण एकला। परब्रह्मचि संचला।
अनेकत्वाचा आला। पूर जैसा।।८-२५।।
तैसें समविषमत्व नेणों कैंचें। वायांचि चराचर रचें।
पाहतां प्रसवतियां योनींचें। लक्ष दिसती।।२६।।
एरी जिवाभावाचियें पालवियें। काही मर्यादाच करू नये।
पाहिजे कवण आघवें वियें। तंव मूल तैं शून्य।।२७।।
म्हणौनि कर्ता मुद्दल न दिसें। आणि शेखीं कारणही काईं नसे।
माजीं कार्यचि आपैसें। वाढो लागे।।२८।।
<u>ऐसा कर्तेनविण गोचरु। अव्यक्तीं हा आकारु।</u>
<u>निफजे जो व्यापारु। तेयां नाम कर्म।।२९।।</u>

"या अनेकत्वाच्या पूरात एकल्या परब्रह्माशिवाय इतर काहीही नाही. विविधतेने नटलेल्या या चराचर सृष्टीत प्रसवणारे लक्षावधी जीव व योनी दिसतात. त्यांच्या एकूण गणनेस मितीच नाही. पण हे सगळे प्रसवणारे कोण, तर ते ***शून्य*** च आहे. म्हणून या ब्रह्मांडाचे ***कारण*** काहीच नाही व ***कर्ता*** पण कोणी दिसत नाही. कर्ता व कारणरहित असे हे **जगत्*कार्य*** आपोआपच निर्माण होऊन प्रसार पावते. याप्रमाणे **<u>कर्ता अगोचर असूनही, अव्यक्तातून हा जो विश्वाकार निर्माण होतो, ते करविणाऱ्या व्यापारास *कर्म* म्हणतात</u>."**

मोठमोठ्या विचारवंतांनी या विश्वाच्या उत्पत्ति-स्थितीस कारणीभूत असणाऱ्या शक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण ते सर्व अपयशीच ठरले. या विश्वाचा कर्ता त्यांना गोचर होऊ शकला नाही. विश्व उत्पन्न होण्याचे कारण कळत नाही. पण विश्व मात्र गोचर आहे. अशी जी ही व्यवस्था - हा जो व्यापार - ही जी स्थिती - ज्यात अनंतच्छटांनी, विविधतेने नटलेली सृष्टी व तिच्यातील अगणित जीवराशी, चर व अचर, स्थावर जंगम पदार्थ आहेत; तिला ***कर्म*** अशी संज्ञा आहे. म्हणजे **वस्तुत:** ***विश्वात्मा व विश्व यांचा जो परस्परसंबंध आहे, तोच कर्म या नावाने ओळखला जातो.***

श्रीकृष्णवचन

अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ यांची कल्पना सांगतांना श्रीकृष्णांचे उद्गार असे आहेत:

अधिभूतं क्षरो भाव: पुरुषाश्चाधिदैवतम्।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर।।८-४।।

"हे नरश्रेष्ठा! ***अधिभूत*** म्हणजे क्षर पदार्थ, पुरुष म्हणजे ***अधिदैवत*** आणि या देहात ***अधियज्ञ*** म्हणजे मीच होय."

अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ::::

याचे स्पष्टीकरण करतांना श्रीज्ञानेश्वर म्हणतात:

आतां जैं अधिभूत म्हणिपे। तैंहीं सांगो संक्षेपें।
तऱ्हीं होय आणि हारपे। अभ्र जैसें।।८-३०।।
तैसें असतेपण आहाच। नाहीं होईजे हे सांच।
जेयांतैं रूपा आणिती पांच पांच। मिळोनियां।।३१।।
भूतांतैं अधिकरूनि असे। आणि भूतासंयोगें तऱ्हीं दिसे।
जैं वियोगवेळें भ्रंशे। नामरूपादिक।।३२।।
तेयांतैं अधिभूत म्हणिजे।.....।।३३।।

"आता अधिभूत कशाला म्हणतात, तेही तुला थोडक्यात सांगतो. जसे ढग उत्पन्न होतात व दिसेनासे होतात, तसे होणारे व जाणारे, पंचमहाभूते व पंचेंद्रिये यांच्या तन्मात्रांनी नावारूपाला आलेले, पंचमहाभूतांचा आश्रय करून असणारे, पंचीकरणाने प्रकटणारे आणि मृत्युपरांत **नष्ट होणारे जे शरीर, त्याला *अधिभूत*** असे म्हणतात."

...............। मग अधिदैव पुरुष जाणिजे।
जेणें प्रकृतीचें भोगिजें। उपार्जिलें।।८-३३।।
जो चेतनेचां चक्षु। जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु।
जो देहास्तमानीं वृक्षु। संकल्पविहंगमाचां।।३४।।
<u>जो परमात्माचि दुसरा। जैं अहंकारनिद्रा निदसुरा।</u>
म्हणौनि स्वप्नींचियां वोरबारा। संतोषें शिणें।।३५।।
***<u>जीव</u>* एणें नांवें। जेयांतैं आलविजे स्वभावें।**
तैं अधिदैव जाणावें। पंचायतनींचें।।३६।।

"तसेच जो प्रकृतीने निर्मिलेले भोग शरीराद्वारे भोगतो, त्याला ***अधिदैव*** वा ***पुरुष*** अशी संज्ञा आहे. तोच या शरीराची चेतना आहे; सर्वेंद्रियांचा अधिपती आहे. देह त्यागतेवेळी असलेले संकल्प, वृक्षावर जसे पक्षी बसावेत, तसे ज्याच्यावर आरूढ होतात; तो हा ***अधिदैव*** वास्तविक परमात्माच आहे; परंतु अहंकारनिद्रेने गाढ झोपी गेलेला असून त्यामुळे संसारस्वप्न पाहतो व त्यातील सुखाने संतोषतो आणि दु:खाने कष्टी होतो; **त्याला *जीव* असेही म्हणतात. तोच या पांचभौतिक देहात असतो."**

आतां इयेंचि शरीरग्रामीं। जैं शरीरभावांतैं उपशमी।
तो अधियज्ञु येथ गां मी। पांडुकुमरा।।८-३७।।

"आणि शरीरग्रामात असणारा पण शारीरी भावांपासून मुक्त असणारा, पुरुषाची सुखदु:खे, स्वप्ने व भोग, इ.पासून सर्वथैव अलिप्त असणारा असा जो मी स्वतः ***आत्मा*** आहे, त्यालाच ***अधियज्ञ*** असे म्हणतात."

समन्वयन

औपनिषदिक दोन पक्ष्यांची गोष्ट येथे आठवते. ***"द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते। तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीती।।३-१-१।।मुंडकोपनिषद।।"*** ज्ञानदेवही त्याचप्रमाणे येथे **अधिदैवा**स त्यातील एका पक्ष्याची उपमा देऊ इच्छितात, असे वाटते. दुसरा पक्षी म्हणजे ***अधियज्ञ.***

याप्रमाणे ***१)अधिभूत हा क्षर भाव म्हणजे देह; २) पुरुष वा जीव म्हणजे उपभोक्ता हा अधिदैव,*** ज्यालाच शास्त्रांतरी ***हिरण्मय पुरुष, सूत्रात्मा, हिरण्यगर्भ, प्रजापती, ब्रह्मा*** इ.नावांनी संबोधले जाते. आणि **३) देहांतर्यामी राहणारा - सर्व उपाधींपासून अलिप्त असणारा आत्मा म्हणजेच *अधियज्ञ*** असे स्पष्ट होते. हा विषय पुनः परत वेगवेगळ्या संज्ञांच्या स्पष्टीकरणासाठी *तेराव्या* अध्यायात व्यापक रूपाने आलेला आहे व *पंधराव्या* अध्यायातही तो ***क्षर, अक्षर व उत्तम पुरुष*** दर्शनाच्या निमित्ताने येतो.

गीतेने वेगवेगळ्या तत्त्वज्ञानप्रणालींचा एकप्रकारे समन्वय केल्यासारखेच यामुळे जिज्ञासूंना जाणवले तर नवल नाही. यापासून वादविवादग्रस्त तत्त्वज्ञानी चर्चा मिटवण्यासाठीही सुजाण पंडित योग्य तो बोध घेऊन आपापले खरे गंतव्य गाठी लावू शकतील, इतकी थोरवी या गीतादर्शनकर्त्या श्रीकृष्णांची निश्चितच आहे; किंबहुना ज्याने अशी सम्यक अर्थाने गीता उपासिली, त्याला अगम्य वा गूढ असे तत्त्वज्ञान कोणतेच असू शकणार नाही, इतके महद् उपकार त्या श्रीगोपालाने या जगतावर करून ठेवलेला आहे, हे सूज्ञांस सांगणे न लगे! असो.

विश्व व विश्वात्मा यांचे अद्वैत

ज्ञानदेव पुढे म्हणतातः

एर अधिदैवताधिभूत। तैही मीचि कीर समस्त।
परि पंधरें किडाला मिलत। काय साकें नोहें।।८-३८।।
तऱ्हीं तैं पंधरेपण न मैलें। आणि किडाचियांही अंशा न मिले।
परि जंव असे जेयाचेनि मेलें। तंव सांकचि म्हणे।।३९।।
तैसें अधिभूतादि आघवें। हे अविद्येचेनि पालवें।
झांकवें तंव मानावें। वेगलें ऐसें।।४०।।

"हे पांडुपुत्रा! **अधिदैव व अधिभूत हेही तसे मीच होत.** परंतु अस्सल सोने जसे किडाळाला मिळाले की हिणकस होते, त्याप्रमाणे या अवस्था होत. जरी असे असले तरी सोन्याचे सोनेपण जात नाही व ते किडाळात मिसळूनही जात नाही; परंतु त्याच्या साहचर्याने असल्याने हिणकस असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे अधिभूत व अधिदैव ही दोन्ही म्हणजे पंचमहाभूतात्मक देह व त्यातील जीव हे अविद्येच्या पदराआड जोपावेतो झाकलेले असतात, तोपर्यंत ते अधियज्ञापेक्षा वेगळे मानावे लागतात."

तैंचि अविद्येची जंवनिक फिटे। आणि भेदभावाची अवधी तुटे।
मग म्हणो एक होऊनि जऱ्ही आटे।
तऱ्ही काय दोन होती।।८-४१।।
पैं केशांचां गुंडाला। ठेविली स्फटिकशीला।
तैं वरी पाहिली डोलां। तंव भेदिली गमली।।४२।।
पाठीं केश परौतें नेलें। आणि भेदलेपण काय नेणों जाहलें।
तऱ्हीं डांक देऊनि सांधिलें। शिलेतें काईं।।४३।।
ना तऱ्हीं अखंडचि आयतीं। परि संगें भिन्न गमली होती।
तैं सारिलीयां मागौती। जैसीं कां तैसीं।।४४।।

"जेव्हा अविद्यारूपी पडदा हटतो व जीव आणि परमात्मा यातील भेदभाव उरत नाही, त्यावेळी ते एक होतात, असे म्हणावे, तर ते दोन्ही कोणी वेगवेगळे का आहेत! स्फटिकशिळेवर केसांचा गुंता ठेवला तर ती भग्न झाल्यासारखी दिसते. केस बाजूला केले असता ती एकसंध दिसते, ती काय तिला डाग देऊन सांधली म्हणून की काय! ती तर एकसंधच आहे.पण केवळ केशसंयोगमात्रे भग्न झालेली वाटते."

जेवीं अहंभावो जाये। तऱ्ही ऐक्य तैं आधीचि आहे।
हेचि साचे होये। तो अधियज्ञु मी।।८-४५।।

"त्याचप्रमाणे म्हणायचे तर केवळ अहंकाराच्या सान्निध्याने वा स्वीकाराने अधिदैव व अधिभूत रूपाने भासणारा खरा तर मी अधियज्ञच आहे. आमचे तिघांचे ऐक्य सनातनच आहे. त्यात दुजेपणाला वाव कोठून मिळणार!"

अशा प्रकारे ***द्वैताभासाने जरी विश्व दिसत भासत असले तरी विश्व व विश्वात्मा यांचे अद्वैत आहे,*** हे येथे स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरांनी येथे स्फटिकशिलेचा दृष्टांत वापरला आहे.

पतञ्जलींचा त्रिपुटीबाबतचा स्फटिकमणी दृष्टांत

पतञ्जलींनी दृश्य व द्रष्टा यांचा संबंध स्पष्ट करत असाच स्फटिकमण्याचा दृष्टांत ***समापत्ति*** म्हणजे समाधीचे स्वरूप स्पष्ट व्हावे यासाठी कसा वापरला होता, ते सहजच आठवते. ते म्हणतातः

क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेर्ग्रहीतृग्रहणग्राह्येषु तत्स्थतदञ्जनता समापत्तिः।।१-४१।। पा.यो.सू.।।

संपूर्ण वृत्ती क्षीण झालेल चित्त, ग्रहीता *(पुरुष वा द्रष्टा)*, ग्रहण *(ज्ञानेंद्रियांसहित चित्त वा दर्शन)* आणि ग्राह्य *(सर्व स्थूल-सूक्ष्म विषय वा दृश्य)* यांच्याशी जेव्हा स्फटिकशिलेसारखे - तिच्यात जसा बाजूच्या दृश्याचा प्रतिबिंब ठसवून घेऊन त्याच्याशी एकरूप होण्याचा गुण असतो, तसे एकरूप होते, तेव्हा त्या चित्तावस्थेला ***समापत्ति*** असे म्हणतात. समाधिकाली ही अवस्था प्रकटते.

तत्र शब्दार्थज्ञानविकल्पैः संकीर्णा सवितर्का समापत्तिः।।१-४२।।पा.यो.सू.।।

"शब्द, त्यांचा अर्थ व त्या अर्थानुसार त्या त्या वस्तूचा होणारा विशिष्ट बोध या तिन्ही वस्तुतः एकमेकांपासून भिन्न आहेत. परंतु संकेतामुळे त्या तिघांमध्ये एकरूपतेचा भ्रम निर्माण होतो.अशा तऱ्हेने ज्ञान आणि वस्तू एकरूप समजून, त्या त्या वस्तूठायी चित्ताची जी एकरूपता होत असते, ती ***सवितर्का*** म्हणजे भ्रममूलक असल्याने तिला ***सवितर्का समापत्ति*** असे म्हणतात."

याप्रमाणे पतञ्जली स्फटिकशिलेचा असाच दृष्टांत ***दृश्य, द्रष्टा व दर्शन*** यांचा कसा संयोग होतो, हे स्पष्ट करण्यासाठी वापरून, त्याच क्लृप्तीचा समाधिव्याख्येसाठीही उपयोग करून घेतांना दिसतात. असो. हे विषयांतर पुरे!

त्रिपुटीरहित होण्याची योगयुक्ती

अधिदैव, अधिभूत व अधियज्ञ यांतील कल्पित भेद मिटवण्याची एक स्वतंत्र युक्तीसुद्धा ज्ञानदेवांनी स्वतःची म्हणून यापुढील ओव्यांत प्रकटवलेली दिसतेः

पैं गां आम्हीं तुज। सकल यज्ञ कर्मज।
सांगितलें कां जैं काज। मनीं धरूनि।।८-४६।।
तो हा सकल जीवांचा विसांवा। नैष्कर्म्यसुखाचां ठेवा।
परि उघड करूनि पांडवा। दाविजत असे।।४७।।

भगवंत म्हणतात की, "मागे *(म्हणजे चौथ्या अध्यायी)* मी तुला सर्व यज्ञ कर्मापासून झाले आहेत, असे हाच हेतू मनात धरून सांगितले होते. त्याच प्रमेयाची सिद्धी आता होत आहे. हा ***अधियज्ञ*** म्हणजे नारायण होय. हाच सर्व जीवांचा विसांवा आहे आणि नैष्कर्म्यसुखाचा मोठा ठेवा आहे. त्याचे रहस्य मी तुला आता उघड करून सांगत आहे. त्याची प्राप्ती व्हावी म्हणून योजावयाची युक्ती पुनः एकदा स्पष्ट करतो."

पहिलें वैराग्यइंधनपूर्तीं। इंद्रियानलीं प्रदीप्तीं।
विषयद्रव्याचियां आहुति। देऊनियां।।८-४८।।
मग वज्रासन तैंचि उर्वी। शोधूनि आधारमुद्रा बरवीं।
वेदिका रचे मांडवीं। शरीरांचां।।४९।।
तेथ संयमाग्नीची कुंडें। इंद्रियद्रव्याचेनि पवाडें।
पूजिती उद्दंडें। युक्तिघोषें।।५०।।
मग मन प्राण आणि संयमु। हाचि हवनसंपदेचा संभ्रमु।
येणें संतोषविजे निर्धूमु। ज्ञानानलु।।५१।।

"विषयांचे जळण घालून वैराग्यइंधनाने धडाडणाऱ्या इंद्रियरूपी अग्नीत विषयांचीच आहुती द्यावी. नंतर ***वज्रासन*** जणू पृथ्वी - तिच्यावर शरीररूपी मंडपात ***आधारमुद्रा*** रूपी वेदिका रचून, ***बंधत्रय*** लावून **धारणा-ध्यान-समाधिरूप संयमाग्नी**च्या अथवा***कुंडलिनी***च्या यज्ञकुंडात इंद्रियरूपी विपुल द्रव्याच्या यजनाने जगदंबा कुंडलिनीला संतुष्ट करत - तिला मार्गस्थ करत - तिचा मंत्रजागर उच्चारत - समंत्रक ***मन, प्राण आणि संयम*** यांची हवनसंपदा कल्पून , त्या यज्ञाने धूमरहित, निर्मळ, उज्ज्वल अशा ***ज्ञानाग्नी***स संतोषवावे."

ऐसेनि हे सकल ज्ञानीं समर्पे। मग ज्ञान तैं ज्ञेयीं हारपें।
पाठीं ज्ञेयचि स्वरूपें। निखल उरे।।८-५२।।
तेयां नांव गां अधियज्ञु। ऐसें बोलिला जंव सर्वज्ञु।
तंव अर्जुनु अतिप्राज्ञु। तेयां पातलें तैं।।५३।।

" या ज्ञानरूपी यज्ञनारायणास अशा रीतीने या सर्व द्रव्यांनी संतोषविले असता तो प्रसन्न होऊन ज्ञानाचा ज्ञेयात आपोआपच लय करतो आणि मग केवळ ***ज्ञेय*** च स्वस्वरूपाने अवघे उरते. त्यालाच ***अधियज्ञ*** असे म्हणतात." सर्वज्ञ अशा त्या श्रीकृष्णांनी हे जे सांगितले, ते अर्जुन अति बुद्धिमान - प्रज्ञावान होता, म्हणून त्याला सत्वर समजले.

या यज्ञप्रसंगाने अजूनही परत एकदा आपणांस ज्ञानदेवांच्या पंथराजाचा प्रभाव पहायला मिळतो. हे सर्व वर्णन **कुंडलिन्यधिष्ठीत योगा**चेच नाही काय! आणि तसा काही तरी प्रसंग येथे आहे का त्याचा उदोउदो करण्याचा! आणि प्रसंग-अप्रसंग ठरवणारे आपण कोण! पण ज्ञानदेव प्रसंग - अप्रसंग असा काही भेदभाव न करता, जेव्हा हवे तेव्हा या योगाचा निर्देश किंवा पडताळा देण्यास चुकत नाही. मागे म्हटल्याप्रमाणे अशी कित्येक स्थळे ज्ञानेश्वरीत दाखवता येतात. या सर्वांचे लक्ष्य नेमके काय आहे, ते जिज्ञासूंच्या तरी लागलीच लक्षात येते. ज्ञानदेवांना गीता निरूपणातून आपली ही योगशैली चाणाक्ष मुमुक्षूंच्या मनात ठसवायची आहे, यात संदेह नाही. असो.

श्रीकृष्णांचा संतोष

यज्ञाचे हे रूप अधियज्ञाच्या निमित्ताने अर्जुनास श्रीकृष्णांनी समजावून दिले व ते अर्जुनाला नीट आकळले. त्यामुळे श्रीकृष्ण प्रसन्न झाले.त्या प्रसंगाचे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

हे जाणौनि म्हणितलें देवें। पार्था परिसतु आहासि बरवें।
या कृष्णाचियां संतोषासवें। एरु सुखाचा जाहला।।८-५४।।
देखा बालकाचियां धणीं धाईजे। कां शिष्याचियां जाहलें होईजे।
हे सद्गुरूचि एकलें जाणिजें। कां प्रसवतियां।।५५।।
म्हणौनि सात्त्विक भावाची मांदी। कृष्णाआंगीं अर्जुनाआधीं।
न समातसे परि बुद्धी। सांवरूनि देवें।।५६।।
मग पिकलियां सुखाचां परिमलु।
कां निवालियां अमृताचां कल्लोलु।
तैसा कोंवला आणि सरलु। बोलु बोलिला।।५७।।
म्हणें परिसणेयांचियां राया। आईकें बापां धनंजया।
ऐसीं जलों सरलियां माया। तेथ जालितें तैंही जलें।।५८।।

ज्ञानखंडन

देव म्हणाले, "अर्जुना! मी सांगितलेले तुला छान समजले." श्रीकृष्णांना संतोष झालेला पाहून अर्जुनही आनंदित झाला. लहान बालकाला स्तन्य पाजून आपणच तृप्त व्हावे, हे जशी एकली माताच जाणते; तसे शिष्याच्या पूर्णत्वाने आपण कृतार्थ व्हावे, हे एकला सद्गुरूच जाणो! अर्जुनाला या निमित्ताने अष्टसात्त्विक भावांचा जो उमाळा

आला होता, तो त्याआधीच श्रीकृष्णांना आला. पण तो भावाचा उमाळा आवरून, पिकलेल्या सुखरूपी फलाचा जणू परिमलच वा शीतल अमृताची जणू लाटच असे आपले सुकोमल, मृदु व सुस्पष्ट बोल त्यांनी अर्जुनाला ऐकवले. ते म्हणाले:

"हे नृपा! अर्जुना! ***यांप्रमाणे जेव्हा माया जळून नाहीशी होते, तेव्हा तिला जाळून दग्ध करणारे ज्ञानही जळून नाहीसे होते.***"

यातच **अमृतानुभवा**तील ***ज्ञानखंडन*** या प्रकरणाचे सार आाले आहे. ज्ञेयप्राप्तीनंतर ज्ञानाचे काय वेगळेपण राहणार! आणि जेथे ***अद्वैत*** झाले, तेथे ***ज्ञान, ज्ञेय, ज्ञातृत्व*** ही त्रिपुटी कशी असेल! ती लोपच पावणार! उरणार काय तर ***निखळ परब्रह्म*** च!

"अंतकाले च मामेव"::::

याप्रमाणे भगवंतांनी अधियज्ञाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. असा यज्ञ करून अधियज्ञास प्रकटविणाऱ्या थोर महात्म्यांची अंतकाली कोणती गती होते व स्थिती काय असते, यासंबंधीचा अर्जुनाचा जो प्रश्न होता, त्याचेही जे उत्तर भगवंत देतात, ते आपण थोडे विषयांतर करून का होईना, पुढील विषयाकडे वळण्यापूर्वी आताच पाहून ठेवलेले बरे! ते म्हणतातः

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः।।८-५।।

"आणि जो पुरुष अंतकाली माझेच स्मरण करत शरीर सोडून जातो, तो माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो, यात काहीच संशय नाही."

"तैं मीचि होती"

श्रीज्ञानदेव या उत्तराच्या प्रसंगानिमित्त स्पष्टीकरणार्थ म्हणून मागीलच ***अधियज्ञ*** प्रकटवणाऱ्या त्यांच्या खास नाथपंथीय ***पंथराज***योगरहस्याचे सूत्र पुढे चालवितांना म्हणतातः

जैं आतांचि सांगितलें होते। अगां अधियज्ञु म्हणितला जेयांतैं।
जैं आदींचि तेयां मातें। जाणौनि अंतीं।।८-५९।।
तैं देह झोल ऐसें मानूनि।
ठेलें आपणपें आपणचि होऊनि।..।।६०।।

"हे अर्जुना! आताच तुला जो ***अधियज्ञ*** संक्षेपिला, त्याला जाणणारे ते आत्मसंयमी दक्ष पुरुष असल्याने, अंतकाळीही त्यांना त्याची विस्मृती होत नाही. ते जीवन्मुक्ती भोगणारे महाभाग आपल्यातील ***अधिभूत*** व ***अधिदैव*** यांचा जिवंतपणीच ***अधियज्ञात* विलय करून** चुकलेले असतात; हा देह ही आत्म्याची खोळ आहे असे समजणारे ते स्वस्वरूपी सदा निमग्न असतात."

....। जैसा मठ गगना भरौनि। गगनींचि असे।।८-६०।।
यें प्रतीतीचियां माजघरीं। तेयां निश्चयाची वोंवरी।
आली म्हणौनि बाहेरी। नव्हेचि से।।६१।।
ऐसें सबाह्य ऐक्य संचलें। मीचि होऊनि असें रचिलें।
बाहेरीं भूतांची पांचही खवलें। नेणतांचि पडली।।६२।।

"मठ जसा आतबाहेर गगनानेच व्याप्त असतो, तसा अंतर्बाह्य मीच त्यांच्यात भरून राहिलेला आहे, असा त्यांचा निश्चय झालेला असतो आणि तशीच त्यांची प्रतीती असल्याने त्यांचे बाह्य प्रपंच-विषय-संसार-जगत इ.वरचे प्रेम साफ उडून गेलेले असते. जिवंतपणीच त्यांचे असे माझ्याशी अंतर्बाह्य ऐक्य झालेले असल्याने व त्यांच्या प्रतीतीरसाने ***"हे समस्तही श्रीवासुदेवो"*** असा त्यांच्या बुद्धीचा ठाम निश्चय घडवलेला असल्याने, देह म्हणजे पंचमहाभूतरूपी खवल्यांची खोळ - ती त्यांना नकळतच पडते."

उभया उभेपण नाही जेयांचें। ना पडलियां गहन कवण तेयाचें।
म्हणोनि प्रतीतीचियां पोटींचें। पाणी न हाले।।८-६३।।
तैं ऐक्याची आहे वोतिलीं। कीं नित्यतेचियें हृदयीं घातिलीं।
जैसीं समरससमुद्रीं धतलीं। रूलेचिना।।६४।।

"जिवंतपणीच त्यांना देहाची शुद्ध वा भान नसते, तर तो पडतांना त्याचे दुःख वा शोक वा मोह होण्याचे काय कारण असणार! म्हणून त्यांचा देहपात होतेवेळीसुद्धा त्यांची माझ्यावरील आस्था - प्रीती - मद्रूपता - समरसता - कोणत्याही प्रकारे विचलित होत नाही. ती त्यांची मजशी झालेली तद्रूपता ही जणू ऐक्यरसाची ओतलेली एकसंध पुतळीच असते म्हणा ना! स्वस्वरूपाच्या हृदयी ती पुतळी स्वस्वरूपच भरून ठेवावे, तशी ठेवलेली असते व तिला अखंड समरसतेच्या समुद्री स्नान घालत राहिल्याने ती कधीच मलिन होत नाही."

पैं अथावीं घट बुडाला। तो आंतबाहेरीं उदकें भरला।
पाठीं दैवगत्या जऱ्हीं फुटला।
तऱ्हीं उदक काय फुटे।।८-६५।।
ना तऱ्हीं सर्पें कवच सांडिलें। कां उबारेन वस्त्र फेडिलें।
तऱ्हीं सांग कां काईं मोडलें। अवैवांमाजीं।।६६।।

"जसा अथांग पाण्यात घट बुडवला. तो आतबाहेर उदकाने भरला व मग पाण्यातच तो फुटला, तर पाणी पाण्यात न फुटता-न तुटता जसे एकसंधच राहते; किंवा सर्पाने कात टाकली, अथवा एखाद्याने उकाड्यामुळे वस्त्र अंगावरून काढून टाकले, तर त्या सापाच्या शरीरात किंवा त्या मनुष्याच्या अवयवात काही फरक पडतो किंवा त्यांची मोडतोड झाली असे होते काय!"

तैसा आकारु हा आहाचि भ्रंशे। वांचूनि वस्तु तैं संचलीचि असे।
तैंचि बुद्धी जालियां विसकुसें। कैसेनि आतां।।८-६७।।

"तसाच वरवर भासणारा हा देहाचा आभास भग्न झाला म्हणून काय जी आत्मवस्तू देहाआत व देहाबाहेर सगळीकडे एकसंध - एकरस भरून राहिली आहे, ती अस्ताव्यस्त होईल काय! आणि सर्वत्र, सर्वदूर परमात्मस्वरूपच पाहणाऱ्या त्या महाभागाच्या सुमेरू बुद्धीचा मत्स्वरूपीच राहण्याचा निश्चय थोडातरी उन्मळेल काय!"

म्हणौनि यापरी मातें। अंतकालीं जाणतसातैं।
जैं मोकलीती देहांतैं। तैं मीचि होती।।८-६८।।

"हे पार्था! म्हणूनच याप्रमाणे जे मला जिवंतपणीच जाणतात, ते देहपात होतेसमयी पण माझ्यावर अनन्यभक्ती ठेवून, त्याच समयामाझ्यात प्रवेशतात; ते मीच होऊन असतात व जातात! पण हे तरी कसे म्हणावे! ते मजहून वेगळे कधी होते, तर देहांती ते मला मिळतात,म्हणून म्हणावे!"

पंथराजनिर्देश::::

संक्षिप्त ज्ञानेश्वरी

याप्रमाणे अर्जुनाने केलेल्या या महत्त्वाच्या ***अधिभूत*** इ.विषयक प्रश्नासंबंधी ज्ञानदेवांना काय म्हणावयाचे आहे, ते आपण पाहिले. हा *आठव्या* अध्यायाचा भाग म्हणजे ज्ञानेश्वरी संक्षेपाने सांगण्याचा एक प्रकार वाटतो. श्रीज्ञानदेव ही पद्धती केव्हा केव्हा अवलंबतांना दिसतात. चौकस जिज्ञासूंना ज्ञानेश्वरी वाचतांना अशी आणिकही स्थळे सापडतील. श्रीज्ञानदेव ही पद्धती केव्हा केव्हा अवलंबितांना दिसतात.

श्रीज्ञानदेवांनी पंथराजास किती महत्त्व दिलेले आहे, याचाही या स्थळाच्या दर्शनाने बोध होतो. केवळ सहाव्या अध्यायात ***नाथगृहींचा*** म्हणून ***पंथराज*** चिकटवला आहे, असे म्हणण्याचे धाष्टर्य करणाऱ्या महाभागानी पण यावरून ज्ञानदेवांच्या दृष्टिकोनाचा नीट विचार करण्यास उद्युक्त व्हावे ही सदिच्छा!

मूळात श्रीकृष्णांनी जी गीता सांगितली आहे, ती ***"अभक्ताय न कदाचन"*** या मंत्रणेने! आमची बुद्धी स्वयमेव तर त्या गीतातत्त्वापाशी पोहोचणे अशक्यच! त्यातून महान दिग्गज प्राज्ञ पंडित, आचार्य इ.नी त्यावर केलेली भाष्ये त्यातील संस्कृतावगाहनासह आम्हाला कळणे तर दुष्प्रायच!

अशा परिस्थितीत जेथे संस्कृतातील गीता आम्हाला धड कळत नाही, तेथे ज्ञानदेवांसारख्या अनुभूतिप्राप्त महात्म्याने स्वतः तळमळीने, गीतेच्या ***"पदाची कोरही न सांडिता"*** ही ***भावार्थदीपिका*** रचली आहे, असे वचनपूर्वक आश्वासिल्यावरही, स्वतःच्या अल्पस्वल्प मतीने ***"ज्ञानदेव आम्हास गीतेपासून दूर कोठेतरी घेऊन जात आहेत"*** अशी हाकाटी पिटणाऱ्या आपली जेवढी कीव करावी, तेवढी थोडीच!

पुनः पंथराजदर्शन

अधियज्ञ प्रसंगी ज्ञानदेव परत ***पंथराजप्रणाली*** चा सम्यक निर्देश ज्या ओव्यातून करतात, त्या ओव्या *(८-४७ते५३ व ५१ते ६८)* आपण वर पाहिल्याच आहेत. त्यांच्यातील ***वज्रासन, आधारमुद्रा, बंधत्रय, संयमाग्नी, युक्तीघोष, मन-प्राण-संयम, ज्ञानानल, यज्ञकुंड, ज्ञान, ज्ञेय,*** इ.संज्ञांचा खास *नाथपंथीय अर्थ* आपण नंतर जेव्हा पंथराजाचे स्वरूप पाहू, त्यावेळी समजून येईलच. तसेच ***समरसता, प्रतीती, इंद्रियद्रव्यांचे हवन,*** इ.विधानेसुद्धा त्या पक्षाच्या विचारासंदर्भात पुढेमागे लक्षात घेता येतील.

येथे एवढेच म्हटले तर चालेल की, *सहाव्या* अध्यायाव्यतिरिक्त, *चौथ्या अध्यायातील श्लोक क्र.३०* ***(अपरे नियताहाराः...)*** *व ओवी क्र ४७* ***(एक वज्रयोगक्रमें। ....सर्वाहारसंयमें।...)*** यांच्याशी , तसेच *बाराव्या अध्यायातील श्लोक क्र.३* ***(संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।....)*** *व ओवी क्र. ४६ते ५१* ***(पैं वैराग्यमहापावकें। जाळूनि विषयांची कटकें।...)***, तसेच *अठराव्या अध्यायातील श्लोक क्र. ४५* ***(स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।....)*** *पासून पुढील श्लोकात व ओवी क्र. ८८५ पासून पुढे व विशेषतः १०३६ पासून* ***(अपानरंध्रामाझारीं धनंजया।....)*** यात **क्रमयोगसोपान**दर्शनाच्या निमित्ताने, इ.ठिकाणी ज्ञानेश्वर पुन:पुनः ***पंथराज*** श्रेयास आळवितांना जे दिसतात, ते नक्कीच निरर्थक नाही. ते नक्कीच सार्थ आहे व त्यातून खऱ्या सुज्ञांस सत्वर योग्य तो बोध व्हावा व त्यांच्या या ग्रंथाकडे पाहण्याची वाचकांना योग्य ती दृष्टी मिळावी, यासाठीच त्यांची ही धडपड आहे!! ते जे काही ठिकठिकाणी ***पंथराज*** योगमार्गाबद्दल सांगतात, ते सर्व जाताजाता सांगावे, तसे सांगताहेत; त्याला काही विशेष महत्त्व नाही, असे जे काही मान्यवरांनी सोयीस्करपणे ठरवून घेतले आहे, तशा पद्धतीचे, ज्याला Jurisprudence मध्ये ***obiter ditta*** म्हणतात, तशा प्रकारचे निश्चितच नाही.

नाही म्हटले तरी निदान पाच-सहाशे ओव्या त्यांनी अशा विविध प्रकारे पंथराजप्रक्रियेस आणि वर्णनास दिलेल्या दिसतात. त्या ओव्या अशा श्रीज्ञानेश्वरीच्या साधारणपणे *१५वा भाग* होतात. हे नक्कीच लक्षणीय आहे. यावरून त्यांना गीतेच्या संदर्भात पंथराज किती महत्त्वाचा वाटतो ते समजून येते.

मीमांसकांच्या ग्रंथाचे तात्पर्य काढण्याच्या व मुख्य विषय ठरवण्याच्या ज्या काही कसोट्या आहेत, त्यांचाही विचार याबाबत करता येईल. पण ते जाऊ द्या. त्या सर्वाचा प्रसंगोपात्त विचार करता येईल. तूर्त ***पंथराज*** निर्देशाबाबत इतकेच पुरे!

ज्ञानदेव म्हणजे काहीतरी व्यर्थ बडबड करणाऱ्या आधुनिक स्वनामधन्य विचारवंतांप्रमाणे आहेत का, तर ते उगाचच अप्रस्तुत असे काहीबाही नको ते उगाचच सांगत बसतील! जर त्या टीकाकारांचा असा समज झाला असेल, तर त्यांच्यासाठी ज्ञानेश्वर नाहीत, असेच सखेद म्हणावे लागेल! असो. तूर्त आपण हा विषय येथेच सोडून देऊ या.

आताच आपण अधियज्ञाचे स्वरूप पाहिले. याच संदर्भात पुढील ***उन्मेष क्र. १८-गीतेतील यज्ञाचे स्वरूप*** हा आता प्रस्तुत केला जात आहे. त्यावरून गीता ***यज्ञ*** म्हणून कशास म्हणते, ते स्पष्ट होईल. तर वळू या तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१८::
::गीतेतील यज्ञाचे स्वरूप::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष १८:

गीता:
३:१४,१५
४:२३-४२
६:२७
ज्ञानेश्वरी:
४:११५-१५२,१५६-२१०
६:१५४,२२३,२२६,२२७,२७४-२७९,२८३,२८७-२९१,३२०-३२८
पा.यो.सू.:
१:११,५१
२:२९,३२
३:४-६
यो.ता.:
४,८,१०

::उन्मेष१८::
::गीतेतील यज्ञाचे स्वरूप::

यज्ञाचा विचार::::

यज्ञ व अधियज्ञ

आपण *सतराव्या* उन्मेषात नुकताच आठव्या अध्यायातील ज्या ***अधियज्ञ*** संबंधित यज्ञनिर्देशनपर काही ओव्यांचा विचार केला, त्यांचा संबंध तसा *चौथ्या* अध्यायातील ***यज्ञ*** या संकल्पनेशी खूपच जवळचा आहे. ***यज्ञ*** या संकल्पनेचा थोडाफार परामर्ष आपण पूर्वीच ***चिद्भ्रमरविलास*** *(उन्मेषः१-२::विषयप्रवेश-२पृ.क्र.३०,३१)* या भागातून घेतलेला वाचकांस स्मरत असेलच.

आताच ज्या ओव्या आपण अधियज्ञानिमित्त पाहिल्या, त्यातून श्रीकृष्णांना अभिमत असलेला श्रेष्ठतम असा जो ***ज्ञानयज्ञ*** त्याचे दर्शन या ओव्या पुरेपूर पण साक्षेपाने करतात. अंतिमतः विचार केल्यास असे जाणवते की **ज्ञानदेवांसमोर *भौतिक यज्ञ* नसून केवळ अधियज्ञासच प्रकट करविणारा यज्ञच सर्व ज्ञानेश्वरीभर आहे.**

या विचारातून जर आपण *चौथ्या* अध्यायातील ***यज्ञ*** या संकल्पनेचा ज्ञानदेवनिर्दिष्ट मागोवा घेतला, तर त्याचे खरे रहस्य प्रकट होण्यास साहाय्य होते. तसेच भगवंतांच्या पुढील उक्तीचाही गूढार्थ कळण्यास मदत होतेः

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।।४-२३।।

"कर्माचा संग ज्याने सोडलेला आहे; जो मुक्त झाला आहे; ज्ञानाच्या ठिकाणी ज्याचे चित्त आसक्त झाले आहे; जो यज्ञाप्रीत्यर्थच कर्माचरण करतो; त्याच्याठायी सर्व कर्म लय पावते."

या श्लोकातील ***कर्म*** संकल्पना जर *आठव्या* अध्यायातील भगवंतांच्या व्यख्येनुसार घेतली *(श्लोक क्र.८-३)*, तर उपरोक्त श्लोकाचा खरा अर्थ उमगण्यास मदत होते. वरील श्लोकावर ज्ञानदेवांनी रचलेल्या ओव्यांसह हे उत्तमरीत्या कळून येतेः

तो देहसंगें तऱ्हीं असे। परि चैतन्यासारिखा दिसे।
पाहतां परब्रह्माचेनि कसें। चोखालु भला।।४-११५।।
ऐसाही परि कौतुकें। जऱ्हीं कर्मे करी यज्ञादिकें।
तऱ्ही तियें लयें जाती अशेखें। तेयांचाचि ठाईं।।११६।।
अकालींची अभ्रें जैशीं। उर्मीवीण आकाशीं।
हारपती आपैशीं। उदैजली सांतीं।।११७।।
तैशीं विधिविधान विहितें। जऱ्हीं आचरें तो समस्तें।
तऱ्हीं तियें ऐक्यभावें ऐक्यातैं। पावतीचि गां।।११८।।

"तो देहधारी तर दिसतो, पण चैतन्यासारखा असतो. त्याने सहज म्हणून जरी श्रौतादिक यज्ञकर्मे केली, तरी त्यांचे फल म्हणून स्वर्गादी न मिळता ती सर्व त्याच्याठायी समग्र लय पावतात. अकाळी पातलेले मेघ जसे वृष्टी न करताच आले तसे नाहीसे होतात व आकाश पुनः जसेच्या तसेच दिसते, त्याप्रमाणे त्याने जरी वेदविहित एकूण एक विधाने यथासांग संपन्न केली, तरी त्याला कोणतीही भवस्वर्गादी बंधने प्राप्त न होता समस्त कर्म त्याच्याठायी लय पावते - जशी सर्व सृष्टी परमात्मठायी लीन होते किंवा लयास जाते, अशीच त्याची आत्मस्थिती असते."

ब्रह्मयज्ञ व कर्म

या ***कर्म*** व ***यज्ञ*** संकल्पनांद्वारे ***ब्रह्मयज्ञा***चेही स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते. श्रीकृष्णांनी म्हटले आहे कीः

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।

"कर्मच ब्रह्म आहे, अशी समबुद्धी असलेला तो पुरुष यज्ञासाठी जे अर्पण करतो, ते ब्रह्मच! ज्याची आहुती देतो, तेही ब्रह्मच! ज्या अग्नीत आहुती देतो, तो अग्नीही ब्रह्मच आणि स्वतः आहुती देणारा यजमानही ब्रह्मच व ज्याप्रति तो जाणार आहे, तेही ब्रह्मचः अशी त्या ब्रह्मरूप यज्ञकर्मात समाधिस्थ झालेल्या पुरुषाची स्थिती असते."

यावर ज्ञानदेवांचे वचन पाहाः

जें हे हवन मी होता। कां इयें यज्ञीं हा भोक्ता।
ऐसियां बुद्धीसीं नाही भंगता। म्हणऊनियां।।४-११९।।
जैं इष्ट यज्ञ यजावें। तैं हविर्मंत्रादी आघवें।
तो देखतसे अविनाशभावें। समबुद्धी।।१२०।।

"अशी ब्रह्ममय आत्मस्थिती असणाऱ्यांच्याठायी ***"हे यज्ञरूप कर्म"*** व ***"ते करणारा मी कोणी"*** किंवा ***"यज्ञामध्ये अमुक एक भोक्ती देवता"*** आहेत असा भेदभाव नसतो. इष्टयज्ञादी जे तो करतो, ते सर्व आणि हवि, मंत्र, द्रव्यादींसह सगळीच ती ब्रह्म आहेत, अशा भावनेने तो पाहतो."

म्हणऊनि ब्रह्म तैंचि कर्म। ऐसें बोधां आलें जेयां सम।
तेयां कर्तव्य तैं नैष्कर्म्य।धनुर्धरा।।४-१२१।।
आतां अविवेक कुमारत्वा मुकलें।
जेयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहलें।
मग उपासन जिहीं आणिलें। योगाग्नीचें।।१२२।।

"अशा रीतीने पूर्णतया आत्म्यात बुद्धी रमलेल्या त्या महाभागास ब्रह्मच कर्म आहे व कर्म पण ब्रह्मच आहे, असा भाव प्राप्त होतो व म्हणून त्याने कर्तव्य म्हणून काही जरी केले, तरी ते नैष्कर्म्य होते. अशी नैष्कर्म्यसिद्धी त्या विवेकरूप तारुण्य लाभलेल्या व विरक्तिप्रमदेशी विवाह केलेल्या आणि योगरूप अग्नीची उपासना करणाऱ्या पुरुषास प्राप्त होते."

यातील ***नैष्कर्म्यसिद्धी*** चा भागही *आठव्या* अध्यायातील *ओवी क्र.४७* ***(तो हा सकळ जीवांचा विसांवा। हा नैष्कर्म्यसुखाचां ठेवा।...)*** मधील नैष्कर्म्यसिद्धीच्या उल्लेखाशी पूर्णतया संबंधित असाच

आहे, हेही जिज्ञासूंच्या लागलीच लक्षात आले असेलच! हा यज्ञाचा दाखला इतका महत्त्वाचा आहे की तो पुढील श्लोकातून व ओव्यातून मूळापासूनच समग्र पाहणे उचित ठरते. त्याशिवाय अधियज्ञाच्या ज्ञानदेवांच्या संकल्पनेस पुरेसे महत्त्व दिले असे म्हणता येत नाही.

यज्ञसंकल्पना::::

चौथ्या अध्यायातील यज्ञ

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति।।४-२५।।

"योगी लोक दैवयज्ञाची उपासना करतात, तर कित्येक ब्रह्मरूपी अग्नीठायी यज्ञानेच यज्ञाची उपासना करतात."

यावर ज्ञानदेव म्हणतातः

जैं यजनशील अहर्निशीं। जिहीं अविद्या हविलीचि मनेंशीं।
गुरुवाक्यहुताशीं। हवन केलें।।४-१२३।।
तिहीं योगाग्निक यजिजें। तो दैवयज्ञ म्हणिजे।
जेणें आत्मसुख कामिजे। पंडुकुमरा।।१२४।।
दैवास्तव देहाचें पालण। ऐसा निश्चयो परिपूर्ण।
जो चिंतिना देहभरण। तो महायोगी जाण दैवयोगें।।१२५।।

"जे योगी अहर्निश यज्ञ करण्यात गुंतलेले असतात; ज्यांनी मनासह अविद्येची आहुती गुरुवाक्यरूपी अग्नीमध्ये देऊन हवन केले आहे, ते योगाग्नीचे यजन करणारे जो यज्ञ करतात, त्याला ***दैवयज्ञ*** म्हणतात. यात केवळ आत्मसुखच वांछित असते. ज्याने देह प्रारब्धावर सोडून दिला आहे, असा तो याज्ञिक या दैवयज्ञायोगे महायोगी झालेला आहे, हे निश्चितच समज."

आतां अवधारीं सांगेन आणिक। जैं ब्रह्माग्नि साग्निक।
तेयांतैं यज्ञेंचि यज्ञु देख उपासिजे।।४-१२६।।

"जे इतर कित्येक ब्रह्मरूप अग्नीचे अग्निहोत्री आहेत, ते यज्ञानेच यज्ञाची उपासना करतात. ती अशी":

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति।
शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति।।४-२६।।

"असे जे योगी असतात, ते संयमरूप अग्नीच्या ठिकाणी शब्द आदीकरून विषयांची आहुती देतात."

उपरोल्लेखित *आठव्या* अध्यायातील यज्ञासंबंधित ओव्यातून हेच प्रकार पुनः वर्णिले आहेत. तसेचः

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते।।४-२७।।

"योगी इंद्रियांची सर्व कर्मे आणि प्राणांची सर्व कर्मे यांची ज्ञानरूप अग्नीने प्रदीप्त झालेल्या आत्मसंयमरूपी योगाग्नीत आहुती देतात."

हे जे यज्ञाचे वेगवेगळे प्रकार योगिजन अवलंबितात, ते तसे पाहिले तर भिन्न पण वस्तुतः एकाच मार्गाने जाणारे आहेत. याबद्दल आपली दिशाभूल होण्याची शक्यता गृहित धरूनच *आठव्या* अध्यायातील अधियज्ञासंबंधी ***यज्ञ*** म्हणजे नक्की काय ते स्पष्ट करणाऱ्या ओव्या ज्ञानदेवांनी रचल्या असाव्यात असे वाटते.

संयम व संयमाग्नि

तसेच या यज्ञप्रकारांत वारंवार ***संयम*** व ***संयमाग्नि*** यांचे जे निर्देश येतात, त्यांचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. यापूर्वीच आपण श्रीगोरक्षनाथकृत ***सिद्धसिद्धांतपद्धति*** नुसार योगाच्या अष्टांगांचे लक्षण अवलोकिले होते. ज्ञानेशांनाही हा ग्रंथ गुरुस्थानी असल्याचे अमान्य करण्याचे काही कारण दिसत नाही. कारण स्वतः ज्ञानदेव हे गोरक्षपरंपरेतील गहिनीनाथांच्या निवृत्तिनाथ या शिष्यांचे शिष्य! ही गुरुपरंपरा त्यांनी ज्ञानेश्वरीच्या *अठराव्या* अध्यायात प्रकट केलेली आपणांस विदित आहेच. ***सिद्धसिद्धांतपद्धति*** मध्ये गोरक्ष म्हणतातः

यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाधयोऽष्टाङ्गानि।।२-३२।।सि.सि.प.।।

पतञ्जलीसुद्धा योगाची अष्टांगे प्रदर्शित करत तसेच म्हणतातः

यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाधयोऽष्टाङ्गानि।।२-२९।।पा.यो.सू.।।

यप्रमाणे योगाची अष्टांगे कोणती याबाबत पातञ्जल व गोरक्षप्रणाल्यात कोणताही शब्दभेद नाही, इतकी या दोन सूत्रांची एकवाक्यता आहेः त्यात आहे तो अर्थभेद व तोसुद्धा आपण पूर्वीच निरीक्षिला आहे. त्यावेळी आपल्या हेही लक्षात आले की गोरक्षप्रणित ***अष्टांगयोग*** हा या अष्टांगांची जी व्याख्या करतो, ती व्युत्पन्न वा सिद्धांना लागू असलेली आहे. परंतु योगाच्या प्राथमिक भूमिकेवर या व्याख्या आपणांस पतञ्जलीमुनिप्रणीतच धराव्या लागतात.

गोरक्षमताचे आद्यशंकराचार्यांच्या तशाच प्रकारच्या मतांशी असलेले साम्य आपण ***अपरोक्षानुभूति*** या त्यांच्या स्फुट प्रकरणानिमित्त पाहिलेच होते.

संयम

आता प्रश्न मुख्यतया संयमाची व्याख्या पाहण्यापुरता मर्यादित आहे. ती व्याख्या पुरविण्यास पातञ्जलयोगसूत्रे उपयुक्त ठरतातः

त्रयमेकत्र संयमः।।३-४।।पा.यो.सू.।।

"धारणा, ध्यान व समाधि या तीन गोष्टी वा अवस्था एकत्र प्रवृत्त होणे म्हणजे ***संयम*** आहे." इंद्रियांचा संयम करणे - त्यांच्यावर ताबा ठेवणे इ.अर्थी तो शब्द येथे वापरला नाही. पुढे संयमाने होणारी उपलब्धी सांगतांना पतञ्जली म्हणतातः

तज्जयात्प्रज्ञालोकः।।३-५।।

व

तस्यभूमिषु विनियोगः।।३-६।।पा.यो.सू.।।

त्या ***संयमाचा जय*** म्हणजे ***धारणा, ध्यान व समाधि*** यांच्या एकत्रित अवस्थेला स्थैर्य आले की ***प्रज्ञा*** प्रकट होते. ***प्रज्ञा*** म्हणजे वस्तुमात्राचे यथार्थ ज्ञान करून देणारी शक्ती. त्या प्रज्ञेचा उपयोग योग्य ठिकाणी करावा. म्हणजे समाधीपेक्षाही सूक्ष्मतर अशा पुढील भूमिका प्राप्त करण्यासाठी प्रज्ञेचा उपयोग करावा. म्हणजे अंतिम गंतव्य जे ***कैवल्य,*** ते प्राप्त होते; आत्मा केवळ चिन्मात्र अवस्थेत राहतो. थोडक्यात संयमानेच पुढील श्रेयोपलब्धी होते; निव्वळ समाधि साध्य झाल्याने नव्हे; अशी योगसूत्रांची भूमिका आहे.

आपणही ***संयम*** व ***संयमाग्नि*** हे शब्द याच अर्थाने या ठिकाणी घेऊ या. ***संयमाग्नि, योगाग्नि, ब्रह्माग्नि, ज्ञानाग्नि या सर्व*** **संज्ञा समानार्थकच आहेत.** फक्त प्रसंगपरत्वे त्यांच्यात थोडाफार संदर्भभेद प्रकटतो, एवढे लक्षात ठेवले म्हणजे झाले. या पार्श्वभूमीवर ज्ञानदेवांचे ***यज्ञदर्शन*** पुढे पाहू याः

संयमाग्नि

एक संयमाग्निहोत्री। तैं युक्तित्रयाचां मंत्रीं।
यजन करिती पवित्रीं। इंद्रियद्रव्यीं।।४-१२७।।

"***मूल-वोढियाणा व जालंधरादी*** त्रिबंधांची मंत्रस्वरूप यंत्रणा वापरून यमनियमासनप्राणायामप्रत्याहारादींनी पवित्र केलेल्या इंद्रियद्रव्यांचे कोणी योगी *धारणा-ध्यान-समाधि-एकरूपतेच्या संयमाग्नीत* हवन करतात. हाच त्यांचा यज्ञ होय!"

एक वैराग्यरवि विवलें। तंव संयती विहार केले।
तेथ अपावृत जाहलें। इंद्रियानल।।४-१२८।।
तिहीं विरक्तीचि ज्वाला घेतली। तंव विकारांची इंधनें पलिपलीं।
तेथ आशाधूमें सांडिली। पांचही कुंडें।।१२९।।
मग वाक्यविधीचियां निरवडी। विषय आहुति उदंडीं।
हवन केलें कुंडीं। इंद्रियाग्नीचां।।१३०।।
एकीं ययापरी पार्था। दोषु क्षालिलें सर्वथा।....।।१३१।।

"वैराग्यरवीचा उदय होताच संयत आहाराविहाराची युक्ती वापरून, इंद्रिये शुद्ध करून, त्यांच्यात वैराग्याची ज्वाळा पेटवून, त्यात विषयविकारांची इंधने सारून, त्या पंचेंद्रियरूपी अग्निकुंडातील आशारूपी धूर घालवून टाकल्यावर, वेदोक्त विधिवाक्यांच्या आचाराने त्यात उद्दंड विषयांच्या आहुती देऊन, हवन करून, काही योगी यज्ञ संपादतात. अर्जुना! ते योगी आपल्याठायींच्या संसारमलदोषांचे क्षालन करतात."

ज्ञानाग्नी

यानंतर त्यांच्या आवडत्या ***गुरुपदिष्ट कुंडलिन्यधिष्ठित योग***मार्गाचे यज्ञरूपे वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

.....।आणिकीं हृदयारणीं मंथा। विवेकु केला।।४-१३१।।
तो उपशमें निहटिला। धैर्यें वरी दाटिला।
गुरुवाक्यें काढिला। बलकटपणें।।१३२।।
ऐसें समरसें मंथन केलें। तेथ झडकरीं काजा आलें।
तैं उज्जीवन जाहलें। ज्ञानाग्नीचें।।१३३।।
पहिला ऋद्धिसिद्धिचा संभ्रमु। तो निवर्त्तोनि गेला धूमु।
मग प्रगटला सूक्ष्मु। विस्फुलिंगु।।१३४।।

"आता दुसरे योगी काय करतात, ते ऐक. ते आपल्या हृदयाची अरणी करून विवेकाचा मंथा करतात. तो मंथा शांतीने बळकट धरतात व वरून धैर्याने दाबतात. आणि गुरुपदेशरूपी दोरीने मंथन करतात. याप्रमाणे समरसतेने मंथन केले की सत्वर ***ज्ञानाग्नी*** प्रकट होतो. त्यानंतर प्रथम ऋद्धिसिद्धी प्रकटतात. त्यांचा संभ्रमात पाडणारा धूर निवटला की मग सूक्ष्म अशी ज्ञानाग्नीची ठिणगी प्रकट होते."

यमनियम-आसन-प्राणायाम-प्रत्याहारादी साधना यांना येथे ***हृदयाची अरणी व विवेकाचा मंथा*** यांच्याशी संबंधित धरून, ***गुरुपदेश*** हा मंत्र समजून, ***ज्ञानाग्नि*** म्हणजे **कुंडलिनी जगदंबेचे जागरण** येथे अभिप्रेत आहे.

"तैशी तैं कुंडलिनी। मोटकी औटवलणी। अधोमुख सर्पिणी। निदैली असे।।६-२२३।।";"तेथ नक्षत्र उलंडलें। कीं सूर्याचें आसन मोडिलें। तेजाचें बीज विरूढलें। अंकुरेंशी।।२२६।।";"तैशीं वेढियांतैं सोडिती। कवतिकें आंग मोडिती। कंदावरी शक्ति। उठली दिसें।।२२७।।" असे जिचे वर्णन ज्ञानदेवांनी *सहाव्या* अध्यायात केले आहे, ती कुंडलिनी सुप्तावस्थेतून जाग्रतावस्थेत परिणत होते.

तेयां मनाचें मोकलें। तैंचि पेटवण घातलें।
जैं यमदमीं हलुवारिलें। आइतें होते।।४-१३५।।
तेणें सादुकपणें ज्वाला समृद्धा। मग वासनांतराचियां समिधा।
स्नेहेंसि नानाविधा। जालिलियां।।१३६।।

"त्या ज्ञानाग्नीला मग यमदमादींनी कोरडे केलेले मनाचे आणि प्राण व इंद्रियांचे पेटवण घातले. त्यामुळे त्याची ज्वाळा समृद्ध झाली. त्या ज्वाळेत वासनांच्या समिधा ममतारूपी तुपासह जाळल्या; म्हणजे प्राणापानांची गती रुद्ध करून कुंडलिनीला ऊर्ध्वमार्गी केल्यावर सुषुम्नेत साठवलेल्या जन्मजन्मांतरीच्या वासनांची त्यात आहुती देऊन त्यांचा नाश केला."

तेथ सोऽहंमंत्रें दीक्षितीं। इंद्रियकर्मांचियां आहुती।
तियें ज्ञानानलीं प्रदीप्तीं। दिधलियां।।४-१३७।।
पाठीं प्राणक्रियेचेनि स्त्रुवेनिशीं। पूर्णाहुतीं पडलीं हुताशीं।
तेथ अवभृथ समरसीं। साहजें जाहलें।।१३८।।

"तो ज्ञानाग्नी आणखीनच प्रदीप्त झाला. त्यात सोऽहंभावनेने राहून - ***सोऽहं*** या मंत्राचा उच्चार करत, इंद्रिये व कर्म यांच्या आहुती दिल्या आणि त्यापाठोपाठ ***प्राणक्रिया*** हीच जणू स्त्रुवा - तिच्याने हवन करून मनप्राणेंद्रियक्रियांची पूर्णाहुती दिली. त्यामुळे आपोआपच **समरसतेचे *अवभृथ स्नान*** याजकाला घडले."

हीच क्रिया ***"पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतींचा दंशु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९१।।"*** या ओवीत व्यक्तवलेली आहे.

मग आत्मबोधींचें सुख। जैं संयमाग्नीचें हुतशेष।
तोचि पुरोडाशु देख। घेतला तिहीं।।१३९।।

"तदनंतर संयमाग्नीत इंद्रियादिक शेष द्रव्यांचे यजन-याजन करून शिल्लक राहिलेले, यज्ञनारायणाने प्रसन्न होऊन प्रसाद म्हणून दिलेले शेष द्रव्य जो आत्मबोधरूपी पुरोडाश, तो त्या याज्ञिकाने सेवन केला आणि हे यजन संपूर्णतेस जाऊन पृथ्वी-स्वर्ग-पाताळादी भुवनात पुनरावृत्ती होण्यापासून मुक्ती मिळाली."

या सर्व वर्णनात **पंथराजा**शी अतीव साम्य दर्शवलेले दिसते. जरी हे यज्ञांचे विविध प्रकार म्हणून वर्णिले आहेत, तरी सम्यक दृष्टीने पाहणाऱ्यास त्यांच्यात एक सूत्र दिसते. तीच क्रिया, तिच्या

विश्वव्यापार

वेगवेगळ्या प्रक्रिया सुट्यासुट्या समजून केलेले हे एकाच क्रियेच्या विविध अंगांचे वर्णन आहे, असे आपणांस वाटते.

ज्ञानेश हा वर्णनप्रकार कधीकधी वापरतात. तो आपण ***पंथराज***वर्णनाच्या वेळी अधिक नीटरीत्या पाहूच! त्यातून येथे श्रीकृष्णोक्ती पण अनेकविध यज्ञप्रकार सांगण्याची आहे. म्हणून पण ज्ञानदेव हे असे वर्णन करून साधकांच्या वेगवेगळ्या अवस्था दाखवत आहेत, आणि त्या सर्वच क्रियांचा समन्वय करून त्यांचा ***पंथराज*** वा ***क्रमयोग*** प्रकटला आहे, असेही म्हटले तरी चालेल. कारण त्यांनी म्हटलेच आहे कीः

पैं योगिवृंदें वहिलीं। आडवीं आकाशें निगालीं।
किं तेथ अनुभवाचां पाउलीं। धोरणु पडिला।।६-१५४।।

प्रथमतः हा योगमार्ग स्पष्ट कळला नव्हता. जो तो, त्याला वाटेल तसा, मिळेल त्या मार्गाने वा पद्धतीने हा आकाशपंथ आक्रमू पाही. पण अनेक सिद्धांच्या अनुभवांच्या समन्वयाने त्या मार्गातील खांचाखोचा, ठिकाणे व क्रम लक्षात येऊन मग एक सुस्पष्ट असा मार्ग दिसू लागला. आणि मग त्या सिद्धांनी विचारपूर्वक या मार्गाचे आरेखन केले आणि त्या रूळलेल्या मार्गावरून जाऊन अनेक साधकांचे सिद्ध झाले. याच विविध क्रिया येथे श्रीकृष्णोक्ती स्पष्ट करण्यासाठी ज्ञानदेव सांगत आहेत, असे आपले मत होते. असो.

यज्ञीय पुरोडाश

हे यज्ञ संपन्न झाल्यावर प्रसाद म्हणून जो पुरोडाश प्राप्त होतो, त्याचे खरे वर्णन तर ज्ञानदेव *सहाव्या* अध्यायात करतात. अत्यंत मनोवेधक असे ते वर्णन पहाः

जैं उन्मनियेचें लावण्य। जैं तुर्येचें तारुण्य।
अनादि जैं अगण्य। परमतत्त्व।।६-३२०।।
जें आकाराचां प्रांतु। जैं मोक्षाचां एकांतु।
जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलें।।३२१।।
जैं विश्वाचें मूल। जैं योगद्रुमाचें फल।
जैं आनंदाचें केवल। चैतन्य गां।।३२२।।
जैं महाभूतांचें बीज। जैं महातेजाचें तेज।
एवं पार्था जैं निज-। स्वरुप माझें।।३२३।।
तैं हे चतुर्भुज कोंभैलीं। जेयाची शोभा रूपा आली।
देखौनि नास्तिकीं नोकिलीं। साधुवृंदें।।३२४।।
तैं अनिर्वाच्य महासुख। पैं आपणचि जाहलें जैं पुरुख।
जेयांचें कां निष्कर्ष। प्राप्तिवेरीं।।३२५।।
आम्ही साधन हे जैं सांधितलें। तैंचि शरीरीं जिहीं केलें।
तैं आमुचेनि पडों आलें। निर्वाललेयां।।३२६।।
परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचियें मुसें।
वोतींव जाहलें तैसें। दिसती आंगें।।३२७।।
जऱ्हीं हे प्रतीती हन अंतरीं फांकें।
तऱ्हीं विश्वचि हे आघवें झांकें।....।।३२८।।

अशा नितांतसुंदर, सुबोध शब्दांतून ज्ञानेश ती यज्ञपूर्तीची अवस्था वर्णन करतात.

सकल यज्ञांची सांगता

एक ऐशियां इहीं यजनीं। मुक्त तैं जाहलें त्रिभुवनीं।
या यज्ञक्रिया तऱ्हीं आनानी। परि प्राप्य तैं आईक।।४-१४०।।

"असो. याप्रमाणे या सर्व यज्ञक्रियांचे जे विविध प्रकार निरूपण केले, त्यांचे प्राप्तव्य मात्र असे हे एकच आहे," असे श्रीकृष्ण म्हणतात. पुढे त्याबाबत पुनः एकवाक्यता करत ते सागतात कीः

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः।।४-२८।।

इतर सर्व प्रकारच्या यज्ञांचा संक्षिप्त उल्लेख करून श्रीकृष्ण म्हणतात, "त्याचप्रमाणे ***द्रव्ययज्ञ*** म्हणजे ईश्वरार्पणबुद्धीने लोकसंग्रहार्थ द्रव्याचा विनियोग करणे; ***तपोयज्ञ*** म्हणजे ईश्वराज्ञा म्हणून स्वधर्मपालनरूप तपाचे आचरण करणे; ***योगयज्ञ*** म्हणजे ***अष्टांगयोग*** वा इतर योगक्रियांद्वारे परमात्मप्राप्तीसाठी अहर्निश झटणे; ***स्वाध्याययज्ञ*** म्हणजे आत्मा गोचर करणाऱ्या सच्छास्त्रांचे ईश्वरार्थ अध्ययन-अध्यापनादी करणे; ***ज्ञानयज्ञ*** म्हणजे लोकसंग्रहार्थ व लोकोद्धारार्थ सच्छास्त्रांचे सांग आचरण करून लोकात ईश्वराप्रीत्यर्थ ती शास्त्रे प्रसृत करणे; असे हे विविध यज्ञप्रकारच होत. अहिंसादी तीक्ष्ण व्रते आचरणारे यत्नशील पुरुषच हे यज्ञ करू शकतात."

यज्ञाचा गूढार्थ::::

यज्ञाचे अर्थ

या ठिकाणी या यज्ञांचे जे सर्वसामान्य अर्थ आहेत, ते दिले आहेत. त्यांचे खरे गूढ असे जे अर्थ आहेत, ते नंतर या श्लोकांवरील ज्ञानदेवांच्या ओव्या देतांना सुचविले असून जिज्ञासूंनी त्यांचा जरूर नीट विचार करावा. असो.

योगतारावली::::

केवलकुंभक

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे।
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः।।४-२९।।

"इतर कोणी योगिजन अपानवायुठायी प्राणवायूचा होम करतात; तर कोणी प्राणवायुठायी अपानाचे हवन करतात. ***प्राणायामपरायण*** **असणारे इतर कोणी योगी प्राण व अपान यांच्या गतीचा निरोध करून *केवलकुंभक* साधून घेण्याचा यज्ञ करतात.**"

या श्लोकात श्रीकृष्णांनी **हठयोगा**चा निर्देश व त्यातील सहसा ज्ञात नसणाऱ्या प्रकारांचा नामोल्लेख केलेला आढळतो. यातील ***केवलकुंभक*** या एकाच योगविशेषावर संपूर्ण प्रकाश पाडणारा श्रीमदाद्यशंकराचार्यांचा अद्वितीय प्रकरणग्रंथ म्हणजे ***योगतारावली*** होय. थोडे विषयांतर करून ते काय म्हणतात, ते पाहू याः

केवलकुंभकाची महती गातांना आचार्य म्हणतातः

"सहस्रशः सन्तु हठेषु कुंभाः। संभाव्यते केवलकुंभ एव। कुंभोत्तमे यत्र तु रेचपुरौ प्राणस्य ना प्राकृतवैकृताख्यौ।।१०।।यो.ता.।।"

"हठयोगात अनेक प्रकारचे कुंभक जरी सांगितलेले असले तरी *केवलकुंभक* हाच सर्वश्रेष्ठ असल्याने प्रशंसनीय आहे. कारण

यात प्राणवायूचे नैसर्गिकरीत्या होणारे आवागमन तर नाहीच, पण हट्टाने केलेला निरोधसुद्धा नाही."

हठयोग

हठयोग हा सर्वात जास्त ऐकीवातला व म्हणूनच सर्वात कमी माहितीचा असा प्रांत आपणांसाठी असतो. ***ह-सूर्य; ठ-चंद्र* वा *सूर्यनाडी -पिंगला* आणि *चंद्रनाडी-इडा*, यांच्याशी संबंधित असणारा योगप्रकार हा खरे तर *हठयोग* होय.** अडाण्यांसारखे उगाचच काही तरी श्वास कोंडणे इ.प्रकार यात नाहीत, तर शास्त्रशुद्ध आडाखे व प्रायोगिक भूमीवर बसवून मान्यवरांनी अनुभवलेले ***योगशास्त्र*** त्यात आहे.

त्यातील वरील कुंभकप्रकार जो श्रीशंकराचार्य निर्देशितात, तो ***केवलकुंभक*** या नावाने प्रसिद्ध आहे. यात प्राणवायूचे आवागमन नाही - म्हणजे संसाराची जी नैसर्गिक ओढ असते, ती नाही; तसेच हटातटाने केलेला प्राणनिरोधही नाही- म्हणजे इंद्रिये बळेच आवरून धरणे पण तरीही मनाने विषयसेवन करणे चालूच असणे पण नाही; तर **साधकाचे मन पूर्णतया निर्विषय होऊन ते सर्वदा निश्चल, प्रशांत राहण्याची स्थिती होय.**

योगतारावली, गीता व पातञ्जलसूत्रे

चित्ताचे वासनासंस्कार अवशेषमात्रही न उरणे, शिल्लक न राहणे, हे या कुंभकात अभिप्रेत आहे. पतञ्जलींनी ***"तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः ।।१-५१।।"*** असे सांगितले आहे, ते याच ***कैवल्य***नामक स्थितीला उद्देशून! हीच ***निर्बीज समाधि*** होय. चित्तावरील ***ऋतंभरा*** प्रज्ञेच्या संस्कारांसकट सर्व संस्कारांचा निरोध झाला असता ही स्थिति प्राप्त होते.

तसेच गीता *श्लोक क्र. ६-२७* मध्ये म्हटलेली ***"प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम्। उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम्।।"*** -म्हणजे मन पूर्ण शांत होऊन निष्पाप - रजोगुण शांत झालेली व सच्चिदानंदघन परमात्म्याशी ऐक्य पावण्याची जी अत्युत्तम आनंदमय अशी योग्याची स्थिती, ती प्राप्त होण्यास हा ***केवलकुंभक*** साध्य होणे आवश्यक आहे. एवं च काय, ***केवलकुंभक* अवस्था हीच ती ब्रह्मीभूत स्थिती होय** - इतके या कुंभकाचे महत्त्व आहे.

केवलकुंभकविद्या

असे असल्यानेच श्रीशंकराचार्य ***केवलकुंभकरूपी* विद्येची उपासना** करतांना म्हणतातः

"बंधत्रयाभ्यासविपाकजाताम्। विवर्जितांरेचकपूरकाभ्याम्। विशोषयंतीं विषयप्रवाहाम्। विद्यां भजे केवलकुंभरूपाम् ।।८।।यो.ता.।।"

"त्रिबंधांच्या दीर्घ अभ्यासाने त्याबाबत परिपक्वता आली असता, जिच्यामध्ये रेचक व पूरक या प्राणक्रिया नसतात *(बंद पडतात)* आणि जिच्यात विषयवासनांचा वृत्तिप्रवाह कुंठित होतो, अशी जी श्रेष्ठ ***केवलकुंभकरूपी विद्या*** आहे, तिची मी उपासना करतो."

अनाहतनाद व पंथराज

आचार्यांनी अशी केवलकुंभकविद्येची महती गायिली आहे. त्यांची ही योगविद्या त्यात प्रकटणाऱ्या ***अनाहतध्वनी*** वा नादामुळे श्रीज्ञानदेवांच्या पंथराजाशी जवळीक असणारी आहे.

"नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यम्। त्वां साधनं तत्त्वपदस्य मन्ये। भवत्प्रसादात्पवनेन साकम्। विलीयते विष्णु पदे मनो मे ।।४।।यो.ता.।।"

"हे नादानुसंधाना! तुला माझा नमस्कार असो! कारण तूच माझ्याठायी ब्रह्मभाव प्रस्थापित होण्याचे अमोघ साधन आहेस, असे मी मानतो. कारण तुझ्या कृपेने आता माझे मन प्राणासमवेत विष्णुपदी लीन होत आहे."

या नादासंबंधी ज्ञानदेवांच्या सहाव्या अध्यायातील ओव्या लगेच स्मरतातः

हे असो तैं कुंडली। हृदयाआंतु आली।
तंव अनाहताची बोली। चावले तैं।।६-२७४।।
शक्तीचियां आंगां लागलें। बुद्धीचें चैतन्य होतें आलें।
तैं तेणें आईकलें। अलुमालु।।२७५।।
घोषाचां कुंडीं। नादचित्रांची रूपडीं।
प्रणवाचियां मोडीं। रेखिलीं ऐसीं।।२७६।।
हेंचि कल्पावें तन्हीं जाणिजे। परी आतां कल्पितें कैंचें आणिजे।
परि नेणों काय गाजे। तियें ठायीं।।२७७।।
विसरौनि गेलो अर्जुना। जंव नाशु नाहीं पवना।
तंव वाचा आथी गगना। म्हणौनि घुमे।।२७८।।
तेयां अनाहताचेनि मेघें। मग आकाश दुमदुमों लागें।
तंव ब्रह्मस्थानींचें बेगें। फिटलें सहजें।।२७९।।

असो. अनाहतनादाविषयी योगानुभूत माहिती पुढे कधीतरी पाहू.

सहजामनस्का

ज्ञानदेव व श्रीशंकराचार्य यांच्या रचनांतील ही साम्यस्थले लक्षात घेतली की आपणांस कळेल की आचार्य अशी मनीषा का व्यक्त करतातः

"विवर्तयन्ती निखिलेन्द्रियाणाम्। प्रवर्तयन्ती परमात्मयोगम्। संविन्मयीं तां सहजामनस्काम्। कदा गमिष्यामि गतान्यभावाम् ।।२३।।यो.ता."

"मनासह सर्व इंद्रियांना आपापल्या क्षेत्रातील विषयग्रहणापासून निवृत्त करणाऱ्या, श्रेष्ठतम आत्म्याशी संयोग घडण्यास प्रवृत्त करणाऱ्या, इंद्रियातीत, ज्ञानरूपा असणाऱ्या व सर्व भावांचा, वृत्तींचा व कल्पनांचा अभाव असणाऱ्या, त्या ***सहजामनस्का*** ज्ञानसमाधीला मी केव्हा बरे पोहोचेन!"

श्रीशैल्यनागार्जुन

यात जी ***सहज-अमनस्का*** वा ***उन्मनी*** वा ***अमन** अवस्था* किंवा ज्ञानदेव म्हणतात ती ***"जंव मनाचा पटु फांटे"*** अशी अवस्था प्राप्त व्हावी, ही जी आचार्यांची मनीषा आहे, तिची पुरेपूर कल्पना येण्यासाठी साधकाने जरूर एकदातरी श्रीशैल्यनागार्जुनाच्या राईत जी श्रीशंकराचार्यांची तपोभूमी आणि जो *पातालगंगा* नामक प्रपात आहेत,

तेथील पवित्र, शांत अन निसर्गरम्य वातावरणात जाऊन शांत चिंतन करावे. ***योगतारावली*** हा आचार्यांचा दिव्य ग्रंथ त्यांना ***सौंदर्यलहरी*** या तशाच दिव्य ग्रंथासह तेथेच स्फुरला, असा इतिहास आहे. हे ग्रंथ त्या परिसरात अभ्यासणाऱ्या साधकास काही निश्चित प्राप्ती जरूर संभवते, असा काही योगाभ्यासकांचा स्वानुभव आहे.

जाताजाता या ग्रंथावर प्रस्तुत श्री.चं.वा.दांडेकर यांचे ***योगतारावली*** व प.पू.विष्णुतीर्थ महाराज यांचे ***सौंदर्यलहरी*** या ग्रंथाभिनामाने प्रसिद्ध असलेल्या रचना अतिउत्कृष्ट अशाच आहेत, हे आवर्जून सांगेवेसे वाटते. असो.

यज्ञफल::::

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः।।४-३०।।

चवथ्या अध्यायातील आपण पाहिलेल्या*४-२८ व २९* या श्लोकांनंतरच्या या श्लोकातून श्रीकृष्ण मिताहारी राहून प्राणांचे प्राणांच्याच ठिकाणी हवन करणाऱ्या यज्ञवेत्त्यांचा असा निर्देश करत म्हणतात की "या सर्व यज्ञवेत्त्यांची वा याज्ञिकांची पातके या विविध यज्ञांनी नष्ट झाली आहेत असे जाणावे."

नंतर या यज्ञांनी मिळणारे फल सांगतांना ते म्हणतात कीः

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम्।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम।।४-३१।।

"यज्ञाचे अवशिष्ट जे अमृतरूपी फल ब्रह्म आहे, ते भोगणारे ते महान यज्ञवेत्ते शाश्वत ब्रह्मपदाला प्राप्त होतात. हे कुरुश्रेष्ठा! या विविध यज्ञप्रकारातील एकही यज्ञ न करणाऱ्याला हा मनुष्यलोकसुद्धा धड उपभोगता येणार नाही, तर परलोकातील सुखोपभोग कोठून मिळणार! आणि त्याला उत्तम गती तरी कशी मिळणार!"

यज्ञप्रकार::::

विविध यज्ञ

याप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारांनी यज्ञ सांगण्याच्या निमित्ताने अधियज्ञाची जी सांगता केली जाते, त्याबद्दल ज्ञानदेव श्रीकृष्णवचनांस अनुसरून म्हणतातः

एक द्रव्ययज्ञ म्हणीपती। एक तपसामग्रिया निफजती।
एक योगयागुही आहाती। जैं सांधितलें।।४-१४१।।
एकीं शब्दीं शब्द यजिजे। तो वाग्यज्ञु म्हणिजे।
ज्ञानें ज्ञेय गमिजे। तो ज्ञानयज्ञु।।१४२।।
हे अर्जुना सकल कुवाडें। जैं अनुष्ठितां अति सांकडें।
परि जितेंद्रियासिची घडे। योग्यतावशें।।१४३।।
तैं प्रवीण तेथ भलें। आणि योगसमृद्धी आथिलें।
म्हणौन आपणा तिहीं केलें। आत्महवन।।१४४।।

"हे यज्ञ याज्ञिकांच्या देहांतरीतील पंचेंद्रिये, तत्त्वे इ.द्रव्यांचा होम करून साधतात. त्यातील काहींना ***द्रव्ययज्ञ*** अशी संज्ञा आहे. तर काहींसाठी तपसामग्री आवश्यक आहे. त्यांना ***तपोयज्ञ*** असे म्हणतात. ***योगयज्ञ*** म्हणूनही एक यज्ञप्रकार आहे. एक ***स्वाध्याययज्ञ*** म्हणजे ***वाग्यज्ञ*** होय. यात **शब्दाचेच शब्दी यजन** करावयाचे असते."

या वाग्यज्ञाचा अजूनही एक अर्थ संभवतो. तो म्हणजे ***परा-पश्यंति- मध्यमा व वैखरी*** या चार वाचांचा ***वैखरी-मध्यमा-पश्यंति-परा*** या क्रमाने उत्तरोत्तर एकीचा दुसरीत लय करत जायचे. अजपाजपमार्ग तोही हाच! यायोगे ***शब्द म्हणजे विश्व*** **आदिकारणात लीन होऊन मुक्तिप्राप्ती अपेक्षित आहे.** तसे पाहिले तर एका अर्थी हा ***पंथराजाचा लययोग***च आहे. फक्त ***तत्त्वांच्या लयाचा क्रम*** **सांगण्याऐवजी *वाचांचा लयक्रम* निर्देशिला आहे. *वाचा व तत्त्वे* ही शेवटी एकमेकांशी पूर्णतया संबंधितच आहेत!**

ज्ञानयज्ञ

"त्याचप्रमाणे ज्ञानाने ज्ञेय प्राप्त करणे हाही एक यज्ञ ***ज्ञानयज्ञ*** म्हणून प्रसिद्ध आहे." यालाच ***सांख्ययोग, ज्ञानमार्ग, विहंगममार्ग*** अशाही संज्ञा आहेत. आपण ***क्रमयोग*** पाहू तेव्हा हा योगही पंथराजाचा एक टप्पाच आहे, जो तीव्र संवेगाच्या साधकांनाच फक्त साधतो, असे दिसून येईल.

श्रीकृष्ण पुढे म्हणतातः "अर्जुना! हे सर्व यज्ञ संपन्न करण्यास कष्टसाध्य आहेत व म्हणूनच तेवढी योग्यता असल्याने केवळ जितेंद्रिय पुरुषांसाठीच आहेत. हे समस्त याज्ञिक त्या यज्ञांत प्रवीण असून योगसमृद्धिबलाने परिपूर्ण असतात. म्हणूनच ते ***आत्मस्वरूपाठायी जीवबुद्धीचे हवन करून*** **कृतार्थ होतात."**

याही ठिकाणी ज्ञानदेवांचा ***पंथराज*** अप्रत्यक्षपणे प्रकटतो. **जीवबुद्धीचे आत्मस्वरूपाठायी हवन करणे म्हणजेच जीवाशिवाचे मिलन-*सामरस्य*-लययोग इ.आहे. हा तर प्रच्छन्न पंथराजच!** असो.

यज्ञांचे गूढ प्रकार

अगोदरच म्हटल्याप्रमाणे हे ***यज्ञ*** अत्यंत गूढ प्रकारचे आहेत व त्यांचा वरवरचा अर्थ लावणाऱ्यांस त्यांचा खरा अर्थ दुष्प्रायच आहे. तसेच हे यज्ञप्रकार आचरणारे श्रेष्ठ पुरुष उत्तरोत्तर अत्यल्पच असल्याने त्यांचे रहस्य पूर्णपणे कळणे कठीणच आहे. म्हणूनच विद्वानांत या यज्ञांच्या वास्तविक स्वरूपाबद्दल अनेक मते प्रचलित आहेत. ज्ञानदेवांच्या मते हे सर्व यज्ञ सामान्यांपलीकडचे आणि अनुष्ठिण्यास अवघड आहेत. याचेच सूत्र धरून म्हणावयाचे तर पुढीलही ओव्यांतून सांगितलेले यज्ञ तसेच दुष्कर आहेतः

मग अपानाग्नीचां मुखीं। प्राणद्रव्येच देखीं।
हवन केलें एकीं। अभ्यासयोगें।।४-१४५।।
एक अपानु प्राणीं अर्पितीं। एक दोहींतैंहीं निरुंधिती।
तें प्राणायामी म्हणिपती। पांडुकुमरा।।१४६।।
एक वज्रयोगक्रमें। सर्वाहारसंयमें।
प्राणीं प्राणु संभ्रमें। हवन करिती।।१४७।।

"अभ्यासाने कोणी एक अपानाग्नीच्या मुखात प्राणद्रव्य हवन करतात; तर कोणी प्राणाठायी अपानास अर्पण करतात; याहूनही इतर कोणी प्राण व अपान या दोन्हीसही निरोधतात. या सर्वांना ***प्राणायामी*** असे म्हणतात. हे अर्जुना! किती एक इंद्रियांसाठी मिताहार व युक्तविहाराची युक्ती वापरतात व ***वज्रयोग***क्रमे निर्दिष्ट मार्गाने प्राणांतरी प्राणच विलीन करतात."

वज्रयोग व पंथराज

वज्रयोग हा वज्रासन-मूलबंधादी क्रमाने साध्य करावयाचा योग असून कुंडलिनीयोगाशी तो मिळताजुळता आहे. या दृष्टीने जिज्ञासूंनी पुढील ओव्या निरीक्षाव्या. म्हणजे हे काय गूढ आहे हे कळण्यास साहाय्य होईल:

ऐसीं निजकांती हारविली।
मग प्राणुचि केवल जालीं।...।।६-२८३।।
मग तियें हृदयभूमि पोकलें। जिराली कां एकें वेलें।
तैसें शक्तीचें रूप मावलें। शक्तीचिमाजीं।।२८७।।
तेधवां तऱ्हीं शक्तीचि म्हणिजे। एरवीं तो प्राणु केवल जाणिजे।
आतां नादबिंदु नेणिजे। कला ज्योति।।२८८।।
मनाचा हन मारु। कां पवनाचां धरु।
ध्यानाचां आदरु। नाहीं परी।।२८९।।
हे कल्पना घे सांडीं। तैं इयें नाहीं परवडी।
हे महाभुतांची फुडी। आंटणी देखा।।२९०।।
पिंडें पिंडाचां ग्रासु। तो हा नाथसंकेतींचा दंशु।
परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।२९१।।

वज्रयोग म्हणजे ***हठयोग***च असे जाणकारांचे स्पष्ट मत आहे. आणि ***हठयोग*** व ***पंथराज*** यांचा परस्परसंबंध आपणांस ठिकठिकाणी दिसूनच येणार आहे. कुंडलिनीचे एक नांव ***वज्रांगी*** असे पण आहे. तूर्त जिज्ञासूंना एवढीच वानगी पुरे!

मोक्षफल

असो. या सर्व यज्ञतत्पर निष्ठावानांना कोणते फल प्राप्त होते, ते आपण पाहत होतो. ते असे:

ऐसें मोक्षकाम सकल। समस्त हे यजनशील।
जिहीं यज्ञद्वारां मनोमल। क्षालण केलें।।४-१४८।।
जेयां अविद्याजात जालितां। जैं उरलें निजस्वभावता।
जेथ अग्नि आणि होता। उरेचिना।।१४९।।
जेथ यजितयाचां कामु पुरे। यज्ञींचें विधान सरे।
मागुतें जेथूनि वोसरे। क्रियाजात।।१५०।।
विचार जेथ न रिगे। हेतु जेथ न निगे।
जैं द्वैतदोखसंगें। सिंपेचिना।।१५१।।
ऐसें अनादिसिद्ध चोखट। जैं ज्ञान यज्ञावशिष्ट।
तैं सेविती ब्रह्मनिष्ठ। ब्रह्माहंमंत्रें।।१५२।।

"हे सर्व मोक्षेच्छू याज्ञिक होत. यांनी यज्ञाद्वारे आपले मनोमळ धुवून टाकले आणि सर्व अविद्यादी जाळून टाकले. त्यानंतर जे अखंडैकरस परब्रह्मतत्त्व सर्वतः सर्वदूर, सर्वेंद्रियरूप, सर्वगोचर, गुणविवर्जित, सर्वव्यापाररहित, निरामय, निरञ्जन असे ब्रह्मांडात व बाहेर भरून राहिले आहे; जेथे अग्नी, यज्ञ, होता *(यज्ञकर्ता)* असा भेद उरत नाही, अशी जी त्रिपुटीविरहित अवस्था; यज्ञकर्त्याच्या सकळ कामनांची ज्यायोगे तृप्ती होते व यज्ञ परत करण्याची जरूरी उरत नाही; सर्व क्रिया जेथून परत फिरतात व नाहीशा होतात, अशी जी नैष्कर्म्यावस्था; विचार जेथपावेतो पोहोचू शकत नाही; ज्याच्या स्वरूपाचा निर्णय करण्यासाठी तर्काची मात्रा चालत नाही; ज्या स्थितीत द्वैतात वावरूनही द्वैताचा दोष लिंपत नाही; असे अनादी, अगण्य, शुद्ध, सिद्ध, पवित्र जे ज्ञान यज्ञाचे शेष म्हणून प्राप्त होते; ते पायस-तो पुरोडाश- तो यज्ञनारायणाचा प्रसाद ते ब्रह्मज्ञानी ***"आपण स्वतःच ब्रह्म आहोत"*** या भूमिकेत स्थिरावून सेवून धन्य होतात."

"अशा त्या यज्ञावशिष्ट अमृताने तृप्त झालेले ते महाभाग मृत्युभूमी आक्रांत करून अमर अशा आत्मभूमीत प्रतिष्ठित होतात. हे पांडुपुत्रा! ज्यांना वैराग्य वरत नाही; ज्यांना संयमाग्नीची उपासना घडत नाही; जे योगयाग करत नाहीत; त्यांचे ऐहिकही धड राहत नाही, तर परत्राची काय वार्ता!"

वरील ***"अनादिसिद्ध चोखट। जैं ज्ञान"*** इ.ज्ञानविषयक वर्णनाचे ***"जैं उन्मनियेचें लावण्य। जैं तुर्येचें तारुण्य।... आदि आणि अंतु। विरौनि गेलें।।६-३२१।।"*** या पंथराजाच्या प्राप्तव्यस्थितिदर्शक ओव्यांशी किती कमालीचे साधर्म्य आहे, ते आपणासारख्या जिज्ञासूंस त्वरित दिसून येते.

कर्म, यज्ञ, ब्रह्म व ज्ञान

यामप्रमाणे:

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे।।४-३२।।

"असे बहुविध यज्ञप्रकार वेदांनी विस्तारपूर्वक सांगितले आहेत. हे सर्व यज्ञ कर्मापासून होणारे आहेत. हे यज्ञ जाणल्याने तू संसारबंधनापासून मुक्त होशील."

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।४-३३।।

"हे पार्थ! वेदांनी सांगितलेल्या वस्तुरूप द्रव्यांच्या यज्ञांपेक्षा ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहेत. सर्व कर्मच अखेर ज्ञानाने समाप्त होते."

ज्ञानदेव म्हणतात:

ऐसें बहुती परी अनेग। जैं सांघितलें तुज कां याग।
तैं विस्तारुनि वेदेंचि चांग। म्हणितलें आहाति।।४-१५६।।
परि तेणें विस्तारें काय करावें। हेंचि कर्मसिद्ध जाणावें।
येतुलेनि कर्मबंधु स्वभावें। पावेल ना।।१५७।।

श्रीकृष्ण म्हणतात; "असे पुष्कळ प्रकारचे जे यज्ञ मी तुला सांगितले, ते वेदांनी अति विस्तारले आहेत. परंतु आपणाला त्या चर्चेशी काय करावयाचे आहे! हे सर्व यज्ञादिक कर्मापासूनच उत्पन्न होतात, एवढे जाणलेस तरी तुला कर्मबंध जाचणार नाही."

तिसऱ्या अध्यायात ***कर्म, वेद-श्रुति व ब्रह्म*** यांचा संबंध स्पष्ट करतांना व स्वधर्मरूप यज्ञ इ.च्या अनुषंगाने भगवंतांनी म्हटले आहे की:

......।.......यज्ञः कर्मसमुद्भवः।।३-१४।।
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम्।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।।३-१५।।

"....कर्मापासून यज्ञाची उत्पत्ती होते. कर्म वेदांपासून म्हणजे ब्रह्मापासून उद्भव पावले आहे असे जाणावे. कारण परमात्मा वेदांचे कारण आहे. म्हणून सर्वव्यापी, सर्व विषयांचे प्रकाशन करणारा वेदोनारायण म्हणजे ब्रह्म वा **परमात्मा** यज्ञामध्ये नित्य स्थित आहे."

सातव्या अध्यायातील ***कर्म, ब्रह्म व अधियज्ञ वा यज्ञ*** यांचा जो संबंध दाखवला आहे, तोच याद्वारे *तिसऱ्या* अध्यायी उपरोक्त श्लोकातून एका विशिष्ट संदर्भात म्हणजे निष्काम कर्म करून स्वधर्माचे पालन करण्याबाबत जवळजवळ त्याच प्रकारे दाखविलेला दिसतो.

ज्ञानयज्ञ::::

ज्ञानयज्ञाची महती

कर्म, ब्रह्म व यज्ञ यांचा हा अनुबंध जाणणाऱ्यास *कर्म म्हणजे संसार जाचणार नाही,* हे सांगून पुढे ज्ञानदेव म्हणतातः

अर्जुना वेदु जेयाचें मूल। जैं क्रियाविशेषें स्थूल।
जेयां नव्हालियेचें फल। स्वर्गसुख।।४-१५८।।

"हे अर्जुना! वेद ज्यांचे मूळ आहे व ज्यातील क्रिया स्थूल आहेत, असे जे द्रव्यादी याग वेदांतरी वर्णन केले आहेत, त्यांच्यापासून फार फार तर अनुपम असे केवळ स्वर्गसुखच प्राप्त होते. परंतु या यज्ञादींना ज्ञानयज्ञाची सर नाही. ताऱ्यांचा दिमाख सूर्यापुढे चालत नाही. तसेच ते यज्ञ ज्ञानयज्ञाच्या पुढे होत."

तैं द्रव्यादियागु कीर होती। परि ज्ञानयज्ञाची सरी न पवती।
जैशीं तारातेजसंपत्ती। दिनकरापाशीं।।४-१५९।।
देखें परमात्मसुखनिधान। साधावेयां योगीजन।
जैं न विसंबती अंजन। उन्मेखनेत्रीं।।१६०।।
जैं धांवतयां कर्माची लाणीं। नैष्कर्म्यबोधाची खाणी।
जैं भुकेलियाची धणी। साधनाची।।१६१।।
जेथ प्रवृत्ति पांगुल जाहली। तर्काची दिठी गेली।
जेणें इंद्रियें विसरली। विषयसंगु।।१६२।।
मनाचें मनपण गेलें। जेथ बोलाचें बोलपण ठेलें।
जेयांमाजीं सांपडलें। ज्ञेय दिसे।।१६३।।
जेथ वैराग्याचां पांगु फिटे। विवेकाचा सोसु तुटे।
जेथ न पाहतां सहजें भेटें। आपणपेंचि।।१६४।।
तैं ज्ञान गां बरवें।...... ।।१६५।।

"हे पहा! परमात्मरूपी सुखाचा ठेवा हस्तगत करण्यासाठी जे अंजन योगिजन आपल्या दिव्य चक्षूंत नेहमी घालतात; जेथे कर्म समाप्त होते; जे नैष्कर्म्यबोधाची खाणच आहे; ज्यांना परमात्म्याची ओढ लागली आहे अशांच्या साधनेचे जे फल आहे; ज्याच्याठायी संसार थबकतो; तर्क ज्याला पाहू शकत नाही; जे पाजताच इंद्रिये विषयात रस घेईनाशी होतात, त्यांची कसमस थांबते; मनाचे मनपण जेथे उरत नाही; बोल जेथे विराम पावतो व परतत नाही; ज्यामध्ये प्रत्यक्ष ज्ञानाची परिसीमा वा ज्ञेय वा परब्रह्म गंवसते; जेथे वैराग्याचा खुळा असोस संपतो; विवेकही जेथे स्तब्ध होतो व ज्याच्याठायी न पाहतासुद्धा आपोआप आत्मस्वरूप दिसते; *असे ज्ञान त्या ज्ञानयज्ञाचे फल असते."*

ज्ञानप्राप्तीचा सोपा उपाय म्हणजे गुरुकृपा

...............। जऱ्हीं मनीं आथि आणावें।
तऱ्हीं संतां या भजावें। सर्वस्वेंशीं।।४-१६५।।

"असे जे ज्ञान, त्या उत्तम फलाची आपणांस प्राप्ती व्हावी असे जर मनात असेल, तर संतांची तन-मन-सर्वस्वाने सेवा करावी."

यात्प्रमाणे ज्ञानदेव हे ज्ञान प्राप्त करण्याचा सोपा उपाय सहज सांगून जातात. श्रीगोपालांचे हेच मनोगत आहे:

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।।४-३४।।
यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव।
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि।।४-३५।।

"आचार्यांकडे जाऊन, प्रणिपातपूर्वक त्यांची सेवा करून त्यांना आत्मबोधाचा प्रश्न करणे हे सुज्ञाचे काम आहे. ज्ञानसंपन्न व तत्त्वदर्शी असे ते महाभाग ज्ञानाचा उपदेश करून जिज्ञासूंस कृतार्थ करतात. हे पांडवा! त्यांच्याकडून ज्ञान मिळाल्यावर तुला पुनः मोह होणार नाही व तू सर्व भूतांठायी स्वतःला आणि माझ्याठायी तुझ्यासह समस्त भूतांना पाहशील."

हा जो **अधियज्ञदर्शना**च्या निमित्ताने आपण *यज्ञप्रसंग* अवलोकला, त्याची सांगता ज्ञानदेवांच्या अजून काही ओव्यांच्या रसास्वादनाविना होणार नाही व हा विषयही आपल्या मनाजोगता हाताळल्याचे समाधान आपणांस मिळणार नाही. म्हणून उत्साहपूर्वक पुढे होऊन ज्ञानदेवांची मुग्धा वाणी व तिच्या श्रीगोपालांच्या मधुरावाणीशी झालेल्या प्रशांत ज्ञानसंगमात न्हाऊन कृतार्थ होऊ याः

जैं ज्ञानाचां कुरुठा। तेथ सेवा हा दरवांठा।
तो स्वाधीन करी सुभटा। वोलगोनि।।४-१६६।।
तऱ्हीं तनुमनुजीवें। चरणांसीं लागावें।
आणि अगर्वता करावें। दास्य सकल।।१६७।।
मग अपेक्षित आपुलें। तैंहीं सांघती पुसिलें।...।।१६८।।

"संत हे ज्ञानाचे घर आहेत. त्यांची सेवा हा त्या घराचा उंबरठा आहे. अर्जुना! तू त्यांची सेवा करून तो स्वाधीन करून घे. त्यांच्या द्वारी उभा राहून शरीराने, मनाने व जीवापासून त्यांच्या चरणी लाग. त्यांचे अभिमानरहित चित्ताने दास्य कर. म्हणजे ते प्रसन्न होऊन आपल्या मनीचे प्रश्न विचारताच जिज्ञासातृप्ती करतील."

..। जेणें अंतःकरण बोधिले। संकल्पा न ये।।४-१६८।।
जेयाचेनि वाक्यउजिवडें। जाहलें चित्त निधडें।
ब्रह्माचेनि पाडें। निःशंकु होये।।१६९।।
तैं वेळीं आपणपेयां सहितें। इयें अशेखेंही भूतें।
माझ्यां स्वरूपीं अखंडितें। देखसीं तूं।।१७०।।
ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल। तैं मोहाचां अंधकारु जाईल।
जैं गुरुकृपा होईल। पार्था गां।।१७१।।

"त्यांनी केलेल्या उपदेशाने बोध प्राप्त झालेले अंत:करण संकल्प करण्याचे विसरून जाते. त्यांच्या अशा वचनांनी ज्या चित्तात आत्मप्रकाश फाकला आहे, ते चित्त संशयरहित होते व आत्म्यास पूर्णतया जाणते. त्यावेळी आपल्यासहित ही समस्त भूतजाते तू माझ्या स्वरूपी निरंतर पाहशील. त्या ज्ञानप्रकाशात तुझ्या मनीचा संसारमोह पूर्णपणे नाहीसा होईल. अरे पार्था! संतरूपी त्या सद्गुरूंची कृपा प्राप्त झाली की काय अशक्य आहे!"

याप्रमाणे ज्ञानदेव पुनः आपल्या **योगप्रणालीचा खास विशेष म्हणजे *गुरुकृपा*** यानिमित्ताने प्रकट करतांना दिसतात. यापूर्वीही *ओवी क्र.४-१३२-१३३* मध्ये:

तो उपशमें निहटिला। धैर्यें वरी दाटिला।
गुरुवाक्यें काढिला **। बलकटपणें।।४-१३२।।**
ऐसें समरसें मंथन केलें। तेथ झडकरीं काजा आलें।
तैं उज्जीवन जाहलें। ज्ञानाग्नीचें।।१३३।।

आपल्या या खास योगशैलीचे एक धावते दर्शन *श्लोक क्र.४-२७* यावर स्पष्टीकरणानिमित्त त्यांनी हा योग गुरुकृपांकित कसा आहे, हे खुबीने सांगून केलेले वाचकांना स्मरत असेलच! असो.

ज्ञानाचे सामर्थ्य

ज्ञानाचे अतर्क्य सामर्थ्य वर्णितांना श्रीकृष्ण असे म्हणतात की:

अपि चेदसि पापेभ्य: सर्वेभ्य: पापकृत्तम:।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि।।४-३६।।

"जरी सर्व पापी माणसांमध्ये अत्यंत पापी असा तू असशील, तरी ज्ञानरूपी नौकेने तू सर्व पातके तरून जाशील."

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन।
ज्ञानाग्नि: सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा।।४-३७।।

"हे अर्जुना! प्रज्वलित अग्नी जसा काष्ठांचे भस्म करून टाकतो, तसा हा ज्ञानरूप अग्नी सर्व कर्मे भस्मसात करून टाकतो."

ज्ञानदेव म्हणतात:

जर्‍हीं कल्मषाचा आगरु। तू भ्रांतीचा सागरु।
व्यामोहाचा डोंगरु। होऊनि अससी।।४-१७२।।
तर्‍हीं ज्ञानशक्तीचेनि पाडें। हे आघवेंचि गां थोकडें।
ऐसें सामर्थ्य असें चोखडें। ज्ञानीं इयें।।१७३।।
देखें विश्वभ्रमाऐसा। जो अमूर्ताचां कवडसा।
तो जेयाचियां प्रकाशा। पुरेचिना।।१७४।।
तेयां कायसें हे मनोमल।
हे बोलतांचि अति किडाल।..।।१७६।।

"तू जरी पापाचे आगर, भ्रांतीचा सागर किंवा व्यामोहाचा अगदी डोंगर असलास, तरी ज्ञानशक्तीपुढे हे सर्व अगदी किरकोळ आहे. ज्ञानाच्या अंगी हे सर्व सहज नाहीसे करण्याचे अपार अद्भुत सामर्थ्य आहे. पहा! ***निराकार परमात्म्याची छाया असा हा जो विश्वाचा पसारा आहे, तोसुद्धा ज्ञानाच्या प्रकाशापुढे नगण्य आहे;*** तेथे तुझे हे मनोमळ काहीच नाहीत. मनोमळ म्हटले की वाटते, हे कसचे धुतले जाणार!"

....। नाहीं एणें पाडें ढिसाल। दुजें जगीं।।४-१७५।।
सांगे भुवनत्रयाची काजली। जैं गगनामाजीं उधवलीं।
तियें प्रलयींचें वाहुटली। काय अभ्र पुरे।।१७६।।
कीं पवनाचिनि कोपें। पाणियेचि जो पलिपे।
तो प्रलयानलु दडपें। तृणें काष्ठें काइं।।१७७।।
म्हणौनि असो हे न घडे। तैं विचारितांचि असंगडें।..।।१७८।।

"पण यांच्याइतके ढिसाळ जगात काहीही नाही. हे तर हां हां म्हणता त्या ज्ञानाग्नीत भस्म होऊन जातील. तिन्ही लोकांची राखरांगोळी गगनात उडवून देणारी जी प्रळयकाळची वावटळ असते, तिच्यापुढे आकाशातील ढग ते काय टिकणार! त्या प्रळयकाळच्या झंझावाताने पाण्यानेच पेट घेणारा प्रळयाग्नी, तो काय तृण वा लाकडांना दाद देणार! तर पापादी या ज्ञानापुढे उरणे शक्यच नाही."

ज्ञानासारखे पवित्र काहीच नाही!

संतसद्गुरूंच्या भगवंताच्या कृपेने जे हे ज्ञान प्राप्त होते, त्याची महती गातांना श्रीकृष्ण म्हणतात:

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।
तत्स्वयं योगसंसिद्ध: कालेनात्मनि विन्दति।।४-३८।।

"ज्ञानासारखी पवित्र करणारी वस्तू या जगामध्ये दुसरी नाही. योगाचरणाने सिद्ध झालेल्या योग्यास यथाकाल हे आत्मविषयक ज्ञान प्राप्त होते."

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्पर: संयतेन्द्रिय:।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति।।४-३९।।

"जो श्रद्धावान मनुष्य इंद्रियसंयम करून या ज्ञानउपासनेत तत्पर होतो, त्यालाच ते प्राप्त होते आणि हे ज्ञान प्राप्त झाले की त्यापाठोपाठ त्यास अविलंब शांति प्राप्त होते."

यावर ज्ञानदेवांची उक्ती ऐका:

.....। पुढति ज्ञानाचेनि पाडें। पवित्र न दिसें।।४-१७८।।
एथ ज्ञान हे उत्तम होये। आणिकही एक तैसें कें आहे।
जैसें चैतन्य कां नोहें। दुसरे गां।।१७९।।

"ज्ञान एवढे सामर्थ्यशाली असल्याने त्याच्याइतके पवित्र करणारे जगात काहीच नाही. हे ज्ञानच श्रेष्ठ आहे. ज्याप्रमाणे चैतन्यासारखे दुसरे काहीही या ब्रह्मांडात नाही, तशीच ज्ञानाशी तुलना करता येण्यासारखी वस्तूही जगात नाही."

या महातेजाचेनि कसें। जर्‍हीं चोखालु प्रतिबिंब दिसे।
कां गिंवसिलें गिंवसें। आकाश हे।।४-१८०।।
ना तर्‍हीं पृथिवीचेनि पाडें। कांटालें जर्‍हीं जोडे।
तर्‍हीं उपमा घडे। पांडुकुमरा।।१८१।।
म्हणौनि बहुतीं परी पाहतां। पुढुत पुढुति निर्धारितां।
हे ज्ञानाची पवित्रता। ज्ञानींचि आथी।।१८२।।

"सूर्याच्या बिंबापेक्षा प्रतिबिंब जर तेजस्वी दिसेल; किंवा आकाशाला जर कवळता येईल; किंवा पृथ्वीच्या तोलाची वस्तू

सापडेल, तरच ज्ञानाला साजेलशी उपमान वस्तू शोधता येईल! म्हणूनच ज्ञानाइतके पवित्रक दुसरे नाही, असे म्हणावे लागते."

जैसी अमृताची चवी निवडिजे। तऱ्हीं अमृताचिसारिखें म्हणिजे।
तैसें ज्ञान हे उपमिजे। ज्ञानेंसींचि।।४-१८३।।
आतांययावेरी जैं बोलणें। तैं वायांचि वेळु फेडिणें।
तंव सांचचि जी हे पार्थु म्हणें। जैं बोलत असां।।१८४।।

"ज्याप्रमाणे अमृताची चव अमृतासारखीच असते; त्याचप्रमाणे ज्ञान हे ज्ञानासारखेच असते. आता यावर परतपरत तेच तेच बोलणे हे व्यर्थ वेळ वाया दवडणे आहे."

तेव्हा अर्जुन म्हणाला,"तुम्ही म्हणता ते खरेच आहे."

परि तैंचि ज्ञान केवीं जाणावें। ऐसें अर्जुनें जंव पुसावें।
तंव तैं मनोगत देवें। जाणितलें।।४-१८५।।
मग म्हणतसे किरीटी। आतां चित्त देईं गोठीं।
सांगेन ज्ञानाचियें भेटीं। उपाय तुज।।१८६।।

त्याला असेही विचारावयाचे होते की हे ज्ञान कसे पावावे. पण त्याने हा प्रश्न विचारण्याआधीच श्रीकृष्णांनी त्याचे मनोगत उमजून म्हटले, "या ज्ञानाच्या भेटीचा उपाय मी तुला सांगतो.अर्जुना! नीट चित्त देऊन ऐक!"

ज्ञानाने *शांति* ची प्राप्ती

तऱ्हीं आत्मसुखाचियां गोडीया। विटे जो कां सकल विषया।
जेयांचां ठाईं इंद्रियां। मानु नाही।।४-१८७।।
जो मनासीं चाड न सांगें। जो प्रकृतीचें केलें नेघें।
जो *श्रद्धेचेनि संभोगें*। सुखिया जाला।।१८८।।
तेयांतैंचि गिंवसित। हे ज्ञान पावें निश्चित।
जेयामाजीं अचुंबित। शांति असे।।१८९।।

"आत्मसुखाच्या गोडीने जो सर्व विषयांना विटतो व इंद्रियांच्या हाकेला ओ देत नाही; जो मनात इच्छा आणत नाही व प्रकृतिद्वारे घडणारे शारीरिक कर्म आपण करतो, असे समजत नाही; जो श्रद्धेच्या संभोगाने सुखी झालेला असतो; ज्याची परमात्म्यावर नितांत निष्ठा असते; त्याला शोधत हे ज्ञान निश्चितच येते. याच ज्ञानात निखालस शांतीची वस्ती असते."

काही जाणकार ***श्रद्धा*** याचा येथे ***कुंडलिनी*** असा अर्थ करतात, एवढेच सूचित करून पुढे जाऊ या.

तैं ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे। आणि शांतीचा अंकुर फुटे।
मग विस्तार बहु प्रकटे। आत्मबोधाचा।।४-१९०।।
मग जेउती वास पाहिजे। तेउती शांतीचि देखिजे।
तेथ अपारा पारु नेणिजे। निर्धारितां।।१९१।।
ऐसा हा उत्तरोत्तरु। ज्ञानबीजाचां विस्तारु।
सांगतां असे अपारु। परि असो आतां।।१९२।।

"ते ज्ञान एकदा अंतःकरणात स्थिर झाले की त्या शांतीला अंकुर फुटतो व त्याचा वेल आत्मबोधाचा सुकाळ करत गगनांतरी विस्तारला जातो. असा कृतार्थात्मा जिकडे पाहतो, तिकडे त्याला शांतीच दिसते. त्या अमर्याद शांतीसागराला पारच नाही. या ज्ञानबीजाचा हा शांतीरूप विस्तार वर्णन करण्यास अंतच नाही." कारण पूर्वीच सांगितल्याप्रमाणे *(उन्मेष:१४:दैवी संपदा पृ.क्र.२२१ ते २२४)* ***शान्ति*** म्हणजे ***ब्रह्म***च होय (***..../....त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।*** **इ.च्या अनुरोधाने**).

अवगतीचे कारण व त्यावरील उपाय::::

परमात्म्यावर निष्ठा नसणाऱ्यांची गती

याविरुद्ध संशयी - अश्रद्ध मनुष्यांस - परमात्म्यावर निष्ठा नसलेल्यांना, इहलोक वा परलोक, कोठेच सुख मिळत नाही:

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।४-४०।।

"आत्मज्ञानहीन, श्रद्धाविहीन आणि परमात्म्यावर निष्ठा नसणारा संशयी मनुष्य घोर पतन पावतो. त्याला इहलोकीही नाही, तर परलोकी तरी कोठून सुख प्राप्त होणार!"

ज्ञानदेव समारोप करतात:

ऐकें जेयां प्राणियाचां ठाईं। इया ज्ञानाची आवडी नाही।
तेयाचें जियालें म्हणो काईं। वरि मरण चांग।।४-१९३।।
शून्य जैसें गृह। कां चैतन्येवीण देह।
तैसें जीवित तैं संमोह। ज्ञानहीना।।१९४।।
अथवा ज्ञान कीर आपु नोहे। परि तैं चाड एकीं जऱ्हीं वाहे।
तऱ्हीं तेथ जिव्हाळा काईं आहे। प्राप्तीचां पैं।।१९५।।

"ऐक! ज्या प्राण्याला ज्ञानाची आवड नाही, त्याचे जगणे मृत्यूपेक्षा हीन आहे. जसे ओसाड घर वा चैतन्यहीन देह असावेत, तसेच ज्ञानहीनास जीवन निरर्थक आहे. असो. खऱ्या ज्ञानाची प्राप्ती जरी झाली नसली, तरी त्याची निदान इच्छा तरी मनात असावी. म्हणजे प्राप्तीची काही तरी आशा बाळगता येईल!"

वांचूनि ज्ञानाची गोठी कायसीं। परि तैं आस्थाही न धरी मानसीं।
तऱ्हीं तो संशयरूप हुताशीं। पडिला जाण।।४-१९६।।
जैं अमृतही परि नावडे। ऐसें सावियाचि अरोचकु जैं पडे।
तैं मरण आलें असे फुडें। जाणो ये कीं।।१९७।।
तैसा विषयसुखें रंजे। जो ज्ञानासीचि माजे।
तो संशयें अंगीकारिजे। एथ भ्रांती नाही।।१९८।।

"ज्या माणसाला ज्ञानाची आवडच काय, पण साधी विचारपूसही करावीशी वाटत नाही, तो संसारावर विश्वासलेला जीव अश्रद्धेच्या संशयाग्नीत पडलाच म्हणून समजावे. अमृताबद्दलही नावड असावी इतकी अरुची निर्माण होते, तेव्हा मृत्यू प्राप्त झाला, असे समजता येते. तसेच जो विषयसुखाने लोभावला व ज्ञानाच्या नावाने शंख करतो, त्याला प्रपंचरूप घनदाट संशयाने वेढलेच, असे समज."

मग संशयी जऱ्हीं पडिला। तऱ्हीं निभ्रांत जाणे नासला।
तो ऐहिक परत्रा मुकला। सुखासीं गां।।४-१९९।।
जेयां काळज्वरु आंगीं बाणें। तो शीतोष्णें जैसीं नेणें।
आगी आणि चांदिणें। सरिसेंचि मानी।।२००।।

तैसें सांच आणि लटिकें। विरुद्ध आणि नीकें।
संशयी तो न ओलखें। हिताहित।।२०१।।
हा रात्रिदिवसु पाहीं। जैसा जात्यंधा ठाऊवा नाही।
तैसें संशयी असतां काईं। मना नेये।।२०२।।

"अशा ***संशयग्रस्त म्हणजे अश्रद्ध आणि प्रपंचग्रस्त*** मनुष्याचे सर्व काही - ऐहिक व पारलौकिक सुख - नाश पावते. ज्याला विषमज्वर झालेला असतो, तो जसे शीत व उष्ण यातील फरक जाणत नाही व आग व चांदणे सारखेच समजतो; तसेच त्या मोहग्रस्त मनुष्यास सत्य व असत्य, श्रेयस व अहितकर, चांगले आणि वाईट यातला फरक कळत नाही.जन्मांधाला ज्याप्रमाणे दिवस व रात्रीतला भेद कळत नाही, त्याप्रमाणे त्या मायामोहग्रस्त संशयी पुरुषास इतर कोणतीही ज्ञानाची गोष्ट पसंत पडत नाही."

म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाहीं पाप घोर।
हा विनाशाची वागुर। प्राणियासीं।।४-२०३।।
येणें कारणें तुवां त्यजावा। आधीं हा एकुचि जिणावा।
जो ज्ञानाचां अभावा-। माजीं असे।।२०४।।

"म्हणून ज्ञानावर श्रद्धा नसणे, परमात्म्याविषयी नास्तिक्यबुद्धी असणे, प्रपंचावर प्रेम असणे, यापेक्षा घोर पाप दुसरे कोणतेच नाही. हा संशय म्हणजे प्राण्याच्या घोर अधःपतनासाठी लावलेले कुबुद्धीचे जाळेच म्हणा ना! म्हणून याचा तू त्याग कर. हा शत्रू तू एकदा जिंकलास की ज्ञानाचा अभाव आपोआपच दूर होईल."

जैं अज्ञानाचें गडद पडें। तैं हा बहुंवस मनीं वाढे।
म्हणौनि सर्वथा मागु मोडे। विश्वासाचां।।४-२०५।।
हृदयीं हाचि न सामायें। बुद्धीतैं गिंवसूनि ठायें।
तेथ संशयात्मक होये। लोकत्रय।।२०६।।

"जेव्हा अज्ञानाचा गडद अंधकार मनाला व्यापतो, तेव्हा हा फार माजतो. आणि श्रद्धेचा माग काढून ती पूर्णपणे नष्ट करण्यात समाधान मानतो. हा मनातच भरून संतोषत नाही, तर हा बुद्धीलाही गिंवसतो. संपूर्ण त्रैलोक्याठायी हा संशय भरून असला तरीसुद्धा त्याला समाधान वाटत नाही."

संशयावर ज्ञानशस्त्राचा उपाय

संशय विच्छेदण्यासाठी श्रीकृष्ण उपाय सांगताना म्हणतातः

योगसन्न्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम्।
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय।।४-४१।।
तस्मादज्ञानसम्भूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत।।४-४२।।

"हे धनंजया! योगाने ज्यांनी सर्व कर्मांचा संन्यास केला आहे आणि ज्ञानाने ज्यांचा संशय नष्ट झाला आहे, अशा आत्मवेत्त्या पुरुषांना कर्मे बद्ध करत नाहीत. म्हणून अज्ञानापासून उत्पन्न होऊन स्वतःच्या हृदयात ठाण मांडून राहणाऱ्या या संशयरूपी शत्रूचा ज्ञानरुपी खड्गाने छेद करून आत्मस्वरूपात स्थित होऊन युद्ध कर. म्हणजे तुला त्या कर्मापासून कोणतेही घोर फल प्राप्त होणार नाही."

हाच उपाय ज्ञानदेवांच्या शब्दात ऐकाः

ऐसा जर्‍हीं हा थोरावें। तर्‍हीं उपायें एकें आंगवें।
जर्‍हीं हातीं होय बरवें। ज्ञानशस्त्र।।४-२०७।।
तर्‍हीं ज्ञानशस्त्रे तिखटें। निखलु हा निवटें।
मग निःशेष खता फिटे। मानसींचा।।२०८।।
ययाकारणें पार्था। उठी वेगीं वरौता।
नाश करूनियां हृदयस्था। संशयासीं।।२०९।।

"हा संसाररूपी संशयरिपू जरी इतका उद्दंड अन बलवान असला, तरी त्याच्या नाशाचाही एक उपाय ऐक. हाती ज्ञानखड्ग जर असेल, तर त्याच्या तीक्ष्ण धारेने याला गारद करता येते. हा नष्ट झाला की त्वरित मनोमल नाहीसा होतो. म्हणून हे पार्था! उठ! त्वरित या शत्रूचा हृदयातून समूळ उच्छेद करून आपले ***विजय*** हे नांव सार्थ कर!"

ऐसें सर्वज्ञाचां बापु। जो कृष्णु ज्ञानदीपु।
तो म्हणतसे सकृपु। ऐकें राया।।४-२१०।।

"असे सर्वज्ञाला पितृस्थानी असलेल्या त्या श्रीकृष्णरूपी ज्ञानदीपकाने कृपावंत होऊन जे सांगितले, ते , हे राजा धृतराष्ट्रा! तूही नीट ऐकून ठेव!" असे संजय म्हणाला.

यज्ञसंस्थेचा परामर्ष

याप्रमाणे यज्ञसंस्थेचा पारमार्थिक पातळीवरचा विस्तृत परामर्ष आपण **अधियज्ञा**च्या प्रसंगाने घेतला. त्यापूर्वीच आपण यज्ञचक्राचा *तिसऱ्या* अध्यायातील निरूपणाद्वारे धावता आढावा घेतलेला आपणांस विदित आहेच*(उन्मेषः१-२::विषयप्रवेश-२पृ.क्र.२१,३०)*. याप्रमाणे यज्ञविषयक आपल्या कल्पना गीता-ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून तपासून घेण्याची संधी आपणांस मिळाली.

जिज्ञासूंनी पं.वि.दा.सातवळेकर यांचा गीतेवरील ***पुरुषार्थबोधिनी टीका*** हा ग्रंथ या यज्ञसंस्थेची अधिक माहिती व्हावी म्हणून जरूर पहावा. असो.

समारोप

अर्जुनाच्या सप्तप्रश्नांनिमित्त ***जीव-जगत-ईश्वर*** या त्रयीचे दर्शन आपण घेत आहोत. त्यांचे सविस्तर सांगोपांग दर्शन देतो तेरावा अध्याय! तोच पुढील विषय आहे. त्यासाठी वळू या ***उन्मेष क्र.१९-१:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१*** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::१९-१::
::क्षेत्रक्षेत्रज्ञविचार-१::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष १९-१

गीता:
७:५
१३:१-६
ज्ञानेश्वरी:
७:१५,१६,१९-२१
१३:७-१४८
उद्धृत:
गीतारहस्योक्त तत्त्वांचा तक्ता (पृ.क्र.२८२)
गीतारहस्योक्त ब्रह्मांडाचा वंशवृक्ष(पृ.क्र.२८३)

::उन्मेष१९-१::
:: क्षेत्रक्षेत्रज्ञविचार -१::

प्रस्तावना::::

तेरावा अध्याय

यानंतर आपल्याला पुढील विषयविवरणासाठी *तेराव्या* अध्यायाकडे अपरिहार्यपणे वळावे लागेल. त्यातील ***क्षेत्र* व *क्षेत्रज्ञ*** विचारांचा मागोवा घेतघेत आपल्याला ***प्रकृति-पुरुष*** हे सूत्र धरूनच पुढे चालावे लागेल. त्याकडे आता वळू या!

क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार

साधारणतया *१८०* ओव्यातून हा ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** या विषयाचा प्राथमिक विचार मांडण्यात आला असून गीतेचे ***१३-१ ते ६*** हे श्लोक त्याचा आधार आहेत. मागे उल्लेख केला होता की, *सातव्या* अध्यायात भगवंत आपण होऊनच ***"ज्ञानं ते सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः"*** असे म्हणून तेथील विषयाला सुरुवात करतात; अगदी तसेच या *तेराव्या* अध्यायाच्याही सुरुवातीस भगवंत ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** अर्जुनाच्या एतद्विषयक कोणत्याही प्रश्नाशिवाय सांगायला आरंभ करतात. हे साम्यस्थल जरूर लक्षात येण्यासारखे आहे. कारण या दोन्ही अध्यायांच्या दृष्टीने मुख्य विषय ***विश्व व विश्वात्मा*** यांचा संबंध काय आहे, हाच आहे.

भगवंत अत्यंत सोपी अशी व्याख्या करतात. ती अशीः

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः।।१३-१।।
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
क्षेत्रक्षेत्रयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम्।।१३-२।।

"हे कौंतेय! या शरीराला ***क्षेत्र*** असे म्हणतात आणि जो हे जाणतो, त्याला ***क्षेत्रज्ञ*** असे जाणकार म्हणतात. हे भारता! **सर्व क्षेत्रांच्या ठिकाणी जो *क्षेत्रज्ञ* आहे, तो मीच आहे. *क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांचे जे ज्ञान तेच खरे ज्ञान होय, असे माझे मत आहे."

इतक्याच संक्षेपाने ज्ञानदेवही म्हणतात कीः

पार्था परिसिजे। देह हे क्षेत्र म्हणिजे।
हेंचि जाणें तो बोलिजे। क्षेत्रज्ञु एथ।।१३-७।।
तऱ्हीं क्षेत्रज्ञु तो एथें। तो मी जाण निरुतें।
जो सर्व क्षेत्रातें। संगोपूनि असे।।८।।
क्षेत्र आणि क्षैत्रज्ञातें। जाणणें जें निरुतें।
ज्ञान ऐसें तेयांतें। मानूं आम्हीं।।९।।

"अर्जुना! ऐक! देहालाच ***क्षेत्र*** म्हणतात व त्याच्याद्वारे जो जाणतो, त्याला ***क्षेत्रज्ञ*** असे म्हणावे. हा या देहाद्वारे जाणणारा, करणारा, पाहणारा, ऐकणारा, संवेदना ग्रहण करणारा ईश्वरच असल्याने ***समस्त देहरूपी क्षेत्रातला ज्ञाता ईश्वर म्हणजे मीच आहे.*** मीच या समस्त क्षेत्रांचे पालन, पोषण व भरण करत असतो. याप्रमाणे ***क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ*** यांना व त्यांच्या परस्परसंबंधांना जे जाणणे, त्यालाच आम्ही ***ज्ञान*** असे समजतो."

हा विचार ***प्रकृति-पुरुष*** या कल्पनेशी किती मिळताजुळता आहे, हे लागलीच जाणवते. असो. नंतर श्रीकृष्ण ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** विस्तारपूर्वक मांडण्यास उद्युक्त होतात.

क्षेत्राचे स्वरूप

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारी यतश्च यत्।
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रुणु।।१३-३।।

"ते क्षेत्र कोणते, कोठल्या स्वरूपाचे व कोणत्या विकारांनी युक्त आहे; तसेच ते कोणत्या कारणापासून झालेले आहे; तसेच तो जो क्षेत्रज्ञ आहे, तो कसा आहे आणि त्याचा प्रभाव काय आहे, ते सर्व तू साकल्याने माझ्याकडून ऐक."

***समासेन* शब्दाचा अर्थ**

या श्लोकासंबंधी ध्यानात घेण्याची गोष्ट ही की त्याचा पदच्छेद केल्यावर अन्वयार्थ लावण्यासाठी बरीच पूरक पदे जोडली जातात व ***यत्, तत्, यतः, सः,यः*** या पदांचा अर्थ आपापल्या मतीप्रमाणे जाणकार करतात. तसेच ***समासेन*** या शब्दाचा अर्थ बव्हंशांनी ***संक्षेपाने*** असाच केलेला आढळतो. फक्त *ISKCON* चे आद्यसंस्थापक श्री.ल.प्रभुपादस्वामी यांनी अन्वयार्थ लावण्यापुरता तो *"In details"* असा केला असला, तरी पण सार्थ भाषांतरात त्यांनीही त्या शब्दाचा अर्थ *"In brief"* असाच केलेला आढळतो. ***समास*** या शब्दाचे अर्थ ***एकीकरण व समूह*** असेही होतात. तसेच *जोडशब्दांतील नाते* असाही त्याचा अर्थ होतो.

गीता-ज्ञानेश्वरीने विस्तारपूर्वक मांडलेली कल्पना

तेराव्या अध्यायात श्रीकृष्णांनी ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** या द्वयीचा अर्थ बऱ्याच विस्ताराने सांगितलेला आहे. याच प्रकारचा इतरही विचार त्या अनुषंगाने आपण *अ.क्र. ७ व ८* मध्ये पाहिला आहे आणि *अ.क्र.९ व १४* यांतही पाहणार आहोत. ज्ञानदेव तर या विषयावर ***तेराव्या अध्यायी*** सुरुवातीस *१८०* ओव्या रचतात व पुनः या अध्यायाच्या *श्लोक क्र. १२ ते ३४* यांसाठी परत जवळ जवळ *२५०* ओव्या याच विषयाच्या विस्तारापोटी वेचतात.

तसेच *श्लोक क्र. ७ ते ११* यांसाठी त्यांनी रचलेल्या अदमासे *७००* ओव्या, पाहिल्या तर *अमानित्वादी* गुणांचे वर्णन करण्यासाठी, अन् खरे तर ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ***संबंधांस जाणणाऱ्या ज्ञान्याविषयीच आहेत. एकूण *३४* श्लोकांचा अन्

त्यावरील ११६१ ओव्यांचा हा सगळाच्या सगळा अध्यायच ***क्षेत्रक्षेत्रज्ञ***विचारास पूर्णथैव वाहिलेला दिसतो.

आपण पूर्वीच लक्षात घेतले आहे की एखाद्या विषयाचे ज्ञानदेवांना वाटणारे महत्त्व त्यांनी त्या विषयानुसंधानासाठी किती ओव्या रचल्या आहेत, यावरून साधारणतया अनुमानता येते. तसेच श्रीकृष्ण जरी एखादी गोष्ट अत्यंत संक्षेपाने सांगत असले, तरी श्रीज्ञानेश्वर मात्र ती त्यांच्या शैलीने विस्तारपूर्वक व खुलवून सांगतांना बऱ्याचदा दिसतात.

येथे तर स्वतः श्रीकृष्णच गीतेचे *३४ श्लोक* म्हणजे **गीतेचा *विसावा भाग क्षेत्र-क्षेत्रज्ञ***विचारास वाहतात; अन् ज्ञानदेव तर कमालीचा म्हणजे *११६१ ओव्यांचा* म्हणजे ज्ञानेश्वरीचा ***आठवा भाग*** असा *तेरावा* संपूर्ण अध्यायच त्यावर रचतात; इतका हा ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विषय त्या दोघांनाही महत्त्वाचा वाटतो.

समासेन म्हणजे संक्षेपाने नव्हे, तर साकल्याने

हे लक्षात घेता येथे हा विषय ***"संक्षेपाने सांगतो",*** असे श्रीकृष्णांचे म्हणणे नसून तो ***"साकल्याने सांगतो"*** असे त्यांचे म्हणणे असावे, असे आपल्या अल्पमतीस वाटते. अर्थातच पूर्वसूरींच्या विद्वत्तेचा पूर्ण आदर ठेवूनच आपल्यासारखा सर्वतया सामान्य मनुष्य असे विधान करण्याचे साहस करू शकतो, आणि तेही केवळ त्याच महात्म्यांच्या खांद्यांवर उभे राहून, त्यांच्याच सहानुभूतीच्या आधारे, त्यांनीच दाखवलेल्या क्षितिजाकडे त्यांनीच दिलेल्या दुर्बिणीतून पाहत, हे सविनय मान्य करण्यात आपणांस नक्कीच धन्यता वाटते!! असो!

एवढा उहापोह ज्या श्लोकातील एका शब्दाच्या अर्थाविषयी आपण केला, त्या श्लोकाचा ***अन्वय व पदच्छेद*** पाहणे जिज्ञासूंस माहितीपूर्ण वाटेल, म्हणून तो देऊन पुढे जाऊ या.

श्लोक

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारी यतश्च यत्।
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रुणु।।१३-३।।

पदच्छेद

तत् क्षेत्रम् यत् यादृक् च यद्विकारी यतः च यत् सः च यः यत्प्रभावः च तत् समासेन मे श्रुणु ।।१३-३।।

अन्वय

तत् (ते) क्षेत्रम् (क्षेत्र) यत् (जे) च (आणि) यादृक् (ज्या प्रकारचे) च (तसेच) यद्विकारी (ज्या विकारांचे) च (आणि) यतः (ज्या) यत् (जे) च (तसेच) सः (ते) च (सुद्धा) यः (जो) यत्प्रभावः (ज्या प्रभावाचा) तत् (ते) समासेन (साकल्याने/संक्षेपाने?) मे (माझ्याकडून) श्रुणु (ऐक).

सुज्ञ वाचकांनी वरील गोष्टी विचारात घेऊन आपापला काय योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा. हे एवढे सांगावयाचे मुख्य कारण असे की गीताभ्यास करतांना आपली जर एवढ्या खोलात किंवा याहूनही खूप खोलवर जाऊन चिंतन करण्याची इच्छा असेल, तर तो केवढा महाविस्तृत प्रांत असावा, याची किंचित जाण ध्यानी ठेवलेली चांगली! असो.

ज्ञानदेवांचा अर्थ

समासेन या शब्दाचा अर्थ निश्चित करण्यापूर्वी श्रीज्ञानेश्वरांची तत्संबंधी काय साक्ष आहे, ती पाहून पुढे जाऊ याः

तऱ्ही क्षेत्रज्ञु येणें नांवें। हे शरीर जेणें भावें।
म्हणितलें तैं *आघवें*। सांगो आतां।।१३-१०।।
हे क्षेत्र कां म्हणिजे। कैसें कें हे उपजे।
कवणकवणीं वाढविजे। विकारी एथ।।११।।
हे औट हात मोटकें। कीं केवढें पां केतुकें।
बरड कीं पिके। कोणाचें हे।।१२।।
***इत्यादि सर्व*। जैं जैं याचें भाव।**
तैं बोलिजती *सावेव*। अवधान देईं।।१३।।

प्रथमतः या तीन ओव्यातील ठळक शब्दांचा अर्थ ध्यानी आणू या. १) ***आघवें*** - अवघे, सर्व, सगळे, इत्थंभूत, पूर्ण, विस्तारलेले *(detailed)* २) ***इत्यादि सर्व*** - सगळे, इतर सर्व *(माहिती इ.नी)* परिपूर्ण असे ३) ***सावेव*** - अवयवांसहित *(शरीर)*, सर्व लक्षणे व उपलक्षणे इ.सह *(वस्तू)(चे)(वर्णन)*; परिपूर्ण; सर्व प्रकारच्या बारीकसारीक तपशिलासह असलेली एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती.

या शब्दांचे हे अर्थ ध्यानी ठेवून ओव्यांचा अर्थ पाहिला की ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** **संक्षेपाने** सांगण्याचा श्रीगोपालांचा मनोदय नसून तो **साकल्याने** सांगण्याचा आहे, हे पटकन उमजते.

ज्ञानदेव *१३-१० ते १३* या ओव्यातून म्हणतातः

"तरी या शरीरीला ***क्षेत्रज्ञ*** असे म्हणण्याचे प्रयोजन काय; तसे कोणत्या अर्थाने म्हटले आहे; शरीराला ***क्षेत्र*** का म्हणतात; ते कसे उपजते; याच्याठायी विकार कोणते व कसे उत्पन्न होतात; हे सर्व मी तुला नीट सांगतो."

"हे औट हात मापाचेच आहे की अधिक काही आहे; नापीक आहे की सुपीक आहे; हे कोणाच्या मालकीचे आहे; इत्यादी सर्व माहिती त्यातील सर्व बारीकसारीक तपशिलांसह तुला मी संपूर्ण सविस्तर सांगतो. तरी लक्षपूर्वक ऐक."

असो. हा विषय आता पुरे करू या. सूज्ञांस अधिक सांगणे न लगे! हा मुद्दा स्पष्ट झाल्यावर आता पुढील कल्पनाविस्तार कसा केला आहे, ते पाहू याः

क्षेत्र-क्षेत्रज्ञ निर्णयापोटी होणारे वादविवाद::::

विविध मते

पैं याचि स्थलाकारणें। श्रुति सदा बोबाणें।
तर्कु येणेंचि ठिकाणें। तोंडालु केला।।१३-१४।।
चालितां हेंचि बोली। दर्शनें शेवटां आलीं।
तेथिंचीं नाहीं बुझावली। द्वंद्वे आझुनि।।१५।।

"याच विषयाचा निर्णय करण्यासाठी वेदांची सतत बडबड चालू असते व तर्कशास्त्रालाही याचे आकलन करून घेण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या योजाव्या लागतात. क्षेत्र-क्षेत्रज्ञवादाचा समन्वय करताकरता षट्दर्शने मेटाकुटीला आली. तथापि अद्यापही त्यांनी या द्वंद्वाचा - ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** या जोडगोळीचा एकमताने स्वरूपनिर्णय केलेला नाही. म्हणून या एकाच कारणाने त्या शास्त्रांचे एकमेकांशी पटत नाही."

शास्त्रांचियें सोयरिकें। विचलिजे येणेंचि एकें।
याचेनि एकवंकें। जगासि वादु।।१३-१६।।
तोंडेसीं तोंडा न पडे। बोलेंसीं बोला न घडे।
इयां युक्ती बडबडे। त्राय जाहली।।१७।।
नेणों कोण्हाचें हे स्थल। परि कैसें अभिलाषाचें बल।
जैं घरोघरीं कपाल। पिटवित असे।।१८।।

"या एकाच विषयावर जगात मतमतांतरे होऊन त्यांचे परस्परविवाद सतत चालू असतात. एका मताचे प्रतिपादन दुसऱ्या मतातील प्रतिपादनाशी जुळत नाही. या सर्व वितंडवादांमुळे वादविवादसुद्धा कंटाळून गेले असावेत. हे क्षेत्र कोणाचे आहे; क्षेत्रज्ञ कोण आहे; हे कोणासच कळत नाही. पण ते कळून घेण्याची अभिलाषा केवढी तीव्र आहे, पहा. केवळ याच विषयाचा काथ्याकूट करण्यासाठी विद्वान पंडितांच्या घरोघरी कपाळ पिटून बडबड केली जाते."

नास्तिका द्यावया तोंड। वेदांचें गाढें बंड।
तैं देखौनि पाखांड। आनचि वाजे।।१३-१९।।
म्हणे तुम्ही निर्मूल। लटिकें हे वाग्जाल।
ना म्हणसि तऱ्हीं पोफल। घातिलें आहे।।२०।।

"नास्तिकांनी वैदिक मताचा धिःकार केलेला ऐकून वेद आपले मत जोराने प्रतिपादण्यास पुढे सरसावले. अन ते पाहून त्यांची तोंडे अधिकच वाजू लागली. ते पाखंडी वेदांना म्हणू लागले,"तुम्ही आधाराशिवाय आणि पुराव्याविना बोलत आहात. तुम्ही केवळ शब्दपांडित्य प्रकटवून आपलेच म्हणणे खरे असल्याचा निव्वळ आभास निर्माण करता आहात. आमचे हे आरोप खोटे आहेत, असे जर तुम्हाला सिद्ध करता येत असेल, तर लावा पैज!"

पाखांडांचें कडे। नागवीं लुंचिती मुंडें।
नियोजिलीं वितंडें। तलासि येती।।१३-२१।।

"पाखांड वा नास्तिकांचे शिरोमणी असेच शोभणारे दिगंबरादी जैन श्रमणक वेदांना ***कर्मकांडी*** अशी शिवी देत असतांनाच आपल्या ***श्रमणक*** धर्माचा एक उपचार म्हणून नागवे राहतात व स्वहस्ते केस लुंचत असतांनाच वितंडवाद घालत बसतात. (***वितण्डा*** म्हणजे *वैदिक मतांचे खंडन व पाखंड मताचे मंडन करणारे* वादविवादपर चर्चेचे जैनांचे ग्रंथ आणि तर्कपद्धति). तो त्यांचा ***वितंडवाद*** अगदी टीपेला पोहोचला आहे."

मृत्युबलाचेनि माजें। हे जाईल वीण काजें।
तैं देखौनि व्याजें। निघालें योगी।।२२।।
मृत्युने आधाधिलें। तिहीं निरंजन सेविलें।
यमदमांचे केलें। मेलावे पुरे।।२३।।

"शरीर नश्वर आहे. ते मृत्युमुळे केव्हा नाश पावेल, याची शाश्वती नाही; म्हणून धास्तावलेल्या योग्यांनी जिवंतपणीच या ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ***विचाराचा पक्का निर्णय लवकर व्हावा म्हणून सर्वत्याग करून अरण्याची वाट धरली आणि तेथे यम-दम-शमरूपी साधनांचे घोर परिश्रम उपसण्यास ते कटिबद्ध झाले."

एणेचि क्षेत्राभिमानें। राज्य त्यजिलें ईशानें।
गुंति जाणौनि स्मशानें। वासु केला।।१३-२४।।
ऐसियां पैजा महेशा। पांघुरणें दाहीं दिशा।
लांचकरु म्हणौनि कोलसा। कामु केला।।२५।।
पैं सत्यलोकनाथा। वदनें आलीं बलार्था।
तऱ्हीं तो सर्वार्था। नेणेचिना।।२६।।

"याच ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ***विचाराचा निर्णय करण्याच्या आसक्तीने श्रीशंभूने कैलासाचे राज्य त्यागले आणि प्रपंचात गुंतले जाऊ नये म्हणून स्मशानात निरंतर वास्तव्य केले. दाही दिशांचेच केवळ वस्त्र पांघरलेल्या त्या निःसंग ईशालासुद्धा काम आपल्याला प्रलोभन दाखवून आपले इष्ट साध्य करण्यात बाधक वाटला; म्हणून त्याने रागावून जाऊन खवळून मदनाचा कोळसा केला. प्रत्यक्ष ब्रह्मदेवालासुद्धा या गोष्टीचा निर्णय एका तोंडाने करता येईना! म्हणून त्याने चार चार तोंडे निर्माण करून घेतली. तरीही त्याला या विषयाचे गूढ थोडेसुद्धा आकलन झालेले नाही."

याबाबत ऋषिमुनींचे विचार

थोर तत्त्वज्ञ, ऋषी व मुनी यांनी पण याचा निर्णय करण्यासाठी तपस्या, चिंतन, उपासना, इ.नी शुद्ध झालेल्या बुद्धीने विचार केला. पण:

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक्।
<u>ब्रह्मसूत्र</u> पदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः।।१३-४।।

"***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** तत्त्वाचा विचार ऋषींनी पुष्कळ प्रकाराने केला आहे. वेदांतील छन्दबद्ध मंत्रांत रचलेल्या विविध विभागांतूनही हा विचार सांगोपांग साकल्याने केलेला आढळतो. उपनिषदादींद्वारेदेखील ही चर्चा कलेली आहे व ब्रह्मसूत्रांद्वारे युक्तिप्रयुक्तीने याचा निश्चय प्रकट केलेला आहे."

श्रीकृष्णोक्तीचा असा सर्वसामान्यतया अर्थ केला जातो. यातील ***ब्रह्मसूत्रे*** नेमकी कोणती हे निश्चित होत नाही. सर्वसाधारणपणे वेदांतातील ***बादरायण व्यासकृत*** ब्रह्मसूत्रांचा निर्देश गीतेने येथे केला आहे, असे समजले जाते. पण ज्ञानदेव मात्र अजून एका वेगळ्याच **बृहत्सामसूत्रा**चा यावरच्या ओव्यांत निर्देश करतात, ते

कोणते हे मात्र कळत नाही. या श्लोकावरील ज्ञानदेवांचे भाष्य पाहू या. ते म्हणतात की यासंबंधी वेगवेगळी मते अशी आहेत:

१) जीववाद

एक म्हणति हे स्थल। जीवाचेचि मूल।
मग प्राण हे कुल। तेयाचें एथ।।१३-२७।।
प्राणाचां घरीं। आंगें राबते भाऊ चाऱ्हीं।
आणि मना ऐसीं आवारी। कुलवाडीकरु।।२८।।
तेयां तैं इंद्रियबैलांची पेटीं। न म्हणें अंवसीं पाहाटीं।
विषयक्षेत्रीं आटी। काठी भली।।२९।।

"कित्येक ***जीववादी*** तत्त्वज्ञ असे म्हणतात की जीवच या क्षेत्राचा स्वामी आहे. त्याने हे क्षेत्र बटाईने प्राणास दिले आहे. प्राणाचे ***अपान, व्यान, समान व उदान*** असे चार कामसू व मेहनती भाऊ आणि ***मन*** ही चपळ कारभारीण हे शेत पिकवितात. इंद्रियरूपी बैल औतास जुंपून प्राण रात्रंदिवस कष्ट करतो. या प्रकारे हे सर्व विषयांची पिके काढतात."

मग विधिची वाफ चुकवी। आणि अन्यायाचें बी वाफवी।
कुकर्माचां करवी। राबु जऱ्हीं।।१३-३०।।
तऱ्हीं तेयांचिसारिखें। असंभाड पाप पिके।
मग जन्म कोटी दुःखें। भोगी जीवु।।३१।।
ना तऱ्हीं विधिचेनि वाफें। सत्क्रियाबीज आरोपे।
तऱ्हीं जन्मशत मापें। सुखचि मविजे।।३२।।

"विहित कर्माच्या ओलीवर सत्कर्माचा मळा पिकवण्याऐवजी हे सगळे अविहित निषिद्ध कर्मांचा मळा पिकवतात. कुकर्मांचे बीज असे पेरत राहिल्याने त्याचे पिक पण उदंड येते. अन त्यापासून पुनःपुनः पेरणी-कापणी-मळणी करत गेल्याने कोट्यवधी जन्म त्या जीवास दुःखे भोगत बसावे लागते. त्या शेतात वेदविहित कर्मांच्या ओलीवर सत्कर्माचे बी परतपरत पेरले असता, शेकडो जन्मे भोगत राहावे असे सुखाचे अमाप पीक येते!"

२) प्रकृतिवाद

तंव आणिक म्हणति हे नव्हे। हे जीवाचेचि ना म्हणावें।
आमुतें पुसा आघवें। शेताचें या।।१३-३३।।
अहो जीवु एथ उखिता। वस्तीकरु वाटे जातां।
आणि प्राणु हा बलौता। म्हणौनि जागे।।३४।।
अनादि जैं प्रकृति। सांख्य जियेतैं गातीं।
क्षेत्र हे वृत्ती। इयेंतेंचि जाणैं।।३५।।

त्यावर दुसरे प्रकृतिवादी लोक म्हणतात की,"हे जीववादी जे म्हणतात, ते बरोबर नाही. हे जीवाचे क्षेत्र आहे, असे म्हणूच नका, तर या शेताची समस्त माहिती आम्हाला विचारा. अहो जीव हा केवळ वाटेचा वाटसरू आहे व या क्षेत्री वस्तीस आलेला आहे. तसेच प्राण तर केवळ या क्षेत्राचा बलुतेदार राखण्या आहे. म्हणून तो रात्रंदिवस जागता पहारा देतो. ***सांख्यसिद्धांतवादी*** जिची कीर्ती गातात, ती ***अनादी प्रकृति,*** तिचे हे क्षेत्र वतन आहे."

आणि इयेतेंचि आघवा। आथी घरमेलावा।
म्हणौनि वाहिवा। घरीं वाहे।।१३-३६।।
वाहिव्याचियां राहटीं। जैं कां मुदल तिधें इयें सृष्टी।
तैं इयेचांचि पोटीं। जाहलें गुण।।३७।।
रजोगुणु पेरी। तेंतुलें सत्त्व सोंकरी।
एकलें तम करी। संवंगणीं।।३८।।
रचोनि महत्तत्त्वाचें खलें। मलीं एकें कालगेनि पोलें।
तेथ अव्यक्ताची मिलें। सांज भलीं।।३९।।

"आणि हिच्याजवळ ही शेती चालवण्याचा सगळा बारदाना घरचा आहे. म्हणून ही शेत वाटेकऱ्यास न देता स्वतःच घरी वहिवाट करते. तिच्याच पोटी प्रसवलेले ***सत्त्व, रज व तम*** हे तिघे गुणच या कामी प्रमुख आहेत. रजोगुण जे पेरतो, ते सत्त्वगुण वाढवतो व एकटा तमोगुण पिकाची कापणी करतो. तो तमोगुण महत्तत्त्वाचे खळे रचून एकट्या ***काळ*** नावाच्या पोळाकडून मळणी करून घेतो आणि मग ***सूक्ष्म अव्यक्त*** **सृष्टि**रूपी पिकाच्या धान्याच्या राशीच्या राशी दिसायला लागतात."

३) संकल्पवादी

तंव एकीं मतिवंती। यया बोलाचियां खंतीं।
म्हणितलें या ज्ञप्ती। अर्वाचीना।।१३-४०।।
हां हो परतत्त्वाआंतु। के प्रकृतिची मातु।
हा क्षेत्रवृत्तांतु। उगें आईका।।४१।।
शून्यसेजसालियें। सुलिनतेचियें तिलिये।
निद्रा केली होती बलिये। संकल्पें येणें।।४२।।
तो अवसांत चेईला। उद्यमीं सदैव भला।
म्हणौनि ठेला जाला। इच्छेसवें।।४३।।

तेव्हा हे ***प्रकृतिवादी*** मत कित्येक बुद्धिवंतांना न आवडून ते म्हणाले, "अहो! यांची जाणकारी अर्वाचीन काळातील आहे. फार प्रचीन काळी जे ***परब्रह्म*** होते, त्याच्यापुढे ही ***प्रकृति*** आजकालची! या क्षेत्राची खरी माहिती आम्हीच देऊ शकतो. ती ऐकून घ्या. ***शून्य जे परब्रह्म,*** त्याच्या ब्रह्मरूपी शयनागारात संपूर्ण लीनतेच्या गादीवर या बलवान अशा संकल्पाने निद्रा केली होती. तो अचानक जागा झाला. तो सतत उद्यमशील असल्याने त्याने इच्छा केल्याबरोबर त्यास हा त्रिभुवनरूप ठेवा प्राप्त झाला."

निरालंबाची वाडी। त्रिभुवनाएवढी।
हे तेयाचियें जोडी। रूपा आली।।१३-४४।।
महाभूताचें एकवट। सैंरा वेंटालूनि भाट।
भूतग्रामांचे आधाट। चिरिलें चारीं।।४५।।
यावरी आदी। पांचवटेयाचीं बांधीं।
बांधिलीं प्रभेदीं। पंचभूतिकीं।।४६।।

"निराकार परब्रह्मरूप वाडीत अव्यक्तावस्थेत असणारा हा त्रिभुवनाएवढा बाग त्याच्यामुळेच व्यक्त दशेत आला. महाभूतांचे इतस्ततः असणारे तुकडे एके जागी करून पंचीकरणरूपी मशागतीने त्या जमिनीस एकसंध करून स्वेदजादी चारी पांचभौतिकी देहांना त्याने तयार केले."

कर्माकर्मांचें गुंडें। बांध घातिले दोहीं कडें।
नपुंसक बरडें। रानें केलीं।।१३-४७।।
तेथ येरझारेलागीं। जन्ममृत्युची सुरंगीं।
सुहाविली निलागीं। संकल्पें येणें।।४८।।
मग अहंकारासीं एकलाधि। करूनि जीवितावधी।
वाहाविलें बुद्धी। चराचर।।४९।।
यापरी निराली। वाढे संकल्पाची डाहाली।
म्हणौनि तो मुलीं। प्रपंचा येयां।।५०।।

"या देहांना कर्म व अकर्मरूपी दगडांचे बांध घालून त्याने बरड माळराने पाणी देऊन सुपीक केली. त्या माळरानातील अशा बागेत जाण्यायेण्यासाठी जन्ममृत्युरूपी गुप्त भुयारे त्याच संकल्पाने रचली. मग त्याने एकट्या **अहंकारा**स तहहयात वहिवाटदार नेमून त्याच्याकडून चराचर सृष्टीची शेती करवली. अहंकाराने या कामी आपल्या ***बुद्धी*** या स्त्रीच्या मदतीने ही अशी शेती केली आहे."

४) स्वभाववाद

इयां मतमुक्तकीं। तेथ पडघायिलें आणिकीं।
म्हणती हांहो विवेकी। तऱ्हीं तुम्हीं भलें।.१३-५१।।
परतत्त्वाचां गांवीं। संकल्पसेज देखावीं।
तऱ्हीं कां पां न मानावीं। प्रकृति तेयांचीं।।५२।।
परि हे असो नव्हे। तुम्ही या न लागावें।
आतांचि हे आघवें। सांघिजेल।।५३।।
तऱ्हीं आकाशीं कवणें। केलीं मेघाचीं भरणें।
अंतरिक्षीं तारांगणें। धरी कवण।।५४।।

संकल्पवाद्यांच्या मुखातून बाहेर पडलेली ही मुक्ताफळे ऐकून दुसरे जे ***स्वभाववादी*** होते, त्यांनी त्यांना चापले. ते म्हणाले, "अहो! तुम्ही फारच विचारवंत दिसता! परब्रह्माठायी ***संकल्प*** लीन मानायचा, तर प्रकृतिवाद्यांची प्रकृतीच तेथे का न कल्पावी! पण राहू द्या. तुम्ही या विषयात नका पडू! आम्हीच तुम्हाला ताबडतोब याचे खरे काय ते सांगतो. आकाशात मेघ कोणी निर्माण केले काय! अंतरिक्षात तारांगणे कोणी निर्मिली म्हणून झालीत काय!"

गगनाचां तडवा। कोण्हें वेढिला केधवां।
वारा हिंडतु असावा। हे कवणाचें मत।।१३-५५।।
रोमां कवण पेरी। कोण समुद्र भरी।
पर्जन्याचियां करी। धारा कवण।।५६।।
तैसें क्षेत्र हे स्वभावें। हे वृत्ती कवणाची नव्हे।
हे वाहे तेयां फांवे। येरां तुटे।।५७।।

"गगनाचा मंडप कोणी तयार केला असे तरी आहे काय! वारा वाहत असावा हे तरी कोणाची इच्छा वा संकल्प आहे म्हणून थोडाच तो वाहतो! अरण्ये कोणीतरी निर्मिली अन समुद्रात पाणीसुद्धा कोणीतरी भरून ठेवले आहे थोडेच! पावसाची वृष्टीसुद्धा अशीच कोणीतरी केली असे म्हणणे किती हास्यास्पद आहे! अहो! हा तर या क्षेत्राचा स्वभावच आहे. हे क्षेत्र जो वहिवाटतो, त्याला मिळते. जो याची वहिवाट करत नाही, तो याचा स्वामी कसा बरे होऊ शकेल!"

५) काळवाद

तंव आणिकें एकें। क्षोभें म्हणीतलें नीकें।
तऱ्हीं भोगिजे एकें। कालें केवीं।।१३-५८।।
हे जाणों मृत्यु रागिटा। सिंहाड्याचां दरकुटा।
परि काय वांजटा। पूरीजत असे।।५९।।
तऱ्हीं याचा मारु। देखताति अनिवारु।
परि स्वमति भरु। अभिमानियां।।६०।।

हे स्वभाववाद्यांचे मत ऐकताच रागावलेले ***काळवादी*** म्हणतात, "वा! वा! तुमचे मत जर इतके उत्तम आहे, तर मग या क्षेत्राची वहिवाट केवळ काळच करतो, हे कसे! तो ***काळ***च या क्षेत्रास उपभोगतो - इतर कोणीच नाही! इतर जे कोणी तुम्ही म्हणता, ते सगळे तर काळाच्या अंकितच आहेत. त्या मृत्युरूपी दारुण काळसिंहाची ही दरी म्हणजे क्षेत्र आहे. पण तुम्हा मंडळींच्या अव्याहत निरर्थक बडबडीला कोण पुरे पडणार! काळाचा अनिवार्य तडाखा माहीत असूनसुद्धा तुम्ही आपापला अभिमान सोडत नाही!"

महाकल्पापरौति। कंव घालौनि अवचिति।
सत्यलोकभद्रजाति। आंगीं वाजे।।६१।।
लोकपाल नीच नवें। दिग्गज मेलावें।
स्वर्गींचियां आडवें। रिगौनि मोडी।।१३-६२।।
एरें याचेनि आंगवातें। जन्ममृत्युचियें गर्तें।
निर्जीवें होऊनि भ्रमतें। जीवमृगें।।६३।।
न्याहाला पां केवढा। पसरलासे चवडा।
जो करूनियां माजिवडा। आकारगजु।।६३।।
म्हणौनि कालाची सत्ता। हा बोलु निरुता।
ऐसें वादु पांडुसुता। क्षेत्रालागीं।।६५।।

"महाकल्पाच्या शेवटी अचानक झडप घालून हा ब्रह्मदेवाचे निवासस्थान जो सत्यलोकरूपी हत्ती, त्यालासुद्धा आडवे करतो. नवनवीन लोकपाळ नित्य फस्त करणाऱ्या व स्वर्गरूपी काननातील दिग्गजांचा फन्ना करणाऱ्या या काळसिंहाचा नुसता साधा वारा जरी लागला, तरी जन्ममृत्यूच्या खाचखळग्यात भ्रमिष्ट होऊन जीवमृग सैरावैरा पळू लागतात. साकार विश्वाएवढा प्रचंडातिप्रचंड गजच ज्याने स्वतःच्या चवड्यात घट्ट धरला आहे, त्याचा तो पंजा किती सामर्थ्यवान आहे, हे काय सांगायला हवे काय! म्हणूनच या क्षेत्रावर केवळ एका काळाचीच सत्ता चालते व हे क्षेत्र त्याचेच आहे!"

"परि तेयांतेंही हे क्षेत्र नेणवेंचि"

यांप्रमाणे विविध मतमतांतरे उत्कृष्ट रूपकांच्याद्वारे ज्ञानदेव स्पष्ट करतात. हा चर्चेचा ***पूर्वपक्ष*** आहे, असे म्हटले तरी चालेल. ज्ञानदेव या पद्धतीलाही पारखे नाहीत, असे आपणाला या ठिकाणी सहजच जाणवून जाते. पण त्यांचा पिंड विवादकाचा नाही; तर तो आहे गुरूचा! आपल्यावर निःसीम श्रद्धा असणाऱ्या शिष्यांना योग्य ते मार्गदर्शन करणाऱ्याचा! येथे वादविवादांचे काय काम! असो.

पुढे ते सांगतातः

हे बहु उखिविखी। ऋषी केली नैमिखीं।
पुराणे इयेंविखीं। मतपत्रिका।।१३-६६।।
अनुष्टुभादि छंदें। प्रबंधीं जियें विविधें।
तैं पत्रावलंबनमदें। करितााति आझुनि।।६७।।
वेदींचें बृहत्सामसूत्र। देखणेंपणें अति पवित्र।
परि तेयांतैंही हे क्षेत्र। नेणवेंचि।।६८।।

"हे पांडुसुता! याप्रमाणे बरेच वाद प्रचुर आहेत. याव्यतिरिक्त नैमिषारण्यात वास केलेल्या अनेक ऋषींनीही या ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** वादाचा सखोल उहापोह केलेला आहे. ***आरण्यके, उपनिषदे*** इ.ग्रंथसुद्धा त्यांच्या मतांची निशाणी म्हणून लोकात प्रचलित आहेत. या वादांची साक्ष अद्यापही पुराणे देतात. अनुष्टुप छंद वा इतर अनेक छंदात केलेल्या एतद्विषयक अनेकानेक छंदोबद्ध रचना व वेदांच्या ऋचा, तसेच त्यातून प्रकटविलेली विविध मते, इ.ना त्यांचे अनुयायी अजूनही अभिमानाने अनुसरतांना दिसतात. वेदातील ***बृहत्सामसूत्र*** हे तर त्यातील पवित्र विचाराने परिपूर्ण भरलेले असून याविषयीच्या तत्त्वचर्चेने अति डोळस आहे. परंतु त्यालासुद्धा हे क्षेत्र उमजलेले नाही."

आणिक आणिकीही बहुतीं। महाकवी हेतुमंतीं।
ययालागीं मती। वेचिलियां।।१३-६९।।
परि ते ऐसें हे एवढें। कीं अमुकेयाचेंचि फुडें।
हे कोण्हाहीं वरपडें। होयेचिना।।७०।।
आतां ययावरी जैसें। क्षेत्र हे असें।
तुज सांगु तैसें। साद्यंतु गां।।७१।।

"आणिक इतरही अनेक प्रज्ञावंतांनी यावर आपली बुद्धी खर्च केली आहे. व्यासांसारख्या महाकवीने - महान तत्त्वज्ञाने तर आपली असाधारण, अलौकिक प्रतिभा व बुद्धिबल वेचून वेदांतसूत्रे वा ब्रह्मसूत्रे रचली. पण एवढे अफाट परिश्रम करूनही त्या कोणालाच हे क्षेत्र केवढे, कसे व कोणाचे आहे याचा निर्णय, तसेच इतर सर्व मतांचा छेद घेणे किंवा समन्वय करणे, हे काही जमलेले नाही. म्हणून हे अर्जुना! **मी स्वतःच तुला हे *क्षेत्र* जसे आहे, तसेच *स्पष्ट व साद्यंत* सांगतो.**"

गीतारहस्य व क्षेत्रक्षेत्रज्ञविचार

याप्रमाणे विविध मतांचे निर्देशन व त्यांची या *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* निर्णयाच्या दृष्टीने विफलता स्पष्ट दाखवून ज्ञानदेव भगवंतांचा एतद्विषयक निर्णय प्रकट करण्यास पुढे सरसावतांना दिसतात. आधुनिक भौतिक वा विज्ञानवाद्यांपासून ते तहत पुरातन तत्त्वज्ञान्यांपर्यंत जी या ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ***विचाराबाबत मतमतांतरे आहेत, त्यांचे एक सम्यग्दर्शन प्राप्त करून घेण्यासाठी जिज्ञासूंचे लक्ष यानिमित्ताने महान देशभक्त व कर्मयोगी श्री.लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या ***गीतारहस्य*** या थोर ग्रंथाकडे वेधावे लागते.

त्यांच्या ग्रंथात जो ***क्षेत्रक्षेत्रज्ञ***विचार उत्कृष्टरीत्या मांडलेला आहे, तो अभ्यासणे आधुनिक विद्वानांना, पंडितांना, गीताविवेचकांना, तत्त्वजिज्ञासूंना आणि इतर विचारवंतांना आवश्यक आहे. श्रीगोपालांच्या मताचे विविध पैलू उत्तम रीत्या समजून घेण्यासाठी ***गीतारहस्य*** मोलाची मदत करतो, हे सांगणे न लगे! असो.

श्रीगोपालांचे मत::::

श्रीगोपालांचा निर्णय

महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च।
इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः।।१३-५।।
इच्छा द्वेषः सुखं दुःखं सङ्घातश्चेतना धृतिः।
एतत्क्षेत्रं <u>*समासेन*</u> <u>*सविकार*</u>मुदाहृतम्।।१३-६।।

आता मौजेची गोष्ट म्हणजे पुनः आपला पूर्वीचाच <u>***समासेन***</u> हा शब्द या श्लोकात दृग्गोचर होतो. त्याचाही अर्थ विविध विद्वानांनी ***सारांशतः*** वा ***संक्षेपाने*** असाच केलेला आहे. ए. सी. भक्तिवेदांत श्री.ल.प्रभुपादस्वामीसुद्धा याचा अर्थ व अन्वयार्थ दोन्हीही *"in summary"* असाच करतात. जिज्ञासूंच्या समाधानासाठी या शब्दाचा अर्थ थोडा खोलात शिरून या वेळीसुद्धा पाहणे उचित वाटते. त्यासाठी आपण या दोन्ही श्लोकांचा पदच्छेद व अन्वयार्थ पाहू याः

पदच्छेद

महाभूतानि अहंकारः बुद्धिः अव्यक्तं एव च इन्द्रियाणि दश एकं च पंच च इन्द्रियगोचराः।।१३-५।। इच्छा द्वेषः सुखं दुःखं सङ्घातः चेतना धृतिः एतत् क्षेत्रं <u>*समासेन सविकारं*</u> उदाहृतम्।।१३-६।।

अन्वय

महाभूतानि (पंचमहाभूते) अहंकारः (अहंकार) बुद्धिः (बुद्धी) अव्यक्तं (पराप्रकृति वा जीव) एव (ही) च (व) इन्द्रियाणि (इंद्रिये) दश (दहा) एकं (एक - मन) पंच च (पाच पाच) च (हे) इन्द्रियगोचराः (इंद्रियांचे विषय) ।।१३-५।। इच्छा (इच्छा) द्वेषः(द्वेष) सुखं (सुख) दुःखं (दुःख) सङ्घातः (स्थूल देहाचा पिंड) चेतना (चेतना) (व)धृतिः (धृति) एतत् (हे) ***सविकारं (विकारासहित)समासेन*** *(एकीकरणाने /समूहाने /संक्षेपाने) क्षेत्रं (क्षेत्र) (म्हणून) उदाहृतम् (म्हटले जाते /प्रसिद्ध आहे.)।।१३-६।।*

अर्थ

पंचमहाभूते (५), अहंकार (१), बुद्धी (१), अव्यक्त (१), दशेंद्रिये (१०), मन (१), पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये यांचे

पाच पाच (१०) विषय, इच्छा (१), द्वेष (१), सुख (१), दुःख (१), स्थूल देहाचा पिंड वा संघात (१), चेतना (१) व धृति (१) अशी छत्तीस तत्त्वे यांचा समूह, त्यांच्या एकीकरणाने, विकारांसहित ***क्षेत्र*** *या नावाने प्रसिद्ध आहे.*

पुनश्च *समासेन* चा अर्थ

या ठिकाणी आपणांस लक्षात घेतले पाहिजे की ***समासेन***चा अर्थ आपण ***एकीकरण*** वा ***समूह*** असा लावला आहे. स्व.लोकमान्य टिळकांनीसुद्धा ***समासेन*** या पदाचा अर्थ ***"ही सर्व मिळून होणारा समुदाय"*** असाच केला आहे. ज्ञानदेवांनी या दोन श्लोकांवर जवळजवळ *नव्वद ओव्या* रचल्या आहेत. अर्थातच श्रीगोपालांचा उद्देश याच अर्थी आहे. जरी या संदर्भात हा शब्द ***संक्षेपाने*** या अर्थी वापरता येत असला, तरीसुद्धा श्रीगोपालांचे एकूण वक्तव्य लक्षात घेता, ***समूह व एकीकरण*** हे शब्दार्थ येथे कसे चपखल बसतात, ते जिज्ञासूंनी तपासून पाहावे, ही विनंती. असो.

"पञ्चचेन्द्रियगोचराः"

या श्लोकातील ***"पञ्चचेन्द्रियगोचराः"*** या पदाचा या ठिकाणी शांकरभाष्यानुसार गीतार्थ व ज्ञानदेवांनी केलेला अर्थ हे माहीत करून घेणे आवश्यक आहे. आद्यश्रीशंकराचार्य ***इंद्रियांचे पंच विषय*** असा या पदाचा अर्थ लावतात; तर ज्ञानदेव स्पष्टच ***पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये यांचे एकूण पाच व पाच मिळून दहा विषय*** असा अर्थ करतांना दिसतात.

श्री.शंकरमहाराज खंदारकर यांच्या ***भावार्थ ज्ञानेश्वरी***त स्पष्ट केल्याप्रमाणे ***"पंच च"*** या पदाचा ***पाच व पाच म्हणजे दहा*** असा अर्थ ज्ञानदेवांनी घेतला आहे, असे सुचवले आहे व तेही तसे मान्य होण्यासारखेच आहे. असो. आता आपण या श्लोकावरील ज्ञानदेवांची विस्तृत टीका पाहू याः

छत्तीस तत्त्वांचे क्षेत्र

तऱ्हीं महाभूतपंचकु। आणि अहंकारु एकु।
बुद्धि अव्यक्त दशकु। इंद्रियांचां।।१३-७२।।
आणिकही एकु। विषयांचां दशकु।
सुख दुःख द्वेषु। संघातु इच्छा।।७३।।
आणि चेतना धृति। एवं क्षेत्रव्यक्ती।
सांघितली तूझप्रति। आघवींचि।।७४।।

"पाच महाभूतांचा समुदाय, अहंकार, बुद्धी, अव्यक्त, दहा इंद्रियांचा समुदाय, आणिक एक (मन), दहा विषयांचा समुदाय, सुख, दुःख, द्वेष, संघात, इच्छा आणि चेतना व धृति *(सर्व मिळून छत्तीस तत्त्वे)* याप्रमाणे सर्व क्षेत्र तुला स्पष्ट सांगतो."

गीतारहस्यातील तत्त्वांचे वर्गीकरण

यापुढचे विवेचन पाहण्यापूर्वी आपण ***गीतारहस्य,*** तसेच श्री.ज.स.करंदीकर प्रभृतींनी केलेले तत्त्वांचे वर्गीकरण पाहू या.

मूलतः सर्व तत्त्वे तीन किंवा चार प्रभागात टाकून या प्रकारचे वर्गीकरण होते. सृष्ट्योत्पत्तिक्रमाने ***उच्च, मध्यम व निम्न*** असे स्तर कल्पून त्यात ही छत्तीस म्हणा, चोवीस, पंचवीस किंवा सव्वीस म्हणा, जी काही तत्त्वे त्या त्या तत्त्वप्रणालीत धरली जातात, त्यांचे जे वर्गीकरण केले जाते, ते साधारणपणे *पृ.क्र.२८२* वर दिल्याप्रमाणे असते.

या ठिकाणी आपणांस दिसून येते की गीतेच्या *१३-५ व ६* या श्लोकांतून सांगितलेले क्षेत्र***सविकारं*** म्हणजे ***विकारांसहित*** असे म्हटले आहे. तर मन, इंद्रियादी १६ तत्त्वांचा गीता विकारात समावेश करत नाही, असे लो. टिळक सुचवितात. हा विषय अधिक स्पष्ट व्हावा म्हणून नंतर आपण श्रीज्ञानदेवांच्या या श्लोकांवरील ओव्या पाहणार आहोतच. तेव्हा हे वर्गीकरण ज्ञानदेवांस कितपत मान्य होणारे आहे, ते समजेल. असो.

माया, परा व अपरा प्रकृति विचार

गीतारहस्यमते सांख्यमतातील ***पुरुष*** व वेदांतमते जे ***परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप*** आहे, त्यांनाच गीतेतील ***पराप्रकृति*** असे म्हटले आहे; त्याचा विचार करू या.

या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की *सातव्या* अध्यायात ***अष्टधा*** असे ज्या ***अपरा*** प्रकृतीचे वर्णन केलेले आहे, त्यानुसार ***पंचमहाभूते (५), अहंकार, बुद्धी व मन*** अशी मिळून अष्ट विभागांची गीतोक्त ***अपरा प्रकृति*** आहे.

परा प्रकृति ही गीता ब्रह्मापेक्षा भिन्न मानते. ***परा*** म्हणजे गीतेच्या *सातव्या* अध्यायानुसार***जीवरूपा प्रकृति. परा व अपरा प्रकृति*** मिळूनच गीतेतील ***क्षेत्र*** ही संकल्पना संभवते. सांख्यदर्शनातील ***पुरुष*** वा वेदांतातील जे ***परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप*** यांचा गीतेच्या ***परा***प्रकृतीशी काही मेळ घालणे शक्य नसण्याचे म्हणून जाणवते. कारण *१३-५ व ६* या श्लोकात जे ***अव्यक्त*** म्हणून सांगितलेले क्षेत्राच्या छत्तीस तत्त्वांपैकी एक आहे, तेच ***परा वा जीवरूपा प्रकृति*** होय. ज्ञानदेवही अव्यक्तासच ***परा प्रकृति*** असे मानतात, हे त्यांच्या ओव्या अभ्यासतांना आपणांस कळून येईल. तसेच श्रीमदाद्यशंकराचार्यांचे अव्यक्ताबाबतचे मत पहाः

ते म्हणतातः***"अहंकारो महाभूतकारणम् अहंप्रत्ययलक्षणः। अहंकार कारणं बुद्धिः अध्यवसायलक्षणा। तत्कारणम् अव्यक्तम् एव च न व्यक्तम् अव्यक्तम् अव्याकृतम् ईश्वरशक्तिः*** **"मम माया दुरत्यया"** ***इति उक्तम्।"***

"महाभूतांचे कारण म्हणजे***अहंप्रत्यरूप अहंकार*** आणि अहंकारास कारण म्हणजे ***निश्चयात्मिका बुद्धी.*** परात्पर कारण म्हणजे ***अव्यक्त प्रकृति.*** जी व्यक्त नाही, ती अव्यक्त, ***अव्याकृत ईश्वरीशक्ती*** जिलाच ***"मम माया दुरत्यया"*** असे भगवान म्हणतात." असे आचार्य वक्तव्य करतात.

अव्यक्त म्हणजे पराच!

ज्याअर्थी ***अपरा प्रकृति* व्यक्त** या सदरात मोडते, त्या अर्थी ही ***अव्यक्त प्रकृति* परा**च असली पाहिजे. आणि ज्या अर्थी ***अपरा* प्रकृती**चे ***अष्टधा*** विभाग *१३-५ व ६* या गीतेच्या श्लोकांत स्पष्टच वेगळे समाविष्ट केलेले दिसतात, त्या अर्थीसुद्धा *अपरा प्रकृति* म्हणजे ***अव्यक्त*** म्हणून तेथे सांगितलेले तत्त्व नसले पाहिजे; तर ***अव्यक्त म्हणजे पराच असले पाहिजे .***

परा व अपरा मिळून वास्तविक त्रिगुणमयी माया समजली पाहिजे. त्यामुळे श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या भाष्यातील उपरोक्त विधानातील मायेचा अर्थ करतांना, अपरा प्रकृतिचे अष्टधा भाग वेगवेगळे उल्लेखल्यामुळे ***माया म्हणजे परा प्रकृति*** असाच अर्थ घ्यावा लागेल. हीच ते म्हणतात ती ***अव्याकृत ईश्वरी शक्ती*** होय. *सातव्या* अध्यायाच्या *श्लोक क्र. ४* नुसार ***"भूमिरापोऽनलो वायुः खं मनोबुद्धिरेव च। अहंकारं इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा।।"*** असे अपरा प्रकृतीच्या अष्टविध भागांचे उल्लेख येतात आणि ज्ञानदेवही त्या अपरा प्रकृतीबद्दल असेच म्हणतात की:

तऱ्हीं अवधारीं धनंजया। हे महदादिक माझी माया।
जैसीं प्रतिबिंबें छाया। निजांगाची।।७-१५।।
आणि इयेंतैं प्रकृति म्हणिजे। हे अष्टधा भिन्न जाणिजे।
लोकत्रय निफजे। इयेस्तव।।१६।।......

परा प्रकृति हा परब्रह्माखालील स्तर होय

गीता ***परा*** प्रकृतीबाबत म्हणते की:

अपरिमेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्।।।।७-५।।

म्हणजेच *अपरा प्रकृतीहून भिन्न अशी जी परा प्रकृति आहे, तिनेच हे सर्व जगत धारण केले आहे.* तीच ***जीव*** म्हणून साक्षात होय. ***अर्थात परा प्रकृति म्हणजेच चेतन, अव्याकृत असा जीव होय.*** याबाबत ज्ञानदेवही असे सांगतात:

आणि या आठांची जैं साम्यावस्था। तैं माझी परमप्रकृति पार्था।
तियें नाम व्यवस्था। जीवु ऐसीं।।७-१९।।
जैं जडातैं जीववी। चेतनैंतैं चेतवीं।
मनाकरवीं मानवी। शोकमोहो।।२०।।
बुद्धिचां आंगीं जाणणें। तैं जियेंचियें जवलिकेचें करणें।
जियां अहंकाराचेनि विंदाणें। जगचि धरिजे।।२१।।

या ओव्यांचा अर्थ आपण अगोदरच पाहिला आहे. त्यांच्यावरून असे दिसून येते की ***परा* म्हणजेच *जीव* व हिलाच *अव्यक्त* तसेच *अव्याकृत ईश्वरी शक्ती* किंवा *माया* असे म्हटले जाते.** सामान्यतया ***माया*** म्हणजे ***जगत*** असे मानले जाते. तरीही सदर आचार्यभाष्याच्या संदर्भातील ***"दुरत्यया माया"*** म्हणजे हीच ***पराप्रकृति*** होय.

या पराप्रकृतीचा संबंध थेट परब्रह्माच्या ***"एकोऽहं,बहुस्यामः"*** या संकल्पशक्तीशी पोहोचतो. असेही म्हणता येते की ईश्वराशी एकनिष्ठ पतिव्रतेप्रमाणे अभेद असणारी ही संकल्पशक्तीच परा वा जीवरूपात प्रकट होते. **सिद्धांताप्रमाणे *परब्रह्म व त्याची शक्ती* हे वेगवेगळे वा भिन्न नसल्याने, ही *श्रेष्ठ* वा *परा* म्हणून प्रसिद्ध आहे.**

योगदृष्टीनेही ***जीव व शिव*** यांचे मिलन होते. शिवात मिलन होणारा जीव हा जड नसला पाहिजे व तो त्याच्याहून वस्तुतः भिन्न नसला पाहिजे. त्यांच्यात दिसणारा व भासणारा भेद हा त्रिपुट्यवस्थित जगाच्या दृष्टीनेच आहे, असा मानला पाहिजे. सिद्धांतात असा भेद संभवत नाहीं. म्हणूनच ***जीव - परा - वा माया*** ही प्रकृति ईश्वराहून किंवा ब्रह्माहून भिन्न नाही.

याच दृष्टिकोनातून राधा-कृष्णांचे योगशास्त्रदृष्ट्या युगूल संभवते. योगशास्त्राप्रमाणे कृष्ण म्हणजे परब्रह्म व त्याच्याशी सतत संयुक्त असणारी त्याची जीवरूपा चेतन अव्याकृत शक्ती म्हणजे राधा. हिलाच ***ह्लादिनी शक्ती*** असेही योगात म्हणतात. ***कुंडलिनी***चीच ही शक्ती म्हणजे एका स्तरावरील अभिव्यक्ती आहे. ***"जीवो ब्रह्मैव ना परा"*** ही ब्रह्मसूत्रभाष्योक्ती हेच सुचविते की ***जीवरूपी पराप्रकृति ब्रह्माहून भिन्न नाही.*** असे असले तरीही तत्त्वविचार करतांना ***विश्वाची उभारणी वा सर्जन या संदर्भात परा प्रकृति ही परब्रह्माहून एक पायरी निम्न म्हणून गणावी लागेल.***

परा व मूल प्रकृति

तसेही पाहिले तर *तेराव्या* अध्यायातील क्षेत्राची व्याप्ती दाखवणाऱ्या श्लोकांनुसार *(१३-५ व ६)* या ***परा, जीव वा अव्यक्त*** प्रकृतीचा क्षेत्राच्या *छत्तीस* तत्त्वात समावेश केला गेला आहे. आणि ***क्षेत्रज्ञ*** तद्व्यतिरिक्त असल्याने आपल्याला ***परा***प्रकृतीला सांख्यांच्या ***पुरुष*** वा वेदांत्यांच्या ***परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप*** या ***"न प्रकृति न विकृति"*** या वर्गात समाविष्ट करता येत नाही; तर वर्गीकरण करतांना तिला सांख्यांच्या प्रकृति वा वेदांत्यांच्या ***परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप*** या ***मूलप्रकृति*** वर्गात समाविष्ट करणे अधिक सयुक्तिक वाटते.

प्रकृति-विकृति व अपरा प्रकृति

त्याचप्रमाणे गीतेतील ***अपरा*** प्रकृतीचे ***मूल प्रकृति*** या वर्गात समावेशन करणे तसे उचित वाटत नाही. ***महान (बुद्धि), अहंकार, पंचतन्मात्रे (महाभूतांची) व मन*** या अपरेच्या अष्टविभागांचा ***प्रकृति-विकृति व विकार*** यात तत्त्वानुसार अंतर्भाव केला आहे. त्यामुळे अपरा प्रकृतीचा अंतर्भाव ***प्रकृति-विकृति*** या मुख्य वर्गात करणे अधिक उचित वाटते. या वर्गात सांख्यांची ***महान, अहंकार व पंचतन्मात्रे*** मोडतात. अपरेचे अष्टविध भाग गीतेने मानले आहेत. त्यातील ***बुद्धि*** हा भाग सांख्यतत्त्वात वेगळा सांगितला नसला तरी ***महान* वा *महत्*** या सांख्यतत्त्वासच *बुद्धि* असे म्हणणे विद्वन्मान्य आहे.

लो.टिळकांनी गीतारहस्यात दर्शवलेल्या तत्त्वात्सुद्धा, एक मन वगळता, ***अपरा***प्रकृतीचे अष्टभाग***प्रकृति-विकृति*** या सदरात येतात. म्हणून ***अपरा***प्रकृतीला मूलप्रकृतीच्या वर्गातून काढून ***प्रकृति-विकृति***

या सदरात तिच्या अष्टधा भागांसह समाविष्ट करणे जास्त उचित होईल, असे वाटते.

परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप

राहता राहिले वेदांतमतानुसार *परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप*. वेदांती जगत मानत नाहीत. त्यांच्या दृष्टीने ***माया*** ही जड या सदरात मोडते. परंतु वेदांती ***परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप*** मानून ***जीव*** या संकल्पनेस अप्रत्यक्षपणे स्वीकारतांना दिसतात, असे आपले मत होते. परब्रह्म हे एकमेव - स्वयमेव– स्वयंसिद्ध- निरुपाधिक व तत्सम लक्षणांनी युक्त असल्याने खरे तर वेदांत्यांनी परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप मानायला नको होते. परंतु त्रिपुट्यवस्थित दृश्य जगाचे भान राखून त्यांनी हे कनिष्ठ स्वरूप स्वीकारलेले असावे.

असे असल्याने लो.टिळकप्रभृतींनीसुद्धा त्या स्वरूपास सांख्यांच्या ***मूल प्रकृति व प्रकृति-विकृति*** या उभयवर्गात समाविष्ट केलेले आहे, ते मग सयुक्तिकच म्हणावे लागेल. असे आहे म्हणूनच आपल्यालासुद्धा ***परा व अपरा*** **या दोन्ही प्रकृतींचा समावेश परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप या वेदांती वर्गात करावा लागेल.**

विकार

आता एक महत्त्वाचा मुद्दा उरतो. तो मगाशी म्हटल्याप्रमाणे विकारांची गणना गीता मूलतत्त्वात करते की नाही हा. वेदांती ***विकार*** मानत नाहीत; गीता वेदांतास अनुसरते; त्यांची एकवाक्यता असली पाहिजे; अशी गृहीतकृत्ये धरूनच हे मत मांडलेले असले पाहिजे.

खरे तर गीतेचे जे वेगवेगळे अर्थ प्रचुर आहेत, ते सगळेच काही आपण ज्याला ***वेदांती*** मत समजतो त्यास म्हणजे ***शांकर***मतास धरून नाही. ***उत्तरमीमांसा*** म्हणजे ***वेदांत*** म्हणजे खरे तर पंच प्रमुख आचार्यांची द्वैताद्वैतादी सर्व मते होत. पण सर्वसामान्यपणे आपल्याकडे ***वेदांत*** हे ***केवलाद्वैती***मतास अनुलक्षूनच म्हटले जात असल्याने अशी विधाने संभवतात. केवलाद्वैतमतानुसार विकार नाहीत. पण गीतेची सूक्ष्म छाननी केली असता ***गीता विकारांना गणते असे दिसून येते.***

क्षेत्र रूपाने जी ***छत्तीस*** मूलतत्त्वे ज्ञानदेवमते गीता *श्लोक क्र.१३-५ व६* यांत आहेत, त्यात मन (१), बुद्धिंद्रिये (५), कर्मेंद्रिये (५) व महाभूते (५) यांचा समावेश असल्याने व हे सर्व क्षेत्राचे विकार असल्याचे सांगितले असल्याने ***(सविकारं उदाहृतम्),*** गीता यांची विकारात गणना करत नाही, हे विधान केवळ ***अष्टधा प्रकृति व परा प्रकृति*** हेच फक्त धरून केलेले असावे असे वाटते. *तेराव्या* अध्यायाचा त्यात विचार केलेला दिसत नाही. तरी हा मुद्दासुद्धा आपण ज्ञानदेवांच्या यासंबंधीच्या ओव्या न्याहाळतांना पाहू या.

शांकरमत

सध्या येथे फक्त श्रीशंकराचार्य काय म्हणतात, त्याचा निर्देश करून पुढे जाऊ या. ते आपल्या भाष्यात म्हणतात:

"एतत् क्षेत्रं समासेन सविकारं सह विकारेण महदादिना उदाहृतम् उक्तम्। यस्य क्षेत्रभेदजातस्य संहतिः इदं शरीरं क्षेत्रम् इति उक्तम तत् क्षेत्रम् व्याख्यातं महाभूतादिभेदभिन्नं धृत्यन्तम्।।" याप्रमाणे शंकराचार्यसुद्धा महत्तत्त्वादींना या ***क्षेत्राचे विकार*** असे समजतात व गीता स्वतःच उघडएघड त्यांची विकारांत गणना करते, हे अगदी स्पष्टच आहे.

तत्त्वांच्या वर्गीकरणाची पुनर्रचना

वास्तविक पाहता हा मुद्दा आपल्या दृष्टीने केवळ वैचारिक मतभेदांचा दिसतो. कारण गीतेच्या *तेराव्या* अध्यायात क्षेत्राचे स्वरूप स्पष्ट करतांना या सर्वांची उकल करून ज्ञानदेवांनी त्यांची छत्तीस तत्त्वात विभागणी करून दाखविली असली, तरी त्या सर्वांचा अंतर्भाव केवळ ***अष्टधा अपरा प्रकृतिविभाग व परा प्रकृति*** अशा ९ विभागातही *सातव्या* अध्यायी केलेला आपण पाहिला आहे. तेव्हा हा मुद्दा तूर्त गौण मानला तरी चालेल.

आता आपण वरील चर्चेनुसार **तत्त्वांचे** आपल्या दृष्टीने ***पुनर्वर्गीकरण*** करून पाहू या, आपल्याला काय गंवसते ते. त्यानुसार होणारा तक्ता *पृ.क्र.२८२* वर पाहा.

क्षेत्रवर्णन (१)::::

पंचमहाभूते व अहंकार

गीताश्लोकांसंबंधी एवढी चर्चा केल्यावर आता आपण पुनश्च ज्ञानदेवीकडे वळू या:

आतां महाभूतें कवणें। कवण विषय कैसीं करणें।
हे वेगलालेपणें। एकैक सांघो।।१३-७५।।
तन्हीं पृथ्वी आप तेज। वायु व्योम इयें तूझ।
सांघितलीं बूझ। महाभूतैं पांचैं।।७६।।
आणि जागतिएं दशें। स्वप्न लपालें असे।
ना तन्हीं अंवसें। चंद्रु गूढु।।७७।।
ना ना अप्रौढबालकीं। तारुण्य राहें थोकीं।
कां न फुलतां कलिकीं। आमोदु जैसा।।७८।।
किंबहुना काष्ठीं। वह्नी जेवीं किरीटी।
तेवीं प्रकृतिचां पोटीं। गोप्यु जो असे।।७९।।

"आता तुला महाभूते कोणती, इंद्रिये व विषय कोणते व कसे, हे वेगवेगळे करून सांगतो. ***पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश*** ही तुला सांगितलेलीच *(७व्या अध्यायी निवेदिलेली)* पांच महाभूते होत. आणि जागृत दशेत स्वप्न जसे सुप्त असते; वा अमावास्येला चंद्र जसा गुप्त असतो; लहान बालकामध्ये तारुण्य जसे अप्रकट अवस्थेत असते; न उमललेल्या कलिकेत सुगंध जसा लपून राहतो; किंबहुना काष्ठांमध्ये अग्नी जसा गुप्तरीत्या वास्तव्य करून असतो; तसाच प्रकृतीच्या पोटी अहंकार गौप्यावस्थेत वास करतो."

जैसा ज्वरु धातुगतु। अपथ्याचें मिखें पाहातु।
मग जालियां आंतु। बाहेरीं व्यापी।।१३-८०।।
तैसा पांचांहीं गांठीं पडे। जैं देहाकारु उघडे।
तैं नाचवी चहूंकडे। तो अहंकारु गां।।८१।।

(पुढे पहा,पृ.क्र.२८३)

(अ) संदर्भ: गीतारहस्य : लो. टिळकांनी निर्देशिलेले तत्त्वांचे वर्गीकरण

प्रकरण: विश्वाची उभारणी व संहारणी (२५ मूलतत्त्वांचे वर्गीकरण)

अनु.	सांख्यांचे वर्गीकरण व तत्त्वे		वेदांत्यांचे वर्गीकरण	गीतेचे वर्गीकरण
१.	**न प्रकृति न विकृति**	१ पुरुष	परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप	पराप्रकृति
२.	**मूल प्रकृति**	१ प्रकृति	परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप	अपरा प्रकृति
३.	**प्रकृति-विकृति**	१ महान, १ अहंकार, ५ तन्मात्रे	परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप	अपरा प्रकृतीचे आठ प्रकार (अष्टधा भाग)
४.	**१६ विकार**	१मन, ५बुद्धिंद्रिये ५कर्मेंद्रिये, ५ महाभूते	विकार म्हणून वेदांती या सोळा तत्त्वांना मूलतत्त्वात गणीत नाहीत.	विकार म्हणून गीता या पंधरा तत्त्वांची गणना मूलतत्त्वात करत नाही.

(ब) पुनर्वर्गीकरण

अनु.	सांख्यांचे वर्गीकरण व तत्त्वे		वेदांत्यांचे वर्गीकरण	गीतेचे वर्गीकरण (तेरावा अध्याय लक्षात घेऊन)
१.	**न प्रकृति न विकृति**	पुरुष	परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप	परतत्त्व, परब्रह्म,ब्रह्म, आत्मा इ.नांवांनी संबोधित श्रेष्ठ तत्त्व
२.	**मूल प्रकृति**	प्रकृति	परब्रह्माव्यतिरिक्त इतर स्तर मान्य नाहीत	परा प्रकृति वा जीव वा अव्यक्त
३.	**प्रकृति-विकृति**	महान, अहंकार, पंचतन्मात्रे	-	अपरा प्रकृति व तिचे अष्टधा भाग (मन, बुद्धि, अहंकार व पंचमहाभूते) (व्यक्त)
४.	**१६ विकार**	मन, ५बुद्धिंद्रिये ५कर्मेंद्रिये, ५ महाभूते	-	दशेंद्रिये व त्यांचे दश विषय, इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, चेतना, धृति व जड देहरूपाने व्यक्त होणारा संघात

टीप: मा.स्व.पूज्य लो.टिळकांनी केलेल्या गीतारहस्यातील, तसेच श्री.ज.स.करंदीकरादी मान्यवरांच्या तत्संबंधित विचारांना गौणत्व देण्याचा उद्देश नसून श्रीज्ञानदेवांच्या विचारांचे रसग्रहण करणे व त्या दृष्टीने हा विषय मांडणे हाच या पुनर्वर्गीकरणामागचा खरा उद्देश आहे, हे जिज्ञासू व सन्माननीय टिळकभक्तांनी ध्यानात ठेवावे, ही विनंती. स्वत: लेखकही कट्टर टिळकभक्तच आहे. हा गीतेतील तत्त्वज्ञानाचा प्रांत आहे. त्यातील चर्चेत प.पू.स्व.लो.टिळकांच्या भक्तीचा वस्तुत: काहीही संबंध येत नाही, अशी प्रस्तुत लेखकाची धारणा आहे. त्यातूनही कोणाला हे विचार पटत नसतील, तर त्यांनी ते अपरिपक्व म्हणून सोडून द्यावे, ही नम्र विनंती.

विश्वव्यापार

(पृ.क्र.२८१वरून पुढे सुरू)

नवल अहंकाराची गोठी। विशेषें न लगे अज्ञानापाठीं।
सज्ञानांचें झोंबे कंठीं। नाना संकटीं नाचवीं।।८२।।

"ज्याप्रमाणे हाडीज्वर शरीरधातूंमध्ये छिद्ररूपाने राहतो व अपथ्य केल्याबरोबर शरीराला आतबाहेरून सर्वतया व्यापून टाकत प्रकट होतो, अगदी त्याचप्रमाणे जेव्हा पंचमहाभूते एकत्र येऊन देहाकार प्रकट करतात, त्यावेळी अहंकारसुद्धा आपले अस्तित्व प्रकट करतो आणि देहाला आपल्या इशाऱ्यावर सगळीकडे नाचायला लावतो. या अहंकाराचे एक नवल आहे. हा अज्ञानी जीवांना विशेष त्रास देत नाही. पण सज्ञान जीवांना मात्र गळफांस घालून नाना संकटी पाडतो."

सज्ञान कोण

असा हा जो ***अहंकार*** वर्णिला आहे, तो सर्व शरीरींना व्यापून आहे. मात्र ज्या जीवांना ब्रह्माची लालसा उत्पन्न होते व त्याच्या प्राप्तीकरता जे ***"अहं ब्रह्माऽस्मि"*** चा वा तत्सम महावाक्यांचा घोष करत बसतात, त्यांच्यामात्र पाठीमागचा हा अहंकार सुटत नाही. अशांनाच या ओवीत *(१३-८२)* ***सज्ञान*** म्हटले आहे. तो त्यांना जन्ममरणरूपी संकटात लोटतो.

येथे ***सज्ञान*** म्हणजे स्वसामर्थ्यावर किंवा आपल्या बाहुबलावर विश्वासून *सातव्या* अध्यायात म्हटल्याप्रमाणे ***"स्वयंबुद्धिचां बाहीं रिगाले"*** वा ***"जाणिवेचां डोहीं। गर्वेंचि गिळिलें"*** अशा **परोक्ष**ज्ञान्यांचा निर्देश केलेला समजावा लागतो. अन्यथा ***सज्ञान*** म्हणजे ज्ञानवान ***(अपरोक्ष ज्ञानी)*** असा अर्थ केला तर मुक्त पुरुषांना अहंकार जन्ममृत्यूच्या संकटी नाचवितो, असे होईल आणि तसे म्हणणे योग्य ठरणार नाही.

गुरुपदेशाने कृतार्थ झालेल्या शिष्यास मात्र हा ***अहंकार*** बाधत नाही, हेही जिज्ञासूंच्या ध्यानी आणून देणे भाग आहे. असो.

आता इतर मूलतत्त्वे पाहू याः

बुद्धि

आतां बुद्धि जैं म्हणिजे। तैं ऐसा चिह्नीं जाणिजे।
बोलिलें यदुराजें। तैं आइकें सांगो।।१३-८३।।
तऱ्हीं कंदर्पाचेनि बलें। इंद्रियें वृत्तीचेनि मेलें।
विभांडूनि येती पालें। विषयांचें।।८४।।
तो सुखदुःखांचा नागोवा। जेथ उगाणों लागे जीवा।
तेथ दोहींसिही बरवा। पाडु जैं धरी।।८५।।
हे सुख हे दुःख। हे पुण्य हे दोख।
कां हे मैल हे चोख। ऐसें निवडी।।८६।।
जियें अधमोत्तम सूझें। जियें सानेथोर बुझें।
जियां दिठीं पारखिजे। विषयों जीवें।।८७।।

"आता बुद्धी कशाला म्हणावे व तिची लक्षणे कोणती, ते ऐक! कामाकार चित्तवृत्ती व इंद्रिये यांच्या साहचर्याने जे विषयांचे समुदाय गोळा होतात, त्यांचा सारासार विचार करून चांगले काय, वाईट काय, सुख व दुःख, पाप व पुण्य, यांची निवड करणारी, जिला स्तुत्य काय व निंद्य काय ते समजते; जी लहानथोर असा भेद ओळखते; जिच्याद्वारे जीव भोग्य व त्याज्य अशी विषयांची पारख करू शकतो;" आणि

जैं तेजतत्त्वाची आदि। जैं सत्त्वगुणाची वृद्धि।
जैं आत्मयां जीवाची संधी। बसवीत असे।।८८।।
अर्जुना तैं गां जाण। बुद्धि तूं संपूर्ण।.....।।८९।।

"जी तैजसाचे उत्पत्तिस्थान आहे व जिच्यापासून सत्त्वगुण वर्धमान होतो; जी जीव व आत्मा यांच्यातील सीमारेषा आखून देते; तिला, हे अर्जुना! बुद्धी असे म्हणतात," असे यदुराज श्रीकृष्ण सांगते झाले. बुद्धी म्हणजे काय, हे आपण या ओव्यातून पाहिले.

(गीतारहस्यातील) ब्रह्मांडाचा वंशवृक्ष (सांख्यमतानुसारी)

ब्रह्मांडाचा वंशवृक्ष
- पुरुष
- प्रकृति (अव्यक्त व सूक्ष्म)
  - महान किंवा बुद्धी (व्यक्त व सूक्ष्म)
    - अहंकार किंवा तैजस (व्यक्त व सूक्ष्म)
      - सात्त्विक सृष्टी (म्हणजे व्यक्त व सूक्ष्म इंद्रिये)
        - पाच बुद्धिंद्रिये
        - पाच कर्मेंद्रिये
        - मन
      - तामस सृष्टी (म्हणजे निरिंद्रियसृष्टी)
        - तामस म्हणजे निरिंद्रिय सृष्टी
          - पंच तन्मात्रे (सूक्ष्म)
            - विशेष किंवा पंच महाभूते (स्थूल)

या ठिकाणी वर दिलेला *(पृ.क्र.२८१)* पू.स्व.लो.टिळकांनी सांख्यमतानुसार गीतारहस्यात दर्शविलेला ब्रह्मांडाचा वंशवृक्ष ध्यानी घेणे योग्य ठरेल. सांख्य तत्त्वज्ञानी तत्त्वांचा जो सर्जनक्रम दाखवितात, त्याला अनुसरून हा दिला आहे.

यापूर्वीच आपण अहंकाराचे स्वरूप पाहिले. ***अहंकार*** हा बुद्धीपासून निर्मित होतो, तसेच ***सात्त्विक सृष्टी*** म्हणजे दशेंद्रिये व मन यांची

उत्पत्ती अहंकारानंतरची असल्याचे दिसून येते व हेच ज्ञानदेवांनीही वरील ओव्यातून बुद्धीच्या संदर्भात सांगितले आहे.

या ठिकाणी ***तेजतत्त्वाची आदि***मध्ये ***तेज*** या महाभूताचा उल्लेख नसून तो ***तैजस*** म्हणजे ***अहंकार*** या तत्त्वाचा उल्लेख समजला पाहिजे. त्याचप्रमाणे ***अव्यक्त*** *वा* ***प्रकृति****, तसेच* ***पुरुष*** *मिळून जो* ***जीवभाव*** *प्राप्त होण्याआधीचा आत्म्याचा आविष्कार आहे, त्याच्या व तदनंतरच्या अहंकार आणि जीवभावाच्या आविष्कार या दोन्हींच्या संधिस्थानी वा सीमारेषेवर हे बुद्धितत्त्व आहे, असे जे ज्ञानदेवांचे म्हणणे आहे, तेसुद्धा उपरोक्त तत्त्वावरून सहजच स्पष्ट होते.*

वाचक व जिज्ञासूंना आता जी चर्चा आपण करत आहोत, त्यासंबंधी एक अत्यंत महत्त्वाची सूचना आहे. ती म्हणजे क्षेत्रवर्णनानिमित्त आपण ज्या गीता *श्लोक क्र. १३-५ व ६* यांवरील ज्ञानदेवांच्या ओव्या पाहण्यास सुरुवात केली आहे, त्या पंथराजातील लययोगाच्या दृष्टीने अतीव महत्त्वाच्या आहेत. तत्त्वांचा लय नीट कळण्यासाठी त्यांचे स्वरूप निश्चित कळणे आवश्यक आहे, हे जिज्ञासूंनी ध्यानी ठेवले पाहिजे.

बुद्धि व अहंकार यांचे अर्थ

लययोग साधतांनासुद्धा साधकास विश्वनिर्मितीच्या या क्रमाच्या उलट्या क्रमाने म्हणजे ***पंचमहाभूते व दशेंद्रिये, मन*** इ.पासून ***अहंकार ते बुद्धी*** व त्यापलीकडे अशाच क्रमाने जावे लागते, हे पण जिज्ञासूंनी येथे ध्यानी घेण्यासारखे आहे. ज्ञानदेवांनीही **पंथराज**ात हाच लयक्रम *(पतञ्जलींचा प्रतिप्रसवक्रम)* प्रकटविला आहे. तसेच ज्ञानदेवीत कित्येक ठिकाणी ***बुद्धी व अहंकार*** यांचे जे उल्लेख आहेत, तेथे संदर्भ तसा असल्यास, या शब्दांचे हेच अर्थ अभिप्रेत धरल्यास विषय आकलनास बरीच मदत होत असल्याचे जाणवून येते. असो.

अव्यक्त

यानंतर ***अव्यक्त*** म्हणजे काय हे निर्देशितांना ज्ञानदेव एक महत्त्वाचे विधान करतात.ते असे:

.......। आतां आइकें वोलखण। अव्यक्ताची।।१३-८९।।
पैं सांख्यांच्या सिद्धांतीं। प्रकृति जैं महामती।
तैंचि एथ प्रस्तुतीं। अव्यक्त गां।।१३-९०।।
आणि सांख्य योग मतें। प्रकृति परिसविलीं तूंतैं।
ऐसीं दोनीं परी जेथें। विवंचिली।।९१।।
तेथ दुजी जैं जीवदशा। तियें नांव वीरेशा।
येथ अव्यक्तो ऐसा। पर्यावो हा।।९२।।

याप्रमाणे अव्यक्ताचे रूप व्यक्तवतांना ज्ञानदेव मोठीच बहार करतात व आपण यानिमित्त मागे जो प्रकृतीच्या स्वरूपाचा विषय गीतारहस्यातील तत्त्वाबाबत चर्चिला होता, त्याची परिसमाप्ती ज्ञानदेवांच्या या ***अव्यक्त***निर्देशनपर ओव्यांद्वारे होते. ते स्पष्टपणे सांगतात की:

"सांख्यमतानुसार जिला ***प्रकृति*** असे म्हणतात, तिलाच येथे ***अव्यक्त*** म्हटले आहे; तसेच मागे*(सातव्या अध्यायात)* निरूपण करतांना सांख्य व योगमते प्रकृतीचे अष्टधा स्वरूपाने ***अपरा*** व दुसरी ***परा*** अशा दोन प्रकृतींचे वर्णन केले होते, त्यातील दुसरी म्हणजे ***परा*** किंवा जीवरूपा जी प्रकृति, तिचेच, हे वीरमणे! येथे ***अव्यक्त*** असे पर्यायवाची नाम आहे."

तऱ्हीं पाहालियां रजनी। तारा लोपती गगनीं।
कां हारपे अस्तमानीं। भूतक्रिया।।१३-९३।।
ना तऱ्हीं देहो गेलियां पाठीं। देहादिक किरीटी।
उपाधि लपे पोटीं। कृतकर्माचां।।९४।।
कां बीजमुद्रेआंतु। थोके तरु समस्तु।
कां वस्त्रपण तंतु-। दशें राहे।।९५।।
तैसें सांडौनियां स्थूलधर्म। महाभूतें भूतग्राम।
लया जाती सूक्ष्म। होऊनि जेथ।।९६।।
अर्जुना तेयां नांवें। अव्यक्त हे जाणावें।...।।९७।।

"पहाट फुटल्यावर रात्रीच्या तारका जशा गगनात लोप पावतात; किंवा सूर्यास्त झाल्यावर भूतमात्रांचे व्यापार जसे थांबतात; अथवा देहांतरी वासना जशी कृतकर्मांमध्ये लीन होऊन जाते, वासनादेहात सामावून जाते; जसा बीजामध्ये संपूर्ण वृक्ष दडून राहिलेला असतो; किंवा तंतुदशेने जसे वस्त्रच अव्यक्त रूपात असते; त्याचप्रमाणे सर्व स्थूळ वा प्रकट स्थिती टाकून देऊन, इंद्रिय-मन-अहंकार-बुद्धी इ.चा महाभूतांसह लय करून जीवदशा ज्या सूक्ष्मावस्थेत राहते, तिलाच, हे अर्जुना! ***अव्यक्त*** असे नांव आहे."

इंद्रिये

यानंतर इंद्रियादींचे वर्णन येते.

......।आतां आईकें आघवें। इंद्रियभेद।।१३-९७।।
तऱ्हीं श्रवण नयन। त्वचा घ्राण रसन।
इयें जाणें ज्ञान-। करणें पांचैं।।९८।।
इयें तत्त्वमेलापंकीं। सुखदुःखाची उखिविखी।
बुद्धि करितें मुखीं। पांचैं इहीं।।९९।।
मग वाचा आणि कर। चरण आणि अधोद्वार।
पायु हे प्रकार। पांच आणिक।।१००।।
कर्मेंद्रियें म्हणिपती। तीं इयें जाणिजती।
आइकें कैवल्यपती। सांगतसें।।१०१।।
पैं प्राणांची आंतोरी। क्रियाशक्ती जैं शरीरीं।
तियेचि रिगीं निगीं द्वारीं। पांचैं इहीं।।१०२।।
एवं दाहाही करणें। सांगितली देवो म्हणें।.....।।१०३।।

"कान, नाक, डोळे, त्वचा व जीभ ही पाच ***ज्ञानेंद्रिये*** होत. यांच्याद्वारे श्रवण, गंध, दर्शन, स्पर्शन व रसज्ञान होते. छत्तीस तत्त्वांच्या चिखलात अडकलेल्या जीवाच्या सुखदुःखाचा निर्णय याच पाचांच्याद्वारे बुद्धी करते. ***वाचा, कर, चरण, गुद व उपस्थ*** ही

आणखी पाच ***कर्मेंद्रिये*** म्हणून ओळखली जातात," असे कैवल्यपती श्रीकृष्ण सांगतात.

"पंचप्राणांची स्त्री जी ***क्रियाशक्ती*** म्हणून आहे, ती याच पाच कर्मेंद्रियांद्वारे शरीराच्या आतबाहेर वावरते.." याप्रमाणे देव म्हणाले की "अर्जुना! तुला ही दशेंद्रिये सांगितली." श्रीकृष्ण म्हणतात:"आता मन म्हणजे काय ते ऐक."

मनाचे महत्त्वाचे स्थान::::

मन

मन हे इंद्रिये आणि बुद्धीच्या संधिस्थानी, तसेच बुद्धीच्या बाहेर व अहंकारावरील स्थानी असते. द्वैत वा अविद्या ही याच्यायोगेच भासतात. हे वायुतत्त्वाचे अंतर व रजोगुणाच्या शाखेवर आहे. तेच प्रवृत्तीला वीते; संकल्प विकल्प करते; बुद्धिद्वार त्याने झाकून टाकलेले आहे, असा आशय ज्ञानदेव व्यक्त करतात, त्या ओव्या अशा:

....। परिस आतां फुडें। मन तैं ऐसें।।१३-१०३।।
जैं इंद्रिया आणि बुद्धि। माझारिलियें संधी।
रजोगुणाचां खांदीं। तरलत असे।।१०४।।
नीलिमा अंबरीं। कां मृगतृष्णा लहरी।
तैसें वायांचि फरारी। वावो जाहलें।।१०५।।
आणि शुक्रशोणिताचां सांधा। मिलतां पांचांचां बांधा।
वायुतत्त्व दशधा। एकचि जालें।।१०६।।
मग तिहीं दाहीं भागीं। देहधर्माचां खेवंगीं।
अधिष्ठिलें आंगीं। आपुलालां।।१०७।।

"मन हे इंद्रिये आणि बुद्धीच्या संधिस्थानी व रजोगुणाच्या फांदीवर तरळत असते. नभाचा नीलिमा वा मृगजळावरील लाटा जशा निव्वळ आभासात्मक असतात; तसेच हे मन मुळात नसते, तरीही भासते. शुक्र व रजाच्या मिलनातून पंचमहाभूतात्मक देह उत्पत्तीस येतो व त्यात पंचप्राण व पंच उपप्राण अशा निर्मितीने एकाच वायुतत्त्वाची दहा विभागात वाटणी होते. ते दशप्राण देहधर्मानुसार शरीरांच्या ठराविक ठिकाणी राहतात."

तेथ चांचल्य निखल। एकलें ठेलें निढाल।
म्हणौनि रजाचें बल। धरिलें तेणें।।१३-१०८।।
तैं बुद्धीसीं बाहेरीं। अहंकाराचियें उरावरी।
ऐसां ठायीं माझारीं। बलियावलें।।१०९।।
वायां मन हे नांव। येऱ्हवीं कल्पनाचि सावेव।
जेयाचेनि संगे जीव-। दशा वस्तू।।११०।।

"वायुतत्त्वाचा केवळ गाभाच असे मूर्तिमंत चांचल्य असलेले हे मन त्यामुळे एकटे पडले व त्याने रजोगुणाचा आश्रय केला. ते बुद्धीच्या बाहेर व अहंकाराच्या वर म्हणजे त्या दोघांच्या मधल्या जागेत बलवान होऊन बसले. याला मन हे नांवसुद्धा खरे तर देऊ नये. कारण हे म्हणजे ब्रह्मवस्तूला जीवदशा प्राप्त करून देणारी ***"एकोऽहं, बहुस्याम:"*** अशी वास्तविकत: मूर्तिमंत संकल्पनाच आहे. किंबहुना मनाच्या संगतीनेच ब्रह्मवस्तूला जीवदशा प्राप्त होते."

जैं प्रवृत्तीसीं मूल। कामां जेयाचें बल।
जैं अखंड सूयें छल। अहंकारासि।।१३-१११।।
जैं इच्छेतैं वाढवी। आशेंतैं चढवी।
जैं पाठ पुरवी। भयासि गां।।११२।।
द्वैत जेथ उठी। अविद्या जेणें लाठी।
जैं इंद्रियांतैं लोटी। विषयांमाजीं।।११३।।
संकल्पें सृष्टी घडी। सवेंचि विकल्पेनि मोडी।
मनोरथाचियां उतरंडी। उतरी रची।।११४।।
जैं भुलीचें कुहर। वायुतत्त्वाचे आंतर।
बुद्धीचें द्वार। झांकविलेच जेणें।।११५।।
तैं गां किरीटी मन। ययां बोलां नाहीं आन।...।।११६।।

"प्रवृत्तीचे उगमस्थान; कामाचे बळ वा प्रेरक; अहंकारास सतत चेतवणारे; इच्छेला पोसून दांडगे करणारे; आशेचे इमले चढवणारे; प्रपंचरूपाने जीवास जे भय भेडसावत असते, त्याचा नित्य पाठपुरावा करणारे; ज्याच्यायोगे द्वैत भासते ते; अविद्येला दृढ करणारे; इंद्रियांना विषयांमध्ये वाहवून टाकणारे; सृष्टी आहे असा ज्याने संकल्प केला की सृष्टी निर्माण होते व ती नाही अशी विकल्पात्मक संकल्पना त्याने केली असता सृष्टीचा लय होतो, असे; मनोरथांच्या उतरंडीमागून उतरंडी रचणारे व त्या मोडूनही टाकणारे; मायाभ्रमाची काळोखी गुंफाच असे जे, वायुतत्त्वाचा गाभा वा पिंडरूप असणारे; ज्याने बुद्धीचे द्वार बुजवून बंद केले आहे; त्यालाच, हे अर्जुना! ***मन*** अशी संज्ञा आहे."

मनाचे स्वरूप

क्षेत्रनिरूपणाच्या निमित्ताने ज्ञानदेव जी छत्तीस तत्त्वांची उकल आपणाला सांगत आहेत, त्यातील ***मन*** हे तत्त्व खरे तर अत्यंत महत्त्वाचे आहे. मन नसता केवळ इतर तत्त्वे म्हणजे जगत नव्हेच! जगताची - या विश्वाच्या अफाट पसाऱ्याची रचना केवळ मनामुळे झालेली आहे; इतके त्याचे अमाप महत्त्व आहे.

सृष्टीचा रचयिता ***ब्रह्मा*** हा वास्तविकत: ***आदिमन***च आहे असे समजण्यास प्रत्यवाय नसावा.त्याच्याच संकल्पामुळे सृष्टी निर्माण झाली. आपण मागे जो गीतारहस्यनिर्दिष्ट ***ब्रह्मांडाच्या वंशवृक्षा***चा विचार पाहिला, त्यापेक्षा ज्ञानदेव येथे काही फरक करत आहेत. कारण ते ***मन हे बुद्धी व इंद्रिये यांच्या संधिस्थानी, तसेच बुद्धीच्या बाहेर व अहंकाराच्या उरावर आहे,*** असे सांगतात.

गीतारहस्यनिर्दिष्ट तत्त्वानुसार विचार केला तर आपल्या लक्षात येईल की जी मनाव्यतिरिक्त पंच बुद्धिंद्रिये वा ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये वा सात्त्विक सृष्टीतील व्यक्त व सूक्ष्म इंद्रिये आहेत, त्यांच्या व निरिंद्रिय *(तामस)* सृष्टीतील पंचतन्मात्रा *(सूक्ष्म)* व स्थूल पंचमहाभूते यांच्याशी

महान वा बुद्धि, तसेच ***अहंकार वा तैजस*** यांचा दुवा सांधणारे मन हे :

१) सात्त्विक सृष्टीतील प्रमुख इंद्रिय म्हणावे तर इंद्रिय;

२) सात्त्विक व तामस सृष्टीचे रचयिते म्हणावे तर तसे;

३) म्हटल्यास अव्यक्त व सूक्ष्म प्रकृतीपासून सृजलेले व महान व बुद्धितत्त्वापलीकडील, म्हणजे त्यावरचे वा अगोदरचे;

४) तसेच अहंकारापलीकडील म्हणजे त्याअगोदरचे व

५) आदिसंकल्प करणारे समजल्यास पुरुष व प्रकृति यांच्या सांध्यावरीलसुद्धा समजता येईल!!!

या कल्पनांचा आढावा घेऊन मनाची ही पाच अवस्थांतरे लक्षात घेऊन पुढील सुधारित तक्ता तयार केला आहे. तो जिज्ञासूंनी जरूर अभ्यासावा व त्यामागचा गूढ अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करावा, अशी विनंती आहे. असो.

मन व सुधारित ब्रह्मांडवृक्ष

ब्रह्मांडाचा वंशवृक्ष

पुरुष + (आदि)मन (आदिसंकल्प करणारे) + प्रकृति (अव्यक्त व सूक्ष्म)

↓

मन + महान किंवा बुद्धी (व्यक्त व सूक्ष्म)

मन +अहंकार किंवा तैजस (व्यक्त व सूक्ष्म)

मन +

सात्त्विक सृष्टी (म्हणजे व्यक्त व सूक्ष्म इंद्रिये) — पाच बुद्धिंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, मन

तामस सृष्टी (म्हणजे निरिंद्रियसृष्टी) — पंच तन्मात्रे (सूक्ष्म) — विशेष किंवा पंच महाभूते (स्थूल)

मन व योगविद्या

या प्रतीकरूप वृक्षरचनेचा विचार केला तर आकळून येते की आदिसंकल्प करून विश्वाच्या ***"एकोऽहं, बहुस्यामः"*** याप्रमाणे सर्जन व विस्तारास कारणीभूत असणारे ***आदिमन*** हे पुनः वेगवेगळ्या स्तरांवर प्रकटत असते.*(मन +बुद्धी), (मन +अहंकार), (मन + सात्त्विक सृष्टी + तामस सृष्टी);* या पातळ्यांवरही मनच कार्यप्रवण असल्याचे जाणवते.

जे मन विश्वाचे अशा प्रकारे सर्जन व विस्तार करते, तेच मन त्या विश्वाचा संहार वा लय करण्यास कारण असते. त्यानुसारच सृष्टीचा अहंकारात, अहंकाराचा बुद्धीत व बुद्धीचा पुरुष-प्रकृतीत लय संभवतो. तसेच ***पुरुष -प्रकृति*** या द्वयीचा लयसुद्धा ब्रह्मात करण्यास मनाचेच सामर्थ्य प्रत्ययकारी ठरते. अर्थात हे सांख्यसिद्धांतास मुरड घालूनच म्हणता येते. कारण सांख्यमते ***पुरुष व प्रकृति*** ही अंतिम अनादि तत्त्वे होत. त्यांचा ***ब्रह्म*** संकल्पनेशी कोणताही मेळ नाही. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी एवढे वगळून सांख्य तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्याचे सर्वज्ञातच आहे. असो.

या महालयाच्या धर्तीवरच जेव्हा योगी ***लय*** साध्य करून पिण्डाची ब्रह्मांडात एकत्रीकरणाची योगक्रिया साध्य करतो, तेव्हा सर्वानुमते असाच क्रम लयासाठी वैयक्तिक पातळीवर वापरला जातो. हे विवेचन अर्थातच ***पुरुष-प्रकृति*** या संकल्पनेसापेक्ष केलेले आहे.

श्रीज्ञानदेव जेव्हा***पंथराज***वर्णन करतात, तेव्हा कुंडलिनीशक्तीच्या आधारे पिण्डाचा ब्रह्मांडात लय करण्याची क्रिया हठयोग प्रतिपादित चक्रे, नाड्या, बंधत्रय इ.द्वारे तो कसा होतो, हे सांगतात. त्यांच्याही मतात हा लययोग साधण्यासाठी ***"मनाचा पटु फाटणे (५-१५६)"*** आवश्यक आहे. उन्मन अवस्थेत मन प्रवेशल्यानेच ही क्रिया साध्य होते. थोडक्यात मनाचे मनपण नष्ट झाल्यानेच आण्विक व वैश्विक या दोन्ही पातळ्यांवर पुनः निराकार अशी ब्रह्मावस्था वा ब्रह्मतादात्म्य ही स्थिती प्राप्त होते.

म्हणूनच जाणकारांनीसुद्धा ***"मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः"*** असे म्हटले आहे. इतके सामर्थ्य ज्याच्याठायी आहे; संपूर्ण विश्वाशी जे समरस झालेले आहे; त्या मनाचा विचार आपणांस गीता-ज्ञानेश्वरी अभ्यासतांना कधीच नजरेआड करून चालणार नाही.

संपूर्ण योगधारा ही मन व त्याची संकल्पविकल्पात्मक शक्ती यांच्याशी पूर्णतया संबंधित असून मनाचे *अमनी* अवस्थेत रूपांतर करण्यासाठी उपयोजलेली असते, हे जिज्ञासूंनी ठामपणे जाणून घेऊनच या गीता -ज्ञानेश्वरीसारख्या योगपर ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे; अन्यथा तो करता येत नाही; इतके ***मन*** या संकल्पनेचे महत्त्व आहे.

अहंकार वा अंतःकरणचतुष्टय

विश्वाचा पट विणाऱ्या मनाचे संनियमन व उदात्तीकरण केल्यास व्यक्ती योगी बनू शकते. अहंकाराचे जे व्यक्तिगत पातळीवरील

अंतःकरण, चित्त, मन व बुद्धि असे चतुर्विध विभाग कल्पिले जातात, त्यातील प्रत्येक विभागावर धारणा करून योगाची एक एक विशिष्ट प्रणाली सिद्ध होते. ***अंतःकरण* हे भक्तियोग, *चित्त* हे पातञ्जलयोग, *मन* हे राजयोग व *बुद्धि* हे ज्ञानयोग या प्रणाल्यांना पायाभूत असणारे अहंकाराचे उपविभाग आहेत.** हे उपविभाग ***व्यष्टी*** या पातळीवरचे योगनिर्देशानुरूप समजावयाचे आहेत. असो.

क्षेत्रवर्णन (२)::::

ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांचे पंच पंच विषय

यानंतर विषयाभिधानभेदु सांगतांना श्रीज्ञानदेव म्हणतातः

......। आतां विषयाभिधान। भेदु आईकें।।१३-११६।।
तऱ्हीं स्पर्शु आणि शब्दु। रूपु रसु गंधु।
हा विषयो पंचविधु। ज्ञानेंद्रियांचां।।११७।।
इहींचि पांचैं द्वारीं। ज्ञानासीं धांवु बाहेरीं।
जैसा कां हिरवें चारीं। भांबावें पशु।।११८।।

"तरी त्वचेचा स्पर्श, श्रोत्रेंद्रियांचा ध्वनि वा शब्द, चक्षूंचा रूप वा दृश्य, रसनेचा रस वा चव वा स्वाद, आणि घ्राणेंद्रियाचा गंध वा वास घेणे; असे पंच ज्ञानेंद्रियांचे पंच विषय होत. याच पंचद्वारांनी जाणीव समस्त जगाकडे, एखाद्या पशूने हिरव्यागार चाऱ्याकडे धाव घ्यावी, तशी धाव घेत असते व त्या जीवास विश्वमोहिनीची भुरळ पडते."

मग स्वर वर्णु विसर्गु। अथवा स्वीकार त्यागु।
चंक्रमण उत्सर्गु। विण्मूत्राचां।।१३-११९।।
हे कर्मेंद्रियाचें पांच। विषय गां सांच।
जैं बांधौनियां माच। क्रिया धांवे।।१२०।।
ऐसें हे दाहीं। विषय इयें देहीं।....।।१२१।।

"त्याचप्रमाणे मुखावाटे बोलणे - स्वर, वर्ण व विसर्ग यांचा उच्चार करणे; हातांद्वारे देण्याघेण्याची, स्वीकार-त्यागाची क्रिया करणे; पायां द्वारे चालणे-क्रमण करणे; उपस्थाने मूत्राचा व गुददवारे मलाचा त्याग-उत्सर्ग करणे; हे पाच कर्मेंद्रियांचे पाच विषय होत. याच पंचपंच विषयांची शिडी उभारून जीवाची ***क्रियाशक्ती*** अंतराळात झेप घेऊ पाहते. अशा त्या क्रियाशक्तीला गगनही ठेंगणेच भासत असल्यास नवल ते काय! याप्रमाणे या देहरूपी क्षेत्रात हे दशविध विषय नांदत असतात."

इच्छा

आता इच्छा म्हणजे काय ते पहाः

......। आतां इच्छा तैंहीं। सांधिजैल।।१३-१२१।।
तऱ्हीं भूतलें आठवें। कां बोलें कानु झांकवें।
ऐसियावरी चेतवे। जैं गां वृत्ती।।१२२।।
इंद्रियांविषयांचियें भेटी-। सरिसीची वेगें उठी।
कामाची बाहुटी। धरूनियां।।१२३।।
जियेंचेनि उठिलेंपणें। मना सैंघ धांवणें।
न रिगावें तेथ करणें। तोंडें सुती।।१२४।।
जियें वृत्तीचियें आवडी। बुद्धी होय वेडी।
विषयां जेयां गोडी। तैं गां इच्छा।।१२५।।

इंद्रिये व त्यांचे विषय निर्देशिल्यावर ज्ञानदेव म्हणतातः "इंद्रिये व विषय यांची भेट होताक्षणींच चित्तात जी उर्मी कामाचा हात धरून वेगाने उत्पन्न होते; जिच्यामुळे मन सैरावैरा धावत सुटते व इंद्रिये नको तेथे तोंडे घालतात; पूर्वी उपभोगलेल्या विषयांच्या नुसत्या आठवणीने किंवा त्याबाबतच्या साध्या उल्लेखानेसुद्धा जी चेतून उठते; जिच्या संगतीने बुद्धी विचारभ्रष्ट, सारासारविवेकहीन होऊन विषयसुखाचा मागोवा घेत सुटते; त्या वृत्तीला ***इच्छा*** म्हणतात."

द्वेष

द्वेषाविषयीच्या ओव्या अशा आहेतः

आणि इच्छिलियां सांगडें। इंद्रियां आमिष ना जोडें।
तेथ जो डाओ पडे। तोचि द्वेषु।।१३-१२६।।

"आणि इच्छिल्याप्रमाणे इंद्रियांना मनोवांच्छित विषय न मिळाल्याने जी चित्तावस्था निर्माण होते, तिला ***द्वेष*** असे म्हणतात."

पातञ्जलयोगशास्त्रात*(२-७ व ८पा.यो.सू.)* जे ***राग-द्वेष*** म्हणून द्वंद्व सांगितले आहे, तेच हे ***इच्छा व द्वेष*** होत.

सुख व दुःख

सुख-दुःख हे द्वंद्व वर्णितांना ज्ञानदेव म्हणतातः

आतां ययावरी सुख। तैं एवंविध देख।
जेणें एकेंचि अशेख। विसरे जीवु।।१३-१२७।।
मना वाचें कायें। जैं आपुली आण वायें।
देहस्मृतीची त्रायें। मोडित जैं ये।।१२८।।
जेयाचेनि जालेपणें। पांगुला होईजे प्राणें।
सात्त्विकासी दुणें। वरीही लाभु।।१२९।।
कां आघवियांचि इंद्रियवृत्तीं। हृदयाचां एकांती।
थोपटौनि सुषुप्ती। आणि जैं गां।।१३०।।
किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे।
तेथ जैं होये। तेयां नाम सुख।।१३१।।

"सुख म्हणजे अशा प्रकारचे असते की ज्या एकाच्याचमुळे जीव इतर सर्व गोष्टी विसरून जातो. देह, मन व वाणी ज्याच्या पालनासाठी काहीही करण्यास बिचकत नाहीत; ज्याच्यायोगे मनुष्यास देहभान राहत नाही; जे उत्पन्न झाल्यावर प्राण पांगुळतात व स्तब्ध होतात; ज्याच्यायोगे सात्त्विकता दुणावते म्हणजे सत्त्वगुणाचा परमोत्कर्ष होऊन त्याची शुद्धसत्त्वगुणात परिणती होते; जे सर्व इंद्रियांच्या विषयासक्ती व विषयभोगवादी प्रवृत्तींना चुचकारून, हलकेच त्या सर्वांना हृदय परिसराच्या सुरम्य अन एकांत स्थळी, निःशब्द अशा माजघरात आणून पोहोचवते व तेथेच त्यांना हलकेहलके थोपटून निद्रा आणते; त्या अशा तत्त्वास व अशा प्रकारे जीवाचे आत्म्याशी मिलन करून देणारी जी अवस्था, तिला ***सुख*** म्हणतात."

आणि ऐसें जैं अवस्था। न जोडितां पार्था।
जीजें तैंचि सर्वथा। दु:ख जाणें।।१३-१३२।।
तैं मनोरथसंगें नव्हें। एऱ्हवीं सिद्धी गेलेंचि आहे।
हे दोनींचि उपायें। सुखदु:खासीं।।१३३।।

"जीवाला अशी स्वरूपस्थिती वा आत्मावस्थित स्थिती प्राप्त न होता, जे जीवन भोगावे लागते, त्यालाच ***दु:ख*** असे सार्थ नामाभिधान आहे. मन बेलगामपणे मनोरथ करते, त्यावेळी दु:ख निर्माण होते. ते जेव्हा मनोरथ करणे सोडून देऊन स्तब्ध राहते, स्थिरावते, तेव्हाच आपोआप स्वत:सिद्ध, स्वयमेव ***सुख*** प्रकटते. मनोरथसापेक्ष अशा या दोनच अवस्था सुखदु:खाचे कारण होत."

नाथसांप्रदायिक योग परिभाषा

सुख-दु:ख या द्वंद्वाचा परिचय करून देतांना आपणांस ज्ञानदेव स्पष्ट करतात की विषयोपभोगात जीव रममाण झाला असता जी देहविस्मृती होते व सुखाचा अल्पपरिचय होतो, ते जरी लौकिक अर्थाने ***सुख*** या सदरात मोडत असले तरीही खरे सुख नव्हे. तसेच मनोरथ भंग पावल्याने जे दु:ख होते, ते केवळ लौकिकार्थानेच होय. **ज्ञानदेवांच्या परिभाषेत व क्षेत्राच्या व्याप्तीत *सुख हा केवळ आत्माच होय.* जीवाची व शिवाची भेट होणे हेच खरे सुख होय ज्याला लौकिकात *आत्मसुख* अशी संज्ञा आहे.**

त्याविना मनोरथ करत विषयोपभोगात कालक्रमणा करणे अथवा मनोरथभंगाचे दु:ख भोगत जीवन कंठणे, या अवस्थेला ज्ञानदेव ***दु:ख*** असे म्हणतात. जीव जेव्हा देहाची, इंद्रियांची, वाचेची अन मनाची जाणीव विसरतो; जेव्हा चित्तात प्रक्षोभ निर्माण करणाऱ्या विषयांच्या वृत्ती स्तब्ध होतात; जेव्हा प्राण स्थिरावून सुषुम्नेत प्रवेश करतात; सुषुम्नामार्गे जेव्हा मन, प्राण व चित्त इंद्रियवृत्तींसह हृदयदेशात प्रवेशतात व तेथे स्तब्ध होऊन नाहीसे होतात वा लय पावतात; तेव्हाच जीवाचे शिवाशी मिलन होते व आत्मसुखाची अवस्था उदित होते.

आत्मसुख स्वत:सिद्धच असते. परंतु प्रपंचात वा जगतात जीव रममाण झाला असता त्याला आत्मसुखाचा विसर पडतो व अल्प लौकिकसुखालाच आत्मसुख म्हणून तो कवटाळून बसतो. त्यातूनच जीवामागे दु:खपरंपरा लागते व त्याचा जन्मजन्मांतराचा प्रदीर्घ प्रवास चालू राहतो. हे सर्व थांबवून खरे सुख प्राप्त करावयाचे असल्यास देहेंद्रियांच्या प्रवृत्ती शमवून त्यांना आत्म्याकडे वळवावे लागते. आणि हे साध्य करण्याची ज्ञानदेवांची प्रणाली म्हणजे जो योग, तो ***पंथराज*** या नावाने सुविख्यात आहे.

मागे सांगितल्याप्रमाणे ***नाथपंथाची*** जी ***योगधारा*** ज्ञानेशांपर्यंत प्रवर्तली होती, त्या योगप्रणालीचा परिचय नसलेल्यांना वरील सुख-दु:खदर्शनानिमित्ताने त्यांनी वापरलेले ***हृदय, प्राणांचे पांगुळणे, इंद्रियांना त्यांच्या वृत्तींसह हृदयाच्या एकांतात थोपटून नीज आणणे, सुषुप्ति,*** इ.संज्ञा कळणे कठीणच आहे. तरीही यानिमित्ताने झालेल्या त्यांच्या योगप्रणालीच्या परिभाषेच्या अल्पपरिचयाचा आस्वाद घेत आपण पुढे जाऊ या.

चेतना

चेतनेसंबंधी ज्ञानदेव म्हणतात:

आतां असंगा साक्षिभूता। देहीं चैतन्याची जैं सत्ता।
तियें नांव पांडुसुता। चेतना एथ।।१३-१३४।।
जैं नखौनि केशवरी। ऊभी जागे शरीरीं।
जैं तिहीं अवस्थांतरीं। पालटेना।।१३५।।
मनबुद्ध्यादी आघवी। जियेंचेनि टंवटंवी।
प्रकृतिवनमाधवी। सदांचि जैं।।१३६।।
जडाजडीं अंशीं। राहाटें जैं सरिसी।
तैं चेतना गां तुजसीं। लटिकें नाहीं।।१३७।।

"हे पांडुपुत्रा! या देहात आत्म्याची चैतन्यशक्ती असते. तिच्या सत्तेने देह रचला जातो, त्याचे भरणपोषण होते व तो चेतन होतो. तिला ***चेतना*** असे म्हटले जाते.नखशिखांत अशा शरीरावर तिचे आधिपत्य असते. ती सतत जागृत असते व स्वप्न, जाग्रत व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमुळे तिच्यात कोणताही बदल होत नाही. मन, बुद्धी, चित्त, अंत:करण, इंद्रिये इ.प्रकृतिसंघातवनात वसंतऋतूप्रमाणे जी टवटवी व बहर आणते व वसते; देहाच्या जड व अजड अशा दोन्ही अंशात, म्हणजे ***अहंकार, मन-बुद्धी-चित्त-अंत:करण*** या अजड व ***इंद्रिये-पंचतन्मात्रा-पंचमहाभूते*** या जड अंशांत, जी सारखीच राहाटते, तीच मुख्य तर *चेतना* होय."

पैं रावो परिवारु नेणें। आज्ञाचि परचक्रु जिणें।
कां चंद्राचेनि पूर्णपणें। सिंधु भरती।।१३-१३८।।
नाना भ्रामकाचें सन्निधान। लोहो करी सचेतन।
कां सूर्यसंगु जन। चेष्टवी गां।।१३९।।
अगां मुखमेळेंवीण। पिलियांचें पोषण।
करी निरीक्षण। कूर्मी जेवीं।।१४०।।
पार्था तियांपरी। आत्मसंगती इयें शरीरीं।
सजीवत्वाचां करी। उपेगु जडा।।१४१।।
मग तियेंतें चेतना। म्हणिपे पैं अर्जुना।....।।१४२।।

"राजा व सैन्य यांचा परस्परसंबंध न येताच केवळ त्याच्या आज्ञेनुसार सैन्याकरवी परचक्राचे निवारण केले जाते; किंवा पौर्णिमेचा चंद्र सोळा कलांनी युक्त झाला की त्याच्या पूर्णत्वानेच समुद्राला भरती येते; अथवा लोहचुंबकाच्या केवळ सांनिध्यमात्रे लोखंड आकर्षिले जाऊन हलू लागते; वा सूर्यप्रकाशात जग व्यवहार करू लागते; किंबहुना पिलांनी लुचल्याशिवायच कांसवी त्यांचे जसे आपल्या दृष्टीनेच भरण पोषण करते; अगदी तसेच जीवाची चेतनशक्ती या जडदेहात सजीवपणा वा जिवंतपणा आणते. या कारणाने तिला ***चेतना*** असे म्हणतात."

चेतना व कुंडलिनी शक्ती

यात्रमाणे **ब्रह्माची सत्ता म्हणून जशी *पराशक्ती* वा *जीव* आहे; त्याचप्रमाणे जीवाची सत्ता म्हणून *चैतन्यशक्ती* आहे.** जीव देहांतरीं असेतोवर देहात चेतना असते व जीव देह सोडून जातेवेळी तीसुद्धा त्याच्याबरोबरच देह सोडून जाते. हिलाच उपनिषदांत ***"सा वधुः सति"*** म्हणजे ***"जीवाची सहचरी सति"*** असे म्हटले आहे.

पंचप्राण, देहेंद्रिये, मनबुद्ध्यादी सर्व देहसंघातातील तत्त्वांवर हिचीच एकमात्र सत्ता असते. हिलाच यौगिक परिभाषेत ज्ञानदेवांनी ***प्राणांची आंतुरी*** म्हणजे ***प्राणांची सहचरी*** वा ***कुंडलिनी*** असे म्हटलेले जिज्ञासूंच्या त्वरित ध्यानात यावे.

छत्तीस तत्त्वांपैकी **अव्यक्त वा परासंबंधित जीवस्थितीनिदर्शक असे जे तत्त्व आहे, त्याचा व या *चेतना* या तत्त्वाचा संबंध अत्यंत घनिष्ट आहे.** जीवाचा देहाविष्कार हाः ***परब्रह्म -➤जीव -➤अव्यक्त -➤चेतना-➤संघात-➤देहधारणा*** या क्रमसोपानाद्वारे स्पष्ट होतो व त्याचप्रमाणे जेव्हा या देहींच विदेहावस्था - मोक्ष - जीवन्मुक्ती प्राप्त होते, तेव्हा हा क्रम लययोगाच्या निरूपणानुसारः ***देहसंघात -➤चेतनेची म्हणजे कुंडलिनीची प्रबुद्ध अवस्था-➤जीव व अव्यक्ताची परब्रह्मात मिळवणी:*** अशा योगसोपानाद्वारे उलटतो.

यालाच ***पिंडब्रह्मांड एक होणे; पदीं पद प्रवेशणे,*** इ.खास यौगिक परिभाषेत व्यक्तवले जाते. असो

धृति

आतां धृतिविवंचना-। भेदु आइक।।१३-१४२।।
तऱ्हीं तत्त्वां परस्परें। उघड जातिस्वभाव वैरें।
नव्हें पृथिवीतें नीरें। न नाशिजे।।१४३।।
नीरातें आटी तेज। तेजा वायुसीं जुंझ।
आणि गगन तंव सहज। वायु भक्षी।।१४४।।

"पंचमहाभूतांचे परस्परभिन्न गुणांनी उपजतच एकमेकांशी वैर आहे. जसे पाणी पृथ्वीतत्त्वाचा नाश करते. पाण्यात मृत्तिका कालवल्यास मृत्तिकेचा घनपणा हा गुण उरत नाही. तसेच प्रलयकाळी तर जलोदधीत संपूर्ण पृथ्वीच बुडून जाते. त्याच जलतत्त्वाचा तेजतत्त्व आटवून पूर्ण ऱ्हास करते. त्या अशा तेजतत्त्वाची मात्रा काही वायुतत्त्वापुढे चालत नाही. त्या दोघांचे परस्पर वैर आहे. आणि आकाशतत्त्व तर समस्त वायुतत्त्वाला संपूर्ण गिळून आपल्या जागी स्तब्ध राहते."

तेवींचि कोणेहीं वेळें। आपण कायिसयासही न मिळें।
आंत रिगौनि वेगळें। आकाश हे।।१३-१४५।।
ऐसीं पांचही भूतें। न साहती एकमेकांतैं।
कीं तिएंहीं ऐक्यातें। देहां येती।।१४६।।
द्वंद्वांची उखिविखी। सोडूनि वसती एकीं।
एक एकांतैं पोखी। निजगुणें गां।।१४७।।
न मिळें तेयां साजणें। चले धैर्यें जेणें।
तेयां नांव म्हणे। धृति मी गां।।१४८।।

"पुनः आकाशतत्त्व तर इतर कोणत्याही वस्तूच्या स्पर्शाने मळत नाही व त्या सर्वात राहूनही आपला वेगळेपणा व अलिप्तपणा अजिबात सोडत नाही. आकाशतत्त्व कशातही मिसळले तरी स्वरूपतः वेगळे - अलिप्तच राहते. अशी ही पंचमहाभूते जी एकमेकांना मुळीच साहत नाहीत व सदैव परस्परांशी असहिष्णु वृत्तीने जात्याच वागतात, त्यांनी एकमेकांना आधार देत एकमेकांचे संवर्धन करावे, हे नवल ज्यायोगे प्रवर्तते; त्यांचे ऐक्य ज्यायोगे होते; आपापसातला संघर्ष ज्यायोगे विसरून जाऊन ती पंचतत्त्वे देहात एकोप्याने वस्ती करतात; त्या परस्परांना स्थैर्यपूर्वक धारण करण्याला, मी ***धृति*** म्हणतो."

समारोप

याप्रमाणे आपण या ***उन्मेष क्र.१९-१*** च्या भागात ज्ञानेश्वरपुरस्कृत क्षेत्रवर्णनाच्या ***छत्तीस*** तत्त्वांच्या क्षेत्रातील पस्तीस तत्त्वांचा विचार केला. आता ***क्षेत्रज्ञ*** व उर्वरित ***क्षेत्रवर्णन*** म्हणजे छत्तीसावे तत्त्व ***संघात*** यांच्या विचारासाठी वळू या ***उन्मेष क्र.१९-२ - क्षेत्रक्षेत्रज्ञविचार-२*** याकडे. त्यात आपण सुरुवातीस आचार्यकृत ***पंचीकरण*** या ग्रंथाचा यथाशक्ती अभ्यास करणार आहोत. असो.

::उन्मेष::१९-२::
::क्षेत्रक्षेत्रज्ञविचार-२::

उन्मेष::१९-२

गीता:
१३:१२-१८
ज्ञानेश्वरी:
१३:१५०-१८३,८६४-९५१
सि.सि.प.:
१,२,४-६,२७,३६,४९-५४
पंचीकरण

विश्वव्यापार

::उन्मेष::१९-२::
::क्षेत्रक्षेत्रज्ञविचार-२::

पंचीकरण::::

उपोद्घात

मागील ***उन्मेष क्र.१९-१*** या विभागात आपण ***क्षेत्रक्षेत्रज्ञ*** विचाराचा पूर्वार्ध पाहिला. संघाताची ज्ञानेश्वरवर्णित *पस्तीस तत्त्वे* आपण त्यातून पाहिली. आता उर्वरित विभागाकडे म्हणजे ***संघात*** जे क्षेत्राचे छत्तिसावे तत्त्व आहे व ***क्षेत्रज्ञविभाग*** यांच्याकडे वळू या. तत्पूर्वी या क्षेत्रविषयाचे आद्यश्रीमच्छंकराचार्यकृत ***पंचीकरण*** या ग्रंथातून येणारे संकलन पाहू या:

पंचमहाभूते देहात कशा प्रकारे एकमेकात मिसळतात व देह धारण करतात, हे ***पंचीकरण*** प्रकरणग्रंथ वाचल्यास स्पष्ट कळण्यास मदत होते. ज्याप्रमाणे ***पंचीकरण*** हा वेदांत्यांचा प्रमाणग्रंथ आहे, तसाच नाथसांप्रदायिकांचा ***सिद्धसिद्धांतपद्धति*** हाही एतद्विषयक प्रमाणग्रंथ आहे, याचा पूर्वी उल्लेख केलेला जिज्ञासूंना स्मरतच असेल. पंचमहाभूते देहात कशा प्रकारे असतात, याचे जमेल तितके अवलोकन या दोन्ही ग्रंथांद्वारे करणे सद्य:प्रसंगी उचित ठरेल. तर वळू या त्याकडे!

पंचीकरण: श्रीमद् आद्यशंकराचार्यांचा प्रकरणग्रंथ

या ग्रंथानुरूप तयार केलेले पुढील कोष्टक पाहू या. देह हा पंचमहाभूतांचा बनलेला आहे. प्रत्येक महाभूताची पाचपाच तत्त्वे यात दर्शविलेली आहेत.

पंचीकरण - कोष्टक क्र.१

आकाश	वायू	तेज	आप	पृथ्वी	पंचमहाभूते
काम	चलन	क्षुधा	शुक्र	अस्थी	**तत्त्व क्र.१**
क्रोध	वलन	तृषा	शोणित	मांस	**तत्त्व क्र.२**
शोक	धावन	आलस्य	लाला	त्वचा	**तत्त्व क्र.३**
मोह	प्रसरण	निद्रा	मूत्र	नाडी	**तत्त्व क्र.४**
भय	आकुंचन	कांति	स्वेद	रोग	**तत्त्व क्र.५**

१)आकाश, २) वायू ,३) तेज, ४) आप व ५) पृथ्वी या पंचमहाभूतांपासून स्थूलदेह उत्पन्न होतो. त्या त्या पंचमहाभूतांच्या गुणधर्मानुसार वरील कोष्टकात दर्शविलेली समान धर्माची पंचतत्त्वे प्रसारण होतात. स्थूल देहात वसणारी पंचमहाभूते एकमेकांपासून पूर्णतया भिन्न नसतात, तर विशिष्ट प्रमाणात त्यांच्या एकमेकात झालेल्या मिश्रणातील त्या त्या महाभूताच्या आधिक्यानुसार त्यांना वर दिलेले स्थान आहे.

जसे ***आकाश*** म्हटले की त्यात आकाशाचा १/२ भाग व वायू-तेज-आप-पृथ्वी या इतर भूतांचा प्रत्येकी १/८ भाग, याप्रमाणे सदर कोष्टकातील ***आकाश*** हे महाभूत समजावे. याप्रमाणे इतरही चार महाभूतांची स्थूल शरीरांतर्गत असलेली धारणा समजावी.

हे सर्व श्रीज्ञानदेवांनी वर वर्णिल्याप्रमाणे ***धृति*** या तत्त्वास अनुसरून होत असते. परस्परभिन्न व एकमेकांस थोडेही न साहणारी ही पंचमहाभूते आपापला गुणधर्म प्रत्येकी पंचीकृत म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे *(१/२ + १/८ + १/८ + १/८ + १/८ = १)* याप्रमाणे महाभूतांच्या मिश्रणाने तयार झालेल्या स्थूलदेहांतर्गतच्या महाभूतांद्वारे कसा प्रकट करतात, याचाही अल्प परिचय पुढे दिलेल्या कोष्टकावरून जिज्ञासू समजावून घेऊ शकतात.

पंचीकरण - कोष्टक क्र.२

पंचमहाभूते	पृथ्वी	जल	तेज	वायू	आकाश
पृथ्व्यांश	अस्थी	शोणित	आलस्य	संकोचन	कट्याकाश
जलांश	मांस	शुक्र	कांति	चलन	उदराकाश
तेजांश	नाडी	मूत्र	क्षुधा	उत्क्रमण	हृदयाकाश
वायव्यांश	त्वचा	स्वेद	तृषा	धावन	कंठाकाश
आकाशांश	रोग	लाला	निद्रा	प्रसरण	शिराकाश

हे स्थूलदेहांतर्गत पंचमहाभूतांचे कार्य पाहिल्यावर आपण सूक्ष्मदेहांतर्गत त्यांचे *कोष्टक क्र.२* च्या धर्तीवरील कार्यनिर्देशन करू या *(पहा:पुढील पानावरील कोष्टक क्र.३)*.

यानिमित्त पंचमहाभूते व स्थूल आणि सूक्ष्म देहातील तत्त्वे यांचा जो परस्परसंबंध निर्देशित केला जात आहे, त्याचे योगाच्या जिज्ञासूंनी नीट अवलोकन करणे त्यांच्या हिताचेच आहे. त्यामुळे ज्ञानदेवांनी ***कुंडलिनीसिद्ध पंथराज*** योगाच्या प्रकटीकरणासाठी जे जे निवेदन

(पुढे पहा:पृ.क्र.२१२वर)

पंचीकरण - कोष्टक क्र.३

पंचमहाभूते	आकाश	वायू	तेज	जल	पृथ्वी
	अंत:करण पंचक	प्राणपंचक पंचक	ज्ञानेंद्रिय पंचक	कर्मेंद्रिय पंचक	भोगविषयक पंचक
आकाशांश	अंत:करण (प्रथम स्फुरण)	व्यान (सर्वांतर्गत)	श्रोत्र (श्रवण)	वाचा (भाषा)	शब्द
वायव्यांश	मन (संकल्प विकल्प)	समान (नाभि)	त्वचा (स्पर्श)	पाणि (देणे-घेणे)	स्पर्श
तेजांश	बुद्धि (निश्चय)	उदान (कंठस्थ)	चक्षु (रूप)	पाद (चलन-वलन)	रूप
आपांश	चित्त (स्मरण)	प्राण (हृदयस्थ)	जिह्वा (रस)	शिश्न (रति)	रस
पृथ्व्यांश	अहंकार (असणे)(मी)	अपान (गुद)	घ्राण (गंध)	गुद (मलोत्सर्ग)	गंध

पंचीकरण - कोष्टक क्र. ४

	सात्त्विक भागापासून		राजस भागापासून		तामस भागापासून
पंचभूते	**पाच अंत:करणे**	**पाच ज्ञानेंद्रिये**	**पाच वायु**	**पाच कर्मेंद्रिये**	**पाच विषय**
आकाशाच्या	अंत:करण	श्रोत्र	व्यान	वाचा	शब्द
वायूच्या	मन	त्वचा	समान	पाणि	स्पर्श
तेजाच्या	बुद्धि	चक्षु	उदान	पाद	रूप
आपाच्या	चित्त	जिह्वा	प्राण	शिश्न	रस
पृथ्वीच्या	अहंकार	घ्राण	अपान	गुद	गंध

विश्वव्यापार

(पृ.क्र.२९०वरून पुढे)

केले आहे, त्याचे गूढ उकलण्यास बरीच मदत होते. असो! आता आणिक एक कोष्टक पाहून पुढे जाऊ या.

या *कोष्टक क्र.४* मध्ये पंचमहाभूतांच्या सात्त्विक, राजस व तामस भागांपासून *कोष्टक क्र.३* मधील कोणकोणती तत्त्वे कशी होतात, ते दर्शविले आहे.

कोष्टक क्र. ४ बद्दल थोडे तपशील पाहू या. प्रत्येक महाभूत हे सत्त्व-रज-तम या त्रिगुणांचे बनलेले आहे. महाभूतांच्या सात्त्विक व राजस अंशांपासून पंच अंतःकरणे व पंच ज्ञानेंद्रिये झालेली आहेत. सत्त्वगुणापासून ज्ञान उत्पन्न होते - ***"सत्त्वात्सञ्जायते ज्ञानम्" (१४-१७)*** " अशी गीतोक्ती आहे.

रजोगुण क्रियात्मक आहे. क्रियाशक्तीच्या माध्यमातून ज्यांचे कार्य चालते ती पंच कर्मेंद्रिये व पंचप्राणादी, पंचभूतांच्या राजस भागापासून झालेली आहेत. तामस म्हणजे जड. पंचविषयात सत्त्वरजाचा कोणताही भाग नसून, ते केवळ जड असल्याने, ते पंचभूतांच्या तामस भागांपासून झाल्याचे म्हणतात.


पंचीकरण व ब्रह्मांडाचा वंशवृक्ष

वाचकांस आपण पूर्वी घेतलेला *गीतारहस्य* निर्दिष्ट *ब्रह्मांडाच्या वंशवृक्षाचा आढावा* स्मरतच असेल *(उन्मेष:१९-१:क्षेत्रक्षेत्रज्ञविचार-१पृ. क्र.२७१ ते २८४)*. तसेच त्यावेळी ***मन*** या संकल्पनेनुसार त्यात केलेले परिवर्तन आपण तेव्हाच अवलोकिले आहे. त्यात केलेल्या विचारांचा ***पंचीकरण*** प्रकरणाशी कसा समन्वय करता येतो, ते पाहू या.

कोष्टक क्र.४ प्रमाणे ***पाच अंतःकरणे (अंतःकरण, मन, बुद्धी, चित्त व अहंकार)*** व ***पंच ज्ञानेंद्रिये (श्रोत्र, त्वचा, चक्षू, जिव्हा व घ्राण)*** ही सत्त्वापासून निर्मित आहेत; तर ***पंच कर्मेंद्रिये (वाचा-मुख, पाणि, पाद, शिश्न व गुद)*** ही रजोगुणनिर्मित आहेत. पंचप्राणांच्या चालनेशिवाय पंचज्ञानेंद्रिये व्यवहार करणे शक्य नाही. म्हणून काही विद्वान सत्त्वगुणाचे - *१) शुद्ध सत्त्वगुण* व २) सत्त्वगुण वा *सत्त्वरजोमिश्रित पण सत्त्वगुणाचे आधिक्य असणारा गुण* - असे दोन विभाग करतात.

अंतःकरणपंचकाचा समावेश शुद्धसत्त्वगुणात केल्यास व रजोमिश्रित सत्त्वगुण व रजोगुण यांना सात्त्विक सृष्टीत नियुक्त केल्यास, गीतारहस्यात दिलेल्या ब्रह्मांडवृक्षाची पंचीकरणाद्वारे होणारी स्थिती लक्षात घेता येईल.

त्याचप्रमाणे ***तामस सृष्टी*** म्हणून *(सूक्ष्म)* पंच तन्मात्रे व *(स्थूल)* पंचमहाभूते अशी जी तेथे दाखवलेली आहेत - त्याप्रमाणे पंचविषय - शब्द, स्पर्श, रूप, रस व गंधात्मक यांद्वारे महाभूतांच्या तन्मात्रा धरल्यास व तसेच व्यक्त होणारी *(निरिंद्रिय सृष्टीतील)* महाभूतांची स्थूल रूपे - जसे पृथ्वी, जल, अग्नि, वायू व गगन ही व्यक्तिशः धरल्यास, आपणांस गीतारहस्यातील ब्रह्मांडवृक्षाची पंचीकरणसापेक्ष संगती पुढे दिल्याप्रमाणे मांडता येईल; अर्थात आपण ही स्थिती *पृ.क्र. २८५ते२८७* वर दर्शविलेल्या **मन** या संकल्पनेशी संबंधित स्थितीवर आधारूनच पाहू या:



वरील संकल्पनेचा विस्तार करायचा झाला तर असे म्हणता येईल की ***पुरुष व प्रकृति*** ही ब्रह्मांडाची जी मूल, त्यातील पुरुषाच्या आदिसंकल्पानुसार ***("एकोऽहं, बहुस्याम:") प्रकृति*** म्हणजे त्याची ***त्रिगुणात्मक माया*** - तिने पंचमहाभूतांच्या वेगळाल्या गुणांप्रमाणे व मिश्रणाने सृष्टी निर्माण केली.

या आदिसंकल्पाचे ***प्रथम स्फुरण*** हे अंतःकरण असून ते शुद्धसत्त्वनिर्मित आहे. प्रकृतिसंबंधित ***मन*** हे तदनंतरचे सृष्टीशी पूर्णतयासंबंधित शुद्धसत्त्वनिर्मित तत्त्व आहे. ***अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार*** ही तत्त्वे ***आकाश, वायू, तेज, जल व पृथ्वी*** या पंचमहाभूतांशी अनुक्रमेसंबंधित असल्याने ती उत्तरोत्तर जड समजावी लागतात.

क्रियात्मक असल्याने, या सर्व सृष्टीशी मनाचा सतत संबंध येतो व अशा गुणामुळे त्याला इंद्रियांच्या वर्गातसुद्धा धरले जाऊ शकते. हेच आपण वेगळ्या वळणाने *पृ.क्र.२८५ ते २८७*वर पाहिलेले वाचकांस स्मरत असेलच.

एथपावेतो पंचीकरणाचा आढावा घेतल्यावर आपण आता ***सिद्धसिद्धांतपद्धति*** या नाथसंप्रदायाच्या अध्वर्युस्थानी असणाऱ्या गुरू गोरक्षनाथांनी रचलेल्या ग्रंथाचे याच संदर्भात थोडे परिक्षण करू या. या विषयावर माहिती देणारा ***श्री. म. दा. भट*** यांचा ग्रंथ जिज्ञासूंनी सविस्तर माहितीसाठी जरूर पाहण्यासारखा आहे.

गोरक्षनाथांचा विचार

आरंभी श्रीगुरुगोरक्षनाथ शक्तियुक्त आदिनाथांना नमन करतात. **अमृतानुभव**ारंभी ज्ञानेशांनी शिवशक्तीस केलेले नमन आपण मागे पाहिले होते, त्याचेही यानिमित्त स्मरण होते.

आदिनाथं नमस्कृत्य शक्तियुक्तं जगद्गुरुम्।
वक्ष्ये गोरक्षनाथोऽहंसिद्धसिद्धान्तपद्धतिम्।।१-१।।सि.सि.प.।।

आदिनाथ हा नाथपंथातील ***अनामा*** होय. ज्ञानेश्वरीतील ***"शक्तीचां कर्णकुहरीं"*** रहस्य सांगून नाथसंप्रदायाचे जनकत्व यानेच घेतले आहे. ***"जियें मार्गीचां कापडी। महेशु अञ्जुनि।।"*** असे ज्ञानदेव ज्याच्याबद्दल म्हणतात, तो हाच! तो अजूनही त्याचा संप्रदाय चालवण्याचे कार्य करत आहे.

या नाथसांप्रदायिक तत्त्वज्ञानाप्रमाणे जगताची उत्पत्ती संभवत नाही. तरीही लोकव्यवहारासाठी म्हणून हा विचार सांगण्यास गोरक्ष प्रवृत्त होतांना म्हणतातः

नाऽस्ति सत्यविचारेऽस्मिन्नुत्पत्तिश्चाण्डपिण्डयोः।
तथापि लोकवृत्त्यर्थं वक्ष्ये सत्सम्प्रदायतः।।१-२।।
यदा नाऽस्ति स्वयंकर्ता कारणा न कुलाकुलम्।
अव्यक्तं च परं ब्रह्मं अनामा विद्यते तदा।।१-४।।सि.सि.प.।।

कुल म्हणजे शक्ती व ***अकुल*** म्हणजे शिव, तसेच कर्ता व कारण अस्तित्वात नसतांना अव्यक्त परब्रह्म नामरहित म्हणजे उपाधीशिवाय असते. त्यावेळी त्याची इच्छा म्हणजे ***"एकोऽहं, बहुस्यामः"*** ही ***निजाशक्ती*** म्हणून असते. हीच ***गीतोक्त माया*** वा वेदांत्यांची ***परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप*** या सदरात, वा सांख्यांच्या ***मूलप्रकृती***स समांतर, अशी समजता आली असती.

परंतु गोरक्षमते या निजाशक्तिव्यतिरिक्त ***परा*** व ***अपरा*** या दोन शक्ती ***निजाशक्ती***पासून होत असल्याने तिला ***गीतोक्त माया*** असे वा ***परब्रह्माचे कनिष्ठ स्वरूप*** असे जरी थोड्याफार फरकाने म्हणता येत असले, तरी तिला ***मूलप्रकृति*** वा ***परा प्रकृति*** असे त्या अर्थी म्हणणे कठीण वाटते. परंतु ***माया*** वा ***परा*** यातील संदर्भनिष्ठ एक एक अर्थच केवळ तिला लागू पडू शकेल. जसे ***"मम माया दुरत्यया"*** यातील ***माया*** ती ही ***निजा*** समजली जाऊ शकते.

कुण्डलिनीशक्ती

गोरक्ष म्हणतातः

अनामेति स्वयंमनादि सिद्धमेकमेवानादिनिधनं सिद्धसिद्धान्तप्रसिद्धं तस्येच्छामात्रधर्माधर्मिणी निजा शक्तिः प्रसिद्धा।।१-५।।सि.सि.प.।।

तस्या उन्मुखमात्रेण परा शक्तिरुत्थिता। तस्या स्पन्दनमात्रेण अपरा शक्तिरुत्थिता।।१-६।।सि.सि.प।।

नामरहित, स्वतः अनादिसिद्ध, एकमात्र, अनादिनिधन अशा त्या शक्तीस *सि.सि.प.*त ***इच्छामात्र धर्माधर्मिणी निजाशक्ती*** असे म्हणतात. तिच्या केवळ उन्मेषाने ***पराशक्ती*** निर्माण झाली व पराशक्तीच्या स्पंदनाने ***अपराशक्ती*** निर्माण झाली. नाथपंथाच्या योगप्रणालीचे खास वैशिष्ट्य म्हणून प्रसिद्ध असलेली ***कुण्डलिनीशक्ती*** ही त्यानंतर अहंकार स्फुरणाने निर्माण झालेल्या सूक्ष्मशक्तीपासून निर्माण झाली, असे पुढील श्लोकात म्हणतातः

ततोहन्तार्धमात्रेण सूक्ष्मशक्तिरुत्पन्ना। ततो वेदनशीला कुण्डलिनी शक्तिरुद्गता।।१-७।।सि.सि.प.।।

याप्रमाणे ***आदिनाथ -➢ निजाशक्ती -➢ निजा -➢ परा -➢ अपरा -➢ सूक्ष्म -➢ कुण्डलिनी*** असे नाथपंथीय जगद्व्यापाराचे मूलस्वरूप आहे. त्यानंतर त्या त्या शक्तीचे गुणधर्म सांगून या पंचशक्तींपासून **परपिंड शिवा**ची उत्पत्ती झाल्याचे म्हटले आहे. या शक्तींच्या पंचवीस गुणांचा मिळून जो ***परपिंड*** तयार झाला, त्याचप्रमाणे *अनाद्यपिंड*ाची पंचवीस कारणे सांगून त्यापासून क्रमाक्रमाने ***परमानंद -➢ प्रबोध -➢ चिदुदय -➢ प्रकाश -➢ सोऽहंभाव*** हे कसे उत्पन्न होतात, ते सांगितले आहे.

सोहंऽभाव

हाच ज्ञानेश्वरीतील प्रसिद्ध ***सोऽहंभाव.*** हा समजून घेण्यासाठी नाथपंथाचे तत्त्वज्ञान जाणत्याकडून समजावून घेणेच इष्ट!

या पाचांचे प्रत्येकी पाच गुण वर्णितांना सोऽहंभावाबद्दल ***"अहन्ताऽखण्डैश्वर्यं स्वात्मता विश्वानुभवसामर्थ्य सर्वज्ञत्वमिति पञ्चगुणः सोऽहम्भावः।।१-२७।।सि.सि.प.।।"*** असे म्हटले आहे, ते जिज्ञासूंनी नाथयोगपद्धति व विशेषेकरून ज्ञानेशांचे योग व तत्त्वज्ञान अभ्यासतांना लक्षात ठेवण्यासारखे आहे.

सोऽहंभावाचे हे पाच गुण म्हणजे १) वैश्विक अहंता - मी विश्वच आहे, ही जाणीव २) अखंड ऐश्वर्य - षट्गुणसंपन्नता व अष्टमहासिद्धींचे माहेरघर ३) स्वात्मता - सर्वत्र मीच भरून आहे ही वृत्ती ४) विश्वानुभवसामर्थ्य - विश्वात ओतप्रोत भरून असलेल्या चैतन्याचा आनंद लुटण्याचे सामर्थ्य व ***"मुंगियेचेही वोलखे। मनोगत।"*** *अशी संवेदनशीलता व ५) सर्वज्ञत्व –म्हणजे सर्व काही जाणण्याची शक्ती.*

पिण्डविचार - *"नाथाघरची उलटी खूण"*

त्यानंतर ***आद्यपिंड*** हा वरील पाच गुणांच्या *(परमानंद, प्रबोध इ.)* प्रत्येकी पाच पाच गुणांचा झाला असून तो अनाद्यपिंडापासून

निर्मित असल्याचा निर्देश आहे. यानंतरच्या श्लोकातून आद्यपिंडापासून पंचमहाभूते निर्माण झाल्याचे म्हटले आहे. नंतर पंचमहाभूतांचे पंचपंच गुण निर्देशून नंतर त्यापासून ***महासाकार पिंड*** व त्यापासून ***अष्टमूर्ती*** निर्माण होतात, असे सांगतात. ***महासाकारपिण्ड*** म्हणजेच ***आदिनाथ शिव*** असे म्हटले आहेः

स शिवः शिवाद्भैरवो भैरवात् श्रीकण्ठः श्रीकण्ठात् सदाशिवः सदाशिवादीश्वरः ईश्वराद्रुद्रो रुद्राद्विष्णुर्विष्णोर्ब्रह्मा इति महासाकारपिण्डस्य मूर्त्यष्टकम्।।१-३६।।सि.सि.प.।।

विश्वोत्पत्तिक्रम

यावरून विश्वोत्पत्तीचा मार्ग शक्तिचक्रक्रमेण पुढीलप्रमाणे दिसतोः

सि.सि.प. प्रमाणे विश्वोत्पत्ती

आदिनाथ शक्तियुक्त (निजाशक्तियुक्त शिव)
|
शक्तिपंचक–निजा–परा–अपरा–सूक्ष्म—कुंडलिनी
|
परपिंड शिव—परमपद
|
अनाद्य पिंड
|
आद्यपिंड–परमानंद–प्रबोध—चिदुदय–प्रकाश–सोऽहंभाव
|
महाकाश–महावायु–महातेज–महासलिल–महापृथ्वी
| | | | |
|
महासाकार पिंड = आदिनाथ

याप्रमाणे ***"आदिनाथ ते आदिनाथ"*** या विश्वोत्पत्तीचक्राचा प्रवर्तक वा कारण केवळ ***आदिनाथ*** कसा आहे हे परत ***"नाथाघरची उलटी खूण"*** या नियमाने सांगितले आहे. ही खूण समजल्याशिवाय नाथवाणी वा ज्ञानेशवाणी समजावून घेणे अवघडच आहे. असो.

"शिव –➤ भैरव–➤ श्रीकण्ठ –➤ सदाशिव –➤ ईश्वर –➤ रुद्र –➤ विष्णु –➤ ब्रह्मा" या पायऱ्यांनी ब्रह्मदेवापर्यंत आल्यावर त्याच्या अवलोकनाने ***नरनारीरूप प्रकृतिपिंड*** निर्मिती झाल्याचे व तो पंचवीस गुणांनी युक्त असे ***भौतिक शरीर*** असल्याचे सांगतात. यानंतर पंचीकरणात दिलेली माहिती जी आपण *कोष्टक क्र. १* व तदनंतरच्या कोष्टकांद्वारे पाहिली होती, त्याच धर्तीची माहिती सिद्धसिद्धान्तपद्धतीत थोड्याफार फरकाने व क्वचित संक्षेपतः सांगितलेली दिसते.

असे अनुमान करण्यास हरकत नसावी की **पंचीकरणा**तील पंचमहाभूते, त्यांचा परस्परसंयोग यांद्वारे इंद्रिये, पंचवायू, विषय, शरीरांतर्गत अस्थिमांसादी तत्त्वे, पंचमहाभूतांचे गुणधर्म इ.बाबत गोरक्षनाथांना आक्षेपार्ह असे काहीच नसावे.

इतर माहिती

गोरक्ष म्हणतातः

"अनामेति स्वयंमनादि सिद्धमेकमेवानादिनिधनं सिद्धसिद्धान्तप्रसिद्धं तस्येच्छामात्रधर्माधर्मिणी निजा शक्तिः प्रसिद्धा।।१-५।। सि.सि.प.।।"

यानंतर येणारी ***व्यक्तिशक्तिपंचक, प्रत्यक्षकरणपंचक, नाड्यांची माहिती, दहा वायूंची माहिती, पिण्डोत्पत्ती व इतर उपदेश (द्वितीय ते षष्ठ)*** हे बरेचसे नाथपंथीय योगप्रणालीशी संबंधित असल्याने व ***"पिण्डी ते ब्रह्माण्डी"*** या न्यायानुसार काही अंशी वर्णानात्मकसुद्धा असल्याने, सध्याच्या संदर्भात त्यांचा विचार करणे जरूर भासत नाही. त्यातील **अष्टांगयोगा**चा जो भाग आहे, त्याचा कारणपरत्वे पूर्वी घेतलेला परामर्ष जिज्ञासूंच्या स्मरणात असेलच!

सध्याच्या विषयानिमित्त गोरक्षांनी सांगितलेले ***कुलपंचक*** व सत्त्वरजस्तमादी गुणांची काही माहिती पाहून पुढे जाऊ याः

सत्त्वं रजस्तमः कालो जीव इति कुलपञ्चकम्।।१-४९।।
दया धर्मः कृपा भक्तिः श्रद्धेति पञ्चगुणं सत्त्वम्।।१-५०।।
दानं भोगः श्रृङ्गारः वस्तुग्रहणं स्वार्थमिति पञ्चगुणं रजः।।५१।।
विवादः शोकः कलहः बन्धः वञ्चनमिति पञ्चगुणं तमः।।१-५२।।
कलना कल्पना भ्रान्तिः प्रमादोऽनर्थ इति पञ्चगुणः कालः।।१-५३।।
जाग्रत स्वप्नः सुषुप्तिस्तुर्यं तूर्यातीतमिति पञ्चावस्थागुणोजीवः।।१-५४।।

कुल म्हणजे ***शक्ती वा प्रकृति. सत्त्व, रज, तम, काल व जीव*** हे प्रकृतीचे पंचधा भाग होत. ***दया, धर्म, कृपा, भक्ती व श्रद्धा हे सत्त्वाचे गुण***; ***दान, भोग, शृंगार, संग्रह व स्वार्थ*** हे रजाचे पंचगुण; ***विवाद, शोक, कलह, बंधन व वंचना*** हे तमाचे गुण होत.

कलना, कल्पना, भ्रांती, प्रमाद व अनर्थ हे पाच गुण कालाचे होत; तर ***जागृती, स्वप्न, सुषुप्ती, तुर्या व तुर्यातीत*** या जीवाच्या पाच अवस्था होत. एवढी माहिती आपण नीट समजून घेऊन ध्यानात ठेवली तरी ज्ञानेश्वरीच्या संदर्भात पुरेशी ठरावी.

काश्मिरी शैवमत

श्रीगोरक्षनाथांचा तत्त्वविचार आपण पाहिला. नाथशैवांचा समकक्ष म्हणून **काश्मिरी शैवमता**चा विद्वान विचार करतात. त्या मतानुसार जो तत्त्वविचार **वसुगुप्ता**च्या **शिवसूत्रा**त ***प्रत्यभिज्ञा*** वा ***स्पंदशास्त्र*** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दर्शनात केला जातो, त्याचा येथे ओझरता निर्देश जिज्ञासूंसाठी केला आहे. त्यांच्या तत्त्वविचाराचा वंशवृक्ष पुढील पृष्ठावर दिलेला आहे. अधिक माहितीसाठी मूळ ग्रंथ पाहावेत. स्वामी मुक्तानंदांचे या विषयावरील ग्रंथ उपयुक्त आहेत. तसेच डॉ.के.रा.जोशी यांनीही या विषयावर लिहिलेले ग्रंथ उपलब्ध आहेत. असो.

काश्मिरी शैवसिद्धान्तानुसार विश्वोत्पत्तिक्रम

परमशिव

|

१. शिव–अहम् –अस्मि व २.शक्ती }

| }

इदम्–३.सदाशिव }

| } **१ ते ५ शुद्ध तत्त्वे**

अयम्–४.ईश्वर }

| }

शुद्ध विद्या --५.क्रियाशक्ती }

|

६.माया

|

पंचकंचुके

|

—————————————— } **६ ते१२-**

| | | | | }**शुद्ध-अशुद्ध**

७.कला ८.विद्या ९.राग १०.काल ११.नियती } **तत्त्वे**

——————————————

| |

१२.पुरुष　　१३.प्रकृति (अशुद्ध तत्त्व)

|

अशुद्ध तत्त्वे (१३ ते ३६)　　१४.बुद्धि

|

१५.अहंकार

|

——————————————

| | |

सत्त्वात्मक सर्ग　　रजात्मक सर्ग　　तमात्मक सर्ग

| | |

————　　२२ ते २६ पंच कर्मेंद्रिये　　२७ ते ३१ पंच तन्मात्रा (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध)

| |

१६.मन　　१७ ते २१. पंच ज्ञानेंद्रिये

|

स्थूल पंचमहाभूते

|

(३२ ते ३६)आकाश वायू तेज आप पृथ्वी

काश्मिरी शैवसिद्धान्त

संदर्भः ***प्रत्यभिज्ञा - स्पंदशास्त्र***

आचार्य वसुगुप्त - शिवसूत्रे

महत्त्वाच्या संज्ञा : ***त्रिक् -परब्रह्म-आत्मा –द्रव्य***

स्थूलमानाने *१ते ५* ही तत्त्वे ***परब्रह्माचा उच्च स्तर,*** *६ ते १२* ही तत्त्वे ***परब्रह्माचा मध्यम स्तर*** व *१३ ते ३६* ही तत्त्वे ***परब्रह्माचा निम्न स्तर*** अशी आहेत. त्यासाठी *पृ.क्र.२९५* वर दिलेला तक्ता पाहावा अशी विनंती आहे.

क्षेत्रवर्णन (३)::::

संघात

यानंतर आपण पुनश्च ज्ञानदेवीकडे पुढल्या व शेवटच्या म्हणजे ***संघात*** या छत्तिसाव्या तत्त्वाच्या निरूपणासाठी वळू याः

आणि जीवेंसीं पांडवा। या छत्तीसांचा मेळावा।
तो हा एथ जाणावा। संघातु पैं गां।।१३-१४९।।

"याप्रमाणे ***पंचमहाभूते, अहंकार, बुद्धि, दशेंद्रिये व त्यांचे दशविषय, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, चेतना, धृति, मन व यांचा जीवासह असणारा समुदाय वा संघात,*** हीच या क्षेत्रात नांदणारी ***छत्तीस तत्त्वे*** होत."

याप्रमाणे ***क्षेत्रविस्तार*** सांगून झाल्यावर क्षेत्र अभिव्यक्तीबाबत अखेरचा बोल म्हणून ज्ञानदेव म्हणतातः

एवं छत्तीसही भेद। सांगितले तुज विशद।
यया येतुलियांतैं प्रसिद्ध। क्षेत्र म्हणिजे।।१३-१५०।।
रथांगांचा मेळावा। जेवीं रथु म्हणिजे पांडवा।
कां अधोर्ध्व अवेवा। नांव देहो।।१५१।।
करीतुरंगसमाजें। सेना नाम निफजे।
कां वाक्यें म्हणति पुंजें। अक्षरांचें।।१५२।।
कां जलधरांचा मेला। वाच्य होय आभाला।
नाना लोक सकलां। नाम जग।।१५३।।
कां स्नेहसूत्रवह्नी। मेलु एकें स्थानीं।
धरिजे तो जनीं। दीपु होय।।१५४।।
तैसीं छत्तीसहीं इयें तत्त्वें। मिलती जेणें एकत्वें।
तेणें समूहपरत्वें। क्षेत्र म्हणिपे।।१५५।।

"अशा प्रकारे तुला मी ही छत्तीस विविध प्रकारची तत्त्वे स्पष्ट करून सांगितली. या सर्वांना मिळून ***क्षेत्र*** असे प्रसिद्ध नांव आहे. रथाची चाके, आरे, जू इ.अंगे मिळून जसा रथ म्हणून म्हणतात; किंवा शरीराचा खालील व वरील असे भाग मिळून त्याला शरीर असे म्हणतात; हत्ती, घोडे व सैनिक मिळून जसे त्यास सैन्य असे म्हणतात; अथवा ढगांच्या एकवटून असलेल्या समूहास जसे आभाळ म्हणतात; सर्व लोकांच्या समूहास जसे जग हे नांव देतात; किंवा तेल-तूप, वात व ज्योत यांचा एकेठायी जो मेळ होतो, त्याला लोक दीप म्हणून

विश्वव्यापार

ओळखतात; त्याचप्रमाणे ही छत्तीसही तत्त्वे ज्याठायी एकत्वाने नांदतात, त्या समूहास ***क्षेत्र*** असे नामाभिधान आहे."

आणि वाहतेनि भौतिकें। पापपुण्य एथ पिकें।
म्हणौनि आम्हीं कौतुकें। क्षेत्र म्हणो।।१३-१५६।।
एकाचेनि मतें। देह म्हणति ययातैं।
परि असो हे अनंतें। नामें यया।।१५७।।
पैं परतत्त्वा अरौतें। आणि स्थावरांता आंतौतें।
जें काहीं होते जातें। तैं क्षेत्रचि हे।।१५८।।
परि सुरनरउरगीं। घडत आहे योनिविभागीं।
तैं गुणकर्मसंगीं। पडिलेंसातें।।१५९।।
हेंचि गुणविवंचना। पुढां म्हणिपेल अर्जुना।
प्रस्तुत आतां ज्ञाना। रूप दाऊं।।१६०।।
क्षेत्र तंव सविस्तर। सांगितलें सविकार।.....।।१६१।।

"यात कर्माची लागवड केल्याने पापपुण्यरूपी उत्पन्न येते, म्हणून आम्ही याला ***क्षेत्र*** अशी अलंकारिक शब्दयोजना केली आहे! पण कोणी याला ***देह*** असेही म्हणतात; तर इतरांनी त्याला अनंत नावे ठेवलेली आहेत. असे जरी असले तरी ***जे जे परतत्त्वाहून वेगळे व स्थावरादी पदार्थांतर्गत उपजत नाशत असते, ते सर्व क्षेत्रच असते.*** देव, मनुष्य, सर्प इ.योनींमध्ये त्रिगुण व कर्म यांच्या योगाने या क्षेत्रातील समस्त पदार्थांची वर्गवारी होत असते. त्या गुणांसंबंधी व कर्माचे विवेचन आपण नंतर पाहू. आतापावेतो मी ***सविस्तर विकारांसहित* असे जे क्षेत्र आहे**, ते तुला समजावून दिले."

अशा प्रकारे आपण या **क्षेत्रविभागा**चे विवेचन संपन्न करत आहोत. यानंतरचा विभाग आहे **क्षेत्रज्ञा**चा!

क्षेत्रज्ञविभाग (१) - ज्ञान::::

ज्ञान

श्रीकृष्ण म्हणतातः

.....। म्हणौनि आतां उदार। ज्ञान आईक।।१६१।।

"आतां तुला मूर्तिमंत ज्ञान कसे असते, कसे दिसते, ते सांगतो." ज्ञान उदार आहे, म्हणजे सर्वोत्तम, सर्वश्रेष्ठ, दिव्य, उत्कृष्ट आहे; असे यानिमित्ताने ज्ञानदेव म्हणतात. येथपावेतो आपण त्यांनी केलेला क्षेत्रविचार पाहिला. त्यांची ***"संस्कृताची तीरें गहनें। तोडौनि मऱ्हाटियां शब्दसोपानें।"*** ही उक्ती किती सार्थ आहे, हेही या कारणे आपल्या निदर्शनास आले आहे.

ज्ञानदेव म्हणतात की प्रत्यक्ष ऋषिमुनींना, ब्रह्मसूत्रादींनासुद्धा हा विचार अवघड वाटला व तो नीट करणे त्यांना जमले नाही. अशा विषयावरच्या गीतोक्त विचारांचा विद्वानांनी व संस्कृत भाषेच्या पंडितांनीसुद्धा कित्येकदा जो विपर्यास केला व सामान्यांस गीतार्थ जो दुरावला होता, तो ते *(ज्ञानदेव)* या प्रकारे आपल्या आकलनास सुस्पष्ट अशा ओव्यांद्वारे श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने सोप्या मराठीतून प्रकट करतात. आपण स्वतः काही केलेले आहे असे न म्हणता, सर्व श्रेय त्यांचे गुरू श्रीनिवृत्तिनाथ यांना देत, त्यांची ही पुण्यसलिला ज्ञानवाणी आपणाला तद्नंतरच्या ज्ञानदर्शनास उत्सुक करतच, ज्ञान म्हणजे साक्षात परब्रह्माचा जो मूर्तिमंत आविष्कार आहे, त्याच्या भेटीस घेऊन जाते!

"अमानित्वमदम्भित्वम् अहिंसा क्षान्तिरार्जवम्। ....(१३-७)" या गीताश्लोकापासून ते ***"......। एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।(१३-११)"*** या श्लोकांनिमित्त भगवंतांनी ज्ञानाची व ज्ञान्याची जी विशिष्ट लक्षणे प्रकट केली आहेत, त्यांचा परिचय ज्ञानदेवांच्या वाणीतून आपण पूर्वीच करून घेतला आहे. तेव्हा ती ज्ञानलक्षणे व तद्विरोधी अज्ञानचिह्ने योगधारेच्या यम-नियमांचे परिशीलन करण्यानिमित्त आपण विचारार्थ घेतल्याचे जिज्ञासूंना स्मरतच असेल.

ज्ञान्याहून ब्रह्म वेगळे नसते, अशी जी द्रष्ट्या ऋषींची उक्ती आहे, त्यानुसार ज्ञान्यांची लक्षणे व परब्रह्माची लक्षणे समान मानावी लागतात. ज्ञानी हा साक्षात ब्रह्मच होतो; ज्ञानी हा भगवंताचा साक्षात आत्माच असतो; ज्ञानी म्हणजे भगवंताचे चालतेबोलते सगुण रूप आहे; ज्ञानी भगवंतास आपल्या रूपाने साकार करतो; या व तत्समान अनेकानेक उक्ती उपनिषदादी श्रुत वाङ्मयात आढळतात. ज्ञानदेवांनीही याच विचारधारेची परिसीमा गाठून *तेराव्या* अध्यायाच्या उपरोक्त श्लोकांवर भाष्य करतांना ज्ञानास रूप केलेले आहे.

क्षेत्रज्ञ विचाराचा श्रीगणेशा

तद्नंतरच्या ***"ज्ञेयं यत् तत् प्रवक्ष्यामि.....।(१३-१२)"*** या श्लोकापासून जे ***ज्ञेय*** म्हणून सांगितले आहे व जो खरा तर उरलेला म्हणजे ***क्षेत्रज्ञविचार*** आहे, त्याचा श्रीगणेशा करतांना ज्ञानदेव पुढे म्हणतातः

जेयां ज्ञानालागीं। गगन गिलिताती योगी।
स्वर्गाची आडवंगी। उमरोडूनि।।१३-१६२।।
न करिती सिद्धीची चाड। न धरिती ऋद्धीची भीड।
योगाऐसें दुवाड। हेलसती।।१६३।।
तपोदुर्गे वोलांडित। ऋतुकोटि वोवांडित।
उलथूनि सांडित। कर्मवल्ली।।१६४।।

"साक्षात जीवन्मुक्ती देणाऱ्या त्या भगवंतासम उदार ज्ञानाच्या प्राप्तीसाठी स्वर्गाची मोहप्रद वाट सोडून, योगिजन अतीव कष्टसाध्य असा गगन गिळण्याचा योगपंथ स्वीकारतात. योगसाधना करत असतांना अनायासे प्राप्त होणाऱ्या पण सामान्य जनांस अतिदुर्लभ असणाऱ्या ऋद्धिसिद्धींची मोहक साद दुर्लक्षून ते योगाच्या बिकट मार्गासही, त्यातील पराकोटीच्या कष्टांनाही नगण्य लेखून, आक्रमण्यास कटिबद्ध होतात. इतरही अनेक ऋषिमुनी-तपस्वी याच ज्ञानासाठी दुर्गम तपे आचरतात; अक्षरशः कोटिकोटी याग करतात व कर्माची वेल समूळ उपटून टाकतात."

नाना भजनमार्गीं। धांवत उघडा आंगीं।
एक *रिगताती सुरंगीं। सुषुम्नेचिये*।।१३-१६५।।
ऐसीं जियें ज्ञानीं। मुनीश्वरांची उतान्हीं।
वेदतरूचां पानोवानीं। हिंडताती।।१६६।।
देईल गुरुसेवा। इयां बुद्धि पांडवा।
जन्मशतांचां सांडोवा। टाकीत जैं।।१६७।।

"कित्येक भक्तियोगी घरादाराचे भान विसरून, लौकिकाचीही पर्वा न करता भजनमार्गावरून धावत सुटतात; तर कित्येक ***योगिजन सुषुम्नेची अति अरुंद बिकट वाट पत्करतात.*** त्याच ज्ञानाचा मागोवा अत्यंत उत्कंठेने घेत मुनीवर वेदरूपी तरूच्या विस्तीर्ण शाखोपशाखांवरून ऋचारूपी पानोपानी हिंडत फिरतात. सद्गुरूंची सेवा केल्याने ते ज्ञान प्राप्त होईल असा ठाम विश्वास असणारे सत्शिष्य शेकडो जन्मसुद्धा गुरुउपास्तिसाठी ओवाळून टाकण्यास मागेपुढे पाहत नाहीत."

ज्ञानप्राप्तीसाठी बिकट वाटचाल

योगाची दुर्गम वाट चालतांना स्वर्गात प्रवेशणाऱ्या आडवाटा साधकांना खुणावत असतात. ज्ञान मिळवण्यासाठी योगसाधक जे कष्ट उपसतो, त्यांच्या अत्यल्प प्रमाणात केलेल्या परिश्रमांनीसुद्धा स्वर्गाची द्वारे सताड उघडली जातात. ऋद्धिसिद्धी तर वाटेल तेव्हा प्रकटत असतात. खडतर तपश्चर्या करणाऱ्या विश्वामित्रांच्या वाटेवर या मोहमयी अप्सरा भुरळ घालण्यास सदैव सिद्ध असतात.

या अल्पश्रमात मिळणाऱ्या, ज्यांच्यासाठी सामान्य जन हपापलेले राहतात त्या सुखांचा लोभ न धरता, योग्यांना ज्ञानासाठी अपार व खडतर कष्ट उपसावे लागतात. ***"गगन गिळणे"*** किती अवघड असते, हे ज्ञानदेवांनी *बाराव्या* अध्यायात गीतेच्या ***"क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्। अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते।।१२-५।।"*** या श्लोकावरील टीकेत सुस्पष्ट केलेले आहे. ते किती कष्टदायक आहे, हे दर्शविण्यासाठी तेथील ओव्या जिज्ञासूंनी पाहणे उचित ठरेल.

तेथे ते स्पष्टच म्हणतात की, ***"म्हणौनि योगाचियां वाटा। जैं निगालें गां सुभटा। तेयां दुःखाचाचि वाटा। भागां आला।।१२-६१।। किंबहुना पांडवा। हा अग्निप्रवेशु नीच नवा। भातारेंवीण करावा। तो हा योगु।।६६।। ऐसाहीं जन्हीं धिंवसा। बांधौनियां आकाशा। झोंबती तन्हीं क्लेशा। पात्र होती।।७४।।"***

ज्ञानाची स्तुती

योगाप्रमाणेच अतिदुर्गम अशी तपे आचरणारे; प्रयत्नांची पराकाष्ठा करून यज्ञयाग करणारे; संसाराकडे थोडेही लक्ष न देता भगवद्भक्तीपोटी देहभान विसरून धाव घेणारे भक्तजन; सुषुम्नेत प्राणापान-मन-पवन घालतांना जीवाची होणारी उलघाल सहन करणारे हठयोगी व तत्सम योगनिष्ठ; गुरुसेवेसाठी निरंतर तन-मन-धन-वाणी-इंद्रिये वाहणारे साधक; हे सगळे ज्या ज्ञानासाठी हे अपरिमित साहस करतात, त्याची स्तुती करतांना ज्ञानदेवांची वाणी जणू फुलून येते, ती अशीः

जेयां ज्ञानाची रिगवणी। अविद्ये उणें आणी।
जीव आत्मयां बुझावणी। मांडूनि दे।।१३-१६८।।
जैं इंद्रियांची द्वारें आडी। प्रवृत्तीचें पाय मोडी।
जैं दैन्यचि फेडी। मानसाचें।।१६९।।
द्वैताचां दुकाळु पाहें। साम्याचें सुयाणें होये।
जेयां ज्ञानाची सोयें। ऐसें करी।।१७०।।
मदाचां ठाओची पुसी। जैं महामोहातें ग्रासी।
नेदी आपपरु ऐसीं। भाख उरो।।१७१।।

"जे श्रेष्ठ ज्ञान थोडेही प्रकटले असता, जीवाला संसारमोहात ढकलून देणारी जी अविद्या, ती सहजच नाहीशी होते; जीव व शिव एक होतात; जे इंद्रियप्रवृत्तींना आळा घालते; विषयांचे राज्य नाहीसे करून प्रवृत्तीचा स्वैर धिंगाणा बंद करते; जे मनोमळ क्षालन करून आत्मसुख दाखवते; ज्याच्या योगे द्वैतबुद्धिरूप दुष्काळ नाहीसा होऊन अद्वैताची धन होते; इतके फळ ज्या ज्ञानाची पहाट झाली असताच मिळते; जे संसारप्रवृत्तीचा माज नाहीसा करते; जीवाला प्रपंचबंधनात अडकवणाऱ्या मोहमहिषासुराचा जे ज्ञान ग्रास करते व अहंकार समूळ नाहीसा करते;" आणि

जैं संसारांतें उन्मूलीं। संकल्पपंकु पाखाली।
अनावरा वेंटाली। ज्ञेयांतें जैं।।१३-१७२।।
जेयाचेनि उजालें। उघडती बुद्धीचें डोळें।
जीवु दोंदेवरी लोलें। आनंदाचियां।।१७३।।

"जे संसाराच्या अश्वत्थवृक्षास उन्मळून टाकते; जे आदिसंकल्पाचा चिखल म्हणजे जगदाभास प्रक्षाळून जीवबुद्धीस स्वच्छ करते; ज्याचा अंतपार असंख्य वेदराशी, अगणित मुनीजन, तपस्वी, ऋषी इ.नासुद्धा लागलेला नाही, त्या परब्रह्मालासुद्धा जे कवेत घेण्यास समर्थ असते; जे प्रकटतांना ***प्राण पांगुळतात*** व ***केवलकुंभक*** स्वयेच उदित होतो; ज्याची झुळूकमात्र या जगाचे व्यापार पार पाडण्यास समर्थ असते; ज्या ज्ञानाच्या प्रकाशाने बुद्धीवरील तमाची झापड नाहीशी होते व शुद्ध सत्त्व अनामय असे निधान तिच्यापुढे प्रकटते व जीवाला सुखाचे दोंद सुटून तो आनंदराशीवर लोळू लागतो;"

ऐसें जै ज्ञान। पवित्रैकनिधान।
जेथ विटाललें मन। चोख कीजे।।१३-१७४।।
आत्मया जीवबुद्धी। जैं लागली होती क्षयोव्याधी।
तैं जेयाचियां सन्निधीं। निरुजा करी।।१७५।।
तैं अनिरूप कीं निरूपिजे। ऐकतां बुद्धी आणिजे।
वांचूनि डोलां देखिजे। ऐसें नाहीं।।१७६।।
मग तैंचि इयें शरीरीं। जैं आपुला प्रभावो करी।
तैं इंद्रियां व्यापारीं। दिठी ही दिसें।।१७७।।

"असे जे एकमेव पवित्र ज्ञान असते, त्याच्यायोगे विषयवृत्तींनी विटाळलेले मन आपसुक शुद्ध होते. क्षयासारखी आत्म्याला झिजवणारी जीवबुद्धिरूप जी व्याधी, तिचे निवारण करून आत्म्याला स्वरूपस्थितीत पुनः स्थित करणारे ते ज्ञान निरूपिता येण्याजोगे नाही; त्याची माहिती ऐकून समजण्यासारखेही नाही. एवढेच काय! ते प्रत्यक्ष पाहता येण्यासारखेही नाही. असे जरी असले तरीही जेव्हा ते ***"याचि देहीं"*** प्रकटते, तेव्हा ***"याचि डोळां"*** पाहावे, इतके देहेंद्रियांच्या क्रियांवरून सूज्ञास समजू शकते."

ज्ञानप्राकट्य

ज्ञान आकळण्यास किती कठीण आहे, हे जिज्ञासूंना सांगून ज्ञानदेव म्हणतात की ज्या अलौकिक पुरुषांठायी ते प्रकटते, त्यांच्या देह, इंद्रिये इ.च्या व्यापारावरून, ते पुरुष ज्ञानी आहेत, हे ओळखता येते. ते कोणत्या चिह्नांनी प्रकट दिसते, त्या चिह्नांचे वैशिष्ट्य काय, याचा उपोद्घात करतांना ज्ञानदेव पुढे म्हणतातः

पैं वसंताचें रिगवणें। झाडांचेनि साजेपणें।
जाणिजें तेवीं करणें। सांगती ज्ञान।।१३-१७८।।
अगां वृक्षासि पाताळीं। जल सांपडे मुळीं।
तैं शाखांचियां बाहालीं। बाहेर दिसे।।१७९।।
कां भूमीचें मार्दव। सांगें कोंभाची लवलव।
नाना आचार गौरव। सुकुलिनाचें।।१८०।।

"लता, वृक्ष अन तरूंना फुटणाऱ्या पालवीवरून जसे वसंतऋतूचे नकळत झालेले आगमन सुद्धा लागलीच ओळखू येते; त्याचप्रमाणे देहांतर्यामी प्रकटणाऱ्या ज्ञानाचा बोध इंद्रियांच्या बदलणाऱ्या लक्षणांवरून त्वरित होतो. शाखोपशाखा व पल्लवादिकांनी बहरलेल्या वृक्षास पाहिले की त्याच्या मुळांपाशी भूगर्भातले पाणी असणार हे जसे दिसून येते; किंवा लवलवणाऱ्या गवताच्या वा धान्याच्या लुसलुशीत कोंभावरून तेथली जमीन मृदु आहे हे कळते; अथवा सदाचारांवरून सुकुलिनत्व जसे दिसून येते;" आणि

अथवा संभ्रमाचियां आयतीं। स्नेहो जैसा ये व्यक्तीं।
कां दर्शनाचियें प्रशस्ति। पुण्यपुरुख।।१८१।।
ना तन्हीं केंहीं कापुर जालला। जेवीं परिमळें जाणौं आला।
कां भिंगारीं दीपु ठेविला। बाहेरी फांकें।।१८२।।
तैसें हृदयींचें ज्ञानें। जियें देहीं उमटती चिह्नें।
तियें सांगों आतां अवधानें। चांगें आईक।।१८३।।

कोणा एका व्यक्तीच्या दर्शनाच्या ओढीने व त्यावरून होणाऱ्या संतोषाने, ती व्यक्ती पुण्यात्मा असणार हेही जसे सत्वर कळून येते; किंवा आदरातिथ्य व आगतस्वागत यांवरून स्नेह जसा दृश्यमान होतो; कापूर जाळलेला आहे, हे जसे येणाऱ्या सुवासावरून समजून येते; हंड्या झुंबरे यातून फाकणाऱ्या प्रकाशावरून जसे त्यांच्यात दीपक ठेवल्याचे कळते; तसेच हृदयस्थ ज्ञान, देहीं जी चिह्ने प्रकट दर्शवते, ती तुला स्पष्ट सांगतो. हे पार्था! तू ती लक्षपूर्वक ऐक," असे श्रीकृष्ण म्हणाले.

ज्ञान्यांची मांदियाळी

येथपावेतो आपण तेराव्या अध्यायातील ***क्षेत्रविचार*** व ***ज्ञानविचार*** पाहिला. ज्ञान प्रकटल्यावर ***ज्ञानगुणलक्षणे*** कशी प्रकट होतात, याचा विचार आपण ***अमानित्वादी*** गुणांचा परामर्ष घेतांना ***(गीता श्लोक क्र.१३-७ ते ११)*** पूर्वीच विस्तारपूर्वक केला होता *(उन्मेषः१-१::ज्ञानगुणलक्षणे-१ व उन्मेषः१-२::ज्ञानगुणलक्षणे-२;पृ.क्र.१४० ते१८२व उन्मेषः११:अमृतानुभवातील गुरुदर्शन-१८५ते१९३).*

ज्ञानदेवांनीही श्रीकृष्णांच्या ***"क्षेत्रक्षेत्रयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम(१३-२)"*** या मताचा अनुवाद करतांना म्हटले होते की ***"क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातैं। जाणणें जैं निरुतैं। ज्ञान ऐसें तेयातैं। मानूं आम्ही।।१३-९।।"***. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांना ***निरुते*** म्हणजे सत्यत्वाने जाणणे हीच ***ज्ञानभूमिका*** आहे. ही प्रकट करणाऱ्या देहधारी जीवासच *ज्ञानी* अशी संज्ञा आहे. तोच जीव ब्रह्माशी एकरूप होऊन जीवन्मुक्तीचे सुख भोगत असतो.

हाच जीव म्हणजे ***निवृत्ति*** वा श्रीगुरू. सद्गुरू निवृत्तिनाथ वा ज्ञानदेव आणि तत्सम शुक-याज्ञवल्क्यादी महात्मे ब्रह्मवेत्त्यांच्या भूमिका पार पडतांना जगताचे कल्याण करत असतात! अशा जीवांची मांदियाळी अनवरत भूमंडळी सकळ भूतांवर सकळमंगळाचा वर्षाव करत, आपल्या कल्पतरूवत देहराजीने विराजत, आपल्या पीयूषमय अमृतबोलांची पखरण जगावर मुक्त मनाने करत, जीवाजीवांमध्ये चेतनाचिंतामणी जो परमात्मा, त्याची नगरेच्या नगरे वसवत, त्याच परमस्वरूप अशा अलांछन चंद्रम्याची, त्या तापहीन मार्तंडाची, सर्वत्र जगास ओळख करून देत, त्याच आदिपुरुखाच्या अखंडित भजनी सर्वत्रांना रममाण करवत, त्या सच्चिदानंदघन परब्रह्माची सोयरीक जगाला घडवीत, जगाला सज्जन करत, खळांची व्यंकटी सांडवीत, दुर्जनांत सत्कर्माची रुचि निर्माण करत व वाढवीत, भूतांत परस्पर मैत्र्याचा आविष्कार करवीत, अविद्येच्या दुरित तिमिराचा नाश करत अन परमस्वातंत्र्यप्रदायक स्वधर्मरूपी सूर्याचे म्हणजे आत्म्याचे प्रकाशकिरण सर्व विश्वात पसरवत, प्राणिमात्रांच्या समस्त इच्छाआकांक्षा ज्याच्या प्रतीक असतात त्या आत्मस्वरूपाची भेट जीवांस प्रेमादरपूर्वक करवत, स्वतःबरोबरच सर्वत्रांना सुखी व परिपूर्ण करत तिन्ही लोकी सदासर्वदा वावरत असावी, अशी त्या माउलीस्वरूप जीवन्मुक्तांची विश्वस्वरूप देवास आळवणी असते. ज्ञानदेवांनी जगासाठी विश्वात्मक देवाकडे हेच ***पसायदान*** म्हणून मागितले आहे!! याचसाठी ***अमृतानुभव*** रचला गेला असावा.

क्षेत्रज्ञविभाग (२)-ज्ञेय::::

ज्ञान त्रिपुटी

ज्ञानी, ज्ञान व ज्ञेय अशी ***ज्ञानत्रिपुटी*** जरी शब्दप्रयोगाकरता वापरता येत असली, तरी सारासार विचारांती व शास्त्रसिद्धांतानुसार तशी त्रिपुटी अस्तित्वात असू शकत नाही. हेच मत ज्ञानेशांनी *तेराव्या*

अध्यायात ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** सांगतांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने मांडले आहे, असे आपणांस जाणवते. ज्ञान व ज्ञानी यांचा विचार करण्यासाठी *तेराव्या* अध्यायात वाहिलेल्या *सातशे ओव्या* यासाठीच आहेत. त्यांचा एवढा विचार केल्यावर आपणांस आता अपरिहार्यपणे ***क्षेत्रज्ञ***दर्शनाकडे वळावे लागेल.

"गव्हरीं झाकलेले" अभिप्राय

यापूर्वी ***अज्ञानगुणलक्षणे*** *(उन्मेष:१२:अज्ञानलक्षणे (२): पृ.क्र.२०४)* हा भाग आपण निरीक्षिला होता. तेव्हा श्रोत्यांनी ज्ञानदेवांना केलेली विनंती त्यांच्याच शब्दात ऐकू या:

तूतैं श्रीमुरारी। म्हणितलें प्रगट करी।
जैं अभिप्राय गव्हरीं। झांकिलें आम्हीं।।१३-८५५।।
तैं देवाचें मनोगत। दावीत आहासि मूर्त।
हेंहीं म्हणतां चित्त। दाटेल तुझें।।८५६।।
म्हणौनि असो हे न बोलों। परि सांवियां गां संतोषलो।
जैं ज्ञानतरियें मेलविलो। श्रवणसुखाचां।।८५७।।
आतां इयावरी। जैं तो श्रीहरी।
बोलिला तैं करी। कथन वेगीं।।८५८।।

श्रोत्यांच्या विनंतीला आतुरतेने मान देऊन ज्ञानेश त्यांना श्रीहरीने ***गव्हरीं* झांकलेले अभिप्राय** स्पष्ट खुलवून सांगण्यास सुरुवात करतांना दिसतात, ते असे:

इयां संतवाक्यासरिसें। म्हणितलें निवृत्तिदासें।
जी अवधारा तऱ्हीं ऐसें। बोलिलें देवें।।१३-८५९।।
म्हणती तुवां पांडवा। हा चिह्नसमुदावो आघवां।
आयकिला तो जाणावा। अज्ञानभागु।।८६०।।
इयां अज्ञानविभागा। पाठीं देऊनि पैं गां।
ज्ञानविखीं चांगा। दृढा होईजे।।८६१।।
मग निर्वाललेनि ज्ञानें। ज्ञेय भेदैल मनें।
तैं जाणावेयां अर्जुनें। आंस केली।।८६२।।
तंव सर्वज्ञाचां रावो। म्हणें जाणौनि तेयाचां भावो।
परिसे ज्ञेयाचा अभिप्रावो। सांगो आतां।।८६३।।

"संतांच्या या विनंतीसरसे निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतात की, "आपल्या इच्छेप्रमाणे सांगतो, ते ऐका." श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात की, "आतापावेतो तुला अज्ञानचिह्नांचा समुच्चय *(गीता श्लोक क्र.१३-११)* वर्णन करून सांगितला*(उन्मेष:१०::अज्ञानलक्षणे (१)-पृ.क्र.१८७,१८८;उन्मेष:१२:अज्ञानलक्षणे(२)–१९८ ते २१०)*. अज्ञानाचा त्याग करून तू ज्ञानलक्षणे आपल्या अंगी चांगली बाणवून घे. ती गुणलक्षणे हाडीमांसीं नीट भिनली की विशुद्ध ज्ञानप्राप्ती होईल, जिच्यायोगे तुझे मन ज्ञेय वस्तू जे परब्रह्म आहे, त्याचा भेद करण्यास समर्थ होईल."

ज्ञेय स्वरूपाचे निरूपण

श्रीकृष्णांचे हे बोल ऐकून अर्जुन आंसावला की हे कसे होते, ते आपल्यालाही कळावे. त्याच्या अंतरीचा हा भाव जाणून श्रीमुरारी – तो सर्वज्ञांचा राजा – म्हणाला की "तुला आतां ज्ञेयाचे स्वरूप सांगतो. ते ऐक."

अशा रीतीने ज्ञेयाचे स्वरूप निरूपिण्यास सुरुवात झालेली आहे. हाच विषय उरलेल्या *तेराव्या* अध्यायात चर्चिला जातो. हाच वस्तुतः खरा ***क्षेत्रज्ञविचार.***

ज्ञानलक्षणे निरूपण करतांना आपण **जीवन्मुक्तावस्थेत प्रतीत होणाऱ्या क्षेत्रज्ञाचा** विचार केला होता. आता सगुणनिर्गुणाच्या सीमारेषेवरील व त्याहीपलीकडील जाणीवेच्या अतीत असणाऱ्या **निरञ्जन क्षेत्रज्ञस्वरूपा**ची ओळख करून घ्यावयाची आहे. गीता याविषयी काय म्हणते ते थोडक्यात पाहूनच आपण ज्ञानेश्वरांच्या त्यावरच्या विवेचनाकडे वळू.

गीतेचा अभिप्राय

तेराव्या अध्यायाच्या प्रथम श्लोकातच भगवंत संक्षेपाने सूचित करतात की शरीर हे ***क्षेत्र*** आहे व त्याला जाणणारा तो ***क्षेत्रज्ञ !*** या क्षेत्रज्ञाच्या व्याख्येत ज्ञानी बसतो. तसेच दुसऱ्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे ***"सर्व क्षेत्रांमध्ये श्रेत्रज्ञही भगवंतच आहे,"*** म्हणजे परमात्मा ***क्षेत्रज्ञ*** आहे.

श्लोक क्र. १३-१२ ते १८ यांचा अभिप्राय पुढे दिलेला आहे. त्यासंबंधी गीतेचे श्लोक देऊन नंतर ज्ञानदेवांच्या ओव्या पाहू या!

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तनासदुच्यते।।१३-१२।।
सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्।
सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्त्य तिष्ठति।।१३-१३।।

या श्लोकांनुसार त्या क्षेत्रज्ञाला जाणणेच योग्य आहे व त्याला जाणले असता अमृतत्व प्राप्त होते. त्या परब्रह्माला ***सत्*** ही म्हणता येत नाही व ***असत्***ही म्हणता येत नाही. तो अस्तित्वहीन आहे म्हणावे तर त्याला विश्वरूपाने अस्तित्व आहे. विश्वरूपाने तो अवस्थित आहे म्हणावे तर विश्व हा केवळ मिथ्याभास आहे; नश्वर आहे. म्हणून ते विश्वही नाही असे म्हणावे लागते. ते आदिरहित आहे. त्याला सर्व बाजूंनी हस्तपादादी अवयव, डोळे, नाक-कान, तोंड व शिर असून ते सर्व जगताला व्यापून राहिले आहे.

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितं।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च।।१३-१४।।
बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत्।।१३-१५।।

"इंद्रियरहित असूनही सर्व इंद्रियविषय जाणणारा, सर्व भूतांचे भरणपोषण करणारा, सर्व गुणांचा उपभोग घेणारा असा तो ***क्षेत्रज्ञ*** आहे. सर्व चराचर भूतमात्रात अंतर्बाह्य भरून उरलेला तो चरही आहे अन अचरही आहे, सूक्ष्म असल्याने जाणण्यास अशक्य आहे. दूर तसेच अत्यंत जवळही आहे."

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च।।१३-१६।।

"विभागरहित परिपूर्ण असूनही चराचर भूतात तो विभागलेला दिसतो. असे ते ज्ञेय विष्णुरूपाने भूतांचे धारण-पोषण करते; रुद्ररूपाने त्यांचा संहार करते व ब्रह्मच्याच्या रूपाने त्यांना उत्पन्न करते."

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्।।१३-१७।।
इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते।।१३-१८।।

"ते ज्योतींचीही निजज्योती व मायातीत आहे. तेच ज्ञान आहे, तेच ज्ञेयही आहे, ते ज्ञानानेच प्राप्त होते. ते सर्वांच्या हृदयदेशात स्थित असते. याप्रमाणे ***क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान आणि ज्ञेय*** यांना तत्त्वतः जाणून घेणारा भक्त भगवत्स्वरूप पावतो."

ज्ञा म्हणजे ***जाणणे. ज्ञेय*** म्हणजे ***जाणण्यायोग्य. ज्ञान*** म्हणजे **ज्ञेयास ओळखणे, जाणणे.** ***ज्ञानगम्य*** म्हणजे **ज्ञानाने ओळखता येणारे.** ***क्षेत्रज्ञ*** म्हणजे क्षेत्रातला ज्ञाता वा क्षेत्राचा ज्ञाता. ***ज्ञाता*** म्हणजे **जाणणारा.** ***ज्ञानिन्*** म्हणजे **ज्ञानी म्हणजे क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञान झालेला सत्पुरुष वा साधु वा महात्मा.** यातले सर्व शब्द वेगवेगळ्या संदर्भात गीता-ज्ञानेश्वरीत येतात, ते त्यांच्या या अर्थांसह, तसेच संदर्भानुसार येणाऱ्या ध्वन्यर्थासह. हे मनी ठेवून आपण वरील श्लोकांचा ज्ञानदेवकृत अनुवाद पाहू या:

ज्ञेय

तऱ्हीं ज्ञेय ऐसें म्हणणें। वस्तूतें येणेंचि कारणें।
जैं ज्ञानेंवांचूनि कवणें। उपायें न ये।।१३-८६४।।
आणि जाणतलेयावरौतें। कांहीं करणें नाही जेथें।
जाणणेंचि तन्मयातें। आणी जेयाचें।।८६५।।
जैं जाणलेयाचि साठीं। संसाराची काढूनियां कांटी।
जिरौनि जाईजे पोटीं। नित्यानंदाचां।।८६६।।
तैं ज्ञेय गां ऐसें। आदि जेयां नसे।
परब्रह्म आपैसें। नांव जेयां।।८६७।।

"त्या ब्रह्मवस्तूला ***ज्ञेय*** म्हणण्याचे कारण असे की ते ज्ञानावाचून इतर कोणत्याही उपायाने सापडत नाही. आणि ज्ञान झाले असता म्हणजे त्या वस्तूला जाणून घेतल्यावर इतर कोणताही उपाय करावा लागत नाही; कारण की ज्ञान होणे व त्या वस्तूशी तन्मयता होणे ही दोन्ही एकसमयावच्छेदेकरूनच होतात. आणि ज्ञेय जाणल्याबरोबरच संसार नाहीसा होऊन जीव नित्यानंदस्वरूप होऊन जातो. त्या ज्ञेयाला ***अनादि परब्रह्म*** म्हणून ओळखले जाते."

याप्रमाणे वर म्हटल्याप्रमाणे ज्ञाता व ज्ञेय एकरूप होणे व त्यात ज्ञानसुद्धा हरपून जाणे, हेच ज्ञानाचे कार्य समजता येईल.

जैं नाहीं म्हणों जाईजे। तंव विश्वाकार देखिजे।
आणि विश्वचि ऐसें म्हणिजे। तरि हे माया।।१३-८६८।।
रूप वर्ण व्यक्ती। नाही दृश्य द्रष्टा स्थिती।
तऱ्हीं कोणें कैसें आथी। म्हणावें पां।।८६९।।
आणि सांचचि जऱ्हीं नाही। तऱ्हीं महदादिक कोणें ठाईं।
स्फुरत कैंचें काईं। तेणेंवीण असे।।८७०।।

"ती वस्तू ब्रह्माकार आहे, असे म्हणू गेल्यास ती विश्वरूपाने प्रकटतांना दिसते व ती साकार आहे असे म्हटले तर विश्व हा मायेचा खेळ आहे असे कळते. सिद्धांताप्रमाणे त्या ज्ञेयास रूप, रंग व आकार नसल्याने दृश्य व द्रष्टा ही स्थिती संभवत नाही. त्यामुळे विश्व म्हणजे ज्ञेय म्हणावे तरी पंचाईत व विश्व केवळ आभास असल्याने ज्ञेयसुद्धा अस्तित्वात नसावे असे म्हटल्यास, महत्तत्त्वादी ज्याच्याठायी स्फुरतांना दिसतात, ते ज्ञेय अस्तित्वहीन म्हणावे तरी पंचाईत, अशी त्या ज्ञेयाचा विचार करू जाणाऱ्यांची द्विधा अवस्था होते."

म्हणौनि आथी नाथी हे बोली। जैं देखौनि मुकी जाहली।
विचारासीं मोडली। वाट जेथें।।१३-८७१।।
जैसीं भांडघटशरावीं। तदाकारें असे पृथ्वी।
तैसें सर्व होऊनियां सर्वी। असे जैं वस्तू।।८७२।।

"अशा रीतीने ***अस्ति-नास्ति*** ही भाषा ज्याला पाहून मुकी झाली, जेथे बुद्धीचा मार्ग संपला, विचार जेथे पाऊलही घालू शकत नाही; पृथ्वी जशी घागर, माठ, परळ, भांडे इ.मातीच्या पदार्थात, त्या त्या वस्तूच्या आकाराने त्या त्या आकाराची होऊन वसते, अशी ती *ज्ञेय वस्तू* सर्व विश्वरूपाने प्रकट होऊन सर्व पदार्थात भरून राहिली आहे."

अशा रीतीने सिद्धांताप्रमाणे व शास्त्रानुसार ब्रह्माचे जे निर्गुण, निराकार, नामहीन, रूपहीन इ.वर्णन केले जाते, त्याचा व आपल्याला विश्वाच्या येणाऱ्या साकार प्रचीतीचा मेळ कसा बसत नाही, हे ज्ञानदेव येथे सूचित करतात व आपला सिद्धांत मांडण्यास सुरुवात करतात की ***ब्रह्म हे विश्वातल्या यच्चयावत वस्तुमात्रात त्या त्या वस्तूच्या रूपाने भरून राहिलेले आहे*** . तत्त्वज्ञांनी यालाच ***चिद्विलासवाद*** असे नांव दिलेले आहे. त्याचा मागोवा आपणांस ज्ञानेश्वरी वाचतांना वेळोवेळी घ्यावा लागतो.***चिद्विलासवाद*** असे नांव दिलेला तो तत्त्वज्ञानाचा भाग आपण प्रसंगोपात्त पाहतच जात आहोत. असो. ज्ञेय वस्तूविषयी पुढे पाहू या.

आघवांचि देशीं कालीं। नव्हता देशकालावेगळीं।
जैं क्रिया स्थूलास्थूलीं। तैंचि हात जेयांचें।।१३-८७३।।
तेयांतैं याकारणें। विश्वबाहू ऐसें म्हणणें।
जैं सर्वचि सर्वपणें। सर्वदा करीं।।८७४।।
आणि समस्तांहीं ठायां। एकें कालीं धनंजया।
आलें असें म्हणौनि जेयां। विश्वांघ्रि नांव।।८७५।।

"सर्वत्र व सर्व काळी स्थूल व सूक्ष्म भूते, तसेच व्यक्त व अव्यक्त दशेतील पदार्थमात्रांच्या क्रिया सर्वांतर्यामी असणाऱ्या चैतन्यसत्तेद्वारे होतात, म्हणून त्या ज्ञेयास सर्वत्र हस्त आहेत; तसेच सर्वत्र जे काही

होत असते, केले जात असते, ते हेच ***ज्ञेय*** करत असल्याने, त्याला ***विश्वबाहू*** असे नांव आहे. हे सर्वदा सदा उपस्थित असते, म्हणून सर्वत्र पाद असणारे ते **ज्ञेय *विश्वांघ्रि*** म्हणून ओळखले जाते."

पैं सवितयां आंग डोळें। नाहीत वेगवेगळें।
तैसें सर्वद्रष्टें सकळें। स्वरूपें जैं।।१३-८७६।।
म्हणौनि विश्वतश्चक्षु। हा अचक्षुचां ठायीं पक्षु।
बोलावयां दक्षु। जाहला वेदु।।८७७।।

"सूर्य बिंबरूपाने सर्वत्र पाहतो, त्याचप्रमाणे सर्व भूतांठायी द्रष्टा म्हणून हेच ज्ञेय विद्यमान असल्याने, या अचक्षूला वेदसुद्धा ***विश्वतश्चक्षु*** म्हणजे सर्वत्र नेत्र असणारा असे म्हणू लागले. विश्वात जे काही दृश्यरूपाने विद्यमान असते, त्या सर्वांना पाहणारा द्रष्टा म्हणजे हे ज्ञेयच होय."

जैं सर्वांचियां शिरीवरीं। जैं नांदे नित्य सर्वांपरी।
ऐसिये स्थितीवरी। विश्वमूर्धा म्हणिपे।।१३-८७८।।
पैं गां मूर्त्ति तैंचि मुख। हुताशनीं जैसें देख।
तैसें सर्वपणें अशेख। भोक्ते जैं।।८७९।।
ययालागीं तेयां पार्था। विश्वतोमुख ही वेवस्था।
आली वाक्पथा। श्रुतिचियां।।८८०।।

"मूर्धास्थान हे टाळूवर असते. सर्व भूतमात्रेच ज्याचे देह आहेत, असे ते ***ज्ञेय*** असल्याने, त्यांच्या मूर्ध्निस्थानी अवस्थित असणारे - ***"त्यत्तिष्ठत् दशाङ्गुलम्"*** - या न्यायाने राहणारे ते **ज्ञेय *विश्वमूर्धा*** म्हणजे ***विश्वाचे मूर्ध्निस्थान*** म्हणून वेदांतरी प्रसिद्ध आहे. अग्नीचा देह म्हणजेच त्याचे जसे मुख असते व तो सर्व अंगांनी जसा आहुती स्वीकारत असतो; त्याचप्रमाणे विश्वात जे जे म्हणून भोग्य आहे, त्या त्या सर्वांचा भोक्ता असल्याने त्या ज्ञेयास, हे पार्था! श्रुतींनी जाणूनबुजून ***विश्वतोमुख* म्हणजे *"सर्वत्र आहे मुख ज्याचे"*** असे म्हटले आहे."

आणि वस्तुमात्रीं गगन। जैसें असे संलग्न।
तैसें शब्दजातीं कान। सर्वत्र जेयां।।१३-८८१।।
म्हणोनि आम्ही तेयांतैं। म्हणो सर्वत्र आइकतें।
एवं जैं सर्वांतैं। आवरूनि असे।।८८२।।

"आणि आकाश जसे सर्व वस्तुमात्रात भरून असते, तसे शब्दादींठायी श्रौतेंद्रियस्वरूपाने जे विद्यमान असते व जे काही वाच्य आहे, ते सर्व ऐकणारे हे ***ज्ञेय***च असल्याने, त्याला सर्वत्र कर्णेंद्रिये आहेत, असे म्हटले जाते. अशा प्रकारे सर्व पदार्थांना व्यापून असणाऱ्या त्या ज्ञेय वस्तूला सर्वत्र हस्त-पादादी इंद्रिये आहेत, असे म्हटले जाते, अशी श्रुतींचीही साक्ष आहे."

द्वैत व अद्वैत

जे खरे तर निर्गुण, निर्विकार असे परब्रह्म आहे, त्याच्यावर सगुणत्वाचा अशा प्रकारे आरोप का व कसा केला जातो, हे सांगतांना ज्ञानदेव श्रीकृष्णांच्या ***"सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्"*** या उक्तीवर पुढील ओव्यांद्वारे भाष्य करतातः

एऱ्हवीं तऱ्हीं महामति। विश्वतश्चक्षु इयां श्रुति।
तेयाचियां व्याप्ति। रूप केलें।।१३-८८३।।
वांचूनि हस्त नेत्र पायें। हे भाष तेथ कें आहे।
सर्वशून्यतेचां न साहे। निष्कर्षु जैं।।८८४।।
पैं कल्लोलांतैं कल्लोळें। ग्रासिजत असे ऐसें कलें।
परि ग्रसितां ग्रासावेगळें। आहे काईं।।८८५।।

"हे महाबुद्धिमान अर्जुना! ज्ञेय कसे सर्वव्यापक आहे, हे सूचित करण्यासाठीच केवळ श्रुतीने त्याचे ***विश्वतश्चक्षु*** असे वर्णन केले आहे. ज्ञेय सर्वव्यापक आहे; सर्वत्र त्याची सत्ता आहे; हे बोलणेदेखील खरे तर जेथे खुंटते, त्याला सर्वत्र हात, पाय, डोळे असतात, हे म्हणणे कुठपावेतो चालेल! पाण्याच्या लाटांनी एकदुसऱ्यास गिळावे, तर पाण्यानेच पाण्याला गिळले असे वस्तुतः सत्य असते; गिळणारे व गिळले जाणारे हे एकमेकांशी अभिन्नच असतात."

तैसें सांचचि जैं एक। तेथ कैं व्याप्य व्यापक।
परि बोलावेयां नांवेक। करावें लागे।।१३-८८६।।

"त्याचप्रमाणे ज्ञेय व दृश्य ही दोन्ही वस्तुतः एकच असतांना, हा पाहणारा-ते पाहिले जाणारे, हा ऐकणारा-ते ऐकले जाणारे, हा खाणारा - ते खाल्ले जाणारे, हा पथक्रमण करणारा - तो पथक्रमणा होणारा, हा व्यापणारा - ते व्यापले जाणारे; इ.असे भेदाभेद तेथे कसे असणार! पण त्या केवळ एकमात्र असणाऱ्या ज्ञेयास आपल्या समजुतीच्या कक्षेत आणण्यासाठीच हा सगळा खटाटोप करावा लागतो."

<u>पैं शून्य जैं दावावें जाहलें। तैं बिंदुलें एक पाहिजे केलें।</u>
<u>तैसें अद्वैत सांगावें बोलें। तैं द्वैत कीजे</u>।।१३-८८७।।

"वास्तविक ***शून्य*** म्हणजे अभाव - जेथे काहीच नाही ते. त्या शून्याला बुद्धीच्या आवाक्यात आणण्यासाठीसुद्धा त्याचे प्रतीकस्वरूप असे आळे (०) म्हणून करावे लागतेच ना! त्याचप्रमाणे ***अद्वैत*** म्हणजे दुसरे नाहीच, असे जे परब्रह्म, त्याचा परिचय करून देतांना द्वैतात्मक भाषेचा प्रयोग करावा लागतो. हे जे सर्व दिसते, भासते आहे, ते सर्व जगत, त्यातील यच्चयावत पदार्थांसह, गुणांसह, व्याप्तिसह केवळ एकमात्र ज्ञेयच आहे, अशी द्वैती भाषा म्हणूनच वापरावी लागते."

एऱ्हवीं तऱ्हीं पार्था। गुरुशिष्यसत्पथा।
आडलु पडे सर्वथा। बोलु खुंटे।।१३-८८८।।
म्हणौनि गां श्रुति। द्वैतभावें अद्वैतीं।
निरूपणाचि वाहती। वाट केली।।८८९।।

"हे पार्था! अशी भाषा वापरूनच शिष्यास गुरू वास्तव अद्वैताचा बोध करून देऊ शकतात. अन्यथा गुरुशिष्यसंबंध शिल्लक राहणारच नाही; कारण त्या अद्वैताला ते आहे, ते नाही, ते असे आहे, ते तसे नाही, अशा स्वरूपाची ***आथी-नाथी*** भाषासुद्धा लागू पडत नाही.

श्रुतींनीसुद्धा केवळ हेच साधण्यासाठी - अद्वैताचा बोध करून देता यावा म्हणून - त्या ज्ञेयाची ***विश्वतोमुख, सर्वतश्चक्षु, सर्वतः पाणिपादं, सर्वतोऽक्षिशिरोमुखम्, सर्वतः श्रुतिमल्लोके, सर्वमावृत्त्यतिष्ठति*** अशा प्रकारची सविशेष वर्णने केली आहेत."

सगुण तेच निर्गुण

तैंचि आतां अवधारीं। इयें नेत्रगोचरें आकारीं।
तैं ज्ञेय जियापरि। व्यापक असे।।१३-८९०।।

"नेत्रांस गोचर होणारे ते ज्ञेयाचे स्वरूप किती व्यापक आहे, ते कसे आहे, ते आता ऐक."

या प्रकारे सांगून ***"सर्वेन्द्रियगुणाभासं..... ।।१३-१४।। ते .....ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं.... ।।१३-१७।।"*** या गीताश्लोकांतून परब्रह्माचे जे दर्शन करून देण्यात आले आहे; ते सगुण असूनही निर्गुण कसे, सविकारी दिसत असूनही निर्विकार कसे; इ.बाबत निरूपण करतांना ज्ञानदेव म्हणतात:

तऱ्हीं तैं गां किरीटी ऐसें। आकाशीं आकाश जैसें।
पटीं पटु होऊनि असे। तंतु जेवीं।।१३-८९१।।
उदक होऊनि उदकीं। रसु जैसा अवलोकीं।
दीपपणे दीपकीं। तेज जैसें।।८९२।।
कर्पूरत्वें कापुरीं। सौरभ्य असे जेयापरी।
शरीर होऊनि शरीरीं। कर्म जेवीं।।८९३।।
किंबहुना जैसें पांडवा। सोनेंचि सोनेयाचां रवा।
तैसें जैं या सर्वां। सर्वांगीं असे।।८९४।।

"अर्जुना! अवकाशात आकाश जसे असते; पटात वस्त्ररूपाने धागे वा सूत जसे असते; पाण्यामध्ये रस जसा पाणी होऊनच राहतो; कापुरामध्ये सुगंध जसा कापूर होऊन वसतो; देहात कर्मच जसे देहरूपाने असते; किंबहुना सोने जसे सोन्याच्या तुकड्यात राहते; तसेच ते ज्ञेय सर्व विश्वात विश्वरूपाने असते; विश्वातील यच्चयावत भुतांची देहेंद्रिये म्हणजे त्याचीच देहेंद्रिये होत."

परि रवेपणामाजिवडे। तंव रवा ऐसें आवडे।
वांचूनि सोने सांगडे। सोनया जेवीं।।१३-८९५।।
पैं गां वोघुचि वांकुडा। परि पाणी उजु सुहाडा।
वह्नी आला लोखंडा। लोह नव्हें कीं।।८९६।।
घटाकारें वेंटोलें। तेथ नभ गमे वाटोलें।
मठीं तऱ्हीं चौफलें। आयें दिसें।।८९७।।
परि तैं अवकाश जैसें। नोहेजतिचि कां आकाशें।
जैं विकार होऊनि तैसें। विकारी नोहें।।८९८।।

"परंतु सोने जरी सोन्याच्या तुकड्याच्या रूपाने दिसत असले, तरी सोन्याचे गुणधर्म चोखच असतात त्यात कोणतेही न्यून येत नाही; पाण्याची धार जरी वाकडी असली तरी पाण्याच्या गुणधर्मात काहीच फरक पडत नाही व ते स्वतः वाकडे झाले असे काही म्हणता येत नाही; किंवा लोखंडाची निर्मिती करतांना व त्याला विविध आकार देतांना त्याचा अग्नीशी संयोग करावा लागत असला तरी जसा लोहात अग्नी नसतो; अथवा घटाच्या आकारामुळे आकाश वाटोळे दिसले किंवा मठातले आकाश चौकोनी आकाराचे दिसले, तरी त्या त्या आकारांचे ते जसे होत नाही; त्याचप्रमाणे सर्व विश्वरूपाने विलसतांना ते ज्ञेय जरी दिसले, सर्व इंद्रियांत ते जरी असले, तरीही त्यामुळे ते विकरले आहे - इंद्रियरूपाने आहे, असे मात्र, हे पांडवा! तू समजू नकोस."

"एर सोने तैं सोने"

विकार म्हणजे **बदल वा रूपांतर. *विकिरण*** म्हणजे **पसरणे. *विकृति*** म्हणजे **विकार**, या अर्थी हे शब्द येथे समजले पाहिजेत. ज्ञेय विश्वरूपात, सर्वेंद्रियात रूपांतरित झालेले दिसत असले, तरी त्यात तसे कोणतेही बदल झालेले नाहीत, हे येथे दर्शवलेले आहे. त्याविषयी अधिक स्पष्टीकरण पुढे पाहू याः

मन मुख्य इंद्रियां। सत्त्वादी गुणां ययां।
सारिखें ऐसें धनंजया। आवडे कीर।।१३-८९९।।
परि पैं गुळाची गोडी। नोहे बांधया सांगडी।
तैसीं गुण इंद्रियें फुडीं। नाहीं तेथ।।९००।।

"हे धनंजया! सत्त्वादी गुणांपासून इंद्रिये झालीत, त्या सर्वांत मन हे प्रमुख आहे. त्या इंद्रियांसारखे ते ज्ञेय दिसते. परंतु ज्याप्रमाणे गुळाची गोडी त्याला ढेप वा इतर आकारांमुळे असते, असे म्हणणे जसे चुकीचे आहे; त्याचप्रमाणे त्रिगुणमय व इंद्रियरूप दिसत असणाऱ्या ज्ञेयास गुणसंबंध वा इंद्रियविकिरण हे ज्ञेयत्व प्रदान करतात, असे मात्र नाही; तर ते ज्ञेय गुण व इंद्रिये यांच्याहून भिन्नच आहे."

अगां क्षीराचिये दशें। घृत क्षीराकारें असें।
परि क्षीरचि नोहे जैसें। कपिध्वजा।।१३-९०१।।
तैसें जैं इये विकारीं। विकार नोहें अवधारीं।
पैं आकारा नाम भोंवरी। एर सोने तैं सोने।।९०२।।
इया उघड मऱ्हाटियां। तैं वेगलेपण धनंजया।
जाण गुणइंद्रियां। पासौनियां।।९०३।।

"दुधाच्या अवस्थेत घृत हे दुधाच्या रूपात असते, परंतु दुधाला जसे घृत असे म्हणता येत नाही, तसेच, हे कपिध्वजा! या विकरित गुणेंद्रियांत ते ज्ञेय त्या त्या रूपाने असले, तरी ती ती इंद्रिये वा गुण म्हणजे ***ज्ञेय*** नव्हे.बुगडीमध्ये सोन्याने जो आकार धारण केलेला असतो, त्या आकारामुळे तिला *बुगडी* असे नाम प्राप्त होते. पण त्यातले सोने आपले नाम न बदलता व बुगडी हे नाम न धारण करता जसे सोने म्हणूनच ओळखले जाते; तसेच या ज्ञेयास कोणताही आकार प्राप्त झाला तरी ते ज्ञेय केवळ ज्ञेयरूपानेच विलसते व ओळखले जाते. त्या त्या आकार व विकारांना काही ***ज्ञेय*** ही संज्ञा प्राप्त होत नाही; इतका त्यांचा परस्परसंबंध, हे धनंजया! सुस्पष्ट आहे. **गुण व इंद्रिये यांपासून ते *ज्ञेय* असे भिन्न आहे."**

नामरुपसंबंधु। जातिक्रियाभेदु।
हा आकारासाठींच प्रवादु। वस्तूसि नाही।।१३-९०४।।
तैं गुण नव्हें कहीं। गुणां तेयां संबंधु नाहीं।
तऱ्हीं तेयांचियां ठायीं। आभासती।।९०५।।

"ते ज्या ज्या वस्तूत असते, त्या त्या वस्तूस नाम असते, वेगवेगळे रूप असते; वस्तूवस्तूत जातिक्रियादी भेद असतात; ते सर्व केवळ त्या ज्ञेयाने घेतलेल्या भिन्नभिन्न आकारांमुळेच भासतात. परंतु नामरूप-जाति-क्रियादी गुणधर्म त्या ज्ञेयास अजिबात असत नाहीत; त्रिगुण म्हणजे ज्ञेय नव्हे; इंद्रियादी म्हणजे ज्ञेय नव्हे; तर ही सर्व त्या ज्ञेयाच्या ठायी भासतात, हे तू नीट लक्षात घे."

श्रीकृष्णोक्तीतील विरोधाभासाचा निरास

येतुलेयासाठी। संभ्रांतांचां पोटीं।
ऐसें जाय किरीटी। ना हेचि धरी।।१३-९०६।।
तऱ्हीं तैं गां धरणें ऐसें। अभ्रांतैं जेवीं आकाशें।
कां प्रतिवदन जैसें। आरिसेनि।।९०७।।
सूर्य प्रतिमंडळ। जैसेनि धरी सलिल।
कां रश्मिकरीं मृगजल। धरिजे जेवीं।।९०८।।

"असे असणारे ते ज्ञेय वास्तविकतः अलिप्त असूनही केवळ मायाभ्रमाने या विश्वाला धारण करणारे व पोषण करणारे दिसते, ते केवळ आकाश जसे ढगांना धारण करते तसेच; किंवा आरसा जसा प्रतिबिंबाला धारण करतो तद्वत; किंबहुना जल जसे सूर्याचे प्रतिबिंब, सूर्याशी वास्तविक संबंध नसतांना धारण करते; किंवा सूर्यकिरणच जसे मृगजळाचा आभास उत्पन्न करतात; त्याचप्रमाणे ते ज्ञेय निर्गुण म्हणजे त्रिगुणविरहित असूनही, या विश्वातील यच्चयावत सृष्टीस धारण करते."

तैसें गां संबंधेवीण। ययां सर्वांतैं धरी निर्गुण।
एरी तैं वांयां जाण। मिथ्यादृष्टी।।१३-९०९।।
आणि ययापरी निर्गुणें। गुणातैं भोगणें।
रंका राज्य करणें। स्वप्नीं जैसें।।९१०।।
म्हणौनि गुणाचां संगु। अथवा गुणभोगु।
हा निर्गुणीं लागु। बोलों नयें।।९११।।

"विश्व व ते निर्गुण ज्ञेय वस्तुतः संबंधविरहितच आहेत. परंतु केवळ मिथ्या अशा मायादृष्टीचा वा त्रिपुटीचा अंगीकार करणाऱ्या जीवांना उगाचच ते निर्गुण सगुणत्वाने नांदत असल्याचा आभास निर्माण होतो. रंकाने स्वप्नांतरी राजा व्हावे, हे जसे व्यवहारतः मिथ्या आहे; त्याचप्रमाणे त्या सर्वेंद्रियविवर्जित ज्ञेयाने, सर्वेंद्रिये व त्रिगुण प्रकट करत, या विश्वाचा उपभोग घेतलासे वाटणे आहे. निर्गुणास गुणसंग वा गुणोपभोग हे कदापिही संभवत नाहीत."

महाशून्य व चिद्विलास

याप्रमाणे ***ज्ञेयवर्णन*** व त्याचा ***प्रतिभास*** कसा होतो हे सांगितल्यावर श्रीज्ञानदेव ते *ज्ञेय* एकमात्र कसे आहे हे स्पष्ट करतांना, ते भूतमात्रात अंतर्बाह्य भरून दिसत असले; सूक्ष्म असल्याने जाणण्यास दुर्गम असले व जवळपास तसेच सर्वदूर पसरलेले भासत असले; भूतमात्रात विभक्तपणाने नांदतांना दिसत असले; विश्वातील यच्चयावत भूतांचे भरणपोषण, निर्मिती-संहार करणारे वाटले; तरी ते कसे अलिप्तपणेच नांदते, हे व्यक्तवतांना म्हणतातः

जैं चराचर भुतां-। माजीं असे पांडुसुता।
नाना वह्नी उष्णता। अभेदें जैसीं।।१३-९१२।।
तैसेनि अविनाशभावें। जैं सूक्ष्म दशें आघवें।
व्यापूनि असे तैं जाणावें। ज्ञेय एथ।।९१३।।
जैं एक आंतु बाहेरी। जैं एक जवल दुरी।
जैं एकवांचूनि परी। दुजीं नाही।।९१४।।

"हे पांडुपुत्रा! चर व अचर अशा भूतमात्रांमध्ये भिन्नत्वाने भासणारे ते ***ज्ञेय,*** ज्याप्रमाणे उष्णता वेगवेगळ्या ठिकाणच्या अग्नीत नांदते, त्याप्रमाणे नांदत असते. ***ज्ञेय*** वा ***चैतन्य*** ही जी त्याची स्थिती भूतमात्रांमध्ये जीवरूपाने नांदतांना दिसते, ती स्थिती ***सूक्ष्म*** म्हणजे जाणिवेपलीकडील आहे. ***चैतन्य*** वा ***जीव*** म्हणून प्रख्यात असणारी ही ज्ञेयस्थिती अविनाशी आहे व समस्त विश्वाला ती व्यापून अवस्थित असते. ***जीव, चैतन्य, अविनाशी प्रकृति*** वा ***माया, परा प्रकृति*** इ. विविध नामांनी ओळखली जाणारे ते सर्व **ज्ञेय** आहे. तेच सर्वांतर्यामी आहे. दृश्य पदार्थातही तेच आहे. तेच विश्वात अथपासून इतिपर्यंत ओतप्रोत ओसंडत आहे. त्या एकमेव ज्ञेयावाचून समस्त विश्वात इतर काहीच नाही. ***द्रष्टा व दृश्य*** ही दोन्ही **ज्ञेय**च आहेत."

क्षीरसागरींची गोडी। माजीं बहु थडिये थोडी।
हे नाहीं तेयां परवडी। पूर्ण जैं गां।।१३-९१५।।
स्वेदजप्रभृति। वेगलालां भूतीं।
जेयांचियें अनुस्यूतीं। खौमणें नाही।।९१६।।

"क्षीरसागराचे पायस जसे काठापासून तो तहत मध्यभागापावेतो एकाच गोडीचे वा चवीचे असते, कोठे थोडे कमी वा अधिक मधुर असत नाही; तसेच हे ज्ञेय चैतन्यरूपाने सर्व प्रकृतींत सारखेच समप्रमाणात व पूर्णरूपाने नांदते. स्वेदजादी चतुर्वर्ग प्राण्यांत वा भूतात, प्रत्येक जीवात, ते विभागलेले दिसत असले तरी अविभक्तपणे, कोणातही थोड्यासुद्धा न्यूनमात्रेने न नांदता, पूर्णरूपाने प्रकटत असते. ***"पूर्णमदः। पूर्णमिदं। पूर्णात् पूर्णमुदच्यते।"*** या श्रुतीप्रमाणे ते विभक्त होऊ शकत नसणारे आहे."

पैं श्रोतेमुखटिलका। घटसहस्रां अनेकां।
माजीं बिंबौनि चंद्रिका। न भेदें जेवीं।।९१७।।
नाना लवणकणाचियें राशी। क्षारता एकचि जैसीं।
कां कोडी एकीं ऊसीं। एकचि गोडी।।९१८।।
तैसीं अनेकीं भूतजातीं। जैं आहे एकीं व्याप्तीं।
विश्वकार्या सुमती। कारण जैं गां।।९१९।।

म्हणौनि हा भूताकारु। जेथौनि तैंचि तेयां आधारु।
कल्लोळां सागरु। जियापरी।।९२०।।

"हे श्रोत्यातील श्रेष्ठोत्तमा! ज्याप्रमाणे चंद्रिका सहस्त्रावधी घटातील जलात प्रतिबिंब रूपाने सहस्त्रधा झालेली दिसली, तरी आपल्या पूर्णत्वाने नभातील तारांगणात एकलेपणाने विद्यमान असते, अखंड असते, परिपूर्ण असते; अगदी त्याचप्रमाणे, किंबहुना ज्याप्रमाणे मीठाच्या वेगवेगळाल्या कणात खारटपणा सारखाच राहूनही त्या खारटपणाला त्यायोगे विभागले जाऊ शकत नाही; वा कोटिकोटी उसांमध्ये गोडी विभागली न जाता जितकीच्या तितकीच असते, त्याचप्रमाणे विश्वाला कारणीभूत असणारे ते ज्ञेय, अनेक भूतमात्रांना व्यापत असूनही, अविभक्त न होता, प्रत्येक भूतात पूर्णत्वाने विलसत असते. सागर ज्याप्रमाणे कोट्यवधी तरंगांशी अभिन्नत्वाने असतो, त्याचप्रमाणे समस्त भूतमात्रांना आधार असणारे ते ज्ञेय त्या भूतांशी अभिन्नत्वाने असते."

याप्रमाणे ज्ञेय अलिप्त असूनही जीव-प्रकृतीशी अभिन्न कसे, हे स्पष्ट केल्यावर ज्ञानेश जीवप्रकृतीच्या विलयी, सर्व भूतांचा अस्त झाला असता, त्रिगुणदशा मावळून शून्यावस्था व त्यापलीकडील अवस्था झाल्यावरही **महाशून्यत्वा**ने आपले आपण कसे नांदते, ते प्रकट करतातः

बाल्यादि तिहीं वयसीं। काया एकचि जैसीं।
तैसें आदि स्थिती ग्रासीं। अखंड जैं।।१३-९२१।।
सायंप्रातर्मध्याह्न। होतां जातां दिनमान।
जैसें कां गगन। पालटेना।।९२२।।
अगां सृष्टीवेळीं प्रियोत्तमा। जेयां नांव म्हणती ब्रह्मा।
व्याप्ती जैं विष्णुनामा। पात्र जाहलें।।९२३।।
मग आकारु हा हारपे। तेव्हां रुद्र जैं म्हणिपे।
तैंहीं गुणत्रय जेव्हां लोपे। तैं जैं शून्य।।९२४।।
नभाचें शून्यत्व गिळूनि। गुणत्रयातैं नुरवूनि।
तैं शून्य तैं महाशून्य। श्रुतिवचनसंमत।।९२५।।

गीता श्लोक क्र. ७-५ ते ७ यांमध्ये ***"अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्। जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्"*** असे ज्ञेयापासून असणाऱ्या ***अपरा*** वा ***अष्टधा*** प्रकृतीचे व सर्व जीवांना धारण करणाऱ्या ***परा प्रकृति,*** त्यांच्यापासून उत्पन्न होणारी समस्त भूते, तसेच ***"अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा"*** व ***"मत्तः परतरं नास्ति किञ्चिदस्ति धनञ्जय। मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।।"*** असे जे ***ज्ञेय,*** तेच जगाच्या उत्पत्तीरूप व प्रलयरूप असण्याची, तसेच ज्ञेयाव्यतिरिक्त दुसरे किंचिन्मात्रही नसून सर्व जगत दोऱ्यात जसे मणी ओवावेत, तसे ज्ञेयाठायी ओवलेले असण्याची विधाने आली होती.

त्यांचे वर दाखवल्याप्रमाणे ***"अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्।"*** व इतर ***"असक्तं सर्वभृच्चैव," "भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च।"*** या विधानांशी परस्परमेलन करतांना ज्ञानदेव म्हणतात कीः

"बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तिन्ही वयोमानपरत्वे प्राप्त होणाऱ्या दशात देह जसा तोच असतो, त्याचप्रमाणे विश्वाच्या आरंभी, विश्वावस्थेत, तसेच विश्वाच्या अंतीसुद्धा तेच ज्ञेय अखंड स्वरूपात विद्यमान असते. प्रातःकाल, मध्याह्नकाल वा सायंसमयी जसे गगन पालटत नाही; त्याचप्रमाणे सर्जनसमयी ब्रह्मारूपाने असणारे, सृष्टी असतेवेळी विष्णुनामाने ओळखले जाणारे, विश्वप्रलयकाली रुद्र नांवाने विख्यात असणारे, **गुणत्रयांच्या साम्यावस्थेत महाकाशरूपी शून्याला गिळून उरणारे *जे शून्य* व *महाशून्य* म्हणजे *पुरुष व प्रकृति या द्वयीपलीकडील जो भाव,*** ही सर्व होतजात असतांनासुद्धा त्या ज्ञेयाच्या अखंड स्थितीला थोडाही धक्का लागत नाही."

या ओव्यात ज्ञानेश ज्या श्रुतीवचनाचा निर्देश करतात, ते म्हणजे **नासदीय सूक्ता**तील ***"असत् वा इदमग्र आसीत्"*** आहे, असे जाणकारांचे मत आहे. तसेच पुनः आपणांस ज्ञानदेव नाथपंथोक्त परिभाषा ***शून्य, महाशून्य, नभाचे शून्यत्व*** हे शब्द उपयोजून वापरतांना दिसतात. त्यांचा यथोक्त परिचय योगाच्या अंतरंगात आपण जेव्हा डोकावू, तेव्हा आपोआपच होईल.

ज्ञेय हेच विश्वाचे सार व सर्वस्व

यानंतर ज्ञेय, ज्ञान व जगत ही सर्व एकच असून ते परब्रह्म सर्वांच्या हृदयस्थ असणाऱ्या परमात्मरूपाने स्थित आहे, हे ज्ञानदेव पुढील ओव्यांतून दिग्दर्शित करतात, ते पाहू याः

जैं अग्नीचें दीपन। जैं चंद्राचे जीवन।
सूर्याचें नयन। देखती जेणें।।१३-९२६।।
जेयाचेनि उजियेडें। तारांगण उबडे।
महातेज सुरवाडें। जेणें राहाटे।।९२७।।
जैं आदीचीं आदी। जैं वृद्धीची वृद्धी।
बुद्धीची जैं बुद्धी। जीवाचा जीवु।।९२८।।
जैं मनाचें मन। जैं नेत्राचें नयन।
कानाचें कान। वाचेची वाचा।।९२९।।
जैं प्राणाचा प्राण। जैं गतीचें चरण।
क्रियेचें कर्तेपण। जेयाचेनि।।९३०।।

"ते ज्ञेयच अग्नीला दीपविते; चंद्राला अमृत प्रदान करते; सूर्याचा जे नेत्र आहे, जेणेकरून तो समस्त विश्व प्रकाशमान करू शकतो; तारांगणसुद्धा त्याच्याच तेजाने लखलखते आणि महातेजस्वी भास्करसुद्धा त्याच्याच आधाराने राहाटतो. तेच सृष्टीच्या प्रारंभी होते. तेच सृष्टीचा विकास करणारे आहे. बुद्धीला बुद्धित्व देणारे तेच तत्त्व आहे. जीवाला जीवपण त्याच्यामुळेच लाभते. मनाचा गाभाही तेच आहे. **आदिमन**ही तेच आहे. नेत्रातील ज्योतीही तेच आहे. श्रोत्रेंद्रियांची श्रवणशक्ती त्याच्याच विद्यमाने आहे. वाचेला वचनसामर्थ्य

त्याचेच आहे. प्राणांचे प्राणपणही ते ज्ञेयच आहे.चरणांची गतिशीलता त्याच्याचपासून आहे. क्रियाशक्ती त्याच्याचमुळे कर्तृत्ववान आहे."

आकारु जेणें आकारें। विस्तारु जेणें विस्तारें।
संहारु जेणें संहरे। पांडुकुमरा।।१३-९३१।।
जैं मेदिनीची मेदिनी। जैं पाणी पिऊनि असे पाणी।
तेजा दिवेलागणी। जेणें तेजें।।९३२।।
जैं वायुचां श्वासोश्वासु। जैं गगनाचा अवकाशु।
हे असो आघवाचि आभासु। आभासें जेणें।।९३३।।

"विश्वाकार त्याच्यामुळेच रूपास येतो; त्याचा विस्तार व स्थिती त्या परमोदात्त तत्त्वामुळेच आहे; विश्वसंहारक शक्तीसुद्धा तेच आहे. पृथ्वीसुद्धा त्याच्यापासूनच पृथ्वीतत्त्व अंगीकारते. प्रत्यक्ष जलसुद्धा त्या ज्ञेयरसाच्या प्राशनानेच जलत्वास प्रप्त होते. तेजाची दीपशिखा त्या तेजापासूनच प्रकटते. वायूचा श्वासोछ्वासही त्याच आदिवायूचे पान करून चालू असतो. गगनाचेही चिद्गगन ते एकमात्र ज्ञेयच आहे. एवढेच काय! तर हा एवढा प्रचंड जगताचा आभाससुद्धा त्या ज्ञेयाच्याच मायावशे होत असतो."

जीव हाच शिव

सर्व ज्योतींची निजज्योती व तमसांधकारापलीकडील कृष्ण तत्त्व ते ***ज्ञेय*च आहे. तेच *द्रष्टा, दृश्य व दर्शन* या त्रिपुटीचे बीज असून भूतमात्रांच्या गुह्यातिगुह्य अशा *हृत्स्थानी* अधिष्ठित आहे.** म्हणून ज्ञानेश उद्गारतातः

किंबहुना पांडवा। जैं आघवेंचि असे आघवा।
जेथ नाहीं रिगावा। द्वैतभावासीं।।१३-९३४।।
जैं देखिलियांचि सवें। दृश्य द्रष्टा हे आघवें।
एकवाट कालवें। सामरस्यें।।९३५।।
मग तैंचि होय ज्ञान। ज्ञाता ज्ञेय हन।
ज्ञानें गमिजे स्थान। तैंही तैंचि।।९३६।।

"किंबहुना हे पार्था! द्वैतभाव जेथे क्षणमात्रही रिगू शकत नाही, असे जे सर्व विश्वाचे सर्वस्व , ते तेच ज्ञेय होय. त्याचे दर्शन होताच ***द्रष्टा, दृश्य व दर्शन*** या त्रिपुटीचा सामरस्यात लय होतो व सर्वत्र ***अद्वैत*** होते.***सामरस्य*** म्हणजे ***जीवाशिवाची भेट, पदी पदाचे प्रवेशणे, पद-पिंडाची गाठभेट होणे, पिंड-ब्रह्मांडाची मिळवणी, विश्वात्मा होऊन विश्व भोगणे, विश्वरूप होणे, परमपद प्राप्त करणे, निजधाम वा परमधामास पोहोचणे;*** ही अवस्था प्राप्त होताच ते परब्रह्मच ज्ञान होते; ज्ञाता अन ज्ञेयही तेच असते; ज्ञानाने प्राप्त होण्याचे स्थानही तेच असते."

जैसें सरलियां लेख। आंख होती एक।
तैसें साध्य साधनादिक। ऐक्यासि ये।।१३-९३७।।
अर्जुना जियें ठायीं। न सरे द्वैताची वही।
हे असो जैं हृदयीं। सर्वांचां असे।।९३८।।

"जसे हिशेबाची मिळवणी करताच वेगवेगळ्या रकमा त्या मिळवणीत समाविष्ट होतात, तसेच साध्य जे ***परब्रह्म*** व साधन जे ***ज्ञान,*** हे सर्व एकरूप होऊन त्यांचे वेगळेपणाने राहण्याचे प्रयोजनच उरत नाही. ***साधक, साध्य व साधन*** हे सर्व त्या एकमेवाद्वितीय तत्त्वात समाविष्ट होताच, जगदाभासरूपी द्वैताचा लेख पुसला जाऊन ***नुसधीचि शान्ति*** सर्वत्र उरते. असे ते तत्त्व, हे अर्जुना! सर्व भूतमात्रांच्या ***गुह्यातिगुह्य अशा हृत्स्थानी*** सर्व अवस्थात सदैव वसत असते. ***जीव हा अशा प्रकारे शिवच आहे. तोच क्षेत्रज्ञ आहे."***

एवं तुजफुडां। आदीं क्षेत्र सुहाडा।
दाविलें फाडोवाडां। विवंचुनी।।१३-९३९।।
तैसेंचि क्षेत्रापाठीं। जैसेनि देखसीं दिठीं।
तैसें ज्ञानही किरीटी। सांघितलें।।९४०।।
अज्ञानाहीं कवतुकें। रूप केलें निकें।
जंव आयणी तुझी टेंके। पुरे म्हणो।।९४१।।
आणि आतां हे रोकडें। उपपत्तीचेनि पवाडें।
निरूपिलें उघडें। ज्ञेय पैं गां।।९४२।।

"हे सुहृदा! याप्रमाणे सुरुवातीस ***क्षेत्र*** म्हणजे काय हे तुला उघड केले व त्यापाठोपाठ ज्ञानाचे मूर्तिमंत दर्शन घडविले. त्या अनुषंगाने सहजच ***अज्ञान*** म्हणजे काय याचेही स्पष्ट निरूपण सांगितले. तुझे पूर्ण समाधान होईस्तोवर हे विषय चर्चिले. त्यानंतर मूळापासून संपूर्ण असा ***ज्ञेय*** हा विषय पण सोपपत्तिक सविस्तर वर्णन केला."

चिद्विलास::::

चिद्विलासाची ओळख

श्रीज्ञानदेवांचे तत्त्वज्ञानास काही विद्वान ***चिद्विलासवाद*** म्हणून ओळखतात. ***विश्व हा आत्माच आहे. विश्व होतजात असतांना जरी दिसत असले, तरी हे सर्व आभास आहेत; विश्वाचे हे विकिरणसुद्धा चैतन्याचा विलास आहे. मुळात सर्वत्र एकच एक सच्चिदानंद परमात्मा भरून राहिला आहे. तो सृष्टीतील विविध रूपे ल्यायलेला आहे; सृष्टीतील नानाविध वैचित्र्याने विनटलेला आहे.*** अनंतरूपांच्या त्या अनंतचक्षूस, अनंत हस्त, अनंत पाद, अनंत श्रोत्रेंद्रिये असणाऱ्या त्या परमउदार स्वरूपास तत्त्ववेत्ते विविध नामांनी ओळखतात.

परमात्मा, परब्रह्म, ज्ञेय, द्रष्टा, परमधाम, परमश्रेयस, निःश्रेयस, महाशून्य, अतिशून्य, शून्य, चिद्गगन, चिदानंद, अखंडानंद, अखंडैकरस, परमज्योति, निजज्योति, हृदयस्थ, चित्, चैतन्य, अनंत, विश्वरूपा, विश्वतश्चक्षु, विश्वबाहु, अमृत, शाश्वत, गुप्त, परमोदार, परमोदधि, शेषशायी, नारायण, नित्य, निजानंद, नित्यानंद, सच्चिदानंद, प्रभु, विभु, महाबली, प्रणव, ॐकार, श्रीकृष्ण, विष्णु, शिव, परमशिव, निरञ्जन, उदारधि, एक, एकमेवाद्वितीय, सद्सद्विलक्षण, महादेव आणि तत्सम अनेकानेक नांवांनी तो विख्यात आहे. विश्वातील यच्चयावत पदार्थात तो पूर्णत्वाने नांदतो.

"एऱ्हवीं आघवेंचि आत्मा"

अशा या ज्ञानेशांच्या चिद्विलासाच्या तत्त्वज्ञानाची आपण प्रसंगोपात्त ओळख करून घेत आहोतच. ***"इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः। मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते।।१३-१८।।"*** या श्लोकावरील आपल्या रचनेत ज्ञानेश तत्त्वज्ञानाचा हा पैलू, ***"एरवीं आघवेंचि आत्मा", "म्हणौनि एकचि संचलें"*** या उक्तींद्वारे कसा स्पष्ट होतो, हे पाहू याः

हे आघवेंचि विवंचना। बुद्धि भरौनि अर्जुना।
मत्सिद्धिभावना। माझियां येती।।१३-९४३।।
देहादिपरिग्रहीं। संन्यास करूनियां जिहीं।
जीवु माझां ठायीं। वृत्तिकु केला।।९४४।।
तैं मातें किरीटी। हेचि जाणौनियां शेंवटीं।
आपणपेयां सांटोवाटीं। मीचि होती।।९४५।।
मीचि होती परी। हे मुख्य गां अवधारीं।
सोहोपी सर्वांपरी। रचिलीं आम्हीं।।९४६।।
कडां पायरी कीजे। निराली माचु बांधिजे।
अथावीं सुईजे। तऱ्हीं जैसीं।।९४७।।

"हे अर्जुना! हे सर्व तत्त्वज्ञान अंगी बाणवून, या सर्व भूतमात्रात माझीच भावना करणारे ज्ञानी भक्त माझ्याच स्वरूपी येऊन मिळतात. देहगृहादी परिवाराचा संन्यास करून माझ्याठायी वृत्ती अर्पण करणारे भक्तसुद्धा सरतेशेवटी ***"हे समस्तही श्रीवासुदेवो"*** या प्रतीतिरसाच्या ज्ञानाने स्वतःलासुद्धा मदर्पण करून मत्स्वरूपी सिद्धी प्राप्त करतात. माझ्यात येऊन मिळण्याचे जे मार्ग वा प्रकार आहेत, त्या सर्वात हेच सोपे आहेत. तुलासुद्धा मी हाच सोपा मार्ग सांगतो आहे. डोंगराच्या निमथ्यावर जाऊन पोहोचण्यासाठी कडेकपारींमध्ये सोप्या पायऱ्या तयार कराव्यात किंवा अथांग दर्या तरून जाता यावा म्हणून नौका त्यात लोटून द्यावी, असे ज्ञेयापर्यंत जाऊन पोहोचण्यासाठी निर्मिलेले हे मार्ग मीच प्रवर्तले आहेत."

एऱ्हवीं आघवेंचि आत्मा। हे सांगो जऱ्हीं वीरोत्तमा।
तऱ्हीं तुझियां मनोधर्मा। मिलेल नां।।१३-९४८।।
म्हणौनि एकचि संचलें। चतुर्धा आम्हीं केलें।
जैं अदलपण देखिलें। तुझियें प्रज्ञें।।९४९।।
पैं बाल जैं जेवविजें। तैं घासु विसां ठायीं कीजे।
तैसें एकचि चतुर्व्याजें। कथिलें आम्हीं।।९५०।।
एक क्षेत्र एक ज्ञान। एक ज्ञेय एक अज्ञान।
हे भाग केलें अवधान। जाणौनि तूझें।।९५१।।

"***सर्वच आत्मा आहे,*** हे तत्त्वज्ञान तुला एकदम पटणार नाही, म्हणून हे समस्तात जे एकमात्र ब्रह्मच संचले आहे, त्याचे ***क्षेत्र, ज्ञान, अज्ञान व ज्ञेय*** असे चतुर्विध विभाग करून तुझ्या बुद्धीच्या आवाक्यात मी ते आणून दिले आहे. आई बाळाला भरवते, तेव्हा त्याला एक मोठा घास गिळता येणार नाही, हे जाणून त्या घासाचे विसांठायी भाग करून लहानलहान घासांनी त्याला भरवते; अगदी तसेच ***"हे समस्त ज्ञेयच आहे"*** हा मोठा घास तुला एकदम घेता येणार नाही, हे जाणून मी त्याचे ***क्षेत्र, ज्ञान, अज्ञान व ज्ञेय*** असे चार घास करून भरवले आहेत, हे तू जाणून घे. हा त्या ज्ञेयास तत्त्वतः जाणण्याचा अत्यंत सोपा मार्ग आहे."

ज्ञानदेवांचे ऋण

याप्रमाणे अर्जुनास जवळपास *साडेनऊशे* ओव्यांतून सांगितलेला ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** भगवंत परिसमाप्तीस नेतात. तो तसा नेत असतांनाच त्याची परिणती भगवत्प्राप्तीत कशी होते, याचा सोपानमार्गही विवेचन करण्यात ते दक्ष आहेत.

या स्थळी ज्ञानेश्वरांतील तत्त्वज्ञ प्रायोगिक भूमिकेवर कसा येतो, याचे हृद्य दर्शन होते. अन्यथा ज्ञान-विज्ञान, क्षेत्रक्षेत्रज्ञविचार इ.ची शुष्क चर्चा करणारे काही पंडित, जिज्ञासूंस व मुमुक्षूंस प्रायोगिक पातळीवरून समाधान देण्यात कसे असमर्थ असतात, हे आपणांस अशा महाभागांचे ग्रंथ परिशीलन करतांना सतत ध्यानात येतच असते! तसे ज्ञानदेवांचे कधीच नसते, हे आपणांस त्यांचे ऋण शतशः स्वीकारत मान्य करावेच लागते!

अद्वैत तत्त्वज्ञानाचा चिद्विलासाच्या भूमिकेवरून त्यांनी ज्ञानेश्वरीच्या प्रंगणात अमृतसडा शिंपला आहे अन तोसुद्धा तुम्हाआम्हासारख्या सामान्यांस त्यात नाचण्याबागडण्यासाठीच! अन हे साधे नाचणेबागडणेसुद्धा आपल्याला बऱ्याचदा, भल्याभल्यांना जन्मो न जन्म कठोर तपस्या करूनसुद्धा जे मिळत नाही, ते समाधान अभावितपणे देऊन जाते, हा ज्ञानेशांचा विशेष आहे.

सहज म्हणून येथे उल्लेख करावासा वाटतो की ज्याप्रमाणे ***योगवासिष्ठ*** हा निव्वळ योगाचा ग्रंथ नसून ज्ञानाचे निरूपण करणारा एक प्रमुख ग्रंथ आहे, तद्वतच ***ज्ञानेश्वरी*** हा निव्वळ तत्त्वज्ञानाचा ग्रंथ नसून, योगधारेचा प्रमुख ग्रंथ आहे, हे जिज्ञासूंनी मनीमानसी वागवावे!

यानिमित्ताने हे पण जाणवते की निव्वळ नावावर जाणाऱ्यांची येथे फसगत होते. ***ज्ञान*** म्हणजे काही जटिलजंबाल विषय आहे; ***योग*** म्हणजे काही क्लिष्ट साधना आहे; असा योगवासिष्ठादी महान ग्रंथ ऐकून आपला गैरसमज झाला असेल, तर तो सुलभ ज्ञानाच्या सोपान योगधारेचा ***ज्ञानेश्वरी*** हा उत्तम ग्रंथ समजून घेतल्यावर सहजच दूर होतो!! असो.

समारोप

क्षेत्रक्षेत्रज्ञविचार समजून घेतल्यावर आता आपणांस याच *तेराव्या* अध्यायी केलेला ***प्रकृति-पुरुष विवेक*** पाहावयाचा आहे. त्यासाठीच पुढील ***उन्मेष क्र. २०- प्रकृति-पुरुषविचार*** याचे प्रयोजन आहे. तर वळू या तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::२०::
::प्रकृति-पुरुषविचार::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २०

गीताः
७:१४
१३:१९-२२
ज्ञानेश्वरीः
१३:९५२-१०२८
उद्धृत:(?)(पृ.क्र.३०८)
कोल्हटकर पा.यो.सू.

::उन्मेष::२१::
::क्षेत्र-क्षेत्रज्ञविचारसार::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २१

गीताः
४:४०
६:५,६
१३:१,२२-३४
ज्ञानेश्वरीः
१३:१०२९-११६९

::उन्मेष::२०::
::प्रकृति-पुरुषविचार::

प्रास्ताविक::::

प्रकृति-पुरुषविचार

क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार चार ठिकाणी ***क्षेत्र, ज्ञान, अज्ञान व ज्ञेय*** असे विभाग करून सोप्या पद्धतीने समजावून देऊनही जर का तो अजूनही कळला नसेल, तर पुनः हाच विचार प्रकृति-पुरुष यांच्या निमित्ताने ज्ञानदेव सांगतात. ते म्हणतातः

आणि ऐसेनही पार्था। जन्हीं हा अभिप्रावो तुज हातां।
न ये तन्हीं हे वेवस्था। एक हेल सांगो।।१३-९५२।।
आतां चौठायीं ना करूं। एकही म्हणौनि ना सारूं।
आत्मानात्मया धरूं। सरिसा पाडु।।९५३।।
परि तुवां येतुलें करावें। मागौनि तैं आम्हां देयावें।
जैं कानाचि नांव ठेवावें। आपण पैं गां।।९५४।।
यया श्रीकृष्णाचियां बोलां। पार्थु रोमांचित झाला।
तेथ देवो म्हणती भला। उचंबलेना।।९५५।।
ऐसेनि तो येतां वेगु। धरूनि म्हणे श्रीरंगु।
प्रकृति-पुरुषु विभागु। परिसें सांघो।।९५६।।

"ज्ञेय वा ब्रह्म हे ***क्षेत्र, ज्ञान, अज्ञान व ज्ञेय*** असे जे चतुर्विध सांगितले, ते जर तुला पटले नसेल, तर हे पार्था! तुला ही कल्पना पुनः एकदा वेगळ्या रीतीने समजावून सांगतो. आता चौठायी विभाग न करता किंवा हे सर्व अद्वैतातील आहे, असेही न सांगता, ***आत्मा व अनात्मा*** यांना एकत्रच बुझवू. तू मात्र माझ्या बोलण्याकडे नीट चित्त दे." हे श्रीकृष्ण वाक्य कानी पडताच आपल्याला आता कल्पनातीत अशा बोधाचा लाभ होणार आहे, हे लक्षात येऊन तो चतुर श्रोता अर्जुन रोमांचित झाला.

तेव्हा त्याची ती उचंबळून आलेली उत्कंठा पाहून देव हर्षित झाले व मनात म्हणाले, "याची तीव्र जिज्ञासा तत्त्वनिरूपणास उत्तमच आहे." मग उघड बोलते झाले, "आता तुला प्रकृति-पुरुष विभाग सांगतो. ते ऐक."

योगधारेच्या दृष्टीतून ज्ञान-विज्ञान

प्रकृति-पुरुषविचार सांगण्यास ज्ञानदेव याप्रमाणे उद्युक्त झाले आहेत. येथे ते वेदांत विचारातील एकमेवाद्वितीय अशा ब्रह्माचा वा ज्ञेयाचा साङ्ख्योक्त प्रकृति-पुरुषविचाराशी कसा छान मेळ घालतात ही लक्षात घेण्याजोगी बाब आहे. प्रकृति व पुरुष, आत्मा व अनात्मा हे सांगण्याच्या मिषाने येथे त्यांना कोणाचे तत्त्वज्ञान अभिप्रेत आहे, हा थोडासा विवाद्य मुद्दा आपण मान्यवर पंडितांसाठी सोडून देऊ या.

सर्वसाधारणपणे ***साङ्ख्य,*** तसेच ***पातञ्जलयोग*** ही शास्त्रे प्रकृति-पुरुषविचारावर आधारित समजली जातात. साङ्ख्योक्त प्रकृति-पुरुष यांचे वेदान्ती व गीतेद्वारे होणारे समायोजन एतद्विषयक विचारांचा आढावा घेतांना आपण पूर्वी एकदा पाहिलेले आहे.

प्रायोगिक म्हणजे योगधारेच्या भूमिकेतून पातञ्जलयोगाच्या भूमिकेचा स्वल्प परिचयही आपणांस झालेला आहे. ***सेश्वर साङ्ख्य*** व ***निरीश्वर साङ्ख्य*** या तत्त्वचर्चेत न पडता आपण तेथे पाहिले होते की पातञ्जल योगसूत्रातील ***"ईश्वरप्रणिधानाद्वा (१-२१)"*** व इतर काही सूत्रे ते शास्त्र **सेश्वर साङ्ख्यां**चे असल्याबाबत निर्देश करतात.

श्रीगीतेतही ***प्रकृति-पुरुष*** ही चर्चा वारंवार येते. पण हा प्रकृति-पुरुषाधारित तत्त्वविचार कसा चुकीचा आहे, हे दाखवण्यासाठी मात्र ती नसते; तर या विचारावर आधारून योगशास्त्र कसे समजावून घेतले जाऊ शकते यासाठीच!

मगाशी म्हटल्याप्रमाणे ***ज्ञानेश्वरी*** हा ग्रंथ निव्वळ ज्ञानविषय निरूपण करणारा नसून प्रमुखतः योगधारेचे विवरण करणारा आहे व अगदी बोलूनचालून योगविषयासच निव्वळ वाहिलेल्या ***श्रीमद्भगवद्गीता*** या ग्रंथाचेही तसेच आहे. याबाबत खुलासेवार विचार पूर्वी *उन्मेष क्र. ४* मध्ये आपण केला होता व तेव्हा अध्यायसमाप्तीसाठी लावल्या जाणाऱ्या ***"श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे"*** ही जी मुद्रा आहे, तिच्या अनुरोधाने ***गीताशास्त्र हा ब्रह्मविद्यांतर्गत येणाऱ्या योगावरील ग्रंथ होय,*** असे लक्षात आणून घेतले होते.

या सर्वांवरून स्पष्ट होते की गीता व तिला अनुसरणाऱ्या ज्ञानेश्वरीलाही आपण योगशास्त्रावरचे ग्रंथ असे निर्विवाद मानल्यास व केवळ त्या अनुरोधानेच ब्रह्मविद्येच्या ***ज्ञान*** या शाखेचे, त्यांच्यात आवश्यकतेनुसार उल्लेख, संदर्भ, दाखले वा प्रमाणे, उतारे वा अवतीर्ण केलेली वचने, तसेच स्पष्टीकरण इ.येतात असे गृहीत धरल्यास त्या दोन्ही ग्रंथातील ***ज्ञान*** या ब्रह्मविद्येच्या शाखेविषयी निर्माण झालेले बरेच वाद पूर्णविराम पावतील.

योगशास्त्र हे मूलतः तत्त्वचर्चेचे शास्त्र नसून प्रायोगिक शास्त्र आहे, हे तरी निर्विवाद मान्य करण्यास हरकत नसावी. इतर प्रायोगिक शास्त्रांना जशी तत्त्व वा सैद्धान्तिक चर्चेची व त्यांच्या सखोल परिशीलनाची फारशी आवश्यकता नसते, तर ते सिद्धांत गृहीत धरून अमुकअमुक केले असता, अमुकअमुक प्रकारे यंत्र रचले असता, अमुकअमुक कार्यक्षमता निर्माण होते वा अमुकअमुक फलप्राप्ती होते, एवढेच अपेक्षित असते; त्या सिद्धांतांचा व्यावहारिक वा प्रायोगिक पातळ्यांवर यशस्वी उपयोग मात्र करून घ्यावयाचा असतो; तसेच ***योगशास्त्र*** व ***ज्ञानशाखा*** यांचे नाते आहे.

दुसरे असे की ***योगशास्त्र*** हे इतर प्रायोगिक विज्ञानाप्रमाणे अनुभूति वा अनुभवावर आधारलेले आहे. सिद्धांत हे अशा शास्त्रांनी यशस्वीरीत्या त्यांची उपयुक्तता व्यवहारात आणल्यानंतर कितीतरी

काळाने प्रसृत झाल्याची वा माहीत झाल्याची उदाहरणे तर आधुनिक विज्ञान व अभियांत्रिकीशास्त्रात पावलागणिक मिळतात. आणि कित्येकदा तर सिद्धांत कालबाह्य वा चुकीचे ठरतात अन नवनवे सिद्धांत त्यांची जागा घेतात; पण प्रायोगिक शास्त्र मात्र जसेच्या तसेच राहते, असेही दिसून आलेले आहे. उदाहरणार्थ न्यूटनचे गतिविषयक नियम. आईनस्टाईनच्या *Theory of Relativity*ने त्यांची अचूकता विवादास्पद असल्याचे दाखवून दिले. पण तरीही त्याच त्या जुन्या आडाख्यांवर यंत्रे चालतच होती आणि आहेतही!

कित्येकदा सिद्धांताप्रमाणे लागणारी यंत्रांची परिमाणे व यंत्रशास्त्रज्ञाने यंत्रनिर्मितीसाठी वापरलेली परिमाणे यांतही बरीच भिन्नता आढळते. यंत्र सुव्यवस्थितरीत्या चालावे म्हणून अभियांत्रिकीशास्त्रात अनुमान वा आनुभविक प्रमाणे *(Empirical Formulae)* तर खूपच असतात. त्या सर्वांचा मूलसिद्धांताशी बऱ्याचदा तंतोतंत मेळ घालतासुद्धा येत नाही. त्याप्रमाणेच ***योगशास्त्र*** व ***ज्ञानशाखा*** यांचे परस्परसंबंध समजता येतात.

आपण योगशास्त्राचे जिज्ञासू आहोत ही भूमिका न विसरता जमेल तेवढा ज्ञानशाखेचा आस्वाद घेऊ या. हीच धारणा ज्ञानदेवांचीही आपणाविषयी आहे, हे आपणांस ज्ञानेश्वरीचा अभ्यास करतांना वारंवार जाणवते व तिच्याकडे आपणांस दुर्लक्ष करता येणार नाही. असो.

साङ्ख्य मतातील प्रकृति-पुरुषविचार

प्रकृति-पुरुष विचार सांगण्यास आरंभ करतांना ज्ञानदेव सहजच म्हणून जातात की, जे एकमेव ब्रह्म ***ज्ञान, अज्ञान, क्षेत्र व ज्ञेय*** असे चतुर्विभाग कल्पून निरूपिले होते, त्याचेच आता निव्वळ दोन विभाग - ***पुरुष व प्रकृति*** - असे करून सांगतो. अन तेसुद्धा ही दोन्ही मिळून अद्वैत होते असे न प्रतिपादिताच! याबाबत जिज्ञासूंचे लक्ष पुनश्च महान देशभक्त व आदरणीय कर्मयोगी ***स्व.लोकमान्य टिळक*** लिखित ***गीतारहस्य*** या ग्रंथाकडे अनिवार्यपणे वेधावेच लागते. तेथील ***कापिलसाङ्ख्यशास्त्र*** किंवा ***क्षराक्षरविचार*** हे प्रकरण त्यासाठी जरूर पाहावे.

"प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि।। १३-१९।।" म्हणजे ***"प्रकृति व पुरुष असे दोन स्वतंत्र पदार्थ विश्वाची मूलतत्त्वे असून दोन्ही अनादी आहेत."*** त्यात म्हटल्याप्रमाणे ***कापिल साङ्ख्यशास्त्र*** अशी ही दोन पूर्णतया स्वतंत्र मूलतत्त्वे मानते.

या साङ्ख्यशास्त्राचा मूलसिद्धांत असा आहे की जगात नवे असे काहीही उत्पन्न होत नाही. म्हणून कोणतेही कार्य घेतले तरी त्याचे हल्लीचे द्रव्यांश व गुण मूळच्या कारणातही कोणत्यातरी स्वरूपात असले पाहिजेत. यासच ***सत्कार्यवाद*** असे नांव आहे. ***पुरुष, प्रकृति, बुद्धी, अहंकार, दश इंद्रिये, मन, पंच तन्मात्रे व पंच महाभूते*** **अशी पंचवीस तत्त्वे** ***साङ्ख्य*** **मानतात**, असे **ईश्वरकृष्णा**च्या ***साङ्ख्यकारिका, शाङ्करभाष्य, गौडपादाचार्यांचे साङ्ख्यकारिकेवरील भाष्य***, **श्रीमद्भागवत** इ.ग्रंथांवरून दिसून येते.

तसेच ***पुरुष*** संख्येने अनंत आहेत, असाही साङ्ख्यमताचा रोख आहे. परंतु ***प्रकृति व पुरुष*** **यांच्यापलीकडे जगाचे परब्रह्मरूपी एकच मूलभूत तत्त्व असून त्यापासून प्रकृति-पुरुषसुद्धा सर्व सृष्टी झाली आहे, या उपनिषदांतील अद्वैत सिद्धांतास न सोडता, बाकीचे साङ्ख्यांचे सिद्धांत आपणांस अग्राह्य नाहीत, असे वेदांतसूत्रभाष्यात (ब्रह्मसूत्रे) श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे** ***(वे.सू. शां.भा. २-१,३). प्रकृति व पुरुष*** हे काही वेळा ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांच्या समानार्थी घेण्यात येतात व यांसच ***अनात्मा व आत्मा*** अशाही संज्ञा दिल्या जातात, हे ज्ञानदेवांचे विवेचन पाहिल्यावर आपणांस जाणवते.

योगऋषी श्री.कृ.के.कोल्हटकरांचे मत

साङ्ख्यमताची जी चर्चा आपण पाहिली, तिचा समारोप करतांना ***कै. कृष्णाजी केशव कोल्हटकर*** या महान प्रायोगिक विचारवंतांच्या ***भारतीय मानसशास्त्र अथवा पातञ्जलयोगदर्शन*** या ग्रंथराजातील ***भूमिका-परिच्छेद १०(२) - षड्दर्शनांचा उगम व त्यातील विचारांचा विकास*** यातल्या त्यांच्या मताचा परामर्ष घेतल्याविना जिज्ञासूंना समाधान वाटणार नाही. तरी त्यांनी तो भाग जरूर त्या ग्रंथातून पाहावा.

त्यांनी तेथे नमूद केलेल्या त्यांच्या मतानुसार : *१)* ***न्याय, २) वैशेषिक, ३) निरीश्वर साङ्ख्य, ४) सेश्वर साङ्ख्य, ५) पूर्वमीमांसा व ६) उत्तरमीमांसा*** ही षट्शास्त्रे असून, सेश्वरसाङ्ख्यदर्शनाप्रमाणे पुरुषतत्त्वदर्शनार्थ मनोवृत्तींचा निरोध करण्याचा योगमार्ग प्रतिपादिला आहे. या ***सेश्वरसाङ्ख्यदर्शन*** शास्त्राचे खंडन ***"एतेन योग: प्रत्युक्त:"*** या सूत्राने ***ब्रह्मसूत्रकार*** करतात व आचार्यमते या प्रत्युक्त योगशास्त्रातील पहिले सूत्र ***"अथ तत्त्वदर्शनोपायो योग:"*** असे आहे. परंतु ***पातञ्जल*** योगदर्शनातील प्रथम सूत्र ***"अथ योगानुशासनम्"*** असे आहे. आचार्यांनी ब्रह्मसूत्रभाष्यात प्रत्युक्त योगशास्त्राचे जे सूत्र दिले आहे, ते प्रचलित पातञ्जलयोगसूत्राहून भिन्न असल्याने, सदर ब्रह्मसूत्राचे लक्ष्य ***पातञ्जलयोग*** नसून लोप पावलेले व कदाचित त्याच नावाचे ***सेश्वरसाङ्ख्ययोगदर्शन*** असावे.

त्यांचे हे मत जिज्ञासूंनी जरूर लक्षात घ्यावे. त्याचप्रमाणे ***पातञ्जलयोगशास्त्र*** हे वेदांती ***अद्वैत*** तत्त्वज्ञानावर कसे आधारित आहे व त्यास कसे अनुकूल आहे, याचा त्यांनी केलेला त्यांच्या ग्रंथांतर्गतचा विचार जिज्ञासूंनी मुळातूनच पाहणे इष्ट वाटते.

अखिल तत्त्वज्ञानांचे समन्वायक श्रीज्ञानेश्वर

उपरिनिर्दिष्ट दोन्ही ग्रंथांतील संदर्भांकित विभाग वाचल्यावर जिज्ञासूंची भूमिका बरीच स्पष्ट होण्यास मदत होईल व श्रीज्ञानदेवांनी ***प्रकृति-पुरुष*** निरूपण जे *तेराव्या* अध्यायी केलेले आहे व तन्निमित्त साङ्ख्यदर्शनाशी मिळताजुळता जो विचार आपण अभ्यासणार आहोत, त्याचे यथायोग्य आकलन करणे सोपे होईल.

याचवेळी सहज म्हणून *पहिल्या* अध्यायातील **गणेशरूपका**कडे जरा नजर फिरवावी असे वाटते. कारण ज्ञानदेवांचा ***आदि श्रीगणेश*** हा आत्मरूपा, स्वसंवेद्य, ॐकारस्वरूप व वेदप्रतिपाद्य विश्वात्माच

आहे. त्याने वर उल्लेखिलेली षट्शास्त्रे - ***"देखा षट्दर्शनें म्हणिपती। तैंचि भुजांची आकृति। म्हणऊनि विसंवादे धरिती। आयुधें हातीं।।१-१०।।"*** अशी आपल्या षड्भुजांनी साकार केलेली आहेत व त्या प्रत्येक हातात त्या त्या शास्त्राचे प्रतीक म्हणून त्या त्या स्वरूपाचे आयुध धारण केलेले आहे.

अष्टादश पुराणे, दशोपनिषदे, स्मृति, काव्यनाटके, नाना प्रमेये, द्वैताद्वैतनिकुंभ इ.चे आंगिक भाव, भूषणे, पुष्पे असा साज ल्यायलेला हा ***"अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल। मकार महामंडल। मस्तकाकारें।।"*** असा गणेश ***आदिबीज*** आहे. या आदिबीजास विसंवादी शास्त्रे, एकमेकांचे खंडन करणारी दर्शने व इतर प्रमेये लीलया ***आंगिक शोभा*** म्हणून वागविता येतात.

या रूपकाद्वारे ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानावर बराच प्रकाश पडतो. षट्शास्त्रे, अष्टादश पुराणे, स्मृति इ.मधील, तसेच द्वैती व अद्वैती प्रमेयांतील परस्पर विसंगतीस व विरोधास त्यांचे तत्त्वज्ञान समावून घेते, असाच या रूपकाचा अर्थ होतो. अन् हे जर मान्य केले तर त्यांचे तत्त्वज्ञान कोणकोणत्या भाष्यकारांची ***वाट पुसत*** चालते आहे, यासंबंधीच्याही शंका नाहीशा होतात.

ज्ञानदेव कोणालाही न दुखवता, त्यांच्या तत्त्वज्ञानातील उत्तम भाग ग्रहण करतात; अन आपले **चिद्विलास**ाचे तत्त्वज्ञान प्रायोगिक अशा योगभूमीवर प्रत्यक्षात रूपांतरित करतात. ***त्यांचा आदिबीज गणेश हा असा सद्सद्विलक्षण, द्वैताद्वैतविलक्षण, सेश्वर-निरीश्वर साङ्ख्यांस वेदांतात सामावून घेणारा, योगशास्त्राचा आद्यप्रवर्तक, प्रवृत्ति व निवृत्ति यांना, ज्ञान व अज्ञान यांना सहज लीलया जवळ करणारा सर्वशास्त्रसमन्वायक आहे.***

साङ्ख्य तत्त्वज्ञान::::

साङ्ख्यविचार व तत्त्वज्ञान

या प्रस्तावनेनंतर आपण ***प्रकृति-पुरुषविचार*** व्यक्तवणाऱ्या ज्ञानेशांच्या ओव्यांकडे वळू या.

सेश्वर साङ्ख्य व निरीश्वर साङ्ख्य, तसेच प्रकृति-पुरुष व ईश्वर, पुरुषाचे साङ्ख्यप्रतिपादित अनेकत्व व एकमेवाद्वितीय परमात्मा, साङ्ख्य व वेदांती यांच्यातील मतभिन्नता, श्रीमदाद्यशंकराचार्य मते मान्य असलेला शुद्ध साङ्ख्य तत्त्वज्ञानाचा भाग, कर्म व त्याचे कारण वा सत्कार्यवाद, शांकरभाष्यानुसार प्रत्युक्त *(पातञ्जलनामे ?)* योगशास्त्र अन तत्सम सर्व बाबींचा समन्वय ज्ञानदेवांनी केलेला आहे.

जेयां मार्गातैं जगीं। सांख्य म्हणताती योगी।
जेयाचियें भाटिवेलागीं। मी कपिल जाहलो।।१३-९५७।।
तो आईक निर्दोखु। प्रकृतिपुरुषुविवेकु।
म्हणे आदिपुरुषु। अर्जुनातैं।।९५८।।
तऱ्हीं पुरुषु अनादि आथी। आणि तैंचि लागौनि प्रकृति।
संवसरिसीं दिवोराती। दोनीं जैसीं।।९५९।।
कां रूप नोहे वायां। परी रूपा लागली छाया।
निकणु वाढे धनंजया। कणेंसीं कोंडा।।९६०।।
तैसीं जाण जवटें। दोन्हीं इयें एकवाटें।
प्रकृतिपुरुष प्रगटे। अनादिसिद्धें।।९६१।।

"जे तत्त्वज्ञान योगमार्गीयांत (सेश्वर व निरीश्वर साङ्ख्ययोगी - आचार्य श्रीशंकराभिमते प्रत्युक्त योगशास्त्राचे अनुयायी इ.त) *साङ्ख्य* म्हणून ओळखले जाते व कपिलमुनीच्या अवतारात मी जे प्रतिपादिले, त्यातला प्रकृति-पुरुषासंबंधीचा खरा - शुद्ध व निर्दोष विचार ऐक," असे तो आदिपुरुष अर्जुनास म्हणाला. "पुरुष हा अनादी आहे व प्रकृति त्याच्याचबरोबर असणारी व तशीच अनादी आहे. दिनरात्रीची जोडी जशी असते; किंवा शरीराबरोबर त्याची सावली असते; वा फोलकट जसे धान्याच्या दाण्याबरोबर वाढते; दाणा जसा कोंड्यासह असतो; तसेच एकत्र असणारे हे प्रकृति-पुरुषाचे अनादिसिद्ध युग्म आहे, हे अगदी स्पष्ट आहे."

पैं क्षेत्र एणें नांवें। जैं सांघितलें आघवें।
तैंचि जाणावें। प्रकृति हे गां।।१३-९६२।।
आणि क्षेत्रज्ञु ऐसें। जेयांतैं म्हणितलें असें।
तो पुरुष हे अनारिसें। न बोलों घेईं।।९६३।।
इयें आनानें नांवें। परि निरूप्य आन नोहें।
हे लक्षण न चुकावें। पुढत पुढुति।।९६४।।

"क्षेत्र म्हणून ज्याचे सविस्तर वर्णन पूर्वी केले होते, ते म्हणजे यातली ***प्रकृति*** व ***क्षेत्रज्ञ*** ज्याला म्हटले होते, तो म्हणजे यातला ***पुरुष*** असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांस ***प्रकृति व पुरुष*** यांव्यतिरिक्त बरीच नांवे आहेत; परंतु वेगवेगळ्या नावांनी ती जरी ओळखली गेली, तरी त्या त्या नांवांनी याच दोघांचाच बोध होतो; हे यातले मर्म तू नीट ध्यानी घे."

तऱ्हीं केवळ जैं सत्ता। तो पुरुषु गां पांडुसुता।
प्रकृति तैं समस्तां। क्रियां नांव।।१३-९६५।।
बुद्धि इंद्रियें अंतःकरण। इत्यादी विकरणभाव।
आणि तैं तिन्हीं गुण। सत्त्वादिक।।९६६।।
हा आघवाचि मेलावा। प्रकृति जाहला जाणावा।
हेचि हेतु संभवा। कर्माचियां।।९६७।।

"निव्वळ ***सत्ता*** म्हणजे शुद्ध अस्तित्व, वा जाणीव वा ज्ञान वा ज्ञाता वा निर्गुण वा आधार वा कारण, असे त्या पुरुषाचे स्वरूप आहे; तर समस्त ***क्रिया*** वा जगत, वा विश्व वा कार्य, म्हणजे प्रकृति होय. बुद्धी, अंतःकरण, इंद्रिये इ.विकारजात व सत्त्वरजतमादी त्रिगुण या सर्वत्रांचा समुदाय हीच प्रकृति असून हिच्याचमुळे कर्म संभवते."

प्रकृति व पुरुष यांचे कार्य

याप्रमाणे ***"प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि। विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान्।।१३-१९।।"*** या श्लोकावर भाष्य केल्यानंतर ***"कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते। पुरुषः***

सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते।।१३-२०।।" या श्लोकावर तसेच सुगम भाष्य करतांना ज्ञानदेव म्हणतातः

तेथ इच्छा आणि बुद्धी। घडवी अहंकारेसीं आधीं।
मग तियां लाविती वेधीं। कारणाचां।।१३-९६८।।
तैंचि कारण ठाकावेयां। जैं सूत्र धरणें उपाया।
तेयां नांव धनंजया। कार्य पैं गां।।९६९।।
आणि इच्छामदाचां थावीं। लागली मनातैं उठवीं।
तैं इंद्रियें राहाटवी। हे कर्तृत्व पैं।।९७०।।
म्हणौनि तिन्हीं यां जाणा। कार्यकर्तृत्वकारणा।
प्रकृति मूळ हे राणा। सिद्धांचा म्हणें।।९७१।।

कार्य, कारण व कर्तृत्व या सर्वांस प्रकृति मूळ कारण आहे व सुखदुःखाच्या भोगाला पुरुष ***कारण*** आहे, असा ***साङ्ख्य सिद्धांत*** आहे; तो ज्ञानदेव आपल्या शैलीने प्रतिपादितातः

"प्रकृति ज्या बुद्ध्यादी इंद्रिये व त्रिगुणांच्या समुदायाने कर्मे करवते, त्यांची उपपत्ती अशी आहेः प्रकृति ***इच्छा व बुद्धी*** यांना प्रसवते. त्यांच्यापासून ***अहंकार*** उद्भवतो. या सर्वांस कारणाच्या नादी ती प्रकृति लावते, म्हणजे इष्ट वस्तुप्राप्तीच्या मागे धावावयास भाग पाडते. ***अहंकार*** म्हणजे जीवाचा सूक्ष्म पातळीवरचा आविष्कार."

"इष्ट वस्तुप्राप्तीसाठी जीवाकडून केली जाणारी प्रेरणा म्हणजे ***कर्तृत्व*** व त्या प्रेरणेयोगे इच्छेने लुब्ध झालेले मन इंद्रियांकरवी जो प्रयत्न करवून घेते, त्या प्रयत्नास ***कार्य*** असे नांव आहे. अशा प्रकारे ***इच्छा, बुद्धी व अहंकार*** या त्रिसूत्रींनी बद्ध झालेला जीव म्हणजे शुद्ध पुरुषाचे अनंत रूपाने प्रकटणारे स्वरूप, जे ***कारण*** म्हणजे इच्छिलेले प्राप्त करण्यासाठी ***कर्तृत्व*** म्हणजे प्रेरणेयोगे, जे जे प्रयत्न म्हणजे ***कार्य*** इंद्रियादींकडून मनायोगे घडवते, त्या सर्वांचे आदिकारण वा मूळ ती प्रकृतीच होय," असे तो सिद्धांचा राणा श्रीकृष्ण म्हणतो.

एवं तिन्हींचेनि समवायें। प्रकृति कर्मरूप होएं।
परि जेयां गुणा वाढे त्राये। त्याचिसारिखी।।१३-९७२।।
जैं सत्त्वगुणें अधिष्ठीजे। तैं सत्कर्म म्हणिजे।
रजोगुणें निफजे। मध्यम तैं।।९७३।।
जैं कां केवल तमें। होती जियें कर्में।
निषिद्धें अधमें। जाण तियें।।९७४।।

"याप्रमाणे ***कारण-कार्य-कर्तृत्व*** या त्रयीच्या रूपाने प्रकृतीच कर्मरूप होते. थोडक्यात पुरुषाचा आविष्कार ***जीवरूपे*** होतो, तर प्रकृतीचा आविष्कार ***कर्मरूपाने*** होतो. आता हे कर्म म्हणजे कर्मरूप प्रकृति ही त्रिधा स्वरूपाने प्रकट होते. त्याकरता ***गुण*** कारणीभूत आहेत. सत्त्वगुणाच्या अधिष्ठानमात्रेकरून सत्कर्म उपजते; तर रजोगुणाच्या योगे मिश्रित वा मध्यम स्वरूपाचे कर्म निपजते. तमोगुणाच्या संयोगवश जी कर्मे होतात, ती सर्व अधम स्वरूपाची निषिद्ध कर्मे होत."

ऐसेनि संतासंतें। कर्में प्रकृतिस्तंव होते।
तेयांपासूनि निर्वाळें तैं। सुखदुःख।।१३-९७५।।
असंतीं दुःख उपजे। सत्कर्मीं सुख निफजें।
तेयां दोहींचां बोलिजें। भोगु पुरुषा।।९७६।।
सुखदुःखें जंववरी। निफजती सांचोकारीं।
तंव प्रकृति उद्यमु करी। पुरुषु भोगी।।९७७।।

"***सत्त्व-रज-तम*** या त्रिगुणांच्या कमीअधिक अधिष्ठानाने अशी जी उत्तम-मध्यम-अधम कर्मे प्रकृति उपजवते, त्यांच्या पापपुण्याच्या प्रमाणानुसार सुख-दुःख उत्पन्न होते. पापमय व तमोगुणयोगे झालेल्या कर्मांचे फळ दुःख होय व पुण्यमय वा सत्त्वगुणयोगे झालेल्या कर्मांचे फळ सुख होय. शास्त्रानुमते पुरुषाला या दोहोंचा म्हणजे सुख व दुःख यांचा भोग भोगावा लागतो. सुख व दुःख ही जोपावेतो निपजत असतात, तोपावेतो पुरुषाला भोग भोगावे लागतात व प्रकृति आपला व्यवसाय चालविते."

प्रकृतिपुरुषांची कुलवाडी। सांगतां असंगडी।
जैं आंबुली जोडी। आंबुला खाये।।१३-९७८।।
आंबुलयां आंबुलियें। संगती ना सोये।
कीं आंबुली जग वियें। चोज आईक।।९७९।।

"प्रकृति-पुरुषांची ही शेतकी अघटित आहे. येथे स्त्री कमावते व नवरा बसून खातो. या प्रकृति-पुरुषांच्या युगुलाचा एकमेकांशी कधी संबंधही येत नसतो व त्यांच्यात एकवाक्यता पण नसते; तरीही हे असे विजोड जोडपे नवरा-बायकोचा संबंधही न येता, स्त्रीद्वारे *(प्रकृतिद्वारे)* जगाएवढे हे मोठे आश्चर्य कसे प्रसविते, ती गंमत ऐक."

पुरुषास गुणाचा भोग

पुरुष व प्रकृतीच्या या जगावेगळ्या व्यापार करणाऱ्या जोडप्यावर ज्ञानदेव अधिक प्रकाश पाडतात, तो पुरुष प्रकृतिवश होत्साता जन्मजन्मांतराच्या चक्रात कसा गुरफटतो, ते सांगणाऱ्या या गीताश्लोकानिमित्त -

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान्।
कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु।।१३-२१।।

"प्रकृतीत स्थित असलेला पुरुष तिच्यापासून उद्भवलेल्या त्रिगुणात्मक पदार्थांचा भोग घेतो आणि या गुणसंगामुळेच तो उत्तम वा अधम योनींत जन्मानुजन्म पावतो."

यावर ज्ञानदेव म्हणतातः

जैं अनंगु तो पेंधा। निकवडा नुसधा।
जीर्णु अतिवृद्धा-। पासौनि वृद्धु।।१३-९८०।।
तेयां आडनांव पुरुषु। एऱ्हवीं स्त्री ना नपुंसकु।
किंबहुना एकु। निश्चयु नव्हे।।९८१।।

"प्रकृतीठायी स्थिर असणारा तो पुरुष अंगहीन *(निराकार)*, पांगळा *(क्रियाहीन)*, द्रव्यहीन *(गुणरहित वा निर्गुण)*, एकटा, जुनापुराणा *(अजर, अमर)* अन अति म्हाताऱ्याहूनही म्हातारा *(अनादि)* असा

आहे. तो केवळ नाममात्र पुरुष आहे; वस्तुतः तो स्त्री नाही व नपुंसकही नाही; म्हणूनच त्याला पुरुष म्हणावयाचे, झाले! त्याच्याजवळ स्त्रीची प्रसवक्षमता नाही व नपुंसकत्वही नाही; तसेच पुरुषत्वही नाही. एवढेच काय तो एकटाच आहे, असाही निश्चय नाही. शुद्ध साङ्ख्यशास्त्र त्याला अनेकत्वाने मानते, तर सेश्वर साङ्ख्य त्याला ईश्वररूपे अनेकत्वाचे एकत्व होते, असे मानते."

अचक्षु अश्रवणु। अहस्तु अचरणु।
रूपु ना वर्णु। नामु आथी।।१३-९८२।।
अर्जुना कांहींचि जेथ नाहीं। तो प्रकृतिचां भर्त्ता पाहीं।
कीं भोगणें ऐसेयाही। सुखदुःखाचें।।९८३।।
तो तन्हीं अकर्ता। उदासु अभोक्ता।
परि इयां पतिव्रता। भोगविजे।।९८४।।

"त्याला ना चक्षु, ना श्रवणेंद्रिय, ना हस्तपादादी अवयव, ना रूप, ना आकार, ना रंग, ना नाम! जो म्हणजे काहीच नाही, असा तो पुरुष त्या प्रकृतीचा भर्तार आहे अन नवल म्हणजे जो नाही तोच सुखदुःखाचा भोग घेतो. तो पुरुष अकर्ता *(कार्य-कारण-कर्तृत्वरहित)*, निरिच्छ *(इच्छा-बुद्धिरहित-उदास)* व अभोक्ता *(अहंकारशून्य)* असूनही ही त्याची पतिव्रता *(त्याची सदैव पाठराखण करणारी, सदैव त्याच्याशी रत असणारी, जिला त्याच्यावाचून कोणीही नाही, अशी)*, ती प्रकृति त्याला सुखदुःखांचा, आपल्या गुणांचा भोग घ्यायला लावते."

प्रकृतीचे कर्तृत्व::::

प्रकृतीचा प्रभाव

सर्वेन्द्रियविवर्जित अशा त्या पुरुषाठायी ***सर्वेन्द्रियगुणाभास*** कसा प्रकटतो, त्याचे ज्ञानदेवकृत वर्णन पाहाः

जियेंतैं अलुमालु। रूपागुणाचां चालुढालु।
तैं भलतैसाही खेलु। लेखा आणी।।१३-९८५।।
मां इयें प्रकृती तंव। गुणमयी हेंचि नांव।
किंबहुना सावेव। गुण तैंचि हे।।९८६।।
हे प्रकृति क्षणीं नीच नवी। रूपाचीच आघवी।
जडांतेंही माजवी। इयेचां माजु।।९८७।।
नांवे इया प्रसिद्धें। स्नेहो इयां स्निग्धें।
इंद्रियें प्रबुद्धें। इयेंचेनि।।९८८।।
कायि मन हे नपुंसक। कीं तैं भोगवी तिन्हीं लोक।
ऐसें अलौकिक। करणें इयेंचें।।९८९।।

"ज्या स्त्रीला थोडेफार रूप असते, ती आपल्या नखरेल विभ्रमांनी कोणतेही खेळ करून भलभलत्या पुरुषांना आपल्या नादी लावू शकते; मग ही तर सर्वगुणमयी प्रकृतीच! किंबहुना मूर्तिमंत गुण म्हणजे प्रकृतीच! ही प्रकृति क्षणोक्षणी नित्य नूतन रूप धारण करते. हिचीच सर्व रूपे होत. हिचे मादक विभ्रम तर प्रत्यक्ष जडालासुद्धा चेतना आणतात. हीच वेगवेगळ्या नांवांनी वस्तुजातांची रूपे धारण करते. दोन गोष्टींचे परस्पर आकर्षण हीच करविते. हिच्यामुळेच इंद्रिये आपापले व्यापार करतात. मन तर बोलून चालून नपुंसक! पण तिची करणी अशी अलौकिक आहे की त्यालासुद्धा ती तिन्ही लोक भोगायला लावते."

हे भ्रमाचें महाद्वीप। व्याप्तीचेचि रूप।
विकार उमप। इयां केलें।।१३-९९०।।
हे कामाची मांडवी। हे मोहवनींची माधवी।
इयें प्रसिद्धचि दैवी। माया हे नांव।।९९१।।
हे वाङ्मयाची वाढी। हे साकारपणाची जोडी।
प्रपंचाची धाडी। अभंग हे।।९९२।।

"अर्जुना! ही प्रकृति म्हणजे विश्वरूपाने प्रकटलेले त्या अथांग ब्रह्मांडसागरातील संसारभ्रमाचे महाद्वीपच होय. ही सर्वव्यापक व अतिविशाल आहे. जीवाला महामोहात गुंतवून ठेवण्यासाठी हिनेच अनेकानेक, चमत्कृतीपूर्ण विकार निर्मिले आहेत. ही प्रकृति म्हणजे कामरूप वेली ज्यावर विस्तारलेल्या आहेत व थेट गगनापर्यंत नेऊन भिडवलेल्या आहेत, असा मंडपच म्हणेनास! ही मोहरूपी वनातील वसंतऋतुश्रीच आहे. हिला ***दैवी माया*** ***("दैवी ह्येषा गुणमयी। मम माया दुरत्यया।।७-१४।।")*** असे विख्यात नांव आहे. ***परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी*** या चारी वाचांना कारण असणारी व त्यांद्वारे विश्व साकार करणारी, जीवमात्रांना प्रपंचाच्या अखंड वावटळीत फिरवणारी ***माया*** ती हीच!"

कला येथूनि जालियां। विद्या इयेंचियां केलियां।
इच्छा ज्ञान क्रिया। वियाली हे।।१३-९९३।।
हे नादाची टांकसाल। हे चमत्काराचें वेलाऊल।
किंबहुना सकल। खेलु इयेचां।।९९४।।
जैं उत्पत्ति प्रलयो होत। तैं इयेंचें सायंप्रात।
हे असो अद्भुत। मोहन हे।।९९५।।
हे अद्वयाचें दुसरें। हे निःसंगाचें सोयरे।
निरालेंसीं घरें। नांदत असे।।९९६।।

"सकल कला, सकल विद्या हिनेच केल्या. इच्छा, ज्ञान व क्रिया हिच्याच पोटी जन्मल्या. समस्त नामरूपात्मक सृष्टी हिच्यापासूनच निर्माण झाली. सृष्टीतील सकल वैविध्य हिच्याचमुळे आहे. अरे पार्था! एवं च काय! हा सगळा प्रपंचाचा खेळ तिनेच मांडला आहे. विश्वोत्पत्तीची प्रातः व विश्वप्रलयाची सायंकाळ हीच होय. अशी ही प्रकृति म्हणजे अद्भुत भुरळ होय. सर्व जगत हिने भुलवले आहे. ही प्रकृति म्हणजे अद्वयाशी असणारे द्वैत आहे. ही उपाधी त्या निःसंग निरञ्जनाची सोयरी आहे. त्या अनिकेतासह ही विश्वरूपी निकेतात नांदते."

अकुलाचे कुल

इयेंतें येतुलावरी। सौभाग्यव्याप्तीची थोरी।
म्हणौनि तेयां आवरी। अनावरातैं।।१३-९९७।।

तेयाचां तंव ठायीं। निपटूनि कांहींचि नाही।
कीं तेयां आघवेंही। आपणचि होये।।९९८।।
तेयां स्वयंभूची संभूति। तेयां अमूर्त्ताची मूर्त्ती।
आपण होय स्थिती। ठावो तेयां।।९९९।।
तेयां अनार्त्ताची आर्त्ती। तेयां पूर्णाची तृप्ती।
तेयां *अकुलाची जाती। गोत* होय।।१०००।।
निराकाराचा आकारु। तेयां निर्व्यापाराचां व्यापारु।
निरहंकाराचा अहंकारु। होऊनि ठाके।।१००१।।

"शून्यस्वरुप परब्रह्माची ही अद्वितीय सहचारिणी आहे व हे समस्त विश्वच तिचे घर आहे. असे थोर सौभाग्य तिला प्राप्त झाल्याने त्या अनावर परमात्म्यास ही आकाररूपे साकार करते. त्या परब्रह्माठायी काहीच नसतांना हीच त्याची सर्व काही होते; त्या स्वयंभूची ही उत्पत्ती होते; त्या अमूर्ताची ही मूर्ती होते; त्याला हीच अस्तित्व देते; त्याचे राहण्याचे निवासस्थानही हीच होते. त्या निष्कामाची कामना हीच होते. तो पूर्णत्व भोगतो, ते हिच्याचमुळे! तो कुलरहित आहे - ***अकुल*** आहे; त्याचे कुलगोत्र हीच होते. त्या निराकाराचा विश्वरूप आकार, त्या निर्व्यापाराचा संसाररूपी व्यापार, त्या निरहंकार निरंजनाचा महाभूतस्थ अहंकारी प्रत्यय म्हणजे ही प्रकृतीच!"

तेयां अचर्चाचें चिह्न। तेयां अपाराचें मान।
तेयां अमनस्काचें मन। बुद्धीही होये।।१३-१००२।।
तेयां अनामाचें नाम। तेयां अजाचें जन्म।
आपण होय कर्म। क्रिया तेयां।।१००३।।
तेयां निर्गुणाचें गुण। तेयां अचरणाचें चरण।
तेयांचें श्रवण। अचक्षूचें चक्षू।।१००४।।
तेयां भावातीताचें भाव। तेयां निरवयवाचें अवयव।
किंबहुना होएं सर्व। पुरुषाचें हें।।१००५।।

"त्या वर्णनातीताच्या ओळखीची खूण ती हीच. त्या अपाराची मोजपट्टी ती हीच! ***त्या अमनस्काचे मन व बुद्धीही हीच प्रकृति आहे. त्या अनामधन्य ओनाम्याचे नामही हीच!*** त्या अजाला जन्म घ्यायला लावते ती हीच! त्याचे कर्म हीच होते. त्याची क्रियाशीलताही हिचीच असते. त्या निर्गुणाला गुण प्रकटावयाला हीच लावते. पादादी अवयवरहित परमात्म्याचे अवयव व हस्तपादादी हीच होते. ज्ञानेंद्रियरहित परब्रह्माचे श्रोत्रेंद्रिय व चक्षू हीच प्रकृति आहे. त्या ***'भावातीतो निरञ्जनः'*** अशा केवलाचे महाभावविकार म्हणजे ***जन्म, सत्ता, वृद्धी, परिवर्तन, ऱ्हास व नाश*** ही प्रकृतीच होते. त्या निरवयव साक्षाताचे अवयव, किंबहुना सर्व काही, ही प्रकृतीच आहे. एवं च त्या पुरुषाची सर्वेसर्वा कारभारीण, ती ही अनादी प्रकृतीच समज!"

"पुरुष प्रकृति आला"

ऐसेनि इयां प्रकृति। आपुलियां सर्व व्याप्ती।
अविकारातैं विकृति-। माजीं कीजैं।।१३-१००६।।
तेथ पुरुषत्व जैं असे। तैं ये इयें प्रकृतिदशें।
चंद्रमा अंवसें । पडिला जैसा।।१००७।।
विदल बहु चोखा। मीनलियां वाला एकां।
कसु होये पांचिका। जेयांपरी।।१००८।।
कां साधूतैं गोंदली। संचारौनि सूयें मैलीं।
नाना सुदिनाचां आभालीं। दुर्दिनु कीजे।।१००९।।
पय पशूचां पोटीं। वह्नीं जैसां काष्ठीं।
गुंडुनि घेतला पटीं। रत्नदीपु।।१०१०।।

"अविकारी निष्कलास षोडश कलागुणांनी प्रकटवून, अविकारावर विकृति पसरवून, ती प्रकृति त्या पुरुषास व्यापून टाकते. त्यामुळे ते पुरुषत्व प्रकृतिदशेस प्राप्त होऊन, चंद्र जसा अमावास्येने व्यापल्यावर निस्तेज होतो; किंवा सोन्यात थोडासा हीणकस धातू मिसळून ते जसे निर्भेळत्वाला मुकते तसा; किंवा साधू जसा प्रापंचिक झाला की निर्मलत्वास मुकतो त्याप्रमाणे; किंवा आभाळ आले की भानू जसा झाकोळून जाऊन दिनमान उदासवाणे भासू लागते, तद्वत; वा पय पशूच्या आचळांत असतांना आपल्याठायीचे शुभ्रत्व जसे प्रकटवू शकत नाही तसे; किंवा रत्नाची दीप्ती वस्त्रात गुंडाळल्यावर जशी हरवल्यासारखी होते, तशी;" आणि

राजा पराधीनु जाहला। कां सिंहु रोगें रुंधला।
तैसा पुरुषु प्रकृति आला। स्वतेजा मुके।।१३-१०११।।
जागता नरु सहसा। निद्रा पाडूनि जैसा।
स्वप्नींचियां सोसा। वश्यु कीजे।।१०१२।।
तैसें प्रकृति जालेपणें। पुरुषा गुणु भोगणें।
उदासु अंतुरीगुणें। आंतुडें जेवीं।।१०१३।।

"जसा राजा परतंत्र झाला किंवा सिंह रोगजर्जर झाला की त्याचे स्वयंभू सामर्थ्य व कीर्ती जशा लोपायमान होतात; त्याचप्रमाणे प्रकृतिवशे पुरुष आपले स्वत्व हरवून बसल्यासारखा भासतो. झोपी गेलेल्या पुरुषास जसा तेव्हा पडणाऱ्या स्वप्नातल्या सुखदु:खांचा - ती खरी नसली तरी, भोग घ्यावाच लागतो; विरक्त पुरुषास जशी स्त्रीच्या अधीन झाल्यावर प्रपंचातील कर्मे करावीच लागतात व त्यांचे फल भोगावे लागते; त्याचप्रमाणे त्या निर्गुण परब्रह्मास प्रकृतीच्या योगे गुणोपभोग घ्यावा लागतो."

पुनः स्फटिकशिला दृष्टांत

तैसें अजा नित्या होये। अंगीं जन्ममृत्युचें घायें।
वाजती जैं लाहे। गुणसंगातैं।।१३-१०१४।।
परि तैं ऐसें पांडुसुता। तातले लोह पिटितां।
जेवीं वह्नीसीचि धाता। बोलती तेयां।।१०१५।।
कां आंदोललियां उदक। प्रतिमा होय अनेक।
तैं नानात्व म्हणती लोक। चंद्रीं जेवीं।।१०१६।।
दर्पणाचियां जवलिकां। दुजेपण जैसें ये मुखा।
कां कुंकुमें स्फटिका। लोहित्व ये।।१०१७।।

तैसा गुणसंगमें। अजन्मा हा जन्मे।
पावतु ऐसा गमे। एऱ्हवीं नाहीं।।१०१८।।
अधमोत्तमा योनी। यासीं ऐसियां मानीं।
जैसा संन्यासी होय स्वप्नीं। अंत्यादी जाती।।१०१९।।
म्हणौनि केवला पुरुखा। नाहीं होणें भोगणें देखा।
येथ गुणसंगुचि अशेखा-। लागीं मूल।।१०२०।।

"तो अजन्मा प्रकृतीच्या अधीन होऊन जन्ममृत्यूचे तडाखे सहन करत संसारचक्रात फिरतांना दिसतो. हे पांडुसुता! लोखंडावर अग्नीत तापवल्यावर घातलेले घाव जसे त्यातून प्रकटणाऱ्या ज्वाळांवर होतांना दिसतात; किंवा पाण्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब जसे पाणी हिंदकळल्यावर अनेकत्वाने भासते; किंवा आरशाच्या समोर मुखास जसे द्वित्व प्राप्त होते; कुंकुमाच्या जवळिकेने स्फटिकशिला जशी रक्तवर्णाची दिसू लागते; तसे गुणसंगतीने विकारी झालेल्या त्यास जन्म येतांना दिसतात. संन्याशास स्वप्नांतरी जशा अंत्यजादी योनी प्राप्त व्हाव्यात, तद्वत त्या पुरुषास अधमोत्तम योनी प्राप्त होतात. केवल पुरुषास जन्म व भोग नसतांना, केवळ गुणसंगच त्या सर्व विकारांस मूळ कारण आहे."

पुरुष::::

"कानडा राजा पंढरीचा"

प्रकृति व तिचे त्रिगुण यांच्यामुळे हा पुरुष नानात्वे भासतो. भगवंत म्हणतातः

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः।।१३-२२।।

"***द्रष्टा*** म्हणजे सर्व कार्यसंघाताच्या जवळ राहून साक्षिरूपाने पाहणारा, ***अनुमंता*** म्हणजे देहेंद्रिये, मन, बुद्ध्यादी आपापले व्यवहार करत असतांना केवळ सान्निध्यमात्रे त्या सर्वांस अनुकूल दिसणारा, ***भर्ता*** म्हणजे प्रकृतीचा स्वामी, ***भोक्ता*** म्हणजे व्यवहारातील सुखदुःखे उपभोगतांना दिसणारा; ***महेश्वर*** म्हणजे ब्रह्मादी सर्वांचा अंतर्यामी, स्वतंत्र व शास्ता; ***परमात्मा*** म्हणजे अहंकारग्रस्त जीवात्म्यापेक्षा अतिउत्कृष्ट, उत्तम असे आत्मस्वरूप. **असा हा वैविध्यपूर्ण दिसणारा जो देहांतर्यामी पुरुष आहे, तो वस्तुतः प्रकृतीशी असंबंधित असा *पर* वा प्रकृतीपलीकडचा आहे."**

अशा त्या पुरुषाला शब्दबद्ध करतांना ज्ञानदेव म्हणतातः

हा प्रकृतिमाजीं उभा। परी जुईं जैसा वोथंबा।
यया प्रकृति पृथिवीनभा। तेतुला पाडु।।१३-१०२१।।
प्रकृतिसरितेचां तटीं। मेरु हा किरीटी।
माजीं बिंबे परी। लोटीं लोटों नेणें।।१०२२।।
प्रकृति होय जाये। हा तो असतुचि आहे।
म्हणोनि आब्रह्माचे होये। शासन हा।।१०२३।।

"हा पुरुष प्रकृतिस्थ आहे, परंतु जुईलीच्या वेलीस मंडप जसा केवळ आधार असतो, तसा तो तटस्थ व साक्षी आहे. वस्तुतः त्याच्यात अन् प्रकृतीत, पृथ्वी व नभात असते तितके अंतर आहे! प्रकृतिस्वरूपा नदीच्या काठी हा पुरुषरूपी मेरू पर्वत स्थित आहे. त्याचे केवळ प्रतिबिंब त्या नदीच्या जलात पडतांना दिसते, पण तिच्या प्रवाहाबरोबर काही हा वाहत जात नाही. प्रकृतीने घडविलेले विश्व उत्पन्न होते व त्याचा नाशही होतो. परंतु हा पुरुष जसाच्या तसाच असतो. याच्यात उत्पत्ती व नाशाची कोणतीही लक्षणे प्रकटत नसल्याने हाच आब्रह्मादी सर्वत्रांचे व त्यांना निर्माण करणाऱ्या प्रकृतीचा नियंता आहे."

प्रकृति येणें जिये। याचियां सत्ता जग विएं।
इयांलागीं इयें। वरयतु हा।।१३-१०२४।।
अनंतें कालें किरीटी। जियां मिलती इयां सृष्टी।
तियां रिगती ययांचां पोटीं। कल्पांतसमयी।।१०२५।।
हा महद्ब्रह्मगोसावी। ब्रह्मगोलकलाघवी।
अपारपणें मवी। प्रपंचातें।।१०२६।।
पैं ययां देहामाझारीं। परमात्मा ऐसीं जैं परी।
बोलिजे तैं अवधारीं। ययांतैंचि।।१०२७।।
अगां प्रकृतिपरौता। एक आथी पांडुसुता।
ऐसा प्रवादु जो तत्त्वतां। पुरुषु हा पैं।।१०२८।।

"प्रकृतीला अस्तित्व याच्यामुळेच असते. हा आहे, म्हणूनच त्याच्या सत्तेने ती जग प्रसविते. म्हणून प्रकृतीचा भर्ताही हा पुरुषच आहे. अनंत काळाने, अनंत विश्व, कल्पांतसमयी ज्याच्या पोटात सामावले जाते, तोही हा पुरुषच होय. महदादी सृष्टीचा - या ब्रह्मांडाचा हा स्वामी आहे. ब्रह्मांडाचा सूत्रधार जो कोणी, तो हाच आहे. अपार अशा विश्वाला सामावून घेणारा - ज्याचा अंतपार वेदांनाही कळला नाही तो हाच ***'कानडा राजा पंढरीचा'*** असा परात्पर पुरुष आहे. **देहांतर्यामी वसणारा परमात्मा यालाच म्हणतात. प्रकृतीच्या पलीकडचे अस्तित्व म्हणून जे समजले जाते, तो हाच पुरुष होय. यालाच *आदिपुरुष* अशी संज्ञा आहे."**

समारोप

ज्ञानदेवांचा ***प्रकृति-पुरुषविवेक*** असा संपन्न होतो. क्षेत्र-क्षेत्रज्ञविचाराचे सार व या आदिपुरुषास जाणण्याचे उपाय यानंतर *तेराव्या* अध्यायीच ज्ञानदेव सांगणार आहेत. ते आपण पुढील ***उन्मेष क्र. २१ - क्षेत्र-क्षेत्रज्ञविचारसार*** यात पाहणारच आहोत. तूर्त इत्यलम्।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::२१::
::क्षेत्र-क्षेत्रज्ञविचारसार::

साधनामार्गः:::

आदिपुरुषास जाणण्याचे उपाय

यांप्रमाणे आपण आतापर्यंत जो ***क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार*** पाहिला, त्याचे सार पाहू या.

आदिपुरुषाचे गौप्य प्रकट केल्यावर श्रीगोपालकृष्ण पुढील तीन श्लोकांतून त्या पुरुषास त्याच्या प्रकृतिसह जाणणे व त्याचे उपाय वर्णन करून त्याचे फलस्वरूप म्हणजे जन्म-पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्ती असे सांगतातः

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते।।१३-२३।।

"पुरुषास प्रकृति व गुणांसह जो जाणतो, तो प्रपंचातील सर्व कर्मे करत वावरत असला, तरी पुनश्च कदापिही जन्म पावत नाही."

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना।
अन्ये साङ्ख्येन योगेन कर्मयोगेन चापरे।।१३-२४।।

"या अशा पुरुषास जाणण्याचे वेगवेगळे उपाय आहेत. कित्येक जण ध्यानयोगाने आत्मावस्थित होऊन, सर्वत्र प्राणिमात्र व भूतजात यांच्यात विश्वरूपाने वावरणाऱ्या त्या परमात्म्यास आपल्या आत्म्याशी अभिन्न स्वरूपात सर्व दृश्यमात्रात पाहतात. इतर कितीक जण त्यास साङ्ख्य वा ज्ञानयोगाने जाणतात; तर कित्येक जण त्यास निष्काम कर्मयोगाद्वारे जाणण्यास समर्थ होतात."

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वान्येभ्य उपासते।
तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः।।१३-२५।।

" योगाच्या विविध उपायांनीही त्यास बरेच जण जाणतात. इतर अनेक अजाणताच ज्ञानी-ऋषि -मुनी यांच्या वचनावर श्रद्धा ठेवून श्रुतिप्रणीत वेदविहित उपासना-कर्म-भक्ती-यजन-याजन-भजन-पूजन इ.द्वारे हा मृत्युरूप संसारसागर निःसंशय तरून जातात."

तत्वज्ञानाच्या विविध प्रणालीः:::

विविध साधनामार्गांची समन्वायक चतुःश्लोकी

गीतेचे हे तीन श्लोक*(१३-२३ते२५)* आणि त्यापूर्वीचा ***"उपद्रष्टानुमन्ता च....। परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः।।१३-२२।।"*** हा श्लोक मिळून एक खुबीदार चतुःश्लोकी रचना होते. <u>**साङ्ख्यप्रतिपाद्य *पुरुष व प्रकृति (निरीश्वर साङ्ख्यांच्या मते अनेकत्वाने असणारे पुरुष व सेश्वर साङ्ख्य मते त्यांचा एकंविशिष्ट पुरुष), योग्यांचा परमात्मा, ज्ञान्यांचा आत्मा, वेदांत्यांचे ब्रह्म वा परब्रह्म,गीतोक्त ब्रह्म वा परंधाम इ.त्या अद्वितीयास उद्देशून वापरल्या जाणाऱ्या द्वैती व अद्वैती संज्ञांचा समन्वय या ठिकाणी होत असल्याचे आपणांस जसे जाणवते,***</u> तसेच याच महत्त्वाच्या गीतास्थळी ते साध्य प्राप्त करण्याचे भिन्नभिन्न साधनमार्ग कळून येतात व कोणत्याही मार्गाने गेले तरी होणारी एकमेव अंतिम परिणतीही तीच असल्याचे निखालसपणे कळून येते.

गीता ***सर्वसमन्वायक*** असल्याचा हा एक सबळ पुरावा वा दाखला समजता येईल. तसेच गीतेने प्रमुखतः कर्मयोगच प्रतिपादिला आहे की ज्ञानाचेच महत्त्व गायिले आहे; संन्यासच सर्वश्रेष्ठ मार्ग आहे कां भक्तीच करावी असे आवर्जून सांगितले आहे, हे व तत्सम इतरही बरेच व्यावच्छेदक वादंग कालौघात प्रचुर झालेले आहेत; त्यांच्यावरही ही चतुःश्लोकी सर्वसामान्यांसाठी अखेरचा पडदा टाकण्यास प्रवृत्त करणारी समजण्यास प्रत्यवाय नसावा. एवढे सांगून या विषयावरील ज्ञानदेवांनी केलेले रसग्रहण पाहण्यास तिकडे आता वळू या.

साधनामार्ग

जो निखलपणें एणें। पुरुषांतैं ययां जाणें।
आणि गुणांचें करणें। प्रकृतीचें तैं।।१३-१०२९।।
हे रूप हे छाया। पैल जल हे माया।
ऐसा निवाडु धनंजया। जेवीं कीजे।।१०३०।।
तेणें पाडें अर्जुना। प्रकृतिपुरुष विवंचना।
जेयांचियां मना। गोचर जाहली।।१०३१।।
तो शरीराचेनि मेलें। करूं कां कर्में सकलें।
परि आकाश धुयें न मैलें। तैसा असे।।१०३२।।
आथिलेनि देहें। जो न घेपे देहमोहें।
देह गेलियां नोहें। पुनरपि तो।।१०३३।।

"जो भ्रांतिरहित अंतःकरणाने इतक्या स्पष्टपणे त्या शुद्ध पुरुषास जाणतो व विश्वरूप जो जगदाभास आहे, तो प्रकृति व तिचे गुण यांमुळे प्रकटतो, हे नीट उमजतो; त्या मनुष्यास ***प्रकृति-पुरुषविचार*** उत्तम समजला असे म्हणावे. वस्तू व तिची छाया किंवा सुदूर असणारे जल व त्यामुळे प्रतिभासित होणारे मोहक मृगजळ यातला फरक जितक्या स्पष्टपणे करता येतो, तितक्याच स्पष्टपणे पुरुष व त्याची मोहक छायास्वरूप जी प्रकृति, त्यांतील अंतर ज्यास मनोमन गोचर झाले आहे; जो या देहाच्या व त्याद्वारे संभवणाऱ्या विकारांच्या मोहात सापडत नाही; त्याने त्या देहाद्वारे कोणतीही कर्मे केली, तरी आकाश जसे धुराने मलिन होत नाही, त्याप्रमाणे अंतःकरण मलिन न होता, देहांती तो मनुष्य पुनरपि जन्मास येत नाही."

ऐसा तेयां एकु। प्रकृतिपुरुषु विवेकु।
उपकारु अलौकिकु। करी पैं गां।।१३-१०३४।।
परि हाचि अंतरीं। विवेकभानूचियां परी।
उदैजे तैं अवधारीं। उपाय बहुत।।१३-१०३५।।

"प्रकृति-पुरुषविवेक स्पष्टपणे निखालस जाणून घेण्याचा हा एवढा मोठा लाभ त्याच्या पदरी पडतो. हा विवेक अंतःकरणात

सूर्याप्रमाणे स्वच्छ लखलखीत प्रकटावा यासाठी बरेच उपाय वा साधने आहेत. ती आता ऐक."

कोण्हीं एक सुभटा। विचाराचां आगिटां।
आत्मानात्मकीटां। पुटें देऊनि।।१३-१०३६।।
छत्तीसही वानी भेद। तोडौनियां निर्विवाद।
निवडिती शुद्ध। आपणपें।।१०३७।।
तेयां आपणपेयांचां पोटीं। आत्मध्यानाचियां दिठीं।
देखती गां किरीटी। आपणपेंचि।।१०३८।।

"हे सुवीरा अर्जुना! *काही साधक विवेकाग्नीमध्ये आत्मानात्मरूपी हीणकस सोन्यास चिंतनरूपी रासायनिक द्रव्याची वारंवार पुटे चढवून, त्यातील छत्तीसही तत्त्वांचे हीण मिश्रण जाळून टाकतात व शुद्ध निखालस आत्मतत्त्वरूपी सुवर्णाची प्राप्ती करतात.* **त्या आत्मतत्त्वाचे कोणी ध्यानयोगी साधक स्वत:च्या अंत:करणात चिंतन करून, स्वत:त व संपूर्ण विश्वात सर्वत्र सर्वदूर पसरलेल्या दृश्यात त्याचाच साक्षात्कार करून घेऊन *"हे विश्वचि माझे घर"* अशी स्थिर मती प्राप्त करून घेतात.** *किंबहुना हे समस्त चराचर म्हणजे मीच असा त्यांचा आत्मप्रत्यय असतो."*

आणिक पैं दैवबगें। चित्त देती साङ्ख्ययोगें।
एक तैं आंगलगें। कर्माचेनि।।१३-१०३९।।

"इतर कित्येक साधक दैववशात ***साङ्ख्य*** म्हणजे ***विहंगम*** वा ***ज्ञान*** योगे त्या आत्मतत्त्वाची एकाच झेपेत प्राप्ती करून घेतात; किंवा पूर्वाभ्यासाने प्राप्त झालेल्या यौगिक प्रज्ञेचा अवलंब करून, चित्तवृत्तिनिरोध वा तत्सम इतर योगमार्गांचा अभ्यास केल्याने त्या आत्मतत्त्वास प्राप्त होतात. कोणी एक साधक निष्काम कर्मयोगाचे सांगोपांग आचरण करूनही निर्विकार होत्साते त्या आत्मतत्त्वात स्थिर होतात."

एणें एणें प्रकारें। निस्तरती सांचोकारें।
हे भवभेंऊरें। आघवेंचि।।१३-१०४०।।
परि तैं करिती ऐसें। अभिमानु दवडूनि देशें।
एकाचियें विश्वासें। टेंकती बोलां।।१०४१।।

"कित्येक इतके प्रज्ञासामर्थ्य वा सिद्ध नसणारे लोक, ज्यांना भवभय भेडसावते, ते अन्य ज्या मार्गाने या भवसागरास पार करतात,तो ऐक! आपल्या अहंकाराचा, बुद्धीचा, कर्तृत्वाचा व धनसंपत्ती इ.सामर्थ्यादिकांचा अभिमानमद त्यागून, ते साधुसंत-ऋषिमुनी इ.च्या वचनांवर पूर्ण विश्वास ठेवून, श्रद्धापूर्वक त्यांच्या मुखाने श्रुत्यादींचे जे विवेचन केले जाते, त्याचे अत्यादरपूर्वक श्रवण करतात."

जैं हिताहित देखती। हानि कवणां घेपती।
पुसोनि शिणु हारिती। देती सुख।।१३-१०४२।।
तेयांचेनि मुखें निघें। तेतुलें आदरें चांगें।
ऐकोनियां आंगें। मनें होती।।१०४३।।
तेयां ऐकणेयाचि नांवें। ठेविती गां आघवें।
तेयां अक्षरांसीं जीवें। लोण करिती।।१०४४।।
तेही अंतीं कपिध्वजा। इयां मरणार्णवसमाजा-।
पासौनि निघती वोजा। गोमटियां।।१०४५।।

"गुरु, आप्त व श्रुती यांसमान आदरणीय, सर्वांच्या हिताहितास जपणारी, दु:खींची विचारपूस करून त्यांचा भार हलका करणारी, आर्तांची आर्ती कनवाळूपणे ऐकणारी व सर्व प्राणिमात्रांस सुख प्रदान करण्यात तत्पर असणारी अशी ती सज्जन सोयरी आपल्या प्रतीतीच्या बोलांनी, स्वयेच श्रुति-उपनिषदांचे प्रज्ञासामर्थ्य प्रकटविणाऱ्या मधुर वाणीने जो उपदेश करतात, त्याचे आदरपूर्वक ग्रहण करून व त्याप्रमाणे आचरण करून, त्या अक्षर वाङ्मयाचे मनन व चिंतन करून, त्यावर जीवापाड प्रेम करून, असे लोक अक्षरश: त्यावरून तन-मन-धन ओवाळून टाकून, अंती, हे कपिध्वजा अर्जुना! या जन्ममृत्यूच्या परंपरेतून उत्तीर्ण होतात."

क्षेत्र-क्षेत्रज्ञविचारसमन्वय::::

"सिद्धान्त नवनीत"

याप्रमाणे ***ज्ञान, योग, निदिध्यासन, आत्मानात्मविवेक, निष्काम कर्म, श्रद्धा, महापुरुषांचा संश्रय*** इ.सर्व मार्गांचे थोडक्यात निर्देशन करून ज्ञानदेव म्हणतात:

ऐसैसें हे उपायें। बहुंवस एथ पाहें।
जाणावेयां होएं। एकी वस्तु।।१३-१०४६।।
आतां पुरे हे बहुत। पैं सर्वार्थाचें मथित।
सिद्धांतनवनीत। देऊं तुज।।१०४७।।
येतुलेनि पांडुसुता। अनुभव लाहाणा आयिता।
येर तंव तुज होतां। सायास नाहीं।।१०४८।।
म्हणौनि बुद्धि रचूं। मतवाद खांचूं।
सोलींव निर्वचूं। फलितार्थ।।१०४९।।

"याप्रमाणे हे बरेच उपाय वा साधने त्या एकमेवाद्वितीय वस्तूस जाणण्यासाठीच आहेत. असो. या सर्व मार्गांचे कष्ट न उपसता आयता ***सिद्धानुभव*** तुला प्राप्त व्हावा म्हणून मी आता या सर्वांचा साररूप असा जो सिद्धांत आहे, तो तुला सांगतो. त्या सिद्धांताची सत्यता पटवण्यासाठी व दुराग्रही मतांचे खंडन करून सोलीव गर्भित अर्थ स्पष्ट करण्यासाठी प्रज्ञा सिद्ध करू या!"

याप्रमाणे सूचना देऊन ज्ञानदेव आता *तेराव्या* अध्यायाच्या उरलेल्या *चतुर्थ* भागास विशद करण्यास सिद्ध होत आहेत. त्यांच्या मते हा भाग ***सिद्धान्तनवनीत*** आहे; ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विचाराचे अंतिम संस्करण वा सिद्धता करणारे हे श्लोक गीतेच्या *श्लोक क्र.१३-३६*पासून सुरू होतात. **श्लोक क्र. *१३-२६ ते ३४* मध्ये *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* व विश्व यांचा संबंध काय आहे, हे दर्शविले असून क्षेत्रज्ञाचा खरा विचार स्पष्ट केला आहे. त्याचप्रमाणे यांना जसे आहे, तसेच जाणणाऱ्या ज्ञात्याची दृष्टी व अंतिम स्थिती सांगितलेली आहे.**

श्रीकृष्णमुखें हे ज्ञान प्रकटते, ते असे:

यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं स्थावरजङ्गमम्।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ।।१३-२६।।

ते म्हणतात; "हे अर्जुना! यच्चयावत जे काही स्थिर व चर पदार्थ उत्पन्न होतात, ते सर्व क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानेच उत्पन्न झालेले जाण."

याबद्दल ज्ञानदेवोक्ती अशी आहे:

तऱ्हीं क्षेत्रज्ञ एणें बोलें। तुज आपणपें जैं दाविलें।
आणि क्षेत्र सांघितलें। आघवें जैं।।१३-१०५०।।
तेयां एरएरांचां मेलीं। होईजे भूतीं सकलीं।
अनिलसंगें जलीं। कल्लोल जैसें।।१०५१।।
कां तेजा आणि उखरा। भेटी जालियां वीरा।
मृगजलाचियां पूरा। रूप होये।।१०५२।।
नाना धाराधरधारीं। झलंबलियां वसुंधरीं।
उठिजे जेवीं अंकुरीं। नानाविधीं।।१०५३।।
तैसें चराचर आघवें। जैं काहीं जीवु नांवें।
तैं तो उभययोगें संभवें। ऐसें जाण।।१०५४।।
इयालागीं अर्जुना। क्षेत्रज्ञा प्रधाना।
पासौनि न होती भिन्ना। भूतव्यक्ती।।१०५५।।

"याप्रमाणे मी तुला सविकार ***क्षेत्र*** त्याच्या **छत्तीस** तत्त्वांसह स्पष्ट करून सांगितले. तसेच ***क्षेत्रज्ञ म्हणजे जे आत्मतत्त्व***, तेही विशद केले. या दोघांच्यापासून समस्त भूतमात्रे उत्पन्न होतात. वायूमुळे जळावर जशा लाटा निर्माण होतात; सूर्यकिरणे व वालुकामय प्रदेश यांच्या संयोगाने मृगजळ जसे भासते; किंवा पर्जन्यधारांनी भिजलेली पृथ्वी जसे नानाविध धान्य-वनस्पती इ.चे अंकुर निर्माण करते; त्याचप्रमाणे या उभय ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांच्या योगाने ***जीव*** म्हणून ओळखली जाणारी या चराचर सृष्टीतील भूतमात्रे उपजतात. म्हणूनच हे वीरा अर्जुना! ***क्षेत्रज्ञ व प्रधान म्हणजे प्रकृति, यांच्याहून भूते भिन्न नाहीत."***

समदृष्टी

हे ज्ञान प्राप्त झालेला पुरुष समस्त सृष्टीस ज्या दृष्टीने पाहतो, तिचे वर्णन गीतेत पुढील श्लोकांद्वारे केले आहे:

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्।
विनश्यस्त्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति।।१३-२७।।
समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम्।।१३-२८।।

"समस्त भूतमात्रांठायी वसणाऱ्या एका त्या परमतत्त्वास जो जाणतो व भूतांच्या विनाशाबरोबर त्या परमेश्वराचा विनाश घडत नाही, तर ते परमतत्त्व अविनाशी आहे, क्षेत्रज्ञ हे तेच तत्त्व आहे, हेही जाणतो; तोच त्या परमेश्वराचे खरे स्वरूप जाणतो. सर्वत्र भरून असणाऱ्या त्या ईश्वरास त्याच्या सत्य स्वरूपात पाहणारा स्वतःच स्वतःचा संसारचक्रात घात न करून घेता, त्या श्रेष्ठ गतीस म्हणजे परब्रह्मस्वरूपास पावतो."

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति।।१३-२९।।

"या सर्व विश्वाच्या पसाऱ्यात सर्व प्रकारची कर्मे प्रकृतीकडूनच केली जातात, व आत्मा स्वतः अकर्ता आहे, तसेच निमित्तमात्र आहे; हे जो जाणतो, तोच खरा समदृष्टी प्राप्त झालेला व त्रिपुटीविरहित तुर्यावस्थेत विहरणारा ज्ञानी असतो."

याप्रकारे गीतेने जी आत्मा वा पुरुष वा क्षेत्रज्ञाची लक्षणे प्रकट करत ज्ञान्याचीही स्थिती दर्शविली आहे, त्यासंबंधीच्या ज्ञानदेवांच्या ओव्या अशा आहेत:

पैं पटत्व तंतु नव्हे। तऱ्हीं तंतूसिचि तैं आहे।
ऐसा खोलीं डोलां जो पाहे। ऐक्य हे गां।।१३-१०५६।।
भूतें आघवींचि होती। एकाची एक आहाती।
परि पैं भूतप्रतीती। वेगलीक असे।।१०५७।।
यांची नांवेही आनानें। अनारिसीं वर्तनें।
वेषही सिनानें। आघवेयांचें।।१०५८।।
ऐसें देखौनि किरीटी। भेद सूसीं हन पोटीं।
तऱ्हीं जन्माचियां कोटी। न लाहसि निघों।।१०५९।।

"वस्त्र तंतूंनी विणलेले असते. पण त्याला तंतू म्हणता येत नाही. वस्त्रत्व हा तंतूचाच गुण आहे, त्यापासूनच उद्भवला आहे, हे जसे खोलवर विचार केला तर पटते; त्याचप्रमाणे भूते व ज्ञेय ब्रह्मवस्तू वा क्षेत्रज्ञ यांचा संबंध आहे, हे सखोल विचारांती पटते. प्रत्येक भूत वेगवेगळे प्रतीत होत असले, तरी सर्व भूते एकाच तत्त्वापासून झालेली आहेत. त्यांची नांवे वेगवेगळी आहेत; वर्तणूकही भिन्नभिन्न आहे; त्यांची रूपे निरनिराळी आहेत; हे भिन्नत्व पाहून, हे अर्जुना! जर तुला असे वाटले की ही सर्व भूते एकमेकांपेक्षा दुजी आहेत, तर तुला द्वैतबाधा होऊन कोट्यवधी जन्मांतरीसुद्धा परमात्मप्राप्ती होऊ शकणार नाही."

पैं नाना प्रयोजनशीलें। दीर्घें वक्रें वर्तुलें।
होती एकींचिचीं फलें। तुंबिणियेंचीं।।१३-१०६०।।
होतु कां उजु वांकुडें। परि बोरीचें हे न मोडे।
तैसीं भूतें अवघडें। वस्तू उजू।।१०६१।।

"कमीजास्त आकाराची, लांबोडकी, वांकडी अशी वेगवेगळी भासणारी फळे जशी एकाच भोपळ्याच्या वेलीवर लागतात; किंवा वाकड्या व सरळ वेगवेगळ्या आकाराच्या फांद्या एखाद्या बोरीच्या झाडास लागल्या, तरी त्यातले लाकूड जसे बोरीचेच असते; त्याचप्रमाणे भूते जरी भिन्नभिन्न म्हणून प्रतीत होत असली, तरी ती त्या एकमात्र ब्रह्मवस्तूपासूनच झालेली आहेत, हे तू जाणून अस."

अंगारकणीं बहुंवसीं। उष्णता समान जैसीं।
तैसा नाना जीवराशीं। परेशु असे।।१३-१०६२।।
गगनभरी धारा। परि पाणी एकचि वीरा।
तैसा ययां भूताकारां। सर्वांगीं तो।।१०६३।।
हे भूतग्राम विषम। परि वस्तू तैं एथ सम।
घटमठीं व्योम। जियापरी।।१०६४।।

"अनेक अग्निकणात उष्णता जशी समभावाने असते, तसाच नाना जीवराशीत एकच परमात्मा समभावाने नांदत असतो. असंख्य

पर्जन्यधारा जरी आकाशास वोसंडून वाहत राहिल्या तरी त्यांच्यातील जल वेगवेगळे जसे असत नाही, तसेच सर्व भूतांस व्यापून, त्यांच्या सर्वांगातून तो एकच परमात्मा प्रकटतो. घटातील व मठातील आकाश जसे तेच असते, त्याचप्रमाणे विविध आकाराच्या व स्वभावाच्या सर्व भूतमात्रातून ती एकच ब्रह्मवस्तू समानतेने नांदते."

हा नासतां भूताभासु। एथ आत्मा तो अविनाशु।
जैसा केयूरादिकीं कसु। सुवर्णाचां।।१३-१०६५।।
एवं जीवु धर्महीनु। जो जीवासीं अभिन्नु।
देखें तो सुनयनु। ज्ञानियांमाजीं।।१०६६।।
ज्ञानाचां डोलां डोलसां-। माजीं डोलसु तो वीरेशा।
हे स्तुती नोहें बहुंवसा। भाग्याचां तो।।१०६७।।

"केयूरादिक सुवर्णाभूषणांना आटवले असता त्यात भरून राहिलेले एकमात्र सुवर्ण आपल्या मूळ स्वरूपास पावते, त्याचप्रमाणे समस्त भूतादींचा लोप होताच तो आत्मा आपल्या अविनाशी स्वरूपात निष्पन्न होतो. परमात्मा सर्व जीवांशी अभिन्न असूनही जीवभावरहित आहे, हे जाणणारा ज्ञान्यातील सुनेत्रच म्हणावा; हे अर्जुना! ही स्तुती नव्हे, तर तो अतिभाग्यवान असून तो ज्ञान्यांचा चक्षूच शोभतो अन डोळसांतला खरा डोळस असा तोच महात्मा समजावा."

"उद्धरेदात्मनात्मानं"

अन्य लोक आपला आपणच आत्मघात करून घेतात. पण असा समदृष्टी प्राप्त झालेला ज्ञानी स्वतःच स्वतःचा घात करून घेत नाही; तर तो परब्रह्मस्वरूपास पावतो. गीतेतील *श्लोक क्र.* ६-५मध्ये म्हटले होते की, ***"उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत। आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः।।";*** आपणच आपला उद्धार करावा. आपण आपल्या आत्म्याला अधोगतीस जाऊ देऊ नये. आत्मोद्धाराविषयी आपणच आपले मित्र आहोत व आपणच आपले शत्रू आहोत. त्या श्लोकाची येथे आठवण होते. हाच भाव **"न हिनस्त्यात्मनात्मानं (१३-२८)"** यातही आहे.

तेव्हा ***"बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः। अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत्।।६-६।।"*** असे सांगून श्रीगोपालकृष्णांनी योगयुक्ती सांगण्यास सुरुवात केली होती. त्याचा विचार प्रसंगोपात्त करण्यात येईलच. संशयात्म्याचा विनाश होतो, असेही गीता श्लोक क्र. ४-४०मध्ये ***"अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति। नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।"*** सांगितलेले आपणांस स्मरत असेलच. स्वतःच स्वतःचा घात करून न घेता आत्मोद्धार करून घेणाऱ्या ज्ञान्याच्या स्थितीबाबत ज्ञानेश्वर *तेराव्या* अध्यायातील अठ्ठाविसाव्या श्लोकाधारे म्हणतातः

जैं गुणेंद्रियधोकटी। देहधातूंची त्रिकुटी।
पांचमेलावा वोखटी। दारुण हे।।१३-१०६८।।
हे उघड पांचवेऊली। हे पंचधा आंगीं लागली।
जीव पंचानना सांपडली। हरिणकुटी हे।।१०६९।।
ऐसा असूनि इयें शरीरीं। कोण नित्यबुद्धीची सुरी।
अनित्यभावाचियां उदरीं। दाटीचिना।।१०७०।।
परि इयें देहीं असतां। जो नयेचि आपणयां घाता।
आणि शेखीं पांडुसुता। तेथेंचि मिळे।।१०७१।।

"पंचमहाभूते, त्रिगुण व इंद्रिये यांच्यापासून तयार झालेला हा देह म्हणजे सप्त धातूंना धारण करणारी, ***स्थूल, सूक्ष्म व कारण*** असे तीन कप्पे असलेली घाणेरडी पोतडी आहे. हीच जीवाला बंदिस्त करून दारुण यातना भोगविते. पंचविषयांच्या नांग्या मारणारी ही पाच नांग्यांची इंगळीच आहे. किंवा विषयपंचकरूपी पंचाग्नीच जणू या जीवाला होरपळवतो आहे जसा काही! सिंहाला हरणांच्या घरात प्रवेश मिळाला तर तो जसा त्या हरणांनी तृप्त धाल्याशिवाय तेथून बाहेर पडणार नाही; त्याचप्रमाणे हा जीवपंचानन या गुणेंद्रियविषयरूप हरणांच्या देहरूपी घरातून तृप्त झाल्याशिवाय बाहेर पडू इच्छित नाही. म्हणून संसारलुब्ध पुरुष नित्यानित्यविवेकबुद्धिरूप सुरी या अनित्य अशा देहभावावर चालवू इच्छित नाहीत व आत्मनाश करून घेतात. परंतु भाग्यवंत ज्ञानी महात्मे मात्र अशा प्रकारे देहबुद्धीने वावरून स्वतःचा घात करून घेत नाहीत."

आत्मसाक्षात्काराचे स्वरूप

जैं योगज्ञानाचियें प्रौढी। वोलांडूनियां जन्मकोडी।
न निगो इयां भाषा बुडी। देती योगी।।१३-१०७२।।
<u>जैं आकाराचें पैलतीर। जैं नादाची पैलमेर।</u>
<u>तुर्येचें माजघर। परब्रह्म जैं</u> ।।१०७३।।
मोक्षासगट गती। जेथें येती विश्रांतीं।
गंगादि आपांपती। सरिता जेवीं।।१०७४।।
तैं सुख एणेंचि देहें। पायपाखालणियां लाहे।
भूतवैषम्य नोहे। विषमबुद्धी।।१०७५।।

"हे पांडुपुत्रा! असा ज्ञानी अंती परब्रह्मासच पावतो. योग व ज्ञान यांच्या प्रभावाने कोट्यवधी जन्म पार करून योगी व ज्ञानी त्या परब्रह्मातून परत न येण्याच्या निश्चयाने त्यात बुडी देऊन राहतात. **साकार विश्वाभिव्यक्तीची सीमारेषा ओलांडून, अव्यक्तावस्थेत असणाऱ्या विश्वाच्या पल्याड *नादरूपाअंती असणारे ते परब्रह्म* म्हणजे तुर्यावस्थेचे माजघर वा विश्रामस्थानच असते.** गंगा वगैरे नद्या ज्याप्रमाणे सरितापती सागरात मिळून विश्रब्ध होतात, त्याचप्रमाणे मोक्षासहित सर्व गती ज्यात जीवासह मिसळून जातात, ते हेच विश्रामस्थान होय. भूतमात्रात विषमबुद्धी न ठेवणाऱ्या त्या योग्यांस व ज्ञान्यांस याच देहीं ते असे उत्तम परब्रह्मसुख मुबलक मिळते."

दीपांचां कोडी जैसें। एकचि तेज सरिसें।
तैसा जो असे। सर्वत्र ईशु।। १३-१०७६।।
ऐसेनि समत्वें पांडुसुता। जियें तो देखतसाता।
तो मरण आणि जीविता। नागवें फुडां।।१०७७।।
म्हणौनि तो दैवगळां। वानीत असो वेलोवेलां।
जैं साम्यसेजें डोला। लागला तेयां।।१०७८।।

"कोटिकोटी दीपांतर्यामी जसे एकच तेजतत्त्व विराजते, त्याचप्रमाणे या समस्त विश्वाच्या पसाऱ्यात विविधतेने नटनाच करणारा तो केवल एकमात्र ईश्वरच आहे; अशा समभावास प्राप्त झालेला तो

आप्तकाम पुरुष जन्म अन् मृत्यूला पार करून जातो. अशा समभावरूपी शेजेवर निद्रा करणाऱ्या त्या पुरुषास भाग्यवंत म्हणून मी वारंवार वाखाणत असतो, ते याचसाठी!"

आणि मनोबुद्धिप्रमुखें। कर्मेंद्रियें अशेखें।
करी प्रकृतिची हे देखें। सांचें जो गां।।१३-१०७९।।
घरींचि राहाटती घरीं। घर कांहीं न करी।
अभ्र धांवें अंबरीं। अंबर तैं उगे।।१०८०।।
तैसीं प्रकृति आत्मप्रभा। खेळें गुणीं विविधारंभा।
येथ आत्मा तो वोथंबा। नेणें कोण।।१०८१।।
ऐसेनि येणें निवाडें। जेयाचां जीवीं उजिवडें।
अकर्त्तयांतैं फुडें। देखिलें तेणें।।१०८२।।

"आणि मन-बुद्धी यांद्वारे कर्मेंद्रियांचा जो व्यापार चालतो, तो केवळ प्रकृतीमुळेच होतो, हे जो जाणतो; ज्याप्रमाणे घर राहाटतांना दिसले, तरी त्यात खरे तर माणसांच्यामुळे वर्दळ दिसते, घर काही स्वतः राहाटत नाही; किंवा आकाशात ढगांच्या होणाऱ्या हालचालींमुळे आकाश धावतांना भासले तरी ते खरे तर स्तब्धच असते; त्याचप्रमाणे प्रकृति आत्मप्रकाशात जो खेळ खेळते, त्यांना आत्मा हा भोज्याच्या खांबाप्रमाणे आहे; अशा निर्णयाचा प्रकाश ज्याच्या अंतःकरणात स्फुरला आहे, त्याच ज्ञान्याने वास्तविक अकर्त्या आत्म्यास पाहिले आहे, असे म्हटले पाहिजे."

चिद्विलासाची अनुभूती

अशाच पुरुषाला ब्रह्माची प्राप्ती होते. म्हणून गीतामाई म्हणते:

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति।
तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा।।१३-३०।।

"भूतांचा निरनिराळेपणा एकाच आत्म्याठायी स्थित आहे व त्या आत्म्याच्या संकल्पापासूनच या सर्व विश्वाचा विस्तार झालेला आहे, हे दर्शन झाल्यावर त्या पुरुषास ब्रह्माची प्राप्ती होते."

त्यावर ज्ञानदेव म्हणतात:

एरवीं तैंचि अर्जुना। होईजे ब्रह्मसंपन्ना।
जैं या भूताकृति भिन्ना। दिसती एकी।।१३-१०८३।।
लहरी जैसियां जलीं। परमाणुकणिका स्थलीं।
रश्मीकर मंडलीं। सूर्याचां।।१०८४।।
ना तन्हीं देहीं अवेव। मनीं आघवेंचि भाव।
विस्फुलिंग सावेव। वह्नीं एकीं।।१०८५।।
तैसें भूताकार एकाचें। हे दिठीं रिगे जैं सांचें।
तैंचि ब्रह्मसंपत्तीचें। तारूं लागे।।१०८६।।
मग जेयातेयांकडे। ब्रह्मेंचि दिठी उघडे।
किंबहुना जोडे। अपार सुख।।१०८७।।

"वास्तविक पाहता, हे अर्जुना! जेव्हा साधकास भिन्नभिन्न आकाराप्रकारांच्या या सर्व भूतमात्रात त्या एकाच परमात्म्याचा बोध होतो, तेव्हा त्यास ब्रह्माची प्राप्ती होते. जलाच्या लाटाच जशा जलावर असतात; किंवा अणु-परमाणू पृथ्वीवर भिन्नत्वाने स्थित दिसले तरी ते पृथ्वीचेच अंश असतात; अथवा सूर्यकिरण सूर्यमंडळाहून भिन्न भासले तरी त्यांना सूर्यमंडळच उगमस्थान असते; अथवा देहाचे अवयव असतात; किंवा अंतर्यामीचे भाव जसे मनात असतात; किंवा ठिणग्यांच्या रूपाने अग्नीच जसा असतो; त्याचप्रमाणे एका परमात्म्याचेच हे भिन्नभिन्न भूताकार आहेत, याची प्रतीती प्राप्त झालेल्या साधकास ब्रह्मभावनेच्या जहाजावर बसावयास मिळते आणि सर्वत्र समुद्राच्या पाण्याप्रमाणे पसरलेला ब्रह्मरूपाचा पसाराच दिसू लागतो. याप्रमाणे त्यास अपार सुखाची प्राप्ती होते."

एतुलेनि तुज पार्था। प्रकृतिपुरुषव्यवस्था।
ठायेंठावो प्रतीतिपथा-। माजीं जाहलीं।।१३-१०८८।।
अमृत जैसें ये चुळां। कां निधान देखिजे डोळां।
तेतुला जिव्हाला। मानावा गां।।१०८९।।
हा जी जाहलियें प्रतीती। घर बांधणें जैं चित्तीं।
तैं आतां ना सुभद्रापती। इयावरी।।१०९०।।
तन्हीं एक दोन्हीं तैं बोल। बोलिजती सखोल।
देईं मनातैं वोल। मग तैं घेईं।।१३-१०९१।।
ऐसें देवें म्हणितलें। मग बोलों आदरिलें।
तेथे अवधानाचेंचि केलें। सर्वांग एरें।।१०९२।।

"श्रीकृष्ण म्हणतात: "हे पार्था! ***याप्रमाणे जी अनादी अशी प्रकृति-पुरुष यांद्वारे असलेली विश्वव्यवस्था आहे, तिचे तुला सांगोपांग दर्शन घडविले आहे. हीच व्यवस्था योगसाधकास प्रत्ययास येते.*** तुझ्या अहोभाग्याने याचा प्रत्यक्ष अनुभवही तुला घेता आला. भाग्यवंताच्या वाटी आलेली अमृताची चूळ जशी तो न थुंकता सावकाश प्राशन करतो; किंवा एखादा अनुपम ठेवा पाहण्यास मिळाला, तर तो जसा दृष्टीत साठवून घ्यावा; त्याच प्रकारे या प्रकृति-पुरुषरहस्याचे जतन करावे व सावकाश आस्वाद घ्यावा. परंतु त्याआधी तू माझे एकदोन बोल नीट ऐकून घे. माझे म्हणणे तुझ्या मनात खोलवर रुजव. म्हणजे हा अनुभव चिरंतन करण्यासाठी या रहस्याच्या प्रतीकाचे तुला स्वतःच्या मनात उत्तम स्मारक रचता येईल."

देहबुद्धीचा निरास

देवांचे हे बोलणे ऐकून पार्थ सर्वांगानी अवधान देऊन त्यांचे भाष्य पुढे ऐकण्यास सज्ज झाला. त्यावर श्रीकृष्ण म्हणतात:

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः।
शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते।।१३-३१।।

"हे कौंतेय! अनादी असल्याने व गुणातीत असल्याने अविनाशी असा हा परमात्मा शरीरात राहूनही वास्तविक काहीही करत नाही व कशानेही लिप्त होत नाही."

देहांतर्यामी असूनही देहाद्वारे घडणाऱ्या कर्मांचे कर्तृत्व नसणाऱ्या व देहसंघाताद्वारे होणाऱ्या कर्मफलांनी, वासना व इच्छेने लिप्त न होणाऱ्या त्या अविनाशी परमतत्त्वासंबंधी ज्ञानदेव उद्गारतात:

म्हणे परमात्मा म्हणिपे। तो ऐसा जाण स्वरूपें।
जलीं जलें न लिंपे। सूर्यु जैसा।।१३-१०९३।।

"सूर्याचे प्रतिबिंब जळात भिजलेले भासत असले तरी सूर्य जसा पाण्याचा स्पर्शही न होता जसाच्या तसाच राहतो, त्याचप्रमाणे ज्याला परमात्मा म्हणतात, त्याचे स्वरूप असते. प्रकृतीठायी त्याचे आत्मरूपाने प्रतिबिंब भासते व तो प्रकृतीने लिप्त झालेला दिसतो. परंतु प्रकृतीच्या सर्व कार्यापासून अलिप्त असाच तो परमात्मा वस्तुतः आहे."

कां जैं जलां आदीं पाठीं। सूर्यु असतुचि असे किरीटी।
माजीं बिंबें तैं दृष्टी। आणिकांचिये।।१३-१०९४।।
तैसा आत्मा देहीं। आथि म्हणीपे हे कांहीं।
सांचें तऱ्हीं नाहीं। तो जेथींचा तेथे।।१०९५।।
आरिसा मुख जैसें। बिंबलियां नाम असे।
देहीं बैसणें तैसें। आत्मतत्त्वा।।१०९६।।

"जळ असो किंवा नसो, सूर्य जसा त्यात पडणाऱ्या प्रतिबिंबावर आपल्या अस्तित्वासाठी अवलंबून नसतो, किंबहुना इतरांना त्याचे प्रतिबिंब केवळ स्वतःच्या दृष्टीने दिसते; त्याचप्रमाणे आत्मा हा त्याचा देहांतर्यामी जो आभास होतो, त्यावर आपल्या अस्तित्वासाठी अवलंबून राहत नाही व तो त्या देहातही खरे तर न राहता, आपला जेथल्या तेथे उगाच राहतो. आरशात मुखाचे प्रतिबिंब दिसल्यावर त्याला जसे मुख असे म्हणावे, तद्वतच देहामध्ये भासणाऱ्या आत्मतत्त्वाचे आहे. परमात्म्याचे वा चेतनेचे जे हे प्रतिबिंब देहांतर्यामी दिसते, त्याला जग वायाच आत्मा म्हणून संबोधिते."

तेयां देह म्हणती भेटी। हे सपाईं निर्जीव गोठी।
वारियां वालुवें गांठी। केवीं आहे।।१३-१०९७।।
आगीं आणी पींसा। दोरा सुवावा कैसा।
केउतां सांदा आकाशा। पाषाणेंसीं।।१०९८।।
एक निघे पूर्वेकडे। एक तैं पश्चिमेकडे।
तियें भेटीचेनि पाडें। संबंधु हा।।१०९९।।

"आत्म्याचा आणि देहाचा संबंध जुळतो असा जो प्रवाद आहे, तो निव्वळ बाष्कळ आहे. अरे अर्जुना! अग्नी आणि पीस यांना ओवणारा दोरा शोधूनही सापडेल का! वारा आणि वालुका यांची मोट बांधता येईल का! आकाश आणि पाषाण यांचा सांधा जुळवता येईल का! एक मनुष्य पूर्व दिशेला प्रवासास निघाला, तर दुसरा पश्चिमेकडे. त्या दोघांची भेट कधी तरी पडेल का!"

उजिवडा आणि अंधारेयां। जो पाडु मृता उभया।
तोचि गां आत्मया। देहा जाण।।१३-११००।।
रात्री आणि दिवसा। कनका आणि कापुसा।
अपाडु कां जैसा। तैसाचि हा।।११०१।।

"अरे! अंधार व उजेड यांचा जेवढा मेळ बसेल किंवा मृत आणि जिवंत मनुष्य यांच्यात जेवढे सादृश्य असते, तेवढेही सादृश्य देह अन आत्मा यांच्यात नाही. सोने आणि कापूस, दिवस आणि रात्र, यांच्यात जेवढी भिन्नता आहे, तितकीच, किंबहुना त्याहूनही बरीच भिन्नता देह आणि आत्मा यांच्यात आहे. असे असता देह व आत्मा एकत्र नांदतात, हे खरे तरी वाटेल काय!"

"आत्मा तो एथ ऐसा"

देह हा असा निव्वळ नाशिवंत व अनित्य आहे अन आत्मा तर अनादी व अविनाशी आहे. ज्ञानदेव पुढे म्हणतातः

देह तंव पांचाचें जालें। हे कर्माचां गुणीं गुंथलें।
भंवतसें चाकीं सूदलें। जन्ममृत्युचां।।१३-११०२।।
हे कालानलाचें कुंडीं। घातली लोणियाची उंडी।
माशी पांख पाखडी। तंव हे सरे।।११०३।।
हे विपायीं आगीं पडें। तऱ्हीं भस्म होऊनि उडे।
जाहलें श्वान वरपडें। तऱ्हीं तैं मल।।११०४।।
यया चुके दोनीं काजा। तऱ्हीं होय कृमीचां पुंजा।
हा परिणामु कपिध्वजा। कश्मलु गां।।११०५।।

"कर्माच्या गुंड्यात गुंतलेला पंचमहाभूतांचा बनविलेला हा देह तर निव्वळ जन्ममृत्युचक्रात अडकून भ्रमत असतो. हा तर कालाग्नीत टाकलेल्या लोण्याच्या आहुतीसम आहे. माशी पंख पसरते, तेवढ्या अल्पावधीत हा नाश पावतो. अंती अग्नीत पडून त्याची राख तरी होते किंवा श्वानादींकडून खाल्ले जाऊन त्याचा मल होतो. या दोन्ही परिणामात्मक पर्यायातून जर तो सुटला तर अंती त्यात किड्यांचा पुंजका होतो. हे कपिध्वजा! या देहाचा असा किळसवाणा शेवट होतो."

पण यावेगळा आत्मा कसा असतो ते पाहाः

या देहाची हे दशा। आणि आत्मा तो एथ ऐसा।
पैं नित्यसिद्ध आपैसा। अनादिपणें।.१३-११०६।।
सकलु ना निष्कलु। अक्रियु ना क्रियाशीलु।
कृशु ना स्थूलु। निर्गुणपणें।।११०७।।
आभासु ना निराभासु। प्रकाशु ना अप्रकाशु।
अल्प ना बहुंवसु। अरूपपणें।।११०८।।

आत्मानंदाचे तत्त्वज्ञान सांगतांना ज्ञानदेवांच्या सिद्धवाणीस, वसंतऋतूत वनश्रीस यावा तसा नव्हाळीचा पानोरा-फुलोरा अन बहर येतो. ते म्हणतातः

"हा देह असा मर्त्य व नाशवंत आहे. आत्मा मात्र अनादी, नित्य व सिद्ध आहे. तो निर्गुण आहे; पण तरीही निरवयव नाही, तसेच सावयवही नाही. सगुण नाही, तसेच असगुणही नाही. अक्रिय नाही, तसाच क्रियाशीलही नाही. सूक्ष्म नाही, तसेच स्थूलही नाही. आत्मा अरूप आहे, म्हणून तो प्रकट नाही, पण अप्रकटही नाही. त्याचा आभास या देहात नसतो, पण वास्तविक निराभासही नसतो. आत्मा प्रकाशमान नसतो, तसाच अप्रकाशमानही नसतो. या विश्वात तो स्वल्पांशाने साकारही होत नाही, तसेच बव्हंशीसुद्धा साकार होत नाही; पण तो निराकार आहे, असेही म्हणता येत नाही, तसेच तो निराकार नाही, असेही म्हणता येत नाही."

रिता ना भरितु। रहितु ना सहितु।
मूर्त्तु ना अमूर्त्तु। शून्यपणें।।१३-११०९।।
आनंदु ना निरानंदु। एकु ना विविधु।
मोकळा ना बद्धु। आत्मपणें।।१११०।।

येतुला ना तेतुला। आइता ना रचिला।
बोलता न उगला। अलक्षपणें।।१११११।।

"तो शून्य आहे, पण म्हणून रिक्त आहे असेही नाही; तसेच तो भरलेलाही नाही. प्रकृतिरहितही नाही, तसेच प्रकृतिसहितही नाही. मूर्त नाही, तसाच अमूर्तही नाही. आत्मा म्हणजे परतत्त्व वा अंतिम तत्त्व वा अंतिम सत्य असला, तरी तो सानंद नाही, तसाच निरानंदही नाही; एकलाच आहे असे नसले, तरी ***'बहुस्याम्'*** सुद्धा नाही; मुक्त आहे असेही नाही, तरी तो बद्धसुद्धा नाही. तो आत्मा निर्विषय असल्याने मोजमापरहित आहे; देवाणघेवाणीपलीकडील आहे; स्वतःसिद्ध वा स्वयंभू नाही, तसेच निर्माण केलेला नाही; तो मूक नाही, पण अमूकही नाही. तो कोणाचेही लक्ष्य होऊ शकत नाही, असे असूनही अलक्षसुद्धा नाही."

सृष्टीचा होणां न रचे। सर्वसंहारें न वेंचे।
आथी नाथी या दोहींचे। पंचत्व तो।।१३-१११२।।
मवे ना चर्चे। वाढे ना खांचे।
विटे ना वेंचें। अव्ययपणें।।१११३।।
एवंरूप पैं आत्मा। देहीं जैं म्हणती प्रियोत्तमा।
तैं मठाकारें व्योमा। नाम जैसें।।१११४।।

"तो परमात्मा सृष्टीच्या सर्जनासह उत्पन्न होत नाही, तसाच सृष्टीच्या संहाराबरोबर नष्टही होत नाही. ***अस्ति व नास्ति*** या दोनही उपमानांचे लय त्या परमात्म्यातच होतात. ***अव्यय*** असल्याने आत्म्याचा ऱ्हासही होत नाही, तसाच तो वृद्धीही पावत नाही; त्याचे विभागही होत नाहीत किंवा त्याचे गुणधर्मही पालटत नाहीत; त्याला मापता येत नाही, तसेच त्याचे ***"तो अमुकअमुक प्रकारचा आहे"*** असे वर्णनसुद्धा करता येत नाही. हे प्रियोत्तमा अर्जुना! अशा स्वरूपाचा हा परमात्मा आहे. तो देहांतर्यामी आहे, असे म्हणणे म्हणजे ज्या आकाशामुळे मठाकार स्पष्ट होतो, त्या मठाकाररूपी इवल्याशा मठाकाशालाच आकाश अशी व्यापक संज्ञा देण्यासारखे ठरेल!"

तैसें तेयाचियें अनुस्यूति। होती जाती देहाकृती।
तो घे ना संडी सुमती। जैसा तैसा।।१३-१११५।।
अहोरात्रे जैशीं। येती जाती आकाशीं।
आत्मसत्तें तैशीं। देहें जाण।।१११६।।

"हे सुमते! त्या सर्वव्यापक अखंड आत्मतत्त्वावर देहाकृती उमटून नाश पावतात, पण या सृष्टीच्या होण्याजाण्याने त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही; तो जसाच्या तसाच असतो. आकाश दिवस व रात्र दाखविते, तसे असूनही आपण मात्र निर्लेप राहाते; अगदी तसेच त्या आत्मसत्तेमुळे देहादिक दिसतात, पण मूळ आत्मा जसाच्या तसा अलिप्त राहातो."

म्हणौनि इयें शरीरीं। कांहीं करवी ना करी।
आयताहीं व्यापारीं। सज्जु नोहें।।१३-१११७।।
ययालागें स्वरूपें। उणा पुरा न घेपें।
हे असो तो न लिंपे। देहीं देहां।।१११८।।

"या देहादींची कर्मे करणे व व्यापार-व्यवहार चालविणे, यांच्याशी त्याचा संबंध असत नाही. आपोआप त्याच्या सत्तेने होणाऱ्या सृष्ट्यव्यवहाराचा तो चैतन्यमय आत्मा केवल साक्षिभूत असतो. परमात्मस्वरूप हे असे आहे. देहादी सृष्टीच्या व्यापार व व्यवहाराने तो आत्मा विकरत नाही. तसेच त्यात आसक्तही होत नाही; सहभागी होत नाही. देहाच्या ठायी असूनही तो देहेंद्रियांनी लिप्त होत नाही."

क्षेत्रविहीन तो क्षेत्रज्ञ

सर्वव्यापी व सर्वत्रावस्थित असणारा असा हा परमात्मा स्वरूपाने कसा आहे, हे सांगतांना गीता पुढे सांगतेः

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते।।१३-३२।।

"ज्याप्रमाणे सर्वव्यापी असूनही सूक्ष्मत्वामुळे आकाश कोणत्याही पदार्थाशी लिप्त होत नाही; त्याचप्रमाणे आत्मासुद्धा सर्वत्र अवस्थित असूनही देहाने लिप्त होत नाही." अशा आत्मवस्तूची कल्पना सुस्पष्ट करतांना ज्ञानदेवही म्हणतातः

अगां आकाश कें नाही। हे न रिघेचि कवणें ठायीं।
परि काईसेनही कहीं। गादिजेना जैसें।।१३-१११९।।
तैसा सर्वत्र सर्व देहीं। आत्मा असतुचि असे पाहीं।
संगदोषें एकेंहीं। लिप्तु नोहें।।११२०।।
पुढत पुढति एथें। हेंचि लक्षण निरुतें।
जैं जाणावें क्षेत्रज्ञातें। क्षेत्रविहीना।।११२१।।

"अर्जुना! आकाश नाही असे कोणते स्थळ आहे! सर्वव्यापी व सूक्ष्म अशा त्याचा प्रवेश न होणारे स्थल वा पदार्थ अस्तित्वातच नाही. असे असूनही ते सर्वथा सर्व वस्तुमात्रांपासून अस्पर्शच राहत नाही का! ***आत्मासुद्धा सर्वत्र व सर्व देहांत असूनसुद्धा देहेंद्रियांच्या संबंधामुळे विकरला जात नाही. आत्म्याचे हे एकच लक्षण प्रमुख आहे आणि या योगेच त्या क्षेत्रज्ञ आत्म्यास नीट ओळखता येते.*** देहादिसंघाताचे जे क्षेत्र असते, त्याहून आत्म्याला म्हणजे क्षेत्रज्ञाला वेगळे जाणण्याचे हे लक्षण म्हणजे प्रमुख चिह्न आहे."

क्षेत्र-क्षेत्रज्ञ परस्परसंबंध

क्षेत्र-क्षेत्रज्ञातील परस्परसंबंध व्यक्तवतांना श्रीकृष्ण म्हणतातः

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत।।१३-३३।।

"हे भारता! ज्याप्रमाणे एकटा सूर्य या सर्व जगताला प्रकाशित करतो, त्याचप्रमाणे ***क्षेत्रज्ञ*** मात्र संपूर्ण क्षेत्राला प्रकाशित करतो."

"सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च" असे श्रुति म्हणते. ज्ञानदेव ही उक्ती सुप्रकाशित करतात, ती अशीः

संसर्गें चेष्टिजे लोहें। परि लोह भ्रामक नोहें।
क्षेत्र क्षेत्रज्ञा आहे। तेतुलां पाडु।।१३-११२२।।
दीपकाची आर्ची। राहाटी आहे घरीची।
परि वेगलीक कोडीची। दीपा आणि घरा।।११२३।।
काष्ठाचां पोटीं। वह्नी असे किरीटी।
परि काष्ठ नोहे या दिठी। पाहिजे गां।।११२४।।

"लोहचुंबकाच्या संपर्काने लोखंडात क्षणभंगुर चुंबकत्वाचा आभास व हालचाल निर्माण होते, पण तेवढ्याने लोखंड काही लोहचुंबक म्हटले जात नाही. तसेच ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांचे आहे. क्षेत्रज्ञाच्या संपर्काने क्षेत्र चेतना धारण करतांना दिसते, पण क्षेत्र म्हणजे क्षेत्रज्ञ नव्हे काही! दीपकाच्या प्रकाशात अंधारातील घर राहाटू लागते. म्हणावे तर दीपकच रात्री घर चालवितो. पण तेवढ्याने काय घर म्हणजे दीपक होते का, की दीपकाला घर असे म्हणता येईल! हे किरीटी! अर्जुना! काष्ठाच्या पोटात अग्नी असतो, पण काष्ठ म्हणजे अग्नी नव्हे. हेच अंतर क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्यातही आहे."

अपाडु नभा आभालां। रवि आणि मृगजलां।
तैसाचि हाही डोलां। देखसीं जन्हीं।।१३-११२५।।
हे आघवेंचि असो एकु। गगनौनि जैसा अर्कु।
प्रगटवी लोकु। नांवे नांवें।।११२६।।
एथ क्षेत्रज्ञु तो ऐसा। प्रकाशकु क्षेत्राभासा।
यावरुतें हे न पुसा। शंका नेघा।।११२७।।

"नभ व अभ्र किंवा सूर्य व मृगजल यांत जो भेद आहे, तसाच भेद ***देह व आत्मा*** किंवा ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांत आहे, हे जाणकारांस विदित आहेच. अन् हे समजण्यास तशीच दृष्टी पण असावी लागते. हे असो. नभांतरी एकला रवी जसे लोकलोकांतर वेळोवेळी प्रकट करत त्रैलोक्यास प्रकाशमय करतो, त्याचप्रमाणे तो ***क्षेत्रज्ञ वा आत्मा वा परमात्मा*** या संपूर्ण नामरूपाने, विविधतेने अन विपुलतेने विनटलेल्या प्रकृति वा क्षेत्राच्या आभासाला अथवा देहेंद्रियादी संघाताला चेतवत राहून प्रकाशमान करतो, हे निर्विवाद सत्यच आहे. इतउप्पर याविषयी इतर प्रश्न नको व शंका तर मुळीच राहू देऊ नकोस."

भूतप्रकृतिचा अंत::::

"भूतप्रकृतिमोक्षं च"

याप्रमाणे ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विचाराची अंतिम शलाका प्रकट करून त्याबाबत असणाऱ्या सर्व वादविवादांचा व तर्ककुतर्कांचा सोक्षमोक्ष लावून, श्रुतींनाही स्पष्ट करता न आलेल्या, ऋषिमुनींच्या संघातांनी बहुत चर्चिलेल्या, वेदींच्या बृहतसामादी सूत्रांना अन ब्रह्मसूत्र इ.ना तत्त्वचर्चेत न गवसलेल्या या देखण्या विषयाबाबत भगवंत म्हणतात:

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम्।।१३-३४।।

भूतप्रकृतिमोक्ष ही कल्पना जरा विलक्षण आहे. ती समजावून घेण्यासाठी थोडे तपशिलात शिरले पाहिजे.

या श्लोकाचा सर्वसामान्य अर्थ अन्वयासह असा देतात:

"*ये* -जे, *एवं* - याप्रमाणे, *क्षेत्रक्षेत्रज्ञयो:* - क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्यामधील, *अन्तरं* - परस्परविलक्षणता, फरक, *च* -व, *भूतप्रकृतिमोक्षं* -प्रकृति *(भूतांची प्रकृति)* व तिचे विकार यांपासून सुटण्याचा उपाय, *ज्ञानचक्षुषा* - ज्ञानदृष्टीने, *विदु:* -जाणतात, *ते* - ते ज्ञानी, *परं* - परमात्मतत्त्वास, *यान्ति* -प्राप्त होतात."

चौतीस श्लोकांच्या *तेराव्या* अध्यायाच्या समाप्तीच्या या श्लोकास तसेच महत्त्वही आहे. या अध्यायावर ज्ञानदेवांनीही सामान्यतया ११६१ ओव्या रचल्या आहेत. त्यातला बव्हंश भाग आपण अवलोकला आहेच. उरलेल्या ओव्या पाहण्यापूर्वी या श्लोकाची शांकरभाष्यकृत आलोचना पाहू या. ते म्हणतात:

"क्षेत्रक्षेत्रज्ञयो: यथाव्यातयो: एवं यथादर्शितप्रकारेण अन्तरम् इतरेतरवैलक्षण्यविशेषं ज्ञानचक्षुषा शास्त्राचार्योपदेशजनितम् *आत्मप्रात्ययिकज्ञानं चक्षु: तेन ज्ञानचक्षुषा* भूतप्रकृतिमोक्षं च भूतानां प्रकृति: अविद्यालक्षणा अव्यक्ताख्या तस्या भूतप्रकृते: मोक्षणम् अभावगमनं च ये विदु: विजानन्ति यान्ति गच्छन्ति ते परं परमार्थतत्त्वं ब्रह्म न पुन: देहम् आददते इत्यर्थ:।।१३-३४।।शां.भा.।।"

"जो पुरुष शास्त्र व आचार्यांच्या उपदेशाने उत्पन्न झालेल्या ***आत्मसाक्षात्काररूप ज्ञाननेत्रांनी,*** पूर्वी प्रकट केलेल्या ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांतील अंतर - त्यांची ***परस्परविलक्षणता*** - पूर्वदर्शित प्रकारे जाणून घेतो; तसेच ***अव्यक्त***नामक अविद्यारूप भूतांच्या प्रकृतीचा ***मोक्ष*** म्हणजे ***अंत*** वा ***त्याबाबतचे सत्य,*** आणि त्या प्रकृतीचा ***अभाव*** म्हणजे ***आभासात्मकता, मिथ्यात्व वा क्षणभंगुरता अथवा उपमुख्यता किंवा दुय्यम दर्जा अथवा अप्राधान्यत्व वा अविशेषता वा नामधारित्व, अप्रकाशत्व वा परप्रकाशितता,*** अर्थात तिचे यथार्थ स्वरूप जाणून घेतल्यामुळे, तिच्यापासून सुटका करून घेण्याचा उपाय जाणतो, तो पुरुष परमार्थतत्त्वस्वरूप ब्रह्मास प्राप्त होतो; अर्थात पुनर्जन्म पावत नाही."

या श्लोकावरील आपण घेतलेल्या शांकरभाष्यार्थावरून श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या मते ***प्रकृति*** म्हणजे काय ते स्पष्ट दिसून येते. त्यांच्या मते ही प्रकृति -***अव्यक्त***नामे ओळखली जाते. ती अविद्यास्वरूप आहे व भूतांशी अभिन्न आहे. ती आभासात्मक आहे; ***मिथ्या*** आहे; क्षणभंगुर आहे. ***पुरुष-प्रकृति*** या जोडीतला ***पुरुष*** हा मुख्य तर ती उपमुख्य आहे; दुय्यम दर्जाची आहे.

पुरुष प्रधानत्वाने आहे तर ही ***अप्रधान*** आहे; पुरुष ***विशेष*** आहे तर ही ***अविशेष*** आहे; नामधारी आहे. पुरुष ***स्वप्रकाश*** तर ही ***अप्रकाश*** किंवा त्याच्यापासून प्रकाशित होणारी अशी परप्रकाशित आहे. हेच तिचे सर्वार्थाने खरे स्वरूप आहे. हेच जाणून घेणारा पुरुष तिच्यापासून मुक्त होण्याचा उपाय जाणून **तिचा *अंत* म्हणजे *मोक्ष*** पावतो.

हा श्लोक एवढ्या विस्तारपूर्वक पाहण्याचे कारण म्हणजे गीतेच्या श्लोकांचा अर्थ लावतांना पंडित, आचार्यादी महान विद्वज्जन व इतरेजनांनी केलेले विविध अन्वयार्थ व त्यायोगे एकूण गीतेचेच वेगवेगळे अर्थ लावण्यासंबंधी विद्वानांत असणारे मतभेद कसे निर्माण होतात, याचा अल्प परिचय आपल्यासारख्या जिज्ञासूंना व्हावा व त्यायोगे आपली दृष्टी ज्ञानदेवांनी गीतेच्या साकल्याने केलेल्या अर्थाचे सावधानतापूर्वक रसग्रहण करण्याकडे वळवण्यात व्हावी, ही इच्छा!

अशा गीतेतील विविध स्थलांचे मर्मज्ञ रसग्रहण जर आपणांस करणे जमले, तर आपणांस इतरेजनांचा आदर ठेवूनही असे म्हणण्याचा मोह दुर्निवार होतो की गीता ***जशी आहे तशी*** सांगणारे एकमात्र ज्ञानदेवच होत!!! हा मान केवळ त्या अध्वर्यु योगीराटाचाच आहे! असो.

ज्ञानदेवांच्या शब्दांत *भूतप्रकृतिमोक्ष*

भूतप्रकृतिमोक्ष या पदाच्या अर्थासंबंधाने उठणारे वादळ ज्ञानदेवांच्याच शब्दांनी उपशमवू या! ते म्हणतातः

शब्दतत्त्वसारज्ञा। पैं देखणी तैंचि प्रज्ञा।
जैं क्षेत्र क्षेत्रज्ञा। अपाडु देखें।।१३-११२८।।
इयां दोहींचें अंतर। देखावेयां चतुर।
ज्ञानियांचें द्वार। आराधिती।।११२९।।
याचिलागीं सुमती। जोडिती शांतिसंपत्ति।
शास्त्रांची दुभतीं। पोसिती घरीं।।११३०।।
योगाचियां आकाशा। वलघिजे एवढाचि धिंवसा।
याचियाचि आशा। पुरुषासीं गां।।११३१।।

"वेदांततत्त्वाचे सार जाणणाऱ्या हे अर्जुना! ***क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ*** यातले हे ***परस्परवैलक्षण्य*** अशा प्रकारे जी प्रज्ञा पाहते, तीच खरी डोळस व ज्ञाती होय. हे अंतर जाणून घेण्यासाठीच मुमुक्षू पुरुष ज्ञानी पुरुषांच्या उंबरठ्यास झिजवतात. हे सुमते! याच एका कारणास्तव शमदमादी षट्संपत्तीची जोड केली जाते व शास्त्ररूप धेनूंची जोपासना करतात. ही प्रज्ञा प्राप्त व्हावी म्हणूनच आशावंत पुरुष योगाच्या कवेत न मावणाऱ्या विशाल गगनाला गवसणी घालण्यास सिद्ध होतात."

शरीरादि समस्त। मानिताती तृणवत।
जीवें संतांचें होत। वाहाणधरु।।१३-११३२।।
ऐसैसियांपरी। ज्ञानाचियां भरोवरीं।
करूनियां अंतरीं। निरुते होत।।११३३।।
मग क्षेत्रज्ञा क्षेत्राचें। जैं अंतर देखती सांचें।
ज्ञानें उन्मेख तेयांचें। वोवाळूं आम्हीं।।११३४।।

"आणि संतसज्जनांचे पाईक होऊन त्यांच्या सेवेपुढे शरीराला तृणवत मानतात व आपल्या जीवाच्या वहाणा करून त्या संतांच्या पायी चढवतात. अशा विविध प्रकारे शास्त्रे व महापुरुषांच्या उपासनेने कृतार्थ होऊन, ज्ञानाची परिपूर्णता मिळवून, अंतरंगी समाधान पावतात. क्षेत्र व क्षेत्रज्ञाचे अंतर अशा रीतीने जाणणाऱ्या त्या आत्मसाक्षात्कारी पुरुषांच्या ज्ञानचाक्षुषी दृष्टीवरून आम्ही ***(परमात्मा श्रीकृष्ण)*** आमचे ज्ञान ओवाळून त्यांची आरती करू!"

यानंतर ***भूतप्रकृतिमोक्ष*** विषयक ओव्या पाहाः

आणि महाभूतादिकीं। प्रभेदिलीं अनेकीं।
पसरलिसे लटिकी। प्रकृति जैं ही।।१३-११३५।।
तैं शुकनलिकान्यायें। न लगती लागली आहे।
हे जैसें तैसें होये। ठाउवें जेयां।।११३६।।

"यापूर्वी सविस्तर वर्णिलेली, छत्तीस तत्त्वांनी बनलेली, पंचमहाभूतादी विविध भागात विभागता येणारी ही जी मिथ्या प्रकृति पसरली आहे व ***अव्यक्त*** म्हणून जिचे वर्णन करतात; ती प्रकृति शुकनलिकान्यायाने, वास्तविक जीवाला चिकटलेली नसूनही, आत्म्याशी संलग्न अशी असलेली दिसत आहे; हे यथातथ्य जाणणाऱ्या पुरुषांची स्थिती ऐक."

जैसीं माला तैं माला। ऐसींचि देखिजे डोळां।
सर्पबुद्धि टवाला। उखी होऊनि।।१३-११३७।।
कां शुक्ति तैं शुक्ति। हे सांच होय प्रतीती।
रुपेयाचि भ्रांति। जाऊनियां।।११३८।।
तैसीं वेगली वेगलेपणें। प्रकृति जैं अंतःकरणें।
देखती तैं मी म्हणें। ब्रह्म होती।।११३९।।

"ज्याप्रमाणे रज्जु-सर्प दृष्टांतातील सर्प, रज्जूचे आकलन झाल्यावर दिसेनासा होतो; किंवा मोत्याची शिंपली ही शिंपलीच असून तिच्यावर प्रतीत होणारी चांदी वा रुपे हा निव्वळ आभास आहे, ही जाणीव झाल्यावर रुपे दिसेनासे होते; अगदी त्याचप्रमाणे ***ज्या महापुरुषांस आत्मा हा प्रकृति नाही, तर तिच्याहून भिन्न आहे, हा साक्षात्कार होतो; त्यांना या जगदाभासात दिसणारा मायेचा पसारा दिसेनासा होतो व सर्वत्र ब्रह्माचेच दर्शन होते; अन ते मत्स्वरूप होतात."***

"एर कलशीचें एरीं रिचविजे"

याप्रमाणे अर्जुनास क्षेत्र-क्षेत्रज्ञाच्या मिषाने ***ब्रह्मदर्शन*** करून दिल्यावर अर्जुनाची कशी स्थिती होते, ते वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

जैं आकाशाहूनि वाड। जैं अव्यक्ताची पैल कड।
जैं भेटिलियां अपाडा पाड। पडो नेदीं।।१३-११४०।।
आकारु जेथ सरे। जीवत्व जेथ विरे।
द्वैत जेथ नुरे। अद्वय जैं।।११४१।।
तैं परमतत्त्वपार्था। होती तैं सर्वथा।
जैं आत्मानात्मव्यवस्था। राजहंसु।।११४२।।

"आकाशही ज्यापुढे थोकडे आहे; अव्यक्ताच्या म्हणजे प्रकृतीच्या जे पल्याड आहे; ज्याचा साक्षात्कार झाला असता प्रकृतीमध्ये भासणारे ब्रह्म स्वयमेव वेगळे असल्याची ग्वाही पटते; ज्याच्याठायी नामरूपात्मक साकार विश्व नाहीसे होते; जीवभाव लयास जातो; द्वैत नाहीसे होते; ज्यासम दुसरे नाही, असे जे अद्वय परमतत्त्व ब्रह्म आहे, तेच ते ब्रह्म हे आणि आत्मा व अनात्मा *(प्रकृति)* यांचा हा जो सविस्तर सांगितलेला संबंध, तो राजहंसाने पाणी ते पाणी व दूध ते दूध जसे वेगळे करावे तसा जाणणारे पुरुष धीर होत."

ऐसा हा जी आघवा। श्रीकृष्णें तेया पांडवा।
उगाणा दिधला जीवा। जीवाचियां।।१३-११४३।।
येर कलशींचे येरीं। रिजविजे जेयापरी।
आपणपें तेयां हरी। दिधलें तैसें।।११४४।।

"याप्रमाणे साद्यंत असा हा ***प्रकृति-पुरुष, क्षेत्र-क्षेत्रज्ञ, आत्मा-अनात्माविवेक*** श्रीकृष्णांनी आपल्या जीवाचाही जीव इतका प्रिय जो अर्जुन, त्याला उपदेशिला. ज्याप्रमाणे एका कलशातील पाणी दुसऱ्या कलशात ओतावे, त्याप्रमाणे त्या श्रीहरीने आपले ज्ञान अर्जुनाच्या अंतःकरणात रिक्त केले."

आणि कोण्हा देता कोण्ह। तो नर तैसा नारायण।
वरी अर्जुनातैं कृष्ण। हा मी म्हणें।।१३-११४५।।
परि असो तैं नाथिलें। न पुसतां कां मी बोलें।
किंबहुना दिधलें। सर्वस्व देवें।।११४६।।

"वास्तविक पाहता हेही म्हणणे तितकेसे बरोबर नाही. कारण अशी देवाणघेवाण करण्याइतका आपपरभावच श्रीकृष्णार्जुनांच्या ठायी नव्हता. नरनारायण ऋषिद्वयांचे साक्षात अवतारच तर ते दोघे होते. अन् वर श्रीकृष्णांनी ***"पाण्डवानां धनञ्जयः।।१०-३७।।"*** असे सांगून अर्जुन ही श्रीकृष्णांची एक प्रमुख विभूति म्हणून गौरवली आहेच! म्हणून श्रीकृष्णांनी अर्जुनाला हे ज्ञान दिले, असे म्हणणेसुद्धा गैरलागूच आहे. असो. कोणी विचारले नसतांनाच मी हे सर्व का बरे सांगत आहे! तरीही पाहा! श्रीकृष्णांनी अशा प्रकारे अर्जुनाला आपले सर्वस्वच दिले."

उपसंहार::::

अर्जुनाची श्रवणासक्ती

क्षेत्र-क्षेत्रज्ञविवेकासारखे उत्तम ज्ञान प्राप्त झाले असताही अर्जुनास तृप्ती होत नाही. या ठिकाणी जिज्ञासूंस पूर्वी एकदा केलेला उल्लेख स्मरतच असेल की गीतेत एकूण ७०१ श्लोक आहेत, असेही काही संहितांप्रमाणे दिसून येते; व *तेरावा* अध्याय त्या मते एकूण ३५ श्लोकांचा असून त्यातला प्रथम श्लोक ते असा देतात की:

अर्जुन उवाचः

प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्र क्षेत्रज्ञमेव च।
एतद्वेदितुमिच्छामि ज्ञानं ज्ञेयं च केशव।।१३-१।।

प्रकृति, पुरुष, क्षेत्र, क्षेत्रज्ञ, ज्ञान व ज्ञेय हे येथे प्रकट केलेले विषय जाणून घेण्याची अर्जुनाची ही जिज्ञासा केशवाने परिपूर्ण केल्याचे आपण नुकतेच पाहिले. तरीही तो अधिकाधिक ज्ञानश्रवणाची तृष्णा वाढवत राहिलेला दिसून येतो! याविषयी ज्ञानदेवांचे बोलणे पाहाः

कीं तो पार्थु जी मनीं। आझुनि तृप्ती न मानीं।
अधिकाधिक उतान्ही। वाढवितु असे।।१३-११४७।।
स्नेहाचियां भरोवरी। आंबुथिला दीपु घे थोरी।
चाड अर्जुना अंतरीं। परिसतां तैसीं।।११४८।।
तेथ सुगरणी उदारें। रसज्ञ आणि जेवणारे।
मिलती मग अवतरे। हातु जैसा।।११४९।।

ज्या ज्ञानाने धन्यता पावते; भूतप्रकृतीचा मोक्ष होतो; जे मिळाले असता अन्य कशाचीही इच्छा उरत नाही; सर्व ज्ञानातही जे उत्तम आहे; ज्याची कशाबरोबरही तुलना होऊ शकत नाही; असे ते ज्ञान साक्षात श्रीकृष्णमुखे उपदेशिले गेले, तरीही अर्जुनाला तृप्ती वाटतच नव्हती. आणि ते जगत्कल्याणकारकच होते म्हणा ना! तो अजूनही श्रीकृष्णांनी ज्ञानामृताचा पान्हा सोडावा म्हणून अंतरी कशी इच्छा करतो, ते पाहाः

"भरपूर तेल किंवा तूप घातलेला दिवा जसा आणखीनच प्रदीप्त होतो, त्याचप्रमाणे हे सर्व ज्ञान श्रवण केल्यावर अर्जुनाच्या मनातील ज्ञानदीपिका अधिक ज्ञानश्रवणाच्या इच्छेने चेतवली गेली. उदार सुगरण असावी व भोजनेच्छेने स्वयंपाकाचा स्वाद घेणारे भोजनेच्छू तिला भेटावेत; म्हणजे वाढण्यासाठी अन जेवण्यासाठी हात जसे सरसावतात, अगदी तसेच श्रीकृष्णार्जुनांचे झाले."

तैसें जी होतसे देवा। तेयां अवधानाचियां लवलवा।
पाहातां व्याख्यान चढलें थांवा। चौगुणें वरी।।१३-११५०।।
सुवायें मेघु सांवरे। जैसा चंद्रें सिंधु भरे।
तैसा मातुला रसु आदरें। श्रोतयांचेनि।।११५१।।
आतां आनंदमय आघवें। विश्व कीजैल देवें।
तैं रायें परिसावें। सञ्जयो म्हणें।।१३-११५२।।

"अर्जुनाच्या अंतरीची ज्ञानार्जनाची आस्था व तो देत असलेले अवधान पाहून केशवाचा हुरूप चौपटीहूनही जास्त वाढला व अनुकूल वाऱ्याने सुवृष्टी करणारे मेघ जसे जमा व्हावेत; किंवा चंद्राचे पूर्णत्व पाहून सागरास जशी मोठी भरती यावी; त्याप्रमाणे अर्जुनाठायीच्या श्रवणासक्तीने श्रीकृष्णनाथांच्या व्याख्यानाला मोठी रंगत आली. आता श्रीकृष्णमुखाने स्रवणारी ती वाक्सुधा समस्त विश्वाला कसे आनंदमय करील, ते परिसण्यास, हे राजा धृतराष्ट्रा! तू सज्ज हो," असे सञ्जय म्हणाला.

"श्रवणासवें सुमना। समाधि जोडे।।"

याप्रमाणे ***क्षेत्र-क्षेत्रज्ञकथन*** संपूर्ण झाले. *११००-१२००* ओव्यांचा मोठा असा *तेरावा* अध्यायही ज्ञानदेवांनी निरोपित आणला. साहजिकच त्यांचा उत्साहही वृद्धिंगत झालेला आहे अन पुनश्च एकदा विसावा घेण्यापूर्वी जे श्रोत्यांची उत्कंठा वाढविणारे त्यांचे अमृतमय बोल आहेत, त्यातून पुनः स्पष्ट होणारी त्यांची ***गीता व ज्ञानेश्वरी*** यांच्या परस्परसंबंधाविषयीची भूमिका त्यांच्याच मनोज्ञ शब्दांत कशी अंकित केली आहे, ते पाहाः

एवं जैं महाभारतीं। श्रीव्यासें अतिप्रांतमती।
भीष्मपर्वीं शांती। म्हणितली कथा।।१३-११५३।।
तो कृष्णार्जुनसंवादु। नागरीं बोलीं विशदु।
सांगौनि दाऊं प्रबंधु। वोवियेचां।।११५४।।
नुसधीचि शांतिकथा। आणिजेल कीर वाक्पथा।
जैं शृंगाराचां माथां। पाय ठेविती।।११५५।।
दाऊं वेल्हालें देशी नवी। जैं साहित्यातें वोजावी।
अमृतातैं चुकी ठेवी। गोडिसेपणें।.११५६।।

"याप्रमाणे महाभारतातील भीष्मपर्वांतर्गत, विशालबुद्धी व्यासमहर्षींनी शांतरसात ग्रथित केलेली श्रीगीता, त्यातील

श्रीकृष्णार्जुनसंवादास ओवीरूपाने छंदोबद्ध करून प्रगल्भ अशा प्रबंधरूपात मी निरूपण करत आहे. मूलतः अनुभूत तत्त्वज्ञानाचा विषय असूनही शांत रसात मार्जन केलेली ही व्यासोक्ती मी शृंगाररसाहूनही श्रेष्ठतर रसाचे संमार्जन करून आपल्या श्रवणपथात मधुरतम बोलीभाषेत आणून ठेवीन. अमृतालाही बाजूला सारील अशी साहित्यावर मनोरम साज चढवणाऱ्या मराठी भाषेतील मधुर बोलांची ही अलंकृत रचना मी तुम्हापुढे ठेवीत आहे."

बोल वोल्हावतेनि गुणें। चंद्रासीं घे उमाणें।
रसरंगीं भुलविणें। नादु लोपी।।१३-११५७।।
खेचराचियांही मना। आणी सात्त्विकाचा पान्हा।
श्रवणासवें सुमना। समाधि जोडे।।११५८।।
तैसा वाग्विलास विस्तारु। गीतार्थेंसीं विश्व भरूं।
आनंदाचें आवारु। मांडू जगां।।११५९।।

"शीतलतेत चंद्रालाही उणे आणणारे हे बोल त्यातील रसरंगाने नादब्रह्मासही तृप्तीत मागे सारतील! तमोगुणांनी परिपूर्ण असणाऱ्यांनासुद्धा हे बोल सात्त्विकभावाचा पान्हा सोडायला लावतील! आणि शुद्ध निर्मल अंतःकरणाच्या भाविकांस तर ते बोल खचितच तत्काळ समाधिसुख प्राप्त करून देतील यात शंकाच नाही. मी तुम्हा श्रोतेसज्जनांपुढे हा असा सारस्वत वाग्विलास प्रकटवीन की त्यामुळे गीतार्थाने विश्व ओतप्रोत ओसंडून जाईल आणि जगताला क्रिडण्यासाठी आनंदघन चैतन्याचे आवारच उपलब्ध होईल."

फिटो विवेकाची वाणी। हो कानामना जिणी।
देखो आवडी तैं खाणी। ब्रह्मविद्येची।।१३-११६०।।
दिसो परतत्त्व डोलां। पाहो सुखाचा सोहोला।
रिघो महाबोधसुकाला-। माजीं विश्व।।११६१।।

"समस्त विश्वातील विवेकाची उणीव नष्ट होवो अन या सुरंगी बोलांनी श्रोत्याची श्रवणेंद्रिये व मने तृप्तीने तुष्ट होवोत! मुमुक्षूजनांना तर या रूपाने ब्रह्मविद्येची खाणच पाहाता येवो! परमतत्त्व प्रत्यक्ष आपल्या चक्षूंस दिसो अन ब्रह्मसुखाचा सोहोळा तुम्हाला उपभोगावयास मिळो! या ज्ञानदेवीच्या बोलांमध्ये हे आघवे विश्व महाबोधाच्या संततवृष्टीमध्ये प्रवेशो!"

"ज्ञानदेवो म्हणें बरवा। सांगेन ग्रंथु"

सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथांचे गुरुऋण निर्देशित करत ज्ञानदेव पुढे आश्वासन देत म्हणतात कीः

हे निफजेल आतां आघवें। ऐसें बोलिजेल बरवें।
जैं अधिष्ठिला असे परमदेवें। निवृत्ति मी।।१३-११६२।।
म्हणोनि अक्षरीं सुभेदीं। उपमा श्लोक कोंदाकोंदीं।
झाडा देईन प्रतिपदीं। ग्रंथार्थासीं।।११६३।।
हा ठावोवरी मातें। पुरतयां सारस्वतें।
केलें असे श्रीमंतें। श्रीगुरुरायें।।११६४।।

"परमोदार अशा निवृत्तिनाथस्वरुप दैवताने माझा अंगीकार केला असल्याने आता आश्वासन दिल्याप्रमाणे तसे बोल माझ्या मुखातून प्रकट होऊन हे सर्व होईल. म्हणून आता उपमा-उत्प्रेक्षा इत्यादी अलंकारांची दाटीवाटी असणाऱ्या मर्मग्राहक अशा अक्षरांची रेलचेल करत, प्रत्येक श्लोक अन त्यातील पदा न् पदाचा मागोवा घेत घेत मी या गीताग्रंथाचा अर्थ तुम्हापुढे स्पष्ट ठेवीन. हे आश्वासन पूर्ततेस नेण्याइतके सारस्वत धन मला माझ्या श्रीमंत सद्गुरूराजाने पुरविले आहे, हे नक्कीच!"

तेणें जी कृपासावायें। मी बोलें तेतुलें सामायें।
आणि तुमचिये सभे लाहें। गीता म्हणो।।१३-११६५।।
वरी तुम्हां संतांचें पायें। आजि मी पातलो आहे।
म्हणौनि जी नोहें। अटक कांहीं।।११६६।।
प्रभु काश्मिरी मुकें। नुपजे हे कौतुकें।
नाहीं उणी सामुद्रिकें। लक्ष्मीयेसीं।।११६७।।

"त्या निवृत्तिनाथांच्या कृपाबळाने मी जे जे सहज म्हणून बोलतो आहे, ते ते तुम्हा संतसज्जनांना स्वीकृत होत आहे. आणि तुमच्यासारख्या रसिक आणि मर्मज्ञ संतसज्जनांच्या सभेत म्हणूनच गीतार्थ विशद करण्याचे सामर्थ्य मला येत आहे. त्यातून तुम्हा संतजनांच्या पायाशी मी येऊन ठेपलो आहे! आता तर मला कसलीच उणीव नाही अन गीतार्थ सांगण्यास कोणताही प्रतिबंध म्हणून उरलेला नाही. अहो प्रभू! सरस्वतीच्या पोटी चुकूनही मुके बालक जन्म घेत नाही अन लक्ष्मीमातेला सामुद्रिक चिह्नांची कोणती उणीव असणार!"

तैसीं तुम्हां संतांपासीं। अज्ञानाची गोठी कायसीं।
यालागीं नवरसीं। वरिखेन मी।।१३-११६८।।
किंबहुना आतां देवा। अवसरु मज देयावा।
ज्ञानदेव म्हणे बरवा। सांगेन ग्रंथु।।११६९।।

"तुम्हा संतांच्या पायाशी बसलेल्या माझ्यासारख्या सामान्यातल्या सामान्य अशास अज्ञानाची काय तमा असणार! आता नवरसांनी परिपूर्ण अशा शब्दमेघातून मी गीतार्थाचा वर्षाव करीन! हे श्रोतेसज्जनहो! मला असे करण्याची केवळ संधी मात्र तुम्ही द्याच! म्हणजे मी हा ग्रंथ सुंदर रीतीने सांगीन!"

समारोप

यात्रमाणे ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विषयाची सांगता ज्ञानदेव करतात व पुढील आख्यानाविषयी आपणांस उत्कंठित करतात. त्यासाठी निरूपण होणार आहे *चौदाव्या* ***गुणातीतदर्शन*** या अध्यायाचे! तर वळू या त्यासाठी पुढील ***उन्मेष क्र.२२ - त्रिगुणमयी प्रकृति*** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::२२::
:त्रिगुणमयी प्रकृति::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २२

गीताः
६:४१,४२
७:४
१४:१-१८
ज्ञानेश्वरीः
१:१,२
१४:२९,३५-२७८
१८:१२३९-१२४४

::उन्मेष::२२::

:त्रिगुणमयी प्रकृति::

असंगसंग::::

चौदावा अध्याय - गुणातीत दर्शन

क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार तसेच ***प्रकृति, माया, पुरुष, आत्मा, अनात्मा*** इ.चा विचार आपण आतापावेतो *अ.७,८व १३* यांच्या अनुषंगाने केला. हाच विचार थोड्याफार फरकाने व गुणातीत पुरुषाचे वर्णन करतांना *चौदाव्या* अध्यायारंभी आलेला आहे. मागे उपोद्घात केल्याप्रमाणे हाही भाग समालोकित करणे आवश्यक ठरते.

तेराव्या अध्यायाअंती ज्ञानदेवांनी श्रोत्यांची उत्कंठा वर्धमान करून *चौदाव्या* अध्यायाच्या निरूपणाची तयारी केलेली आपण पाहिलीच होती. *चौदाव्या* अध्यायारंभीच्या गुरुवंदनपर ओव्यांचा परामर्षही आपण पूर्वी घेतला होता *(उन्मेषः३::चिद्विलास पृ.क्र.६१-६३).*

"तऱ्हीं आतां एणें प्रसादें। विन्यासें विदग्धें। मूळशास्त्रपदें। वाखाणीन।।१४-२९।।" असे सूतोवाच करून ज्ञानदेव विषयप्रवेशारंभी म्हणतातः

तऱ्हीं मागां त्रयोदशीं। अध्यायीं गोष्टी ऐसीं।
श्रीकृष्णें अर्जुनेंसीं। चावलली।।१४-३२।।
जैं क्षेत्र क्षेत्रज्ञयोगें। होईजे एणें जगें।
आत्मा गुणसंगें। संसारिया।।३३।।
आणि हाचि प्रकृतिगतु। सुखदुःखभोगीं हेतु।
अथवा गुणातीतु। केवलु हा।।३४।।

गीताशास्त्राची मूळ पदे सांग वर्णिण्याचे आश्वासन देत ज्ञानदेव म्हणतातः "*तेराव्या* अध्यायी ***क्षेत्र-क्षेत्रज्ञविवरण*** करतांना सांगितले होते की **क्षेत्रज्ञ व क्षेत्र यांच्या संबंधामुळे हे जग होते व आत्मा गुणसंबंधाने संसारबंधनात पडतांना दिसतो.** प्रकृतीच्या स्वाधीन झाल्यामुळे या आत्म्यास सुखदुःखांचा उपभोग घडतो. **गुणातीत असतांना आत्म्याचे जे स्वरूप असते, तेच *केवल* म्हणून प्रसिद्ध आहे.**"

"कैसा पां असंगा संगु"

तऱ्हीं कैसा पां असंगु संगु। कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोगु।
सुखदुःखादि भोगु। केवीं तेयां।।१४-३५।।
गुण तैं कैसें किती। बांधती कवणें रीती।
ना तऱ्हीं गुणातीतीं। चिह्नें काईं।।३६।।
एवं ययां आघवेयां। अर्था रूप करावेयां।
विषो एथ चौदावियां। अध्यायासीं।।३७।।
तऱ्हीं तो आतां ऐसा। प्रस्तुत परियेसा।
अभिप्रावो विश्वेशा। वैकुंठाचां।।३८।।

"असो. तरी त्या असंग आत्म्याला प्रकृतीचा संग कसा घडतो; ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांचा योग म्हणजे काय; आत्म्याला सुखदुःखादी भोग कसे प्राप्त होतात; गुण किती व त्यांचे स्वरूप काय; आणि ते आत्म्याला प्रकृतिबंधात कसे बांधतात; गुणातीत पुरुषाची लक्षणे कोणती; या सर्व प्रश्नांची चर्चा हाच *चौदाव्या* अध्यायाचा विषय आहे. याविषयीचा विश्वेश श्रीकृष्णांचा अभिप्राय आता प्रस्तुत केला जात आहे."

तो म्हणें गां अर्जुना। अवधानाची सर्व सेना।
मेलौनि इयां ज्ञाना। झोंबावे हो।।१४-३९।।
आम्हीं मागां बहुतीं। दाविलें हे उपपत्तीं।
तऱ्हीं आझूनि प्रतीती। कुशी न रिगे।।४०।।

ते म्हणतातः "हे अर्जुना! याविषयीचे जे ज्ञान मी आता सांगणार आहे, त्याला तू अवधानाचे सर्व सैन्य एकत्र जमवून भीड. आम्ही मागे तुला पुष्कळ युक्तिवादांनी हा विचार समजावून दिला होता. परंतु तुझे मन अद्यापही त्या प्रतीतीच्या कुशीत विसावू पाहत नाही. म्हणून पुनः ऐक."

उत्तम ज्ञान

असे म्हणून श्रीकृष्ण म्हणतातः

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः।।१४-१।।

"ज्ञानामध्ये उत्तम व अत्यंत श्रेष्ठ असे ज्ञान मी पुनः तुला सांगेन, जे जाणल्याने सर्व मुनी लोक या संसारबंधनातून मुक्त होऊन परमसिद्धीला प्राप्त झाले आहेत."

यावर ज्ञानदेव निरूपितातः

म्हणौनि गां पुढती। सांगिजेल तुज प्रती।
पर म्हण म्हणों श्रुती। डाहारिलें जैं।।१४-४१।।
एऱ्हवीं ज्ञान हे आपुलें। परि पर ऐसें जाहलें।
जैं आवडौनि घेतलें। भवस्वर्गादिक।।४२।।

"म्हणून आता तुला ***पर*** म्हणजे मायेच्या पलीकडील असे म्हणून गौरवलेले, वेदाच्या शाखोपशाखी विस्तारलेले ते ज्ञान तुला सांगतो. वस्तुतः हे ज्ञान ***पर*** नसून ते म्हणजे ***स्व*** च आहे. परंतु भवस्वर्गादी संसारात गुंतून राहिल्यामुळे व त्या वासनोर्मींचा सतत जन्मजन्मांतरी पाठपुरावा करत राहिल्याने, ते ***ज्ञान स्वरूप*** असूनही, आपल्याला पारखे होऊन ***पर*** म्हणून प्रतीत होते."

अगां याचि कारणें। हे उत्तम सर्वोपरी मी म्हणें।
जैं वह्नी हे तृणें। येरें ज्ञानें।।१४-४३।।
जियें भवस्वर्गांतैं जाणिती। यागचि चांग म्हणती।
पारखी फुडी आथी। भेदीं इयें।।४४।।

तियें आघवींचि ज्ञानें। केली एणें स्वप्नें।
जैशा वातोर्मी गगनें। गिळिजती अंतीं।।४५।।

"स्वरूप असे हे ज्ञान असल्यानेच मी त्याला ***उत्तम ज्ञान*** म्हणून गौरविले आहे. ***"ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्" !*** इतर सर्व ज्ञाने या ज्ञानापुढे, अग्नीपुढे गवत जसे जळून नष्ट होते, तशी नष्ट होतात व नगण्य असतात. भवस्वर्गातील यातायात जाणणारी, यज्ञाद्वारे सुखोपभोग मिळवण्यासच उत्तम पुरुषार्थ म्हणून मान्यता देणारी व स्वरूपाची ओळख विसरावयास लावणारी इतर जी ***ज्ञान*** या नावाने ओळखली जाणारी, पण वस्तुतः ***अज्ञान*** असणारी इतर ज्ञाने या लोकी प्रसिद्ध आहेत, ती या उत्तम ज्ञानापुढे, गगनाने अंती ग्रासलेल्या प्रचंड वावटळीसदृश आहेत. ती इतर ज्ञाने म्हणजे स्वप्नेच म्हणेनास का!"

कां उदितें रश्मिराजें। लोपिलीं चंद्रादि तेजें।
नाना प्रलयांबुजलें। नदी नद।।१४-४६।।
तैसें हे एणें पाहलेयां। ज्ञानजात जात लया।
म्हणौनियां धनंजया। उत्तम हे।।४७।।
अनादि जैं मुक्तता। आपुली असे पांडुसुता।
तो मोक्षु हातां येतां। होय जेणें।।४८।।
जेयाचियां प्रतीती। विचारवीरीं समस्तीं।
नेदिजेचि संसृती। माथां उधऊं।।४९।।
मनें मन घालूनि मागें। विश्रांती जालियां आंगें।
तैं देहीं देहाजोगे। होतीचि ना।।५०।।
मग तैं देहाचे बेलें। वोलांडूनि एकेंचि वेलें।
संवतुलीं कांटालें। माझें जालें।।५१।।

"जसे रविराजाच्या उदयाबरोबर चंद्रादी तारकांचे तेज लोपते; किंवा प्रलयोदधी प्राप्त झाला की नद्या, नद, सागर इ.भेद लोप पावतात; तसेच हे ज्ञान प्राप्त झाले असता इतर सर्व ज्ञान अस्तंगत होते. म्हणूनच हे धनंजया! या ज्ञानास मी उत्तम म्हणून गौरविले आहे. अनादिसिद्ध असा जो ***मोक्ष*** **वा आत्मस्वातंत्र्य**, ते याच ज्ञानाने प्राप्त होते."

"मनानेच मनाला मुरड घालून जीवन्मुक्तीचे सुख उपभोगणारे विवेकवंत याच ज्ञानाची प्रतीती पावून संसारास डोके वर काढू देत नाहीत व देहात असतांनाही देहातीत अवस्था उपभोगत, एकाध क्षणातच देहाचे दुबेळके उल्लंघून माझ्याच योग्यतेचे होतात."

"तैं मी जालें ज्ञानां ययां। अनुसरौनि"

अशा तऱ्हेने भगवंतासदृश झालेल्या त्या महान पुरुषांबद्दल गीता म्हणतेः

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागता :।
सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च।।१४-२।।

"या उत्तम ज्ञानाच्या उपासनेने भगवत्स्वरूप झालेल्या त्या महात्म्यांना जन्मही नाही अन मृत्यूही नाही."

यावर ज्ञानदेव सांगतातः

जैं माझियां नित्यता। तेणें नित्य तैं पांडुसुता।
परिपूर्ण पूर्णता। माझियांचि।।१४-५२।।
मी जैसा अनंतानंदु। जैसाचि सत्यसिंधु।
तैसेंचि तैं भेदु। उरेचि ना।।५३।।

"असे ते महात्मे माझ्या चिरंतनतेने चिरंतन होतात; माझ्या पूर्णतेने पूर्णत्व पावतात. मी जसा आनंदघन, आनंदाचा अनंत कंद आहे, तसेच तेसुद्धा होतात. अन निखळ सत्याचा जो मी सागर आहे, तसेच तेही होतात.मी जेवढा आहे, जसा आहे, थेट तसेच व तेच ते महात्मे होतात. त्यांच्यात व माझ्यात भेद शिल्लक राहत नाही."

जैं मी जेवढें जैसें। तेंचि तैं जालें तैसें।
घटभंगीं घटाकाशें। आकाश जेवीं।।१४-५४।।
ना तऱ्हीं दीपमूलकीं। दीपशिखा अनेगीं।
मीनलियां अवलोकीं। होय जैसें।।५५।।
अर्जुना तेयापरी। सरली द्वैताची वारी।
नांदो नामार्थ एकाहारीं। मीतूंवीण।।५६।।

"घट भंगला असता त्यातील घटाकाश जसे वेगळेपणाने न उरता आकाशच होऊन जाते; किंवा दीपज्योतीच्या मूलस्थानी जर अनेक दीपज्योती जुळवून ठेवल्या, तर त्या जशा एकाच दीपशिखेसारख्या प्रतीत होतात; त्याचप्रमाणे मी-तूपणाचा द्वैतभाव ओसरलेले ते महात्मे अन मी, नाम-रूप-अर्थाने एकच होऊन, ***जेथे ते, तेथे मी अन् जेथे मी, तेथे ते,*** इतक्या अभिन्नतेने त्यांच्या लौकिक देहांतर्यामी, तसेच अखिल ब्रह्मांडात भरून राहतो."

एणेंचि पैं कारणें। जैं पहिलें सृष्टीचें जुंपणें।
तैंही तेया होणें। पडेचि ना।।१४-५७।।
सृष्टीचिये सर्वादि। जेयां नाहीं देहाची बांधी।
तैं कैंचें प्रलयावधी। निमतील पैं।।५८।।
म्हणौनि जन्मक्षयां-। अतीत तैं धनंजया।
मी जालें ज्ञाना ययां। अनुसरौनि।।५९।।

"त्यांचे नाम अन रूप सर्वार्थाने माझेच होते. त्यांच्या देहेंद्रियसंघाताद्वारे मीच प्रकट होतो. त्यांचे सकळ कर्तृत्व म्हणजे माझेच कर्तृत्व होते. अन देहाने सकळ कर्मे करत असले तरी ते म्हणजे मीच असल्याने, ती कर्मे त्यांना लिंपत नाहीत. देहाकृतीच्या मुशीत असूनही ते देहातीत असतात. सांत दिसणारे ते महात्मे अनंत असतात. दिक्कालातीत असे माझे स्वरूप पावलेले ते महाभाग सृष्टीच्या आदि-स्थिति-अंत या चक्रनेमिक्रमातून मुक्तच राहतात."

"सृष्ट्योत्पत्ती क्रमानुसार जे देहबंधनात अडकून पडत नाहीत, त्यांना सृष्टिप्रलयवेळी निमणे ते कुठचे! या उत्तम ज्ञानालाच अनुसरल्यामुळे, हे धनंजया! ते सत्पुरुष माझे स्वरूप पावून जन्म-क्षयदोषरहित असे होतात, हे नक्की जाणून घे!"

"निरूपण आकाशें। वेटालेना"

उत्तम ज्ञानाची महती ऐकून अर्जुनावर कसा परिणाम होतो, ते स्पष्ट करणाऱ्या ओव्या पुढे येतात, त्या अशाः

ऐसीं ज्ञानाची वाढी। वानिलीं देवें आवडी।
तेवीचि पार्थाही गोडी। लावावया।।१४-६०।।
तंव तेयां जालें आन। सर्वांगीं निगालें कान।
सपाई सावधान। आतला पां।।६१।।
आतां देवाचियां ऐसें। जाकलीजतु असें वोरसें।
म्हणौनि निरूपण आकाशें। वेंटालेना।।६२।।

"याप्रमाणे उत्कंठावर्धक असा ज्ञानाचा महिमा श्रीकृष्णांनी मोठ्या आवडीने अर्जुनास त्याची गोडी लावण्यासाठी वर्णिला. एकाग्रतेचा मूर्तिमंत पुतळा असणाऱ्या अर्जुनावर त्याचा विलक्षण परिणाम झाला. त्याला श्रवणासाठी जणू सर्वांगास कान निघाले. अन देव पुढे काय सांगतात, ते ऐकण्यासाठी तो नखशिखांत, अंतर्बाह्य सावधानता देऊ लागला. मूळातच भगवंतांचे निरूपण आकाशाच्याही कवेत न मावणारे होते. पण त्यांचाच वत्स असलेला पार्थ ते प्रेममय रसाने परिपूर्ण असणारे भगवद्निरूपणरूपी स्तन्य मोठ्या आवडीने प्राशन करू लागला. श्रीकृष्ण धेनू अन पार्थ वत्स असे होऊन त्या गीतामृताचे जे दूधदुभते जगाच्या हितार्थ प्रकट करतात, त्याचे पुढे आस्वादन करू या."

मग म्हणे गां प्रज्ञाकांता। उजवली आज वक्तृत्वता।
जैं बोलाएवढा श्रोता। जोडलासीं।।१४-६३।।
तऱ्हीं एकु मी अनेकीं। गोविजे देहपाशकीं।
त्रिगुणीं लुब्धकीं। कोणी परी।।६४।।
कैसा क्षेत्रयोगें। विएं इयें जगें।
तैं परिस सांगें। कोणें परी।।६५।।
पैं क्षेत्र येणें व्याजें। हे यालागीं बोलिजे।
जैं मत्संगबीजें। भूतीं पिके।।६६।।

श्रीकृष्ण म्हणतातः "हे प्रज्ञेच्या कांता! अर्जुना! आज माझी वक्तृत्वतारूपी कन्या तिच्या वाणीच्या तोलाचा श्रोता असणारा तुझ्यासारखा वर मिळाल्यामुळे उजवली गेली! तर आता ऐक. मी एकच असतांनाही अनेक कसा होतो; अन त्रिगुणात्मक पारध्याच्या देहपाशात कसा अडकतो; क्षेत्राशी संबंध येऊन या जगास कसा प्रसवतो; हे सांगतो. मागे तुला **क्षेत्रविचार** *(तेराव्या अध्यायात)* समजावून दिला होता. माझ्या संगाच्या बीजाची धारणा करून यात भूतादी पिके येतात; म्हणूनही याला ***क्षेत्र*** असे म्हणतात.

भूतोत्पत्तीः:::

महद्ब्रह्म

हे कसे घडते, हे सांगतांना गीतागोपाल म्हणतातः

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत।।१४-३।।

"***महत् ब्रह्म*** हे योनी म्हणजे माझे बीजप्रदानाचे स्थान आहे. त्याठायी ज्यातून सर्व भूतादी निर्माण होतात, असा गर्भ माझ्या बीजापासून माझ्या संगाने दिला जातो."

यावर ज्ञानदेव उकल करतांना सांगतातः

एरवीं तऱ्हीं महद् ब्रह्म।यालागीं हे ऐसें नाम।
जैं महदादिक विश्राम-। शालिका हे।।१४-६७।.
विकारां बहुंवस थोरी। अर्जुना हेंचि करी।
म्हणौनि अवधारी। महद्ब्रह्म।।६८।।

"महत्तत्त्वादींना विश्रांतीस्थान असणारे किंवा सर्व तत्त्वे ज्यात विराम पावतात, ते हे स्थान असल्यामुळे जात्याच याला ***महद्ब्रह्म*** असे नांव आहे. विकारांना वाढवून बहुल करणारे हेच आहे. म्हणूनही हे अर्जुना! याला ***महत् ब्रह्म*** असे म्हणतात."

अव्यक्तवादमतीं। अव्यक्त ऐसीं वदंती।
सांख्याचिया प्रतीती। प्रकृति हे।।१४-६९।।
वेदांती इयेंतैं माया। ऐसें म्हणिपे प्राज्ञराया।
असो किती बोलों वायां। अज्ञान हे।।७०।।
आपला आपणपेया। विसरु जो धनंजया।
तैंचि रूप ययां। अज्ञानासीं।।७१।।

"अव्यक्तवादी याला ***अव्यक्त*** असे म्हणतात; तर साङ्ख्यांना याचीच प्रतीती ***प्रकृति*** म्हणून येते. हे सुज्ञांच्या राया! वेदांतमते हिलाच ***माया*** असे म्हणतात. हे असो. या महत् ब्रह्माची अशी बऱ्याच प्रकारे ओळख करून देता येते. पण खरे तर हे सर्व मूळ ***अज्ञान*** आहे. आत्म्याच्या मूळ स्वरूपाचा विसर पडून त्याला ***जीव*** अशी जी भ्रांत स्थिती प्राप्त होते, तेच या अज्ञानाचे यथार्थ रूप आहे."

पुनः *"भाष्यकारांतैं वाट पुसतु"*

अशा प्रकारे ***महद्ब्रह्म*** म्हणजेच ***प्रकृति, माया वा अज्ञान जेथून जगत व्यायले जाते, ती अवस्था वा मूळ संकल्प*** इ.रीतीने याची ओळख ज्ञानदेव पटवितात अन् एक महासमन्वय साधण्याचे कार्य करतात. ***साङ्ख्य, वेदांती अन गीता*** यांचा असा हा समन्वय आपण जो पाहत आहोत, तो करतांना ज्ञानदेव ना कोणाचे खंडन करतात ना मंडन. हिरिरीने वाद चालविणाऱ्या थोरथोर आचार्यांच्या भूमिकेशी कितीतरी भिन्न अशी ही ज्ञानदेवांची समन्वायक भूमिका आहे! म्हणूनच आपणांस जाणवते की ते कोणत्याही थोर आचार्यांचे निदान अशा वादंगांच्या प्रवृत्तीने जाण्याचे अनुकरण नक्कीच करू इच्छित नाहीत! हा पण एक मुद्दा ***"भाष्यकारांतैं वाट पुसतु"*** यातील भाष्यकारांस शोधू जाणाऱ्या महाभागांनी लक्षात घ्यावा असाच आहे.

जीव ही अज्ञानावस्थाच

ज्ञानदेव पुढे वर्णितातः

आणिकही एक असे। जैं विचारावेळें न दिसे।
वातीं पाहतां जैसें। अंधारे कां।।१४-७२।।

"या अज्ञानाचा आणिकही एक विशेष आहे. तो म्हणजे अंधार काय असतो, तो पहावा म्हणून जर कोणी दिव्याच्या उजेडात त्याचा शोध घेऊ गेला, तर अज्ञान दृष्टीस येत नाही."

हालविलियां जाये। निश्चळीं तऱ्हीं होये।
दूधीं जैसीं साये। दूधाची तैं।।१४-७३।।
पैं जागरु ना स्वप्नु। ना स्वरूपावस्थानु।
तैं सुषुप्ति कां घनु। जैसीं होय।।७४।।
कां न वियतां वायूतैं। वांझे आकाश रिते।
तेयां ऐसें निरुते। अज्ञान गां।।७५।।
पैल खांब कां पुरुखु। ऐसा निश्चयो नाहीं एकु।
परि काय नेणों आलोकु। दिसत असे।।७६।।

"स्थिर असलेल्या दुधावरील साय, ते हलवले किंवा ढवळले असता जशी नाहीशी होते; किंवा वायूविना आकाशाचे अस्तित्व जसे जाणवत नाही; अथवा जागृती नाही, स्वप्न नाही; वा स्वरूपस्थितीही नाही, अशी गाढ सुषुप्त्यवस्था जशी असते; किंवा अल्पप्रकाशात दिसणारी वस्तू ही खांब आहे की मनुष्य आहे, याचा निश्चय होत नसला तरी तेथे काहीतरी आहे व ते दिसत आहे, असे भासते."

तेवीं वस्तु जैसीं असे। तैसीं कीर न दिसे।
परि कांहीं अनारिसें। देखिजेना।।१४-७७।।

"त्याचप्रमाणे जी सद्वस्तू आहे ती जशी आहे तशीही दिसत नाही व ती त्या विपरीत काहीतरी आहे, असाही निश्चय करता येत नाही, अशी अज्ञानावस्था असते. दुधावरील साय जशी दुग्धस्वरूप असल्याने ढवळून जशी दूधात मिसळून नाहीशी होते; त्याप्रमाणे ब्रह्मभावना केली असता अज्ञान गडप होते. अज्ञान जेव्हा नसते, तेव्हा वायूविना रीत्या असलेल्या अवकाशाची जाणीव होत नाही; तशीच ब्रह्माचीही, ते सर्वदूर अवस्थित असूनही जाणीव होत नाही. सुषुप्तीत ज्याप्रमाणे जागृति, स्वप्न वा स्वरूप यांची जाणीव नसते,किंबहुना कोणतीच जाणीव राहात नाही; त्याचप्रमाणे अज्ञानावस्थेत जीवाला ***ब्रह्म वा अज्ञान*** यांपैकी कोणतीही जाणीव नसते."

ना राती ना तेज। तैं संधी जेवीं सांज।
तेवीं विरुद्ध ना निज। अज्ञान आथी।।१४-७८।।
ऐसीं कोण्ही एकी दशा। तियें वादु अज्ञानु ऐसा।
तेयां गुंडलियां प्रकाशा। क्षेत्रज्ञु नांव।।७९।।

"रात्र नाही व दिवसही नाही, अशी सांजवेळ असते. त्याप्रमाणे स्वरूपावस्थाही नाही व त्या विपरीत अवस्थाही नाही, ती अज्ञानावस्था असते. एवं विशिष्ट असे जे, त्याला ***अज्ञान*** म्हणतात. या अज्ञानाने आवृत असणारा जो ***चित् प्रकाश,*** त्याला ***क्षेत्रज्ञ*** असे नामाभिधान आहे."

चिदंश

अज्ञान थोरिएं आणिजे। आपणपें तऱ्हीं नेणिजे।
तैं रूप जाणिजे। क्षेत्रज्ञाचे।।१४-८०।।
हाचि उभय योगु। बुझे बापा चांगु।
सत्तेचा नैसर्गु। स्वभावो हा।।८१।।
आतां अज्ञानासारिखें। वस्तु आपणपेंचि दिखें।
परि रूपें अनेगें। नेणों कोणें।।८२।।

"हा ***चिदंश*** क्षेत्रज्ञरूपाने अवस्थित असतो, पण तो स्वरूपास ओळखत नाही व अज्ञान प्रसवत असतो. ***अज्ञान*** म्हणजेच ***क्षेत्र.*** क्षेत्रज्ञाची जी सत्ता म्हणजे अस्तित्व असते, तिचा हा नैसर्गिक स्वभाव आहे. तिच्याद्वारे अज्ञानाची वाढ होते. ***क्षेत्र व क्षेत्रज्ञ*** यांचा असा हा संबंध आहे. अज्ञानामुळेच सद्वस्तूस आपणच अनेक रूपात विलसलेले दृष्टीस येते. ही रूपे अनेकानेक, अनंत, अमित अशी आहेत."

जैसा रंकु भ्रमाला। म्हणे जा रे मी रावो आला।
कां मूर्छितु गेला। स्वर्गलोकां।।८३।।
तेवीं लचकलियां दिठी। मग देखणें जैं जैं उठी।
तेयां नांव सृष्टी। मीचि वियें पैं गां।।८४।।
जैसें कां स्वप्नमोहां। तो एकाकी देखिजे बहुवा।
तोचि पाडु आत्मयां। स्मरणेंवीण असे।।८५।।
हेचि आनि भ्रांती। प्रमेय उपलवूं पुढती।
परि तूं प्रतीती। याचि घे पां।।८६।।

"दरिद्री मनुष्यास भ्रम होऊन त्याने आपणांस गजांत लक्ष्मीचा धनी समजावे; किंवा बेशुद्ध मनुष्यास स्वर्गलोकी गेल्याचा भ्रम व्हावा; त्याचप्रमाणे स्वात्मवस्तूपासून दृष्टी चळाली की जी जी दृश्ये दिसतात; जो जगत्पट विस्तृत झालेला दिसू लागतो; त्या स्थितीला माझ्याद्वारे प्रसवलेली सृष्टी असे म्हणतात. पुरुष निद्रिस्त झाल्यावर स्वप्नावस्थेत ज्याप्रमाणे एकाकी असतांही स्वप्नातील वस्तू व दृश्यांद्वारे ***स्व*** लाच अनेकानेक रूपांत प्रसवलेले पाहतो; अगदी त्याचप्रमाणे स्वतःचे विस्मरण झालेल्या ***क्षेत्रज्ञ*** या अवस्थेत असलेल्या जीवास वा चिदंशास आपणच सृष्टिरूपाने दिसतो. हाच सिद्धांत मी तुला अजून वेगळ्या प्रकारे समजावून देईन. परंतु तू या सिद्धांताची प्रतीती जरूर घेऊन पाहा."

आत्मसत्ता वा आदिमाया

"एकोऽहं, बहुस्यामः" या आदिसंकल्पास या ठिकाणी ज्ञानदेवांनी ***सत्ता*** किंवा ***आत्मसत्ता*** असे म्हटलेले आपल्यास जाणवते. याच आदिसंकल्पामुळे, याच सत्तेमुळे, एकला आत्मा अनंतरूपे घेऊन नटलेला आहे. हेच विलसणे म्हणजे ***सृष्टी.*** हिचेच दुसरे नांव म्हणजे ***क्षेत्र*** व ***आदिसंकल्प*** प्रसवणारा ***आत्मा*** हा ***क्षेत्रज्ञ,*** असेही म्हणता येईल. ***आदिसंकल्प*** वा ***आत्मसत्ता*** वा ***सत्ता*** म्हणजेच ***माया*** वा ***आदिमाया*** वा ***अविद्या. परा*** व ***अपरा*** हे त्या सत्तेचेच विभाग. या सगळ्या कल्पनांना गोपालकृष्ण ***"मम योनिर्महद्ब्रह्म......"*** या श्लोकाद्वारे कसे व्यक्तवतात, याचा खुलासा करतांना ज्ञानदेव पुढे असे निरूपितात, ते असेः

विश्वव्यापार

तऱ्हीं हे गृहिणी। अनादि तरुणी।
अनिर्वाच्यगुणी। अविद्या हे।।१४-८७।।
इयें नाही हेचि रूप। ठाणें हे अति उमप।
हे निद्रितां समीप। चेतां दुरीं।।८८।।

"अविद्या अथवा ***माया*** ही अनादी तरुणी माझी गृहिणी आहे. हिच्या अंगी अनिर्वाच्य गुण भरलेले आहेत. ***अस्तित्व नसणे*** हेच हिचे रूप आहे! अतिविस्तृत, अफाट, अमर्याद, अनंत असा तिचा आकार आहे. अनिर्वाच्य ब्रह्म हे तिचे राहण्याचे ठिकाण आहे. स्वरूपावस्थेचा विसर पडलेल्या चिदंशास वा क्षेत्रज्ञास ही अत्यंत जवळची आहे, तर स्वरूपावस्थित परब्रह्मास हिचा स्पर्शही नसतो."

पैं माझेनिचि आंगें। पौढल्या हे जागें।
आणि सत्तासंभोगें। गुर्विणी होय।।१४-८९।।
महद्ब्रह्म उदरीं। प्रकृति आठैं विकारीं।
गर्भाची करी। पेलोवेली।।९०।।

क्षेत्रज्ञ ही आत्म्याची निद्रितावस्था आहे, तर जागृत आत्मा स्वरूपी लीन असतो, असे येथे सूचित आहे. "मी स्वतः निद्रिस्त असता ही जागी असते व माझ्या सत्तेच्या संगाने ही गरोदर होते. हीच माझी योनी वा महद्ब्रह्म आहे."

उभयसंगु पहिलें। बुद्धितत्त्व प्रसवलें।
बुद्धितत्त्व भारैलें। होएं मन।।१४-९१।।
तरुणी ममता मनाची। तैं अहंकार तत्त्व रची।
तेणें महाभूतांची अभिव्यक्ती होये।।९२।।
आणि विषयेंद्रिय गोसी। स्वभावें तंव भूतांसीं।
म्हणौनि येती सरिसीं। तियेंही रूपा।।९३।।

"भूमिरापोऽनलोवायुः खं मनो बुद्धिरेव च। अहंकारं इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा।।७-४।।" या श्लोकात प्रकृतीचे अष्ट विकार सांगितले आहेत. "या आठ प्राकृत विकारांनी बनलेला गर्भ ही आपल्या उदरी धारण करते. ***मी आणि अविद्या*** अशा दोघांच्या समागमातून प्रथमतः ***बुद्धितत्त्व*** प्रसवले जाते. बुद्धितत्त्वापासून ***मन*** निर्माण होते. त्या मनाची ***ममता*** या नावाची स्त्री आहे. हिचेच ममत्व हे स्वरूप आहे. ***मी व माझे असे मनाचे स्फुरण ते हेच.*** त्यापासूनच ***अहंकार*** तत्त्व रचले जाते. त्यातूनच ***पंचमहाभूते*** प्रकट होतात. या पंचमहाभूतातच ***पंचविषय*** व पंचविषयेंद्रिये ***(कर्मेंद्रिये)*** यांचा, तसेच ***पंच ज्ञानेंद्रिये*** व त्यांचे ***पंचविषय*** यांचा अंतर्भाव असतो. म्हणूनच पंचमहाभूतांबरोबरच हे ***दशविकार*** अवतरतात."

जालेनि विकारक्षोभें। पाठीं त्रिगुणाचें उभें।
तेव्हां ये वासनागर्भें। ठायें ठावो।।१४-९४।।
रुखाचां आंवाका। जैसीं बीजकणिका।
जीवीं बांधें उदका। भेंटतखेंवो।।९५।।
तैसीं माझेनि संगें। अविद्या नाना जगें।
आर घेवों लागें। अणियाची।।९६।।
मग गर्भगोला तेयां। कैसें रूप तैं येआया।
तैं परिसें राया। सुजनांचियां।।९७।।

"प्राकृत अष्टविकारांनी तयार झालेल्या या गर्भाचा जेव्हा आविष्कार होतो व त्रिगुणात्मक मायेच्या सामर्थ्याने तो जेव्हा हालचाल करू लागतो, तेव्हा आदिसंकल्पस्वरूप वासनेने आवृत असलेला चिदंश त्याच्या ठायी प्रकट होतो. हाच जीव होय. ज्याप्रमाणे बीजास पाणी मिळाले असता त्यात सजीव वृक्षाचा सूक्ष्म अंकुर प्रकटतो, त्याचप्रमाणे माझ्यायोगे अविद्या नाना जगतांच्या टोकेरी अंकुरांना प्रसवते. हे सुजनांच्या राया! अर्जुना! तदुपरांत त्या गर्भगोलास कोणते रूप प्राप्त होते, ते ऐक."

ज्ञानदेवांचा तत्त्व उत्पत्तिक्रम वा ब्रह्मांडवृक्ष

या ठिकाणी पुनः एकदा ज्ञानदेव आपल्याकडून ***अष्टधा*** प्रकृतीच्या स्वरूपाची उजळणी करून घेतात. संपूर्ण गीतेचा धागा आपल्या हातून निसटू न देण्यात ते किती दक्ष असतात, हे या प्रसंगी आपणांस परत एकदा जाणवते. मागे आपण ***ब्रह्मांडाचा वंशवृक्ष*** व तन्निमित्ताने तत्सदृश इतर कल्पनांचा जो मागोवा घेतला होता, त्याकडे लक्ष वेधणे आवश्यक वाटते *(उन्मेषः१९-१:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१ पृ.क्र.२८२-८३,२८६).*

साङ्ख्य व वेदांत्यांच्या मतानुसार दाखविलेला ब्रह्मांडाचा जो वंशवृक्ष आपण तेथे संदर्भासाठी घेतला होता, त्याहून वरील ओव्यांतून ज्ञानदेवांनी प्रकट केलेला तत्त्वउत्पत्तिक्रम तसा वेगळा आहे. त्या ठिकाणी म्हटला तसा ***"(पुरुष व प्रकृति) -➢बुद्धि –➢अहंकार -➢व्यक्त व सूक्ष्म इंद्रियादी (मन, पंच बुद्धींद्रिये व पंच कर्मेंद्रिये)";*** तसेच ***"अहंकार -➢ तामस सृष्टी -➢ पंच तन्मात्रे -➢ स्थूल पंचमहाभूते"*** हा जो अनुक्रम तेथे दाखवलेला आहे, तो ज्ञानदेवांपेक्षा वेगळाच आहे. येथे ज्ञानदेवमते जो तत्त्वानुक्रम आहे, तो असाः

===============================

पुरुष व प्रकृति

|

बुद्धितत्त्व

|

मन (ममत्वासह)

|

अहंकार

|

पंचमहाभूते

|

पंच कर्मेंद्रिये व त्यांचे पंचविषय | पंच ज्ञानेंद्रिये व त्यांचे पंचविषय

===============================

जिज्ञासूंनी उपरोक्त क्रम अगोदर उल्लेखलेल्या ज्ञानदेवीच्या *ओवी क्र. १३-१०४* निमित्त स्पष्टीकरणार्थ दिलेल्या तत्त्याशी ताडून पाहावा. म्हणजे याविषयी असणाऱ्या काही कल्पनांचा परामर्ष घेण्यास सोयीचे ठरेल. या ठिकाणी ज्ञानदेवांनी मनाचे जे स्थान बुद्धितत्त्वानंतरचे दाखविले आहे, ते पूर्वीच्या तत्त्यातील सात्त्विक सृष्टीनंतरच्या स्थानापेक्षा विशेष भिन्न आहे व त्याचा जिज्ञासूंनी जरूर विचार करावा. असो.

गर्भाचे स्वरूप

आता ज्ञानदेवांनी गर्भ कोणते रूप धारण करतो याचे केलेले वर्णन पाहू याः

पैं मणिज स्वेदज। उद्भिज जारज।
उमटती सहज। अवेव हे।।१४-९८।।
व्योमवायुवशें। वाढलेनि गर्भरसें।
मणिजु उससें। अवेवु तो।।९९।।
पोटीं सूनि तमरजें। आगलिकां तोयतेजें।
उठिता निफजे। स्वेदजु मा।।१००।।
आपपृथ्वीउत्कटें। आणि तमोमात्रे निकृष्टें।
स्थावरु उमटे। उद्भिजु हा।।१०१।।
पांचापांचाही विरजी। होती मनबुद्ध्यादी साजीं।
ही हेतु जारजीं। ऐसें जाण।।१०२।।

"त्या गर्भगोलास ***अंडज (मणिज), स्वेदज, उद्भिज व जारज*** असे हे अवयव स्वभावतः उमटतात. आकाश व वायू यांच्या योगाने गर्भरस वाढल्याने ***मणिज*** जीव उद्भवतात. तम व रज हे दोन गुण पोटी घालून आप व तेज यांचे आधिक्य झाले की ***स्वेदज*** योनी संभवतात. आप आणि पृथ्वी यांच्या आधिक्याने आणि केवळ नीच अशा तमोगुणाच्या प्रभावाने ***स्थावर*** असा ***उद्भिज*** निर्मिला जातो. पाचही महाभूते सांघष्ट्याने एकमेकांस सहकार्य जेव्हा करतात, तेव्हा पंचीकरणानिमित्त केलेल्या आखणीनुसार मन, बुद्ध्यादी साधने तल्लख असणारी मनुष्यादी ***जारज*** योनी उद्भवते. अशा रीतीने ***महद्ब्रह्म*** या योनीपासून सर्व प्रकारची भूते उत्पन्न होतात."

जगत::::

धृति, पंचीकरण व योनी

ज्ञानदेवांनी जारजादी योनी उद्भवतांना पंचमहाभूते व सत्त्वरजादी त्रिगुण यांचा जो वेगवेगळ्या प्रमाणातील आविष्कार वर्णिला आहे; तो नीट समजून घ्यायची इच्छा असलेल्या जिज्ञासूने पूर्वी ***पंचीकरण*** स्पष्ट करतांना ज्या कल्पनांचा आपण परामर्ष घेतला होता, त्यांचा आधार घ्यावा; म्हणजे तो भाग आकलन होण्यास साहाय्य होईल *(उन्मेषः१९-२:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-२,पृ.क्र. २१० ते २१२).* प्रमुखतया *कोष्टक क्र.४* पाहावे.

मनुष्याच्या पिंडोत्पत्तिसापेक्ष वर्णन मुख्यतः त्या भागात केले आहे. तसेच पंचमहाभूतांच्या गुणाधिक्याप्रमाणे निर्माण होणारी तत्त्वे सदर कोष्टकात दर्शविली आहेत. ज्ञानदेवांनी वरील ओव्यांतून जे स्पष्टीकरण केले आहे, ते इतर योनींचा उगम कसा होतो, ते दर्शविते. तसेच ज्ञानदेवांनी *तेराव्या अध्यायाच्या ओवी क्र.१४३ते १४८* मध्ये स्पष्ट केलेल्या ***धृति*** या तत्त्वामुळे पंचमहाभूतांना एकमेकांत सहकार्य करावयाला लावून *(उन्मेषः१९-१:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१, पृ.क्र.२८९) (जारज योनीतील मनुष्यादी)* जीवाचा पिंड कसा उत्पन्न करून धारण केला जातो, तेही जिज्ञासूंना स्मरत असेलच . असो.

भूतोत्पत्ती

हा जो गर्भपिंड प्रकटतो, त्यातून जी विभिन्न भूते निर्माण होतात, त्याचे ज्ञानदेवकृत पुढील वर्णन पाहू याः

ऐसें चारी हे सकल। करचरणतल।
महाप्रकृति स्थूल। तैंचि शिर।।१४-१०३।।
प्रवृत्ति पेलले पोट। निवृत्ति तैं पाठीं नीट।
सुरयोनी आंगें आठ। उर्ध्वाचि।।१०४।।
कंठु उल्हासतां स्वर्गु। मृत्युलोकु मध्यअर्धभागु।
अधोदेशु चांगु। नितंबु तो।।१०५।।
ऐसें लेंकरु एक। प्रसवली हे देख।
जेयाचें तिन्हीं लोक। बालसे गां।।१०६।।
चौऱ्यांशी लक्ष योनी। तियें कांडां पेरां सांदणी।
वाढे प्रतिदिनीं। बालक हे।।१०७।।

"अंडज, स्वेदज, उद्भिज व जारज हे त्या पिंडाचे करचरणादी अवयव होत. विस्तारलेली स्थूल महाप्रकृति वा अपरा प्रकृति हे त्याचे शिर होय. प्रवृत्ति ही त्याच्या पोटाच्या स्थानी आहे, तर निवृत्ति ही त्याची पाठ आहे. अष्ट सुरयोनी ही त्याची अष्ट उर्ध्वांगे होत.स्वर्ग त्याच्या कंठस्थानी, मृत्युलोक त्याच्या कटिस्थानी व पाताळलोक त्याच्या नितंबस्थानी आहेत. अशा अंगोपांगांचे बालक ती अविद्या वा माया प्रसवते. तिन्ही लोकांचा विस्तार हे त्या बालकाचे बाळसे होय. चौऱ्यांशी लक्ष योनी या त्याच्या हातापायांच्या हाडांच्या संधिस्थानी वसतात. असे हे बालक दिवसेंदिवस वाढीस लागते."

मायेचे जगद्रूपी बालक

अशा त्या जगद्रूपी बालकाचे लालन पालन ती माया कशी करते, ते पाहाः

नाना देह अवयवीं। नामाची लेणीं लेववी।
मोहस्तन्यें वाढवी। नीच नवेनि।।१४-१०८।।
सृष्टी वेगवेगलियां। तियां करांघ्रीं आंगोलियां।
भिन्नाभिमान सूदलियां। मुदिया तेथ।.१०९।।
हे एकलौतें चराचर। अविचारित सुंदर।
प्रसवोनि थोर। थोरावली।।११०।।

"त्या त्रिभुवनरूपी बालकाच्या देह व अवयवांस नामरूपाची विविध लेणी ती माया घालते. नित्य नूतन वाटणारे चविष्ट मोहस्तन्य देऊन ती त्याला वाढविते. वेगवेगळ्या सृष्टी या त्या बालकाच्या हातापायांची

बोटे आहेत. त्यांच्यात योनीसापेक्ष भिन्नभिन्न देहाभिमानांच्या अंगठ्या तिने घातल्या आहेत.अविवेककाली सुंदर भासणारे असे हे एकुलते एक चराचररूपी बालक पावून ती मायारूपी माता धन्यता मानते."

ब्रह्मा प्रातःकालु। विष्णु तो मध्याह्नवेलु।
सदाशिव सायंकालु। बाला ययां।।१११।।
महाप्रलयसेजें। खिलौनि आले निदिजे।
विषमज्ञानें उमजे। कल्पोदयीं।।११२।।
अर्जुना ययापरी। मिथ्यादृष्टीचां घरीं।
युगानुवृत्तीची करी। चोज पाउलें।।११३।।
संकल्पु इयाचां इष्टु। अहंकारु विनटु।
ऐसियां होय शेवटु। ज्ञानें इयें।।११४।।
आतां असो हे बहु बोली। ऐसें विश्व माया व्याली।
तेथ जांघु जाली। माझी सत्ता।।११५।।

"या बाळाचा प्रातःकाळ म्हणजे ब्रह्मा, मध्याह्न म्हणजे विष्णु, तर सदाशिव म्हणजे सायंकाळ होत. दिवसभर बागडून हे बालक महाप्रलयाच्या शय्येवर निद्रा करते. कल्पाचा उदय होताच अन्यथा ज्ञानाची दृष्टी उघडून ते जागे होते. हे अर्जुना! अशा प्रकारे हे बालक स्वस्वरूपाहून चळलेल्या म्हणजे मिथ्यादृष्टिरूप घरात, युगमालिकारूप पावले कौतुकाने टाकते. ते पाहून ती मायारुपी माता धन्य होते. या बालकाचा संकल्प हा आवडता मित्र आहे अन अहंकार हा खेळगडी सोबतीस सतत असतो. अशा प्रकारे लाडाकोडाने वाढवलेल्या त्या मायेच्या जगद्रूपी बालकाचा ज्ञानरूपी काळाकडून घात होतो."

हे जाणूनच जणू काही ती मायारूपी माता ज्ञानास याच्या आजूबाजूला फिरकूसुद्धा देण्यास तयार नसते. म्हणूनच भगवंतांनी ***"मम माया दुरत्यया"*** असे म्हटले आहे.

"तर असो. या वर्णनाचे तात्पर्य इतकेच की हे विश्व मायेच्या उदरी जन्मले आणि माझी ***सत्ता*** ही त्यास कारण झाली," असे श्रीकृष्ण म्हणतात.

जगताची मातापितरे

माया ही जगाची ***माता*** व ***परब्रह्म*** त्याचा ***पिता*** आहेत, हे सांगतांना गोपालकृष्ण म्हणतातः

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता।।१४-४।।

"हे कौंतेय अर्जुना! नाना प्रकारच्या सर्व योनींत ज्या मूर्ती अर्थात शरीरे उत्पन्न होतात, त्या सर्वांची ***महत्ब्रह्म*** म्हणजे ***त्रिगुणमयी माया*** ही गर्भ धारण करणारी माता आहे आणि मी बीज प्रदान करणारा पिता आहे."

याबाबत ज्ञानदेव कथिततातः

याकारणें मी पिता।महद्ब्रह्म माता।
अपत्य पांडुसुता। जगडंबरु।।१४-११६।।
आतां शरीरें बहुलें। देखौनि न भेद हो चित्तें।
जैं मनबुद्ध्यादी भूतें। एकेंचि एथें।।११७।।
हां गां एकेंचि देहीं। काय अनारिसें अवयव नाहीं।
तेवीं विचित्र विश्व पाहीं। एकचि हे।।११८।।

"महत् ब्रह्माच्या उदरी जन्म पावणाऱ्या या विश्वाची म्हणूनच ***माया*** ही माता व ***मी*** पिता आहोत. हे बृहत असे जगडंबररूपी विचित्र विश्व आमचे अपत्य आहे. त्यातील भूतादींचे भिन्न भिन्न आकार - प्रकार व वैचित्र्याने तुझ्या मनात ती भूते परस्परभिन्न आहेत, अशा द्वैतभावनेचा उदय होऊ देऊ नकोस. कारण ***या भूतमात्रांतून तीच पूर्वी वर्णन केलेली एकमात्र अष्टधा स्वरूप पावलेली एकलौती प्रकृतीच अभिव्यक्त होत असते.*** ज्याप्रमाणे एकाच देहास निरनिराळे अवयव असतात, त्याचप्रमाणे एकमात्र अशा त्या विचित्र विश्वाचे हे सर्व भूतमात्र अवयव आहेत."

पैं उंचा नीचा डाहालिया। विषमा वेगलालियां।
एकाचि जेवीं जालियां। बीजाचियां।।१४-११९।।
आणि संबंधु तोही ऐसा। मृत्तिकें घटु लेकु जैसा।
कां पटत्व कापुसा। नातू होये।।१२०।।
नाना कल्लोलपरंपरा। संतती जैसीं सागरा।
आम्हां आणि चराचरां। संबंधु तैसा।।१२१।।
म्हणौनि वह्नी आणि ज्वाल। दोन्ही वह्नीचि केवल।
तेवीं मी गां सकल। संबंधु वावो।।१२२।।

"ज्याप्रमाणे लहानमोठ्या वेगवेगळ्या आकाराच्या व झाडाच्या अंगी ठिकठिकाणी फुटलेल्या फांद्या जशा एकाच बीजापासून निर्माण होतात; त्याचप्रमाणे ***मन, बुद्धी, अहंकार व पंचमहाभूते*** या ***अष्टधास्वरूप प्रकृती*** पासूनच ही सर्व भूते उत्पन्न होतात. आणि जसा घट हा मृत्तिकेचा पुत्र असतो; किंवा वस्त्रत्व हे कापसाचे पौत्र असते; वा लाटा ही जशी सागराची संतती असते; अगदी तसाच या चराचराचा आणि माझा संबंध आहे."

"हे अर्जुना! ज्याप्रकारे अग्नी व ज्वाळा ही केवळ अग्नीच होत, त्याचप्रमाणे हे समस्त विश्व म्हणजे मीच आहे. जग, प्रकृति व आमच्यात वर उल्लेखलेला पुत्र-माता-पिता असा जो संबंध सांगितला तोसुद्धा वास्तविक तसाच्या तसाच नाही, तर आता सांगितला त्या प्रकारचा आहे."

चिद्विलास::::

"उखितें। आघवें मीचि।"

अशा प्रकारे पुनः ज्ञानदेव आपले चिद्विलासाचे तत्त्वज्ञान प्रकाशित करतात अन पुढे म्हणतात कीः

जालेनि जगें मी झांकें। तऱ्हीं जगत्वें कोण्ह फांकें।
किलेवरी माणिकें। लोपिजे काईं।।१४-१२३।।
अलंकारातें आलें। तऱ्हीं सोनेपण काईं गेलें।
कीं कमल फांकलें। कमलत्वा मुकें।।१२४।।

सांग पां धनंजया। अवयवीं अवयविया।
आच्छादिजे कीं तेयां। तेंचि रूप ।।१२५।।

"विश्व आणि मी दोन्ही वेगवेगळे आहोत, असे कसे म्हणता येईल! मी जर विश्वाहून वेगळा असलो, तर मग विश्वरूपाने कोणाचा प्रकाश पडतो! सुवर्णाचे अलंकार घडवले की सुवर्णत्वाचा लोप होतो का! अथवा कमळ उमलले की कमलत्वास मुकते की काय! हे धनंजया! अवयव हे देहवानास झाकून टाकतात, की त्याचे रूप अवयवांद्वारे प्रकट होते!"

कीं विरुढिलियां जोंधला। कणिसाचा निर्वाला।
वेंचला कीं आगला। दिसतसें।।१४-१२६।।
म्हणौनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें।
तैसा नोहें उखितें। आघवें मीचि।।१२७।।
हा तूं सांचोकारा। निश्चयाचा खरा।
गांठीं बांध वीरा। जीवाचिये।।१२८।।

"अरे! जोंधळ्याच्या कणसापासून जेव्हा अंकुर फुटून कणीस उत्पन्न होते, तेव्हा पेरलेला दाणा नष्ट पावला असे समजावयाचे की तो कणसाच्या दाण्यांइतका वृद्धिंगत झाला असे म्हणावयाचे! अर्जुना! विश्वाचा भ्रम बाजूस सारून मला पाहण्याचा प्रयत्न विफल आहे; कारण हे अवघे विश्व म्हणजे मीच आहे. मी सांगितलेल्या या सिद्धांताची तू आपल्या मनाशी खूणगाठ बांधून ठेव."

अज्ञान्याचे द्वैत, तेच ज्ञान्याचा चिद्विलास

या प्रकारे ज्ञानदेव त्यांच्या **चिद्विलासवाद**ाची स्पष्ट उकल करून दाखवितात. ***ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत व अधियज्ञ*** या संकल्पना पूर्वीच गीतेच्या *आठव्या* अध्यायातील श्लोक पाहतांना आपण अवलोकल्या होत्या. यानिमित्ताने स्पष्ट होते की ***ब्रह्म, अधिभूत व अधियज्ञ,*** तसेच ***कर्म*** ही परस्पर अभिन्न होत. ही सर्व वेगवेगळी केवळ अज्ञान्यांसाठी आहेत; तर ज्ञानदेव जी ज्ञानदृष्टी आपणांस प्रदान करतात, तिच्यासाठी ही सर्व परब्रह्मच होत. त्याचप्रमाणे ***ब्रह्म व अध्यात्म*** यांनासुद्धा वेगवेगळे मानणे योग्य नाही. असो.

पूर्व व उत्तर अनुसंधान

याप्रमाणे जे विज्ञान निरीक्षिण्यास आपण सुरुवात केली होती *(उन्मेषः१६ःप्रकृतिविचार पृ.क्र.२४३पासून)*, ते आतापावेतो बव्हंशी पाहून झाले. याच विज्ञानाचा अवशिष्ट भाग आपण प्रामुख्याने गीतेतील *पंधराव्या* अध्यायातील **क्षराक्षरपुरुषविवेक** व *चवदाव्या* अध्यायाचा **त्रिगुणा**संबंधी उर्वरित विभाग, तसेच *सतराव्या* अध्यायाच्या चर्चेनिमित्त पाहणार आहोत. हा सर्व भाग केवळ नुकताच जो ***चिद्विलास सिद्धांत*** ज्ञानेश्वरांनी प्रस्थापित केला आहे, त्याच्या प्रतिपादनासाठी व उरल्यासुरल्या **क्षेत्र-क्षेत्रज्ञविचारा**च्या परिपूर्तीसाठी आहे, हे जिज्ञासूंनी लक्षात ठेवावे.

ॐ नमोजी आद्या **पासूनच चिद्विलासाचे प्रतिपादन**

या चिद्विलासाचा खरा आरंभ तसा ज्ञानदेवीच्या पहिल्याच ओवीपासून होतो, हे स्पष्ट करून पुढे जाऊ या.

ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।
देवा तूंचि गणेशु। सकलमतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।१-२।।

ॐकार हे विश्वरूपाच्या ***तीन मात्रा*** व अव्यक्तनिदर्शक ***अर्धी मात्रा*** यांचे रूपक आहे. ***"ॐ नमो जी आद्या"*** असे म्हटले की हे ***विश्व,*** ते नामरूपास आणणारी परब्रह्माची ***माया*** वा ***अव्यक्त*** आणि ***आद्या*** म्हणजे ***परब्रह्म*** यांचा बोध होतो. अशा त्या विश्वरूपाने फाकलेल्या आत्मरूपासच वेद प्रतिपादितात. निर्गुण, निराकार असणारे परब्रह्मच विश्वरूपाने साकार होऊन स्वतःच स्वतःस वेद्य होते; म्हणजे जाणते आणि ***स्वसंवेद्य*** होते. म्हणजे अनुभवते.

अशा त्या साकारलेल्या स्वसंवेद्य, वेदप्रतिपाद्य, आत्मरूपासच श्रीज्ञानदेवांनी ***गणेश*** म्हटले आहे. विश्वाला प्रकाश्य करणारा हा जो गणेश आहे, तोच सकल मतीचा प्रकाशक आहे. ***सकल मती*** म्हणजे ***स्वसंवेद्यता*** जिचा गुण आहे, अशी ***आत्मस्थ जाणीव.*** या आत्मरूप गणेशास नमन करून ज्ञानेश्वर त्याचा जयजयकार करत आपला चिद्विलासाचा सिद्धांत प्रतिपादन करण्यास आरंभ करतात व सकल जिज्ञासूंना तो लक्षपूर्वक अवलोकन करण्यास सावध करतात.

चौदाव्या अध्यायातील *चिद्विलास*

ज्ञानदेवांनी आपणापुढे ज्ञानेश्वरीद्वारे असे हे चिद्विलासाचे तत्त्वज्ञान मांडलेले आहे. **हे तत्त्वज्ञान *व त्यांची* गुरुपदिष्ट कुंडलिन्यधिष्ठित योगप्रणाली *ही त्यांच्या ग्रंथाची ठळक वैशिष्ट्ये होत.***

यानंतर आपण ***त्रिगुणरहस्य*** पाहू या. ***चिद्विलास*** ही संकल्पना पुढे विशद करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आतां मियां मज दाविला। शरीरीं वेगलाला।
गुणीं मीचि बांधला। ऐसा आवडें।।१४-१२९।।

श्रीकृष्ण म्हणतातः "आतापावेतो विविध निरूपणांद्वारे माझे स्वरूप स्पष्ट सांगितले. मीच विविध भूतादिप्रकृतिद्वारे वेगवेगळी रूपे कशी धारण करतो, हे तुला आता कळून चुकले आहे. त्रिगुणमयी मायेद्वारे माझे हे प्रकटन होते. म्हणून मी त्या मायेच्या अधीन आहे, असे जरी भासत असले, तरी ते मिथ्या आहे."

जैसें स्वप्नीं आपण। उठवूनियां आत्ममरण।
भोगिजे गां जाण। कपिध्वजा।।१४-१३०।।
कां कवलांतें डोले। प्रकाशूनि पिंवलें।
देखती हेहीं कले। तेयांसीचि।।१३१।।
नाना सूर्यप्रकाशें। प्रकटी तैं अभ्र भासे।
तो लोपला हेहीं दिसें। सूर्येंचि कीं।।१३२।।

पैं आपणपेनि जालियां। छाया गां आपुलियां।
बिहोनि बिहालियां। आन आहे।।१३३।।

"हे कपिध्वजा! एखाद्याने स्वप्नात आपले मरण पहावे व त्या दुःखाने व्यथित व्हावे; किंवा कावीळ झालेल्या माणसास डोळ्यांनी सगळे पिवळे दिसावे व त्यावरूनच त्याचा त्यासच बोध व्हावा की ही कावीळ झाल्याची लक्षणे आहेत; अथवा सूर्याचा प्रकाश लोपवणाऱ्या ढगांचे प्रकाशन स्वतः सूर्याद्वारेच जसे व्हावे; वा स्वतःच्याच छायेस, ती आपल्यापेक्षा भिन्न असूनही एखाद्याने भ्यावे; त्याच प्रकारचा संबंध मी आणि माझ्यापासून उत्पन्न झालेल्या विविध आकारा-प्रकारांच्या भूतसमुदायात आहे."

तैसीं इयें नाना देहें। दाऊनि मी नाना होये।
तेथ ऐसा बंधु आहे। तेंही देखें।।१४-१३४।।

"या संबंधासच मायेचा बंध असे जरी म्हणत असले, तरी तो खरोखरच बंध आहे का; माझ्याच स्वरूपाद्वारे प्रकाशित होणारी त्रिगुणमयी माया व तिच्यापासून उद्भवणारी ही विभिन्न भूते माझ्यापेक्षा वास्तविक भिन्न आहेत का; हे नीट जाणून घे."

बंधु कां न बंधिजे। हे जाणणें मज माझें।
नेणणेनि उपजे। आपलेनि।।१४-१३५।।
तऱ्हीं कोणें गुणें कैसा। मजचि मी बंधु ऐसा।
आवडे तैं परियेसा। अर्जुनदेवा।।१३६।।
गुण किती किंधर्म। कायि येयां रूपनाम।
कें जालें हे वर्म। अवधारिजे।।१३७।।

"मगाशी म्हटलेल्या स्वमरण पाहणाऱ्या स्वप्नजागृत पुरुषाप्रमाणे, वा स्वतःस कावीळ झाली आहे हे उमजू शकणाऱ्या व्यक्तीप्रमाणे; किंवा स्वप्रकाशाने मेघांस प्रकट करून स्वतः त्यांच्यामुळे लोपणाऱ्या सूर्याप्रमाणे, अथवा स्वतःच्या शरीरापासून उत्पन्न होणाऱ्या छायेच्या स्वशरीराशी असलेल्या संबंधाप्रमाणे, हे त्रिगुणात्मक विश्व व माझा संबंध आहे. हे जाणून घेणाऱ्यास बंध नाही व हे नेणणाऱ्यास तो बंध आहे. हे कसे घडते; आपणच सृजलेल्या त्रिगुणांद्वारे मी स्वतःसच कसा बद्ध करतो; गुण किती, त्यांची लक्षणे कोणती, हे कसे उत्पन्न झाले; हे सर्व, अर्जुनदेवा! आता लक्षपूर्वक अवधारा!"

त्रिगुण::::

प्रकृतिज त्रिगुण

त्रिगुणरहस्य स्पष्ट करतांना भगवंत म्हणतातः

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्।।१४-५।।

"सत्त्व, रज व तम ही त्या त्रिगुणांची नांवे होत. अविद्यात्मिका प्रकृतीपासून ते उत्पन्न होतात. हे महाबाहो! यापूर्वी क्षेत्रज्ञविचार सांगतांना *(श्लोक क्र. १३-३१ व ३२)* अनादी, निर्गुण, अव्यय असणाऱ्या व देहांतर्यामी वसूनही अलिप्त असणाऱ्या ज्या ***क्षेत्रज्ञ*** नावाने उल्लेखलेल्या आत्मस्वरूपाचे वर्णन केले होते, त्यास हे त्याच्याच प्रकृतीपासून उत्पन्न झालेले गुण जणू काही देहात बद्ध करतात."

"एकोऽहं.." या आदिसंकल्पाची विरूढी फुटून स्वस्वरूपाहून दृष्टी लचकलेल्या स्थितीत आत्म्यास ***क्षेत्रज्ञ*** नामे विख्यात असलेली ***जीवदशा*** प्राप्त होतेवेळी त्यास हे त्रिगुणरूपी मायेचे बंधन भासते व जोपावेतो पुनः स्वरूपावस्थित होत नाही, जोपावेतो गुणांचे कर्तृत्व स्वतःचे समजण्यात आत्म्यास धन्यता वाटते; तोपावेतो त्याचा व मायेचा संबंध दृश्यरूपाने प्रकटत राहतो. वस्तुतः आत्मस्वरूप निर्लेपच असते व हा बंध मिथ्याच असतो." असे खरे तर नसणारे त्रिगुणबंधन कसे प्रकटते, हे सांगणाऱ्या ज्ञानदेवींच्या ओव्या अशा आहेतः

तऱ्हीं सत्त्व रज तम। तिघांसीही हे नाम।
आणि प्रकृति जन्म-। भूमिका ययां।।१४-१३८।।
एथ सत्त्व तैं उत्तम। रज तैं मध्यम।
तिहींमाजीं तम। सावियाधारें।।१३९।।
हे एकेंचि वृत्तीचां ठायीं। त्रिगुणत्व आवडे पाही।
वयसात्रय देहीं। एकीं जेवीं।।१४०।।

"सत्त्व, रज व तम ही नावे असणारे त्रिगुण प्रकृतीपासून जन्म पावतात. प्रकृतीच्या उत्तमांशापासुन ***सत्त्वगुण,*** मध्यमांशापासून ***रजोगुण*** व अधमांशापासुन ***तमोगुण*** होतात. एकाच देहाठायी बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तिन्ही अवस्था जशा प्रकट होतात, त्याचप्रमाणे एकाच आदिसंकल्पाठायी असणाऱ्या मायेच्या या तीन गुणात्मक अवस्था आहेत."

कां मीनलेनि कीडें। जंव जंव तुक वाढे।
तंव तंव सोने हीण पडे। पांचिकां कसीं।।१४-१४१।।
पैं सावधपणें जैसें। वाहविलें आलसें।
सुषुप्ति बैसे। घणावोनि।।१४२।।
तैसीं अज्ञानांगिकारें। निगाली वृत्ति विखुरे।
तैं सत्त्वरजद्वारें। तमही होय।।१४३।।

"शुद्ध सुवर्णाच्या तुकड्यात हीण धातू मिसळून त्याचे वजन जसजसे वाढवत जावे, तसतसे ते सोने शुद्धत्वाला मुकत जाऊन हलक्या प्रतीचे होत जाते; किंवा आळस वाढत जाऊन सावधानता कमी कमी होत ज्याप्रमाणे बेसावध अशी गाढ सुषुप्त्यावस्था प्राप्त होते; अगदी तशीच शुद्ध आत्म्याठायीची मायावृत्ती, अज्ञानाचा अंगीकार केल्याबरोबर, निखळ अविद्यारूप अशा सत्त्व, रज अन एवढेच काय तर तमोगुणातसुद्धा बघता बघता प्रसारित होते. हे अर्जुना! असे हे त्रिगुण निर्माण होतात."

त्रिगुणांचे बंधकत्व

ते गुण कसे बंधन करतात, हे सांगतांना गीता म्हणतेः

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम्।
सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ।।१४-६।।

"हे निष्पाप अर्जुना! त्या त्रिगुणांपैकी ***सत्त्वगुण*** हा बुद्धीचा प्रकाशक असून ज्ञानोर्मीस कारण आहे; स्फटिकसदृश निर्मल आहे; जीवास आत्मसन्मुख करणारा आहे. तरीही सुख व ज्ञान या दोन पाशांनी तो बंधन करतो."

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम्।
तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम्।।१४-७।।

"***रजोगुण*** हा अभिलाषात्मक असतो. तृष्णा व आसक्ती ही याच्यापासून उत्पन्न होतात. हा जीवात्म्यास कर्मसंयोगाने बांधतो."

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम्।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत।।१४-८।।

"***तमोगुण*** हा तर अज्ञानापासून निर्माण होतो असे जाण. तो सर्व जीवांना मोह पाडतो. हे भारता! प्रमाद, आळस व निद्रा यांद्वारे तो जीवात्म्यास बंधन करतो."

या गीतोक्तीचे स्पष्टीकरण करतांना ज्ञानदेव आपल्या शैलीत म्हणतातः

अर्जुना गां जाण। ययां नाम गुण।
आतां दाखऊं खूण। बांधिती तैं।।१४-१४४।।
तऱ्हीं क्षेत्रज्ञदशे। आत्मा मोटका पैसे।
हे देह मी ऐसें। मुहूर्त करी।।१४५।।
आजन्म मरणांती। देहधर्मीं समस्तीं।
ममत्वाची सूती। घेना जंव।।१४६।।
जैसीं मीनाचां तोंडीं। पडेना जंव उंडी।
तंव गल आसुडी। जल पारधी।।१४७।।

"आदिसंकल्पाचा उन्मेष होऊन आत्मा क्षेत्रज्ञदशेत प्रवेशतो न प्रवेशतो, तोच ***जीवात्मभाव*** धारण करतो. अन त्याबरोबरच हे ***त्रिगुण*** त्यास बंधन करू लागतात. जन्मल्यापासून तहत मृत्यूपर्यंत समस्त देहधर्म हे मीच असे तो मानू लागतो. त्या ममत्वाचा उदय झाल्याझाल्याच, माशाने आमिष तोंडाने पकडल्याबरोबर तत्काळ कोळ्याने जसा गळ पाण्याबाहेर काढावा, तसे हे त्रिगुण जीवात्म्याला आनंदोदधीतून हिसडा मारून बाहेर फेकतात."

तेवीं सत्त्वें लुब्धकें। सुखज्ञानाची पाशिकें।
वोढिजती मग खुडके। मृगु जैसा।।१४८।।
मग ज्ञानें चडफडी। जाणिवेचें खुरखोडी।
स्वयंसुख हे धाडी। हातींचें गां।।१४९।।

"हरीण पारध्याच्या पाशात जसे अडकते, त्याप्रमाणे त्यातल्या सत्त्वगुणरूप पारध्याच्या सुख व ज्ञान या पाशात जीव अडकून तडफडावयास लागतो. ज्ञानपाशाने बद्ध झाल्यावर शांती हरवल्यासारखा तो चरफडू लागतो व जाणिवेच्या लाथा झाडून हातचे आत्मसुख आपणच व्यर्थ दवडतो."

सुख व ज्ञान यांचे पाश

तेव्हा विद्यामानें तोखें। लाभमात्रें हरिखें।
मी संतुष्ट हेहीं देखें। श्लाघो लाघे।।१४-१५०।।
म्हणे भाग्य ना माझें। आजि सुखिये नाही दुजें।
विकाराष्टकें फुंजे। सात्त्विकाचेनि।।१५१।।

"जीवदशेस नुकताच आरंभ केलेल्या त्या क्षेत्रज्ञास ***जाणिवेची ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय ही त्रिपुटी*** चिकटते. तेव्हा निःसीम आत्मदशेस जरी तो मुकतो, तरी सत्त्वगुणाच्या प्रभावाने प्राप्त होणाऱ्या विद्या व त्यांच्याबरोबर प्राप्त झालेल्या मानमान्यतेने व लाभांनी तो संतोषून हरखून जातो. आपण सुखी आहोत, अशी आत्मप्रौढी त्याला भुरळवू लागते. ***"माझ्यासारखे सुख कोणालाच नाही; माझ्यासारखा भाग्यवान मीच!"*** अशा अष्टसात्त्विक विकारांनी त्याची वृत्ती लिप्त होते."

आणि एणेंही न सरे। लांकण लागे दुसरे।
जैं विद्वत्तेचें भरे। भूत आंगीं।।१४-१५२।।
आपणचि ज्ञानस्वरूप आहे। तैं गेलें हे दुःख न वाहे।
कीं विषयज्ञानें होये। गगनाएवढा।।१५३।।
रावो जैसा स्वप्नीं। रंकपण रिघे ध्यानीं।
तो दों दाणां मानीं। इंद्रु ना मी।।१५४।।
तैसें गां देहातीता। जालेयां देहवंता।
हो लागे पांडुसुता। बाह्यज्ञानें।।१५५।।

"या सुखोर्मीने तो घुमू लागतो, तोच त्याला आपल्यासारखा विद्वान कोणीच नाही, या प्रौढीच्या भूताची लागण होते. स्वस्वरूपाची ओळख विसरल्याचे दुःख वा खंती त्याला अजिबात नसते. उलट संसारज्ञानाच्या त्रिपुटीने ग्रस्त होऊन तो स्वतःस आकाशाहूनही ***वाड*** समजू लागतो.एखाद्या राजाला आपण भिकारी झाल्याचे स्वप्न पडावे व त्या स्वप्नातच त्याला मुठभर दाणे मिळावे. त्यावेळी स्वतःला त्याने जणू इंद्रच समजावे; तसेच त्या देहातीतास देहवान झाल्यावर होऊ लागते. आत्मज्ञानाचे साम्राज्य आपले असतांनाही जीवात्मावस्थेत होणाऱ्या बाह्यज्ञानाने तो संतुष्ट होऊ लागतो."

प्रवृत्तिशास्त्र बुझे। यज्ञविद्या उमजे।
किंबहुना सुझे। स्वर्गवरी।।१४-१५६।।
आणि म्हणे आजि आन। मीवांचूनि नाहीं सज्ञान।
चातुर्यचंद्रा गगन। चित्त माझें।।१५७।।
ऐसें सत्त्व सुखज्ञानीं। जीवासीं लावूनि कानीं।
बैलाची करी वानी। पांगुलाचियां।।१५८।।

"सुखे प्राप्त करून घेण्याचे शास्त्र त्याला अवगत होते, स्वर्गप्राप्ती करून देणारी यज्ञविद्या त्याला समजते. एवं च काय समस्त त्रैलोक्यातील कोणतीही गोष्ट त्याला अज्ञात नसते. म्हणून त्याला आपल्याइतके ज्ञानी कोणीच नाही, असे वाटू लागते. स्वतःचे चित्त म्हणजे जणू चातुर्यचंद्रिकेस विहरण्याचे गगनच असल्याचे त्याला

वाटते. अशा प्रकारे सुख व ज्ञान यांच्या काढण्या लावून सत्त्वगुण जीवास नंदीबैलासारखा निर्बुद्ध करतो."

रजोगुणाचा पाश

आतां हाच शरीरीं। रजें जियापरी।
बांधिजे तैं अवधारी। सांगिजैल।।१४-१५९।।
हे रज याचि कारणें। जीवातैं रंजऊं जाणें।
हे अभिलाखाचें तरुणें। सदाचि गां।।१६०।।
हे जीवीं मोटकें रिगे। आणि कामाचां मदीं लागे।
मग वारया वलघे। चिंतेचियां।।१६१।।

"आता रजोगुण जीवात्म्याला देहैक्यभावनेच्या बंधात कसे अडकवतो, ते ऐक. अभिलाषा ही जणू कोणी रूपयौवनसंपन्न स्त्री व हा रजोगुण म्हणजे तिचे उफाळणारे तारुण्य! अशी ही अभिलाषारूप स्त्री आपल्या रजोमयी तारुण्याने जीवात्म्यास रिझवते; आपल्या मोहपाशात बद्ध करते आणि सदासाठी त्याला आपल्याशी बांधून घेते. या रजोगुणाचा अंतःकरणवृत्तीत थोडाफार प्रवेश झाला न झाला की काममदाने मत्त होऊन जीव विषयचिंतनरूपी वाऱ्याच्या वारूवर स्वार होतो."

घृतें आंबुखूनि आगियालें। वज्राग्नीचें सादुकलें।
आतां बहु थेंकुलें। आहे तेथ।।१४-१६२।।
तैसीं खवले चाड। होय दुःखासगट गोड।
इंद्रश्रीही सांकड। गमों लागें।।१६३।।
तैसीं तृष्णा वाढिनलियां। मेरुही हातां आलियां।
तऱ्हीं म्हणे एखादियां। दारुणाही वलघो।।१६४।।

"लाकडे तुपाने माखावीत अन त्यांच्यावर वीजेचा लोळ पडावा; मग त्यांच्यातून उफाळणाऱ्या अग्निज्वाळांपुढे काहीतरी टिकेल का! त्याचप्रमाणे कामाग्नी भडकल्यावर त्याच्या इच्छारूपी लोळांपुढे दुःखांसकट सगळे स्वाहा होते. तेव्हा त्या कामोर्मीच्या तृप्तीपुढे त्याला इंद्राचे वैभवही तुच्छ वाटू लागते. त्या जीवात्म्याची तृष्णा इतकी वाढते की हाती जरी मेरूएवढा सुवर्णपर्वत आला, तरी त्याहूनही जे काही मोठे प्राप्तव्य असेल, ते मिळवण्यासाठी दारुण कष्ट सहन करण्यास तो सिद्ध होतो."

आजि असते वेंचिजैल। परि पाहे काय कीजैल।
ऐसा पांगीं वडील। व्यवसाय मांडी।।१४-१६५।।
जीविताची कुरोंडी। वोवालूं लागे कवडी।
मानी तृणाचियां जोडी। कृतकृत्यता।।१६६।।

"आज हाती असलेल्या धनाचा उपभोग घेऊन ते नाहीसे होईल; मग काय करावयाचे, या विचाराने तो अजूनही अधिकाधिक धनसंपत्ती मिळवण्याच्या आसक्तीने मोठमोठे व्यवसाय हाती घेतो; कवडीकवडीसाठी प्राण वेचायला तयार होतो आणि अतिप्रयासाने जरी गवताची काडी गाठी लावता आली, तरी कृतकृत्य होतो."

म्हणे स्वर्गा हन जावें। तऱ्हीं तेथ काय खावें।
ययालागीं धांवें। याग करूं।।१४-१६७।।
व्रतापाठीं व्रतें। आचरें इष्टापूर्तें।
काम्यावांचूनि हातें। शिवणें नाही।।१६८।।
पैं ग्रीष्मांतीचां वारा। विसंवो नेणें वीरा।
तैसा न म्हणें व्यापारा। रातिदिवो।।१६९।।

"रजोगुण अतिप्रबल झाला की तो जीव परलोकी काय काय उपभोग घ्यावेसे वाटतात, त्याचीसुद्धा पूर्वतयारी करून ठेवतो. स्वर्ग जरी मिळाला तरी तेथे यथेच्छ खाण्यापिण्यास मिळावे म्हणून यज्ञयाग करतो; व्रतापाठी व्रते करतो; इष्ट व पूर्त कर्मांशिवाय इतर कर्मांकडे लक्षसुद्धा देत नाही. ग्रीष्म ऋतू सरतांना जे वारे वाहतात, त्यांना जशी थोडीही उसंत नसते; त्याचप्रमाणे काम्य कर्मांसाठी अधीर झालेल्या त्या जीवात्म्याचा व्यापार ना ओळखतो दिवस, ना रात्र!"

काय चंचलु मासा। कामिनीकटाक्षु जैसा।
लवलाहो तैसा। वीजू नाही।।१४-१७०।।
तेतुलेनि गां वेगें। स्वर्गसंसारपांगें।
आगीमाजीं रिगें। क्रियांचियां।।१७१।।
ऐसा देहीं देहावेगला। ले तृष्णेचियां सांखला।
खटाटोपु वाहे गलां। व्यापाराचां।।१७२।।
हे रजोगुणाचें दारुण। देहा देहियासीं बंधन।...।।१७३।।

"चंचल मत्स्य पाण्यात जसा झरकन इकडून तिकडे वळावा; किंवा स्त्रीचा नेत्रकटाक्ष जसा चांचल्याची परिसीमाच करतो; तेवढाच तो रजोगुणी पुरुष अति चंचल असतो. नभोमंडलात विजेची थिरकत ज्या वेगाने अन झरकन लवलवते; त्यासही मागे टाकणाऱ्या वेगाने तो काम्यक्रियांच्या मागे लागलेला पुरुष कर्मजंजाळाच्या अग्निकुंडात प्रवेशतो, तो केवळ स्वर्ग व इहलोकातील कामनांची यथेच्छ पूर्ती करता यावी म्हणूनच! रजोगुणाच्या अशा दारुण बंधनापोटी, देहापेक्षा वस्तुतः भिन्न असणारा तो जीवात्मा, तृष्णेची साखळी गळ्यात अडकवून घेऊन, देहव्यापाराचा मोठा खटाटोप उभारून, देहात बंदिवान होतो."

तमोगुणाचा मोहपाश

तृष्णा व आसक्ती यांद्वारे रजोगुण जीवाची पारध कशी करतो, हे स्पष्ट केल्यावर, तमोगुणाचे जीवास मोह पाडण्याचे कपटकारस्थान उघडकीस आणतांना ज्ञानदेव म्हणतातः

........। परिस आतां विंदाण तमाचें तैं।।१४-१७३।।
व्यवहाराचेही डोले। मंद जेणें पडलें।
मोहरात्रीचें कालें। मेहुडे जैं।।१७४।।

"व्यवहार म्हणजे सतत सावधानता, सतत डोळसपणा अन सातत्याने दक्षता! अशा त्या व्यवहाराच्याही डोळ्यांमध्ये दृष्टिमांद्य वा अंधत्व आणणारे पटल म्हणजे ***तमोगुण!*** आषाढाचा कृष्णपक्ष भर यौवनात असावा अन त्याच्या काळ्याकुट्ट रात्री नभ काळ्याशार घनमेघांनी संपूर्ण आक्रमून टाकावे; त्या मेघांनी हत्तीच्या सोंडेएवढ्या

जाड धारांनी सृष्टिमंडल व्यापून सोडावे; सर्वत्र जळमय करून पृथ्वीवर प्रळय करून टाकावा अन प्राण्यांची दैना दैना करुन सोडावी; अगदी तद्वतच सत्त्वरजोगुणांनी ऐन कर्मोर्मीच्या भरात आलेल्या जीवात्म्याच्या मलिन चित्तावर मोहप्रवृत्तिरूपी अपरात्री हा काळाभोर तमोमेघ आक्रमण करून चित्तवृत्तींचा काळोख अधिक गडद करून टाकतो."

अज्ञानाचें जियालें। तेयां एका लागलें।
जेणें विश्व भुललें। नाचत असे।।१४-१७५।।
अविवेकमहामंत्र। जैं मौढ्यमद्याचें पात्र।
हे असो मोहनास्त्र। जीवांसीं जैं।।१७६।।

"त्या तमोमेघातील अज्ञानरूप पावसाच्या मुसळधारांच्या वर्षावाने अखिल विश्व डळमळू लागून जणू प्रळयच होतो. त्या अज्ञानधारांच्या तांडवात जणू विश्वच भुलून नाचू लागते. मोहिनीरूप विष्णूच्या नृत्यांगविक्षेपाने भुलून नाचू लागलेल्या शंभूप्रमाणे तमोगुणाचे मोहनास्त्र मूढतारूपी मद्याचे पात्र जीवात्म्याच्या हाती देऊन, अविवेकरूपी डमरूतून अविचाररूप महामंत्र प्रकटवत, त्याला आपल्या तालावर नाचवू लागते."

पार्था तैं गां तम। रचूनि ऐसें वर्म।
चौखुरीं देहात्म। मानीं यांतें।।१४-१७७।।
हे एकचि कीर शरीरीं। माजो लागें चराचरीं।
आणि तेथ दुसरी गोठी नाही।।१७८।।

"अशी युक्तिप्रयुक्ती रचून, कापट्यकारस्थानाने तो तमोगुण ***देह हाच आत्मा*** असे मानणाऱ्या जीवात्म्यास चौफेर आपल्या पाशात जखडून टाकतो. हा ***तम*** जरी एकटाच शरीरात माज करू लागला तरी समस्त चराचर व्यापून जीवात्म्यास दुसरे काही सुचू देत नाही."

निद्रा, आलस्य व प्रमाद

सर्वेंद्रियां जाड्य। मनामाजीं मौढ्य।
माल्हाती दार्ढ्य। आलस्याचें।।१४-१७९।।
आंगें आंग मोडामोडीं। कार्यजातीं अनावडी।
नुसधी परवडी। जांभयांची।।१८०।।
उघडियाची दिठी। देखणें नाही किरीटी।
नाळवतांचि उठी। वो म्हणौनि।।१८१।।
पडिलियें धोंडीं। नेणें कानीं मुरडी।
तेयांचि परी मुरकुंडी। उकलूं नेणें।।१८२।।

"तो तमोगुण सर्व इंद्रियांठायी जाड्य आणतो; मनास मूढ करतो आणि आळस दृढ करतो. अंगाला आळोखेपिळोखे देववतो. कर्तव्याबद्दल नावड निर्माण करतो. प्राणी जांभयांच्या स्वाधीन होतो. हे अर्जुना! त्याचे डोळे सताड उघडे असूनही तो काही पाहत नाही. कोठेही लक्ष नसल्याने तो कोणी हाक दिली नसतांनाही ***ओ*** देतो. जमिनीवर पडलेला धोंडा जसा त्याच स्थितीत हालचाल न करता पडून राहतो, त्याचप्रमाणे तो हातापायांची मुरकुंडी वळून स्तब्ध पडून राहतो."

पृथ्वी पातालीं जावो। कां आकाशही वरी येवो।
परि उठणें हा भावो। उपजो नेणें।।१४-१८३।।
उचितानुचित आघवें। झांसुरतां नाठवेच जीवें।
जेथींचा तेथ लोलावें। ऐसीं मेधा।।१८४।।
उभऊनि करतलें। पडिघायें कपोलें।
पायाचें शिरियालें। मांडूं लागे।। १८५।।

"पृथ्वी जरी रसातळाला गेली किंवा अंगावर आभाळ कोसळले, तरी आहे तेथून हलण्याचा विचारही त्याच्या मनाला स्पर्श करत नाही. योग्य काय आणि अयोग्य काय हे तो स्मरतही नाही अन जेथे असेल तेथे लोळावे, अशी त्याला बुद्धी असते. आळसामुळे जर लोळता आले नाही, तर तो बसल्याबसल्याच तळहातांनी कानशिले धरून गुडघ्यात मान घालून बसतो."

आणि निद्रेविषयीं चांगु। जीवीं आथी लागु।
झोंपीं जातां स्वर्गु। वावो म्हणें।।१४-१८६।।
ब्रह्मायु होईजे। मग निजलेयाचि असिजे।
हेवांचूनि दुसरे। व्यसन नाही।।१८७।।
वाटा जातां वोघें। कल्हतांही डोलां लागे।
अमृतही परि नेघे। जऱ्हीं नीद आली।।१८८।।

"आणि निद्रा तर त्याला प्राणाहूनही प्रिय असते. तिच्यापुढे स्वर्गसुखालाही तो उणे मानतो. ब्रह्मदेवाइतके आयुष्य मिळावे अन आपण ते झोपून काढावे, ही त्याच्या मनींची आवडती गोष्ट असते. वाटेने चालतांना सहज म्हणून जरी तो लवंडला, तरी त्याचा डोळा लागतो. त्याला झोपाळलेला असता अमृत जरी दिले, तरी तेसुद्धा न घेता तो झोपी जातो."

तेवींचि आक्रोशबलें। व्यापारें कोणें एकें वेलें।
निगालें तऱ्हीं आंधलें। रोषे जैसें।।१४-१८९।।
केधवां कैसें राहाटावें। कोणेंसीं काये बोलावें।
हे ठाकतें कीं नागवें। हेही नेणें।।१९०।।
वणवा मियां आघवां। पांखेंचि पुसोनि घेयावा।
पतंगु या हांवा। घालीं जेवीं।।१९१.।
तैसा वलघे साहसा। अकरणींच धिंवसा।
किंबहुना ऐसा प्रमाद रुचे।।१९२।।

"एखादा आंधळा त्वेषाने काही काम करण्यास जाऊ लागला, तर तो कुठे जाईल अन काय करील, याचा नेम नाही. तसेच तमोगुणामुळे आपण काय करायला हवे, कोणाशी कसे वागावे व बोलावे, हाती घेतलेले कार्य योग्य की अयोग्य, याचा विवेक नाहीसा झालेला तो मनुष्य वाटेल ते करतो, वाटेल तसे वागतो, हवे ते बकतो; अन नको तेच करून बसतो. वणवा आपल्या पंखुड्यांनी साफ पुसून टाकावा या हावेने पतंग जशी अविवेकाने त्यात उडी घालतो, तसाच

तो मनुष्य न करण्यासारख्या कामाकरता अट्टाहास करतो. किंबहुना त्याला असेच प्रमादी साहस करणे रुचते."

एवं निद्रालस्यप्रमादीं। तम इहीं त्रिविधीं।
बांधें निरुपाधी। चोखटातें।।१४-१९३।।

"अशा रीतीने ***निद्रा, आलस्य व प्रमाद*** या तीन पाशात ***तमोगुण*** त्या निरुपाधिक अशा शुद्ध आत्मतत्त्वास बांधून टाकतो. एवं च सत्त्व, रज व तम हे त्रिगुण त्या निरञ्जनास बद्ध करतांना, त्याचा प्रकृतीशी घनिष्ट संबंध स्थापन करतांना अन त्याला देहात्मबुद्धी जडवतांना दिसतात. परंतु हे अर्जुना! ही बद्धता भासात्मक आहे.

जैसा वह्नी काष्ठाकारें भरे। तैं दिसे काष्ठाकारें।
व्योम घटें आवरे। तैं घटाकाश।।१४-१९४।।
नाना सरोवर भरले। तैं चंद्रत्व तेथ बिंबलें।
तैसें गुणाभासीं बांधलें। आत्मत्व गमे।।१९५।।

"ज्याप्रमाणे अग्नीने काष्ठ व्यापले की तो काष्ठाकाराचा दिसतो; किंवा घटाने आवृत झालेले आकाश घटाकाराचे दिसते; भरलेल्या सरोवरी चंद्राचे प्रतिबिंब पडून तेथे चंद्रत्व पाण्याने व्याप्त दिसते; अगदी त्याचप्रमाणे अव्यय आत्मतत्त्व क्षेत्रज्ञरूपाने देहात प्रकटलेले व गुणाभास प्रकाशित करतांना दिसले, तरी ते गुणांनी बद्ध होत नाही."

त्रिगुणांचा आपसातील खेळ

मायातीताच्या अशा या त्रिगुणमय आवरणाचे अधिक विश्लेषण गीता करते, ते असेः

सत्त्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत।।१४-९।।

"हे भारता! सत्त्वगुण सुखासक्ती, रजोगुण कर्मासक्ती, तर तमोगुण ज्ञानाला आवृत करून प्रमादासक्ती उत्पन्न करतात."

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा।।१४-१०।।

"हे अर्जुना! रज आणि तम यांचा निरोध करून सत्त्वगुण बळावतो. सत्त्व आणि तम यांना जिंकून रजोगुण वाढतो. अन सत्त्व आणि रज यांना दाबून तमोगुण उफाळतो."

त्रिगुणांच्या या प्रवृत्ती आणि परस्परसंबंध यांवर प्रकाश पाडतांना ज्ञानदेव म्हणतातः

परि हारूनि कफवात। जैं देहीं आटोपे पित्त।
तैं करी संतप्त। देह जेवीं।।१४-१९६।।
कां वरिष आतप जैसें। जिणोनि शीतचि दिसें।
तेव्हां होय हिंव ऐसें। आकाश हे।।१९७।।
नाना स्वप्न जागृती। लोपूनि ये सुषुप्ति।
तैं क्षणु एक चित्तवृत्ती। तैंचि होये।।१९८।।
तैसीं रजतमें हारवी। जैं सत्त्वु माजु मिरवी।
तैं जीवाकरवीं म्हणवी। सुखिया ना मी।।१९९।।

"कफ आणि वात यांना दाबून जेव्हा देहात पित्तप्रकोप होतो, तेव्हा तो देहाचा जसा क्षोभ करून तापवतो; किंवा उन्हाळा अन पावसाळा यांच्या डोक्यावर जेव्हा हिंवाळा स्वार होतो, तेव्हा आकाश जसे हिमासारखे थंडगार होते; अथवा स्वप्न व जागृती यांचा लोप करून जेव्हा सुषुप्ती येते, तेव्हा केवळ क्षणभरातच जशी चित्तवृत्ती सुषुप्तिमय होऊन जाते; त्याचप्रमाणे रज व तम यांना लोपवून जेव्हा सत्त्वगुण प्रबल होतो, तेव्हा तो जीवाकरवी आपण किती सुखी आहोत, याचा अभिमान वाढवितो."

तैसेंचि सत्त्व रज। लोपूनि तमाचें भोज।
वलघे तैं सहज। प्रमादी होय।।२००।।
तेयांचि गां परिपाठीं। सत्त्वतमातैं पोटीं।
घालूनि जेव्हां उठी। रजोगुण।।२०१।।
तेव्हां कर्मावांचूनि कांहीं। आन सौंदरचि नही।
ऐसें मानीं देहीं। देहराजु।।२०२।।
त्रिगुणवृद्धिनिरूपण। तीं श्लोकीं सांगितलें जाण।..।।२०३।।

"त्याचप्रमाणे सत्त्व व रज यांचा नाश करून तमोबुद्धी वाढते, तेव्हा जीव आपसुकच प्रमादाकडे ओढा करतो. याचप्रकारे सत्त्वतमांना पोटात घालून रजोगुण उफाळून येतो, तेव्हा कर्मासारखे सौंदर्य कशातच नाही, असा त्या देहस्थ आत्मराजाचा निश्चय बळावतो. याप्रमाणे त्रिगुणांची वृद्धी कशी होते, ते या श्लोकांतून मुकुंदाने निरूपिले आहे."

अंतकालाची गती::::

गुणविवृद्धिलक्षणे व अंतकालची स्थिती

श्रीकृष्ण म्हणतातः

....।आतां सत्त्वादिवृद्धिलक्षण। सादर परिसा।।१४-२०३।।

"आतां प्रत्येक गुणाच्या वृद्धीचा परिणाम लक्षपूर्वक ऐक." हा परिणाम गीतेच्या ज्या पंचश्लोकात प्रकट केला आहे, ते असे आहेतः

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन प्रकाश उपजायते।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत।।१४-११।।

"या देहामध्ये सर्व इंद्रियांच्या ठिकाणी जेव्हा प्रकाश म्हणजे आत्मवस्तूचे ज्ञान उत्पन्न होते, तेव्हा सत्त्वगुणाची वृद्धी झाली असल्याचे समजावे."

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ।।१४-१२।।

"लोभ म्हणजे परद्रव्य इ.प्राप्तीची इच्छा वा कमी श्रमात अधिकाधिक लाभ पदरात पाडून घेण्याची कामना, असा लोभ, कर्मारंभ करण्याची इच्छा वा कृती, अशांती, हर्ष व विषयांची अभिलाषा व सर्व काम्य वस्तूंची लालसा ही सर्व लक्षणे जेव्हा रजोगुण वाढतो, तेव्हा, हे भरतश्रेष्ठा ! प्रकटतात."

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन।।१४-१३।।

"अप्रकाश म्हणजे आत्यंतिक अविवेक, अप्रवृत्ती म्हणजे प्रवृत्तीचा अभाव, प्रमाद म्हणजे वाटेल ते गर्ह्य कृत्य करण्याचे साहस आणि मोह म्हणजे अविवेकरूप मूढता, ही सर्व लक्षणे तमोगुणाची वृद्धी झाली असता दिसतात."

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत।
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते।।१४-१४।।

"सत्त्वगुणाची वृद्धी झाली असता त्या देहधाऱ्यास जर मृत्यू आला तर उत्तम तत्त्व वा परमतत्त्व जाणणाऱ्या निर्मल लोकात तो जातो"

रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते।।१४-१५।।

"रजोगुण वाढला असता मृत्यू पावल्यास कर्मासक्त अशा मानुषी योनीत जन्मतो आणि तमोगुण बलवत्तर असता देह ठेवणाऱ्यास पश्वादी मूढ योनीत जन्म घ्यावा लागतो."

उपरोक्त श्लोकाद्वारे त्रिगुणांची प्रकट होणारी लक्षणे अधिक सविस्तर सांगितलेली असून देहपाताच्या वेळी ज्या गुणाची वृद्धी झालेली असते, त्याप्रमाणे जीवात्म्यास कोणती गती प्राप्त होते, तेही सांगितले आहे.

सत्त्वविवृद्धी

सत्त्वाची वृद्धी झाल्यावर काय होते, ते सांगतांना ज्ञानदेव म्हणतात:

पैं रजतमविजयें। सत्त्व गां देहीं इयें।
वाढतां चिह्नें तियें। ऐसीं होती।।१४-२०४।।
जैं प्रज्ञा आंतुलीकडें। न समाती बाहेरी वोसंडें।
वसंतीं पद्मखंडें। दृती जैसीं।।२०५।।
सर्वेंद्रियाचां आंगणीं। विवेक करी राबणी।
सांचचि करचरणीं। होती डोळें।।२०६।।

"हे अर्जुना! जेव्हा रजतमांना जिंकून या देही सत्त्वाचा आविर्भाव होतो, तेव्हा प्रकटणारी लक्षणे ऐक. वसंत ऋतूतील कमलाचा सुगंध जसा त्याच्या पाकळ्यांतून बाहेर पडून आसमंतात भरतो, त्याप्रमाणे सत्त्वधीर पुरुषाची प्रज्ञा त्याच्या अंतरात न सामावून विश्वाकार होऊ पाहते. सर्व इंद्रियांच्या द्वारी विवेक जागृत राहून विषय अन वृत्ती यांचे नियमन करतो. हस्तपादादी अवयव जणू सुनेत्र होऊन काय आचरावे, हे निरखून त्याप्रमाणे वागतात."

राजहंसापुढें। चांचूचें आगरडें।
तोडी जेवीं झगडे। क्षीरनीराचें।।१४-२०७।।
तेवीं दोषादोषविवेकीं। इंद्रियेंचि होती पारखीं।
नियमु बारे पायिकी। वोलगे तैं।।२०८।।
नाइकणें तैं कानचि वाली। न पाहणें तैं दिठीचि गाली।
अवाच्य तैं टालीं। जीभचि गां।।२०९।।
वाती पुढां जैसें। पलो लागे कालवसें।
निषिद्ध इंद्रियां तैसें। समोर नोहे।।२१०।।

"राजहंसाच्या चोचीचे अग्र ज्याप्रमाणे त्याच्या पुढ्यात ठेवलेल्या दूध व पाणी यांच्या मिश्रणातील दूध व पाणी वेगवेगळे करते; त्याप्रमाणे पाप व पुण्य, कृत्य व अकृत्यविवेक त्या पुरुषाची इंद्रिये सक्षमतेने करतात. इंद्रियनियमन आपसुकच होते. जणू नियम त्याची सेवाचाकरी करत असतात. जे ऐकू नये, ते कानच वर्ज्यतात. जे पाहू नये, तिकडे दृष्टीच वळत नाही. जे बोलू नये, त्याचा उच्चार जीभच करण्याचे टाळते. दिव्याच्या वातीसमोरला अंधार जसा आपण होऊन पळून जातो, त्याप्रमाणे निषिद्ध अशा गोष्टी आपण होऊनच इंद्रियांच्या वाटेतून दूर होतात."

धाराधरकालें। महानदी उचंबलें।
तैसीं बुद्धी पघलें। शास्त्रजाती।।१४-२११।।
अगां पुनवेचां दिवशीं। चंद्रप्रभा धांवें आकाशीं।
ज्ञानीं वृत्ती तैसीं। फांके सैंघ।।२१२।।
वासना एकवटे। प्रवृत्ति वोहटे।
मानस विटे। विषयांवरी।।२१३।।
एवं सात्त्विक वाढे। तैं हे चिह्न फुडें।...।।२१४।।

"वर्षा ऋतूत जसा महानदीला पूर येऊन ती पार दुथडी भरून ओसंडून जाते, त्याचप्रमाणे त्या पुरुषाची बुद्धी समस्त शास्त्रादी विषयांत निरंकुश चालते. जसा चंद्रप्रकाश पुनवेच्या रात्री आकाशात सर्वदूर पसरतो, त्याप्रमाणे त्याच्या चित्तवृत्तीचा प्रकाश ज्ञानाकाशात सर्वत्र फैलावतो. संसारासक्तीला ओहटी येते व त्याच्या समस्त एषणा केवळ ब्रह्मवस्तूवर केंद्रित होतात. त्याचे मन विषयांना पार विटते. अशा प्रकारे ***सत्त्वगुणप्रवृद्धी*** होऊन ही चिह्ने प्रकट होतात."

शुद्धसत्त्वगुणात परिणती

अशा त्या सत्त्वगुणाचा **शुद्धसत्त्वगुणा**त परिपोष झालेल्या अवस्थेत जर त्या पुरुषास मृत्यू आला, तर तो उत्तम गती प्राप्त करतो. त्याचे वर्णन पाहा:

....। आणि निधनही पडे। तेव्हांचि जऱ्हीं।।१४-२१४।।
तऱ्हीं जैसीचि घरीचि संपत्ति। आणि तैसीचि उदार्य धैर्यवृत्ती।
मा परत्रा अन कीर्त्ती। कां नोहावें।।२१५।।
कां पाहालेनि सुयाणें। जालयां परगुणें।
पढियंते ये पाहुणें। स्वर्गौनियां।।२१६।।
मग गोमटेयां तेयां। जावली असे धनंजया।
तेवीं सत्त्व जाणें देहा। कें आथी गां।।२१७।।

"सत्त्वगुण विवृद्ध झालेल्या अवस्थेत देह ठेवलेल्या मनुष्याचे भाग्य काय वर्णावे! संपत्तिमान पुरुषाला औदार्य व धैर्य असल्यास त्याची इहलोकात कीर्ती व परलोकी गती का न व्हावी! दान यज्ञयागादी पुण्य अर्जित करण्यासाठी व इह व परत्र त्याद्वारे साधण्यासाठीच नाही का त्यास त्या संपत्तीचा उपयोग होणार! सुबत्ता असतांना मेजवानी

आयोजावी अन त्या वेळी अत्यंत अनपेक्षित असा आवडीचा मनुष्य अवचित उपस्थित व्हावा, तर यजमानाच्या आनंदाला काही पारावार उरेल का! त्याचप्रमाणे सत्त्वगुणाला भरती आली असता मृत्यू पावणाऱ्याच्या भाग्याला काय उणे असणार!"

जैं स्वगुणीं उद्भट। घेऊनि सत्त्व चोखट।
निगे सोडूनि कोपट। भोगक्षम हे।।१४-२१८।।
अवचटें ऐसा जो जाये। तो सत्त्वाचाचि नवा होये।
किंबहुना जन्म लाहे। ज्ञानियांमाजीं।।२१९।।
सांग पां धनुर्धरा। रावो रायपणें डोंगरा।
गेलियां अपुरा। होय काई।।२२०।।
ना तऱ्हीं येथींचा दिवा। नेलियां सेजिया गांवां।
तो तेथ तऱ्हीं पांडवा। दीपचि कीं।।२२१।।
तैसीं तैं सत्त्वशुद्धी। आगली ज्ञानेंसीं वृद्धी।
तरंगावो लागे बुद्धी। विवेकावरी।।२२२।।

"श्रेष्ठ अशा सुलक्षणांनी युक्त असणाऱ्या सत्त्वगुणाचा हात धरून भोगांना माहेरघरच असणारा हा देह टाकून देणाऱ्याला निव्वळ सत्त्वयुक्त असाच नवा देह प्राप्त होतो. किंबहुना ज्ञानवान अशा कुलात तो जन्म घेतो. हे धनुर्धरा! सांग बरे! राजा जरी गिरीकंदरात जाऊन वसला, तरी त्याच्या ऐश्वर्याला काहीतरी उणे येते काय! राजाबरोबर त्याचे समस्त परिजन आणि इतर अधिकारी तेथे वस्तीला जातीलच ना! अथवा या गावातला दिवा दुसऱ्या गावी नेला, तरी तो दीपाचेच गुणधर्म तेथेही नेईलच की नाही! त्रिगुणांच्या मूर्ध्निस्थानी असणाऱ्या व दीपाप्रमाणे प्रकाशक असणाऱ्या सत्त्वगुणाबरोबर निर्मलत्व आणि ज्ञानादी त्या पुरुषासह जाऊन विवेकयुक्त बुद्धीही सोबतीला जाते."

पैं महदादि परिपाटीं। विचारूनि शेंवटी।
विचारासगट पोटीं। जिरौनि जाये।।१४-२२३।।
छत्तीसां सदतिसावें। चोविसां पंचविसावें।
तिन्हीं नुरौनि स्वभावें। चतुर्थ जैं।।२२४।।
ऐसें जैं सर्वोत्तम। जालें असे जेयां सुगम।
तेयांसवें निरुपम। लाहे देह।।२२५।।

"म्हणून तो ज्ञानीयांच्या महत्तम श्रेष्ठ अशा कुलातच पुनर्जन्म पावतो. अथवा महत्तत्त्वादी सृष्टीपलीकडील, जे बुद्धितत्त्वाचाही लय करवते, विचार ज्यात विलीन होतो, छत्तीस तत्त्वांपेक्षा वेगळे जे ***सदतिसावे तत्त्व*** आहे; साङ्ख्यसिद्धांतातील चोवीस तत्त्वांच्या पलीकडील जे ***पंचविसावे तत्त्व*** आहे; त्रिगुणातीत, जागृति-स्वप्न व सुषुप्ति याव्यतिरिक्त ***तुर्या*** जे आहे, किंबहुना जे ***तुर्यातीत*** अशी स्थिती आहे; असे जे सर्वोत्तम आहे, ते ज्यांना सहजच अवगत झाले आहे, अशा महात्म्यांच्या संगात राहण्यासाठी अति निरुपम असा देह प्राप्त करून तो पुरुष त्यांच्या लोकात मोक्ष होईस्तोवर दीर्घ काल वास्तव्य करतो."

"छत्तीसां सदतिसावें" व ***"चोविसां पंचविसावें"*** यांचा समन्वय

अशा रीतीने शुद्धसत्त्वधीर पुरुषाची मृत्यूनंतर अंतिम गती काय होते, ते ज्ञानदेवांनी येथे सांगितले आहे. योगभ्रष्टाची गती सांगतांना भगवंतांनी जे ***"शुचीनां श्रीमतां गेहे..। .....।अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।।६-४१ व ४२।।"*** असे म्हटले होते, ते येथे सहजच ध्यानात ठसते. त्याचप्रमाणे येथे ज्ञानदेव सहजच उल्लेख करतात, तो *गीता श्लोक क्र. १३-५ व ६* यांद्वारे निरूपिलेल्या ***छत्तीस*** तत्त्वाच्या क्षेत्राचा. त्याविरहित जो ***क्षेत्रज्ञ*** म्हणजे ***आत्मा*** आहे, त्यास ते ***सदतिसावे तत्त्व*** म्हणूनही येथे गौरवतात. याच तत्त्वाचा साङ्ख्यांच्या चोवीस तत्त्वांवेगळ्या ***पंचविसाव्या*** तत्त्वाशी जो समन्वयही ते येथे करतात, तो मोठा मनोज्ञ आहे.

यापूर्वीच आपण *साङ्ख्यांची चोवीस तत्त्वे* कोणती ते पाहिले होते. ती प्रकृत्यादी *(महान, अहंकार, पंचतन्मात्रे, मन, बुद्धिंद्रिये-५, कर्मेंद्रिये-५ व पंचमहाभूते व प्रकृति)* ही जी चोवीस तत्त्वे होत, त्यांवेगळे तत्त्व म्हणजे ***पुरुष हे पंचविसावे तत्त्व*** होय. याद्वारे पुनश्च स्पष्ट होते की ज्ञानदेव यालाच ***क्षेत्रज्ञ*** असे समजतात. यापूर्वी आलेला एतद्विषयक भाग जिज्ञासूंनी वाटल्यास पुनश्च अवलोकावा, ही विनंती *(उन्मेषः११-१:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१ व उन्मेषः११-२:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-२;पृ.क्र.२७३ ते ३०६ व इतरत्र).*

रजोगुणोत्कर्ष

असो. इतउपरांत ***रजोगुणोत्कर्ष*** व त्या अवस्थेत देहपात झाल्यास होणारी गती पाहू याः

इयाचि परी देख। तमसत्त्व अधोमुख।
बैसोनि जैं आगलीक। धरी रज।।१४-२२६।।
आपुलियां कार्याचा। धुमाड गांवीं देहाचां।
माजवी तैं चिह्नांचा। उदो ऐसा।।२२७।।
पांजरली वाहुटली। करी वेगल वेंगली।
तैसीं विषयीं सरलीं। इंद्रियां होय।।२२८।।
परदारादिक पडे। परि विरुद्ध ऐसें नावडे।
मग शेलियेचेनि तोंडें। सैंघ चरे।।२२९।।

"जेव्हा तम व सत्त्व गुणांना पराजित करून रजोगुण उत्कर्षास चढतो, तेव्हा तो या देहाच्या क्षेत्रात आपल्या शक्तीने जो धुमाकूळ माजवतो, जी लक्षणे प्रकटवितो, ती ऐक. वावटळ जशी सगळ्या पालापाचोळ्याला एकत्र करते, त्यात चांगल्यावाईट अशा सगळ्या वस्तू जशा एक होतात, त्याप्रमाणे इंद्रिये रजोगुणाच्या प्रबळ वावटळीमुळे बरेवाईट, विधिनिषेध इ.ची तमा न बाळगता सर्व विषयात प्रवृत्त होतात. परस्त्रीसेवनासारख्या गोष्टी करतांनासुद्धा आपण काही निषिद्ध कर्म करतो आहोत, असे त्याला वाटत नाही. शेळी जशी समोर दिसणारा सर्व प्रकारचा पाला,पाचोळा, गवत इ.चरत सुटते, तसा तो रजोगुणी पुरुष वाटेल त्या विषयात प्रवृत्त होतो."

हा ठायवेरी लोभु। करी स्वैरत्वाचा राबु।
वेंटालियां अलाभु। तैं तैं उरे।।१४-२३०।।
आणि आड पडलियां। उद्यमजातां भलतेयां।
प्रवृत्ति धनंजया। हातु न काढी।।३३१।।
तेंवींचि एखादा प्रासादु। कां करावा अश्वमेधु।
ऐसा अचाटु छंदु। घेऊनि उठी।।३३२।।
नगरेंचि रचावी। जलाशयें निर्मावीं।
महावनें लावावीं। नानाविधें।।२३३।।
ऐसैसा अफाटीं कर्मीं। समारंभु उपक्रमीं।
आणि दृष्टादृष्ट कामीं। पुरे न म्हणें।।२३४।।

"त्याच्या अभिलाषेतून केवळ त्याला अप्राप्य तेवढ्या वस्तू अन विषय सोडून इतर काहीच सुटत नाही. समस्त विषयांची मनमुराद रेलचेल व्हावी, यासाठी कोणताही उद्योग करण्यास तो कचरत नाही. त्याचे छंदसुद्धा अचाट असतात. राजवाडा बांधावा, अश्वमेध करावा, नगरे वसवावीत, तलाव बांधावेत, नानाप्रकारची उद्याने व मोठी मोठी वने लावावीत,अशा प्रकारच्या अफाट कर्मांचा तो उपक्रम करत राहतो. आणि इह-परलोकीचे भोग प्राप्त करून घेण्यासाठी तो सर्व प्रकारे धडपडत असतो. त्याच्या हावेला अस्मानही ठेंगणे वाटते."

सागरुही सांडीं पडें। आगी न लाहे तीन कवडे।
ऐसें अभिलाषीं जोडे। दुर्भरत्व।।१४-२३५।।
स्पृहा मना पुढां पुढां। आशेचा घे दवडा।
विश्व घापे चाडा। पायातलीं।।२३६।।
इत्यादि वाढतां रजीं। इयें चिह्नें होती साजीं।...।।२३७।।

"त्याची अभिलाषा एवढी असते की ज्याप्रमाणे सागरात कितीही नद्या, नद रिते केले तरी तो जसा भरून जाणे अशक्य असते, त्यापेक्षाही त्या मनुष्याची वासनापूर्ती करणे अवघड असते. अग्नीला केवढे का इंधन घाला ना, तो तृप्त होणे असंभव आहे. असा तो अग्नीसुद्धा त्या मनुष्याच्या वासनाजाळापुढे कवडीमोलही ठरणार नाही. त्याची विषयतृष्णा मनापेक्षाही अतीव वेगाने आशेच्या मागे धाव घेत असते, अन संपूर्ण विश्वच तिच्या पायांतळी तुडवले जाते, पण ती तृप्त होत नाही. रजोगुण समर्थ झाला की अशी नाना प्रकारची चिह्ने ओळखू येतात."

....। आणि ऐशा समाजीं। वेंचें जऱ्हीं देह।।२३७।।
तऱ्हीं आघवांचि इहीं। परिवारला अन देहीं।
रिगे परि योनी। मानुषीचि।।२३८।।
सुरवाडेंसि भिकारी। वसो पां राजमंदिरीं।
तऱ्हीं काय अवधारीं। रावो होईल।।२३९।।
बैल तेथ करबाडें। हे न चुके गां फुडें।
नेइजो कां वऱ्हाडें। समर्थाचेनि।।२४०।।
म्हणौनि व्यापाराहातीं। उसंतु दिहा ना रातीं।
तैसयांचियें पांती। जुंपिजे तो।।२४१।।
कर्मजडाचां ठायीं। किंबहुना होय देहीं।
जो रजोवृद्धीचां डोहीं। बुडौनि निमे।।२४२।।

"विषय, आशा, तृष्णा, इच्छा, वासना, भोग, लोभ अशांच्या संगतीत जेव्हा त्या रजोगुण्याचा देह पडतो, तेव्हा त्याला जो दुसरा देह प्राप्त होतो, तो मनुष्याचाच असतो. अर्जुना! एखादा भिकारी राजप्रासादात वस्तीला राहिला, तर राजा होत नाही; किंवा श्रीमान मनुष्याच्या लग्नाच्या वऱ्हाडात जरी नेला, तरी बैलाच्या नशिबीचा कडबा काही सुटत नाही. श्रीमंतांच्या पदरचे सर्व लोक उत्तमोत्तम भोजन घेत असले तरी बैलास ते कधीच लाभत नाही. जसे त्या बैलाचे काबाडकष्ट आणि त्या भिकाऱ्याचे जन्मदारिद्र्य जसेच्या तसेच राहातात; त्याप्रमाणेच त्या रजोगुणी मनुष्यास मानवदेही जरी पुनर्जन्म मिळाला, तरी रात्रंदिवस उसंत न मिळू देणाऱ्या व्यापाराला तो जुंपला जातो; किंवा रजोगुणाच्या डोहातच बुडून मरण पावलेला तो मनुष्य अति कर्मठ कुलात जन्म पावतो."

तमोगुणाचे कार्य

सत्त्वगुण्याची गती ***"अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्"*** व रजोगुण्यास वैश्य अथवा कर्मठ कुळी जन्म घ्यावा लागतो, असे सांगून आता तमोगुणलक्षणे व गती सांगतांना ज्ञानदेव म्हणतात:

मग तैसाचि पुढति। रजसत्त्ववृत्ती।
गिळूनि ये उन्नती। तमोगुण।।१४-२४३।।
तैंचि जियें लिंगें। देहींचि सबाह्य सांगें।
तियें परिस चांगें। श्रोत्रबलें।।२४४।।
तऱ्हीं होय ऐसें मन। जैसें रविचंद्रहीन।
रात्रींचें कां गगन। अंवसेचियें।।२४५।।
तैसे अंतर असोस। होय स्फूर्तिहीन उद्वस।
विचाराची भाष। हारपे तैं।।२४६।।
बुद्धि मेंचवेना धोंडीं। हा ठायवेरी मवाले सांडीं।
आठवो देशधडी। जाला दिसे।।२४७।।
अविवेकाचेनि माजें। सबाह्य शरीर गाजे।
एकलेनि घेपें दीजे। मौढ्यें तेथ।।२४८।।

"हे वीरा अर्जुना! आता नीट लक्षपूर्वक ऐक! रज व सत्त्वगुणांना गिळून टाकल्यावर तमोगुण उन्नतीस येतो. त्याची देही अंतर्बाह्य जी लक्षणे प्रकट होतात, ती सांगतो. अमावास्येच्या रात्री आकाश जसे रविचंद्रविहीन निस्तेज होते, तसे त्या तमोगुणी पुरुषाचे मन होते. त्याचे अंत:करण रिक्त होते. स्फूर्ती नाहीशी होऊन तो विचारहीन व उदास होतो. बुद्धीचा बथ्थडपणा इतका वाढतो की तिला धोंड्याची उपमा क्षुल्लक ठरते, इतके बुद्धीचे सूक्ष्मत्व लोपून जडत्व येते. त्याची स्मरणशक्ती जणू देशोधडीला लागते. अविवेक इतका माजतो की तो शरीरास अंतर्बाह्य व्यापून टाकतो. अशा वेळी निव्वळ मूर्खपणाखेरीज त्या पुरुषाच्या अंगी काहीच उरत नाही."

आचारभंगाची हाडे। रुपती इंद्रियांपुढें।
मरे जन्हीं तेणेंकडें। क्रिया जाय।।१४-२४९।।
पाही आणिकही एक दिसे। जैं दुष्कृतीं चित्त उल्हासें।
आंधारीं देखणें जैसें। डुडुळाचें।।२५०।।
तैसे निषिद्धाचेनि नांवें। भलतेंही मरे हांवें।
तिएंविषयीं धांवें। घेती करणें।।२५१।।

पूर्वी गावकुसाबाहेर हाडवळ्यात आजूबाजूला मेलेल्या जनावरांची हाडे पडलेली असत. त्यावरून तो भाग वेगळा दिसत असे. त्याची उपमा देत ज्ञानदेव म्हणतातः "भग्न केलेल्या आचारांची हाडके त्याच्या इंद्रियग्रामी पडलेली असतात व त्यावरून तमोगुण स्पष्ट होतो. असा मनुष्य मरेस्तोवर तमोगुणी कार्ये करतच सुटतो. अजूनही त्या तमोगुण्याचे एक लक्षण आहे. ते म्हणजे घुबडाला जसे अंधारातच दिसते, त्याप्रमाणे त्या मनुष्याचे चित्त केवळ दुष्कर्मेच करणे जाणते. सत्कर्मांचा प्रकाश त्याचे चित्त सहन करू शकत नाही. म्हणूनच कोणतेही निषिद्ध कर्म म्हटले की अनावर लालसेने त्याची इंद्रिये अशा कर्मांकडे धाव घेतात."

"पशु कां पक्षी होये। झाड कां कृमी"

मूर्तिमंत अविवेकाचा पुतळा अन मूर्खपणाचा कळस असा तो तमोगुणी पुरुष असतोः

मदिरा न घेतां डुलें। सन्निपातेंवीण बरलें।
निषेमेंचि भुलें। पिसें जैसें।।१४-२५२।।
चित्त तन्हीं गेले आहे। परि उन्मनी तैं नोहे।
ऐसें माल्हातिजे मोहें। माजिरेनि।।२५३।।
किंबहुना ऐसैसीं। इयें चिह्नें तम पोसीं।
जैं वाढे आयितीशी। आपुलेयां।।२५४।।

"तो तमोगुणी पुरुष मदिरा न घेताच झोकांड्या खातो आणि ज्वर नसतांनाच वाटेल तसे बरळतो. वेड्यापिशा माणसासारखा उगीच कशालाही भुलतो. उन्मत्त करणाऱ्या मोहमदाने त्याला वश केलेले असते. चित्त भ्रष्ट व नष्ट झालेले असले तरी ही उन्मनी अवस्था खासच नव्हे. किंबहुना या पायरीपर्यंत खाली पोहोचलेल्या त्या मनुष्यात व जडादी पाषाणात काहीच फरक नाही. तमोगुण परमोच्च कोटीला पोहोचला की तो अशी ही सारी चिह्ने प्रकट करतो."

आणि हेचि होय प्रसंगें। मरणाचें जन्हीं खागें।
तन्हीं तेतुलेनि रिगे। तमेंसीं तो।।१४-२५५।।
राई राईपण बीजीं। सांठवूनियां आंग त्यजी।
मग विरूढें तैं दुजी। गोठी आहे कां।।२५६।।
पैं होऊनि दीपकलिका। एरु आगी विझो कां।
कां जेथ लागे तेथ असका। तोचि आहे।।२५७।।
म्हणौनि तमाचियें लोथें। बांधौनियां संकल्पातैं।
देह जाय तैं मागुतें। तमाचेंचि होये।।२५८।।

आतां काय येणें बव्हें। जो तमोवृद्धि मृत्यु लाहे।
तो पशु कां पक्षी होये। झाड कां कृमी।।२५९।।

"अन् त्याच अवस्थेत जर तो कालवश झाला, तर ही आयतीच पोसलेली तमोगुणराशी घेऊन परत तेवढ्याच निकृष्ट गुणांच्या योनीत जन्म घेतो. मोहरीचे झुडूप आपले मोहरीपणाचे सगळे गुणधर्म आपल्या बीजात साठवून अंग ठेवते. त्या बीजापासून होणारे झाड जसे मोहरीचेच असते, त्याप्रमाणे; किंवा अग्नी जरी दीपास पेटवल्यावर आपण विझला तरी त्या दीपज्योतीच्या रूपाने जळतच राहतो; तद्वतच तमाच्या मोटेत आपल्या चित्तास वासनांसह बांधणाऱ्याचा हा देह गेला, तरी पुनर्जन्मी तमोगुणी योनीच प्राप्त होतात. जास्त काय सांगू! तमोवृद्धी झाली असता मृत्यू पावणाऱ्यास पश्वादी, पक्षी वा कृमी किंवा वृक्षादी निकृष्ट योनींत जन्म घ्यावा लागतो."

त्रिगुणरहस्याचा सारांश

याप्रकारे त्रिगुणांची लक्षणे सांगोपांग वर्णन केल्यावर त्रिगुणांचे परिणाम, फल व त्यामुळे प्राप्त होणारी मरणोत्तर गती संक्षेपाने गीतेच्या पुढील तीन श्लोकांतून परत सांगितली आहेः

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम्।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम्।।१४-१६।।

"सात्त्विक कर्मांचे सत्त्वप्रधान निर्मल फल प्राप्त होते, तर राजस कर्मांपासून प्राप्त होणारे फल दुःखदायक असते. अज्ञान हे फल तमोगुणप्रधान कर्माचे होय."

सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं रजसो लोभ एव च।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च।।१४-१७।।

"सत्त्वगुणाने ज्ञान होते, रजोगुणाने लोभ वाढतो, तर प्रमाद, मोह तसेच अज्ञान ही तमोगुणजन्य होत."

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः।।१४-१८।।

"सत्त्वधीर पुरुष ***ऊर्ध्व*** म्हणजे स्वर्गादी उत्कृष्ट लोकांप्रति जातात. रजोमयी पुरुष भूलोकात म्हणजे मनुष्ययोनी प्राप्त करतात. तमोगुणाने निंदनीय वृत्तींनी ज्यांना आपले करून घेतले आहे, असे लोक नीच योनींमध्ये म्हणजे पशु-पक्ष्यादींमध्ये जन्म घेतात."

यावर ज्ञानदेव पुनः तीच गोष्ट सकलजनहितार्थ सांगतांतः

येणेचि पैं कारणें। जैं निफजे सत्त्वगुणें।
तैं सुकृत ऐसें म्हणे। श्रौतसमौ।।१४-२६०।।
म्हणौनि तेयां निर्मलां। सुखज्ञानीं सरला।
अपूर्व ये फला। सात्त्विक तैं।।२६१।।
मग राजसा जियां क्रिया। तेयां इंद्रावणी पिकलेयां।
जैं सुख चितारूनियां। फलती दुःखें।।२६२।।
कां निंबोलियेचें पिक। वरी गोड आंत विख।
तैसें तैं राजस देख। क्रियाफल।।२६३।।

तामस कर्म तितुकें। अज्ञानफलचि पिकें।
विषांकुरे विखें। जियांपरी।।२६४।।

"आतापावेतो जे सांगितले, त्यावरून दिसून येते की अपूर्व असे निर्मळ, सुख व ज्ञान देणारे सात्त्विक फल सत्त्वगुणाच्या प्रवृद्धीमुळे प्राप्त होते. श्रुतीसुद्धा असे फल देणारे कृत्य म्हणून सात्त्विक कर्मास ***पुण्य*** वा ***सुकृत*** म्हणून वाखाणतात. कडूलिंब पिकला की लिंबोळ्यांचा सडाच पडतो. त्या बाहेरून सुंदर दिसतात, पण आतून कडूजहर असतात. तसेच इंद्रावणीचे पिके फळ चित्रासारखे सुरेख दिसते. पण त्याच्या बिया दुःखद असतात. राजस क्रियांचे फलसुद्धा दिसतांना आकर्षक वाटत असले तरी अंती कटू असते. विषाच्या अंकुरातही विषच जसे असते, त्याप्रमाणे तामस कर्माचे फल अज्ञानरूपाने भरघोस येते. कारण वस्तुतः तम व अज्ञान ही एकच होत."

म्हणौनि बा अर्जुना। येथ सत्त्वचि हेतु ज्ञाना।
जैसा कां दिनमाना। सूर्यु हा पैं।।१४-२६५।।
आणि तैसेचि हे जाण। लोभासि रज कारण।
आपुलें विस्मरण। अद्वैता जेवीं।।२६६।।
मोह अज्ञान प्रमादा। ययां मैलेयां दोखवृंदा।
पुढती पुढती प्रबुद्धा। तमचि मूल।।२६७।।

"म्हणूनच बा अर्जुना! दिवसाचे कारण सूर्य जसा असतो, त्याचप्रमाणे ज्ञानाचे कारण सत्त्वगुणच आहे. जीवदशा प्राप्त होण्यास अद्वैताचे आपणांस झालेले विस्मरण जसे कारण असते, त्याप्रमाणे लोभ प्रकटण्यास रजोगुणच कारणीभूत असतो.मोह-अज्ञान-प्रमाद या दोषवृंदाचे तम हे मूळ असते, हे तू सुजाणा! ध्यानी ठेव."

ऐसें विचाराचां डोलां। तिन्हीं गुण हे वेगलवेगलां।
दाविले जैसे आंवला। तलहातींचा।।१४-२६८।।
तंव रजतमें दोन्ही। देखिली प्रौढ पतनीं।
सत्त्वावांचूनि नाणी। ज्ञानाकडे।।२६९।।
म्हणोनि सात्त्विका वृत्ति। एक जाले गां जन्मव्रती।
सर्वत्यागें चतुर्थी। भक्ती जैसी।।२७०।।

"करतळावरचा आवळा जसा स्पष्ट दृग्गोचर होतो, त्याप्रमाणे हे प्रज्ञाचक्षू अर्जुना! मी तुला हे तिन्ही गुण वेगळाले स्पष्ट दाखवले आहेत. रज व तम हे असे अधःपतनकारक आहेत आणि एका सत्त्वगुणाखेरीज इतर कोणीच ज्ञानाकडे नेत नाहीत. म्हणूनच काही लोक - ज्ञानी भक्तादी ज्याप्रमाणे इतर भक्तीचा त्याग करतात, त्याप्रमाणे रजतमादी सांडून केवळ सत्त्वगुणाचा आश्रय करण्याचे व्रत जन्मोजन्मी घेतात."

तैसें सत्त्वाचेनि नटनाचें। असणें जाणें जेयांचें।
तै तनुत्यागीं स्वर्गीचें। राय होती।।१४-२७१।।
इयांचि परी रजें। जिहीं कां जीजे मरिजे।
तिहीं मनुष्य होईजे। मृत्युलोकीं।।२७२।।
कां निंबोलियेचें पिक। वरी गोड आंत विख।
तैसें तैं राजस देख। क्रियाफल।।२६३।।

आणि जेयाचि स्थिती तमीं। जैं वाढौनि निमती भोगक्षेमीं।
तैं घेती नरकभूमी। मूलपत्र।।२७४।।

"निखळ सत्त्वगुणच ज्यांच्या देहांतर्यामी खेळत बागडत असतो, ते देहत्यागानंतर स्वर्गाचे राज्य पावतात. याचप्रमाणे जे रजोगुणासाठीच केवळ जगले व मेले, ते मृत्यूनंतर पुनः मर्त्यलोकी मानवजन्म घेतात व तेथील सुखदुःखांचे मिश्र उपभोग एकाच वेळी घेतघेत, पुनः मरून, तेथेच जन्मत राहतात. या जन्ममृत्युरूपी चक्राकार वाटेतून जन्मजन्मांतरीही सुटका होणे अत्यंत दुर्धर आहे. तसेच तमोगुणाचे ज्यांनी ताम्रपत्र लिहून घेतले आहे, ते निव्वळ मोहांधकारात सापडून नरकभूमीचे कायम रहिवासी होतात."

एवं वस्तूचियां सत्ता। त्रिगुणासीं पांडुसुता।
दाविलीं सकारणता। आघवींचि।।१४-२७५।।
पैं वस्तू वस्तुत्वें असिकें। तैं आपणपें गुणासारिखें।
देखौनि कार्यविशेखें। अनुकरें गां।।२७६।।
जैसें कां स्वप्नींचेनि राजें। जैं परचक्र देखिजे।
तैं हारी जैत होईजे। आपणचि।।२७७।।
तैसें मध्योर्ध्वअध। हे जैं गुणवृत्तिभेद।
तैं दृष्टीवांचूनि शुद्ध। वस्तुचि असे।।२७८।।

"आपल्यावर परचक्र आले आहे, असे स्वप्नांतरी राजा होणाऱ्यास भासले, तर त्याची जी हार वा जीत होते, तिच्यामुळे त्याच्या स्थितीत मूलतः काही फरक पडत नाही. त्याचप्रमाणे जी मूळ ब्रह्मवस्तू आहे, ती स्वस्वरूपापासून विचलित झाल्यामुळे गुणविशेषाने वर्ततांना व कर्मे करतांना भासते व तिचे मध्य, ऊर्ध्व व अध हे गुणवृत्तिपर भेद कल्पिले जातात; पण त्यांमुळे तिच्या वस्तुत्वास काहीच बाध येत नाही; त्रिपुटीअवस्थित दृष्टीचा त्याग केला की ती वस्तू मूळ स्वरूपात जशीच्या तशीच अवस्थित राहते."

महासिद्धान्तः:::

ज्ञानदेवांचा सर्वसमन्वायक *महासिद्धांत*

येथपावेतो आपण ***त्रिगुण व त्यांचे भेद, गुणांचे कार्य, गुणपरत्वे मिळणारे फल व अंतिम गती*** इ. माहिती सविस्तर पाहिली. ***"मम माया दुरत्यया"*** असे जे भगवंत म्हणतात, ते त्रिगुणमयी मायेस अनुलक्षूनच हे जाणकारांस माहितीचे आहे. ***माया व मायातीत निरञ्जन*** यांचा भेद याच त्रिगुणांमुळे व्यक्त होतो. मायेचे ***परा*** व ***अपरा प्रकृति*** वा ***माया*** असे जे भेद कल्पिले आहेत, ते या त्रिगुणांच्या साम्यावस्थेस वा अव्यक्तावस्थेस, तसेच या त्रिगुणांच्या क्षोभित अवस्थेस लक्षात घेऊनच आहेत. त्रिगुण क्षोभित असतांनाची ती ***अपरा माया*** व त्यांचा लय झाला असतांनाची ती ***परा माया*** असेही स्थूल मानाने म्हणता येईल.

सर्व तत्त्वज्ञान्यांचे जे विविध मतभेद आहेत, त्यांना मूळ कारण म्हणजे या त्रिगुण व माया, तसेच मायातीत निरञ्जनाच्या परस्परसंबंधाविषयी असणारी विविध सैद्धांतिक बैठक

(Differences in the perception of Reality and the Causal Relationship). आतापावेतो केलेल्या ज्ञानदेवीच्या विवेचनावरून आपणांस दिसून आलेलेच आहे की इतर तत्त्वज्ञान्यांच्या मतांचा परामर्ष घेत असतांनाच ज्ञानदेव त्यांचा झाल्यास समन्वय करतात अन त्याचबरोबर आपला ***चिद्विलासाचा सिद्धांत*** स्पष्ट करत जातात.

एका औपनिषदिक कथेनुसार, वेगवेगळ्या माणसांस एकच सरडा जसा वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या रंगांचा दिसावा, तसा ***जीव, जगत व ईश्वर*** यांचा संबंध, दार्शनिकांच्या दृष्टिकोनातून वा कल्पकतेनुसार, वैविध्याने दृश्यमान होतो. सर्वसमावेशक असे जे काही आहे, त्याच्यात कोणासही जे जे हवे ते ते दिसावे यात नवल ते काय!

त्या अनंताच्या अशा ज्या विविध कक्षा वा मिती आहेत, त्या वास्तविक अभिन्नच असून एकाच बृहताची वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिलेली रूपे आहेत. एकाच पुरुषाचे वर्णन करतांना कोणी तो लांब नाकाचा आहे असे म्हणतील; तर कोणी तो सोनेरी केसांचा आहे, असे म्हणतील; तर कोणी तो उंच आहे म्हणतील; तर कोणी त्याला सशक्त बांध्याचा म्हणतील; कोणी त्याला बुद्धिमान व चतुर म्हणतील; तर कोणी त्याला साक्षेपी म्हणतील. एकाच हत्तीला चाचपडून तो कसा आहे, हे वर्णन करणाऱ्या आंधळ्यांच्या गोष्टीप्रमाणे ही विविध दार्शनिक मते आहेत.

ग्रंथामागील भूमिका या प्रकरणात या सर्व गोष्टींचा उहापोह आपण केलेलाच आहे. तेव्हा विविध दार्शनिकांची मते पाहतांना आपण या विषयाचा अधिक विचार केलेला होताच. तेव्हा योग्य तो खुलासा केलेलाच होता. तूर्त ज्ञानदेवांचा विचार आपण पाहत आहोत. तर अशा प्रकारच्या एकांगी वर्णनापलीकडे न्याहाळणाऱ्या अति प्रज्ञावान, डोळस अशा ज्ञानेश्वरांनी म्हणूनच ज्ञानदेवीचा समारोप करण्यापूर्वी *अठराव्या* अध्यायात म्हटले आहे कीः

आणि प्रसंगें गीता। हा ठावो ही संपतां।
म्हणौनि दावी आद्यंता। एकार्थत्वें।।१८-१२३९।।
जैं ग्रंथाचां मध्यभागीं। नाना अधिकारप्रसंगीं।
निरूपण अनेगीं। सिद्धांती केले।।१८-१२४०
तऱ्हीं तेतुलेंही सिद्धांत। इयें शास्त्रीं प्रस्तुत।
हे पूर्वापर नेणत। कोण्हीं जैं मानी।।१२४१।।
तैं महासिद्धांताचा आंवाका। सिद्धांतकक्षा अनेका।
भिडवूनि आरंभु देखा। संपवितु असे।।१२४२।।

"या ग्रंथांतरी जे विविध दार्शनिक सिद्धांत त्या त्या दार्शनिकांच्या अनुभूतींनुसार निरूपिले आहेत, ते तसेच्या तसेच ज्ञानदेव मान्य करत आहेत, असे जे समजतील त्यांनी या ग्रंथाचा अनुबंध जाणलाच नाही."

महासिद्धांत म्हणजे हे जे ज्ञानदेवांचे ज्ञानेश्वरीद्वारे प्रकटणारे दर्शन आहे, त्याच्या अंतर्गत अनेक दर्शनांच्या बाजू समाविष्ट केलेल्या आहेत. विविध दार्शनिक मतांचा समन्वय व समावेश करणाऱ्या या दार्शनिक सिद्धांतास ज्ञानदेव ***महासिद्धांत*** म्हणून गौरवितात.

ज्ञान व महासिद्धांत

ज्ञानदेवीच्या आरंभापासून ते समारोपापर्यंत हा एकच *महासिद्धांत* प्रतिपादिला आहे. याच ज्ञानदेवांच्या दार्शनिक महासिद्धांतास पंडितवर्य *चिद्विलासवाद* म्हणून ओळखतात. हा जो त्यांचा सिद्धांत आहे, तो अनुभूतीसह जाणून घेणे, या एकमेव साधनास ते *ज्ञान* म्हणतात. *ज्ञान = ज्ञानदेवांचा चिद्विलासाचा महासिद्धांत अनुभूतीसह जाणून घेणे. हेच खरे अपरोक्षज्ञान. अविद्येचा नाश* अन *मोक्षप्राप्ती* ही या ज्ञानमार्गाची फळे आहेत. हाच मार्ग वा हे साधन परत एकदा *क्रमयोग* या नावाने ज्ञानदेवांनी अठराव्या अध्यायी *ज्ञान व योगसाधनेचा सारांश* म्हणून सांगितले आहे.

ज्ञानदेव संपूर्ण ग्रंथातून या साधनाव्यतिरिक्त मुख्य असे इतर काहीही सांगत नाहीत. म्हणूनच ते म्हणतातः

एथ अविद्यानाशु हे स्थल। तेणें मोक्षोपादान हे फल।
या दोन्हीं केवल। साधन ज्ञान।।१८-१२४३।।
हे इतुलेंचि नाना परी। निरूपिलें ग्रंथविस्तारीं।
तैं आतां दोहीं अक्षरीं। अनुवादावे।।१२४४।।

अनुभूत ***ज्ञान*** ही दोन अक्षरे अनुवादण्यासाठी ***ज्ञानेश्वरी*** या अभिनव वाग्विलासिनी शारदेचा आविष्कार ज्ञानदेवांनी ज्या विविध पैलूंतून साकार केलेला आहे; तो आतां आपण **गुणातीत दर्शना**द्वारे अवलोकू. त्यासाठी या *चौदाव्या अध्याया*तील काही शेष भागाकडे आपण पुढील उन्मेषाचे आयोजन केले आहे. तर आता वळू या पुढील ***चतुर्थ स्कंध - उपासनेच्या खाणाखुणा*** यामधील ***उन्मेष क्र. २३- गुणातीतदर्शन*** याकडे त्यासाठी.

तसेच ***तृतीय स्कंध -विश्वव्यापार*** यातील संबंधित उर्वरित विषय आपण नंतर ***पञ्चम स्कंध - जीवाचे स्वरूप*** व ***षष्ठ स्कंध - गीतेचा अनुबंध*** यामध्ये पाहणार आहोत. असो.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::चतुर्थ स्कंध::उपासनेच्या खाणाखुणा::
(उन्मेष २३ते २५) (पृ.क्र.३४४ ते ३८७)

:::चतुर्थ स्कंध:::
::उपासनेच्या खाणाखुणा::

::उन्मेष::२३::
::गुणातीतदर्शन::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २३:
गीताः
१४:१-२९
ज्ञानेश्वरीः
१४:२७९-४१५

:::चतुर्थ स्कंध:::
::उपासनेच्या खाणाखुणा::

::उन्मेष::२३::
::गुणातीतदर्शन::

गुणोत्क्रमण::::

गुणातीतत्व व अमृतप्राप्ती

प्रकृतिस्थ पुरुष हे वस्तुतः असंभवनीय आहे. तरीही आदिसंकल्पाच्या भ्रामक जालाने मोहपाश पडून पुरुष प्रकृतिवश होत्साता दिसतो. प्रकृतीच्या संगाने तो सुख, दुःख, मोह पावतांना दिसतो. ***क्षेत्रज्ञ आत्मा*** त्या संगदोषाने आपण सुखी, दुःखी, मूढ आहोत, असा देहतादात्म्याने निर्माण झालेला भाव अनुभवू लागतो. हा जो संग आहे, तोच त्या पुरुषाला चांगल्या वाईट योनीत जन्म घ्यायला लावतो अन् संसारचक्राच्या प्रवर्तनाचे कारण हा ***प्रकृति-पुरुष***संगच आहे; हे पूर्वी *तेराव्या* अध्यायी स्पष्ट केलेले होते. *(पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान्। कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु।।१३-२१।।).*

त्या अनुषंगाने चौदाव्या अध्यायाच्या ***"सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः।*** *......।।१४-५।।" या श्लोकापासून ते* ***"ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था....*** *।...।।१४-१८।।"* या श्लोकापर्यंत गुणांचे स्वरूप, गुणांचे कार्य, तद्द्वारे गुणांचे बंधकत्व व गुणबंधनातल्या पुरुषाची गती यांचे विस्तारपूर्वक वर्णन केलेले असून ***"आपण प्रकृतीशी अभिन्न आहोत"***, या अविद्यामलाने युक्त झाल्यामुळे जो बंध प्राप्त होतो, त्याचे मूल कारण ***"आपला प्रकृतीशी संग होतो"*** हे अज्ञानच होय, हे सर्व आतापावेतो निरूपण केले. यथार्थ ज्ञानाने मोक्ष प्राप्त होतो; *अज्ञानाने बद्ध झालेला* ***क्षेत्रज्ञ*** *आपले स्वस्वरूप कसे प्राप्त करतो,* हे दर्शवितांना भगवंत म्हणतातः

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति।।१४-१९।।

त्रिगुणांचे समर्पक व सांग वर्णन केल्यानंतर श्रीगोपाल म्हणतातः "ज्यावेळी कार्य, करण *(इंद्रिये)* व विषय यांच्या आकारात परिणत झालेल्या गुणांव्यतिरिक्त अन्य कोणीही येथे कर्ता नाही, हे द्रष्टा पुरुष जाणतो आणि तशी अनुभूती प्राप्त करतो; सर्व अवस्थात गुणच स्थित असून तेच सर्व कर्मांचे कर्ते आहेत व या गुणव्यापारास साक्षिभूत असणारे चैतन्य गुणांपलीकडे आहे हे ओळखतो; तेव्हा तो द्रष्टा ज्ञानी पुरुष गुणातीत असणाऱ्या माझ्या स्वरूपाला पावतो."

अशा प्रकारे गुणातीत झालेल्या पुरुषाला होणाऱ्या ज्ञानाविषयी ज्ञानेश्वर म्हणतातः

परि हे वाहणी असो। तऱ्हीं आन न दिसो।
परिसे तैं सांगतसो। मागील गोठी।।१४-२७९।।
तऱ्हीं ऐसें निजनिजें। सामर्थ्यें तिन्हीं सहजें।
होती देहव्याजें। गुणचि हे।।२८०।।
इंधनाचेनि आकारें। अग्नि जैसा अवतरे।
कां अवगे तरुवरें। भूमिरसु।।२८१।।
नाना दहियाचेनि मिसें। परिणमें दूधचि जैसें।
का मूर्त होये उंसें। गोडी जेवीं।।२८२।।
तैसें हे सांतःकरण। देहचि होति त्रिगुण।
म्हणौनि बंधा कारण। घडे कीर।।२८३।।

"हे असो! विषयप्रवाहाच्या ओघात मी तुला सविस्तर जे काही सांगितले, त्याचे मूळ प्रमेय नीट लक्षात घे! मागे *(तेराव्या अध्यायात)* जो सांगितला होता, तोच हा ***प्रकृति-पुरुष*** व गुणसंगाचा विषय आपण पाहत आहोत. हे त्रिगुणच आपल्या सामर्थ्याने देहरूपाने प्रकट होऊन व्यापारतात. इंधनाच्या आकाराने अग्नीच जसा प्रकट होतो; भूमिरसच जसा मोठ्या मोठ्या तरुवरांच्या रूपाने अवतीर्ण होतो; किंबहुना दह्याच्या रूपे दूधच जसे ते गुणधर्म प्रकट करते; साखरेच्या रूपाने उसाची गोडीच जशी अस्तित्वात येते; त्याचप्रमाणे हे त्रिगुणच अंतःकरणादींसह देहरूपाने प्रकट पावतात. देहबंधास हेच तिघे खरे तर कारण आहेत."

परि चोज हे धनुर्धरा। जैं एवढा गुंफिरा।
मोक्षाचां संसारा। उणा नोहे।।१४-२८४।।
गुण आपुलालेनि धर्मैं। देहींचें माघुत साउभें।
चालितांही न खोमें। गुणातीतता।।२८५।।
ऐसीं मुक्ती असे सहज। तैं आतां परिसऊं तुज।
जैं तूं ज्ञानांबुज-। द्विरेफु कीं।।२८६।।
आणि गुणीं गुणाजोगें। चैतन्य नोहे मागें।
बोलिलो तैं खागें। तेवींचि हे।।२८७।।

"तरीसुद्धा हे अर्जुना! आश्चर्य म्हणजे जीवात्म्यास संसारपाशात बद्ध करण्यासाठी इतकी गुंतागुंतीची रचना असली, तरी आत्म्याच्या मुक्तावस्थेस काहीच उणेपण येत नाही. गुण असे आपापल्या धर्माप्रमाणे देहांतर्यामी व जगतात वर्तत असतांनाही आत्म्याची गुणातीतता जशीच्या तशीच राहते. ही जी सहजावस्था वा आत्म्याची मुक्तावस्था, तिचे तुझ्यासारख्या ज्ञानकमलाच्या भोक्त्या अशा चिद्भ्रमरास आता कथन करतो. चैतन्यांश गुणाधारे गुणांच्या स्वभावानुरूप वर्ततांना दिसत असला तरी तो गुणांनी लिप्त होत नाही, हे तुला *(तिसऱ्या व तेराव्या अध्यायप्रसंगी)* सांगितले होतेच."

स्वस्वरूपाची ओळख

तऱ्हीं पार्था जैं ऐसें। बोधलेनि जीवें दिसें।
स्वप्न कां जैसें। चेईलेनि।।१४-२८८।।

ना तऱ्हीं आपण जळीं। बिंबलो तीरोनि न्याहाली।
चलण होतां कल्लोळीं। अनेकधां।।२८९।।
कां नटलेनि लाघवें। नटु जैसा न झंकवें।
तैसे गुणजात देखावें। न होनियां।।१९०।।
पैं ऋतुत्रय आकाशें। धरूनियांही जैसें।
नेदिजेचि येवों वोसें। वेगलेपण।।२९१।।

"जागृत झाल्यावर स्वप्न मिथ्या होते, हे जसे उमजते; त्याप्रमाणे बोध प्राप्त झाल्यावर गुणव्यापारांचे मिथ्यात्व आत्मदृष्टीने पाहणाऱ्यास जाणवते. जलाशयाच्या काठावर बसलेल्यास लाटांमुळे आपलेच प्रतिबिंब अनेकधा होतांना दिसते. वेगवेगळ्या भूमिका पार पाडतांना नटाला स्वतःचा विसर पडत नाही. तिन्ही ऋतुकाली भिन्नत्व प्रकटवणारे आकाश आपले स्वत्व हरवून बसत नाही."

तैसें गुणीं गुणापरौतें। जैं आपणपें असे आयितें।
तियें अहं बैसे अहंतें। मूलकेचिया।।१४-२९२।।
तैं तेथूनि मग पाहतां। म्हणे साक्षी मी अकर्ता।
हे गुणचि क्रियाजातां। नियोजना।।२९३।।

"त्याचप्रमाणे हे आघवे गुणत्रय आत्मस्वरूपासाठी होत. हे पार्था! त्रिगुणांच्या पसाऱ्यात जे आत्मतत्त्व विराजमान झालेले आहे, त्याचा बोध जीवात्मा जेव्हा आपल्या मूलस्वरूपास ओळखतो, तेव्हा त्यास होतो. आत्मस्वरूपास पावलेल्या जीवात्म्यास ***"आपण साक्षी आहोत, अकर्ते आहोत व सर्व कर्मजातांना हे गुणच कारण आहेत"***, हे स्पष्ट दिसते."

सत्त्वरजतमांचा। भेदीं पसरु कर्माचा।
होत असे तो गुणांचा। विकारु हा।।१४-२९४।।
ययामाजीं मी ऐसा। वनीं कां वसंतु जैसा।
वनलक्ष्मी विलासा। हेतुभूत।।२९५।।
कां तारांगणीं लोपावें। सूर्यकांतीं उद्दीपावें।
कमलीं विकासावें। जावें तमें।।२९६।।
ये कोणाची काजीं कहीं। सविता जैसा नाही।
तैसा अकर्ता मी देहीं। सत्तारूप।।२९७।।

"हे धनंजया! सत्त्व, रज व तमोगुणाच्या प्रभावाने हा जो विश्वरूप विकरलेला मी दिसतो, त्याच्यात मी कसा आहे हे विचारशील तर पहाः वसंतऋतू जसा वनलक्ष्मीच्या विलासाला, वनराजीच्या शोभायमान दिमाखाला कारण असतो; तो जसा काहीच करत नाही, तर त्याच्या केवळ असण्याने वने बहरून जातात; दिनमणीच्या उगवण्याने जसे तारांगण लोपते, कमले विकसतात व अंधार नाहीसा होतो, तेव्हा सूर्य जसा त्यात नसतो, तर तो केवळ निमित्तमात्र असतो; त्याचप्रमाणे या देहजातांच्या ठिकाणी मी अकर्ता असून केवळ अधिष्ठानस्वरूप आहे."

मी दाऊनि गुण देखें। गुणता हे मियां पोखें।
ययाचेनि निःशेखें। उरे तैं मी।।१४-२९८।।
ऐसेनि विवेकें जेयां। उदो होय धनंजया।
ये गुणातीतत्व तेयां। ऊर्धपंथे।।२९९।।

"हे गुण माझ्याच प्रकाशाने प्रकाशतात; त्यांचा पसारा पाहणारा मीच आहे; गुणांच्या वृद्धीस मी त्या वसंताप्रमाणे, त्या सूर्याप्रमाणेच कारणीभूत आहे आणि मी या गुणांच्यापलीकडील तत्त्व आहे; असा विवेक ज्याच्याठायी उदित होतो, त्याला तत्काळ गुणातीतता प्राप्त होते."

जीवन्मुक्तावस्था

भगवंत म्हणतातः

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान्।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते।।१४-२०।।

"माझ्या भावाला प्राप्त होणारा तो महाभाग, तो ज्ञानी पुरुष, देहोत्पत्तीस कारणीभूत असलेल्या मायोपाधिक अशा त्या त्रिगुणांस उल्लंघून, जिवितावस्थेतच त्यांचा अतिक्रम करून, देहधारी असूनही जन्म,मृत्यू, जरा, दुःख, व्याधी इ.पासून विमुक्त होऊन जीवन्मुक्तावस्थेचा अमृतानुभव उपभोगतो."

अशा त्या जीवन्मुक्ताचे वर्णन ज्ञानदेव पुढील ओव्यातून कसे करतात, ते पाहू याः

आतां निर्गुण असे आणिक। तैं तो जाणें अचुक।
जैं ज्ञानें केली टीक। तेयाचिवरी।।१४-३००।।
किंबहुना पांडुसुता। ऐसा तो माझी सत्ता।
पावे जैसी सरिता। सिंधुत्व गां।।३०१।।
नलिकेवरूनि उठिला। जैसा शुक शाखे बैसला।
तैसा मूल अहंतें वेढिला। तो म्हणौनियां।।३०२।।
अगां अज्ञानाचियां निदा। जो घोरत होता बदबदा।
तो स्वस्वरूपी प्रबुद्धा। चेईला कीं।।३०३।।

"त्रिगुणातीत असे जे निर्गुण, त्यास तो जीवन्मुक्त अचूक जाणतो; जसा काही ज्ञानाने त्यास मंगलतिलक लावला असावा. अर्जुना! नदी जशी सिंधुत्व पावते, तसाच मला प्राप्त होऊन त्याला मद्भावच प्राप्त होतो. शुकनलिकान्यायातल्या शुकास अकस्मात नलिकेस सोडून द्यावेसे वाटले, तर तो जसा उडून झाडाच्या फांदीवर म्हणजे स्वतःच्या स्थानी जाऊन बसतो; त्याप्रमाणे ***देहअहंता*** सोडल्याबरोबरच तो महान पुरुष स्वरूपाधिष्ठित होतो. अज्ञानाच्या निद्रेने ग्रासून जो जगद्भ्रमाचे घोरणे घोरत होता, तो एकदाचा स्वरूपज्ञानाने जागा झाल्यावर ज्ञानाशिवाय दुसरे काय अनुभवणार!"

पैं बुद्धिभेदाचां आरिसा। तेयां हातौनि पडिला वीरेशा।
म्हणौनि प्रतिमुखाभासा। मुकला तो।।१४-३०४।।
देहाभिमानाचा वारा। आतां वाजो ठेला वीरा।
तैं ऐक्य वीचिसागरां। जीवेशां हे।।३०५।।
म्हणौनि मद्भावेंसीं। प्राप्ति पाविजे तेणेंसरिसीं।
वर्षांतीं आकाशीं। घनजात जेवीं।।३०६।।
तेवीं मी होऊनि निरुता। मग देहींचि ये असतां।
नागवे देहसंभूतां। गुणांसीं तो।।३०७।।

"जगद्रूपी आरशात त्रिगुणरूपी मायेच्या कवडशात स्वतःचे प्रतिबिंब पाहत असतांना त्याच्या हातून तो आरसा निसटून पडला

अन् म्हणून स्वत्वाचा केवळ आभास असणारे असे त्याचे प्रतिबिंब त्याला दिसेनासे झाले! वारावादळ वाहणे थांबले की लाटांचे समुद्राशी जसे ऐक्य होते, त्याप्रमाणे देहाहंकाराचे वादळ शमल्याने त्या जिवाचे ईशाशी ऐक्य झाले! पर्जन्यऋतू संपला की जलदांचे जसे नभाशी ऐक्य होते, तद्वतच त्या पुरुषाचे मजशी ऐक्य होते. अशा प्रकारे मद्भावास प्राप्त झाल्यावर याच देही असतांनासुद्धा देहधारणेस बीजभूत असणाऱ्या त्रिगुणांचे तो अतिक्रमण करून जातो."

जैसा भिंगाचेनि घरें। दीपप्रकाशु नावरे।
कां न विझेंचि सागरें। वडवानलु।।१४-३०८।।
तैसा आला गेला गुणांचा। बोध न मैले तेयाचां।
तो देहीं जैसा व्योमींचा। चंद्र जलीं।।३०९।।
तिन्हीं गुण आपुलालियां प्रौढी। देहीं नाचविती बागडीं।
तो पाहोंही न धाडी। अहंतेतें।।३१०।।
हा ठायेवरी। नेहटोनि ठेला अंतरीं।
आतां काय वर्ते शरीरीं। कांहीं नेणें।।३११।।

"जसा काचेच्या हंडीत ठेवला तरी दिव्याचा प्रकाश आवरला जात नाही; किंवा वडवानलाच्या ज्वाळा सागरापोटी त्याला ठेवूनही विझत नाहीत; त्याचप्रमाणे गुणांच्या आत वावरूनही, त्या पुरुषास जो बोध प्राप्त झालेला असतो, त्याला किंचितही मालिन्य येत नाही. नभांगणातल्या चंद्राला जशी आपल्या जलात पडलेल्या प्रतिबिंबाची वार्तासुद्धा नसते, त्याचप्रमाणे त्याला आपल्या देहस्थितीचे भान नसते. तिन्ही गुण आपापल्यापरीने त्याच्या देहांतरी नाचतबागडत असतात, पण तो त्यांना आपले म्हणण्याइतकेसुद्धा जवळ करत नाही. त्रिगुणमयी मायेचा एवढा त्याने निरास केलेला असल्याने स्वतःच्या देहांतरी चाललेल्या व्यापाराबाबत तो पूर्णतया अजाण असतो."

सांडौनि आंगाची खोली। सर्प रिगालियां पातालीं।
तैं त्वचा कोण सांभाली। तैसें जाले।।१४-३१२।।
कां सौरभ्यजीर्णु जैसा। आमोदु मिलौनि जाय आकाशा।
माघारा कमलकोशा। न येचि तो।।३१३।।
पैं स्वरूपसमरसें। तेयांही गां जालें तैसें।
तेथ किंधर्म हे कैसें। नेणें देह।।३१४।।

"अंगावरची कात टाकून विवरात प्रवेशलेला सर्प जसा आपल्या काचोळीची वास्तपुस्त चुकूनही करत नाही; तसेच तो पुरुष देहेंद्रियविषयादी समस्त बाह्य देहसंघाताचा तत्त्वतः त्याग करून आत्मदहरात प्रवेशल्यानंतर देहादींबाबत पूर्णतया बेफिकीर होतो. पूर्ण उमललेल्या कमलातील सुगंध एकदा आसमंतात भरल्यावर पुनः जसा कमलकोशातल्या स्वस्थानी परतत नाही; त्याचप्रमाणे विदेही झालेल्या त्या पुरुषाचा आत्मा स्वस्वरूपी समरस होऊन गेल्यावर पुनश्च देहादिसंघातात स्थित होत नाही; मग देह व त्याचे धर्म इ.ना तो कसे ओळखेल!"

म्हणोनि जन्मजरामरण। इत्यादि जैं साही गुण।
तैं देहींचि ठेलें कारण। नाही तेयां।।१४-३१५।।
घटाचियां खापरियां। घटभंगीं फेडिलियां।
महदाकाश आपैसेयां। जालेंचि असे।।३१६।।
तैसीं देहबुद्धि जाये। जैं आपणपां आठौ होये।
तैं आन कांही आहे। तैं वांचूनि।।३१७।।
येणें थोर बोधलेपणें। तेयासीं गां देहीं असणें।
म्हणौनि तो मी म्हणें। गुणातीतु।।३१८।।

"म्हणून त्या ज्ञानी पुरुषाला विकारी देहाशी काहीच कर्तव्य नसते. जन्म, अस्तित्व, वर्धन, विपरिणाम, अपक्षय *(वार्धक्य)* व विनाश या देहाच्या सहाही विकारांशी त्याला काहीच प्रयोजन उरत नाही. घट भंगल्यावर त्याच्या ठिकऱ्या इतस्ततः पसरून घटाकाश जसे आपैसेच महदाकाश होते, तसेच देहबुद्धीचा नाश झाल्यावर त्याचा अहंकार स्वस्वरूपात आपोआपच परिणत होतो; कारण मग इतर दुसरे उरतेच काय! असा महत्तम बोध बाळगून तो देहात असतो असे म्हणायचे झाले! म्हणूनच मी त्याला ***गुणातीत*** असे म्हणतो."

गुणातीतलक्षणे::::

गुणातीतास कसे ओळखावे

यया देवाचियां बोलां। पार्थु अति सुखावला।
मेघें संबोखिला। मोरु जैसा।।१४-३१९।।

"मेघगर्जनेची साद ऐकून मोर जसा सुखाच्या ऊर्मीने अतीव संतोषतो, तसेच श्रीकृष्णांचे हे बोल ऐकणाऱ्या पार्थाचे झाले." त्यातून तो थोडासा भानावर जेव्हा आला तेव्हा देवांना विचारू लागलाः

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो।
किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते।।१४-२१।।

"हे प्रभो! जिवंतपणीच गुणांना उल्लंघून अमृतत्व प्राप्त करून घेणारा तो पुरुष कोणत्या लक्षणांनी युक्त असतो; त्याचे आचरण कसे असते; त्रिगुणांपलीकडे त्याला कसे जाता येते; ते सांगा."

अर्जुनाच्या या प्रश्नांपैकी गुणातीत पुरुषाची लक्षणे व आचरण यांचे वर्णन करतांना, त्याचे प्रश्न व त्यांची उत्तरे मांडतांना ज्ञानदेव काय म्हणतात, ते पाहू याः

तेणें तोषें वीर पुसे। जी कोण्हीं चिह्नीं तो दिसे।
जेयामाजीं वसे। ऐसा बोधु।।१४-३२०।।
तो निर्गुण काय आचरे। कैसेनि गुण निस्तरे।
हे सांगिजो माहेरें। कृपेचेनि।।३२१।।
तेयां अर्जुनाचियां प्रश्ना। तो षड्गुणांचा राणा।
परिहारु आकर्णा। बोलतु असे।।३२२।।
म्हणे पार्था तुझी नवाई। हे येतुलेंचि पुससीं काईं।
तैं नामचि तेयां पाही। सांचें लटिकें।।३२३।।
गुणातीत जेयां नांवें। तो गुणाधीन तऱ्हीं नोहे।
ना होय तऱ्हीं नागवे। गुणां ययां।।३२४।।

श्रीकृष्णांच्या बोलण्याने सुखावलेला तो वीर विचारतोः "हे प्रभो! हा एवढा महान बोध वागविणाऱ्या त्या पुरुषाची प्रकट लक्षणे कोणती; तो गुणातीत कसा वर्ततो; तो गुणांचा निरास कसा करतो; ते, हे कृपासिंधु! मला सांगा."

अर्जुनाच्या या प्रश्नावर तो षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर म्हणालाः "ऐक! पूर्ण अवधान दे! पार्था! तुझे प्रश्न नवलाचे असतात. तू हे

असे काय विचारतोस! त्या पुरुषाचे ***गुणातीत*** हे वर्णनच खरे तर व्यर्थ होय! कारण गुण हे मिथ्या असल्याने गुणातीत हे तत्सापेक्ष वर्णन सर्वथा गैरच ठरते. तसेच जो एकदा गुणातीत ठरला, तो गुणांच्या अधीन नसणार हेही निश्चितच आहे. जर तो गुणांच्या अधीन असता, तर त्याला गुणातीत असे कसे म्हणता येईल! असो!"

परि अधीन कां नागवें। हेचि कैसेनि जाणावें।
गुणांचिये ऊखरेवें-। माजीं असतां।।१४-३२५।।
हा संदेह जऱ्ही वाहसिं। तऱ्हीं सुखें पुसों लाहसीं।
परिस आतां तेयासीं। रूप करूं।।३२६।।

"परंतु तुला कदाचित असे विचारायचे असेल की गुणांच्या रेताडीत वावरत असणाऱ्या पुरुषास तो गुणातीत आहे की गुणाधीन आहे, हे कसे ओळखावे. तर तुझा हा संदेह फेडून घेण्याच्या इच्छेनेच तू हे प्रश्न विचारले असतील, तर तुला त्या गुणातीताची तशी खूण सांगतो. ती ऐक!"

गुणातीताचे वर्णन

गीता *श्लोक क्र. १४-२२ ते २५* मध्ये भगवंत याचे उत्तर देतात, ते असे:

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव।
न द्वेष्टि सम्प्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति।।१४-२२।।

"सत्त्वगुणाचे कार्य प्रकाश, रजोगुणाचे कार्य प्रवृत्ति व तमोगुणाचे कार्य मोह ही जेव्हा प्राप्त होतात, तेव्हा तो पुरुष त्यांचा द्वेष करत नाही; तसेच आपापला भाव प्रकट केल्यानंतर हे त्रिगुण जेव्हा निवृत्त होतात, तेव्हा त्यांच्या प्रकटीकरणाची तो आकांक्षा करत नाही."

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते।
गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते।।१४-२३।।

"कार्य, करण व विषयाकार झालेले गुणच आपापसात वर्तत आहेत, हे उमजलेला तो पुरुष उदासीन होत्साता त्यांच्या परिणामात न पडता, आपल्या गुणातीत अवस्थेत स्थित असतो आणि गुणांच्या प्रभावाने आत्मस्वरूपापासून विचलित होत नाही."

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः।।१४-२४।।

"त्याला सुखे व दुःखे समान असतात. आत्मस्वरूपी स्थिरावलेल्या त्या पुरुषास माती, दगड व सोने ही सारख्याच किंमतीची असतात. तो प्रिय व अप्रिय दोघांसही समानच मानतो. त्या बुद्धिवान धीर पुरुषास निंदा व स्तुती ही सारखीच वाटतात."

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः
सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते।।१४-२५।।

"त्याला मान व अपमान ही समान वाटतात. दोन्ही प्राप्त झाली असता, तो निर्विकार असतो. मित्र पक्ष व शत्रू पक्ष यांच्याकडे तुल्य दृष्टीने पाहणारा असतो. दृष्टादृष्ट फलांसाठी करावयाच्या कर्मांचा त्याने त्याग केलेला असतो. केवल शरीरधारणेसाठी लागणारी कर्मेच तो करत असतो. अशा लक्षणांनी युक्त असणाऱ्यास ***गुणातीत*** असे म्हणतात."

सदा स्वरूपी अवस्थान

या समस्त गीतोक्त लक्षणांचे व त्या गुणातीताच्या आचरणाचे वर्णन ज्ञानदेव असे करतातः

तऱ्हीं रजाचेनि माजें। देहीं कर्माचें अणोजें।
प्रवृत्ति जैं घेईजे। वेंटाळूनि।।१४-३२७।।
तैं मीचि कां कर्मठ। ऐसा ना ये श्रीमाठ।
दरिद्रलिये बुद्धि वीट। तोही नाही।।३२८।।
अथाव सत्त्वेंचि अधिकें। जैं सर्वेंद्रियीं ज्ञान फांके।
तैं सुविद्यता तोखें। उमजेही ना।।३२९।।
कां वाढिलेनि तमें। ना गिळिजेचि मोहभ्रमें।
तैं अज्ञानत्वें श्रमे। घेणेही नाही।।३३०।।
पै मोहाचां अवसरीं। ज्ञानाची चाड न धरी।
ज्ञाने कर्में नादरी। होतां न दुःखी।।३३१।।

"रजोगुणाच्या उत्कर्षामुळे त्याच्या देहाकडून कर्मकांडे होऊ लागली व काम्याकाम्य कर्मांनी त्याचे चित्त व्यापले, तरी त्याला त्या कर्मठपणाचा अभिमान स्पर्शत नाही अन रजोगुणाचा अपकर्ष झालेला असता कर्माबद्दल जी अनासक्ती उत्पन्न होते, तिच्यामुळे त्याला वीटही येत नाही. सत्त्वगुणाच्या आधिक्यामुळे त्याच्या सर्वेंद्रियांकडून जरी ज्ञान प्रकाशले, तरी आपण विद्यावान आहोत, असा तो तुष्ट होत नाहीच; पण तमोगुणाच्या प्राबल्याने जरी त्याला मोहभ्रमादींनी ग्रासले, तरी त्या अज्ञानवशतेचे दुःख त्याला श्रांत करत नाही. मोहिन्नल्या अवस्थेत आपण ज्ञानापासून दूर झालो आहोत, अशी खंती तो करत नाही; तसेच ज्ञानस्थितीत कर्मे करता येत नसली तरी त्यास विषाद वाटत नाही."

सायंप्रतर्मध्याह्ना। या तिन्ही कालांची गणना।
नाही जेवीं तपना। तैसा असे।।१४-३३२।।
तेयां वेगलाचि प्रकाशें। ज्ञानित्व यावें असे।
काय जलार्णव पाउसें। साजा होये।।३३३।।

"सूर्यास जशी सायं-प्रातः व मध्याह्न या तिन्ही काळांची गणती नसते; तशीच सत्त्व-रज-तम या त्रिगुणांच्या द्वारे देहस्थिती व अंतर्याम उजळले वा झाकोळले, तरी त्याला त्या स्थितींची खिजगणती नसते. सांग! काय पाऊस पडल्यानेच समुद्र भरतो का! अन् एरवी काय तो रिक्त असतो! सत्त्वाच्या प्रकाशानेच काय त्या ज्ञान्याठायी ज्ञान उत्पन्न होणार असते आणि एरवी काय त्याच्याठायी ज्ञानदीप्ती नसते!"

ना प्रवर्त्तलेनि कर्में। कर्मठत्व तेयां कां गमे।
सांगें हिमवंतु हिमें। कांपे कायि।।१४-३३४।।
ना तऱ्हीं मोह आलियां। काईं पां ज्ञान मुकिजैल तेयां।
महाआगीतैं उन्हालेयां। जालवत असे।।३३५।।

"हिमाचलास काय बर्फाने थंडीची हुडहुडी भरते, तर त्या ज्ञान्यास त्याची कर्मांठायी प्रवृत्ती झाली तर त्या कर्मफलांची बाधा होईल! प्रखर उन्हाळा महाअग्नीला जाळतो की काय, तर त्या पुरुषाचे मोहग्रस्ततेमुळे ज्ञान लोपेल!"

गुणांच्या चलनवलन व स्फुरणामुळे त्या महापुरुषाची ***स्वरूपस्थिती*** काही ढळत नाही. म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात:

गुणाच्या वावटळीतही स्थिरता

तैसें गुणागुणकार्य हे। आघवेंचि आपण आहे।
म्हणौनि एकेका नोहे। तडातोडी।।१४-३३६।।
एवढेयां गां प्रतीती। तो देहां आलासे वसती।
वाटे जातां गुंती-। माजीं जैसा।।३३७।।
तो जिणता ना हारवी। तैसा गुण नव्हे ना करवी।
जैसीं कां श्रोणवी। संग्रामींची।।३३८।।

"देहेंद्रियसंघाताचे जगद्व्यापार हे अवघे केवळ त्रिगुणांचे कार्य आहे, आपण प्रारब्धवशात केवळ या देहात वसती केलेली आहे; अन् वाटेचा वाटसरू जसा मिळेल तेथे विश्राम करतो, तसे आपले या देही असणे आहे, हे तो जाणून असतो. म्हणून गुणांच्या उत्कर्ष वा अपकर्षाने त्याच्या चित्तात खळबळ माजत नाही. रणभूमी जशी कोणीही हरले किंवा जिंकले असता त्याविषयी उदासीन असते, तद्वतच तो गुणांनी जिंकला गेला वा गुण हरले, तर त्याबाबत उदासीन असतो."

कां शरीराआंतील प्राणु। घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु।
नाना चोहटाचा स्थाणु। उदासु जैसा।।१४-३३९।।
आणि गुणाचा यावाजावा। ढळे चले ना पांडवा।
मृगजलाचा हेलावा। मेरु जैसा।।३४०।।
हे बहुत काय बोलिजे। व्योम वारेनि न वचिजे।
कां सूर्यु ना गिळिजे। अंधकारें।।३४१।।
स्वप्न कां गां जियापरी। जागयातें न सिंतरी।
गुणीं तैसा अवधारीं। न बंधिजे तो।।३४२।।

"शरीराबाबत प्राण जसा निर्विकार असतो; अतिथी जसा यजमानाच्या घराबाबत लोभ ठेवत नाही किंवा चव्हाट्यावरील स्तंभ जसा रस्त्याने येणाऱ्याजाणाऱ्यांबद्दल उदास असतो; तसा तो धीर पुरुष गुणांच्या येण्याजाण्याविषयी उदास असतो. मेरु जसा मृगजळाच्या हेलकावण्याने चलायमान होत नाही; तसाच तो स्थिर बुद्धीचा पुरुष गुणांच्या खळबळीने दोलायमान होत नाही. फार काय सांगू! आकाश जसे वायूने हालत नाही; अंधार जसा सूर्याला गिळू शकत नाही; किंवा स्वप्न जसे जागृत मनुष्याला भ्रमात पाडू शकत नाही; तसाच तो गुणांनी वेष्टिला जात नाही."

विश्वव्यापाराचे *साक्षित्व*

गुणां कीर नातुडे। परि दुरूनि जैं पाहे कोडें।
तैं गुणदोष सायिखडे। सभ्यु जैसा।।१४-३४३।।
सत्कर्मे सात्त्विकीं। रज तैं रजोविषयकीं।
तम मोहादिकीं। वर्तत असे।।३४४।।
परिस तेयांचियां गां सत्ता। होती गुणक्रिया समस्तां।
हे फुडें जाणें सविता। लौकिकां जेवीं।।३४५।।

"सत्कर्मे सात्त्विक प्रभावाने, रजोदोषपूर्ण कर्मे रजोगुणाने व मोहादी प्रवृत्ती तमोदोषाने होतांना त्या पुरुषास दिसतात; तो त्या गुणांच्या बंधनात सापडत नाही. एखादा सद्गृहस्थ जेवढ्या निर्लिप्तपणे कठपुतळीचा खेळ पाहील, तेवढ्याच निर्लिप्तपणे तो महाभाग गुणांचा हा जगत्पटावरील खेळ साक्षिरूपाने अवलोकितो. गुणातीत पुरुष आत्मवत असतो. लौकिक व्यापार जसे सूर्याच्या आधाराने चालतात, तशाच आत्म्याच्या अधिष्ठानावर ज्या गुणांच्या क्रिया चालतात, त्या गुणातीताच्याच सत्तेने चालतात म्हणेनास!"

समुद्रचि भरती। सोमकांतचि पाझरती।
कुमुदें विकसती। चंद्रु तो उगा।।१४-३४६।।
कां वाराचि वाजे विझे। गगनें निश्चल असिजे।
तैसा गुणाचिये गजबजे। डोलेना जो।।३४७।।
अर्जुना एणें लक्षणें। तो गुणातीतु जाणणें।...।।३४८।।

"चंद्राच्या केवळ असण्यानेच जशा समुद्रास भरती येणे; सोमकांत मणी पाझरणे वा चंद्रकमले विकसित होणे या गोष्टी घडतात; तसेच त्या गुणातीत पुरुषाच्या सहभागावाचून पण त्याच्या अस्तित्वावर सर्व गुणजात अवलंबून असतात. वायू वाहिला अथवा स्तब्ध राहिला, तरी गगन आपली निश्चलता अभंग टिकवून असते; तद्वतच गुणांच्या गजबजाटात तो धीमान तटस्थच असतो. अर्जुना! ही अशी त्याची लक्षणे आहेत."

देहबुद्धीचा अस्त

"समदुःखसुखःस्वस्थः..... । मानापमानयो... । स उच्यते।।१४-२४,२५।।" या दोन गीताश्लोकांद्वारे ***गुणातीत*** पुरुषाचे जे आचरण भगवंत प्रकट करतात, त्याबाबत ज्ञानदेव म्हणतात:

....। परिस आतां आचरणें। तेयाचियें।।१४-३४८।।
तऱ्हीं वस्त्रासीं पाठीं पोटीं। नाही सुतावांचूनि किरीटी।
ऐसें सूयें दिठी। चराचर मद्रूपें।।३४९।।
म्हणौनि सुखदुःखासरिसें। कांटालें आचरें ऐसें।
रिपुभक्तां जैसें। हरीचें देणें।।३५०।।
एऱ्हवीं तऱ्हीं साहजें। सुखदुःख तैंचि सेविजे।
देहजलीं होईजे। मासोली जैं।।३५१।।

"आता त्याचे आचरण कसे असते, ते ऐक. वस्त्र जसे अंतर्बाह्य सूतच असते, तद्वतच हे चराचर ज्याला मद्रूपच दिसते, त्याच्या दृष्टीस सुख अन दुःख ही सारख्याच तोलाची वाटल्यास नवल ते काय! हरीच्या दृष्टीने मोक्ष देण्यास शत्रू अन भक्त जसे सारखेच असतात, तसेच त्या गुणातीतास सुखे व दुःखे समानच असतात. मासोळी जशी जलाशी अभिन्न वागते, तसे जे देहातादात्म्यबुद्धीचा स्वीकार करतात, त्यांच्यासाठीच देहाची सुखदुःखे असतात. परंतु ज्याने देहास केवळ प्रारब्धाच्या स्वाधीन केलेले आहे आणि स्वस्वरूपी ठाण मांडले आहे, त्याला सुखदुःखे वेगवेगळी कशी करता येतील!"

आतां तैं तंव तेणें सांडिलें। आहे स्वस्वरूपेंसीं मांडिलें।
सस्यांतीं निवडिलें। बीज जैसें।।१४-३५२।।
कां वोघ सांडूनि गाङ्ग। रिघौनि समुद्राचें आंग।
निस्तरली लगबग। खलालाची।।३५३।।

तेवीं आपणपांचि जेयां। वस्ती जालीं गां धनंजया।
तेयां देहीं आपैसया। सुख तैसे दुःख।।३५४।।

"मळणी करून पिकातील कोंडा व टरफले उडवून देऊन निव्वळ बीजच जसे ग्रहण करावे, त्याप्रमाणे या समस्त विश्वातील नश्वराचा संन्यास करून त्या महाभागाने माझे स्वरूप निवडलेले असते. गंगेचे पात्र त्यागून तिचे पाणी जेव्हा समुद्राअंगी प्रवेशते, तेव्हा त्याचा खळखळाट स्तब्धावतो; त्याप्रमाणे माझ्याठायी वस्तीस आलेल्या त्या गुणातीत पुरुषाठायी देहादींच्या सुखदुःखांची गजबज आपोआपच नाहीशी होते."

चित्ताचे समत्व

रात्री तसें पाहलें। हे धारणा जेवीं जालें।
आत्मारामा देहाआंतलें। द्वंद्व तैसें।।१४-३५५।।
पैं निद्रिताचेनि आंगेशीं। सापु तैशी उर्वशी।
तेवीं स्वस्वरूपस्था सरिसीं। देहिं द्वंद्वें।।३५६।।
म्हणोनि तेयाचां ठायीं। शेणा सोनयां विशेष नाही।
रत्ना गुंडेयां काहीं। नेणें भेदु।।३५७।।
घरां येवो पां स्वर्ग। कां वरिपडो वाघ।
परि आत्मबुद्धिसीं भंग। कदा नोहे।।३५८।।

"स्तंभाच्या लेखी दिवस व रात्र ही जशी सारखीच असतात, त्याप्रमाणे आत्मारामरूप झालेल्याच्या दृष्टीस सुखदुःखादी देहींची द्वंद्वे समान असतात. निद्रिस्त व्यक्तीच्या लेखी सर्प अन उर्वशी यांत काहीच फरक नसतो; तसाच त्या स्वस्वरूपी गर्क झालेल्या गुणातीतास द्वंद्वांत अधिक वा उणे काहीही नसते. रत्न व पाषाण यात त्याला प्रिय वा अप्रिय काहीच नसते. घरी स्वर्ग अवतरला, तरी त्याला त्याचे विशेष नसते अन् अंगावर वाघाने झेप घेतली, तर त्याला धास्ती वाटत नाही. त्याला प्राप्त झालेली आत्मबुद्धी कशानेही ढळत नाही."

निवटलें ना उपवढे। जलिनलें न विरूढें।
साम्यबुद्धि न मोडे। तेयांपरी।।१४-३५९।।
हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो। कां नीच म्हणौनि निंदिजो।
परी नेणों जलों विझो। राखोंडी जैसीं।।३६०।।
तैसीं निंदा आणि स्तुती। नये कोण्हेचि व्यक्ती।
नाही अंधारें कां वाती। सूर्याघरीं।।३६१।।

"निवर्तलेले मनुष्य पुनः जसे उठून बसत नाही; जळालेल्या बीजास जसा पुनः अंकुर फुटत नाही; त्याप्रमाणे त्याच्या देहबुद्धीचा जो अस्त झालेला असतो, तिचा उदय होत नाही अन त्याची साम्यावस्था भंगत नाही. हा प्रत्यक्ष ब्रह्मदेवच आहे, अशी त्याची कोणी स्तुती जरी केली, तरी त्याला विशेष संतोष नसतो; तसेच हा अति नीच आहे, अशी निंदा केल्यामुळे त्याला खेद होत नाही. सूर्याच्या लेखी अंधार व उजेड असे काहीच असत नाहीत; राख जशी जळणे किंवा विझणे या दोन्ही द्वंद्वांपासून अलिप्त असते; त्याप्रमाणे निंदा व स्तुती ही त्याच्या चित्तात कोणतीच भावना अभिव्यक्त करत नाहीत."

निंदा व स्तुती, माती दगड व सोने ही समान मानणाऱ्या त्या महापुरुषावर मानापमान इ.चा काहीच परिणाम होत नाही.

"जलती गां कर्मफळें"

ईश्वरबुद्धि पूजिला। कां चोरु म्हणौनि गांजिला।
वृषगजीं वेढिला। केला रावो।।१४-३६२।।
कां सुहृद पासां आलें। अथवा वैरी वरपडें जाहलें।
परी नेणें राती पाहालें। तेज जेवीं।।३६३।।
साहीं ऋतु येतां आकाशें। लिंपिजेचि ना जैसें।
तेवीं वैषम्य मानसें। जाणिजेना।।३६४।।

"त्या महापुरुषाची ईश्वर म्हणून पूजा केली किंवा त्याला चोर म्हणून छळले; तो वृषभ-गजादी धनाने मंडित असलेला प्रतिष्ठित झाला; त्याच्यापाशी संपत्ती नसून रंक झाला; मित्र त्याच्याजवळ असले वा तो शत्रुपरिवाराने वेढला गेला; तरी सूर्य जसा रात्र व दिवस यांना जाणत नाही, तसाच तोही या सर्वासंबंधाने अजाण असतो. साही ऋतूत आकाश जसे अलिप्त राहते, तसाच तोही या सर्वत्रांपासून अलिप्त असतो. त्याच्या लेखी चांगल्या गोष्टींनी हुरळणे अन वाईट गोष्टींनी वैषम्य मानणे ही काहीच नसतात."

आणिकही एकु पाही। आचारु तेयाचां ठायीं।
तऱ्हीं व्यापारासीं नाही। जालें दिसे।।१४-३६५।।
सर्वारंभा उटकलें। प्रवृत्तीचें तेथ मावलें।
जलती गां कर्मफलें। तैं तो आगीं।।३६६।।
दृष्टादृष्टाचेनि नांवें। भावोचि जेवीं नुगवे।
सेवी जैं स्वभावें। पैठें होये।।३६७।।
सुखे ना शिणें। पाषाणु कां जेणें मानें।
तैसीं सांडीमांडी मनें। वर्जिली असे।।३६८।।

"त्याच्या आचरणाचा एक आणखीही विशेष आहे. त्याच्या ठिकाणी कर्मजाताचा अभाव झालेला असतो. सर्व कर्मारंभाचे म्हणजे संकल्पांचे उच्चाटण झाल्याने प्रवृत्तीची त्याच्याठायी वार्तासुद्धा नसते. ज्या अग्नीत कर्मफळे जळून जातात, तो म्हणजे प्रत्यक्ष तो गुणातीत पुरुष असतो. इह वा परलोकादी भोग प्राप्त व्हावेत, हा भावसुद्धा त्याच्या अंतरात उदित होत नाही. प्रारब्धवशात जे काही भोग प्राप्त होतात, त्यांचे तो निर्लिप्तपणे सेवन करतो. पाषाण जसा सुखावतही नाही अन दुःखितही होत नाही, त्याप्रमाणे त्याच्या मनाने सर्व कर्मफलांच्या त्याग वा स्वीकाराने आनंद वा दुःख मानणे वर्ज केलेले असते."

आतां किती हाचि विस्तारु। जाणें ऐसा आचारु।
तेयां तोचि साचारु। गुणातीतु।।१४-३६९।।

"असे किती सांगावे! त्या गुणातीताचा आचार त्याच्या नावाला साजेसाच असा असतो."

अव्यभिचारी भक्ती::::

गुणातीत होण्याचे साधन

गुणातैं अतिक्रमणें। घडें उपायें जेणें।
तो आतां आणिकु आईक म्हणें। श्रीकृष्णनाथु।।१४-३७०।।

यदुनाथ श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतातः "आता कोणत्या उपायाने हे गुणातीतत्व प्राप्त होते व गुणांचे अतिक्रमण केले जाते, ते ऐक."

गीतागोविंद तो उपाय सांगतातः

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।१४-२६।।

या श्लोकानिमित्त श्रीमद्आद्यशंकराचार्यांचे भाष्य पाहण्यासारखे आहेः

"मां च ईश्वरं नारायणं सर्वभूतहृदयाश्रितं यो यतिः कर्मी वा अव्यभिचारेण न कदाचित् यो व्यभिचरति भक्तियोगेन भजनं भक्तिः सा एव योगः तेन भक्तियोगेन सेवते सा गुणान् समतीत्य एतान् यथोक्तान् ब्रह्मभूयाय भवनं भूयो ब्रह्मभूयाय ब्रह्मभवनाय मोक्षाय कल्पते समर्थो भवति इत्यर्थः।।१४-२६।।

"जो संन्यासी वा कर्मयोगी, सर्वभूतांच्या हृदयाश्रित असलेल्या मज परमेश्वरास - नारायणास - कदापिही विचलित न होणाऱ्या अव्यभिचारी भक्तियोगाद्वारे सेवितो, तो उपरोल्लेखित त्रिगुणांचे अतिक्रमण करून ब्रह्मलोकी विराजमान होण्यास योग्यता पावतो. ***भजन म्हणजेच भक्ती. हाच भक्तियोग.***"

अव्यभिचारी भक्ती

या भक्तियोगाची व्याख्या स्पष्ट करून भगवंतोक्तीचे यथार्थ दर्शन घडवतांना ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं व्यभिचाररहितें चित्तें। भक्तियोगें मातें।
सेवी तो गुणांतैं। जाकळूं शके।।१४-३७१।।
तऱ्हीं कोणु मी कैसीं भक्ती। अव्यभिचारा काय व्यक्ती।
हे आघवेंचि निरुती। होआवी लागे।।३७२।।
तऱ्हीं पार्था परियेसा। मी तंव एथ ऐसा।
रत्नीं किलावो जैसा। रत्नचि तो।।३७३।।
कां द्रवपणचि नीर। अवकाशुचि अंबर।
गोडी तैंचि साकर। आन नाही।।३७४।।
वह्नी तैंचि ज्वाल। दलाचि नांव कमल।
रुख तैंचि डहाल। फलादिक।।३७५।।
अगां हिंव जैं आकर्षलें। तैंचि हिमवंत जालें।
नाना दूध मुरालें। तैंचि दही।।३७६।।
तैसें विश्व एणें नांवें। हे मीचि पैं आघवें।....।।३७७।।

"जो पुरुष अव्यभिचारी भावाने भक्तियोगाद्वारे माझी उपासना करतो, तो या त्रिगुणांचे अतिक्रमण करण्यास समर्थ होतो. म्हणून मी कोण; भक्ती म्हणजे कोणती; अव्यभिचारभाव कसा व्यक्त होतो; या सर्वांचा आधी निर्णय केला पाहिजे. पार्था ! ऐक मी कसा आहे ते! रत्नाची दीप्ती जसे रत्नच असते; द्राव्यता हा गुणच जसे नीर असते; अवकाशच जसे अंबर असते; गोडी हा गुणच जशी साखर असते; ही सर्व जशी एकमेकांहून अभिन्न असतात; किंवा ज्वाळा व अग्नी जसे एकच असतात; कमलदले म्हणजे जसे कमलच असते; डहाळ्या, फांद्या, पाने, फुले, फळे इ.जसे वृक्षरूपच असतात; किंबहुना एकत्र गोठलेले बर्फ म्हणजेच जसा हिमवान आहे; अथवा विरजलेले जे दूध असते, त्यालाच दही म्हणतात; अगदी त्याचप्रमाणे हे विश्व म्हणून जे काही म्हणतात, ते सर्व केवळ मीच आहे."

...। घेई चंद्रबिंब सोलावे। न लगे जेवीं।।१४-३७७।।
घृताचें थिजलेंपण। न मोडितां घृतचि जाण।
कां नाटितां कांकण। सोनेचि तैं।।३७८।।
नुकलितां पटु। तंतुचि असे स्पष्टु।
न विरवितां घटु। मृत्तिका जेवीं।।३७९।।
<u>म्हणौनि विश्वपण जावें। मग मातें घेयावें।</u>
<u>तैसा नव्हें आघवें। सकटचि मी</u>।।३८०।।
ऐसेनि मातें जाणिजे। तैं अव्यभिचार भक्ति म्हणिजे।
येथ भेदु कांहीं देखिजे। तऱ्हीं व्यभिचारु तो।।३८१।।

"चंद्रकलांच्या उपभोगार्थ चंद्रबिंब जसे सोलावे लागत नाही, तर त्या चंद्रकला चंद्रबिंबाशी जशा अभिन्न असतात; तुपाचे थिजलेपण न बिघडवताही ते घट्ट झाले तरी ते जसे तूपच असते; सुवर्णाचे कंकण आटविले नसतांनाही जसे निखळ सोनेच असते; वस्त्राचे धागे वेगवेगळे केले नाहीत, तरी ते जसे केवळ तंतुमयच असते; किंवा मातीचा कच्चा घट पाण्यात न विरघळवतासुद्धा जसा निव्वळ मृत्तिकामयच असतो; अगदी थेट त्याचप्रमाणे <u>**यच्चयावत समस्त विश्व त्यातल्या सर्व पदार्थांसह मीच आहे. विश्वपणा बाजूला करावा अन नंतर मी पहावा असे काही नाही; तर *हे विश्व म्हणजे मीच आहे*. हे जे ज्ञान आहे, त्याचेच नांव *अव्यभिचारी भक्ती* होय**</u>. विश्व अन् मी यात भिन्नत्व वा भेदभावाने पाहणे हाच येथे ***व्यभिचार*** होय."

चिद्विलास व सोऽहंवृत्ति

अव्यभिचारी भक्ती सांगण्याच्या प्रसंगी ज्ञानदेवानी पुनः एकदा **चिद्विलास**ाचे तत्त्वज्ञान स्पष्ट केले आहे. ***विश्व व विश्वात्मा एकच आहेत, हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.*** त्याची अनुभूती येते ती अव्यभिचारभक्तिद्वारे. **ही भक्ती, ज्ञान व योग यांचे सर्वस्व एकच आहे. ते म्हणजे *सोऽहंवृत्ति.*** *ती प्रकट होते ती या तत्त्वज्ञानाच्या आधाराने अन ज्ञानदेवप्रणीत ज्ञान, भक्ती अन योग यांच्या समन्वयदर्शक अशा त्यांनी निर्दिष्ट केलेल्या विशिष्ट* ***गुरुपरंपराप्राप्त ईश्वरप्रणिधानाधिष्ठित कुंडलिनीयोगा***द्वारे. याचा निर्देश प्रसंगोपात्त आपण केलेला होताच. ***अव्यभिचार भक्ती*** व ***सोऽहंवृत्ति*** यांचे रहस्य स्पष्ट करणारे ज्ञानदेवांचे बोल ऐका.

याकारणें भेदांतैं। सांडूनि अभेदें चित्तें।
आपणयासकट मातें। जाणावें गां।।१४-३८२।।
पार्था सोनयाचि टीक। सोनयासि लागली देख।
तैसें आपणपें आणिक। मानावें ना।।३८३।।

"हे जे तत्त्वज्ञान तुला आतापावेतो वेगवेगळ्या रीतीने स्पष्ट करून सांगितले, ते आकलन व्हावे म्हणून तू चित्तातील आपण व ईश्वर यात असणाऱ्या भेदाच्या भावनेचा त्याग कर अन् समस्त विश्व मद्रूपच आहे, हे अंतरी सुनिश्चित कर. हे पार्था! सुवर्णालंकारावर

जडवलेली सुवर्णाची टिकली ही त्या सुवर्णालंकारासह सोनेच असते. अगदी तसेच हे आहे."

तेजाचा तेजौनि निगाला। परि तेजींचि असे लागला।
तेया रश्मि ऐसा भला। बोधु होआवा।।१४-३८४।।
पैं परमाणु भूतलीं। हिमकणु हिमाचलीं।
मजमाजीं न्याहालीं। अहं तैसे।।३८५।।
हो कां तरंगु लहानु। परि सिंधुसीं नाही भिन्नु।
तैसा ईश्वरीं मी आनु। नोहेंचि गां।।३८६।।
ऐसेनि या समरसें। दृष्टी जैं उल्हासे।
तैं भक्ती पैं ऐसें। आम्हीं म्हणो।।३८७।।

"पृथ्वीचा परमाणू पृथ्वीच असतो. हिमकणाचाच हिमाचल असतो. तेजोरश्मी जसा रश्मिगोलकापासून पृथक झाल्यासारखा दिसला, तरी तो त्या सवितानारायणाहून भिन्न नसतो. अगदी तसाच माझ्याठायी प्रकटणारा***अहं*** वा***जीवात्मा*** होय. उदधीवरील तरंग लहानुला असला, तरी सिंधूपेक्षा भिन्न नसतो. प्रकाशकिरणास आपण सूर्याहून भिन्न नाहीत, असा बोध झाल्यास जसे होईल, त्यासारखा बोध घेऊन, हे अर्जुना! तू मज ईश्वराहून भिन्न नाहीस, ही प्रतीती अंगी बाणवावीस. **ही समरसता प्राप्त होऊन जी दृष्टी लाभते, तिला मी *भक्ती* असे म्हणतो. हीच *अव्यभिचार भक्ती* होय.**"

आणि ज्ञानाचें चांगावें। इयेंचि दृष्टी नांवें।
योगाचेही आघवें। सर्वस्व हे।।१४-३८८।।
सिंधु आणि जलधारा-। माजीं लागली अखंड धारा।
तैसीं वृत्ती वीरा। प्रवर्ते तैं।।३८९।।
कां कुहेंसीं आकाशा। तोंडीं सांधा नाही जैसा।
तो परमरसु तैसा। एकवटे गां।।३९०।।

"**ही *अव्यभिचार भक्ती* म्हणजेच *"ज्ञानानाम् ज्ञानमुत्तमम्"* म्हणून मी जे गौरविलेले आहे, ते *ज्ञान* होय. *योग* म्हणून मी जो कथन केला, त्याचे सर्वस्व म्हणजे हीच *भक्ती* होय. *दृश्य, द्रष्टा व दर्शन*** या त्रिपुटीविरहित अशी ही जी वृत्ती प्रकटते, ती जीव अन शिव यांचा मिलाप घडवते. सिंधू अन मेघ यांना सांधणारी अखंड जलधारा असावी, तशी ही वृत्ती जीवाशिवात प्रकटते. विहीर व आकाश यांना सांधणारे विहिरीचे तोंड जसे असते, तशी *ही परमरसात्मक दृष्टी वा वृत्ती **जीवाशिवाच्या सांधणीवर** आहे. अन ज्याला ती प्राप्त होते, तो त्या परमरसात्मक परब्रह्माशी एकरूप होतो.*"

प्रतिबिंबौनि बिंबवेरी। प्रभेची जैसीं उजरी।
तैं सोऽहंवृत्ति अवधारी। तैसी होय।।१४-३९१।।
ऐसेनि मग परस्परें। तैं सोऽहंवृत्ति जैं अवतरे।
तैं तियेंहीसकट सरे। आपैसया।।३९२।।

"प्रतिबिंबापासून ते बिंबापर्यंत प्रभेचे साम्राज्य जसे असते, तशी ही ***सोऽहंवृत्ति*** जीव अन शिव यांच्यात असते. मीच शिव आहे, ही जीवाची प्रकट होणारी अशी जी***सोऽहंवृत्ति*** आहे, तिचा जेव्हा जीवासह शिवात लय होतो, तेव्हा जीव व शिव यांचे अनादी ऐक्य प्रकट होते."

सोऽहंवृत्तीचा लोप व ब्रह्मत्व

"सोऽहं तेही अस्तावले" अशी ही जी अवस्था प्रकट होते, तिचे ज्ञानदेव पुढे वर्णन करतांना म्हणतात:

जैसा सैंधवाचा रवा। सिंधूमाजीं पांडवा।
विरालेयां विरवावा। हेहीं टाकें।।१४-३९३।।
ना तन्हीं जालूनि तृण। वह्नीही विझे आपण।
तैसें भेदु नाशूनि जाण। ज्ञान नुरे।।३९४।।
माझें पैलपण जाये। भक्त हे ऐलपण ठाये।
अनादि ऐक्य जैं आहे। तैंचि निवडे।।३९५।।

"***सोऽहंवृत्ति*** अशी सरली की, मिठाचा खडा समुद्रात विरघळल्यानंतर विरघळणे ही क्रियासुद्धा जशी सरते; किंवा तृणास जाळून अग्नी जसा नाहीसा होतो; त्याचप्रमाणे जीवाशिवातील भेदवृत्ती नष्ट होऊन त्याबरोबर ***सोऽहंवृत्तिरूप* असे जे *ज्ञान* असते, त्याचाही लोप होतो.** मी संसारापलीकडील व भक्त संसारातला हे दोन्ही भेद नाहीसे होऊन आमचे जे ***अनादी अद्वैत*** आहे, तेच पुन:स्थापित होते."

आतां गुणांतैं किरीटी। जिणें या नव्हती गोष्टी।
जैं एकपणाही मिठी। पडों सरली।।१४-३९६।।
किंबहुना ऐसिं दशा। तैं ब्रह्मत्व गां सुदंशा।
हे तो पावे जो ऐसा। मातें भजे।।३९७।।
पुढती इहीं लिंगीं। भक्तु जो माझां जगीं।
हे ब्रह्मता तेयांलागीं। पतिव्रता।।३९८।।
जैसें गंगेचेनि वोघें। डलमलित जल जैं निघे।
सिंधुपद तेयाजोगें। आन नाही।।३९९।।
तैसा ज्ञानाचिया दिठी। जो मातें सेवी किरीटी।
तो होये ब्रह्मतेचां मुकुटीं। चुडारत्न।।४००।।

"मी व माझा भक्त जेव्हा अशा अभिन्नत्वाने नांदू लागतो, तेव्हा आम्ही दोघे परस्परात एकरूप होतो, या म्हणण्यातही काही अर्थ उरत नाही. अशा स्थितीत गुण ते काय! अन त्यांना तो पुरुष - माझा भक्त जिंकतो, ही गोष्ट कुठची! मला अशा ***अव्यभिचारी*** भक्तीने एकनिष्ठेने जो भक्त भजतो, त्याला ही अशी दशा प्राप्त होते. हे मर्मज्ञ अर्जुना! या दशेलाच ***ब्रह्मत्व*** असे जाणकार म्हणतात, हे तुला सांगायला नकोच! ही अवस्था भोगणाऱ्या माझ्या भक्ताची ***ब्रह्मत्व*** ही जणू पतिव्रता स्त्रीच होय. फोफावत निघालेल्या गंगेच्या जळास समुद्रावाचून अन्य गती कोणती! तशीच त्याची गती माझ्यातच असणार यात नवल नाही. **अद्वैतज्ञानदृष्टी**ने माझी उपासना करणारा तो भक्तशिरोमणी या अशा ब्रह्मत्वाच्या मुकुटींचे अग्रस्थानी विराजलेले रत्नच समज!"

यया ब्रह्मत्वासीचि पार्था। सायुज्य ऐसीं वेवस्था।
याचि नांवे चौथा। पुरुषार्थु गां।।१४-४०१।।
परि माझें आराधन। ब्रह्मत्वीं होय सोपान।
येथ मी हन साधन। गमेन हो।।४०२।।

उपासनेच्या खाणाखुणा

तऱ्हीं झणें झणें ऐसें। तुझां चित्तीं पैसें।
पैं ब्रह्म आन नसे। मीवांचौनि।।४०३।।

"या ब्रह्मतेसच, हे पार्था! ***सायुज्य*** अथवा ***चौथा पुरुषार्थ*** वा ***मोक्ष*** इ.नावे आहेत. ही जी ***भक्ती*** मी तुला निरूपिली, ती हा चतुर्थपरमपुरुषार्थप्राप्तीचा सोपानच आहे. पण तुला जर चुकून असे वाटले की मी या साधनस्वरूप आहे, तर लक्षात घे की मी साधन नसून ***ब्रह्म हे प्रत्यक्ष मीच आहे.***"

भक्तीचा प्रवास - *द्वैती ते सोऽहंवृत्ति ते अद्वैती*

या ठिकाणी ज्ञानदेव अत्यंत खुबीदार रीतीने ***द्वैतभावातील परमात्मा, भक्त व भक्ती*** यांचा ***अद्वैतभवातील परमात्मा, भक्त व भक्ती*** यांच्याशी मेळ घालतात. द्वैती भक्ती हे साधन व परमात्मा हे साध्य समजून जो भक्त परमार्थसोपान आक्रमू लागतो, त्याला आपल्या मार्गात कधी न कधी हा अद्वैतभक्तीचा सोपान लागणार हे येथे अभिप्रेत आहे. ***द्वैती भक्ती -➤ सोऽहंभाव -➤ अद्वैतभक्ती असा हा प्रवास आहे.***

या प्रवासाचा अंतिम टप्पा जेव्हा गाठला जातो, जेव्हा ***अद्वय*** वा ***अद्वैत भक्ती*** वा **ब्रह्मत्वा**ची प्राप्ती होते; तेव्हा सुरुवातीस साध्य समजलेला परमात्मा, त्याची भक्ती हे साधन समजून प्राप्त करण्याची वस्तू राहत नाही; तर ***परमात्मा, भक्त व भक्ती*** हे तिन्ही एकस्वरूपच आहेत, अशी अनिर्वाच्य अवस्था प्रकटते.

भक्तिभावाने उपासलेला परमात्मा हा यानिमित्ताने द्वैती स्थितीत साधन व साध्यरूप भासण्याची शक्यता येथे गृहीत धरली आहे. म्हणूनच ज्ञानदेव या अद्वैतभक्तीचे आगळेवेगळे स्वरूप विशद करतांना येथे साधन व साध्य आणि साधक असा हा भेदच नसतो, हे स्पष्ट करून म्हणतात की "हे समस्त येथे केवळ ब्रह्मच वा परमात्मा आहे."

सगुण व निर्गुण यांचा समन्वय

ब्रह्म वा परमात्म्यावाचून इतर काहीच नसल्याने साध्य-साधनादी भेद येथे संभवत नाहीत. ***द्वैती*** वा ***गौणी*** भक्तीतील सगुणस्वरूप साधन समजणारे व त्याद्वारे निर्गुण प्राप्त झाल्यावर सगुणाचा त्याग करावा किंवा करु नये अशी जी दोन वेगवेगळी मते प्रसारित झालेले आहे; त्यावरही या विवेचनाद्वारे असा प्रकाश पडतो की ***सगुण*** व ***निर्गुण*** ही दोन्ही परमात्मस्वरूपच असल्याने सगुणाचा त्याग व निर्गुणाचा स्वीकार वा अन्यथा अशा वेगवेगळ्या अवस्था संभवत नाहीत.

सगुणच निर्गुणात सामावले जाते. याचेच वर्णन ज्ञानदेवांनी आपल्या अभंगातून ***"सगुणु निर्गुणु एकु गोविंदु रे"*** असे केले आहे. ***सगुण व निर्गुण ही दोन्ही एकीभूतच असतात व त्यातला ज्ञानाज्ञान अवस्थेतील सोऽहंभावसुद्धा ज्ञानभक्तीच्या अंतिम अवस्थेत राहत नाही.*** तरीही श्रीस्वामी रामदाससमर्थांनी निर्गुण प्राप्त झाले तरी सगुणास लवंडू नये असे सांगितले आहे. त्यामागे अर्थातच काही वेगळी कारणे आहेत!

ज्ञानदेवांनी जाताजाता हा जो सूचक निर्देश वरील शेवटच्या दोन ओव्यातून केलेला आहे *(१४-४०२,४०३)*, त्याचा यथार्थ उमगून घेण्यासाठी आपण *चौदाव्या* अध्यायाच्या अंतिम श्लोकाकडे व त्यावरील शांकरभाष्याकडे वळू याः

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ।।१४-२७।।

"अमृत, अव्यय, शाश्वत, धर्मरूप, सुख व अद्वितीयादी असे जे ब्रह्म ते मीच आहे. अशा ब्रह्मात व माझ्यात काहीच भेद नाही."

याविषयी ***शांकरभाष्य*** असे आहेः

"कुत एतद् इति उच्यतेः ब्रह्मणः परमात्मनो हि यस्मात् प्रतिष्ठा अहं प्रतितिष्ठति अस्मिन् इति प्रतिष्ठा अहं प्रत्यगात्मा। कीदृशस्य ब्रह्मणः। अमृतस्य अविनाशिनः अव्ययस्य अविकारिणः शाश्वतस्य च नित्यस्य धर्मस्य ज्ञानयोगधर्मप्राप्यस्य सुखस्य आनन्दरूपस्य ऐकान्तिकस्य अव्यभिचारिणः। अमृतादिस्वभावस्य परमात्मनः प्रत्यगात्मा प्रतिष्ठा सम्यग्ज्ञानेन परमात्मतया निश्चीयते। तद् एतत् ब्रह्मभूयाय कल्पते इति उक्तम्।।१४-२७।।"

अव्यभिचारी भक्तिद्वारे पुरुषोत्तमास भजणाऱ्या त्या महान भक्तास त्रिगुणांस उल्लंघून जाणे साध्य होते. येथे ***मां च*** या *श्लोक क्र.१४-२६* मधील प्रत्यगात्म्याबद्दल श्रीमदशंकराचार्य असे म्हणतात की,

" ब्रह्म वा परमात्मा ज्यात प्रतिष्ठित असतात, तो मी अंतरात्माच ब्रह्माची प्रतिष्ठा आहे. ते ब्रह्म अविनाशी, अव्यय - निर्विकार, धर्मस्वरूप - ज्ञानयोगरूप धर्माद्वारे प्राप्त होणारे, आनंदरूप, व्यभिचाररहित सुखस्वरूप असे आहे. ते माझ्यातच प्रतिष्ठित आहे. अमृतादी लक्षणांनी युक्त असणारे ब्रह्म म्हणजे मीच आहे. कारण यथार्थ ज्ञानाने मज आत्म्यासच परमात्मत्व आहे, हे निश्चित होते. म्हणूनच **अव्यभिचारी भक्तियोगा**ने माझी उपासना करणाऱ्यास मोक्षप्राप्ती होते, असे ***ब्रह्मभूयाय कल्पते*** या पदाद्वारे म्हटले आहे."

याचे अधिक स्पष्टीकरण करतांना आचार्य पुढे सांगतातः

"यया च ईश्वरशक्त्या भक्तानुग्रहादिप्रयोजनाय ब्रह्म प्रतिष्ठते प्रवर्तते सा शक्तिः ब्रह्म एव अहं शक्तिशक्तिमतोः अनन्यत्वाद् इति अभिप्रायः। अथवा ब्रह्मशब्दवाच्यत्वात् सविकल्पकं ब्रह्म तस्य ब्रह्मणोनिर्विकल्पकः अहम् एव न अन्यः प्रतिष्ठा आश्रयः।"

"ज्या ईश्वरीय शक्तीने भक्तांवर अनुग्रहादी करण्यास ब्रह्म प्रवृत्त होते, ती शक्ती म्हणजे मी ब्रह्मच आहे. शक्ती व शक्तिमान यात वेदांतमते भेद नाही. अथवा असेही मानण्यास प्रत्यवाय नसावा की ***ब्रह्म*** शब्दाने येथे सगुण ब्रह्माचा निर्देश केलेला आहे अन त्या सगुण ब्रह्माचा आश्रय वा प्रतिष्ठा मी **निर्विकल्प ब्रह्म**च आहे. त्याला मजवाचून दुसरे प्रतिष्ठान नाही."

असे हे *सगुण ब्रह्म* **किंविशिष्टस्य** म्हणजे कोणत्या विशेषणांनी युक्त आहे, ते श्लोकात उल्लेखिले असून आचार्य म्हणतात त्याप्रमाणे ***"अमृतस्य अमरणधर्मकस्य अव्ययस्य व्ययरहितस्य"*** असे अमृत वा मरणधर्मरहित व अविनाशी वा क्षयापासून मुक्त आहे. त्याचप्रमाणे *"किं च शाश्वतस्य च नित्यस्य धर्मस्य ज्ञाननिष्ठालक्षणस्य सुखस्य*

तज्जनितस्य ऐकान्तिकस्य एकान्तनियतस्य च प्रतिष्ठा अहम् इति वर्तते" म्हणजे "ज्ञाननिष्ठारूप शाश्वत - नित्य अशा धर्माचे व "अमृत, अव्यय, शाश्वत, धर्मरूप, सुख व अद्वितीयादी असे जे ब्रह्म ते मीच आहे. अशा ब्रह्मात व माझ्यात काहीच भेद नाही."

याविषयी ***शांकरभाष्य*** असे आहे:

"कुत एतद् इति उच्यतेः ब्रह्मणः परमात्मनो हि यस्मात् प्रतिष्ठा अहं प्रतितिष्ठति अस्मिन् इति प्रतिष्ठा अहं प्रत्यगात्मा। कीदृशस्य ब्रह्मणः। अमृतस्य अविनाशिनः अव्ययस्य अविकारिणः शाश्वतस्य च नित्यस्य धर्मस्य ज्ञानयोगधर्मप्राप्यस्य सुखस्य आनन्दरूपस्य ऐकान्तिकस्य अव्यभिचारिणः। अमृतादिस्वभावस्य परमात्मनः प्रत्यगात्मा प्रतिष्ठा सम्यग्ज्ञानेन परमात्मतया निश्चीयते। तद् एतत् ब्रह्मभूयाय कल्पते इति उक्तम्।।१४-२७।।"

अव्यभिचारी भक्तिद्वारे पुरुषोत्तमास भजणाऱ्या त्या महान भक्तास त्रिगुणांस उल्लंघून जाणे साध्य होते. येथे ***मां च*** या *श्लोक क्र.१४-२६*मधील प्रत्यगात्म्याबद्दल श्रीमच्छंकराचार्य असे म्हणतात की,

" ब्रह्म वा परमात्मा ज्यात प्रतिष्ठित असतात, तो मी अंतरात्माच ब्रह्माची प्रतिष्ठा आहे. ते ब्रह्म अविनाशी, अव्यय- निर्विकार, धर्मस्वरूप - ज्ञानयोगरूप धर्माद्वारे प्राप्त होणारे, आनंदरूप, व्यभिचाररहित सुखस्वरूप असे आहे. ते माझ्यातच प्रतिष्ठित आहे. अमृतादी लक्षणांनी युक्त असणारे ब्रह्म म्हणजे मीच आहे. कारण यथार्थ ज्ञानाने मज आत्म्यासच परमात्मत्व आहे, हे निश्चित होते. म्हणूनच **अव्यभिचारी भक्तियोगा**ने माझी उपासना करणाऱ्यास मोक्षप्राप्ती होते, असे ***"ब्रह्मभूयाय कल्पते"*** या पदाद्वारे म्हटले आहे."

याचे अधिक स्पष्टीकरण करतांना आचार्य पुढे सांगतात:

"यया च ईश्वरशक्त्या भक्तानुग्रहादिप्रयोजनाय ब्रह्म प्रतिष्ठते प्रवर्तते सा शक्तिः ब्रह्म एव अहं शक्तिशक्तिमतोः अनन्यत्वाद् इति अभिप्रायः। अथवा ब्रह्मशब्दवाच्यत्वात् सविकल्पकं ब्रह्म तस्य ब्रह्मणोनिर्विकल्पकः अहम् एव न अन्यः प्रतिष्ठा आश्रयः।"

"ज्या ईश्वरीय शक्तीने भक्तांवर अनुग्रहादी करण्यास ब्रह्म प्रवृत्त होते, ती शक्ती म्हणजे मी ब्रह्मच आहे. शक्ती व शक्तिमान यात वेदांतमते भेद नाही. अथवा असेही मानण्यास प्रत्यवाय नसावा की ***ब्रह्म*** शब्दाने येथे सगुण ब्रह्माचा निर्देश केलेला आहे अन त्या सगुण ब्रह्माचा आश्रय वा प्रतिष्ठा मी **निर्विकल्प ब्रह्म**च आहे. त्याला मजवाचून दुसरे प्रतिष्ठान नाही."

असे हे सगुण ब्रह्म **किंविशिष्टस्य** म्हणजे कोणत्या विशेषणांनी युक्त आहे, ते श्लोकात उल्लेखले असून आचार्य म्हणतात त्याप्रमाणे *"अमृतस्य अमरणधर्मकस्य अव्ययस्य व्ययरहितस्य"* असे अमृत वा मरणधर्मरहित व अविनाशी वा क्षयापासून मुक्त आहे. त्याचप्रमाणे "किं च शाश्वतस्य च नित्यस्य धर्मस्य ज्ञाननिष्ठालक्षणस्य सुखस्य तज्जनितस्य ऐकान्तिकस्य एकान्तनियतस्य च प्रतिष्ठा अहम् इति वर्तते" म्हणजे "ज्ञाननिष्ठारूप शाश्वत - नित्य अशा धर्माचे व त्यापासून प्रकटणाऱ्या एकमात्र निश्चित परम आनंदाचे मूल मीच आहे."

अहं प्रतिष्ठा हे पद **मां च** या पदाच्या अनुवृत्त्यर्थ घेतलेले असल्याने *मी आणि ब्रह्म* यांचे स्पष्टीकरणार्थ आचार्यांनी हा सगळे विवेचन त्यांच्या भाष्याद्वारे केले असावे, असे वाटते. असो.

"परि ब्रह्म आन नसे। मी वांचौनि।।"

शांकरभाष्यातून ध्वनित होणारे हे अर्थ ज्ञानदेवांनी आपल्या ***"परि माझें आराधन। ...पैं ब्रह्म आन नसे। मीवांचूनि।।-४०२ व ४०३।।"*** या ओव्यात व्यक्तवले असून पुढे ते श्रीकृष्णोक्ती स्पष्ट करतांना म्हणतात:

अगा ब्रह्म या नांवा। अभिप्रावो मी पांडवा।
मीचि बोलिजे आघवां। शब्दीं इहीं।।१४-४०४।।
पैं मंडळ आणि चंद्रमा। दोन्ही नव्हती सुवर्मा।
तैसा मज आणि ब्रह्मा। भेदु नाही।।४०५।।
अगां नित्य जैं निष्कंप। अनावृत धर्मरूप।।४०६।।
सुख जैं उमप। अद्वितीय।।४०७।।
विवेकु आपुलें काम। सारुनि ठाकी जैं धाम।
निष्कर्षाचें निःसीम। किंबहुना मी।।४०७।।
ऐसेसें हो अवधारा। तो अनन्याचा सोएरा।
सांगतसे वीरा। पार्थासीं।।४०८।।

हे अर्जुना! ***ब्रह्म*** या शब्दाने ***मी***च अभिप्रेत आहे. या सर्व शब्दांनी माझाच निर्देश केला जातो. चंद्रप्रभा अन चंद्रमंडल ही वेगवेगळी का असतात! माझ्यात व ब्रह्मात काहीच फरक नाही. नित्य, निष्कंप, अनावृत, धर्मरूप, आत्यंतिक सुखप्रद, अद्वितीय असे जे ब्रह्म, ज्याला विवेकाद्वारे पावता येते अन जेथे पोहोचल्यावर विवेकाचाही लय होतो; असे जे, ते परमधाम, तत्त्वज्ञानाचे अंतिम गंतव्य स्थान वा प्राप्तव्य असे जे काही ते आहे; ते किंबहुना मीच आहे."

या शब्दांनी त्या अनन्य भक्तांच्या सोयऱ्या श्रीकृष्णाने वीरवर पार्थास कृतार्थ केले!

तमोग्रस्त धृतराष्ट्र

एवढा हा अतीव आनंदाचा व सोलीव सुखाचा विषय सञ्जयाने धृतराष्ट्रास निरोपिला. त्यावर तो तमोग्रस्त राजा काय म्हणतो पाहा:

एथ धृतराष्ट्र म्हणे। संजया हे तूतैं कोणें।
पुसिलेनविण वायाणें। कां बोलसीं।।१४-४०९।।
माझी अवसरी तैं फेडी। विजयाची सांगें गुढी।
येरू जीवीं म्हणे सांडीं। गोठी यिया।।४१०।।

धृतराष्ट्र म्हणतो: "संजया हे तू न विचारताच काय वायफळ बोलतो आहेस! मला माझ्या पुत्रांच्या विजयाची वार्ता सांग. या श्रीकृष्णार्जुन संवादाच्या गप्पा नकोत."

संजयो विस्मयें मानसीं। आहा करूनि रसरसीं।
म्हणें कैसें पां देवेंसीं। द्वंद्वययां।।१३-४११।।
तऱ्हीं कृपालु तो तुष्टो। यया विवेकु हा घोंटो।
मोहाचां फिटो। महारोगु।।४१२।।

या धृतराष्ट्राच्या बोलण्याने विस्मित झालेल्या संजयास वाटते की "काय पाहा याला देवाशी वैर आहे! तरीही तो कृपाळु देव याच्यावर कणव धरून विवेक उत्पन्न करो अन याच्या मोहग्रस्ततेचा हा महारोग निपटो!"

सञ्जयाचा अमृतानुभव

संजयो ऐसें चिंतितां। संवादु तो संभालितां।
हरिखाचा येतु चित्ता। महापुरू।।४१३।।
म्हणौनि आतां येणें। उत्साहाचेनि अवतरणें।
श्रीकृष्णाचें बोलणें। सांगिजेल।।४१४।।
तेयां अक्षरांआंतील भावो। पाववीन मी तुमचा ठाओ।
आइका म्हणे ज्ञानदेवो। निवृत्तीचा।।४१५।।

संजयाने याप्रमाणे धृतराष्ट्राचे हित चिंतिले आणि श्रीकृष्णार्जुनांचा तो रोमहर्षक संवाद पुन:पुनः मनातल्या मनात आठवत बसला. त्या आठवणींनी त्याच्या चित्तास आनंदाचा महापूर उधाणला.

निवृत्तिशिष्य ज्ञानदेव म्हणतातः"या संजयाच्या उमप अमृतानुभवाच्या चित्तभूमीला स्मरत स्मरत मीसुद्धा तुम्हा श्रोतेसज्जनांना उत्साहपूर्वक त्या श्रीकृष्णांचे बोल स्पष्ट करून सांगीन! त्या अमितलाघवी पुरुषोत्तमाचे बोल त्यातल्या भावांसह मी तुमच्यापर्यंत पोहोचवीन. ते आता ऐका."

समारोप

याप्रमाणे ***गुणत्रययोग*** या *चौदाव्या* अध्यायाची ज्ञानदेवांनी परिसमाप्ती केली आहे. ज्ञानदेव आपणांस गीतेतून ***उपासनेची रहस्ये*** उकलून दाखवीत आहेत. त्यासाठी आपण गीतेतील ***उपासनेच्या खाणाखुणा*** या प्रस्तुत **चतुर्थ स्कंधा**चे प्रयोजन ठेवले आहे. पुढील रहस्य पाहण्यासाठी *सतराव्या* अध्यायाकडे ***श्रद्धात्रयविभाग*** पाहण्यास वळणे आवश्यक आहे. तोच आपला पुढील ***उन्मेष क्र. १४- श्रद्धात्रयविभाग*** - आहे. तर पाहू या ज्ञानदेव त्यात उपासनेविषयी काय सांगतात ते.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::२४::
::श्रद्धात्रयविभाग::

उन्मेष २४:
गीता:
१६:२३,२४
१७:१-२२
ज्ञानेश्वरी:
१३:१३१
१७:२१-३२५

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उपासनेच्या खाणाखुणा

::उन्मेष::२४::
::श्रद्धात्रयविभाग::

श्रद्धेनुसार वर्तन::::

सतराव्या अध्यायाचे अनुसंधान

मागे उल्लेख केला होता की ***धारणा-ध्यान-समाधि*** या योगाच्या अंतरंग विशेषांगांचा विचार करण्यापूर्वी प्राणायाम-प्रत्याहारादी योगाच्या बहिरंगांचा नीट परिचय करून घेणे आवश्यक आहे. तसेच ज्ञानदेवांच्या विचारप्रणालीचा आधारस्तंभ असणारे चिद्विलासाचे तत्त्वज्ञानही अभ्यासणे आपल्या दृष्टीने श्रेयस्कर आहे *(उन्मेषः१६ःप्रकृतिविचार, पृ.क्र.२४७-२४८व उन्मेषः२२::त्रिगुणमयी प्रकृति,पृ.क्र.३३१-३३३).*

त्याकरता आपण गीतेच्या *तेराव्या* अध्यायाचा मागोवा घेत घेत, त्रिगुणांच्या संभ्रमात विश्व कसे भासते याचा *चौदाव्या* अध्यायाद्वारे साक्षेपी विचार करत करत, अव्यभिचारिणी भक्तीच्या अद्वैत सोपानावर केव्हा येऊन पोहोचलो, ते आपल्याला कळलेसुद्धा नाही. ज्ञानदेवांचा हाच खास विशेष आहे की बहिरंग योगांगांचे परीक्षण करत असतांनाच ते आपल्याला समाधीच्या उत्तुंग शिखरावर लिलया घेऊन जातात.

आपण आता पूर्वीच सुनिश्चित केलेल्या पथक्रमाने प्रथमतः *सतराव्या* अध्यायाचा आपल्या मतीस आकळेल असा परामर्ष घेऊ या. स्थूल-सूक्ष्म शरीरादींचे आवश्यक ते शुद्धिकरण व्हावे यासाठी शास्त्रविधिवत आचरावयाची जी जीवनचर्या असते, तिचा निर्देश करतांना भगवंतांनी *सोळाव्या* अध्यायाच्या ***"यः शास्त्रविधिमृत्स्युज्य... ।।१६-२३।।"*** असा शास्त्रविधींचा त्याग करणाऱ्यांच्या पतनाचा उल्लेख केला होता व तसेच ***"तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते .... ।।१६-२४।।"*** अशी शास्त्रोक्त कर्माचरणाची महती सांगितली होती. शास्त्रोक्त कर्माचरणासंबंधी अर्जुनाने उपस्थित केलेल्या प्रश्नाने ***श्रद्धात्रयविभागयोग*** या सतराव्या अध्यायाची सुरुवात होते. याबाबत ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं षोडषाध्यायशेखीं। तियें समाप्तिचां श्लोकीं।
जो ऐसा निर्णो निष्टंकी। ठेविला देवें।।१७-२१।।
जैं कृत्याकृत्यवेवस्था। अनुष्ठावया पार्था।
शास्त्रचि एक सर्वथा। प्रमाण तुज।।२२।।
तेथ अर्जुन मानसें। म्हणें हे ऐसें कैसें।
जै शास्त्रेंवीण नसे। सुटिका कर्मा।।२३।।

"*सोळाव्या* अध्यायाच्या समाप्तिप्रसंगी श्रीकृष्णांनी पार्थाला जो एक निश्चित निर्णय सांगितला होता की कर्तव्य व अकर्तव्य हे जाणून कर्मानुष्ठान कसे करावे, यासाठी शास्त्र हेच एकमेव प्रमाण आहे; त्याविषयी त्याच्या मनात शंका उद्भवली. ती अशी की शास्त्राशिवाय कर्म करता येऊ नये, इतके शास्त्राचे बंधन कर्माकरता कशासाठी आहे."

तऱ्हीं तक्षकांचें फडे। ठाकौनि कैं तो मणी काढे।
कैं नाकींचा केशु जोडे। सिंहाचियें।।१७-२४।।
मग तेणें तो वोंविजे। तऱ्हींचि लेणें पाविजे।
एऱ्हवीं काय असिजे। रिक्त कंठीं।।२५।।
तैसीं शास्त्राची मोकली। मां कैं कोण वेंटाली।
एकवाक्यतेचां फलीं। पैसिजे कैं।।२६।।

"तक्षकाची फडा पकडून तिच्यावरचे रत्न काढून आणावे आणि ते सिंहाच्या नाकाडावरच्या केसात ओवून गळ्यात घालावे. इतके अशक्यप्राय काम करता आले नाही तर गळ्यात काहीच आभूषण घालू नये. तसेच हे शास्त्राचे बंधन कर्मासाठी दिसते. मुळातच शास्त्राशास्त्रांची एकवाक्यता नाही. शास्त्रनिर्णयसुद्धा समजून घेण्यास फार कठीणतम असतात. तर शास्त्रनिर्णय व त्यांच्या एकवाक्यतेच्या फळांचा बुद्धिगम्य असा आस्वाद केव्हा घेता येणार! अन् त्याआधारे ***कार्याकार्यव्यवस्थिती*** हे कसे काय ठरवणार!"

जालयांही एकवाक्यता। कां लाभे वेलु अनुष्ठितां।
कैंचा पैसारु जीविता। येतुलालियां।।१७-२७।।
आणि शास्त्रें अर्थें देशें कालें। या चहूंही जैं एक फलें।
तो विपावो कीं कां मिले। आघवेयांसीं।।२८।।
म्हणौनि शास्त्राचें घडतें। नोहे प्रकारें बहुतें।
तऱ्हीं मूर्खा मुमुक्षां येथें। काय गति पां।।२९।।

"आणि त्यातून समजा कधीतरी शास्त्रांची एकवाक्यता जरी झाली, तर तोपावेतो आपले आयुष्यच सरून गेल्याने शास्त्रानुसार कर्म करण्याएवढा वेळ कोठून मिळणार! शास्त्राचे ज्ञान, कर्माचरणासाठी अनुकूल परिस्थिती, योग्य ठिकाण व काल ही चारी मिळून आल्याशिवाय पुनः ते अनुष्ठान कसे होणार! ही सर्व एखाद्यास प्राप्त होणे जवळजवळ असंभवनीयच आहेत. म्हणून शास्त्रानुसार कर्म घडणे सर्वसामान्यांस केवळ अशक्यच आहे. अशा परिस्थितीत त्यांनी आणि इतर मुमुक्षू जनांनी काय करावे!"

हा पुसावेयां अभिप्रावो। जो अर्जुनु करी प्रस्तावो।
तो सतराविया ठावो। अध्याया एथ।।१७-३०।।
तऱ्हीं सर्वांविषयीं वितृष्णु। जो सकल कालीं प्रवीणु।
कृष्णाही नवल कृष्णु। अर्जुनत्वें जो।।३१।।

शौर्या जोडला आधारु। जो सोमवंशाचा शृंगारु।
सुखादि उपकारु। जेयाचि लीला।।३२।।
जो प्रज्ञेचा प्रियत्तमु। ब्रह्मविद्येचां विश्रामु।
सहचरु मनोधर्मु। देवाचा जो।।३३।।
तो अर्जुनु म्हणे गां तमालश्यामा। इंद्रियां फांवलियां ब्रह्मा।
तुझा बोलु आम्हां। साकांक्षु पैं जी।।३४।।

"या सर्व आशंका अर्जुनाच्या मनात आल्या. *सतराव्या* अध्यायप्रसंगी त्याने नेमके हेच श्रीकृष्णास विचारले अन हा अध्याय श्रीकृष्णाच्या त्याबाबतच्या स्पष्टीकरणार्थच आहे. अशा प्रसंगी सर्व विषयांविषयी निरिच्छ असणाऱ्या, सर्व कलांमध्ये पारंगतता प्राप्त केलेल्या कृष्णालासुद्धा हा अर्जुन माझ्यासारखा एवढा कृष्णरूप कसा, हे आश्चर्य करावयास लावणाऱ्या; शौर्य ज्याच्या आश्रयास आलेले आहे अशा, सोमवंशाचे शृंगार, सुखोपचारादी ऐश्वर्य लीलया प्रकटवणाऱ्या; विद्यांचे निवासस्थान असणाऱ्या, प्रज्ञादेवीचा प्रियोत्तम अशा त्या श्रीकृष्णांच्या मनोधर्मासारखाच त्यांचा सहचर असणाऱ्या त्या अर्जुनाने म्हटले: "हे तमालवृक्षासमान नील कांतीच्या श्रीकृष्णा! इंद्रियगोचर अशा सगुण ब्रह्मरूप गोविंदा! तुझे हे शास्त्रविधानानुसार कर्म करावे असे जे सांगणे आहे, त्याबाबत मला अद्याप एक शंका आहे."

शास्त्रविधीस अनुसरण्याबाबत अर्जुनाचा प्रश्न

अर्जुन म्हणतो:

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः।।१७-१।।

"हे श्रीकृष्णा! जी मनुष्ये शास्त्रविधींचा त्याग करून केवळ श्रद्धायुक्त होऊन देवादिकांचे पूजनादी करतात, त्यांची स्थिती कोणती; सात्त्विकी, राजसी अथवा तामसी, ते सांग."

श्रीमदाद्यशंकराचार्यमते येथे केवळ अशा मनुष्यांचा उल्लेख केला आहे की जे अज्ञानवश श्रुति-स्मृत्योक्त विधान न जाणल्यामुळे शास्त्रविधी सोडून पूजन करतात. जी मनुष्ये शास्त्रविधानांचे जाणकार असूनही त्यांचा त्याग करतात, त्या महाभागांचा यात समावेश नाही. ***निष्ठा*** याचा अर्थ त्यांनी केलेले पूजन, यजन, याजन इ.असा ते करतात. आपण आता ज्ञानदेव या प्रश्नास अर्जुनमुखे कसे रूप देतात, ते पाहू या:

जैं शास्त्रवांचौनि आणिकें। प्राणियां स्वमोक्षु न देखें।
ऐसें कां कैं पखें। बोलिलासी।।१७-३५।।
तन्हीं न मिळेचि तो देशु। नव्हेचि काला अवकाशु।
जो करवी शास्त्राभ्यासु। तो दुरी।।३६।।
आणि अभ्यासीं विरजिया। होती जिया सामुग्रिया।
त्याही नाही आपैतिया। तिये वेलीं।।३७।।
उजू नोहेचि प्राचीन। नेदीचि संज्ञा संवाहन।
ऐसें ठेलें आपादन। शास्त्रांचें जेयां।।३८।।

"कृष्णा! शास्त्राधारे वर्तन करावे, अन्यथा प्राण्यांना मोक्ष हा परमपुरुषार्थ प्राप्त करण्याचे इतर साधन नाही; असे शास्त्राचा पक्ष घेणारे विधान तू का करतोस! अरे! शास्त्राचा अभ्यास करवणारा गुरू भेटत नाही. सुयोग्य स्थल, काल अन अवकाश प्राप्त होत नाहीत. शास्त्रानुकूल वर्तन व अभ्यासास साहाय्यक ठरणारी अर्थादी सामुग्रीसुद्धा सहज प्राप्त होत नाही. ज्यांना पूर्वसंचिताची ठेव लाभलेली नाही, ज्यांना बुद्धी साहाय्य करत नाही; अशा दीनमूढांनी शास्त्र संपादन कसे करावे!"

किंबहुना शास्त्रविखीं। एकही न लाहाताचि नखीं।
म्हणोनि उखीविखी। सांडिली जिहीं।।१७-३९।।
परि निर्धारूनि शास्त्रें। अर्थानुष्ठानें पवित्रें।
नांदतात परत्रें। साचारें जैं।।४०।।
तेयां ऐसें आम्ही होआवे। ऐसीं चाड बांधौनि जीवें।
घेती तेयांचे मागोवे। आचरावया।।४१।।

"शास्त्रविषयात मुंगीएवढाही प्रवेश आपल्याला मिळणार नाही, हे जाणून ज्यांनी त्याबाबतचा विचार करणे अजिबात टाकून दिले आहे; परंतु शास्त्राधारे वर्तणूक करून व त्यांना अनुसरून कर्मानुष्ठान ठेवून ज्या पवित्र आचरणाच्या ज्येष्ठांनी आपले परत्र सुखेनैव प्राप्त करून घेतले आहे, त्यांचा आदर्श बाळगून आपणही त्यांच्यासारखे व्हावे या इच्छेने त्यांच्या आचरणानुरुप वर्तन ठेवू पाहणाऱ्यांस, हे कृष्णा! काय मिळते! "

धड्याचियां आखरां। तलीं बाल लिहे दातारा।
कां पूढासूनि पडिकरा। अक्षमु चाले।।१७-४२।।
तैसें सर्वशास्त्रनिपुण। तेयाचें जैं आचरण।
तैंचि करिती प्रमाण। आपुलियें श्रद्धा।।४४।।
तेयां सत्त्वरजतमा-। माजीं कोण पुरुषोत्तमा।
गति होय तैं आम्हां। सांगिजो जी।।४५।।

"कित्त्याबरहुकूम अक्षरे त्याखालील ओळींवर लिहून बालक साक्षर होते. डोळस वाटाड्याच्या मदतीने अपंग आंधळा मुक्कामास पोहोचतो. त्याचप्रमाणे जे शास्त्रनिपुण वडील मंडळींचे आचरण प्रमाण मानून श्रद्धापूर्वक अनुसरतात; शिवादी देवतांचे पूजन, अर्चन, भजन, यजन, याजनादी करतात; भूमी इ.महादाने त्यांचे पाहून जे लोक श्रद्धावंत अंतःकरणाने देतात; अग्निहोत्रादी अनुष्ठाने त्यांच्याप्रमाणे करतात; त्यांना सत्त्व-रज-तमातील कोणती गती प्राप्त होते, ते, हे पुरुषोत्तमा! तू मला सांग."

श्रद्धेचे त्रिविधत्व::::

श्रद्धेचे तीन प्रकार

तंव वैकुंठपीठींचें लिंग। जो निगमपद्माचा पराग।
जिये जेयाचेनि हे जग। अंगच्छाया।।१७-४६।।
काल सावियाचि वाढु। लोकोत्तर प्रौढु।
अद्वितिय गुढु। आनंदघनु।।४७।।

इयें श्लाघिजती जेणें बिकें। तैं जेयाचें आंगीं असिकें।
तो श्रीकृष्ण स्वमुखें। बोलत असे।।४८।।

"तेव्हा वैकुंठपीठीचे साक्षात शिवलिंग, वेदकमलाचा साक्षात पराग, साक्षात अभिवृद्ध असा काल, लोकोत्तर प्रौढत्व, अद्वितीय गूढता, आनंदघनता हे ज्याच्या अंगीचे गुण म्हणून वाखाणले जातात; ज्याच्या छायेवरून हे जग प्रवर्तते; असा तो निजसुखानंद सावळा श्रीकृष्ण स्वमुखाने म्हणू लागलाः

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा।
सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रुणु।।१७-२।।

"प्राण्यांची ती स्वाभाविक श्रद्धा सात्त्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारांची असते."

अर्जुनाचा प्रश्न सामान्य मनुष्यांशी व मुमुक्षू साधकांशी संबंधित आहे, हे उघडच आहे. असे असले तरी सर्व प्राणिमात्रांच्या हितकर्त्या त्या गोपालकृष्णाने हा प्रश्न गांभीर्यपूर्वक हाताळला आहे. प्रथमतः श्रद्धेचे तीन प्रकार असतात, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. श्रीमच्छंकराचार्य म्हणतात की प्राण्यांच्या अंतकाली जन्मजन्मांतरीच्या धर्म-अधर्मादी संस्कारांमुळे जे संस्कार प्रकटतात, त्यांच्या समुदायास ***स्वभाव*** असे म्हणतात. या वासनादी संस्कारांनुरूप ही श्रद्धा स्वाभाविकरीत्या तीन प्रकारची असते.

ज्ञानदेव म्हणतातः

म्हणे पार्था तुझा अतिसो। घेईं गां आम्ही जाणतसों।
शास्त्राभ्यासाचा आडसो। मानितोसि कीं।।१७-४९।।
नुसधियाचि श्रद्धा। झोंबों पाहसी परमपदा।
तऱ्हीं तैसें हे प्रबुद्धा। सोहोपे नोहें।।५०।।
श्रद्धा म्हणितलियासाठीं। पातेजो नये किरीटी।
काय द्विजु अंत्यजघृष्टी। अंत्यचि नोहे।।५१।।
गंगोदक जऱ्हीं जालें। तऱ्हीं मद्यभांडा आलें।
तैं घेवों येई काहीं केले। विचारी पां।।५२।।
चंदनु होय शीतलु। परि अग्नीसीं पावे मेल
तैं हातीं धरिला जाळूं। न शके काईं।।५३।।

"हे पार्था! तुझी सामान्य जन आणि साधकांसाठीची तळमळ मी जाणतो. त्यांना शास्त्राभ्यासाची फार अडचण येते, असे तू म्हणतोस ना! पण अर्जुना! निव्वळ श्रद्धेने परमपदापर्यंत पोहोचणे तितकेसे सोपे नाही. हे चतुर अर्जुना! श्रद्धा ही लाखमोलाची खरी, पण केवळ श्रद्धेच्या सामर्थ्यावर कार्यभाग होईल, असे विश्वासू नये. अरे! द्विज अंत्यजाच्या संसर्गाने त्याच्यासारखाच होत नाही का! चंदन शीतल असला तरी तो जेव्हा अग्नीस जवळ करतो, तेव्हा जाळू शकत नाही काय!"

कां कीडाचियें आटतियें पुटीं। पडिलें सोलें किरीटी।
घेतलें चोखासाटीं। नागवेना।।१७-५४।।
तैसें श्रद्धेचें दलवाडें। आंगें कीर चोखडें।
परि प्राणियांचां पडे। विभागीं जैं।।५५।।

"हिणकस धातू जाळून ज्या मुशीत शुद्ध केले जाते, त्या मुशीत जर शुद्ध सोने आटविले, तर किडाळाच्या संसर्गाने त्याचे शुद्धत्व कमी नाही का होत! असे सोने चोख म्हणून घेणारा फसणार नाही का! श्रद्धेचेही तसेच आहे. श्रद्धा उत्तम खरी; पण ती प्राण्यांच्या स्वभावानुसार वेगवेगळ्या स्वरूपाची होते."

स्वभावज श्रद्धा

स्वभावजन्य गुणदोषांनी त्या श्रद्धेचे फलसुद्धा विविध प्रकारे प्राप्त होतेः

तैं प्राणिये तंव स्वभावें। अनादिमायाप्रभावें।
त्रिगुणाचेंचि आघवें। वलिलें आहाति।।१७-५६।।
तेथही दोन गुण खांचती। मग एक धरी उन्नती।
तैं तैसियाचि होती वृत्ती। जिवांचियां।।५७।।
वृत्तीऐसें मन धरिती। मनाऐसीं क्रिया करिती।
केलियां ऐसीं वरिती। मरौनि देहें।।५८।।
बीज मोडे झाड होये। झाड मोडें बीजीं सामायें।
ऐसेनि कल्पकोडीं जाये। परि जाति न नशे।।५९।।
तियांपरी यियें अपारे। होतां जातां जन्मांतरें।
परि त्रिगुणत्व न व्यभिचरे। प्राणियांचें।।६०।।
म्हणौनि प्राणियांचा पैकीं। पडिली श्रद्धा अवलोकीं।
तैं होय गुणासारिखी। तिहीं ययां।।६१।।

"अनादी अशा मायेच्या प्रभावाने सगळे प्राणी मूलतःच तीन गुणांचे बनलेले आहेत. त्यातूनही जेव्हा जेव्हा दोन गुण दडपून टाकून एकेक गुण प्रबळ होतो, तेव्हा जीवांस त्या त्या प्रबल गुणाप्रमाणे प्रवृत्ती उत्पन्न होते. वृत्तीनुसार मनाची प्रवृत्ती होते अन त्याप्रमाणे कर्म घडते. मेल्यानंतर त्या कृतकर्मानुरूप ते देह स्वीकारतात. बीज नाश पावते, ते झाडाला जन्म देऊन व झाड बीजाला जन्म देऊन नष्ट होते. असा हा क्रम कोट्यवधी वर्षे चालला, तरी त्या झाडाची जात नष्ट होत नाही. त्याचप्रमाणे अगणित जन्मजन्मांतरीसुद्धा प्राण्यांचे त्रिगुणमयत्व पालटत नाही. म्हणून प्राणिगणांच्या वाट्यास येणारी श्रद्धासुद्धा या त्रिगुणांसारखीच होते."

विपायें वाढें सत्त्वशुद्ध। तेव्हा ज्ञानासी करी साद।
परि एका दोघे वोखद। एर आहाति।।१७-६२।।
सत्त्वाचेनि आंगलगें। श्रद्धा मोक्षफलां रिगे।
तंव रजतम उगे। कांपां रहाति।।६३।।
मोडौनि सत्त्वाचि त्रायें। रजोगुण आकाशीं जाये।
तेव्हां तैचि श्रद्धा होये। कर्मकेरसुणी।।६४।।
मग तमाची उठी आगी। तेव्हां तैंचि श्रद्धा भंगीं।
हो लागे भोगालागीं। भलतेयां।।६५।।

"अवचित शुद्ध सत्त्वगुण प्रबळ झाला, तर तो ज्ञानास साद देऊ लागतो. सत्त्वानुरूपा श्रद्धा जेव्हा मोक्षफळास झोंबू पाहाते, त्यावेळी रजतम हे उगाच स्वस्थ बसतील का! कारण उपजतच हे दोघे त्याचे मारेकरी आहेत. ते सत्त्वाचा कणा मोडून काढून

आपण मनोवृत्तीच्या वारूवर आरूढ होतात. रजोगुण जेव्हा आकाशापर्यंत जाऊन भिडतो, तेव्हा कर्म करण्यास प्रवृत्त करतो. तेव्हा असे रूप ती श्रद्धा धारण करते. तमोगुण भडकून उठतो, तेव्हा तीच श्रद्धा वाटेल त्या भोगांसाठी प्रवृत्त होते."

सर्वच मनुष्ये सश्रद्ध

याप्रमाणे ***स्वभाव*** व ***श्रद्धा*** यांचे गुणादी संस्कारांनुसार जे रूप प्रकटते, त्याप्रमाणे प्राणिमात्र वागतात. त्यांचा पिंड त्या श्रद्धेच्या अनुरूप होतो. म्हणून गोपालकृष्ण म्हणतात:

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सा।।१७-३।।

"हे भारता! श्रद्धा म्हणजे आस्तिक्यबुद्धी. सर्व प्राणिमात्रांच्या भिन्नभिन्न विशिष्ट अशा संस्कारांनी युक्त असणाऱ्या आपापल्या अंत:करणानुरूप त्यांची श्रद्धा असते. कारण की संसारी जीवात्मा श्रद्धामय असतो."

ज्ञानदेव म्हणतात:

एवं सत्त्वरजतमा-। वेगळीं श्रद्धा सुवर्मा।
नाहीं गां जीवग्रामा-। माजीं ययां।।१७-६६।।
म्हणौनि श्रद्धा स्वाभाविक। असें पैं त्रिगुणात्मक।
रजतमसात्त्विक। भेदीं इहीं।।६७।।
जैसें जीवनची उदक। परि विषीं होये मारक।
कां मीरयामाजीं तिख। उंसीं गोड।।६८।।
तैसा बहुंवसें तमें। जो सदाचि होय निमें।
तेथ श्रद्धा परिणमें। तैंचि होऊनि।।६९।।
मग काजळां आणि मसीं। न दिसें विवंचना जैसीं।
तेवीं श्रद्धा तामसीं। सिनी नाहीं।।७०।।

"हे मर्मज्ञ अर्जुना! या जीवसमुदायाची श्रद्धा सत्त्व, रज व तमोगुणी यावेगळी नसते. म्हणूनच त्या त्रिगुणात्मक श्रद्धेचे सत्त्व, रज व तम हे स्वाभाविक भेद आहेत. उदक हे स्वभावत:च जीवन देणारे आहे. पण विषाबरोबर ते मारक होते. मिऱ्यामध्ये ते तिखट होते; तर उसात गोडी आणते. त्याप्रमाणेच तमाच्या प्राबल्यावस्थेत जो देह ठेवतो, त्याच्याठायी श्रद्धा तमोगुण धारण करते. त्यावेळी त्या श्रद्धेत व तमोगुणात काहीच फरक नाही. काजळ व त्यापासून केलेल्या शाईच्या रंगात जसा काहीच फरक नसतो, त्याप्रमाणे अशा माणसाची श्रद्धा तमागुणाचीच असते."

तैसीचि राजसीं जीवीं। रजोमय जाणावीं।
सात्त्विकीं आघवीं। सत्त्वाचीच।।१७-७१।।
ऐसेनि हा सकलु। जगडंबरु निखलु।
श्रद्धेचाचि केवलु। वोतला असे।।७२।।
परि गुणत्रयवशें। त्रिविधपणाचेनि लासें।
श्रद्धें जैं उठिलें असे। तैं वोलख तूं।।७३।।
तऱ्हीं जाणिजे झाड फुलें। कां मानस जाणिजे बोलें।
भोगें जाणिजे केलें। पूर्वजन्मींचें।।७४।।
तैसीं जिहीं जिहीं चिह्नीं। श्रद्धेची रूपें तिन्हीं।
देखिजती तैं वानी।अवधारीं पां।।७५।

"त्याचप्रमाणे राजसगुणाचे प्राबल्य असता देह ठेवणाऱ्या प्राण्याची श्रद्धा रजोमय व सत्त्वगुण बलवत्तर असतांना मरण पावणाऱ्याची श्रद्धा सत्त्वगुणी समजावी. हे समस्त जगडंबर असे केवळ श्रद्धामयच आहे. फक्त त्रिगुणवश होत्साते त्यातील प्राणिमात्रांच्या अंत:करणात श्रद्धेचे जे विविध प्रकारचे नर्तन होते, ते तू जाणून घे. फुलावरून जशी झाडाची जात ओळखता येते; माणसाच्या बोलांवरून जसे त्याचे अंत:करण ओळखता येते; किंवा प्रारब्धभोगांवरून जसे पूर्वजन्मीचे कर्म ओळखता येते; त्याचप्रमाणे कोणकोणत्या लक्षणांद्वारे श्रद्धेची ही तिन्ही रूपे प्रकट होतात, ती मी सांगतो. ऐक!"

त्रिगुणांनुरूप श्रद्धालक्षणे

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तमसा जनाः।।१७-४।।

"सात्त्विक श्रद्धेने युक्त असे मनुष्य देवांची उपासना करतात. राजस श्रद्धेने घडलेले पुरुष यक्षराक्षसांची पूजा करतात. तर इतर तामसी श्रद्धेने बनलेले लोक प्रेते, भूते व सप्तमातृकादी गण पूजितात."

तऱ्हीं सात्त्विक श्रद्धा। जेयांचा होय बांधा।
तेयां बहुतकरूनि मेधा। स्वर्गीं आथी।।१७-७६।।
तैं विद्याजात पढति। यज्ञक्रियें निवडिती।
किंबहुना पडती। देवलोकीं।।७७।।
आणि श्रद्धा राजसा। घडलें जैं वीरेशा।
तैं भजती राक्षसां। खेचरां हन।।७८।।
श्रद्धा जैं कां तामसी। तैं मी सांगेन तुजपासीं।
जैं कां केवल पापराशीं। अतिकर्कशी निर्दयत्वें।।७९।।
जीववधें साधूनि बली। भूतप्रेतकुलें मैलीं।
स्मशानीं सायंकालीं। पूजिती तैं।।८०।।
तैं तमोगुणाचें सार। काढूनि निर्मिलें नर।
जाण तामसियेचें घर। श्रद्धेचे तैं।।८१।।
ऐसीं इहीं लिंगीं। त्रिविध श्रद्धा जगीं।....।।८२।।

"ज्यांचा पिंड सात्त्विक श्रद्धामय असतो, त्यांची बुद्धी स्वर्गादींकडे वळते. ते विद्यावान होतात. यज्ञक्रिया आचरतात. अन सहसा देवलोकी गमन करतात. राजस श्रद्धेचे लोक यक्षराक्षसांना भजतात. अतीव क्रूरतेने व निर्दयीपणाने युक्त असणारी तामसी प्रकृतीची श्रद्धा तर निव्वळ पापांची खाणच म्हणेनास! जिवांना बळी देऊन, स्मशानी सायंकाळी भूतप्रेतादी अमंगल गणांचे पूजन करणारे ते नर, तमोगुणाचे अर्कच काढून निर्मिलेले असतात. तामसी श्रद्धेचे ते जणू घरच असतात.

<u>उपासनेच्या खाणाखुणा</u>

अशा रीतीने या त्रिविध रूपलक्षणांनी श्रद्धा या जगी मूर्त होते."

सात्त्विक श्रद्धा जतन करावी

...। पैं हे ययालागीं। सांगत असे।।१७-८२।।
जै हे सात्त्विक श्रद्धा। जतन करावी प्रबुद्धा।
एरी दोन्हीं विरुद्धा। सांडाविया।।८३।।
हे सात्त्विक मती जेयां। निर्वाहती होय धनंजया।
बागुल नोहे तेयां। कैवल्य तैं।।८४।।
तो न कां पढो ब्रह्मसूत्र। न लोढो सर्व शास्त्र।
सिद्धांतु न होतु स्वतंत्र। तेयाचां हातीं।।८५।।
परि श्रुतिस्मृतींचें अर्थ। जैं आपण होऊनि मूर्त।
अनुष्ठानें जगा देत। वडील जैं जैं।।८६।।
तेयांचीं आचरती पाऊलें। पाऊनि सात्त्विकी श्रद्धा चाले।
तो तैंचि फलें ठेविलें। ऐसें लाहे।।८७।।

"हे सुजाणा! यातील सात्त्विक श्रद्धा जतन करावी व इतर दोन्हींचा त्याग करावा. राजस व तामस श्रद्धा ज्ञानाविरुद्ध असतात. त्यांच्यामुळे प्राणिमात्र अधःपतित होतात. परंतु जो सात्त्विक बुद्धीची जोपासना करतो, त्याला कैवल्य आपल्या हाती येईल की नाही, ही भीती नाही. श्रुतिस्मृतींचे अर्थ आपल्या आचरणाने प्रत्यक्ष करून व अनुष्ठून जगापुढे त्यांचा आदर्श ज्या श्रेष्ठींनी घालून दिलेला असतो, त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जे लोक चालतात, त्यांची बुद्धी सिद्धांतांचा अर्थ आकळण्याजोगी समर्थ जरी नसली व त्यांनी जरी ब्रह्मसूत्रादी ग्रंथ व इतर शास्त्रे अभ्यासली नसली, तरी त्यांना श्रेष्ठांना जे फळ त्यांच्या स्वतःच्या अनुष्ठानांनी प्राप्त झाले, तेच अनायासे प्राप्त होते."

पैं एकु दीपु लावी सायासें। आणिक तेथें लाऊं बैसें।
तऱ्हीं तो कां प्रकाशें। वंचिजे गां।।१७-८८।।
कां एकें मोलें अपार। वेंचूनि केलें धवलार।
तो सुरवाडु वस्तीकर। न भोगी काईं।।८९।।

"एखाद्याने प्रयत्नपूर्वक एक दीप लावला, तर दुसऱ्याला त्यावरून आपला दिवा जसा लावून घेता येतो व तो दिवा जसा प्रकाश देण्यास काचकूच करत नाही; श्रमसायासाने दिवा लावला तरच प्रकाश त्याला उजळतो अन विनासायास लावलेल्या दिव्याकडून प्रकाश दिला जाणार नाही असे थोडेच असते! किंवा एखाद्याने अपार द्रव्यराशी खर्च करून घर बांधले, तर ते त्यालाच सुखाने राहण्यास देते अन वाटेच्या वाटसरूने त्यात वसती केल्यास त्याला सुखोपभोग देत नाही, असे आहे काय!"

हे असो जैं तळें करी। तैं तेयाचिची तृषा हरी।
कीं सुआरासींचि अन्न घरीं। येरां नोहे।।१७-९०।।
बहुत काय बोलो पैं गां। एका गौतमासीचि गंगा।
एरां समस्ता काय जगा। वाहाल जाली।।९१।।
म्हणौनि आपुलियां परी। शास्त्र अनुष्ठिती कुसरी।
जाणें तेयांतैं श्रद्धा जो वरी। तो मूर्खुही तरे।।९२।।

"एखाद्याने तळे बांधले, तर ते काय फक्त त्याची एकट्याचीच तहान भागविते की काय! किंवा ज्या स्वयंपाक्याने अन्न शिजविले, त्याला एकट्यालाच ते खाता येते अन इतरांना त्याचा आस्वाद घेता येत नाही, असे आहे का! फार काय सांगावे! अरे! गौतमासाठी प्रकटलेली गंगा, त्याच्यासाठी तेवढी गंगा अन इतरांसाठी काय ओहोळ होते काय! म्हणून ज्या श्रेष्ठांनी आपापल्या श्रद्धेनुसार व अभ्यासाप्रमाणे शास्त्रांचे काटेकोर अनुष्ठान केले असते, त्यांच्या त्या आदर्शाचा कित्ता गिरवणारे मूर्खसुद्धा अशा स्वतःच्या श्रद्धेमुळे भवसागर तरून जातात."

आसुरी निष्ठा

परंतु अशी सात्त्विक श्रद्धा प्राप्त झालेले लोक सहस्त्रांमध्ये क्वचितच सापडतात. शास्त्रविधी माहीत नसतांनाही देवादिकांचे पूजन करणारे असे थोडे लोक सोडले, तर इतरेजन अधिकांश राजसी व तामसी निष्ठा असणारेच असतात. हे बहुधा आसुरी प्रवृत्तीच्याच वर्गात समाविष्ट होतात. त्यांच्या आचरणाविषयी भगवान म्हणतातः

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः।
दम्भाहङ्कारसंयुक्ताः कामरागबलान्विताः।।१७-५।।
कर्शयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः।
मां चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान्।।१७-६।।

"असे लोक शास्त्रात ज्याचे विधान नाही, अशी अशास्त्रविहित व इतर प्राणी व स्वतःच्या शरीराला व मनाला घोर पीडा करणारी; दंभ, अहंकार, काम, राग, बलाचा दर्प इ.नी युक्त असणारी अनुष्ठाने व तपे आचरतात. ते अविवेकी पुरुष शरीरातील इंद्रियादी करणसमुदाय आणि अंतरात्म्यास कष्टवत, त्यांच्या बुद्धी व कर्माचा साक्षी अशा ईश्वराची अनुज्ञा न घेताच अशी जी अनुष्ठाने व तपे करतात; त्यांना आसुरी निष्ठेचे असे निश्चयपूर्वक म्हणता येते."

अशांची संगत व आदर्श ठेवू नये. अशांबद्दल ज्ञानदेवही म्हणतातः

ना शास्त्राचेनि कीर नांवें। खाकरोंही नेणती जीवें।
परि शास्त्रज्ञांही शिवें। टेंकों नेदिती।।१७-९३।।
वडिलांचियां क्रिया। देखौनि वांती वांकुलियां।
पंडितां डाकुलियां। वाजवीति।।९४।।
आपुलेनिची आटोपें। धनित्वाचेनि दर्पें।
सांचचि पाखांडाची तपें।आदरिती।।९५।।

"त्यांना शास्त्राबद्दल यत्किंचितही माहिती नसते. एवढेच काय पण शास्त्रज्ञानाला ते आपली शीवसुद्धा ओलांडू देत नाहीत. ज्येष्ठ व श्रेष्ठ ज्ञात्यांच्या कर्मास ते वेडावून दाखवितात अन पंडितांच्या आख्यानांना जांभया देत चुटक्या वाजवतात.

अहंमन्यतेच्या भरात संपत्तिमदाने प्रेरित होऊन नास्तिक लोकांची तपे आचरतात.''

आपुलियां पुढिलांचियां। आंगीं घालूनि कातिया।
रक्तमांसा प्रणीतया। भरभरों।।१७-९६।।
रिचविती जलतकुंडीं। लाविती चेड्याचां तोंडीं।
नवसियां देती उंडी। बालकांची।।९७।।
आग्रहाचियां उजरियां। क्षुद्र देवता वरिया।
अन्नत्यागें सातरियां। टाकती एक।।९८।।
अगां आत्मपरपीडा। बीज तमक्षेत्रीं सुहाडा।
पेरिती मग पुढां। तैंचि पिकें।।९९।।

''स्वत:च्या व इतर प्राणिमात्रांच्या सर्वांगात तीक्ष्ण शस्त्रे वापरून जखमा करतात. त्यातून वाहणाऱ्या रक्तांची व मांसाने भरलेली पात्रे जळत्या आगीत ओततात आणि भूतप्रेतादी योनींच्या तोंडी त्यांचा प्रसाद करतात. तामसी दैवतांना नवस म्हणून बाळकांचा बळी देतात. दृष्टांत झाला असे मानून क्षुद्र देवतांना भजतात व त्यांचे व्रत म्हणून दिवसेंदिवस अन्नत्याग व उपोषणे करतात. स्वात्म व पर यांना अशा पीडा देणाऱ्या आचरणाच्या त्या लोकांनी हे असे तमोलक्षणी साधनेचे जे बीज आपल्या तमोगुणबलवंत भूमीत पेरलेले असते, ते त्यांच्या जन्मजन्मांतरी भरघोस असे तमोमयी श्रद्धेचे उद्दंड पीक त्यांच्या पदरी टाकत असते.''

आसुरांचे दर्शनसुद्धा निषिद्ध

बाहु नाही आपुलियां। आणि नावेतेही धनंजया।
न धरी होय तेयां। समुद्रीं जैसें।।१७-१००।।
कां वैद्यातैं करी सला। रसु सांडीं पायखोलां।
तो रोगियां जेवीं विवला-। सवता होय।।१०१।।
नाना पडिकाराचेनि सलें। काढी आपुलेचि डोले।
तैं वानवसां आंधलें। जैसें ठाके।।१०२।।
तैसें तेयां आसुरां होये। जैं निंदूनि शास्त्रांची सोये।
सैंघ धांवताती मोहें। आडवी जैं गां।।१०३।।

''बाहूत जोर नसलेल्याने समुद्रात नाव धिक्कारावी, किंवा रोग्याने वैद्याचा राग करून औषध पायांतळी सांडून द्यावे, त्यांची जशी समुद्रात अथवा रोगापायी दुर्गती होते; डोळस वाटाड्याचा राग करून अधू नेत्राच्या मनुष्याने आपले डोळे काढून टाकावेत, तर त्याला पावलोपावली जसे खाचखळग्यात पडावे लागते; तसे शास्त्रांची अवहेलना करणाऱ्या अन मोहग्रस्त झालेल्या आसुरांची अवस्था होते.''

कामु करवी तैं करिती। क्रोधु मारवी तैं मारिती।
किंबहुना मातें पुरती। दु:खाचां गुंडा।।१७-१०४।।
आपुला परावा देहीं। दु:ख देती जैं जैं कांहीं।
मज आत्मया तेतुलाही। होय शीणु।।१०५।।
पैं वाचेचेनिही पालवें। पापियां तेयां नातलावें।
परि पडिलें सांगावें। त्यजावया।।१०६।।

''कामाचा आश्रय करून तो करायला लावेल ते, ते लोक करतात; क्रोधपूरित होऊन वाटेल त्याचा वध करतात. सर्वांतर्यामी असणाऱ्या मला असे कष्टवून ते दगडाधोंड्यांच्या राशीत गाडतात. स्वत:ला व इतरांना असे दु:ख पोहोचवून ते मज आत्मयाला पीडतात. काय सांगावे! वाचेच्या पदरानेही त्यांना स्पर्शू नये, पण त्या पाप्यांचा त्याग करता यावा म्हणून हे सर्व वर्णन करावे लागत आहे.''

प्रेत बाहिरें घालिजे। कां अंत्यजु संभाषणीं त्यजिजे।
हे असो हातें क्षालिजे। कश्मलातैं।।१७-१०७।।
तेथ शुद्धिचियां आशा। तो लेपु न मनवे जैसा।
तयांतैं सांडावेयां तैसा। अनुवादु हा।।१०८।।
परि अर्जुना तूं तेयांतैं। देखसि तैं स्मर हो मातें।
जैं आन प्रायश्चित्त येथें। मानेल ना।।१०९।।

''प्रेताला घराबाहेर करण्यासाठी हात लावावा लागतो; किंवा अंत्यजालासुद्धा त्याला हाकलण्याकरता हाकारावे लागते. घाण धुण्यासाठी हात वापरावे लागतात. अशा सर्व प्रसंगी शुद्धत्व राखण्यासाठी जसे हे स्पर्शादी वर्ज मानले जात नाहीत, त्याचप्रमाणे त्या रजोतमगुणी पाप्यांना ओळखता येऊन त्यांचा त्याग करता यावा, म्हणून हे सर्व सांगणे भाग पडते आहे. परंतु अर्जुना! तू मात्र अशा पापिष्टांना कधी साधे जरी पाहिलेस तरी त्या पापापासून वाचण्यासाठी प्रायश्चित्त म्हणून माझे स्मरण करत जा.''

अशा नष्ट लोकांचा संपर्क टाळावाच आणि आपण मात्र सत्त्वाचा आश्रय करावा,असे ज्ञानदेवांचे आवर्जून सांगणे आहे.

सात्त्विक श्रद्धेची जोपासना

म्हणौनि श्रद्धा जैं सात्त्विकी। पुढती तैंचि पैं एकीं।
जतन करावी निकीं। सर्वांपरी।।१७-११०।।
तऱ्हीं धरावा तैसा संगु। जेणें पोखें सात्त्विक लागु।
सत्त्ववृद्धिचां भागु। आहारु घेपे।।१११।।
एऱ्हवीं तऱ्हीं पाही। स्वभाववृद्धिचां ठाईं।
आहारावांचूनि नाही। बली हेतु।।११२।।
प्रत्यक्ष पाहे पां वीरा। जो सावध घे मदिरा।
तो होऊनि ठाके माजिरा। तियेचि क्षणीं।।११३।।
कां जो साविया अन्नरसु सेवी। तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं।
काएं ज्वरु जालियां निववीं। पयादिक।।११४।।

''या कारणासाठी मनुष्यमात्रांनी सात्त्विक गुणधर्माची जी श्रद्धा असते, ती जतन करावी. म्हणून सत्त्ववृत्तीचे पोषण करील अशी संगत ठेवावी व आहारसुद्धा सात्त्विकच असावा. उदाहरणच द्यायचे जाले तर एखादा ज्या क्षणी मद्य घेतो, त्याच वेळी त्याची शुद्ध हारपून झिंगून जातो की नाही! अरबटचरबट अन्नपदार्थ सेवन करणारा कफवातादी प्रकृतीचा होतोच की नाही! विषम प्रकृतीचे

अन्नसुद्धा वमन होऊन पडतेच ना! जसे ज्वरात दूध हे विषासमान असल्याने त्याच्यापासून हानिसुद्धा होते की नाही!"

ना तऱ्हीं अमृत जेयापरी। घेतलियां मरण वारी।
कां आपुलियां ऐसें करी। जैसें विख।।१७-११५।।
तेवीं जैसा घेपें आहारु। धातु तैसाचि होये आकारु।
आणि धातुऐसा अंतरु। भावो पोखे।।११६।।
जैसें भांडियाचेनि तापें। आंतुलें उदकही तापे।
तैसीं धातुवशें आटोपें। चित्तवृत्ती।।११७।।
म्हणौनि सात्त्विकु रसु सेविजे। तैं सत्त्वाची वाढी पविजे।
राजसा तामसा होईजे। येरीं रसीं।।११८।।
तऱ्हीं सात्त्विकु कोण आहारु। राजसा तामसा कायी आकारु।
हे सांगो आदरु। आकर्णनीं।।११९।।

"विष घेतले की मनुष्य दगावतो व तोच अमृताने अमर होतो. म्हणून मनुष्य ज्या प्रकृतीचा आहार घेतो, त्याच्यासारखे सप्तरस देहादीत वृद्धिंगत होतात अन धातूंसारखाच मनुष्यस्वभाव होतो, हे निर्विवाद आहे. स्वभाव जसा असेल, तोच भाव अंतःकरणात वसतो. ज्याप्रमाणे भांड्याबरोबर आतले पाणीसुद्धा तापते, त्याप्रमाणे धातुयोगे चित्तवृत्तीही त्यासमच होतात. म्हणून सात्त्विक अन्नरससेवनाने सत्त्वगुण वृद्धिंगत होतो व श्रद्धासुद्धा सत्त्वात्मक होते. त्याव्यतिरिक्त इतर रसांच्या सेवनाने रज-तम प्रवृत्ती वाढते. यासाठी सात्त्विक आहार कोणते आहेत, ते तुला सांगतो. नीट ऐक!"

आहारभेद::::

श्रद्धेनुरूप आहारादी

याप्रमाणे आहारानुरूप वृत्ती असतात, हे तत्त्व येथे प्रतिपादन केले आहे. साधकांससुद्धा आहारपेयांविषयी याच कारणाने अति दक्ष रहावे लागते. त्यांच्या हितासाठी गोपालकृष्णांचे मार्गदर्शन असे आहेः

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः।
यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं श्रृणु।।१७-७।।

"सर्व प्राणिमात्रांना आवडणाऱ्या आाहाराचे असे हे तीन प्रकार आहेत. त्याचप्रमाणे ***यज्ञ, तप*** तसेच ***दान*** हीसुद्धा तीन प्रकारची असतात. त्यातील भेद ऐक."

सात्त्विक आहार

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः
सात्त्विकप्रियाः ।।१७-८।।

"आयुष्य, सत्त्व, बल, आरोग्य, सुख व प्रीती यांची वृद्धी करणारे, जात्याच सुरस, स्निग्ध, शरीरास स्थिरत्वप्रदायक, स्वादिष्ट व अंतर प्रसन्न करणारे असे आहार सात्त्विक वृत्तीच्या लोकांना प्रिय असतात."

आणि एकसरें आहारा। कैसेनि तिनीं मोहरां।
जालियां तेही वीरा। रोकडें दाऊं।।१७-१२०।।
तऱ्हीं जेवणाचिया रुची। निष्पत्ति कीं बोनियांची।
आणि जेवतां तंव गुणांची। दासी येथ।।१२१।।
जैं जीव कर्त्ता भोक्ता। तो गुणास्तव स्वभावता।
पावोनियां त्रिविधता। चेष्टे त्रिधा।।१२२।।
म्हणौनि त्रिविधु आहारु। यज्ञुही करित त्रिप्रकारु।
तप दान हन व्यापारु। त्रिविधचि तैं।।१२३।।

"आणि आहाराचेच, पण त्रिविध प्रकार कसे आहेत, तेही अर्जुना! तुला स्पष्ट सांगतो. जिवाच्या रुचीनुसार त्याचे आहार पदार्थ असतात व जीव तर त्रिगुणांची दासी असावी तसा असतो. कर्ता व भोक्ता जीव केवळ त्रिगुणांच्या उपजत मिश्रणाप्रमाणे त्रिविध प्रकारचा होऊन तीन वेगवेगळ्या प्रकारे वर्तत असतो. म्हणूनच त्याच्या स्वभावाप्रमाणेच त्याच्या आहाराचे, तसेच यज्ञ, तप, दानादी व्यापाराचेही त्रिविध प्रकार उद्भवतात. ते सर्व मी सांगतो."

पैं आहारलक्षण पहिलें। सांगो जैं म्हणितलें।
तैं आईक गां भलें। रूप करूं।।१७-१२४।।
तऱ्हीं सत्त्वगुणाकडें। जैं दैवें भोक्ता पडे।
तैं माधुरीं रसीं वाढे। मेचु तेयां।।१२५।।
आंगेंचि द्रव्यें सुरसें। जैं आंगेंचि पदार्थ गोडसें।
आंगेचि स्नेहें बहुंवसें। सुपक्वें जियें।।१२६।।
आकारें नव्हती ढगलें। स्पर्शें अति मवाळें।
जिभेलागीं स्नेहाळें। स्वादें जियें।।१२७।।
रसें गाढीं वरी ढिलीं। द्रवभावें आथिलीं।
ठायेंठावों सांडिलीं। अग्नितापें।।१२८।।
आंगें सानें परिणामें थोरु। जैसें गुरुमुखींचें अक्षरु।
तैशीं अल्पीं जिहीं अपारु। तृप्ति राहे।।१२९।।
आणि मुखीं जैसीं गोडें। तैसींचिही यैं आंतुलेहीकडें।
तियें अन्नीं प्रीती वाढे। सात्त्विकांसीं।।१३०।।

"प्रथम आहारलक्षण ऐक. दैववशात ज्याचा सत्त्वगुणाकडे ओढा असतो, त्याला मधुररसाचेच स्वभावतः आकर्षण असते. जे पदार्थ अंगचेच सुरस, रसभरित असतात, मधुर असतात, स्निग्ध असतात, सुपक्व असतात, बेढब आकाराचे नसतात; जिव्हेस मऊ लागतात; रुचि उत्पन्न करतात; स्वादिष्ट असतात, द्रवाने रसरसलेले असतात; मऊ पापुद्रा असलेले व चुबचुबीत असतात; ज्या पदार्थांना अग्निदाहाने करपवलेले नसते; गुरुमुखीचे अक्षर साने असले तरी जसे अतीव परिणामकारक असते, त्याप्रमाणे जे पदार्थ थोडेसेही सेवन केले, तरी अपार तृप्ती होते; जे गोड आस्वादाचे असतात; अन देहादी संघातास हितकारक ठरतात; अशांठायी सात्त्विक प्राण्यांची प्रीती असते."

एवंगुणलक्षण। सात्त्विक भोज्य जाण।
आयुष्याचें त्राण। नीच नवें हे।।१७-१३१।।
एणें सात्त्विकें रसें। जंव देहीं मेहो वरिषें।
तंव आयुष्यनदी उससें। देहाचि देहा।।१३२।।
सत्त्वाचिये कीर पालिती। कारण हाचि सुमती।
दिवसाचिये उन्नती। भानु जैसा।।१३३।।
आणि शरीरा हन मानसा। बलाचा पैं कुवासा।
हा आहारु तऱ्हीं दशा। कैंचीं रोगां।।१३४।।

सात्त्विक आहार हा सत्त्वाचा परिपोष करतो. नित्य असा आहार सेवन करणाऱ्या साधकांच्या अंतर्यामी पुढे पुढे शुद्ध सत्त्वगुणाचा उदय होऊन सुख, शांती व आनंद उपभोगण्यास मिळतात. हे ***सुख*** म्हणजे जे छत्तीस तत्त्वातले क्षेत्राशी संबंधित म्हटलेले आहे, तेच.

ज्ञानदेवमते ***"किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे। तेथ जैं होये। तेयां नाम सुख।।१३-१३१।।"***. याच सुखाच्या पोटी ***शांती*** अन् ***आनंद*** प्रकटतात. असा थोर परिणाम प्रकट करणाऱ्या सात्त्विक आहाराबाबत ज्ञानदेव पुढे सांगतातः

"मागे वर्णिलेल्या गुणलक्षणांनी युक्त असा हा सात्त्विक आहार असतो. याच्यापासून आयु नित्य सुबल प्राप्त करत वृद्धिंगत होतो. सात्त्विकरसपूर्ण असा हा आहाररूपी मेघ जेव्हा देही वर्षतो, तेव्हा आयुष्यरूपी नदी उफाणते. सूर्यामुळे दिवस जसा ऐन भरात येतो, त्याप्रमाणे अशा आहारामुळे सत्त्वगुण जोर करतो. आणि शरीराला व मनाला नित्य बल प्रदान करणारा हा सात्त्विक आहार घेणाऱ्याला रोगराईंचे अन दुःखादी तापांचे कसले भय उरणार!"

हा सात्त्विकु होय भाग्यु। तैं भोगावया आरोग्यु।
शरीरासीं भाग्यु। उदयलें जाणों।।१७-१३५।।
आणि सुखाचें घेणें देणें। निकें उवाया ये एणें।
हे असो वाढे साजणें। आनंदेसीं।।१३६।।
ऐसा सात्त्विकु आहारु। परिणमला थोरु।
करी हा उपकारु। सबाह्यासीं।।१३७।।

"ज्याच्या वाट्याला हा सात्त्विक आहार आला, त्याच्या देहास आरोग्य भोगण्याचे भाग्य प्राप्त झाले! या सात्त्विक आहाराने सुखाचा व्यापार भरभराटीस येतो अन जीवाचे आनंदाशी सख्य वाढते. अंतर्बाह्य असा उपयुक्त थोर परिणाम सात्त्विक आहार करतो."

राजसिक आहार

आतां राजसासीं प्रीती। जिहीं आथी रसीं।
करूं तेयांही व्यक्ती। प्रसंगें गां।।१७-१३८।।

आता प्रसंगोपात्त राजसिक प्रवृत्तीच्या मनुष्यास ज्या रसाची आवड असते, त्याबद्दलही सांगतो.

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः।।१७-९।।

"राजसिक मनुष्यांस आवडणाऱ्या आहारात कडवटपणा, खारटपणा, उष्णता, तीक्ष्णता, रूक्षता, दाहकत्व हे गुणधर्म अति प्रमाणात असतात. त्यांच्यामुळे दुःख, शोक व रोग प्राप्त होतात."

ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं मारे उणें कालकूट। तेणें मानें जैं कडुवट।
कां चुनियांहूनि दासट। आम्लीं हन।।१७-१३९।।
कणिकेतैं जैसें पाणी। तैसेंचि मीठ बांधया आणी।
तेतुलिंचि मेलवणी। रसांतराची।।१४०।।
ऐसें खारट अपाडें। राजसा तेयां आवडे।
उन्हाचेनि मिषें तोंडें। आगीचि गिळी।।१४१।।
वाफेचियां सिगे। वातीही लाविल्या लागे।
तैसें उन्ह मागें। राजसु तो।।१४२।।

"काळकूट विष मारक असते. त्यालाही लाजवतील इतके कडू अन्नपदार्थ त्याला मानवतात. चुन्याहूनही पोळणारे आंबट पदार्थ त्या राजसिकास प्रिय असतात. कणकेत भिजवण्यासाठी जेवढे पाणी घालावे, तेवढ्याच प्रमाणात मीठ घालून होणारी खारट चव आणि तितकेच इतर रस घालून तयार होणारा अन्नरस त्याला फार आवडतो. गरमागरम पदार्थांची तर त्याला इतकी आवड असते की जणू तो मुखाने अग्नीच गिळत असावा. त्या पदार्थांतून निघालेल्या उष्ण वाफेवर तर दिव्याची वातही पेटेल!"

वावदल पाडूनि ठायें। सावलु डाहारला आहे।
तैसें तीख तो खायें। जै घायेंवीण रुपे।।१७-१४३।।
आणि राखेहूनि कोरडें। आंतबाहेरी एक पाडें।
तो जिव्हादंशु आवडे। बहु तेयां।।१४४।।
परस्परें दातां। आदलु होय खातां।
तो गां तोंडीं घेतां। तोषों लागे।।१४५।।
आधींच द्रव्यें चुरमुरीं। वरि परिवडिजती मोहरी।
जियें घेतां होती धुंवारी। नाकें तोंडें।।१४६।।

"वावटळीत झाडे अंगावर पडून घाव लागावा, तितके मनुष्यास बेशुद्ध पाडणारे तिखट पदार्थ त्याला आवडतात. ते अंगावर घाव न करताच रुपतात. राखेच्या तोबऱ्यासारखे अंतर्बाह्य रूक्ष पदार्थ त्याच्या जिव्हेस प्रिय असा दंशच करतात, म्हणेनास! तो पदार्थ तर इतके कडक खातो की ते खातांना दात एकमेकांवर आदळून त्याचा संतोष वृद्धिंगत होतो. मुळातच झणझणीत पदार्थांवर मोहऱ्या फेसून ते पदार्थ खातांना नाकातोंडावाटे *हाय हाय* करून निघणारे सुस्कारे त्याला आनंद देतात."

हे असो उगें आगीतैं। म्हणें तैसें राइतें।
पढिये प्राणापरौतें। राजसासि गां।।१७-१४७।।
ऐसा न पुरौनि तोंडां। जिभा केला वेडा।
अन्नमिषें अग्नि भडाडा। पोटीं भरी।।१४८।।
तैसाचि लवंघा सुटे। मग भुई गां सेजे सांटे।
पाणियाचें न सुटे। तोंडौनि पात्र।।१४९।।

"तिखटजाळपणात अग्नीलाही मागे सारणारे रायते, लोणची त्या राजसिक वृत्तीच्या माणसास प्राणाहूनही प्रिय असतात. आणि हे असे कडू, आंबट, खारट, तिखट, तीक्ष्ण, रूक्ष, दाहक पदार्थसुद्धा त्याला पुरेसे पडत नाहीत व जिव्हालौल्याने वेडा झालेला तो मनुष्य अन्नाच्या मिषाने अग्नीलाही उणे आणतील, असे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ शोधून काढून भडाभडा पोटात ठासत असतो. आणि जसे हे आहारादिक तो सेवतो, त्यांच्या गुणाधिक्यानुसार त्याच्या अंगाचा दाह होऊन तो जमिनीवर गडबडा लोळतो; पाण्याचे पात्र सतत तोंडी लावतो; तरीही त्याच्या जीवाची होणारी तगमग शांत होत नाही."

तें आहार नव्हती घेतलें। व्याधिजाल जैं सुतलें।
तैं चेववावया घातलें। माजवण पोटीं।।१७-१५०।।
तैसें एकमेकां सलें। रोग उठती एकें वेलें।
ऐसा राजसु आहारु फलें। केवल दुःखें।।१५१।।
एवं राजसु आहारा। रूप केलें धनुर्धरा।
परिणामाचाही विसुरा। सांगितला।।१५२।।

"जराव्याधिदुःखदोष निर्माण करणाऱ्या व्याधिरूप भुजंगांना डिवचण्यासाठी निमित्त ठरणारे असे हे त्यांचे आहारादी असतात; ते शरीर-मनेंद्रियेपोषक अन्नपदार्थ नव्हेत. त्या सेवनाने त्यांच्या अंगीचे रोग एकमेकांशी स्पर्धा करत एकाच वेळी उफाळून येतात. अशा रीतीने राजस आहाराची केवळ दुःखदायक फलात परिणती होते. हे धनुर्धरा! याप्रमाणे हे राजस आहाराचे वर्णन मूर्तिमंत सांगितले व त्याचा परिणामही स्पष्ट केला."

तामसिक आहार

आतां तेयां तामसा। आवडे आहारु जैसा।
तैंही सांगो चिलसा। झणें तुम्हीं।।१७-१५३।।

"आता तामसी मनुष्यास आवडणारा आहारही सांगतो. पण त्याने किळस वाटेल."

साधकांच्या हितार्थ म्हणूनच केवळ अशा आहाराचे श्रीगोपाल वर्णन करतातः

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत्।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम्।।१७-१०।।

"जे भोजन अर्धवट शिजलेले, रसरहित, दुर्गंधीयुक्त, शिळे, उष्टे, आंबलेले, अपवित्र असते; तेच तामस मनुष्यास प्रिय असते."

ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं कुहिजलें उष्टें खातां। न मनिजे तेणें अनहिता।
जैसें कां उपहिता। म्हैसी खाय।।१७-१५४।।
निफजलें अन्न तैसें। दुपहरीं कां एरें दिसें।
अतिकरें तैं तामसें। घेईजे तैं।।१५५।।
ना तऱ्हीं अर्धें उकडिलें। कां निपट करपौनि गेलें।
तैसेंही काय चुकलें। रसा जैं येवों।।१५६।।
जेयां कां आथी निष्पत्ती। जेथ रसु धरी व्यक्तीं।
तैं अन्न ऐसिं प्रतीती। तामसा नाहीं।।१५७।।
ऐसेनि कंहीं विपायें। सदन्ना वरपडा होये।
तऱ्हीं घाणी सुटे तंव राहे। व्याघ्र जैसा।।१५८।।

"म्हैस जशी उष्टे आंबोण खाते, तसे आंबलेले उष्टेमाष्टे खातांना त्या तामसी मनुष्यास काही अहित वाटत नाही. सकाळी केलेले अन्न तो तामसी मनुष्य दोन प्रहरी अथवा बऱ्याचदा दुसऱ्या दिवशी खातो. रसहीन, अर्धकच्चे शिजवलेले किंवा अगदी करपलेले असे ते अन्न असते. त्याच्या दृष्टीने रसपूर्ण अन्न हे अन्नच नसते. त्यातूनही दैववशात त्याला सदन्न मिळाले, तर ते तो कुबटल्या, वाशाळल्याशिवाय खात नाही. वाघ जसे मेलेले जनावर त्याला घाण येईस्तोवर खात नाही, तसेच त्या तामसाचे असते."

कां बहुवेच दिवसीं वोलांडिलें। स्वादपणें सांडिलें।
शुष्क अथवा सडलें। गाभिणेंहीं हो।।१७-१५९।।
तेंही बालाचें हातवरी। चिवडिलें जैसें राडी करी।
कां सवें बैसोनि नारी। गोतांबील करी।।१६०।।
ऐसेनि कश्मलें जैं खाय। तैं तेयां सुखभोजन ऐसें होय।
परि येणेंही न धाय। पापियां तो।।१६१।।
मग चमत्कारु देखा। निषेधाचं आंबुखा।
जेयां कां सदोखा। कुद्रव्यासीं।।१६२।।
तेयां अपेयाचां पानीं। अखाद्याचां भोजनीं।
वाढविजे उतान्हीं। तामसें तेणें।।१६३।।

"खूप दिवसांचे शिळे, स्वादहीन, शुष्क, रूक्ष, सडलेले-कुजलेले, अळ्या पडलेले कदान्न, मूल जसे घाणेरड्या हातांनी जेवण चिवडून खाते तसे करून किंवा गोतावळ्यासह - स्त्रीसह एकाच पानात बसून ते तो खातो. अशा किळसवाणेपणाने खाल्ले, तरच त्याला भोजनापासून सुख वाटते. पण एवढ्यानेसुद्धा त्या पापिष्टाचे समाधान झाले तर! अन्यथा त्यात भर म्हणून तो ज्या द्रव्यांचा व पेयांचा शास्त्रांनी निषेध केला आहे, असे अमेध्य व अपेय पदार्थ घेण्यासाठी हपापलेलाच असतो."

एवं तामस जेवणारा। ऐसैसीं मेचु हे वीरा।
याचें फल दुसरां। क्षणीं नाही।।१७-१६४।।
जैं जेव्हांचि हे अपवित्र। शिवे तेयाचें वक्त्र।
तेव्हाचि पापा पात्र। जाला तो कीं।।१६५।।
यावरतैं जैं जेवीं। तैं जेविती वोज न म्हणावी।
पोटभरती जाणावी। यातना तैं।।१६६।।
शिरच्छेदें काय होए। कां आगीं रिघतां कैसें आहे।
हे जाणावें काईं पाहे। परि साहातुचि असे।।१६७।।
म्हणौनि तामसा अन्ना। परिणामु ना सिनाना।
न सांगोचि गां अर्जुना। देवो म्हणें।।१६८।।

"असे तामस प्रकृतीचे अन्न खाणाऱ्या त्याची बुद्धी तशीच तामसी होते. हे वीरा! त्या अन्नभक्षणाचे असे फळ मिळण्यासाठी दुसऱ्या क्षणाचीसुद्धा वाट पाहावी लागत नाही, तर ज्या क्षणी त्याचे मुख अशा अन्नाला स्पर्श करते, त्याच क्षणी त्याचे पाप लागून तो

तामसी दुष्प्रवृत्तींचा अंगीकार करतो. याप्रकारे तो जे जे खातो, त्याला भोजन असे म्हणवत नाही, तर ती एक प्रकारची पोटभरती असते. शिरच्छेदापासून होणाऱ्या यातना किंवा अग्नीत प्रवेशल्यावर होणाऱ्या यातना जशा असतात,त्याचप्रकारच्या यातना अशा अन्नापासून त्याला भोगाव्या लागतात. त्यांचे वेगळे वर्णन व त्या अन्नाचा हा असा परिणाम आतां सांगत बसत नाही."

यज्ञभेद::::

सात्त्विक यज्ञ

आतां ययावरी। आहाराची परी।
यज्ञुही अवधारीं। त्रिधा असे।।१६९।।
परि तिहींमाजी प्रथम। सात्त्विक यज्ञाचें वर्म।
आईक पां सुमहिम। शिरोमणी।।१७०।।

आतापावेतो श्रीकृष्णांनी आहाराच्या त्रिविध परी समजावून दिल्या. नंतर ते म्हणतातः

"श्रद्धेनुसार यज्ञही अशाच तीन प्रकारचे असतात. त्यात उत्कृष्ट प्रतीचा जो सात्त्विक यज्ञ असतो, हे सुविख्यात वीरेशशिरोमणी! तो ऐक."

अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः।।१७-११।।

"जो यज्ञ शास्त्रविधीने नियत केलेला व जो करणेच कर्तव्य आहे, या जाणिवेतून समाधानयुक्त मनाने फलेच्छा न करणाऱ्या मनुष्याकडून केला जातो, तो सात्त्विक यज्ञ होय."

तऱ्हीं एक प्रियोत्तमु-। वांचौनि वाढों नेदी कामु।
जैसा कां मनोधर्मु। पतिव्रतेचा।।१७-१७१।।
नाना सिंधूतैं ठाकौनि गंगा। पुढार न करिचि निगा।
कां आत्मा देखौनि उगा। वेदु ठेला।।१७२।।
तैसें जैं आपुलां स्वहितीं। वेंचुनियां चित्तवृत्ती।
नुरवितीचि अहंकृती। फलालागीं।।१७३।।

"पतिव्रतेची कामेच्छा फक्त पतीच्या ठायीच असते, अन्यत्र तिची पूर्तता करून घेण्याचा विचारसुद्धा जसा तिच्या मनाकडे फिरकत नाही; समुद्राला आपले सर्वस्व अर्पण केल्यावर गंगा जशी पुढे वाहत जात नाही; आत्मा दृश्यमान झाल्यावर वेद जसे पुढे बोलेनासे झाले; त्याचप्रमाणे सात्त्विक वृत्तीचे यजनशील पुरुष सर्व चित्तवृत्ती आपले हित साधण्यासाठी अर्पण करतात व फलेच्छेत मन गुंतू देत नाहीत."

पातलेयां झाडाचें मूल। मागुतें सरो नेणेचि जल।
जिरालें गां केवल। तेयाचांचि आंगीं।।१७-१७४।।
तैसें मनें देहें दोहीं। यजननिश्चयाचां ठाईं।
हारपौनि जैं काहीं। वांछितीना।।१७५।।
तिहीं फलवांच्छात्यागीं। स्वधर्मावांचूनि विरागीं।
कीजे जो यज्ञु सर्वांगीं। अलंकृतु।।१७६।।

"ज्याप्रमाणे झाडाच्या मुळापर्यंत एकदा पोहोचले की पाणी त्याच्यात जिरून जाते व माघारी परतत नाही; त्याचप्रमाणे त्या मनुष्याद्वारे एकदा का यजननिश्चय झला की त्या सत्त्वधीराची देहेंद्रियादी संघात व मन ही सर्व त्या संकल्पाच्या ठायी एकरूप होऊन जातात व स्वतःसाठी फलप्राप्तीची इच्छा करत नाहीत."

परि आरिसा आपणपें। डोलां जैसा घेपें।
कां तलहातींचें दीपें। रत्न पाहिजे।।१७-१७७।।
नाना उदिलें दिवाकरें। गमावा मग दिठीं भरे।
तैसा वेदनिर्धारें। देखौनियां।।१७८।।
तियें कुंडें मंडप वेदी। आणिकही संभारसमृद्धी।
तैं मेलवणी जैसी विधी। आपण केलीं।।१७९।।

"अशा पुरुषाने फलेच्छा त्यागून, स्वधर्म पालनासाठीच, पण इतरत्र विरक्त होऊन जो यज्ञ करावा, तो सर्वांगी परिपूर्ण व अलंकृत असा शोभतो. आरशात आपलाच डोळा आपल्याला जेवढा स्पष्ट दिसतो; किंवा तळहातावर घेतलेले रत्न जसे त्याच्याच दीप्तीने पाहावे; अथवा सूर्य उगवल्यावर जाण्याचा मार्ग जसा त्याच्या प्रकाशात दृष्टिपथात येतो; त्याप्रमाणे वेदांनी सुनिर्धारित केल्यानुसार कुंड, मंडप, वेदी व इतर साधनसामुग्री यथोक्त नियोजून असा यज्ञ संपन्न होतो."

सकलावयवउचितें। लेणीं पातलीं जैसीं आंगांतैं।
तैसें पदार्थ जेथींचें तेथे। विनियोगुनि।।१७-१८०।।
काय वानूं बहुतीं बोलीं। जैसीं सर्वाभरणीं भरली।
तैं यज्ञविद्याचि रूपा आली। यजनमिषें।।१८१।।
तैसा सांगोपांगु। निफजे जो यागु।
नुठऊंनियां लागु। महत्त्वाचां।।१८२।।
प्रतिपालु तऱ्हीं पाटाचां। झाडीं कीजे तुलसींचां।
परि फलां फुलां छायेचां। आश्रो नाहीं।।१८३।।
किंबहुना फलाशेविण। ऐसेयां निगुती यज्ञनिर्माण।
होय तो यागु जाण। सात्त्विकु गां।।१८४।।

"सर्व अवयवांवर त्यांच्या योग्य असे अलंकार धारण केल्यावर तनू जशी सुशोभित होते; त्याप्रमाणे यज्ञविधीसाठी लागणारी उपकरणे व पदार्थ जेथल्या तेथे विनियोजून असा यज्ञ केला जातो. तो पाहणाऱ्याच्या दृष्टीचे पारणेच फिटते. असा यज्ञ म्हणजे यजनमिषाने प्रकटलेली सर्वांगालंकृत अशी साक्षात यज्ञविद्याच म्हणा ना! अहंकाररहित अंतःकरणाने असा सांगोपांग केलेला; वृंदावनीची तुळस जशी छाया, फले, फुले यांची इच्छा न करता जोपासावी तसा फलेच्छेविरहित जोपासलेला; निगुतीने केलेला जो यज्ञ प्रपन्न होतो, त्याला ***सात्त्विक यज्ञ*** म्हणावे."

राजस यज्ञ

सात्त्विक यज्ञरूप असे प्रकट केल्यावर भगवंत राजस यज्ञांचे वर्णन करतातः

अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत्।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम्।।१७-१२।।

"हे अर्जुना! जो यज्ञ केवळ दंभाचरणासाठी वा फलेच्छेने केला जातो, तो यज्ञ *राजस* जाणावा."

आतां यज्ञु कीर वीरेशा। तऱ्हीं पैं याचि ऐसा।
परि श्राद्धालागीं जैसा। अवंतिला रावो।।१७-१८५।।
जऱ्हीं राजा घरासीं ये। तऱ्हीं बहुत उपेगा जाये।
आणि कीर्तीही होये। श्राद्ध न ठके।।१८६।।
तैसा धरूनि आंवाका। म्हणे स्वर्गु जोडेल असिका।
दीक्षितु होईन मान्यु लोकां। घडेल यागु।।१८७।।
ऐसीं केवळ फलालागीं। महत्त्व फोकारावयां जगीं।
पार्था निष्पत्ति तैं यागीं। राजस पैं तैं।।१८८।।

"हे वीरेशा पार्था! आता राजस यज्ञसुद्धा सात्त्विक यज्ञाप्रमाणेच सिद्ध केला जातो. परंतु श्राद्धानिमित्त राजाला आमंत्रण द्यावे अन् त्यानिमित्ताने यजमानाचीही कीर्ती व्हावी; श्राद्धकर्मसुद्धा सुव्यवस्थित पार पडावे आणि राजाजवळ मान्यता प्राप्त झाल्याने लौकिक कामेही करून घेता यावीत, असे फळ मिळावे; त्याचप्रमाणे स्वर्गप्राप्ती होईल, लोकात मानमान्यता मिळेल; दीक्षित म्हणून कीर्ती मिळेल आणि यज्ञही घडेल या इच्छेने असा ***राजस यज्ञ*** केला जातो. फलेच्छेने व स्वतःचे मोठेपण मिरवण्यासाठी राजस पुरुष हे यज्ञ करतात."

तामस यज्ञ

आता तामस यज्ञांविषयी गीता काय म्हणते, ते ऐका.

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम्।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते।।१७-१३।।

"तसेच शास्त्रविधिरहित, अन्नदानरहित, मंत्ररहित, दक्षिणा न देता व श्रद्धेविरहित केलेल्या यज्ञास ***तामस यज्ञ*** असे म्हणतात."

ज्ञानदेव सांगतातः

पशुपक्षीविवाहीं। जोशी कामापरौता नाही।
तैसा तामसा यज्ञां पाहीं। आग्रहोचि मूल।।१७-१८९।।
वारया वाट न वाहे। कीं मरण मूहूर्त पाहे।
निषिद्धासीं बिहे। आगी जऱ्हीं।।१९०।।
तऱ्हीं तामसाचियां आचारा। विधीचा आथी वोढावारा।
म्हणोनि तो धनुर्धरा। उत्सुंखलु।।१९१।।

"पशुपक्षांचे विवाह संपन्न होतात, ते जसे एका कामदेव याच ब्राह्मणाद्वारे; त्याचप्रमाणे तामसाच्या यज्ञास संपन्नता प्राप्त होते, ती एकमात्र ***अहंकार*** या ऋत्विजाने! वारा जर वाटेनेच वाहू लागला; किंवा मरण जर मुहूर्त पाहून येऊ लागले; अथवा निषिद्ध पदार्थांची अग्नीने राख केली नाही, असे पदार्थ भक्षण केले नाहीत; तरच एकवेळ त्या तामसाचे यज्ञ विधिशास्त्रसंकेतानुसार होतील! म्हणून तामस यज्ञ उच्छृंखलतेने परिपूर्ण असतात."

नाही विधीची तेथ चाड। नये मंत्रादिक तेयाकड।
अन्नजाता न सूयें तोंड। मासिकें जेवीं।।१७-१९२।।
वैराचा बोधु ब्राह्मणा। तेथ कैं रिगेल दक्षिणा।
अग्नी जाला वाउधाणा। वरपडा जैसा।।१९३।।
तैसें वायांचि सर्वही वेंचें। मुख न देखतां श्रद्धेचें।
नागविलें निपुत्रिकाचें। जैसें घर।।१९४।।
ऐसा यज्ञावभासु। तेयां नाम यागु तामसु।
आइकें म्हणें निवासु। श्रियेचां तो।।१९५।।

"त्यात विधीची चाड नसते; मंत्रादींचा प्रयोग नसतो; माशीला पुरेल इतकेसुद्धा अन्नसंतर्पण नसते. ब्राह्मणालाच वैरी मानणारे त्याचे यजमान दक्षिणा कधीतरी देतील, हे संभवनीय नाही. अग्नीस वाऱ्याचे साहाय्य झाले असता, तो जसे सर्व काही समाप्त करतो, त्याप्रमाणे अशा यज्ञाप्रीत्यर्थ वाटेल तेवढी साधनसामुग्री केवळ दंभ मिरवण्यासाठी खर्चली जाते. निपुत्रिकाचे घर जसे अकृतार्थ असते, त्याप्रमाणे श्रद्धेवीण समारंभिलेले असे तामस यज्ञ व्यर्थच असतात. यज्ञाचा निव्वळ आभासस्वरूप अशा त्या यज्ञांना तामस याग म्हणतात."

असा हा यज्ञाचा भाग सांगून झाला आहे. यापूर्वी प्रसंगोपात्त आपण अवलोकिलेल्या ***यज्ञ*** या विषयाची आता पूर्तता झाली *(उन्मेषः१-२::विषयप्रवेश-२,पृ.क्र.२८-३०; उन्मेषः१७:अर्जुनाचे सप्तप्रश्न,२५७-५८ व उन्मेष १८-गीतेतील यज्ञाचे स्वरूप २६२-२७२).*

तपभेद::::

तपाचे त्रिविध प्रकार

पुढे तो रमारमण काय सांगतो कीः

आतां गंगेचे एक पाणी। परि नेलेच आनानीं वाहणीं।
एक मलीं एक आणी। शुद्धत्व जैसें।।१७-१९६।।
तैसें तिहीं गुणीं तप। जेथ जाहलें आहे त्रिरूप।
तैं एक केलें दे पाप। उद्धरी एक।।१९७।।

याप्रमाणे तपाचेही यज्ञाप्रमाणेच त्रिविध प्रकार सांगण्यास देव प्रवृत्त होतात. तपासंबंधी भाग असाः "गंगेचे एकच पाणी जसे वेगवेगळ्या वापरासाठी घेतले, तर जसे वेगवेगळे गुण दर्शविते; मळात ते मालिन्य पावते, तर कमंडलूत ते शुद्धत्वप्रदायक ठरते; त्याचप्रमाणे त्रिगुणमिषाने तपसुद्धा सात्त्विक, राजस व तामस या प्रकारे संभवते. एका प्रकारचे तप पाप देते, तर एका प्रकारचे तप मनुष्याचा उद्धार करते."

तऱ्हीं तैंचि तिहीं भेदीं। कैसेनि पां म्हणौनि सुबुद्धी।
जाणों पाहसीं तऱ्हीं आधीं। तपचि जाण।।१७-१९८।।
एथ तप म्हणिजे काई। तैं स्वरूप दाऊं पाही।
मग भेदिलें गुणीं तिहीं। तैं पाठीं बोलों।।१९९।।
तऱ्हीं तप जैं सम्यक। तेहीं त्रिविध आइक।
शारीर मानसिक। शाब्द गां।।२००।।

"हे तिन्ही भेद जाणून घेण्यासाठी प्रथमतः तप म्हणजे काय, ते जाणून घे. हे सुबुद्धी! प्रथम तुला तप म्हणजे काय, हे सांगतो अन नंतर तिन्ही गुणांच्या भेदानुरूप ते कसे तीन प्रकारचे असते, ते सांगीन. तप हे तीन प्रकारचे असते. ***शारीरिक, मानसिक व वाचिक.***"

शारीर तप

आतां या तिहींमाझारीं। शारीर गां अवधारी।....।।२०१।।

"त्यातले शारीर तप कोणते, ते ऐका."

श्रीकृष्ण सांगतातः

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते।।१७-१४।।

"देव, ब्राह्मण, गुरू व ज्ञानी यांचे पूजन, पवित्रता, आर्जव, ब्रह्मचर्य व अहिंसा याला ***शारीरिक तप*** म्हणतात."

या ठिकाणी आता श्रीगोपाल शारीरिक, मानसिक व वाचिक तपाच्या निमित्ताने पुढील विशुद्ध आचरण सांगतातः

१) देव, ब्राह्मण, गुरू व ज्ञानी यांचे पूजन, वंदन व सेवा, २) शौच-पवित्रता, ३) आर्जव, ४) ब्रह्मचर्य, ५) अहिंसा, ६) स्वाध्याय, ७) दुसऱ्याला दुःख न देणे, ८) मनःप्रसादन, ९) सौम्यत्व, १०) मौनवृत्ती, ११) आत्मसंयम व १२) अंतःकरणाची ऋजुता.

यातल्या बऱ्याचशा गोष्टी पतञ्जलिकृत यमनियमांशी साधर्म्य राखणाऱ्या आहेत व त्यांचा विचार आपण पूर्वी *तेराव्या* अध्यायातील ***अमानित्वादी*** गुणसंपदेचा परामर्ष घेतांना केलेलाच आहे. साधकांस हितकर असणाऱ्या अशा विषयांचे ज्ञान प्रकट करतांना श्रीगोपालकृष्ण पुनरुक्तीचा दोष पदरी घेण्यासही तयार आहेत, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे व या विषयाचे महत्त्व वेळीच जाणून घ्यावे असे वाटते.

ज्ञानदेव या विषयांचे विवेचन करतांना पुनश्च सांगतातः

.....। तऱ्हीं शंभु कां श्रीहरी। पढियंता होय।।१७-२०१।।
तेया प्रिया देवतालया। यात्रादिकें करावया।
अष्टौपाहार जैसें पायां। उलिग घापे।।२०२।।
देवांगण मिरवणियां। अंगोपचार पुरवणियां।
करावयां म्हणियां। शोभती हात।।२०३।।
लिंग कां प्रतिमा दिठी। देखतखेंवो अंगेष्टी।
लोटिजे कां काठी। पडली जैसीं।।२०४।।
आणि विधिविनयादिकीं। गुणीं वडिल जैं लोकीं।
तेयां ब्राह्मणांची नीकीं। पाइकीं कीजे।।२०५।।

"तरी आपल्याला आवडणाऱ्या श्रीशंभू वा श्रीहरी अशा दैवताच्या मंदिरे व तीर्थक्षेत्रे येथे यात्रा करण्यासाठी त्याच्या पायाला अष्टौप्रहर जसे चक्र बांधलेले असते. देवालय झाडून, संवरून, रांगोळी घालून इ.प्रकारे सुशोभित करण्यासाठी त्याचे हात शोभत असतात. देवतेचे दर्शन झाल्याबरोबर जमिनीवर काठी ठेवावी तसे त्याचे शरीर विनम्रभावाने लोटांगण घेते. आणि शास्त्रोक्त आचरण व विनयादी गुणांनी श्रेष्ठ असणारे जे ब्राह्मण या लोकी असतात, त्यांची मनोभावे सेवा करण्यात तो धन्यता मानतो."

अथवा प्रवासें कां पीडा। कां शिणले जैं सांकडा।
तैं जीव सुरवाडा। आणिजती।।१७-२०६।।
सकल तीर्थांचियें धुरें। जियें कां मातापितरें।
तेयां सेवेसीं कीर शरीरें। लोण कीजे।।२०७।।
आणि संसाराऐसा दारुणु। जो भेंटलाचि हरी शिणु।
तो ज्ञानदानीं सकरुणु। भजिजे गुरु।।२०८।।

"जे जीव संकटांनी त्रस्त असतात, प्रवास वा पीडेने शिणलेले वा दुःखित असतात; त्यांचा त्रास व दुःख नाहीसे करून त्यांना सुख व्हावे, म्हणून असा मानुष्य तत्पर असतो. सर्व तीर्थाच्यात श्रेष्ठतम अशी मातापिता असतात, त्यांच्यावरून तर तो आपल्या जीवाची कुरवंडी करतो. संसारताप अति दारुण असतो. असा तापसुद्धा ज्याच्या निव्वळ दर्शनाने हरण केला जातो, त्या श्रीगुरू करुणाकराला, ज्ञानदात्याला तर तो आराध्य दैवतच समजून भजतो."

आणि स्वधर्माचियां आगिठां। देहजाड्याचियां कीटा।
आवृत्तिपुटीं सुभटा। झाडी कीजे।।१७-२०९।।
वस्तु भूतमात्रीं नमिजे। परोपकारीं भजिजे।
स्त्रीविषयीं नियमिजे। नांवें नांवें।।२१०।।
जन्मतेनि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें।
तेथूनि जन्म आवघें। सोंविलें कीजे।।२११।।

"तसेच स्वधर्मरूपी अग्नीत अहंकाररूपी कीट वा हीण, जे स्वस्वरूपी सुवर्णावर चढलेले असते; त्याला शौचादींचे पालन करून नाहीसे करतो. भूतमात्रात ब्रह्मभावना करून त्यांना वंदन करतो. प्राणिमात्रांवर परोपकार करतो. स्त्रीविषयीचे असे नियमन करतो की जन्मतेवेळी जेवढा स्त्रीदेहाचा स्पर्श होतो, तो सोडला तर स्त्रीदेहास चुकूनही शिवत नाही."

भूतमात्राचेनि नांवें। तृणही नासुडावें।
किंबहुना सांडावें। छेद भेद।।१७-२१२।।
ऐसैसीं जैं शरीरीं। राहाटीची पडे उजरी।
तैं शारीर तप घुमरी। आलें जाण।।२१३।।
पार्था समस्तही हे करणें। देहाचेनि प्रधानपणें।
म्हणौनि मी म्हणें। शारीर तप।।२१४।।
एवं शारीर जैं तप। तेयाचें दाविलें रूप।...।।२१५।।

"तो भूतमात्रांची हिंसा करत नाही. साधी गवताची काडीसुद्धा त्यातल्या जीवाला दुःख पोहोचू नये म्हणुन तोडीत नाही. मग इतरांना कापणे वा इजा करणे कुठले! अशा प्रकारे जेव्हा तो वर्ततो, तेव्हा शारीरिक तप भराला आले आहे, असे समजावे. पार्था! हे

तप शरीराने प्रमुखतः आचरावे लागते, म्हणून त्याला मी ***शारीरिक तप*** असे म्हणतो. त्याचे आतापावेतो यथायोग्य वर्णन केले.”

वाचिक तप

...।आतां आइक निष्पाप। वाङ्मय तैं।।२१५।।

“यानंतर वाचिक तप कसे ते सांगतो.” श्रीकृष्ण म्हणतातः

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते।।१७-१५।।

“दुसऱ्याला दुःख न देणारे,सत्य, प्रिय आणि हितकर बोलणे आणि स्वाध्यायाचा अभ्यास यांना वाङ्मय तप म्हणतात.”

तऱ्हीं लोहाचें आंग तुक। न तोडितांचि कनक।
केलें जैसें देख। परिसें तेणें।।१७-२१६।।
तैसें न दुखवितां सेजे। जवलियां सुख निफजे।
ऐसें साधुत्व कां देखिजे। बोलणां जिये।।२१७।।
पाणी मुदल झाडां जाये। तृण तैं प्रसंगेचि जियें।
तैसें एका बोलिलें होये। सर्वांही हित।।२१८।।
जोडे अमृताची सुरसुरी। तैं प्राणांतैं अमर करी।
स्नानें पापताप वारी। गोडीही दे।।२१९।।
तैसा अविवेकुही फिटे। आपुलें अनादित्व भेंटे।
आइकतां रुचि न विटे। पीयूषीं जैसीं।।२२०।।

“लोखंडाला निव्वळ स्पर्श करून, त्याचे तुकडेताकडे न करताच, परिस जसे त्याला आपल्या कनवाळूपणाने सुवर्णाचे मोल देतो; त्याप्रमाणे वाङ्मयीन तप आचरणारा तो साधुपुरुष आपल्या साहचर्यात आलेल्यांना आपल्या मृदु बोलांनी सुखी करतो. झाडांना दिलेले पाणी जसे आजूबाजूच्या गवतालाही जीवन देते, तसे त्याचे बोलणे सर्वांच्या हिताचे असते. अमृताचीच गंगा जर प्राप्त झाली, तर तिचे जल मधुर तर असतेच, वर तिच्या स्नानाने पाप, ताप, दैन्य, दुःख ही पण हरतात व प्राणी अमरही होतो; तसेच बोलणे असावे - जे ऐकतांना अमृताचा जसा कधीही वीट येत नाही, तसे सर्वदा प्रिय, ज्याच्यामुळे अज्ञान नाहीसे होऊन स्वस्वरूपाची गाठ पडते, असे!”

जऱ्हीं कोणी करी पुसणें। तऱ्हीं होआवें ऐसें बोलणें।
ना तऱ्हीं आवर्तवणें। निगमु कां नाम।।१७-२२१।।
ऋग्वेदादी तिन्हीं। प्रतिष्ठिजती वाग्भुवनीं।
केली जैसीं वदनीं। ब्रह्मशाला।।२२२।।
ना तऱ्हीं एकाधें नांव। तैंचि शैव कां वैष्णव।
वाचें वसें तैं वाग्भव। तप जाणावें।।२२३।।

“कोणी विचारले तर हे असेच बोलावे; अन्यथा नामाचा वाचेने जप करावा किंवा वेदपठण करावे. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या तिन्ही वेदांसाठी आपले मुख जसे वेदशाळाच असावे. शिवाचे किंवा विष्णूचे एखादे नांव मुखी सतत असावे. यालाच ***वाचिक तप*** असे म्हणतात.”

मानसिक तप

आतां तप जैं मानसिक। तेंही सांगो आइक।
म्हणे लोकनाथनायक-। नायकु तो।।१७-२२४।।

“आता मानसिक तपाचा प्रकार सांगतो. तो ऐक.” असे लोकपालनायकांचाही नायक असा तो वैकुंठीचा राणा म्हणाला.

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते।।१७-१६।।

“मनाची शांती, अंतःकरणाची शांत वृत्ती, मनःसंयम, मौन व इतरांशी व्यवहारात सरलता व निष्कपट भाव यांच्या समुच्चयाने मानसिक तप सिद्ध होते.”

ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं सरोवर तरंगीं। सांडिलें आकाश मेघीं।
कां चंदनाचें उरगीं। उद्यान जैसें।।१७-२२५।।
नाना कलावैषम्यें चंद्रु। कां सांडिला आधीं नरेंद्रु।
ना तऱ्हीं क्षीरसमुद्रु। मंदराचलें।।२२६।।
तैसें नानाविकल्पजालें। सांडुनि गेलियां सकलें।
मन राहे कां केवलें। स्वरूपें जैं।।२२७।।

“तरंगरहित संथ जलाशय असावा; मेघ निघून गेलेले निळेशार निरभ्र स्वच्छ आकाश असावे; सर्पांनी वर्जिलेले चंदनाचे सुवासिक शीतल उद्यान असावे; क्षयरहित पूर्ण चंद्रमा शोभायमान व्हावा; चिंताविवर्जित भूपती असावा; मंदार पर्वताने घुसळणे थांबवलेला क्षीरसागर जसा शोभावा; त्याप्रमाणे समस्त विकल्पग्रस्ततेचा त्याग केलेल्या मनाला जी शांती लाभते अन ते जे स्वरूपी लीन होऊन राहते; ती मानसिक तपाची एक दशा होय.”

तपनेंवीण प्रकाशु। जाड्येंवीण रसीं रसु।
पोकलीवीण अवकाशु। होय जैसा।।१७-२२८।।
तैसीं आपुली सोय देखे। आणि आपुलियां स्वभावा मुके।
हिंवली जैसीं आंगिकें। हिंवों नेदी निजांग।।२२९।।
तैसें निखल तैं कलंकेवीण। शशिबिंब जैसें परिपूर्ण।
तैसें चोखीं शृंगारपण। मनाचें जैं।।२३०।।

“प्रकाशातील उष्णता नाहीशी व्हावी; जडत्वविरहित असा सुसेव्य अन्नरस असावा; पोकळीचा संभ्रम निर्माण न करणारे अवकाश दिसावे, त्याप्रमाणे आत्म्यास पाहून जे अंतःकरणाचे प्रशांतत्व पावणे, तेही मानस तपाचे एक प्रमुख चिह्न समजावे. हिवेच्या अंगी हिवेमुळे थरकाप होत नाही; किंवा चंद्रबिंब अचल व पूर्ण असतांना जसे दिसते, त्याप्रमाणे मनाने आपला संकल्पविकल्पात्मक स्वभाव टाकून दिला की जी जीव लोभावणारी मनःसंयमाची अवस्था निर्माण होते; ती पण मानस तपाचाच भाग आहे.”

बुजालीं वैराग्याची वोरप। जिराली मनाची धांप कांप।
तेथ केवल जाली वाफ। निजबोधाची।।१७-२३१।।
म्हणौनि विचारावया शास्त्र। राहाटवावें जैं वक्त्र ।
तैं वाचेचें सूत्र। हातीं न धरी।।२३२।।

"वैराग्याची ओढ संपून, मनाचे चंचलत्व नष्ट होऊन, निजबोधाचे अन्न छान शिजले असल्यामुळे अशा अवस्थेत, ज्या तोंडाचे प्रयोजन शास्त्रजिज्ञासेचे प्रश्न विचारण्याचे असते, त्याला विचारण्याजोगे काहीच उरलेले नसल्याने वाचा मौनावते; अन काहीच बोलण्याचालण्यासारखे राहत नाही. हे लक्षण***मानस तप*** सिद्ध झाल्याचे आहे."

तैं स्वभाव लाभलेंपणें। मन मनपणाही धरूं नेणें।
शिवतलें जैसें लवणें। आपुलें निज।।१७-२३३।।
तेथ कैं उठति तैं भाव। जिहीं इंद्रियमार्गीं धांव।
घेऊनि ठाके गांव। विषयांचें तैं।।२३४।।

"मिठाला जसे आपले मूळ जे समुद्रजल, त्याचा स्पर्श झाल्यावर मीठपणा उरू नये; त्याप्रमाणे अशा रीतीने मनःशांती, अंतःकरणाची शुद्धता, मौन व मनःसंयम प्राप्त झालेल्या अवस्थेत, मनाला त्याचे निधान जो आत्मा, तो लाभल्यामुळे ते आपला मनपणाही ठेवू शकत नाही. अशा वेळी त्यात इंद्रियप्रवृत्तीकडे धाव घेऊन विषयांचा समूह गाठणारे भाव उठतीलच कसे!"

म्हणौनि तियें मानसीं। भावशुद्धीचि असे आपैसीं।
रोमशुद्धी जैसीं। तलहातासीं।।१७-२३५।।
काय बहु बोलों अर्जुना। जैं हे दशा ये मना।
तैं मनस्तपोनिधाना। पात्र होय।।२३६।।
परि तैं असो हे जाण। मानस तपाचें लक्षण।
देवो म्हणें संपूर्ण। सांगितलें।।२३७।।
म्हणौनि देहवाचाचित्तें। जैं पातलें त्रिविधत्वातें।
तैं सामान्य तप तूंतैं। परिसविलें गां।।२३८।।
आतां गुणत्रयसंगें। हेंचि विशेखीं त्रिविधीं रिगे।
तेंही आइक चांगें। प्रज्ञाबलें।।२३९।।

"अशा स्थितीत, तळहाताला रोमशुद्धी म्हणजे रोमावळींपासून मुक्तता जात्याच जशी असते, तशी आपोआपच भावशुद्धी मनात प्रकटते. हे अर्जुना! अशी सम्यक अवस्था जेव्हा मनाला प्राप्त होते, तेव्हा ते मन ***तप*** या संज्ञेला प्राप्त होते. हे असो! तुला मानस तपाचे संपूर्ण गुणलक्षण सांगितले. तपाच्या ***कायिक, वाचिक व मानस*** अशा त्रिविध परी तुला सागितल्या. आता गुणत्रयांच्या संबंधाने त्यांच्याही ज्या तीन परी संभवतात, त्या सांगतो. प्रज्ञाभिसंधान देऊन तू त्या श्रवण कर."

सामान्य वा सात्त्विक तप

अशा प्रकारे ज्ञानदेवांनी ***सामान्य तप*** म्हणून जे जे सांगितले, ते ते वास्तविक ***सात्त्विक तप*** होय. आत्मानुसंधानार्थ हे जे आचरण केले जाते, त्यात रज व तमाचा भाग कोठून असणार! ज्ञानदेव अशा प्रसंगाने आत्मावस्थित अवस्थेलाच सामान्य अवस्था मानतात, हे आपल्याला जाणवून जाते. याच सामान्य तपाचरणासंबंधी भगवंताचे म्हणणे आहे कीः

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः।
अफलाभिकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते।।१७-१७।।

"हे जे तीन प्रकारचे कायिक, वाचिक व मानसिक तप सांगितले, त्याचे फलाकांक्षारहित व समाहित चित्ताच्या पुरुषाकडून सश्रद्ध अंतःकरणाने पालन केले जाते. तेव्हा त्या तपास ***सात्त्विक तप*** असे विद्वान म्हणतात."

आणि ज्ञानदेव एवढीच प्रशस्ती जोडतात कीः

तऱ्ही हेंचि तप त्रिविधा। जैं दाविलें तुज प्रबुद्धा।
तैंचि पूर्ण श्रद्धा। सांडूनि फल।।१७-२४०।।
जैं पुरतिया सत्त्वशुद्धी। आचरिजे आस्तिक्यबुद्धी।
तैं तयांतेचि गां प्रबुद्धी सात्त्विक म्हणिजे।।२४१।।

सात्त्विक तपाचे खरे पूर्ण वर्णन सामान्य तपाच्या मिषाने ज्ञानदेवांनी *अध्याय १७ ओवी क्र. २०२ ते २३८* यातून केले. त्यात आता फक्त पूर्णश्रद्धा व निष्काम बुद्धी, तसेच आस्तिक्यबुद्धी यांनी ते युक्त केले व सात्त्विक श्रद्धेच्या पुरुषाने ते आचरले की ते ***सात्त्विक तप*** असे समजावे, असे गोपालकृष्णांनी अर्जुनासारख्या बुद्धिमंतास सांगितलेले येथे दिसते.

राजस तप

यानंतर राजस तपाची व्याख्या करतांना श्रीकृष्ण म्हणतातः

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत्।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम्।।१७-१८।।

"सत्कार, मान व पूजा यांच्याकरता केवळ दांभिकपणाने जे तप आचरले जाते, त्याला ***राजस तप*** असे म्हणतात. ते तप अनिश्चित व अस्थिर असे समजतात." म्हणजे आपले महत्त्व व मोठेपणा वाढवण्यासाठी केलेल्या अशा तपाचे फळ निष्परिणामी असते.

ज्ञानदेव म्हणतातः

ना तऱ्ही तपस्थापनेलागीं। दुजेपण मांडूनि जगीं।
महत्त्वाद्रिंच्या शृंगीं। बैसावया।।१७-२४२।।
त्रिभुवनींचियां सन्माना। न वचावें ठायां आना।
धुरेचियां आसना। भोजनालागीं।।२४३।।
विश्वाचियां स्तोत्रा। आपण होआवया पात्रा।
विश्वें आपुलिया यात्रा। करावियां यावें।।२४४।।
लोकांचियां विविधा पूजा। आश्रयो न धरावियां दुजा।
भोग भोगावेंच वोजा। महत्त्वाचियां।।२४५।।
आंग बोल माखूनि तपें। विकावियां आपणपें।
अंगहीन पडपें। जियापरी।।२४६।।

हे असो धनमानीं आस। वाढवूनि तप कीजे सायास।
तैं तैंचि तप राजस। बोलिजे गां।।२४७।।

"राजस तप आपण जगाहून कोणीतरी वेगळे आहोत, असे दाखवून महत्त्वगिरिशिखरावर आरूढण्यासाठीच आचरले जाते. त्रिभुवनातील मान, सन्मान, अग्रासन, भोजनाची निमंत्रणे इतर कोणाला न मिळता स्वतःलाच प्राप्त व्हावी; विश्वाच्या स्तुतीला आपण पात्र व्हावे; समस्त जगताने आपल्या दर्शनास यावे; लोकांकडून आपली एकट्याचीच पूजा व्हावी; उत्तमोत्तम उपभोग, वस्त्रे, आभूषणादिक, शृंगारादी आपणांस प्राप्त व्हावेत या इच्छेने प्रेरित होऊन वृद्ध वेश्या ज्याप्रमाणे आपणांस लोकांनी विकत घ्यावे या हेतूने साजशृंगार करून खोट्याखोट्या लावण्य व तारुण्याचा देखावा करते; त्याप्रमाणे शारीरिक व वाचिक तपाचे आचरण करण्याचा बहाणा करून, धन व मान यांची आसक्ती चित्तात धरून जे आचार केले जातात, त्यांना ***राजस तप*** असे म्हणतात."

परि पहुरणीं जैं दुहिलें। तैं तैं गुरु न दुभेचि व्यालें।
कां उभे शेत चारिलें। पिकावया नुरें।।१७-२४८।।
तैसें फोकारितां तप। कीजे जैं सापेक्ष।
तैं फलीं तंव सोप। निःशेख जाय।।२४९।।
ऐसें निर्मळ फल देखोनि करितां। माझारीं सांडीं पांडुसुता।
म्हणौनि नाहीं स्थिरता। तपा तेयां।।२५०।।

"ज्याप्रमाणे पहुरणी नावाच्या किड्याने दुभत्या जनावराचे आचळ चोखले, तर ते गुर व्यालेले असूनही दूध देत नाही; किंवा उभे शेत गुरांना चारले तर त्यात पीक येत नाही; तसे ते ***राजस तप*** आपला गवगवा करण्यासाठी व सायासानेच केलेले असल्याने निष्फल होते. त्या तपाचे फल प्राप्त होत नाही हे पाहून ते मध्येच त्यागण्यात येत असल्याने, त्याला स्थिरता नसते."

एऱ्हवीं तऱ्हीं आकाश मांडीं। जो गर्जौनि ब्रह्मांड फोडी।
तो अवकालु मेघु काय घडी। राहात आहे।।१७-२५१।।
तैसें राजस जैं तप होये। तैं फलीं कीर वांझ जाये।
परि आचरणींही नोहे। निर्वाहतें गां।।२५२।।

"अवकाळी आकाश भरून टाकून आसमंत गर्जून फोडून टाकणारा मेघ जसा घटकाभरही टिकत नाही; त्याप्रमाणे असे तप टिकतही नाही अन त्यायोगे केलेले आचरणसुद्धा मध्येच सोडून दिल्यामुळे ते ***राजस तप*** व्यर्थ होते."

तामस तप

आतां तैंचि तप पुढुती। तामसाचियें रीती।
पैं परत्रा आणि कीर्ती। मुकौनि कीजे।।१७-२५३।।

"पारलौकिक कल्याण व कीर्ती मिळविणे यांचाही ज्या तपात अभाव असतो, त्याला ***तामस तप*** म्हणतात." श्रीकृष्ण सांगतातः

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम्।।१७-१९।।

"जे तप मूर्खतापूर्वक, हट्टाने, अंतर्बाह्य शरीराला पीडा देऊन किंवा दुसऱ्याचे अनिष्ट करण्याकरता केले जाते, त्या तपाला ***तामस तप*** म्हणतात."

यासंबंधी ज्ञानेशांचे उद्गार पाहाः

केवळ मूर्खपणाचा वारा। जीवीं घेऊनि धनुर्धरा।
नाम ठेविजे शरीरा। वैरियाचें।।१७-२५४।।
पंचाग्नींचीं दडगी। खोलविजती शरीरालागीं।
कां इंधन कीजे आगी-। आंतु लावी।।२५५।।
माथां जालिती गुगुलु। पाठीं घालिजती गलु।
आंग जाळिती इंगलु। जलतभीतां।।२५६।।
दवडौनि श्वासोश्वास। कीजती वायांचि उपवास।
कां घेपती धूमाचें घांस। अधोमुखें।।२५७।।
हिमोदकें आकंठें। खडकें सेविजती तटें।
जितया मांसाचें चिमुटे। तोडिती जेथ।।२५८।।
ऐसीं नानापरी हे काया। घाय सूतां पैं धनंजया।
तप कीजे नाशावया। पुढिलांतैं।।२५९।।

"निव्वळ शंखपणा डोक्यात भरून घेऊन, हे धनुर्धरा! शरीराला वैऱ्याला द्याव्या तशा यातना देऊन हे ***तामस तप*** केले जाते. पंचाग्निसाधनाने शरीराचे हालहाल करणे; शरीराला ठिकठिकाणी जाळणे, भाजणे, चटके देणे, मुद्रा घेणे; डोक्यावर पेटता गुग्गुळ ठेवणे; शरीराला आकड्याने विंधून टांगून घेणे; रसरशीत निखाऱ्यांनी अंग चोळणे; श्वासोच्छ्वास रोधून धरणे; दिवसेंदिवस अन्नादी सेवन न करणे; झाडाला उलटे टांगून घेऊन खाली धूर पेटवून तो नाकातोंडाने घेणे; थंडगार बर्फमय पाण्यात आकंठ बुडी देऊन बसणे; नदीच्या काठच्या खडबडीत पाषाणांवर भर उन्हाचे बसणे; आपल्याच मांसाचे लचके आपल्याच हाताने चिमटून तोडणे; अशा नाना प्रकारे शरीराला कष्टवून आणि त्याच्यावर घाव घालून, इतर प्राण्यांच्या नाशार्थ या तामस तपाचे आचरण केले जाते."

आंगभारें सुटला धोंडा। आपण फुटौनि होय खंडखंडा।
कां आड जालियांतैं रगडा। करी जैसा।।१७-२६०।।
तेवीं आपलियां आटणियां। सुखें असतया प्राणिया।
जियावया शिराणिया। कीजती गां।।२६१।।
किंबहुना हे वोखटी। घेऊनि क्लेशाची हातवटी।
तप निफजे तैं किरीटी। तामस होय।।२६२।।
ऐवं सत्त्वादिकांचां आंगीं। पडिलें तप तिन्हीं भागीं।
जालें तेहीं तुज चांगीं। दाविलें व्यक्तीं।।२६३।।

"आपल्या वजनामुळे कड्यावरून निखळलेला धोंडा जसे स्वतःचे तुकडेतुकडे तर करूनच घेतो, पण वाटेत येणाऱ्यांचाही चुराडा करून टाकतो; त्याप्रमाणे हे तामस तप स्वतःच्या शरीरास तर कष्टवतेच, पण त्याद्वारे सुखी असणाऱ्या इतर जीवांना जिंकून

त्यांना त्रास देण्यासाठीही ते आचरिले जाते. असे क्लेश उत्पन्न करणारे ते ***तामस तप*** असते. अशा प्रकारे तुला आतापावेतो सत्त्व, रज व तमोगुणांच्या योगाने तपाचे जे तीन भाग होतात, ते नीट समजावून दिले."

दानप्रकार::::

दान

याप्रमाणे ***यज्ञ*** व ***तप*** या संकल्पनांचा गुणाधिक्यानुसार होणारा परामर्ष आतापावेतो घेऊन झाला. त्यानंतर येणारा तितक्याच महत्त्वाचा विषय म्हणजे ***दान*** होय. यासंबंधीच्या कल्पनासुद्धा आता गोपालकृष्ण स्पष्ट करत आहेत.

आतां बोलतां प्रसंगा। आलें म्हणूनि पैं गां।
करुं रूप दानलिंगा। त्रिविधा तेयां।।१७-२६४।।
येथ गुणाचेनि बोलें। दानही त्रिविध जालें असे।
तैंचि आइक पहिलें। सात्त्विक ऐसें।।२६५।।

"आता प्रसंगोपात्त दानाचेही जे या त्रिगुणांच्या संयोगाने त्रिविध प्रकार होतात, त्यांचेही वर्णन करतो. त्यातल्या सात्त्विक दानासंबंधी प्रथम सांगेन."

सात्त्विक दान

श्रीकृष्ण पुढे म्हणतातः

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्।।१७-२०।।

"दान करणे हेच योग्य आहे असा विचार करून, प्रत्युपकार करण्यास असमर्थ असणाऱ्या किंवा प्रत्युपकार करू शकणाऱ्या पण ज्याच्याकडून तशी अपेक्षा केली नाही अशा अधिकारी व्यक्तीस जे केले जाते व कुरुक्षेत्रादी पुण्यभूमींवर, संक्रांति इ.पुण्यकाली, षडंगांसह वेदपारंगत असणाऱ्या द्विजादी श्रेष्ठ सत्पात्री जे दान केले जाते, त्यास ***सात्त्विक दान*** असे म्हणतात."

यावर ज्ञानदेवांचे सांगणे ऐकाः

तऱ्हीं स्वधर्माआंतौतें। जैं जैं मिले आपणयातें।
तैं तैं दीजें बहुतें। सन्मानयोगें।।१७-२६६।।
जालियां सुबीजप्रसंगु। पडे क्षेत्रवाफेचा पांगु।
तैसाचि दानाचा हा लागु। देखतसें।।२६७।।
अनर्घ्य रत्न हातां चढे। तैं भांगाराची वोढी पडे।
दोनीं जालीं तऱ्हीं न जोडे। लेतें आंग।।२६८।।
परि सण सुहृद संपत्ती। हे दोन्हीं एकीं मिलती।
जैं भाग्य धरीं उन्नती। आपुलां विखीं।।२६९।।
तैसें निफजावया दान। जैं सत्त्वासि यें संवाहन।
तैं देशकालभाजन। द्रव्य मिले।।२७०।।

"स्वधर्माने आपणास जे काही मिळाले असेल, ते दान म्हणून मोठ्या सन्मानपूर्वक द्यावे. उत्तम बी हाती आले असता, त्यासाठी उत्तम क्षेत्र, योग्य काल व ओल यांचा योगही जुळून आल्याशिवाय काही ते उपयोगी पडत नाही; त्याचप्रमाणे दानाचेही आहे. अनर्घ्य बहुमोल रत्न मिळावे व ते जडविण्यासाठी चोख सोने मिळू नये अन् हे दोन्ही योग येऊन उत्तम अलंकार करवून घ्यावा, तर तो घालून मिरवण्यासाठी अंगी लावण्य नसावे; त्याचप्रमाणे दानाचेही आहे. परंतु आपले भाग्य प्रसन्न झाले, तर संपत्ती, दान करण्यास योग्य काल व पात्र ही लाभतात. असे उत्कृष्ट दान करण्यास जेव्हा सत्त्वगुण उत्स्फूर्त होतो, तेव्हा मनुष्यास ***देश, काल, पात्र व द्रव्य*** ही सर्व अनुकूल असतात."

तऱ्हीं आधीं तंव प्रयत्नेंसीं। होआवे कुरुक्षेत्र कां काशी।
ना तऱ्हीं तुके जो इहींसीं। तो देशही हो।।१७-२७१।।
तेथ रविचंद्राहुमेलु। होतां पाहे पुण्यकालु।
कां तेयासारिखा निर्मलु। आनुही जाला।।२७२।।
तैसा कालीं तियें देशीं। होआवी पात्रसंपत्ती ऐसी।
मूर्त्ति आहे धरिली जैसी। शुचित्वेंचि कां।।२७३।।
आचाराचें मूलपीठ। वेदाची उतारपेठ।
तैसें द्विजरत्न चोखट। पावोनियां।।२७४।।
मग तेयाचां ठायीं वित्ता। निवर्त्तवावी स्वसत्ता।
परि प्रियापुढें कांता। रिगे जैसेनीं।।२७५।।
कां जेयाचें ठेविलें तेयां। देऊनि होईजे उतराईयां।
नाना हडपें विडा राया। दिधला जैसा।।२७६।।
तैसेनि निष्कामें जीवें। भूम्यादिक अर्पावें।
किंबहुना हांवें। नेदावें उठो।।२७७।।

"रविचंद्रराहु नक्षत्रादींनी सुयोग्य ग्रहण, संक्रांत इ.वा त्यांच्यासारख्या इतरही पर्व वा पुण्यकाळी आणि कुरुक्षेत्र, काशी वा तत्सम पुण्यदेशी सत्पात्र पाहावे. ते असावे तर असे की जणू काही शुचित्वच मूर्तिमंत आहे. अन सदाचाराचे मूळपीठ व वेदातील मालाची घाऊक पेठच असे चोख द्विजरत्न अशा त्या व्यक्तीस आपले वित्तादी दान करावे. आपल्या स्वेच्छेने कांतापुढे पत्नी जसे सर्वस्व प्रेमाने अर्पण करते, तितक्या सलगीच्या भावनेने असे दान करावे. ज्याची ठेव त्याला परत केली असता जसा आपल्यावरचा भार हलका झाल्यासारखा वाटतो; किंवा राजाला विडा देऊन हुजऱ्यास जसे कृतकृत्य झालेले वाटते; त्याचप्रमाणे अत्यंत निष्काम अंतःकरणाने भूमी आदींचे असे दान दिले जावे व फलेच्छेला अजिबात थारा देऊ नये."

आणि दान जेयां द्यावें। तेयांतैं ऐसेयां पाहावें।
जेयां घेतलें नुमचवें। कायसेनही।।१७-२७८।।
साद घातलियां आकाशा। नेदी प्रतिशब्दु जैसा।
कां पाहिला आरिसा। एरीकडें।।२७९।।
उदकाचियें भूमिकें। आफलिलेनि कंदुकें।
उधलौनि कवतुकें। न येइजें हातां।।२८०।।
नाना वसो घातला चारु। माथां तुंबविला बुरु।
ना करी प्रत्युपकारु। जियापरी।।२८१।।

तैसें दिधलें दातयाचें। जो कोणेंही अंगें नुमचे।
अर्पिलियां साम्य तेयाचें। कीजे पैं गां।।२८२।।
ऐसियां जैं सामग्रिया। दान निफजे वीरराया।
तैं सात्त्विक दानवरिया। सर्वांही जाण।।२८३।।
आणि तोचि देशु कालु। घडे तैसाचि पात्रमेलु।
दानभागुही निर्मलु। न्यायगतु।।२८४।।

"आणि ज्याला दान करावयाचे, तो असा असावा की त्याला दात्यावर प्रत्युपकार करता न यावा. आकाश सादेला प्रतिसाद जसे देत नाही; आरसा मागून पाहिला तर प्रतिबिंब दाखवत नाही; किंवा पाण्याच्या पृष्ठभागावर आपटलेला चेंडू उशी घेऊन आपल्या हाती परत जसा येत नाही; अथवा चारा ज्याला दिला तो पोळ किंवा डोक्यावर ओझे घेतलेला कृतघ्न मनुष्य जसा उपकारकर्त्यावर चुकूनही प्रत्युपकार करत नाहीत; असाच सत्पात्र मनुष्य निवडून त्याला दान द्यावे की जो दात्यावर कोणत्याही प्रकारे प्रत्युपकार करणार नाही. आणि दान केल्यावर दात्याने ते केल्याचेसुद्धा मनातून काढून टाकावे. अशा प्रकारे हे वीरश्रेष्ठ अर्जुना! जे सर्वश्रेष्ठ दान केले जाते, त्याला ***सात्त्विक दान*** असे म्हणतात."

राजस दान

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्।।१७-२१।।

" जे दान प्रत्युपकार करण्यासाठी किंवा त्यापासून पारलौकिक फल प्राप्त व्हावे म्हणुन मुद्दाम केले जाते व जे करतांना दात्यास खेद वा क्लेश होतात, त्यास ***राजस दान*** म्हटले जाते."

यावर ज्ञानदेवांच्या ओव्या अशा आहेतः

परि मनीं धरुनि दुभतें। चारिजे जेवीं गाईतें।
कां पेव करूनि आइतें। पेरूं जाइजे।।१७-२८५।।
नाना दिठी घालूनि आहेरा। अवंतु जाईजे सोयिरा।
कां वाण धाडिजे घरां। वौसयाचियां।।२८६।।
पैं कलांतर गांठीं बांधिजे। मग पुढिलांचें काम कीजे।
पूजा घेऊनि रसु दीजे। पीडितांसीं।।२८७।।
ऐसें जैं दान देणें। तो तेणेचि गां जीवनें।
पुढती भुंजावा भावें येणें। दिजे जैं कां।।२८८।।

"सात्त्विक दानास लागतो, तसाच देश, काळ, पात्र व निर्मळ व न्याय्य मार्गाने मिळवलेली संपत्ती हा योग राजस दानासही लागू पडतो. पण दुभत्याच्या अशेने गायीला चारावे; किंवा धान्य साठवण्यासाठी पेव तयार करून बी पेरण्यासाठी निघावे; अथवा आहेरावर नजर ठेवून सोयऱ्याधायऱ्यांना लग्नासाठी पाचारण करावे; आपल्यासाठी व्रत करणाऱ्याकडे वाण पाठवावे; किंवा संभावनाद्रव्य गाठीला लावून नंतर वैद्याने रोग्याचे औषधपाणी करावे; अथवा मेहनताना घेऊन लोकांची कामे करावीत; अशाच प्रकारे ज्याला दान दिले जाते, त्याने त्या दानाच्या पोटी आपले काहीतरी काम करावे या भावनेने ***राजस दान*** केले जाते."

अथवा कोणी वाटे जातां। घेतलें उमचो न शकतां।
मिळें जैं पांडुसुता। द्विजोत्तमु।।२८९।।
तऱ्हीं कवड्या एकासाठीं। अशेखां गोत्रांचीच किरीटी।
सर्व प्रायश्चित्तें सुये मुठी। तियाचियें।।२९०।।
तेवींचि पारलौकिकें। फलें वांछिजती अनेकें।
आणि दीजे तऱ्हीं भुके। एकाही नोहें।।२९१।।
तेहीं ब्राह्मणु नेवों सरे। कीं हानिचेनि शिणें झांसुरे।
सर्वस्व जैसें चोरें। नागऊनि नेलें।।२९२।।
काय बहु सांगो सुमती। जैं दीजे या मनोवृत्ती।
तैं दान गां त्रिजगतीं। राजस पैं।।२९३।।

"अथवा अनायासे जर एखादा सर्व श्रेष्ठ ब्राह्मण लाभला की ज्याच्याकडून परतफेड करून घेता येणार नाही, तर केवळ अल्पदान करून त्यापोटी त्याच्या हातून आपल्या समस्त कुटुंबीय-गोत्रादी नातेवाईकांच्या पापांची प्रायश्चित्ते त्याचा मोबदला म्हणून करून घ्यावीत; अन वर त्या दानाद्वारे अनेकानेक पारलौकिक फले प्राप्त व्हावीत अशी इच्छा धरावी; पण दान इतके अत्यल्प की ज्याने माणसाची एक वेळेची भूकसुद्धा भागवता येऊ नये; एवढेच काय! तर त्या ब्राह्मणाने तेवढेसे दान जरी नेले तरी सर्वस्व गमावून बसल्यासारखा, चोराने लुबाडल्यासारखा, विषाद प्राप्त व्हावा; अशा वृत्तीने जे दान केले जाते, त्यास हे सुमती! त्रैलोक्यी ***राजस दान*** असे एकवाक्यतेने म्हणतात."

तामस दान

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम्।।१७-२२।।

"जे दान अयोग्य देश म्हणजे म्लेंच्छादींनी युक्त पापमय प्रांतात, अकाली म्हणजे पुण्यकाल नसतांना, अपात्री म्हणजे मूर्ख, चोर इ.ना दिले जाते अथवा योग्य देशकाली योग्य पात्राचा सत्कार न करता व उलट त्याचा अवमान करून दिले जाते, ते तामस दानात गणले जाते."

याप्रमाणे श्रीगोपालांनी तामस दानप्रकार सांगितला आहे. त्यावरच्या ज्ञानेशांच्या ओव्या अशा आहेतः

मग म्लेंच्छांचें वसौटें। दांगाणें हन कैकाटे।
कां शिबिरें चोहटें। नगरींचें तैं।।१७-२९४।।
तेही तेही ठायीं मिळणी। समयो सांजवेळु कीं रजनी।
तेंव्हा उदार होणें धनीं। चोरियेचां।।२९५।।
पात्रें भाट नागरी। कां स्त्रिया कां जुवारी।
जियें मूर्त्तिमंत भुररीं। भुले तेयां।।२९६।।

रूपानृत्याची पुरवणी। तैं फुडां डोलेभारणी।
गीत भाटींव तैं श्रवणीं। कर्णजपु।।२९७।।

"म्लेंच्छांची वस्ती, कैकाड्यांची ठाणे, भटक्यांची पाले, शहराचा चव्हाटा अशा स्थळी, कातरवेळी किंवा रात्री कुमार्गाने मिळवलेल्या धनावर तामस दाता उदार होतो. ते धन वेचण्यासाठीची पात्रे म्हणजे स्तुतिपाठक भाट, गारुडी, वेश्या, जुगारी! त्यांच्या रूपाने मूर्तिमंत भूलच अवतरते. रूपाचे मोहक आविष्कार, नृत्याचे मादक अंगन्यास यांनी दृष्टी भारली जाते. त्यातच अहंकाराला रिझवणाऱ्या स्तुतिस्तोत्रादी त्या दात्याची कर्णेंद्रिये विंधून घेतात."

तेयाहीवरी अलुमालु। जैं घे फुलागंधाचा गुगुलु।
तंव भ्रमाचा तो वेतालु। अवतरे तैसा।।१७-२९८।।
तेथ विभांडुनियां जगु। आणिलें पदार्थ अनेग।
तेणें घालूं लागे मातंग-। गवांदीसीं।।२९९।।
ऐवं ऐसेनि जैं जैं देणें। तैं तामसदान मी म्हणें।
आणि घडे दैवगुणें। आणिकही एक।।३००।।

"भरीला भर म्हणून पुष्पमाला, गजरे, अत्तरे इ.चा सुगंध मनाला वेडे करतो. अशा वेळी साक्षात वेताळच प्रकटावा, तसा त्या तामसी पुरुषाचा भ्रम मूर्त रूप घेतो. त्यावेळी जगातून लुटून आणलेली सर्व संपत्ती मांगांना अन्नसत्र घालण्यासाठी अन वेश्या, जुगारी, भाटांना दान केली जाते. अशा प्रकारे जे दान घडते, ते ***तामस दान*** होय."

विपायें घुणाक्षर पडे। टालियें काऊला सांपडें।
तैसें तामसा पर्व जोडे। पुण्यदेशीं।।१७-३०१।।
तेथ देखौनि तो आथिला। योग्यु मागोही आला।
तोही दर्पा चढला। भांबावें जऱ्ही।।१७-३०२।।
तऱ्ही श्रद्धा न धरी जीवीं। तेयां माथाही न खालवी।
स्वयें ना करी ना करवी। अर्घ्यादिक।।३०३।।
आलियां न घली बैसों।....।।३०४।।

"अन दैवयोगाने क्वचित वाळवीने कोरलेल्या पानावर अक्षर कोरले जावे; किंवा टाळी वाजवताच कावळा यावा; त्याप्रमाणे अशा तामसी पुरुषाला पुण्यदेशी, पर्वकाळी, अशा माणसाकडे एखादे सत्पात्र आपणहून काही दान मिळावे या हेतूने चालत आले, तर त्या अभिमानाने गर्विष्ठ झालेल्या तामसाची मती गुंग झाल्याने यदाकदाचित अशा वेळी त्याने दान केले, तर ते कसे असते पहाः अंतःकरणात श्रद्धा न ठेवता, त्या सत्पात्रापुढे मस्तक न लववता; स्वतः तर नाहीच, पण इतरही कोणाकडून अर्घ्य,पाद्यादिक न करता; याचकास आसन न देताच, त्या याचकाची तो कशी बोळवण करतो बघा."

......। तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो।
हा अप्रसंगु कीर असो। तामसीं नरीं।।३०४।।
पैं बोलविजे रिणाईतु। तैसा झंकवी तेयाचां हातु।
तूंकरणें याचा बहुतु। प्रयोगु तेथ।।३०५।।
आणि जेयां जैं दे किरीटी। तेयांतैं उमाणी तेयासाठीं।
मग कुबोलें कां लोटी। अवज्ञाचि।।३०६।।
हे बहु असो या परी। मोल वेंचणें जैं अवधारीं।
तेयां नांव चराचरीं। तामस दान।।३०७।।

"मानसन्मानादीच जेथे द्यावयाचे त्या पुरुषाच्या गावीही नसते, तो याचकास गंधाक्षता अर्पण करील हे असंभवनीयच! सावकारास थोडेफार देऊन ऋणकरी जसे वाटेला लावतो, त्याप्रमाणे त्या सत्पात्र याचकाच्या हातावर काही तरी टाकून त्याचा अवमान करून तो त्याला घालवून लावतो. याचकास *"अरेतुरे"* म्हणणे व त्याला दिलेले दान त्याच्या लायकीप्रमाणेच असल्याचे सांगून उद्धटपणा व अपशब्दांचा मारा करणे; हे अशा दात्याचे अंगचे गुणच असतात. अशा प्रकारे जे द्रव्य खर्चले जाते, ते ***तामस दान*** या सदरात मोडते."

सत्त्वगुण::::

सत्त्वगुणाची खरी ओळख

ऐशीं आपलालां चिह्नीं। अलंकृतें तिन्हीं।
दानें दाविली अवधानीं। रजतमा या।।१७-३०८।।
तेथ मी जाणत असे। विपायें तूं गां ऐसें।
कल्पिसिल मानसें। विचक्षणा।।३०९।।
जैं भवबंधमोचक। एकलें कर्म सात्त्विक।
तऱ्हीं कां वेखासी सदोख। येर बोलावीं।।३१०।।
परि नोसंततां विवसी। भेटी नाही निधीसीं।
कां धूं न साहतां जैसीं। वाती न लगें।।३११।।

"असो. ***सात्त्विक, राजस व तामस*** अशा तिन्ही प्रकारच्या दानांचे त्यांच्या लक्षणांसह वर्णन तू ऐकलेस. पण तुझ्या मनात अशी शंका असेल की भवबंधमोचक असे सात्त्विक दानकर्म तेवढेच सांगून चालले असते, इतर दोन प्रकार कशाला सांगायला हवे होते! राजस अन तामस दाने ही सदोषच आहेत! तर हे बुद्धिमंता! विवसीला हाकलल्याशिवाय पुरलेला निधी जसा हाती येत नाही किंवा धूर सहन केल्याशिवाय दिवा जसा पेटवता येत नाही; तसाच हा प्रकार आहे."

तैसें शुद्धसत्त्वाआड। आहे रजतमाचें कवाड।
तैं भेदणेयातें कीड। कां म्हणावें गां।।१७-३१२।।
आम्हीं श्रद्धादिदानात। जैं समस्तही क्रियाजात।
सांगितलें कां व्याप्त। तिन्हीं गुणीं।।३१३।।
तेथ भंरवसेनि तिन्हीं। न सांगोचि ऐसें मानीं।
परि सत्त्व दावावयां दोन्हीं। बोलिलो एरें।।३१४।।
जैं दोहींमाजीं तिजें असे। तैं दोन्हीं सांडितांचि दिसे।
अहोरात्रत्यागें जैसें। संध्यारूप।।३१५।।

तैसें रजतमविनाशें। तिजें जैं उत्तम दिसें।
तैं सत्त्व हे आपैसें। फावासि ये।।३१६।।

"सत्त्व हे रजातमाच्या पडद्याआड झाकलेले असल्यामुळे त्यांना हात लावल्याशिवाय सत्त्वगुणाचे दर्शन कसे घेता येईल! आणि म्हणून हे जे सदोष गोष्टींचे वर्णन करावे लागले, त्याला वाईट म्हणू नये. श्रद्धेपासून आरंभ करून दानापर्यंत जे काही मी तुला सांगितले, त्यात तिन्ही गुणांचे दर्शन करण्याचा हेतू नव्हता; तर ***सत्त्वगुण*** प्रकर्षाने समजावता यावा, म्हणून इतर दोन्ही गुणांचे वर्णन केले. दोन गोष्टींमध्ये लपलेली जी तिसरी वस्तू असते, ती पाहण्यासाठी त्या दोनही गोष्टी प्रथम बाजूला सारायला लागतात. दिवस आणि रात्र यांपैकी दोघेही नसताच जसे संध्येचे रूप प्रकटते, त्याचप्रमाणे ***रज व तम यांच्या लोपानेच सत्त्व उत्तमरीत्या दिसते व जाणता येते.***"

एवं दावावया सत्त्व तुज। निरोपिलें तमरज।
तैं सांडूनि सत्त्वें काज। साधीं आपुलें।।१७-३१७।।
सत्त्वेंचि एणें चोखालें। करी यज्ञादिकें सकलें।
पावसीं तैं करतलें। आपुलें निज।।३१८।।
सूर्यें दाविलें सांतें। काय एक न दिसें तेथें।
तेवीं सत्त्वें केलें फलांतैं। काय नेदी।।३१९।।

"हे अर्जुना! सत्त्व कसे असते, हे तुला उत्तमरीत्या समजावे म्हणून केवळ रजतमांची माहिती दिली. त्याचा उपयोग करून तू आपले कल्याण साधून घे. या चोख शुद्ध अशा सत्त्वगुणाने मंडित अशी यज्ञादी सकळ कृत्ये करत जा. म्हणजे तुला निजसुख डोळ्यांना स्पष्ट दिसेल अशी प्राप्ती होईल. सूर्याने प्रकाशित केलेली कोणती वस्तू दृष्टीस अगोचर असते! त्याचप्रमाणे सत्त्वगुणयुक्त क्रियेला मिळण्यास दुष्प्राय असे कोणते तरी फळ आहे काय!"

हे कीर आवडतां विखीं । रीती सत्त्वीं आथी निकीं।
परि मोक्षेंसीं एकीं। मिसलणें जैं।।१७-३२०।।
तैं एक आनचि आहे। तेयाचां सावोवा जैं लाहे।
तैं मोक्षाचांही होये। गांवीं सरतें।।३२१।।
पैं भांगार जऱ्हीं पंधरें। तऱ्हीं राजावलीची अक्षरें।
लाहें तैंचि सरे। जियापरी।।३२२।।

"खरोखरच हवे ते फल प्राप्त करून देण्यासाठी सत्त्वाचीच रीत उत्तम आहे. परंतु मोक्षधामास पावणे हे एक विलक्षणच आहे. त्याकरता आचरावयाची रीतही वेगळीच आहे. त्या रीतीने हे सात्त्विक कर्म केले असता मनुष्यास मोक्षप्राप्ती होते. चोख सुवर्णास राजमान्यतेची अक्षरे जोडून जेव्हा टाकसाळीतून नाण्यांच्या रूपाने ते बाहेर पडते, तेव्हाच त्याला व्यवहारात विनिमयक्षमता प्राप्त होते."

स्वच्छें शीतलें सुगंधें। जलें होती सुखप्रदें।
परि पवित्रत्व संबंधें। तीर्थाचेनि।।१७-३२३।।
नई हो कां भलतैसी थोरी। परि गंगें जैं अंगिकारीं।
तैंचि तियें सागरीं। प्रवेशु गां।।३२४।।
तैसें सात्त्विकां कर्मा किरीटी। येतां मोक्षाचिये भेटी।
न पडे आडकाठी। तैं वेगलें आहे।।३२५।।

"जल शुद्ध केले, स्वच्छ केले व त्यात वर सुगंध व शीतलता त्याला प्रदान केली की ते जसे सुखप्रद होते; किंवा नदी केवढीही मोठी असली, तरी तिचा गंगेने अंगीकार केल्याखेरीज सागरी जशी ती प्रवेशू शकत नाही; त्याचप्रमाणे सात्त्विक कर्माला मोक्षफल मिळवण्यात आडकाठी होऊ नये म्हणून ते करण्याची हातवटी विशिष्ट आहे."

त्याप्रकारे जेव्हा सात्त्विक कर्मे केली जातात, तेव्हाच ती मोक्षदायक होतात. त्या हातवटीचा विचार नंतर योग्य ठिकाणी करू!

पुढील अनुसंधान

उपासनेच्या खाणाखुणा सांगणाऱ्या या ***चतुर्थ स्कंध***ात आता आपणास प्रथम ***गीतेतील उपासनेचा प्रत्येक अध्यायागणिक प्रकटणारा अनुबंध*** निरीक्षिणे विषयानुरोधाने अगत्याचे आहे. त्यातून ***गीतेची उपासनापद्धती*** सर्वसाधारणपणे कशा प्रकारची आहे, त्याचा बोध होईल. त्यासाठी वळू या पुढील ***उन्मेष क्र. २५- गीतेतील उपासनेचा अनुबन्ध*** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::२५::

::गीतेतील उपासनेचा अनुबंध::

उन्मेष २५

गीता:साररूप सर्व श्लोक

::उन्मेष::२५::
::गीतेतील उपासनेचा अनुबंध::

आमुख::::

अनुसंधान

यज्ञ, तप व दान या त्रिविध कर्मांचे ***सत्त्व-रज-तम*** या गुणांशी संबंधित मार्गदर्शनपर विवेचन आपण पाहिले आहे. यानंतर गोपालकृष्ण सात्त्विक कर्मे कशी करावीत याचे गीता *श्लोक क्र. १७-२३* पासून अध्यायाच्या अखेरपावेतो निर्देशन करतात. त्यांचा उद्देश त्या कर्मांद्वारे साधकास मोक्ष कसा मिळवता येईल, हे सांगण्याचा आहे. ते आपण नंतर योग्य प्रसंगी अवलोकू. तसेच आपला जो ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** चर्चेचा महत्त्वाचा असा उर्वरित भाग आहे, त्याचाही अद्याप परामर्ष घ्यावयाचा आहे.

क्षेत्र-क्षेत्रज्ञ उर्वरित विचार

भगवंतांनी ***"मय्यासक्त मनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः। असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु।।७-१।।"*** या श्लोकाद्वारे विज्ञानासहित ज्ञान सांगण्याचे अभिवचन दिले होते*(उन्मेषः१६-प्रकृतिविचार, पृ.क्र.२४५)*. त्यातला ज्ञानाचा काही अंश प्रामुख्याने विज्ञानाच्या हाताला धरून आपण निरीक्षिला आहे. *सातवा, आठवा, तेरावा, चौदावा, सोळावा व सतरावा* या गीताध्यायातील विशिष्ट श्लोक व त्यावरील ज्ञानेश्वरांचे विचार यांचा मुक्तहस्ते उपयोग करत आपले हे विवेचन चालू आहे.

आत्मा व जगत यांचा परस्परसंबंध जाणून घेण्यासाठी गीतेचा जो महद्प्रपंच आहे, त्याचे जिज्ञासूंना नीट आकलन करता यावे व योगसाधकांस सुयोग्य मार्गदर्शन व्हावे, हा यामागचा आपला हेतू पूर्वीच प्रकट केला आहे. परंतु हा सर्व विषय हाताळण्यापूर्वी अगोदर म्हटल्याप्रमाणे या उन्मेषात गीतेतील उपासनेचा अनुबंध निरीक्षिणे आवश्यक आहे.

गीतेचा अनुबंध

मुळात १)यम, २) नियम, ३) आसन, ४) प्राणायाम, ५) प्रत्याहार, ६) ध्यान, ७) धारणा व ८)समाधि ही जी अष्ट योगांगे आहेत, त्यातल्या ***यम-नियम-प्रत्याहार*** यांच्याशी संबंधित असा साधनोपयोगी भाग त्यानिमित्ताने आपल्यापुढे ठेवला गेला. ही जी योगांगे आहेत, ती त्यांच्यात प्राणायाम अंतर्भूत केल्यास, प्रमुखतः चित्तभूमीच्या शुद्धीसाठी आहेत.

कर्म हे अटळ आहे, असा गीताकारांचा एक सिद्धांत आहे. त्याला लक्षात घेता कर्म तर करावेच लागते. फक्त ते चित्तशुद्धीस साहाय्यक होईल असे करण्याची रीत अवलंबिली म्हणजे झाले. त्या दृष्टीने कर्मयोगाचा जो प्रमुख भाग आहे, त्यातला काही भाग यानिमित्ताने आपल्या नजरेस आलेला आहे, याचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे.

कर्म, योग, ज्ञान व भक्ती या चतुष्टीचा गीतेत जो विचार केला आहे, त्याचा ***अनुबंध*** या ठिकाणी लक्षात आणून, नंतर आपण *उर्वरित* ***क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार***, *पंधराव्या* अध्यायात ***क्षर-अक्षर व उत्तम*** पुरुषांचे दर्शन करतांना कसा प्रकट केलेला आहे, तो पाहू.

गीताध्यायानुसारी उपासनासार::::

कर्मयोगाच्या जपमाळेचा मेरुमणी (अ.२)

भगवंत ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं ....।।२-११।।"*** पासून ***ज्ञान*** व ***साङ्ख्यबुद्धी*** प्रतिपादण्यास सुरुवात करतात. ***"सुखदुःख समे कृत्वा....।।२-३८।।"*** मध्ये अर्जुनाला आत्मा अवध्य असल्यामुळे युद्धास उभे राहण्याचा उपदेश त्यानिमित्त येतो. ***"एषा तेऽभिहिता साङ्ख्ये .....।।२-३९।।"*** पासून कर्मयोग सांगण्यास सुरुवात होते. ***"कर्मण्येवाधिकारास्ते मा फलेषु कदाचन....।।२-४७।।"*** हा श्लोक म्हणजे कर्मयोग्याने जपावयाच्या माळेचा मेरुमणी! ***"यदा ते मोहकलिलं ...।।२-५२।।"*** या श्लोकात भगवंत अर्जुनाला बुद्धीवरचे मोहरूप मालिन्य दूर करण्यास सांगतात व ***"श्रुतिविप्रतिपन्ना ते....।।२-५३।।"*** याद्वारे बुद्धी परमात्मस्वरूपी स्थिर होईल, तेव्हा योगप्राप्ती होईल, असे म्हणतात.

ज्ञान्याची लक्षणे (अ.२)

ज्ञान्यांची लक्षणे सांगण्यास भगवंत उद्युक्त होतात, ते अर्जुनाच्या ***"स्थितप्रज्ञस्य का भाषा...।।२-५४।।"*** या प्रश्नाने. हा विषय ***"प्रजहाति यदा कामान्....२-५५।।"*** या श्लोकापासून चर्चिण्यास सुरुवात होते आणि ज्ञान्याची अवस्था ते सांगतात, ती ***"एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ....।।२-७२।।"*** या श्लोकाने समाप्ती करेतोपावेतो वर्णिली जाते.

कर्मयोगाची ख्याती (अ.३)

"लोकेऽस्मिनद्विविधानिष्ठा.....।।३-३।।" द्वारे भगवंत सूचित करतात त्या ज्ञान्यांकरता ***ज्ञानयोग*** व कर्म करणाऱ्यांसाठी ***कर्मयोग*** या दोन साधनपद्धतींपैकी कर्मयोगाचे पुनश्च विवेचन ***"न कर्मणामनारम्भा....।।३-४।।"*** द्वारे सुरू होते. या विवेचनातील परवलीचा श्लोक म्हणजे ***"न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्। ....।।३-५।।"***. मनुष्यांस प्रकृतिजन्य गुणांच्या अधीन होऊन कर्म करावेच लागते. ***"नियतं कुरु कर्म त्वं ....।।३-८।।"*** द्वारे शास्त्रविहित कर्म करावे, असे सांगितले आहे.

नंतरच्या श्लोकात ***"यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र.....।।३-९।।"*** द्वारे यज्ञकल्पनेचा परामर्ष घेण्यास सुरुवात होते. ईश्वराप्रीत्यर्थ करावयाचे

कर्म तोच यज्ञ! यज्ञ व सृष्टिचक्राचे वर्णन ***"एवं प्रवर्तितं चक्रं..... ।।३-१६।।"*** या श्लोकाने समाप्त होते. प्राप्तार्थ पुरुषानेही यज्ञकर्म टाकावयाचे नसते; मी भगवंतसुद्धा लोकपालनार्थ कर्म करतच असतोः ज्ञान्याने लोकसंग्रहार्थ कर्म अवश्य केलेच पाहिजे; हा कर्मयोगाची ख्याति व्यक्तवणारा भाग ***"यस्त्वात्मरतिरेव.... ।।३-१७।।"*** पासून ***"न बुद्धिभेदं जनयेत्... ।।३-२६।।"*** पर्यंत येतो.

प्रकृति व तिचे गुण कर्मे करून घेतात; अहंकारी विमूढ आपण ती केली असे मानतो;इंद्रियांचे नियमन करावे व काम-क्रोध यांच्या ताब्यात जाऊ नये; *इंद्रिये, मन व बुद्धी यांच्यापेक्षा श्रेष्ठ अशा आत्मतत्त्वास जाणून घ्यावे;* हा भाग ***"प्रकृतेः क्रियमाणानि.... ।।३-२७।।"*** ते ***"एवं बुद्धेः परं बुद्ध्वा ..... ।।३-४३।।"*** या श्लोकापावेतो विवेचिला आहे. यात साधकांसाठी भगवंतांचा जो उपदेश आहे, त्यातील ***"श्रेयान्स्वधर्मो विगुणः .... ।।३-३५।।"*** व ***"तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य .... ।।३-४१।।"*** हे श्लोक कर्मयोगी व इतर साधकांसाठी आचारसंहिता प्रमाणित करणारे आहेत. यमनियम व स्वकर्माचरण यांचा या श्लोकांद्वारे उगम होतो.

योगाचा आश्रय करून विहित कर्मे करण्याचा उपदेश (अ.४)

"आत्मस्वरूप जाणून घे," असे भगवंतांनी *श्लोक क्र. ३-४३* यात सांगून योगस्थितिप्राप्ती वांछनीय आहे हे सुचविले. त्यांनी हा अविनाशी योग सूर्याला, सूर्याने मनूला व मनूने इक्ष्वाकूला सांगितल्यापासून योगाचे प्रवर्तन झाले व तो योग कालांतराने या लोकी लोप पावला. त्या पुरातन योगाचे रहस्य अर्जुनाला सांगत असल्याचे भगवंत म्हणतात. हा सर्व भाग *श्लोक क्र. ४-१*-***"इमं विवस्वते योगं.... ।।"*** पासून सांगण्यास सुरुवात होते.

भगवदवताररहस्य ***"बहूनि मे व्यतीतानि.... ।।४-५।।"*** ते ***"जन्मकर्म च मे दिव्यमेवं .... ।।४-९।।"*** या श्लोकात स्पष्ट केले आहे. सगुण भगवंतास प्राप्त करून घेणे हा जो त्या पुरातन योगसिद्धीचा भाग आहे व जो कर्मयोगसोपानाद्वारे प्राप्त होतो, त्याचा निर्देश हे अवताररहस्य सांगून झाल्यावर ***"वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः।.... ।।४-१०।।"*** या श्लोकाद्वारे केलेला आहे. कर्मयोगाद्वारे ही सिद्धी लवकर प्राप्त होते, असे भगवंत ***"काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं .... ।।४-१२।।"*** या श्लोकातून व्यक्तवतात.

वर्णविहित स्वकर्मव्यवस्थेचा उल्लेख ***"चातुर्वर्ण्यं मया सृष्टं .... ।।४-१३।।"*** या श्लोकात येतो. गुण व कर्म याअनुसार भगवंतांनी वर्णव्यवस्था निर्माण केलेली आहे. व विहित कर्म ठरवण्यासाठी हा श्लोक पायाभूतच समजावा लागेल.

भगवत्तत्त्व उत्तमरीत्या जाणून कर्मयोग आचरावा; सर्व करूनही भगवंत अकर्ताच असतो; हा उपदेश ***"न मां कर्माणि लिम्पन्ति ... ।।४-... ।।४-१४।।"*** व ***"एवं ज्ञात्वा कृतं कर्म... ।।४-१५।।"*** या श्लोकद्वयीत येतो. परंतु कर्मयोग आचरण्यासाठी ***अकर्म व कर्म*** यांचा निर्णय करणे बुद्धिमान मनुष्यांसही कठीण आहे. म्हणून संसारबंधनातून मुक्त होण्यासाठी कोणते कर्म करावे, ते सांगण्याचे सूतोवाच ***"किं कर्म किं कर्मेति... ।।४-१६।।"*** या श्लोकी केलेले आहे.

कर्म, अकर्म व विकर्म यांचे स्वरूप ***"कर्मणो ह्यपि बोद्धव्यं. ... ।।४-१७।।"*** ते ***"यदृच्छालाभसंतुष्टो ... ।।४-२२।।"*** यात स्पष्ट केल्यावर भगवंत तृतीयोध्यायातला ***यज्ञ*** हा विषय विहित कर्म स्पष्ट करण्यासाठी पुनः हाताळतात. ***"गतसङ्गस्य मुक्तस्य .... ।।४-२३।।"*** ते ***"श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः ... ।। ४-३३।।"*** पर्यंत विविध यज्ञ म्हणजे विहित कर्म सुयोग्य रीतीने करण्याच्या पद्धती स्पष्ट केल्या आहेत. ***"ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।... ।।४-२४।।"*** हा श्रेष्ठ अशा ब्रह्मयज्ञाचा प्रकारही त्यात येतो.

तसेच यज्ञाचे अवशिष्टरूप ज्ञानामृत सेवन करणाऱ्या योग्यांना सनातन ब्रह्म प्राप्त होते, असेही भगवंत ***"यज्ञशिष्टामृतभुजो ... ।।४-३१।।"*** या श्लोकात म्हणतात.

यातील बरेचसे यज्ञ प्राणायामरहस्यासह आहेत. ***"श्रेयान्द्रव्यमया .... ।।४-३३।।"*** मध्ये ज्ञानयज्ञाचे श्रेष्ठत्व प्रतिपादिले आहे. त्यांचे स्वरूप कळण्यास योगस्थित ज्ञान्याचा उपदेश आवश्यक आहे आणि ज्ञान्यांची सेवा करून ज्ञानयज्ञाची उपासना करण्याचा मार्ग माहीत करून घ्यावा, हे ***"तद्विद्धि प्रणिपातेन .... ।।४-३४।।"*** द्वारे आपणास कळते. ज्ञानाची महती सांगणारे श्लोक अध्यायाअखेरपावेतो येतात.

ज्ञानरूपी अग्नी सर्व कर्मे भस्मसात करतो, हे महत्त्वाचे प्रतिपादन ***"यथैधांसि समिद्धोऽग्नि ... ।।४-३७।।"*** या श्लोकात येते. योगाचा आश्रय करण्याने कर्मबंधन बाधत नाही, असे ***"योगसन्न्यस्तकर्माणं ... ।।४-४१।।"*** मध्ये म्हटले आहे. म्हणून ***"तस्मादज्ञान .... ।।४-४२।।"*** द्वारे अर्जुनास संशयरहित होऊन युद्ध करण्याचा आदेश भगवंत देतात.

निष्काम कर्मे व साङ्ख्यनिष्ठा

आतापावेतो भगवंतांनी कर्म करण्याची जी प्रशस्ती केली आहे, त्याद्वारे अर्जुनाच्या मनात संदेह निर्माण होतो. पूर्वी *द्वितीय* अध्यायी ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं .... ।।२-११।।"*** पासून आत्मा कर्ता नाही असे प्रतिपादण्यास सुरुवात केली होती. नंतर ज्ञान्यांची म्हणजे आत्मा अकर्ता आहे, असे जाणणाऱ्यांची स्थितीही त्या अध्यायात वर्णिली होती. तदुपरांत तृतीयोध्यायी ***ज्ञान*** वा ***साङ्ख्य*** वा ***संन्यास*** या निष्ठांव्यतिरिक्त ***कर्मयोग्यांची निष्ठा*** वर्णन करून तिचा उहापोह *तृतीय* व *चतुर्थ* अध्यायात केला आहे.

परत चतुर्थोध्यायाच्या अंतिम भागी ज्ञानाची महती वर्णन करून ज्ञानी गुरुजनांकडून सर्व यज्ञातील श्रेष्ठ अशा ज्ञानाचा उपदेश करून घेण्यास भगवंत अर्जुनाला सांगतात व ज्ञानयज्ञ आचरण्यास उपदेशितात. अर्जुनाच्या मनात असे येते की आत्मा जर अकर्ता आहे, तर कर्म करण्याची काय आवश्यकता! व ज्ञानच जर श्रेष्ठ असेल, तर केवळ ज्ञान प्राप्त करून घ्यावे - कर्मे केली नाहीत, तर

चालणार नाही काय! या शंकेला तो ***"सन्न्यासं कर्मणां कृष्ण .... ।।५-१।।"*** या श्लोकाद्वारे मांडतो.

या शंकेला ***"यस्त्वात्मरतिरेव ... ।।३-१७।।"*** व ***"नैव तस्य कृतेनार्थो ... ।।३-१८।।"***ही वचने तसेच ***"तस्मादसक्तः ....सततं कार्यं कर्म समाचर। ... ।।३-१९।।"*** या भगवदुक्तीची पार्श्वभूमी आहे. खरे तर त्याला श्रीकृष्णांनी सांगितले आहे की आत्म्याठायी रत असणाऱ्या मनुष्यास काही कर्तव्य राहत नाही; त्या मनुष्याला या लोकी कर्म केल्याने अथवा न केल्यानेसुद्धा काही लाभ साधायचा नसतो; म्हणून मनुष्याने अनासक्त होऊन निरंतर कर्तव्यकर्म करत रहावे; कारण अनासक्त मनुष्याला कर्म करून मोक्ष प्राप्त होतो.

निष्काम कर्मनिष्ठा व योगयुक्ती (अ.५)

भगवंतांनी हा विषय आपल्या ***"सन्न्यासः कर्मयोगश्च ... ।।५-२।।"*** या श्लोकापासून विवेचिला आहे. ***संन्यास*** म्हणजे संन्यासाश्रम, कर्मे न करणे, कर्मे टाकून देणे, असे मर्यादित अर्थ येथे अभिप्रेत नाहीत. ***ज्ञाननिष्ठा*** व ***कर्मनिष्ठा*** या दोन्हीपैकी ***ज्ञाननिष्ठा*** म्हणजे ***संन्यास.*** हेच पुनः ***"साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः ... ।।५-४।।"*** या श्लोकातून व्यक्त करून ***साङ्ख्यनिष्ठा*** म्हणजेच ***संन्यास*** असे स्पष्टीकरण मिळते. **निष्काम कर्मयोग**च या दोन्ही निष्ठांपैकी सोपा आहे, असे ***"सन्न्यासस्तु महाबाहो ... ।।५-६।।"*** या श्लोकाद्वारे म्हटले आहे. असा हा जो ***निष्काम कर्मयोग*** आहे, त्याचे आचरण व फलादी पुढील ***"योगयुक्तो विशुद्धात्मा .... ।।५-७।।"*** ते ***"कायेन मनसा बुद्ध्या ... ।।५-११।।"*** या श्लोकातून वर्णिले आहे.

अशा कर्मयोगाने आत्मशुद्धी वा अंतःकरणाची शुद्धी होते. असा योगी शांती पावतो व शरीरात असूनही आनंदात राहतो, असे **जीवन्मुक्तीचे स्वरूप** ***"युक्तः कर्मफलं त्यक्त्वा .... ।।५-१२।।"*** व ***"सर्वकर्माणि मनसा ...।।५-१३।।"*** या श्लोकांद्वारे दर्शवले आहे.

ईश्वर व माया किंवा ***भगवंत व अज्ञान*** यांचा मनुष्यमात्राच्या कर्तृत्वाशी काय संबंध आहे, हे ***"न कर्तृत्वं न कर्माणि .... ।।५-१४।।"*** व ***"नादत्ते कस्यचित्पापं .... ।।५-१५।।"*** या श्लोकात स्पष्ट केले आहे. ईश्वर भूतमात्रांचे कर्तेपण, कर्म व कर्मफल यांना निर्माण करत नाही; अज्ञानाने ज्ञान झाकलेले असल्याने जीव मोहित होतात.

अज्ञान लोपून ज्ञानरवीचा उदय झालेल्या मनुष्याची स्थिती ***"ज्ञानेन तु तदज्ञानं .... ।।५-१६।।"*** ते ***"कामक्रोधवियुक्तानां .... ।।५-२६।।"*** या श्लोकातून सांगितली आहे.

इंद्रिये, बाह्यविषयोपभोग, काम व क्रोध यांपासून मुक्त झालेला मनुष्य ब्रह्मनिर्वाण प्राप्त करतो; सर्वभूतहितार्थ झटतो व अंतर्बाह्य परब्रह्मच होतो; असा भगवंत निर्वाळा देतात.

"स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः। ... ।।५-२७।।" व ***"यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः । .. ..।।५-२८।।"*** यात विषयभोगांचा त्याग व दृष्टी भुवयांमध्ये स्थिर करून प्राण व अपान वायूंना समान करून इंद्रिये, मन व बुद्धी यांना जिंकण्याची ***योगयुक्ती*** निरूपण्यास सुरुवात झाली आहे. ***"भोक्तारं यज्ञतपसां .... ।।५-२९।।"*** अशा सर्वलोकमहेश्वर व सर्व भूतांचा सुहृद असणाऱ्या भगवंतास जाणून शांती प्राप्त होते, हे त्या योगयुक्तीचे फल आहे.

मुळातच भगवंतांनी मोक्षोपाय म्हणून ज्या दोन निष्ठा म्हणजे ***ज्ञान व साङ्ख्य*** म्हणजे ***ज्ञानयोग व कर्मयोग*** म्हणून सांगितल्या आहेत *(गीता श्लोक क्र. ३-३)*, त्यातील कर्मयोगाच्या या विवेचनात आपणास ज्याला बहुतशः ***योग*** अशी संज्ञा आहे, तो गुंफलेला आढळतो तो गीतेच्या ५-२७ व २८ या श्लोकांत. हा योगाचा भाग कर्मयोगांतर्गत येतो व तो साधण्याची रीती *सहाव्या* अध्यायात निरूपिली आहे.

गीतेतील योगाचे स्वरूप (अ.६)

"अनाश्रितः कर्मफलं .... ।।६-१।।" ते ***"यदा हि नेन्द्रियार्थेषु ... ।।६-४।।"*** या श्लोकांतून पुनश्च ***संन्यास वा साङ्ख्य वा ज्ञान*** आणि ***कर्मयोग वा योग*** यांची एकवाक्यता प्रतिपादिली आहे. **गीतेचे मूळ सूत्र** ***"कर्मफलाची इच्छा न धरता विहित कर्म करून परमात्मप्राप्ती करून घ्यावी,"*** हे या श्लोकात पुनः प्रकट होते.

श्लोक क्र. ६-५ व ६ यांद्वारे ***"उद्धरेदात्मनात्मानं ... ।।६-५।।"*** व ***"बंधुरात्मात्मनस्तस्य ... ..६-६।।"*** मध्ये आत्मोद्धार आपला आपणच करून घ्यावा व शरीरेंद्रियसंघात स्वाधीन करून घ्यावा, असे सांगून जितेंद्रिय योग्याची स्थिती ***"जितात्मनः प्रशान्तस्य ...... ।।६-७।।"*** ते ***"योगी युञ्जीत ... ।।६-१०।।"*** यात व्यक्तवली आहे. ज्ञान आणि विज्ञान यांनी योग्याचे अंतःकरण तृप्त असते, हेसुद्धा ***"ज्ञानविज्ञानतृप्तात्मा .... ।।६-८।।"*** मध्ये सांगण्यास भगवंत दक्ष आहेत. याच ज्ञानविज्ञानासाठी नंतर *सातवा* अध्याय पुढे येतो.

"शुचौ देशे प्रतिष्ठाप्य .... ।।६-११।।" ते ***"आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन। .... ।।६-३२।।"*** या श्लोकांमधून हा योग कसा साधावा, त्याचे अनुष्ठान कसे करावे, तो साध्य झाल्यास परम उपलब्धी कशी होते व योग्याची स्थिती यांचे वर्णन येते. पूर्वी *श्लोक क्र. ५-२७ ते २९* अशी योगयुक्तीची त्रयी सांगितली होती, तिचाच हे श्लोक विस्तार करतात.

हा योग जो गीता सांगते, तो पुढील कल्पनांशी पूर्णतया संबंधित आहे: इंद्रिये, त्यांचे विषय, त्या विषयांचा त्याग व संन्यास, इंद्रिये व त्यांचे विषय यांचे नियमन व त्यांना जिंकणे; इच्छा, भय व क्रोध यांपासून मुक्ती; मोक्षप्राप्ती हेच जीवनाचे उद्दिष्ट असावे; यज्ञ व तप यांचा भोक्ता म्हणजे ज्याच्यासाठी ही करावयाची तो एकमेव परमेश्वर; निष्काम कर्म, कर्मफलाचा त्याग; शम म्हणजे सर्व संकल्पांचा अभाव; आत्मोद्धार, समत्वबुद्धी व द्वंद्वराहित्य; ज्ञानविज्ञानाने संपूर्ण होणे; सर्व प्राणिमात्रात समभाव ठेवणे; वासनाराहित्य, अपरिग्रह, एकांतसेवन, निरंतर आत्म्याचे चिंतन; प्राण व अपानांना सम करणे,

दृष्टी भुवयांमध्ये स्थिर करणे; पवित्र स्थल, आसनादी व शुद्ध स्थान, मनाची एकाग्रता; चित्त व इंद्रिये यांच्या क्रियांचे नियमन; शरीर, मस्तक व मान यांची समान व अचल स्थिती, नासाग्रदृष्टी; ब्रह्मचर्य, भयराहित्य, सावधानता, शांत अंतःकरण, मनाचे संयमन; परमेश्वराठायी चित्त लावणे वा ईश्वरप्रणिधान; युक्ताहार व युक्त विहार, युक्त कर्मे; चित्ताची परमेश्वराच्याठायी स्थिरता, चित्ताचे हळूहळू नियमन करून मन व बुद्धी यांना परमात्म्याच्या स्मरणात लावत लावत बाह्यविषयांपासून चित्ताचा उपराम करत अभ्यासपूर्वक साधावयाचा चित्तवृत्तींचा निरोध ***("यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया। ...।।६-२०।।");*** दु:खरूप संसाराच्या संयोगापासून वियोग; परमात्म्यावरचा ***संयम*** म्हणजे ***धारणा, ध्यान व समाधि*** यांचा परमेश्वर हाच एकमेव आलंब विषय असणे ***("....। आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत्।।६-२५।।" व "यतो यतो निश्चरति ... . .. नियम्यैतदात्मन्येवं वशं नयेत्।।६-२६।।");*** पापराहित्य व रजोगुणाची शांती; परमात्मसुख म्हणजेच उत्तम सुख; सर्व प्राणिमात्रात आत्मा पाहणे; सर्व प्राणिमात्रांना आत्म्याठायी पाहणे: अशा सर्वव्यापी परमेश्वराचे सतत भजन करणे वा भक्तियोग; इ.संकल्पना.

योगाचा अधिकारी कोण

"योऽयं योगस्त्वया प्रोक्तः ... ।।६-३३।।" व ***"चञ्चलं हि मनः ... ।।६-३४।।"*** द्वारे अर्जुन आपली शंका मांडून मनाच्या चांचल्यामुळे योग पावणे दुष्कर आहे असे म्हणतो. श्रीकृष्ण म्हणतातः ***("असंशयं महाबाहो .... ..६-३५।।" व "असंयतात्मना योगो ... ।।६-३६।।")*** की मन चंचल असून निग्रह करण्यास दुष्कर असले तरी सतत अभ्यास व वैराग्याने त्याचा निग्रह करणे शक्य आहे व प्रयत्नशील मानुष्यास हा योग प्राप्त होणे शक्य आहे.

"जिज्ञासुरपि योगस्य"

यावर अर्जुनाचा प्रश्न आहे की योगप्राप्ती प्रयत्न करूनही काही कारणाने नच झाली तर काय ***("अयतिः श्रद्धयोपेतो ... ।।६-३७।।")*** व त्या योगभ्रष्टाची गती कोणती ***("कच्चिन्नो ... ।।६-३८।।").*** अशा प्रयत्नशीलाचे अधःपतन होत नाही व जन्मजन्मांतरीसुद्धा योगाभ्यासाचे फल त्याला मिळते हे भगवंत ***"पार्थ नैवेह ... ।।६-४०।।"*** ते ***"प्रयत्नाद्यतमानस्तु .... ।।६-४५।।"*** या श्लोकांतून स्पष्ट करतात.

योगाबद्दल एकदा जिज्ञासा निर्माण झाली की मनुष्यास कधी ना कधी, कोणच्या ना कोणच्या जन्मी, परमात्मप्राप्ती होतेच होते, हे ***"पूर्वाभ्यासेन तेनैव ... ।।६-४४।।"*** भगवत्वचन जिज्ञासूंसाठी अमूल्यच आहे. याच श्लोकातून गीतेस पुनर्जन्मसिद्धांत तत्त्वतः मान्य असल्याचे दिसते. एवढेच नव्हे तर योगप्राप्तीसाठी गीतेची मदार याच सिद्धांतावर आहे, हेही आपणांस जाणवते.

योगसाधनेचे महत्त्व

भगवंतांना या योगाचे म्हणजे कर्मयोगक्रमातील योगाचाराचे महत्त्व किती वाटते, ते त्यांच्या ***"तपस्विभ्योऽधिको योगी .... ।।६-४६।।"*** या वचनावरून दिसून येते. तसेच ईश्वरप्रणिधान करतकरत योग पावणारा सर्व योग्यांत श्रेष्ठ आहे, हे लक्षात येते ते त्यांच्या ***"योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना। श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः।।६-४७।।"*** या अंतरंगीच्या बोलांनी!

विश्वात्मा व विश्वव्यापार यांचे ज्ञान (अ.७)

"ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः। युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः।।६-८।।" मध्ये म्हटल्याप्रमाणे असा योगी भगवत्स्वरूपविषयक शास्त्रोक्तीची जाणकारी म्हणजे ज्ञान असणारा व त्याप्रमाणे अनुभूती असणारा म्हणजे विज्ञानतृप्तात्मा असतो. ज्ञान व विज्ञान यांनी तृप्त असणारा असा योगी जितेंद्रिय असून स्वस्वरूपी अविचल राहतो.

भगवत्स्वरूप व त्याची प्राप्ती वा साक्षात्कार हे समग्र समजावून देण्यासाठी ***ज्ञानविज्ञानयोग*** या गीतेच्या *सातव्या* अध्यायाचे सूतोवाच करतांना भगवंत म्हणतातः ***"मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः। .... ।।७-१।।"*** व म्हणतात की ***"ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः। ...।।७-२।।"*** -जे जाणल्यावर या जगात जाणण्यास योग्य असा पदार्थ उरत नाही, ते हे ***ज्ञान व विज्ञान*** सहस्रो मनुष्यातील क्वचितच एखाद्या योग्यास प्राप्त होते; हे पण भगवंत सांगतात ते त्यांच्या ***"मनुष्याणां सहस्रेषु ...।।७-३।।"*** या उक्तिद्वारे!

"भूमिरापोऽनलो वायुः ... ।।७-४।।" पासून हे ज्ञानविज्ञान सांगण्यास सुरुवात होते. ***परा, अपरा, जीवरूप चेतन प्रकृति, अष्टधा प्रकृति*** इ.सांगून झाल्यावर येणारे मुख्य सूत्र म्हणजे ***"मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय। ....।।७-७।।".*** जाणून घेण्यास जे जे पदार्थ आहेत, ते ते भगवंताहून वेगळे नाहीतच. हे सर्व जग दोऱ्यातील मण्याप्रमाणे त्यांच्या स्वरूपी गुंफलेले आहे.

"रसोऽहमप्सु कौन्तेय ...।।७-८।।" ते ***"ये चैव सात्त्विका भावा ....।।७-१२।।"*** या श्लोकांतून भगवंतांच्या ठळक ठळक विभूति सांगून वर्णन केले आहे. हाच भाग नंतर दहाव्या अध्यायात प्रकर्षाने विस्तारला आहे.

असे असले तरी भगवंत म्हणतात ***"त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः ... ।।७-१३।।",*** त्याप्रमाणे त्रिगुणांच्या कार्यरूप असलेल्या भावांनी मोहित झालेले हे जगत त्रिगुणातीत व अविनाशी अशा त्यांना जाणत नाही.

"दैवी ह्येषा गुणमयी ... ।।७-१४।।" अशी भगवंतांची तरून जाण्यास दुस्तर माया, फक्त त्यांनाच जे निरंतर भजतात, तेच तरून जातात.

"न मां दुष्कृतिनो मूढाः ...।।७-१५।।" द्वारे भगवंत सांगतात की आसुर व मूढ त्यांना भजत नाहीत. त्यांना भजणाऱ्या

भक्तांचे ***अर्थार्थी, जिज्ञासू, आर्त व ज्ञानी*** असे चार प्रकार असतात हे ते ***"चतुर्विधा भजन्ते मां .... ।।७-१६।।"*** द्वारे सांगतात.

भगवत्स्वरूपी नित्य एकायतनस्थित भक्त त्यांना कसा प्रिय असतो, हे सांगतांना ते म्हणतात: ***"तेषां ज्ञानी नित्ययुक्त ... ।।७-१७।।"***. अशा ज्ञानी भक्ताचे वर्णन ***"उदाराः सर्व एवैते ... ।।७-१८।।"*** व ***"बहूनां जन्मनामन्ते ... ।।७-१९।।"*** या श्लोकद्वयीतून येते. वासुदेवच सर्व काही आहे; जीव, जगत वा प्रकृति हे परमेश्वरच आहेत असा भाव असणारा, योगमंदिराच्या कलशस्थानी शोभणारा ज्ञानी महात्मा वा सर्वश्रेष्ठ भक्त अत्यंत दुर्लभ असतो.

ज्ञानी व अज्ञानी भक्त

ज्ञानी भक्ताची महती सांगितल्यावर अज्ञानी लोक कशी भक्ती करतात, हे सांगतांना, गौणी भक्तीचे फल कोणते उपजते, ते सर्व ***"कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः .... ।।७-२०।।"*** या श्लोकात विवेचिले आहे. अज्ञानी लोकांस भगवत्स्वरूप कसे व का कळत नाही, हे ***"अव्यक्तं व्यक्तिमापन्नं ... ।।७-२४।।"*** ते ***"इच्छाद्वेषसमुत्थेन ... ।।७-२७।।"*** या श्लोकांतून वर्णिले आहे. परंतु पुण्यवान लोकांस भगवत्स्वरूपाचे ज्ञान होते व ***अधिभूत, अधियज्ञ व अधिदैव*** यांसह ते भगवंतास जाणतात, असे शेवटच्या ***"येषां त्वंतगतं पापं ... ।।७-२८।।"*** ते ***"साधिभूताधिदैवं मां ... ।।७-३०।।"*** या श्लोकत्रयीत व्यक्तवले आहे.

अधिभूतासह परमात्म्यास अनुभूतिद्वारे यथार्थ जाणणे, अधिदैवाचे आकलन होणे व या ज्ञानाद्वारे ***अधियज्ञ*** म्हणजे परमात्मा प्राप्त करून घेणे हा ज्ञानविज्ञानाचा श्रेष्ठ भाग जाणणारे महाभाग अंतकाळीसुद्धा परमात्म्यास स्मरतात, असे सांगून *सातव्या* अध्यायाचा समारोप होतो.

अर्जुनाचे सप्तप्रश्न व योग्याची गती (अ.८)

"हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतीरसाचा ओतला भावो।" या अवस्थेतील ज्ञानी भक्त ***"साधिभूताधिदैवं साधियज्ञं"*** अशा परमेश्वरास जसे जाणतो, ते ज्ञान विचारण्यास उद्युक्त झालेला अर्जुन प्रश्न करतो, ते असे: ***"किं तद्ब्रह्म ... ।।८-१।।"*** व ***"अधियज्ञः कथं कोऽत्र .... ।।८-२।।"***. त्याचे उत्तर भगवंतांनी दिले आहे, ते येते ***"अक्षरं ब्रह्म परमं ... ।।८-३।।"*** ते ***"अन्तकाले च ... ।।८-५।।"*** या श्लोकातून.

अत्यंत श्रेष्ठ अविनाशी परमात्मा ***ब्रह्म*** आहे. ब्रह्माचे स्वरूप जो **जीवात्मा**, त्याला ***अध्यात्म*** म्हणतात. प्राणिमात्रांची उत्पत्ती करणारा सृष्टिव्यापार म्हणजे ***कर्म.*** सर्व नाशिवंत पदार्थ हे ***अधिभूत*** होत. हिरण्यगर्भ वा पुरुष हा ***अधिदैव*** आहे आणि शरीरांतर्यामीचा परमेश्वर हा ***अधियज्ञ*** आहे.

अंतकाली केलेल्या स्मरणानुसार भाव वा गती प्राप्त होते, हा भाग ***"यं यं वापि स्मरन्भावं ... ।।८-६।।"*** या श्लोकात येतो.

म्हणून मनुष्याने सर्वदा भगवंताचे स्मरण करावे; ध्यानाचा अभ्यास करून चित्त स्थिर करावे; हा अभ्यास मनुष्यास अंतकाली उपयोगी पडतो. दोन्ही भुवयांच्यामध्ये प्राण योग्य प्रकारे स्थापन करून साधकास परम पुरुष परमात्म्याप्रत अंतकाली जाता येते, हा भाग ***"तस्मात्सर्वेषु कालेषु .... ।।८-७।।"*** ते ***"प्रयाणकाले मनसाचलेन ... ।।८-१०।।"*** या श्लोकात आहे.

योगाभ्यासरत मनुष्यास ज्याची प्राप्ती होते, ते परमपद कसे आहे व ते कसे ***ॐ*** या एकाक्षरी ब्रह्माचा अंतकाली उच्चारण करत मूर्ध्निस्थानी प्राण स्थापन करून योगधारकास प्राप्त होते; त्याला पुनर्जन्म कसा मिळत नाही हा विचार ***"यदक्षरं वेदविदो ... ।।८-११।।"*** ते ***"आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन .... ।।८-१६।।"*** या श्लोकांतून सांगितला आहे.

तसेच ब्रह्मादी सर्व लोकांचा विनाश होतो; अव्यक्तामधून हे सर्व लोक निर्माण होऊन पुनः त्यात विलीन होतात; परंतु त्या ***अव्यक्त भावापलीकडील जो दुसरा अव्यक्त भाव*** असा परब्रह्म परमात्मा आहे, तो अविनाशी आहे व अनन्यभक्तीने प्राप्त होणारा असा हा परमपुरुष आहे; इ.सर्व भाग ***"सहस्त्रयुगपर्यन्त ... ।।८-१७।।"*** ***ते "पुरुषः स परः पार्थ ... ।।८-२२।।"*** या श्लोकांतून वर्णिला आहे.

अंतकाली ज्या ***आवृत्ति*** व ***अनावृत्ति*** अशा दोन गती प्राप्त होतात, त्यांचे वर्णन व योगी यांच्या रहस्यास जाणत असल्याने *वेदाध्ययन, यज्ञ, तप, दान* इ.च्या पुण्यफलासही उल्लंघून जातो; हे शेवटी ***"यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः। ... ।।८-२३।।"*** ते ***"वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव ... ।।८-२८।।"*** या श्लोकांतून स्पष्ट केले आहे.

असा योगी हे संपूर्ण रहस्य जाणत असल्याने प्रकृतिवश होऊन मोहित होत नाही. ***शुक्ल व कृष्ण*** या गती ब्रह्मोपासकांच्या होत. परंतु जे पूर्ण ज्ञानी सद्योमुक्तीचे अधिकारी असतात, ते जीवन्मुक्त असतात. ***"न तस्य प्राणा उत्क्रामन्ति"*** या श्रुतिनुसार त्यांना गति वा अगति नसतात; हे आद्यश्रीशंकराचार्यांनी पण आपल्या गीताभाष्यात स्पष्ट केले आहे. म्हणूनच भगवंत उपदेशितात की ***"....तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ।।८-२७।।"***; म्हणजे मनुष्याने जीवन्मुक्ती देणारा योग आचरावा.

ईश्वराचे स्वरूप व ईश्वरप्रणिधान (अ.९)

या जीवन्मुक्ती प्रदान करणाऱ्या योगरहस्याचे प्रबोधन करण्यासाठी *नवम* अध्यायाची योजना केलेली आहे. ज्ञानदेव तर म्हणतात की ***"आतां अठरा पर्वीं भारतीं। तैं लाभे कृष्णार्जुन वचनोक्तीं। आणि जो अभिप्रावो सातें शतीं। तो एकलाचि नवमीं।।१०-३१।।"***. असा हा *नववा* अध्याय सुरू होतो तो श्रीकृष्णांनी दिलेल्या गुह्य ज्ञानास विज्ञानासह सांगून दुःखरूप संसारापासून मुक्त होण्याच्या

"इदं तु ते गुह्यतमं ....।।९-१।।" या आश्वासनाने ! राजविद्या, राजगुह्य, पवित्र असे हे उत्तम व प्रत्यक्ष अनुभवण्यासारखे, अव्यय व सुगम ज्ञान ***"राजविद्या राजगुह्यं ...।।९-२।।"*** ते ***"मयाध्यक्षेण प्रकृतिः ...।।९-१०।।"*** या श्लोकांत ते सांगतात.

सर्व भूतांचा महेश्वर अशा या भगवत्स्वरूपास न ओळखणारे अज्ञानी व अश्रद्ध मृत्युरूप संसारचक्रात भ्रमत राहतात. म्हणून भगवंत म्हणतात: ***"अवजानन्ति मां मूढा .. ।।९-११।।"*** आणि ***"मोघाशा मोघकर्माणो .. ।।९-१२।।"*** या श्लोकात म्हटल्याप्रमाणे आसुरी प्रकृतीस प्राप्त होतात.

परंतु दैवी प्रकृतीचा आश्रय करणारे महात्मे भगवद्भजन करतात. त्याबाबत भगवंतांची वचने ***"महात्मानस्तु मां पार्थ ... ..।।९-१३।।"*** ते ***"ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये .... ।।९-१५।।"*** या श्लोकांत आहेत.

यानंतरच्या ***"अहं क्रतुरहं यज्ञः ... ।।९-१६।।"*** ते ***"तपाम्यहं वर्षं ...।।९-१९।।"*** पर्यंतच्या श्लोकांतून भगवंत आपल्या विभूति सांगतात व त्याद्वारे विराटस्वरूप आत्मा जगतात कसा विनटलेला आहे; याचे स्वल्प दिग्दर्शन करतात. याच विराट स्वरूपास वेगवेगळ्या भावांनी त्यांचे भक्त भजतात.

अनन्यभक्तीचे अप्रूप

वेदांतील यज्ञादींचे फल क्षणभंगुर स्वर्गप्राप्ती आहे; इतर देवतांचे सकाम भजन करणारे भक्तसुद्धा भगवंतांचेच, पण अविधिपूर्वक यजन करतात; ज्या ज्या देवतांना जो जो भजतो, तो तो त्यांच्या त्यांच्या भावास प्राप्त होतो; म्हणून भगवंतांचेच अनन्यभक्तिभावाने भजन करणारा त्यांच्याप्रत जातो; असे ***"त्रैविद्या मां सोमपाः .. . . ..।।९-२०।।"*** ते ***"यान्ति देवव्रता .... ।।९-२५।।"*** या श्लोकांतून म्हटले आहे. भगवंतांच्या अनन्य भक्तांसाठी दिलासा देणारे महत्त्वाचे वचन येथे येते ते ***"अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।".***

सर्व यज्ञांचे भोक्ते व स्वामी भगवंतच आहेत. त्यांचे अनन्य भक्त त्यांची पूजादी कशी करतात, याचे उद्बोधक वर्णन आणि त्याद्वारे त्यांना फलरूपाने भगवंतांची प्राप्ती कशी होते; हा भाग शेवटच्या ***"पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।"*** ते ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"*** या श्लोकांत येतो.

या शेवटच्या *श्लोक क्र ९-३४* चे गीताकारांस किती अप्रूप आहे, ते त्यासमानच असलेल्या ***"मन्मना भव मद्भक्तो ... .।।१८-६५।।"*** या श्लोकाची रचना पाहिल्यावर तत्काळ ध्यानी येते. या दोन श्लोकात ***"युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"*** व ***"सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।१८-६५।।"*** ही पदेच केवळ भिन्न आहेत. अन्यथा अर्थांतर विशेष नाही. या दोन्ही श्लोकांपूर्वी भगवंत गुह्य वचनांचा संकेत करतात, तो असा आहेः ***"इदं ते गुह्यतमं ...।।९-१।।"*** व ***"इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया। ...।।१८-६३।।"*** व ***"सर्वगुह्यतमं भूयः...।।१८-६४।।"*** त्याचप्रमाणे संपूर्ण गीताशास्त्र हेच गुह्य आहे, हाही संकेत ***"य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति। ... ।।१८-६८।।"*** याद्वारे प्रकटतो.

<u>या सर्व वचनांचा ***मद्भक्त*** या शब्दाशी असणारा हृद्य मिलाप पाहून **गीतेचे खरे रहस्य भगवद्भक्ती हेच आहे**, असा गूढार्थ प्रकटतो</u>! आणि भगवंत व त्यांचे भक्त यांचे वास्तव दर्शन गीतेत जसे आहे, तसे सांगणारी एकमेव ज्ञानेशांची अशी ***ज्ञानदेवी***च हे अगदीच निश्चितपणे उमजते, ते त्यांच्या तिच्याद्वारे केलेल्या समयोचित रहस्यपाटनाद्वारे!!

भगवत्स्वरूप व विभूति (अ.१०)

"राजविद्या राजगुह्य" सांगतांना नवमाध्यायी ***"मन्मना भव ... ।।९-३४।।"*** हा दिव्य आदेश दिल्यानंतर पुनः परम वचन सांगावे म्हणून श्रीकृष्ण म्हणतात: ***"भूय एव महाबाहो श्रुणु मे परमं वचः। यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया।।१०-१।।";*** ही अशी दशमोध्यायाची सुरुवात आहे. आपणांस देवता व महर्षी पण जाणत नाहीत - ***"न मे विदुः सुरगणाः ...।।१०-२।।"*** असे सांगून झाल्यावर आपणांस जाणल्याने कशी सर्व पापांपासून मुक्ती मिळते, हे कथितांना भगवंत म्हणतात: ***"यो मामजमनादिं च ....।।१०-३।।".***

यानंतर ***"बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः ...।।१०-४।।"*** पासून ते आपल्या विभूति सांगण्यास प्रारंभ करतात. काही विभूति पूर्वीच्या अध्यायातही सांगितलेल्या आहेत आणि काही नंतरही सांगितलेल्या आहेत. विभूति जाणून घेण्याने त्यांचे भक्त एकमेकांचे व स्वतःचे कल्याण साधून घेतात, असा भाग ***"एतां विभूतिं योगं च... ।।१०-७।।"*** ते ***"तेषामेवानुकम्पार्थं.....।।१०-११।।"*** या श्लोकात येतो.

भगवंतांच्या विभूतींविषयी सतर्क व जाणकार अर्जुन जे म्हणतो, तो भाग ***"परं ब्रह्म परं धाम ... ।।१०-१२।।"*** ते ***"विस्तरेणात्मनो योगं ...।।१०-१८।।"*** पावेतो आहे. ***"स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम। ... ।।१०-१५।।"*** असा स्वसंवेद्य जो पुरुषोत्तम आहे, त्याच्या आपणांस माहीत असलेल्या विभूतींचा उल्लेख करून अर्जुन ***"अधिक विभूति सांगून आपली लालसा तृप्त करावी"*** अशी इच्छा प्रकट करतांना म्हणतो: ***"विस्तरेणात्मनो योगं ...।।१०-१८।।"***

अर्जुनास आपल्या अमृतवाणीचे रसपान घडवून आणण्यास सिद्ध झालेला तो पुरुषोत्तम आपल्या विविध दिव्य विभूतींचा जो कल्पवृक्ष विस्तारतो, तो आपणांस ***"हन्त ते कथयिष्यामि .... ।।१०-१९।।"*** ते तहत ***"दण्डो दमयतामस्मि ...।।१०-३८।।"*** या श्लोकातून अवलोकिता येतो. ***"आपल्या विभूतींना अंतच नाही,"*** कारण अखिल ब्रह्मांडच भगवंतांनी व्यापले आहे; किंबहुना हे अखिल चराचर त्यांच्या एका अंशानेच होते; असे सांगतांना भगवंत म्हणतात: ***"यच्चापि***

सर्वभूतानां .... ।।१०-३९।।". "अथवा बहुनैतेन .... ।।१०-४२।।" हे सांगून दशम अध्यायाची परिसमाप्ती होते.

विश्वरूपदर्शन (अ.११)

यानंतर येतो ***विश्वरूपदर्शनयोग*** हा *अकरावा* अध्याय. त्याची सुरुवात होते ती अर्जुनाच्या वक्तव्याने. ***"मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसञ्ज्ञितम्। ......।।११-१।।"*** ते ***"मन्यसे यदि तच्छक्यं ....।।११-४।।"*** या श्लोकांतून अर्जुन म्हणतो की भगवंतांनी अनुग्रहपूर्वक जे गुह्य अध्यात्मज्ञान सांगितले, त्यामुळे त्याचा अविवेक वा मोह नष्ट झाला. भूतांचे व भूतभावन जगदीशाचे ऐक्य पण त्याला समजले. तथापि जे परमेश्वराचे अविनाशी असे **विश्वरूप** आहे, ते शक्य असल्यास भगवंतांनी त्याला दाखवावे. यावर आपले विश्वरुप दाखवण्यास त्यांनी सुरुवात केली.

ते म्हणतातः ***"पश्य मे पार्थ रूपाणि .... ।।११-५।।" .... "इहैकस्थं जगत्कृत्स्नं .... ।।११-७।।".*** परंतु असे हे रूप पाहण्यासाठी दिव्यचक्षूंची आवश्यकता असल्याने ते देतांना भगवंत म्हणतात - ***"न तु मां शक्यसे ....।।११-८।।".***

भगवंतांनी अर्जुनास जे विश्वरूप दाखविले, त्याचे सञ्जयकृत वर्णन ***"एवमुक्त्वा ततो राजन् ...।।११-९।।"*** ते ***"तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं .... ।।११-१३।।"*** या श्लोकातून येते. भगवंतांचे रूप पाहून अर्जुन भारावलेला व विस्मयचकित होतो. ***"....।प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत।।११-१४।।"*** होत्साता तो त्या विश्वरूपाचे त्याला दिसणारे उग्रातिउग्र स्वरूप वर्णन करतांना म्हणतो - ***"पश्यामि देवांस्तव देव देहे।.....।।११-१५।।" ....."आख्याहि मे को भवानुग्ररूपो ....।।११-३१।।".***

त्यावर आपले हे रूप लोकांचा नाश करणाऱ्या महाकालाचे आहे, असे भगवंत म्हणतात व अर्जुनास युद्ध करण्यास प्रोत्साहित करतात, तो भाग ***"कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो .... ।।११-३२।।"*** ते ***"तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व ....।।११-३३।।"*** पर्यंत येतो.

भगवत्स्वरूप व तेही असे क्रुद्ध व रौद्र पाहून अर्जुनाची जी भ्यालेली अवस्था होते, ती संजयाचा उद्गार अशा ***"एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य ...।।११-३५।।"*** या श्लोकातून प्रतिबिंबित होते.

हे भगवंताचे रूप कसे आहे; त्याच्यामुळे मनाला आनंद व भय दोन्हीही एकाच वेळी कसे प्राप्त होतात; श्रीकृष्ण हे सगुण रूपही त्याचेच असल्याने, ते न जाणून अर्जुनाने त्याच्याशी सलगीपूर्वक वर्तणूक केली व तेच रूप त्याला पुनः प्रकट करून दाखवावे, ही अर्जुनाची विनंती इ.भाग ***"स्थाने हृषीकेश तव ....।।११-३६।।"*** ते ***"किरीटिनं गदिनं चक्रहस्तम् ....।।११-४६।।"*** या श्लोकात आलेला आहे.

आपले हे अनंत विराट स्वरूप वेद-यज्ञ-अध्ययनादिंद्वारेही दिसण्यास दुर्लभ असून केवळ अर्जुनावर प्रसन्न होऊन भगवंतांनी ते प्रकट केले आहे; तरीही अर्जुनाच्या इच्छेनुसार चतुर्भुज रूप धारण करून ते भ्यालेल्या त्या अर्जुनास कसा धीर देतात, इ.भाग ***"मया प्रसन्नेन ...।।११-४७।।"*** ते ***"इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा.. ।।११-५०।।"*** या श्लोकी येतो.

हे रूप पाहून शांतचित्त झालेला अर्जुन म्हणतोः ***"दृष्ट्वेदं मानुषं रूपं ... ।।११-५१।।".*** यावर भगवंतांचे म्हणणे व उपदेश ***"सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ...।।११-५२।।"*** ते ***"मत्कर्मकृन्मत्परमो ... ।।११-५५।।"*** या श्लोकांतून येतो. विश्वरूप पाहण्यास मिळणे अनन्य भक्तांशिवाय इतरांस दुर्मीळ आहे. अनन्य भक्त मात्र असे रूप पाहू शकतो; तत्त्वतः जाणू शकतो आणि त्यात प्रवेशही करू शकतो. म्हणून भगवंतांचे अनन्य भक्त व्हावे, असे श्रीकृष्ण म्हणतात.

सगुण व निर्गुण उपासना (अ.१२)

अनन्यभक्ती चे विवरण तपशीलपूर्वक करणाऱ्या यानंतर येणाऱ्या *बाराव्या* अध्यायाची सुरुवातच मुळी अर्जुनाच्या अशा प्रश्नाने होते की ***"एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते। ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः।।१२-१।।"***

भगवंतांचे ***दोन प्रकारचे अनन्य भक्त*** आहेत - ***एक म्हणजे सगुणसाकाराची विश्वरूप आत्मा म्हणून उपासना करणारे व दुसरे म्हणजे अक्षर अव्यक्त ब्रह्माची उपासना निर्गुण निराकार स्वरूपाची करणारे.*** या दोन्हीपैकी उत्तम योगवेत्ते कोण असा अर्जुनाचा जो प्रश्न आहे, त्याला उत्तर देतांना भगवंत म्हणतातः ***"मय्यावेश्य मनो ये मां ... ।।१२-२।।"***- सगुण साकाराची उपासना करणारे भक्त अहर्निश भगवंतांशी युक्त असतात.

निरंतर निर्गुण निराकारास उपासणारेही सतत युक्तच असतात. परंतु त्या उपासनेचे स्वरूप देहवानांना साजेसे नसल्याने त्यांना त्याद्वारे अधिकतया क्लेश पत्करावे लागतात. म्हणून श्रीकृष्ण म्हणतातः ***"ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते। ... .।।१२-३।।" .... "क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।...।।१२-५।।".***

याकरता *अनन्यभक्ति*योगातल्या सगुण साकार उपासनेचे सुलभत्व स्पष्ट करतांना भगवान म्हणतातः ***"ये तु सर्वाणि कर्माणि ... ।।१२-६।।"*** व ***"तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्। ...।।१२-७।।".*** सर्व कर्मे भगवंतांना अर्पण करून त्यांची अशी जे भक्ती करतात, त्यांना शीघ्रातिशीघ्र ते संसारसमुद्रातून उद्धरतात. म्हणून ते म्हणतात, ***"मय्येव मन आधत्स्व ... ।।१२-८।।" ...."श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।"***

गीतेतील योगचतुष्ट्याचा समन्वय (श्लोक क्र.१२-१२)

या ठिकाणी या श्लोकातून परमात्मप्राप्तीचे उपाय व त्याच्या पद्धतींचे दिग्दर्शन येते. भगवंताप्रत मन स्थिर करणे; बुद्धी त्यांच्या स्वरूपी प्रतिष्ठित करणे; चित्तस्थैर्याचे हे उपाय नच जमले तर अभ्यासपूर्वक

तसे करणे; तशी इच्छा ठेवणे; अन्यथा भगवत्प्रीत्यर्थ सर्व कर्मे करणे; असेही न साधले तर सर्व कर्मे भगवंतास अर्पण करून, चित्त नियत करून, सर्व कर्मफलांचा त्याग करणे यातील जमेल त्या उपायांचा अभ्यास करणे; आणि चित्तशुद्धी, योग, ज्ञानप्राप्ती या मार्गाद्वारे मोक्षप्राप्ती करून घेणे; असा स्थूलमानाने येथे निर्देश असल्याचे विद्वानांचे मत आहे.

या श्लोकाचा आपण ***शांति***निमित्त पूर्वीच विचार केला आहे *(उन्मेषः१४ःदैवी संपदा,पृ.क्र.२१६ ते २११).* तेव्हा या विद्वत् मताचा यथायोग्य विचार केला होताच. तेव्हा आपल्या निदर्शनास असे आले होते की ***ज्ञान, अभ्यास, त्याद्वारे शक्ती जागृत करणे, तिच्यायोगे ध्यानसिद्धी व तदुपरांत होणारा कर्मफलत्याग व अंतिमतः परमशांती प्राप्त होणे; असा उत्तरोत्तर चढत्या श्रेणीचा हा भक्तियोगसोपान आहे.***

या सोपानाचे विहंगावलोकन आपण ***शांति*** या दैवीगुणाची उकल करून पाहतांना केल्याचे जिज्ञासूंना स्मरतच असेल. ज्ञानदेवमते याच *श्लोक क्र. १२-१२*वर गीतेचे ***उपासनाकांड*** समाप्त होऊन ***ज्ञानकाण्ड*** निरूपिण्यास प्रारंभ होतो.

भगवद्भक्तांची महत्ता

यानंतरच्या ***"अद्वेष्टा सर्वभूतानां ...।।१२-१३।।"*** या श्लोकापासून ***"तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो ... ।।१२-१९।।"*** या श्लोकापावेतो सिद्ध पुरुषाची ज्ञानगुणलक्षणे प्रकटविली आहेत. सर्वत्र समभाव ठेवणारा, समबुद्धीने सर्व द्वंद्वे झेलणारा, सद्गुणी असा हा ज्ञानवान भक्त भगवंतांना अति प्रिय आहे. म्हणून वारंवार *"... । **भक्तिमान्यः स मे प्रियः...।; "...। भक्तिमान मे प्रियो नरः।";*** असे प्रतिपादन करूनही त्यांचे समाधान न होऊन ते पुनश्च त्यांच्या दिव्यातिदिव्य वाणीने उद्घोषितातः ***"ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते। श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।१२-२०।।".*** असे जे श्रद्धावान व भगवत्परम झालेले ***अनन्य भक्त*** अशा धर्मरूप अमृतधारेचे म्हणजे मोक्षाचे आकंठ रसपान करतात व असे आचरण करतात, ते भगवंतांना अतिशयच प्रिय असतात. या भक्तिरसामृतजलाच्या अखंड धारेने सिंचित केलेल्या गीतोक्त *बाराव्या* अध्यायाची येथेच परिसमाप्ती होते.

क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार व ज्ञानगुणलक्षणे (अ.१३)

बाराव्या अध्यायी दिव्यामृतधारेचे अर्जुनास यथेच्छ पान करवून श्रीगोपाल ज्ञानकांडांतर्गतच्या गहन विचारांकडे *तेराव्या* अध्यायी लक्ष वेधतात. त्यांच्या ***"इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधियते.... ।।१३-१।।"*** या वचनाने ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विषयाचा उपोद्घात होतो. हे क्षेत्र कोणाचे, येथे क्षेत्रज्ञ कोण, इ.प्रश्नांची उत्तरे महाप्राज्ञ ऋषींनासुद्धा उमगली नसल्याचे भगवंत ***"ऋषिभिर्बहुधा गीतं ... ।।१३-४।।"*** याद्वारे सांगून सर्व शरीररूपी या क्षेत्रात ***आत्मा*** हा ***क्षेत्रज्ञ*** असल्याचे प्रतिपादितात.

क्षेत्र व आत्मा यांचे ज्ञान हेच यथार्थतेने ज्ञान होय, असे ते *"क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि ... ।।१३-२।।"* यात म्हणतात. त्यातल्या क्षेत्रसंबंधित **एकतीस वा छत्तीस तत्त्वे** ***"महाभूतान्यहङ्कारो ... ।।१३-५व ६।।"*** या श्लोकांत सांगतात, ती अशीः ***पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, अव्यक्त, दश इंद्रिये व मन हे अधिक एक इंद्रिय, पाच इंद्रियांचे पंच पंच विषय (५ वा१०), इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात, चेतना व धृति.***

"अमानित्वमदम्भित्वमहिंसा ...।।१३-७ ते ११।।" अशी एकूण **अठरा ज्ञानगुणलक्षणे** नंतर सांगितली आहेत. ***अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षांति, आर्जव, आचार्योपासन, शौच, स्थैर्य, आत्मविनिग्रह, वैराग्य, अनहंकार, जन्म-मृत्यु-जरा-व्याधि-दुःख या दोषांना जाणणे, विषय व पुत्रदारादींची अनासक्ती, समचित्तत्व, अनन्य अव्यभिचारिणी भक्ती, एकांतवास, अध्यात्मज्ञान व परतत्त्वाचे दर्शन*** हीच ज्ञानाचीही साधने होत. ज्ञानगुणांच्या विरोधी लक्षणे ती अज्ञानाची समजावी, असा येथे अभिप्राय दिला आहे.***अनन्य व अव्यभिचारिणी भक्ती***चे भगवंत किती मूल्य मानतात, हे येथे जाणवते.

ज्ञेयाचे स्वरुप, क्षेत्रज्ञ विचाराचा समन्वय व प्राप्तीची साधने

क्षेत्रज्ञ, क्षेत्र, ज्ञान यानंतर **ज्ञेय** म्हणजे काय हे सुस्पष्ट करतांना भगवंत म्हणतातः ***"ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि ... ।।१३-१२ ते १७।।".*** **आदिरहित निरतिशय ब्रह्मच *ज्ञेय* आहे.** हेच जाणावे; जाणून घ्यावे व जाणण्यायोग्य आहे. ते कशा प्रकारचे आहे; त्याचे स्वरूप कसे प्रकटते; हेही या श्लोकांतून व्यक्त होते.

याप्रमाणे संक्षेपाने ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ, ज्ञान -ज्ञेय*** विचार केला गेला. हा जाणून भक्त भगवत्स्वरूपी प्राप्त होतो, असे ***"इति क्षेत्रं ... ।।१३-१८।।"*** या श्लोकी येते. यांचा परस्परसंबंध ***पुरुष-प्रकृति-विकार-गुणादिं***सह पुढील ***"प्रकृतिं पुरुषं चैव ...।।१३-१९ ते २२।।"*** या श्लोकांत निर्देशिला आहे.

"उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः। ...।।१३-२२।।" अशा त्या परम पुरुषास या सर्व ज्ञानाने जो जाणतो, तो जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होतो; असे ***"य एवं वेत्ति पुरुषं ...।।१३-२३।।"*** मध्ये म्हटले आहे.

त्या दिव्य आत्मस्वरूपास कोणी ध्यानाद्वारे, तर कोणी साङ्ख्यबुद्धीद्वारे, कोणी योग वा कर्माद्वारे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. इतर याला न जाणणारे साधक आचार्योपदेश, श्रुति इ.नी उपदेशिल्याप्रमाणे आचरण ठेवून याची श्रद्धापूर्वक उपासना करतात. हे सर्व साधक अंतिमतः मृत्युला उल्लंघून जातात. म्हणून भगवद्वचन आहेः ***"ध्यानेनात्मनि पश्यन्ति ... ।।१३-२४ व २५।।".*** हा सर्व चराचर विश्वाचा पसारा क्षेत्र-क्षेत्रज्ञसंबंधाने उत्पन्न होतो; आत्मा अकर्ता आहे; तो सर्वभूतात सम आहे; इ.भाग ***"यावत्संजायते किञ्चितसत्त्वं ...।।१३-२६ ते ३४।।"*** या श्लोकांत येतो.

हे सर्व जाणणारा; आत्मा अलिप्त आहे हे उमगणारा; क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्र प्रकाशित करतो, हे समजणारा; क्षेत्र-क्षेत्रज्ञ वैलक्षण्य ओळखून भूतप्रकृतिमोक्षाचा ज्ञाता असा साधक तत्त्वदर्शी असतो; तोच ब्रह्म होतो; तोच परमतत्त्वास प्राप्त होतो; असे गीता म्हणते. असा हा ***विश्वाचा आलेख*** ज्यात आहे, तो *तेरावा* अध्याय ***क्षेत्र-क्षेत्रज्ञयोग*** या नामे प्रसिद्ध आहे.

त्रिगुणांचे ज्ञानविज्ञान (अ.१४)

अखिल विश्वाकार अशा माधवस्वरूप प्रयागतीर्थात *तेराव्या* अध्यायी मनसोक्त जलक्रीडा केल्यानंतर गीताराज्ञी ***गुणत्रयविभागयोग*** या *चौदाव्या* अध्यायी गुणातीताच्या गुणगौरवरूपाची लेणी अंगाखांद्यावर भूषवत जो वाग्विलासरूपी पदन्यास करत आपले चित्ताकर्षण करते; त्याचा प्रथम पदक्षेप होतो तो ***"परं भूयः प्रवक्ष्यामि ... । यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ।।१४-१।।"*** या श्लोकाने!

मुनिजनांना परमसिद्धी ज्या ज्ञानाने प्राप्त करून दिली आहे, ते भगवंत पुनः सांगणार आहेत. भगवंत म्हणतातः ***"इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः । .... ।।१४-२।।"*** अशा या ज्ञानाचा आश्रय केलेले पुरुष उत्पत्ति-विनाशांपासून मुक्त असतात.

महद्ब्रह्म ही योनि, परमात्मा पिता व त्यांचा गर्भ म्हणजे समस्त भूतादी सृष्टी हा भाग ***"मम योनिर्महद्ब्रह्म ... ।।१४-३ व ४।।"*** या श्लोकांत येतो. ***सत्त्व, रज व तम*** हे त्रिगुण प्रकृतीपासून उत्पन्न होतात; सत्त्व निर्मलत्वाने प्रकाशतो, पण आत्म्याला ज्ञानपाशाने बद्ध करतो; रज विषयानुकार असून कर्मासक्तीने आत्म्यास बद्ध करतो; तर तम म्हणजे मोह व अविवेकाचा पुतळाच! हाही निद्रा-आलस्ययोगे आत्म्यास निबद्ध करतो; इ.भाग व या त्रिगुणांचे स्वरूप व ते वृद्धिंगत पावले असता दृग्गोचर होणारी प्रमुख लक्षणे; हे गुण विवृद्ध झालेल्या स्थितीत देह ठेवणाऱ्यांची गती; हा सर्व विषय ***"सत्त्वं रजस्तम इति गुणाः ... ।।१४-५ ते १८।।"*** या श्लोकांतून सांगितला आहे.

गुणातीतदर्शन व अव्यभिचारी भक्ती

त्रिगुणांचे जो उल्लंघन करून जातो; गुणांहून विलक्षण अशा परमतत्त्वास जो जाणतो; तो जन्म, मृत्यू, जरा व दुःखे यांच्यापासून मुक्त होऊन अमृतानुभवास प्राप्त होतो. म्हणून गीता म्हणतेः ***"नान्यं गुणेभ्यः कर्तारं ...।।१४-१९ व २०।।"***

आत्म्यास अकर्ता व गुणांना कर्तृत्वशील समजणाऱ्या गुणातीताची लक्षणे वा चिह्ने प्रकट कळावीत या इच्छेने अर्जुन असा प्रश्न करतो की, ***"कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो। किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते।।१४-२१।।"***

गुणातीतदर्शन, गुणातीताचे आचार व विचार, त्याची परमेश्वराप्रतीची अव्यभिचारी भक्ती व त्या सर्वांद्वारे त्याचे गुणांचे उल्लंघन होऊन परमब्रह्मभावास प्राप्त होणे; हा भाग पुढील ***"प्रकाशं च प्रवृत्तिं च...।।१४-२२ ते २६।।"*** या श्लोकांतून विवेचिला आहे. यासाठी भगवत्वचन असे आहेः ***"मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते। स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।१४-२६।।"***

यानंतर एक फार महत्त्वाचा विचार भगवंत व्यक्त करतात, तो असाः ***"ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्थ च । शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ।।१४-२७।।"***

अश्वत्थवृक्ष व आत्मतत्त्वाचे सांगोपांग दर्शन (अ.१५)

चौदावा अध्याय येथे समाप्त होतो, तो अव्यभिचारिणी भक्तीचे महत्त्व पुनश्च प्रतिपादन करून! या भक्तिद्वारे ब्रह्मभावाची प्राप्ती तर होतेच; पण ब्रह्म वा परमात्मा ज्यात अधिष्ठित आहेत, असे तत्त्वसुद्धा तद्द्वारे प्राप्त होते.

असे हे जे तत्त्व आहे, ते कोणते व ब्रह्म कशाला म्हणतातः येथे ब्रह्म म्हणजे ***सगुण ब्रह्म*** समजावे व ते तत्त्व म्हणजे ***निर्गुण ब्रह्म*** असा शांकरमते अभिप्राय आहे; किंवा ब्रह्म म्हणजे ***ईश्वरीय अनुग्रहशक्ती*** व तत्त्व तो ***ईश्वर,*** असेही ते मत म्हणते.

कर्मयोगानुगामी व ज्ञानयोगी यांसह भक्तियोगी यांना क्रममार्गे मोक्ष देणारा ईश्वरच असतो. भक्तियोग्यांनाही मोक्षफल तोच देतो. ***ईश्वर म्हणजे आत्मतत्त्व !*** त्याच्या सांगोपांग विवेचनासाठी *पंधरावा* ***पुरुषोत्तमयोग*** हा अध्याय प्रकटतो, तो भगवंतांच्या मुखातील ***"ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्रहुरव्ययम्। छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्।।१५-१।।"*** या श्लोकापासून.

अव्यक्त व मायाशक्ती ज्याचे मूळ आहे व ***महत्तत्त्व, अहंकार, तन्मात्रादी*** सर्जन ज्याच्या शाखा आहेत; ज्याचे रक्षण करणारी पाने म्हणजे ***वेद*** आहेत; त्या संसारवृक्षाला जाणणाराच वेदांचा अर्थ जाणतो. याच अर्थी संत श्रीतुकोबारायांनी ***"वेदांचा तो अर्थ आम्हासींचि ठावे"*** असे म्हटले आहे. वेदार्थ उमगणाराच सर्वज्ञ असतो.

अशा या संसारवृक्षाचे अंकुर व शाखा सर्वदूर पसरलेल्या आहेत. त्याच ज्ञान व कर्म यांची फले होत. त्रिगुणयोगे या वाढलेल्या आहेत. विषय हे त्यांचे कोमल अंकुर वा पल्लव होत. मनुष्यमात्र कर्मेच्छेने या शाखाप्रशाखांवर जन्मानुजन्म प्रवास करत राहतो. असा हा ***"अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा ...।।१५-२।।"*** असणारा जो संसारवृक्ष आहे, त्याचे रूप संसारी प्राण्यांना उमगू शकत नाही.

ज्याचे मूळ खोलपर्यंत गेले आहे, अशा या वृक्षास छेदण्यास केवळ ***असंग*** या एकाच शस्त्राचा उपयोग होतो. म्हणूनच म्हटले आहे की ***"न रूपमस्येह तथोपलभ्यते ... ।।१५-३।।"*** या अनादी प्रवृत्तिरूप संसारवृक्षाचे मूळ वा आदितत्त्व असा जो ***पुरुष*** आहे, त्याला शोधावे; त्यालाच शरण जावे; म्हणजे हे छेदन शक्य होते.

याकरता भगवंत म्हणतातः ***"ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः। तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।१५–४।।".***

संसारवृक्ष छेदणाऱ्या पुरुषाचे व तो जेथे पोहोचतो, त्या मूलपदाचे वर्णन करतांना गीता म्हणते: ***"निर्मानमोहा जितसङ्गदोषा ... ।।१५-५ व ६।।".*** मान, अहंकार, अविवेकादींपासून मुक्त झालेल्या, संसारासक्तीचा दोष जिंकलेल्या, परमात्मस्वरूप पाहण्यात नित्य मग्न असणाऱ्या, कामनेपासून पूर्णतया निवृत्त झालेल्या, द्वंद्वरहित अशा त्या विवेकी पुरुषांस ते ***अव्यय पद*** प्राप्त होते. त्या पदी सूर्यचंद्राचा वा अग्नीचा प्रकाश पोहोचत नाही व तेथे पोहोचले असता संसारात पुनरागमन होत नाही. असे ते पदच भगवंताचे सर्वश्रेष्ठ - परम असे स्वरूप आहे.

जीव हा चिदंशच

यानंतर ***शरीरस्थ आत्मा वा जीव हा सनातन*** असून ***ईश्वराचाच अंश*** म्हणजे त्या सर्वश्रेष्ठ तत्त्वाचाच अंश असून, मनादी सहा इंद्रियांना आकर्षून शरीरादी धारण वा त्यागादी करतो; असा भाग ***"ममैवांशो जीवलोके .....।।१५-७ व ८।।"*** या श्लोकांतून येतो. इंद्रियादिंद्वारे विषयोपभोग सेवणाऱ्या उपाधियुक्त अशा या जीवाचे हे सनातनत्व साधकवृत्ती नसणारे अविवेकी पुरुष जाणू शकत नाहीत; परंतु ज्ञानदृष्टीने ते पाहता येते.

"क्षोत्रं चक्षुः स्पर्शनं .... ।।१५-९ ते ११।।"-आत्मावस्थित अशा या जीवास वा ईश्वराच्या सनातनांशास पाहू शकणाऱ्या योग्यांना हा असा दिसतो: ***"यदादित्यगतं तेजो ...।।१५-१२ ते१५।।"*** सर्वांचे तेज, भूतांना धारण करणारी शक्ती, औषधींचे पोषण करणारा रसराज चंद्र, चतुर्विध अन्न पाचन करणारा प्राणापानांनी युक्त असा वैश्वानर जो हा सनातन अंश वा ईश्वर आहे; त्याने सर्वांच्या अंत:करणात उत्तमरीत्या प्रवेश केला आहे; म्हणजे तो सूक्ष्मातिसूक्ष्म आहे. हाच एकला जाणण्यास योग्य आहे. ***वेदांती*** वा ***वेदार्थवेत्ता*** व ***वेदप्रवर्तक*** हाच आहे.

क्षर, अक्षर व उत्तम पुरुष

यानंतर अत्यंत गुह्य असा विषय येतो तो ***"द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।.....।...उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।। .. ..।।१५-१७ ते२०।।"*** - या संसारात ***क्षर व अक्षर*** म्हणजे नाशवंत प्राणिमात्र व कूटस्थ वा अविनाशी असे दोन पुरुष आहेत. ***पुरुष*** म्हणजे ***पुर वा शरीरात राहणारा*** व वास्तव्य करणारा. अविनाशी वा अक्षर पुरुषाहूनही उत्तम व क्षर पुरुषाहून वेगळा, क्षराक्षर पुरुषांना म्हणजे जीवात्म्यासह सर्व सृष्टीला त्यात प्रवेश करून त्यांना धारण करणारा असा हा जो ***परमात्मा*** म्हणून वेदांतात प्रसिद्ध आहे; तोच या लोकात व वेदात ***पुरुषोत्तम*** म्हणून ख्यात आहे.

हेच ते तत्त्व, ज्याचा निर्देश *चौदाव्या* अध्यायी ***ब्रह्माची प्रतिष्ठा (आश्रय, स्थान)*** म्हणून केला गेला आहे ***("ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहम ..।।१४-२७।।")*** मोहमुक्त पुरुष यालाच जाणून याचीच सर्वभावे भक्ती करतात.***अनन्य वा अव्यभिचारिणी भक्ती*** याचीच केली जाते.

असे हे गुह्य तत्त्वज्ञान जाणणारा बुद्धिमंत पुरुष कृतकृत्य होतो; तोच परमश्रेयसाची प्राप्ती करून घेतो. ***हे परमश्रेयस वा परंधाम म्हणजेच ते पुरुषोत्तमनामे प्रसिद्ध असणारे ईश्वरीय मूलतत्त्व!*** याप्रमाणे अतिउत्तम तत्त्व प्रतिपादणारे असे हे एकूण वीस श्लोक या ***पंधराव्या*** गीताअध्यायी आहेत. ही श्लोकावली म्हणजे जणू त्या पुरुषोत्तमाने धारण केलेली वैजयंतीमालाच!!

दैवासुरसंपद्विभाग (अ.१६)

यानंतर येणारा *सोळावा* अध्याय ***दैवासुरसंपद्विभाग*** सांगणारा आहे. *नवव्या* अध्यायी ***"मोघाशा मोघकर्माणो .... ।।९-१२ व १३।।"*** यांद्वारे आसुरी व दैवी प्रकृतींचा उल्लेख केलेला होता. आताचा अध्याय तेच सूत्र पुढे उचलीत दैवी गुणसंपदसमुच्चय सांगण्यास ***"अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः।... ।।१६-१ ते ३।।"*** या श्लोकांचा प्रयोग करतो.

अभय, सत्त्वसंशुद्धी, ज्ञान व योग यातील तन्निष्ठता, दान, दम, यज्ञ, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांति, अपैशून, भूतदया, अलोलुपत्व, मार्दव, ऱ्ही, अचापल, तेज, क्षमा, धृति, शौच, अद्रोह, अमानिता ही अभिजात ***दैवी गुणसंपदा*** होय.

आसुरी संपदा ही याविरुद्ध असणारी. तिचे वर्णन ***"दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च। ...।।१६-४।।"*** असे करतात. ***दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता आणि अज्ञान*** हे ***आसुरीसंपदा***विशेष होत.

दैवी संपदा मोक्षकारक आणि आसुरी संपदा बंधनास कारण असते, या अर्थी ***"दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता... ...।।१६-५।।"*** हा श्लोक येतो. दैवी संपदेचा सांगोपांग उहापोह *नवव्या* व *तेराव्या* अध्यायात केला होता. ज्ञानवानाच्या, भक्ताच्या व योग्यांच्या मनोभूमिका व आचार स्पष्ट करतांनासुद्धा ही संपदा चर्चिली होती. आता उर्वरित आसुरी सृष्टीचे नीट विवरण करावे म्हणून भगवंत म्हणतात: ***"द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च। .... ।।१६-६।।".***

असत्य, अधर्म, दुराचार, शास्त्रविधिरहित आचरण करणारे, कामपूर्तीसाठीच जग आहे, असे मानणारे, ज्ञान नष्ट झालेले, जगताचे अरि, जगाचा क्षय करण्यासाठीच उत्पन्न झालेले, दंभमानादी आसुरी गुणांचे प्राबल्य असलेले, मोहग्रस्त, मूढ, अविवेकी, चिंतातुर, कामोपभोगात रमलेले, आशापाशबद्ध, कामी, क्रोधी, अन्यायाने अर्थसंचय करणारे, धनादींची आसक्ती बाळगणारे, स्वत:स ईश्वर व सिद्ध समजणारे, आढ्यताखोर, कुलीनतेची घमेंड वाहणारे, स्वत:स सर्वश्रेष्ठ समजणारे, दातृत्वादींचा अभिमान असणारे, अज्ञानाने मोहित केलेले, चित्तभ्रांत झालेले, अहंमन्य, यज्ञादींचे नाममात्र यजनादी करणारे; अहंकार, बल, दर्प, काम व क्रोधाचा आश्रय करून इतरांची असूया बाळगणारे व त्यांना व त्यांच्या अंतर्यामीच्या श्रीनिवासस्वरूपास कष्टवणारे; स्वत:सही कष्टवणारे; असे ते आसुर असतात. त्यांचे

वर्णन "***प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुरा। ...।।१६-७ ते १८।।***" या श्लोकांत येते.

त्यांची गती सांगतांना गीता म्हणते: "***तानहं द्विषतां क्रूरान्संसारेषु नराधमान्।...।।१६-१९ व २०।।***" - त्या संसारद्वेष्ट्या क्रूरांना भगवंत जन्मोजन्मी आसुरी योनीत टाकतात. ते भगवंतांना प्राप्त करू शकत नाहीत. त्यांची अधोगती होते.

म्हणून नरकाची द्वारेच असे जे काम, क्रोध व मोह, ते टाळून मोक्षाचे साधन करावे व शास्त्रविहित कर्मे आणि आचरण करावे. हा सर्व भाग "***त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः।.....।।१६-२१ ते २४।।***" या श्लोकात येतो.

कर्तव्य व अकर्तव्य यांचा निश्चय एक शास्त्रच करू शकते. म्हणून शास्त्र जाणून घेऊन कर्म करण्यायोग्य व्हावे; हा संदेश देऊन ***दैवासुरसंपद्विभागयोग*** या *सोळाव्या* अध्यायाची सांगता होते.

शास्त्रविधिवत कर्मे आचरणे (अ.१७)

श्रीगोपालकृष्णांनी ***शास्त्रप्रामाण्य*** ही एकमेव मापनपट्टी वापरून कर्तव्याकर्तव्याचा विचार करावा, असे *सोळाव्या* अध्यायी प्रतिपादन केले. त्याला धरून अर्जुन प्रश्न करतो की "***ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः। ...।।१७-१।।" श्रद्धापूर्वक परंतु शास्त्र न जाणणारे लोक देवादिकांची पूजा वगैरे करतात, त्यांची गती कोणती-सात्त्विकी, राजसी का तामसिक.*** या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी *सतराव्या* अध्यायाचे प्रयोजन आहे.

भगवंत म्हणतात की स्वाभाविक श्रद्धा तीन प्रकारची असते. अंतःकरणाच्या पूर्वजन्मार्जित संस्कारांनुरूप श्रद्धा असते. ती ***सात्त्विक, राजस व तामस*** या प्रकारात मोडते. प्रत्येक जिवास यातील कोणत्या ना कोणत्यातरी प्रकारची श्रद्धा असतेच. आपापल्या श्रद्धेनुसार सात्त्विक देवादिकांचे, राजस यक्षराक्षसांचे व तामस भूतप्रेतादींचे यजनयाजन, भजन-पूजन करतात. सात्त्विकांव्यतिरिक्त इतर श्रद्धांचे आचरण भगवंतांना मान्य नाही. तामस श्रद्धा तर घोर अधःपतन करते.

अविवेकी, दंभ, मान, मदग्रस्त पुरुष अशास्त्रीयरीत्या घोर तपादींचे आचरण करतात व त्यायोगे स्वतःच्या व इतर भूतमात्रांच्या अंतर्यामी असणाऱ्या भगवंतांना कष्टवतात. हे आसुरी लोक होत. त्यांचा भगवंत अधिक्षेप करतात.

असा हा सर्व भाग "***त्रिविधा भवति श्रद्धा .... ।।१७-२ ते ६।।***" या श्लोकांत येतो. त्रिगुणात्मक श्रद्धेनुसार आहारादींचे तसेच जे तीन भाग वा प्रकार असतात, त्यांचे वर्णन "***आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति ...।।१७-७ ते १०)।।***" या श्लोकी केले आहे. विशेषतः सात्त्विक आहाराची भगवंत प्रशंसा करतात.

यज्ञ

यज्ञांचेही असेच त्रिविध प्रकार "***अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो ...।।१७-११ ते १३।।***" या श्लोकांतून सांगण्यात आले आहेत. फलाकांक्षारहित शास्त्रविधियुक्त व प्राप्त कर्तव्यकर्म म्हणून केलेला यज्ञ ***सात्त्विक*** असतो. फलाकांक्षेसह असा यज्ञ केल्यास तो ***राजस*** स्वरूपाचा ठरतो; तर शास्त्रविधिरहित, मंत्ररहित, श्रद्धाविरहित, अन्नदानाव्यतिरिक्त व दक्षिणा न देता केलेला नाममात्र यज्ञ ***तामस*** असतो.

तप

यानंतर विस्तारपूर्वक त्रिविध प्रकारची तपे "***देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं .... ।।१७-१४ ते १९।।***" या श्लोकांद्वारे चर्चिली आहेत. त्याअंतर्गत शारीरिक, वाङ्मय व मानस असे त्यांचे तीन तीन प्रकारही सांगितले आहेत. फलाकांक्षारहित समाहित चित्ताच्या पुरुषाने केलेले तप ते ***सात्त्विक*** होय. फलाकांक्षेने व दंभपूर्वक आचरलेले तप ***राजस*** असते. निव्वळ स्व व परपीडनार्थ केलेले तप ***तामस*** ठरते.

सात्त्विक तपात देव, गुरू, ब्राह्मण व विद्वान यांचे पूजन व अर्घ्य-पादादी, ब्रह्मचर्य, शौच, आर्जव, अहिंसा ही ***शारीरिक तपे;*** सत्य, प्रिय व अनुद्वेगकारक वचन, स्वाध्याय, अभ्यास ही ***वाङ्मय तपे;*** मनाचे प्रसन्नत्व, शांतभाव, मौन, आत्मविनिग्रह, मनाचा निष्कपटपणा ही ***मानस तपे*** व त्याद्वारे अर्जित होणाऱ्या दैवी संपदा यांचा अंतर्भाव केला जातो.

दान

याचप्रमाणे दानाचेही सात्त्विक, राजस व तामस असे वर्गीकरण करतांना भगवंत म्हणतात: "***दातव्यमिति यद्दानं ....।।१७-२० ते २२।।***" विहित देशी, काली व सत्पात्री अवश्यंभावी म्हणून जे केले जाते व प्रत्युपकारार्थ किंवा परतफेडीच्या आशेने जे केलेले नसते, ते ***सात्त्विक*** दान ठरते. फलाकांक्षेने केलेले ते ***राजस*** दान व अविवेकीपणाने केले जाते, ते ***तामस*** दान असते.

ब्रह्मनामाचा कर्मासाठी विनियोग

यानंतर येतात ते श्लोक "***ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः।.....।।१७-२३ ते २७।।***" या श्लोकांद्वारे ब्रह्मनामे ***"ॐ," "तत्" व "सत्"*** अशी त्रिविध आहेत व पूर्वापार ***ब्राह्मण, वेद व यज्ञ*** असे या नामांच्यापासून स्थित आहेत. या त्रिविध पवित्र अशा नामांनी ब्रह्मवादिन्यांच्या ***यज्ञ-दान-तप*** या क्रिया संपन्न होतात.

"ॐ" हे ब्रह्मवादिनांचे, "तत्" हे मोक्षेच्छूंचे, तर "सत्" हे मांगलिकादी प्रशस्त कर्मांचे व सत्कर्मांचे प्रतिपादक पद आहे.

अश्रद्धापूर्वक केलेल्या कर्मांचा "***अश्रद्धया हुतं दत्तं ...।।१७-२८।।***" या श्लोकात म्हटल्याप्रमाणे इह वा परलोकी उपयोग होत नाही. म्हणून ***श्रद्धापूर्वक या त्रिविध ब्रह्मनामांचा विनिमय करून सर्व कर्मे व क्रिया आचराव्यात; त्याद्वारे त्यातल्या त्रुटी दूर होऊन शास्त्रविधियुक्त कर्म केल्याचे फल प्राप्त होते;*** असा या अध्यायाचा मुमुक्षूंना संदेश आहे. याप्रमाणे भगवंत अध्यायारंभी अर्जुनाने केलेल्या पृच्छेचे योग्य असे समाधान करतात.

"असतो मा सद्गमय"

सत् म्हणजे परमात्मा. असत् म्हणजे संसारासक्ती वा प्रवृत्ति. असत् अशा श्रद्धेचा त्याग करावा. ***सत्*** अशा श्रद्धेचा परिपोष करावा. ***सत्*** *म्हणजेच* ***सत्त्वानुरूपा श्रद्धा.*** या श्रद्धेचे अल्पस्वल्प जतन केले तरी महान फलाची प्राप्ती होते. हे महत्फल म्हणजे परमात्मा!

म्हणूनच शास्त्रविधि न जाणूनही जर सात्त्विक श्रद्धेने युक्त होऊन व पूर्वासूरींचा आदर्श बाळगून कर्मे केली तर अंतिमतः *"असतो मा सद्गमय"* असे असताकडून सताकडे, मृत्यूकडून अमृतत्वाकडे, तमसाकडून ज्योतीकडे जाण्याचे फल प्राप्त होते.

अठरावा अध्याय - *"गीतारहस्य "*

सतराव्या अध्यायानंतर येतो तो ज्ञानेशांनी ***कलशोध्याय*** म्हणून गौरवलेला *अठरावा* अध्याय. आदिशंकराचार्यसुद्धा म्हणतात की ***संपूर्ण गीतेचे सार*** या अध्यायात सांगितलेले आहे. *हा अध्याय पुनश्च अर्जुनास भगवंतांनी पूर्वीच सांगितलेल्या* ***साङ्ख्य व बुद्धियोग,*** *वा* ***साङ्ख्य -संन्यास आणि कर्म वा योग, ज्ञान व कर्म*** *या द्विविध निष्ठांचा विषय चालवतांना दिसतो.* ***गीतेचे साररूप असे या अध्यायास म्हटलेले असल्याने गीता खरी याच विषयासाठी आहे, हे स्पष्ट होते.***

श्रद्धेच्या त्रिविध प्रकारांनुसार ***संगजा, शास्त्रजा व स्वभावजा*** तसेच ***सत्त्व, रज, तम*** या त्रिगुणांच्या आधिक्यानुसार मनुष्यमात्रांची बुद्धी असते. या बुद्धीमुळे आणि पूर्वजन्मींच्या संस्कार आणि कर्मांनुसार उपजतच प्राणिमात्रांचे विभिन्न स्वभाव व प्रकृती असतात. त्या ***प्रत्येकास उच्चतम गती प्राप्त व्हावी, अगदी हीनातिहीन मतिमंदास पण साफल्यप्राप्ती व्हावी हा गीतेचा उद्देश आहे.***

म्हणूनच वरकरणी अनेकानेक छटा असणारे ***भक्ती, ज्ञान, योगादी*** मार्गांचे ती वर्णन करतांना दिसते. पण म्हणून इतके अनेकानेक मार्ग आहेत, असे नव्हे. **प्रमुख मार्ग दोनच - साङ्ख्य आणि योग.** हे दोनही कसे एकच होत, हेसुद्धा ***"साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः ...।।५-४।।"*** या श्लोकाद्वारे पूर्वीच सांगितले होते. म्हणजे ***गीतेचा प्रतिपाद्य विषय एकमेवाद्वितीय अशा त्या भगवंताच्या प्राप्तीचा जो एकच मार्ग तो! हा मार्ग म्हणजेच योगमार्ग.***

हे रहस्योद्घाटन करणारा *अठरावा* अध्याय अर्जुनाच्या बोलांनी सुरू होतो, तो असाः ***"सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्। त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन।।१८-१।।"*** -"हे महापराक्रमी श्रीकृष्णा! ***संन्यास*** या शब्दाचा खरा अर्थ *(या अर्थाचे तत्त्व)* जाणण्यास मी इच्छितो आणि हे इंद्रियांच्या ईशा! हे केशिदैत्याला मारणाऱ्या कृष्णा! ***त्याग*** या शब्दाचाही खरा अर्थ *(या अर्थाचे तत्त्व)* अगदी निराळा असा मी जाणण्याची इच्छा करतो."

संन्यास व कर्म:खरा त्याग

"काम्यानां कर्मणां न्यासं ...।।१८-२ व ३।।" या श्लोकात संन्यास व त्याग यासंबंधी विद्वानांची प्रचलित मते सांगून भगवंत आपले स्वतःचे मत सांगतांना म्हणतातः ***"निश्चयं शृणु मे तत्र ... ।।१८-४।।"*** इच्छापूर्तीसाठी करावयाच्या कर्मांचा त्याग, नित्य-नैमित्तिक कर्मांच्या फलांचा त्याग, बंधक कर्मांचा त्याग इ., तसेच यज्ञ, दान, तप एतद्रूप कर्मे त्यागू नयेत, अशी जी मते आहेत, त्यांबाबत भगवंत म्हणतात की ***त्याग* हा त्रिविध स्वरूपाचा असतो.**

यज्ञ, दान व तप ही कर्मे त्यागू नयेत, तर ती अवश्य करावीत. कारण ती पावन करणारी आहेत. परंतु त्याही कर्मांच्या फलासक्तीचा त्याग करून ती करावीत. आपल्या वाट्याला आलेल्या कर्मांचा त्याग करणे योग्य नाही. मोह वा अज्ञानग्रस्ततेने असा त्याग केला तर तो ***तामस*** म्हटला जातो. देहक्लेश होतील या भीतीने दुःखरूप वाटणाऱ्या कर्मांचा त्याग केला तर तो ***राजस*** असतो व त्यागाचे फल प्राप्त होत नाही.

नित्य जे कर्म ते अवश्य केलेच पाहिजे, असे समजून कर्मासक्ती व फलाचा त्याग होतो, तो मात्र *सात्त्विक* असा गणला जातो. असा त्याग करणाराच खरा त्यागी वा संन्यासी होय. देहधारी पुरुषांना कर्मे त्यागणे असंभवच आहे. म्हणून ***कर्मफलत्याग*** **हाच खरा त्याग होय.** म्हणून काम्यादी संसारावर्तनकारक कर्मांचा द्वेष न करणाऱ्या, चित्तशुद्धी करून मोक्षकारक ठरणाऱ्या नित्यकर्मांची आसक्ती न ठेवणाऱ्या, असा सङ्ग व फल यांचा त्याग करून नित्यकर्मे अनुष्ठून आत्मानात्मविवेकाला कारण होणाऱ्या सत्त्वाने संयुक्त होणाऱ्या मेधावी पुरुषाचे सर्व ***संशय (संसारलिप्सा)*** छिन्न होतात.

असा त्याग न करणाऱ्यांना मृत्यूपरांत जी पश्वादी योनी, मनुष्य वा देवादी योनिप्राप्तीची त्रिविध कर्मफले प्राप्त होतात, ती त्याग्यास कधीही मिळत नाहीत, असा हा सर्व उहापोह ***"नियतस्य तु सन्न्यासः ....।।१८-७ ते १२।।"*** या श्लोकांतून केला आहे.

याप्रमाणे *कर्मासक्ती धरणे व त्या कर्मांच्या फलांची इच्छा करणे हे जसे गोपालकृष्णांना मान्य नाही; तसेच फले मिळू नयेत म्हणून कर्मे करणे टाकून देणे वा कर्मांद्वारे क्लेश होतील म्हणून ती टाळणे हेही त्यांना पटत नाही. त्यांना अभिप्रेत आहे तो कर्मासक्ती व कर्मफले यांचा त्याग!* याकरता स्वतःचा आदर्श घालून देतांना त्यांनी असे म्हटले होते की: ***"न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा। ...।।४-१४।।"*** व ***"न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन...।।३-२२ व २३।।"***

कर्माची पंच अधिष्ठाने

कर्म, अकर्म, नैष्कर्म्य या ज्या संज्ञा गीतेत येतात, त्यांचा वेळोवेळी संदर्भाप्रमाणे जसा अर्थ प्रतीत होतो, त्याचा असा निरास केल्यावर व त्या संज्ञांचा यथार्थ पुनश्च प्रकट केल्यावर भगवंत या ***कर्मविषयाची आदि***च प्रकटावी म्हणून म्हणतातः ***"पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे।...।।१८-१३ व १४।।"*** - साङ्ख्यानुसारी कर्मसिद्धीची पाच कारणे अशी आहेतः ***अधिष्ठान वा शरीर, कर्ता, नाना इंद्रिये, त्यांच्या विविध चेष्टा व दैव.***

शरीर, वाणी व मनाद्वारे कार्याकार्य, धर्म्याधर्म्य जे घडते, ते सर्व याच कारणांमुळे. असंस्कृत बुद्धीचा पुरुष हे न जाणून अकर्त्या आत्म्यालाच कर्ता समजतो, त्याला आत्मज्ञान होत नाही. म्हणून अत्यंत घोर कर्मसुद्धा स्वतः कर्ता नाही, हे जाणून केले, तर त्याचे पाप लागत नाही.

कर्मचोदना म्हणजे कर्मात प्रवृत्त करणारी सामग्री. ही तीन प्रकारची आहे:***ज्ञान, ज्ञेय वा विषय आणि परिज्ञाता. कर्मसंग्रह*** तीन प्रकारे होतो:***कर्म, कर्ता आणि इंद्रिये.*** असा भाग ***"शरीर-वाङ्मनोभिर्यत्कर्म ... ।।१८-१५ ते १८।।"*** या श्लोकांतून आला आहे.

यानंतर येणाऱ्या ***"ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः। ...।।१८-१९ ते २८।।"*** या श्लोकांतून गुणाधिक्यानुरूप होणारे ज्ञान, कर्म व कर्ता यांचे त्रिविध प्रकार सांगितले आहेत.

ज्ञान:सर्व भूतात एकच अविभक्त, अव्यय भाव पाहणे हे सात्त्विक ज्ञान, त्यांच्यात भिन्नत्व पाहणे हे राजस ज्ञान, ईश्वरास न जाणणे असे वृथा ते तामस ज्ञान होत.

कर्म:आसक्ती व फलेच्छा सोडून केलेले रागद्वेषरहित कर्म ते सात्त्विक कर्म, फलप्राप्तीची इच्छा धरून केलेले ते राजस कर्म, अविचारपूर्वक, हिंसात्मक असे ते तामस कर्म असते.

कर्ता:धैर्य-उत्साहादींनी युक्त, आसक्तिरहित चित्ताचा, यशापयशाची पर्वा न करणारा कर्ता ***सात्त्विक*** असतो. रागी व लोभी कर्ता ***राजस*** व असंस्कृत, घमेंडखोर, शठ, ***आळशी, दुसऱ्याचे बरे न पाहणारा, विषादी व दीर्घसूत्री कर्ता तामस*** होत.

गुणत्रयदर्शन:उर्वरित भाग

सत्त्व, रज व तम या त्रिगुणांना *चौदावा* अध्याय वाहिला होता. तोच विषय पुढे ***श्रद्धात्रय*** सांगण्यासाठी *सतराव्या* अध्यायातून ***त्रिगुणी श्रद्धाविभाग*** निरूपितांना चालविला होता. या समारोपाच्या *अठराव्या अध्यायाचे श्लोक क्र. ७ ते ४४* म्हणजे एकूण ३७ श्लोक परत या **गुणत्रयदर्शना**स दिलेले आहेत. या त्रिगुणरहस्यप्रतिपादनाचे उपासनेच्या दृष्टीने गीताकारांस किती महत्त्व वाटते, ते यावरून दिसून येते. असो.

बुद्धी व धृति

यानंतर ***बुद्धी व धृति*** यांचेही त्रिगुणांनुरूप प्रकटणारे रूप ***"बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं श्रुणु। ...।।१८-२९ ते ३५।।"*** या श्लोकांतून दाखविले आहे.

बुद्धी:बंध आणि मोक्ष यांना जाणते, ती सात्त्विक बुद्धी असते. यांचा निर्णय न जाणणारी ती राजस आणि हे सर्व विपरीत जाणणारी - धर्मास अधर्म, अधर्मासच धर्म समजणारी बुद्धी ती तामस होय.

धृति:प्रवृत्ति व निवृत्ति, कर्मसंग आणि मोक्ष, कर्तव्य आणि अकर्तव्य, भयाचे कारण संसारवृत्ती व अभयाचे कारण परतत्त्वदर्शन, नित्य समाधियोगाच्या शेजेशी अव्यभिचारिणी वृत्तीने तादात्म्य पावणारी व मन, प्राण, इंद्रिये यांच्या क्रियांनी तेथेच रती करणारी धृति ***सात्त्विक*** असते. धर्म, अर्थ व कामतृप्तीसाठी आणि कर्मांचे फल इच्छिणारी धृति ***राजस*** होय. दुर्बुद्धी पुरुष जिच्यायोगे भय, स्वप्न, शोक आणि विषाद यांनी रहित होऊ शकत नाहीत, ती ***तामस*** धृति असते.

सुख

आता सुखाचे असेच त्रिविध प्रकार पडतात. ते ***"सुखं त्विदानीं त्रिविधं च श्रुणु मे भरतर्षभ। ...।।१८-३६ ते ३९।।"*** या श्लोकांतून वर्णिले आहेत. ज्या सुखानुभवाचा अभ्यास केल्याने त्यात मनुष्य रमतो आणि दु:खमुक्त होतो, जे प्रारंभी विषासारखे क्लेशकारी पण अंतिमतः अमृतोपम असते; असे आत्मबुद्धीच्या प्रसादाने प्रदान केलेले सुख ***सात्त्विक*** असते.

विषय व इंद्रिये यांच्या मन:पूत संयोगाने निर्मिलेले सुख प्रारंभी अमृतासारखे गोड वाटले तरी शेवटी दु:खद असते; ते सुख ***राजस*** होय. सुरुवातीपासून शेवटापर्यंत आत्म्याला विमोहित करणारे व निद्रा, आलस्य व प्रमादनिर्मित सुख ***तामस*** होय.

स्वकर्म:स्वभावज

अशा या त्रिगुणांनी ज्याला व्यापलेले नाही, असा प्रकृतीने सोडून दिलेला जीव पृथ्वी, स्वर्ग वा देवादिकांतही कोणीच नाही. या गुणाधिक्यानुसारच ब्राह्मणक्षत्रियादी वर्ण निर्माण होतात. ***शम, दम, शौच, क्षांति, आर्जव, ज्ञान, विज्ञान, आस्तिक्य*** हे स्वभावतः **ब्राह्मणां**चे कर्मविभाग आहेत.

शौर्य, तेज, धैर्य, दक्षता, युद्धातून विमुख न होणे, दान व प्रभुत्व हे **क्षत्रियां**चे स्वभावज कर्मविभाग होत. ***कृषी, पशुपालन, वाणिज्य*** हे **वैश्यां**चे स्वाभाविक कर्मविभाग होत आणि ***परिचर्यात्मक कर्म*** हे **शूद्रां**ना स्वभावतः प्राप्त झालेले आहे. प्रकृतीच्या या त्रिगुणांनी अव्याप्त असे कोणीही नाही, इ.असा हा भाग ***"न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः। ...।।१८-४० ते ४४।।"*** या श्लोकांतून येतो.

ईश्वरप्राप्तीसाठी युक्तिपूर्वक स्वकर्मानुष्ठान

कर्म टळत नाही; प्रकृतिजन्य गुण मनुष्याकडून स्वाभाविक कर्मे करूनच घेणार; संन्यास वा त्याग हा कर्मांचा करण्याचा नसून कर्मसंग व कर्मफलेच्छेचा असावा; मानवाने मोक्षेच्छू असावे व त्यासाठी अभ्यास करावा; मोक्षप्राप्ती हेच या जीवनाचे सार्थक; परमशांती मोक्षानेच मिळते इ. भाग या गुणकर्ममीमांसेद्वारे येथपावेतो येतो.

कर्म हे निंदनीय नसून करणीयच आहे, असा आदेश श्रीकृष्ण देतात. कर्म करतांनाच त्याद्वारे मुक्तीचा मार्ग आक्रमावा म्हणून ते म्हणतात: *"स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः। स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु।।१८-४५।।"* स्वकर्मनिरत मनुष्याला त्याद्वारे मोक्ष कसा मिळतो, हे सांगण्यासाठी ते पुढे म्हणतात: ***"यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।....।।१८-४६ ते ५३।।"***

"कर्मे ईशु भजावा"

ज्यापासून या सर्व भूतादींची उत्पत्ति होते; ज्याने हे सर्व व्यापले आहे; त्याला स्वकर्माचरणाने पूजून सिद्धी प्राप्त होते. उत्तमरीत्या आचरलेल्या परधर्मापेक्षा गुणहीन स्वधर्माचे आचरण श्रेयस्कर होय. प्रकृतिवशात व प्रवृत्तीनुरूप कर्म सदोषच असले तरीही ते टाकून

देऊ नये. पुत्र-स्त्री-धनादींनी ज्याची बुद्धी आसक्त झालेली नाही; ज्याने आपले अंत:करण रागादींबाबत वश करून घेतले आहे; ज्याची स्पृहा नष्ट झाली आहे, असा पुरुष ***ज्ञानपूर्वक केलेल्या सर्वकर्मसंन्यासाने -म्हणजे स्वकर्मे त्यांच्या फलाकांक्षेचा व संगाचा त्याग करून आचरत,*** सर्वोत्कृष्ट ***नैष्कर्म्यसिद्धी*** पावतो - म्हणजे कर्मे करूनही अकर्ता असणे - कर्मांनी न लिंपून घेणे -कर्मफलेच्छेने व्याप्त न होणे - अशा परमावस्थेला प्राप्त होतो.*(**"असक्तबुद्धिः सर्वत्र..।।१८-४८।।"**)*

या प्रकारे सिद्धी प्राप्त होऊन तो ब्रह्मभावास प्राप्त होतो. हीच तर पराकोटीची ***ज्ञाननिष्ठा*** होय.***हिच्याही आचरणात कर्मत्याग नाहीच!! कर्म वा योग आणि साङ्ख्य वा ज्ञान*** या पुराप्रोक्त ज्या दोन निष्ठा आहेत, त्या अशा प्रकारे एकच आहेत आणि तेच ते एक फल देतात.

विशुद्ध बुद्धीने युक्त होऊन, धैर्यपूर्वक शरीरेंद्रियसंघाताचे नियमन करत, शब्दस्पर्शादी विषयांचा त्याग करून, राग व द्वेषहीन होऊन, एकांताचे सेवन करणारा, हितकर परिमित, पचनास हलके असे पवित्र अन्न सेवन करणारा; शरीर, वाक् आणि मनाचे नियमन केलेला; सतत ध्यानयोगाचे अनुसंधान करणारा; विरक्त झालेला; अहंकार, बल, दर्प, मद, काम, क्रोध व परिग्रह टाकून देऊन ममत्वरहित झालेला; शांत होत्साता तो पुरुष ब्रह्मप्राप्ती करून घेतो. तो ब्रह्मच होतो!!

आप्तकाम पुरुष

अशा आप्तकाम पुरुषाचे वर्णन गीता ***"ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति। ...।।१८-५४ ते ५६।।"*** या श्लोकांतून करते. सच्चिदानंदघन ब्रह्मास पावलेला, आत्मप्रसन्न पुरुष शोक व इच्छारहित असतो. सर्व भूतांप्रत समभाव धारण केलेल्या त्या पुरुषास श्रेष्ठ भक्ती प्राप्त होते. त्याद्वारे तो त्या सर्वव्यापक अशा विभुस्वरूपाला यथार्थ जाणतो व अनुभवतो. त्या तत्त्वाठायी तो तत्काळ प्रवेशतो. भगवंताच्याठायी ज्याने आपली सर्व वृत्ती अर्पिली आहे, ज्याने केवळ त्या आत्मतत्त्वाचाच आश्रय घेतला आहे, असा तो पुरुष सर्व कर्मे करत असतांनाही भगवत्प्रसादामुळे शाश्वत अशा अव्यय पदाला प्राप्त होतो.

श्रीकृष्णोपदेशाची परिसमाप्ती

यानंतर गीतेच्या परिसमाप्तिप्रीत्यर्थ जे उरलेले श्लोक येतात, त्यांद्वारे अर्जुनास अहंकार सोडून आपले स्वकर्म करण्याचा उपदेश केलेला आहे. अर्जुनाने द्वितीयोध्यायी ***"शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।"*** अशी जी विनंती केली होती, त्यासाठी गीतेचा ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं....।।२-१०।।"*** पासून हा जो प्रपंच केला गेला, त्याची पुढील श्लोक म्हणजे ***"चेतसा सर्वकर्माणि ...।।"*** ते ... ***"कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ..।।१८-५७ ते ७२।। "*** ही अखेरची मात्रा आहे.

अनन्यशरणता

भगवंत अंतिमतः अर्जुनास म्हणतात की: "सर्व कर्मांचा विवेकबुद्धी वापरुन मजठायी निरास कर. मत्परायण हो. बुद्धियोगाचा आश्रय करून सतत माझ्याठायी चित्त ठेव. माझ्या कृपेमुळे सर्वदुर्गम अशा अडचणींचे आणि संसारसंकटांचे निवारण होईल. अहंकारयुक्त होऊन तू जर न लढण्याचा निश्चय केलास व माझे म्हणणे ऐकले नाहीस, तर मात्र तुझा विनाश म्हणजे दुर्गती अटळ आहे."

"कारण एक तर तुझा निश्चय टिकणार नाही. कारण प्रकृति तुझ्या स्वभावज क्षात्रवृत्तीस पुढे करून जबरीने तुजकडून युद्ध करवून घेईल. स्थिरचित्त नसलेल्या तुझ्या हातून जो मानवसंहार घडेल, त्याच्या पापभयाने तुझी अधोगती होईल. हे टाळावयाचे असेल, तर ***ज्या मायेने ईश्वर सर्व प्राणिमात्रांस भ्रमवत असतो, त्या मायाधीश ईश्वरास सर्वथा शरण जा. त्याच्या प्रसादाने तू परमशांतिरूप शाश्वत स्थान प्राप्त करशील."***

"हे गुह्यातिगुह्य ज्ञान मी तुझ्या कल्याणास्तव तुला सांगितले आहे. त्याचा नीट विचार करून मग जशी तुझी इच्छा असेल, तसे वाग. तू मत्प्रिय आहेस. म्हणून पुनश्च हे ज्ञान तुला एकदा थोडक्यात सांगतो."

"मन्मना भव मद्भक्तो"

असे म्हणून ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।१८-६५।।"*** व ***"सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।१८-६६।।"*** या श्लोकद्वयीत संपूर्ण गीतेचा संदेश भगवंतांनी गुटिकास्वरूपात दिलेला आहे.

ते म्हणतात: *"माझ्याचमध्ये ज्याचे मन आहे, असा तू हो. मलाच नमस्कार कर. सर्व धर्म व अधर्म यांचा परित्याग करून केवळ मलाच शरण ये. तू शोक करू नकोस. माझे सत्यवचन ऐक.मी तुला सर्व पापांपासून सोडवीन. तू मला अतीव प्रिय आहेस. तू मलाच येऊन पोहोचशील."*

गीतेचा संप्रदाय

पार्थाला हे ज्ञान प्रदान केल्यावर या गीताशास्त्राचे सांप्रदायिक मूल्य सांगतांना भगवंत म्हणतात: ***"इदं ते नातस्काय नाभक्ताय ...।।१८-६७ ते ७१।।"***- "हे गीताज्ञान गुह्य आहे. ते वाटेल त्याच्यापुढे प्रकट करू नये. तपश्चर्या न करणाऱ्याला तर सांगूच नये. भगवंतांना निंदणाऱ्यांस व त्यांची असूया करणाऱ्यासही सांगू नये."

"हे ज्ञान केवल भगवद्भक्तांनाच सांगावे. असे करणारा भगवंतालाच जाऊन मिळेल. प्रभूच्या भक्तांना याचे रहस्योद्घाटन करणाऱ्याएवढा त्यांचा कोणीच प्रिय नाही. आणि जो कृष्णार्जुनांच्या या धर्म्य संवादाचे पठन करील, तो प्रभूचे ज्ञानयज्ञाने पूजन करणारा म्हणून त्यांना मान्य होईल. जो श्रद्धावंत असूयारहित अंत:करणाचा पुरुष हा संवाद नुसता ऐकेलही, तोही पापमुक्त होऊन पुण्यवानांच्या शुभ लोकास प्राप्त होईल."

अर्जुनाच्या संशयाची पूर्ण निवृत्ती

हे सर्व ऐकून पार्थास ते कळले का यासाठी श्रीकृष्ण त्याला विचारतात: ***"कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ ...।।१८-७२।।"*** व त्याचे उत्तर म्हणून अर्जुन म्हणतो: ***"नष्टो मोहः ...।।१८-७३।।"*** हे सर्व एकाग्र चित्ताने ऐकून आपला अज्ञानजन्य अविवेक पार नाहीसा झाला असल्याची स्पष्ट ग्वाही देऊन अर्जुन म्हणतो की त्याचा सर्व संशय

नष्ट होऊन, विस्मृत झालेले आत्मस्वरूप त्यास पुनश्च गवसले आहे. आता तो श्रीकृष्णांनी म्हटल्याप्रमाणेच आचरण करील आणि युद्धविन्मुख न होता युद्धसन्मुख होईल.

सञ्जयाचे महद्भाग्य

असा हा अद्वितीय रोमहर्षक संवाद ऐकून संजयाच्या अंगावर रोमांच आले. त्याबाबत त्याचे उद्गार म्हणजे ***"इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः। ... ।।१८-७४ ते ७८।।"*** हे गीतेचे व *अठराव्या* अध्यायाच्या परिसमाप्तीचे श्लोक होत.

तो म्हणतोः "श्रीकृष्ण परमात्म्याने स्वमुखाने कथन केलेला हा ***परमहरस्ययुक्त गुह्य योग*** मी व्यासप्रसादाने ऐकला. या अद्भुत आणि पुण्यप्रद संवादास स्मरतांना मी पुनःपुनः आनंदित होतो. ते हरीचे अद्भुत रूप पुनःपुनः आठवून मला मोठा विस्मय वाटतो. आणि मी पुनःपुनः हर्ष पावत आहे."

सञ्जयाचा गीतापूर्णाचा उद्गार

यानंतर धृतराष्ट्राच्या गीतारंभीच्या मूळ प्रश्नाला म्हणजे ***"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ... ।।१-१।।"*** याला खरेखुरे उत्तर देतांना तो म्हणतोः ***"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।१८-७८।।"***- "ज्या पक्षाकडे योगेश्वर श्रीकृष्ण आहेत आणि तसेच धनुर्धारी पार्थ आहे, त्याच पक्षास श्री, विजय, ऐश्वर्य आणि अढळ नीती आहेत; असे मला दृढतया वाटते."

गीतार्थाचे सार

गीतार्थाचे हे संक्षिप्त परिशीलन करण्यामागे जो आपला उद्देश होता, तो म्हणजे गीतेतील ***कर्म, ज्ञान, योग आणि भक्ती या उपासनांचा अनुबंध*** माहीत करून घेणे. पुढील विषयाच्या विवेचनासाठी हा लक्षात असणे आवश्यक ठरते. ***त्यात मुख्य म्हणजे योग आणि ज्ञान यांचा गीताकारांनी प्रकट केलेला मेळ.***

आपणांस आतापर्यंतच्या धावत्या आढाव्यावरून जाणवते ते असे की ***गीतोक्त योगांतर्गतच गीता कर्म, ज्ञान आणि भक्ती या त्रयीचा समावेश करते.*** *याला विशेष प्रमाण म्हणून श्लोक क्र. १८-५४ ते ५६ आणि १८-६५ व ६६ हे श्लोक समजता येतात. कारण हे श्लोक म्हणजे संक्षिप्त गीतार्थच असे आहेत(पृ.क्र. ३८६).*

संपूर्ण ज्ञानेश्वरीचे अवलोकन केले तर हेच प्रतिपादन आपणांस त्यातही केलेले आढळते. चतुर्था भक्ती, ज्ञान, योगद्रुमाचे फळ, कर्ममार्गाचे क्रमयोगसोपानाद्वारे *अठराव्या* अध्यायात घडविलेले विहंगम दर्शन, अशा कितीतरी स्थळी हे स्पष्ट होते.

गुरुमुखाने जो उपदेश केला जातो, त्याक्षणीच त्याबरोबरच आत्मस्थिती प्राप्त झालेल्या काही महामानवांची गोष्ट सोडली तर ***विशुद्ध*** अशा समजल्या जाणाऱ्या, निव्वळ आत्मानात्मविचारविवेकाने आणि आजन्म कोणतेही कर्म न करताच सिद्धी प्राप्त करून घेण्याच्या तथाकथित ज्ञानमार्गाचे उत्तम असे शुकासारखे अधिकारी ***(कोणतेही कर्म न करताच योगसंसिद्धी प्राप्त करणारे)*** दुर्मीळच म्हटले पाहिजेत. ***गीता ही अशा महामानवांना मार्गदर्शन करण्यासाठी सांगितलेली नसून इतर सर्वसामान्य साधकांसाठी आहे.***

त्यामुळे तात्त्विक दृष्ट्या जरी *ज्ञान व योग* असे दोन मार्ग गीता मान्य करते, तरीही ती योगावरच भर देते. गीतेचा या कर्म, ज्ञान, योग व भक्ती चतुष्टीचा हा अनुबंध लक्षात घेतला की नंतर योगांतर्गत गंतव्यप्राप्तीसाठी जे ज्ञान प्राप्त होते, ते ज्ञानमार्गाच्या अधिकाऱ्यांस प्राप्त होणाऱ्या ज्ञानाहून भिन्न नसल्याचे पण जाणवते.

*आणि कर्मसोपानाद्वारे कर्मे करत करतच योगांतर्गतच असणाऱ्या अनन्य - अव्यभिचारिणी भक्तीचीही प्राप्ती या ज्ञानासारखीच होते. भगवंत जिचा गौरव करतात, ती चतुर्थ भक्ती या योगमार्गानेच प्राप्त होते. ते म्हणतात तसा कर्मे करण्याचा अभ्यास सातत्याने करून त्याला जो **योग** म्हणून सहाव्या अध्यायात म्हटला आहे, त्याची जोड द्यावी; म्हणजे सुगमत्वाने ज्ञान व भक्ती यांची प्राप्ती होते. असा हा सर्व गीतोक्त उपासनेचा अनुबंध आहे.*

वस्तुतः ***या उपासनामार्गावर येणारे विशिष्ट टप्पेच कर्मयोग, ध्यानयोग, भक्तियोग व ज्ञानयोग या प्रमुख नामाभिधानांनी विद्वज्जनांत ओळखले जातात.*** म्हणून केवळ प्रतिपादनापुरते हे चार वेगवेगळे मानले तरी ज्ञानदेव त्या सर्वांचा अंगीकार ते एकच आहेत, असा करतांना दिसतात. आणि उपरोल्लेखित गीताश्लोकांचा ध्वनितार्थसुद्धा असेच सूचित करतो. असो. येथे हा ***उपासनेचा अनुबंध*** संपतो.

समारोप

याप्रमाणे आपण अवलोकण्यास घेतलेला गीतार्थाचा हा भाग आता संपवून, आपल्या मूळ ध्येयाकडे वळू या.

मागे *(उन्मेषः२२::त्रिगुणमयी प्रकृति,पृ.क्र.३४३)* जो गीतेचा पंधरावा अध्याय सूत्रानुक्रमे आलेला होता, त्याद्वारे ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विचाराच्या शेष भागासाठी ***क्षर, अक्षर आणि उत्तम*** पुरुषांचे रहस्य ***विश्वाभासात्मक अश्वत्था***च्या माध्यमातून उलगडून पाहू या. त्यासाठी आपणांस आता प्रयोजन आहे ***पञ्चम स्कंध - जीवाचे स्वरूप*** यातील ***उन्मेष क्र. २६-विश्वाभासात्मक अश्वत्थ*** याचे! तर वळू या तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::पञ्चम स्कंध::जीवाचे स्वरूप::
(उन्मेष २६ते २८) (पृ.क्र.३८८ ते ४४१)

:::पञ्चम स्कंध:::
::जीवाचे स्वरूप::

::उन्मेष::२६::
::विश्वाभासात्मक अश्वत्थ::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २६

गीता:
१५:१-६
ज्ञानेश्वरी:
१५:२९-३१६

:::पञ्चम स्कंध:::
::जीवाचे स्वरूप::

::उन्मेष::२६::
::विश्वाभासात्मक अश्वत्थ::

विवेक वैराग्य::::

पंधराव्या अध्यायाचा प्रस्ताव

ज्ञान-विज्ञान अवलोकत असता आपण ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ, प्रकृति-पुरुष*** इ.विषय पाहत होतो. मध्यंतरी त्यानिमित्ताने आपण ***गीतेतील उपासनेचा अनुबंध*** पाहिला. ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** संबंधित उरलेला विचार विचार पाहण्यासाठी आपण आता ***क्षर, अक्षर व उत्तम*** पुरुषांचे रहस्य उलगडून दाखविणाऱ्या *पंधराव्या* अध्यायाकडे वळू या.

या *पंधराव्या* अध्यायाचे प्रयोजन सांगतांना ज्ञानदेव असे म्हणतात की क्षणभंगुर संसार कसा आहे, हे नीट उमगल्याविना ज्ञान आणि वैराग्य प्राप्त होणे कठीण आणि प्राप्त झाले तरी टिकणे कठीण! वैराग्यप्राप्त्युपरांत ज्ञानप्राप्ती होते. तरी***वैराग्य*** ही साधनसंपत्ती मुमुक्षूंसाठी आवश्यक ठरते. हे स्पष्ट करणाऱ्या त्यांच्या ओव्या पाहाः

तऱ्हीं तो प्रस्तुतीं। चौदावियां अध्यायाचां अंतीं।
निर्णयो कैवल्यपति। ऐसा केला।।१५-२९।।
जैं ज्ञान जेयाचां हातीं। तोचि समर्थु मुक्ती।
जैसा शतमख संपत्ति। स्वर्गीचियां।।३०।।
कां शतएक जन्मां। जो जन्मौनि ब्रह्मकर्मा।
करी तोचि ब्रह्मा। आनु नोहे।।३१।।
नाना सूर्याचा प्रकाशु। लाहे जेवीं डोळसु।
तेवीं ज्ञानेंचि सौरसु। मोक्षाचा तो।।३२।।
तऱ्हीं तेयां ज्ञानालागीं। कवणां पां योग्यता आंगीं।
हे पाहतां जगीं । देखिला एकु।।३३।।

"चौदाव्या अध्यायाच्या शेवटीशेवटी गुणातीतदर्शनानिमित्त ज्ञानवानाचे दर्शन घडविले होते.असा ज्ञानी मुक्ती पावतो, हा निर्णय त्या प्रसंगी श्रीकृष्णांनी केला होता. इंद्राहाती स्वर्गीची संपत्ती जशी असते; शंभर जन्म ब्राह्मणाचे होऊन त्या प्रत्येक जन्मी ब्रह्मकर्म सुव्यवस्थित आचरणाऱ्यासच जसे ब्रह्मदेवाचे पद प्राप्त होते; दुसऱ्यांना ही पदे मिळत नाहीत; सूर्याचा प्रकाश जसा फक्त डोळसालाच दिसतो; त्याचप्रमाणे ज्ञान हाती असलेल्यालाच मुक्ती मिळते. असे हे ज्ञान प्राप्त होणाऱ्याची पात्रता कोणती असते! तर पहा! ही पात्रता असणाऱ्याची लक्षणे ऐक."

वैराग्याशिवाय ज्ञान नाही

जैं पातालींचेही निधान। दावील कीर अंजन।
परि होआवे लोचन। पायालाचें।।१५-३४।।
तैसें मोक्ष देईल ज्ञान। येथें कीर नाहीं आन।
परि तैंचि थारे ऐसें मन। शुद्ध होआवें।।३५।।
तऱ्हीं विरक्तीवांचूनि केंहीं। ज्ञानासि तगणें नाही।
हें विचारूनि ठाईं। ठेविलें देवें।।३६।।
आतां विरक्तीची कवण परी। जैं येऊनि मनांतें वरी।
हेहीं सर्वज्ञें श्रीहरी। देखिलें असे।।३७।।
जैं विषें रांधिली रससोयें। जैं जेवणारा ठाऊवी होए।
तैं ताटचि सांडुनि जाये। जेयापरी।।३८।।
तैसीच संसारा या समस्तां। जाणिजे जैं अनित्यता।
तैं वैराग्य दवडितां। पाठीं लागे।।३९।।

"पाताळींचे गुप्तधनसुद्धा अंजन डोळ्यात घातले की दिसू शकते; पण ते केवळ पायाळू माणसालाच! तसेच श्रीहरी जे ज्ञान म्हणतात, त्याने मोक्ष जरूर प्राप्त होतो. पण त्यासाठी ते ज्ञान नीट स्थिरावून ठेवील असे विशुद्ध मन असावे लागते. आणि विरक्ती हीच यासाठी आवश्यक ठरते. विरक्तीशिवाय ज्ञानवृक्ष तगू शकत नाही. हा विचार करून श्रीहरींनी आधीच ठरविले होते की विरक्तीने आपणहून मनाला वरले पाहिजे. अन्नात विष मिसळले आहे, हे माहीत होताच जेवणारा जसा ताटच अव्हेरून जातो, त्याप्रमाणे या संसाराची अनित्यता नीट उमजली की वैराग्यास हाकून दिले, तरी ते स्वतः होऊन पाठोपाठ येईल."

आतां अनित्यत्व या कैसें। तैंचि वृक्षाकारमिषें।
सांगिजत असे विश्वेशें। पंचदशीं।।१५-४०।।
उपडिलें कवतिकें। झाड एरी मोहरा ठाके।
तैं वेगें जैसें सुके। तैसें हे नव्हे जाण।।४१।।
याचि एकेपरी। रूपकाचियां कुसरी।
सारितसे वारी। संसाराची।।४२।।
करूनि संसार वावो। स्वरूपीं अहंतें ठावो।
होआवया अध्यावो। पंधरावा हा।।४३।।
आतां हेंचि आघवें। ग्रंथगर्भीचें चांगावें।
उपलविजेल जीवें। आकर्णिजे।।४४।।

"हे जाणून श्रीहरी या पंधराव्या अध्यायी वृक्षरूपकाद्वारे हे संसाराचे अनित्यत्व पटवून सांगतात. अवचित उन्मळून पडलेले, शेंडा खाली व बुडखा वर असे झालेले झाड सहजच सुकून जाते,

तसा हा संसारवृक्ष नाही. आगळ्याच अशा संसारवृक्षाचे रूपक चातुर्याने उपयोजून श्रीहरी त्याद्वारे संपूर्ण संसाराची येरझार कशी चुकवतात, पहा. संसार हा मिथ्या आहे; क्षणभंगुर आहे; हे पटवून देत, स्वस्वरूपी विराजण्यासाठी हा पंधरावा अध्याय उभारला आहे. हा ग्रंथांतरीचा विशेष अभिप्राय मी तुम्हा श्रोत्यांना नीट उकल करून सांगीन. तरी तुम्ही त्याकडे जिवाभावाने लक्ष पुरवा."

ज्ञान हे भक्ती व योग यांचे सर्वस्व

या सर्व ओव्यांतून जी *चौदाव्या* अध्यायाचा संदर्भ देऊन ज्ञानमहती गायिली आहे, तिचा विचार आपण पूर्वी *चौदाव्या अध्यायातील श्लोक क्र. २६ व २७* व त्यावरील ज्ञानेश्वरीच्या ओव्या पाहतांना केला होता. तेथे जे *ज्ञान* म्हटले आहे, ते *अव्यभिचार* भक्तीला. *भेद सोडून अभेदभावाने संसार पाहणे हीच ती भक्ती; हेच ज्ञान आणि हेच योगसर्वस्व असा येथे संदर्भ आहे (ओव्या क्र. १४-३८० ते ३८२, ३८६ ते ३८८, ३९१ ते ३९५ व ३७१ ते ४०८: उन्मेषः२३::गुणातीतदर्शन,पृ.क्र.३५०-३५३).*

असे हे ज्ञान म्हणजेच भक्ती वा योग कोणत्या उपायाने स्थिर होईल, तर ते विरक्तीने! ही ***विरक्ती संसार अनित्य आहे या ज्ञानसंधानाने प्राप्त होते*** आणि त्यासाठीच या *पंधराव्या* अध्यायाचा प्रपंच आहे, हे जिज्ञासूंनी नीट समजावून घेतले म्हणजे या ठिकाणी *(ओवी क्र. १५-३२ व ३३, ३५ व ३६ मध्ये)* ***ज्ञान*** हा जो शब्द उपयोजिला आहे, त्यात अडखळून पडण्याचे टळेल.

अश्वत्थाचे स्वरूप::::

विश्वाभास हाच अश्वत्थ वृक्ष

यानंतर ज्ञानदेव या वृक्षरूपकाबद्दल अधिक काही प्रस्तावना करतात, ती पाहा:

तऱ्हीं महानंदसमुद्र। जो पूर्णपूर्णिमाचंद्र।
तो द्वारकेचा नरेंद्र। ऐसें म्हणे।।१५-४५।।
अगां पैं पांडुकुमरा। येतां स्वरूपाचियां घरा।
करीतसे आडवारा। विश्वाभासु जो।।४६।।
तो हा जगडंबरु। नोहे एथ संसारु।
हा जाणें महातरु। थांवला असे।।४७।।
परि एरां रुखांसारिखा। तळीं मूळें वरी शाखा।
तैसा नोहें म्हणौनि लेखा। नये कवणां।।४८।।
आगीं कां कुऱ्हाडी। होय रिगावा जऱ्हीं बुडीं।
तऱ्हीं हो कां भलतेवढी। वरिचिल वाढी।।४९।।
जैं तुटलियां मूळापासीं। उलंडैल कां शाखांसीं।
परि तैसीं गोठी कायसीं। हा सोहोपा नोहे।।५०।।
अर्जुना हे कवतिक। सांगतां असे अलौकिक।
जैं वाढी अधोमुख। रुखा येयां।।५१।।

आता महानंदाच्या सागरास भरती आणणारा एकमेव पौर्णिमेचा पूर्णचंद्रच असणारा द्वारकेचा नरेंद्र श्रीकृष्ण असे म्हणतो:

"हे पांडुपुत्रा! स्वरूपस्थानी सुखरूप पोहोचवण्यास अडवणारा हा जो विश्वाभास जगडंबर म्हणून ओळखला जातो, तो काही साधा संसार नाही; तर तो एक फोफावलेला महावृक्ष आहे. पण हा इतर सामान्य वृक्षांसारखा वर फांद्या व खाली मुळे असा नसल्याने तो कोणाच्याही सहज दृष्टीस येत नाही. इतर वृक्षांच्या तळाशी अग्नी लावला तर ते कितीही फोफावलेले का असेनात, फांद्यांसह मूळ तुटल्याबरोबर खाली कोसळून पडतात. पण या विशेष वृक्षाची गोष्ट तशी नाही. इतका सहजासहजी हा उन्मळून टाकता येईल असा हा वृक्ष नाही. कारण या अलौकिक वृक्षास अधोमुख वाढ -विस्तार -शाखा - पल्लव आहेत."

जैसा भानु उंची नेणों कें। रश्मिजाल तळीं फांकें।
संसार हे कावरुखें। झाड तैसें।।१५-५२।।
आणि आथी नाथी तितुकें। रुंधलें असे एणेंचि एकें।
कल्पांतीचेनि उदकें। व्योम जैसें।।५३।।
कां रवीचां अस्तमानीं। अंधारेनि कोंदें रजनी।
तैसा हाचि गगनीं। मांडला असे।।५४।।

"बघायला गेले तर सूर्य नभोमंडलात किती उंचावर आहे, त्याचा शोध लागत नाही. पण त्याच्या किरणांचे जाळे तर जिकडे पाहावे तिकडे सर्व दूर पसरलेले दिसते. हा वृक्षसुद्धा तसाच अद्भुत आहे. कल्पांती उदक जसे समस्त व्योमादी व्यापून सर्वदूर भरून राहते, त्याचप्रमाणे हा विचित्र वृक्षसुद्धा या जडसूक्ष्म विश्वातील असणाऱ्या, दिसणाऱ्या, न दिसणाऱ्या अशा सर्व वस्तुमात्रांना व्यापून आहे. सूर्य अस्तमान झाला की जशी रजनी काळोखाने भरगच्च भरून जाते, जिकडे तिकडे सर्वदूर जसा अंधारच दाटतो; त्याप्रमाणे हा वृक्ष सर्व गगनास भरून टाकत आहे."

यया फळां न चुंबितां। फूल ना तुरंबितां।
जैं कांहीं पांडुसुता। तैं रुखुचि हा।।१५-५५।।
हा ऊर्ध्वमूल आहे। परि उन्मूलिला नोहे।
येणेंचि हा होये। शाड्वलु गां।।५६।।
आणि ऊर्ध्वमूल ऐसें। निगदिलें कीर असे।
परि अधींहीं असोसें। मूळें येयां।।५७।।
पैं बिल्वाचेनि महामारी। पिंपला कां वडाचियां परी।
जैं पारंबियांमाझारीं। डहालियां असती।।५८।।

" ना या वृक्षाला चाखता येणारी फळे आहेत, ना याला वास घेता येतील अशी फुले आहेत. सर्व काही हा एकला वृक्षच आहे. हे पांडुपुत्रा! हा वृक्ष ऊर्ध्वभागी मुळे असलेला जरी असला, तरी तो उन्मळून पडला असेल असे मात्र नाही; तर तो रसरशीत हिरव्यागार भरगच्च पानोऱ्याने सदा बहरलेलाच असतो. कारण हा जिवंत वृक्ष असून ऊर्ध्वभागी असणाऱ्या मुळांद्वारे पोसला जात आहे. आणिकही एक आहे. याची मुळे वरच्या बाजूला रोवली आहेत, असे म्हणत असलो तरी याला खालच्या बाजूलासुद्धा खूप

विपुल मुळे आहेत. म्हणजे ऊर्ध्वभागाकडून व अधोभागाकडूनही पोषण मिळून वाढणारा हा वृक्ष आहे. वड-पिंपळ-औदुंबराच्या झाडांप्रमाणे याला पारंब्या फुटतात. त्यातल्या कित्येक खालपर्यंत येऊन भरदार मुळे जमिनीत रोवतात आणि या सर्व मुळापारंब्यांच्या पसाऱ्यावर वरखाली सर्वदूर फांद्यांचे जाळेच जाळे पसरते."

तेवींचि गां धनंजया। संसारतरु येयां।
अधींचि आथी खांदियां। हेहीं नाही।।१५-५९।।
तऱ्हीं ऊर्ध्वाहीकडे। शाखांचें मांदोडे।
दिसताती अपाडें। सासिन्नलें।।६०।।
जालें गगनचि पां वेलिये। कां वारा मांडिला रुखाचेनि आयें।
नाना अवस्थात्रयें। उदयला असे।।६१।।
ऐसा हा एकु। विश्वाकार विटंकु।
उदयला जाण रुखु। ऊर्ध्वमूलु।।६२।।

"हे धनंजया! म्हणून या वृक्षाला खालच्याच बाजूला फक्त खांद्या असतात असे नाही; तर ऊर्ध्वबाजूकडेसुद्धा त्याच्या फांद्यांचे समुदाय विस्तारलेले आहेत. एखाद्या वेलीचा विस्तार एवढा व्हावा की तिने गगनमंडल समस्त व्यापून टाकावे, सर्व वायुमंडलसुद्धा तिने भरून जावे; गगन म्हणजे जणू ती वेलीच असावी; किंवा वायुमंडल म्हणजे जशी काय तीच असावी; तसे या वृक्षाचे आहे. हा सर्व विश्व व्यापून टाकतो आणि एवढेच काय! विश्वाचे उत्पत्ती, स्थिती आणि लय हे अवस्थात्रय म्हणजे जसा काही हा विचित्र वृक्षच आहेत. असा हा ऊर्ध्व मुळे असलेला निबिड, उंच, घनदाट वृक्षच विश्वाच्या आकाराने उत्पन्न झाला आहे पाहा."

"ऊर्ध्वमूलमधः शाखम्"

आतां ऊर्ध्व या कवण। येथें मूल तैं किं लक्षण।
कां अधोमुखपण। शाखा कैसिया।।१५-६३।।
अथवा दुमा येयां। अधीं जियां मूलियां।
तिया कोण कैसियां। ऊर्ध्व शाखा।।६४।।
आणि अश्वत्थु हा ऐसी। प्रसिद्धी कायसीं।
आत्मविद्विलासीं। निर्णयो केला।।६५।।
हे आघवेंचि बरवें। तुझिये प्रतीतीस फावे।
तैसेनि सांगो सोलिवें। विन्यासें गां।।६६।।
परि ऐकें गां सुभगा। हा प्रसंगु असे तुजचि जोगा।
कानचि करी सर्वांगां। हियें आथिलिया।।६७।।

"अशा या संसारवृक्षाची ऊर्ध्व कोणती; याचे मूळ कशा प्रकारचे आहे; याचे अधोमुखत्व म्हणजे काय; याच्या शाखा कशा आहेत; आणिक या संसारद्रुमवराच्या अधोभागी सुटलेल्या मुळ्या आणि फुटलेल्या पारंब्यांचे, तसेच ऊर्ध्वस्थानी जाणाऱ्या शाखांचेही स्वरूप कसे आहे; तसेच हा तरुवर **अश्वत्थ** या नावाने का ओळखला जातो; या सर्व विषयाचा आत्मविद आणि आत्मरत महाभागांनी केलेला अंतिम निर्णय तुला स्पष्ट प्रतीत होईल, असे शेलके निरूपण मी आता करणार आहे. म्हणून हे भाग्यवंता! तू सर्वांगाचेच कान करून एकाग्र अंतःकरणाने अवधान दे. हे असे उत्कृष्ट निरूपण ऐकण्यास तूच एकला काय तो मला पात्र दिसतोस."

ऐसें प्रेमरसें सुरफुरें। बोलिलें जंव यदुवरें।
तंव अवधान अर्जुनाकारें। मूर्त जालें।।१५-६८।।
देव निरूपिती तैं थेंकुलें। एवढें श्रोतेपण फांकलें।
जैसें आकाशा खेंव पसरिलें। दाहीं दिशीं।।६९।।
श्रीकृष्णोक्तिसागरा। हा अगस्तिचि दुसरा।
म्हणौनि घोंटु भरों पाहें एकसरा। आघवेयांचि।।७०।।
ऐसीं सोयें सांडूनि खवलिली। आवडी अर्जुनीं देवें देखिली।
तेथ जालेनि सुखें केली। कुरवंडी तेयां।।७१।।

"त्या यदुश्रेष्ठाचे साक्षात प्रेमरसाने भरलेले ते बोल ऐकताच जणू अर्जुनाच्या रूपाने अवधानच मूर्तिमंत प्रकटले. विस्तृत आकाशाला जणू दाही दिशांनी कवेत घ्यावे; तसे भगवंतांचे अपरिमित आशयाचे निरूपणसुद्धा परिमित वाटावे, इतके ते अवधान विस्तारले. समुद्र एका आचमनात प्राशन करणाऱ्या अगस्तीसारखाच जसा काही दुसरा अगस्तीच त्या अर्जुनाच्या रूपाने श्रीकृष्णोक्तिसागराचे एकाच घोटात प्राशन करण्यास प्रकटला. अर्जुनाठायी मर्यादा ओलांडून प्रकटणारा तो आतुरतेचा महासागर उचंबळलेला पाहिला अन त्याने हर्षभरित होत त्या प्रभूंनी आपले सुखच त्याच्यावरून ओवाळून टाकले."

प्रेम-हर्ष-सुखभाराने लगडलेला तो ***श्रीकृष्णपरमात्मरूपी अश्वत्थ,*** त्या दुसऱ्या अश्वत्थाचे असे वर्णन करू लागलाः

ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्।।१५-१।।

"मूल ऊर्ध्व असणाऱ्या व शाखा अधोभागी असणाऱ्या या अश्वत्थ वृक्षास ***अव्यय*** असे म्हणतात. ज्याची ***वेद*** ही पाने आहेत, अशा त्या वृक्षाला जो जाणतो, तोच ***वेदवेत्ता*** होय."

पंधराव्या अध्यायाचे प्रयोजन

अश्वत्थ पिंपळाचे संस्कृत नांव आहे. या अश्वत्थाच्या खऱ्या गीतार्थाचे विवेचन ज्ञानेशांनी आपल्या ओव्यात केलेले आहे. तत्पूर्वी याविषयी इतरांचे विचार पाहू या.

आदिशंकराचार्य असे म्हणतात कीः *"चौदाव्या अध्यायी* ***"मां च योऽव्यभिचारेन भक्तियोगेन सेवते।"*** असा भक्त, ज्ञानी व कर्मयोग्यांविषयी उल्लेख केला होता. तसेच भगवत्तत्त्व जाणणारे ब्रह्मप्राप्ती करून घेतात. हे भगवत्तत्त्व सांगण्यासाठी *पंधरावा* अध्याय उपयोजिला आहे. हे तत्त्व जाणण्यासाठी ***वैराग्य*** आवश्यक आहे व संसाराचे यथार्थ रूप समजले की वैराग्य उपजते. हे संसारस्वरूपच या अध्यायात *(पंधराव्या)* वृक्षरूपकाद्वारे स्पष्ट

केले आहे. हा वृक्ष ऊर्ध्वमूले असणारा, कालापेक्षा सूक्ष्म, कारण, नित्य आणि महान या लक्षणांचा असल्यामुळे ***अव्यक्त मायाशक्तियुक्त ब्रह्म*** याचे मूळ आहे व ते सर्वांपेक्षा श्रेष्ठ असल्याने ***ऊर्ध्व*** असे म्हटले आहे. या संसारवृक्षाचे ***ऊर्ध्वमूल म्हणजे ब्रह्म!"***

"पुराणे म्हणतात की अव्यक्तरूपी मूलापासून उत्पन्न झालेला, त्याच्याच अनुग्रहाने वर्धमान झालेला, बुद्धिरूपी प्रमुख शाखा असणारा, इंद्रियरूपी ढोल्या असणारा, महाभूतरूपी शाखा-प्रतिशाखायुक्त असा, विषयरूप पर्णे असणारा, धर्म व अधर्मरूप सुंदर पुष्पांनी विनटलेला, तसेच सुखदु:खरूपी फले लागलेला असा हा सनातन ब्रह्मवृक्ष आहे. याच्याच आश्रयाने सर्व भूतमात्रांची उपजीविका चालते. हेच ***ब्रह्मवन*** आहे. यातच सदैव ब्रह्माचे वास्तव्य असते. अशा या ब्रह्मरूप वृक्षाचे ज्ञानरूप श्रेष्ठ तीक्ष्ण शस्त्राने छेदन-भेदन करून आत्मरती प्राप्त होते. त्यानंतर पुनश्च या संसारात आवागमन होत नाही."

"अशा या ऊर्ध्वस्थ मूल व अधस्थ शाखा असलेल्या मायामय संसारवृक्षाला - ***ज्याच्या महत्तत्त्व, अहंकार, तन्मात्रादी शाखा खाली आहेत*** **- तो न टिकणारा असल्याने, क्षणात उध्वस्त होणारा असल्याने, *अश्वत्थ असे म्हटले आहे*** व हा अनादी अनंत असा संसारच देहादींचा आश्रयस्थान असल्याने याला ***अव्यय*** असे म्हटले आहे. म्हणून हा वृक्ष अव्यय आहे. तसेच ब्रह्म याचे मूळ असल्यानेही याला ***अव्यय*** असे म्हणतात."

"ऋक्, यजुस व सामवेदादी या संसारवृक्षाचे रक्षण करतात. हे वेदच *(वा छंद)* धर्म व अधर्म यांना कारण व फलासह प्रकाशित करतात; व तसे करून याचे रक्षण करणारे होतात. म्हणून त्यांना या वृक्षाच्या पर्णांची उपमा दिली आहे."

"अशा या संसारतरूला त्याच्या मूलासहित जाणणाऱ्यांना म्हणून ***वेदवित्*** म्हटले आहे. या मूलासहित स्थित असलेल्या अश्वत्थ वृक्षास जाणले की इतर जाणावयाचे काहीच उरत नाही. म्हणून याला असे जाणणारे सर्वज्ञ होत. या वृक्षाचे असे हे जे ज्ञान आहे, तेच सर्वश्रेष्ठ, उत्तमोत्तम ज्ञान होय. हेच ज्ञान गोपालकृष्ण प्रकाशित करत आहेत."

संसाररूपी अश्वत्थाचे इतर अवयव

या संसारवृक्षाच्या अन्य अंगांची कल्पना करतांना गीतामाधव म्हणतात:

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः।
अधश्च मूलान्यनुसन्ततानि
कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके।।१५-२।।

"सत्त्व-रज-तम या त्यांच्या उपादानकारण अशा गुणांद्वारे प्रवृद्ध झालेल्या स्थूल विषयांच्या पल्लवांकुरयुक्त असणाऱ्या या वृक्षाच्या ज्या बऱ्याचशा शाखा आहेत, त्या कर्म व ज्ञान यांना अनुरूप फल म्हणून प्राप्त होणाऱ्या मनुष्यादींपासून स्थावरापर्यंत खालच्या अंगास आणि ब्रह्म्यापावेतो वरच्या अंगास पोहोचतात. कर्मफलरूप देहादी शाखांपासून शब्दादी विषय पल्लवांकुरांसमान उदित होतात. म्हणून या विविध योनींमध्ये प्राप्त होणाऱ्या शरीरादिस्वरूपाच्या शाखांना विषयरूप अंकुरादी आहेत, असे म्हणतात."

"संसारवृक्षाचे परममूल ***उपादानकारण*** म्हणजे ***अव्यय ब्रह्म*** आहे, हे पूर्वीच्या श्लोकाद्वारे स्पष्ट केले होतेच. आता कर्मफलजन्य रागद्वेषादी वासनासुद्धा त्या मूलासारख्याच अधर्म व धर्मविषयक प्रवृत्तींचे कारण म्हणून अंतर्भूत केल्या जातात. मनुष्यलोकी ही वासनारूप मुळे देवादींच्या तुलनेने खालच्या अंगास अविच्छिन्नपणे पसरली आहेत. पापपुण्यरूप कर्मांच्या अनुबंधामुळे मनुष्यादी योनी प्राप्त होतात आणि त्याप्रमाणे फलभोग प्राप्त होतो. ही फले प्रामुख्याने मनुष्यलोकी विशेषरूपाने प्रकटतात आणि म्हणून मनुष्यांना कर्माचा केवल अधिकार आहे, असे म्हणतात. म्हणून त्या वासनांना मनुष्यांसाठी ***कर्मानुबंधिनी*** असे म्हटले आहे."

"अशा त्या वृक्षाच्या शाखा अध:स्थानी व ऊर्ध्वभागी पसरलेल्या आहेत. त्या गुणांद्वारे प्रवृद्ध झालेल्या आहेत. त्यांना विषयरूपी कोमल पल्लवांकुर आहेत. त्यांची वासनामय मुळे मनुष्यलोकासाठी कर्मानुबंधित्व प्रदान करतात."

अश्वत्थाचा नाश

अशा या संसारवृक्षाचे छेदन-भेदन करून मुक्ती मिळवण्यासाठी गीता म्हणते:

न रूपमस्येह तथोपलभ्यते
नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा।।
अश्वत्थमेनं सुविरूढमूल-
मसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा।।१५-३।।

"या वृक्षाचे अशा प्रकारचे स्वरूप जाणून घेणे दुस्तर आहे. कारण याला आदि, मध्य व अंत नाहीत. या अश्वत्थरूपी वृक्षास असङ्गशस्त्राने दृढपणे छाटून टाकावे."

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।१५-४।।

"तदनंतर ते पद जाणून घ्यावे की जेथे गेल्यानंतर त्या मार्गावरून पुन: परत यावे लागत नाही. ते ***पद*** म्हणजेच आद्य पुरुषाचे स्थान, ज्यापासून या चिरंतन मायेचा उद्गम आहे."

आदिशंकराचार्य म्हणतात की: " स्वप्नातल्या वस्तूप्रमाणे, मृगजलाप्रमाणे किंवा मायारचित गंधर्वनगरीप्रमाणे हा संसारवृक्ष बघताबघताच नाश पावणारा आहे. याला आदि नाही, अंत नाही

आणि तो विद्यमानही नाही. म्हणून तो कोणालाही गवसत नाही. त्याला तो जसा आहे, तसा जाणून घेणे म्हणूनच फार दुष्प्राय आहे. याची वासनामय मूळे अतिशय दृढ झालेली आहेत. म्हणून त्या मुळांवर वैराग्यरूपी शस्त्राचा आघात करून ती छाटून टाकावीत."

"पुत्रेषणा, दारेषणा, वित्तेषणा, लोकेषणा इ.इषणांचा त्याग करणे म्हणजे ***असंगशस्त्र*** वा ***वैराग्य*** धारण करणे. विवेकाभ्यासरूपी अश्म्यावर या शस्त्रास उत्तम धार लावून परजावे आणि या संसाररूपी वृक्षाचे बीजासह उच्छेदन मूलासहित करावे. असे केले म्हणजे त्यानंतर त्या परमवैष्णवपदाचा सर्व प्रकारे, सर्व मार्गांनी शोध घ्यावा. ते पदच असे आहे की तेथे पोहोचणाऱ्या पुरुषास पुनश्च जन्म घ्यावा लागत नाही."

"असा तो पुरुष संसारातील पुनरागमनरूपी चक्रातून मुक्त होतो. या पदाचा शोध घ्यावयाचा म्हणजे त्या पदाने ज्याचा बोध होतो, त्या आदिपुरुषास सर्व भावेकरून शरण जावे. या पुरुषापासूनच इंद्रजाल पसरावे तशी ती पुरातन, सनातन, चिरंतन प्रकृति प्रसृत झाली आहे. ही प्रवृत्तीच या संसाररूप मायावृक्षाच्या रूपाने विस्तार पावली आहे."

वैदिक वाङ्मयातील अश्वत्थ::::

श्रीमदाद्यशंकराचार्यांनी सुस्पष्ट केलेले हे चार श्लोक आपण अवलोकित केले. आता या अश्वत्थ वृक्ष कल्पनेवर इतर श्रौतस्मार्त वाङ्मय काय प्रकाश टाकते, तेही थोडक्यात पाहू याः

कठोपनिषद

कठोपनिषद *(६/१)* म्हणतेः ***"ऊर्ध्वमूलोऽर्वाकशाख एषोश्वत्थः सनातनः। तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवामृतमुच्यते।। तस्मिँल्लोकाःश्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन एतद्वै तत्।।"***

"ज्याची मुळे वर आहेत आणि शाखा खालील बाजूस आहेत, तो सनातन अश्वत्थ वृक्ष हा आहे. तोच शुक्र, तोच ब्रह्म आणि तोच अमृत आहे, असे म्हणतात. याच्यातच सर्व लोकांचा आश्रय आहे. याचे कोणीही उल्लंघन करू शकत नाही. खात्रीने हा तोच आहे." हाच तो आदिपुरुष आहे.

मुण्डकोपनिषद

मुण्डक म्हणतेः ***"द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते। तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति।।३-१।। समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः। जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिती वीतशोकः।।३-२।।"*** ऋग्वेदातही *(१ /१६४/२०)* या ऋचा आहेत. त्यांचा अर्थ असा करतातः "उत्तम पंखांचे, बरोबर राहणारे दोन पक्षी एका वृक्षावर एकत्र आहेत. त्यांपैकी एक पक्षी त्या वृक्षाचे गोड फळ खातो आणि दुसरा काही न खाता विराजत आहे. या वृक्षावर राहणारा पुरुष या वृक्षाच्या फलात निमग्न होऊन मोहित होतो. तो आपल्या असमर्थतेबद्दल, आपल्या दौर्बल्याबाबत शोक करत असतो. दुसऱ्याचे म्हणजे खऱ्या ईशाचे जेव्हा हा दर्शन करतो आणि हा महिमा त्याचाच आहे, असे जाणतो, तेव्हा याचा शोक नाहीसा होतो."

महाभारतातील श्रीगोपालरूपी चिद्अव्यय अश्वत्थ

ब्रह्मारण्याचे महाभारताच्या आश्वमेधिक पर्वात केलेले वर्णन पाहाः ***"प्रज्ञावृक्षं मोक्षफलं शान्तिच्छायासमन्वितम्। ज्ञानाश्रयं तृप्तितोयमन्तःक्षेत्रज्ञभास्करम्।।१६।। येऽधिगच्छन्ति तत्सन्तस्तेषां नास्ति पुनर्भवः। ऊर्ध्वं चाधश्च तिर्यक्च तस्य नान्तोऽधिगम्यते।।१७।।अ.१८(अनुगीता)।।"***

"त्या विद्यारण्यात किंवा ब्रह्मरण्यात ***प्रज्ञा*** नामक वृक्ष आहेत. त्यांना मोक्षरूपी फले लागली आहेत. शांतिरूपी छाया तेथे आहे. ज्ञानाचा आश्रय करण्याजोगे स्थान आहे; तृप्ती देणारे जीवनजल तेथे आहे. आणि **क्षेत्रज्ञ आत्म्या**चा प्रकाश येथे पडला आहे. जे लोक या वनात जातात, त्यांचा पुनर्जन्म घडत नाही. या वनाचा वरखाली कोणत्याही बाजूला अंत असा दिसून येत नाही."

असा हा वृक्ष असङ्गशस्त्राने कापण्याजोगा नाही, तर हाच अत्यंत वाञ्छनीय असा परमात्मस्वरूपाचा श्रीगोपाल नांवाचा अश्वत्थ महावृक्ष आहे. याचाच प्रज्ञावान, धीमान, उदात्त महाभाग आश्रय घेतात.

अथर्ववेद

अशा या अव्यय, अविनाशी अश्वत्थाबद्दल अथर्ववेदाचा एक मंत्र पाहून आपली जिज्ञासा तृप्त करून घेऊ याः

"अश्वत्थो देवसदनस्तृतीयस्यामितो दिवि। तत्रामृतस्य चक्षणं देवाः कुष्ठमवन्वत।।५/४/३; १९/३९/६।।"

"अश्वत्थ वृक्ष हे देवांच्या राहण्याचे स्थान आहे. हा वृक्ष तिसऱ्या द्युलोकात असतो. त्या अमरत्व देणाऱ्या वृक्षाला देवांनी प्राप्त केले."

गीतेत असङ्गशस्त्राने अश्वत्थवृक्ष तोडण्याबद्दल म्हटले आहे. पण या अथर्ववेदीय अश्वत्थाच्या आश्रयाने देवता राहातात व त्याच्या शाखा तोडण्याची आवश्यकता भासत नाही. हा वृक्ष अमरत्व प्रदान करणारा आहे. पण गीतेत देवांचेही अमरत्व चिर नसल्याचे म्हटले आहे, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

अधिक जिज्ञासापूर्तीसाठी

याप्रमाणे आता जिज्ञासूंना अश्वत्थाची जी दोन वेगवेगळी स्वरूपे वेदवाङ्मयात वर्णिली आहेत, त्यांचा अल्प परिचय झाला आहेच. ज्यांना याहूनही अधिक जाणून घेण्याची उत्सुकता असेल, त्यांनी ***पं.श्री.श्री.दा.सातवळेकर महर्षी*** यांची भगवद्गीतेवरील ***पुरुषार्थबोधिनी टीका*** जरूर अभ्यासावी. असो.

जीवाचे स्वरूप

ज्ञानेश्वरांचे निरूपण::::

अजानवृक्षाचे सांगणे

श्रीकृष्ण परमात्मरूपी अमृतमधुरफळभाराने लगडलेल्या अश्वत्थाने गीतोक्तिद्वारे त्या दुसऱ्या अश्वत्थाचे जे वर्णन केले आहे, त्याबाबत ज्ञानदेवरूपी ***अजानवृक्ष*** काय म्हणतो, ते पाहणेच आता जास्त उचित ठरेल. तर तिकडे वळू या:

आनंदकंद मूळ

मग म्हणे धनंजया। तैं ऊर्ध्व गां तरु येयां।
एणें रुखेंचि कां जेयां। ऊर्ध्वता गमे।।१५-७२।।
एऱ्हवीं मध्य ऊर्ध्व अध। हे नाही जेथे भेद।
अद्वयासीं एकवद। जेयां ठायीं।।७३।।
जो नाइकजतां नादु। जो असौरभ्य मकरंदु।
जो आंगाथिला आनंदु। सुरतेंवीण।।७४।।
जेयां जैं आऱ्हापरौतें। जेयां जैं पुढें मागौतें।
दिसतेनविण दिसते। अदृश्य जैं।।७५।।

"भगवंत म्हणतात: "हे धनंजया! या वृक्षाचे मूल ऊर्ध्व आहे, असे म्हटले खरे. पण ते निव्वळ या संसारवृक्षसापेक्षच समज. कारण ते जे मूल आहे, त्याला अध, मध्य ही नाहीतच! तर ऊर्ध्वता तरी कोठून असणार! त्या मूलाठायी कोणतेच भेद नाहीत. ते एकमेव, अद्वय, अभेद असे आहे. ते मूल म्हणजे इंद्रियातीत-कर्णांना गोचर न होणारा सुनाद आहे; घ्राणास न जाणवणारा सुवास आहे; सुरतक्रिडेवाचून प्रकटलेला मूर्तिमंत आनंद आहे. त्या मूलास मागे-पुढे, अलीकडे-पलीकडे अशा भावनेने पाहता येण्यासारखे ते दृश्य थोडेच आहे! इंद्रियांस ते प्रतीत होत नाही; दृष्टीस दिसत नाही; तरीही ते अदृश्य असूनही दिसणारे आहे असे म्हणतात."

उपाधीचा दुसरा। घालितां वो पसरा।
नामरूपाचा संसारा। होय जेयांतैं।।१५-७६।।
ज्ञातृज्ञेयाविहीन। नुसधेंचि जैं ज्ञान।
सुखा भरलें गगन। गालींव जैं।।७७।।
जैं कार्य ना कारण। जेयां दुजें ना एकपण।
आपणेयां जैं जाण। आपणचि।।७८।।
ऐसें वस्तु जैं सांचें। तैं ऊर्ध्व गां येयां तरुचें।
तेथ आर घेणें जैं मूलाचें। तैं ऐसें असे।।७९।।

"उपाधी चिकटवूनच ते केवळ नामरूपात्मक अशा संसाराच्या रूपाने प्रतीत होते. पण वस्तुतः ते ***ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय*** या त्रिपुटीविरहित असणारे मुक्तछंद केवळ ज्ञानच आहे. ते असे हे मूल म्हणजे केवळ ***आनंदाचा कंद*** असे निरामय सुखाने परिपूर्ण असणारे शुद्ध गगनच आहे. कार्य आणि कारण, एकले आणि दुजे, याचा नाममात्रसुद्धा संबंध नसणारे असे ते आहे. स्वतःच स्वतः असणारे ***स्वसंवेद्य*** असे ते मूल म्हणजे साक्षात ती वस्तूच तर आहे! हे असे ***ब्रह्म*** तेच या वृक्षाचे ***ऊर्ध्वस्थ*** म्हणून म्हटलेले मूळ आहे."

"माया अंकुरून। अज्ञानाचा कोंब।"

असे ते मूळ असून त्याला कोंब कसे फुटतात; ते अंकुरते कसे; त्याचे रूप विस्तारल्यावर ते कसे दिसते; हे कथित करतांना ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं माया ऐसीं ख्याती। नसतीच तेयां आथी।
कां वांझेची संतती। वानणें तैं।।१५-८०।।
तैशी सत ना असत होएं। जैं विचाराचें नाम न साहे।
ऐसेयां परीची आहे। अनादी जैं।।८१।।
जैं भवद्रुमाची बीजिका। जैं प्रपंचाची भूमिका।
विपरितज्ञानदिपिका। सांचली जैं।।८२।।
जैं नाना शक्तीची मांदुस। जगद्भ्रमाचे आकाश।
जैं आकारजाताचें दुस। घडी केलें।।८३।।

ब्रह्म-माया निरूपण

"या ***ब्रह्म***नामक ऊर्ध्वस्थ मुळापासून जो कोंब फुटतो, तो ***माया*** या नावाने ख्यात आहे. पण वस्तुतः वांझेच्या संततीसमानच तिला अस्तित्व आहे. मुळात जी नाही, तिचे हे असे ***माया*** म्हणून विश्रुत नाम आहे. ही सतही नाही आणि असतही नाही. दृश्यमान होत असली तरी विचारापुढे - विवेकापुढे ती टिकत नाही. अशा प्रकारची ही माया त्या मुळापासून उद्भवते आणि तीसुद्धा अनादिसिद्धच आहे. या संसारवृक्षाची खरी तर ती बीजिकाच आहे. प्रपंचास तीच ठाव देते. विपरीत वा वृथा ज्ञानास म्हणजेच अज्ञानास उजळवणारी पेटती मशालच म्हणेनास का हिला! ही मायाच नाना शक्तींची पिटारी आहे. जगद्रूप भ्रम जिच्यावर भासमान होतो, ते गगन म्हणजे ही माया! किंवा ही तर साक्षात घडी करून ठेवलेला विश्वाकारच समजेनास!"

तैं माया वस्तूचां ठाईं। असे जैसेनि नाहीं।
मग वस्तुप्रभाचि पाहीं। प्रगट होय।।१५-८४।।
जेव्हां आपणेयां आली नीद। करी आपणपें जेवीं मुग्ध।
कां काजली आणी मंद। प्रभा दीपीं।।८५।।
स्वप्नीं प्रियापुढें तरुणांगीं। निदैली चेववूनि वेगीं।
आलिंगलेनिवीण आलिंगीं। सकामु करी।।८६।।
तैसीं स्वरूपीं जालीं माया। आणी स्वाश्रयीं नेणणें धनंजया।
तैंचि रुखा येयां। मूल पहिलें।।८७।।

"ही माया वस्तूच्या म्हणजे ब्रह्माठायी नसल्यासारखीच आहे. खरे तर ती म्हणजे त्या ब्रह्मवस्तुची प्रभाच आहे! किंवा ती वस्तुप्रभाच हिच्या रूपाने प्रकटते असेही म्हटले तरी चालेल. झोप ज्याप्रमाणे जागृतावस्थेचा लोप करविते; किंवा ज्योतीवर धरणारी काजळी ज्योतीपासूनच उत्पन्न झालेली असली तरीही, ज्योतीचा प्रकाश मंद करून जशी काळोख वाढविते; किंवा

स्वप्नांतरीची नवयौवना - अस्तित्वात नसूनही प्रियकराशेजारी झोपलेली दिसून येते आणि त्या अवस्थेत तिने त्याला आलिंगन दिले आहे असे भासले, तर खरे तर ते आलिंगन न देताच ती नसणारी तरुणी जशी प्रियकरास कामोर्मीने झाकोळून टाकते; त्याचप्रमाणे स्वरूपाशी मायेचा संबंध आहे. या परस्परसंबंधांचा परिणाम म्हणजे अज्ञानाचे स्वरूपी प्राकट्य पावणे. हे प्रकटणारे ***अज्ञान वा माया*** हेच या वृक्षाचे -अश्वत्थाचे - ***खरे मूळ !*** किंवा ब्रह्मरूपास मुख्य मूळ मानले तर हे मायाजनित अज्ञान म्हणजे त्या मुळास फुटलेला कोंब किंवा ***अंकुर*** म्हणेनास!"

माया आणि ब्रह्म यांचा परस्परसंबंध सूचित करण्यासाठी ज्ञानदेवांनी या ठिकाणी उत्कृष्ट दृष्टांत वापरले आहेत. ज्योत आणि तिच्यावर धरणारी, ज्योतीच्या अस्तित्वामुळेच अस्तित्व असणारी, ज्योतीच्या प्रकाशकता या गुणधर्माविरुद्ध काळोख हा गुणधर्म प्रकटवणारी अन् वर्धायमान अवस्थेत असतांना पूर्ण वाढ झाली तर त्या ज्योतीस्वरूपास पूर्ण झाकून टाकणारी - एवं च काय - तिला विझवूनसुद्धा टाकणारी काजळी, हे मायेचे उत्कृष्टोत्कृष्ट दर्शन घडविणारे रूपक आणि ज्योती हे परब्रह्माचे निदर्शक रूपक यांद्वारे ज्ञानदेवांची प्रतिभा विलास करतांना दिसते.

दुसरा दृष्टांत झोपेचा आहे. ***माया ही निद्रा तर जागृत जीव हे ब्रह्म.*** निद्रावस्थित जीव हा जागृतावस्थेतील जीवापेक्षा भिन्न वाटला तरी जीवात जसा कोणताच फरक पडत नाही; या दोन्ही अवस्थातील जिवाजिवामध्ये अभिन्नत्वच आहे; त्याप्रमाणे ***मायाच्छादित ब्रह्म*** हे मूळ स्वरूपाहून सुतरामही भिन्न नसते. फरक पडतो तो त्या जिवाच्या क्रीडनावस्थेचा. जागृत जीव वेगळ्या क्रीडा करतो, तर निद्रित जीव वेगळ्या क्रीडा करतो. आणि निद्रित जिवाच्या क्रीडा, स्वप्न इ.मिथ्या असतात; व्यवहाराशी त्यांचा संबंध नसतो - तो सर्व आभासच असतो; त्याप्रमाणे ***मायावेष्टित ब्रह्म*** जे विश्वाकाराने क्रीडतांना दिसते, ते त्या ब्रह्माची ***स्वप्नावस्था*** वा निद्रितावस्थाच होय.

ब्रह्म हे असे विकरलेले दिसले, तरी ते विकरलेले खरे तर नाहीच; असेही या दृष्टांतामुळे स्पष्ट होते. अन बहारीचा दृष्टांत म्हणजे स्वप्नातली प्रियतमा सुंदरी - रूपयौवना व तिच्या आलिंगनादी कामचेष्टा ही ***माया,*** तर तिच्या या स्वप्नींच्या भासामुळे कामजागृत झालेला निद्रिस्त प्रियकर हे ***ब्रह्म !*** या रूपकाद्वारे ब्रह्माचे चलनवलन हा जो जगद्रूप पसारा दिसतो, तो खरा नसून स्वप्नातल्या कामचेष्टांसारखा आहे, हे स्पष्ट होते. स्वप्नसुंदरी तर मिथ्याच असते. तशीच मायासुद्धा मिथ्याच आहे. तिने केलेल्या चेष्टासुद्धा ***असत*** आहेत. ***सत*** ते केवळ प्रियकरच आहे. म्हणजे ***ब्रह्मच सत आहे - माया असत आहे*** हा सिद्धांत रूपकाद्वारे स्पष्ट होतो. असो.

ज्ञानदेव व रसराज शृंगार

या ठिकाणी सहज नमूद करण्यासारखी गोष्ट आहे ती अशी की ज्ञानदेवांसारख्या आघवे आयुष्य स्त्रीसंगाविण सोवळे करणाऱ्या महाभागांनी वापरलेले स्त्री-कामचेष्टा -प्रियकर-आलिंगन इ.क्रीडा-सुरतविषयक दृष्टांत! ज्ञानदेवीत जनांच्या कामजीवनातील विविध पैलूंचा व भावनोर्मींचा ज्ञानदेव जो उपयोग चातुर्याने करून घेतांना कधीकधी दिसतात; त्याबद्दल साहित्यिक जाणकारांना तसा या दृष्टांतांबाबत कोणताच आक्षेप असण्याचे कारण नाही.

रतिरंग - शृंगारालाही जिंकणारा रसवर्ग प्रकट करण्याचे तर ज्ञानदेवांनी स्वतःच प्रतिज्ञोत्तर केलेले आहे. रसराज शृंगारालाही नम्र करील अशा शांतिरसाने ज्ञानदेवीचे अक्षरवाङ्मय ज्ञानदेव प्रकट करू इच्छितात, हे तर सुस्पष्टच आहे आणि ते तसे करत असता, उपमा -उपमान -उपमेय-दृष्टांत, व्यवहारदर्शन इ.साठी सढळ हस्ताने कोणी हा शृंगारराज वापरला असता,तर त्या साहित्यिकावर कोणीही तसा आक्षेप घेतला नसता.

परंतु काही मान्यवर समीक्षक मात्र ज्ञानेश्वरीची आलोचना करत असे म्हणतात की ज्ञानदेवांनी आपली साहित्यकृती जेमतेम किशोरवयाच्या - पौगंड - यौवनावस्थेच्या उंबरठ्यावर असतांना रचल्याचे म्हटले जाते. त्यातून जन्मतः झालेला अनिवार्य स्त्रीदेहस्पर्श सोडला तर पूर्ण जन्म ***स्त्रीदेहा शिवतणे नाही*** अशी प्रतिज्ञा अन तीही काया-वाचे-मनेकरून केलेले ते ज्ञानदेव होते. मग ते असले दृष्टांत कसे वापरतात! यात काही उणे आहे काय! अशा विद्वर्गासाठी थोडे स्पष्टीकरण योग्य ठरेल.

विद्वानोक्तीस दुर्लक्षावे

एक म्हणजे श्रीज्ञानदेवांची प्रतिमा. ती अत्यंत स्वच्छ आहे. दुसरे म्हणजे वयाच्या अवघ्या बाल्यावस्थेत महाज्ञान प्रकटविणाऱ्या त्यांच्यासारख्या लोकोत्तर विभूतींना तुम्हाआम्हासारख्या संसारी पामरांच्या मापाने तोलण्याची चूक आपण करू नये. तिसरे महत्त्वाचे कारण असे की साधुसंतांचे जीवन आपल्यासारख्या अतिसामान्य, विषयी, मतिमंद मूढांना शाश्वत जीवनदर्शक मूल्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी असते. ते करतांना आपल्यासारख्या मूढांना सहज समजेल तशी भाषासुद्धा वापरावी लागते.

तुमच्यामाझ्यासारख्या विषयलौलुप्याने जन्मामागून जन्म संसार करणाऱ्यांना स्त्रीविषयाचे केवढे आकर्षण आहे, हे त्यांच्या नजरेतून सुटत नाही. आणि म्हणूनच त्या विषयाचे स्वतः न अनुभवलेले प्रासंगिक दाखले देऊन ते आपला हा अनिर्वाच्य अध्यात्मविषय मांडतांना दिसतात, तो या तळमळीने की त्यांचे प्रतिपादन आपल्या काळजाला भिडावे; नीट लक्षात राहावे, ठसावे आणि आमचा उद्धार व्हावा. महाज्ञानी सर्वज्ञांना हा विषय स्वतः न अनुभवताच उमगत असतो, याविषयी मान्यवर विद्वानांचे दुमत नसावे. त्यातूनही

काही संशय असलाच तर तो मण्डनमिश्र व सरस्वती यांच्याशी झालेल्या वादप्रसंगानिमित्त श्रीमदाद्यशंकराचार्यांनी केलेल्या परकायाप्रवेशाचे स्मरण करून निरसन करून घ्यावा हे बरे! असो.

ज्ञानदेवांवर श्रद्धा असणाऱ्या आपणांसारख्या जिज्ञासू जीवांच्या अंत:करणाला या तथाकथित विद्वानोक्तींनी घरे पडू नयेत यासाठी हा प्रपंच! अशा त्या मान्यवर तथाकथित विद्वानांस दुर्लक्षूनच आपण पुढे जावे हेच योग्य!

त्रिगुण व चित्तचतुष्ट्याचा प्रभव

वस्तूसीं आपुला जो अबोधु। तो ऊर्ध्वीं आद्युलैजे कंदु।
वेदांतीही हाचि प्रसिद्धु। बीजभावो।।१५-८८।।
घन अज्ञान सुषुप्ति। तो बीजाङ्कुरभावो म्हणती।
एर स्वप्न हन जागृती। हा फलभावो तेयाचां।।८९।।
ऐसीं येयां वेदांती। निरूपणभाषाप्रतीती।
परि तैं असो प्रस्तुतीं। अज्ञान मूल।।९०।।
तैं ऊर्ध्व आत्मा निर्मलें। अधोर्ध्व सूचिती मूलें।
बलिया बांधौनि आलें। मायायोगाचें।।९१।।

"ब्रह्माठायी प्रकटणारे ***अज्ञान*** हा त्या वृक्षाचा पोसलेला कंद होय. यालाच वेदांतशास्त्रात ***बीजभाव*** या नावाने प्रसिद्धी आहे. यापासून फुटणारा अङ्कुर तो ***अज्ञानघन सुषुप्ती***चा असतो. सुषुप्तीस म्हणूनच ***बीजाङ्कुरभाव*** असे म्हणतात. जागृती आणि स्वप्न या अवस्थांना या अज्ञानाची फळे असे समजतात. अज्ञानरूपी मूळाचा कंद तयार होऊन त्यापासून फलस्वरूप अशा या स्वप्न आणि जागृति या अवस्था प्रकटतात. वेदांतातील निरूपणपद्धती ही अशी आहे. ऊर्ध्वस्थानी निर्मळ, निराकार, निरामय, निरंजन आत्मतत्त्व आहे. या अज्ञानाच्या कंदाच्या खाली व वर जी मूळे फुटतात, त्यांची जपणूक करावी म्हणून मायेचे बळकट आळे बांधलेले आहे. हे आळे त्या चैतन्याचा मायेशी दृढ संबंध प्रस्थापित करून या वृक्षाला साकार करण्यास कारणीभूत होते."

मग आधिलीं सदेहांतरें। उठती जियें अपारें।
तैं चौपासी घेऊनि आगारें। खोलावती।।१५-९२।।
ऐसें भवद्रुमाचें मूल। हे ऊर्ध्वीं करी बल।
मग आणियांचें बेंचल। आधीं दावीं।।९३।।
तेथ चिद्वृत्ति पहिलें। महत्तत्त्व उमललें।
तैं पान वाल्हें दुल्हें। एक निघे।।९४।।

"या प्रकारे जी मुख्यमुख्य मुळे आहेत, म्हणजे ***अज्ञान-सुषुप्ती -स्वप्न -जागृति*** - त्यांपासून खालच्या बाजूस अगणित अशी देहादिक स्वरूपांची अग्रे फुटतात; ती सर्वदूर, चोहींकडे, खोलवर जातात. अशी जी या वृक्षाची उत्पत्ती होते, त्यावेळी ऊर्ध्वभागी फुटलेली मुळे जसजसे बळ धरू लागतात, तसतसे या अग्रांचे जुंबाडेच्या जुंबाडे अधोभागी फोफावू लागतात. अशा वेळी ***चिद्वृत्ति*** किंवा ***माया*** या आळ्यातून उगवू पाहणाऱ्या या वृक्षाचा एक गोंडस अङ्कुर एकुलत्या एक **महत्तत्त्व**रूपी पानाच्या रूपाने उमलतो."

मग सत्त्वरजतमात्मकु। त्रिविधु अहंकारु जो एकु।
तो तिवणा अधोमुखु। डिरु फुटे।।१५-९५।।
तो बुद्धिची घेऊनि आगारी। भेदाची वृद्धी करी।
तेथ मनाचे डाल धरी। साजेपणें।।९६।।
ऐसा मूलाचिया गाढिका। विकल्परस कोंवलिका।
चित्तचतुष्ट्य डाहालिका। कौंभेजै तो।।९७।।

"नंतर त्या अङ्कुरापासून त्रिमुखी अशी सत्त्वरजतमात्मक **अहंकारा**ची अधोमुख डिरी फुटते. त्या अहंकाररुपी डिरीस***बुद्धि***नामक अग्र असते. त्या अग्रापासून ***भेद*** वृद्धिंगत होतो आणि भेद वाढून ***मन*** ही कोवळी लुसलुशीत डहाळी प्रकट होते. त्याचप्रमाणे मूळाच्या म्हणजे अज्ञानाच्या संवर्धनाबरोबर त्याच्याबरोबर पोहोचवला जाणारा कोवळा विकल्परस सिंचित होऊन ***मन, बुद्धी, चित्त व अहंकार*** या चित्तचतुष्ट्यरूपी डहाळ्यांच्या कोंभांनी तो वृक्ष मंडित होतो."

महत्तत्त्वादी आणि पंचीकरण

संसारवृक्षाचे रूपक सजवितांना ज्ञानदेवांचे मन असे रंगून जाते व पंचमहाभूतांची उत्पत्ती स्पष्ट करतांना ते म्हणतात:

मग आकाश वायु द्योतक। आप पृथ्वी हे पांच फोंक।
महाभूतांचे सारोख। सरलें होती।।१५-९८।।
तैसीचि क्षोत्रादि तन्मात्रें। तियें आंगवसां गर्भपत्रें।
लुललुलितें विचित्रें। उमलती गां।।९९।।
तेथ शब्दांकुर वरपडी। श्रोत्रा वाढवी देव्हडी।
होता करीत कांडीं। आकांक्षेची।।१००।।

"मग ***आकाश, वायु, तैजस, आप व पृथ्वी*** या पंचमहाभूतांचे चांगले सरळसोट असे पाचही फोक निघतात. या फोकांच्या आतील बाजूला, त्यांच्या आधाराने ***श्रोत्र, चक्षु, स्पर्श, घ्राण, रस*** ही पंचतन्मात्रे, लुसलुशीत तऱ्हेतऱ्हेची पाने असावीत तशी प्रकटतात. या पंचतन्मात्रांच्या उमललेल्या कोवळ्या पानांतून जे पल्लवांकुर फुटतात, ते ***इंद्रिये व त्यांचे रसविषय*** होत. आकाशरूपी फोक ***श्रोत्र*** या तन्मात्रेचे पान प्रकटवते. त्यापासून ***श्रोत्रेंद्रिय व वाक्*** हे ज्ञान व कर्मेंद्रियरूपी अंकुर उत्पन्न होतात. अशा या ***आकाश*** या फोकापासून श्रोत्र तन्मात्रारूपी पान व **श्रवणेंद्रिय व वागिंद्रिय**रूपी अंकुराने प्रफुल्लित झालेल्या कोंभाची दिवढीने वाढ होते आणि त्यांना शब्दरूपी विषयांकुर निघतो. प्रत्येक महाभूतापासून अशी विषयपंचकाची पेरी असणारी कांडे उत्पन्न होतात."

अंगत्वचेचें वेलपल्लव। स्पर्शांकुरीं घेती धांव।
तेथ बांबल पडे अभिनव। विकारांचें।।१५-१०१।।
पाठीं रूपपत्र पेलोवेलीं। चक्षु लांब तैं कांडें घाली।
तेथ व्यामोहता भलीं। पाहालीं जाय।।१०२।।

"**वायू**च्या फोकापासून ***त्वचा*** हे तन्मात्रपान फुटते. त्याला ***पाणि*** हे कर्मेंद्रियरूप तर ***त्वचा*** हे ज्ञानेंद्रियरुप अंकुर फुटतात. आणि ***स्पर्शरूप*** विषयांकुर फुटतो. शरीराचे त्वचारूप लतापल्लव स्पर्शरुप अंकुराद्वारे वाढू लागतात आणि विषयविकारांचा नवा मायाजाल असणारा त्या वेलीसदृश दोरांचा जंजाळ प्रकटतो. ***तेज*** या महाभूतरूपी फोकापासुन ***चक्षू*** हे तन्मात्रारूप कोवळे पान प्रकटते. ते ***पाद*** या कर्मेंद्रियरुप व ***चक्षू*** या ज्ञानेंद्रियरूप पल्लवांकुराने सुशोभित होते. त्यातच ***रूप*** या विषयाची जी पर्णे प्रकट होतात, त्यांचा बेफाट विस्तार होतो. नामरूपात्मक सृष्टीची ही आदिच आहे. ही रूपपर्णे या तेजाच्या कांडाला फारच दाटीवाटीने लगडतात आणि त्यांच्यातच ***बुद्धी***चे लांबलचक कांड फुटते. याच कांडाला व्यामोहरूप पल्लवांचे झुंबडच्या झुंबड लगडतात. ते फार मोहक अन आकर्षक व सदैव टवटवीत दिसतात."

आणि रसाचें आंगवसें। वाढतां वेगें बहुंवसें।
जिव्हें आर्तीची असोसें। निघती बेंचें।।१५-१०३।।
तैसींचि कोंभैलेनि गंधें। घ्राणाची डिरी धांवु बांधें।
तेथ तलु घे स्वानंन्दें। प्रलोभाचा।।१०४।।

"आणि ***आप*** या महाभूतात्मक फोकापासून ***रस*** ही तन्मात्रारूप पाने, त्यांपासून ***जिह्वा*** आणि ***शिश्न*** ही ज्ञान व कर्मेंद्रियरूप पल्लवे आणि ***रस*** हा विषयांकुर अशी उत्पन्न होतात. या ***रस***विषयाचा ***रस*** त्या फोकास झपाट्याने वाढीस लावतो. त्यापासून निर्माण होणाऱ्या शाखापल्लवादी अंगविस्तार दृष्टीत समावणार नाही इतका वाढतो आणि रसनेठायी या वृक्षाला जणू चिरंतनत्व प्रदान करणारी वासनारुपी पानातून पुष्कळ पानेच पाने फुटतात. त्याचप्रमाणे ***पृथ्वी*** या महाभूतात्मक फोकाला ***गंध*** ही तन्मात्रा व ***घ्राण*** व ***गुद*** ही ज्ञान व कर्मेंद्रिये असे पल्लवांकुर फुटतात. त्यांना अंकुरणाऱ्या ***गंध*** या विषयाच्या अंकुरामुळे घ्राणाची ही डिक्षी चांगलीच बळावते. आणि ***गंध*** या विषयाचा स्वानंदरूप प्रलोभनीय असा तळ शोधण्यास ही डिक्षी झेपावते."

एवं महदहंबुद्धी। मनें महाभूतसमृद्धी।
इया संसाराचियां अवधि। सासिनजे।।१५-१०५।।
किंबहुना इहीं आठैं। अंगीं हा अधिक फांटे।
परि शिंपीचि एवढे उमटे। रूपें जेवीं।।१०६।।
कां समुद्राचेनि पैसारें। वरी तरंगतां असारें।
तैसें ब्रह्मचि होय वृक्षाकारें। अज्ञानमूल।।१०७।।

"महत्तत्त्व, बुद्धि, अहंकार, मन व महाभूते यांनी समृद्ध करून फोफावलेल्या या संसारवृक्षाची ही व्याप्ती अशी आहे. ***महत्तत्त्व*** प्रकटून त्यानंतर ***मन, बुद्धि, अहंकार, पंचमहाभूते*** या ***अष्टधा*** अंगांनी वाढणारा हा संसारवृक्ष असा आहे. परंतु शिंपीच्या चमकीमुळे रुप्याचा आभास निर्माण झाला, तरी ते शिंपीच्याच आकाराने दिसते व शिंपीच असते, रुपे नसते; किंवा समुद्रावर उठणारे लाटांचे तरंग समुद्राहून वेगळे वाटले, तरी त्यांची व्याप्ती समुद्राएवढीच असते आणि ते समुद्राहून भिन्न नसतात; रौप्यदीप्ती हा जसा शिंपीचा गुणधर्म आहे; किंवा तरंगत्व हा समुद्राचा जसा भाव आहे; त्याप्रमाणे या संसारवृक्षाचे ***अज्ञान*** हेच जरी मूळ दिसत असले, तरी ते ब्रह्मच खरे तर या संसारतरूच्या रूपाने प्रकटते."

आतां याचा हाचि विस्तारु। हाचि ययां पैसारु।
जैसा आपणपें स्वप्नीं परिवारु। एकाकियां।।१५-१०८।।
परि तैं असो हे ऐसें। कावरे झाड उससें।
येयां महदादि आवरसें। अधोशाखा।।१०९।।

"जसा एखादा पुरुष एकाकी असूनही स्वप्नावस्थेत परिवारादिद्वारे मंडित होतो; त्याचप्रमाणे हे ब्रह्म एकले एक असूनही असे या महदादी परिवाराने विस्तारलेल्या संसारवृक्षाने बहुल होऊन विलसतांना दिसते. असो. हे वर्णन आता राहू दे. तर हा महत्तत्त्वादी अधोशाखा व अंकुर फुटलेला अशा प्रकारचा नवलाईचा वृक्ष सतत वर्धायमान होत आणि वासनांनी जोपासला जात असोसत जातो."

ज्ञानदेवमते विश्वोत्पत्तिक्रम

या वृक्षरूपकावरून आपणापुढे ज्ञानदेवप्रणीत विश्वाच्या संरचनेचा आराखडा पुनः एकदा उभा केला जातो. पूर्वी या विषयाचा उहापोह आपण केला होताच. यानिमित्त पुनः एकदा स्पष्ट होते की ***"ज्ञान -➤अज्ञान-➤महत्तत्त्व-➤अहंकार-➤बुद्धि -➤मन -➤चित्त-➤पंचमहाभूते-➤पंचतन्मात्रे-➤ पंचज्ञानेंद्रिये -➤ पंचकर्मेंद्रिये -➤त्यांचे पंच पंचविषय"*** असा या विश्वाचा उत्पत्तिक्रमच श्रीज्ञानराजांना अभिमत आहे.

अश्वत्थ म्हणजे पिंपळ नव्हे, तर क्षणभंगुर वृक्ष

अशा वृक्षरूपकाद्वारे हा विषय पुनः सुस्पष्ट केल्यावर या संसारवृक्षाचे क्षणभंगुरत्व हे लक्षण स्पष्ट व्हावे म्हणून आदिशंकराचार्यांप्रमाणेच असणारे त्यांचे मत मांडतांना ज्ञानदेवांच्या विमलवाग्वैजयंतीरूप मनोरम वेलीस फुटलेले नजाकती धुमारे असे दिसतातः

आणि अश्वत्थु ऐसें ययातें। म्हणती जैं जाणिते।
तेही परिस हो एथें। सांघिजैल।।१५-११०।।
तऱ्हीं श्व म्हणजे उखा। तोवरीं एकसारिखा।
नाही निर्वाहो ययां रूखा। प्रपंचरूपा।।१११।।

"अन् जाणते ज्ञानी लोक या वृक्षास ***अश्वत्थ*** असे का म्हणतात, ते सांगतो. ऐक. ***श्वः*** म्हणजे ***दुसरा दिवस. अ*** म्हणजे ***न*** आणि ***त्थ*** म्हणजे ***स्थित.***"

या दृष्टीने ***आदिशंकराचार्य*** असे म्हणतात की ***"न श्वः अपि स्थाता इति अश्वत्थः तं क्षणप्रध्वंसिनम् अश्वत्थं प्राहुः कथयन्ति अव्ययम्।"*** हा वृक्ष अव्यय म्हणण्याचे कारण शांकरमते असे आहेः

"संसारमायामयम् अनादिकालप्रवृत्तत्वात् सः अयं संसारवृक्षः अव्ययः अनाद्यन्तदेहादिसन्तानाश्रयो हि सुप्रसिद्धः तम् अव्ययम्।"

ज्ञानदेव म्हणतातः "दुसऱ्या दिवसापर्यंतही जसाच्या तसा न राहणारा हा प्रपंचरूप वृक्ष रात्रीच्या घोर काळोखात अज्ञानतमाच्या भूमीत जन्मतो आणि हा उषःकालापर्यंत म्हणजे ज्ञानाची पहाट फुटेस्तोवरसुद्धा टिकत नाही."

जैसा न लोटतां क्षणु। मेघु होय नाना वर्णु।
कां विजु नसे संपूर्णु। निमेषभरी।।१५-११२।।
ना कांपतिया पद्मदला। वरिलिया बैसका नाहीं जला।
कां चित्त जैसें व्याकुला। माणुसाचें।।११३।।
तैसींचि येयाचि स्थिती। नासत जाय क्षणक्षणाप्रति।
म्हणौनि येयातें म्हणती। अश्वत्थु हा।।११४।।
आणि अश्वत्थु एणें नांवें। पिंपलु म्हणती स्वभावें।
परि तो अभिप्रावु नोहे। श्रीहरीचा।।११५।।

"क्षणोक्षणी मेघमालेचे वर्णपटल जसे नाना रंग धारण करते, तिचे रंग जसे सतत बदलत राहतात; वीज जशी समग्र दर्शन निमिषभरसुद्धा देत नाही, इतकी चंचलता तिच्याठायी असते; किंवा हलत्या कमलदलावरील जलबिंदूला क्षणभरसुद्धा जसे स्थैर्य नसते; किंवा व्याकुल चित्ताला जसे क्षणएकसुद्धा स्थिर राहता येत नाही; तशीच या संसारवृक्षाची स्थिती आहे. हा वृक्ष प्रतिक्षणी विनाशाकडे ढकलला जात असतो. ***म्हणून शाश्वत स्थिती नसणाऱ्या या वृक्षाला अशाश्वत अथवा अश्वत्थ असे म्हणतात.*** *अश्वत्थ* असे पिंपळाच्या वृक्षालाही म्हटले जाते. परंतु ते या अर्थाने नव्हे. तसेच श्रीहरींनी या श्लोकी ***अश्वत्थ** या शब्दाने **पिप्पलवृक्ष सुचविलेला नाही.*** त्यांचा अभिप्राय येथे ***क्षणभंगुर - न टिकणारा*** असा हा वृक्ष असल्याचा आहे."

एऱ्हवीं पिंपलु घडतां विखीं। मियां गति देखिली असे नीकीं।
परि तैं असो लौकिकीं। हेतु काज।।१५-११६।।
म्हणोनि हा प्रस्तुतु। अलौकिकु परियेसा ग्रंथु।
तऱ्हीं क्षणत्वेंचि अश्वत्थु। बोलिजे हा।।११८।।

"एऱ्हवी श्रीहरींनी अश्वत्थ म्हणजे पिंपळ असे जरी उपमान वापरले असते, तरी तेसुद्धा मला पटले असते. कारण काही श्रुतींचा तसाही अभिप्राय आहे. आणि श्रीहरीसुद्धा सर्वदा श्रुतिवचनांस आदरूनच संभाषण करत असतात. परंतु हे असो. लौकिक भाषेतसुद्धा ***अश्वत्थ*** हे पिंपळाचेच नांव असले तरी त्याच्याशी आपल्याला काय करावयाचे आहे! आता प्रस्तुत तरी श्रीपतींनी हा वृक्ष क्षणभंगुर असल्यानेच त्यांचा असा अलौकिक अभिप्राय वर्तवला आहे."

अश्वत्थ, पण तरीही अव्यय

यानंतर या वृक्षाचे *अव्ययत्व* स्पष्ट करतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणिकही एक थोरु। येयां अव्ययत्वाचा डगरु।
आथी परि तो भीतरु। ऐसा असे।।१५-११८।।
जैसा मेघांचेनि तोंडें। सिंधु ऐकें आंगें काढे।
आणि नदी एरीकडे। भरितीचि असती।।११९।।

"आणि या संसारवृक्षाची आणिकही एक थोरवी आहे. लोक त्याला ***अव्यय*** म्हणजे ***अविनाशी*** समजतात. पण खरी परिस्थिती मात्र अशी नाही. वरवर ***अव्यय*** दिसणारा हा वृक्ष खरा कसा आहे पहा. समुद्र एकीकडून मेघांच्या रूपाने आटत असतो. पण दुसरीकडून सरितांद्वारे भरत असतो. म्हणून तो भरलेला दिसतो. कधीच ओहोटलेला किंवा मर्यादा सोडून भरती आलेला असा समुद्र आपल्याला दिसत नाही."

तेथ वोहटे ना चढे। ऐसा परिपूर्णुचि आवडे।
परि तैं फुली जंव नुघडे। मेघांनदींची।।१५-१२०।।
ऐसें यया रुखाचें होणे जाणें। न तर्के होतेनि वाहिलेपणें।
म्हणोनि लोकु यातें म्हणे। अव्ययु हा।।१२१।।

"जोपर्यंत मेघ आणि सरिता यांचा सागराशी झालेला हा संयोग बिघडत नाही, तोपावेतो समुद्र असा स्थैर्य राखून राहतो. परंतु तो समुद्र त्यातल्या येणाऱ्याजाणाऱ्या पाण्याच्या दृष्टीने पाहता या क्षणी जसा असतो, तसा दुसऱ्या क्षणीसुद्धा नसतो. वस्तुतः क्षणाक्षणाला बदलणाऱ्या पण वरवर तोच तो दिसणाऱ्या समुद्राप्रमाणेच या संसारवृक्षाचे अविनाशपणे असणे आहे. हा वृक्ष झपाट्याने क्षणी-प्रतिक्षणी बदलत जातो. क्षणात नाहीसा होऊन निमिषमात्रात अवतरतो. याच्या शीघ्र गतीच्या होण्याजाण्यामुळे लोकांना त्याच्या अस्तित्वात येण्याचा आणि नाश पावण्याचा निव्वळ तर्कच बांधावा लागतो. ***म्हणून हा वृक्ष अव्यय भासत असल्याने लोकांतरी त्याची अव्यय अशी ख्याती आहे.***"

एऱ्हवीं दानशीलु पुरुषु। वेंचकपणेंचि संचकु।
तैसा व्ययेंही हा रुखु। अव्ययो गमे।।१५-१२२।।
जातां वेगें बहुंवसें। न वचे कां भूमी रुतलें असे।
रथाचें चक्र दिसे। जियापरी।।१२३।।

"किंवा एखादा दानशूर पुरुष जसा त्याने केलेल्या दानाच्या रूपाने खर्च करुनही त्याद्वारे पुण्यरूपाने संचय करत असतो; ते दानच जसे पुण्यात परिवर्तित होत असते; तसेही या वृक्षाचे समजेनास का! हा वृक्ष नष्ट होत असतांनाच आपल्या पुनःसर्जनाची बीजे पेरीत जात असतो आणि म्हणून नाश पावत असला तरी पुनःसर्जित होतो. आणिकही एक भाग असा आहे की हा वृक्ष आपले रूप क्षणोक्षणी पालटत असला, तरी तसे करतांना तो दिसत नाही. रथचक्र रथाबरोबर वेगाने जात असते, पण

भूमीकडे पाहिले तर ते एकाच ठिकाणी रोवलेले दिसते; तसेच या वृक्षाचे आहे. तो इतक्या वेगाने पालटत असतो की जणू स्थिरच दिसतो."

तैसें कालातिक्रमें जैं वाले। तैं भूतशाखा जेथ गले।
तेथ कोडीवरी उमाले। उठती आणिक।।१५-१२४।।
परि एकीं केधवां गेली। शाखाकोडी केधवां जाली।
हे नेणवें जेवीं उमलली। आषाढअभ्रें।।१२५।।

"कारण कालानुक्रमाने ज्या ज्या भूतरूपी शाखा असतात, त्या जशा वाळल्यामुळे गळून पडतात; तशाच कोट्यवधी भूतशाखा त्याठायी सतत निर्माण होत असतात. ज्याप्रमाणे आषाढातल्या मेघमालेतून एखादा ढग केव्हा नाहीसा होतो आणि इतर ढग केव्हा तिच्यात येऊन दाखल होतात, ते वरवर पाहता कळून येत नाही; तसेच या वृक्षातल्या भूतादी शाखापल्लव अंकुरांचे होणेजाणे आहे."

महाकल्पाचां शेंवटीं। उदेलियां उमलती सृष्टी।
तैसेंचि आणिकीचें दांग उठी। सासिन्नलें।।१५-१२६।।
संहारवातें प्रचंडें। पडती प्रलयांतींची सालडें।
तंव कल्पादिचें जुंबाडे। पाल्हेजती।।१२७।।
रिगे मन्वंतर मनुपुढें। वंशावरी वंशांचें मांडें।
जैसीं इक्षुवृद्धि कांडेन कांडें। जिंकें जेवीं।।१२८।।

"या वृक्षात त्यांच्यावर नजर ठरणार नाही इतकी भूतावली आहे व ती सारखी होतजात असते. त्यामुळे सर्वदा हा वृक्ष सदा बहरलेला असाच दिसतो. महाकल्पाच्या शेवटी कितीतरी असंख्य सृष्टी व भूतमात्र गळून उन्मळून पडतात आणि नवीन महाकल्प अवतरण्याची नांदी म्हणून तशाच कित्येक सृष्टी, भूतसमुदाय हे उत्पन्न होतात. प्रलयांतीच्या संहारकारक झंझावाताने गतसृष्टीची जुनाट जीर्ण साल गळून पडते आणि नंतर नूतन कल्पाचा आरंभ करणाऱ्या सृष्टींचे समुदायच्या समुदाय निर्माण होतात. जसा कांड्यामागून कांडी वाढत जाऊन ऊस वाढत जातो किंवा पेरामागून पेरे उत्पन्न होत जाऊन कळक वाढतो, त्याप्रमाणे एका मनुपाठोपाठ दुसरा मनू आपल्या कल्पासह येऊन सृष्टीला सातत्य प्रदान करतो."

कलियुगांतीं कोरडी। चहूं युगांची सालें सांडीं।
तंव कृतयुगाची पेली देव्हडी। पडे पुढुती।।१५-१२९।।
वर्तते वर्ष जाये। तैं पुढीला मूलहारी होये।
जैसा दिवसु जात कीं येत आहे। हे चोजवेना।।१३०।।

"चारी युगांचे अंतिम कलीयुग संपतांना हा वृक्ष आपली जीर्ण कोरडी साल टाकून देतो आणि नव्या चतुर्युगधारणेस आरंभ करणाऱ्या कृतयुगाबरोबर नवजीवनाने रसरसलेली अंगकांती घेऊन उभा ठाकतो. दिवसामागून दिवस येतो आणि जातो. जाणारा दिवस जाण्यासाठी गेला की नव्या दिवसाच्या रूपाने पुनः येण्यासाठी गेला हे कळेनासे होते; त्याप्रमाणे वर्षांमागून वर्षे लोटतात; युगामागून युगे आणि कल्पांपश्चात कल्पांच्या आवृत्त्या होतात. जाणारे वर्ष नवीन येणाऱ्या वर्षाला जणू आमंत्रण करणारे मूळच!"

जैशा वारियाचां झुलुकां। सांदा ठाऊवा नोहे देखा।
तैसिया उठती पडती शाखा। नेणों किती।।१५-१३१।।
एकी देहाची डिरी तुटे। तंव देहांकुरीं बहुवी फुटे।
ऐसेनि भवतरु हा वाटे। अव्ययो ऐसा।।१३२।।

"वाऱ्याच्या दोन झुळुकांमध्ये सांधणी कोठे आहे, ते समजत नाही. एक झुळूक कोठे संपते अन दुसरी कोठे सुरू होते हा दुवा जसा सापडत नाही; त्याचप्रमाणे देहरूपी काही शाखा केव्हाच्या केव्हाच गळून पडून त्यांच्या जागी अनेकानेक देहरूपी शाखा केव्हा निर्माण झाल्या हे लक्षातसुद्धा येत नाही. अशी अनेकानेक स्थित्यंतरे होत असूनही ती नकळत होत असल्याने आणि त्यांचा वेग पराकोटीचा असल्याने हा वृक्ष ***अव्यय*** असा भासतो."

अव्यय, तरीही क्षणिक, असा हा अश्वत्थ

जैसें वाहतें पाणी जाय वेगें। तैसेंचि आणिक मिले मागें।
तेवीं असंतचि असिजे जगें। मानिजे संत।।१५-१३३।।
कां लागौनि डोळां नुघडे। तंव कोडीवरी घडी मोडे।
तैं नेणतया तरंगु आवडे। नित्यु ऐसा।।१३४।।

"शाखा गळून पडतात आणि त्यांच्या जागी नवनवीन शाखा निमिषार्धात उत्पन्न होतात; त्या कशा अन केव्हा हेही कळत वा दिसत नाही. प्रवाहातील पाणी वाहून पुढे निघून जाते, ते काही एका जागी स्थिर राहात नाही. त्या जागी दुसरेच पाणी येते; पण हा भेद वरवर पाहणाऱ्याच्या ध्यानातही येत नाही. त्याला पाणी स्थिरच आहे, असे भासते. हे जगतसुद्धा अस्थिर असूनही तसेच संथ वाटते; सतत बदलत असूनही स्थिर वाटते. डोळा मिटून उघडावा न उघडावा, तोवर या जगाची कोट्यवधी वेळा लय आणि सर्जने होतात. पाण्यावरला तरंग कितीएक वेळा घडतो आणि मोडतो; तरी तो पाहणाऱ्यास संथच दिसतो. तसेच हे सतत अस्तित्व व नास्तित्व यांच्याशी पाठशिवण खेळणारे विश्व असले, तरी ते सदोदित नित्यच भासते."

वायसा एकें बुबुळें दोहींकडें। डोळां चालवतां अपाडें।
दोन्हीं आथी ऐसा पडे। भ्रमु जेवीं जगां।।१५-१३५।।
पैं भिंगोरी निधिये पडली। तैं गमे भूमीसीं जैसीं जडली।
ऐसा वेगातिशयो भूली। हेतु होय।।१३६।।

"कावळ्याला एकच बुबुळ असते; पण तो वेगाने ते दोन्ही डोळ्यातून इतक्या सहजतेने फिरवितो की त्याच्या दोन्ही डोळ्यात सतत एक एक बुबुळ असल्याचा भास होतो. भिंगरी वेगाने जमिनीवर भिरभिरते तेव्हा ती भूमीस जखडली आहे असे वाटते. त्याचे कारण म्हणजे तिचा अतिशय वेग; त्या वेगामुळे ती स्थिर उभी आहे असा भुलावा निर्माण होतो."

हे बहु असो झडती। आंधारें भोवंडती कोलती।
तैं दिसे जैसी आयती। चक्राकार।।१५-१३७।।
हा संसारवृक्षु तैसा। मोडतु मांडतु सहसा।
न देखौनि लोकु पिसा। अव्ययो मानी।।१३८।।

"एवढेंच काय! कोलती भर्रकन गरगर फिरवत ठेवली तर चक्राकार कोलीत पेटलेले दिसते. त्याचे कारणसुद्धा एकच! ते म्हणजे त्या कोलतीची वेगवान भोवंड! अर्जुना हा संसारवृक्षसुद्धा अशाच वेगातिशयाने नष्ट होऊन पुनश्च तशाच वेगाने उत्पन्न होत असतो व म्हणूनच वेडे संसारी लोक याला ***अव्यय - अविनाशी*** असे मानतात."

ज्ञानदृष्टीने अश्वत्थाचे स्वरूप

परि येयाचा वेगु देखे। जो हा क्षणिक ऐसा ओलखे।
जाणें कोडी वेलें निमिखें। होत जात।।१५-१३९।।
नाही अज्ञानावांचूनि मूल। ययाचें असिलेंपण टवाल।
ऐसें झाड सिनसाल। देखिलें जेणें।।१४०।।
तेयांतें गां पांडुसुता। मी सर्वज्ञुही म्हणे जाणता।
पैं वाग्ब्रह्मसिद्धांता। वंद्यु तोचि।।१४१।।

"परंतु समृद्ध अशा वेगाने हा वृक्ष उत्पन्न आणि नष्ट होत असतो, हा क्षणिक आहे, हे उमजणाऱ्याला ठाऊकच असते की हा वृक्ष तर निमिषात कोट्यवधी वेळा होतजात असतो. **या वृक्षाचे मूळ एकमेव *अज्ञान* च आहे; याचे अस्तित्व *मिथ्या* आहे;** हा वृक्ष जीर्णशीर्ण सालीचा, पुराणा असा आहे. हा अव्यय नाही; हा तर प्रकृतीबरोबर निर्माण होऊन वारंवार नाश पावणारा आहे. असा हा विचित्र वृक्ष आहे, हे ज्याने जाणून घेतले आहे, त्याला मी सर्वज्ञ श्रीकृष्णसुद्धा ***"तो ज्ञानी आहे"*** असेच म्हणतो. वेदप्रतिपाद्य सिद्धांताद्वारेसुद्धा तो मनुष्य वंदिला जाण्यायोग्य आहे."

योगजाताचें जोडलें। तेयां एकासिची उपेगा गेलें।
किंबहुना जियालें। ज्ञानही तेणें।।१५-१४२।।
असो बहु हे बोलणें। वानिजेल तो कवणें।
जो भवरुखु जाणें। उखि ऐसा।।१४३।।

"योगविभूतींचे सर्वस्व त्या एकट्यालाच प्राप्त झालेले आहे व योगकला त्यालाच फावली असे म्हणेनास का! अर्जुना! त्या महाभागानेच ज्ञान जिवंत ठेवले आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. असो. हे बोलणे राहू दे! ज्याने हा भववृक्ष मिथ्याभास अन वायफळ आहे हे ओळखले आहे, त्याची पर्याप्त प्रशंसा कोणी तरी करू शकेल का!"

ज्ञानदेव भाष्यकर्ते आचार्य नव्हेत, तर संत आहेत

ज्ञानदेवकृत या वृक्षाचे यापुढील वर्णन पाहण्यापूर्वी एकदोन गोष्टी येथे ध्यानात घेतल्या पाहिजेत. हा वृक्ष ***अश्वत्थ*** म्हणून प्रसिद्ध असून तो***अव्यय*** समजला जातो, या एकाच गोष्टीचे स्पष्टीकरण करण्यासाठी ज्ञानदेवांनी या प्रसंगी जवळ जवळ *३४* ओव्या रचल्या आहेत. तसेच हे वृक्षरूपक, जे गीतेच्या *श्लोक क्र. १५-१ ते १५-३* यातून उभारले आहे, त्याच्या बृहतीकरणासाठी जवळ जवळ *२२५ ते २३० ओव्या* नियोजतांना ज्ञानदेव आपणास दिसतात. यावरून पूर्वी वेळोवेळी आपणांस स्पष्ट केल्याप्रमाणे ज्ञानदेवांस या विषयाचा वाटणारा जिव्हाळा कळून येतो.

या ठिकाणी ज्ञानदेव असेही सुचवितात की ***अश्वत्थ*** म्हणजे ***पिंपळ*** असे जर श्रीकृष्णाचे म्हणणे असते, तर तेही सार्थच असते आणि यासाठी त्यांच्याजवळ सुयोग्य उपपत्तिसुद्धा आहेत. त्या उपपत्त्यासुद्धा आपण उपरोक्त गीताश्लोकांचा परामर्ष घेतांना पाहिल्या आहेत. वेदवाङ्मयाच्या आधारे त्यांचे दर्शन आपणास या उन्मेषाच्या *पृ. क्र. ३१२ व ३१३* वर घडलेले आहे.

मुख्य मुद्दा म्हणजे ही ज्ञानदेवोक्ती असे सूचित करते की वेदवाङ्मयाचा त्यांचा अभ्यास फार गाढा आहे आणि वस्तुतः ***आचार्य*** ही पदवी प्राप्त करण्यासाठी लागणारी पर्याप्त अशी सर्व अर्हता उपलब्ध असतांनाही ज्ञानदेवांनी तो सन्मान प्राप्त व्हावा म्हणून कोणतीही धडपड केलेली नाही. कोणाचीही मते ***वितण्डा*** घालून खण्डित केलेली नाहीत किंवा ***वाद-जल्पादी*** युक्त्या प्रयोजून स्वतःस पंडितवर असेही म्हणवून घेतलेले नाही. असे आहे म्हणूनच आपणही त्यांना ***आचार्य*** न म्हणता ***संत*** म्हणतो; त्यांच्या चरणी नतमस्तक होतो आणि त्यांनीच प्रकाशित केलेल्या ज्ञानपथावरून पुढची वाटचाल करतो. असो.

अश्वत्थ व ८४ लक्ष योनी

भववृक्षाचे समग्र दर्शन घडवण्यानिमित्त ज्ञानदेव पुढे म्हणतातः

मग ययाचि प्रपंचरूपा। अधोशाखिया पादपा।
डाहालिया जाती उमपा। ऊर्ध्वाही उजू।।१५-१४४।।
आणि अधीं फांकलीं डालें। तियें होती मूलें।
तेयांहीं तलीं पघले। वेलु पालवु।।१४५।।
ऐसें जैं आम्हीं। म्हणितलें उपक्रमीं।
तेंहीं परिसें सुगमीं। बोलीं सांगों।।१४६।।

"अशा या प्रपंचरूपी वृक्षाच्या अगणित शाखा अधोभागाकडे जातात आणि तशाच असंख्य भरदार शाखा ऊर्ध्वभागीही फैलावतात; अधोमुखी शाखांनासुद्धा मुळ्या फुटतात; या वृक्षाच्या तळाकडच्या भागात लतावल्लरींनी आच्छादलेल्या खांद्या, मुळे आणि पाने यांची दाटीवाटी होते; असे जे मी या वृक्षरूपकाचा उपक्रम करतांना तुला सांगितले होते, ते आता सुगमरीत्या स्पष्ट करतो."

तऱ्हीं बद्धमूलें अज्ञानें। महदादिकीं शासनें।
वेदांची थोखनें। घेऊनियां।।१५-१४७।।
परि आधीं तंव स्वेदज। जारज उद्भिज मणिज।
हे बुडौनि महाभुज। उठती चारीं।।१४८।।

येयां एकेकाचेनि आणगटें। चौऱ्यांशीं लक्षधा फुटे।
तैं वेलीं जीवशाखीं फांटे। सैंघ होती।।१४९।।

"अज्ञानाच्या बळकट मूळापासून उगवलेल्या व महदादिक तत्त्वांच्या जाडजूड बुंध्याने भरदार फोफावलेल्या या संसारवृक्षाला, अरण्येच्या अरण्ये शोभावीत अशी दिसणारी, वेदत्रयीची मोठाली पानेच्या पाने फुटतात. या वृक्षाकडे समग्र दृष्टीने पाहिले तर तो वेदारण्यमय पानांच्या अतिविस्तृत पसाऱ्यामुळे अतिशय डेरेदार दिसतो. बुंध्यापासून याला ***स्वेदज, जारज, उद्भिज व मणिज*** अशा चार मोठाड खांद्या फुटतात. या प्रत्येक मोठ्या शाखांना उपशाखा अंकुरतात. त्याच ***चौऱ्यांशी लक्ष योनी*** होत. या चौऱ्यांशी लक्ष उपशाखांना जीवरूपी अगणित, अमाप, बहुल अशा कितीतरी छोट्याछोट्या फांद्या फुटतात."

प्रसवति शाखा सरलियां। नाना सृष्टी डाहालियां।
आड फांटती मालिया। जातिचियां।।१५-१५०।।
स्त्री पुरुष नपुंसकें। हे व्यक्तिभेदांचें डहाके।
आंदोलती आंगिकें। विकारभारें।।१५१।।
जैसा वर्षाकालु गगनीं। पाल्हेजें नवघनीं।
तैसें आकारजात अज्ञानीं। वेलीं जाय।।१५२।।

"मुख्य मुख्य सृष्टिरूप अशा डहाळ्या सरळसोट निघतात व विविध योनींच्या निदर्शक अशा डहाळ्या आडव्या फाकतात. त्यांच्यावर स्त्री, पुरुष आणि नपुंसक असे व्यक्तिगत भेदांचे घोस लागतात आणि उपजतच असणाऱ्या विकारांच्या भाराने त्या फांद्यांवर ते आदळतात. वर्षाऋतू जसा नूतन मेघमालांच्या रूपाने आकाशात विस्तारला जातो, त्याप्रमाणेच मूळ अज्ञानच वेगवेगळ्या आकारजातांच्या रूपाने या वृक्षावर वेलीप्रमाणे पसरलेले दिसते."

गुणक्षोभित वृक्ष

मग शाखांचेनि आंगभारें। लवोनि गुंफती परस्परें।
गुणक्षोभाचें वारे। उदयजति।।१५-१५३।।
तेथ तेणें अचाटें। गुणाचेनि झडझडाटें।
तिहीं ठायीं हा फांटे। ऊर्ध्वमूल।।१५४।।

"अंगच्या भाराने लवून हिंदकळणाऱ्या या वृक्षाच्या शाखा परस्परात गुंततात. त्यातच **गुणां**च्या क्षोभरूप असे वारे वाहू लागतात. त्या अचाट झंझावाताने हेलावलेला हा ऊर्ध्वमूल वृक्ष ***त्रिधा*** होतो."

भूलोकींची मनुष्ययोनी: रजोगुण

ऐसा रजाचिया झुलुका। झाडाडितां आगलिकां।
मनुष्यजाती शाखा। थोरावती।।१५-१५५।।
तियां ऊर्ध्वी ना अधीं। माझारींचि कोंदाकोंदी।
आड फांटती खांदी। चतुर्वर्णाचियां।।१५६।।
तेथ विधिनिषेधीं सपल्लव। वेदवाक्यांचें अभिनव।
पालव डोलती बरव। आणिती तेयां।।१५७।।

अर्थु कामु पसरे। अग्रवनें घेती थारे।
तेथ क्षणिक पदांतरें। इहभोगांची।।१५८।।

"रजोगुण क्षोभवणारे वारे झडझडून जोरात वाहायला लागले की मनुष्यजातिरूप शाखा मोठमोठ्याने हेलावायला लागतात. या शाखा त्या वृक्षाच्या ऊर्ध्वभाग व अधोभाग या स्थानी नसतात, तर त्या वृक्षाच्या मध्यभागीच दाटीवाटीने असतात. त्यांच्याआतून चातुर्वर्ण्याच्या फांद्या फुटतात. वेदवाक्यरूपी नूतन पालवी आपल्या विधिनिषेधयुक्त भाषेच्या कोमल पल्लवांसह त्या फांद्यांना सुशोभित करते. त्या पालवीच्या अर्थ आणि कामरूपी विस्तारामध्ये ऐहिक उपभोगांच्या डिऱ्या क्षणिक सुखरूप अशा विविध स्थानी विराजतात."

तेथ प्रवृत्तिचेनि वृद्धिलोभें। खांकरेजति शुभाशुभें।
नाना कर्मांचें खांबें। नेणों किती।।१५-१५९।।
तेवींचि भोगक्षयें मागिलें। पडती देहाचें बुडसलें।
तंव पुढां वाढी पेलें। नवेयां देहांची।।१६०।।
आणि शब्दादिक सुहावे। सहज रंगें हवावें।
विषयपल्लव नवे। नीचची होती।।१६१।।
ऐसें रजोवातें प्रचंडें। मनुष्यशाखांचें मांदोडे।
वाढती तो एथ रूढे। मनुष्यलोकु।।१६२।।

"आणि प्रवृत्तीच्या अभिवृद्धीमुळे शुभाशुभ आसक्तियुक्त नानाविध कर्मांच्या किती जाडजूड पारंब्या त्या शाखांना फुटतात, त्यांची तर गणतीच नाही. क्षणोक्षणी उपभोगलेल्या वासनांची जुनी खोडे असलेले देह गळून पडून नित्य नूतन उपभोगक्षम अशा नव्या नव्या देहांचे अंकुर जोम धरू लागतात. आणि त्या अंकुरांना निसर्गत:च विलोभनीय रंगतदार असे शब्दादी विषयरूप शोभिवंत पालव उत्पन्न होतात. अशा प्रकारे या वृक्षाच्या मनुष्यरूपी शाखांचा विस्तीर्ण वाढलेला समुदाय, त्यांना हेलावून सोडणाऱ्या रजोगुणरूपी झंझावातासह, येथे मनुष्यलोक म्हणून प्रसिद्ध आहे."

तमोयोनी

तैसाचि तो रजाचा वारा। नावेक धरी वोसरा।
मग वाजो लागे घोरा। तमाचा तो।।१५-१६३।।
तेधवां याचि मनुष्यशाखा। नीच वासना अधीं देखा।
पाल्हेजती डालुका। कुकर्माचियां।।१६४।।
अप्रवृत्तीचें खणुवालें। फोक निघती सरलें।
घेत पान पालव डालें। प्रमादाची।।१६५।।
बोलती निषेधनियमें। जिया ऋचा यजु:सामें।
तो पाला तेयां घुमें। टकेयावरी।।१६६।।

"आणि हा रजोगुणाचा प्रचंड वारा ओसरू लागतो न लागतो, तोच तमोगुणाचा भयानक वारा वाहू लागतो. त्यावेळी याच मनुष्यरूपी फांद्यांच्या खालच्या अंगास नीच वासनारूपी शाखा उत्पन्न होतात अन वाईट कर्मांच्या रूपाने त्या पालवतात. तसेच अपप्रवृत्तीचे

मजबूत सरळसोट फोक फुटतात आणि त्यांच्यावर प्रमादरूपी पाने, पालवी व डहाळ्या निर्माण होतात. अन त्या पानोऱ्यावर अग्रभागी दिमाखाने जी पालवी विराजते ती - जो धुमारा फुटतो, तो म्हणजे यजुर्वेद-सामवेदादी ऋचांनी ज्यांचा निषेध केला आहे, अशी कर्मे! त्या डहाळ्यांवर मग पसरते ती म्हणजे वासनारूप वेल!"

प्रतिपादिती अभिचार। आगम जैं परमार।
तेहीं घेती प्रसर। वासना वेली।।१५-१६७।।
तंव तंव होती थोराडें। अकर्माची तलबुडें।
आणि जन्मशाखा पुढें पुढें। घेती धांव।।१६८।।
तेथ चांडालादि निकृष्टा। दोषजातीचा थोर फांटा।
जाल पडें कर्मभ्रष्टा। भुलौनियां।।१६९।।

"त्या वेलीची पाने म्हणजे जारण-मारणादी अभिचार परोत्सादनार्थ व इतरांच्या नाशासाठी प्रतिपादणारी शास्त्रे! असा हा तमोगुणी वाऱ्याने वाजणारा संसारवृक्षसंभार जसजसा समृद्ध होऊन वृद्धी पावतो, तसतशी अकर्मरूपी मुळे बळकट होत जातात अन जन्मामागून जन्म जे येतात, त्यांच्यास्वरूप ज्या शाखा असतात, त्या अधोभागाकडे जोरात फोफावू लागतात आणि त्या भुललेल्या कर्मभ्रष्टांस त्यातल्या चांडाळादी निकृष्ट व निव्वळ दोषस्वरूप -***पापयोनीरूप*** अशा जातिस्वरुप असणाऱ्या आडमार्गी फांद्यांच्या अन झाडोऱ्याच्या जंजाळात अडकून पडावे लागते."

पशु पक्षी सूकर। व्याघ्र वृश्चिक विखार।
हे आडशाखा निकर थोरावती।।१५-१७०।।
परि ऐशा शाखा पांडवा। सर्वांगीही नित्य नवा।
निरयभोग यावा। फलाचा तो।।१७१।।
आणि हिंसाविषयफुडारी। कुकर्मसंगें घुरघुरी।
जन्मवरी आगारी। वाढतीचि असे।।१७२।।
ऐसें होती तरुतृण। लोह लोष्ट पाषाण।
इया खांदियां तेवीं जाण। फलेंहि हेंचि।।१५-१७३।।
अर्जुना गां अवधारीं। मनुष्यालागौनि इया परी।
वृद्धि स्थावरांतवरी। अधोशाखांची।।१७४।।
म्हणोनि जी मनुष्यडालें। येंचि जाणावी अधींची मूळें।
जैं एथूनि मग पघले। संसारतरु।।१७५।।

"तेथेच पशू, पक्षी, सूकर, व्याघ्र, वृश्चिक, सर्प अशा योनिरूपी आडवळणाच्या फांद्यांचा समुदाय वृद्धिंगत होतो. अशा या आडमार्गी अधोगती शाखांच्या सर्वांगावर नित्य नवीन व दारुण अशी नरकभोगरूपी फळे लगडतात. हिंसा व मैथुन उपभोगादी कुकर्मे ही त्या शाखांची अग्रे जन्मामागून जन्म जातात, तसतशी पुढेपुढे वाढतच जातात. ज्या मनुष्यरूपी शाखांचा तमोगुणाच्या विंजाणाने असा अधोमुख विस्तार होतो, त्यांचा अंत अखेर वृक्ष, तृण, लोह, अश्म, माती अशा स्थावरादी निकृष्ट योनिस्वरूपी फांद्या होण्यात अन फळे लागण्यात होतो. अर्जुना! मनुष्यापासून तो तहत इतर स्थावरजंगम सृष्टिरूप अशी या अधोशाखांची वृद्धी होते. म्हणून ***जी मनुष्यरूपी शाखा इ. आहेत, तीच या संसारतरूची खालच्या बाजूची मुळे समजली पाहिजेत.*** कारण त्यांच्यापासूनच हा संसारवृक्ष फोफावतो."

एऱ्हवीं ऊर्ध्वींचें पार्था। मुद्दल मूल पाहतां।
अधींचियां मध्यस्था। शाखा इया।।१५-१७६।।
परि तामसी सात्त्विकीं। सुकृतदुष्कृतात्मकीं।
विरूढती या शाखीं। अधोर्ध्वींचा।।१७७।।
आणि वेदत्रयीचियां पाना। नये अन्यत्र लागो अर्जुना।
जैं मनुष्यावांचौनि विधाना। विषो नाही।।१७८।।

"हे पार्था! अन खरे तर ऊर्ध्वभागी जे मूळ आहे, असे या संसारवृक्षासंबंधी पूर्वी जे मी म्हटले होते; त्याचेसुद्धा मुद्दलातले मूळ म्हणजे या मध्यभागी अन खाली विस्तारलेल्या शाखाच होत. पापपुण्यात्मक कर्मांच्या द्वारे तामसी अन सत्त्वगुणी रसांनी पोषलेल्या ज्या या अध व ऊर्ध्वभागातल्या मनुष्यरूपी शाखा आहेत, त्यांनाच फक्त वेदत्रयींची पाने फुटतात. इतर शाखांना ही पाने नसतात. कारण ***ऋग्वेद, यजुर्वेद अन सामवेद या वेदत्रयीच्या आज्ञेस पात्र असणारे केवळ मनुष्यगणच होत.*** इतर योनींसाठी वेदाज्ञेचे प्रयोजन नाही."

म्हणौनि तनु मानुषा। इया ऊर्ध्वमूलौनि जऱ्हीं शाखा।
तऱ्हीं कर्मवृद्धिसी देखा। इयांचि मूळें।।१५-१७९।।
आणि आनी तऱ्हीं झाडीं। शाखा वाढतां मूळें गाढीं।
मूल गाढें तंव वाढी। पैस आथी।।१८०।।

"म्हणून अज्ञानरूपी अशा ऊर्ध्वस्थ मुख्य मुळापासून हा संसारवृक्ष शाखोपशाखांच्या रूपाने विस्तारत असला, तरीही या मनुष्य तनुरूप त्याच्या ज्या शाखा आहेत, त्याच कर्मवृद्धीची म्हणजे या संसारतरुवराच्या आत्यंतिक विस्ताराला कारणीभूत असणारी मुळे समजावी लागतात. तसेही पाहिले तर इतर वृक्षांबाबत असेच असते ना की शाखोपशाखांचा पसारा वाढत जातो, तसतसे त्यांचे मूळ फोफावत जाते; आणि फोफावणाऱ्या मुळाच्या जोमदार वाढीबरोबरच त्या वृक्षाच्या फांद्या पाने इ.पसारा फैलावत जातो. याप्रमाणे मुळे सखोल बळकट होतात अन वृक्षसुद्धा बेफाम वाढत जातो."

तैसेंचि इयां शरीरा। कर्मे तंव देहां संसारा।
आणि देह तंव व्यापारा। ना म्हणोचि नये।।१५-१८१।।
म्हणोनि देहें मानुषें। इयें मूळें होती न चुके।
ऐसें जगज्जनकें। बोलिलें तेणें।।१८२।।

"संसारवृक्षाला शाखारूप असणाऱ्या मनुष्यदेहाचे असेच आहे. तो आहे म्हणून कर्मे आहेत अन कर्मे आहेत, तोवर देहाला व्यापार आहे. म्हणून मनुष्यदेहरूपी शाखांना संसारवृक्षाचे अज्ञानरूप मूळच

जरी कारण असले, तरी ***कर्म हे त्यांना जोमाने वाढविणारे अधस्थ मूळ म्हटले पाहिजे.***"

हा संसारवृक्ष मनुष्ययोनिरूप शाखांचा पसारा कर्माच्या घात प्रमाणात असा भौमितिक श्रेणीने वाढवितांना दिसतो, असे म्हटल्यास योग्यच ठरावे!! म्हणून ***"मनुष्यदेह ही या संसारवृक्षाची या लोकी दिसणारी मुळे होत, असे म्हणणे वावगे नाही,"*** असे त्या जगज्जनक श्रीकृष्णाने म्हटले.

सत्त्वगुणाची वावटळ

यानंतर सत्त्वगुणाच्या अभिवृद्धीत या वृक्षाचे कसे स्थित्यंतर होते, ते सांगतांना ज्ञानेश म्हणतातः

मग तमाचें तैं दारुण। स्थिरावलेयां वाउधाण।
सत्त्वाची सुटे सत्राण। वाहुटली।।१५-१८३।।
तैं याचि मनुष्याकारें। मुळीं सुवासना निघती।
घेऊनि फुटती कोंबारा। सुकृतांकुरीं।।१८४।।
उकलतेनी उन्मेखें। प्रज्ञाकुशलतेची तिखें।
डिरीयां निघती निमिखें। बाबुलैजुनि।।१८५।।
मतीचें सोट वावे। घालिती स्फूर्तीचेनि थांवें।
बुद्धि प्रकाश घे धांवें। विवेकाचेनि।।१८६।।

"तमोगुणरूपी दारुण वादळवारे शांत झाले की सत्त्वगुणाची जोरदार वाहुटळ सुटते. त्यावेळी याच मनुष्याकार अधोभागीच्या मुळांना सुवासनांचे मोड फुटतात. त्यांना जे कोंब फुटतात, त्यातूनच सत्कर्मे अंकुरतात. ते कोंब म्हणजे विकसणारे ज्ञानच! त्यांना असणारी तीक्ष्ण टोके म्हणजे बुद्धिचातुर्य! त्यातून सपासप विस्तारणाऱ्या डिऱ्या प्रकटतात व त्यांचे पाहतापाहता बुद्धीच्या जोमदार सोटात रूपांतर होते. ते स्फूर्तिरूप बळ पावून वृद्धिंगत होतात. विवेकाचा जोम घेऊन ते बुद्धिरूप सोट प्रज्ञाप्रकाशाकडे धाव घेतात."

तेथ मेधारसें सगर्भ। आस्थापत्रीं सबोंब।
सरल निगती कोंब। सद्वृत्तीचें।।१५-१८७।।
सदाचाराचियां सहसा। टका उठती बहुंवसा।
घुमिती घोषां। वेदपद्यांचां।।१८८।।
शिष्टागमविधानें। विविध यागवितानें।
इयां पानावरी पानें। पांजरती।।१८९।।

"अशा वेळी मेधारूपी धारणाशक्तीचा रस सबाह्यांभ्यंतर भरलेले सद्वृत्तीचे सरळ सन्मार्गगामी कोंभ त्या वृक्षाला फुटतात व त्यांना श्रद्धारूपी शोभायमान पाने लगडतात. सदाचाराचे घोस त्या वृक्षाला लागतात. वेदपद्यांचा सुमंगल घोष त्या संसारवृक्षावरचे ऋत्विजरूपी पक्षी करू लागतात. श्रेष्ठींनी सांगितलेली आचरणे व विविध यज्ञादी अनुष्ठाने हीच जणू पानांवर पाने अशी पसरून त्या वृक्षाला मंडित करून सोडतात."

ऐशा यमदमीं घोंसालियां। उठती तपाचियां डाहालिया।
देती वैराग्यशाखा कवलिया। वेल्हालपणें।।१५-१९०।।
विशिष्टां व्रतांचें फोंक। धीराचां अणगटीं तिख।
जन्मवेगें ऊर्ध्वमुख। उंचावती।।१९१।।
माजीं वेदांचा पाला दाट। तो करी सुविद्येचा झडझडाट।
जंव वाजे अचाट। सत्त्वानिलु तो।।१९२।।

"यमदमतितिक्षादी घोस असलेल्या तपरूपी डहाळ्या त्या संसारवृक्षास फुटतात. त्यांना कोवळ्या वैराग्यरूपी नाजूक अशा शाखा फुटतात. उत्तमोत्तम व्रताचरणरूप फोक, ज्यांना धैर्याची सुतीक्ष्ण टोके असतात, ते ऊर्ध्वमुख उंचावत जातात अन श्रेष्ठतर जन्मपरंपरेकडे झेपावतात. हा सत्त्वगुणरूपी झंझावात जेव्हा वाजत असतो, तेव्हा त्या संसारवृक्षास लागलेली वेदरूपी पर्णराजी सुविद्या व ज्ञान यांचा झडझडाट करत फडफडते."

धर्मरूपी शाखा

तेथ धर्मडाल बाहाली। दिसती धर्मशाखा सरली।
तियां आड फुटती फलीं। स्वर्गादिकीं।।१५-१९३।।
पुढा उपरती रागें लोहिवी। धर्ममोक्षाची शाखा पालवी।
लाहलाहात नित्य नवी। वाढतीचि असे।।१९४।।
पैं रविचंद्रादि ग्रहवर। पितृ ऋषी विद्याधर।
हे आडशाखा प्रकार। पैसु घेती।।१९५।।

"सत्त्वगुणी वावटळ जेव्हा अशी ऐन जोमात असते, तेव्हा धर्मरूपी शाखेचा अतोनात विस्तार होतो आणि जन्मरूपी शाखोपशाखांचा उत्तरोत्तर ऊर्ध्वभागाकडे आरोहक्रम होत जातो. या धर्मरूपी शाखा व तिच्या जन्मरूपी उपशाखादींना स्वर्गादिक फळांनी युक्त अशा अनेक आडशाखा फुटतात. विरक्तीच्या योगाने तांबडीभगवी असा रंग असलेली पालवीदार अशी ती धर्ममोक्षरूपी शाखा नित्य नव्या जोमाने वाढत जाते अन् लुसलुशीत पल्लवांकुर धारण करते. या धर्मशाखेचा अधिक विस्तार होतो, तेव्हा रविचंद्रादि ग्रहश्रेष्ठ, पितर, ऋषी, विद्याधर गणादी लोकांच्या विविध आडशाखा तिला फुटतात."

याहीपासून उंचवडे। गुढलें फलाचेनि बुडें।
इंद्रादिक तैं मांदोडें। थोर शाखांचें।।१५-१९६।।
मग तेयांही उपरी डाहालिया। तपोज्ञानीं उंचावलियां।
मरीची कश्यपादि इयां। उपरी शाखा।।१९७।।
एवं मालोवाली उत्तरोत्तरु। ऊर्ध्वशाखांचा हा पैसारु।
बुडी साना अग्री थोरु। फलाढ्यपणें।।१९८।।
वरी उपरीशाखाही पाठीं। येती फलभार तैं किरीटी।
तैं ब्रह्मेशांत अणगटी। कोंभ निघती।।१९९।।

"धर्मशाखा खूप वरपर्यंत वाढली की या सर्व फांद्यांहून उंचावर असणाऱ्या इंद्रादिक लोकपालांच्या श्रेष्ठ शाखांचे जुंबाडे तिला फुटतात आणि त्या फांद्या विविध लोकोत्तर सुखरूपी फळांच्या

भाराने लगडून भरगच्च दिसतात. इंद्रादिक लोकपाल शाखांपेक्षासुद्धा ऊर्ध्वस्थानी विराजमान झालेल्या शाखा आहेत. त्या मरीचि, कश्यप, इ.श्रेष्ठ अशा ब्रह्मनिष्ठांच्या होत. या शाखांचा असा जो विस्तार सांगितला, तो तळवटीकडे लहान व उत्तरोत्तर ऊर्ध्वभागाकडे थोर असा व शेंड्यापाशी जास्तीतजास्त सुखोपभोगादी फलांनी समृद्ध असा असतो. या सर्वच्या सर्व शाखांस भारांपेक्षाही अत्युच्च ठिकाणी जे कोंब फुटतात, ते ब्रह्मदेव व शंकररूपी अणकुचीदार असे असतात."

फलाचेनि वोझपणें। ऊर्ध्वीं वोवांडें दुणें।
जंव माघौतें बैसणें। मूळींचि होय।।१५-२००।।
प्राकृताही तऱ्हीं रुखा। जैं फळें दाटली होय शाखा।
तैं वोवांडिली देखा। बुडासि ये।।२०१।।

"त्या कोंबांना जो फळभार लगडतो, तो अतीव घनदाट असतो. हा संसारवृक्ष अशा प्रकारे मनुष्यशाखांच्या उत्तरोत्तर ब्रह्मा व ईश यांच्या शाखांपावेतो होणाऱ्या विस्ताराने व समृद्ध अशा कर्मोपभोगरूपी फलभाराने लगडल्याने इतका झुकतो की त्याचे मूळ जे माया वा अज्ञान आहे, त्यालाच तहत जाऊन भिडतो. त्याहीउपर तो फलभाराने लगडलेला संसारतरु आपल्या अशा झुकलेल्या या ऊर्ध्वस्थ शाखांद्वारे पुनश्च ब्रह्माच्याच समीप जाऊन पोहोचतो म्हणा ना! इतरही लौकिक वृक्षसुद्धा फळांनी लगडलेल्या फांद्यांसह पुनश्च मुळाकडे लवतातच की नाही!"

तैसें जेथूनि हा आघवा। संसारतरूचा उठावा।
तियें मूळीं टेंकती पांडवा। वाढतेनि ज्ञानें।।१५-२०२।।
म्हणौनि ब्रह्मेशानापरौते। वाढणें नाहीं जीवातें।
तेथौनि मग वरौतें। ब्रह्मचि कीं।।२०३।।

"त्याचप्रमाणे हे अर्जुना! ज्या ठिकाणापासून या संसारवृक्षाचा हा एवढा विस्तार झाला आहे, त्याच मूलस्थानी हा त्याचा शाखासंभार, वाढणाऱ्या ज्ञानाच्या योगाने येऊन ठेपतो. ही परिसीमा या संसारतरूच्या ***ब्रह्मा व ईश*** या शाखा गाठतात. म्हणून जीवाची उत्क्रांत अवस्था या ब्रह्मा व ईश यांच्यापलीकडे पोहोचू शकत नाही. आणि त्यापलीकडे ***ऊर्ध्वस्थ*** तर केवळ साक्षात **ब्रह्म**च असते!"

अधस्थ मूळ

परि हें असो ऐसें। ब्रह्मादिक जैं आंगवसे।
ऊर्ध्वमूळासरिसें। न तुकती गां।।१५-२०४।।
आणिकही शाखा उपरता। जियां सनकादिकनामें विख्याता।
तियां फळीमूळीं नाडळतां। भरिलियां ब्रह्मीं।।२०५।।

"हे असो! या ब्रह्मादिक ज्या शाखा या संसारवृक्षास लागल्या आहेत, त्या कितीही ऊर्ध्वस्थानी असल्या तरी मूळ जे ब्रह्म आहे, त्याच्या पासंगासही पुरत नाहीत. त्या शाखा या वृक्षाचे खालील ***माया व अज्ञान*** म्हणून विख्यात असणारे जे मूळ आहे, त्याच्याचपासून उत्पन्न होतात.आणि माया वा अज्ञान या उगमस्थानापावेतोच झेपावतात."

"त्यापलीकडे या संसारतरूचे जे खरेखुरे असे ऊर्ध्वमूल आहे, तेथे फक्त ***सनकादिक*** नांवांनी विख्यात असलेल्या काही उफराट्या शाखाच पोहोचतात व त्या शाखांना त्या अधस्थ मायामूळाचा व त्यापासून उपजणाऱ्या फलादी भोगांचा कोणताच अटकाव होत नाही. त्या शाखा बाकी त्या परब्रह्मस्वरूप मुळापाशी प्रवेशून त्याच्यात सुखेनैव विस्तारून त्या मूळ ब्रह्माशी अभिन्न अशा एकरूप होऊन जातात."

मनुष्यालागौनि जाणावी। ऊर्ध्वीं ब्रह्मादि शेष पालवी।
शाखांची वाढी बरवी। उंचावे पैं।।२०६।।
पार्था ऊर्ध्वीचियां ब्रह्मादि। मनुष्यत्वाचि होय आदि।
म्हणौनि इयें अधीं। म्हणितली मूळें।।२०७।।

"याप्रमाणे या वृक्षाची मनुष्यापासून वाढत जाणारी शाखोपशाखारुपी उत्पत्ती जसजशी ऊर्ध्वस्थ मूलाकडे उंचावत जाते, तसतशी ब्रह्मादिक ही त्याची पालवी अत्युच्च स्थानी दिमाखाने मिरवते. म्हणून या वृक्षाचे लौकिक मूल म्हणजे ही मनुष्यलोकरूपी शाखाच समजायला हवी. ही शाखाच या संसारतरूचे अधस्थ मूल होय. अगदी ऊर्ध्वभागीच्या ब्रह्मलोकादिरूपी शाखांचीसुद्धा ***मनुष्यलोक*** हीच मूळे आहेत. म्हणून हे पार्था!***मी मनुष्यलोकरूप शाखांना या वृक्षाची अधस्थ मुळे असे म्हटले आहे.***"

एवं तुज अलौकिकु। हा अधोर्ध्वशाखु।
सांगितला भवरुखु। ऊर्ध्वमूळु।।१५-२०८।।
आणि अधींची ही मूळें। उपपत्ति परिसविली सविवळें।
आतां परिस उन्मूळें। कैसेनि हा।।२०९।।

"याप्रमाणे मी तुला हा अलौकिक असा अधस्थ व ऊर्ध्वस्थ शाखा असलेला व ऊर्ध्वमूळ असलेला भववृक्ष वर्णन करून सांगितला. त्याचप्रमाणे त्याच्या अधस्थ मूळांचेसुद्धा स्पष्ट खुलासेवार सोपपत्तिक समग्र दर्शन तुला घडविले. आता हा वृक्ष कशा प्रकारे उन्मूळला जातो, ते लक्षपूर्वक ऐक."

नास्तित्व हेच या अश्वत्थाचे खरे स्वरूप

श्रीगोपाल याबाबत म्हणतात की:

न रूपमस्येह तथोपलभ्यते
नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा।
अश्वत्थमेनं सुविरूढमूल-
मसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा।।१५-३।।

यावर ज्ञानेशोक्तीचा साज कसा चढतो, या गोपालांच्या श्लोकाचे बृहत मार्गदर्शनपर स्पष्टीकरण ते कसे करतात, हे आपण त्यांच्या यापुढील ओव्यांच्या आधाराने समजावून घेऊ या:

जीवाचे स्वरूप

परि तुझां हन पोटीं। ऐसें गमेल किरीटी।
जैं एवढें झाड उत्पाटीं। ऐसें कायि असे।।१५-२१०।।
कैं ब्रह्मेयाचां शेंवटवरी। ऊर्ध्व शाखांची थोरी।
आणि मूल तंव निराकारीं। ऊर्ध्वीं असे।।२११।।
हा स्थावरांही तळीं। फांकत असे अधींचां डालीं।
माजीं धांवतसे दुजां मूळीं। मनुष्यरूपीं।।२१२।।
ऐसा गाढा आणि अफाटु। आतां कोण करी येयां शेंवटु।
तऱ्हीं क्षणीं हा हलुवटु। धरिसि भावो।।२१३।।

"पण अर्जुना! तुझ्या मनात असे येत असेल की हा एवढा अफाट अलौकिक वृक्ष उपटून टाकण्याजोगे काहीतरी साधन असेल तरी का! कारण हा वृक्ष तर ब्रह्माच्या सीमारेषेपावेतो शाखादिकांनी थोरावला आहे आणि याचे मूळ तर प्रत्यक्ष निराकार परब्रह्मस्थानी आणि तेही ऊर्ध्वभागी आहे. त्यातूनही तळवटीकडेसुद्धा हा वृक्ष स्थावरादी शाखांच्या रूपाने खूपच बेफाट पसरलेला असून त्याच्या मध्यभागी मनुष्यरूपी शाखांची बळकट मुळे घट्ट रुजली आहेत. अशा या बळकट आणि महान संसारवृक्षाचा शेवट करण्यास कोणीतरी समर्थ असेल का असा तर्कशुद्ध विचार तू करत असशील. पण असा निराशेचा भाव तू आपल्या अंतःकरणात आणू नकोस."

परि हा उन्मूलावया दोषें। येथ सायासचि कायिसें।
काय बाल बागुल देशें। दवडावा आहे।।१५-२१४।।
गंधर्वदुर्ग कायि पाडावें। काय शशविषाण मोडावें।
होआवें मग तोडावें। खपुष्प कीं।।२१५।।

"अरे! या वृक्षास उपटून टाकण्याची इच्छा असली की मग कोणतेही आयासप्रयास न करता तो उपटला जातो. बागुलबुवाची भीती लहान मुलांना दाखवितात अन ती घालवण्यासाठी बागुलास खरोखरच कोठे दूरदेशी हाकलून द्यावे लागते की काय! बागुलबुवा जसा खोटा असतो, तसाच हा संसारतरू पण मिथ्याच आहे. अरे आकाशात ढगांच्या विचित्र रचना होतात. त्यात प्रतिभासणारे गंधर्वदुर्ग काय मोडून टाकल्यावरच नाहीसे होतात काय! का सशाचे शिंग मोडल्यावरच नाहीसे होते! गगनपुष्प असले तर ना ते तोडावयाचे!"

तैसा संसारु हा वीरा। रुख नाही सांचोकारा।
मा उन्मूलणीं दरारा। कायिसा तऱ्हीं।।१५-२१६।।
आम्हीं सांगितली जैं परी। मूलडालांची उजरी।
तैं वांझेची घरभरीं। लेंकुरें जैशीं।।२१७।।
काय कीजती चेइलेंपणीं। स्वप्नींचि तियें बोलणी।
तैशी जाण तैं काहाणी। दुगलीची तैं।।१५-२१८।।

"हे वीरा अर्जुना! हा संसारवृक्षसुद्धा असाच आहे. हा प्रत्यक्षात नसतोच तर त्याला उन्मळून टाकण्यास काय घाबरायचे! मी तुला त्याच्या मुळांची व शाखोपशाखांची जी व्यवस्था वर्णन केली, त्याचा जो बेफाट विस्तार सांगितला; ते सर्व म्हणजे वांझेच्या घरभर बागडणाऱ्या लेकरांप्रमाणे होय! जसे स्वप्नीचे संभाषण जागेपणी फोल ठरते, तसेच ते या वृक्षाचे सर्व वर्णन समज. या वृक्षाची ही सर्व कहाणी निव्वळ पोकळ आहे."

वांचूनि आम्हीं निरूपिलें जैसें। ययाचें अचल मूल असे तैसें।
आणि तैसाचि हा असे। साचोकारा।।१५-२१९।।
तऱ्हीं कोणाचेनि संतानें। निफजती ययां उन्मूलणें।
कां फुंकिलियां गगनें। जाइजेल गां।।२२०।।

"आणि मी म्हटल्याप्रमाणे जर हा वृक्ष खरोखरच असता आणि याचे मूळ जर तसेच अचल असते, तर असा कोणता मायेचा पूत आहे की ज्याने याची पाळेमुळे खणून काढून याला फेकून दिले असते! काय निव्वळ एखाद्याने फुंकर मारली तर गगन उडून जाईल!"

म्हणौनि पैं धनंजया। आम्हीं वानिलें रूप तैं माया।
कासवीचेनि तूपें राया। वोगरिलें जैसें।।१५-२२१।।
मृगजलाची गां तळीं। तिये दिठी दुरूनिचि न्याहालीं।
वांचूनि तेणें पाणियें साली केली। लाविसी काईं।।२२२।।
मूल अज्ञानचि तंव लटिकें। मा तेयाचें कार्य हे केतुकें।
म्हणौनि संसाररुखु सत्य कें। वावोचि गां।।२२३।।

"परंतु हा संसारवृक्ष तुला वर्णन करून सांगितला तसा नसून ते मायेवर रचलेले एक रूपकाख्यान मी तुला सांगितले. कासवीच्या तुपात शिजवलेले अन्नपदार्थ राजास वाढावे, तसे ते मायेवरील वृक्षरूपकही मिथ्याच आहे. मुळात माया लटकी आहे, तिथे तिच्या त्या वृक्षरूपकाची काय महती! मृगजळाने परिपूर्ण भरलेली तळी लांबूनच दृष्टीने पाहून धन्य व्हावे! त्यांच्या पाण्यावर काय कोणी कधीतरी साळी पिकवल्या आहे का केळी लावल्या आहेत! मूळ अज्ञानच मिथ्या - असत्य आहे, तर त्याला मूळ कल्पून त्याचे कार्य म्हणून दिसणारा हा जो संसार, तो तरी कोठून सत्य वा खराखुरा वास्तवातला असणार! म्हणून हा जो संसारवृक्ष सांगितला तो सत्य कोठून असणार! तो तर निव्वळ मिथ्याभास आहे."

अश्वत्थास अंत आहे ही व नाही ही

परंतु;

आणि अंतु येयां नाहीं। ऐसें बोलिजे जैं कांहीं।
तैंही सांचचि पाही। परी एकीं।.१५-२२४।।
तऱ्हीं प्रबोधु जंव नोहे। तंव निद्रे काय अंतु आहे।
कीं रात्री न सरे तंव न पाहे। तेया आरौतें।।२२५।।
तैसा जंव पार्था। विवेकु नुधवी माथा।
तंव अंतु नाहीं अश्वत्था। भवरूपा या।।२२६।।

"या वृक्षाला अंत नाही; याचा शेवट होत नाही; असे जे काही म्हटले जाते, ते पण एकापरी खरेच आहे. कारण जोपावेतो जागृती येत नाही, तोपावेतो निद्रेला शेवट येतो काय! किंवा रात्र

तोपावेतो सरत नाही, जोपावेतो पहाट फुटून दिवस उगवत नाही. हे पार्था! या भवरूप अश्वत्थ वृक्षाससुद्धा त्याचप्रमाणे जोपावेतो विवेक जागृत होऊन आपले मस्तक उंचावत नाही, तोपावेतो अंत नाही."

वाजते वारे निवांत। जंव न राहे जेथींचें तेथ।
तंव तरंगतां अनंत। म्हणावीचि कीं।।१५-२२७।।
म्हणौनि सूर्यु जैं हारपे। तंव मृगजलाभासु लोपे।
कां प्रभा जाय दीपें। मालवलेनि।।२२८।।
तैसें मूल अविद्या खायें। तैं ज्ञान जैं उभें होये।
तैंचि येयां अंतु आहे। एरवीं नाही।।२२९।।

"वादळवाऱ्याने जलपृष्ठावर लाटा उठतात. वारा जोपावेतो निवांत होत नाही, तोपावेतो त्या लाटा उठतच राहतात. अन तोपावेतो त्यांना अंत नसतोच! सूर्यकिरण जेव्हा नाहीसे होतात, तेव्हाच मृगजळाचा आभास लोपतो; एऱ्हवी नाही. दिवा मालवला म्हणजेच त्याची प्रभा नाहीशी होते; अन्यथा तिला अंत नसतो. अगदी असेच या भववृक्षाचे आहे. त्याचे मूळ जी ***अविद्या*** आहे, तिचा ग्रास करणारे ***ज्ञान*** जेव्हा प्रकटते, तेव्हाच या संसारतरूचा अंत होतो. एऱ्हवी तो जसाच्या तसाच राहतो."

म्हणून ***याला अंत असतांनासुद्धा त्याला अंत नाही, असे गोपालकृष्णांनी या श्लोक क्र. १५-३ मध्ये म्हटले आहे.***

अश्वत्थाचे आदित्व हाही भासच!

तसेच या वृक्षाच्या **आदित्वा**संबंधी माउली म्हणते:

तेवींचि हा अनादि। ऐसी आथी शाब्दी।
तो आलु नोहे नुरोधी। बोल तेयां।।१५-२३०।।
जैं संसारवृक्षाचां ठायीं। सांचोकार तंव नाही।
मा नाही तेयां आदि काईं। कोण होईल।।२३१।।
जो सांच जेथूनि उपजे। तेयांतैं आदि हे साजे।
आतां नाहींचि तो म्हणिजे। कोठूनियां।।२३२।।
म्हणोनि जन्मे ना आहे। तैसियां सांगो कवण माये।
यालागीं नाहीपणेंचि होये। अनादि हा।।२३३।।

"या वृक्षास तो ***अनादी*** आहे, असे म्हणतात. हा मिथ्यारोप नसून खरे तर तसेच अनादित्व त्याला आहे. ***हा संसारवृक्ष मुळातच वास्तव वा सत्य नाही; तर त्याचा उगम ज्यापासून होईल असे काही तरी असणे संभवनीय तरी आहे का!*** जी गोष्ट इतर कशाहीपासून उत्पन्न होते, त्या गोष्टीची दुसरी वस्तू आदि वा उत्पत्तिस्थान म्हणून समजली जाते. परंतु जी वस्तू मुळातच अस्तित्वात नाही; तिचा आरंभ कोठून होतो असे म्हणावे! जो जन्मतही नाही व असतही नाही, त्याची जन्मदात्री माता कोण असणार! **हा वृक्ष तरी त्याच प्रकारचा असल्याने - तो *नास्तित्वाने* आहे म्हणून - त्याला शास्त्रांतरी *अनादी* असे म्हणण्याचा प्रघात आहे.**"

वांझेचियां लेंका। कैंचि जन्मपत्रिका।
नभीं निलीच भूमिका। कें कल्पूं पां।।१५-२३४।।
व्योमकुसुमाचां पांडवा। कवणें देठु तोडावा।
म्हणौनि नाही ऐसियां भवा। आदि कैंची।।२३५।।
जैसें घटाचें नाहीपण। असतचि असे केलेनिवीण।
तैसा समूल वृक्ष जाण। अनादि हा।।२३६।।

"वांझेचे मूल अन त्याची जन्मपत्रिका, किंवा निळ्याभोर गगनावकाशाच्या अनंत पोकळीत निळा रंग असणारी भूमी, या जशा वृथा कल्पना होत; किंवा आकाशपुष्पाचा देठ तोडून ते हाती येणे, हे जसे असंभव आहे; तसेच या भववृक्षास अस्तित्वच नसल्याने, त्याला आदि वा जन्म वा आरंभ तो कोठून असणार! घट नाही, शून्य आहे; घटाचे असलेपण नाही; वस्तूस अस्तित्व नसणे; या सर्वातले ***नाहीपण*** म्हणजे शास्त्रात ज्याला **प्राग्भाव** असे म्हणतात; तो कोणी उत्पन्न केल्याविनाच असतो. अगदी अशाच प्रकारचा हा समूळ भववृक्ष आहे व म्हणूनच त्याला ***अनादी*** म्हणून ओळखले जाते."

अश्वत्थाची स्थिती हा आभासच!

अशा वृक्षाची स्थिती कशी आहे, याचे अधिक वर्णन करतांना ज्ञानदेव सांगतात:

अर्जुना ऐसेनि पाहीं। आद्यंतु येयासि नाही।
माजीं स्थिती आभासे काहीं। परि टवाल तैं गां।।१५-२३७।।
ब्रह्मगिरीहूनि न निगे। आणि समुद्रीही कीर न रिगे।
तऱ्हीं माजीं दिसे वाउगें। मृगांबु जैसें।।२३८।।
तैसा आद्यंतीं कीर नाहीं। आणि सांचही नोहें कहीं।
परि लटिकेपणाची नवाई। पडिभासे गां।।२३९।।

"हे अर्जुना! या भववृक्षास अशा प्रकारे ***आदि व अंत*** दोन्हीही नाहीत. तरीसुद्धा मध्यंतरी याला ***स्थिती*** किंवा ***अवस्था*** जी काही दिसते, ती केवळ मिथ्या आभास आहे. मृगजळास ना तर ब्रह्मगिरीवरून गंगेचा जसा उगम होतो, तसा उगम आहे; ना ते गंगेसारखे समुद्रात मिळते; तरीही ते उगम व अंतरहित असूनसुद्धा मध्यंतरीच्या काळात दृश्यमान होतेच की नाही! त्याचप्रमाणे हे पार्था! हा संसारतरुवर आदिरहित, अंतविहीन असला तरीही त्याच्या मायेची अशी नवलाई आहे की तो नसूनसुद्धा संसारी जनांस असलेला भासतो."

नाना रंगीं गजबजे। जैसें इंद्रधनुष देखिजे।
तैसा नेणतेया आपैजे। आहे ऐसा।।१५-२४०।।
ऐसेनि स्थितीचिये वेळें। भुलवी अज्ञानाचें डोळें।
लाघवी हरी मेखळें। लोकु जैसा।।२४१।।

"विविध रंगांनी विनटलेले इंद्रधनुष्य कितीही मनोहर दिसत असले, तरी ते जसे अस्तित्वात नसते; तर तो केवळ एक प्रकाशाचा जलबिंदूंशी होणारा खेळ आहे; रंगांचा धनुष्याकृती जसा हा आभास

त्यांपासून निर्माण होतो, त्याचप्रमाणे हा भववृक्षसुद्धा कल्पनेने निर्मिलेला मोठा संभ्रम आहे, जो अस्तित्वात नसूनही अज्ञानवश असणाऱ्यापुढे प्रकटतो. त्याचे जे हे असे अस्तित्व अज्ञान्याच्या दृष्टीस भुलावण पाडते, ते म्हणजे बहुरूपी जसे नाना वेष धारण करून लोकांस भ्रम पाडतो, तसेच म्हणेनास!"

आणि नसतीचि श्यामिका। व्योमीं दिसे तैसीं दिसो कां।
तऱ्हीं दिसणेंही क्षणा एका। होय जाय।।१५-२४२।।
स्वप्नींही मानिलें लटिकें। तऱ्हीं निर्वाहो कां एकसारिखें।
तेवीं आभासु हा क्षणिकें। रीतीचा गां।।२४३।।

"आणि आकाशात नसलेली निळिमा जशी तरीही दिसते व त्यायोगे आकाश निळ्या रंगाचे भासते, वर ते तसे भासणेसुद्धा दिवस संपून जाताच क्षणातच नाहीसे होते व पुनश्च उषःकाली क्षणातच प्रकटते; किंवा स्वप्नात दिसणारे पदार्थ मिथ्या असतात, तरीही स्वप्नावस्थेत ते दिसतच राहतात; आणि स्वप्न भंगताच दिसेनासे होतात; त्याचप्रकारे या संसारवृक्षाचे असणे व भासणे क्षणभंगुर आहे व केवळ क्षणैक आहे."

देखतां आहे आवडें। घेऊं जाईजे तऱ्हीं नातुडें।
जैसा टिकु कीजे माकडें। जलामाजीं।।१५-२४४।।
तरंगभंगु सांडीं पडें। विजूही न पुरे होडें।
आभासासी तेणें पाडें। होणें जाणें गां।।२४५।।

"माकडास स्वतःचे जलाशयात पडणारे प्रतिबिंब जसे खरे वाटते, पण त्याला हात लावावा म्हणून पाण्याला स्पर्श केला तर ते जसे हाती गवसत नाही, तसेच या वृक्षाचे अस्तित्व फोल आहे. जलपृष्ठावर तरंग निर्माण होतो न होतो, तोच तो मोडतो किंवा आकाशात विद्युल्लता चमकते न चमकते, तोच ती नाहीशी होते; याकरता जेवढा क्षणार्ध लागत असेल, त्यापेक्षाही अल्पकाळात हा संसारवृक्ष होतजात असतो. हा संसाराभास असा अत्यल्पजीवी आहे."

तैसा ग्रीष्मशेषींचा वारा। नेणिजे सामोरी कां पाठिमोरा।
तैसीं स्थिती नाहीं तरुवरा। भवरूपा येयां।।१५-२४६।।

"जसा ग्रीष्मांतीचा वारा केव्हाही, कसाही कोणीकडूनही वाहतो; क्षणात समोरून येतो, तर क्षणात पाठीमोरा वळतो; त्याला जशी एकच स्थिती वा अवस्था असत नाही; क्षणोक्षणी त्या वाऱ्याची स्थिती जशी पालटत असते; तसेच या वृक्षाच्या अस्तित्वाबद्दल आहे. हा एका स्थितीत थोडा वेळसुद्धा स्थिरावत नाही." या भवरूप तरुवराचे स्वरूप हे असे आहे.

ज्ञानोपाय::::

ज्ञानखड्ग हाच या अज्ञान मूळ असलेल्या वृक्षाच्या नाशाचा उपाय

एवं आदि ना अंत ना स्थिती। ना रूप येयासि आथी।
आतां कायसीं कुंथाकुंथी। उन्मूलणीं गां।।१५-२४७।।
आपुलियां अज्ञानासाठीं। नव्हता थांवला किरीटी।
तऱ्हीं आतां आत्मज्ञानाचियें लोटीं। खांडेनि गां।।२४८।।
वांचूनि ज्ञानेंवीण एकें। उपाय करिसी जेतुकें।
तिहीं गुंफसीं अधिकें। रुखीं इयें।।२४९।।
मग किती खांदोखांदीं। येयां हिंडावें ऊर्ध्वीं अधीं।
म्हणौनि मूलचि अज्ञान छेदी। सम्यग्ज्ञानें।।२५०।।

"आदि नसणाऱ्या, अंत व अस्तित्वही नसणाऱ्या, रूपसुद्धा ज्याला नाही अशा या भववृक्षास उन्मळून टाकण्यासाठी श्रम ते असे किती करावे लागणार! **आपल्या अज्ञानाच्या बळावर हा वृक्ष बळावला होता, तर त्याला आत्मज्ञानरूपी तलवारीच्या धारदार खांडाने छाटून टाक.** हे अर्जुना! एका आत्मज्ञानाशिवाय इतर कितीही प्रयत्न याला उपटून टाकण्यासाठी केले, तरी काहीच उपयोग न होता, जितके जितके वायफळ प्रयत्न करशील, तितका तितका अधिकच तू या वृक्षात गुंतत जाशील. तसे झाले तर जन्मोनजन्म या वृक्षाच्या खांद्यांवरून वर खाली किती काळ भटकत हिंडावे लागेल, त्याची काहीच गणती नाही. म्हणून यथार्थ ज्ञानाने या वृक्षाचे अज्ञानरूपी मूळच छेदून टाक."

एऱ्हवीं दोरीचियां उरगा। डांगा मेलविती पैं गां।
तो वावचि मारु गां। केला होय।।१५-२५१।।
तरावया मृगजलाची गंगा। डोणीलागीं धांवतां दांगा।
माजीं वोहलें बुडिजे पैं गां। सांच जेवीं।।२५२।।
तेवीं नाथिलियां संसारा। उपायीं जाचतया वीरा।
आपणपें लोपें वारा। विकोपीं जाय।।२५३।।
म्हणौनि स्वप्नींचियां भया। ओखद चेवोचि धनंजया।
तेवीं अज्ञानमूलां ययां। ज्ञानचि खड्ग।।२५४।।

"एरवी तरी दोरीवर प्रतिभासणाऱ्या सर्पास ठार करण्यासाठी लाठ्याकाठ्या गोळा करून त्या त्याच्यावर हाणाव्यात, हे व्यर्थ खटाटोपाचेच लक्षण नाही काय! मृगजळाची नदी तरून जाता यावे म्हणून नावेचा शोध घेत रानोमाळ धावू गेल्यास खरोखरच एखाद्या ओढ्यात सापडून बुडून जाण्याचा प्रसंग यावा, त्याप्रमाणेच या नसलेल्या संसारास तरून जाण्यासाठी जे जे उपाय, हे वीरा! करावेत, ते ते निव्वळ व्यर्थ सायास ठरून त्यात स्वतःचे व्यर्थ मरणच ओढवून येते आणि हा संसार मात्र विकोपास जातो. स्वप्नात भय निर्माण झाल्यास त्याचा उपाय म्हणजे जागृतावस्थाच जशी आहे, त्याप्रमाणेच, हे अर्जुना! या अज्ञानमूळ असलेल्या संसारवृक्षाचा नाश करण्यास समर्थ असणारे केवळ एकमेव **ज्ञानखड्ग**च आहे."

"असङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा।"

परि तैंचि लीला परजावें। तैसें वैराग्याचें नीच नवें।
अभंगबल होआवें। बुद्धिसीं गां।।१५-२५५।।

जीवाचे स्वरूप

उठलेनि वैराग्यें जेणें। हा त्रिवर्गु ऐसा सांडणें।
जैसें वमुनियां सुणें। आतांचि गेले।।२५६।।
हा ठायवरी पांडवा। पदार्थजातीं आघवा।
विटवी तो होआवा। वैराग्य लाठु।।२५७।।
मग देहाहंतेचें दलें। सांडूनि एकेंचि हेलें।
प्रत्यग्बुद्धि करतलें। हातवसावें।।२५८।।
निसिलें विवेकसाहाणें। जैं ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें।
मग पुरतेनि बोधें उटणें। एकलेंचि।।२५९।।

"पण अर्जुना! हे ज्ञानखड्ग लीलया फिरविता यावे, यासाठी मात्र साधकाच्या अंगी नित्य नवोन्मेषशाली वैराग्याचे अभंग सामर्थ्य असले पाहिजे. कुत्र्याने नुकतेच खाल्लेले वमन करावे, ते जितके त्याज्य, त्याप्रमाणे वैराग्य इतके प्रखर पाहिजे की त्याच्या प्रभावाने सत्त्व-रज-तम हा त्रिवर्ग सत्वर त्यागला गेला पाहिजे.सर्व पदार्थजात व संसारासक्तीचा वीट पुरेपूर निर्माण करील इतके उद्दंड वैराग्य असले पाहिजे. देहाभिमानरुपी म्यानातून हे ज्ञानखड्ग खाडकन बाहेर काढून आत्माकार झालेल्या बुद्धिरूप मुठीत ते धरावे. विवेकरूपी सहाणेवर ते पाजळलेले असावे व ***मी ब्रह्म आहे,*** या बोधाची त्याला तीक्ष्ण धार असावी.संपूर्ण साक्षात्काराचा सुसज्ज पवित्रा घेऊन ते खड्ग उगारण्यास सिद्ध व्हावे."

परि निश्चयाचें मुष्टीबल। पहावें एकदोनीं हेल।
मग तुलावें अतिचोखाल। मननवेरीं।।१५-२६०।।
पाठीं हातियेरां आपणेयां। निदिध्यासें ये जालेयां।
पुढां दुजा नुरेल घाया। पुरते गां।।२६१।।
तैं आत्मज्ञानाचें खांडें। अद्वैतप्रभेचेनि वाढें।
नेदील उरों कवणेकडें। भववृक्षासि।।२६२।।

"संसार नाही असा आपला सुनिश्चय असल्याचे मुष्टिबळ हे खड्ग तोलण्यास लागते. ते पुरेपूर असल्याचे एकदोन वेळा हे ज्ञानखड्ग पेलून पाहून नीट जोखून घ्यावे. ***आपण ब्रह्मच आहोत,*** या ***अतिशुद्ध अद्वैत***धारणेच्या सततच्या मननाच्या सामर्थ्याने मग ते ज्ञानखड्ग सावधपणे पेलावे. ते ***ज्ञानखड्ग, ब्रह्म व साधक*** हे या मननाच्या निदिध्यासरूपी सामर्थ्याने जेव्हा एकरूप होतात, तेव्हा ज्याच्यावर ते ज्ञानखड्ग चालवावे, असे दुसरे काय उरणार! ज्याच्या मुळावर घाव करावा म्हणून हे ज्ञानखड्ग साधकाने पेलले आहे, असा तो ***भववृक्ष*** त्या ***अद्वैतबोधानंतर*** कोठेतरी दिसेल काय! अद्वैतप्रभेच्या दीप्तीने तळपणारे दुधारी असे ते ज्ञानखड्ग भववृक्षास कोणीकडेही ऊरूं देणार नाही."

शरदागमींचा वारा। जैसा केरु फेडी अंबरा।
कां उदयला रवी आंधारा। घोंटु भरी।।१५-२६३।।
नाना उपवढ होतां खेवों। नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो।
स्वप्रतीतीधारेचा वाहो। करील तैसें।।२६४।।
तेव्हां ऊर्ध्व कां ऊर्ध्वीचें मूल। कां अधींचें हन शाखाजाल।
तैं काहींचि न दिसे मृगजल। चांदिणां जेवीं।।२६५।।
ऐसेनि गां वीरनाथा। आत्मज्ञानाचियां खड्गलता।
छेदूनियां भवाश्वत्था। ऊर्ध्वमूलांतैं।।२६६।।

"शरदऋतू प्राप्त झाला असता वाहणारा वारा जसा नभातील अभ्ररूपी केरकचरा साफ झाडून नाहीसा करतो; किंवा रवी उगवल्याउगवल्याच अंधारास गिळून टाकून नाहीसे करतो; अथवा जागृत झाले की स्वप्नातील संभ्रमावस्था लोपून जाते; त्याप्रमाणे स्वप्रतीतीच्या निदिध्यासरूपी सुतीक्ष्ण धारेच्या प्रहाराने या संसारतरुवराचा ठावठिकाणासुद्धा उरत नाही. चांदण्यात मृगजळ जसे दिसू शकत नाही; चंद्रप्रकाशापुढे मृगजळ जसे नाहीसे होते; त्याचप्रमाणे या ज्ञानखड्गाच्या सान्निध्यात या संसारवृक्षाचा ऊर्ध्वभाग तो काय अन त्याचे ऊर्ध्वस्थ मूळ ते काय! अथवा त्याचे अधस्थ मूळ ते कोणते वा त्याच्या शाखोपशाखांचे ते जंजाळ ते काय! असले काहीही औषधासाठीही उरत नाही. अशा प्रकारे हे वीरा अर्जुना! आत्मज्ञानाच्या खड्गवल्लरीने विळखा घालून या भवाश्वत्थास त्याच्या ऊर्ध्वमूळासह सर्वतया छेदून छाटून टाकावे."

महावाक्यांचाही विराम करणारी अद्वैतावस्था

या **भवाश्वत्था**चा असा काटा काढून टाकल्यावर मग स्वानंदसाम्राज्य हाती लागते. त्याचा उपभोग घेणाऱ्या भाग्यवंताचे वर्णन करतांना ज्ञानेशांची वाणी द्रष्टेपणाने उद्गारते:

मग इदंतेसीं वालिलें। जैं मीपणेंवीण डाहारिलें।
तैं रूप पाहिजे आपुलें। आपणचि।।१५-२६७।।
परि दर्पणाचेनि आधारें। एकचि करूनि दुसरें।
मुख पाहाति गव्हारें। तैसें नको हे।।२६८।।

"***इदं व अहं*** या दोन्ही वृत्तींचा अभाव निर्माण झाला, संसार व आपण यातला भिन्नत्वभाव नाहीसा झाला; आत्मस्वरूपी साचोकारपणे वृत्ती लीन झाली; ***"अहम् ब्रह्मास्मि"*** हा बोधसुद्धा मावळल्यावर शुद्ध अद्वैत भूमिका प्राप्त झाली की ***इदम् स्फुरण व अहम् स्फुरण*** ही दोन्ही लुप्त होऊन ***अहम्-इदम्-वृत्तिशून्य*** म्हणून विख्यात असलेले ***आत्मरूप*** ते आपले आपण पाहण्याचे भाग्य लाभते. परंतु हे जे आत्मस्वरूप निरखणे ते कसे आहे पाहा:अर्जुना! मूर्ख माणसे आरसा समोर धरून आपल्या मुखाचे प्रतिबिंब मोठ्या आवडीने तास न तास निरखतात आणि ते प्रतिबिंब म्हणजेच आपण अशी मिथ्या कल्पना करून घेतात. त्या प्रतिबिंबाविषयी इतके जे हे तादात्म्य त्यांच्या अंत:करणातून उपजते, तसे ज्ञात्याचे आत्मस्वरूप निरीक्षिणे नाही."

हे पाहाणें ऐसें वीरा। जैसा न मोपलियां विहिरा।
मग आपुलियां उगमीं झरा। भरौनि ठाके।।१५-२६९।।
ना तन्हीं आटलियां अंभ। निजबिंबीं प्रतिबिंब।
नेहटें कां नभीं नभ। घटाभावीं।।२७०।।

जीवाचे स्वरूप

नाना इंधनांशु सरलेयां। वह्नी परते जेवीं आपणपेयां।
तैसें आपेआप धनंजया। न्याहालणें जैं गां।।२७१।।

"परंतु विहीरीअभावी झरा जसा आपणच आपल्याठायी प्रकट असतो; विहीर केल्यावरच तो असतो आणि विहीर बुजवल्यावर तो नाहीसा होतो, असे जसे नसते; किंवा पाणी आटल्यावर बिंब व प्रतिबिंब जशी एकरूप होतात; किंवा घट भंग पावल्यावर घटाकाश हे जसे महाकाशात स्वस्वरूपी मिसळून जाते; अथवा इंधनाचा उर्वरित भाग जळून संपवल्यावर अग्नी जसा स्वतःतच लीन होऊन जातो; याप्रमाणेच हे धनंजया! हे सहजभावाने स्वतःच स्वतःस न्याहाळणे, आत्मस्वरूप देखणे आहे."

जिह्वें आपुली चव चाखणें। चक्षु निज बुबुल देखणें।
आहे तेयां ऐसें निरीक्षिणें। आपुलें पैं।।१५-२७२।।
कां प्रभेसि प्रभा मिले। गगन गगनावरी लोले।
नाना पाणी भरले खोलें। पाणियाचिये।।२७३।।
आपणचि आपणयातें। पाहिजे जैं अद्वैतें।
तैं ऐसें होय निरुतें। बोलिजतु असे।।२७४।।

"याची कल्पनाच करायची म्हटले तर जिह्वेने आपला स्वाद चाखून पाहावा; किंवा डोळ्याने आपले बुबुळ निरीक्षावे; किंवा तेज तेजोराशीत मिळून जावे; अथवा आकाशाच्या पटावर आकाशानेच लोळण घ्यावी; अथवा पाण्याच्याच वस्त्राची खोळ करून त्यात पाणीच भरावे; तसेच हे स्वस्वरूप पाहणे आहे. अद्वैतभक्तीने भगवंतास भक्त जे भेटतात, भगवत्स्वरूप जे पाहतात, ते वस्तुतः अशाच प्रकारचे आहे, हे मी, भक्तांचा राणा हृषीकेश, तुला स्वमुखाने सांगतो आहे."

जैं पाहिजतेनवीण पाहिजे। कांहीं नेणणाचि जाणिजे।
आद्यपुरुखु कां म्हणिजे। जेयां ठायांतैं।।१५-२७५।।
तेथही उपाधीचा वोथंबा। घेऊनि श्रुति उधवती जिभा।
मग नामरूपाचा बडंबा। करिती वांया।।२७६।।

"हे भगवत्स्वरूप वा आत्मस्वरूप निरीक्षिण्यास द्रष्टा असावा लागत नाही; ***द्रष्टा, दृश्य व दर्शन*** या त्रिपुटीसापेक्ष हे निरखणे नाही; ज्या स्वरूपास ***जाणणे म्हणजे काहीच न जाणणे*** वा ***नेणणे असते***; ज्या परमपदास ***आद्यपुरुष*** म्हणून गौरवतात; तो हा ठाव आहे; ती ही ***अद्वैतबोधस्थिती*** आहे. हेच साधकांचे परमश्रेष्ठ गंतव्यस्थान आहे. हेच ते ***परमश्रेयस*** आहे, ज्यासाठी साधक सर्व प्रकारचे सायास शतजन्मकोडींवरपर्यंत करत असतात."

"अशा या आत्मस्वरूपाचे, त्याला निरीक्षिण्याचे, त्याच्या रूपगुणादी वर्णन करण्याचे, त्याला नामसंबोधने देण्याचे वस्तुतः तेथे काहीच प्रयोजन नसते. त्याठायी ***रूप-गुण-नाम*** ही गैरलागू आहेत. या उपाधी त्या पदास - त्या स्थितीस - चिकटलेल्या नसतांनाही, मायोपाधींचा आश्रय करून ***वेदवाणी*** त्या अतुल गौरवशाली अशा परमपदाचे वर्णन करण्यास सिद्ध होते व नामरूपांची व्यर्थ बडबड अन गलका करत गर्जत राहाते, हे एक नवलच नव्हे काय!"

अज्ञानात्मक द्वैत ते ज्ञानात्मक अद्वैत अशी साधकाची वाटचाल

असो. आपण आता मुमुक्षू साधकांची वृत्ती आणि वाटचाल कशी असते, तेच पाहू याः

पैं भवस्वर्गा उबगलें। मुमुक्षु योगज्ञाना वलघलें।
पुढती न यो इया निगालें। पैजा जेथ।।१५-२७७।।
संसाराचिया पायां फुडां। पलती वीतराग होडा।
ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्मकडा। घालिती मागां।।२७८।।
अहंतादिभावा आपुलियां। झाडा देऊनि आघवेयां।
पत्र घेती ज्ञानिये जेयां। मूलघरासीं।।२७९।।
जिएं कां वस्तुचें नेणणें। आणिलें थोर जगां जाणणें।
नाहीं तैं नांदविलें जेणें। मी तूं जगीं।।२८०।।
पैं जेथूनि हे एवढीं। विश्वपरंपरेची वेलांडी।
वाढती आशा जैसी कोरडी। निदैवाची।।२८१।।

"संसार आणि स्वर्ग यांना उबगलेले जे मुमुक्षुजन आपण पुनः या जन्ममरण परंपरेच्या चक्रात सापडावयाचे नाही, अशा निश्चयाने **योग व ज्ञान** यांचा आश्रय करते झाले; **विवेक व वैराग्य**योगे जे संसाराच्या चालीपेक्षाही जास्त वेगाने त्याच्यापुढे पळून गेले; जगताचा शेवटचा टप्पा वर चढून जाऊन ओलांडण्यास अतिदुस्तर असा ***ब्रह्मपदाचा कडा*** जे पार करून गेले; ज्यांनी आपल्या **अहंभाव**ाचा साक्षेपी त्याग केला; आणि ***ज्ञानिये*** ज्या ठिकाणचे पट्टाधिष्ठित वतनदार आहेत, त्याठायी जे पोहोचले; ज्या वस्तूच्या अज्ञानाने या जगातील यच्चयावत जाणीव उगम पावली; ज्या वस्तूच्या अज्ञानाने द्वैत निर्माण केले; निदैवी पुरुषाची आशा व्यर्थ प्रच्छन्न वाढावी, तशी ज्या वस्तूपासून या विश्वप्रपंचाची वेल उत्कर्ष पावली; अशा त्या वस्तूस पाहून जे धन्य झाले, त्यांनी काय पाहिले तर स्वतःच स्वतःचे रूप पाहिले; आत्मस्वरूप निरखले."

पार्था तैं वस्तू पहिलें। आपणपें पैं आपुलें।
पाहिजे तैसें हिंवलें। हिंव हिंवें।।१५-२८२।।
आणिकही एक तेयां। वोलखण असे धनंजया।
तऱ्हीं जेयां कां भेटलियां। येणेचि नाही।।२८३।।
परि तेयां भेटती ऐसें। जैं ज्ञानें सर्वत्र सरिसें।
महाप्रलयांबुचें जैसें। भरलेंपण।।२८४।।

"आणि ते पाहणे तरी कसे तर हिवेने स्वतःच्या अंगच्या थंडीने गारठून जावे, तसे! आत्मस्वरूप पावल्याची अजूनही एक ओळख आहे, ती अशी की धनंजया! एकदा का आत्मस्वरूप भेटले की तेथून संसाराकडे पुनः येणे नसते. आणि अशा आत्मस्वरूपास तेच महाभाग पावतात की महाप्रळयाचे जल जसे सर्वत्र सारखे भरलेले असते; सर्व दिशा व्यापून टाकते; तसे ज्यांना उपजत ज्ञानामुळे सर्वत्र, सर्वदूर आत्मरूप भरून राहिलेले दिसते."

जीवाचे स्वरूप

परमपद::::

परमपदाचे महिमान

असे जे ते महाभाग असतात, त्यांचे वर्णन करतांना ते ज्या पदाप्रत प्राप्त होतात, त्या पदाचे महिमान स्पष्ट करतांना भगवंत म्हणतात कीः

निर्मानमोहा जितसङ्गदोषा-
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञै-
र्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत्।।१५-५।।

"जे पुरुष नित्य मान व मोहरहित असून संसारसङ्गरूपी जो दोष त्यास जिंकलेले आहेत; तसेच निरंतर आत्मस्वरूपात रममाण झालेले आणि सर्व इच्छा तृप्त झालेले, कामापासून पूर्णतया निवृत्त झालेले आहेत; सुख व दुःख संज्ञा असणाऱ्या द्वंद्वांपासून कायमचे मुक्त झालेले आहेत; असे ते ज्ञानी माझ्या त्या अविनाशी पदापर्यंत जातात."

न तद्भासयते सूर्यो
न शशाङ्को न पावकः।
यद्गत्वा न निवर्तन्ते
तद्धाम परमं मम्।।१५-६।।

"ते ***पद*** वा माझे ***धाम*** असे आहे की सर्वप्रकाशक सूर्याचासुद्धा त्याठायी प्रकाश पोहोचू शकत नाही, तेव्हा चंद्र आणि अग्नी यांच्या प्रकाशाचे तेथे कोठून प्रवेशणे! एकदा का अशा माझ्या सर्वप्रकाशक- सूर्यचंद्रादींनासुद्धा प्रकाशविणाऱ्या त्या पदास पोहोचले, माझ्या त्या *श्रेष्ठ वैष्णव* निजधामास पावले की तेथून या संसारी परतणे होत नाही."

आप्तकाम पुरुषांची स्थिती

या गीताश्लोकांस व त्यावरील शांकरभाष्यास अनुसरत ज्ञानदेवांची प्रगल्भ वाणी म्हणतेः

जेयां पुरुषांचें कां मन। सांडौनि गेलें मोहमान।
वर्षांतीं जैसें घन। आकाशांतैं।।१५-२८५।।
निकवड्या निष्ठुरा। उबगिजे जेवीं सोयरा।
तैसें नागवती विकारा। वेटाळू जैं।।२८६।।
फलली केली उन्मलें। तैसीं आत्मलाभें प्रबलें।
जेयांची क्रिया ढालेंढालें। गलती आहे।।२८७।।
आगीं लागलियां रुखीं। देखौनि सैरा पलती पक्षी।
तैसें सांडिलें अशेखीं। विकल्पीं जैं।।२८८।।

"वर्षाऋतु संपल्यावर ढग जसे आकाशाला सोडून जातात, त्याप्रमाणे कामाने सोडून दिलेल्या ज्या पुरुषाच्या मनाला मोह आणि मान स्वतः होऊनच टाकून गेले; खंक पुरुषाला जसे त्याचे व्यवहारनिष्ठुर नातेवाईक उबगून त्याच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहायला तयार नसतात, त्याप्रमाणे सर्व इच्छांचा त्याग केलेल्या ज्या पुरुषास विकार स्पर्शसुद्धा करू धजत नाहीत; ज्याप्रमाणे फळलेली केळ आपसुकच उन्मळून पडते, त्याप्रमाणे प्रबळ आत्मलाभाचे फळ लागलेल्या ज्याच्या देहाच्या क्रियादिक हळूहळू आपोआप मुळापासूनच सुटत आहेत; वृक्षास आग लागली असता त्यावरील पक्षी जसे सैरावैरा वाट फुटेल तिकडे पळून जातात, त्याप्रमाणे ज्या पुरुषास ज्ञानाग्नी प्राप्त झाला आहे, त्याचे विकल्प दाही दिशांस विखरून संपूर्ण नाहीसे होतात व त्याचा त्याग करतात."

आइकें सकल दोखतृणीं। अंकुरजती जिये मेदिनी।
तियें भेदबुद्धिची काहाणी। नाहीं जेयांतैं।।१५-२८९।।
सूर्योदयासरिसी। रात्रि पलोनि जाये आपैसी।
गेली देहाहंता तैसी। अविद्येसवें।।२९०।।
पैं आयुष्यहीना जीवातैं। शरीर सांडीं जेवीं अवचितें।
तेवीं निदसुरें द्वैतें। सांडिलें जैं।।२९१।।
लोहाचें सांकडें परिसा। न जोडे अंधारु रवि जैसा।
द्वैतबुद्धिचा तैसा। सदा दुकालु।।२९२।।
अगां सुखदुःखाकारें। द्वंद्वें देहीं जियें गोचरें।
तियें जेयां कां सामोरें होतीचिना।।२९३।।

"ज्या भेदरूपी बुद्धीच्या धारेवर भिन्नभावरूपी दोषांनी युक्त असलेले गवत वाढते, त्या भेदबुद्धीची ज्यांना वार्तासुद्धा नाही; सूर्य उगवताच रात्र जशी नाहीशी होते, त्याप्रमाणे आत्मरवीच्या उदयाबरोबरच ज्यांची देहाहंता अविद्येच्या काळोखासह नाश पावली; ज्याप्रमाणे आयुष्य सरलेल्या जीवास शरीर एकदम टाकून देते, त्याप्रमाणे ***पूर्वसंचित संपलेल्या*** ज्या पुरुषांस ***अज्ञानमय द्वैतबुद्धी*** त्यागून जाते; परिसास लोखंड जसे माहीतच नसते, अथवा रवीला अंधाराला जसे भेटता येत नाही; त्याप्रमाणे ज्यांच्या अद्वैतभानूस द्वैतबुद्धिरूप अंधकाराची कधीच भेट होत नाही; अशा त्या पुरुषांच्या समोर ती देही गोचर होणारी सुखदुःखाकार द्वंद्वे येऊ धजत नाहीत."

स्वप्नींचें राज्य कां मरण। नोहे हर्षशोकासीं कारण।
उपवढलियां जाण। जियापरी।।१५-२९४।।
तैसें सुखदुःखरूपीं। द्वंद्वीं जैं पुण्यपापीं।
ने घेपिजती सर्पीं। गरुड जैसें।।२९५।।

"ज्याप्रमाणे स्वप्नावस्थेत येणारे मरण किंवा मिळालेले राज्य जागे असतांना हर्षशोकास कारण होत नाहीत; किंवा सर्पाकडून गरुड जसा धरला जात नाही; त्याप्रमाणे ते पुरुष व्यवहारातील लाभहानीचे सुखदुःख या भावांस प्राप्त होत नाहीत व पुण्य व पाप या द्वंद्वांकडून वेढले जात नाहीत."

आणि अनात्मवर्गनीर। सांडूनि आत्मरसाचे क्षीर।
चरताती जैं सविचार। राजहंस।।१५-२९६।।
जैसा वर्षोनि भूतलीं। आपुला रसु अंशुमाली।
मागौता आणी रश्मिजालीं। बिंबासीचि।।२९७।।

तैसा आत्मभ्रांतीसाठी। वस्तु विखुरली बारा वाटीं।
तैं एकवटिती ज्ञानदृष्टी। अखंड जैं।।२९८।।
किंबहुना आत्मयाचां। निर्धारीं विवेकु जेयाचां।
बुडाला वोघु गंगेचा। सिंधु जैसा।।२९९।।
पैं आघवाचि आपुलेपणें। नुरेचि जेयां अभिलाखणें।
जैसें येथुनि पऱ्हा जाणें। आकाशा नाही।।३००।।

"असे जे राजहंसाप्रमाणे अनात्मवर्गपदार्थरूपी नीर त्यागून आत्मरूपी दूध सेवन करणारे विवेकी पुरुष असतात; आपले किरणजाळ भूमंडळावर विखरवून टाकणारा रवी ज्याप्रमाणे त्यांद्वारे निर्माण झालेल्या मेघमंडलांच्या रूपाने त्या आपल्या किरणांस नभात परत सामावून घेत आपल्या बिंबाप्रत आणतो; त्याप्रमाणे आत्मभ्रांत झाल्यावर जी ब्रह्मवस्तू बारा वाटांनी जगद्भ्रमरूपाने विखुरलेली असते, तिला जे महापुरुष आपल्या ज्ञानदृष्टीने परत जेथल्या तेथे स्वस्वरूपी अद्वैतभावाने स्थापन करतात; फार काय सांगावे! गंगौघ जसा सिंधूत विलीन होतो, त्याप्रमाणे ज्यांची विवेकबुद्धी सर्वार्थाने आत्मरूपाशी तद्रूप होते; सर्वव्यापी असल्यामुळे आकाशास जसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचे प्रयोजन नसते, त्याप्रमाणे स्वतःच विश्वात्मक विश्वरूप अशा झालेल्या त्या सत्पुरुषांस वासना, अभिलाषा, इच्छा, काम वा आकांक्षा असणे शक्य नसते."

जैसा अग्नीचा डोंगरु। नेघे कोणी बीजअंकुरु।
तैसा मनीं जेयां विकारु। उदैजेना।।१५-३०१।।
जैसा काढिलियां मंदराचलु। राहे क्षिराब्धि निश्चलु।
तैसा नुठी जेयां सलु। कामोर्मीचां।।३०२।।
चंद्रमा कलीं धाला। न दिसे कोणें अंगीं वोसावला।
तेवीं अपेक्षेचा अवखला। न पडे जेयां।।३०३।।

"अग्नीने व्यापलेला डोंगर जसा कोणत्याही बीजाच्या अंकुरास थाव देत नाही, त्याप्रमाणे ज्ञानाग्नीने वेष्टून प्रज्वलित केलेल्या त्यांच्या मनोभूमीत कोणताच विकार उदित होत नाही. क्षीरसागराचे मंथन करतांना वापरलेला मंदार पर्वत जेव्हा त्यानंतर बाहेर काढला गेला, तेव्हा तो क्षीरसमुद्र जसा स्तब्धावला, त्याप्रमाणे ज्यांच्या चित्तसागरातून वासनारूपी घुसळणे निघून गेल्यामुळे त्यावर कामोर्मीच्या लाटा उसळणे थांबले आहे; जसा षोडष कलांनी संपूर्णत्व पावलेला चंद्र कोणत्याही अंगाने उणावलेला दिसत नाही, त्याप्रमाणे ज्या पुरुषांच्या तृप्त चित्तवृत्तीस कामेच्छापूर्तीच्या अपेक्षेचे न्यूनत्व नसते; हे निरुपम अशा त्या पुरुषांचे वर्णन किती प्रकारे उपमा देऊन करावे!"

हे किती बोलूं असंगडें। जेवीं परमाणु नुरे वायुपुढें।
तैसें विषयांचें नावडे। नांवचि जेयां।।१५-३०४।।
एवं जैं जैं कोण्ही ऐसें। केले ज्ञानाख्यहुताशें।
तैं तेथ मिलती जैसें। हेमीं हेम।।३०५।।

"ज्याप्रमाणे वाऱ्याच्या झुळुकीसमोर परमाणू टिकाव धरू शकत नाही; त्याप्रमाणे त्यांच्या चित्तव्योमातील अद्वैतबोधाच्या झंझावातापुढे विषय ते कोठून टिकणार! अशा ज्या पुरुषांना विषयांचे नावही आवडत नाही; असे जे जे कोणी महापुरुष असतात, ते ज्याप्रमाणे अग्नीत टाकले असता सुवर्ण वितळून सुवर्णाच्या दुसऱ्या तुकड्याशी अभिन्न होऊन जाते, त्याप्रमाणे ***ज्ञान*** या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या अग्नीने त्या आत्मस्वरूपात तसेच मिळून एकरूप होऊन जातात; त्याठायी अभिन्नत्व पावतात.

तेथ म्हणिजे कवणें ठाईं। ऐसेंही पुससीं काईं।
तऱ्हीं तैं पद गां नाही। वेचु जेयां।।१५-३०६।।
दृश्यपणें देखिजे। कां ज्ञेयत्वें जाणिजे।
अमुकें ऐसें म्हणिजे। तैं जैं नोहे।।३०७।।

"आता हे अर्जुना! ते स्वरूप वा ठिकाण कोणते वा कसे हे जर विचारशील तर सांगतो, ऐक. ***ते अव्यय, अविनाशी असे माझे परमपद आहे.*** दृश्यपणे पाहता येण्याजोगे जे जे आहे, ज्ञेयबुद्धीने जाणून घेण्याजोगे जे जे आहे; अमुक एक अशा संबोधनाने ज्याचा उल्लेख करता येतो; अशा कोणत्याही वस्तुमात्राप्रमाणे नसणारे असे ते ***पद*** आहे."

परमधाम

अशा त्या भगवंतांच्या परमपदाची महती गातांना ज्ञानेश्वरांची चिरंतन वाणी म्हणतेः

पैं दीपाचियां बंबाळीं। कां चंद्र हन जैं उजली।
हे काय बोलों अंशुमाली। प्रकाशी जैं।।१५-३०८।।
तैं आगवेंचि दिसणें। जेयातैं कां न देखणें।
विश्व भासतसे जेणें। लपालेनि।।३०९।।

"अग्निशिखा किंवा मनुष्याने पेटवलेल्या दिव्याच्या प्रकाशात, अथवा परप्रकाशित चंद्राच्या प्रकाशाने जे जे काही दिसते, एवढेच काय तर प्रत्यक्ष तेजोनिधी सूर्याच्या प्रकाशाने जे जे काही उजळून जाते, असे जे यच्चयावत विश्वातील जे जे काही दृग्गोचर होत असते; ते ते ज्याच्या प्रकाशात दिसेनासे होते; एवं च काय! ***ज्याच्या अस्तमान असण्याच्या वेळी संपूर्ण विश्वाचा आभास प्रकटतो; असे ते माझे स्वरूप आहे, जे त्या महाभागास पावते.***"

जैसें शिंपीपण हारपे। तंव तंव खरे होय रुपें।
कां दोरी लपतां सापें। फार होईजे।।१५-३१०।।
तैसीं चंद्रसूर्यादि थोरें। इयें तेजें जियें फारें।
तियें जेयाचेनि आंधारें। प्रकाशती।।३११।।

"शिंपल्यावरील नजरेस त्यात जसजसा शिंपल्याचा अभाव व रुप्याचा आभास दिसू लागतो, तसतसे ते शिंपले खरेखुरे रुपेच आहे, असे वाटू लागते. किंवा दोरीऐवजी सर्पत्वाची कल्पना जसजशी मनात रुजू लागते, तसतसा त्या रज्जूवर सर्पाचा आभास दृढावत जातो. त्याप्रमाणेच त्या पदाच्या - त्या परमवस्तूठायी

कल्पनाविलास केल्याने चंद्रसूर्यादी जी महातेजे आहेत, ती प्रकटलेली भासतात. त्या पदाचा प्रकाश दिसेनासा होऊन जेव्हा दृतीपुढे अंधार येतो, त्या वेळी हा समस्त जगदाभास रज्जुसर्प किंवा शिंप-रुपे या न्यायाने प्रकटतो."

तैं वस्तु कीं तेजोराशी। सर्वभूतात्मक सरिसी।
चंद्रसूर्याचां मानसीं। प्रकाशें जैं।।१५-३१२।।
म्हणौनि चंद्रसूर्य कवडसां। पडती वस्तुचियां प्रकाशा।
यालागीं ते जैं तेजसा। तैं वस्तुचें आंग।।३१३।।

"अशी जी ती वस्तू आहे, ती म्हणजे निव्वळ तेजाची अक्षरशः खाणच आहे! तीच यच्चयावत भूतमात्रात सारखेपणाने भरलेली आहे. त्याच वस्तूच्या तेजाने चंद्रसूर्यादी उत्तमोत्तम ज्योतींची मानसे पण प्रकाशतात; उजळून निघून जगतास प्रकाश देतात. त्या परमवस्तूच्या प्रकाशाचे पडलेले कवडसे म्हणजे चंद्रसूर्य होत. म्हणून ***"तेजतेजस्विनामहम् (७-१०)"*** असे जे तैजस वस्तूंचेही निजतेज आहे, ते त्या परमवस्तूच्या अंगाचा गुण आहे."

भगवंतांनी म्हटल्यानुसार, ***"यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवाव गच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम्।।१०-४१।।";*** अशा त्या परमतेजापासूनच सर्व वस्तू, ज्या ज्या वैभवाने, संपत्तीने वा श्रीने अथवा सत्त्वाने वा कांतीने युक्त अशा विभूतिस्वरूप आहेत, त्या प्रकट झालेल्या आहेत.

आणि जेयाचां प्रकाशीं। जग हारपे चंद्रार्केंशीं।
सचंद्र नक्षत्रें जैशीं। दिनोदयीं।।१५-३१४।।
ना तऱ्हीं प्रबोधलिये वेळें। तैं स्वप्नींची डिंडी मावले।
कां नुरेचि सांजवेळें। मृगतृष्णिका।।३१५।।
तैसा जिये वस्तुचां ठायीं। कोण्हीच कां आभासु नाही।
तैं माझें निजधाम पाही। पाटाचें गां।।३१६।।

"अशा त्या वस्तूचा प्रकाश पडला की चंद्रसूर्यांसह हे सर्व जगत लोप पावते. दिनमणीचा उदय होताच चंद्रासह नक्षत्रे, तारकामंडल जसे अस्तंगत होते, म्हणजे जेथल्या तेथे असूनही, दिनकराच्या प्रकाशापुढे निस्तेज होऊन दिसत नाहीत; त्याप्रमाणे त्या परमवस्तूचा प्रकाश दृग्गोचर होताच या जगताचा अस्त होतो. जागृत झाल्यावर स्वप्नातील वस्तूंचा पसारा जसा मावळतो; किंवा संध्यासमयी सूर्यकिरण लोपल्यावर जसे मृगजळसुद्धा नष्ट होते अन त्याचा आभासही शिल्लक राहत नाही; त्याप्रमाणे त्या माझ्या परमधामी विश्वाभास मावळतो; त्या परमवस्तूस पावलेल्यांना या जगताचे मृगजळ दिसत नाही. कारण त्या मृगजळास प्रकटवणारे अज्ञानसूर्याचे प्रकाशकिरण त्या ज्ञानसूर्याच्या प्रकाशात अस्तंगत होतात. त्या परमधामी पोहोचून जी जागृतावस्था प्राप्त होते, तिच्यामुळे विश्वभ्रांतीचे स्वप्न मोडून जाऊन जगताचा पसारा मावळतो."

पुढील अनुसंधान

विश्वभासात्मक क्षणभंगुर असा अश्वत्थ, त्याला छेदणारे ज्ञान हे खड्ग, आत्मकाम पुरुष हे लक्ष्य यांचे निरूपण केल्यावर ज्ञानदेव आता ***जीवत्वस्वरूपाचा निर्णय*** करणार आहेत. तो ***द्वैती का अद्वैती, अनादि का उद्भवणारा*** इ.अनेक गोष्टींचा विचार पुढील ***उन्मेष क्र. २७- जीवत्वस्वरूपाचा निर्णय*** यात करावयाचा आहे. तर तिकडे वळू या.

::उन्मेष::२७::
::जीवत्वस्वरूपाचा निर्णय::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २७:

गीता:
१०:४०-४२
१५:७-१४
ज्ञानेश्वरी:
१५:३१७-४२०

जीवाचे स्वरूप

::उन्मेष::२७::
::जीवत्वस्वरूपाचा निर्णय::

जीवत्वदशेचे स्वरूप::::

स्वरूपलक्ष्यापासून पुनरागमन व जीवत्वदशेचा निर्णय

जीव स्वरूपी पोहोचला की त्याचे पुनः या जगदाभासात परतणे होत नाही. याबाबत आता ज्ञानदेव विवेचन करणार आहेत. या विधानावरून अनेक तार्किक शंका निर्माण होतात. त्यांवर अर्जुनाचे प्रश्न आधारित आहेत.हा विषय हाताळत ज्ञानदेव म्हणतातः

पुढती जें तेथ गेलें। तैं न घेतीचि माघौतें पाऊलें।
महोदधीं कां मिनलें। स्रोत जैसें।।१५-३१७।।
कां लवणाची कुंजरी। सूदलियां लवणसागरीं।
होयचि ना माघारीं। परती जैसीं।।३१८।।
नाना गेलियां अंतराला। न येतीचि वह्नीज्वाला।
नाहीं तप्त लोहौनि जला। निघणें जेवीं।।३१९।।
तेवीं मजसि एकवाट। जैं जालें ज्ञानें चोखट।
तेयां पुनरावृत्तीची वाट। मोडली गां।।३२०।।

"जसे महासमुद्रास मिळालेले नद्यांचे स्रोत पुनः नदीत परतून येत नाहीत; तसे जे त्या माझ्या परमतेजात मिसळून जातात, त्यांचे पाऊल मागे हटत नाही. मिठाची हत्तीण जेव्हा मिठाच्या सागरात म्हणजे खाऱ्या समुद्रात घातली असता माघारी जशी परतत नाही; किंवा अग्नीचे स्फुलिंग वा ज्वाळा जशा अंतराळी एकदा गेल्या की परतत नाही; अथवा तापलेल्या लोहावर उडवलेले पाण्याचे शिंतोडे जसे पुनः पाणी म्हणून रूप घेत नाहीत; त्याप्रमाणे एकवार ज्या पुरुषांना शुद्ध ज्ञानाने भगवत्स्वरूपी लीनता मिळाली, त्यांची पुनरावृत्तीची-संसारात पुनरागमनाची वाट कायमची मोडते."

तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो। पार्थु म्हणे जी जी महापसावो।
परि विनंती एकीं देवो। चित्त देतु।।१५-३२१।।
तऱ्हीं देवेंसीं स्वयें एक होती। मग माघौतें जैं न येती।
तैं देवेंसीं भिन्न आथी। कीं अभिन्न जी।।३२२।।
जऱ्हीं भिन्नचि अनादिसिद्ध। तऱ्हीं न येती हें असंबद्ध।
जैं फुलां गेलें षट्पद। तैं फुलेंचि होतु पां।।३२३।।

हे ऐकल्यावर प्रज्ञारूपी विशाल पृथ्वीचा राजा जो अर्जुन, तो श्रीकृष्णांना म्हणतोः "देवा! आपले हे महाबोध दुणावणारे बोल म्हणजे माझ्यासाठी महाप्रसाद आहेत. पण एक विनंती अवधारा! हे स्वामी! जे पुरुष तुमच्या स्वरूपी मिळून जातात, अन् माघारी परतून येत नाहीत, ते पुरुष मूळचे तुमच्याहून भिन्न असतात की तुमच्याहून ते प्रथमपासूनच अभिन्न असतात! जर ते पुरुष स्वरूपेकरून मूळचेच तुम्हापेक्षा भिन्न असतील, तर ते माघारी येत नाहीत असे तुमचे म्हणणे म्हणजे फुलांवर बसलेले व त्यांच्यात गुंतलेले भ्रमर म्हणजे फुलेच होतात, असे म्हणण्यासारखे विसंगतिपूर्ण आहे."

पैं लक्ष्याहूनि अनारिसें। बाण लक्ष्यीं शिवोनि जैसें।
मागुतें पडती तैसें। येतीचि तैं।।१५-३२४।।
ना तऱ्हीं तूंचि तैं स्वभावें। तऱ्हीं कोण्हें कोण्हासीं मिलावें।
आपणयासीं आपण रुपावें। शस्त्रे केंवीं।।३२५।।
म्हणौनि तुजसीं अभिन्ना जीवां। तुझा संयोगुवियोगु देवा।
नयें बोलां अवयवां। शरीरेंसीं।।३२६।।

"स्वरूपाने लक्ष्याहून भिन्न असणारे बाण लक्ष्यवेध केल्यावरही जसे वेगळे दिसतात, लक्ष्याशी एकरूप काही होत नाहीत; त्याप्रमाणे मुळचेच भिन्न असलेले जीव तुमच्या स्वरूपलक्ष्यापर्यंत जरी पोहोचले, तरी ते तुमच्याहून भिन्नच राहून पुनश्च या संसारात आगमन करतीलच! अथवा शस्त्र जसे स्वतःच स्वतःत रूपू शकत नाही, त्याप्रमाणे जर जीव हे मूलतःच तुझ्यापासून अभिन्न असतील, तर मग तेथे कोणी कोणात मिळावे! ज्याप्रमाणे अवयव हे शरीराहून वेगळे नसतात, त्याप्रमाणे तुझ्याशी अभिन्न असे जर जीव असतील, तर त्यांचा तुझ्याशी संयोग होतो किंवा त्यांचा तुझ्यापासून वियोग होतो, असे म्हणणे बरोबर वाटत नाही."

आणि जैं सदा वेगळें तुजसीं। तेयां मिळणीं नाहीं कोण्हें दिवसीं।
मा येती न येती हे कायसि। वायबुद्धि।।१५-३२७।।
तऱ्हीं कोण्ह गां तूंतैं। पावोनि न येती माघौतें।
हे विश्वतोमुखा मातें। बुझावीं जी।।३२८।।

"पुनः असे पहा की ते जीव जर सदाचेच तुझ्याहून वेगळे असतील, तर ते तुझ्यात मिसळून जातील, हे केव्हाही अशक्यच! तेथे ते तुझ्याहून वेगळे होऊन परततील, किंवा न परततील, ही भाषा व्यर्थच ठरते. हे विश्वतोमुखा! म्हणून तुला पावून परत माघारे न येणारे जीव कोणते व त्यांचे स्वरूप काय असते, हे सर्व मला नीट उलगडा करून सांगा!"

जीव जरी द्वैती दिसला तरी अद्वैतीच!

जीव हा परमात्म्यापेक्षा विभिन्न आहे की जीव व परमात्मा यांचे अनादिसिद्ध एकत्वच आहे, हा तत्त्वज्ञानातील गहन चिंतनाचा विषय आहे. ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विचाराचा हा प्रश्न एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. ***जीव व परमेश्वर*** यांस भिन्न मानल्यामुळे किंवा त्यांना एकच मानल्यामुळे आचार्यादिप्रभृतींनी गीतेचे वेगवेगळे अर्थ लावण्याचे कसोशीने प्रयत्न केले आहेत, असेही काही विद्वानांचे मत आहे.

इयें आक्षेपीं अर्जुनाचां। जो शिरोमणी सर्वज्ञांचां।
तोषला बोधु शिष्याचा। देखोनियां।।१५-३२९।।

मग म्हणे गां महामती। मातें पावूनि न येती पुढती।
तैं भिन्नाभिन्न रीती। आहाति दोनीं।।३३०।।
जैं विवेकें खोलें पाहिजे। तऱ्हीं मी तैंचि तैं सहजें।
ना आहाचवाहाच तऱ्हीं दुजें। ऐसेहीं गमती।।३३१।।

इतका हा जिव्हाळ्याचा प्रश्न उपस्थित केल्याबाबत श्रीकृष्ण परमात्मा आपल्या परमशिष्य अर्जुनावर प्रसन्न झाले आणि त्याच्या उद्बोधनाची पातळी पाहून त्या सर्वज्ञशिरोमणी श्रीकृष्ण भगवंतांनी हा जटिल प्रश्न उकलण्यासाठी सुरुवात करतांनाच आपले अतीव महत्त्वाचे विधान सांगितले. अर्जुनाच्या या मार्मिक प्रश्नावर प्रसन्न झालेली ती श्रीकृष्णमूर्ती मग म्हणते:

"हे महामती अर्जुना! ज्ञानाग्नीने पावन झालेले विशुद्ध जीव मला येऊन मिळतात आणि परत माझ्यापासून विभक्त होत नाहीत, असे मी तुला म्हटले, त्यामागे जीवांच्या दोन प्रकारे ज्या भिन्न श्रेणी संभवतात, त्याबाबत समजून घे. ***जीव हे माझ्यापेक्षा भिन्नही असून अभिन्नही असू शकतात.*** जर सखोल विवेकाने प्राप्त झालेल्या ज्ञानदृष्टीने निरीक्षिले तर जीव आणि मी एकच आहोत; आमचे अनादिसिद्ध ऐक्य आहे व ते केव्हाच मोडले नाही, असे अगदी स्पष्ट दिसेल. पण वरवर उथळ विचार करणाऱ्यास मात्र या जगदाभासापलीकडे पाहण्याची दृष्टी नसल्याने अज्ञानाने जीव आणि मी दोघे भिन्नभिन्न आहोत, असेच भासेल."

जैसें पाणियांही वेगल। आपजतां दिसती कल्लोल।
एऱ्हवीं तऱ्हीं निखिल। पाणीचि तैं।।१५-३३२।।
कां सुवर्णाहूनि आनें। लेणी गमती भिन्नें।
मग पाहिजे तंव सोने। आघवेंचि तैं।।३३३।।
तैसें ज्ञानाचियें दिठीं। मजसि अभिन्नचि तैं किरीटी।
एर भिन्नपणें तैं उठीं। अज्ञानास्तव।।३३४।।

"पाण्यावर लाटा उठतात. त्या पाण्याहून भिन्न वाटतात. पण सखोल विचारांती लाटा तेच पाणी व पाणी तेच लाटा असल्याचा बोध होतो. त्याचप्रमाणे सुवर्णाचे दागिने म्हणजे निखळ सोनेच असते की नाही! हे अर्जुना! त्याचप्रकारे ज्ञानदृष्टीने पाहता जीव मजशी अभिन्नच असतात. ते माझ्याहून भिन्न वाटतात, ते केवळ अज्ञानामुळे. आणि जर खरोखरच मूलवस्तूचा विचार केला, तर माझ्यापेक्षा भिन्न अथवा दुजे असे काही तरी असू शकेल काय! आणि मी आणि जीव असा भिन्नत्वाचा व्यापार मज अद्वैताठायी संभवेल तरी कसा!"

अद्वैतसिद्धीबाबत ज्ञानदेवांची भूमिका

अशा प्रकारे ***अद्वैतसिद्धीची भूमिका*** न्याहाळतांना ज्ञानदेव म्हणतात:

आणि साचोकारेनि वस्तुविचारें। कैंचें मज एकासि दुसरें।
तैं भिन्नाभिन्न व्यवहारें। उमसिजैल।।१५-३३५।।
आघवेंचि आकाश सूनि पोटीं। बिंबचि जैं आते खोटी।
तैं प्रतिबिंब कैं उठी। कैं रश्मि शिरे।।३३६।।
कां कल्पांतीचियां पाणिया। काय वोत भरताती धनंजया।
म्हणौनि कैंचें अंश अविक्रिया। एका मज।।३३७।।

"अवघे अवकाश जर सूर्याने आपल्या बिंबाने व्यापून टाकले तर त्याचे प्रतिबिंब आणि किरणे कोठे दिसतील! अथवा जेव्हा कल्पांत होतो, त्यावेळी आब्रह्मस्तंबपर्यंत उदकच उदक होते; त्या उदकाचे वेगळाले प्रवाह किंवा स्त्रोत कल्पनेत तरी संभवतील का! त्याचप्रमाणे मी जो एक नित्य अविकारी असा परमात्मा आहे, त्या मला अंश कुठले अन अंशात्मक असे वेगळाले जीव तरी कसे असू शकतील!"

परि वोघाचेनि मेलें। पाणी उजूं परि वांकुडें जालें।
रवी दुजेपण आलें। तोयबगें।।१५-३३८।।
व्योम चौफलें कीं वाटोलें। हे ऐसें कायिसयाही मिले।
परि घटमठीं वेंटालें। तैसेहीं आथी।।३३९।।
हां गां निद्रेचेनि आधारें। काय एकलेनि जग न भरे।
स्वप्नींचेनि जैं अवतरे। रायपणें।।३४०।।

"ओघ आणि पाण्याचा साठा यात तेच ते पाणी जरी असले, तरी ओघाच्या प्रवाहीपणामुळे जसे त्या दोन्हीत भिन्नत्व दिसते; किंवा पाण्याचा संबंध आल्यामुळे सूर्याच्या बिंबास दुसरेपणाने दिसणारे प्रतिबिंब जसे निर्माण होते किंवा दिसते; अथवा आकाश चौकोनी किंवा वाटोळे अशा कोणत्याही आकाराचे नसले, तरी घटमठादींच्या संबंधामुळे त्या त्या आकारात ते जसे वेष्टिले जाते; किंबहुना निद्रितावस्थेत स्वप्नीचे राजेपण जेव्हा कोणास दृश्यमान होते, तेव्हा त्या एकट्याच्याच मनोव्यापारामुळे त्या स्वप्नीचे विश्व साकार होत नाही काय!"

कां मिनलेनि किडालें। वानिभेदासि ये सोलें।
तैसा स्वमाया वेंटालें। शुद्ध जैं मी।।१५-३४१।।
तैं अज्ञान एक रूढें। तेणें कोऽहं विकल्पांचें मांडे।
मग विवरुनि कीजे फुडें। देहो मी ऐसें।।३४२।।

"एवढेच काय! पण हीणकस धातूशी संयोग पावून शुद्ध शंभर नंबरी सोने अशुद्ध होऊन वेगवेगळे कस प्रकट करत नाही काय! अगदी असाच व्यापार माझ्याठायी तेव्हा प्रकट होतो, जेव्हा स्वमायेने मी वेटाळतो! वस्तुतः मी निखळ शुद्ध असतांनाही स्वमायावशे अज्ञानग्रस्त होत्साता, देह धारण करून, त्या देहासच मी असे ठाम समजून बसतो."

जीवजगत::::

जीवांची जगत यात्रा

हा भाव प्रकट करतांना श्रीगोपाल मोजकेच सांगतात, ते असे:

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।
मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति।।१५-७।।

"या जीवलोकी देहस्थित जीवात्मा हा जो कर्ता, भोक्ता असा आहे, तो माझाच सनातन अंश आहे व प्रकृतिकार्य असणाऱ्या मनादी सहाही इंद्रियांकडून आकर्षिला जातो *(अथवा प्रकृतिस्थित असणाऱ्या मनादी सहा इंद्रियांचे तो आकर्षण करतो).*

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः।
गृहित्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात्।।१५-८।।

"एकदा शरीरस्थ झाल्यावर त्या शरीराचा त्याग करतांना, वायू जसा आपल्याबरोबर तो जेथे जातो तेथे तेथे पुष्पादींठायी वसलेल्या परिमलास वाहून नेतो, त्याप्रमाणे या सहाही इंद्रियांचे ग्रहण करून तो नवीन शरीरात जातो."

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च।
अधिष्ठाय मनश्चाय विषयानुपसेवते।।१५-९।।

"हा जीवात्मा कान, डोळे, त्वचा वा त्वगेंद्रिय, रसना वा जिह्वा, नाक व मन या षष्टेंद्रियांचा अंगीकार करून त्यांच्याद्वारे विविध विषयांचे सेवन करून उपभोग घेतो."

संक्षिप्त क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार व चिद्विलास

१५-७ ते ९ हे तीन श्लोक म्हणजे ***संक्षिप्त क्षेत्र-क्षेत्रज्ञसंबंधविचार*** होत. क्षेत्राचे जे अनेक तत्त्वात विभाजन करून विश्लेषण करता येते, ते येथे केवळ ***सहा इंद्रिये व प्रकृतीचे कार्य वा गुण*** यात स्थूलमानाने करता येते. ***क्षेत्रज्ञ व जीवात्मा*** यांचे सनातन अभिन्नत्व प्रकट करून याच श्लोकांद्वारे अद्वैत तत्त्वज्ञानाची, तसेच चिद्विलासवादाचीही सिद्धी करता येते. याच श्लोकांवरून, विशेषतः ***"ममैवांशो जीव....सनातनः।"*** या श्लोकार्धावरूनच वेगवेगळ्या आचार्यांची भाष्ये वेगवेगळ्या तत्त्वज्ञानांच्या दिशेने धाव घेतांना दिसतात.

आपल्या अद्वैतभूमिकेस अनुसरत व चिद्विलासाच्या तत्त्वज्ञानाचा परिपोष यानिमित्ताने करतांना ज्ञानदेव पुढे असे म्हणतातः

ऐसें शरीराचि एवढें। जैं आत्मज्ञान वेगलें पडे।
तैं माझा अंशु ऐसें आवडे। थोडेपणें।।१५-३४३।।
समुद्र कां वायुवशें। तरंगाकार उल्लसे।
तो समुद्रांश ऐसा दिसे। सानिवा जेवीं।।३४४।।
तेवीं जडातैं जीवविता। देहअहंता उपजविता।
मी जीव गमे पंडुसुता। जीवलोकीं।।३४५।।

"स्वमायेने वेढला जाऊन देहधारण केल्यामुळे व तो देह म्हणजेच मी हे अज्ञान कवटाळून बसल्यामुळे, जीवात्मा जरी मीच असलो, तरी आत्मज्ञान नाहीसे झाल्याने त्यास मर्यादा प्राप्त होते आणि म्हणून तो माझाच केवळ अंश आहे असे वाटते. परिपूर्ण आत्मज्ञानयुक्त असा मी, आणि तो, हे या लक्षणांमुळे भिन्न भासणे त्यामुळे संभवते. तसेच जीवात्मा हा माझा अत्यल्पांश आहे असे या प्रकारे वाटते. वायूच्या योगाने समुद्रात लाटा निर्माण झालेल्या दिसतात. त्या समुद्राहून वेगळ्या भासतात. तसेच त्या समुद्राचा एक अत्यल्पांश आहेत, हेही जाणवते. त्यांना उत्पत्ती, स्थिती व लय आहे, हे पण दिसते. पण त्यांचे उगमस्थान हे समुद्रच आहे; स्थिती पण समुद्रच आहे व लय पण समुद्री जलातच होतो. त्या समुद्रांश अशा म्हणूनच वाटतात. त्यांच्या प्रकटीकरणास निमित्त होते ते वायूचे. हे अर्जुना! याचप्रमाणे स्वमायावशे जडास चेतनता प्रदान करणारा व देह म्हणजे मीच असा अहंकार निर्मिणारा जो मी, तो या जीवलोकी ***जीव*** म्हणून भासतो."

पैं जीवाचियां बोधा। गोचरु जो हा धांदा।
तो जीवलोकशब्दा। अभिप्रावो।।१५-३४६।।
अगां उपजणें निमणें। हे सांचचि जैं कां मानणें।
तो जीवलोकु मी म्हणें। संसारु हन।।३४७।।

"आणि ***जीवलोक*** या शब्दाचा माझा अभिप्राय ऐक! देह म्हणजेच मी हा स्वल्पबोध असणाऱ्या माझा हा जो गोचर होण्याचा व्यापार आहे, त्याला मी ***जीवलोक*** असे म्हणतो. जडाला चेतनत्व प्रदान करून जीव म्हणून उपजणे, चेतनत्व निघून जाऊन देहाचे निमाणे, आणि हा सर्व व्यापार अज्ञानवशे खराखुरा आहे, असे जे मानणे; त्याला ***जीवलोक*** अथवा ***संसार*** म्हणावे. असो."

एवंविध जीवलोकीं। तूं मातें ऐसा अवलोकीं।
जैसा चंद्रु कां उदकीं। उदकातीतु।।१५-३४८।।
पैं काश्मीराचा रवा। कुंकुमावरी पांडवा।
आणिका गमे लोहिवा। तो तऱ्हीं नोहे।।३४९।।
तैसें अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडें।
परि कर्त्ता भोक्ता ऐसे आवडे। तैं जाण गां भ्रांती।।३५०।।

"या जीवलोकी मी, म्हणजे जसा चंद्र प्रतिबिंबरूपाने उदकात प्रतिभासत असूनही उदकातीत असतो तसा, जीवरूपाने जीवलोकी दिसत असूनही संसारातीत असणारा असा आहे. अथवा स्फटिकाचा तुकडा केशरावर ठेवल्यामुळे लालसर जरी दिसला, तरी तो जसा लाल रंगाचा नसतो; त्याप्रमाणे जीवरूपे जरी मी स्वल्प, क्रियावान, कर्ता, भोक्ता असा मायेच्या योगाने दिसत असलो, तरी मज शुद्ध निरञ्जनाचे उपजणे-निमणे कसे संभवणार!"

किंबहुना आत्मा चोखटु। होऊनि प्रकृतीसीं एकवटु।
बांधें प्रकृतिधर्माचा पाटु। आपणपयां।।१५-३५१।।

"मी जसाच्या तसाच अनदित्व न भंगलेला, अक्रियत्व न खंडलेला, असाच असतो आणि जीव म्हणून कर्ता व भोक्ता असे माझे जे स्वरूप दिसते, ती निव्वळ भ्रांती होय. किंबहुना विशुद्ध आत्मतत्त्वच प्रकृतीशी युक्त होऊन, तिच्या धर्माचा अंगीकार करून, आपणांस जेव्हा अज्ञानाने बद्ध करून घेते, तेव्हा ते जीवरूपाने गोचर होत असले, तरी आत्मतत्त्वाशी अभिन्नच असते."

जीव व प्रकृति

असा हा जीव मग प्रकृतिकार्यात कसा रममाण होत, ते ऐकाः

पैं मनादि साही इंद्रियें। श्रोत्रादि प्रकृतिकार्यें।
तियें माझी म्हणौनि होएं। व्यापारारूढु।।१५-३५२।।
जैसें स्वप्नीं परिव्राजें। आपणपयां आपण कुटुंब होईजे।
मग तेयांचेनि धांविजे। मोहें सैरा।।३५३।।
तैसा आपुलियां विस्मृति। आत्मा आपणचि प्रकृति।
सारिखा गमोनि पुढुति। तियेसींचि भजे।।३५४।।

"जीव हा आत्माच जरी असला तरी प्रकृतीच्या संगाने तिचे कार्यरूप असणारी मनासहित श्रोत्रादी सहाही इंद्रिये आपली म्हणून कर्मव्यापारारूढ होतो. संन्याशाला स्वप्न पडून त्यात आपले कुटुंब दिसावे - म्हणजे वस्तुतः कुटुंब नसतांना स्वतःच स्वप्नलोकी ते व्हावे आणि मग त्या कुटुंबाच्या मोहाने धावत सुटावे; त्याप्रमाणे स्वस्मृतीचा नाश झाल्याने आत्मा आपल्याला प्रकृतिसमच समजू लागून विषयांठायी आसक्त होतो."

मनाचां रथीं वलघें। श्रवणाचियां द्वारां निघे।
मग शब्दाचियां रिघे। रानामाजीं।।१५-३५५।।
तोचि प्रकृतिचा वागोरा। करी त्वचेचियां मोहरा।
आणि स्पर्शाचियां घोरा। वना जाय।।३५६।।
कोण्हें एकें अवसरीं। रिघौनि नेत्राचां द्वारीं।
मग रूपाचां डोंगरीं। सैरा हिंडें।।३५७।।
कां रसनेचियां वाटा। निघौनि गां सुभटा।
रसाचा दरकुटा। भरोंचि लागे।।३५८।।
ना तन्हीं एणेंचि घ्राणें। देहेशु करी निघणें।
मग गंधाची दारुणें। आडवें लंघी।।३५९।।

"मग तो श्रवणाच्या द्वाराने शब्दसुखाच्या रानीवनी हिंडत सुटतो. प्रकृतीकडून स्वतःस असा लगाम लावून घेतो आणि तिने तो लगाम त्वगेंद्रियसुखाच्या दिशेने खेचला की हा त्या नादास लागतो आणि स्पर्शविषयरूपी घोर अरण्यात प्रवेशतो. आणि जर नेत्रद्वारी रिघाला तर रूपविषयाने लुब्ध होऊन दृश्यसुखाच्या डोंगरकडा पालथ्या घालण्यास उद्युक्त होतो. शरीरस्थ हा जीव जेव्हा रसनेच्या वाटेने जाऊ लागतो, तेव्हा तो रसांनी आपल्या जठराची दरी भरून घेऊ लागतो. अन हा देहेश जर घ्राणमार्गे आक्रमण करू लागला तर गंधविषयाची दारुण अरण्ये लंघून जातो."

ऐसेनि देहेंद्रियेंनायकें। धरूनि मन जवळिकें।
भोगिजती शब्दादिकें। विषयभरणें।।१५-३६०।।

"अशा प्रकारे देह अन इंद्रिये यांचा स्वामी असूनही आपणांस प्रकृतीचा दास समजून बद्ध झालेला आत्मा शब्दादिक विषयालंकार मिरविण्यात धन्यता मानतो; विषयोपभोगात मनाच्या सहवासाने लुब्ध होऊन गढून जातो."

जीवाचे शरीरधारण

या जीवात्म्याची ही प्रकृतिकर्षित अवस्था तो जेव्हा शरीर धारण करतो, तेव्हाच दृग्गोचर होते व प्रकर्षाने जाणवते. याबाबतच्या ज्ञानदेवांच्या ओव्या अशा आहेत:

परि कर्त्ता भोक्ता ऐसें। हे जीवाचें तैंचि दिसे।
जैं शरीरीं कां पैसे। एकाधिये।।१५-३६१।।
जैसा आथिला आणि विलासिया। तैंचि वोलखो ये धनंजया।
जैं राजसेव्या ठाया। वस्तीसि ये।।३६२।।
तैसा अहंकर्तृत्वाचा वाढु। कां विषयेंद्रियांचां धुमाडु।
हा जाणिजे तैं निवाडु। जैं देह पावे।।३६३।।

"जीवाची कर्ता वा भोक्ता अशी अवस्था तो जेव्हा एखाद्या शरीरात प्रवेश करतो, तेव्हाच दिसते. एखादा ऐश्वर्यसंपन्न आणि विलासी पुरुष तेव्हाच ओळखता येतो, जेव्हा, हे धनंजया! तो विलास करण्यास योग्य अशा राजधानी किंवा तत्सम मोठाल्या नगरी येतो. जीवाचे कर्तृत्व व भोक्तृत्व प्रकटवण्यास उपयुक्त असा देह जेव्हा त्यास मिळतो, तेव्हां त्याच्याठायीचे अहंकाराचे आधिक्य किंवा विषय आणि इंद्रिये यांचा धुमाकूळ स्पष्ट होतात."

अथवा शरीरांतैं सांडी। तन्हीं इंद्रियांची तांडी।
हे आपणयांसवें काढी। घेऊनि जाये।।१५-३६४।।
जैसा अपमानिला अतिथी। ने सुकृताची संपत्ती।
कां साइखडेयाचि गति। सूत्रतंतू।।३६५।।
ना ना मावलतेनि तपनें। नेईजति लोकांची दर्शनें।
हे असो द्रुति पवनें। नेईजे जैसीं।।३६६।।
तेवीं मनःषष्ठा ययां। इंद्रियांतैं धनंजया।
देहराजु ने देहा-। पासूनि गेला।।३६७।।

"हा जीव असा प्रकृतीच्या पूर्णतया अधीन झाला असल्याने जेव्हा याला एखाद्या शरीराचा त्याग करणे भाग पडते, तेव्हाही तो आपल्यासवे या मनासहित सहाही इंद्रियांचा समुदाय त्या शरीरातून बाहेर काढतो आणि जेथे जातो, तेथे बरोबर घेऊन जातो. यजमानाने उपेक्षिलेला अतिथी त्याची पुण्यसंपदा जशी आपल्याबरोबर घेऊन जातो; किंवा कळसूत्री बाहुल्याची हालचाल करण्याची शक्ती जसा त्याला हलवणारा दोरा आपल्याबरोबर ठेवतो; किंवा सूर्य मावळतांना ज्याप्रमाणे प्राण्यांचे दृष्टिसामर्थ्य स्वतःबरोबर घेऊन जातो; किंबहुना वायू जसा आपल्याबरोबर जाईल तेथे सुवास वाहून नेतो; त्याप्रमाणे हा देहराज आत्मा जेव्हा देहापासून विलग होतो, तेव्हा आपल्याबरोबर मनादी सहा इंद्रिये घेऊन जातो."

जन्ममृत्युचक्र

मग येथे अथवा स्वर्गीं। जेथ जैं देह आपंगी।
तेथ तैसेंचि पुढति पांगीं। मनादिक।।१५-३६८।।
जैसा मालवलियां दिवा। प्रभेसि जाय पांडवा।
मग उजललियां तेथ तेधवां। तैसाचि फांकें।।३६९।।
परि ऐसैसियां राहाटी। अविवेकियांचियें दिठी।
एतुलें हे किरीटी। गमेचि गां।।३७०।।
जैं आत्मा देहा आला। आणि विषयो एणेंचि भोगिला।
अथवा देहोनि गेला। हे सांचचि मानी।।३७१।।
येन्हवीं येणें आणि जाणें। कां करणें आणि भोगणें।
हे प्रकृतिचें तेणें। मानियेलें।।३७२।।

"त्यानंतर इहलोकी अथवा स्वर्गलोकी जसा देह प्राप्त होईल त्याप्रमाणे हा आत्मा त्या इंद्रियादी समुदायास पुनः त्यात घालतो.

दिवा मालविल्यावर प्रभेसह प्रकाश निघून जातो आणि तो पुनः लावला की प्रकाश व प्रभेसह फाकतो. त्याप्रमाणे आत्मा नवीन देहात इंद्रियांसह प्रवेशून विषयांचा पुनः धुमाकूळ घालू लागतो. हा त्याचा उपक्रम वा राहटी एका देहामागून दुसरा, दुसऱ्यानंतर तिसरा देह... अशी चालू राहते. त्याचे हे जाणेयेणे, विषयोपभोग घेणे, हे पाहून अविवेकी मूढ लोकांना असे वाटते की जीवात्माच देहस्थित होतो आणि जातो; विषय उपभोगणारा तो हाच! त्यांची ही समजूत इतकी ठाम असते की देहादी धारण करणे किंवा त्यागणे, कर्तृत्व आणि भोक्तृत्व, ही सर्व प्रकृतिकार्येच असूनही त्यांना ती आत्म्याची वाटतात."

आत्मतत्त्व::::

देह व आत्मतत्त्वाचा संबंध

याविषयी गोपालकृष्णांची उक्ती अशी आहेः

उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम्।
विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः।।१५-१०।।

"शरीर सोडून जाणाऱ्या, शरीरामध्ये स्थित होणाऱ्या, विषयोपभोग घेणाऱ्या वा त्रिगुणांनी युक्त होणाऱ्या या जीवात्म्याचे खरे स्वरूप अज्ञानी विमूढ लोकांस दिसत नाही; ते फक्त ज्ञानचक्षू असणाऱ्यांनाच दिसते."

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम्।
यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः।।१५-११।।

"अभ्यास करणारे योगी आत्मस्थ असणाऱ्या या जीवात्म्याचे खरे स्वरूप प्रयत्नांती पाहतात; परंतु शास्त्रादी प्रमाणांनुसार न वागून असंस्कृत अंतःकरणयुक्त राहिलेले अविवेकी पुरुष मात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करूनसुद्धा याचे खरे स्वरूप जाणून घेऊ शकत नाहीत."

यापूर्वी गीता *श्लोक क्र. १५-७ ते ९* ***("ममैवांशो जीवलोके... ...मनश्चायं विषयानुपसेविते।।")*** यातून व्यक्तवलेला ***सारभूत क्षेत्रविचार क्षेत्रज्ञ*** विचाराच्या सीमारेषेवर नेऊन पोहोचवला आहे, तो वरील *१५-१० व ११* या श्लोकांतून. जीवात्मा हा आपलाच सनातन अंश आहे, हे सांगून झाले. तो प्रकृतिकार्यास आपलेच मानून देहांतरे कशी करतो व विषयोपभोगात कसा गुंगून जातो, हेही स्पष्ट करून झाले. आता वरील या दोन श्लोकांतून *(१५-१० व ११)* या जीवात्म्याचे खरे स्वरूप स्पष्ट केले आहे. हा ***क्षेत्रज्ञविचार*** या निमित्ताने ज्ञानदेवांनी कसा मांडला आहे, ते पाहू याः

परि देहाचें मोटकें उभें। आणि चेतना तेथ उपलभे।
तियें चलवलीचेनि लोभें। आला म्हणती।।१५-३७३।।
तैसेंचि तेयां संगती। इंद्रियें आपलालां अर्थी वर्तती।
तेयां नांव सुभद्रापती। भोगणें जेयां।।३७४।।
पाठीं भोगक्षीण आपैंसें। देह गेलियां तैं न दिसे।
तेथ गेला गेला ऐसें। बोभाटती गां।।३७५।।

"प्रकृतिकार्य असे देहाचे मुटकुळे उत्पन्न होते आणि त्यास चैतन्य प्राप्त होते. ते कार्य करू लागते. त्याच्या चलनवलनादी क्रियांनी भ्रमित होऊन देहात आत्मा आला आहे, असे लोक म्हणतात. त्याच्या संगतीने इंद्रिये आपापल्या विषयात प्रवृत्त होऊन वर्ततांना दिसली की आत्मा भोक्ता आहे, असेही समजतात. भोग भोगण्यास असमर्थ असा देह गळून पडला की कर्तृत्व व भोक्तृत्व ही प्रतीत न झाल्याने, आत्मा देहातून निघून गेला आहे, असा ओरडा करतांना हेच लोक दिसतात."

पैं रुखु डोलतु देखावा। तऱ्हीं वारा वाजतु मानावा।
रुखु नसें तेथ पांडवा। नाहीं तो गां।।१५-३७६।।
कां आरिसा समोर ठेविजे। आणि आपणपें तेथ देखिजे।
तऱ्हीं तेधवांचि जालें मानिजे। काय आधीं नाही।।३७७।।
कां परता केलियां आरिसा। लोपु जाला तेयां आभासा।
तऱ्हीं आपणपें नाहीं ऐसा। निश्चयो करावा।।३७८।।
शब्द तऱ्हीं आकाशाचा। परि कपालीं पिटे मेघांचां।
कां चंद्रीं वेगु अभ्राचा। आरोपिजे।।३७९।।

"अर्जुना! वृक्ष डोलतांना दिसला तरच वारा वाहत आहे, असे समजावे आणि जेथे वृक्ष नाही तेथे वारा वाहत नाही, असे मानावे काय! आरसा आपल्यासमोर ठेवल्यावरच आपले प्रतिबिंब त्यात पाहून आपण आहोत, असे ठरवावे आणि त्यापूर्वी आपण नव्हतो असा निश्चय करावा काय! किंवा आरसा बाजूला केल्यावर त्या प्रतिबिंबाचा लोप होताच आपण नाहीसे होतो की काय! मेघ गर्जतांना दिसतात. खरे तर ***शब्द*** हा आकाशाचा गुण आहे, मेघांचा नव्हे. तरी तो मेघांच्या माथी मारला जातोच ना! किंवा आकाशात अभ्रांच्या हालचालीमुळे त्यांच्यामागील चंद्र हा चालतांना दिसतो व म्हणून चंद्र चालतो आहे, असे अजाण लोक म्हणत नाहीत काय!"

तैसें होईजे जाईजे देहें। तैं आत्मसत्तें अविक्रियें।
निष्टंकिती गां मोहें। आंधले तैं।।१५-३८०।।

"त्याचप्रमाणे देहाचे होणे-जाणे, उपजणे-नाश पावणे, यांच्याशी आत्मसत्तेचा काहीच संबंध नसूनही ते आंधळे अविवेकी मूढ लोक तसा संबंध जोडतात. ते समजतात की आत्माच उपजतो आणि मरतो; तोच भोगतो आणि कार्य करतो. वास्तविक ती आत्मसत्ता अविकृत, अविकारी, अविनाशी अशी असूनही अज्ञानाने वेष्टिलेले ते ज्ञानदृष्टी न लाभलेले लोक आत्म्यावर देहाच्या गुणांचा आरोप करतात.

"चैतन्य चढे ना वोहटे"

परंतु ज्ञानदृष्टी लाभलेले मात्र सत्यास जाणतातः

तेथ आत्मा आत्मयाचां ठायीं। देखिजे देहींचा धर्मु देहीं।
ऐसेस देखणें तैं पाहीं। आन आहाति।।१५-३८१।।
ज्ञानें कां जेयांचें डोळें। देखौनि न राहती देहींचें खोलें।
सूर्यरश्मी आणियालें। ग्रीष्मीं जैसें।।३८२।।

तैसीं विवेकाचेनि पैसें। जेयांचि स्फूर्ती स्वरूपी बैसें।
तैं ज्ञानिये देखती ऐसें। आत्मयांतें।।३८३।।

"ज्ञाते मात्र देहाचे व्यापार हे देहाच्या गुणधर्मांमुळे होतात, हे जाणून जीवात्मा आत्म्याठायी जसाच्या तसा आहे, असे पाहतात. अशी ही डोळस ज्ञानदृष्टी त्यांना लाभलेली असते. ग्रीष्मऋतुकाळी सूर्याची प्रखर किरणे जसे अभ्रपटल भेदून बाहेर पडतात, त्याप्रमाणे तीक्ष्ण ज्ञानदृष्टी लाभलेले त्यांचे डोळे या देहाच्या खोळीतून आरपार पाहतात. विवेकाच्या विस्ताराने आत्मस्वरूपाच्याठायी स्थिरावलेल्या त्यांच्या प्रज्ञेस देहांतर्यामी असणारा जीवात्मा हा वस्तुतः आत्माच आहे, असे दिसते."

जैसें तारांगणीं भरलें। गगन समुद्रीं बिंबलें।
परि तैं तुटौनि नाहीं पडिलें। ऐसें निवडे।।१५-३८४।।
गगन गगनचि आहे। हे आभासें तैं वायें।
तैसा आत्मा देखती देहें। गंवसलाही।।३८५।।

"नक्षत्रांनी खच्चून भरलेल्या तारांगणाचे समुद्रात प्रतिबिंब पडते; त्यावरून तारामंडल तुटून समुद्रात पडले आहे, असा निवाडा कोणी करत नाही. कारण गगन हे आपल्याचठायी, गगनीच, जसेच्या तसे असते. त्याचप्रमाणे त्या ज्ञान्यांना देहाच्या मुटकुळ्यात जीवात्मा जरी गवसलेला दिसला, तरी तो आत्म्याच्याठायी जसाच्या तसा असल्याचे दिसत असते."

खलालाचां लगबगीं। फेडूनि खलालाचां भागीं।
देखिजे चंद्रिका कां उगी। चंद्रीं जेवीं।।१५-३८६।।
कां नाडरचि भरे शोषें। सूर्यु तो जैसा तैसाचि असे।
देह होतां जातां तैसें। देखती मातें।।३८७।।

"खळखळ वाहणाऱ्या पाण्यात पडलेले चांदणे खळखळाटाबरोबर चांचल्याने हलतांना जरी दिसत असले, तरी त्या खळखळाटापलीकडे जाऊन पाहणारास चांदणे चंद्राच्याठायी जसेच्या तसे विसावलेले दिसते; किंवा पाण्याचे डबके भरते-आटते, त्याबरोबर त्यात पडणारे सूर्याचे प्रतिबिंब प्रकटते आणि लोपते; सूर्य मात्र तरीही आपल्याठायी जसाच्या तसाच राहतो. त्याचप्रमाणे ते ज्ञाते देहाच्या स्थित्यंतराकडे पाहूनसुद्धा जाणतात की आत्मा जसाच्या तसा आहे."

घटुमठु घडलें। तैंचि पाठीं मोडलें।
परि आकाश तैं संचलें। असतचि असे।।१५-३८८।।
तैसें अखंडें आत्मसत्तें। अज्ञानदृष्टिकल्पितें।
हे देहचि होते जातें। जाणती फुडें।।३८९।।
चैतन्य चढे ना वोहटे। चेष्टवी ना चेष्टे।
ऐसें आत्मज्ञानें चोखडें। जाणती तैं ।।३९०।।

"घटमठ घडविले अन् नंतर मोडले, तर आकार धारण करते ती माती; आकाश जरी त्या त्या वेळी घटाच्या वा मठाच्या आकाराचे दिसत असले, तरी तसा आकार धारण न करता, आपल्याठायी जसेच्या तसेच असते. याचप्रमाणे एकाच अखंड आत्मसत्तेवर अज्ञानदृष्टीने कल्पिलेले हे देहच होत जात असतात; आत्मसत्ता ही अभंग, अखंड, अविकारी, अविनाशी, निराकार अशी जशीच्या तशीच असते; हे ते ज्ञानी पुरुष पक्के जाणतात. चैतन्य वाढत नाही; तसेच ते ओसरतही नाही. ते कर्मचेष्टा करत नाही; विषय उपभोगत नाही; तसेच कर्मचेष्टा वा विषयोपभोग कोणाकडून करवतही नाही; असे शुद्ध आत्मज्ञानाच्या योगाने त्यांनी जाणलेले असते."

आत्म्याची ओळख का होत नाही

अशी ही ज्ञानदृष्टी लाभणे मूढजनांसाठी किती दुरापास्त आहे, हे सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणि ज्ञानही आपैतें होईल। प्रज्ञा परमाणुही उगाणा देईल।
सकल शास्त्रांचें येईल। सर्वस्व हातां।।१५-३९१।।
परि तैं व्युत्पत्ति ऐसीं। जऱ्हीं विरक्ती न रिगे मानसीं।
तऱ्हीं सर्वात्मका मजसीं। नव्हेचि भेटी।।३९२।।
पैं तोंड भरो कां विचारा। आणि अंतःकरणीं विषयांसीं थारा।
तऱ्हीं नातुडे धनुर्धरा। त्रिशुद्धीं मी।।३९३।।

"आणि सर्वज्ञताही अंगी येईल; प्रज्ञायोगे सृष्टीतील परमाणू न् परमाणूचे रहस्यही उकलेल; समस्त शास्त्रादींचे सर्वस्वही हस्तगत होईल; परंतु एवढे सर्व सारस्वत धन आपलेसे जरी झाले, तरी जोपावेतो वैराग्याने मनात घर केलेले नाही, तोपावेतो मज सर्वात्मकाची भेट होऊ शकत नाही. सर्व तत्त्वविचार जरी मुखोद्गत असला, तरी जोपावेतो अंतःकरणात विषयांना थारा आहे, तोपावेतो, हे धनुर्धरा! मी सापडणे त्रिवार अशक्य आहे."

हां गां वोसणतयाचां ग्रंथीं। काईं तुटती संसारगुंती।
कीं परिवसविलियां पोथी। वाचिलीं होये।।१५-३९४।।
नाना बांधौनियां डोळें। घ्राणीं लाविजती मुक्ताफळें।
तऱ्हीं तेयांचें काय कळे। मोल मना।।३९५।।
तैसा चित्तीं अहंते ठावो। आणि जीह्लें सकल शास्त्रांचा सरावो।
ऐसेनि कोडी एक जन्म जावो। परि न पविजे मातें।।३९६।।

"ग्रंथ इतका पाठ केला की स्वप्नातही तोच बरळला जावा; असे असले तरी त्याने काय संसारग्रंथी तुटतील काय! किंवा ***पोथी आणून तिची केवळ स्थापना करण्यानेच काय ती वाचली असे होणार आहे!*** मोत्यांची किंमत पारखतांना जर पारखण्याचे इंद्रिय म्हणजे जे नेत्र, ते बांधून ठेवले आणि घ्राणेंद्रियाने त्यांना हूंगून त्यांचे पाणी जोखण्याचा आटापिटा केला, तर काहीतरी पारख करता येईल काय! त्याचप्रमाणे आत्म्यास पारखण्यासाठी जी अंतःकरणाची शुद्धी असावी लागते, त्याऐवजी चित्तात अहंकाराचे ठाणे बळकट करून, मग कितीही शास्त्रे पढली; कितीही तत्त्वज्ञानाचे ग्रंथ मुखोद्गत करून पांडित्य मिरवले; तरी असे कोट्यवधी जन्म घालवून पण मी मिळणार नाही."

जो एकु मी कां समस्तीं। व्यापकु असे भूतजातीं।
ऐक तिये व्याप्ती। रूप करूं।।१५-३९७।।

"अशा अहंकारग्रस्त, संसारी, अकृतात्म, तपादींचे षट्संपत्तिसाधन न केलेल्या, असंस्कृत अंतःकरणाच्या विमूढ व अज्ञानी मोहमायाग्रस्त जीवांना माझी ओळख होणे निव्वळ असंभवच आहे. कारण मी जो असा आहे; जीवात्मा म्हणून जरी या देहांतरी ओळखला जात असलो, तरी समस्त यच्चयावत जीवमात्रात आणि वस्तुजातात व भूतमात्रात एकदेशी असा जो मी व्यापून राहिलो आहे; त्या माझे स्वरूप अहंकारास बाजूस सारल्याविना दिसणे शक्य नाही. अशा मज व्यापकाचे स्वरूप आता तुला वर्णन करून सांगतो, ते परीस."

आत्मा दाखविणारी गीतेची युक्ती

अशा त्या सर्वात्मक सर्वेश्वराचे वर्णन करतांना वेदसुद्धा जेथे मौनावले, तेथे गीता कोणती युक्ती योजते, ते पाहणे मनोरंजक तसेच बोधप्रदही आहे. ही युक्ती गीतेत वारंवार वापरण्यात आली आहे. किंबहुना ही युक्ती वापरलेला एक संपूर्ण अध्यायच गीतेत आहे, जो **विभूतियोग** या नामाने विश्रुत आहे.

परमात्म्याच्या सामर्थ्याने, ओजाने, तेजाने, ऐश्वर्याने, श्रीने, कांतीने, विशेष गुणांनी युक्त असणाऱ्या श्रेष्ठतम, उत्तमोत्तम भावांचा वा वस्तूंचा निर्देश करून, त्यांना गीता *भगवद्विभूति* म्हणते. अशा विभूतींचे वर्णन करून त्याद्वारे गीता भगवंतांकडे अङ्गुलिनिर्देश करत त्यांचे स्वरूपरहस्य प्रकट करते. हीच ती गीतेची लाघवी युक्ती होय.

या ठिकाणीसुद्धा त्या व्यापकाचे सर्वात्मक स्वरूप वर्णन करण्यासाठी याच युक्तीचा आधार घेत गीतामाउली गोपालांचे वचन सांगते, ते असेः

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्।
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम्।।१५-१२।।

"सूर्याठायी असणारे जे तेज समस्त जगाला प्रकाशित करते; चंद्र व अग्नीच्याही ठिकाणी जे आहे; ते तेज माझेच आहे, असे तू जाण."

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा।
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः।।१५-१३।।

"आणि पृथ्वीमध्ये प्रवेशून मी आपल्या ओजाने सर्व भूतात्मक जगतास धारण करतो व रसस्वरूप सोम होऊन तदद्वारे समस्त वनस्पतिजातांचे पोषण करतो."

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्।।१५-१४।।

"मी सर्व प्राण्यांच्या देहातील जठराग्नीत ***वैश्वानर*** या प्रसिद्ध नावाने प्रवेशतो आणि प्राण व अपान यांच्याशी संयुक्त असणारे ***भक्ष्य, भोज्य, लेह्य व चोष्य*** असे चतुर्विध प्रकारचे अन्न पचवतो."

विभूतिनिर्देशाचे प्रयोजन

या तीन श्लोकांचे पुढे परीक्षण करतांना शांकरभाष्यातील त्यासंबंधीच्या काही ठळक बाबींचा निर्देश केला पाहिजे.

"न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः। यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम्।।१५-६।।" या श्लोकात सूर्यादी ज्योती ज्या स्वयंप्रकाश पदास प्रकाशित करू शकत नाहीत, त्या पदाचे ते तेज माझे आहे, असे प्रभूंनी म्हटले होते. ***"ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः। ...।।१५-७।।"*** या श्लोकात घटाकाश जसे महाकाशाचा अंश असते, त्याप्रमाणे ***उपाधिभेदाने*** वा ***मायासंपर्काने*** परमात्म्यापासून झालेला ***अंश*** म्हणजे ***जीव*** असल्याचे म्हटले आहे.

"उत्क्रामन्तं स्थितं वापि ....।।१५-१०।।" व ***"यतन्तो योगिनश्चैनं ...।।१५-११।।"*** या श्लोकांतून त्या ***जीवात्म्याचे खरे स्वरूप परमात्माच असल्याचे*** स्पष्ट केले आहे. कल्पित भावाने परमात्म्याहून विभिन्न भासणारा जीवात्मा ज्या परमपदास पोहोचल्यावर पुनः संसारचक्रात गुरफटत नाही; त्या परमपदाचे ऐश्वर्य, सर्वात्मकत्व आणि समस्त जगद्व्यापारास असणारे त्याचे अधिष्ठान सांगण्याच्या हेतूने भगवंतांनी या गीता *१५-१२ ते १४* श्लोकांतून संक्षेपतः आपल्या विभूतींचे वर्णन केले आहे.

विभूतिमत्त्व

विभूति सांगण्याचा असा हेतू असला तरी विभूतिमत्त्वामुळे त्या त्या विभूतींठायी जे चैतन्य आविष्कारते, ते इतर वस्तुमात्रापेक्षा अधिक किंवा उण्या प्रमाणात नसून सर्वत्र समच असते. परंतु भिंत व आरसा हे जरी समान भावाने आपणासन्मुख असले, तरी केवळ आरशातच आपले प्रतिबिंब विशेषत्वाने दिसते. आरसा जितका अधिक स्वच्छ तेवढे ते प्रतिबिंब अधिक स्पष्ट दिसते. त्याचप्रमाणे विभूतींचेही आहे.

सत्त्वगुणाचे, प्रकाशाचे, ऐश्वर्याचे प्रकटन करणाऱ्या त्या त्या पदार्थातील परमात्मस्वरूप अधिकाधिक प्रतिभासित करण्याच्या त्यांच्या गुणधर्मानुरूप त्या त्या विभूतींचे श्रेष्ठत्व ठरविले जाते. अशा ज्या श्रेष्ठातिश्रेष्ठ विभूति गीतेत वेळोवेळी सांगितलेल्या आहेत, त्या मुख्यत्वेकरून ***विभूतियोग*** या गीतेच्या *दहाव्या* अध्यायात येतात. त्यांच्याबाबतही गीता म्हणते कीः

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतिनां परन्तप।
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया।।१०-४०।।
यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम्।।१०-४१।।
अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।।१०-४२।।

भगवंतांच्या दिव्य विभूति अनंत आहेत. ज्या या सर्व विभूति त्यांनी सांगितल्या आहेत, त्या केवळ अत्यंत संक्षेपाने सांगितल्या

आहेत. ज्या वस्तूत विभूतिमत्त्व आहे; ज्या वस्तू श्री व ऊर्जेने युक्त आहेत; त्या भगवंतांच्या तेजोंशापासून उत्पन्न झालेल्या आहेत. या सर्व विभूति सांगण्यामागे भगवंतांचा उद्देश केवळ हाच आहे की ***"परमात्मा केवळ त्याच्या एका अंशाने हे सर्व जगत विशेषरूपाने दृढतापूर्वक धारण करून त्यात स्थित असतो; समस्त भूते त्या परमेश्वराचे* 'पादोऽस्य विश्वा भूतानि' *अशी केवळ एक पाद आहेत;"*** या परमसत्याचे आपणास आकलन व्हावे." असो.

पंधराव्या अध्यायातील विभूति

आता ज्ञानदेव वरील *(१५-१२ ते १४)* श्लोकांस कोणते रूप देतात, ते निरखू याः

तर्‍हीं सूर्यासगट आघवीं। हे विश्वरचना जैं दावी।
तैं दीप्ती माझीं जाणावी। आद्यंतीं आहे।।१५-३९८।।
जल शोषूनि गेलियां सविता। ओलांश पुरवितसे जैं माघौता।
तैं चंद्रीं पांडुसुता। ज्योत्स्ना माझी।।३९९।।

"सूर्यासकट या समस्त विश्वरचनेला प्रकट करणारी ***दीप्ती*** माझीच आहे. ती दीप्ती, तो प्रकाश, ती आभा या विश्वाच्या आदि-मध्य-अंत या तिन्ही अवस्थात जशीच्या तशीच असते. सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळे जलांश नाहीसा होतो; आर्द्रतेच्या रूपाने तो जीवनांश परत पुरवणारी जी चंद्राठायीची ***ज्योत्स्ना*** वा प्रकाश वा चांदणे वा तेज, ते, हे पांडुसुता! माझेच आहे."

आणि दहनपचनसिद्धी। करीतसे जैं निरवधि।
तैं हुताशीं तेजोवृद्धि। माझीचि गां।।१५-४००।।
मी रिगालों असे भूतलीं। म्हणौनि समुद्रमहाजलीं।
हे पांसूचि ढेपली। विरेचिना।।४०१।।
आणि भूतेंहीं चराचरें। हे धरितसे जियें अपारें।
तियें मीचि धरीं धरे। रिगोनियां।।४०२।।

"अविश्रांतपणे दहन व शिजवणे या क्रिया पूर्णत्वास नेणार्‍या अग्नीठायी तेजाची वृद्धी जी असते, ती माझीच आहे; किंबहुना ***अग्नीचे प्रखर तेज*** म्हणजे मीच आहे. मी पृथ्वीतलास आधार दिला आहे; म्हणूनच महासागराच्या जलात ठेवलेली ही मातीची ढेपळी विरघळून जात नाही आणि ही धरणी भूतमात्रांनी वसलेली आहे, ती त्यांच्या भाराने दबून जात नाही. कारण तिच्यात प्रवेशून मीच त्यांना धारण करतो."

गगनीं मी पांडुसुता। चंद्राचेनि मिसें अमृता।
भरला जालों चालतां। सरोवरु।।१५-४०३।।
तेथौनि फांकती रश्मिकरु। तैं पाट पेलूनि अपारु।
सर्वौषधींचें आगरु। भरितु असे मी।।४०४।।
ऐसेनि सस्यादिकें सकळां। करीं धान्यजाती सुकाळा।
दे अन्नद्वारां जिव्हाला। भूतजातां।।४०५।।

"हे अर्जुना! आकाशामध्ये चंद्राच्या रूपाने तुडुंब भरलेले अमृताचे सरोवरही मीच झालो आहे. तेथून जी किरणे फाकतात, जो सोमाचा अपार स्रोत वाहतो; त्यास धारण करून सर्व वनस्पतिजात, औषधी, तृणादी, वृक्ष इ.सर्वांची आगरेच्या आगरे त्याने पोसून, त्या समस्तांची अभिवृद्धी मीच करतो. वनस्पतीतला ***रसात्मक*** असा म्हणून मीच आहे. अशा तर्‍हेने भात इ.सर्व धान्यांना विपुल करून त्या अन्नाद्वारे सर्व प्राणीमात्रांस जीवन देतो, तो मीच!"

आणि निफजविलें अन्न। तर्‍हीं तैसें कैंचें दीपन।
जेणें जिरूनि समाधान। भोगिती जीव।।१५-४०६।।
म्हणोनि प्राणिजाताचां घटीं। करूनि कंदावरी आगिठी।
दीप्ती जठरीं किरीटी। मीचि जालों।।४०७।।
प्राणापानाचां जोडभातीं। फुंकफुंकौनियां अहोरातीं।
आटीतसें नेणों किती। उदरामाजीं।।४०८।।
शुष्कें अथवा स्निग्धें। सुपक्वें कां विदग्धें।
परि मीचि गां चतुर्विधें। अन्नें पचीं।।४०९।।
एवं मीचि आघवें जन। जना जीववितें मीचि जीवन।
जीवनीं मुख्य साधन। वह्नीहीं मीचि।।४१०।।

"याप्रमाणे जे अन्न मी निपजवतो आणि त्याला शिजवतो; त्याचे जीवांच्या शरीरात दीपन होऊन ते जिरेल अन प्राणिमात्र संतुष्ट कसे होतील, यासाठी त्यांच्या शरीरात नाभिकंदावर आगटी तयार करून, हे अर्जुना, त्यांच्या जठरातील अग्नी मीच झालो आहे. प्राण व अपानरूपी जोडभात्याने फुंकफुंकून रात्रंदिवस सर्व प्राण्यांच्या उदरामधील किती अन्न मी पचवतो त्याला गणतीच नाही. शुष्क आणि स्निग्ध, तसेच चांगले शिजलेले वा करपलेले, असे चतुर्विधही प्रकारांचे अन्नपदार्थ मी पचवितो. याप्रमाणे हे समस्त भूतजात म्हणजे मीच आहे; त्यांना जीवनसुद्धा मीच आहे; अन्न मीच आहे आणि अन्नाचे पाचन करणारा दीप्त अग्नीही मीच आहे."

याबाबत श्रीशंकराचार्यसुद्धा असे म्हणतात कीः ***"वैश्वानर अग्नी*** हा अन्न खाणारा आहे आणि ***सोम*** हे खाल्ले जाणारे अन्न आहे. म्हणून हे अखिल जगत अग्नी व सोमस्वरूप आहे व त्याप्रमाणे त्यांना जाणणार्‍या मनुष्यास अन्नदोष बाधत नाहीत."

सर्वात्मक* , *सर्वांघटी* सम असणारा *आत्माराम

सर्व दूर भरून राहिलेल्या त्या सर्वात्मकाचे रूप प्रकट करतांना ज्ञानदेव पुढे असे म्हणतातः

आतां ऐसियाहीवरी काईं। सांगो व्याप्तीचि नवाई।
येथ दुजें नाहींचि घेईं। सर्वत्र मी गां।।१५-४११।।
तर्‍हीं कैसेनि पां वेखें। सदा सुखियें एकें।
एकें तियें दुःखें। क्रांतें भूतें।।४१२।।
जैसीं सगलियें पाटणीं। एकेंचि दीपें दिवे लावणीं।
जालियां कां न देखणीं। उरली एकें।।४१३।।
ऐसीं हन उखीविखी। करीत आहासि मानसीं कीं।
तर्‍हीं परीस तैंहीं निकीं। शंका फेडीं।।४१४।।

"हे अर्जुना! मीच सर्वत्र कसा भरलेलो आहे; मज व्यापकास रूप करणे किती अवघड आहे; हे समजून घे. माझ्या व्याप्तीची अपूर्वता अशी आहे की या समस्त विश्वात माझ्याव्यतिरिक्त इतर कोणी दुसरे म्हणून नाहीच. मीच सर्व भूतमात्रात सम असतांना त्यातील काही सदा सुखी, तर काही दुःखाने पीडलेली का असावीत; असा विचार तुझ्या मनात येत असेल. नगरातील सर्व दीप एकाच दीपावर लावले, तरी काही दिवे प्रकाश न पाडणारे असे का रहावेत! हे तर्कवितर्क तू करत असशील, तर ती शंकासुद्धा निवारण करून घे."

पैं आघवा मीचि असे। येथें नाहीं कीर अनारिसें।
परि प्राणियांचिया उल्लासें। बुद्धि ऐसा।।१५-४१५।।
जैसे एकचि आकाशध्वनी। वाद्यविशेषीं आनानीं।
वाजावें पडें भिन्नीं। नादांतरीं।।४१६।।
कां लोकचेष्टीं वेगळालां। हा जो एकचि भानु उदैला।
तो आनानीं परी गेला। उपेगासीं।।४१७।।
नाना बीजधर्मानुरुप। झाडीं उपजवीं आप।
तैसें परिणमलें स्वरूप। माझें जीवा।।४१८।।

"हे अवघे विश्व म्हणजे मीच आहे; येथे दुसरे कोणीच नाही; हे निखालस सत्य आहे. परंतु व्यक्त होत असतांना मी प्रत्येक प्राण्याच्या अंतःकरण स्वभावानुसार प्रकटतो. ध्वनी हा आकाशाचा गुण सर्वत्र सम असतो. परंतु वाद्यविशेषानुसार प्रत्येक वाद्यातून बाहेर पडणारा ध्वनी नाना नादरूपांनी येतो. सूर्य प्रकाशतो, तो एकाच प्रकारे. पण विविध लोकांच्या वेगवेगळ्या व्यापारांस चालना देतांना तो विविध प्रकारे नाही का त्यांच्या उपयोगी येत! वनस्पतिजातांचे पोषण करणे हा जलाचा गुणधर्म आहे. एकच प्रकारचे असे जल विविध बीजांच्या गुणधर्मानुसार वेगवेगळ्या प्रकारांची झाडे जसे उत्पन्न करते; त्याचप्रमाणे भिन्नभिन्न जीवांच्या स्वभावानुसार त्यांच्याद्वारे माझे एकच स्वरूप भिन्नभिन्नरीत्या अभिव्यक्तीस येते."

अगां नेणां आणि चतुरा। पुढां निलयाचां दुसरा।
नेणां सर्पत्वें जाला एरा। सुखालागीं।।१५-४१९।।
हे असो स्वातीचें उदक। शुक्तीं मोतीं व्यालीं विख।
तैसा सज्ञानासीं मी सुख। दुःख तो अज्ञानासीं।।४२०।।

"आणि मीच सर्वत्र भरलेला असूनही काही जीवांना सदा सुखकर तर काहींना दुःखमय का वाटतो, हे तू विचारलेस, तर ऐक! नीलरत्नांचा हार पुढ्यात अवचित पडला असता जाणकारास त्यापासून सुख होईल व अज्ञान्यास तो सर्प आहे, असे वाटून दुःख व भय उत्पन्न होईल; किंवा स्वाती नक्षत्री पडलेले पावसाचे पाणी जसे शिंपल्यात मोती होते, तर सर्पाच्या अंगी विष होते; त्याचप्रमाणे माझे यथार्थ स्वरूप जे जाणतात, त्या ज्ञान्यांसाठी विश्वरूपाने व्यक्त असलेला मी माझ्या खऱ्या स्वरूपासह सदा सुखदायक ठरतो; आणि मला न जाणणाऱ्या अज्ञान्यांसाठी माझे हेच स्वरूप दुःखक्रांत करणारे ठरते."

समारोप

अशा प्रकारे आपण या **पञ्चम** स्कंधातील **जीवाचे स्वरूप** पाहत आहोत. त्यासाठी आता वळू या त्यातील शेवटच्या **उन्मेष क्र. २८- क्षर-अक्षर-उत्तम पुरुषविचार** यातून दिसणाऱ्या परमात्म्याच्या वास्तविक स्वरूपाकडे. त्यासाठी आपण पाहणार आहोत गीतेच्या *पंधराव्या* अध्यायातील उर्वरित **परमात्मस्वरूप : क्षर-अक्षर-उत्तम पुरुष** यांचा विचार!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::२८::
::परमात्मस्वरूप::
[क्षर-अक्षर-उत्तमपुरुषविचार]

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष २८:

गीता:
८:१
९:२,३४
१५:१८-२०
१८:५४-५८,६१-७०

ज्ञानेश्वरी:
४:१६०-१६५
१५:४२१-५९८
१६:४१-५१
१८:१४३५-१४४९

जीवाचे स्वरूप

::उन्मेष::२८::

::परमात्मस्वरूप::

[क्षर-अक्षर-उत्तमपुरुषविचार]

जीवदशेतील आत्मा::::

परमात्म्याची विशेष अभिव्यक्ती

सर्वत्र सर्वदूर असा हा जो ***परमात्मा*** आहे, तो विशेषेकरून सर्वांच्या ***हृदयाकाशात*** व्यक्त होतो. त्याबाबत गोपालकृष्ण म्हणतातः

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो -
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो -
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्।।१५-१५।।

"तसेच सर्वांच्या हृदयात मी अधिष्ठित असून, माझी स्मृती, माझे ज्ञान व त्यांचे अपोहन म्हणजे नाश ही सर्व माझ्यापासूनच होतात; आणि समस्त वेदांनी जे काय जाणावयाचे आहे, ते मीच! वेदांताचा कर्ता आणि वेद जाणणाराही मीच!"

जीवदशेतील आत्मारामाची ओळख

या भगवदुक्तीबद्दल ज्ञानदेवांचे स्पष्टीकरण असे आहेः

एरवीं सर्वांचां हृदयदेशीं। मी अमुका आहे ऐसीं।
जैं बुद्धि स्फुरे अहर्निशीं। तैं वस्तु गां मी।।१५-४२१।।
परि संतांसवें वसतां। योगज्ञानीं पैसतां।
गुरुचरण उपासितां। वैराग्येंसीं।।४२२।।
येणेंचि सत्कर्में। अशेषही अज्ञान विरमे।
जेयांचें अहं विश्रामे। आत्मरूपीं।।४२३।।
तैं आपैआप देखौनि देखीं। मियां आत्मेनि सदा सुखी।
एथ मीवांचूनि अवलोकीं। आन हेतु।।४२४।।

"अर्जुना! सर्व प्राणिमात्रांच्या हृदयाकाशात मी अमुक आहे असा जो अहंकार अहर्निश स्फुरण पावतो, तो मीच आहे. परंतु संतसमागमाने, योग व ज्ञानात स्थिर झाल्याने, गुरुभक्ती केल्याने व वैराग्य जोपासल्याने अज्ञान मुळातूनच लोपते. अशा सत्कर्मे उपासणाऱ्यांचा अहंकार आत्मरूपाशी स्थिरावतो; विसावतो. आपैसाच त्यांना मज आत्म्याच्या स्वरूपाचा साक्षात्कार होतो. माझे स्वरूप पावून ते सदैव सुखात - निजानंदात - निमग्न होतात. त्यांना माझा हा साक्षात्कार घडण्यामागे, त्यांचे अज्ञान जाऊन त्यांना स्वरूपज्ञान होण्यामागे, त्यांची स्वस्वरूपाची स्मृती जागृत होण्यापाठी मीच कारण आहे. माझ्याचमुळे त्यांच्याबाबतीत हे सर्व घडते; त्याला दुसरे कोणतेही कारण नाही."

अगां सूर्योदयो जालियां। सूर्ये सूर्यूचि पाहावा धनंजया।
तेवीं मातें मिया जाणावया। मीचि हेतु।।४२५।।
ना शरीरापरतें सेवितां। संसारगौरवचि ऐकतां।
देहीं जेयांचि अहंता। बुडौनि ठेली।।४२६।।
तैं स्वर्ग संसारालागीं। धांवतां कर्मभागीं।
दुःखाचां सेलभागीं। भागीन होती।।४२७।।

"सूर्योदय होतो, तेव्हा सूर्य पहावा तो सूर्याच्याचमुळे ना! त्याचप्रमाणे मज आत्मरवीचा उदय झाला की मला पाहण्यासाठी माझाच उपयोग होतो. द्रष्टाही मीच, दर्शनही माझेच, दृश्यही मीच अन दृष्टीही मीच, त्या दृष्टीचे कारणही मीच! असे हे माझे ज्ञान वा स्वरूप त्यावेळी असते. पण शरीरासक्त होऊन, संसारी लोकांत राहून, संसाराची गाथा श्रवण करतकरत ज्यांचा अहंकार देहाशी तादात्म्य पावतो; ते स्वर्ग व संसार यात सुख मिळवण्यासाठी जी कर्मचेष्टा वा धडपड करत असतात; त्यांना मात्र दुःखाच्या शेलक्या भागाचे वाटेकरी व्हावे लागते."

परि हेहीं होणें अर्जुना। मजचिस्तव तेयां अज्ञाना।
जैसा जागताचि हेतु स्वप्ना। निद्रेतैं होये।।१५-४२८।।
पैं अभ्रें दिवसु हारपला। तोही दिवसेंचि जाणो आला।
तेवीं मी नेणोनि विषयो देखिला। मजचिस्तव भूतीं।।४२९।।
एवं निद्रा कां जागणिया। प्रबोधुचि हेतु धनंजया।
तेवीं ज्ञाना अज्ञाना जीवांचियां। मीचि मूल।।४३०।।

"पण अर्जुना! हे त्यांचे अज्ञानसुद्धा माझ्यामुळेच असते. जागृत पुरुषच जसा त्याच्या निद्रा व स्वप्नावस्थांस कारणीभूत असतो; त्याचप्रमाणे ज्ञानाज्ञान व आत्मस्मृतिविस्मृति या अवस्थांना मीच कारणीभूत आहे. आकाशात अभ्र येऊन दिवसाचा प्रकाश जसा कमी झालेला दिवसाच्या प्रकाशामुळेच दिसतो; त्याचप्रमाणे विषयांमुळे माझे जे विस्मरण वा अज्ञान भूतमात्री प्रकट दिसते, त्यालाही कारण मीच आहे. प्राण्यांच्या निद्रित वा जागृत स्थितीला त्यांची मुळची जागृत अवस्थाच जशी कारण असते, तसाच जीवमात्रांच्या ज्ञान व अज्ञान या दोहोंसही मीच मूळ वा कारण आहे."

उपाधि व चैतन्य::::

वेदांनी केलेला स्वरूपाचा शोध व आत्मतत्त्व

वेदांचेही मूळ मीच आहे, या विधानाचे ज्ञानदेवकृत वर्णन पाहण्यासारखे आहेः

जैसें सर्पत्व कां दोरा। दोरुचि मूल धनुर्धरा।
तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा। मियांचि सिद्धु।।१५-४३१।।
म्हणौनि जैसा असे तैसया। मातें नेणोनि धनंजया।
वेदो जाणों गेला तो तंव तेयां। जालियां शाखा।।४३२।।

"दोरीवर भासणारे सर्पत्व किंवा दोरीचे यथार्थ ज्ञान यांना दोरीच जशी मूळ असते; त्याचप्रमाणे माझ्याबाबतचे ज्ञान आणि अज्ञान प्रकट होतात, त्यांना दोघांनाही मीच कारण आहे. हे न जाणल्यामुळे मी जसा आहे तसा मला जाणायला जेव्हा वेद पुढे सरसावला व मी म्हणजे केवळ ज्ञानच प्रवर्ततो, अशी ठाम समजूत त्याची जेव्हा झाली; तेव्हा ते काम त्याच्या आवाक्याबाहेरचे पडल्यामुळे भंगून त्याचे तुकडेतुकडे झाले. तेच वेदांच्या शाखा म्हणून ओळखले जातात. अथवा मला जसा आहे, तसा जाणता न आल्यामुळे, माझी ओळख नीट पटवून घेण्यात गफलत होऊन एकवाक्यता न होऊन, माझ्या स्वरूपाबाबत निराळी मतमतांतरे झाल्याने वेदांच्या अनुयायांच्या वेगवेगळ्या शाखा झाल्या, असेही म्हणेनास का!"

तऱ्हीं तिहीं शाखाभेदीं। मीचि जाणिजे त्रिशुद्धी।
जैसा पूर्वापर नदी। समुद्रचि ठी।।४३३।।
आणि महासिद्धांतापाशीं। श्रुति हारपती शब्देंसीं।
जैसिया सगंधा आकाशीं। वातलहरी।।४३४।।
तैसें समस्तही श्रुतिजात। ठाके लाजिलें ऐसें निवांत।
तैं मीचि करी यथावत। प्रकटोनियां।।४३५।।

"असे असले तरीही ज्याप्रमाणे पूर्ववाहिनी व पश्चिमवाहिनी अशा सर्वच नद्या सागरासच पावतात, त्याप्रमाणे त्या वेदाच्या तिन्ही शाखाभेदांद्वारे त्यांचे अंतिम प्राप्तव्यस्थान असणारा मीच एक खरोखर आहे. जशा गंधयुक्त वायुलहरी आकाशात विरतात, त्याप्रमाणे ***महासिद्धांतापाशी म्हणजे माझ्यापाशी*** येतात न येतात, तो वेद शब्दांसह मौनावतात. माझी चाहूल लागताच ती अगणित वेदशब्दराशी जी अशी लाजून स्तब्ध होऊन राहाते, तेव्हा तिचे शब्दलाघव मीच प्रकट होऊन यथावत पूर्वीसारखे आविष्कृत करतो. याप्रमाणे माझे ज्ञान मीच प्रकट करतो."

पाठीं श्रुतिसगट अशेख। जग हारपे जेथ निःशेख।
तैं निजज्ञानही चोख। जाणता मीचि।।१५-४३६।।
जैसें निदैलियां जागिजे। तेव्हां स्वप्नींचें कीर नाहीं दुजें।
परि एकत्वही देखों पाविजे। आपुलेंचि।।४३७।।
तैसे आपुलें अद्वयपण। मी जाणतसें दुजेनविण।
तेयांही बोधा कारण। जाणता मीचि।।४३८।।

"श्रुतींसह ज्यात समग्र सृष्टी निःशेषतया लोप पावते, ते निजज्ञान म्हणजे स्वरूपज्ञान उत्तमरीत्या जाणणाराही मीच आहे. ज्याप्रमाणे झोपलेला मनुष्य जागा झाला की स्वप्नातील वस्तूंचा व दृश्यांचा स्वतःशी भासणारा द्वित्त्वाभास नाहीसा होऊन आपले स्वतःचे ऐक्य किंवा एकलेपणा अनुभवतो, त्याला तो स्वतःच जसा कारण असतो; त्याप्रमाणे माझे अद्वयपण मी स्वतःच इतर कोणीही कारण न होताच जाणतो. दुसरे कोणीही जेथे नाही अशा या अद्वयपणाचा बोध माझ्यामुळेच केवळ प्रकटतो."

मग आगी लागलियां कापरा। ना काजली ना वैश्वानरा।
उरणें नाहीं वीरा। जेयापरी।।१५-४३९।।
तेवीं समूल अविद्या खाये। तैं ज्ञानही बुडौनि जाये।
तऱ्हीं नाहीं जैं कीर नोहे। आणि न साहे असणेंही।।४४०।।
पैं विश्व घेऊनि गेला मागेंसीं। तेयां चोरातैं कवण कें गिंवसीं।
जैं कोण्हीं एकी दशा ऐसीं। शुद्ध तैं मी।।१५-४४१।।
ऐसें जडाजड व्याप्ती। रूप करितां कैवल्यपती।
ठीं केली निरूपहितीं। आपुलां रूपीं।।४४२।।

"तेव्हा हे वीरा! जसा कापूर पेटवला की त्याची काजळीही मागे उरत नाही आणि अग्नीही मागे राहात नाही, त्याप्रमाणे जीवाची अविद्या वा अज्ञान समूळ नष्ट करून ती नाशवणारे ज्ञानसुद्धा जेथे बुडून जाते, तेव्हा ***'नाही, अशीही नाही';*** आणि ***'आहे, अशीही जी नाही';*** अशी जी एक कोणती विशुद्ध ज्ञानाज्ञानातीत अवस्था प्रकटते, ती म्हणजे ***निरञ्जन*** असा मीच होय. अशा माझ्या त्या स्वरूपाचा शोध घेणे म्हणजे समग्र विश्वच बगलेत मारून मागोव्यासह नाहीशा झालेल्या चोराचा तपास लावण्यासारखेच आहे!!"

ज्ञानदेव म्हणतातः "याप्रमाणे जड व चैतन्य यांची व्याप्ती दर्शवतांना, ज्ञान आणि अज्ञान, चर व अचर सृष्टीतील आपले स्वरूप स्पष्ट करतांना, त्या कैवल्याच्या राणा श्रीकृष्णाने आपल्या ***निरुपाधिक*** अशा स्वरूपाचा निर्णय प्रकट केला."

अर्जुनाची भगवंताच्या निरुपाधिकत्वाबाबत पृच्छा

जड व चैतन्य आणि भगवंतांचे निरञ्जन निरुपाधिक स्वरूपाचे हे विवेचन ऐकून अर्जुनाची जी अवर्णनीय स्थिती होते, त्याबाबत ज्ञानदेव म्हणतातः

तो आघवाचि बोधु सहसा। अर्जुनीं उमटला कैसा।
व्योमींचा चंद्रोदय जैसा। क्षीरार्णवीं।।१५-४४३।।
कां प्रतिभिंती चोखटें। समोरील चित्र उमटे।
तैसा अर्जुनें आणि वैकुंठें। नांदतसे बोधु।।४४४।।
तऱ्हीं बापा वस्तुस्वभावो।
फांवें तंव तंव गोडिये थांवो।..।।४४५।।

"श्रीकृष्णांनी केलेला तो निजस्वरूपाचा अवघा बोध अर्जुनाच्या अंतःकरणात, ज्याप्रमाणे नभांगणातील चंद्रोदयाचे क्षीरसागरी प्रतिबिंब पडावे, त्याप्रमाणे चोख प्रतिबिंबित झाला. चितारलेल्या भिंतीसमोरील चकचकीत गुळगुळीत भिंतीवर मूळ चित्राचे हुबेहूब प्रतिबिंब जसे उमटते, त्याप्रमाणे वैकुंठनायक श्रीकृष्णांच्या अंतरीचा स्वात्मबोध अर्जुनाच्या शुद्ध चित्तात तितकाच हुबेहूब नांदत होता. आणि त्या वस्तूचा स्वभाव कसा आहे, ते पाहा! जसजसा तिचा अनुभव येत जातो, तसतशी तिची गोडी वाढतच जाते."

....म्हणौनि अनुभवियांचां रावो। अर्जुन म्हणे।।४४५।।
जी व्यापकपण बोलतां। निरुपाधिक जैं आतां।
स्वरुप प्रसंगता। बोलिलें देवो।।४४६।।

तैं एकवेल अव्यंगपणें। कीजो कां मज सांगणें।
तेथ द्वारकेचां नाथु म्हणे। भलें केलें।।४४७।।
पैं अर्जुना आम्हांहीं वाडेंकोडें। अखंड बोलों आवडे।
परि काय कीजे न जोडे। पुसतें ऐसें।।४४८।।

स्वात्मानुभवियांचा शिरोमणी अर्जुन म्हणूनच म्हणालाः "देवा! आताच आपले व्यापकपण निरूपित असतांना प्रसंगोपात्त म्हणून ज्या आपल्या ***निरूपाधिक*** स्वरूपाविषयी आपण निर्देश केला, तेच पुनः एकवेळ परिपूर्णरीत्या उद्बोधावे."

तेव्हा ते द्वारकानाथ श्रीकृष्ण म्हणाले: "वा! फार छान! आम्हालाही याच स्वरूपाविषयी अखंड कौतुकाने बोलण्याची आवड आहे. पण काय करावे! ते जाणून घेण्याची अनिवार इच्छा असणारा भेटेल तर ना!"

आजि मनोरथांचें फल। जोडिलासि तूं केवल।
जैं तोंड भरूनि निखल। आलासि पुसों।।१५-४४९।।
जैं अद्वैतावरीही भोगिजे। तैं अनुभवींचें तूं विरजे।
पुसौनि मज माझें। देतोसि सुख।।४५०।।

"माझी जी ते स्वरूप वर्णन करण्याची इच्छा, ती पूर्ण करणारा तू मला आज एकटाच भेटला आहेस. अन तुला तेच निरूपाधिक स्वरूप अंतःकरणापासून विचारावेसे वाटले आहे! ***अद्वयस्थिती*** प्राप्त झाल्यावरही ज्याचा उपभोग करावा असे जे अप्रतिम सुख आहे, ते उपभोगण्यास मला मिळावे म्हणून या तुझ्या पृच्छेच्या निमित्ताने तू माझा साहाय्यकर्ताच झाला आहेस! असे ते उत्तम सुख माझ्या उपाधिरहित स्वरूपाविषयी विचारून तू मला देत आहेस."

जैसा आरिसा आलियां जवलां। दिसें आपणपें आपुला डोलां।
तैसा संवादिया तूं निर्मला। शिरोमणी।।१५-४५१।।
तुवां नेणोनि पुसावें। मग आम्हीं परिसऊं बैसावें।
तो गां हा पाडु नोहे। सोयरिया।।४५२।।
ऐसें म्हणौनि आलिंगिलें। कृपादृष्टी अवलोकिलें।
मग देवो काय बोलिलें। अर्जुनेसीं।।४५३।।

"आरसा आपल्याजवळ आला की आपल्याला आपलाच डोळा त्यात स्पष्ट दिसतो. तूही तसाच संवादाचे स्वरूप संवादकास आपण होऊन अंतःकरणाच्या आरशातून स्पष्ट प्रतिभासवणाऱ्या निर्मळ श्रोत्यांचा शिरोमणी आहेस. मी जे काही संवादतो, ते तुझ्या अंतरंगी उत्कृष्टरीत्या प्रतिबिंबित झालेले मला दिसते आणि माझ्या बोलांचे खरेखुरे स्वरूप मला डोळे भरून न्याहाळता येते. आणि तू तरी नेणता आहेस, म्हणून हे सर्व विचारावे आणि मी ते तुला ऐकवावे, तशातला हा प्रसंग थोडाच आहे!"

"भुलला देवो मोहें"

असे म्हणून श्रीकृष्णांनी त्यांच्या प्रिय अर्जुनास आलिंगन देऊन कृपादृष्टीने अवलोकिले व म्हणाले:

पैं दोहीं वोठीच एक बोलणें। दोहीं चरणीं एक चालणें।
तैसें पुसणें सांगणें। तुझें माझें।।१५-४५४।।
एवं आम्ही तुम्ही येथे। देखावें एका अर्थातें।
सांगते पुसतें एथें। दोन्हीं एक।।४५५।।
ऐसा भुलला देवो मोहें। अर्जुनातें आलिंगूनि ठायें।
मग बिहाला म्हणे नोहे। आवडी हे।।४५६।।

"अर्जुना! ओठ दोन असतात, पण बोल तो एकच उमटतो; दोन पावलांची चाल एकच असते. तुझी पृच्छा आणि माझे निरूपण ही अशीच एकच अभिप्राय प्रकटवतात. आपल्या या संवादाचे हेच वैशिष्ट्य आहे की निवेदक आणि पृच्छक हे दोघे एकरूपच आहेत अन् म्हणून हा संवाद, अर्थाचा विपर्यास न करता थेट हृदयाला जाऊन भिडतो." आपल्या व अर्जुनाच्या एकरूपतेच्या विचाराने श्रीकृष्णांना आपल्या उचंबळून आलेल्या भावना अनावर होऊन त्यांनी त्याला आलिंगन दिले. पण एवढा मोह, हा उमाळा, हे भुलणे समयोचित नाही, या जाणिवेने ते बिचकले.

जालें इक्षुरसाचें ढाल। तऱ्हीं लवण देतसें किडाल।
जैं संवादसुख रसाल। नासेल थितें।।१५-४५७।।
आधींचि आम्हां ययां कांहीं। नरनारायणा सिनें नाहीं।
परि आतां जिरो माझां ठाईं। वेगु हा माझा।।४५८।।

"ऊसाच्या रसापासून गुळाची ढेप करतांना, ती नीट सांधली जावी म्हणून क्षाराचे हीण त्यात मिसळावे लागते. रसाळ संवादसुख मूर्त करावयाचे असल्यामुळे म्हणूनच द्वैतभावाचे कीट त्यात थोडे तरी असले पाहिजे; नाही तर संवादच नासून जाईल. वास्तविक नरनारायणात काहीच भिन्नता नाही; तसे श्रीकृष्ण व अर्जुन दोघेही एकरूपच आहेत. परंतु हा जो रोमहर्षक संवाद ते करत आहेत, तो पुढे चालत राहावा म्हणून श्रीकृष्णांनी विचार केला की, "हा माझा आवेग आता माझ्याठायीच जिरो."

इयां बुद्धि सहसा। श्रीकृष्ण म्हणे वीरेशा।
पैं गां तो तुवां कैसा। प्रश्नु केला।।१५-४५९।।
जो अर्जुन कृष्णीं विरत होता। तो परतोनियां मागुता।
प्रश्नावलीची कथा। ऐकों आला।।४६०।।
येथें सदगदें बोलें। अर्जुनें जी जी म्हणितलें।
निरुपाधिक आपुलें। रूप सांगा।।४६१।।
ययां बोला तो शार्ङ्गी। तैंचि सांगावयालागीं।
उपाधी दोहीं भागीं। निरूपीत असे।।४६२।।

अर्जुनाला भानावर आणण्यासाठी म्हणूनच ते म्हणाले की, "हे वीरेशा! माझे निरूपाधिक स्वरूप ऐकण्यासंबंधीची तुझी जिज्ञासा प्रशंसनीयच आहे." श्रीकृष्णांचे हे वाक्य ऐकताच आपल्या पृच्छांचे निरसन आता होणार आहे, हे जाणवून श्रीकृष्णरूपी विरून जात असलेला अर्जुन जरा भानावर आला आणि सद्गदित होऊन म्हणू लागला की, "खरेच तर! देवा! आपले उपाधिविरहित जे स्वरूप आहे, ते मला सांगावे असे मी तुम्हाला विनवले आहे."

जीवाचे स्वरूप

या अर्जुनाच्या बोलांनी प्रसन्न होऊन तो शार्ङ्गधर आपले उपाधिरहित रूप निरूपिण्यास उद्युक्त झाला.

उपाधि व उपहित विवेचनास प्रारंभ

उपाधि कशी दोन प्रकारची असते, हे तो स्पष्ट करू लागला:

पुसिलियां निरुपहित। उपाधि कां सांगें एथ।
हे कोण्हाहीं प्रस्तुत। गमे जऱ्हीं।।१५-४६३।।
तऱ्हीं ताकाचें अंश फेडणें। याचि नांव लोणी काढणें।
चोखाचिये शुद्ध तोडणें। कीडचि जेवीं।।४६४।।
बाबुलीचि सारावी हातें। परि पाणी तंव असे आइतें।
अभ्रचि जावें गगन तैं। सिद्धचि कीं।।४६५।।
वरील कोंड्याचा गुंडाला। झाडुनि केलियां वेगला।
कणु घेतां विरंगोला। असें काई।।४६६।।
तैसा उपाधि उपहितां। शेंवटु जेथ विचारितां।
तैं कोण्हातैंहीं न पुसतां। निरुपाधिकु।।४६७।।

"आता अर्जुनाने तर ***निरुपाधिक*** रूपाविषयी विचारले होते अन भगवंताने तर उपाधीविषयी सांगण्यास सुरुवात केली! हे असे का तर ज्याप्रमाणे नवनीतमंथन करण्यासाठी दह्यापासून ताकाचा भाग वेगळा केला की लोणी जसे आपसुकच हाती येते; किंवा सोन्यातला हीणकस धातू मुशीत शोधून जाळून वेगळा केला की जसे शुद्ध सोने आपण होऊनच प्राप्त होते; अथवा वापीतील वा जलाशयावरील पाण्यावरचे गोंडाळ हाताने दूर सारले की पाणी सहजच उपलब्ध होते; किंवा अभ्रे विराली की गगन जसे स्वयंसिद्धच प्रकटते; किंबहुना धान्यावरचे कोंड्याचे भूस झाडून टाकले की धान्याचे दाणे हाती लागतांना काहीच अडचण येत नाही; त्याप्रमाणेच ***उपाधि*** व ***उपहित*** यांचे आवरण दूर केले की ***उपाधि*** व ***उपहित*** यांचा ज्यात शेवट होतो ते ***निरुपाधिक*** आपोआपच गवसते."

जैसें न सांगणेवरी। बाला पतीसीं रूप करी।
बोलु निमालेपणें विवरी। अचर्चातैं।।१५-४६८।।

"उपाधि म्हणजे प्रपंच व उपहित म्हणजे प्रपंचाशी युक्त असणारे चैतन्य. प्रपंच आणि त्याचा चैतन्याशी येणारा हा जो संबंध आहे, तो जाणून घेतला की त्यापलीकडे जे उपाधिरहित स्वरूप आहे, ते आपण होऊनच स्पष्ट होते. त्यासाठी वेगळे स्पष्टीकरण किंवा अधिक काही निरूपण करावयास लागत नाही. तुझा पती कसा आहे, हे विचारले तर मुग्ध बालिका उत्तर देत नाही; पण त्याचे खरेखुरे रूपगुणवर्णन विचारणाऱ्याने केले, तर ती जशी लाजून जाऊन ते वर्णन खरे असल्याचे मौन राहूनही प्रकट करते; त्याचप्रमाणे श्रुतिवधूचेही आहे. तिला त्या अचिंत्य निरुपाधिक स्वरूप अशा आपल्या पतिदेवाचे वर्णन स्वतः करवत नाही. पण जेव्हा त्या वर्णनातीताचे वर्णन तो ***वर्णनातीत*** आहे, असे केले जाते; तेव्हा ती श्रुति मूकपणे त्याला संमती दर्शवते."

पैं सांगण्याजोगें नोहें। तेथींचें सांगणें ऐसें आहे।
म्हणौनि उपाधि लक्ष्मीनाहें। बोलिजे आदीं।।१५-४६९।।
पाडिव्याची चंद्ररेखा। निरुती दावावयां शाखा।
दाविजे तेवीं औपाधिका। बोली इयां।।४७०।।

"***निरुपाधिक*** चैतन्याचे वर्णन करता येण्याजोगे नाही; तरी अर्जुनाने तर ते वर्णन करावे अशी इच्छा श्रीहरीजवळ व्यक्त केली. म्हणून त्यासाठी त्यांनी हे असे कथन करण्यास प्रारंभ केला, जो उपाधीचे दोन प्रकार विवेचण्यापासून झाला. पाडव्याची सूक्ष्म स्वरूपाची चंद्रकोर विस्तीर्ण नभांगणात दाखविण्यासाठी जसा झाडाच्या शाखेकडे अंगुलिनिर्देश करावा, तसेच या उपाधिवर्णनाचे आहे. उपाधिआड लपलेली त्या निरञ्जनाची सूक्ष्मातिसूक्ष्म कला त्या उपाधीच्या निर्देशाने अशी दृग्पथात आणून दाखवण्याचे कौशल्य केवळ त्या जगन्नियंत्या प्रभू परमात्म्यासच ठावे!"

पुरुषत्रयी::::

क्षर, अक्षर व उत्तम पुरुष

या इच्छेच्या तृप्तीसाठी श्रीकृष्ण ***क्षर*** **व** ***अक्षर*** पुरुषांचा स्पष्ट निर्देश करून वर्णन करण्यास सुरुवात करतात, ती अशी:

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते।।१५-१६।।

"संसारात ***क्षर*** आणि ***अक्षर*** हे दोन प्रकारचे पुरुष आहेत. सर्व भूते ही क्षर आणि कूटस्थ अक्षर म्हटली जातात."

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः।।१५-१७।।

"***उत्तम पुरुष*** तर निराळाच आहे, ज्याला ***परमात्मा*** म्हटले गेले आहे; जो तिन्ही लोकांत प्रविष्ट होऊन सर्वांचे भरणपोषण करणारा ***अव्यय ईश्वर*** आहे."

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।१५-१८।।

"कारण मी क्षराहून अतीत आहे व अक्षराहून उत्तम आहे, म्हणून लोकांत आणि वेदांतही ***पुरुषोत्तम*** म्हणून विख्यात आहे."

साधकांसाठी थोडे पूर्वरंगाचे परिशीलन

आता आपण यथाक्रम *पंधराव्या* अध्यायाच्या परिसमाप्तीकडे वळत आहोत. अध्यायारंभी अश्वत्थरूपकाद्वारे त्या परमतत्त्वाचा, भगवंतांच्या पदाचा, त्यांच्या परमधामाचा परिचय करून देऊन भगवंतांनी साधकांचे विवेकधन, सारासारविचार, आत्मानात्मविवेक संपन्न व्हावेत, या दृष्टीने सुंदर उपदेश केला. त्या उपदेशाचे श्रीज्ञानदेवांनी केलेले सार्थ विवेचन ऐकून आपण धन्यतेस पावलो. पुढील भाग पाहण्यापूर्वी थोडे पूर्वसूत्राचे पुनरावलोकन करू या.

पतञ्जलीप्रणीत योगधारेची बहिरंग साधनेची ***यम, नियम, आसन*** ही जी अंगे आहेत, त्यातील यम व नियम यांच्या दृढतेसाठी सद्गुणांची

जोपासना, दैवी संपत्तीचे संचयन, आसुरी भावांचा सर्वथैव त्याग ही आवश्यक असतात. त्याचप्रमाणे ***आसन*** हे योगांग स्थैर्यासाठी आवश्यक आहे. साधकास योगसाधना सफळ करण्यासाठी मानसिक स्थैर्य अतिशय आवश्यक आहे. किंबहुना ***"स्थिरसुखमासनम्"*** याद्वारे शारीरिक आसनाप्रमाणेच मानसिक बैठक वा आसनाचाही निर्देश अभिप्रेत आहे.

आसनस्थ झाल्यावर मन एकाग्र करून चित्त व इंद्रिये यांच्या क्रियांचे नियमन करत योग्याने अंतःकरणाच्या शुद्धीसाठी योगाचा अभ्यास करावयाचा असतो *(गीता श्लोक क्र. ६-११ व १२-* ***"शुचौ देशे प्रतिष्ठाप्य...।...तत्रैकाग्रं मनः कृत्वा... योगमात्मविशुद्धये।।")***.

शारीरिक स्थैर्यासाठी आवश्यक त्या सूचना गीतेच्या ***"समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः। संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।६-१३।।"*** या श्लोकातून दिलेल्या आहेत.

मानसिक स्थैर्याबाबतचा मानदंड गीतेच्या ***"प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः। मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।६-१४।।"*** या त्यापुढील श्लोकात निर्देशिला आहे.

मानसिक बैठकीच्या स्थैर्याचे १) अंतःकरणाची शांती, २) भीतिराहित्य, ३) ब्रह्मचर्यव्रतपालन, ४) परमात्म्याठायी चित्त ठेवणे, ५) प्रभुपरायणता व ६) मनाचे संयमन असे सहा दंडक या ठिकाणी सांगितले आहेत.

सहाव्या अध्यायात योगसाधकाची चर्या वर्णिली असून त्याला योगसाधनेसाठी आवश्यक असलेल्या ज्या इतर संपदांचा उल्लेख केला आहे, त्यानुसार पुढील सर्व गोष्टी त्याला आवश्यक ठरतात. या गोष्टींचा मानसिक आसनाशी तसेच योगाच्या मध्यरंगसंबंधित ***प्रत्याहार व प्राणायाम*** यासंबंधीच्या अष्टांगांशी निकटचा संबंध आहे.

यांमध्ये अंतर्भूत गोष्टी अशाः १) कर्मफलाची इच्छा न करता कर्म करणे, २) संकल्पांचा सर्वथैव त्याग करणे *(वा निष्काम कर्म आचरणे)* ३) आत्मोद्धारात दक्ष असणे, ४) द्वंद्वे प्राप्त झाली असताही अंतःकरण शांत असणे, ५) ***ज्ञान आणि विज्ञान*** परिपूर्ण प्राप्त करणे, ६) विकाररहित असणे, ७) वासनाराहित्य, ८) अपरिग्रही असणे, ९) एकांतात वास करत सतत परमेश्वराच्या ध्यानात मग्न राहणे, १०) मन स्वाधीन असणे, ११) युक्ताहार व युक्तविहार आणि त्यांना साजेसेच देहेंद्रियव्यापार करणे; तसेच नियमित झोपणे व जागे राहणे,१२) वशीभूत चित्त असणे, १३) दुःखातीतता, १४)***अनिर्विण्ण चेतस*** म्हणजे उत्साही तत्पर चित्त असणे, १५)***प्रत्याहार*** करणे म्हणजे संकल्पाने उत्पन्न होणाऱ्या सर्व कामनांचा निःशेष त्याग करून व मनाने इंद्रियांच्या समुदायाला सर्व बाजूंनी उत्तम प्रकारे वश करून क्रमाक्रमाने विषयांपासून निवृत्त करणे ***("सङ्कल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः।...।। गी.श्लोक क्र. ६-२४।।")*** १६) धैर्ययुक्त बुद्धी, १७) परमात्म्याखेरीज इतर विषयांचे किंचितही चिंतन न करणे, १८) मन पूर्ण शांत असणे, १९) रजोगुण पूर्णतया शांत होणे म्हणजेच तमोगुण व रजोगुणांवर विजय मिळवून सत्त्वगुणात आसनस्थ असणे, २०) पापराहित्य, २१) सर्वभूतस्थ आत्म्याला आत्मोपम्य दृष्टीने पाहणे, २२) योगाभ्यासाचे सातत्य ठेवणे व २३) श्रद्धेने परिपूर्ण असणे.

याच***मध्यरंग*** म्हणजे ***प्रत्याहार व प्राणायाम*** या योगांगांच्या पूर्णत्वामुळे साधकाचा त्यापुढील म्हणजे ***धारणा-ध्यान व समाधि*** या ***अंतरंग*** योगांगांत क्रमशः प्रवेश होतो. वस्तुतः यम-नियम ते समाधि ही योगांगे विश्लेषणासाठी वेगवेगळी असली, तरी त्या प्रत्येकाचा इतर योगांगांशी घनिष्ट संबंध असतो. म्हणून त्या सर्वांची साधनश्रेणी या घनिष्ट संबंधांचा समावेश करणारीच असावी लागते.

श्रीगोपालकृष्णांनी श्रीमद्भगवद्गीतेद्वारे आपणास उपदेशिलेली साधनप्रणाली अशीच आहे व योग पूर्णत्वास नेण्यास समर्थ अशी ती असल्याने साधकांना प्रमाण आहे. म्हणूनच उपरोल्लेखित गीतोक्त योगसाधनासंपदेत ***धारणा व ध्यान*** या भूमींसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा उल्लेख येतो. तसेच ***समाधिसदृश*** अंगांचा अभ्यासही त्यांच्यात अंतर्भूत केलेला आढळतो. असो.

साधकांसाठी आत्मानात्मविवेक व ज्ञानविज्ञान यांचे महत्त्व

आपल्या सध्याच्या विवेचनाच्या दृष्टीने ***यम-नियमादी*** साधनांसाठी लागणारी पूर्वतयारी आपण अभ्यासत होतो. त्यानंतर ***आसन व प्रत्याहार*** या योगांगांकडे आपण कल्पना न देताच वळलो. त्यानिमित्त ***दैवी व आसुरी***संपदविभागांचे, तसेच अमानित्वादी गुणसंपदेचे परिशीलन झाल्यावर आपण ज्ञानविज्ञानाच्या तृप्ततेसाठी ***प्रकृति, क्षेत्र-क्षेत्रज्ञ, अनात्मा-आत्मा, अश्वत्थ वृक्षरूपक*** इत्यादी भाग हाताळला.

त्याचप्रमाणे हा विवेकविचार बौद्धिक तसेच मानसिक पातळीवरही दृढ व्हावा म्हणून प्रकृतिविचाराअंतर्गत येणारा त्रिगुणविचार आपण करू लागलो. त्रिविध गुणभेदांनुसार होणारे ***यज्ञ, दान,तप*** इ.चा यानिमित्ताने आपणांस पूर्वपरिचय झाला. अशा प्रकारे मानसिक आसनस्थैर्यासाठी आवश्यक असणारा ***"आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति"*** ही दृष्टी प्राप्त होण्यासाठी मूलभूत असणारा आत्मविचारसुद्धा आपण करत आहोत.

प्रत्याहार साधण्यासाठी या आत्मानात्मविवेकाचे म्हणजेच ***ज्ञानविज्ञान*** जाणून घेण्याचे अतीव महत्त्व आहे, हे जिज्ञासूंना माहीत असेलच. तसेच हे समजलेले ***ज्ञानविज्ञान*** केवळ बौद्धिक वा मानसिक पातळीवर राहून निष्प्रभ होऊ नये, तर आचरणात येऊन पक्व व्हावे या हेतूने त्रिगुणांचे स्वरूप समजावून घेत असतांनाच, रज व तम यांनी आसुडलेली कर्मे वाळीत टाकून सात्त्विक कर्मविभागाचे कसे आचरण करावे, हे नीट चित्तात ठसावे या हेतूने तद्विषयक यज्ञ, दान व तपादींचा भागही आपण अभ्यासिला.

जीवाचे स्वरूप

ज्ञानविज्ञानशलाकेत सापडलेला पुरुषोत्तम

ज्ञानविज्ञान शलाकेला धरून कर्मविचार करतकरत असे आपण गीतेच्या पंधराव्या **पुरुषोत्तमयोग** या अध्यायाप्रत केव्हा येऊन ठेपलो, ते आपल्याला कळलेसुद्धा नाही. आता पुढेही हीच ज्ञानविज्ञानदीपिका हाती घेऊन कर्मविचाराचा भाग दृष्टीखालून घालत, ज्ञानदेवांच्या समर्थ अन प्रभावी अशा नेतृत्वाखाली व श्रीगोपालकृष्णांच्या साहाय्याने त्या संसाररूपी महाअश्वत्थाच्या मूलाच्याही पलीकडे, ऊर्ध्वाहूनही ऊर्ध्व असणाऱ्या व त्या वृक्षमूलाचेही मूलस्थान असणाऱ्या त्या परमपदाकडे जाण्याची वाट न्याहाळत मार्गस्थ होऊ या!

श्लोक क्र. १५-१६ ते १८ यांवर शांकरभाष्य काय म्हणते

त्यासाठी आपण अगोदर जे गीतेचे *श्लोक क्र. १५-१६ ते १८* हे उद्धृत केले होते, त्यांजकडे श्रीमद्आद्यशंकराचार्यांच्या नजरेने पाहू याः

"यदादित्यगतं तेजं" इत्यादी चार श्लोकांद्वारे ईश्वराच्या उत्तम अशा उपाधियुक्त विभूति सांगितल्या. आता ***क्षर*** व ***अक्षर*** या दोन उपाधि भिन्नभिन्न दर्शवून उपाधिविरहित परमात्मस्वरूपाचा निश्चय करण्यासाठी ***"द्वाविमौ पुरुषौ लोके... ।।"*** या श्लोकास आरंभ केला आहे. **<u>या श्लोकांमध्ये यापूर्वी आलेल्या व नंतर येणाऱ्या अध्यायांचा संपूर्ण अभिप्राय तीन भेदांत विभक्त करून संक्षेपतः सांगितला आहे</u>.** संसारातील अनंत जीवराशींचे वर्गीकरण फक्त ***क्षरपुरुष व अक्षरपुरुष*** या दोन भागांत केले जाते. ***क्षर*** पुरुष नाशवान आहे. त्या विपरीत असणारा ***अक्षर*** पुरुष हा भगवंताची ***मायाशक्ती*** आहे. हाच ***क्षर*** पुरुषाचे उत्पत्तिबीज आहे. अनेक संसारी जीवांच्या कामना, कर्म इ.संस्कारांचा आश्रयस्थान असणारा हा पुरुष ***अक्षर*** म्हटला जातो."

"सर्व भूतमात्रे अर्थात प्रकृतीचे सर्व विकार *(क्षेत्रदर्शनानिमित्त प्रकट केलेले - अ.१३वा)* हेच तो ***क्षर*** पुरुष म्हणून म्हटले आहेत. ***कूटस्थ*** म्हणजे कूटराशीप्रमाणे स्थित असलेला; अथवा ***कूट*** म्हणजे ***माया***, जिची वञ्चना, कुटिलता, कपट इ.पर्यायनामे आहेत, तिच्यात स्थित असलेला; असा जो संसाराचे बीजस्वरूप आहे, त्याला नाश नसल्याने ***अक्षरपुरुष*** असे म्हटले आहे."

"त्याचप्रमाणे क्षराक्षरविलक्षण, तसेच क्षर-अक्षररूप दोन्ही उपाधींच्या संबंधविरहित असा जो नित्य शुद्ध, बुद्ध व मुक्तस्वरूप-उत्तम-अतिशय उत्कृष्ट पुरुष आहे, तो निराळाच आहे. अर्थात क्षर व अक्षर पुरुषांहून अत्यंत विलक्षण असा जो आहे, त्याला ***परमात्मा*** या नावाने ओळखले जाते. हाच ***ईश्वर*** अविद्याजनित शरीरादी आत्म्यापेक्षा पर आहे व सर्व जीवांचा आत्मा म्हणजे ***प्रत्यग्चेतन*** आहे. म्हणून त्यालाच ***परमात्मा*** असे नांव आहे."

"त्या उत्तम पुरुषाचे विशेष निरूपण असेःतो पृथ्वी, अंतरीक्ष आणि स्वर्ग या तिन्ही लोकांना आपल्या चैतन्यबलाच्या शक्तीने त्यांच्यात प्रविष्ट होऊन, केवळ स्वरूपसत्तेद्वारे त्यांना धारण करतो; त्याचा कधीही नाश होत नाही, असा तो ***नारायण*** नामक ***सर्वज्ञ व सर्वांचे शासन करणारा ईश्वर आहे."***

"उपर्युक्त ईश्वराला ***पुरुषोत्तम*** हे प्रख्यात नांव कां दिले गेले, याची हेतुसहित व्युत्पत्ती सांगून, त्या नामाचे सार्थकत्व प्रकट करण्यासाठी भगवंत आपले स्वरूप ***निरतिशय ईश्वर*** असे असल्याचे म्हणतातः कारण की क्षरभावाहून अतीत असून मायामय संसारवृक्षाचे - अश्वत्थनामे वृक्षाचे - अतिक्रमण करून भगवंत स्थित आहेत आणि संसारवृक्षाच्या बीजस्वरूप अक्षर*(मूलप्रकृतीहून)* ते उत्तम - अतिशय उत्कृष्ट वा अतिशय उच्च आहेत; म्हणून, म्हणजेच **<u>क्षर व अक्षर या दोघांहूनही उत्तम असल्याने त्यांना लोकात व वेदात *पुरुषोत्तम* हे विख्यात नाम आहे</u>.** भक्तजन त्यांना याच नावाने ओळखतात आणि कवीसुद्धा काव्यात याच नावाचा प्रयोग करतात; अर्थात ***पुरुषोत्तम*** या नांवाने ***नारायण*** वा ***भगवंत*** यांचा स्वतःचाच उल्लेख केला जातो."

ज्ञानदेवांचे निरूपण::::

ज्ञानदेवांचा क्षराक्षर विचार

ही एवढी पार्श्वभूमी अवलोकिल्यानंतर आपण ज्ञानदेव हा विषय आपल्याला कसा सुलभरीत्या समजावून देतात, त्याकडे वळू याः

मग म्हणे गां सव्यसाची। पैं इयें संसारपाटणींची।
वस्ती सांविया टांची। दुपुरुषीं।।१५-४७१।।
जैसीं आघवांचि गगनीं। नांदते दिवोराती दोनीं।
तैसें संसारराजधानीं। दोन्हीचि हे।।४७२।।
आणिकुही तिजा पुरुषु आहे। परि तो या दोहींचें नांवही न साहे।
जो उदैला गांवेंसीं खाये। दोहींतैं येयां।।४७३।।

मग श्रीकृष्ण म्हणाले: "हे सव्यसाची अर्जुना! या संसाररूपी नगरीतील वस्ती अगदीच थोडकी आहे. या नगरीत फक्त दोन पुरुष राहातात. अनंत अवकाशात जसे दिवस आणि रात्र हे दोनच नांदतात, तसेच या विशाल संसारराजधानीत हे दोन पुरुषच वसतात. यांव्यतिरिक्त अजून एक तिसरा पुरुष आहे. पण त्याला या दोघांचा सहवासच काय, त्यांचे नांवही सहन होत नाही. आणि तो प्रकट झाला असता या दोघा पुरुषांना त्या संसारराजधानीसकट खातो."

परि तैं तंव गोठी असो। आधीं दोहींचि हे परियेसों।
संसारग्रामा वसों। आलें असती।।४७४।।
एक आंधला वेडा पंगु। एर सर्वांगें पुरता चांगु।
परि ग्रामगुणें संगु। घडला दोघां।।४७५।।
तेयां एका नाम क्षरु। एरांतैं म्हणती अक्षरु।
इहीं दोहींचि परीं संसारु। कोंदला असे।।४७६।।
आतां क्षरु तो कवणु। अक्षरु तो किंलक्षणु।
हा अभिप्रावो संपूर्णु। विवंचू गां।।४७७।।

<u>जीवाचे स्वरूप</u>

"पण ती गोष्ट आता नको. प्रथम आपण त्या दोघांबद्दल बोलू, जे या संसारग्रामी वस्ती करण्यास आलेले आहेत. त्यातला एक आंधळा, वेडा अन पांगळाच आहे. अन दुसरा धडधाकट आहे, अव्यंग आहे. पण या संसारग्रामायोगे त्यांना एकमेकांचा संग प्राप्त झाला आहे. त्यातल्या पहिल्याचे नांव ***क्षर*** व दुसऱ्याचे नांव ***अक्षर*** असे आहे. हे आहेत तर दोघेच, पण अवघा संसार या दोघांनीच दाटीवाटीने ठेचून भरलेला आहे. यातला हा जो ***क्षर*** आहे, तो कोण आणि **अक्षरा**ची लक्षणे कोणती याचा संपूर्ण खुलासा स्पष्ट करून सांगतो. ऐक."

क्षरविचार

तऱ्हीं महदाहंकारा। लागौनियां धनर्धरा।
तृणांतींचा पांगोरा-। वरी पैं गां।।१५-४७८।।
जैं काईं सानेथोर। चालतें अथवा स्थिर।
किंबहुना गोचर। मनबुद्धी जैं।।४७९।।
जेतुलें पांचभौतिक घडतें। जैं नामरूपा सांपडतें।
गुणत्रयाचां पडतें। कामठा जैं।।४८०।।
भूताकृतीचें नाणें। घडत भांगारें जेणें।
काळासि जूं खेलणें। जिहीं कवडा।।४८१।।
जाणणेंचि विपरितें। जैं जैं कांहीं जाणिजतें।
तैं प्रतिक्षणीं निमतें। होऊनियां।।४८२।।

"हे धनुर्धरा! महत्तत्त्व अहंकारादीपासून थेट गवताच्या पानाच्या टोकापर्यंत जे जे काही लहानथोर आहे; चर वा अचर आहे; किंबहुना मन व बुद्धी यांच्या जाणिवेच्या कक्षेत जे जे काही येते; जेवढे म्हणून काही पंचमहाभूतांनी घडलेले आहे; ज्याला ज्याला नाम व रूप आहे; व जे त्रिगुणरूपी टाकसाळीत टंकले जाते; प्राणिमात्राचे आकाररूपी नाणे ज्या सुवर्णापासून घडते, अथवा काळ ज्या धनाने जुगार खेळतो; विपरीत वा अन्यथा ज्ञानानेच जे जाणले जाते; तसेच जे जे प्रतिक्षणी उत्पन्न होऊन नष्ट होते;" अन्

अगां काढूनि भ्रांतीचें दांग। उभवी सृष्टिचें आंग।
हे असो बहु जग। जेयां नाम।।१५-४८३।।
पैं अष्टधा भिन्न ऐसें। जैं दाविलें प्रकृतिमिसें।
जैं क्षेत्राद्वारें छत्तीसें। भागीं केले।।४८४।।
हे मागील सांगों किती। अगां आतांचि जैं प्रस्तुतीं।
वृक्षाकाररूपक रीती। निरूपिलें।।४८५।।
तैं आघवेंचि साकारें। कल्पूनि आपणयां पुरें।
जालें असे तदानुकारें। चैतन्यचि।।४८६।।

भ्रांतिरूप अरण्याच्या आकाराने नावारूपास आलेले हे जे सृष्टीचे शरीर आहे; हे असो! ज्याला जग असे नांव आहे; आणि प्रकृतिवर्णनानिमित्ताने ज्याचे विविध ***अष्टभाग*** दाखविले *(अ.७ श्लोक क्र.४)* व *क्षेत्र* म्हणून ज्याचे छत्तीस तत्त्वांचे मिळून वर्णन केले *(अ. १३ श्लोक क्र. ५ व ६)*; हे पूर्वी वर्णिलेले विषय पुन:पुन: काय सांगू! नुकतेच या *(पंधराव्या)* अध्यायात अश्वत्थवृक्षरूपकाच्याद्वारे ज्याचे वर्णन केले; ते सर्व काही आपल्याला साकार संसारनगररूपी असे कल्पून त्यानुसार झालेले मूळ चैतन्यच आहे."

आणि हे असे कल्पिणे कसे झाले,तर:

तैं जैसें कुहां आपणचि बिंबें। सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभें।
मग क्षोभला समारंभें। घाली तेथ।।१५-४८७।।
कां सलिलीं असतचि असें। व्योमावरी व्योम बिंबें जैसें।
अद्वैत होऊनि तैसें। द्वैतें घेपें।।४८८।।
अर्जुना गां ययापरी। साकार कल्पूनि पुरी।
आत्मा विस्मृतीची करी। निद्रा तेथ।।४८९।।

"विहीरीत आपणच प्रतिबिंबित झालेला सिंह त्या प्रतिबिंबासच दुसरा खरोखरीचा प्रतिस्पर्धी वनराज समजून क्षोभाने डरकाळ्या फोडत आवेशाच्या वेगात त्या विहीरीत उडी घालतो; किंवा पाण्यामध्ये मूळ आकाशतत्त्वाचा अंश असूनही त्याच व्योमांशावर जसे आकाशाचे प्रतिभासक प्रतिबिंब उमटते; त्याचप्रमाणे साकाराशी तादात्म्य पावणारे ***चैतन्य*** हे मूळचे अद्वैत असूनही द्वैतलक्षण प्रकट करते. स्वप्नात शय्या दिसली तर त्यावर जसे शयन करावे, तसे आत्मा हा या संसारपाटणी या देहपुरीस आपणच असे कल्पून आत्मविस्मृतीची गाढ निद्रा त्या नगरी करतो."

पैं स्वप्नीं सेजार देखिजे। मग पहुडणें जैसें तेथ कीजे।
तैसें पुरीं शयन जाणिजे। आत्मयासीं।।१५-४९०।।
पाठीं तियें निद्रेचेनि भरें। मी सुखी दुःखी म्हणत घोरे।
अहंसमाधीचेनि थोरें। वोसणाये सादें।।४९१।।
हा जनकु हे माता। हा मी गौर हीन पुरता।
पुत्र वित्त कांता। माझें ना हे।।४९२।।
ऐसियां वेंधौनि स्वप्ना। धांवत भवस्वर्गाचियां राना।
तेयां चैतन्या नाम अर्जुना। क्षर पुरुष।।४९३।।

"आणि त्या सुषुप्त्यवस्थेत त्याचे घोरणे मी सुखी, मी दुःखी या आवाजाचे असते. आणि त्यावेळी त्याला जी अहंकारग्रस्ततेची समाधी लागते, तिच्यात तल्लीन होऊन ही माझी माता, हा माझा पिता; मी उजळ वर्णाचा; मी हीन; मी दरिद्री; हे माझे वित्त; हा माझा पुत्र; ही माझी पत्नी; अशा नादात तदाकार होतो. या स्वप्नसृष्टीस कवटाळून बसून स्वर्गसंसाराच्या रानावनात धावपळ करणाऱ्या चैतन्याचे नांव, हे अर्जुना! ***क्षरपुरुष*** असे आहे."

यानंतर ***क्षर*** पुरुषाचे आणखी वर्णन येते, ते असे:

आतां ऐक क्षेत्रज्ञ येणें। नामें जेयांतैं बोलणें।
जग जीवु कां म्हणे। जियें दशेंतें।।१५-४९४।।
जो आपुलेनि विसरें। सर्वभूतत्वें अनुकरें।
तो आत्मा बोलिजे क्षरें। पुरुषनांवें।।४९५।।
जैं तो वस्तुस्थितीपुरता। म्हणौनि आली पुरुषता।
वरी देहपुरीं निदैजतां। पुरुषनांवें।।४९६।।

आणि क्षरपणाचां नाथिला। आलु येयां ऐसेनि आला।
जैं उपाधीचि आंतला। म्हणौनियां।।४९७।।

"ज्याला ***क्षेत्रज्ञ*** म्हणतात; अथवा ज्या दशेला ***जीव*** अशी संज्ञा जगाने दिली आहे; जो आपल्या स्वरूपाचा विसर पडल्याने सर्व भूतांचे अनुकरण करून त्यांच्याशी तादात्म्य पावतो; त्या आत्म्यास वा चैतन्यास ***क्षर*** पुरुष असे नांव आहे. असे असले तरी वस्तुस्थितीने पुरता म्हणजे आत्मस्वरूपाने पूर्ण आहे, म्हणून त्याला ***पुरुष*** म्हणावयाचे; किंवा देहपुरात वस्ती करतो, निद्रिस्त होतो, म्हणूनही त्याला ***पुरुष*** अशी पदवी आहे. हा उपाधीशी तादात्म्य पावतो म्हणजे भूतप्रकृतीचे विकार आपलेच समजतो; म्हणून उपाधिनाशाबरोबर नाशिवंत असणारा असा त्याच्यावर आरोप वा आळ येतो."

जैसीं खलालींचियां उदका-। सरिसीं उदालें चंद्रिका।
तैसा विकारां औपाधिकां। ऐसाचि गमे।।१५-४९८।।
कां खलालु मोटका शोषे। आणि चंद्रिका तैं सरिसीचि भ्रंशे।
तैसा उपाधिनाशीं न दिसे। उपाधिकु।।४९९।।
ऐसें उपाधिचेनि पाडें। क्षणिकत्व यांतें जोडें।
तेणें खोंकरपणें घडे। क्षर हे नांव।।५००।।
एवं जीवचैतन्य आघवें। हे क्षर पुरुष जाणावें।
आतां रूप करूं बरवें। अक्षरासीं।।५०१।।

"खळखळणाऱ्या झऱ्याच्या पाण्याबरोबर त्या पाण्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब जसे हिंदकळते, तसा हा ***क्षरपुरुष*** उपाधीच्या विकारांमुळे तसाच आंदोळे घेतो. आणि खळखळाट करणारे उदक आटले, तर जशी चंद्रिका प्रतिबिंब भंगून नाहीशी झाल्यासारखी प्रतिभासते; तसाच हा पण उपाधीच्या नाहीसे होण्याबरोबर नाहीसा होतो, याप्रमाणे याला उपाधीच्या योगे क्षणिकत्व प्राप्त होते. क्षणिक असणारा, क्षरणारा, नाशिवंत असा हा ***औपाधिक पुरुष*** म्हणूनच ***क्षर*** या नामास प्राप्त झाला आहे. याप्रमाणे सर्व *जीवचैतन्य हे क्षर पुरुष* म्हणून असल्याचे जाणावे."

अक्षर पुरुष विचार

यानंतर ***अक्षर*** पुरुषाचे रूप दर्शवतांना ज्ञानेश म्हणतातः

तऱ्हीं अक्षरु जो दुसरा। पुरुषु पैं धनुर्धरा।
तो मध्यस्थु गां गिरीवरां। मेरु जैसा।।१५-५०२।।
जैं तो पृथ्वी पाताल स्वर्गीं। इहीं न भेदें तिहीं भागीं।
तैसा दोहीं ज्ञानाज्ञानांगीं। पडेना जो।।५०३।।
ना एथ यथार्थज्ञानें एक होणें। ना अन्यत्वें दुजें घेणें।
ऐसें निखळ जैं नेणणें। तैंचि तैं रूप।।५०४।।

"धनुर्धरा! आता जो दुसरा ***अक्षर*** म्हणून म्हटलेला पुरुष आहे, त्याची लक्षणे ऐक! समस्त उत्तुंग पर्वतशैलांच्या मधोमध स्थित असलेला मेरू पर्वत जसा आहे, तसा हा पुरुष ***उत्तम पुरुष व क्षर पुरुष*** यांच्यामध्ये अवस्थित आहे. आणि जसा मेरू पर्वत पृथ्वी, पाताळ व स्वर्ग या तीन लोकात वाटला जात नाही; त्यातल्या कोणाच्याच एकट्याच्या भागी येत नाही; त्याचप्रमाणे **हा *अक्षर पुरुष* ज्ञान *(यथार्थज्ञान)* व अज्ञान *(अन्यथा ज्ञान वा विपरीत ज्ञान)* यांपैकी कोणत्याच विभागात समाविष्ट होत नाही**. *यथार्थज्ञानाने ब्रह्माशी एकरूप होणे अथवा अन्यत्वाने संसाराशी तादात्म्य पावणे, या दोन्हीतील काहीच न जाणणे, अशा* **स्वरूपाची जी विशुद्ध नेणीव; तेच त्या अक्षर पुरुषाचे स्वरुप आहे**."

पांसुता निःशेष जाये। ना घटभांडादिकें होये।
तेयां मृत्पिंडा ऐसें आहे। मध्यस्थ जैं।।१५-५०५।।
पैं आटौनि गेलियां सागरु। मग तरंगु ना नीरु।
तेयां ऐशीं अनाकारु। जैं दशा गां।।५०६।।
पार्था जागणें तऱ्हीं बुडे। परि स्वप्नाचें कांहीं न मांडे।
तैसियां निद्रें सांगडें। निहालिजे।।५०७।।
विश्व आघवेंचि मावलें। आणि आत्मबोधु तऱ्हीं नुजले।
तियें अज्ञानदशें कोंवलें। अक्षरु नांव।।५०८।।

"मृत्तिकेचे कणत्व नाहीसे झाले असावे आणि तिचे घट, भांडी इ.कोणत्याही आकारात रूपांतर झालेले नसावे अशी चिखलाच्या गोळ्यासम जी अवस्था, तशीच या ***अक्षर*** पुरुषाची अवस्था ज्ञान लोपले व अज्ञानात त्याचे पर्यवसन झालेले नाही, अशी मधली आहे. सागर आटून गेल्यावर जलाची जी ना नीर ना तरंग अशी अनाकार दशा असते, तशीच या पुरुषाची दशा आहे. पार्था! जागृति लोपून जाऊन निद्रित व्हावे पण स्वप्न मात्र पडलेले नसावे, तशा निद्रेसारखी या अक्षराची स्थिती आहे; कारण याला विश्वाभास तर होत नाही आणि आत्मबोधही प्रकटत नाही; अशा निखळ विशुद्ध अज्ञानावस्थेस ***अक्षर*** असे म्हटले आहे."

"अजामेकां"

अजा म्हणतां जन्म नाहीं। त्यासि नाशु कैंचा काईं।
यालागीं अक्षरु पाहीं। अज्ञानघन।।१५-५०९।।
पैं सर्वोपाधिविनाशें। हें जीवदशा जेथ पैसें।
फलपाकांत जैसें। झाड बीजीं।।५१०।।
तैसें अपाधि उपहित। थोकोंनि ठाकें जेथ।
तेयांतैं अव्यक्त। बोलतीं गां।।५११।।
जेयांसि कां बीजभावो। वेदांतीं केला असे आवो।
तो तेयां पुरुषाचां ठावो। अक्षराचा।।५१२।।

"अजा म्हणजे ज्याला जन्म नाही. ***अज्ञान*** असेच असते, हे श्रुतिसंमत आहे. ज्याला जन्म नाही, त्याला नाश कुठचा असणार! म्हणून या ***अज्ञानघन*** अवस्थेला ***अक्षरत्व*** आहे. षोडष कलांनी वर्जिलेले चंद्राचे रूप अमावास्येला उरते. अक्षराचे रूपही तसेच आहे. ***सर्वोपाधीचा नाश झाल्यावर ही जीवदशा जेथे लीन होते, तेच अक्षर होय.*** फळ पिकल्यावर गळून पडते आणि त्याच्या बियेत

जसे ते झाड व फळ समावलेले असतात, त्याप्रमाणेच या **देहाची उपाधि आणि उपहित, *क्षर* पुरुष व *चैतन्य* ही दोन्ही ज्या अवस्थेत लीन होतात, ती अवस्था म्हणजेच हा *अक्षर पुरुष* होय.**"

जेथुनि अन्यथा ज्ञान। फांकौनि जागृति स्वप्न।
नाना बुद्धीचें रान। रिगालें असे।।१५-५१३।।
जीवत्व जेथुनि किरीटी। विश्व उठवितचि उठी।
तैं उभय बोधांची मिठी। अक्षरु पुरुषु।।५१४।।

"जेथून अन्यथा ज्ञान प्रकटते; जागृति व स्वप्न या अवस्था प्रकाशतात वा प्रकटतात; विकारांचे रान - विकल्पांचे भेंडाळे माजते; वेदांतात ***बीजभाव*** म्हणून ज्याची ख्याती आहे; त्या सर्वांस त्या **अक्षरपुरुषा**चा आश्रय आहे. **जेथून जीवत्व विश्वासह प्रकटते; अन्यथा बोध व स्वात्मबोध यांची जेथे संधी होते; त्यास *अक्षर पुरुष* म्हणतात.**"

एरु क्षरु पुरुषु कां जनीं। जिहीं खेले जागृति-स्वप्नीं।
तियां अवस्था जो दोनीं। वियाला गां।।१५-५१५।।
पैं अज्ञानघनसुषुप्ती। ऐसैसीं जैं कां ख्याती।
या उणीं एकीं प्राप्ती। ब्रह्माची जैं।।५१६।।
सांचचि पुढुती वीरा। जन्हीं न येतां स्वप्नजागरां।
तन्हीं ब्रह्मभावा सांचोकारा। म्हणो येतां।।५१७।।
परि प्रकृतिपुरुषें दोनीं। अभ्रें जालीं जियें गगनीं।
क्षेत्रक्षेत्रज्ञु स्वप्नीं। देखिला जियें।।५१८।।
हे असो अधोशाखा। या संसाररूपा रुखा।
मूल तैं पुरुषा। अक्षराचें।।५१९।।

"दुसरा जो ***क्षर*** पुरुष आहे, तो जगात ज्या जागृति व स्वप्न या अवस्थांनी क्रीडतो; त्या अवस्था हा ***अक्षर*** नावाचा पुरुष प्रसवत असतो. ***अज्ञानघनसुषुप्ति*** असे प्रसिद्ध नांव असलेली ही जी त्याची अवस्था आहे, तिला एकमात्र उणीव आहे; अन्यथा तिलाच ***ब्रह्मावस्था*** म्हणता आले असते. ती उणीव म्हणजे येथूनच स्वप्न व जागृति उदय पावतात. असे नसते तर याच अवस्थेला खराखुरा ब्रह्मभाव असेच म्हणता आले असते. ***परंतु प्रकृति व पुरुषरूपी अभ्र ज्या नभात असते; क्षेत्र व क्षेत्रज्ञ ज्याच्या स्वप्नात प्रकटतात; किंबहुना या संसाररुपी वृक्षाचे जे मूळ आहे; ते सर्व हाच अक्षर पुरुष आहे.***"

हा पुरुषु कां म्हणिजे। जैं पूर्णपणेंचि निजिजे।
पैं मायापुरी पहुडिजे। तेणेंही बोलें।।१५-५२०।।
आणि विकारांची जैं वारी। तैं विपरीत ज्ञानाची परी।
नेणिजे जियें माझारीं। तैं सुषुप्ति गां हा।।५२१।।
म्हणौनि ययां आपैसें। क्षरणें पां नसे।
आणि कंहीं हा न नशे। ज्ञानाविणें।।५२२।।
यालागीं हा अक्षरु। ऐसा वेदांतीं डगरु।
केला देखसीं थोरु। सिद्धांताचा।।५२३।।

ऐसें जीवकार्यकारण। जेयां मायासंगुचि लक्षण।
अक्षरु पुरुषु जाण। चैतन्य तैं।।५२४।।

"आता याला ***पुरुष*** म्हणण्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे पुरीत म्हणजे मायापुरीत हा शयन करतो म्हणून हा ***पुरुष*** आहे; आणि हा पूर्ण आहे, अव्यंग आहे, हे दुसरे कारण. तसेच हा विकारग्रस्त होत नाही; याला विपरीत ज्ञानाचा गंधही नसतो; ***नेणणे* हाच याचा स्थायी भाव आहे; *अज्ञानघन* अशी *सुषप्ति* हाच आहे**; म्हणून याला सहसा नाश नाही. म्हणजे याचा नाश केवळ एकमात्र ज्ञानानेच होतो; म्हणून याचा वेदांतशास्त्रात हा ***अक्षर*** आहे, या सिद्धांताद्वारे डिंडिम पिटला जातो. ***यात्रमाणे जीवदशेचे जे कार्य, त्याचे कारणस्वरूप जे चैतन्य आहे व ज्याचे मायोपाधीचा संग हे लक्षण आहे, म्हणजे जे मायेच्या सहवासात असते; त्या चैतन्यास अक्षर पुरुष म्हणून जाणले जाते.***"

उत्तम पुरुष हाच परमात्मा

क्षर व अक्षर पुरुषांचा भाव व्यक्तवून यानंतर ज्ञानदेव ***उत्तम पुरुष*** जो ***परमात्मा,*** त्याचे प्रकटन कसे कलात्मकरीत्या करतात, ते पाहणे अति मनोज्ञ आहे:

आतां अन्यथाज्ञानीं। या दोनीं अवस्था जेयां जनीं।
तेयां हारपती घनीं। अज्ञानतत्त्वीं।।१५-५२५।।
तैं अज्ञान ज्ञानीं बुडालियां। ज्ञानें कीर्तिमुखत्व केलियां।
जैसा वह्नी काष्ठ जालौनियां। स्वयें जळें।।५२६।।
तैसे ज्ञानें नेलें। आपण वस्तू देऊनि गेलें।
ऐसें जाणणेंनिविण उरलें। जाणतें जैं।।५२७।।
तैं तो गां उत्तम पुरुषु। जो तृतीय कां निष्कर्षु।
दोहींहूनि अधिकु। मागिला जो।।५२८।।

"ज्या अव्यक्तापासून अन्यथा ज्ञानाच्या ***जागृति व स्वप्न*** या अवस्था उदित होतात, त्यातच त्या लीन झाल्या; म्हणजे अज्ञानघन सुषुप्तीत जेव्हा या दोन अवस्था लीन होतात; तेव्हा निव्वळ ***अज्ञान*** उरते. आणि ते अज्ञानही ज्ञानात बुडाले; आणि त्या ज्ञानानेही कीर्तिमुखत्व केले म्हणजे ते लोपले की, ज्याप्रमाणे अग्नी जसा लाकडास जाळून स्वतःही जळून नाहीसा होतो, त्याप्रमाणे **अज्ञान ज्ञानाने नाश पावले की ज्ञान स्वतःही नाहीसे होते. परंतु ते *आत्मसाक्षात्कार* वा *ब्रह्मभाव* देऊन जाते. *ही अवस्था म्हणजे ज्ञानाशिवायच ज्ञातृत्व वा ज्ञाता असणे.* ही अवस्थाच *उत्तम पुरुष* म्हणून विख्यात आहे.** हा क्षराक्षराहून वेगळा वा तिसरा असून सारभूत आहे. हा त्यांच्याहून श्रेष्ठही आहे."

सुषुप्ति आणि स्वप्ना-। पासूनि बहुवें अर्जुना।
जागणें जैं आना। बोधाचेंचि।।१५-५२९।।
कां रश्मी हन मृगजला-। पासूनि अर्कमंडला।
अफाटु तेवीं वेगला। उत्तमु गां।।५३०।।

हे ना काष्ठींचा काष्ठाहूनि। अनारिसा जैसा वह्नी।
तैसा क्षराक्षरापासूनि। आनचि तो।।५३१।।

"सुषुप्त्यवस्था व स्वप्नावस्था यांपेक्षा जागृत्यवस्था जशी वेगळ्याच बोधाची असते; किंवा सूर्यरश्मी अथवा मृगजळ यांच्यापेक्षा सूर्यमंडळ जसे अगदी वेगळ्याच श्रेणीचे असते; त्याचप्रमाणे हा ***उत्तम पुरुष*** त्या ***क्षर -अक्षर*** पुरुषांहून पराकाष्ठेचा निराळ्या स्वरूपाचा आहे. लाकडास लागलेला अग्नी जसा लाकडापेक्षा अति भिन्न स्वरूपाचा असतो, तसाच हा ***उत्तम पुरुष*** क्षराक्षराहून अति भिन्न प्रकारचा आहे."

पैं ग्रसुनि आपुली मर्यादा। एक करीत नदीनदां।
उठी कल्पांतीं उदावादा। एकार्णवाचां।।१५-५३२।।
तैसें स्वप्न ना सुषुप्ति। ना जागराची गोठी आथी।
जैसीं गिलिली दिवोरातीं। प्रलयतेजें।।५३३।।
मग एकपण ना दुजें। असें नाही हे नेणिजे।
अनुभव निर्बुजे। बुडाला जेथ।।५३४।।
ऐसें आथि जैं काई। तैं तो उत्तमु पुरुषु पाहीं।
जैं परमात्मा इहीं। बोलिजे नामीं।।५३५।।

"आपली मर्यादा सांडून, नदी व नद यांना एक करत, कल्पांत समयी जसा प्रळयाचा महापूर लोटावा; अथवा प्रळयकाळीच्या तेजाने जसे दिवस व रात्र यांना त्यांना प्रकटवणाऱ्या सूर्यासह गिळून टाकावे; ज्याप्रमाणे जेथे स्वप्नावस्था नाही व सुषुप्त्यवस्थाही नाही; तेथे जागृत्यवस्थेचे काय देणे घेणे! याचप्रमाणे *ज्याठायी द्वैतही नाही अन अद्वैतही नाही, किंवा ही आहेत, असा **अस्ति-नास्तिभाव** वा जाणीव किंवा नेणीव ही नसतात; ज्या पदी अनुभूतीसुद्धा दिङ्मूढ होऊन जाते; आत्मसाक्षात्कारही जेथे थक्क होऊन जातो; असे जे काही आहे, ते तो **उत्तम पुरुष** असून त्यालाच **परमात्मा** या नावाने ओळखतात."* हाच ***पुरुषोत्तम !***

पुरुषोत्तमाचे स्वरूप

अशा या पुरुषाचे -***उत्तम पुरुष*** म्हणजेच पुरुषोत्तमाचे स्वरूप सांगत ज्ञानदेव म्हणतातः

तेंही एथ न मिसलतां। बोलणें जीवत्वें पांडुसुता।
जैसीं बुडणेयाचि वार्ता। थडिएंचां कीजे।।१५-५३६।।
तैसें विवेकाचियें कांठीं। उभें केलेयां किरीटी।
पारावाराचियां गोठी। करणें वेदां।।५३७।।
म्हणौनि पुरुष क्षराक्षरु। दोनीं देखौनि अवरु।
यांतैं म्हणती परु। आत्मरूपु।।१५-५३८।।

"या परमात्म्याविषयी कोणताही विचार त्याच्याशी एकरूप न होते वेळीच फक्त करता येतो. जीवत्वबुद्धी असेतोवरच परमात्मा हा कोणी आहे, हा विचार वा विवेक संभवतो. त्याच्याशी एकरूप झाल्यावर मात्र हे शक्य नाही. पाण्यात बुडणारा बुडतो आहे, असे फक्त काठावर उभा असलेला मनष्यच म्हणू शकतो; स्वतः बुडणारा त्याबाबत काय बोलणार! त्याचप्रमाणे विवेकाच्या काठावर उभे असलेले वेदच ***पर*** व ***अवर*** अथवा अलीकडच्या तीरावरील व पलीकडील तीरावरील अशा ***क्षर, अक्षर व उत्तम*** पुरुषांबद्दलच्या गोष्टी करू शकतात. म्हणून ***क्षराक्षरपुरुष*** हे उपाधियुक्त व म्हणून अलीकडले व ***उत्तमपुरुष*** हा यांच्या सापेक्ष पलीकडील म्हणजे ***पर*** असणारा व आत्मरूप आहे, असे त्यांना म्हणता येते."

अर्जुना ऐसियां परी। परमात्मा शब्दवरी।
सूचिजे गां अवधारीं। पुरुषोत्तमु।।१५-५३९।।
एऱ्हवीं न बोलणेचि बोलणें। जेथिंचें सर्व नेणिवा जाणणें।
कांहींच न होनि होणें। जैं वस्तू गां।।५४०।।
<u>सोऽहं तेंहीं अस्तावलें</u>। जेथ सांगतेचि सांगणें झालें।
द्रष्टत्वेंसीं गेलें। दृश्य जेथें।।५४१।।

"हे अर्जुना! ऐक! याप्रमाणे ***पर आत्मरूप*** म्हटला जाणारा तो ***उत्तम पुरुष***च आहे. त्यालाच ***पुरुषोत्तम*** असे विख्यात नाम आहे. अन्यथा काही न बोलणे म्हणजे सर्वथा मौन हेच ज्याच्याविषयी बोलणे म्हणजे वर्णन करणे आहे; ज्याच्याविषयी संपूर्ण नेणीव असणे हीच ज्याची जाणीव असणे आहे; आणि काहीही न होता म्हणजे ***क्षर, अक्षर, जीव, शिव, ब्रह्म*** इ.न होता - अस्तित्वात न येता - ज्याचे अस्तित्व आहे; अशी जी वस्तू आहे; ज्याठायी **सोऽहंवृत्तीचा*सुद्धा अस्त वा लय होतो;*** ज्याच्याठायी त्याचे स्वरूप खरेखुरे वर्णन करणारा स्वतःच तो वर्ण्य विषयच झाला; ***अशी जी अवर्णनीय अवस्था वा पद वा वस्तू तीच उत्तम पुरुष वा परमात्मा होय.***"

आतां बिंबा आणि प्रतिबिंबा-। माजीं कैंची हे म्हणों नये प्रभा।
जऱ्हीं कैसेनि हे लाभा। जायेचि ना।।१५-५४२।।
कां घ्राणा फुलां दोहीं। द्रुती असे जैं माझारिलां ठाईं।
तैं न दिसे तऱ्हीं नाहीं। ऐसें बोलों नयें।।५४३।।
तैसें द्रष्टा दृश्य हे जायें। मग कोण्ह म्हणें काये आहे।
हेंचि अनुभवें तेंचि पाहे। रूप तेयां।।५४४।।

"हे कसे असू शकते असे विचारशील तर ऐकः सूर्यबिंब व प्रतिबिंब यांच्यामधील प्रभा जरी कोणत्याही उपायाने आपणांस घेता आली नाही किंवा दिसली नाही, तरी काहीही झाले, तरी तिचे अस्तित्व जसे नाकारता येत नाही; किंवा घ्राणेंद्रिय व पुष्प यांच्यामधल्या अवकाशात जो सुगंध भरलेला असतो, तो दिसत नसला, तरी त्याचे अस्तित्व जसे नाकारता येत नाही; त्याचप्रमाणे जेथे ***द्रष्टा व दृश्य*** ही दोन्ही नाहीशी झाल्यावर तेथे काय आहे, हे विचारणारा तरी कोण उरणार! असे जे काही आहे, ते अनुभवणारा, त्याची साक्षात अनुभूती घेणारा साक्षात्कारी पुरुषच त्याचे खरेखुरे स्वरूप पाहू शकेल! ते इतरांच्या दृष्टिपथात कसे बरे येईल!"

"तो गां मी निरुपाधिकु"

अशा त्या अवर्णनीय स्वरूपाच्या परमात्म्याचे तरीही वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

जो प्रकाश्येंवीण प्रकाशु। ईशितव्येंवीण ईशु।
आपणेनीचि अवकाशु। वसवीत असे जो।।१५-५४५।।
जो नादें ऐकिजतां नादु। स्वादें चाखिजतां स्वादु।
जो भोगिजतसे आनंदु। आनंदेंचि।।५४६।।
सुखासि सुख जोडिलें। जैं तेज तेजासीं सांपडलें।
शून्यहीं बुडालें। महाशून्यीं जिएं **।।५४७।।**
जो पूर्णतेचां परिणामु। पुरुषु गां सर्वोत्तमु।
विश्रांतीचाही विश्रामु। विराला जियें।।५४८।।
जो विकासावरीही उरतां। ग्रासांतैंहीं ग्रासूनि पुरता।
जो बहुतें पाडे बहुतां। पासूनि बहु।।५४९।।

"जो प्रकाशवला न जाताच प्रकाश आहे; नियम्य पदार्थ अस्तित्वात नसतांनाही त्यांचा नियामक वा ***ईश्वर*** आहे; पोकळी हाच ज्याचा गुणधर्म असतो, तो अवकाशही जो स्वतःच भरून राहिला आहे; जो ध्वनीद्वारे ऐकला जाणारा ध्वनीचाही ध्वनी आहे; जो स्वादाद्वारे स्वाद्य असा स्वादाचाही स्वाद आहे; जो आनंदस्वरूप आपल्याच आनंदाने आपलाच आनंद उपभोगतो; जे सुखाचेही सुख आहे; जे तेजाचेही तेज आहे; आाकाशादी शून्यही ज्या **महाशून्या**त बुडते; जो पूर्णत्वाची परिसीमा आहे; जो सर्वोत्तम पुरुष आहे; विश्रांतीचा आत्मा असा, विश्रांतीलाही विश्रांती देणारा जो आहे; विश्व विकसले असताही जो ***अव्यय*** आहे; विश्वाचा ग्रास झाला असतांना त्याला ग्रासून जो जसाच्या तसाच राहतो; जो अनंत प्रकारे अनंत उपाधींपेक्षा अनंत पटीने बहुल आहे;" अन्

पैं नेणतेयांप्रति। रुपेपणाची प्रतीती।
रुपें न होऊनि शुक्ती। दावीं जेवीं।।१५-५५०।।
कां नाना अलंकारदशें। सोनें न लपत लपालें असें।
विश्व न होनिया तैसें। विश्व जो धरी।।५५१।।

"जो विश्वरूप न होता विश्व प्रकाशवतो; जसे शिंपले रुपेपणाची प्रतीती आपण रुपे न होताही, रुपेपणाचा आभास ज्याला तिच्यात दिसतो, त्याच्यापुढे प्रकटवते; किंवा नाना अलंकाररूपाने सोन्याचे सोनेपण न लोपूनही लोपल्यासारखे दिसते; त्याचप्रमाणे असा जो ***उत्तमपुरुष परमात्मा*** आहे, तो हे विश्व स्वतः न होताच विश्वपणास पावतो."

हे असो जलतरंगा। नाही सिनानेपण जेवीं गां।
तेवीं दिसतां प्रकाशु जगां। आपणचि जो।।१५-५५२।।
आपुलियां संकोच विकाशा। आपणचि रूप वीरेशा।
हा जळीं चंद्र हन जैसा। समग्र गां।।५५३।।

" किंबहुना जल व त्यावरले तरंग यांच्यात पृथकत्व वा भिन्नता जशी अजिबात नसते; तरंग हे जलच असतात, पण आकाररूपाने जलापेक्षा वेगळे असल्याचे जसे भासतात; त्याप्रमाणे जगत आभासवणारा प्रकाश हा परमात्माच आहे. बचकभर पाण्यात चंद्रबिंब इवलेसे दिसते, तर जलाशयात तेच पूर्णत्वाने विकास पावलेले दिसते. ज्याप्रमाणे त्या प्रतिबिंबाच्या अशा संकोचाविकासास तो चंद्रच कारणीभूत आहे; त्याप्रमाणे विश्वाच्या प्रकटनास आणि लयास वा संकोचास हा परमात्माच कारण आहे."

तैसा विश्वपणें काई होएं। विश्वलोपीं केंहीं न जाये।
जैसा रात्रीं दिवसे नोहे। द्विधा रवि।।१५-५५४।।

"परंतु विश्वपणा धारण केल्याने हा विश्व होतो; किंवा विश्वाचा लोप झाला की हा कुठे लुप्त होतो; असे मात्र नाही. दिवस व रात्र यांच्या योगे त्यांना प्रकटविणारा रवी काय दोन अवस्थांचा होतो की काय! असा हा ***परमात्मा वा उत्तमपुरुष*** आहे."

तैसा कांहींचि कोण्हीकडें। काईसेनिही वेंची न पडे।
जेयाचें सांगडें। जेयासिची।।१५-५५५।।
जो आपणपेंचि आपणयां। प्रकाशितसें धनंजया।
काय बहु बोलो जेयां। नाहीं दुजें।।५५६।।
तो गां मी निरुपाधिकु। क्षराक्षरोत्तमु एकु।
म्हणौनि म्हणे वेदु लोकु। पुरुषोत्तमु।।५५७।।

"तो काहीही झाले तरी कशानेही - कोणत्याही प्रकारे खर्ची न पडणारा - ***अव्यय*** असा आहे. हा या सम हाच आहे; याच्यासारखा दुजा कोणी नाही. हे अर्जुना! हा स्वतःच स्वतःला प्रकाशवतो. फार काय सांगावे! हा ***निरुपम अद्वय*** असाच आहे. यालाच म्हणून मी ***निरुपाधिक*** असे म्हटले; म्हणूनच ***क्षर*** व ***अक्षर*** पुरुषांहूनही ***उत्तम*** अशी याला वेदात व लोकात मान्यता आहे. म्हणून याला ज्ञाते ***पुरुषोत्तम*** म्हणून गौरवितात. अर्जुना! काय सांगू तुला! हा ***पुरुषोत्तम*** म्हणजे इतर कोणी नव्हे, तर ***साक्षात मीच तो उत्तम पुरुष, परमात्मा वा ईश्वर आहे."***

उपासनेचे गुह्य::::

विश्वात्म्यापलीकडील स्वरूप व त्याची उपासना

असे आपले श्रेष्ठतर स्वरूप भगवंत प्रकट करतात. *उत्तमपुरुष म्हणजे साक्षात भगवंतच* असे या गीता *श्लोक क्र. १५-१८* मध्ये म्हटले आहे. भगवंतच ***पुरुषोत्तम*** या संज्ञेस पात्र आहेत. त्याचप्रमाणे भगवत्स्वरूपाचे स्पष्ट वर्णनही या अध्यायात केलेले आहे. ***विश्वात्मा हे त्यांचे स्वरूप येथे स्पष्ट तर होतेच, पण त्याहीपलीकडचा जो अव्यय, अविनाशी, निराकार, निरञ्जन, मूलगामी असा भाव आहे; त्याचे समग्र रुपदर्शन या गीतेच्या पंधराव्या अध्यायाद्वारे घडवले आहे.*** एकदा तो ***उत्तम पुरुष, ते परम तत्त्व, तो परम आत्मा, ते परम धाम, ते परम पद, तो ईश्वर,*** हे सर्व काही भगवंत स्वतःच आहेत, अशी स्पष्ट ग्वाही दिली की नंतर भगवंत आपल्या सर्वश्रेष्ठ गुह्यतम उपासनेचे रहस्य प्रकट करतांना म्हणतातः

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।

"याप्रमाणे मी पुरुषोत्तम आहे, हे मोह न पावणारा जो कोणी जाणतो, तो सर्वज्ञ होत्साता सर्व भावेकरून, हे भारता! मलाच भजतो."

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत।।१५-२०।।

"हे निष्पाप भारता! असे हे ***गुह्यातले गुह्य शास्त्र*** तुला मी सांगितले. ह्याचा बोध उत्तमरीत्या सांगोपांग असा अंतर्यामी प्रकटलेला मनुष्य बुद्धिमान, ज्ञाता *(सर्वज्ञ)* आणि कृतकृत्य होतो."

गीतेतील उपासनेचे परम रहस्य

पंधरावा अध्याय समाप्त करतांना हे जे गुह्यतम शास्त्राचे सांकेतिकरीत्या निर्देशन केले आहे, त्यावरून पुनः स्मरण होते, ते अशाच आणखी दोन गीतास्थलांचे, जी आपण पूर्वी गीतेचा अनुबंध न्याहाळतांना ध्यानी घेतले होती *(उन्मेष:२५::गीतेतील उपासनेचा अनुबंध पृ.क्र. ३७८).*

"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।१८-६५।।" -"माझ्या ठिकाणी मन ठेवणारा हो. माझा भक्त हो. माझे यजन करणारा हो. मला नमस्कार कर. म्हणजे तू माझ्याप्रत येशील. तू मला प्रिय असल्यामुळे हे मी तुला प्रतिज्ञेवर सांगत आहे."

याप्रमाणे दुसरे स्थल म्हणजे ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"***- "माझ्या ठिकाणी मन अर्पण करणारा हो. माझा भक्त हो. माझे यजन करणारा हो. सर्वत्र मज वंदन करणारा हो. अशा रीतीने मत्परायण होत्साता माझे ठायी चित्त युक्त केले की तू माझ्याप्रतच येशील."

आणि आताच पंधराव्या अध्यायात म्हटल्याप्रमाणे ***"यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्। स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।"*** - "मी *पुरुषोत्तम* आहे, हे जाणून जो ज्ञानी सर्व भावेकरून मला भजतो; तो कृतकृत्य व सर्वज्ञ होतो."

<u>या तीन श्लोकांद्वारे गीतेची उपासनापद्धतीच साक्षात मूर्त होते! यातील मला म्हणजे भगवंताला सर्व भावाने भजणे; त्याच्याठायी मन व चित्त ठेवणे; त्यालाच एकाला नमस्कारिणे; त्याचेच यजन-याजन, भजन-पूजन करणे; त्याच्याच परायण होणे; त्याच्याशीच युत वा युक्त होणे; तोच पुरुषोत्तम आहे, असे जाणणे; अशी उपासनासूत्रे यांद्वारे प्रकट होतात.</u>

गीतेचा योग ***ईश्वरपरायण*** आहे. तो ***ईश्वरप्रणिधान*** हेच प्रधान मानतो. निराकाराची उपासना करतांना तिला ईश्वरप्रणिधानाचा आधार देऊन ती करावी, अन्यथा ती कष्टप्रद आहे; असा संदेशही गीतेच्या *बाराव्या* अध्यायाद्वारे दिला गेला आहे. हे उपरोल्लेखित तीन श्लोक त्यांच्या आदेशांसह लक्षात घतले की गीतेतल्या खऱ्या योगरहस्याचे आकलन जिज्ञासूंना आपसुकच होते. तसेच आपण हे असे ***योगरहस्य*** वा ***योगबीज*** प्रकट करत आहोत, ही जाणीव असलेल्या श्रीगोपालकृष्णांनी याच श्लोकांच्या आगेमागे तसा संकेत दिलेला आहे.

नववा अध्याय सुरू होतो तोच या स्पष्टोक्तीने! ***"इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे। ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्।।८-१।।"*** - श्रीकृष्ण म्हणतातः"आता अत्यंत गुह्य असे हे ज्ञान, विज्ञानासह, असूयारहित अशा तुला सांगतो. हे जाणल्याने तू अशुभापासून मुक्त होशील; मोक्ष पावशील."

नंतर ते म्हणतातः ***"राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्। प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्।।९-२।।"*** - "हे ज्ञान सर्व विद्यांचा राजा, सर्व गुह्यांचा स्वामी, पवित्र, उत्कृष्ट, प्रत्यक्ष अनुभवास येणारे, धर्माला अनुसरून असलेले, अनायासे आचरण करता येण्यासारखे आणि क्षयरहित - अव्यय - असे आहे."

या ***गुह्यातिगुह्य*** **राज**विद्येचा असा स्पष्ट निर्देश करून *नववा* अध्याय प्रकटवण्यास उद्युक्त झालेल्या गोपालांनी त्या गुह्याचा सारभूत असा श्लोक त्या अध्यायाच्या समाप्तीस सांगितला, तो वर म्हटल्याप्रमाणे ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"***

अठरावा अध्याय व उपासनारहस्य

अठराव्या अध्यायातील ***"मन्मना भव मद्भक्तो ...।।१८-६५।।"*** या श्लोकाचेही असेच आहे. त्या अगोदर असलेल्या श्लोकांमधून सर्वात अत्यंत गुह्य ज्ञान प्रकट करण्याचे सूतोवाच करतांना भगवंत म्हणतात; ***" सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः। इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्।।१८-६४।।"*** - "सर्वात गुह्य असे ज्ञान प्रकट करणारे माझे उत्कृष्ट भाषण पुनः ऐक. तू मला अत्यंत प्रिय आहेस; म्हणून तुला हिताची गोष्ट सांगतो." आणि ***"मन्मना भव मद्भक्तो..।..।।"*** व ***"सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।१८-६५ व ६६।।"***-"सर्व धर्मांचा त्याग करून मला एकट्यालाच अद्वैतभावाने शरण ये; म्हणजे मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन; तू शोक करू नकोस;" हे श्लोक मग येतात, ते मगा म्हटलेले ***रहस्य*** वा ***योगबीज*** प्रकटविणारे!

असेच *पंधराव्या* अध्यायातील ***"यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्.....। ।।"*** व ***"इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ। ...।।१५-१९ व २०।।"*** या श्लोकांबाबत आपण पाहिले होतेच. *अठराव्या* अध्यायातही साधनासूत्रांचा असाच परिपाठ गीताशास्त्र संक्षेपाने सांगतांना येतो. तोसुद्धा पाहण्यासारखा असल्यामुळे येथे उद्धृत करत आहे.

श्रीकृष्ण परमयोगरहस्य स्पष्ट करतांना म्हणतातः

१) ***"ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति। समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्।।१८-५४।।"*** - " ब्रह्मभावयोग्यता

प्राप्त झालेला, आत्मबोधप्रशस्तिपदावर आरूढ झालेला योगी शोक करत नाही व इच्छाही करत नाही. सर्व भूतांठायी समत्व प्राप्त झालेला तो योगीराट माझी श्रेष्ठ वा ***चतुर्था भक्ती*** वा ***ज्ञानभक्ती*** प्राप्त करून घेतो.

२) ***"भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः। ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्।।१८-५५।।"*** - "या सहजा ज्ञानभक्तीच्या योगाने मी कोण आहे व केवढा आहे, हे तो तत्त्वतः जाणतो. अशा रीतीने मला तत्त्वतः जाणून त्यानंतर तो माझ्यामध्ये प्रवेश करतो. माझ्याशी समरस होतो."

३) ***"सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः। मत्प्रसाददवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्।।१८-५६।।"*** - "बुद्धी, काया व वाचा यांनी माझा आश्रय केलेला योगी सर्वदा सर्व कर्मे करत असला, तरी माझ्या प्रसादाने शाश्वत व अविनाशी - अव्यय - असे परमपद प्राप्त करतो."

४) ***"चेतसा सर्व कर्माणि मयि सन्न्यस्य मत्परः। बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव।।१८-५७।।"*** - विवेकाने युक्त होऊन, सर्व कर्मे माझ्याठायी समर्पून, मत्पर होऊन, बुद्धियोगाचा आश्रय करून, सर्व काल माझ्याठायी चित्त जडलेला असा तू हो."

५) ***"मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि। अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि।।१८-५८।।"*** - "माझ्याच ठिकाणी ज्याने चित्त लावले आहे असा तू माझ्या कृपेमुळे संसाराला कारण होणाऱ्या अज्ञानादी सर्व निमित्तांना तरशील; त्यांचे उल्लंघन करून जाशील. पण तू जर अहंकार न त्यागता माझे वचन ऐकणार नाहीस, तर विनाश पावशील; अर्थात परमार्थपथापासून भ्रष्ट होशील."

या श्लोकातून साधनासूत्र प्रकटवता प्रकटवता श्रीकृष्ण असाही निर्वाणीचा इशारा देतात की दुरभिमानाने या त्यांच्या योगसूत्रानुरूप न वागणाऱ्या साधकास परमार्थसिद्धी न होता, तो मार्गापासून भ्रष्ट होईल. या मुख्य वचनावरूनही श्रीगोपालांनी प्रशस्ती केलेला योगमार्ग कोणता हे आपल्या लक्षात निश्चित यावे, अशी त्यांची अपेक्षा असल्यास नवल ते कोणते!

६) ***"ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।१८-६१।।"*** व ***"तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत। तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।१८-६२।।"*** - हे अर्जुना! शरीररूपी यंत्रावर आरूढ झालेल्या सर्व प्राण्यांना अंतर्यामी ईश्वर आपल्या मायेने भ्रमण करवत सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात स्थित आहे. हे भारता! त्याच परमेश्वराला अनन्यभावाने शरण जा. त्याच्या कृपेमुळे परमशांती आणि शाश्वत स्थानाला प्राप्त होशील."

संपूर्ण ***गीतारहस्य*** हे असे उघड करून दाखविल्यावर ते ***गुह्य*** असल्याबाबतची मुद्रा अंकित करतांना श्रीगोपाल म्हणायला विसरत नाहीत कीः ***"इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया। विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु।।१८-६३।।"*** - "याप्रमाणे हे पार्था! मी तुला गुह्याहूनही अति गुह्य असे हे ज्ञान सांगितले. याचा पूर्णपणे विचारविमर्श करून मग जसे तुला योग्य वाटेल, तसे कर."

आणि या श्लोकानंतर इतउपरांत पुनः ते गुह्यज्ञान सारांशाने प्रकटवणारे तेच ते दोन श्लोक - ***"मन्मना भव मद्भक्तो ...।।"*** व ***"सर्वधर्मान्परित्यज्य ...।।१८-६५ व ६६।।"*** येतात!

योगाचा गुह्य संप्रदाय

हा जो गीतेच्या *परमरहस्याचा* - त्यातील निर्दिष्ट अशा योगमार्गाचा त्यातल्या तत्त्वज्ञानासह त्यातल्या श्लोकरूपी योगसूत्रांद्वारे आपण परामर्ष घेतला, त्याची सांगतासुद्धा श्रीगोपालकृष्ण ***गुह्यात गुह्य*** असलेल्या या गीताशास्त्राचा समारोप करतांना, त्या शास्त्राबाबतचे व त्याच्या संप्रदायाचे जे गुह्य संकेत स्पष्ट करतात, त्या श्लोकांनी होते; ती अशीः

१) ***"इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन। न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति।।१८-६७।"*** - "हे ज्ञान तू तपश्चर्या न करणाऱ्याला सांगू नकोस. तसेच माझा जो भक्त नाही, त्याला केव्हाही सांगू नकोस. आणि जो माझा निंदक आहे, त्याला तर कधीच सांगू नकोस! तसेच जो माझी असूया करतो, त्यालाही या ज्ञानापासून दूरच ठेव."

२) ***"य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति। भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः।।१८-६८।।"*** - "जो पुरुष माझ्याठायी परमभक्ती व प्रेम ठेवून हे परमरहस्ययुक्त गीताशास्त्र माझ्या भक्तांना सांगेल, तो निःसंशय मलाच येऊन पोहोचेल."

३) ***"न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः। भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि।।१८-६९।।"*** - "आणि त्या भक्ताहून अधिक माझे अत्यंत प्रिय कार्य करणारा मनुष्यांमध्ये दुसरा कोणीही नाही आणि त्याच्याहून मला अत्यंत प्रिय असा या भूमंडलावर दुसरा कोणीही होणार नाही."

४) ***"अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः। ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः।।१८-७०।।"*** व ***"श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः। सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ।।१८-७१।।"*** - "आणि जो आम्हा दोघांच्या या धर्मरूपी संवादाचे पठन करील, म्हणजे त्याचे अध्ययन करील; त्याच्याकडून ज्ञानयज्ञाने माझीच पूजा केली गेली असे होईल; असे माझे मत आहे.एवं च काय! जो श्रद्धाळू, असूया न करणारा - मत्सररहित मनुष्य- हा आमचा संवाद नुसता ऐकेलही, तोही पापापासून मुक्त होऊन, पुण्यवानांच्या शुभलोकाला प्राप्त होईल."

पुरुषोत्तमाशी योग

पुरुषोत्तमालाच जिने वरले आहे, अशा गीतादेवीच्या मनीचे गूढ हितगूज आपण ***पुरुषोत्तमयोग*** नावाच्या अध्यायमिषे जाणून घेण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. तो कितपत सफळ झाला, ते जिज्ञासूंनी

आपले आपणच ठरवावे! आता आपण परिशीलन करीत होतो, त्या ***"मामेवमसम्मूढो ... ।।"*** व ***"इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ। ... ।।१५-१९ व २०।।"*** या श्लोकद्वयीकडे वळू या.

यांच्याविषयी आद्यश्रीशंकरभगवत्पादांचे म्हणणे आहे, ते असेः "उत्तम पुरुषाचे तत्त्व प्रकट केल्यावर या आत्मतत्त्वास जाणण्याचे फल सांगितले आहे, ते असे की जो कोणी अज्ञानरहित पुरुष अशा प्रकारे *(आधीच्या श्लोकांद्वारे)* निर्देशिलेल्या मज पुरुषोत्तम ईश्वरास असे जाणतो की हा ***पुरुषोत्तम मीच आहे,*** तो सर्वज्ञ आहे. तो संमोहविवर्जित पुरुष सर्वात्मभावास जाणतो. म्हणून तो ***सर्वज्ञ*** आहे आणि हे भारता! सर्व भूतमात्रात स्थित असणाऱ्या मज परमात्म्यालाच तो **सर्वभावेन - सर्वांचा आत्मा समजून** भजतो."

नंतरच्या श्लोकातून, मोक्षरूप फल देणाऱ्या या अध्यायी प्रकटवलेल्या भगवत्तत्त्वज्ञानाबाबत ते म्हणतातः "हे गुह्यतम अर्थात सर्वांपेक्षा अधिक गोपनीय वा गूढ रहस्य आहे."

"हे तत्त्वज्ञान जे या अध्यायात येते, ते शास्त्रात गणले जाते काय? यास ***शास्त्र*** असे विशेषत्वाने म्हटले आहे. *कारण संपूर्ण गीता हीच शास्त्र या अभिधानास पात्र आहे.* परंतु या *पंधराव्या* अध्यायात सर्व गीताशास्त्राचा गूढ अर्थ संक्षेपतः सांगितला आहे; एवढेच काय! **या ठिकाणी वेदांच्या अर्थाचीही परिसीमा गाठली गेली आहे. त्याबाबत *"यस्तं वेद स वेदवित्" व वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः"* अशी उक्ती येथे येते.**"

"म्हणून हे बुद्धिमान अर्जुना! हे असे माझे परम गोपनीय शास्त्र तुला सांगितले. याला नीट जाणून घेतल्याने मनुष्य बुद्धिमान व कृतकृत्य होतो; इतर कोणत्याही प्रकारच्या शास्त्राने नाही. जे काही जाणण्यायोग्य आहे, ते सर्व भगवत्तत्त्व जाणून घेतल्याने आपोआपच जाणले जाते. याच एका प्रकारे केवल सर्व कर्तव्याची इतिकर्तव्यता वा परिसमाप्ती होते. म्हणूनच ***"सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।"*** असे म्हटले आहे. मनूचेसुद्धा असेच वचन आहे. ***"एतद्धि जन्मसामग्र्यं ब्राह्मणस्य विशेषतः।"*** व ***"प्राप्यैतत्कृतकृत्यो हि द्विजो भवति नान्यथा।"***. "म्हणून हे भारता! माझ्याकडून हे परमार्थतत्त्व ऐकून तू कृतार्थ झालास! धन्य झालास!"

पंधरावा अध्याय व गीता

श्रीमदआद्यशंकराचार्यांनी असा निर्वाळा देऊन ***गीता* आता या *पंधराव्या* अध्यायी खरे तर सांगून पूर्ण झाली आहे,** असा संदिग्ध संकेत सूचित केला आहे. आणि यानंतर येतात ते गीतेचे *१६,१७ व १८ हे अध्याय* पुरवणी व उजळणीस्वरूपच आहेत,तसेच गीतेचे *तृतीय* म्हणजे वेदांसदृश **ज्ञानकांड** या *पंधराव्या* अध्यायी पूर्ण होते, असेही श्रीज्ञानदेवांचेही मत आपण पूर्वी पाहिले आहेच.

ज्ञानदेवोक्तीतून गीतारहस्य

ही पार्श्वभूमी ध्यानी घेऊन आपण आता ज्ञानदेव या दोन श्लोकरत्नांच्या दीप्तीचा प्रकाश आपल्या सर्वांच्या अंतःकरणात पाडण्यासाठी ज्ञानदेवीच्या ओवीप्रदीपास कसे उजळतात, ते पाहू याः

परि हे असो ऐसियां। मज पुरुषोत्तमातें धनञ्जया।
जाणें जो पाहलेयां। ज्ञानमित्रें।।१५-५५८।।
चेईलियां आपुलें ज्ञान। जैसें नाहींचि होय स्वप्न।
तैसें स्फुरतें जेयां त्रिभुवन। वावो जालें।।५५९।।

"मीच तो पुरुषोत्तम आहे; तो उत्तम पुरुष म्हणजे मीच हे तुला आणखी किती वेगवेगळ्या रीतींनी सांगू! अशा मज पुरुषोत्तमास, अक्षराहून ***पर*** व अक्षरापेक्षा ***उत्तम*** असणाऱ्या मला, जो योगी ज्ञानरवी उदयास आला असता त्याच्या असीम प्रकाशात माझे निखिल निरञ्जन परमात्मस्वरूप पाहण्याचे भाग्य पावून धन्य होतो; कृतार्थता पावतो; आत्माराम होतो; परम निःश्रेयस पावल्याने आप्तकाम होतो; मज निराकारास जो सर्वथैव जाणतो; जगदाभासाने मोहित न होता असंमूढ चित्ताने जो माझे स्वरूप यथार्थ ग्रहण करतो;"

"मायेच्या प्रलोभनाने विस्मित न होता जो धैर्यपूर्वक त्या मायेच्याही मूलस्थ असणाऱ्या मला सर्व प्रकारे उत्तमरीत्या ओळखतो, मी जो ***परमात्मा*** तो माझ्यासारखा मीच आहे, हे तत्त्व ज्याच्या दृष्टीपुढे सूर्याइतके स्पष्ट प्रकटले आहे; मला पाहण्यासाठी ज्याने आपल्या ज्ञानदृष्टीचा उत्तम विनियोग करून ती सार्थकी लावली आहे; आत्मसाक्षात्काररूपी बोध ज्याला गवसला आहे; परमात्मानुभूतीचे गौरीशंकर हे शिखर ज्याने जिंकले आहे; जागृति आल्यावर स्वतःचे स्वरूपज्ञान जाणवल्याने स्वप्नांतरीचे त्याविषयी भासणारे मिथ्याज्ञान वा अज्ञान जसे नाहीसे होते, तसे ज्याचे या प्रस्फुरण पावणाऱ्या त्रिभुवनाविषयीचे अज्ञान नाहीसे झाले आहे व या विश्वाचे खरे स्वरूप ज्याला ज्ञात झाले आहे;" आणि

कां हातीं घेतलियां माला। फिटे सर्पाभासाचां कांटाला।
तैसा माझेनि बोधें टवाला। नागवे जो।।१५-५६०।।
लेणें सोनेंचि जो जाणें। तो लेणेंपण वावो म्हणे।
तेवीं मी जाणौनि जेणें। वालिला भेदु।।५६१।।
मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु। मीचि एकु स्वतःसिद्धु।
जो आपणेनसीं भेदु। नेणोनो जाणें।।१५-५६२।।
तेणेंचि सर्व जाणितलें।....।।५६३।।

"नीलरत्नांचा हार जेव्हा हातात धरला जातो, तेव्हा त्याच्यावर भासणाऱ्या सर्पविषयक भ्रमाचा पूर्ण निरास झाल्याने अंगावर उठलेले भयग्रस्ततेचे शहारे जसे नाहीसे होतात; त्याचप्रमाणे मज पुरुषोत्तमासन्मुख होऊन माझे खरेखुरे स्वरूप ज्याने जाणून घेतले, हे विश्व म्हणजे मी परमात्माच हे ज्याच्या प्रतीतीस आले, ज्याला

माझा स्वरूपबोध झाला, म्हणून जो त्या दुरत्यया मायेच्या या मिथ्याभासरूपी विश्वभ्रमाने फसत नाही;" आणि

"अलंकार भिन्नभिन्न असले, तरी ते ज्या लगडीपासून तयार केले गेले, तिच्यात सुवर्ण होते अन् आहे; तेच सुवर्ण जसेच्या तसे त्या अलंकारांत असल्याचे जो जाणतो, तो जसा अलंकारांचे मूल्य करतांना, त्याच्या आकारावरून ते ठरवत नाही, तर सुवर्णावरून ते करतो; त्याचप्रमाणे ***"हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतीरसाचा वोतला भावो।।"*** हा ज्याचा आंगिक भाव झाला आहे व म्हणून भेद - परमात्मा व विश्व भिन्न असण्याचा भाव - ज्याने वर्ज केला आहे; असे रहस्य ज्याने आत्मसात केले आहे व त्यामुळे ज्याला सर्वत्र सच्चिदानंद परमात्माच भरून राहिलेला दिसतो व मज परमेश्वराशिवाय इतर कोणीच येथे नाही, मीच एकमेव स्वयंसिद्ध तत्त्व आहे, हे ज्याच्या स्वतःसह माझ्याठायी निक्षेपलेल्या अभेदवृत्तीच्या जाणिवेच्या प्रांतात ओतप्रोत भरून ठसलेले आहे; ज्याने भेदवृत्तीचा सर्वतया त्याग केलेला आहे; त्यानेच - त्या महायोग्यानेच - हे अर्जुना! सर्व काही जाणण्यासारखे जे आहे, ते संपूर्णतया जाणले आहे, असे मी म्हणतो."

.........। हेही म्हणणें थेंकुलें।
जैं तेयां सर्व उरलें। द्वैत नाहीं।।१५-५६३।।

"तोच सर्वज्ञ आहे; तोच ज्ञाता आहे. एवं च काय! साक्षात ज्ञानही तोच आहे आणि मूर्तिमंत ज्ञेयही तोच आहे! आता त्या अवस्थेतल्या या महापुरुषाला त्याने हे सर्व जाणले आहे, असे म्हणणेही वास्तविक नाही. कारण सर्वच ज्याला ब्रह्ममय झाले, परमात्माच ज्याला सर्वत्र गवसला, ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** अशा साक्षात्कारात जो स्थित झाला, त्याला द्वैत ते कोठले! ***मी, तू, तो*** ही भाषा जेथे स्थिरावून लोप पावते; मौन हाच जिथला स्थायीभाव आहे; ***"द्वैताद्वैतविवर्जित। केला नामा।।"*** अशी अनामधन्य जी स्थिती आहे; त्याठायी, त्या माझ्या परम विश्रामधामात जो पोहोचला; त्याच्याविषयी कोणतेच द्वैतवाचक उद्गार सार्थ ठरत नाहीत."

अनन्यभक्ती

म्हणौनि माझियां भजना। उचितु तोचि अर्जुना।
गगन जैसें आलिंगना। गगनाचियां।।१५-५६४।।
क्षीरसागरां परगुणें। कीजें क्षीरसागरचिपणें।
अमृत होऊनि मिलणें। अमृतीं जेवीं।।५६५।।
साडेपंधरा मिसलावें। तैं साडेपंधरेंचि होआवें।
तेवीं मी जालिया संभवे। भक्ति माझी।।५६६।।
हां गां सिंधुसि आनी होती। तऱ्हीं गंगा कैसेनि मिलती।
म्हणोनि मी होतां भक्ती। अन्वयो आहे।।५६७।।

"म्हणूनच हे अर्जुना! मज अद्वैताच्या भजनाला - साचोकार भक्तीला - सर्वथैव पात्र असलेला असा तोच एकमेव पुरुष आहे. गगनाला आलिंगन द्यावे, तर जसे गगनच व्हावे तर! क्षीरसागराचे यजमानत्व करावे, तर क्षीरसागरानेच! अमृतात मिसळावे तर अमृत होऊनच! चोख सोन्यात बेमालूमपणे मिसळायचे तर आपणही तसेच विशुद्ध होऊनच! म्हणून माझी अभेदभावाने जर भक्ती करावयाची असेल, तर मत्स्वरूपच व्हायला पाहिजे! गंगा जर सागरापेक्षा वेगळ्या द्रव्याची असती, तर त्याला मिळून एकरूप होती ना! अशाच प्रकारे माझ्याशी एकरूप झाल्याशिवाय माझ्या भक्तीत प्रवेश तरी कसा होईल!"

ऐसियालागीं सर्व प्रकारीं। जैसा कल्लोळू अनन्यसागरीं।
तैसा मातें अवधारीं। भजिन्नला जो।।१५-५६८।।
सूर्या आणि प्रभे। एकवंकी जेणें लोभें।
तो पाडु मानूं लाभें। भजना तेयां।।५६९।।

"समुद्राची लाट जशी समुद्राशी अनन्य असते, त्याचप्रमाणे जो योगी माझ्याशी अनन्य होऊन सर्व भावांनी माझी भक्ती करतो, त्याच्या भक्तीची विशेषता काय वर्णावी! सूर्य आणि त्याची प्रभा जशी अनन्य असतात; त्यांचे आपसात इतके प्रेम असते, इतका एकमेकांवर लोभ असतो, इतकी प्रीती ते एकमेकांवर करतात की जेथे सूर्य तेथे त्याची प्रभा आणि जेथे त्याची प्रभा तेथे सूर्य, असे त्यांचे अनन्यगतिकत्व असते. सूर्य व प्रभा ही अशी एकरूपच झालेली असतात की सूर्यावाचून प्रभेस अस्तित्व नाही अन् त्याचप्रमाणे प्रभेवाचून सूर्य नाही. मज परमात्म्याच्या व त्या ज्ञानी भक्ताच्यात असाच सूर्य व त्याची प्रभा यांच्यासारखाच भक्तीचा संबंध आहे."

"सूर्य-रश्मि-प्रभा या त्रयीने जसा एकमेव सूर्याचा बोध होतो, ही तिन्ही सूर्याठायी अद्वैत वा अनन्य रूपाने आहेत; तसेच ***मी परमात्मा -भक्ती -योगी वा भक्त वा ज्ञानी*** यांच्याद्वारे मज एका नारायणाचाच केवळ बोध घ्यावा. आम्ही दोघे व आमच्यातील रश्मिसदृश भक्तीचा दुवा ही तिघे मज परमेश्वराच्या निरञ्जन स्वरूपाठायी अद्वैतरूपाने स्थित असतात. हे अर्जुना! हा माझ्यातील व माझ्या भक्तातील अनन्य प्रेमसंबंध - भक्तिरस - जाणून तो प्राप्त करून घे आणि कृतकृत्य हो."

यात्रमाणे ***अनन्यभक्तीचा - ज्ञानभक्तीचा - चतुर्थाभक्तीचा - उत्तमा भक्तीचा - परमभक्तीचा - प्रेमारसामृताचा - दिव्यामृतधारेचा - पुरातन योगधारेचा - दिव्यातिदिव्य ज्ञानगङ्गेचा*** **संस्मरणीय धाराप्रवाह भगवंतांनी प्रकट केला आहे. हीच धारा - हेच सूत्र - या गीताशास्त्राचा विशेष प्रतिपाद्य विषय आहे**, हे जिज्ञासूंना सांगणे न लगे! हे गूढातिगूढ रहस्य, हे अगम्य ***योगबीज***, ही ज्ञानामृताची जान्हवी जेव्हा गीतेद्वारे प्रकट होते, तेव्हा सूज्ञ जाणकारांस कृतकृत्य करते.

आत्मा अवतरवणारे मंत्ररहस्य

हा बोध जेव्हा अंतर्यामी धारण करून योगी त्या पुरुषोत्तमस्वरूपातील नारायणास जाणून घेऊन त्याची अनन्यभावे भक्ती करतो, तेव्हा तो आप्तकाम होतो; बुद्धिमान होतो आणि कृतकृत्य होत्साता भगवंताच्याचठायी लीन होतो.

जीवाचे स्वरूप

त्यासंबंधीच्या ओव्या आपण फार पूर्वी गीतेची महनीयता अभ्यासतांना पाहिल्याचे आपणांस स्मरत असेलच *(उन्मेषः२::आत्मरूपा सद्गुरू,पृ.क्र.४७ते ४८)*. पुनरुक्तीचा दोष पदरी घेऊनही त्यातल्या महत्त्वाच्या ओव्या या ठिकाणी पुनश्च पाहणे विषयानुक्रमाच्या सध्याच्या संदर्भात व *श्लोक क्र. १८-२०* व ***पुरुषोत्तमयोग*** यांच्या अवलोकनार्थ उचितच ठरेल. त्या ओव्या अशाः

एवं कथलेयादारभ्य। जैं हे सर्वशास्त्रैकलभ्य।
उपनिषदां सौरभ्य। कमलदलां जेवीं।।१५-५७०।।
हे शब्दब्रह्माचे मथितें। व्यासप्रज्ञेचेनि हातें।
मथूनि काढिलें आयितें। सार आम्हीं।।५७१।।

"हे गीताशास्त्र *प्रथम* अध्यायापासून आतापावेतो या *पंधराव्या* अध्यायाअखेरपावेतो जे निरुपिले, ते म्हणजे समस्त शास्त्रांच्या अध्ययनाने जी वस्तू प्राप्त होते; दशोपनिषदरूपी दशदलपद्मातील जो सौरभ आहे; ते सर्व अगणित शब्दब्रह्म वेदवाङ्मयाचे मुरलेले अक्षर दही एकत्र करून, व्यासप्रज्ञारूपी रवीने घुसळून आम्ही काढलेले बुद्धिरूपी तळहातावर घेऊन सहज सेवन करता येणारे पुरुषोत्तमरूपी नवनीतच होय."

जैं ज्ञानामृताची जाह्नवी। जैं आनंदचंद्रीचीं सतरावी।
विचारक्षीरार्णवींची नवी। लक्ष्मी जैं हे।।१५-५७२।।

"अशी ही जी गीताराज्ञी प्रकटली आहे, ती ज्ञानरूपी अमृततोयास्वरूपा प्रवाहाने ओसंडून दुथडी भरभरून वाहणारी; पुरुषोत्तमनाद आपल्या खळखळाटाने प्रकट करत ज्ञानवान योग्यांच्या चित्तास उल्हासवणारी; आपल्या काठावरील पादपांना, तृणांकुरांना, पशुपक्ष्यांना जीवन प्रदान करणारी; जेथे जेथे तिचा प्रवाह वळेल, तेथील पाप-ताप-दैन्य-दुःख-शाप निवारणारी ही जाह्नवीच आहे. आत्मानंदरूपी चंद्राची ही सतरावी कला आहे."

"हिच्या रूपाने व लावण्याने दुसरी साक्षात ज्ञानरूपा लक्ष्मीच विचाररूपी क्षीरसागराचे, दैव व आसुरसंपद्विभागरूपी देवदैत्यांद्वारे, बुद्धिरूपी मंदार पर्वतास रवी करून, भयावह संसाररूपी वासुकी सर्पाची दोरी करून, मंथन केल्यावर प्रकटली आहे. मी ***पुरुषोत्तम*** त्या बुद्धिरूपी मंदार पर्वताच्या तळी आधार देऊन हे मंथन पूर्णत्वास नेऊन पोहोचवणारा कूर्मनारायणच आहे."

म्हणौनि आपुलेनि पदें वर्णें। अर्थाचेनि जीवें प्राणें।
मीवांचौनि हों नेणें। आन काईं।।१५-५७३।।
क्षराक्षरत्वें समोर आलें। तेयांचें पुरुषत्व वालिलें।
मग सर्वस्व मज दिधलें। पुरुषोत्तमीं।।५७४।।

"अशी ही चिरयौवना नूतन ज्ञानलक्ष्मी आपल्या पदरूपी कायेने, वाणीरूप वाचेने आणि अर्थरूपी जीवप्राणाने मज पुरुषोत्तमावाचून इतर कोणाचीही अर्धांगिनी होण्याचा विचारही जाणत नाही. या गीतालक्ष्मीने आपणांस वरावे या मोहाने लिप्त झालेले ***क्षरपुरुष***रूपी दैत्य व ***अक्षरपुरुष***रूपी सुर तिची मनधरणी करण्यासाठी पुढे झाले असता, ते पूर्ण पुरुष नाहीत, हे मनोमन जाणून तिने त्यांना वरण्यास नकार दिला आणि मग आपण होऊन मज पुरुषोत्तमास वरमाला घातली व सर्वार्थाने मला आपले सर्वस्व - तन - मन - प्राण - चित्तवृत्तींसह अर्पण करून कृतार्थता पावली."

म्हणौनि जगीं गीता। मियां आत्मेनि पतिव्रता।
जैं हे प्रस्तुत तुवां आतां। आकर्णिलीं।।१५-५७५।।
सांचचि बोलाचें नव्हें हे शास्त्र। पैं संसार जिणतें हे शस्त्र।
आत्मा अवतरवितें मंत्र। अक्षरें इयें।।५७६।।

"प्रथमारंभापासून आतापावेतो ज्या या गीतादेवीचे तुला दर्शन घडले, ती गीता मजशी अनन्य असल्याने मज आत्मराज पुरुषोत्तमाची अशी पतिव्रता आहे.***गीता हे निव्वळ शब्दपांडित्य प्रकटवणारे सामान्य शास्त्र नाही, तर गीता हे संसाररूपी दुरासदास जिंकण्याचे शस्त्र आहे.*** या जगती तर साक्षात आत्म्याला आवाहन करून प्रकट व्हायला लावणाऱ्या अक्षर मंत्रांची मूर्तीच अशी ही गीता आहे."

अर्जुनाची प्रशंसा

अशी ही गीता साक्षात भगवन्मुखाने प्रकटवणाऱ्या अर्जुनाबाबत श्रीज्ञानदेव म्हणतातः

परि तुजफुडां सांगितलें। तैं अर्जुना ऐसें जालें।
जैं गौप्यधन काढिलें। माझें आज।।१५-५७७।।
मज चैतन्यशंभूचां माथां। जो निक्षेपु होता पार्था।
तेयां गौतमु जालासीं आस्था-। निधी तूं गां।।५७८।।

"गीताश्लोकांची ही अक्षर मंत्रावली तुझ्यापुढे प्रकटली. अर्जुना! माझा हा गुप्तधनाचा ठेवा - हे गौप्यनिधान - हा गीतारत्नांचा खजिना - तू आज स्वाधीन करून घेतलास. पूर्वी भगवान चंद्रमौलीश्वराच्या मस्तकी गुप्त रूपाने वास्तव्य करणारी गंगा प्रकटविण्यास जसे गौतमऋषींचे तप कारणीभूत झाले, त्यांची भगवंतावरील श्रद्धा जशी त्रैलोक्यास हितकर ठरली; त्याप्रमाणे मज चैतन्यशंभूच्या मस्तकी जो आत्मज्ञानाचा निधी होता, त्याला प्रकट करून त्याद्वारे त्रैलोक्यास पुण्य प्रदान करण्यास तुझी मजप्रत असणारी असीम श्रद्धा व आदर यांचा अमूल्य समुच्चय विनियोगिला गेला."

चोखटिवा आपुलियां। पुढिलां उगाणा घेआवया।
तेयां दर्पणाचिचि परी धनंजया। केली आम्हां।।१५-५७९।।
कां भरलें चंद्रतारांगणीं। नभ सिंधू आपणयांमाजीं आणी।
तैसा गीतेसीं मी अंतःकरणीं। सूदला तुवां।।५८०।।
जैं त्रिविधमलकटा। तूं सांडिलासि सुभटा।
म्हणौनि गीतेसीं मज वसौटा। जालासि गां।।५८१।।

"आपल्यासमोर असलेल्या वस्तूस तिचे चोख रूप दर्शवणाऱ्या निर्मळ आरशासारखी आमची स्थिती करून तू त्यात आत्मरूप पाहून धन्य झालास. चंद्राच्या प्रफुल्लित करणाऱ्या चांदण्यासह व चमचमणाऱ्या

तारकांसह विस्तीर्ण नभांगणास विशाल अंतःकरणाचा समुद्र जसा त्याच्या हुबेहूब प्रतिबिंबास आपल्याठायी समावून घेतो, तसाच मज पुरुषोत्तम परमात्म्यासह या गीताबोधास तू तुझ्या निर्मळ अंतःकरणात प्रेमपूर्वक आस्थापिले आहेस. अर्जुना! तुझ्या चित्तातील त्रिविध मल त्यागले गेल्यामुळे त्या प्रशांत, स्थिर, वृत्तिरहित, स्वच्छ अशा हृदयात तू मला वसवून धन्य झालास."

ज्ञान व कर्म::::

"ज्ञानियां पुरुषा। कर्म करूं सरलें देखा।।"

याप्रमाणे अर्जुनाची प्रशंसा केल्यावर श्रीगोपालकृष्ण गीताशास्त्राची महती स्पष्ट करण्यासाठी असे म्हणतात कीः

परि हे बोलों काय गीता। जैं हे माझी उन्मेखलता।
जाणें तो समस्तां मोहां मुके।।१५-५८२।।
सेविली अमृतसरिता। रोगु दवडूनि पांडुसुता।
अमरपण उचिता। देऊनि घाली।।५८३।।
तैसीं गीता हे जाणितलिया। काय विस्मो मोह जावया।
परि आत्मज्ञानें आपणपयां। मिलिजे जेथ।।५८४।।

"मला गीतेसह आपल्या विशाल झालेल्या हृदयात ठाव देणाऱ्या पार्था! तुझ्यासारख्या भक्तवर्याची प्रशंसा करावी, तेवढी थोडकीच! तुझ्या पावलावर पाऊल टाकून जे ही माझी ज्ञानवल्लरी - ही उन्मेषलता ***गीता***, तिचे स्वरूप जाणतात, तेसुद्धा या जगदाभासाच्या मोहमयी मायेपासून मुक्त होतात. हे अर्जुना! अमृतसरितेच्या तोयप्राशनाने तहान तर भागतेच, पण रोगसुद्धा सगळे दूर पळून जाऊन आयतेच अमरत्वही जसे लाभते; तसेच या गीतेच्या अमृतरूप ज्ञानाचे पान करण्याने आत्मशांती लाभून ज्ञानतृप्ती तर होतेच, पण संसारमोहाची अति जुनाट व्याधीही मूळासकट नष्ट होऊन वर आत्मज्ञानाने ***अव्यय, अक्षर, अक्षय्य, निरञ्जन*** **पदही प्राप्त होते!"**

हारपलें दाऊनि जैसा। मागु सरे वीरविलासा।
ज्ञानचि कलसु वलघे तैसा। कर्मप्रासादा।।१५-५८५।।
म्हणौनि ज्ञानियां पुरुखा। कृत्य करूं सरलें देखा।
ऐसा अनातांचा सखा। बोलिला तो।।५८७।।

"हे आत्मज्ञान तरी असे असते की त्याच्यावरून कर्म आपल्या जीविताची कुरवंडी करून विलयास जाते. हे वीर्याचे विलासस्थान असणाऱ्या अर्जुना! हरवलेली वस्तू दाखवून त्या वस्तूचा मागोवा जसा सरावा, त्याचे काहीच प्रयोजन उरू नये; तसेच कर्माचे होते. कर्ममार्गाने ज्या ज्ञानाचा मागोवा घेतघेत साधक पथक्रमण करत असतो, ज्या कर्मप्रसादावर चढून त्याच्या कलशस्थानी असणाऱ्या ज्ञानशिखरावर साधक आरूढ होऊ पाहतो; त्या ज्ञानशिखरास एकदा पादाक्रांत केले की कर्म करण्याचे प्रयोजन नसते," याप्रमाणे तो अनाथांचा सखा, दीनदयाळू श्रीकृष्ण पार्थास म्हणाला.

कर्मयोग व ज्ञानयोग यांचा संगम

उपरोल्लेखित क्र.१५-५८३ *ते ५८७* -***"सेविली अमृतसरिता। ...।।...ऐसा अनाथांचा सखा....।।"*** या ओव्या गीतेच्या योगरहस्याबाबत महत्त्वपूर्ण आहेत. गीताश्लोक *क्र. १५-१९ व२०*द्वारे म्हटल्यानुसार पुरुषोत्तम भगवंतांस जाणणाऱ्या, संसारादींमुळे भ्रम न पावणाऱ्या, भगवंतांना सर्व भावेकरून भजणाऱ्या आप्तकाम पुरुषास गीताशास्त्रोक्त उत्तम बोध प्राप्त झाल्याने सर्वज्ञता व कृतकृत्यता प्राप्त होतात.

येथे *गीता व ज्ञानेश्वरी यांतील एक महत्त्वाचा अनुबंध* लक्षात घेण्यासारखा आहे. यापूर्वी गीताध्यायांचा अनुबंध परीक्षिण्यासाठी *उन्मेषः२५::गीतेतील उपासनेचा अनुबंध,पृ. क्र. ३७३ ते ३७५* येथे गीतेतल्या *ज्ञान* व *कर्म* या दोन निष्ठांचा काही विचारविनियम आपण केला होता. कर्मयोगाचे अवश्यंभावी आचरण गीता प्रतिपादते. या प्रतिपाद्य विषयाच्या अनुषंगाने तेथे आलेल्या *द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम* या अध्यायांचे महत्त्वाच्या श्लोकांचे तेथे विहंगम अवलोकन केले होते.

आताच्या *पंधराव्या* अध्यायातील उपरोल्लेखित ओव्यांच्या संदर्भासाठी जिज्ञासूंचे लक्ष गीतेच्या ***"श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परन्तप। सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।।४-३३।।"*** या श्लोकाकडे वेधणे उचित होईल.

हा श्लोक *कर्म व ज्ञान* यांचा दुवा सांधतो. द्रव्यादी साधनांद्वारे सिद्ध होणाऱ्या यज्ञांपेक्षा *ज्ञानयज्ञ* श्रेष्ठ आहे. तसेच सर्व कर्मांचे म्हणजे यज्ञांचे पर्यवसान ज्ञानामध्ये होते. ज्ञानापाशी कर्म आपण होऊन थबकते. सर्व कर्मयज्ञांची सांगता ज्ञानयज्ञात न झाल्यास निःश्रेयसप्राप्ती होत नाही. भले स्वर्गसंसारातील उत्तमोत्तम फलभोग कितीही का मिळेनात; असा येथे मतितार्थ आहे. या श्लोकानिमित्त ज्ञानदेवांनीही म्हटले आहे कीः

देखे परमात्मसुखनिधान। साधावया योगीजन।
जैं न विसंबिती अञ्जन। उन्मेखनेत्रीं।।४-१६०।।
जैं धांवतयां कर्माची लाणी। नैष्कर्म्यबोधाची खाणी।
जैं भुकेलियां धणी। साधनाची।।१६१।।
जेथ प्रवृत्ति पांगुल जालीं। तर्काची दिठी गेली।
जेणें इंद्रियें विसरली। विषयसंगु।।१६२।।
मनाचें मनपण गेलें। जेथ बोलाचें बोलपण ठेलें।
जेयामाजीं सांपडलें। ज्ञेय दिसे।।१६३।।
जेथ वैराग्याचां पांगु फिटे। विवेकाचाही सोसु तुटे।
जेथ न पाहतां सहज भेटे। आपणपें।।१६४।।
तैं ज्ञान पैं गां बरवें। जऱ्हीं मनासि आथी आणावें।
तऱ्हीं संतांसीं या भजावें। सर्वस्वेंसीं।।१६५।।

हा भाग यज्ञकल्पनेचा परामर्ष घेतांना *अधियज्ञ* संकल्पनेच्या संदर्भात पूर्वी येऊन गेला आहे *(उन्मेषः१७:अर्जुनाचे सप्तप्रश्न,*

पृ. क्र. २५५व २५७). संतांना शरण जाऊन जे ज्ञान मिळवायचे; कर्मयोगाचे यज्ञाइतके पवित्र आचरण करून ज्याठायी पोहोचावयाचे; सर्व कर्मांची, कर्मयोगाची, यज्ञांची सांगता ज्या ज्ञाननारायणात होते; जो सर्व यज्ञांचा भोक्ता परमेश्वर आहे; त्याच्याप्रत जे जाऊन पोहोचावयाचे, तेथे जाऊन पोहोचले की अनिमिष ज्ञानांजनशलाका नेत्री असणाऱ्या योगी जनांची इतिकर्तव्यता होते.

ते परमात्मसुखनिधान गवसले की संचित कर्माचा लोप होतोच, पण ***प्रारब्ध*** व ***क्रियमाण*** ही दोन्ही कर्मेही आपल्या शेवटास जातात. कर्म, मग ते कोणत्याही प्रकारचे असो, येथे समाप्त होते. येथे खरी नैष्कर्म्यता प्राप्त होते. ब्रह्मप्राप्तीसाठी आतुरलेल्या साधकांची साधने जेथे संपतात; साधनांचे काहीही प्रयोजन जेथे पुढे राहात नाही; कर्मयोगाचे साधन जेथे पुढे उरत नाही; जेथे प्रकृतीचे प्रवृत्तिपर गुण पांगुळतात; बुद्धी व तर्क यांना जेथे स्थान नाही; बुद्धियोग, शास्त्रे इ.चे जेथे प्रयोजन उरत नाही; इंद्रिये विषयाकार होण्याची मूळ प्रवृत्ती टाकून देतात व खरा संन्यास जेथे प्राप्त होतो; मनाचे ***अमन*** जेथे होते; वाचा जेथे मौनावते; वैराग्य जेथे सार्थकी लागते; विवेकाची धारा जेथे समाप्त होते; ज्यामध्ये हरपलेले श्रेय पुनश्च गवसते; ते म्हणजे ज्ञानच!

ज्ञानदेवांचा कर्मयोगविषयक विचार

असा ***कर्मयोग व ज्ञान*** यांचा हृद्य संगम येथे *पंधराव्या* अध्यायाअंती गीतेचे ***ज्ञानकांड*** संपतांना जो चितारला आहे, तो ज्ञानदेवांच्या योगप्रणालीस अनुसरूनच आहे. **क्रमयोगा**चे आपण जेव्हा विवेचन पाहू, तेव्हा या विषयाचा अधिक परामर्ष घेता येईल. तूर्त ***पुरुषोत्तमयोग*** या अध्यायाच्या सांगतेसाठी ज्ञानदेवांनी हाच विचार *१५-५८३ ते ५८७* या ओव्यांतून कसा मांडला आहे, हे आपण पाहात आहोत. या स्थलीसुद्धा ज्ञानदेवांनी पुनश्च म्हटले आहे की ***आत्मज्ञानाठायी कर्म लोपते.***

कर्मयोग आचरण्याचा एकमेव हेतू म्हणजे ज्ञानरूपी अंतिम स्थान प्राप्त करून घेणे. **एकदा ते *परमपद - ज्ञान - परमात्मतत्त्व - निःश्रेयस* प्राप्त झाले की कर्माचे प्रयोजन संपते. म्हणून अशा प्राप्तार्थ पुरुषांस - ज्ञान्यांस कर्तव्य उरत नाही.** याच अर्थी गोपालकृष्णांनी असा योगी पुरुष सर्वज्ञ होतो आणि तसेच कृतकृत्य होतो, असे म्हटले आहे *(गीता श्लोक क्र. १५-२०).*

गीतारहस्यातील विचार

कर्मयोगरहस्य व ***संन्यासमार्गी*** यांसंबंधी ***गीतारहस्य*** या आपल्या ग्रंथात आदरणीय लो.टिळक यांनी साद्यंत चर्चा केली आहे. त्यांनी समालोकित केलेल्या काही मुद्यांची जिज्ञासूंनी जरूर नोंद घ्यावी. **त्यांच्या मते, गीतेचा प्रमुख प्रतिपाद्य विषय म्हणजे कर्मयोगशास्त्र आहे. *"ब्रह्मविद्यायां योगशास्त्र"* म्हणजे *कर्मयोगपर गीताशास्त्र!***

मोक्ष प्राप्त करण्यासाठी जगात व्यवहार कोणत्या धोरणाने करावेत, असा प्रश्न या शास्त्राने सोडवला आहे. ज्ञानोत्तर कर्मे करावीत का करू नयेत; तसेच ज्ञानप्राप्तीपूर्वी चतुर्थ आश्रम स्वीकारून कर्मांचा संन्यास करावा किंवा नाही; तसेच श्रीमच्छंकराचार्य व इतर संन्यासमार्ग श्रेष्ठ समजणारे वा त्यास मान्यता देणारे, यांची मते चुकीची का बरोबर, -*स्मार्त* म्हणजे संन्यास श्रेष्ठ मानणारे व *वैष्णव* म्हणजे *भागवत* वा आमरणांत अधिकारानुसार कर्म करणे श्रेष्ठ मानणारे - त्यातला गीतेस मान्य असणारा कोणता संप्रदाय आहे; गीतेचा *प्रस्थान*त्रयीत समावेश असल्याने *उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व गीता* ही तिन्ही मिळून परिपूर्ण वेदांत व तत्त्वज्ञान असले पाहिजे आणि म्हणूनच गीता कर्मयोगाची विशेषता सांगत असली पाहिजे; ब्रह्मज्ञान वा आत्मज्ञान झाल्यावर कर्मे करत राहून नंतर मोक्ष मिळतो असा कर्मयोगाचा भाग त्यांनी *अध्यात्म (प्रकरण ९)* व *संन्यास व कर्मयोग (प्रकरण १०)* या आपल्या ग्रंथातील प्रकरणांत विवेचिला आहे.

शंकराचार्यांचा संन्यास विचार

गीतारहस्यातील शांकरसंन्यासाश्रमास उचलून धरण्याविरुद्धची मीमांसा ही मूलभूत दोन प्रकारची आहेः १)साधकाने उद्दिष्ट म्हणून चतुर्थाश्रम - संन्यास - स्वीकारावा की नाही; २) ब्रह्मज्ञानी पुरुषाने ज्ञानप्राप्तीनंतर मोक्ष होईस्तोवर कर्मपर आचरण करावे की संन्यास ग्रहण करावा.

वास्तविक पाहिले तर कर्मांचा निःशेष त्याग संभवनीय नाही. देहादींचे व्यापार हे देह आहे, तोपावेतो चालूच राहाणार. त्यामुळे संन्यास म्हणजे कर्मे न करणे असा नसून संसारासक्तीने करावयाची कर्मे शक्य तोवर टाळणे व त्यासाठी चतुर्थाश्रमाचा स्वीकार करणे, असा अर्थ संन्यासमार्गीयांस अभिप्रेत असल्याचे जिज्ञासूंस सहजच जाणवेल.

संसारासक्ती सोडणे कठीण असल्याने आणि कामेच्छेच्या प्रांतात सर्वतया राहून तिचा सामना करणे सामान्य साधकांस शक्य नसल्याने त्यांनी गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पार पाडल्यानंतर *वानप्रस्थ* व *संन्यास* हे आश्रम स्वीकारावेत, असे पुरातन मत आहे. अनेक जन्म संसारासक्तींचा असा त्याग करण्याचा अभ्यास केल्यास मनुष्य आत्मपथावर अग्रेसर होईल, हा हेतू त्यामागे आहे.

गृहस्थाश्रमादी पार न पाडताच बालवयात संन्यास घेणाऱ्या भगवत्पूज्यपाद आचार्य श्रीशंकर यांचा म्हटले तर केवळ अपवादच या नियमाबाबत आहे. आणि त्यांचे लोकोत्तर व्यक्तिमत्त्व आणि त्यांनी अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यात केलेले महत्कार्य पाहता सदर शास्त्रोक्त संन्यासाश्रम मर्यादेच्याविषयी निरतिशय अपवादात्मक असेच त्यांच्या संन्यासग्रहणाबाबत म्हणावेच लागेल! शंकराचार्यांनी आठव्या वर्षी आग्रहपूर्वक संन्यास ग्रहण केला याचा अर्थ असा तर होत नाही की सर्वांनी तसेच करावे असे त्यांचे मत होते!

आणि संन्यासाश्रम ग्रहण केल्यावर वैदिक धर्माच्या पुनरुत्थानाचे व भारतभ्रमण करून आचार्यपीठे स्थापन करण्याचे; तसेच योग, वेदांत, प्रस्थानत्रयी इ.वर भाष्यादी अलौकिक ग्रंथरचना करून लोकांस मार्गदर्शन करण्याचे - लोकसंग्रहाचे - जे असामान्य कार्य त्यांनी केले; त्याकडे पाहता ज्ञानोत्तर कर्मे करूच नयेत, असे त्यांचे मत असणे शक्य वाटत नाही.

ब्रह्मज्ञान व मोक्ष

दुसरा मुद्दा असा की ***ब्रह्मज्ञान ते मोक्ष*** **असा जो प्रवास कल्पिला आहे, त्यातील विसंगती म्हणजे *ब्रह्मज्ञान हे खऱ्या अर्थी झाले असल्यास तेव्हाच मोक्ष होतो.*** मध्यंतरी काही इतर आचरण करून तो मिळवायचा असतो असे नाही. ***जीवन्मुक्ती*** वा मोक्षाची कल्पना ही अशी आहे. जिज्ञासूंनी याबाबत आपली जिज्ञासा तृप्त करून घेण्यासाठी व वर केलेला खुलासा तपशीलवार तपासण्यासाठी मूळ ग्रंथ ***गीतारहस्य*** पहावा, अशी भावना व्यक्त करून पुढील विचाराकडे वळू या!

ज्ञानदेवकृत समन्वय

आदरणीय लो. टिळक, भगवत्पाद श्रीमच्छंकराचार्य, स्मृति, श्रुति, शास्त्रादींनी बहुत चर्चिलेला हा असा ज्ञानोत्तर कर्मांचा आणि चतुर्थाश्रमी संन्यासाचा ***स्मार्त व भागवत*** मतादी या सदरात मोडणारा विषय आहे.

याबाबतच्या सर्व प्रकारच्या मतमतांतरांचा परामर्ष घेऊन त्यांचा समन्वय श्रीज्ञानदेवांनी साधला आहे. स्पष्टच म्हणावयाचे तर असे की ज्ञानोत्तर कर्मांचे कोणतेच प्रयोजन उरत नाही. तरीही ज्ञान्यांस कर्म सुटत नाही. देहवानास कर्म करणे अवश्यंभावी आहे. देहास कर्म चिकटलेले आहे.

सर्वच ज्ञान्यांची उदाहरणे पाहिली तर शुक-याज्ञवल्क्यादी, जनक, व्यास, भीष्मादिप्रभृती विदुर, उद्धव, नारद, वाल्मिकी इ.पासून तो तहत ज्ञानेश्वरादी एकनाथ, रामदास, तुकाराम इ.संतमंडळी, तसेच श्रीमदाद्यशंकरभगवानांसह सर्व ज्ञान्यांस, आचार्यादिकांस ब्रह्मप्राप्ती झालेल्यांस कर्मांनी सोडलेले नसल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे, तर या सर्व जीवन्मुक्तावस्थेत विचरणाऱ्या अलौकिक विभूतींनी त्या कर्माद्वारे लोकोद्धाराचे कार्य विस्तृत प्रमाणावर केलेलेही दिसून येते.

म्हणजेच केवळ भगवी वस्त्रे धारण करणे व संन्यासाश्रमाच्या व्रतादी नियमांचे पालन करणे व कोणतेही इतर कर्म अजिबात न करणे, असा ज्ञानोत्तर संन्यासाचा मर्यादित अर्थ घेणे उचित ठरत नाही. गीतेत *कर्मसंन्यास* वा तत्सम विचार जे येतात, ते कर्मे करण्याची नैष्कर्म्यतासिद्धी, कामेच्छेचा तसेच फलेच्छेचा जात्याच अभाव, कर्मविपाकापासून मुक्तता यांना अनुलक्षूनच बव्हंशी ते असतात. *संन्यासाश्रम* व त्यातील विहित आचरण यांच्याशी गीतेतल्या *ज्ञानोत्तर संन्यास* वा *कर्मसंन्यास* यांचा संबंध जोडणे म्हणून तसे योग्य वाटत नाही.

संन्यासाचा दुसरा अर्थ *ज्ञान वा साङ्ख्यबुद्धि वा योग* असा असल्याने कर्मयोगपर मार्गाव्यतिरिक्त त्यास मोक्षप्राप्तीचा दुसरा मार्ग अशी गीतेची मान्यता आहे. ज्ञानदेव त्या मार्गास *विहंगम मार्ग* असे म्हणून पक्ष्याचा दृष्टांत देऊन त्याचे वैशिष्ट्य स्पष्ट करतात.

पक्षी अचानक उड्डाण करून वृक्षावरील फळावर झेप घेतो. पण मनुष्याला मात्र झाडाच्या खांदीखांदीवरून चढत जाऊनच ते फळ हस्तगत करावे लागते. *साङ्ख्य, संन्यास वा ज्ञान* हे मार्ग क्वचित कोण्या महभागांसाठी आहेत; तर *कर्मयोगपर मार्ग* इतर सर्व मनुष्यमात्रांसाठी आहे; हे ज्ञानदेवांनी **क्रमयोगा**चे *अठराव्या* अध्यायात विवेचन करतांना स्पष्ट केले आहे.

त्याचप्रमाणे भगवंतांनीही या विषयासंबंधी म्हणजे *संन्यासाचे तत्त्व* स्पष्ट करण्यासाठी *अठराव्या* अध्यायात *श्लोक क्र.१* मधील अर्जुनाच्या ***"सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्। त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशीनिषूदन।।"*** या पृच्छेचे सविस्तर विवेचन करून आपले मत सांगतांना यज्ञदानतपादी कर्मे आसक्तिरहित होऊन करावीत; त्यांचा त्याग करू नये; असे प्रतिपादले आहे. जवळजवळ संपूर्ण अध्यायच *(श्लोक क्र. १८-१ ते ६३)* या विषयास वाहिलेला आहे. त्याचा आपण पुढे योग्य वेळी विचार करणारच आहोत.

तूर्त पंधराव्या अध्यायाच्या समाप्तिप्रसंगीच्या ज्ञानदेवांच्या ***"म्हणौनि ज्ञानिया पुरुषा। कृत्य करू सरले देखा। ऐसा अनाथांचा सखा। बोलिला तो।।१५-५८७।।"*** या उद्गारांची विशेष नोंद घेणे, त्यांनी जी गीताध्यायसंगती प्रकट केली आहे, त्याप्रमाणे *पंधराव्या* अध्यायी गीतेचा त्रिकांडात्मक विषय संपत असल्याने उचित ठरेल!!!

समारोप::::

गीता अध्याय १ ते १८ तील प्रतिपाद्य विषय

पंधराव्या अध्यायाविषयी व गीताध्यायसंगतीविषयींचे त्यांचे विचार पाहून पुढे जाऊ याः

तऱ्हीं पहिला जो अध्यावो। तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो।
द्वितीयीं साङ्ख्यसद्भावो। प्रकाशिला।।१८-१४३५।।
मोक्षदानीं स्वतंत्र। ज्ञानप्रधान हे शास्त्र।
येतुलालें दुजीं सूत्र। उभारिलें।।१४३६।।
मग अज्ञानें बांधलेयां। मोक्षपदीं बैसावया।
साधनारंभु तो तृतीया-। ध्यायीं बोलिला।।१४३७।।
जैं देहाभिमानबद्धें। सांडूनि काम्यनिषिद्धें।
विहित परि अप्रमादें। अनुष्ठावें।।१४३८।।
ऐसेनि सद्भावें कर्म करावें। हा तिजा अध्यावो जो देवें।
निर्णो केला तैं जाणावें। <u>*कर्मकाण्ड*</u> एथ।।१४३९।।
आणि तैंचि नित्यादिक। अज्ञानाचें आवश्यक।
आचरतां मोचक। केवीं होय पां।।१४४०।।
ऐसीं अपेक्षा जालियां। बद्ध मुमुक्षुत्वें आलियां।
देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया। सांगितली।।१४४१।।

जैं देहवाचामानसें। विहित निफजे जैं जैसें।
तैं एक ईश्वरोद्देशें। कीजे म्हणितलें।।१४४२।।

पंधरा अध्यायांचा सारांश

प्रथमाध्यायी शास्त्रारंभाची प्रस्तावना; दुसऱ्यात साङ्ख्यसिद्धांताचे प्रकटन; तसेच हे गीताशास्त्रांतर्गतचे *साङ्ख्यशास्त्र* मोक्ष प्रदान करणारे स्वतंत्र शास्त्र असल्याचे प्रतिपादन; तृतीयाध्यायी अज्ञानबद्धांना मुक्तिपदी बसवण्यासाठी करावयाच्या साधनाचा उपोद्घात; तसेच देहाहंता सोडून देता न येणाऱ्यांनी काम्य व निषिद्ध कर्मे त्यागून विहित कर्मे आचरावीत हा निर्णय, हे एवढे कर्मकांड; तसेच अज्ञान्याने नित्य कर्मे अनुष्ठितांना ती बंधमोचक होण्यासाठी ब्रह्मार्पण करण्याची युक्ती व देहवाचामनाने होणारी सर्व कर्मे मुमुक्षूंनी केवळ ईश्वराप्रीत्यर्थ करावीत, असे आदेश, असे भाग चतुर्थाध्यायी येतात.

हेंचि ईश्वरीं कर्मयोगें। भजनकथनाचेनि खागें।
आदरिलें शेख भागें। चतुर्थाचेनि।।१८-१४४३।।
तैं विश्वरूप अकरावा। अध्यावो संपे जंव आघवा।
तंव कर्में ईशु भजावा। हे जैं बोलिलें।।१४४४।।
तैं अष्टाध्यायीं उघड। जाण एथ *देवताकाण्ड*।
शास्त्र सांगतसें आड। मोडौनी बोलें।।१४४५।।

कर्मयोगाच्याद्वारे भक्ती व हरिकथा -भजन- पूजनादींद्वारे साधन करत अकराव्या अध्यायापर्यंत कर्मे ईशु भजावा, असा सिद्धांत स्थापन करून *अध्याय चार ते अकरा* अशी *अष्टाध्यायी* ***देवता***कांडात मोडते. हे सर्व आडपडदा न राखता सांगण्यात आले आहे.

आणि तैंचि ईशप्रसादें। श्रीगुरुसंप्रदायलब्धें।
सांच ज्ञान उद्बोधें। कोंवलें जैं।।१८-१४४६।।
अद्वेष्टादिप्रभृतिकीं। अथवा अमानित्वादिकीं।
वाढविजे म्हणौनि लेखीं। बारावा गणूं।।१४४७।।
तो बारावा अध्याय आदि। आणि पंधरावा अवधी।
ज्ञानफलपाकसिद्धि। निरूपणासि।।१४४८।।
म्हणौनि चहूंहीं इहीं। ऊर्ध्वमूलांतीं अध्यायीं।
***ज्ञानकाण्ड* ये ठायीं। निरूपिजे।।१४४९।।**

"कर्मकुसुमांद्वारे ईश्वरभक्ती करत असतांना श्रीगुरुप्रसादाने ईश्वरकृपा होऊन ज्ञान प्रकटू लागते. त्यास अद्वेष्टादी व अमानित्वादी गुणांनी वृद्धिंगत करण्याचे सूत्र बाराव्या अध्यायी येते. ज्ञानफलाच्या सिद्धीसाठी बारावा ते पंधरावा अशा चार अध्यायी निरूपण करून ***ज्ञानकांड*** समाप्त होते."

यानंतर येणारे अध्याय पुरवणीवजा व सारांशात्मक आहेत. ज्ञानविरोधी अज्ञान सोळाव्या अध्यायी निरूपिले आहे. सतराव्या अध्यायात अज्ञानवर्गास जिंकण्यासाठी शास्त्र प्रमाण मानण्याची युक्ती सांगितली आहे. आणि या *समग्र वेदांताचे वेदांसह तात्पर्य वा अर्थसमूहाचे सार अठराव्या कलशाध्यायात निरूपिले आहे;* असा श्रीज्ञानदेवांचा अभिप्राय आहे.

पंधराव्या अध्यायाचे मर्म

तसेच पंधराव्या अध्यायातील निरूपणाविषयी ज्ञानदेवांचे म्हणणे असे आहे की:

तऱ्हीं अध्यायीं पंधरावा। श्रीकृष्णें तेयां पांडवा।
***शास्त्रसिद्धांतु* आघवा। उगाणिला।।१६-४१।।**
जैं वृक्षरूपक परिभाषा। केलें उपाधि रूप अशेषा।
सद्वैद्यें जैसें दोषा। अंगलीना।।४२।।
आणि कूटस्थु जो अक्षरु। दाविला पुरुषुप्रकारु।
तेणें उपहिताही आकारु। चैतन्या केला।।४३।।

"प्रथमाध्यायी गीताशास्त्राच्या बाबत जो शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव केला होता, त्याप्रमाणे संपूर्ण शास्त्रसिद्धांत श्रीकृष्णांनी पांडुपुत्र अर्जुनास *पंधराव्या* अध्यायी विस्तारपूर्वक विवेचिला. निष्णात वैद्याने रुग्णाच्या अंगीचे दोषव्याधी जसे ओळखावेत, त्याप्रमाणे वृक्षरूपकाद्वारे चिकित्सा करून त्याने उपाधिरूप जगताचे निदान करून, कूटस्थ अक्षर पुरुषाचे स्वरूप निश्चित केले. तसेच सोपाधिक झालेल्या क्षराक्षररूपी चैतन्याचेही रूपदर्शन घडविले."

पाठीं उत्तम पुरुषोत्तम। शब्दांचे करूनि मिख।
दाविलें चोख। आत्मतत्त्व।।१६-४४।।
आत्मविषयीं आंतुवट। सादण जैं आंगदट।
ज्ञान हेहीं स्पष्ट। चावलला।।४५।।
म्हणौनि इयें अध्यायीं। निरूप्य नुरेचि काई।
आतां गुरुशिष्या दोहीं। स्नेहो लाहणा।।४६।।
एवं इयेंविखीं कीर। जाणते बुझावलें अपार।
परि मुमुक्षु इतर। साकांक्ष जाले।।४७।।

"नंतर ***उत्तम पुरुष*** या शब्दाचे अनुसंधान करून शुद्ध चैतन्याचे - आत्मतत्त्वाचे - परमात्म्याचे स्पष्ट समग्र तत्त्व आद्यंत सांगितले. ***आत्मप्राप्तीसाठी अंतरंग साधन ज्ञानच होय*** आणि त्याच्यासारखे समर्थ अन हमखास यश देणारे इतर काहीच नाही, हेही श्रीकृष्णांनी तेथे स्पष्टच सांगितले आहे. म्हणून आता या सोळाव्या अध्यायी निरूपण करण्याजोगते आता काहीच उरत नाही. आता पुढे जे काही श्रीकृष्णार्जुनसंवाद येतील, ते गुरुशिष्यांचे प्रेमदर्शनच होय! या सर्व आतापर्यंतच्या निरूपणामुळे ज्ञात्या लोकांचे पूर्ण समाधान झाले. पण इतर जे मुमुक्षुजन होते, ते मात्र अजून जिज्ञासातृप्ती होणार या अपेक्षेने पुढील संवाद ऐकण्यास उत्सुक झाले."

त्या मज पुरुषोत्तमा। ज्ञानें भेटें जो सुवर्मा।
तो सर्वज्ञु तोचि सीमा। भक्तीचिही।।१६-४८।।

"हे मर्मज्ञ अर्जुना! त्या मज पुरुषोत्तमास ज्ञानपूर्ण ऐक्यभावाने जो बुद्धिमान योगी पुरुष येऊन मिळतो, तोच ***सर्वज्ञ*** होय आणि भक्तीची परिसीमाही तोच आहे. तोच कृतार्थ - कृतकृत्य आहे," असे पंधराव्या अध्यायप्रसंगी श्रीकृष्णांनी शेवटच्या श्लोकात व्यक्त

केले. त्या प्रसंगी त्यांनी आनंदाने ज्ञानाचेही सविस्तर वर्णन केले. ते असेः

ऐसें त्रैलोक्यनायकें। बोलिलेच अध्यायांत श्लोकें।
तेथ ज्ञानचि बहुतेकें। वानिलें तोषें।।१६-४९।।
भरूनि प्रपंचाचा घोंटु। कीजैं देखतयाचि द्रष्टु।
आनंदासाम्राज्यीं पाटु। बांधिजे जीवा।।५०।।
एवढेयां लाठेपणाचा उपावो। आनु नाहींचि म्हणे देवो।
हा सम्यग्ज्ञानाचा रावो। उपावांमाजीं।।५१।।

"असे ते ज्ञान अखिल संसाराचा एकच घोट करून, पाहतापाहताच जीवाला द्रष्टा करून, आनंदसाम्राज्याच्या सिंहासनावर विराजमान करते. आत्मतत्त्वाशी एवढी जवळीक साधण्याचा एवढा बलवान उपाय दुसरा कोणताच नाही. प्रपंचाचा निरास करून जीवास आत्मस्वरूपाचे ज्ञान करून देऊन त्याठायी नेऊन पोहोचवणारा यथार्थ वा सम्यग्ज्ञानाचा हा उपाय म्हणजे सर्व साधनांचा राजाच आहे; म्हणूनच या गीताशास्त्रोक्त सिद्धांतस्वरूपास - *या योगमार्गास - या गीताज्ञाननिष्ठेस - या नैष्कर्म्यरूप योगसिद्धीस - या क्रमयोगसोपानास - या ब्रह्मविद्येच्या योगशास्त्रास - या पंथराजास -या उत्तम चतुर्था भक्तिपंथास - या वेदांतसारशिरोमणीस - या संपूर्ण चिद्विलासाच्या ज्ञानदेवांच्या आवडत्या तत्त्वज्ञानास - या अद्वैत मेरुशिखरास - या पुण्यसलिला अमृततोया ज्ञानगंगेस - या चिदानंदस्वरूप ज्ञानमार्तंडास - या प्रत्यक्ष परमात्म्याच्या मुखाने वर्धित केलेल्या, दिव्य केलेल्या दिव्यातिदिव्य विद्यारत्नास* प्रत्यक्ष भगवंत **राजविद्या** म्हणून सन्मानाने संबोधितात."

"तो अंधुहि सुखिया जाला":::::

असे ते श्रीकृष्णवचनामृत पार्थाचे अंतरंग भरून टाकून वोसंडू लागले व ते सञ्जयास व्यासकृपेने प्राप्त झाले. सञ्जयाने ते अमृत धृतराष्ट्रास बळजबरीने पाजले.

तैसीं हरिवक्त्रींची अक्षरें। सञ्जयें सांगितली आदरें।
तिहीं अंधु तोही अवसरें। सुखिया जाला।१५-५९२।।

म्हणून त्या आंधळ्या मोहग्रस्त राजास अंतकाळ जड गेला नाही. एरवी गीताश्रवणासाठी धृतराष्ट्र अनधिकारीच होता. पण त्याला गीतेचा प्रकाश शेवटी उपयोगास आला. द्राक्षवेलीस दूध घातले, तर ते वाया गेल्यासारखे वाटले, तरी ते भरघोस फळाच्या रूपाने दुप्पट होते. त्याचप्रमाणे हरिमुखीची अक्षरे बळेबळेच त्या अंधाच्या कानी आदरपूर्वक घालणाऱ्या सञ्जयामुळे त्या अंधाचा अंतसमय चांगला निभावून गेला.

पंधराव्या अध्यायाचा समारोप

अशी ही हरिमुखाची अक्षरसंपदा आपल्यापर्यंत आणून पोहोचविणारे ज्ञानदेव म्हणतातः

तैंचि मऱ्हाटेनि विन्यासें। मियां उन्मेखें ठंसेंठोंबसें।
जाणें नेणें तैसें। निरोपिलें।।१५-५९३।।
सेवंतिये अरसिकांहीं। आंग पाहतां विशेषु तऱ्हीं नाहीं।
परि सौरभ्य नेलें तिहीं। भ्रमरी जाणीजे।।५९४।।
तैसें घडतें प्रमेय घेईजे। उणें तैं मज देईजे।...।।५९५।।

"ती हरिमुखींची अक्षरे मराठमोळ्या भाषेत मला कळली, न कळली तशी म्यां अपरिपक्व ज्ञान असणाऱ्याने निरूपिली. शेवंतीच्या फुलांकडे त्यांचा विशेष सुगंध माहीत नसलेल्यांचे लक्ष जाण्याचे कारण नाही. परंतु त्यांचा सौरभ जिने लुटला त्या भ्रमरीलाच रसिकदृष्टीचे म्हटले पाहिजे. माझी मराठमोळी भाषा तशीच आहे. त्यातल्या रूपरंगाची उणीव माझी आहे. पण त्यातल्या गीतार्थाच्या प्रतिपादनातील योग्य असेल तो भाग आपण रसिक श्रोत्यांनी ग्राह्य मानावा, ही प्रार्थना!"

...। जैं नेणणें हेंचि सहजें। रूप कीं बाला।।१५-५९५।।
परि नेणतें जऱ्हीं होये। तऱ्हीं देखौनि बाप कीं माये।
हर्ष केंहीं न सामाये। चोज करिती।।५९६।।
तैसें संत माहेर माझें। तुम्हीं मिनलियां मी लाडैजें।
तैंचि ग्रंथाचेनि व्याजें। जाणिजो जी।।५९७।।
आतां विश्वात्मकु हा माझा। स्वामी श्रीनिवृत्तिराजा।
तो अवधारु वाक्पूजा। ज्ञानदेवो म्हणे।।५९८।।

"नाहीतरी मजसारख्या अनभिज्ञ बालकास गीतार्थातील काहीच न कळणे हाच सहज भाव नाही का! परंतु मूल जरी असले, तरी त्याच्या मातापित्यांनी त्याला पाहिले की त्यांना हर्षाचे भरते येते आणि त्याचे किती कौतुक करू अन किती नको, असे त्यांना होऊन जाते. तुम्ही संतमंडळी अशीच माझी मायबापे आहात! मी माझ्या माहेरघरी तुम्ही भेटल्यावर असा लडिवाळपणा करतो आहे, तो या ग्रंथरूपानेच! विश्वात्मक असा माझा स्वामी श्रीनिवृत्तिराज आहे. त्याला पण माझी ही वाक्पूजा आवडो, असे माझे - ज्ञानदेवाचे - मागणे आहे."

अभिजात नम्रतावृत्ती अंगी असणाऱ्या श्रीज्ञानदेवांनी असा पंधराव्या अध्यायाचा समारोप केला आहे. त्यांचीच बालके असणारे आपणसुद्धा दुसरे काय म्हणणार! त्यांच्या बोटाला धरून ज्ञानदेवी अन गीतेच्या अंतरंगविश्वातील हे आपले भ्रमण - हे पथक्रमण - यथासांग पूर्णतेकडे जावो, ही अंतर्यामीची इच्छा प्रकट करून, आपण आता पुढील **स्कंध क्र. ६ - गीतेचा अनुबंध** याकडे वळू या.

क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचाराचा जो पाठपुरावा आपण आतापावेतो ज्या परीक्षणाद्वारे केला, त्याचे विहंगम अवलोकन करून, गीतेतील तत्त्वज्ञान आणि उपासना यांचा समन्वय कसा होतो, ते तेथे पाहावयाचे आहे. त्यासाठी आता आपणांस पुढील ***उन्मेष क्र. २९ - गीता तत्त्वज्ञान व उपासना समन्वय*** याकडे वळणे क्रमप्राप्त आहे. इत्यलम्।

::षष्ठ स्कंध::गीतेचा अनुबंध::
(उन्मेष २९) (पृ.क्र.४४२ ते ४५३)

:::षष्ट स्कंध:::
::गीतेचा अनुबंध::

::उन्मेष::२९::
::गीता तत्त्वज्ञान व उपासना समन्वय::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

<u>उन्मेष २९:</u>
गीता:
३:१४,१५,१७
ज्ञानेश्वर:
७:४-७,१२-१४
८:१-४,७,८,१४,१५,२०-२२,२८
१३:१-३,५,६,१२-२३,२६,२७,२९-३४,
१४:३-५,१९,२०,२६,२७
१५:१-११,१५-२०

:::षष्ट स्कंध:::
::गीतेचा अनुबंध::

::उन्मेष::२९::
::गीता तत्त्वज्ञान व उपासना समन्वय::

अध्यायपरत्वे विचार::::

जीव-जगत-ईश्वर विचाराचे पुनरावलोकन

अभिजात नम्रतावृत्ती अंगी असणाऱ्या श्रीज्ञानदेवांनी पंधराव्या अध्यायाचा केलेला समारोप आपण नुकताच पाहिला. त्यांचीच बालके असणारे आपणसुद्धा दुसरे काय म्हणणार आणि मागणार! त्यांच्या बोटाला धरून ज्ञानदेवी अन् गीतेच्या अंतरंगविश्वातील आपले हे भ्रमण - हे पथक्रमण - यथासांग पूर्णतेकडे जावे, ही अंतर्यामीची इच्छा प्रकट करून, आपण *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* विचाराचे *विहंगम अवलोकन* आतापावेतो केलेल्या परीक्षणाच्या आधारे करू या:

अध्यायानुरूप केलेला तत्त्वविचार व उपासनामार्ग

जीव, जगत व ईश्वर यांचा या दृश्य सृष्टिव्यापाराच्या संदर्भात काय संबंध आहे, याचा विचार पूर्वी वेदांत्यांनी त्यांचे केलेले वर्गीकरण व गीतामते केलेले वर्गीकरण यांचा लो. टिळककृत तक्त्याद्वारे आढावा घेतांना आपण केला होता. तो विचार मुख्यत्वे प्रकृति, तिचे विकार आणि श्रेष्ठतम तत्त्व कोणते याबाबत होता. तसेच क्षेत्राच्या तत्त्वासंबंधीचा जो भाग *तेराव्या* अध्यायात येतो, त्या संदर्भात त्यापुढील विचार व तत्त्वक्रम आपण न्याहाळला होता.

पंधराव्या अध्यायात *क्षर-अक्षर-उत्तम* या पुरुषांच्या, तसेच *ऊर्ध्वमूल* वृक्षरूपकाच्या विवेचनाद्वारे हा सर्व विचार एका वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवण्यात आला. तसेच या विषयाचा विचारस्त्रोत जो *तिसऱ्या* अध्यायापासून सुरू होतो, तो या *पंधराव्या* अध्यायी समाप्त होतो. त्यापुढे ज्ञानविज्ञानाचा उर्वरित भाग जो राहतो, तो प्रामुख्याने कर्मविषयक आहे. आतापावेतो आलेल्या *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* व तत्संबंधी भागाचा विचार असा आहे:

१) **तृतीयाध्यायात** ***"अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः। यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः।।३-१४।।"; "कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम्। तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।।३-१५।।"*** व ***"यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः। आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते।।३-१७।।"*** हे श्लोक आहेत.

सर्व प्राणी अन्नापासून उत्पन्न होतात. अन्नाची उत्पत्ती पर्जन्यापासून होते; पर्जन्य यज्ञापासून होतो व यज्ञ कर्मापासून होतो. कर्म वेदापासून होते. वेद हे अविनाशी अक्षर ब्रह्मापासून उत्पन्न झाले आहेत. म्हणून सर्वव्यापी ब्रह्म यज्ञात सर्वदा नित्य स्थिर आहे *(३-१४ व १५).*

"ब्रह्म -➢वेद –➢कर्म -➢यज्ञ -➢पर्जन्य -➢अन्न -➢ जीव" असा ब्रह्मापासून जीवापर्यंत उत्पत्तिक्रम तेथे येतो. या क्रमाचा असाही अर्थ घेता येतो की ब्रह्मापासून *शब्दब्रह्म* वा *अव्यक्त* प्रकटले. त्यापासून म्हणजे वेदापासून *(शब्दब्रह्म = अव्यक्त = वेद)* कार्यकारणरूप व्यक्त जगत म्हणजे *कर्म* उत्पन्न झाले. यातल्या *क्रिया* म्हणजे कर्ता व कर्म यांना जोडणाऱ्या संबंधास *यज्ञ* असे म्हणता येईल. एवं च जगद्व्यापारास *यज्ञ* म्हटले जाऊ शकते. *पर्जन्य व अन्न* हे या ठिकाणी पंचमहाभूतांचे प्रतिनिधी असून *जीव* हा पंचमहाभूतात्मक आहे, असा अर्थ येथे प्रतीत होतो. यज्ञात *ब्रह्म* नित्य प्रतिष्ठित असते म्हणजे या सृष्टीत *(सर्वश्रेष्ठ - सूक्ष्मातिसूक्ष्म या अर्थी)* परमात्मतत्त्व वा *ब्रह्म* भरून राहिले आहे व त्याच्याच सत्तेने या सर्व चेष्टा होतात.

"जो मनुष्य आत्म्याच्याच ठिकाणी रत असतो, आत्म्याच्याच ठिकाणी तृप्त असतो व आत्म्यामध्येच संतुष्ट असतो; त्याला काही कर्म उरत नाही *(३-१७)."*

या श्लोकांद्वारे दाखविलेला सृष्ट्युत्पत्तिक्रम त्यातल्या श्रेष्ठतर घटकांनुरूप तीन सदरात विभागावयाचा झाला, तर पुढील मानचित्र प्रकटते:

```
१) निम्न स्तर          २)मध्यम स्तर              ३) श्रेष्ठ स्तर
     |          }          |                          |
    कर्म        }➤— वेद ➤—➤—➤—- ब्रह्म
     ↓          }          ⇓                          ⇧
   (यज्ञ)       }          ⇓                          ⇧
     ↓          }          ⇓                          ⇧
   पर्जन्य      }          ⇓                          ⇧
     ↓          }          ⇓                          ⇧
    अन्न        }          ⇓    {(आत्मतृप्त   }       ⇧
     ↓          }     -⇗ ➔  {   आत्मरत,   }--⇗
    जीव         }               {  आत्मतुष्ट) }
```

---

२) नंतर **सातव्या अध्यायी** श्रीकृष्ण म्हणतात:

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च।
अहङ्कारं इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा।।७-४।।
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्।।७-५।।

"पृथ्वी,जल, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार अशी अष्टप्रकारांची माझी जी जड वा *अपरा* प्रकृति आहे, तिने हे सर्व जगत, हिच्याहून दुसऱ्या जीवरूप चेतन प्रकृति वा *परा* प्रकृति जी आहे, तिच्या सहयोगाने धारण केले आहे."


एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा।।७-६।।
मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव।।७-७।।

"सर्व *भूतमात्रे* या दोन प्रकृतींपासून निर्माण झालेली आहेत. सर्व जगाचा उत्पत्ति व विनाश करणारा मीच आहे. हे धनंजया! हे सर्व जग दोऱ्यातील मण्याप्रमाणे माझ्यामध्ये गुंफलेले आहे. माझ्याहून वेगळी अशी कोणतीही वस्तू या जगात नाही."

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि।।७-१२।।
त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत्।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम्।।७-१३।।
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते।।७-१४।।

"आणि जे काही सात्त्विक, राजसिक व तामसिक पदार्थ आहेत, ते सर्व माझ्यापासून आहेत. पण ते माझ्यात आहेत; मी त्यांच्यात नाही. या त्रिगुणात्मक भावांनी मोहित होऊन हे सर्व जगत, यांच्यापलीकडला जो मी *अव्यय*, त्या मला जाणत नाही. गुणात्मक अशी ही माझी *दिव्य माया* दुस्तर आहे. म्हणून जे मलाच शरण येतात, ते या मायेला तरून जातात."

येथे व्यक्तवलेला उत्पत्तिक्रम पूर्वी तपशीलात जाऊन आपण अभ्यासला होता. या ठिकाणी *परा, अपरा* इ. घटकांचे वर्गीकरण मागीलप्रमाणे तीन स्तरात करू या:



३) यानंतर क्षेत्रक्षेत्रज्ञ संबंधित **आठव्या अध्यायात** येणारे जे श्लोक आहेत, ते असे:

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते।।८-१।।
अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः।।८-२।।
अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसञ्ज्ञितः।।८-३।।
अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम्।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर।।८-४।।

ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ इ.संबंधीच्या अर्जुनाच्या पृच्छेचे उत्तर देतांना श्रीकृष्ण म्हणतात: "अत्यंत श्रेष्ठ - परम - अविनाशी - अक्षर- असे ते *ब्रह्म* आहे. ब्रह्माच्या स्वभावास - सहजस्थितीस - जगद्रूपाची अभिव्यक्ती व लोप पावणे यांच्याबरोबर उत्पत्ति, स्थिती व विनाश ज्यात नाही, त्यास *अध्यात्म* म्हणतात."

"सर्व भूतमात्रांच्या उत्पत्ति, स्थिती व विनाशाचा हा जो कर्ता व कारणावाचून गोचर होणारा व्यक्त असा सृष्टिव्यापार, त्यास *कर्म* अशी संज्ञा आहे. पंचमहाभूतात्मक असणारे नामरूपात्मक पदार्थ *अधिभूत* होत. *अधिदैवत* म्हणजे प्रकृतीने -मायेने - जे जे उत्पन्न केले, ते ते भोगणारा *पुरुष.* हाच दुसरा *परमात्मा* - चेतनाचक्षू - इंद्रियांचा अध्यक्ष - देहास्तमानी संकल्प-विकल्प ज्याच्या ठायी सामावतात - अहंकाराने स्वस्वरूपाचा ज्यास विसर पडला आहे असा - पंचभूतात्मक शरीरपिंडातील *जीव* या नावाने ओळखला जाणारा असा हा *पुरुष* म्हणजेच *अधिदैवत* होय."

"देहेंद्रियबुद्धीचा - अहंकाराचा लोप करणारा जो मी, तोच येथे *अधियज्ञ* आहे. *ज्ञेय* हेच *अधियज्ञ* होय. असे असले तरी अधिभूत, अधिदैवत हे अधियज्ञस्वरूपच होत. कारण *अधियज्ञ* वा *ज्ञेय* हे तर सर्वव्यापी आहे."

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम्।।८-७।।
अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन।।८-८।।
अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।८-१४।।
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।८-१५।।

"म्हणून सर्व काळी माझे स्मरण करत जा. माझ्याठायी मन आणि बुद्धी अर्पण केली म्हणजे मलाच येऊन पोहोचशील, यात संशय नाही. चित्त दुसरीकडे न जाऊ देता अभ्यासाच्या साहाय्याने स्थिर करून दिव्य परम पुरुषाचे ध्यान करत असले, म्हणजे त्याच पुरुषाला जाऊन पोहोचते. अनन्यभावाने सदासर्वदा जो माझे नित्यशः स्मरण करतो, त्या नित्ययुक्त योग्यास मी सुलभरीत्या प्राप्त होतो. मला

येऊन मिळाल्यावर परमसिद्धी पावलेल्या त्या महात्म्यास दु:खाचे घर व अशाश्वत असा पुनर्जन्म प्राप्त होत नाही.''

परस्तमात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।।८-२०।।
अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम्।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।८-२१।।

''(पूर्वी सांगितलेल्या) व्यक्ताव्यक्तापलीकडील दुसरा *सनातन अव्यक्त पदार्थ*, जो सर्व भूते नाहीशी झाली तरीही नाहीसा होत नाही; ज्या अव्यक्ताला *अक्षर* असे म्हणतात; तोच *परम* म्हणजे उत्कृष्ट वा अखेरची गती म्हटली आहे. ज्याला जाऊन पोहोचले असता फिरून येत नाही, असे माझे *परमधाम* तेच आहे.''

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।
यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिद ततम्।।८-२२।।
वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परं स्थानमुपैति चाद्यम्।।८-२८।।

''ज्याच्या आत सर्व भूते आहेत व ज्याने हे जग विस्तारले वा व्यापले आहे, तो *पर* वा *श्रेष्ठ पुरुष* अनन्यभक्तीने लभ्य होय. हे सर्व जाणणारा योगी वेदोक्त, यज्ञोक्त, तपादींचे व दानाचेही पुण्यफल उल्लंघून त्याच्यापलीकडील आद्य अशा परम स्थानास जाऊन पोहोचतो.''

या प्रसंगी उल्लेख केलेल्या १) *ब्रह्म, अध्यात्म व कर्म;* तसेच २) *अधियज्ञ, अधिदैव व अधिभूत* यांचे पूर्वी पाहिलेल्या तीन स्तरातील वर्गीकरण करू या:

---

१) निम्न स्तर		**२)मध्यम स्तर**		**३) श्रेष्ठ स्तर**
(अ) ब्रह्म, अध्यात्म व कर्म				
कर्म }		{ अध्यात्म }		ब्रह्म
(विसर्ग) }	--➢	{ (ब्रह्मस्वभाव)	-➢ }	(परमपुरुष)
(जगत) }		{ (अव्यक्त) }		(दिव्य)(अहम्)
(व्यक्त) }		| —➢-—➢ |		(सनातन)
(सर्व भूते) }		|**(अनन्यभक्ति** |		(अव्यक्त)
		| **योग)** ** |		(अक्षर)
		| —➢—➢ |		(परमगति)
(ब)अधियज्ञ, अधिदैव व अधिभूत				
अधिभूत }		{अधिदैव}		{अधियज्ञ
(पंचमहाभूतात्मक }	—-➢	{(पुरुष) }	—➢	{(परमधाम)
प्रकृतिनिर्मित }		{ (जीव) }		{(परपुरुष)
नाशिवंत पदार्थ) }	—-➢	{(प्रावृ्गति)}	——➢ -⇗	

---

*(** नित्यस्मरण, मन-बुद्धी अर्पण करून अभ्यासाने दिव्य परमपुरुषाचे ध्यान करणे.)*

४) यानंतर आपण *क्षेत्रक्षेत्रज्ञयोग* या **तेराव्या अध्यायाद्वारे** त्यांचे *(क्षेत्र-क्षेत्रज्ञांचे)* जे स्वरूप प्रकटवले होते, त्याचा विचार असाच करू या. या अध्यायात *१) क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमात्मा २) क्षेत्र-ज्ञान ३) पुरुष व प्रकृति ४) क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमेश्वर ५) अनात्मा (प्रकृति) व आत्मा व ६) भूतमात्रे व ब्रह्म* या सहा प्रकारे *जीव-जगत -ईश्वर* या त्रयीचे विभाग केलेले आहेत. या विचाराशीसंबंधित श्लोक पुढे प्रथम उद्धृत केले आहेतः

(अ) क्षेत्र-क्षेत्रज्ञ- परमात्मा::

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः।।१३-१।।
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम।।१३-२।।

''*देह* हे *क्षेत्र* आहे. यास जो जाणतो, तो *क्षेत्रज्ञ* होय. सर्व क्षेत्रांना संगोपणारा क्षेत्रज्ञ तो मी म्हणजे *परमात्मा* होय.''

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारी यतश्च यत्।
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रुणु।।१३-३।।
महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च।
इंद्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः।।१३-५।।
इच्छा द्वेषःसुखं दुःखं सङ्घातश्चेतना धृतिः।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम्।।१३-६।।

क्षेत्र हे पुढील तत्त्वांचे मिळून होतेः *१)पंचमहाभूते २) अहंकार ३) बुद्धि ४) अव्यक्त ५) दश इंद्रिये ६) एक मन ७) दशेंद्रियांचे दश विषय ८) सुख ९) दुःख १०इच्छा ११) द्वेष १२) संघात १३) चेतना १४) धृति.* अशी ही छत्तीस तत्त्वे मिळून *विकारांसहित क्षेत्र* होते. जे जे काही स्थावर जंगम पदार्थ, तसेच *जीव* इ.नावांनी आहे, ते ते सर्व क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगातून उत्पन्न होते.''

''सर्व भूतमात्रात अविनाशी असा परमेश्वर समभावाने स्थित आहे. सर्व भूतमात्रात स्थिर असणाऱ्या आत्म्याचे एकत्व पाहणारा, त्याच्यापासूनच या प्रपंचाचा विस्तार झालेला आहे. ब्रह्मच एक सर्वदूर विस्तारलेले आहे, हे ओळखणारा ब्रह्मास पावतो. देहांतर्यामी स्थित असूनही तो अनादि, अव्यय, अविनाशी असा परमात्मा ना तर कर्ता आहे, ना तो कर्माने लिप्त वा बद्ध होतो. सर्वत्र अवस्थित असूनही, सर्व पदार्थमात्रात भरलेले असूनही, आकाश जसे सूक्ष्म असते व त्या पदार्थाने लिप्त होत नाही, जसेच्या तसेच राहते; त्याप्रमाणे सर्वत्र अवस्थित असणारा, सर्व देहांत स्थित असणारा तो *आत्मा* त्या देहसंगाने लिप्त होत नाही.''

''सर्व लोकांस जसा एकच रवी प्रकाशवतो, त्याचप्रमाणे सर्व क्षेत्रांस एकच क्षेत्रज्ञ प्रकाशवतो. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांस जो असे जाणतो;

तो भूतभावाचे उल्लंघन करून, जीवत्व विरून जाऊन, प्रकृतीच्या बंधनातून मुक्त होऊन ब्रह्म होतो."

(ब): परब्रह्म व चराचर भूते (ज्ञान व क्षेत्र) (ज्ञान व अज्ञान):

पुढील श्लोकांतून कोणता बोध होतो, ते पाहू याः

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते।।१३-१२।।
सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति।।१३-१३।।
सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च।।१३-१४।।

"जे जाणण्यास योग्य आहे; जे जाणून अमृतत्व प्राप्त होते; ते आदिरहित *परब्रह्म* सत नाही व असतही नाही, असे म्हटले जाते. त्यास सर्वत्र हातपाय, सर्व बाजूंनी डोळे, डोकी व तोंडे, सर्वदूर कान असून ते जगतातील सर्व व्यापून आहे. ते सर्वेंद्रियरहित असूनही सर्व इंद्रियांच्या गुणांस प्रकाशित करते; तसेच निर्गुण व अनासक्त असूनही सर्व भूतांचे धारण-पोषण करणारे व गुण भोगणारे आहे."

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत्।।१३-१५।।
अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च।।१३-१६।।
ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते।
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्।।१३-१७।।

"ते सर्व चराचर भूतमात्रांत अंतर्बाह्य भरलेले सूक्ष्म असल्याने ते जाणण्यास शक्य नसल्याने अत्यंत जवळ असूनही अत्यंत दूर आहे. ते *अविभक्त* असूनही भूतमात्रांठायी *विभक्त* असलेले दिसते. ते **ज्ञेय**च सर्व भूतमात्रांचे धारण-पोषण, उत्पत्ती व संहार करणारे आहे. ज्योतींचीही *ज्योती* जे आहे; ते तमसाच्या पलीकडे असून, तेच *पर* म्हणून म्हटले जाते.तेच *ज्ञान व ज्ञेय* आहे. तेच ज्ञानाने प्राप्त होणारे असून सर्व भूतांच्या हृदयस्थ आहे."

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते।।१३-१८।।

"याप्रमाणे हे क्षेत्र, तसेच ज्ञान व ज्ञेय ही थोडक्यात सांगितली. यांना जाणून माझा भक्त माझ्या भावास प्राप्त होतो."

या श्लोकांतून पुढील संज्ञांचा बोध होतोः (अनादि) (निर्गुण) ज्ञेय (परब्रह्म) (ज्ञान) (सूक्ष्म) (ज्ञानगम्य) (ना सत ना असत) व (सर्वव्यापक) (अज्ञान) (क्षेत्र) (चराचर भूते)= ज्योतींचीही ज्योती व तमस (अंधकार).

(क) पुरुष व प्रकृतिः

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसम्भवान्।।१३-१९।।
कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते।।१३-२०।।
पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान्।
कारणं गुणसंङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु।।१३-२१।।

"प्रकृति व पुरुष या दोहोंनाही ते अनादि आहेत, असे जाण व सर्व विकार व गुण हे प्रकृतीपासूनच उत्पन्न होतात, हेही जाण. *कार्य व कारण आणि कर्तृत्व* यांना प्रकृतीच कारण आहे; तर पुरुष हा सुखदुःख भोगण्याला कारण आहे, असे म्हटले जाते. प्रकृतीच्या ठिकाणी स्थित असलेला पुरुष प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या गुणांचा भोग घेतो. हा गुणसंगच चांगल्या व वाईट योनींमध्ये जन्म घेण्यास कारण आहे."

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः।।१३-२२।।
य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते।।१३-२३।।

"*पुरुष* या देहाठायी स्थित असूनही प्रकृतीपलीकडील आहे व तोच *अनुमोदक*, धारण करणारा, *भोक्ता, महेश्वर* असून *परमात्मा* म्हणून ख्यात आहे. याप्रमाणे जो पुरुष व गुणांसहित प्रकृतीस जाणतो, तो सर्व प्रकारे कर्मे करत असला, तरी पुनः जन्माला येत नाही."

या श्लोकांतून पुढील संज्ञांचा बोध होतोः (अनादि) पुरुष (पर) (परमात्मा) (महेश्वर) (उपद्रष्टा) (अनुमंता) व प्रकृति (अनादि).

(ड) क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमेश्वरः

यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं स्थावरजङ्गमम्।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ।।१३-२६।।
समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्।
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति।।१३-२७।।

"यावन्मात्र जी काही स्थावरजंगमादी सृष्टी आहे, ती सर्व क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगानेच उत्पन्न होते, असे जाण. या सर्व विनाशी भूतमात्रांठायी समभावाने स्थित असणाऱ्या परमेश्वरास जो पाहतो, तोच जाणकार आहे."

या श्लोकांतून पुढील संज्ञांचा बोध होतोःक्षेत्र (प्रधान) क्षेत्रज्ञ (आत्मा) व परमेश्वर (आत्मा).

(ई) प्रकृति व आत्मा (अनात्मा व आत्मा):

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति।।१३-२९।।

"प्रकृतीकडूनच सर्व कर्मे केली जातात, असे जो जाणतो, तसेच आत्मा अकर्ता आहे, हे जो जाणतो; तोच पाहतो (तोच जाणकार वा ज्ञानी आहे)."

या श्लोकांतून पुढील संज्ञांचा बोध होतो:प्रकृति (अनात्मा) व आत्मा.

(फ) ब्रह्म व भूतमात्र (क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमात्मा):

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति।
तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा।।१३-३०।।
अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः।
शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते।।१३-३१।।
यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते।।१३-३२।।

"जेव्हा भूतांची विविधता, वेगळेपणा व त्यांचा विस्तार त्या एका ब्रह्माच्या आधारावर आहेत, असे जाणले जाते; तेव्हा त्या ब्रह्माची प्राप्ती होते. अनादि व निर्गुण असलेला हा *अव्यय-अविनाशी परमात्मा* शरीरस्थ असला तरी काही करत नाही आणि कर्माने लिप्त होत नाही. ज्याप्रमाणे सर्वव्यापी आकाश सूक्ष्म असल्याने लिप्त होत नाही, त्याचप्रमाणे सर्व देहांत आत्मा स्थित असूनही लिप्त होत नाही."

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत।।१३-३३।।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम्।।१३-३४।।

"जसा सर्व लोकांस एकच रवी प्रकाशवितो, तसाच एकच *क्षेत्रज्ञ* या सर्व क्षेत्रांस आभासित करतो. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांतील हे अंतर जाणणारे व प्रकृतीचे कर्तृत्व जाणणारे, ती भूतमात्री कशी प्रभेदली आहे, हे ओळखून तिच्यापासून सुटण्याचा उपाय माहीत झाल्याने मोक्ष पावून त्या परब्रह्मास प्राप्त होतात."

या श्लोकांतून पुढील संज्ञांचा बोध होतो:(भूतप्रकृति) भूतमात्र (क्षेत्र) (विस्तार) (देह) ब्रह्म (आत्मा) (परब्रह्म) आणि (परमात्मा)-जो (अनादि) (निर्गुण) (अव्यय) (शरीरस्थ) (सर्वत्रावस्थित) आहे.

तेराव्या अध्यायातील (अ) ते (फ) या संज्ञांचे वर्गीकरण::::

(अ) क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमात्मा

१)निम्न स्तर	२)मध्यम स्तर	३) श्रेष्ठ स्तर
(पंचमहाभूते, अहंकार }	क्षेत्र	{ क्षेत्रज्ञ (परमात्मा)
बुद्धि, अव्यक्त, }	(प्रपंच)	{ परमेश्वर (आत्मा)
दशेंद्रिये,मन, }	⇓	{ (ब्रह्म) (अनादि)
दशविषय, सुख, }	⇓	{ (निर्गुण) (अव्यय)
दुःख, इच्छा, द्वेष, }	⇓	{ (अकर्ता) (अलिप्त)
संघात, चेतना, धृति) }	⇓	{ (सूक्ष्म) (देहस्थित)
(जीवत्व) (प्रपंच) }	⇓	{ (सर्वत्रावस्थित)

⇓ —➤—≺—-↲ ↑

⇓ {(क्षेत्र-क्षेत्रज्ञज्ञान } ↑

➘ –➤{ **भूतप्रकृतिमोक्ष)** }-⬀

क्षेत्र हे निम्न व मध्यम स्तरातील अभिव्यक्ती आहे. म्हणून वर त्या दोन्ही ठिकाणी ते दाखविले आहे. त्याचप्रमाणे *अव्यक्त* जे क्षेत्राच्या छत्तीस तत्त्वांपैकी एक आहे, तेच *जीव* वा *परा प्रकृति* होय. ही मध्यम स्तरातील दशा समजली पाहिजे. परंतु सदर वर्गीकरण करतांना ते केवळ *क्षेत्र (प्रपंच)* व *क्षेत्रज्ञ (परमात्मा इ.)* असे दोनच विभागात केले असल्याने अव्यक्ताचे वेगळे वर्गीकरण केलेले नाही.

(ब) परब्रह्म व चराचर भूते (ज्ञान व क्षेत्र) (ज्ञान व अज्ञान):

१)निम्न स्तर	२)मध्यम स्तर	३) श्रेष्ठ स्तर
|	|	|
क्षेत्र	क्षेत्र	परब्रह्म
⇓	⇓	(ना सत ना असत)
––➤——≺—↲		(अनादि) (निर्गुण)
⇓		(सर्वेंद्रियरहित)
क्षेत्र		(अनासक्त) (सूक्ष्म)
[येथेही (अ) प्रमाणेच *क्षेत्र* हे निम्न		(पर) (हृदिस्थ)
व मध्यम स्तरातील		(ज्ञेय) (ज्ञानगम्य)
अभिव्यक्ती समजावी.]		(ज्ञान) (अविभक्त)
⇓		(मद्भाव)
⇓		↑
⇓	{(**क्षेत्र ,ज्ञान व** }	↑
➘ –➤{ **ज्ञेय यांचे ज्ञान)**-➤-⬀		

(क) पुरुष व प्रकृति:

१)निम्न स्तर	२)मध्यम स्तर	३) श्रेष्ठ स्तर
|	|	|
अनादि	अनादि	अनादि
⇓	⇓	(सुखदुःखभोक्ता)
———————–		(अनुमोदक)
⇓		(भर्ता)(भोक्ता)
प्रकृति		(पर) (महेश्वर)
(सर्व विकार, सर्व गुण, कार्य,		(परमात्मा)
कारण, कर्तृत्व)		(गुणभोक्ता)
⇓	{(**पुरुष व गुणांसहित** }	↑
➘ –➤{ **प्रकृतीचे ज्ञान)** }-⬀		

गीतेचा अनुबंध

(ड) क्षेत्र - क्षेत्रज्ञ -परमेश्वर:

१)निम्न स्तर **२)मध्यम स्तर** **३) श्रेष्ठ स्तर**

प्रकृति ⇓ | प्रकृति ⇓ | आत्मा (क्षेत्रज्ञ) (परमेश्वर) ↑

⇓

{(भूतमात्रे) (अनात्मा) (क्षेत्र)
येथे प्रकृति (क) प्रमाणेच सर्व विकार,
सर्व गुण, कार्य, कारण व कर्तृत्व
अशी समजावी.) }
⇓

➘ –➢**(विनाशी भूतांच्या ठायी समभावाने स्थित असलेल्या परमेश्वरास पाहणे)** ↑ -⇗

(ई) प्रकृति व आत्मा (अनात्मा व ईश्वर):

१)निम्न स्तर **२)मध्यम स्तर** **३) श्रेष्ठ स्तर**

प्रकृति (अनात्मा) ⇓ | प्रकृति (अनात्मा) ⇓ | आत्मा (अकर्ता) ↑

⇓

{येथे प्रकृति (अनात्मा)
कर्तृत्वशील (कर्तृत्वशक्ती)
(कर्मे घडविणारी)
अशी समजावी.)}
⇓

➘ –➢**(आत्मा अकर्ता आहे) व (प्रकृतीकडून कर्मे होतात, याचे ज्ञान)**——-➢⇗ ↑

(फ) ब्रह्म व भूतमात्र (क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमेश्वर):

१)निम्न स्तर **२)मध्यम स्तर** **३) श्रेष्ठ स्तर**

क्षेत्र(प्रकृति) ⇓ | क्षेत्र (प्रकृति) ⇓ | ब्रह्म (परब्रह्म)(अनादि) (निर्गुण) (अव्यय) (अविनाशी) (परमात्मा) (शरीरी) (अकर्ता) (क्षेत्रज्ञ) (क्षेत्री) (सर्वत्रावस्थित) (आत्मा) ↑

⇓

{येथे क्षेत्र (प्रकृति) मध्ये
(सर्व भूतमात्रे)आहेत व
विस्तार (विश्व) (भूतप्रकृति)
(देह) यांचा अंतर्भाव होतो.}
⇓
⇓

➘ –➢**(भूतप्रकृतिमोक्षज्ञान)**-⇗

---

५) **चौदाव्या अध्याया**तील क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचाराची अभिव्यक्ती करणारे गीताश्लोक आता पाहू या:

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत।।१४-३।।
सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः संभवन्ति याः।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता।।१४-४।।
सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्।।१४-५।।

"*महद्ब्रह्म* ही माझी *योनी* असून तिच्या ठायी मी *गर्भ* स्थापन करतो. त्यापासून सर्व भूतांची उत्पत्ती होते. सर्व योनींमध्ये जे प्राणिमात्र निर्माण होतात, त्यांची *महद्ब्रह्म* ही गर्भ धारण करणारी माता व मी बीज प्रदान करणारा पिता आहोत. *सत्त्वगुण, रजोगुण व तमोगुण* हे प्रकृतीपासून निर्माण झालेले त्रिगुण देहात स्थित असलेल्या अविनाशी आत्म्यास देहात बद्ध करतात."

नान्यः गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति।।१४-१९।।
गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान्।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते।।१४-२०।।
मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते।
स गुणान्समतीत्येतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।१४-२६।।
ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च।
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च।।१४-२७।।

"जेव्हा गुणांखेरीज कोणी दुसरा कर्ता नाही असे *द्रष्टा* जाणतो व त्रिगुणांच्या पलीकडचे *तत्त्व* ओळखतो; तेव्हा तो माझ्या भावास

प्राप्त होतो. देहधारी मनुष्य देहोत्पत्तीस कारण झालेल्या या तिन्ही गुणांच्या पलीकडे जाऊन जन्म, मृत्यू व जरा यांच्या दुःखापासून विमुक्त होऊन अमृताचा अनुभव घेतो. जो *अव्यभिचारी* भक्तियोगाने माझी सेवा करतो, तो या तीनही गुणांच्या पलीकडे जाऊन *ब्रह्मीभूत अवस्था* प्राप्त करून घेण्यास समर्थ असतो. कारण मीच *अमृत व अव्यय* ब्रह्माचे, शाश्वत धर्माचे व एकांतिक परमावधीच्या सुखाचे अखेरचे स्थान आहे."

आता येथेही उपरोक्त स्तरप्रणालीनुसार केलेले वर्गीकरण पाहू याः

———————————————————

<u>महद्ब्रह्म व अहम् (योनी व पिता):</u>

१)निम्न स्तर | **२)मध्यम स्तर** | **३) श्रेष्ठ स्तर**

| | |
महद् ब्रह्म | महद् ब्रह्म | अहम्
⇓ ⇓ (मी) (पिता)
————————- (अमृत) (अव्यय)
⇓ (देहिन्) (ब्रह्म)
{येथे महद् ब्रह्म म्हणजे (बीजप्रदाता)
(योनि) (माता) (गर्भ ठेवणारा)
(गर्भ धारण करणारी)आहे.} (त्रिगुणातीत तत्त्व)
⇓ (द्रष्टा) (मद्भाव)
-————————-- (शाश्वत धर्म व
⇓ ⇓ एकांतिक सुख)
सत्त्व, रज व | सर्व भूतमात्रे | ↑
तम हे त्रिगुण | (सर्व प्राणिमात्र,जीव) | ↑
(निम्न स्तर) | (सर्व देह) | ↑
⇓ | हा मध्यम स्तर | ↑
⇓ ⇓ ↑
————————-- ↑
⇓ ↑
⇓ ↑
➘ –➢(**त्रिगुणांचे कर्तृत्व, आत्म्याचे** ↑
अकर्तेपण यांचे ज्ञान व द्रष्टत्व ; ↑
अव्यभिचार भक्तियोग—-➢⇗

———————————————————

यापुढे **पंधराव्या अध्यायी** *अश्वत्थ रूपक* व *क्षर-अक्षर-उत्तम पुरुष* यांद्वारे *क्षेत्र-क्षेत्रज्ञ* विचाराचा मागोवा घेऊ याः

(अ) अश्वत्थवृक्ष-पुरातन प्रवृत्ति-अव्ययपद

ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्रहुरव्ययम्।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्।।१५-१।।

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः।
अधश्च मूलान्यनुसन्ततानि
कर्मानुबंधीनि मनुष्यलोके।।१५-२।।
न रूपमस्येह तथोपलभ्यते
नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा।....।।१५-३।।

"मूळ वर व शाखा खाली असून जो *अव्यय-अविनाशी* आहे व *वेद* ही ज्याची पाने आहेत, असे ज्या अश्वत्थवृक्षाचे वर्णन करतात; तो ज्याने जाणला, तोच *वेदवेत्ता* होय. सत्त्वादी त्रिगुणांनी पोसलेल्या व विषयांचे अंकुर फुटलेल्या अशा त्याच्या शाखा खाली आणि वरही पसरलेल्या आहेत. त्याच्या मुळ्या खालीही गेलेल्या आहेत व कर्माने बंधन पावलेल्या मनुष्यलोकी त्या पसरलेल्या आहेत. परंतु या वृक्षाचे असे हे रूप इहलोकी उपलब्ध होत नाही किंवा त्याचे आदी, अंत व स्थिती कळून येत नाहीत."

......अश्वत्थमेनं सुविरूढमूल-
मसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा।।१५-३।।
ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।१५-४।।

"अत्यंत बलवान असे मूल असणाऱ्या या अश्वत्थास *अनासक्तिरूप* प्रबल शस्त्राने तोडून टाकून पुरातन प्रवृत्ति ज्यापासून प्रसृत झाली आहे, जेथे गेले असता पुनः परतून यावे लागत नाही; ते पद शोधून काढण्यासाठी त्या आद्य पुरुषास शरण गेले पाहिजे."

निर्मानमोहा जितसङ्गदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः।
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञै-
र्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ।।१५-५।।
न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकाः।
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।१५-६।।

"मान आणि मोह यांनी जे विरहित, आसक्तिदोष जिंकलेले, अध्यात्माठायी नित्य स्थिर असणारे, निष्काम, सुखदुःखसंज्ञक द्वंद्वापासून मुक्त असणारे ज्ञाते पुरुष असतात; ते त्या अव्यय पदास जाऊन पोहोचतात. जेथे गेले असता परत येत नाहीत; जे ना सूर्य, ना चंद्र, ना अग्नीही प्रकाशित करू शकतात; असे ते माझे *परम स्थान वा पद* आहे."

या विचारांचे पुनः आपल्या पद्धतीने त्रिस्तरीय वर्गीकरण करू याः

(अ) अश्वत्थवृक्ष-पुरातन प्रवृत्ति-अव्ययपद

१)निम्न स्तर **२)मध्यम स्तर** **३) श्रेष्ठ स्तर**

अव्ययपद (स्वप्रकाशित) (आद्य पुरुष) (अंतिम गंतव्य स्थान) (परमधाम)

अश्वत्थवृक्ष ⇓ पुरातन प्रवृत्ति ⇓ ↑

अध:मूले ⇓ अध:शाखा ⇓ ऊर्ध्वमूल ⇓ ↑

त्रिगुण, कर्मे व त्यांचे बंधन,
मनुष्यलोक, वेद ⇓ ↑

↘ –➢(**अनासक्ती व आद्य पुरुषास शरण जाणे.**)-➢⇗

(ब) षष्ठ इंद्रिये-प्रकृति-अहम् (अव्यक्त-मी):

यानंतरच्या श्लोकांतून जीव-जगत-ईश्वर या त्रयीचे स्पष्टीकरण होते; ते असे:

ममैवांशो जीवलोके जीवभूत: सनातन:।
मन:षष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानी कर्षति।।१५-७।।
शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युतक्रामतीश्वर:।
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात्।।१५-८।।
श्रोत्रं चक्षु: स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च।
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते।।१५-९।।
उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितम्।
विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुष:।।१५-१०।।

"या जीवलोकात माझाच *सनातन अंश जीव* होऊन मनासहित सहा इंद्रियांद्वारे कर्षित होतो. ईश्वराला म्हणजे जीवाला जेव्हा शरीर प्राप्त होते किंवा तो जेव्हा शरीर सोडून जातो; तेव्हा वायू जसा गंधाला त्याच्या आश्रयस्थानापासून काढून आपल्याबरोबर घेऊन जातो, तसे तो जीव मनासहित पाचही इंद्रियांना आपल्याबरोबर घेऊन जातो. हाच जीव *कान, नाक, डोळे, त्वचा, जिह्वा व मन* यांचा आश्रय करून विषय सेवन करतो. शरीर सोडून जाणाऱ्या, शरीरात स्थित असणाऱ्या, विषय सेवणाऱ्या वा त्रिगुणांनी युक्त होणाऱ्या या जीवास अज्ञानी ओळखत नाहीत. त्याला फक्त ज्ञानचक्षू असणारेच पाहतात."

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम्।
यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतस:।।१५-११।।

"हृदयस्थ असणाऱ्या या जीवाला योगी प्रयत्नपूर्वक पाहतात. परंतु ज्यांनी योग्य ती साधना केलेली नाही, असे अज्ञानी लोक प्रयत्नांतीसुद्धा यास पाहू शकत नाहीत."

या श्लोकांतील *जीव (वा जीवात्मा) (वा ईश्वर), प्रकृति, माझा सनातन अंश, शरीर, मनासहित सहा इंद्रिये व मी* यांचे स्तरविशिष्ट वर्गीकरण पुढीलप्रमाणे होते:

(ब) षष्ठ इंद्रिये-प्रकृति-अहम् (अव्यक्त-मी):

१)निम्न स्तर **२)मध्यम स्तर** **३) श्रेष्ठ स्तर**

षष्ठ इंद्रिये } ↘	प्रकृति	अहम् (मी)
(मन, रसनेंद्रिय, } ↘	(अव्यक्त)	जीव
कान,नाक, } ↘	⇓	(जीवात्मा)
डोळे व त्वचा) } -➢-➢	(व्यक्त	↑
देह } ↗	विभाग)	↑
त्रिगुण } ↗	⇓	↑

↘ –➢(**योगज्ञान साधना**--↗ ↑

याप्रमाणे आतापर्यंत आपण क्षेत्र-क्षेत्रज्ञासंबंधित गीतेच्या विविध अध्यायी आलेल्या श्लोकांचे एक संक्षिप्त समालोचन केले. संबंधित तत्त्वांचे *निम्न स्तर, मध्यम स्तर व श्रेष्ठ स्तर* असे वर्गीकरणही केले. प्रत्येक स्तरातील त्याच तत्त्वाची समानार्थी व एकतादर्शक भिन्नभिन्न नामे वा रूपे त्या त्या स्तरात कंसात दिलेली आहेत. तसेच एका तत्त्वापासून उत्क्रांतीची दिशा आवश्यक तशी आडव्या/उभ्या बाणांनी दाखविली आहे.

त्याचप्रमाणे श्रेष्ठ स्तराकडे जाणाऱ्या **ठळक बाणांकित जोडणीरेषेने** *मोक्षाचा मार्ग* दर्शविला असून त्यासाठी लागणारे *साधनासामर्थ्य वा उपाय* त्याच जोडणीरेषेत ठळक अक्षरात कंसात लिहिलेला आहे. याप्रमाणे वरील तत्त्वे समजावून घेतांना श्लोक व त्यांच्या अर्थाचे साहाय्य घेतल्यास जिज्ञासूंना काही अडचण येणार नाही, अशी अपेक्षा आहे. असो.

गीतेचा अनुबंध

आतापावेतो तिसऱ्या अध्यायापासून पंधराव्या अध्यायापर्यंत पाहिलेल्या या विषयाचा आता समन्वय करू या. तत्पूर्वी *पंधराव्या* अध्यायाचा उत्कृष्ट व परम असा *क्षराक्षर-उत्तम* पुरुषाविषयीचा भाग अवलोकिणे आवश्यक आहे.

(क) क्षर-अक्षर-उत्तम पुरुष:

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो-
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्।।१५-१५।।
द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते।।१५-१६।।
उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः।।१५-१७।।

"सर्वांच्या हृदयात मी अधिष्ठित असून स्मृती, ज्ञान व त्यांचा नाश ही सर्व माझ्यापासून होतात. सर्व वेदांनी जे काय जाणावयाचे, तेही मीच आणि वेदांताचा कर्ता आणि वेद जाणणाराही मीच! या लोकी *क्षर व अक्षर* हे दोन पुरुष आहेत. *क्षर* म्हणजे सर्व नाशवंत भूते आणि *कूटस्थ* म्हणजे या सर्व भूतांच्या मुळाशी जे *अव्यक्त तत्त्व*, त्यास *अक्षर* म्हणतात. परंतु जो *उत्तम पुरुष*, तो या दोहोंहून भिन्न असून त्याला *परमात्मा* असे म्हणतात. तोच *अव्यय ईश्वर* या त्रैलोक्यात भरलेला असून त्याचे पोषण करतो."

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।१५-१८।।

"ज्याअर्थी मी क्षराच्याही पलीकडचा व अक्षराहूनही *उत्तम पुरुष* आहे, त्याअर्थी लोकव्यवहारात आणि वेदांतातही मी *पुरुषोत्तम* या नावाने प्रसिद्ध आहे."

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।
इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ।
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत।।१५-२०।।

"याप्रमाणे मी पुरुषोत्तम आहे, हे मोह न पावलेला जो जाणतो; तो सर्वज्ञ होत्साता सर्व भावेकरून मलाच भजतो. हे असे गुह्यातले गुह्य शास्त्र मी तुला सांगितले. हे पापरहित भारता! हे समजावून घेतल्याने मनुष्य बुद्धिमान म्हणजे बुद्ध किंवा जाणता आणि कृतकृत्य होतो."

या श्लोकांतून जे तीन स्तर प्रकटतात, ते असे:

(क) क्षर -अक्षर-उत्तम पुरुष (नाशवंत भूतमात्र-कूटस्थ-अहम्):

१)निम्न स्तर	**२)मध्यम स्तर**	**३) श्रेष्ठ स्तर**
|	|	|
क्षर पुरुष —|	अक्षर पुरुष	उत्तम पुरुष
(नाशवंत भूतमात्रे)	(कूटस्थ)	अहम् (मी)
व्यक्त भाव	(अव्यक्त)	(हृदिस्थ)
⇓	(वेदगम्य)	(वेदवेत्ता)
⇓	अव्यक्त भाव	(वेदांतकर्ता)
⇓	⇓	(अव्यय)(ईश्वर)
↘ - ➤(त्रैलोक्य)➤— ↙		(परमात्मा)
⇓		(पुरुषोत्तम)

↘(संसारात आसक्त न होता, ↑
पुरुषोत्तमास जाणून त्याला ↑
सर्वभावाने भजणे)---—↗

समन्वय::::

जीव, जगत, ईश्वर विचारसमन्वय

या सर्व विश्लेषणाचा आता आपण समन्वय करून पाहू या *जीव, जगत व ईश्वर* या तात्त्वज्ञानिक त्रयीविषयी गीतेत काय काय विचार मांडले आहेत ते आणि त्यांच्यातून कोणती एकवाक्यता प्रतीत होते, ती:

(अ) श्रेष्ठ स्तर:

याची विविध नामे व विशेषणे सापडतात, ती अशी:

ब्रह्म, मी अथवा अहम्, अव्यय, परम, परम पुरुष, दिव्य पुरुष, सनातन अव्यक्त, अक्षर, परम गति, परम धाम, पर पुरुष, अधियज्ञ, क्षेत्रज्ञ, परमात्मा, परमेश्वर, आत्मा, अनादि, निर्गुण, अकर्ता, अलिप्त, सूक्ष्म, सर्वत्रावस्थित, देहस्थित, परब्रह्म, ना सत ना असत, सर्वेंद्रियरहित, अनासक्त, पर, हृदिस्थ, ज्ञेय, ज्ञान, ज्ञानगम्य, अविभक्त, मद्भाव, पुरुष, सुखदुःखभोक्ता, अनुमोदक, भर्ता, भोक्ता, महेश्वर, गुणभोक्ता, अकर्ता, क्षेत्री, पिता, अमृत, देहिन, बीजप्रदाता, गर्भ ठेवणारा, द्रष्टा, त्रिगुणातीत तत्त्व, शाश्वत धर्माचे स्थान, एकांतिक सुखाचे स्थान, अव्यय पद, स्वप्रकाशित, आद्य, पुरुष, अंतिम गंतव्य स्थान, जीव, जीवात्मा, आत्मन्यवस्थित, ईश्वर, उत्तम पुरुष, वेदगम्य, वेदांतकर्ता, वेदवेत्ता, परमात्मा, पुरुषोत्तम, इ.

(ब) मध्यम स्तरः

या स्तराची विविध नावे व विशेषणे अशीः

वेद, परा प्रकृति वा परा माया, जीव, गुणमयी माया, अध्यात्म, ब्रह्मस्वभाव, अव्यक्त (श्रेष्ठ स्तराखालील पातळीवरील);

अधिदैव, प्रकृति, पुरुष (हे *पुरुष व प्रकृति* संज्ञक स्तर *अधिभूत व अधिदैव* यातील दुवा, तसेच अधियज्ञाच्या पातळीपर्यंत नेऊन पोहोचवणारे आहेत, असे एका विशिष्ट संदर्भानुसार समजावे लागतात. या ठिकाणचा स्तर "अधियज्ञ- ➢ पुरुष व प्रकृति- ➢ अधिभूत" असा मानावा लागतो. म्हणून येथे *पुरुष व प्रकृति* हे अधिदैवसंज्ञक व मध्यम स्तराचे मानले आहेत.);

क्षेत्र, प्रपंच, अनादि प्रकृति, अनात्मा, भूतमात्रे (*प्रकृति* ही निम्न व मध्यम अशा दोन्ही स्तरांवर आहे, असे या ठिकाणी अभिप्रेत असल्याने भूतमात्रे ही पण *अनात्मा व क्षेत्र* यांप्रमाणे या दोन्ही स्तरांवरील मानावी लागतात.);

कर्तृत्वशक्ती, विस्तार, विश्व, भूतप्रकृति, देह या संज्ञांचेही असेच निम्न व मध्यम अशा द्विस्तरावरील एकदेशी वर्गीकरण *ब्रह्म* या श्रेष्ठ स्तरास अनुसरून केलेले आहे.

अहम् या श्रेष्ठ स्तरानुरूप पुनः असेच मध्यम व निम्न स्तरांचे एकीकरण करून महद् ब्रह्म, योनी, माता, गर्भ धारण करणारी, या संज्ञा दिलेल्या दिसतात. मात्र या ठिकाणी सत्त्व, रज व तम हे त्रिगुण निम्न स्तरावरील मानावे लागतात; तर *अहम्* व *महद् ब्रह्म* या दोहोंपासून उत्पन्न होणारे सर्व भूतमात्र, जीव, सर्व प्राणिमात्र, सर्व देह, यांनाही उत्क्रांतिक्रमानुसार निम्न स्तर द्यावा लागतो.

यानंतर अश्वत्थासंबंधी ऊर्ध्वमूल, पुराणी प्रवृत्ती हे असेच मध्यमस्तरीय होत. प्रकृति, अक्षर पुरुष, कूटस्थ, त्रैलोक्य (म्हणजे तिन्ही लोकांतील *अव्यक्त भाव*), ही अशीच मध्यम स्तरविशिष्ट नामे होत.

(क) निम्न स्तरः

या स्तराचा विचार असाः

कर्म व त्याचे विभाग म्हणजे यज्ञ, पर्जन्य, अन्न व जीव; अपरा प्रकृति, त्रिगुणात्मक सृष्टी व तिचे पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी, व अहंकार हे विभाग; विसर्ग, जगत, व्यक्त, सर्व भूते, अधिभूत, पंचमहाभूतात्मक प्रकृतिनिर्मित सर्व नाशिवंत पदार्थ; क्षेत्र व त्याअंतर्गतची पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, अव्यक्त वा जीवत्व, दशेंद्रिये व त्यांचे दशविषय, मन, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, संघात, चेतना व धृति; प्रपंच, अनादि प्रकृति व तिचे सर्व विकार, सर्व गुण, कार्य, कारण व कर्तृत्व, अनात्मा, भूतमात्रे, कर्तृत्वशील, कर्मे घडवणारी प्रकृति वा कर्तृत्वशक्ती, विस्तार वा विश्व याचा व्यक्त भाग, भूतप्रकृति; देह, योनि वा महद् ब्रह्माचा, मातेचा वा गर्भ धारण करणाऱ्या योनीचा सत्त्व, रज व तमोगुणी त्रिगुणमय विस्तार व त्याअंतर्गत सर्व देह, जीव, सर्व प्राणिमात्र वा सर्व भूतमात्रे; अश्वत्थ वृक्षसंबंधित अधःशाखा व अधोमूले, त्रिगुण, कर्मे व त्यांचे बंधन, मनुष्यलोक व वेद हे त्याचे विभाग; मन, कान, नाक, डोळे, रसनेंद्रिय व त्वचा ही षष्ठ इंद्रिये, तसेच देह आणि त्रिगुण हे प्रकृतीचे व्यक्त विभाग; क्षर पुरुष, नाशवंत भूतमात्रे, त्रैलोक्याचा व्यक्त भाव, या प्रमाणे निम्न स्तराचे सर्वसामान्य रूप वरील वर्गीकरणामुळे व समालोचनाद्वारे आपणापुढे दृग्गोचर झाले आहे.

स्तरविशिष्ट संज्ञा व मूलतत्त्वांच्या वर्गीकरणविषयक तक्त्याचा समन्वय

याप्रमाणे हा जो स्तरविशिष्ट आढावा आपण घेतला, त्यामुळे गीतेतील वेगवेगळ्या प्रसंगी *जीव, जगत व ईश्वर* यांना वापरलेल्या विविध संज्ञांचे रूप स्पष्ट होते. या समालोचनामुळे समानस्तरिय व समानार्थी शब्द कळून आल्याने आपला वैचारिक गोंधळ कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

या सर्व संज्ञांचा मेळ एकवार आपण पूर्वी अभ्यासलेल्या *गीतारहस्या*निमित्त उत्क्रांत केलेल्या तत्त्याशी घालून पाहू या व तदनंतर वरील विषयाच्या एका अत्यंत महत्त्वाच्या भागाकडे वळू या.

<u>**उन्मेषः१९-१ःक्षेत्रक्षेत्रज्ञविचार-१**</u>*पृ. क्र. २८२,२८३ व २८६* वर दिलेले तक्ते पुनश्च अवलोकन केल्यास आपल्या लक्षात येते की तेथील वर्गीकरण *१) ना प्रकृति ना विकृति २) मूल प्रकृति व ३) प्रकृति-विकृति व ४) सोळा विकार* या चार सदरात केलेले आहे. आपण वर जे वर्गीकरण केले आहे, ते *१) श्रेष्ठ स्तर २) मध्यम स्तर व ३) कनिष्ठ वा निम्न स्तर* या तीन सदरात केले आहे. या दोन्ही प्रणालींचे समन्वयीकरण करतांना असे दिसून येईल की त्यांच्यात पुढीलप्रमाणे सादृश्य आहेः

१) ना प्रकृति ना विकृति = श्रेष्ठ स्तर = परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप
(परब्रह्म इ. गीतोक्त)

२) मूल प्रकृति = मध्यम स्तर } परब्रह्माचे कनिष्ठ
३) प्रकृति विकृति व }= निम्न वा }= स्वरूप (विकार
४) १६ विकार } कनिष्ठ स्तर } वजा जाता)

गीतेच्या विविध अध्यायातून या विषयाचे जे जे दर्शन घडते, ते आपण पूर्वीच सविस्तर पाहिले आहे. यास अनुलक्षून संबंधित सुधारित तक्ता आता पुढील *पृ. क्र. ४५२* प्रमाणे रूप धारण करतो. जिज्ञासूंनी या विषयाचे सर्वंकष आकलन करून घेण्यासाठी दिलेल्या संदर्भित पृष्ठ क्रमांकानुसार *(उन्मेष १९-१ क्षेत्र-क्षेत्रज्ञविचार-१)* उपरोल्लेखित विषय पुनश्च अवलोकन केल्यास उपयुक्त ठरेल. असो. अशा रीतीने हे तिन्ही स्तरांवरील विचारांचे समन्वयन सांग संपूर्ण झाले आहे.

अध्यात्मसाधनेचा मार्ग

जीव, जगत व ईश्वर ही *व्याप्ति* आहे. त्यापासून पुनः जर परब्रह्माच्या श्रेष्ठ स्तरात *लय* वा *मोक्ष* साधावयाचा असेल, तर वरील उत्क्रांतिमार्गाविरुद्ध दिशेने म्हणजे *"परब्रह्माचा श्रेष्ठ स्तर ते मध्यम स्तर ते कनिष्ठ स्तर"* ऐवजी *"परब्रह्माचा कनिष्ठ स्तर ते मध्यम स्तर ते श्रेष्ठ स्तर"* असा प्रवास करावा लागेल. आतापर्यंत घेतलेल्या आढाव्यात ठळक बाणांकित जोडणीरेषेवरील कंसाद्वारे या प्रवासाची दिशा व साधने दाखविली आहेत. त्या साधनांचा आता समन्वय करू याः

१) आत्मतृप्ती, आत्मरती व आत्मसंतुष्टताः आत्म्याठायी या वृत्ती ठेवणे.

२) भगवंतास शरण जाणेः सर्वभावेकरून एका परमात्म्यास शरण जाणे.

३) अनन्यभक्तियोगः परमात्म्याचे नित्य स्मरण; त्याला मन व बुद्धी अर्पण करणे; चित्त त्याच्याठायी स्थिर करून अभ्यासपूर्वक त्या दिव्य पुरुषाचे ध्यान करणे.

४) क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञान व भूतप्रकृतिमोक्षः हे विवेकज ज्ञानसाधन आहे. यात क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञानाची परिपूर्णता म्हणजेच अपरोक्षज्ञान अभिप्रेत आहे.

५) पुरुष व प्रकृतीचे तिच्या गुणांसह ज्ञानः हे सुद्धा विवेकज ज्ञानसाधन आहे. त्यात ज्ञानाची परिपूर्णता अपेक्षित आहे.

६) विनाशी भूतांठायी समभावाने स्थित असणाऱ्या परमेश्वरास पाहणे - ओळखणेः हेही ज्ञानसाधन आहे.

७) प्रकृति कर्तृत्वशील आहे; ती कर्मे करवते आणि आत्मा अकर्ता आहे; याचे ज्ञानः हेही ज्ञानसाधन आहे.

८) भूतप्रकृतिमोक्षज्ञानः हेही विवेकज ज्ञानसाधन आहे.

९) त्रिगुणांचे कर्तृत्व, आत्म्याचे अकर्तेपण, यांचे ज्ञान; द्रष्टृत्व; अव्यभिचार भक्तियोगः ज्ञानपूर्वक अनन्यभक्तियोग *(वरील अ.क्र.३ मध्ये सांगितल्यानुसार)*

१०) मानमोह यांनी विरहित, आसक्तिदोषरहित, निष्काम, नित्य अध्यात्मात स्थिती; सुखदुःखादी द्वंद्वांपासून मुक्त अशा ज्ञानी पुरुषांनी आद्य पुरुषास शरण जाऊन, ते परमपद पावणे.

११) ज्ञानसाधना करून ध्यानयोगाद्वारे हृदिस्थ परमात्म्यास पाहणे.

१२) संसारासक्ती सोडणे व पुरुषोत्तमास जाणून घेऊन त्याला सर्व भावेकरून भजणेः अनन्यभक्तियोग (ज्ञानपूर्वक).

तत्त्वज्ञान व योगसाधनामार्ग यांचा समन्वय

या सर्व साधनांचे, तसेच मागे **उन्मेष क्र. २५ - गीतेतील उपासनेचा अनुबंध** यामध्ये गीतेचा अध्यायानुसारी उपासनाविचारांचा जो अनुबंध आपण पाहिला होता, त्याचे पण नीट परीक्षण केल्यावर असे दिसून येते की *या साधनामार्गांचे तात्पर्य* ***१) ज्ञान २) योग ३) भक्ती व ४) निष्काम कर्म*** *अशी चार प्रकारांची संयुक्त अशी योगधारा आहे.* मागे आपण ही सर्व एकच कशी आहेत व ज्ञानदेवप्रणीत योगप्रणाली त्यांचा समन्वय कसा करते, हे थोडे विस्ताराने पाहिल्याचे जिज्ञासूंस स्मरत असेलच *(उन्मेष क्र. ४ ते ७ -पृ.क्र. ८० ते ११९).*

गीता तत्त्वज्ञान व उपासनेचा हा समन्वय पुढील विवेचनासाठी आवश्यक असाच आहे, असो. आता पुढील विचाराकडे वळू या. त्यासाठी *संन्यास, त्याग व कर्म* यांची पूर्वपीठिका समजून घेणे गीताभ्यासकांसाठी महत्त्वाचे आहे. त्याद्वारे कर्माचे स्वरुप उडगडण्यास साहाय्य होईल. त्या चर्चेसाठी पुढील **सप्तम स्कंध - कर्माचे स्वरूप** नियोजिला आहे. तर वळू या त्यातील पुढील **उन्मेष क्र. ३० - संन्यास, त्याग व कर्म** याच्याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

विश्वाची उभारणी व संहारणी (मूलतत्त्वांचे वर्गीकरण)

(सुधारित)

स्तर	सांख्यांचे वर्गीकरण व तत्त्वे		वेदांत्यांचे वर्गीकरण	गीतेचे वर्गीकरण (तेरावा अध्याय लक्षात घेऊन)
श्रेष्ठ वा उच्च-तम	न प्रकृति ना विकृति	पुरुष	परब्रह्माचे श्रेष्ठ स्वरूप	अव्यक्त, अव्यय, परतत्त्व, परब्रह्म,ब्रह्म, आत्मा,क्षेत्रज्ञ अहम्, पुरुषोत्तम,ज्ञान, द्रष्टा,परमात्मा,अधियज्ञ,पिता इ. नांवांनी संबोधित श्रेष्ठ तत्त्व
मध्यम स्तर	मूल प्रकृति	प्रकृति	परब्रह्माव्यतिरिक्त इतर स्तर मान्य नाहीत. (तरीही)परब्रह्माचे उपाधिसापेक्ष कनिष्ठ स्वरूप	परा प्रकृति, जीव, अव्यक्त (अलीकडील), वेद, परा माया, कूटस्थ, गुणमयी माया, अधिदैव, अध्यात्म, ब्रह्मस्वभाव, पुरुष व प्रकृति, क्षेत्र, प्रकृति, अनात्मा, प्रपंच, पुराणी प्रवृत्ति, अक्षर पुरुष इ. नावांनी संबोधित तत्त्व
निम्न स्तर वा कनिष्ठ स्तर	प्रकृति-विकृति	महान, अहंकार, पंचतन्मात्रे	परब्रह्माव्यतिरिक्त इतर स्तर मान्य नाहीत. (तरीही) परब्रह्माचे उपाधिसापेक्ष कनिष्ठ स्वरूप	अपरा प्रकृति व तिचे अष्टधा विभाग (मन, बुद्धि, अहंकार व पंचमहाभूते); व्यक्त; कर्म व त्याचे यज्ञ, पर्जन्य, अन्न व जीव हे विभाग; त्रिगुणात्मक सृष्टी व तिचे पृथ्वी, आप, अग्नि, वायु , आकाश, मन, बुद्धी व अहंकार हे विभाग; विसर्ग, जगत, सर्व भूते, अधिभूत, पंचमहाभूतात्मक नाशिवंत पदार्थ, क्षेत्र व त्याची छत्तीस तत्त्वे; प्रपंच, अनादि प्रकृति व तिचे गुण, कर्तृत्वशक्ती, इ.; अनात्मा, भूतमात्रे वा विस्तार वा विश्व यांचा व्यक्त भाग; भूत प्रकृति, देह, योनि, महद् ब्रह्म, क्षर पुरुष, त्रैलोक्याचा व्यक्त भाव, ऊर्ध्वमूल इ.
	१६ विकार	मन, ५बुद्धिंद्रिये ५कर्मेंद्रिये, ५ महाभूते	वेदांतमते ही सोळा तत्त्वे *विकार* म्हणून मूलतत्त्वात गणली जात नाहीत. परंतु गीता मात्र क्षेत्रास त्याच्या छत्तीस तत्त्वातील दशेंद्रिये व त्यांचे दश विषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, चेतना, धृति व जड देहरूपाने व्यक्त होणारा संघात या २७ तत्त्वांस विकारात समाविष्ट करते.	

(संदर्भ पृ. क्र. २८२)

ॐॐ

::सप्तम स्कंध::कर्माचे स्वरूप::

(उन्मेष ३० ते ३३) (पृ.क्र.४५४ते ५२४)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::सप्तम स्कंध:::

::कर्माचे स्वरूप::

::उन्मेष::३०::

::संन्यास, त्याग व कर्म::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३०:

गीताः
२:११,३७,३९,४८
३:१,३-५
४:४१
५:१-६
६:१-४
१२:१२
१७:२८
१८:१-१२
ज्ञानेश्वरीः
१८:६०-७५,८७-२३२

:::सप्तम स्कंध:::
::कर्माचे स्वरूप::

::उन्मेष::३०::
::संन्यास, त्याग व कर्म::

अर्जुनाची पृच्छा::::

अठरावा अध्याय

मागील अध्यायात केलेल्या समन्वयाने *ज्ञान व विज्ञान* यांचा हा भाग आता आटोपत आला आहे. यानंतर आपण वळू या गीतेच्या अठराव्या अध्यायाकडे. त्या अध्यायात जी कर्मविषयक व्याख्या त्रिगुणरहस्यासह स्पष्ट केली आहे, ती जाणून घेतल्याने आपल्याला पूर्वोल्लेखित ज्ञानदेवप्रणीत योगमार्गाचे परिशीलन करण्यास फार साहाय्य होइल, अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे कर्म करणे व कर्माचा त्याग करणे, तसेच कर्माचा संन्यास करणे; ही जी कर्मविषयक मीमांसा उद्भवते, त्याबाबतही श्रीगोपालकृष्णांचे निर्णायक मत आपणांस ज्ञानदेवीच्या आधाराने उमजून घेता येईल. म्हणून त्या अध्यायारंभीचा अर्जुनाचा प्रश्न पाहू या:

संन्यास व त्याग याविषयी अर्जुनाची पृच्छा

सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन।।१८-१।।

अर्जुन पृच्छा करतो:"हे महाबाहो केशिदैत्यनिषूदना! हे हृषीकेशा! संन्यासाचे तत्त्व आणि त्यागाचे तत्त्व ही मी पृथक पृथक जाणून घेऊ इच्छितो."

बहुचर्चित व वादविवादांनी रंगलेला असा संन्यासाचा विषय असल्याचे आपण यापूर्वी पंधराव्या अध्यायाचा समारोप होतांना पाहिले होते *(उन्मेष:२८::[परमात्मस्वरूप क्षर-अक्षर-उत्तमपुरुषविचार] पृ.क्र.४३८-४४१).* श्रीमदाचार्य शंकर भगवत्पूज्यपाद ते आदरणीय देशभक्त लो. टिळक अशा धुरंधरांनी याविषयी आपली प्रमाणिक मते नोंदविल्याचे सर्वांस विदित आहेच.

साङ्ख्य: संन्यास विषयक गीताश्लोक

साङ्ख्य म्हणजे संन्यास याविषयीचे जे उल्लेख गीताश्लोकांत येतात, ते प्रामुख्याने असे:

दुसऱ्या अध्यायात ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे। गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिता:।।२-११।।"*** या श्लोकाने सुरुवात करून भगवंतांनी ज्ञानी पुरुषांची भूमिका व तत्त्वप्रणाली सांगण्यास सुरुवात केली.

आत्मा अज आहे; अमर आहे; नित्य आहे; अव्यय आहे; अविनाशी आहे; अचिंत्य आहे; हा कोणास मारत नाही; किंवा कोणाकडून मारवलाही जात नाही. हा न जळणारा, न तुटणारा, न भिजणारा, न सुकणारा, स्थिर, अचल व सनातन, चिरंतन अशा स्वरूपाचा आहे. हा अव्यक्त, इंद्रियांस अगोचर असा आहे. त्यास कोणत्याही विकाराची उपाधि नाही; असा अविकार्य हा आत्मा आहे; अशा साङ्ख्यप्रणालीचे निरूपण त्यानंतरच्या *श्लोक क्र. २-१२ ते २-३०* यांतून येते.

हे स्पष्ट केले की भगवंत सरळच म्हणतात की ***"एषा तेऽभिहिता साङ्ख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु। बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि।।२-३९।।"*** - "साङ्ख्य निष्ठेप्रमाणे हे ज्ञान साांगितले. आता ज्या बुद्धीने युक्त झाल्यास कर्मबंधातून सुटशील, त्याबाबत ऐक."

कर्मबंधापासून मुक्तता

यानंतर येणाऱ्या ***"नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते। स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।२-४०।।"*** या श्लोकापासून कर्मबंधांपासून सुटण्यासाठी आचरावयाचा *मार्ग* व त्यासंबंधीचे ज्ञान सांगण्यास भगवंतांनी सुरूवात केली आहे.या मार्गात सुरू केलेल्या योग उपक्रमाचा नाश होत नाही; विघ्ने येत नाहीत; त्याचे स्वल्पाचरण जरी करता येत असले, तरी संसारभयाचा अंती शेवट होतो.

अनेक फलेच्छांच्या मागे धावणारी *बुद्धी* या मार्गास उपयुक्त नाही - ती फक्त वेदोक्त कर्मे करून उत्तमोत्तम भवस्वर्गादी फले प्राप्त करून देते. कार्याकार्याचा सुनिश्चय करणारी एकाग्र बुद्धी वासनाक्षयासाठी या मार्गात गृहीत धरलेली आहे. अशीच बुद्धी समाधिप्रत नेऊन पोहोचवू शकते.

वेद ही त्रिगुणांची खाण आहे. तिचा लोभ सोडून देऊन त्रिगुणातीत, नित्यसत्त्वस्थ, सुखदु:खादी द्वंद्वापासून अलिप्त असे राहून; योगक्षेमादी स्वार्थप्रवृत्तींपासून दूर राहिल्यास आत्मनिष्ठ होता येते. ब्रह्मज्ञान्यास वेदांचे प्रयोजन उरत नाही.

मुमुक्षूसाठी योगनिष्ठा अथवा कर्मयोग

यानंतर मुमुक्षू साधकांसाठी परवलीचा असा श्लोक येतो. ***"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि।।२-४७।।"*** - "कर्म करण्यापुरताच त्यांचा अधिकार आहे; कर्मफलाचा आग्रह त्यांनी धरणे योग्य नाही;

फलेच्छेने कर्म करू नये; तसेच कर्मे न करण्याचाही अट्टाहासही त्यांनी करू नये," असे भगवंत स्वच्छ सांगतात.

यातच *त्याग* आणि *संन्यास* यांचे उत्तर गुंफलेले आहे - जो प्रश्न वस्तुतः अर्जुनाने गीता *श्लोक क्र. १८-१* मध्ये फार नंतर केला आहे.

कर्मे न करण्याचा अट्टाहास हा लौकिक दृष्ट्या **संन्यासाश्रमा**चा आचार ठरतो व फलेच्छारहित कर्म करणे हा त्यागाचा भाग आहे; असे अठराव्या अध्यायी पुनश्च स्पष्ट केलेले आहे. त्याचप्रमाणे अठराव्या अध्यायी ***"अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम्। भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु सन्न्यासिनां क्वचित्।।१८-१२।।"*** - ज्ञानी संन्याशास म्हणजे कर्मफलत्याग्यास म्हणजेच कर्मफलाशेचा त्याग करणाऱ्या पुरुषासंबंधी त्याला *अनिष्ट, इष्ट वा मिश्र* असे कोणतेही कर्मफल प्राप्त होत नाही; असे जे सांगितले आहे; त्याबाबत समांतर युक्ती सांगतांना श्रीगोपालकृष्ण गीता *श्लोक क्र. २-४८* मध्ये म्हणतात कीः ***"योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय। सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।।"*** - "आसक्तिरहित होऊन व कर्मे सिद्ध होवोत वा न होवोत, दोन्ही सारखेच मानून योगस्थ होऊन कर्मे करावीत. याच समबुद्धीस योग म्हणतात."

या योगापेक्षा *सकाम कर्म* करणे हे फारच कनिष्ठ पातळीवरील आहे. म्हणून या साम्यबुद्धीचा आश्रय करून योगाचे आचरण करावे. अशा प्रकारे कर्मे करण्याची जी हातवटी, तीच *निष्काम* कर्मयोग्याची धन होय. हाच मोक्षाचा मार्ग आहे. हीच ***साङ्ख्य***निष्ठेव्यतिरिक्त मोक्षाप्रत नेणारी दुसरी निष्ठा आहे - हिलाच ***योगनिष्ठा*** असे म्हणतात. या निष्ठेला अनुसरून आचरण करणाऱ्यास काम- क्रोध-लोभादी रिपु त्रास देत नाहित; इंद्रिये व विषय त्याला चाळवत नाहीत; त्याचे चित्त प्रसन्न राहते; त्याची बुद्धी स्थिर राहते; सर्व विषय त्याच्याठायी नांदत असले; तो सर्व प्रकारची कर्मे करत असला; तरी तोच खरा ***समाधिस्थ पुरुष*** असतो. त्यालाच खरी शांती मिळते, असा श्रीगोपालांचा अभिप्राय आहे. हा अभिप्राय ज्ञानपूर्वक संन्यास करणाऱ्या - त्यागी पुरुषांस लागू होतो.

कर्माची अनिवार्यता व ते करण्याची योगयुक्ती

संन्यासाचा विषय पुनः तिसऱ्या अध्यायात चर्चिला जातो, तो अर्जुनाच्या ***"ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन। तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव।।३-१।।"*** व ***"व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे। तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्।।३-२।।"*** या उद्गारांनी! कर्म करण्यापेक्षा समत्वबुद्धियोगच जर श्रेष्ठ असेल, तर युद्ध करण्याचा आग्रह कशासाठी! अर्जुन विसरतो की *भगवंत बुद्धियोग साधण्यासाठी कर्मे करावयाची नाहीत, असे म्हणत नाहीत; तर कर्मे फलेच्छेविरहित करावीत; असे म्हणत आहेत.*

म्हणून श्रीकृष्ण पुनः स्पष्ट करतात की ***"लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ। ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"***. ज्ञानयोगाने *सांख्यनिष्ठा* व कर्मयोगाने *योगनिष्ठा* अशा दुसऱ्या अध्यायी सांगितल्याचा उल्लेख करून ते म्हणतात की ***"न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते। न च सन्न्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति।।३-४।।"*** व ***"न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्। कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः।।३-५।।***

कर्मे न करणाऱ्या पुरुषास नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होत नाही. आणि कर्मांचा संन्यास करण्याने सिद्धी प्राप्त होत नाही. कारण कर्मे केल्याशिवाय कोणीच क्षणभरही राहू शकत नाही. प्रकृतीचे गुण प्रत्येकास कर्म करण्यास लावत असतातच. बाह्यात्कारी कर्मेंद्रिये आवरून मनात विषयचिंतन करणारा लौकिक संन्यासी मूढ आहे. पण मनाने त्यांना आवरून अनासक्तबुद्धीने कर्मयोग आचरणाऱ्या ज्ञानी संन्याशाची योग्यता विशेष आहे.

नियत कर्म करावे. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे चांगले. यज्ञार्थ करावयाचे कर्मसुद्धा फलाशा सोडून करावे. ज्ञानी मनुष्यानेसुद्धा कोणतेच प्राप्त कर्तव्य त्यास नसले तरीही लोकसंग्रहार्थ कर्म अवश्य करावे. असा स्वतःच्या उदाहरणाने प्रत्यक्ष भगवंतांनीच आदर्श घालून दिलेला आहे. ज्ञानवान पुरुषसुद्धा आपल्या प्रकृतिस्वभावानुरूप वागतो. गुण व कर्मे आपल्याहून भिन्न आहेत, हे ओळखून, त्यांच्या कर्मव्यापारात रत न होता, भगवंताठायी अध्यात्मबुद्धीने सर्व कर्मांचा संन्यास करावा व फलाशा सोडून व ममत्वरहित बुद्धीने कर्मे आचरावीत. हाच *योगमार्ग* होय.

कर्माकर्मविचार व आत्मज्ञानी

याच योगमार्गाची महती व कर्माकर्मविचार चौथ्या अध्यायी सांगून झाल्यावर भगवंत या संन्यासयोगाची प्रशंसा करतात. ते म्हणतातः ***"योगसन्न्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम्। आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय।।४-४१।।"*** - "कर्मयोगाच्या आचरणाने कर्मांचा संन्यास केलेल्या व ज्ञानामुळे सर्व संशय छिन्न झालेल्या आत्मज्ञानी पुरुषास कर्मे बांधू शकत नाहीत."

साङ्ख्य व (कर्म)योग यांचे एकत्व

याप्रमाणे *कर्मयोग* व *संन्यास* यांबाबत प्रभूंच्या विवेचनाबद्दल अर्जुनाची मार्मिक शंका अशी की ***"सन्न्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि। यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम्।।५-१।।"***. "कर्माचा संन्यास करावा व वर असेही तुम्ही म्हणता की कर्मयोग आचरावा. यातील अधिक श्रेयस्कर काय आहे, ते सांगा."

यावर भगवंत म्हणतातः ***"सन्न्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ। तयोस्तु कर्मसन्न्यासात्कर्मयोगो विशिष्यते।।५-२।।"*** - "कर्मयोग व कर्मानुष्ठान ही दोन्ही मोक्षास कारणीभूत होतात.

पण यात कर्मानुष्ठानरूपी मार्गच विशेष श्रेयस्कर आहे." कारण कर्मयोगाचे आचरण केल्यास संन्यासफल अनायासेच प्राप्त होते.

हे दोन्ही अभिन्नच आहेत. म्हणून भगवंत म्हणतातः ***"साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः। एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम्।।५-४।।"*** - "साङ्ख्य व योग हे एकच आहेत. त्यातल्या कोणत्याही एकाचे अनुष्ठान केले, तरी ते करणाराला दोहींचेही मोक्ष हेच फल प्राप्त होते. म्हणून ***"यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते। एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति।।५-५।।"*** असे म्हटले आहे. *योगी* व *साङ्ख्य* दोघेही एकाच स्थानास - फलास - प्राप्त होतात.

कर्मयोगी हाच नित्य संन्यासी

यानंतर लौकिक संन्यासाश्रमाद्वारे मोक्ष मिळवण्याची व्यर्थ हाव धरणाऱ्या व वरवरच्या कर्मत्यागाने तो मिळेल अशी आशा करणाऱ्यांबद्दल भगवंत म्हणतातः ***"सन्न्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः। योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति।।५-६।।"***. "ज्याच्या हातून कर्मयोगाचे अनुष्ठान घडत नाही, तो व्यर्थच संन्यासमार्गाच्या खटाटोपात पडतो. परंतु निष्काम कर्मयोगाच्या युक्तीने जाणाऱ्यास संन्यासप्राप्ती अत्यंत सुलभ होते."

असा मनुष्य कर्म करत असला, तरी अकर्ताच असतो. खरी *नैष्कर्म्यसिद्धी* त्यालाच प्राप्त होते. असा *कर्मयोगी* हा *ज्ञानी* व *नित्यसंन्यासी* असून त्यासाठी त्याला गृहादिक त्यजावे लागत नाहीत. उपाधीत असूनही त्याला कर्मबंधन घडत नाही. म्हणून श्रीकृष्ण म्हणतातः ***"ज्ञेयः स नित्यसन्न्यासी यो न द्वेष्टी न काङ्क्षति। निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते।।५-३।।"***. अशा निर्द्वंद्व झालेल्या त्या नित्यसंन्याशाची बंधापासून अनायासेच मुक्तता होते.

खरा योगी व खरा संन्यासी कोण

अशा प्रकारे *१) संन्यासमार्ग वा साङ्ख्यमार्ग, २) संन्यासाश्रम वा लौकिकार्थाने घेतलेला चतुर्थाश्रम वा संन्यास व ३) कर्मसंन्यास वा निष्काम कर्मयोग आचरून प्राप्त झालेला खरा संन्यास* या तिन्ही कल्पनांची योग्य उकल करून दाखवल्यावर, या सर्व स्पष्टीकरणावर भगवंत, सहाव्या अध्यायी अभ्यासयोगाचे विवेचन करण्यापूर्वी शिक्कामोर्तब करतात, ते असेः

"अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः। स सन्न्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः।।६-१।।". "कर्मफलाचा आश्रय न करता जो कर्तव्यकर्म करतो, तोच खरा संन्यासी व तोच योगी होय. केवळ अग्निहोत्राचा म्हणजे गृहस्थाश्रमाचा त्याग करणारा अथवा संन्यासाश्रमात प्रवेश न केला तरी निष्क्रियतेस संन्यास समजणारा व तसे वागणारा मनुष्य काही संन्यासी किंवा योगी नव्हे." म्हणून ***"यं सन्न्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव। न ह्यसन्न्यस्तसङ्कल्पो योगी भवति कश्चन।।६-२।।"*** - "जो संन्यासी तोच योगी अशी शास्त्रांनी ग्वाही दिली आहे, ती संकल्पाचा सर्वथैव संन्यास ज्याच्याठायी घडतो, त्याच्याबद्दलची आहे. ज्याचा कर्मफलाविषयीचा संकल्प सुटलेला नाही, असा कोणीही मनुष्य (त्याने अगदी जाणूनबुजून संन्यासाश्रम स्वीकारला असला तरी) योगी किंवा संन्यासी ठरू शकत नाही."

सर्वसंकल्पसंन्यास हेच योगारूढाचे लक्षण

म्हणून भगवंत पुनश्च सांगतातः ***"आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते। योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते।।६-३।।"*** **व** ***"यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते। सर्वसङ्कल्पसन्न्यासी योगारूढस्तदोच्यते।।६-४।।"***. "योग प्राप्त व्हावा अशी इच्छा करणाऱ्या मुनीला *कर्म* हे साधन आहे. योगप्राप्तीनंतर *शम* हे साधन आहे."

कर्ममार्गरूपी पायऱ्या यमनियमरूपी पायथ्यापासून निघून आसनाच्या पायवाटेने , प्राणायामाच्या कड्याने योगरूपी डोंगराच्या मध्यभागावर येतात. त्यापुढे अभ्यासाच्या बळाने प्रत्याहाररूपी कड्यावर वैराग्यरूपी नख्या चिकटवून हळूहळू पुढे सरकत प्राण व अपानरूपी वायूंच्या वाहनावर स्वार होऊन, धारणेच्या प्रशस्त मार्गाने ध्यानरूपी शिखरापर्यंत जावे लागते. त्या धारणामार्गाची वाटचाल पूर्ण झाली की साध्य-साधनभेद नष्ट होतो. प्रवृत्ति व संकल्प उरत नाहीत. कशाचेही स्मरण उरत नाही; अशी ऐक्यभूमीवर दृढ समाधी प्राप्त होते.

"अशा योग्याचे सर्व संकल्प सुटलेले असल्याने विषय व कर्म यांच्याठायी त्याला आसक्ती उरत नाही. अशा योग्यासच *योगारूढ* अशी संज्ञा आहे." *सर्वसंकल्पसंन्यास* हे त्याचे चिह्न वा लक्षण आहे.

अर्जुनाच्या प्रश्नाची पूर्वपीठिका

अशी *संन्यास, कर्मफलेच्छात्याग, निष्काम कर्मयोग, चतुर्थाश्रम वा लौकिक संन्यास, कर्मांचा मूढ त्याग, संकल्पत्याग वा संकल्पसंन्यास, साङ्ख्य वा ज्ञानमार्ग आणि कर्म वा योगमार्ग* यांची पूर्वपीठिका गीतेच्या पूर्वाध्यायी आली आहे. याचा स्वल्पसा परिचय करून घेतल्यामुळे आपणास पुनश्च अठराव्या गीताध्यायाच्या पहिल्या श्लोकातून अर्जुनाने केलेल्या पृच्छेकडे पाहणे सोपे जाणार आहे.

त्याच्या ***"सन्न्यासस्य महाबाहो ....।।१८-१।।"*** या पृच्छेकडे जरा वेळ आपण श्रीमच्छंकराचार्य यांच्या दृष्टिकोनातून बघू या; व त्यानंतर ज्ञानदेवांची अमृतमय वाणी या सर्व विचारांचा कसा सुंदर मेळ घालते, ते पाहू.

गीताश्लोक क्र. १८-१,२,३ व आचार्य

आचार्य प्रथमच स्पष्ट करतात की गीतेचा अठरावा अध्याय सर्व गीताशास्त्राच्या साररूप आहे. पूर्वीच्या अध्यायात *संन्यास*

व *त्याग* हे शब्द ज्याअर्थी येतात, तो स्पष्ट उलगडत नसल्याने, त्यांचा शब्दार्थ व भावार्थ जाणून घेण्याच्या बुद्धीने अर्जुनाचा हा प्रश्न *(गी.१८-१)* आहे. याचा निर्णय करतांना भगवंत म्हणतातः

काम्यानां कर्मणां न्यासं सन्न्यासं कवयो विदुः।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः।।१८-२।।

कित्येक बुद्धिमान पंडित अश्वमेधादी सकाम कर्मांचा त्याग यास *संन्यास* असे म्हणतात व कर्तव्यरूप शास्त्रविहित कर्मे न करणे, हे संन्यासात धरतात. तर काही विचक्षण पंडित असे म्हणतात की *नित्य व नैमित्तिक* सर्व प्रकारच्या कर्मफलांचा स्वतःसंबंधित परित्याग करणे म्हणजे *सर्वकर्मफलत्याग*, असा *त्याग* या शब्दाचा अभिप्राय आहे. अशा प्रकारे काम्य कर्मांचा *स्वरूपतः त्याग* असो किंवा सर्व कर्मफलांचा त्याग असो, *संन्यास व त्याग* या शब्दांनी एकमात्र त्यागाचाच बोध होतो, असेही एक मत आहे. कर्माचे फल असंन्याशांना मिळतेच मिळते. पण संन्याशांस मात्र मिळत नाही.

यापरते दुसरे मत असे आहे कीः

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिती चापरे।।१८-३।।

साङ्ख्यादिमते सर्वच कर्मे बंधनकारक असतात. हा दोष त्यांच्या अंगी असल्याने रागद्वेषादी जसे त्यागावे लागतात, तशीच सर्व कर्मे त्यागली पाहिजेत. म्हणून *मुमुक्षू* म्हणजे कर्मे करण्याचा अधिकार असणाऱ्या व्यक्तीनेसुद्धा कर्मे टाळली पाहिजेत. काही विद्वान याबाबत एवढाच फरक करतात की यज्ञ, दान, तपादी कर्मे सोडून इतर कर्मांचाच त्याग करावा.

आचार्यमते हे सर्व विकल्प म्हणजे - संन्यास, कर्मफलत्याग, सर्व कर्मे न करणे वा यज्ञ-दान-तपादी कर्मेच तेवढी करणे, हे कर्म करणाऱ्या कर्माधिकाऱ्यांसाठीच सांगितले आहे. समस्त भोगांपासून विरक्त असणाऱ्या ज्ञाननिष्ठ संन्याशांसाठी हे विकल्प उद्भवतच नाहीत. ***"ज्ञानयोगेन साङ्ख्यानां .."*** म्हणून *(गीता श्लोक क्र. ३-३)* जी *साङ्ख्यनिष्ठा* वा *मोक्षमार्ग* म्हटला, त्याच्याविषयी पूर्वीच निर्णय केलेला आहे *(द्वितीयाध्यायी)*. म्हणून या ठिकाणी केवळ *कर्मनिष्ठा* वा *योगनिष्ठा* आचरू पाहणाऱ्या मुमुक्षू साधकांचा व इतरेजनांचा विचार सध्या अठराव्या अध्यायी प्रस्तुत आहे, असे आचार्य म्हणतात.

कारण *साङ्ख्य* वा *ज्ञाननिष्ठा* पावलेल्यांसाठी राग-द्वेष, मोहादी दुःखास कारणीभूत होत नाहीत; तसेच ते देहादींची दुःखे आत्मवत समजत नाहीत व त्यांच्याद्वारे कर्मांचा त्याग करणे किंवा कर्मे करणे हे संकल्प होऊ शकत नाहीत. सर्व कर्मे गुणांद्वारे घडतात; आपण कोणतेच कर्म करत नाही, असे जाणून मनाद्वारेच सर्व कर्मांचा संन्यास केलेल्या तत्त्वज्ञानी पुरुषाची ही निष्ठा आहे.

सर्वारंभपरित्यागी, मौनी, संतुष्ट इ. लक्षणांनी अशा गुणातीत पुरुषाचे वर्णन केले जाते. ज्ञानाची परानिष्ठा असणाऱ्या अशा ज्ञाननिष्ठ संन्यस्त पुरुषांसाठी म्हणूनच या प्रकरणी मधूसूदनांची वक्तव्ये लागू पडत नाहीत, असे आचार्य म्हणतात; व हे प्रकरण केवळ कर्माधिकारी पुरुषांबाबत चालविले आहे, असे त्यांचे मत आहे.

या ठिकाणी *कर्मफलत्याग (रूपसंन्यास)* सत्त्वगुणयुक्त व तामस-राजस त्यागांपेक्षा उत्तम असल्याने, गौण रूपाने त्यासच *संन्यास* म्हटले आहे; त्याच्याशी *सर्वकर्मसंन्यासरूप मुख्य संन्यास* म्हणजे *ज्ञाननिष्ठांचा संन्यास* संबंधित नाही; व या श्लोकांमध्ये तसा अभिप्रायही नाही; असे आचार्यमत आहे.

शंका व आचार्यांचे उत्तर

यावर मूलभूत शंका अशी की देहवानास सर्व कर्मांचा संन्यास स्वरूपतः करणे अशक्य असल्याने या ठिकाणी *कर्मफलत्याग* यासच *संन्यास* म्हटले असले पाहिजे व तोच मुख्य संन्यास समजला पाहिजे. आचार्यमते कर्मफलत्यागाची केवळ स्तुती करण्यासाठी भगवंतांनी ***"न हि देहभृता ...।।"***, तसेच "*कर्मफलत्यागापेक्षा श्रेष्ठ म्हणजे त्यापासून शांती प्राप्त होते (गीता श्लोक क्र.१२-१२)*," अशी विधाने केली आहेत. कारण अर्जुन आत्मज्ञानरहित होता व त्यास आत्मनिष्ठ होण्याच्या साधनांचा भगवंत उपदेश करत आहेत, ही वस्तुस्थिती दृष्टिआड करुन चालणार नाही.

सर्व कर्मे मनाने सोडून दिलेल्या, परमार्थदर्शन ज्यांना झाले आहे अशा यथार्थज्ञानी - साङ्ख्ययोगी वा संन्यासनिष्ठांना - असा अधिकार असणाऱ्या पुरुषांना - वर उल्लेखलेले कर्म करणे - टाकणे - कर्मफलाचा त्याग करणे - यज्ञदानादी कर्मे करणे - इ. विकल्प लागू पडत नाहीत. याबाबत इतर शांकरमते वा सिद्धांत जिज्ञासूंनी त्यांच्या गीताभाष्याच्या तृतीय अध्यायी मुळातूनच पाहणे इष्ट ठरेल.

ज्ञानदेवांचे संन्यासविषयक सूतोऽवाच

एवढा उहापोह झाल्यावर आपण आता याविषयी ज्ञानदेव काय सांगतात, त्याकडे वळू या. शंकराचार्यांप्रमाणेच ज्ञानेश्वरसुद्धा गीतेचा *अठरावा अध्याय गीतासारस्वरूप* असल्याचे म्हणतात. ते या अध्यायास गीताप्रासादाचा *कलश* समजतात. सतराव्या अध्यायातून अठरावा अध्याय कसा उत्पन्न झाला, याविषयी थोडी पूर्वपीठिका पाहू या; म्हणजे अर्जुनाच्या *श्लोक क्र. १८-१* मधील पृच्छेचे कारण नीट समजेल.

सतराव्या अध्यायात *ॐ, तत् व सत्* ही ब्रह्माची त्रिविध नामे व त्यांचा विनियोग स्पष्ट केला आहे. श्रद्धेवाचून, ब्रह्मनामाशिवाय उपयोजिलेले कर्म निष्फळ ठरते; परंतु या नामाच्या विनियोगाने केलेली यज्ञ, दान व इतर सर्व कर्मे ब्रह्माठायी अर्पिली असता

ब्रह्मस्वरूप पावतात. अशी कर्मे जन्ममरणरूपी बंध उरू देत नाहीत. अशा सद्विनियोगरूपी कर्मांचे अनुष्ठान संपूर्ण वेदाच्या सांग अनुष्ठानासारखेच दिव्यातिदिव्य आहे.

म्हणून सतराव्या अध्यायाच्या समाप्तिप्रसंगी भगवंतानी शेवटच्या श्लोकात असे म्हटले होते की: ***"अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्। असदित्युच्यते पार्थ न च तत् प्रेत्य नो इह।।१७-२८।।"***. अश्रद्धेने केलेले हवन, दान, आचरलेले तप व केलेले कर्म जे असते, ते *असत्* म्हणून ओळखले जाते. त्याचे परलोकीही फल नाही व इहलोकीही नाही."

श्रीकृष्णांचा कर्मनिष्ठेचा आग्रह

म्हणून ज्ञानदेव म्हणतात की:

तन्हीं सतरावा अध्यावो। पावतां पुरता ठावो।
जैं संपता श्लोकीं देवो। ऐसें बोलिले।।१८-६०।।
ना ब्रह्मनामाचां विखीं। बुद्धि सांडूनि आस्तिकीं।
कर्में कीजती तितुकीं। असंतें होती।।६१।।
हा ऐकौनि देवाचा बोलु। अर्जुना आला डोलु।
म्हणे कर्मनिष्ठा मलु। ठेविला देखों।।६२।।

"ब्रह्मनामाविषयी श्रद्धा न ठेवता जितकी काही कर्मे करावीत, ती सगळी व्यर्थ होतात, हे देवाचे सांगणे ऐकून अर्जुन मनी संतोषला. कर्माचे द्वाडपण जर असे आहे, तर कर्म करायलाच नको व कर्म नको, तर युद्ध पण नको, अशा त्याच्या मनोभूमीस साजेसे भगवंत आता सांगतील, अशी आशा त्याच्या मनात बहुधा उत्पन्न झाली असावी. तो मनात म्हणू लागला: "सांख्य व कर्म वा योग या दोन निष्ठा श्रीकृष्णांनी सांगितल्या आहेत. त्यातली ही जी कर्मनिष्ठा देव सतत आग्रहपूर्वक सांगत आहेत, ती तर अशी कर्ममळाने भरलेली व आचरण्यास कठीण दिसते आहे."

तो अज्ञानांधु तंव बापुडा। ईश्वरुचि न देखे एवढा।
तेथ नाम एक फुडां। कां सुझे तेयां।।१८-६३।।
आणि रजतमें दोन्हीं। गेलियावीण श्रद्धा सानी।
तैं कां लागे अभिधानीं। ब्रह्माचिये।।६४।।

"मुमुक्षू जन, साधक, सर्वसामान्य मनुष्ये ईश्वरास ओळखूसुद्धा शकत नाहीत; तेथे त्या अज्ञानांधांस त्या ईश्वराचे नाम व त्याचा विनियोग करण्याइतपत बुद्धी ती कोठली असणार! पुनः त्यांचे चित्त रजतमांनी व्याप्त असते. हे रजतम जाणे कठीण! ते गेल्यावाचून श्रद्धा-श्रद्धा असे कितीही म्हणत बसले, तरी ती हीणकस श्रद्धा ब्रह्मनामी जडेल कशी!"

मग कोता खेंव देणें। वार्तेवरील धांवणें।
संडी पडे खेलणें। नागिणीचें तैं।।१८-६५।।
तैसीं कर्मे दुवाडें। तेयां जन्मजन्मांतरींची कडे।
दुर्मेलावे एवढे। कर्मामाजीं।।६६।।
ना विपाएं हे उजू होये। तन्हीं ज्ञानाचीच योग्यता लाहे।
येन्हवीं येणेंचि जाये। निरयालया।।६७।।

"अन त्या तकलुपी श्रद्धेच्या योजनेने केलेली सर्व कर्मे तर शस्त्राग्रास आलिंगन देण्यापेक्षा; किंवा दोरावरून धावण्यापेक्षा; एवढेच काय! तर नागिणीच्या फड्याशी खेळण्याहूनही घातक ठरल्यास काय नवल! कर्मे ही अशी मुळातच दुर्निवार असतात. पुनः त्यांना पुनर्जन्मांचे सुळके पण असतात. इतके कुयोग या कर्ममेळाव्यात आहेत. अगदी क्वचित अपवादात्मक प्रसंगी समजा हे कर्म चुकून यथासांग जर झाले, तर त्यास ज्ञानाची योग्यता लाभते व मोक्षमार्गी जाण्यास उपकारक ठरते. परंतु ते सांग होऊ शकत नसल्याने, असे कर्म आचरणारे नरकाचीच वाट नाही का धरत!"

कर्मी हा ठावोवरी। आहाती बहुवा अवसरीं।
आतां कर्मठा कैं वारी। मोक्षाची हे।।६८।।
तन्हीं फिटो कर्माचा पांगु। कीजो आघवाचि त्यागु।
आदरिजो अव्यंगु। संन्यासु जो।।६९।।
कर्मबाधेची कंहीं। जेथ भयाची गोठी नाही।
तैं आत्मज्ञान जिहीं। स्वाधीन होय।।७०।।
ज्ञानाचें आवाहनमंत्र। जैं ज्ञान पिकतें सुक्षेत्र।
ज्ञान आकर्षितें सूत्र-। तंतु जैं कां।।७१।।
तैं दोनीं संन्यास त्याग। अनुष्ठूनि सुटो जग।
तन्हीं हेंचि आतां चांग। व्यक्त पुसो।।७२।।

"कर्ममार्गात अशा बहुविध अडचणी आहेत! अशा स्थितीत कर्मनिष्ठा ठेवणाऱ्यांना मोक्षाकडे प्रस्थान ते कसे ठेवता येणार! तर आता हे कर्माचे दारिद्र्य नष्ट होवो! यापेक्षा उत्तम असा *ज्ञानमार्ग* वा सांख्ययोग आचरावा हेच उत्तम! सर्व कर्मांचा त्याग करावा; आणि त्या अव्यंग अशा दोषरहित संन्यासमार्गाचा आश्रय करावा, हेच प्रशस्त आहे! जेथे कर्मबाधेच्या जन्ममरणदुश्चक्ररूपी संयंत्राची भीती नाही; ज्यायोगे आत्मज्ञान स्वाधीन होते; जे ज्ञानाला आवाहन करणारे मंत्र आहे; जे ज्ञानच पिकविणारे सुक्षेत्र आहे; जे ज्ञानास आकर्षणारे सूत्रतंतू आहेत; अशा त्या *संन्यास व त्याग* या दोन्हींस आचरून या प्रपंचापासून मुक्ती मिळवावी! हेच आता देवांस नीट स्पष्ट विचारू या!"

ऐसें म्हणूनि पार्थे। त्यागसंन्यास व्यवस्थे।
रूप होआवया जेथें। प्रश्नु केला।।१८-७३।।
तेथ प्रत्युत्तरें बोली। श्रीकृष्णें जैं चावलिली।
तेयां व्यक्ती जाली। अष्टादशा।।७४।।
एवं जन्यजनकभावें। अध्यावो अध्यायातें प्रसवे।
आतां ऐका बरवें। पुसिलें तैं।।७५।।

"असा विचार करून पार्थाने *कर्मत्याग* व *कर्मसंन्यास* यांच्या विभागणी व व्यवस्थेविषयी जो प्रश्न केला; त्याच्यावर जे निरूपण

श्रीकृष्णांनी केले; त्याचे जे स्पष्ट उत्तर त्यांनी दिले, त्यात हा गीतेचा अठरावा अध्याय प्रकटला! असा सतराव्या अध्यायातून हा अठरावा अध्याय पूर्वीच्याच क्रमाने म्हणजे एका अध्यायातून दुसरा अध्याय उत्पन्न होणे, या प्रकारे निर्माण झाला आहे. तरी आता अर्जुनाचा प्रश्न नीट ऐका."

संन्यास व त्याग म्हणजे काय

अर्जुन म्हणतो, "हे जगाच्या नियंत्या! माझी विनंती ऐकावी."

सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन।।१८-१।।

त्याग आणि संन्यास यांचे पृथक पृथक तत्त्व स्पष्ट जाणून घ्यावे म्हणून हृषीकेशास - त्या केशिनिषूदन श्रीकृष्णास विनंती करणारा अर्जुन ज्ञानदेव रेखाटतात, तो असा आहे. तो म्हणतो:

हां जी संन्यासु आणि त्यागु। इयां दोहीं एका अर्थीं लागु।
जैसा संघातु आणि संघु। सांगातेंचि बोलिजे।।१८-८७।।
त्यागें तैसा संन्यासें। त्यागुचि बोलिजतु असे।
आमचेनि तंव मानसें। जाणिजे हेंचि।।८८।।
ना काही आथी अर्थभेदु। तो देव करोतु विशदु।...।।८९।।

"देवा! संन्यास आणि त्याग या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच असल्याचे दिसते. ज्याप्रमाणे *सांघात* आणि *संघ* हे शब्द एकच गोष्ट सुचवतात, त्याप्रमाणे *संन्यास म्हणजे त्यागच* अशी माझी समजूत आहे. पण त्याग आणी संन्यास या दोन शब्दांचे अर्थ भिन्न असले, तर ते स्पष्ट करा!"

विविध मते::::

संन्यास व त्याग यांची विद्वत् व्याख्या

....। एथ म्हणती मुकुंदु। भिन्नचि पैं।।८९।।

तेव्हा श्रीहरी मुकुंद म्हणाले की "या दोन शब्दांचे अर्थ भिन्न आहेत." ते अर्थ स्पष्ट करतांना ते म्हणतात:

काम्यानां कर्मणां न्यासं सन्न्यासं कवयो: विदु:।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणा:।।१८-२।।

"काम्य कर्मांचा न्यास करणे म्हणजे संन्यास असे काही विद्वान समजतात आणि सर्व कर्मांच्या फलांचा त्याग म्हणजे त्याग होय असे काही विचक्षण म्हणतात."

याविषयी ज्ञानदेवी म्हणते:

एरवीं अर्जुना तुझां मनीं। त्याग संन्यास दोनीं।
एकार्थ गमलें हे मानीं। मीही सांच।।१८-९०।।
इहीं दोहीं कीर शब्दीं। त्यागुचि बोलिजे त्रिशुद्धी।
परि कारण एथ भेदीं। येतुलेंचि।।९१।।
जैं निपटूनि कर्म सांडिजे। तैं सांडणें संन्यासु म्हणिजे।
आणि फलमात्र कां त्यजिजे। तो त्यागु गां।।९२।।
तऱ्हीं कोणा कर्माचें फल। सांडिजे कोण कर्म केवल।
हेहीच सांगो विवल। चित्त दे पां।।९३।।

श्रीकृष्ण म्हणतात: "अर्जुना! त्याग आणि संन्यास हे तुला एकाच अर्थाचे गमले, तेही तसे एकाअर्थी बरोबरच आहे. कारण या दोन्ही शब्दांचा वाच्यार्थ त्याग असाच आहे. पण त्यागाच्या प्रकारात मात्र थोडी भिन्नता आहे. *कर्म मुळातून अजिबातच न करणे याला **संन्यास** असे म्हणतात. हा कर्मांचा सर्वथैव त्याग होय. आणि कर्मे करावयाची, पण त्यांच्या फलांचा त्याग करावयाचा, यास **त्याग** असे म्हणतात.* असे त्या त्याग व संन्यास यांचे भिन्न अर्थ आहेत. तरी कोणते कर्म संपूर्णतया टाकावयाचे आणि कोणत्या कर्मांना करून त्यांची फले त्यागावयाची, ते स्पष्टच सांगतो. लक्षपूर्वक ऐक."

तऱ्हीं आपैंसीं दांगीं डोंगर। झाडाली विती असार।
तैसें लांबे राजागार। नुठिती तैं।।९४।।
न पेरितां सैंघ तृणें। उठती तैसें सालीचें होणें।
नाहीं गां राबाडणें। जेयापरी।।९५।।
कां आंग जालें सहजें। परि लेणें उद्यमें कीजे।
नदी आपैसी आपादिजे। विहिरी जेवीं।।९६।।

"डोंगरदऱ्यात आपोआपच घनदाट झाडीझाडोरा, वने, अरण्ये वाढतात. पण चांगल्या बागा किंवा मळे काही तेथे आपोआप उगवत नाहीत. साळीच्या पिकासाठी राब व पेरणी करावी लागते. पण न पेरताच गवत सर्वदूर आपैसेच उगवते. शरीर तर नैसर्गिकरीत्याच प्राप्त होते. पण त्यावरील आभूषणे मात्र मुद्दाम प्रयत्नपूर्वक तयार करावी लागतात. नदी तर आपण स्वयेंच निसर्गदत्त आहे. पण विहीर मात्र खणून कष्टपूर्वक करावी लागते."

तैसें नित्य नैमित्तिक। कर्म होय स्वाभाविक।
परि न कामितां कामिक। न निफजे जैं।।१८-९७।।

"त्याप्रमाणे नित्य *(स्नान-संध्यादिक)* व नैमित्तिक *(श्राद्धादिक)* कर्मे स्वाभाविक वेदाज्ञेनुसार नेमून दिलेली आहेत. पण जी काम्य कर्मे आहेत, ती कामना केल्यावाचून केली जात नाहीत. नित्यनैमित्तिक कर्मे न केल्यास दोष आहे. पण ती केल्याने विशेष फल मिळत नसते."

काम्य कर्मे व संन्यास

काम्य कर्मांचे अधिक वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतात:

कामनेचेनि दलवाडें। जैं उभारावया घडे।
अश्वमेधादिक फुडें। याग जेथ।।१८-९८।।
वापी कूप आराम। अग्रहारें अन महाग्राम।
आणिकही नाना संभ्रम व्रतांचें तैं।।९९।।
ऐसे इष्टापूर्त सकल। जाय कामना एक मूल।
जैं केली भोगवी फल। बांधौनियां।।१००।।

"कामनेचे चतुरंग दल सज्ज झाले की अश्वमेधादिक यज्ञ-याग, बारव, कूप, आड व विहिरींचे निर्माण; बागबगिचे निर्मिती; अग्रहाररूपाने ब्राह्मणांना जमिनींचे दान; किंवा मोठाल्या गावांचे

दान; मोठमोठाली नगरे वसविणे; इ.परोपकारार्थ कामे; किंवा विविध व्रते-वैकल्ये यांचे स्वत:च्या कल्याणासाठी आचरण केले जाते. ही सगळी इष्टापूर्त कर्मे आहेत. या सर्व काम्य कर्मांचे एकमेव मूळ म्हणजे *फलाची कामना*. या कर्मांपासून इहपारलौकिक सुख प्राप्त व्हावे, ही आसक्ती त्या कर्मांमागे असल्याने अशा काम्य कर्माचरणाचे फळ कर्त्यास ती कामना अगदी बांधून बळेच भोगायला लावते."

देहाचियां गांवा आलियां। जन्ममृत्यूचियां सोहोलिया।
ना म्हणो न ये धनंजया। जियापरी।।१८-१०१।।
कां ललाटींचे लिहिलें। न मोडे गां कांहीं केलें।
कालेगोरे पण धुतलें। फिटो नेणें।।१०२।।
केलें काम्य कर्म तैसें। फल भोगावया धरणें बैसें।
न फेडितां ऋण जैसें। वोसंडिना।।१०३।।

"देहनगरीत येऊन वसलेल्या आत्म्यास जसा जन्ममरणाचा सोहोळा साजरा करावाच लागतो; किंवा जो ललाटीचा लेख सटवाई लिहिते, तो काही केल्या पुसून टाकता येत नाही; किंवा जसे कितीही पाण्याने कितीही वेळा धुतले, तरी अंगचे काळेपण किंवा गोरेपण नाहीसे होत नाही; अथवा ऋण फेडल्यावाचून त्यापासून जशी सुटका होत नाही; त्याप्रमाणे काम्य कर्म केले की ते फळ भोगवण्यासाठी देहाच्या द्वारी धरणेच धरून बसते आणि ते फळ भोगल्याशिवाय जीवास इतर मार्ग नाही."

कां कामनाही न करितां। अवसांत घडे पांडुसुता।
तऱ्हीं वायकांडें न झुंजतां। लागे जैसें।।१८-१०४।।
गूळ नेणतां तोंडीं। घातला देचि गोडी।
आगी म्हणोनि राखोंडी। चेपिली पोली।।१०५।।
काम्यकर्मी हे एक। सामर्थ्य आथी स्वाभाविक।..।।१०६।।

"काम्य कर्मांचे अधिकही एक वैशिष्ट्यपूर्ण सामर्थ्य आहे. जर सहजच म्हणून लढाईच्या जागी गेले, तर युद्धात भाग न घेताही विनाकारण बाण आपल्या शरीरास लागू शकतो; त्याप्रमाणे कामना न करताच जरी अवचित काम्य कर्म हातून घडले, तरी त्याचे फळ भोगावे लागते. गूळ अजाणता जरी तोंडी पडला, तरी त्याच्या गोडीचा अनुभव येतोच! राख म्हणून चुकून अग्नीवर पाऊल पडले, तर पोळल्याशिवाय राहात नाही. तसेच स्वाभाविक सामर्थ्य काम्य कर्माठायी असल्याने ते हातून एकदा इच्छेने किंवा अनिच्छेने वा अकस्मात जरी घडले, तरी त्याचे फल भोगायलाच लागते."

...। म्हणौनि नको कौतुक। मुमुक्षू एथ।।१८-१०६।।
किंबहुना पार्था ऐसें। जैं काम्यकर्म गां असे।
तैं त्यजिजे विख जैसें। वोलूनियां।।१०७।।

"म्हणून मुमुक्षू साधक जनांनी काम्य कर्मांबाबत अति दक्ष रहावे व त्यांच्या वाटेला जाऊ नये. किंबहुना अर्जुना! विष चुकून पोटात गेले, तर जसे ते ओकून टाकावे; तसेच ही काम्य कर्मे मुमुक्षूंस विषवत असल्याने ती त्यागून त्यांपासून अलिप्त राहावे."

मग तेया त्यागातें जगीं। संन्यासु ऐसियां भंगीं।
बोलिजे अंतरंगीं। सर्वद्रष्टा।।१०८।।
हे काम्यकर्म सांडणें। तैं कामनेतेचि उपडणें।
धनत्यागें दवडणें। भय जैसें।।१०९।।

"अशा काम्य कर्मांच्या त्यागास लौकिक दृष्ट्या *संन्यास* असे म्हणतात - हाच काम्य कर्मे सर्वथैव त्यागण्याचा मार्ग आहे - असे त्या अंतरंगद्रष्ट्या श्रीगोपालकृष्णांचे सांगणे आहे. धनत्यागाने जसे भय नाहीसे होते, त्याप्रमाणे कामनेचे मूळच उखडून टाकून काम्य कर्मे न करण्याने संसारभय नाहीसे होते."

नित्य व नैमित्तिक कर्मे

यानंतर त्यागाचे तत्त्व सांगावे, म्हणून नित्य व नैमित्तिक कर्मांची चर्चा ज्ञानदेव करतात:

आणि सोमसूर्यग्रहणें। येऊनि करविती पार्वणें।
कां मातापितरमरणें। अंकित जैं दिवस।।१८-११०।।
अथवा अतिथी हन पावे। ऐसैसें पडे जैं करावे।
तैं तैं कर्म जाणावें। नैमित्तिक गां।।१११।।
वार्षियां क्षोभे गगन। वसंतें दुणावें वन।
देहा शृंगारी यौवन-। दशा जैसीं।।११२।।
कां सोमकांतु सोमें पघलें। सूर्ये फांकती कमलें।
एथ असे तैंचि पाल्हालें। आन न ये।।११३।।
तैसें नित्य जैं कां कर्म। तैंचि निमित्ताचें लाहे नियम।
एथ उंचावे तेणें नाम। नैमित्तिक होय।।११४।।

"चंद्रसूर्यग्रहणाच्या प्रसंगी करावयाची पर्वकालातील कृत्ये, आईवडिलांचे श्राद्धदिन, अतिथी अभ्यागताची सेवा- आदरातिथ्य, इ.जी कर्मे अवसरेकरून प्राप्त होतात; ती सर्व नैमित्तिक समजावीत. वर्षासमयकाली जसे ढग येऊन गडगडाट होतो; किंवा वसंतकाली वनास जसा दुपटीने बहर येतो; किंवा यौवनकाली देह जसा तारुण्याच्या नव्हाळीने शृंगारला जातो; किंवा सोमकांत मणी जसा चंद्राच्या सान्निध्यात द्रवतो; अथवा कमळे जशी सूर्योदयाबरोबर विकासतात; अशा प्रकारे विशिष्ट समयी वा विशिष्ट योग आला असता, मुळचेच जे काही असते, ते विस्तार पावते किंवा विशेषत्वाने मंडित होते; त्याचप्रमाणे जे नित्य कर्म असते, तेच काही विशेष प्रसंगी वा समयी, काही विशेष कारणांनी व विशिष्ट योगांनी प्राप्त होते; त्या कर्मास *नैमित्तिक कर्म* असे विशेष नांव आहे."

आणि सांयंप्रातर्मध्याह्नीं। जैं करणें तेही प्रतिदिनीं।
परि दृष्टी जैसीं लोचनीं। अधिक नोहे।।१८-११५।।
कां नापादितां गती। चरणीं जैसीं आथी।
ना तऱ्हीं हे दीप्ती। दीपबिंबीं।।११६।।

वासु नेदितां जैसें। चंदनीं सौगंध्य असे।
अधिकाराचें तैसें। रूपचि जैं।।११७।।
नित्य कर्म ऐसें जनीं। पार्था बोलिजे तैं मानी।
एवं नित्य नैमित्तिकीं दोनीं। दाविली तुज।।११८।।

"आणि जे कर्म प्रतिदिन सकाळी, दुपारी व संध्याकाळीही करावयाचे असते; जे वर्णाश्रमधर्मानुसार जात्याच प्राप्त झालेले कर्म आहे; जे करतांना आपण काही वेगळे किंवा विशेष करतो आहोत, याची जाणीव मनुष्यास नसावी - जशी नेत्रांठायींची दृष्टी उपजतच असते - तिची वेगळी जाणीव नेत्रांस असावी लागत नाही; किंवा पायांठायीं याचप्रकारे गती जशी स्वाभाविकच असते; अथवा दीपज्योतीठायी दीप्ती जशी स्वयमेवच नांदते; वा चंदनास सुवासिक द्रव्याचा बाहेरून लेप न लावताच ते जसे नैसर्गिकरीत्याच सुवासिक असते; तसे लौकिकात *नित्य* म्हणून ओळखले जाणारे कर्म त्या त्या मनुष्यास वेदाज्ञेनुसार स्वाभाविकच प्राप्त होते. अशा प्रकारे हे पार्था! मी तुला *नित्य आणि नैमित्तिक* अशा दोन्ही प्रकारच्या कर्मांचे स्वरूप स्पष्ट करून सांगितले आहे."

कर्मफलाचा त्याग

अगदी नित्य कर्मही झाले तरी त्याचेही आणि नैमित्तिक कर्माचेही फल हे ठेवलेलेच आहे. म्हणून श्रीकृष्ण पुढे सांगतातः

हेचि नित्यनैमित्तिक। अनुष्ठेय आवश्यक।
म्हणौनि म्हणो पाहती एक। वांझ ययातें।।१८-११९।।
परि भोजनीं जैसें होए। तृप्ति लाभे भूक जाए।
तैसें नित्यनैमित्तिकीं आहे। सर्वांगीं फल।।१२०।।
कीड आगिठां पडे। तऱ्हीं मलु तुटे वानो चढे।
या कर्मा तेयां सांगडें। फल जाणावें।।१२१।.
जैं प्रत्यवाय तंव गले। स्वाधिकार बहुवें उजळें।
तेथ हातोफलियां मिले। सद्गतीसि।।१२२।।

"हे नित्यनैमित्तिक कर्म शास्त्राज्ञेनुसार वर्णाश्रमधर्माप्रमाणे आचरावे लागत असल्याने, ते करण्याचे कोणतेच फल नाही; असे काही विद्वानांचे मत आहे. पण कर्तव्यकर्म म्हणून साधे भोजन जरी केले, तर भूक भागून वर तृप्तीची ढेकर पण जशी येते, तसेच खरे तर या नित्यनैमित्तिक कृत्यांस फळ आहे. हीणकस सोने जसे अग्नीत पडले की त्यातले कीडाळ जळून जाऊन शुद्ध सोने बावनकशी चकाकून उठते; तसेच नित्यनैमित्तिक कर्मांच्या शास्त्राज्ञेने घडलेल्या आचरणाचे आहे; त्यांनी अंगी दोष तिळमात्र उरत नाही; आपल्या शास्त्रनिष्ठेला उजाळा मिळतो; आणि त्या आधारे त्वरित सद्गती प्राप्त होते."

एवढेवरी ढिसाल। नित्यनैमित्तिकीं आहे फल।
परि तैं त्यजिजे मूल। नक्षत्रीं जैसें।।१८-१२३।।
लता पिके आघवीं। तंव चूत बांधे पालवी।
मग हात न लावित माधवी। सोडूनि घाली।।१२४।।
तैसीं नोलांडितां रेखा। चित्त दीजे नैमित्तिका।
पाठीं फलां कीजे अशेखा। वांताचें वानी।।१२५।।
येयां कर्मफलत्यागातें। त्यागू म्हणती पैं जाणितें।
एवं संन्यास त्याग तूंतें। परिसविले।।१२६।।

"इतके या कर्मांचे माहात्म्य जरी असले, तरी मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या बालकाचा, मग ते कितीही देखणे, गोजिरवाणे व अंगसामुद्रिक लक्षणांनी मंडित असले, तरी त्याग करावा; तशाच प्रकारे या नित्यनैमित्तिक कर्मांच्या उत्कृष्ट फलांचाही त्यागच करावा. वसंत ऋतूच्या अगमनाने लतिका बहरतात; आंब्यास धुंद वासाचा मोहोर फुटतो; पण तो ऋतुराज त्यांचा कोणत्याही प्रकारे उपभोग न घेताच, जसा आला तसाच निघून जातो. त्याचप्रमाणे आपले कर्तव्यकर्म, नित्यनैमित्तिके प्राप्त झाली असता, शास्त्रोक्त मर्यादेनुरूप सुव्यवस्थित पार पाडावे; पण त्याचे फल मात्र ओकलेल्या अन्नाप्रमाणे संपूर्णपणे त्यागून टाकावे. याच कर्मफळत्यागास सूज्ञ जन *त्याग* असे म्हणतात. हे अर्जुना! याप्रमाणे *त्याग* आणि *संन्यास* यांचा अर्थ तुला समजावून दिला आहे.

संन्यास व त्याग दोन्हींची आवश्यकता

अशा प्रकारे केलेल्या *त्याग* व *संन्यास* यांचे फल सांगतांना ज्ञानदेव म्हणतातः

हा संन्यासु जैं संभवे। तैं काम्य बाधू न पावे।
निषिद्ध तंव स्वभावें। निषेधें गेलें।।१८-१२७।।
आणि नित्यादिक जैं असे। तैं एणें फलत्यागें नासे।
शीर लोटिलियां जैसें। एर आंग।।१२८।।
मग सस्य फलपाकांत। तैसें निमालियां कर्मजात।
आत्मज्ञान गिंवसित। आपैसें ये।।१२९।।
ऐसिया निगुती दोनीं। त्याग संन्यास अनुष्ठानीं।
पडिलें गां आत्मज्ञानीं। बांधती पाटु।।१३०।।

"संन्यास केल्याने काम्य कर्मे व त्यांचे फळ यांचा उपद्रव नाहीसा होतो. निषिद्ध कर्मे करायचीच नसतात. त्यामुळे त्यांचेही फल मिळणार नाही. राहता राहिली नित्यनैमित्तिक कर्मे! मस्तक तोडून टाकले की बाकीच्या शरीरास मारण्याकरता अधिक काही करावे लागते का! तसेच नित्यादिक कर्मांच्या फलांचा त्याग केल्यावर त्यांच्यापासूनही संसारादी पीडा उद्भवत नाहीत. ज्याप्रमाणे पीक वाळून गेल्यावर हाती धान्य लागते; पीक हिरवेचार असतांना ते फल देत नाही; त्याप्रमाणे सर्व कर्मजात जेव्हा असे निमून जाते, तेव्हा आपैसे आत्मज्ञानरूपी उत्तम धान्य मुमुक्षू साधकाच्या आयते पदरी पडते. वस्तुतः *त्याग* आणि *संन्यास* यांची मी सांगितलेली हातवटी साधली की त्यांचे यथोचित अनुष्ठान होते आणि आत्मज्ञानाचे सिंहासन प्राप्त होते."

कर्म करणे पूर्णपणे टाकावे का

ना तऱ्हीं हे निगुते चुके। मग त्यागु कीजे हाततुकें।
तैं कंहीं न त्यजे अधिकें। गोवींचि पडे।।१८-१३१।।
जैं औषध व्याधी अनोलख। तें घेतलियां परते विख।
कां अन्न न मानितां भूक। न मारी कायी।।१३२।।
म्हणौनि त्याज्य जैं नोहें। तेथ त्यागातें न सुवावे।
त्याज्यालागीं नोहावें। लोभापर।।१३३।।
चुकलियां त्यागाचें वेझें। केला सर्वत्यागुही होय वोझें।
न देखती सर्वत्र जुंझे। वीतराग तैं।।१३४।।

"परंतु हे अवधान न राखता केवळ अनुमानधक्क्याने कशाचा तरी त्याग केला तर त्यापासून धड त्यागही घडत नाही; धड संन्यासही सिद्ध होत नाही आणि कर्मफलांचा गुंता अधिकच वाढतो. जे औषध व्याधीशी मेळ खात नाही, ते रोग्यावर उलटतेच की नाही! आणि भुकेचा विचार न करता खाल्लेले वाटेल ते अन्न पचनशक्तीस मारक ठरत नाही का! म्हणून त्याज्य जे नसते, त्याचा त्याग करू नये आणि जे त्याज्यच आहे, त्याचा लोभ करू नये. त्याग करण्याचे मर्म जाणून न घेता कसातरी त्याग केला तर सर्वत्यागसुद्धा संसाराचे ओझे शिरी देतो. म्हणून विरागी वृत्तीचे पुरुष त्याग आणि संन्यासाचे सर्वदा यथोचित पालन करतात."

कर्मत्यागाबाबतची मतमतांतरे

त्यागाविषयी पंडितांचे मत सांगतांना पुढे गोपालकृष्ण म्हणतातः

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे।।१८-३।।

"कर्म दोषवत आहे, म्हणून पूर्णतया त्यागावे, असे काही विद्वान म्हणतात; तर दुसरे काही म्हणतात की यज्ञ, दान तपादी कर्मे कधीही त्यागू नयेत."

ज्यांचा मनोवृत्तींवर ताबा नसतो, ते मात्र कर्माचीच निंदा करून ते त्याज्य ठरवितात. ज्ञानदेव सांगतातः

एकां फलाभिलाष न ठाके। तैं कर्मातैं म्हणती बांधकें।
जैसें आपण नग्न भांडकें। जगातैं म्हणती।।१८-१३५।।
कां जिह्वालंपट रोगिया। अन्नें दूषी धनंजया।
आंगां न रुसे कुष्टिया। मासियां कोपे।।१३६।।
तैसें फलकाम दुर्बल। म्हणती कर्मचि कीडाल।
मग निर्णो देती केवल। त्यजावे ऐसा।।१३७।।

"अशा काही लोकांना फलाभिलाषा सोडवत नाही. म्हणून ते सगळेच कर्म बंधनकारक आहे, असे म्हणतात. एखादा मनुष्य नागडाच सर्व जगभर वावरू लागला, तर त्याला हसणाऱ्या लोकांना पाहून जसा तो त्यांनाच भंडखोर म्हणतो; किंवा जिह्वालौल्य असणारा रोगी जसा पथ्यकर अन्नासही दोष देतो; अथवा कुष्टरोगाने अंग सडलेला मनुष्य अंगावर बसलेल्या माशांवरच जसा कावतो; तसेच ज्यांना फलेच्छेचा त्याग करवत नाही, असे लोक कर्मच मलीन आहे, असे ठरवतात व अखिल कर्मजातच त्यागावे असा निर्णय करण्यास प्रवृत्त होतात."

एक म्हणती यागादिक। करावेचि आवश्यक।
जैं यांवाचूनि शोधक। आन नाहीं।।१८-१३८।।
मनशुद्धीचां मार्गीं। जैं विजयी व्हावे वेगीं।
तैं कर्म सबलालागीं। आलसु न कीजे।।१३९।।

"आता दुसरे काही विद्वान म्हणतात की सर्व कर्म काही त्यागू नये; तर यज्ञयागादी कर्मे अवश्य करावीत, कारण यज्ञ-दान-तपादी जी कर्मे आहेत, ती सर्व चित्तशुद्धीसाठी आवश्यक आहेत. मनास लवकरात लवकर ज्यांना जिंकावयाचे आहे, त्यांनी अशा समर्थ उपायास म्हणजे ही कर्मे करण्यास चुकू नये."

भांगार आथी शोधावे। तऱ्हीं आगी जेवीं नुबगावें।
कां आरिसयालागिं सांचावें। अधिक रज।।१८-१४०।।
ना लुगडी चोखें होआवीं। ऐसें आथी जऱ्हीं जीवीं।
तऱ्हीं संवदणी मानावी। मलिन जैसीं।।१४१।।
तैसीं कर्मे क्लेशाकारें। म्हणौनि न न्यावी अव्हेरें।
कां अन्न लाभे अरुवारें। रांधि तेयां उणें।।१४२।।
इही इहीं गां शब्दीं। एक कर्मीं बांधविती बुद्धी।..।।१४३।।

"इतर काही लोकांचे म्हणणे असे आहे की कर्मे क्लेशाकार आहेत; त्यापासून संसारबंधन होते; म्हणून कर्मे त्यागावी हे योग्य नाही. सोने चोख शुद्ध करायचे असेल तर त्याकरता भट्टीच्या आगीला उबगून चालणार नाही; आरसा स्वच्छ करण्यासाठी त्यावर रांगोळीची पूड घासावीच लागते; वस्त्रे स्वच्छ करावयाची तर परटाची डोण कळकट मळकट म्हणून चालणार नाही. ज्याप्रमाणे अन्नास अग्नीची आच देऊन शिजवल्याशिवाय ते रुचकर लागत नाही; त्याचप्रमाणे कर्मे कितीही दुर्मद असली, तरी चित्तशुद्धी व श्रेयसप्राप्तीसाठी ती करायलाच हवीत. अशा प्रकारे प्रतिपादन करत ते कर्मे करण्याची आवश्यकता सिद्ध करतात."

...। ऐसा त्यागु विसंवादी। पडौनि ठेला।।१८-१४३।।

"या विविध मतमतांतरांच्या भोवऱ्यात त्यागाची नाव अशी भरकटत जात आहे."

श्रीगोपालांचे मत::::

कर्मत्यागाविषयी श्रीगोपालकृष्णांचे मत

परि आतां विसंवादु तो फिटे। त्यागाचा निश्चयो भेटे।
तैसें बोलों गोमटें। अवधान देईं।।१८-१४४।।

"हे सगळे वाद मिटावेत आणि त्यागाबाबत सुनिश्चित विचार स्पष्ट होईल, असा सरळसरळ निर्णय मी तुला आता सांगणार आहे. तरी तू तो अवधान देऊन श्रवण कर!"

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः।।१८-४।।

"हे भारतोत्तमा! माझा हा त्यागासंबंधी निर्णय तू ऐक. हे पुरुषव्याघ्रा! त्याग हा तीन प्रकारचा सांगितला आहे."

ज्ञानदेव म्हणतात:

तऱ्हीं त्यागु एथ पांडवा। त्रिविधु पैं जाणावा।
तेयां त्रिविधाही बरवा। विभागु सांगो।।१८-१४५।.
त्यागाचे तिन्ही प्रकार। कीजती जऱ्हीं गोचर।
तऱ्हीं तूं इत्यर्थाचें सार। इतुलें जाण।।१४६।।
मज सर्वज्ञाचिये बुद्धी। जैं आलोट माने त्रिशुद्धी।
तैं निश्चयतत्त्व आधीं। अवधारीं पां।।१४७।।
तऱ्हीं आपुलिये सोडवणें। जो मुमुक्षु जागों म्हणें।
तेयां सर्वस्वें करणें। हेचि एक।।१४८।।

"हे अर्जुना! त्याग हा तीन प्रकारचा आहे आणि त्या त्रिविध प्रकारांचे स्वरूप मी तुला सांगीन. ते स्पष्ट करण्यापूर्वी त्यागाचे सारसर्वस्व जे मज सर्वज्ञाच्या बुद्धीसही खरोखर पटते, ते तू लक्षात घे. कारण ज्या मुमुक्षूस संसारबंधनापासून त्वरित मुक्त व्हावयाचे आहे व जो असा सजग आहे त्याने सर्वस्व पणास लावून, हेच मी सांगणार आहे ते तत्त्व अनुसरावयाचे आहे. यापरते दुसरे त्याने काही करावयाची आवश्यकता नाही."

गोपालकृष्ण याविषयीचा आपला तत्त्वनिर्णय करतांना म्हणतातः

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत्।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्।.१८-५।।
एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम्।।१८-६।।

"पार्था! यज्ञ, दान, तप ही कर्मे त्याज्य नाहीत. ती केलीच पाहिजेत. कारण यज्ञ, दान व तप ही कर्मे बुद्धिवानांसाठी चित्तशुद्धिकारक आहेत. ही कर्मे मात्र आसक्ती व फलेच्छा यांचा त्याग करून अवश्य केली पाहिजेत, असे माझे निश्चित उत्तम मत आहे."

ज्ञानदेवांच्या शब्दात श्रीगोपालांचे उत्तम मत

ज्ञानदेव भगवंतांचे हे उत्तमोत्तम मत ओवीरूपात ग्रथित करतांना म्हणतातः

जियें यज्ञदानतपादिकें। इयें कर्मे जियें आवश्यकें।
तियें न सांडावी पांथिकें। पाऊलें जैसीं।।१८-१४९।।
हारतलें न देखिजे। तंव मागु न सांडिजे।
कां न धातां न लोटिजे। भाणें जेवीं।।१५०।।
नाव थडी न पवतां। न सांडिजे केली फलतां।
कां ठेविलें न दिसतां। दीपु जैसा।।१५१।।
तैसीं आत्मज्ञानविखीं। जंव निश्चिती नाहीं निकीं।
तंव नोहावें यागादिकीं। उदासीना।।१५२।।
पैं स्वाधिकारानुरुपें। तियें दानें याग तपें।
अनुष्टावींचि आक्षेपें। अधिकेंवरी।।१५३।।

"यज्ञदानतपादी कर्मे अति आवश्यक आहेत. चालणाऱ्या वाटसरूने ज्याप्रमाणे पावले टाकण्याचे थांबवू नये, त्याचप्रमाणे मुमुक्षूंनी ही कर्मे सोडून देऊ नयेत. हरपलेली वस्तू जोपावेतो मिळत नाही, तोपावेतो तिचा माग टाकू नये; अथवा तृप्ती झाल्याशिवाय अन्नपात्र बाजूला सारू नये; किंवा पैलथडीला पोहोचल्याशिवाय नावेचा त्याग करू नये; अथवा केळीची फळे मिळाल्याविना तिला तोडू नये; एवं च काय! अंधारात शोधावयाची वस्तू पाहण्यासाठी उजळलेला दीप जसा ती वस्तू दिसल्यावांचून बाजूस ठेवू नये; त्याप्रमाणे जोपावेतो मुमुक्षू साधकांस आत्मज्ञान खात्रीपूर्वक झालेले नाही, तोपावेतो त्यांनी यज्ञयागादी कर्मे करण्याचे सोडून देऊ नये. उलट ही दान, याग व तपे आपल्या अधिकारानुरूप अत्यंत दक्षतेने आचरावीत."

जैं चालणें वेगावत जाये। तो वेगु बैसावयाचि होये।
तैसा कर्मातिशयो आहे। नैष्कर्म्यालागीं।।१८-१५४।।
अधिकें जंव जंव ओखदी। सेवेचि मांडी बांधीं।
तंव तंव मुकिजे व्याधी। तेयाचिये।।१५५।।
तैसा कर्मीं हातोपातीं। जैं कीजती येथानिगुती।
तैं रजतमें झडती। झाडा देऊनि।।१५६।।

"अधिकाधिक द्रुत गतीने चालू लागले की जसे विश्रामस्थान लवकर येऊन चालणे लवकर विराम पावते; त्याप्रमाणे या पावन कर्मांचा विशेष आदर केल्याने मुमुक्षू साधकांस लवकरच *नैष्कर्म्यावस्था* प्राप्त होते. औषध जसजसे नियमपूर्वक वेळेवारी हयगय न करता घेत जावे, तसतशी त्या औषधीच्या सेवनाने व्याधी नाहीशी होत जाते; त्याचप्रमाणे यथोक्त विधिवत आचरलेली ही यज्ञदानादी कर्मे जसजशी केली जातात, तसतसे रज व तम गुणांचे मळ साफ नाहीसे होतात."

कां पाठोवाटीं पुटें। भांगारा खारु देणें घटे।
तैं कीड झडकरी तुटे। निर्व्याजु होये।।१८-१५७।।
तैसें निष्ठा केलें कर्म। झाडी करूनि रजतम।
सत्त्वशुद्धीचे धाम। डोलां दावी।।१५८।।
म्हणौनियां धनंजया। सत्त्वशुद्धी गिवंसतिया।
तीर्थाचिया सावाया। आलीं कर्मे।।१५९।।
तीर्थें बाह्यमलु क्षालें। कर्मे अभ्यंतर उजले।
एवं तीर्थें जाण निर्मलें। सत्कर्मेचि।।१६०।।

"हीणकस सोन्याला भट्टीत शुद्ध करतांना क्षाराची पुटे जशी अधिकाधिक देत जावीत, तसे ते कीड लवकर झडून जाऊन चोख होते. त्याप्रमाणे अत्यंत निष्ठापूर्वक आचरलेले कर्म रजतमरूपी हीण भागास नाहीसे करून लवकर सत्त्वशुद्धीठायी नेऊन सोडते. हे अर्जुना! म्हणूनच ही कर्मे अंतःकरणसुद्धीसाठी

तीर्थांच्या योग्यतेची आहेत. किंबहुना ती तीर्थांहूनही श्रेष्ठ आहेत. कारण तीर्थयोगे बाह्यमळाचेच क्षालन होते; तर या कर्मरूपी तीर्थांनी अभ्यंतर उजळते."

तृषार्ता मरुदेशीं। झलें अमृतें वोललीं जैसीं।
कीं अंधालागीं डोल्यांसीं। सूर्यु आला।।१८-१६१।।
बुडतया नयेचि धंविन्नली। पडतया पृथ्वीचि कलवलली।
निमतया मृत्यूने दिधली। आयुष्यवृद्धी।।१६२।।
तैसें कर्में कर्मबद्धता। मुमुक्षु सोडविले पांडुसुता।..।।१६३।।

"निर्जल मरुप्रदेशात तहानेने जीव व्याकुळ झालेल्यावर गरमागरम झळीतून अमृताची वृष्टी व्हावी; किंवा जन्मांधाच्या डोळ्यात प्रत्यक्ष सूर्याचेच तेज प्रकटावे; नदीत बुडणाऱ्याच्या रक्षणासाठी नदीनेच धावून जावे; किंवा ठेच लागून पडणाऱ्यासाठी पृथ्वीमातेचा जीव कळवळावा व तिने त्याला सावरावे; अथवा मृत्युपंथी लागलेल्या मनुष्यास मृत्यूनेच आयुष्यवृद्धी द्यावी; त्याचप्रमाणे या अशा बंधक म्हणून समजल्या जाणाऱ्या कर्मांनीच उदार होऊन मुमुक्षूंस हे असे आपल्या बंधनापासून सोडवणे आहे!"

....। जैसा रसरीती मरतां। राखिला विखें।।१८-१६३।।
तैसीं एक हातवटियां। कर्में केली धनंजया।
बंधकेंचि सोडवावया। मुख्यें होती।।१६४।।

"हे अर्जुना! मारक असणारे विषच जर रसायनाच्या रूपाने घेतले, तर ते मरणाऱ्याचे प्राणही वाचविते. त्याचप्रमाणे ही बंधन करणारी कर्मेच जर एका हातवटीने केली, तर मोक्षाची मुख्य साधने होतात."

कर्मे करण्याची युक्ती

आतां तैंचि हातवटी। तुज सांगो गोमटी।
जेयां कर्मासि किरीटी। कर्मचि रुसे।।१८-१६५।।

"हे किरीटी! मी तुला आता तीच कर्मे करण्याची हातोटी – ती कर्मे करण्याचे कौशल्य सांगणार आहे. या उत्कृष्ट युक्तीने कर्मच कर्ममळास नाहीसे करते."

तऱ्हीं महायाग प्रमुखें। कर्में निफजतांही अचुकें।
कर्तेपणाचें न ठाकें। फुंजणें आंगीं।।१८-१६६।।
जो मोलें तीर्था जाये। तेयां मी यात्रा करितु आहे।
ऐसी श्लाघाचि नोहे। तोखु जेवीं।।१६७।।
कां मुद्रा समर्थाचियां। जो एकटु झोंबे राया।
तो मी जिणता ऐसिया। गर्वा न ये।।१६८।।
जो कांसे लागूनि तरे। तेयां पोहती उर्मी नुरे।
पुरोहितु नाविष्करें। दातेपणें।।१६८।।
तैसें कर्तृत्व अहंकारें। नेघोनि यथा अंवसरें।
कृत्यजाताची निरहरें। सारीजती।।१६९।।

"प्रमुखप्रमुख अश्वमेधादिक महायज्ञ जरी हातून उत्कृष्टरीत्या शास्त्रशुद्ध रीतीने बिनचूक असे घडले, तरी कर्तेपणाचा अहंकार अंगी मुळीसुद्धा नसावा. जो वेतन देऊन सेवक म्हणून मालकाबरोबर तीर्थयात्रेला जातो, त्याला मी तीर्थयात्रा करतो आहे, असा अभिमान व त्यापासून संतोष किंवा आनंद जसा नसतो; किंवा राजाच्या आज्ञेने जेव्हा एखादा वीर त्याच्यापाशी सरावाचे शस्त्रांचे हात करतो किंवा झुंज देतो, तेव्हा त्या वीराचा त्या वेळी जरी विजय झाला व राजा पराजित झाला, तरी आपण राजाला जिंकले असा गर्व त्याच्या मनात उपजत नाही; अथवा जो दुसऱ्याच्या कासेला लागून तरून जातो, त्याला जसा मी पोहणारा असा अभिमान उत्पन्न होत नाही; किंवा यजमानाच्या वतीने दान देणाऱ्या पुरोहितास जसा आपण कोणी मोठे दाते आहोत, असा अहंकार उत्पन्न होत नाही; त्याचप्रमाणे मुमुक्षूंनी कर्तृत्वाहंकार सर्वथैव त्यागून, अवसरोचित अशी, कर्मरूपी मोहरी साधकजीवनाच्या बुद्धिबळाच्या पटावर पुढे सरकवत न्यावीत. त्यायोगे संसाराच्या पार्श्वभूमीवर रंगलेला हा अनंत घडीचा मोक्षरूपी बुद्धिबळाचा खेळ त्याला लवकर जिंकता येईल."

आणि केलां कर्मीं पांडवा। जो आथी फलाचा यावा।
तेयां मोहरा हो नेदावा। मनोरथु।।१८-१७०।।
आधींचि फलाची आस तुटिया। कर्मे आरंभावी धनंजया।
परावे बाल धाया। पाहिजे जैसें।।१७२।।
पिंपरुवाचियां आशा। न शिंपिजे पिंपलु जैसा।
तैसियां फलनिराशा। कीजती कर्में।।१७३।।

"तसेच कर्म केले की त्याच्यामुळे जे फळ मिळणार असते, त्याच्याकडे मनोरथांस फिरकूही देऊ नये. दुसऱ्याचे मूल पाजण्यासाठी घेणारी दाई जशी त्या मुलाविषयी निरपेक्ष असते, त्याप्रमाणे आरंभापासूनच फलांची आसक्ती सोडून देऊन कर्मे करावीत. हे धनंजया! पिंपळास पिंपळफळाच्या लोभाने काही कोणी पाणी शिंपडत नाहीत. त्याप्रमाणे फळाची आशा सोडून कर्मे आदरावीत."

सांडूनि दुधाची टकली। गोवारी गांवधनें वेंटालीं।
किंबहुना कर्मफलीं। तैसें कीजे।।१८-१७४।।
ऐसीं हे हातवटी। देऊनि जैं क्रिया उठी।
आपुलियां आपण गांठीं। लाहेचि तो।।१७५।।
म्हणौनि फलु लागु। सांडौनि देहसंगु।
कर्में करावी हा चांगु। निरोपु माझा।।१७६।।
जो जीव बंधे शिणला। सुटकें जाचें आपलां।
तेणें पुढतपुढुती ययां बोलां। आन न कीजे।।१७७।।

"गुराखी गुरे राखतो तो, ती काही त्याला दूध देतील या आशेने नाही; तर केवळ ते आपले कामच आहे म्हणून! त्याप्रमाणेच कर्मे करतांनासुद्धा मुमुक्षूने फलांची आस ठेवू नये. अशा कौशल्याने जेव्हा कर्मे आचरली जातात, तेव्हा आपणांस आपल्या आत्मस्वरूपाठायी जाऊन मिळता येते. म्हणून मुमुक्षू साधकांनी

फलासक्ती व अहंकार यांचा त्याग करून, आपल्याकडे कर्तृत्व न घेता, सकळ कर्मे, जी करणीय आहेत, ती ती करत जावीत, अशी मज सर्वज्ञाची आज्ञा आहे. प्रपंचाच्या बंधनात अडकल्यामुळे जो जीव कंटाळला आहे आणि आपली त्यापासून सुटका करून घेण्यासाठी प्रयत्नशील आहे, त्याने हे सांगितल्यानंतर तरी माझ्या या कर्मविषयक आज्ञेचे उल्लंघन करू नये."

कर्मत्यागाचा सारांश

यांप्रमाणे *संन्यास, त्याग, कर्मे करण्याची हातोटी*, या सर्व विषयांबाबत आपले अंतिम मत श्रीगोपालकृष्णांनी प्रकट केले आहे. कर्मयोगसोपानाच्या पायरीपायरीवरून त्यांनी आखून दिलेल्या लक्ष्मणरेषेवरून साधकांनी आपला प्रवास करत करत साधकांचे सिद्ध व्हावयाचे आहे. *संन्यास व त्याग* यांचा जो अभूतपूर्व वादंग जाणत्या मंडळींनी शतकानुशतके मांडला आहे, त्याचे असे सुफळ निराकरण ज्ञानदेवांच्या वाणीतून अवतरतांना आपल्याला येथे दिसते. *नित्य कर्मे, नैमित्तिक कर्मे, काम्य कर्मे, निषिद्ध कर्मे आणि यज्ञदानतपादी कर्मे* यांच्या आचरणाविषयी असे सुस्पष्ट नियम जे श्रीगोपालांनी घालून दिले आहेत, त्यांची उजळणी करून पुढील कर्मविषयक भाग पाहू:

नित्य व नैमित्तिक कर्मे स्वाभाविक शास्त्राज्ञेनुसार वेदोक्त आहेत. ती त्यागता येत नाहीत. काम्य कर्मे फलास देणारी असतात. *त्याग व संन्यास* या दोन्ही शब्दांनी त्यागच अभिप्रेत असला, तरी त्यात थोडा फरक आहे. *कर्म अजिबात करण्याचे सोडून देणे म्हणजे संन्यास आणि कर्म केले तरी त्याच्या फलाचा त्याग करणे म्हणजे त्याग!* **संन्यास म्हणजे कर्मांचा मुळातूनच त्याग आणि त्याग म्हणजे कर्मफलत्याग असा त्यांच्यात फरक आहे.**

काम्य कर्मांचा त्याग करावा. परंतु यज्ञ-दान-तपादी जी पावन करणारी कर्मे आहेत, ती फलाशेचा त्याग करून यथायोग्य रीतीने आचरावीत. त्यायोगे मुमुक्षूची मोक्षपथावरील प्रगती रजोतमोमल लवकर झडून गेल्याने जलद गतीने होते. नित्यनैमित्तिक कर्मेसुद्धा आपापले उत्कृष्ट फळ देतातच. म्हणून त्यांच्याही फलाचा त्याग केला पाहिजे. निषिद्ध कर्मे वेदाज्ञेविरुद्ध असून त्यांच्यायोगे कर्ममळ रजतमरूपाने साधकांस अधिकच बंधनात पाडतो. म्हणून आपले श्रेयस लवकर प्राप्त करण्यासाठी साधकांनी अशा निषिद्ध कर्मांकडे चुकूनही वळू नये.

कर्मे जरी फल देणारी व बंधक असली, तरी ती तशी ठरू नयेत म्हणून त्यांना करण्याची एक विशिष्ट हातवटी किंवा कौशल्य आहे. *कर्तृत्वमदरहित, मी कोणी कर्ता आहे असा अभिमान न बाळगता, देहाभिमान व आसक्ती सोडून अहंकाररहित चित्ताने कर्मे आरंभावीत. ती फलेच्छारहित होऊन करावीत. त्यांच्या फलाचा, ते कितीही उत्कृष्ट असले तरी, त्याग करावा.* हीच श्रीकृष्णपरमात्म्याची अखिल साधकवर्गासाठी प्रमाण असणारी आज्ञा समजून त्याप्रमाणे आपले आचरण ठेवावे. असो.

अविहित त्यागाचे स्वरूप::::

हा विषय आता सत्त्व-रज-तमोगुणांचे कार्य व त्यानुसार कर्मांचे बदलणारे स्वरूप यांकडे वळत आहे. तरी गीतागोविंद त्याबाबत काय सांगतात, ते पाहू याः

तामस त्याग

नियतस्य तु सन्न्यासः कर्मणो नोपपद्यते।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः।।१८-७।।

"नियत वा विहित कर्मांचा संन्यास करणे वा त्याग करणे उचित नाही. मोह म्हणजे अज्ञानवश होऊन अशा कर्मांचा परित्याग तामस म्हणून ख्यात आहे."

अज्ञान्यांसाठी नित्य कर्मे चित्तशुद्धीचे उपाय म्हणून उपयुक्त असतात. विपरीत ज्ञानाने त्यांचा त्याग करणे हा मोहपूर्वक केलेला त्याग असून *तामस* म्हटला जातो. याबाबत ज्ञानदेव म्हणतातः

ना अंधाराचेनि रोखें। जैसीं डोळां रोविजती नखें।
तैसा कर्मद्वेषें अशेखें। कर्मेंचि सांडी।।१८-१७८।।
तेयाचें जैं कर्म सांडणें। तैं तामस पैं मी म्हणें।
शिसाराचां रागीं लावणें। शिसचि जैसें।।१७९।।

"अंधारात काहीच दिसत नाही म्हणून चिडलेल्या माणसाने दिवा लावून पाहण्याऐवजी,संतापाने आपल्याच डोळ्यात आपलीच नखे खुपसून त्यांना शिक्षा करावी; तसा अखिल कर्म बंधक आहे, असा द्वेष चित्तात उपजलेली मनुष्ये कर्मांचा सर्वथैव त्याग करतात. कपाळशूळ उठला तर त्यावर औषधोपचार करण्याऐवजी मस्तकच तोडून टाकण्यासारखा हा त्यांचा कर्मद्वेषाचा आत्मघातकी प्रकार होय. अशा त्यांच्या त्या कर्मत्यागास मी *तामस त्याग* असे म्हणतो."

हां मार्गु दुवाडु होये। तऱ्हीं निस्तरितील पायें।
कीं तैंचि खांडणें आहे। मार्गापराधें।।१८-१८०।।
भुकेलियापुढें अन्न। हो कां भलतैसें उन्ह।
तऱ्हीं बुद्धि न घेतां लंघन। भाणें पापरां हालेयां।।१८१।।
तैसा कर्माचा बाधु कर्में। निस्तरिजे करतेनि वर्में।
हे तामस नेणें भ्रमें। माजविला।।१८२।।
कीं स्वभावें आलें विभागा। तैं कर्मचि वोसंडीं पैं गां।
परि झणें आतलां त्यागा। तामसा तेयां।।१८३।।

"दुर्गम पथावरून वाटचाल करतांना वाटचालीस वैतागून जाऊन, ज्या पायांनी ती वाट कधी ना कधीतरी पार करण्याची शक्यता असते, ते पायच छाटून टाकावेत का! भुकेने प्राण कंठी आलेल्या माणसापुढे कढकढीत गरमागरम चटके देणारे अन्न वाढून आले, तर तत्काळ भूक भागवता न येण्याने संतापून जाऊन त्याने ते लाथेने उडवून दिल्यास उपासमार टळेल का! कर्मे जरी दोषयुक्त असली तरी ती लाथाडून देणे योग्य नाही. कर्मे करून

त्यांचा दोष लागू नये याची युक्ती न जाणणारे ते मोहग्रस्त तामस पुरुष आपले विहित कर्मच टाकून देण्याची घोर चूक करतात. परंतु हे अर्जुना! तू त्या तसल्या तामस त्यागाचा स्वत:ला स्पर्शसुद्धा होऊ देऊ नकोस."

राजस त्याग

आणि राजसिक त्याग कसा असतो पहाः

दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत्।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत्।।१८-८।।

"जी कर्मे दु:खरूप आहेत असे समजून शारीरिक त्रासाच्या भीतीने त्यागण्यात येतात; या अशा त्यागास राजस मानावे. त्यागाने जे मोक्षफल मिळते, ते अशा प्रकारच्या त्यागाने मिळत नाही."

जी कर्मे करणीय असूनही त्यांच्यापासून होणाऱ्या शारीरिक वा मानसिक त्रासाचा व दु:खाचा विचार करून ती करणे टाळले जाते, त्या तशा त्यागास निष्फल म्हणजे मोक्षफल देण्याचे सामर्थ्य नसणारा *राजस त्याग* असे म्हटले जाते.

ज्ञानदेव सांगतातः

अथवा स्वाधिकारु बुझे। आपुलें विहितही सुझे।
परि करतया उभजे। निबरपण।।१८-१८४।।
जैं कर्मारंभाची कड। नावेक होय दुवाड।
वाहतिये वेळें जड। शिदोरी जैसीं।।१८५।।
निंब जिभे कडुवटु। हिरडा पहिले तुरटु।
तैसा कर्मा ऐल शेवटु। खणुवाला होय।।१८६।।

"वर्णाश्रमधर्मानुसार आपल्या वाट्याला आलेली कर्मे कोणती हे उमजूनसुद्धा ती विहित कर्मे करतांना होणाऱ्या त्रासाला काही जण उबगून जातात. शिदोरी बरोबर नेतांना जड लागते. पण ती खातांना मात्र ती वाहून आणल्याचे श्रम न जाणवता समाधान होते. किंवा निंब जरी जिभेला कडू असला तरी आरोग्यदृष्ट्या हितकर असतो; अथवा हिरडा आरंभी तुरट लागला तरी नंतर जसा स्वादिष्ट लागतो व पाचकही असतो; त्याचप्रमाणे विहित कर्मे आरंभतांना प्रथम कष्टदायक, कंटाळवाणे वाटले, तरी तेच उत्तमरीत्या व कौशल्यपूर्वक केले तर अंतिम फल मोक्षासारखे सुरेख मिळते."

गाई दुवाड शिंग। शेवंतिये अडव आंग।
भोजनसुख महाग। रांधितां ठायीं।।१८-१८७।।
तैसें पुढतपुढती कर्म। आरंभीच अति विषम।
म्हणौनि तो ते श्रम। करितां मानीं।।१८८।।

"दुभत्या गाईची शिंगे ती मारकुटी असल्यास सांभाळावीच लागतात. ही कर्मे पण तशीच आहेत; कारण बंधक असली, कष्टप्रद असली; तरी मोक्षदायकही तीच आहेत. शेवंतीची फुले असतात सुवासिक खरी, पण तिचे झुडुप मात्र बेडौल असते. विहित कर्मसुमने विश्वेश्वरास वाहावयाची असतात; पण तो कर्ममांडव असा जरा बेढब वाटतो खरा! अन्न शिजवण्याचे - स्वयंपाक करण्याचे कष्ट वाटले, तरी रुचकर अन्नाचा स्वाद घेतांना ते विसरले जातात. कष्ट आहेत म्हणून स्वयंपाक न करून चालेल का! असे असले तरी काही लोक प्रारंभी खूप कष्ट पडतात, म्हणून विहित कर्मे करणे त्रासदायक आहे, असे समजतात."

एऱ्हवीं विहितत्वें मांडीं। परि घालितां असुरवाडी।
येथ पोलला ऐसा सांडीं। आदरिलेंही।।१८-१८९।।
म्हणे वस्तु देहासारिखी। आलीं बहुवें भाग्यविशेखीं।
मां जाचूं कां कर्मादिकीं। पापियां जैसा।।१९०।।

"एरवी ते विहित कर्मे जाणून घेऊन त्यांचा प्रारंभ तर करतात. पण त्या वेळी कष्ट पडू लागले की विस्तवाने हात पोळल्यावर तो जसा टाकून द्यावा, त्याप्रमाणे करू घातलेल्या विहित कर्मांचाही त्याग करतात. त्यांना वाटते की देहासारखी उत्तम उपभोग घेता येणारी वस्तू आपल्या हाती आहे, हे मोठे भाग्यच आहे. ते लाथाडून विहित कर्मांच्या कष्टप्रद जंजाळात एखाद्या पापिष्टाप्रमाणे मी का गुंतावे, असे त्यांना वाटते."

केला कर्मीं जैं देयावें। तैं झणें मज होआवें।
आजि भोगूं ना कां बरवें। हातींचें भोग।।१८-१९१।।
ऐसा शरीराचियां क्लेशा-। भेणें कर्मे वीरेशा।
सांडी तो परियेसा। राजसु त्यागु।।१९२।।

"विहित कर्म करून त्याचे जे काही फल मिळणार असेल, ते आजच - आताच थोडे मिळणार आहे! मला तर आताच ते फल हवे! मग हाती असलेले उत्कृष्ट भोग भोगण्याची सुवर्णसंधी दवडून मी त्या कर्मादिक जंजाळामागे का लागावे! असा क्षणैक सुखाचा विचार करून आणि शारीरकष्टांच्या भयाने आपले विहित कर्म सोडून देणे - त्यास *राजस त्याग* असे म्हणतात."

एऱ्हवीं तेथेंही कर्म पडे। परि त्यागफल न जोडे।
जैसें उतले आगी पडे। तैं होमा न लगे।।१८-१९३।।
कां बुडौनि प्राण गेलें। तैं अर्धोदकीं निमालें।
हे म्हणो नये जाहलें। दुर्मरणचि।।१९४।।
तैसें देहाचेनि लोभें। जेणें कर्मा पाणी सुभे।
नेणें सांच न लभे। त्यागाचें फल।।१९५।।

"तसे पाहिले तर राजस त्यागातही कर्मत्याग होतो. पण त्या त्यागास मोक्षफळ मिळत नाही.ऊतून जाऊन दूध अग्निमुखी पडले, तरी ती होमात दिलेली आहुती होऊ शकत नाही; किंवा पाण्यात बुडून मृत्यू आलेल्या माणसाने पुण्योदकात समाधी घेतली, असे जसे होत नाही; त्यास खरे तर वाईट प्रकारचे मरण असेच म्हटले जाते; त्याचप्रमाणे देहादिकांच्या सुखलोभाने ज्याने कष्टप्रद वाटणाऱ्या कर्मांस तिलांजली दिली, त्याला त्या अशा कर्मत्यागाने मोक्षरूप फल ते कसे मिळणार!"

कर्माचे स्वरूप

किंबहुना आपुलें। जैं ज्ञान होय उदया आलें।
तैं नक्षत्रांतैं पाहलें। गिली जैसें।।१८-१९६।।
तैशा सकारण क्रिया। हारपति धनंजया।
तो कर्मत्यागु ये जेया। मोक्षफलासी।।१९७।।
तैं मोक्षफल अज्ञाना। त्यागिया नाही अर्जुना।
म्हणौनि तो त्यागू न माना। राजसु तो।।१९८।।

"सूर्योदयी नक्षत्रे जशी हरपतात, त्याप्रमाणे ज्ञानोदय झाल्यावर सर्व कर्मजात त्याच्या प्रयोजनासह लुप्त होते. कर्मगतीस असा अंतिम विश्राम मोक्षफलप्राप्तीवेळीच दिला जातो. मी जो कर्मत्याग तुला सांगितला त्याचेही अंतिम फल हेच आहे. परंतु राजस त्यागास असे गोजिरे फळ मिळत नाही; कारण अज्ञानी त्याग्याने हा असा त्याग सारासारविचार न करताच शारीरकष्टांना भिऊन जाऊन केलेला असतो. म्हणून अशा त्यागास खरे तर त्याग असे नाव पण देणे अयोग्य आहे. असो."

त्यागाचे मर्म

तऱ्हीं कोणें पां एथ त्यागें। तैं मोक्षफल घर रिघे।
हेंही आईक प्रसंगें। बोलिजेल।।१८-१९९।।

"आता खऱ्या त्यागाची लक्षणे ऐक, ज्यायोगे मोक्षफल आयतेच हाती येते."

खऱ्या त्यागाबद्दल श्रीगोपाल म्हणतातः

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः।।१८-९।।

"हे अर्जुना! कर्तव्य समजूनच नियत केलेले कर्म आसक्तिरहित होऊन फलाचा त्याग करून केले जाते, तेव्हा घडणारा त्याग सात्त्विक मानला गेला आहे."

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते।
त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः।।१८-१०।।

"जो मनुष्य अशुभ कर्मांचा द्वेष करत नाही व शुभ कर्मांठायी आसक्त होत नाही; तो सत्त्वशील, मेधावी व संशयरहित त्यागी म्हणावयाचा."

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते।।१८-११।।

"कारण देहधारी मनुष्यांस सर्व कर्मांचा पूर्णपणे त्याग करणे शक्य नाही. म्हणून जो कर्मफलत्याग करतो, त्यासच त्यागी असे म्हटले आहे."

या तीन श्लोकांचा भावार्थ पाहिल्यावर त्यांबाबत आचार्यप्रभृती, तसेच स्व.लो. टिळक यांची भिन्नभिन्न मते आहेत, या मुद्द्याची केवळ नोंद घेऊन पुढे जाऊ या.

कर्तृत्वमद व फलास्वादासक्ती यांचा त्याग

या श्लोकांवरच्या ज्ञानदेवांच्या ओव्या काय सांगतात, ते आपण पाहू याः

तऱ्हीं स्वाधिकाराचेनि नांवें। जैं वांटिया आलें स्वभावें।
तैं आचरे विधिगौरवें। शृंगारौनि।।१८-२००।।
परि हे मी करितु असे। ऐसा आठवु त्यजी मानसें।
तैसेंचि पाणी दे आशे। फलाचिये।।२०१।.
पैं अवज्ञा आणि कामना। मातेचां ठाईं अर्जुना।
केलियां दोनीं पतना। हेतु होती।।२०२।.
तऱ्हीं दोनीं ये त्यजावी। मग माताचि तैं भजावी।
वांचूनि मुखालगीं वालावी। गायचि सगलीं।।२०३।।

"आपापल्या वर्णश्रमधर्मास अनुसरून आपल्या वाट्याला जे कर्म येते, ते विधिविधानशुद्ध शास्त्रोक्तरीत्या अलंकृत करून आचरावे व त्याचा सन्मान ठेवावा. परंतु ते कर्म करतांना कर्तृत्वाहंकार व फलाशा यांवर पाणी सोडावे. *कर्तृत्वमद* तर मनातसुद्धा स्फुरू देऊ नये. मातेच्या ठिकाणी कामना असणे व तिची अवज्ञा करणे, या दोन्ही गोष्टी मनुष्याच्या सर्वथैव पतनास प्रबळतया कारणीभूत होतात; पण या दोन्हींचा त्याग करून जर मातृभक्ती केली तर त्या भक्तीएवढे सर्वोत्तम फल जगात इतर कोणत्याही व्रताने वा इतर साधनाने प्राप्त होणार नाही. गोमुख अपवित्र असले, तरी ते सोडून गायीचे इतर सर्व शरीर वंदनीय आहे व पवित्र फल निर्माण करणारे असल्याने त्याच्यासारखे साधकांसाठी इतर उत्तम काहीच नाही."

आवडतियें फलीं। असारें साली आंठोली।
त्यासाठीं अवगलीं। फलांतैं कोण्ही।।१८-२०४।।
तैसा कर्तृत्वाचा मदु। आणि कर्मफलाचा आस्वादु।
या दोहींचें नांव बंधु। कर्माचा कीं।।२०५।।
तऱ्हीं या दोहींचां विखीं। जैसा बापु नातले लेंकीं।
तैसा हो न शके दुःखी। विहिता क्रिया।।२०६।।
हा तो त्याग तरुवरु। जो मोक्षफलें ये थोरु।
सात्विक ऐसा डगरु। यासीचि जगीं।।२०७।।

"आवडणाऱ्या फळात असार आठोळ्या व वर बेचव साली असतात; म्हणून काय कोणी ते फळ टाकून देतात का! कर्मांठायीसुद्धा अशाच प्रकारे कर्तृत्वमद आणि कर्मफळाचा आस्वाद या दोन बंधक गोष्टी आहेत. त्यांच्याद्वारेच कर्मबंधन घडते. पण हेच कर्म यथायोग्य रीतीने आचरले की तेच मोक्षप्रदायक होते. म्हणून पिता जरी लेकीच्या भरण-पोषण- वस्त्रेप्रावरणे-सुख-आनंद यांसाठी झटत असला, तरी ते काही तिच्याकडून कामनापूर्ती करून घेण्यासाठी जसे नसते, तर केवळ निरपेक्ष मनाने कर्तव्यकर्म म्हणूनच जसे केवळ असते; त्याप्रमाणे कर्माच्या अनुषंगाने असणारे कर्तृत्वमद आणि फलास्वादासक्ती या दोन्हींना मनाचा साधा स्पर्शसुद्धा न होऊ देता व त्या कर्माच्या आचरणावेळी कराव्या लागणाऱ्या यातायातीला न कंटाळता, विहित कर्मे उत्तमरीत्या

आचरावीत. सर्वश्रेष्ठ अशी मोक्षरूपी फले ज्या तरुवरास लागतात, तोच हा *सात्त्विक* नावाने विख्यात असणारा त्याग तरुवर होय."

जाळुनि बीज जैसें। झाड कीजे निर्वंशे।
फल त्यागूनि कर्म तैसें। त्यजिलें जेणें।।१८-२०८।।
तेयां लागतखेंवो परिसी। धातूची गंधकलिका जैसीं।
जाती रजतमे तैसीं। तुटली दोहीं।।२०९।।

"बीजच जर नसले तर झाड कोठून निर्माण होईल! म्हणून बी जाळून टाकून झाडाचा जसा निर्वंश होतो, त्याप्रमाणे कर्मफळ त्यागून कर्मच निर्जीव, निरुत्पादक - बंधन न करू शकणारे असे होत असते. कर्मफळाची आसक्ती व कर्तृत्वमद हीच या कर्मरूपी तरूची बीजे होत. त्यांचा असा नाश केला की ज्याप्रमाणे परिसाच्या स्पर्शाबरोबर लोहाचा गंजच काय, त्याच्याठायीचे मळकटपणसुद्धा नाहीसे होऊन जसे त्याचे शुद्ध चकचकीत सोन्यात तत्काळ रूपांतर होते; त्याप्रमाणे शास्त्रोक्त कर्माच्या आचरणाने साधकाचे रज व तम हे दोन्ही मळ नाहीसे होतात व तो शुद्ध सत्त्वगुणाने मंडित - अलंकृत होतो."

मग सत्त्वें तेणे चोखालें। उघडती आत्मबोधाचें डोलें।
तेथ मृगांबु सांजवेलें। होय जैसें।।१८-२१०।।
तैसा बुद्ध्यादिकांफुडां। असतु विश्वाभासु येवढा।
तो न देखें कवणीकडां। आकाशु जैसें।।२११।।

"त्या शुद्ध सत्त्वयुक्त बुद्धीच्या प्रभावाने, ज्याप्रमाणे संध्याकाळी रविअस्ताबरोबर मृगजळ जसे एकाएकी नाहीसे होते; किंवा त्यावेळी एवढे विस्तीर्ण नभोमंडल, पण तेही जसे लोप पावते; त्याप्रमाणे आत्मबोधाचे नेत्र उघडून, हा जो विश्वाकाराचा पसारा असतो, तो समस्त विश्वाभास कोणीकडेही दृष्टीस पडत नाही."

सात्त्विक त्याग व त्याचे फल

म्हणौनि प्राचीनाचेनि बलें। आली कृत्यें कुशलाकुशलें।
तिये व्योमाआंगीं आभालें। जिराली जैसीं।।१८-२११।।
तैसीं तेयाचिये दिठी। कर्मे चोखालली किरीटी।
म्हणौनि सुखदुःखीं उठीं। पडे ना तो।।२१२।।
तेणें शुभकर्म जाणावें। मग तैं हर्षे करावें।
कां अशुभालागीं होआवें। द्वेषिया ना।।२१४।।

"नभात उत्पन्न होणाऱ्या मेघमालिका जशा नभांगीच विलीन होतात; तद्वत प्रारब्धवशे जी काही शुभ वा अशुभ कर्मे अशा साधकवरास प्राप्त होतात, ती त्याच्या दृष्टीने ब्रह्मापासूनच उत्पन्न होणाऱ्या व ब्रह्मातच लीन होणाऱ्या कर्ममालिका होत. म्हणून तो शुभ कर्मे प्राप्त झाली असता सुख मानत नाही व अशुभ कर्मे प्राप्त झाली, तर दुःखावेगाने दडपून जात नाही. त्याने सत्कर्म जाणून घ्यावे व ते हर्षोत्फुल्ल होऊन करावे वा अशुभ कर्म प्राप्त झाले असता, त्याचा द्वेष करावा, याविषयी तो असमर्थ असतो."

तऱ्हीं इयाविषयींचा काहीं। तेयां एकुही संदेहो नाहीं।
जैसा स्वप्नाचां कां ठाईं।जागिन्नलियां।।१८-२१५।।
म्हणऊनि कर्म आणि कर्त्ता। या द्वैतभावाची वार्त्ता।
नेणें तो पांडुसुता। सात्त्विकु त्यागु।।२१६।।
ऐसेनि कर्मे पार्था। त्यजिलीं त्यजितीं सर्वथा।
अधिकें बांधती अन्यथा। सांडिली तऱ्हीं।।२१७।।

"जागृत मनुष्यास स्वप्नांतरीची दृश्ये संभ्रम उत्पन्न करू शकतील काय! अशाच प्रकारे तो मनुष्य सर्वदूर त्या एका सच्चिदानंदासच निरखत असल्याने मायापटलाचा प्रभाव त्याच्यावर नसतो. त्यामुळे तो पूर्णतया संशयरहित झालेला असतो व त्याच्या लेखी कर्म आणि कर्ता या द्वैतभावनेची गंधवार्ता पण नसते. अशा प्रकारे ज्ञानयुक्त व संशयरहित ब्रह्मार्पण बुद्धियुक्त व शुद्धसत्त्वसंपन्न असणाऱ्या त्यागाचे स्वरूप *सात्त्विक* म्हणून ओळखावे. हे अर्जुना! केवळ हाच त्याग सर्वश्रेष्ठ असून याच प्रकारे खराखुरा कर्मत्याग घडतो. अशा कर्माचरणाचे फळ म्हणून अखिल कर्मसंन्यासाचे फल प्राप्त होते. अन्यथा कर्मे आचरण्याचे टाकून दिल्याने पदरात अधिकच बंधन मात्र पडते."

"खंती करिती कर्माची। तैं गांवढें गां।।"

तसेच कर्म सर्वथैव टाकून देण्याच्या गप्पासुद्धा खरे तर वायफळच आहेत. म्हणून ज्ञानदेव आता खास सुंदर असा अभिप्राय प्रकट करतात, तो असाः

आणि हां गां सव्यसाची। मूर्त्ति लाहूनि देहाची
खंती करिती कर्माची। तैं गांवढें गां।।१८-२१८।।
मृत्तिकेचा वीटु। घेऊनि काय करील घटु।
केउता ताथु पटु। सांडिल तो।।२१९।।
तेवीचि वह्नित्व आंगीं। आणि उबे उबगणें आगी।
तो दीप प्रभेलागी। द्वेषु करील कायी।।२२०।।

"आणि हे सव्यसाची अर्जुना! कर्म हे ज्याचे अटळ प्रारब्ध आहे, अशा या देहाकाराने साकारलेली परब्रह्माची ही चालतीबोलती प्राणमय सजीव मूर्ती प्राप्त होऊनही कर्मांची खंत बाळगणारे म्हणजे शुद्ध अडाणीच! अंगभूत गुणांचा वीट आला, तरी काय उपयोग! मृत्तिकोत्पन्न घटाने मृत्तिकेस विटून काय होणार! वस्त्रतंतू वस्त्रपटास सोडून पटरूपाने राहू तरी शकेल काय! वह्नित्व हाच अंगचा गुणधर्म असल्याने अग्नी म्हणून जो ओळखला जातो, त्याने अंगभूत उष्णतेस उबगून कसे चालेल! आणि प्रभा ही जिची अविभाजनीय अर्धांगी असते, त्या दीपज्योतीने तिचा द्वेष करणे उचित आहे काय!"

हिंगु त्रासला घाणी। तऱ्हीं कैंचें सुगंधित्व आणी।
द्रवपण सांडूनि पाणी। केंवी राहे तैं।।१८-२२१।।
तैसा शरीराचेनि आभासें। नांदतु जंव असे।
तंव कर्मत्यागाचें पिसें। काइसें तऱ्हीं।।२२२।।

"अर्जुना! हिंग अंगभूत उग्र वासास कंटाळला, तरी तो सुगंधत्व कोठून लाहील! आणि पाण्याने आपला अंगभूत द्रवत्व हा भाव सोडून दिला, तर ते अस्तित्वात तरी राहील काय! म्हणून साक्षात परब्रह्माची साकारलेली मूर्ती असा जरी हा देह असला, तरी तो जोपावेतो जीवात्म्याशी निगडित आहे आणि या विश्वाकार भ्रमाच्या पसाऱ्यात नांदत आहे, तोपावेतो हे संपूर्ण कर्मत्यागाचे - हे समूळ संन्यासाचे - वेडपटपणाचे पिसे लावून घेऊन काय खरा कर्मसंन्यास प्राप्त होणार आहे!"

आपण लाविजे टीला। म्हणौनि पुसो ये वेलोवेलां।
मा घाली फेड निडाला। कां करूं ये गां।।१८-२२३।।
तैसें विहित स्वयें आदरिलें। म्हणौनि त्यजूं ये त्यजिलें।
परि कर्मचि देह आंतलें। तैं कां सांडें।।२२४।।
जैं श्वासोच्छ्वासवेरी। होत निजेलियाहिवरी।
कांहीं न करणेंचि परी। होती जेयाची।।२२५।।
या शरीराचेनि मिसकें। कर्मचि लागलें तैं असिकें।
जिता मेलया न ठाके। इया रीती।।२२६।।

" जी गोष्ट आपणच स्वीकारलेली आहे, तिचा त्याग करणे शक्य आहे. कपाळावर लावलेले गंध सहजच पुसून टाकता येते. पण कपाळपट्टी अशी सहजासहजी कधीतरी आणि कोणालातरी बदलून - खरवडून -टाकता येईल का! विहित कर्म आपण स्वतःच होऊन आचरावयाचे असल्याने, ते त्यागले जाऊ शकते. पण जे देहांतर्यामीचे कर्म - ते कसे बंद पाडणार! निजल्यानंतरही जे या देहाचे श्वसोछ्वासापर्यंतचे तहत कर्म घडत असते; ज्या कर्मव्यापारात देहाचा काहीच न करणे हाही कर्मभाग असतो; जो असा देहाचा कर्मभाग जित्या वा मेलेल्यासही सुटत नाही; त्या कर्माचा संन्यास कोणी आणि कसा करायचा!"

"कर्मफळ ईश्वरी अर्पिजे"

एयांतैं सांडिती एथ परी।
एकीचि तैं अवधारी।...।।२२७।।

"असे हे कर्म तर या देहाला चिकटलेले आहे; पण ते सोडण्याचीही एक युक्ती आहे." ती अशीः

...। करितां न जाइजे हारी। फलासेचिये।।१८-२२७।।
कर्मफल ईश्वरीं अर्पे। तत्प्रसादें बोधु उद्दीपें।
तेथ रज्जुज्ञानें लोपें। व्यालशंका।।२२८।।
तेणें आत्मबोधें तैसें। अविद्येसीं कर्म नाशें।
पार्था त्यजिजे जैं ऐसें। तैं त्यजिलें होय।।२२९।।
म्हणौनि इयापरी जगीं। कर्मे करितां मानूं त्यागी।..।।२३०।।

"शरीरास जे असे कायमचे चिकटलेले कर्म आहे, त्याला सोडण्याची युक्ती एकच आहे. ऐक! कर्म करत असता फलाशेच्या आहारी जाऊ नये. कर्मफळ ईश्वरास अर्पण करावे. ईश्वर त्यायोगे प्रसन्न झाला की त्याच्या प्रसादाने आत्मज्ञान प्रकट होते. ज्याप्रमाणे सर्पाचा आभास दोरीवर होत आहे, हे कळले की सर्पाभासाचा नाश होतो; तद्वतच आत्मज्ञान प्रकटले की या सांसारिक मायाभासाच्या मृगजळाचा लोप होतो. असा त्या आत्मज्ञानाद्वारे अविद्येसह कर्माचा नाश होतो. कर्म करण्याच्या या रीतीने कर्माचा त्याच्या *अविद्या* या मूळ कारणासह जो अशा प्रकारे समूळ नाश होतो, त्याच कर्म करण्याच्या हातोटीस *खरा त्याग* असे म्हटले जाऊ शकते. *कर्मत्याग* याच रितीने होतो. म्हणून अशा युक्तीने जो कर्मे करतो, त्यासच या जगी *त्यागी* असे मानावे. इतर प्रकारचे *कर्मत्याग* हे केवळ नावाचेच त्याग होत."

..। एर मूर्छेचें नांव रोगी। विसांवा जैसा।।१८-२३०।।
तैसा कर्मीं शिणे एकीं। कीं विसांवा पाहे आणिकीं।
खांडियाचें घाय बुकी। धाडणे जैसें।।२३१।।
परि हे असो पुढुति। तोचि त्यागी त्रिजगतीं।
जेणें फलत्यागें निष्कृति। नेलें कर्म।।२३२।।

"रोग्यास मूर्च्छा आली तर तो विसावा घेत आहे, असे म्हणण्यासारखेच त्या इतर वायफळ कर्मसंन्यासास वा कर्मत्यागास त्याग म्हणणे ठरेल. कर्मे करण्याचा शीण पाहून अन्यत्र सोय पाहणाऱ्यांची; त्याग कसातरी, कसलातरी,मनाला येईल तसा करू पाहणाऱ्यांची अवस्था खरी तर तलवारीचे घाव बुक्क्यांनी परतवून लावू पाहणाऱ्या लढवय्यांसारखी केविलवाणी आहे. तात्पर्य म्हणजे तिन्ही लोकी <u>*तोच एकला खरा त्यागी की ज्याने कर्मफलत्यागाद्वारे कर्मासच नैष्कर्म्य स्थितीला नेऊन पोहोचवले*</u>."

असा त्याग म्हणजे बहुजन ज्यास ***कर्मयोग*** म्हणतात, तोच हे वेगळे सांगायला नको! कर्माचे हे विवेचन असेच पुढील **उन्मेष क्र. ३१- कर्मजिज्ञासा** यातून चालू राहणार आहे. तर वळू या तिकडे!

::उन्मेष::३१::

::कर्मजिज्ञासा::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३१:

गीताः

४:१३-१८

१८:१२-१७

ज्ञानेश्वरीः

१८:२३३-५१६

कर्माचे स्वरूप

::उन्मेष::३१::

::कर्मजिज्ञासा::

कर्मफल::::

कर्मफलाचे त्रिविध प्रकार

अत्याग्यास व त्याग्यास प्राप्त होणाऱ्या फलासंबंधी श्रीगोपालकृष्ण सांगतातः

अनिष्टंमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम्।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु सन्यासिनां क्वचित्।।१८-१२।।

"अनिष्ट, इष्ट व मिश्र *(थोडे इष्ट व थोडे अनिष्ट)* असे कर्माचे तीन प्रकारचे फल मेल्यानंतर अत्यागी, म्हणजे कर्मफलाचा त्याग न करणाऱ्यास मिळते. पण जो संन्यासी म्हणजे कर्मफलाचा त्याग करणारा, त्यास असे कोणतेही फल मृत्यूपरांत प्राप्त होत नाही."

एऱ्हवीं तऱ्हीं धनंजया। त्रिविधा कर्मफलां गां येयां।
समर्थ ते कीं भोगावया। जैंन सांडितीचि आशा।।१८-२३३।।
आपणचि विऊनि दुहिता। कीं न मम म्हणे पिता।
तो सुटे कीं प्रतिग्रहिता। जांवाई शिरके।।२३४।।
विषाचें आगरही वाहाती। तैं विकितां सुखें लाभें जिती।
एर निमालें तें घेती। वेंचोनि मोलें।।२३५।।
तैसें कर्ता कर्म करूं। अकर्ता फलाशा धरूं।
एथ न शके आवरूं। दोघांतेंही कर्म।।२३६।।

"धनंजया! वास्तविक पाहता त्रिविध अशी कर्मफले, ज्यांना त्यांची आस असते त्यांनाच भोगायला लागतात. कन्येस उपजवणाऱ्या पित्याची तिचे दान करून सुटका होते; परंतु तिला स्वीकारणाऱ्या जावयाला मात्र प्रतिग्रहफलस्वरूप संसारपाशात अडकून पडावे लागते! विषाक्त अशा पिकांची शेतीवाडी करणारे ती विकून सुखाने गुजराण करतात; परंतु पदरचे पैसे खर्च करून ती विकत घेणारे मात्र मरतात. त्याचप्रमाणे कर्म करूनही कर्त्यास अथवा कर्मेच टाळणाऱ्या अकर्त्यास जर फलाशा नसेल, तर त्यांना कर्म बंधनकारक होत नाही."

वाटे पिकलियां रुखाचें। फल अपेक्षी तेयाचें।
तेवीं साधारण कर्माचें। फल घे तेयां।।१८-२३७।।
परि करूनि फल ने घे। तो जगाचां कामीं न रिघे।
जैं त्रिविध जग आघवें। कर्मफल हे।।२३८।।
देव मनुष्य स्थावर। येयां नांव जगडंबर।
पऱ्हीं हे तंव त्रिप्रकार। कर्मफल पैं।।२३९।।
तैंचि एक गां अनिष्ट। एक तैं केवल इष्ट।
आणि एक इष्टानिष्ट। त्रिविध ऐसें।।२४०।।

"वाट चालतांना लागलेल्या वृक्षाचे फल जो त्याची इच्छा करतो, त्यालाच लाभते. त्याचप्रमाणे कर्मराहटी चालवितांना जो त्या कर्माचे फल अपेक्षितो, त्यासच ते प्राप्त होते. परंतु कर्मे करूनसुद्धा जो त्यांचे फल घेऊ इच्छित नाही, तो या जगाच्या रहाटगाडग्यातून सुटतो; असा हा कर्मसिद्धांत आहे. देवयोनी वा स्वर्ग, मनुष्यादी योनी वा स्थावरादी हे सर्व जगडंबर म्हणून जे काही आहे, ते सर्व कर्मफलाच्या त्रिविध प्रकारातून प्रकटते. हे कर्मफल इष्ट, अनिष्ट व इष्टानिष्ट वा मिश्र असे तीन प्रकारचे असते."

परि विषमता बुद्धी। आंगीं सूनि अविधी।
प्रवर्त्तती जैं निषिद्धीं। कुव्यापारीं।।१८-२४१।।
तेथ कृमी कीट लोष्ट। हे देह लाहती निकृष्ट।
तेयां नाम तैं अनिष्ट। कर्मफल।।२४२।।
कां स्वधर्मा मानु देतां। स्वाधिकारु फुडां सूतां।
सुकृत कीजे पुसतां। आम्नायातैं।।२४३।।
तैं इंद्रादिक देवांची। देहें लाहिजती सव्यसाची।
तेयां कर्मफलां इष्टाची। प्रसिद्धी गां।।२४४।।

"विषयासक्त बुद्धीने जे निषिद्ध कर्मे करतात, स्वैराचार करतात, त्यांस त्या कर्माचे अनिष्ट असे फल प्राप्त होऊन कृमी, कीटक, मातीचे ढेकूळ, इ.निकृष्ट देह प्राप्त होतात. स्वधर्माचरण करत वेदविहित सुकर्मे करणाऱ्यांस त्या कर्मांच्या इष्ट फलस्वरूप अशी इंद्रादी देवांची शरीरे प्राप्त होतात."

आणि गोड आंबट मिले। तेथ रसांतर फरसालें।
उठी दोहीं वेगलें। दोहीं जिणतें।।१८-२४५।।
रेचकुचि योगवशें। होय स्तंभावया दोखें।
तेवीं सत्यासत्यसमरसें। सत्य असत्यु जिणिजें।।२४६।।
म्हणौनि समभागें शुभाशुभें। मिलौनि अनुष्ठानाचें उभें।
तेणें मनुष्यत्व लाभें। तैं मिश्रफल।।२४७।।
ऐसें त्रिविध येयां भागीं। कर्मफल मांडलेसें जगीं।
हे न संडी तेयासी भोगी। जैं सूदलें आशा।।२४८।।

"आणि अर्जुना! गोड आंबट या रसांच्या मिश्रणाने तिसराच वेगळा असा भिन्न प्रकारचा रस निर्माण होतो; त्याची चव काही औरच जशी असते; किंवा रेचकाचेच योगविद्येद्वारे स्तंभन केले असता कुंभकाची प्राप्ती होऊन शारीरिक व्याधी जसा नाहीशा होतात; अथवा सत्य व असत्य समरस झाले तर ना सत्य, ना असत्य असे वेगळेच मिश्रण जसे निर्माण होते; तद्वत शुभ व अशुभ अशा दोन्ही प्रकारच्या कर्मांच्या अनुष्ठानाने मनुष्यत्वरूपी मिश्रफल प्राप्त होते. अशा प्रकारे स्थावर जंगमादी योनींच्या रूपाने इष्ट, अनिष्ट व मिश्र अशी तीन प्रकारची फले या जगात विस्तारलेली

दिसतात. ही फले जे कोणी फलाशेविरहित कर्मे आचरू शकत नाहीत व भोगासक्ती ज्यांना सोडता येत नाही, त्यांनाच प्राप्त होतात."

कर्मफलांची अखंड उत्पत्ती

एथ जिह्वेचा हातु फाटे। तंव जेवितां वाटे गोमटें।
परि परिणामें शेवटें। अवश्य मरण।।१८-२४९।।
संवचोरमैत्री चांग। जंव न पविजे तैं दांग।
सामान्या भली आंग। न शिवे तंव।।२५०।।

"रुचकर सुग्रास अन्नाचे पोट भरून सेवन करत असतांना जिह्वालौल्यामुळे सुख वाटते; पण बेफाट खात सुटल्याने त्याचा परिणाम जसा वाईटच होतो; अथवा अरण्य जोपावेतो लागले नाही, तोपावेतोच जशी ठगांची मैत्री वाटसरूंसाठी असते; किंवा जोपावेतो अंगस्पर्श करत नाही, तोपावेतो वेश्या जशी दुरूनच चांगली असते; त्याप्रमाणे कर्मे करत असता गोड वाटते; लांबून कर्मे छान वाटतात, पण त्यांचे फल प्राप्त होईस्तोवरच!"

तैसीं कर्मे करिती शरीरीं। लाहती महत्त्वाची फरारी।
पाठीं निधनीं एकसरी। पावती फलें।।१८-२५१।।
समर्थु आणि ऋणिया। मागों आला बाइणिया।
न लोटे तैसा प्राणिया। पडे तो भोगु।।२५२।।
मग कणिसौनि कणु झडे। तो विरूढला कणसा चढे।
पुढुती भूमी पडे। पुढुती उठी।।२५३।।
तैसें भोगीं जैं फल होये। तैं फलांतरें वीत जाये।
चालतां पावो पायें। जिणिजे जैसा।।२५४।।

"आणि जन्मभर कर्मांमागे उत्साहाने धावले की मरणोपरांत त्यांचे फल एकाएक मागे हात धुवून लागलेच समजा! समर्थ सावकारापुढे जसे ऋणकोचे काहीच न चालता त्याला ऋण फेडावेच लागते. त्याप्रमाणे प्राणिमात्रांस कर्मांचे फल भोगावे लागतेच लागते! मग कणसांतून निघालेल्या दाण्यांपासून पुनः अंकुर फुटून त्यातून कणसेच कणसे उत्पन्न होतात; त्या कणसांचे बी पुन:पुन: जमिनीवर पडून उगवून धान्याची रासच्या रास जशी निर्माण होते; तशीच ती कर्मफले भोगत असतांना नवीननवीन कर्मे घडत जातात; त्याही कर्मांची फले भोगत असता पुनश्च कर्मफल निर्माण होतच जाते. अशी ही कर्मफलांची रास निर्माण होते. वाटचाल करत असता एक पाऊल पुढे टाकले की दुसरे पाऊल पुढे येते आणि पाऊलवाट जशी अखंड पुढे सरकते व तिच्यावरून पावलांची ओळच्या ओळ जशी उठत जाते; तशी ही कर्मफलांची रांगच्या रांग लागते म्हणा ना!"

उताराचिये सांगडी। ठाके तैं ऐलीच थडी।
तेवीं न मूकिजती वोढी। भोग्याचियें।।१८-२५५।।
पें साध्यसाधनप्रकारें। फलभोगु तो गां पसरे।
एवं गोंविलें संसारें। अत्यागी तैं।।२५६।।

" नाव ज्या तीराला जाऊन पोहोचते, तोच तिच्यासाठी ऐलतीर असतो; ती म्हणून पैलतीराला कधीच जशी पोहोचू शकत नाही; त्याप्रमाणे कितीही भोगली, तरी कर्मफले संपतच नाहीत. कितीही प्रकारची साधने करत गेले, तरी साध्य जसे लांबचे लांबच राहते, त्याप्रमाणे फलांमागून फले उपभोगत राहिले तरी त्यांचा पसारा विस्तारतच गेल्याने त्यांचा शेवट कसा तो होतच नाही. अशा रीतीने फलाशेचा त्याग न करणारे जन्ममरणाच्या संसाररूपी चक्रात गुंतत जातात."

कर्मसंन्यासाचे मर्म

एऱ्हवीं जाईचियां फुलां फांकणें। त्याचि नाम जैसें सुकणें।
तैसें कर्ममिषे न करणें। केलें जिहीं।।१८-२५७।।
बीजचि वरोसि वेंचे। तैं वाढती कुलवाडी खांचे।
तेवीं फलत्यागें कर्माचें। सारिलें काम।।२५८।।
तैं सत्त्वशुद्धी साहाकारें। गुरुकृपामृततुषारें।
सासिन्नलेनि बोधें वोसरे। द्वैतदैन्य।।२५९।।
तेव्हां जगदाभासमिषें। स्फुरे तैं त्रिविध फल नाशें।
येथ भोक्ता भोग्य आपैसें। निमालें हे।।२६०।।

"जसे जाईच्या फुलाचे उमलणे हेच त्याचे सुकणे असते, तसेच ज्यांनी कर्माकार होऊनही नैष्कर्म्यतासिद्धी प्राप्त केली आहे; बियाणे पोटगीसाठी खर्चले असता ऊर्जितावस्थेतील शेतकीचा उदीम जसा लुप्त होतो; त्याप्रमाणे कर्मफलाचा त्याग करून ज्यांनी कर्मफलाद्वारे वाढत जाणाऱ्या कर्माचा शेवट करून टाकला आहे; त्यांना त्या वेळी शुद्धसत्त्वगुणाच्या साहाय्याने *श्रीगुरुकृपा* प्राप्त होते व तिच्या अमृतमय वृष्टीने अद्वैतबोधाचे पिक जोमाने वाढते आणि द्वैतात्मक बुद्धीचे दैन्य नाहीसे होते. मग जगद्रूपाने भासणारे तीन प्रकारच्या कर्मफलांमुळे प्रचीतीस येणारे हे विश्व नाहीसे होते. अशा वेळी तेथे भोक्ता व भोग्य असे काय उरणार!"

घडे ज्ञानप्रधानु हा ऐसा। संन्यासु जेयां वीरेशा।
तैं फलभोगसोसा। मुकले गां।।१८-२६१।।
आणि येणें कीर संन्यासें। जैं आत्मरूपीं दिठी पैसें।
तैं कर्म एक ऐसें। देखणें आहे।।२६२।।
पडौनि गेलियां भिंती। चित्रांची केवल होय माती।
कीं पाहालेयां राती। अंधारें उरे।।२६३।।
जैं रूपचि नाहीं उभें। तैं साऊली काह्याची शोभे।
आरसेनवीण बिंबें। वदन कें पां।।२६४।।
फिटलियां निद्रेचा ठाओ। कैंचा स्वप्नांचा प्रस्तावो।
मग तैं सांच कां वावो। कोण म्हणे।।२६५।।

"हे वीरेशा अर्जुना! असा ज्ञानप्रधान संन्यास ज्यांना घडतो, ते कर्मफलाच्या व त्याच्या भोगाच्या जाचातून मुक्त होतात. आणि अशा प्रकारच्या या कर्मसंन्यासाने जेव्हा दृष्टी आत्मस्वरूपावर खिळून जाते, तेव्हा कर्म तरी वेगळेपणाने दिसण्यासारखे कोठे

उरणार! भिंत पडून गेली की त्यावर चितारलेल्या अत्युत्तम देखाव्यांची निव्वळ मातीच नाही का होऊन जात! आणि उजाडले की काळोख राहतो काय! जेव्हा शरीराकारच नाहीसा होतो, तेव्हा सावली म्हणून कोणती दिसणार! आणि आरसाच नसला, तर मुखाचे प्रतिबिंब कशात पाहायचे! झोपच जर नसली तर स्वप्ने तरी कशी असतील! अन मग स्वप्न खरे की खोटे हा विचार तरी राहील काय!"

तैसें गां संन्यासें येणें। मूल अविद्येसीचि नाहीं जिणें।
मा तियेचें कार्य कोणें। घेपे दीजे।।१८-२६६।।
म्हणौनि संन्यासीं इयें पाहीं। कर्माची गोठी कीजैल काईं।
परि अविद्या आपुलां देहीं। आहे जैं कां।।२६७।।

"त्याचप्रमाणे या ज्ञानप्रधान कर्मसंन्यासामुळे जेथे अविद्याच शिल्लक राहात नाही, तेथे तिचे कार्यस्वरूप असणारे कर्म करायचे ते कोणी आणि त्यागावयाचे ते तरी कोणी! म्हणून अशा स्थितीत देही अज्ञान वा अविद्या स्फुरत असतांना जे कर्म होते, त्याचा लवलेशही नसतो."

आत्म्याचे अकर्तृत्व::::

अविद्या व कर्म

अशा प्रकारे कर्मसंन्यास या संकल्पनेचे मूर्त स्वरूप स्पष्ट दाखविल्यावर, कर्माधिकाऱ्यांच्या प्रबोधनासाठी अज्ञान व त्याचे कार्य म्हणजे कर्म काय ते सांगून त्यांची जिज्ञासा तृप्त करावी, म्हणून ज्ञानदेव सांगतातः

जें कर्तेपणाचेनि थांवें। आत्मा शुभाशुभीं धांवें।
दृष्टी भेदाचिये राणिवे। रचलीसे जैं।।१८-२६८।।
तैं तऱ्हीं गां सुवर्मा। बिजावली आत्मया कर्मा।
अपाडें जैसी पश्चिमा। पूर्वेसीं कां।।२६९।।

"असे असल्यामुळे जोवर देहांतरी अविद्येचा वास असतो, तोपर्यंत कर्तेपणाच्या अभिनिवेशाने आत्मा पापपुण्यकारक कर्मांच्या ठायी लोभावतो. अशा वेळी आत्म्याची दृष्टी भेदबुद्धीच्या सिंहासनावर विराजमान होते. हे मर्मज्ञ अर्जुना! त्या वेळी आत्मा आणि कर्म यांच्यात जरी पूर्व आणि पश्चिम यांच्याइतके जरी अंतर असले, तरी आत्म्याकडून कर्म करवण्यात येते."

ना तऱ्हीं आकाशा कां आभाला। सूर्या आणि मृगजला।
बिजावली भूतला। वायूसि जैसी।।१८-२७०।।
पांघरोनि नईचें उदक। असे नईचिमाजीं खडक।
परि जाणसीं कां वेगलीक। कोडीचि तैं।।२७१।।
हो कां उदकाजवळीं। परि सिनानीचि तैं बाबुली।
काय संगास्तव काजली। दीपु म्हणो ये।।२७२।.
जऱ्हीं चंद्रु जाला कलंकु। तऱ्हीं चंद्रेसि नव्हे एकु।...।।२७३।।

"आकाश आणि ढग किंवा सूर्य आणि मृगजळ यांच्यात, अथवा भूमी आणि वायू यांच्यात जेवढी भिन्नता असते; किंवा नदीचे उदक पांघरलेले खडक व नदी यांच्यात जेवढा फरक असतो; पाण्यावर असले,तरी शेवाळे जसे पाण्याहून अति भिन्न असते; तेवढी भिन्नता *आत्मा व कर्म* यांच्यात आहे. दीपाची जरी जवळीक असली, तरी त्यामुळे काजळीला दीपक म्हणता येईल का! चंद्रावर दिसणारा कलंक हा तसा चंद्राहून भिन्नच नसतो का!"

...। आहे दिठी डोलियां विवेकु। अपाडु जैसा।।१८-२७३।।
नाना वाटा वाटे जातेया। वोघा वोघीं वाहतेयां।
आरिसयां आरिसा पाहातेयां। अपाडु जेतुला।।२७४।।
पार्था गां तेतुलेनि मानें। आत्मेनिसीं कर्म सिनें।
परि घेववीजे अज्ञानें। तैं कीर ऐसें।।२७५।।
विकासें रवीने उपजवी। द्रुती अलीकरवीं भोगवी।
तैं सरोवरी कां बरवी। अब्जिनी जैसीं।।२७६।।
पुढतपुढती आत्मक्रिया। अन्य कारणिकाचि तैशीया।
करूं पांचाही तेयां। कारणां रूप।।२७७।।

"डोळा आणि डोळ्याची दृष्टी यांच्यात जेवढा वेगळेपणा आहे; वाट आणि वाटेने चालणारा वाटसरू यांच्यात जितका फरक असतो; किंवा आरसा व आरशात स्वतःस पाहणारा यांच्यात जेवढी भिन्नता असते; तेवढीच भिन्नता कर्म व आत्मा यांच्यात असते. तरीसुद्धा आपल्या विकसण्याने सूर्यास प्रकट करतेशी भासवणाऱ्या, सुगंध भुंग्याकडून भोगवतांना दिसणाऱ्या सरोवरातील कमलिनीप्रमाणे आत्म्यामुळे कर्मादी प्रपंच होतांना जरी दिसत असला, तरी तो सर्व अन्य कारणांमुळे होत असतो. कर्म ज्यायोगे सिद्ध होते, ती पाच कारणे तुला स्पष्ट करून दाखवतो."

कर्मव्यापाराचे विश्लेषण

याप्रमाणे गोपालकृष्ण आता *कर्माचीच व्याख्या* करण्यास सिद्ध झालेले आहेत. आतापावेतो *कर्मसंन्यास, कर्म व आत्म्याचे पृथकत्व, कर्माची अटळता*, अशा गोष्टींचा खुलासा झालेला आहे. कर्म वास्तवात मृगजळाप्रमाणे असूनही, समस्त विश्वव्यापार हा कर्माधिष्ठितच दिसतो. अज्ञान्यास तर हे सर्व व्यापार सत्यच प्रतीत होतात. अशा अज्ञानी कर्माधिकाऱ्यांस सत्पथावरून पुढे घेऊन जाण्यासाठी, त्याच्या बुद्धीस आकळेल अशा रीतीने कर्म नामक व्यापाराचे विश्लेषण करतांना गीता सांगतेः

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे।
साङ्ख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम्।।१८-१३।।

"हे महाबाहो! सर्व कर्मांच्या सिद्धीस आवश्यक अशी पाच कारणे साङ्ख्यसिद्धांतात कर्माच्या परिसमाप्तीचे निरूपण करण्याप्रीत्यर्थ सांगितली आहेत. ती तू माझ्याकडून नीट समजावून घे."

येथे कर्माची पाच कारणे म्हणजे कर्म सिद्ध करण्यासाठी लागणारी पाच साधने निर्दिष्ट आहेत. उपरोक्त श्लोकातल्या *कृतान्त* या शब्दाची उकल करतांना शंकराचार्य म्हणतात की

कृत म्हणजे *कर्म*. *त्याचा अंत म्हणजे परिसमाप्ती होणे म्हणजे कृतान्त*. ***"यावानर्थ उदपाने ...", " सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते...।"*** या व तत्सम वचनांद्वारे गीतामते आत्मज्ञानोपरांत समस्त कर्मांची निवृत्ती होते. तसेच *ज्या शास्त्रात पदार्थांची गणना केली जाते, त्यास **साङ्ख्य** अशी संज्ञा आहे. यालाच **वेदान्त** असेही नाम आहे*. आत्मज्ञानपर *कृतान्त* - *साङ्ख्य*शास्त्रात समस्त कर्मांच्या सिद्धीसाठी सांगितलेली पाच कारणे वा साधने निर्देशितांना गोपाल म्हणतातः

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम्।।१८-१४।।

"देह, कर्ता जीव, विविध इंद्रिये, विविध इंद्रियादी व्यापार वा चेष्टा आणि दैव म्हणजे इंद्रियांच्या अधिष्ठात्या देवता अशी ती पाच कारणे कर्मांच्या सिद्धीसाठी आवश्यक असतात."

कर्मव्यापारातील प्रकृति-पुरुष विचार

देह म्हणजे इच्छा-द्वेष, सुख-दुःख, ज्ञान इ.ची अभिव्यक्ती ज्याच्या आश्रयाने होते, ते शरीर. *कर्ता* म्हणजे उपाधिस्वरूप भोक्ता जीव. *करण* म्हणजे शब्दादी विषयांना ग्रहण करणारी बारा इंद्रिये - पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, मन व बुद्धी. त्यांच्या *चेष्टा* वा व्यापार म्हणजे श्वास-प्रश्वास, विषयसेवन इ. *दैव* म्हणजे चक्षुरादी इंद्रियांच्या सोम-सूर्य-इंद्रादी अनुग्रहकारक देवता. वास्तविक त्या देवता म्हणजे चेतनेचेच रूप होत. अशा प्रकारे कर्माची पाच कारणे जी श्रीगोपालकृष्णांनी निवेदित केलेली आहेत, त्यांचा खुलासा श्रीशांकरमते वर केल्याप्रमाणे आहे.

थोडक्यात म्हणजे पूर्वी आपण तेराव्या अध्यायाच्या *क्षेत्र* विचार, तसेच तत्संबंधी इतर संकल्पना पाहिल्या होत्या; त्यांच्याशी सुसंगत असाच हा पञ्च कारणांचा समुच्चयच *प्रकृति* म्हणून वा *क्षेत्र* म्हणून प्रसिद्ध आहे. कर्माचे कर्तृत्व हे प्रकृतीकडे जाते हेच येथे पुनः सूचित केले आहे. *आत्मा अकर्ता व प्रकृति कर्ती* असे या संकल्पनेचे सार आहे.

कर्मजिज्ञासा (चतुर्थ अध्याय)

कर्मजिज्ञासा तृप्त करण्यासाठी आपला हा जो प्रयत्न चालला आहे, त्यासाठी चतुर्थाध्यायातील श्रीगोपालकृष्णांच्या काही उक्तींची ख्याती पाहणे योग्य ठरेल. ते श्लोक असेः

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्।।४-१३।।
न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते।।४-१४।।
एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभीः।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्।।४-१५।।
किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्।।४-१६।।
कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः।।४-१७।।
कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत्।।४-१८।।

गुणकर्मानुसार भगवंतांनी चातुर्वर्ण्यसृष्टी निर्मिली आहे. या निर्माणाचा तो कर्ता जरी असला, तरी त्यास *अकर्ता* व *अव्यय* च समजले पाहिजे. कारण त्याला कर्मे बंधन करत नाहीत. त्याला कर्मफलासक्ती नाही. त्यास असे जाणणाऱ्यांस कर्मे बंधन करत नाहीत. पूर्वीच्या जनकादी महाभागांनी हेच जाणून कर्मे केली. त्यांना ती जशी बंधक झाली नाहीत, तशीच त्यांची परंपरा चालवणाऱ्या इतरही मुमुक्षूंस ती कर्मे बंधन करत नाहीत. म्हणून इतर मुमुक्षूंनी जनकादींप्रमाणे कर्मे आचरावीत.

मुळातच कर्म कोणते व अकर्म म्हणजे काय इ. विचार करतांना तत्त्वज्ञांची मती कुंठित झाली आहे. म्हणून त्यांच्या वक्तव्यातून नक्की काही कळणे सामान्य जनांस कठीण झाले असल्याने कर्माविषयीची जिज्ञासा तृप्त करण्यासाठी *अशुभ* अशा संसारापासून मुक्त करणारे कर्म कसे असते, ते सांगण्यासाठी भगवंत सिद्ध झाले आहेत.

सामान्य - *भूतभावोद्भवकर* - म्हणजे विश्वोत्पत्तिकर म्हणून जे ओळखले जाते, ते *कर्म*; वर्णाश्रमधर्मानुरूप करावयाचे कर्तव्य कर्म वा विहित कर्म म्हणजे *विकर्म*; आणि निषिद्ध कर्म म्हणजे *अकर्म*; अशी ही नीट समजून घेतली पाहिजेत. कारण कर्माची व्याप्ती अति गहन आहे. त्याचा विचार दुर्बोध आहे.

कर्माच्या ठिकाणी जो अकर्म पाहतो व अकर्माच्या ठिकाणी जो कर्म पाहतो, तो मनुष्य बुद्धिमान व योगयुक्त कर्मे करणारा जाणावा. म्हणजे निष्काम, फलासक्तीरहित होऊन जो प्राप्त कर्मे आचरतो, म्हणजे आपण कर्मे करत असूनही कर्ते नाही, असे जाणणारा व कर्म हे कर्त्याशिवाय वेगळे असे काही नाही, हे जाणणाराच असा मनुष्य होय.

श्रीकृष्णोक्तीः "आत्मा कर्ता नव्हे"

अशा प्रकारे कर्मविषयक एक धावता आढावा घेतल्यावर आपण श्रीकृष्णांच्या निवेदिलेल्या कर्मसिद्धीसाठी आवश्यक असणाऱ्या पाच कारणांविषयी ज्ञानदेव काय म्हणतात, ते पाहू याः

आणि पांचही कारणें तियें। तूंही जाणसिल विपायें।
जैं शास्त्रे उभऊनि बाहें। बोलती तेयांतें।।१८-२७८।।
वेदरायाचियां राजधानीं। सांख्यवेदांताचां भुवनीं।
निरूपणाचा निशाणध्वनीं। गर्जति तियें।।२७९।।

जें सर्व कर्मासिद्धीलागीं। इयेंचि मुदलें हो जगीं।
येथ न सुवावा अभंगी। आत्मराजु।।१८-२८०।।

"कर्मास सिद्ध करणारी अशी ती पाचही कारणे कदाचित तुलासुद्धा माहीत असतील; कारण शास्त्रे याच कारणांचा डांगोरा पिटत असतात. वेदरूपी रायाच्या नगरीतले *सांख्य-वेदांतशास्त्र* छातीठोकपणे म्हणते की सकळ कर्मांची सिद्धी होण्यासाठी हीच पाच कारणे आवश्यक आहेत. त्या कारणांना न जाणल्याने आत्माच सर्व कर्मे करतो असा भ्रम होतो. तरी जाणत्यांनी *अव्यय* अशा आत्मराजावर तो कर्ता असल्याचा वृथा आरोप करून त्याला बंधनात घालू नये. या कारणांचा असा डांगोरा केलेला असल्याने तूही ती नीट ऐकून ठेव."

असे म्हणून तो घननीळ अत्यंत प्रेमाने अर्जुनावरील आपला लोभ व्यक्त करतांना सांगू लागलाः

यया बोलाची डांगुरटी। तियें प्रसिद्धी आली किरीटी।
म्हणोनि तुझां हन कर्णपुटीं। वसो कां जैं।।१८-२८१।।
आणि मुखांतरीं आइकिजे। तैसें कायसें हे वोझें।
मी चिद्रत्न तुझें। असतां हातीं।।२८२।।
आरिसा फुडां मांडलियां। कां लोकांचियां डोलयां।
मानु देयावा पाहावया। आपुलें नीकें।।२८३।।
भक्त जैसेनि जेथ पाहें। तेथ तैं तैंचि होत जाये।
तो मी तुझें जाहालो आहे। खेलणें आजि।।२८४।।
ऐसें प्रीतीचेनि वेगें। देवो बोलितां से नेघे।
तंव आनंदामाजीं आंगें। विरतसे एरु।।२८५।।

"अर्जुना! आणि माझ्यासारखे आत्मरत्न साक्षात तुझ्या हाती असतांना, ती कारणे अपरोक्ष सांगोवांगीवरून इतरांकडून ज्ञात करून घेण्याचा प्रसंग तरी तुझ्यावर कां आणावा! आरसा आपल्यापुढे असतांना आपले मुखवर्णन समजण्यास लोकांच्या दृष्टीचा पुरावा कशाला हवा! भक्त ज्या भावाने जे जे पाहातो, ते ते सर्व मीच होत जातो. असा मी तर केवळ तुझाच होऊन राहिलो आहे. मग तुला अप्राप्य असे ते काय असणार!" असे अतीव प्रेमाच्या भराने जेव्हा तो मुरारी बोलू लागला, तेव्हा त्याचे भान हरपले. त्या आनंदकंदाच्या संपर्काने अर्जुनसुद्धा त्या प्रीतिसागरात विरघळून जाऊ लागला.

"चंद्रा आणि चंद्रिकें। न मिलणें आहे।।"

चांदिणियाचा पडिभारु। जालयां सोमकांताचा डोंगरु।
विघरौनि सरोवरु। हो पाहें जैसा।।१८-२८६।।
तैसें सुख आणि अनुभूती। या भावांची मोडूनि भिंती।
आतले अर्जुनाकृती। सुखचि जेथ।।२८७।।
तेथ समर्थु म्हणूनि देवा। अवकाशु जाहला आठवा।
मग बुडतयाचा धांवा। जीवें केला।।२८८।।

"चंद्रकांत मण्याच्या पर्वतावर चांदणे वर्षले असता, तो जसा विरघळून जाऊन सरोवररूप होऊ पाहतो; तशी ती सुख आणि अनुभूती अनुभवणारी अर्जुनाची मूर्ती श्रीकृष्णप्रेमरूप चांदण्याच्या वर्षावात विरघळून निव्वळ सुखसागरस्वरूपच झाली. द्वैत अद्वैतरूप झाले. भक्त आणि भगवंत एक झाले. त्या वेळी द्वैत आणि अद्वैत यात न हरवता लीलया सर्वठायी विहार करण्यास समर्थ असणाऱ्या त्या भगवंतास अर्जुनाची स्थिती आकळून, त्याने त्याला - त्या सुखसागरात बुडून जाऊन विरघळणाऱ्या पार्थाला पुनश्च पूर्वस्थितीवर आणण्यासाठी जीवापाड प्रयत्नांची शर्थ सुरू केली."

अर्जुना येसणें धेंडे। प्रज्ञा परेंसीं बुडे।
आलें भरते येवढें। तैं काढूनि पुढती।।१८-२८९।।
देवो म्हणे हां गां पार्था। तूं आपणपें देख सर्वथा।
तंव श्वासूनि एरें माथा। तुकियेला।।२९०।।
म्हणे जाणसी दातारा। मी तुजसी व्यक्तिशेजारा।
उबगला आदीं एकाहारा। येवों पाहे।।२९१।।
तेयांही हा ऐसा। लोभें देतसां जऱ्हीं लालसा।
तऱ्हीं कां जी घालितसां। आड आड जीवा।।२९२।।

मुळात अर्जुनासारखा धीरोदात्त बुद्धीचा प्रज्ञावान पुरुष त्या भावसमाधीत जेव्हा बुडून जाऊ लागला, तेव्हा त्यातून बाहेर काढण्यासाठी तशाच सामर्थ्यवानाची निकड होती. ती देवांनी पूर्ण केली. त्याला भानावर आणत ते म्हणाले की "आता पूर्वस्थितीवर ये!" हे ऐकून अर्जुनाने निःश्वास टाकीत मान हलवली. तो म्हणाला, "देवा! सतत तुमचे सान्निध्य असल्याने मला तुमच्यात एकच होऊन मिसळून जावेसे नेहमी वाटते. त्यातून तुम्ही माझ्यावर नेहमी एवढा लोभ करता की मला नेहमी आपली ही आस तुम्ही पुरवाल, असे वाटत असते. आता अचानक माझ्या मनासारखे घडत होते, तर तुम्ही त्याला का बरे प्रतिबंध करत आहात!"

तेथ श्रीकृष्ण म्हणती नीकें। अद्यापि नाहीं मा ठाऊकें।
वेड्या चंद्रा आणि चंद्रिकें। न मिलणें आहे।।१८-२९३।।
आणि हाही बोलोनि भावो। तुज दाऊं आम्हीं भिवों।
जैं रुसतां बांधें थांवो। तैं प्रेम गां हे।।२९४।।
एथ एकमेकांचिये खुणे। विसंवादु तंवचि जिणें।
म्हणौनि असो हे बोलणें। इयेविखीचें।।२९५।।

"तेव्हा श्रीकृष्ण म्हणतातः "अरे भाबड्या अर्जुना! आपण दोघे मूळातच जर एक आहोत, तर हे पुनः एकमेकात मिळून जाणे म्हणजे काय, एवढे तुला उमजते तरी आहे काय! चंद्र आणि चंद्रिका ही वेगळी कधी असतात, तर त्यांनी पुनः एकत्र व्हावयाचे आहे! पण हेसुद्धा तुला स्पष्ट सांगण्यात मला अशी भीती वाटते की ते न पटून तू रुसूनच बसला, तर काय करावे! आणि तू तरीही हट्ट

घेतलास की आपण एकमेकात मिसळून जावे म्हणून, तर तुझ्यामाझ्यातल्या अतीव प्रेमापायी मला तो पूर्ण करावा लागेल अन मग आपली वेगवेगळी अस्तित्वे मिटून जाऊन जगण्यातला आनंदच लोपेल. असो. आपण जी आत्मस्वरूपाविषयीची चर्चा करत होतो, तिकडे वळू या."

कर्माची कारणे व हेतू::::

प्रेमाचे ऋण

मग कैशी कैशी तैं आतां। बोलत होतो पांडुसुता।
सर्व कर्मा भिन्नता। आत्मेंनिसीं।।१८-२९६।।
तंव अर्जुन म्हणे देवें। माझिये मनिंचेनि स्वभावें।
प्रस्ताविलें बरवे। प्रमेय जी।।२९७।।
जैं सकल कर्माचें बीज। कारणपंचक तुज।
सांगेन ऐसीं पैज। ओतली कां।।२९८।।
आणि आत्मेयां एथ काईं। सर्वथा लागु नाहीं।
हे पुढारलासि तैं देईं। लाहाणें माझें।।२९९।।

तेव्हा अर्जुन म्हणलाः "देवा! आत्म्याहून कर्म भिन्न आहे, असे जे तुम्ही निरूपित होता, तो विषय मला मनापासून आवडतो आहे. सकल कर्मांच्या बीजस्वरूप अशा कारणपंचकासंबंधी तुम्ही मला साद्यंत सांगण्याचे वचन दिले आहे. तरी आत्म्याचे कर्माशी काही देणेघेणे नाही, यासंबंधीचे विवेचन पुढे सुरू करून माझी आवड पुरवा."

येयां बोलां विश्वेशें। म्हणितलें तोखें बहुंवसें।
इयेंविखीं धरणें बैसें। ऐसें कें जोडे।।१८-३००।।
तऱ्हीं अर्जुना निरूपिजैल। तैं कीर भाषेआंतुल।
परि मेचु हे होईजेल। ऋणिया तुज।।३०१।।
तंव अर्जुन म्हणे देवो। काईं विसरले मागील भावो।
इयेच गोठी किं राखत आहो। मीतूंपण जी।।३०२।।
एथ कृष्ण म्हणती हो कां। आतां अवधानाचा पसरूनि नीका।
करूनियां आइका। पुढारलो तैं।।३०३।।

यावर तो विश्वेश श्रीकृष्ण म्हणता झालाः "अर्जुना! अरे या विषयाचा हट्ट घेणारा असा तुझ्याहून दुसरा कोण सापडणार! तुझी उत्कंठा पाहून माझा संतोष वृद्धिंगत झालाआहे. त्यामुळे तुझा मी ऋणी झालो आहे. तरी ते सर्व काही तुला निरूपीन." त्यावर अर्जुन म्हणालाः "देव मागील सांगितलेले सर्व विसरलेत वाटतं! आपण दोघे एकच आहोत, असे म्हणताम्हणता परत निरूपणासाठी हे प्रेमाच्या ऋणाचे दुजेपण कशाला!" तेव्हा मग श्रीकृष्ण म्हणाले: "बरं! तर आता नीट अवधानपूर्वक मी जे सांगणार आहे, ते ऐक."

"आत्मा सिना"

यानंतर श्रीकृष्ण सांगू लागले:

तऱ्हीं सांचचि गां धनुर्धरा। सर्व कर्मांचा उभारा।
होये बाहेर बाहिरा। कारणें पांचें।।१८-३०४।।
आणि पंचीकरण दलवाडें। जिहीं कर्माकारु मांडें।
तैं हेतु तंव उघडे। पांच आथी।।३०५।।
येर आत्मतत्त्व उदासीन। तैं ना हेतु ना उपादान।
ना अंगें करी संवाहन। कार्यसिद्धीचें।।३०६।।
तेथ शुभाशुभ अंशीं। निफजती कर्में ऐशीं।
राती दिवो आकाशीं। जियापरी।।३०७।।

"हे धनुर्धर अर्जुना! आत्मतत्त्वासभोवती हा जो समस्त कर्मांचा पसारा दिसतो आहे, तो केवळ पाच कारणांमुळे होतो. आणि ज्या पाच कारणांच्या समुच्चयाने हा कर्मपसारा उभारला जातो, त्यामागे हेतूसुद्धा पाचच आहेत. या सर्वांपेक्षा भिन्न असणारा जो आत्मा आहे, तो उदासीन असून कर्माचा हेतू व उपादान कारण नसून, कर्मसिद्धी करणारा पण नाही. कर्मे करण्यास तो साहाय्यकारकसुद्धा होत नाही. आकाश उदासीन असून त्यावर दिवस व रात्र जशी होतात, तसा आत्मा *अकर्ता* असून ही शुभाशुभ प्रकारची कर्मे त्याच्या संबंधावाचून निर्माण होतात."

तोय तेज धूमु। येयां वायूसि संगमु।
जालियां होय अभ्रागमु। व्योम तैं नेणें।।१८-३०८।।
नाना काष्ठीं नाव मिळें। तैं नावाडौनि चले।
चालविजे अनिळें। उदक तैं साक्षी।।३०९।।
कां कवणें एकें पिंडें। वेंचितां अवतरे भांडें।
मग भवंडिजै दंडें। भ्रमे चक्र।।३१०।।
आणि कर्तृत्व कुलालाचें। तेथ काय तैं पृथिवीयेचें।
आधारावांचूनि वेंचें। विचारीं पां।।३११।।

"पाणी,उष्णता व वाफ यांचा वायूशी संबंध आला असता ढग निर्माण होतो. त्याचा आकाशाशी काही संबंध असतो काय! अनेक प्रकारचे लाकूड नाव करण्याकरता वापरले जाते. ती नाव पाण्यावरून वायुवशात नावाड्याकडून हाकारली जाते. तिचा आणि पाण्याचा खरा संबंध तो केवढा! उदक या सर्व व्यापाराचे निमित्तमात्र साक्षिभावाने असते ना! किंवा गोळ्याच्या आकाराने माती कुंभाराच्या चाकावर टाकून दांडक्याने त्या चाकास गती दिली असता, कुंभाराच्या कर्तृत्वाने भांड्याचा आकार घेते. या सर्व व्यापारासाठी आधाराव्यतिरिक्त माती वा पृथ्वी यांचे काय खर्चते!"

हेंहीं असो लोकांचियां। राहाटी होतां आघवियां।
कोण काम सवितयां। आंगां आलें।।३१२।।
तैसें पांचहेतुमिलणीं। पांचेंचि इहीं कारणीं।
कीजे कर्मलतांची लवणी। आत्मा सिना।।३१३।।
आतां तैंचि वेगलालीं। पांचही विवंचू गां भली।
तुकौनि घेतली। मोतियें जैसीं।।३१४।।

"सूर्यप्रकाशात जग व्यापारते. त्यावेळी सूर्य प्रत्यक्ष कोणते काम अथवा व्यवहार करतो, सांग बरे! त्याचप्रमाणे या पाच हेतूंनी

एकत्र येऊन या पाचच कारणांमुले कर्मलतांची वेल निपजवली जाते. आत्मा मात्र त्या कारणांपेक्षा व त्या क्रियादिकांहून वेगळाच्या वेगळाच असतो. मोती जसे नीट पारखून घ्यावेत, त्याप्रमाणे मी तुला ही पाचही कारणे बारकाव्यांसह स्पष्ट करून सांगतो. ऐक."

१ व २) देह व जीव

श्रीकृष्णांनी या प्रसंगी सांगितलेली कर्मसिद्धीस आधारभूत असणारी अशी ती पाचही कारणे निरूपितांना श्रीज्ञानेश म्हणतातः

तैसी यथालक्षणें। आइक पां कर्मकारणें।
तऱ्हीं देह हे मी म्हणें। पहिलें एथ।।१८-३१५।।
येयांतें अधिष्ठान ऐसें। म्हणिजे तैं याचि उद्देशें।
जैं स्वभोग्येंसी वसे। भोक्ता एथ।।३१६।।
इंद्रियांचां दाहीं हातीं। जाचौनियां दिवोरातीं।
सुखदुःखें प्रकृति। जोडिजती जियें।।३१७।।
तियें भोगावया पुरुखा। आन ठाओचि नाहीं देखा।
म्हणौनि अधिष्ठानभाखा। बोलिजे देह।।३१८।।

"अशी ती कर्मास सिद्ध करणारी पाच कारणे त्याच्या लक्षणांसह मी तुला सांगणार आहे. ती लक्षपूर्वक ऐक. प्रथम कारण म्हणजे *देह*. यालाच *अधिष्ठान* असे म्हणतात. कारण आपल्या सुखदुःखादींसह विषयोपभोक्ता जीव येथेच वसतो. दशेंद्रियरूपी हातांनी रात्रंदिवस श्रम करून प्रकृतीच्या योगाने जी सुखदुःखे जोडली जातात, ती भोगण्यासाठी पुरुषाला या देहाशिवाय अन्य स्थान नाही. म्हणून त्यास *अधिष्ठान* अशी संज्ञा आहे."

हे *चोविसांहिं तत्त्वांचे* । कुटुंब घर वस्तीचें।
तुटें बंधमोक्षाचें। गुंतलें एथ।।१८-३१९।।
किंबहुना अवस्थात्रया। अधिष्ठान धनंजया।
म्हणौनि देहा ययां। हेंचि नाम।।३२०।।

"सांङ्ख्यप्रतिपादित चोवीस तत्त्वांच्या कुटुंबाचे हा देह हे घर आहे. याच देहात बंध आणि मोक्ष यांचा अभिभव होतो. अर्जुना! किंबहुना जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्थात्रयांना हा देहच अधिष्ठानरूप असल्याने शास्त्रसुद्धा त्यालाच *अधिष्ठान* म्हणून ओळखते."

आणि कर्ता हे दुजें। कर्माचें कारण जाणिजे।
प्रतिबिंब म्हणिजे। चैतन्याचें जें।।१८-३२१।।
आकाशचि वरुषे नीर। तैं तलवटीं बांधे नाडर।
मग बिंबौनि तदाकार। होय जेवीं।।३२२।।
कां निद्राभरें बहुवें। राया आपणपें ठाऊवें नोहें।
मग स्वप्नाचियें सामावें। रंकपणीं।।३२३।।
तैसें आपुलेनि विसरें। चैतन्यचि देहाकारें।
आभासोनि आविष्करें। देहपणें जैं।।३२४।।
जेयां विचाराचां देशीं। प्रसिद्धी गां जीवु ऐशीं।
जेणें भाख केली देहेंशी।आघवांविखीं।।३२५।।
प्रकृति करी कर्में। ती म्यां केली म्हणे भ्रमें।
येथ कर्ता येणें नामें। बोलिजे जीवु।।३२६।।

"आता दुसरे कारण जे कर्मसिद्धीसाठी लागते, ते म्हणजे *कर्ता*. प्रतिबिंबस्वरूपात असणारे चैतन्य, स्वतःस विसरून देहाकाराने अवभासते. आकाशातून पर्जन्यवृष्टी होते. ते पाणी डबके होते. त्या डबक्यातील पाण्यात आकाश प्रतिबिंबित होते. राजा झोपेत असतांना स्वप्न पडते. त्यात तो भिकारी होतो. तद्वतच आत्मतत्त्वाची ही अवस्था असते. स्वस्वरूपास विसरून देहाकाराशी तादात्म्य पावलेल्या या स्थितीस *जीव* असे म्हणतात. प्रकृती समस्त कर्मे करणारी आहे. त्यांचे कर्तृत्व आपले आहे, असे भ्रमाने समजणाऱ्या त्या जीवास *कर्ता* असे म्हणतात. कर्माचे दुसरे कारण ते हेच."

३ व ४) इंद्रिये व प्राणशक्ती

मग पातेयांचां केशीं। एकचि उठी दिठी जैशीं।
मोकली चवरी ऐशी। चिरीव गमे।।१८-३२७।।
कां घरां आंतुल एकु। दिपाचा तो अवलोकु।
गवाक्षभेदें अनेकु। आवडे जेवीं।।३२८।।
तेविं बुद्धिचें जाणणें। श्रोत्रादिभेदें येणें।
बाहेरी इंद्रियपणें। फांके जैं कां।।३२९।।
तैं पृथग्विध करण। कर्माचें इयां कारण।
तिसरें गां जाण। नृपनंदना।।३३०।।

"आणि चक्षूंची दृष्टी एकच असूनही त्यांच्याकडे पाहिले तर पापण्यांच्या केसांमुळे ती चवरीच्या केसांप्रमाणे चिरे पडलेली जशी दिसते; किंवा घरात असलेला एकुलता एक दिवा जसा विविध गवाक्षांतून त्याचा प्रकाश बाहेर पडतांना पाहून अनेक झाल्याचा भासतो; त्याप्रमाणे एकच एक असणारी पण इंद्रियरूपे अनेकविध भासणारी - श्रोत्र चक्षुरादिरूपे वेगवेगळी प्रकटते आहे, अशी वाटणारी - जाणीव असते. जाणीवेची वा बुद्धिज्ञानाची अशी पृथकता दाखवणारी वेगवेगळी *इंद्रिये* वा *करण* हे कर्मसिद्धीस आवश्यक ठरणारे तिसरे कारण आहे."

आणि पूर्वपश्चिमवाहणीं। निघालियां मेघाचियां मिलणीं।
होय नदीनद पाणी। एकचि जेवीं।।१८-३३१।।
कां एकुचि पुरुखु जैसा। अनुसरत नवा रसां।
नवविधु ऐसा। आवडु लागे।।३३२।।
तैशीं क्रियाशक्ती पवनीं। असें जैं अनपायिनी।
तैं पडिलीं नाना स्थानीं। नाना होये।।३३३।।

"हे राजपुत्रा अर्जुना! आता कर्मसिद्धी करविणारे चौथे कारण ऐक. पाणी एकच असता पूर्ववाहिनी किंवा पश्चिमवाहिनी असे, ज्या दिशेने प्रवाहाचा ओघ वाहत असेल, तसे नदीस म्हटले जाते. पण समुद्रास नद्या मिळाल्या की हे भेद लोप पावून नदी व नद यांच्यांत भेद उरत नाही; किंवा एकच पुरुष शृंगारादी नवरसांचा

आविर्भाव करतांना, त्या त्या रसासापेक्ष वेगवेगळा वाटतो; पण मूळ त्या पुरुषात बदल तो काही पडत नाही; तशी प्राणांठायी असणारी अखंड अशी जी क्रियाशक्ती असते, ती देहांतर्गत विविध स्थानी विविध प्रकारची होतांना दिसते."

जैं वाचें करी एणें। तैं तैंचि होये बोलणें।
हातां आली तऱ्हीं घेणें। देणें होय।।१८-३३४।।
अगां चरणाचां ठायीं। तऱ्हीं गती तैंचि पाहीं।
अधोद्वारीं दोन्हीं। क्षरणें तैंचि।।३३५।।
कंदौनि हृदयवरी। प्रणवाची उजरी।
करितां तैंचि शरीरीं। प्राणु म्हणिजे।।३३६।।
मग ऊर्ध्वींचियां रिगिनिगा। पुढती तैंचि शक्ती पैं गां।
उदानु ऐसियां लिंगां। पात्र जालीं।।३३७।।
अधोरंध्राचेनि वाहें। अपानु हे नाम लाहे।
व्यापकपणें होये। व्यानु तैंचि।।३३८।।

"वाचेच्या रूपाने ती वाक्शक्ती, हातांद्वारे देणेघेणे करणारी, पायांच्या ठिकाणी गती म्हणून, दोन्ही अधोद्वारी क्षरणरूपाने, नाभिकमलापासून हृदयापर्यंतच्या प्रदेशात ॐकाराचा ध्वनी करणारी शरीरस्थ *प्राण* म्हणून, ऊर्ध्वस्थ शरीराकडे जा ये करणारी म्हणून *उदान* या नावाने प्रसिद्ध असणारी ती एकच एक शक्ती आहे. अधोद्वाराकडे वाहतांना ती *अपान* म्हणून ओळखली जाते; तर शरीरास व्यापणारी म्हणून *व्यान* असे तिलाच म्हणतात."

आरोगिलेनि रसें। शरीर भरींच सरिसें।
आणि न सांडिता असे। सर्व संधीं।।१८-३३९।।
ऐसियां इयां राहाटीं। मग तैंचि क्रिया पाठीं।
समान ऐसीं किरीटी। बोलिजैं गां।।३४०।।
आणि जांभई शिंक ढेकर। ऐसैसा होतसे व्यापार।
नाग कूर्म कृकर। इत्यादी होय।।३४१।।
एवं वायूचि हे चेष्टा। एकीचि परी सुभटा।
वर्तनास्तव पालटा। येतसें जैं।।३४२।।
तैं भेदिलीं वृत्तिपंथें। वायुशक्ती गां एथें।
कर्मकारण चौथें। ऐसें जाण।।३४३।।

"अन्नसेवनाद्वारे रसरूपाने ती सर्व शरीरात प्रवाही होते. पण सांडत नाही. सर्व सांध्यांमध्ये तीच भरलेली आहे. समानत्वाने सर्व शरीरात राहते, म्हणून तिलाच *समान* असे म्हणतात. हे अर्जुना! तीच प्राणशक्ती जांभई, शिंक, ढेकर इ.मध्ये *नाग, कूर्म, कृकर* इ. भेद दाखवत प्रकटत असते. हे सुजाणा! प्राणांची ही विविध प्रकारची चेष्टा अशी प्रत्यक्षात देहांतर्गत व्यापारांच्या विविधत्वाने प्रकटत असली, तरी वास्तविक एकच एक अभिन्न अशी आहे. विविध वृत्ती प्रकाशात आणतांना वैविध्याने नटलेली ती प्राणशक्ती हे कर्मसिद्धीस आवश्यक ठरणारे चौथे कारण आहे."

५) इंद्रियाभिमानी देवता

आणि ऋतु बरवा शारदु। शारदीं पुढती चांदु।
चंद्रीं जैसा संबंधु। पूर्णिमेचा।।१८-३४४।।
कां वसंतीं बरवा आरामु। आरामींही प्रियसंगमु।
संगमीं आगमु। उपचारांचा।।३४५।।
नाना कमलीं पांडवा। विकासु जैसा बरवा।
विकासींही यावा। परागाचा।।३४६।।
वाचें बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व।
रसिकत्वीं परतत्त्व-। स्पर्शु जैसा।।३४७।।
तैसीं सर्ववृत्तिवैभवीं। बुद्धीची एकलीं बरवीं।
बुद्धीहीं बरव नवी। इंद्रियप्रौढी।।३४८।।
इंद्रियप्रौढीमंडला। शृंगारु एकचि निर्मला।
जैं अधिष्ठात्रियां कां मेला। देवतांचा।।३४९।।
म्हणौनि चक्षुरादिकां दाहें। इंद्रियां पाठीं स्वानुग्रहें।
सूर्यादिकां कां आहे। सुरांचें वृंद।।३५०।।
तैं देववृंद बरवें। कर्मकारण पांचवें।
अर्जुना एथ जाणावें। देवो म्हणे।।३५१।।

"आता पाचवे कारण ऐक. सहाही ऋतूंमध्ये जसा शरद ऋतू आहे, त्यातही शारदी रात्रीचे चांदणे जसे आल्हाददायक असते आणि ऐन पौर्णिमेचा चंद्र त्यात कशी बहार उडवून देतो; किंवा वसंत ऋतूत ऐशारामाची जशी अपूर्व गोडी असते, त्यातही प्रियकर व्यक्तीची मिलनोत्सुकता पूर्ण व्हावी व त्यात उपचारांची भर पडावी; किंवा साहित्यात काव्य जसे श्रेष्ठ असते, त्यातही रसपूर्णता जशी आनंद देते आणि त्या काव्याला वर परतत्त्वदर्शिता असली तर मग काय विचारावयाचे! तसेच सर्व क्रियाजातांच्या अंतरी बुद्धीचा प्रकाश पालवून, तिला इंद्रियसामर्थ्याची जोड मिळावी व त्या इंद्रियांच्या अभिमानी अशा सोमसूर्यादी सुरवरांच्या देवतावृंदाने अनुग्रह करावा याला तोड नाही. इंद्रियांच्या चैतन्यमय अशा त्या अधिष्ठात्या देवतावृंदासच *दैव* म्हणून संज्ञा आहे. हे दैव हेच कर्माचे पाचवे कारण होय."

या ठिकाणी जाताजाता एक गोष्ट नोंद घेण्यासारखी आहे. ती म्हणजे लो. टिळकांच्या मतेः आपल्या प्रयत्नांस अनुकूल वा प्रतिकूल असणारे जे इतर सृष्टिव्यापार, ज्यांची आपणास माहिती नसते, त्यांसच *दैव* असे म्हटले जाते. हा ठळक मुद्दा जिज्ञासूंनी लक्षात घेण्यासारखा आहे.

कर्माचे पाच हेतू

एवं माने तुझिये आयणी। तैसीं कर्मजातांची हे खाणी।
पंचविध आकर्णीं। निरूपिलीं।।३५२।।

कर्माचे स्वरूप

आतां हेचि खाणी वाढे। मग कर्माची सृष्टी घडे।
जिहीं हे हेतुही उघडें। दाऊं पांचैं।।३५३।।

"हे अर्जुना! तुझ्या बुद्धीला पटतील अशी ही कर्मजातांची पंचविध प्रकारांची सर्व कारणे मी निरूपिली आहेत. आता याही कारणांचे पंचविध हेतू, ज्यांच्यामुळे कर्मसृष्टी सृजते, ती तुला स्पष्टपणे उघड करून सांगतो. ते लक्षपूर्वक ऐक."

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः।
न्याय्यं वा विपरीतं वा पञ्चैते तस्य हेतवः।।१८-१५।।

"शरीर, मन व वाणीद्वारे जे जे विहित वा निषिद्ध कर्म मनुष्य करतो, त्याचे पाच हेतू आहेत." हे हेतू स्पष्ट करतांना ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं अवसांत आली माधवी। तै हेतु होय नवपल्लवीं।
पल्लव पुष्पपुंज दावी। पुष्प फलांतैं।।१८-३५४।।
कां वार्षिये आणिजे मेघु। मेघें वृष्टिप्रसंगु।
वृष्टीस्तव भोगु। सस्यसुखाचा।।३५५।।
ना तऱ्हीं प्राची अरुणांतैं विये। अरुणे सूर्योदय होये।
सूर्यो सगला पाहे। दिवो जैसा।।३५६।।
तैसें मन हेतु पांडवा। होय कर्मसंकल्पभावा।...।।३५७।।

"वसंतऋतुमुळे वृक्षवेलींना अकस्मात नवीन पालवी फुटून त्यातून पुष्पांचे भरगच्च गुच्छ प्रकटतात. त्यातच ती फळांनी लगडून जातात. या सर्वांचे कारण व हेतू वसंतऋतूच म्हटला जातो. अथवा वर्षाऋतू मेघांना आणतो. ते वृष्टी करून धनधान्य इ.चा सुकाळ करतात. त्यामुळे अन्न, पक्वान्ने इ.सुखदायक पदार्थ मिळतात. या सर्वांस कारणही वर्षा ऋतू व हेतूही वर्षाऋतूच असतो. किंवा पूर्व दिशा अरुणास प्रसवते. अरुणामुळे सूर्योदय होतो. सूर्यप्रकाशामुळे अवघा दिवस उगवतो. या सर्वांस सूर्यच जसा कारण व हेतू मानावा लागतो; त्याप्रमाणेच, हे पांडवा! कर्मसंकल्प करण्यासाठी मन हे हेतू आहे."

...तो संकल्पु लावी दिवा। वाचेचां गां।।१८-३५७।।
मग वाचेचां तो दिवटा। दावि कृत्यजातांचियां वाटा।
तेव्हां कर्ता रिगे कामठां। कर्तृत्वाचां।।३५८।.
तेथ शरीरादिक दलवाडें। शरीरादिकां हेतुचि घडे।
लोहकाम लोखंडें। निर्वालिजे जैसें।।३५९।।
कां तांथुवाचां ताणा। तांथु घालितां वैरणा।
तो तंतूचि विचक्षणा। होय पटु।।३६०।।
तैसें मनवाचादेहांचें। कर्म मनादि हेतुचि रचे।
रत्नीं घडे रत्नाचें। दलवाडे जेवीं।।३६१।।

"त्या संकल्पातून वाग्दीप प्रज्वलित होतो. हा दीपच समस्त कर्माचा पथ प्रकाशवितो आणि त्याच्या प्रकाशात कर्ता हा कर्तृत्वाच्या व्यापारात मग्न होतो. अशा शरीरादिक संघाताकडून करवल्या जाणाऱ्या कर्मांना शारीरिक कारणेच हेतूसुद्धा आहेत. लोखंडाची वस्तू जशी लोखंडानेच तयार केली जाते; किंवा तंतूच आडवे आणि उभे विणले असता त्याच तंतूंमुळे वस्त्र विणले जाते; त्याचप्रमाणे मनादींकडून जे कर्म होते, त्याचे कारण रत्नाचे पैलू जसे रत्नाच्या अंगचेच असतात; तसे शरीरादिकच हेतू होत."

कर्माची पाच कारणे हेच हेतु

एथ शरीरादिक कारणें। तेंचि हेतु केवीं हे कोणें।
अपेक्षिजे तऱ्हीं तेणें। अवधारिजो।।१८-३६२।।

"शरीरादिक कारणेच कर्माचे हेतूसुद्धा कसे होतात, ही शंका तुला आली असेल, तर पाहाः"

आइका सूर्याचिया प्रकाशा। हेतु कारण सूर्युचि जैसा।
कां ऊसां कांडें ऊंसा। वाढी हेतु।।१८-३६३।।
नाना वागदेवता वानावी। तैं वाचाचि लागे कामवावी।
कां वेदां वेदेंचि बोलावी। प्रतिष्ठा जैं।।३६४।।
तैसें कर्मे शरीरादिकें। कारण हें कीर ठाऊकें।
परि हेचि हेतु न चुके। हेही एथ।।३६५।।
आणि देहादिक कारणीं। देहादि हेतु मिलणीं।
होय जेयां उभारणी। कर्मजातां।।३६६।।
तैं शास्त्रार्थें मानलेयां। मार्गा अनुसरे धनंजया।
तऱ्हीं न्याय तो न्याया। हेतु होय।।३६७।।

"जसा सूर्याच्या प्रकाशाला कारण व हेतू सूर्यच असतो; किंवा उसाचे एक कांडे जसे दुसऱ्या कांड्याच्या वाढीसाठी कारण व हेतू असते; अथवा जेव्हा वाग्देवता सरस्वती स्तविली जाते, तेव्हा वाचेचाच उपयोग करावा लागतो; किंबहुना जसे वेदांची प्रतिष्ठा वानण्यासाठी वेदांनाच बोलावे लागते; त्याप्रमाणे कर्माची पंचविध कारणे शरीरादिक अधिष्ठान, कर्ता इ.च आहेत व तीच कर्माचे हेतूसुद्धा होत. शरीर, मन व वाचा यांच्या योगाने ही सर्व कर्मे संपन्न होतात व यांचा अंतर्भाव अधिष्ठानादिकात आपोआपच होतो. याप्रमाणे शास्त्राप्रमाणे जी जी कर्मे सिद्ध केली जातात, ती, हे धनंजया! न्यायच जसा न्यायाला हेतू असतो, तशी आपली आपणास हेतू होत."

न्याय्य व अन्याय्य कर्मे

जैसा पर्जन्योदकाचा लोटु। विपायें धरी सालिचा पाटु।
तऱ्हीं जिरे परि अचाटु। उपेगु आथी।।१८-३६८।।
कां रोषें निघालें अवचटें। पडिलें द्वारकेचिये वाटे।
तैं शिणु परि सुनाटें। न वचती पदें।।३६९।।
तैसें हेतुकारणमेळें। उठी कर्म जैं आंधळें।
शास्त्राचे लाहे डोलें। तैं न्याय्य म्हणिपे।।३७०।।

"दिशाहीन असतो, तरी पावसाच्या पाण्याचा लोट जर अवचितरीत्या साळीच्या शेतात शिरला, तर तेथे जिरून तो पिकास उपकारक ठरतोच की नाही! रागेजून घर सोडलेला मनुष्य

अकस्मात द्वारकेच्या वाटेने जाऊ लागला, तर कितीही चालण्याचे श्रम करावे लागले, तरी त्याचे कष्टणे सार्थकीच नाही का लागणार! त्याचप्रमाणे प्रकृतीच्या अधीन होऊन अधिष्ठानादी कारण व हेतूंद्वारे शरीर, मन व वाणी यांजकडून जे काही अनियंत्रित कर्म उद्भवते, त्यास जर शास्त्रदृष्टी लाभली, तर तेच कर्म न्याय्य वा शास्त्रविहित ठरते व अतीव लाभकर होते."

ना दूध वाढितां ठावो पावे। तंव उतौनि जाये स्वभावें।
तोहीं वेंचु परि नोहे। वेंचिलें तैं।।१८-३७१।।
तैसें शास्त्रसाह्येवीण। केलें नोहें जन्हीं अकारण।
तन्हीं लागो कां नागवण। दानलेखीं।।३७२।।
अगां बावन्ना वर्णापरौता। कोण मंत्रु आहे पांडुसुता।
कां बावन्नुही नुच्चारितां। जीवु आथी।।३७३।।

"याउलट जसे दूध तापवितांना लक्ष न दिल्याने ते भांड्याच्या काठापर्यंत आले की ऊतू जाऊन वाया जाते व त्याचा उत्तम विनियोग होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे अशा अनियंत्रित कर्मास शास्त्रसाहाय्य न मिळाल्यास ते वाया जाते. तसे होत नसते, तर चोरीस गेलेल्या द्रव्याची दानधर्मात गणना नसती का झाली! हे पांडुपुत्रा! ज्यात बावन्न वर्णातील अक्षरे नाहीत, असा कोणता मंत्र आहे! आणि बावन्न वर्णांचा उच्चार न केलेला असा मनुष्य तरी सापडेल का! असे असतांही मंत्राचे संविधान केल्यास जे फल प्राप्त व्हावयाचे असते, ते कोणा एखाद्यासच कधीतरी क्वचितच प्राप्त होते; याचे कारण काय आहे!"

परि मंत्राची कडसणी। जंव नेणिजे कोदंडपाणी।
तंव उच्चारफल वाणी। न पवे जेवीं।।१८-३७४।।
तेवीं कारणहेतुयोगें। जैं बिसाट कर्म निगे।
तैं शास्त्राचियें न लगे। कांसें जंव।३७५।।
कर्म होतचि असे तेव्हांही। परि तैं होणें नव्हे पाही।
तो अन्यायो गां अन्यायीं। हेतु जाणावा।।३७६।।

"हे कोदंडधारी अर्जुना! जोपावेतो मंत्रोच्चारणविधीची हातोटी प्राप्त झाली नाही, तोपावेतो वाणीला मंत्रोच्चाराचे फल जसे प्राप्त होत नाही; तद्वतच कारण व हेतू यांच्या योगाने जे काही कर्म यदृच्छया उत्पन्न होते, त्यास शास्त्राधार जोपावेतो लाभत नाही, तोपावेतो ते अन्याय्य वा विपरीत कर्मच ठरते. जसा *न्याय्य* कर्मास न्यायदृष्टी हेतू असते, तशीच *अन्याय्य* कर्मास न्यायदृष्टीचा अभाव हा हेतू असतो."

ज्ञान्याचे नैष्कर्म्य::::

ज्ञानी व मूढ यातील फरक

यांप्रमाणे जे काही न्याय्य वा विपरीत कर्म शरीर, मन वा वाणीद्वारे होते, त्याचे कारण व हेतू *अधिष्ठान, कर्ता जीव, विविध इंद्रिये, त्यांचे प्राणादींमुळे होणारे विविध व्यापार व त्यातील चेतनेच्या अधिष्ठात्र्या देवता वा दैव अशी पंचविध* असल्याचे स्पष्ट केल्यावर श्रीगोपाल हे न जाणणाऱ्या मूढात्म्यांबद्दल म्हणतात की:

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः।।१८-१६।।

"सकल कर्मांची पंचविध कारणे व हेतू ही अशी वेगळी आहेत. तरी पण बुद्धी सुसंस्कृत नसल्याने जो आत्म्यास कर्ता समजतो, तो मूढ होय; त्याला वस्तुस्थिती जाणून घेता येत नाही."

परंतु हे सर्व यथार्थ जाणणारा खरा ज्ञानी असतो. कारणः

यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते।
हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते।।१८-१७।।

"अशा ज्ञान्याठायी आपण कर्ता आहोत, असा अहंकार नसतो. त्याची बुद्धी विकारांपासून अलिप्त असते. प्रकृतीच केवळ कर्तृत्ववान आहे, आत्मतत्त्व निर्लेप आहे, हे सर्वथैव आकळले असल्याने तो स्वतःकडे कोणत्याही कर्माचे कर्तृत्व घेत नाही. म्हणून त्याने जरी सर्व जगताला मारले, तरी तो कोणालाही मारीत नाही व कोणत्याही कर्माने तो बद्ध होत नाही."

देहाहंकार हीच मूढता

कर्मांची निष्पत्ती कशी होते, हे स्पष्ट केल्यानंतर ते न जाणणाऱ्या मूढांविषयी ज्ञानदेव म्हणतातः

एवं पंचकारणा कर्मा। पांचही हेतु हे सुमहिमा।
आंत येथ पाहे पां आत्मा। सांपडला असे।।१८-३७७।।
भानु न होनि रूपें जैसीं। चक्षु रूपातें प्रकाशी।
आत्मा न होनि कर्मे तैसीं। प्रकटित असे गां।।३७८।।
पाही प्रतिबिंब आरिसा। दोन्हीं न होती वीरेशा।
दोहींतैं प्रकाशी जैसा। न्याहालितां तो।।३७९।।
कां अहोरात्र सविता। न होनि करी पांडुसुता।
तैसा आत्मा कर्मकर्ता। न होनि दावी।।३८०।।

"हे सत्कीर्तिमंत अर्जुना! याप्रमाणे पाच कारणे असणाऱ्या कर्माचे पाच हेतूही हेच होत. यांच्यात कोठेतरी आत्मा आहे का! स्वतः दृश्यरूप न होता, चक्षू आणि दृश्ये वा दृश्य पदार्थ यांना सूर्य जसा प्रकाशतो, त्याप्रमाणे कर्म वा कर्माचे कारण किंवा कर्ता यातील काहीच न होता, तो *आत्मराज* या सर्वांस प्रकटवतो. आरसा व त्यातील प्रतिबिंब यातील काहीच न होतात, आरशात स्वतःस न्याहाळणारा जसा आरसा व आपले प्रतिबिंब यांचा योग घडवून आणतो; किंवा दिवस व रात्र यातील काहीच न होता, सूर्य जसा त्यांना प्रकट करतो; त्याप्रमाणे कर्म किंवा कर्ता यांपैकी एकही स्वतः नसतांना, आत्मा त्यांना प्रकटवितो."

परि देहाहंभिमानभुलीं। जेयांचि बुद्धि देहिंचि आंतली।
जेयां आत्मविखीं जाली। मध्यरात्री।।१८-३८१।।
जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा। देहचि केली परमसीमा।
तेयां आत्मा कर्ता हे प्रमा। अलोट उपजे।।३८२।।

आत्माचि कर्ता। हाही निश्चयो नहीं तत्त्वतां।
देहोचि मी कर्मकर्ता। मानी तो सांच।।३८३।।

"हे पांडुपुत्रा! असे आहे तरीसुद्धा देहाहंकाराची भूल पडल्याने ज्यांची बुद्धी देहाव्यतिरिक्त काहीही जाणण्यास असमर्थ झाली असते, त्यांना आत्मविषयी रात्रच असे असणारे अज्ञान ग्रस्त करते. लोकांनी चैतन्यस्वरूप अशा त्या ईश्वराला, त्या ब्रह्माला देहाची खोळ मानून आत्माच कर्ता आहे, अशी आपली ठाम समजूत करून घेतलेली असते. किंबहुना आत्माच सर्वकर्मकर्ता आहे, असासुद्धा त्यांचा ठाम निश्चय नसतो. कारण देहासच सर्वस्व समजत असल्याने, ते देहालाच सर्व कर्मांचा कर्ता समजतात. त्यांच्या दृष्टीने देह हाच आत्मा असतो"

जैं आत्मा मी कर्मातीतु। सर्वकर्मसाक्षिभूतु।
हे आपुली कंहीं मातु। नायकेचि कानीं।।१८-३८४।.
म्हणोनि उपमा आत्मयांतें। देहचिवरी मविजे एथें।
विचित्र काईं दिवसांतें। डुडुल न करी।।३८५।।

"त्यामुळे हे अर्जुना! त्यांना माझे म्हणणे की *'मीच सर्व कर्मातीत आत्मा आहे; मी सर्व कर्मांस प्रकटवितो. पण असे असूनही सर्व कर्मांचा मी केवळ साक्षिमात्र आहे;'* हे साधे ऐकून पण घ्यायचे नसते. घुबड रात्रीलाच दिवस अन दिवसाला रात्र समजून जसे सर्व व्यवहार करते, त्याप्रमाणे आत्म्याला देह अन अनात्म्याला आत्मा समजून आपले विचित्र व्यवहार असे लोक चालवतात. अमर्याद आत्म्याला देहात मर्यादित करण्याचे अचाट कर्तृत्व ते याच लोकांचे!"

पैं जेणें आकाशींचां कंहीं। सांचु सूर्यु देखिला नाहीं।
तो थिल्लरींचें बिंबें काईं। मानूं न लाहे।।१८-३८६।।
थिल्लराचेनि जालेपणें। सूर्यासी आणि होणें।
तेयाचां नाशीं नाशणें। कंपें कंपु।।३८७।।
अगां निद्रितां चेवो न ये। तंव स्वप्न सांच हो लाहे।
रज्जु नेणतां सापा बिहे। विस्मो कवण।।३८८।।
जंव कवल आथि डोलां। तंव चंद्रु देखावा कीं पिंवला।
काय मृगीही मृगजलां। भालावें ना।।३८९।।

"ज्याने आकाशातील खरा सूर्य कधी पाहिलाच नाही, तो डबक्यात पडलेल्या सूर्यबिंबास सूर्यच समजणार नाही का! डबके आटले की त्या सूर्याचा नाश होतो आणि त्यातल्या पाण्यावर तरंग आले की सूर्यबिंबाचा थरकाप होतो आहे असे त्याने समजले, तर त्यात काय नवल! अर्जुना! झोपी गेलेला मनुष्य जोपावेतो जागा होत नाही, तोपावेतो तो स्वप्नास सत्यच समजत नाही काय! दोरीस सर्प समजणारा भ्याला तर त्यात नवल ते काय! कावीळ झालेल्यास चंद्र पिवळाच दिसतो. मृगजळास हरीणांनी खरे मानून त्याच्याकडे धाव घेतलीच पाहिजे, नाही का!"

तैसा शास्त्रगुरुचेनि नांवें। जो वाराही टेंकू ने दे सिंवें।
केवल मौढ्याचेनिचि जीवें। जियाला जो।।१८-३९०।।
तेणें देहात्मदृष्टीमुलें। आत्मया घापे देहाचें जालें।
जैसा अभ्राचा वेगु कोल्हे। चंद्रीं मानी।।३९१।।
मग तेया मानणेयासाठी। देहबंदीशाले किरीटी।
कर्माचां वज्रगांठीं। कलासे तो।।३९२।।

"अशाच प्रकारे ज्यांनी *शास्त्र व गुरू* यांच्या नावाचा वारासुद्धा आपल्या शिवेवर येऊ दिलेला नाही आणि निव्वळ मूर्खतेलाच आपले जीवित वाहिले आहे - किंबहुना मूर्खत्व हेच ज्यांच्या जीवस्थानी आहे, त्यांनी कोल्हा जसा ढगांची गती चंद्राच्या ठिकाणी पाहातो, तसे आत्म्याला देहाच्या जाळ्यात घातलेले असते. अर्जुना! अशा अज्ञान्यांनी देहासच आत्मा समजल्यामुळे देहरूपी बंदिशाळेत आत्म्यास कर्माच्या वज्रगाठींनी बांधून कैद केलेले असते."

पाहे पां बंधभावना दृढा। नलियेवरी तो बापुडा।
काय मोकलेपणींही चवडा। न ठकेचि पुंसा।।१८-३९३।।
म्हणौनि निर्मलु आत्मस्वरूपीं। जो प्रकृतीचें केलें आरोपी।
तो कल्पकोडींचां मापीं। मवीचि कर्में।।३९४।।

"असे पाहा की आपण नलिकेला जखडलेलो आहोत, असे समजणारा शुकपक्षी, तसे नसतांनाही, त्याचे पंजाचे चवडे बांधलेले नसूनही, तसेच ठामपणे समजून फसत नाही का! म्हणून निर्मल अशा आत्मरूपाठायी प्रकृतीने केलेल्या कर्मांचा आरोप करणारे ते अज्ञ जन कोट्यवधी कल्पांपर्यंत त्या आत्म्याने केलेल्या कर्मांस मोजत राहत बंधनात अडकतात."

नित्यमुक्त ज्ञानी व संत

आता नित्यमुक्त अशा ज्ञान्यांची स्थिती पाहाः

आता कर्मामाजी असे। परि तेयांतें कर्म न स्पर्शे।
वडवानलातैं जैसें। समुद्रादिक।।१८-३९५।।
तैसेनि वरगलेपणें। जेयाचें कर्मीं असणें।
तो कीर जाणावा कवणें। तन्हीं सांगो।।३९६।।
जैं मुक्तातें निर्धारितां। लाभे आपुलीच मुक्तता।
जैसीं दीपें दिसें पाहतां। आपुली वस्तू।।३९७।।

"नित्यमुक्त असा ज्ञानी पुरुष म्हणजे समुद्रात असणाऱ्या वडवानलास जसा पाण्याचा स्पर्शही नसतो, तसा कर्मात असूनही कर्मांनी न स्पर्शिलेला असा असतो. असा कर्मात रत असूनही कर्मांपासून अलिप्त असणारा पुरुष कसा ओळखावा, हे सांगतो. कारण की ज्याप्रमाणे काळोखातील वस्तू दिव्याच्या उजेडात पाहिली असता आपली आपणास गवसते, त्याप्रमाणे मुक्त पुरुषांची अवस्था जाणून घेण्याने आपल्याला पण आपली स्वयमेव मुक्तस्थिती लाभते."

नाना आरिसा जंव उटिजे। तंव आपणपयां आपण भेटिजे।
कां पाणी पावतां पाणी होईजे। लवणें जेवीं।।१८-३९८।।

हे असो परतौनि मागुतें। प्रतिबिंब पाहे बिंबातें।
तंव पाहणें जाऊनि आयितें। बिंबचि होय।।३९९।।
तैसें हारपलें आपणपें पावे। तैं संतांतैं पाहातां गिंवसावें।
म्हणौनि वानावें ऐकावें। तेचि सदा।।४००।।

"आरसा जसजसा उजळावा, तसतसे आपणास आपले प्रतिबिंब सापडत जाते; किंवा मिठास पाणी भेटले असता त्याचेही पाणी होऊन जाते. किंबहुना प्रतिबिंब उलटून जेव्हा मूळ बिंबास पाहू जाते, तेव्हा पाहण्याची क्रिया संपून निव्वळ बिंबच उरते. म्हणून आपले हरपलेले आत्मस्वरूप आपणास प्राप्त व्हावे अशी इच्छा असणाऱ्यांनी संतांचा शोध घ्यावा. संतांचेच सद्गुण वानावेत व ऐकावेत. म्हणजे आपले ते हरवलेले आत्मस्वरूप आपणास गवसते."

तऱ्हीं कर्मीं असौनि कर्मे। जो नावरे समें विषमें।
चर्मचक्षूंचेनि चामें। दृष्टि जैसीं।।१८-४०१।।
तैसा सोडविला जो आहे। तेयाचें रूप आतां पाहे।
उपपत्तीची बाहें। उभऊनि सांगो।।४०२।।

"ज्याप्रमाणे चर्मचक्षूतील दृष्टी कातडीने वेढलेली असूनही त्याद्वारे लिप्त होत नाही, त्याप्रमाणे कर्माच्या पसाऱ्यात गुरफटलेले दिसत असूनही त्या बऱ्यावाईट कर्मांनी जो बांधला जात नाही, त्या कर्मांनी जो लिप्त होत नाही; त्याचे - त्या सत्पुरुषाचे - त्या ज्ञान्याचे - यथातथ्य वर्णन सांगतो, ते ऐक."

आत्मभाव

अशा ज्ञान्याचे वर्णन करतांना ज्ञानेशांच्या वाणीस चढणारे स्फुरण पहाः

तऱ्हीं अविद्येचियां निदा। विश्वस्वप्नाचा हा धांदा।
भोगीत होता प्रबुद्धा। अनादि जो।।१८-४०३।।
तो महावाक्याचेनि नांवें। गुरुकृपेचेनि थांवें।
माथां हातु ठेविला नोहे। थापटिला जैसा।।४०४।।
तैसीं विश्वस्वप्नेंसीं माया। नीद सांडूनि धनंजया।
सहसा चेईला अद्वया-। नंदपणें जो।।४०५।।
तेव्हा मृगजलाचें पूर। दिसते एक निरंतर।
हारपति कां चंद्रकर। फांकतां जैसें।।४०६।।
कां बालत्व निघौनि जाय। तैं बागुल नाहीं त्राय।
पैं जललियां इंधन न होय। रंधन जेवीं।।४०७।।
नाना चेवो आलियां पाठीं। तैं स्वप्न न दिसे दिठी।
तैसीं अहंममता किरीटी। नुरेचि तेयां।।४०८।।

"हे सुजाण अर्जुना! अविद्यारूपी निद्रेत विश्वरूपी स्वप्न पाहण्यात दंग झालेल्या अनादिरूप अशा त्या जीवास महावाक्याने हाक मारून, त्याच्या माथी हाताने थोपटून, आपल्या सामर्थ्याने जागे करते, ती गुरुकृपा! त्यासरशी विश्वस्वप्नासह मायारूपी निद्रा टाकून देऊन, हे धनंजया! तो जीव आपण अद्वयानंदरूप आहोत, या भानावर येतो. मग त्यावेळी, चंद्रकिरणे फाकल्यावर मृगजळ जसे नाहीसे व्हावे; किंवा बालपण सरले की बागुलबुवाचे त्राण नाहीसे व्हावे; किंवा लाकडे जळून इंधन सरले की जसा स्वयंपाक होत नाही; अथवा जागृत झाल्याबरोबर स्वप्न जसे दिसत नाही; त्याप्रमाणे त्या अद्वयानंदबोधाने जागृत झालेल्या जीवाची अहंममत्वबुद्धी नाहीशी होते."

मग सूर्युचि अंधारालागीं। रिघो कां भलते सुरंगीं।
परि तो तेयांचां भागीं। नाहींचि जैसा।।१८-४०९।।
तैसा आत्मत्वें वेठिला होये। तो जेया तेयां दृश्यातें पाहे।
तैं दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये। तेयाचेचि रूप।।४१०।।

"हे किरीटी! मग अंधाराचा मागोवा घेण्यासाठी म्हणून काळोख्या विवरात सूर्य प्रवेशला, तरी त्याच्या वाट्याला अंधार जसा येत नाही; त्याप्रमाणे जो आत्मभावाने वेष्टिला जातो, त्याला दृश्य असे ते काहीच उरत नाही. कारण तो ज्या ज्या पदार्थाला पाहतो, तो तो पदार्थ - ते ते दृश्य - द्रष्टेपणासह त्या आत्मस्वरूपाचेच होत जाते."

जैसा वह्नी जेयां लागे। तैं वह्नीचि जालियां आंगें।
दाह्यदाहक विभागें।सांडिजे तैं।।१८-४११।।
तैसा कर्माकारा दुजेया। तो कर्तेपणाचा आत्मेयां।
अवलाहो ये तैं गेलेयां। कांहीं बाहीं जैं उरे।।४१२।।
तिये आत्मस्थितीचा जो रावो। मग तो देहीं इयें जाणेल ठावो।
काय प्रलयांबुचा उन्नाहो। वोघु मानीं।।४१३।।

"जेव्हा एखाद्या पदार्थास अग्नी जाळतो, तेव्हा तो पदार्थ अग्निरूप होऊन जाळणारा अग्नी व जळणारा पदार्थ असा भेद उरत नाही. त्याप्रमाणे एकदा आत्माकार वृत्ती झाली की तत्पूर्वी असणारा आत्मा व तो कर्ता आहे, हा त्याच्यावरचा कर्माच्या कर्तृत्वाचा असणारा आरोप हे दोन्हीही वेगळे उरत नाहीत. असा जो आत्मस्थितीचा राजा होतो, त्याला देह व कर्म आणि त्याचे कर्तृत्व या गोष्टींची वार्ता कुठून असणार! प्रळयकाली सर्वदूर पसरून विश्व व्यापणारा उदधी काय आपणास एखादा जलौघ समजेल!"

तैसीं तैं पूर्ण अहंता। काईं देहपणें पांडुसुता।
आवरे काईं सविता। बिंबें धरिला।।१८-४१४।।
पैं मथूनि लोणी घेपें। तैं मागुती ताकीं घापें।
तन्हिं तैं अलिप्तपणें सिंपे। तेणेंसीं काईं।।४१५।।
नाना काष्ठौनि वीरेशा। वेगलाविलियां हुताशा।
राहे काष्ठाचिया मांदुसा। कोंडलेपणें।।४१६।।
कां रात्रीचियां पोटांआंतु। निगाला जो हा भास्वतु।
तो रात्री ऐसा मातु। ऐकें काईं।।४१७।।

"हे पांडुपुत्रा! अशा प्रकारे बाह्याकार वृत्ती झाली की कधीतरी तो पुरुष देहाहंकाराने आवरला जाईल काय! तसे झाले तर प्रतिबिंब बचकीत पकडल्याने सूर्यासच पकडता आल्यासारखे नाही का

होणार! ताक घुसळून लोणी काढल्यावर पुनः ते ताकात घातले, तर त्याचे परत ताक होईल का! हे वीरश्रेष्ठा! काष्ठांचे घर्षण करून एकदा अग्नी उत्पन्न केला की तो लाकडाच्या पेटीत बंदिस्त करून ठेवता येईल काय! अथवा रात्रीच्या गर्भातून जन्म घेणाऱ्या रवीस रात्र माहीत तरी असते काय!"

तैसें वेद्य वेदकपणेंसीं। पडिलें कां जेयाचें ग्रासीं।
तेयां देह मी ऐसीं। अहंता कैंची।।१८-४१८।।
आणि आकाशें जेथे जेथूनि। जाईजे तेथ असे भरौनि।
म्हणौनि ठेलें कोंदौनि। आपें आप।।४१९।।
तैसें जैं तेणें करावें। तो तैंचि आहे स्वभावें।
मां कोण्हें कर्मी वेठावें। कर्तेपणें।।४२०।।

"त्याप्रमाणे ज्ञानसूर्य उगवल्यामुळे जो ज्ञात्यासह संपूर्ण ज्ञेय आत्मसात करून बसला आहे, त्याला देहाहंतेचा स्पर्श तरी होईल काय! आणि आकाश इकडून तिकडे जाऊ असे म्हणू लागले, तर त्याने जायचे तरी कसे अन कोठे! कारण सर्वदूर आकाशच आकाश दाटले आहे. याचप्रमाणे त्या ब्रह्मीभूत पुरुषाने करावे असे कोणते कर्म आहे की जे तो स्वतःच नाही!"

ज्ञान्याचे प्रारब्ध

नुरेचि गगनाविण ठावो। नोहेचि समुद्रा प्रवाहो।
नुठीच ध्रुवा जावो। तसें जाहलें।।१८-४२१।।
ऐसेनि अहंकृति भावो। जेयाचां बोधीं जाहला वावो।
तऱ्हीं देहा जंव निर्वाहो। तंव आथी कर्में।।४२२।।

"सर्वत्र स्थित असल्यामुळे आकाशाशिवाय असलेली रिकामी जागा कोठे असेल काय! सर्व प्रवाह जरी त्याला येऊन मिळत असले, तरी समुद्रास प्रवाह असतो काय! आपल्या स्थानी अढळपद पावलेल्या ध्रुवताऱ्यास भ्रमणे असते काय! याचप्रमाणे त्या शांत्यवस्थित पुरुषाचे असते. कर्तृत्वाचा अहंकार त्याच्या अंगीभूत झालेल्या ज्ञानामुळे नष्ट झालेला असतो. परंतु जोवर शरीरादी आहेत, तोवर त्यांद्वारे कर्मे होतच राहतात."

अगां वारा जऱ्हीं वाजोनि वोसरे। तऱ्हीं तो डोल रुखीं उरे।
कां सेंदें द्रुती राहे कापुरें। वेंचलेनि।।१८-४२३।।
कां सरलेया गीताचा समारंभु। न वचे राहवलेपणाचा क्षोभु।
भूमी लोळूनि गेलियां अंबु। बोल थारे।।४२४।।
अगां मावललेनि अर्कें। संध्येचिये भूमिके।
ज्योतीदीप्ती कौतुकें। दिसे जैसीं।।४२५।।
पैं लक्ष भेदिलियाही वरी। बाण धांवेंचि तंववरी।
जंव भरली आथी उरीं। बलाची तैं।।४२६।।
नाना चाकीं भांडें जालें। तैं कुंभारें परतें नेलें।
परि भ्रमेचि तें मागिलें। भोवंडिलेपणें।।४२७।।
तैसा देहाभिमानु गेलियां। देह जेणें स्वभावें धनंजया।
जालें तैं आपैसया। चेष्टवीचि तें।।४२८।।

"वारा वाहायचा जरी थांबला, तरी त्यामुळे हलणारे वृक्ष जसे नंतरही डोलत राहतात; करंडीतील कापूर उडून गेल्यावरही तिथे जसा त्याचा सुवास उरतो; संगीताची मैफल सरली तरी तिचा मनावरचा कैफ जसा उतरत नाही; भूमीवर लोळण घेतलेला पाण्याचा प्रवाह जरी आटला, तरी जमिनीची ओल मागे राहातेच; अथवा सूर्य जरी मावळला, तरी संध्येच्या रूपाने त्याचा प्रकाश जसा मागे राहातो;आणि लक्ष्य भेदल्यानंतरही बाणाची गती जशी त्यातील आवेग जोवर ओसरत नाही, तोवर रुद्ध होत नाही; किंबहुना कुंभाराने मडके आकारण्यासाठी चक्रास दिलेला गतीमुळे मडके तयार होऊन जरी त्यावरून उचलून घेतले, तरी ते चाक जसे बराच वेळ भ्रमत राहते; त्याचप्रमाणे अंगी असलेला देहाहंकार जरी ज्ञानामुळे नष्ट झाला तरीही, हे धनंजया! ज्या प्रारब्धवशात देह निर्माण झाला होता, त्या प्रारब्धाचा जोर ओसरून जाईतोवर ज्ञान्याचा देहसुद्धा कर्मचेष्टा करतच राहतो."

संकल्पेंवीण स्वप्न। न लावितां दांगीचें बन।
न रचितां गंधर्वभुवन। उठी जैसें।।१८-४२९।।
आत्मयाचेनि उद्यमेंवीण। तैसें देहादि पंचकारण।
होय आपणयां आपण। क्रियाजात।।४३०।।

"संकल्प न करताच जसे स्वप्नीचे व्यापार होतात; लागवड न करताच वनातील वृक्ष जसे आपोआप वाढतात; कोणी बांधल्याशिवायच जशी आकाशात गंधर्वभुवने रचली जातात; त्याप्रमाणे आत्म्याने काहीही न करताच देहादी पांच कारणे आपला आपणच शरीराचा कर्मव्यापार चालवितात."

ज्ञान्याचे कर्म व कर्तृत्व

पैं प्राचीन संस्कारशेखें। पांचही कारणें सहेतुकें।
कामवीजती गां अनेकें। कर्माकारें।।१८-४३१।।
तेयां कर्मामाजीं मग। संहरो आघवें जग।
अथवा नवें चांग। अनुकरो।।४३२।।
परि कुमुद कैसेनि सुके। तैं कमल कैसें फांकें।
ही दोनहीं रवी न देखें। जियापरी।।४३३।।
कां वीजु वरिषोनि आभाल। ठिकरिया आतो भूतल।
अथवा करूं शाड्वल। पर्जन्यवृष्टी।।४३४।।
परि तेयां दोहींतेंही जैसें। नेणिजेचि कां अकाशें।
तैसा देहींचि जो असे। विदेहदृष्टी।।४३५।।
तो देहादिकीं चेष्टीं। घडतां मोडतां हे सृष्टी।
न देखें स्वप्न किरीटी। चेईला जैसा।।४३६।।

"कारण प्राक्तनातील जे संस्कार त्याच्या देहाबाबत शिल्लक असतात, त्यांच्यामुळे ही त्याची देहादी कर्मकारक अशी पंचविध कारणे त्याच्याकरवी अनेक प्रकारची कर्मे संपन्न करवतात. मग त्या कर्मांद्वारे जगाचा संहार होवो अथवा नवे जग निर्माण होवो! ज्याप्रमाणे चंद्रकमळ कसे कोमेजते किंवा सूर्यकमळ कसे उमलते,

हे जसे रवीच्या जाणिवेत येत नाही; अथवा आभाळातून वीजा पडून पृथ्वीच्या ठिकऱ्या झाल्या किंवा पर्जन्यवर्षावाने भूमी सुजलां सुफलां झाली, तरी आकाशास जशी त्याची वार्ताही नसते; त्याप्रमाणे देहात वावरूनही जो विदेही असतो, त्या महाभागास आपल्या देहादी संघाताद्वारे यासृष्टीची जी घडामोड होते त्याची, जागृतावस्थेतील मनुष्यास स्वप्न जसे दिसत नाही तद्वत वार्ताही नसते."

एऱ्हवीं चामाचें डोळेंवरी। जैं देखती देहचिवरी।
तैं कीर तो व्यापारी। ऐसेंचि मानिती।।१८-४३७।।
कां तृणाचा बाहुला। जो आगरमेरें ठेविला।
तो सांचचि राखता कोल्हा। मानिजे ना।।४३८।।
पिसें नेसलें कां नागवें। हे लोकीं येऊनि जाणावें।
ठाणोरियाचें मवावें। आणिकीं घाय।।४३९।।
कां महासतीचें भोग। देखें कीं सकल जग।
परि तैं आगीचि ना आंग। ना लोकु देखें।।४४०।।
तैसा स्वस्वरूपें उठीला। जो दृश्येंसीं द्रष्टा आटला।
तो नेणें काय राहाटिला। इंद्रियग्रामु।।४४१।।

"एरवी इतर वरवर पाहाणाऱ्यांस मात्र तो कर्मे करणारा कर्ता आहे, असेच वाटत असते. गवताचे केलेले बुजगावणे शेताच्या मेरेवर ठेवले जाते, त्यास कोल्हा खरोखरचा रखवालदार समजतोच की नाही! वेड्यापिशा मनुष्याने कपडे घातले आहेत की तो विवस्त्र आहे, याची त्याला गंधवार्ता पण नसते. हवे तर इतर लोकांनी येऊन ते जाणून घ्यावे! महासतीची सौभाग्यलेणी व शृंगारादी सोहोळा जरी सगळ्या लोकांच्या नजरेसमोर दिसला, तरी तिला स्वतःला ना त्याची जाणीव असते, ना लोकांची, ना अग्नीची वा त्यात जळणाऱ्या आपल्या देहाची! याप्रमाणेच जो आत्मस्वरूपात विहरत असतो, त्या जीवन्मुक्तास, त्याच्या द्रष्टा व दृश्य या दोन्ही सापेक्ष भावांचा लोप झालेला असल्याने, आपला इंद्रियसंघात कोणती कर्मे करत आहे, हे जाणवत नाही."

द्वैताद्वैतविवर्जित अवस्था

अगां थोरी कल्लोळीं कल्लोल सानें। लोपतां तीरींचेनि जनें।
एकीं एक गिळालें हे मनें। मानिजे जऱ्हीं।।१८-४४२।।
तऱ्हीं पाणियाकडें पाही। कोणें गिळिजत आहे काईं।
तैसें पूर्णा दुजें नाही। जैं तो मारी।।४४३।।
सोनयाचियां चंडिका। सुवर्णशूळेंचि देखा।
सोनियाचियां महिखा। नाशु केला।।४४४।।
तो देवलवासिया कडा। व्यवहारु गमला फुडा।
वांचूनि शूल महिष चामुंडा। सोनेंचि आहे।।४४५।।

"अर्जुना! जलाशयाकडे तीरावरून पाहाणाऱ्यास मोठ्या लाटा लहान लाटांना सामावून घेतात असे दिसते. पण पाण्याच्या दृष्टीने पाहिले तर मोठ्या लाटा अन लहान लाटा असा भेद कोठे असतो! पूर्ण पुरुषाचेही असेच असते. त्याने कोणास मारलेले दिसले, तरी विश्वाकार झालेल्या त्याच्या अहंतेत मी मारणारा व दुसरा मारला जाणारा असा भाव कोठे असणार! सुवर्णमय चंडिकेच्या मूर्तीतील तिच्या हातच्या सोन्याच्या त्रिशूलाने सोन्यापासून घडवलेल्या महिषासुरास मारले आहे, असे मूर्तीकडे पाहणाऱ्या भक्तांस भावत असते. पण वस्तुतः असा व्यवहार घडेलच कसा! कारण तिन्ही गोष्टी सोन्याच्याच बनवलेल्या असून नकली आहेत; निर्जीव आहेत. सोनेच सोन्याचा घात करत आहे, असे वाटणे कितपत सुज्ञतेचे आहे!"

पैं चित्रींचें पाणी हुताशु। तो दिठीचि भागु आभासु।
पटीं आगी वोलांशु। दोन्हीं नाही।।१८-४४६।।
मुक्ताचें देह तैसें। हालत संस्कारवशें।
देखौनि लोक पिसे। कर्ता म्हणती।।४४७।।
आणि तेयां करणेयांआंतु। घडो तिहीं लोकां घातु।
परि तेणें केला हे मातु। बोलोचि नये।।४४८।।

"पटावर रंगवलेल्या चित्रातील पाणी व अग्नी जरी हुबेहूब खरेखुरे भासत असले, तरी तेथे पाणी - जलांश, ओलेपणा वा अग्नी व त्याची दाहकता ही दोन्हीही नसतात. तसेच जीवन्मुक्त पुरुषांच्या देहाकडून प्रारब्धसंस्कारवश कर्मे होतांना जरी दिसत असली व म्हणून इतरेजन भ्रमाने त्यांना कर्ते समजत असले, तरी तसे वस्तुतः नसते - अगदी त्या मुक्ताकडून कधी काळी संपूर्ण जगाचा नाश केला गेला, तरी तो त्याने केला, ही भाषाच तेथे गैर आहे."

तंव अंधारुचि देखावा तेजें। मा तैं फेडी हे कें बोलिजे।
तैसें ज्ञानियां नाही दुजें। करील कायी।।१८-४४९।।
म्हणौनि तेयाचि बुद्धि। नेणें पापपुण्याची गंधी।
गंगा मिनलियां नदी। विटालु जैसा।।४५०।।
आगीसीं आगी झगटलया। काय पोले धनंजया।
कीं शस्त्र रुपे आपणयां। आपणचि।।४५१।।
तैसें आपणयापरतें। जो नेणें क्रियाजातातें।
तेथ काय लिंपवी बुद्धितें। तेयाचिये।।४५२।।

"तेजास अंधाराची ओळख तरी असते का की सूर्याने म्हणावे की त्याने अंधार नाहीसा केला म्हणून! ज्ञानी पुरुषासही मी व इतरेजन असा भाव नसतो. त्याच्या बुद्धीला पापपुण्य या भावना स्पर्शतही नाहीत. गंगेला मिळणाऱ्या इतर नद्यांचे जल गंगाजलाइतकेच पवित्र होतेच ना! अग्नीस अग्नीने होरपळले आहे, असे म्हणता येईल का! अथवा शस्त्र आपले आपणासच रुतले, असे होते का! आपणापेक्षा कर्म वेगळे म्हणून न जाणणाऱ्या, कर्तेपणाचा अहंकार न वागवणाऱ्या ज्ञान्याची बुद्धी तशीच त्या कर्मे इ.नी लिप्त होत नाही."

"तो साक्षी चिद्रूपु"

आपली अहंता, आपले अस्तित्व हे असे विश्वरूपात विसर्जित करणाऱ्या त्या महाभागाबद्दल म्हणूनच ज्ञानेश असे म्हणतात कीः

म्हणौनि कार्य कर्ता क्रिया। हे स्वरूपचि जाहालें जेयां।
नाहीं शरीरादिकीं तेयां। कर्मी बाधु।।१८-४५३।।
जो कर्ता जीव विंदाणी। काढूनि पांचैं खाणी।
घडित आहे करणीं। आउतीं दाहैं।।४५४।।
तेथ न्यावो आणि अन्यावो। हा द्विविधु साधूनि आवो।
उभवितां न लवी खेंवो। कर्मभुवनें।।४५५।।
या थोराडा कीर कामा। विरजा नोहे आत्मा।
परि म्हणसी हन उपक्रमा। हातु लावी।।४५६।।

"कर्ता, कर्म व क्रिया यांची त्रिपुटी स्वस्वरूपी लीन असलेल्या त्या आत्मवंतास त्याच्या शरीरादिक संघाताकडून केल्या जाणाऱ्या कर्मांचे बंधन नसते. आणि कर्त्या जीवाकडून अधिष्ठानादी पाच कारणांच्या भांडवलावर करण *(इंद्रिये)* रूपी दहा आऊते जुंपून जो उपजीविकेचा व्यापार *कर्म* या नावाचा होतो, त्यांच्यातून न्याय्य व अन्याय्य अशा कर्मांच्या आकाराची कर्मभुवने सहजच निर्मिली जातात. अशा या अचाट कर्तृत्वास आत्मा कारण होत नाही."

तो साक्षी चिद्रूपु। कर्मप्रवृत्तीचा संकल्पु।
उठी तो कां निरोपु। आपणचि दे।।१८-४५७।।
तऱ्हीं कर्मप्रवृत्तीही लागीं। तेयां आयासु नाही आंगीं।
जैं प्रवृत्तीचियें उलिगीं। लोकुचि आथी।।४५८।।
म्हणौनि आत्मयाचें केवल। जो रूपचि जाहला निखिल।
तेयां नाही बंदिशाल। कर्माची हे।।४५९।।

"आणि त्यांचा आरंभसुद्धा या आत्म्याकडून केला जात नाही. *निव्वळ साक्षीभूत चिद्रूप असा तो आत्मा आहे.* कर्मप्रवृत्तीचा जो संकल्प होतो, तो करण्यास निमित्तसुद्धा ते आत्मतत्त्व नसते. म्हणून जी कर्मप्रवृत्ती व तिचा संकल्प म्हणून ख्यात आहेत, ती त्या आत्म्याची नसून अधिष्ठानादी पंचकारणांची आहेत. या *कर्मसंकल्प* वा प्रकृतीचे हे पाचच म्हणजे *जीव, देहसंघात, इंद्रिये, त्यांचे व्यापार व दैव* असे त्या कर्माचे वेठबिगार करणारे आहेत. आत्म्यास ही बिगार नाही. म्हणून जो जीवन्मुक्त झाल्याने निखल निरंजन असा केवळ आत्मस्वरूप झाला, त्या पुरुषासाठी ही कर्मरूपी बंदिशाला - हा कर्माचा तुरुंगवास नाही."

आत्म्याचे निष्क्रियत्व

निर्विकार आत्मा अकर्तृत्ववान असल्याने त्याचा विकारांशी अथवा विकार्य गोष्टींशी संयोग होणे असंभव असते; विकारी वस्तूच संघात बनवून कर्तृत्वशाली होतात; आत्म्याचे असे केवलत्व स्वाभाविक आहे, असे श्रीशंकराचार्य म्हणतात. गीता म्हणूनच सांगते की हा आत्मा ***"अविकार्योऽयमुच्यते।"*** असा विकाररहित आहे व ***"गुणैरेव कर्माणि क्रियन्ते", "शरीरस्थोऽपि न करोति"*** - सर्व कर्मे गुणांनीच होतात व आत्मा शरीरात जरी स्थित असला, तरी कर्मे करीत नाही.

आत्मतत्त्व म्हणून अवयवरहित, स्वतंत्र व विकाररहित आहे. अधिष्ठानादी पाच हेतूच कर्मास कारण होतात. म्हणून आपणच आत्मा आहोत, हे जाणणारा ज्ञानी कोणास मारत नाही वा कोणास बद्ध करत नाही. अशा प्रकारे गीतेच्या दुसऱ्या अध्यायी म्हटल्याप्रमाणे ***"नाऽयं हन्ति न हन्यते"*** इ. आत्म्याचे निष्क्रियत्व प्रतिपादित करणाऱ्या वचनांची सांगता करतांना गीता शास्त्रसिद्धांत प्रस्थापित करते तो ***"यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते। हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते।।१८-१७।।"*** या श्लोकाने.

विद्वान जीवन्मुक्तांचा अहंकार लोपतो. म्हणून आपसुकच अविद्याकर्तृक सर्व कर्मांचा संन्यास घडल्याने कर्मांची इष्ट, अनिष्ट व मिश्र अशी त्रिविध फले त्यांस मिलत नाहीत.

अज्ञान्यांचे कर्मः:::

अज्ञानजन्य त्रिपुटीचे विश्लेषण

परंतु इतर कर्माधिकारी जनांस अशी फले अवश्य प्राप्त होत असल्याने, कर्मविषयाची अधिक उकल करावी म्हणून कर्मप्रवर्तक अशा गोष्टींचा निर्देश करण्यासाठी श्रीगोपालकृष्ण म्हणतातः

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसङ्ग्रहः।।१८-१८।।

"ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता ही कर्माची प्रवृत्तित्रये होत आणि करण *(इंद्रिये)*, कर्म व कर्ता ही त्रिविध स्वरूपाचा कर्मसंग्रह होय."

अज्ञानाच्या गर्भातून उद्भवणाऱ्या कर्माची अधिक चिकित्सा करतांना ज्ञानदेव म्हणतातः

परि अज्ञानाच्या पटीं। अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी।
तेथ चितारणी हे त्रिपुटी। प्रसिद्ध जैं कां।।१८-४६०।।
जैं ज्ञान ज्ञाता ज्ञेय। हे जगाचें बीजत्रय।
तैं कर्माची निःसंदेह। प्रवृत्ति जाण।।४६१।।
आतां येयांचि गां त्रया। व्यक्तीं वेगलाल्या।
आईकें धनंजया। करूं रूप।।४६२।।

"अज्ञानरूपी पटावर जे अन्यथाज्ञानाचे चित्र उमटते, त्यास कारण म्हणजे ज्ञान, ज्ञाता व ज्ञेय अशी त्रिधा असणारी त्रिपुटी. कर्माची प्रवृत्ती, जगाचे बीजत्रय, म्हणून हीच प्रसिद्ध आहे. आता या त्रिपुटीच्या तिन्ही अंगांचे वर्णन नीट ऐक."

ज्ञान वा खरे तर, अज्ञान वा प्रपंचज्ञान

जीवसूर्यबिंबाचे। रश्मी श्रोत्रादिक पांचैं।
धांवोनि विषयपद्माचे। फोडिती मढ।।१८-४६३।।
कीं जीवनृपाचें वारु उपलाणें। घेऊनि इंद्रियांची कैंकाणें।
विषयदेशींचें नागवणें। आणीत जैं।।४६४।।
हे असो इहीं इंद्रियीं राहाटे। जैं सुखदुःखेंसीं जीवें भेटे।
तैं सुषुप्तिकालीं ओहोटे। ज्ञान जेथ।।४६५।।

तेयां जीवा नांव ज्ञाता। आणि जैं हे सांगितलें आतां।
तैंचि एथ पांडुसुता। ज्ञान जाण।।४६६।।

"हे धनंजया! जीवरुपी सूर्यबिंबातून श्रोत्रादी पाच इंद्रियरूपी किरण फाकतात. ते सत्वर विषयरूपी पद्मास फुलवतात. किंवा कोण्या जीवनामक राजाचे इंद्रियरूपी वारूंवर स्वार झालेले सैन्य विषयनामक प्रदेशावर स्वारी करून सुखदु:खादी धनसंपत्ती लुटून आणतात. अशा प्रकारे दहाही इंद्रियांचा व्यापार करवून, सुखदु:खांचीजीवास जे भेट घडवून आणते, त्यास *ज्ञान* असे म्हणतात. हे सुषुप्तिकाली ज्या अवस्थेत लीन होते, त्यास - सुखदु:खांचा जागृतिकाली उपभोग घेणाऱ्या जीवास *ज्ञाता* असे म्हणतात. खरे तर हे ज्ञान नसून *अज्ञान* आहे."

जैं अविद्येचियें पोटीं। उपजतखेंवों किरीटी।
आपणयांतें वांटी। तिहीं ठायीं।।१८-४६७।।
आपुलियें धांवेपुढां। घालूनि ज्ञेयाचा गुंडा।
उभारी मागिलाकडां। ज्ञातृत्वातें।।४६८।।
मग ज्ञातया ज्ञेया दोघां। तो नांदणुकेचा बगा।
माजीं जालेनि पैं गां। वाहे जेणें।।४६९।।
ठाकूनि ज्ञानाची शींव। पुरे जेयाचि धांव।
सकल पदार्था नांव। सूतसे जैं।।४७०।।
तैं गां सामान्यज्ञान। या बोलां नाहीं आन।...।।४७१।।

"असे हे *अन्यथाज्ञान* अविद्येच्या पोटी उपजते व उपजता क्षणीच स्वतः त्रिधा स्वरूप पावते. स्वतः मध्ये उभे ठाकते व पुढे विषयादिस्वरूप ज्ञेय वस्तूंचा पसारा मांडून मागील बाजूस ज्ञातेपणाची भूमिका वठवते. *ज्ञाता व ज्ञेय यांना सांधणारा ज्ञान हा जो दुवा, ते त्याचेच स्वरूप.* या दुव्यामुळे ज्ञानाचा व्यवहार संपन्न होतो व कर्मफलांची राशी निर्माण होते. विषयरूप ज्ञेय प्राप्त झाले की याची धाव कुंठते आणि सर्व पदार्थांना ते नामरूपे प्रदान करते. अशा त्या ज्ञानास खरे तर *सामान्य ज्ञान वा प्रपंचाचे ज्ञान वा अज्ञान* असेही म्हटले, तर वावगे ठरणार नाही."

ज्ञेय

नंतर ज्ञानेश्वर ज्ञेय विवरत म्हणतात:

...। ज्ञेयाचेंही चिह्न। आइक आतां।।४७१।।

"आता ज्ञेयाची लक्षणे सांगतो, ती ऐक."

तऱ्हीं शब्द स्पर्शु। रूप गंध रसु।
हा पंचविधु आभासु। ज्ञेयाचा जो।।१८-४७२।।
जैसें एकेचि चूतफलें। इंद्रियां वेगलवेगलें।
रसें वर्णें परिमलें। भेटिजे स्पर्शें।।४७३।।
तैसें ज्ञेय तऱ्हीं एकसरें। परि ज्ञान इंद्रियद्वारें।
ये म्हणौनि प्रकारें। पांचैं जालें।।४७४।।
आणि समुद्रीं वोघाचें जाणें। सरे लाणीपासीं धांवणें।
कां फलीं सरे वाढणें। सस्याचें जेवीं।।४७५।।
तैसें इंद्रियांचां वाहवटीं। धांवतया ज्ञान जेथ ठी।
होय तैं गां किरीटी। विषय ज्ञेय।।४७६।।

"*ज्ञेय* हे *शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध* असे पाच प्रकारांनी जाणवते. एकच आम्रफल जसे वेगवेगळ्या इंद्रियांना वेगवेगळे आकर्षण निर्माण करते, तसेच ज्ञेयाचेही आहे. *ज्ञेय* वस्तू जरी एकच असते, तरी *ज्ञाता* तिचे पंचज्ञानेंद्रियांद्वारे ज्ञान करून घेतो, तेव्हा ती पंचविध प्रकारे आभासते. ज्याप्रमाणे प्रवाहांची गती समुद्रापाशी थंबते; किंवा भोज्याजवळ धावणे संपते; किंवा पिकांची वाढ फळल्यावर खुंटते;त्याप्रमाणे हे अर्जुना! पंचविध इंद्रियांद्वारे धावणारे ज्ञान जेथे थबकते, ते म्हणजे विषयरूपी ज्ञेय!"

त्रिपुटीचा कर्मांशी संबंध

एवं ज्ञातया ज्ञाना ज्ञेया। तिहीं रूप केलें धनंजया।
तंव स्वीकारा कां त्यजावया। प्रवर्तेचि तो।।१८-४७९।।
परि मीनातैं देखौनि बकु। जैसा निधनांतैं रंकु।
कां स्त्री देखौनि कामुकु। प्रवृत्ति धरी।।४८०।।
जैसें खालारा धांवें पाणी। भ्रमर फलाचियें घ्राणीं।
नाना सुटला सांजवणी। वत्सुचि पां।।४८१।।

"हे धनंजया! असे हे *ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता* या त्रिकुटाचे सार्थ दर्शन तू केलेस. सर्व क्रियाजातांचे उगमस्थान - सर्व कर्मांची प्रेरक असणारी प्रसिद्ध *त्रिपुटी* ती हीच! आणिक एक ऐक. जसा माशाला बघितल्यावर बगळा त्याला पटकन चोचीत पकडायला पाहतो; किंवा पैशाकडे गरीब धनहीन मनुष्य लोभावून खेचला जातो; किंवा नारीस पाहून भुललेला कामुक जशी तिच्याकडे ओढ घेतो; अथवा पाणी जसे खालच्या पातळीकडे वाहत जाते; भ्रमर जसा फुलाच्या सुगंधाकडे आकर्षित होतो; दूध पिण्यासाठी सोडलेले वासरू जसे गायीकडे धाव घेते;" फार काय!

अगां स्वर्गींची ऊर्वशी। ऐकौनि जेंवीं माणुसीं।
वारत्या लाविजती आकाशीं। यागांचियां।।१८-४८२।।
पैं पारिवा जैसा किरीटी। चढला नभाचियेही पाठीं।
पारवी देखौनि लोटी। आंगचि सगलें।।४८३।।
हे ना घनगर्जनासरिसा। मयूर वोवांडें आकाशा।
ज्ञाता ज्ञेय देखोनि तैसा। धांवचि घे।।४८४।।
म्हणौनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता। हे त्रिविध गां पांडुसुता।
होयचि कर्मां समस्तां। प्रवृत्ति एथ।।४८५।।

"स्वर्गातल्या त्या ऊर्वशी इ.अप्सरांच्या वर्णनाने लुब्धावलेले प्रतिष्ठित राजे जसे यज्ञरूपी शिड्यांची माळच आकाशात चढून जाता यावे म्हणून अहमहमिकेने उभी करतात; पारवा आकाशात उंच उडत असतांना त्याच्या नजरेला पारवी पडली की जसा तिच्या दिशेने अंग लोटून देतो; हे राहू दे! मेघांच्या गर्जनेने केकारव करत हर्षोत्साहित झालेला मयूर जसा पिसारा फुलवून नाचू लागतो

किंवा आकाशाकडे झेपावून जातो; अगदी अशाच प्रकारे ज्ञाता ज्ञेयास पाहिल्याबरोबर त्याकडे धाव घेतो. *ज्ञात्याचे हे ज्ञेयविषयक आकर्षण; विषयांकडे ओढ घेणे; असा हा ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता या त्रिपुटीचा संबंधच समस्त कर्मांना प्रेरणा देतो.*"

ज्ञानत्रिपुटीचे कर्मत्रिपुटीत रूपांतर

ज्ञेयाकडे झेपावणाऱ्या ज्ञात्यास सुखदु:खे उपजतात. ज्ञानदेव म्हणतात:

परि तैंचि ज्ञेय विपायें। जऱ्हीं ज्ञातयातैं प्रिय होये।
तऱ्हीं भोगावेयां न साहें। क्षणही विलंबु।।१८-४८६।।
ना तऱ्हीं अवचटें। तैं विरु होऊनि भेंटें।
तऱ्हीं युगांत वाटे। सांडावया।।४८७।।
व्याला कां हारा। वरपडा जालेयां नरा।
हरिखु आणि दरारा। सरिसाचि उठी।।४८८।।
तैसें ज्ञेय प्रियाप्रियें। देखिलेनि ज्ञातया होये।
मग त्यागस्वीकारीं वाहें। व्यापारातैं।।४८९।।

"ज्ञेय जेव्हा ज्ञात्यास प्रिय वाटते, तेव्हा त्याचा उपभोग मिळण्यास होणारा क्षणाचा विलंबसुद्धा त्याला साहवत नाही. अन अवचित ते ज्ञेय त्याला प्रतिकूल भासले, तर ते टाकतांना जाणारा क्षणक्षणसुद्धा त्याला कल्पांतासारखा प्रदीर्घ व भयंकर वाटतो. गळ्यात अचानक येऊन पडलेली वस्तू ही सर्प आहे, असे वाटले तर मनुष्य भयकंपित होतो. पण तोच जर हार आहे, असे कळले, तर तो हर्षचकित होऊन जातो. त्याचप्रमाणे प्रिय व अप्रिय ज्ञेये ज्ञात्यात हर्षभयादी विकार उत्पन्न करतात. यातूनच *प्रिय ज्ञेयाचा स्वीकार व अप्रिय ज्ञेयाचा त्याग असा कर्मव्यापार सुरू होतो.*"

तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसांवी सकल दलाचा।
रथु सोडूनि पायांचा। होय जैसा।।१८-४९०।।
तैसें ज्ञातेपणें जें असे। तैं ये कर्ता ऐसियें दशे।
जेवितें बैसिलें जैसें। रंधन करूं।।४९१।।
कां भंवरेंचि केला मला। वरकलुचि जाला अंकसला।
ना ना देवो रिगाला देउला-। चियां कामा।।४९२।।
तैसा ज्ञेयाचिया हांवा। ज्ञाता इंद्रियांचां मेलावा।
राहाटवी तेथ पांडवा। कर्ता होय।।४९४।।

"जसा सर्व सैन्यदलाचा धुरीण रथात बसला असता मल्लविद्येच्या आवडीमुळे समोर आलेल्या बरोबरीच्या मल्लास पाहताक्षणी रथातून पायउतार होऊन असा कमीपणासुद्धा घेण्यास मागेपुढे पाहत नाही; त्याप्रमाणे ज्ञातृत्वाची वरची पायरी सोडून *ज्ञाता* **कर्ता** या खालच्या दशेला प्रियाप्रिय ज्ञेयाच्या स्वीकार-त्यागाने पावतो. ज्याप्रमाणे जेवणाच्या आसक्तीने मनुष्याने स्वत:च स्वयंपाक करण्यास सिद्ध व्हावे; किंवा भुंग्याने फुलांच्या सुवासास इतके लोभावून जावे की स्वत:च फुलबाग व्हावे; सोने पारखणाऱ्याने त्यासाठी स्वत:च कसोटीचा दगड व्हावे; किंवा आपल्यासाठी देऊळ बांधण्याच्या आसक्तीने देवाने स्वत:च बांधकाम करू लागावे; त्याप्रमाणे हे पांडुपुत्रा! ज्ञेयाच्या आसक्तीने विंधला गेलेला *ज्ञाता* सर्व इंद्रियवर्गांचा समुदाय राहाटवीत जातो आणि *कर्ता* असे पद पावतो."

आणि आपण होऊनि कर्ता। ज्ञान आणि करणता।
तेथ ज्ञेयचि स्वभावतां। कार्य होय।।१८-४९५।।
ऐसा ज्ञानाचिये निजगतीं। पालटु पडे गां सुमती।..।।४९५।।

"असे स्वत:कडे कर्तृत्व घेणारा तो *ज्ञाता* ज्ञानास कारणत्व *(कर्म करण्याचे कारण)* बनवून ठेवतो. त्यामुळे साहजिकच *ज्ञेय* हेच कार्य होऊन जाते. अथवा *ज्ञाता* स्वत: *कर्ता* झाल्याने ज्ञानास इंद्रियरूप प्राप्त होते आणि ज्ञेय वस्तू विषय होऊन त्यांचा कर्त्याने इंद्रियांद्वारे उपभोग घेतल्याने *कर्म* होते. हे सुमती अर्जुना! याप्रकारे *ज्ञान, ज्ञाता व ज्ञेय* अशी जी **ज्ञानत्रिपुटी**, तिचे *कर्म, कर्ता व करण* या **कर्मत्रिपुटी**त पाहता पाहता रूपांतर घडून येते."

कर्मत्रिपुटी

...। डोलियांची शोभा रातीं। पालटे जैसी।।१८-४९५।।
कां अदृष्ट जालियां उदासु। पालटे श्रीमंताचा विलासु।
पुनिवेपाठीं शीतांशु। पालटे जैसा।।४९६।।
तैसा चालितां करणें। ज्ञाता वेढिजे कर्तेपणें।
तेथिंची तियें लक्षणें। ऐक आतां।।४९७।।

"ज्यप्रमाणे रात्री डोळ्यांचे तेज कमी होऊन दृष्टी मंदावते; किंवा गरीबी आली की श्रीमंत व्यक्तीच्या विलासास उतरती कळा येते; अथवा पौर्णिमेनंतर चंद्राचा क्षय होऊ लागतो; त्याप्रमाणे जेव्हा ज्ञाता इंद्रियव्यापारात अडकतो, येव्हा त्याला कर्तेपण चिकटते. ते कसे कसे होत जाते, ते ऐक."

तऱ्हीं बुद्धि आणि मन। चित्त अहंकार हन।
हे चतुर्विध चिह्न। अंत:करणाचे ।।१८-४९८।।
बाहिरी त्वचा श्रवण। चक्षु रसना घ्राण।
हे पंचविध जाण। इंद्रियें गां।।४९९।।
तेथ आंतुलें तंव करणें। कर्ता कर्तव्या घे उमाणें।
मग तैं जऱ्हीं जाणें। सुखा येते।।५००।।
तऱ्हीं बाहेरिलें तियेंही। चक्षुरादिकें दाहाहीं।
उठौनि लवलाहीं। व्यापारा सूयें।।५०१।।
मग तो इंद्रियकदंबु। करविजे तंव राबु।
जंव कर्तव्याचा लाभु। हातासि ये।।५०२।।

"बुद्धी, मन, चित्त आणि अहंकार ही अंत:करणचतुष्टय म्हणजे अंत:करणाची चार लक्षणे आहेत. त्यांद्वारे अंत:करणाची अभिव्यक्ती होत असते. त्वचा, कर्णेंद्रिय, चक्षु, रसना व घ्राणेंद्रिय ही पाच ज्ञानेंद्रिये होत. त्यांच्याद्वारे अंत:करणास बाहेरील वस्तूंचे ज्ञान

होते. *कर्ता* जो *जीव* त्यास अंत:करणचतुष्ट्याद्वारे जेव्हा कर्माची व त्याद्वारे प्राप्त करावयाच्या सुखाची जाणीव होते, तेव्हा तो पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये अशा दहाही इंद्रियांना लगबगीने उठवून कामास लावतो. जोवर क्रियेचे फल हाती येत नाही, तोवर तो त्या इंद्रियवर्गास राबवतो."

ना तैं कर्तव्य जन्हीं दु:खें। फलेल ऐसें देखें।
तो लावी त्यागमुखें। तियें दाहाहीं।।१८-५०३।।
मग फिटे दु:खाचा ठावो। तंव राहाटवी रात्रिदिवो।
विकणुवातें कां रावो। जेयां परी।।५०४।।
तैसेनि त्यागस्वीकारीं। वाहातां इंद्रियांची धुरी।
ज्ञातयांतैं अवधारीं। कर्ता म्हणिपे।।५०५।।

"परंतु जर त्या क्रियांचे फल दु:ख असेल, तर मात्र त्या क्रियांचा त्याग करण्याकरता तो आपल्या इंद्रियांस भाग पाडतो. दु:खाचा ठावठिकाणा नाहीसा होईस्तोवर आणि सुखाची प्राप्ती होईस्तोवर त्या इंद्रियांना तसेच राबवले जाते, जसे खंडापोटी धान्याचा कणही न घालणाऱ्या रयतेस राजा रात्रंदिवस वेठीस धरतो. असा सुखस्वीकार व दु:खत्याग या क्रियांपोटी इंद्रियांचे जू ज्याच्या मानेवर येते, त्या ज्ञात्यास *कर्ता* म्हटले जाते."

आणि कर्तेयांतैं सर्व कर्मीं। आऊतांचियां परी श्रमवी।
म्हणौनि इंद्रियांतैं आम्हीं। करणें म्हणो।।१८-५०६।।
आणि हेंचि करणेंवरी। कर्ता क्रिया जियां उभारी।
तिया व्यापें तैं अवधारीं। कर्म एथ।।५०७।।

"आणि हे कर्तेपणाचे ओझे आपल्या खांद्यावर वाहतांना सर्व कर्मे करण्यासाठी आऊतांप्रमाणे जोडल्या गेलेल्या दहाही इंद्रियांना *करणे* असे सार्थ नांव दिले जाते. आणि या इंद्रियरूपी आऊताकडून त्यांचे जू खांद्यावर घेतलेला *कर्ता* ज्या ज्या क्रिया करतो, त्या क्रियांमध्ये ज्याचा मुख्यत्वे समावेश होतो, ते *ज्ञेय* म्हणजे *कर्म* समज."

कर्मसंचय

या कर्माची व्याप्ती सांगतांना ज्ञानदेव म्हणतात:

सोनाराचियें बुद्धी लेणें। व्यापें चंद्रकरीं चांदिणें।
कां व्यापे वेल्हालपणें। वेली जैसीं।।१८-५०९।।
नाना प्रभा व्यापे प्रकाशु। गोडिया इक्षुरसु।
हे असो अवकाशु। आकाशीं जैसा।।५१०।।
तैसें कर्तयाचियां क्रिया। व्यापलें जैं धनंजया।
तैं कर्म गां बोलावया। आन नाहीं।।५१०।।

"सुवर्णकाराची बुद्धी, त्याचे कौशल्य जशी दागिन्यास व्यापतात; चांदणे जसे चंद्रकिरणांद्वारे व्यापलेले असते; किंवा वेटोळ्यावेटोळ्यांनी वेल जशी व्यापलेली असते; अथवा प्रभा जशी प्रकाशास व्यापते; गोडी जशी उसाच्या रसास व्यापते; एवढेच काय! तर अवकाश जसा आकाशाने व्यापला जातो; त्याप्रमाणे, हे धनंजया! कर्त्याच्या क्रियांनी जे काही व्यापले जाते, ते सर्व *कर्म* या नावाने ओळखले जाते. त्याव्यतिरिक्त *कर्म* म्हणून दुसरे काहीही नाही."

एवं कर्ता कर्म करण। तिहींचेही लक्षण।
सांगितलें तुज विचक्षण। शिरोमणी।।१८-५११।।
एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय। हे कर्माचें प्रवृत्तित्रय।
तैसेंचि कर्ता करण कार्य। हा कर्मसंचयो।।५१२।।

"असो. हे चतुरश्रेष्ठा अर्जुना! *कर्ता, कर्म व करण* या तिघांची उकल अशी होते. या ठिकाणी *ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय* ही त्रिपुटी *कर्मचोदना* अथवा कर्माची प्रेरक होय. आणि *कर्ता, करण व कार्य* हे त्रिकूट *कर्मसंचय* म्हणून ओळखले जाते."

वह्नी ठेवला असे धूमु। आथीं बीजीं जेवीं द्रुमु।
कां मनीं जोडे कामु। सदा जैसा।।१८-५१३।।
तैसा कर्ता क्रिया करणीं। कर्माचें आहे जिंतवणीं।
सोनें जैसें खाणीं। सुवर्णाचिये।।५१४।।
म्हणौनि हे कार्य मी कर्ता। ऐसें आथी जेथ पांडुसुता।
तेथ आत्मा दूरी समस्तां। क्रियांपासीं।।५१५।।

"अग्नीच्या ठिकाणी धूर जसा ठेवलेला असतो; बीजांडात वृक्ष जसा संचित झालेलाच असतो; अथवा मन जसे सदा कामास आपल्यात राखून ठेवते; सोन्याची खाण जसा सोन्याचा ठेवाच असते; त्याप्रमाणे *कर्ता, कर्म वा क्रिया आणि करणे* यांच्यात कर्म पुरेपूर भरून राहिलेले असते. म्हणून या तिन्हींस *कर्मसंचय* असे म्हणतात. *मी कर्ता आहे आणि हे कार्य वा कर्म आहे, असा बोध जेव्हा जीव प्रकट करतो, तेव्हा सर्व काही व्यापणारा तो आत्मा असला, तरी त्या क्रियाजातांपासून - त्या कर्तृत्वाहंकारापासून - त्या कर्मप्रेरणांपासून - त्या कर्मत्रयीपासून मात्र तो दूरच असतो.*"

यालागीं पुढुती। आत्मा वेगलाचि सुमती।
आतां असो हे किती। जाणतासि तूं।।१८-५१६।।

"या सर्व व्यापारात तो असूनसुद्धा नसणारा आहे; हे सर्व काही आत्म्यापेक्षा वेगळे आहे; असे तुला किती प्रकारे वारंवार सांगावे! तू तर सुजाण बुद्धिमंत आहेस. म्हणून हे सर्व तू जाणतोसच!"

उपसंहार

याप्रमाणे कर्माचे विश्लेषण केल्यानंतर *त्रिगुण व कर्म यांचा संबंध* पाहण्यासाठी पुढील **उन्मेष क्र. ३२ - त्रिगुणात्मक कर्मव्यापार** याच्याकडे वळू या.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष::३२::
::त्रिगुणात्मक कर्मव्यापार::

उन्मेष ३२:

गीता:
१८:१९-३९
ज्ञानेश्वरी:
१८:५१७-८१२

कर्माचे स्वरूप

::उन्मेष::३२::
::त्रिगुणात्मक कर्मव्यापार::

त्रिगुणप्रक्रिया::::

कर्माची शास्त्रोक्त मीमांसा

मागील उन्मेषातून कर्माची शास्त्रोक्त मीमांसा गीता श्लोक *क्र. १८-१३ ते १८* यांना धरून करण्यात आली. कर्माची पाच कारणे, त्याचे पाच हेतू, अधर्म व धर्मयुक्त कर्मे,या सर्वांपासून आत्म्याची अलिप्तता, जीवन्मुक्ताची लक्षणे, त्रिविध प्रकारची ज्ञान-ज्ञाता व ज्ञेय ही कर्मचोदना व कर्ता, कर्म व करण हा कर्मसंग्रह अशी प्रकरणे यानिमित्त आपण अवलोकिली. परंतु त्रिगुणांशी यांचा पूर्वापर संबंध लक्षात घेतल्यावाचून ही कर्मजिज्ञासा पूर्ण होत नाही.

संपूर्ण सृष्टी त्रिगुणात्मक आहे, हा गीतेचा सिद्धांत आहे. त्याचा तपशील पूर्वी सोळाव्या अध्यायाच्यानिमित्त आपण थोडाफार पाहिला होता. आता कर्ममीमांसेच्या या प्रसंगी प्रथमतः अठराव्या अध्यायात अधिक स्पष्ट केलेले हे त्रिगुणरहस्य दृष्टीखालून घालू या. कारण त्यानंतर कर्मे करण्याची सतराव्या अध्यायी सांगितलेली हातोटी न्याहाळणे सोयीस्कर होईल.असो.

त्रिपुटी व त्रिगुणप्रक्रिया

साङ्ख्य शास्त्राचा त्रिगुणविषयक दृष्टिकोन ज्ञानादींस कसा लागू होतो, ते स्पष्ट करतांना गीता सांगतेः

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः।
प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छृणु तान्यपि।।१८-१९।।

"ज्ञान, कर्म व कर्ता ही तिन्ही सत्त्व, रज व तम अशा तीन गुणांच्या भेदाने तीन प्रकारची असतात, असा साङ्ख्यशास्त्राचा निर्वाळा आहे. तो जसाच्या तसा ऐक."

गीतेतील अद्वैताला उचलून धरणारे श्रीशंकराचार्य म्हणतात की त्रिगुणात्मिका सृष्टीरचना *साङ्ख्यमत* प्रतिपादिते, ते तात्त्विक दृष्ट्या गीतेस मान्य नाही. परंतु या विश्वाचा व्यवहार गुणात्मक रचनेसह सुंदररीत्या साङ्ख्यांनीच उकलून दाखवलेला आहे. म्हणून त्या मताचा गीतेत समावेश केला आहे. कसेही असले तरी मुमुक्षू व जिज्ञासूंसाठी मात्र त्रिगुणात्मक सृष्टीरचना व व्यापार समजावून घेणे अवश्य व हिताचे असल्याने आपण या सखोल तात्त्विक बाबीत न शिरता आपली याबाबतची जिज्ञासा श्रीज्ञानदेव कशी पुरवतात, तेच पाहू या.

साङ्ख्य दृष्टी

परी सांगितलें जैं ज्ञान। कर्म कर्ता हन।
तैं तिहीं ठायीं भिन्न। गुणीं आहाती।।१८-५१७।।
म्हणौनि ज्ञाना कर्मा करतेया। पातेजों नये धनंजया।
जैं दोनीं बांधती सोडावया। एकचि प्रौढ।।५१८।।
तैं सात्त्विक ठाउवें होये। तो गुणभेद सांगों पाहें।
जो सांख्यशास्त्रीं आहे। उवाईला।।५१९।।

श्रीकृष्ण म्हणतातः "आता जे ज्ञान, कर्म व कर्ता यांचे वेगवेगळे लक्षण तुला सांगितले, त्यात पुनः त्रिविध गुणांमुळे अधिक भेद होतात. म्हणून निव्वळ ज्ञान श्रेष्ठ समजून कर्ता व कर्मास कमी लेखू नये. कर्ता व कर्म जरी बंधक असली व ज्ञान जरी मोक्षदायक असले, तरी त्यातल्या सात्त्विक ज्ञानासच खरी तर एवढी योग्यता आहे. म्हणून तो सात्त्विक ज्ञानप्रकार उत्तम रीतीने समजून घेता येण्याकरता साङ्ख्यशास्त्राने जे गुणभेद सांगितले आहेत, ते ऐक."

जैं विचारक्षीरसमुद्र। स्वबोधकुमुदिनीचंद्र।
ज्ञानडोलसां नरेंद्र। शास्त्रांचा जैं।।१८-५२०।।
कीं प्रकृतिपुरुख दोनीं। मिसलली दिवोरजनीं।
तियें निवडितां त्रिभुवनीं। मार्तंडु जैं।।५२१।।
जेथ अपारा मोहराशी। तत्त्वाचां मापीं चोवीसीं।
उमाणा घेऊनि परेशीं। सुरवाडिजे।।५२२।।

"सांख्यशास्त्र हे तर प्रत्यक्ष विचारांचा क्षीरसमुद्र आहे. आत्मज्ञानरूपी कुमुदिनीस प्रफुल्लित करणारा चंद्रच जणू, असे सांख्यशास्त्र आहे. डोळस म्हणून दिमाखाने मिरवणारी ज्ञानप्रदायक अशी जी जी म्हणून शास्त्रे आहेत, त्यांचा राजा असणारे हे शास्त्र आहे, म्हणेनास का! ज्याने समस्त विश्वात एकरूप होऊन वावरणाऱ्या प्रकृतिपुरुषांची जोडी दिवस आणि रात्रींसारखी वेगवेगळी करून दाखवली तो प्रत्यक्ष सूर्यच जसा, तसे हे शास्त्र आहे. अपार मोहराशी असा हा संसाराचा अगणित पसारा केवळ चोवीस तत्त्वांच्या मापात बसवून त्यातील परेशास डोळ्यांनी प्रत्यक्ष दाखवून देऊन त्याच्यासोबत आनंदात रममाण करवते, ते हेच शास्त्र!"

अर्जुना तैं साङ्ख्यशास्त्र। पढे जेयाचें स्तोत्र।
तैं गुणभेदचरित्र। ऐसें आहे।।१८-५२३।।
जैं आपुलेनि आंगिकें। त्रिविधपणाचेनि अंकें।
दृश्यजात तितुकें। अंकित केलें।।५२४।।
जैं त्रैविध्य आदी ब्रह्म-। अंतीं कृमी।।५२५।।

"अर्जुना! असे जे ते सांख्यशास्त्र आहे, ते ज्या त्रिगुणांचे रहस्य स्पष्ट सांगते, ते असे आहे बघ.त्या त्रिगुणांनी अंगच्या उपजत भेदसामर्थ्याने समस्त दृश्यजातास -सर्व वस्तुमात्रांस, त्रिविध प्रकारे अंकित वा चिह्नित केले आहे. या सत्त्व-रज-तमत्रयीची मातब्बरी एवढी की त्यांनी अगदी ब्रह्मदेवापासून तहत कीड्यामुंगीपावेतोच्या सर्वांचे त्रिविध भेद करून दाखवले आहेत."

कर्माचे स्वरूप

परि विश्वींचि आघवीं मांदी। जेणें भेदलेनि गुणभेदीं।
पडिली तैं तंव आदी। ज्ञान सांगो।।१८-५२६।।
जैं दिठी जन्हीं चोख कीजे। तन्हीं भलतेंही चोख सुझे।
तैसें ज्ञान शुद्धें लाहिजे। सर्वही शुद्ध।।५२७।।
म्हणौनि तैं सात्त्विक ज्ञान। आतां सांगों दे अवधान।
कैवल्यगुणनिधान। श्रीकृष्ण म्हणे।।५२८।।

"विश्वाची सगळी मांदियाळी अशा प्रकारे त्रिधैव जी होते, त्याचे आद्य कारण जे ज्ञान आहे, तेसुद्धा या तीन गुणांनी भेदावयाचे ठेवले नाही. तर तेच प्रथम तुला निरूपितो. कारण दृष्टी जर निर्मळ केली, तर कोणतेही वस्तूजात स्पष्ट दिसते. म्हणून शुद्ध ज्ञान मिळवल्यास अत्यंत शुद्ध असे ब्रह्मसुद्धा प्राप्त होते. म्हणून तुला अगोदर त्या सात्त्विक ज्ञानाविषयीच सांगतो. ते तू नीट लक्ष देऊन ऐक."

पुढे तो कैवल्यरूपी गुणांचा ठेवा श्रीकृष्ण म्हणतो:

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम्।।१८-२०।।

"सर्व भूतमात्रांच्या भिन्नभिन्न रूपात ज्या ज्ञानामुळे एकाच अविनाशी, अव्यय, अविभक्त अशा परमात्म्याचे स्वरूप दृष्टीस पडते, त्यास तू सात्त्विक ज्ञान म्हणून जाण."

शंकराचार्य व ज्ञानदेव यांच्यातील सांख्यशास्त्रविषयक मतभिन्नता

आत्मतत्त्वाचे असे साक्षात अद्वैतदर्शन सात्त्विक ज्ञानामुळे घडते, तर द्वैतदर्शन राजसतामस ज्ञानामुळे होते, असे श्रीशंकराचार्य म्हणतात. यावरील ज्ञानदेवांचे विचार ऐकण्यापूर्वी सांख्यशास्त्राबाबत या दोघांची मतभिन्नता असण्याचे कारण पाहणे मनोरंजक ठरेल.

ज्ञानदेवांची भूमिका ही अखिल मानवजातीच्या उद्धारासाठी तळमळणाऱ्या महामानवाची - संतपुरुषाची आहे. त्यासाठी कोणतीही तात्त्विक तडजोड न करता ज्या ज्या शास्त्रातील, ज्या ज्या सिद्धांतातील, ज्या ज्या विचारप्रणालीतील, ज्या ज्या योगधारेतील, जे काही उत्कृष्ट, सुंदर, दिव्य, उपयुक्त, उत्तम, मनोज्ञ, रंजक, चित्ताकर्षक असे असते, ते ते, ते आपल्या संग्रही ठेवतात. तसे करतांना आपला आणि परका, अधिक आणि उणा, प्रमुख आणि गौण, सिद्धांतपोषक आणि सिद्धांतविरोधी असा छाप त्या त्या तत्त्वप्रणालीवर सहसा न उठवण्याची त्यांची शैली त्यांना साजेशीच आहे.

परंतु श्रीमच्छंकराचार्य मात्र त्यांच्या *केवलाद्वैत*मताच्या प्रतिष्ठापनेसाठी, वेदांतमताच्या अभिनिवेशाने, सनातन धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी त्या मताच्या आड येणाऱ्या विचारांचा, शास्त्रांचा, पंथप्रणालींचा, सिद्धांतांचा परामर्ष अत्यंत तर्ककर्कश, आग्रही अशा भूमिकेतून घेतांना दिसतात.

आपल्या मताचे मंडण व इतरांच्या मतांचे बृहत खंडण त्यांना करावयाचे असल्याने अशी व्यावहारिक भूमिका त्यांना स्वीकार्य आहे. म्हणून आपणास विरोधी असणारी मते, शास्त्रे, प्रणाल्या इ.ना गौण लेखणे, उणे ठरविणे, त्यांचा पाडाव करणे असा व्यवहार त्यांनी स्वीकारल्याचे दिसते.

तर्काच्या सुतीक्ष्ण धारेवरून चालण्यासाठी आपला तोल यत्किंचितही ढळू नये, म्हणून हे असे करणे त्यांना भागच आहे. जटिल अशा प्रश्नांवर - शास्त्रसिद्धांतांवर - वादविवाद, वितंडा, जल्प इ.चा आयुष्यभर उपयोग करावा लागल्याने प्रतिपक्षास उपकारक ठरेल अशी सूतभरही सिद्धांतभूमी त्यांना मिळू न देण्यात ते अति दक्ष आहेत. यामुळेच *सांख्यसिद्धांत व गीता* यांचा आपल्या केवलाद्वैताशी मेळ घालण्यासाठी ते सांख्यशास्त्राचे सौंदर्य, व्यावहारिक दृष्ट्या जगद्व्यापार आकळून घेण्याकरता त्याच्या गुणमीमांसेचे महत्त्व, ही जाणूनसुद्धा त्यास गौणत्व देण्यासाठी त्या शास्त्राचा गीतोक्त अद्वैतास विरोध आहे, हे म्हणण्यास विसरत नाहीत.

याउलट श्रीज्ञानदेव स्तुतीसुमनांची मुक्तहस्ते उधळण करतकरत सांख्यशास्त्राची महती गातात. एवढेच काय! तर परेशाची प्रत्यक्ष गाठभेट करून देणारे ते शास्त्र म्हणजे ज्ञानवान शास्त्रांचा मुकुटमणी असे त्याला मानून गौरवतात आणि अद्वैतविलासानंद प्राप्त करून देणाऱ्या अत्युत्तम शास्त्रांत सांख्यशास्त्राची ज्ञानदेव गणना करतात, ते त्यांच्या उपरोक्त श्रेणीच्या भूमिकेमुळेच!

दोन महापुरुष - एक श्रीशंकराचार्य व दुसरे श्रीज्ञानदेव - अशा वेगवेगळ्या भूमिका स्वीकारत असल्याने त्यांच्याबद्दलच्या आदरास यत्किंचितही धक्का न लागू देता कोणाची भूमिका आपणांस या वेळी स्वीकार्य आहे, हे ज्याचे त्यानेच ठरवलेले बरे! असो.

त्रिविध ज्ञान::::

सात्त्विक ज्ञान

आता ज्ञानदेवोक्त सात्त्विक ज्ञानाचे गुणश्रवण करू या.

तन्हीं अर्जुना गां तैं फुडें। सात्त्विक ज्ञान चोखडें।
जेयाचां उदयीं ज्ञेय बुडे। ज्ञातेंनिसीं।।१८-५२९।।
जैसा सूर्यु न देखें अंधारें। सरिता नेणिजती सागरें।
कां कवललियांही न धरे। आत्मछाया।।५३०।।
तेयापरी जेयां ज्ञान। शिवादि तृणावसाना।
इयां भूतव्यक्ती भिन्ना। नाडलिती।।५३१।।

"अर्जुना! ज्याचा उदय होताक्षणीच ज्ञात्यासह ज्ञेय लोपून जाते, तेच खरे ज्ञान होय. सूर्याला अंधकाराचे जसे दर्शनही होत नाही; सागरास जशी आपणास मिळणाऱ्या अनंत सरितांची ओळखसुद्धा नसते; आणि कितीही जोरात मिठी घालून पकडू पाहिले तरी आपली छाया जशी गवसत नाही; त्याप्रमाणे अशा सात्त्विक ज्ञानास शिवापासून ते तृणापर्यंत ही जी भिन्न भिन्न भूते आहेत, त्यांची जाणीवसुद्धा नसते."

जैसें हातें चित्र पाहतां। होये पाणिये मीठ धुतां।
कां चेवौनि स्वप्ना येतां। जैसें होय।।१८-५३२।।

तैसें ज्ञान जेणें। करितां ज्ञातव्यातें पाहाणें।
जाणतां न जाणणें। जाणावें उरे।।५३३।।

"कितीही हुबेहूब जिवंत भासणारे चित्र असले, तरी त्याच्यावर हात फिरवून पाहिले की ते केवळ चित्रच आहे, प्रत्यक्ष नाही, हे त्वरित लक्षात येते; मीठ पाण्याने धुतल्यावर जसे दिसेनासे होते; किंवा जागे झाले की स्वप्न मिथ्या असल्याचे जसे सहज ज्ञान होते; त्याप्रमाणे अशा ज्ञानदृष्टीने जेव्हा ज्ञातव्य वस्तूंकडे पाहिले जाते, तेव्हा तेथे न उरतो जाणता, न उरते जाणणे, ना राहते जाणीव! हा सर्व जगदाभास सत्य नाही, हे या ज्ञानाने समजते. हे ज्ञान प्राप्त झाले की सगळा दृश्याभास नाहीसा होतो."

पैं सोनें आटूनि लेणीं। न काढिती आपुलिया आयणी।
कां तरंग न घेपती पाणी। गाळूनि जैसें।।१८-५३४।।
तैसिं जेयां ज्ञानाचियां हातां। न लगेचि दृश्यकथा।
तैं ज्ञान जाण सर्वथा। सात्त्विक गां।।५३५।।
आरिसा पाहों जातां कोडें। जैसा पाहतेंचि कां रिगे फुडें।
तैसें ज्ञेय लोटौनि पडे। ज्ञाताचि जैं।।५३६।।
पुढ़ति तैचि सात्त्विक ज्ञान। जैं मोक्षलक्ष्मीचें भुवन।...।।५३७।।

"बुद्धिमान मनुष्यास जसे न आटवताच दागिन्यात सुवर्ण असल्याचे जाणवते; किंवा लाटेत पाणी आहे हे, ते हातात न घेताच कळते; त्याप्रमाणे अशा ज्ञानासमोर दृश्याची कथाच उरत नाही. असे *ज्ञान* सर्वथैव *सात्त्विक* म्हणून ओळखावे. सहज आरसा पाहू गेल्यास जसा पाहणारा प्रतिबिंबरूपाने त्याजागी स्वतःसच पाहू लागतो; त्याप्रमाणे या ज्ञानरूपी आरशास पाहिले असता सर्व दृश्यजात ज्ञात्याच्या स्वरूपानेच भरलेले दिसते. असे जे *सात्त्विक ज्ञान* असते, ते म्हणजे मोक्षलक्ष्मीचे साक्षात निवासस्थानच होय. असो."

राजसिक ज्ञान

...। हे असो ऐक चिह्न। राजसाचें।।१८-५३७।।

आता राजस ज्ञान कसे असते, ते ऐक."

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान्।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम्।।१८-२१।।

"सर्व भूतमात्रातील नाना भाव व भिन्नभिन्न भेद पृथकपणे ज्याने जाणली जातात, त्यास राजस ज्ञान म्हणून समजावे."

या विषयी ज्ञानदेव म्हणतात:

तऱ्हीं पार्था परियेस। तैं ज्ञान गां राजस।
जैं भेदाची कांस। धरूनि चालें।।१८-५३८।।
विचित्रता भूतांचियां। आपण आंतौनि ठिकरिया।
बहु चकै ज्ञातयां। आणिली जेणें।।५३९।।
जैसें सांचा रूपाआड। घालूनि विसराचें कवाड।
मग स्वप्नाचें काबाड। वोइरी निद्रा।।५४०।।
तैसें स्वज्ञानाचियें पौली-। बाहेरी मिथ्याचां महीं खलीं।
तिहीं अवस्थांचियां वह्याली। दावीं जैं जीवा।।५४१।।

"तर अर्जुना! द्वैताच्या कासेस लागलेले ज्ञान राजस असते. भूतांची विचित्रता पाहून स्वतःच्या ठिकऱ्या उडाल्याचे चित्र जे ज्ञात्यास दाखवते, ते हेच ज्ञान. ज्याप्रमाणे जागृतीतील आपल्या खऱ्या स्वरूपाआड विस्मृतीचे कवाड देऊन स्वप्नाचे कष्ट जसे निद्रा करावयास लावतात; त्याप्रमाणे आत्मज्ञानाच्या आवाराबाहेर, असार संसाराच्या मोकळ्या माळरानावर जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांचा खेळ राजस ज्ञानामुळे जीवांस पाहावा लागतो."

अलंकारपणें झांकलें। बाला सोनें कां वांया गेलें।
तैसें नामींरूपीं कां दुरावलें। अद्वैत जेयां।।१८-५४२।।
अवतरलीं गाडग्यां घडां। पृथ्वी अनोलख जालीं मूढा।
वह्नी जालां कानडा। दीपत्वासाठीं।।५४३।।
कां वस्त्रपणाचेनि आरोपें। मूर्खाप्रति तंतू हारपें।
नाना मुग्धा पटु लोपें। दाऊनि चित्र।।५४४।।
तैशीं जेयां ज्ञाना। जाणौनि भूतव्यक्तीं भिन्ना।
ऐक्यबोधाची वासना। निमौनि गेली।।५४५।।

"घटागाडग्यांच्या रूपाने असलेली मृत्तिका जशी मूढ माणसास पारखी होते; किंवा वस्त्र म्हटले की मूर्ख माणसास त्यातले धागे दृष्टीस पडत नाहीत; किंवा पटावरील चित्र पाहणाऱ्या अपरिपक्व बुद्धीच्या अजाणास पटाचे अस्तित्व कळत नाही, तर केवळ चित्रच जाणवते; त्याप्रमाणे अशा ज्ञानामुळे भूतमात्रात अनेकत्वाचा आभास उत्पन्न होतो व त्यातले एकत्व दिसेनासे होते."

मग इंधनीं भरला अनलु। फुलावरी परिमलु।
कां जलभेदें सकलु। चंद्रु जैसा।।१८-५४६।।
तैसें पदार्थभेद बहुंवस। जाणोनि सानथोर वेख।
आंतलें तैं राजस। ज्ञान एथ।।५४७।।

"मग अनेक काष्ठांनी अग्नीचे भेद कल्पावेत, किंवा विविध फुलांच्या रूपाने सुवासाचे भाग व्हावेत; अथवा जलाशयातील प्रतिबिंबामुळे एकाच चंद्राची अनेकानेक भिन्न रूपे व्हावीत व ते वेगवेगळे चंद्र आहेत असे समजून बसावे; त्याप्रमाणे पदार्थमात्रातील अनेक भेद, वेगवेगळे आकार-स्वरूपे, ही पाहून तसे आहे हे जे मानते, ते ज्ञान राजस समजावे."

तामसिक ज्ञान

आतां तामसाचेंही लिंग। सांगेन तैं वोलख चांग।
डावलावयां मातंग-। सदन जैसें।।१८-५४८।।

"आता तामसज्ञानाच्या खूणा ऐका. कारण हीन पुरुषाचे सदन जसे वाळावे लागते, तसेच या तामस ज्ञानाचा त्याग करावा लागतो."

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम्।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम्।।१८-२२।।

"आणि हे शरीरच काय ते सर्वस्व आहे म्हणून देहासक्तीतच जे गुंतून राहवते आणि ज्याला तत्त्वाचा किंवा वेदविहित प्रमाणाचा कोणताही आधार नसतो व जे अल्प जाणीव देते, त्या ज्ञानास *तामस* असे म्हणतात."

या ज्ञानास नीट ओळखावे व त्याचा सर्वस्वी त्याग करावा या हेतूने त्याचे ज्ञानदेव सविस्तर विवेचन करतात. ते असेः

तऱ्हीं किरीटी जैं ज्ञान। हिंडे विधिचेनि वस्त्रेहीन।
श्रुती पाठिमोरी नग्न। म्हणौनि तेयां।।१८-५४९।।
एरींही शास्त्रबटिकरीं। जैं निंदेचें विटालवरी।
बोलविलेसें डोंगरीं। म्लेंच्छधर्मांचां।।५५०।।
जैं गां ज्ञान ऐसें। गुणग्रहें तामसें।
घेतलें भोवें पिसें। होवोनियां।।५५१।।

पूर्वी तेराव्या अध्यायात *अज्ञानलक्षणे* प्रकटवतांना ज्ञानदेवांनी जे सांगितले होते, त्याचाच सारांश थोड्याफार फरकाने तामस गुणवर्णन करतांना त्यांच्या भाषेत येत असतो. ते म्हणतातः

"हे अर्जुना! विधीचे वस्त्र न नेसता श्रुतीकडे पाठ करून जे ज्ञान नागवे हिंडते; श्रुती राहोत, तिच्या दासीपदी असणाऱ्या सामान्य शास्त्रांनाही जे जुमानत नाही आणि शास्त्रांची यथेच्छ निंदा करून ज्या ज्ञानाने त्यांना हद्दपार करून स्वतः म्लेंच्छधर्माचा आसरा घेतला आहे; ते *तामस ज्ञान* असते. त्या ज्ञानाने तमोगुणरूपी पिशाच्चाच्या आहारी जाऊन बुद्धीस वेडेपिसे केले आहे."

जैं सोयरीके बाधु नेणें। पदार्थीं निषेधु ना म्हणें।
निरोविलें जैसें सुणें। शून्यग्रामीं।।५५२।।
तेयां तोंडीं जैं नाडलें। कां खातां जेणें पोलें।
तैंचि एक वाले। एर घेणेंचि।।५५३।।
पाहीं सोनें चोरितां उंदिरु। न म्हणे थरु विथरु।
नेणें मांसखाइरु। कालें गोरें।।५५४।।
नाना वनामाजीं बोहरीं। कडसणी जेवीं न करी।
कां जीत मेलें न विचारी। बैसतां माशी।।५५५।।
अगां वांता कां वाढलेयां। साजुक कां सडलियां।
विवेकु कावलियां। नाही जैसा ।।५५६।।
तैसें निषिद्ध सांडुनि देयावें। कां विहित आदरें घेयावें।
हे विषयांचेनि नांवें। नेणेंचि जो।।५५७।।

"ओसाड गावात सोडलेल्या कुत्र्याप्रमाणे मनःपूत संचार करणारे; पाहिजे ते विषय भोगतांना ज्यास नात्यांचा प्रतिबंध जाणवत नाही; खाण्याचा विधिनिषेध नसणारे, असे ते ज्ञान असते. त्याच्या तोंडी जो पडत नाही किंवा ज्याने तोंड पोळते, तेवढा पदार्थ सोडून सगळे पदार्थ खाण्यात त्याचा हातखंडा असतो. सोने चोरणारा उंदीर चोख व डागाचे सोने असे जसे जाणत नाही; तसाच याचा प्रकार असतो. मिळेल ते मांस काळेगोरे असा भेद न करता ते फन्ना करविते, इतका त्यास मांसाहार प्रिय असतो. रानात पेटलेला वणवा जसे ओलेसुके जाणत नाही, सर्वच जाळून भस्मसात करतो; किंवा जिवंत प्राणी किंवा प्रेत न पाहता माशी जशी त्याच्यावर बसते; अथवा अन्न ताजे की ओकलेले आहे, सुग्रास की सडलेले आहे, याचा कावळ्याला जसा विवेक नसतो; त्याप्रमाणे निषिद्ध टाकून द्यावे व विहित तेवढेच विषय भोगावेत, असे ज्याच्या लेखीसुद्धा नसते, तेच हे *तामस ज्ञान* समजावे."

जेतुलें आड पडें दिठीं। तेंतुलें घे विषयाचि साठीं।
मग तैं स्त्रीद्रव्य वांटी। शिश्नोदरां।।१८-५५८।।
तीर्थातीर्थ हे भाख। उदकीं नाहीं सनोलख।
तहान वोले तैंचि सुख। वांचुनियां।।५५९।।
तेयाचिपरी खाद्याखाद्य। न म्हणें निद्यानिंद्य।
तोंडीं आवडे तैं मेध्य। ऐसाचि बोधु।।५६०।।

"ज्या ज्या विषयावर त्याची दृष्टी पडते, मग ते द्रव्य असो की कोणतीही स्त्री असो, त्याचा शिश्नोदराने लगेच उपभोग घ्यावा अशी या ज्ञानामुळे प्रवृत्ती असते. पाणी पवित्र आहे की अपवित्र, शुद्ध आहे का अशुद्ध, त्याची पर्वासुद्धा न करता हे ज्ञान केवळ तृषाशांतीसाठी ते ओठास लावण्यास भाग पाडते. तहान शमवण्यासारखे सुख ते कोठले! त्याचप्रमाणे खाद्य वा अखाद्य, निंद्य कृत्य वा अनिंद्य कर्म, याचा विचारसुद्धा न करता, जे तोंडास आवडेल, मनास रुचेल, ते सर्व उत्तम व पवित्रच, असे हे ज्ञान समजते."

लालसा व आसुरी वृत्ती

आणि स्त्रीविषयी तर बोलायलाच नको इतकी आसक्ती ते ज्ञान प्रसवतेः

आणि स्त्रीजात तितुकें। त्वगेंद्रियेंचि वोलखे।
तियेंविखीं सोयरिकें। एकचि बोधु।।१८-५६१।।
पैं स्वार्थीं जैं उपकरें। तेयाचि नाम सोयिरे।
देहसंबंधु न सरे। जियें ज्ञानी।।५६२।।
मृत्यूचें आघवेंचि अन्न। आघवेंचि आगीं इंधन।
तैसें जगचि आपुली धन। तामस ज्ञाना।।५६३।।
ऐसेनि विश्व सकल। जेणें विखोंचि मानिलें केवल।
तेयां एक जाणें फल। देहभरण।।५६४।।

"सगळ्या स्त्रीजातीस तो त्वगेंद्रियाद्वारेच जणतो. स्त्रीसारखे उपभोगांचे व सुखाचे परम आगरच नाही, असा साक्षात्कार झालेल्या त्या महाभागास तिच्याशी फक्त लैंगिक असाच संबंध, एवढेच नाते ओळखण्यास जे ज्ञान भाग पाडते, ते तामस असते. तसेच जो उपयोगी पडतो व आपल्या फायद्याचा असतो, त्यासच तेवढ्यापुरते सोयरे समजण्याची व त्यापलीकडे नातेसंबंध न ओळखणे अशी तामस ज्ञानाची उपजत प्रवृत्ती असते. मृत्यूला जसे सगळे जगतच अन्न असते; किंवा सगळे पदार्थ जसे अग्नीचे इंधन मात्र असतात; त्याप्रमाणे सगळे जगत आपली धन आहे – आपल्या उपभोगासाठी आहे, असे समजणे ही तमोगुण प्रबळ असणाऱ्या ज्ञानाची मिरासदारी असते"

<u>**कर्माचे स्वरूप**</u>

आकाशपतिता नीरा। जैसा सिंधूचि एक थारा।
तैसें कृत्यजात उदरा-। लागीं बुझे।।१८-५६५।।
वांचूनि स्वर्गु नरकु आथी। तेयां हेतु प्रवृत्ति निवृत्ति।
इयें आघवियेंचि राती। जाणिवेची जैं।।५६६।।
जैं देहखंडा नाम आत्मा। ईश्वर पाषाणप्रतिमा।
ययापरौति प्रमा। ढलों नेणें।।५६७।।
म्हणौनि पडिलेनि शरीरें। केलेनिसीं आत्मा विसरे।
मां भोगावयां उरे। कोण वेखें।।५६८।।

"असे जाणून निव्वळ विषयोपभोग, केवळ उदरंभरणाकडे ते ज्ञान प्रवृत्त करते. जसा आकाशातून पडणाऱ्या पाण्यास समुद्रीच थारा असतो, तसे समस्त कर्मे ते ज्ञान उदरपोषणासाठीच करवते. याशिवाय स्वर्ग व नरक आहेत आणि त्यांना प्रवृत्तिनिवृत्ति या कारक होतात, अशा जाणिवेची ते ज्ञान केवळ काळरात्रच करते. देहाच्या तुकड्यास आत्मा मानण्यास लावणारे, पाषाणाच्या प्रतिमेस ईश्वर म्हणवणारे ते ज्ञान असे अल्प मोलाचे असते. म्हणून त्या तामस ज्ञानामुळे अशी ठाम समजूत होते की शरीर पडले की मृत्यूपरांत स्वर्गनरक भोगायला आत्मा उरतोच कोठे!"

ना ईश्वरु पाहतां आहे। तो भोगवी हे जऱ्हीं होये।
तऱ्हीं देवोचि खाये। विकोनियां।।१८-५६९।।
गांवींचें देवलेश्वर। नियामकचि होती साचार।
तऱ्हीं देशींचें डोंगर। उगें कां असती।।५७०।।
ऐसा विपायें देवो मानिजे। तऱ्हीं पाषाणमात्रचि जाणिजे।
आणि आत्मा तंव म्हणिजे। देहांतैंचि।।५७१।।

"आणि ईश्वर मनुष्यास त्याने केलेल्या पाप-पुण्यात्मक कर्मांची फळे देववतो, असे म्हणावे तर त्याची त्या दगडाधातूंच्या मूर्ती विकूनसुद्धा खाण्याची तयारी असते. मग असा पाषाणाचा देव कसली ती पापपुण्यांची फळे भोगावयास लावणार! निव्वळ देखाव्याकरता असणाऱ्या त्या प्रतिमांना जर एवढे सामर्थ्य असले तर आणि देवळातले दगडाधोंड्यांचे देव जर एवढे सृष्टीचे नियमन करत असले, तर मग देशोदेशींचे अचाट पर्वत - पत्थरांचे अगडबंब पहाड हे केवढे मोठे देव असतील, नाही का! असे ती तामस ज्ञानवृत्ती विचारायला लावते. देव जरी मानला तर याच कल्पनेने तो निव्वळ पाषाणाचा समजणे आणि देहासच आत्मा खराखुरा समजणे हे या ज्ञानाचे लक्षण आहे."

"हे तामस ज्ञान म्हणजे साक्षात तमोगुणच!"

वरवरच्या वृथा ज्ञानास भुलणाऱ्यांबद्दल पुढे ऐका:

एरें पापपुण्यादिकें। तैं आघवेंचि करौनि लटिकें।
हित मानी अग्नीमुखें। चरणें जैं कां।।१८-५७२।।
जैं चामाचें डोलें दाविती। जें इंद्रियें गोडी लाविती।
तैंचि सांच हे प्रतीती। फुडी जेयां।।५७३।।

"इतउपर सर्व पापपुण्याच्या कल्पना खोट्या समजून शुद्धाशुद्ध, विधिनिषेध न बाळगता, अग्नी जसा समोर जे जे येते, त्याचा फडशा पाडतो, तसे जे जे विषयोपभोग मिळतील ते सर्वच्या सर्व भोगावे अशी मनोधारणा ते ज्ञान करवते."

किंबहुना ऐसी प्रथा। वाढती देखसीं पार्था।
धुंवाचि गेली वृथा। आकाशीं जैसीं।।१८-५७४।।
कोरडा ना वोला। उपेगा आथी गेला।
तो वाढौनि मोडला। भेंडु जैसा।।५७५।।
नाना उंसाची कणसें। कां नपुंसक माणसें।
बन लागलें जैसें। साबरीचें।।५७६।।
ना तऱ्हीं बालकाचें मन। कां चोराघरींचें धन।
अथवा गलस्तन। शेलियेंचें।।५७७।।
तैसें जैं वायाणें। वोसाल दिसे जाणणें।
तेयांतैं मी म्हणें। तामस ज्ञान।।५७८।।

"चर्मचक्षूंना जे आवडेल, इंद्रियांस जे गोड लागेल, तेच चांगले, अशी प्रतीती ते तामस ज्ञान देते. अर्जुना! धुराची वेल जशी गगनात चढते, तशी या प्रतीतीची उतरंडी सतत वाढतीच असते. भेंडाचा वृक्ष ना जिवंतपणी कामास येत ना वाळल्यावर! निव्वळ उंच वाढून तो निरुपयोगीपणे मोडून पडतो. किंवा ऊसाची कणसे जशी केव्हाही बी धरत नाहीत; अथवा नपुंसक माणूस जसा प्रजननाच्या कामी सर्वथा अक्षम असतो; सावरीच्या वनातील झाडे जशी ना जळणाच्या उपयोगी असतात ना इतर कशाच्या; किंवा बाळकाचे मन जसे बोधहीन असते; किंवा शेळीचे अजागळ स्तन जसे दूधासाठी निरुपयोगीच ठरतात; जसे चोराच्या घरी गेलेले द्रव्य आपल्या उपयोगी येत नाही; त्याप्रमाणे निरर्थक व तद्दन स्वैर अशी जी जाणीव असते, असे जे ज्ञान म्हणून समजले जाते, ते वास्तविक ज्ञान नसतांही *तामस ज्ञान* म्हणून ओळखले जाते."

तैंहीं ज्ञान इयां भाषा। बोलिजे तो भावो ऐसा।
जात्यंधाचां कां जैसा। डोलां वाडु।।१८-५७९।।
कां बधिराचें नीट कान। अपेया नाम पान।
तैसें आडनांव ज्ञान। तामसा तेयां।।५८०।।
हे असे किती बोलावें। तऱ्हीं ऐसें जैं देखावें।
तैं ज्ञान नव्हे जाणावें। डोलस तम।।५८१।।
एवं तिहीं गुणीं। भेदिलें यथालक्षणीं।
ज्ञान ज्ञातेशिरोमणी। दाविलें तुज।।५८२।।

"जसा जन्मांधाचा डोळा विशाल आहे, असे म्हणावे; किंवा बहिरटाचे कान गोजिरे आहेत असे म्हणावे; अथवा अपेय द्रव्यासच पेय म्हणावे; त्याचप्रमाणे अशा तामस ज्ञानास उगीचच ज्ञान म्हणून संबोधायचे, झाले! असो. हे परोपरीने किती सांगावे! असे ते ज्ञान नसून स्वच्छच म्हणावयाचे तर निव्वळ पोषलेला तमोगुणच साक्षात

आहे. हे श्रोत्यांच्या शिरोमणी! सत्त्वरजतमादींनी होणारे ज्ञानाचे तीन प्रकार त्यांच्या लक्षणांसह मी तुला आताच सांगितले."

त्रिविध कर्म::::

सात्त्विक कर्म

आतां याचि त्रिप्रकारा ज्ञानाचेनि धनुर्धरा।
प्रकाशें होती गोचरा। कर्तयाचियां क्रिया।।१८-५८३।।
म्हणौनि कर्म पैं गां। अनुसरे तिहीं भागा।
मोहरें झालियां वोघां। पाणी जैसें।।५८४।।
तैंचि ज्ञानत्रयवशें। विविध कर्म जैं असे।
तेथ सात्त्विक तंव ऐसें। परिस आथीं।।५८५।।

"आता याचप्रमाणे कर्त्याच्या क्रिया ज्ञानाच्या या तीन प्रकारच्या प्रकाशात कशा गोचर होतात, ते ऐक. एकच पाणी जसे वेगवेगळ्या पात्रातील ओघांना अनुसरून वेगवेगळ्या प्रकारे वाहते, त्याप्रमाणे ज्ञानत्रयीच्या योगे सत्त्व-रज-तम या तीन भागांना अनुसरून कर्म त्रिविध प्रकारचे कसे असते, ते पाहा. त्यातील प्रथमतः सात्त्विक कर्माचा भाग ऐक."

नियतं सङ्गरहितमरागद्वेषतः कृतम्।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते।।१८-२३।।

"फलाकांक्षा न ठेवता, प्रीती व द्वेष यांचा त्याग करून, निरासक्त अंतःकरणाने जे नियत वा विहित कर्म करण्यात येते, त्यास *सात्त्विक कर्म* म्हणण्यात येते."

ज्ञानदेव सांगतातः

तऱ्हीं स्वाधिकाराचेनि मार्गें। आलें जऱ्हीं मानिलें आंगें।
पतिव्रतेचेनि परिष्वंगें। प्रियातें जैसें।।१८-५८६।।
सांवल्या आंगां चंदन। प्रमदालोचनीं अंजन।
तैसें अधिकारासीं मंडन। नित्यपणें जैं।।५८७।।
तैं नित्यकर्म भलें। होय नैमित्तिकीं सावाइलें।
सोनयासि जोडलें। सौरभ्य जैसें।।५८८।।
आणि आंगां जीवाची संपत्ती। वेंचूनि बालाची करी पालती।
परि जीवें उबगणें हे स्थिती। न पाहे माय।।५८९।।
तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी। परि फल हे न सूयें दिठी।
उखिता क्रिया पाठीं। ब्रह्मेंचि करी।।५९०।।

"पतिव्रतेच्या आलिंगनाने पतीस जसा संतोष होतो, त्याप्रमाणे आपल्या अधिकारानुसार वेदविहित व शास्त्रोक्त असे कर्म वाट्याला आले म्हणजे त्यातच समाधान पावणे, हे सात्त्विक ज्ञानलक्षण आहे. सावळ्या अंगास चंदनाचे विलेपन जसे शोभिवंत करते; किंवा प्रमदेच्या नेत्रातील अंजन जसे तिच्या रूपयौवनात भर घालते; त्याप्रमाणे नित्य कर्मे ही कर्मकर्त्यास भूषणीय असतात. अशा नित्य कर्मांना वर नैमित्तिक कर्मांची जोड मिळाली तर सोन्याला सुगंधही जसा असावा, तसे समजावे. शरीर व प्राणांचीसुद्धा प्रसंगी पर्वा न करता माऊली जशी तान्हेल्या बालकाचे न कंटाळता पालनपोषण करते, त्याप्रमाणे सर्वस्व वेचूनही अशी विहित कर्मे आचरणे व त्यांचे फळ मनी न धरता ते सर्व ब्रह्मार्पण करणे, ही सात्त्विक कर्म करण्याची हातवटी आहे."

आणि प्रिय आलियां स्वभावें। सबल वेंचे उरे फाउवें नोहे।
तैसें सत्प्रसंगें करावें। पारुषें जऱ्हीं।।१८-५९१।।
तऱ्हीं अकरणाचेनि खेदें। द्वेषातें जीवीं न बांधें।
जालियाचेनि आनंदें। फुंजो नेणें।।५९२।।
ऐसेऐसियां हातवटिया। कर्म निफजे जैं धनंजया।
जाण सात्त्विक हे तेयां। गुणनाम गां।।५९३।।

"आणि प्रिय व्यक्ती आली असता त्याच्या सन्मानार्थ आपल्याजवळची सर्व सामग्री खर्चली जाऊन काहीच शिल्लक उरली नाही तरी त्याचे जसे भान नसावे; त्याप्रमाणे सत्संग, संतसमागम अशा प्रसंगी आपली नित्य नैमित्तिक कर्मे करण्याचे बाजूस पडले तरी त्याकरता खेद न मानणे, तसेच अशी कर्मे यथायोग्य पार पडली तर आनंदाने फुलून न जाणे, अशी सात्त्विक कर्मकर्त्याची वृत्ती असते. अशी लक्षणे प्रकट करत जे कर्म होते, त्यास, हे धनंजया! *सात्त्विक कर्म* असे सार्थ नाम आहे."

राजस कर्म

ययावरी राजसाचें। लक्षण सांगिजैल सांचें।
न करी अवधानाचें। वाणेपण।।१८-५९४।।

"आता राजस कर्माची लक्षणे सांगतो. तरी लक्षपूर्वक ऐकण्याबाबत तू कसूर करू नकोस."

यत्तु कामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम्।।१८-२४।।

"काम्य कर्मे वर अहंकार धरून आणि अहमहमिकेने केली तर त्यांस *राजस* म्हणतात."

अशा कर्मांच्या खुणा ज्ञानदेव सांगतांना म्हणतातः

तऱ्हीं घरीं मातापितरां। धड बोली नाहीं संसारा।
एर विश्व भरी आदरां। मूर्खु जैसा।।१८-५९५।।
कां तुलसीयेचियां झाडां। दुरूनि न घापे सिंतोडा।
द्राक्षीचियां बुडां। दूधचि लाविजे।।५९६।।
तैसीं नित्य नैमित्तिकें। कर्मे जियें आवश्यकें।
तेयांचियें विखीं न शके। बैठला उठूं।।५९७।।
एरां काम्याचेनि तऱ्हीं नांवें। देह सर्वस्व आघवें।
वेंचितांही न मनवें। बहु ऐसें।।५९८।।

"आईवडिलांना हिडीसफिडीस करायची आणि जगातल्या इतर, अगदी क्षुद्रातील क्षुद्र व्यक्तींशीसुद्धा आदरपूर्वक वागायचे अशी एखाद्या मूर्ख माणसाची जशी रीत असते; आणि तुळशीच्या झाडावर लांबूनसुद्धा पाण्याचा शिंतोडादेखील उडवायचा नाही, परंतु फलदायक म्हणून द्राक्षवेलीच्या मुळांशी दूधाची धार धरायची अशी लोभी माणसाची

कृती असते. त्याप्रमाणे नित्य नैमित्तिक अशी जी कर्मे आदरपूर्वक करावयाची असतात, त्यांच्यासाठी उठून उभे राहण्याचे परिश्रमसुद्धा करायची तयारी नसणे आणि काम्य फलदायी अशा कर्मांच्या नावाने मात्र सर्वस्वासह देहसुद्धा खर्चला तरी कमीच आहे, असे मानणे हा राजस कर्माचा भाग आहे."

अगां देवढी वाढी लाहिजे। तेथ मोल देतां न धाइजें।
पेरितां पुरे न म्हणिजे। बीज जेवीं।।१८-५९९।।
कां परिसु जालियां हातीं। लोहालागीं सर्व संपत्ती।
वेंचु करिती ये उन्नती। साधकु जैसा।।६००।।
तैसीं फलें देखौनि फुडें। काम्यकर्में दुवाडें।
करी परि तैं थोकडें। केलेंही मनी।।६०१।।
जेणें फलकामुकें। यथाविधी नेटकें।
काम्य कीजें तितुकें क्रियाजात।।६०२।।

"ज्या व्यवहारात वाढीदिवढीची प्राप्ती होते, त्यांसाठी कितीही द्रव्य खर्चावे लागले, तरी खर्च करणाऱ्याच्या जीवावर येत नाही; किंवा बियाणे जितके जास्त पेरावे तितके जास्त पीक येईल या आशेने शेतकरी जसा पेरण्यात काटकसर करत नाही; परिस हाती लागला की सगळी संपत्ती खर्च करून लोखंड विकत घेण्यासाठी, उन्नती करून घेण्यामागे लागणारा साधक जशी तमा करत नाही; त्याप्रमाणे अत्यंत कठीण, कष्टदायक अशी द्वाड काम्य कर्मे त्यांच्या फळांकडे पाहून केली जातात आणि ते केलेले पण थोडे असे मानले जाते. अशा प्रकारची सर्व काम्य कर्मे विधिवत शास्त्रानुसार घडवून आणणे हा राजस कर्मांचा क्रियाकलाप आहे."

इतउपरांत अहंकाराने युक्त होत्साती ती कर्मे केली जातात:

आणि तेयांही केलियाचें। तोंडीं लवी दोंडीचें।
कर्मी या नांवपाठाचें। वाणें सारी।।१८-६०३।।
तैसा भरे कर्माहंकारु। मग पिता अथवा गुरु।
तैं न मनी कालज्वरु। औषध जैसें।।६०४।।
तैसेनि साहंकारें। फलाभिलाखेचियें नरें।
कीजे गां आदरें। जैं जैं कांहीं।।६०५।।
परि तैंहीं करणें बहुंवसा। वलघौनि करी सायासा।
जीवनोपावो कां जैसा। कोल्हाटियांचां।।६०६।।

"आणि अशी काम्य कर्मे जी केली जातात, त्यांची अगदी दवंडी पिटल्यासारखी जाहिरात करून स्वतःस अशी कर्मे करणाऱ्यांचा अग्रणी अशी प्रसिद्धी मिळवली जाते. अशा प्रकारची कर्मे सिद्ध केल्याचा अहंकार एकदाचा अंगात भरला की काळज्वर जसा औषधाची महत्ता मानत नाही, तशी तीर्थाहूनही पवित्र असणाऱ्या आपल्या मातापित्यांची वा गुरूचीसुद्धा अवगणना केली जाते. अहंकारयुक्त होऊन फलाभिलाषेने असा मनुष्य जे जे काम्य कर्म मनापासून करतो आणि त्यापोटी सायासांची पर्वा करत नाही, ते म्हणजे जीवावरचे खेळ करून पाहूनही पुरेसे पोटापुरते न मिळणाऱ्या कोल्हाट्यांच्या उपजीविकेसारखेच ठरते."

एका कणालागीं उंदिरु। आसका उपसे डोंगुरु।
कां शेवालोद्देशें दर्दुरु। समुद्रु डहुली।।१८-६०७।।
पाहीं भिकेपरतें न लाहें। तऱ्हीं गारुडी सापु वाहे।
काय कीजे शिणुचि होये। गोडु एका।।६०८।।
हे असो परमाणुचेनि लाभें। पाताल लंघिती वोलंबें।
तैसें स्वर्गसुखलोभें। विचंबणें जैं।।६०९।।
तैं काम्य कर्म सक्लेश। जाणावें एथ राजस।...।।६१०।।

"उंदीर जसा धान्याच्या एका कणाच्या अभिलाषेने डोंगरच्या डोंगर पोखरून टाकण्याचा उपद्व्याप करू पाहतो; किंवा शेवाळ खाण्यासाठी बेडकाने समुद्रच्या समुद्र जसा ढवळून काढू जावे; अथवा भिकाऱ्यास मिळते, तेवढेसुद्धा खायला मिळाले नाही, तरी आपल्या क्षुद्र पोटभऱ्या व्यवसायापोटी गारुडी जसा सापांशी जीवावर उदार होऊन खेळतो; तसे त्या मनुष्याचे काम्य कर्मे करणे असते. काय म्हणावे! एखाद्याच्या नशिबी ढोरमेहनतच करणे लिहिलेले असते अन् अशांना त्या काबाडकष्टांची उपजत अशी गोडी पण असते! असो. एका परमाणुएवढ्या छोट्याशा लाभापाठी वाळवी पाताळ नाही का धुंडून काढीत! असेच स्वर्गसुखाच्या क्षुल्लक लोभापायी क्लेश पत्करूनसुद्धा जी काम्य कर्मे केली जातात, ती राजस कर्मांच्या सदरात मोडतात."

तामसिक कर्म

...। आतां चिह्न परिस। तामसाचें।।६१०।।

"आता तामस कर्मांचे स्वरूप ऐक"

अनुबन्धं क्षयं हिंसामनवेक्ष्य च पौरुषम्।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते।।१८-२५।।

"मागचापुढचा विचार न करता, स्वतःच्या सामर्थ्याची व बलाबलाची, हिताहिताची दखल न घेता मोहग्रस्त होऊन जे काम आरंभले जाते आणि ज्यात नुकसान, विनाश आणि प्राणिहिंसा अटळ असतात, अशांस तामस कर्म म्हटले जाते."

याबाबत ज्ञानदेवांचे उद्गार असे आहेत:

तऱ्हीं तैं गां तामस कर्म। जैं निंदेचें कालें धाम।
निषेधाचें जन्म। सांच जेणें।।१८-६११।।
जैं निफजविल्यापाठीं। कांहींचि न दिखे दिठी।
रेघ काढिलियां पोटीं। तेयाचां जेवीं।।६१२।।
कां कांजी घुसलिलियां। कां सारखरु फुंकिलियां।
कांहीं न दिखे गालिलियां। वालु घाणा।।६१३।।
नाना उपणिलियां भूंस। कां विंधिलियां आकाश।
नाना मांडिलियां पाश। वारयासीं।।६१४।।
हे आघवेंचि जैसें। वांझें होऊनि नासे।
जैं केलियां पाठीं तैसें। वांयाचि जाये।।६१५।।

"निंद्य कर्मांचे माहेरघर, काळ्या काजळीने भरलेले धाम, निषिद्ध कर्मांचा जन्म सफल करणारे असे ते *तामस कर्म* असते. पाण्याच्या पृष्ठभागावर काढलेली रेघ जशी दिसत नाही, तसेच या कर्माचे फल दृष्टीस कधीच पडत नाही. कांजी घुसळली तर लोणी थोडेच मिळते! विझलेला कोळसा फुंकरून प्रज्वलित होतो का! वाळूस घाण्यात गाळून तेल मिळते का! भूसा उफणून धान्याची रास कधी तयार होते का! आकाशास मारलेला बाण कोणत्या लक्ष्याचा वेध घेतो! आणि फास फेकून त्यात वारा कधी अडकतो की काय! या सगळ्या क्रिया जशा निष्फळ म्हणून वांझ असतात, त्यासारखेच ते *तामस कर्म* असते. ते केले तरी वायाच जाते."

एऱ्हवीं नरदेहा एवढें। धन आटणीयें पडे।
जैं निफजवितां मोडे। जगाचें सुख।।१८-६१६।।
जैसा कमलवनीं फांसु। काढिलियां कांटसु।
आपण झिजे नशु। कमलां करी।।६१७।।
कां आपण आंगें जळें। आणि नागवी जगाचें डोळें।
पतंगु जैसा सळे। दीपाचेनि।।६१८।।
तैसें सर्वस्व वांयां जावो। वरी देहाही होय घावो।
परि पुढिलां अपावो। निफजविजे जेणें।।६१९।।
मासी आपणयांतैं गिळवी। परि पुढिलां वांती शिणवी।
हे कश्मल आठवी। आचरण जैं।।६२०।।

"आणि वर हे असले कर्म करतांना नरदेहाचा बळी गेला, सगळी साधनसंपत्ती नाश पावली आणि जगाचे सुख नष्ट केले गेले तरी थोडेच म्हणावे, असे घोर अन् अचाट ते कर्म असते. कमळवनावरून काटेरी फास ओढत नेला, तर तो जसा स्वतःही झिजतो व कमळपुष्पांचाही नाश करतो; किंवा दीपकाप्रति द्वेष प्रदीप्त होऊन त्याच्यावर झेप घालणारा पतंग जसा स्वतः तर जळून नष्ट होतोच, वर दिवा विझून जगास अंधारात घालतो; तशाप्रमाणे सर्वस्व वाया जाऊन वर आपल्या देहावरही आघात ज्यात होतात आणि इतरांनाही अपाय होतो, असे तामस कर्माचे आचरण असते. माशी नाही का स्वतःस गिळवून दुसऱ्यांना वांती करवून शिणवीत! अशा घाणेरडेपणाची ते कर्म आठवण करविते."

तेंही करावया दोखें। मज सामर्थ्य असे की नसे।
हेंही पुढील तैसें। न पाहतां करी।।१८-६२१।।
केवढा माझा उवावो। करिता कोण प्रस्तावो।
केलियांही आवो। काय एथ।।६२२।।
इयें जणिवेची सोएं। अविवेकाचेनि पायें।
पुसौनियां होये। साटोप कर्मीं।।६२३।।
आपुला वसौटा जालौनि। बिसाटे जैसा वह्नी।
कां स्वमर्यादा गिळौनि। सिंधु उठी।।६२४।।
मग नेणें बहु थोडे। न पाहे मागे पुढें।
मार्गामार्ग एकवढें। करीत चालें।।६२५।।
तैसें कृत्याकृत्य सरकटीत। आपपर नुरवित।
कर्म होय तैं निश्चित। तामस जाण।।६२६।।
ऐसीं गुणत्रयभिन्ना। कर्माची गां अर्जुना।
हे केली विवंचना। उपपत्तींसीं।।६२७।।

"आणि असे अघोर कर्म करण्यासाठी स्वसामर्थ्य आहे का, त्याचे दुष्परिणाम काय होतील, यांचा विचारसुद्धा तामस कर्ता करत नाही. आपले बळ किती, प्रसंग कोणता आहे आणि कर्म करून प्राप्ती काय याचा विचार करण्याऐवजी, असा विचार जी बुद्धी करू शकते त्या सद्सद्विवेकबुद्धीला अविवेकाच्या पायांखाली तुडवून, तो तसे कर्म करण्यास अति दक्ष होतो. आपले राहाण्याचे वसतीचे स्थान जाळून अग्नी जसा फैलावतो; किंवा मर्यादा उल्लंघून सागराने जसे मार्गी येईल ते पोटात ढकलत जावे; मागचापुढचा विवेक न बाळगता, कमीजास्त-अधिकउणे न पारखता, मार्गामार्ग एक करत जसे ते असे करत सुटतात; त्याप्रमाणे कृत्याकृत्य सरधोपट करत, आपला व इतरांचा काहीच विचार न करता जे कर्म निपजते, ते *तामस* म्हणून ओळखावे. तीन गुणांमुळे कर्माचे असे जे तीन भिन्न प्रकार होतात, त्या सर्वांचे मी असे हे सोपपत्तिक विवेचन केले आहे."

कर्त्याचे त्रिविध भेद::::

सात्त्विक कर्ता

आतां येयांची कर्मे भजतां। कर्माभिमानियां कर्ता।
तो जीवुही त्रिविधता। पांतला असे।।१८-६२८।।
चतुराश्रमवशें। एकु पुरुखु चतुर्धा दिसे।
कर्तेयां त्रैविध्य तैसें। कर्मभेदें।।६२९।।
परि तेयां तिहीं आंतु। सात्त्विक तंव प्रस्तुतु।
सांगेन दत्तचित्तु। आकर्णीं।।६३०।।

"हे अर्जुना! आता हीच कर्मे आचरत असता कर्माभिमानी कर्त्या जीवास जी गुणत्रयांमुळे त्रिविधता प्राप्त होते, कर्मत्रैविध्य कर्त्यास कशी त्रिविधता देते, ते ऐक. एकाच पुरुषाची चार आश्रमांचे पालन करतांना वेगवेगळी रूपे नाही का दिसत! त्याप्रमाणे कर्त्याच्या होणाऱ्या या त्रिविध प्रकारांपैकी सात्त्विक कर्त्याचा प्रकार सांगतो. तो चित्त देऊन श्रवण कर."

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारःकर्ता सात्त्विक उच्यते।।१८-२६।।

"धृति आणि उत्साहपूर्वक, अहंकाररहित अंतःकरणाने, कर्मफलाची आसक्ती न ठेवता आणि कर्म सिद्धीस जावो अथवा न जावो, त्याविषयी निर्विकार राहून ते करणाऱ्या कर्त्यास *सात्त्विक कर्ता* असे म्हणतात."

ज्ञानदेव सांगतातः

तऱ्हीं फलोद्देश सांडिलियां। वाढिती जेवीं सरलियां।
शाखा कां चंदनाचियां। बावन्नया।।१८-६३१।।

कां न फलतांही सार्थका। जैसियां नागलतिका।
तैसियां करी नित्यादिकां। क्रिया जो कां।।६३२।।
परि फलशून्यता। नाहीं तेयां विफलता।
पैं फलासिचि पांडुसुता। फलें कायिसीं।।६३३।।

"मलयगिरीवरील चंदनाच्या शाखा फळभार नसल्याने कशा सरळसोट वाढतात; किंवा नागवेलीस फळें नसली तरी अंगभूत गुणधर्माने तिचे कसे सार्थक होते! यांचे तर फलशून्यतेमुळे काही बिघडत नाही; आणि बिघडावे तरी का! काय फलासच फळ यावे अशी अपेक्षा करायची आहे!"

आणि आदरें करी बहुंवसें। परि कर्ता मी हे नुमसे।
वर्षाकालींचें जैसें। मेघवृंद।।१८-६३४।।
तेवींचि परमात्मलिंगा। समर्पावयाजोगा।
कर्मकलापु पैं गां। निफजावया।।६३५।।
तेयां कालातैं नुल्लंघणें। देशशुद्धिही साधणें।
कां शास्त्राचां वातीं पाहणें। क्रियानिर्णो।।६३६।।
वृत्ती करणें एकवेलां। चित्त जावों न देणें फलां।
नियमांचियां सांखलां। वाहणें हन।।६३७।।
हा निरोधु साहावयालागीं। धैर्याचियां चांगचांगीं।
चिंतवणी जिती आंगीं। वाहे जो कां।।६३८।।

"आणि वर्षाकालीचे मेघ जसे अहंकाराचा गडगडाट न करता विपुल जलवृष्टी करतात; त्याप्रमाणे नित्यादी कर्मे सगळी यथासांग करतो, पण मी कर्ता आहे असा अहंकार ज्याला नसतो; जो ही सर्व कर्मे परमात्म्यास समर्पण करण्याच्या हेतूने ती शुद्ध, यथाकाल, यथाशास्त्र व्हावीत, हे शुद्ध देश पाहून करतो; कर्म यथासांग करण्याकडे जो आपल्या चित्तवृत्ती वाहून घेतो; त्यांच्या फळावर आशा ठेवत नाही व कर्मे साग्र संपन्न व्हावीत म्हणून यमनियमांच्या शृंखलासुद्धा आदराने धैर्यपूर्वक धारण करतो आणि त्यासाठी लागणारे धैर्य जो मनीमानसी वृत्तीत सदा वाहतो;"

आणि आत्मयाचियें आवडीं। कर्मैं करितां वरपडीं।
देहसुखाचिये परवडीं। येवों न लाहे।।१८-६३९।।
ऐसा निद्रा दुरावे। क्षुधा न बाणवे।
सुरवाडु न पावे। आंगाचां ठावो।।६४०।।
तंव अधिकाधिक। उत्साहो धरी आगलिक।
सोनें जैसें तुक। तुटलियां कसीं।।६४१।।

"आणि परमात्म्यास प्रिय अशी ती कर्मे व्हावीत म्हणून जो देहसुखाची पर्वा करत नाही; याप्रमाणे कर्मे करतांना निद्रा दुरावत गेली, भुकेची वेळ टळून गेली, उपवास घडले व सुखाची शरीराला भेटसुद्धा घडली नाही,तरी पण अधिकाधिक उत्साह अंगी धरून नेटाने व श्रद्धेने जो ती कर्मे पार पाडतच जातो; सोने जसे अग्नीत तापवले की वजन कमी झाले, तरी कसास उतरते, त्याप्रमाणे शरीरकष्टांची तमा न करता चित्तशुद्धिकारक अशी कर्मे करणाऱ्यास *सात्त्विक कर्ता* असे म्हणतात."

चित्तशुद्धी

जऱ्हीं आवडी आथी सांच। तऱ्हीं जिवीतही सलंच।
आंगीं घालितां रोमांच। देखिजती सतिये।।१८-६४२।।
मा आत्मेयाएवढिया प्रिया। वालभेला जो धनंजया।
देहचि सिदतां तेयां। काय खेदु होईल।।६४३।।

"हे पांडुपुत्रा! अशा कर्त्याची लक्षणे आणखी ऐक. पतिप्रेमाने वेड्या झालेल्या पतिव्रतेस सती जातांना चितेत उडी घेतांना अंगावर भीतीचे शहारे जसे अजिबात उठत नाहीत, त्यापेक्षाही एवढ्या मोठ्या प्रिय अशा आत्म्यासाठी त्याच्यावर नितांत प्रेम असणाऱ्या त्या पुरुषास देहास कितीही दुःख झाले, तरी त्याप्रीत्यर्थ कर्मे करत असतांना खेद कोठून होईल!"

म्हणौनि विषय सुरवडु तुटे। जंव जंव देहबुद्धी आटे।
तंव तंव आनंद दुणवटे। कर्मीं तेयां।।१८-६४४।।
ऐसेनि जो कर्मैं करी। आणि कोणें एकें अवसरीं।
तैं ठाके ऐसी परी। वाहे जऱ्हीं।।६४५।।
तऱ्हीं कडाडीं मोडे गाडा। तो आपणपें न मानीं अवघडा।
तैसा ठाकलेनिही थोडा। नोहे जो कां।।६४६।।
ना तऱ्हीं आदरिलें। अव्यंग सिद्धी गेलें।
तऱ्हीं तेंही जिंतिलें। मिरवू नेणें।।६४७।।
इयां खूणा कर्म करितां। देखिजे जो पांडुसुता।
तेयातैं म्हणिपे तत्त्वतां। सात्त्विकु कर्ता।।६४८।।

"म्हणून अशी कर्मे करत असतांना जसजसे विषयसुख कमीकमी मिळू लागते आणि देहाहंकार आटत जातो, तसतसा त्याचा आनंद दुणावत जातो. तो सात्त्विक कर्ता अशा रीतीने कर्म करत असतो. आणि जर अकस्मात एखादा गाडा भरवेगात जात असता कड्यावरून खाली कोसळून मोडून पडला, तर त्या गाड्यास जसे दुःखशोक होत नाहीत; त्याप्रमाणे अवचित असे कर्म करण्याचे जरी थांबले, तरी तो हिरमुसला होत नाही. यापेक्षा हाती घेतलेले कर्म उत्तमरीत्या सिद्धीस गेले, तरी आपण काही मोठे केले असा गर्व तो वाहत नाही. सात्त्विक कर्त्याच्या अशा तात्त्विक विवेचनानंतर आता राजस कर्त्याची लक्षणे ऐक."

राजस कर्ता

आतां राजसा कर्तेया। वोलखणें हे धनंजया।
जैं अभिलाखा जगाचियां। वसौटा तो।।१८-६४९।।

"जगातील सर्व अभिलाषांचे जो वसतिस्थान असतो, तो राजस कर्ता कसा ओळखावा, ते आता सांगतो."

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः।।१८-२७।।

"कर्मफलाची आसक्ती असणारा, लोभी, अभिलाषेने कर्म करणारा, हिंसात्मक वृत्तीचा, शौच वा शुचिर्भूतपणा नसणारा, हर्ष व शोकांनी व्यापला जाणारा असा कर्ता *राजस* म्हणून प्रसिद्ध आहे."

जैसा गांवींचियां कश्मला। उकरडा होय एकवेलां।
कां श्मशानीं अमंगला। आघवयांचि।।१८-६५०।।
तेयापरी जो अशेखा। विश्वाचियां अभिलाखा।
पायपाखालनियां देखा। घरटां झाला।।६५१।।

"जसे गावातील सगळया घाणीस उकिरडा हे एकच स्थान असते; किंवा सगळ्या अमंगळासाठी स्मशान ही एकत्र येण्यास एकच जागा असते; त्याप्रमाणे जगातील सर्व अभिलाषेने ज्याचे पाय धुवावे असे एकमेव आश्रयस्थान म्हणजे *राजस कर्ता* होय."

म्हणौनि फलाचां लागु। देखे जियें असलगु।
तियें कर्मीं चांगु। रोहो मांडीं।।१८-६५२।।
आणि आपण जालेयां जोडी। उपरवो नेदी कवडी।
क्षणां क्षणां कुरोंडी। जीवाची करी।।६५३।।
कृपणु चित्तीं ठेवा आपुला। तैसा दक्षु पराविंयां मोला।
बकु जैसा खुतला। मासेपासीं।।६५४।।
आणि गोंवीं गेलियां जवलीं। झगटलियां आंग फालीं।
फले आंतु पोली। बोरांटी जैसीं।।६५५।।
तैसें मनें वाचें कायें। भलतयां दुखवितु जाये।...।।६५६।।

"ज्यात कमीतकमी श्रमात फळ मिळेल अशी कर्मे करण्यासाठी तो मांड घालतो. तसेच आपण मिळवलेल्या द्रव्याची कवडी न् कवडी जतन करून ठेवण्यासाठी त्यावरून जीवसुद्धा ओवाळून टाकतो. आपला ठेवा अशा कृपणपणे राखून ठेवतो. पण दुसऱ्याच्या मौल्यवान वस्तूंवर मात्र त्याची लोभी नजर असते. बगळा जसा माशांवर लक्ष ठेवून असतो, तसे त्याचे चित्त धनाकडे असते. आणि बोरांटीची जाळी जशी जवळ गेल्यास मनुष्यास आपल्या काट्यात लपेटून घेते; आणि अंगावरून तिला झटकून टाकण्यास गेले तर जशी ओरफाडे काढते; इतउपर तिची बोरे अशी आंबटढाण असतात की जिभेला चुन्यासारखी पोळून काढतात; त्याप्रमाणे असा कर्ता वाचेने इतरांस दुखावतो; कायेने इतरांस कष्ट देतो व मनाने इतरांस हानी पोहोचवितो."

... । स्वार्थ साधितां न पाहे। पराचें हित।।१८-६५६।।
तेवींचि आंगें कर्मीं। आचरणें नोहें क्षमी।
न निघे मनोधर्मीं। अरोचकु।।६५७।।
कनकाचियां फलां। आंतु माज बाहेरी मौला।
तैसा सबाह्य दुबला। शुचित्वें जो।।६५८।।

"स्वतःचा स्वार्थ साधतांना दुसऱ्यांचे कितीही नुकसान झाले, तरी त्याला त्याची पर्वा नसते. तसेच त्याच्या अंगी सामर्थ्य नसले तरीही वाटेल ते अचाट कर्म करण्याची त्याची इच्छा मात्र जबरदस्त असते. धोतऱ्याच्या फळाला आत कैफ आणणाऱ्या बिया व वर काटे असतात, असे ते अंतर्बाह्य जसे अपायकारक असते, तसेच अशा कर्त्याचे अंतर्बाह्य दोन्हीही अशुचिर्भूत असतात."

आणि कर्मजात केलियां। फल लाहे जऱ्हीं धनंजया।
तऱ्हीं हरिखें जगां ययां। वांकुलियां वाहे।।१८-६५९।।
अथवा जैं आदरिलें। हीनफल होय केलें।
तऱ्हीं शोकें तेणें जिंतिलें। धिक्कारों लागे।।६६०।।
कर्मीं राहाटी ऐसीं। जेयांतैं होती देखसीं।
तोचि जाण त्रिशुद्धीसीं। राजस कर्ता।।६६१।।

"त्याने केलेले कर्म जर सफळ झाले तर, हे धनंजया! त्याला एवढा उन्माद चढतो की तो साऱ्या जगालासुद्धा वेडावून वाकुल्या दाखवण्यास अनमान करत नाही. याउलट त्याने केलेले कर्म अपेक्षिलेले फळ जर देत नसेल, तर तो हवालदिल होऊन दुःखाने त्या कर्मास हाय! हाय! असे धिक्कारण्यासही मागे पुढे पाहात नाही. कर्माच्याठायी असे वर्तणारा कर्ता राजसच असतो, हे पक्के समज."

तामस कर्ता

आतां ययां पाठीं एरु। जो कुकर्माचा आगरु।
तोही करूं गोचरु। तामस कर्ता।।१८-६६२।।

"यानंतर आता कुकर्माचे निव्वळ आगरच असा जो तामस कर्ता असतो, त्याचे स्वरूप स्पष्ट बघ."

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते।।१८-२८।।

"चंचल, असंस्कृत, गर्विष्ठ, अहंकारमन्य, कपटी, आळशी, विषाद करणारा, विघ्नसंतुष्ट, आपमतलबी, दीर्घसूत्री अशा कर्त्यास *तामस* अशी संज्ञा देतात."

अशा तामस कर्त्याचे वर्णन ज्ञानदेव अति विस्तृतपणे करतात. किंबहुना गुणत्रयदर्शनानिमित्त ते पुनश्च एकवार दैवासुरसंपत्तीचे विविध पैलू प्रकटवितांना दिसतात, ते असे:

तऱ्हीं मी लागलियां कैसें। पुढील जलत असे।
हे नेणिजे हुताशें। जियापरी।।१८-६६३।।
पैं शस्त्रें मियां तिखटें। नेणिजे कैसेनि निवटें।
कां नेणिजे कालकूटें। आपुलें केले।।६६४।।
तैसा पुढलियां आपुलियां। घात करिती धनंजया।
आदरीं वोखटियां। क्रिया जो कां।।६६५।।
तियां करितयांही वेलीं। काय जालें हे न सांभाली।
चलला वायु वाहुटलीं। चेष्टें तैसा।।६६६।।
पैं करणिया आणि जेयां। मेलु नाही धनंजया।
तो पाहुनी पिसेया। कैंची त्राय।।६६७।।

"आपल्यामुळे दुसरे पदार्थ कसे जळत असतात, हे अग्नीला जसे ठाऊक नसते; आपल्याकडून दुसऱ्याचा प्राणघात कसा होत

आहे, हे तीक्ष्ण धारेच्या शस्त्रास जसे उमजत नाही; आपणामुळे इतर कसे मृत्युमुखी पडताहेत, याची काळकूट विषास जशी कल्पना नसते; त्याप्रमाणे आपल्यामुळे दुसऱ्यांचा कसा घात होत आहे, याचा विचारसुद्धा तशा वाईट क्रिया आचरणाऱ्या तामस कर्त्याच्या गावीही नसतो. वावटळीतील वायु जसा इतस्ततः कशालाही लपेटत, कशालाही उडवून गिरकावत भिरकावून देतो, त्याप्रमाणे आपल्या क्रिया लहरीखातर कशाही प्रकारे करणाऱ्या त्या तामस कर्त्याच्या विचार आणि कर्मांचा मेळ बसत नाही. त्याचे सर्व कारभार अनियंत्रितपणे चालतात. त्याची अशी वर्तणूक पाहता वेड्याचे वेडाचारसुद्धा फिके वाटतील."

आणि इंद्रियांचें वोइरिलें। चरौनि रखें जो जियालें।
बैलातलीं लागलें। गोचिड जैसें।।१८-६६८।।
हांसया रुदना वेलु। नेणतां आदरीं बालु।
ताहटे उच्छृंखलु। तेयापरी।।६६९।।
जो प्रकृति आंतलेपणें। कृत्याकृत्यस्वादु नेणें।
फुगे केलें धालेपणें। उकीरडा जैसा।।६७०।।
म्हणौनि मान्याचेनि नांवें। ईश्वराही परी न खालवे।
स्तब्धपणें न मनवे। डोंगरासीं।।६७१।।

"बैलावरले गोचिड जसे त्याचे रक्त पीत त्याला गच्च चिकटतात, त्याप्रमाणे इंद्रियांसमोर आलेल्या विषयांना तो घट्ट धरून ठेवतो आणि प्राण गेला तरी सोडत नाही. लहान बालक जसे वाटेल तेव्हा रडते अन हसते, काळवेळ ते पाहात नाही; त्याप्रमाणे असा कर्ता उच्छृंखलपणे वागत असतो आणि प्रकृतिवश झाल्याने चांगल्या वाईट कर्मांचा विचार न करता वाटेल ती कर्मे करतो. उकिरडा जसा घाणीने भरलेला असतो, तसा तो अशा वाटेल त्या कर्मांच्या कर्तृत्वाने ओसंडून वाहत असतो. त्यातच कर्तृत्वाच्या अहंकाराने फुगून जाऊन ईश्वरासही मान देण्यास तयार नसतो. आणि गर्वोन्नत तर एवढा असतो की मोठेमोठे डोंगरसुद्धा त्याच्यापुढे लाजतील."

मनाचे हिडीसपण

आणि मन जेयाचें कलालीं। राहटी फुडी चोरिली।
दिठी कीर तैं बोली। पण्यांगनेची।।१८-६७२।।
किंबहुना कपटाचें। देहचि वलिलें तेयाचें।
तैं जिणें कीं जुवाराचें। टिटेघर।।६७३।।
नोहें तेयाचां प्रादुर्भावो। तो साभिलाख भिल्लांचा गांवो।
म्हणौनि नोहें येवों जावों।तेयां वाटा।।६७४।।

"त्याचे मन कपटी असते. वागणे कावेबाज असते. त्याचे हावभाव व बघणे वेश्येसारखे फसवे असते. त्याचा देहच जणू मूर्तिमंत कपटाचा घडवलेला असतो. त्याचे व्यवहार म्हणजे जसा काही जुगाऱ्यांचा अड्डाच! इतके पराकोटीचे कपट त्याच्याठायी वसत असते. असा हा *तामस कर्ता* म्हणजे चालतेबोलते लुटारू भिल्लांचे गावच जणू असतो. म्हणून त्याच्या वाटेकडे फिरकूसुद्धा नये."

आणि आणिकांचें नीकें केलें। विरु होय जेयां आलें।
जैसें अपेय पया मिनलें। लवण करी।।१८-६७५।।
कां हींव ऐसा पदार्थु। घातला आगीआंतु।
तैंचि क्षणीं धडाडितु। अग्नि होय।।६७६।।
नाना सुद्रव्यें गोमटीं। जालियां शरीरीं पैठी।
होऊनि ठाती किरीटी। मलुचि जेवीं।।६७७।।
तैसें फुडिलांचें बरवें। जेयांचां भीतरीं पावें।
आणि विरुद्धचि आघवें। होंहों निगे।।६७८।।

"आणि त्याला कोणाचेही बरे पाहवत नाही. लोकांचे कल्याण होत असलेले पाहून त्याचा आत्मा कासावीस होतो. मद्य जर दुधात मिसळले तर दूध मीठ घातल्यासारखे नासते. गार पदार्थ जर अग्नीत टाकला, तर लागलीच तो धडधडून पेट घेऊन जळू लागतो. अथवा अर्जुना! सुग्रास पदार्थाचासुद्धा शरीरात नरक होतो. त्याप्रमाणे इतर कोणाचेही सद्भाग्य अशा माणसाच्या अंतरंगी नतद्रष्टतेत परिणत होते."

जो गुण घे दे दोख। अमृताचें करी विख।
दूध पाजलियां देख। व्यालु जैसा।।१८-६७९।।
आणि ऐहिकीं जियावें। जेणें परत्रा सांच यावें।
तैं उचित कृत्य पावें। अवसरीं जियें।।६८०।।
तेव्हां जेयां आपैसी। निद्रा ये ठेविली ऐसी।
दुर्व्यवहारीं जैसीं। विटालें लोटे।।६८१।।

"सर्प जसा प्यालेल्या अमृततुल्य दुधाची विषात परिणती करतो, त्याप्रमाणे दुसऱ्यांचे चांगले गुण ऐकले की हा त्यांचे दोष दाखवू लागतो. किंबहुना त्याचा चांगुलपणा म्हणजे वाईटपणा आहे, असे तो पटवू पाहातो. आणि ऐहिक कृत्ये उत्तमरीत्या करून पारलौकिक कल्याण साधण्याचा प्रसंग आला की तो झोपी गेल्यासारखा स्तब्ध होतो. पण दुष्कृत्ये करण्याच्या वेळी मात्र त्याची झोप - ती स्तब्धता विटाळासारखी दूर टाकली जाते."

दीर्घसूत्री

इतउपर त्याची वागणूक कशी असते, पाहाः

पैं द्राक्षरसा आम्ररसा। वेळें तोंड सडे वायसा।
कां डोळे फुटती दिवसां। डुडुलाचें।।१८-६८२।।
तैसा कल्याणकालु पाहे। तैं तेयांतें आलसु खाये।
ना प्रमादीं तऱ्हीं होये। तो म्हणे तैसें।।६८३।।
जेवींचि सागराचां पोटीं। जले अखंड आगिठी।
तैसा विषादु वाहे गांठीं। जिवाचिये जो।।।६८४।।

"घाण खातांना कावळा पुढे असतो, पण द्राक्षे किंवा आंबे पुढे आले असता त्याचे तोंड व्रणांनी भरून गेल्यासारखे होते; अथवा घुबडास रात्री विहरायला दिसते, पण दिवसा मात्र त्याचे डोळे जसे फुटतात; त्याप्रमाणे कल्याणाची वेळ आली असता त्याला आळस

ग्रासतो, पण प्रमाद करतांना मात्र असा तामस कर्ता दोन पावले पुढेच असतो. आणि त्याच्या अंतःकरणात विषाद तर एवढा असतो की जसा काही वडवानलच समुद्रापोटी अखंड जळावा असा."

लेंडोराआगीं धुमावधि। कां अपाना आंगीं दुर्गंधि।
तैसा तो जीवितावधि। विषादें केला।।१८-६८५।।
आणि कल्पांताचियां पारा। वेगलेंही जो वीरा।
सूत्र धरी व्यापारा। साभिलाखा।।६८६।।
अगां जगाही परौती। शुचा वाहे पैं चित्तीं।
करितां विखीं हातीं। तृणही न लगे।।६८७।।
ऐसा जो लोकाआंतु। पापपुंजु मूर्तु।
देखसि तो अव्याहतु। तामसु कर्ता।।६८८।।
एवं कर्म कर्ता ज्ञान। या तिहींचें त्रिधा गुण।
दाविलें तुज सुजन-। चक्रवर्त्ती।।६८९।।

"अपान वायू सरेस्तोवर जसा दुर्गंधीने व्यापलेला असतो किंवा लेंड्यांच्या विस्तवात जसा धूरच धूर विझेस्तोवर असतो; त्याप्रमाणे त्याचे अवघे जीवन – सारे आयुष्य वैफल्यग्रस्त असते. आणि हे वीरा अर्जुना! तो इतका दीर्घसूत्री असतो की अगदी कल्पांतानंतरही फले प्राप्त व्हावीत या इच्छेने धोरण आखतो. त्याचे जीवन चिंतेने अगदी पुरेपूर भरलेले असते. जगाच्या भारापेक्षासुद्धा जास्त असे चिंतेचे ओझे तो वाहत असतो. पण त्याच्या दीर्घसूत्री कारभारामुळे त्याच्या हाती एवढी काळजी करूनही साध्या गवताच्या काडीएवढे पण फल लागत नाही. असा जो मूर्तिमंत पापराशी असणारा मनुष्य तू पाहशील, तेव्हा तो *तामस कर्ता* आहे, असे पक्के समज. हे सज्जनांच्या चक्रवर्ती राजा! कर्म, कर्ता व ज्ञान यांचे त्रिविध प्रकार मी तुला यथासांग समजावले."

बुद्धि व धृतीचे भेद::::

बुद्धि व धृति

यानंतर *बुद्धी व धृती* यांविषयी उहापोह करतांना गीता सांगते:

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय।।१८-२९।।

"हे धनंजया! आता बुद्धी आणि धृती यांचे गुणांनुरूप होणारे त्रिविध प्रकारे ऐक. त्यांचे वेगवेगळे संपूर्ण स्वरूप मी तुला सांगतो."

ज्ञानदेव म्हणतात:

आतां अविद्येचां गांवीं। मोहाची वेढूनि मदवी।
संदेहाची आघवीं। लेऊनि लेणीं।।१८-६९०।।
आत्मनिश्चयाची बरव। जेयां आरिसा पाहे सावयव।
तियें बुद्धिचीही धांव। त्रिधा असे।।६९१।।
अगां सत्त्वादि गुणीं इहीं। काईं एक तिहीं ठाईं।।
न कीजेचि एथ पाहीं। जगामाजीं।।६९२।।
आग नसतां पोटीं। कवण काष्ठ असे सृष्टी.।
तैसें तैं कैंचें दृश्यकोटी। त्रिधा जैं नोहें।।६९३।।
म्हणोनि तिहीं गुणीं। बुद्धि केली त्रिगुणीं।
धृतिसिहीं वांटणी। तैसीचि असे।।६९४।।
तैंचि एक वेगलालें। तेथ चिह्नीं अलंकारिलें।
सांगिजेल उपाइलें। भेदलेपणें।।६९५।।

"चोखडे, सुंदर आत्मरूप सावयव ज्यात निरखून पाहावे, असा आरसा म्हणजे बुद्धी. अशी ही बुद्धीसुद्धा अविद्यारूप संसारात मोहरूपी भरजरी वस्त्र नेसून आत्मसंदेहरूपी रत्नखचित अलंकार लेऊन वावरतांना त्रिगुणांमुळे तीन प्रकारची असते. या सत्त्वादी त्रिगुणांनी त्रिधा केलेली नाही, अशी एकतरी वस्तू या प्रपंचात आहे काय! सृष्टीमध्ये असे कोणते काष्ठ आहे की ज्याच्या पोटी अग्नी नाही! त्याप्रमाणे या त्रिगुणांनी बुद्धीसही तीन प्रकारचे केले आहे. तसेच धृतीचेही असेच तीन भाग झाले आहेत. हे सर्व भाग वेगळाले करून त्यांची अंगलक्षणे त्या भेदांप्रमाणे सविस्तर सांगतो."

परि बुद्धि धृति इयां। दोहीं भागामाजीं धनंजया।
आधीं रूप बुद्धिचियां। भेदासि करूं।।१८-६९६।।
तऱ्हीं उत्तमा मध्यमां निकृष्टां। संसारासि गां सुभटा।
प्राणियां येतियां वाटा। तिनीं आथी।।६९७।।
जैं अकरण काम्य निषिद्ध। तैं हे मार्ग तिन्हीं प्रसिद्ध।
संसारभयें सबाध। जीवां ययां।।६९८।।

"आता हे धनंजया! बुद्धी आणि धृती यांपैकी प्रथम बुद्धीचे त्रिभेद व लक्षणे पाहू या. हे सुधीर योद्ध्या! प्राणिमात्र संसारात उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा तीन प्रकारच्या वाटांनी प्रवेशतात. विहित कर्माचरण न करणे, काम्य कर्मे आचरणे व निषिद्ध कर्मे करणे; या त्या तीन प्रसिद्ध वाटा आहेत. जीवांना यांमुळे संसारभय निर्माण होते. म्हणून या मार्गांनी जाणे दोषयुक्त व बाधाकारक आहे."

सात्त्विक बुद्धी

म्हणौनि अधिकारें मानिलें। जैं विधिचेनि वोधें आलें।
तैं एकचि एथ भलें। नित्य कर्म।।६९९।।

"असे असल्याने स्वाधिकारानुरूप विधिवत वाट्याला जे नित्य कर्म येते, तेच एकमात्र केवळ करण्यास योग्य व उन्नतीकारक म्हणून म्हटले जाते."

हे जाणणाऱ्या सात्त्विक बुद्धीला गौरवितांना श्रीकृष्ण म्हणतात:

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।
बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी।।१८-३०।।

"हे पार्था! जी बुद्धी करणीय व अकरणीय यांना जाणते; प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग, संसारभय व त्यापासून अभय कसे प्राप्त होते हे ओळखते आणि बंध कशामुळे होतो आणि मोक्ष कसा प्राप्त होईल हे नीट जाणते, तीच *सात्त्विक* असते."

ज्ञानदेव या श्लोकाची उकल करत म्हणतात;

तैंचि आत्मप्राप्तिफल। दिठी सूनि केवल।
कां जैं जैसें कां जल। सेविजे ताहानें।।१८-७००।।
येतुलेनि तैं कर्म। सांडीं जन्मभय विषम।
करूनि दे सुगम। मोक्षसिद्धी।।७०१।।
ऐसें कर्म करी तो भला। संसारभयें सांडिला।
करणीयत्वें आला। मुमुक्षुभागा।।७०२।।
तेथ जैं बुद्धी ऐसा। बली बांधें भंरवसा।
मोक्षु ठेविला ऐसा। जोडेल एथ।।७०३।।
म्हणौनि निवृत्तिचि मांडिली। सूनि प्रवृत्ति तलीं।
इयें कर्में बुडकुली। देयावीं कां ना।।७०४।।

"पाण्यानेच जशी तहान भागवायला पाहिजे, त्याप्रमाणे आत्मप्राप्तीची तृषा हरण्यासाठी केवळ शास्त्रविहित कर्माचाच उपयोग होतो. असेच कर्म अनिष्ट संसाराचे भय घालवून मोक्षाची सहजच प्राप्ती करून देते.असे कर्म करण्याने मुमुक्षुत्व लाभते आणि जन्ममरणाचा फेरा चुकतो. असे निष्काम कर्मच मोक्षप्राप्ती करवून देईल असा ज्याच्या बुद्धीने निश्चय केलेला असतो, त्याला प्रवृत्तिवृक्षाच्या तळीच निवृत्तिरूपी फळांचा सडा पडलेला सापडतो. कर्मे करत असता त्यास मोक्षप्राप्ती होते."

तृषार्ता पाणिये जिणें। कां पूरीं पडलियां प्रवाहणें।
अंधकूपगतां किरणें। सूर्याचेनि।।१८-७०५।।
नाना पथ्येंसि औषध लाहें। तन्हीं रोगें दाटलाही जिये।
कां मीना जिव्हाला होये। जलाचा जन्हीं।।७०६।।
तन्हीं जेयां जिवीतां। नाही जेवीं अन्यथा।
तैसें कर्मीं इयें प्रवर्त्ततां। जोडेचि मोक्षु।।७०७।।

"त्याने एकदा का हा निश्चय केला की त्याला, तृषार्त जसा पाणी मिळून जगतो किंवा अंधाऱ्या विहिरीत पडलेल्यास जसे सूर्यकिरण जीवन देतात; रोगजर्जर अन व्याधींनी ग्रासलेल्यास जसे पथ्यपाणी व औषधांनी नवजीवन प्राप्त होते; किंवा पाण्याविना तडफडणाऱ्या माशाला पाण्याने जसे जीवदान मिळते, त्याप्रमाणे त्या मार्गाने चालू लागतालागताच मोक्षप्राप्ती होते."

हे करणीयाचियां कडे। जैं ज्ञान आथी चोखडें।
आणि अकरणिय हे फुडें। ऐसें जाण।।१८-७०८।।
जी तियें काम्यादिकें। संसारभयदायकें।
अकृत्यपणाचें आंबुखें। पडिलें जेयां।।७०९।।
तियें कर्मीं अकार्यीं। जन्ममरणसमयीं।
प्रवृत्ति पलवी पायीं। मागिलीचि।।७१०।।

"अशी सुनिश्चित बुद्धी मनुष्यास करणीय कर्मे कोणती व अकरणीय कर्मे कोणती; कोणत्या कर्मांवर ती काम्य आहेत म्हणून न करण्याचे शिंतोडे उडले आहेत; संसारभय कोणत्या कर्मांनी निर्माण होते, याचे ज्ञान करवून देते व अशा अकरणीय जन्ममरणयुक्त कर्मांठायी असणाऱ्या प्रवृत्तीला मागच्या पायीच पळवून लावते."

पैं आगीमाजीं न रिघवें। अथावीं न घलवे।
धगधगीत नागवे। शूल जेवीं।।१८-७११।।
कां कालयाणा धुंधुवातु। देखौनि न घलवे हातु।
न वचवे खोपेआंतु। वाघाचिये।।७१२।।
तैसें कर्म अकरणीय। देखोनि महाभय।
उपजे निःसंदेह। बुद्धी जियें।।७१३।।

"जळत्या आगीत जसा प्रवेश करवत नाही; अथांग पाण्याच्या डोहात जशी उडी घेववत नाही; अथवा धगधगीत तप्त शूळ जसा धरवत नाही; किंवा फणफणणारा काळा नाग पाहून त्याला धरण्यासाठी जसा हात पुढे करवत नाही; वा वाघाच्या ढोलीत जसे जाववत नाही; त्याप्रमाणे अकरणीय कर्मास पाहून ज्या अशा बुद्धीमुळे निःसंदेह महाभय उपजते, ती सात्त्विक असते."

वाढिलें रांधूनि विखें। तेथ जाणिजे मृत्यु न चुके।
तेवीं निषेधीं कां देखे। बंधातें जैं।।१८-७१४।।
मग बंधभयभरितीं। तियें निषिद्धें प्राप्तीं।
विनियोगु जाणें निवृत्ति। कर्माचिये।।७१५।।
ऐसेनि कार्याकार्यविवेकीं। प्रवृत्तिनिवृत्तिमापकीं।
खरा कुडापारखी। जिया परी।।७१६।।
तैसीं कृत्याकृत्यशुद्धी। बुझे जैं निरवधि।
सात्त्विक म्हणिपे बुद्धी। तैंचि तूं जाण।।७१७।।

"विष मिसळून सिद्ध केलेले अन्न सेवन केल्यास मृत्यू जसा हमखास ठेवलेलाच असतो, त्याप्रमाणे निषिद्ध कर्मे केल्यास बंधन हमखास आहे, हे जाणून अशी बुद्धी त्या कर्मांचा त्याग करणे जाणते. ज्याप्रमाणे रत्नपारखी खऱ्याखोट्या रत्नांस पारखून घेतो, त्याप्रमाणे प्रवृत्तिनिवृत्तीच्या कसोटीवर करणीय व अकरणीय अशा कर्मांना नीट पारखून घेणारी अशी ही बुद्धी असते. सदैव असे जाणून त्याप्रमाणे कर्म करवणारी वा टाळणारी जी बुद्धी असते, तिला *सात्त्विकी* असे म्हणतात."

राजसिक बुद्धी

आता राजसी बुद्धीची लक्षणे पाहाः

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी।।१८-३१।।

"हे पार्था! ज्या बुद्धीने धर्म व अधर्म, कार्य वअकार्य यांचा उचित निर्णय होत नाही, ती बुद्धी राजस होय." याबाबत ज्ञानेश थोडक्यात म्हणतातः

आणि बकाचां गांवीं। घेपे क्षीरनीर सकलवीं।
कां अहोरात्रींची गोंवीं। आंधलें नेणें।।१८-७१८।।
जेयां फुलांचा मकरंद फांवें। तो काष्ठें कोरूं धांवें।
परि भ्रमरपणें नव्हें। अव्हां जेवीं।।७१९।।

तैसीं इयें कार्याकार्यें। धर्माधर्मरूपें जियें।
तियें न चोजवितां जाये। जाणती जैं कां।।७२०।।
अगां डोलियांवीण मोतियें। घेतां पाडु मिले विपायें।
ने मिळणें तैं आहे। ठेविलें तेथ।।७२१।।
तैसें अकरणीय अवचटें। नोडवे तऱ्हींच लोटे।
एरवीं जाणें एकवटें। दोन्हीं जैं कां।।७२२।।

"बगळ्यांच्या गावी जसा नीरक्षीरविवेक असण्याचे कारण नाही; किंवा आंधळ्यास दिवस व रात्र जशी एकमेकात गुंतलेली असतात व त्यातला फरक जाणवत नाही; अथवा फुलांचा मकरंद चोखण्याचे काम भ्रमर जेवढ्या आवडीने करतो, तेवढ्याच गोडीने लाकूड कोरण्यासही धावतो, त्यात भ्रमरत्वास जशी काहीच बाधा येत नाही; त्याप्रमाणे कार्य व अकार्य, धर्म व अधर्म, यांच विवेक करणे जी जाणत नाही व वाटेल ते कार्य करण्यास मनुष्यास प्रवृत्त करते ती बुद्धी, मोत्यांची पारख नसता ते विकत घेतल्यास अभावानेच जसे चांगले मोती पदरीं पडतील, त्याप्रमाणे सरसकट सर्व कर्मे करवत सुटल्याने क्वचितच जेव्हा अकरणीय कृत्य सामोरे ठाकत नाही तेव्हाची वेळ सोडून, करणीय कृत्य सहसा करत नाही"

तैं गां बुद्धि चोखविषीं। जाण एथ राजसी।
अक्षत टाकिली जैसीं। मांदियेसीं।।१८-७२३।।

"लग्नाच्या वेळी अक्षता टाकल्या जातात, त्या जशा वधूवरांवर क्वचितच पडतात. पण इतरेजनांवरच जास्त करून पडतात. त्याप्रमाणे अशा प्रकारे करवलेल्या कर्मांत करणीय भाग क्वचितच असून, अकरणीय भाग मात्र सर्वतः असतो. असे करवणारी बुद्धी निश्चितपणे राजसी असल्याची खूणगाठ तू बांधून ठेव."

तामसिक बुद्धी

आता तामसी बुद्धीचे वर्णन ऐका:

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी।।१८-३२।।

"तमसाने आवृत असणारी, अधर्मासच धर्म मानून चालणारी आणि विपरीत अर्थांनाच खरे समजते, ती बुद्धी तामसी होय."

ज्ञानदेव म्हणतात:

आणि राजा जियां वाटां जाये। तैं चोरांसि आडव होये।
कां राक्षसां दिवो पाहे। राती होऊनि।।१८-७२४।।
नाना निधानचि निदैवा। होये कोलसयाचां उंडवा।
पैं असतें आपणपें जीवा। नाहीं जालें।।७२५।।
तैसें धर्मजात तेतुकें। जियें बुद्धीसि पातकें।
सांच तैं लटिकें। ऐसेचि बुझे।।७२६।।
तैं आघवेंचि अर्थ। करूनि घाली अनर्थ।
गुण तैं तैं व्यवस्थित। दोखचि मानी।।७२७।।
किंबहुना श्रुतिजातें। अधिष्ठुनि केलें सरतें।
तेंतुलेंही उपरतें। जाणें जैं बुद्धि।।७२८।।
तैं कोण्हातेंहीं न पुसतां। तामसी जाणावी पांडुसुता।
रात्री काय धर्मार्था। सांच करावी।।७२९।।

"राजमार्ग असतो, तो चोरांसाठी आडमार्ग असतो; राक्षस रात्रीचाच दिवस करतात; दुर्दैवी माणसाच्यासाठी पुरलेले गुप्त धन कोळशाच्या रूपात अवतरते; याप्रमाणेच जे जे धर्म्य आहे, त्यास पाखंड मानणारी, सत्यास असत्य समजणारी, सर्व शास्त्राचा विपरीत अर्थ लावणारी, गुणांस दोष समजणारी, एवढेच काय! तर श्रुतिसंमत असणाऱ्या गोष्टींना अग्राह्य समजणारी जी बुद्धी असते, तिला *तामसी* म्हणण्यासाठी कोणा मोठ्या जाणकारास विचारावे लागते काय!"

सात्त्विक धृति

एवं बुद्धीचें भेद। तिन्हीं तुज विशद।
सांगितलें स्वबोध-। कुमुदचंद्रा।।१८-७३०।।
आतां याचि बुद्धिवृत्ती। निष्टंकिला कर्मजातीं।
खांदु मांडिजे धृति। त्रिविधता जेयां।।७३१।।
तियें धृतीचेहीं विभाग। तिन्हीं यथालिंग।
सांगिजती चांग। अवधान दे।।७३२।।

"असे हे बुद्धीचे त्रिविध भेदप्रकार तुला विशद केले. आता या तीन प्रकारच्या बुद्धींच्या अनुसरण्याने जे कर्ममात्र संपन्न करावयाचे, त्यासाठी ज्या धृतीचे अधिष्ठान असते, त्या धृतीचे पण तीन प्रकार होतात. ते सलक्षण सांगतो. अवधान दे."

धृतीचे प्रकार असे:

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः।
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी।।१८-३३।।

"हे पार्था! मन, प्राण व इंद्रिये यांच्या क्रियांचे योगाशी एकनिष्ठ राहण्यासाठी उपकारक ठरेल असे नियमन करून त्यांना धैर्यपूर्वक जी आवरून धरते, ती धृती सात्त्विक असते."

याविषयी ज्ञानदेव म्हणतात:

तऱ्हीं उदैलियां दिनकरु। चोरीसीं थोकें अंधारु।
कां राजाज्ञा अव्यवहारु। कुंठवी जेवीं।।१८-७३३।।
नाना पवनाचा साटु। वाजीनलियां नीटु।
आंगेंसीं बोभाटु। सांडिती मेघ।।७३४।।
कां अगस्त्याचेनि दर्शनें। सिंधु घेऊनि हातीं मौनें।
चंद्रोदयीं कमलवनें। मिठी देती।।७३५।।
हे असो पावों उचलिला। मदमुख न ठेविती खालां।
गाजौनि फुडां जाला। सिंहु जऱ्हीं।।७३६।।
तैसा जो धीरु। उठलियां अंतरु।
मनादिकें व्यापारु। सांडिती उभीं।।७३७।।
इंद्रियां विषयांचियां गांठीं। अपैसया सुटती किरीटी।
मनां मायेचां पोटीं। रिगती दाहीं।।७३८।।

"सूर्य उगवला की चोरांसाठी काळोखी रात्र होते; किंवा राजाची आज्ञा निंद्य कर्मांस जशी अटकाव करते; अथवा अगस्ति ऋषी

दृष्टीस पडल्याबरोबर समुद्र जसा मौनावतो; चंद्रोदयाबरोबर कमळांची वने जशी मिटतात; किंबहुना सिंह जरी गर्जत सामोरा आला, तरी मदोन्मत्त हत्ती जसे उचललेले पाऊल खाली ठेवत नाही; त्याप्रमाणे असणारे धैर्य जेव्हा अंतरी उदित होते, तेव्हा मनादिक सर्व इंद्रिये आपले विषयोपभोग टाकून उगाच राहतात; इंद्रियांच्या विषयातील अनिर्बंध व्यापारास अटकाव होतो; दाही इंद्रिये मनासह मौनावतात आणि मिटून जाऊन मायेच्या पोटात आपल्या मूळ स्वरूपात लीन होतात.''

अधोर्ध्व गुढें काढीं। प्राण नवांची पेंडी।
बांधौनि घाली उडी। मध्यमेमाजीं।।१८-७३९।।
संकल्पविकल्पांचें लुगडें। सांडूनि मन उघडें।
बुद्धिही मागिलांकडें। उगीच बैसें।।७४०।।
ऐसीं धैर्यराजें जेणें। मन प्राण करणें।
स्वचेष्टांची संभाषणें। सांडविजती।।७४१।।
मग आघवींचि सडीं। ध्यानाचां आंतुलां मढीं।
कोंडिजती निरवडीं। योगाचियें।।७४२।।
परि परमात्मेयां चक्रवर्ती। उगाणती जंव हातीं।
तंव लांचु न घेती धृती। धरिजती जियां।।७४३।।
तैं गां धृती एथ। सात्त्विक हे निरुतें।
आइक अर्जुनातें। श्रीकांतु म्हणे।।७४४।।

''ते धैर्य अपानवायू व प्राण यांतील भेद नाहीसा करते. कुंडलिनी जागृत होऊन सर्व पंचप्राण व उपप्राण यांची एकत्र पेंडी बांधून, त्यांच्यातले भेद विलीन करत सुषुम्नेत प्रवेशते. त्या धैर्याच्यायोगे मन आपण ल्यालेले संकल्पविकल्पांचे वस्त्र टाकून देऊन विवस्त्र होते व बुद्धीच्याही मागे जाऊन बसते. असे ते धैर्यराज मन, प्राण व इंद्रियांच्या व्यापारांना आटोपते आणि त्यांना ध्यानाच्या अंतर्गृहात बंदिस्त करून टाकते व योगास आपला प्रिय मानून जोपावेतो तो परम चक्रवर्ती आत्मा आपल्या स्वाधीन होत नाही, तोपावेतो त्या सर्वांना सिद्धींची लाच न स्वीकारता नियंत्रणाखाली ठेवते; अशा धृतीस सात्त्विक म्हणावे,'' असे *शुद्ध सात्त्विक* धृतीचे लक्षण श्रीकांताने अर्जुनास सांगितले आहे.

ज्ञानदेवांचे पंथराजप्रेम

सात्त्विक धृतीच्या निमित्ताने योगधारा प्रकटवतांना ज्ञानेश पुनश्च **पंथराजा**चा निर्वाळा देत आहेत, ही गोष्ट जिज्ञासूंसाठी लक्षणीय आहे. सहाव्या अध्यायात ***कुंडलिनीजागृती व पंथराज*** यांचे जे विस्तृत वर्णन येते, त्याचे संक्षिप्त रूप येथे पाहण्यास सापडते. आपल्या योगप्रणालीचा विशेष असा दाखवितांना ज्ञानेश जी **योगप्रक्रिया** स्पष्ट करतात, ती अशी आहे. त्या प्रक्रियेत ***प्राणापानांचे एकीकरण, दशविध वायूंचे एकत्रीकरण, गूढ अशा कुंडलिनीचे उद्बोधन, मन व इंद्रिये यांना कुंडलिनीद्वारे सुषुम्नामार्गे नेतनेत ध्यानाद्वारे परमात्मदर्शन करवणे, बुद्धीपलीकडे जाऊन त्या परमात्म्यास आपला करवून घेणे;*** असे विविध भाग येथेही दिसतात.

हा सर्व भाग गोपालकृष्णांनी निवेदित केलेल्या मन, प्राण व इंद्रियांच्या क्रियांचे नियमन करून परमात्मप्राप्तीसाठी एकनिष्ठेने आचरावयाच्या योगमार्गाचे स्पष्टीकरण करण्यासाठी ज्ञानदेवांनी सांगितला आहे. हे वैशिष्ट्य ध्यानी घेऊन, पंथराजास ज्ञानदेव किती महत्त्व देतात व योग तो हाच असे त्यांचे निर्देशन निर्विवाद आकळून घेऊन आता आपण राजस धैर्याचे वर्णन ऐकू याः

राजसिक धृति

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन।
प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी।।१८-३४।।

''हे पार्था! प्रसंगानुरूप फलाची आकांक्षा मनात ठेवून जी धृति मनुष्यास धर्म, अर्थ व कामात प्रवृत्त होतांना साहाय्य करते, ती राजस होय.''

याबाबत ज्ञानदेव म्हणतातः

आणि होऊनिया शरीरी। स्वर्गसंसाराचां दोहीं घरीं।
नांदे जो पोटभरी। त्रिवर्गोपायें।।१८-७४५।।
तो मनोरथाचां सागरीं। धर्मार्थकामांचां तारुवावरी।
जेणें धैर्यबळें करी। क्रियावाणिज्य।।७४६।।
जैं कर्म भांडवला सूयें। तेयाची चौगुणीं येती पाहे।
एवढें सायास साहे। जेयां धृति।।७४७।।
तैं गां धृति राजस। पार्था एथ परियेस।...।।७४८।।

''अर्जुना! शरीरी राहणे पत्करलेला जीवात्मा धर्म, अर्थ व काम या त्रिवर्गाद्वारे स्वर्ग व संसार या दोन्ही लोकी आनंदाने नांदत असतांना, मनोरथरूपी सागरात धर्मअर्थकामरूपी जहाजातून क्रियारूपी वाणिज्य कर्मरूपी भांडवलाची गुंतवणूक करून ते चौपट होण्यासाठी ज्या धृतीच्या योगे सायास करतो; त्या धृतीस *राजस* असे समजावे.''

तामसिक धृती

...। आतां आइक तामस। तिसरी जैं।।७४८।।

''आता तिसरी तामस म्हणून जी धृती असते, तिची लक्षणे ऐक.''

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च।
न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी।।१८-३५।।

''आणि ज्या धृतियोगे अविवेकी मनुष्य निद्रा, संसारभय, दुःख आणि मद यांना न सोडता विषयसेवनात धन्यता मानून विषादास प्राप्त होतो, ती तामस असते.''

या श्लोकाचा विस्तार करत ज्ञानदेव सांगतातः

तऱ्हीं सर्वाधमें गुणें। जेयाचें कां रूप येणें।
कोळसा काळेपणें। घडिला जैसा।।१८-७४९।।
अहो प्राकृत आणि हीनु। तेयांही कीं गुणत्वाचा मानु।
परि न म्हणे पुण्यजनु। राक्षसु काईं।।७५०।।

पैं ग्रहांमाजीं इंगलु। तेयातैं म्हणिपे मंगलु।
तैसा तमीं धसालु। गुणशब्दु हा।।७५१।।
जैं सर्व दोखांचां वसौटा। कामचि कामऊनि सुभटा।
उभारिला आंगवठा। जेयां नराचा।।७५२।।

"कोळसा जसा काळेपणाचा घडला आहे, त्याप्रमाणे या तमोगुणाचे रूप सर्व अधम अशा गुणांनी सजवलेले आहे.राक्षसांना नाही का पुण्यजन असे म्हणत! त्याचप्रमाणे असंस्कृत आणि हीन अशा या तमोगुणाला गुणातच मानला आहे. नवग्रहांमध्ये विस्तवच अशा ग्रहास - मंगळास - मंगल असे म्हणतातच ना! तसें तमोगुणास गुण असे उगीचच म्हणायचे, झाले!"

तो आलसु सूनि असे कांखें। म्हणौनि निद्रे कंहीं न मुके।
पापें पोखितां दुःखें। न सांडिजे जेवीं।।१८-७५३।।
आणि देहाधनाचियां आवडी। सदा भय तेयातैं न संडी।
विसंबू न शके धोंडीं। काठिण्य जैसें।।७५४।।
आणि पदार्थजातीं स्नेहो। बांधे म्हणौनि तो शोकें ठावो।
केला न शके पाप जावों। कृतघ्नौनि जैसें।।७५५।।
आणि असंतोख जीवेंसीं। धरूनि ठेला अहर्निशीं।
म्हणौनि मैत्री तेणेंसीं। विषादें केली।।७५६।।
लसणांतें न संडीं गंधी। कां अपथ्यशीलांतैं व्याधी।
तैसीं केली मरणावधी। विषादें तेयां।।१८-७५७।।

"हे सुवीरा! सर्व दोषांचे साक्षात आश्रयस्थान अशा या तमानेच ज्या नराचे अवघे शरीर घडविलेले असते, तो आळसास नेहमी काखोटीला मारूनच असतो. म्हणून त्याला निद्रा काही सोडत नाही. सतत पापे करत जाणाऱ्यास दुःखे जशी सोडत नाहीत, तसेच हे आहे. आणि धोंड्याला जसे काठिण्य सोडता येत नाही, त्याप्रमाणे देहाधनाची आसक्ती असल्याने त्या पुरुषास भय कधीच सोडत नाही. आणि कृतघ्न पुरुषापासून पाप जसे जात नाही, तसेच अशा संसारासक्त मनुष्यास शोक सोडत नाही. तो तामसी पुरुष सतत असंतुष्ट असतो."

आणि वयसा वित्तकामु। यांचा वाढवी संभ्रमु।
म्हणौनि मदें आश्रमु। तोचि केला।।१८-७५८।।
आगीतें न सांडी तापु। सलातैं जातीचा सापु।
कां जगाचा वैरी वासिपु। अखंडु जैसा।।७५९।।
ना तऱ्हीं शरीरांतैं कालु। न विसंबे कवणें वेलु।
तैसा आथी अढलु। तामसीं मदु।।७६०।।
एवं पांचही हे निद्रादिक। तामसाचां ठायिं दोख।
जियं धृति देख। धरिलें आहाती।।७६१।।
तियें धृति नांवें। तामसी एथ जाणावें।
म्हणीतलें तेणें देवें। जगाचेनि।।७६२।।

"त्याची कामना कधीच तृप्त होत नाही. म्हणून विषादाने त्याच्याशी मैत्री केली आहे. लसणाला दुर्गंध कधीच सोडून जात नाही. कुपथ्य करणाऱ्यास व्याधी सोडत नाही. त्याचप्रमाणे त्या मनुष्यास विषाद् मरणापर्यंत सोबत करतो. आणि तारुण्याची मस्ती, द्रव्याची लालसा आणि विषयासक्ती यांच्याठायी रममाण होऊन राहिल्याने त्या तामसी पुरुषास मदाने आपले वास्तव्यस्थान केले आहे. ज्याप्रमाणे अग्नीला उष्णता सोडून जात नाही; किंवा साप वैर सोडत नाही; अथवा शरीरास काळ केव्हाही विसरत नाही; त्याप्रमाणे तामसी पुरुषास मद नेहमीच धरून असतो. निद्रा, भय, शोक, विषाद आणि मद अशा या पाच दोषांना तामसी पुरुषाठायी ज्या धृतीने राखले आहेत, तिला *तामसी धृती* असे समजावे," असे तो जगन्नाथ म्हणाला.

सुख व त्याचे भेद::::

बुद्धी, धृति व कर्म यांचा सुखाशी असणारा संबंध

यानंतर बुद्धी, धृति व कर्म यांचा अनुबंध व त्याचा सुखाशी संबंध स्पष्ट करतांना ज्ञानदेव म्हणतातः

एवं त्रिविध जैं बुद्धि। कीजे कर्मनिश्चो आधी।
तो धृती या सिद्धि। नेइजो एथ।।१८-७६३।।
सूर्यें मार्गु गोचरु होये। आणि तो चालती कीर पायें।
परि चालणें तैं आहे। धैर्यें जेवीं।।७६४।।
तैसीं बुद्धि कर्मातैं दावी। तैं करणसामग्री निफजवी।
परि निफजावयां होआवी। धीरता जैं।।७६५।।
तैं हे गां तुजप्रति। सांगितली त्रिविध धृति।
येयां कर्मत्रेयां निष्पत्ति। जालियां मग।।७६६।।
एथ फळ जैं एक निफजे। सुख जेयाते म्हणिजे।
तैंही त्रिविध जणिजे। कर्मवशें।।७६७।।

"सत्त्वरजतमोगुणांनी त्रिविध प्रकारांची जी बुद्धी होते, त्या बुद्धीने जो कर्मनिश्चय केला जातो, तो सिद्धीस नेणाऱ्या अशा या त्रिविध प्रकारच्या धृती आहेत. सूर्यप्रकाशाने मार्ग उजळतो. तो मार्ग पायांनी चालावयाचा असतो. पण त्यासाठी जसे अंगी बळ लागते, त्याप्रमाणे बुद्धीद्वारे कर्म कोणते करावयाचे ते ठरते; इंद्रियसमुदाय ते कर्म करतो; परंतु ते कर्म धृतियोगे केले जाते. या धृतीचे जे तीन प्रकार मी वर्णन केले, त्याद्वारे संपन्न होणाऱ्या त्रिविध कर्मांपासून जे त्रिविध प्रकारचे फळ निर्माण होते, त्यास *सुख* असे म्हणतात."

तऱ्हीं फलरूप तैं सुख। त्रिगुणीं भेदिलें देख।
विवंचूं आतां चोख। चोखीं बोलां।।१८-७६८।।
परि चोखी तैं कैसीं सांगें। पैं घेवो जातां बोलबगें।
कानींचियेही लागे। हातींचा मलु।।७६९।।
म्हणौनि जेयाचेनि अव्हेरें। अवधानही होय बाहिरें।
तेणें आईक हो आंतरें। जिवाचेनि।।७७०।।

"कर्मप्रकारांनुसार हे सुख त्रिविध प्रकारचे असते. असे ते गुणत्रयीनुसार त्रिविध प्रकारचे होणारे सुख कसे असते, हे आता स्पष्ट सांगतो. ते अवधानपूर्वक ऐक. माझे बोल इतके चोख असतील की ते कर्णेंद्रियांद्वारे ऐकतांना त्यांना कर्णेंद्रियांचा मलिन स्पर्श झाल्यास

ते बोलही हीणकस होतील; म्हणून जीवाचाही जीव अशी जी अंतर्मुखता असते, जिच्यामुळे बाह्य अवधानही हद्दपार केले जाते; अशा अंतर्मुख अंतःकरणाने माझे शुद्ध बोल ऐक."

त्रिविध प्रकारचे सुख

ऐसें म्हणौनि देवो। त्रिविधा सुखाचा प्रस्तावो।
मांडिला तो निर्वाहो। निरूपितसें।।१८-७७१।।

"असे म्हणून श्रीकृष्णांनी त्रिविध प्रकारचे सुख निवेदिण्यास सुरुवात केली. ते ऐका!"

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति।।१८-३६।।
यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्।।१८-३७।।

"हे भरतकुलश्रेष्ठा! त्रिविध प्रकारचे सुख कसे असते, ते माझ्याकडून ऐक. ज्या सुखात अभ्यासाने रममाण होता येते व जे दुःखाचा निश्चित नाश करते; जे आरंभी विषाप्रमाणे वाटले तरी अंती अमृताप्रमाणे परिणाम करते; जे आत्मैक्य बुद्धीच्या प्रसादामुळे प्राप्त होते; त्या सुखास *सात्त्विक सुख* असे म्हणतात."

ज्ञानेश म्हणतातः

म्हणे सुखत्रयसंज्ञा। सांगो म्हणौनि प्रतिज्ञा।
बोलिलों तैं प्राज्ञा। आइक आतां।।१८-७७२।।
तऱ्हीं सुख तैं गां किरीटी। दाविजैल तुज दिठी।
जैं आत्मयाचिये भेटी। जीवासि होय।।७७३।।
परि मात्रेचेनि मापें। दिव्यौषध जैसें घेपे।
कां कथिलाचें कीजे रुपें। रसभावनीं।।७७४।।
नाना लवणाचें जलु। होआवया दोनि चार वलु।
देऊनि सांडिजती ढालु। तोयाचां जेवीं।।७७५।।
तेवीं जालेनि सुखलेशें। जीवु भाविलियां अभ्यासें।
जीवपणाचें नासे। दुःख जेथें।।७७६।।
तैं एथ आत्मसुख। जालें असे त्रिगुणात्मक।
तैंही सांगो एकैक। रूप आतां।।७७८।।

"हे प्रज्ञावान अर्जुना! सुखाचे तीन प्रकार सांगण्याची बोली मी केली आहे. तर ऐक. आत्म्याच्या भेटीसरसी जीवास होणारे सुख तुला दिसेल असे करतो. दिव्य औषधी परिणामकारक होण्यासाठी जसे ते मात्रेएवढ्या अल्प प्रमाणात वारंवार द्यावे लागते; किंवा खारे पाणी करण्यासाठी मीठ पाण्यात वारंवार ढवळावे लागते; अथवा कथलास वारंवार रसायनाची पुटे देत गेल्यास त्याचे रुपे होते; त्याप्रमाणे आत्मा आणि जीव यांच्या वेळोवेळी क्षण दोन क्षण होत जाणाऱ्या भेटीतून प्राप्त होत जणाऱ्या सुखलेशांच्या वारंवार चढत गेलेल्या पुटांमुळे जीवत्व व त्यासंबंधीचे संसारदुःख यांचा नाश होऊन गोमटे असे आत्मसुख भावते. असे हे आत्मसुख त्रिगुणांच्या संगतीत कसे प्रकटते, ते सांगतो."

सात्त्विक सुख

आतां चंदनाचें बुड। सर्पी जैसें दुवाड।
कां निधानाचें तोंड। विवसियां जेवीं।।१८-७७८।।
अगां स्वर्गींचें गोमटें। आडव यागसंकटें।
कां बालपण दासटें। त्रासकाल।।७७९।।
हे असो दीपाचियें सिद्धी। अवघड धूं आधीं।
ना तऱ्हीं तो ओखदीं। जिभेचां ठाओ।।७८०।।
तेयापरी पांडवा। जेयां सुखाचां रिगावा।
विषम तेथ मेळावा। यमदमांचा।।७८१।।

"चंदन सुवासिक व शीतळ खरे! पण त्याच्या खोडाला सर्पाचा विळखा असतो. गुप्तधनाच्या साठ्यावर पिशाच्च बसलेले असते. स्वर्गरूपी मोहक सुखांनी दाटलेले अरण्य प्राप्त करण्यासाठी यज्ञयागादी अवघड मार्ग चोखाळावा लागतो. तारुण्य उपभोगण्यापूर्वी बाळपणाच्या रोगराई व त्रासातून पार व्हावे लागते. एवढेच काय! दीपाची प्रभा अनुभवण्यापूर्वी काळा धूर पहावा लागतो. औषधे परिणामकारक असतात, पण ती सेवन करतेवेळी तोंड वाईट होते. अर्जुना! याप्रमाणेच यमदमांचा कठीण ताप सहन केल्याशिवाय खरे सुख मिळत नाही."

देत सर्वस्नेहा मिठी। आंगीं ऐसें वैराग्य ठी।
स्वर्गसंसारां कांटीं। काढितचि।।७८२।।
विवेकश्रवणें अति त्रासें। जेथ व्रताचरणें कर्कशें।
करितां जाती भोकसें। बुद्ध्यादिकांचें।।७८३।।
सुषुम्नेचेनि तोंडें। गिळिजे प्राणापानाचें लोंढे।
बोहणियेसीचि एवढे। भारी जेथ।।७८४।।

"स्वर्ग व संसार यातल्या सुखांना ओरबाडून काढत, सर्व संसारासक्तीचा नाश करत अंगी प्रथम वैराग्य उभे राहते. नित्यानित्यविवेकाच्या अनुसंधानाने व कडक व्रतांच्या आचरणाने बुद्ध्यादी सर्व इंद्रियांचे लचके तोडले जातात. सुषुम्ना मुखाने प्राणापानांचे लोंढेच्या लोंढे गिळावे लागण्याचे संकट या सुखाच्या आरंभीच सहन करावे लागते."

जैं सारसांही विघडतां। होय वोहाहुनि वत्स काढितां।
नव्हे भणंगु दवडितां। भाणयावरुनी।।१८-७८५।।
पैं मायेपुढुनि बालकु। कालें नेतां जैं एकु।
होय कां उदकु। तुटतां मीना।।७८६।।
तैसें विषयांचें घर। इंद्रियां सांडितां थोर।
युगांतु होय तैं वीर। विरागी साहाती।।७८७।।
ऐसा जेयां सुखाचा आरंभु। दावी काठिण्याचा क्षोभु।
मग क्षीराब्धि लाभु। अमृताचा जैसा।।७८८।।

"चक्रवाक मिथुनाचा जोडा फुटल्यामुळे त्यांना जे दुःख होते; गायीच्या कासेखाली पिणाऱ्या वासराला तेथून खेचून काढतांना त्याला जे तीव्र दुःख होते; भांड्यावरून माशीला हाकलतांना तिला जसे

दु:ख होते; किंवा मातेच्या पुढ्यातील एकुलते एक बालक काळाने हिरावून नेले असता तिला ज्या अतीव वेदना होतात; माशाला जळाबाहेर काढतांना त्याची जी तडफड होते; तेवढेच, किंबहुना त्याहूनही अधिकच दु:ख या सुखाच्या आरंभी भोगावे लागते. इंद्रियांना विषयांपासून विभक्त करतांना युगांत होण्याइतके दु:ख विरागी पुरुषांना साहावे लागते. आरंभीच एवढे दु:ख त्या सुखाच्या प्राप्तीपूर्वी पदरी येते ते जणू काही अमृतमंथनासाठी घुसळल्या जाणाऱ्या क्षीरसमुद्राच्या क्षोभण्यासारखे असते."

पाहिलियां वैराग्यगरळां। धैर्यशंभु वोढवी गळा।
तऱ्हीं ज्ञानामृतें सोहोळा। पाहें जेथ।।१८-७८९।।

"सुरवातीस यमदमरूपी वासुकी सर्पाच्या दोरीने शरीररूपी मंदारास रवी करून अंत:करणरूपी क्षीरसागराचे मंथन केले असता वैराग्यरूपी हलाहल विष निघते. ते धृतिरूप श्रीशंभूने आपल्या गळ्यात ठेवून घेतल्यानंतर ज्ञानामृताचा कुंभ लाभतो. असा हा सोहोळा आहे."

पैं कोलितांही कोपें ऐसें। द्राक्षांचें हिरवेपण असें।
तें परिपाकीं कां जैसें। माधुर्य आते।।१८-७९०।।
तैं वैराग्यादि तैसें। पिकलियां आत्मप्रकाशें।
मग वैराग्येंशीही नाशे। अविद्याजात।।७९१
तेव्हां सागरीं गंगा जैसीं। आत्मा मीनल्या बुद्धि तैसीं।
अद्वयानंदाची आपैसीं। खाणी उघडे।।७९२।।
ऐसें स्वानुभवविश्रामें। वैराग्यमूल जें परिणमे।
तें सात्त्विक येणें नांवे। बोलिजे सुख।।७९३।।

"हिरवे द्राक्ष तोंड पोळण्याइतके आंबट असते; परंतु ते पिकले की कसे मधुर होते! त्याचप्रमाणे वैराग्यादिकरूपी द्राक्षसुद्धा पिकले की त्यात आत्मप्रकाशरूपी माधुर्य निर्माण होते. आत्मप्रकाशाची गोडी चाखली की मग वैराग्यासह अविद्यासुद्धा नाश पावते. गंगा सागरास जशी मिळून जाते, तशी बुद्धी आत्म्याशी एकरूप झाली की अद्वयानंदाची खाणच हाती लागते. असे वैराग्य ज्याचे मूळ असते, ते सुख आत्मानुभवात स्थिरावते. त्या सुखास *सात्त्विक* असे नांव आहे."

राजसिक सुख

आता *राजस सुख* कसे असते ते पाहा:

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम्।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम्।।१८-३८।।

"विषय व इंद्रिये यांच्या संयोगातून निर्माण होणारे जे सुख असते, ते प्रथम अमृताच्या अवीट गोडीचे वाटले, तरी अंती विषासारखे घातक असते. त्या सुखास *राजस सुख* असे मानले आहे."

ज्ञानेश म्हणतात:

आणि विषयेंद्रियां। मेलु होतां धनंजया।
जें सुख जाय थडियां। सांडूनि दोन्हीं।।१८-७९४।।
अधिकारियां रिगतां गांवों। होय जैसा उत्साहो।
कां रिणवरी विवाहो। विस्तारिला।।७९५।।
नाना रोगिया जिभेपासीं। केलें गोड साखरेसीं।
कां बचनागाचीं जैसीं। महुरता पहिली।।७९६।।
पहिलें संवचोराचें मैत्र। हाटभेटीचें कलत्र।
कां लाघवियेचें विचित्र। विनोद तैं।।७९७।।
तैसें विषयेंद्रियदोखीं। जैं सुख जिवातैं पोखीं।
मग उपडिला खडकीं। हंसु जैसा।।७९८।।

"इंद्रियांस विषय उपभोगण्यास मिळाले असता जे सुख अंत:करणात दुथडी भरून ओसंडू लागते; ते सुख सुरुवातीस अमृताप्रमाणे मधुर वाटते. अधिकारी गावात येताच उत्साहाचा जल्लोष उसळतो. ऋण काढलेले असले तरी विवाहाचा समारंभ जसा ठेसात चालतो; रोग्याला कुपथ्यकर असले तरी केळे व साखर जशी गोड लागतात; बचनाग विष खातांना जसे गोड लागते; पण अंती खाणाऱ्याचे प्राण हरण करते; संभावित चोराची मैत्री कृत्रिम असून अंती घात करणारी असली तरी प्रथम दर्शनी जशी आकृष्ट करते; बाजारबसवी स्त्री जशी लाघवी व मादक वाटली तरी शेवटी अहितच करते; अथवा बहुरूप्याचे सोंग जसे बघताक्षणीच फसवे असते व खरे तर लटके असते; त्याप्रमाणे विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगाने दोषास्पद असे जे सुख निर्माण होते, ते जरी जीवास पोसणारे असे वाटले, तरी चंद्राचे चांदणे जलाशयात प्रतिबिंबित झालेले पाहून त्यावर रत्ने समजून झेपावणाऱ्या राजहंसाची पाण्यातल्या खडकांवर चोच आपटून जशी मरणप्राय अवस्था व्हावी, तसे हानिकारक ठरते."

तैसीं गोडी आघवी आटे। जीविताचां ठाओ फिटे।
सुकृताचियांही सुटे। धनाची गांठ।।१८-७९९।।
आणिक भोगलें जें काहीं। तें स्वप्न तैसें होय नाही।
मग हानिचांचि घायीं। लोलावे उरे।।८००।।
ऐसें आपत्ती जें सुख। ऐहिकीं परिणमें देख।
परत्रीं कीर विख। होऊनि परतें।।८०१।।
जें इंद्रियांजातां लला। दिधलियां धर्माचा मला।
जाळूनि भोगिजे सोहला। विषयांचा जेथ।।८०२।।

"त्या सुखामुळे कमावलेल्या अवघ्या संपत्तीचा नाश होतो. जीविताचा क्षय होतो. पुण्यरूपी धनाचा संचय उधळला जातो. वर जे सुख भोगतांना मोहमय वाटते, तेसुद्धा उपभोगून झाले की स्वप्नवत नाहीसे होते. त्यानंतर नुकसानीची मोजदाद करणेच फक्त मनुष्याच्या हाती उरते. ऐहिकीं अशी संकटपरंपरा ते सुख निर्माण करते आणि परलोकासाठी तर ते जसे काही विषच, तसे सेवणाऱ्यावर उलटते. कारण इंद्रियांचे लाड पुरवण्यासाठी धर्माचा मळा जाळतच या सुखाचा सोहोळा संपन्न होत असतो."

तेथ पातकें बांधिती थावो। तियें नरकें देती ठावो।
जेणें सुखें हा अपावो। परत्रीं ऐसा।।१८-८०३।।
पैं नामें विष महुरें। परि मारौनि अंतीं खरे।
तैसें आदि जें गोडिरें। अंतीं कडू।।८०४।।

पार्था तैं सुख सांचें। वलिलें आहे रजाचें।
म्हणौनि न शिवे तेयाचें। आंग कहीं।।८०५।।

"त्यामुळे पातकांना आरूढण्यासाठी बळकट स्थान मिळते आणि मनुष्यास नरकात स्थान मिळते. बचनाग विष सेवतांना मधुर लागले तरी अंती जीवच घेते. त्याप्रमाणे आरंभी सेवतांना जे गोड वाटते पण परिणामी कडूजहर असते, ते सुख, हे पार्था! केवळ रजोगुणाचाच परिपाक असते. म्हणून त्या तशा राजस सुखास स्पर्शसुद्धा करू नये."

तामसिक सुख

गुणत्रयानुसार सरतेशेवटी तामस सुखासंबंधी श्रीगोपाल म्हणतातः

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहमात्मनः।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम्।।१८-३९।।

"निद्रा, आळस व प्रमाद यांपासून संभवणारे जे सुख आत्म्यास मोहात पाडते व ज्याचा मोह शेवटीसुद्धा सुटत नाही, त्या सुखास *तामस सुख* असे म्हणतात."

याबाबत ज्ञानदेव म्हणतातः

आणि अपेयाचेनि पानें। अखाद्याचेनि भोजनें।
स्वैरस्त्रीसंनिधानें। होय जैं सुख।।१८-८०६।।
कां पुढिलांचेनि मारें। ना तऱ्हीं परस्वापहारें।
जैं सुख अवतरे। भाटाचां बोलीं।।८०७।।
जैं आलस्यावरी पोखिजे। निद्रमाजीं जैं देखिजे।
जेयांचां आद्यंतीं भुलिजे। आपुली वाट।।८०८।।
तैं गां सुख पार्था। तामस जाण सर्वथा।
हे बहु न सांगोचि जैं कथा। असंभाव्य हे।।८०९।।

"मदिरादी अपेय पानामुळे, अभक्ष्यभक्षणाने वा स्त्रियांच्या स्वैर संगाने जे सुख होते; अथवा दुसऱ्यांस ठार मारून, परद्रव्याचा अपहार करून, वा भाटांच्या स्तुतीपासून जे सुख अवतरते; जे सुख असे आत्म्याविषयीच्या आळसाने वाढीस लागते; स्वात्मकेंद्रित विचारांच्या निद्रेने अनुभवले जाते; ज्या सुखाच्या सुरुवातीपासून ते तहत अंतापर्यंत मनुष्य आत्मसुखाच्या मार्गास विसरतो, त्या सुखास *तामस* अशी संज्ञा आहे. हे पार्था! खरे तर त्यास सुख म्हणणेही उचित नाही."

ऐसे कर्मभेदें मूदलें। फलसुखही त्रिधा जालें।
तैं हे यथागमें केलें। गोचर तुज।।१८-८१०।।
तैं कर्ताकर्मफल। एं त्रिपुटी एकीं हेल।
वांचूनि कांहीं नसे स्थूलें-। सूक्ष्मीं इयें।।८११।।
आणि हे तंव त्रिपुटी। तिहीं गुणीं इहीं किरीटी।
गुंफिली असे पटीं। तांतुवीं जैसीं।।८१२।।

"सुखाचे मूळ कारण जे कर्म आहे, त्या अनुरूप सुखाचेसुद्धा असे हे त्रिविध प्रकार होतात. ते तुला मी यथाशास्त्र प्रकट केले. या स्थूल-सूक्ष्म सृष्टीमध्ये अणुरेणूत व ब्रह्मांडातसुद्धा - या कर्ता, कर्म व कर्मफळ अशा त्रिपुटीविरहित असणारी कोणतीही वस्तू नाही. आणि अर्जुना! वस्त्रात जसे तंतू गुंफलेले असतात, तद्वतच ही त्रिपुटीसुद्धा त्रिगुणांची मढवलेली असते."

असो. त्रिगुणांनुसार वर्णव्यवस्था पण आहे. त्यास अनुलक्षून स्वधर्मकर्तव्ये असतात. हाच विचार आपण पुढील **उन्मेष क्र. ३३- स्वधर्मकर्तव्य** यातून करणार आहोत. तो पाहू या.

::उन्मेष::३३::
::स्वधर्मकर्तव्य::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३३:

गीता:
३:८-१९
१७:२३-२८
१८:४०-४३
ज्ञानेश्वरी:
३:७७-८०,८४-१५१
१७:३२६-४३३
१८:८१३-८८४
पा.यो.सू.:
१:२३
२:१

कर्माचे स्वरूप

::उन्मेष::३३::
::स्वधर्मकर्तव्य::

वर्णविहित कर्मव्यवस्था::::

अखिल ब्रह्मांडाचे त्रिगुणमयत्व

त्रिपुटीच्या रूपाने आणि *सत्त्व, रज व तम* या त्रिकूटाने हे अखिल विश्व व्याप्त आहे. म्हणून श्रीकृष्ण सांगतातः

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः।
सत्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः।।१८-४०।।

"प्रकृतिजन्य अशा या सत्त्व-रज-तमादी गुणत्रयीपासून मुक्त असणारा कोणीही प्राणी वा अन्य वस्तुमात्र या पृथ्वी, द्युलोक वा स्वर्ग यांमध्ये नाही; देव वा इतर योनींमध्येही असे काहीही नाही, जे या त्रिगुणांविरहित आहे." म्हणून ज्ञानेशांचे सांगणे आहे कीः

म्हणौनि पृथ्वीचां आलोकीं। न बंधिजे इहीं सत्त्वादिकीं।
तैसीं स्वर्गीं वा मृत्युलोकीं। आथी वस्तु।।१८-८१३।।
कैंचा लोंवेवीण कांबला। मातियेंवीण मोदला।
कां जलेंवीण कल्लोला। होणें आहे।।८१४।।
तैसें न होनि गुणाचें। सृष्टीचियां रचना रचे।
ऐसें नाही गां सांचें। प्राणिजात।।८१५।।
यालागीं हे सकल। तिन्हीं गुणांचेंचि केवल।
घडलें आहे निखिल। ऐसें जाण।।८१६।।
गुणीं देवां त्रयीं लाविली। गुणीं लोकी त्रिकुटी पाडिली।
चातुर्वर्णीं घातली। सिनानीं उलीमें।।८१७।।

"म्हणून या सत्त्वादिक त्रिगुणांनी वेष्टिलेली नाही अशी कोणतीच वस्तू स्वर्ग वा मृत्युलोक वा प्रकृतीच्या कोणत्याही आविष्कारात नाही. लोकरीशिवाय घोंगडी जशी नसते; मातीशिवाय कुंभ नसतो; जळाविना लाटा नसतात; त्याप्रमाणे सृष्टीच्या रचनेनुसार निर्मिलेला असा कोणताही प्राणिजात नाही, जो या गुणांचा झालेला नाही. याचसाठी, हे अर्जुना! असे जाण की हे अखिल विश्वच निव्वळ या त्रिगुणांपासून खरे तर घडलेले आहे. याच गुणांनी देवाचे ब्रह्मा, विष्णू व महेश असे रूप केले; त्यांनीच स्वर्ग, मृत्युलोक व पाताळ असे त्रिलोक केले आहेत; आणि चातुर्वर्ण्यांना विविध व्यवसाय करण्यास लावले आहे."

वर्णप्रभव

"चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।।४-१३।।" असे सांगणारे भगवंत त्यांचे गुण व कर्मविभाग वर्णपरत्वे स्पष्ट करतांना अठराव्या अध्यायातील पुढील श्लोकी म्हणूनच असे म्हणतात कीः

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः।।१८-४१।।

"हे परंतपा! स्वभावप्रभव गुणांयोगे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची कर्मे वेगवेगळ्या स्वरूपाची असतात."

असेच वर्णवत कर्मविभाग सांगतांना ज्ञानदेव म्हणताताः

तैंचि चारी वर्ण। पुसती जन्हीं कोण कोण।
तन्हीं जेयां मुख्य ब्राह्मण। धुरेचें जैं।।१८-८१८।।
एर क्षत्रिय वैश्य दोनीं। तेंहीं ब्राह्मणांचांचि मानिजे मानीं।
जैं तैं वैदिकविधानीं। योग्य म्हणौनि।।८१९।।
चौथा शूद्र जो धनंजया। वेदीं लागु कीर नाही तेयां।
तन्हीं वृत्ति वर्णत्रेया-। अधीन तेयाची।।८२०।।
तियें वृत्तिचियें जवलिका। वर्णां ब्राह्मणादिकां।
शूद्रूही कीं देखा। चौथा जाला।।८२१।।

"तर ते चार वर्ण कोणते म्हणून विचारशील तर ऐक. ज्यांमध्ये ब्राह्मण मुख्य आहेत; क्षत्रिय व वैश्य या दोघांनाही वेदोक्त कर्मांचे अधिकारी असल्याने ब्राह्मणांसारखाच मान आहे आणि चौथा वर्ण शूद्राचा आहे - ज्याला वेदांसंबंधी अधिकार नाही व ज्याची वृत्ती सर्वस्वी ब्राह्मणादी त्रैवर्णिकांवर अवलंबून आहे - असे ते चार वर्ण आहेत. कारण ब्राह्मणादी त्रैवर्णियांवर वृत्ती अवलंबून असल्याने शूद्राचासुद्धा वर्णव्यवस्थेत चौथा वर्ण म्हणून समावेश होतो."

जैसा फुलाचेनि सांघातें। तंतु तुरंबिजे श्रीमंतें।
तैसें द्विजसंगें शूद्रातें। स्वीकारी श्रुती।।१८-८२२।।
ऐसैसीं गां पार्था। चातुर्वर्ण्यव्यवस्था।...।।८२३।।

"फुलांबरोबर त्यांना गुंफणाऱ्या सुताचाही श्रीमंत मनुष्य जसा स्वीकार करतो; त्याचप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही वर्णांसह असलेल्या शूद्राचासुद्धा श्रुतीने वर्णविचारात समावेश केलेला आहे. त्यांच्याबरोबर राहून आपली कर्मे यथास्थित पार पाडल्यास शूद्रासही वेदोक्त फलप्राप्ती आहे. हे पार्था ! अशी ही चातुर्वर्ण्यव्यवस्था आहे."

वर्णविहित कर्म

...। करूं आतां कर्मपथा। यांचियां रूप।।१८-८२३।।
जिहीं गुणीं तैं वर्ण चान्हीं। जन्ममृत्युचियें कातरीं।
चुकौनियां ईश्वरीं। पैठें होती।।८२४।।
जिएं आत्मप्रकृतिचां इहीं। गुणीं सत्त्वादिकीं तिहीं।
कर्मे चौघां ठायीं। वांटिली वर्णां।।८२५।।

"आता यांचे विहित कर्ममार्ग स्पष्ट करू या. त्या मार्गाचे योग्य आचरण केल्याने, मायायोगे सत्त्वादिक तिन्ही गुणांची या चारी वर्णाच्याठायी जी व्यवस्था केलेली असते, त्यांच्या अनुरूप कर्म करून, त्या सर्वांना जन्ममृत्यूच्या कातरीतून सुटून ईश्वरास जाऊन मिळता येते."

जैसें बापें जोडिलें लेकां।वांटिलें सूर्यें मार्ग पांथिका।
नाना व्यापार सेवकां। स्वामी जैसें।।१८-८२६।।

तैसीं प्रकृतिचां गुणीं। जेयां कर्माची वेल्हावणी।
केली आहे वर्णीं। चहूं इहीं।।८२७।।
तेथ सत्त्वें आपुलां आंगीं। समीननिमीन भागीं।
दोघें केलें नियोगी। ब्राह्म क्षत्रिय।।८२८।।
आणि रज परि सात्त्विक। येथ ठेविलें वैश्य लोक।
रजचि तमभेसक। तेथ शूद्र तैं गां।।८२९।।

"जसे पित्याने ठेवलेले धन मुलांत वांटून द्यावे; किंवा सूर्याने प्रत्येक पांथस्थासाठी त्याचा त्याचा मार्ग प्रकाशित करत दाखवावा; किंवा स्वामीने सेवकांना त्यांची त्यांची कामे नेमून द्यावीत; त्याप्रमाणे प्रकृतीच्या गुणांनी या चारही वर्णांना त्यांच्या त्यांच्या नियत कर्मांची विभागणी करून दिली आहे. सत्त्वगुणाने त्याच्या कमीजास्तपणाने ब्राह्मण व क्षत्रिय हे वर्ण नियोजिले आहेत. आणि रजोगुणात थोडा सत्त्वगुण मिसळून त्या भागी वैश्य लोकांस ठेवलेले आहे. रजोगुणात तमोगुणाची भेसळ करून त्या भागी शूद्र वर्ण होतो."

ऐसा एकाचि प्राणिवृंदां। भेदु चतुर्वर्णधा।
गुणींचि प्रबुद्धा। केला जाण।।१८-८३०।।
मग आपुलें ठेविलें जैसें। आइतेंचि दीपें दिसें।
गुणाभिन्न कर्म तैसें। शास्त्र दावी।।८३१।।
तैंचि आतां कोण कोण। वर्णविहिताचें लक्षण।
हे सांगों ऐक श्रवण-। सौभाग्यनिधि।।८३२।।

"हे बुद्धिवान अर्जुना! याप्रमाणे एकाच मनुष्यजातीचे गुणांनीच चतुर्विध प्रकार केलेले आहेत. मग दीप जसे आपले ठेवलेले वस्तुमात्र दाखवतो, त्याप्रमाणे या वर्णांची गुणांप्रमाणे जी कर्मे असतात, ती शास्त्राच्या प्रकाशाने दिसतात. असे दिसणारे वर्णविहित कर्म कोणकोणते आहे, ते, हे श्रवणसौभाग्यनिधी! तू मजपासून श्रवण कर."

ब्राह्मणांचे स्वभावज कर्म

ब्राह्मणाची कर्मे गीता सांगते, ती अशीः

शमो दमस्तप: शौचं क्षान्तिरार्जवमेव च।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्मस्वभावजम्।।१८-४२।।

"शम, दम, शौच, क्षमा, आर्जव, ज्ञान, विज्ञान व आस्तिक्य ही ब्राह्मणाची स्वभावज कर्मे आहेत."

यांचे विवेचन करतांना ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं सर्वेंद्रियांचियां वृत्ति। घेऊनि आपुलां हातीं।
बुद्धि आत्मेयां मिले कांतीं। प्रिया जैसीं।।१८-८३३।।
ऐसा बुद्धीचा उपरमु। तेयां नाम म्हणिपे शमु।
तो गुणु या उपक्रमु। जेया कर्माचां।।८३४।।
आणि बाह्येंद्रियांचें धेंडें। पिटूनि विधिचेनि दंडें।
नेदिजे अधर्माकडे। कंहींचि जावो।।८३५।।
तो पैं गां शम विरजा। दम गुण एथ दुजा।
आणि स्वधर्माचियां बोजा। जिणें जैं कां।।८३६।।
तेवींचि सटविचियें रातीं। न विसंबिजे जेवीं वाती।
तैसा ईश्वरनिर्णो चित्तीं। वाहणें सदा।।८३७।।
तेयां नाम तप। तैं तिजयां गुणाचें रूप।...।।८३८।।

"प्रिय पतीशी पत्नी जशी रत होते, त्याप्रमाणे सर्वेंद्रियांनी बुद्धी जेव्हा आत्म्यात रममाण होते, तेव्हा बुद्धीस आत्मतत्त्वी अंतर्मुख करणाऱ्या गुणास *शम* असे म्हणतात. हा ब्रह्मकर्माचा आरंभ करतो. आणि बाह्य इंद्रियांचे उद्दंडपण विधीच्या दंडाने पिटून त्यांना अधर्माकडे जाऊ न देणारा *दम* हा दुसरा गुण आहे. आणि स्वधर्म न विसरता त्याचे पालन करत जगणे - जसे पाचवीच्या सटवीच्या रात्री नवजात अर्भकासाठी ठेवलेल्या दीपास विसंबू नये, तसे स्वधर्मास न विसंबणे - त्याचप्रमाणे आचरण करत *ईश्वरप्रणिधान* सदासर्वदा चित्ती बाळगणे, या कर्मास *तप* असे म्हणतात. हा तिसरा ब्रह्मकर्माचा गुण आहे."

आणि शौचही निष्पाप। द्विविध एथ।।१८-८३८।।
मन भावशुद्धी भरलें। आंग क्रिया अलंकारिलें।
ऐसें सबाह्य जियालें। साजिरें जैं कां।।८३९।।
तेयां नांव गां शौच पार्था। तो कर्मीं गुण जयें चौथा।
आणि पृथिविचियें परी सर्वथा। सर्व जैं साहणें।।८४०।।
तैं गां क्षमा पांडवा। गुण जेथ पांचवा।
स्वरामाजीं सुहावा। पंचमु जैसा।।८४१।।

"चौथा गुण म्हणजे *शौच*. त्या शुद्ध शौचाचे दोन प्रकार आहेत. विहित कर्मांच्या शुद्ध आचरणाने शरीर मंडित करणे आणि मनात सद्‍भाव - साधुभाव जागृत ठेवणे - असे ते प्रकार आहेत. याप्रमाणे अंतर्बाह्य निर्मळता राखणे याचे नांव *शौच* आहे. स्वरसप्तकात पंचमस्वराचे जे स्थान आहे, तेच, हे अर्जुना! *क्षमा* या पाचव्या ब्रह्मकर्माच्या गुणाचे आहे. पृथ्वी जशी सर्व भार सहन करते, सर्व प्राणिजात - वस्तुमात्र - यांचे सर्व काही निवंतपणे साहून जाते, त्याप्रमाणे सकळ प्राणिमात्रांनी आपले केलेले अपराध विनातक्रार साहणे, हे या गुणाचे लक्षण आहे."

आणि वांकडेनि वोघेंसीं। गंगा वाहे उजूचि जैसीं।
कां पुठीं वललां ऊंसीं। गोडी जेवीं।।१८-८४२।।
तैसा विषमांही जीवां-। लागीं ऊजुकारु बरवा।
तैं आर्जव गां साहावा। जेथींचा गुणु।।८४३।।
आणि पाणिये प्रयत्नें माली। अखंड जचे झाडामुळीं।
परि तैं आघवेंचि फलीं। जाणें जेवीं।।८४४।।
तैसें शास्त्राचारें तेणें। ईश्वरुचि एकु पावणें।
हे फुडे जैं कां जाणणें। तैं तेथ ज्ञान।।८४५।।
तैं गां कर्मीं जियें। सातवा गुण होये।...।।८४६।।

"वाकडे वळण घेतले तरी गंगा पुण्यसलिलाच जशी असते; किंवा ऊस वाकडा असला तरी त्याची गोडी जशी तेवढीच्या तेवढीच राहते; त्याप्रमाणे कोणत्याही जीवाबद्दल अंतरी जिव्हाळा असणे हा ब्रह्मकर्माचा सहावा गुण *आर्जव* नावाचा आहे. आणि माळी प्रयत्नपूर्वक

झाडांच्या मुळाशी पाणी देण्याचे काम अखंड करतो, तेव्हा त्याच्या मनीमानसी केवळ फळांचाच जसा ध्यास असतो; त्याचे अवघे चित्त जसे झाडांपासून मिळावयाच्या फळांकडे लागलेले असते, त्याप्रमाणे शास्त्रविहित आचरणाचा एकमेव उद्देश म्हणजे ईश्वरास प्राप्त करून घेणे आहे, याची सतत जाणीव असणे म्हणजे *ज्ञान*. हा ब्रह्मकर्माचा सातवा गुण आहे."

...। आणि विज्ञान हे पाहें। एवंरूप।।१८-८४६।।
तऱ्हीं सत्त्वशुद्धीचिये वेळें। शास्त्रें कां ध्यानबळें।
ईश्वरतत्त्वींचि मिळे। निष्टंकबुद्धी।।८४७।।
हे विज्ञान बरवें। तैं गुणरत्न जेथ आठवें।
आणि आस्तिक्य जाणावें। नववा गुण।।८४८।।
पैं राजमुद्रा आथिलियां। प्रजा भजे भलतेयां।
तेवीं शास्त्रे स्वीकारिलियां। मार्गमात्रातैं।।८४९।।
आदरें जैं कां मानणें। तैं आस्तिक्य मी म्हणे।
तो नववा गुण जेणें। कर्म तैं सांच।।८५०।।

"आता *विज्ञान* या आठव्या गुणाचे स्वरूप पाहा. अंतःकरण व चित्तवृत्ती शुद्ध झाल्यामुळे शास्त्रविहित आचरणाने वा ध्यानयोगाने ईश्वरतत्त्वामध्ये बुद्धी अखंड रममाण होते. या गुणातील रत्नास *विज्ञान* असे म्हणतात. आणि नववा गुण म्हणजे *आस्तिक्य*. राजाने मान्यता दिलेल्या, राजमुद्रा अंकित केलेल्या कोणत्याही कायद्यांची व हुकुमांची प्रजा जशी वहिवाट करते; त्याप्रमाणे शास्त्रांनी स्वीकारलेले मार्ग, त्यांनी उद्घोषित केलेले नियम, निर्बंध व वर्तणूक आदरपूर्वक मानणे, त्यास *आस्तिक्य* असे म्हणतात. हा नववा गुण ब्रह्मकर्म संपन्न होण्यासाठी पायाभूत आहे."

एवं नवही शमादिक। गुण जेथ निर्दोख।
तैं कर्म जाण स्वाभाविक। ब्राह्मणांचें।।१८-८५१।।
तो नवगुणरत्नाकरु। या नवरत्नांचां हारु।
न फेडित ले दिनकरु। प्रकाशु जैसा।।८५२।।
नाना चांपा चांपौळीं पूजिला। चंद्र चंद्रिका धवलिला।
कां चंदनु निजें चर्चिला। सौरभ्यें जेवीं।।८५३।।
तेवीं नवगुणटिकलग। लेणें ब्राह्मणाचें अव्यंग।
कंहींचि न संडीं आंग। ब्राह्मणाचें।।८५४।।

"याप्रमाणे शमादिक नऊ निर्दोष गुण ज्या कर्मास संपन्न करतात, ते स्वाभाविक असे ब्राह्मणांचे कर्म असते. *ब्राह्मणत्व* म्हणजे या नऊ गुणांचा सागरच! सूर्य जसा अखंड प्रकाशास धरण करतो, त्याप्रमाणे या नऊ गुणरूपी रत्नांचा हार ब्राह्मण सतत परिधान करत असतो. चाफ्याच्या झाडांची शोभा जशी त्याच्या फुलांनी दिसते; चंद्र जसा अंगच्याच चांदण्याने शुभ्र दिसतो; अथवा चंदन जसे अंगच्याच सुवासाने माखलेले असते; त्याप्रमाणे या नऊ गुणांनी जडविलेला चोख अलंकार नेहमी ब्राह्मणत्वास भूषवितो. असा ब्राह्मण दैवी संपत्तीचा स्रोतच असतो. या नऊ गुणांनी मंडित असते, तेच *ब्रह्मकर्म* होय."

क्षत्रियांचे स्वभावज कर्म

आतां उचित तैं क्षत्रिया। तेंहीं कर्म धनंजया।
सांगें ऐक प्रज्ञेचियां। भरोवरी।।१८-८५५।।

"आता क्षत्रियांना उचित असे कर्म सांगतो. तू प्रज्ञेची पराकष्ठा करून ते समजून घे."

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्।।१८-४३।।

"शौर्य, तेज, धृति, दक्षता, युद्धपराङ्मुख न होणे, दान आणि ईश्वरभाव ही क्षत्रियांची स्वाभाविक कर्मे आहेत."

तऱ्हीं भानु हा तेजें। नापेक्षीं जेवीं विरजे।
कां सिंहें न पाहिजे। जावलिया।।१८-८५६।।
ऐसा स्वयंभ जो जीवें लाठु। सावायेंवीण उद्भटु।
तैं शौर्य गां जेथ श्रेष्ठु। पहिला गुणु।।८५७।।
आणि सूर्याचेनि प्रतापें। कोडीही नक्षत्र हारपे।
ना तो तऱ्हीं लोपे। सचंद्रीं तिहीं।।८५८।।
तैसें आपुलेनि प्रौढीगुणें। जगासि विस्मो देणें।
आपण तऱ्हीं न क्षोभणें। कायसेनही।।८५९।।
तैं प्रागल्भ्यरूप तेजा। जियें कर्मीं गुणु दुजा।..।।८६०।।

"सूर्य जसा प्रकाश देण्यासाठी कोणाचे साहाय्य मागत नाही; किंवा सिंहास कोणाच्या मदतीची अपेक्षा नसते; त्याप्रमाणे उपजतच जो धीटपणा व स्वयंभू असे जे *शौर्य* ते क्षात्रवृत्तीचा पहिला श्रेष्ठ गुण समज. आणि सूर्याच्या प्रतापाने कोट्यवधी नक्षत्रेदेखील दिसेनाशी होतात; पण तो सूर्य जसा करोडो नक्षत्रांसह चंद्रमा जरी असला तरी त्याच्याकडून निस्तेज होत नाही; त्याप्रमाणे आपल्या सामर्थ्याने या जगाला आश्चर्यचकित करून सोडणे, पण आपण मात्र कशानेही अवाक न होणे, असा जो पाणीदार *तेजस्वीपणा* असतो, तो क्षात्रांचा दुसरा गुण होय."

... । आणि धीरु तो तिजा। जेथींचा गुणु।।१८-८६०।।
वरी पिडलियां आकाश। बुद्धिचे डोळें मानस।
झांकी ना ते परियेस। धैर्य जेथें।।८६१।।
आणि पाणी हो भलतेतुकें। परि तैं जिणौनि पद्म फांकें।
कां आकाश उंचिया जिंकें। आवडे तेयातैं।।१८-८६२।।
तेवीं विविधा अवस्था। पातलियां जिणौनि पार्था।
प्रज्ञा फलतयां अर्था। वेझ देणें जैं।।८६३।।
तैं दक्षत्व गां चोख। जेथ चौथा गुणु देख।...।।८६४।।

"तिसरा गुण म्हणजे *धीर*. आकाश कोसळून जरी आपल्यावर पडले तरी मनाची चलबिचल न होऊ देणे व बुद्धी स्थिर राहाणे याचे नांव धैर्य. आणि पाणी वाटेल तितके खोल असले तरी आपण त्याही परिस्थितीत त्याच्यावर येऊन आपला विकास करणे हा कमलाचा जसा गुण असतो; किंवा आकाश उंचीच्या बाबत सर्वांपेक्षा वरच राहते; त्याप्रमाणे नाना प्रकारच्या अवस्था प्राप्त झाल्या तरी त्यांना जिंकून

प्रज्ञेच्या सामर्थ्याने त्यांचा भेद करून स्थिर राहणे, यास *दक्षत्व* असे म्हणतात. हा क्षत्रियांचा चौथा गुण आहे."

...। आणि जुंझ अलौकिक। तो पांचवा गुणु।।१८-८६४।।
आदित्याची झाडें। सदा सन्मुख सूर्याकडें।
तेवीं समोर शत्रूपुढें। होणें सदा।।८६५।।
माहेवणीं प्रयत्नेंसीं। चुकविजे सेजे जैसीं।
रिपू पाठीं नेदिजे तैसीं। समरांगणीं।।८६६।।
क्षत्रियांचां आचारीं। पांचवा गुणेंदु अवधारीं।
चहूं पुरुषार्थ शिरीं। भक्ती जैसीं।।८६७।।

"आणि *विलक्षण युद्ध* करणे व ते करतांना सूर्यफूल जसे सूर्यास पाठ दाखवत नाही, त्याप्रमाणे शत्रूस *पाठ न दाखवणे*, गर्भवती स्त्री जशी पुरुषाचा सहवास कसोशीने चुकविते, तसे शत्रूस पाठमोरे होण्याचे चुकवण्याची पराकाष्ठा करणे, हा क्षात्रांचा पाचवा गुणचंद्र आहे. चारी पुरुषार्थांच्या शिरी भक्तिचंद्र जसा शोभतो, तसा हा गुणचंद्र क्षात्रधर्माच्या भाळी शोभतो."

आणि जालेनि फुलें फलें। शाखिया जैसी मोकले।
कां उदार परिमलें। पद्माकरु।।१८-८६८।।
नाना आवडीचेनि मापें। चांदिणें भलतेनि घेपें।
पुढीलांचेनि संकल्पें। तैसें जैं देणें।।८६९।।
तैं उमप गां दान। जेथ साहावें गुणरत्न।...।।१८-८६९।।

"आणि आपल्या फळाफुलांच्या बाबत वृक्षशाखा जशी उदार असते, ज्याला जितके हवे तितके लवून देते; किंवा कमल आपला सुगंध जसा उदारहस्ते सगळ्या आसमंतास वाटत सुटते; अथवा ज्याला जेवढे आवडेल तेवढे आपल्या चांदण्याचे सुख मुबलक हस्ते चंद्र जसा देत असतो; त्याप्रमाणे इतरांच्या इच्छेप्रमाणे त्यांना जे जे हवे, ते ते, अपेक्षारहित अंत:करणाने, मोकळेपणाने, मुबलक प्रमाणात, दुजाभाव न करता, सर्व प्राणिमात्रांस देणे - अशा प्रकारच्या अपरिमित **दान**ास क्षात्रांचा सहावा गुण समजावे."

...। आणि आज्ञे एकायतन। होणें जैं कां।।१८-८७०।।
पोखूनि अवयव आपुलें। करविजती मानविलें।
तेवीं पालणें लोभविलें। जग जैं भोगणें।।८७१।।
तेयां नाम ईश्वरभावो। जो सर्वसामर्थ्याचा ठावो।
तो गुणांमाजीं रावो। सातवा जेथ।।८७२।।

"तसेच आपल्या अवयवांचे उत्तम पोषण करून शरीर सुव्यवस्थित ठेवून त्याच्याकडून आपल्याला जे हवे ते करवून घेण्याप्रमाणे प्रजेचे उत्तम पालनपोषण करून तिने आपली आज्ञा प्रेमादरपूर्वक शिरसावंद्य मानणे यास *ईश्वरीभाव* प्रकटवणे असे म्हणतात. क्षत्रियांचे सर्व सामर्थ्य याच भावात एकवटलेले असते. गुणांमध्ये हा सातवा गुण राजा आहे."

ऐसे जैं शौर्यादिकीं। इहीं सात गुणविशेखीं।
अलंकृत सप्तऋखीं। आकाश जैसें।।१८-८७३।।
तैसे सप्तगुणीं विचित्र। कर्म जैं जगीं पवित्र।
तैं सहज जाण मात्र। क्षत्रियाचें।।८७४।।
नाना क्षत्रिय नव्हे नरु। तो सत्त्वसोनयाचा मेरु।
म्हणौनि गुणस्वर्गा आधारु। सातां इयां।।८७५।।
ना तन्हीं सप्तगुणार्णवीं। परिवारली बरवी।
हे क्रिया नव्हे पृथिवी। भोगीतसे तो।।८७६।।
कां गुणांचां सातांहीं ओघीं। हे क्रिया तैं गंगा जगीं।
तेयां महोदधीचां आंगीं। विलसे जैसीं।।८७७।।
परि हे बहु असो देख। शौर्यादि गुणात्मक।
कर्म गां नैसर्गिक। क्षात्रजातीसी।।८७८।।

"आकाश जसे सप्तर्षिंनी सुशोभित दिसते, त्याप्रमाणे या शौर्यादिक सप्त गुणांनी क्षात्रवृत्ती अलंकृत होते. जे कर्म या अलौकिक सात गुणांनी पवित्र होते, ते क्षत्रियांचे स्वभावज कर्म होय. या सात गुणांनी अभिषेक केलेला क्षत्रिय हा मनुष्य नव्हे, तर साक्षात सत्त्वरूपी सुवर्णाचा मेरुपर्वत होय. या सात गुणरूपी सप्तस्वर्गांचा आधारच असा तो असतो. फार काय! असे कर्म कर्मच नव्हे, तर त्या सप्तगुणरूपी सिंधूंनी परिवेष्टित असलेली कर्मरूपी वसुंधरा तो क्षत्रियराज उपभोगीत आहे म्हणेनास! अथवा या गुणरूपी सप्तौघांनी वाहणारी गंगाच जणू क्षात्रकर्मरूपी महासागरास आलिंगन देत आहे, असे वाटते. असो. इतक्या विस्ताराने जी शौर्यादी गुणांनी युक्त अशी कर्मे सांगितली आहेत, ती क्षात्रजातीची उपजत कर्मे होत."

वैश्य व शूद्रांचे स्वभावज कर्म

आतां वैश्याचियां जाती। उचित जैं महामती।
तैं ऐक गां निरुति। क्रिया सांघों।।८७९।।

"आता वैश्यादी वर्णिकांची विहित कर्मे निश्चित सांगतो. हे बुद्धिमंत अर्जुना! ती ऐक."

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्।।१८-४४।।

"शेतकी, गोपालन, वाणिज्य व्यवसाय व उदीम ही वैश्यांची स्वभावज कर्मे होत. तसेच परिचर्यात्मक कर्म हे शूद्राचे स्वभावज कर्म आहे."

तन्हीं भूमि बीज नांगरु। ययां भांडवलाचां आधारु।
घेऊनि लाभु अपारु। मेलविणें जैं।।८८०।।
किंबहुना कृषी जिणें। गोधनें राखौनि वर्तणें।
कां समर्घीची विकणें। महर्घीं वस्तू।।८८१।।
येतुलाचि पांडवा। वैश्यांतैं कर्माचा मेळावा।
हा वैश्यजातीस्वभावा-। आंतुला जाण।।८८२।।
आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण। हे द्विजन्में तिन्हीं वर्ण.
ययांचें जैं शुश्रुषण। तैं शूद्रकर्म।।८८३।।

"जमीन, नांगर व बी या भांडवलावर शेतकी व्यवसाय करून अमाप लाभ मिळविणे; किंबहुना शेतीवर उपजीविका चालवणे; गोधन

पाळणे व त्याद्वारे उपजीविका करणे; किंवा व्यापारउदीम करणे. किरकोळीने वस्तू विकत घेऊन त्या चढ्या भावाने विकणे; एवढाच वैश्यांचा कर्मसमुच्चय आहे. अर्जुना! आणि वैश्यादी हे तिन्ही वर्ण द्विज म्हणून जे आहेत, ज्यांना वेदाधिकार आहे, त्यांची सेवा-शुश्रुषा, परिचर्या इ. करणे, हे शूद्रांचे स्वाभाविक कर्म होय."

पैं द्विजसेवेपरौतें। धांवणें नाही शूद्रातैं।
एवं चतुर्वर्णोचितें। दाविलीं कर्मे।।१८-८८४।।

"या द्विजवर्णियांच्या सेवेव्यतिरिक्त शूद्रांस इतर कर्मांची उलघाल नाही. अशी ही कर्मे सांग केल्याने भगवंताची सेवा होते. ती कर्मे तुला मी आतापावेतो स्पष्ट करून दाखविली आहेत."

ही विहित कर्मे सांग केल्याने भगवंताची सेवा होते. ती कर्मे उत्तमरीत्या संपन्न केल्यास साक्षात भगवंताची प्राप्ती होते. इतके या वर्णानुपरत्वे येणाऱ्या स्वधर्मोचित कर्मांचे महत्त्व आहे.

स्वधर्माचरण::::

सात्त्विकतेचा उत्कर्ष व मोक्षप्राप्तीचा मार्ग

स्वधर्माचरण, स्वकर्माचरण, नैष्कर्म्यसिद्धी व त्यांद्वारे ईश्वरप्राप्ती हा विषय यानंतरच्या अठराव्या अध्यायींच्या गीताश्लोकांतून येतो. तो व *स्वकर्ममहती* आपण नंतर पाहू. तत्पूर्वी एक कर्मविषयक जिव्हाळ्याचा विषय पाहू या.

त्रिविध श्रद्धांचे *सात्त्विक, राजस व तामस* स्वरूप हा सतराव्या अध्यायाचा विषय आपण पूर्वी पाहिलेला आहे*(उन्मेषः२४::श्रद्धात्रयविभाग, पृ.क्र.३५४ ते ३७२).* गीता श्लोक१७-२२ पर्यंतचा विषयविभाग त्यासाठी आपण अवलोकिला होता. त्यानंतर आपण कर्मविषयक एक अत्यंत महत्त्वाचा विषय म्हणजे *संन्यास व त्याग* या संकल्पना व तदनुषंगाने श्रीगोपालकृष्णांचे याबाबतचे स्पष्ट मत पाहिले होते. त्याच प्रसंगी आपण कर्माची *इष्ट, अनिष्ट व मिश्र* अशी फले असल्याचे, तसेच देहवानास संपूर्णतया कर्मांचा त्याग करणे अशक्य असल्याचे आणि कर्मसिद्धीसाठी सांख्यांनी प्रतिपादिलेल्या *अधिष्ठान, कर्ता, करण, त्यांचे व्यापार व दैव* अशी *पाच कारणे* आवश्यक असल्याचे ध्यानी घेतले होते.

पंच कारणे व त्यांचे हेतू कर्मास कारण होतात व आत्मा अकर्ता आहे, हा सिद्धांतसुद्धा तेव्हा सांगितला गेला. कर्मास प्रसवणारी अज्ञानमय अशी *ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता* ही प्रसिद्ध त्रिपुटी वा *प्रवृत्तित्रय* असतात; व *कर्म, कर्ता व करण* हा त्रिविध *कर्मसंचय* आहे हा भाग त्यावेळी आला. हा सिद्धांत व उपसिद्धांतरूप भाग आहे. त्यानंतर पुनश्च त्रिगुणांच्या प्रभावाने *ज्ञान, कर्ता, कर्म, बुद्धी, धृति व सुख* यांचे सत्व-रज-तम यात होणारे प्रविभाग, तसेच या सर्वांचा परस्परसंबंध दिग्दर्शित केला गेला. नुकतीच सत्त्व-रज-तम यांच्या प्रभावाने चातुर्वर्ण्यांचा उद्भव व त्यांची गुणानुवर्ती कर्मे पण सांगितली गेली.

या सर्व भागाचा परामर्ष घेतांना गीतेस सत्त्वगुणाची महती किती वाटते, हे आपल्या मनावर उत्कृष्टरीत्या बिंबले. थोडक्यात म्हणायचे तर योगसिद्धीसाठी जी चित्तशुद्धी अपेक्षित आहे, ती प्राप्त करून घेण्यास *यम-नियम-आसन-प्राणायाम-प्रत्याहार* ही पंच योगांगे साध्य करावयाची तर साधकास सत्त्वगुणाचा स्वीकार व रज-तमादींचे दमन व त्याग केला पाहिजे. याच दृष्टीने *यज्ञ-तप-दान* या त्रयींचा त्याग करू नये - कारण ही चित्तशुद्धीस साहाय्यक असतात, असे श्रीगोपालकृष्णांचे मत आहे, असे आपल्यास जाणवते.

त्रिगुणरहस्य व सत्त्वगुणाचे सामर्थ्य या प्रकारे आपल्या ध्यानी आले आहे.परंतु निव्वळ सत्त्वगुणयुक्त होण्याने मोक्ष साध्य होत नाही. हे परमश्रेयस प्राप्त करून घेण्यासाठी त्या सात्त्विक वृत्तीस साहाय्यकर ठरणारा महत्त्वाचा प्रांत आता आपण पाहणार आहोत. सात्त्विक कर्म मोक्षदायक व्हावे म्हणून त्याला जी जोड द्यावयाची, त्याची माहिती करून घेण्यास जसे आपण उत्सुक आहोत, तसाच तो धनुर्धरशिरोमणी अर्जुनही आहे, असे ज्ञानेशांच्या ओव्यांतून प्रतीत होते. पूर्वीच्या सतराव्या अध्यायातील *श्लोक क्र. १७-२२, ओवी क्र.१७-३२५* मधील आख्यानाची कास धरत आपण हा विषय पुढे पाहू या.

हा बोलु ऐकतखेंवों। अर्जुन अधि न मायें जीवीं।
म्हणे देवें कृपा करावी। सांगावें तैं।।१७-३२६।।
तेथ कृपालुचक्रवर्त्ती। म्हणे आइक तेयाची व्यक्तीं।
जेणें सात्त्विक तैं मुक्ती-। रत्न देखिलें।।३२७।।

अंतःकरणात उत्कंठा न समावलेला अर्जुन देवास कृपा करा, असे विनवू लागला व ते पाहून श्रीकृष्ण, कृपाळूंचा कृपाळू असा चक्रवर्ती म्हणाला की "ज्यायोगे मुक्तिरत्न हाती येते, ते सांगतो"

ब्रह्मनाम व सृष्ट्योत्पत्ति

देव म्हणाले, "सात्त्विक कर्मांचे मोक्षकर अभिन्न असे जे अंग आहे, ते म्हणून आता ऐक."

ॐ तत्सदिती निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः।
ब्रह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा।।१७-२३।।

"ॐ, तत् व सत् असे ब्रह्माचे त्रिविध नामनिर्देश असल्याचे श्रुति व ब्रह्मवेत्ते पुरुष सांगतात. सृष्टिचक्राची उत्पत्ती झाली, तेव्हा याच ब्रह्मनामाच्या सामर्थ्याने ईश्वराने ब्राह्मण,वेद व यज्ञ निर्माण केले."

ब्राह्मण, वेद व यज्ञ यांद्वारे प्रकट होणारा सृष्ट्युत्पत्तिक्रम तिसऱ्या अध्यायातील ***"अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः। यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः।।३-१४।।";"कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम्। तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञेप्रतिष्ठितम्।।३-१५।।" व "एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः। अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति।।३-१६।।"*** या श्लोकांतून प्रकटवला आहे. त्याचा थोडा भाग आपण पूर्वी *क्षराक्षरविचार* करतांना केला होता.

सतराव्या अध्यायाच्या उपरोल्लेखित श्लोकाचा ज्ञानदेवकृत विचार पाहतांना त्यांचे या सृष्ट्युत्पत्तिक्रमावरील *तृतीयाध्यायीचे भाष्य* पाहणे

उपयुक्त ठरेल. म्हणून प्रथम तो भाग पाहून मग *सतराव्या* अध्यायाचा प्रस्तावित भाग घेणे जिज्ञासूंसाठी उपकारक होईल. या सृष्ट्युत्पत्तिचक्राबद्दल ज्ञानेश अस म्हणतातः

अन्नास्तव भूतें। प्ररोह पावती समस्तें।
मग वारिषु या अन्नातें। सर्वत्र प्रसवे।।३-१३४।।
तेयां पर्जन्या यज्ञीं जन्म। यज्ञातें प्रगटीं कर्म।
कर्मासि आदि ब्रह्म। वेदरूप।।१३५।।
मग वेदांतें परात्पर। प्रसवतसे अक्षर।
म्हणऊनि हे चराचर। ब्रह्मबद्ध।।१३६।।
परि कर्माचिये मूर्त्ति। यज्ञीं अधिवासु श्रुति।
ऐकें सुभद्रापति। अखंड गां।।१३७।।

आणि

जिहीं यज्ञु सिद्धी जाये। परेशा तोषु होये।
तैं हे सामान्य अन्न नोहें। म्हणौनियां।।३-१३२।।
हे न म्हणावें साधारण। अन्न ब्रह्मरूप जाण।
जैं जीवनहेतु कारण। विश्वा ययां।।१३३।।

"अन्नाद्वारे यज्ञाची सिद्धी होते. कारण अन्न सामान्य वस्तू नाही. या सर्व जगतास जगवणारे अन्नच आहे. म्हणून ते मोठ्या योग्यतेचे आहे. अन्नास ब्रह्मरूपच समजावे." म्हणून श्रुति म्हणते, *"अन्नम् ब्रह्मम्"* - *अन्न* हेच ब्रह्म आहे. "समस्त भूतमात्रे अन्नापासून प्रसवतात. या अन्नास पर्जन्य निर्माण करतो. *पर्जन्य* तर यज्ञापासून होतो. असा हा यज्ञ कर्मापासून प्रकटतो. आणि कर्माचे मूळ म्हणजे *वेदरूप ब्रह्म*. असा *अन्नरूप ब्रह्म ते वेदरूप ब्रह्म* यांचा संबंध आहे. वेदांससुद्धा *पर व अपर* असे जे ब्रह्म आहे, ते प्रसवते. असे हे चराचर विश्व ब्रह्माठायी गोवलेले आहे. हे सुभद्रापती! साक्षात कर्माची मूर्ती असा *यज्ञ* जो हा आहे, त्यात श्रुतींचा अधिनिवास असतो. अखिल ब्रह्मच असे यज्ञामध्ये नित्य स्थिर असते."

यज्ञ आणि अभिवृद्धी

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक्।।३-१०।।

"मूळ प्रजापतीने यज्ञासह प्रजा निर्मिली. त्या यज्ञायोगे प्रजेने आपली अभिवृद्धी करून घेऊन आपल्या इष्ट कामना पूर्ण कराव्यात, असे हे सूत्र आहे."

हा लोकु कर्में बांधिला। जो परतंत्रा भुतला।
तो नित्य यज्ञातें चुकला। म्हणौनियां।।३-८४।।
आतां येचिविशीं पार्था। तुज सांगेन एकीं मी कथा।
जैं सृष्ट्यादि संस्था। ब्रह्मेनि केली।।८५।।
तैं नित्ययागसहितें। सृजिलीं भूतें समस्तें।
परि नेणतीचि तियें यज्ञातें। सूक्ष्म म्हणऊनि।।८६।।

"स्वधर्माचरण - तदनुसार कर्मे करणे - असा हा यज्ञप्रकार आहे. यालाच खरा यज्ञ म्हणतात. त्या नित्य अशा यज्ञासह प्रजापतीने ही सृष्टी त्यातील भूतमात्रांसहवर्तमान सृजिली. परंतु या यज्ञाचे खरे स्वरूप सूक्ष्म असल्याने त्या भूतमात्रांस यज्ञ अज्ञातच राहिला."

स्वधर्माचरण हाच यज्ञ

तैं वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा। देवा आश्रौ काय एथ आम्हां।
तंव म्हणे तो कमलजन्मा। भूतांप्रति।।३-८७।।
तुम्हां वर्णविशेषवशें। आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे।
यांतें उपासा मग आपैसें। काम पुरति।।८८।।

त्यावेळी त्यांनी त्यांच्या त्या प्रजापतीला - ब्रह्मदेवाला विनवले की, "देवा! या मृत्युलोकी आम्हाला श्रेयस्कर असे काय आहे, ते सांगा!" तेव्हा तो कमलातून जन्म झालेला ब्रह्मा म्हणाला की, "वर्णपरत्वे स्वधर्माचरण करणे हेच तुमचे विहित कर्म आहे. या कर्मयज्ञाची उपास्ति केली की तुमच्या सकळ कामना पूर्ण होतील. कारण हा लोक कर्म करण्यासाठीच आहे. या नित्य यज्ञास मुकणे म्हणजे बंधनास आमंत्रण करणे आहे. परंतु जो स्वधर्मानुष्ठान करील - असे अखंड यज्ञयाजन करील, त्यास कोणतेच बंधन घडू शकत नाही."

म्हणूनच भगवंतांनी म्हटले आहे कीः

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर।।३-९।।

"स्वधर्मपर अशा या यज्ञकर्माव्यतिरिक्त दुसरे कर्म करणारा लोकसमुदाय कर्मबंधनात पडतो. म्हणून हे कौंतेया! तू कर्मफलासक्तिरहित अंतःकरणाने मजसाठी हे सर्व यज्ञकर्म करत जा."

असे असल्याने भगवंत पार्थास म्हणतातः

तुम्हीं व्रतें नियमु न करावें। शरीरांतें न पीडावें।
दुरीं केंहीं न वचावें। तीर्थासि गां।।३-८९।।
योगादिक साधनें। साकांक्ष आराधनें।
मंत्रयंत्रविधानें। झणीं करा।।९०।।
देवतांतरां न भजावें। हे सर्वथा काहीं न करावें।
तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें। अनायासें।।९१।।

पुढे ही गोष्ट ऐक. ब्रह्मदेव मग म्हणाला, "यास्तव तुम्ही या कर्माव्यतिरिक्त इतर कोणतीही व्रतवैकल्ये करू नयेत. शरीरास पीडाकारक अशी घोर तपाचरणे आणि दूरदूरच्या तीर्थक्षेत्रींच्या यात्रासुद्धा करू नयेत. कष्टप्रद अशी योगादी साधने, सकाम उपासना, मंत्रयंत्रादी तंत्रविधाने कदाचित तुम्हास कोणी सांगतील; तरी ती पण करू नका. देवदेवतांची भजनेपूजनेसुद्धा करू नका. कारण या स्वधर्माचरणरूप यज्ञाची उपासना केल्यास अनायासेच तुमच्या सकल कामनांची पूर्ती होऊन तुमचे श्रेयस तुम्हाला अवचित लाभेल."

अहेतुकें चित्तें। अनुष्ठा पां ययांतें।
पतिव्रता पतीतें। जियापरी।।३-९२।।

तैसा स्वधर्मरूपी मखु। हाचि सेव्य तुम्हां एकु।
ऐसें सत्यलोकनायकु। म्हणतां जाला।।९३।।
देखा स्वधर्मातैं भजाल। तऱ्हीं कामधेनु हा होईल।
मग प्रजाहो न संडील। तुमतें सदा।।९४।।

"फलाकांक्षारहित चित्ताने या यज्ञाची - पत्नी जशी पातिव्रत्याने पतीची एकनिष्ठ सेवा करते, तशी - आराधना करा. हा **स्वधर्मरूप यज्ञ**च तुम्हाला योग्य आहे. याची अर्चना केल्यास तो तुम्हाला कामधेनूच होईल व तुम्हास तो केव्हाही त्यागणार नाही."

देवता व मनुष्ये यांचा परस्परसंबंध

प्रजेचे हित व्हावे म्हणून त्या सत्यलोकनायक ब्रह्मदेवाने त्यांना असा उपदेश केला. तो पुढे म्हणालाः

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः।
परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ।।३-११।।

"या यज्ञाद्वारे तुम्ही देवांना तुष्ट करा. ते तुष्ट देव तुमची उन्नती करतील. तुम्ही असे परस्परांचे हित साधत उत्कृष्ट श्रेय प्राप्त करून घ्या."

जैं एणेंकरूनि समस्तां। परितोषु होईल देवतां।
मग तैं तुम्हां ईप्सितां। अर्थांतैं देती।।३-९५।।
या स्वधर्मपूजा पूजितां। देवतागणां समस्तां।
योगक्षेमु निश्चितां। करिती तुमचा।।९६।।
तुम्हीं देवतांतैं भजाल। देव तुम्हां तुष्टतील।
ऐसीं परस्परें घडेल। प्रीति जेथ।।९७।।

"सृष्टिचक्रात देवतांचे विशिष्ट स्थान आहे. इंद्रिये व निसर्ग यांच्या नियामक अशा या देवता असतात. विहित अशा वर्णोचित स्वधर्मपालनरूप यज्ञामुळे त्यांना आनंद होतो. त्या मग मनुष्यास त्याने वांछिलेले सकळ ऐहिक सुख, संपत्ती इ. प्राप्त करून देतात. स्वधर्मपालनरूपी पूजेने सकळ देवतागण प्रसन्न होऊन तुमचा योगक्षेम नीट चालवतील. असे दैवतांचे यजनपूजन त्यांना तुष्टवील व तुमची व देवतांची परस्परांवर प्रीती जडेल."

तेथ तुम्हीं जैं करूं म्हणाल। तैं आपैसैं सिद्धी जाईल।
वांछितही पुरेल। मानसीचें।।३-९८।।
वाचासिद्धी पावाल। आज्ञापक होआल।
म्हणिये तुमतें मागतील। महाऋद्धि।।९९।।

"मग तुम्ही जे जे कर्म करू पाहाल, ते ते आपैसेच सिद्धीस जाईल. आणि तुमचे मनोवांछितही पुरविले जाईल. तुम्हाला वाचासिद्धी मिळेल. सर्व दिक्पाल तुमची आज्ञा पाळतील. महाऋद्धीसुद्धा अष्टौप्रहर तुमची आज्ञा ऐकण्यासाठी तुमच्या द्वारी तिष्ठतील. देवांनी तुष्ट होऊन दिलेले उपभोग संन्यस्त अंतःकरणाने तुम्ही त्यांच्याप्रीत्यर्थ घ्यावेत."

जैसे ऋतुपतीचें द्वार। वनश्री निरंतर।
वोलगे फलभार लावण्येंसीं।।३-१००।।
तैसे सर्वसुखेंसहित। दैवचि मूर्तिमंत।
येईल देखा काढत। तुम्हां पाठीं।।१०१।।
ऐसें समस्त भोगभरित। होआल तुम्हीं अनार्त।
जऱ्हीं स्वधर्मैकनिरत। वर्ताल बापा।।१०२।।

"ऋतुपती वसंतासह जशी वनश्री फळभार व लावण्ययुक्त अशी निरंतर रत असते, तसे सर्व सुखांसह मूर्तिमंत दैव तुम्हासोबत सदैव राहील. सुदैव तुमचा पाठपुरावा करील. बाळांनो! जर स्वधर्माचे असे एकनिष्ठेने आचरण कराल, तर समस्त भोगांनी संपन्न होऊन तुम्ही निरिच्छ व्हाल." परंतु जर का याने उन्मत्त व्हाल, तर मात्र थोर अनर्थ आहे.

यज्ञिय फलाचा उपभोग

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः।।३-१२।।

"यज्ञाने प्रसन्न झालेल्या देवांनी दिलेले इष्ट उपभोग आपल्यासाठीच केवळ उपभोगणारा व स्वतः त्या उपभोगात रममाण होऊन जाणारा त्या उपभोगांची जणू चोरीच करत असतो."

कां जालियां सकल संपदा। जो अनुसरेल इंद्रियमदा।
लुब्ध होऊनियां स्वादा। विषयांचियां।।३-१०३।।
तिहीं यज्ञभाविकीं सुरीं। जैं हे संपत्ति दिधली पुरी।
तेयां स्वमार्गी सर्वेश्वरीं। न भजेल जो।।१०४।।
अग्निमुखीं हवन। न करील देवतापूजन।
प्राप्त वेलें भोजन। ब्राह्मणांचें।।१०५।।
विमुखु होईल गुरुभक्ती। आदरु न करील अतिथी।
संतोखु नेदील ज्ञाती। आपुलिये।।१०६।।

"परंतु देवांनी दिलेल्या या अवघ्या सुखसंपत्तीने भुलून जाऊन तुम्ही जर विषयांच्या गोडीला चटावून जाऊन उन्मत्त इंद्रिये सांगतील तसे, वाटेल ते आचरण करू जाल; यज्ञादत्त साधनांचा तुटवडा नसतांनासुद्धा त्या साधनसामग्रीचा उचित विनियोग करून स्वधर्माचे पालन करून अशा रीतीने त्या परमेश्वरास न भजाल; अग्निमुखी हवन जर न कराल; अतिथींचा जर अनादर कराल; आपल्या कुलज्ञातिबांधवांस जर संतोष न द्याल; किंवा योग्य वेळी ब्राह्मणांस जर भोजन न द्याल; गुरुभक्तीस जर विन्मुख व्हाल;" आणि

ऐसा स्वधर्मुक्रियारहितु। आथिलेपणें प्रमत्तु।
केवल भोगासक्तु। होईल जो।।३-१०७।।
तेयां मग अपावु थोर आहे। जेणें तैं हातींचें सकल जाये।
देखा प्राप्तही न लाहे। भोग भोगु।।१०८।।

"स्वधर्मोचित कर्मे करण्याचे सोडून केवळ भोगासक्तीत त्या संपत्तियोगे प्रमत्त होऊन बुडून जाल, तर मात्र घोर अनर्थ होईल. अशा स्वैर विषयलोलुप वृत्तीने जर तुम्ही स्वधर्माचरण करणे सोडून दिले, तर तुम्हाला त्या यज्ञदेवाने जे जे काही संपत्तिवैभव -सौभाग्य

दिले असेल, ते सर्व हातचे निघून जाईल व प्राप्त झालेले भोगसुद्धा तुम्ही उपभोगू शकणार नाही.''

स्वधर्मत्यागाचे पातक

जैसे गतायुषीं शरीरीं। चैतन्यु वासु न करी।
कां निदैवाचां घरीं। न राहे लक्ष्मी।।३-१०९।।
तैसा स्वधर्मु जन्हीं लोपला। तन्हीं सर्व सुखांचा थारा मोडला।
जैसा दीपासवें हारपला। प्रकाशु।।११०।।
तैसीं निजवृत्ति जेथ सांडे। तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे।
आइका प्रजाहो हे फुडें। विरंची म्हणे।।१११।।

''जसे आयुष्य सरलेल्या कुडीत चैतन्य राहत नही; किंवा दैवहीनाच्या घरात लक्ष्मी वास्तव्य करत नाही; त्याप्रमाणे स्वधर्म जर लोप पावला, तर सर्व सुखांचे आश्रयस्थानच नाहीसे होते. दिवा मालवला की त्याचा प्रकाश जसा लुप्त होतो, त्याप्रमाणे आपला धर्म व आचार जेथे सुटतात, तेथे आत्मस्वातंत्र्य राहत नाही. प्रजांनो! हे नीट ध्यानी ठेवा,'' असे ब्रह्मदेवाने म्हटले.

म्हणऊनि स्वधर्मु जो संडील। तेयांतैं कालु दंडील।
चोरु म्हणौनि हरील। सर्वस्व तेयाचें।।३-११२।।
मग सकल दोख भंवतें। गिंवसौनि घेती तेयातैं।
रात्रीसमयीं स्मशानातैं। भूतें जैशी।।११३।।
तैशीं त्रिभुवनींची दुःखें। आणि नानाविध पातकें।
दैन्यजात तितुकें। तेथेंचि वसे।।११४।।
ऐसे होय तेयां उन्मत्ता। मग न सुटे बापा रुदतां।
परि कल्पांतींही सर्वथा। प्राणिगणहो।।११५।।

''म्हणून स्वधर्माचा जो त्याग करील, त्याला चोर समजून यमधर्म दंड दईल व त्याचे सर्वस्व हिरावून घेईल. रात्रीच्या वेळी भूते जशी स्मशानास वेढून बसतात, तशी सर्व दुःखे व दोष-व्याधी त्याला गिवसत येतील. त्रिभुवनीच्या दुःखाचे व दैन्याचे तो म्हणजे वसतिस्थान होईल. इंद्रियप्रमादांनी वेडा केलेल्या त्या मनुष्याचा आपपरकल्याणाचा मार्ग निरुद्ध होईल. अशी त्या उन्मत्तास शिक्षा झाली की कितीही आक्रोश केला तरी कल्पांतीसुद्धा त्यातून त्याची सुटका होत नाही.''

म्हणऊनि निजवृत्ति हे न संडावी। इंद्रियें बरलों नेदावीं।
ऐसे प्रजांतैं शिकवी। चतुराननु।।३-११६।।
जैसे जलचरां जल सांडें। आणि तत्क्षणीं मरण मांडें।
हा स्वधर्मु तेणे पाडें। विसंबो नये।।३-११७।।
म्हणौनि तुम्हीं समस्तीं। आपुलालियां कर्मीं उचितीं।
निरत व्हावें पुढपुढुति। म्हणिपत असे।।११८।।

''म्हणून निजवृत्ती टाकू नये व इंद्रियांना स्वैर सोडू नये; आपल्या धर्माचे पालन करावे,'' असे सर्व प्राणिमात्रांस तो चतुरानन उपदेशिला. ''जळचरांस जळाबाहेर येणे घडले की त्यांचे मरण हे ठेवलेलेच आहे. स्वधर्मत्यागही इतकाच भयावह आहे.''

म्हणून ***''स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।३-३५।।''*** असे भगवंतांनी म्हटले आहे. या स्वधर्माचरणावर गीतेचा फार भर आहे. ''म्हणून सर्वांनी आपापली विहित कर्मे उचित प्रकारे साधण्यात दक्ष असावे,'' असे त्या प्रजापतीने वारंवार सांगितले.

स्वधर्माने मोक्षप्राप्ती

असे स्वधर्माचरण मोक्षप्रदायक होते, म्हणूनगीता म्हणतेः

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः।
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः।।३-८।।

''विहित असे कर्म करीत जावे. असे कर्म टाकून नैष्कर्म्य होणे शक्य नाही. कर्म न केल्यास देहयात्राही सुखरूप पार पडणार नाही.''

ज्ञानेश म्हणतातः

म्हणसीं नैष्कर्म्य होआवें। तन्हीं एथ तैं न संभवें।
आणि निषिद्ध केवीं राहाटावें। विचारीं पां।।३-७७।।
म्हणौनि जैं जैं उचित। आणि अवसरेंकरूनि प्राप्त।
तैं कर्म हेतुरहित। आचर तूं।।७८।।
पार्था आणिकही एक। नेणसीं तूं हे कवतिक।
जैं ऐसें कर्म मोचक। आपैसें असे।।७९।।
देखें अनुक्रमाधारें। स्वधर्मु जो आचरें।
तो मोक्षु तेणें व्यापारें। निश्चित पावें।।८०।।

''देहवानांस कर्मे सर्वथैव त्यागणे असंभव आहे आणि निषिद्ध कर्मे कोणी करावीत तरी का! म्हणून केवळ विहित कर्मच केले पाहिजे. प्रसंगोचित असे कर्म निरिच्छ होऊन तू करत जा. आणि पार्था! निष्काम कर्माचे एक महत्त्वाचे फल आहे. ते तुला माहीत नाही. अनायासेच असे कर्म संसारबंधनातून मनुष्यास सोडवते. म्हणून वर्णाश्रमधर्मानुसार स्वधर्माचे जो आचरण करतो, त्यास त्याद्वारेच निश्चितपणे मोक्षाची प्राप्ती होते.''

स्वधर्मरूपी यज्ञ सिद्ध करून त्याचा प्रसाद असा पुरोडाश भक्षण करावा. म्हणजे संसाररूपी पाप नष्ट होते. म्हणून श्रीगोपाल म्हणतात की लोकांनी असे आदर्श आचरण ठेवावे.

यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्।।३-१३।।

''यज्ञशेष भक्षण करणारे सज्जन सर्व पापांपासून मुक्त होतात. परंतु जे केवळ स्वतःकरताच जगतात, ते पापी लोक पापच भोगतात.''

देखा विहित क्रियाविधि। निर्हेतुका बुद्धि।
जो असतिये समृद्धि। विनियोगु करी।।३-११९।।
गुरु गोत्र अग्नि पूजी। अवसरीं भजे द्विजीं।
निमित्तादिकीं यजीं। पितरोद्देशें।।१२०।।
या यज्ञक्रिया उचिता। यज्ञेशीं हवन करितां।
हुतशेष स्वभावता। उरे जैं जैं।।१२१।।
तैं सुखें आपुलां घरीं। कुटुंबेंसीं भोजन करी।
कीं भोग्यचि तैं निवारी। कल्मषांतैं।।१२२।।

"जो विहित कर्माचरण करण्यासाठी निर्हेतुक बुद्धीने आपल्या समृद्धीचा विनियोग करतो; गुरू, गोत्र व अग्नीचे पूजन करतो; अवसर मिळाला की ब्राह्मणांची सेवा करतो; पितरांसाठी नैमित्तिक असे श्राद्धादी याग करतो; विहित कर्माचरणरूपी यज्ञाने यज्ञपुरुष अशा मजसाठी आपल्याजवळील सामग्रीचे हवन करतो आणि मग उरलेले यज्ञावशिष्ट असे द्रव्य आपल्या व कुटुंबाच्या निर्वाहासाठी सुखेनैव विनियोजतो;त्याचे अशा उपभोगाद्वारेच पापहरण होते."

तैं यज्ञावशिष्ट भोगी। म्हणौनि सांडिजें तो अघीं।
जेयापरी महारोगी। अमृतसिद्धी।।३-१२३।।
कां तत्त्वनिष्ठु जैसा। नागवे भ्रांतिलेशां।
तो शेखभोगीं तैसा। नाकळे दोखां।।१२४।।
म्हणौनि स्वधर्मे जैं अर्जे। तैं स्वधर्मेचि विनियोगिजे।
मग उरें तैं भोगिजे। संतोषेंसीं।।१२५।।
हे वांचूनि पार्था। राहाटो नये अन्यथा।
ऐसीं आद्य हे कथा। मुरारी सांधैं।।१२६।।

"स्वधर्मरूपी कर्मयज्ञाची सांगता होऊन मिळालेला पुरोडाश असा सेवन करणाऱ्यांची पापे, जशी महारोग्याची व्याधी अमृतप्राशनाने नष्ट होते, तशी नाश पावतात. आत्मनिष्ठ पुरुषास जशी आत्मभ्रांती लेशरूपानेसुद्धा नसते, त्याप्रमाणे यज्ञावशिष्ट भागाचा उपभोग घेणाऱ्याजवळ पापाचा लेशही उरत नाही. म्हणून स्वधर्माचरणाने जे द्रव्यादी प्राप्त होतात, त्यांचा स्वधर्माचरणासाठीच विनियोग करावा. त्यानंतर जे उरेल, त्याचा स्वसुखासाठी उपभोग घ्यावा. हे पार्था! या राहटीस सोडून कधीच वागू नये," असे त्याला मुरारी म्हणाले.

देहाहंतेचे पाप

जैं देहचि आपणपें मानिती। आणि विषयांतैं भोग्य म्हणती।
यापरतें न स्मरती। आणिक कांहीं।।३-१२७।।
हे यज्ञोपकरण सकल। नेणतसांतैं बरल।
अहंबुद्धी केवल। भोगूं पाहती।।१२८।।
इंद्रियरुचिसारिखें। करविती पाप नीकें।
तैं पापिये पातकें। सेविती जाण।।१२९।।

"परंतु देहासच आपण मानून विषयभोगांसच सर्वस्व मानणारे ही राहटी आठवतसुद्धा नाहीत.ते बहकलेले अज्ञानी लोक आपला देह व संपत्ती ही सर्व यज्ञाची उपकरणे आहेत, हे विसरून केवळ स्वार्थप्रेरित होतात व त्या साधनसामग्रीने भोग घेऊ पाहतात. इंद्रियांस जसे आवडेल तसे करतात. याने जे पाप होते, त्याचेच ते पातकी असे भोग घेतांना सेवन करतात."

जैं संपत्तिजात आघवें। हे हवनद्रव्य मानावें।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें। आदिपुरुखीं।।३-१३०।।
हे सांडौनियां मुर्खु। आपणपेयांलागीं देखु।
निफजविती पाकु। नानाविध।।१३१।।

"आपले सर्व संपत्तिमात्र हवनद्रव्य मानून त्याचे स्वधर्मरूप यज्ञासाठी विनियोजन करावे व त्या आदिपुरुषास ते सगळे अर्पण करून प्रसन्न करून घ्यावे, ही खरी तर आत्मकल्याणाची युक्ती आहे. ती सोडून ते मूर्ख परमात्म्याच्या भोगासाठी ठेवलेल्या साधनसामग्रीचा स्वतःच्या भोगासाठी उपयोग करून निरनिराळी पापरूपी पक्वान्नेच जणू सेवतात."

"मूर्त्ति लाहौनि देहाची"

ब्रह्मदेवाने कथिलेल्या व निर्माण केलेल्या या सृष्ट्युत्पत्तिरूप चक्राला अनुसरून जो वागत नाही, इंद्रियांमध्येच जो रममाण होतो, त्याचे आयुष्य पापमय असते व जीणे व्यर्थच असते. म्हणून ज्ञानेश या यज्ञक्रमाची सांगता करतांना म्हणतातः

ऐशीं हे आदिपरंपरा। संक्षेपें तुज धनुर्धरा।
सांगितली या अध्वरा-। लागौनियां।।३-१३८।।
म्हणोनि समूल हा उचितु। स्वधर्मरूप क्रतु।
नानुष्ठीं जो मत्तु। लोकीं इयें।।१३९।।
तो पातकांची राशी। जाण भार भूमीसी।
जो कुकर्मे इंद्रियांसीं। उपेगा गेला।।१४०।।
तैं जन्मकर्म सकल। अर्जुना अति निष्फल।
जैसें कां अभ्रपटल। अकालींचें।।१४१।।
कां गलां स्तन अजेचें। तैसे जियालें देखे तेयाचें।
जेयां अनुष्ठान स्वधर्माचें। घडेचि ना।।१४२।।

"हे धनुर्धरा! या यज्ञाविषयीची ही आद्य परंपरा मी तुला थोडक्यात निवेदिली आहे. जो उन्मत्त पुरुष या उचित अशा स्वधर्मरूप यज्ञाचे यथासांग अनुष्ठान करत नाही, तो निव्वळ भूमीस भार अशी पापराशी असतो. जो इंद्रियांचे लाड करतो, त्याचा जन्म व त्याचे कर्म केवळ निष्फळ असते. अर्जुना! अकाली उठलेले ढग किंवा बकऱ्याचे अजागळ स्तन जसे व्यर्थ असतात, तसेच ज्याला स्वधर्माचे अनुष्ठान घडत नाही, त्याचे जीणे असते."

म्हणौनि ऐकें पांडवा। हा स्वधर्मु कवणें न सांडावा।
सर्वभावें भजावा। हाचि एकु।।३-१४३।।
हा गां शरीर जऱ्हीं जाहलें। तऱ्हीं कर्तव्य वोघें आलें।
मग उचित कां आपुलें। वोसंडावें।।१४४।।
परिस पां सव्यसाची। मूर्त्ति लाहौनि देहाची।
खंती करिती कर्माची। तैं गांवढें गां।।१४५।।

" म्हणून हे पांडवा! सर्वभावे याच स्वधर्माचे पालन करावे. याचे उल्लंघन कोणीही कधीही करू नये. यातच स्वार्थ आणि परमार्थ उत्कृष्ट साधला जातो आणि निषिद्ध कर्मे तर त्यागावीतच. पण निष्क्रियसुद्धा राहू नये. कारण शरीर म्हटले की कर्म आहेच. मग विहित धर्माचेच आचरण घडेल असे कर्मच का न करावे! हे सव्यसाची! ऐक! मनुष्यदेहासारखी दुर्लभ वस्तू मिळूनही जे स्वकर्माचा कंटाळा करतात

व कर्मेच करण्याचे टाकून देऊन स्वस्थ बसतात, ते शुद्ध अडाणीच होत." या दुर्लभ मनुष्यजन्मात *स्वधर्माचरण* केल्याने *मोक्ष* मिळतो.

निष्काम कर्मासाठी ब्रह्मनामाचा विनियोग::::

अनासक्त बुद्धीने केलेल कर्म

यस्त्वात्मरतिरेव स्यदात्मतृप्तश्च मानवः।
आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते।।३-१७।।

"जो मनुष्य आत्म्याठायी रत असतो, आत्म्याठायी संतुष्ट असतो, आत्म्यामध्येच तृप्त होतो, त्याला करावयाचे काही उरत नाही"

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः।।३-१८।।

"इहलोकी कर्म केल्याने वा न केल्याने त्याला काही लाभहानी नाही. त्याला कोणत्याही भूताशी काहीच देणे घेणे उरत नाही."

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः।।३-१९।।

"म्हणून सर्वत्र अनासक्त बुद्धीने सतत कर्तव्यकर्म करत राहा. कारण अनासक्त होऊन कर्माचरण करण्याने पुरुषास मोक्षपद मिळते.

जनकादींसारखे व्हावे , म्हणून ज्ञानदेव उपदेशितातः

देखें असतेनि देहधर्मे। एथ तोचि एकु न लिंपे कर्मे।
जो अखंडित रमे। आपणपयांचि।।३-१४६।।
जैं तो आत्मबोधें तोखला। तऱ्हीं कृतकार्य देखें जाहला।
म्हणोनि सहजें सांडविला। कर्मसंगु।।१४७।।
तृप्ति जालियां जैसीं। साधनें सरती आपैसीं।
देखें आत्मतुष्टी तैसीं। कर्मे नाही।।१४८।।

"हे पहा! जो अखंड आत्मस्वरूपात रममाण होतो, तो देहाने सकळ कर्मे करत असला, तरी त्यांनी बद्ध होत नाही. आत्मबोधाने संतुष्ट होऊन कृतकार्य झाल्याने सहजच त्याची कर्मफळापासून मुक्तता होते. तृप्ती झाल्यावर साधनांची खटपट जशी आपोआप बंद पडते, तसे ज्याची आत्मतुष्टी झाली आहे, त्याला कर्मे राहत नाहीत."

जंववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना।
तंवचि एयां साधना। भजावें लागें।।३-१४९।।
म्हणऊनि तूं नियतु। सकल कामरहितु।
होऊनिया उचितु। स्वधर्मे राहाटे।।१५०।।
जैं स्वकर्मे निष्कामता। अनुसरलें पार्था।
कैवल्यपर तत्त्वतां। पातलें जगीं।।१५१।।

"अर्जुना! हा आत्मबोध जोवर अंतःकरणास मिळत नाही, तोवरच या कर्मरूपी साधनाची सेवा करावी लागते. असा बोध प्राप्त व्हावा म्हणून निष्काम होऊन तू या नियत कर्मांद्वारे उचित अशा स्वधर्माने वाग. पार्था! निष्काम बुद्धीने स्वकर्माचरण करणाऱ्यांना याच लोकी तत्त्वतः मोक्षपद मिळाले आहे, हे जनकादींच्या उदाहरणावरून प्रसिद्धच आहे."

ब्रह्माचे नाम

असे हे स्वधर्मरूपी कर्माचे सात्त्विक आचरण तर केलेच पाहिजे. पण ते करतांना *ईश्वरार्पण* वृत्तीही ठेवली पाहिजे. त्या ब्रह्माची - परमात्म्याची - ईश्वराची - *ॐ, तत् व सत्* अशी नामे आहेत. त्यांद्वारेच प्रजापतीने *ब्राह्मण, वेद आणि यज्ञ* निर्माण केले असे आपण पाहत होतो. त्याविषयी व सात्त्विक स्वधर्मोचित अशा कर्मांचे आचरण कसे करावे हा भाग आता पाहू या. त्यासाठी आपणांस सतराव्या अध्यायाकडे पुनः एकदा वळावे लागेल.

ज्ञानदेव म्हणतातः

तऱ्हीं अनादि परब्रह्म। जैं जगदादि विश्रामधाम।
तेयाचें एक नाम। त्रिधा पैं असे।।१७-३२८।।
तैं कीर अनाम अजाती। परि अविद्यावर्गाचियें राती-।
माजीं वोलखावया श्रुति। खूण केली तैं।।३२९।।
उपजलियां बालकासीं। नांव नाही तेयापासीं।
ठेविलेनि नांवेसीं। ओ देत उठी।।३३०।।
कष्टलें संसारशीणें। जैं देवों येती गाऱ्हाणें।
तेयां ओ दे जेणें नांवें। तो संकेतु हा।।३३१।।
ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैतत्वें तो भेटावा।
ऐसा मंत्रु देखिला कणवा। वेदें बापें।।३३२।।

"सर्व जगताचे आदि व अंतिम स्थान असे जे अनादी परब्रह्म आहे, त्याचे तीन प्रकारचे एक नांव आहे. खरे तर परब्रह्मास नांवही नाही अन जातकुळीही नाही. परंतु अविद्यामय अशा या जगद्रूपी पसाऱ्याच्या अंधकारमय रात्रीत त्याला ओळखता यावे, म्हणून श्रुतींनी त्याला नाम दिले आहे. नुकतेच जन्मलेले बालक काय नांव घेऊन येते का! पण त्याला जे नांव ठेवावे, त्याला ते ओ देत उठते. संसारभाराने शिणलेल्या जीवांनी देवाकडे गाऱ्हाणे मांडावे तर त्यास कोणत्या नांवाने हाक मारावी! म्हणून श्रुतींनी त्याची खूणेची - त्याने ओ द्यावी म्हणून अशी नांवे ठेवली आहेत."

मग दाविलेनि जेणें एकें। ब्रह्म आलविलें कवतिकें।
मागां असत ठाकें। पुढां उभें।।१७-३३३।।
परि निगमाचलशिखरीं। उपनिषदार्थनगरीं।
आहाति जैं ब्रह्माचां एकाहारीं। तेयांसींचि कले।।३३४।।

"ब्रह्म शब्दरहित - वाचारहित आहे. पण त्याने जीवाशी हितगुज करावे , त्याच्याशी जीवाला अद्वयपणे भेटता यावे, म्हणून त्या कनवाळू अशा वेदस्वरूपी पित्याने या ब्रह्माचा नाममंत्र सिद्ध केला आहे. या मंत्राने पाचारले असता, त्याची आळवणी केली असता, सूक्ष्म असणारे ते परब्रह्म साक्षात सगुण रूपाने समोर येऊन ठाकते. परंतु याचे खरे रहस्य जे वेदपर्वताच्या निमथ्यावर आहेत, ज्यांचा सदैव वास

उपनिषदार्थनगरीत आहे, जे परब्रह्माच्या स्वरूपी स्थिरावलेले आहेत, त्यांनाच उमगतो."

"ॐ तत् सत्"

हेंही असो प्रजापति। शक्ती जैं सृष्टीकरिती।
तैं जेयां एका आवृत्ती। नामाचियें।।१७-३३५।।
पैं सृष्टीचियां उपक्रमा-। पूर्वीं गां वीरोत्तमा।
वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता।।३३६।।
मज ईश्वरातैं नोलखें। ना सृष्टीही न करूं शके।
तो थोरु केला एकें। नामें जेणें।।३३७।।

"सृष्टीसर्जनकर्ती शक्ती असलेल्या प्रजापतीनेसुद्धा फक्त याच नामाच्या जपाने सृष्टीचा उपक्रम केला. त्यापूर्वी, हे वीरोत्तमा! तो एकटाच होता. आणि सृष्टी कशी निर्माण करावी हे न समजल्याने चिंतातुर होता. मज परमात्म्यास तो जाणत नव्हता. म्हणून सृष्टीसुद्धा त्याला निर्माण करता येईना. माझ्या या एकाच नामाने त्याला सृष्टीचे पितृत्व दिले."

जेयाचां अर्थु जीवीं ध्यातां। जैं वर्णत्रयचि जपतां।
विश्वसृजनयोग्यता। आली तेयां।।१७-३३८।।
तेधवां रचिलें ब्रह्मजन। तेयां वेद दिधलें शासन।
यज्ञाऐसे वर्तन। जीविकें केलें।।३३९।।
पाठीं नेणों किती एर। स्त्रजिलें लोक अपार।
जालें ब्रह्मदत्त अग्रहार। तिन्हीं भुवनें।।३४०।।
ऐसें नाममंत्रें जेणें। धातयां अढंच करणे।
तेयांचें स्वरूप आईक म्हणें। श्रीकांतु तो।।३४१।।

"या नामाचे चिंतन करून त्याची *ॐ, तत् व सत्* ही अक्षरे जपल्याने विश्वसर्जनयोग्यता त्याच्याठायी आली. तेव्हा ब्राह्मणांस उत्पन्न करून त्यांना आचरण शिकविणारे *वेद* त्याने निर्माण केले. *यज्ञकर्म* त्यांच्या निर्वाहासाठी उत्पन्न केले. त्यानंतर त्याने असंख्य लोक निर्मिले. त्यांची गणतीच नाही. त्यांना राहण्यासाठी प्रजापतीने ही भुवने रचली व त्यांचे त्या लोकांना दान केले. ज्या नामाने प्रजापतीस एवढे सामर्थ्य दिले, त्याला एवढे कर्तृत्व प्रदान केले, त्या नामाचे स्वरूप ऐक," असे त्या श्रीकांताने अर्जुनास म्हटले.

"फूल तुरंबीं सुंदरु"

तन्हीं सर्व मंत्रांचा राजा। तो प्रणवु आदिवर्णु बुझा।
आणि तत्कारु जो दुजा। तिजा सत्कारु।।१७-३४२।।
एवं ॐतत्सदाकारु। ब्रह्मनाम हे त्रिप्रकारु।
हे फूल तुरंबीं सुंदरु। उपनिषदु तैं।।३४३।।
एणेंसि गां होऊनि एक। जैं चालें कर्म सात्त्विक।
तैं कैवल्याचें पाइक। घरींचें करी।।३४४।।

"आदिवर्ण *ॐकार* हा सर्व मंत्रांचा राजा या नामातील आद्याक्षर आहे. *तत्* हे दुसरे व *सत्* हे या नामातील तिसरे अक्षर आहे. *ॐतत् सत्* अशा आकाराचे या त्रैवर्णिक सौंदर्याने विनटलेले हे सुंदर शोभिवंत नामपुष्प आपल्या अंगभूत सुवासाने उपनिषदांस प्रसन्नचित्त करत असते. उपनिषदांतून याच नामसुमनाचा सुगंध दरवळत असतो. या ब्रह्मनामाशी एकरूप झालेले जे सात्त्विक कर्म असते, ते तर कैवल्यास आपले दास्यत्व करवते."

परि कापुराचें थलींव। आणूनि देईल दैव।
लेवौं जाणणेंचि आडव। तेथ असे बापा।।१७-३४५।।
तैसें आदरिजैल सत्कर्म। उच्चारेल ब्रह्मनाम।
परि नेणिजेल जन्हीं वर्म। विनियोगाचें।।३४६।।
तन्हीं महंतांचियां कोडीं। घरां आलियांही वोढी।
मानूं नेणतां अपरवडी। मुद्दल तुटें।।३४७।।
कां ल्यावयां चोखट। टीक भांगार एकवट।
घालूनि बांधिलीं मोट। गळां जेवीं।।३४८।।

"परंतु कापराचा पोषाख जरी दैवयोगाने आपल्या घरी चालत आला, तरी तो ल्यावयाची युक्ती ठाऊक नसेल तर काय उपयोग! तसेच ब्रह्मनाम उच्चारत सत्कर्म जरी केले, तरी त्याच्या विनियोगाची युक्ती माहीत नसेल तर जसा अवचित आलेल्या साधुवृंदाचा सन्मान कसा करावा हे माहीत नसणाऱ्याच्या पुण्याचा क्षय होतो; किंवा आभूषणे म्हणून चोख सोने आणि हीणाचे गाठोडे गळ्यात जसे बांधून घ्यावे, तसे होते."

तैसें तोंडीं ब्रह्मनाम। हातीं तैं सात्त्विक कर्म।
विनियोगेंवीण काम। विफल होये।।१७-३४९।।
अगां अन्न आणि भूक। पासीं असे परि देख।
जेऊं नेणें बालक। लंघनचि कीं।।३५०।।
कां स्नेहा सूत्रा वैश्वानरा। जालियांही संसारा।
हातवटी नेणतां वीरा। प्रकाशु नोहे।।३५१।।

"मुखी ब्रह्मनाम व हाती सत्कर्म असे जरी जमले, तरी त्याचा उपयोग कसा करावा, हे माहीत नसले तर ते सर्व विफल होते. बाळास भूक लागली असता त्याच्यापाशी जरी अन्न ठेवलेले असले, तरी ते कसे खावे हे माहीत नसल्याने त्यास उपवासच नाही का पडणार! अथवा तेल, वात व अग्नी हे जरी जमवले, तरी दिवा कसा लावावा ही गोष्ट माहीत नसेल, तर प्रकाश मिळेल का!"

तैसे वेळें कृत्य पावें। तेथिंचा मंत्रुही आठवे।
परि व्यर्थ तैं आघवें। विनियोगेंवीण।।१७-३५२।।
म्हणौनि वर्णत्रयात्मक। जैं हे परब्रह्मनाम एक।
विनियोगु तूं आइक। याचा आतां।।३५३।।

"तसेच सात्त्विक कर्म पावले, नाममंत्रही स्मरला, परंतु हे कसे उपयोजावे हेच माहीत नसले तर ते अवघेच व्यर्थ ठरते. म्हणून या त्रिवर्णात्मक परब्रह्मनामाचा विनियोग कसा करावा हे ऐक."

कर्माचे स्वरूप

***"ॐ तत् सत्"* या ब्रह्मनाममंत्राचा विनियोग**

हा विनियोग तीन पायऱ्यांचा आहे. प्रथमतः

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपक्रियाः।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्।।१७-२४।।

"ब्रह्मवादी मोक्षार्थीच्या शास्त्रास अनुसरून ज्या ज्या क्रिया, जी जी कर्मे होतात, ती नेहमी **ॐ** या अक्षराचा उच्चार करून सुरू होतात. उदा. यज्ञ, दान, तप इ.च्या आरंभी *ॐकार* उद्घोषिला जातो."

ज्ञानेश म्हणतातः

नामींची अक्षरें तिन्ही। कर्मा आदिमध्यनिदानीं।
प्रयोजावी पैं स्थानीं। इहीं तिनीं।।१७-३५४।।
हेंचि एकी हातवटी। घेऊनि हन किरीटी।
आलें ब्रह्मविद भेटी। ब्रह्माचिये।।३५५।।
ब्रह्मेंसीं होआवया एकीं। तैं न वंचती यज्ञादिकीं।
जैं चावलिलें वोलखीं। शास्त्रांचियां।।३५६।।
तो आदि तंव ॐकारु। ध्यानें करिती गोचरु।
पाठीं आणिती उच्चारु। वाचेही तो।।३५७।।
तेणें ध्यानें प्रकटें। प्रणवोच्चार स्पष्टें।
लागती मग वाटें। क्रियांचियां।।३५८।।

"*ॐ, तत् व सत्* ही जी या नामाची तीन अक्षरे आहेत, ती अनुक्रमे कर्मारंभी, कर्म करतांना व कर्मांती प्रयोजावीत. अर्जुना! याच एका युक्तीने ब्रह्मवेत्त्यांनी ब्रह्मसाक्षात्काराची मजल मारली आहे. शास्त्रांनी पारखून सांगितलेली यज्ञादी कृत्ये न त्यागल्यामुळेच त्यांना ब्रह्माशी एकरूपता मिळते. म्हणून अशा कर्मारंभी ते पुरुष त्या *आदिअक्षर ॐकारास ध्यानाने गोचर करतात* आणि मग वाचेने त्याचा उच्चार करतात. त्या ध्यानाने *ॐकारस्वरूप* मूर्त झाले आणि प्रणवमंत्र सिद्ध झाला की मग ते कर्मांस सुरुवात करतात."

आंधारीं अभंगु दिवा। आडवीं समर्थु बोलावा।
तैसा प्रणवु जाणावा। कर्मारंभीं।।१७-३५९।।

"अंधारात मार्ग दाखवणारी अखंड दीपज्योत जशी असावी; किंवा घनघोर अरण्यात वाट दाखविणारा समर्थ वाटाड्या जसा असावा; तसा कर्ममार्ग स्पष्ट उजळविणारा व ते सुव्यवस्थित पार पाडण्यास साहाय्य करणारा असा हा विहित कर्मारंभीचा *ॐकार* आहे."

उचित देवोद्देशें। द्रव्यें धर्में आणि बहुंवसें।
द्विजद्वारां हन हुताशें। यजिती पैं तैं।।१७-३६०।।
आहवनीयादि ब्रह्मीं। निक्षेपरूपी हवनीं।
यजिती पैं विधानीं। फुडें होऊनि।।३६१।।
किंबहुना नाना याग। निष्पत्तिचें घेऊनि आंग।
करिती नावडतेयां त्याग। उपाधींचें।।३६२।।

" आता असे पहा की उचित अशी देवतांसाठी करावयाची कर्मे, धर्म्य कर्तव्ये आणि द्रव्यादी विपुल सामुग्रीद्वारे ब्राह्मण व अग्नी यांच्या साहाय्याने करावयाचे यज्ञादी हवन; तसेच आहवनीयादी अग्नीमध्ये हवन करून द्रव्यादींचे अर्पण करणे; इ.कर्मे विहित म्हणून केली जातात. किंबहुना असे कितीतरी प्रकारचे यज्ञ आहेत की जे त्यांच्यानिमित्ताने आपल्याजवळील धनसंपत्ती इ.उपाधींचा धर्म्यमार्गाने त्याग करण्यासाठी मुमुक्षू लोक करतात. असे हे यज्ञप्रकार आहेत. नित्य यज्ञ म्हणजे स्वधर्मोक्त कर्माचरण हे तर रोजचेच आहे."

याचप्रमाणे कर्तव्य म्हणून इतरही कर्मे करावी लागतातः

कां न्यायें जोडिला पवित्रीं। भूम्यादिकीं स्वतंत्रीं।
देशकालशुद्धपात्रीं। देती दानें।।१७-३६३।।
अथवा एकांतरां कृच्छ्रीं। चांद्रायणें मासोपमासीं।
शौखौनि गां धातुराशी। करिती तपें।।३६४।।
एवं यज्ञदानतपें। जियें गाजती बंधरूपें।
तिहींच होय सोपें। मोक्षाचें तेयां।।३६५।।

"स्वधर्माने वागून अर्जित केलेली आपल्या मालकीची जमीन इ.मालमत्ता शुद्ध देशकाल व पात्र पाहून त्यांचे दान करणे, अथवा एकभुक्त राहणे, चंद्रायणे वा तत्सम मासोचित उपवास करणे इ.द्वारे शरीरातील धातू शोषून क्षीण करणे, अशी तपे आचरणे; ही सर्व प्रकारची कर्मे यज्ञदानतपादी अन्यथा केली असता बंधक म्हणून प्रसिद्ध आहेत. परंतु यांनीच मोक्ष कसा सोपा होतो, पाहा."

स्थलीं नावा जियें दाटिजे। जलीं तियांचि जेवीं तरिजे।
तेवीं बंधकीं कर्मीं सुटिजे। नामें येणें।।१७-३६६।।
परि हे असो ऐसियां। या यज्ञदानादि क्रिया।
ॐकारें सावायिलियां। प्रवर्त्तती।।३६७।।
तियां मोटकियां जेथ फलीं। रिगो पाहती निहालीं।
प्रयोजिती तियें कालीं। तच्छब्दु तो।।३६८।।

"जमिनीवर नाव वाहणे कष्टप्रद होते, परंतु पाण्यातून मात्र तिच्यायोगानेच उत्तम तरून जाता येते. त्याचप्रमाणे ज्या अशा यज्ञदानतपादी प्रमुख कर्मांनी प्रधान्येकरून बंधन प्राप्त होते, ती कर्मेसुद्धा त्यांच्या आरंभी *ध्यानपूर्वक ॐकार स्मरला असता,* बंधविमोचक होतात. असे या नामाचे माहात्म्य आहे. हे असो. ॐकाराने युक्त केलेल्या या प्रमुख यज्ञदानादी क्रिया जेव्हा किंचितसुद्धा फल देण्यास प्रवृत्त होतात, तेव्हा साधुपुरुष *तत्* या सच्छब्दाचे उपयोजन करतात."

कर्माच्या आदि याप्रमाणे ॐकाराचे स्मरण करण्यास श्रुती सांगतात. यावरूनच *ॐकारस्वरूप अशा गणेशास* प्रत्येक कार्यारंभी वंदन करण्याची प्रथा पडली. सगुणात रमणाऱ्या भाविकांनी या ॐकारास गणेशमूर्तीच्या स्वरूपात पाहण्यास आरंभ केला. अशा

त्या चिद्गुणविशिष्ट, सकलकलानिधान, विश्वैकरूप, वेदनिधान, उपनिषदांचे सौरभ्य सेवणाऱ्या, सगुण साकार असा दिसूनही निर्गुण निराकाररूप असणाऱ्या, स्वसंवेद्य, आद्य अशा गणेशाची स्तुती करून, त्याचे स्मरण करत, ज्ञानेशांनी आपल्या ग्रंथास आरंभ केल्याचे आपणां सर्वांस विदित आहेच.

तत् व ब्रह्मार्पण बुद्धी

आता पाहू या तत्काराचा महिमा!

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपःक्रियाः।
दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः।।१७-२५।।

"मोक्षाची इच्छा करणारे लोक फलाची इच्छा न धरता यज्ञ, दान, तप इ. क्रिया व कर्मे *तत्* या अक्षराचा उच्चार करत म्हणजे ब्रह्मार्पण बुद्धी ठेवून करत असतात."

जैं सर्वांही जगापरौतें। जैं एकही सर्व देखें।
तैं तच्छब्दें बोलिजे तैं। पैल वस्तु।।१७-३६९।।
तैं सर्वादिकत्वें चित्तीं। तद्रूप ध्याऊनियां सुमती।
उच्चारेंही व्यक्तीं। आणिती पुढुती।।३७०।।
म्हणती तद्रूपा ब्रह्मा तेयां। फळेंसीं क्रिया इयां।
तैंचि होतु आम्हां भोगावयां। कांहींचि नुरो।।३७१।।
ऐसेनि तदात्मकें ब्रह्में। तेथ उगाणूनि कर्में।
आंग झाडिती ममें। एणें बोलें।।३७२।।

"सर्व जगापलीकडील जी एक वस्तू आहे, जी सर्वांस पाहते; त्या सूक्ष्म तत्त्वास, त्या द्रष्ट्यास, त्या अंतिम सत्यास *तत्* या शब्दाने सूचित केले जाते. समस्त विश्वाचे ते जे आदितत्त्व, त्याचे चित्तात ध्यान करत, *तत्* या त्याच्या नामाचा उच्चार करत , आपण करत असलेली कर्मे त्यांच्या फलांसह, त्या *तत्स्वरूपी* ब्रह्मास अर्पण होवोत व आपणांस त्यांचे भोग नुरोत अशा भावनेने त्या *तत्* ब्रह्मास सर्व कर्मे अर्पण करतात व *"इदं न मम"* या संकल्पाने त्या कर्मांचे फलांसह ब्रह्मस्वरूपी विसर्जन करतात."

आतां ॐकारें आदरिलें। तत्कारें समर्पिलें।
इयां रिती जेयां आलें। ब्रह्मत्व कर्मा।।१७-३७३।।
तैं कर्म ब्रह्माकारें। जालें तेणेंही न सरे।
जैं करीतेणेंसीं दुसरें। आहे म्हणौनि।।३७४।।
मीठ आंगें जलीं विरे। परि क्षारता वेगली उरे।
तैसें कर्म ब्रह्माकारें। गमे तैं द्वैत।।३७५।।
आणि दुजे जंव जंव घडे। तंव तंव संसारभय जोडे।
हे देवों आपुलेनि तोंडें। बोलती वेदें।।३७६।।

"अशा रीतीने ॐकाराने आरंभलेले व तत्काराने समर्पिलेले कर्म जरी ब्रह्माकार होत असले, तरी त्याने कर्मबंधन सुटत नाही. कारण अजून कर्त्याचा कर्तृत्वभाव शिल्लक उरतो. मीठ पूर्णपणे पाण्यात जरी विरघळून गेले तरी त्याचा खारटपणा जसा उरतो, त्याप्रमाणे या युक्तीने कर्म ब्रह्माकार जरी झाले, तरी अहंकाररूपाने कर्म व कर्ता, ब्रह्म व मी हे द्वैत उरतेच. आणि जोवर द्वैत असते, तोवर संसारभय असतेच, असे भगवंतांनी प्रत्यक्ष वेदमुखाने सांगितलेले आहे."

म्हणोनि परत्वे ब्रह्म असे। तैं आत्मत्वे परिवयसें।
सच्छब्द या रिणादोखें। ठेविला देवें।।१७-३७७।।
तऱ्हीं ॐकारीं तत्कारीं। कर्म केलें जैं ब्रह्मशरीरीं।
जैं प्रशस्तादि बोलवरी। वाखाणिलें।।३७८।।
प्रशस्त कर्मी तियें। सच्छब्दा विनियोगु आहे।
तोचि आइका होये। तैसा सांगों।।३७९।।

"म्हणून द्वैतभावाने परिभासणाऱ्या ब्रह्माची स्वात्मानुभवाची अनुभूती येऊन द्वैतत्वाचा दोष जावा यासाठी *सत्* या शब्दाचा विनियोग केला जातो. *ॐकार व तत्कार* यांनी ज्या कर्मास ब्रह्मरूप दिले असते व म्हणून ज्या कर्माची एवढी प्रशस्ति केली जाते, त्या प्रशस्त कर्माठायी *सत्* या शब्दाची उपयोजना करावी लागते; ती कशी करावी हे सांगतो; ऐक."

सत् व कर्त्याचा ब्रह्मभाव

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते।।१७-२६।।

"परमात्मभाव, श्रेष्ठ असा पूज्य भाव, निर्मळ भाव, अहंकाररहित चित्तवृत्ती, यांना *सत्* असे म्हणतात. तसेच प्रशस्त कर्म यांजसाठी *सत्* या शब्दाचा, हे पार्था! विनियोग केला जातो."

याबाबत ज्ञानदेवांचा खुलासा असा आहेः

तऱ्हीं सच्छब्दें एणें। आटूनि असतांचि नाणें।
दाविजे अव्यंगपणें। सत्तेचें रूप।।१७-३८०।।
जैं सतचि कालें देशें। होऊं नेणेंचि अनारिसें।
आपणपां आपण असे। अखंडित।।३८१।।
हे दिसतें जेतुलें आहे। तैं असतचि जैं नोहें।
देखतां रूपीं सोएं। लाभे जेयाचि।।३८२।।
तेणेंसि प्रशस्त तैं कर्म। जैं जालें सर्वात्मक ब्रह्म।
देखिजे करूनि सम। ऐक्यबोधें।।३८३।।
तऱ्हीं ॐकारें तत्कारें। जैं कर्म दाविलें ब्रह्माकारें।
तैं गिळूनि होईजे एकसरें। सन्मात्रचि ।।३८४।।

"*असत्* अशा या विश्वाचे नाणे आटवल्यावर जे सत्तेचे शुद्ध स्वरूप राहते, त्यास *सत्* हा शब्द वापरतात. देशकालमानाने जे बदलत नाही आणि अखंड चिदैक अशी सत्ता म्हणजेच सत्! हे जेवढे म्हणून विश्वरूपाने प्रतिभासते आहे, ते *असत्* आहे; असे *असत्* जे नाही ते *सत्* आहे; याची उमज पडल्याक्षणीच ज्याच्या रूपाची साक्षात अनुभूती येते, त्याच्याशी आपण एकरूप आहोत हा बोध चित्तात ठसवून घेतल्यानंतर जे ब्रह्माकार असणारे कर्म केले जाते, ते प्रशस्त कर्म व कर्ता दोन्ही पण सम म्हणजे सद्रूप होतात."

ऐसा हा अंतरंगु। सच्छब्दाचा विनियोगु।
जाण म्हणे श्रीरंगु। मी ना म्हणे हो।।१७-३८५।।

कर्माचे स्वरूप

ना मीचि जऱ्हीं हो म्हणें। तऱ्हीं श्रीरंगीं दुजें हेंचि होणें।
म्हणोनि हे बोलणें। देवाचेचि।।३८६।।

"*<u>असे ॐकार व तत्कार यांनी ब्रह्माकार केलेले सर्वात्मक कर्म जेव्हा कर्त्याच्या सत्स्वरूपाशी एकरूप होते, तेव्हा ते सर्व **सत्** होते.</u> सत्* या शब्दाचा हा असा अंतरंगीचा गुह्य विनियोग आहे," असे श्रीरंगाने म्हटले. आणि *"असे माझे म्हणणे आहे,"* असे जर मी म्हटले असते, तर त्या श्रीरंगाहून मी कोणी वेगळा आहे, असा द्वैतभाव नसता का झाला! म्हणून हे देवाचेच म्हणणे आहे, असे मी म्हणतो."

या ठिकाणी द्वैतास छेद देण्यासाठी श्रीज्ञानदेवांनी एक उत्कृष्ट पदन्यास साधला आहे. द्वैतात राहूनही अद्वैत भोगण्याची युक्ती ज्यांना अवगत असेल, तेच श्रेष्ठ संत असे वाक्चातुर्य दाखवू जाणोत! श्रीकृष्ण व ज्ञानदेव या ठिकाणी *सत्* शब्दाशी एकरूप होतांना आपल्याला दिसतात. याहून *सत्* या संकल्पनेची व तिच्या विनियोगाची अधिक उकल ती काय असणार! असो.

ज्ञानेश म्हणतात:

आतां आणिकीही परी। सच्छब्दु हा अवधारी।
सात्त्विका कर्मा करी। उपकारु जो।।१७-३८७।।
तऱ्हीं सत्कर्मे चांगें। चालिली अधिकारबगें।
परि एकाधें कां अंगें। हीणावती जैं।।३८८।।
तैं उणें एकें अवयवें। शरीर ठाकें आघवें।
कां अंगहीन भांडावें। रथाची गती।।३८९।।
तैसें एकेंचि गुणेंवीण। संतचि परि असंतपण।
कर्म धरी गां जाण। जिये वेळीं।।३९०।।
तेव्हां ॐकार तत्कारीं। सावायिला हा चांगीं परी।
सच्छब्दु कर्मा करी। जीर्णोद्धारु।।३९१।।

"अजूनही एका प्रकारे सात्त्विक कर्मावर हा *सत्* शब्द उपकार करतो. सात्त्विक कर्म आपापल्या अधिकाराप्रमाणे चालू असता त्यात काही न्यून जर राहिले, तर एखादा अवयव कमी असल्यामुळे शरीराचा गाडा जसा अटकतो; किंवा एखादा भाग नसलेल्या रथाची गती जशी अवरुद्ध होते; त्याप्रमाणे एखाद्या गुणाच्या उणेपणामुळे एरवी असणारे सत्कर्मच असत्कर्मपण धारण करते. अशा वेळी *ॐकार व तत्कार* यांच्या योगे *सत्* शब्द येऊन त्या सात्त्विक कर्माचा जणू जीर्णोद्धार करून त्यास असत्पणापासून सोडवून *सत्* भावावर आरूढ करण्यास साहाय्यकर ठरतो."

तैं असतपण फेडी। आणि सद्भावाचिये रूढी।
निजसत्त्वाचिये प्रौढी। सच्छब्दु हा।।१७-३९२।।
दिव्यौषध जैसें रोगियां। कां सावावो ये भंगलियां।
सच्छब्दु कर्मा व्यंगलियां। तैसा जाण।।३९३।।

"*सत्* शब्दातल्या अंगच्या सात्त्विक सामर्थ्याने हे होते. रोग्यास जसे दिव्य औषध मिळाले की रोगमुक्ती होते; किंवा हतबल झालेल्या मनुष्यास समर्थाचे साहाय्य मिळाले असता जशी उभारी येते; त्याप्रमाणे न्यून असणाऱ्या त्या व्यंग्य कर्मास *सत्* शब्द त्याचे न्यून फेडून सत्कर्माप्रति नेऊन पोहोचवतो. प्रशस्त कर्म व थोडेसे व्यंग असलेले सात्त्विक कर्म यांना सत्भावाने असे निरामयत्व येते."

"पाहे पां ॐ तत् सत् ऐसें":::::

ॐ तत् सत् हेच ब्रह्म

अथवा कांहीं प्रमादें। कर्म आपुलियें मर्यादें।
चुकौनि पडे निषिद्धें। वाटे हन।।१७-३९४।।
चालतयाही मार्गु सांडें। पारखियां आखरें पडे।
राहाटीमाजी न घडे। काइं काइं।।३९५।।
म्हणौनि तैसीं कर्मा। राभस्यें सांडें सीमा।
असाधुत्वाचियां दुर्नामा। येवों पाहे जैं।।३९६।।
तेथ गां हा सच्छब्दु। येरां दोहींपरीस प्रबद्धु।
प्रयोजिला करी साधु। कर्मातैं तेयां।।३९७।।

"अथवा काही प्रमादाने कर्म आपली प्रशस्त वाट सोडून निषिद्ध कर्माच्या आडमार्गाला लागते. वाटसरू चुकीच्या मार्गाने नाही का कधीकधी जाऊ लागत! रत्नपारख्याच्या पदरी नाही कां कधीकाळी नजरचुकीने खोटे रत्न पडत! व्यवहारकुशल व दक्ष मनुष्येसुद्धा नाही का काही चुका करत! म्हणून कधीकधी विहित असणारे सत्कर्मच अविचाराने आपल्या सीमा ओलांडून *असत्* कर्माची दुष्कीर्ती पावू शकते. अशा कर्मास *ॐ व तत्* या दोन्ही शब्दांपेक्षा श्रेष्ठ असणारा *सत्* शब्द प्रायोजिला गेला तर तेही कर्म सत्कर्माच्या श्रेणीत जाऊन बसते."

लोहां परिसाची घृष्टी। वोहोळां गंगेची भेटी।
कां मृता जैसीं वृष्टी। पीयूषाची।।१७-३९८।।
तैं असाधुकर्मी तैसा। सच्छब्दुप्रयोग वीरेशा।
हे असो गौरवुचि ऐसा। नामाचा येयां।।१७-३९९।।
घेऊनि एथींचें वर्म। जैं विचारिसी हे नाम।
तैं केवल हेंचि ब्रह्म। जाणसीं तूं।।४००।।

"लोखंडाला परिसाचा स्पर्श व्हावा; टुकार जरी असला तरी तशा ओहोळाची गंगेशी गाठ व्हावी; किंवा मृताच्या शरीरावर अमृतवृष्टी व्हावी; तसाच असत्कर्मावर *सत्* शब्दाचा प्रयोग असतो. निषिद्ध कर्माससुद्धा उद्धारक ठरण्याइतका हा *सत्* शब्द महान आहे. *ॐ तत् सत्* या पदाचे रहस्य असे आहे. हे नीट ध्यानी घेशील तर तुला सत्वर कळेल की हे *ब्रह्मनामच साक्षात ब्रह्म आहे.*"

ॐ तत् सत् हेच ब्रह्म

पाहें पां ॐ तत् सत् ऐसें। हे बोलणें जेथ नेतसे।
जेथूनि कां हे प्रकाशे। दृश्यजात।।१७-४०१।।
तैं तंव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट।
तेयांचें हे आंतुवट। व्यंजक नाम।।४०२।।
परि आश्रो आकाशा। आकाशचि कां जैसा।
या नामा नामीं तैसा। अभेदु असे।।४०३।।

उदयिला आकाशीं। रवीचि रवीतें प्रकाशी।
हे नामव्यक्तीं तैसीं। ब्रह्मा करी।।४०४।।
म्हणौनि त्र्यक्षर हे नाम। नव्हे जाण केवळ ब्रह्म।
एयांलागीं कर्म। जैं जैं कीजै।।४०५।।

"हे पहा! जेथून हे सर्व दृश्य विश्व प्रकटते, त्याठायी *ॐ तत् सत्* ही अक्षरे नेऊन पोहोचवतात. त्याठायीच्या निर्विशिष्ट व शुद्ध ब्रह्माचे *ॐ तत् सत्* हे खरे आवडीचे नाम आहे. परंतु आकाशाला आकाशाचाच जसा आश्रय असतो, त्याप्रमाणे हे *ब्रह्मनाम व त्याचा आश्रय असे ब्रह्म यात अभेद आहे*. नाम व नामी एकच आहेत. अन्यथा असते तर द्वैत निर्माण होते! आकाशात उगवलेला सूर्यच जसा स्वतःला प्रकाशवतो, त्याप्रमाणे *ॐ तत् सत्* हे *नामब्रह्म* स्वतःच स्वतःस व्यक्त करते. म्हणून हे तीन अक्षरी नाम केवळ नामच नव्हे तर ब्रह्मच आहे; हे जाणून कर्मे कर."

कर्ता व कर्म यांचे ब्रह्मीभवन

म्हणून गीता सांगतेः

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते।।१७-२७।।

"यज्ञ, तप व दान इ.सत्कर्मे स्थिर बुद्धीने, ब्रह्मभावनेने, ब्रह्माप्रीत्यर्थ करण्याची भावना *सत्* म्हणून ओळखली जाते. ब्रह्मस्वरूप होऊन केलेले कर्मसुद्धा *सत्* म्हणून म्हटले जाते."

ॐकाराने आरंभलेले, तत्काराने ब्रह्मास समर्पिलेले व सत्काराने ब्रह्मीभूत होऊन केलेले कर्म कर्त्यासह एकरूप होऊन ब्रह्माकार होते. **ॐकार म्हणजे परब्रह्मच!** त्याचे ध्यान करून कर्मास सुरुवात करावी. ब्रह्मनाम *तत्* लक्षून त्या कर्मास फलासह ब्रह्मास अर्पण करावे. आपण व ब्रह्म वेगळे नाही आहोत ही भावना त्या *सत्* रूप ब्रह्माठायी करत कर्म करावे. असे केलेले विहित कर्म वा सात्त्विक कर्म एवं सत्कर्म, एवढेच काय! पण चुकून झालेले निषिद्ध कर्मसुद्धा, कर्मासह कर्त्यास ब्रह्मरूप करते. एवढे या *ॐ तत् सत्* या कर्ममार्गाचे माहात्म्य आहे.

कर्म बंधविमोचक करण्याची युक्ती

अर्जुनापुढे युद्ध हे घोर कर्म उभे आहे. ते निषिद्ध आहे, असा त्याचा समज आहे. पण ते त्याच्या क्षत्रियवर्णास अनुसरून प्राप्त झालेले कर्म आहे. ते कर्म विहित असले वा अगदी निषिद्ध जरी असले, तरी त्याने भगवंतांनी कर्म करण्याची ही जी युक्ती सांगितली आहे, तिला अनुसरत ते करावे. म्हणजे त्या कर्माचा दोष त्याला लागणार नही व पापादी संसारभयापसून तो विमुक्त होईल असा श्रीकृष्णांचा त्याला येथे अध्याहृत असा उपदेश आहे. हे अर्जुनास नीट समजले का म्हणून त्यांची विचारणा आहे, असे ज्ञानदेव म्हणतातः

तैं याग अथवा दानें। तपादिकें गहनें।
तियें निफजतु कां न्यूनें। होऊनि ठातु।।१७-४०६।।
परि परिसाचां वरकलीं। नाहीं चोखाकीडाची बोली।
तैसीं ब्रह्मीं अर्पितां केली। ब्रह्मचि होती।।४०७।।
उणिया पुरियाची परी। नुरेचि तेथ अवधारी।
निवडूं न येती सागरीं। जैसियां नदी।।४०८।।

"*ॐ तत् सत्* या नामब्रह्माचा असा महिमा आहे.या त्रिनामाचा असा विनियोग आहे. म्हणून जे जे कर्म करावे, ते यज्ञ असो, दाने असोत, किंवा खडतर तपे असोत; ती विहित असोत किंवा अविहित असल्याने उणी असोत; असे सर्व कर्म ब्रह्मास अर्पण केले की परिसासमोर जशी चोख सोने व अशुद्ध सोने वा हीण धातू अशी बोली न होता, सर्व जसे चोखच होते; त्याप्रमाणे ब्रह्मार्पण केलेली सर्वच कर्मे ब्रह्म होतात. एकवार सागरात प्रविष्ट झालेल्या नद्यांना जसे वेगवेगळे करून दाखवता येत नाही, त्याप्रमाणे ब्रह्माकार झालेली सर्व कर्मे नंतर न्यून वा सांग, विहित वा निषिद्ध, अधिक वा उणी या प्रकारांची राहत नाहीत."

एवं पार्था तुजप्रति। ब्रह्मनामाची हे शक्ती।
सांगितली उपपत्ती। डोलस गां।।१७-४०९।।
आणि एकेकाहीं आखरां। वेगळवेगळा वीरा।
विनियोगु नागरा। बोलिलों रीतीं।।४१०।।
आतां ऐसें एवं सुमहिम। म्हणौनि हे ब्रह्मनाम।
जाणितलें कीं सुवर्म। राया तुवां।।४११।।

"हे पार्था! तुला आतापर्यंत ब्रह्मनामाचे सामर्थ्य कसे आहे, ते सोपपत्तिक सांगितले. तसेच हे वीरा अर्जुना! या नामातील प्रत्येक अक्षराचा विनियोग कसा आहे, हेसुद्धा स्पष्टपणे सांगितले. हे ज्ञानवाना! या ब्रह्मनामाचे हे असे माहात्म्य असल्याने ते किती सार्थ आहे, हे तू जाणून घेतलेस ना!"

तऱ्हीं एथूनियाचि श्रद्धा। उपलविली हो सर्वदा।
जेयाचें जालें बंधां। उरों नेदी।।१७-४१२।।
जियें कर्मीं हा प्रयोगु। अनुष्ठिजे सद्विनियोगु।
तेथ अनुष्ठिला सांगु। वेदुचि जाण।।४१३।।

"हे राजा! असे हे श्रद्धेचे सार आहे. सात्त्विक, राजस व तामस असे श्रद्धेचे जे तीन प्रकार आहेत, त्याअनुरूप कर्मे केली जातात. त्यातही सात्त्विक श्रद्धा सर्वश्रेष्ठ आहे. ती सात्त्विक व विहित कर्मे करवते. परंतु ब्रह्मनामाच्या सामर्थ्याची जोड मिळाल्याशिवाय मोक्षफळ देण्याएवढे निव्वळ सात्त्विक श्रद्धेचे बळ नाही. म्हणून ब्रह्मनामाच्या सामर्थ्याने अंकित केलेल्या श्रद्धेच्याद्वारे जी जी कर्मे करत जावीत, ती सर्व कर्मबंधनास दूर सरून मोक्षप्रद होतात. म्हणून श्रद्धेच्या बळाने जे लोक आपापली कर्मे *ॐतत् सत्* या ब्रह्मनामाचा सुयोग्य विनियोग अनुलक्षित करतात, त्यांनी संपूर्ण वेदाचे सांग अनुष्ठान केले असे मानायला हवे."

हा जो *सतरावा* अध्याय *श्रद्धात्रयविभाग* सांगण्यासाठी सिद्ध केला आहे, त्याचे हे असे फलित आहे.

कर्माचे स्वरूप

असत् कर्म व त्याचे फल

याप्रमाणे सत्‌श्रद्धेचे स्वरूप व्यक्त केल्यावर जाताजाता त्यापेक्षा भिन्न भाव म्हणजे अश्रद्धा व तिचे फल यांचे निष्फलत्व दाखविण्यासाठी श्रीगोपाल सांगावयास विसरत नाहीत की:

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्।
असदित्युच्यते पार्थ नच तत्प्रेत्य नो इह।।१७-२८।।

"हे पार्था! अश्रद्धा ठेवून जे हवन केले जाते, ते दान दिले जाते, जे तपाचरण केले जाते व जे कर्म केले जाते, त्यास *असत्* असे म्हणतात; त्याचे फल ना परलोकी मिळते ना इहलोकी!"

ईश्वरप्रणिधान त्यागण्याचे अहंकारी कर्म

ब्रह्मनामावरील श्रद्धा किंवा ब्रह्मचिंतनाचे सामर्थ्य लाभलेली *सात्त्विक श्रद्धा* म्हणजे खरे तर योगाच्या आठ अंगांपैकी अंतरंग अशी *धारणा, ध्यान व समाधि* या प्रमुख अंगांशी संबंधित असा *ईश्वरप्रणिधानयुक्त* प्रशस्त योगमार्गच म्हणावा लागेल. तो त्यागून अहंकाराने कर्म करणाऱ्यांबाबत ज्ञानदेव काय म्हणतात, पाहा:

ना सांडूनि हे सोएं। मोडूनि श्रद्धेचि बाहे।
दुराग्रहाची त्रायें। वाढऊनियां।।१७-४१४।।
मग अश्वमेध कोडी कीजे। रत्नें भरौनि पृथ्वी दीजे।
एकांगुष्ठींही तपिजे। तपसाहस्त्रीं।।४१५।।
जलाशयाचेनि नांवें। समुद्र कीजती नवे।
परि किंबहुना आघवें। वृथाचि तैं।।४१६।।
खडकावरी वर्षलें। जैसें भस्मीं हवन केलें।
कां खेंव दिधलें साऊलियें।।४१७।।
ना तऱ्हीं चडकणा। गगन हाणितलें अर्जुना।
तैसा समारंभु सुणा। गेलाचि तो।।४१८।।

"ईश्वरप्रणिधानाचा हा उत्तम मार्ग टाकून, श्रद्धेचे सामर्थ्य उद्ध्वस्त करून केवळ अहंकारमदाने उन्मत्त होऊन दुराग्रही वृत्तीने कोट्यवधी अश्वमेध जरी केले; किंवा रत्ने भरभरून जरी पृथ्वीएवढ्या मोलाची दाने दिली वा एका अंगठ्यावर उभे राहून सहस्त्रावधी वर्षे तप जरी केले; जरी समुद्राएवढे मोठे तलाव निर्मिले, तरी ते सर्व व्यर्थच होय. खडकावरील वृष्टीप्रमाणे, राखेत केलेल्या हवनाप्रमाणे, सावलीस आलिंगिल्याप्रमाणे, किंबहुना आकाशास चापटी मारण्याप्रमाणे ते सर्व खटाटोप वाया जातात."

घाणां गालिलें गुंडें। तेथ तेल ना पेंडी जोडे।
तैसें दरिद्र तेवढें। ठेलेंचि आंगीं।।१७-४१९।।
गांठीं बांधिली खापरी। एथ अथवा पैलतीरीं।
न सरौनि जैसें मारी। उपवासीं गां।।४२०।।
तैसें कर्मजात तेणें। नाहीं ऐहिकीचें भोगणें।
तेथ परत्रु तो कवणें। अपेक्षावा।।४२१।।
म्हणौनि ब्रह्मनामश्रद्धा। सांडूनि कीजे जो धांदा।
हे असो शिणु नुसधा। दृष्टादृष्टी तो।।४२२।।

"तेलाच्या घाण्यात तेलबिया गाळण्याऐवजी दगडगोटे गाळले तर ना तेल, ना पेंड असे होते व दारिद्र्य तर नाहीसे होतच नाही! व्यर्थ खटाटोप मात्र पदरी पडतो. पदरी द्रव्य बांधण्याऐवजी जर खापरखुंटी बांधून घेतली तर आपल्या देशात किंवा परक्या मुलुखात कोठेच तिला मूल्य नसल्यामुळे उपाशी मरण्याचीच वेळ येणार! त्याचप्रमाणे ईश्वरप्रणिधान त्यागून जी जी कर्मे करावीत, ती सर्व व्यर्थ खटाटोप होत. त्यांपासून ना ऐहिक भोग प्राप्त होतात, ना पारलौकिक कल्याण संभवते! म्हणून ब्रह्मनामावरील श्रद्धा सोडून जो जो खटाटोप करावा तो इहपरलोकी निव्वळ शीण देणारा ठरतो."

सतरावा अध्याय ऐकणाऱ्या अर्जुनाची अवस्था

ऐसे कलुषकरिकेसरी। त्रितापतिमिरतमारी।
श्रीवीरवरनरहरी। बोलिलें तेणें।।१७-४२३।।
तेथ निजानंदा बहुंवसा-। माजीं अर्जुनु तो सहसा।
हारपला चंदरु जैसा। चांदिणेनि।।४२४।।
अहो संग्रामु हा वाणिया। मापें नाराचांचियां आणिया।
सूनि मांस घे मवणिया। जीवितेंसीं।।१७-४२५।।
ऐसियां समयीं कर्कशे। भोगीजत स्वानंदराज्य कैसें।
आजि भाग्योदय हा नसे। आणिकें ठाईं।।४२६।।

"पापरुपी मत्त गजांचा लीलया नाश करणारा तो मृगेंद्र, त्रितापरूपी अंधकाराचा नाश करणारा तो भास्वत, सुवीरांत मुकुटमण्याप्रमाणे शोभणारा तो श्रीनरहरी श्रीकृष्ण असे बोलल्यावर चंद्र जसा चांदण्यात हरपतो, तसा तो अर्जुन एकदम अतीव स्वानंदात हरपून गेला."

धृतराष्ट्रास संजय म्हणाला," हे कौरवराया! शत्रूंच्या गुणांना पाहूनसुद्धा संतोषावे. केवढा तो युद्धाचा प्रसंग! काय ती कर्कश वेळा! आणि हा अर्जुन त्या ठिकाणी कसा ते स्वानंदसाम्राज्य भोगतो आहे! असे भाग्य अर्जुनाशिवाय इतर कोणाला भोगण्यास तर सोडाच, स्वप्नी तरी मिळेल काय!"

सतराव्या अध्यायाचा समारोप

आता सतराव्या अध्यायांतीच्या ओव्यांतून ज्ञानेशांना काय म्हणावयाचे आहे, ते पाहू या:

सञ्जयो म्हणे कौरवराया। गुणां रिझो ये रिपूचियां।
आणि गुरुहि हा आमुचियां। सुखाचां एथ।।१७-४२७।।
हा न पुसतां हे गोठी। तऱ्हीं देवो कां सोडिते गांठी।
तऱ्हीं कैसेनि आम्हां भेटी। परमार्थेसीं।।४२८।।
होतो अज्ञानाचां आंधारां। वोसंतीत जन्मवोहरां।
तो आत्मप्रकाशामंदिरा-। आंतु आणिलें।।४२९।।

"आणि हा अर्जुन स्वतःही परमसुख भोगतोच आहे, वर आम्हाला पण ते मिळवून देतो आहे. असा हा आमचा गुरूच नाही का होत! याने जर श्रीकृष्णपरमात्म्यास काही विचारले नसते, तर त्या भगवंताने आपल्या आत्मज्ञानाच्या गासडीची गाठ कशाला सोडली असती! अन आम्हा पामरांना परमार्थाचा लाभ कधीतरी झाला असता का!

आम्ही अज्ञानाच्या अंधाराने भयाण केलेली जन्ममृत्युपरंपरेची बिकट वाट तुडवत चाललो होतो, तो याने अकस्मात येऊन आम्हाला आत्मप्रकाशमंदिरात आणून सोडले."

एवढां आम्हां तुम्हां थोरु। केला येणें उपकारु।
म्हणौनि हा व्याससहोदरु। गुरुत्वें होय।।१७-४३०।।
तेवींचि सञ्जयो म्हणे चित्तीं। हा अतिशयो या नृपती।
खुपैल म्हणौनि किती। बोलत असो।।४३१।।
ऐसीं हे बोली सांडिली। मग एरींचि गोठी आदरिली।
जैं पार्थे कां पुसिली। श्रीकृष्णातैं।।४३२।।
याचें जैसें कां करणें। तैसें मीही करीन बोलणें।
ऐकिजो ज्ञानदेवो म्हणे। निवृत्तीचा।।४३३।।

"एवढा हा थोर उपकार याने आमच्यावर केला आहे. म्हणून आमच्या गुरुवर्य व्यासांचा सहोदर बंधू असा शोभणारा हा अर्जुन आहे. कारण तसेच गुरुत्व त्याच्याठायी प्रकटले आहे."

एवढे बोलल्यावर संजय मनात चपापला. आपले हे बोलणे धृतराष्ट्रास खुपेल व तो नाराज होईल असे मनात येऊन त्याने अर्जुनाचे गुणवर्णन तेथेच सोडले व अर्जुनाने श्रीकृष्णास जे विचारले होते, तेच बोलण्यास सुरुवात केली. "श्रीकृष्णार्जुनसंवाद जसा संजयाने धृतराष्ट्रास निरूपिला, तो तसाच्या तसाच मी पण तुम्हाला पुढे सांगणार आहे. तो ऐका." असे निरूपित ज्ञानदेवांनी - निवृत्तिसुतांनी - सतराव्या अध्यायाची समाप्ती करून श्रद्धेचा विषय परिपूर्ण केला.

सात्त्विक श्रद्धा, ईश्वरप्रणिधान व अंतरंग योगसाधना::::

स्वकर्म व ईश्वरप्रणिधान

या प्रसंगी थोडे मागे वळून पाहू या. *श्रद्धा म्हणजे स्वभावज वृत्ती* असा सतराव्या अध्यायारंभी येणारा अर्थ आपण पाहिला. सात्त्विक श्रद्धा कशी असते, हे पण पाहिले. सत्त्वगुणाची कर्ता, कर्म, ज्ञान, बुद्धी, धृती, यज्ञ, दान, तप इ.मध्ये प्रकटणारी लक्षणे आपण पाहिली आहेत.

सत्त्वगुणाचा परिपोष असणारी प्राणिमात्रांच्या पिंडयोगे स्वाभाविक जी सात्त्विक वृत्ती ती म्हणजे सात्त्विक श्रद्धा. याकरता प्रकट होणारी व्यक्तिविशेष लक्षणे म्हणजे वस्तुतः योगाच्या पंच बाह्य अशा *यम-नियम-आसन-प्राणायाम-प्रत्याहार* या अंगांची परिपक्व साधकावस्था प्रकटवणारे गुण होत. ही योगांगे अशी सांग अभ्यासली - मुख्य म्हणजे *यम-नियम-प्रत्याहार* ही इंद्रियविषयसापेक्ष लौकिक अंगे पूर्णावस्थेप्रत आली की मधल्या अंगांचा विशेष अभ्यास अभिप्रेत आहे.

ही अंगे म्हणजे म्हटली तर बाह्य व म्हटली तर आंतर अशी *आसन व प्राणायाम* ही होत. बाह्य अशा प्रमुख *यम-नियम-प्रत्याहार* या अंगांचा अभ्यास होतांनाच या दोनही अंगांचा प्राथमिक अभ्यास सुरू होऊ लागतो. इंद्रिय-विषय ही दूयी *आसन व प्राणायाम* यांच्यावर परिणाम करते. म्हणून त्यांचे जसजसे नियमन होत जाते, तसतशी आसन-प्राणायाम या योगांगांसाठी साधकाची देह-चित्त-मन ही भूमी सिद्ध होत जाते व त्यानंतर अंतरंग अशा *धारणा-ध्यान-समाधि* यांचा अभ्यास करणे यांस ती अनुकूल होत जाते, असा हा वैशिष्ट्यपूर्ण भाग योगाभ्यासासाठी लक्षात ठेवला पाहिजे.

सात्त्विक श्रद्धा व कुंडलिनी उत्थापन

या योगांगांचा जसजसा दृढ अभ्यास होऊ लागतो, तसतशी *सात्त्विक श्रद्धा कुंडलिन्युत्थापनात परिवर्तित होऊ लागते.* यासाठी काही ज्ञाते कुंडलीनीचे एक नांव *श्रद्धा* असेही असल्याचे म्हणतात. कुंडलिनीशक्तीच्या क्रियाशीलतेशी अशी ही सर्व योगांगे निगडित असल्याचे दिसून येते. परंतु या श्रद्धेच्या - निव्वळ कुंडलिनीशक्तीच्या आधारे ब्रह्मापर्यंत जाता येणे अति दुस्तर आहे, हे आपण पूर्वी बाराव्या अध्यायातील काही भाग न्याहाळतांना पाहिले होते.

तसेच सतराव्या अध्यायारंभीसुद्धा ***"नुसधियाचि श्रद्धा। झोंबों पाहसीं परमपदा। तर्‍हीं तैसें हे प्रबुद्धा। सोहोपे नोहें।।१७-५०।।"*** असे म्हणून निव्वळ श्रद्धाबळावर कार्यभाग होईल असे समजू नये, हा इशारा श्रीकृष्णांनी दिलेला असल्याचा ज्ञानदेवांचा दाखला आहे. त्यासाठीही श्रद्धेला ब्रह्मबळ लाभले पाहिजे. हे ब्रह्मबळ ब्रह्मनामात ***ॐ तत् सत्*** या त्रिपदात *"नाम तेथे नामी व त्याची शक्ती"* या उक्तीने सामावलेले आहे.

हे ब्रह्मबळ सतत सर्व कर्म करतांना ब्रह्मास स्मरून, त्याचे चिंतन करून - त्याचे ध्यान करत - त्याला सर्व कर्मे समर्पण करत -अंती स्वतःसही ब्रह्म असे जाणत - अशी सतत ब्रह्मधारणा ठेवून, आपणास ब्रह्मस्वरूप कल्पित - त्याप्रमाणे समाधि अवस्था ठेवत - कर्ता ब्रह्मस्वरूप आहे, या अद्वैतभावात समरस होत म्हणजे सतत *ईश्वरप्रणिधान* करतकरतच प्राप्त होते. म्हणजे *कुंडलिनीशक्तीच्या सामर्थ्याने ईश्वरप्रणिधानपूर्वक साधावयाचा हा पंथराजच आहे,* हे जिज्ञासूंस वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

प्रवृत्ति व निवृत्ति यांचा म्हणजे *कर्ममार्ग व संन्यास* यांचा मोक्षाशी असा सुंदर संगम सतराव्या अध्यायाठायी श्रीज्ञानदेवांस दृग्गोचर होत असल्याचे आपणांस जाणवते, ते असे!

पंथराजाची अष्टांगयोग व कर्मयोगाची प्रावरणे

वस्तुतः ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायी पंथराजाचे जे दर्शन ज्ञानेशांनी घडविले आहे, ते *अष्टांगयोगसापेक्ष* आहे. पतंजलिप्रणीत योगाचे व पंथराजाचे सादृशत्व असल्याचे आपणास जाणवते. *गीतेचा योग व अष्टांगयोग* यांची साधर्म्यदर्शक पाहणी आपण पूर्वी केली आहे. *पंथराज* व त्याचे गीता - ज्ञानेश्वरीसापेक्ष अवलोकन आपणांस अद्याप करावयाचे आहे.

पण हा *पंथराज* कसा आहे, याचे काही निर्देशन यापूर्वी प्रसंगोपात्त आपण पाहिले आहे. अष्टांगयोगाची वस्त्रे ल्यालेला *पंथराज* आपणांस सहाव्या अध्यायी दिसतो, तर त्याचे *क्रमयोगसोपान* असे दर्शन

अठराव्या अध्यायी घडते. अठरावा अध्याय *मोक्षसंन्यासयोग* या नांवानेही विश्रुत आहे. त्या अध्यायातील मोक्षदायक संन्यासाचे तत्त्व आपण *त्याग व संन्यास* या विषयाची चिकित्सा करतांना अवलोकिले आहे *(उन्मेष क्र.३० : संन्यास, त्याग व कर्म पृ.क्र. ४५४ ते ४६१).*

सर्वसाधारणपणे गीता-ज्ञानेश्वरी यांचा भर विहित कर्मे करण्यावर व ती करतकरतच मोक्षप्राप्ती व जीवन्मुक्ती प्राप्त करून घेण्यावर आहे, असेही आपणांस जाणवते. त्यामुळे *पंथराज* हा कर्ममार्गाचीही वस्त्रेप्रावरणे घेऊन वावरतो, असे आपणांस दिसते. या सतराव्या अध्यायी *ईश्वरप्रणिधान* या पतंजलिप्रणीत संकल्पनेचा पठपुरावा करत *पंथराज* कसा अवतरतो, ते वर सूचित केले आहे.

पतञ्जलींचे ईश्वरप्रणिधान व गीतेचा योग

मूळ पातंजलसूत्रात ईश्वरप्रणिधानाचे महत्त्वाचे उल्लेख येतात, ते असे: ***१) ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।। व २) तपः स्वाध्यायेश्वर-प्रणिधानानि क्रियायोगः।।२-१।।***

(अ) समाहित चित्त असतांना वाणीने प्रणवाचा जप करणे आणि आपण व ईश्वर एकच आहोत, अशी भावना मनात करणे; व (ब) व्युत्थितावस्थेत आपल्या हातून घडणारी कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करणे; असे ईश्वरप्रणिधानाचे दोन प्रविभाग संभवतात. यांद्वारे *असंप्रज्ञात समाधि* प्राप्त होतो. यातील पहिला प्रभाग **ध्यानयोग व पंथराज**रूपाने सहाव्या अध्यायी अवतरतो, तर दुसरा प्रभाग वर दर्शविल्याप्रमाणे सतराव्या अध्यायी अवतरलेला आहे.

ईश्वरप्रणिधानाच्या याच प्रथम व द्वितीय प्रभागांनी व्यापलेले असे साधकजीवनाचे स्वरूप गीताकारांस अभिमत असल्याचे ज्ञानेश्वरीचे परिशीलन करतांना आपणांस उमगते व त्याचे संक्षिप्त स्वरूप आपण जेव्हा अठराव्या अध्यायांतर्गत ज्ञानदेवांनी निरूपिलेल्या **क्रमयोगा**चे विवेचन करू तेव्हा पहावयास मिळेल.

सात्त्विक श्रद्धा कशी असते, तिच्याद्वारे सात्त्विक कर्म कसे उपजते आणि यज्ञ-दान-तपे इ.चा त्या श्रद्धेशी कोणत्या प्रकारचा संबंध आहे, हा भाग आपण पूर्वी चर्चिला आहे. ***"तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि"*** या क्रियायोगाचे वैशिष्ट्य म्हणजे चित्तशुद्धी व त्याद्वारे प्राप्त होणाऱ्या सात्त्विक श्रद्धेसाठी काया, मन व वाचा यांद्वारे केलेले तप, प्रणवादी मंत्रजप, शास्त्रांचे अध्यायन करणे, तसेच प्राप्त कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करणे हेच म्हणजे **ईश्वरप्रणिधान**च होय. यांद्वारे अविद्येचा लेश शिथिल होऊन क्लेश छिन्न होतात.

पतंजलिकृत सूत्रांचा *साधनपाद* हा भाग या माहितीसाठी जिज्ञासूंनी जरूर अभ्यासावा. म्हणजे गीता व पतंजली कसे एकच मार्गाने जातात, ते कळून येण्यास साहाय्य होईल. *या सर्व गोष्टींचा विचार केला की आपणांस स्पष्ट होते की ईश्वरप्रणिधानाद्वारे साधावयाचा योग, ज्यात कुंडलिन्युत्थापन व क्रिया अभिप्रेत आहेत, असा अष्टांगसंभूत सेश्वरसाङ्ख्यकृत पातंजलसूत्रांस मानणारा मार्ग हाच गीताकारांस अभिप्रेत आहे व त्याचे खरे स्वरूप ज्ञानदेवांनी आपल्या भावार्थदीपिकेत यथातथ्य प्रकट केले आहे.* असो.

समारोप

ईश्वरप्रणिधान व श्रद्धा यांचा अन्योन्य संबंध आहे. गीतेचा अंतरंग असा हा उपासनाविषयाशी संबंधित विचार आहे. गीतेचे *राजगुह्य*, तिची *राजविद्या* ही उपासनेशीच घनिष्ट संबंध ठेवते. हाच आपल्या पुढील **अष्टम स्कंध - उपासनारहस्य** याचा विषय आहे. तर वळू या आता त्या गीतेच्या गाभाऱ्याकडे अन त्यानिमित्त पुढच्या **उन्मेष क्र. ३४- ईश्वरप्रणिधान** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::अष्टम स्कंध:::

::उपासना रहस्य::

(पृ.क्र.५२५ ते ५५८)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ३४::

::ईश्वरप्रणिधान::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३४:

गीता:

७:१६-३०

ज्ञानेश्वरी:

७:१०८-११८,१२३-२१०

:::अष्टम स्कंध:::
::उपासना रहस्य::

::उन्मेष ३४::
::ईश्वरप्रणिधान::

चतुर्विध भक्त::::

भक्तांचे ईश्वरप्रणिधान

केवळ सुकृतानेच जी प्राप्त होते, अशी ही मागील उन्मेषात पाहिलेली श्रद्धा आहे. ज्यांना ही प्राप्त होते, ते त्या ब्रह्माचे, त्या परमात्म्याचे उपासक असतात. त्याला विविध रीतीने ते भजतात. अशा भक्तांचे *ईश्वरप्रणिधान* कसे असते, ते पाहणे मनोरंजक ठरते. साधकांसाठी त्यांचे आचरण आदर्शवत असते. दैवी दुरत्यया मायेला उल्लंघून जाण्यास कोणत्याही जीवास सामर्थ्य नाही. परंतु भगवंतांचे हे अनन्यभक्त मात्र सतत ईश्वरस्मरण - सतत ईश्वराभिमुखत्व - सतत भगवद्गुणगान करत या दुस्तर मायेला भगवन्नामाच्या होडीतून सहज पार करून त्या अंतिम परम दिव्य अशा परमधामास नित्यासाठी राहण्याकरता जातात.

अशा त्या भक्तवर्यांची चर्या, त्यांचे आचरण, त्यांच्या कृती, त्यांची साधना व त्यांच्या भगवंताची महत्ता अवलोकिणे ही जिज्ञासूंना मार्गदर्शनपर ठरतील. तसेच साधकांसाठी तर याचे मूल्य अपार आहे. ईश्वरप्रणिधानाचा महिमासुद्धा त्याद्वारे आपणास समक्ष पाहण्यास मिळेल. यासाठी आता त्या विषयाकडे वळू या.

साधकभक्तांचे चार प्रकार सांगतांना भगवंतांनी असे म्हटले की:

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।।७-१६।।

"हे अर्जुना! चार प्रकारचे पुण्यवान लोक माझी भक्ती करतात. ते म्हणजे, हे भरतश्रेष्ठा! आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे होत."

भक्त व भक्तीचा हा विषय आवडीचा असणारे ज्ञानेश उद्गारतातः

........। आइकां चतुर्विध मातें भजलें।
जिहीं आत्महित केलें। वाढतें गां।।७-१०८।।
तो पहिला आर्त्तु म्हणिजे। दुसरा जिज्ञासू बोलिजे।
तिजा अर्थार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा।।१०९।।

"आत्महित वृद्धिंगत करणारे चौघे मला भजतात. दुःखाने, शोकाने, व्याधीने ग्रस्त असणारा मनुष्य माझी भक्ती करतो. ज्ञानाची आवड असणारा जिज्ञासूही भक्त असतो. माझ्यापासून आपल्या कामना पूर्ण व्हाव्यात म्हणून जो माझी भक्ती करतो, तो अर्थार्थी आणि चौथा ज्ञानसंपन्न भक्त असे त्यांचे प्रकार आहेत."

भगवंतास अति प्रिय असणारा ज्ञानी भक्त

यातला *ज्ञानी भक्त* प्रभूस फार प्रिय आहे. म्हणून ते म्हणतातः

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः।।७-१७।।

"सर्व भक्तांत सतत माझ्याशी युक्त होऊन माझी अनन्यभक्ती करणारा ज्ञानी श्रेष्ठ आहे. त्याला मी अत्यंत प्रिय असतो व तो माझा अत्यंत प्रिय आहे."

यातला ज्ञानी भक्त भगवंतांस फार प्रिय आहे. म्हणून ते म्हणतातः

तेथ आर्त्तु तो आर्त्तीचेनि व्याजें।
जिज्ञासु तो जाणावयाचिलागीं भजे।
तिजेनि तेणें इच्छिजे। अर्थसिद्धी।।७-११०।।
मग चौथियाचां ठाईं। काहींचि करणें नाही।
म्हणोनि भक्तु एकु पाहीं। ज्ञानिया जो।।१११।।
जैं तेयां ज्ञानाचेनि प्रकाशें। फिटलें भेदाभेदांचें कवडसें।
मग मीचि जाहला समरसें। आणि भक्तुही तेंवीचि।।११२।।

"यातले *आर्त, अर्थार्थी व जिज्ञासू* हे तिन्ही काहीतरी लाभ व्हावा, काही कामना पूर्ण व्हावी, या इच्छेने मला भजतात. परंतु चौथा जो *ज्ञानी* भक्त आहे, तो मात्र अशा कोणत्याही कामनेने मला भजायचे जाणत नाही. त्याला वस्तुतः काही कर्तव्य राहिलेले नसते. कारण ज्ञानाच्या प्रकाशाने द्वैत-अद्वैतरूपी भिन्नाभिन्नतेचे कवडसे नाहीसे होऊन त्या दिव्य प्रकाशात तो माझ्याशी समरस झालेला असून - मद्रूप झालेला असून तरीही माझी भक्ती करतो."

परि आणिकांचियें दिठीं नांवेक।
जैसा स्फटिकुचि आभासें उदक।
तैसा ज्ञानी नोहेच कवतुक। सांगतां तो।।७-११३।।
जैसा वारा कां गगनीं विरे। मग वारेपण वेगळें नुरें।
तेवीं भक्त हे पैज न सरे। जर्‍हीं ऐक्या आला।।११४।।
जर्‍हीं पवन हालवूनि पाहिजे। तर्‍हीं गगनावेगला देखिजें।
एर्‍हवीं गगन तो सहजें। असे जैसें।।११५।।
तैसें शरीरें हन कर्में। तो भक्त ऐसा गमे।
परि आंतरें प्रतीतीधर्में। मीचि जाहला।।११६।।

"कधीकधी दृष्टीला आभास होऊन स्फटिक पाण्यासारखा दिसतो. तसे हे त्याचे मद्रूप होणे आभासात्मक नसते. तो ज्ञानी भक्त माझ्याशी इतका एकरूप होतो की ज्याप्रमाणे वारा गगनात विरला की जसे त्याचे वायुपण उरत नाही. पण त्या भक्ताचे कौतुक काय वर्णावे! इतके माझ्याशी त्याचे ऐक्य जरी झालेले असले, तरी त्याच्याठायीची मजप्रति असणारी दृढ भक्ती जशीच्या तशी अभंग असते. वारा हलवून पाहिला की तो गगनापेक्षा भिन्नरूप असल्याचे जाणवते; एरवी तो अगदी आकाशरूप असतो. त्याप्रमाणे शरीरादी व कर्मे करण्यामुळे तो भक्त मनुष्यत्व असणारा दिसतो; परंतु त्याच्या अंतरीच्या प्रतीतीच्या गुणाने तो मद्रूपच झालेला असतो."

आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें। मी आत्मा ऐसें तो जाणें।
म्हणऊनि मीही तैसें म्हणें। उचंबलला सांता।।७-११७।।
हां गां जीवापैलिकडिलियें खुणें। जो पावोनि वावरूंही जाणें।
तो देहाचेनि वेगलेपणें। काय वेगला होएं।।११८।।

"भक्तांवर अतीव प्रीती असल्यामुळे उचंबळून जाऊन त्याला प्रतिसाद देत, तो जेव्हा ज्ञानप्रकाशाने न्हाऊन जात स्वतःस आत्मा म्हणून ओळखू जातो, तेव्हा त्यास माझा आत्मा म्हणून मीसुद्धाओळखू लागतो. जीवभावाच्या पल्याड असणाऱ्या अशा प्रतीतीठायी विसंबूनसुद्धा जो असा भक्तिव्यवहार करणे जाणतो, तो केवळ देहाने मजवेगळा दिसत असल्यामुळे काय वेगळा होईल!"

ज्ञानी म्हणजे भगवंताचे चैतन्यच

म्हणून अशा ज्ञानी भक्ताविषयी गौरवपूर्ण उद्गार काढीत भगवंत म्हणतातः

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम्।।७-१८।।

"तसे हे सर्वच चतुर्विध भक्त उदात्त भक्ती करतात. परंतु ज्ञानी भक्त तर माझा आत्माच आहे. माझ्याशी तद्रूप झालेला तो भक्त उत्तमोत्तम गती असा जो मी, त्या मलाच येऊन मिळालेला असतो."

धेनूप्रति वत्स जसा अनन्यगतिक असतो; तसा हा भक्त असतो. "तो माझ्यावर इतकी प्रीती करतो, म्हणून मी त्याच्यावर जीवापाड प्रेम करतो," असे भगवंत म्हणतात.

हे असो मग म्हणितलें। जैं कां तुज सांघितलें।
तेंहीं भक्त भलें। पढियंते आम्हां।।७-१२३।।
परि जाणोनियां मातें। जो पाहों विसरला मागौतें।
जैसें सागरां येवोनि सरितें। मुरडावें ठेंलें।।१२४।।
तैसीं अंतःकरणकुहरीं उपजली।
जेयांची प्रतीतीगंगा मज मिनली।
तो मी हे काय बोलीं। फार करूं।।१२५।।
एऱ्हवीं ज्ञानिया जो म्हणिजे। तो चैतन्यचि केवल माझे।
हे न म्हणावें परि काय कीजे। न बोलणें बोलों।।१२६।।

"असो. इतरही तीन प्रकारचे भक्त सांगितले, तेसुद्धा मला आवडतात. परंतु मला ओळखताच संसाराकडे मागे वळून पाहण्याचे जो विसरला; सागरास एकवार येऊन मिळाल्यावर सरिता जशी मागे मुरडत नाही; त्याप्रमाणे अंतःकरणाच्या गुहेमध्ये उगम पावलेली ज्याच्या चित्तातील प्रतीतिगंगा मला येऊन मिळाली, तो ज्ञानी भक्त म्हणजे मीच आहे, हे तुला कसे सांगू! खरे म्हणजे तो ज्ञानी भक्त म्हणजे केवळ माझे चैतन्यच! हे खरे तर सांगायला नकोच! पण त्याच्या प्रेमाने उचंबळून गेल्यामुळे सांगितल्याशिवाय मला राहवत नाही."

अशा त्या भक्ताच्या विरळेपणाबद्दल भगवंत म्हणतातः

बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।।७-१९।।

"अनेकानेक जन्मांतरी एखाद्या विरळ्या मनुष्यास हे सर्व विश्वच वासुदेव आहे, असे ज्ञान प्राप्त होत असते व तो ज्ञानवान मला येऊन मिळत असतो. म्हणून असा महात्मा - असा भाग्यवंत पुरुष अत्यंत दुर्लभ आहे."

"हे समस्तही श्रीवासुदेवो"

अशा विरळ्या भक्तवर्याचे वर्णन करतांना युगीयुगी क्वचितच प्रकटणारे भक्तशिरोमणी ज्ञानेश म्हणतातः

जैं तो विषयांची मोट झाडीं-।
माजीं कामक्रोधांची सांकडी।
चुकाऊनि आला पाडीं। सद्वासनेचियां।।७-१२७।।
मग साधुसंगें सुभटा। उजू सत्कर्माचियां वाटां।
अपप्रवृत्तीचा आंव्हाटा। डावलूनि।।१२८।।
आणि शतजन्माचियां वाहतवणा।
तेंवींचि आस्थेचियां न लेचि वाहणा।
तेथ फलहेतुचा उगाणा। कोण्ह चाली।।१२९।।

येथे जेमतेम दहाबारा ओव्यांमधून ज्ञानेशांनी एक प्रकारे **क्रमयोगा**चे धावते, संक्षिप्त पण पुरेसे वर्णन केले आहे. खरे तर हाच विषय विस्तारपूर्वक असा शेकडो ओव्यांनी अठराव्या अध्यायी येतो. त्यावेळी तो अधिक खुलाशाने पाहू. तूर्त त्या दुर्लभ भक्ताचे वर्णन ऐकू याः

"विषयांची गर्द झाडी त्यातल्या काम, क्रोध इ.वाटमाऱ्यांच्या तावडीतून सुटून पार केल्यावर सात्त्विक श्रद्धेच्या सपाट अशा मैदानावर तो आलेला असतो. त्यानंतर, हे वीरा! संतांच्या संगतीने सरळ सत्कर्माच्या वाटेवर, निषिद्ध कर्माची आडवाट टाळून तो चालत असता शेकडो जन्मांचा प्रवास त्याने केलेला असतो. या सत्कर्ममार्गाने चालतांना कर्माविषयी आसक्ती असे रूप असणाऱ्या वहाणांचा त्याने आपल्या पावलांना साधा स्पर्शसुद्धा होऊ दिलेला नसतो; तर फलाशेचा त्याने कितीदा त्याग केला असेल, त्याचा हिशेब कोणी करावा!"

ऐसा शरीरसंयोगाचियें रातीं-। माजीं धांवतां सडियां आयतीं।
तंव कर्मक्षयाची पाहती। पाहांट जाली।।७-१३०।।

तैसीं गुरुकृपा उखा उजलिली। ज्ञानाची वोतपली पडली।
तेथ साम्याची ऋद्धी उघडली। तेयाचियें दिठीं।।१३१।।
ते वेळीं जेयाकडे वास पाहे। तेऊता मीचि तेयां एक आहे।
अथवा निवांत जऱ्हीं राहे। तऱ्हीं मीचि तेयां।।१३२।।
हे असो आणिक कांहीं। तेयां सर्वत्र मीवांचूनि नाहीं।
जैसे सबाह्य जल डोहीं। बुडालियां घटां।।१३३।।
तैसा तो मजभीतरीं। मी तेयां आंतुबाहेरीं।
हे सांगिजे बोलवरी। तैसें नोहें।।१३४।।

"देहांतरे करतकरत जन्मजन्मांतरांच्या अंधाऱ्या रात्री असे सर्वसंगपरित्यागाच्या मोकळ्या वाटेवरून धावतांना त्याच्या कर्मक्षयाची पहाट फाकते. त्याबरोबर गुरुकृपारूप उषःकाल होतो आणि ज्ञानरूपी कोवळे ऊन पडते. त्यावेळी त्याच्या नवीनच उघडलेल्या दृष्टीला ब्रह्मैक्याचे ऐश्वर्य दिसते. त्यासमयी जिकडेजिकडे तो पाहतो, तेथे त्याला सर्वत्र मज परमात्म्याचेच दर्शन होते. अन् तो इकडेतिकडे न पाहता निवांत स्वस्थ जरी बसला तरी त्याच्या अंतर्यामी, तसेच आत आणि बाहेरही माझेच दर्शन होते. असे सर्वत्र सर्वदूर त्याला मजशिवाय कोणीच दिसत नाही.डोहातील जळात घट पूर्ण बुडाल्यावर त्याच्या जसे आत व बाहेरही जळच जळ असते, तसा तो माझ्याआत असतो व मी त्याच्याआत व बाहेरही असतो."

म्हणोनि असो हे यापरी। तो देखें ज्ञानाची वाखारी।
तेणें संसरलेनि करी। आपु विश्व।।७-१३५।।
हे समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतीरसाचा वोतला भावो।
म्हणौनि भक्तांमाजीं रावो। आणि ज्ञानिया तोचि।।१३६।।

"पण हे वर्णन करून सांगण्यासारखे सोपे नाही. असो. तो असे ब्रह्मैक्यबोधरूप ज्ञानाचे भांडार अवलोकित असतो व त्यातून योगबलाने थोडा सावरला की सर्व जगच आत्मरूपाने पाहू लागतो. *समस्त विश्वच श्रीवासुदेव आहे,* अशा प्रतीतिरसाने त्याचा भाव ओतलेला असतो. म्हणून भक्तांमध्ये तो राव आहे - राजा आहे - श्रीमान आहे आणि खरा ज्ञानी तोच आहे."

जेयाचियें प्रतीतीचा वाखौरा। पवाडु होय चराचरां।
तो महात्मा धनुर्धरा। दुर्लभु आथी।।७-१३७।।
एर बहु जोडिती किरीटी। जेयांची भजनें भोगांसाठीं।
जैं आशातिमिरें दृष्टी-। मंद जालें।।१३८।।

"ज्याच्या प्रतीतिरूप भांडारात चराचर विश्वाचा समावेश वासुदेवरूपाने होतो, असा हा महात्मा, हे धनुर्धरा! अत्यंत दुर्लभ आहे. इतर प्रकारचे आर्त, अर्थार्थी वा जिज्ञासू भक्त कितीतरी असतात. हे किरीटी! अशा भक्तांची भक्ती केवळ भोग मिळवण्यापुरती असते व त्यांची दृष्टी आशारूप तिमिररोगाने मंद झालेली असते. अशा भक्तांपरीस ज्ञानी भक्त केवळ विरळाच असल्यास नवल नाही."

अज्ञानी भक्त::::

फलेच्छु भक्त

आणि भगवंतांची भक्ती न करता इतर दैवते पूजणारे तर असंख्यात असतात. कारणः

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया।।७-२०।।

"निरनिराळ्या विषयोपभोगांच्या अभिलाषेने ज्ञान नष्ट झालेले अनेकानेक लोक, वेगवेगळ्या प्रकारच्या साधनांचा आश्रय करून, स्वतःच्या प्रकृतीस अनुसरून, माझ्याहून वेगळ्या देवदेवतांची भक्ती करतात."

आणि फलाचियां हांवा। हृदईं कामा जाला रिगावा।
कीं तेयाचिये घंसणीं दिवा। ज्ञानाचा गेला।।७-१३९।।
ऐसें उभयतां अंधारीं पडलें। म्हणौनि पासींचि मज चुकलें।
मग सर्वभावें अनुसरलें। देवतांतरां।।१४०।।
आधींचि प्रकृतिचें पाईक। वरी भोगालागीं रंक।
मग तेणें लोलुप्यें कवतुक। कैसें भजती।।१४१।।

"फळाविषयी हावेने त्यांच्या हृदयी कामना प्रवेशतात आणि त्यांच्या झपाट्याच्या झंझावातात ज्ञानाचा दिवा मालवला जातो. आशेमुळे ज्ञानदृष्टी गमावली आणि कामाने ज्ञानाचा प्रकाश घालवला. असा अंतर्बाह्य सर्वदूर गडद अज्ञानांधकार झाला. त्यावेळी त्यांना त्यांच्या *हृदिसंनिविष्ट* असणाऱ्या मज परमात्म्याची आठवण कशी राहील! त्यांच्या अंतर्यामी असणाऱ्या मलासुद्धा ते अज्ञानाने पाहू शकत नाहीत. अशा प्रसंगी आधीच प्रकृतीचे दास असणारे भोगांसाठी दीन आणि लाचार झालेले ते लोक मला सोडून इतर देवदेवतांना भजू न लागले तरच नवल!"

कवणीं तियां नियमबुद्धी। कैसिया हन उपचारसमृद्धि।
कां अर्पण यथाविधी। विहित करणें।।७-१४२।।

"त्या देवतागणांना प्रसन्न करावे व त्यांच्याकडून आपणांस हवे ते उपभोग प्राप्त व्हावेत म्हणून मग ते लोक सर्व शास्त्रे धुंडाळतात. त्यात सांगितलेल्या विधींनी, उपचारांसाठी लागणारी सर्व सामग्री जमवून, आखून दिलेल्या नियमांच्या चौकटीत दक्षतापूर्वक राहण्याचा आटापिटा करून त्या त्या देवतांचे अत्यंत विषयलोलुपतेने मोठ्या प्रेमाने भजन-पूजन-यजन-याजन व भक्ती करतात. त्यांच्याप्रीत्यर्थ षोडशोपचारांचे यथाविधी समर्पण करतात. व्रते-वैकल्ये-उपासतापास-तपाचरण-दानधर्म इ.सर्व काही त्यांचे त्या दैवतांसाठी असते. माझ्यासाठी ते काहीच करत नाहीत."

व्यभिचारी भक्तीचे नश्वर फल

"असे असले तरी त्या अज्ञान्यांना त्यांच्या या सर्व कर्मांचे फळ माझ्याचमुळे प्राप्त होते. परंतु ते फळ अत्यल्प असते," असे भगवंत म्हणतातः

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्।।७-२१।।

"जो जो भक्त ज्या ज्या रूपात ज्या ज्या देवतेची श्रद्धापूर्वक अर्चना करू इच्छितो, त्याची त्याची श्रद्धा त्या त्या देवतेच्या ठायी मीच स्थिर करून देतो."

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते।
लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तान्।।७-२२।।

"त्या श्रद्धेने युक्त होऊन तो त्या देवतेचे आराधन करतो व त्याला त्यापासून मीच निश्चित करून ठरवून दिलेली इच्छित फळे मिळतात."

अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम्।
देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि।।७-२३।।

"परंतु ही फळें नाशवंत असतात. त्या अल्पबुद्धी मनुष्यांस दैवतांचे यजन करून अशाश्वत अशा त्या दैवतांचा लोक प्राप्त होतो. पण माझे भक्त मात्र शाश्वत, दिव्य अशा माझ्या स्थानी मजप्रत येऊन मिळतात."

ज्ञानदेव सांगतातः

पैं जो जिएं देवतांतरीं। भजावयाची चाड धरी।
तेयाचीं तैं चाड पुरी। पुरवितां मी।।७-१४३।।
देवोदेवी मीचि पाहीं। हाहीं निश्चो त्यासीं नाही।
भाव तैं तैं ठाईं। वेगलाला धरी।।१४४।।
मग श्रद्धायुक्त। तेथींचे आराधन जैं जैं उचित।
तैं सिद्धीवरी समस्त। वर्तों लागे।।७-१४५।।

"अशा लोकांना ज्या देवतेची भक्ती करण्याची कामना उत्पन्न होते, त्यांची ती कामना पुरवणारा खरे तर मीच आहे. या सर्व देवदेवता म्हणजे मीच आहे, एवढेसुद्धा त्यांना समजत नाही. म्हणून विविध दैवते पूजतांना ते त्या त्या दैवतांनुरूप भक्तिभाव वेगवेगळा धरून वागतात आणि आपली मनोकामना जोपर्यंत पूर्ण होत नाही, तोपर्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणाने त्या देवतांची योग्य आचार-उपचार-विधिपूर्वक आराधना करतात."

ऐसे जेणें जें भाविजे। तैं फल तेणें पाविजे।
परि तेंहीं सकल निफजे। मजचिस्तव।।१४६।।
परि तैं भक्त मातें नेणती। जैं कल्पनेबाहेरीं न निघती।
म्हणौनि कल्पित फल पावती। अंतवंत।।१४७।।
किंबहुना ऐसें जैं भजन। तैं संसाराचेनि साधन।
एर फलभोग तैं स्वप्न। नांवभरीं दिसें।।१४८।।

"मग ज्याला जे फळ हवे असेल, ते प्राप्त होते. पण हे सर्व फळ माझ्यामुळेच त्यांना मिळते, हे मात्र त्या लोकांना ठाऊक नसते. असे लोक भक्ती जरी करत असले, तरी मला ते जाणत नाहीत. आपल्या संकुचित श्रद्धाभावामुळे त्यांना माझे विश्वात्मक स्वरूप उमगत नाही. म्हणून त्यांना अत्यल्प असे नाशिवंत फळ त्या भक्तीद्वारे मिळते. फार काय सांगावे! अशी जी भक्ती असते, ती म्हणजे केवळ संसारात जखडून ठेवणारी आहे. आणि जे फळ मिळते, ते निव्वळ स्वप्नवत असे क्षणभंगुर असते."

हे असो परौतें। मग हो कां आवडे तैं।
परि यजी जो देवतांतैं। तो देवत्वासिची ये।।७-१४९।।
एर तनुमनप्राणीं। जैं निरंतर माझिये वाहणीं।
तैं देहाचां निर्वाणीं। मीचि होती।।१५०।।

"इतउपरांत त्यांची श्रद्धेय जी दैवते असतात, त्या देवतांप्रत ते जातात. सर्व दैवते जन्ममृत्युचक्रात असल्यामुळे असे केवळ अशाश्वत स्थान त्या लोकांना प्राप्त होते. परंतु जे भक्त केवळ माझीच भक्ती करतात; माझ्यावरच श्रद्धा ठेवतात; तनमनप्राण केवळ माझ्याठायीच अर्पण करतात; असे मला सर्वस्वसमर्पण करणारे माझे भक्त मात्र देह पडल्यावर मद्रूप होतात - माझ्यात मिळून जातात."

योगमायेने वेष्टिलेले भगवत्स्वरूप व अज्ञान

भगवंतांचे स्वरूप न जाणणाऱ्या अल्पबुद्धी जीवांबद्दल ते पुढे अधिक वर्णन करतात आणि ते लोक भगवंतांच्या परम अव्यय भावास कसे जाणत नाहीत; जन्मास येतेवेळी सर्व प्राणी कसे मोहयुक्त होतात, ते सांगतातः

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम्।।७-२४।।

"अव्यक्त असणाऱ्या मला ते निर्बुद्ध व्यक्त समजतात आणि माझा अव्यय, उत्तमोत्तम, सर्वश्रेष्ठ असा परमभाव वा स्वरूप ओळखण्यास असमर्थ असतात."

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम्।।७-२५।।

"योगमायेने आच्छादित असल्यामुळे माझे स्वरूप सर्वांस दिसू शकत नाही.म्हणून हे मूढ जगत माझे अव्यय स्वरूप जाणत नाही."

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।
सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परन्तप।।७-२७।।

"हे परंतप भारता! हे समस्त भूतमात्र प्रकृतिवश जन्म घेत असल्याने इच्छा व द्वेष *(राग व द्वेष)* या द्वंद्वाने मोह पावून प्रकृतीपलीकडील असणाऱ्या मला विसरतात."

वेदोऽहं समतीतानी वर्तमानानि चार्जुन।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन।।७-२६।।

"जरी मला कोणी जाणत नसले तरी मी मात्र होऊन गेलेल्या, वर्तमानकाली असलेल्या व भविष्यकाली होणाऱ्या सर्वच्या सर्व भूतमात्रांस जाणतो."

फलाशेमुळे भगवंताचा वियोग

याविषयी ज्ञानेशांचे म्हणणे असे आहे कीः

परि तैसें न करिती प्राणिये। वायां आपुलां हितीं वाणिये।
तैं पोहताती पाणिये। तलहातींचेनि।।७-१५१।।

नाना अमृताचां सागरीं बुडिजे। मग तोंडां कां वज्रमिठी पाडिजे।
आणि मनीं तऱ्हीं आठविजे। थिल्लरोदकांतैं।।१५२।।

"फलाशेने विद्ध केलेले जीव माझी भक्ती करणे जाणत नाहीत. मला सोडून इतर देवतांचे भजन करून ते आपल्या हितास मुकतात. सर्वात्मक अशा माझी भक्ती न करता इतर क्षुद्र दैवते जोगावणे म्हणजे अथांग जलाशयात अवगाहन करण्याचा आनंद लुटण्याऐवजी तळहाती घेतलेल्या ओंजळभर पाण्यात पोहोण्यासारखे व त्यातसुद्धा बुडून मरावे असे हतभागीपणाचे आहे;" अथवा

हे ऐसें कायसेयां करावें। जैं अमृतींही रिगौनि मरावे।
तैं सुखें अमृत होऊनि कां नसावें। अमृतामाजीं।।७-१५३।।

"त्यांची वृत्ती अमृताच्या समुद्रात रिघावा झाल्यावरही तोंड गच्च मिटून ठेवण्यासारख्या मूर्खपणाची आहे. एवढ्या त्या समुद्री राहून अमृताचा निदान एक थेंबतरी चाखून अमरत्व प्राप्त करून घ्यावयाचे तर सोडाच! पण त्यावेळी मनात मात्र डबक्यातील घाण गढूळ पाण्याची आठवण काढतकाढत नतद्रष्टपणा करण्यासारखे त्या लोकांचे वर्तन असते. अमृतात बुडत असतांना ते तोंडात जाऊ न देण्याची पराकाष्ठा करत फुकट जीवास मुकण्यापेक्षा सुखेनैव ते अमृत नाकातोंडात जाऊ देऊन स्वतः अमृतस्वरूप होऊन त्या अमृतसागरी माणसाने का न राहावे!"

तैसा फलहेतूचां पांजिरा। सांडूनियां धनुर्धरा।
कां प्रतितीपाखीं चिदंबरा। गोसाविया नोहावें।।७-१५४।।
जेथ उंचावतेनि पवाडें। सुखाचां पैसारु जोडे।
आपुलेनि सुरवाडें। उडों ये ऐसा।।१५५।।
तेयां उमपा माप कां सुयावें। मज अव्यक्तां व्यक्त कां मानावें।
सिद्ध असतां कां निमावें। साधनवरी।।१५६।।

"हे धनुर्धरा! मी म्हणतो की हा फलाशेचा पिंजरा सोन्यासारख्या मोहजालाने जरी घडवला असला तरी त्याचा त्याग करून मनुष्यप्राण्याने आत्मानुभूतिरूपी पंखांनी स्वैर विहार करत चिदाकाशात स्वच्छंद मुक्त संचार का करू नये! त्या अशा उमप चिदाकाशात जितके उंच उडावे तितका सुखद असा संचार करण्यास - विहरण्याबागडण्यास अधिकाधिक अवकाश नाही का दृष्टिक्षेपात येत! अशा त्या अनंत, मुक्त, स्वच्छंद, रमणीय चिदाकाशाला फलाशारूपी पिंजऱ्यातील बंदिस्त, सांत, घुसमटलेल्या चिरमुटल्या अवकाशाच्या मापात का जखडून ठेवावे! माझ्या विश्वात्म स्वरूपाला देवदेवतांच्या रूपाने का जोखावे! मज अव्यक्तास व्यक्त का मानावे! सिद्धत्व अंगी असताही सधनाचा खटाटोप का करावा!"

परि हा बोलु आघवा। जऱ्हीं विचारिजतसे पांडवा।
तऱ्हीं विशेखें या जीवां। न चोजवें गां।।७-१५७।।
कां जैं योगमायापडलें। हे जाले आहाति आंधलें।
म्हणौनि प्रकाशाचेनि दिहबलें। न देखती मातें।।१५८।।

"माझी भक्ती करून माझी प्राप्ती करून घेणे अति सुलभ असूनही उगाच व्यर्थ देवदेवतांचे अवडंबर माजवण्याचे कष्ट करत देह व्यर्थ का वाया दवडावा! परंतु हे पांडवा! बहुतेक जीवांना ही एवढी साधी गोष्टसुद्धा समजत नाही. कारण ते योगमायेचे कातडे डोळ्यांवर ओढून स्वस्थ बसले आहेत. म्हणून स्वस्वरूपाचा प्रकाश गच्च कोंदलेला दिवस उजाडलेला असूनही ते मला पाहू शकत नाहीत."

एरवीं मी नसे ऐसें। कांहीं वस्तुजात असे।
पाहें पां कवण जल रसें-। रहित असे।।७-१५९।।
पवन कवणांतैं न शिवेंचि। आकाश कें न समायेचि।
हे असो एक मीचि। विश्वीं असे।।१६०।।

"असे पहा की रसाशिवाय जळ असते का! तसेच मी ज्यात नाही, असे काहीतरी वस्तुमात्र आहे का! वारा ज्यास स्पर्शत नाही असा कोणीतरी आहे काय! आकाश व्याप्त करत नाही अशी एकतरी जागा आहे काय! हे अर्जुना! असाच मीसुद्धा सर्वत्र सर्वदूर या विश्वात एकला एकच समावलेलो आहे."

व्यामोहाचे स्वरूप

येथें भूतें जियें अतीतलीं। तियें मीचि होऊनि ठेलीं।
आणि वर्तत आहाति जेतुलीं। तीहीं मीचि।।७-१६१।।
भविष्यमानें जियेंहीं। तीहीं मजवेगलीं नाही।
हा बोलुचि एऱ्हवीं काईं। होये ना जायें।।१६२।।
दोराचियां सापासीं। डोंबा बडी ना गव्हालीं ऐसीं।
संख्या न कऱ्हवें कोण्हासीं। तेवीं भुतांसीं मिथ्यत्वें।।१६३।।

"एवं च काय! यापूर्वी या विश्वात जी जी भूते होऊन गेली, ती ती मीच झालो होतो; आणि वर्तमानकालीसुद्धा जी भूतमात्रे आहेत, ती समस्त म्हणजे मीच आहे. फार काय सांगू! भविष्यात जी जी भूते झालेली दिसतील, तीसुद्धा मीच असणार आहे. हे राहू दे! वास्तविक पाहता हे बोलणेसुद्धा तसे निरर्थकच आहे. कारण याठायी ना काही निर्माण होते, ना कसला विनाश होतो. रज्जू जेव्हा सर्पाचा आभास निर्माण करतो, तेव्हा तो सर्प काळा आहे, की गव्हाळ्या रंगाचा आहे की कोणत्या जातीचा आहे, हा निश्चय जसा करता येत नाही; त्याप्रमाणे माझ्या स्वरूपी आभासणारे हे प्राणिमात्र कसे आहेत, याचाही निश्चय कोणी करू शकत नाही. कारण हे सर्व प्राणी मिथ्याच होत."

ऐसा मी पांडुसुता। अनुस्यूत सदा असतां।
या संसारां जो भूतां। तो आनें बोलें।।७-१६४।।
आतां थोडी ऐसीं। गोठी सांघिजैल परियेसीं।
जैं अहंकार तनूंसीं। वालभ पडिलें।।१६५।।
तैं इच्छा हें कुमारी जाली। मग तैं कामाचियां तारुण्यां आली।
तेथ द्वेषेंसीं मांडिली। वऱ्हाडीक।।१६६।।
तेयां दोघांस्तव जन्मला। ऐसा द्वंद्वमोह जाला।
मग तो आजेयानें वाढविला। अहंकारें।।१६७।।

"हे पांडुसुता! माझी स्थिती अशी अखंड एकरस असूनही या भूतांचे अस्तित्व व त्यांच्यामागची संसाररचना यांची कारणपरंपरा वेगळीच आहे. ती थोडक्यात सांगतो. ऐक! जेव्हा अहंकार व देह यांची एकमेकांवर प्रीती जडली, तेव्हा त्यांना इच्छानामक एक कन्या झाली. तिला नंतर कामरूपी तारुण्यमद चढला. त्याला भुलून तिच्याशी *द्वेष* या वराने विवाह केला. त्या दोघांनी *द्वंद्वमोह* नामक पुत्रास जन्म दिला. सुखदु:खादींनी आलिंगिलेला व फलाशेच्या मोहक स्वप्नात बागडणारा हा *द्वंद्वमोह* आहे. याचे पालनपोषण, लालन-पालन, *अहंकार* या त्याच्या आजाने केले."

जो धृतिसीं सदा प्रतिकुलु। नियमांहीं नागवें सलु।
अशारसें दोंदिलु। जाला सांता।।७-१६८।।
असंतुष्टीचियां मदिरा। मत्त होवोनि धनुर्धरा।
विषयांचां वोवरां। विकृतिसीं असे।।१६९।।
तेणें भवशुद्धीचियां वाटे। विखुरलें विकल्पाचें कांटें।
मग चिरिलें अव्हांटे। अप्रवृत्तीचें।।१७०।।

"असा पुष्ट झालेला तो द्वंद्वमोह सात्त्विक धृतीस नेहमी विरोध करतो. आशारसाने माजून गेल्यामुळे तो यमनियमांचे बंधन जुमानत नाही. हे धनुर्धरा! असंतोषरूपी मदिरेने मत्त होऊन तो विषयरूपी आडमाळावर आपल्या विकाररूपी स्त्रीसह रममाण होऊन राहतो. अंत:करणातला भाव जागृत होऊ नये, त्याने आपल्या वाटेला येऊ नये, म्हणून याने त्याच्या मार्गावर विकल्परूपी काटेकुटे पसरवले आहेत. आणि आपल्या विषयरूपी गर्द झाडीत पाहिजे तेव्हा हवे तसे जाता यावे म्हणून याने अपप्रवृत्तींचे व निषिद्ध कर्माचे आडमार्ग निर्मिले आहेत."

तेणें भूतें भांबावलीं। म्हणौनि संसाराचियां आडवींमाजीं पडिलीं।
मग महादु:खाचां घेतली। दांडीवरी।।७-१७१।।

"देहाहंकारापासून इच्छाद्वेष आणि पुढे द्वंद्वमोह हे असे होतात. या द्वंद्वमोहाने -सुखदु:ख व फलाशेने सर्व प्राण्यांस मोहग्रस्त केले आहे. म्हणून भांबावलेले ते सर्व या संसाररूपी अरण्यात सापडले आहेत आणि कामक्रोधादी दरवडेखोरांनी हाणलेल्या जन्ममरणरूपी दांडक्यांनी बडवले जाऊन महादु:खास प्राप्त झले आहेत."

भक्तीचा आलेख::::

द्वंद्वराहित्य, ज्ञान व भक्ती यांची फलश्रुती

परंतु ज्यांची पापे नष्ट झालेली असतात, ते निश्चयपूर्वक भगवंतांना भजून मुक्त होतात. अशा सुकृताने प्राप्त झालेल्या बुद्धीने युक्त असणाऱ्या पुण्यवान मनुष्यांबद्दल श्रीकृष्ण म्हणतात:

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रता:।।७-२८।।

"ज्यांची पापे नष्ट झालेली आहेत, असे पुण्यकर्म करणारे लोक मात्र या द्वंद्वमोहापासून दूर राहून निष्ठापूर्वक व अचल श्रद्धेने युक्त होऊन मला भजतात."

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ते।
ते ब्रह्म तद्विदु: कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम्।।७-२९।।

"जरा व मरण यांच्या दुश्चक्रातून सुटण्यासाठी माझा आश्रय घेऊन असे लोक प्रयत्न करतात व तद्द्वारे त्यांस संपूर्णतया *ब्रह्माचे, अध्यात्माचे व कर्माचे ज्ञान* प्राप्त होते."

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदु:।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतस:।।७-३०।।

"या ज्ञानासह त्यांना *अधिभूत, अधिदैव* यांच्याबरोबर माझेसुद्धा ज्ञान प्राप्त होते. *अधिभूत, अधिदैव, कर्म व ब्रह्म* यांसह मला असे जाणणारे पुण्यात्मे त्यांच्या अंतकालीसुद्धा माझ्याशी युक्तचित्त राहून माझ्यात मिळून जातात."

भक्तीचा स्फुट आलेख

ऐसें विकल्पांचें वांयाणें। कांटें देखोनि सणाणें।
जैं मतिभ्रमाचें पासवणें। घेतीचिना।।७-१७२।।
उजूं एकनिष्ठतेचां पाउलीं। रगडूनि विकल्पाचां भालीं।
महापातकांची सांडिली। अटवीं जिहीं।।१७३।।
मग पुण्याचें धांवें घेतलें। आणि माझी जवलिक पातलें।
किंबहुना तें चुकलें। वाटवधेयां।।१७४।।

"अर्जुना! मिथ्या विकल्पांचे असे अणकुचीदार काटे वाटेत पसरलेले पाहिल्यावरसुद्धा बुद्धिभ्रंश न होता ज्यांनी माघार न घेता सत्वर आत्मनिष्ठारूप पावलांनी त्या विकल्परूप काट्यांची तीक्ष्ण टोके चेंगरून टाकत मोठमोठ्या पातकरूपी अरण्यांस मागे टाकले आहे; आणि पुण्यरूपी मार्गावरून नंतर धाव घेत माझी ज्यांनी जवळीक साधली आहे, ते भक्त या काम, क्रोध, मोहादी द्वंद्वरूपी वाटमाऱ्यांच्या तावडीतून नक्कीच सुटले असे समज."

एरवीं तऱ्हीं पार्था। जन्ममरणाची निमें कथा।
ऐसियां प्रयत्नातें आस्था। विये जेयांचि।।७-१७५।।
तेयां तो प्रयत्नुचि एकें वेलें। मग समग्रें परब्रह्में फलें।
जेयां पिकलेयां रसु गले। पूर्णतेचां।।१७६।।
ते वेलीं कृतकृत्यता जगु भरे। तेथ अध्यात्माचें नवलपण पुरें।
कर्माचें काम सरे। विरमे मन।।१७७।।
ऐसा अध्यात्मलाभु तेयां। होय गां धनंजया।
भांडवल जेयां। उद्यमीं मी।।१७८।।

"जन्ममरणरूपी संसारकथेतून मुक्त व्हावे अशा प्रयत्नांस ज्यांची श्रद्धा जन्म देते, त्यांच्यासाठी ते प्रयत्नच एकदम परब्रह्मरूपी फळात परिणत होतात. आणि ते परब्रह्मरूपी फळ पिकले की त्यातून पूर्णत्वाचा अवीट ब्रह्मरस गळू लागतो. तो रस एकदा चाखला की मनुष्य कृतकृत्य होतो आणि विश्वाचे सार त्यास भरून पावते. कर्माचे प्रयोजन त्यावेळी संपते. मनाचे मनपण नाहीसे होऊन जाते आणि अध्यात्म जगू लागून परब्रह्माशी एकरूपता प्राप्त होते. हे धनंजया! ज्याच्या उद्यमासाठी भांडवल म्हणून मीच असतो, त्याला असा हा अध्यात्मलाभ होतो."

तेयांतें साम्याचियें वाढी। ऐक्याची सांदे कुलवाडी।
तेथ भेदाचियां दुबलवाडीं। नेणिजे तो।।७-१७९।।
जिहीं साधिभुतां मातें। प्रतीतीचेनि हातें।
धरूनि अधिदैवतातें। शिवतलें गां।।१८०।।
जेयां जाणिवेचेनि बेगें। मीअधियज्ञु दृष्टी रिगे।
तैं तनुचेनि वियोगें। विरहें नव्हती।।१८१।।

"माझ्याठायी अद्वैतत्वाने नांदल्यामुळे त्याच्या ऐक्यरूपी शेतकी उदीमास भरभराट येते व द्वैतत्वाचे दारिद्र्य नाहीसे होते. अधिभूतासह मला ज्यांनी असे अद्वैतप्रतीतिरूप हातांनी जवळ करत, अधिदैवताची - म्हणजे जीवात्म्याची - अंतरीची खूण असणाऱ्या अधियज्ञास - म्हणजे मला, आपल्या अंतर्ज्ञानरूपी अनुभूतीच्या दृष्टीने आकळले, त्यांना देह सोडतेवेळी दुःख होत नाही."

एरवीं आयुष्याचें सूत्र विघडतां। भूतांची उमटे खडाडतां।
काय मरतयांही चित्तां। युगांतु नोहे।।७-१८२।।
परि नेणों कैसें पैं गां। जैं जडौनि गेलें माझियां आंगां।
तैं प्रयाणींचियां लगबगां। न सांडितीचि मातें।।१८३।।
एऱ्हवीं तऱ्हीं जाण। ऐसें जैं निपुण।
तैंचि अंतःकरण-। युक्त योगी।।१८४।।

"तसे पाहिले तर आयुष्याचा तंतू क्षीण होतांना प्राण्यांच्या जीवाची जी उलघाल होते, ती पाहणाऱ्या इतरांच्या चित्तालासुद्धा युगांत झाल्यासारखे वाटतेच की नाही! पण कसे कोण जाणे! माझ्याठायी जे पुरुष असे एकरूपतेने जडून गेलेले असतात, ते प्रयाणकालाच्या गडबडीत मला कसे ते विसरत नाहीत. अशा पुरुषांना माझ्याशी अंतःकरणापासून युक्त असणारे योगी म्हणून ओळखावे."

"चतुर्विधा भजन्ते मां ...।।७-१६।।" पासून प्रारंभ करून ***"..प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः।।७-३०।।"*** पर्यंत अशा प्रकारे भगवंत आपल्या भक्तांचे अंतरंग उकलून दाखवतांना दिसतात. त्याचप्रमाणे आपल्याव्यतिरिक्त इतरत्र श्रद्धा ठेवून भक्ती करणाऱ्यांच्या मनोव्यापारांचासुद्धा परामर्ष घेऊन त्यांनी सद्भक्तांस त्यातले दोष स्पष्ट करून दाखवलेले दिसतात. अष्टधा विभागांसहितच्या प्रकृतीचे विवेचन करून आपल्या काही विभूतींचा परिचय करून देत आपले विश्वात्म स्वरूप प्रकट करणारे भगवंत आपल्या भक्तीचा सोपान रचत असा सातव्या अध्यायाचा शेवट करतात.

"कृष्णद्रुमाची वचनफळे"

हे सर्व सश्रद्ध होऊन श्रवण करणाऱ्या अर्जुनाची मोहरलेली चित्तवृत्ती अवलोकन करणारे ज्ञानदेव सुखावून जातात. त्याच्या त्या चित्ताचे पूर्ण उमललेले स्वरूप आपल्याला पण आकळावे म्हणून सांगतांना ते म्हणतातः

तंव इयें शब्दकुपीकेतलीं। नोडवेंचि अवधानाचीं अंजुली।
जैं नांवेक अर्जुनु तये वेळीं। मागांचि होता।।७-१८५।।
जेथ तद्वाक्यब्रह्मफलें। जियें नानार्थरसेंरसालें।
बहकातें आहाति परिमलें। भावाचेनि।।१८६।।

"श्रीकृष्णांची आशयघन शब्दांची ती कुपी अशी रिक्त होत होती, तरी तिच्याखाली अर्जुनाची अवधानरूपी ओंजळ धरली गेली नाही. कारण अर्जुनाचे चित्त त्यावेळी अनुभूतीच्या परमरसात बुडून गेले होते. श्रीकृष्णांचे ते बोल म्हणजे जणू ***"तत् त्वम असि"*** असे ब्रह्माचे प्रतिपादन करणारी नाना प्रकारच्या परमार्थरसांनी भरलेली व भावाच्या परिमळाने दरवळणारी सुग्रास फळेच होती."

सहजकृपामंदानिलें। कृष्णद्रुमाची वचनफलें।
अर्जुनश्रवणाचियें खोलें। अवचित पडिलीं।।७-१८७।।
तियें प्रमेयाचीच हो कां वलिलीं।
कीं ब्रह्मरसाचियां सागरीं चुबकलिलीं।
मग तैसींचि कां घोलिलीं। परमानंदें।।१८८।।
तेणें बरवेंपण निर्मलें। अर्जुना उन्मेखाचें डोहलें।
घेताति गलालें। विस्मयामृताचें।।१८९।।

"भगवंताच्या कृपेच्या सुखद वाऱ्याने त्या कृष्णरूपी वृक्षाची ती वचनामृतरूपी पक्व फळे सहजच अलगदपणे पडली, ती नेमकी अर्जुनाच्या श्रवणरूपी झोळीतच! ती श्रीकृष्णोक्तिरूप फळे तत्त्वसिद्धांतांचीच जणू घडलेली होती. ब्रह्मरसाच्या सागरात बुडवून परमानंदात घोळलेल्या त्या फळांआतल्या त्या विशुद्ध चोख अशा परमामृताचे पान करतांना विस्मित झालेल्या अर्जुनास ज्ञानाचे डोहाळे लागले तर त्यात नवल ते काय!"

तियां सुखसंपत्ति जोडिलियां। मग स्वर्गा वाती वांकुलियां।
हृदयाचां जीवीं गुतकुलियां। होत आहाति।।७-१९०।।
ऐसें वरचिलीचि बरवा। सुख जावों लागलें फांवा।
तंव रसास्वादाचियां हांवां। लाहो केला।।१९१।।
झाकरी अनुमानाचेनि करतलें। घेऊनि तियें वाक्यफलें।
प्रतीतिमुखीं एक वेलें। घालूं पाहिली।।१९२।।
तंव विचाराचियां रसना न दाटती।
परि हेतूचांहि दशनीं न फुटती।
ऐसें जाणूनि सुभद्रापती। तो चुंबिचिना।।१९३।।

"त्या अवीट गोडीच्या अमृताचे घुटके घेत बसलेल्या अर्जुनाने मग त्या सुखाच्या प्राप्तीने स्वर्गीच्या देवांना वेडावून दाखविले, तर त्यात काय आश्चर्य! ते श्रवणसुख अनुभूतिरूपे उपभोगतांना त्याच्या जीवाला अंतःकरणाचे उमाळे येऊन गुदगुल्या झाल्या. त्या फळांच्या बाह्य स्वरूपाने आकृष्ट होऊन अर्जुनाने त्यांचा रसास्वाद हावरटपणे घेण्यास सुरुवात केली. सुखाच्या अभिलाषेने अनुमानरूपी तळहातावर ती वाक्यफळे घेऊन एकदम आपल्या प्रतीतिरूप मुखात तो ती घालू लागल. पण ती फळे विचाररूपी मुखात मावेनात! आणि तर्करूपी दातांनी ती फळे फुटेनात! हे पाहिल्यावर मात्र त्या सुभद्रानाथाने त्यांचा मुखाने आस्वाद घेण्याचा नाद सोडला."

अंतरंगानुभूतीतून बाहेर पडून अनुमान - प्रमाण -तर्क यांच्या बहिरंग प्रांतात प्रवेशतांना अर्जुनाची अशी द्विधा मन:स्थिती होणे स्वाभाविकच आहे. समाधि अवस्थेतून व्युत्थान दशेत येत असतांना होणाऱ्या योगिजनांच्या स्थित्यंतरावस्थेचे निर्देशन येथे अभिप्रेत आहे. जे सत्य अनुभूतीनेच उमगते, ते तर्क-अनुमान-प्रमाणादींनी तितके निखळपणे जाणणे किती अवघड असते, याचा चतुर विवेचक उल्लेख यानिमित्ताने ज्ञानदेवांनी केला असल्याचे आपणांस जाणवते.

"तंव चमत्कारें। अवधान ठाकिलें।।"

ते पुढे त्या अवस्थेतील अर्जुनाचे चित्र साकार करतांना म्हणतात:

मग चमत्कारिला म्हणे। इयें जलींची मां तारांगणें।
कैसा झकविलो असलगपणें। अक्षरांचेनि।।७-१९४।।
इयें पदें न होति फुडियां। गगनाचियां घडियां।
येथ आमुची मति बुडिया। थांव न निघे।।१९५।।
वांचूनि जाणावयाचि कें गोठी। ऐसें जीवीं कल्पूनि किरीटी।
तियें पुनरपि केली दृष्टी। यादवेंद्रा।।१९६।।

व्युत्थानदशेचे केविलवाणेपण

अनुमानाने श्रीहरीच्या उक्तीचा आस्वाद घेता न आल्याने आश्चर्यचकित झालेला अर्जुन मग त्या सुरम्य भावस्थित्यंतरावस्थेत स्वगत म्हणू लागला की, "श्रीहरीमुखीच्या त्या सुखद उघड्या बोलांनी मोहून जाऊन त्यांना मी तर्काने जाणून घेण्याचा भाबडा प्रयत्न केला तरी कसा! त्या श्रीकृष्णाची ही वाक्ये म्हणजे जणू जळात पडलेले तारांगणाचे प्रतिबिंब! ते हाती थोडेच गवसणार! हे शब्द तर जशा अवकाशाच्या घड्याच आहेत! आपल्या बुद्धीने त्या उलगडण्याचा आटोकाट प्रयत्न जरी केला तरी त्यांचा थांगपत्ता लागणार नाही. मग त्यांचा अर्थ आकळून घेता येणे तर दूरच राहिले!"

व्युत्थित चित्ताचे हे केविलवाणेपण ध्यानी येऊन तो त्या यादवेंद्राच्या मुखकमलाकडे चातकाप्रमाणे ज्ञानार्ततेने पाहू लागला.

मग विनविलें सुभटें। हां हो जी यें एकवाटें।
सातहीं पदें अनुच्छिष्टें। नवलें आहाति।।७-१९७।।
एऱ्हवीं अवधानाचेनि वाहिलेपणें। नाना प्रमेयांचें उगाणें।
काय श्रवणाचेनि आंगणें। बोलों लाहाति।।१९८।।

त्या सुयोद्ध्या धनुर्धर पार्थाने मग भगवंतास विनवणी केली की, "आपण आताच अकस्मात उल्लेखलेली व आम्ही पूर्वी कधीही न ऐकलेली ही जी सात एकसंध पदे -*ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ व प्रयाणकाली योगिजनांनी तुला स्मरणे*- माझ्या कानावर एकदम पडली, त्यांचे नवल वाटून मी भारावून गेलो आहे. एरवी अवधान देऊन नाना प्रकारचे तत्त्वसिद्धांत दक्षतापूर्वक श्रवण केले असता त्यांचा मतितार्थ समजणे अवघड नसते."

परि तैसें हे नोहेंचि देवा। देखिला अक्षरांचा मेलावा।
आणि विस्मयाचियां जीवा। विस्मो जाला।।७-१९९।।
कानाचेनि गवाक्षद्वारें। बोलाचें रश्मी अभ्यंतरें।
पाहेना तंव चमत्कारें। अवधान ठाकिलें।।२००।।
तेविंची अर्था चाड मज आहे। तैं सांगतांही वेळु न साहे।
म्हणौनि निरूपण लवलाहें। कीजो देवा।।२०१।।

"परंतु ही सात पदे - हा त्यांचा मेळावा श्रवण करतांना मात्र तसे झाले नाही. पण ही पदे मात्र माझ्या अंतरींच्या अंतरापर्यंत भिडून गेली. कानाच्या गवाक्षद्वारातून या पदोल्लेखांची किरणे माझ्या अंतरात प्रवेशतात, न प्रवेशतात, तोच माझे अवधान तटस्थ जाले. माझे लक्ष त्या बोलांनी हरपून टाकले. अशा या नाविन्यपूर्ण अंतरंगलक्ष्यी सातही पदांचा अर्थ कळावा अशी आस मला लागून गेली आहे. तो अर्थ सांगण्यासाठी होणारा थोडाही विलंब मला सहन होत नाही. म्हणून हे दयाघना! त्यांचे पुढील निरूपण सत्वर करा."

"बोलु निमें तैं बोलणें ऐका। ज्ञानदेओ म्हणे।।"

अर्जुनाच्या या भावव्याकुल जिज्ञासेचे व त्याच्या श्रीकृष्णांवर झालेल्या परिणामांचे वर्णन करत करत या सप्तमाध्यायाचा समारोप करतांना ज्ञानदेवांची वाणी आपणांस हे सर्व समर्पकरीत्या सांगण्याचे पुनश्च आश्वासन देते, ती अशी:

ऐसा मागील पडताला घेऊनि। पुढां अभिप्रावो दृष्टी सूनि।
तेविंचि माझीं शिरऊनि। आर्त्ती आपुलीं।।७-२०२।।
कैसीं पुसती पाहें पां जाणीव। भिडेचि तऱ्हीं लंघो नेदी शींव।
एऱ्हवीं कृष्णहृदयासि खेंव। देवों सरला।।२०३।।
<u>अगा गुरुतैं जैं पुसावें। तैं एणें मानें सावध होआवें।</u>
हे एकचि जाणें आघवें। सव्यसाचि।।२०४।।

"आतापावेतो श्रीकृष्णांनी जे निरूपिले होते, त्याचा संदर्भ अंतरी वागवत आणि त्यांच्या अभिप्रायावर लक्ष देत देत, अर्जुनाने आपली जिज्ञासेची आर्तता आपल्या बोलांत ओतून त्यांना ही अशी विनवणी केली. जरी श्रीकृष्णांच्या अंतरीचा जिव्हाळा त्याला कधीचाच प्राप्त झाला होता, तरी त्याची प्रश्न करण्याची अदब कशी आहे ते पाहा! श्रीकृष्णांचा जरी तो सखा होता, तरी सध्याच्या गुरुशिष्यत्वाच्या नात्याची भीड त्याला ओलांडवत नाही. खरे तर गुरूंना जे काही विचारून ज्ञान संपादन करावयाचे असते, त्यावेळी असेच अवधान ठेवले पाहिजे. असे अवधान जाणिवपूर्वक राखणारा जर कोणी एक असेल, तर तो सव्यसाची पार्थच!"

आतां तेयाचें तैं प्रश्नु करणें। वरी सर्वज्ञा श्रीहरीचें बोलणें।
हे संजयो आवडलेपणें। सांगेल कैसें।।७-२०५।।
तियें अवधान देयावें गोठी। बोलिजैल नीट मऱ्हाठी।
जैसीं कानाचिये आधीं दृष्टी। उपेगा जाये।।२०६।।

"तो आता जे प्रश्न विचारील आणि तो सर्वज्ञ श्रीहरी त्याला काय सांगतो, ते सर्व हे ऐकणारा संजय आपल्याला चोखाळपणे सांगणार आहे. श्रोते हो! हे सगळे मी तुम्हाला गोमट्या मराठी बोलांनी ऐकवणार आहे. तरी तिकडे नीट अवधान ठेवा. एखादे दृश्य नीट

आकलन करून घेण्यासाठी शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध अवश्य असले, तरी प्रथम रूप पाहिले जाते व मग दृष्टीने ते नीट टिपले की कर्णेंद्रियादी इतर इंद्रियांचा उपयोग करून घ्यावा कागतो. तसे माझे बोल उमगून घेण्यासाठी पहिला मान तुमच्या अवधानाला आहे.''

बुद्धीचियां जिभा। बोलाचां न चाखतां गाभा।
आखरांचियां भांबा। इंद्रियें जिती।।७-२०७।।
पाहां पां मालतीचें कले। घ्राणासीं कीर वाटलें परिमलें।
परि वरिचिली बरवां काई डोलें। सुखिये न होती।।२०८।।
तैसें देशियेचियां हवावा। इंद्रियें करिती राणिवा।
मग प्रमेयाचियां गांवां। लेसा जाईजे।।२०९।।
ऐसेनि नागरपणें। बोलु निमें तैं बोलणें।
ऐका ज्ञानदेओ म्हणे। निवृत्तीचा।।२१०।।

''तुमच्या बुद्धिरूप जिव्हेला त्या बोलांच्या गाभ्याचा आस्वाद चाखायला मिळण्यापूर्वीच त्यांच्या सौंदर्याने इतर सगळ्या इंद्रियांना वेड लागेल! मालतीच्या कळ्यांचा सुगंध घ्राणेंद्रियास किती उल्हसित करतो पहा! पण त्याचवेळी त्यांच्या बाह्यरूपाने नेत्रसुद्धा सुखावतातच की नाही! या देशी अशा मराठी बोलांच्या रमणीयतेमुळे तृप्त झालेली इंद्रिये आह्लादून जातील आणि मग सहजच अवचितपणे आपल्याला त्या सिद्धांतशिरोमणीच्या स्थानी आयतेच पोहोचता येईल. जेथे शब्द मौनावतात, असे ते सुंदर बोल ऐका, असे हा निवृत्तिनाथांचा शिष्य ज्ञानदेव तुम्हाला विनवतो आहे.''

समारोप

आता आपण पोहोचलो आहोत *ईश्वरप्रणिधान आणि भक्तीच्या अंतरंगात* ! त्याचे दर्शन नवव्या अध्यायात आपण घेणार आहोत पुढील **उन्मेष क्र ३५ - राजविद्या - राजगुह्य** यातून. तर आपली पाऊले आता वळवू या भक्तिचंद्रभागेकाठीच्या त्या वाळवंटाकडे! आणि नाचू या तिथे विठूनामाच्या गजरात, दिंड्या-पताकांच्या भारात अन् टाळमृदुंगांच्या बोलात! ज्ञानदेवांच्या संगतीने अन संतवारकऱ्यांच्या समवेत हरीगजरात धुंद होऊन!!!

::उन्मेष ३५::
::राजविद्या-राजगुह्य::

उन्मेष ३५:
गीताः
९:१-१५
ज्ञानेश्वरी::
९:१-१७१,१८८-२६४
१०:३०-३२
पा.यो.सू.:
१:२,१७-२९

::उन्मेष ३५::

::राजविद्या-राजगुह्य::

पतञ्जलींचे विचार::::

भक्तीचा सोहोळा

ईश्वरप्रणिधान वा भक्तीचा श्रीगणेशा करणाऱ्या *सप्तम* अध्यायाची ज्ञानदेवांच्या सुरंगी नादघन सुरम्य शब्दांनी कशी परिसमाप्ती होते, ते आपण नुकतेच अनुभवले. पण हा ईश्वरप्रणिधानाचा विषय, ज्याचे आमुख आपणांस *सहाव्या* अध्यायी अवलोकण्यास मिळते, तो अप्रतिहतपणे पुढल्या म्हणजे *८,९,१०,११ व १२* या अध्यायात पुढेपुढे सरकतच जातो. हा समस्त भाग अभ्यासणे जिज्ञासूंस क्रमप्राप्तच आहे आणि याइतका सुंदर भाग साधकांस दुसरीकडे कोठे सापडणार! या सर्वांचे सार्थ समालोचन करण्यास सिद्ध होण्यासाठी आपण प्रथम पतञ्जलिप्रणीत योगसूत्रांद्वारे *ईश्वरप्रणिधान* याबाबत काही संकल्पनांचा आढावा घेणे उचित ठरेल.

पतञ्जलिकृत ईश्वरप्रणिधानाचे दर्शन::::

(अ) संप्रज्ञात समाधि

समाधिपादात पतञ्जलींनी "**वितर्कविचारानन्दास्मितारूपानुगमात् संप्रज्ञातः।।१-१७।।**" अशा *संप्रज्ञात* समाधीच्या ***१) सवितर्क, २) सविचार, ३) सानंद व ४) सास्मित*** अशा चार भूमिका सांगितल्या आहेत. स्थूल आलंबनाने *सवितर्क* समाधि होतो. सूक्ष्म आलंबन प्रयोगाने *सविचार* समाधि साधतो. सत्त्वगुणाच्या सुखद आत्मावलंबनाने *सानंद* समाधि सिद्ध होतो आणि अहंच्या - मी असण्याच्या - आलंबनाने *सास्मित* समाधिप्राप्ती होते. हे सर्व समाधि *संप्रज्ञात* आहेत.

चित्ताच्या आलंबनाचे हे जे विषय असतात, ते एकापेक्षा एक सूक्ष्म व सूक्ष्मतर असल्याने हे समाधि उत्तरोत्तर वरच्या श्रेणीचे समजले जातात. हे समाधि अभ्यासाने दृढ झाले की पुढील योगाभ्यास अनायासे होऊ लागतो.

(ब) असंप्रज्ञात समाधि

यानंतरच्या ***"विरामप्रत्ययाभ्यासपूर्वः संस्कारशेषोऽन्यः।।१-१८।।"*** या सूत्रांद्वारे *असंप्रज्ञात* समाधीचा निर्देश केलेला आहे. *संप्रज्ञात* समाधीच्या *सास्मित* या अवस्थेत चित्तावरील *अस्मि* म्हणजे "मी आहे" या व्यतिरिक्तच्या इतर सर्व संस्कारांचा लोप झालेला असतो. ***"योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।।"*** नुसार चित्ताच्या सर्व वृत्तींचा - सर्व संस्कारांचा निःशेष झाला की योग सिद्ध होतो.

चित्तवृत्तींचा उपरम वा विराम याचा पुनःपुनः प्रयत्नपूर्वक अभ्यासपूर्वक प्रत्यय घेणे हे चित्तवृत्तींचे संस्कार निःशेष नाहीसे करण्यास उपकारक ठरते व त्यामुळे अंतिमतः *असंप्रज्ञात समाधि* प्राप्त होतो. या समाधीत चित्त *केवल* स्वरूपात उरते.

सबीज समाध्यवस्था

या *संप्रज्ञात* समाधीचे पूर्वश्रेणीचे दोन प्रभाग संभवतात. ***"भवप्रत्ययो विदेहप्रकृतिलयानाम्।।१-१९।।"*** १) देहविषयक अहंकार नष्ट झालेली विदेहावस्था व २) चित्ताचा प्रकृतीत लय होणे ही अवस्था. महत्तत्त्वाच्या आलंबनाने साधकास दिव्यत्व देणारी *विदेहावस्था* प्राप्त होते, तर प्रकृतीत चित्त विलीन होणे ही दुसरी अवस्था होय. या दोन्ही अवस्था त्यातून व्युत्थान होत असल्याने *भवप्रत्यय* म्हणजे *सबीज* समाध्यवस्था होत. व्युत्थित दशेत पुनश्च संसाराचे दर्शन घडत असल्याने चित्तास खरा आत्मसाक्षात्कार प्राप्त झालेला नसतो. श्रद्धापूर्वक, निष्ठेने त्या असंप्रज्ञात समाधीच्या खऱ्या अवस्थेसाठी अभ्यास व प्रयत्न करावे लागतात. या सर्व अभ्यासायोगे जी *प्रज्ञा* प्राप्त होते, तिच्याद्वारे साधकास हा श्रेष्ठतम *असंप्रज्ञात समाधि* प्राप्त होतो. म्हणून पतञ्जलींनी म्हटले आहे ते असेः ***"श्रद्धावीर्यस्मृतिप्रज्ञापूर्वक इतरेषाम्।।१-२०।।"***

अधिकार व संवेग

हा समाधि कैवल्यप्राप्तीच्या इच्छेच्या उत्कटतेनुसार - संवेगानुसार शीघ्रतेने प्राप्त होतो. ***"तीव्रसंवेगानामासन्नः।।१-२१।।"*** व ***"मृदुमध्याधिमात्रत्वात्ततोऽपि विशेषः।।१-२२।।"*** या सूत्रांद्वारे स्पष्ट केले आहे की चित्तातील तीव्रातितीव्र संवेगानुसार मुमुक्षूस गुरूच्या केवळ दर्शन-स्पर्शन-संभाषणानेसुद्धा असा समाधि साध्य होऊ शकतो. *क्रमयोग* सोपानाचे अठराव्या अध्यायी वर्णन करतांना ज्ञानेशांनी योग्यांचे असे दोन विभाग केलेले आहेत. त्यातील एकास योगाचे फल त्वरित प्राप्त होते, तर इतरांस अभ्यास करून - कित्येकदा तर जन्मोजन्मी करत राहूनच - योगफल प्राप्त होते.

ईश्वरप्रणिधानाचे अंतरंगरहस्य

"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।" - ईश्वरप्रणिधानानेसुद्धा असंप्रज्ञातसमाधि प्राप्त होतो. चित्तास *ईश्वर* हा आलंबनविषय असल्यास केवळ याद्वारेसुद्धा समाधिसिद्धी होते. कारण ईश्वराहून सूक्ष्म विषय दुसरा कोणता असणार! या ईश्वराचे स्वरूप मात्र पतञ्जली म्हणतात, ते कसे आहे, ते पाहाः

१) ***"क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः।।१-२४।।"*** - अविद्या, अस्मिता, इ. *पंचक्लेश*; चांगले, वाईट व मिश्र असे तीन प्रकारचे *कर्म*; जाति, आयु व भोग हा त्या कर्मांचा *विपाक* वा फल; तसेच या कर्मफलास कारण असणाऱ्या चित्तातील प्रसुप्त

वासना- इच्छा - कामना - फलेच्छा असा *चित्ताशय* : या सर्वांशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसणारा *पुरुषविशेष* वा म्हणायचेच झाले तर गीतेतील *पुरुषोत्तम* म्हणजे हा पतञ्जलींचा *ईश्वर* होय.

२) ***"तत्र निरतिशयं सार्वज्ञबीजम्।।१-२५।।"*** - या ईश्वराठायी पराकोटीची *सार्वज्ञता* असते. सृष्ट्योत्पत्ति होण्यापूर्वी ही *सार्वज्ञता* बीजरूपाने त्याच्या ठिकाणी असते.सृष्टी ही त्या बीजाची परिणती होय. ईश्वराच्या शक्तीने - त्या सार्वज्ञतेने ही सृष्टी अवतरते.

३) ***"स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्।।१-२६।।"*** - कालाची मर्यादा ज्याला नसते असा हा *ईश्वर* - *प्रजापति* - *हिरण्यगर्भ* - इ.चा - देवांच्याही देवांचा गुरु होय. समाधिलाभ व्हावा म्हणून इतर देवांची भक्ती पुरेशी पडत नाही. या देवगुरू ईश्वराच्याच प्रणिधानाने *असंप्रज्ञात समाधि* सिद्ध होतो. गीतेतसुद्धा भगवंतांनी त्यांची स्वत:चीच भक्ती - अर्चना करण्यास सुचवले आहे ते याचसाठी. त्यांची जे भक्ती करतात, ते त्यांच्याप्रत पोहोचतात, असे तेथे म्हटले आहे.

४) अशा या ईश्वराची अर्चना, त्याचे स्मरण, त्याची भक्ती करण्यासाठी त्याचे *ब्रह्मनाम* सांगतांना पतञ्जली म्हणतात:***"तस्य वाचक: प्रणव:।।१-२७।।."*** *प्रणव* म्हणजे *ॐकार* त्या ईश्वराचा वाचक आहे. त्यातील वाच्य-वाचक संबंध मनुष्यनिर्मित नसून सनातन आहे.

ईश्वरप्रणिधानाचा मार्ग म्हणजेच भक्ती

५) अशा ॐकाराच्या नित्य जपाने, प्रणवाच्या ध्यानाने - आपण त्याच्याशी अभिन्न आहोत या भावनेने ध्यान करावे - ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।".*** हाच ईश्वरप्रणिधानाचा *अभ्यासयोग* वा *ध्यानयोग* होय. असे केल्याने संतुष्ट होऊन *असंप्रज्ञात* समाधीचे पसायदान तो ईश्वर साधकाच्या ओंजळीत रित्त करतो. समाधीसाठी लागणारी *प्रज्ञा* निर्माण होते आणि समाधिप्राप्तीतील सगळे अडथळे वा अंतराय विनासायास दूर होतात, ते त्या ईश्वराच्या कृपेमुळे.

म्हणून पतञ्जली म्हणतात:***"तत: प्रत्यक्चेतना-धिगमोऽप्यन्तरायाभावश्च।।१-२९।।"*** - ईश्वरप्रणिधानाद्वारे *प्रत्यक् चेतन* म्हणजे बुद्धिसाक्षी अशा पुरुषोत्तमाची साक्षात्कारी अनुभूती प्राप्त होते.

असा हा पातञ्जलयोगसूत्रांनी प्रतिपादन केलेला मार्ग आहे. ईश्वरप्रणिधानाची ही सर्व लक्षणे, या साधनेचा बृहत आयाम तपशिलासह गीता वाचतांना उमगतो आणि ज्ञानदेव तर त्या सर्वांवर आपल्या सर्वंकष प्रज्ञेद्वारे मोठे विशाल असे भक्तिमंदिरच उभारतात. त्या उत्तुंग भक्तिसोपानाचे हे पायींचे चिरे पातञ्जलसूत्ररूपे आपण ज्ञात करून घेतले. आता पायरीपायरीने जाऊ या त्या भक्तितत्त्वाच्या गाभाऱ्यात!!

नवमाध्याय::::

नवमाध्यायी गीतेचा अभिप्राय आहे

भक्तिमंदिरात प्रवेश करू इच्छिणाऱ्या सर्वांना म्हणून यानंतर वळावे लागते, ते ज्ञानदेवांनी ज्याची खूप महती गायली आहे, त्या ***राजविद्या - राजगुह्य*** सांगणाऱ्या *नवम* अध्यायाकडे! या अध्यायाची ज्ञानेशांना इतकी आवड होती की संजीवन समाधि घेतांना हाच अध्याय त्यांच्यापुढे उघडून ठेवला होता! या अध्यायाविषयी ज्ञानदेवांनी जे माहात्म्य *दहाव्या* अध्यायी सांगितले आहे, ते आपण पूर्वीच पाहिले होते *(उन्मेष:२::आत्मरूपा सद्गुरूपृ.क्र. ५०-५१).* त्यांनी स्पष्टच म्हटले आहे की:

आतां शब्दब्रह्मीं असंख्याकें। जेतुला काईं अभिप्राय पिकें।
तेतुला महाभारतें एकें। लक्षें जोडे।।१०-३०।।
आतां अठरा पर्वीं भारतीं। तैं लाभे कृष्णार्जुनवाचोक्तीं।
आणि जो अभिप्राय सातें शतीं। तो एकलाच नवमीं।।३१।।
म्हणौनि नवमीचियां अभिप्राया। सहसा मुद्रा लावावयां।
बिहाला मी वायां। गर्व कां करूं।।३२।।

असंख्य अशा वेदराशीचा अभिप्राय महाभारताच्या एक लक्ष श्लोकांत आहे. अठरा पर्वांच्या त्या श्लोकसागराचा अभिप्राय श्रीकृष्णार्जुनांच्या गीतासंवादात येतो. आणि त्या सप्तशतश्लोकी गीतेचा अभिप्राय निव्वळ नववा अध्याय व्यक्तवतो. ***शब्दब्रह्माचे सारभूत असे रहस्य*** या अध्यायात असल्याने, ते व्यक्तवणे अतिशय बिकट असल्याने ज्ञानदेवांसारखा प्रातिभ दार्शनिक प्रज्ञावंतसुद्धा त्या कामाला हात घालण्यास बिचकतो आहे. परंतु गुरुकृपेने त्यांनी ते रहस्य व्यक्तवले असले, तरी त्याबाबतीत आपणास कितपत यश आले आहे, याविषयी ते साशंक आहेत, अशी स्पष्ट उक्ती येथे आहे.

"सर्वज्ञ भवादृश श्रोते"

परब्रह्माच्या पाठीवर आरूढ होण्याचे एकमेव भाग्य ज्या योगमार्गाने लाभते, त्या मार्गाचे रहस्य उकलून दाखवण्यास सुरुवात करण्यासाठी ज्ञानदेव श्रोत्यांना लडिवाळपणे विनवत या नवम अध्यायाचे निरूपण करू लागतात, ते दृश्य शब्दचित्रांकित करू या:

तऱ्हीं अवधान एकेंहेलें दीजे। मग सर्वसुखासीं पात्र होईजे।
हे प्रतिज्ञोत्तर माझें। उघड ऐका।।९-१।।
परि प्रौढी बोलीं न बोलें हो जी। तुम्हां सर्वज्ञांचां समाजीं।
देयावें अवधान हे माझी। विनवणी सलगीची।।२।।
कां जैं ललेयांचें लले सरती। मनोरथांचें मनोरे पुरती।
जऱ्हीं माहेरें श्रीमंत होती। तुम्हां ऐसीं।।३।।

"हे सज्जनवृंदांनो! मी काय म्हणतो, ते जरा नीट अवधान देऊन श्रवण करा. त्यायोगे तुम्हाला परब्रह्मसुख प्राप्त होईल, हे मी तुम्हाला प्रतिज्ञापूर्वक सांगतो आहे. पण हे माझे बोलणे गर्विष्ठपणाचे आहे, असे मात्र समजू नका हो! तुम्ही सर्वज्ञ मंडळी येथे जमला आहात. त्यांच्यापुढे माझ्या आख्यानाची प्रौढी ती काय असणार! परंतु तुम्ही माझी आईबापे आहात. म्हणूनच केवळ असे हे लाडालाडाने मी म्हटले. आणि तुम्हासारखे समृद्ध माहेरघर मला मिळाले असल्याने मी कोणता हट्ट घेऊ नये की जो पुरवला जाऊ शकणार नाही!

मनोरथांचे असे कोणते मनोरे मी रचू नयेत की तुम्ही ते पुरवण्यास असमर्थ असाल, सांगा बरे!"

तुमचेयां दिठिवेयाचियें वोलें। सासिन्नलें प्रसन्नतेचें मलें।
तैं साऊली देखौनि लोलें। श्रांतु जी मी।।९-४।।
प्रभु तुम्हीं सुखामृताचें डोहों।
म्हणौनि आम्ही आपुलियां स्वेच्छा बोलावो लाहों।
एथहिं जऱ्हीं सलगी करूं बिहों। तऱ्हीं निवों कैं पां।।५।।

"तुमच्या स्नेहार्द्र दृष्टीच्या वर्षावाने प्रसन्नतारूपी मळे तरतरून व रसरशीत झाले आहेत. घनदाट पर्णांनी बहरलेल्या त्या बनातील मायेच्या सावलीत खेळूनबागडून श्रांत झालेले माझे बालमन निवांत पहुडले आहे. महाराजा! आपण तर सुखामृताने पुरेपूर भरलेले डोहच आहात! त्यात बुडी देण्यास भीती काय अन कसली! असे कृपाळू तुम्ही असतांना जर मी लडिवाळपणे बोलण्यास भ्यालो; मुक्तछंदाने वेडेवाकुडे बोल बोलण्यास जर लाजलो, तर मातेच्या कुशीतल्या बालकास मिळणारा विसावा मला कसा बरे लाभेल!"

ना तऱ्हीं बालक बोबड्या बोलीं। कां वांकुडां विचुकां पाऊलीं।
तैं चोज करूनि माऊली। रिझे जेवीं।।९-६।।
तेवीं तुम्हां संतांचा पढियावो। कैसेनि तऱ्हीं आम्हांवरी हो।
या बहुवा आलुकियां जी आहों। सलगी करितु।।७।।
वांचूनि माझिये बोलतियें योग्यते। सर्वज्ञ भावादृश श्रोते।
काय धडेयावरी सारस्वतें। पढो सिकीजे।।८।।

"आणि आपल्या बोबड्या लडिवाळ बोलांनी अन लटलटत टाकलेल्या पावलांनी, दुडदुडणाऱ्या चालीने मातेला रिझवून बाळ जसे तिच्याकडून कौतुक करवून घेते, त्याप्रमाणे तुम्हा संतसज्जनांकडून आपले कसेही करून कौतुक व्हावे, या अतीव इच्छेने मी *"तुम्ही माझ्या बोलांकडे अवधान देऊन सर्वसुखास पात्र व्हा"* अशी सलगीची भाषा करतो आहे. वास्तविक पाहता तुम्हा सर्वज्ञ भावपूर्ण श्रोत्यांपुढे माझ्या बोलांची खरी योग्यता कायआहे! पण अहो! सरस्वतीच्या बालकास काय कित्ता गिरवून अक्षरओळख करून घ्यावी लागते काय! अन मी तर तुमचेच बालक ना! मला काय उणे असणार!"

अवधारां आवडे तेसणा धुंधुरु।
परि महातेजीं न मिरवे काय करूं।
अमृताचियां ताटीं वोगरु। ऐसीं रससोय कैंची।।९-९।।
अहो हिमकरासीं विंझणें। कीं नादापुढें आइकवणें।
लेणियासि लेणें। हे कंहीं आथी।।१०।।

"पण ऐका! जरी काजवा केवढाही टिमटिमाट करत असला, तरी सूर्यापुढे त्याची काय ती मिरास असणार! अमृतच जर भोजनास आले, तर त्याच्या ताटात वाढावी अशी पक्वान्ने कोठून बरे आणावीत! अहो हिमवत शीतल असणाऱ्या त्या चंद्रम्यास कोणत्या पंख्याने विंझणवारा घालावा! प्रत्यक्ष नादब्रह्मच जर पुढ्यात अवतरले, तर कोणत्या रागाने त्याला रिझवावे! आणि अलंकारांना दुसऱ्या कोणत्या अलंकारांनी सजवून मढवावे बरे!"

सांगा परिमळें काय तुरुंबावें। सागरें कवणें ठाईं नाहावें।
हे गगनचि आहे आघवें। ऐसा पवाडु कैंचा।।९-११।।

"सुगंधाने कोणत्या सुवासिक फूलाचा वास घ्यावा! विशाल अशा त्या सागराने कोणत्या पाण्यात नाहावे! आणि या समस्त गगनास व्यापून टाकील अशी वस्तू कोठून बरे आणावी! मग तुम्हा सर्वज्ञांची ऐकण्याची इच्छा तृप्त करेल अन तुम्हाला भावेल असे वक्तृत्व कोणी कसे करू शकेल! तुम्हासारख्यांना आपल्या बोलांनी रिझवणारा वक्ता तरी कोठे मिळेल, तुम्हीच सांगा!"

माऊली श्रोतेजन आणि *लेकुरु* ज्ञानदेव

तैसें तुमचें अवधान धायें। आणि तुम्हीं म्हणा हे होये।
ऐसें वक्तृत्व कवणा आहे। जेणें रिझा तुम्हीं।।९-१२।।
तऱ्हीं विश्वप्रगटतियां गभस्ति। हातिवेनि न कीजे आरति।
कां चुळोदकें अपांपती। अर्घ्यु नेदिजे।।१३।।
प्रभु तुम्हीं महेशाचियां मूर्ति। आणि मी दुबळा अर्चितसे भक्ती।
म्हणौनि बेल जऱ्हीं गंगावती। तऱ्हीं स्विकाराल कीं।।१४।।

"असे आहे खरे! पण सूर्योदय झाला की कोणी काय त्या सूर्याला काडवातीचा दिवा दाखवून ओवाळूच नये का! अन समुद्रास ओंजळभर पाण्याने अर्घ्य देऊच नये का! हे संतसज्जनरूपी ईश्वरहो! तुम्ही तर साक्षात महेश्वरच आहात. त्या महादेवाला जशी भक्तीने वाहिलेली निर्गुडीसुद्धा बेलाऐवजी चालते, त्याप्रमाणे तुम्हाला पण माझे असमर्थतेने केलेले हे गीतेवरील आख्यान चालेल, अशी मला खात्री आहे."

बालक बापाचियें ताटीं रिघे। रिगौनि बापातेंचि जेवऊं लागे।
कीं तो संतोषलेनि वेगें। मुखचि वोडवी।।९-१५।।
तैसा मी जऱ्हीं तुम्हांप्रति। चावटी करीतसें बालमति।
तऱ्हीं तुम्हीं तोषिजे ऐसीं जाती। प्रेमाची ययां।।१६।।
आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें। तुम्हीं संत घेतलें असा बहुवें।
म्हणौनि केलियां सलगीचा नोहें। आभारू तुम्हां।।१७।।

"पिता जेवत असता छोटे बाळ त्याच्या ताटात जेवू लागते आणि वर त्यालाच घास भरवू पाहाते. तेव्हा तो आपल्या मुखाचा त्याच्यापुढे *आ* करून आवडीआवडीने त्याच्या चिमुकल्या हातातून घास घेत नाही का! गीतार्थ जाणणाऱ्या तुम्हा वडीलधाऱ्या मंडळींपुढे तो सांगण्याची बालीश बडबड मी करत असलो, तरी त्यानेसुद्धा संतोषून तुम्हाला आनंद होईल, अशी आपल्या प्रेमाची गोडी आहे. तुमचा माझ्यावर फार लोभ आहे. म्हणून मी तुम्हाशी ही जी प्रेमाची सलगी करतो आहे, तिचा तुम्हाला नक्कीच त्रास वाटणार नाही."

अहो तान्हेयाची लागतां झटें। तऱ्हीं अधिकचि पान्हा फुटे।
रोषें प्रेम दुणवटें। पढियंतयाचेनि।।९-१८।।
म्हणौनि मज लेंकुरवाचेनि बोलें। तुमचें कृपालुपण निदैलें।
तैं चेईलें हे जी जाणवलें। यालागीं बोलिलो मी।।१९।।

एऱ्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणीं।
कीं वारया धापत आहे बाहणी।
हां हो गगनासीं गंवसणी। घालिजे केवीं।।२०।।

"तान्हे बालक दूध पितांना आईच्या स्तनांना बिलगते व ढुशा देते; त्याने तिला अधिकच पान्हा फुटतो ना! गोपालकृष्णाच्या खोडकर चेष्टांमुळे व वाह्यात चाळ्यांमुळे रोष झाला तरी यशोदामातेच्या त्याच्यावरल्या प्रेमाचा सागर कसा उचंबळून जायचा! तुमचे कृपालुत्व झोपलेले होते. ते मज लेकराच्या असंबद्ध बडबडीने अचानक जागे झालेले मला जाणवले. म्हणून *"आता माझ्याकडे लक्ष द्या"* असा हा हट्ट मी धरून बसलो आहे. नाही तर गीतार्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य मजकडे कसे असणार! चांदणे पिकलेले आहे असे म्हणतात; पण त्यासाठी आढी शोधून तरी सापडेल का! वारा वाहत असतो; पण त्याला असणारी गती कोण देऊ शकेल! अहो! गगनाला गवसणी कशी घालावी!"

आइका पाणी वोथिजावें न लगे। नवनीतीं माथुला न रिगे।
तेंवीं लाजिलें व्याख्यान न निगे। देखौनि जेयांतें।।९-२१।।
हे असो शब्दब्रह्म जियें बाजे। शब्द मावललेयां निवांतु निजे।
तो गीतार्थु मऱ्हाठियां बोलिजे। हा पाडु काई।।२२।।
परि ऐसियाहीं मज धिंवसा। तो पुढतियाचि एकीं आशा।
जैं धिटींवा करूनि भवादृशां। पढियंतया होआवें।।२३।।

"पाणी प्रवाही असते. त्याला द्रवपणा कोण देऊ जाणार! नवनीतात रवीचा प्रवेश तरी होऊ शकतो का! ती तर फक्त दह्यादुधाचे विरजणच घुसळू शकते. याचप्रमाणे शब्दब्रह्माला पाहून शब्द त्याचे वर्णन न करता आल्यामुळे लाजून जेथे मौन पाळतात; ज्या गीतार्थाच्या बाजेवर ते शब्दब्रह्म शब्दांची गजबज शांत झाल्यावर शांतपणे पहुडते; तेथे त्या गीतार्थाला मराठमोळ्या बोलीत शब्दांकित करायला कोण धजावेल! ही इतकी अशाक्य गोष्ट असतांना मी हे करू पाहातो आहे, ते केवळ एकाच इच्छेने! ती म्हणजे हा धीटपणा दाखवून आपणांसारख्या आत्मज्ञानी जीवन्मुक्त संतसज्जनांचा मी लाडका व्हावे!"

"सांग जैं निरूपिलें। नारायणें"

परि आतां चंद्रापासौनि निववितें। जैं अमृताहूनि जीववितें।
तेणें अवधान कीजो वाढते। मनोरथां माझियां।।९-२४।।
कां जैं दिठिवा तुमचा वरुषे। तैं सकलार्थसिद्धी मति पिके।
एऱ्हवीं कौंभैला उन्मेष सुखे। जऱ्हीं उदासु तुम्हीं।।२५।।
सहजें तऱ्हीं अवधारा। वक्तृत्वा अवधानाचा होय चारा।
तऱ्हीं दोंदें पेलती आखरां। प्रमेयाची।।२६।।

"तुमचा आवडता मी झालो, तर तुम्ही मजकडे लक्ष द्याल. चंद्रापेक्षाही शीतल, मृतास संजीवन देणाऱ्या अमृताहूनही श्रेष्ठ व जीवनदायी असे तुमचे अवधान माझे मनोरथ पूर्ण करील. कारण तुमच्या कृपामय दृष्टीच्या वर्षावाने माझी मती सुपीक होऊन त्यात त्या सर्वेशाचे स्वरूप वर्णन करण्यास योग्य अशा वाङ्मयाचे पीक येईल. पण तुम्ही जर असे अवधान दिले नाही, तर मात्र माझ्यातला हा नुकताच फुटलेला ज्ञानांकुर - हा ज्ञानोन्मेष सुकून जाईल. सहजच आहे! वक्तृत्वशक्तीस जर श्रोत्यांच्या अवधानाचे खाद्य मिळाले तर त्या बोलांना प्रमेयांची दोंदे न फुटली तरच नवल म्हणायचे!

अर्थु बोलाची वाटु पाहे। तेथ अभिप्रावो अभिप्रायातें विये।
भावाचा फुलौरा होत जाये। मतिवरी।।९-२७।।
म्हणौनि संवादाचा सुवावो ढले। तऱ्हीं हृदयाकाश सारस्वतें वोलें।
आणि श्रोता दुश्चिता तऱ्हीं वितुलें। मांडला रसु।।२७।।
अहो चंद्रकांतु द्रवतां कीर होये। परि तैं हातवटी चंद्रीं कीं आहे।
म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहें। श्रोतयेनवीण।।२९।।

"वक्त्याच्या तोंडातून शब्द फुटण्याआधीच अर्थ श्रोत्यांच्या मनात घर करतो; अभिप्रायातून अभिप्राय प्रकट होत जातात आणि बुद्धी भावातुर होऊन चातकासारखी त्या वक्तृत्वाचा ओघ टिपून घेण्यासाठी दक्ष होते. वक्ता आणि श्रोता यांच्यात असा सुसंवादरूपी वायू संचार करू लागला की हृदयरूपी आकाश शास्त्रसिद्धांतरूपी शब्दमेघराशींनी दाटून येते. पण श्रोता जर दुश्चित झाला, त्याचे अवधान नसले, तर मात्र वक्तृत्वास आलेला गहिरा रंग विरघळून जाऊन रसभंग होण्यास वेळ लागत नाही. अहो! चंद्रकांतमण्यास पाझर फुटतो खरा! पण तो पाझर कसा फोडावा हे केवळ चंद्रम्यासच अवगत असते. त्याप्रमाणेच वक्त्यास वक्ता बनवणे हे केवळ श्रोत्याच्या हाती असते. सावधान श्रोत्यांवीण असतो, तो कितीही जरी पंडित असला, तरी वक्ता खास नव्हे!"

परि आतां आमुतें गोड करावें। ऐसें हे तांदुळीं कासया विनवावें।
साइखडेयाने काईं प्रार्थावें। सूत्रधारातें।।९-३०।।
काय तो बाहुलियांचियां काजा नाचवी।
कीं आपुलिये जाणीवेची कला वाढवी।
म्हणऊनि आम्हां या ठेवाठेवी। काय काज।।३१।।

"पण हे सगळे मी कशासाठी सांगत बसलो आहे! आम्हाला गोड करून घ्या असे तांदूळ कधी शिजवणाऱ्याला विनवतात काय! तो त्यांना शिजवून आपच आपला गोड स्वाद प्रकट करायला लावणारच आहे! आणि बाहुल्यांनी आम्हास तू हालचाल करायला लाव ना, अशी सूत्रधाराची प्रार्थना थोडीच करावी लागते! तो काय बाहुल्यांच्या समाधानासाठी त्यांना नाचवतो थोडाच! तो तर आपले कौशल्य पराकोटीस नेऊन दाखवण्यासाठीच त्यांना नाचवत असतो. आपल्यासारख्या संतसज्जनांमागे माझी ही भुणभुण कशासाठी! आपण तर माझ्याकडून गीतार्थ वदवून घेणारच आहात!"

तंव गुरु म्हणती काय जाहलें। हे समस्तहीं आम्हां पावलें।
आतां सांगें जैं निरूपिलें। नारायणें।।९-३२।।
येथ संतोखूनि निवृत्तिदासें। जी जी म्हणऊनि उल्हासें।
अवधारां श्रीकृष्ण ऐसें। बोलते जाहले।।३३।।

श्रीज्ञानदेवांचे हे नम्रतापूर्ण उद्गार ऐकून आनंदलेल्या श्रीगुरू निवृत्तिनाथांनी म्हटले की, "अरे! हे तू स्तुतिस्तोत्रे रचणे काय चालविले आहेस! हे तुझे सकळ गुणगान आम्हा सर्वांना पोहोचले आहे. तरी पुढे त्या नारायणाने अर्जुनास काय उपदेश केला तो लवकर सांग."

श्रीगुरूंनी दिलेली ही पोचपावती मिळालेल्या ज्ञानेशांनी संतोषून उल्हासाने म्हटले की, "हो का जी! ऐका तर मग ते श्रीकृष्ण काय म्हणाले ते!"

"राजविद्या -राजगुह्यं"

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्।।९-१।।

"आता अत्यंत गुह्य असे हे ज्ञान - ही ब्रह्मविद्या - विज्ञानासह - *जडचेतनसृष्टिज्ञानासह* - दोषदृष्टिरहित निर्मळ अंतःकरणाच्या अशा तुला सांगतो. हे अर्जुना! हे ज्ञान तुला प्राप्त झाले की या जन्मृत्युचक्रातून - या संसारातून तू मुक्त होशील."

भगवंतांनी सातव्या अध्यायीही ***"ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः। यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।।७-२।।"*** अशाच वरील९-१ या श्लोकाप्रमाणेच विज्ञानासह ज्ञान सांगण्यास सुरुवात केली होती. त्याचाच अवशेष आता या नवम अध्यायी सांगितला जात आहे.

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्।।९-२।।

"ही विद्यांचा राजा शोभणारी ब्रह्मविद्या आहे. ज्ञानात राजा असणारे, सर्व गुह्यातील परमगुह्य, पवित्र करणारे, अत्युत्कृष्ट, प्रत्यक्ष अनुभव देणारे, धर्मविहित मोक्ष प्राप्त करून देणारे, सहज आचरणात आणता येण्याजोगे आणि एकदा प्राप्त झाले असता जे विस्मृती, उजळणी न करणे, प्रत्यक्ष आचरण न करणे, इ.दोषांनी लुप्त न होणारे, सर्वदा आपल्याजवळ जसेच्या तसे राहाणारे असे हे ज्ञान असल्याने मनुष्यमात्राने याच्याच प्राप्तीसाठी आपल्या आयुष्याचा विनियोग करावा."

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परन्तप।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि।।९-३।।

"हे परंतपा! असे न करणारे अश्रद्ध पुरुष या उत्कृष्ट धर्माची - या विद्याप्राप्तीसाठी दक्षतेने प्रयत्न करण्याच्या आचरणाची अवहेलना करतात. त्यांना माझी प्राप्ती न झाल्याने ते या मृत्युमय संसाराच्या चक्रातून सुटत नाहीत."

भक्त व अभक्त

भक्तिमंदिर साकारण्याआधीच या प्रकारे भक्तीचे परमरहस्य सांगण्याचा उपोद्घात करून भगवंत भक्त आणि अभक्त यातला फरक सूचित करतात. भक्त म्हणजे भगवंतावर श्रद्धा ठेवणारा - या राजविद्येवर श्रद्धा असणारा, त्याप्रमाणे आचरण ठेवून ब्रह्मविद्या प्राप्त करू इच्छिणारा वा ती परमप्राप्ती करून घेतलेला, मोक्षप्राप्तीच्या सन्मार्गावर जो चालतो तो *भक्त*. आपले आयुष्य मोक्षासाठी झोकांडून देतो, तो भक्त!

अश्रद्ध पुरुष मात्र *अभक्त* या सदरात मोडतात. साहजिकच ज्याच्या आयुष्याची मिळकत धनसंपत्ती- दारा-गृह-पुत्र- पौत्र- स्वर्ग -संसार - ऐश्वर्य - लोभ मोह - काम - क्रोध - आसुरी संपदा - भगवंताऐवजी इतर देवादिकांवर श्रद्धा - काम आणि अर्थ या पुरुषार्थांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न - वासानाक्षयाऐवजी वासनाकांड - यांच्यात व तत्सम गोष्टीत असते, ते या भक्तिसोपानाची एकसुद्धा पायरी चढून जाऊ शकत नाहीत. भगवंताची प्राप्ती तर दूरच राहो! त्यांना आपल्या ईप्सित कामना पूर्ण करून घेणेसुद्धा अत्यंत दुरापास्त असते.

गीतेतील भक्त

या ठिकाणी आणखी एक मुद्दा ध्यानी घ्यावा लागेल. *भक्त* या संबोधनाने सर्वसामान्यपणे ईश्वराचे भजन-पूजन-यजन - याजन इ.करणारा पुरुष अभिप्रेत असतो. परंतु केवळ मोक्षप्राप्तीसाठी हे सर्व कर्म आचरणारा तो भक्त असे येथे अध्याहृत आहे. तसेच भक्त म्हणजे योग्याहून निराळा, निष्काम कर्म संपन्न करणाऱ्या साधकापेक्षा कोणी इतर, ज्ञानी भक्तापेक्षा वेगळा, भक्त म्हणजे कोणी खुळाबावळा, वेडपट, टाळा कुटणारा, व्रते-वैकल्ये, उपास-तापास इ. करणारा, तीर्थयात्रा करणारा, असे आपले जे समज असतात, ते येथे गैरलागू आहेत.

गीतेचा भक्त हा असातसा कोणीतरी नसून तो विज्ञानासहित ज्ञानाने परिपूर्ण असणारा - किंबहुना तसे नसेल तर तसे होण्याची आस्था बाळगणारा, मोक्षेच्छेने भगवंतांनी सांगितलेल्या मार्गाचे दक्षतेने आचरण करणारा, सश्रद्ध परंतु अंधश्रद्ध नव्हे असा, केवळ भगवत्प्रीत्यर्थ निष्काम कर्म करणारा, कर्मांचा लौकिक संन्यास न करता, कर्मफले व त्यांची ईप्सा यांचा त्याग करणारा; भक्तीसाठी - ती प्राप्त व्हावी म्हणून ईश्वरनिष्ठ राहून योग अनुसरणारा, असा सर्वसामान्य भक्तांपेक्षा विशेष असा आहे. ***तो ज्ञानी आहे; तो योगी आहे, तो कर्मनिष्ठ आहे; आणि तो भक्त पण आहे!***

गीतेतील भक्तीमार्ग

अशी त्याची भक्ती सुफळ संपूर्ण व्हावी; तो मोक्षपदी आरूढावा म्हणून गीता *कर्म, योग, ज्ञान व भक्ती* या प्रवाहांचा उत्कृष्ट समन्वय करते. या चारही उपांगांसह असते, तीच खरी भक्ती - तीच *ज्ञानभक्ती* - तीच *परानिष्ठा* - तीच *अद्वैतभक्ती* - तीच श्रेष्ठतम भक्ती गीतेने उपदेशिली आहे. जो जो मोक्षेच्छू आहे, तो तो भक्त आहे व त्यासाठी जे जे मार्ग आचरितो, ते ते भक्ती या सदरात मोडतात. भक्त व भक्ती यांसंबंधी एवढे संक्षेपाने पाहिले म्हणजे यापुढे जो विस्तीर्ण असा पैस, उत्तुंग असा अवकाश , भक्तीचा जो विशाल प्रांत आपण अवलोकणार आहोत, तो व योगमार्ग हे एकमेकांहून भिन्न नाहीत हे ध्यानी ठेवून पुढील विवेचन साक्षेपाने पाहता येईल. असो.

अर्जुन तर आस्थेचीच संज्ञा

भक्तीच्या परमरहस्याचे उद्घाटन करणारी श्रीकृष्णवचनोक्ती आपण पाहिली. तीच आता ज्ञानेशांच्या शब्दात अवलोकू याः

ना तऱ्हीं अर्जुना हे बीज। पुढुति सांघिजैल तुज।
जैं हे अंत:करणींचें गूज। जीवाचियें।।९-३४।।
एणें मानें जीवाचें हियें फोडावें। मग गुज कां पां मज सांगावें।
ऐसें काहीं स्वभावें। कल्पिशी जऱ्हीं।।३५।।
तऱ्हीं परियेसी प्राज्ञा। तूं आस्थेचीच संज्ञा।
बोलिलिये गोष्टीची अवज्ञा। नेणसीं करूं।।३६।।
म्हणौनि गूढपण आपुलें मोडों। वरी बोलावेंही बोलावें घडो।
परि आमुचेचि जीवींचें पडो। तुझां जीवीं।।३७।।

"योगी जे परमस्थान प्राप्त करतात, म्हणून तुला*(आठव्या अध्यायी)* सांगितले, ते कसे प्राप्त करून घ्यावयाचे त्याचे रहस्य हे मी जीवापाड जतन करून ठेवलेले आहे. हे माझ्या अंत:करणींचे गूज तुला सांगतो, ते ऐक. पण तुला असे वाटत असेल की एवढे हे अंतरंगरहस्य जे जीवाच्या आत मी जपून ठेवलेले आहे, ते मी तुला हृदय उघडून सांगावे ते का! तर असे पाहा! हे बुद्धिमान अर्जुना! तू म्हणजे ज्ञानप्राप्तीच्या तीव्र इच्छेची मूर्तीच आहेस! किंबहुना तुझे नांव हे आस्थेची दुसरी संज्ञाच आहे म्हणेनास! तुझी माझ्यावर अपार श्रद्धा असल्याने मी जे सांगेन त्याची अवज्ञा करण्याचे तू मनातसुद्धा आणणार नाहीस. म्हणून मी गुप्त ठेवलेली ही गोष्ट उघड झाली तरी चालेल. कारण माझे अंतस्थ गुह्य माझ्याप्रमाणेच तुलाही अवगत व्हायला हवे."

अगां थानीं कीर दूध गोड। परि थानासीचि नव्हे की गोड।
म्हणौनि सरो कां सेवितेयाची चाड।
जऱ्हीं अनन्य मिळे।।९-३८।।

"स्तनात दूध गुप्तपणे असते, पण त्याची गोडी स्तनाला काही चाखता येत नाही. त्याचे सेवन करणारे अनन्यगतिक लेकरूच त्या दुधाचे पान करू शकते. त्या दुधाची गोडी त्या लेकराची स्तनपानाची भूक भागवते. तुला पण या माझ्याअंतरी असणाऱ्या गुह्य ज्ञानाची तृष्णा लागली आहे, तर ती भागवणेच योग्य होईल. एरवी ते नुसतेच मजजवळ राहील."

मुडाहूनि बीज काढिलें। मग निर्वाललिये भूमी पेरिलें।
तऱ्हीं तैं सांडीविखरीं गेलें। म्हणो ये काईं।।९-३९।।
यालागीं सुमनु आणि शुद्धमति। जो अनिंदकु अनन्यगति।
पैं गां गौप्यही परि तेयाप्रती। चावलावे सुखें।।४०।।
तऱ्हीं प्रस्तुत आतां गुणीं इहीं। तूं वांचूनि आणिकु नाहीं।
म्हणौनि गूज तऱ्हीं तुझांठायीं। लपवूं नये।।४१।।

"अर्जुना! कणगीत जपून ठेवलेले बी काढावे अन ते मशागत केलेल्या भूमीत पेरावे, तर ते अनंत पटीने वाढते. कणगीतले बी वाया गेले असे काही होत नाही. तसेच या ब्रह्मविद्येचे आहे, पहा. हे ज्ञानबीज ज्याच्याठायी पेरावे असा शुद्ध मनाचा, निष्कलंक बुद्धीचा, सश्रद्ध आणि मजव्यतिरिक्त इतरत्र निष्ठा नसणारा जो असतो, त्याला ही माझी गुह्य गोष्ट असली तरी सुखेनैव सांगायला हरकत नाही. आणि सध्या तरी असा गुणवंत तुझ्याखेरीज दुसरा कोण आहे! म्हणूनहे माझे अंतर्यामीचे गूढ तुजपासून लपवून ठेवण्यात काही हशील नाही."

"ज्ञानविज्ञान तैसें। वांटूनि देऊं"

आतां किती नावानावा गूज। म्हणतां कानडें वाटेल तुज।
तऱ्हीं ज्ञान सांघैन सहज। विज्ञानेंसीं।।९-४२।।

"आतां तुला वाटत असेल की हा श्रीहरी सारखे सारखे गूढ, गूज, गुह्य, रहस्य असे कोणत्या गोष्टीस म्हणतो आहे; अशी कोणती अज्ञात गोष्ट आहे की ज्यासाठी एवढी मोठी प्रस्तावना चालवली आहे, तर ऐक. मी तुला विज्ञानासहित साकल्याने ज्ञानाचे विवरण करणार आहे."

परि तैंचि ऐसेनि निवाडें। जैसें भेसललें खरेकुडें।
मग काढिजे फाडोवाडें। पारखूनियां।।९-४३।।
कां चांचूचेनि सांडसें। खांडिजे पय पाणी राजहंसें।
तुज ज्ञानविज्ञान तैसें। वांटूनि देऊं।।४४।।
मग वारयाचेनि धारसां। पडिला कोंडा कां नुरेचि जैसा।
आणि अन्नकणाचा आपैसा। राशि जोडे।।४५।।
तैसें जाणितलेयासाठीं। संसार संसाराचियें गांठीं।
लाऊनि बैसवी पाटीं। मोक्षश्रियेचां।।४६।।

"आणि ते विवेचनसुद्धा असे करणार आहे की जसे सत्य व असत्य यांच्या भेसळीतून पारख करून दोन्ही वेगवेगळे करावे, त्याप्रमाणे ज्ञान व विज्ञान ही वेगवेगळी स्पष्ट करून दाखवीन. चंचूच्या सांडशीने राजहंस पाणी ते पाणी अन दूध ते दूध कसे वेगवेगळे करून दाखवतो, त्याप्रमाणे ही दोन्ही साकल्याने स्पष्ट करीन. मळणी करतांना धान्य, कोंडा व भूस एकत्र होतात. त्यांना वाऱ्यावर धरून उफणले की कोंडा आणि भूस उडून जातात आणि खाली पडते ती निखळ धान्यराशी. त्याप्रमाणे बुद्धियोगे जाणण्याच्या गोष्टी नीट उमजून घेऊन ज्ञान जाणून घ्यावे. ते जाणून घेतले की मोक्षलक्ष्मीच्या शेजारी जाऊन एकाच आसनावर बसता येते."

जैं जाणणेयां आघवेयांचां गांवीं। गुरुत्वाची आचार्यपदवी।
जैं सकल गुह्यांचा गोसावी। पवित्रां रावो।।९-४७।।
आणि धर्माचें निजधाम। तेंविंचि उत्तमाचें उत्तम।
पैं येतां जातां नाहीं काम। जन्मांतराचें।।४८।।
मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असे।
प्रत्यक्ष फांवों लागे तैसें। आपैसया।।४९।।
तेविंचि पैं गां सुखाचां पाउटीं। चढतां येईजे जेयाचियां भेटी।
मग भेटल्या कीर मिठी। भोगणेयांही पडे।।५०।।

"हे ज्ञान म्हणजे सर्व विद्यांचा - सर्व ज्ञानाचा - गुरू असून त्यांच्या आचार्यपदी विराजलेले आहे. सकळ गुह्य गोष्टींचा हे ज्ञान स्वामी आहे. पवित्र अशा ज्ञानांचा हे ज्ञान राजा आहे. ते तर प्रत्यक्ष धर्माचे धाम आहे. हे उत्तमोत्तम असून त्यायोगे जन्ममृत्यूच्या चक्रातून

सुटका होते. गुरुमुखे उपदेशाद्वारे याचा किंचितसा उदय झालेला दिसतो. पण खरे तर ते आपल्या हृदयी स्वयंभ स्थित असते. त्यामुळे गुरूने अल्पस्वल्प उपदेश केला न केला तोच त्याची अनुभूती येऊ लागते. या अनुभूतिसुखाच्या सहज सुलभ मार्गाने चालताचालता टप्प्याटप्प्यावर वाढत्या श्रेणीचे सुख प्राप्त होते. या सोपानावरून चढत गेले की प्रत्यक्ष परब्रह्म आपसुकच भेटते.''

परि भोगाचियां ऐलिकडिलिये मेरें। चित्त उभें ठेलेंचि सुखा भरे।
ऐसें सुलभ आणि सोपारें। वरि परब्रह्म।।९-५१।।

''ती भेट घडेपावेतो चित्त अनिर्वचनीय सुखाने जेथल्या तेथे ओसंडून जाते. परब्रह्माच्याअलीकडल्या काठावर हा असा सुखाचा सोहोळा संपन्न होतो, तर परब्रह्माच्या पैलतीरी साधक पोहोचला की तो *सिद्ध* होतो आणि परब्रह्माची गाठभेट होताच सर्व प्रकारचे भोग लोप पावतात. ***भोक्ता, भोग व भोग्य; ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय; ध्याता, ध्यान व ध्येय्; भक्त, भक्ती व भगवंत; द्रष्टा, दृश्य व दर्शन; कर्ता, कर्म व कर्मफल,*** या समस्त त्रिपुटींचा तेथे लय होतो आणि सर्वदूर एकमात्र ते सच्चिदानंदस्वरूपी परब्रह्म भरून अद्वैतत्वाने राहते. या ज्ञानाची अशी महती असल्याने त्याच्यात व परब्रह्मात तसा काहीच भेद नाही.''

पैं गां आणिकही एक ययाचें। जैं हातां आले तऱ्हीं न वचे।
आणि अनुभवितां काहीं न वेंचे। वरि विटेही ना।।९-५२।।

''आणि या ज्ञानाचे - या ब्रह्मविद्येचे - आणिकही एक वैशिष्ट्य आहे. हे एकदा प्राप्त झाले - हाती लागले की कधीही हातचे जात नाही. त्याची चोरी होऊ शकत नाही. ही विद्या लोपत नाही. या ज्ञानाचा अनुभव घेत राहिल्याने, याचा विनियोग केल्याने, त्याच्यात कोणतेच न्यून येत नाही. त्याचे वाटेहिस्से पडत नाहीत. ते खर्चले न जाणारे व वाया न जाणारे अमाप विद्याधन आहे. ही अक्षय्य ब्रह्मविद्या आहे. हिची अनुभूती कितीही वेळा, कितीही काळ जरी घेतली, तरी मन विटत नाही.''

किंबहुना ***''पूर्णमिदम्। पूर्णमदः। पूर्णात् पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।''*** असे हे ज्ञान आहे - अशी ही विद्या आहे, अशी ही प्रत्यक्ष परब्रह्मच असणारी वस्तू आहे. अन म्हणूनच *राजविद्या, राजगुह्य, पवित्र, उत्तमोत्तम, धर्म्य, अव्यय, सुखपूर्ण* असे या ज्ञानाचे वर्णन केले जाते.

अज्ञान्यांचे दुर्भाग्य

एथ जऱ्हीं तूं तार्किका। ऐसीं हन घेशी शंका।
ना एवढी हे वस्तू लोकां। उरली केवीं पां।।९-५३।।
एकोत्तरेयाचियां वाढी। जैं जलतिये आगीं घालिती उडी।
तैं अनायासें स्वगोडी। सांडिती केवीं।।५४।।
तऱ्हीं पवित्र आणि रम्य। तेंविचि सुखोपायें गम्य।
आणि स्वसुख वरि धर्म्य। वरि आपणपां जोडें।।५५।।
ऐसा आघवाचि सुरवाडु आहे। तऱ्हीं जनाहातीं केंवि उरो लाहे।
हा शंकेचा ठावो कीर होये। परि न धरावी तुवां।।५६।।

''ज्ञानाची ही महत्ता ऐकल्यावर तुझ्या मनात तर्कट लोकांसारखी जर अशी शंका आली की एवढी सहजसुलभ व उत्कृष्ट वस्तू असूनही लोकांनी न अनुभवलेली व त्यांना गूढ अशी कशी राहिली, तर ऐक. शंभर रुपयांचे एकशेएक व्हावेत या क्षुल्लक इच्छेने पण लोक जळत्या आगीत उडी घालण्यास बिचकत नाहीत. पण पवित्र आणि रम्य, स्वसुखासारखी ही मनोहर वस्तू त्यांच्या हाती लागत नाही. सहजसुलभ आणि धर्म्य असे हे उत्कृष्ट सुख त्यांना लाभत नाही. स्वतःचे स्वतःच अनुभवता येणारे व ज्याचा कधीच नाश होत नाही, असे हे परमामृत ते लोक सेवन करू शकत नाहीत. या सगळ्याला विशिष्ट कारण आहे.''

पाहे पां दूध पवित्र आणि गोड। पासीं त्वचेचियां पदराआड।
परि तैं अव्हेरूनि गोचिड। अशुद्ध काय नेघती।।९-५७।।
कां कमलकंदा आणि दरदुरीं। नांदणूक एकेंचि घरीं।
परि परागु सेविजे भ्रमरी। जवळिला चिखलुचि उरे।।५८।।
ना तऱ्हीं निदैवाचां परिवेरीं। लेह्या रुतलिया आहाति सहस्त्रवेरी।
परि तेथ बैसौनि उपवासु करी। कां दरिद्रें जियें।।५९।।
तैसा हृदयामध्ये मी रामु। असतां सर्वसुखाचां आरामु।
कीं भ्रांतासीं कामु। विषयावरी।।६०।।

''असे पाहा की दूध शुद्ध आणि गोडही असते. ते गाईच्या स्तनांतील दूध सहज सेवता येण्याजोगे असूनही गोचिड त्याचा अव्हेर करतात आणि अशुद्ध असे रक्त पितात. किंवा कमलकंद आणि बेडूक दोन्ही चिखलातूनच उत्पन्न होतात. पण कमळाची सोयरीक भ्रमरांशी होते. ते त्यातला पराग सेवून सुखावतात. बेडकांच्या नशिबी फक्त चिखलातच जगणे व मरणे उरते. कमनशिबी मनुष्याच्या घरात सहस्त्रावधी मोहरा पुरलेल्या असल्या तरी त्यांची माहिती नसल्याने तो त्यांच्यावर बसूनसुद्धा फाके मारत नाही का! याचप्रमाणे सर्व सुखाची वसती असा जो मी, तो त्या मनुष्यांच्या हृदयी आत्माराम म्हणून वसत असलो, तरी त्या भ्रांत लोकांना विषय लोभावतात व त्यांची कामना विषयसुखामागे धावत सुटते.''

बहु मृगजल देखौनि डोलां। थुंकिजे अमृताचा गिळितां गलाला।
तोडिला परिसु बांधिला गलां। शुक्तिकालाभें।।९-६१।।
तैसीं अहंममतेचियें लवडसवडीं। मातें न पावती बापुडी।
म्हणौनि जन्ममरणाचिये दुथडीं। डहुलतें ठेलीं।।६२।।

''मृगजळाने मोहून गिळत असलेल्या अमृताचा घुटका थुंकून टाकावा; किंवा चमचमत्या शिंपीला रुपे समजून अजाणतेपणाने गळ्यात बांधलेला परिसाचा ताईत फेकून द्यावा अन ती शिंप गळ्यात धारण करावी; त्याप्रमाणे मी आणि माझे यांच्या नादाने लोभावलेले, अहंकार आणि ममत्वबुद्धी यांच्या नादात दंग झालेले असे ते बापडे लोक

माझ्याप्रत न पोहोचता या जन्ममृत्युच्या अनंत चक्रात गुरफटून जाऊन या मायानदीच्या दुथडी भरून वाहणाऱ्या घोर प्रवाहात गटांगळ्या खात बसतात."

ऐश्वर्ययोग::::

ईश्वराचे स्वरूप

अभक्तांना भगवंतांची प्राप्ती न होण्यामागची कारणे *विषयतृष्णा, अहंकार व ममता* ही होत. आसुरी बुद्धीच्या प्रभावाने ते लोक आसुरी संपदा जमवतात. त्यांचे कर्म, त्यांचे भोग, त्यांच्या कामना, त्यांची संपदा ही सर्व व्यर्थ होत. याउलट भक्तांना ईश्वराचा लाभ होतो. दैवीगुणसंपत्तीचे अर्जन करणारे सश्रद्ध असे ते भक्त संसारनदीचा घोर प्रवाह पार करून जातात, ते त्यांच्या भक्तीच्या योगे. ही *भक्ती* म्हणजे *ईश्वरप्रणिधानयुक्त योग* होय.

ईश्वरप्रणिधानपूर्वक भक्तीचे माहात्म्य असे आहे. या भक्तीलाच *राजविद्या - ब्रह्मविद्या -ज्ञान* अशी संबोधने आहेत. या अद्वैताभक्तीचे स्वरूप श्रीज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत जागोजागी प्रकटविले आहे. त्याचा परामर्ष आपण यथावकाश घेऊच. तत्पूर्वी *ईश्वराचे स्वरूप* माहीत करून घेऊ.

ज्या ईश्वराचे प्रणिधान करावयाचे - ज्याचे अनुसंधान सतत ठेवायचे - ज्याच्या प्राप्तीसाठी अभ्यास करावयाचा - ज्याचे ध्यान करावयाचे, तो कसा आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. पातञ्जल योगसूत्रांद्वारे प्रकट होणारे त्या ईश्वराचे स्वरूप आपण पाहिले आहे. क्लेशादी नसणारा, सार्वज्ञता असणारा, सर्वांचा अनादिसिद्ध गुरू, ॐकाराने वाच्य असा ईश्वर असल्याचे पतञ्जली म्हणतात. श्रीगोपालकृष्णांनी गीतेत ईश्वराचे - भगवंताचे, म्हणजे स्वतःचे जे स्वरूप वर्णिले आहे, ते असेच आहे. ते आणि असेही म्हणतात कीः

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना।
मत्स्थानी सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः।।९-४।।

"हे सर्व जगत माझ्या अव्यक्तरूपाने धारण केलेले आहे. त्या माझ्या अव्यक्त निर्गुण रूपाठायी ही सर्व भूते स्थित असतात. परंतु त्या भूतांठायी मी स्थित नाही."

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः।।९-५।।

"परंतु नीट विचार केला तर असे दिसून येईल की वास्तविक ही भूतेसुद्धा - हे सगुण साकार विश्वसुद्धा माझ्या स्वरूपाठायी स्थित नाही. या सर्व भूतमात्रांना धारण करून त्यांचे पालनपोषण करणारा, एवढेच काय! त्यांना उत्पन्न करणारा असा जो माझा आत्मा समजतात, तोसुद्धा वस्तुतः प्राणिमात्रांठायी स्थित नसतो. परंतु तो तसा स्थित असल्याचे भासते खरे! असा माझा प्रभाव आहे तो केवळ योगमायेद्वारे जाणवतो. मला या अशा प्रकारच्या संबंधामुळे ईश्वरत्व प्राप्त झालेले आहे, हे जाणून घे."

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय।।९-६।।

"उदाहरणच द्यायचे झाले तर या भूतांचा माझ्याशी कसा संबंध आहे तो पाहा. जसा सर्वत्र संचार करणारा महान वायू निरंतर आकाशाठायी स्थित असतो, तो आकाशापासून उत्पन्न झालेला असतो; पण आकाश जसेच्या तसे अव्यय, निराकार राहाते. आकाशाला त्या वायूशी काहीही कर्तव्य नसते. वायूमध्ये आकाश असून नसल्यासारखे असते. आकाशच वायूला धारण करू शकते. अगदी त्याचप्रमाणे माझ्या संकल्पापासून - आदिमायेद्वारे - योगमायेच्या प्रभावाने उत्पन्न झालेली ही भूते हे अखिल विश्वावडंबर - हे सगुण साकारलेले जगत माझ्याठायी स्थित आहे."

"आमुचा प्रकृतिपैलीकडील भावो"

विश्वपटलावर अवतरलेल्या त्या घननीळ, मेघश्याम श्रीकृष्णांच्या या वचनोक्तींवर भक्तीचा मळा फुलवणारे महान योगिराज ज्ञानेश्वर आपल्या ओवीकुसुमांचा हार चढवतात, तो किती साजिरा आहे, पाहाः

ऐऱ्हवीं मी तऱ्हीं कैसा। मुखाप्रति भानु जैसा।
कहीं नसे न दिसें ऐसा। वाणीचा नव्हें।।९-६३।।
माझेयां विस्तारलेपणाचेनि नांवें। हे जगचि नोहे आघवें।
जैसें दूध मुरालें स्वभावें। तऱ्हीं तैंचि दही।।६४।।
कां बीजचि जाहलें तरु। कां भांगारचि अळंकारु।
तैसा मज एकाचा विस्तारु। तै हे जग।।६५।।

आपले स्वरूप विशद करतांना श्रीकृष्णपरमात्मा म्हणतातः "समोरचा सूर्य जितका स्पष्ट असतो, तितका सर्वांना सहज दिसावा असा खरा तर मी आहे. पण सूर्यातसुद्धा एक उणीव आहेः तो रात्री आणि ढगाआड गेला की दिवसासुद्धा दिसेनासा होतो. पण माझे अस्तित्व मात्र असे लोपत नाही. अर्जुना! हे अखिल जगत म्हणजे माझाच साकार रूपातला विस्तार नव्हे का! जसे दूध विरजले की स्वाभाविकपणेच त्याचे दही होते तसे! किंवा बीजापोटी वृक्ष जसा अंकुरतो अन विशाल स्वरूपात अवतरतो; अथवा सुवर्णाच्याच लगडीचा अलंकार होतो; तद्वतच हे अवघे विश्व म्हणजे मज एकाचेच विस्तारित रूप आहे."

हें अव्यक्तपणें थिजलें। तैंचि मग विश्वाकारें वोथिजलें।
तैसें अमूर्तमूर्ति मियां विस्तारिलें। त्रैलोक्य जाणें।।९-६६।।
महदादि देहांतैं। इयें अशेखेंही भूतें।
परि माझां ठायीं बिंबतें। जैसें जलीं फेण।।६७।।
परि तेयां फेणाआंतु पाहातां। जेवीं जल न दिसे पांडुसुता।
ना तऱ्हीं स्वप्नींची अनेगता। चेइलियां नोहिजे।।६८।।
तैसीं भूतें इयें माझियां ठाइं। बिंबती तेयामाजी मी नाहीं।
इया उपपत्ति तुज पाहीं। सांघितलियां मागां।।९-६९।।

"माझे जे *अव्यक्त* असे रूप आहे, त्याच्याठायी बीजरूपाने संकोचलेल्या या विश्वाचा हा सर्व पसारा व्यक्त दशेतला आहे. थिजलेला गोठलेला पदार्थ जसा पातळ झाल्यावर सर्वदूर पसरतो, तसे अव्यक्त दशेत गोठवलेल्या माझ्याच रूपाचे हे त्रैलोक्य म्हणजे विस्तारित - पसरलेले रूप आहे. पाण्यावर बुडबुडे किंवा फेस असावा तशी तहत महत्तत्त्वापासून तो समस्त स्थावर जंगमादी प्राणी व भूतमात्रे ही माझ्याठायी भासतात. परंतु त्या बुडबुड्यांमध्ये जल जसे असत नाही; किंवा स्वप्नांतरी जे विविध पदार्थ - दृश्ये - भूतजात दिसतात, ती जागृतावस्थेत दिसत नाहीत - म्हणजे खरे तर त्यांचे अस्तित्व जसे भासात्मक असते, खरे नसते; त्याप्रमाणे ही सर्व भूते जरी माझ्याठायी दृश्यमान होत असली, तरी त्यांच्याठायी मी नसतो."

"हे मी तुला पूर्वीच सोपपत्तिकरीत्या समजावून सांगितले होते. *(सातव्या अध्यायी)* अष्टधा प्रकृति व तदनुषंगाने माझा प्रभाव सांगून झाला आहे; मीच कसे हे जग व्यापले आहे, हे विभूतितत्त्वांच्या किंचित निदर्शनाने ***".... रसोऽहमप्सु कौन्तेय ..."*** इ.श्लोकांतून वर्णन केले होते. ***"मत्तः परतरः नान्यत्किञ्चिदस्ति ...।।"*** असे पण सांगितल्याचे तुला स्मरत असेलच. आणि ***"ये चैव सात्त्विका भावा..। मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि।।"*** हा भागसुद्धा तू आठव!"

म्हणौनि बोललियां बोलाचां अतिसो। न कीजे ययालागीं हे असो।
तऱ्हीं मजआंतु पैसो। दिठी तुझी।।९-७०।।
आमुचा प्रकृतिपैलीकडील भावो।
जऱ्हीं कल्पनेविण लागसीं पाहों।
तऱ्हीं मजमाजीं भूतें हेंही वावो। जैं मी सर्व म्हणौनि।।७१।।

" हे धनंजय! वारंवार तुझ्या मनावर नीट बिंबावे म्हणून पुनरुक्तीचा दोष स्वीकारून माझ्या खऱ्या स्वरूपाचे तत्त्व तुला नीट आकळावे म्हणून परत सांगतो. माझे खरे स्वरूप ध्यानी आण व त्यात तुझी दृष्टी गुंतव! तसे पाहिले की तुला लगेच उमजेल की कल्पनातीत अशी व मायेपलीकडची माझी जी स्वरूपस्थिती आहे, तिच्याठायी या प्राणिमात्रांचे असणे शक्य नाही. कारण हे सर्वच मी आहे."

एऱ्हवीं सकल्पाचियें सांजवेळें। नावेक तिमिरेजती बुद्धिचें डोळें।
म्हणौनि अखंडित परि झांवलें। भूतभिन्न ऐसें देखें।।९-७२।।
तैंचि संकल्पाचि सांज पैं लोपे। तैं अखंडितचि आहे स्वरूपें।
जैसीं शंका जातखेंवो लोपे। सापपण मालेचें।।७३।।

"सहज विचार केला तर तुला कळून येईल की संकल्पनारूपी सायंकाळी बुद्धीची दृष्टी थोडी मंद पडते. त्या क्षणभरात माझे अखंडित स्वरूप झाकोळून जाऊन त्या ठिकाणी बुद्धीस भिन्नभिन्न भूते दृग्गोचर होतात. ती संकल्पवेळ - तो कमी प्रकाश या अवस्था नाहीशा झाल्या, बुद्धीची दृष्टी पूर्ववत झाली की माझे अखंड स्वरूप परत जसेच्या तसे दिसू लागते. माळ आहे ती सर्प असल्याचा भास व्हावा व नंतर खरे ते लक्षात आल्यावर माळेचे स्वरूप परत जसे प्रतीत होते, तसेच हे जगडंबर व मी यांच्याबाबत आहे."

"इयें निर्मळें माझां स्वरूपीं"

एऱ्हवीं तऱ्हीं भूमीआंतूनि स्वयंभ।
काय घडेयागाडगेयांचें निघति कोंभ।
परि तैं कुलालमतीचें गर्भ। उमटलें कीं।।९-७४।।
ना तऱ्हीं सागरींचां पाणीं। काय तरंगाचियां आहाति खाणी।
तैं अवांतर करणी। वारियाची नव्हे।।७५।।
पाहें पां कापुसाचां पोटीं। काय कापडाची होती पेटी।
तो वेढितयाचियां दिठीं। कापड जाहला।।७६।।
जऱ्हीं सोनें लेणें होऊनि घडे। तऱ्हीं तेयाचें सोनेपण न मोडें।
एर अलंकार हें वरचिलीकडें। लेतयाचेनि भावें।।७७।।
सांगें पडिसादाची प्रत्युत्तरें। कां आरिसा जैं आविष्करें।
तैं आपुलें कीं सांचोकारें।तेथेंचि होतें।।७८।।

"मातीची भांडी, घडे-गाडगे, माठ, परळ इ.असतात, ते काय आपोआप जमिनीला फुटलेले कोंब असतात की काय! ते तर कुंभाराच्या बुद्धीतून निर्माण होतात. सागराच्या पोटात काय लाटांची खाण असते! पाण्याचे लाटात रूपांतर करण्याची ही अवांतर करणी वाऱ्याची नसते का! असे पाहा की कापसाच्या पोटात कापडाचा गठ्ठा असतो का! वस्त्र नेसणाऱ्याच्या दृष्टीतून पाहता तो कापूसच कापड होतो ना! सोन्याचे अलंकार होतात, तेव्हा त्यांचे सोनेपण नाहीसे न होता लेणाऱ्यास अलंकाररूपाने दिसते. ध्वनीस प्रतिध्वनी येतो किंवा आरशात आपले प्रतिबिंब प्रकटते. ही काय स्वयंभू असतात किंवा प्रत्यक्ष ध्वनी किंवा आपण असतात! यासारखेच आहे, पाहा!"

तैसें इयें निर्मळें माझां स्वरूपीं। जो भूतभावना आरोपी।
तेयांसीं तेयाचां संकल्पीं। भूताभासु दिसे।।९-७९।।
तैंचि कल्पिती प्रकृति पुरे। आणि भूताभासु आधींच सरे।
मग स्वरूप उरे एकसरें। निखल माझें।।८०।।
हें असो आंगीं भरलियां भवंडीं।
जैशा भोंवत दिसती अरडीदरडी।
तैशीं आपुलियां कल्पना अखंडीं। गमती भूतें।।८१।।
तैंचि कल्पना सांडौनि पाहीं। तऱ्हीं मी भूतीं भूतें माझीयां ठायीं।
हे स्वप्नींहीं परि नाही। कल्पावयाजोगें।।८२।।

"माझे स्वरूप अत्यंत निर्मळ आहे. पण त्याच्यावर भूतभावनेचा आरोप जेव्हा केला जातो, तेव्हा त्या संकल्पकर्त्यास अशा भावनेमुळे माझ्याठायी भूताभास होतो. जेव्हा असा आरोप करणाऱ्या प्रकृतीचा लय होतो, त्यावेळी माझे निखळ अखंड स्वरूप जसेच्या तसे उरते. स्वतःभोवती गरागरा फिरून भोवळ येते. त्याप्रमाणे निव्वळ संकल्पाची - प्रकृतीची - भोवंड आल्यामुळे, माझ्या अखंड स्वरूपी जी कधीच विद्यमान नसतात, ती भूते दिसायला लागतात. पण जेव्हा ही भोवळ नाहीशी होते, कल्पना निमते, प्रकृति विरमते, तेव्हा मी भूतात असतो किंवा ही भूते माझ्याठायी असतात, अशी कल्पना स्वप्नातसुद्धा करता येणार नाही."

"निर्विकल्पीं। मीचि मी आघवें।।"

आतां मी एक भूतांतें धर्त्ता। अथवा भूतांमाजीं मी असतां।
या संकल्पसंन्निपाता-। आंतिलियां बोलियां।।९-८३।।
म्हणौनि परियेसी गां प्रियोत्तमा। ययापरी मी विश्वेंसीं विश्वात्मा।
जो इयां लटकियां भूतग्रामा। भाव्यु सदा।।८४।।
रश्मीचेनि आधारें जैसें। नव्हतेंचि मृगजल आभासें।
माझांठायीं भूतजात तैसें। आणि मातेंहीं भावीं।।८५।।

"म्हणून मी भूतांना धारण करतो अथवा भूतमात्रांमध्ये मी भरून राहिलो आहे, अशी धारणा म्हणजे सन्निपात ज्वरात केलेल्या वायफळ बडबडीसारखी आहे. हे प्रियोत्तमा अर्जुना! या मिथ्या मृगजळवत भूतग्रामाचा भूतभावन भूतेश, त्यांना आधार असणारा जो मी आहे, तो कसा आहे ते ऐक. सूर्यकिरणांच्या योगे जेथे जलाशय नसतो, तेथे त्याचा आभास उत्पन्न करणारे मृगजळ जसे उत्पन्न होते, तद्वत ही भूतमात्रे माझ्याठायी दिसतात, तो आभास माझ्यामुळे निर्माण होतो. जेथे जलाशय नसतो, तेथे तो असल्याचे जसे मृगजळामुळे दिसते, तसा त्या भूतांठायी नसलेला मी त्यांच्याठायी असलेला भासतो, तो केवळ माझ्या त्या सूर्यकिरणांइतक्याच सत्य अस्तित्वाने!"

मी ये परीचा भूतभावनु। परि सर्व भूतांसीं अभिन्नु।
जैसीं प्रभा आणि भानु। एकचि तैं।।९-८६।।
हा आमुचा ऐश्वर्ययोगु। तुवां देखिला कीं चांगु।
आतां सांगें काई एथ लागु। भूतभेदाचा असे।।८७।।

"माझा या भूतसंघास असा आश्रय आहे. असे हे सर्व आहे, तरीही मी या भूतमात्रांहून वेगळा नाही. भानु आणि प्रभा, रवी आणि त्याचा प्रकाश, हे जसे अभिन्न असतात, तसा मी व हे भूतमात्र यांतील संबंध आहे. यालाच - या अशा प्रकारच्या नात्याला माझा *ऐश्वर्ययोग* असे जाणकार म्हणतात. या संबंधामुळे मला *ईश्वरत्व* प्राप्त झाले आहे. भूते आणि मी त्यांचा ईश्वर यातले हे नाते आता तुला चांगले उमजले आहे. तर सांग बरे! महत् तत्त्वादी समस्त हे विश्व आणि मी यांच्यात कोणता तरी भेद आहे का!"

यालागीं मजपासूनि भूते। आनें नव्हती निरुतें।
आणि भूतांवेगलियां मातें। कहींच न हो मनीं।।९-८८।।
पैं गगन जेवढें जैसें। पवनु गगनीं तेव्हढाचि असे।
सहजें हालविलियां वेगळा दिसें। एऱ्हवीं गगन तैंचि तो।।८९।।
<u>तैसें भूतजात माझांठायीं। कल्पिजे तऱ्हीं आभासें काईं।</u>
<u>निर्विकल्पीं तऱ्हीं नाहीं। तेथ मीचि मी आघवें</u>।।९०।।

"यास्तव माझ्याहून हे प्राणिमात्र वेगळे नाहीत आणि मीसुद्धा त्यांच्याहून भिन्न आहे, असे मानत जाऊ नकोस. पण ध्यानात घे! गगन जेवढे व जसे असते, अगदी तसाच आणि तेवढाच त्यातला वायू पण असतो. जर तो हलला - चळला, तर वायू गगनाहून भिन्न असल्याचे जाणवते. एरवी वायू म्हणजे जसे गगनच, तसाच कल्पनेच्या वाहुटळीत या भूतांचा आभास - यांचे माझ्याठायीचे वेगळे अस्तित्व जाणवते. अन्यथा निर्विकल्प स्थितीत भूते नसतातच! असतो तो केवळ एकला मीच!"

ऐश्वर्ययोग

म्हणऊनि नाहीं आणि असे। हे कल्पनेचेनि सौरसें।
जैं कल्पनालोपें भ्रंशे। आणि कल्पनेसवें होये।।९-९१।।
तैंचि कल्पितें मुदल जायें। तैं असें नाही हें कें आहे।
म्हणौनि पुढती तूं पाहे। हा <u>*ऐश्वर्ययोगु*</u>।।९२।।

"म्हणून हे विश्व व त्यातील भूतग्राम हे अस्तित्वात असतात वा नसतात, हे सर्व कल्पनायोगे भासते. संकल्पना केली की यांचे अस्तित्व प्रकटते आणि ती निमाली की यांचा लोप होतो. ही कल्पना - हा संकल्प हा तरी निव्वळ अहंकाराचा प्रताप आहे. म्हणून जेव्हा या अहंकाराचे मुद्दल नष्ट होते, तेव्हा कल्पना लोप पावते. त्यावेळी भूतांचे असणे वा नसणे हा व्यवहारसुद्धा शक्य नसतो. असा हा माझा *ऐश्वर्ययोग* आहे."

ऐसिया प्रतीतीबोधसागरीं। तूं आपणायातें कल्लोलु करीं।
मग जंव पाहसीं चराचरीं। तंव तूंचि आहासि।।९-९३।।

"हा योग तू नीट उमजून घे. हे तत्त्वज्ञान नीट पचव आणि अनुभूती घे. एकवार या अद्वैतबोधाची तू प्रतीती घे. तसे केलेस की या प्रतीतिबोधरूपी सागराची एक लाट तू होऊन जाशील आणि तेव्हा समस्त चराचराकडे तू पाहिलेस तर जिकडेतिकडे तुला इतर कोणीही दिसणार नाही."

या जाणणेयाचां चेवो। तुज आला ना म्हणती देवो।
तऱ्हीं आतां द्वैतस्वप्न वावो। जालें कीं ना।।९-९४।।
तऱ्हीं पुढुति जऱ्हीं विपायें। बुद्धिसीं कल्पनेची झोंप ये।
तऱ्हीं अभेदबोधु जाये। जैं स्वप्न पडिजे।।९५।।

"या ज्ञानाचा उन्मेख - ही जाणीवेची जागृती तुला आली ना! आणि तुला पडलेले द्वैतावस्थेचे - विश्व व मी व तू हे कोणी भिन्नभिन्न आहोत, असे स्वप्न मिथ्या ठरले की नाही, सांग बरे! पण लक्षात ठेव. पुनः जर का बुद्धीने कल्पनारूपी झोप पांघरली, तर हा अभेदभाव, हा अद्वैतबोध जाऊन परत विश्वभिन्नतेचे - द्वैताचे स्वप्न तू पाहू लागशील."

म्हणौनि इयें निद्रेची वाट मोडें।
निखल उद्बोधाचेंचि आपणपें घडे।
ऐसें वर्म जैं आहे फुडें। तैं दावो आतां।।९-९६।।
तऱ्हीं धनुर्धरा धैर्या। नीकें अवधान देईं बा धनंजया।
पैं सर्व भूतांतैं माया। करी हरी गां।।९७।।

"म्हणून असे कधीही होणार नाही व त्या कल्पनारूपी निद्रेला ठावच मिळणार नाही आणि तुला केवळ स्वरूपावस्थेतच सतत राहता येईल, असे जे वर्म आहे - जे खास रहस्य आहे, ते तुला दाखवतो.

तरी हे धैर्यधर धनुर्धारी अर्जुना! नीट अवधानपूर्वक माझ्याकडे लक्ष पुरव."

ज्ञानेशांचा *महासमन्वयकारक महासिद्धांत*

आतापर्यंत गीतेच्या *श्लोक क्र.९-४,५ व ६* यांच्या आधारे श्रीज्ञानेशांनी जे हे *ब्रह्माचे स्वरूप, ईश्वर, जगत, द्वैत, अद्वैत, जीवमात्र, चराचर विश्व, सोऽहंवाद, अहं ब्रह्मास्मिची अनुभूती, माया वा प्रकृति* या सर्वांविषयी विवेचन केले आहे; त्यात त्यांचे चिद्विलासाचे तत्त्वज्ञान मूर्त होते. निर्गुण निराकार ब्रह्म उपासले जाऊ शकत नाही; सगुण साकार अशा त्याच्या स्वरूपाचीच उपासना करून ईश्वरसाक्षात्कार होऊ शकतो.

हा ईश्वर व ब्रह्म ही वेगळी नाहीत; असा साक्षात्कार मर्त्य मानवास सश्रद्धरीत्या केलेल्या योगाचरणाने - भक्तीने सहज सुलभरीत्या होऊ शकतो; हा साक्षात्कार - ही अनुभूती *याचि देहीं याचि डोळां* प्राप्त करून घेता येते; अशी अनुभूती ज्याला घेता येते, तो जीवन्मुक्ती पावतो, ब्रह्म होऊन वावरतो; स्वसंवेद्य असे आत्मरूप हेच काय ते एकमेव सत्य आहे; त्या एकाचे अनेकत्व - नानात्व - ही संकल्पनेची फळे होत; ही संकल्पना अहंकार निर्मितो; *एकोऽहं, बहुस्यामः।* या त्या संकल्पाचे फळ माया वा प्रकृतीच्या हुंकारातून या विश्वरूपाने प्रकटते; या प्रकृतीचा योगधारणेने लय करून अहंकारास भगवंताला अर्पण करून शरण येण्याने सर्वश्रेष्ठ अशी आत्मानुभूतीची - *अपरोक्षानुभूती*ची प्राप्ती होते; भक्ती ही खरी तर अपरोक्षानुभूतीची दशाच होय; अशा सिद्धांतबीजांस ज्ञानदेवांचा हा *चिद्विलासवाद* रुजवतो.

त्या बीजांचा महान वृक्ष होतो. या वृक्षासच ज्ञानदेव *राजविद्या, राजगुह्य, पवित्र, उत्तम, प्रत्यक्षावगमं, धर्म्य, अव्यय, अविनाशी, सहजसाध्य,* इ.गीतोक्त सालंकृत शब्दांनी गौरवताहेत, असे आपणांस न जाणवले,तरच नवल! या सिद्धांतशिरोमणीच्या - या महासिद्धांताच्या आवाक्यात जगातील सर्व उत्कृष्ट तत्त्वज्ञानप्रणालींचा सुरेख संगम होतो.

गीताश्लोकातील अति सैल - बऱ्याचदा व्याघातपूर्ण अनुबंध आणि तर्कहीन, दिशाहीन अशी वाटणारी तत्त्वज्ञानमीमांसा; तसेच कर्म-ज्ञान- योग -भक्ती इ.विविध मार्गोपमार्गांची गचाळ दाटीवाटी; विविध उपनिषदांचा एकदुसऱ्याशी मेळ बसत नसतांनाही अटीतटीने त्यांचा समन्वय करण्याचा विफल प्रयत्न; इ. काही विद्वानांस जाणवणारे गीतेवरील आक्षेप आपल्या अशा या महासिद्धांताच्या - चिद्विलासाच्या योगाने निष्प्रभ ठरवण्याएवढी अनुभूती या महात्म्या ज्ञानदेवांस उपजतच असल्याने आजपावेतो झालेल्या तत्त्ववेत्त्यांस जो तत्त्वज्ञानसमन्वय करता आला नाही, तो करून आपणांसारख्या जिज्ञासूंना योग्य मार्गदर्शन व्हावे, असे आपले भाग्य उजळवण्याचे श्रेय म्हणून ज्ञानदेवांनाच द्यावे लागते.

प्रकृतीचे अधिष्ठान::::

प्रकृतीचे स्वामित्व

आता प्रकृतीचे स्वरूप व तिचे परब्रह्माशी असणारे जे नाते आहे, त्याचे दर्शन श्रीकृष्ण कसे करतात, त्याकडे वळू याः

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम्।।९-७।।

"हे कौंतेया! ही सर्व भूते कल्पांती माझ्या प्रकृतीस येऊन मिळतात आणि कल्पारंभी मी त्यांना पुनः उत्पन्न करतो."

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात्।।९-८।।

"ही भूते आपापल्या कर्मफलांयोगे प्रकृतीला वश म्हणजे पराधीन व बद्ध झालेली असतात. ती प्रकृती माझ्या स्वाधीन असते. तिचा अवलंब करून स्वभावतः म्हणजे त्रिगुणांयोगे बद्ध झालेल्या या भूतांचा समुदाय कल्पांमागून कल्पे असा मी पुनःपुनः निर्माण करतो."

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु।।९-९।।

"हे धनंजया! या भूतमात्रांस निर्मिण्याच्या कर्माची फले मला बद्ध करत नाहीत. कारण उदासीनवत असणाऱ्या मला त्या फलांची आसक्ती नसते."

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते।।९-१०।।

"हे कुंतीपुत्रा! माझ्या स्वामित्वाखाली असणारी ही प्रकृती अशा प्रकारे या चराचरास सर्जतांना दिसते. या सर्व व्यापारास - जगडंबरास कारण म्हणजे मीच आहे."

गीतेतील तत्त्वज्ञान

जीव-जगत - ईश्वर यांचा संबंध स्पष्ट करणे हे तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट असते. या त्रयींची तत्त्वज्ञानपरत्वे वेगवेगळ्या संज्ञांत व कित्येकदा त्रयीऐवजी द्वयीत ओळख करून दिली जात असली, तरी यातील खरा संबंध जाणून घेणेच जिज्ञासू - मुमुक्षूंच्या हिताचे असते. प्रमुख अशा तत्त्वज्ञानसंकेतांचा परामर्ष घेतांना असे आढळून येते की या तीन संज्ञा अत्यंत लवचीकपणे वापरल्या जाऊ शकतात. या लवचीकपणाचाच बळकट धागा करून गीता त्या सर्वांत एकसूत्रता व एकवाक्यता साधण्याचा प्रयत्न करते.

म्हणून तत्त्वतः जरी *ब्रह्म -ईश्वर – सगुण - निर्गुण परमेश्वर - परब्रह्म* या विविध संज्ञांद्वारे वेगवेगळ्या मितींचा व परिमाणांचा निर्देश होत असला, तरी भगवंत या सर्व संज्ञांचा गीतेत स्वतःचा उल्लेख करण्यासाठी व आपल्या तत्त्वाचे विवेचन करण्यासाठी विनियोग करतांना आढळतात.

अशा या तत्त्वाचे - परमतत्त्वाचे -रूपकचित्र ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच *आद्य, वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य, आत्मस्वरूप,* ***"सर्वेषां पूर्वेषामपि***

कालेनानवच्छेदात् गुरुः" *सकलांचा - गुरूंच्या गुरूचाही गुरू - ज्याला कालाची मर्यादा नसते असा, सकलमतिप्रकाशक, द्वैताद्वैतनिकुंभ असणाऱ्या, विविध दर्शनांनी - तत्त्वज्ञानांनी - प्रमेयांनी - उपनिषदांनी मूर्त केलेल्या, अकार -उकार - मकार त्रयींनी युक्त अशा ॐकाररूप, ज्ञानमकरंद उदारतेने दान करणाऱ्या, सुविवेक-सुविमल बुद्धीने अभ्यर्चिल्या जाणाऱ्या, महासुखदायक, परमानंदस्वरूप* अशा ज्या गणेशाद्वारे प्रकट केले आहे, त्याला वंदन करतकरतच आपणांस त्या गीता परमतत्त्वाचे - त्या गुह्यातिगुह्य दैवी अशा परमात्म्याचे दर्शन घ्यावयाचे असते, हे ध्यानात ठेवले पाहिजे. त्या आत्मरूप गणेशाच्या मानचित्राची ही विविध अंगे न्याहाळणे मनोरमच आहे. असो.

प्रकृतिनिरूपण

म्हणून आता त्या *कर्त्या असूनही अकर्त्या*, प्रकृतीचे स्वामित्व असूनही अलिप्तपणे असणाऱ्या, कर्मफलांनी बद्ध न होणाऱ्या ईश्वराचा प्रकृतीशी असणारा संबंध ज्ञानदेव कसा स्पष्ट करतात, ते जाणून घेऊ या.

जिये नांव गां प्रकृति। जैं द्विविध सांघितली तुझ प्रति।
एकीं अष्टधा भेदव्यक्तीं। दुजी जीवरूपा।।९-९८।।
हा प्रकृतिविखो आघवा। तुवां मागां परिसिलासे पांडवा।
म्हणौनि असो काइं सांगावा। पुढतपुढुति।।९९।।
तऱ्हीं ये माझिये प्रकृति। महाकल्पाचां अंतीं।
सर्व भूते अव्यक्तीं। ऐक्यासि येती।।१००।।

"हे धनंजया! सर्व भूतमात्रांस मायाच उत्पन्न करते आणि त्यांचा नाशही तीच करते. हिचेच नांव प्रकृति आहे. ***अपरा (अष्टधा) व परा (जीवरूपा)*** असे तिचे दोन प्रविभाग आहेत. हिचे अष्टधा भागसुद्धा वर्णिले जातात. हा सर्व विषय तू पूर्वीच श्रवण केला आहेस *(अ. ७ श्लोक क्र.४ व ५)*. तर तो आता परत सांगायला नको. त्याबाबत पुढील भाग ऐक. कल्पक्षय जेव्हा होतो, तेव्हा सर्व भूते माझ्या अव्यक्त अशा प्रकृतीत लीन होतात."

ग्रीष्माचां अतिरसीं। सबीजें तृणें जैसीं।
मागुती भूमीसि। सुलीनें होती।।९-१०१।।
कां वार्षियें ढेढें फिटे। तेव्हां शारदियेचा अनघडु फुटे।
तेव्हां घनजात आटे। गगनीचें गगनीं।।१०२।।
ना तऱ्हीं आकाशाचियें खोपें। वायु निवांतचि लोपे।
कां तरंगता हारपे। जलीं जेवीं।।१०३।।
अथवा जागिनलिये वेळें। स्वप्न मनींचें मनीं मावले।
तैसें प्राकृत प्रकृतीं मिळे। कल्पक्षयीं।।१०४।।
मग कल्पादि पुढुति। मीचि सृजी ऐसीं वदंती।
तऱ्हीं इयेंविखीं निरुती। उपपत्ति आइक।।१०५।।

"ग्रीष्माच्या तडाख्याने गवत जसे बीजासह भूमीत पूर्णतया लीन होते; किंवा वर्षाऋतूची झाकोळी जाऊन जेव्हा शरदाचे चांदणे प्रसन्न आकाशात सुशांत पहुडते, तेव्हा जशी आकाशीची मेघडंबरी आकाशीच विरून जाते; अथवा गगनाच्या महालात वायू जसा निवांत होऊन लोपून जातो; वा लाट जशी जळी हरपून नाहीशी होते; एवढेच काय! पण जागृत झाले की स्वप्न जसे मनातल्या मनात मावळून जाते; तद्वतच कल्पक्षयाच्या वेळी हे प्रकृतीपासून उद्भवलेले जगत त्यातल्या जीवमात्रांसह प्रकृतीत मिळून नाहीसे होते. त्यानंतर नवीन कल्पारंभी मीच त्यांना परत निर्माण करतो असे लोकांत प्रचुर आहे. पण याची वस्तुस्थिती स्पष्ट करणारा विचार नीट श्रवण कर."

प्रकृती व परमात्मा यांचा संबंध::::

प्रकृतीस परमात्म्याचे अधिष्ठान

प्रकृतीशी असणारा आपला संबंध स्पष्ट करतांना श्रीकृष्ण परमात्मा पुढे म्हणतातः

तऱ्हीं हेचि प्रकृति किरीटी। मी स्वकीया सहजें अधिष्ठीं।
तेथ तंतुसमवायपटीं। जेविं विणवणी दिसे।।९-१०६।।
मग तियें विणावणीचेनि आधारें। लहानां चौकडियां पटत्व भरे।
तैसीं पंचात्मकें आकारें। प्रकृतिचि होये।।१०७।।
जैसें विरजणियाचेनि संगें। दूधचि आटेजो लागे।
तैसीं प्रकृति आंगां रिगे। सृष्टीचियां।।१०८।।

"हे अर्जुना! अशा या माझ्या प्रकृतीचा स्वाभाविक संबंध माझ्याशीच असतो. माझे अधिष्ठान लाभल्याने तीच या पंचमहाभूतात्मक जगदाकाराची होते. ज्याप्रमाणे तंतूंच्या विणीतील तंतूंनीच चौकडी चौकडी होत जाऊन वस्त्रात त्या तंतूचे रूपांतर होते; किंवा विरजणाच्या साहचर्याने दूधच घट्ट होत जाऊन त्याचे दह्यात रूपांतर होते; तद्वतच माझे अधिष्ठान लाभल्याने या प्रकृतीच्या अंगी हे सृष्टित्व प्रकट होते."

बीज जलाची जवलीक लाहे। आणि तैंचि शाखोपशाखीं होये।
तैसें मज करणें आहे। भूतांचें हें।।१०९।।
अगां नगर हें रायें केलें। ययां म्हणण्या सांचपण कीर आलें।
परि निरुतें पाहातां काय शिणलें। रायाचें हात।।११०।।
आणि मी प्रकृति अधिष्ठीं तैं कैसें। जैसा स्वप्नीं जो असे।
मग तोचि प्रवेशे। जागृतावस्थे।।१११।।
तऱ्हीं स्वप्नौनि जागृति येतां। काय पाय दुखती पांडुसुता।
कीं स्वप्नामाजीं असतां। प्रवासु होये।।११२।।
या आघवियाचा अभिप्रावो कायी। जैं हें भूतसृष्टीचें काईं।
मज एकुही करणें नाहीं। ऐसाचि अर्थु।।११३।।

"बीजास जळाचा ओलावा लाभला की शाखोपशाखांच्या रूपाने त्या बीजाचे विस्तीर्ण झाड जसे होते, तसेच माझ्या सहवासाने प्रकृतीस हे जगद्रूप प्राप्त होते. मी भूतांना निर्मितो असे म्हणणे या प्रकारचे आहे. हे पहा! राजाने नगर वसवले आहे, असे म्हणतात. ते जरी खरे असले, तरी त्यासाठी राजाने काही कष्ट उपसले होते का! प्रकृतीला या जगदुत्पत्तीसाठी माझे अधिष्ठान कारणीभूत होते, असे म्हटले आहे. पण तेसुद्धा स्वप्नातून जागृतीत येतांना स्वप्नात

घडलेल्या प्रवासाने माणसाचे पाय दुखतात, असे म्हणण्यासारखे आहे. आणि स्वप्नात प्रवास तरी कधी घडतो का! या सर्वाचा मतितार्थ काय तो एकच की या समस्त भूतसृष्टीस उत्पन्न करणे हे माझे कर्तृत्व नाही. जसा प्रजेला तिच्या राजाचा आश्रय असतो व त्याच्या आधाराने जो तो प्रजाजन आपापले व्यवहार राहाटत असतो, त्याप्रमाणे या प्रकृतीच्या व्यवहाराला - या सृष्ट्युत्पत्तीला माझ्या सत्तेचे केवळ अधिष्ठान मात्र असते; जे काही कर्तृत्व असते, ते केवळ त्या प्रकृतीचेच!"

जैशीं रायें अधिष्ठिलीं प्रजा। व्यापारें आपुलालियां काजा।
तैसा प्रकृतिसंगु माझा। एर करणें तैं इयेचें।।९-११४।।
पाहें पां पूर्णचंद्राचिये भेटी। समुद्रीं भरतें अपार दाटी।
तेथ चंद्रासीं काय किरीटी। उपखा पडे।।११५।।
जड परि जवलिका। लोह चले तऱ्हीं चलो कां।
कवण शीणु भ्रामका। सन्निधानाचा।।११६।।
किंबहुना इयापरी। मी निजप्रकृति अंगीकारीं।
आणि भूतसृष्टी एकसरीं। प्रसवोंचि लागे।।११७।।

"प्रकृतीशी असा जो माझा संग घडतो, तोसुद्धा कसा तर पूर्णचंद्राचा सागरास येणाऱ्या भरतीशी असतो, तसा! समुद्र भरतीने अफाट भरून येतो, तो काय चंद्राने काही केले म्हणून की काय! जड लोखंड लोहचुंबकाच्या सान्निध्याने सचेतन होऊन हलूचळू लागल्यासारखे दिसले, तर दिसू दे; पण त्या त्याच्या चेष्टितांचा लोहचुंबकास जवळपणामुळे काही शीण होतो का! किंबहुना याचप्रमाणे माझ्या जवळिकीमुळे ही माझी प्रकृती भूतसृष्टीस प्रसवू लागते. पण त्यात माझा सहभाग मात्र शून्यच असतो."

परमात्म्याचे साक्षित्व

आणि ही भूते त्या प्रकृतीच्या कशी अधीन असतात, पाहाः

जो हा भूतग्रामु आघवा। असे प्रकृतिआधीन पांडवा।
जैसीं बीजाचियां वेलापालवां। समर्थ भूमी।।९-११८।।
ना तऱ्हीं बालादिक वयसां। गोसावी देहसंगु जैसा।
अथवा घनावली आकाशा। वर्षिये जेवीं।।११९।।
कां स्वप्नासीं कारण निद्रा। तैशी प्रकृति हे नरेंद्रा।
या अशेखाही भूतसमुद्रा। गोसाविणी गां।।१२०।।

"हे अर्जुना! भूतैकमात्रे जी जी आहेत, ती ती सर्व या प्रकृतीच्या अधीन आहेत. बीजापासून वेल अंकुरते अन पाना-फला-फुलांनी बहरते, त्याला जमीन जशी मूळ आहे; बाल्य-तारुण्य-वार्धक्यादी अवस्था देहावर उमटतात, त्यांना प्राणाचा देहाशी होणारा संग जसा कारणीभूत असतो; जसा आकाशात मेघमाला प्रकटण्यामागे हेतू वर्षाऋतू हाच असतो; किंवा स्वप्न पडण्यास कारण पहावे, तर जशी निद्रादेवी असते; त्याप्रमाणे, हे नरेंद्रा! या समस्त भूतसागराचे मूळ म्हणजे त्याची स्वामिनी अशी ती प्रकृती आहे."

स्थावरां आणि जंगमां। स्थूलां आणि सूक्ष्मां।
हे असो भूतग्रामां। प्रकृतिचि मूल।।९-१२१।।
म्हणौनि भूतें हन सृजावी। कां सृजिलीं प्रतिपालावी।
इयें करणीं न येती आघवीं। आमुचियां आंगां।।१२२।।

"यच्चयावत स्थावर आणि जंगम सृष्ट्य अशा पदार्थांचे स्थूळ व सूक्ष्म अशा समस्त वस्तुजाताचे मूळ - या विशाल भूतसमुदायाच्या उत्पत्ति-स्थिति-लयादी अवस्थांचे कारण असे या प्रकृतीचेच आहे. म्हणून भूते सर्जावी, त्यांचा प्रतिपाळ करावा, इ.कर्तृत्वे माझ्या स्वरूपाशी संबंधित नाहीत."

जलीं चंद्रिकेचियां पसरती वेली। तैं वाढी चंद्रें नाहीं वाढिविलीं।
तेवीं मातें पावोनि ठेलीं। दूरीं कर्में।।९-१२३।।

"हे असो! ही प्रकृती माझीच आहे असे म्हणावे, तर ते तसेही नाही. चंद्रकिरणांनी पोषण करून वाढवलेल्या जळवेलींच्या वाढीचे कार्य काय चंद्र करतो! ते तर त्याच्या अस्तित्वाने आपोआपच घडत असते. तशीच ही प्रकृतीने घडवलेली कर्मे माझ्या अस्तित्वाने होत असली, तरी माझ्याशी त्यांचा सुतरामही संबंध नाही. आणि समज की मीच या कर्मांचा कर्ता आहे म्हणून! तर काय त्या सकळ सृष्टीचे उपादान कारण असा जो मी आहे, ज्याव्यतिरिक्त सृष्टी निष्प्रभ आहे, त्या मलाच ती बंधन करतील!"

आणि सुटलियां सिंधुजलाचां लोटु। न शके धरूं सैंधवाचा घाटु।
तेवीं सकल कर्मां मीचि शेंवटु।
तैं काईं बांधिती मातें।।९-१२४।।
धुमरजाचि पिंजरी। वाजतियां वायूतैं जऱ्हीं हांकारी।
कां सूर्यबिंबामाघारीं। आंधारें रिगे।।१२५।।
हे असो पर्वताचिये हृदयींचें। जेवीं पर्जन्यधारांस्तव न खोंचें।
तेवीं कर्मजात प्रकृतीचें। न लगे मज।।१२६।।

"समुद्राच्या लाटेला मिठाचा बांध अडवू शकेल काय! धूम्रकणांचा पिंजरा काय वाहत्या वाऱ्याला बंदिस्त करू शकेल! सूर्यबिंबात अंधकार प्रवेशू शकेल काय! उत्तुंग अन विशाल अशा पर्वतराजींवरून कोसळत वाहणाऱ्या पर्जन्यधारा काय त्याच्या अंतरंगापर्यंत पोहोचून ते झिजवू शकतात का कधीतरी! असेच त्या प्रकृतीचे कर्मजात काही मला बद्ध करू शकत नाही."

एऱ्हवीं इयें प्रकृतिविकारीं। एकु मीचि आहे अवधारीं।
परि उदासीनाचियां परी। करीं ना करवीं।।९-१२७।।

"तसे पाहिले तर या विश्वातील एकमात्र कर्ता करविता जरी मी एकटाच आहे, असे असले तरी मी कर्तृत्वशून्य आहे. उदासीन वृत्ती असलेल्या पुरुषाप्रमाणे या कर्मांत मी प्रवृत्त होत असल्याने ती कर्मे खरी तर मी करीतही नाही आणि प्रकृतीकडून करवीतही नाही."

दीपु ठेविला परिवरीं। कवणांतैं नियमीं ना निवारीं।
आणि कवण कवणियां व्यापारीं। राहाटे तैंहीं नेणें।।९-१२८।।

तो जैसा कां साक्षिभूतु। गृहव्यापारप्रवृत्तिहेतु।
तैसा भूतकर्मीं अनासक्तु। मी भूतीं असे।।१२९।।

"पहा! घरात दीप ठेवतात, तो कोणी काय करावे किंवा करू नये, हे ठरवून देतो का! आणि कोण काय काम करतो, ते तरी त्याला ठाऊक असते काय! जसा तो दिवा गृहातील व्यवहारांस प्रवृत्त करत असला तरी त्यांचा कर्ता नसतो, त्यांचे कारणही नसतो, तर निव्वळ साक्षिभूत असतो; त्याप्रमाणे या जगतातल्या व्यापाराला मी प्रवृत्त करत असलो, तरी ते केवळ साक्षित्वाने! त्या सकळ भूतमात्रांच्या कर्मात अनासक्तपणे मी वावरतो. माझे भूतजातात असणे हे अशा प्रकारचे आहे."

"इंद्रियां देऊनि कवाड। हृदई भोगीं"

हा एकुचि अभिप्रावो पुढुतपुढुति। काय सांगो बहुतां उपपत्ती।
तेथ एकहेल सुभद्रापति। येवढें जाण पां।।९-१३०।।
जैं लोकचेष्टां समस्तां। जैसा निमित्तमात्र कां सविता।
तैसा जगत्प्रभवीं पांडुसुता। हेतु मी जाणें।।१३१।।
कां जैं मियां अधिष्ठिलियां प्रकृति। होती चराचराचियां संभूतीं।
म्हणौनि मी हेतु हें उपपत्ती। घडे येयां।।१३२।।

"माझ्या स्वरूपाचा जगताशी आणि त्यातील भूतमात्रांशी हा जो संबंध आहे, तो किती वेळा सांगायचा! अनेक युत्त्याप्रयुत्त्यांनी हा विषय समजावला गेला आहे. हे सगळे उमज आणि अर्जुना! मुख्य अभिप्राय नीट ध्यानी ठसवून घे, म्हणजे झाले! तो म्हणजे या समस्त लोकादींच्या चेष्टा - त्यांचे व्यापार - कर्मजात ही प्रकृति व तिचे कर्तृत्व इ.ना या लोकांच्या उत्पत्तिविनाशाला मी तसाच कारण आहे, जसा सूर्य जगराहटीला निमित्तमात्र कारण असतो. या प्रकृतीचे अधिष्ठान मी आहे व म्हणून तिच्याद्वारे या चराचरांची उत्पत्ती होते; म्हणून त्या सर्वांना मीच मूळ आहे, अशी जी लोकांची धारणा आहे; तिची उकल करून आता मी दाखविली."

आतां येणें उजिवडें निरुतें। न्याहालीं पां ऐश्वर्ययोगातें।
जैं <u>माझां ठाईं भूतें। परि भूतीं मी नसें</u>।।९-१३३।।
अथवा <u>भूतें ना माझां ठाईं। आणि भूतांमाजीं मी नाहीं</u>।
या खुणा तूं कंहीं। चुकों नको।।१३४।।
हे सर्वस्व आमुचें गूढ। परि दाविलें तुज उघड।..।।१३५।।

"आता या ज्ञानाच्या प्रकाशात माझे स्वरूप पहा. माझ्याठायी भूते असली तरी मी त्यांच्यांत नाही. आणि खरे तर भूतेसुद्धा माझ्याठायी नाहीत. भूतमात्र -चराचर विश्वात मी भरून राहिलो आहे, हे म्हणणेसुद्धा वावगे आहे. असे हे कूट आहे. माझे ईश्वरत्व - या जगाचे स्वामित्व - हे अशा प्रकारचे आहे. यालाच मी माझा ऐश्वर्ययोग म्हणजे प्रकृति-जगत-जीवमात्र व मी ईश्वर यांचा परस्परसंबंध म्हणतो. हे माझे सारभूत तत्त्व आहे. हे असे माझे ईश्वरतत्त्व अति गूढ आहे. हे बुद्धीपलीकडचे आहे. पण तरीही तुला मी ते गुह्य उघडउघड निरूपिले आहे."

....। आतां इंद्रियां देऊनि कवाड। हृदईं भोगी।।९-१३५।।
हा दंशु जंव न ये हातां। तंव माझें साचोकारपण पार्था।
न संपडें गां सर्वथा। जेवीं भुसीं कणु।।१३६।।

"हे अनुभवण्यासाठी तुला इंद्रियांची द्वारे बंद करून घ्यावी लागतील. त्यासाठी *योगयुक्ती* म्हणजेच *अभ्यासयोग* तुला अवगत करून घ्यावा लागेल. तसा करून तू या रहस्याची चित्तवृत्ती शांत करून अंत:करणात अनुभूती घे. कारण जोपावेतो या माझ्या स्वरूपाची प्रत्यक्ष अनुभूती तुझ्या स्वाधीन होणार नाही - हा *नाथसंकेतींचा दंशु* जोपावेतो तुझ्या हाती येणार नाही - तोपावेतो कोंड्यात दाणा जसा कितीही शोधला, तरी सापडत नाही; त्याप्रमाणे माझे खरे स्वरूप तुला दृष्ट होणार नाही."

एऱ्हवीं अनुमानाचेनि पैसें। आवडे कीर कळलें ऐसें।
परि मृगजलाचेनि वोलांशें। काय भूमि तिमे।।९-१३७।।
जैं जाल जलीं पांगिलें। तेथ चंद्रबिंब दिसे आंतुडलें।
परि थडिये काढूनि झाडिलें। तेव्हां बिंब कें सांगें।।१३८।।

"*एरवी तर्काच्या जोरावर कितीही अनुमानप्रमाणादी शास्त्रोक्त युत्त्याप्रयुत्त्या अवलंबल्यास आणि त्याने हे माझे स्वरूप आकळले असे जरी कितीही वाटले, तरी मृगजळाच्या ओलीने जमीन जशी न भिजता तशीच कोरडी ठणठणीत राहाते, तसा तू पण ब्रह्मज्ञानाबाबत कोरडाच रहाशील.* पाण्यात जाळे पसरले असता त्यात चंद्रबिंब गवसले असे वाटून जाळे बाहेर काढून काठावर झटकले, तर काय त्यातून चंद्रबिंब हाती येणार आहे!"

तैसें बोलवरि वाचाबळें। वायांचि झंकविजति प्रतीतीचें डोळें।
मग सांचोकारें बोधावेलें। आथिना होईजे।।९-१३९।।
किंबहुना भवा बिहा या। आणि सांचें चाड जऱ्हीं आथि मियां।
तऱ्हीं तुम्हीं गां उपपत्ति इयां। जतन कीजो।।१४०।।

"या तर्क-अनुमान -प्रमाण इ.वाचाळ बडबडीने माझे स्वरूप कळले आहे, असे उगीच वाटते. खरे तर या व्यर्थ खटाटोपामुळे माझ्या स्वरूपाची प्रतीती येण्यास अडसरच निर्माण होतो. अनुभूती ज्यायोगे घ्यायची तेच या उपद्व्यापाने हातचे जाते. आणि मग खरा बोध प्राप्त होण्याची जेव्हा वेळ येते, तेव्हा तो बोध होऊ शकत नाही. आणि जर यदाकदाचित झाला तर टिकू शकत नाही तो या ज्ञानप्रतिबंधामुळे! *म्हणून अनुभूती घेण्याचे सोडून व्यर्थ या शास्त्रज्ञानात फसू नकोस.* जर तू या संसाराचे भय बाळगत असशील, तर ऐक! मी मगाशी जो विचार सांगितला, तो पक्का ध्यानात ठेव आणि *सत्वर माझ्या स्वरूपप्राप्तीसाठी प्रयत्न कर."*

शास्त्राभ्यासाचा फोलपणा

वरील ओव्यांचा सारांश असा की मनुष्यास मोक्षेच्छा असेल, तर त्याने लक्षात ठेवावे की शास्त्रांचा कितीही अभ्यास केला, तरी तो उपयोगी पडणार नाही. भगवंताचे गुह्य स्वरूप हे केवळ अंतश्चक्षूंनीच पाहता येते, अन्यथा नाही. त्या स्वरूपाचे वर्णन शब्दातीत असल्याने ते समजावून देता येत नाही. ते आकळून येण्याकरता प्रत्यक्ष अनुभूती पाहिजे. इंद्रिये नियमन साधून, चित्त एकाग्र करून, इतर सर्व विषयवृत्तींचा निरोध करून, गीता सहाव्या अध्यायी जो *अभ्यासयोग* सांगते, तो साधूनच ही अनुभूती घेता येते. हे असे भगवंतांचे स्वरूप व त्याची अनुभूती घेण्याचे गूढ रहस्य आहे. ते केवळ भाग्यवंतच प्राप्त करून घेऊ शकतात. योगमार्गाचा सर्वथा अवलंब करून ते भगवंतांप्रत जाऊन पोहोचतात. त्यांनाच भगवंत खरा आकळून येतो.

स्थूल दृष्टीचे अज्ञानी::::

मूढांद्वारे ईश्वराची अवहेलना

इतरेजनांस आसुरी मोहमयी अशा प्रकृतीच्या अधीनच राहावे लागते. त्यांना त्यांच्या संसाराबाबतच्या दुरासद आसक्तीमुळे आपले खरे स्वरूप उलगडू शकत नाही, असे भगवंत म्हणतातः

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम्।।९-११।।

या श्लोकाचा विचार वेगवेगळ्या प्रकारे होऊ शकतो. एक म्हणजे श्रीकृष्णभगवान साक्षात मनुष्यदेह धारण केलेला परमात्मा समजून, परमात्मा असा देह धारण करतो ही समजूत. दुसरा असा की रामकृष्णादी अवतारी पुरुष म्हणजे मनुष्यदेहधारी परमेश्वर. तिसरा म्हणजे ईश्वर जो कोणी, तो उच्च कोटीचा जरी असला तरी त्याला पण मानवी आकार असला पाहिजे. चौथा म्हणजे अशा प्रकारे मनुष्यदेह धारण करणारा परमात्मा असूनही त्याचे स्वरूप न ओळखता येऊन त्या अवतारी पुरुषास इतरांसारखेच क्षुल्लक लेखणे, इ.असे विविध अर्थ जरी ध्वनित होत असले तरी सर्वसामान्य अर्थ असा कीः

"माझे परमस्वरूप असे असून ते न जाणणारे मूढ लोक मला मनुष्यासारखा मानतात. मानवीदेह धारण करणाऱ्या इतरेजनांसारखा मलासुद्धा विकारी समजतात. माझी मनुष्यासारखी मूर्ती निपजवून तिलाच परमेश्वर मानून भजतात. सर्व भूतांचा महान ईश्वर असूनही माझी अवज्ञा व अवहेलना करून ते मूढ आसुरी योनी पावतात."

या श्लोकाचा असाच काहीसा अर्थ प्रकटवतांना ज्ञानेश काय म्हणतात, ते पाहू याः

एऱ्हवीं वेधिलीं दिठीं कवलें। तैं चांदिणियांतैं म्हणे पिवलें।
तेंवीं माझां स्वरूपीं निर्मलें। देखाल दोख।।९-१४१।।
ना तऱ्हीं ज्वरें विटालिलें मुख। तैं दुधातैं म्हणे कडू विख।
तेंवीं अमानुषा मानुष। मानाल मातें।।१४२।।

"मां मानुषीं तनुमाश्रिताम्।" याचा अजूनही एक अर्थ ज्ञानेश येथे प्रकट करतात, तोसुद्धा पूर्वापर संबंधांमुळे श्लोकसंगती लावण्यास उपयुक्त आहे. ते सांगतात कीः

"कावीळ डोळ्यात उतरली की त्या माणसास चांदणेसुद्धा पिवळे आहे असे वाटते. लोकसुद्धा स्थूल दृष्टीने पाहात असल्याने माझे स्वरूप निर्मळ असूनही त्याच्याठायी विकारदोष पाहातात. मी अविकारी असूनही या विकारी जगद्रूपाने मीच विस्तारतो, असे ते मूढ मानतात. ज्वराने दूषित झालेल्या मुखास गोड दूधसुद्धा कडूजहर विषासारखे भासते. त्याचप्रमाणे हे जन माझ्या दैवी अमानुष स्वरूपावर मनुष्यत्वाचा किंवा लौकिकत्वाचा आरोप करतात."

म्हणऊनि पुढुती तूं धनंजया। झणें विसंबसीं ययां अभिप्राया।
जैं इयां स्थूलदृष्टी वायां। जाइजेल गां।।९-१४३।।
पैं स्थूलदृष्टी देखती मातें। तैंचि न देखणें जाण निरुतें।
जैसें स्वप्नींचेनि अमृतें। अमरा नोहिजे।।१४४।।

"पण हे धनंजया! त्यांच्यासारखाच स्थूलदृष्टीने मला पाहातांना तू कदाचित मी सांगितलेले रहस्य दुर्लक्षित करशील. तर तसे करू नकोस. कारण मला पाहतांना बुद्धीचा उपयोग शून्य आहे. जे बाह्येंद्रियांनी - चर्मचक्षूंनी - तर्कज्ञानादी उपायांनी मला जाणून घेण्याचा प्रयत्न करतात, ते व्यर्थच शिणतात. या विकारी जगडंबरात माझा शोध घेणे मूढतेचे लक्षण आहे. स्थूलदृष्टीने मला पाहाणे म्हणजे न पाहणेच आहे; जसे स्वप्नांतरीचे अमृत पिऊन कोणी अमर होतो काय!"

एऱ्हवीं स्थूलदृष्टी मूढ। मातें जाणिती कीर दृढ।
परि तैं जाणणेंचि जाणणेयां आड। रिगौनि ठाकें।।९-१४५।।

"मी स्थूल आहे; हे जगत जेवढे जसे दिसते, तेवढा तसाच मी आहे; ही भूतमात्रे म्हणजे मीच आहे; अशा प्रकारे मी कसा आहे, याचा दृढनिर्णय मूढच करतात आणि ते ज्ञान त्यांना माझे खरे स्वरूप जाणण्यास प्रतिबंध करते."

जैसा नक्षत्राचियां आभासा-। साठीं घातु जाला तेयां हंसा।
माजीं रत्नबुद्धिचियां आशा। रिगौनियां।।९-१४६।।
सांगें गंगा या बुद्धी मृगजल। टाकौनि आलियाचें कवण फल।
काय सुरतरु म्हणौनि बाबुल। सेविली करी।।१४७।।
हा निलयाचां दुसरा। या बुद्धी हातु घातला निखारा।
कां रत्नें म्हणौनि गारा। वेंचीं जेवीं।।१४८।।

"पाण्यातील चांदण्यांचे प्रतिबिंब ती रत्ने आहेत या समजूतीने वेचू जाणाऱ्या राजहंसाची चोच अकस्मात पाण्यातल्या खडकावर आपटून त्याचा जसा घात होतो, तसाच या मूढांची बुद्धी त्यांचा घात करते. मृगजळास गंगा समजून पावन व्हावे म्हणून त्याच्याकडे धाव घेतली, तर त्याचे कोणते फळ आहे! कल्पवृक्ष समजून बाभळीच्या झाडाखाली रचलेले मनोरथ कसे वांझ निपजतात! नीलरत्ने समजून

निखारा हाती घेतला, तर काय होईल! रत्ने समजून गारा वेचाव्यात का!

अथवा निधान प्रकटले। म्हणौनि खदिरांगार खोलें भरिलें।
कां साउली नेणतां घातलें। कुहां सिंहें।।९-१४९।।
तेवीं मी म्हणौनि प्रपंचीं। जिहीं बुडी दिधली कृतनिश्चयाची।
तिहीं चंद्रासाठी जेवीं जलींचीं। धरिली प्रतिमा।।१५०।।

"माणिकांचा ठेवाच सापडला आहे, असे वाटून खदिराचे रक्तवर्ण निखारे आपल्या झोळीत भरून घेणे शहाणपणाचे ठरते काय! विहिरीतल्या आपल्या प्रतिबिंबास दुसरा सिंह आपल्यास आव्हान देतो आहे, असे समजून त्याच्यावर आवेशाने उडी घेणाऱ्या सिंहाचे काय होते, माहीत आहे ना! याचप्रमाणे मी या प्रपंचात - या संसारात - या जगडंबरातच आहे, त्याचप्रकारचा, तसाच आहे असा कृतनिश्चय करून ज्यांनी त्या बुद्धीत डुबी दिली आहे, त्यांनी चंद्र मिळावा म्हणून त्याचे जळातले प्रतिबिंबच जणू धरले आहे! त्यांचा तो तसला कृतनिश्चय - तो दृढ निर्णय वायाच जातो."

"अनामा नाम आरोपिती"

तैसा कृतनिश्चयो वायां गेला। जैसा कोण्ही एकु कांजी पियाला।
मग परिणामो पाहों लागला। अमृताचा।।९-१५१।।
तैसें स्थूलाकारीं नाशिवंतें। भरंवसा बांधौनि चित्तें।
पाहती मज अविनाशातें। तऱ्हीं कैंचा दिसे।।१५२।।
काईं पश्चिमसमुद्राचियां तटां। निघिजत आहे पूर्विलियां वाटा।
कां कोंडा कांडता सुभटा। कणु आंतुडे।।१५३।।
तैसें विकारलें हे स्थूल। जाणितलेयां मी जाणवतसे केवल।
काईं फेण पेतां जल। सेविलें होय।।१५४।।

"एखाद्याने भाताची कांजी पिऊन त्याचा परिणाम अमृतासारखा होण्याची वाट पाहावी, त्याप्रमाणे नाशिवंत स्थूल प्रकृतीच्या चेष्टांना त्या मीच आहेत, असा मनात भरवसा ठेवून जे मला आकळू पाहतात, त्यांना मी अविनाशी त्यात कसा आढळेन! पूर्वेकडे चालत गेल्याने कोणी कधी पश्चिमेकडील सागराचा किनारा गाठेल काय! कोंडा कितीही जरी कांडला तरी त्यातून धान्याचा कण तरी मिळेल काय! तसेच या विकरलेल्या स्थूळ जगतास व त्यातल्या तशाच भूतमात्रांस ते मीच आहेत, अशा जाणिवेने पाहिल्याने काय माझे *केवल - निखिल - निरंजन - अविनाशी - अव्यय - निरुपाधिक - अप्रमेय - निराकार - गुणातीत* असे स्वरूप जाणले जाऊ शकेल कधी! पाण्यावरचे बुडबुडे व फेस पिऊन का पाण्याची तहान शमेल कधी!"

म्हणौनि मोहिलेनि मनोधर्में। हेचि मी मानूनि संभ्रमें।
मग एथिंचें जियें जन्मकर्में। तियें मजचि म्हणती।।९-१५५।।
येतुलेनि अनामा नाम। मज अक्रियासि कर्म।
विदेहासि देहधर्म। आरोपिती।।१५६।।

"त्या लोकांच्या अशा अप्रबुद्ध जाणीवेमुळे होते काय की एकदा या स्थूलाकारासच जगदविभ्रमाने भ्रांतमती होऊन मीच आहे, असे मानले की मग या लोकी देहाद्वारे जी काही कर्मे होतात, त्यांचा कर्ताकरविता ते मला समजतात. हे कर्मकर्तृत्व मजवर लादल्याने उगीचच मज अनाम्यास *नामी* म्हणतात. मी *अक्रिय* असूनही कर्म करणारा समजतात. *विदेह* असूनही मजवर देहधर्माचा आरोप करतात."

मज आकारशून्या आकारु। निरुपाधिका उपचारु।
मज विधिवर्जिता व्यवहारु। आचारादिक।।९-१५७।।
मज वर्णहीना वर्णु। गुणातीतासि गुणु।
मज अचरणा चरणु। अपाणिया पाणी।।१५८।।

"आकारशून्य अशा मला साकार सगुण समजतात. निरुपाधिक असणाऱ्या मला उपचारादी अर्पण करतात. विधीपलीकडील अशा मला ते आचारांच्या नियमावळीत - व्यवहारादींच्या पातळीवर आणून बसवतात. वर्णहीन अशा मला वेगवेगळ्या वर्णाचा मानतात. गुणातीत अशा मला त्रिगुणांनी वेष्टिलेला समजतात. चरण वा हस्त नसलेल्या मला अवयवी मानतात."

मज अमेया मान। सर्वगतासि स्थान।
जैसें सेजेमाजीं वन। निदैला देखें।।९-१५९।।
तैसें अश्रवणा श्रोत्र। मज अचक्षूसि नेत्र।
अगोत्रा गोत्र। अरूपा रूप।।१६०।।

"अमाप, अपरिमेय असे अनंत माझे स्वरूप असूनही मला या जगताच्या मापाने मोजू पाहातात. सर्वत्र असणाऱ्या माझे स्थान कोणते, याचाही ते विचार करतात. शय्येवर सुखपूर्वक पहुडलेल्या मनुष्याने स्वप्नात आपण अरण्यात आहोत, असे मानावे, तसेच ते मूढ मज कर्णेंद्रिय नसलेल्यास कर्णेंद्रिय आहे, असे मानतात. नेत्र नसूनही मला चक्षू आहेत व रूप नसताही मी रूपवान आहे, तसेच गोत्र नसलेला मी वेगवेगळ्या गोत्रांचा आहे, असे ते ठरवितात."

"ऐसे विपरीत। ज्ञान तेयांचें"

एवढेच काय! तर:

मज अव्यक्तासि व्यक्ती। अनार्त्तासि आर्त्ती।
स्वयंतृप्ता तृप्ती। भाविती गां।।९-१६१।।
मज अनावरणा प्रावरण। भूषणातीतासि भूषण।
मज सकलकारणा कारण। देखती तैं।।१६२।।

"मी अव्यक्त असूनही या जगद्रूपाने व्यक्त झालो आहे, असे ते मानतात. मी निरिच्छ असूनही माझ्या इच्छेप्रमाणे हे जग चालते, असे व्यर्थ समजतात. मी स्वत:सिद्ध तृप्तीचे आगर आहे, तरीही यज्ञकर्मांनी तृप्त होतो, अशी त्यांची भावना असते. मी वस्त्रांना लेण्याइतका सीमित नसतांनाही ते लोक मला तृप्त करण्यासाठी वस्त्रेप्रावरणे अर्पण करतात. आभूषणे परिधान करण्याजोगा मी देहवान नसूनही ते मला आभूषणांनी शृंगारू पाहतात. पुराणांतरीची देवदेवता ही माझीच रूपे आहेत, असे कल्पितात व त्यांना जन्मादी असून कल्पक्षयाबरोबर त्यांचा विलय होतो अशा खुळ्या कल्पनांच्या ते आहारी

जातात. या समस्त प्राकृताचा कारण असा जो मी त्याचेसुद्धा कारण शोधण्याचा विफल प्रयत्न ते मूर्ख पंडित करतात."

मज सहजांतैं करिती। स्वयंभातैं प्रतिष्ठिती।
निरंतरातैं आव्हानिती। विसर्जिती गां।।९-१६३।।
मी सर्वदा स्वतःसिद्ध। तो कीं बाल तरुणु वृद्ध।
मज एकरूपा संबंधु। जाणती ऐसें।।१६४।।

"सर्वदूर असणाऱ्या माझी मूर्ती इ.तयार करून त्यात मी असतो, असे मानून स्वयंभू असणाऱ्या माझी त्या मूर्तीत प्राणप्रतिष्ठा करतात. नित्य, निरंतर, अखंड, सर्वदा असणाऱ्या मला ते त्यांच्या स्तोत्रामंत्रादींद्वारे आवाहन करतात; एवढेच काय! ते अज्ञानी पामर माझे विसर्जनसुद्धा करतात. मी सर्वदा स्वतःसिद्ध असतांनाही माझे अवतार कल्पितात व मनुष्यदेह धारण करून मी पृथ्वीतलावर जन्म घेतो, बाल्य-तारुण्य-वार्धक्य इ.अवस्थांना प्राप्त होतो व मृत्यू पावतो असे समजतात. मी एकटाच असूनही कार्यकारणभाव कल्पून माझा प्रकृति - आत्मा- अनात्मा - ईश्वर - जीव -जगत इ.शी कोणकोणता संबंध आहे, याचा विचार करतात. "

मज अद्वैतासि दुजें। मज अकर्तयासि काजें।
मी अभोक्ता कीं भुंजें। ऐसें म्हणती।।९-१६५।।

"माझी अद्वैतावस्था अखंड अबाधित अशी असून पण ते *द्वैत - द्वैताद्वैत - विशिष्टाद्वैत - केवलाद्वैत* - या ना त्या विविध संकल्पनांचा परिपोष करत बसतात व आपापसात व्यर्थ वितंडवाद घालून जीवन व्यर्थ घालवतात. मी नित्य अकर्मी असा आहे. तरीही हे अखिल विश्व माझेच कर्म आहे, असे मानतात. देहांतरी मी वसतो असे मानून होणारे कर्म व त्याच्या फलांचा उपभोक्ता मीच आहे, असे त्यांना वाटते.आत्मा हा सर्वगत असूनही तो जन्म घेतो या समजुतीने भ्रमित होतात आणि माझे देहाबरोबरच निधन झाले, असे मानून शोक पावतात."

मज अकुलाचें कुल वानिती। मज नित्याचेनि निधनें शिणती।
मज सर्वांतरातें कल्पिती। अरि मित्र गां।।९-१६६।।
मी स्वानंदाभिरामु। तेयां मज अनेगां सुखांचा कामु।
आघवाचि मी असे समु। कीं म्हणती एकदेशी।।१६७।।
मी आत्मा एकु चराचरीं। म्हणती एकाचां कैंपक्ष करी।
आणि कोपौनि एकांतैं मारी। हेंचि वाढविती।।१६८।।

"मी अकुल असूनही मला कुल आहे, असे तत्त्वज्ञान काही विद्वान तशी अनुभूती येत नसतांनाही प्रसारित करतात. सर्वांच्या अंतर्यामी मीच आहे. तरीही एकमेकांना शत्रूमित्र समजतात. स्वानंदात मी सदा रममाण झालेला असतो. तरीही ते मला *(आत्म्याला)* वेगवेगळ्या सुखांची कामना आहे, असे कल्पितात. मी सगळीकडे सारखा व्यापलेला असूनही ते मला देहादीत अवस्थित व बद्ध असा आत्मा तो मीच असतो म्हणून जाणतात. चराचरी मी आत्मतत्त्वरूपाने भरलेलो आहे, तरी मी कोणाचा कैवार घेतो व कोणावर कोपून त्याला ठार करतो, असे समजतात."

किंबहुना ऐसें समस्त। जैं हे मनुष्यधर्म प्राकृत।
तेयांचि नांव मी ऐसें विपरीत। ज्ञान तेयांचें।।९-१६९।।
जंव आकारु एकु फुडां देखती। तंव हा देव एणें भावें भजती।
मग तोचि विघडलियां टाकिती। नाहीं म्हणौनि।।१७०।।
मातें येणें येणें प्रकारें। जाणती मनुष्यें ऐसेनि आकारें।
म्हणऊनि ज्ञानचि तैं आंधारें। ज्ञानासि करी।।१७१।।

"हे अर्जुना! फार काय सांगू! मनुष्यांचे जे प्रकृतिदत्त देहादी स्वभावधर्म, गुणदोष, जन्म -मृत्यू - बाल्य - जरा - व्याधी - वार्धक्य, इच्छा, कामना, तृप्ती - अतृप्ती - सुख - दुःख - भाव - भावना इ.असतात, ते मलाही असतात; मी त्यांच्यासारखाच दिसतो इ.कल्पना ठामपणे बाळगणारे ते त्यांचे ज्ञान विपरीत आहे. अशा मूर्तिमंत अज्ञानाच्या आहारी जाऊन ते मला आकार आहे, असे समजून त्या आकाराला देव म्हणून भजतात आणि तो आकार भंगला की देव भंगला या कल्पनेने तो टाकून देऊन पुनः नव्या आकाराची मूर्ती देव म्हणून पुजू लागतात. त्यांच्या अशा या प्रकारांनी ते मला मानुषधर्मी असल्याचे जाणतात व त्यांचे असे विपरीत ज्ञानच खरे ज्ञान प्राप्त होण्याच्या आड येते."

"अवजानन्ति मां मूढा"

भगवंतांचे खरे स्वरूप न ओळखणारे जन हे असे अज्ञानाने आवृत होऊन त्यांना *जगद्रूप, मनुष्यरूप, जीवरूप, देहगत आत्मरूप, प्रकृति-नियंता ईश्वररूप, द्वैताधिष्ठित रूप, मूर्तिरूप, यज्ञयागादींनी पावणारे रूप, अवतारी रूप, सगुण साकार रूप, विविध दैवतारूप, कर्माधिष्ठित रूप, कर्ता - कर्म - वासना - इच्छा - कर्मफले यांनी बद्ध रूप, भूताधिष्ठितरूप, विकार्यरूप, स्थूलरूप, त्रिगुणरूप, हस्तपादादी अवयवीरूप, भक्तकामकल्पद्रुमरूप, दुष्टारिसंहारकरूप, सांतरूप, आवाहवनीय - विसर्जनीयरूप,* अशा अनेकानेक रूपाचा तो भगवंत आहे, असे भ्रामक ज्ञान होते असे ज्ञानेश म्हणतात.

जाताजाता या श्लोकासंबंधी *("**अवजानन्ति मां मूढा ..।।९-११।।**")* **श्रीमदाद्यशंकराचार्य** काय भाष्य करतात, ते पाहणे उचित ठरेल:

ते म्हणतातः "मूढ अविवेकी लोक माझ्या या सर्व लोकांच्या - सर्व भूतांच्या महान ईश्वररूप परमभावास जाणत नाहीत. परम आत्मतत्त्व आकाशापेक्षाही सूक्ष्मतर आहे व सर्वव्यापक आहे; सर्वांचे आत्मारूप परमात्मा तो मीच आहे, हे जाणत नाहीत. म्हणून मनुष्यदेहधारी अशा मज परमात्म्याची अवज्ञा - अनादर करतात. मला अशा निरादर भावाने पाहाणारे पामर व्यर्थ जीवन वाया घालवतात. त्यांच्या कामना व्यर्थ असतात. त्यांची कर्मे व्यर्थ ठरतात. त्यांचे ज्ञानही

निष्फल असते. ते विवेकहीन असतात. मोहमयी अशा देहात्मवादी आसुरी प्रकृतीचा ते आश्रय करतात. मोडतोड, खाणेपिणे, मजा मारणे, दुसऱ्यांचे धनादी अपहरण करणे, असे क्रूरकर्मा ते होतात. ते आसुरांना राहण्यायोग्य प्रकाशहीन लोकांत राहाण्यास योग्य असतात."

अभेदज्ञानभक्ती::::

ज्ञानी भक्त

"परंतु जे लोक श्रद्धायुक्त व भगवद्भक्तिरूप मोक्षमार्गात प्रवृत्त असतात, ते मात्र शम, दम, दया, श्रद्धा इ.सद्गुणरूप दैवी स्वभावाचा अवलंब करणारे उदारचित्त महात्मे भक्तजन असतात. मज ईश्वरास सर्व भूतमात्रांचा अर्थात आकाशादी पंचमहाभूते व समस्त जीवांचे *आदिकारण* म्हणून ते ओळखतात. माझ्या अविनाशी स्वरूपास नीट ओळखणारे असे लोक सतत अनन्य मनाने मला भजतात - माझे अहर्निश चिंतन करतात."

अशा भक्तांची चर्या प्रकट करतांना भगवंत स्वतः असे म्हणतात कीः

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते॥९-१४॥

"सातत्याने, प्रयत्नपूर्वक,दृढव्रती राहून, अभ्यासयोग साधून, माझे भक्त माझे कीर्तन करत व मला वंदित राहून, सर्वत्र योगयुक्त चित्ताने माझी उपासना करतात." हा योगभावाचा मार्ग आहे.

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम्॥९-१५॥

"तर याव्यतिरिक्त इतर काही भक्तजन *विश्वतोमुख - सर्वतोमुख - विराटस्वरूप* अशा मज परमात्म्याचे ज्ञानयज्ञपूर्वक यजन करतात. विश्वतोमुख अशा माझी ही उपासना ज्ञानमार्गी आहे. माझ्याशी अभेदभावाने राहून - किंवा नवविधा भक्तींपैकी कोणत्याही भावाने म्हणजे स्वामी-सेवक, सखा-मित्र इ. भावांनी माझ्याशी संबंध प्रस्थापित करून वा अनेकविध अशा इतर भक्तिप्रकारांनी माझी ते उपासना करतात."

साङ्ख्य कोण

अशा रीतीने परत एकदा भगवंत आपणांस ***"लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ। ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्॥३-३॥"*** या उक्तीचे स्मरण करून देतात. *साङ्ख्य* म्हणजे कोण हा गीतेचा अर्थ करणाऱ्यांमध्ये एक वादाचा मुद्दा आहे. *साङ्ख्य म्हणजे एक तत्त्वज्ञान* - जे मूलतत्त्वांची संख्या करून गणना करते ते, असा एक निश्चित मतप्रवाह आहे. गीतेस हे साङ्ख्य तत्त्वज्ञान विहित आहे व म्हणून *ज्ञानयोगी* म्हणजे *साङ्ख्य म्हणजे साङ्ख्य तत्त्वज्ञान* मानणारे असा अर्थ येथे संभवतो.

दुसरा अर्थ असाही घेतात की *साङ्ख्य म्हणजे संन्यासमार्ग* अनुसरणारे चतुर्थाश्रमी यती; म्हणून ज्ञानयोगी म्हणजे हे संन्यासीच असले पाहिजेत. परंतु अठराव्या अध्यायातील *संन्यास व त्याग* यांचे गीतोक्त विवेचन *श्लोक क्र. १८-१ ते १२* यांच्याप्रीत्यर्थ पाहतांना चतुर्थाश्रमी संन्याशांचा संन्यास येथे गृहीत धरता येत नाही. म्हणून *कर्मफलत्यागी* हाच खरा संन्यासी होय आणि हा संन्यासी तर कर्मयोगाचा पाईक आहे. *कर्मयोग हा योगमार्ग आहे* - हा *अभ्यासयोग* आहे. अर्थात *साङ्ख्य म्हणजे संन्यासी* हा अर्थ या ठिकाणी न घेणे उचित वाटते.

आता निव्वळ तत्त्वज्ञानाने - त्याच्या पठनाने, बुद्धी - तर्क इ.च्या साहाय्याने स्वरूपज्ञान होते असे गीता मानत नाही. हे सर्व परोक्षज्ञानास साहाय्यक असले तरी अपरोक्षज्ञानाविना मोक्ष नाही. प्रत्यक्ष अनुभूती हाच गीतेचा पाया आहे. *आत्मसाक्षात्कार* हे तिचे ध्येय आहे. म्हणून विश्वाची पाच-पंचवीस तत्त्वांत, छत्तीस वा दोन तत्त्वात कशीही कितीही विश्लेषणपूर्वक चिकित्सा केली तरी त्या चिकित्सक बुद्धीचे - त्या पांडित्याचे आत्मानुभूतीत परिवर्तन घडणे कठीणच दिसते. एवं च *साङ्ख्य म्हणजे साङ्ख्य तत्त्वज्ञानाचे पंडित वा अभ्यासक* हा अर्थही येथे घेता येत नाही.

म्हणून जे *ज्ञानयोगी वा ज्ञानमार्गी असे साङ्ख्य* म्हटले आहेत, ते वरील श्लोकात*(९-१५)* उल्लेखलेले ज्ञानमार्गी भक्त असले पाहिजेत. विराटस्वरूपाचे ज्ञान खरेच प्राप्त होऊन त्याची अनुभूती *एकत्वेन, पृथक्त्वेन वा बहुधा* अशा प्रकारांनी घेत ज्ञानयज्ञ उपासणारे हे महाभाव भक्त - ***"वासुदेवः सर्वमिति"*** - असे महात्मे होत. हेच खरे ज्ञानमार्गी! अद्वैतभक्तीचे खरे स्वरूप प्रकट होते, ते या भक्तवर्यांच्याद्वारे!

असे जरी असले, तरी योगमार्गी अभ्यासी भक्त, सतत ईशप्राप्तीसाठी प्रयत्न करणारे युक्तचित्त ध्यानयोगी, कर्मफलत्यागी हेसुद्धा भक्तच होत. त्यांनासुद्धा तेच स्थान प्राप्त होते, जे ज्ञानी भक्तांना प्राप्त होते. म्हणूनच भगवंतांनी स्पष्ट सांगितले आहे की ***"साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः। एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम्॥५-४॥"*** व ***"यत्साङ्ख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते। एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति॥ ५-५॥."***

गीतेतील भक्तीचे विश्लेषण

नवम अध्यायानिमित्ताने गीतेतील भक्तीचे स्वरूप काय या विषयाचा उहापोह करणे उचितच आहे. गीतेत योग, ज्ञान, भक्ती की कर्म प्रतिपादिली आहेत; सर्वश्रेष्ठ मार्ग कोणता; असे जे बहुचर्चित विषय आहेत, त्यांचा जिज्ञासूंच्यासाठी असा खुलासा होणे आवश्यक आहे. कर्म त्यागले जाऊ शकत नसल्याने *भक्ती व कर्म* या दोन्ही मार्गीयांसाठी कर्माची सुयोग्य व्यवस्था लावणे अगत्याचे ठरते.

म्हणून गीतोक्त *कर्मफलेच्छात्याग* हा या उभय मार्गीयांसाठी आवश्यक असा भाग आहे; हे आपण लक्षात घेऊ या.

वर पाहिलेच आहे की *कर्म व भक्ती* हे मार्ग सोडता उरलेले प्रसिद्ध असे *ज्ञान व योग* हेही भक्तीचेच प्रकार आहेत. म्हणजे निष्कर्ष असा निघतो की गीता भक्ती प्रतिपादते. *ज्ञानभक्ती, अद्वैतभक्ती* अशा कोणत्याही नांवाने ही भक्ती ओळखली जाऊ शकते.

या भक्तीचे दोन मूलस्त्रोत आहेत. एक म्हणजे *भक्त* व दुसरा म्हणजे *भाव्य* वा भगवंत. यासच *ईश्वर* असेही म्हटले जाते. पण हा ईश्वर कसा आहे, हे आपणांस *पातञ्जलयोगसूत्रे* दाखवितात. त्याच ईश्वराचे साद्यंत स्वरूप *गीता ज्ञानदेवी* ने जसे प्रकटविले आहे, ते पतञ्जलिप्रणीत ईश्वरापेक्षा भिन्न नसल्याचे आपण आतापावेतो अवलोकिले आहे. *भक्ती* वा *ईश्वरप्रणिधान* या संकल्पना अशा प्रकारे अभिन्न असल्याची जाणीव आपणांस होणे अपरिहार्य आहे, याची मनोमन नोंद घेऊन आपण पुनश्च वळू या भक्तवर्यांच्या चर्येकडे!

भक्तांची उपासना

श्लोक क्र.९-१३ व १४ मधील ही चर्या स्पष्ट करतांना *केवलाद्वैतवेदान्तशिरोमणी* भक्तवर्य श्रीमदाद्यशंकराचार्य म्हणतात कीः "शम, दम, दया, श्रद्धा इत्यादी सद्गुणरूप दैवी प्रकृतीचा आश्रय करणारे उदारचित्त महात्मे भक्तजन - संत - मज ईश्वरास मी सर्व भूतमात्रांचे व जीवांचे आदिकारण आहे, असे जाणून व माझे अविनाशित्व आकळून घेऊन अनन्यचित्ताने माझी उपासना करतात. ते दृढव्रती भक्त म्हणजे ज्यांचा माझ्या स्वरूपाविषयीचा निश्चय अचल आहे, ते इंद्रियनिग्रह करत, शम दम दया अहिंसादी धर्मांनी युक्त होत प्रयत्नपूर्वक सर्वदा निरंतर ब्रह्मस्वरूप असणाऱ्या मला भगवंताला म्हणजे हृदयांतरी वसणाऱ्या मज परमात्म्यास उपासतात."

"ज्ञानिजन भगवद्विषयक ज्ञानरूप यज्ञाने माझे पूजन करतात. परब्रह्म परमात्मा एकच आहे, अशा एकत्वरूप परमार्थज्ञानाने अनुभूतिसंपन्न होऊन ते मला यजतात; तर कोणी कोणी पृथग्भावाने आदित्य -चंद्रमा आदी प्रकारांनी मीच अवस्थित आहे, असे जाणून त्या स्वरूपातल्या माझी उपासना करतात. इतर कितीतरी भक्त *सर्वतोमुख* अशा विश्वमूर्ती विराट भगवत्स्वरूपास जाणून घेऊन बहुविध प्रकारांनी त्या माझी उपासना करतात."

"मीचि होऊनि करिती माझी सेवा"

याच चर्येचे उत्कृष्ट विवेचन आपण श्रीज्ञानेशांच्या मुखाने श्रवण करू याः

तऱ्हीं जेयांचिये चोखटे मानसीं। मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी।
जेयां निजेलियांतैं उपासी। वैराग्य गां।।९-१८८।।
जेयांचियें आस्थेचियां सद्भावा। आंतु धर्मु करी राणिवा।
जेयांचें मन वोलावा। विवेकासि।।१८९।।
जैं ज्ञानगंगें नाहालें। पूर्णता जेऊनि धालें।
जैं शांतीसि आलें। पालव नवें।।१९०।।
जैं परिणामा निघालें कोंभ। जैं धैर्यमंडपाचें स्तंभ।
जैं आनंदसमुद्रीं कुंभ। चुबकलौनि ठेलें।।१९१।।

या ओव्या *(क्र. ९-१८८-१९६)* आपण पूर्वी दैवी संपत्तीच्या संदर्भात अभ्यासल्या होत्या *(उन्मेषः१३ःदैवासुरसंपद्विभाग,पृ.क्र.२०१)*. भक्तांच्या माहात्म्यासंबंधी त्यांचा पुनः परामर्ष घेणे चित्तवेधक आहे. ज्ञानेश म्हणतातः

"मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी"

"ज्यांच्या निर्मल मनोरूपी तीर्थक्षेत्रात मी स्वतः संन्याशासारखा आदरपूर्वक वास्तव्य करतो; ज्यांची विषयवासना निमालेली असल्याने त्यांची वैराग्य स्वतः भक्ती करते; ज्यांची श्रद्धा सद्भाव उत्पन्न करते आणि तो सद्भाव म्हणजे प्रत्यक्ष धर्माचे सिंहासनच असते, ज्यावर बसून धर्म आपले राज्य करतो; ज्यांचे मन विवेकास जीवनदायी असते; जे ज्ञानगंगेत स्नान करतात; पूर्णतेचे भोजन करून जे तृप्त झाले आहेत; धृतिरूप मंडपास तोलून सावरणारे स्तंभ असे जे आहेत; आनंदसमुद्रातून काठोकाठ भरून घेतलेले कुंभ असेच जे आनंदस्वरूप आहेत; जे पूर्णावस्थेला फुटलेले कोंब आहेत; जे शांतीला फुटलेली नव्हाळीची पालवी आहेत;" अन

जेयां भक्तीची येतुलीं प्रीती। जैं कैवल्यातें परौतें सर म्हणती।
जेयांचियें लीलेमाजीं नीति। जियाली दिसे।।९-१९२।।
जैं आघवांची करणीं। लेइलें शांतीची लेणीं।
जेयांचें चित्त गंवसणी। व्यापका मज।।१९३।।
ऐसें जैं महानुभाव। जैं दैविये प्रकृतिचें दैव।
जैं जाणोनियां सर्व। स्वरूप माझें।।१९४।।
मग वाढतेनि प्रेमें। मातें भजती जैं महात्मे।
परि दुजेपण मनोधर्में। शिवतलें नाहीं।।१९५।।
ऐसें मीचि होऊनि पांडवा। करिती माझी सेवा।
परि नवलावो तो सांगावा। असे आइक।।१९६।।

"ज्यांना भक्तिरसामृताची इतकी लयलूट झालेली असते की ते मोक्षसुखासुद्धा नाकारतात; ज्यांच्या सहज वागण्याबोलण्यात आचरणात नीतीस जीवनदान मिळते; सर्वेंद्रियांस ज्यांनी शांतीचे अलंकार लेववून मंडित केलेले असते; ज्यांचे चित्त मज व्यापकास गवसणी असते; असे जे महानुभाव असतात, ते साक्षात दैवी प्रकृतीचेच सद्भाग्य होत. ज्यांनी माझे सर्वस्व - माझे स्वरूप जाणलेले असते; आणि वृद्धिंगत होत जाणाऱ्या -*"दिन दिन बढत सवायो!"* या कबीरोक्तीप्रमाणे प्रेमाने जे महात्मे मला भजतात, माझी भक्ती करतात पण भक्त-भगवंत असा दुजाभाव वा द्वैत ज्यांच्या मनास शिवतसुद्धा नाही; असे जे ते माझी सेवा मीच होऊन करतात; मीच होऊन माझी भक्ती करतात, त्यांच्या त्या भक्तीचा नवलाव काय सांगावा!"

"आनंदाचें आवारु होतु जगां"::::
"कीर्तनाचेनि नटनाचें"

अशा भक्तोत्तमांचे तरीही पुढे कौतुक ऐका:

तऱ्हीं कीर्तनाचेनि नटनाचें। नाशिलें व्यवसाय प्रायश्चित्तांचें।
जैं नामचि नाहीं पापाचें। ऐसें केलें।।९-१९७।।
यमदमा अवकला आणिली। तीर्थे ठायावरूनि उठविली।
यमलोकींची खुंटली। राहाटी आघवीं।।१९८।।
यमु म्हणें काय यमावें। दमु म्हणें कोण्हातैं दमावें।
तीर्थे म्हणती काय खावें। दोख ओखदासि नाहीं।।१९९।।
ऐसें माझेनि नामघोषें। नाहीं करिती विश्वाचि दुःखें।
आघवें जगचि महासुखें। दुमदुमित भरलें।।२००।।

"माझ्या कीर्तनाचा रंग सतत सर्वत्र मुक्त हस्ताने उधळून टाकत त्या महानुभाव भक्तवर्यांनी प्रायश्चित्तांना जागाच उरू दिलेली नसते. कारण त्यांच्या साहचर्यात पापाचेच जेथे नामोनिशाण उरत नाही, तेथे प्रायश्चित्तांचे काय प्रयोजन असणार! यमदमादी साधनांना त्यांनी निस्तेज केले; तीर्थे जागची उठवून लावली आणि त्यांच्यामुळे यमलोकांकडची लोकांची लागलेली रीघच थांबली. त्यामुळे यमास कोणावर शासन चालवावे असा प्रश्न पडतो. यमदमादी साधनांना गिऱ्हाईक सापडत नाही. तीर्थांना खाण्यासाठी औषधाएवढाही दोष सापडत नाही. माझा सतत नामघोष करत अशा प्रकारे ते संत भक्त समस्त विश्वातील दु:खदौर्मनस्य दुर्दैव नाहीसे करतात. सगळे जगच ते महासुखाने दुमदुमवून टाकतात."

तैं पाहांटेविण पाहावीत। अमृतेंवीण जीववित।
योगेंविण दावित। कैवल्य डोळां।।९-२०१।।
परि राया रंका पाड धरूं। नेणती सानेयां थोरां कडसणी करूं।
एकसरें आनंदाचें आवारु। होतु जगां।।२०२।।

" साधकाच्या अंत:करणी ज्ञान उजाडण्यापूर्वीच ते त्याला साक्षात्कार घडवून देतात. अमृतपान घडले नाही, तरी त्यांच्यायोगे मनुष्यांस अमरत्वप्राप्ती होते. योगयागादी साधने न करताही त्यांच्या कृपेमुळे साधकांना ***याचि देहीं याचि डोळां*** कैवल्यसुख पाहावयास लाभते. आणि त्यांची अमोघ कृपा लहानथोर, राजारंक, असा कोणताही भेदभाव न करता, पात्रापात्रता न पाहाता सर्व जनांवर सतत वर्षत असते. असे ते भक्तजन - ते महात्मे - ते संत म्हणजे सकळ विश्वास क्रीडण्यासाठी असणारे महासुखाने सुशोभित केलेले आनंदरूपी आवारच होत."

पसायदानातील भक्तोत्तम

पसायदानात प्रार्थिलेले आहे की या अशा *ईश्वरनिष्ठांची मांदियाळी* सकळांवर कल्याणनिधानाचा वर्षाव करत भूतमात्रांस निरंतर भेटो. कल्पतरूंचे चालतेबोलते उद्यान, चैतन्यचिंतामणींचे वसतिस्थान, अमृताचे सारस्वत सागर असेच ते महात्मे जसे काही आपल्या दयेचा प्रकाश सर्वत्रांवर वर्षवणारे अकलंकित शीतल कृपाचंद्रच होत. ते त्रितापरहित मार्तंड सर्वांचे सज्जन सोयरे होवोत. त्यांच्या योगे सर्वसुखी होऊन या त्रिलोकींच्या जीवांनी पूर्णत्व पावावे आणि त्या आदिपुरुषाची अखंड भक्ती करावी. विशेष म्हणजे या ग्रंथाच्या - ज्ञानदेवीच्या योगाने त्यांनी इहलोकी संसारतापग्रस्त जीवांचा उद्धार करावा.

"जेयांचें वाचेपुढे। नाम नाचत असे माझें"

अशा त्या संतसज्जनांविषयींचे ज्ञानदेवांचे भावपूर्ण उद्गार पाहा:

कंहीं एकाधेनि वैकुंठा जावें। तैं तिहीं वैकुंठचि केलें आघवें।
ऐसें नामघोषगौरवें। धवललें विश्व।।९-२०३।।
तेजें सूर्य तैसें सोज्वल। परि तोही अस्तवे हे कीडाल।
चंद्र संपूर्ण एखादें वेळें। हे सदा पुरते।।२०४।।

"सामान्यपणे एखादाच कोणीतरी आपल्या पुण्याईच्या बळाने वैकुंठी पोहोचतो. पण या संतजनांनी तर आपल्या पुण्याईच्या थोरवीने सगळे जगच वैकुंठ केले आहे. माझ्या नामघोषाच्या पुण्याईने त्यांनी सगळे विश्वच उजळवले आहे. स्वतेजाने ते सूर्यासारखे तळपतात. पण त्यांना सूर्य तरी कसे म्हणावे! तो तर अस्त पावतो! चंद्रासारखे पूर्णत्व त्यांच्याठायी असते म्हणावे तर तो फक्त पौर्णिमेसच पूर्ण असतो. हे महात्मे तर सर्वदा***"पूर्णमदः। पूर्णमिदं। पूर्णात् पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।"*** अशा तोडीचे पूर्ण स्वरूपस्थितीचे असतात."

मेघु उदारु परि वोसरे। म्हणऊनि उपमेसीं न पुरे।
हे नि:शंकपणें सपांखरें। पंचानन।।९-२०५।।

"मेघ उदार असतो म्हणून त्याची उपमा त्यांना द्यावी, तर तेही बरोबर नाही. कारण वर्षून मेघ ओसरतात. यांनी आपल्या कृपेचा सतत वर्षाव करूनही ती ओसरत नाही. हे महात्मे सिंहाप्रमाणे धीर असूनही कृपाळू पण आहेत."

जेयांचें वाचेफुडां भोजें। नाम नाचत माझें।
जैं जन्मसाहस्त्रीं वोलगिजे। एक वेळें मूखें यावया।।९-२०६।।
<u>तो मी वैकुंठीं नसें। एक वेळें भानुबिंबीहीं न दिसें।</u>
<u>वरि योगियांचीही मानसें। उमरडौनि जाये</u>।।२०६।।
<u>परि तेयापाशीं पांडवा। हारपला मी गिंवसावा।</u>
<u>जेथ नामघोषु बरवा। करिती तैं माझें</u>।।२०८।।

"सहस्त्रावधी जन्मांच्या पुण्याईने जे माझे नांव एखादवेळी मुखी येते, ते माझे नाम ज्यांच्या वाचेपुढे सचेतन होऊन मूर्त स्वरूपात नाचतबागडत असते, त्यांच्यापाशी, हे अर्जुना! मी जर कधी वैकुंठातून नाहीसा झालो किंवा भानुबिंबी सतत असणारा मी जर कधी दिसेनासा झालो; अथवा योगिजनांचे हृदय पण सोडून गेलो, तर माझा शोध घ्यावा; जेथे हे महात्मे सतत माझा नामघोष चालवतात. माझ्या गुणगौरवाने ते कसे तृप्त असतात!"

"कृष्ण विष्णु हरि गोविंद"

कैसें माझां गुणीं धालें। देशकालांतें विसरलें।
कीर्तनसुखें जाहलें। आपणपांचि।।९-२०९।।
कृष्ण विष्णु हरी गोविंद। या नामाचें निखल प्रबंध।
माजीं आत्मचर्चा विशद। उद्दंड गाती।।२१०।।
हे असो बहु इयापरी। कीर्तित मातें अवधारीं।
एक विचरती चराचरीं । पांडुसुता।।२११।।

"देशकाळाला विसरून जात माझ्या कीर्तनाची सतत गोडी चाखतचाखत ते माझ्याच स्वरूपाचे होऊन राहिले आहेत. ***"श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे। हे नाथ नारायण वासुदेव।"*** अशा माझ्या सहस्त्रनामरूपी निर्मळ प्रबंधांना ते रचतात आणि त्यात सगळ्यांना बोध होईल अशी आत्मचर्चा उत्कृष्टरीत्या करतात. त्यांची ती चर्चा व प्रबंध म्हणजे जणू पंचमातले सुस्वर गानच होय. हे किती प्रकारे पुन:पुनः सांगावे! हे पांडुपुत्रा! ऐक! असे कित्येक महात्मे भक्तजन माझे सतत कीर्तन करत या भूमंडळी नित्य विचरत असतात."

"कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचें निखळ प्रबंध। माजीं आत्मचर्चा विशद। उद्दंड गाती।।९-२१०।।" या ओवीतून प्रकट होणारा अर्थ ज्ञानेश्वरांच्या संदर्भात किती सार्थ आहे पहा! हा भक्तराज ज्ञानेश्वर संत आहे; सर्व भूतमात्रांचा सज्जन सोयरा आहे. *"आनंदाचे आवारु"* जगासाठी मांडणारा महंत आहे. उदार तर आहेच. समस्त जीवांचे कल्याण वांछिणारा आहे. कृपाळू आहे. अद्वैत भक्तिमंदिराचा कळस साकार करणारा ज्ञानदेवीरूप प्रबंध रचणारा आहे.

अक्षरागणिक *"कृष्ण विष्णु हरि गोविंद"* या नामाचे रूप प्रकटवणारा त्यांचा हा प्रबंध चोखाळ प्रमेयरत्नांनी आणि सुलभ आत्मचर्चेने खचाखच भरलेला पण आहे. आपल्या या ***ज्ञानेश्वरीरूप अखंड संकीर्तनाद्वारे भगवंताचा नामघोष त्रैलोक्यात दुमदुमवून सोडणारा आहे.*** भक्तवर्यांची उपरिनिर्दिष्ट समस्त लक्षणे अंगी पुरेपूर बाळगणाऱ्या ज्ञानदेवांची थोरवी गावी तितकी थोडीच आहे.

भगवद्गीता हा भगवंतांनी स्वतः गायिलेला आत्मबोधासाठीच्या विशद आत्मचर्चेचा प्रबंध आहे; त्यांच्या वाणीहून सुखद, मधुर, रसाळ, *धन्य ते गायनीकळा* असे गान दुसरे कोणते असणार! म्हणूनच त्यांच्या त्या सातशे श्लोकी संवादास महात्म्यांनी ***भगवद्गीता*** म्हणजे ***भगवंतांनी स्वतः गायिलेली*** असे नाम दिलेले आहे. ओव्यांद्वारे त्या गीतास मराठमोळ्या शृंगाराने सजवून आपल्यापुढे ज्ञानदेवांनी जो हा ***ज्ञानदेवी***नामक ग्रंथ ठेवला आहे, तोसुद्धा त्या स्वर्गीय - आत्मरमण करवणाऱ्या सुस्वर भगवद्गीतासारखाच आहे, हे ज्ञानदेवांचे कौतुक आपल्याला न जाणवले तरच नवल!

योगभक्तीचा दुर्ग जिंकणारा भक्त::::

ज्ञानभक्तीइतकेच, किंबहुना बऱ्याच साधकांसाठी त्याहूनही अधिक श्रेयस्कर असल्यामुळे महत्त्व पावलेल्या योगिजनभक्तांच्या चर्येचे पंथराजनिर्दिष्ट स्वरूप प्रकट करतांना हा *योगियांचा राणा* ज्ञानेश्वर आपल्या सुमधुर वाणीने काय उद्घोष करतो, पाहाः

पंथराज : योगदुर्गावर चढाईचा मार्ग

मग आणिक तैं अर्जुना। साविया बहुवा जतना।
पंचप्राणा मना। पाढाऊ घेऊनि।।९-२१२।।
बाहेरी यमनियमांची कांटी लाविली।
आंतु वज्रासनाची पौली पन्नासिली।
वरि प्राणायामाची मांडिली। वाहाति यंत्रें।।२१३।।

"योगभक्तीचा दुर्ग जिंकणारे अभ्यासयोगी साधक काय करतात, ते, अर्जुना! ऐक. *पंचप्राण व मन* हे त्या दुर्गाची इत्थंभूत माहिती असणारे खबरे वाटाडे मार्गदर्शक म्हणून घेऊन या योगदुर्गास तत्परतेने जिंकून घेण्याच्या स्वाभाविक विश्वासाने ते चाल करून जातात. *यमनियम*रूपी फौजांनी ते त्या दुर्गास वेढा घालतात. नंतर पुढे *वज्रासन*रूपी बळकट मूळबंधाचे ठाणे बांधतात. त्यावर *प्राणायाम* रूपी तोफा चढवून त्या दुर्गावर त्या डागून भडिमार करतात."

तेथ उल्हाटशक्तीचेनि उजिवडें। मनपवनाचेनि सुरवाडें।
सतरावियेचें पाणियाडें। बलियाविलें।।९-२१४।।
तेव्हां प्रत्याहारख्याति केली। विकारांची संपिली बोहली।
इंद्रियें बांधौनि आणिली। हृदयाआंतु।।२१५।।

"मग *कुंडलिनी* रूपी मशाल पेटवून त्या *पंचप्राण व मन* यांच्या मार्गदर्शनाखाली चुपचाप काळोख्या *सुषुम्ना* विवरामार्गे त्या दुर्गातल्या *सतराव्या* जीवनकलारूपी पाणवठ्यावर जाऊन पोहोचतात व ते आपल्या कब्जात घेऊन दुर्गाच्या आतील विषयरूपी शत्रूचे पाणी तोडतात. यमनियमरूपी फौजेने अगोदरच त्या शत्रूंची रसद तोडलेली असते. अशा वेळी **प्रत्याहारा**ने पराक्रमाची अतीव शर्थ करून विषयांची विकाररूपी सेना गारद केली व इंद्रियसेनानींना बंदिस्त करून हृदयाच्या आतल्या गुहेत कैद करून ठेवले."

तंव धारणावारु दाटिले। महाभूतांतें एकवटिलें।
मग चतुरंग सैन्य निवटिलें। संकल्पाचें।।९-२१६।।
तेयावरी जैत रे जैत। म्हणौनि ध्यानाचें निशाण।
दिसे तन्मयाचें झलकत। एकछत्र।।२१७।।

"तेवढ्यात धारणारूप वारूवर स्वार झालेल्या खाशा सैन्याने पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या पंचमहाभूतांचे बळ एकत्र करून संकल्पाचे मन, बुद्धी, चित्त व अहंकाररूपी चतुरंगदल उद्ध्वस्त केले. त्यावेळी *कुंडलिनी व पंचमहाभूते* यांनी महावायूचे स्वरूप घेऊन **अनाहतनाद**च्या नौबती झडवत विजयाची नांदी ललकारली. तद्रूपतेचे - ब्रह्मैक्याचे सिंहासन ताब्यात आले व पराक्रमाची शर्थ केलेला व हा योगदुर्ग जिंकणारा साधक त्यावर आरूढ होऊन निर्वेध निष्कंटक अशा एकछत्री आत्मानुभवरूपी राज्याचा उपभोग घेण्यासाठी सज्ज झाला."

पाठीं समाधिश्रियेचा अशेखा। आत्मानुभवराज्यसुखा।
पट्टाभिषेकु देखा। समरसें जाहला।।९-२१८।।
ऐसें हे गहन। अर्जुना मझें भजन।
आतां ऐके सांघैन। जैं करिती एक ।।२१९।।

"समाधिरूपी लक्ष्मीचा पूर्णतया उपभोग घेण्यासाठी त्या सिंहासनावर आरोहण करतांना त्याच्यावर समरसता - समत्व - अद्वैतैक्यरूपी सप्तसिंधुजलाचा पट्टाभिषेक झाला व तो साधक सिद्ध होऊन स्वानंदसाम्राज्याचा अनंत काळ उपभोग घेणारा *जीवन्मुक्त* म्हणून विराजमान झाला. अर्जुना! असा **हा माझ्या भक्तीचा *गूढ* प्रकार आहे**."

हाच *पंथराजनिर्दिष्ट* योगभक्तीचा प्रकार ज्ञानेशांनी पुरस्कारलेला आहे, हे ज्ञानदेवीच्या *सहाव्या, नवव्या, बाराव्या व विशेषतः अठराव्या अध्याया* तील, तसेच इतस्ततः आलेल्या निर्देशांवरून आपणांस कळून येते. या योगभक्तीचे दोन प्रकार मात्र ते आवर्जून करतात असे *बाराव्या* अध्यायातील योगदुर्गाच्या कठीणपणाविषयींच्या व *सहाव्या* अध्यायातील पंथराजाच्या सुलभतेबाबतच्या ज्ञानेशांच्या विवेचनावरून वाटते.

*गुरुपदिष्ट ईश्वरप्रणिधानयुक्त सगुण भक्ती*चा योगमार्ग सोपा असून तो ते *सहाव्या* अध्यायात सांगतात, तर त्याव्यतिरिक्त स्वबाहुसामर्थ्यावर विसंबून निर्गुणभक्तीचा योगमार्ग बोचरे लोहाचे चणे खाण्यासारखा दुःखदायक क्लेशकारक असल्याचे ते *बाराव्या* अध्यायी स्पष्ट करतात. ***कुंडलिनी विकशन* करूनच कोणताही साधनामार्ग पूर्णतेत परिणत होतो, अन्यथा नाही, हा मूलभूत सिद्धांत ध्यानात ठेवूनच आपणांस या ज्ञानेशांच्या प्रतिपादनास आकळून घेता येते.**

गुरुवी भक्ती

वर निर्देशिलेल्या गोष्टी ध्यानात ठेवून आपण ज्ञानेशांनी सांगितलेल्या भक्तीच्या स्वरूपाचा अधिक आस्वाद घेऊ या!

तऱ्हीं दोनीं पालववेरीं। जैसा एकु तंतु अंबरीं।
तैसा मीवांचूनि चराचरीं। जाणती ना।।९-२२०।।
आदि ब्रह्मा करूनि। शेवटी मशक धरूनि।
माजीं समस्त हे जाणौनि। स्वरूप माझें।।२२१।।
मग वाड धाकुटें न म्हणती। सजीव निर्जीव नेणती।
देखलिये वस्तू उजू लुंटिती। मीचि म्हणौनि।।२२२।।

"समाधिश्रियेचा लाभ होऊन ते भक्त चराचरात कसे विचरतात, ते ऐक. जसे वस्त्रातील एकूण एक धागे या पदरापासून त्या पदरापर्यंत सूताचेच बनलेले असतात - सूताखेरीज त्यात इतर काहीच नसते; तसेच या चराचर सृष्टीत एका मज भगवंतावाचून इतर काहीही ते जाणत नाहीत. आदिपासून अंतापावेतो - ब्रह्म्यापासून ते मशकापर्यंत जे जे काही आहे, ते सर्व माझेच स्वरूप आहे, अशी त्यांची प्रतीती असते. म्हणून लहान-थोर, सजीव-निर्जीव, हा भेदभाव न पाहता ते सर्वांतरी असणाऱ्या मला लोटांगण घालतात."

आपुलें उत्तमत्व नाठवें। पुढील योग्यायोग्य नेणवें।
एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें। नमूंचि आवडे।।९-२२३।।
जैसें उंचीं उदक पडिलें। तैं तलवटीवरी ये उगेलें।
तैसें नमिजे भूतजात देखिलें। ऐसा स्वभावो तेयांचां।।२२४।।
काइ फललियां तरूचि शाखा। सहजें भूमीसि उतरे देखा।
तैसें जीवमात्रा अशेखा। खालावती तैं।।२२५।।

"त्यांना आपल्या श्रेष्ठत्वाची जाणीव नसते. समोरील पदार्थ चांगला-वाईट, उत्तम-कनिष्ठ, सुष्ट-दुष्ट असा त्यांना जाणवत नाही. जे काही वस्तुमात्र समोर येईल, त्याला भगवंतास वंदन करत आहोत, या भावाने ते वंदितात. उंचावरून पडणारे पाणी सहजच जसे सखोल भागाकडे वाहू लागते, तसे सर्व भूतमात्रांत ईश्वर असल्याच्या प्रचीतीमुळे ते स्वभावतःच त्यांना नमन करत जातात. फळभाराने लगडलेली वृक्षाची शाखा जशी आपैसेच जमिनीकडे झेपावते, त्याप्रमाणे ब्रह्मभावफलांनी भारावलेली त्यांची चित्तवृत्ती समस्त जीवमात्रांपुढे लवते."

अखंड अगर्वता होऊनि असती। तेयांतैं विनयो हीच संपत्ति।
जैं जयजयमंत्रें अर्पिती। माझांचि ठाईं।।९-२२६।।
नमितां मानाभिमान गलाले। म्हणौनि अवचितें मीचि जालें।
ऐसें निरंतर मिसललें। उपासिती।।२२७।।

"सदा निगर्वी वृत्ती ते अंगी धारण करतात. विनय हीच त्यांची खरी संपत्ती असते. त्या संपत्तीस ते भूतमात्रांस नमस्कार करत, माझा जयजयकार करत माझ्याठायी अर्पण करतात. भूतमात्रांत मलाच पाहून त्यांना वंदन करत गेल्याने योगधारणेने जीर्णशीर्ण झालेली त्यांच्या अहंकाराची पुटे अवचित गळून पडतात आणि पुनश्च व्युत्थानदशा प्राप्त न होताच ते माझ्याचठायी मिसळून एकरूप होऊन जातात."

अर्जुना हे गुरुवी भक्ती। सांघितली तुजप्रति।
आतां ज्ञानयज्ञें यजिती। तैं भक्त आइकें।।९-२२८।।
परि भजन करिती हातवटी। तूं जाणत आहासि किरीटी।
जैं मागां इयां गोठी। केलियां आम्हीं।।२२९।।

"अर्जुना! ही श्रेष्ठ अशी गुरुपदिष्ट भक्ती कशी असते, ते तू माझ्याकडून ऐकलेस. या श्रेष्ठ योगभक्तिमार्गाचा उपदेश - त्याचे रहस्य आधी पण सांगितले होते *(सहाव्या अध्यायी - पंथराजदर्शनानुषंगाने!)*. त्याचप्रमाणे आता तुला जे माझे भक्त ज्ञानयज्ञाने माझी भक्ती करतात, त्यांच्याबाबत पण सांगतो, ते ऐक. त्यांची भक्ती करण्याची रीती, हे अर्जुना! तुला माहीतच आहे. कारण ती पण तुला मी पूर्वीच सांगितली होती *(२,३ व ४ या अध्यायी व इतरत्र)*."

पंथराज व ज्ञानयज्ञ यांची विस्तृत मीमांसा करतांना हा विषय आपणांस पाहाता येईल.

अर्जुनाची श्रवणासक्ती

तूर्त ईश्वरप्रणिधानाचा हा भाग पुढे पाहू या. आता अर्जुन भगवंताच्या या विधानाबाबत काय म्हणतो पहाः

तंव आथि जी अर्जुनु म्हणे। तैं दैवकिया प्रसादाचें करणें।
परि काय अमृताचें आरोगणें। पुरें म्हणावें।।९-२३०।।
ययां बोलां अनंतें। लगटा देखिला तेयांतें।
कीं सुखावलेनि चित्तें। डोलतु असे।।२३१।।
म्हणें भलें केलें पार्था। येन्हवीं हा अनवसरु सर्वथा।
परि बोलवितसे आस्था। तुझी मातें।।२३२।।

अर्जुन म्हणाला, "आपण पूर्वी *योग व ज्ञान* यांविषयी *(सहाव्या अध्यायी पंथराजानिमित्त अन इतरत्र)* जे जे काही सांगितले होते, ते माझ्या स्मरणात आहेच. पण तुम्ही प्रसन्न झालात व प्रसाद दिलात, किंवा अमृताचे कोणी जर वाढप करू लागले, तर *"पुरे, पुरे! आणखी नको!"* असे कोण करंटा म्हणेल!"

अर्जुनाचे हे उत्सुकतेचे बोल ऐकून तो देवकीपुत्र आनंदला व चित्त सुखावून तो अनंत डोलू लागला. तो म्हणाला, "तुझी ते परत ऐकण्याची इच्छा पाहून मला संतोष वाटतो आहे. खरे तर हे सर्व पूर्वीच सांगितले असल्याने यावेळी पुनः सांगण्याचे काहीच प्रयोजन नाही. पण तुझी जिज्ञासू वृत्ती मला स्वस्थ बसू देत नाही."

तंव अर्जुनु म्हणें हे कायीं। चकोरेंवीण चांदिणेंचि नाहीं।
जग निवविजे हा तेयाचां ठाईं। स्वभावो कीं जी।।९-२३३।।
एरें चकोरें तियें आपुलियें चाडें। चांचू करिती चंद्राकडें।
तेवीं आम्हीं विनवूं तैं थोकडें। देवो कृपासिंधु।।२३४।।
जी मेघु आपुलियें प्रौढी। जगाची आर्ती दवडी।
वांचूनि चातकाची ताहान ती केव्हढी।
तो वर्षावो पाहूनि।।२३५।।
परि चुला एकाचियां चाडें। जेवीं गंगेतैंचि ठाकावें पडे।
तेवीं आर्त बहु थोडें। तन्हीं सांगावें देवा।।२३६।।

यावर अर्जुन म्हणतो, "असे काय म्हणता! यात माझे कौतुक ते काय! चकोर पक्षी असला तरच चंद्र उगवतो आणि नसला तर तो उगवायचा राहातो की काय! सगळ्या जगाला शीतलता देणे हा चंद्राच्या चांदण्याचा अंगभूत स्वभाव नाही का! चकोर पक्षी तो केवळ आपली तृप्ती व्हावी म्हणून चंद्राकडे चोंच वासून पाहातो. पण तो कितीसे चांदणे पिणार! माझी विनवणी तशीच अल्प आहे. पण आपण देव कृपासिंधु आहात. समस्त विश्वाच्या कल्याणार्थ उपदेश करणे, हे तर आपले ब्रीदच आहे. आपण तर जगद्गुरू आहात! महाराज! मेघ आपल्या उदारतेचा वर्षाव करून संपूर्ण जगाची तृष्णा शमवतो. त्या मानाने त्या बापुड्या चातकपक्षाची तहान ती केवढी असते! असे असले तरी ज्याप्रमाणे गंगोदक एक चुळकाभर जरी हवे असले, तरी जसे गंगेकडेच जावे लागते, त्याप्रमाणे आमची आर्तता किती का असेना! थोडी असो नाही तर खूप असो! देवा! ती तुम्हालाच पुरवणे भाग आहे."

तेथें देवें म्हणितलें राहे। जो संतोखु आम्हां जाहाला आहे।
तेयावरि स्तुति साहे। ऐसें उरलें नाहीं।।९-२३७।।
पैं परिसतु आहासि निकयापरी। तैंचि वक्तृत्वा वन्हाडीक करी।
ऐसें पुरस्कारौनि श्रीहरी। आदरिलें बोलों।।२३८।।

हे अर्जुनाचे बोलणे ऐकून प्रसन्न होत्साते श्रीकृष्ण म्हणाले, "हे राहू दे! तुझे बोलणे ऐकूनच मला फार संतोष झाला. आता वर स्तुती सहन होईल, अशी माया उरली नाही. तू उत्तमरीत्या माझे म्हणणे ऐकून घेतो आहेस. तुझी ही श्रवणभक्तीच माझ्याठायीच्या वक्तृत्वास प्रकट होण्यास भाग पाडत आहे."

ज्ञानयज्ञ

याप्रमाणे अर्जुनास प्रशस्ती देत श्रीहरीने पुढे बोलण्यास आरंभ केला. ते म्हणालेः

तन्हीं ज्ञानयज्ञु तो एवंरूपु। तेथ आदिसंकल्पु हा यूपु।
महाभूतें मंडपु। भेदु तो पशु।।९-२३९।।
मग पांचांचे जैं विशेष गुण। अथवा इंद्रियें आणि प्राण।
हेंचि यज्ञोपचारभरण। अज्ञान घृत।।२४०।।

येथे ज्ञानधारा प्रकट करतांना ज्ञानयज्ञाचे रूपक कल्पले आहे. *ज्ञानयज्ञ* कसा असतो, पहाः "आदिसंकल्प - *"एकोऽहं, बहुस्यामः।"* - हा यज्ञिय पशू बांधावयाचा स्तंभ आहे. भूतमात्रे भिन्नभिन्न आहेत; जीव, जगत व परमेश्वर वेगवेगळे आहेत, या संकल्पनारूपी *भेद*नामक पशूचा या यज्ञात बळी दिला जातो. पंचमहाभूतेरूपी मांडव या यज्ञासाठी शृंगारला आहे. या पंचमहाभूतांचे जे *शब्द - स्पर्श - रूप - रस - गंध* हे विशेष गुण व तन्मात्रा आहेत, त्या किंवा त्यांची जीवांतील प्रातिनिधिक असणारी इंद्रिये व त्यांचे *विषय व प्राण* ही सर्व या यज्ञात होमिली जाणारी सामग्री आहे. त्यांसह *अज्ञान* रूप घृतयुक्त अशा आहुत्या या यज्ञात दिल्या जातात."

तेथ मनबुद्धिचियां कुंडा-। आंतु ज्ञानाग्नि धडफुडां।
साम्य तैंचि सुहाडा। वेदिका जाणें।।९-२४१।।
सविवेकमतिपाटव। तैंचि मंत्रविद्यागौरव।
शांति स्रुकस्रुव। जीव यज्वा।।२४२।।
तो प्रतीतीचेनि पात्रें। विवेकमहामंत्रें।
ज्ञानाग्निहोत्रें। भेदु नाशी।।२४३।।

"मनबुद्धीरूपी कुंड रचून त्यात ज्ञानाग्नी धडधडून प्रज्वलित केला जातो. हे सख्या अर्जुना! *समचित्तत्व* - द्वंद्वाबाबत चित्ताची समता - सर्व भूतमात्रांबाबत समत्वाची भावना ही या यज्ञाची *वेदिका* आहे. हिच्यावर भेदरूपी पशूचे बलिदान करून हा यज्ञ संपन्न होतो. *आत्मानात्मविवेक* करणारे बुद्धिकौशल्य ही या यज्ञाची मंत्रविद्यादेवता

आहे. तिच्या साहाय्याने विवेकमहामंत्राचा उच्चार करत शांतिरूपी स्रुक-स्रुवांमधून यज्ञिय द्रव्ये घेतघेत, त्यांना मंत्रोच्चारपूर्वक होमत यज्ञकर्ता जो जीव आहे, त्याच्या हातून हा यज्ञ केला जातो."

तेथ अज्ञान सरौनि जाये। आणि यजिता यजन हे ठाये।
आत्मसमरसी न्हायें। अवभृथीं जेव्हां।।९-२४४।।
तेव्हां भूतें विषय करणें। हे वेगलालें कंहीं न म्हणे।
आघवें एकचि जनें। आत्मबुद्धी।।२४५।।

"विवेकरूपी महामंत्राने हे ज्ञानाग्निहोत्र संपन्न केले की प्रतीतिरूप पुरोडाश मिळतो. तो भक्षिला असता भेदभावना नष्ट होतात. या भेदाचा असा लोप झाला की अज्ञान सरून जाते आणि यज्ञकर्ता व यज्ञ यांतली भिन्नता पण नाहीशी होऊन आत्मैक्यबोधाचे - सामरस्याचे *अवभृथस्नान* घडते. मग भूतमात्रे, विषय व इंद्रिये ही भाषा उरत नाही. आत्मबुद्धी प्राप्त झालेला तो यज्ञकर्ता ही सर्व आपणापेक्षा भिन्न आहेत, असे न मानता ती सर्व एकात्मच आहेत अशा प्रतीतीत बुडून जातो."

जैसा चेईला तो अर्जुना। म्हणे स्वप्नींची ही विचित्र सेना।
मीचि जाहलों होतो ना। निद्रावशें।।९-२४६।।
आतां सेना तैं सेना नव्हें। हे मीचि एक आघवें।
ऐसें एकत्वें मानवें। विश्व तेयां।।२४७।।
मग तो जीवु ही भाख सरे। आब्रह्म परमात्मबोधें भरे।
ऐसें भजति ज्ञानाध्वरें। एकत्वें येणें।।२४८।।

"अर्जुना! जसा स्वप्नात चित्रविचित्र दृश्ये पाहाणारा जेव्हा जागा होतो, तेव्हा ती खरी नव्हेत, निद्रावश होऊन आपणच ती झालो होतो, असे ज्ञान होऊन भानावर येतो; त्याप्रमाणे त्या ज्ञानयज्ञ संपन्न करणाऱ्यास खरा बोध येऊन आपणच हे अवघे विश्व आहोत, अशा एकात्मतेने या सर्वांचा प्रत्यय येतो. असे होते, तेव्हा *मी जीव आहे*, ही संकल्पना लोपते. *आब्रह्मस्तंबपर्यंता* त्यास आत्मबोध होत राहातो. सर्वच परमात्मा आहे, अशा ज्ञानाने तो परिपूर्ण होतो. याप्रमाणे तो ज्ञानी भक्त ज्ञानयज्ञाद्वारे माझी एकत्वबोधाने भक्ती करतो."

ज्ञान्याची अनुभूती

त्या ज्ञानिभक्तांच्या चित्तवृत्तीवर प्रकाश टाकतांना ज्ञानेश म्हणतात:

अथवा अनादि हे अनेक। जैं आनासारिखें एका एक।
आणि नामरूपादिक। तेंहीं विषम।।९-२४९।।
म्हणौनि विश्व भिन्न। परि न भेदें तेयांचें ज्ञान।
जैसें अवयव तन्हीं आन आन। परि एकेंचि देहींचें।।२५०।।
कां शाखिया सानिया थोरा। परि आहाति एकाचिये तरुवरा।
बहु रश्मि परि दिनकरा। एकाचें जेवीं।।२५१।।
तेंवीं नानाविध व्यक्तीं। आनानें नामें आनानी वृत्ती।
ऐसें जाणिती भेदलां भूतीं। अभेदा मातें।।२५२।।

"या एकात्मबोधाची प्रतीती वेगवेगळ्या प्रकारे कशी घेता येते, ते ऐक. हे सर्व विश्व अनादी असून त्यात तेव्हापासूनच हे दृश्य होणारे अनेकत्व आहे. त्यातील पदार्थ एकासारखे एक नाहीत. त्यांची नामरूपे भिन्नातिभिन्न आहेत. अशी या विश्वातील भिन्नता जरी त्यांच्या दृष्टीस येत असली, तरी त्यांचा *एकात्मबोध* काही भंग पावत नाही. कारण अवयव जरी वेगवेगळे असले, तरी ते एकाच देहाचे असतात."

"तरुवराच्या शाखा जरी लहानथोर वेगवेगळ्या आकाराप्रकाराच्या असल्या, तरी त्या एकाच वृक्षाच्या असतात. अनंत भिन्नभिन्न ठिकाणी पडणारे वेगळाले सूर्यकिरण असतात मात्र त्या एकाच दिनकराचे! त्याचप्रमाणे नाना प्रकारचे व्यक्त पदार्थ - भूतमात्रे, स्थावर, जंगम इ. वस्तू, त्यांची नामरूपे, त्यांचे भिन्नभिन्न स्वभाव व गुणधर्म याप्रमाणे अनेक भेद जरी असले, तरी त्या भूताभूतातील भेदातसुद्धा ते मज *अभेद* असणाऱ्या परमतत्त्वास ओळखतात."

येणें वेगलालेपणें पांडवा। करिती ज्ञानयज्ञु बरवा।
जैं भेदिती जाणिवा। जाणते म्हणऊनि।।९-२५३।।
ना तन्हीं जेधवां जियें ठायीं। देखति कां जैं जैं कांहीं।
तैं मीवांचूनि नाहीं। ऐसाचि बोधु।।२५४।।
पाहे पां बुडबुडा जेउता जाये। तेउतें जलचि एक तेयां आहे।
मग विरे अथवा राहे। तन्हीं जलाचिमाजीं।।२५५।।
कां पवनें परमाणु उचलिलें। तैं पृथ्वीपणावेगलें नाहीं गेलें।
आणि माघौतें जन्हीं पडिलें। तन्हीं पृथिवीयेचिवरी।।२५६।।
तैसें भलतेथ भलतेणें भावें। भलतेंही न हो अथवा होआवें।
परि तैं मी ऐसें आघवें। होऊनि ठेलें।।२५७।।

" अशा प्रकारे ते उत्तम ज्ञानयज्ञ संपन्न करतात. कारण ते महात्मे ज्ञानी असल्याने अशा विविध भेदांच्या जाणिवेने स्वरूपापासून ढळत नाहीत. जेव्हा ज्या ज्या ठिकाणी ते जे जे काही पाहातात, ते मजवाचून अन्य नाही, असा त्यांचा बोध असतो. बुडबुडा कोठेही गेला, तरी त्याला तेथे - सर्वदूर जळाचाच बोध होणार! मग राहिला काय अन विरून गेला काय! सर्व जळाचेच असणार! किंवा वाऱ्याने पृथ्वीचे परमाणू उडवून आपल्यात समावून घेतले, तरी त्यांचे पृथ्वीत्व जात नाही. आणि पुनः ते जरी पृथ्वीतलावर पडले, तरी ते पृथ्वीच्या पृथ्वीचेच राहातात. त्याप्रमाणे वाटेल ते वस्तुजात असो वा नसो, ते सर्व अवघे मीच आहे - *परमात्मा आहे* - विश्वतोमुख असा तो सगळा मी एकमात्र आहे, अशी त्या *ज्ञानियाची अनुभूती* असते."

ज्ञानभक्ती

अगां हे जेव्हढी माझी व्याप्ती। तेव्हढीचि तेयांचि प्रतीती।
ऐसें बहुधाकारीं वर्तती। बहुचि होऊनि।।९-२५८।।
हे भानुबिंब आवडतेयां। सन्मुख जैसें धनंजया।
तैसें तैं विश्वा ययां। सामोरे सदा।।२५९।।

"मी जेवढा व्यापक आहे, जे जे मी व्यापलेले आहे, ते ते सर्व त्यांना मद्रूप प्रतीत होते. त्या सर्वत्रात स्वत:सह मला पाहत ते त्या बहुविध आकाराप्रकारांमध्ये त्या त्या बहुविधरूपांनी वर्ततात. हे धनंजया! सूर्यबिंब जसे सर्वांस सन्मुख होऊन असते व त्याचे रूप

लख्ख दिसते, तसे ते पुरुष या विश्वास सर्वदा सामोरे असतात. त्या विश्वात त्यांना मीही तसाच - त्या सूर्याप्रमाणे स्पष्टपणे दिसतो."

अगां तेयांचियां ज्ञाना। पाठीं पोट नाहीं अर्जुना।
वायु जैसा गगना। सर्वांगीं असे।।९-२६०।।
तैसा मी जेतुला आघवा। तैंचि तुक तेयांचियां सद्भावा।
तऱ्हीं न करतां पांडवा। भजन जाहलें।।२६१।।

"त्यांच्या ज्ञानास पाठ किंवा पोट अशी अंगे नसतात. वायू जसा गगनात सर्वांगी भरून राहातो, तसे त्यांचे ज्ञान विश्वाकार झालेले असते; मग त्या ज्ञानाचे प्रभाग ते कसे आणि कोणते पाडावेत! विश्व होऊन या विश्वात वर्तणाऱ्या त्या महाभागांचा मजवरील हा ज्ञानस्वरूप सद्भाव तोलाने मी जेवढा जसा आहे, तेवढा तसाच संपूर्ण अखंड असतो. माझी अशी अनुभूती ते सदासर्वदा घेत असल्याने माझे कीर्तन न केले, मला नमन न केले, मला जरी त्यांनी वंदिले नाही, तरीही ते माझी अविरत भक्ती करतात. ही त्यांची सहजाभक्ती वा *ज्ञानभक्ती* होय."

येऱ्हवीं तऱ्हीं सकल मीचि आहे।
तऱ्हीं कवणीं कें उपासिला नोहें।
येथ एक जाणणेनविण ठाये। अप्राप्तासि।।९-२६२।।
परि तैं असो येणें उचितें। ज्ञानयज्ञें यजितयांतैं।
उपासिती मातें। तैं सांघितलें।।२६३।।
अखंड सकल हे सकलां मुखीं।
सहज अर्पित असे मज एकीं।
नेणणेयासाठीं मूर्खीं। न पविजेचि मातें।।२६४।।

"वस्तुतः सकळ विश्व व त्यातले यच्चयावत पदार्थ मीच आहेत. मग माझी उपासना न करणारा कोठे शोधावयाचा! पण असे असूनही अज्ञानी जीवांकडून हे जाणले जात नसल्याने माझी खरी भक्ती ते करत नाहीत. पण ते राहू दे. तर हे माझी उचित अशा ज्ञानयज्ञाने उपासना करणारे भक्त कोण, ते तुला सांगितले. एरवी हे यजन सकळांच्या रूपाने अखंड घडत असते. ते सहजच मला अर्पण होत असते. पण इतरेजन मूर्ख असल्याने मला जाणत नाहीत. ते मला म्हणूनच पावत नाहीत."

समारोप

भक्तीचा मार्ग स्पष्ट करत, ज्ञान आणि योग यांची तिच्याशी सांगड घालत कर्म आचरण्याचा हा गीतेच्या उपासनेचा विशेष आपण *ज्ञानेश्वरी* आणि पातञ्जलयोगसूत्रातील *ईश्वरप्रणिधान* या संकल्पनेच्या आधारे ***राजविद्या - राजगुह्य*** या गीतेच्या केंद्रीय विशेषास अनुलक्षून या **उपासनारहस्य** नामक **अष्टम स्कंध**ात अभ्यासला.

ईश्वरप्रणिधान व *भक्ती* यांचे हे गुह्य उकलण्यासाठी ईश्वराची पण नीट ओळख करून घ्यावी लागेल. तसा *ईश्वरस्वरूपाचा विचार* काही प्रमाणात आपण पूर्वी वेळोवेळी केलेला आहेच. पण त्याचे अंतरंग अजूनही दृष्टीस पडावे म्हणून आपणास पुढील **नवम स्कंध - ईश्वराचे अंतरंग** याकडे वळावे लागते. तर आता तेच प्रयोजन! तर आता पाहू या त्या स्कंधातील **उन्मेष क्र. ३६ - शिवशक्तीचा चिद्विलास**!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::नवम स्कंध:::
::ईश्वराचे अंतरंग:
(पृ.क्र.५५९ ते ६१०)

उन्मेष ३६:

गीता:

९:१६,१७

ज्ञानेश्वरी:

९:२६६-२७७

१३:९२६,९८१-९८४,९८६९९९-१००६

अमृता.:

१:१-६४

पा.यो.सू.:

१:२३

२:१-४,९,१०,१३

::उन्मेष ३६::
::शिवशक्तीचा चिद्विलास::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::नवम स्कंध:::
::ईश्वराचे अंतरंग:

::उन्मेष ३६::
::शिवशक्तीचा चिद्विलास::

ईश्वरप्रणिधान::::

ज्ञानाग्नी व कुंडलिनी

ज्ञानयज्ञाचे ज्ञानदेवपुरस्कृत स्वरूप आपण मागील उन्मेषातून अवलोकिले. त्यातला *ज्ञानाग्नी* म्हणजे जागृत *कुंडलिनी* शक्ती होय, हे जिज्ञासूंनी लक्षात ठेवावे. ती जेव्हा कार्य करू लागते, तेव्हा तिच्या मुखात अज्ञानाची आहुती पडते. पापपुण्याच्या जन्मोजन्मीच्या राशी ती पाहता पाहता भस्म करून टाकते आणि साधकास शुद्ध, पवित्र, भेदाभेदविवर्जित करून त्याला ज्ञानसंपन्न दृष्टी प्रदान करते,असा शास्त्रांतरीचा दाखला आहे.

वेद व ईश्वरप्रणिधान::::

"वेदांचा तो अर्थ"

अशा या ज्ञानाग्निसाधनेने सुफळ संपूर्ण होणाऱ्या यज्ञाचे सूतोवाच भगवंतांनी चतुर्थ अध्यायी ***"ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।"*** असे केले होते. आता ब्रह्म ते आपण स्वतः आहोत; *परमात्मा व ब्रह्म* किंवा *ईश्वर व परमात्मा* यात तसा मूलतः फरक नाही, हे विधान आपल्यापर्यंत पोहोचावे व आपल्या ईश्वरप्रणिधानयुक्त समाधिसाधनास सर्वांगपरिपूर्णता यावी; या दृष्टीने भगवंत काय म्हणतात, ते पाहा:

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम्।
मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम्।।९-१६।।

"वेदोक्त विधान म्हणजे क्रतु; त्यापासून संपन्न करावयाचा यज्ञ, स्वधा, औषधी, मंत्र, घृत, अग्नी आणि आहुती मीच आहे. असा हा *ज्ञानयज्ञ* होय."

तुकाराममहाराजांनी म्हटले आहे की *"वेदांचा तो अर्थ आम्हासिचि ठावा। इतरें तो वाहावा। भार माथां।।"*. वेदाचे खरे ज्ञान व त्यातून उद्भवणारे यज्ञकर्म संतसज्जनांनी व भगवंतांनी आपापल्या उपदेशातून वेळोवेळी स्पष्ट केलेले जे आढळते, ते पठडीच्या पंडितांच्या धारणेपेक्षा भिन्न आहे, हेच या श्लोकातून दिसून येते.

त्याबाबत ज्ञानदेव म्हणतात:

तोचि जाणिवेचा उदो जऱ्हीं होये। तऱ्हीं मुदल वेदु मीचि आहे।
आणि विधानातें जेयां विये। तो क्रतुही मीचि।।९-२६५।।
मग तेयां कर्मापासूनि बरवा। जो सांगोपांगु आघवा।
यज्ञु प्रगटे पांडवा। तोही मी गां।।२६६।।
स्वाहा मी स्वधा। सोमादि ओषधी विविधा।
आज्य मी समिधा। मंत्रु मी हवि।।२६७।।
होता मी हवन किजै। तेथ अग्नि तो स्वरूप माझें।
आणि हुतक जैं जैं। तैंहीं मीचि।।२६८।।

आपल्या भक्तांना वेदाचा जो अर्थ आकळतो, त्याबाबत भगवंतांचे अनुमोदन प्रकट करतांना या श्लोकावर ज्ञानेश म्हणतात की: "खऱ्या ज्ञानाचा नुसता उदय झाला की *वेद* म्हणजे मूळात मीच आहे हा बोध होतो. त्याने प्रकटवलेले विधान म्हणजे म्हणजे कर्मविषयक *क्रतु (यज्ञकर्म)* सुद्धा मीच आहे आणि कर्मापासून जो यज्ञ अंगोपांगांसह प्रकटतो, तोही मीच आहे, हे सहजच आकळून येते. यज्ञातील *स्वाहा* - आहुतीचे अन्न, *स्वधा* - पितरांना द्यावयाच्या आहुतीचे अन्न, सोमादिक वनस्पती - औषधी, आज्य - तूप, समिधा, यज्ञमंत्र, हवनीय द्रव्य ही सर्व मीच आहे. एवं च काय! *होता* - यज्ञकर्म करणारा ब्राह्मण, तसेच ज्यात हवन करतात, तो होमाग्नी आणि *हुतक* - हवन करण्याचे द्रव्य ही सर्वच्या सर्वच एकमेव मी परमात्माच आहे, हे असे ज्ञान प्राप्त होताच उमजते."

ॐकारस्वरूप

याजकास परमात्मस्वरूपी अधिष्ठित करणाऱ्या या ज्ञानयज्ञाविषयी इतके स्पष्ट सांगितल्यावर आपले ईश्वरीय स्वरूप अधिक स्पष्ट करतांना *ॐकार* वा *प्रणव* म्हणजे आपणच कसे आहोत, हे सांगून पतञ्जलिप्रणीत ***"तस्य वाचकः प्रणवः"*** या सूत्राची आठवण करून देणारे भगवंतांचे विधान ऐका:

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः।
वेद्यं पवित्रमोङ्कार ऋक्साम यजुरेव च।। ९-१७।।

"मी या जगताचा पिता आहे. माता आहे. पालनकर्ता आहे. पितामह मीच आहे. ज्ञेय वस्तू मीच आहे. पवित्र असा भगवद्वाचक ॐकार वा प्रणवही मीच आहे. ऋग्वेद, सामवेद आणि यजुर्वेद ही ॐकारस्वरूप वेदत्रयी पण मीच आहे."

भगवंतांचे द्वैतातद्वैतविलक्षण स्वरूप

भगवंत म्हणतात की त्यांचे स्वरूप विश्वाच्या मर्यादेतील नाही. अमर्याद, अनंत, निखल, निरञ्जन, अमूर्त, निराकार, अव्यक्त, अचिंत्य, अविकारी,अविनाशी, भूतैकभिन्न, आदि, अनादि, कालातीत अशा त्यांच्या स्वरूपाविषयी आपण वेळोवेळी पाहिलेच आहे. या जगताशी माझा कोणताही संबंध नाही, असे ते म्हणतात, त्याचवेळी या जगताशी नातेही जोडतात. एवढेच काय तर आपल्या विभूतीसुद्धा

सांगतात. काही विभूतींचा परिचय आपण पूर्वी सातव्या अध्यायी करून घेतला आहे. तेव्हा ***"रसोऽहमप्सु कौन्तेय ...।।७-८ ते ११।।"*** यातूनसुद्धा भगवंत आपण कोण कसे आहोत, हे सांगत होते. हा विभूतिविषय अत्यंत विस्तारपूर्वक असा *विभूतियोग* या अध्यायनामाने *दशम* अध्यायी येतो. तो आपण योग्य वेळी अवलोकणार आहोतच.

पण प्रश्न असा उद्भवतो की भगवंतांच्या या सर्व उक्तींचा मेळ कसा घातला जातो! निर्गुण तरीही सगुण, निराकार तरीही साकार, अव्यक्त तरी व्यक्त, भूतैकभिन्न तरीही भूतांतर्यामी, अमूर्त तरी मूर्त, अविकारी तरी पण विकारी विश्वाशी संबंधित, अविनाशी तरी विनाशी जगतात वावरणारे, सत् तरी असद्रूपे जगतात प्रत्ययास येणारे, अकर्ता असूनही कर्मे करवणारे, अद्वैत तरीही द्वैतमिषाने प्रकट दिसणारे, जीव व जगताचा सापेक्ष निरास करत असले तरी भक्त-भाव्य अशा स्वरूपात लक्षिले जाणारे, जाणिवेच्या अतीत, शब्दातीत, अवाच्य, अनिर्वचनीय असे असले तरी वेदोक्त अनुभूती देणारे, संतसज्जन व द्रष्ट्यांनी ग्रथित केलेले, असे हे भगवंतांचे स्वरूप आहे. हे सापेक्ष स्वरूप मनुष्यमात्रांसाठी आहे.

निरपेक्ष स्वरूप मानवी मर्यादेच्या कोटीत बसणारे नाही. काहीच नाही, ***नास्ति किञ्चन***, असे शून्यात्मक स्वरूप आपल्या कल्पनेच्या डोहात खोल बुडी मारून जरी जरासे आकळले आहे असे वाटले, तरी ते ज्ञान सापेक्षच असणार! *आहेच्या* सापेक्ष *नाहीचा* भाव अथवा *नाही* म्हणजे *आहेचा अभाव* ही तशी मानवाच्या नित्य परिचयाची कल्पना आहे. पण जर *आहे* या संकल्पनेचे अस्तित्व कधीच अनुभवता आले नसले, तर *नाही* ही तत्सापेक्ष कल्पना कशी उमजणार! बरे जरी *नाही* या कल्पनेस उमगले, तरी ते कोणाच्या तरी *आहेपणाने* वा अस्तित्वानेच ना!

म्हणजे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने भगवंताचे निरपेक्ष रूप कितीही जरी सत्य असले, तरी प्रत्ययासाठी, अनुभूतीसाठी, प्रचितीसाठी, प्रतीतीसाठी, साक्षात्कारासाठी या दृश्य रूपाशी त्या रूपाची सांगड घालावीच लागते. मिथ्या, मिथ्या म्हणून मायेचा कितीही उद्घोष केला तरी समोरून बेफाम हत्ती जेव्हा चाल करून येतो, तेव्हा त्याच्या आतल्या परमतत्त्वापेक्षा माहुतातल्या परमतत्त्वाचा सापेक्ष आदर करावाच लागतो.

चिद्विलासाचे माध्यम

अज्ञान्यांचे सज्ञान्यांत परिवर्तन करतांना तरी किंवा शिष्यास अपूर्णावस्थेतून पूर्णत्वाकडे नेत असतांना वा सर्वसामान्यांस असामान्य अशा तत्त्वज्ञानाची ओळख करून देत असतांना, धुळाक्षराच्या पाटीप्रमाणे **इह** हे मान्य करतकरतच **पर**तत्त्वाची ओळख त्या इहद्वारे-येथीलद्वारे - करून देणे आवश्यक ठरते.

गीता-ज्ञानेश्वरी हे ग्रंथ मूळ म्हणजे त्या परमतत्त्वाचा उपदेश करतात. निव्वळ ज्ञान्यांना तो उपदेश आवश्यक नाही. स्वयंभू प्रज्ञावंतांसाठी हा बोध नाही. पण इतरांसाठी म्हणून अशा *द्वैताद्वैतविलक्षण, सदसद्विलक्षण, अमूर्त तरीही मूर्त* स्वरूपाची आवश्यकता भासते. हा *द्वैत* व *अद्वैत* यातला उपरोध नसून एका विशिष्ट अवस्थेतील साधकांसाठी केलेला समन्वय आहे. याच समन्वयासाठी **चिद्विलासा**चे *स्वसंवेद्य* असे तत्त्वज्ञान ज्ञानदेव आधारभूत ठरवतांना दिसतात. *प्रेमभक्ती* या उच्चतम भावांची अभिव्यक्ती होण्यासाठी हे चिद्विलासाचे माध्यमच योग्य आहे.

शुष्क, शून्य अशा परमात्मस्वरूपाने - तशा वेदांताने ज्ञानी जनांससुद्धा आनंद प्राप्त होत नसावा असे दाखले आहेत. श्रीरामकृष्ण परमहंसांच्या जीवनात आलेला असीम तत्त्वज्ञानी वेदांती अशा *न्यान्गट्या* संन्याशाचा अनुभव व त्याला कालीमातेची सगुण भक्ती प्राप्त झाल्यानंतरचा आनंदाविष्कार हेच दर्शवितात. महाज्ञानी ***"व्यासोऽच्छिष्टं जगत्सर्वं"*** ख्यातीच्या व्यासमहर्षींना कोण कमी ज्ञानी म्हणेल! पण श्रीमद्भागवतातील भक्तिपूर्ण रचना करून - श्रीकृष्णाचे सगुण लीलाचरित्र प्रकटवून - ते त्या महाज्ञानी भक्तवर्य शुकाचार्यांच्या मुखाने श्रवण करूनच त्यांना खरा आनंद प्राप्त झाला.

एकदा हा आनंद प्राप्त झाला की त्यापुढे मुक्तीची मातब्बरी - तत्त्वज्ञानाची अभिलाषा इ.काही वाटत नाहीत. असे आहे म्हणूनच पायरीपायरीने, टप्प्याटप्प्याने आपण ईश्वराचे अचिंत्य रूप पाहाता यावे म्हणून त्याचा या सगुण साकार रूपाशी असणारा वा दर्शवला जाणारा अत्युत्कृष्ट संबंध जाणून घेतला पाहिजे. *ईश्वरप्रणिधान* करता येऊन समाधि सिद्ध होण्यासाठी ईश्वराच्या स्वरूपाचे अनुसंधान अभिमत आहे. पतञ्जलीसुद्धा त्या अनुसंधानासाठी प्रणवाशी त्याची सांगड बांधतात.

ईश्वरप्रणिधानाचे स्वरूप

"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।" मधील ईश्वराचा परिचय आपण तत्संबंधी सूत्रांवरून करून घेतला होता. थोड्याफार फरकाने पण त्याच आशयाने त्याचा तसाच परिचय गीता करून देते, हेही आपण पाहिले आहे. *ईश्वरप्रणिधान* म्हणजे काय याविषयी थोडे अधिक खोलात पाहू या!

ईश्वरप्रणिधान म्हणजे ईश्वराची विशेष भक्ती होय. शरीर, मन, प्राण, अंत:करण इ.सर्व, त्यांपासून उद्भवणारी कर्मे व त्या कर्मांचे फल भगवंतास म्हणजे ईश्वरास अर्पण करणे; ॐकारात ईश्वराची भावना करून त्याचा जप करणे; या सर्वांस तप व स्वाध्याय यांची जोड देणे; या सर्वांद्वारे म्हणजे *तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान* यांच्या योगाने पतञ्जली म्हणतात तसा ***"तप:स्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोग:।।२-१।।"*** असा *क्रियायोग* साध्य होतो.

या क्रियायोगाचे फल म्हणजे समाधीचा चित्तात वारंवार प्रादुर्भाव होणे व क्लेश क्षीण करणे असे आहे. याअर्थी पतञ्जली म्हणतात ते असे: ***"समाधिभावनार्थ: क्लेशतनूकरणार्थश्च।।२-२।।"***

हे *क्लेश* पंच सांगितले आहेत. ते म्हणजे ***"अविद्या - अस्मिता - राग - द्वेष - अभिनिवेशाः क्लेशाः।।२-३।।"*** यांनाच *साङ्ख्य* परिभाषेनुसार अनुक्रमे *तमस्, मोह, महामोह, तामिस्त्र व अंधतामिस्त्र* असे म्हणतात. *पुराणे यांनाच नरकात गणतात. अविद्या* ही सर्व क्लेश व दुःखाचे तथा अज्ञानाचे मूल कारण आहे म्हणून म्हटले आहे कीः ***"अविद्याक्षेत्रमुत्तरेषां प्रसुप्ततनुविच्छिन्नोदाराणाम्।।२-४।।"*** हे क्लेश *प्रसुप्त, तनु, विच्छिन्न व उदार* या अवस्थात असतात.

अनित्यात नित्यत्व पाहाणे, अपवित्रास पवित्र समजणे, दुःखास सुख मानणे आणि अनात्म्यात आत्मा पाहाणे, ही अविद्यालक्षणे आहेत. म्हणून पतञ्जली म्हणतातः ***"अनित्याशुचिदुःखानात्मसु नित्यशुचिसुखात्मख्यातिरविद्या।।२-५।।"***

पंचक्लेश *असंप्रज्ञात* समाधिद्वारे चित्तास आपल्या कारणात लीन करून त्याबरोबरच लीन होतात. यासाठी *क्रियायोग* आचरणे व *प्रसंख्यान* म्हणजे *विवेकख्याति* वा *ज्ञानाग्नी* यांचा उपयोग होतो. ***"ते प्रतिप्रसवहेयाः सूक्ष्माः।।२-१०।।"*** - यात **प्रतिप्रसवक्रम** सांगितला आहे. *अभिनिवेश -राग –द्वेष* यांचा त्याच क्रमाने उत्तरोत्तर *अस्मिता* व नंतर *अविद्या* यांत लय करावा म्हणून पतञ्जली सांगतात. म्हणजे एका प्रकारे हा लय साध्य करण्याचे *कुंडलिनी*जागृतीसह साधन जे **पंथराज**, त्याचा हा योगशास्त्रीय निर्देश समजावा लागेल.

अविद्या इ. क्लेश जड होतात, म्हणजे दृढ झाले की **प्रसवक्रम** म्हणजे संसारात आवागमन होते. म्हणून पतञ्जली म्हणतात ; ***"सति मूले तद्विपाको जात्यायुर्भोगाः।।२-१३।।"*** - *आयु, जाति व भोग* ही *कर्माशय* समृद्ध होण्याची फले आहेत. तद्विरुद्ध *कर्माशय* क्षीण झाला, *क्लेश* तनु झाले व चित्त कारणात त्यांसह लय पावले की हे चक्र उलटून ***प्रतिप्रसवक्रम*** होतो व कैवल्यप्राप्ती होऊन संसारचक्रातून मुक्ती मिळते.

शौच, संतोष यांची जोड जर *तप, स्वाध्याय व ईश्वर*प्रणिधानास मिळाली, तर जीवन्मुक्ती प्राप्त होते. या अर्थाने श्रीव्यासांनी त्यांच्या पातञ्जलयोगसूत्रभाष्यात म्हटले आहे कीः

शय्यासनस्थोऽथ पथि व्रजन्वा स्वस्थः परिक्षीणवितर्कजालः।
संसारबीजक्षयमीक्षमाणःस्यान्नित्ययुक्तोऽमृतभोगभागी।।व्या.भा.।।

"जो योगी शय्या व आसनावर बसलेला असता, मार्गक्रमणा करत असता किंवा एकांतात स्थित असतांना वितर्करूप जालास नष्ट करून *ईश्वरप्रणिधान* करतो, त्याला संसाराचे मूल जी *अविद्या* आहे, तिचा क्षय झाल्याचा अनुभव येतो. नित्य परमात्म्याशी युक्त होऊन तो अमृताच्या भोगाचा भागीदार होतो."

विश्वोत्पत्ती करणाराही ईश्वर आणि विश्वही ईश्वरच!

सर्व नियमांमध्ये *ईश्वरप्रणिधान* मुख्य आहे. अशासाठी ज्याचे *प्रणिधान* म्हणजे *भक्ती* करावयाची त्या **ईश्वरा**चे साधकांसाठी स्वरूप स्पष्ट करतांना ज्ञानदेव काय सांगतात, ते पाहणे उचित ठरेलः

पैं जेयाचेनि अंगसंगें। इयें प्रकृतिस्त्व अष्टांगें।
जन्म पाविजत असे जगें। तो पिता मी गां।।९-२६९।।
अर्धनारीनटेश्वरीं। जो तोचि पुरुष नारी।
तेविं मी चराचरीं। माताही होय।।२७०।।
आणि जाहलें जग जेथें राहें। जेणें जित वाढत आहे।
तैं मीवांचूनि नोहें। आन निरुतें।।२७१।।

"ज्याच्या शरीरसंबंधाने या प्रकृतीपासून अष्टधा भाग - *भूमी, आप, अनल, वायु, ख, मन, बुद्धी व अहंकार* असलेले हे जगत जन्म पावते, तो बीजप्रदाता पिता मी आहे. हे पूर्वीसुद्धा सांगितलेच होते. ***अर्धनारीनटेश्वर*** असे जे आदियुगूल ज्याच्यापासून हे जगत निर्मिले गेले आहे, त्यातील नर व नारी अभिन्न असतात. म्हणून जगाची आद्य नारी म्हणजे माताही मीच आहे. एवं च *प्रकृती व मी* एकच आहोत. मी *पुरुष* व ती *प्रकृती* ही भिन्न नसून एकच आहोत. असा या चराचराचा पिता व माता दोघेही मीच आहे. आता हे उत्पन्न झालेले जगत ज्याठायी राहाते व ज्यायोगे व्यवहारते, ते माझ्याशिवाय इतर काहीही नाही."

इयें प्रकृतिपुरुषें दोन्हीं। उपजलीं जेयाचियां अमनमनीं।
तो पितामह त्रिभुवनीं। विश्वाचा मी।।९-२७२।।
आणि आघवेयां जाणणेयांचियां वाटा। जेयां गांवां येती गां सुभटा।
जैं वेदांचियां चोहटां। वेद्य जैं म्हणिजे।।२७३।।
जेथ नाना मतां बुझावणी जाहली।
एकमेकां शास्त्रांची अनोलखी फिटली।
चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आली। जैं पवित्र म्हणिजे।।२७४।।

"आणि *प्रकृति-पुरुष* हे *आदियुगूल* ज्याच्या मनोरहित संकल्पातून जन्मली, तो या अखिल विश्वाचा पितामह पण मीच आहे. आणि हे सुयोद्धया अर्जुना! चहूं वेद जेथे मिळतात, तो चव्हाटा ज्या *वेद्य* या ठिकाणी असतो व जेथे सर्व तत्त्वज्ञानरूपी वाटा येऊन मिळतात; ज्या ठिकाणी नाना मतातील भेद मिटतात आणि सर्व शास्त्रांची एकमेकांशी असलेली अनोळख फिटून एकवाक्यता होते; आडवाटेला लागलेली - ज्ञानाची वाट चुकलेली - ज्ञानमते शेवटी ज्याठायी अंती जाऊन पोहोचतात; ज्यास पवित्रासही पवित्र करणारे म्हणतात, ते ठिकाण - ते *परमधाम* मीच आहे."

पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु। घोषध्वनिनादाकारु।
तेयाचें गां भुवन जो ॐकारु। तोही मी गां।।९-२७५।।
जेयां ॐकाराचियें कुशी। अक्षरें होती अ उ मकारेंसीं।
जियें उपजत वेदेंसीं। उठलीं तिन्हीं।।२७६।।
म्हणौनि ऋग्यजुःसामु। हे तिन्हीं म्हणे मी आत्मारामु।
एवं मीचि कुलक्रमु। शब्दब्रह्माचा।।२७७।।

"ब्रह्मबीज अंकुरले असता *घोष - परा, नाद -पश्यंति, ध्वनी - मध्यमा व आकार - वैखरी* असा अंकुर ज्या ॐकाररूपी भुवनातून प्रकटतो, ते उत्तम भुवन - धामही मीच आहे. या ॐकाराच्या पोटी

अकार, उकार व मकार अशी तीन अक्षरे आहेत. या ॐकारासह *अ, उ व म* ही अक्षरे तिन्ही वेदांसह त्या ब्रह्मबीजांकुराबरोबरच उपजली आहेत. म्हणून *ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद* ही वेदत्रयीही मीच आहे," असे तो आत्माराम श्रीकृष्ण म्हणाला.

जगताचे मातापिता::::

अमृतानुभवातील *"पिताऽहमस्य जगतो माता"*

आदियुगुलाचे *अर्धनारीनटेश्वर* स्वरूप श्रीज्ञानदेवांनी **अमृतानुभव** या त्यांच्या रचनेतून स्पष्ट केलेले आहे. त्याचा मूळभाग असे पंचश्लोक यापूर्वी आपण एकदा पाहिले आहेत *(उन्मेष ११-अमृतानुभवातील गुरुभक्ती - पृ.क्र.१८५ ते १९३).* गीता श्लोक क्र.९-१७ याच्या अनुषंगाने जगाची ही मातापिता कशी आहेत, त्याचे वर्णन **अमृतानुभवा**च्या माध्यमातून करून घेणे आपल्याला आवडेल असेच आहे. म्हणून स्वल्पसे विषयांतर करून तो भाग समजावून घेऊ या:

अमृतानुभवाची पंचश्लोकी

"अक्षर, निर्विकार, वर्णन न करता येणारे, आनंदस्वरूप, अज, स्वयंसिद्ध, नित्य, केवल, निरुपाधिक, सापेक्षसंबंधशून्य, श्रीमत्-ऐश्वर्यादी षट्संपत्तीने मंडित असे जे परमात्मस्वरूप गुरुपद आहे, त्याला निरंतर अनन्य भावाने शरण जावे." ज्ञानेशांचे गुरू *निवृत्तिनाथ* असे असून त्यांचा आश्रय ज्ञानेशांना लाभला आहे, असे म्हणून ज्ञानदेव पुढे म्हणतात की "जगात गुरू ही साक्षात *शांकरीविद्या* आहे. हीच *ब्रह्मविद्या* आहे. ज्ञान व आत्मवस्तू वा गुरू व विद्या ही एकच आहेत. त्या गुरुवत विद्येला, जी दयेने पाझरत आहे, तिला नमस्कार असो. तिचा जयजयकार असो."

"समरूपी असणाऱ्या अर्धनारीनटेश्वरस्वरूप *शिव* व *शिवा* या युगुलाचा कोणाचा अर्धा भाग कोणाच्या अर्धभागाशी संलग्न झाला आहे, हे जाणणे अशक्य आहे. त्या प्रकृति-पुरुषद्वयीत द्वैत केवल प्रतिभासित होते. जड व चेतन यांचा संधी कोठे होतो, हे उमगत नाही."

परस्परांमध्ये *अद्वैततत्त्व* विराजत आहे, हे दर्शवणाऱ्या त्या जगताच्या आद्य अशा मातापित्यांस त्यांच्या तात्त्विक स्वरूपाचे यथार्थ ज्ञान व्हावे म्हणून ज्ञानदेव वंदन करतात.

"जैं अनादि एकपणें। नांदती दोघें"

जगताच्या आदि- मध्य - अंतीं असणाऱ्या पण ज्याला आदि - मध्य - अंत नाहीत अशा त्या पूर्ण व सुखदायक अशा शंभूस नमस्कार करून ज्ञानेश म्हणतात:

ऐशीं ही निरुपाधिकें। जगाचीं जियें जनकें।
तियें वंदिली मियां मूलिकें। देवोदेवी।।१-१।।अ.।।
जो प्रीयुचि प्राणेश्वरी। उलथे आवडीचियें सरोभरीं।
चारुस्थलीं एकाहारीं। एका आंगाची।।२।।
आवडीचेनि वेगें। एकएकांतैं गिलिती आंगें।
कीं द्वैताचेनि पांगें। उगलिते आहाति।।३।।

शिवशक्तीचे स्वरूप

"अशी जगताची निरुपाधिक मातापिता जी आहेत, त्या आदिनाथ व भवानीदेवता या आद्य दैवतांस ज्ञानदेव वंदन करतात. वस्तूला इतरांपासून वेगळे करणारा विशेष म्हणजे *उपाधी*. जग प्रकट होते, ते उत्पन्न होत नाही. म्हणून सूर्य व त्याची प्रभा असा या जगाचा त्याच्या आदितत्त्वाशी संबंध आहे. एका शिवस्वरूपातच शिवशक्तीचा मिथुनात्मक *चिद्विलास* आहे. प्रियच प्राणेश्वरी आहे. आपल्या एकाच अंगात ही दोन रूपे तो आलटूनपालटून दाखवितो. हा नित्य व स्वयंभू संबंध आहे. मिथ्या नाही. प्रेमाच्या आवडीने ही जणू एकमेक एकमेकाला गिळून उगळतात आणि द्वैत प्रकटते. पण मूळ अद्वैतस्थिती भंगत नाही. असा हा त्या आदियुगुलाचा प्रेमविलास आहे."

जी एकचि नव्हे एकसरे। दोघां दोपण नाहीं पुरे।
काय नेणों साकारें स्वरूपें। जियें।।१-४।।अ।।
कैशी स्वसुखाची अलुकी। जैं दोनीपण मिलूनि एकीं।
नेदेतीचि कवतुकीं। एकपण फुटो।।५।।
हा ठावोवरी वियोगभेडे। जैं बाल जगायेवढें।
वियालीं परि न मोडे। दोघुलेपण।।६।।
आपुलियें आंगीं संसारा। देखिलियां चराचरा।
परि नेदितीचि तिसरा। झोंक लागों।।७।।

"त्या स्थितीस एकच म्हणावे तर एक नाही; दोन म्हणाव्या तर दोन पण पुरत्या नाहीत. हे जे साकार रूप दिसते, त्याचे खरे स्वरूप काय आहे, कोण जाणे! असे हे द्वैताद्वैतविलक्षण स्वरूप आहे. या युगुलास स्वसुखाची केवढी आवड आहे पहा! द्वैतत्व मिळवूनसुद्धा अद्वैतत्व ती फुटू देत नाहीत. जगायेवढे बाळ त्या दोघांना झाले, तरी आपला एकमेकांशी वियोग होऊ नये या उत्कट इच्छेने प्रेरित होऊन ती दोघांच्यात तिसरे कोणी आहे, असे होऊ नये म्हणून त्या जगतासही आपल्या स्वरूपी सामावून घेतात. *शिव-शक्ती व जगत* यांचे असे एकरूपत्व आहे."

जेयां एकसत्तेचें बैसणें। दोघां एका प्रकाशाचें लेणें।
जैं अनादि एकपणें। नांदती दोघें।।१-८।।अ।।
भेद लाजौनि आवडी। एकरसीं देत बुडी।
जो भोगणेयां थांव काढी। द्वैताचा जेथे।।९।।

"परस्परांवरील प्रीतीतून जरी हे तिसरे निर्माण होत असले, तरी खरे तर ते तिसरेही नाही अन कोणी दुसरेही नाही. कारण जगत म्हणजे त्या दोघांचेच एक रूप आहे आणि ती दोघे म्हणजे एकच आहेत. तर तेथे तिसरे कोणी असेलच कसे! शिवशक्ती ही एकत्वाने अनादी कालापासून नांदताहेत. त्या दोघांना अधिष्ठान एकच आहे आणि ते एकच एक ज्ञान त्या दोघांठायी आहे. ही दोघे दोन दिसतात असे पाहणारा भेद जेव्हा त्या शिव शक्तींमध्ये द्वैत पाहू गेला, तेव्हा लज्जित झाला आणि त्यांच्या अद्वैतत्वामुळे अद्वैताचा भोक्ता होऊन त्या एकरस शिवशक्तींमध्ये समाविष्ट झाला."

जेणें देवें संपूर्ण देवी। जियेवीण कांहीं ना तो गोंसावी।
किंबहुना एकोपजीवी। एकएकाची।।१-१०।।अ।।
कैसा मेलु आला गोडिये। दोघें न मातीं जगीं ईयें।
कीं परमाणूहीमाजीं उवायें। मांडिली आहाति।।११।।
जिहीं एकएकावीण। न कीजैं तृणाचेंहीं निर्माण।
जियें दोघें जीवप्राण। जियां दोघां।।१२।।

"अशा त्या शिवाशी युक्त झाल्यामुळे शक्तीस पूर्णत्व येते, तर शक्तिविना शिव म्हणजे निव्वळ शून्यच होय. एवढेच काय तर ती दोघे एकमेकावाचून राहतही नाहीत आणि एकत्वाचा त्यागही करत नाहीत. यांच्या प्रीतीची रीतच अशी न्यारी आहे की दोघे जगद्रूपाने नटून परमाणूंमध्ये ओतप्रोत भरून राहिली आहेत. तरीही त्यांना हे जगत थोकडेच वाटते. म्हणावे तर अणूरेणूंतही ती पूर्णपणे समावलेली आहेत, पण तरीही हे संपूर्ण जगत पूर्णत्वाने व्यापूनही जशीच्या तशीच पूर्णत्वाने उरली आहेत. त्या दोघांशिवाय साधे तृणाचे पानसुद्धा उत्पन्न होउ शकत नाही, इतकी ती एकमेकांस जीव की प्राण आहेत."

"दो दांडी एक श्रुती"

घरवातें मोटकीं दोघें। जैं गोसावी सेजे रिघे।
तैं दंपत्यपणें जागे। स्वामिणी जैं।।१-१३।।अ।।
जेयां दोघांमाजीं एकादें। विपायें उमजलें होय निदें।
तऱ्हीं घरवात गिळूनि नुसधें। कांहीं ना करी।।१४।।

"सर्व चराचरसृष्टीरूप या घरात या दोघांवाचून तिजा कोणीच नाही. त्यांचा संसार ती दोघे कसा चालवतात, पहा. जेव्हा शिव वा पुरुष निजतो, तेव्हा गृहस्वामिनी अशा त्या शक्तीने त्याला गाढ आलिंगन दिले असले, तरी ती सावध जागी असते. खरे तर सर्वदा ती दोघे स्वसुखात निमग्न असतात. त्यातून दोन्हीही एकरूपच असल्याने कोणी जागे आहे व दुसरे झोपलेले आहे, असे म्हणावे तरी कसे! पण या जगद्रूप पसाऱ्यावरून असे भासते खरे की शक्ती जागी आहे व शिव स्वस्वरूपी मग्न आहे - त्यास जगद्भान नाही. खरे तर शिवासंगती ती शक्ती अशी दोघेही स्वस्वरूपी भान विसरून नित्य रममाण झालेली असतात. त्या स्थितीला जागृतावस्था वा निद्रा असे काहीही म्हणता येत नाही. आणि त्यातून जर या दांपत्यापैकी कोणी एक यदाकदाचित खरेच जागृत झाले, तर या संपूर्ण चराचररूपी घरास गिळून टाकून ती दोघे निष्क्रियत्वाने उगी राहातात."

<u>ज्ञानमार्ग व योगमार्ग यांचे गमक</u>

शिव वा शक्ती कोणीही जागे झाले तर संसार नष्ट होतो, असे ज्ञानदेव म्हणतात. यात एक गूढ अर्थ आहे. *शिव म्हणजे ज्ञान वा स्वरूपानुभूती. शक्ती म्हणजे ज्ञानशक्ती.* **जीव** हा *शिव वा आत्मा* आहे. तो या देही निद्रित असतो. *शक्ती* वा *कुंडलिनी* ही या देहाचा कारभार चालवते. ती पण जगन्निर्मितीनंतर निद्राधीन असते. या दोहोतील *शिव वा आत्मा* प्रकटले म्हणजे *ज्ञान* जागृत झाले तरी मनुष्य जीवन्मुक्त होतो व संसार आटोपतो. दुसरे म्हणजे *शक्ती वा कुंडलिनी* जागृत झाली वा प्रबुद्ध झाली की ती जीवासह शिवात स्वस्वरूपी लीन होते आणि योग्यास जीवन्मुक्ती प्रदान करते - त्याचा संसार नष्ट करते; असा भाग येथे अनुस्यूत आहे.

<u>म्हणूनच आत्मस्वरूपानुभूती घेण्याचे दोन मार्ग पूर्वापार या जगात चालत आल्याचे गीतेत म्हटले आहे ("लोकेऽस्मिनद्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ। ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।") - एक म्हणजे ज्ञानमार्ग व दुसरा म्हणजे योगमार्ग. पहिला मार्ग शिवतत्त्वाच्या आत्मजागृतिरूप आहे, तर दुसरा मार्ग कुंडलिनीशक्तिजागृतिरूप आहे.</u>

यातील *पहिला मार्ग मोजक्या भाग्यवंतांसाठी (**ज्ञानमार्गीय वा साङ्ख्य यांच्यासाठी**) आहे, तर दुसरा मार्ग (**कर्ममार्ग वा योगमार्ग**)सर्वसामान्यांनी यत्नपूर्वक साधावयाचा आहे,* एवढे ***<u>अमृतानुभवाच्या आधारे</u>*** लक्षात ठेवणे आपल्यासाठी आवश्यक आहे. असो.

"नेणिजती दोघेजणें। निवडूं जियें"

पुढे ज्ञानदेव काय सांगतात, ते पाहाः

दोन्हीं आंगांचीं आंटणी। गिंवसित आहाति एकपणीं।
जालीं भेदाचियां वाहणी। आधाधी जियें।।१-१५।।अ।।
विषो एकमेकांची जिये। जिये एकमेकांची विषयीं इयें।
जिहीं दोघीं सुखिये। जिये दोघे।।१६।।

"या दोघांची लीला कशी आहे, ते पाहा. **<u>कोणीही जरी जागे झाले, तरी दुसऱ्याचा शोध घेऊन त्याच्यासह ती दोघे स्वस्वरूपी लीन होतात व त्यांच्यातल्या त्या तिसऱ्याचा म्हणजे जगताचा पण त्याठायी निरास होतो</u>**. वर पुनः दोघे आपण अर्धीअर्धी अशी होऊन *अर्धनारीनटेश्वर* रूप प्रकट करत *अभेदातून भेद वा अद्वैतातून द्वैत* भासवतात. आपले वैभव - आपले स्वसुख - आपणच भोगावे असा त्यांचा अनादी स्वभावधर्म आहे. म्हणून असे अर्धेअर्धे रूप - शिव व शक्तिरूप घेऊन - ती एकमेकांशी अनंत कालपर्यंत पाठशिवणीचा खेळ खेळत असतात."

स्त्रीपुरुष नामभेदें। शिवपण एकलें नांदें।
जग सगळें अधाधें-। पणें जिहीं।।१-१७।।अ।।

"शिव शक्तीचा उपभोग घेतो व म्हणून ती त्याचा विषय होते; तर शक्ती शिवाचा उपभोग घेते व म्हणून तो तिचा विषय होतो. युगूल परस्परांचा संभोग घेते व त्या दोघांसही त्याद्वारे अमर्याद आनंद होतो. या आत्मरती - आत्मक्रीडेतून हे जगत उद्भवते. त्यावेळी ती परस्परांना प्रकाशवतात. एकमेकांना प्रकटवत त्यांचा हा स्वानंदसंभोग संपन्न होतो. पण खरे तर दोघेही एकरूपच आहेत. म्हणून जळाच्याच लाटा जळावर उठाव्या, तसा या दोघांचा हा संभोगानंद आहे. *शक्ती आणि शिव* यांना *स्त्री व पुरुष* अशा संज्ञा जरी दिल्या जात असल्या, तरी त्यांच्यात केवळ नाममात्र भेद आहे. त्या दोघातही एकुलते एक शिवतत्त्वच नांदत असते."

दो दांडी एक श्रुती। दोहों फुलीं एक दृति।
दोहों दिवीं दीप्ति। एकचि जेवीं।।१-१८।।अ।।
दों ओंठीं एकी गोठी। दों डोळां एकी दृष्टी।
तेवीं दोघीं जिहीं सृष्टी। एकीचि जैं।।१९।।

"त्या दोघांच्या रूपाने अर्धेअर्धे होणारे ते एकच एक तत्त्व या विश्वात भरून ठेले आहे. टिपऱ्या दोन असल्या तरी त्यांचा नाद एकच असतो. एकाच झाडावरची कोणतीही दोन पुष्पे घ्या, त्यांचा सुवास एकाच प्रतीचा असतो. दोन दीप एकाच प्रकारचा प्रकाश देतात. ओठ दोन असतात, ते शब्द एकोप्याने स्फुरावा म्हणून! दोन्ही डोळ्यातून दृश्य तसेच दिसते. आणि खरे तर दोन्ही डोळ्यांतून पाहणारी दृष्टी एकच असते. त्याचप्रमाणे शिव व शक्ती यांच्यातून जी ही सृष्टी अवतरते, ती एकच असते. आणि या दोघांसह हे जगत म्हणजे एकच एक अफूट- अद्वैत - वस्तू होय."

दाऊनि दोनीपण। एकरसाचें आरोगण।
करीत आहे मेहुण। अनादि जैं।।१-२०।।अ।।
जैं स्वामिचिया सत्ता-। वीण असो नेणें पतिव्रता।
जियेवीण सर्वकर्ता। कांहीं ना जो।।१-२१।।अ।।
जैं कीं भाताराचें दिसणें। भातारूचि जियेचें असणें।
नेणिजती दोघेजणें। निवडूं जियें।।२२।।

"तीच ती परब्रह्मवस्तू द्विधापण दाखवून या शिवशक्तिरूप जोडप्याच्या रूपाने मेहूण म्हणून रससेवनास बसली आहे आणि त्या एकमेवाद्वितीय ब्रह्मरसाचे आकंठ पान करत स्वानंदात मग्न आहे. ती शक्ती पतिव्रता आहे. जेथे पती तेथे ती पतीच्या सत्तेने राहाते. ती त्याच्याशिवाय एकटी राहू शकत नाही. आणि तो शिवसुद्धा कसा आहे, पहा! तो तिचा पती आहे आणि ती नसेल तर त्याला कर्तृत्व व भोक्तृत्व कसे येणार! कारण तिचे दिसणेभासणे म्हणजे त्या शिवाचेच आहे आणि तो स्वतः तिचे अधिष्ठान आहे. *शिव शक्तिरूप आहे व शक्ती शिवरूप आहे. अशी ती दोघे एकरूप आहेत.* मग शक्ती कोणती व शिव कोणता, ते वेगवेगळे कसे ओळखावे!"

चिद्विलास::::

"केले जगाएवढे लेणें। नामरूपाचें"

गोडी आणि गुळु। कापूरु आणि परिमलु।
निवडु जातां पांगुळु। निवाडु होय।।१-२३।।अ।।
समग्र दीप्ती घेतां। जेविं दीपुचि ये हातां।
तेवीं जियेचियां तत्त्वतां। शिवूचि लाभे।।२४।।
जैशीं सूर्य मिरवे प्रभा। प्रभे सुर्यत्वचि गाभा।
तैशी भेद गिलित शोभा। एकचि जैं।।२५।।

"गूळ व त्यातली गोडी, किंवा कापूर व त्यातला परिमळ एकमेकांपासून वेगळे करू गेल्यास ती त्यांना वेगळे करू पाहणारी क्रियाच पांगळी पडेल. समग्र दीप्ती हाती घेऊ पाहाणाराच्या हाती अंती दीपच येतो. त्याचप्रमाणे प्रकृतीच्या स्वरूपाचा विचार करू गेले किंवा शिव व शक्ती यांस पाहू गेले तर तेथे शिवच दिसतो. सूर्याठायी त्याची प्रभा मिरवते व प्रभेमध्ये सूर्यत्वाचा गाभा असतो. त्याप्रमाणे *शिव व शक्ती हा संकेत आहे.* यात भेद नाही, तर ही विश्वशोभा ज्यांच्यामुळे प्रकटते, ते शिवशक्ती सूर्य आणि प्रभेप्रमाणे अद्वैतत्वाचा बोध करून देतात."

कां बिंब प्रतिबिंबा द्योतक। प्रतिबिंब बिंबा अनुमापक।
तैसें द्वैतमिसें एक। बरवत आहे।।१-२६।।अ।।

"प्रतिबिंब हे बिंबाचे द्योतक असते आणि प्रतिबिंबास बिंब प्रकाशवते. ही दोन्ही हुबेहूब सारखी असतात. तसेच ती एकमेकांसापेक्ष असतात. शिव-शक्ती यांचेही तसेच आहे. या विश्वास आरसा करून ते चिद्घन अद्वैत स्वरूप या शिवशक्तिरूप बिंबप्रतिबिंबाचा खेळ आपणच शिव-शक्ती व विश्व होऊन खेळत आहे. या द्वैतमिषाने तेच ते एकमात्र मंडित झाले आहे."

सर्व शून्याचां निष्कर्षु। जिया बाईला केला पुरुषु।
जेणें दादुलेनि सत्ता विशेषु। शक्ती जालीं।।१-२७।।अ।।
जियें प्राणेश्वरीवीण। शीवीं्हीं शीवपण।
थारो न शके तैं आपण। शीवें घडविली।।२८।।

"शून्य गिळूनि। गुणत्रयातैं नुरवूनि। तैं शून्य तैं महाशून्य। श्रुतिवचनसंमत।।१३-९२६।।" असे ज्ञानेश्वारंनी म्हटले आहे. शून्य- निःशून्यांस गिळून जे राहाते; त्रिगुणांचे नावही जे साहत नाही; सर्वशून्यांचे जे सत्तारूप सार आहे; त्यास ***महाशून्य*** म्हणतात. हेच स्वरूप! अशा त्या महाशून्यास नवरा करून स्वतः त्याची बायको होऊन सत्ताविशेष पावणारी ती शक्ती शिवाधीन होऊन राहाते.*अज्ञान, अविद्या, माया, प्रधान व प्रकृति* ही याच शक्तीची नावे आहेत. या शक्तीशिवाय शिवासही शिवपण येत नाही. त्या शक्तिरूप प्राणेश्वरीशिवाय त्यास थारासुद्धा नाही. आणि ती शक्ती तर शिवाचीच घडलेली आहे."

ऐश्वर्येंशीं ईश्वरां। जियेचें आंग संसारा।
आपण होऊनि उभारा। आपणचि जैं।।१-२९।।अ।।
पतीचेनि अरूपपणें। लाजौनि आंगाचें मिरवणें।
केलें जगाएवढें लेणें। नामरूपाचें।।३०।।

"किंबहुना होये सर्व। पुरुषाचें हें"

"सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, स्वतंत्र, नित्यमुक्त असा जो *ईश्वर*, तो म्हणजे *मायाविशिष्ट ब्रह्मच* होय. त्या ईश्वरासही ऐश्वर्य प्रदान करणारी, हे संसारमय जगत म्हणजे जिचे अंग आहे आणि जे तिच्याचमुळे उभे आहे, अशी ती शक्ती शिवस्वरूपच आहे. *यश, श्री,औदार्य, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य* हे ईश्वराचे सहाही गुण तीच होते. त्याच्या **विराट, वैश्वानर, वैराजा**दी स्वरूपांनाही तीच प्रकट करते. ***विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळमाया*** अशी जी ईश्वराची चार अंगे आहेत, ती म्हणजे ही शक्तीच होय."

शिवास वा त्या ईश्वरास रूप नाही, तो अरूप आहे. तो कसा आहे पाहाः ***"जैं अनंगु तो पेंदा। निकवडा नुसधा। जीर्ण अतिवृद्धा।***

पासूनि वृद्ध।।१३-९८१।। तेयां आडनांव पुरुषु। एऱ्हवीं तो स्त्री ना नपुंसकु। किंबहुना एकु। निश्चयो नाहीं।।९८२।। तो अचक्षु अश्रवणु। अहस्तु अचरणु। रूपु ना वर्णु। नाम आथी।।९८३।। अर्जुना कांहींच जेथ नाहीं। तो प्रकृतिचा भर्तारु पाहीं। कीं भोगणें ऐसेयांहीं। सुखदुःखाचें।।९८४।।"

"त्या नवऱ्याच्या अशा स्थितीमुळे लज्जित झालेली शक्ती त्याचे ते व्यंग झाकण्यासाठी आपणच त्याचे सर्व काही झाली. आपले अंगप्रत्यंग खुलवणारे जगाएवढे लेणे ती ल्याली. ते नामरूपाचे लेणे चढवून त्या अरूपासह ती नांदते आहे."

ज्ञानेश्वरीत म्हटले आहे: ***"तंयाच्या तंव ठाईं। निपटूनि कांहींच नाहीं। कीं तेयां आघवेंहीं। आपणचि होय।।१३-९९९।। तेयां स्वयंभाची संभूती। तेयां अमूर्त्ताची मूर्त्ती। आपण होय स्थिती। ठाओ तेयां।।१०००।। अनार्त्ताची आर्त्ती। तेयां पूर्णाची तृप्ती। तेयां अकुलाची जाती। गोत होय।।१००१।। तेयां अचर्चाचें चिह्न। तेयां अपाराचें मान। तेयां अमनस्काचें मन। बुद्धीही होये।।१००२।। तेयां निराकाराचां आकार। तेयां निर्व्यापाराचा व्यापार। निरहंकाराचा अहंकार। होऊनि ठाके।।१००३।। तेयां अनामाचें नाम। तेयां अजाचें जन्म। आपण होय कर्म। क्रिया तेयां।।१००४।। तेयां निर्गुणाचें गुणु। तेयां अचरणाचें चरणु। तेयां अश्रवणाचें श्रवणु। अचक्षुचें चक्षु।।१००५।। तेयां भावातीताचें भाव। तेयां निरवयवाचें अवयव। किंबहुना होय सर्व। पुरुषाचें हें।।१००६।।"***

"जियेतैं पाहावयाचियां लोभा। चढे दृष्टत्वाचियां क्षोभा"

ऐक्याचाही दुकाला। बहुपणाचा सोहोला।
जिये सदैवेचिया लीला। दाखविला।।१-३१।।अ।।
आंगाचियां आटणियां। कांतु उवाया आणिला जियां।
स्वसंकोचें प्रिया। रूढविली जेणें।।३२।।

"मी एकच आहे; तोच अनेक होऊन माझे सुख मी भोगावे," अशा मूळ संकल्पासच *माया* वा *शक्ती* असे म्हणतात. खरे तर द्वैतसापेक्ष अद्वैताचासुद्धा जेथे लेश नाही, असा *शिव* आहे. पण ही शक्ती अक्षरशः महाशून्यही जेथे निरवले जाते, तेथे बहुरूप्याचा सोहोळा प्रकट करते. ***"जियेंतैं अलुमालु। रूपागुणाचा चालुढालु। तैं भलतैसाही खेलु। लेखा आणी।।१३-९८६।।"*** अशी लीलामयी ती शक्ती आहे. तिला असा विलास करता यावा म्हणून शिव स्वतःस संकोचून घेतो. अनंत, अमर्याद, अव्यक्त, व्यापक असे शिवतत्त्व या विश्वात संकोचून अणुरेणूतूनही वावरू लागते, ते असे!"

जियेतैं पाहावयाचियां लोभा। चढे दृष्टत्वाचियां क्षोभा।
जियेतैं न देखतुचि उभा। आंगचि सांडीं।।१-३३।।अ।।

"त्या त्याच्या व्यक्त रूपाभोवती आपले विशाल मायिक आवरण ती शक्ती लीलया पसरवून हे जग आकारास आणते. परंतु जेव्हा ती शक्ती स्वतःचे अंग आटवते, सर्व तत्त्वे व भूते यांची आटणी करत जाते, तेव्हा *प्रबुद्ध तेजस्वी कुंडलिनीशक्ती* च्या रूपाने अवतीर्ण होऊन शिवतत्त्वास प्रकट करते; त्या शिवतत्त्वाचा साक्षात्कार घडवून जीवास धन्य करते. असे *शिव-शक्ति* मिषाने ते आत्मरूप आपले आपणाशी लीला करते. आपल्या त्या सुलक्षणी कांतेस डोळे भरून पाहावे या इच्छेने शिव *द्रष्टा* पुरुष होतो. पण ती जगतशोभा त्याला निमिषमात्रसुद्धा जर दिसेनाशी झाली, तर तिच्या विरहाने दुःखी होऊन तो आपले अंग टाकून देतो आणि स्वस्वरूपी लीन होतो."

शक्तीसह शिव::::

शिव तोच शक्ती

कांतेचियां भिडा। अवला होय जगायेवढा।
अंगविला उघडा। जियेवीण।।१-३४।।अ।।
जो हा ठांव मंदरूपें। उबाइलेंपणें हारपे।
तो जाला जियेचेनि पडणें। विश्वरूप।।३५।।

"खरे पाहता हा शिव अरूप आहे. पण कांतेच्या हट्टामुळे तो या ब्रह्मांडाएवढे रूप घेतो. पण तिचा संग सुटला की हा पुनः अंगहीन होतो. हा त्या प्रकृतीच्या कलाने वागून या जगाचा सोहोळा निर्मितो. शक्ती त्या शिवाचीच आणि हे *द्रष्टेपण* तिच्यामुळे त्याला चिकटते. त्यामुळे हा *जगदाभास* दिसतो. वास्तविक द्रष्टा-दृश्यभावातीत असणारा *शिव* नित्य आपल्या निजसत्तेत नांदत असतो. अक्रिय, अचल, स्थिर असा असूनही प्रकृतीमुळे विस्तार पावून तो आपल्या स्वरूपास हरवून बसतो. या विश्वरूपाने तो नटतो, ते प्रकृतीच्या सौंदर्यास भुलून!"

जियां चेवविला शिवु। वेद्याचें बोणें बहु।
वाढितेणेंशीं जेऊं। धाला जो।।१-३६।।अ।।
निदेलेनि भातारें। जैं वियें चराचरें।
जियेचां विसांवला नुरे। आंबुलेपणही।।३७।।

"जाणण्याजोगे हे सर्व पदार्थ रचून त्यांचा आस्वाद घेण्यासाठी ती पतिव्रता त्या नित्य आनंदात लीन असणाऱ्या चित्स्वरूपास जागे करते. पण तो जागा होताच सर्व ज्ञेय वस्तूंसह त्या स्त्रीचा आस्वाद घेऊन जगाचा फडशा पाडतो. प्रपंचासह प्रकृतीला आपणापोटी लीन करून घेत जागृत झालेले ज्ञान आपल्या मूळ चिद्घनस्वरूपी विराजते. भ्रतारास झोप लागली आहे, असे पाहून शक्ती या चराचरास जन्म देते. पण जेव्हा ती स्वतः झोपते, म्हणजे शिवात लीन होते, तेव्हा शिवपणासह या विश्वाचा लोप करते."

शिव तोच शक्ती

जंव कांत लपो बैसें। तंव नेणिजे जियोद्देशें।
जिये दोघें आरिसे। जियां दोघां।।१-३८।।अ।।

"या प्रकृतिरूप स्त्रीचा कांत म्हणजे शिव जेव्हा या जगताच्या पसाऱ्यात लपून बसतो, तेव्हा त्या अज्ञानस्वरूप शक्तीच्या प्रादुर्भावामुळे त्याला कोणीही ओळखू शकत नाही. असे असले तरी शिव व शक्ती हे एकमेकांस दाखवणारे आरसेच आहेत. शक्ती तोच शिव आणि शिव तोच शक्ती आहेत. या शक्तिस्वरूप विश्वपसाऱ्यात शिवच प्रतिबिंबित झाला आहे आणि त्या शिवस्वरूपावर शक्ती ही या विश्वैकमात्ररूपाने प्रतिबिंबित झाली आहे."

चिद्विलास

जियेचेनि आंगलगें। आनंद आपणां आरोगूं लागे।
सर्व भोक्तृत्वही नेघे। जियेवीण कांहीं।।१-३९।।अ।।

"शक्तीच्या अंगसंगाने शिव स्वतः आनंदस्वरूप असूनही स्वानंद उपभोगू लागला. ते ब्रह्म शक्तीसह असल्यामुळे स्वसंवेद्य झाले. या विश्वरूपाने विनटलेल्या त्या शक्तिरूपी कांतेच्या कणाकणातून, अणुरेणूतून तो शिव स्वानंदाचा उपभोग घेतो आहे. दृश्य व द्रष्टा, भोग्य व भोक्ता, हा संबंध त्या शक्तीसह शिवामुळेच उपलब्ध झाला आहे. पण ही दोघे शिवस्वरूपच असल्यामुळे आपणच आपणांस उपभोगत आहेत. परंतु शक्तीच जर लोपली तर हे भोक्तृत्व - सर्व प्रकारचे उपभोग घेण्याची क्षमता - हा स्वानंद - कसा राहील!"

जेयां प्रियेचें जैं आंग। जो प्रियु जियेचें चांग।
कालवूनि दोन्हीं भाग। जेविते आहाति।।१-४०।।अ।।

"ही विश्वरूप प्रकृती - ही *शिवा* - म्हणजे शिवाचे सौंदर्य प्रकट करणारे रूप होय. आणि ही शक्ती त्या शिवास अलंकृत करत असते. ही दोघे एकत्र बसून या जगद्रूपी पात्रातून स्वानंदभोजन करतात. आपल्याच अंगापासून बनविलेल्या सुग्रास अशा या दृश्य-द्रष्टास्वरूप भोज्य पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेण्यात ती तल्लीन झालेली असतात. ***या दोघांना वा त्या विश्वास त्या शिवशक्ती एकरूपत्वाहून भिन्न समजणाऱ्या लोकांसाठी हा विश्वाचा आभास दृश्यमान होतो. पण त्यांचे ऐक्य जाणणाऱ्यांसाठी शिव-शक्तीचा चिद्विलासच प्रतीत होतो. विश्वरूपाने शिव-शक्ती नित्य विलास करत एकत्वाने नांदत आहेत, असे या चिद्विलासाच्या प्रतीतीचे स्वरूप आहे."***

जैशीं कां समीरेसगट गती। कां सोनियासगट कांति।
तैशीं शिवेंशीं शक्ती। आघवीचि जैं।।१-४१।।अ।।
कां कस्तुरीसगट परिमलु। कां उष्मेसगट अनलु।
तैसा शक्तीशीं केवलु। श्रीशिवुचि जो।।४२।।
राती आणि दिवो। पातली सूर्याचा ठावो।
तैसा आपुलियां सांचीं वावो। दोघें जिये।।४३।।

"वायूसह त्याची गती जशी असते; किंवा सोने जसे त्याच्या तेजासह - कांतीसह - असते; त्याप्रमाणे ही अवघी शक्ती - तिचे हे जगद्रूप - शिवासह आहे. कस्तुरीच्या संगतीने परिमळ जसा राहतो; किंवा अग्नी जसा उष्णतेच्या संगतीने असतो; तसा हा श्रीशिव शक्तीसह जगद्रूपाने असतो. *शिव-शक्तिमिषाने ते एकले स्व-रूप आपणाशी क्रीडा करत आहे.* रात्र व दिवस ही सूर्याच्याठायी कशी राहू शकणार! त्या तेजोघनामुळेच जगतात ही दोघे प्रकट होतात. त्याचप्रमाणे त्या स्वप्रकाशी स्वरूपाठायी *शिव व शक्ती* अशी दोन रूपे कोठून असणार! ती तर केवळ जगद्रूपाने भासतात. हा जगदाभासच त्या स्व-स्वरूपाचा ऊनसावलीचा खेळ आहे."

शिवशक्त्यद्वैत::::

प्रणवाचे मूळ

अनिर्वाच्य - अचिंत्य - निरालंब- निराकार - सद्सद्विलक्षण अशा मूळ ब्रह्मस्वरूपात **आदिसंकल्प - *"एकोऽहं। बहुस्याम्।"*** असा उद्भवतो. *तोच प्रणवाचे मूळ आहे.* प्रणवाच्या *अकार, उकार व मकार आणि अमात्रा* अशा साडेतीन मात्रा मिळून *ॐकार* प्रकटतो. त्यांच्यापासून *जागृति-स्वप्न - सुषुप्ति* या तीन अवस्था, तसेच व्यष्टी व समष्टी इ.मुळे जगत प्रकटते. या संसारवृक्षास म्हणूनच *प्रणवापासून विरूढणारी दशा* असे म्हणतात.

किंबहुना तियें। प्रणवाक्षरीं विरूढतिये।
दशेचीही वैरिये। शिवशक्ती।।१-४४।।अ।।
हे असो नामरूपाचा भेदशिरा। गिलित एकार्थाचा उजिरा।
नमो तेयां शिववोहरा। ज्ञानदेवो म्हणे।।४५।।

"या जगज्जाणिवेची वैरी दशा म्हणजे शिवशक्तियुगूल आहे. या जाणिवेचा लोप करवत सच्चिदानंदस्वरूप ब्रह्माची अनुभूती येते. नामरूपात्मक जगताचा भेद व अद्वैताचे ऐक्य हे सर्व काही गिळून टाकणाऱ्या त्या स्वरूपानंदी तल्लीन असलेल्या अशा या *शिवशक्ती* दांपत्यास ज्ञानदेव नमस्कारिताहेत."

अर्थात असे वंदन करणे त्याच अचिंत्य स्वरूपावस्थेत असणाऱ्या श्रीज्ञानेश्वरांसारख्या संतांसच शक्य आहे!

शिवशक्तियुगुलास वंदन

जेयाचां रूपनिर्धारीं। गेली परेसीं वैखरी।
सिंधुसीं प्रलयनीरीं। गंगा जैशीं।।१-४६।।अ।।
जेयां दोघांचां आलिंगनीं। विरौनि गेली दोनीं।
आघवेयांची रजनी। दिठीचि जैं।।४७।।
वायु चलवलेंशीं। जिराला व्योमाचिये कुशी।
अटला प्रलयप्रकाशीं। सप्रभ भानु।।४८।।
तेवीं निहालितां येयांतैं। गेलें पाहाणेंनशी पाहते।
पुढुति घरौतें वरौतें। वंदिलीं तियें।।४९।।

"प्रळयकाळी सागरात गंगेचे जळ जसे लय पावते, त्याप्रमाणे या *ब्रह्मस्वरूपाचा निश्चय करू पाहणाऱ्या वैखरीचा परावाणीत लय होतो.* असे ते स्वरूप अनिर्वाच्य आहे. या शिव-शक्तीचे आलिंगन किती दृढ आहे, पाहा! ही दोघे एकमेकांस आलिंगत एकमेकात अक्षरशः विरून गेली आहेत.दृष्टी नाही कां जशी रात्रीत विरून जात! अथवा ज्ञानसूर्याच्या प्रकाशात अज्ञान नाही का जसे विरून जात! वायूही असाच गगनाच्या कुशीत जिरून जातो. प्रळयकाळाच्या शतकोटी सूर्यांएवढ्या प्रकाशात सूर्यसुद्धा असाच आपल्या प्रकाशासह दिसेनासा होतो. या *प्रकृति-पुरुष* वा *शिव-शक्ती* दंपतीस न्याहाळणाऱ्याचे असेच होते. *द्रष्टा - दृश्य - दर्शन* आटून जाते व ते सर्व त्या एकमेकात विरून गेलेल्या युगुलात विलीन पावते. अशा त्या दोघांना वंदन असो!"

त्रिपुटीचा लोप

असे वंदन अर्थातच अनन्यत्वानेच केले जाऊ शकते, अन्यथा नाही. या वंदनाची रीत आणिक पाहाः

जेयाचियां वाहणीं। वेदकु वेद्याचें पाणी।
न पिये पण सांडणी। अंगाचिही करी।।५०।।
तेथ मी नमस्कारा-। लागीं हों दुसरा।
तऱ्हीं लिंगभेदा पऱ्हा। जोडूं जावो।।५१।।
परि सोनेनसी दुजें। नव्हतु लेणें सोना भजे।
हें नमन करणें माझें। तैसें आहे।।५२।।

"*ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय* या त्रिपुटीरहित जलौघसदृश अशा त्या वेद्य परब्रह्मस्वरूपास जाणण्यासाठी जेव्हा त्यातील एक प्रवाहस्वरूपच असा जिज्ञासू जातो, तेव्हा त्या जलौघातीलच एक होऊन जाऊन आपला अहंकार त्यागत त्याच्याशी मिसळून जातो. अशा या आत्मवस्तूस जेव्हा मी वंदन करू जातो, तेव्हा दुजेपणा- द्वैत -होते. म्हणून अभेदत्वानेच असे वंदन करावयास हवे. सुवर्णापासून भिन्न न होता सुवर्णालंकार जसा घडतो, तसेच त्या शिवशक्तिस्वरूपाहून भिन्न न होता माझे हे वंदिणे असते."

सांगतां वाचेतैं वाचा। ठावो वाच्यवाचकाचा।
पडतां काय भेदाचा। विटालु होये।।१-५३।।अ।।
सिंधु आणि गंगेची मिलणीं। स्त्रीपुरुषा नामाची मिरवणी।
दिसतसे तऱ्हीं काय पाणी। द्वैत होईल।।५४।।

"*वाचा* हा शब्द वाचेद्वारे उच्चरला जातो. पण तेथे *वाच्य* व *वाचकता* हा भाव दिसत असला, तरी शब्दाने ध्वनित केलेला अर्थ आणि वाचा यांच्यात जसा नाममात्र द्वित्वभाव असतो; सिंधुसागर जेव्हा गंगेस मिठीत घेतो, तेव्हा त्यांच्यांत कसा नाममात्र पुं-स्त्रीभेद असतो - जळ ते जळच! त्यात स्त्री-पुरुष कसे असणार! तसाच नाममात्र द्वैतभेद मी - वंदन करणारा व ते - वंदिले जाणारे - या दोघात आहे."

ज्ञानेश्वरांचा संकल्प

वाचातीत- नामरूपातीत - द्वैतातीत- वंदनातीत - अवेद्य - वेद्यातीत - अवाच्य - अनाम - अरूप - अद्वैत - असे परब्रह्मस्वरूप आहे. तरीही ते ***"जेयांचां वाहणीं। वेदकु वेद्याचें पाणी। न पिये सांडणी। अंगाचीही करी।।१-५०।।अ।।"*** असे आहे. हेच ते स्वसंवेद्य - वेदप्रतिपाद्य - आत्मरूप आहे. यालाच वंदित - याचाच उद्‌घोष करत - याचाच जयजयकार करत - ज्ञानदेवांनी आपली ज्ञानेश्वरीतील नांदीची ओवी रचली आहे.

ॐकारस्वरूपाने प्रकटत आपले अखंडत्व जसेच्या तसे अभंग जपणाऱ्या त्या शिवशक्तियुगुलैकरूप *आद्य* अशा परमतत्त्वास आळवतच ज्ञानदेवांनी ***पहिली माझी ओवी*** ज्ञानदेवीतून गायिली आहे. ***"ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।"*** या ओवीतून झंकारणारा नाद संपूर्ण ज्ञानेश्वरीच्या अंतरंगातून निनादत असतो.

ॐकाररूपी आद्य स्वसंवेद्य अशा त्या परतत्त्वास वंदन करत ज्ञानदेवीचा गाभारा आपल्या झणत्काराने आपूर्ण भरून टाकणारा, त्याचा जयजयकार करणारा ज्ञानदेवांचा ***चिद्विलास*** आपल्या अंतःकरणाच्या गाभ्यास साद घालीत ज्ञानेश्वरीच्या ओवीओवीतून रुंजी घालत राहतो. *हा चिद्विलास व हा जयजयकार आणि हे नमन हाच खरे तर ज्ञानदेवीचा मूळ संकल्प आहे.* हा संकल्प सोडतच ज्ञानेश्वरांची ही रचना साकारते. आणि तिचा असा हा उगम *अमृतानुभव*योगे अवलोकत असता स्तिमित होऊन आपण पाहत राहतो! आणि आपला प्रवास त्या संकल्पप्रवाहाच्या काठाकाठावरून कसा पुढे सरकत जातो आहे, पाहा!

चिद्विलास::::

अद्वैतातील लीला

पाहें पां भास्य भासकता। आपुलां ठाईं दावितां।
एकपण काय सविता। मोडीतसे।।१-५५।।अ।।
चांदाचियां दोंदावरी। होती चांदिणियांची विखुरी।
काय उणें दीप्तीवरी। गिंवसों पां दीपु।।५६।।
मोतियाची कील । होय मोतियावरी पांगुल।
आगलें निर्मल। रूप ये कीं।।५७।।

"रवी स्वतःस स्वतःच प्रकाशवतो. प्रकाश्यही रवीच आणि प्रकाशकही रवीच. तसेच प्रकाशही रविचाच असतो. असे असूनही तो काही त्रिधा होत नाही; जसाच्या तसाच, एकुलता एकच असतो. चंद्राचे दोंद चांदण्याने फुटते. पण चंद्र अन चांदणे काय वेगवेगळे असतात! दीपास त्याची दीप्ती झाकून टाकत असली, तरी ती त्याचीच असते ना! मोत्यांचेच पाणी मोत्यांवर असते. तरी ते काय मोती झाकून टाकते काय! उलट त्याच्यामुळे मोत्यांचे आगळेवेगळे निर्मळ रूप खुलूनच येत नाही काय!"

मात्राचियां त्रिपुटीयां। प्रणवू काय केला चिरटिया।
कीं णकार ती रेघटिया। भेदविला काईं।।१-५८।।अ।।

"प्रणवाच्या म्हणजे ॐकाराच्या तीन मात्रा असतात. अकार, उकार व मकार. पण त्यांच्यायोगे प्रणवाच्या काय तीन चिरोट्या झाल्या आहेत का! आणि ***'ण 'कार*** *(ण कार)* तीन रेघोट्यांचा असला म्हणून त्याचे काही तीन तुकडे थोडेच होतात! शिव व शक्ती यांचे ऐक्य न मोडता वर या विश्वरूपाचे साजिरे रूप जर लभत असेल, तर काय हरकत आहे!"

अहो ऐक्याचें मुदल न ढले। आणि साजिरेपणाचा लाभु मिले।
तऱ्हीं स्वतरंगाची मुकुलें। तुरंबु कां पाणी।।१-५९।।अ।।
म्हणौनि भूतेशु भवानी। वंदिली न करौनि सिनानीं।
मी निघालो नमनीं। तैं हे ऐसें।।६०।।

अद्वैत तत्त्वज्ञानाला बाधा न येता जर ज्ञानदेवांचा ***चिद्विलास*** उपभोगता येत आहे, तर पंडितांनी तेथे का न रममाण व्हावे! "पाण्याचा

एकपणा न बिघडता जर त्यास आपल्या तरंगरूपी पुष्पांचे अवघ्राण करता येत आहे व त्या जळपुष्पांस मस्तकी धारण करून आपली शोभा वाढवता येत असेल, तर पाण्याने तसे का नसावे! शिव व शक्ती यांचे ऐक्य तसेच ठेवून त्यांना हा ज्ञानदेवांचा ***चिद्विलास*** वंदन करत आहे. ज्ञानदेवांचे त्या परम आद्यस्वरूपास जे नमन आहे, ते असे!"

"रंभागर्भु आकाशें। रिगाला जैसा"

दर्पणाचेनि त्यागें। प्रतिबिंब बिंबीं रिगे।
कां बुडी दीजे तरंगें। वायुचा ठेला।।१-६१।।अ।।
ना तन्हीं निदजातखेंवों। पावे आपुला ठावो।
तैशीं बुद्धित्यागें देवी देवो। वंदिली मियां।।६२।।
सांडूनि मिठपणाचा लोभु। मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु।
तेवीं अहं देऊनि मी शंभु। शांभवी जालों।।६३।।

"आरशाच्या त्यागाने बिंबात प्रतिबिंब मिसळून जाते. वायू स्तब्धावला की जळीचे तरंग अंतर्धान पावतात. निद्रा आपणापासून प्रसवलेल्या स्वप्नदृश्यांसह नाहीशी होते, तेव्हा स्वतःस आपण गवसतो. याप्रमाणेच *अहंबुद्धीचा त्याग* केल्याने त्या मूळ देव व देवीस - *शिव व शक्तीस* - आपण वंदू जातो. आपले मिठपण त्यागल्याने मिठास सागरत्व प्राप्त होते. तसा आपला *अहं* नमनाद्वारे त्या परमात्म्यास अर्पून मी शंभू व शांभवीस्वरूप झालो आहे."

शिवशक्ती समावेशें। नमन केलें म्यां ऐसें।
रंभागर्भु आकाशें। रिगाला जैसा।।१-६४।।अ।।

"त्या *भूतेश-भवानीस - त्या शिव-शक्तीस - त्या शंभु-शांभवीस* - अशा अद्वय युगलस्वरूपात सामावून घेत मी नमन करत आहे. माझे नमन म्हणजे केळीच्या गर्भातील आकाशाने आकाशाकडे झेपावत आवेगाने वाढावे, तसे आहे. ***गगनस्वरूप असा मी - ज्ञानदेव - गगनाकार अशा या चिद्विलासी नमनाद्वारे माझ्याठायीच्या चिदाकाशासह त्या स्वस्वरूपीच्या महदाकाशाशी एकरूप झालो आहे.***"

अमृतानुभव व ईश्वरप्रणिधान

ईश्वरप्रणिधानासाठी ईश्वराचे स्वरूप समजावून घेणे नितांत आवश्यक आहे. त्यासाठी ***"पिताऽहमस्य जगतो माता ....।।९-१७।।"*** या श्रीकृष्णोक्तीचे रहस्य हे असे अमृतानुभवाद्वारे आपण समजावून घेऊ शकलो. या जगताच्या मातापित्यांची - *शिव-शक्ती, प्रकृति-पुरुष* आदी नामांनी ओळखल्या जाणाऱ्या त्या आदियुगुलाची ओळख करून घेत असतांनाच *पितामह* कोण तेही आपल्या लक्षात आले असेलच.

वेद्य, पवित्र, ॐकार, ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद असे तेच परमतत्त्व आहे. हे तत्त्व कसे आहे, त्याचा जीव व जगत यांच्याशी कोणत्या प्रकारचा संबंध आहे, या सर्वांसह ज्ञानदेवांच्या चिद्विलासाच्या तत्त्वज्ञानाची अशी सुरेख उकलण अमृतानुभवात केलेली आहे.

अमृतानुभव खरे तर ज्ञानेशांच्या तत्त्वज्ञानाचा ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातील ***चिद्विलासवाद*** म्हणजे हे पहिले **शिव-शक्तिसमावेशन** नावाचे प्रकरण आपण नुकतेच पाहिले. येथून त्या ग्रंथाच्या ईश्वरप्रणिधानाची सुरुवात होते. आणि ग्रंथारंभीच्या श्लोकपंचकाद्वारे त्यांनी त्या ईश्वरास - त्याच्या गुरुस्वरूपास केलेले नमन दुसऱ्या प्रकरणी गुरुस्तवनमिषे विस्तारित रूप घेते. तेही आपण पूर्वी आस्वादिले आहेच *(उन्मेष:११:अमृतानुभवातील गुरुदर्शन, पृ.क्र.१८५ ते १९३).*

त्यानंतर अमृतानुभवात जी प्रकरणे येतात, ती आत्मरूपाचे दर्शन घेतघेतच त्यास वंदन कसे करावे याच्या ओनाम्यासाठी. आणि सरतेशेवटी महत्त्वाचे असे **जीवन्मुक्तदशाकथन** हे प्रकरण येते, ते *ईश्वरप्रणिधान* साध्य होऊन जी समाध्यवस्था प्रकटते, तिच्या वर्णनासाठी! आणि परिशिष्टवजा जे अखेरीस **ग्रंथमहिमान** या नावाने ओळखले जाते, ते प्रकरण त्या जीवन्मुक्ताचे आत्मकथन होय.

ग्रंथ

हा सर्व विचार आताच पाहणे आवश्यक नाही. ज्ञानेश्वरीच्या संदर्भात या विषयांचा जरूर तसा रसास्वाद योग्य त्या वेळी आपणांस घेता येईल. परंतु जिज्ञासूंच्या माहितीसाठी हे स्वल्प निर्देशन केले आहे. अमृतानुभवाची वेदांताशी *(केवलाद्वैताशी)* मिळणी केलेली ज्यांना पहावयाची असेल, त्यांना पुढील ग्रंथ उपयुक्त ठरतील. १) श्रीरंगनाथमहाराज परभणीकरकृत *अमृतानुभवविवरण* व २) *अमृतानुभव* - वै. श्री विष्णुबुवा जोग महाराज.

तसेच अमृतानुभवावरील प्रासादिक रचना म्हणजे १) *श्रीशिवकल्याणस्वामीकृत* श्रीअमृतानुभवविवरण वा *नित्यानंदैक्यदीपिका* व २) परमहंस श्री स्वामी स्वरूपानंदकृत *अभंग अमृतानुभव* हे ग्रंथ वेदांतविचारात अडखळणाऱ्या जिज्ञासूंसाठी उत्कृष्ट मार्गदर्शक ठरतात.

श्री रा. ना. सराफ यांचा *सार्थ अमृतानुभव* हा ग्रंथही पाहाण्यायोग्य आहे. त्यात विषयाची ओळख सुलभरीत्या होते. अमृतानुभवाचे आधुनिक साहित्यिक पद्धतीचे रसग्रहण डॉ. वि. रा. करंदीकर त्यांच्या *ज्ञानदेवांचा आत्मसंवाद* या ग्रंथात करतात.

समारोप

या सर्वात सोप्या मराठीत अमृतानुभवाचे भावविश्व प्रकट करणारे पावसचे स्वामी श्रीस्वरूपानंद कोणास जास्त जवळचे वाटणे साहजिकच आहे. तरी श्रीज्ञानदेवांच्या अमृतानुभवास आपल्यापर्यंत आणून पोहोचवणाऱ्या या उल्लेखित तथा अनुल्लेखित समग्र साहित्यधारेचा ऋणनिर्देश करून आपण दुसऱ्या एका ईश्वरप्रणिधानाशी संबंधित अशा महत्त्वाच्या संकल्पनेकडे वळू या. पतञ्जलींनी ***"तस्य वाचकः प्रणवः"*** असे ज्याबद्दल म्हटले आहे, त्या ईश्वराचे ***ॐकारनिर्दिष्ट स्वरूप*** आपणास अवलोकावयाचे आहे. त्यासाठी प्रयोजन आहे पुढील **उन्मेष क्र. ३७ - ॐकार व प्रणव** याचे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ३७::
::ॐकार व प्रणव::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३७:

गीता:
५:२७
६:१०-१५,
७:८
८:८-१५
९:१७
१०:२५,३३
१७:२३,२४

ज्ञानेश्वरी:
६:१०९,२६८,२६९,२७४-२७६,३०२-३०८
७:३४
८:११४-११९
९:१८,१९,२७५,२७६
१२:३१,३२
१७:३२८-३३२,३३६-३३८,३४२,३४३,३५७-३५९,४०१,४०२

पा.यो.सू.:
१:२७,२८

अभंग:
७३५,७५५,७५९,७६१,७६६,६७९,७८९,७९४,८३६

ईश्वराचे अंतरंग

::उन्मेष ३७::

::ॐकार व प्रणव::

ॐकाराचे स्वरूप::::

ॐकारदर्शन

प्रणव वा *ॐकार* ही ईश्वरप्रणिधानाशी संबंधित अशी अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. या संकल्पनेस धरून तिचे महत्त्वपूर्ण निर्देश, उल्लेख आणि विवरण गीतेत आलेले आहे. पतञ्जलींनीसुद्धा ***"तस्य वाचकः प्रणवः ।।१-२७।।"*** व ***"तज्जपस्तदर्थभावनम् ।।१-२८।।"*** अशा सूचक सूत्रांद्वारे या संकल्पनेचे अतीव महत्त्व प्रदर्शित केले आहे. ईश्वरप्रणिधानातील *ईश्वराचे गमक* आणि ईश्वराप्रत पोहोचण्याचे *साधन* हा *प्रणव* असल्याचे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे.

ज्ञानेशांनीसुद्धा ***प्रणव*** व **ॐकारा**स आपल्या अभंगांत व ज्ञानेश्वरीत गौरवून उच्च स्थान प्रदान केले आहे. उपनिषदे तर याचा महिमा गातातच. एवढेच काय! पण महत्त्वाचे समजले जाणारे *मांडुक्योपनिषद* तर यालाच वाहिलेले आहे. या उपनिषदावरील गौडपादाचार्यांची *कारिका* प्रसिद्ध आहे. *गौडपादाचार्य* हे श्रीमच्छंकराचार्यांचे परात्परगुरू!

वैदिक वाड्मयात आपल्या मांगल्याने विराजमान झालेला *मंत्रराज* कोणता आहे म्हणाल तर तो हा *एकाक्षरी **ॐ!*** *ॐ* हे गणेशाचे प्रतीक समजतात. वेदमंत्रारंभी *ॐकार* उच्चारावा लागतो. कोणतेही वैदिक अनुष्ठान, गायत्रीमंत्रजप वा इतर मंत्र साध्य करण्यापूर्वी ॐकाराचा विधिपूर्वक ठराविक संख्येचा जप करणे अभिप्रेत असते.

ॐकारजप वासनामूल नष्ट करणारा समजला जातो. योगसाधकांसाठी *ॐकार* म्हणजे साक्षात वरदात्री मातृदेवता म्हटली पाहिजे. ध्यानयोग्यांचा मार्ग ॐकाराच्या पाऊलवाटेवरून जातजात अंती ॐकाराच्या गहन गभीर गुहेत प्रवेशतो. ॐकाराचा निनाद अंतःकरणाचा गाभारा भरून टाकत त्या परब्रह्म परमेश्वराचा साक्षात्कार घडवून देतो आणि ॐकारमय झालेला साधक सिद्ध होऊन त्या स्वरूपी लीन होतो. ॐकाराचे एवढे हे सामर्थ्य आहे.

अशा त्या ॐकाराचे थोडेसे दर्शन घेण्यासाठी आपणास गीता-ज्ञानेश्वरीचा प्रांत अभ्यासणे आवश्यक आहे. *ईश्वरप्रणिधान* हा अतीव महत्त्वाचा विषय आपण हाताळत असता नुकतीच आपल्या हाती ***"पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु। घोषध्वनि नादाकारु। तेयाचें भुवन गां ॐकारु। तोही मी गां।।९-२७५।।"*** ही ओवी लागली आहे. *ॐकार* आपली *विभूती* आहे, असे भगवंतांचे निर्देशन आहे.

त्यासाठी ॐकारस्वरूपास नमन करत त्याचे आनंददायक दर्शन घेऊ याः

"वोलखावया श्रुति। खूण केली"

प्रथम ***ॐकार*** कोणत्या वर्णाक्षरांपासून उत्पन्न होतो, ते पाहा. **अ** + **उ** + **म्** अशी तीन अक्षरे ॐकाराच्या पोटात आहेत. त्याचे वर्णन करतांना ज्ञानेश म्हणतातः ***"जेयां ॐकाराचियें कुशीं। अक्षरें होती अ उ मकारेसीं।।९-२७६।।"*** याच *अ,उ व म* यांना ॐकाराच्या *तीन मात्रा* म्हणून ओळखतात. या *तीन मात्रा* व *अमात्रा* - *अर्धमात्रा* - *अनुस्वार* वा *नाद* वा *बिंदु* या चार अंगांचा मिळून *साडेतीन* मात्रांचा *ॐकार* प्रकट होतो.

या *साडेतीन* मात्रांचे आध्यात्मिक रहस्य **माण्डूक्योपनिषद**ात विशद केलेले आहे. तसेच या *साडेतीन* मात्रांचा प्रभाव दर्शवण्याचे आणिकही एक गमक श्रीज्ञानदेवांनी रचले आहे. ते म्हणजे त्यांची *ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवी साडेतीन चरणांची आहे.* प्रत्येक ओवीच्या उच्चाराबरोबर एका शास्त्रविहित ॐकाराचा स्वर निनादावा अशी ही रचना आहे. पतञ्जलींनी निर्देशित केलेल्या ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।।"*** अशा त्या ईश्वराचा संकेत, त्याचा निर्देश, त्याचे अस्तित्व, त्याचे ध्यान असे ज्ञानेश्वरीच्या ओवीओवीतून प्रकटते.

"तज्जपस्तर्थभावनम्।।१-२८।।" - *ॐकार* हा परमेश्वराचे प्रतीक आहे; संकेत आहे. त्याचा जप करावा. जप करतांना ॐकाराचा वाच्य जो ईश्वर आहे, त्याची भावना करावी - त्याचे ध्यान ॐकाररूपाने करावे. हे ईश्वरप्रणिधान असून त्यायोगे पंचक्लेशादी क्षीण होत जातात व अंती समाध्यवस्था प्राप्त होते.

ओवीओवीतून *"तज्जपस्तदर्थभावनम्"*

ज्ञानेश्वरीचे यथावत भक्तिभावाने दृढ श्रद्धापूर्वक पारायण करणाऱ्या साधकांनाही असेच फल मिळू शकते, याचे रहस्य या साडेतीन मात्रासदृश साडेतीन चरणांच्या प्रासादिक व पवित्र ओव्यांत आहे. आणि ज्ञानदेवीच्या प्रथमारंभीच ओवीच्या सुरुवातीस *ॐकार* नियोजून ज्ञानदेवांनी *त्या परब्रह्मास हाक देत* ***"तऱ्हीं अनादि परब्रह्म। जैं जगदादि विश्राम। तेयांचें एक नाम। त्रिधा पैं असे।।१७-३२८।। तैं कीर अनाम अजाती। परि अविद्यावर्गाचियें रातीं-। माजी वोलखावया श्रुति। खूण केली।।३२९।। उपजलिया बालकासीं। नांव नाहीं तेयापासीं। ठेविलेनि नांवेंसीं। ओ देत उठी।।३३०।। कष्टले संसारशिणें। जैं देवो येती गाऱ्हाणें। तेयां ओ दे नांवें जेणें। तो हा संकेतु।।३३१।।"*** या आपल्या ओव्या सार्थ केल्या आहेत.

ईश्वरालाच जागवत - त्याला हाका मारत - ***"ॐ नमो जी"*** या स्वरांनी त्याला आळवत - ज्ञानदेवांनी आपल्यासमोर एक महान संकेत उभा केला आहे. साक्षात ईश्वरच अशा या ॐकारास ग्रंथारंभी आयोजून संपूर्ण ग्रंथांतर्यामी *ईश्वरप्रणिधान* प्रकट करणारे ज्ञानदेव म्हणूनच धन्य आहेत!!

गीतेतील प्रणव व ॐकार

ॐकार वा *प्रणव* याविषयी गीतेतीलही काही वचने प्रसिद्ध आहेत. उदा. *१) "**रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः। प्रणवः सर्व वेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु।।७-८।।**"* व *२) "**पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः। वेद्यं पवित्रमोड्कार ऋक्साम यजुरेव च।।९-१७।।**" पृथ्वीतील गंध, पाण्यातला रस, अग्नीतील तेज, वायूतील स्पर्श व आकाशातला शब्द* ही पंचमहाभूतात्मक विश्वातील ईश्वराची जशी रूपे आहेत, त्याचप्रमाणे *ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद* हेही ईश्वररूप आहेत. त्या वेदांतील ***प्रणव*** वा ***ॐकार*** ही तर ईश्वराची सर्वश्रेष्ठ विभूती आहे. जगताचा माता, पिता, पितामह असे असणारे जे स्वरूप आहे, त्याचा प्रतिनिधी ॐकारच आहे. जाणिवेच्या प्रांतात जे जे जाणण्यायोग्य आहे, ते ते सर्व ॐकाराला जाणले असता जाणले जाते. म्हणून *वेद्य* अशा सर्वात्मरूपाचे ॐकार हे पवित्रतम रूपक आहे.

वस्तुमात्र, भूतजात इ.सर्व ईश्वराचीच रूपे आहेत. यांच्या उत्पत्ति-स्थिति-लयाच्या निर्देशक *अ, उ व म्* या मात्रा आहेत. *अ* पासून निर्मिले जाणारे विश्व *उ* काराने वर्धिष्णू होते आणि त्याचा प्रलय *म* कारात होतो, अशी धारणा आहे. *अ* हे अक्षर जसे स्वरादींत प्रथम आहे व त्याच्यायोगेच सर्व वर्णाक्षरे विस्तारित होतात, त्याचप्रमाणे हे विश्व ज्या *अकारमात्रेने* निर्मिले जाते, ती जगाची आदि आहे. म्हणून या अक्षरास ***"गिरामस्म्येकमक्षरम्।।१०-२५।।"*** व ***अक्षराणामकारोऽस्मि।।१०-३३।।"*** - अक्षरातील *अकार* व वाणीत *ॐकार* तो मीच आहे, असे म्हणत भगवंत गौरवितात.

आणि याबाबत संदेह राहू नये म्हणून नंतर असेही सांगतात की: ***"ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः। ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा।।१७-२३।।"*** व ***"तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः। प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्।।१७-२४।।"*** - *ॐ, तत् व सत्* असा ब्रह्माचा तीन प्रकारे निर्देश केला जातो. ***तत्*** म्हणजे **ते तत्त्व *सत्*** म्हणजे **अविनाशी** आहे, त्याचेच नांव **ॐ** आहे. *ब्राह्मण, वेद व यज्ञ* यापासूनच निर्माण झाले. म्हणून सर्वांचा आदि *ॐ* आहे - परब्रह्म आहे, हे सतत ध्यानात ठेवावे. या अर्थीच ब्रह्मवादी लोकांची यज्ञे, दाने, तपे व कर्मे ही नेहमी ॐकाराचा उच्चार करत केली जातात. हेच सर्वश्रेष्ठ असे *ईश्वरप्रणिधान* म्हणून गीता मान्य करते.

ॐकाराचा अर्थ

या ॐकाराचे बरेच अर्थ प्रकटतात. मांडूक्यात *अ, उ व म* यांनी *जागृति - स्वप्न - सुषुप्ति* यांचा अथवा *स्थूल- सूक्ष्म -अव्यक्त* यांचा निर्देश होतो असे समजले जाते. *अर्धमात्रा* तुर्येची वा समाध्यवस्थेची निदर्शक समजतात. या सर्व अवस्थांस आत्मशक्तीच कारण असते. या अक्षरांचे विविध अर्थ असे देतातः

अ - आद्य, सर्वांपूर्वीचा, सर्वव्यापक, प्रथम, ब्रह्मा, शिव, जागृतीतला अनुभव इ.

उ - उत्कर्ष, उत्तम स्थिती, आद्यंतातील मध्यसंधी, स्वप्नावस्थेतील अनुभव इ.

म् - लय, अंतिम अवस्था, परिणाम, सुख, आनंद, सुषुप्तीतील अनुभव, ब्रह्मस्वरूप स्थिती, इ.

अर्धमात्रा - अद्वैत, अनिर्वचनीय आत्म्याची निरञ्जन स्थिती, इ.

"अवति इति ओम्" असेही *अव* धातुसाधित ॐकाराचे रूप विद्वन्मान्य आहे. संरक्षक, गतिमान तत्त्व, प्रिय, कांतिमान, संतोषप्रदायक, तृप्तिदायक, ज्ञातृत्व, व्यापक, श्रवण इ.करणारे, सामर्थ्यशाली, कर्म करणारे, इच्छा, याचना, प्रकाशक, प्राकाश्य, प्रकाश, प्राप्ती, हिंसा, आदान-प्रदान, भाव, वृद्धिंगत होणारे, भाग होऊन राहाणे, दहन वा नाश इ. गुणधर्मांनी युक्त असणारे असा **ॐ** आहे. *ॐकार* असा आहे, म्हणून जगाचे सर्व भाव त्यात समावलेले आहेत.

"सहस्त्रशीर्षाः पुरुषः" अशा त्याच्या रूपापासून ते अव्यक्त, अनिर्वाच्य, अनिर्देश्य, अचिंत्य, अक्षर, नित्य, सर्वगत, स्थाणु, अचल, अच्छेद्य, अदाह्य, अशोष्य, अविकारी अशा सनातन स्वरूपापर्यंत ॐकाराची व्याप्ती आहे. जीवापासून शिवापर्यंत ज्या एकाच मंत्राचा जप केला जातो, तो *अजपाजप* - ती *सोऽहं गायत्री* - तो *मंत्रराज* हा ओम्च आहे.

याचाच जप करावा असा पतञ्जलींचा, तसेच गीतेचा संदेश आहे. *अजपाजप* यातही *ओम्* हाच प्रमुख आहे. *सोऽहं* म्हणजे *"(सः+)ओ (+ह्+) म् = ओम्" व "अ (+ ह्+) म" वा "(सः) अ (उ) म्"* असे समजतात. त्यानुसार *सोऽहं* चा जप हा ओम्चाच जप असल्याचे मान्य केले जाते. ***तो मीच आहे"*** असे हे अक्षरब्रह्माचे ध्यान आहे.

ॐकार व योग::::

ॐकाराद्वारे लययोग

हे ध्यान करण्यासाठी - प्रतिप्रसवक्रमाचा योगाभ्यास करण्यासाठी - कैवल्यप्राप्तीसाठी - श्रीमदाद्यशंकराचार्यांनी *पंचीकरण* या ग्रंथात म्हटले आहे की: ***"अकार उकारे, उकारो मकारे, मकार ओंकारे, ओंकारोऽहम्येव। अहमात्मा साक्षी केवलश्चिन्मात्रस्वरूपः। नाज्ञानं, नापित्कार्यं, किन्तु नित्यशुद्धबुद्धमुक्तसत्यस्वभावं परमानन्दाद्वयं प्रत्यग्भूतचैतन्यं ब्रह्मैवाहमस्मीत्यभेदेनावस्थानं समाधिः। "तत्त्वमसि" (छां. ६-८-७); "ब्रह्माहमस्मि"(परमहं) "प्रज्ञानमानन्दं ब्रह्म"(ऐ. ब्रा. ३-१);"अयमात्मा ब्रह्म" (बृहदा. २-५-१०); इत्यादि श्रुतिभ्यः।।"*** - अकाराचा उकारात, उकाराचा मकारात, मकाराचा ॐकारात लय करावा. *ओंकार* म्हणजे *"जे हे विश्व आहे, ते मीच"* ही भावना करावी. असा हा मी म्हणजे *केवल*, चिन्मात्रस्वरूप असा आत्माच आहे, हा भाव दृढ करावा. अशा आत्म्यास अज्ञान नाही;

काही कर्म नाही. नित्य शुद्ध - बुद्ध, मुक्त- सत्य असे आत्मरूप आहे. परमानंददायक, अद्वय, प्राग्चैतन्य अशा त्या ब्रह्मात व आपल्यात अभेद आहे, अशा प्रत्ययाची समाध्यवस्था असते. ***"तत्त्वमसि", "ब्रह्माहमस्मि", "प्रज्ञानानंदं ब्रह्म", "अयमात्मा ब्रह्म"*** इ. श्रुती सांगतात, ती हीच अवस्था होय असे श्रीमच्छंकराचार्य म्हणतात.

ॐकाराधारित अभ्यासयोग

अर्थातच असा हा जो ॐकाराचा अभ्यास करावयाचा, त्याचे ध्यान करावयाचे, तो सर्व भाग गीतेच्या पाचव्या अध्यायी व सहाव्या अध्यायी अनुस्यूत असला पाहिजे. ते ध्यान साधावे म्हणून गीतेचे म्हणणे असे आहे की ***"स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः। प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ।।५-२७।।," "योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः। एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ।।६-१०।।","शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः। नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ।।६-११।।," "तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः। उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ।।६-१२।।,""समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः। सम्प्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ।।६-१३।।," "प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः। मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ।।६-१४।।," व "युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः। शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ।।६-१५।।"***

ॐकारजपाने समाधिसिद्धी

परब्रह्माचे असे ॐकारमय ध्यान करत साधावयाचा हा जो योग आहे, त्याची गीतोक्त रूपरेखा वरील श्लोकातून दिसून येते, ती अशीः

विषयांचा इंद्रियांशी होणारा संयोग टाळून, दृष्टी दोन्ही भुवयांमध्ये राखावी. नाकातून वाहाणारे प्राण व अपान *(इडा व पिंगला नाड्या)* सम करावेत. योगसाधकाने एकटे रहावे. चित्त व आत्मा आवरून - म्हणजे कोणतीही कामवासना न राखता, परिग्रह म्हणजे जगताचा पाश मनातून दूर करत सतत योगाभ्यास करावा.

त्यासाठी शुद्ध स्थळी उत्तम जागा पाहून आसन मांडावे. दर्भ, मृगचर्म व वर वस्त्र घातलेले, फार उंच नही वा फार सखोलही नाही, असे हे आसन असावे. त्याच्यावर चित्त व इंद्रिये यांचे क्रियाव्यापार आवरून मन एकाग्र करून बसावे. शरीराचा उर्ध्व भाग हा समतोल ठेवावा. आवतीभोवती पाहू नये. निश्चल राहून आपल्या नासिकाग्रावर - *भ्रूमध्यस्थानी आज्ञाचक्रावर - अंतर्दृष्टी* खिळवावी.

अपयशादींची भीती न बाळगता, शांत अंतःकरणाने ब्रह्मचर्यनिष्ठेने - ब्रह्मातच विचरण्याच्या निश्चयाने - मनाचे संयमन करावे. चित्त भगवंताठायी ठेवून तत्परायण होत योगाभ्यासास लागावे. सतत असा योगाभ्यास करावा. त्यामुळे योग्याचे मन नियत होऊन क्लेशादी *तनु* होतात. या अभ्यासाचा शेवट समाधीत होतो आणि योग्यास निर्वाणपद प्राप्त होते. परब्रह्माठायी तो लीन होतो व चिरशांतीचा धनी होतो. असा हा योगभ्यास गीता सांगते.

चित्त भगवंताठायी ठेवणे व तत्परायण होणे - ***"मच्चित्तो युक्त आसीत मत्परः"*** याचे निर्देशन मात्र गीतेत इतरत्र येणाऱ्या संदर्भांनुसार जुळवले जाऊ शकते. यात प्रामुख्य ईश्वरप्रणिधानास असल्याने, यात भगवंतात चित्त गुंतवायचे असून त्याच्याठायी परायण व्हावयाचे असल्याने, त्यात सातत्यपूर्वक ध्यान करण्याचा भाग अभिप्रेत आहे.

ईश्वराच्या निव्वळ निर्गुण स्वरूपाचे ध्यान करणे अवघड असल्याने येथे साधकास मार्गदर्शनासाठी योगसूत्रांचा आश्रय करावा लागतो; तो म्हणजे चित्त एकाग्र करण्यासाठी व केल्यावरही त्याच्या आलंबनासाठी कोणतीतरी स्थूल वस्तू घेऊन जसजसे चित्त धारणा - ध्यानपरायण होत जाते, तसतशी ती वस्तू सूक्ष्मातिसूक्ष्म कल्पित जावयाची. अत्यंत सूक्ष्म अशा वस्तूच्या आलंबनाचा अभ्यास सिद्ध होऊ लागला, धारणा पक्व होऊन ध्यान आकारास येऊ लागले, उत्तरोत्तर सूक्ष्मातिसूक्ष्म, सूक्ष्मतर व सूक्ष्मतम अशा आलंबविषयांवरील संयम दृढ होत गेला की हळूहळू परब्रह्माच्या नितांत अनिर्वचनीय अशा निर्गुण स्वरूपाकडे क्रमशः आलंबन सरकवत नेण्याचा अभ्यास करावयाचा असतो. याच उपक्रमात अशा वेळी श्रीमच्छंकराचार्यांनी वर दिलेला **पंचीकरणा**तील अभ्यास करणे इष्ट आहे.

या अभ्यासाच्या परिपक्वतेनुसार हळूहळू आलंबविषयाचा टेकू काढून घेत चित्तास स्व-स्वरूपी लीन होऊ देणे नंतर अभिप्रेत आहे. समाधीच्या वा समाहित चित्ताच्या *सप्तधा भूमी* पादाक्रांत करत असता सरतेशेवटी योग्यास *निरालंब* असा *असंप्रज्ञात समाधि* सिद्ध होतो. भौतिक विज्ञान व गणितातील Quantum Theory सांगते तसाच हा *संप्रज्ञात समाधि* ते *असंप्रज्ञात समाधि* असा एक प्रकारे शेवटचा Quantum Jump आहे. असा हा पतञ्जलिप्रणीत व गीताशास्त्रानुसारचा योगाभ्यास आहे.

नामजप - हाही एक योगाभ्यासच

आलंबविषय सुरुवातीस स्थूल घेतला जातो म्हणजे भगवंताचे रूप-चित्र- मूर्ती इ. त्यानंतर तो जसजसा सूक्ष्म करावयाचा असतो, तसतसे त्याचे गुण, त्याचे यश, त्याचे औदार्य, त्याची कीर्ती इ.ध्यानासाठी घेता येतात. त्याहून सूक्ष्म विषय म्हणजे परब्रह्माचे नाम. ही नामे अनंत आहेत आणि आपापल्या रुचिवैचित्र्यानुसार व पूर्वसंकेताप्रमाणे साधक आपणास भावणारे नाम आलंबनासाठी घेतो. त्या नामात परब्रह्माचे - ईश्वराचे रूप मूर्त करावयाचे असते. हळूहळू हे रूप आपण *ईश्वर* या पतञ्जलिप्रणीत कल्पनेतल्या ईश्वराशी जुळवत जावयाचे असते. *नामजप* करणे असे या अभ्यासाचे प्रचलित नांव

असले, तरी त्यामागचा विधी हा असा शास्त्रशुद्ध योगाभ्यासाच्या मार्गानेच साध्य करावा लागतो, हे तत्त्व साधकांनी विसरू नये.

योग्य तऱ्हेचा *नामजप* हा यज्ञातील उत्कृष्ट *यज्ञ* आहे. तो म्हणजे साक्षात परब्रह्मस्वरूप *ब्रह्मयज्ञ* आहे. म्हणून श्रीगीता ग्वाही देते ती अशी की ***"यज्ञानां जपयज्ञोऽस्मि।।१०-२५।।"*** आणि त्याच श्लोकात ***"गिरामस्म्यैकमक्षरम्"*** असे म्हणून वाणीद्वारे - वाचेने - मग ती *वैखरी* असो, *मध्यमा* वा *पश्यंती* असो किंवा *परा* असो! तिच्याद्वारे उच्चारल्या जाणाऱ्या अक्षरातील सर्वोत्कृष्ट - ब्रह्माची वा ईश्वराची विभूती असणारे असे जे एकमेव अक्षर आहे, त्याचा महत्त्वपूर्ण उल्लेख केला आहे. हे एकमेव अक्षर म्हणजे ***ॐ*** वा ***प्रणव*** च आहे, याची ग्वाही स्वतः श्रीमच्छंकराचार्यांनी आपल्या सुविख्यात गीताभाष्यात दिलेली आहे.

ॐकाराची योगप्रक्रिया

म्हणून सर्वात सूक्ष्म आलंब ज्याचा घ्यावयाचा तो परमात्माच असल्याने व त्याचे सर्वकष - अचिंत्य - अमूर्त रूप ध्यानासाठी घेणे अत्यंत क्लिष्टतापूर्ण असल्याने, त्याचे सर्वोत्कृष्ट नाम असा हा *प्रणव* वा *ॐकार* या ब्रह्मरूप जपयज्ञासाठी - या समाधीच्या अभ्यासासाठी योजणे येथे अभिप्रेत आहे. अर्थातच हे नाम प्रथम वैखरीद्वारे जपतजपत, सर्व कर्मारंभी व मध्ये आणि अंतीसुद्धा घ्यावे लागते. ब्रह्मचर्यव्रताने राहून म्हणजे परब्रह्माशी निष्ठापूर्वक आचरण ठेवत सुज्ञ जन ***"ॐ तत् सत्"*** असा त्या ब्रह्मनामाचा त्रिधा उच्चार करत आपल्या सर्व क्रिया आचरत असतात हा संकेत आपण पूर्वीच सतराव्या अध्यायातून पाहिला आहे.

गीता*श्लोक क्र. १७-२३ व २४* येथे स्पष्टच ब्रह्मनाम कोणते हे सांगितले आहे व तेच उच्चारत यज्ञ वा तप आचरावयाचे असते, हा भाग येथे विहित आहे. हळूहळू हे ब्रह्मनाम - हा ॐकार सूक्ष्मतर वाणीत उतरवायचा असतो. *मध्यमा - पश्यंती - परा* असा त्याचा प्रवास येथे होतो. हेच सूक्ष्मतराहून सूक्ष्मातिसूक्ष्माकडे आणि सूक्ष्मतमाकडे आलंबनविषयाचे करावयाचे स्थित्यंतर होय. आणि *नाम व नामी* यांच्यात एकवाक्यता असते, असा सिद्धांत आहे. म्हणून अंती हे *ब्रह्मनाम* अनायासेच ब्रह्माप्रत घेऊन जाते.

सगुण साकार विश्वरूपापासून चित्त जे आलंबन घेते, त्यापासून ते तहत अचिंत्य अशा परब्रह्मस्वरूपाकडे - त्या निर्गुण निराकार अद्वयतत्त्वाकडे चित्त लावावयाची - ***"मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः।।"*** - याची योगयुक्ती ही अशी आहे. अळी जशी एका पानावरून दुसऱ्या पानावर जात असता हवेत आपल्या शरीराचा पूल बांधून दुसऱ्या पानास ते टेकवत हळूहळू पहिल्या पानाचा आधार सोडून देत दुसऱ्या पानावर जाते, तसे हे आहे. सगुण साकाराच्या अंतिम अवस्थेपर्यंत त्याच्याच आधाराने - आलंबाने - जावयाचे व नंतर मध्ये ***ॐकाररूपी आपल्याच सूक्ष्मकोशाचा*** - सगुण व निर्गुण यातल्या दुव्याचा हलकासा लक्ष्मणझुला बांधावयाचा आणि त्याद्वारे त्या परब्रह्मस्वरूपाकडे संक्रमण करून त्या अवस्थेत परब्रह्माच्याच आश्रयाने स्थित व्हावयाचे, असा हा ***योगमार्ग*** आहे.

विश्वातील यच्चयावत वस्तूंमध्ये ॐकाराची स्पंदने भरलेली असतात. म्हणून त्या ॐकाराशी तद्रूप झाले की आपोआप विश्वांतर्यामी असे जे परब्रह्म, त्याच्याशी योगी युक्त होतो. याच *ॐकाररूप स्पंदनास- या शक्तीस - कुंडलिनी* असे योगीजन नाम देतात. त्या कुंडलिनीस जागृत करणे म्हणजे ही ॐकारस्पंदने दृश्य पदार्थातून त्याच्या उगमात शोधणे होय. *वैखरी-मध्यमा- पश्यंती - परा* अशी ही स्पंदने सूक्ष्मातिसूक्ष्म होत जातात. त्यांचा जसजसा शोध घ्यावा, तसतसा त्या कुंडलिनीचा प्रबुद्धावस्थेतला प्रवास *जीव ते शिव* असा होत जातो. त्याचे समग्र वर्णन आपण जेव्हा ज्ञानेशांचे सहाव्या अध्यायावरील निरूपण पाहू तेव्हा पाहता येईल. तूर्त हा *कुंडलिनी*प्रांताचा इतका निर्देश पुरे!

फक्त यावेळी *कुंडलिनी* ही *मोटकी औट* वळणांची म्हणजे *साडेतीन* वेढ्यांची असते व मूलधारी सुप्तावस्थेत राहते, हे ज्ञानेशांचे उद्गार ॐकाराच्या साडेतीन मात्रांशी कसे साधर्म्य दर्शवणारे आहेत, एवढे लक्षात ठेवणे पुढील विवेचनाच्या दृष्टीने अगत्याचे आहे, हे जिज्ञासूंसाठी सांगणे न लगे!

वैदिक वाङ्मयातील ॐकार::::

कठोपनिषदातील ॐकार

अशा या ॐकाराचे वैदिक वाङ्मयास असाधारण महत्त्व वाटते यात काय नवल! ॐकारविषयक समस्त वैदिक वाङ्मयाचा येथे परामर्ष घेणे शक्य नाही. वानगीदाखल काही स्फुट उल्लेख पाहू याः

कठोपनिषद म्हणते: ***"एतद् हि एकाक्षरं ब्रह्म।।"*** - हेच ***अक्षरब्रह्म*** आहे.

"सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपाँसि सर्वाणि च यद्वदन्ति। यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदँ संग्रहेण ब्रवीम्योमित्येतत्।।१-२-१५।। एतद्ध्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परम्। एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत्।।१६।। एतदालम्बनँ-श्रेष्ठमेतदालम्बनं परम्। एतदालम्बनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते।।१७।।कठ।।" - "सर्व उपनिषदे ज्याचे प्रतिपादन करतात, सर्व तपांचे विधान ज्यासाठी करावयाचे आहे, ज्याच्यासाठी ब्रह्मचर्य आचरले जाते, ते पद संक्षेपतः सांगायचे तर ते ***ओम्*** हे होय. हे अक्षरच ब्रह्म असून तेच परमश्रेष्ठ आहे. यास जाणल्याने निःश्रेयसाची प्राप्ती होते; सर्व इच्छा परिपूर्ण होतात. ॐकाराचेच आलंबन सर्वश्रेष्ठ आहे. पराकोटीचे - अंतिम - अत्युत्तम असे आलंबन हे प्रणवाचेच असते. याच्या आलंबनाने - याचा आश्रय करूनच मनुष्यास ब्रह्मज्ञान प्राप्त होऊन तो ब्रह्मीभूत होतो."

कठवल्ली म्हणजे *यम-नचिकेत* संवाद आहे. यमासारख्या श्रेष्ठ धर्मवेत्त्याने ***ॐकाराचे पद*** असे वर्णिले आहे. त्या यमधर्माचे

आत्मोपलब्धी कशी होते, याबाबतचे उद्गार या ग्रंथाच्या सुरुवातीसच *(उन्मेष क्र.१-१)* उद्धृत केले होते. त्यांचे पुनश्च अवलोकन करून पुढे जाऊ या. यम म्हणतो: ***"नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन। यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुँ स्वाम।।१-२-२३।।कठ।। व ।।मुंडक।।३-२-३।।"*** - "प्रवचनाने, बुद्धिमत्तेने, पांडित्याने अथवा कोणत्याही साधनाने या आत्म्यास हस्तगत करता येत नाही. ज्याच्यावर त्याची कृपा होते, त्या पुरुषास तो लाभतो. त्या पुरुषास आत्मा आपण होऊन आपले स्वरूप प्रकटवतो!!" असो.

तैत्तिरियातील ॐकार

ॐकाराविषयी ***तैत्तिरिय*** उपनिषद काय म्हणते पाहा: ***"ओमिति ब्रह्म। ओमिति इदँसर्वम्। ओमिति एतदनुकृतिः ह स्म वा अप्यो श्रावयेत्याश्रावयन्ति। ओमिति सामानि गायन्ति। ओँशोमिति शस्त्राणि शँसन्ति। ओमिति अध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति। ओमिति ब्रह्मा प्रसौति। ओमिति अग्निहोत्रं अनुजानाति। ओम इति ब्राह्मणः प्रवक्ष्यन्नाह ब्रह्मपाप्नवानीति। ब्रह्मैवोपाप्नोति।।१-८-१।।तै।।"*** - "*ओम्* हेच ब्रह्म आहे. ओंकारच सर्व जगत आहे. *ओम्* म्हणजे होकार आहे. कृती म्हणजे *ओम्* आहे. विचारांचे आदानप्रदान - भाषा - ही सर्व *ओम्* आहेत. *साम* ओंकारासच गातात. "*ओम् शं*" असे स्तोत्र मंत्रारंभी म्हणून त्या परब्रह्मास स्मरत - त्यास आवाहन करत - सुखाची इच्छा करणारे मंत्रस्तुती करतात. यज्ञातील ब्रह्म्याची आज्ञा, अध्वर्यूचे उत्तर इ.सर्व ओंकाराचेच रूप आहेत. ओंकाराचा उच्चार करत अग्निहोत्रादी कर्मांस प्रारंभ करतात. विद्याध्ययनास प्रारंभ करण्यापूर्वी ब्राह्मण ओंकाराचेच पूजन करतात व ओंकारास उच्चारतात. ब्रह्मप्राप्तीच्या इच्छेने असे विद्याध्ययन करणाऱ्या ब्राह्मणास ब्रह्माचीच प्राप्ती होते.

प्रश्नोपनिषदातील ॐकार

प्रश्नोपनिषद तर ॐकाराचा फारच साकल्याने विचार करते.आत्म्याचे स्वरूप स्पष्ट ऐकल्यानंतर त्याविषयी *सत्यकाम पिप्पलाद* मुनींना पृच्छा करतो, ती अशी:

"स यो ह वै तद् भगवन् मनुष्येषु प्रायणान्तं ॐकारम् अभिध्यायीत। कतमं वाव स तेन लोकं जयतीति? ।।५-१।।प्र।।" - "हे भगवन! जो मनुष्य अंतकाळीसुद्धा ॐकारास ध्यातो, त्यास कोणता लोक प्राप्त होतो?"

हा प्रश्न गीतेतील आठव्या अध्यायातील ***"प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः।।८-२।।"*** या अर्जुनाच्या प्रश्नास समांतर आहे. तेथे दिलेले श्रीकृष्णाचे उत्तर नंतर यथावकाश पाहू. प्रथम पिप्पलादऋषी सत्यकामाच्या प्रश्नास काय उत्तर देतात, ते ऐकू या.

पर व अपर ब्रह्म

ते म्हणतात: ***"एतद् वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यदोङ्कारः। तस्माद् विद्वान एतेनैवायतनेन एकतरमन्वेति।।५-२।।प्र।।"*** - *ॐकाररूपी ब्रह्म पर व अपर असे द्विविध आहे.* ॐकाराचे प्रयाणकालीसुद्धा जो ध्यान करतो, त्यास यातील एका प्रकाराची प्राप्ती होते.

एका मात्रेच्या ध्यानाचे फल

"स यदि एकमात्रमभिध्यायीत स तेनैव संवेदितस्तूर्णमेव जगत्यामभिसम्पद्यते। तमृचो मनुष्यलोकमुपनयन्ते, स तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया सम्पन्नो महिमानमनुभवति।।५-३।।प्र।।" - "ॐकारब्रह्माच्या - एकाक्षरब्रह्माच्या एका मात्रेचे - अकाराचे ध्यान करणारा मनुष्य उत्तम ज्ञानाने युक्त होऊन मनुष्यजन्म घेतो व तप, ब्रह्मचर्य व श्रद्धा यांच्या बळाने वैभव उपभोगतो."

द्विमात्राध्यानाचे फल

"अथ यदि द्विमात्रेण मनसि सम्पद्यते सोऽन्तरिक्षं यजुर्भिरुन्नीयते सोमलोकम्। स सोमलोके विभूतिमनुभूय पुनरावर्तते।।५-४।।प्र।।" - "ॐकाराच्या *अ व* उ या मात्रांचे ध्यान मनुष्यास मानसशक्ती प्रदान करते. सोमलोकात जाऊन तेथील ऐश्वर्य तो उपभोगतो. पण पुनश्च मृत्युलोकी जन्म घेतो."

त्रिमात्राध्यानाचे फल

"यः पुनरेतं त्रिमात्रेण ओमिति एतेनैवाक्षरेण परं पुरुषमभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः। यथा पादोदरस्त्वचा विनिर्मुच्यत एवं ह वै स पाप्मना विनिर्मुक्तः स सामाभिरुन्नीयते ब्रह्मलोकं स एतस्मात् जीवघनात् परात् परं पुरिशयं पुरुषमीक्षते। तदैतो श्लोकौ भवतः।।५-५।।प्र।।" - "*अ, उ व म* या तिन्ही मात्रांनी युक्त अशा ॐकाराचे असे मृत्युपर्यंतही ध्यान करणारा मनुष्य त्या परमपुरुषास स्मरत तेजोयुक्त अशा सूर्यलोकी पोहोचतो. सर्व पापांपासून मुक्त होऊन ब्रह्मलोकी विराजतो. त्या ठिकाणी त्यास जीवापेक्षा श्रेष्ठ आणि सर्वशरीरव्यापी अशा तेजोमय परमपुरुषाचे दर्शन होते." जिज्ञासूंसाठी येथे एवढा निर्देश पुरे आहे की या श्लोकात सांगितलेले सूर्यलोक, ब्रह्मलोक व परमपुरुष या संज्ञांनी पिंडांतर्गतची योगस्थिती जशी दर्शवली जाते, तशीच मृत्युपरांत गतीही निर्देशिलेली आहे.

त्रिवेदाचरणाचे फल

"तिस्त्रो मात्रा मृत्युमत्यः प्रयुक्ता अन्योन्यसक्ता अनविप्रयुक्ताः। क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक्प्रयुक्तासु न कम्पते ज्ञः।।५-६।।प्र।।" - "ओंकाराच्या तीन मात्रा एकेकट्या मृत्युलोकावगमनास कारण होतात. पण त्या सर्व मिळून एकत्र ओंकारस्वरूपाचे ध्यान सिद्ध झाले की त्या परस्परसंयुक्त होऊन बाह्य व आंतर कर्मे व वृत्ती यांचे सुयोग्य नियमन करत मनुष्यास स्थिरचित्तवृत्तिप्रदायक व ज्ञानदायक ठरतात."

ऋग्वेदादींचे फल

"ऋग्भिरेतं यजुर्भिरन्तरिक्षं सामभिर्यत तत् कवयो वेदयन्ते। तमोङ्कारेणैव आयतनेनान्वेति विद्वान यत् तत् शान्तमजरममृतमभयं

परं चेति।।५-७।।प्र।।" - "ऋग्वेदऋचा मृत्युलोकास जिंकतात; यजुर्वेदमंत्र अंतरिक्षलोक प्राप्त करून देतात; सामवेदगायनाने ब्रह्मलोकी गमन होते; हे सर्व ज्ञानी पुरुष जाणतात. म्हणून ते नित्य ओंकाराच्या पूर्णस्वरूपात आश्रय घेतात आणि परमपदास जातात. ते पद शांत, अजर, अमृत, अभय - मृत्युमय संसाराची जेथे भीती नाही, असे आहे.

मुण्डकाद्वारे ॐकार व ईश्वरप्रणिधानावर प्रकाश

ईश्वरप्रणिधानाचा आत्मा केवळ तीन श्लोकातून प्रतीत होतो, तो **मुण्डकोपनिषदा**च्या पुढील उक्तीने:

"धनुर्गृहित्वा उपनिषदं महास्त्रं शरं ह्युपासानिशितं सन्धयीत। आयम्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं तदेवाक्षरं सोम्य विद्धि।।२-२-३।।मुं।।" -"उपासनारूपी तीक्ष्ण बाण उपनिषदरूपी धनुष्यास जोडून आत्मस्वरूपचिंतनमग्न अशी चित्तरूपी प्रत्यंचा आकर्ण ओढून अक्षररूपब्रह्माचा वेध करावा."

"अरा इव रथानाभौ संहता यत्र नाड्यः स एषः अन्तश्चरन्ते बहुधा जायमानः। ओमित्येव ध्यायथ आत्मानं स्वस्ति वः पराय तमसः परस्तात्।।२-२-६।।मुं।।" - "रथचक्राच्या नाभीत जशा त्याच्या सर्व अऱ्या येऊन मिळतात, तशा सर्व नाड्या <u>आध्यात्मिक</u> हृदयात येऊन पोहोचतात. त्या ठिकाणी आत्मा विचरत असतो. तो शरीराद्वारे अनेक प्रकारे प्रकटतो. ओंकाराने आत्म्याचे ध्यान करा. तेच तुम्हाला या अविद्यामय अंधकारातून - प्रपंचातून - प्रकाशाकडे घेऊन जाईल."

"प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्षमुच्यते। अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत।।२-२-४।।मुं।।" - "***ॐकाररूपी धनुष्यास*** आपला ***जीवरूपी बाण*** जोडून ***ब्रह्म हे लक्ष्य*** चिंतून अत्यंत कौशल्याने त्याचा वेध करावा. बाण जसा लक्ष्यात जडून जातो, तसे मनाने ब्रह्माशी तन्मय व्हावे."

बृहदारण्यक व ॐकार

ॐकारस्वरूप ब्रह्माविषयी *बृहदारण्यक* उपनिषदाचे असे वचन आहे:

"ॐ खं ब्रह्म। खं पुराणं वायुरं खं इति ह स्म आह कौरव्यायणीपुत्रो वेदो अयं ब्राह्मणा विदुः वेद एनेन यद् वेदितव्यम्।।५-१-२।।बृ।।" -"ॐकाररूपी अवकाशच ब्रह्म आहे. हे सनातन ब्रह्म आहे. ॐकाराने जाणले जाणारे ब्रह्म असल्याने ॐकारासच ब्राह्मण वेद म्हणून ओळखतात.*(आणि त्याचीच उपासना करतात.)*

छांदोग्यातील उपासना::::

ॐकारस्वरूपा"

अशा या ॐकाराचे वैदिक वाङ्मयास अप्रूप आहे. ***छांदोग्य*** *व* ***मांडूक्य*** ही दोन प्रमुख उपनिषदे तर *ॐकार वा उद्गीथास*च वाहिलेली दिसतात. या दशोपनिषदांचा असा हा मकरंद चाखतचाखत ही दोन सुंदर औपनिषदिक सुमने, त्यांचा स्वल्प रसास्वाद घेत घेत, निर्वाणपदप्राप्तीसाठी परब्रह्मपदी वाहत त्यांचा आसमंतात दरवळणारा सुगंध तृप्त मनाने सेवून प्रफुल्लित होऊ या.

छांदोग्य म्हणते: ***"ओम् इति एतद् अक्षरं उद्गीथं उपासीत। ओम् इति हि उद्गयति तस्य उपव्याख्यानम्।।१-१-१।।छां।।"*** - "*ओम्* हाच *उद्गीथ* आहे. त्याची *अक्षरब्रह्म* म्हणून उपासना करावी. ओंकाराचा विधिपूर्वक उच्चार करत उद्गाता यज्ञात उच्चरवाने साम गातो. ओंकारब्रह्माची उपासना कशी करावी ते ऐका":

"सर्वाधार पृथ्वी आहे. पृथ्वीचा रस पाणी, वाणीचा रस ऋग्वेद, ऋग्वेदाचा रस साम, आणि सामाचा रस उद्गीथ वा ॐ आहे. उद्गीथ हा सर्वश्रेष्ठ असा परमात्मरस आहे. हाच *ब्रह्मरस* आहे. यज्ञातील *सोम* तो हाच. *प्राण* हाही *उद्गीथ* आहे. याची जो उपासना करतो, त्याचे सर्व मनोरथ हा पूर्ण करतो *।।१-१-२।।छां।।"*

छांदोग्यातील प्राणोपासना

"प्रकाशणारा *सूर्य* प्राण्यांकरता उद्गान करत अंधकार व भय यांचा विनाश करतो. *प्राण व अपान* वा *स्वर व प्रत्यस्वर* यांची *सूर्यासह ओंकाररूपाने उपासना करावी।।३-१-१,२।।छां।।"*

"प्राणापानाच्या संधिस्थानी *व्यान* असतो. व्यान म्हणजे *वाणी.* तिचीही ओंकाररूपे उपासना करावी. वाणी हीच *ऋक्* म्हणजे ऋचा होय. प्राणापानाशिवाय म्हणजे प्राणापान सम करून या वाग्रूपी ऋचेची ओंकाररूपाने उपासना करावी *।।३-१-३,४।।छां।।"*

वरील मंत्र क्र.३-१-१ ते ४ यातून *छांदोग्य* सांगते ती आपण करतो तीच *गायत्री*उपासना होय. गीता ह्याच उपासनेविषयी ***"स्पर्शान्कृत्वा .... चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः। प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ।।५-२७।।"*** या श्लोकातून निर्देशिते. ज्ञानदेवही *पंथराजाद्वारे* याच उपासनेचे बृहत स्वरूप विशद करून सांगतात, एवढे जिज्ञासूंच्या लक्षात असावे. असो.

उद्गीथाच्या अक्षरांची उपासना

"उद्गीथाच्या अक्षरांची उपासना करावी. *प्राण* हा *उत्* - व्यापार करवणारा, वाणी ही *गी* - गिरा, अन्न हे *थ* - यात विश्व स्थित असते; तसेच स्वर्ग, आदित्य, सामवेद हे उत्; अंतरिक्ष, वायू व यजुर्वेद हे *गी* आणि अग्नी, पृथ्वी व ऋग्वेद हे *थ* अशी भावना करून हा ओंकार उपासणारा अन्नाने परिपूर्ण होतो *।।१-३-६,७।।छां।।"*

ही उपासना कशी करावी, ते ऐका: "या अक्षरांचे ध्यान करावे. हाच साममंत्र. याची देवता, ऋचा, ऋषी, छंद, स्तोम, दिशा इ.चे ध्यान करावे. ॐकाराचे अनन्यभावाने शरण जाऊन स्तवन करावे. असे करणाऱ्याच्या सर्व कामना पूर्ण होतात *।।१-३-८ ते १२।।छां।।"*

छांदोग्य हे एक बृहत उपनिषद आहे. त्याच्या अभ्यासाने ईश्वरप्रणिधानाच्या क्षेत्रातील अनेकानेक संकल्पनांची उकल व समन्वय

करता येतो. सांप्रत हे उपनिषद आपल्या विशेष अभ्यासाचा विषय नाही. अभ्यासाच्या दृष्टीने तो एक महाविशाल असा विशिष्ट प्रांतच आहे. परंतु त्यातील प्रमुख अशा महत्त्वाच्या उपासनासंदर्भांचा येथे आपण काही एक विचार मात्र जरूर करत आहोत. त्या दृष्टीने पाहता आताच पाहिलेल्या भागातील प्राण-अपानादी उपासनेचा व ॐकाराच्या तीन मात्रांच्या उपासनेचा भाग, तसेच विश्व अन्नात स्थित असते, इ.भाग लक्षणीय आहेत. असो.

उद्गीथाचे गायन

"*उद्गीथ* म्हणजे *प्रणव* आणि *प्रणव* म्हणजेच *उद्गीथ* वा *ॐकार!* ओंकाराचे गायन करावे. आकाश जसे सर्व भूतांचे आश्रयस्थान असते, तसा हा अनंत *उद्गीथ* सर्वश्रेष्ठ आहे. त्याची जो उपासना करील, तो सर्वश्रेष्ठत्व पावेल. प्राण्यांचे तारण करणारा *गायत्र* असा हा *प्रणव* आहे. यास जो जाणतो, तो संपन्न होतो. तो महामना म्हणजे विशाल मनाचा होतो *।।१-५-१,५;३-१२-१,९;३-१३-१ ते ७।।छां।।*"

ॐकाराचे स्वरूप

"धर्माचे तीन भाग आहेत. ते म्हणजे *यज्ञ, वेदाध्ययन व दान, ब्रह्मचर्य व आचार्यसेवन, आणि तप*. ब्रह्मस्थित मनुष्यास अमृतत्वप्राप्ती होते. जेव्हा प्रजापतीने तप म्हणजे ध्यान केले, तेव्हा या उद्गीथाच्या ध्यानाने त्यास तीन वेद प्राप्त झाले. त्या वेदांचे ध्यान करून *भूः, भुवः व स्वः* ही तीन अक्षरे उत्पन्न झाली. यांनाच *व्याहृति* अशी संज्ञा आहे. याच तिन्ही लोकांच्या निदर्शक आहेत. त्या तिहींचे ध्यान करून प्रजापतीला *"गिरामस्म्यैकमक्षरम्"* असे ज्याला गीतेत म्हटले आहे, तो *ॐकार* प्राप्त झाला. असे सर्व शब्दमात्रास जाणणारे व व्यापणारे हे ॐकारस्वरूप आहे."

मधुप्राप्ती

"ॐ। असौ वा आदित्यो देवमधु तस्य द्यौरेव तिरश्चीनवंशो अन्तरिक्षं अपूपो मरीचयः पुत्राः।।३-१-१।।छां।।" - "*आदित्य* हा देवांच्या मधाचे पोळे आहे. स्वर्लोकरूपी वृक्षशाखेवर हे आकाशरूपी पोळे आहे आणि सूर्यकिरण हे त्यावरील भ्रमर आहेत. पूर्वेकडील किरण हे त्या पोळ्याची छिद्रे, *ऋचा* हे मध करणारे भ्रमर, *ऋग्वेद* हे पुष्प होय. ऋचा यातील मध घेऊन जातात. आदित्याचे ऊर्ध्वकिरण म्हणजे त्या पोळ्याची वरील भागाकडील छिद्रे. गुह्यमंत्र म्हणजे मधु निर्मिणाऱ्या मधुमक्षिका. ओंकाररूप ब्रह्म हेच जणू पुष्प - याच्यापासूनच अमृतरसाची - मधाची प्राप्ती होते."

यातील *आदित्य, स्वर्लोक* इ.संकल्पनांचा लौकिक अर्थ येथे अभिप्रेत नाही. खरा अर्थ ब्रह्मविद्येशी संबंधित असाच आहे. *कुंडलिनीयोगात* अशा या संज्ञांचा जो पिंडांतर्गत अर्थ घेतला जातो, तोच येथे अभिप्रेत आहे. *आदित्य* म्हणजे *आत्मा; स्वर्लोक* म्हणजे अमात्रेचा व त्यापलीकडील प्रांत; इ.अर्थ येथे अभिप्रेत आहेत.

याच अर्थी *छांदोग्य* म्हणतेः "गूढमंत्रांचा परंपराप्राप्त उपदेश ब्रह्मापर्यंत नेऊन पोहोचवतो. ही ब्रह्मविद्या आहे. तिचे रक्षण करावे."

औपनिषदिक वचनांचा अर्थ करतांना लौकिक अर्थ क्वचितच लक्षित असू शकतो, हे प्रसंगोपात्त ध्यानी घ्यावे लागते. म्हणूनच उपनिषदांचे परंपराप्राप्त अध्ययनच ब्रह्मविद्येस साहाय्यक ठरते आणि त्यासाठी गुरुमुखातून प्रकट झालेले परंपरागत ज्ञानच विशेष वांछनीय आहे. निव्वळ वैय्याकरणीय व तार्किक ज्ञानाची येथे मर्यादित उपयुक्तता आहे, हे यानिमित्ताने जिज्ञासूंनी नीट मनात ठसवून घ्यावे.

"पिंडीं ते ब्रह्मांडीं"

"परमात्मस्वरूप सर्व विश्वास व्यापून अंतर्यामासही व्यापते. हृदयस्थ जे आकाश असते, तेच ब्रह्म आहे. त्याला जाणावे *।।३-१२-७ ते ९।।छां।।*"

"सर्वं खलु इदं ब्रह्म तज्जलान् इति शान्त उपासीत।।३-१४-१।।छां।।" - "सर्व विश्व ब्रह्मस्वरूप आहे. ते ब्रह्मातूनच उत्पन्न होते. ब्रह्मातच ते स्थित असते आणि तेथेच त्याचा लय होतो. शांत चित्ताने त्याची उपासना करावी."

"जे अनंत आहे, त्यातच खरे सुख आहे. ते वर, खाली, पुढे, मागे, सर्वदूर आहे. सर्वदूर आत्माच आहे. पाहणारा, मनन करणारा, ज्ञाता असा आत्माच आहे. या शरीररूपी ब्रह्मपुरीत एक *हृदयरूपी कमल* आहे. *त्यातील सूक्ष्मशा आकाशात ब्रह्म वसते. आत्मा तेथेच असतो.* त्याचा शोध घ्यावा *।।३-१४-२ ते ४।।छां।।*"

"पिंडीं ते ब्रह्मांडीं" असा हा औपनिषदिक संदेश आहे. यावरच श्रीज्ञानदेवांच्या नाथपंथीय योगसाधनेची - **पंथराजा**ची - बैठक आहे. ती स्पष्ट आकळावी यासाठीच हे **छांदोग्य** उपनिषदातील विचारांचे सिंहावलोकन उपयुक्त आहे. ***ॐकारोपासना*** ही ज्ञानेशप्रणीत योगोपासनेशी तसेच गायत्रीउपासनेशी पूर्णतया संबंधित आहे. यासाठी ॐकाराच्या व्याप्तीचे हे अल्पसे दर्शन घेण्याचा आपला प्रयत्न सरतेशेवटी *ॐकारमय* अशा *माण्डूक्य* उपनिषदाच्या विचारधारेने समृद्ध करत मूळ विषयप्रवाहाकडे वळू या.

माण्डूक्याचा ॐकारविचार::::

सर्वच ॐकार

मांडूक्य उद्घोषितेः ***"हरिःॐ ओमित्येतदक्षरमिदम्ँसर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोङ्कार एव। यच्चान्यत्रिकालातीतं पदप्योङ्कार एव।।१।।मां।।"*** - "हे सर्व विश्व इ.*ॐ अक्षररूप* आहे. जे पूर्वी होऊन गेले, सध्या आहे आणि पुढे होणार आहे, ते सर्व ॐकारच आहे. दुसरे त्रिकालातीत असे इतरही सर्व ॐकारच आहे. हे सर्व *ब्रह्म* आहे."

आत्म्याचे पाद

"हा आत्माही ब्रह्मच आहे. त्याचे चार पाद असतात. प्रथम पाद **वैश्वानर** आहे. त्याला सप्त अंगे व एकोणीस मुखे आहेत. जागृत

अवस्था व विषयांची जाणीव ही त्याची लक्षणे आहेत. पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंचप्राण, मन, बुद्धी, अहंकार व चित्त ही त्याची एकोणीस मुखे होत. तेज, सूर्य, वायु, आकाश, जल, पृथ्वी व आहवनीय अग्नी हे त्याचे सप्तांगभाग होत *।।२ व३ ।।मां।।"*

तैजस व प्राज्ञ पाद

"त्याचा द्वितीय पाद **तैजस** आहे. त्यालाही सप्तांगे व एकोणीस मुखे आहेत. स्वप्नावस्था व विषयांची आंतरजाणीव ही त्याची लक्षणे आहेत *।।४।।मां।।"*

"तृतीय पाद **प्राज्ञ** म्हणून ओळखला जातो. सुषुप्ती अवस्था व एकजिनसी जाणीव ही त्याची लक्षणे होत. इतर दोन पादांचे हा द्वार आहे व म्हणून *तो चेतोमुख* आहे. हा *प्रज्ञानघन* आहे. निव्वळ आनंदमय आहे. इच्छा व स्वप्न यांपासून मुक्त आहे. हा पाद सर्वांचा **ईश्वर** आहे. हा सर्वज्ञ आहे. हा सर्वांचे उगमस्थान आहे. हाच अंतर्यामी आहे. सर्व भूतमात्रांची उत्पत्ती यापासूनच होते व लयही त्यातच होतो *।।५ व ६ ।।मां।।"*

"सच्चिदानंद रूपोऽहम् अहमेवाहमव्ययः।"

"याचा चौथा पाद **तुरीय** आहे. तोच *आत्मा* आहे. तोच जाणण्यायोग्य आहे. तो परमसुखदायक आहे. तो जागृतही नाही, स्वप्निलही नाही, प्रज्ञानघनही नाही. जाणिवेचा त्यात अभावही नाही. तो ज्ञानेंद्रियांना दृश्य नाही. मनास तो आकळत नाही. त्याचा कार्यकारणभावाने बुद्धिद्वारे बोध करता येत नाही. तो अचिंत्य आहे. त्याचे गुण सांगता येत नाहीत. तो आत्मप्रत्ययाचे सार आहे.प्रपंचाचा उपशम करणारा आहे. प्रशांत आहे. असा हा *चतुर्थपाद* आहे. आणि तोच आत्मा आहे! *।।१२।।मां।।"*

" *त्या आत्म्यासच या सर्व पादांसह एकसंधरूपाने पाहिले म्हणजे ॐकाररूप प्राप्त होते.* त्यास ***अ, उ व म*** या मात्रा आहेत. ***अ*** कार *वैश्वानर* पदाचा द्योतक आहे. तो विराट स्वरूपाचा प्रतीक आहे. **उ** कार *तैजस* पदाचा प्रतीकरूप आहे. ***म*** कार हा प्रज्ञानघन *प्राज्ञ* या अवस्थेस दर्शवितो. विश्व लय करणारा हा पाद आहे. चौथी ***अमात्रा*** आहे. ती ध्वनिरहित आहे. तिचा कशाशीही संबंध नाही. तिच्याठायी बाह्य सृष्टीचा उपशम होतो. तीच ***शिव*** ही अवस्था आहे."या औपनिषदिक संकेतात चिद्विलासाची बीजे आहेत, असे आपणास जाणवते.

"हे जो जाणतो, तो आपल्या आत्म्यास परमतत्त्वात एकरूपत्वाने प्रविष्ट करवतो. ॐकाराचेच ध्यान करावे. त्याच्याच पादांचे ज्ञान करून घ्यावे. **याशिवाय दुसरी कोणतीही उपासना आवश्यक नाही.**" याचअर्थी वेदांनीही गायत्रीची उपासना अशीच एकमेवाद्वितीय म्हणून सांगितली आहे.

"चित्तास ॐकाराशी युक्त करावे. प्रणवोपासना करणारास भय कोठचे!"

"प्रणवच *पर व अपर ब्रह्म* आहे. तोच अव्यय अविनाशी परब्रह्म आहे. हाच सर्वांच्या हृदयात स्थित असलेला परमेश्वर आहे. ध्वनिरहित असा हा जो ***प्रणव वा ॐकार*** आहे, त्यास अनंत मात्रा वा अनंत ध्वनी आहेत. हा द्वैताचा निरास करतो व म्हणून सतत शांती देतो. ज्याने या ॐकारास जाणले, तोच खरा मुनी! असे हे ॐकारस्वरूप श्रेष्ठ पद आहे."

म्हणून या श्रेष्ठ पदास - त्या ॐकारास - वंदन करतांना गौडपादाचार्य आपल्या कारिकेत म्हणतात की ***"दुर्दर्शमतिगम्भीरमजं साम्यं विशारदम्। बुद्ध्वा पदमनानात्वं नमस्कुर्मो यथाबलम्।। असङ्गोऽहम् असङ्गोऽहम् पुनः पुनः। सच्चिदानंद रूपोऽहम् अहमेवाहमव्ययः।।१००,१०१।।अलातशान्ति।।गौडपादिय मांडूक्यकारिका।।"*** - "दर्शन करण्यास दुर्लभ, अत्यंत गहन अशा स्वरूपाचे, अजन्मा, सर्वत्र सम असे, तरीही अनेकत्वापासून मुक्त असणारे हे जाणीवेच्या पलीकडचे श्रेष्ठ पद आहे. ते प्राप्त करून घेऊन त्यास यथाशक्ती अभिवादन असो. हे वंदन आत्म्यास आत्म्यानेच करावयाचे असल्याने असंगाचे असंगास हे पुन:पुनः केलेले आत्मवंदन आहे.असा मी केवळ सच्चिदानंदरूपी अविनाशी अव्यय आहे."अमृतानुभवाचे रहस्य मांडूक्यकारिकेच्या या दोन श्लोकात सहजच व्यक्त झाले आहे.

मांडूक्य उपनिषदातील या ज्ञानधारेच्या प्रकाशात पाहिले की ज्ञानदेवांनी - ***"परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।"*** - असा जो ***पंथराज*** गीतेतील गुह्य अन गोपालकृष्णाच्या मनींचे *गूज* म्हणून प्रकट केला आहे, त्याची रहस्यपूर्ण अंगोपांगे उलगडणे सूज्ञांस अनुभवाधारे शक्य होते. या ग्रंथांतरी आपल्या बृहत प्रयत्नांचा तरी तोच आयाम आहे, एवढे येथे निर्देशिले तरी पुरे!

ॐकार व ईश्वरप्रणिधान::::

"ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म"

उपरि दशोपनिषदें। जियें उदारें ज्ञानमकरंदें।
तियें मुकुटीं कुसुमें सुगंधें। शोभती भलीं।।१-१८।।

अशा शब्दात श्रीज्ञानदेवांनी ज्या उपनिषदकुसुमांना ॐकारस्वरूपा अक्षरगणेशाच्या मस्तकी विराजमान केलेले आहे, त्यांचा हा रससुगंध उपभोगून आपण धन्य धन्य झालो. आणि त्यातही वर *माण्डूक्य* उपनिषदातील या अजर, अमर, अविनाशी, अव्यय अशा आत्मरूपी प्रणवाकार अमृतधारेचे आकंठ रसपान केल्यानंतर त्या अक्षर ब्रह्मस्वरूप ॐकाराबाबत श्रीगोपालकृष्णांचे वचन ऐकण्यापेक्षा उत्तम श्रेयस्कर असे दुसरे काय असणार!

अंतकालीही या ॐकाराचेच ध्यान करावे असा त्यांचा स्पष्ट आदेश त्यांच्याच मुखाने श्रवण करू या.

योगाभ्यासकाची गती

ॐकारविवक्षित पुढील श्लोक योगाभ्यास कशा करावा त्या क्रियेचे, तसेच ध्यान कोणते करावे व अंतकाली तेच ध्यान केले असता जी शाश्वत गती प्राप्त होते, त्यांचे स्पष्ट चित्र उभे करतातः

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः।।८-५।।

श्रीकृष्ण म्हणतातः "अंतकाली माझेच स्मरण करत देह सोडणारा माझ्याच स्वरूपास येऊन मिळतो, हे निःसंशय आहे."

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।।८-८।।

"योगाचा अभ्यास करून चित्त माझ्याखेरीज इतर कोठेही जाऊ देऊ नये. माझ्या दिव्य स्वरूपाचे - परम पुरुषाचे - स्थिर चित्ताने केलेले ध्यान त्या माझ्या परमपदास पोहोचविते."

कविं पुराणमनुशासितार-
मणोरणीयां समनुस्मरेद्यः।
सर्वस्य धातारमचिन्त्यरूप-
मादित्यवर्णं तमसः परस्तात्।।८-९।।
प्रयाणकाले मनसाचलेन
भक्त्या युक्तो योगबलेन चैव।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्-
स तं परं पुरुषमुपैति दिव्यम्।।८-१०।।

"सकलतत्त्वनिधान, सनातन, ईश्वर, अणूहूनही लहान - सूक्ष्मातिसूक्ष्म, सर्वांचे अधिष्ठान, अचिंत्यस्वरूप व तमसापलीकडील दैदिप्यमान सूर्यासारख्या तेजस्वी अशा त्या *परमपुरुषाचे स्मरण* करत जो *योगी स्थिर चित्त* राखून आपल्या अंतकाली ***योगबल आणि भक्तीच्यायोगे ध्यान करतो*** आणि *आपले प्राण दोन्ही भुवयांमध्ये म्हणजे भ्रुकुटीमध्यात स्थापन करत* देह सोडतो, तो त्या दिव्य पुरुषाप्रत जाऊन पोहोचतो."

यदक्षरं वेदविदो वदन्ति
विशन्ति यद्यतयो वीतरागाः।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति
तत्ते पदं सङ्ग्रहेण प्रवक्ष्ये।।८-११।।

"*(तो दिव्य पुरुष म्हणजे)* ज्या अक्षरब्रह्माची वेदवेत्ते वाखाणणी करतात, वीतराग मुनी ज्या ब्रह्मात प्रवेशतात, ज्याच्या प्राप्तीसाठी ब्रह्मचर्याचे पालन करावयाचे असते, ते परमपद कसे प्राप्त करावे हे तुला संक्षेपतः सांगतो; ते ऐक."

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम्।।८-१२।।
ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मर।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।८-१३।।

*"सर्वेंद्रियरूप विषयग्राहक द्वारांचे संयमन करून (यम-नियम पाळून), (प्रत्याहारपूर्वक) मनाचा निरोध करून (चित्तवृत्तींचा निरोध करून), (प्राणायामपूर्वक) (कुंडलिनीशक्तीला चेतवून सुषुम्नाद्वारे) (हृदयात) (प्रवेश करण्यास लावून), (असणाऱ्या सर्व) प्राणांस (व चेतनेस) मूर्ध्निस्थानी स्थापन करत **ॐ** या एकाक्षरी ब्रह्माचा जप करत माझे ध्यान करावे. **(हा समाधियोग आहे.)** यात स्थिर झालेला मनुष्य माझे स्मरण करत देह सोडतो आणि तदुपरांत तो उत्तम गतीस (म्हणजे मला) प्राप्त होतो."*

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।८-१४।।

" हे पार्था! अनन्येकचित्ताने जो माझे नित्य स्मरण *(म्हणजे ध्यान)* करतो, त्या नित्य योगयुक्त असणाऱ्या योग्यांसाठी मी अत्यंत सुलभ आहे."

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।८-१५।।

"माझी प्राप्ती करून घेतलेल्या, माझ्या परमपदास येऊन पोहोचलेल्या त्या संसिद्ध महात्म्यांना केवळ दुःखाचे घर असणारा अशाश्वत देह पुनः प्राप्त होत नाही. ते महात्मे जन्ममृत्युजरातीत अशा अमृतास प्राप्त करतात."

ॐकारध्यान हेच खरे ईश्वरप्रणिधान

वर आलेल्या श्लोकातूनही ***ॐ हेच ब्रह्म असून*** योग्यांनी ॐकारच जाणावा; त्याचेच ध्यान करण्याचा अभ्यास करावा; असा अभ्यासच त्यांना अंतकाळीही तारून नेतो; जन्मभर केलेल्या या अभ्यासाचे फल म्हणजे प्रयाणकालीसुद्धा असा समाधी सुलभरीत्या साधतो आणि परमपदप्राप्ती होते, हे महत्त्वाचे विषय येतात.

ॐकाराचे असाधारणत्वसुद्धा येथे नजरेत भरते. आणि परमात्म्याचे ध्यान कसे करावे, याचा स्पष्ट निर्देश येथे मिळतो. यासच अनुसरून श्रीज्ञानदेवांनी सहाव्या अध्यायी *पंथराजाची घडी ग्राहीक श्रोत्यासाठी उपलवून* दाखवली आहे. तो भाग योग्य वेळी पाहावयाचा आहेच. तूर्त इत्यलम्।

ज्ञानेश्वरीतील ॐकार

आता सरतेशेवटी ज्ञानेश्वरीतील ॐकारविषयक काही दाखले पाहू या. प्रथम ओवीतच त्यांनी ***"ॐ नमो जी आद्या"*** असे त्या ॐकारास अभिवादन केलेले आहे. त्यासच गणेश म्हणून ***"अकार चरणयुगुल, उकार उदर विशाल, मकार महामंडल, मस्तकाकारें।।१-१९।।"*** असा त्याच्या त्रिमात्रांचा निर्देश आहे. हे तीन मिळून ***शब्दब्रह्म*** होते आणि त्या ***आदिबीज*** अशा ॐकारास नमन करून ज्ञानदेव पुढे होतात.

योगधारणा सांगत असता ***"प्राणाचा प्रणवुचि करावा"*** असे कुंडलिनीच्या औट वळणांशी प्रणवाचे साधर्म्य ज्ञानदेव दर्शवतात. *आकाशाचा - मात्रात्रयांचा - अर्धचंद्रात लय होतो व वायूचा बिंदूत लय होतो. नादाचा (ध्वनि)लय होऊन ॐकार अदृश्य होतो व ॐकाराचे स्मरण सरून पूर्णघन ब्रह्मच लाभते;* असा योगप्रक्रियेचा भाग - जो कुंडलिन्यधिष्ठित योगप्रणालीचा विशेष आहे तो ***("तैसें चित्त राहलेयां पांडवा। प्राणाचा प्रणवुचि करावा। मग तो अनुवृत्तिपंथें आणावा। मूर्ध्निवेन्हीं।।......तैसें ॐ हे स्मरों सरे। आणि तेथ***

चि प्राणु पूरे। मग प्रणवातीत उरे। पूर्णघन जैं।।८-११४ ते ११८।।") या ओव्यांमध्ये येतो.

तसेच ज्ञानेश *प्रणव*च कसा परमात्मरूप आहे, ते सांगतातः ***"म्हणौनि प्रणवैकनाम। हें एकाक्षरब्रह्म। जो माझें स्वरूप परम। स्मरतसांता।। त्यजी देहांतैं। तो त्रिशुद्धी पावे मातें। जेयां पावणेयांपरौतें। आणिक पावणें नाहीं।।८-११८,११९।।"***

कुंडलिनी योगप्रक्रिया व ॐकार

योगप्रक्रियेचा उलगडा करतांना कुंडलिनी शक्तिरूप झाल्यानंतर तिचे*मारुत* असे नाम होते आणि शिवास आलिंगन देण्यासाठी ती कशी आवेगाने पुढे सरसावते, याचे ॐकाराच्या परिभाषेत सहाव्या अध्यायी वर्णन येते, ते पाहा: ***"मग जालंधर सांडी। ककारांत फोडी। गगनाचियें पाहाडीं। पैठी होय।।६-३०२।। तैं ॐकाराचिये पाठीं। पाय देत उठाउठीं। पश्यंतीचिये पाउटी। मागां घाली।।३०३।। पुढां तन्मात्रा अर्धवेरी। आकासाचां अंतरीं। भरती गमे सागरीं। सरिता जैशीं।।३०४।। मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनि। सोऽहंभावाच्या बाह्या पसरूनि। परमात्मलिंगा धांवोनि। आंगां घडे।।३०५।। तंव महाभुतांची जवनिक फिटे। मग दोहींसि होय झटें। तेथ गगनासकट आटे। समरसीं तियें।।३०६।। पैं मेघाचेनि मुखें निवडिला। समुद्र कां वोघीं पडिला। तो मागुता जैसा आला। आपणपेयां।।३०७।। तेवीं पिंडाचेनि मिषें। पदीं पद प्रवेशे। तैं एकत्व होय तैसें। पांडुकुमरा।।३०८।।"***

हा सर्व भाग *सहाव्या* आणि *आठव्या* अध्यायातील वर्णन यांसह पाहणे जिज्ञासूंसाठी मनोज्ञ आहे. ***गीतेतील योग हा कुंडलिनीअधिष्ठित आहे*** असे ज्ञानदेवांचे मत आपणांस या सर्व उल्लेखांतून दृग्गोचर होते, ते असे!

"जेथूनि कां हें प्रकाशे। दृश्यजात"

ब्रह्मैक्यासाठी जो *ॐकार* जाणावयाचा असतो, त्याविषयी ज्ञानेशांचे स्पष्ट म्हणणे आहे की: ***"तो आदि तंव ॐकारु। ध्यानें करिती गोचरु। पाठीं आणिती उच्चारु। वाचेंही तो।।१७-३५७।। तेणें ध्यानें प्रकटें। प्रणवोच्चारें स्पष्टें। लागती मग वाटें। क्रियांचियें।।३५८।। आंधारीं अभंगु दिवा। आडवीं समर्थु बोलावा। तैसा प्रणवो जाणावा। कर्मारंभीं।।३५९।।"***

असा ॐकारजप कोठे नेतो त्याविषयी ज्ञानेश म्हणतातः ***"पाहें पां ॐ तत् सत् ऐसें। हें बोलणें तेथ नेतसे। जेथूनि कां हें प्रकाशे। दृश्यजात।।१७-४०१।। तैं तंव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट। तेयाचें हें आंतुवट। व्यंजक नाम।।४०२।।"*** हा सर्व सतराव्या अध्यायाचा भाग पूर्वी पाहिलाच आहे *(उन्मेष:३३:स्वधर्मकर्तव्य, पृ.क्र. ५१७ ते ५२१).*

या नामाची योग्यता - ॐकाराची शक्ती वर्णितांना ज्ञानदेव म्हणताः ***"पैं सृष्टीचियां उपक्रमा-। पूर्वीं गां वीरोत्तमा। वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता।।१७-३३६।। मज ईश्वरातें नोळखे। ना सृष्टीही करूं शके। तो थोरु केला एकें। नामें जेणें।।३३७।। जेयाचां अर्थु जीवीं ध्यातां। जैं वर्णत्रयचि जपतां। विश्वसृजनयोग्यता। आली तेयां।।३३८।। तन्हीं सर्व मंत्रांचा राजा। तो प्रणवु आदिवर्णु बुझा। आणि तत्कारु तो दुजा। तिजा सत्कारु।।३४२।। एवं ॐतत्सदाकारु। ब्रह्मनाम हें त्रिप्रकारु। हें फूल तुरंबीं सुंदरु। उपनिषद तैं।।३४३।।"***

ज्ञानदेवीतील प्रणव

या अशा ॐकाररूपी सुंदर पुष्पाचा सुगंध घेण्यात उपनिषदे कशी मग्न होतात, ते आपण अवलोकलेच आहे! जाताजाता प्रणवासंबंधीचे ज्ञानदेवीतील काही महत्त्वपूर्ण उल्लेख पाहू या:

भगवंत प्रणवास आपली विभूति म्हणतातः ***"गगनीं मी शब्दु। वेदीं प्रणवु।।७-३४।।"*** अशा वेदाचे वस्त्र प्रणवाच्या पेठेत ग्राहीक श्रोत्यांपुढे उकलवून दाखवण्यापूर्वी ज्ञानेश म्हणतातः ***"प्रणवाचिये पेठें। जाहलें शब्दब्रह्म माजिठें। तैं जेयाचियां यशा धाकुटें। वेढूं न पुरे।।६-१०९।।"*** - परमात्म्यास वेदरूपी वस्त्र पुरत नाही.

पण प्रणवाचे तसे आगळेच आहे. कुंडलिनी जेव्हा *आध्यात्मिक* हृदयात प्रवेशते, तेव्हा *अनाहतनाद* उठतो. हा म्हणजे खरा तर प्रणवाचा परावाणीद्वारे होणारा जपच! हा जप करत परमात्मा कसा गवसतो, ते सहाव्या अध्यायी सांगितले आहे. त्यातील *प्रणवाचे नादचित्र* कसे असते, पाहा: ***"हें असो तैं कुंडली। हृदयाआंतु आली। तंव अनाहताची बोली। चावले तैं।।६-२७४।। शक्तिचियां आंगां लागलें। बुद्धीचें चैतन्य होतें आलें। तैं तेणें आइकलें। आलुमालु।।२७५।। घोषाचां कुंडीं। नादचित्रांची रूपडीं। प्रणवाचियां मोडीं। रेखिलीं ऐसीं।।२७६।।"***

आणि समाधिसुख कसे अलगद प्राप्त होते पहा: ***"तेथ मनाचें मेहुडें विरे। पवनाचें पवनपण सरें। आपणपां आपण मुरे। आकाशही।।६-२६८।। प्रणवाचा माथा बुडे। येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे। म्हणौनि आधींचि बोलु बहुडें। तेयांलागीं।।२६९।।"***

समाधिस्थ योग्यास जी ब्रह्मवस्तू प्राप्त होते, तिचे वर्णन असे आहे: ***"जैं प्रणवापैलीकडें। वैखरीयेसीं कानडें। कायिसयाही सांगडें। नव्हें जी वस्तू।।१२-३१।। तैं अक्षर जी अव्यक्त। निर्देशदेशरहित। सोऽहंभावें उपासित। ज्ञानिये जैं।।३२।।"***

अभंगांतील ॐकार::::

विहंगम मार्ग

असा हा *ॐकाराचा - प्रणवाचा आणि परब्रह्माचा व कुंडलिनीप्रांताचा, तसेच योगमार्गाचा परस्परसंबंध* वरील ओव्यांतून व्यक्तवलेला आहे. त्याची शक्य तेवढी उकल योग्य वेळी पाहाता येईल. परंतु ॐकाराची ज्ञानदेवांच्या दृष्टीतून केलेल्या आलोचनेची सांगता त्यांच्या काही अभंगांवाचून होणार नाही.

ज्ञानदेवांच्या अभंगांतील ॐकार वा प्रणव समजावून घेण्यासाठी काही योगशास्त्रीय संज्ञांचा उलगडा होणे आवश्यक आहे. उत्तर भारतातील *कबीर, दयाल, दादु* इ.संत आणि इतर योगी

आज्ञाचक्रावरील अर्धमात्रेच्या विभागात असणारी प्रमुख चक्रे वा स्थाने पुढे दिलेल्या तक्त्याप्रमाणे सांगतांना दिसतात. त्या स्थानांची नांवे पण विभिन्न योगप्रणाल्यातून वेगवेगळी दिली जातात. पण सर्वतः येथे दिलेल्या संज्ञांचाच प्रयोग बहुशः केला जातो. ही माहिती जिज्ञांसूंस उपयुक्त ठरेल म्हणून दिली आहे. असो. -➢ -➢ -➢[२]

ज्ञानेशांच्या अभंगांतून ॐकारदर्शन

ज्ञानदेवांचे काही ठळक अभंग *ॐकार संकल्पनेची खोली* दाखवण्यासाठी जिज्ञासूंच्या नजरेस पडावे म्हणून वानगीदाखल पुढे घेत आहोत. ते असेः

ॐकाराची अर्धमात्रा

ॐकाराची *अर्धमात्रा महाकारणस्थानी बिंदुसह* असते. त्याबाबतचा योगपर अभंग असा आहेः

"चहूं शून्यांचा भेद कैसा पहावा देहीं। ब्रह्मरंध्रीं निःसंदेहीं निजवस्तू।।१।। सांवळें सुकुमार बिंदूचें अंतरीं। अर्धमात्रेवरी विस्तारिलें।।२।। त्रिकूट श्रील्हट गोल्हाट तिसरे। औटपीठादि सारें। ब्रह्मांडासीं।।३।। स्थूल सूक्ष्म कारणीं माया। महाकारणांचां ठायां रीघ करी।।४।।अभंगमाला -क्र. ७३५।।"–

"**देहांतरी** चार शून्ये आहेत. ती योगसाधकांनी नीट जाणून घ्यावीत. *१) त्रिकूट २) श्रील्हट ३) गोहाट (गोल्हाट) ४) औटपीठ* अशी ती शून्यस्थाने आहेत. या देहात *स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण* असे चार देह आहेत. त्यातील महाकारण देह हा ॐकाराच्या अर्धमात्रेचा विस्तार आहे. त्यात ही चार शून्ये वसतात. हेच महदाकाश होय."

"*नेत्र (तृतीय), बुबुळ, डोळा* या संज्ञांनी ओळखल्या जाणाऱ्या आज्ञाचक्रस्थ बिंदूत हा अवकाश समावलेला असतो. तेथूनच या अर्धमात्रेत प्रवेश करावयाचा असतो आणि महाकारण देहाच्या मूळस्थानी म्हणजे ब्रह्मरंध्री निःसंदेह जी आत्मवस्तू विराजते, तिचा लाभ करून घ्यावयाचा असतो. आज्ञाचक्रस्थ बिंदूत ज्या सावळ्या सुकुमार परब्रह्ममूर्तीस योगी ध्यातात व पाहतात, ती म्हणजे या ब्रह्मरंध्रस्थ निजवस्तूचेच सगुण साकार रूपडे होय."

निवृत्तिनाथ व ज्ञानदेव या दोघांचीही हीच अनुभूती आहे. या अर्धमात्रेचा अर्थ गुरुगम्य आहे. तो कसा ते पाहाः

"अकारीं अर्धमात्रा कवण्या रीतीं दिसें। उकारींही रसे कवणेपरी।।१।। मकारीं संयुक्त झालीं कवण्यापरी। अर्धमात्रेवरी अर्धमात्रा।।२।। अर्धमात्रेचा अर्थ अवचटचि दिसे। गुरुगम्य सोय जाणती पैं।।३।। ज्ञानदेवें अर्थ शोधूनि घेतला। महाशून्यीं संचला निवृत्तिराजा।।४।।अ।।७५५।।" -

"**अशी** ही जी *अर्धमात्रा* आहे, ती स्थूल देह *(अ कार)*, सूक्ष्म देह *(उ कार)* व कारण देह *(मकार)* यांच्याठायी कोणत्या रूपाने दिसते आणि *अर्धमात्रे* शीही ती कोणत्या रीतीने संयुक्त झाली आहे, ते केवळ गुरुगम्य आहे."

या ठिकाणची ज्ञानेशांची शब्दयोजना जरा कठीण आहे. *"अर्धमात्रेवरी अर्धमात्रा कवण्यापरी मकारीं संयुक्त झाली"* याचे[१] -➢

[१] *(पुढील पृ.क्र.५८० पहावे.)*

-➢[२] **विहंगम मार्ग - प्रचलित संज्ञा (सुधारित तक्ता)**

पिंड	स्थाननाम	स्थानीय अन्य विशेष	कुंडलिनी
पिंड	} **षट्चक्रे**	} मूलाधार, स्वाधिष्ठान,	**अ**
(भ्रूमध्या	} ⇓	} मणिपूर, अनाहत, विशुद्धी	**धः**
पर्यंतचा	} ⇓	} व आज्ञाचक्र	
भाग)	} **आज्ञाचक्र**	स्थूल देहाची मर्यादा,	
	} **(द्विदल)**	आत्म्याचे स्थान	
	} चतुर्दलकमल		**म**
	} षट्दलकमल		
(सूक्ष्म	} अष्टदलकमल	तृतीय नेत्र, पंचतत्त्वे व तीन गुण	
देह)	} दशदलकमल		
	} द्वादशदलकमल	सहस्त्रदलकमलात अवस्थित	
अंड	} **सहस्त्रदलकमल-१**	जोत, निरञ्जन, शिवशक्ती, निजमन	
(भ्रूमध्या-	} षोडशदलकमल	श्वेतवर्णाचे	
वरचा	} **त्रिकुटी (द्विदल)**	ओम्, प्रणव, गगनब्रह्म, महत्,	**ध्या**
भाग	}	महाकाश, वेद इ.दिव्य ग्रंथ (ब्रह्म)	
	} चतुर्दल कमल		**ऊ**
	} षट्दलककमल		
(कारण	} **शून्यस्थान**	(७ शून्ये आहेत - अंतीचे शून्य	
देह)	} **(ब्रह्मरंध्र)**	दशमद्वार वा ब्रह्मरंध्राकडील	
ब्रह्मांड	}	सुषुम्नामुख),आत्मपद, परब्रह्म,	
	}	प्रकृति-पुरुष (मूल)	
(काल	} अष्टदलकमल		
प्रदेश)	} दशदलकमल		
	} द्वादशदलकमल	(सहजदीप)	
	} **महाशून्य**	(६ महाशून्य स्थाने)	
	} षोडषदलकमल	(शेवटचे महाशून्य)	
	} **भ्रमरगुंफा(द्विदल)**		**र्ध्व**
व्याल	} सत्यलोक }	} चैतन्यमय महाप्रकाशमान	**प**
-देश	} }	} निर्मल स्थानः संत येथेच	
(दयाल	} }	वसतात.	**र**
देश)	} **अलक्ष्य(अलख)** }		
महा	} **(लोक)**	} **(दिव्य सहस्त्रार ऊर्ध्व-**	**म**
कारण	} अगम (लोक)	} **सहस्त्रार वा कोल्हाटचक्र,**	**शि**
देह)	} **अनामी (लोक)**	} **सहस्त्रदळकमळ-२, परमसंतांचे वास्तव्यस्थान)**	**व**

१-➤ गूढ उलगडणे सहज शक्य दिसत नाही. वरील स्तंभात दिलेल्या माहितीतील *भ्रमरगुंफा* ही अर्धमात्रेच्या अंतिम स्थानाची निदर्शक आहे. त्यानंतर *व्यालदेश* येतो. कदाचित ज्ञानदेव या *व्याल* देशालाच अर्धमात्रेपुढील तिच्याशी संयुक्त होणारी अर्धमात्रा असे तर म्हणत नसावेत ना! किंवा असेही अनुमान करता येते की *आज्ञाचक्र ते सहस्त्रदलकमल* हा भाग प्रथम अर्धमात्रेचा धरून (*अंड* संज्ञांकित) पुढील ब्रह्मांडाचा भाग ही पुढची अर्धमात्रा (*ब्रह्मांड* संज्ञांकित) आहे. त्यानंतरचा *व्यालदेश* हा भाग परब्रह्माचा प्रांत समजावा लागतो. ज्ञानेश्वर यासच *अनाक्षर* असे एका याच उन्मेषातील पुढे दिलेल्या *अभंग क्र.७५९* तून म्हणतात असे वाटते. हाच तर्क त्यातल्या त्यात जास्त सयुक्तिक आहे. पिंडाप्रमाणे ब्रह्मांडांतही *अर्धमात्रा* धरणे तसे योग्यच वाटते. असो. योगशास्त्राच्या दृष्टीने हा विचार करणे महत्त्वाचे आहे.

"अर्धमात्रेची अनुभूती गुरुकृपेने अवचित येते आणि साधक धन्यधन्य होऊन जातो. ज्ञानदेवांनी गुरुकृपेने या अमात्रेचा खरा महिमा जाणून घेतला आहे. अनुभूतीच्या वाटेवरील सर्व खाणाखूणा त्यांस अवगत झाल्या आहेत."

"या सर्व खूणा *नाद - प्रकाश - ज्योती - कला* इ.सगळ्या त्या एकाच एका वस्तूच्या साक्षात्काराच्याच आहेत. तीच आत्मवस्तू स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण देहांस व्यापून महाकारणातही स्थित आहे. आणि महाकारण देहापलीकडील - परेच्याही पल्याड असलेल्या - *महाशून्यस्थानी* - त्या परमधामात तीच वस्तू संचलेली आहे. गुरुराज निवृत्तिराज हा स्वयमेव ती वस्तूच आहे असा ज्ञानदेवांचा साक्षात्कार आहे." ॐकाराच्या तीन मात्रा ***(अ,उ व म)*** आणि ***अर्धमात्रा*** यांचा हा असा साक्षात्कार ज्ञानदेवांना घडला आहे.

ब्रह्माचे ॐकारस्वरूप आणि अनाक्षर

पुढील अभंग ब्रह्माचे ॐकारस्वरूप व सगुणाचे रहस्य प्रकटवणारा आहे:

"एकाएक गुज बोलतो निर्वाण। निवृत्तिचरण आठवूनि।।१।। अर्धमात्राक्षरीं अक्षरें पाहाती। अनाक्षरा परती बाइयांनो।।२।। रज सत्त्व तम यांहूनि निराळीं। लक्षांहीं वेगळी निवृत्ति जाणें।।३।। ध्येय ध्याता ध्यान परता जिचा खेळ। ज्ञेय ज्ञाता ज्ञान याची साक्ष।।४।। सत् चित् आनंद ब्रह्मा हरिहर। तेही जिचा पार नेणविती।।५।। सलोकता मुक्ती आदि तिन्ही वर। वसतसे जैं घर योगियांचें।।६।। त्वंपद तत्पद असिपदाचा रंग। त्याचा अंतरंग देखा बाइयांनो। निवृत्ति सोपान मुक्ताबाईची खूण। ज्ञानदेवें सघन बोलिलीं हें।।७।।अ।।७५९।।" -

"**सघन** ब्रह्माची साक्षात खूणच असा हा ॐकार आहे. ***अ,उ*** व ***म*** या अक्षरांना सामावून घेणारे व अक्षरब्रह्माच्या *(शब्दब्रह्माच्या)* पलीकडे *अर्धमात्रास्वरूप जे अक्षर आहे* आणि त्या अक्षरापलीकडेही जे *अनाक्षर* आहे, त्याचे गूढ मी तुम्हाला निवृत्तिनाथांचे चरण वंदित सांगत आहे; ते नीट लक्षपूर्वक ऐका," असे ज्ञानदेव म्हणताहेत.

"हे अर्धमात्रारूपापलीकडील *अनाक्षर तत्त्व* सत्त्व, रज व तम या त्रिगुणांच्या अतीत, त्याहून वेगळेच आहे; ते तर *अलक्ष्य* आहे - त्याचे ध्यान करणे कसे बरे शक्य आहे! ते तर लक्ष्यापलीकडील आहे: मनाचा नाश झाला तरच ते लाभते. कारण ध्येय्य - ध्याता - ध्यान या मनाच्या ध्यानत्रिपुटीपलीकडील असणारी *निवृत्तिकला* हे त्याचे स्थान आहे."

"या *निवृत्ति* अवस्थेचा खेळ त्या *अनाक्षर - अक्षर* तत्त्वातच चालतो. अर्धमात्रेहीपलीकडील ही निवृत्ति *ज्ञेय - ज्ञाता - ज्ञान* या ज्ञान त्रिपुटीची केवळ साक्षिमात्र आहे! ज्ञानाचाही तेथे रिगाव नाही. *सत् - चित् - आनंद* अशा ब्रह्मा - विष्णु - महेशादी सच्चिदानंदपदत्रयीची अनुभूतीसुद्धा या अर्धमात्रेपल्याडच्या अनाक्षराचा अंतपार जाणत नाही. *सलोकता - समीपता - सरूपता* अशा ज्या मुक्तित्रयावस्था आहेत, त्यांच्याहीवर - पलीकडे वसणारे जे *योग्यांचे निजधाम* आहे, तेच हे अर्धमात्रातीत *अनाक्षर* आहे."

"तत् त्वम् असि" अशी जी तीन पदे आहेत, ही जी अवस्था आहे, तिच्या रंगात रंगलेली जी ही *अर्धमात्रा* आहे - हा जो ॐकाराचा गाभारा आहे - त्याचेही अंतरंग असणारे *अनाक्षर* ते हे असे आहे. हे सख्यांनो! निवृत्ति-सोपान-मुक्ताई यांची खूण ती हीच आहे. अर्धमात्रेवरही जाऊन हे तिघेजण साक्षात ब्रह्मरूपच झालेले आहेत. मी ज्ञानदेव तर तुम्हा सगळ्यांना सघन सगुण साकारलेल्या ब्रह्मस्वरूपाच्या या निवृत्ति-सोपान-मुक्ताईरूप खुणा स्पष्टच सांगतो आहे."

पूर्णस्वरूप ॐकाराचे असे हे दर्शन ज्ञानदेव आपणास घडवत आहेत.

प्रणव तोच ॐकार

अशा या प्रणवाचे ध्यान सांगतांना ज्ञानेश म्हणतात:

"अकार उकार मकार ओंकार। प्रणव हा साकार सुरेख रे।।१।। मसुरामात्र सार योगी ध्याती देहीं। निरंजन पाही ब्रह्म तैंचि।।२।। ज्ञानदेव म्हणे देह झाले देव। प्रणवचि शिवु अनुभवें।।३।।अ।।७६६।।" -

"**अकार,** उकार व मकार या तीन मात्रांनी स्थूल-सूक्ष्म -कारण देहांच्या विद्यमानें विलसणारा हा *साकार प्रणव* वा *ॐकार* किती सुरेख आहे, पहा बरे! या प्रणवाचे *अर्धमात्रा* हे सार आहे, आणि मसुरमात्र आकाराच्या दिव्य तेजस्थित बिंदुच्या स्वरूपाचे त्याचे दर्शन योग्यांस घडत असते. देहींच देहिन् आत्म्यास लक्षिणारे योगी या मसुराकृती तेजोमय आत्मवस्तूचे सतत ध्यान करण्यात निमग्न असतात. *निरञ्जन* असे जे ब्रह्म त्याचेच हे ध्यान आहे. असे ध्यान साधत असताच ज्ञानदेवांचा देह देवस्वरूपास पावला आहे. या देहाकृतीने विलसणारा ***प्रणव*** हाच साक्षात शिव आहे असा त्यांचा साक्षात्कार आहे."

नयनाचे अंजन

अशा ध्यानामुळे ते ॐकार अक्षर कसे *अनाक्षर - अक्षर* ब्रह्माठायी हरपते आणि योग्यांच्या डोळ्यात ठसून त्यास सर्वत्र कसे दिसू लागते, त्याबाबत ज्ञानेश म्हणतात:

“नयनाचे अंजन मनाचे रंजन। ठसा हा सघन बाईयांनो।।१।। ॐकार अक्षर अक्षरीं हारपें। अनुभवाच्या मापें मोजूं बापा।।२।। बिंदूचें जैं मूळ प्रणवाचें फळ। योगियाचें खेळ तैंचि ठायीं।।३।। ज्ञानदेव म्हणे निवृत्तिप्रसादें। स्वरूपाच्या विनोदें बोलिलें हें।।अ।।७६१।।”

– “**तृतीयनेत्र** *(डोळा, बुबुळ वा आज्ञाचक्रस्थ बिंदू)* उघडणारे अंजन म्हणजे हा प्रणवच आहे. हा नेत्र उघडला म्हणजे अर्धमात्रास्थित स्वरूपाचा साक्षात्कार घडून येतो. त्या साक्षात्काराने मन मोहून जाते आणि सर्वत्र स्वरूपाचाच ठसा उमटलेला दिसू लागतो. नेत्रात हे स्वरूपच सघन दाटून राहते. सर्व जगद्रूपी ॐकार हे अक्षरब्रह्माच्या मूळ अव्यय अक्षररूपात हरपून जाते आणि सर्वदूर त्या अक्षरब्रह्माचीच अनुभूती येऊ लागते. ॐकारध्यानाने हा असा *लययोग* अनुभवास येतो. *आज्ञास्थित बिंदूचे जे मूळ आहे,* त्याठायीच योग्यांचा विहार असतो. ज्ञानदेव म्हणतात की निवृत्तिकृपेने स्वानुभवाच्या प्रमाणातून आकळलेला हा स्वरूपप्रसाद त्यांना प्राप्त झाला आहे.” साधकांना हा प्रसाद कसा होतो, हे कळावे म्हणून हे स्वल्प वर्णन त्यांनी केले आहे.

प्रणव व कुंडलिनीयोग

आता *प्रणवरूपा कुंडलिनी* च्या योगाने प्रणवाचे हे रहस्य कसे उलगडावे, याबाबतची त्यांची एक अभंगरचना पाहू या:

“प्रणवाचें भेद उकलावे देहांत। चंद्राची मी मात सांगतसें।।१।। सहस्त्रदळावरी तेज शुद्ध असे। त्या तेजें प्रकाशें चंद्र बापा।।२।। उन्मनीचे ध्यासें सहस्त्रदळ गाजे। पश्चिममार्गें बीजें दोन असती।।३।। लक्ष लावी ज्ञानदेव एकलाचि। शुद्ध ज्योती तोचि जाणें एक।।४।।अ।।७७९।।” –

“**प्रणवसाधनेचे** हे *अंतरंग रहस्य* मी सांगतो, ते ऐका” असे ज्ञानेश म्हणतात. “प्रणवाची ही साधना देहातच *पिंडीं ते ब्रह्मांडी* या न्यायाने सिद्ध करावी. प्रणवरूपा कुंडलिनीचे औट वेढे सोडवून तिचे उन्नयन करावे आणि तिला चंद्रावर घेऊन जावे. *अर्धचंद्र वा अर्धेंदु* हेच ते स्थान अर्धमात्रेत स्थित असते. आज्ञाचक्रस्थ **स** व **ह** या बीजांवरचा हा चंद्राकडे जाणारा *पश्चिमपथ* आहे. याच बीजांचे - *जीव व शिव* यांचे - ऐक्य या पथावरच घडून येते.”

“चंद्रावरून पुढे गेले की *उन्मनी* प्राप्त होते. उन्मनीचा मार्ग *नाद*स्थानावरून जातो. तेथे होणाऱ्या अखंड अनाहत गजराने *सहस्त्रदलकमल* निनादून जाते. त्याच सहस्त्रदलावर *ब्रह्मरंध्र* असते व तेथेच ते दिव्यातिदिव्य शुद्ध चैतन्य असे आत्मतेज असते. त्याच्या प्रकाशात चंद्रासह सर्व *अर्धमात्रा* प्रकाशते. त्याच प्रकाशात ज्ञानदेवांनी आत्म्यावर आपले लक्ष लावलेले आहे.” असे लक्ष्य लावणारे आणि त्या शुद्ध ज्योतीचे स्वरूप निरीक्षिणारे ज्ञानदेवांसारखे योगी विरळाच होत.

हा अभंग ज्ञानदेवांची आत्मानुभूतीविषयी अशी साक्ष देतो. नंतरच्या एका अभंगात ही अनुभूती अधिक स्पष्ट होते, ती अशी:

“नाभिस्थानीं ठेवा हृत्कमळीं पाहावा। द्विदलीं अनुभवावा ऐक्यभावें।।१।। प्रणव ॐकार विचार करितां। बिंदुचि तत्त्वतां सर्वगत।।२।। कुंडलिनी गति सहजचि राहे। सहस्त्रदळीं पाहें आत्मरूप।। भिन्नाभिन्न नाहीं अवघेंचि स्वरूप। पाहातां निजरूप रूप होय।।३।। तेथ कैंची गति कैंचा विचार। बाप रखुमादेविवर विठ्ठल हा।।४।।अ।।८३६।।” –

“**नाभिकमलाद्वारे** प्रकट झालेला जीवरूपी ठेवा हृत्कमळी वसतो. तो हा *जीव* ब्रह्मच आहे. या ऐक्यस्थितीची अनुभूती येण्यासाठी ***स*** व ***ह*** अशी दोन दले असणाऱ्या आज्ञाचक्री कुंडलिनीचे उन्नयन व्हावे लागते. तीच कुंडलिनी सहस्त्रदली विराजमान झाली की आत्मरूपप्राप्ती होते. प्रणवाचा वा ॐकाराचा तत्त्वविचार केला की सर्वच काही आज्ञाचक्रस्थित परमात्मस्वरूपी बिंदुनेच व्यापले आहे, असे दिसून येते.”

“वास्तविक म्हटले तर जीव व ब्रह्म हे भिन्न नाहीतच! *“जीवो ब्रह्मैव ना परा”!* हे सर्व काही निखळ स्वरूपच आहे. अनुभवाने हे जाणवून आले की निजरूप व स्वरूप ही एकच होतात. त्यावेळी कुठली कुंडलिनीची गती अन कुठली स्थिती! या सहज गतीत आत्मानात्मविचार तरी कोठून उरणार! सर्वत्र हा बाप रखुमादेवीवर विठ्ठलच विचरत नाही का!”

ज्ञानदेवांचा हा अभंग *“मुक्ताई म्हणे जावें यावें कोठे। अवघें निघोट स्वरूप स्वामी।।”* या उद्गारांची आठवण करून देतो*(नामदेव अभंग गाथा क्र.११७३).*

योगपर अभंगांचे सार व योगदृष्टी

ज्ञानदेवांचे अजून असे कितीतरी अभंग आहेत ज्यांच्यात कुंडलिनीयोगाची रहस्ये दडलेली आहेत. ते योग्य प्रसंगी पाहू. प्रणवासंबंधी वानगीदाखल अजून दोन अभंग पाहू या:

“प्रणवचि देह देह हा प्रणव। कल्पेचा भाव कल्पूं नये।।१।। अंजनाचें सार तैंचि देह बा रे। आत्मा परिपूर्ण सारे पाहाति ज्ञानी।।२।। ज्ञानदेव म्हणे प्रणव माझा पिता। अक्षर तैंचि माता याचि भेदें।।३।।अ।।६७९।।” –

“**प्रणव** हा देहच आहे. देह हा *मिथ्या* आहे, ही कल्पनाच करू नये, तर हे सर्व एकले आत्मतत्त्वच आहे, हे नीट जाणून घ्यावे. या ज्ञानाचे सार म्हणजे याच देहाने आत्मसाधन करावयाचे असते. सर्वत्र परिपूर्ण आत्मतत्त्वच विलसते आहे, हे या साधनाने पाहणारे ज्ञानी होत. *प्रणव वा अक्षर* हेच या विश्वाचे मातापिता आहेत, असे याच गूढ ज्ञानाने ज्ञानदेवांना आकळून आले आहे.”

या अभंगातून *प्रणवास पिता* व *अक्षरास माता* असे ज्ञानदेव म्हणत आहेत. *अक्षर, प्रणव व ॐकार* या तिन्ही संज्ञा कधीकधी कांटेकोरपणे न वापरता *प्रणव तेच अक्षर* आणि *तोच ॐकार* अशाही प्रकारे योगी वापरतांना दिसतात.

अर्धमात्रेच्याबाबत काही वेगळाच प्रकार जो आहे, तो आपण नुकताच *अभंग क्र.७५५ व ७५९* यांच्या निमित्ताने पाहिलाच आहे.

अनाक्षर व अक्षर या संज्ञाही तशा सापेक्षच आहेत. अक्षरापलीकडील ते अनाक्षर असा अर्थ उद्भवतो आणि त्यानुसार *अक्षर म्हणजे विश्व साकारण्यास उन्मुख स्थिती* असा अर्थ संभवतो.

अनाक्षर म्हणजे ब्रह्माची साम्यावस्था किंवा निर्विकार स्थिती. या अनाक्षरातही जर *अर्धमात्रा* आहे, असे योगी म्हणत असतील तर ही स्थिती म्हणजे *दादु, दयाल* इ.च्या मते जी ब्रह्मांडावरची स्थिती तिला म्हणजे *सत्यलोक, अगम, अनामी आदी* प्रांतास *अनाक्षर* ही संज्ञा द्यावी लागते *(पृ. क्र.५७१)* आणि त्यानुसार *अनामी लोकास अर्धमात्रा म्हणणे भाग आहे.* तरी त्यातील *अनामीलोक* म्हणजे या अनाक्षराची अर्धमात्रा समजता येते का याचा योगसाधकांनी विचार करावा.

सांप्रत अभंगाच्या दृष्टीने अक्षर यास ब्रह्मांडस्थिती तर प्रणवास अनाक्षरस्थिती कल्पिणे भाग आहे, असे अनुमान आहे. असो. जिज्ञासूंनी व योगसाधकांनी याचा अधिक विचार करावा अशी भावना व्यक्त करून पुढे जाऊ या.

या संज्ञांचा अधिक विचार करण्यासाठी ज्ञानेशांचा आणिक एक अभंग पाहू या. मातापितासंबंधित आणि वरील प्रणव इ.विचाराचा अधिक परामर्ष त्यात आहे, तो असा::

"प्रणवचि शक्ती शिव प्रणवचि। क्षर अक्षर सांची प्रणव तैं।।१।। त्रिकूट श्रीहाट गोल्हाट ब्रह्मरंध्र। प्रणव निरंतर ऐक्य जाला।।२।। ज्ञानदेव आपण प्रणव जाला आधीं। ध्याता ब्रह्मपदीं प्रणवचि।।अ।।७९४।।" -

"**माझ्या** या प्रणवसाधनेने - कुंडलिनीयोगाने -प्रणवाद्वारे प्रणवाचेच ध्यान करून मी प्रणवच झालो आहे; मी ब्रह्मपदी जाऊन बसलो आहे. अहो! काय सांगू! शक्ती प्रणवच आहे; शिवही प्रणवच आहे! क्षराक्षर सगळे निव्वळ प्रणवच आहेत! त्रिकूट काय! श्रीहाट काय! गोल्हाट काय! ब्रह्मरंध्रासकट ही सगळी निरंतर प्रणवातच समरसलेली आहेत!! सर्वत्र हा प्रणवस्थित आत्माच अवस्थित आहे आणि त्याविना येथे दुसरे काहीही नाही!!!" *"नेह नानास्ति किञ्चन"* अशी ही अनुभूती आहे.

त्रिकूटादी संज्ञांचा विचार

या अभंगातील प्रणवाच्या *त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, ब्रह्मरंध्र आणि ब्रह्म* यांसापेक्ष निर्देशांमुळे असे दिसून येते की सूक्ष्मदेहात *त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, ब्रह्मरंध्र, प्रणव व ब्रह्म* असा अनुक्रम असला पाहिजे. त्रिकूट-गोल्हाटादी संज्ञांचा अधिक विचार नंतर **योगविभव** या *एकादश* स्कंधात आणि **संजीवन समाधि** या *बावन्नाव्या* उन्मेषात केलेला आहे. त्यांव्यतिरिक्त थोड्या वेगळ्या यौगिक मतांचा निर्देश स्थानक्रमे पुढील *पृ. क्र. ५८३* मधील तक्त्यात देत आहे.

त्या मतांचा तौलनिक विचार करता असे दिसून येते की *चक्रक्रम-३* मध्ये *श्रीहट, कोल्हाटादी* चक्रस्थाने जी दिली आहेत, त्यात काहीतरी संदेह आहे. सर्वसाधारणपणे ***ब्रह्मरंध्र –➤भ्रमरगुंफा –➤ कोल्हाटचक्र*** असा उत्तरोत्तर क्रम इतर मतांनुसार असतांना या मतानुसार तो उलटसुलट दिलेला दिसतो तो असा: ***कोल्हाट –➤भ्रमरगुंफा –➤ब्रह्मरंध्र.*** त्यातच इतर मतात न दाखविलेल्या *श्रीहट्ट, औटपीठ* या स्थानांचाही निर्देश हे मत करते. अर्थात हे मत *(चक्रक्रम ३)* बरेच विवादास्पद आहे. कोल्हाटादी संज्ञांचा अधिक विचार नंतर वर उल्लेखल्याप्रमाणे इतरत्र करण्यात येईल, त्या वेळी याबाबत अधिक पाहाता येईल. असो.

योगजिज्ञासूंनी या सर्व गोष्टींचा विचार करावा. ज्ञानेशांच्या या अशा सर्व योगपर अभंगांचे सार काढण्यासाठी योग्याची दृष्टी हवी. इतरेजनांनी तशी दृष्टी प्राप्त झाली नसता अनुमानाने काहीतरी विपर्यस्त अर्थ घेणे अयोग्य ठरेल. हा सर्व योगाच्या गूढतम अंतरंगसृष्टीतील प्रांत आहे. किमानपक्षी स्वतः योगसाधनेचा प्राथमिक अभ्यास केलेला असेल, तर यावरील विवेचन जिज्ञासूंच्या पचनी पडेल. अन्यथा *आईनस्टाइनचा सापेक्षतावाद* जसा चांगल्याचांगल्या बुद्धिमान विचारवंतांनाही आकलन होणे अवघड आहे, तशीच स्थिती होण्याचा अधिक संभव आहे.

हे सर्व सविस्तर खोल अशा विचारात घेण्याचे कारण असे आहे की *ज्ञानदेवाची एकूण एक रचना - ज्ञानेश्वरी घ्या, अभंग घ्या, अमृतानुभव घ्या वा चांगदेवपासष्टी घ्या - योग्यांच्या अनुभूतीतून साकारलेली आहेत. त्यांचा मार्गसुद्धा कुंडलिनीयोगासारखा अत्यंत श्रेष्ठ आणि गुंतागुंतीचा योगमार्ग आहे.* उच्च अधिकारी व्यक्तीशिवाय हा योगमार्ग समजावून देण्यास कोण समर्थ असणार!

आणि ज्ञानदेवांची अनुभूती ही तर त्यातून अत्यंत पराकाष्ठेच्या उच्च पातळीवरील आहे. *सञ्जीवन समाधी* घेणाऱ्या आणि युगीयुगी क्वचितच अवतरणाऱ्या त्या महान योगिराजाचे या सर्व ग्रंथांतरी योगावरील जे विवेचन आहे ते कळून घेण्यात, आपणासारखे सर्वसामान्य तर सोडाच! पण मोठे मोठे प्रथितयश साहित्यिक, पंडित, मान्यतम विद्वज्जन आणि ज्ञानदेवांच्या रचनांचा काथ्याकूट करणारे श्रेष्ठी यांच्या हाती काहीच लागत नसले, तर ती वास्तविकता आहे!

आपण जर त्या योगिराटास अनन्यभावाने शरण गेलो, तरच कदाचित यातील काही रहस्ये उकलण्याची व त्यांच्या रचनांचा स्थूल आराखडा आपणांस काही प्रमाणात आकळण्याची शक्यता आहे. जिज्ञासूंनी जरूर हा विचार आपल्या चित्तवृत्तीत ठसवून घेऊन मगच ज्ञानेश वाङ्मयाचे या दृष्टीने परिशीलन करावे व त्यांचे *दर्शन* समजावून घेण्याचा आपापल्या कुवतीनुसार प्रयत्न करावा, असे म्हणण्याचा आपणास अनावर मोह होत आहे. आपणा सर्वांची ही कुवत लक्षात ठेवूनच ज्ञानेशोक्तीचा हा अभ्यास आपण करत आहोत. असो.

निजानंदाचा आविष्कार

ॐकाररूपाने असे प्रकटणारे हे शब्दब्रह्म, हे विश्व, त्याच्या साडेतीन मात्रांतून साकारणारा हा देह, ॐकाराच्याच साधनाने साध्य करता येणारा *पिंडापासून ब्रह्मांडापर्यंतचा* हा योगप्रवास, ॐकाराचे हे असे नादब्रह्मरूप, ही *कुंडलिनी* म्हणून त्याचीच होणारी अभिव्यक्ती,

ईश्वरप्रणिधानातील ॐकाराचे अपरंपार - एकमेवाद्वितीय - असाधारण महत्त्व, ज्ञानेश्वरीच्या ओवीओवीतून प्रकटणारा अन् झंकारणारा हा ॐकार, उपनिषदांतून मूर्त होणारा हा ॐकार, *सोऽहं* साधनेचा प्राणच असा हा ॐकार, अजपाजप वा प्रणवगायत्रीतील ॐकारमय असा हा नाद, गीतेच्या सहाव्या अध्यायातील केवळ निर्विवाद असे ॐकारासहितच्या योगप्रणालीचे हे स्पष्ट दिग्दर्शन, पातञ्जलयोगसूत्रातील हे *ॐकारचित्र*; *ॐकार, प्रणव व उद्गीथ* यांची ही एकवाक्यता; *जागृति-स्वप्न-सुषुप्ति-तुर्या* यांच्याहूनही पलीकडे असणारे ॐकाराचे हे स्वरूप, ॐकाराचे हे श्रेष्ठ विभूतिमत्त्व, ज्ञानेशांच्या अभंगमालेत योगपर रचनांमधून झंकारणाऱ्या या ॐकाराचा असा हा नित्य श्रवणीय अनुपम नाद - किती म्हणून सांगावीत - ही सर्व ॐकाराच्या *"नाद-चित्रांची घोषाचियें कुंडीं"* प्रकटणारी *"प्रणवांकित रूपडी"* आपणापुढे मूर्त होतात, ती निजानंदाचा आविष्कार करतच!!!

त्यांच्या रूपड्यांच्या दर्शनाने, त्यांच्या नादश्रवणाने, त्यांच्या साहचर्याने, साधकाचे अंतर्याम मोहरून येते आणि तो देहींच्या देहींच ॐकारमय होऊन जातो. यातच त्या विभु आत्म्याचा चमत्कृतिपूर्ण साक्षात्कार साठवलेला आहे. त्याचे पुनर्दर्शन पुढील **उन्मेष क्र. ३८ - विभूतिदर्शन** यातून आपण घेणारच आहोत. असो. तर आता प्रस्थान तिकडेच! इत्यलम्।

विविध योगमतांनुसार योगचक्रस्थाने

चक्रक्रम-१	चक्रक्रम-२	चक्रक्रम-३	चक्रक्रम-४
आज्ञाचक्र		**आज्ञाचक्र**	**आज्ञाचक्र**
		↓	↓
↓		त्रिकूट	त्रिवेणीचक्र (भ्रूमध्यस्थान)
		↓	↓
चंद्रचक्र	ललाटचक्र	श्रीहट्ट	चंद्रचक्र (ललाटस्थान)
↓	↓	↓	↓
ब्रह्मरंध्र	**सहस्त्रदलकमल**	↓	**ब्रह्मरंध्रचक्र (मूर्धास्थान)**
↓	↓	↓	↓
तालुचक्र	तालुचक्र	↓	ऊर्ध्वरंध्रचक्र (तालुस्थान)
↓	↓	↓	↓
भ्रमरगुहा	**भ्रमरगुहा**	↓	**भ्रमरगुंफा (अलक्ष्यचक्र)**
↓		↓	↓
ब्रह्मचक्र		↓	पुण्यागारचक्र
↓		↓	↓
कोल्हाटचक्र		**कोल्हाट**	**कोल्हाटचक्र**
		↓	
		औटपीठ	
		↓	
		भ्रमरगुंफा	
		↓	
		ब्रह्मरंध्र	

ईश्वराचे अंतरंग

::उन्मेष ३८::
::विभूतिदर्शन::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३८:

गीताः

३:३

९:१८,१९,३४

१०:१-७,१२-४२

१७:१६

ज्ञानेश्वरीः

९:२७८-३०६

१०:४१,४२,४४,४६-११०,१४९-३३५

पा.यो.सू.:

१:२४,२७-३३

उद्धृतः(?)
बेलसरे -भगवद्गीता(पृ.६००)

::उन्मेष ३८::
::विभूतिदर्शन::

प्रास्ताविक::::

सत् व असत् दोन्हीही एक भगवंतच

मागील उन्मेषात आत्मस्वरूपाचे *ॐकाराभिमुख दर्शन* आपण घेतले. त्याच सर्वश्रेष्ठ आत्म्याचे बृहत असे पुनर्दर्शन गीतेतून व ज्ञानेशोक्तीतून घेऊ या. त्यासाठी आपणांस गीतेच्या दहाव्या अध्यायाकडे वळावे लागते. त्याची पूर्वभूमिका गीतेच्या नवव्या अध्यायी श्रीकृष्ण आपण कोण आहोत हे सांगतांना प्रकट होते, ती पाहू या. ते म्हणतातः

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम्।।९-१८।।
तपाम्यहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन।।९-१९।।

या श्लोकद्वयीचा अर्थ प्रकटवतांना श्रीशंकराचार्य म्हणतातः "*गति* म्हणजे कर्मफल, *भर्ता* - सर्वांचे पोषण करणारा, *प्रभु* - सर्वांचा स्वामी, *साक्षी* - प्राण्याच्या कर्म अकर्मांचा साक्षी, निवास - ज्याच्यात प्राणी विसावा घेतात, ते स्थान; *शरणं* - शरण आलेल्या आर्तांचे दुःख दूर करणारा, *सुहृत* - प्रत्युपकाराची अपेक्षा न ठेवता उपकार करणारा, *प्रभव* - जगताच्या उत्पत्तीचे कारण, *प्रलय* - ज्यात हे जगत लय पावते, ते; *स्थान* - ज्यात या जगताची प्राणिमात्रांसह स्थिती असते, ते; *निधान* - कालांतराने प्राणिमात्रांनी ज्याचा उपभोग घ्यावयाचा आहे, अशा कर्मांचा आशय वा भांडाररूपी निधान; *बीज* - उत्पत्तिशील पदार्थांच्या उत्पत्तीचे कारण, *अव्यय* - अविनाशी; सूर्यरूपाने उष्णता देणारा, वर्षवणारा व जलास पुनश्च शोषणारा, असे चक्र चालवणारा; मीच आहे."

"देवांना अमर करणारे अमृतही मीच आहे आणि मर्त्य प्राण्यांचा मृत्यूही मीच आहे. *सत्* आणि *असत्* म्हणजे विद्यमान असणारा आणि नसणाराही मीच आहे. परंतु *अत्यंत असत्* असे माझे स्वरूप नाही. *कार्य व कारण* म्हणजेच *असत् व सत्* समजावीत."

"अशा प्रकारे मला एकत्वाने वा पृथकत्वादी प्रकाराने जाणून माझ्याप्रीत्यर्थ जो *ज्ञानयज्ञ* केला जातो, त्यायोगे मनुष्यास माझे पद प्राप्त होते."

सकळ विश्वाचे आश्रयस्थान असा ईश्वर

याबाबत ज्ञानदेवांचे भाष्य पाहाः

हें चराचर आघवें। जियें प्रकृति आंतु सांठवे।
तैं शिणैली जेथ विसांवें। तैं परमगति मी।।९-२७८।।
आणि जेयांचेनि प्रकृति जिये। जेणें अधिष्ठिली विश्व विये।
जो घेऊनि प्रकृति इयें। गुणांतैं भोगी।।२७९।।
तो विश्वश्रियेचां भर्ता। मीचि गां पांडुसुता।
मी गोसांवी समस्तां। त्रैलोक्याचां।।२८०।।

शब्दब्रह्माचा - वेदांचा पूर्वज असणारा तो आत्माराम म्हणतोः "हे अवघे चराचर विश्व प्रकृतीच्या पोटात आहे. ती प्रकृती जेव्हा श्रांत होते, तेव्हा ती माझ्याठायी विसावते. तिची परम वा अंतिम गती वा गंतव्यस्थान मीच आहे. विश्वाचा कर्माशय म्हणजे प्रकृतीच आहे. म्हणून प्राण्यांचे कर्मफल तिच्याद्वारे त्यांना देववणारा मीच आहे. म्हणून *गति* म्हणजे *कर्मफल* मीच आहे असा संबंध दूरान्वयाने जोडला जातो. प्रकृती ज्याच्या योगे वर्तते, ज्याचे अधिष्ठान पावून ही प्रकृती हे विश्व प्रसवते, या प्रकृतीच्या संगाने जो गुणांचा उपभोग करतो, असा या प्रकृतीचा - या विश्वश्रीचा - पती आणि या त्रैलोक्याचा स्वामी मीच आहे."

आकाशें सर्वत्र वसावें। वायूनें नांवभरी उगें नसावें।
पावकें दहावें। वर्षावें जलें।।९-२८१।।
पर्वतीं बैसका न संडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी।
पृथिवियां भूतें वाहावीं। हें आज्ञा माझीं।।२८२।।
म्यां बोलविल्या वेदु बोलें। म्यां चालविल्या सूर्यु चाले।
म्यां हालविल्या प्राणु हाले। तप जगांतैं चालितां।।२८३।।

"माझ्या आज्ञेने हे गगन सर्वत्र भरून राहिले आहे; वायू क्षणभरही स्वस्थ बसत नाही; अग्नी ज्वलनशील आहे; पर्जन्य वर्षतो; पर्वत अचल आहेत; समुद्र मर्यादा सांडत नाही; पृथ्वी या भूतांचा भार वाहते. हे सर्व माझ्या प्रभुत्वाने घडते. मी म्हटले म्हणून वेद बोलके झालेत. मी सूर्यास चालवितो. मी प्राणास आज्ञापिले म्हणून ते चलनवलन करतात. त्यांना ती शक्ती मीच देतो. जगात सर्व घडामोडी, हालचाली माझ्यामुळे होतात."

मियांचि नियमिलासांता। कालु ग्रासितसें भूतां।
इयां म्हणियागतें पांडुसुता। सकलें जेयांची।।९-२८४।।
ऐसा जो समर्थु। तो मी जगाचा नाथु।
आणि गगनाऐसा साक्षिभूतु। तोहि मीचि।।२८५।।
इहीं नामरुपीं आघवा। जो भरला असे पांडवा।
आणि नामरूपांही वोल्हावा। आपणचि जौ।।२८६।।
जैसें जलाचें कल्लोल। आणि कल्लोलीं आथी जल।
ऐसेनि वसवितसें सकल। तो निवासु मी।।२८७।।

"मी नियम जसे घालून दिले आहेत, त्यांस अनुसरून काळ भूतांस ग्रासतो. अर्जुना! हे सर्व माझ्या आदेशाने होत असते. कारण

ईश्वराचे अंतरंग

या जगताचा नाथ मीच आहे. गगनासारखा सर्वत्रांचा साक्षी आत्माही मीच आहे. नामरूपात्मक अशी जी ही विश्वाची रचना आहे, त्यात मीच भरलेलो आहे. त्या नामरूपात्मक सृष्टीचे अधिष्ठानही मीच आहे. जलावरील लाटांना जलाचेच अधिष्ठान असते. आणि लाटांतही जळच भरलेले असते. त्या लाटांना जळाचा जसा आश्रय असतो, त्याप्रमाणे या सकळ विश्वास आश्रयस्थान म्हणजे निवास असा मीच आहे."

परमात्म्याचे अविनाशित्व

जो होय मज अनन्यशरण। त्याचें निवारी मी जन्ममरण।
यालागीं शरणागता शरण्य। मीचि एकु।।९-२८८।।
मीचि एक अनेगपणें। वेगलालेनि प्रकृतिगुणें।
जीत जगाचेनि प्राणें। वर्तत असें।।२८९।।
जैसा समुद्र थिल्लरु न म्हणतां। भलतेथ बिंब सविता।
तैसा ब्रह्मादि सर्व भूतां। सुहृदु तो मी।।२९०।।
मीचि गां पांडवा। या त्रिभुवनासीं वोलावा।
सृष्टिक्षयप्रभवा। मूल तैं मी।।२९१।।

"अनन्यभावाने मला जे शरण येतात, त्यांचे जन्ममृत्युचक्र मी थांबवतो. म्हणून शरणागतांचे एकमेव शरणस्थान असा केवळ मीच आहे. मी एकलाच प्रकृतीच्या अनेकानेक गुणांनुसार अनेकपणे होऊन या जगास जीवन देणारा प्राण होऊन राहतो. सूर्य जसा डबके व समुद्र असा भेद न करता सर्व जळाशयांत प्रतिबिंबित होतो, तसाच मी ब्रह्मदेवापासून तहत सर्व भूतमात्रांपर्यंत लहानथोर असा भेदभाव न करता सर्वांवर उपकार करणारा आहे. अर्जुना! या त्रिभुवनातील जीवन मीच आहे. या सृष्टीचा क्षय व उत्पत्ती यांचे मूळ कारण मीच आहे."

बीज शाखांतैं प्रसवे। मग तैं रुखपण बीजीं सामावे।
तैसें संकल्पें होय आघवें। पाठीं संकल्पीं मिळे।।९-२९२।।
ऐसें जगाचें बीज जो संकल्पु। अव्यक्त वासनारुपु।
तेयां कल्पांतीं जेथ निक्षेपु। होय तैं मी।।२९३।।
इयें नामरुपें लोटती। वर्णव्यक्ती आटती।
जातीचें भेदु फिटती। जैं आकाश नाहीं।।२९४।।
तैं संकल्पु वासनासंस्कारु। माघौतें रचावया आकारु।
जेथ राहौनि असती अमरु। तैं निधान मी।।२९५।।

"बीज वृक्षास व त्याच्या शाखांस प्रसवते आणि नंतर त्या वृक्षाचे वृक्षपण पुनः बीजात समावून जाते. याचप्रमाणे आदिसंकल्पापासून म्हणजे माझ्याचपासून या विश्वाची उत्पत्ती होते आणि अंती ते विश्व त्या आदिसंकल्पात पुनः अवतीर्ण होण्याआधी समावून जाते. अशा प्रकारचा या जगाचा मूल बीज असा वासनारूप अव्यक्त संकल्प आहे. तो संकल्प कल्पांती ज्येथे राहतो, ते स्थान म्हणजे मीच आहे. ही सर्व नामरूपधारी सृष्टी जेव्हा लयास जाते, वर्ण व व्यक्तींचा जेव्हा ठावठिकाणाही उरत नाही; जाति-आयु-भोग यांचे परिमाण जेव्हा अस्तावते; आकाशाचासुद्धा जेव्हा मागमूस राहात नाही; त्यावेळी हे सूक्ष्म असे जगताचे वासनामय संस्कार पुनश्च जगाचा आकार निर्मिण्यासाठी अमरपणे ज्याच्या आश्रयास जातात, ते निधान - ते स्थान - मीच आहे."

मी सूर्याचेनि वेषें। तपें तैं हें शोषे।
पाठीं इंद्र होऊनि वरुषें। तैं पुढती भरे।।९-२९६।।
अग्नि काष्ठें खायें। तैं काष्ठचि अग्नि होये।
तैसें मरितें मारितें पाहें। स्वरुप माझें।।२९७।।
यालागीं मृत्युचां भागीं जैं जैं। तेंहीं पैं रूपु माझें।
आणि न मरतें तंव सहजें। अविनाशु मी।।२९८।।
आतां बहु बोलौनि सांगावें। तैं एकीं हेलां घे पां आघवें।
सतासतही जाणावें। मीचि पैं गां।।२९९।।

"सूर्य होऊन मीच हे सर्व आटवतो आणि इंद्र होऊन मीच जलवृष्टीतून सृष्टी निर्मितो. अग्नी काष्ठांस भक्षितो, तेव्हा ती काष्ठेच अग्निरूप होतात. याचप्रमाणे मरणारे आणि मारणारे अशी सर्व भूते माझीच रुपे आहेत. आणि तरीही अमर अविनाशी असे माझे स्वरूप आहे. फार म्हणून काय सांगावे! किती प्रकारे वर्णन करावे! अरे अर्जुना! सत् आणि असत् ही दोन्हीही मीच आहे."

"आंधलेयां गरुडाचें पांख आहाति"

म्हणौनि अर्जुना मी नसें। ऐसा कवणु ठांव असें।
परि प्राणियांचें दैव कैसें। जैं न देखती मातें।।९-३००।।
तरंग पाणियेंवीण सुकति। रश्मि वातीवीण न देखति।
तैसें मीचि तैं नव्हति। विस्मो देखें।।३०१।।
हें आंतबाहेर मियां कोंदलें। जग निखिल माझेंचि वोतलें।
कीं कैसें कर्म आलें। जैं मीचि नाहीं म्हणती।।३०२।।

"अर्जुना! असे काय आहे ज्यात मी नाही! असे कोणते स्थान आहे, जेथे मी नाही! पण दुर्दैव असे की लोकांना तरीही मी दिसत नाही. लाटांना जलच जीवन देते. त्यावांचून लाटा सुकून जातील. दिव्यातून निपजणारे प्रकाशाचे किरण दृश्यमान होण्यासाठी त्यातील वात हवीच. वातीशिवाय दिवा नाही आणि प्रकाशकिरणही नसणार! माझ्याविना तसेच हे जगतही नाही, मग प्राणी कुठून असणार! अंतर्यामी व बाहेर सर्वदूर केवळ मीच असूनही या प्राण्यांना मी दिसू नये, यासारखे दुसरे आश्चर्य ते कोणते! सगळी भूते म्हणजे मीच! मीच मला ओळखत नाही, हे विस्मयकारक नव्हे का! जगाच्या आत व बाहेर घनदाट कोंदून असणारा मी आहे. जग हे निव्वळ माझ्याच स्वरूपाने ओतलेले आहे. आणि हे प्राणी पाहा! काय त्यांचे करंटेपण की तेच मी कोठेही नाही असे म्हणू जातात!"

परि अमृतकुहां पडिजे। कां आपणयांतें कडिये काढिजे।
ऐसें आथी काय कीजै। अप्राप्तासीं।।९-३०३।।
ग्रासा येका अन्नासाठीं। अंधु धांवताहे किरीटी।
आडलला चिंतामणी पायें लोटीं। आंधलेपणें।।३०४।।

तैसें ज्ञान जैं सांडूनि जाये। तैं ऐसीं हे दशा आहे।
म्हणौनि कीजैं तैं केलें नोहें। ज्ञानेनविण।।३०५।।
आंधलेयां गरुडाचें पांख आहाति। तैं कवणा उपेगा जाती।
तैसें सत्कर्माचें उपखें ठाती। ज्ञानेंवीण।।३०६।।

"अमृताने काठोकाठ भरलेल्या कुंडात पडलेल्या अभाग्याने तत्परतेने त्यातून जीव वाचवण्यासाठी, आपण त्यात बुडून मरू नये म्हणून काठ गाठावा व अमृताचा एकही थेंब पोटात जाऊ न देण्यासाठी दक्ष असावे, तसाच या प्राण्यांचा प्रकार आहे. एखादा आंधळा अन्नान्न होऊन घासभर अन्नासाठी दशदिशांना धावत असता त्याच्या पायात चिंतामणी रत्न अडखळले, तर तिरमिरीने त्याला लाथेने उडवून लावण्यास त्याचे आंधळेपणच कारण असते. त्याचप्रमाणे या प्राण्यांस ज्ञानाने सोडून दिले आहे. अज्ञानाच्या आंधळेपणाने ते दृष्टिहीन झालेले आहेत. मला ते पाहू शकत नाहीत, त्याचे कारण म्हणजे हे अज्ञानच आहे. आंधळ्या गरुडाचे सामर्थ्यशाली पंख काय उपयोगाचे! ज्ञानदृष्टीविना कर्माची खटपट काय कामाची! कितीही सत्कर्म केले तरी ते ज्ञानाविण व्यर्थ ठरते."

विभूतिवर्णनाचा उद्देश

सत्कर्म करावे, विहित कर्म करावे, ते सर्व ईश्वरार्पण बुद्धीने करावे; भगवंताचे सतत स्मरण करत सर्व कर्म करावे व कर्मफल त्यालाच अर्पण करावे, असे गीता सांगते. पण ते सर्व ईश्वराच्या ज्ञानाशिवाय कसे घडणार! ईश्वर हा कोण व कसा आहे, याचे सम्यक ज्ञान आवश्यक आहे. त्यासाठी जसे तत्त्वज्ञान आवश्यक आहे, त्याचप्रमाणे त्या तत्त्वज्ञानास अनुभूतीची पण जोड हवी. अनुभूतीच्या दृष्टीवीण असणारे तत्त्वज्ञान कितीही सांचोकार, सामर्थ्यशाली असले तरी ते उपयोगाचे नाही.

ईश्वरप्रणिधान या पतञ्जलींच्या संकल्पनेत या दोन्ही धारणांचा समावेश होतो. ईश्वराचे स्वरूप आकळून घेणे आणि त्या स्वरूपाची अनुभूती घेणे या दोहोंचा ईश्वरप्रणिधानात अंतर्भाव होतो. अनन्यभक्तीचे रूप विशद करण्यासाठी ज्याची भक्ती करावयाची तो भगवंत कसा आहे, हे गीता सांगत असतांना साहजिकच ते सांगणे समजावून घेण्यासाठी आता आपणास *दहाव्या* गीता अध्यायाकडे वळणे क्रमप्राप्त आहे. हा गीतेचा जो *दहावा* अध्याय आहे, तो *विभूतियोग* या नांवाने ओळखला जातो. भगवंताचे दिव्यातिदिव्य रूप वाखाणतांना या अध्यायी ज्ञानेशांची रसवंती बहरास येते. त्याविषयीचा त्यांच्या स्वतःच्या मुखीचा दाखला अवलोकू याः

दहावा अध्याय::::

दशम अध्यायाचे विषयानुसंधान

येथ विभूति प्रतिविभूति। प्रस्तुत अर्जुना सांघिजैति।
तैं विदग्धा रसवृत्ती। म्हणिपैल कथा।।१०-४१।।
देशियेचेनि नागरपणें। शांतु शृंगारातैं जिणें।
तन्हीं वोंवियां होती लेणें। साहित्यासीं।।४२।।

"या दहाव्या अध्यायी श्रीकृष्ण अर्जुनास आपल्या विशेष व सामान्य विभूति सांगतात. त्या सर्वांचे रसपूर्ण उत्कृष्ट कथन आता येणार आहे. मराठी भाषेतल्या त्या सुसंस्कृत आविष्काराने, त्यातील शांतरसाच्या सुश्राव्य अभिव्यक्तीने, उत्कट अशा शृंगाररसासही लाज वाटेल अशा ज्या ओव्या मूर्त होतील, त्या मराठी साहित्याची आभूषणेच होतील. गीतेचा अभिप्राय चातुर्याने प्रकट करणाऱ्या त्या ओव्या गीतेची भूषणे होऊन राहतील."

जैसें अंगाचेनि सुंदरपणें। लेणियासीं आंगचि होय लेणें।
अलंकारिसें कवण कवणें। हें निर्वचेना।।१०-४४।।
उठावलियां भावा रूप। करितां रसवृत्तीचें लागे वडप।
चातुर्य म्हणें पडप। जोडिलें आम्हां।।४६।।
तैसें देशियेचें लावण्य। हिरौनि आणिलें तारुण्य।
मग रचिलें अगण्य। गीतातत्त्व।।४७।।

"मूळचीच गीता सुंदर आहे; वर तिला या सुंदर ओव्यांची आभूषणे सालंकृत करत आहेत, असे दृश्य पाहणाऱ्यास कोण कोणास अलंकृत करत आहे हेच कळेनासे झाले, तर त्यात काय नवल! सुंदर तनू अलंकारांसच अलंकारित करतांना वाटते की नाही! तसेच हे आहे. गीतार्थाच्या भावांना प्रकट करतांना रसाविष्काराची वृष्टीच होऊन त्यायोगे निर्मितीच्या आनंदास सुखाची पर्वणी लभते. त्यासाठी मराठीचे सौंदर्य मनसोक्त लुटून आणून वर तिचे तारुण्यही हिरावून घेऊन हे नवरसांनी मुसमुसलेले, अनाकलनीय असणारेही गीतातत्त्व, सार्थ मूर्त स्वरूपात मी साकारत आहे."

"तो कृपालुवांचा रावो। म्हणें आईकें गां महाबाहो"

तैसा चराचरपरमगुरु। चतुरचित्तचमत्कारु।
तो ऐका यादवेश्वरु। बोलता जाहला।।१०-४८।।
ज्ञानदेव निवृत्तिचा म्हणे। काईं बोलिलें श्रीहरी तेणें।
अर्जुना आघवियाचि मातू अंतःकरणें। घडौता आहासि।।४९।।

"चराचर सृष्टीचे परमगुरू श्रीकृष्ण ज्ञात्यांच्या चित्तासही स्तिमित करणारी वचने गीतेद्वारे सांगत आहेत. ती ऐका."

भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया।।१०-१।।

"हे महाबाहो! तुझ्या हितासाठी तू ज्याने अत्यंत संतोषशील, अशी माझी श्रेष्ठ वचने ऐक!"

ज्ञानदेव - निवृत्तिनाथशिष्य - म्हणतातः

आम्हीं माघिल जैं निरूपण केलें। तैं तुझें अवधानचि पाहिलें।
तंव टांचें नव्हें भलें। पुरतें आहे।।१०-५०।।
घटीं थोडेसें उदक घालिजे। तेणें न गले तन्हीं वरिता भरिजे।
तैसा परिसौनि पाहिलासि तंव परिसविजे। ऐसेंचि होतसे।।५१।।
अवचितयावरी सर्वस्व सांडिजे।
चोख तन्हीं तोचि भांडारी कीजे।
तैसा तूं आतां माझें। निजधाम कीं।।५२।।

"अर्जुना! तू अंतःकरणापासून लक्ष देऊन मी काय सांगतो आहे ते नीट ऐकत आहेस, असे मला दिसून येत आहे. आतापावेतो मी जे निरूपण केले, त्याकडे तू अवधान देतो आहेस का, हे मी अजमावून पाहिले आहे. तू अपुरे लक्ष देत नाहीस, तर पूर्ण लक्ष देऊन ही माझी वचने श्रवण करत आहेस. म्हणून मला आनंद होतो आहे. घटामध्ये थोडेसे पाणी घालून तो गळका तर नाही ना, हे जसे अजमावून पाहून मगच तो पाण्याने पूर्ण भरावा; त्याचप्रमाणे थोडेथोडे सांगून पाहावे व ऐकणारा खरेच नीट ऐकतो आहे का हे पाहून मगच पुढे सांगावे. अनोळखी मनुष्याची नीट पारख करतांना त्याच्यावर आपले सर्वस्व सोपवून पाहावे आणि जर तो खरेच प्रामाणिक आहे, असे आढळले तरच त्याला आपले खजिनदार करावे, तसेच हे आहे. आणि तू या कसोटीला उतरला आहेस. म्हणून तू आता माझे निधान झाला आहेस. तुझे अंतःकरण हेच आता माझे वसतिस्थान झाले आहे."

तैसें अर्जुना येउतें सर्वेश्वरें। पाहौनि बोलिलें आदरें।
गिरी देखोनि सुभरे। मेघु जैसा।।१०-५३।।
तैसा कृपालुवांचा रावो। म्हणे आईकें गां महाबाहो।
सांघितलाचि अभिप्रावो। सांघैन पुढती।।५४।।
प्रतिवर्षी क्षेत्र पेरिजे। पिकें तऱ्हीं वाहों नुबगिजे।
पिकासीं निवाडु देखिजे। अधिकाधिक।।५५।।
पुढत पुढती पुटें देतां। जोडें वानियेची अधिकता।
तैं सोनें पांडुसुता। शोधूंचि आवडे।।५६।।
तैसें एथ पार्था। तुज आभार नाहीं सर्वथा।
आम्हीं आपुलियाचि स्वार्था। बोलौनि आम्हीं।।५७।।

अर्जुनाची ही श्रेष्ठ योग्यता पाहून गिरिवरांस पाहून मेघांस जसे भरते येते, तसे त्या सर्वेश्वराचे हृदय भरून आले. आणि तो कृपाळूंचा राजा सर्वेश्वर श्रीकृष्ण बोलू लागला, "हे महाबाहो! ऐक! आतापावेतो तुला मी जे निरूपिले, तेच पुनः सांगतो. दर वर्षी धान्य पेरावे व ते पिकले की त्याची मशागत करावी. पुनः तेच पेरावे व अधिकाधिक धान्य उत्पन्न करावे; अथवा सोन्याला वारंवार क्षाराची पुटे देत जावीत व ते अधिकाधिक कसाचे करत जावे, तसेच हे बोलणे आहे. ते जितके अधिक वेळा तू ऐकशील, तेवढे तुझे अंतःकरण अधिकाधिक शुद्ध होऊन ज्ञान उजळत जाईल."

"अक्षरें लेऊनि परब्रह्म। तुज खेंवांसि आलें"

अगा बालका लेवविजे लेणें। तयाप्रमाणें तैं काय जाणें।
तो सोहोला भोगणें। जननीयेसीं दृष्टी।।१०-५८।
तैसें तुझें हित आघवें। जंव जंव कां तुज फावे।
तंव तंव आमुचें सुख दुणावें। ऐसें असे।।५९।।
आतां असो हे विकडी। मज उघड तुझी आवडी।
म्हणौनि तृप्तीची सवडी। बोलतां न पडे।।६०।।
आम्हां येतुलियांचि कारणें। तैंचि तैं तुजशीं बोलणें।
परि असो हें अंतःकरणें। अवधान दे।।६१।।
ऐकें ऐकें सुवर्मा। वाक्य माझें परम।...।।६२।।

"असे पहा की लहान मुलास वस्त्राभूषणांनी नटवतात, सजवतात. त्या बालकास त्याची काही गोडी असते का! त्याला असे नटवून मातेसच दृष्टिसुखाचा सोहोळा असतो. माझेही तसेच आहे. हे बोलणे तुला जसे जसे आकळू लागते, तुझे त्यायोगे जसजसे निश्चित कल्याण होऊ लागते, तसतसा माझाच आनंद दुणावत जातो. पण खरेच सांगू का! मला तू अत्यंत प्रिय आहेस. म्हणून तुझ्याशी कितीही बोललो तरी माझे मन तृप्त होत नाही. केवळ याचसाठी मी तुझ्याबरोबर हा संवाद करत आहे. कारण या संवादाचे सुख काही वेगळेच - अगदी अपूर्व असे आहे. हे असो. आता नीट अवधान देऊन माझे परम वचन ऐक."

....।जैं अक्षरें लेऊनि परब्रह्म। तुज खेंवांसि आलें।।६२।।
तऱ्हीं किरीटी तूं मातें। नेणसीं ना निरुतें।
तऱ्हीं गां जो मी एथें। तैं विश्वचि हें।।६३।।

"हे सूज्ञा! माझी ही वाक्ये म्हणजे साक्षात परब्रह्मच अक्षररूपी वस्त्राप्रावरणांनी सजून तुला जसे आलिंगन देत आहे. ***ईश्वर*** म्हणजे जो मी तो कसा आहे, हे नीट जाणून घे. हे समस्त विश्व म्हणजेच मी - ईश्वर आहे."

"मी आदि। म्हणौनि जाणतां अवघड"

असे म्हणून आपले स्वरूप कसे आहे - ईश्वर कोण व कसा आहे - या विषयाचे सूत्र वाढवत तो परमात्मा म्हणतोः

न मे विदुः सुरगणाः न प्रभवं न महर्षयः।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः।।१०-२।।

"सुरगण तसेच महर्षी यांसही माझी उत्पत्ती कशी झाली, हे माहीत नाही. कारण हे देव व महर्षी व हे सर्व जगत यांच्याही अक्षरशः पूर्वीपासून मी आहे."

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम्।
असम्मूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते।।१०-३।।

"इतउपरसुद्धा जो मनुष्य माझे अज व अनादी असे स्वरूप आहे, असे जाणतो आणि या समस्त लोकांचा महेश्वर मीच आहे, हे सत्य ओळखतो, तो मनुष्यांमध्ये सुज्ञ व ज्ञानवान आहे. माझ्या या अशा अचिंत्य स्वरूपाची साक्षात अनुभूती पावून तो पुरुष सर्व पापांपासून मुक्त होऊन मला येऊन मिळतो."

वारंवार आपल्या *अज, अनादी, निखळ, पापरहित* अशा स्वरूपाकडे अर्जुनाचे चित्त वेधून घेऊ पाहणाऱ्या श्रीकृष्णांचे हे शब्द आपल्यापुढे साकार करत ज्ञानदेवांची वाणी जो ओघ घेते, तो पाहाः

एथ वेद मुके जाहाले। मन पवन पांगुळलें।
रातीविण मावळलें। रविशशी।।१०-६४।।

उदरींचा गर्भु जैसा। नेणें मातेची वयसा।
देवांसि मी तैसा। चोजवेना।।६५।।

"माझे स्वरूप पाहून वेद मुके झाले; मन व प्राण यांना पांगुळपण आले. बुद्धीला थारा लागला नाही. सूर्यचंद्रतारकांसह त्या स्वरूपास प्रकाश देऊ पाहणारे नभांगण आपल्या कोटिकोटी ग्रहताऱ्यांसह लोपून गेले – जसा रात्री सूर्य दिसू नये, तसा रात्र नसतांनाच माझ्या प्रभावी प्रकाशापुढे त्यांचा प्रकाश काजव्याएवढाही दिसत नाही. गर्भस्थ शिशु जसे मातेचा जन्म केव्हाचा हे जाणण्यास निव्वळ असमर्थ व असाहाय्य असते, तसेच देवांचेही ज्ञान माझा आदि केव्हाचा व कसा हे जाणण्यास तोटके पडते."

आणि जलचरां उदधिचें मान। मशकां नोलांडावें गगन।
तैसें महर्षींचें ज्ञान। नेणें मातें।।१०-६६।।
मी कवण केतुला। कवणाचां कैं जाहला।
निरुती याकरितां बोलां। युगें गेलीं।।६७।।

"जळचरांनी समुद्र केवढा व कसा आहे, हे जाणणे जसे असंभव आहे, किंवा चिलटाने कितीही अन कसेही उडण्याची पराकाष्ठा जरी केली, तरी गगनाचा ठाव त्याला लागणे जसे शक्य नाही; त्याचप्रमाणे महर्षींनी आपल्या प्रज्ञेच्या कशाही झेपा घेतल्या तरीही त्यांच्या ज्ञानाच्या आवाक्यात माझे स्वरूप गवसत नाही. मी कोण आहे, केवढा आहे, कसा आहे, कोणापासून कसा उत्पन्न झालो, केव्हापासून आहे, या सर्व गोष्टींची निश्चिती करताकरता ही युगानुयुगे आली आणि बघता बघता निघून गेली."

महर्षी अन या देवां। एरां भूतजातां सर्वां।
मी आदि म्हणौनि पांडवा। जाणतां अवघड।।१०-६८।।
उतरलें उदक पर्वतें वलघें। कां वाढतें झाड मुळीं लागें।
तऱ्हीं मियां जालेनि जगें। जाणिजे मी।।६९।।
कां गाभेवनें वटु गिंवसवें। तरंगीं सागरु सांठवें।
कां परमाणुमाजीं सामावें। भुगोलु हा।।७०।।
तऱ्हीं मियां जालियां जीवां। महर्षी अथवा देवा।
मातें जाणावया होआवा। अवकाशु गां।।७१।।

"हे थोर ऋषी अन देव, तसेच समस्त भूतमात्रे या सर्वांचे मूळ कारण मीच असल्याने, हे अर्जुना! त्यांना माझा थांग सापडत नाही. जर पर्वतावरून ओसंडणारा जलप्रपात त्याच्या निमथ्याकडे वळेल वा वाढणारे झाड शेंड्याऐवजी मुळाकडे वाढू लागेल, तरच माझ्यापासून उत्पन्न झालेल्या या जगाकडून मी जाणला जाऊ शकेन! न रुजलेल्या बीजातील सूक्ष्म अशा अंकुराने जर त्यापासून संभवणारा वृक्ष झाकून जाईल; किंवा तरंगात समुद्राचे सर्व पाणी साठवणे जर शक्य असेल; अथवा एका लहानुल्या पृथ्वीकणात जर ही वसुंधरा समावणे संभवेल; तरच या मजपासून उद्भवलेल्या देव, महर्षी वा इतर जीवांना माझ्या स्वरूपाचा थांगपत्ता लागेल."

"स्वप्रकाशें चोखें। अजत्व माझें देखें"

असे असले तरीही काही थोड्या पुण्यवंतांना ते स्वरूप निश्चितच गवसते, ते कसे ते पाहाः

ऐसाही जऱ्हीं विपायें। सांडूनि पुढील पाये।
सर्वेंद्रियांसि होये। पाठिमोरा जो।।७२।।
प्रवर्तलाही वेगें बहुडें। देहु सांडौनि मागिलाकडें।
महाभूतांचियां चढे। माथयावरी।।७३।।
तैसा राहौनि ठायठीकें। स्वप्रकाशें चोखें।
अजत्व माझें देखें। आपुलिये डोलां।।७४।।

"मला जाणणे अतिशय दुरापास्त असले, तरी पण क्वचित विरळा असा एखादा साधक विवेकबुद्धीने सारासार तत्त्वविचार करून या बाह्य जगताच्या प्रलोभनांकडे पाठ फिरवतो आणि सर्व विषयोपभोगांना पाठीमोरा होऊन, सर्वेंद्रियांमधील चित्तवृत्ती काढून घेऊन, देहबुद्धीला वेगाने मागे टाकून, पंचमहाभूतांच्याही माथ्यावर चढून जातो. योगयुक्ती साधून पंचमहाभूतांचा लय केल्याने ही स्थिती प्राप्त होते. अशा निराधार – निरालंब अवस्थेत तो स्थिर झाला की मग त्याला स्वतःच्या फाकणाऱ्या प्रकाशात माझा प्रकाश अभिन्नत्वाने एकरूप झालेला दिसतो. त्या प्रकाशात त्याला माझे निखळ आत्मरूप दिसते. आणि माझे अजत्व त्याच्या दिव्य चक्षूंना स्पष्ट दिसून येते."

मी आदिसीं परु। सकललोकमहेश्वरु।
ऐसियां मातें जो नरु। या परी जाणें।।१०-७५।।
तो पाषाणांमाजीं परिसु। रसांमाजीं सिद्धरसु।
तैसा मनुष्याकृति अंशु। तो माझाचि जाण।।७६।।
तो चालतें ज्ञानाचें बिंब। तेयाचें अवयव तैं सुखाचें कोंभ।
परि माणुसपणाची भांभ। लोकांचि भागु।।७७।।

"हा जो मी आहे, तो आदिअंतापलीकडील असा अनादी-अनंत असणारा सर्व लोकांचा महान ईश्वर आहे, देवाधिदेव तो हा मीच आहे, असे त्या महाभागास स्पष्ट कळून येते. तो साधकाचा सिद्ध होतो. असा पुरुष म्हणजे पाषाणातला परीस, सर्व रसायनांतील सिद्धरसायन अथवा अमृतच असा मनुष्याकृतीने वावरणारा माझा अंशच होय. तो म्हणजे साकारलेला ज्ञानरवीच होय. त्याचे अवयव म्हणजे महासुखास फुटलेले अंकुरच होत. त्याचे मनुष्यत्व हा म्हणजे लोकांना होणारा भ्रमच मानला पाहिजे."

अगां अवचितां कापरा-। माजीं सांपडला हिरा।
वरि पडिलियां नीरा। न निगे केवीं।।१०-७८।।
तैसा मनुष्यलोकां आंतु। तो जऱ्हीं जाहला प्राकृतु।
तऱ्हीं प्रकृतिदोषांची मातु। नेणिजे तेथ।।७९।।

"कापुराच्या थळिवात हिरा अडकवला आणि ते सर्व पाण्यात दडवून ठेवले, तरी हिऱ्याचे अंगभूत तेज लोपते का कधी! तसाच तो पुरुष जरी या मनुष्यलोकात अडकलेला दिसला आणि संसारसुखे

- विषय यांच्यांत निमग्न वाटला, तरी त्याच्याठायी प्रकृतीच्या अंगभूत जरा-जन्म -मरण -कर्मे - कर्मफल इ.नी चक्रायमान अशा संसाराचे काहीही चालत नाही."

तो आपसयेंचि सांडिजे पापीं। जैसा जलतु चंदनु सर्पीं।
तैसा मातें जाणें तो संकल्पीं। वर्जूनि घालिजे।।१०-८०।।
तैंचि मातें कैसें जाणिजें। ऐसें कल्पि जऱ्हीं चित्त तुझें।
तऱ्हीं मी ऐसा हें माझें। भाव आईकें।।८१।।
जैं वेगळालां भूतीं। सारिखें होऊनि प्रकृति।
विखुरलें आहेत त्रिजगतीं। आघवियें।।८२।।

"जळणाऱ्या चंदनास सर्प जसे आपण होऊन वर्जितात, तशी त्या मला जाणणाऱ्या पुरुषास पापे आपसुकच सांडून जातात आणि संकल्पसुद्धा त्यास आपण होऊन त्यागतो. अशा त्या पुण्यश्लोक पुरुषाचे हे वर्णन ऐकून तुझ्या मनी मला कसे जाणता येते ही जिज्ञासा निर्माण झाली असेलच! तर ऐक, मी कसा आहे ते. आणि हे माझ्यापासून भिन्न वाटणारे वस्तुजात भिन्नभिन्न भूतांमध्ये त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार होऊन या त्रिलोकात कसे विखुरले आहे, तेही ऐक."

सृष्ट्योत्पत्ती::::

आत्मतत्त्वाची सृष्टी

सर्वच भाव व समस्त भूतमात्रे त्या एका आत्मतत्त्वापासूनच होतात, असा स्पष्ट सिद्धांत प्रकट करतांना श्रीकृष्ण म्हणतातः

बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः क्षमा सत्यं दमः शमः।
सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च।।१०-४।।
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः।
भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः।।१०-५।।
महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा।
मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः।।१०-६।।

उपरोक्त श्लोकांचा अर्थ श्रीमद्भगवत्पूज्यपाद शंकराचार्य यांच्या गीताभाष्याच्या साहाय्याने पाहू याः

"सूक्ष्माहूनही सूक्ष्मतर अशा गोष्टींना समजून घेण्याचे सामर्थ्य जिच्यात असते, ती *बुद्धी* ; आत्मा, अनात्मा इ.पदार्थांचा बोध म्हणजे *ज्ञान*; ज्ञातव्य कळून आले की त्याच्याठायी विवेकपूर्वक प्रवृत्ती असणे म्हणजे *असंमोह*; क्रोध आणणारी कृत्ये, निंदा, ताडन इ.होत असतांनासुद्धा चित्त अविकारी राखणे म्हणजे *क्षमा;* जे आपणास दिसले, ते तसें व जे जसे ऐकले, ते तसेच्या तसेच, आपल्या वैयक्तिक अनुभवाशी प्रतारणा न करता, दुसऱ्याच्या बुद्धीस आकळावे म्हणून उच्चारली जाणारी वाणी म्हणजे *सत्यवचन;* बाह्येंद्रियांना वश ठेवणे म्हणजे *शम;* आह्लाद निर्माण करते, ते *सुख;* संताप निर्माण करणारे - संत्रस्त करणारे, ते *दुःख;* उत्पत्ति वा जगत म्हणजे *भव;* त्याचा लय वा विनाश म्हणजे *अभाव;* मनोबुद्धीस होणारा - अंतःकरणास ग्रासून टाकणारा त्रास म्हणजे *भय;* अथवा संसारचक्रपरिवर्तनात बद्ध होणे म्हणजे *भय* व तद्विपरीत अशी शांती वा मुक्तता म्हणजे *अभय;*"

आणि "कोणत्याही प्राण्याला पीडा होणार नाही असे वर्तन म्हणजे *अहिंसा;* सम चित्त राखणे, प्राणिमात्रात एकच आत्मा आहे, अशी भावना असणे, इष्टानिष्ट - सुखदुःख-प्रिय-अप्रिय, निंदास्तुती इ. द्वंद्वांतही चित्ताचा समतोल ढळू न देणे - समत्वबुद्धी म्हणजे *समता;* यदृच्छेने जे काही लाभले आहे, त्याविषयी अंतःकरण संतोषी असणे म्हणजे *तुष्टी;* इंद्रियनिग्रह करून शरीर, वाचा व मन यांचा संयम करणे म्हणजे *तप;* यथाशक्ती आपल्याजवळील वस्तू व वित्त, धनसंपदा, विद्या इ.चा इतरांनाही लाभ व्हावा या बुद्धीने त्यांचा विनियोग करणे म्हणजे *दान;* धर्मपरक आचरणाने व बुद्धीने प्राप्त होणारी कीर्ती म्हणजे *यश;* अधर्माने वागल्याने होणारी अपकीर्ती म्हणजे *अयश;* असे हे जे सर्व बुद्ध्यादी भाव प्राणिमात्रात प्रकट होतात, ते ते सर्व त्यांच्या त्यांच्या कर्मानुरूप मज ईश्वरापासून उत्पन्न होतात."

"भृगु, मरिचि, अत्रि, पुलस्त्य, पुलह, क्रतु आणि वसिष्ठ हे सात *महर्षी,* तसेच सावर्णि, धर्मसावर्णि, दक्षसावर्णि आणि सावर्ण हे अतीत कालापासून विख्यात असलेले चार *मनु,* अशा ज्या सर्व मनु व महर्षींनी ही स्थावरजङ्गमात्मक प्रजा ईश्वरीय सामर्थ्याने व माझ्याठायी अनन्यभावाने युक्त झाल्याने केवळ मनोबलाने निर्मिली आहे, ते सर्व माझ्यापासूनच उत्पन्न झालेले आहेत."

याबाबत ज्ञानेश म्हणतातः

तैं प्रथम जाण बुद्धि। मग ज्ञान जैं निरवधि।
असंमोह सहनसिद्धि। क्षमा सत्य।।१०-८३।।
मग शम दम दोन्हीं। सुखदुःख वर्तत जनीं।
अर्जुना भावाभाव मानीं। भावाचिमाजीं।।८४।।
आतां भय अन निर्भयता। अहिंसा अन समता।
हें मम रूपचि पांडुसुता। वोलख तूं।।८५।।
दान यश अपकीर्त्ती। हें जैं भाव वसत सर्वत्रीं।
तैं मजचिपासौनि होती। भुतांचां ठायीं।।८६।।
जैसीं भूतें आहाति सिनानीं। तैसेंचि हें वेगलाले मानीं।
एक उपजती माझां ज्ञानीं। एक नेणती मातें।।८७।।

"हे त्रैलोक्य निर्मिणारे व त्यात वसणारे जे विविध भाव माझ्यापासून होतात, त्यात पहिली *बुद्धी* आहे, तसेच *अगाध ज्ञान, असंमोह,* सहन करण्याची शक्ती म्हणजे *क्षमा, सत्य, शम व दम* ही दोन्ही आणि लोकांतरी वर्तणारी *सुखे व दुःखे* व याचप्रमाणे होणे व नसणे अथवा *उत्पत्ती व लय* हे सर्व माझेच भाव आहेत. *भय आणि निर्भयता, अहिंसा आणि समता* ही सर्व, हे पांडुपुत्रा अर्जुना! माझीच रूपे आहेत. *दान, यश व अपकीर्ती* हे सर्वठायी दृग्गोचर होणारे भाव आहेत, तेसुद्धा भूतांठायी माझ्याचमुळे प्रकटतात. भूतमात्रे जशी भिन्नातिभिन्न आहेत, तसेच या भावांचेसुद्धा विविधत्व आहे. या सर्व

भावांपैकी काही भाव माझ्या ज्ञानातून उत्पन्न होतात, तर कित्येक भाव मजविषयीच्या अज्ञानामुळे अस्तित्वात येतात.''

अगां प्रकाशु अन कवडसें। सूर्याचिस्तंव जैसें।
प्रकाशु उदयीं दिसे। तम अस्तूसि।।१०-८८।।
आणि माझें जैं जाणणें नेणणें। तैं तंव भुतांचिया दैवांचें करणें।
म्हणौनि भूतीं भावांचें विषम होणें। विषम पडें।।८९।।
यापरी माझियां भावीं। हें जीवसृष्टी आहे आघवीं।
गुंतली असे जाणावी। पांडुकुमरा।।९०।।

"प्रकाश आणि कवडसा जसे सूर्यामुळेच होतात, किंवा सूर्योदयानंतर प्रकाश दिसतो, तर सूर्यास्तावेळी तमाचे साम्राज्य होते; त्याचप्रमाणे मजविषयीच्या ज्ञान व अज्ञानाचे असणे व नसणे केवळ माझ्यामुळेच होते. त्या त्या भूतांच्या दैवानुसार व कर्माप्रमाणे त्यांच्या त्यांच्याठायी या विविध भावांची कमीअधिक प्रमाणात अभिव्यक्ती होते. हे पांडुकुमारा! या प्रकारे ही सर्व जीवसृष्टी माझ्या या विविध पृथक पृथक भावांमध्ये गुंतलेली आहे.''

अकरा लोकपालक भाव

आतां इयें सृष्टीचें पालक। तेयां अधीन वर्तती लोक।
तैं अकरा भाव आणिक। सांघैन तुज।।१०-९१।।

"आणि या सृष्टीचे पालन करणारे जे *अकरा भाव* आणिक आहेत, ज्यांच्या अधीन राहून हे समस्त लोक वर्ततात, ते पण सांगतो. ऐक.''

तऱ्हीं आघवांचि गुणीं वृद्ध। जैं महर्षीमाजीं प्रबुद्ध।
कश्यपादि प्रसिद्ध। सप्त ऋषी।।१०-९२।।
आणिकही सांघिजतील। जैं चौदा आंतील।
स्वायंभू मुख्य मुदल। चाऱ्हीं मनु।।९३।।
ऐसें हें अकरा। माझां मनीं जाहालें धनुर्धरा।
सृष्टीचियां व्यापारा-। लागौनियां।।९४।।

"कश्यप ऋषींपासून झालेले भृग्वादी श्रेष्ठ गुणमंडित आणि महर्षींमध्ये अत्यंत ज्ञानी म्हणून ख्यात असलेले सप्त ऋषी आणि चौदा मनुंतील स्वायंभुवादी मुख्य चार मनु असे हे एकूण *अकरा भाव* या सृष्टीचा व्यापार प्रवर्तवण्यासाठी माझ्या मनातून उत्पन्न झाले.''

जैं लोकांची ये वेवस्था न पडे। जैं या त्रिभुवनाचें कंहीं न मांडें।
तैं महाभूतांचें दलवाडें। अचुंबित असे।।१०-९५।।
तैंचि जैं जाहालें। इहीं लोकपाल केलें।
अध्यक्ष रचूनि ठेविले। इहीं जन।।९६।।
म्हणौनि अकरा हे राजा। मग एर लोक यांचियां प्रजा।
ऐसा हा विस्तारु माझा। वोलख तूं।।९७।।

"ज्या काळी हे त्रैलोक्य मांडले गेले नव्हते, पंचमहाभूतांचा संघात अस्तित्वातही आला नव्हता आणि या सृष्टीची कोणतीही नांवनिशाणीसुद्धा नव्हती, तेव्हा हे अकरा भाव उत्पन्न झाले व त्यांनी लोकपाल निर्मिले. तसेच त्यांच्यासाठी विविध कामे नेमून दिलीत. हेच या सृष्टीचे अध्यक्ष म्हणजे कारभार चालवणारे, व्यवस्था ठेवणारे अकरा भाव होत. त्यांनीच या विविध भूतजातींच्या प्रजांचे सर्जन केले. सृष्टी निर्माण केली. असे हे या सृष्टीचे अकरा राजे आहेत व सर्व भूतमात्रे ही त्यांची प्रजा आहे. हा असा सगळा जगत व्यापार म्हणजे माझाच विस्तार आहे, हे तुझ्या नीट लक्षात आले ना!''

मनाची उत्पत्ती

पाहें पां बीज आरंभीं एकलें। मग तैंचि विरूढलियां बुड जाहालें।
बुडीं कोंभ निगालें। खांदियांचें।।१०-९८।।
खांदियांपासौनि अनेगा। पसरलियां शाखोपशाखा।
शाखांस्तव देखा। पल्लवपानें।।९९।।
पल्लवीं फूल फल। एवं वृक्षत्व जाहलें सकल।
तैं निर्धारितां केवल। बीजचि तैं।।१००।।

"असे पहा! प्रथम एकुलते एक बीज असते. ते रुजून अंकुरते व बुंधा होतो. त्यापासून कोंब फुटून फांद्या उत्पन्न होतात. त्याच पसरत जातात. अनेक छोट्यामोठ्या शाखोपशाखा प्रकटतात. त्यांना पल्लवपर्णादींचा भार लगडतो. पल्लव अंकुरून त्यांनाच फुले व फळे येतात. असे होऊन एक मोठा वृक्ष आकारास येतो. तो वृक्ष वस्तुतः दुसरे काही नसून विस्तारित झालेले ते बीजच नव्हे काय!''

ऐसें मी एकचि पहिलें। मग मी तैं मानसैं व्यालें।
तेथ सप्तऋषि जाहालें। आणि चाऱ्हीं मनु।।१०-१०१।।
इहीं लोकपाल केलें। लोकपालीं विविध लोक स्त्रजिलें।
लोकांपासूनि निफजले। प्रजाजात।।१०२।।

"याचप्रमाणे पूर्वी प्रथमारंभी मीच एकटा होतो. नंतर मी त्या मनास उत्पन्न केले, ज्यापासून हे सप्तऋषी व चार मनु उत्पन्न झाले. त्यांनी *इंद्र, वरुण, यम, अग्नी, वायू, निऋति, ईशान व कुबेर* असे हे अष्ट दिक्पाल वा लोकपाल निर्मिले. या सर्वांनी मिळून अनेक लोक रचले आणि त्यात वसती करणाऱ्या या प्रजाजातांस सर्जिले.''

अभेदभक्ती::::

सर्वज्ञता सिद्धी

भगवद्तत्त्व वा आत्मतत्त्वाच्याच या समस्त विभूती आहेत आणि हे जाणणारा महायोगी होतो, असे गीतावचन आहे. ते असेः

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः।
सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः।।१०-७।।

"असा हा माझा भावांशी असणारा संबंध म्हणजे *विभूति* व माझा विस्तार म्हणजे आत्मतत्त्वाचाच एक भाग आहे. हे जाणणे योगाच्या ऐश्वर्य व सामर्थ्याचा आविष्कार आहे. योगाने उत्पन्न होणाऱ्या सर्वज्ञतासिद्धीमुळे हे सर्व निःसंशय जाणले जाते. या अशा विभूतींनी विस्तारलेल्या आत्मतत्त्वाचे यथावत ज्ञान झालेला योगी सतत सम्यग्दर्शनात स्थित होऊन आत्मक्रीडेत निमग्न होतो, याबाबत कोणतीही शंका नाही.''

सर्वज्ञतासिद्धी - योगप्रतीती

योग व सहाव्या अध्यायाबाबत, एवं च काय! संपूर्ण गीतेतील योगमार्गाच्या रहस्याबद्दल या श्लोकाचे ज्ञानदेवोक्त स्पष्टीकरण अत्यंत मार्मिकतेचे आहे. सूज्ञांनी ज्याचा सखोल विचार करावा, ते विवेचन असे आहे:

ऐसेनि हें विश्व एथें। मीचि प्रसवला ना निरुतें।
परि भावाचेनि हातें। मानसाचेयां।।१०-१०३।।
ययालागीं सुभद्रापती। हें भाव इयां माझियां विभूति।
आणि ययांचियां व्याप्ती। व्यापिलें विश्व।।१०४।।
म्हणोनि गां ययापरी। ब्रह्मादिपिपीलिकावरी।
मीवांचौनि दुसरी। गोठी नाहीं।।१०५।।
ऐसें जाणें जो सांचे। तेयां चेईरें जाहलें ज्ञानाचें।
म्हणोनि उत्तम मध्यम भेदाचें। दुःस्वप्न तेयां।।१०६।।
मी माझियां विभूति। आणि विभूतीं व्यष्टिलियां व्यक्ती।
हें आघवें योगप्रतीती। एकचि मानी।।१०७।।

"अशा या वेगवेगळ्या भावांनी दृश्यमान होणारे हे अखिल विश्व आहे. ते समस्त म्हणजे माझ्यापासूनच उत्पन्न झालेली निर्मिती आहे यात कोणताही संदेह नाही. माझ्यापासून मानस व मानसापासून भाव व त्यांपासून हे विश्व व त्यातील विभूतिविस्तार असा हा निर्मिती आलेख आहे. हे सुभद्रापती! हे भाव म्हणजे माझ्याच विभूती होत. यांच्यायोगे मी हे विश्व व्यापले आहे. म्हणून ब्रह्मदेवापासून तो तहत कीड्यामुंगीपावेतो या विश्वात माझ्यावाचून दुसरे काहीच नाही. ज्याला असे अनुभूतिपूर्ण ज्ञान असते, तोच खऱ्या जागृतावस्थेत असतो. म्हणून वस्तुभिन्नतेचे - भेदभावाचे - संसाररूपी दुःस्वप्न त्याला पडत नाही. मी आणि माझ्या विभूती, तसेच त्या विभूतींनी व्यापलेले हे व्यक्त विश्व या सर्व एकच आहेत; त्यांच्याठायी एकुलते एक आत्मतत्त्वच स्फुरित होते; याची योगज प्रतीती त्याला असते."

अभेदभक्तियोग

म्हणौनि निःशंकें एणें महायोगें। मज मीनला मनाचेनि आंगें।
एथ संशय करणें न लगे। तो त्रिशुद्धी जाहला।।१०-१०८।।
कां जैं ऐसें किरीटी। मातें भजे जो अभेद दिठी।
तेयांचियें भजनाचियें नाटीं। सूती मज।।१०९।।

"संशयरहित अंतःकरणाने ही प्रतीती त्याने **महायोग** साध्य करून घेतलेली असल्याने तो मजशी मनापासून एकरूप झालेला असतो, हे त्रिवार सत्य आहे, असे तू निःसंशय समज. हे अर्जुना! ही अशी प्रतीतीने जी अभेद दृष्टी उत्पन्न होते, तीच माझ्या भक्तीचे रहस्य आहे. अशा त्या महायोगाच्या - त्या अभेदभक्तियोगाच्याठायी मी सर्वांशाने गुंतलेला असतो."

म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगु। तेथ शंका नाहीं नये खंगु।
करितां ठेला तऱ्हीं चांगु। तैं सांघितलें षष्ठीं।।१०-११०।।

"हा असा जो अभेद भक्तियोग आहे, तो काही कारणाने जरी या जन्मी अपुरा साध्य झाला, तरी त्याचा ऱ्हास होत नाही; उलट पुढील जन्मी पुढची प्रगती साध्य होते, यात संशय नाही, हे तुला मी *सहाव्या* अध्यायी स्पष्टच सांगितले आहे."

महायोग::::

गीतेतील योगाची अधिष्ठात्री देवता

"सर्वं खल्विदं ब्रह्म" - "अयमात्मा ब्रह्म" - "तत् त्वम् असि" - "अहं ब्रह्मास्मि" - "ॐ ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्" इ. श्रुतिवचनांनी ज्या अनुभूतीचा बोध होतो, ती अनुभूती - तो साक्षात्कार, ते मानवी जन्माचे साफल्यप्रदायक असा हा *अद्वैत भक्तियोग* आहे. या भक्तियोगाची अमृतधारा ज्या योगाचलाच्या निमथ्यावरून प्रकटते, तो योग एकमेव आहे. हा योगच *पंथराज* म्हणून ज्ञानेशांनी *सहाव्या* अध्यायी सांगोपांग वर्णन करत स्पष्ट केला आहे.

आपण नुकत्याच पाहिलेल्या *ओवी क्र. १०-१०८* मध्ये ज्या **महायोग**ाचा संदर्भ ज्ञानेश देतात, तो म्हणजे दुसरेतिसरे काहीच नसून हा **पंथराज**च आहे - ज्याला त्यांनी **क्रमयोग** या दुसऱ्या नांवाने *अठराव्या* अध्यायी पुनः प्रकट केले आहे. ***महायोग*** हा कुंडलिनीयोगच असतो, असे सर्व योगिजनांचे एकमत आहे, हे जिज्ञासूंनी ध्यानात घेणे आवश्यक आहे.

गीतेत वेगवेगळ्या प्रकारचे *ज्ञानयोग, भक्तियोग, योगयोग, निष्कर्मयोग, कर्मसंन्यासयोग, कर्मफलसंन्यासयोग, सर्वसंगपरित्यागयोग* इ.अनेकानेक योगप्रकार वर्णिले आहेत, असा जो एक मतप्रवाह आहे, तो कसा निराधार आहे, हे अशा प्रसंगी ज्ञानदेवोक्तीद्वारे स्पष्ट कळून येते. ***खरे तर ज्ञान, भक्ती, निष्काम कर्म, कर्मफलसंन्यास, कर्मसंन्यास, सर्वसंगपरित्याग इ.सर्व ही या पंथराजाची वा क्रमयोगाची वा महायोगाची उपांगे आहेत.*** गीतेत जो सामान्यांसाठी एकमेव योग **कर्मयोग** म्हणून सांगितला आहे - **ज्ञानयोग** व **कर्मयोग** यांपैकी - ***"ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"*** - त्याची ही अंगे साधनभूत होत. तसेच त्या योगाची फलश्रुती झाल्याचेही या अंगांच्याच परिपक्वतेवरून जाणकारांस सूचित होते.

आतापावेतो आपण जो अभ्यास केला, त्याचा परिपाक याप्रमाणे आपणास दृग्गोचर होतो. यापुढेही आपण जे गीता-ज्ञानेश्वरीचे परिशीलन करणार आहोत, त्यायोगे या आपल्या निरीक्षणास बळकटीच येणार आहे. ***"वासुदेवः सर्वमिति"*** ही अनुभूती हीच गीतेची व तिने निर्देशित केलेल्या या एकमात्र महायोगाची - या पंथराजाची - *अधिष्ठात्री देवता* आहे, हे आपणापुढे स्पष्ट होत आहे, हे जिज्ञासूंस सांगणे न लगे!

"तूं ब्रह्मकटाहधात्री। जीवकलेची अधिष्ठात्री"

अशा या देवतेस संतुष्ट कसे करता येते – भक्ती कशी करावी – याचा एक भाग म्हणून गीतेतील विभूतिविस्तार सांगितला आहे. तो नीट समजावून घ्यावा, ईश्वराचे रूप-गुण-नाम इ.चे वैविध्य जाणून घ्यावे, त्याचे मूर्तामूर्त स्वरूपात ध्यान करता यावे, यासाठी अर्जुन श्रीकृष्णांची प्रार्थना करतो. तो म्हणतोः

परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान्।
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम्।।१०-१२।।

"हे भगवन! तू तर परम असे ब्रह्मच आहेस. परम पवित्र असा तू आहेस. सर्व जीवांचे परमधाम तूच आहेस. तू अज आहेस. सर्वव्यापी असे तुझे स्वरूप आहे. देवांचाही देव – सर्वांचे आदिस्थान तूच आहेस. तू दिव्य असा अक्षय पुरुषोत्तम आहेस."

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा।
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे।।१०-१३।।

"सर्व ऋषी, देवर्षी नारद, तसेच असित, देवल एवं च काय! व्याससुद्धा असेच म्हणतात. हे भगवंता! तू पण मला आपले असेच स्वरूप आहे, म्हणून सांगितले आहेस."

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव।
न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः।।१०-१४।।

"हे केशवा! तू जे हे सांगितले आहेस, ते सर्व मला सत्यच वाटते. तुझे खरे स्वरूप, हे भगवन! ना तर देव जाणतात, न दानवांस माहीत आहे."

अर्जुनाचे हे भावपूर्ण उद्गार ज्ञानेशवाणीतून प्रकटतांना कोणते रूप घेतात, पाहाः

तऱ्हीं होसी गां तूं परब्रह्म। जैं या महाभूतां विसंवते धाम।
पवित्र तूं परम। जगन्नाथा।।१०-१४९।।
तूं परमदैवत तिहीं देवां। तूं पुरुष जी पंचविसावा।
दिव्य तूं प्रकृतिभावा-। पैलिकडील।।१५०।।
अनादिसिद्ध तूं स्वामी। जो नाकळिजसीं जन्मधर्मी।
तो तूं हें आम्हीं। जाणीतलें आतां।।१५१।।

अर्जुन म्हणतोः "हे जगन्नाथा! या पंचमहाभूतांनी उभारलेल्या जीवमात्रांचे अत्यंत पवित्र असे परम विश्रामस्थान – त्या जीवयोनींचे माहेरच असे परब्रह्म म्हणजे तूच आहेस, हे मला कळून चुकले आहे. ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रयीचे दैवत तूच आहेस. प्रकृतिभावापलीकडील दिव्यातिदिव्य असा असणारा तू म्हणजे *पंचविसावे तत्त्व* वा *चोवीस साङ्ख्यतत्त्वांचा मूळ असा पुरुष* आहेस. सर्व पदार्थांपूर्वीचा सिद्ध असा एकमेव तूच आहेस. तुला आदि नाही. या अखिल विश्वाचा स्वामी कोण, तर तूच आहेस. असा तू आहेस व तुला जन्ममरण-भवव्यथा यांचा संपर्कसुद्धा नाही, हे मी आता जाणून घेतले आहे."

तूं या कालयंत्रासि सूत्रीं। तूं जीवकलेची अधिष्ठात्री।
तूं ब्रह्मकटाहधात्री। हें कललें फुडां।।१०-१५२।।
पैं आणिकही एकें परी। इयेचि प्रतीतीची येतसे थोरी।
जैं मागें ऐसेंचि ऋषिश्वरीं। सांगितलें तूंतें।।१५३।।
परि तेयां सांघितलेयाचें सांचपण। हें आतां देखतसे अंतःकरण।
जैं कृपा केली आपण। म्हणौनि देवा।।१५४।।

"या कालरूपी यंत्राचा सूत्रधार तूच आहेस. जीवमात्राची अधिष्ठात्री देवता तूच आहेस. या ब्रह्मांडरूपी उत्पत्तीची माता तूच आहेस. *चित्कला, काम, काल, यम, मृत्यू, कर्म, पाश* हे सर्व तुझ्याठायीच प्रवर्ततात, हेसुद्धा आम्हाला कळले आहे. आमची ही प्रतीती किती खरी आहे, याला अजूनही एक प्रमाण आहे. कारण की पूर्वी मोठमोठ्या ऋषिवर्यांनी तुझे असेच माहात्म्य कथिले होते. परंतु त्यांच्या त्या म्हणण्याची सत्य अनुभूती माझ्या अंतःकरणास घेता येत आहे, ती केवळ तू माझ्यावर जी कृपा केलीस तिच्यामुळेच!"

एरवीं नारदु अखंड जवळां ये। तोहि ऐसींचि वचनें गायें।
परि अर्थ न बुझौनि ठायें। गीतसुखचि ऐकों।।१०-१५५।।
हां गां आंधळियांचां गांवीं। आपणपें प्रगटलें रवी।
तऱ्हीं तिहीं वोतपलीचि घेयावी। वांचूनि प्रकाश कैंचा।।१५६।।
एरवीं देवर्षिही अध्यात्म गातीं। आहाच रागांगेंसीं जैं महुरता।
तैंचि फांवें येर चित्ता। न लगेचि कांहीं।।१५७।।

"एरवी देवर्षि नारद वारंवार आमच्याकडे येत, तेव्हा ते पण अशाच अर्थाची वचने गात असत. पण त्यांच्या त्या उक्तीचा अर्थ आम्हा पामरांना अजिबात उमगत नसे. केवळ त्यांच्या सुस्वर मधुर वाणीनेच आम्ही मुग्ध होऊन जात असू. आंधळ्यांच्या प्रदेशात सूर्य स्वतः प्रकट झाला, तरी त्यांना त्याचा प्रकाश कसा अनुभवता येणार! ते केवळ त्याच्या उष्णतेचेच धनी नव्हेत का! तसेच जेव्हा जेव्हा नारदमुनी आपले अध्यात्मपर साम गात आमच्या घरी बसत, तेव्हा आम्ही फक्त त्या सामाच्या रागगायनाच्या मधुरतेने प्रसन्नचित्त होत असू. त्यावाचून त्या गाण्याचा अर्थ आम्हाला खरा काय तो कळतच नसे!"

"मजपासीं चिद्रत्नांचियां खाणी"

पैं असितादेवलाचेनिही मुखें। मी एवंविधा तूंतें आईकें।
परि तैं बुद्धि विषयविखें। धरिली होती।।१०-१५८।।
विषयविखाचा पडिपाडु। गोड परमार्थ लागे कडु।
विषय तो गोडु। जीवासि जाहला।।१५९।।
आणि हें आणिकांचें काय सांगावें।
राऊळां आपणचि येऊनि व्यासदेवें।
तुझें स्वरूप आघवें। सर्वदा सांघिजें।।१६०।।
परि तो आंधारीं चिंतामणि देखिला। जेवीं नव्हें या बुद्धि उपेक्षिला।
पाठीं दिनोदयीं वोळखिला। होय म्हणौनि।।१६१।।

ईश्वराचे अंतरंग

तैसीं व्यासादिकांची बोलणीं।
तियां मजपासीं चिद्रत्नांचियां खाणी।
परि उपेक्षिल्या जात होत्या तरणी। तुजवीण कृष्णा।।१६२।।

"असित व देवल या ऋषींच्याकडूनसुद्धा तू असा आहेस, हे मी ऐकून होतो. पण तेव्हा माझी बुद्धी विषयरूपी विषाने व्याप्त झाली असल्याने विषय तेवढे गोड वाटत असत आणि परमार्थ गोड असूनसुद्धा कडूजहर लागायचा. या सर्वांचे सांगणे राहू दे! खुद्द व्यासमहर्षींनी स्वतः आमच्या राजवाड्यात येऊन तुझे सगळे स्वरूप कितीदातरी वर्णिले होते. परंतु त्यांचे ते बोल म्हणजे जणू काळोखात पडलेला चिंतामणी असावा, तसे उपेक्षिले गेले. दिवस फाकल्याविना तो चिंतामणी जसा ओळखला जात नाही, तसेच ते बोल अगदी अमोल असले तरीसुद्धा, हे कृष्णा! तुझ्या रूपाच्या सूर्योदयाशिवाय खिजगणतीत येत नव्हते. या सर्वांची वचने म्हणजे जणू चिद्रत्नांच्या खाणीच! त्या अशाच मजजवळ गुप्त पडून राहिल्या."

तैं आतां वाक्यसूर्यकर तुझें फांकलें।
आणि ऋषीं मागें होते जैं कथिलें।
तेयां आघवेयांचेचि फिटलें। अनोलखपण।।१०-१६३।।
जी ज्ञानाचें बीज तेयांचें बोल।
माझिये हृदयभूमिके पडिलें सखोल।
वरि इयें कृपेची जाहली वोल।
म्हणौनि संवादफलेंसीं उठिलें।।१६४।।
अहो नारदादिकां संतां। त्यांचिया युक्तिरूप सरिता।
मी महोदधि जाला अनंता। संवादसुखाचा।।१६५।।

"पण आता तुझ्या वाक्यरूपी रविकिरणांच्या प्रकाशात त्या ऋषिवरांनी पूर्वी जे कथन केले होते, त्या सर्वाचे अनोळखीपण फिटले आहे. त्यांचे बोल म्हणजे ज्ञानाचे बीजच! ते माझ्या हृदयभूमीत खोलवर पेरले गेले होते. त्यास आता तुझ्या कृपामृताची ओली मिळाल्यामुळे ते रुजले व त्यांचे डौलदार संवादरूपी वृक्ष होऊन ही संभाषणरूपी रुचिर फळे त्यांस लागली आहेत. हे अनंता! नारदादी संतांच्या युक्तिरूपी संवादसरितांना आपल्यात समावून घेणारा संवादसुखरूपी महोदधी मी जो झालो आहे, तो तुझ्याच कृपेमुळे!"

"जैं सानुकुलूं सद्गुरु"

प्रभु आघवेनि एणें जन्में। जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें।
तयांची न ठकतीचि कामें। सद्गुरु तुवां।।१०-१६६।।
एऱ्हवीं वाडवडिलांचेनि मुखें। मी सदा तूंतें कानीं आईकें।
परि कृपा न कीजेचि तुवां येकें। तंव नेणवेचि काई।।१६७।।
म्हणौनि भाग्य जैं सानुकूलु। जालियां केलें उद्यम सदा सुफलु।
तैसें श्रुताधीत सकलु। गुरुकृपा सांच।।१६८।।

"हे प्रभु! जन्मजन्मांतरी मी जेवढी उत्तमोत्तम पुण्यकृत्ये केली असतील, त्यांच्यामुळेसुद्धा हे एवढे भाग्य मला लाभू शकणार नाही, जे केवळ तुजसारख्या एकट्या सद्गुरूच्या जोडण्यामुळे लाभते. तसेच पाहिले तर वाडवडलांच्या मुखातून तुझा महिमा मी सतत श्रवण केला आहे. परंतु जोपावेतो तुझी कृपा झाली नव्हती, तोपावेतो त्याचा काहीच उपयोग झाला नाही. भाग्य जेव्हा अनुकूल होते, तेव्हा केलेले उद्यम जसे नेहमी सफल होतात, तसेच जेव्हा गुरुकृपा होते, तेव्हाच वेदश्रुतीत सांगितलेले फल प्राप्त होते, त्या श्रुतिवचनांची साक्षात अनुभूती प्राप्त होते."

जी बनकरु झाडेंसीं जीवेंसाटीं। पाडूनि जन्में काढी आटी।
परि फलेंसि तैंचि भेंटी। जैं वसंतु पावे।।१०-१६९।।
अहो विषमा जैं वोहट पडे। तैं महुर तैं महुर आवडे।
पैं रसायनें तैं गोडें। जेव्हां आरोग्य देहीं।।१७०।।
कां इंद्रियें वाचा प्राण। यां जालियांचें तैंचि सार्थकपण।
जैं चैतन्य येऊनि आपण। संचरें माजीं।।१७१।।
तैसें शब्दजात आलेडिलें। अथवा योगादिक जैं अभ्यासिलें।
तैं तैंचि म्हणो ये आपुलें। जैं सानुकूल श्रीगुरु।।१७२।।

"बागवान झाडांची उपज करणे, त्यांना वाढवणे, त्यांची जोपासना करणे, याकरताच जन्मभर जिवापाड परिश्रम करतो. पण त्याच्या त्या कष्टांचे फळ प्राप्त होण्यासाठी - ती झाडे फळभाराने लगडून जाण्यासाठी वसंत ऋतूचे आगमन आवश्यक असते. विषमज्वर जेव्हा ओसरतो, तेव्हा गोड पदार्थ गोड लागू लागतात. तापात ते कडूच लागतात. जेव्हा आरोग्य देहात पदार्पण करते, तेव्हा रसायनांचा उपयोग होतो. रोगी देहास रसायने घातकच ठरतात. इंद्रिये, वाचा, मन व प्राण यांचे सार्थक तेव्हाच होते, जेव्हा देहात चैतन्य येऊन संचार करते. याचप्रमाणे श्रुतींचा कितीही अभ्यास केला वा योगाभ्यास जरी केला, तरी त्यांचा उपयोग तेव्हाच होतो, जेव्हा गुरू आपणास अनुकूल होऊन कृपा करतात."

जालियें प्रतीतीचेनि माजें। अर्जुनु निश्चयेंची नाचतुसें भोजें।
तेवींचि म्हणें देवा तुझें। वाक्य मज मीनलें।।१०-१७३।।
तऱ्हीं सांचचि हें कैवल्यपति। मज त्रिशुद्धि आली प्रतीती।
जैं तूं देवदानवांचियें मती-। जोगा नव्हसी।।१७४।।
तुझें वाक्य व्यक्तीं न येतां देवा। आपुलियां जाणें जाणिवा।
तैसा कंहींचि नाहीं हें सद्भावा। भंरवसेनि आलें।।१७५।।

"भगवत्स्वरूपाची अशी प्रतीती प्राप्त झाल्याने तिने मत्त होऊन अर्जुन खरोखरीच आनंदाने नाचू लागला. प्रभुप्रेमाने आर्त झालेला अर्जुन म्हणू लागला: "देवा! तुमचे बोलणे माझ्या अंगी भिनले आहे. हे कैवल्याधीशा! तुझ्या वचनांची खरीखुरी प्रचिती मला येत आहे, हे अगदी त्रिवार सत्य आहे. असा तू जो आहेस, तो देव वा दानव दोघांच्याही मतीस आकळता येणारा नाहीस! हे परमेश्वरा! तुझ्या वाक्यरूपी कृपेची पांखर जोवर अंतःकरणावर पडत नाही, तोवर आपल्या ज्ञानाच्या जोरावर तुला जाणून घेणे अशक्य आहे, हे मला निश्चितपणे कळले आहे."

स्वरूपानुभूतिप्राप्ती गुरुकृपेनेच!

अशा प्रकारे स्वरूपानुभूती प्राप्त होण्यासाठी-साक्षात्कार होण्यासाठी गुरुकृपा - संतसज्जनांची कृपा - ईश्वरकृपा यांचेच जे आत्यंतिक महत्त्व परमार्थप्रांतात आहे, ते अर्जुनाच्या मुखाने स्वतः ज्ञानदेवच आपणास स्पष्टपणे सांगत आहेत. वेदांचा भार आपण कितीही वाहिला, हटीतटीने योगाभ्यास केला, तरी ते परमात्मस्वरूप गुरुकृपेविना आकळणे शक्यच नाही, असा अभिप्राय येथे व्यक्त झालेला आहे.

साधने केवळ *गुरुकृपा* वा *ईश्वरकृपा* वा *संतसज्जनांची कृपा* यांच्याच माध्यमातून सिद्धी देतात. त्याविना साधने म्हणजे निव्वळ आण्विक प्रयत्नात मोडतात, असा हा भाग आपण पूर्वी पाहिलेला होता *(उन्मेषः१-१::विषयप्रवेश-१:पृ. क्र.१)*. वरील ज्ञानदेवोक्ती ही त्याची सत्यता पटवून देण्यास समर्थ आहे, हे जिज्ञासूंना परत सांगावे असे नाही. असो.

"केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया"::::
विभूतींचे पूजनादी

यानंतर भगवत्स्वरूपाचे चिंतन, धारणा, ध्यान इ. करण्यासाठी कोणत्या विभूतींचे भजन-पूजन करावे, हे जाणून घेण्यासाठी अर्जुन काय म्हणतो, पाहाः

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते।।१०-१५।।

"हे स्वसंवेद्य पुरुषोत्तमा! हे भूतेशा! हे भूतांना उत्पन्न करणाऱ्या ईश्वरा! हे देवाधिदेवा! हे जगत्पते! आपल्या दिव्यातिदिव्य विभूतींचे पूर्णपणे वर्णन करण्यास आपल्याशिवाय इतर कोणीही समर्थ नाही."

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः।
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि।।१०-१६।।

"आपल्या अंगीच्या निरतिशय ज्ञान, ऐश्वर्य, सामर्थ्यादी शक्तींमुळे आपण हे विश्व व्यापून राहिला आहात. या विश्वव्यापी आपल्या विभुस्वरूपाचे वर्णन अर्थात विभूतिविस्तार ऐकण्याची माझी उत्कट इच्छा आहे."

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन्।
केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया।।१०-१७।।

"हे योगेश्वरा! तुझे सदैव चिंतन मी कोणत्या रूपाचे करावे; हे भगवन! ईश्वरप्रणिधानासाठी कोणकोणत्या भावांचे चिंतन करणे उचित आहे; हे मला जाणवून द्यावे."

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम्।।१०-१८।।

"हे जनार्दना! समस्त लोक आपणाकडे उन्नती व कल्याणासाठी प्रार्थना करतात. आपल्या योगैश्वर्ययुक्त शक्तींनी विशेषरीत्या व्यापलेल्या विभूती कोणत्या, कोणत्या विभूतींचे ध्यान करावे, ते मला विस्तारपूर्वक सांगावे. कितीही वेळा श्रवण केले, तरी माझी अद्यापही तृप्ती झालेली नाही. त्यासाठी आपण पुनश्च एकवार मला आपल्या त्या सांगितलेल्या दिव्य ध्येय्य विभूतींचे वर्णन करावे."

ध्येय्य विभूतींची आवश्यकता

जिज्ञासूंना कधीतरी असा प्रश्न पडतो की गीतेचा एक संपूर्ण *दहावा* अध्याय व इतर ठिकाणी जे विभूतिवर्णन येते, त्याचा काय उद्देश असावा. या प्रश्नाचे उत्तर वरील श्लोकातून मिळते. *विभु* म्हणजे *व्यापक*. भगवंतांच्या विस्तारानेच हे जगत झालेले आहे. त्यातील यच्चयावत वस्तुमात्र या विभूतीच होत. ईश्वराच्या *विभूति* - ज्यात ईश्वर भरलेला आहे, असे सर्व प्राणिमात्र, भूतजात, पदार्थमात्र आहेत. अर्जुन जे विभूतिस्वरूप ऐकू इच्छितो, ते याच जाणिवेतून!

परंतु आता त्यास भगवंतांच्या *विशेष विभूती* ऐकावयाच्या आहेत, ज्यांच्यात *यश-श्री-ऐश्वर्यादी* विशेष प्रमाणात असल्याने त्यांद्वारे भगवंतांचे स्मरण अवचितच सहजपणे घडते. विश्वव्यापी भगवंतांचे स्मरण करावयाचे तर समस्त जगास ध्येय्य वस्तू समजून तसे करणे साधकांसाठी तसे कठीणच म्हटले पाहिजे. *अमूर्त* असेही भगवत्स्वरूप आहे. त्याचे ध्यान करणे, त्याला लक्ष्य बनवणे, तशी योगसाधना करणे, ही किती कठीण आहेत, तो भाग *बाराव्या* अध्यायात येतो.

सगुण स्वरूपाचे ध्यान करणे सुकर आहे, या दृष्टीने *गीता* आता या विषयाकडे वळतांना दिसते. जगत हे भगवंतांचे सगुण रूप असले, तरी इतक्या विशाल व्यापक स्वरूपाचे ध्यान करणे मर्यादित देहबुद्धीच्या मानवास दुरापास्त आहे. म्हणून मनास ज्यामुळे आह्लाद प्राप्त होईल, चित्त ज्यायोगे सुप्रसन्न राहील, असे भगवंतांचे मूर्त स्वरूप ध्यानाचा विषय म्हणून घेणे सर्वसामान्य साधकांसाठी अत्यंत उचित ठरते.

"मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः। भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते।।१७-१६।।" या गीताश्लोकात *मानस* तपाची व्याख्या केलेली आहे. मनाची प्रसन्नता, सौम्यत्व, मौनवृत्ती, आत्मसंयम, निर्विकल्पावस्था या मानस तपाच्या अंगांची परिपूर्ती करणारे ध्येय्य विषय अर्थातच श्रेष्ठ समजले पाहिजेत. कारण वस्तुतः *मानस तप* हा योगाच्या अंतरंगातील भाग आहे. धारणाध्यानाच्या अंतर्गत असणारा हा प्रांत आहे. म्हणून ध्येय्य विषय चित्तप्रसादनास अनुकूल असला पाहिजे.

भगवंतांच्या अनेकानेक विभूती आहेत. त्यांच्यात मन प्रसन्न करणारे भाव आहेत, तसेच दुःख, दौर्मनस्य, आलस्य इ.चित्ताचे विक्षेप करणार भाव असणे हेही स्वाभाविक आहे.साधकास चित्तविक्षेपक भावांवर विजय मिळवावयाचा असतो. त्यासाठी पतञ्जलींनी *ईश्वरप्रणिधान* हा सर्वश्रेष्ठ उपाय आवर्जून सांगितला आहे. ते म्हणतात:***"ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च।।१-२९।।पा.यो.सू.।।"*** ईश्वरप्रणिधानामुळे *प्रत्यक्चेतन* अशा

आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. त्या *पंचविसाव्या* तत्त्वाची - पुरुषाची साक्षात अनुभूती प्राप्त होते. योगाचा अंतराय होत नाही.

योगमार्गातील अडथळे

योगमार्गातील अडथळे सांगतांना पतञ्जली निर्देशितात की: ***"व्याधिस्त्यानसंशयप्रमादालस्याविरतिभ्रान्तिदर्शनालब्धभूमिकत्वानवस्थितत्वानि चित्तविक्षेपास्तेऽन्तरायाः ।।१-३०।।पा.यो.सू.।।"*** - रोग, चित्ताची अकर्मण्यता, *(योगमार्गाच्या प्रभावीपणाविषयी)* संशयवृत्ती, *(योगाभ्यासास दुर्लक्षिणे)* प्रमाद, आलस्य, अविरति *(वैराग्याची अपरिपक्वता)*, भ्रांतदर्शन (ऋतंभरा प्रज्ञा उत्पन्न झल्याचा खोटा आभास होणे), अलब्धभूमिकत्व *(योगमार्गात प्रगती खुंटणे)* व अनवस्थितत्व *(योगभूमिकेत स्थैर्य प्राप्त न होणे व वारंवार चित्त ध्येयापासून विचलित होणे)* असे हे अडथळे योगसाधकांस येतात.

तसेच ***"दुःखदौर्मनस्याङ्गमेजयत्वश्वासप्रश्वासविक्षेपसहभुवः ।।१-३१।।पा.यो.सू.।।"*** यात म्हटलेली दुःख, मनाचे अस्वास्थ्य, अंग कंपित होणे, श्वास-प्रश्वासात विक्षेप निर्माण होणे, हे पण योगमार्गीयांस विक्षेपकर असल्याचे निर्देशित केले आहे. त्या सगळ्यांचे निराकरण ईश्वरप्रणिधानाद्वारे आपोआप होत असते.

एकतत्त्वाभ्यास हा उपाय

या सर्व चित्तविक्षेपांसाठी व अंतरायांसाठी पतञ्जली ईश्वरप्रणिधानाव्यतिरिक्त अजून एक उपाय सांगतात. तो म्हणजे ***"तत्प्रतिषेधार्थमेकतत्त्वाभ्यासः।।१-३२।।"*** - कोणत्यातरी एका तत्त्वाचा अभ्यास - त्यावर धारणा - ध्यान - संयम करणे, यायोगे चित्त स्थिर होते. तसेच जे लोक *ईश्वरप्रणिधान* करण्यास त्यांच्या श्रद्धेच्या बलातील न्यूनतेमुळे असमर्थ असतात, त्यांनाही योगाभ्यास करण्यासाठी अशा एक तत्त्वाचा धारणा-ध्यानासाठी अवलंब करता येतो.

तसेच हे सर्व करतांना वस्तुमात्राविषयी कोणती भावना करावी, याचे निर्देशन सर्व साधकांसाठी आवश्यक ठरते. कारण वस्तुमात्र या ईश्वराच्याच विभूती आहेत. त्यासंबंधी ईश्वरप्रणिधानाव्यतिरिक्त उत्कटतेची भावना योगघातक ठरू शकते. म्हणून पतञ्जलींचे म्हणणे आहे की: ***"मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम्।।१-३३।।पा.यो.सू.।।"*** - सुखीशी मैत्री, दुःखितांविषयी करुणा, पुण्यवंतांप्रति हर्ष व पापी जनांची उपेक्षा वा त्यांप्रति उदासीनत्व अशा भावना कराव्यात.

"तियां प्रधाना नामांकितां। प्रगट करी"

याप्रमाणे पतञ्जलींनी योगाभ्यास करणाऱ्यांसाठी ईश्वराच्या या जगतातील विभूतींविषयी कसे आचरण करावे, हे सांगितले आहे आणि ईश्वराच्या विशेष विभूति ध्यानासाठी घेऊन *एकतत्त्वाभ्यास* दृढ करावा, असा संकेत येथे अभिप्रेत आहे. असा *एकतत्त्वाभ्यास* हा पतञ्जलींनी निर्देशिलेला विषयच आपण *विभूतियोग* पाहतांना हाताळत आहोत.

परमेश्वराच्या विशेष अशा विभूती *ध्यानविषय* म्हणून घेणे सर्वात रास्त ठरते. म्हणून अशा विभूती सांगाव्यात म्हणून आग्रह धरणारा अर्जुन काय म्हणतो, ते ज्ञानेश्वरांच्या शब्दात पाहाः

एथ आपुलें वाडपण जैसें। आपणचि जाणिजे आकाशें।
कां मी येतुली घनवट ऐसें। पृथिवीचि जाणें।१०-१७६।।
तैसा आपुलियें सर्वशक्ती। तुज तूंच जाणूं लक्ष्मीपती।
येर वेदादिक मती। मिरविती वांयां।।१७७।।
हां गां मनातैं मागां सांडावें। पवनातैं वावीं मवावें।
आदिशून्य उतरौनि जावें। केउतें बाहीं।।१७८।।

"आकाशाचे विशालपण आाकाशालाच माहीत! इतरांस ते काय आकळणार! पृथ्वीचे वजन पृथ्वीच जाणे, इतरांस त्याची काय कल्पना करता येणार! तुझ्या सर्व शक्ती जाणणारा केवळ तूच आहेस! हे लक्ष्मीपती! वासुदेवा! तुला जाणतो असा गर्व धरणारे वेद उगाचच आपल्या बुद्धिवैभवाचा दिमाख मिरवतात, झाले! स्वैर धावण्यात मनापुढे कोण धावू शकेल! वाऱ्याला बाहुपाशात जखडणे शक्य आहे का! योगाभ्यास करतांना *शून्य-महाशून्य -निरशून्य -आदिशून्य* असा जो निराकाराचा प्रांत येतो, तो आपल्या स्वतःच्या बळावर कसा पार करता येईल! हे परमेशा! तुला जाणण्याचा प्रयत्नसुद्धा यांसारखाच आहे."

तैसें हें जाणणें आहे। म्हणौनि कोणासही ठाकतें नोहें।
आतां तुझें ज्ञान होये। तुजचिजोगें।।१०-१७९।।
जी आपणपयांतैं तूंचि जाणिसी।
आणिकांतैंही सांघावेयां तूं समर्थु होसी।
तऱ्हीं आतां एकहेल घाम पुसीं। आर्तीचियां निडलाचां।।१८०।।

"म्हणूनच तुझे ज्ञान करून घेणे मनुष्यमात्राच्या बुद्धीला दुष्प्राय आहे. तुझ्या अशा अथांग - अतर्क्य स्वरूपाचे ज्ञान केवळ तुलाच आहे. म्हणूनच तुला स्वसंवेद्य असे म्हणतात. देवा! तूच स्वतःला जाणतोस आणि इतरांना तुझे स्वरूप वर्णन करून सांगण्याइतकी पात्रता केवळ तुझीच आहे. तरी तुझे वर्णन तुझ्याच मुखाने ऐकावे, या आर्त इच्छेने माझ्या तनूवर जे स्वेदबिंदु गोळा झाले आहेत, ते आपल्या सुमधुर भाषणाने मला तृप्त करून पुसून टाक. तुझे संभाषण ऐकण्यासाठी मी अधीर झालो आहे."

हें आइकिलें कीं भूतभावना। त्रिभुवनगजपंचानना।
सकलदेवदेवतार्चना। जगन्नायका।।१०-१८१।।
जऱ्हीं थोरी तुझी पाहात आहों।
तऱ्हीं पासीं उभें ठाकावयाही योग्य नोहों।
या शोच्यता विनवूं बिहों। तऱ्हीं आनु उपावो नाहीं।।१८२।।

"हे समस्त भूतांची उत्पत्ती करणाऱ्या ईश्वरा! त्रैलोक्यरूपी भवगजाचा फडशा पाडणाऱ्या हे पंचानना! सकल देवतामंडलास पूज्य असणाऱ्या जगन्नाथा! तू माझी विनवणी ऐकतो आहेस ना! खरे

तर तुझी थोरवी अशी आहे की आम्ही तुझ्यापाशीसुद्धा उभे राहण्याच्या योग्यतेचे नाही. पण तुला ही विनंती करायला भ्यायलो, तर तुझे अवर्णनीय स्वरूप कळून घेण्यासाठी दुसरा कोणता उपाय करावा!"

भरिलें सरिता समुद्र चहूंकडें। परि तैं बापयासीं कोरडें।
कां जैं मेघौनि थेंबुटा पडें। तैं पाणी कीं तेयां।।१०-१८३।।
तैसें गुरु जी सर्वत्र आथी। परि कृष्णा आम्हां तूं गती।
हें असो मजप्रति। विभूति सांघें।।१८४।।
जी तुझियां विभूति आघवियां।
परि व्यापिती या शक्ती दिव्या जियां।
तियां आपुलियां दावावियां। आपण मज।।१८५।।
जिहीं विभूतीं ययां समस्तां। लोकांती व्यापूनि आहाति अनंता।
तियां प्रधाना नामांकिता। प्रगटा करी।।१८६।।

"चहूकडे नद्या-नाले-समुद्र अमाप जलाने भरलेले जरी असले, तरी चातकाची तहान केवळ मेघातून वर्षणाऱ्या पर्जन्यानेच भागते. त्या जलधारेचा एक थेंब, तेवढेच पाणी असे त्याच्या लेखी जसे असते, त्याचप्रमाणे गुरू जरी घरोघरी असले, गुरुतत्त्व जरी विश्वात भरून राहिलेले असले, तरी तूच एकटा आम्हाला हे तुझ्या स्वरूपाचे ज्ञान देऊ शकतोस. आम्हाला तुजवाचून दुसरी गतीच नाही! म्हणून हे देवेशा! तुझ्या विभूती मला सांग! तसे हे समस्त वस्तुजात तुझीच विभूति आहे. पण तुझ्या दिव्य शक्तीने विशेष भारलेल्या अशा ज्या विभूती आहेत, त्या मला दाखव. तू हे विश्व आपल्या विभूतींनी व्यापून टाकले आहेस. तरी हे अनंता! आपल्या प्रमुख प्रमुख व उत्तमोत्तम अशा विभूती प्रकट सांगाव्यात."

"तूंतैं चिंतितां मज। सायासु नाहीं"

जी कैसें मियां तूंतैं जाणावें। काय जाणौनि सदा चिंतावें।
<u>जर्‍हीं तूंचि म्हणों आघवें। तर्‍हीं चिंतनचि ना घडे</u>।।१०-१८७।।
म्हणौनि मागां भावां जैसें। आपुलें सांघितलें तुवां उद्देशें।
आतां विस्तरौनि तैसें। एक हेल बोलें।।१८८।।

"हे भगवंता! <u>या संपूर्ण विश्वात तूच भरून उरला आहेस. तुझ्या या विशाल स्वरूपाचे ध्यान करणे आम्हा सांत बुद्धीच्या मानवांस अशक्यच आहे</u>. तसे करू गेले तर तुझे ध्यान कोणालाच करता येणार नाही. म्हणून तुझ्या कोणत्या स्वरूपाचे ध्यान आमच्यासारख्या साधकांनी करणे योग्य आहे, तुझे कोणते रूप सदा मनी चिंतावे, हे आम्हाला सांग. मागे तू *(सातव्या व नवव्या अध्यायी, तसेच दहाव्या अध्यायाच्या श्लोक क्र.४, ५व ६ यांमधून)* **विभूती व मन्वादी भाव** यांचे विवरण केले होतेस. पूर्वी सांगितलेल्या त्या भावादींचा निर्देश आता सविस्तर सांग."

<u>जेया जेयां भावांचां ठाईं। तूंतैं चिंतितां सायासु नाहीं</u>।
तो विवल करूनि देईं। योगु आपुला।।१०-१८९।।
आणि पुसलियां जियां विभूति।
त्याही बोलावियां भूतपति।...।१९०।।

"ज्या ज्या भावादींठायी चिंतन करणे प्राणिमात्रांस शक्य आहे व ज्या विभूतींचे ध्यान करणे सुलभ आहे, अशा विभूतींचे स्पष्ट वर्णन कर. म्हणजे ईश्वरप्रणिधानयुक्त अशा या *सहजयोगमार्गाचे* आम्हा मुमुक्षू साधकांस आचरण करणे सोपे जाईल. म्हणून आपल्या विभूती, हे जनार्दना! हे भूतेशा! आम्हास स्पष्ट कराव्यात."

....।एथ म्हणसि जर्‍हीं पुढत पुढती। काय सांघो।।१०-१९०।।
तर्‍हीं हा भाव मना। झणें जाय हो जनार्दना।
पैं प्राकृताही अमृतपाना। ना न म्हणवें जी।१९१।।
जैं कालकूटाचें सहोदर। जैं मृत्युभेणें प्यालें अमर।
तर्‍हीं दिहाचें पुरंदर। चौदा जाती।।१९२।।
ऐसा कवण क्षीराब्धीचा एक रसु। जेयां वांचोनि अमृतपणाचा आभासु।
तेयांहीं मिठांशु। जैं पुरे म्हणों नेदीं।।१९३।।
तेयां पाबलेयाही येतुलेवरी। गोडियेची आथि थोरी।
मग हें तंव अवधारिं। परमामृत सांचें।।१९४।।

"पण तुझ्या मनात जर असे येत असेल की वारंवार काय तेच तेच सांगावयाचे! तर हे देवा! तसे मनात आणू नकोस. हे प्रभू! सामान्य असे ते अमृत, जे कालकूट विषाचे सख्खे सहोदर भावंड आहे, मृत्यूच्या भयापासून विमुक्त व्हावे या हेतूने देवादींनी ज्याचे रसपान केले पण तरीसुद्धा त्यांच्या राजाला - देवेंद्रालासुद्धा - ब्रह्म्याच्या एका दिवसात चौदा वेळा जन्ममृत्यूच्या चक्रातून जावे लागते; त्या तशा अल्पगुणी क्षीरसमुद्राच्या रसाचे प्राशन करत असतांनाही ते नको - आता पुरे - असे म्हणवत नाही. ज्या अमृताला उगाचच अमृतत्वाचा आभास आहे, पण ज्याची गोडी माणसास काय! पण देवांसही जेथे मोह पाडते; तेथे आपले वचनामृत तर सर्वश्रेष्ठ - अतिउत्कृष्ट परमामृतच आहे! त्याला नाही कसे म्हणवेल बरे!"

"तुवां स्वमुखें जैं बोलिलें। हें आम्हीं नादासि रूप देखिलें"

जैं मंदराचलु न ढालितां। क्षीरसागरु न डहुलितां।
अनादि स्वभावता। आईतें आहे।।१०-१९५।।
जैं द्रव ना नव्हे बद्ध। जेथ नेणिजती रस गंध।
जैं भलतेयांहीं सिद्ध। आठवलेंचि फांवें।।१९६।।
जेयांचि गोठीचि ऐकतखेंवों। आघवा संसारु होय वावो।
बलियां नित्यता लागे येवों। आपणपेयां।।१९७।।
जन्ममृत्यूंची भाख। हारपौनि जाय निःशेख।
आंत बाहेरीं महासुख। वाढोंचि लागे।।१९८।।

"हे श्रीकृष्णा! आपल्या मुखींचे हे परमामृत मिळावे म्हणून, ना तर मंदराचलाने क्षीरसागर घुसळण्याचे परिश्रम करावे लागतात, ना कालकूट पदरी पडण्याची भीती आहे! हे तर नित्यसिद्ध असून सहज उपलब्ध झाले आहे. या परमामृतास साठवण्यासाठी घटादी उपचार अनावश्यक आहेत. रसता, द्रवता, गंध, स्वाद या सर्व उपलक्षणांपासून मुक्त असे हे आहे. ते प्राप्त व्हावे म्हणून ना सुर, ना असुर व्हावे

लागते. ते तर सर्वसामान्य मनुष्यासही लाभू शकते. हे हवे असे मुमुक्षूंना वाटू लागते, न लागते, तोच ते त्यांना सहज उपलब्ध होऊ लागते. या परमामृताची गोष्ट कानी पडली न पडली, तोच संसार अवघाच फोल होऊन बाजूला सरतो. जन्ममृत्यूची वार्ता निमून जाते. संसारवृक्ष निर्मूल नाहीसा होतो. अढळ अशी शांती प्राप्त होते अन अंतर्बाह्य सगळे महासुखाने भरून जाते."

मग दैवगत्या जऱ्हीं सेविजै। तऱ्हीं तैं आपणचि होऊनि ठाकिजै।
तैं तुज देतां चित्त माझें। पुरे म्हणों न शके।।१०-१९९।।
तंव तुझें नामचि जी आम्हां आवडे।
वरि भेटी होय आणि जवलिक जोडे।
पाठीं गोठी सांगसीं सुरवाडें। आनंदाचेनि।।२००।।

"सतत वाढत जाणारे महासुख प्राप्त करून देणाऱ्या या परमामृताचे अवचित जरी रसपान घडले, तरी मनुष्य परब्रह्म होऊन जातो. असे हे परमामृत तू मला स्वखुषीने देत असता, "ते आतां पुरे" असे मी कसे म्हणू शकेन! हे दयाघना! मुळात तुझे नामस्मरणच किती गोड आहे! तू दूर असलास तरी त्यामुळे तू जवळ असल्यासारखा वाटतोस. आणि तू तर साक्षात माझ्याजवळ आहेस. वर तुझे सख्यत्व मला लाभले आहे. त्याशिवाय आनंदाच्या भरात तू मला उत्तमोत्तम गोष्टी सांगत आहेस व उपदेश करत आहेस."

आतां हें सुख कायिसयासारिखें। काई निर्वेना मज परितोखें।
तऱ्हीं येतुलें जाणें जैं येणें मुखें। पुनरुक्तही हो।।१०-२०१।।
हां गां सूर्यु काय शिला। अग्नि म्हणों येत आहे वोंविला।
कां नित्य वाहातेयां गंगाजलां। पारसेंपण असे।।२०२।।
तुवां स्वमुखें जैं बोलिलें। हें आम्हीं नादासि रूप देखिलें।
आजि चंदनतरुची फुलें। तुरंबीत आहों मां।।२०३।।

"असा हा महासुखाचा सोहोळा कसा आहे, म्हणून सांगू जावे तर त्या सुखाने संतोषल्यामुळे मला ते वर्णन करण्याइतकी उसंतसुद्धा काढता येत नाही. पण मला इतके उमजते आहे की तुझ्या मुखातून हे जे बोल येत आहेत, त्यांची पुनरुक्ती झाली तरी मला त्यांचा वीट येत नाही. सूर्य कधी रोज रोज तोच तो उगवतो, म्हणून नकोसा होतो का! अग्नीला आंघोळ नाही म्हणून त्यास कधी ओवळा म्हणून *"तू नकोस!"* असे म्हणावेसे वाटते का! नित्य वाहणाऱ्या त्या गंगाजलास पारोसेपण कधी येते का! हे श्रीकृष्णा! आपल्या मुखींचे बोल म्हणजे साक्षात मूर्तिमंत *नादब्रह्म* आहेत! तुमचे हे बोल म्हणजे चंदनाला सुवास तर असावाच, पण वर त्यास सुवासिक फुले पण असावीत, तसे आहेत."

अर्जुन तर ज्ञानभक्तीचे आगरच!

ययां पार्थाचियां बोलां। सर्वांगें कृष्णु डोलिला।
म्हणे भक्तिज्ञानासि जाहला। आगरु हा।१०-२०४।।
ऐसा पतिकराचियां तोषांआंतु। प्रेमाचा वेगु उंचंबलितु।
तैं सायासें सांवरूनि अनंतु। काय बोलें।।२०५।।

अर्जुनाचे हे बोलणे ऐकून श्रीकृष्ण अति संतोषून डोलू लागले. प्रसन्न होत्साते ते म्हणाले, "तू तर प्रत्यक्ष ज्ञान व भक्तीचा मळाच झाला आहेस."

आपणास अति प्रिय अशा अर्जुनावरच्या प्रेमाने उचंबळणाऱ्या आवेगास कसेबसे आवरून तो अनंत विभु परमात्मा त्यास आपल्या अनेकानेक विभूती सांगण्यास सिद्ध झाला.

सगुणाची उपासना::::

विभूतिरूपातील ध्यान

या अध्यायातील *ओवी क्र. १८७ ते १८९* यांमध्ये योगाचे उत्तम रहस्य विशद केले आहे. अणुरेणूंसह अखिल विश्वास भरून ***"त्यतिष्ठत दशाङ्गुलम्"*** असा जो परमात्मा वेदोपनिषदांतून गायिला आहे, गीताभगवंताने ज्याचे असेच रूप वर्णिले आहे, त्याच्याशी एकरूप होण्यासाठी - मुक्ती प्राप्त करण्यासाठी - योग साधावयाचा असतो. ***"वासुदेवः सर्वमिति"*** अशी ज्या योगाची परम अनुभूती असते, तो योग या विश्वस्वरूप परमेश्वराचे ध्यान करण्याने - त्याच्या *निर्गुण निराकार* स्वरूपाचे ध्यान करण्यापेक्षा स्वल्प सोप्या अशा वाटणाऱ्या ध्यानानेसुद्धा साध्य करणे दुरापास्तच आहे. हाच अभिप्राय या वरील ओव्यांतून ज्ञानदेव प्रकटवत आहेत.

निर्गुण परमेशाचे ध्यान करून योग साधणे अत्यंत अवघड आहे, असे *बाराव्या* अध्यायात निःसंदेहरीत्या व्यक्तवले आहे आणि त्याच्या सगुण - विश्वाकार स्वरूपाचे ध्यान करणेही अत्यंत कठीण आहे, असे या ठिकाणी म्हटले आहे. *ईश्वरप्रणिधान* हा *योगगर्भ* जरी पातञ्जलसूत्रे व गीता-ज्ञानेश्वरीत स्वयंसिद्ध व स्पष्ट असला, तरी आता खरा प्रश्न तात्त्विक पातळीवरून प्रायोगिक भूमिकेवर ध्यान कोणत्या स्वरूपाचे करावे, असा उपस्थित झाला आहे.

क्लेश-कर्मविपाक इ.पासून अलिप्त अशा ईश्वराचे ध्यान करावे, हा पतञ्जलिमुनींचा आदेश गीता मान्य करते. ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।।"*** हे पण गीता उचलून धरते. ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।"*** या पातञ्जलसूत्राची उकल करतांना आपणास साहाय्यकारी ठरणारी गीता वरील ध्यानविषयाचे निर्देशन करत असतांना *विभूति व भाव* यांची त्या सूत्रांच्या भावार्थाशी सांगड घालीत आहे, हे आपल्या सहज ध्यानात येते.

ज्याच्या जपाने, ज्याच्या स्वरूपाच्या भावनेने धारणा-ध्यान सिद्ध करावयाचे, धारणा-ध्यानाचे *संयम* व *समाधी*त परिवर्तन करावयाचे तो ***"पुरुषविशेषः ईश्वरः (१-२४,पा.यो.सू.)"*** *विभूति* वा *भाव* रूपाने व्यक्त झाला आहे, हा सिद्धांत आता गीता मांडत आहे. त्याचे हे रूप *सगुण - साकार* आहेच, पण सांतही आहे. ते विभूति वा भावस्वरूप मनाच्या मर्यादेचे अतिक्रमण करणारे नसल्याने आणि इंद्रियांना गोचर असल्याने - प्रत्यक्ष अनुभवता येणारे असल्याने, *सविकल्प* समाधीच्या अभ्यासासाठी अत्यंत समुचित आहे, असे येथे आपणास उमगून येते.

ईश्वराचे अंतरंग

सांत विभूति - अवतार -भाव हे मूर्तिरूपाने ध्यायले जाऊ शकतात व त्यांच्यांत दिव्यत्व असल्याने ते साधकास ईश्वरस्वरूपाभिमुख करून समाधि सिद्ध करण्यास अत्यंत उपकारक ठरतात, असा आपल्या प्राच्य आध्यात्मिक संशोधनाचा निष्कर्ष आहे. हा निष्कर्ष प्रायोगिक तत्त्वज्ञानावर आधारलेला असून अनुभूतिजन्य आहे. मागे म्हटल्याप्रमाणे ***गीतेत जी एकमेव योगप्रणाली अनुस्यूत आहे, ती सगुणावर आधारित अशी कुंडलिनी जागृतीशी संबंधित आहे*** .

दिव्य विभूतिवर्णन

सगुणाशी संबंधित अशा विभूती विस्ताराने ऐकाव्यात अशी अर्जुनाच्या अंतर्यामीची जी इच्छा आहे, ती पूर्ण करणारे भगवंत म्हणतातः

हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः।
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ।।१०-१९।।

"तुझ्या इच्छेनुसार मी तुला आता माझ्या दिव्य अशा आत्मतत्त्वाने परिपूर्ण असणाऱ्या विभूती सांगतो. माझ्या विस्ताराला अंत नसल्याने, हे कुरुश्रेष्ठा! मी तुला मुख्य मुख्य विभूती ज्या आहेत, तेवढ्याच सांगतो."

आपला विस्तार पुनश्च सांगणारे श्रीकृष्ण म्हणतातः

मी पितामहाचा पिता। हें आठवितांही नाठवें चित्ता।
कीं म्हणतसे बा पांडुसुता। भलें केलें।।१०-२०६।।
अर्जुनातें बा म्हणे एथ काईं।
आम्हां विस्मो करावया कारण नाहीं।
अंगें तो नंदाचें काईं। नव्हेंचि नंदाचें।।२०७।।
परि प्रस्तुत ऐसें असो। हें करवी आवडीचा अतिसो।..।।२०८।।

अर्जुनाविषयी प्रेमभराने विव्हळ झालेल्या श्रीकृष्णांना आपण खुद्द ब्रह्म्याचेही पिता आहोत, हे विसरायला झाले. ते म्हणाले, "बा अर्जुना! तुझे बोलणे अन प्रश्न करणे फारच छान आहे. त्यांनी मी संतोष पावलो आहे." श्रीकृष्ण अर्जुनाशी इतक्या आपुलकीने व जवळिकीने बोलत आहेत, त्याबाबत आपल्याला आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. तसे पाहिले तर त्या परब्रह्म अशा श्रीकृष्णाने जन्म घेतला व नंदगोपाचे लेकरू म्हणून लडिवाळपणा केला नाही का! पण सांप्रत ते राहू द्या. प्रेम आणि आवड असल्यावर आपुलकी अन जिव्हाळा आपोआपच येतो. मग तो परब्रह्म श्रीकृष्ण असला, तरी यास अपवाद कसा होईल! असो."

...। मग म्हणे आईकें सांगतसों। धनुर्धरा।।१०-२०८।।
तऱ्हीं तुवां पुसिलियां विभुति। तेयांचें अपारपण सुभद्रापति।
ज्या माझियांचि परि माझिये मती। आकलती ना।।२०९।।
येऱ्हवीं तऱ्हीं मी कैसा केवढा।
म्हणौनि आपणपयांही नव्हेंचि फुडा।
ययालागीं प्रधाना जियां रूढा।
ययां विभूति आईकें।।२१०।।

श्रीकृष्ण म्हणू लागले, "हे धनुर्धरा! तू विभूती विचारल्यास, त्या ऐक. हे सुभद्रापती! त्या इतक्या अगणित आहेत की त्या माझ्याच असूनही माझ्या बुद्धीला त्यांचा पार लागत नाही. आपल्या अंगावर किती रोम आहेत, हे ज्याचे त्यालासुद्धा मोजता येत नाहीत, त्याचप्रमाणे या माझ्याच विभूती किती आहेत, तेही मला गणना करून सांगता येत नाही. एरवी मी कसा आहे, केवढा आहे, याची माझी मलाच कल्पना नाही. म्हणून माझ्या केवळ मोजक्याच पण प्रमुख अशा विभूती सांगतो. ते ऐक."

जियां जाणितलियासाठीं।
आघवियां जाणितलियां होती किरीटी।
जैसें बीज आलियां मुठीं। तरुचि आला होय।।१०-२१२।।
कां उद्यान हातां चढिलें। तऱ्हीं आपैसीं सांपडली फलें फुलें।
तेवीं देखिलियां जियां देखवलें। विश्व सकल।।२१३।।
येऱ्हवीं सांचचि गां धनुर्धरा। नाहीं शेंवटु माझियां विस्तारां।
पैं गगना ऐसियां अपारा। मजमाजीं लपणें।।२१४।।

"या विभूती तुला एकदा नीट समजल्या की माझ्या इतर असंख्य विभूती जाणल्यागत आपसुकच होईल. बीज आपल्या हाती लागले की जसा त्यापासून उत्पन्न होणारा वृक्ष आपल्या आवाक्यात आलाच म्हणून समजावे; किंवा बागबगिचा आपला झाला की आपच त्यातली फळे व फुले आपलीच जशी होतात; तसेच या विभूतींचे स्वरूप एकदा पाहिले की सगळ्याच विभूतींनी व्यापलेले हे अमर्याद विश्वस्वरूप पाहिल्यागत होते. अर्जुना! माझ्या व्यापकतेला काहीच सीमा नाही. अपार असे गगनसुद्धा माझ्या या विशाल स्वरूपात सहजच लपून जाते."

विभूतिकथन

असे म्हणत आपल्या मुख्य विभूती सांगण्यास भगवंत सुरुवात करतात, ती अशीः

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च।।१०-२०।।

"अर्जुना! सर्व भूतसमुदाय हा माझी विभूती आहे. त्यांच्यांत स्थित असलेला अंतर्यामी आत्मा ही माझी मुख्य विभूती आहे. तसेच त्या भूतैकमात्रांची उत्पत्ती, स्थिती व अंत या माझ्या प्रधान विभूती होत."

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान्।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी।।१०-२१।।

"बाराही आदित्य याही माझ्या विभूती असून त्यातील प्रमुख विभूती विष्णु मीच आहे. सर्व प्रकाशमान पदार्थांत मीच असून त्यातील रवी ही माझी मुख्य विभूति आहे. मरुद्गण माझ्याच विभूती आहेत व त्यांतील प्रमुख मरीचिही मीच आहे. नक्षत्रमंडल हे माझेच स्वरूप आहे व त्यांतील चंद्रमा ही माझी विभूती प्रमुख आहे."

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः।
इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना।।१०-२२।।
रुद्राणां शङ्करश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम्।
वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम्।।१०-२३।।

"वेदस्वरूपातील सामवेद, देवगणांतील इंद्र, इंद्रियसंघातस्वरूपातील मन, भूतसमुदायातील चेतना, समस्त रुद्रगणरूपातील शंकर, यक्षराक्षससंघातस्वरूपातला कुबेर, अष्टवसूंतील अग्नी, तसेच पर्वतश्रेणीरूपातील मेरु या माझ्या मुख्य मुख्य विभूती आहेत."

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम्।
सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः।।१०-२४।।

"पुरोहितगणस्वरूपातील बृहस्पति, सेनानायकरूपात स्कंद, जलाशयरूपातला सागर अशाही माझ्या प्रमुख विभूती आहेत."

महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम्।
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः।।१०-२५।।

"महर्षीसुद्धा माझीच रूपे आहेत व त्यांच्यांत भृगु हे माझी प्रमुख विभूती आहेत. वाणी ही मत्स्वरूप असून त्यातील परावाक् आणि उच्चारल्या जाणाऱ्या वाचेतील अक्षस्वरूपातील *ॐकार* ही माझी प्रधान रूपे आहेत. समस्त *यज्ञ* म्हणजे मीच! त्यांच्यातला *जपयज्ञ* ही माझी प्रधान विभूती आहे. तसेच माझे जे स्थावरजंगमात्मक स्वरूप आहे, त्यात हिमालय हा पण माझी मुख्य विभूती आहे."

"माझें व्यापकपण। विभूतियोगें जाण"

त्या दिव्य आत्म्याचा असा उत्कट आविष्कार करणाऱ्या विभूतींविषयी ज्ञानेश म्हणतातः

आईकें कुटिलालकमस्तका। धनुर्वेदत्र्यंबका।
मी आत्मा असें एकैकां। भूतमात्राचां ठाईं।।१०-२१५।।
आंतुलीकडे मीचि यांचां अंतःकरणीं। भूताबाहेरीं माझी गंवसणी।
आदि मी निर्वाणी। मध्यही मीचि।।२१६।।
जैसें मेघां या तलीं वरीं। एक आकाशचि आंत बाहेरी।
आणि आकाशचि जालें अवधारीं। असणेंहीं आकाशीं।।२१७।।
पाठीं लया जैं वेळीं जाती। तैं वेळीं आकाशचि होऊनि ठाती।
तेवीं आदि स्थिती अंत गती। भूतांसि मी।।२१८।।
ऐसे बहुंवस आणि व्यापकपण।
माझें विभूतियोगें जाण।...।।२१९।।

"कुरळ्या केसांनी शोभणारे मस्तक असणाऱ्या अर्जुना! हे धनुर्वेदात साक्षात त्र्यंबकासारख्या निपुण असलेल्या गांडीवधाऱ्या! ऐक. प्रत्येक प्राणिमात्राठायी असणारा आत्मा तो मीच आहे. त्यांच्या अंतःकरणी मीच आहे आणि त्यांच्या शरीरात व बाहेरसुद्धा या समस्त अन्नब्रह्मात मीच आहे. त्यांच्या उत्पत्तीचे कारण, त्यांचे पोषण करणारा व त्यांना जीवन देणारा, तसेच त्यांचा मृत्यू ही सर्व मीच आहे. मेघांस जसे सर्वदूर - आत - बाहेर - खाली - वर आकाशच असते; ते जसे आकाशात उत्पन्न होतात, त्यातच वावरतात व अंती त्यांतच त्यांचा जसा लय होतो; आणि लय झाल्यावरही ते जसे आकाशगतच होऊन जातात; त्याचप्रमाणे या भूतमात्रांचे मजशी नाते आहे. त्यांचा आदि - मध्य - अंत मीच आहे. असे अनेकत्व व व्यापकपण असणाऱ्या मला तू विभूतियोगाद्वारे जाणून घे."

गीतेतील योग शब्दाचा अर्थ::::

अध्यायसंज्ञा

"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।पा.यो.सू.।।" या सूत्राचा असा विभूतियोगात परिपोष झाल्याचे आपणास जाणवून येते. म्हणून पुनश्च स्पष्ट होते की गीतेतील अध्यायसंज्ञक *साङ्ख्ययोग, कर्मयोग, ध्यानयोग* इ.योगवाचक शब्दांनी ***योग*** या शब्दाचा अर्थ वास्तविकरीत्या ***खरा योग*** असा घेता येत नाही. तो शब्द बव्हंशी ***युक्ती*** या अर्थी वापरलेला आहे. तसेच तो शब्द त्या त्या अध्यायातून येणाऱ्या प्रमुख विषयाचे अनुसंधान आणि *खरा योग* साधण्यास उपयुक्त ठरणाऱ्या विविध युक्त्यांशी संबंधित आहेः-

विभूतियोग या शब्दाचा अर्थ

जसे या स्थली म्हणजे दहाव्या अध्यायी *विभूतियोग* सांगितला आहे व ज्ञानेशही *ओवी क्र. १०-२१९* मधून सांगत आहेत की ईश्वराचे व्यापकपण ***विभूतियोगे*** जाणून घ्यावे. याठिकाणी *विभूतियोगें* या ज्ञानेश्वरांच्या शब्दाचे दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे *विभूति* नांवाच्या *योगाद्वारे* आणि दुसरा म्हणजे *विभूतींच्या द्वारे* ! *विभूति* नांवाचा *योग* जर गीता सांगत असेल, तर तो कोणता असा प्रश्न येथे उद्भवतो.

जर विभूतींपैकी कोणती एक विभूती सगुणोपासनेसाठी घ्यावी असा अर्थ घेतला जाईल, तर हा *योग* नसून त्याचे एक उपांग मात्र आहे - म्हणजे ध्येय्य वस्तू कोणती असावी एवढाच मर्यादित आयाम या योगनिर्देशाचा असणार! सर्वच विभूती भगवंताच्या आहेत आणि हे जाणून त्याची उपासना करावी, असा दुसरा अर्थ घेतला, तर तो ज्ञानाचे एक उपांग मात्र होईल व तेही *परोक्षज्ञानाचे* म्हणूनच धरावे लागेल. म्हणजे ज्ञानयोगाच्या साधनेचा आणि विस्तृत अर्थाने कर्मयोगाच्या साधनेचा हा एक भाग होईल. म्हणजे शेवटी या अध्यायी ***विभूतियोग*** म्हणून काही योगाचा एक वेगळा स्वतंत्र प्रकार सांगितला आहे, असा अर्थ संभवत नाही तो नाहीच! हीच गोष्ट थोड्याफार फरकाने गीतेतील विविध योगनामांची आहे, एवढे जिज्ञासूंनी ध्यानी ठेवणे आवश्यक आहे. असो.

आपल्या दृष्टीने पाहाता *विभूतींचे माहात्म्य - परमेश्वर सर्व विश्वात भरून राहिला आहे हे तत्त्वज्ञान व ते अंगी मुरावे म्हणून विश्वातील प्रत्येक पदार्थात - प्रत्येक भावात - भगवंतास पाहण्याचा अभ्यास करणे - त्याच्या त्या त्या विभूतीस चित्ताचा आलंब विषय करून ध्यान करणे व सविकल्प समाधि प्राप्त करून घेणे असा भाग या अध्यायी येतो. यासच विभूतियोगाद्वारे भगवंतास जाणून घेणे, असे*

ज्ञानदेव या १०-२१९ ओवीत म्हणताहेत, हे आता आपल्या लक्षात आले आहे.

गीतेतील विविध योग

गीतेत जे असे अनेक *योगांत* शब्द वापरलेले आहेत, त्यांचा मतितार्थ यावरून लक्षात घेतला पाहिजे. भगवत्स्वरूपी लीन करणारा ***खरा योग*** साधण्यासाठी आवश्यक असणारे हे अनेकानेक ***योग*** वा या युक्त्या आहेत. परंतु त्या सर्व म्हणजे विविध *योगधारा* आहेत, असे नव्हे. केवळ कर्मयोगाद्वारे वा बुद्धियोगाद्वारे वा कर्मसंन्यासयोगाद्वारे वा ज्ञानयोगाद्वारे वा भक्तियोगाद्वारे भगवंत सापडेल व श्रेष्ठ समाधिसुख प्राप्त होईल असा समज येथे गौण समजला आहे.

श्री. के.वि. बेलसरे सांगतात त्याप्रमाणे बहुजन साधकांसाठी *सगुण* ईश्वराची उपासनाच ईश्वरदर्शनासाठी योग्य आहे. त्यांच्या *श्रीमद्भगवद्गीता* या ग्रंथात ते म्हणतात त्याप्रमाणे अंतर्यामीच्या त्या ईश्वराचे दर्शन घेण्यासाठी प्रथम बाह्य पसारा दृष्टीआड करून आत उतरावे लागते. त्यासाठी *ज्ञान, ध्यान, कर्म, व भक्ती* असे चार मार्ग आहेत. हे मार्गच वर म्हटल्याप्रमाणे आपल्या दृष्टीने साधनांतर्गत *योग वा युक्ती* या सदरात येतात. परंतु मनुष्य कोणत्याही मार्गाने आत उतरला, तरी गर्भागारात शिरण्यास *ईश्वराचे ध्यान व निदिध्यास* हेच एकमेव द्वार आहे, असेही श्री. बेलसरे यांचे म्हणणे आहे. श्री. बेलसरे सांगतात ते चार मार्ग अत्यंत प्राथमिक पायरीवरील आहेत. गीता-ज्ञानेश्वरीच्या व्यापक अर्थाने ते घेता येत नाहीत. त्या पातळीवर ते वेगवेगळे मार्ग म्हणून उरत नसून त्यांचा संगम होऊन एकच एक मार्ग उरतो.

तसेच आणिक थोडासा - स्वल्प - फरक करून असे म्हणावेसे वाटते की मनुष्यास *मन- बुद्धी - कर्मेंद्रिये - ज्ञानेंद्रिये - चेतना - धृति - दशेंद्रियांचे विषय - पंचमहाभूते - अहंकार - इच्छा- द्वेष - सुख - दुःख - संघात* अशा छत्तीस तत्त्वांचा *क्षेत्रसमुदाय* असतो. त्यात असणारा क्षेत्री म्हणजे *आत्मा* आहे. *त्यापर्यंत पोहोचून या समस्त छत्तीस तत्त्वांचा त्याच्यात लय करणे, त्या अलिप्त आत्म्याच्या रूपात हा छत्तीस तत्त्वांचा संघात एकरूप करणे यासच खरा योग असे म्हटले पाहिजे.*

ही *छत्तीस तत्त्वे* वा हे *छत्तीस भाव* आपापल्या प्राकृतिक स्वभावगुणधर्मानुरूप सतत वर्तत असतात. त्यांना आत्म्याकडे वळवण्यासाठी विविध *युक्त्या* वा *योगांत* शब्दवाचक विविध योगसाधने वापरावी लागतात. परंतु त्यातले कोणतेही एक साधन या समस्त संघातास प्रभुगामी करून तेथपावेतो नेऊन पोहोचवू शकेल इतके समर्थ नाही. म्हणून या विविध तत्त्वांशी संबंध असणारे युक्तिप्रयोग ज्यात अंतर्भूत असतात, तोच *खरा संपूर्ण योगमार्ग* !

असाच एकमेव योगमार्ग गीतेला उपदिष्ट करावयाचा असल्याने त्याची उपांगेच असे हे विविध (कर्मयोगादी) ***योगांत*** शब्दवाचक *योग* अथवा *युक्तिप्रकार* गीतेत वर्णिले आहेत. ज्ञानदेवही प्रसंगोपात्त गीतेतील याच अर्थाने *कर्मयोग, ज्ञानयोग* इ.*योगांत* शब्द वापरतांना दिसतात, ते काही विविध *योगप्रकार* सांगण्यासाठी नसून श्रीगोपालकृष्णांच्या उक्तीनुसार *योग* या शब्दाचा *युक्ती* या मर्यादित अर्थाने ते प्रयोग करतात. गीतेतील एकमेव योगमार्गाचे - राजविद्येचे - प्रकटन ज्ञानेशांनी सहाव्या अध्यायात ***पंथराज*** आणि अठराव्या अध्यायात ***क्रमयोग*** असे नामकरण करून केलेले आहे.

पंथराजातील छत्तीस तत्त्वांवर आधारित योगयुक्ती व सर्व योगांचा समावेशः

सदर ***पंथराजात सहज पहावे तरः पंचमहाभूतांची आटणी; चेतना वा कुंडलिनीचे उत्थापन व अहंकारासह इतर सर्व तत्त्वे वा तत्त्वसंघाताची परमशिवस्वरूपी तिच्याद्वारे मिळणी; मनास जिंकणारा ध्यानमार्ग; बुद्धीस ईश्वरस्वरूपाचा निर्णय करत त्याच्याठायी लीन करविणे; त्यासाठी विभूतियोग, ज्ञानयोग, साङ्ख्ययोग इ.प्रणाली;दशेंद्रिये व त्यांचे दशविषय यांचे उदात्तीकरण करण्यासाठी कर्मयोग, कर्मसंन्यासयोग, मोक्षसंन्यासयोग, यम-नियमादी प्राणायाम-प्रत्याहारादी साधने, श्रद्धात्रयांचे यथातथ्य विनियोजन, इ.गोष्टी; इच्छा–द्वेष-सुख-दुःख या संघातावर आधारित समत्वबुद्धीचा योगप्रकार; या संपूर्ण देहेंद्रियसंघातास खऱ्या योगमार्गाकडे प्रवृत्त करविणारे प्रमुख असे ज्ञान- भक्ती - योग - कर्म - ध्यान हे प्रकार; इ. सर्वांचा अंतर्भाव आहे.*** म्हणून या पंथराजास ज्ञानदेवांनी सर्वत्र सर्वश्रेष्ठ म्हणून गौरवलेले आहे आणि हाच गीतेने सांगितलेला ***खरा योगमार्ग*** आहे, असे आपल्यासुद्धा निदर्शनास येते, ते वरीलप्रमाणे! असो.

प्रधान विभूतिः:::

"जीवुचि करौनि श्रवण। आईकोनि आईकें"

आता श्रीकृष्ण पुढे काय सांगतात, पाहाः

...। तऱ्हीं जीवुचि करूनि श्रवण।
आईकौनि आईक।।१०-२१९।।
याहीवरी तियां विभूति। सांगणें ठेलें तुजप्रति।
सांघेन म्हणितलें तुज प्रीती। त्या प्रधाना आईकें।।२२०।।

"अर्जुना! असा हा माझा विभूतियोग तू आपल्या या छत्तीस तत्त्वांच्या संघातासह असणाऱ्या जीवाचे कान करून श्रवण कर आणि ते सर्व ऐकून त्याचे यथायोग्य चिंतन व मनन कर. माझ्या व्यापक स्वरूपाचे वारंवार वर्णन करून सांगून झाले आहे. आता विभूती त्या वेगळ्या अशा कोणत्या सांगाव्यात! पण तरीही तुजवरील प्रीतीने त्या सांगतो असे म्हटले आहे, तर ऐक. माझ्या प्रधान विभूती सांगतो."

हें बोलौनि तो कृपावंतु। म्हणे विष्णु मी आदित्यां आंतु।
रवी मी रश्मिवंतु। सुप्रभांमाजीं।।१०-२२१।।
मरुद्गणांचां वर्गीं। मरिचि म्हणे मी शार्ङ्गी।
चंद्रु मी गगनरंगीं। तारां माजीं।।२२२।।

वेदां आंतु सामवेदु। तो मी म्हणे गोविंदु।
देवांमाजीं मरुद्बंधु। महेंद्रु तो मी।।२२३।।
इंद्रियांआंतु अकरावें। मन तैं मी हें जाणावें।
भूतांमाजीं स्वभावें। चेतना तैं मी।।२२४।।

असे म्हणून तो कृपावंत श्रीकृष्ण म्हणू लागला, "मी आदित्यांत विष्णु आहे. उत्तम तेजस्वी वस्तूत रश्मिवान असा सूर्य मी आहे." पुढे तो शार्ङ्गधारी कृष्ण म्हणतो की, "एकोणपन्नास मरुद्गणसमुदायातील मरीचि तो मीच आहे. आकाशरूपी रंगणातील तारामंडलात शोभणारा जो चंद्रमा तोही मीच आहे." तो गोविंद आणिक असे म्हणाला की, "वेदांत सामवेद आणि देवांमध्ये मरुतांचा बंधु जो देवेंद्र तोही मीच आहे. इंद्रियसंघातातील अकरावे इंद्रिय म्हणजे मन - तेही मीच आहे. आणि भूतादींमध्ये असणारी चेतना हीही माझीच विभूती आहे, हे जाणून घे."

स्वर्गीय विभूती

पुढे श्रीकृष्ण म्हणतातः

अशेखांहीं रुद्रांमाझारीं। शंकर जो मदनारि।
तो मी एथ न धरी। भ्रांती कंहीं।।१०-२२५।।
यक्षरक्षोगणांआंतु। शंभुचा सखा जो धनवंतु।
तो कुबेरु मी हें अनंतु। म्हणतां जाहला।।२२६।।
मग आठांहीं वसूंमाझारीं। पावकु तो मी अवधारीं।
शिखराथिलियां सर्वोपरी। मेरु तो मी।।२२७।।
जो स्वर्गसिंहासना सावावो। सर्वज्ञते आदिचा ठावो।
तो पुरोहितांमाजीं रावो। बृहस्पति मी।।२२८।।

"सर्व रुद्रदेवतांतील शंकर - ज्याने मदनास क्रोधाने भस्म केले - तो म्हणजे मीच आहे, याविषयी शंकाच नको. यक्षराक्षसगणांतील *कुबेर* जो शंकराचा परममित्र आहे आणि धनवानांचा स्वामी आहे, तोही मीच आहे," असे अनंत म्हणाला. "अष्टावसूंतील अग्नी आणि उत्तुंगात्युत्तुंग पर्वतराजीतला मेरु या माझ्याच विभूती आहेत. इंद्राचा साहाय्यकर्ता, देवांचा गुरू, सर्वज्ञतेचा प्रारंभ जेथून होतो तो पुरोहितांचा स्वामी बृहस्पतीही मीच आहे."

त्रिभूवनींचियां सेनापतीं- । आंतु स्कंदु तो मी महामती।
जो हरवीर्ये अग्निसंगतीं। कृत्तिकांआंतु जाहला।।१०-२२९।।
सकलिकां सरोवरांसी। माझारीं समुद्रु तो मी जलराशी।
महर्षीआंतु तपोराशी। भृगु तो मी।।२३०।।

"शंकराच्या वीर्यापासून अग्नीच्या योगाने कृत्तिकांच्या ठायी ठेवलेल्या गर्भापासून झालेला त्रिलोकींच्या सेनानींमध्ये अग्रगण्य असणारा स्कंद तो मीच आहे. समस्त सरोवरांतील अपार जलधी असा समुद्र तो मीच आहे. महर्षींमधील केवळ तपोराशीच असे जे भृगु ऋषी, तेही माझी प्रधान विभूती आहेत."

अशेखांहीं वाचा- । आंतु नटनाच सत्याचा।
तैं आखर एक मी वैकुंठीचां। वेल्हालु म्हणे।।१०-२३१।।

"सर्व वाणींमध्ये जिच्यावर सत्य नाचत असते, अशा त्या परावाचेने उच्चारले जाणारे जे एकमात्र अक्षर, तो *ॐकार* वा प्रणवही मीच आहे," असे तो वैकुंठप्रिय श्रीकृष्ण म्हणाला.

"नामजपयज्ञु तो परम"::::

परब्रह्मनाम ही एक श्रेष्ठतम विभूती

समस्तांहीं यज्ञांचां पैकीं। जपयज्ञु तो मी इयें लोकीं।
जो कर्मत्यागें प्रणवादिकीं। निफजविजे।।१०-२३२।।
नामजपयज्ञु तो परम। बांधूं न शके स्नानादि कर्म।
नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।२३३।।

"कर्म ब्रह्मार्पण करत ***"ॐ तत् सत्"*** या उच्चाराने जो या लोकी केल्या जाणाऱ्या समस्त यज्ञांतील सर्वश्रेष्ठ असा ***जपयज्ञ*** आहे, तोसुद्धा मीच आहे. असा हा *नामजपयज्ञ*, जो *ब्रह्मनाम* घेत संपन्न होतो, त्यास स्नानादी शुचिता - अशुचिता इ.चे स्थळकाळादींचे कोणतेही बंधन नसते. इतर यज्ञांचे तसे नसते. हाच यज्ञ सर्वोत्कृष्ट स्थितीत संपन्न होतो, तेव्हा तो ***अजपाजप*** याही नांवाने ओळखला जातो. या नामजपयज्ञाने सर्व धर्म - अधर्म, पुण्य - पाप ही पावन होतात. त्यायोगे साधकास मोक्षसुखाची प्राप्ती होते. कारण वेदोक्तीनुसार *परब्रह्माचे नाम म्हणजे साक्षात परब्रह्मच होय.*"

अशा प्रकारे ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।पा.यो.सू.।।"*** या सूत्राची आणखी उकल होते. सतराव्या अध्यायी जो *कर्मब्रह्मार्पणयोग* व त्यासाठी परब्रह्मनामाचा - ***ॐतत् सत्*** या त्रिनामांचा जो विनियोग सांगितला आहे, तो सदर पातञ्जलयोगसूत्राची प्रायोगिक भूमिका स्पष्ट करणारा आहे. तसेच ***परब्रह्मनाम*** ही परब्रह्माची अत्यंत श्रेष्ठ विभूती असल्याने केवळ तिच्या जपानेही हे सूत्र प्रायोगिकरीत्या आचरणात आणता येते, असेसुद्धा या ओव्यांतून कळून येते. फक्त ***"तदर्थभावनम्"*** हे सूत्र ***"तज्जपा"*** च्या बाबत पक्के ध्यानात ठेवणे आवश्यक आहे, याची जिज्ञासूंनी व्यवस्थित नोंद घ्यावी! असो.

स्थावरां गिरिवरां आंतु। पुण्यपुंजु जो हिमवंतु।
तो मी म्हणे कांतु। लक्ष्मीयेचा।।१०-२३४।।

पुढे तो लक्ष्मीपती म्हणतो की, "हे अर्जुना! अचल अशा सर्व स्थावरांमध्ये, तसेच गिरिवरांमध्ये निखळ पुण्यराशी असा जो हिमवान पर्वत आहे, तो म्हणजे मीच आहे, असे जाण."

प्राणिभूतमात्रांतील विभूतिमत्त्व

पुढे भगवंत म्हणतातः

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः।
गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः।।१०-२६।।
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम्।
ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम्।।१०-२७।।

"सर्व वृक्ष या माझ्या विभूती असून त्यातील मुख्य असा अश्वत्थ वृक्ष म्हणजे मीच आहे. देवर्षींमध्ये नारद, गंधर्वांपैकी चित्ररथ,

सिद्धांमध्ये कपिल मुनी, अमृतमंथनसमयी प्राप्त झालेला *उच्चैःश्रवा* हा अश्वांमध्ये, तसेच हत्तींमध्ये त्या समयीचाच *ऐरावत* या माझ्याच विभूती आहेत."

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक्।
प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः।।१०-२८।।
अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम्।
पितृणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम्।।१०-२९।।

"नरांमध्ये राजा, आयुधांतील वज्र, धेनूंमधील कामधेनू, प्रजननशक्तीचा प्रेरक असा काम, सर्पांमध्ये वासुकी, नागांमध्ये अनंत वा शेषनाग, जलदेवतांमध्ये वरुण, पितृगणांपैकी अर्यमा, विश्वनियामक शक्तींमध्ये यम अथवा साधकांच्या संयमित आचरणातील यम,नियमादी ह्याही माझ्याच विभूती आहेत."

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम्।
मृगाणां च मृगेन्द्रोऽहम् वैनतेयश्च पक्षिणाम्।।१०-३०।।
पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम्।
झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी।।१०-३१।।

"दैत्यातील प्रल्हाद, कलन वा गणना करणाऱ्या मितींमध्ये काल, पशूंमध्ये सिंह, पक्ष्यातील गरुड, वेगवान वाहणाऱ्या वस्तूंतील वायू, शस्त्रधारी योद्ध्यांमधील श्रीराम, जलचरांपैकी मगर, तसेच सर्व जलप्रवाहांमध्ये जाह्नवी वा गंगा नदी अशा माझ्या प्रमुख विभूती आहेत."

"अमृतांशु तो मी"

सर्वच प्राणिमात्रांमध्ये-पदार्थांत-वस्तूंत भरून असलेल्या त्या भगवत्स्वरूपाच्या अशा या विभूतींबाबत ज्ञानेश म्हणतातः

कल्पद्रुम हन पारिजातु। गुणें चंदनुही वाड विख्यातु।
तऱ्हीं ययां वृक्षजातां आंतु। अश्वत्थु तो मी।।१०-२३५।।
देवऋषी आंतु पांडवा। नारदु तो मी जाणावा।
चित्ररथु मी गंधर्वां। सकलिकांमाजीं।।२३६।।
ययां अशेखांही सिद्धां-। माजीं कपिलाचार्यु मी प्रबुद्धा।
तुरंगजातां प्रसिद्धां-। आंतु उच्चैःश्रवा मी।।२३७।।
राजभूषण गजांआंतु। अर्जुना मी गां ऐरावतु।
पयोराशी सुरमथितु। अमृतांशु तो मी।।२३८।।

"कल्पवृक्ष, पारिजात, तसेच सुप्रसिद्ध शीतल व सुगंधी चंदन अशांसारखे सर्व वृक्षच जरी माझ्या विभूती असलेत, तरी त्यांच्यातील *अश्वत्थ* वृक्ष म्हणजे मीच आहे. देवऋषींमध्ये *नारद,* सर्व गंधर्वांपैकी *चित्ररथ,* एकजात सर्व सिद्धांतील *कपिलमहामुनी* या, हे अर्जुना! माझ्या विभूती होत. अश्वातील प्रसिद्ध *उच्चैःश्रवा,* तसेच राज्यलक्ष्मीचे द्योतक अशा हत्तींमधील *ऐरावत* हे दोन्ही सुरासुरांच्या क्षीरसागर मंथनसमयी अमृताच्या अंशातून उत्पन्न झाले. तेही माझ्याच श्रेष्ठ विभूतींपैकी होत."

ययां नरांमाजीं राजा। तो विभूतिविशेष माझा।
जेयांतें सकल प्रजा। होऊनि सेविती।।१०-२३९।।
पैं आघवियां हातियेरां-। आंतु वज्र तैं मी धनुर्धरा।
जैं शतमखोत्तीर्णकरा। आरूढौनि असे।।२४।।

"प्रजाजनांनी प्रतिष्ठापिलेला *राजा,* ज्याची प्रजा मनापासून सेवा करते, तोसुद्धा हे बुद्धिमान अर्जुना! समस्त नरजातीतील माझी विशेष विभूती म्हणून जाण. शतयज्ञ सांग पाडल्यामुळे इंद्रपद मिळते. अशा त्या इंद्राच्या हाती जे विराजमान होते, ते *वज्र* ही सर्व आयुधांतील माझी विभूती होय."

धेनूंमध्ये कामधेनु। तैं मी म्हणे विष्वक्सेनु।
जन्मवितयां आंतु मदनु। तो मी जाणें।।१०-२४१।।
सर्पकुलांआंतु अधिष्ठाता। वासुकी गां मी कुंतीसुता।
नागांमाजीं समस्तां। अनंतु तो मी।।२४२।।

पुढे तो विष्वक्सेन श्रीकृष्ण म्हणतो, "धेनूंमध्ये *कामधेनू,* जन्मकारणांमध्ये *काम,* सर्पकुलाचा प्रमुख *वासुकी* आणि समस्त नागांमध्ये *अनंत* हे सर्व, हे कुंतीपुत्रा! माझ्याच विभूती म्हणून ओळखाव्यात"

"दैत्यांचियां कुळीं। प्रह्लादु तो मी"

अगां यादसांआंतु। जो पश्चिमप्रमदेचा कांतु।
तो वरुणु मी हें अनंतु। सांगतु आहे।।१०-२४३।।
आणि पितृगणां समस्तां-। माजीं अर्यमा जो पितृदेवता।
तो मी हें तत्त्वतां। बोलत आहे।।२४४।।
जगाची शुभाशुभें लिहिती। प्राणियांचियां मानसीचां झाडा घेती।
मग केलियांनुरुप होती। भोगनियम जैं।।२४५।।
तेयां नियमितयांमाजीं यमु। जो कर्मसाक्षी धर्मु।
तो मी म्हणे रामु। रमापती।।२४६।।

पुढे तो अनंत सांगू लागला, "पश्चिमदिशा या प्रमदेचा कांत जो *वरुण,* तो सर्व जलचरांमध्ये माझी विभूती आहे. तसेच खरे म्हणजे समस्त पितरांमधील *अर्यमा* म्हणून जी पितृदेवता आहे, ती पण मीच आहे." मग तो रमापती म्हणाला, "जगांतील सर्वांच्या शुभाशुभ कर्मांची - पापपुण्यांची नोंद घेऊन, त्यांच्या मनोप्रवृत्तींना अनुसरून त्यांच्या कर्मांनुसार फले देणारे नियंते असे जे सुख-दुःख देणारे नियामक आहेत, त्यातला कर्मसाक्षी *यमधर्म* तो म्हणजे मी प्रत्यक्ष आत्मारामच आहे."

अगां दैत्यांचियां कुळीं। प्रह्लादु तो मी न्याहाळीं।
म्हणौनि दैत्यभावादिमैळीं। लिंपेचिना।।१०-२४७।।
पैं कलितयांमाजीं महाकालु। तो मी म्हणे गोपालु।
श्वापदां आंतु शार्दूलु। तो मी जाण।।२४८।।
पक्षिजातीमाझारीं। गरुड तो मी अवधारीं।
यालागीं जो पाठीवरी। वाहों शके मातें।।२४९।।

"आणि दैत्यांच्या कुळांतील शिरोमणी - कुलभूषण असा जो *प्रह्लाद*, तोही मीच असल्याने त्यास दैत्यभावाचा मळ लिंपला गेला नाही. ग्रासणाऱ्यांमध्ये *महाकाळ* आणि श्वापदांतील *सिंह* मीच आहे." पुढे तो गोपाळ म्हणतो, "सर्व पक्षिजातीतील *गरुड* सुद्धा मीच आहे व म्हणूनच तो मज श्रीविष्णूचा भार वाहाण्यास समर्थ आहे."

"श्रीरामु तो मी"

पृथ्वीचियां पैसारा- । माजीं घडी न लगतां धनुर्धरा ।
एकेंचि उड्डाणें सातांहीं सागरां ।
प्रदक्षिणा करी जो ।।१०-२५०।।
तेयां वाहिलियां गतिमंतां- । आंतु पवनु तो मी पांडुसुता ।
शस्त्रधरां समस्तां- । माजीं श्रीरामु तो मी ।।२५१।।
जेणें सांकडिलियां धर्माचेनि कैवारें ।
आपणपयां धनुष्य करूनि दुसरें ।
विजयलक्ष्मीये एकें मोहरें । केलें त्रेतीं ।।२५२।।
पाठीं उभें ठाकूनि सुवेलीं । प्रतापलंकेश्वराचीं सिसालीं ।
गगनीं उदो म्हणतयां हस्तबली । दिधलीं भूतां ।।२५३।।
जेणें देवांचा मानु गिंवसिला । धर्मासि जीर्णोद्धारु केला ।
सूर्यवंशीं उदैजला । सूर्यु जो कां ।।२५४।।
तो हतियेरु परजितयांआंतु ।
रामचंद्रु मी जानकीकांतु ।..।।२५५।।

"हे धनुर्धरा! या पृथ्वीच्या अफाट विस्तारास, सप्तसागरांना एकदम लंघून जात क्षणभरसुद्धा न लागता एकाच उड्डाणात प्रदक्षिणा करणारा *वायू* हा सर्व गतिमान पदार्थांतील माझी विभूती आहे. तसेच समस्त शस्त्रधारी योद्ध्यांमधील ***श्रीराम*** तो मीच आहे. त्याने तर संकटात सापडलेल्या धर्माचा, ऋषिमुनींचा, देवादिकांचा, प्रजाजनांचा कैवारी होऊन त्रेतायुगी स्वतःच जणू दुसरे धनुष्य होऊन विजयलक्ष्मीस स्वतः एकट्याकडे खेचून आणली. सुवेलनामक पर्वतशिखरावर आरूढ होऊन त्याने प्रतापी लंकेश्वर रावणाची दहाही मस्तके उडवून आकाशात घनघोर गर्जना करत वावरणाऱ्या भुतांच्या हाती भक्षण करण्यास बळी दिली. त्याने देवांचा गेलेला मान शोधून आणून त्यांचा त्यांना परत केला. धर्माचा त्याने जीर्णोद्धार केला. तो जानकीपती श्रीरामचंद्र म्हणजे सूर्यवंशात उगवलेला प्रत्यक्ष सूर्यच! तो तर माझी अत्यंत श्रेष्ठ विभूती आहे. त्याच्या नामघोषाने अवघी पापे जळून भस्म होतात, एवढे अपार त्याच्या नामाचेसुद्धा माहात्म्य आहे."

विभूतिवर्णनास सहस्रो जन्मही अपुरेच!

...। मकर मी पुच्छवंतु । जलचरांमाजीं ।।१०-२५५।।
पैं समस्तांहीं वोघां- । मध्यें जैं भगीरथें आणितां गंगा ।
जह्नुने गिळीली मग जंघा । फाडूनि दिधली ।।२५६।।
तैं त्रिभुवनैकसरिता । जाह्नवी मी पांडुसुता ।
जलप्रवाहां समस्तां । माझारीं जाणें ।।२५७।।
ऐसेनि वेगलालां सृष्टीपैंकीं । विभूतिनाम सुतां एकेकीं ।
सगळेनि जन्मसहस्रे अवलोकीं । अर्ध्या नव्हती ।।२५८।।

"तसेच भगीरथाने महाप्रयत्नाने स्वर्लोकीची जी गंगा या पृथ्वीतलावर आणली, जी जह्नुने गिळली व नंतर जंघा फोडून पुनः सोडली, या कारणाने जिचे नांव *जाह्नवी* असे पडले आहे, अशी जी त्रिभुवनातील सरितांत एकमेव श्रेष्ठ आहे, ती म्हणजे सर्व जलप्रवाहांतील माझी विभूती आहे. आणि जळात वावरणारे जे समस्त जलचर आहेत, त्यांतील पुच्छ असणारे *मकर* जे आहेत, ते पण मीच आहेत. हे अर्जुना! अशा रीतीने जर तुला माझ्या सर्वच्या सर्व विभूती सांगावयाच्या म्हटल्या तर या समस्त सृष्टीतील विभूती नुसत्या सांगण्यासाठी जरी पूर्ण आयुष्य असलेले सहस्रो जन्म गेले तरी अर्ध्यासुद्धा सांगून होणार नाहीत, इतक्या माझ्या अगणित विभूती या विश्वात आहेत."

आणिक काही विभूती::::

"अध्यात्मविद्या विद्यानाम्"

वानगीदाखल अजून काही विभूतींचा निर्देश करत श्रीहरी म्हणतातः

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ।।१०-३२।।

"या सृष्टीतील सर्व पदार्थांचा आदि, मध्य व अंत हे मीच आहे. हे अर्जुना! विद्यांमध्ये अध्यात्मविद्या, तसेच वादविवादांतील शास्त्रसंबंधी वाद तो मीच आहे."

अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च ।
अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ।।१०-३३।।

"अक्षरांमधील *अकार* व समासातील *द्वंद्व समास* हे मीच आहे. क्षयरहित *काल* तोही मीच आहे. या सर्व विश्वाची उत्पत्ती करणारा व विश्वैकरूपाने विराजमान झालेला तो *आदिपुरुष* मीच आहे."

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।
कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ।।३४।।

"सर्वांचा संहारक काळ असा *मृत्यू* पण मीच आहे. भविष्यकाली वा कल्पांती सर्व प्राणिमात्रांना मीच उत्पन्न करतो. देवतांमधील *कीर्ती, श्री, वाक्, स्मृति, मेधा, धृति आणि क्षमा* यांच्या वाचक देवता, त्याही मीच आहेत."

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम् ।
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ।।१०-३५।।

"चौदा सामप्रकारांतील *बृहत्साम* मीच आहे. छंदांतील *गायत्री* छंद मी आहे. मासांमध्ये *मार्गशीर्ष* आणि ऋतूंमध्ये *वसंत* तो मीच आहे."

"ऐसियां व्यापकां मातें जैं जाणावें"

जैसीं आघवींचि नक्षत्रें वेंचावीं। ऐसीं चाड उपजैल जैं जीवीं।
तैं गगनाची बांधावीं। लोथ जेवीं।।१०-२५९।।
कां पृथिवीये परमाणूंचा उगाणा घ्यावा।
तऱ्हीं भूगोलचि कंखें सुवावा।
तैसा विस्तारु माझा पाहावा। तऱ्हीं जाणावें मातें।।२६०।।
जैसें शाखांसीं फूल फल। एकीहेलां म्हणिजे सकल।
तऱ्हीं उपडौनियां मूल। जेवीं घेपें हातीं।।२६१।।
तेवीं माझें विभूतिविशेष। जऱ्हीं जाणों पाहिजेती अशेष।
तऱ्हीं स्वरूप एक निर्दोष। जाणिजे माझें।।२६२।।

ज्ञानेश्वर श्रीकृष्णांचे बोल आपल्या भाषेतून स्पंदित करत आहेत, ते असे: "तारांगणींची सर्व नक्षत्रे वेचून घ्यावीत अशी इच्छा झाली, तर त्या मनुष्याने आकाशाचेच गाठोडे बांधून घेतले पाहिजे. अथवा पृथ्वीतील परमाणू न् परमाणू मोजावा, असे ज्याला वाटत असेल, त्याने पृथ्वीचा हा गोल बगलेत मारला पाहिजे. त्याचप्रमाणे माझे विशाल स्वरूप आणि हा विभूतिविस्तार ज्यास जाणून घ्यावयाचा असेल, त्याने खरे तर माझे समग्र ज्ञानच मिळवावे. खांद्यांसह झाडाची फळे -फुले-पर्णसंभार इ.सर्व एकाच वेळी हाती यावेत, असे वाटले तर ते झाडच समूळ उपटून हातात घ्यावे लागेल. त्याचप्रमाणे जर माझे एकूण एक विभूतिविशेष जाणून घ्यावयाचे असतील, तर माझे निष्कलंक -निखळ-निरञ्जन स्वरूप जाणून घेणे आवश्यक ठरते."

येऱ्हवीं वेगळालियां विभूति। कायियेक परिससी किती।
म्हणौनि एकीहेलीं महामती। सर्व मी जाण।।१०-२६३।।
मी आघवियेची सृष्टी। आदिमध्यांती किरीटी।
ओतप्रोत पटीं। तंतु जेवीं।।२६४।।
ऐसियां व्यापकां मातें जैं जाणावें। तैं विभूतिभेदें काय करावें।
परि हें तुझी योग्यता नव्हें। म्हणौनि असो।।२६५।।

"एरवी माझ्या विभूती अगणित असल्याने तू त्या किती वेळ ऐकत राहणार आहेस! म्हणून हे बुद्धिवंत अर्जुना! एवढेच समजून घे की हे सर्व विश्वच मी आहे. ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** अशी श्रुती आहे. ती जाणून घे. तंतू जसा वस्त्रात इत्थंभूत भरलेला असतो, त्याप्रमाणे या अवघ्या सृष्टीच्या आदि-मध्य व अंतीही मीच एक आहे. माझी अशी व्याप्ती एकवार ज्याने ओळखली, त्यास विभूती वेगवेगळ्या जाणून घेण्याचे काय प्रयोजन! पण सांप्रत तुला हे सर्व उमजत नसेल, तर राहू दे!"

"ऐसा अपारु जो काळु"

कां जैं तुवां पुसिलियां विभूति।
म्हणौनि तियां आईक सुभद्रापति।..।।१०-२६६।।

"तू विचारल्याप्रमाणे, हे सुभद्रापती! माझ्या अजून काही विभूती सांगतो. त्या ऐक."

... तऱ्हीं आतां विद्यांमाजीं प्रस्तुतीं।
अध्यात्मविद्या तैं मी।।१०-२६६।।
अगां बोलतयांचियां ठायीं। वादु तो मी पाहीं।
जो सकलशास्त्रसंमतें कंहीं। सरेचिना।।१०-२६७।।
जो निर्वचू जातां वाढे। आईकिलियां उत्प्रेक्षे सलु चढे।
जेयांवरी बोलतयांची गोडें। बोलणीं होती।२६८।।
ऐसा प्रतिपादनामाजीं वादु। तो मी म्हणे गोविंदु।..।।२६९।।

"तर पहा. सर्व विद्यांचा राजा अशी जी *अध्यात्मविद्या* आहे, ती म्हणजे मीच आहे. आपापली मते प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रीपंडितांनी मांडलेले वाद हे मीच आहेत. सर्व शास्त्रांचे कधीच एकमत होत नसल्यामुळे या वादांचा कधीच समन्वय होऊ शकत नाही. या वादांचा जो विषय आहे, त्यांचा कितीही प्रयत्न केले तरी निर्णय होत नाही; कितीही ऐकले तरी तर्कसंगती लागत नाही आणि ज्या वादांचे प्रतिपादन केवळ ऐकण्यापुरते चांगले वाटते, पण ज्यांच्यामुळे बुद्धी भ्रमित होते, ते *वाद* म्हणजे मीच आहे."

...। अक्षरां आंतु विशदु। अकारु तो मी।।१०-२६९।।
पैं गां सामासांमाझारीं। द्वंद्व तो मी अवधारीं।
मशकालागौनि ब्रह्मावेरीं। ग्रासितां तो मी।।२७०।।
मेरुमंदारादिकीं सर्वीं। सहित पृथिवीयेतैं विरवी।
जो एकार्णवांतैंहीं जिरवी। जेथींचा तेथें।।२७१।।
जो प्रलयतेजा देत मिठी। सगलियां पवनांतैं गिली किरीटी।
आकाश जेयांचियां पोटीं। सामावलें।।२७२।।
ऐसा अपारु जो कालु। तो मी लक्ष्मीलीलु।
मग पुढती सृष्टीचा मेलु। सृजितां तो मी।।२७३।।

"पुढे तो गोविंद म्हणतो की, "वर्णमालेच्या अक्षरांचा प्रारंभ ज्यापासून होतो, तो *अकार* मीच आहे आणि व्याकरण वा भाषेत जे सामासिक प्रयोग केले जातात, त्यांतील *द्वंद्व* समासही मीच आहे. मशकापासून ते ब्रह्म्यापर्यंत सर्व प्राणिमात्रांना ग्रासणारा काळही मीच आहे. मेरुमंदारादी पर्वतांसह या सर्व पृथ्वीला विरवून टाकणारा, प्रळयकाळी जलमय झालेल्या समस्त सृष्टीला जेथल्या तेथे जिरवून टाकणारा, त्यावेळच्या कोटी सूर्यासम अशा महातेजालाही कवेत घेऊन त्यासह तेव्हाच्या महावायूसही गिळून टाकणारा, गगनही जो ग्रासून टाकतो, असा अपार *महाकाल*, तोही मीच आहे," असे तो लक्ष्मीशी लीला करणारा श्रीकृष्ण म्हणता झाला. पुढे तो म्हणतो की, "सृष्टीचा संघात प्रळयसंहारानंतर पुनश्च उत्पन्न करणारा *ब्रह्मा* ही मीच आहे." पुढे ऐका:

उत्तमोत्तम विभूती::::

देवतादी विभूती

आणि सृजिलियां भूतांतैं मीचि धरीं।
सकलां जीवनही मीचि अवधारीं।
शेखीं सर्वांतैं या संहारीं। तेव्हां मृत्युही मीचि।।१०-२७४।।

आतां स्त्रीगणांचां पैकीं। माझियां विभूति सात आणिकीं।
तियां आईक कवतिकीं। सांघिजतील।।२७५।।
तऱ्हीं नीच नवी जें कीर्त्ती। अर्जुना तैं माझी मूर्त्ती।
आणि औदार्येंसीं जैं संपत्ती। तैंहीं मीचि जाणें।।२७६।।
आणि तैं गां मी वाचा। जैं सुखासनीं न्यायाचां।
आरूढौनि विवेकाचां। मार्गीं चालें।।२७७।।

"तसेच या उत्पन्न झालेल्या सृष्टीतील भूतांना धारण मीच करतो. त्यांचे जीवनही मीच आहे आणि पहा, त्यांचा अंती मीच संहार करतो. म्हणून त्या भूतमात्रांचा मृत्यूही मीच आहे. आता तुला माझ्या सात विभूती सांगतो, त्या देवतावर्गातील आहेत. त्यांचे माहात्म्य ऐक. नित्य नूतन अशी जी दिगंत *कीर्ती* मिळते, ती माझ्याचमुळे! तसेच औदार्यवंताची *संपत्ती* म्हणजे माझीच मूर्ती समजावी आणि न्यायशास्त्राच्या सुखासनावर आरूढून विवेकाच्या मार्गावर चालणारी *वाक्*, तिही मीच आहे. माझा बोध तीच करून देते."

देखिलेनि पदार्थें। जैं आठवूनि दे मातें।
तैं स्मृतिही पैं येथें। त्रिशुद्धी मी।।१०-२७८।।
पैं स्वहिता अनुजायिनी। मेधा तैं गां मी इयें जनीं।
धृती मी त्रिभुवनीं। क्षमा तैं मी।।२७९।।
एवं नारींमाझारीं। या सातही शक्ती मीचि अवधारीं।
ऐसें संसारगजकेसरी। म्हणतां जाहला।।२८०।।

"त्याचप्रमाणे दिसणाऱ्या प्रत्येक वस्तूत मीच आहे, अशी सतत आठवण जागृत ठेवणारी व झालेल्या बोधास जपणारी *स्मृति* ही मीच आहे. तसेच स्वहितास जपणारी, इहपारलौकिक कल्याण प्राप्त करून देणारी आणि माझा बोध प्राप्त करून देण्यास तत्पर असणारी *मेधा* ही पण माझीच विभूती आहे. आणि या त्रैलोक्यास धारण करणारी वा माझा झालेला बोध दृढ ठेवणारी व त्यासाठी वाटेल ते दिव्य करू धजणारी *धृती* ही मीच आहे. सर्व भूतांप्रत असणाऱ्या समबुद्धीतून उपजणारी *क्षमा* ही माझेच रूप आहे. अशा या देवतांपैकी असणाऱ्या माझ्या सात उत्तम विभूती आहेत," असे तो संसाररूपी गजाचा मद उतरवण्यास दक्ष असलेला श्रीकृष्णरूपी केसरी म्हणाला.

वेदराशींचियां सामा-। आंतु बृहत्साम जैं प्रियोत्तमा।
तैं मी म्हणें रमा-। प्राणेश्वरु।।१०-२८१।।
गायत्री छंद जैं म्हणिजे। तैं सकलां छंदांमाजीं माझें।
स्वरुप हें जाणीजे। निभ्रांत तुवां।।२८२।।
मासांआंतु मार्गेसरु। तो मी म्हणे शार्ङ्गधरु।
ऋतुंमाजीं कुसुमाकरु। वसंतु तो मी।।२८३।।

पुढे तो असेही म्हणाला की "वेदोराशीतील सामवेदातील *बृहतसामसूक्त* ही मज रमारमणाची विभूती आहे. तसेच *गायत्री छंद* हा सकल छंदांतील माझे साक्षात रूप आहे, हे तू स्पष्ट समजून घे." वर त्या शार्ङ्गधराने म्हटले की, "मासांतील *मार्गशीर्ष* महिना आणि ऋतूंतील श्रेष्ठ असा कुसुमाकर *वसंत* ऋतुराजही मीच आहे."

कृष्णार्जुन याही विभूतीच

अंती आपल्या काही विभूती सांगत श्रीकृष्ण म्हणतात:

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम्।।१०-३६।।

"छळिक वस्तूंमध्ये द्यूत, तेजस्वी पदार्थांतील तेज, विजय, उद्योग, सात्त्विक वस्तूंतील सत्त्व ही सर्व मीच आहे."

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनञ्जयः।
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः।।१०-३७।।

"वृष्णीकुलांतील वासुदेव आणि पांडवांतील अर्जुन, तसेच मुनींतील व्यास व तत्त्ववेत्त्यांत शुक्राचार्य हे सर्व मीच आहे."

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम्।
मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम्।।१०-३८।।

"दमन करणाऱ्यांचा *दंड* वा शासकशक्ती मी आहे. विजयेच्छूंची नीती मीच आहे. सर्व गुह्यांतील श्रेष्ठतम मौन तर मीच आहे. आणि ज्ञान्यांचे ज्ञानसुद्धा साक्षात मीच आहे."

या श्रीकृष्णांच्या वचनांस शब्दांकित करत ज्ञानदेव त्यातला भाव कसा प्रकट करतात, ते पाहा:

छलितयां विंदाना-। माजीं जूं तैं मी विचक्षणा।
म्हणौनि चोहटां चोरी परि कवणा। निवारूं नये।।१०-२८४।।
अगां अशेखांहीं तेजसा-। आंतु तेज तैं मी भंवतसा।
विजयो मी कार्योद्देशां। सकलांमाजीं।।२८५।।
जेणे चोखालत दिसे न्याय। तो व्यवसायांत व्यवसाय।
माझेंचि स्वरुप हे राय। सुरांचा म्हणे।।२८६।।
सत्त्वाथिलियां आंतु। सत्त्व मी म्हणे अनंतु।...।।२८७।।

"हे मर्मज्ञ अर्जुना! कापट्यातील माझी विभूती म्हणजे *जुगार!* म्हणूनच उघडउघड सर्वांसमक्ष चोरी केली जाते, तरी ती कोणाला निवारता येत नाही. तसेच पहा. समस्त तेजस्वी पदार्थांतील *तेज* ही माझी विभूती आहे. आणि कार्य करण्याचे जे कोणते उद्देश असतात, त्यातील *विजयेच्छा* म्हणजे मीच आहे." पुढे तो देवांचा राया श्रीकृष्ण म्हणतो, " ज्या व्यवसायाचे नीतिन्यायाने पालन केले जाते, तो *व्यवसाय* म्हणजे मीच आहे. तसेच सत्त्वगुणसंपन्न पदार्थांतील *सत्त्व* मीच आहे."

"यादवांमाजीं श्रीमंतु"

यादवांमाजीं श्रीमंतु। तोचि तो मी।।१०-२८७।।
जो देवकी वसुदेवांस्तव जाहला। कुमारीसाठीं गोकुलीं गेला।
तो मी प्राणासगट पियाला। पूतनेतैं।।२८८।।

पुढे तो अनंत म्हणाला, "आणि यादवांमधील ऐश्वर्यवंत पुरुष मीच आहे. देवकी-वसुदेवाच्या पोटी जन्मून नंद-यशोदेच्या योगमायारूपी कन्येऐवजी गोकुळात वाढविलेला गोपाल तो मीच

आणि पूतनेचे तिच्या प्राणांसकट शोषण करणारा *कृष्ण* तोही मीच आहे."

नुघडितां बालपणाची फुली। जेणें मियां अदानवी सृष्टी केलीं।
करीं गिरी धरूनि उमाणिली। महेंद्रमहिमा।।१०-२८९।।
कालिंदीचें हृदयशल्य फेडिलें। जेणें मियां जलत गोकुल राखिलें।
वासुरवांसाठीं लाविलें। विरंचीस पिसें।।२९०।।

"बाळपणींच दानवांचा संहार करून सृष्टीचा भार हलका मीच केला. हातांवर पर्वत धरून इंद्राचा ताठा मीच हरण केला. यमुनेच्या हृदयी सलणाऱ्या कालिया सर्पाचे दमन मीच केले. दावाग्नीपासून जळणाऱ्या गोकुळाचे रक्षणही मीच केले. तसेच ब्रह्मदेवाने गाई-वासरे-गोपाळ यांचे हरण करून गुहेत एक संवत्सर कोंडून ठेवले, तेव्हा त्या गाई-वासरां-गोपाळांचे रूप घेऊन गोकुळास तोषवणारा व ब्रह्मदेवास त्या माझ्या कृतीने भ्रमात पाडणारा श्रीकृष्ण तो मीच!"

प्रथमदशेचियें पाहांटें-। माजीं कंसाऐशीं अचाटें।
महाधेंडीं अवचटें। लीलाचि नाशिलीं।।१०-२९१।।
हें काय कितीएक सांगावें। तुवांहीं देखिलें ऐकिलें असे आघवें।
तऱ्हीं यादवांमाजीं जाणावें। हेंचि स्वरूप माझें।।२९२।।

"किशोरावस्थेत प्रारंभीच कंसासारखी दैत्य धेंडे सहजच नष्ट करणारा तो मीच! तुला किती म्हणून हे सर्व सांगावे! कारण तुम्ही सर्वांनी माझे हे प्रताप ऐकलेले आहेतच व प्रत्यक्ष पाहणारे लोक आजही हयात आहेत. असे माझे *श्रीकृष्णस्वरूप* म्हणजे यादवांमधील माझी श्रेष्ठतम विभूती आहे. मी म्हणजे साक्षात भगवंताचा सकलगुण-कलासंपन्न पूर्णावतार आहे, अशी ज्ञानी ऋषिमुनी व भक्तांची साक्ष आहे."

"अर्जुनु तो मी जाणावा"

आणि सोमवंशी तुम्हां पांडवां-। माजीं अर्जुनु तो मी जाणावा।
म्हणौनि एकमेकांचियां प्रेमभावा। विघडु न पडे।।१०-२९३।।
संन्यासी तुवां होऊनि जनीं। चोरूनि नेलीं माझी भगिनी।
तऱ्हीं विकल्पु नुपजे मनीं। मी तूं दोन्हीं स्वरूप येक।।२९४।।

"हे अर्जुना! मी *श्रीकृष्ण* अशी यादवांतील प्रत्यक्ष भगवंताची विभूती आहे आणि तू स्वतः तर पांडवांतील साक्षात मीच आहे. म्हणून आपल्यात कोणताही दुरावा नाही व आपला परस्परांवरला प्रेमभाव दृढ आहे. संन्याशी होऊन तू माझ्या भगिनी सुभद्रेचे हरण केलेस. पण त्यामुळे माझ्या मनात कल्मष उत्पन्न झाले नाही याचे हेच कारण आहे की आपण दोघे भिन्न व्यक्ती म्हणून जरी दिसत असलो, तरी आपले स्वरूप एकच आहे."

मुनींआंतु व्यासदेओ। तो मी म्हणे यादवराओ।
कवीश्वरांमाजीं धैर्यराओ। उशनाचार्यु तो मी।।१०-२९५।।
अगं दमितयांमाजारीं। अनिवार दंडु तो मी अवधारीं।
जो मुंगियेलागौनि ब्रह्मावेरीं। नियमित पावे।।२९६।।

"पुढे ऐक. मुनींमधील *व्यास* म्हणजे यादवराणा श्रीकृष्णच आहे. तसेच तत्त्वदर्शी लोकांत विवेक उत्तम असणारे शुक्रचार्यही मी स्वतःच आहे. यमधर्मादी जे नियामक शास्ते आहेत, त्यांपैकी ब्रह्मदेवापासून तहत मुंगीकीटकांपर्यंत या ब्रह्मांडाचे शासन नियमितरीत्या करणारा शास्ता कोण म्हणशील तर तोही मीच आहे पाहा!"

पैं सारासार निर्धारितयां। धर्मज्ञानाचां पक्षु धरीतयां।
सकलशास्त्रांमाजीं येयां। नीतिशास्त्र तैं मी।।१०-२९७।।
आघवियांचीं गूढां-। आंतु मौन तैं मी सुहाडा।
म्हणौनि न बोलतयां पुढां। स्त्रष्टाही नेण होय।।२९८।।
अगां ज्ञानियांचां ठाईं। ज्ञान तैं मी प्रत्यक्ष पाहीं।
आतां असो हें ययां काईं। पार न देखों।।२९९।।

"सारासार विवेक करवणारे, धर्मसिद्धी व ज्ञानप्राप्ती करवून देणारे जे *नीतिशास्त्र,* ते सकळ शास्त्रांतील माझी विभूती आहे. आणि महापुरुषांचे ते तत्त्वदर्शनानंतरचे प्राप्त होणारे *मौन* -ज्यापुढे प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचेही ज्ञान तोकडे पडते, कितीही बोलणाऱ्या व माझे स्वरूप वर्णन करू पाहाणाऱ्या वेदांची वाणी स्तब्धावते -ते तर गुह्यातिगुह्य अशी माझी विभूतीच होय. अशा त्या धीमान पुरुषाचे *ज्ञान* पण मीच आहे, हे लक्षात घे. अशा उत्तमोत्तम विभूती किती सांगाव्यात! त्यांना काही पारच नाही!"

विश्वरूपाचे सार::::

"एकांशेन स्थितो जगत्"

आपले सर्वंकष स्वरूप प्रकट करणारे श्रीकृष्ण म्हणून निर्णायक असा अभिप्राय व्यक्त करतात. तो असाः

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम्।।१०-३९।।

"एवं च हे अर्जुना! सर्व भूतमात्रांचे जे बीज आहे, ते मीच आहे. या चराचर विश्वात माझ्यावाचून अस्तित्वात कोणतीही वस्तू येऊ शकत नाही."

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परन्तप।
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया।।१०-४०।।

"हे परंतपा! त्यातूनसुद्धा माझ्या दिव्यातिदिव्य विभूती तर अगणित आहेत. त्यांचे समग्र वर्णन करणे केवळ अशक्य आहे. म्हणून त्यातल्या या काही विभूती मी संक्षेपतः तुला सांगितल्या."

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम्।।१०-४१।।

"जी जी वस्तू माझ्या अंगभूत अशा वैभवाने, श्रीने वा सत्त्वाने युक्त असेल, माझा प्रभाव जिच्याद्वारे प्रत्ययास येतो, ती ती वस्तू माझ्या तैजस अंशापासून निर्माण झालेली आहे, असे निश्चित समज."

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।।१०-४२।।

"आणि हे अर्जुना! तुला या विश्वांतील हा सर्व विभूतिविस्तार जाणूनच घ्यायचा असेल, तर एवढे ध्यानात घे की माझ्या केवळ एका अंशानेच हे समस्त जगत व्यापून मी राहिलो आहे."

"माझियां विशेषां लिंगा। नाहीं मिती"

भगवंतांचे हे स्वरूप प्रकटवत ज्ञानेश म्हणतातः

पैं पर्जन्याचियां धारा। वरी लेख करवेल धनुर्धरा।
कां पृथिवीयेचियां तृणांकुरां। होईल ठी।।१०-३००।।
पैं महोदधीचियां तरंगां। व्यवस्था धरूं नयें जेवीं गां।
तेवीं माझियां विशेषां लिंगां। नाहीं मिती।।३०१।।
ऐशियांहीं सात पांच प्रधाना। विभूति सांगितलियां तुज अर्जुना।
तो हा उद्देशु जो गां मना। आहाच गमला।।३०२।।
एरां विभूतिविस्तारांसि कांहीं। एथ सर्वथा लेख नाहीं।
म्हणौनि परिससीं तूं काई। आम्हीं सांगों किती।।३०३।।

"हे अर्जुना! एकवेळ पावसाच्या धारांची गणती करता येईल; पृथ्वीच्या पाठीवर उगवलेल्या तृणांकुरांची पण कदाचित मोजदाद करता येईल. हे कदाचित शक्य झाले, तरी सागराच्या लाटांप्रमाणे अमाप असणाऱ्या माझ्या विशेष विभूतींचे मोजमाप करणे केवळ अशक्यकोटीतलेच आहे. असे असूनसुद्धा तुझ्यासाठी म्हणून सत्तर पंचाहत्तर प्रमुख विभूती तुला आतापावेतो मी सांगितल्या. आणि त्या सांगतासांगता माझ्या लक्षात आले की माझ्या विभूतिविस्ताराची गणना करणे शक्यच नाही. म्हणून तू किती वेळ ऐकशील आणि मी तरी किती वेळ त्यांबाबत सांगत बसू!"

ययालागीं एकहेलीं तुज। दाऊं आतां वर्म निज।
सर्वभूतांकुरें बीज। विरूढत असें तैं मी।।१०-३०४।।
म्हणोनि सानें थोर न म्हणावें। उंच नीच भाव सांडावें।
एक मीचि ऐसें मानावें। वस्तुजातातैं।।३०५।।
तऱ्हीं ययावरी साधारण। आईक पां आणिकही एक खूण।
तऱ्हीं अर्जुना तैं तूं जाण। विभूति माझी।।३०६।।
जेथ जेथ संपत्ति आणि दया। दोन्हीं वसती आलियां ठायां।
तैं तैं जाण धनंजया। विभूति माझी।।३०७।।

"असे आहे म्हणून आता तुला त्यांचे वर्मच सांगतो. ते असे की या सर्व भूतांच्या रूपाने जे जे अंकुरते, ते *बीज* मी आहे. म्हणून प्राणिजातांत लहानथोर, उच्चनीच असा भेदभाव न धरता ते समस्त म्हणजे मीच आहे, असे जाणून असावे. आता याहूनही माझी अधिक एक खूण माझ्या विभूतींमध्ये असते, ती सांगतो. ज्या ज्या वस्तूठायी ती प्रकट होते, ती ती वस्तू माझी विभूतीच असते. *संपत्ती व भूतदया - ऐश्वर्य -समता - श्री - सत्त्व* ही माझी दैवी गुणसंपत ज्या ज्या पदार्थांच्या - पुरुषांठायी प्रकर्षाने प्रकट होते, ते ते सर्व माझ्या विशेष विभूती होत."

"माझियां स्वरूपीं गोठी। सामान्य विशेखाची नाहीं"

अशा विभूतींतील अवतारी माहात्म्यांबद्दल ज्ञानेश म्हणतातः

अथवा एकलें बिंब गगनीं। तऱ्हीं प्रभा फांकें त्रिभुवनीं।
तेवीं एकाकियाची सकल जनीं। आज्ञा पाळिजे।।१०-३०८।।
तेयांतैं एकलें झणीं म्हण। तैं निर्धन या भाख नेण।
काय कामधेनूसवें सर्व साहान। चालत असें।।३०९।।
तियेंतैं जैं जेधवां जो मागे। तैं तैं एकसरेंचि प्रसवो लागे।
तेवीं विश्वविभव तेयां आंगें। होऊनि आहाति।।३१०।।

"सूर्यबिंब आकाशात एकटेच असूनही त्याची प्रभा त्रिभुवनास उजळून टाकते. त्याचप्रमाणे ज्या माझ्या अशा विशेष विभूती असतात, त्यांचा मान तिन्ही लोकांत केला जातो. सर्व त्यांची आज्ञा पाळतात. त्यांना ते जसे दिसतात, तेवढेच ते आहेत, असे समजू नये. त्यांना संपत्तिहीन म्हणूनही लेखू नये. कारण त्यांच्याजवळ माझे ऐश्वर्य असते. कामधेनूकडे पाहून तिला इतर गाईंसारखी सामान्य समजणे योग्य होइल का! काय कामधेनू आपल्याबरोबर सर्व गोष्टी घेऊन चालते का! तरीही तिच्याजवळ जे जे मागावे, ते ते ती एकदम प्रसवत नाही का! याचप्रमाणे या समस्त विश्वाचे वैभव त्या विभूतिविशेषांच्या अंगभूत होऊन असते."

तेयांतैं वोलखावयां हेंचि संज्ञा। जैं जगें नमस्कारिजे आज्ञा।
ऐसें आथि तैं जाण प्राज्ञा। अवतार माझें।।१०-३११।।
आतां सामान्य विशेख। हें जणणें एथ महादोख।
कां जैं मीचि एक अशेख। विश्व आहे म्हणौनि।।३१२।।
तऱ्हीं आतां साधारण अन चांगु। ऐसा कैसेनि पां कल्पावा विभागु।
वांयां आपुलियेचि मती वंगु। भेदाचा लावावा।।३१३।।

"त्या विभूती ओळखण्याची एक खूण अशी आहे की सर्व लोक त्यांची आज्ञा पाळतात. अशांना तू माझे *अवतार* म्हणून हे प्रबुद्ध अर्जुना! ओळख. पण खरे सांगायचे तर सामान्य आणि विशेष असा माझ्या विभूतींत भेद करणे पण योग्य नाही. कारण हे *विश्व* म्हणजे मीच आहे. त्याच्या अणुरेणूंतून मी पूर्णपणे भरून ठेलो आहे. म्हणून सामान्य आणि उत्तम असा त्यांतल्या वस्तूंत विभाग कसा कल्पावा! असे करणे म्हणजे उगीचच आपापल्या मतीचा दोष त्या जगन्नियंत्या अशा माझ्या ठायी आरोपून भेदभावाने पाहाणे होय!"

एऱ्हवीं तऱ्हीं तूप कासया घुसळावें।
अमृत कां रांधौनि अर्धें करावें।
हां गां वायूसि काय डावें-। उजवें आंग आहे।।१०-३१४।।
पैं सूर्यबिंबासि पोटपाठी। पहातां नासैल आपुली दिठी।
तेवीं माझियां स्वरूपीं गोठी। सामान्य विशेखाची नाहीं।।३१५।।
आणि सिनाना विभूति। मज अपारातैं मविसिल किती।
म्हणौनि किंबहुना सुभद्रापति। असो हें जाण।।३१६।।
आतां पैं माझेनि एकें अंशें। हें जग व्यापिलें असें।
ययालागीं भेदु सांडौनि सरिसें। साम्यें भज।।३१७।।

"अर्जुना! एकवार तूप हाती आले, मग ते घुसळून अधिक उत्कृष्ट ते काय मिळणार! अमृत आटवून अर्धे केल्याने त्याची चव काय वाढणार का आहे! सूर्यबिंबाची पाठ व पोट पहायला जाणाऱ्याचे डोळे अधू नाही का होणार! माझ्याही स्वरूपाचे असेच आहे. त्याच्याठायी सामान्य आणि विशेष असा विभूतिविभूतींतील भेद टिकत नाही. आणि हे सुभद्रापती! वेगवेगळ्या समस्त विभूती जाणून घेऊन तू काय करशील! मज अपार अशा परमेश्वरास त्या विभूतींची गणना करून जाणता येईल का! अरे! माझ्या केवळ एका अंशाने हे जग झालेले आहे. यात केवळ एका अंशाने मी प्रकटलो आहे, हे जाणून तू भेदभावना टाकून माझी सर्वत्र समभावाने भक्ती कर."

"मज साम्यें भज"

भक्तियोगाचे असे अत्युत्कृष्ट रहस्य स्पष्ट करत भगवंतांनी अर्जुनास विश्वातील यच्चयावत स्थावर-जंगम -प्राणिमात्र यांच्याठायी त्या एकमात्र ईश्वरास पाहावे असे सांगितले. *समभाव* हा श्रेष्ठ *भक्तियोग* आहे. विभूतिविशेषांच्या द्वारे त्या सर्वत्र सम अशा भावास पोहोचता येते. अशा त्या *निर्विशेष* ईश्वराचे प्रणिधान करणे सुलभ व्हावे, पतञ्जलींनी निर्देशिलेला योग साधता यावा, यासाठी विभूती व त्यांचे *भजन - पूजन - अर्चन - दास्य - सख्यत्व -वंदन- निवेदनादी नवविधा भक्ती* नारदादी भक्तिमार्तंडांनी *भक्तिसूत्रे* रचून प्रकट केल्या आहेत.

भेद आहेच कोठे!

गीतासुद्धा हेच भक्तिविशेष उचलून धरते. ते कसे ते पुढे भक्तचर्या पाहातांना आपल्या लक्षात येईलच. तूर्त भक्तियोगाचा हा टप्पा विभूतिदर्शनाने सांग पूर्ण झाला आहे. त्याची पावती श्रीकृष्णार्जुनांच्या या संवादांतरी प्रकट करत ज्ञानेश म्हणतात:

ऐसें विबुधवनवसंतें। तेणें विरक्ताचेनि एकांतें।
बोलिलें जेथ श्रीमंतें। श्रीकृष्णदेवें।।१०-३१८।।
तेथ अर्जुनु म्हणे स्वामी। येतुलें हें राभस्य बोलिलेती तुम्हीं।
जै भेदु एक आणि आम्हीं। सांडावा एकीं।।३१९।।
हां हो सूर्य म्हणे काय जगातैं। आंधारें दवडा कां परौतें।
केवीं धसाल म्हणे देवा तूंतैं। तन्हीं अधिक हा बोलु।।३२०।।
तुझें नांवचि कोण्ह एक हेलें।
जेयांचियां कां मुखासि कां काना मिले।
तेयांचियां हृदयातैं सांडूनि पळें। भेदु जी सांच।।३२१।।

ज्ञानीपुरुषरूपी वनाचा वसंतऋतू - ज्यायोगे ते वन फुलून येते असा तो वैराग्यशील पुरुषांचा एकांत असणारा श्रीमंत श्रीकृष्णदेव असे अर्जुनास विभूतियोगाचे रहस्य स्पष्ट करता झाला. ते ऐकून अर्जुन उगीचच म्हणाला की, "देवा! येथे असा भेद उरलाच कोठे आहे, तर तो मी टाकावा! हे तुमचे बोलणे तर खरे नाही की मी भेदभाव वर्ज्य करून तुला समदृष्टीने भजावे म्हणून. कारण सूर्य कधी लोकांना असे म्हणतो का की, "हे पाहा! तुम्ही अंधार दूर करा. कारण मी आता तुमच्यापुढे प्रकट होणार आहे!" सूर्यदेवाची चाहूल लागताच अंधार आपच नाहीसा होतो की नाही! देवा! तुमचेही तसेच नाही का! तुमचे नामसुद्धा एखाद्या भाग्यवंताच्या चुकून कानी पडले किंवा सहजच मुखातून बाहेर पडले, तरी त्याच्या हृदयातून भेद खरोखरच पळून जातो."

तो तूं परब्रह्मचि असिकें। मज दैवें दिधलासि हस्तोदकें।
तन्हीं भेदु कायिसा कें। देखावा कवणें।।१०-३२२।।
जी चंद्रबिंबाचां गाभारा। रिगलियांही उबारा।
परि राणेपणें शार्ङ्गधरा। बोला हें तुम्हीं।।३२३।।

"आणि तू तर साक्षात परब्रह्म असा माझ्या हाती उदक सोडून दान मिळावे तसा दैवयोगे प्राप्त झालाआहेस. असा साक्षात ज्ञानमार्तंड माझ्यासमोर प्रकटला आहे, तर आता भेदरूपी अंधकार - तो तम - ते अज्ञान माझ्याठायी उरेलच कसे, तर त्याचा त्याग करावा! पण तरीही तुम्ही असे म्हणत आहात की, "अर्जुना! भेदभाव बाजूस सारून तू सर्वत्र समबुद्धी ठेवून मला भजत जा!" तर तुमचे हे बोलणे गैरलागू आहे, असे माझ्यासारख्या सामान्याने तुम्हाला म्हणावे तरी कसे! चंद्रबिंबाच्या अंतरंगी प्रवेश केल्यावरही आपल्याला उकडते आहे - उष्मा फार होतो आहे -असे कोणी म्हणेल तरी कसे! पण आता तुम्ही मोठेपणाने असे म्हणताच आहात की ,"भेद बाजूला सार!" तर तसेच असो!"

"विश्व आघवें तुवां भरिले"

तेथ सावियाचि परितोखौनि देवें। अर्जुनातैं आलिंगिलें जीवें।
मग म्हणे तुवा न कोपावें। आमुचियां बोलां।।१०-३२४।।
आम्हीं तुज भेदाचियां वाहाणीं।
सांगितलीं जैं विभूतींची काहाणी।
तैं अभेदें काय अंतःकरणीं। मनिलीं कीं न मने।।३२५।।
हेंचि पाहावयालागीं। नावेक बोलिलों बाहेरि सवडियां भंगीं।
तंव विभूति तुज चांगी। आलियां बोधा।।३२६।।

अर्जुनाचे हे बोल ऐकून तो शार्ङ्गपाणी प्रसन्न झाला. संतोषून त्याने अर्जुनास जीवाभावाचे आलिंगन दिले व तो म्हणाला, "अर्जुना! माझे बोलणे मनाला लावून घेऊ नकोस. कारण या भेदाच्या बहाण्याने मी तुझ्या अंतःकरणाची परीक्षा केली. जी विभूतींची कथा -त्यांचे माहात्म्य व त्याद्वारे सर्वत्र सम अशा ईश्वराचे प्रणिधान करण्याचा मार्ग मी तुला सांगितली, तिच्यायोगे तुझ्या अंतरी अभेद ठसला की नाही, हे मी या बहाण्याने जोखून पाहिले! त्यासाठी असे वरवरचे थोडे तुला लागट वाटेलसे भाषण मी केले. मला कळून चुकले आहे की तुला विभूतिरहस्य उत्तमरीत्या आकळलेले आहे."

येथ अर्जुनु म्हणे देवें। हें आपुलें आपण जाणावें।
परि देखतसें विश्व आघवें। तुवां भरिलें।।१०-३२७।।

त्यावर देवांना अर्जुन म्हणाला की, "हे पाहा! मला विभूतियोग नीट कळला की नाही, ते तुम्हाला जसे वाटेल तसे पारखत बसा!

पण माझ्या दृष्टीपुढे आता असे स्पष्ट दिसते आहे की हे अवघे विश्व तुझ्यानेच भरलेले आहे!"

अकराव्या अध्यायाची पूर्वपीठिका::::

"विश्वरूपा सकला, झोंबावें"

कृष्णार्जुनांचे हे भावविश्व व्यासकृपेने प्रत्यक्ष अनुभवणारा सञ्जय आपल्यापुढे उभा राहतो, तो ज्ञानेशांच्या पुढील उक्तीनेः

पैं राया तो पांडुसुतु। ऐसियां प्रतीतीसि जाहला वरैतु।
या सञ्जयाचियां बोलां निवांतु। धृतराष्ट्र राहे।।१०-३२८।।
कीं सञ्जयो दुखावलेनि अंतःकरणें।
म्हणितसें नवल नव्हें दैव दवडिणें।
हा जीवें धाडसा मी म्हणें। तंव आंतुहीं आंधला।।३२९।।

ते कृष्णार्जुनप्रेमाचे दृश्य अनुभवणारा संजय म्हणाला, "हे राजा धृतराष्ट्रा! तो पांडुपुत्र अशा त्या ***"वासुदेवः सर्वमिति"*** या अनुभूतीस वरता झाला." पण संजयाचे हे बोल धृतराष्ट्राच्या मनात ठसलेच नाहीत. तो तसाच निवांत बसून राहिला. ते पाहून संजय मनात असे उमजला की, "हा जरी चर्मचक्षूंनी आंधळा असला, तरी अंतःकरणाने तरी धड असेल, असे मी उगीचच समजत होतो झाले! याचे असे हे भाग्य दवडणे आश्चर्यप्रदच आहे. पण हा खरोखरच अंतर्यामीसुद्धा अज्ञानांधकारात बुडालेला दिसतो आहे." धृतराष्ट्राच्या असमंजसपणाबद्दल संजय व्यथित झाला. पण ते असो!"

परि असो हें तो अर्जुनु। स्वहिताचा वाढवितसे मानु।
कीं ययाहीं वरी तेयां आनु। धिंवसा उपनला।।१०-३३०।।
म्हणे हेंचि हृदयाआंतुली प्रतीती।
बाहेरीं अवतरो कां डोलियांप्रति।
इयें आर्त्तीचां पाऊलीं मती। उठती जाहाली।।३३१।।
मियां इहींचि दोहीं डोलां। झोंबावें विश्वरूपा सकला।
येवढी हांव तो दैवा आगला। म्हणऊनि करी।।३३२।।

"इकडे अर्जुन पहा! त्याला आपले हित अधिकाधिक करून घेण्याची बुद्धी झाली. तो विभूतींचा अनुभव-सर्वत्र समबुद्धी प्राप्त होऊन पण त्याला वाटू लागले की ही अंतर्यामीची प्रतीती जर बाह्यचक्षूंनासुद्धा अनुभवण्यास मिळाली, तर किती अपूर्व होईल! या प्रकारच्या तीव्र इच्छेने त्याची बुद्धी व्याप्त जाली. तो भाग्यवान म्हणून त्याला अशी हाव सुटली की आपल्या या दोन्ही डोळ्यांनी भरून ते विश्वरूप पहावे; त्या विश्वरूपाला झोंबावे!"

आजि तो कल्पतरुचि शाखा। म्हणौनि वांझोलें न लगती देखा।
जैं जैं येईल तेयांचियां मुखा। तैं तैं सांच करी येरु।।१०-३३३।।
जो प्रह्लादाचियां बोलां। विषाहीसगट आपण जाहला।
तो सद्गुरु असे जोडिला। किरीटीसि।।३३४।।
म्हणौनि विश्वरूप पुसावयालागीं। पार्थ रिगता होईल कवणें भंगीं।
तैं सांगैन पुढिलिये प्रसंगीं। ज्ञानदेवो म्हणे निवृत्तिचा।।३३५।।

निवृत्तिसुत ज्ञानदेव म्हणतातः "आणि काय सांगावे! अर्जुन आज कल्पतरूची शाखाच आहे. त्या शाखेला वांझ फुले येतीलच कशी! त्याच्या मनात जे जे येईल, तो जे जे काही म्हणेल, ते ते सर्व करून देणारा तो श्रीकृष्ण परमात्मा आहे ना त्याच्यापाशी! प्रह्लादाखातर जो त्याच्यापुढे ठेवलेल्या विषाहीसकट सर्व पदार्थ आपण झाला; त्याला अग्नीत टाकले, तर जो अग्नी झाला; पर्वतावरून लोटले, तर पर्वत जो झाला; असा तो प्रत्यक्ष नारायण अर्जुनाला सद्गुरू म्हणून मिळाल्यावर अधिक काय सांगू! तो अर्जुन आता श्रीकृष्णास विश्वरूप दाखवा अशी विनंती कोणत्या प्रकारे करणार आहे, ते तुम्हाला नंतर सांगेन."

भक्ति-योगसिंधु::::

"कबीराचे विणतो शेले"

अर्जुनाचे विश्वरूपाचे लळे श्रीकृष्ण पुरवितात, तो भाग गीतेच्या *अकराव्या* अध्यायी येतो. अकरावा अध्याय म्हणजे भक्तिरसाचा पूर्ण कुंभच आहे. भक्तिरसामृताचा सिंधू असाच जणू तो अध्याय आहे. त्या सिंधूस ज्ञानेशवाणीरूपी चंद्रम्यास अवलोकून उचंबळून येते. तो त्या भक्तीचा आवेग आपण यथावकाश अनुभवणारच आहोत.

गीतेच्या *सहाव्या* अध्यायापासून प्रकटलेली *योगगंगा अकराव्या* अध्यायी त्या भक्तिसिंधूस जाऊन आवेगाने भेटते, तो प्रसंग तसाच लक्षणीय आहे. योगाची भक्तीच्या प्रवाहाने स्फुरणारी धारा त्यातील नवविधा भक्तीच्या विलक्षण रंगांनी मोहक होते. भक्तीचे अनोखे रंगढंग न्याहाळणे म्हणून कौतुकाचे आहे.

कृष्णप्रेमाच्या यमुनाजलात अल्लडपणे मनसोक्त डुंबणाऱ्या गोपयुवतींनी त्या जेव्हा श्रीकृष्णास अनन्यभक्तीने शरण येऊन तो म्हणेल, ते ऐकण्यास उद्युक्त झाल्या, त्यावेळी श्रीहरीने त्यांना भक्तीची जी मनोहर रंगीबेरंगी भरजरी नक्षीदार कशिदाकाम केलेली निभ्रांत सुंदर वस्त्रे लेवविली, ती वस्त्रे त्यांच्या ऐश्वर्यासह आपल्यालाही लाभतात, ती ज्ञानेशांच्या *अकराव्या* अध्यायावरील सुस्नात ओव्यांद्वारे!

त्या वस्त्रांचे अंतरंग कसे आहे, त्याची अल्पशी चुणूक *ग्राहीक श्रोत्यांना* त्या महाविष्णूने *नाथसंकेताचा दंश* प्रकटवत *सहाव्या अध्यायी* दाखवली. ज्या संकेताची-ज्या भक्तीच्या महावस्त्राची घडी थोडीशी उपलवून तेव्हा ज्ञानेशांनी दाखविली, त्या वस्त्राची नवाई - त्या वस्त्राची झळाळी-त्या वस्त्राने सजणे-हे सर्व *अकराव्या अध्यायी* प्रकटवून भक्तीचे अप्रतिम लावण्य योगाच्या अवगुंठनातून कसे प्रकटते, ते पाहाण्याचे सद्भाग्य आपणास खचितच लभणार आहे.

पण तत्पूर्वी ही भक्तीची अनुपम पैठणी पूर्ण विणण्यासाठी काही भावरत्नांचे भरजरी धागे तिच्यात गुंफणे आवश्यक आहे. हे धागे यापूर्वीच्या काही अध्यायातून उचलून घेत हा भक्तीचा भरतारी शेला कबीराच्या एकतानतेने विणू या! असा तो शेला विणण्यास तो जानकीचा नाथ -तो श्रीरामचंद्र-तो सखा श्रीकृष्ण-आपणास श्रीज्ञानदेवांच्या

रूपाने साहाय्यकारी जरूर होईल! हा भक्तीचा शेला एकदा का सगळा विणला गेला की तोच आपल्या अंगाखांद्यांवर मिरवत प्रभुनामाचा परावाणीतून घोष करत भक्तिभावात धुंद होऊन मग आपण त्या *अकराव्या* अध्यायींच्या भक्तिप्रयागतीर्थातल्या पुण्यपावन सलिलाशी क्रीडा करू या!! इत्यलम्।

पूर्वविषयाचे अनुसंधान

तोपावेतो प्रथम भक्ति-योगप्रवाहाची इतर वळणेवाकणे, त्या धारेचा प्रवाह, गती, तुषार इ.ही कशी मनोज्ञ आहेत, ती पाहू याः

गीतेची ही भक्ती व योगाची धारा ज्ञानाशी अभिन्न आहे. *कर्म* हे त्या *भक्ति-ज्ञान-योग*रूपी प्रवाहाचे उगमस्थान आहे.***सर्व प्राणिमात्रांस कर्म अटळ आहे, हा गीतेचा स्वयंसिद्ध पाया आहे***. या मूलभूत अशा कर्माचे आतापावेतो थोडेसे संकलन व आकलन आपण वेगवेगळ्या प्रसंगी केले. त्याचा काही भाग अद्यापही अवशिष्ट राहिला आहे. तो पाहिल्यावाचून गीतेच्या योगधारेचा आपणास पूर्ण परिचय होणार नाही.

योगधारा::::

कुंडलिनीयोग

तसेच योगातील एक अत्यंत महत्त्वाचा प्रांत अद्याप सांग न्याहाळावयाचा उरला आहे. तो म्हणजे ***कुंडलिनीअधिष्ठित अंतरंगयोग!*** या योगाचा काही भक्तिपंडितांनी अजाणता अनुल्लेखाने अधिक्षेप केल्याचे जाणवते. परंतु *नारदभक्तिसूत्रे, शांडिल्यसूत्रे* इ.भक्तिसिद्धांताच्या पायाभूत अशा अधिकारी दर्शनांचा अंतरंग विचार करणाऱ्यांस अशा आधुनिक स्वघोषित भक्तिपंडितांचे अननुभवी म्हणणे व *प्रचितीवीण बोलणे* पटणारे नाही. रामकृष्ण परमहंसांसारख्या या युगातील भक्तिमार्तंडांनीसुद्धा या अंतरंग योगाचे महत्त्व आपल्या शिष्यांवर बिंबित केल्याचे जिज्ञासूंना माहीत असेलच!

अंतरंगातील ***देवात्मशक्ती, शक्ती, परमात्मशक्ती, चित्, संवित, प्रबुद्धा, सुप्ता, भुजंगिनी, कुटला, गुह्या, प्रसादिनी, प्रमोदिनी, महादेवी, गायत्री, सावित्री, सरस्वती, वरेण्या, महामाया, मदालसा, ईश्वरी, ईं, माया, कुटिलांगी, कुंडली, अरुंधती, खेचरी, वामा, परा, इच्छा, अघोरी, छिन्नमस्ता, सौरी, वैष्णवी, शिवा, शैवी, बौद्धी, ब्राह्मी, माहेश्वरी, उमा, प्रतिभा, चिदग्निकुंडसंभूता, चित्शक्ती, ज्ञानाग्नी, भक्ती, ईशा, प्रथमा, प्रमदा, सुभगा, सुंदरी, स्वसंवेद्या, अनामिका, विद्युत्, निजा, शुभा, भुवनेश्वरी, गिरिजा, मेधा, प्रभा, आभा, प्रज्ञा, विद्या, बुद्धी, स्मृती, धी, धैर्य, विद्येश्वरी, प्राणदा, त्रिपुरसुंदरी, तप, ज्ञान, मातंगी, प्रधान, अजा, विमर्श, वस्तुसामर्थ्यशक्ती, महाशक्ती, सती, कृपा, ज्ञानशक्ती, गुरुवी शक्ती, उल्हाटशक्ती, लीला, मुद्रा, वामांगी, दैविकी, आह्लादिनी, प्राणेश्वरी, प्रिया, आधारशक्ती, दुर्गा, भैरवी, बालरंडा, सौभाग्यवती, चैतन्यशक्ती, सुधा, माता, जगज्जननी, अविद्या, पराप्रकृति, स्वातंत्र्य, श्रद्धा, शारदा, वेदमाता, सर्वोपशांतीप्रमदा, सत्ता, अनादिनिधना, चेतनास्वरूपा, सूक्ष्मा, परमा, परमगती, गुरुकृपा*** इ.नाना नामांनी विख्यात असणाऱ्या **कुंडलिनी**शक्तीचे योगगर्भातील रहस्य जाणून घेतल्यावाचून योगच काय, पण खरा तर योगच असणारा, पण भक्ती-भक्ती म्हणून गौरविला जाणारा असा मार्गसुद्धा सिद्ध होऊ शकत नाही.

ज्ञानेशही याचसाठी ***कुंडलिनी***शक्तीस आगळे महत्त्व देत असल्याचे आपणासारख्या जिज्ञासूंच्या ध्यानी असणे म्हणूनच अत्यंत जिव्हाळ्याचे आहे. म्हणून गीतेतील *एकमात्र प्रतिपादित* योगाचे रहस्य समजावून घेण्यासाठी आपल्याला ज्ञानेशांकडून याही प्रांताचे आमुख करून घ्यावे लागेल.

त्याचप्रमाणे भक्तचर्या, अभक्त व भक्तांची गती, भक्तीतील नवविधा रस आणि ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"*** असा जो *नवव्या* अध्यायांती श्रीगोपालकृष्णांचा सर्वांसाठी स्पष्ट संदेश आहे-जो *एकश्लोकी गीता* म्हणून पण आपण ओळखू शकतो-त्या सर्वांचे अंतरंगपरीक्षण केल्यावरच आपणास या *भक्ति-योग-ज्ञान* धारेचे *कर्मफळ अकराव्या* अध्यायातील *विश्वरूपदर्शनाच्या* आस्वादाने चाखता येईल व त्याची खरी महती कळेल.

भक्तियोगधारेच्या *साकार व निराकाराची भक्ती* या द्विविध प्रवाहांविषयी अर्जुनाचे संशय निवृत्त करून त्याच्या मनावर भक्तांचे व भक्तीचे अलौकिक माहात्म्य ठसवणारा व गीतेचा भक्तियोगावरील पताकास्वरूप असा *बारावा अध्याय* आपण त्यानंतर ज्ञानेशमुखाने समजावून घेणार आहोत.

समारोप

एवढे दिग्दर्शन केल्यानंतर आपण कर्मसमुच्चयासंबंधित **दशम स्कंध - कर्मपथदिग्दर्शन** याकडे वळू या. त्यातील **उन्मेष ३९ - कर्मपथ-१-१** हाच आता आपल्या विशेष अभ्यासाचा भाग असणार आहे. तर चला अग्रेसर होऊ या **कर्मपथा**वर!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::दशम स्कंध:::
::कर्मपथदिग्दर्शन::
(पृ.क्र.६११ ते ७१०)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ३९-१::
::कर्मपथ-१-१::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ३९-१:
गीता:
१:१-४७
ज्ञानेश्वरी:
१:८५-२७५

:::दशम स्कंध:::

::कर्मपथदिग्दर्शन::

::उन्मेष ३९-१::

::कर्मपथ-१-१::

प्रथम अध्यायारंभ::::

कर्मसमुच्चय

या कर्ममार्गाची सुरुवात खरी तर गीतेच्या *प्रथमाध्यायी* च होते. धृतराष्ट्राचे पुत्रस्नेहाने प्रश्न विचारणे व सञ्जयाने त्याच्या उत्सुकतेच्या पूर्तीसाठी कुरुक्षेत्र व त्या समरांगणावरील योद्ध्यांचे वर्णन करणे हा तसा गीतेच्या योग आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने खास भाग नसला, तरी अविद्येने ग्रास केलेला मनुष्य कसा असतो, हे धृतराष्ट्र व दुर्योधनांच्या वक्तव्यातून सूचित होते; तसेच अविद्याजन्य मोह इ.नी ग्रस्त झालेला मनुष्य कर्तव्याविषयी अन सद्धर्माविषयी कसा विकृत मतांचा होतो, हे पण अर्जुनाच्या आप्तस्वकीयांचा वध करण्याच्या विचारातून निर्माण झालेल्या पापपुण्यविषयक शंकांतून व युद्धविन्मुख होण्याच्या निर्णयातून सूचित होते.

कर्म हे वासनासमुच्चयाशी कसे निगडित आहे, हे आपण पूर्वी पाहिले होते. *अज्ञानी जन वासनांनुसार कर्मे करत, त्या कर्मांची फले भोगत अंधकारयात्रा करत असतात. परंतु त्यांच्या कर्मपथावर जेव्हा श्रीकृष्ण आपला श्वेताश्वयुक्त रथ चालवू लागतात आणि अशा त्या दिव्य रथात बसण्याचे भाग्य जेव्हा त्या पामरास लाभते, तेव्हा त्याची स्थिती अर्जुनासारखी वांछनीय होते;* अशी विविध लक्षणाचित्रे या अध्यायातून सूचित होतात.

म्हणून श्रीमच्छंकराचार्य भगवत्पूज्यपादांनी आपल्या गीताभाष्यात महत्त्व न देता बाजूस सारलेला *पहिला अध्याय व दुसरा अध्याय (श्लोक क्र.१ ते १०)* यांमधील हा गीताभाग तरीही पाहाणे आपल्यासाठी उद्बोधक आणि मनोरंजक ठरते. कर्माकर्मांची जिज्ञासा उत्पन्न करत हा भाग आपणास गीतेच्या गाभ्याकडे नेत जातो. कर्मपथिकांनी हा भाग अवलोकिणे म्हणूनच, जरी थोडे रटाळवाणे वाटले तरी आवश्यक ठरते. तरी आपण गीतेच्या मूल श्लोकाकडे - धृतराष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे वळून त्या भागाचा जमेल तसा परामर्ष घेऊ या!

गीतेचा प्रथम श्लोक

धृतराष्ट्र उवाचः धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय।।१-१।।

धृतराष्ट्र विचारतो, "हे संजया! धर्मस्थान असे जे कुरुक्षेत्र आहे, तेथे युद्धासाठी जमलेले माझे पुत्र व पांडव काय करत आहेत?"

धृतराष्ट्राचे मोहग्रस्त चित्र ज्ञानदेव उत्तम उभे करतात. ते असेः

तऱ्हीं पुत्रस्नेहें मोहितु। धृतराष्ट्र असे पुसतु।
म्हणे संजया सांग मातु। कुरुक्षेत्रींची।।१-८५।।
जैं धर्मालया म्हणिजे। तेथ पांडव आन माझें।
गेलें असती व्याजें। झुंझाचेनि।।८६।।
तऱ्हीं तिहीं येतुलां अवसरीं। काय कीजत असे येरयेरीं।
तैं झडकरी कथन करीं। मजप्रति।।८७।।

पुत्रस्नेहामुळे सद्सद्विवेकबुद्धी नष्ट झालेला धृतराष्ट्र संजयास विचारू लागला, "संजया! मला कुरुक्षेत्राची वार्ता सांग. ज्यास धर्मालय म्हणून ओळखले जाते, त्या कुरुक्षेत्री युद्ध करण्यासाठी माझे पुत्र आणि पांडव गोळा झाले आहेत. तर सध्या ते काय काय करत आहेत, ते समस्त मला लवकर ऐकव!"

यावर संजय सांगू लागला कीः

दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा।
आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवीत्।।१-२।।
पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम्।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता।।१-३।।

पांडवांच्या सैन्याची व्यूहरचना पाहून दुर्योधन आचार्य द्रोणांजवळ जाऊन म्हणू लागला की, "हे आचार्य! पांडवांचे सैन्य पहा! तुमचा बुद्धिमान शिष्य अन द्रुपदाचा पुत्र असणाऱ्या धृष्टद्युम्नाने या मोठ्या सेनेचा व्यूह रचला आहे."

"सैन्यसिंहु पांखरिला"

ज्ञानेशोक्ती यावर असे सुचवते कीः

तियें वेळीं तो संजयो बोलें। म्हणे पांडवसैन्य उचलिलें।
जैसें महाप्रलयीं पसरलें। कृतांतमुख।।१-८८।।
तैसें तैं घनदाट। उठावलें एकवट।
जैसें उचलिलें कालकूट। धरीं कवण।।८९।।

संजय म्हणाला, "युद्धासाठी पांडव सैन्य सज्ज झाले आहे. ते जणू काही महाप्रळयाच्या वेळी विस्तारलेले काळाचे मुख भासते. अमित संख्याबल असलेले ते सैन्य हल्ला करण्यासाठी एकजूटीने उभे राहिले आहे, तर त्यास आवर कसा घालता येईल! एकदम काळकूट क्षीरसागरातून उसळी मारून बाहेर पडले, तेव्हा त्याला सुर-असुर कोणी तरी शमवू शकलेत काय!"

ना तऱ्हीं वडवानल सादुकला। प्रलयवातें पोखला।
सागर शोखूनि उधैला। अंबरासि।।१-९०।।
तैसें दल दुर्धर। नानाव्यूहीं परिकर।
अवगमलें भ्यासुर। तियें कालीं।।९१।।

"समुद्राच्या पोटींचा वडवानळ जेव्हा प्रक्षुब्ध होतो व त्याला प्रलयकाळींच्या वाऱ्याने फोफावले की तो जसा समुद्राचे शोषण करून विश्वभर पसरतो आणि आकाशापर्यंत त्याच्या ज्वाळा पसरल्यावर तो जसा भीषण भासतो, तसे ते पांडवसैन्य कोणालाच आटोपणारे नाही आणि वर त्याची व्यूहाकार रचना केलेली असल्याने ते भयावह वाटत आहे."

तैं देखिलियां दुर्योधनें। अव्हेरिलें कवणें मानें।
जैसें न गणिजे पंचाननें। गजघटांतैं।।१-९२।।
मग द्रोणापासीं आला। तेयांतैं म्हणे हा देखिला।
कैसा दलभारु उचलिला। पांडवांचा।।९३।।
गिरिदुर्ग जैसें चालतें। तैसें विविध व्यूह संभवतें।
हें रचिलें आथी बुद्धिमंतें। द्रुपदकुमरें।।९४।।
जो कां तुम्हीं शिक्षापिला। विद्या देऊनि कुरुठा केला।
सैन्यसिंहु पांखरिला। देख देख।।९५।।

"पण ते पाहूनही दुर्योधनाने त्याची मुळीच पर्वा केली नाही. हत्तींच्या कळपांची खिजगणतीसुद्धा सिंह जशी करत नाही, तशीच त्या पांडवसैन्याची दुर्योधनाने तमा बाळगली नाही. तो तसाच द्रोणाचार्यांपाशी आला आणि त्यांना म्हणू लागला, "पांडवांचे हे सैन्य किती विशाल पसरले आहे, पहा! ते कसे युद्ध करण्यासाठी उसळ्या घेत आहे! तुमच्या बुद्धिमान अशा शिष्याने-द्रुपदपुत्राने या सैन्याचे कसे व्यूह रचले आहेत, पहा! हे सैन्य म्हणजे जणू चालणारे डोंगर किंवा दुर्गच आहेत. तुम्ही ज्याला विद्या शिकवली आणि महत्त्वास आणले, त्या पांडवांच्या सेनानी अशा धृष्टद्युम्नाने हा सैन्यरूपी सिंह कसा झडप घालण्याच्या पवित्र्यात उभारला आहे, ते पहा!"

महायोद्ध्यांचा परिचय

पांडव सैन्यातले प्रमुख योद्धे पाहून दुर्योधन पुढे म्हणतोः

अत्र शूरा महेश्वासा भीमार्जुन समा युधि।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः।।१-४।।
धृष्टकेतुश्चेकितानः कशिराजश्च वीर्यवान्।
पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः।।१-५।।
युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजश्च वीर्यवान्।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः।।१-६।।

"यांच्यांत भीमार्जुनासारखे युद्धात शूर व महाधनुर्धर योद्धे आहेत. युयुधान *(सात्यकी)*, विराट, महारथी द्रुपद, धृष्टकेतु, चेकितान, वीर्यसंपन्न काशिराजा, पुरुजित, कुंतिभोज, नरवीर शैब्य, पराक्रमी युधामन्यु, वीर्यशाली उत्तमौजा, सुभद्रापुत्र अभिमन्यु आणि द्रौपदीचे पाच पुत्र - हे सर्व महारथी या पांडव सेनेत आहेत."

पांडवांच्या योद्ध्यांचा परिचय करून देतांना ज्ञानदेव म्हणतातः

आणिकही असाधारण। जैं शस्त्रास्त्रीं प्रवीण।
जैं क्षात्रधर्मीं निपुण। वीर आहाती।।१-९६।।
जैं बलें प्रौढी पौरुषें। भीमार्जुनांसारिखें।
तैं सांघेन कौतुकें। प्रसंगेनि।।१-९७।।

"यांच्याव्यतिरिक्त इतरही असामान्य वीर आहेत. ते शस्त्रास्त्रविद्येत निपुण आहेत आणि युद्ध करण्यात कुशल आहेत. ते भीमार्जुनांसारखेच बळाने, पौरुषाने आणि कीर्तीने मोठे आहेत. त्यांची नांवे पण आता प्रसंग आला आहे, म्हणून सहज सांगतो."

येथ युयुधानु सुभटु। आला असे विराटु।
महारथी श्रेष्ठु। द्रुपदु वीरु।।१-९८।।
चेकितान धृष्टकेतु। काशीश्वरु विक्रांतु।
उत्तमौजा नृपनाथु। शैब्य देख।।९९।।
हा कुंतिभोज पाहे। एथ युधामन्यु आला आहे।
आणि पुरुजितादि राय हें। सकल देखें।।१००।।

"या रणांगणात लढवय्या वीर सात्यकी, विराट, श्रेष्ठ महारथी वीर द्रुपद हे पण युद्धासाठी जमले आहेत. तसेच चेकितान,धृष्टद्युम्नपुत्र धृष्टकेतु, पराक्रमी काशीश्वर, नृपश्रेष्ठ उत्तमौजा आणि शैब्य राजा हेसुद्धा येथे आहेत. कुंतिभोज, युधामन्यु आणि पुरुजितादी राजेही येथे गोळा झाले आहेत."

हा सुभद्राहृदयनंदनु। जो अपरु नवा अर्जुनु।
तो अभिमन्यु म्हणे दुर्योधनु। देखें द्रोणा।।१-१०१।।
आणिकही द्रौपदीकुमर। हें सकलही महारथी वीर।
मिती नेणिजे परि अपार। मीनलें असती।।१०२।।

पुढे दुर्योधन म्हणतो, " आणि हा पाहा सुभद्रेच्या हृदयास आनंदित करणारा अर्जुनाचा लाडका पुत्र अभिमन्यु! हा तर प्रतिअर्जुन असाच आहे. हे द्रोणाचार्य! द्रौपदीचे पांचही पुत्र पहा. हे सगळे महारथी वीर आहेत. आणिक जे इतर वीर आहेत, त्यांची गणती करणेसुद्धा अशक्य आहे. हे सर्व जण युद्ध करण्यासाठी पांडव सैन्यात दाखल झाले आहेत."

दुर्योधनाचे सामर्थ्य

नंतर स्वतःच्या सेनाबलाची प्रौढी सांगत दुर्योधन म्हणतोः

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम।
नायका मम सैन्यस्य सञ्ज्ञार्थं तान्ब्रवीमि ते।।१-७।।
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जयः।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च।।१-८।।
अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः।।१-९।।
अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम्।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम्।।१-१०।।

"हे द्विजश्रेष्ठा! आता माझ्याकडील प्रसिद्ध सेनानी कोण कोण आहेत, ते पाहा! आपण स्वतः, भीष्म पितामह, कर्ण, कृपाचार्य, समितिंजय, अश्वत्थामा, विकर्ण, सोमदत्ताचा पुत्र भूरिश्रवा हे महान वीर माझ्या बाजूने युद्ध करणार आहेत. आणखी इतरही अनेक जीवावर उदार होऊन माझ्याप्रीत्यर्थ लढणारे वीर आहेत. ते सगळे विविध शस्त्रांमध्ये प्रवीण व युद्धकलेत निष्णात आहेत. भीष्म ज्याचे प्रमुख सेनापती आहेत, असे हे माझे सैन्य बलिष्ठ आहे. ते अजिंक्य

सैन्य अफाट विस्तारलेले आहे; उलट भीमाने रक्षिलेले सैन्य मोजकेच असून त्याचा आपल्याला सहज पराभव करता येईल."

"हे अप्रतिमल्ल जगीं"

अहंमन्य दुर्योधनाची दर्पोक्ती स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतातः

आतां आमुचां दळीं नायक। जैं रूढ वीर सैनिक।
तैं प्रसंगें आईक। सांघिजती।।१-१०३।।
उद्देशें एक दोनीं। जायिजती बोलौनि।
तुम्हीं आदिकरूनि। मुख्य जैं जैं।।१०४।।
हा भीष्मु गंगानंदनु। जो प्रतापतेजस्वी भानु।
रिपुगजपंचाननु। कर्णु वीरु।।१०५।।
या एकेकाचेनि मनोव्यापारें। हें विश्व होये संहरें।
हा कृपाचार्यु पुरे। एकलाचि।।१०६।।

"आमच्याकडचे नामांकित योद्धे कोण कोण आहेत, पाहा! त्यातल्या दोनएक जणांची वानगीदाखल नांवे सांगितली तरी पुरे आहे. तुमच्याप्रमाणेच इतर जे प्रमुख महायोद्धे आहेत, त्यांत हे भीष्म *गंगासुत* म्हणून विख्यात आहेत. हे भानुप्रमाणे महातेजस्वी व प्रतापवान आहेत. शत्रूरूपी गजाचे मर्दन करणारा वीरसिंह म्हणजे हा कर्ण आहे. माझ्याकडील एकेक वीर असा प्रतापी आहे की त्याच्या नुसते मनात यायचा अवकाश! या जगाचा संहार करणे त्याच्या हातचा मळ आहे. हे विश्व अजून जसेच्या तसे आहे; कारण त्यांनी अजून त्याचा संहार करण्याचा संकल्प केलेला नाही एवढेच! या समस्त पांडवसैन्याचा काळ करण्यास, फार कशाला जे एकटे कृपाचार्यच पुरून उरतील!"

एथ विकर्ण वीरु आहे। हा अश्वत्थामा पैलु पाहें।
याचा अडदरु वाहे। कृतांतु मनीं।।१-१०७।।
समितिंजयो सोमदत्ती। ऐसें आणिकही बहुत आहाती।
जेयांचियां बलां मिती। धाताही नेणें।।१०८।।
जैं शस्त्रविद्या पारंगत। मंत्रावतार मूर्त।
हो कां जैं अस्त्रजात। एथूनि रूढ।।१०९।।
हें अप्रतिमल्ल जगीं। पुरता प्रतापु आंगीं।
परि सर्व प्राणें मजचिलागीं। आराईलें असती।।११०।।

"तसेच इतर वीर पाहा! विकर्ण हा महायोद्धा आहे. अश्वत्थामा पण आहे. याचा धाक प्रत्यक्ष काळाला पण पडतो. समितिंजय, सोमदत्ति यांसारखे बरेच वीर माझ्या बाजूला आहेत. त्यांच्या अपार बलाची गणती प्रत्यक्ष ब्रह्मदेवालासुद्धा करता येणार नाही. असे हे वीर शस्त्रविद्येत पारंगत आहेत. अस्त्रविद्या तर यांच्यापासूनच उपजली. असे ते मंत्रांचे मूर्तिमंत अवतारच आहेत. यांना या विश्वात कोणी प्रतिस्पर्धी नाही. इतके हे प्रतापी आहेत. हे सगळे वीर माझ्यासाठी प्राणसुद्धा अर्पिण्यास तयार आहेत."

"येणें पाडें थेकुलें। लोकत्रय"

पुढे दुर्योधन म्हणतोः

पतिव्रतेचें हृदय जैसें। पतीवांचूनि न स्पर्शे।
मी सर्वस्व यां तैसें। सुभटांसीं।।१-१११।।
आमुचियां काजाचेनि पाडें। देखती जीवित थोकडें।
ऐसें निरवधि चोखडें। स्वामीभक्त।।११२।।
जुंझति कुळकणी जाणिती। कळें कीर्तिसि जिती।
हें बहु असो क्षात्रनीति। एथौनियां।।११३।।
ऐसें सर्वापरी पुरते। वीर दळीं आमुतें।
आतां काय गणूं ययांतैं। अपार हें।।११४।।

"पतिव्रतेच्या अतःकरणात पतिव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचा विचार जसा येत नाही, त्याचप्रमाणे या सुयोद्धयांसाठी मीच सर्वस्व आहे. माझ्या कार्यासाठी आपल्या प्राणांचीही कुरवंडी ओवाळून टाकणारे हे स्वामिभक्त आहेत. युद्धकलेत हे कुशल तर आहेतच आणि तिच्या जोरावर हे वीर यश आणि कीर्ती खेचून आणतीलच! किंबहुना काय सांगावे! क्षात्रतेजाचा उगमच यांच्यापासून झाला आहे, असे म्हटल्यासही वावगे ठरू नये. असे अष्टपैलू वीर आमच्या सैन्यदलात आहेत. त्यांची गणना करणे होत नाही, इतके अगणित हे आहेत."

वरि क्षत्रियांमाजीं श्रेष्ठु। जो जगजेठीं गां सुभटु।
तेयां दलवेपणाचा पाटु। भीष्मासीं पैं।।१-११५।।
आतां ययाचेनि बळें गंवसलें। हें दुर्ग जैसें पन्नासिलें।
येणें पाडें थेंकुलें। लोकत्रय।।११६।।

"याच्यावर ताण करणारी गोष्ट अशी आहे की सर्व क्षत्रियांमध्ये श्रेष्ठ योद्धा असा जगज्जेता गंगासुत भीष्म आमचा सेनानी आहे. आपल्या क्षात्रबलाने सांभाळलेल्या या सर्व सैन्याची उभारणी त्यांनी इतकी उत्कृष्ट केली आहे की हे सेनादळ दुर्गम दुर्घट दुर्गासारखे अजिंक्य दिसत आहे. त्याच्या सामर्थ्यापुढे त्रिभुवनही थोकडे पडेल."

आधींचि समुद्रु पाहीं। तेथ दुवाडपण नाहीं।
मग वडवानलु तैसेयांहीं। विरजा जैसा।।१-११७।।
ना तऱ्हीं प्रलयवह्नि महावातु। ययां दोघां जैसा सांघातु।
तैसा हा गंगासुतु। सेनापती।।११८।।

"समुद्राचेच उदाहरण घ्या. तो तरून जाण्यास किती दुस्तर असतो. वर त्याला वडवानळाची साथ असते. मग तो किती भयकारी वाटतो! प्रलयाग्नी व त्याला सोबत देणारा महावात यांच्यापुढे त्रिभुवन क्षणभर तरी टिकते का! या अफाट सैन्यदळाला भीष्मांसारखा सेनानी मिळाल्यामुळे तसेच झाले आहे."

आतां येणेंसि कवण भिडे। हें पांडव सैन्य कीर थोकडें।
ओईचलेनि पाडें। दिसत असे।।१-११९।।
वरी भीमसेनु बेथु। तो जाहला असे सेनानाथु।
ऐसें बोलौनि हे मातु। सांडिली तेणें।।१२०।।

"आता या अशा माझ्या सैन्याशी कोणी भिडावे! वर हे पांडव सैन्य तर अगदीच मोजके आहे. आमच्या मानाने हे अपुरे आहे. वर त्याला भीमासारखा बथ्थड अन् निव्वळ आडदांड सेनापती मिळाला आहे. तर त्या सैन्याची हां हां म्हणताम्हणता कशी वाताहत होईल, हे कोणी वेगळे सांगायला हवे का!"

"हाचि एकु रक्षावा"

असे बोलून दुर्योधन उगी राहिला व मग पुढे बोलू लागला:

अयनेषु च सर्वेषु यथा भागमवस्थिताः।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि।।१-११।।

"या सैन्यव्यूहात आपापल्या निर्दिष्ट केलेल्या स्थानी प्रत्येक योद्ध्याने सज्ज राहून आपण सर्वांनी मिळून भीष्मांचे रक्षण करावे."

सेनानींना युद्धाचा पवित्रा घेण्याचा आदेश देत दुर्योधन म्हणतो:

मग पुनरपि काय बोलें। सकल सैनिकांतैं म्हणितलें।
आतां दलभार आपुलालें। सरसें करा।।१-१२१।।
जेयां जियां अक्षौहिणी। तेणें तियां आरणी।
वरगण कवण कवणीं। महारथियां।।१२२।।
तेणें तियां आवरिजे। भीष्मातलीं राहिजे।
द्रोणातैं म्हणे पाहिजे। तुम्हीं सकल।।१२३।।
हाचि एकु रक्षावा। मी तैसा हा देखावा।
येणें दलभारु आघवा। सांचु आमुचा।।१२४।।

"तुम्ही सकळ सेनानींनी आपापले सैन्य व्यवस्थित सज्ज ठेवून, ज्यांच्याकडे अक्षौहिणी भार आहे, त्यांनी त्यांचे व्यवस्थित विभाग करून त्या एका एका महारथ्याकडे सुपूर्द कराव्यात. त्या त्या महारथ्यांनी आपापल्याकडे सोपवलेल्या सेनेचे संरक्षण करावे आणि भीष्मांच्या आज्ञेप्रमाणे युद्ध करावे."

त्यानंतर दुर्योधन द्रोणाचार्यांना म्हणतो की, "या सर्व सैन्यावर तुम्ही नियंत्रण करावे, देखरेख करावी आणि भीष्मांचे सर्वतोपरी रक्षण करावे. कारण आपल्या सैन्याचे सगळे सामर्थ्य त्यांच्या एकट्याठायीच आहे. म्हणून त्यांना माझ्यासारखेच मानून सर्वांनी त्यांचे रक्षण करावे."

दुर्योधन रणनीतिकुशल असल्याचे महाभारत दर्शविते आणि भीष्मांचे रक्षण करण्यास सांगण्यात त्याचे राजनीतिचातुर्य पण दिसून येते. पुढे जो शिखंडीआडून बाण मारून अर्जुनाने भीष्मांचा युद्धात पाडाव केला, तसे काही होऊ नये, कोणत्याही प्रकारे भीष्मांना युद्धनिवृत्त व्हावे लागू नये, अशी दुर्योधनाची इच्छा आहे. तसेच भीष्म व द्रोण हे त्यांच्या हाती शस्त्र असेतोवर कोणाहीकडून जिंकले जाऊ शकणार नाहीत, हे पण दुर्योधन जाणत आहे.

या दोघांवरच आपली सर्व मदार आहे, हे ओळखून तो द्रोण व भीष्म यांनी प्रसन्न व्हावे व आपल्या बाजूने मनापासून युद्ध करावे या इच्छेने द्रोणांशी गोड बोलून त्यांना मोठेपणाचा मान देत त्यांच्यासह भीष्मांची अशी स्तुती करत आहे, हे पण आपण ध्यानी घेतले पाहिजे.

दिव्य शंखनाद::::

"स शब्दस्तुमुलोऽभवत्"

त्याच्या या युक्तीचा परिणामही त्वरित दिसून येतो, तो असा:

तस्य सञ्जनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः।
सिंहनादं विनद्योच्चैः शङ्खं दध्मौ प्रतापवान्।।१-१२।।
ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत्।।१-१३।।

"दुर्योधनाचे हे बोलणे ऐकून प्रसन्न झालेल्या कुरुकुलातील ज्येष्ठ अशा त्या प्रतापी पितामह भीष्मांनी उच्च स्वरात गर्जना करत सिंहासारखा नाद दुमदुमवत आपला शंख मोठ्याने वाजवला. त्याबरोबर युद्धसज्ज झालेल्या कौरव सेनेने व त्यांच्या सेनानींनीसुद्धा आपापली शंख, नगारे, ढोल, मृदंग, कर्णे इ.विविध रणवाद्ये जोरजोरात वाजवली. त्यांचा तो अकस्मात झालेला नाद भयंकरच होता."

भीष्मांचा दिव्य शंखनाद

हे युद्धसज्जतेचे कौरवांचे प्रतिपक्षास आव्हान देणारे रणभेरी, शंख इ.चे आवाज वर्णित त्यांचे नादचित्र आपल्यापुढे साकार करत ज्ञानदेव म्हणतात:

या राजाचियां बोलां। सेनापति संतोखला।
मग तेणें केला। सिंहनादु।।१-१२५।।
तो गाजत असे अद्भुतु। दोहीं सैन्यांचियां आंतु।
प्रतिध्वनि न सामातु। उपजत असे।।१२६।।
तेयांचि तुलगासवें। विरवृत्तीचेनि थांवें।
दिव्य शंख भीष्मदेवें। आस्फुरिला।।१२७।।
तें दिव्य नाद मिनलें। तेथ त्रैलोक्य बधिरभूत जाहालें।
जैसें आकाश कां पडिलें। तुटौनियां।।१२८।।

"राजा दुर्योधनाच्या या बोलांनी सेनापती भीष्म संतोषले. मग त्यांनी सिंहासारखी गर्जना केली. ती गर्जना कौरव व पांडवांच्या सैन्यात विलक्षण दुमदुमली. तिचे प्रतिध्वनी उठू लागून ते आकाशातही समावेनात. त्या प्रतिध्वनींनी वीरवृत्ती उफाळून येऊन भीष्मदेवांनी आपला दिव्य शंख वाजविला. शंखाचा निनाद व प्रतिध्वनी एकमेकांत मिसळून जो कोलाहल झाला, त्यामुळे त्रिभुवनाच्या कानठळ्या बसल्या. आकाशच जणू तुटून पडावे, असा भयंकर तो ध्वनी होता."

घडघडित अंबर। उचंबलित सागर।
क्षोभलें चराचर। कांपत असें।।१-१२९।।
तेणें महाघोषगजरें। दुमदुमिती गिरिकंदरें।
तंव दलामाजीं रणतुरें। आस्फुरलीं।।१३०।।

"अंबर धडाडले; सागर उचंबळून आला; सर्व चराचराचा क्षोभ होऊन ते थरथर कापू लागले; गिरिकंदरे दुमदुमून गेली; इतका तो महाघोष गर्जत होता. आणि त्याचबरोबर उत्साहित झालेल्या कौरवदलाकडून रणवाद्ये एकदम वाजवली जाऊ लागली."

"ऐसा अद्भुत तुरबंबालु"

अशा वेळी केवढा रणकल्लोळ उसळला, तो किती ***"न भूतो न भविष्यति"*** असा भयंकर होता, त्याबाबत ज्ञानेश म्हणतात:

उद्दंड सैंघ वाजतें। भयानकें खाखातें।
महाप्रलयो जेथे। धाकडांसि।।१-१३१।।

भेरी निशाण मांदल। शंख काहला भोंगल।
आणि भयासुर रणकोल्हाल। सुभटांचें।।१३२।।
आवेशें भुजा त्राहाटिती। विसणैलें हांका देती।
जेथ महामद भद्रजाती। आवरती ना।।१३३।।
तेथ भेडांचि कवणु मातु। कांचयां केरु फिटतु।
जेणें दचकला कृतांतु। आंग नेघें।।१३४।।

"भयंकर व कर्कश आवाज करत सर्वदूर अनेकानेक रणवाद्ये इतकी जोरजोराने गर्जू लागली की मोठमोठ्या वीरांनाही तो जसा काही प्रळयकाळच समीप येऊन पोहोचला आहे, असे वाटू लागले. नौबती, डंके, ढोल, शंख, मोठ्या झांजा व कर्णे इ.वाद्यांसोबत योद्ध्यांच्या गर्जना यांमुळे भयानक रणकल्लोळ तेथे उपजला. कित्येक वीर आवेशात येऊन दंड थोपटून दाखवू लागले. त्या कोलाहलामुळे आधीच मदोन्मत्त केलेले हत्ती बिथरून जाऊन आवरेनासे झाले. अशाठायी भ्याडांचे काय झाले असेल, ते कसे कस्पटाप्रमाणे उडून गेले असतील, हे काय सांगायलाच हवे! त्या सर्व रणकल्लोळाने प्रत्यक्ष कृतांतसुद्धा दचकला व थरथर कापू लागला."

एकां उभयतांचि प्राण गेलें। चांगांचें दांत बैसलें।
बिरुदांचें दादुलें। हिंवताती।।१-१३५।।
ऐसा अद्भुतु तुरबंबालु। ऐकौनि ब्रह्मा व्याकुलु।
देव म्हणती प्रलयकालु। ओढवला आजीं।।१३६।।

"त्या समयी काही दुबळे तेथे जमले होते. त्यांचे प्राणच त्यांना सोडून गेले. काही काही धैर्यवान होते, त्यांच्या भयाने दांतखिळी बसल्या. आणि मी मी म्हणणाऱ्या वीरांची अंगे भयाने थरथर कापू लागली. असा तो अद्भुत आवाज ऐकून ब्रह्मदेव चिंतातुर झाला आणि देव तर म्हणू लागले की आज प्रळयकाळच ओढवलेला दिसतो आहे जणू!"

श्वेताश्वयुक्त भव्य रथातून केशवार्जुनांचा दिव्य शंखनाद

ऐसीं स्वर्गीं मातु। देखौनि तो आकांतु।
तंव पांडवदलांआंतु। वर्तलें कायि।।१-१३७।।

"तो रणभूमीवरील आकांत पाहून स्वर्गात अशी चिंता निर्माण झाली.त्यावेळी पांडव सैन्यात काय घडले, ते ऐका!"

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः।।१-१४।।

"कौरव सैन्यातील रणगर्जना ऐकून त्या ठिकाणी पांढरे शुभ्र अश्व जोडलेल्या श्रेष्ठ रथात आरूढ झालेल्या श्रीकृष्ण आणि अर्जुन यांनीही प्रतिपक्षाचे आव्हान स्वीकारत आपापले दिव्य शंख फुंकले."

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनञ्जयः।
पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः।।१-१५।।

"भगवंतांनी पांचजन्य शंख वाजविला, तर अर्जुनाने आपला देवदत्त शंख वाजवला. अचाट कर्मे करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या भीमसेनाने आपला पौंड्र नामक शंख वाजवला."

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ।।१-१६।।

"त्याचवेळी कुंतीपुत्र राजा युधिष्ठिराने अनंतविजय व नकुल-सहदेवांनी आपापले सुघोष व मणिपुष्पक नावाचे शंख वाजविले."

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः।।१-१७।।
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक्।।१-१८।।

"तसेच महाधनुर्धर काशीराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट, अपराजित सात्यकी, द्रुपद व द्रौपदीचे महारथी पुत्र आणि महाबाहू अभिमन्यु इ.सर्वांनी आपापले शंख वाजवून प्रतिसाद दिला."

पांडवांतर्फे दिल्या गेलेल्या प्रतिआव्हानात्मक अशा त्या शंखनादांचे कौतुक रसभरितपणे करत ज्ञानेश म्हणतातः

हो कां निजसार विजयाचें। कीं तैं भांडार महातेजाचें।
जेथ गरुडाचियें जवलियेचें। कांतलें चाऱ्हीं।।१-१३८।।
कीं पांखांचां मेरु जैसा। रहिवरु मिरवतसे तैसा।
तेजें कोंदाटलियां दिशा। जेयांचेनि।।१३९।।
जेथें अश्ववाहकु आपण। वैकुंठींचा राणा जाण।
तेयां रथाचें गुण। काय वर्णूं।।१४०।।
ध्वजस्तंभावरी वानरु। तो मूर्त्तिमंत शंकरु।
सारथी शार्ङ्गधरु। अर्जुनेंसीं।।१४१।।

पांडवांकडे जगन्नियंता श्रीकृष्ण आहे. तो अर्जुनाचे सारथ्य करत आहे, हे या रणभूमीवरील सुंदर दृश्य प्रथम शब्दांकित करत ज्ञानेश म्हणतातः "विजयगर्भच असा महातेजाचे भांडार भासावा असा गरुडासारख्या दिव्य कांतीचे चार चपळ अश्व जोडलेला व पंख असलेला मेरु पर्वत शोभावा असा तो दिव्य रथ पाहा! त्याच्या तेजाने दशदिशा भरून गेल्या आहेत आणि त्या अशा दिव्य रथावर श्रीकृष्ण - तो वैकुंठीचा राणा - स्वतः बसून सारथ्य करत आहे. त्या रथाचे गुण किती म्हणून वर्णन करावेत! ध्वजस्तंभ म्हणून प्रत्यक्ष मारुती त्या रथावर आरूढला होता. त्याच्या रूपाने साक्षात शंकरच त्या रथाचा सन्मान वाढवत होते."

देखा नवल तेयां प्रभूचें। प्रेम अद्भुत भक्ताचें।
जैं सारथ्य पार्थाचें। करित असे।।१-१४२।।
पाइकु पाठीशीं घातला। आपण पुढां राहिला।
तेणें पांचजन्यु आस्फुरिला। अवलीलाचि।।१४३।।

"त्या प्रभूचे - श्रीकृष्णाचे - नवल किती म्हणून सांगावे! भक्तावरील त्याचे प्रेम अद्भुत आहे. अर्जुनाच्या प्रेमाखातर तो स्वतःच त्याचा सारथी झाला आहे! आपल्या सेवकास पाठीमागे घालून तो स्वतः पुढे झाला आहे! त्या वैकुंठीच्या रायाने लीलेनेच आपल्या हातातील ***पांचजन्य*** वाजवला व आपल्या सख्या अर्जुनास आपण त्याच्यासमवेत असल्याचे आश्वासन प्रकट केले."

परि तो महाघोषु थोरु। गाजत असे गंहिरु।
जैसा उदैला लोपी दिनकरु। नक्षत्रांतैं।।१-१४४।।
तैसें तुरबंबालु भंवतें। कौरवदलीं गाजत होते।
तैं हारपौनि नेणों केउतें। गेलें तेथ।।१४५।।

" त्या शंखाचा महाघोष गंभीरपणे सर्वदूर घुमत राहिला. सूर्य उगवला की नक्षत्रांना जसा लोपवून टाकत आपल्या तेजाने दशदिशा अन आसमंत उजळून टाकतो, त्याप्रमाणे त्या पांचजन्याच्या महानादापुढे कौरवदळात गाजणारी रणवाद्ये आणि त्यांचा कल्लोळ कोठल्याकोठे नाहीसा झाला."

तैसाचि देखें एरें। निनादें अति गहिरें।
देवदत्त धनुर्धरें। आस्फुरिला।।१-१४६।।
तैं दोनीं शब्द अचाट। मीनलें एकवट।
तेथ ब्रह्मकटाह शतकूट। हों पाहत असे।।१४७।।

"श्रीकृष्णांच्या आश्वासक अशा त्या शंखनिनादाने उत्साहित झालेल्या अर्जुनाने मग आपला अति गंभीर नाद करणारा ***देवदत्त***नामक शंख फुंकला. त्या दोन्ही शंखांचे अचाट नाद जेव्हा एकवटले, तेव्हा असे भासू लागले की हे ब्रह्मांड आता शतधा विदीर्ण होते की काय!"

भीमादी पांडवांचे शंखध्वनी

कृष्णार्जुनांच्या त्या दिव्य शंखनादाने आसमंत व्याप्त झाले आणि पांडवसैन्यास उत्साहाचे व वीरश्रीचे उधाण आले. त्यावेळी काय झाले पहाः

तंव भीमसेनु विसणैला। जैसा महाकालु खवलिला।
तेणें पौंड्र आस्फुरिला। महाशंखु।।१-१४८।।
तो महाप्रलयजलधरु। जैसा धडधडिला गंहिरु।
तंव अनंतविजयो युधिष्ठिरु। आस्फुरित असे।।१४९।।
नकुलें सुघोषु। सहदेवें मणिपुष्पकु।
जेणें नादु अंतकु। गजबजला ठाके।।१५०।।

"तिन्हीं लोक डंडलित"

"तेवढ्यात खवळलेल्या महाकालाप्रमाणे आवेश चढलेल्या भीमसेनाने आपला *पौंड्र* नामक महाशंख फुंकला. त्याचा आवाज महाप्रळयकाळाच्या महामेघांचा कडकडाट वाटावा इतका घोर होता. मग युधिष्ठिरानेही आपला *अनंतविजय* नावाचा शंख जोरजोराने वाजवला. नकुलानेही *सुघोष* व सहदेवाने *मणिपुष्पक* नावाचे आपापले शंख फुंकले. त्या आवाजांनी प्रत्यक्ष कळिकाळाच्या अंतःकरणात गजबज झाली."

तेथ भूपती होतें अनेक। द्रुपद द्रौपदेयादिक।
का काशीपति देख। महाबाहु।।१-१५१।।
तेथ अर्जुनाचा सुतु। सात्यकि अपराजितु।
धृष्टद्युम्नु नृपनाथु। शिखंडी हन।।१५२।।
विराटादि नृपवर। जैं सैनिक मुख्य वीर।
तिहीं नाना शंख। आस्फुरिलें।।१५३।।
तेणें महाघोषनिर्घातें। शेषकूर्म अवचितें।
गजबजौनि भूभारांतै। सांडूं पाहाती।।१५४।।
तेथ तिन्हीं लोक डंडलित। मेरु मांदार आंदोलित।
समुद्रजल उसलत। कैलासावेरी।।१५५।।

"त्या युद्धस्थली अनेक राजे होते. द्रुपद, द्रौपदीचे पाच पुत्र, महाबाहू काशीपती, अर्जुनपुत्र अभिमन्यु, अजिंक्य वीर सात्यकी, राजाधिराज धृष्टद्युम्न, शिखंडी आणि विराटादी राजे तेथे होते. त्यांनी आणि इतर प्रमुख वीरांनी आपापले शंख सतत वाजवले. या सर्व महाघोषाच्या आघाताने शेषनाग अन कूर्म यांना पण गडबडायला होऊन ते पृथ्वीचा भार टाकू पाहू लागले. त्रैलोक्य त्यामुळे डळमळून जाऊ लागले. मेरु व मांदार हे पर्वत डोलू लागले. समुद्राचे जळ उसळ्या घेत कैलासापर्यंत उचंबळू लागले."

"तुमुलो व्यनुनादयन्"

असे थैमान माजविणारा तो महानाद कौरवांना कसा भयभीत करून टाकतो पाहाः

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन्।।१-१९।।

"आकाश आणि पृथ्वी दणाणून टाकणाऱ्या त्या महभयंकर घोषाने कौरवांची अंतःकरणे शतशः विदीर्ण केली."

"तेणें दलभार विध्वंसिला। कौरवांचा"

अशा त्या महानादाचे व त्यामुळे कौरवसेनेवर झालेल्या विदारक परिणामाचे ज्ञानेशकृत वर्णन असे आहेः

पृथ्वीतल उलथों पाहात। आकाश असे आसुडत।
तेथ सडा होत। नक्षत्रांचां।।१-१५६।।
सृष्टि गेली रे गेली। देवां मोकलवादी जाहाली।
ऐशीं एक टाली पिटिली। सत्यलोकीं।।१५७।।
दिहाचि दिन थोंकला। जैसा प्रलयकाल मांडला।
तैसा हाहाकारु उठिला। तिहीं लोकीं।।१५८।।

"त्या महाघोषाच्या आघाताने पृथ्वीतळ उलथून पडते की काय आणि आकाशाला हादरे बसून त्यातल्या नक्षत्रांचा तुटून सडा पडतो की काय, असे वाटू लागले. सृष्टिप्रलय होऊन आता देव निराधार होणार आहेत, अशी सत्यलोकात एकच हाकाटी झाली. दिवसाउजेडीच सूर्य मावळल्यासारखा भासू लागला आणि प्रळयकाळी व्हावा, तसा त्रैलोक्यात हाहाकार झाला."

तंव आदिपुरुखु विस्मितु। म्हणें झणे होय पां अंतु।
मग लोपला अद्भुतु। संभ्रमु तो।।१-१५९।।
म्हणौनि विश्व सांवरलें। एऱ्हवीं युगांत होते वोडवलें।
जैं महाशंख आस्फुरिलें। कृष्णादिकीं।।१६०।।
तो घोष तऱ्हीं उपसंहरिला। परि पडसाद होता राहिला।
तेणें दलभार विध्वंसिला। कौरवांचा।।१६१।।

" ते सर्व पाहून आदिपुरुष विस्मित झाला. अवेळीच या सृष्टीचा अंत होतो आहे की काय, असे वाटून त्याने तो अद्भुत गोंधळ लोपवला

व त्रैलोक्यास सावरून घेतले. नाहीतर युगांतच ओढवला होता. कृष्णादिकांनी जे महाशंख वाजवले होते, त्यांचा घोष सरला तरी प्रतिध्वनी जे गर्जत होते, त्यांच्यामुळे कौरव सैन्याची दाणादाण उडाली. सगळे सैन्य इतस्ततः पांगले."

"हृदयानि व्यदारयत्"

तो जैसा गजघटांआंतु। सिंह लीला विदारतु।
तैसा हृदयांतैं भेदितु। कौरवांचियां।।१-१६२।।
तो गाजत जंव आइकती। तंव उभेंचि हियें घालती।
एकमेकांतैं म्हणती। सावध रे सावध।।१६३।।

"हत्तींच्या कळपास सिंह जसा लीलया विदारतो, तसाच तो ध्वनी कौरवांची हृदये भेदून टाकत होता. तो प्रतिध्वनी दुमदुमत त्यांच्या कानी पडला, तेव्हा उभ्याउभ्याच त्यांच्या काळजांनी ठाव सोडला. तरीही त्यातल्या त्यात धीर वीर एकमेकांना सावरत सावध करू लागले."

पुनरपि कौरव सैन्य व्यवस्थित होऊ लागले.

युद्धोत्सुक अर्जुन

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः।
प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पांडवः।।१-२०।।
हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते।

अर्जुन उवाचः

सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत।।१-२१।।
यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान्।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे।।१-२२।।
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः।।१-२३।।

"व्यवस्थित उभ्या राहाणाऱ्या त्या कौरवसैन्यास पाहून आपले धनुष्य उचलून शस्त्रसंपात करण्याच्या त्या समयी कपिध्वज असलेला अर्जुन हृषीकेश कृष्णाला काय म्हणाला, ते हे राजा धृतराष्ट्रा ऐक."

अर्जुन म्हणालाः "हे अच्युता! माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी नेऊन उभा कर. म्हणजे युद्ध इच्छिणाऱ्या या कौरवांचे मला नीट निरीक्षण करता येईल आणि मी कोणाकोणाशी युद्ध करावे हे ठरविता येईल. दुष्टबुद्धी धृतराष्ट्रपुत्रांचे हित करण्याच्या इच्छेने या कुरुक्षेत्री कोणकोणते वीर जमले आहेत, तेही मला पाहता येईल."

या प्रसंगाचे वर्णन करतांना ज्ञानेश म्हणतातः

तेथ बलें प्रौढीपुरतें। जैं महारथी वीर होते।
तिहीं पुनरपि दलांतैं। आवरिलें।।१-१६४।।
मग सरिसेपणें उठावलें। दुणवटौनि उचलिलें।
तेयां दंडीं क्षोभलें। लोकत्रय।।१६५।।
तेथ बाणवेरी धनुर्धर। वर्षताती निरंतर।
जैसें प्रलयांत जलधर। अनिवार कां।।१६६।।

"कौरव सेनेत जो आकांत झाला होता, त्यातून महारथी वीरांनी पुनः सर्व सैन्यसांभार आवरून धरला. तेव्हा सावरलेल्या त्या कौरवसेनादलाच्या नव्या आवेशाने त्यांचा युद्धोत्साह द्विगुणित होऊन त्यमुळे लोकत्रय हादरल्यासारखे भासू लागले. धनुर्धर बाणांचा निरंतर वर्षाव असा करू लागले जसा काही प्रळयकाळींचा मेघ अखंड बरसत असावा."

तैं देखलियां अर्जुनें। संतोख घेऊनि मनें।
मग संभ्रमें दिठी सेनें। घालितसें।।१-१६७।।
तंव संग्रामीं सज्ज जाहालें। सकल कौरव देखिलें।
मग लीला धनुष्य उचलिलें। पांडुकुमरें।।१६८।।
तें वेळीं अर्जुनु म्हणतसें देवा। आतां झडकरीं रथु पेलावा।
नेऊनि मध्यें घालावा। दोहीं दलीं।।१६९।।
जंव मी नावेक। हें सकल वीर सैनिक।
न्याहालीन अशेख। झुंझतें जैं।।१७०।।

"ते दृश्य पाहून अर्जुन मनी संतोषला. त्याने मग कौरवसेनेवर आपली युयुत्सू दृष्टी फिरवली. युद्धोन्मुख कौरव वीर पाहून त्याने पण आपले धनुष्य लीलया उचलले. तो श्रीकृष्णांना म्हणू लागला, "देवा! आता शीघ्र आपला रथ हाकावा व कौरव-पांडव सैन्यांच्या मध्ये नेऊन उभा करावा. म्हणजे मला क्षणभर हे सगळे युद्धोत्सुक सैनिक वीर नीट न्याहाळता येतील."

एथ आलें असती आघवें। परि कवणेंसीं म्यां झुंझावें।
हे रणीं लागें पाहावें। म्हणऊनियां।।१-१७१।।
बहुतकरूनि कौरव। हें आतुर दुःस्वभाव।
वांटिवावीण हांव। बांधिती झुंझीं।।१७२।।
झुंझाची आवडी धरती। परि संग्रामीं धीर नव्हती।
हें सांगोनि रायाप्रति। काय संजयो म्हणे।।१७३।।

"येथे अनेक वीर आले आहेत. पण मला त्यातल्या कोणाशी युद्ध केले पाहिजे, ते ठरवायला हवे. बहुतेक हे सगळे कौरवच युद्धास आतुरलेले आहेत. या दुष्टांकडे सामर्थ्य नसतांनाही ते युद्ध करण्यासाठी हपापलेले आहेत. युद्ध करून आम्हाला हरवण्याची त्यांना फार हौस आहे. पण रणांगणातून पळ काढण्यात ते फार कुशल आहेत, हे पूर्वीच्या अनेक प्रसंगांतून स्पष्ट कळून चुकले आहे."

अर्जुनाची मोहग्रस्तता::::

सञ्जय उवाचः

एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन् भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम्।।१-२४।।
भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम्।
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति।।१-२५।।

"हे भरतकुलातील राजा धृतराष्ट्रा! त्या गुडाकेश अर्जुनाने असे म्हणताच हृषीकेश श्रीकृष्णांनी दोन्ही दळांच्या मधोमध तो उत्तम रथ उभा केला आणि समोर असलेल्या भीष्मद्रोणादी प्रमुख व इतर राजांच्या सन्मुख पार्थाला करून ते म्हणाले की, "हे पार्था! येथे जमलेल्या या कुरूंना पहा."

करुणाव्याप्त अर्जुन

तत्रापश्यत्स्थितान् पार्थः पितृनथपितामहान्।
आचार्यान्मातुलान्भ्रातृन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा।।१-२६।।
श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि।
तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान्।।१-२७।।
कृपया परयाऽऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत्।..।।१-२८।।

"त्या ठिकाणी जमलेल्या वडीलांस, आजे, मामे, गुरू, पुत्र, पौत्र, जिवलग मित्र, तसेच सासरे, स्नेही यांना तेथे युद्धासाठी सज्ज झालेले अर्जुनाने त्या दोन्ही सैन्यांत पाहिले. ते सर्व आपले आप्तेष्ट, बांधवच आहेत, असे पाहून तो कुंतीपुत्र अत्यंत करुणेने व्याकुळ होऊन कष्टी झाला."

श्रीकृष्णाचा अचंबा

या प्रसंगाबाबत ज्ञानेश म्हणतात:

आईका अर्जुनु इतुकें बोलिला। तंव कृष्णें रथु पेलिला।
दोहीं सैन्यांमाजीं केला। उभा तेणें।।१-१७४।।
जेथ भीष्मद्रोणादिक। जवलिकेचें सन्मुख।
पृथिवीपति आणिक। बहुत आहाति।।१७५।।
तेथ स्थिर करूनि रथु। अर्जुनु असे पाहातु।
तो दलभारु समस्तु। संभ्रमेंसीं।।१७६।।
मग म्हणें देख देख। हें गोत्रगुरु अशेख।
तंव कृष्णा मनीं नावेक। विस्मो जाहला।।१७७।।

"अर्जुनाने म्हणण्याचाच अवकाश होता की कृष्णाने रथ नेऊन दोन्ही सैन्यांच्या मध्ये उभा केला. भीष्मद्रोणादिक आप्तसंबंधी आणि बरेच राजेरजवाडे तेथे समोरच उभे होते. त्या ठिकाणी रथ थांबल्यावर तेथील सैन्यसांभाराकडे अर्जुन उत्सुकतेने पाहू लागला. तेथे असलेल्या वीरांना पाहून तो श्रीकृष्णास म्हणू लागला की, "देवा! पहा! पहा! हे तर सगळे आप्तस्वकीय, वडीलधारे, गुरुच आहेत!"

हे ऐकून श्रीकृष्णाला क्षणभर अचंबा वाटला. त्याच्या मनात असे आले की, "या अर्जुनाच्या मनात काय आहे, कोण जाणे! पण याचे हे बोलणे विलक्षणच आहे."

तो आपणपयां आपण म्हणे। एथ कायि कवण जाणें।
हें मनीं धरिलें येणें। परि कांहीं आश्चर्य असे।।१-१७८।।
ऐसीं पुढील से घेतु। तो सहजें जाणें हृदयस्थु।
परि उगा असे निवांतु। तियें वेळीं।।१७९।।
तंव तेथ पार्थ सकल। पितृपितामह केवल।
गुरु बंधु मातुल। देखता जाहला।।१८०।।
इष्टमित्र आपुलें। कुमरजन देखिलें।
हें सकल असती आलें। तयांमाजीं।।१८१।।
सुहृज्जन सासरे। आणिकही सखेसोयरे।
कुमर पौत्र धनुर्धरें। देखिलें तेथ।।१८२।।

अर्जुनाच्या मनात असणाऱ्या विचारांबाबत अशी अटकळ त्या हृदयस्थ जनार्दनाने बांधली, तरी तो काहीएक न बोलता निवांतच राहिला. अर्जुनाला त्या रणभूमीवर आपले सगळे बंधू, मातुल, गुरु, वडीलधारे, पितामह दिसले. इष्टमित्र, सखेसोयरे, पुत्र, युवा पौत्र, सुहृद इ. सर्व जवळचे लोक युद्ध करण्यासाठी तेथे गोळा झाले होते."

जेयां उपकार होतें केलें। कां आपदीं जैं रक्षिलें।
हें असो वडिल धाकुलें-। आदिकरूनि।।१-१८३।।
ऐसें गोत्रचि दोन्हीं दलीं। उदित झालें असें कलीं।
हें अर्जुनें तियें वेलीं। अवलोकिलें।।१८४।।
तेथ मनीं गजबज जाहलीं।
आणि आपैसीं कृपा आली।...।।१८५।।

"उपकृत केलेले आणि आपत्काळी ज्यांचे त्याने रक्षण केले होते, असे इतर सर्व जण धरून त्याचे संपूर्ण गोत्र - भाऊबंद कौरव-पांडव सैन्यात दाखल होऊन युद्धास सज्ज झालेले अर्जुनाने पाहिले. ते पाहून त्याच्या मनात गलबलून आले आणि त्या सर्व आप्तेष्टांविषयी करुणा उत्पन्न झाली."

"तैं अंतःकरण दिधलें। कारुण्यासीं"

...। तेणें अपमानें निघालीं। वीरवृत्ती।।१-१८५।।
जियां उत्तम कुलींचियां होती। आणि गुणलावण्य आथी।
तियां आणिकीतैं न साहती। सुतेजपणें।।१८६।।
नवियें आवडीचेनि भरें। कामुक निजवनिता विसरें।
मग पाडेंविण अनुसरें। भ्रमला जैसा।।१८७।।
कीं तपोबलें ऋद्धि। पातलियां भ्रंशे बुद्धि।
मग तेयां विरक्ततासिद्धि। आठवेना।।१८८।।

"करुणावृत्ती ही वीरवृत्तीच्या विरोधी आहे. करुणेस अर्जुनाने आपल्या अंतःकरणात वसवले, हे पाहून वीरवृत्ती अपमानित झाली व त्याला सोडून निघून गेली. ज्या उत्तम कुलातील गुणलावण्ययुक्त स्त्रिया असतात, त्यांना पतीने सवत आणलेली सहन होत नाही. तसेच त्या वीरवृत्तीचे झाले. नवीन स्त्रीच्या नादाने कामुक पत्नीस विसरतो आणि त्या स्त्रीचे रूपगुण इ.चा विचारसुद्धा मनात न आणता भुलून जाऊन तिच्यापुढे जसा गोंडा घोळत बसतो; किंवा तपोबलाने जेव्हा ऋद्धिसिद्धी प्राप्त होतात, त्यावेळी साधकाची बुद्धी त्यांच्या मोहाने भ्रष्ट होऊन जशी आपले मूळ ध्येय म्हणजे वैराग्यसिद्धी मिळवण्याचे विसरून जाते, तसेच अर्जुनाचे झाले."

तैसें अर्जुना तेथ जाहलें। असतें पुरुषत्व गेलें।
जैं अंतःकरण दिधलें। कारुण्यासीं।।१-१८९।।
देखा मंत्रज्ञु बरलूं जाये। मग तेथ कां जैसा संचारु होये।
तैसा तो धनुर्धरु महामोहें। आकलिला।।१९०।।
म्हणऊनि असतां धीरु गेला। हृदया द्रावो आला।
जैसा चंद्रकलीं सिंपिला। सोमकांतु।।१९१।।

"कारुण्यबुद्धीस अंतःकरणात ठाव दिल्याने त्याचे पुरुषत्व लोपले. मांत्रिक बरळू लागला की पिशाच्च त्याच्या अंगी जसे संचारते, तसा त्या अर्जुनाच्या कारुण्यपूर्ण वर्तणूकीमुळे त्याच्याठायी महामोह प्रवेशला व त्याला ग्रासून बसला. त्यायोगे अर्जुनाठायीची धीरवृत्ती नष्ट झाली. हृदय द्रवित झाले. जणू चंद्रकिरणांनी सोमकांत पाझरावा, तसे त्याचे अंतःकरण दयेने पाझरले."

"गाण्डीवं स्रंसते हस्तात्"

तयापरी पार्थु। अतिस्नेहें मोहितु।
मग सखेद असें बोलतु। अच्युतेंसीं।।१९२।।

अतिस्नेहाने मोहित झालेला अर्जुन त्या अच्युतास म्हणू लागला कीः

अर्जुन उवाचः

...। दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम्।।१-२८।।
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते।।१-२९।।
गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते।।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः।।३०।।

"हे कृष्णा! युद्धेच्छू अशा या स्वबांधवांस येथे गोळा झालेले पाहून माझे मन संभ्रमित झाले आहे. माझी गात्रे शिथिल होत आहेत. मुखास शोष पडला आहे. माझ्या शरीरास कंप सुटला आहे व रोमांच उभे राहत आहेत. शरीराच्या त्वचेचा दाह होत आहे. व्याकुलतेने विद्ध होऊन माझ्या हातातील गांडीव धनुष्य गळून पडत आहे."

अर्जुनाचे हे विलक्षण चित्र उभे करतांना ज्ञानेश म्हणतातः

तो म्हणे अवधारीं देवा। म्यां पाहिला हा मेळावा।
तंव गोत्रवर्गु आघवा। देखिला एथ।।१-१९३।।
हें संग्रामीं अति उद्यत। जाहालें असती कीर समस्त।
पण आपणपेयां उचित। केंवीं होय।।१९४।।
येणें नांवेंचि नेणों कायीं। मज आपणपें सर्वथा नाहीं।
मन बुद्धीठायीं। स्थिर नोहें।।१९५।।
देखें देह कांपत। तोंड असें कोरडें होत।
विवलता उपजत। गात्रांसि।।१९६।।
सर्वांगां कांटाला आला। अति संतापु उपनला।
तेथ बेंबल हातु गेला। गांडीवाचा।।१९७।।
तैं न धरतचि निष्टलें। परि नेणेचि हातौनि पडिलें।
ऐसें हृदय असें व्यापिलें। मोहें एणें।।१९८।।

अर्जुन पुढे काय म्हणतो पहाः "श्रीकृष्णा! येथे जमलेला हा स्वकीयांचा समुदाय लढाईला किती उत्सुक आहे पाहा! पण आपल्याच संबंधिजनांशी युद्ध करणे कितपत योग्य आहे? या आप्तेष्टांशी युद्ध करण्याच्या नुसत्या कल्पनेनेच मला उदास वाटू लागले आहे. माझे मन व बुद्धी आपल्याठायी स्थिर राहीनाशी झाली आहेत. देहास कंप सुटून तोंडाला कोरड पडली आहे. गात्रांतील त्राण नाहीसे जाले आहे. सर्व शरीरावर रोमांच उभे झाले आहेत. सर्वांगाचा दाह होत आहे. गांडीव धरणारा माझा हात लुळा पडला आहे. हातातून धनुष्य केव्हा निसटून पडले, ते मला कळलेसुद्धा नाही. माझे अंतःकरण असे या मोहासुराने व्याप्त करून टाकले आहे."

अर्जुनाची व्याकुळता

चित्त थाऱ्यावर नसल्याने अर्जुनाची अशी अवस्था झाली आहे. त्याच्या मनात पुढे करावयाच्या युद्धाबाबत मोठा संदेह उपजत आहे. पुढे ऐकाः

जैं वज्रापासौनि कठीण। दुर्धर अति दारुण।
तयाहूनि असाधारण। हें स्नेह नवल।।१-१९९।।
जेणें संग्रामीं हरु जिंतिला। निवातकवचांचा ठाओ फेडिला।
तो अर्जुनु मोहें कवळिलां। क्षणामाजीं।।२००।।
जैसा भ्रमर नेदीं कोडें। भलतैसें काष्ठ कोरडें।
परि कलिकेमाजीं सांपडें। कोंवळियें।।२०१।।
तेथ उत्तीर्ण होईल प्राणें। परि तैं कमलदल चिरुं नेणें।
तैसें कठीण कोंवळेंपणें। स्नेह देखा।।२०२।।

"खरे तर अर्जुनाचे अंतःकरण वज्रापेक्षाही कठोर, दुर्धर आणि अत्यंत खंबीर होते. पण त्या तशाही अंतःकरणात प्रवेशलेल्या त्या आप्तस्वकीयांसंबंधीच्या स्नेहभावनेचे नवलच आहे! पाहता पाहता त्या स्नेहाने अर्जुनाच्या कठोर अंतःकरणाचा नवनीताहूनही मुलायम करवणारा कायापालट घडवून आणला. युद्धात प्रत्यक्ष शंकरास ज्याने जिंकले; निवातकवच नावाच्या राक्षसांचा ठावठिकाणा उरू दिला नाही; तो अर्जुन त्या मोहाने क्षणात घेरला गेला. कितीही कठीण असणाऱ्या लाकडास भ्रमर लीलया पोखरतो. पण जेव्हा कोवळी कमलकलिका त्याला बंदिस्त करते, तेव्हा प्राण गेला तरी त्या कलिकेचा भेद करून तो बाहेर पडू शकत नाही. अर्जुनाच्या मनात उपजलेला स्नेहही असाच त्या कलिकेसारखा कोवळा आणि तरीही भ्रमरास ती कलिका जशी अभेद्य असते, तसा त्याच्या कठोर अंतःकरणास भेदण्यास अभेद्य असा होता!"

हें आदिपुरुखाची माया। ब्रह्मेयाहीं नयेचि आया।
म्हणऊनि भुलविला ऐकें राया। संजयो म्हणे।।१-२०३।।
अवधारीं मग तो अर्जुनु। देखौनि सकल स्वजनु।
विसरला अभिमानु। संग्रामींचां।।२०४।।
कैसीं नेणों सदयता। उपनली तेयां चित्तां।
मग म्हणे कृष्णा आतां। नसिजे एथ।।२०५।।
माझें अतिशय मन व्याकुल। होतसे वाचा बरल।
जैं वधावें हें सकल। येणें नांवें।।२०६।।

संजय म्हणतो, "हे राजा! हा स्नेह म्हणजे आदिपुरुषाच्या मायेप्रमाणेच आहे. ब्रह्मदेवालासुद्धा न आकळणारी ती माया जशी असते, तसा हा स्नेहसुद्धा कोणालाही कळू न शकणारा आहे. अशा त्या स्नेहमोहाने पादाक्रांत केलेला अर्जुन भ्रमून गेला. स्वजनांना युद्धासाठी आलेले पाहून युद्ध करण्याची आपली ईर्षा विसरला. त्याच्या चित्तात सदयतेने कसा प्रवेश केला कोण जाणे! तो कृष्णास म्हणू लागला की, "देवा! माझे मन या सगळ्या स्वजनांचा घात करण्याच्या विचाराने व्याकुळ झाले आहे. वाचेवरील नियंत्रण सुटून मनातही वाटेल तसे विचार येत आहेत. तरी आपण आता येथून निघून जावे, हेच बरे! हे युद्ध करणे नकोच!"

"या सकलांतैं वधावें"

पुढे तो अर्जुन त्या जनार्दनास म्हणू लागलाः

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे।।१-३१।।

"हे केशवा! या युद्धाची मला विपरीत लक्षणे दिसत आहेत. या स्वजनांचा घात करून काही श्रेय लाभेल, असे मला वाटत नाही."

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा।।१-३२।।
येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च।।१-३३।।

"ज्यांच्यासाठी राज्य, भोग, सुख व धनाची इच्छा करावयाची, ज्यांच्या आनंदासाठी हे सगळे मिळवायचे, तेच ते सर्व स्वकीय आमच्याविरुद्ध युद्ध करण्यासाठी आपल्या प्राणांची व धनसंपत्तीची आस सोडून उभे झाले आहेत. हे पाहून हे कृष्णा! मला विजयाची इच्छा उरली नाही. मला राज्यही नको अन् त्यायोगे मिळणारी सुखेही नकोत. कारण हे सर्व मिळून काय उपयोग! हे गोविंदा! स्वजनांचा घात करून राज्य मिळाले, सुखोपभोग मिळाले, तर काय उपयोगाचे! आणि त्यांच्या रक्ताने हात भरून घेऊन जगणे लांछनास्पदच नाही का!"

अर्जुनाच्या मनातील तळमळ शब्दांकित करत ज्ञानेश म्हणतातः

या कौरवां जऱ्हीं वधावें। तऱ्हीं युधिष्ठिरादिकां कां न वधावें।
हें एरएर आघवें। गोत्रज आमुचें।।१-२०७।।
म्हणोनि जळो हें जुंझ। प्रत्यया न ये मज।
एणें काय काज। महापापें।।२०८।।
देवा बहुतीं परीं पाहतां। एथ वोखटें होईल जुंझतां।
वर कांहीं चुकवितां। लाभु आथी।।२०९।।

अर्जुन पुढे म्हणतो, "या कौरवांचा वध करणे जर उचित असले, तर युधिष्ठिरादिक सगळ्यांना का मारू नये! कारण तसे पाहिले तर कौरव अन युधिष्ठिरादिक हे सगळे माझे गोत्रजच आहेत. गोत्रजांचा वध करणे हे पाप नसेल तर ठीकच आहे! पण हे तर महापाप आहे! असे महापाप पदरी बांधणारे हे युद्ध जळू दे! त्याच्यापासून काहीच लाभ नाही. सगळी हानीच हानी होणार आहे. हे कृष्णा! खूप विचार करून पाहिले. पण या युद्धाचे परिणाम वाईटच आहेत. म्हणून ते टाळणेच उत्तम!"

तेयां विजयवृत्ती कांहीं। मज सर्वथा काज नाहीं।
एथ राज्य तऱ्हीं काई। हें पाहौनियां।।१-२१०।।
यां सकलांतैं वधावें। मग जैं भोग भोगावें।
तैं जळोत आघवें। पार्थु म्हणें।।२११।।

"असे हे युद्ध जिंकण्याची मला इच्छा नाही. अशा प्रकारे मिळवलेले राज्य तरी काय करायचे! या समस्त आप्तस्वकीयांचा वध करून मिळवावयाचे ते सगळे रक्तलांछित भोग जळोत!"

तेणें सुखेंविण होईल। तैं भलतेही साहिजैल।
वरि जीवितही वेंचिजैल। याचिलागीं।।१-२१२।।
परि यांसी घातु कीजे। मग आपण राज्य भोगिजे।
हें स्वप्नींहीं मन माझें। करूं न शके।।२१३।।

तो पृथापुत्र पुढे म्हणालाः " ते राज्य, ते भोग, ते सुख न मिळाले आणि वाटेल तितक्या हालअपेष्टांचे जीवन वाट्याला आले, तरी मला चालेल. इतकेच काय! या सगळ्या कौरवांनी माझाच जीव घेतला तरीही काही बिघडणार नाही! पण यांचा घात करावा आणि मग मिळणारे राज्यसुख भोगावे, अशी कल्पना मी स्वप्नातही करू शकत नाही; तर जीतेजागतेपणी मी यांच्याशी युद्ध कसे करू शकेन!"

"निज हृदयां करूं। घातु केवीं"

आपल्या विचारांच्या पुष्ट्यर्थ तो पुढे म्हणू लागला कीः

तऱ्हीं आम्हीं कां जन्मावें। कवणालागीं जियावें।
जैं वडिलां या चिंतावें। विरुद्ध मनें।।१-२१४।।
पुत्रातैं इप्सी कुल। तेयांचें कायीं हेंचि फल।
जैं निर्दालिजें केवल। गोत्र आपुलें।।२१५।।
हें मनींचि केंवीं धरिजे। आपण वज्राचेयां बोलिजें।
वरि घडे तऱ्हीं कीजे। भलें ययां।।२१६।।
आम्हीं जैं जै जोडावें। तैं समस्त इहीं भोगावें।
हें जीवितही उपकारावें। काजीं यांचां।।२१७।।

"आणि या वडीलधाऱ्या भीष्मादिकांचे अहितच जर चिंतावयाचे असेल, तर आम्ही यांच्या कुलात जन्म घेण्याचा काय उपयोग आहे! पुत्र जन्मावा म्हणून कुलीन घराणे इच्छित असते, ते काय कुलाचा ऱ्हास करावा म्हणून काय! गोत्राचा नाश करण्यासाठी पुत्राचा जन्म असतो काय! समस्त गोत्रबंधूंचा वध करण्याचे हे पाप मनात उपजावे तरी कसे! यांना वज्रादपि कठोर शब्द उच्चारित युद्धासाठी कसे आव्हानावे! उलट यांचे जमेल, तसे हितच आपण करायला हवे! आपण जे काही मिळवावे, ते यांनीच खरे तर उपभोगायचे असते. अन जरूर पडल्यास यांचे रक्षण करण्यासाठी आपले प्राणसुद्धा खरे तर वेचायला हवेत."

आम्हीं दिगंत कीर्तीचें भूपाल। विभांडूनि सकल।
मग संतोषविजे कुल। आपुलें जैं।।१-२१८।।
तैंचि हें समस्त। परि कैसें कर्म विपरीत।
जैं जाहालें असती उद्यत। जुंझावेयां।।२१९।।
अंतौरियां कुमरें। सांडौनियां भांडारें।
शस्त्राग्रीं जिव्हारें। आरौपूनि।।२२०।।
ऐसियांतैं कैसेंनि मारूं। कवणावेरी शस्त्र धरूं।
निज हृदयां करूं। घातु केवीं।।२२१।।

"पृथ्वीतलावरील यच्चयावत राजांचा पराभव करून ज्या कुलाचा संतोष करावयाचा, त्याऐवजी आपल्याच कुलाचे वैर साधून हे युद्ध आपल्या गोत्रजांशीच करण्याचा कसा हा दुर्धर प्रसंग आमच्यावर ओढवला आहे पाहा! आमचे कर्म किती वाईट आहे की त्याचे फल म्हणून हे आप्तेष्ट आपापल्या कुलवधू, पुत्र-पौत्र, धन-संपत्ती या सर्वांवर पाणी सोडून व शस्त्रांच्या अग्रांवर आपले प्राण पणाला लावून आपापसात युद्ध करायला सज्ज झाले आहेत. अशा या आपल्याच माणसांना मी कसे मारू! मी स्वतःच्या काळजावरच शस्त्राघात कसा करू!"

"स्वजनं हि कथं हत्वा"

स्वतःची कीव करत अर्जुन पुढे म्हणतो कीः

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः सम्बन्धिनस्तथा।।१-३४।।

"तुला म्हटल्याप्रमाणे हे माझे स्वजन समोर दिसत आहेत. यात गुरू, पितृतुल्य वडील माणसे, पुत्र, त्याचप्रमाणे पितामह, मातुल श्वशुर, पौत्र, शालक तसेच संबंधित स्वकीय जन आहेत."

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते।।३५।।

"हे मधुसूदना! हे सर्व जण जरी मला ठार मारण्याची इच्छा धरून आहेत, तरीही मी यांना त्रैलोक्याचेसुद्धा राज्य मिळवण्यासाठी मारावे लागणार असले, तरीही मारणार नाही. त्यापुढे पृथ्वीवरच्या या कुरुराज्याची काय कथा!"

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः।।१-३६।।

"हे जनार्दना! या धृतराष्ट्रपुत्रांना मारून आमचे काय भले होणार आहे? या युद्धास निमंत्रण देणाऱ्या आततायी कौरवांना मारल्याने आम्हाला मात्र कुलक्षयाचे पातकच लागेल."

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान्।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव।।१-३७।।

"म्हणून आमचे स्वबांधव असे हे जे कौरव आहेत, त्यांना ठार मारणे योग्य नाही. कारण हे माधवा! या स्वजनांचा घात करून आम्ही कदापिही सुखी होणार नाही."

अर्जुनाचे हे बोल ज्ञानेश साकार करतात, ते असेः

हें नेणसीं तूं कवण। परि पैल भीष्मद्रोण।
जेयांचे उपकार असाधारण। आम्हां बहुत।।१-२२२।।
एथ शालक सासुरे मातुल। आणि बंधु कीं हे सकल।
पुत्र नातू केवल। इष्टही असती।।२२३।।
अवधारीं अति जवलिकेचें। हें सकलहीं सोयरे आमुचें।
म्हणौनि देख आथि वाचें। बोलतांचि।।२२४।।

"परपक्षाकडे भीष्म व द्रोण आहेत. त्यांचे आमच्यावर खूप उपकार आहेत. तुला हे माहीत नाही काय? शालक, श्वशुर, मातुल, बंधू, पुत्र, पौत्र व इतर आमचे इष्टमित्र असे हे वीर येथे जमले आहेत. हे सगळे आमचे अतिशय जवळचे सोयरे आहेत. त्यांचा घात करावा असे बोलणेसुद्धा दोषास्पद आहे. हे सर्व काही का करेनात!"

हें वरि भलते करितु। आतांचि एथें मारितु।
परि आपण मनें घातु। न चिंतावा।।१-२२५।।
त्रैलोक्याचें अनकलित। जऱ्हीं राज्य होईल एथ।
तऱ्हीं हें अनुचित। नाचरें मी।।२२६।।
जऱ्हीं आजि एथ ऐसें कीजे। तऱ्हीं कवणांचां मनीं उरिजे।
सांगें मुख केवीं पाहिजे। तुझें कृष्णा।।२२७।।

"मला आताच्याआताच जरी यांनी ठार केले, तरी त्यांचा घात करण्याचे मी मनात आणणेसुद्धा चांगले नाही. संपूर्ण त्रैलोक्याचे निर्वेध राज्य जरी मिळणार असेल, तरी यांना मारणे अनुचित आहे. मी असे कधीच करणार नाही. जर आज आम्ही यांना युद्धात ठार केले, तर सर्वांच्या मनातून उतरू आणि तुझ्यासमोर येण्याच्या लायकीचे आम्ही राहाणार नाही."

"तुजसि अंतराय होईल"

जऱ्हीं वधु करूनि गोत्रजांचां। तऱ्हीं वसौटा होऊनि दोखांचा।
मज जोडलासि तूं हातींचा। दूरी होसीं।।१-२२८।।
कुलहरणीं पातकें। तियें आंगीं जडती अशेखें।
तयें वेलीं तूं कवणें कें। देखावासि।।२२९।।
जैसा उद्यानामाजीं अनलु। संचरला देखौनि प्रबलु।
मग क्षणभरी कोकिलु। स्थिर नोहें।।२३०।।
सकर्दम सरोवरु। अवलोकूनि चकोरु।
न सेवितु अव्हेरु। करूनि निघे।।२३१।।

जन्मोजन्मीच्या शुभपुण्यकर्मफलाच्या उदयाने अर्जुनास कृष्णसखा मिळाला आहे. अर्जुनास तो दुरावण्याची भीती वाटत आहे. तो म्हणतोः "गोत्रजांचा वध केल्याने मी पातकांचे वसतिस्थान जर झालो, तर तू मला जो लाभला आहेस, तो दूर होशील. कुलघातक्यास जी पातके लागतात, ती माझ्या अंगी भरली तर तुझे दर्शन अतिदुर्लभ होईल. उद्यानात जोपावेतो वृक्षछाया, शीतलता, स्वच्छ वातावरण असतात, तोवर कोकील पक्षी लुब्ध होऊन तेथे विसावतो व आपल्या मधुर पंचम आलापांनी आसमंतात प्रसन्नता भरतो. पण तेच उद्यान जर वणव्यात सापडले, तर तो तेथे क्षणभर तरी थांबतो का! सरोवर आटून गेल्यावर गाळ व चिखलाने भरून गेले आहे, असे पाहिल्यावर चकोर त्या गलिच्छ सरोवरास अव्हेरून निघून नाही का जाणार!"

तयापरी तूं देवा। मज झकों न येसीं मावा।
जऱ्हीं पुण्याचा वोलावा। नाशिजेल।।१-२३२।।
म्हणौनि मी हें न करीं। इयें संग्रामीं शस्त्र न धरीं।
हें किडाल बहुतांपरी। दिसतसे।।२३३।।
तुजसीं अंतराय होईल। मग सांगें आमुचें काय उरेल।
तेणें दुःखें हियें फुटेल। तुजवीण कृष्णा।।२३४।।
म्हणऊनि कौरव हें वधिजति। मग आम्हीं भोग भोगिजती।
हें असो मातु अघडति। अर्जुनु म्हणे।।२३५।।

"हे श्रीकृष्णा! हे प्रभो! तूसुद्धा माझ्याजवळच्या पुण्याचा ओलावा ओसरला की मला चकवून निघून जाशील! म्हणून मी या गोत्रबांधवांस वधणार नाही. हे युद्ध मी करणार नाही. कारण हे युद्ध अनेक प्रकारांच्या पापांचे माहेरघरच वाटते आहे. अशा त्या पापकृत्यांमुळे तुझा अंतराय झाला, तर आमच्याजवळ काय शिल्लक राहील! तुझ्या तोलाचे आम्हाला काय मिळणार आहे, तर हे युद्ध तुला गमावण्यासाठी आम्ही करावे! असे आमचे दुर्भाग्य उगवले, तर त्या दुःखाने आमचे हृदय

दुभंगेल! तुझ्यावाचून आमचे जीवन व्यर्थ आहे. यासाठी या कौरवांचा वध करून आम्ही राज्योपभोग घ्यावा, ही गोष्ट घडणे अशक्य आहे."

युद्धाचे भीषण परिणाम

युद्धाच्या या अटळ परिणामांविषयी अर्जुन पुढे म्हणतो:

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसा।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम्॥१-३८॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन॥१-३९॥

"लोभामुळे चित्त भ्रमल्यामुळे या कौरवांना कुलक्षय केल्याने होणारा दोष व मित्रद्रोहाचे पातक दिसत नाही. पण हा दोष आम्हाला स्पष्ट दिसत असता, हे जनार्दना! या पापापासून परावृत्त होण्याची बुद्धी आम्हाला व्हायला नको का?"

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत॥१-४०॥
अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसङ्करः॥१-४१॥

"कुलक्षय झाल्यामुळे सनातन असा कुलधर्म नष्ट होतो. कुलधर्म पाळला न गेल्याने कुलास अधर्म व्यापून टाकतो. अधर्मरत असे कुल नष्ट झाल्यामुळे कुलस्त्रिया पातिव्रत्यापासून ढळतात. हे वार्ष्णेया! कुलस्त्रियांस दुष्ट संगतीने शीलभ्रष्टता येते व वर्णसंकर होतो."

सङ्करो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः॥१-४२॥
दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसङ्करकारकैः।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः॥१-४३॥

"संकरामुळे कुलाचा लोप होतो आणि समस्त कुल व कुलघातक्यांना हटकून नरकात पडावे लागते. पिंडदान व तर्पणादी क्रिया लुप्त झाल्याने पितरांचेही पतन होते. कुलघातक्यांच्या अशा या वर्णसंकर घडवून आणणाऱ्या दोषांमुळे शाश्वत अशा जातिधर्माचा कुलधर्माबरोबरच नाश होतो"

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।
नरकेऽनियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम॥१-४४॥

"हे जनार्दना! ज्या मनुष्यांचे कुलधर्म नष्ट होतात, त्यांचा नित्य नरकात वास होतो, असे आमच्या ऐकण्यात आहे."

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः॥१-४५॥
यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत्॥१-४६॥

" या यत्किंचित राज्यसुखाच्या लोभाने अंध होऊन आम्ही सर्व हे केवढे थोरले पाप करण्यास व तेही स्वजनांचा वध करून त्यांच्या रक्ताने हात माखून घेत करण्यास उद्युक्त झालो आहोत, पहा! म्हणून हे श्रीकृष्णा! मी युद्ध अजिबात करणार नाही. प्रतिकार न करणाऱ्या निःशस्त्र अशा मला या रणांगणावर कौरवांनी ठार मारले, तर त्यांच्याशी युद्ध करून त्यांना ठार मारण्यापेक्षा ते मला निश्चितच कल्याणकारक ठरेल!"

"इयां कल्मषाची थोरी"

अर्जुनाचा शस्त्रसंन्यासाचा असा हा निश्चय व्यक्तवितांना ज्ञानदेव सांगतात:

हें अभिमानमदें भुललें। जऱ्हीं पां संग्रामां आलें।
तऱ्हींच आम्हीं हित आपुलें। जाणावें लागे॥१-२३६॥
हें ऐसें कैसें करावें। जैं आपुलें आपण मारावें।
जाणत जाणतांचि सेवावें। कालकूट॥२३७॥
हां जी मार्गी चालतां। फुडां सिंह जाहला अवचितां।
तो तंव चुकवितां। लाभु आथीं॥२३८॥

"हे कौरव दुरभिमानी आहेत. त्यांना युद्धाची खुमखुमी आहे. पण ते परिणामांविषयी अनभिज्ञ आहेत. पण आम्हाला तरी आमचे हिताहित पाहिलेच पाहिजे. आम्ही युद्ध करून आपल्याच आप्तेष्टांना कसे मारावे! जाणूनबुजून कालकूट विषाचे प्राशन कसे करावे! वाटेने जात असता समोर अवचित सिंह आला, तर त्याला चुकवून जाण्यातच शहाणपणा नाही का!"

असतां प्रकाशु सांडावा। मग अंधकूप आश्रावा।
तऱ्हीं तेथ कवणु देवा। लाभु सांगें॥१-२३९॥
कां समोर अग्नि देखौनि। जऱ्हीं न वचिजे वोसंडूनि।
तऱ्हीं क्षण एकां कवलूनि। जालूं शके॥२४०॥
तैसें दोख हें मूर्त। अंगीं वाजों असती पाहात।
हें जाणतांहीं केंवीं एथ। प्रवर्तावें॥२४१॥

"हातचा दिवा मालवून अंधकारात वावरण्यात काय लाभ! देवा! समोर अग्नी धडाडलेला दिसत असता, त्याला टाळून आपण गेलो नाही तर एका क्षणात आपणास तो लपेटून राखरांगोळी नाही का करणार! तसेच हे युद्धजन्य दोष आमच्यावर लादले जाणार असता, असे पापमय युद्ध आम्ही का करायचे!"

"अधर्मुचि आरोपे। कुलामाजीं"

ऐसें पार्थ तियें अवसरीं। म्हणे देवा अवधारीं।
इयां कल्मषाची थोरी। सांगेन तुज॥१-२४२॥

पार्थ पुढे देवांना म्हणतो, "या पापाचा भयंकरपणा ऐका, कसा आहे तो!"

जैसें काष्ठें काष्ठ मथिजे। तेथ वह्नि एक उपजे।
तेणें काष्ठजात जालिजे। प्रज्वललेनि॥१-२४३॥
तैसा गोत्रींची परस्परें। जऱ्हीं वधु घडे मत्सरे।
तऱ्हीं तेणें महादोखें घोरें। कुलचि नाशे॥२४४॥
म्हणऊनि येणें पापें। वंशजधर्मु लोपे।
मग अधर्मुचि आरोपे। कुलामाजीं॥२४५॥
एथ सारासार विचारावें। कवणें काय आचरावें।
आणि विधिनिषेध आघवें। पारुषती॥२४६॥

"काष्ठांनी कष्ठांचे घर्षण केल्याने त्यातून जो अग्नी उत्पन्न होतो, तो समस्त काष्ठांना भडकून जाळून टाकतो. तसाच मत्सरापोटी गोत्रजांनी एकमेकांचा वध केला, तर त्या घोर महापापाने अवघ्या कुळाचा नाश होतो. परंपरागत कुलधर्माचा अशा पापाने लोप होतो व कुळात भ्रष्टाचार फोफावतो. सारासार विचार लोप पावतो. धर्म काय, अधर्म काय, कर्तव्य काय, अकर्तव्य काय हे कळत नाही. विधिनिषेधांची चाड राहात नाही."

असतां दीपु दवडिजे। मग अंध:कारीं राहाटिजे।
तऱ्हीं उजूंचि कां आडलिजे। जेयांपरी।।१-२४७।।
तैसा कुलीं कुलक्षयो होय। तयें वेळीं तो आद्यु धर्मु जाय।
मग आन कांहीं आहे। पापावांचूनि।।२४८।।

"जवळ असणारा दीप मालवून अंधाऱ्या जागी वावरावे, तर अडगळ नसलेल्या जागी पण जसे अडखळायला होते, त्याप्रमाणे उज्ज्वळ कुलदीपकांचा घात केल्याने कुलाचार लोप पावतात. अशा वेळी पापाचरणावाचून काय असणार!"

समस्त कुलाचे पतन

पापाचरणामुळे कुलस्त्रिया बिघडून कुलाची पूर्णपणे कशी अधोगती होते, त्याचे वर्णन करत अर्जुन पुढे म्हणतो:

जैं यमनियम ठाकती। तेथ इंद्रियें स्वैर विचरती।
म्हणवूनि व्यभिचार घडती। कुलस्त्रियांसीं।।१-२४९।।
उत्तम अधमीं संचरती। ऐसें वर्णावर्ण मिसलती।
तेथ समूल उपडती। जातिधर्म।।२५०।।
जैसें चोहटाचिये बली। पाविजे सैरा काउलीं।
तैसीं महापापें कुलीं। प्रवेशती।।२५१।।
मग कुलां तेयां अशेखां। आणि कुलघातकां।
एरएरां नरकां। जाणें आथी।।२५२।।

"जेव्हा यमनियम मोडले जातात, तेव्हा इंद्रिये हवी तशी स्वैर वागू लागतात.अशामुळे कुलस्त्रिया व्यभिचारी होतात. उच्च वर्णाच्या स्त्रियांचा अधमांशी संकर होऊन वर्ण-अवर्णांची भेसळ होते आणि जातिधर्माचा पूर्णतया उच्छेद होतो. ज्याप्रमाणे चव्हाट्यावर ठेवलेल्या बळीवर चहूकडून कावळे झडपा घालतात, त्याप्रमाणे कुलधर्माशिवाय उघड्यावर पडलेल्या कुळावर महापापे झडप घालतात. कुळात अशा महापापांनी प्रवेश करताच संपूर्ण कुलासह त्या कुलघातकांस नरकच भोगावा लागतो."

देखें वंशवृद्धि समस्त। यापरी होय पतित।
मग वोवांडिती स्वर्गस्थ। पूर्वपुरुष।।१-२५३।।
जेथ नित्यादि क्रिया ठाके। आणि नैमित्तिक कर्म पारुखे।
तेथ कवणां तिलोदकें। कवण अर्पी।।२५४।।
तऱ्हीं पितर काय करिती। कैसेनि स्वर्गीं वसती।
म्हणौनि तेंहीं येती। कुलांपासीं।।२५५।।
जैसा नखाग्रीं व्यालु लागे। तो शिखांत व्यापी वेगें।
तेवीं आब्रह्म कुल आघवें। आप्लविजे।।२५६।।

"अशा प्रकारे त्या वंशात उत्पन्न झालेली सर्व प्रजा पतित होते. मग त्यांचे स्वर्गातील पूर्वज पुन: परत भूतलीं येतात. नित्य-नैमित्तिकादी कर्मांचा लोप झाल्यावर कोण कोणाला तिलोदक, पिंडतर्पण इ.करणार! तेव्हा त्या वेळी त्यांचे पितर तरी काय करणार! ते स्वर्गात कशाच्या जोरावर राहाणार! तेसुद्धा मग आपल्या भ्रष्ट कुलासमवेत नरकाचे धनी होतात. ज्याप्रमाणे नखाग्रास सर्पदंश झाला असता, ते विष हांहां म्हणताम्हणता शिखेच्या अग्रापावेतो पसरते, त्याप्रमाणे कुलाचा घात केला असता सर्वच्या सर्व कुळ पातकात बुडून जाते."

देवा अवधारीं आणिक एक। एथ घडे महापातक।
जैं संगदोखें हा लौकिक। भ्रंशु पावे।।१-२५७।।
जैसा घरीं आपुलां। वानिवसें वह्नि लागला।
तो आणिकीं प्रज्वलिलां। जालूनि घाली।।२५८।।
तैसियां तेयां कुलसंगति। जैं जैं लोकु वर्तति।
तेंहीं बाधु पावती। निमित्तें येणें।।२५९।।
तैसें नाना दोखें सकल। अर्जुनु म्हणे तैं कुल।
मग महाघोर केवल। निरय भोगी।।२६०।।
पडिलियां तियें ठायीं। मग कल्पांतींहीं उगंडु नाहीं।
येसणें पतन कुलक्षयीं। अर्जुनु म्हणें।।२६१।।

"कृष्णा! आणिक पहा! त्या पातकी कुळाच्या संसर्गदोषामुळे इतरही लोक भ्रष्ट होतात. हे पण एक महापातकच आहे. एखाद्या घरास अकस्मात आग लागली असता ती उफाळून येऊन आजूबाजूच्या घरांनासुद्धा जशी जाळून टाकते, त्याप्रमाणे त्या पतित कुलाच्या संगतीत जे जे लोक येतात, त्यांनासुद्धा त्या संपर्काने दोष पदरी पडतो. याप्रमाणे नाना दोषांना जन्म देत, पापांचे आगर असे ते कुल अत्यंत महाघोर अशा नरकात पडते. एकदा त्या नरकात पडले की कल्पांतीसुद्धा त्याची सुटका होऊ शकत नाही. कुलक्षयाच्या दोषामुळे येवढे पतन घडते."

देवा हें विविध कानीं आयकीजे। परि अझुनिवरी त्रासु नुपजे।
हृदय वज्राचें काय कीजे। अवधारीं पां।।१-२६२।।

अर्जुनास असे वाटते की श्रीकृष्णास आपले बोलणे पटत नाही. कारण तो गप्पच बसला आहे. म्हणून तो म्हणतो: "देवा! हे सगळे ऐकूनही तुला अजूनही काहीच कसे वाटत नाही! आमचा एवढा अध:पात होऊ घातला असताही तू आमची कीव का करत नाहीस! असे वज्राप्रमाणे कठोर हृदय करून तू आमची उपेक्षा करू नकोस!"

"राज्य तैं केवल। निरयभोगु"

अपेक्षिजे राज्यसुख। जेयांलागीं तैं तंव क्षणिक।
ऐसें जाणतांहीं दोख। अव्हेरूं ना।।१-२६३।।
जैं हें वडिल सकल आपुलें। वधावयां दिठीं सूदलें।
सांग पां काय थेंकुलें। घडिलें आम्हां।।२६४।।
आतां ययावेरीं हें जियावें। तेयापासूनि हें बरवें।
जैं शस्त्र सांडूनि साहावें। बाण यांचें।।२६५।।

तेयावरी होय जितुकें। तैं मरणही वरी नीकें।
परि येणें कल्मषें। चाड नाहीं।।२६६।।

"ज्या शरीराच्या सुखासाठी, मनाच्या आनंदासाठी राज्य अपेक्षावे, ते शरीर अन हे जीवन खरे तर क्षणभंगुर आहे. हे जाणूनही हा युद्धजन्य दोष आम्ही न अव्हेरावा, हे कसे घडेल! या वडीलधाऱ्यांचा वध करण्यासाठी आम्ही येथे एकत्र झालो आहोत, हे तरी काय कमी प्रतीचे पाप आहे का! तूच सांग! आता इतउपरांत जगण्यापेक्षा शस्त्रत्याग करून या कौरवांचे बाण सहन करावेत, हेच बरे! आणि इतउपर जर त्यांच्याकडून मृत्यूही आला, तर फारच चांगले! कारण अन्यथा युद्ध करून जे महापाप जोडावयाचे, त्याची कशाशीच तुलना होऊ शकत नाही."

ऐसें देखौनि सकल। अर्जुनु आपुलें कुल।
मग म्हणे राज्य तैं केवल। निरयभोगु।।१-२६७।।

आपल्या कुळाचे होणारे पतन ध्यानी घेऊन अर्जुन म्हणू लागला की, "हे राज्य म्हणजे निव्वळ नरकयातना आहेत."

"*धनुष्यबाण सांडिलें*"

अशा टोकाच्या भूमिकेप्रत गेलेल्या अर्जुनाने युद्धाचा अव्हेर करण्यासाठी शस्त्रास्त्रांचा परित्याग केला असल्यास त्यात काहीच नवल नाही.त्याने काय केले, ते संजयाच्या मुखाने ऐका:

एवमुक्त्वार्जुन सङ्ख्ये रथोपस्थ उपाविशत्।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानस:।१-४७।।

"त्या रणांगणावर अशा प्रकारची उपरती झाल्याने धनुष्य व बाण टाकून देत रथाखाली उडी घेऊन शोकाने चित्त व्याकुल होऊन तो खाली बसला."

"उडी घातलीं खालां।रथौनियां"

अर्जुनाची शोकग्रस्तता व्यक्त करणाऱ्या ज्ञानेशांच्या ओव्या अशा आहेत:

ऐसें तियें अवसरीं। अर्जुनु बोलिला समरीं।
संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रांतैं।।१-२६८।।
मग अत्यंत उद्वेगला। न धरत गंहिंवरु आला।
तेथ उडी घातली खालां। रथोनियां।।२६९।।
जैसा राजकुमरु पदच्युतु। सर्वथा होय उपहतु।
कां रवि राहुग्रस्तु। प्रभाहीनु।।२७०।।
ना तऱ्हीं महासिद्धिसंभ्रमें। जिंतला तापसु भ्रमे।
मग आकळूनि कामें। दीन कीजे।।२७१।।
तैसा तो धनुर्धरु। अत्यंत दु:खें जर्जरु।
दिसे ..।।२७२।।

"संजय धृतराष्ट्रास म्हणतो: "त्यावेळी त्या समरांगणावर तो पांडुपुत्र असे म्हणाला. अत्यंत उद्वेगाने गहिवरून जाऊन त्याने रथावरून खाली उडी घेतली. जसा अधिकारावरून पदच्युत झालेला राजकुमार निष्प्रभ होतो; किंवा राहूने ग्रासल्यावर रवी जसा निस्तेज होतो; किंबहुना महासिद्धी प्राप्त करण्याच्या वेडाने पछाडलेला तपस्वी जसा मोहित होऊन जातो आणि त्या कामनेच्या तडाख्यात सापडून दीनवाणा होतो; त्याप्रमाणेच तो धनुर्धर समोर ठाकलेल्या त्या अप्रिय युद्धाच्या दृश्याने व्यथित होऊन दु:खी दिसू लागला."

..।....जेथ रंहवरु। त्यजिला तेणें।।२७२।।
मग धनुष्यबाण सांडिलें। न धरत अश्रुपात झालें।
ऐसे ऐकें राया तेथ वर्तलें। संजयो म्हणें।।२७३।।

"त्याने जेव्हा रथाचा त्याग केला, त्याचवेळी धनुष्यबाणही टाकून दिले आणि अत्यंत शोकाकुल होउन अश्रुपात करू लागला. हे राजा धृतराष्ट्रा! त्या रणांगणावर हे असे अक्रीत घडले आहे. धीरोदात्त, वज्रादपि कठोर अंत:करणाचा शूरवीर धनुर्धर शिरोमणी असा तो कुंतीपुत्र अर्जुन युद्ध न करण्याचा निश्चय करून समोर उभ्या ठाकलेल्या युद्धप्रसंगाच्या परिणामांस भिऊन जाऊन नि:शस्त्र होऊन भूमीवर बसून रुदन करत आहे, यापेक्षा केविलवाणे दृश्य कोणते असणार!"

आतां ययावरी तो वैकुंठनाथु। देखौनि सखेदु पार्थु।
कवणेपरी परमार्थु। निरूपिल।।१-२७४।।
तैं सविस्तर पुढारी कथा। अति सकौतुक ऐकतां।
ज्ञानदेवो म्हणें आतां। निवृत्तिदासु।।२७५।।

"आता या पार्श्वभूमीवर त्या खिन्न अर्जुनास पाहून तो वैकुंठपती त्याला कोणत्या प्रकारे परमार्थाचा उपदेश करणार आहे, ती सविस्तर कथा कौतुकाने ऐकण्यासाठी, श्रोतेजनहो! तयार असा! असे निवृत्तिनाथांचा दास हा ज्ञानदेव तुम्हाला विनवत आहे."

प्रथमाध्यायसमाप्ती

भीष्मादिकांनी युद्धोन्मुख होत जो शंखकल्लोळ केला होता, त्यास प्रतिआव्हानात्मक अशी शंखगर्जना श्रीकृष्णांसमवेत करणारा युयुत्सू वीर अर्जुन कोठे आणि हा चिखलात रुतलेल्या कोमल राजहंसाप्रमाणे दीनवाणा रुदन करणारा - धनुष्यबाणादी त्यागून, मधुसूदनाने सारथ्य केलेल्या त्या सुंदर श्वेताश्वयुक्त रथातून खाली उडी टाकणारा - स्वत: होऊन पदच्युत होऊ पाहणारा कुंतीपुत्र अर्जुन कोठे! ही दोन विरोधी क्षणचित्रे आपणास प्रदान करत गीतेचा प्रथम अध्याय संपूर्ण होतो. यानंतर गीता वळते *दुसऱ्या अध्यायाकडे*- ज्यात या अध्यायातील *अर्जुनविषाद* एक वेगळे वळण घेतो.

समारोप

त्यासाठी आपण आता वळू या याच उन्मेषाच्या द्वितीय भागाकडे **उन्मेष क्र. ३९-२: कर्मपथ १-२** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ३९-२::
::कर्मपथ-१-२::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

<u>उन्मेष ३९-२:</u>

गीताः
२:१-३८,४७
४:१५
५:७
१३:३१
ज्ञानेश्वरीः
२:६-५४,८१-२२९

::उन्मेष ३९-२::
::कर्मपथ-१-२::

द्वितीय अध्यायारंभ::::

कर्मपथाचे सूतोऽवाच

गेल्या भागात आपण अर्जुनाच्या भावसंक्रमणाची दोन विरोधी शब्दचित्रे गीता-ज्ञानेश्वरीतून साकार होतांना पाहिलीत. अन्यायाचे राज्य टिकविण्याच्या व पुत्रमोहाच्या कामनेने परिपूर्ण असणाऱ्या द्धुह्लाचार्य धृतराष्ट्राच्या संजयास केलेल्या पृच्छा आणि न्यायपूर्ण राज्य मिळवण्यासाठी नाईलाजाने युद्धास सामोरे जाणाऱ्या पांडवांचा प्रतिनिधी असणाऱ्या अर्जुनाच्या पाप-पुण्य-कुलक्षय इ.च्या शंका, तसेच संपूर्ण कुलाचे हिताहित लक्षात घेऊन त्याचा युद्धविन्मुख होण्याचा निश्चय, अशी ही पण दोन विरोधात्मक मानचित्रे आपणापुढे गीतेने *प्रथमाध्यायी* उभी केलेली आपण नुकतीच न्याहाळली.

अर्जुन हा पांडवसेनेचा कणाच आहे. तो आता असा मोडून पडल्यासारखा झाला आहे. त्याला पुनरुज्जीवित करून पुनः युद्धोन्मुख करण्याचे परमकर्तव्य आता श्रीकृष्णांपुढे प्राप्त झाले आहे. शोकदावानलाने होरपळवलेला *अर्जुनाचल* त्या श्यामसुंदर घननीळ मेघश्यामाच्या मुखातून ओसंडणाऱ्या वचनामृतधारांनी निववायचा आहे. पुनः त्याच्या माथ्यावर युद्धोन्मेषाची *नवी विरूढी* फुटावयाची आहे. हा सर्व प्रसंग *दुसऱ्या* अध्यायापासून उभा केला जातो व त्याची सांगता गीतेच्या *अठराव्या* अध्यायी होते.

ही पार्श्वभूमी ध्यानी ठेवून आपण गीतेचा *द्वितीय* अध्याय त्यातल्या कर्मपथाच्या दिग्दर्शनासाठी पाहू या. कर्मपथावरून भ्रष्ट झालेल्या, बुद्धिभेदामुळे कर्म-अकर्म, धर्मानुसारी कर्म, अधर्मयुक्त कर्म या सर्वांबाबत चुकीचा निश्चय केलेल्या पृथापुत्रास ***सुयोग्य कर्मपथ*** दाखवत त्याची अध्यात्मिक उंची वाढवणाऱ्या श्रीगोपालांच्या वचनदीपाचा प्रकाश निरीक्षिल्याने मुमुक्षू साधकांस उत्तम मार्गदर्शन होत असते.

कर्म हाच योगाचा - किंवा हवे तर भक्तीचा म्हणा! - पाया आहे. ***कर्माची हस्तपादादी कर्मेंद्रिये, ज्ञानाची चक्ष्वादी ज्ञानेंद्रिये आणि भक्तीची अंत:करणचतुष्टये (मन, बुद्धी, चित्त व अंत:करण) आणि कुंडलिनीयोगाचा जीवशिवात्मक आत्मा लाभलेला हा गीतेतील योगपुरुषाचा देह आहे.*** त्यामुळे त्या सकळांचा संघात असल्याशिवाय हा ***योगपुरुष*** रूप घेऊ शकत नाही, हे ध्यानात ठेवून परमात्म्याच्या अंत:करणात पोहोचण्यासाठी कर्माचा पथ क्रमणे प्रशस्त आहे.

द्वितीय अध्यायाचा प्रारंभ

या कर्ममार्गाचा उर्वरित भाग पाहाण्यासाठी दुसऱ्या अध्यायाकडे व तदनंतरच्या उर्वरित अध्यायांकडे वळणे आपणास क्रमप्राप्तच आहे. दुसऱ्या अध्यायारंभी संजय धृतराष्ट्रास म्हणतोः

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम्।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः।।२-१।।

श्रीभगवान उवाचः

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम्।
अनार्यमजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन।।२-२।।

"करुणेने व्याप्त, अश्रुपूर्ण व व्याकुल दिसणाऱ्या आणि विषाद करणाऱ्या त्या अर्जुनास मधुसूदन म्हणतोः "हे अर्जुना! या हातघाईच्या युद्धाच्या प्रसंगी युद्धच न करण्याचा हा आर्यांना न शोभणारा, स्वर्गाचा मार्ग रुद्ध करणारा, त्रैलोक्यात तुझी अपकीर्ती पसरविणारा असा हा अंधकारी निश्चय तुझ्या मनात कोठून उद्भवला आहे ?"

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परन्तप।।२-३।।

"नपुंसकासारखा युद्धविन्मुख होऊ नकोस! हे हृदयाचे क्षुद्र दुबळेपण तुझ्यासारख्या वीर पुरुषाला शोभत नाही. युद्ध न करण्याच्या तुझ्या निश्चयाचा त्याग करून, हे शत्रुतापना! आपली शस्त्रे हाती घेऊन माझ्या या रथावर पुनश्च आरूढ हो!"

श्रीकृष्णांच्या या उद्गारांस शब्दरूप देत ज्ञानेशवाणी उद्गारतेः

म्हणे अर्जुना आदि पाहिं। हें उचित काय इयें ठाइं।
तूं कवणु हें काइं। करित आहासि।।२-६।।
तुज सांघें काय जालें। कवण उणें आलें।
करितां काय ठेलें। खेदु काइसा।।७।।
तूं अनुचितां चित्त नेंदिसी। धीरु कंहिं न संडिसि।
तुझेनि नामें आपेसिं। दिशा लंघी।।८।।
तूं शूरवृत्तिचा ठाओ। क्षत्रियांमाझिं राओ।
तुझेयां लाठेपणाचा आओ। तिहिं लोकिं।।९।।

महामोहाने जर्जर केलेल्या त्या अर्जुनास तो शार्ङ्गपाणी म्हणू लागलाः "या ठिकाणी तुझे हे करणे योग्य आहे का! तू कोण आहेस आणि हे काय करत आहेस, त्याचा थोडा तरी विचार कर! सांग! तुला झाले आहे तरी काय! तुला काय कशाची कमतरता आहे! तुझ्यासाठी आम्ही काय करावयाचे बाकी ठेवले आहे तर तू हा खेद करत आहेस! एरवी तू कधीच अयोग्य गोष्टींकडे लक्ष देत नाहीस. तुझा धीर कधीच सुटत नाही. तुझे नांव ऐकताच अपयश आसमंत सोडून पळून जाते. तू तर साक्षात शूरवृत्तीचे स्थान आहेस. क्षत्रियांमधील सर्वश्रेष्ठ असा तूच आहेस. तुझ्या पराक्रमाचा धाक त्रैलोक्यास वाटतो."

"ऐसे पौरुष चोखडें। पार्था तुझें"

तुवां संग्रामीं हरु जींतला। निवातकवचांचा ठाओ फेडिला।
पवाडा तुवां केला। गंधर्वासिं।।२-१०।।
हें पाहातां तूझेनि पाडें। दिसें त्रैलोक्य ही थोकडें।
ऐसें पौरुष चोखडें। पार्था तूझें।।११।।
तो तूं किं आजि एथें। सांडुनियां वीरवृत्तितें।
अधोमुख रुदनातें। करीतु आहासि।।१२।।
विचारीं तूं अर्जुनु। कीं कारुण्यें कीजतासि दीनु।
सांघ पां अंधकारें भानु। ग्रसिला कंहीं।।१३।।

"तू प्रत्यक्ष शंकरास युद्ध करून जिंकलेस! निवातकवचादी दैत्यांचा पुरेपूर विध्वंस केलास. चित्ररथादी गंधर्वांस एकट्यानेच हरवलेस. तुझ्या पराक्रमापुढे हे त्रैलोक्यही थिटे भासते. पार्था! असे अद्वितीय पौरुष तुझ्याठायी वसत आहे. आणि असे असताही असा कोणता प्रसंग तुझ्यावर येऊन ठेपला आहे की त्या वीरवृत्तीचा - त्या पौरुषाचा - त्या शौर्याचा त्याग करून अधोमुख होऊन तू मुळुमुळू रडत बसला आहेस! विचार करून पाहा. तू अद्वितीय धनुर्धर असा अर्जुन आहेस आणि करुणेने तुझ्या हृदयाचा वेध घेऊन तुला असे दीनवाणे करून सोडावे!"

"उठीं घे धनुष्यबाण"

ना तऱ्हीं पवनु मेघासीं बिहें। कीं अमृतासीं मरण आहे।
पाहें पां इंधनचि गिळौनि जाये। पावकांतैं।।२-१४।।
कीं लवणेंचि जल विरें। संसर्गें कालकूट मरे।
सांघैं महाफणि दुर्दुरें। गिळिजे कायी।।१५।।
सिंहासीं झोंबें कोल्हा। ऐसा अपाडु आथीं कां जाहला।
परि तो तुवां सांच केला। आजि एथ।।१६।।
म्हणौनि अझुंइं अर्जुना। झणें चित्त देसीं यया हीना।
वेगीं धीरु धरुनियां मना। सावधु होईं।।१७।।
सांडीं हें मूर्खपण। उठीं घे धनुष्यबाण।
संग्रामीं हें कवण। कारुण्य तुझें।।१८।।

"अरे! वाऱ्याने ढगांना भ्यावे काय! अमृतास मरण आहे का! काष्ठे कधी अग्नीला भक्षितात काय! पाणी मिठात विरते का! बेडूक महासर्पास गिळू शकतो काय! कोल्हा सिंहाशी झटापट करील तरी कसा! असे अघटित कधी घडले नाही. पण आज मात्र तू हे सगळे अघटित प्रत्यक्ष केलेस ते तुझ्या या दुबळेपणामुळे! म्हणून हे अर्जुना! या हीन विचारांकडे वेळीच दुर्लक्ष करून आपले मन लवकर खंबीर कर. सावधान हो. हे मूर्खपण सोडून दे. आपले धनुष्यबाण उचल आणि युद्धास सज्ज हो. अरे! या अशा अटीतटीच्या युद्धप्रसंगी हे कोणते कारुण्य तुला अवकळा आणत जागे झाले आहे!"

हां गां तूं जाणता। तऱ्हीं न विचारिसीं कां आतां।
सांघैं जुंझावेळे सदयतां। उचित काईं।।२-१९।।
हें असतिये कीर्तीसि नाशु। आणि पारत्रिकासीं भ्रंशु।
म्हणे जगन्निवासु। अर्जुनातैं।।२०।।

"तू तर चांगला समंजस आहेस. मग वेळीच विचार का करत नाहीस की युद्धवेळी सदयता योग्य कशी असेल! या अवेळी उचल खाणाऱ्या सद्गुणांमुळे तुझी मिळवलेली कीर्ती नष्ट पावेल. तुझे पारत्रिक कल्याणही होणार नाही. ऐहिक व पारलौकिक असे दोन्ही प्रकारचे अकल्याण करणारी ही दयाबुद्धी आणि करुणा यांचा तत्काळ त्याग कर."

म्हणौनि शोकु न करीं। तूं पुरुता धीरु धरी।
हें शोच्यता अव्हेरीं। पांडुकुमरा।।२-२१।।
तुज नव्हें हें उचित। येणें नासैल जोडलें बहुत।
तूं अझुइं वरी हित। विचारीं पां।।२२।।

पुढे तो जगन्निवास अर्जुनाला असे म्हणाला, "तू व्यर्थ शोक करू नकोस. अंतरी धीर धरून, हा खेद टाकून युद्धासाठी पुनः उभा हो. हे पांडुपुत्रा! किती सांगावे! ही खेदभावना तुझ्यासारख्या वीरास शोभत नाही. या तुझ्या अशा वागण्याने तुझे पराकोटीचे नुकसान होईल. आता तरी तू आपल्या हिताचा नीट विचार कर व युद्धासाठी दक्ष राहा!"

"तो कृपावंतु। नानापरी सिकवितु"

एणें संग्रामाचेनि अवसरें। एथ कृपालुपण नुपकरें।
हें आतांचि काय सोयरें। जाहलें तुज।।२-२३।।
तूं आदीचि काइ नेणसीं। कीं हें गोत्र नोलखिसीं।
वांयांचि काय करिसीं। अतिशो एथ।।२४।।

"या युद्धप्रसंगी कृपाळुपणा अहितकारक ठरेल आणि ज्या या सर्वांना तू सोयरेधायरे म्हणत आहेस, ते आताच या युद्धाच्या वेळी आकस्मिकरीत्या तुझे संबंधी झाले आहेत की काय! यांना तू पूर्वी ओळखत नव्हतास की काय! आणि ते व तू एकाच गोत्राचे आहात याची आताच तुला माहिती झाली की काय! युद्धास तयार होऊन या इथे रणांगणावर उपस्थित होते वेळी तुला हे सर्व जसे काय माहीतच नव्हते की काय! उगाचच फाजिल कळवळा दाखवत आहेस, झाले!"

आजिचें हें जूझ। काय जन्मा नवल तूज।
हें परस्परें तुम्हां व्याज। सदाचि आथी।।२-२५।।
तऱ्हीं आतां काय जालें। काइसें स्नेह उपनलें।
हें नेणिजे परि कुडें केलें। अर्जुना तुवां।।२६।।

"आणि या कौरवांशी तुझा हा जन्मभरातला एकमेव असा पहिलाच युद्धाचा प्रसंग आहे काय! तुम्ही तर एकमेकांशी युद्ध करण्यास निमित्तच शोधत असता, इतके तुमचे परस्परांवरील प्रेम उतू जात असते! मग आताच तुला हे काय झाले! अर्जुना! ही या कौरवांविषयीची ममता तुझ्या मनात अकस्मात कोठून उपटली, हे मला कळेनासे झाले आहे. पण तू हे चांगले करत नाहीस."

मोहो धरिलेयां ऐसें होईल। जैं असती प्रतिष्ठा जाईल।
आणि परलोकही अंतरैल। इहिकेंसीं।।२-२७।।
हृदयाचें ढीलेपण। एथ नीकेयासीं नव्हें कारण।
हें संग्रामीं पतन जाण। क्षत्रियांसि।।२८।।

"मोहाने या दुर्जनांना आपले म्हणू लागल्याने तुझी प्रतिष्ठा जाईल; तुझा परलोक अंतरेल व ऐहिकही बुडेल. यावेळी अंत:करणाची अशी विषादव्यग्रता - असा लेचेपेचेपणा - काय कामाचा! त्यमुळे क्षत्रियास युद्ध करता येत नाही व पतन हमखास ठेवलेलेच आहे."

"यत् श्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि"

ऐसेनि तो कृपावंतु। नाना परी असे सिकवितु।
जें ऐकौनि पांडुसुतु। काय बोलें।।२-२९।।

याप्रमाणे त्या कृपासागर श्रीकृष्णाने अर्जुनास नाना प्रकारे बोध केला व त्याच्या मनातील ते कल्मष काढून टाकण्याचा खूप प्रयत्न केला. त्यावर तो पांडुपुत्र काय म्हणतो, पाहा:

कथं भीष्ममहं सङ्ख्ये द्रोणं च मधुसूदन।
इषुभि: प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन।।२-४।।

"हे मधुसूदना! भीष्म आणि द्रोणांशी युद्ध करतांना बाणांनी प्रत्युत्तर कसे द्यावे! हे तर मला अत्यंत पूजनीय आहेत."

गुरुनहत्वा हि महानुभावा-
ञ्छ्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके।
हत्वार्थकामांस्तु गुरुनिहैव
भुञ्जीय भोगान्रुधिरप्रदिग्धान्।।२-५।।

"अशा या महानुभावांवर हल्ला करून त्यांना ठार मारणे कृतघ्नपणाचे आहे. त्यापेक्षा या लोकी भिक्षा मागून जगणेसुद्धा श्रेयस्कर आहे. या गुरुवरांना मारून त्यांच्या रक्ताने माखलेले सुखोपभोग भोगण्याइतके आम्ही नीच आहोत काय!"

न चैतद्विद्म: कतरन्नो गरीयो-
यद्वा जयेम यदि वा नो जयेयु:।
यानेव हत्वा न जिजीविषाम-
स्तेऽवस्थिता: प्रमुखे धार्तराष्ट्रा:।।२-६।।

"या अशा विषम परिस्थितीत होणाऱ्या युद्धात आम्हाला जय मिळेल किंवा त्यांना जय मिळेल; पण यातले कोणते श्रेयस्कर आहे, ते कळेनासे झाले आहे. ज्यांना मारून जगण्याची आमची मनीषा नाही, ते कौरवच नेमके या युद्धासाठी आमच्याविरुद्ध उभे आहेत."

"शिष्यस्तेऽहं"

कार्पण्यदोषोपहतस्वभाव:
पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेता:।
यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।

"मोहदोषाने स्वभावाचे हनन झालेला व धर्मासंबंधी काय योग्य व काय अयोग्य याचा निश्चय करता न येणारा असा मी तुला विचारतो आहे की जे श्रेयस्कर असेल, ते तू मला सांग. ***मी तुझा शिष्य आहे.*** तुला मी शरण आलो आहे. मला योग्य उपदेश कर."

न हि प्रपश्यामि ममापनुद्या-
द्यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम्।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाधिपत्यम्।।२-८।।

"निष्कंटक व समृद्ध असे भूलोकीचे राज्य मिळवून किंवा देवेंद्रपद मिळाले, तरीही हा माझ्या सर्वेंद्रियाना शोषणारा शोक नाहीसा करील असे तुझ्या उपदेशावाचून आणि काय करावे, काय नको याच्या मार्गदर्शनावाचून काहीच दिसत नाही. तरी काय योग्य असेल, ते, हे श्रीकृष्णा! तू मला सांग."

अर्जुनाने आता आपली खरी व्यथा प्रकट केली आहे. आतापर्यंतच्या कौरवांशी झालेल्या विराटगोग्रहणादी युद्धप्रसंगी त्याने कौरवांचा नुसता पराजय केला होता. कोणालाही ठार मारले नव्हते. आणि भीष्मद्रोणांसारख्या गुरू व पूजनीय व्यक्तीसुद्धा तेवढ्या अटीतटीने युद्ध करत नव्हत्या. त्यामुळे त्यांचा केवळ पराजय करण्याने त्याने पूर्वी युद्ध जिंकले होते.

पण प्रस्तुतचा युद्धप्रसंग अगदी वेगळा होता. भीष्मद्रोण जोपावेतो युद्धातून निवृत्त होणार नाहीत, तोवर पांडवांना विजय मिळणे अशक्यच होते आणि त्यांचा पाडाव केल्याशिवाय ते युद्धभूमी सोडणारे पण नव्हते. बरे! त्यांच्या हाती शस्त्र असेतोवर ते अजिंक्य असल्याने त्यांचा काहीही करून वध हा करावाच लागणार होता.

"तऱ्हीं काय मी भस्मासुरु"

ते दोघेही धनुर्धर असल्याने पांडवाकडून त्यांच्याशी अर्जुनालाच युद्ध करावे लागणार होते, ज्यांच्या अंगखांद्यांवर आपण खेळलो, बागडलो, त्यांचा वध करणे हे अत्यंत अप्रिय व कटू असे कर्तव्य अर्जुनापुढे उभे होते. या परिस्थितीने तो संमूढ झाला यात नवल नाही.

त्याच्या या मन:स्थितीचे समर्पक चित्र उभे करत ज्ञानेश म्हणतात:

देवा हें इतुलेवेन्हीं। बोलावें न लगे अवधारीं।
आदीं तूंचि चित्तिं विचारीं। संग्रामु हा।।२-३०।।
हें जूंझ नव्हें प्रमादु। एथ प्रवर्तलियां दीसतसें बाधु।
हा उघडा लिंगभेदु। वोडवला आम्हां।।३१।।
देखें मातापितरें अर्चिजती। सर्वस्वें तोषु पावविजती।
तियें पाठीं केंवीं वधिजती। आपुलां हातीं।।३२।।

"देवा! तुम्ही इतके सगळे का सांगत आहात! युद्ध कर म्हणता तर खरे सांगा! हे काय युद्ध आहे! हा तर निव्वळ घोर अपराध आहे. हा करण्याने मोठे पाप जडणार आहे. सरळ सरळ पूजनीय व्यक्तींचा उच्छेद करण्याचे हे काम आहे. मातापित्यांची सेवा करावी, सर्व प्रकारे त्यांना संतोष द्यावा व नंतर आपल्याच हातांनी त्यांचा वध करावा, हे कोणत्या प्रकारचे कृत्य आहे!"

देवा संतवृंदु नमस्कारिजे। कां घडे तऱ्हीं पूजिजे।
हें वांचूनि केंवीं निंदिजे। स्वयें वाचा।।२-३३।।
तैसें गोत्रगुरु आमुचें। हें पूजनीय आम्हां नियमाचें।
मज बहूत भीष्मद्रोणांचें। वर्ततसें।।३४।।
जेयांलागीं मनें वीरुं। आम्हीं स्वप्नींहीं न धरु।
तेयां प्रत्यक्ष केंवीं करूं। घातु देवा।।३५।।

"संतजनांना वंदन करावे; जमल्यास त्यांचे पूजन करावे. समजा असे पुण्य हातून घडत नसेल, तर राहू द्या! निदान स्वतः त्यांची निंदा तरी करू नये. हे भीष्मद्रोण असेच आम्हाला वंदनीय आहेत; पूजनीय आहेत. हे आमचे वडीलधारे व कुलगुरू आहेत. मी स्वतः तर त्या दोघांचा खूप ऋणी आहे. ज्यांचे वैर आम्हाला मनाने करणे स्वप्नीसुद्धा अशक्य आहे, अशा यांचा प्रत्यक्ष घात कसा करावा!"

वरि जलो हें जियालें। एथ आघवियांसीं हेंचि जालें।
जेयांचां वधीं अभ्यासिलें। मिरविजे आम्हीं।।२-३६।।
मी पार्थु द्रोणाचा केला। येणें धनुर्वेदु मज दिधला।
तेणें उपकारें काय आभारैलां। वधीं ययांतैं।।३७।।
जेथींचियां कृपा लाभिजे वरु। तेथेंचि मनें व्यभिचारु।
तऱ्हीं काय मी भस्मासुरु। अर्जुनु म्हणे।।३८।।

"जळो हे आमचे जिणे! काय आमचे कमनशीब आहे पहा! यांच्याकडून जी शस्त्रविद्या आम्ही शिकलो, तिची प्रौढी यांनाच मारून मिरवायची आम्हाला काय हौस आली आहे, पहा! द्रोणांनी मला धनुर्वेद देऊन सर्वश्रेष्ठ धनुर्धर केले आहे. त्यांच्या उपकारांची परतफेड त्याच विद्येने त्यांचा घात करून मी करावी काय! ज्याच्या कृपेने वर लाभला, त्याच्याचवर उलटायला मी काय भस्मासुर आहे काय!"

"द्रोणांना कसे बरे वधू!"

अर्जुन पुढे म्हणतो:

देवा समुद्र गंभीर आइकिजे। वर तोही आहाचु देखिजे।
परि क्षोभु मनीं नेणिजे। द्रोणाचियें।।२-३९।।
हें अपार जैं गगन। वर तेयांहीं होईल मान।
परि अगाध भलें गहन। हृदय याचें।।४०।।
वरी अमृतही विटे। कीं कालवशें वज्र फुटे।
परि मनोधर्मु न लोटे। विकरविला हा।।४१।।
स्नेहालागीं माये। म्हणिपे तैं कीरु होये।
पण कृपा तैं मूर्त आहे। द्रोणीं इयें।।४२।।
हा कारुण्याचा आदि। सकल गुणांचा निधी।
विद्यासिंधु निरवधि। अर्जुनु म्हणे।।४३।।

"हे श्रीकृष्णा! समुद्राच्या गंभीरतेची उपमा या द्रोणाला कमी पडेल. कारण सागराची गंभीरता तशी वरवरची असते. पण या द्रोणाचार्यांच्या मनात क्षोभ कधीही उसळत नाही. हे आकाश अमर्याद दिसते, पण कदाचित त्याची मितीही जाणता येईल. परंतु या द्रोणांचे हृदय अथांग गहन आहे. एखादे वेळी अमृत आपली चव टाकील; कालवशात वज्र भंगेल; परंतु यांच्या मनात काहीही झाले तरी विकार उत्पन्न होत नाहीत. आईची ममता खरी असे म्हणतात, कारण ती अमर्याद असते. पण हा द्रोण म्हणजे मूर्तिमंत ममताच आहे. कारुण्य याच्यापासून जन्मले; सकळ गुणांचा हा निधी आहे; थांग न लागणारा विद्यासागर हा द्रोण आहें"

हा येणें मानें महंतु। वरी आम्हांलागीं कृपावंतु।
आतां सांघ पां येथ घातु। काइं चिंतूं येईल।।२-४४।।
ऐसें हें रणीं वधावें। मग आपण राज्यसुख भोगावें।
तैं मना नैये आघवें। जीवितेंसीं।।४५।।

अर्जुन म्हणतो, "हे देवा! हे द्रोणाचार्य इतके महान आहेत. वर त्यांची आमच्यावर कृपादृष्टी आहे. आता सांग! अशा या आमच्या गुरूंना रणांगणात जीवे मारावे असे आमच्या मनात तरी कसे येईल! अशा भीष्मद्रोणांना रणात वधावे व त्यापासून मिळणारे राज्योपभोग घ्यावेत, असे आम्ही जोपावेतो जिवंत आहोत, तोवर आमच्या मनाला आवडणार नाही."

"काईं करावें तैं नेणों आम्ही"

तो पुढे असेही म्हणू लागला की:

हें येणें मानें दुर्भर। जैं याहीहूनि भोग सपुर।
तैं असतु येथ वर। भिक्षा मागतां भली।।२-४६।।
ना तऱ्हीं देशत्यागें जाइजे। कां गिरिकंदर सेविजे।
परि शस्त्र आतां न धरिजे। ययांवरी।।४७।।
देवा नवनिसिति शरीं। वावरौनि यांचां जिव्हारीं।
भोग गिंवसावें रुधिरीं। बुडालें जैं।।४८।।
तैं काढूनि काय कीजति। विलिप्त केंवीं सेविजति।
मज नैये हें उपपत्ति। इयाचिलागीं।।४९।।

"या राज्याची काय कथा! याहूनही उत्तमोत्तम भोग जरी आम्हाला द्रोणांसारख्यांची हत्या करून मिळणार असतील, तर ते पण आम्हाला कदापि नकोत. त्यापेक्षा भिक्षा मागून जगणे अधिक उत्तम! किंवा देशत्याग करून विजनवासात राहणेसुद्धा बरे! नाही तर सरळ गिरिकंदरांचा-रानावनांचा आश्रय करून राहिले, तरीही चालेल! पण भीष्मद्रोणांवर काही आम्ही शस्त्र धरणार नाही. देवा! नवीन धार लावलेल्या बाणांनी यांची मर्मस्थळे फोडावीत आणि त्यांच्या रुधिराने माखलेले भोग आम्ही कसे भोगावेत! म्हणून तुमचे *"युद्ध कर"* हे सांगणे मला पटत नाही."

ऐसें अर्जुनु तियें अवसरीं। म्हणे कृष्णा अवधारीं।
परि तै मना नैये चि मुरारी। आइकौनियां।।२-५०।।
हें जाणौनि पार्थु बिहाला। मग पुनरपि बोलों लागला।
म्हणे देवो कां चित्त ययां बोलां। देतिचिना।।५१।।
यऱ्हवीं माझां चित्तीं जैं होते। तैं मी विचारुनि बोलिलो एथें।
परि नीकें काय यया परौतें। तुम्हीं जाणा।।५२।।

पैं वीरु जेयांसि ऐकिजे। आणि इं बोलींचि प्राणु सांडिजे।
तैं एथ संग्रामव्याजें। उभें आहाति।।५३।।
आतां ऐसेयांतैंहि वधावें। कीं अव्हेरुनि वेगीं निगावें।
या दोहिंमाजीं काइं करावें। तैं नेणों आम्हीं।।५४।।

त्यावेळी जरी अर्जुनाने हे असे स्पष्ट सांगितले, तरी श्रीकृष्णास त्याचे बोलणे पटेना! हे जाणून अर्जुन कचरला. मग पुनः म्हणू लागला, "देवा! तुम्ही माझे म्हणणे लक्षात का घेत नाही? मी तर माझ्या मनातले सर्व काही स्पष्ट आडपडदा न ठेवता सांगितले. आता काय करायचे, ते तुम्ही पाहा. पण ज्यांच्याशी वैर करायचे असे म्हटल्याबरोबर आपले प्राण गेलेले चांगले, त्यांच्याशीच युद्ध करण्याचा प्रसंग आज ओढवला आहे. आता अशा वेळी काय करावे, यांचा वध करणे उचित आहे, की हे सर्व सोडून निघून जावे, यांपैकी कोणते योग्य तो निर्णय आम्हाला करता येत नाही."

गीताकथनारंभ::::

अर्जुनाची विषण्णता

असे म्हणून अर्जुन श्रीकृष्णांस शिष्यत्वभावाने शरण गेला. त्या युद्धाच्या भवितव्याच्या विचाराने त्याच्या मनाला पुनः एकवार उदासीनतेने घेरून टाकले.

मोहफणिग्रस्त अशा त्या पार्थास वाचवणारा तो श्रीकृष्ण गारुडी त्यावेळी धावून गेला. त्या प्रसंगाचे वर्णन करतांना संजय म्हणतोः

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परन्तप।
न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह।।२-९।।

"शत्रुतापन अशा त्या कुरळे केस असलेल्या अर्जुनाने त्या हृषीकेशास आपण युद्ध करणार नाही, असे म्हटले व तो स्तब्ध राहिला."

<u>गीता सांगण्यास सुरुवात</u>

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः।।२-१०।

"हे धृतराष्ट्रा! त्यावेळी दोन्ही सैन्यांच्या मधोमध खिन्न होऊन बसलेल्या अर्जुनाची समजूत काढण्यासाठी श्रीकृष्ण थोडेसे हसल्यासारखे करून त्याची समजूत काढू लागले."

या प्रसंगाचे वर्णन ज्ञानेश पुढील ओव्यांतून करतातः

ऐसें संजयो असे सांघतु। म्हणे राया तो पार्थु।
पुनरपि शोकाकुलितु। काय बोलें।।२-८१।।
आईकें सखेदु बोलें श्रीकृष्णातैं। आतां नालवावें तुम्हीं मातें।
मी सर्वथा न जुंझें एथें। भंरवसेनि।।८२।।
ऐसें एकीं हेलां बोलिला। मग मौन करूनु ठेला।
तेथ श्रीकृष्णु विस्मो पातला। देखौनि तेयांतैं।।८३।।
मग आपुलां चित्तीं म्हणे। एथ हें कायि आदरिलें येणें।
अर्जुनु सर्वथा कांहीं नेणें। काय कीजै।।८४।।

संजय सांगू लागला, "हे राजा धृतराष्ट्रा! पुनः शोकाकुल झालेला पार्थ श्रीकृष्णास म्हणाला "आता मला समजावण्याचा प्रयत्न तुम्ही करू नका. मी हे युद्ध काहीही झाले तरी करणार नाही." असे म्हणून तो गप्प बसला.

ते पाहून श्रीकृष्णांना फार आश्चर्य वाटले. ते विचार करू लागले की, "हा अर्जुन हे काय असे करत आहे! याची समजूत आता कशी काढावी! याला तर काहीही पटत नाही. याला कसा धीर द्यावा!"

ते विचार करू लागलेः

हा उमजे आतां कवणेंपरी। कैसेनि धीरु स्वीकारी।
जैसा ग्रहांतैं पंचाक्षरी। अनुमानी कां।।२-८५।।
ना तर्न्हीं असाध्य देखौनि व्याधि। अमृतासम दिव्य ओखदी।
वैद्य सूची निरवधि। निदानीचीं।।८६।।
तैसें विवरतु असें श्रीअनंतु। तयां दोनीं सैन्याआंतु।
जेयापरी पार्थु। भ्रांती सांडीं।।८७।।

"एखादा मांत्रिक पिशाच्याचा बंदोबस्त कसा करता येईल, याचा विचार करतो; किंवा असाध्य व्याधी पाहून वैद्य जशी निकडीच्या अमृतासम दिव्य औषधीची उपाययोजना करतो; त्याप्रमाणे त्या दोन्ही सैन्यांमध्ये रथावर बसलेले श्रीकृष्ण पार्थाची ही भ्रांती कशी दूर करता येईल, याचा विचार करण्यात मग्न झाले."

भगवान उवाचः

ते म्हणू लागले कीः

<u>अशोच्यानन्व शोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाष्यसे</u>।
<u>गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिताः</u>।।२-११।।

"शोक करण्यास योग्य नसणाऱ्या गोष्टींबाबत, हे पार्था! तू व्यर्थ शोक करत आहेस. जिवंत असणाऱ्या वा मेलेल्या अशा कोणत्याही मनुष्यांच्या विचाराने विवेकी लोक कधीच व्यथित होत नाहीत, हे तुला माहीत नसावे."

ज्ञानदेव या प्रसंगाचे वर्णन करतांना म्हणतातः

तैं कारण मनीं धरिलें। मग सरोष बोलों आदरिलें।
जैसें मातेचां कोपीं थोकलें। स्नेह आथी।।२-८८।।
कीं ओखदाचियां कडुवटपणीं। जैसीं अमृताची पुरवणी।
तैं आहाच न दिसे परि गुणीं। प्रकट होय।।८९।।
तैसीं वरिवरि पांतां उदासें। आंतु तर्न्हीं अति सुरसें।
तियें वाक्य हृषीकेशें। बोलों आदरिलीं।।९०।।

मग आपल्या मनाशी काय करावयाचे ते ठरवून ते पार्थाशी जराशा रोषाने बोलू लागले. आईच्या रागावण्यात प्रेम जसे दडलेले असते; किंवा औषधाच्या कडवटपणास त्याच्या अमृतोपम परिणामाची जशी जोड असते-जी दिसत नाही, पण व्याधी दूर सारून प्रकट होते, त्याप्रमाणे वरवर सरोष व गंभीर अशा त्या हृषीकेशाच्या बोलात अंतरी अतिशय सुरसपण होते."

आणि अशा त्या सुरस बोलांची ही गीतावल्ली आहे. तिचा उर्वरित भागही आपण समजावून घेण्याचा प्रयत्न करणार आहोतच. तसेच यानिमित्ताने आद्य श्रीशंकराचार्यांच्या गीताभाष्याचा खरा उपोद्घात याच *दुसऱ्या* अध्यायातील दहाव्या श्लोकापासून जो होतो, तोसुद्धा जमेल तसा निरीक्षू या. कारण प्रामुख्याने या सर्व उपोद्घातावरूनच श्रीशंकराचार्यांच्या मतांबाबत विद्वज्जनात वेगवेगळे वाद निर्माण झाले आहेत.

शाङ्करभाष्याचा खरा अभिप्राय

संन्यासाचे तत्त्व मागे आपण एकदा समजावून घेतले होते. त्या प्रसंगी या वादांचा थोडा उल्लेख केला होता. विद्वानांच्या वादात पडून आपणास अधिक काही मिळणार नाही. परंतु या स्थळी श्रीशंकराचार्यांचे मत उद्धृत केल्याशिवाय - त्यांनी गीताभाष्याच्या आरंभी काय म्हटले आहे, त्याचा आढावा घेतल्याशिवाय जिज्ञासूंची तृप्ती होणार नाही.म्हणून आचार्य काय म्हणतात, ते ऐका:

"**दृष्ट्वा तु पाण्डवानीकम्...।।१-२।।** ते" "**न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह।।२-९।।**" या श्लोकांद्वारे मनुष्याचे शोक, मोह इ.संसारात पुनरावर्तन करवणारे जे भाव आहेत, त्यांचे दर्शन घडविले आहे. "**कथं भीष्ममहं सङ्ख्ये ....।।**" इ.श्लोकांतून अर्जुनाचा अज्ञानजन्य *मी आणि माझे* व *मी आणि इतर* असा शोकमोहादी समस्यांना जागवणारा भाव व्यक्त होतो. या संगदोषांनी लिप्त झाल्यामुळे तो *स्वधर्म* म्हणजे *क्षात्रधर्म* सोडून निषिद्ध धर्माचे - अगदी भिक्षुकीवृत्तीने जीवन कंठण्याचे पण पालन करण्यापावेतो जाऊन पोहोचला. स्वधर्मपालन करतांना मनुष्ये फलाकांक्षा व अहंकार बाळगूनच करतात, असे सामान्यपणे दिसून येते. यातूनच पुण्य आणि पाप यांचा ससेमिरा मनुष्यमात्रांमागे लागून पुनर्जन्म संभवतात."

ज्ञानकर्मसमुच्चयाचा वादविषय

"चांगलेवाईट जन्म आणि सुखदु:खमय संसार या दोघांची निवृत्ती ***सर्वकर्मसंन्यासपूर्वक*** आत्मज्ञान प्राप्त केल्यावाचून होत नाही. म्हणून अर्जुनाची शोकमोह व संसारयात्रा यातून सुटका व्हावी यासाठी त्याला आत्मज्ञान सांगावे व त्यानिमित्ताने सर्व लोकांवर अनुग्रह करावा म्हणून ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं.....।।२-११।।"*** या श्लोकापासून भगवान सुरुवात करतात."

"परंतु काही टीकाकारांच्या मते सर्वकर्मसंन्यासपूर्वक आत्मज्ञाननिष्ठेने कैवल्यप्राप्ती होत नाही, तर अग्निहोत्रादी श्रौत-स्मार्त कर्मांसहित ज्ञानामुळेच मोक्षप्राप्ती होते."

"आपल्या या मताच्या पुष्टिप्रीत्यर्थ ते टीकाकार प्रमाणे देतात ती म्हणजे - ***"अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि।।२-३३।।"***, ***"कर्मण्येवाधिकारस्ते।।२-४७।।"***, ***"कुरु कर्मैव तस्मात्त्वम्।।४-१५।।"*** इ.इ. ते असे पण म्हणतात की हिंसादी कर्मांचा अंतर्भाव ज्या वैदिक धर्मात -यज्ञादी कर्मांत -आहे, त्यामुळे अधर्म होतो, असे मानू नये. युद्धरूप कर्म जरी क्रूर असले व त्यात गुरू, बंधू, गोत्रज इ.ची हत्या जरी होणार असली, तरी क्षत्रियांसाठी तोच स्वधर्म असल्याने त्यात दोष नाही.तसेच या स्वधर्माचे पालन न केल्यास ***"तत: स्वधर्मं च कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि।।२-३३।।"*** असे भगवंतानी स्पष्ट म्हटले आहे."

"त्या टीकाकारांच्या मते याद्वारे स्पष्ट आहे की जीवनभर कर्मे करावीत. तसेच यज्ञयागादीमध्ये होणाऱ्या व स्वधर्माप्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या जीवमात्रांच्या हत्या दोषास्पद नाहीत. ***एवं च कोणत्याही कारणास्तव स्वधर्मनियोजित कर्माचा त्याग यावज्जीवन करू नये."***

यावर आचार्य पुढे म्हणतात की: "परंतु हे टीकाकार विसरतात की भगवंतांनी दोन वेगवेगळ्या निष्ठा सांगितलेल्या आहेत - एक म्हणजे ***ज्ञाननिष्ठा वा साङ्ख्य*** व दुसरी म्हणजे ***कर्मनिष्ठा वा योग.*** *या दोन्ही निष्ठांची अधिष्ठाती बुद्धीही वेगवेगळ्या प्रकारची आहे."*

ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा

"अशोच्यान्...।।२-१०।।" या श्लोकापासून ***"स्वधर्ममपि चावेक्ष्य ...।।२-३१।।"*** या श्लोकापर्यंत जे परमार्थ व आत्मतत्त्वनिरूपण भगवंत करतात, ते ***साङ्ख्य*** आहे आणि त्यास आधारभूत जी बुद्धी आहे - *जिच्याद्वारे आत्मा अकर्ता आहे, असा सुनिश्चय होतो - ती* ***साङ्ख्यबुद्धी*** *आहे.* ज्ञान्यांसाठी ती बुद्धी आधार असून ते ***साङ्ख्ययोगी*** म्हणून म्हटले जातात."

आचार्य पुढे सांगतात: "*साङ्ख्यबुद्धी* उत्पन्न होण्याअगोदर *"आत्मा देहापासून वेगळा आहे"*, धर्म-अधर्म इ.चा विवेक करत मोक्षसाधन अनुष्ठिण्याचा जो मार्ग आहे, त्याचे नांव *योग* आहे. त्यास आधारभूत अशी ***योगबुद्धी*** होय. ज्या कर्ममार्गीयांस ती उचित आहे, ते योगाधिकारी होत. म्हणून भगवंतांनी *"एषा तेऽभिहिता साङ्ख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु"* या श्लोकाद्वारे या दोन बुद्धी वेगवेगळ्या असल्याचे दर्शविले आहे."

"*साङ्ख्यबुद्धी* चा उल्लेख करतांना ते म्हणतात: ***"पुरा वेदात्मना प्रोक्ता"*** व कर्मयोगनिष्ठेबाबत ***"कर्मयोगेन योगिनाम्"*** असे म्हटले आहे. <u>या दोन्ही निष्ठा एकाच पुरुषात असणे असंभव असल्याने भगवंतांनी स्वत: निष्ठांचे हे दोन विभाग सांगितले आहेत. कारण</u> ***कर्म व ज्ञान यांचा समुच्चय होऊ शकत नाही.***"

संन्यास एक आश्रम!

"श्रुतींमध्येसुद्धा आत्मप्रिय ब्राह्मण संन्यास घेतात असे म्हटले आहे व अविद्या-कामनायुक्त पुरुषांसाठीच केवळ इतर श्रौतादी संपूर्ण कर्मे सांगितली आहेत. ***गीताशास्त्रातसुद्धा श्रौत-स्मार्त कर्मांसह ज्ञानाचा समुच्चय केलेला नाही, हे ध्यानी घेतले पाहिजे,*** " असे श्रीशंकराचार्य म्हणतात.

वरील *संन्यास घेणे* या आचार्योक्तीवरून संन्यासाश्रमाचे *(चतुर्थ आश्रमाचे)* ग्रहण करणे असा अर्थ प्रतीत होतो, असे वाटते. ***"एतमेव***

प्रव्राजिनो लोकमिच्छन्तो ब्राह्मणाः प्रव्रजन्ति।।बृहदारण्यक।। ४।४।२२।।" या श्लोकाचा असाच अर्थ निघतो.

लोकसंग्रहार्थ ज्ञान्याचे कर्म

पुढे आचार्य असे म्हणतात की, "अज्ञान वा आसक्ती इ.दोषांनी प्रभावित केलेल्या पुरुषासही यज्ञ, दान, तपादींद्वारे चित्तशुद्धी झाल्याने परमार्थतत्त्वाचे ज्ञान होते. तेव्हा ***"हे सर्व ब्रह्मच आहे"*** आणि ***"स्वतः आपण अकर्ते आहोत"*** असे जाणवते. त्या पुरुषासही त्या ज्ञानामुळे कर्म व त्यांचे फल यांपासून सुटका मिळते. परंतु केवळ लोकसंग्रहार्थ तो पूर्वीप्रमाणेच सर्व कर्मे करत राहतो. पण ही त्याची कर्मे वस्तुतः कर्मे नव्हेतच! म्हणून त्यांचा ज्ञानाबरोबर समुच्चय होतो असे म्हणणे अयोग्य आहे."

"फलेच्छा व अहंकार त्या कर्मांत नसल्याने ज्ञान्याची कर्मे ही कर्मे नसतातच! "कुर्वन्नपि न लिप्यते।।५-७।।", "न करोति न लिप्यते।।१३-३१।।", इ.भगवद्वचने हेच दर्शवितात. योगी अंतःकरणाच्या शुद्धीसाठी कर्म करतो; तसे करून त्यास सिद्धी मिळते; त्याचप्रमाणे ब्रह्मप्राप्ती होते, इ.वचने गीता सांगते, त्या सर्वांवरून एकच सिद्ध होते, ते हे की ***"ज्ञान्यास कर्मे नाहीत"*** किंवा ***"सर्वकर्मसंन्यासावाचून आत्मज्ञान नाही."***

आचार्यांच्या या दोन विधानांतील सकृद्दर्शनी भासणारा विरोधाभास समजावून घेत त्यांची एकवाक्यता जाणणे म्हणजेच ***गीतारहस्य!!***

अशी सर्व भूमिका विशद करून आचार्य म्हणतात की, "म्हणूनच अर्जुनाचा आत्मज्ञानाविना उद्धार होणार नाही, हे जाणून गीतेद्वारे श्रीकृष्णांनी त्यास आत्मज्ञान प्रदान केले." गुरूचे एकमेव कर्तव्य जे होते, ते त्यांनी केले. अर्जुनाचे अज्ञान-शोक-मोह दूर केले. त्यास संसारबंधनातून मुक्त केले, मग तो युद्ध करो अथवा न करो!

परंतु भगवंतांचा आदर्श समोर असल्याने यती बनून तो विजनवासात निघून गेला नाही, तर लोकसंग्रहार्थ युद्ध करण्याचा पर्याय त्याने निवडला. या गोष्टी आपणास माहीतच आहेत.

निरर्थक वाद

तसेच आचार्यांचे मत आपण अवलोकिले. त्यावरून विद्वानांत होणारे वाद निरर्थकच आहेत व निव्वळ पुस्तकी स्वरूपाचे व पांडित्यप्रचुर असावेत अशी आपल्यासारख्या अल्पमती जिज्ञासूंची समजूत झाल्यास नवल नाही. आपला उद्देश आहे, तो ऊस खाण्याचा व त्याची गोडी चाखण्याचा! उसात गोडी कशी निर्माण होते इ.गोष्टी पंडितांसाठी आहेत, हे पुनश्च ध्यानी घेऊन आपला हा ग्रंथप्रवास - ही गीताज्ञानेश्वरीयात्रा - पुढे चालवणे अधिक श्रेयस्कर ठरेल. असो.

आत्मानात्मविवेकः:::

"तूं भ्रमलेपणें अहंकृती"

आता गीतेचा जो महत्त्वाचा एक भाग आहे, ज्याला ***साङ्ख्यविषयक तत्त्वज्ञान आणि बुद्धी*** म्हणून म्हटले आहे, त्याकडे वळू या. *श्लोक क्र. २-११* पासून भगवंतांनी याबाबतचे विवेचन सुरू केले आहे. अर्जुनाचे अज्ञान घलविण्यासाठी अगोदर त्यास योग्य ते ज्ञान नाही, असे श्रीकृष्ण त्याला म्हणतात व ते ज्ञान सांगण्यास सुरुवात करतात, असा हा प्रसंग आहे.

ज्ञानदेवांच्या शब्दात तो ऐका:

मग अर्जुनातें म्हणितलें। आम्हीं आजि हें नवल देखिलें।
जैं तुवां आदरिलें। माझारींचि।।२-९१।।
तूं जाणता जऱ्हीं म्हणिपसीं। परि नेणिवेतें न सांडिसीं।
आणि सिकवूं म्हणो तऱ्हीं बोलिसीं। बहुसाल नीति।।९२।।
जात्यंधा लागलें पिसें। मग तैं सैरा धांवें जैसें।
तुझें सिहाणेपण तैसें। दिसतसें।।९३।।
तूं आपणपें तऱ्हीं नेणसीं। परि या कौरवांचें शोचूं पाहसीं।
हा विस्मो आम्हांसीं। पुढतपुढती।।९४।।

श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाले, "मी आज हे नवलच पाहतो आहे. तू युद्ध न करण्यासाठी विचित्र युक्तिवाद युद्धाच्या ऐन प्रसंगी करतो आहेस! तू स्वतःला मोठा ज्ञाता समजतोस! पण अज्ञानास कवटाळून बसला आहेस. वर नीतिसंबंधी लंब्याचवड्या बाता मारतो आहेस. जन्मांधास वेड लागून तो सैरावैरा धावत सुटावा आणि वाटेल तेथे आपटावा, त्या प्रकारचे हे तुझे ज्ञातेपण आहे. तू स्वतः कोण आहेस हेसुद्धा तू ओळखत नाहीस आणि कौरवांना मी मारणार या विचाराने तू शोक करत आहेस, याचे मला वारंवार आश्चर्य वाटत आहे."

तऱ्हीं सांघ पां मज अर्जुना। तुजपासौनि स्थिती या त्रिभुवना।
हें अनादी विश्वरचना। तैं लटकी कांयी।।२-९५।।
एथ समर्थु एक आथी। तेयांपासूनि भूतें होती।
तऱ्हीं हें वांयांचि काय बोलती। जगामाजीं।।९६।।
हो कां सांप्रतें ऐसें जाहलें। जैं हें जन्ममृत्यु तुवां शृजिलें।
आणि नाशु पावें नाशिलें। तुझेनि कायीं।।९७।।
तूं भ्रमलेपणें अहंकृती। यांसि घातु न करिसी चित्तीं।
तऱ्हीं सांघैं हें कायी होती। चिरंतन।।९८।।

"तरी अर्जुना! तू मला सांग बरे की या त्रिभुवनाचे अस्तित्व तुझ्यामुळेच आहे काय! आणि तसे असेल तर ही अनादी विश्वरचना खोटीच म्हणायची का! तू काय या विश्वाचा आदि आहेस! आम्ही तर असे ऐकतो आणि जगही असेच म्हणते की त्या कोणाएका समर्थ शक्तीपासून ही सर्व भूते होतात. ते काय असत्य समजायचे! असे काही आहे का की हे जन्ममृत्यू तू निर्मिले आहेस आणि तू कशाचा नाश करणारा आहेस, म्हणून काही नाश पावत असते! तू आपल्या

भ्रमाला चिकटून बसलास आणि या भीष्मद्रोणादी कौरवांना मारणार नसलास, तर ते काय अमर होणार आहेत!"

"अनादिसिद्ध हें आघवें"

कीं तूं एकु वधितां। आणि सकल लोकु हा मरतां।
ऐसीं भ्रांती झणें चित्ता। येयौं देसीं।।२-९९।।
अनादिसिद्ध हें आघवें। होत जात स्वभावें।
तऱ्हीं तुवां कां शोचावें। सांघैं मज।।१००।।

"तू एक मारणारा व हे सगळे मरणारे अशी जी भ्रांती तुला उपजली आहे, तिचा तत्काळ त्याग कर. कारण हे विश्व अनादी आहे. जन्ममृत्यू आमच्या कोणाच्याही हातात नाहीत. हे सर्व स्वाभाविकपणे होत जात असतात. कोणाला मारणे जर तुझ्या हाती नाही, त्यांचा मृत्यू कसा व्हावा हे विश्वनियामक शक्तींच्या जर हातात आहे, तर त्याविषयी तू व्यर्थ शोक का करावास सांग बरे!"

"तत्त्वतां जैं वस्तु असें। अविनाशचि तैं"

पुढे श्रीकृष्ण म्हणतातः

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम्।।२-१२।।

"वास्तविक पाहता हे सर्व राजे, तू व मी हे पूर्वी नव्हतो असेही नाही व यानंतर आपण असणार नाही, असेही नाही."

याविषयी ज्ञानेश म्हणतातः

परि मूर्खपणें नेणसीं। न चिंतावें चिंतिसीं।
आणि तूंचि नीति सांगसीं। आम्हांप्रति।।२-१०१।।
देखें विवेकी जैं होती। तैं दोहींतैंहीं न शोचती।
जैं होय जाय हें भ्रांती। म्हणऊनियां।।१०२।।

"पण तू हे सर्व जाणत नाहीस. त्यामुळे ज्या गोष्टींची चिंता करू नये, जे विचारही मनात कधी आणू नयेत, त्यांना तू थारा देत आहेस. आणि वर योग्य काय, अयोग्य काय, धर्म काय, अधर्म कोणता, ही सगळी नीती तू आम्हाला शिकवत आहेस! जन्म व मृत्यू ही निव्वळ भ्रांती आहे. म्हणून जाणते विवेकी पुरुष यांपैकी कशाचाही शोक करत नाहीत."

अर्जुना सांघैन आईक। एथ आम्हीं तुम्ही देख।
आणि हें भूपति अशेख। आदिकरूनि।।२-१०३।।
नित्यता ऐसेचि असौनि। ना तऱ्हीं निश्चित क्षया जाऊनि।
इयें भ्रांती वेगली करूनि। दोनीं नाहीं।।१०४।।
हें उपजें आणि नाशें। तैं मायावशें दिसें।
यऱ्हवीं तत्त्वतां वस्तु जैं असें। तैं अविनाशचि।।१०५।।
जैसें पवनें तोय हालविलें। आणि तरंगाकार जाहलें।
तऱ्हीं कवण कें जन्मलें। म्हणों ये तेथ।।१०६।।
तैंचि वायूचें स्फुरण ठेलें। आणि उदक साहाजें सपाटलें।
तऱ्हीं आतां काय निमालें। विचारीं पां।।१०७।।

"अर्जुना! ऐक! हे पाहा! येथे जे आपण दोघे आणि हे सगळे राजे वगैरे गोळा झाले आहोत, ते नेहमीच असे नसणार व निश्चित आपला सगळ्यांचा मृत्यू कधी ना कधी होणार, ही भ्रांतीच आहे. कारण जन्म व मृत्यू या दोन्ही भ्रांतीच आहेत. जे उपजते त्याचा कधी ना कधी विनाश होतो, असे जे वाटते, त्याचे कारण माया आहे. खरे तर जी वस्तू आहे, ती अविनाशी आहे. वाऱ्यामुळे जळ हलते व तरंगाकार होते. तेव्हा असे म्हणणे योग्य होईल का की तरंगांचा जन्म झाला आहे! आणि वायूचे वाहणे थांबले व ते तरंग निमाले, तर कसला तरी नाश झाला म्हणावे!"

सृष्ट्य पदार्थ हे नाशवंतच!

आणि पाहाः

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति।।२-१३।।

"देहास ज्याप्रमाणे बालपण, कौमार्य व वार्धक्य ही प्राप्त होतात, त्याचप्रमाणे देहधाऱ्यास त्या एका देहानंतर दुसरा देह प्राप्त होत असतो. म्हणून देहाबाबत ज्ञानी पुरुष मोह पावत नाहीत; शोक चिंता करत नाहीत."

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्वभारत।।२-१४।।

"देहाची उत्पत्ती, स्थिती व नाश याबाबत शोकमोह करणे बरोबर नाही. तसेच त्या देहास सुख व दुःख प्राप्त करून देण्यास इंद्रियांचा बाह्य सृष्टीतील पदार्थांशी म्हणजे विषयांशी होणारा संयोग हा कारण असतो. त्यास पण उत्पत्ती व विनाश असतात. तसेच सृष्ट्य पदार्थांसही उत्पत्ती व विनाश हा ठरलेलाच असतो. म्हणून या सर्वांबाबत विचार करू नकोस व ते सर्व सहन कर."

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते।।२-१५।।

"हे पुरुषर्षभ! जो पुरुष इंद्रियांच्या आवेगाने, विषयांच्या संयोगाने सुखदुःख मानीत नाही, सुख हवे व दुःख नको, असे ज्याला वाटत नाही, त्यास सुखदुःख व्यथित करू शकत नाहीत. असा पुरुष अमृतत्व म्हणजे ब्रह्माची प्राप्ती करून घेऊ शकतो."

तत्त्वज्ञान व निःश्रेयसाचा उपाय यांचा संगम

तत्त्वज्ञान सांगत असताच निःश्रेयसप्राप्तीचा उपाय किंवा मार्गही सांगणे हे खास गीतेचे वैशिष्ट्य आहे. गीता जे तत्त्वज्ञान सांगते, ते उहापोह करून आपलेच तत्त्वज्ञान कसे अत्युच्च आहे, हे सिद्ध करण्यासाठी नसते, तर त्या तत्त्वज्ञानातील मौलिक अशा सिद्धांतांचा व्यवहारात कसा उपयोग करून घेता येईल, त्याद्वारे सुखदुःखादि द्वंद्वे सहज कशी सहन करता येतील व निश्चित कल्याणाचा मार्ग कसा गवसेल, यासाठी गीतेतील तत्त्वज्ञानाचा भाग येतो, हे आपणास सूक्ष्म निरीक्षणांती जाणवते.

हानोपाय

या ठिकाणीही तत्त्वज्ञानपरक विचार सांगण्यास सुरुवात झाली न झाली, तोच श्रीकृष्णांनी मनुष्याच्या सुखदुःखांची मीमांसा, चैतन्याचे अबाधितपण, देहाचे नश्वरत्व, पुनर्जन्माचा सिद्धांत, इंद्रिये व विषय यांपासून निर्माण होणारे व पोसले जाणारे अज्ञान यांचा परामर्ष घेत मनुष्यास निर्वाण कसे प्राप्त होईल, याचा मार्ग उपदेशिण्यास त्वरित सुरुवात केली आहे.

तत्त्वविवेकापासून सुरुवात करून तत्त्वप्राप्तीकडे नेणारा गीतेचा हा नुकताच सांगितला जाणारा मार्ग - ***विषयांची सुखदुःखे अनित्य आहेत व त्यांच्याशी आपण संयोग करू नये*** - हा गौतम बुद्धाने प्रतिपादिलेल्या *हानोपायांना* समांतर आहे, एवढेच जिज्ञासूंच्या निदर्शनास आणून श्रीकृष्ण काय म्हणतात, तिकडे वळू या.

देहाची स्थित्यंतरे व चैतन्य

गीता *श्लोक क्र. २-१२ ते १५* यांचे स्पष्टीकरण करत ज्ञानेश म्हणतातः

आईकें शरीर तऱ्हीं एक। परि वयसाभेद अनेक।
हें प्रत्यक्षचि देख। प्रमाण तूं।।२-१०८।।
एथ कौमारत्व दिसें। मग तारुण्यीं तैं भ्रंशें।
परि देहचि न नशे। एकेकासवें।।१०९।।
तैसीं चैतन्याचां ठाइं। इयें शरीरांतरें होती जाती पाइं।
ऐसें जाणें तेयां नाहीं। व्यामोहदुःख।।११०।।

"आता प्रत्यक्ष प्रमाणच पाहा. शरीर तेच असते. पण वयोमानपरत्वे त्याचे अनेक भेद दिसतात. प्रथम शरीर कुमार दिसते, लहान आकारापासून वाढत जाऊन मोठ्या आकाराचे, ताकदीचे व वेगळ्या क्षमतेचे होते. तेव्हा ते तारुण्यात येते. मूळ देह भ्रंशला असे दिसते खरे. नंतर वार्धक्याचे तर विचारूच नका. हे म्हातारे खोकड शरीर कधी बाल व कधीतरी तरुण होते, याच्या खाणाखुणा काही त्या देहावर उरत नाहीत. पण सुज्ञ मनुष्य त्या त्या अवस्थेबरोबर देहाचा नाश झाला व दुसरा देह आला असे म्हणेल का! अर्जुना! याप्रमाणेच *चैतन्य* तेच ते असून जन्मजन्मांतरामुळे देहांतरे होत असतांना जरी दिसली तरी चैतन्य जन्मले व नासले असे कसे म्हणता येईल! जो यातले सत्य यथातथ्य जाणतो, त्यास भ्रांतीमुळे निर्माण होणारे शोकदुःखादी नाहीत."

एथ नेणावयां हेंचि कारण। जैं इंद्रियां अधीनपण।
तिहीं आकलिजे अंतष्करण। म्हणऊनि भ्रमे।।२-१११।।

"परंतु अज्ञानी माणसांस हे समजत नाही.कारण ते इंद्रियांअधीन होऊन विषय उपभोगांमध्ये एकजीव झालेले असतात. ते विषय त्यांच्या अंतःकरणास ग्रासून टाकतात. म्हणून चैतन्यासंबंधी अज्ञान जसेच्या तसे त्यांच्याठायी वास करते व त्यांस भ्रांती निर्माण होते. अशीच भ्रांती, अर्जुना! तुला पण झालेली आहे."

देहाहंकार हेच सुखदुःखांचे मूळ

इंद्रियें विषय सेविती। तेथ हर्षशोकु हें उपजती।
तैं आंतर आप्लविती। संगें एणें।।२-११२।।
जे ययां विषयांचां ठाइं। एकनिष्ठता कंहीं नाहीं।
तेथ दुःख आणि कंहीं। सुखही दिसे।।११३।।

"असे पहा. इंद्रिये जेव्हा विषयांचे सेवन करतात, तेव्हा हर्ष व शोक उपजतात. त्यांचा संग अंतःकरणाची चलबिचल करतो. ही इंद्रियेसुद्धा विषयांशी एकनिष्ठ नसतात. कधी त्यांना विषय आवडतात, तर कधी आवडत नाहीत."

देखैं हें शब्दाची व्याप्ति। निंदा आणि स्तुति।
तेथ द्वेषाद्वेष उपजती। श्रवणद्वारें।।२-११४।।
मृदु आणि कठीण। हें स्पर्शाचें दोनहीं गुण।
जैं वपुचेनि संगें कारण। संतोखखेदां।।११५।।

"त्या त्या आवडीमुळे सुख व दुःख निर्माण होते. कसे ते पहा. स्तुती आणि निंदा या दोन्ही शब्दाच्याच क्षेत्रातील आहेत. श्रोत्रेंद्रियांचा शब्द हा विषय आहे. पण स्तुतीमुळे स्नेह व निंदेमुळे द्वेष अशा सुखदुःखादींना जागवणाऱ्या भावना निर्माण करण्यास ते इंद्रिय कारण होते. मृदु व कठीण अशा स्पर्शांमुळे त्वचा संतोष व खेद असे सुखदुःखात्मक भाव निर्माण करते."

इतर इंद्रियांचेही असेच आहेः

भ्यासुर आणि सुरेख। हें रूपाचें स्वरूप देख।
जैं उपजवी सुखदुःख। नेत्रांद्वारें।।२-११६।।
सुगंधु आणि दुर्गंधु। हा परिमलाचा भेदु।
जो घ्राणसंगें विषादु-। तोषु देतां।।११७।।
तैसाचि द्विविधु रसु। उपजवी प्रीति त्रासु।
म्हणौनि हा अपभ्रंशु। विषयसंगु।।११८।।
देखें इंद्रियांअधीन होईजे। तैं शीतोष्णांतैं पाविजे।
आणि सुखदुःखें आकलिजे। आपणपें।।११९।।

"तसेच भयंकर व सुंदर ही रूपाची अभिव्यक्ती नेत्रांद्वारे दुःख व सुख उपजवतात. परिमळ दोन प्रकारचा असतो - सुगंध व दुर्गंध. त्याचा घ्राणेंद्रियाशी संसर्ग झाला की तोष व विषाद उत्पन्न होतात. द्विविध रस - रुचकर व अरुचिकर - हे पण असेच रसनेंद्रियाशी युक्त होऊन आवड व नावड निर्मितात. इंद्रिये म्हणजे आपण असे अज्ञानाने समजल्यामुळे विषय व इंद्रिये यांच्या संगाने मनुष्यास सुखदुःखादी द्वंद्वे भोगावी लागतात. इंद्रियांच्या अधीन राहण्याने शीतोष्णाचा अनुभव घ्यावा लागतो आणि सुखदुःख, हवे-नको, या ईप्सेच्या ताब्यात जावे लागते."

आत्मप्राप्तीचा उपाय

एयां विषयांवांचूनि कांहीं। आणिक सर्वथा रम्य नाहीं।
ऐसा स्वभाओचि पाहीं। इंद्रियांचां।।२-१२०।।

हें विषय तऱ्हीं कैसें। रोहिणीचें जल जैसें।
कां स्वप्नींचां आभासे। भद्रजाति।।१२१।।
देखें अनित्य तियांपरी। म्हणऊनि तूं अव्हेरीं।
हा सर्वांथा संगु न करीं। धनुर्धरा।।१२२।।

"आणि या इंद्रियांचा स्वभावच असा आहे की त्यांना विषयोपभोगांशिवाय इतर कशाचीच आवड नसते. अन ते विषय तर रोहिणीजलाप्रमाणे - मृगजलाप्रमाणे फसवे व भ्रामक तसेच असत्य असतात. स्वप्नात पाहिलेल्या हत्तीप्रमाणे त्यांचे अस्तित्व असते."

हें विषय जेयांतें नाकलिती। तेयां सुखदुःखें हीं न पवती।
आणि गर्भवासुसंगती। नाहीं तेयां।।२-१२३।।
तो नित्यरूपु पार्था। ओलखावा सर्वथा।
जो ययां इंद्रियार्था। नाकले चि।।१२४।।

"अशा क्षणभंगुर विषयसुखाचा ध्यास तू घेत जाऊ नकोस. हे धनुर्धरा! विषयांस सर्वदा अव्हेरावे, त्यांची इच्छा करू नये. ते मिळाल्यास सुखदुःख मानू नये. याप्रकारे या विषयांच्या तावडीतून जो सुटला, त्यास सुखे व दुःखे यांची बाधा होत नाही. विषय-सुख-दुःख-इच्छा-भोग यांच्यापासून अलिप्तता प्राप्त झाली की गर्भवास वाट्यास येत नाही. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटका होते. मुक्ती मिळते. इंद्रिये आणि विषय यांच्या कह्यात जो सापडत नही, तो, हे पार्था! नित्यरूप म्हणजे आत्मरूप वा ब्रह्मरूप होतो."

साङ्ख्यबुद्धी

याप्रमाणे भगवंत जीवन्मुक्ती प्राप्त करून घेण्याचा मार्ग सांगतात. विषयांस अव्हेरणे, त्यांची इच्छा न करणे, त्यासाठी प्रयत्न न करणे, मिळेल त्या विषयसुखात लिप्त न होणे, सुखदुःखांच्या अधीन न होणे, इंद्रियांचे लळे न करणे, अशा या युक्त्या त्या मार्गात आहेत. विचाराने हे जाणून घेणे, विवेकबुद्धीने सत्य-असत्य, नित्य-अनित्य ओळखणे, असा हा मार्ग आहे. साङ्ख्यबुद्धी ती हीच!

याविषयी अजून श्रीकृष्ण काय म्हणतात पहा:

आतां अर्जुना आणिक एक। सांघैन मी आईक।
जैं विचारपर लोक। वोलखिती।।२-१२५।।
या उपाधीमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत।
तैं तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।।१२६।।

"अर्जुना! त्या साङ्ख्यांचे अजून एक लक्षण ऐक. ते विवेकाद्वारेच वस्तूचे रूप ओळखतात. या जगडंबरास, या देहामध्ये, या प्रकृतीच्या पसाऱ्यात गुप्त रीतीने पण सर्वत्र वास करणारे जे चैतन्य असते, त्यास जाणून घेऊन तत्त्वज्ञ संत त्याचाच सत्य म्हणून स्वीकार करतात."

सलिलीं पय जैसें। एक होऊनि मिनलें असें।
परि निवडूनि राजहंसें। वेगलें कीजै।।२-१२७।।
कीं अग्निमुखें कीडाल। तोडौनियां चोखाल।
निवडीति केवल। बुद्धिमंत।।१२८।।
ना तऱ्हीं जाणिवेचियां आयणीं। करितां दधिकडसणी।
मग नवनीत निर्वाणीं। दिसें जैसें।।१२९।।
कीं भूंस बीज एकवट। उपणितां राहें घनवट।
तेथ उडे तैं फलकट। जाणों आलें।।१३०।।
तैसें विचारितां निरसलें। तैं प्रपंचूनि साहजें सांडविलें।
मग तत्त्वतां तत्त्व उरलें। ज्ञानियांसि।।१३१।।

"पाण्यामध्ये दूध मिसळले तर राजहंस कसे दूध पाण्यापासून वेगळे करून त्याचेच ग्रहण करतात; किंवा बुद्धिमान मनुष्य सोन्यातील हीण धातूस अग्नीच्या योगे जाळून जसे शुद्ध सोने प्राप्त करून घेतात; अथवा दही घुसळून लोणी कसे काढतात; किंवा भुसा व बीज एकत्र मळणी झाल्यावर हाती येते, त्याला वाऱ्यावर उफणून भूस उडून जाते, फलकटे फेकली जातात आणि खाली जशी निव्वळ धान्याची उत्कृष्ट रास राहते; त्याप्रमाणे बुद्धिचातुर्य वापरून विवेकाच्या साहाय्याने या देहादी सामग्रीतील प्रपंच व संसार असार असल्याचे ठरते व त्याचा निरास करून जे निर्भेळ तत्त्व उरते, त्याचा ज्ञानी वा साङ्ख्य स्वीकार करतात."

तत्त्वज्ञ संतांचा नित्यानित्यविवेक

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः।।२-१६।।

"*असत्* आहेसे नाही व *सत्* नाहीसे नाही. *सत् व असत्* या दोन्हींचा तत्त्वदर्शींनी अंत पाहिले आहे व *सत्* वस्तू कोणती व *असत्* वस्तू कोणती आहे, त्याचा अनुभूतिपूर्वक निर्णय केला आहे."

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति।।२-१७।।

"हे सर्व जगत ज्याने व्यापले आहे, ते तत्त्व अविनाशी आहे. त्या अव्यय तत्त्वाचा विनाश करण्यास कोणीही समर्थ नाही, हे तू जाणून घे."

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत।।२-१८।।

"नित्य, अविनाशी व अचिंत्य असा शरीर धारण करणारा जो आहे, त्याचे शरीर मात्र नाशवंत आहे, हे जाणून, हे भारता! तू युद्ध कर."

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते।।२-१९।।

"हा देह धारण करणारा आहे वा तो मारला जातो, असे जे मानतात, त्या दोघांनाही खरे काय ते माहीत नाही. कारण हा देही ना तर मारला जातो, ना तो कोणाला मारतो."

सारासारविचार

या विचारांचा मागोवा घेत ज्ञानदेव म्हणतात कीः

म्हणौनि अनित्याचां ठाइं। तेयां आस्तिक्यबुद्धी नाहीं।
जैं निष्कर्षु दोहींहीं। देखिला असे।।२-१३२।।
देखैं सारासार विचारितां। भ्रांती तैं पाहीं असारता।
तन्हीं सार तैं स्वभावतां। नित्य जाणें।।१३३।।
हा लोकत्रयाकारु। तो जेयाचां विस्तारु।
तेथ नाम वर्णु आकारु। चिह्न नाहीं।।१३४।।
जो सर्वदा सर्वगतु। जन्मक्षयातीतु।
तेयां केलियांहीं घातु। कदाचि नोहें।।१३५।।

"ज्ञानी लोक अनित्य अशा या संसाराबद्दल तो शाश्वत आहे असा निश्चय करत नाही. सारासार विचार करून त्यांचा असा निर्णय असतो की असारता ही भ्रांती आहे आणि सार हे स्वभावतःच नित्य आहे, असा त्या दोनही गोष्टींचा विवेक करून त्यांनी पाहिलेला आहे. ज्याचा विस्तार हे त्रैलोक्य आहे, त्याला नाम, वर्ण वा आकार अशी कोणतीही लक्षणे नाहीत; असा जो शाश्वत व सर्व व्यापणारा आहे, त्याचा घात करू गेले तरी होऊ शकत नाही."

आणि शरीरजात आघवें। हें नाशवंत स्वभावें।
म्हणौनि तुवां जूझावें। पांडुकुमरा।।२-१३६।।
तूं धरूनि देहाभिमानातैं। दिठी सूनि या शरीरांतैं।
मी मारितां हें मरतें। म्हणत आहासी।।१३७।।
तन्हीं अर्जुना तूं हें नेणसीं। जन्हीं तत्त्वतां विचारिसी।
तन्हीं वधिता तूं न्हवसी। हें वध्य नव्हती।।१३८।।

"पण शरीरादी इतर सर्व नाशवंत आहे. आपण कोणाचाही घात करत नाही, हे जाणून घे व हे अर्जुना! आपली भ्रांती टाकून देऊन युद्ध कर. देहाभिमान धरून, शरीर म्हणजेच मी असे ठरवून तू म्हणत आहेस की मी मारणारा व हे मरणारे आहेत. कारण तू अज्ञानी आहेस. तत्त्वतः विचार करून पाहिले, तर तुला कळून येईल की वध करणारा तू नाहीस-कोणीही नाही आणि वध्य पण हेच काय, कोणीही नाहीत."

आत्म्याचे स्वरूप

साङ्ख्यबुद्धीचा अजून विस्तार करत श्रीकृष्ण म्हणतातः

न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायं भूत्वा भविता वा न भूयः।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो-
न हन्यते हन्यमाने शरीरे।।२-२०।।

"हे जे शाश्वत आहे, त्यास जन्म नाही आणि मृत्यूही नाही. शरीर जसे एकदाच होते, तसे हे एकदा झाले की पुनः न होणारे नाही. कारण यास नाशच नाही. हे अज, नित्य, शाश्वत, अनादी असून शरीराबरोबर याचा नाश होत नाही."

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम्।
कथः स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम्।।२-२१।।

"हे अर्जुना! हे असे अविनाशी, नित्य, अज व अव्यय तत्त्व जो जाणतो, तो पुरुष कोणास मारणार व मारवणार!"

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही।।२-२२।।

"मनुष्य जशी जीर्ण झालेली वस्त्रे टाकून देऊन नवीन वस्त्रे धारण करतो, त्याप्रमाणे हा देही जीर्ण शरीर टाकून देऊन नवीन शरीर धारण करतो."

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।।२-२३।।

" यास शस्त्रे छेदत नाहीत; यास अग्नी जाळत नाही; यास पाणी भिजवत नाही; किंवा यास वायू शोषत नाही."

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनाः।।२-२४।।

"हा अच्छेद्य, न जळणारा, न भिजणारा, न शोषला जाणारा आहे. हा सर्वत्र, नित्य, स्थिर, अचल व सनातन आहे."

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि।।२-२५।।

"यास अशा प्रकारे जाणून घे व त्यासंबंधी हा मरणार आहे, मी याला मारणार आहे इ.प्रकारचा मोह धरून शोक करू नकोस. कारण हा मरणारा नाही; मारला जाणारा नाही आणि मारणाराही नाही; आणि या जगात याच्यावाचून काहीच नाही. तेव्हा कोण कोणास मारणार!"

"सर्वथा नाशु नाहीं। स्वरूपासीं"

याविषयी ज्ञानेश म्हणतातः

जैसें स्वप्नामाजीं देखिजे। तैं स्वप्नींच सांच आपजे।
मग घेऊनियां पाहिजे। तंव कांहींचि नाहिं।।२-१३९।।
तैसीं हें जाण माया। तूं भ्रमत आहासि वांयां।
शस्त्रें हाणीतलियां छाया। जैसीं आंगीं न रुपे।।१४०।।
कां पूर्ण कुंभ उलंडला। तेथ बिंबाकारु दिसें भ्रंशला।
परि भानु नाहीं नाशला। तेयासवें।।१४१।।
ना तन्हीं मठीं आकाश जैसें। मठाकृति अवतरलें असें।
तो भंगलियां आपैसें। स्वरूपचि।।१४२।।
तैसें शरीराचां लोपीं। सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं।
म्हणऊनि तूं हें नारोपीं। भ्रांती बापा।।१४३।।

"स्वप्न पडते. त्यावेळी जे दिसते, ते तेव्हा खरेच वाटते. पण जागे झाल्यावर पाहावे तर तसे काहीच वास्तविक नसते. ही माया पण तशीच आहे. तिच्यामुळे तुला उगीचच भ्रांती झालेली आहे.

सावलीवर शस्त्रप्रहार केला तर तो आपल्या अंगावर होतो का! जळाने पूर्ण भरलेला कुंभ उलथला. त्यातले पाणी सांडून गेल्यावर त्यात सूर्यबिंब जे अगोदर दिसत होते, ते लोप पावले. पण त्यामुळे सूर्य नाहीसा होत नाही. किंवा मठातील आकाशास मठाकार येतो. तो मठ फुटला की ते आकाश आपल्या मूळ स्वरूपी जाऊन मिळते. याचप्रमाणे हे अर्जुना! शरीर लोपले तरी स्वरूपाचा नाश होत नाही. तुझा व्यर्थ भ्रम तू स्वरूपावर आरोपून त्याचा देहाबरोबर नाश होतो, असे म्हणू नकोस."

जैसें जीर्णे वस्त्रें सांडिजे। मग नूतनें आणिकें वेढिजे।
तैसें देहांतरांतैं स्वीकारिजे। चैतन्यनाथें।।२-१४४।।
हा अनादी नित्यसिद्ध। निरुपाधि विशुद्ध।
म्हणऊनि शस्त्रादिकीं छेदु। न घडे एयां।।१४५।।

"जीर्ण झालेले वस्त्र टाकून जसे नवे वस्त्र परिधान करावे, त्याप्रमाणे एक देह टाकून तो चैतन्यनाथ दुसऱ्या देहास स्वीकारतो. हा चैतन्यनाथ अनादी, नित्यसिद्ध, निरुपाधिक व विशुद्ध असा आहे. त्यामुळे तो शस्त्रांनी छेदला जात नाही."

"अनादि अविकृतु। सर्वरूपु"

तसेच त्याचे अधिक स्वरूप वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

हा प्रलयोदकें नाप्लवें। अग्निदाहो न संभवें।
एथ महाशोषु न प्रभवें। मारुताचां।।२-१४६।।
अर्जुना हा नित्यु। अचलु हा शाश्वतु।
सर्वत्र सदोदितु। परिपूर्णु हा।।१४७।।
हा तर्काचियें दिठीं। गोचर नव्हें किरीटी।
ध्यान येयाचियें भेटीं। उत्कंठा वाहें।।१४८।।
हा सदा दुर्लभु मना। आपु नोहें साधना।...।।१४९।।

"हा प्रळयकाळच्या एकार्णवात बुडून लोपत नाही. अग्नीमुळे जळणे शक्य नाही.वायूच्या महाशोषणशक्तीचा याच्यावर प्रभाव पडत नाही. अर्जुना! हा नित्य आहे. अचल आहे. शाश्वत आहे. सर्वत्र सदोदित हाच असतो. हा परिपूर्ण आहे. ***"पूर्णमदः। पूर्णमिद। पूर्णात्पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।"*** असा तो हाच म्हणावयाचा! तर्कदृष्टीने कितीही शोधला, तरी हा सापडत नाही. ध्यानाससुद्धा हा भेटावा हीच सतत उत्कंठा असते. मनाला हा दुर्लभ आहे. मन याची नीट कल्पनासुद्धा करू शकत नाही. अमनस्क अवस्थेतच हा गोचर होतो. कोणतेही साधन याची प्राप्ती करून देण्यास असमर्थ आहे. कारण हा ज्याच्यावर कृपा करतो, त्यालाच तो लाभतो. ***"यमेवैष वृणुते तेन लभ्य:"*** असा हा आहे. आणि हा कोणावर केव्हा कृपा करील याचा काही नियम नाही."

...। निःसीमु हा अर्जुना। पुरुषोत्तमु।।२-१४९।।
हा गुणत्रयरहितु। व्यक्तीसि अतीतु।
अनादि अविकृतु। सर्वरूपु।।१५०।।
अर्जुना ऐसा जाणावा। हा सकलात्मकु देखावा।
मग साहाजें शोकु आघवा। हरैल तूझां।।१५१।।

"पुरुषोत्तम म्हणून यासच गौरवतात. हा मर्यादातीत आहे. हा मायेपलीकडचा आहे. याचा अंतपार लागत नाही. हाच ***पंढरीचा कानडा राजा*** आहे. हा त्रिगुणातीत आहे. हा निराकार आहे. निर्गुण आहे. अनादी आहे. अविकारी आहे. पण तरीही सर्व भूते याचीच रूपे आहेत. हा सकळ विश्वास व्यापून ***दशांगुळे*** उरला आहे. अर्जुना! याची अशी ओळख करून देतात. हा सर्वात्मक आहे. हा सर्वेश्वर आहे. याचे खरे स्वरूप जाणून घे. म्हणजे तो तुझा सर्व शोक हरण करील."

नास्तिक मतः:::

"आत्मा जरी नित्य नसला, तरी"

पण समजा कोणाला हे आत्मस्वरूप असे भावत नसेल, तरीही हरकत नाही. भगवंत म्हणतातः

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्।
तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि।।२-२६।।

"हे महाबाहो! हा आत्मा जन्ममृत्युरहित आहे, हे तुला जर मानवत नसेल, तर क्षणभर तुला वाटते, तसे पण समजेनास का! म्हणजे हा देहाबरोबरच जन्मतो व देहासवे मृत्यू पावतो, असे म्हटले तरी तुला शोक करणे योग्य नाही."

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हति।।२-२७।।

"कारण जन्मलेल्याला कधीतरी मृत्यू येणारच आहे आणि मृत्यू पावलेल्याचा पुनः जन्मही होणारच आहे. अशा निश्चित ठरलेल्या गोष्टी कोणाच्याही हातात नाहीत. तरी शोक करणे योग्य नाही."

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना।।२-२८।।

"अर्जुना! ही अव्यक्त भूते काही काळ व्यक्त होऊन पुनः मृत्यूनंतर अव्यक्त होतात. तर त्यांचा मृत्यू झाला म्हणून शोक का करावा!"

गौतमबुद्ध आणि अर्जुन यांना झालेले मृत्युदर्शनः:::

मृत्युदर्शनाने तत्त्वज्ञानप्राप्ती व हानोपाय

या श्लोकातील विचारशृंखला वेगळ्या प्रकारची आहे. आत्म्याबाबतचे नास्तिक मत त्यात थोड्याफार प्रमाणात व्यक्त होत आहे. तरी ज्ञानेश या मतास कसे मांडतात, ते पाहाः

अथवा ऐसा नेणसीं। तूं अंतवंतचि हें मानिसीं।
तऱ्हीं शोचूं न पवसीं। पांडुकुमरा।।२-१५२।।
जैं आदि स्थिती अंतु। हा निरंतर असे नित्यु।
जैसा प्रवाहो अनुस्यूतु। गंगाजलाचा।।१५३।।

तैं आदि नाहीं खंडलें। समुद्रीं तऱ्हीं असे मिनलें।
आणि जात चि मध्यें उरलें। दिसें जैसें।।१५४।।
इयें दोनीं तियांपरीं। सरसींचि सदा अवधारीं।
भूतांसीं कवणीं अवसरीं। ठाकती ना।।१५५।।
म्हणौनि हें आघवें। एथ तुज नलगे शोचावें।
जैं स्थितीचि हें स्वभावें। अनादि ऐसीं।।१५६।।

"अथवा हा आत्मा असा चिरंतन आहे, हे न ओळखता जर तू त्याला नाशवंत समजत असशील, तरी पण, हे पांडुपुत्रा! तू या कौरवांना वधण्याच्या विचाराने शोकमग्न होऊ नकोस. गंगाजलाचा प्रवास जसा उगमापासून अखंडितपणे चालू राहून सागरास सतत भेटत राहातो, त्या प्रवाहात कधीच खंड असा तो पडतच नाही व मध्यंतरी ते जल नदीच्या रूपाने वाहतांना जसे दिसते, त्याप्रमाणे जीवांची उत्पत्ती, स्थिती व नाश हा क्रम अविरतपणे चालूच आहे. हा कोणासच थांबवता येणारा नाही. प्रत्येक भूतास या क्रमातून जावेच लागते. ही अनादी अशी व्यवस्था आहे. म्हणून कौरवांच्या तथाकथित, पुढे होणाऱ्या युद्धातील मृत्यूबाबत शोक करू नकोस."

ना तऱ्हीं हें अर्जुना। नैये चि तुझियां मनां।
जैं देखौनि लोकु अधिना। जन्मक्षयां।।२-१५७।।
तऱ्हैं एथ कांहीं। तुज शोकासीं कारण नाहीं।
जैं जन्ममृत्यु हें पाहीं। अपरिहर।।१५८।।

"अथवा हे जग जन्ममृत्यूच्या अधीन आहे, याचा विचार करून तुला खेद वाटत असेल, तर तोदेखील उचित नव्हे. कारण जन्ममृत्यू कोणासही टाळता येत नहीत. मग अटळ गोष्टींबाबत शोक करण्यात काय हशील!"

या विचारांकडे पाहून आपणास गौतमबुद्धांची कथा आठवल्यास आश्चर्य नही. राजपुत्र सिद्धार्थाचे क्रमबद्ध सुरक्षित जीवन ते आपल्या पित्याच्या वत्सल छायेखाली जेव्हा जगत असत, तेव्हा त्यांना या जगातील अटळ अशा जरा-व्याधी -मृत्यू यांची ओळख होऊ दिली गेली नव्हती. अकस्मात जेव्हा त्यांनी जरा-व्याधि-मृत्यू यांचे दर्शन घेतले, तेव्हा ते अत्यंत व्यथित झाले. कारण मनुष्यमात्रास हे सर्व अटळ आहेत, हे त्यांना जाणवले.

जिज्ञासूंनी हे ध्यानात घेण्यासारखे आहे की राजपुत्र सिद्धार्थ पण अर्जुनासारखाच देहाच्या मृत्यूच्या विचाराने विषण्ण झाला होता. आणि त्याच्या या विषादातून त्याने जी ज्ञानसाधना केली, त्यातून फोफावलेल्या बोधिवृक्षाने अनंत अशा जीवांना आपापल्या दुःखमय जीवनातून निर्वाणाकडे अग्रेसर होण्यास पुरेशी छाया व प्रकाश दिला व अजूनही त्याचे हे कार्य निर्वाणानंतरही चालूच आहे.

अर्जुनाची ही विषण्णतासुद्धा अशीच समस्त मानवांस उपयुक्त ठरणारी आहे. त्यायोगे गीता प्रसृत झाली व तिच्या प्रकाशात कोट्यवधी जीवांना मुक्तीचा मार्ग सापडला. असो.

"उपजैं तैं नाशें"

श्रीकृष्ण पुढे अर्जुनास काय उपदेशितात, ते पाहाः

उपजैं तैं नाशें। नाशलें पुनरपि दिसें।
हें घटिकायंत्र तैसें। परिभ्रमें गां।।२-१५९।।
ना तऱ्हीं उदो अस्तु आपैसें। अखंडित होत जात जैसें।
हें जन्ममरण तैसें। अनिवार जगीं।।१६०।।
महाप्रलय अवसरें। हें त्रैलोक्यही संहरें।
म्हणौनि हा परिहरें। आदि अंतु।।१६१।।
तूं जऱ्हीं हें ऐसें मानिसीं। तऱ्हीं खेदु कां करिसी।
काय जाणतू चि नेणसीं। पांडुकुमरा।।१६२।।

"उपजलेले नाश पावते. नाश पावलेले पुनः प्रकटते. रहाटगाडग्यासारखा हा सृष्टिक्रम अव्याहत चालतो. उदयअस्त हे जसे स्वाभाविकपणे अखंड होतजात असतात, त्याप्रमाणे जन्ममृत्यूसुद्धा होतजात असतात. त्यांच्यावर कोणी नियंत्रण ठेवू शकत नाही. महाप्रलयकाली या त्रैलोक्याचाही संहार होतो. म्हणून या जगालाही आदी व अंत आहेच! हे जर तुला पटत असेल, तर, हे धनुर्धरा! खेद का करतोस! हे माहीत असूनही अडाण्यासारखा का वागतोस!"

एथ आणिकही एक पार्था। तुज बहुतीं परी पल्हांतां।
दुःख करावेयां सर्वथा। विषो नहीं।।२-१६३।।
जैं समस्तें इयें भूतें। जन्माआदिं अमूर्तें।
मग पातलीं व्यक्तींतैं। जन्मलेयां।।१६४।।
तियें क्षयां जेथ जाती। तेथ निभ्रांत आनें नव्हती।
देखें पूर्वस्थितीच एंति। आपुलियें।।१६५।।

"कितीही प्रकारे विचार केला, तरी तू शोक का करावा हे कळत नाही. अजून असे पहा की ही समस्त भूते जन्माआधी निराकार असतात. जन्म होऊन ती व्यक्त दशेत येतात. त्यांचा जेव्हा नाश होतो, तेव्हा ती काही वेगळी होत नाहीत. त्याच त्या अव्यक्त अशा आपल्या पूर्वदशेस ती पुनरपि जाऊन पोहोचतात."

"अवीट तैं पाहीं। चैतन्य एक"

व्यक्त दशेचा लोप म्हणजे मृत्यू. तर त्याविषयी शोक तो का करायचा! म्हणून पुढे श्रीकृष्ण असेही सांगतात कीः

एर मध्यें प्रतिभासें। तैं निद्रितां स्वप्न जैसें।
तैसा आकारु हा मायावशें। सत्स्वरूपीं।।२-१६६।।
ना तऱ्हीं पवनें स्पर्शिलें नीर। पढियासे तरंगाकार।
कां परापेक्षां अलंकार-। व्यक्तीं कनकीं।।१६७।।
तैसें सकल हें मूर्त। जाण पां मायाकारित।...।।१६८।।

"अव्यक्तातून व्यक्त रूपात जे मध्यंतरी दृश्यमान होते, ते निद्राधीन व्यक्तीला पडणाऱ्या स्वप्नासारखे असते. मायेमुळे सत् स्वरूपाठायी हा जगदाकार भासतो. पण तो स्वप्नवत मिथ्याच असतो. वाऱ्याने स्पर्शिलेले जळ तरंगाकार होते. पण जळापेक्षा तरंग

वेगळा नसतो. अथवा दुसऱ्यांच्या इच्छेमुळे सुवर्णाचा आकार अलंकारामध्ये परिवर्तित होतो. तरीही अलंकार सोन्यापेक्षा भिन्न द्रव्याचे नसतात. याचप्रमाणे हे सकल मूर्त विश्व म्हणजे मायेमुळे सत् तत्त्वाचा परिवर्तन पावलेला आकार आहे. त्यात व त्या मूळ तत्त्वात यत्किंचितही भेद नाही."

...। जैसें आकाशीं बिंबत। अभ्रपटल।।२-१६८।।
तैसें आदिचि जैं नाहीं। तेयालागीं तूं रुदसीं कायी।
तूं अवीट हें पाहीं। चैतन्य एक।।१६९।।

"आकाशावर अवचित अभ्रपटल येऊन ते दिसेनासे होते. पण म्हणून काय आकाश लोप पावते का! अथवा अभ्रपटलासच कोणी आकाश समजून बसले व अभ्र वितळल्यानंतर आकाश नाहीसे झाले म्हणून विलाप करू लागले, तर त्यास काय म्हणावे! हे जगत व त्यातील मनुष्यमात्रे ही मुळातच जशी दिसतात, तशी नाहीत. त्यांच्याठायी तू निर्विकार चैतन्य पहा. म्हणजे या मूर्त आकाराच्या नाशाच्या कल्पनेने तुला जो शोक होत आहे, तो नाहीसा होईल. त्या चैतन्याचा तू ध्यास घे."

जेयांचि आर्त्ती चि भोगीत। विषइं त्यजिलें संत।
जेयांलागीं विरक्त। वनवासिये।।२-१७०।।
दिठी सूनि जेयांतैं। ब्रह्मचर्यादि व्रतें।
मुनीश्वर तपातैं। आचरति।।१७१।।

"संतांच्या अंतःकरणात त्याच्या प्राप्तीची इच्छा उपजताच विषय त्यांना सोडून जातात. त्या चैतन्याच्या आसेने सुजन अरण्यवास पत्करतात, विरक्ती स्वीकारतात. त्याच्यावर लक्ष ठेवून मुनिमहात्मे ब्रह्मचर्यादी व्रते व तपे आचरतात. ते चैतन्य असे महान आहे. तुला पण त्याच्या प्राप्तीची ओढ लागू दे. म्हणजे हे विषय - कामना - मोह - सुख - दुःख यांचे जाल नाहीसे होईल."

चैतन्याचा साक्षात्कार

चैतन्याची महती वर्णित श्रीकृष्ण पुढे म्हणतातः

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन-
माश्चर्यवद्वदति तथैव चान्यः।
आश्चर्यवच्चैन्यमन्यः शृणोति
श्रुत्वाऽप्येनं वेद न चैव कश्चित्।।२-२९।।

"या चैतन्याचे दर्शन अभूतपूर्व असते. ज्यांना ते होते, ते आश्चर्यचकित होऊन स्तब्ध होतात.त्यातूनही काही जण त्याविषयी मोठ्या आश्चर्यजनक गोष्टी सांगतांना पुनरपि त्या चैतन्यतत्त्वाशी तल्लीन होऊन जातात. कोणी महात्मे त्या आश्चर्यजनक वार्तांचे श्रवण करत आनंद उपभोगतात. पण इतरांस मात्र त्या गोष्टींचे श्रवण करूनसुद्धा चैतन्य कसे आहे, ते आकळून येऊ शकत नाही. कारण ***चैतन्यदर्शन हेच प्रमुख आहे. साक्षात्कार हा त्याचा मार्ग आहे."***

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि।।२-३०।।

"असे हे चैतन्य सर्व देहांतरी वसत असते. ते अवध्य आहे. देहाचा घात झाला तरी त्याचा घात होत नाही. म्हणून कोणत्याही प्राण्याचा देह पतन पावला, तरी त्याचा शोक कोणीही करू नये. या कौरवांविषयी पण असा शोक तू करू नयेस."

साक्षात्कारी पुरुषांची अनुभूती

आचार्य श्रीशंकरांनीसुद्धा *श्लोक क्र.२-२९* चा अर्थ दोन प्रकारे केला आहे. या श्लोकाचा भावार्थ काय असावा याबाबत निश्चित एकवाक्यता नाही. ज्ञानेश्वर मात्र या श्लोकाचा वर दिलेल्यापेक्षा वेगळाच अर्थ घेत काय सांगतात, ते पाहाः

एक आंतरीं निश्चल। जैं निहालितां केवल।
विसरलें सकल। संसारजात।।२-१७३।।
एकां गुणानुवाद करितां। उपरति होऊनि चित्ता।
निरवधि तल्लीनता। निरंतर।।१७३।।
एक आइकतां चि निवालें। तैं देहभावीं सांडिलें।
एक अनुभवें पातलें। तद्रूपता।।१७४।।

"ध्यानयोगाने अंतःकरणास प्रशांत करणारे योगिजन त्या चैतन्यास न्याहाळत बसतात व सर्व संसाराचा पसारा त्यांना दिसेनासा होतो. त्या चैतन्याचे साक्षात्कारी पुरुषांनी केलेले वर्णन ऐकत असतांनाच काही मुमुक्षू जनांस शांती प्राप्त होते. ते देहबुद्धी सांडून देतात आणि कोणीकोणी अनुभूतिद्वारे त्याच्याशी तद्रूप होतात. कोणी एक त्याचे श्रुतींनी केलेले, संतांनी गायिलेले स्वरूपवर्णन ऐकताऐकता चित्तास उपरम होऊन निरंतर निःसीम तल्लीनतेने त्या चैतन्याशी रममाण होतात."

जैसें सरिता ओघ समस्त। समुद्रामाजीं मिलत।
परि माघौतें न समात। परतलें नाहीं।।२-१७५।।
तैसियां योगीश्वरांचियां मती। मिलणीसमें एकवटती।
परि जैं विचारुनि पुनरावृत्ति। भजतीचिना।।१७६।।

"समस्त सरितांचे प्रवाह समुद्रात जेव्हा जाऊन मिळतात,तेव्हा समुद्राने त्यांना समावून घेतले नाही, असे कधीतरी होते का! समुद्रात ते न समावल्याने परत फिरल्याचे कोणाच्या ऐकीवात तरी आहे का! या सर्व योगीवृंदांचे तसेच आहे. त्यांची बुद्धी आत्मसाक्षात्कार घडून येताच त्या चैतन्यात जी समावते, ती पुनः फिरून संसारात रत न होण्यासाठीच!"

जैं सर्वत्र सर्वहीं देहीं। जेयां करितांहीं घातु नाहीं।
तैं विश्वात्मकु तूं पाहीं। चैतन्य एक।।२-१७७।।
ययाचेनिचि स्वभावें। हें होंत जांत आघवें।
तऱ्हीं सांघैं काइं शोचावें। एथ तुवां।।१७८।।
यऱ्हवीं तऱ्हीं पार्था। तुज कां नेणों न गमें चित्तां।
परि कीडाल हें शोचितां। बहुतीं परीं।।१७९।।

"असे ते अनुपम चैतन्य सर्वत्र आहे. ते सर्व देहांत विराजलेले आहे. ज्याचा घात करण्याचा कोणीही कसाही प्रयत्न केला, तरी ज्याचा घात होऊ शकत नाही, असे ते चैतन्य विश्वात ओतप्रोत भरलेले आहे. त्यास तू ओळख. या चैतन्याच्या अंगच्या गुणधर्मांमुळेच हे जगत होते व त्याचा अंतही होतो. मग त्या जगताच्या एका नगण्य अंशाएवढ्या या कौरवांच्या विनाशाच्या विचाराने तुला व्यथित होण्याचे काय कारण, सांग बरे! हे पार्था! इतक्या परींनी विचार करूनसुद्धा तुझ्या मनाला हे का पटत नाही व तुझे चित्त अद्यापही शोकाकुल का आहे, हे मला उमजत नाही. पण हा असा शोक करणे फार वाईट आहे."

स्वधर्माचे पालन::::

स्वधर्माचे आमुख

असा शोक का करू नये त्याची आणखी काही कारणे देतांना श्रीकृष्ण म्हणतात:

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते।।२-३१।।

"स्वधर्माचा विचार करता तुला असे चंचल होणे योग्य नाही. कर्तव्य अशा या धर्माने प्राप्त होणाऱ्या युद्धापेक्षा क्षत्रियास श्रेय देणारे अधिक इतर काहीच नाही."

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम्।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम्।।२-३२।।

"हे पार्था! हे असे युद्ध तर प्रत्यक्ष स्वर्गाचेच द्वार आहे. हे तुझ्यासारख्या भाग्यशाली क्षत्रियांसाठी या कुरुक्षेत्री सहजच उघडले गेले आहे."

"दीपाधारें वर्ततां। नाडलिजे"

ज्ञानेश म्हणतात:

तूं अझुइं कां न विचारिसि। काइं हें चिंतितु आहासि।
स्वधर्मु तो विसरलासि। तरावें जेणें।।२-१८०।।
एया कौरवां भलतें जाहालें। अथवा तुजचि काईं पातलें।
कीं युगचि हें बुडालें। जन्हैं एथ।।१८१।।
तऱ्हीं स्वधर्मु एकु आहे। तो सर्वथा त्याज्य नोहें।
मग तरिजैल काइ पाहें। कृपालुपणें।।१८२।।

"अर्जुना! तू अजूनही नीट विचार कर. तुझा युद्ध न करण्याचा निश्चय चुकीचा आहे. स्वधर्मास विसरल्याने असा आत्मघातकी निर्णय तू घेतो आहेस. स्वधर्माच्या आधारानेच खरे तर मनुष्यमात्र हा भवसागर तरून जातात. या कौरवांचे काहीही होवो! अथवा तुझ्यावर कसाही प्रसंग ओढवो! किंवा अगदी युगांत का होईना या युद्धामुळे! परंतु स्वधर्म म्हणून जो सांगितला आहे, त्याचा मुळीच त्याग करता कामा नये. अरे जर तू स्वधर्माचाच असा अविचाराने त्याग केलास, तर हा संसार तू कशाच्या साहाय्याने उत्तीर्ण करशील? तुझा हा दयाळुपणा सर्वथैव अनाठायी आहे."

अर्जुना तूझें चित्त। जऱ्हीं जाहलें द्रवीभूत।
तऱ्हीं हें अनुचित। संग्रामसमइं।।२-१८३।।
अगां गोक्षीर जऱ्हीं जाहलें। तऱ्हीं पथ्यासि नाहीं म्हणितलें।
ऐसेनिहीं विख नोहे सूदलें। नवज्वरीं देतां।।१८४।।
तैसें आनीं आन करितां। नाशु होईल हिता।
म्हणऊनि तूं आतां। सावध होईं।।१८५।।

"तुझे अंतःकरण जरी या सर्व योद्ध्यांच्या संभाव्य मृत्यूंमुळे द्रवले असले, तरी या युद्धप्रसंगी हे अनुचित आहे. हे पहा! गायीचे दूध म्हणजे जणू अमृतच! पण रोग्यास पथ्य पाळावयाचे असेल, तर त्या वेळी जर वैद्याने प्रतिबंध केला असेल, तर ते घेता येते का! इतउपर नवज्वर झालेल्या मनुष्याने ते अमृतोपम दूध प्यायले, तर ते विषतुल्य मारक ठरतेच ना! म्हणून वाटेल त्या वेळी वाटेल ते केल्याने स्वहिताचा नाशच होईल. तुझ्या अनाठायी दयाबुद्धीपासून सत्वर सावध हो."

वांयांचि व्याकुल काइं। आपुलां निजधर्मु तूं पाहीं।
जो आचरितां बाधु नाहीं। कव्हणीं कालीं।।२-१८६।।
जैसें मार्गेचि चालतां। अपावो न पवें सर्वथा।
कां दीपाधारें वर्ततां। नाडलिजे।।१८७।।
तेयपरी पार्था। स्वधर्में राहाटतां।
सकल कामपूर्णता। साहजें होय।।१८८।।

"व्यर्थ व्याकुळ होऊ नकोस. स्वधर्माचे पालन करणाऱ्यास केव्हाही दोष लागत नाही. सर्व लोक ज्या मार्गाने जातात, त्याने जाणाऱ्यास जसा काही धोका होत नाही; किंवा अंधाऱ्या जागी दिव्याच्या प्रकाशात वावरणाऱ्यास अडखळायला जसे होत नाही; त्याप्रमाणे, हे पार्था! स्वधर्माने वागले की आपल्या सकळ कामनांची पूर्ती होते. धर्म-अधर्म-काम-मोक्ष हे पुरुषार्थ स्वधर्माचे पाईक आहेत, हे तू विसरू नकोस."

संग्राम म्हणजे क्षत्रियांच्या पुण्यफलाचा उदय

म्हणौनि यालागीं पाहीं। तुम्हां क्षत्रियां आणिक कांहीं।
संग्रामावांचूनि नाहीं। उचित जाणैं।।२-१८९।।
निष्कपटा होआवें। उशिना घाइं जुंझावें।
हें असो काय सांघावें। प्रत्यक्षावेरीं।।१९०।।
अर्जुना जूझ देखैं आतांचें। हें हो काज दैव तुमचें।
कीं निधान सकलधर्माचें। प्रकटलें असे।।१९१।।
हा संग्रामु काइं म्हणिपे। कीं स्वर्गुचि येणें रूपें।
मूर्त्तु कां प्रतापें। उदो केला।।१९२।।

"म्हणून हे पाहा! तुम्हा क्षत्रियांना युद्धाशिवाय उचित असे इतर काही आहे का? निष्कपट मनाने युद्ध करावे. हल्ला झाला तर आवेशाने प्रतिहल्ला करून उत्तर द्यावे. मनापासून युद्ध करावे. हा क्षत्रियधर्म आहे. आणि अधिक काय सांगू! हे सांप्रत प्राप्त झालेले युद्ध म्हणजे तुझ्या प्रतापभानूचा उदय करवणारा असा हा युद्धप्रसंग आहे. ही तुला एक पर्वणीच आहे. तुमचे दैव अति प्रसन्न झाले आहे. सकळ

धर्माचे निधान येथे युद्धरूपे प्रकटले आहे. या युद्धास निव्वळ युद्ध असे कोण म्हणेल! याच्या रूपाने प्रत्यक्ष स्वर्गच येथे अवतरला आहे.

ना तऱ्हीं गुणाचेनि परिकरें। आर्त्तिचेनि पडिभरें।
हें कीर्त्तीचि स्वयंवरें। आली तुज।।२-१९३।।
क्षत्रिं बहुत पुण्य कीजे। तैं जूझ ऐसें लाठें लाहिजे।
जैसें मार्गे जातां आडलिजे। चिंतामणीं।।१९४।।
ना तऱ्हीं जांभया पसरें मुख। तेथ अवचटें पडे पियूख।
तैसा हा संग्रामु देख। पातला असे।।१९५।।

"तुझ्या गुणांवर लुब्ध झालेली ही युद्धरूपी कीर्तिदेवता उत्कटतेने तुला वरण्यासाठी स्वतः होऊन येथे प्रकटली आहे. क्षत्रियाने बहुत पुण्य केले कीच त्याला हा असा युद्धप्रसंग प्राप्त होतो. या युद्धरूपे तुझे जन्मोजन्मीचे पुण्यफलच उदित झाले आहे. वाटेने जातांना मनुष्य चिंतामणीला अडखळावा; किंवा जांभई देण्यास उघडलेल्या मुखात अवचित अमृत पडावे, तसा हा संग्राम तुला मोठ्या भाग्यानेच अनायासे लाभला आहे."

"निन्दन्तस्तव सामर्थ्यं"

युद्ध न करण्याने अर्जुनाची किती अपकीर्ती होईल, त्याचे पुढे श्रीकृष्ण स्पष्ट वर्णन करतात, ते असेः

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं सङ्ग्रामं न करिष्यसि।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि।।२-३३।।

"पण असा हा सहजगत्या लाभलेला युद्धाचा प्रसंग लाथाडून तू जर स्वधर्मविहित असे हे युद्ध न करशील, तर स्वधर्मपालन व कीर्ती या दोन्हींना मुकशील. त्यायोगे तुला पाप पण लागेल."

अकीर्तिं चापि भूतानि
कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्।
संभावितस्य चाकीर्ति-
र्मरणादतिरिच्यते।।२-३४।।

"हे सर्व लोक तुझी अपकीर्ति सर्वदूर सदासर्वदा पसरवत सुटतील; तुझ्यासारख्या प्रथितयश पुरुषाला अशा दुष्कीर्तीपेक्षा मरण परवडले."

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम्।।२-३५।।

"सर्व योद्धे तुझ्याकडे बहुमानाने आदरपूर्वक पाहातात. परंतु युद्ध न केलेस तर इतर महारथी तू भयाने रणांगण सोडून पळालास असे मानतील व सर्व शूर वीर तुला तुच्छ समजतील."

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः।
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम्।।२-३६।।

"तुझी असूया करणारे हे कौरव तुझ्याबद्दल भलभलते बोलतील. ते तुझ्या सामर्थ्याची टर उडवतील. यापेक्षा अधिक दुःखप्रद काही आहे का याचा नीट विचार कर."

युद्धाच्या अव्हेराने अपकर्ष

यावरची ज्ञानेशोक्ती अशी आहेः

आतां हा ऐसा अव्हेरिजे। मग नाथिलें शोचूं बैसिजे।
तऱ्हीं आपण आहाणा न होईजे। आपणपेयां।।२-१९६।।
पूर्वजांचें जोडलें। आपणचि होय धाडिलें।
जऱ्हीं आजि शस्त्र सांडिलें। रणीं इयें।।१९७।।
असती कीर्ती जाईल। जगचि अभिशापु देईल।
आणि गिंवसित पावतील। महादोख।।१९८।।
जैसें भातारेंहीन वनिता। उपहति पावे सर्वथा।
तैशीं दशा जीविता। स्वधर्मेवीण।।१९९।।

"असे हे प्राप्त युद्ध नाकारून, नाही त्या गोष्टींना मनात थारा देऊन त्यांचा शोक करत बसलास, तर स्वतःच आपला घात केला असे घडेल. आज जर तू शस्त्रत्याग करून हे रण त्यागलेस, तर पूर्वजांनी मिळवलेली धवल कीर्ती आपल्याच हातांनी घालवलीस, असा ठपका तुझ्यावर येईल. तुझी उज्ज्वल कीर्ती मलिन होईल व सगळे जग तुझी छीथू करील. सर्व महादोष तुझ्यावर तुटून पडतील. कारण पतिविहीन कांता जशी सर्वांकडून उपेक्षिली जाते, तशी स्वधर्मविहीन जीवाची दशा होते."

ना तऱ्हीं अरण्यीं शव सांडिजे। तैं चौम्हेरीं गिधीं विदारिजे।
तैसें स्वधर्महीन अभिभविजे। महादोखीं।।२-२००।।
म्हणौनि स्वधर्मु हा सांडसील। तऱ्हीं पापा वरपडा होसील।
आणि अपेश तैं न वचैल। कल्पांतावेरीं।।२०१।।
जाणतेनि तंवचि जियावें। जंव अपकीर्ति आंगा न पवे।
आणि सांघ पां केंवीं निगावें। ऐथौनियां।।२०२।।

"अरण्यात पडलेल्या प्रेतावर चोहो बाजूंनी झेपावून गिधाडे जसे त्याचे लचके तोडतात, त्याप्रमाणे स्वधर्महीन पुरुषावर महादोष झडप घालतात. म्हणून युद्ध करण्याचा स्वधर्म त्यागून तू निव्वळ पापाचा धनी होशील. भीरू म्हणून तुझी अपकीर्ती होईल आणि कल्पांत झाला तरी ती तुझी पाठ सोडणार नाही. अर्जुना! सज्जन पुरुषांनी जोवर अपकीर्ती आपल्या अंगास शिवली नाही, तोवरच जगावे. बरे! हे रण सोडून निघून जाऊ या असे तू म्हणतोस! पण ते तरी कसे शक्य आहे?"

"अर्जुन आम्हां बिहाला"

कारण असे आहे कीः

तूं निर्मछरु सदयता। येथूनि निघसी कीर माघौता।
परि तैं गति समस्तां। नैयें येयां।।२-२०३।।
हें चहूंकडूनि वेढितील। बाणवेरी घेतील।
तेथ न सुटिजैल। कृपालुपणें।।२०४।।
ऐसेनिहीं प्राणसंकटें। जऱ्हीं विपायें पां निगणें घटें।
तऱ्हीं तैं जियालेंहीं ओखटें। मरणाहूनि।।२०५।।

"तू यांचा मत्सर करण्याचे टाकून या दुष्ट कौरवांवर दया दाखवून या रणांगणातून मागे फिरू पाहशील, तर ते यांना चालणार नाही. एक तर तुझा निष्कपट हेतू त्यांना आकळणार नाही. आणि तूं युद्धासाठी शस्त्र हाती घेत नाहीस, हे पाहून अधिकच चेव येऊन ते तुझ्यावर बाणांचा वर्षाव करतील. त्यावेळी काही हा दयाळूपणा तुझ्या कामी येणो नाही. त्यातूनही एखादे वेळी तू येथून सहीसलामत निघून जाऊ शकलास, तरी ते जीणे मरणाहूनही वाईट असेच असणार!"

तूं आणिकही एक न विचारिसीं। एथ संभ्रमें जूझों आलासीं।
आणि सकणवपणें निघालासीं। माघौता जऱ्हीं।।२-२०६।।
तऱ्हीं तूझें तैं अर्जुना। एया वैरियां दुर्जना।
कां प्रत्यया येईल मनां। सांघैं मज।।२०७।।

"तू असाही विचार का करत नाहीस की मोठ्या अहमहमिकेने येथे युद्ध करावे, म्हणून जो तू आलेला आहेस, तो कणव उत्पन्न झाल्याने येथून परत फिरलास, तरी ते या दुर्जन कौरवांच्या मनाला खरे वाटेल काय! सांग बरे मला! ते तर असेच म्हणतील की *"पहा! पहा! हा अर्जुन मोठा शूर वीर म्हणवतो, पण तो तर आम्हाला भिऊन रणातून पळून गेला."* हा असा वृथा दोषारोप तुझ्यावर होईल. तो तुला आवडेल का?"

हें म्हणती गेला रे गेला। अर्जुनु आम्हांसि भियाला।
हा सांगें बोलु उरला। नीका काइं।।२-२०८।।
लोक सायासें करूनि बहुलें। कां वेंचिति आपुलीं जीवितें।
परि वाढविती कीर्त्तीतें। धनुर्धरा।।२०९।।
तैं तुज अनायासें। अनकलित जोडिली असे।
हें अद्वितीयत्व जैसें। गगन होय।।२१०।।

"हे धनुर्धरा! लोक प्रयत्नांची शर्थ करून आणि वेळ पडलीच तर आपल्या जीवाचे मोल देऊन कीर्ती मिळवितात. अशी कीर्ती आणि तीसुद्धा इतरांना हेवा वाटेल अशी निष्कलंक व संपूर्ण तुला दैवयोगाने अगोदरच मिळाली आहे. गगनाला जशी तुलना नाही, तशी तुझी कीर्ती पण अद्वितीय आहे. इतर कोणीही तुझ्याएवढा कीर्तिमंत नाही."

"जिंतलें तऱ्हीं भोगावें। पृथ्वीतल"

आणि असेही पाहा की:

तैसीं कीर्त्ति नि:सीम। तुझां ठायीं निरूपम।
तुझे गुण उत्तम। तिहीं लोकीं।।२-२११।।
दिगंतीचें भूपती । भाट होऊनि वाखाणिती।
जैं ऐकिलियां दचकती। कृतांतादिक।।२१२।।
ऐसा महिमा घनवट। गंगा जैसीं चोखट।
जेयां देखी जगीं सुभट। जाणतें जाहलें।।२१३।।
तैं पौरुष तुझें अद्भुत। आईकौनियां हें समस्त।
जाहलें आथि विरक्त। जीवितेंसीं।।२१४।।
जैसा सिंहाचियां हांकां। युगांतु होये मदमुखा।
तैसा कौरवां अशेखां। धाकु तूझा।।२१५।।
जैसे पर्वत वज्रातैं। ना तऱ्हीं सर्प गरुडातैं।
तैसें अर्जुना हें तूंतैं। मानिती सदा।।२१६।।

"अशी निरुपम दिगंत कीर्ती तुला मिळालेली आहे. जगभरचे राजेसुद्धा तुझे भाट बनून तुझा महिमा गातात. तो ऐकून साक्षात कृतांतसुद्धा दचकतो. तुझी इतकी थोरवी आहे. तुझी कीर्ती गंगेसारखी पवित्र आहे. मोठेमोठे वीरसुद्धा तुझे नांव आदराने घेतात अन कित्ता गिरवू पाहातात. तुझ्या अद्भुत पौरुषाची धास्ती घेतलेल्या या कौरव वीरांनी तर आपल्या जीविताची आशाच सोडून दिली आहे. सिंहाची गर्जना कानी पडताच हत्तीला प्रलयकाळच ओढवला आहे, असे वाटते. पर्वतराज वज्राला जसे घाबरतात; अथवा सर्प जसे गरुडाचे भय बाळगतात; त्याचप्रमाणे हे कौरव तुला पाहून भयभीत झालेले आहेत."

तैं अगाधपण जाईल। मग हिणाओ आंगां येईल।
जऱ्हीं माघौता निघसील। न जुंझतांचि।।२-२१७।।
आणि हें पलतां पलों नेदिती। धरूनि अवकला करिती।
न गणीत कुटी बोलती। आईकतां तुज।।२१८।।
मग तैं वेलीं हियें फुटावें।
आतां लाठेपणें कां न जुंझावें।..।।२१९।।

"तू येथून युद्धविन्मुख होऊन परतू लागलास तर तुझे हे अगाधपण जाईल; तुला कमीपणा येईल. आणि हे कौरव तुला तसे पळून पण जाऊ देणार नाहीत. तुला धरून आणतील आणि तुझे धिंडवडे काढतील. तुला ते इतके अपमानास्पद बोलतील की ते ऐकून तुझे हृदय शतधा विदीर्ण होईल. तुझी दयाबुद्धी कोणालाही कळणार नाही. उलट पळपुटा भित्रा शेंदाडशिपाई म्हणून तुला हिणवले जाईल. त्यापरीस या समयी शौर्य गाजवून युद्ध का करू नये!"

"नैवं पापमवाप्स्यसि"

श्रीकृष्ण अर्जुनाची समजूत काढत पुढे म्हणतात:

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय:।।२-३७।।

"समर करत असता धारातीर्थी पडलास, तर तुला स्वर्गप्राप्ती निश्चितच आहे. आणि विजय मिळवलास तर या अपरिमित पृथ्वीचे राज्य उपभोगायला मिळेल. म्हणून हे अर्जुना! इतर बाष्कळ विचार टाकून उत्साहाने युद्धास सज्ज हो."

सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि।।२-३८।।

"सुखदु:ख, पापपुण्य, लाभहानी ही सर्व सारखीच मानून क्षात्रधर्मासच श्रेष्ठ समजून युद्ध कर. म्हणजे तुला कोणतेच पाप लागणार नाही."

युद्ध जिंकलेस तर निर्वैर अशा पृथ्वीचा उपभोगही मिळेल, तरी क्षात्रधर्माला स्मरून अर्जुनास युद्ध कर असे श्रीकृष्ण म्हणत आहेत.

स्वधर्माचरण दोषास्पद नसते

ज्ञानेश म्हणतातः

...। हें जिंतलें तऱ्हीं भोगावें। पृथ्वीतल।।२-२१९।।
ना तऱ्हीं रणीं एथ। जूझतां वेचिलें जीवित।
तऱ्हीं स्वर्गसुख अनकलित। पावसील।।२२०।।
म्हणौनी इये गोठीं। विचारुं न कीजे किरीटी।
आतां धनुष्य घेऊनि उठी। जूझैं वेगीं।।२२१।।
देखें स्वधर्मु हा आचरितां। दोषु नाशे असतां।
तुज भ्रांती हें कवणि चित्तां। एथ पातकाची।।२२२।।

"अर्जुना! या रणांगणात युद्ध करत असतांना जर तुझे प्राण खर्ची पडले, तर अनायासेच तुला अवीट अशा स्वर्गसुखाची प्राप्ती होईल. कारण क्षत्रियाने युद्धकर्तव्य करत देह ठेवला, तर अमाप पुण्य मिळते. म्हणून आता निष्क्रिय विचार पुरे! हे किरीटी! धनुष्य उचलून प्रत्यंचेचा टणत्कार करत युद्धासाठी सरसावून पुढे हो! स्वधर्म आचरत असता जी कर्मे घडतात, त्यांचा नाममात्रदेखील दोष लागत नाही. एवढेच काय! असणाऱ्या पातकांचा पण निरास होऊन जातो! मग तुला पापाची भीती बाळगण्याचे काय कारण!"

निष्काम कर्माचा संदेश

त्याचप्रमाणे त्याला ***निष्कामकर्मा***चाही संदेश देण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. या अगोदर ***साङ्ख्य तत्त्वज्ञान*** निवेदून झालेच आहे. असो. तो संदेश असाः

सांघैं प्लवेंचि काय बुडिजे। कां मार्गीं चालितां आडलिजे।
परि विपायें चालों नेणिजे। तऱ्हीं तैंहीं घडे।।२-२२३।।
अमृतें तऱ्हींचि मरिजे। जऱ्हीं विखेंसीं सेविजे।
तैसा स्वधर्मु दोखु पाविजे। हेतुकपणें।।२२४।।
म्हणौनि तुज पार्था। हेतु सांडौनि सर्वथा।
क्षात्रवृत्ती जूझतां। पाप नाहीं।।२२५।।

"सांग बरे! नावेत बसलेला बुडेल काय! किंवा राजमार्गाने चालणाऱ्यास कधी ठेच लागते का! पण नावेतील माणसांनी वेडावाकडा धांगडधिंगा घातला, तर नावही उलटते. धड चालतांना येत नसेल, तर चांगल्या रस्त्यावरही माणूस अडखळून पडू शकतो. त्याचप्रमाणे स्वधर्म पालन करतांना जर फलाशा ठेवून कर्तव्यकर्म केले, तर मात्र दोष लागतो. म्हणून हे पार्था! ***सर्व प्रकारच्या फलाशांचा त्याग करून क्षात्रधर्मानुसार युद्ध केलेस, तर पाप कदापिही लागणार नाही."***

"आतां जूझावें। निभ्रांत तुवां"

सुखीं संतोखां नैयावें। दुःखीं विखादा न भजावें।
आणि लाभालाभ न धरावें। मनामाझिं।।२-२२६।।
एथ विजयपण होईल। कां सर्वथा देह जाईल।
हें आदींचि कांहीं पुढैल। चिंतावेना।।२२७।।
आपणपेयां उचितां। स्वधर्मातैंचि राहटतां।
जैं पावें तैं निवांता। साहौनि जावें।।२२८।।
ऐसियां मनें होआवें। तऱ्हीं दोषु न घडे स्वभावें।
म्हणौनि आतां जूझावें। निभ्रांत तुवां।।२२९।।

"कारण मनुष्याने आपले विहित कर्म करत असता कधीही फलावर दृष्टी ठेवू नये, हा खरा धर्म आहे. स्वधर्माचरण करत असतांना सुख प्राप्त झाले, तरी त्यामुळे हुरळून जाऊ नये. तसेच दुःख प्राप्त झाले, तरी विषाद करू नये. लाभ व्हावा किंवा हानी होऊ नये अशी इच्छा पण मनाने करू नये. युद्ध हे कर्तव्य म्हणून करावयाचे आहे. म्हणून विजयाचे मनोरथ उभारू नयेत; तसेच देह पडल्यास त्याची पण चिंता करू नये. आपल्याला पूर्वसूरींनी उचित म्हणून सांगितलेला हा जो *स्वधर्म* आहे, त्याचे पालन करत असता जी काही सुखे वा दुःखे, लाभ वा हानी, इ.प्राप्त होतील, ती निवांतपणे भोगावीत. त्यांच्यामुळे चित्ताची चलबिचल होऊ देऊ नये. अशी जेव्हा आपण मनाची तयारी ठेवतो, तेव्हा काहीही घडले तरी आपणास कोणतेही पाप लागत नाही. तेव्हा फलाशेचा त्याग करून तू स्थिरचित्ताने हे युद्ध खुशाल कर."

समारोप

याप्रमाणे ***साङ्ख्यांचा संदेश*** भगवंतांनी अर्जुनास सांगितला. ***निष्काम कर्म करावे*** हा उपदेश करत हा उन्मेष समाप्त होत आहे. यानंतरचा *कर्मपथ* पुढील **उन्मेष क्र.४०-कर्मपथ-२** यातून दृष्टिपथात येईल. तर वळू या तिकडे!

::उन्मेष ४०::
::कर्मपथ-२::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४०:

गीताः
२:३९-७२
६:१२,२०,२३,२४,२६,३५,४५
१४:६
ज्ञानेश्वरीः
२:२३०-३३७,३४२-३७०
पा.यो.सू.:
१:१,३-१४

::उन्मेष ४०::
::कर्मपथ-२::

बुद्धियोग::::

सांङ्ख्यबुद्धीचा समारोप

सांङ्ख्यबुद्धीचा समारोप व बुद्धियोगाचे आमुख करत भगवंत म्हणतातः

एषा तेऽभिहिता साङ्ख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रुणु।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि।।२-३९।।

"आतापावेतो तुला साङ्ख्य तत्त्वज्ञान व कर्म करण्याची त्याची युक्ती जो ***साङ्ख्ययोग*** म्हणून प्रसिद्ध आहे, तो सांगितला. आणि आता ***बुद्धियोग*** सांगतो, तो ऐक. ज्या बुद्धीने युक्त होऊन कर्मे केल्यास ती बंधनकारक होत नाहीत, असा मुक्तिप्रद योग सांगतो."

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।२-४०।।

"ज्या मार्गाने जाऊन केलेल्या शुभकर्मांचा कधीच नाश होत नाही, ज्या मार्गात संकटे प्राप्त होत नाहीत, असा हा योग आहे. या योगाचे थोडेही अनुष्ठान घडले, तर ते महान अशा या संसारभयापासून मनुष्याचे रक्षण करते.

बुद्धियोग वा कर्मयोग

ज्ञानेश सांगतातः

हें सांख्यस्थिती मुकुलितु। सांघितलीं तूझ एथु।
आतां बुद्धि योगिं निश्चितु। अवधारीं पां।।२-२३०।।
जेयां बुद्धि युक्तां। जाहालिया पार्था।
कर्मबंधु सर्वथा। बाधुं न पावें।।२३१।।
जैसें वज्रकवच लेईजे। मग शस्त्रांचा वर्षाव साहिजे।
परि जैतेंसि उरिजे। अचुंबितां।।२३२।।
तैसें इहिक तऱ्हीं न नशें। आणि मोक्षू तो उरला असे।
जेथ पूर्वानुक्रम दिसें। चोखालत।।२३३।।

"आतापावेतो ***("अशोच्यानन्वशोचस्त्वं ....।।२-११।।" ते "देही नित्यमवध्योऽयं ....।।२-३०।।"या श्लोकांतून)*** तुला *साङ्ख्य तत्त्वज्ञान* निरूपिले. त्यानंतर *स्वधर्म* म्हणजे काय तो समजावून दिला. तसेच व्यवहारही सांगितला. आतां *बुद्धियोग* म्हणजे नक्की काय, ते ऐक. कर्मे करणे टाकून देता येत नाही. जन्मलेल्या प्रत्येकास कर्म करणे अटळ आहे. कर्म फलाशा निर्माण करते. त्यातून मनुष्य वासनेच्या चक्रात गुंतत जातो. जन्ममरणाचा फेरा त्यास पडू लागतो. कर्म केल्याविना मनुष्याचा एकही क्षण जाऊ शकत नाही. म्हणून तुला अशी बुद्धी सांगतो की जिच्याशी युक्त झाला असता मनुष्यास कर्मबंधन मुळीच होत नाही. जसे वज्रासमान टणक कवच अंगात घातले असता शस्त्रांचा वर्षाव सहज सहन करता येतो व शरीरावर एकही घाव न होता विजयश्री अचूक मिळते; त्याप्रमाणे पूर्वापार चालू असणारे कर्म विशुद्धरीत्या करत राहण्याचा मार्ग ऐक.

कर्माधारें तरि राहटिजे। परि कर्मफल न निरिक्षिजे।
जैसा मंत्रज्ञु न बधिजे। भूतबाधा।।२-२३४।।
तियांपरी जैं सुबुद्धि। आपु जालेयां निरवधि।
हां असतांचि उपाधि। आकलूं न सकें।।२३५।।
जेथ न संचरें पुण्यपाप। जैं सूक्ष्म अति निष्कंप।
गुणत्रेयादि लेप। न लगती जेथ।।२३६।।
अर्जुना तैं पुण्यवशें। जऱ्हीं अल्पचि हृदइं बुद्धि प्रकाशें।
तऱ्हिं अशेखहीं हें नाशें। संसारभय।।२३७।।

"या मार्गाने गेले असता ऐहिकाचा लाभ मिळतोच आणि वर मोक्ष तर ठेवलेलाच आहे. कर्मांस न त्यागता ती करत राहावीत. पण कर्मफलाची इच्छा ठेवू नये. म्हणजे ज्याप्रमाणे मंत्र जाणणाऱ्यास भूतबाधा होत नाही, त्याप्रमाणे अशी सुबुद्धी असणाऱ्यास कर्मात राहूनही कदापिही उपाधीची म्हणजे संसाराची बाधा होत नाही. अशी जी ही सद्बुद्धी असते, ती अत्यंत सूक्ष्म व निश्चल असते. पापपुण्यांचा तिच्याठायी प्रवेश होत नाही. त्रिगुणांनी ती लिप्त होत नाही. अर्जुना! कोटिकोटी जन्मांच्या पुण्यवशात जेव्हा अशी बुद्धी अल्प का होईना, हृदयी प्रकटते, तेव्हा संसारभय पूर्णपणे नष्ट होते. असे त्या सद्बुद्धीचे महिमान आहे."

गीतेत योग आहेत तरी किती!

कर्मयोग, कर्मयोग म्हणून जो गौरवला जातो, त्याचा प्रारंभ असा या गीतेच्या *श्लोक क्र. २-३९ व ४०* यांपासून होतो. ***बुद्धियोग*** म्हणून येथे त्या योगाचे नांव आहे. गीतेत अनेक योगप्रकार वर्णिले आहेत, असे ज्यांचे म्हणणे आहे, त्यातील काही या बुद्धियोगास कर्मयोगापेक्षा वेगळा समजू शकतात. काही मान्यवरांनी आपली बुद्धी गीताध्यायांच्या प्रचुर नामांशी निगडित केली असल्यास त्यांना गीतेत *विषादयोग* सुद्धा योगाचा एक प्रकार म्हणून दिसला, तर आश्चर्य वाटून घेऊ नये!

अध्यायनामांनुसार गीतेत कमीत कमी अठरा योग तरी मग धरले पाहिजेत. ***"सर्वगीतार्थसंग्रहयोग"*** असे अठराव्या अध्यायास काहींनी म्हटले असल्याने *"सर्व गीतेचा अर्थ संग्रह करणारा"* असाही एक योगप्रकार मग संभवेल, नाही का! त्याव्यतिरिक्त भगवंतांनी *योग* शब्द जोडून जे जे शब्द वापरले आहेत, त्यांच्याप्रमाणे अजूनही *न भूतो न भविष्यति* असे अनाहूत योगप्रकारसुद्धा मग असले पाहिजेत, असाही कोणा प्रांजळ जिज्ञासूचा गैसमज होऊ शकेल!

याबाबत पूर्वी पण आपण एकदा उहापोह केला होता आणि पुनश्च *अठराव्या* अध्यायात जेव्हा आपण *क्रमयोगसोपान* पाहू, तेव्हाही या विषयाची थोडी चर्चा करावी असा मानस आहे. तसेच सध्या गीतोक्त ***बुद्धियोग*** हा जो शब्द आपण वापरला आहे, त्याचे दोन अर्थ आहेत, हेही ध्यानात घेणे आवश्यक आहे - एक म्हणजे *बुद्धीचा योग* व दुसरा म्हणजे *योगाची बुद्धी* . ज्ञानेश्वर व श्रीशंकराचार्य दुसराच अर्थ घेतात व *"बुद्धियोगे"* याचा अर्थ *योगप्रवर्तक बुद्धी* असाच करतात, हे आपण लक्षात घ्यावे. असो

सद्यः **गीतेचा हा जो परिवर्तन बिंदु (Turning Point) आहे, जेथून वास्तविक पाहता अर्जुनाला अध्यात्माचा प्रयोग शिकवला जात आहे - तत्त्वज्ञानाची अनुभूती प्रत्यक्षात कशी घ्यावी, याचा योगमार्ग विशद करण्यास सुरुवात होते आहे** - त्याठायी श्रीमच्छंकराचार्यांनी जे मत नोंदविले आहे, त्याचा आपण परामर्ष घेऊ या. म्हणजे या *अनेकानेकयोगनामे* योगाचा सत्य परिचय घडून येण्यास मदत होईल.

श्रीशाङ्करमते गीतेतील योग दोनचः:::

(१) साङ्ख्यांचा ज्ञानयोग

"स्वधर्ममपि चावेक्ष्य... ।।२-३१।।" इ.श्लोकांद्वारे श्रीकृष्णांनी शोक व मोह दूर सारून अर्जुनाने प्राप्त युद्ध केले पाहिजे, याची व्यावहारिक कारणे दिली आहेत. त्यांचा परमार्थाशी कोणताही संबंध नाही. खरे तर **परमार्थदर्शन** हाच गीतेचा विषय आहे. ***गीताशास्त्र*** याचसाठी सांगितले गेले आहे. त्या शास्त्राचा एक विभाग ***"एषा तेऽभिहिता... ।।२-३९।।"*** या श्लोकापर्यंत सांगून झाला आहे. त्यास **साङ्ख्य** असे नामकरण भगवंत करतात. ***"ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"*** अशा द्विविध निष्ठा गीता सांगते. म्हणून ***साङ्ख्य अर्थात परमार्थविषयक वस्तूचे ज्ञान वा बुद्धी***, ती ओळखता यावी म्हणून सांगून झाले आहे. हे ज्ञान ***साङ्ख्य*** म्हणून सुप्रसिद्ध आहे आणि शोकमोहादी संसारात पाडणारे जे दोष आहेत, त्यांची निवृत्ती या ज्ञानाने होते.

(२) योग्यांचा कर्मयोग

परंतु ***हे परमार्थावस्थेचे ज्ञान वा ही साङ्ख्यबुद्धी प्राप्त करण्यासाठी साधन म्हणून योग सांगण्यास पुढे सुरुवात होत आहे.*** आसक्तिरहित होऊन सुखदुःख इ. द्वंद्वांना त्यागून ईश्वराराधना करण्यासाठी केले जाणारे जे कर्म आहे, ते कसे करावे, हा या **कर्मयोगा**चा विषय आहे. या योगानेच समाधी प्राप्त होतो. असा हा योग बुद्धीवर आधारित आहे. त्या योगबुद्धीच्या द्वारे पापपुण्यात्मक अशा कर्मरूप बंधनाचा ईश्वरप्रसादाने होणाऱ्या ज्ञानप्राप्तिद्वारे नाश होतो. हा जो योग आहे, त्याचे विपरीत फल कदापिही प्राप्त होत नाही. हा योग आरंभला की पूर्णत्वास हमखास जातो. कारण त्याचा कधीच नाश होत नाही. या कर्मयोगरूपी धर्माचे अल्पस्वल्प अनुष्ठान केले तरी ते संसारभयापासून मुक्ती मिळवून देतेच देते! हा योग अनुष्ठिण्यास साहाय्यभूत होणाऱ्या बुद्धीस ***व्यवसायात्मिका बुद्धी*** असेही नांव गीता देते *(श्लोक क्र.२-४१)*.

गीतेत खरा योग एकच

श्रीशंकराचार्यांच्या उपरोक्त खुलाशावरून निश्चित असे दिसून येते की ***साङ्ख्ययोग*** हासुद्धा कोणता तरी वेगळा योग आहे, असे नाही. *साङ्ख्ययोग* हे *तत्त्वज्ञान* (Philosophy)आहे. आत्म्याचे अविनाशित्व इ.विचार त्यात केलेला आहे. तो आपण यापूर्वी *श्लोक क्र.२-११ ते २-३०* यांनिमित्त पाहिला आहे. पण हे तत्त्वज्ञान ऐकून वा वाचून त्याची अनुभूती घेणे दुरापास्त आहे.

जे कोणी महाभाग्यवान या तत्त्वज्ञानाची ओळख होताच त्याची अनुभूती प्राप्त करू शकतात, ते अत्यंत दुर्लभ आहेत. किंबहुना गतजन्मींच्या योगसाधनेमुळे परिपक्व झालेल्या योगबुद्धीचा ठेवा घेऊन ते जन्माला आले असले पाहिजेत. म्हणून अधिक काहीही न करताच त्यांना या जन्मी त्या योगाचरणाचे उपजतच असे पूर्ण फल मिळाले असावे. शुकासारखे असे महात्मे सोडले, तर इतरांना ते ज्ञान विनासायास प्राप्त होणे अशक्यच म्हणावे लागेल.

म्हणून हे साङ्ख्यज्ञान - हे आत्मज्ञान - हे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष प्राप्त व्हावे, त्याची अनुभूती यावी, साक्षात्कार घडावा यासाठी कर्मयोगाचा प्रशस्त मार्ग गीतेद्वारे भगवंतांनी उपदेशिला आहे. *ईश्वराराधना* हा या मार्गाचा उद्देश आहे. ईश्वरास प्रसन्न करून घेऊन ते अद्भुत ज्ञान मिळवावे व त्या ज्ञानामुळे आपोआप मुक्ती प्राप्त व्हावी म्हणून या कर्मयोगाचे प्रयोजन आहे, असे मत आपणास आद्यश्रीशंकराचार्यांच्या वर उल्लेखिलेल्या स्पष्टीकरणावरून प्रतीत होते. असो.

या योगाचे आचरण कसे करावे, त्याचा अभ्यास कोणकोणत्या प्रकारे करावा, हा भाग उर्वरित गीता सांगते. तसेच हा योग सिद्ध झाला की त्याच्या फलस्वरूप जे ज्ञान प्राप्त होते, जी जीवन्मुक्तदशा प्राप्त होते, त्या जीवन्मुक्तांची चर्या कशी असते, हे वर्णनसुद्धा गीतेत प्रसंगोपात्त येत राहते. योगसाधकांसाठी विहित चर्या सांगण्याच्या उद्देशाने त्यांच्या अंतिम गंतव्याची उद्बोधक माहिती व हे गंतव्य प्राप्त केलेल्या योगसिद्धांचे वर्णन गीता करते. हा पूर्वापर संबंध जिज्ञासूंनी ध्यानी घेतला म्हणजे गीतार्थापासून ते यत्किंचितही दूर जाणार नाहीत, याची खात्री बाळगता येते. असो. आता मूळ विषयाकडे वळू या.

व्यवसायात्मिका बुद्धी

सद्बुद्धी वा कर्मयोग्याची बुद्धी कशी असते, त्याविषयी गीता सांगतेः

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम्।।२-४१।।

"ईश्वराराधनेस वाहिलेली अशी जी *व्यवसायात्मिका बुद्धी* असते, ती एकाग्र असते. पण हे कुरुनंदना! तद्व्यतिरिक्त अशी विषयोपभोगांना

कवटाळणारी जी *अव्यवसायात्मिका बुद्धी* आहे, तिला अनंत वासनांच्या शाखा असतात."

व्यवसायात्मिका बुद्धीचे स्वरूप विशद करत ज्ञानदेव सांगतातः

जैसी दीपकलिका धाकुटी। परि बहु तेजातैं प्रकटी।
तैसी सद्बुद्धि हें थेंकुटीं। म्हणों नैयें।।२-२३८।।
पार्था बहुतें परी। हें अपेक्षिजे विचारशूरीं।
जैं दुर्लभ चराचरीं। सद्वासना ।।२३९।।
आणिकासारिखा बहुंवसु। जैसा न जोडें परिसु।
कां अमृताचां लेसु। दैवगुणें।।२४०।।
तैसीं दुर्लभ जैं सद्बुद्धि। जियें परमात्माचि अवधि।
जैसा गंगेसि उदधि। निरंतर।।२४१।।
तैसीं ईश्वरु वांचूनि कांइं। जियें आणिकिं लाणी नाहीं।
तैं एकचि बुद्धि पाहीं। अर्जुना जगीं।।२४२।।

"दीपज्योत लहान कळीएवढी असते. पण किती प्रकाश देते! ही कर्मयोगात प्रवृत्त करणारी सद्बुद्धी अशीच महान असते. तिला कधीही उपेक्षू नये. अर्जुना! बुद्धिमंत विवेकी पुरुष याच बुद्धीची इच्छा धरतात. कारण ही या सृष्टीत देवदुर्लभच आहे. इतर वस्तू विपुल मिळू शकतात. पण परीस सहसा हाती येत नाही; किंवा अमृताचा एक थेंब मिळायलासुद्धा दैवही तसेच बलवत्तर हवे. त्याचप्रमाणे परमात्म्याला जाऊन भेटणारी सद्बुद्धी अत्यंत दुर्लभ आहे. गंगेला जसे सागराशिवाय अन्य गंतव्य नाही, त्याप्रमाणे ईश्वराशिवाय अन्य कोठेही न स्थिरावणारी जी बुद्धी असते, तीच एकटी *सद्बुद्धी* म्हणून म्हटली जाते."

एरी तैं दुर्मति। जैं बहुधा असें विकरति।
तेथ निरंतर रमति। अविवेकियें।।२४३।।
म्हणौनि तैयां पार्था। स्वर्ग संसारीं आस्था।
आत्मसुख सर्वथा। दृष्ट नाहीं।।२४४।।

"अर्जुना! इतर प्रकारच्या बुद्धी म्हणजे बुद्धी नसून निव्वळ कुबुद्धी होत. अशी जी दुर्बुद्धी असते, ती अनेक प्रकारे विकरित होते. विकारग्रस्त अशा त्या बुद्धीने दाखवलेल्या विषयांच्या लालसेत अविवेकी पुरुष निरंतर रममाण होतात. म्हणून तर, हे पार्था! त्यांना कधीही आत्मसुख दृष्टीस येत नाही. त्यांना स्वर्ग, संसार व नरक यांच्या दुष्टचक्रात गुंतून राहवे लागते."

अविवेकी जनांची अव्यवसायात्मिका बुद्धी

असे लोक भलेही वेदोक्त पुण्य कर्मे कितीही करीनात का, त्यांना ईश्वर काही भेटत नाही. गीता म्हणतेः

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः।।२-४२।।

"हे पार्था! वेदोक्त कर्मांच्या भोग व ऐश्वर्यादी फलप्राप्तीच्या आशेने लुब्धावलेले अविवेकी मूढ जीवनाचे सुखोपभोगांव्यतिरिक्त अन्य कोणतेही साध्य नाही, असे समजतात. असे हे अर्थवादात रत झालेले लोक वेदांच्या पुष्पयुक्त वृक्षाप्रमाणे मनोहर दिसणाऱ्या वाणीस भुलून जाऊन तशी सांगितलेली सर्व कर्मे करण्यात तत्पर असतात."

कामात्मनः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम्।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति।।२-४३।।

"काम जिचा आत्मा आहे; जन्म हेच जिने सांगितलेल्या कर्मांचे फल आहे; स्वर्गप्राप्ती हाच जिचा हेतू आहे; भोग व ऐश्वर्य मिळवण्यासाठी जिने कर्मकाण्डाचा आटापिटा करायला सांगितले आहे; अशा त्या वेदोक्त मनोहर वाणीस भुललेले ते अज्ञ जन विषयभोग व ऐश्वर्य यांच्याठायी लोलुप होऊन त्या वाणीच्या प्रभावाखाली येतात"

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम्।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते।।२-४४।।

"अशा त्या भोग व ऐश्वर्य यांची आसक्ती असलेल्यांची विवेकबुद्धी हिरावली जाते. अशांच्या चित्तात *व्यवसायात्मिका बुद्धी* उदित होऊ शकत नाही."

वेद महान खरे! पण गीता त्यांना लोक देतात, तितके महत्त्व देत नाही. कारण लोक वेदातील आत्मतत्त्वास दुर्लक्षून कर्मकांडात गुंतून पडतात. याबाबत ज्ञानदेवांचे स्पष्टीकरण पुढे येणार आहे.

वेदांची पुष्पित वाणी

ते काय सांगतात, पहाः

वेदाधारें बोलिती। केवल कर्म प्रतिष्ठिती।
परि कर्मफलीं आसक्ति। धरूनियां।।२-२४५।।
म्हणती संसारीं जन्मिजे। यज्ञादि कर्म कीजे।
मग स्वर्गसुख भोगिजे। मनोहर।।२४६।।
एथ हें वांचूनि काइं। आणिक सर्वथा सुलभ नाहीं।
ऐसें अर्जुना बोलिती पाहीं। दुर्बुद्धि तैं।।२४७।।

"असे लोक आस्तिक असतात. ते वेदप्रामाण्य मानतात. पण वेदांतील निव्वळ कर्मकांडात्मक भाग जो आहे, त्याला अतिशय महत्त्व देतात. ज्ञानात्मक असा वेदांचा भाग ते साफ दुर्लक्षितात. मुळात वेद हे *धर्म, अर्थ, काम व मोक्ष* हे चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यासाठी आहेत, याचा त्यांना विसर पडतो. *अर्थ व काम* यांच्या प्राप्तीसाठी ते वेदोक्त धर्माचे पालन करतात. कर्मफलांची आसक्ती धरतात. त्यांचे म्हणणे असे आहे की मृत्युलोकी जन्म घेणे उत्तमच आहे. कारण यज्ञयागादी वेदोपदिष्ट कर्मे याच लोकी करता येतात. ती करून मनोहर, निरुपम असे स्वर्गसुख भोगावे. त्या स्वर्गसुखाशिवाय इतर कोणतेच सुख - आत्मसुखसुद्धा त्या लोकांना माहीत नसते. असे ते लोक दुर्बुद्धी असतात."

देखैं कामना अभिभूत। होऊनि कर्मे आचरित।
तैं केवल भोगीं चित्त। देऊनियां।।२-२४८।।
क्रियाविशेषें बहुतें। न लोपिति विधितैं।
निपुण होऊनि धर्मातैं। अनुष्ठिती।।२४९।।

"अर्जुना! कामनांचे दास होऊन व स्वर्ग इच्छित भोगात चित्त आसक्त झालेले ते लोक कर्मे करतात, त्यात बहुत सायास असतात. वेदविधी यत्किंचितही चूक होऊ न देता करण्यात ते अत्यंत दक्ष असतात. कारण त्याशिवाय अपेक्षित स्वर्गफल मिळणार नाही; उलट ऐहिकही नासेल या भीतीने वेदोक्त कर्मे अत्यंत चोखपणे असे लोक करत असतात."

"यज्ञपुरुषा चुकती"

परि एकचि कुडें करिती। जैं स्वर्गकामु मनीं धरिती।
यज्ञपुरुषां चुकतीं। भोक्ता जो।।२-२५०।।
जैसा कर्पूराचा राशि कीजैं। मग अग्नि लाऊनि जालिजैं।
कां मिष्टान्नीं संचरविजैं। कालकूट।।२५१।।
दैवें अमृतकुंभ जोडिला। तो पायें हाणूनि उलंडिला।
तैसा नासिती धर्म निफनला। हेतुकपणें।।२५२।।

"वेदोक्त धर्माचे मन:पूर्वक अनुष्ठान करून सर्वांगसुंदर अशी कर्मे ते जरी करत असले, तरी त्यांत एक अत्यंत मोठे न्यून असते. ते म्हणजे स्वर्गोपभोगांची लालसा बाळगून ही कर्मे अनुष्ठिली जातात आणि सर्व यज्ञांचा भोक्ता जो यज्ञपुरुष परमात्मा, त्याला मात्र ते हटकून विसरतात. धवलगौर कर्पूराची मनोहर राशी रचली व तिला पेटवून भस्म करून टाकले की काय उरते! मिष्टान्ने किती रुचकर असतात! त्यांच्यात काळकूट मिसळले की भोजन करणाऱ्याची काय गत होते! दैवयोगाने अमृताने परिपूर्ण भरलेला कुंभ हाती आला असता, तो लाथ हाणून उलंडणाऱ्यास काय म्हणावे! हे वेदांच्या अर्थवादाने भुललेले लोक पण असेच करतात. सर्वांगसुंदर कर्मे निपजवली, तरी फलेच्छेने व भोगलालसेने युक्त होऊन ती केली जात असल्यामुळे मिष्टान्नात जहर मिसळावे, तशी ती मारक ठरतात."

वैदिकांची दुर्बुद्धी

अशा वेदपटू आणि वेदपाठकांना उद्देशूनच संत श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले होते की ***"वेदांचा तो अर्थ आम्हांसिच ठावा। इतरांनी तो वाहावा। भार माथां।।"*** पुण्यकर्मांच्या वेदविधियुक्त राशी उभ्या करून त्याच्या मोबदल्यात वेदपुरुषाला न घेता, स्वर्गभोग स्वीकारणारे खरे तर ते पुण्य कर्पूराप्रमाणे जाळून नष्ट करतात. भक्तिनैवेद्याचे भरून आलेले ताट ते त्यात आपल्या अभिलाषांचे विष मिसळून नासवून टाकतात. अमृत असा परमात्माच त्या कर्मयोगे मिळणार असता, त्याला लाथाडून भवस्वर्गाचे गढूळ पाणी पीत बसणाऱ्या त्या महाभागांना शतश: प्रणाम!!

ज्ञानेश पुढे म्हणतात:

सायासें पुण्य अर्जिजें। मग संसारु कां अपेक्षिजे।
परि नेणति तैं काइं कीजैं। अप्राप्त देखैं।।२-२५३।।
जैसीं रांधवणी रससोय नीकीं। करूनियां मोलें विकी।
तैसा भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु।।२५४।।
म्हणौनि हे पार्था। दुर्बुद्धि देख सर्वथा।
तेयां वेदवादरतां। मनीं वसें।।२५५।।

"एवढ्या मोठ्या कर्मकांडांचे सायास करून पुण्य जोडावयाचे आणि त्याच्या जोरावर केवळ संसारच मागायचा! पण ते असे अज्ञानी असतात, त्याला काय करावे! त्यांची बुद्धीच तेवढी! उत्तम सुग्रास अन्न शिजवायचे कष्ट घ्यायचे आणि स्वत:साठी त्याचा अल्पसा भागसुद्धा न ठेवता द्रव्यासाठी सगळेच्या सगळे विकून टाकावयाचे, त्यास काय म्हणावे! हे अविवेकी मूढसुद्धा असाच भोगप्राप्तीसाठी उत्तम निफजवलेला धर्म विकतात. वेदवादरत अशा सर्व लोकांच्याठायी निव्वळ दुर्बुद्धीचा वास असतो."

सत्त्वाधिष्ठित उपनिषदे

गीता म्हणते:

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्योभवार्जुन।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्।।२-४५।।

"हे अर्जुना! वेद हे त्रिगुणमय कर्मांचे प्रतिपादक आहेत. म्हणून तू त्यांच्या त्रिगुणयुक्त कर्मकांडांपासून अलिप्त रहा. द्वंद्वातीत हो. नित्य सत्त्वाठायी आपली बुद्धी ठेवून रहा. उपभोगांच्या मागे लागू नकोस. वेदांपलीकडे जाऊन आत्मवंत हो."

तिहीं गुणीं आवृत्त। हें वेद जाण निभ्रांत।
म्हणौनि उपनिषदादि समस्त। सात्त्विक तैं।।२-२५६।।
एर रजतमात्मक। जेथ निरूपिजे कर्मादिक।
जैं केवळ स्वर्गसूचक। धनुर्द्धरा।।२५७।।
म्हणौनि तूं जाण। हें सुखदु:खांसि चि कारण।
एथ झनें अंतष्करण। रिगों देसिं।।२५८।।
तूं गुणत्रेयांतैं अव्हेरीं। मी माझें हें न करीं।
एक आत्मसुख आंतरीं। विसंब झणीं।।२५९।।

"वेद हे *सत्त्व-रज-तम* असे त्रिगुणात्मक आहेत, हे अगदी निर्विवाद आहे. त्यातील उपनिषदादी जो भाग आहे, तेवढा केवळ सात्त्विक असून उर्वरित सर्व वेदांग हे कर्मादींचे निरूपण करते. तो सर्व भाग निव्वळ रजतमात्मक आहे. हे धनुर्धरा! वेदांचा असा जो भाग आहे, तो केवळ स्वर्ग-मृत्युलोक-स्वर्ग यांच्यात मनुष्यास भ्रमंती करण्यास लावतो. कष्ट करा. धन मिळवा. त्या धनाने सुख उपभोगा. ते संपले की पुन: कष्ट करा! अशा पुनरावृत्तीचा मार्ग वेदांच्या कर्मकांडात्मक भागापासून प्राप्त होतो. हा मार्गच सुखदु:ख यांचे कारण आहे. म्हणून तू त्याच्यामध्ये चित्त गुंतू देऊ नकोस. अर्जुना! तू त्या गुणत्रयांचा स्वीकार करू नकोस. अहं व ममत्व यांचा त्याग कर आणि चित्तांतरी फक्त आत्मसुखाचाच विचार कर. त्या विचारास क्षणभरही विसंबू नकोस."

वेदांचे स्वल्पत्व

वेदांचा कुठला भाग स्वीकारावा याविषयी गीता स्पष्ट म्हणते:

यावानर्थ उदपाने सर्वतः सम्प्लुतोदके।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः।।२-४६।।

"सर्वत्र पाणी उपलब्ध असले, तरी आपली तहान भागेल, एवढेच पाणी आपल्या उपयोगाचे असते. त्याचप्रमाणे सर्व वेदांचा विचार करून आपणांस ज्ञानप्राप्तीसाठी जेवढा भाग आवश्यक असेल, तो ग्रहण करावा. सर्वात मोठा असा उदधी उपलब्ध असता, लहान कूपाची मनुष्यास जेवढी आवश्यकता भासते, तेवढीच ज्ञानसंपन्न ब्राह्मणास वेदोक्त अशा कर्मकांडाची वाटते."

या श्लोकाच्या अर्थाबाबत विद्वज्जनांत काही मतभेद आहेत. वर जो या श्लोकाचा भावार्थ दिला आहे, त्यात त्या दोन्ही मतांचा समन्वय साधण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. तरीही विद्वानांतील मतमतांतरांस तिलांजली अर्पण करत, आपण ज्ञानदेव या श्लोकाबाबत काय सांगताहेत, तेच मनी बिंबवू या:

"वेदार्थांतैं विचरति। अपेक्षित तैं स्विकारिति"

जर्‍हीं वेदें बहुत बोलिलें। विविध भेद सूचिलें।
तर्‍हीं आपण हित आपुलें। तैंचि घेपें।।२-२६०।।
जैसा प्रगटलियां गभस्ति। अशेखहीं मार्ग दिसति।
तर्‍हीं तेतुलें काय चालिजति। सांघैं मज।।२६१।।
कां उदकमय सकल। जर्‍हीं जाहलें असें महीतल।
तर्‍हीं आपण घेपें केवल। आर्त्तिचि जोगें।।२६२।।
तैसें ज्ञानियें जैं होती। तैं वेदार्थांतैं विचरिति।
मग अपेक्षित तैं स्विकरिति। शाश्वत जैं।।२६३।।

"वेद बोलका आहे. त्याने पुष्कळ प्रकारच्या गोष्टी, विधी, निषेध इ.सांगितले आहेत. आपण त्यातील आपल्या हिताचे जेवढे आहे, तेवढेच ग्रहण करावे. सूर्याच्या उदयाबरोबर सगळे मार्ग प्रकाशतात. पण वाटसरूने काय त्या प्रत्येक रस्त्याने जायवे असते का! त्याला तर आपल्या इच्छित ठिकाणी जी वाट नेईल, तिनेच गेले पाहिजे, नाही का! पृथ्वीतळावर जिकडेतिकडे मुबलक पाणी जरी मिळू लागले, तरी आपल्याला तहान भागेल, तेवढेच पाणी पुरेसे असते. म्हणून वेदांनी काहीही सांगितले असले, तरी जे ज्ञानी आहेत, ते त्या सर्वाची उपयुक्तता जोखून पाहातात आणि जे शाश्वत व इष्ट आहे, ते परमात्मदर्शन तेवढे स्वीकारतात. त्याव्यतिरिक्त इतर कशाचीही ते अपेक्षा करत नाहीत."

वेदातील परमार्थ तेवढाच ग्राह्य!

म्हणौनि आइकैं पार्था। याचिपरी पाहातां।
तुज उचित होय आतां। स्वकर्म तैं।।२-२६४।।
आचरितां सिद्धी गेलें। तर्‍हीं काजचि किर आलें।
परि ठेलियांहिं सगुण जाहलें। ऐसेंचि मानीं।।२७०।।
देखें जेतुलालें कर्म निफजें। तेंतुलें आदिपुरुखीं अर्पिजे।
तर्‍हीं परिपूर्ण साहाजें। जाहालें जाणें।।२७१।।
देखें संतांसंतीं कर्मीं। हें जैं सरिसेंपण मनोधर्मीं।
तैंचि योगस्थिती उत्तमीं। प्रशंसिजे।।२७२।।

"म्हणून हे अर्जुना! तुला स्वकर्म करणेच उचित आहे. पण कर्मफलाची आशा न धरता, ते सिद्धीस जावो अथवा न जावो, दोन्हीही सफलच गोष्टी आहेत, असे मानून कर्म कर. जे काही कर्म आपल्या वाट्याला आले असेल, ते त्याच्या फलासह आदिपुरुषाला अर्पण कर. म्हणजे ते कर्म सहजगत्या परिपूर्ण होईल. कर्मसिद्धीबाबत समतोलपणा राखणे, यशापयशांना, लाभहानीला सारखे मानणे, असा मनाचा भाव ठेवणे, हीच खरी योगस्थिती होय. ज्ञानी पुरुष याच योगदशेची प्रशंसा करतात."

वेद, उपनिषदे व गीता

वरील काही श्लोकांतून *(२-४२ ते ४६)* गीता वेदांचा अधिक्षेप करते आहे, असे कोणास वाटू शकेल. वेदांना स्वल्पत्व देऊन त्यातील कर्मकांडास हीन प्रतीचे लेखणे कोणास रुचणार नाही अशी पण शक्यता आहे. येथे श्री. गुरुदेव रानडेंचा एक विचार उल्लेखनीय आहे. आपल्या ***उपनिषद्रहस्य*** या ग्रंथात त्यांनी सूचित केले आहे की ***वेद ➔उपनिषदे ➔ गीता*** या एकातून दुसऱ्याकडे अशा संक्रमणाच्या स्थिती सूचित करणाऱ्या आध्यात्मिक विचारांच्या प्रातिनिधिक रचना आहेत.

वेदांचा अर्थ दुर्बोध होत गेला आणि त्यातील पूर्वमीमांसकांचे कर्मकांड जसजसे अर्थविहीन वाटू लागले, तसतसे औपनिषदिक विचारांचे प्राबल्य होऊन त्यांना पुष्टी देणारी उपनिषदे रचली गेली. त्यांनी जरी वेदांना नाकारले नाही, तरीही वेदांतील निव्वळ अध्यात्मपर भाग उचलून धरून विस्तारला, हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

उपनिषदेही अनेक झाली. प्रमुख म्हटली तरी बारा किंवा चौदा उपनिषदे मान्यता पावलेली आहेत. त्यांव्यतिरिक्त अनेक उपनिषदे प्रचारात आली. त्यांची संख्या निश्चित नसली तरी ती शंभराहून अधिकच आहेत. त्यांतील विचारांतही अवश्यंभावी भिन्नता आली. या सर्वांचे सुसूत्रीकरण करण्याचा गीतेत प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे गीतेत आपणास सहज ओळखता येणारी अशी काहीकाही उपनिषद्वचने सापडतात.

या दृष्टीने पाहिले, तर गीता वेदांना जो तथाकथित कमीपणा देते, तो त्यांच्या अधिकारास नसून कालमानेकरून निर्माण झालेल्या नवनवीन विचारधारांचा समन्वय करण्यासाठीच असे आपणास प्रतीत होते. तसे असले तरीही वेदांतील उपासनेस उपयुक्त अशा तप, दान, यज्ञ, वर्णाश्रमोचित कर्तव्ये इ.अनेक गोष्टींचा गीतेने संग्रहच केला आहे. आणि श्रीशंकराचार्यांसारख्या वेदज्ञानेही गीतेचा हा पैलू नाकारलेला नाही.

वेदांतील कर्मे करावीतच, पण फलाशेचा त्याग करूनच एवढाच गीतेचा वेदविहित कर्मांबाबत आग्रह आहे. वेदांतील फलांची कामना असणे व स्वर्ग व मृत्युलोकांतील उत्तमोत्तम भोगांची अभिलाषा एवढ्याच गोष्टींना गीता हीन लेखते. कारण या गोष्टी सरळ सरळ परमार्थविरोधी असल्याचे दिसून येते.

तसेच वेदांना स्वल्पत्वसुद्धा गीता देते ते ब्रह्मज्ञान्याच्या दृष्टीने, हाही भाग खासच उपेक्षणीय नाही. ब्रह्मज्ञानी नेहमीच वेदातीत असतो, हे श्रुतिसंमतच आहे.असो.

कर्मयोगाचा संदेश::::

गीतेतील कर्मयोगाचे उद्घाटन करणारी सप्तश्लोकी

असे उपदेशून श्रीकृष्ण अर्जुनाचा कर्मरथ योगपथावर आणून दाखल करतात. ***साधकांचे सिद्ध करणारे अत्युत्कृष्ट योगरहस्य खालील सप्तश्लोकांतून प्रकटविले आहे.*** **कर्मयोगाचा स्पष्ट संदेश** देत भगवान म्हणतातः

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि।।२-४७।।

"कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे. फल कसे मिळावे, ते तुझ्या ताब्यात नाही. म्हणून प्राप्त कर्म करत जा. पण अमुकच फल मिळावे असा हेतू ठेवू नकोस. अथवा अपेक्षित फलप्राप्ती होणार नाही किंवा नको ते फल मिळेल, म्हणून कर्म टाळण्याकडे तुझा कल होऊ देऊ नकोस."

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते।।२-४८।।

" हे धनंजया! फलेच्छेचा त्याग करून केवळ ईश्वराराधनाप्रीत्यर्थ सर्व कर्मे करत जा. कर्म सिद्धीस जावो अथवा न जावो, ईश्वरसाक्षात्कार घडो अथवा न घडो, त्याचा विचार मनात न आणता जे कर्म आचरले जाते, ईश्वराप्रीत्यर्थ कर्म करणे एवढेच उद्दिष्ट जेव्हा असते, तेव्हा त्या आचरणास ***योग*** असे म्हणतात. ***कर्मयोग*** वा ***बुद्धियोग*** म्हणतात, तो हाच! अशा योगाने युक्त होऊन कर्मे करावीत."

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनञ्जय।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः।।२-४९।।

"बुद्धियोगयुक्त होऊन केलेल्या कर्मासारखे श्रेष्ठ असे कोणतेच कर्म नाही. फलेच्छेने केलेले कर्म तर अत्यंत हीन दर्जाचे असते. म्हणून समत्वबुद्धीला अथवा योगबुद्धीला धरून कर्म केले पाहिजे. कारण फलहेतू मनात धरून कर्म करणारे दीन होत."

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम्।।२-५०।।

"योगबुद्धी प्राप्त करून कर्मे करणाऱ्या मनुष्यास कर्मांची पाप व पुण्ये लागत नाहीत. त्यांचा त्याग येथल्या येथेच होतो. म्हणून हे अर्जुना! तू बुद्धियोग प्राप्त व्हावा यासाठी प्रयत्न कर. अभ्यास कर. अशा प्रकारचे पाप-पुण्य न लागू देता कर्मे करण्याचे कौशल्य म्हणजे ***योग*** म्हटला जातो."

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः।
जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम्।।२-५१।।

"***बुद्धियोग*** सिद्ध करणारा ज्ञानी असतो. त्यास कर्मांची फले बाधत नाहीत. कारण कर्मफलांचा त्याग करून तो जन्मरूप बंधनातून मुक्त होतो आणि निरामय - निर्दोष - कल्मषरहित अशा परमपदास तो पावतो."

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च।।२-५२।।

"जेव्हा तुझी बुद्धी मोहरूप मालिन्य - संसारस्वर्गाचे आकर्षण दूर करून पलीकडे जाईल, तेव्हा तुला कोणी काही श्रुतज्ञान सांगावे व तू ते ऐकावेस या अवस्थेच्या पार तू जाशील."

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि।।२-५३।।

"नाना प्रकारच्या श्रुत्युक्त उपदेशांनी विचलित झालेली तुझी बुद्धी त्यावेळी निश्चल होईल. समाधिसुख उपभोगण्यात स्थिर अशी बुद्धी प्राप्त झाली की खरा योग तुला प्राप्त होईल."

कर्मयोगरहस्य

उपरोक्त सप्तश्लोकीतून प्रकाशवलेला हा योगच गीतेतील खरा अन एकमेव *योग* आहे. मग आपण त्याचे *भक्तियोग, बुद्धियोग, कर्मयोग, अष्टांगयोग, षडंगयोग, मोक्षसंन्यासयोग, कर्मफलत्यागयोग, अभ्यासयोग* इ.काय हवे ते नामकरण करा! हा *बुद्धियोग* वा *कर्मयोग* हाच गीतेचा गभा आहे; मूल प्रतिपाद्य विषय आहे.

निव्वळ घाण्याच्या बैलासारखे कर्म करा असे गीता सांगत नाही. कर्ममीमांसा करून कर्म म्हणजे काय, अकर्म कोणते, विकर्म कोणते, निष्क्रियत्व काय असते, निष्काम कर्म कसे करावे, इ.सर्व उहापोह गीता करते. कर्माचे स्वरूप स्पष्ट करणे, विहित कर्म व स्वधर्म समजावून देणे, गुणत्रयीनुसार कर्म, कर्ता व कर्त्याची बुद्धी कशा प्रकारे प्रत्ययास येतात, इ.चर्चा गीतेत आहे. कर्मफल, त्याचे बंधन, जन्ममृत्युपरंपरा, पुनर्जन्म या गोष्टी गीतेत येतात. कर्माचे सकल स्वरूप स्पष्ट करून मग कर्म कोणते करावे व कसे करावे, ते गीता उपदेशिते.

"जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम्"

किल्ली दिलेले खेळणे किल्ली संपेस्तोवर हालचाल करतच राहते, त्याप्रमाणेच देहात प्राण असेस्तोवर मनुष्याकडून कर्मे घडत असतात. कर्म कोणते घडणार व घडावे, हे मनुष्याच्या हातात तसे फारसे नसते. मनाची परिस्थितीप्रमाणे जी अवस्था असते, त्यास जसे वाटते, त्याप्रमाणे सर्व ऐच्छिक कर्मे घडतांना दिसतात. शरीरांतर्गत कर्मे तर केवळ निसर्गनियमांनुसार चालू असतात. त्यांची जबाबदारी मनुष्यावर

येत नाही. मनुष्य जबाबदार असतो, तो केवळ ऐच्छिक कर्मांच्या परिणामांना!

सर्व ऐच्छिक कर्मे सर्वसामान्य मनुष्य सुख प्राप्त व्हावे व दुःख टळावे म्हणून करतो तरी, किंवा करण्याचे टाळतो तरी! असे कर्म केले किंवा टाळले, तरी मनास वासनाधीन व्हावे लागते. वारंवार असे केल्याने वासनासंस्कार प्रबळ होतात. वासनांना मन अनुसरू लागते. हाच मनाला पडणारा *बंध* होय. हाच बंध लिंगदेहास मृत्यूपरांत पुनर्जन्म घ्यावयास लावतो व वासनांची पूर्ती करवण्यासाठी हाच प्रयत्नशील असतो.

एका वासनेतून दुसरी वासना अशा अनंत वासना जीवास चिकटतात. त्यांच्या पूर्तीसाठी अनंत जन्म घ्यावे लागतात. अपेक्षित भोग प्राप्त झाला की सुख, अनपेक्षित घडले की दुःख, असे सुखदुःखाचे रहाटगाडगे जीवाच्या मागे लागते. हर्ष - शोक - विषाद - भय ही त्याची फळे आहेत. आनंद क्षणभंगुर ठरतो.

शाश्वत सुख वा आनंद माणसास मिळावा, त्याच्यामागचे जन्ममृत्युचक्र थांबावे, मनुष्य हा देह नाही - तो त्यापलीकडील एका सनातन तत्त्वाचा आविष्कार आहे - हे सत्य अनुभूतीत उतरावे, हा योगसाधनेचा भाग आहे. तसे म्हटले, तर हा पण एक कामनेचाच भाग आहे. पण भगवंतांनी म्हटले आहे की ही *शुभकामना* आहे. पापपुण्यापलीकडे नेणारी कामना आहे. व्यवसायात्मिक बुद्धी ती हीच! हिचा त्याग करू नये. उलट हिची शास्त्रशुद्ध अभ्यास करून पूर्ती करावी.

या कामनेची पूर्ती झाली की मनुष्याच्या सर्व प्रकारच्या कामना गळून पडतात. ही कामनासुद्धा त्यावेळी उरत नाही. म्हणून या शुभकामनेचे आत्यंतिक महत्त्व आहे. हिलाच ज्ञानदेव *सद्बुद्धी* असे म्हणतात. कोटिकोटी जन्मांच्या शुभपुण्य कर्मांच्या फलोदयाने ही कामना निर्माण होते आणि एकदा का ही कामना निर्माण झाली की तिची पूर्ती होईस्तोवर ती नष्ट होत नाही.

योगसाधना एकवार सुरू केली की कधी ना कधी तरी गंतव्य प्राप्त होतेच होते, असा हा आनुभविक भाग आहे व त्यास भगवंतांनी गीतेतून प्रसंगोचित पुष्टी दिलेली आहे. मनुष्यास कधीही न सरणारे सुख मिळवून देण्याचा ***योगमार्ग*** गीता सांगते, तो असा आहे. असो.

चित्ताचे समत्व हेच योगसार

आता कर्म करण्याच्या कौशलाविषयी भगवंतांनी जे सूचित केले - ***"योगः कर्मसु कौशलम्"*** - त्याबाबत ज्ञानेश काय म्हणतात, ते पाहू याः

अर्जुना समत्व चित्ताचें। तैंचि सार जाण योगाचें।
जेथ मना आन बुद्धिचें। ऐक्य आथि।।२-२७३।।
तो बुद्धियोगु विवरितां। बहुवें पाडें पार्था।
दिसें हा अरौता। कर्मभागु।।२७४।।
परि तैंचि कर्म आचरिजे। तन्हींचि हा योगु पाविजे।
जैं कर्मशेष साहाजें। योगस्थिती।।२७५।।
म्हणोनि बुद्धियोगु सधरु। तेथ अर्जुना होई थिरु।
मनें करी अव्हेरुं। फलहेतूचां।।२७६।।

"कर्म करण्याविषयी जी ही चित्ताची समता आहे, तीच योगाचे वर्म आहे. मनाची इच्छाशक्ती आणि बुद्धीचा कर्तव्यनिश्चय या दोन्ही गोष्टी यात आत्माराधनेसाठी नियोजित असतात.त्या बुद्धियोगाचे विवरण पाहता कर्म करण्याची जनसामान्यांची प्रत फारच निकृष्ट दिसते. कारण त्यात फलाशा असते. पण म्हणून काही कर्म करण्याचे टाकून देता येत नाही. कारण सामान्य अशा कर्मांचेच योगयुक्तिपूर्वक आचरण केले व फलेच्छा व फल यांचा त्याग केला असता योगस्थिती प्राप्त होते. म्हणून हे अर्जुना! फलहेतूस अव्हेरून या भक्कम बुद्धियोगाच्या आधाराने तू स्थिर चित्ताचा हो."

जैं बुद्धियोगां योजिलें। तैंचि पारंगत जाहालें।
इहीं उभयसंबंधीं सांडिलें। पापपुण्यीं।।२-२७७।।
तैं कर्मीं तऱ्हीं वर्तति। परि कर्मफलां नाकलिती।
आन यातायाती लोपति। अर्जुना तेयां।।२७८।।
मग निरामयभरित। पावती पद अच्युत।
तैं बुद्धियोगयुक्त। धनुर्द्धरा।।२७९।।

"बुद्धियोगाची नाव ज्यांनी या भवसागरात हाकारली, तेच तो तरून जातात. पापपुण्यांपलीकडे जाण्यासाठी बुद्धियोगच उपयोगी पडतो. असे योगप्राप्त सिद्ध पुरुष कर्मे तर करतात, पण कर्मफलास स्पर्शसुद्धा करत नहीत. म्हणून त्यांचा जन्ममरणाचा फेरा संपतो. अच्युत अशा निरामय आनंदघन पदास ते असे बुद्धियोगी पावतात."

आत्मज्ञानप्राप्ती

अर्जुनाने ही स्थिती मिळवण्यास प्रयत्न करावेत, असे श्रीकृष्णांचे म्हणणे आहेः

तूं ऐसा होसि। जैं मोहांतैं या सांडीसि।
आणि वैराग्य मानसिं। संचरैल।।२-२८०।।
मग निष्कलंक गहन। उपजैल देखैं आत्मज्ञान।
तेणें निचाडें होईल मन। आपैसें तूझें।।२८१।।
तेथ आणिक कांहीं जाणावें। कां मागिलातैं स्मरावें।
हें अर्जुना आघवें। पारुखैल।।२८२।।

"अर्जुना! या मोहास टाकून देऊन तू असे होण्याचा निश्चय कर. म्हणजे तुझ्या मनात वैराग्य संचारेल. निष्कलंक असे गहन आत्मज्ञान त्यामुळे प्राप्त होईल. त्यामुळे सहजच तुझे मन निरिच्छ होईल. त्यावेळी आणिक काही तत्त्वज्ञान जणून घ्यावे किंवा केलेल्या कर्मांचे स्मरण करावे, त्यांच्या फलाच्या प्राप्तीची इच्छा धरावी, हे सगळे तेथच्या तेथेच लुप्त होईल."

इंद्रियांचियां संगति। जियें प्रसरु होतसें मति।
तैं स्थिर होईल माघौति। आत्मस्वरूपीं।।२-२८३।।
समाधिसुखीं केवल। जैं बुद्धि होईल निश्चल।
तैं पावसि तूं सकल। योगस्थिती।।२८४।।

"इंद्रियांच्या संगाने विषयाकार झालेली, अनंत विषयांचे बहुल आकार धारण केलेली तुझी बुद्धी अनायासेच त्यावेळी आत्मस्वरूपी स्थिरावेल. केवळ समाधिसुखाच्याठायी अशी तुझी बुद्धी जेव्हा निश्चल होईल, तेव्हा तुला समग्र सर्वांग अशी योगस्थिती प्राप्त होईल."

ही योगस्थिती प्राप्त करून घेणे यापेक्षा मानवी जीवनाचे खरे उद्दिष्ट दुसरे काहीच नाही, असे गीतेचे म्हणणें आहे.

गीता व पतञ्जली::::

गीतेतील योगाची ठळक वैशिष्ट्ये

श्रीकृष्णांनी गीतोक्त अशा या योगाच्या उपदेशास सुरुवात केली आहे. त्या योगाची काही ठळक वैशिष्ट्ये दिसून तेतात. ती अशीः

१) कर्म करत राहणे;

२) संसारात राहणे;

३) प्रिय असो, अप्रिय असो, कर्म केलेच पाहिजे;

४) कर्मफळ न निरीक्षिणे;

५) कर्मफळाचा हेतू मनात न धरता कर्म करणे;

६) कर्म करत असता, ते सिद्धीस जावो अथवा न जावो, दोन्हीबाबत सम चित्तवृत्ती ठेवणे;

७) कर्म केल्याने यश मिळो, अपयश मिळो; लाभ होवो, हानी होवो; सुख मिळो वा दुःख मिळो; सर्वत्र समचित्त राहणे;

८) वासना न धरता प्राप्त कर्म करणे;

९) कर्म करत असता आपण कर्माची निवड - हे करीन किंवा ते करणार नाही अशी न करणे;

१०) कर्म व्यवस्थित करणे म्हणजे कर्म करतांना त्याकडे दुर्लक्ष न होऊ देणे, पण ते झालेच पाहिजे अथवा न झाल्यास काही बिघडले आहे, अशी चित्ताची धारणा न ठेवणे;

११) परतत्त्व प्राप्त व्हावे म्हणून कर्मे करणे, पण त्यातील यशापयशातही मनास न गुंतू देणे;

१२) ***मन, बुद्धी, चित्त व अंतःकरण*** ही जी अंतःकरणचतुष्टय म्हणून ओळखली जातात, ती या योगाचा गाभा आहेत.

इंद्रियांकडून घडणाऱ्या क्रियांना तेवढे महत्त्व नाही, तर त्या क्रियांमागची मनोभूमिका, क्रिया करतांना लागणारा बुद्धीचा ती कशी करावीत हा निश्चय, चित्ताचे क्रियांविषयक समत्व आणि अंतःकरणात योग साधण्याची सद्वासना यांनाच या योगात प्रमुख स्थान आहे.

संपूर्ण गीतेचे नीट परिशीलन केले तर याच दिशेने जाणारा योगमार्ग तिच्यात अधोरेखित केल्याचे दिसून येते. ही वैशिष्ट्ये साधण्यासाठी साधकाच्या मनोभूमीस व त्याच्या संस्कारांस अनुसरून करावयाच्या साधनेतील काही भागांवर कमीअधिक भर दिला जातो. पण तो तात्पुरता असतो.

उदा. स्त्री-शूद्रांसाठी प्रभूनामाचे अत्यंत महत्त्व आहे. पण एका विशिष्ट चित्त-मनप्रांतापर्यंत उन्नत झाल्यावर त्यांनाही धारणा-ध्यान - समाधि इ.योगांगे हाताळावीच लागणार असतात. पिंडांतर्गत संस्कारांनुसार सुरुवातीस घ्यावयाचा मार्ग वेगवेगळा दिसला, तरी एका विशिष्ट टप्प्यानंतर सर्वच साधकांना पुढे एकदिशामार्गानेच जावे लागते - त्यांचा त्या टप्प्यापुढचा मार्ग एकच असतो, हे येथे परतपरत सांगावेसे वाटते.

नेमक्या याच गोष्टीबाबत योगशास्त्राविषयी अनभिज्ञ असलेल्यांची बहुधा चुकीची धारणा असल्याचे प्रायः दिसून येते. मुळात आण्विक प्रयत्न आणि वैश्विक अधिष्ठानावर आधारित साधना यांतला फरक न समजल्यामुळे त्यांची अशी दिशाभूल होत असते. शास्त्रात स्पष्टच या गोष्टींबाबत निर्देश असूनही अपुऱ्या शास्त्रज्ञानामुळे किंवा अनुभूती प्राप्त नसल्यामुळे या अशा अत्यंत महत्त्वाच्या बाबींवर त्यांच्याकडून जिज्ञासूंचा अन साधकांचा बुद्धिभेद होईल असे समज वा मते विद्वत्तेच्या नांवाखाली प्रसृत केले जातात. आपण त्याविषयी दक्ष असावे हेच बरे! असो.

अशा गैरसमजांमुळे अंतिम परिणामाबाबतही - म्हणजे समाधिसिद्धीविषयीही त्यांची चुकीची अनुमाने असतात. त्याना वाटते की योग्याची *(पातञ्जल वा तत्सम इतर)* समाधि वेगळी, भक्ताची समाधिस्थिती भिन्नच, ज्ञान्याची समाधि अजूनच विशिष्ट अशी काहीतरी, इ.कल्पना त्यांच्याच नव्हे तर विद्वान साहित्यिकांच्या व प्रायः या विषयावर अननुभविक लिखाण करणाऱ्यांच्या असतात, असे सखेद निदर्शनास आणावे लागत आहे. इत्यलम्।

पिंडांतर्गत संस्कारांविषयी म्हणावयाचे तर गीतेचा पुनर्जन्माच्या सिद्धांतावर विश्वास असल्याने या जन्मी केलेला योगाभ्यास वाया न जाता तसाच्या तसाच पुढील जन्मी ठेवा म्हणून लाभतो. अशा रीतीने स्त्री-शूद्रादी, जे गीतेच्या संकल्पनेप्रमाणे रज-तमोगुणांचे प्राबल्य असल्यामुळे अल्प अधिकार असणारे समजले जातात ते वा योग परिभाषेत मंद असणारे साधकसुद्धा ***"अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।।६-४५।।"*** या भगवद्वचनाप्रमाणे योगसिद्धी कोणत्या ना कोणत्या जन्मी नक्कीच मिळवणार असतात.

मंद-मध्यम-तीव्र संवेग असणारे सर्व साधक नजरेसमोर ठेवून गीता त्यांना मार्गदर्शन करत आहे. परमप्राप्तीसाठी उपयुक्त पडणारा सर्व प्रकारचा अभ्यास प्रत्येकाने यथाधिकार, यथाशक्ती व यथाकाल करावयाचा आहे.

पूर्वजन्मीची योगाभ्यासाची मोठी संपदा घेऊन जर कोणी हा जन्म घेतला असेल, तर अर्थातच त्याला या जन्मी फारशा अभ्यासाचे प्रयोजन कदाचित उरणार नाही व स्वल्प सायासांनीच तो ज्ञानवान होऊ शकतो; साक्षात्कार प्राप्त करून घेऊ शकतो. त्याउलट वाल्या कोळ्याची पिंडप्रवृत्ती असलेल्या साधकाचा योगप्रवास वेगळ्याच मार्गाने होईल, हे वेगळे सांगायला नकोच! असो.

चित्ताचे समत्व आणि पतञ्जली

अंतःकरणचतुष्ट्यावर आणि चित्ताच्या समत्वावर भर देणारा अशा हा गीतेचा योग असल्याचे स्पष्ट दिसून येते. *चित्ताचे समत्व* म्हणजे निर्विकारता, वासनांचा अभाव, अहंकाराचा लोप, जीवन जसे आहे, तसे स्वीकारणे. पण यांपेक्षाही एक गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. ती म्हणजे *परमात्माराधनेत दंग झालेले चित्त* येथे मुळात अभिप्रेत आहे. अंतिम समाधिस्थिती प्राप्त झाल्यावर या परमात्माराधनेचे रूपांतर ***"वासुदेवः सर्वमिति"*** या प्रतीतीत होत असते. गीतेच्या योगाचा हा विशेष आहे.

शून्याकार-निर्विकार-निर्वासन-निरहंकारी चित्त व कर्म करण्याची बाह्यतः दिसणारी वृत्ती ही गीतेच्या योगामुळे प्राप्त होतात. कर्म तर अशा अहमहमिकेने केले जाते की जसा काही फलाने लुब्धावलेला सामान्य मनुष्य कर्म करत आहे. *गीता कर्मनिवृत्ती सांगत नाही, तर नैष्कर्म्ययोग सांगते.* कर्म सविधी आचरूनही त्यापासून अलिप्त असणे हे या योगाचे वैशिष्ट्य आहे. या पार्श्वभूमीवर या योगाचे पातञ्जलयोगाशी कितपत जुळते, ते पाहणे जिज्ञासूंस आवडेल. म्हणून थोडे विषयांतर करून तिकडे वळू या.

गीतेचा योग व पातञ्जलयोग

पतञ्जली म्हणतातः ***"अथ योगानुशासनम्।।१-१।।पा.यो.सू.।।"*** - हा त्यांचा योग *हिरण्यगर्भ* या प्रणेत्यापासून परंपरागत प्राप्त झाला आहे, असे *व्यासभाष्य* सांगते. गीता म्हणते की तिचा योग *विवस्वान - मनु - इक्ष्वाकु* या परंपरेने रूढ झाला होता. मुळात हा योग भगवंतांनी विवस्वानास उपदेशिला होता. भगवंतांचेच *हिरण्यगर्भ* हे सृष्ट्यस्वरूप समजले जाते. म्हणजे दोन्हीही योग एकाच स्रोतातून उगम पावले आहेत, असे म्हणता येते.

निरुद्ध चित्ताचा परिणाम

पतञ्जलींचा योग ***"योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।।पा.यो.सू.।।"*** म्हणजे चित्तवृत्तींच्या निरोधाने साध्य होतो. चित्ताच्या वृत्ती त्रिगुणात्मक - सत्त्व-रज-तमात्मक असतात. यांचा निरोध *गीता व पतञ्जली* दोघांच्या योगांत करावयाचा असतो. चित्ताच्या पाच अवस्था पण सांगितल्या जातात. १) *मूढ* - म्हणजे विषयानुसारी, २) *क्षिप्त* - इंद्रियप्रेरणानुगामी, ३) *विक्षिप्त* - म्हणजे सात्त्विकतेचे आधिक्य व एकाग्रतेच्या प्रथम पायरीवर असणारे, ४) *एकाग्र* - चित्तवृत्तींचा निरोध काही प्रमाणात करू शकणारे व *संप्रज्ञात* समाधि प्राप्त करून घेणारे आणि ५) *निरुद्ध* - सर्व चित्तवृत्तींचा निरोध केलेले केवळ संस्कारमात्र उरलेले व *असंप्रज्ञात* समाधि पावलेले, अशा त्या पाच उत्तरोत्तर प्रगत चित्तावस्था होत.

पतञ्जलींना निरुद्ध चित्त लक्ष्य आहे. चित्त निरुद्ध झाले की ***"तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।।१-३।।पा.यो.सू.।।"*** म्हणजे साधक स्वरूपस्थितीवर येतो. गीतासुद्धा त्रिगुणमाहात्म्य, त्यांचे चित्तावरील प्रभुत्व इ.ओळखून त्रिगुणातीत होण्याचा उपदेश करते. मूढ - तमोगुणाधिक्य, क्षिप्त - रजोगुणाधिक्य, विक्षिप्त -सत्त्वगुणाधिक्य अशा चित्ताच्या तिन्ही अवस्था ओलांडून एकाग्र चित्त व तदनंतर निरुद्ध चित्त, त्रिगुणातीतावस्था व स्वरूपावस्थान हाच गीतेचाही योगप्रवासमार्ग आहे.

वानगीदाखल गीताश्लोक ऐकाः ***१) "तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः। ...।।६-१२।।"*** - मन एकाग्र करावे. चित्त व इंद्रिये यांच्या क्रियांचे नियमन करावे. २) ***"यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया। यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति।।६-२०।।"*** - योगानुष्ठानाने निरोध होऊन चित्त ज्या ठिकाणी रममाण होते, तेथे आपण आत्म्याला पाहून आत्म्यातच संतुष्ट होऊन राहातो. हेच ते *स्वरूपावस्थान* होय आणि अशा त्याच प्रकारच्या मार्गांनी दोन्ही योगमार्गांचे गंतव्यस्थान हेच असल्याचे स्पष्ट दिसून येते.

वृत्तींचे स्थित्यंतर व कर्मबंध

चित्त निरुद्ध नसतांना ते ***"वृत्तिसारूप्यमितरत्र।।१ ४।। पा.यो.सू.।।"*** म्हणजे विषयाकार होत असते. यासच गीता *मोहग्रस्त चित्त* म्हणते. अर्जुनविषादाचा केंद्रबिंदू म्हणजे चित्ताची ही सामान्य संसारी अवस्था होय. अशा चित्ताच्या *पंच क्लिष्ट* व *पंच अक्लिष्ट* अशा वृत्ती असल्याचे पतञ्जली ***"वृत्तयः पञ्चतय्यः क्लिष्टाक्लिष्टाः ।।१-५।।पा.यो.सू.।।"*** या सूत्राद्वारे म्हणतात. या वृत्ती म्हणजे *१) प्रमाण २) विपर्यय ३) विकल्प ४) निद्रा व ५) स्मृती* अशा असल्याचे ***"प्रमाणविपर्ययविकल्पनिद्रास्मृतयः।।१-६।। पा.यो.सू.।।"*** या सूत्रात म्हटले आहे.

आत्मसाक्षात्कार होईपर्यंत या वृत्ती *क्लिष्ट* म्हणजे क्लेशयुक्त असतात. आत्मसाक्षात्कारानंतरही जीवन्मुक्तांच्या चित्तात वृत्ती उमटतात. परंतु त्या *निर्बीज* असतात, संसारबंधनात जखडणाऱ्या नसतात; त्या क्लेशरहित असतात व म्हणून त्यांना *अक्लिष्ट* असे म्हटले जाते.

अर्जुनास श्रीकृष्ण योगयुक्त होऊन युद्ध करण्यास सांगतात, ते याच भूमिकेतून. योगयुक्ताकडून होणारे कर्म चित्तात वृत्ती उठूनच होते. पण त्या वृत्ती - वासना - संसारोपगामी नसतात. चित्तास समत्वबुद्धी प्राप्त झालेली असते, म्हणून जीवन्मुक्त दशेतील कर्मे बंधन करत नाहीत.

समाधि प्राप्त व्हावा या हेतूने योगसाधना करणाऱ्यांस आत्यंतिक सत्त्वगुणाचे फल उपभोगावे लागते. म्हणूनच गीतेने ***"सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ।।१४-६।।"*** असे सत्त्वाचे बंधन स्पष्ट केलेले आहे. याच्याच कारणाने जीवन्मुक्ती प्राप्त झालेल्यांस *व्युत्थानदशा* संभवते. ते मुक्त या व्युत्थानदशेतच अवतारकार्य करत असतात. सर्व जीवांचा उद्धार करणे, असे त्या कार्याचे स्वरूप असते. म्हणून त्यांनी केलेल्या कर्माचे लौकिक फल कसेही का दिसेना! त्यांचा संग प्राप्त झालेल्या पतिताहूनही पतित जीवांचा उद्धार करण्याचे,

त्यांना मुक्तिपथावर अग्रेसर करण्याचे कार्य त्यांच्या हातून अनाकलनीयरीत्या अकल्पित प्रकारे घडत असते.

कंस व शिशुपाल यांचा श्रीकृष्णांनी केलेला वध हे याचे एक उत्तम उदाहरण आहे. लौकिक दृष्ट्या ते श्रीकृष्णांहातून मारले गेले, तरी भगवंतांच्या या जवळिकीने त्यांना मुक्ती मिळाली असे शास्त्राचे म्हणणे आहे. असो.

चित्तव्यापार

(अ) प्रमाणांचे प्रकार *१) प्रत्यक्ष, २) अनुमान व ३) आगम* म्हणजे आप्तवचन - साक्षात्कारी संतांचे वचन, स्मृति, श्रुति इ.चे वचन असे होत. त्याचे सूत्र ***"प्रत्यक्षानुमानागमाः प्रमाणानि।।१-७।।पा.यो.सू.।।"*** असे आहे.

(ब) रज्जूसर्पदृष्टांतातील होणारे मिथ्याज्ञान हा *विपर्यय* होय. ***"विपर्ययो मिथ्याज्ञानमतद्रूपप्रतिष्ठम्।।१-८।।पा.यो.सू.।।"*** असे त्याचे सूत्र देतात.

(क) ***"शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः।।१-९।। पा.यो.सू.।।"*** - शब्दाने जे ज्ञान उत्पन्न होते, त्यामागोमाग उत्पन्न होणारी वृत्ती *विकल्प* म्हणून ओळखली जाते. *विकल्प* म्हणजे चित्ताचा कल्पनेशी होणारा संयोग म्हटले तरी चालेल.

(ड) निद्रेची व्याख्या करत पतञ्जली म्हणतातः ***"अभावप्रत्ययावलंबना वृत्तिर्निद्रा।।१-१०।।पा.यो.सू.।।"*** - ज्या चित्तवृत्तीस पदार्थांच्या अभावाचे आलंबन असते, ती *निद्रा*. निद्रेत असा इतर वृत्तींचा अभाव असतो.

(ई) आता स्मृति या पाचव्या क्लेशाबाबतचे सूत्र आहेः ***"अनुभूतविषयासम्प्रमोषः स्मृतिः।।१-११।।पा.यो.सू.।।"*** - पूर्वी अनुभवलेल्या विषयांमुळे चित्तात होणाऱ्या त्यांच्या अनुसंधानास *स्मृति* अशी संज्ञा आहे.

चित्तवृत्तींचे पतञ्जलिकृत सम्यग्दर्शन

हा सर्व भाग त्यातल्या त्यात एवढ्या विस्ताराने पाहिल्यामुळे आपणास गीता व पातञ्जलसूत्रोक्त योगाचे ज्या चित्तावर आधारित परीक्षण करावयाचे चालू आहे, ते चित्त कसे असते याची ओळख झाली आहे. पतञ्जलींनी अत्यंत शास्त्रोक्त व्याख्या करून चित्तवृत्तींचे असे सम्यक् दर्शन आपणास घडविले आहे. तसेच साधकाच्या व सिद्धाच्या चित्तातील फरक कशा प्रकारचा असतो, ते पण यामुळे आपणास कळून आले आहे. गीतेतील चित्ताबाबत जे विचार आहेत, त्यांचा पाया या पातञ्जलयोगसूत्रांतून जिज्ञासूंस असा उपलब्ध होतो, हे सांगणे न लगे!

योगसाधनेविषयी पतञ्जली व गीता

एवढे परीक्षण केल्यावर पतञ्जली आपणास चित्तवृत्तींचा निरोध करून योग कसा साधावा, याचे दिग्दर्शन करतात, ते पाहू याः

"अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः।।१-१२।।पा.यो.सू.।।" - अभ्यास व वैराग्य यांच्यामुळे चित्ताचा निरोध केला जातो. हा अभ्यास कसा करावयाचा याच्याविषयी अनेक प्रणाली आहेत. त्या त्या प्रणालींमुळे कित्येक प्रकारांस विविध योगवाचक नामे प्राप्त झाली आहेत. उदा. *हठयोग, कर्मयोग, ज्ञानयोग* इ. परंतु हे सर्व प्रकार साधनाक्रमात कोठे ना कोठे, कोणत्या ना कोणत्या पायरीवर साधकास हाताळावेच लागतात.

कोणत्याही एकाच प्रकाराने मुळच्या सर्वसामान्य मनुष्याचा सिद्ध पुरुष होणे शक्य वाटत नाही आणि त्यास प्रत्येक प्रणाली प्रत्येक पायरीवर सुयोग्य असेलच असेही नाही. कोणत्या अभ्यासास कोणत्या वेळी अंगीकारावे, हे अनुभवसिद्ध गुरूकडूनच साधकास समजू शकते. यात दैवी मार्गदर्शनाचाही अंतर्भाव केल्यास चालेल, असे म्हणावेसे वाटते. असो.

एक गोष्ट मात्र निश्चित की *योगवाचक* नामाच्या ज्या या विविध तथाकथित प्रणाली आहेत, त्यांचा एकमेकींशी सुयोग्य समन्वय करून जो मार्ग दृष्टिपथात येतो, तोच अंतिम गंतव्याकडे नेणारा आहे. हाच मार्ग गीता उपदेशिते. किंबहुना सर्व मार्गांचा असा अंतर्भाव या मार्गात असल्यानेच ज्ञानेशांनी त्यास ***सर्व योगांचा राजा*** अशा अर्थी ***पंथराज*** असे गौरवपूर्ण नाम प्रदान केले आहे. याचे अधिक परिशीलन ***क्रमयोग*** अभ्यासतांना करू या. तूर्त एवढेच पुरे!

योगाची व्याख्या, अभ्यास व वैराग्य

अभ्यास व वैराग्य हा जसा पतञ्जलीप्रणीत योगसाधनेचा महत्त्वाचा भाग आहे, तद्वतच तो गीतोक्त योगाचाही तितकाच महत्त्वाचा भाग आहे. *चित्ताची स्थिरता साधण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांस अभ्यास म्हणतात.* आणि असा अभ्यास दीर्घकाल अखंड केला की तो परिपक्व होतो. म्हणून पतञ्जली म्हणतातः ***"तत्र स्थितौ यत्नोऽभ्यासः।।१-१३।।पा.यो.सू.।।"*** व ***"स तु दीर्घकालनैरन्तर्यासेवितो दृढभूमिः।।१-१४।।पा.यो.सू.।।"***

गीतासुद्धा असेच म्हणते. योगाची मूळ व्याख्या गीता करते ती अशीः ***"तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसञ्ज्ञितम्।"*** व ***"स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा।।६-२३।।"*** म्हणजे *दुःखरूप संसाराच्या संयोगापासून विरहित अशा अवस्थेस* ***योग*** *म्हणतात*. अशा योगाचे उत्साही अंतःकरणाने निश्चयपूर्वक अनुष्ठान करावे; अभ्यास करावा.

पतञ्जली म्हणतात की *"संसाराचे दुःख हे चित्तवृत्तींच्या क्लिष्टतेमुळे प्राप्त होते. त्या वृत्ती अक्लिष्ट होणे म्हणजे योग साधणे."* म्हणजेच गीतेच्या भाषेतील संसारदुःखाच्या संयोगाविरहित अवस्था प्राप्त करून घेणे. त्यासाठी अभ्यास आवश्यक आहे.

योगाभ्यास हा पातञ्जल व गीतोक्त योगांचा दुवा

तसेच गीता हा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन करत काय म्हणते पाहाः

"सङ्कल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः। मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः।।६-२४।।", "शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया। आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत्।।६-२५।।" व "यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम्। ततस्ततो नियम्यैतदात्मन्यैव वशं नयेत्।।६-२६।।" - अर्थात संकल्पापासून उत्पन्न होणाऱ्या सर्व इच्छांचा वासना व आसक्तीसह त्याग करून व मनाने इंद्रियांच्या समुदायाचे सर्व बाजूंनी नियमन करून - ज्यासाठी *यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहारादी* अंगे पतञ्जली सांगतात, ती आचरून - धैर्ययुक्त बुद्धी धारण करून सावकाश चित्ताचा उपरम करावा. मन आत्म्याठायी स्थिर करून इतर कोणत्याच वृत्ती मनात येऊ देऊ नयेत; इतर विचार करू नयेत. जसजसे चंचल व अस्थिर मन शांत होत जाईल, ते जेथे जेथे जाईल, तेथून त्याचा निरोध करत, ते आत्म्याच्या ताब्यात आणता येते. यासाठी सातत्याने अभ्यास करावा लागतो.

श्रीकृष्ण म्हणतातः ***"असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्। अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते।।६-३५।।"*** - पण मन अतिशय चंचल असल्याने त्याचा निरोध कसा करता येईल ? त्याचा निग्रह वा निरोध करणे दुर्घट आहे. पण अभ्यास व वैराग्य यांनी ते स्वाधीन करून घेता येते, त्याचा निरोध करता येतो.

याप्रमाणे *पतञ्जली व गीता* मनाच्या निरोधासाठी ***अभ्यास व वैराग्य*** हेच उपाय सांगतांना स्पष्ट दिसतात. आणि तो अभ्यास कसा करावा याबाबतही त्यांचे एकमतच दिसून येते. पातञ्जल व गीतोक्त अशा दोन्ही योगमार्गांत किती साम्य आहे, हे उपरोक्त विस्तृत विवेचनावरून नक्कीच स्पष्ट होते.

दोन्ही योगमार्गात अजूनही एक समानता आहे, ती म्हणजे योगफलाबाबत. पतञ्जली म्हणतातः ***"तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।।१-३।।पा.यो.सू.।।"*** - चित्तवृत्तिनिरोधाने योग सिद्ध झाला की आत्मा आपल्या मूळ स्वरूपात अवस्थित होतो. साधकास आपली स्वरूपस्थिती प्राप्त होते. आणि गीता सांगतेः ***"यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया। यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति।।६-२०।।"*** - योगसाधनेद्वारे निरुद्ध झालेले चित्त उपराम पावते आणि साधक आत्म्याला आपल्यातच पाहून तुष्ट होते; आत्मावस्थित होतो.

असे हे समान योगफल गीता आणि पातञ्जलयोगसूत्रे आपापल्या भाषेत सांगतात आणि ते फळ एकच आहे. ***मुख्य म्हणजे योगाभ्यासाने चित्ताचे वैराग्य संभवते व ते निरुद्ध होते, हा पातञ्जलयोग व गीतोक्त योग यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा होय***. एवढा या दोन्ही योगविशेषांचा आढावा घेतल्यानंतर आपण जेथून हा विषय उचलला होता, त्या स्थलाकडे परतू याः

समाधिस्थिती::::

बुद्धियोग व समाध्यवस्था

श्रीकृष्ण म्हणाले की "मोहरूपी मालिन्याचे तुझ्या चित्तावरील सावट दूर झाले की नाना विकारांनी ग्रस्त झालेली तुझी बुद्धी निश्चल होईल. अर्जुना! ती बुद्धी जेव्हा समाधिसुखाठायी स्थिर होईल, तेव्हा तुला संपूर्णतया योगस्थिती प्राप्त होईल *(गी.२-५२ व ५३)*."

स्थितप्रज्ञ

यावर अर्जुनही युद्धजन्य परिस्थितीचा विसर पडून योगजिज्ञासेकडे वळणारा प्रश्न करत म्हणू लागला की संपूर्ण योगस्थिती म्हणजे काय ते जाणून घ्यायचे आहे. तो म्हणतोः

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम्।।२-५४।।

"हे केशवा! समाधिसुख परिपूर्णतया भोगणाऱ्या, संपूर्ण योगस्थिती पावलेल्या त्या स्थितप्रज्ञाची - आत्मस्थित बुद्धीच्या योग्याची लक्षणे कोणती असतात ? त्याला ओळखावे कसे ? तो स्थितप्रज्ञ काय बोलतो, कसा राहतो आणि कसा विहरतो ?"

ज्ञानेश अर्जुनाच्या या प्रश्नाचे रूपांतर करत म्हणतातः

तेथ अर्जुनु म्हणे देवा। हाचि अभिप्राओ आघवा।
मी पुसेन आतां सांघावा। कृपानिधि।।२-२८५।।
मग अच्युतु म्हणे सुखें। जैं किरीटी तुज नीकें।
तैं पुस पां उन्मेखें। मनाचेनि।।२८६।।

अर्जुन म्हणू लागला, "देवा या योगाविषयी खूप ऐकावे, अशी मला इच्छा झाली आहे. तरी मी काय विचारीन ते मला सांगावे." अर्जुनाच्या मनास अशी कलाटणी मिळालेली पाहून व त्याला योगजिज्ञासा उत्पन्न झालेली पाहून श्रीकृष्ण सुखावले.

योगासंबंधी जिज्ञासा उत्पन्न होणे, ही योगमार्गावरील पहिली पायरी आहे,जिला योगवासिष्ठात ***शुभेच्छा*** अन् ***विचारणा*** या नावांनी ओळखतात. अर्जुनाची ही भूमिका पाहून सुखावून श्रीकृष्ण म्हणाले की, "हे किरीटी! तुला जे काही योग्य वाटेल, ते निःसंकोच मनाने विचार."

एयां बोलां पार्थें। म्हणितलें सांघ पां श्रीकृष्णातैं।
काय म्हणिपैं स्थितप्रज्ञातैं। ओलखों केंवीं।।२-२८७।।
आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजैं। तो कैसां चिह्निं जाणिजैं।
जो समाधिसुख भुंजैं। अखंडितु।।२८८।।
तो कवणें स्थिती असें। कैसेनि रूपीं विलसें।
देवा सांघावें हें ऐसें। लक्ष्मीपति।।२८९।।
तंव परब्रह्मअवतरणु। जो षड्गुणाधिकरणु।
तो काइं तेथ नारायणु। बोलतु असें।।२९०।।

मग अर्जुन विचारू लागला, "देवा! त्या स्थितप्रज्ञाला कसे ओळखावे ? कोणास स्थितप्रज्ञ म्हणावे ? जो अखंडित समाधिसुख

भोगत असतो, त्याची लक्षणे कोणती असतात, तो कोणत्या अवस्थेत असतो, तो कसा वागतो, कसा दिसतो, काय करतो, ते सर्व, हे लक्ष्मीपती! मला सांगा." तेव्हा तो षड्गुणसंपदेने मंडित असणारा परब्रह्माचा परिपूर्ण अवतार असा श्रीकृष्ण त्याला ते सर्व सांगू लागला.

गीतेतील जीवन्मुक्त

जीवन्मुक्तासंबंधीची ही अर्जुनाची जिज्ञासा श्रीकृष्ण या प्रसंगी तर पूर्ण करतातच, पण गीतेत वेगवेगळ्या निमित्ताने जीवनमुक्ताचे कधी *ज्ञानी* म्हणून, तर कधी *योगी* म्हणून, तर कधी *भक्त* म्हणून, तर कधी *नैष्कर्म्यसिद्धिप्राप्त संन्यासी* म्हणून, या ना त्या प्रकारे वर्णन करून आपणापुढे या विषयाचे एक मोठे दालन उघडे करतात. त्यातला काही भाग इतर अध्यायातील विषय पाहतांना आपण अवलोकिला आहेच आणि पुढेही पाहणार आहोत.

स्थितप्रज्ञलक्षणे

आताही श्रीकृष्ण याबाबत काय सांगताहेत, ते आपण पाहू याः ते म्हणतातः

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान्।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते।।२-५५।।
दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते।।२-५६।।

श्रीकृष्ण सांगतात की, "जेव्हा साधक मनामध्ये असणाऱ्या सर्व इच्छांचा सर्वथैव त्याग करतो आणि आत्मस्वरूपाठायी नित्य रममाण होऊन संतुष्ट होतो, तेव्हा त्यास *स्थितप्रज्ञ* असे म्हणतात. दुःखाने ज्याचे मन उद्विग्न होत नाही व सुखाविषयी ज्यास अभिलाषा उरत नाही; भय, क्रोध व विषयासक्ती ज्याची गेलेली असतात, त्याला स्थितप्रज्ञ मुनी म्हणावे."

या श्लोकांपासून जे त्या *जीवन्मुक्तदशेचे कथन* येते, त्याकडे पतञ्जलींनी प्रदान केलेल्या *अक्लिष्ट* पंचक्लेशांच्या माहितीच्या अनुसंधानाने पाहिल्यास जिज्ञासूंना पुनश्च पतञ्जली व गीता यांचे सारूप्य जाणवेल असे वाटते. <u>*हा जीवन्मुक्त पंचक्लेशरहित असतो* असे म्हणावे किंवा *त्याचे क्लेश अक्लिष्ट असतात* असेही म्हणावे, दोन्हींचा अर्थ एकच आहे आणि हाच अर्थ गीतेस अभिप्रेत आहे</u>, हे यापुढील भागाच्या परिशीलनाने समजून येते. असो.

स्थिरबुद्धी

गीतेत उपरोक्त श्लोकातून स्थितप्रज्ञाचे जे वर्णन केलेले आहे, ते ज्ञानेशमुखातून ऐकू याः

म्हणे अर्जुना तरि परियेसिं। जो हा अभिलखु प्रौढु मानसिं।
तो अंतराओ स्वसुखेंसिं। करितु असें।।२-२९१।।
जो सर्वदा नित्यतृप्तु। अंतष्करणभरितु।
परि विषयांमाजीं पतितु। जेणें संगें कीजै।।२९२।।
तो कामु सर्वथा जाये। जेयाचें आत्मतोखीं मन राहें।
तोचि स्थितप्रज्ञु होये। पुरुषु जाणैं।।२९३।।

"अर्जुना! असे पहा की मनात जी विषयवासना वसत असते, तिच्यामुळे मनुष्य आत्मसुखापासून वंचित होतो. सर्वदा नित्यतृप्त, आनंदघन असा अंतःकरणनिवासी जो आत्माराम असतो, त्याचे ज्या कामामुळे अधःपतन घडून येते तो काम जेव्हा सर्वथा जातो, तेव्हा मन निरंतर आत्मसुखात निमग्न होते. असा पुरुष स्थितप्रज्ञ असतो."

नाना दुःखीं प्राप्तीं। जेयासिं उद्वेगु नाहीं चित्तिं।
आणि सुखाचियां आर्त्तिं। अडपेजैना।।२-२९४।।
अर्जुना तेयाचां ठांइं। कामक्रोधु साहाजें नाहीं।
आणि भयातैं नेणें कईं। परिपूर्णु तो।।२९५।।
ऐसा जो निरवधि। तो जाण पां स्थिरबुद्धि।
जो निरसूनि उपाधि। भेदरहितु।।२९६।।

"नाना प्रकारच्या दुःखांमुळे जो व्यथितचित्त असा होत नाही; जो सुखाच्या ओढीने कासावीस होत नाही; अशा मनुष्याठायी काम व क्रोध सहजच नाहीसे झालेले असतात. तो पूर्णावस्थेस प्राप्त झालेला पुरुष भय म्हणजे काय, हे जाणत नाही. उपाधीचा त्याग करून अमित भेदभावरहित असा तो पुरुष अद्वैतबुद्धीत स्थित असतो. त्यास *स्थिरबुद्धी* व *स्थितप्रज्ञ* म्हणून ओळखावे."

प्रज्ञायुक्त

त्याची अजून लक्षणे अशी आहेतः

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम्।
नाभिनन्दन्ति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५७।।

"जो कोठेही आसक्त नसतो; चांगले झाले असता जो प्रसन्न होत नाही व वाईट झाले असता विषादी होत नाही; त्याची बुद्धी स्थितप्रज्ञतेच्या अवस्थेत विराजलेली असते."

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-५८।।

"कासव जसे आपले अंग कवचाआड सर्व बाजूंनी ओढून घेते, त्याप्रमाणे इंद्रियांना त्यांच्या विषयांपासून जो आपल्या आत ओढून घेतो, त्यांचे दमन व नियमन करतो, त्याची बुद्धी स्थिर असते, अचल असते, असे समजावे."

ज्ञानदेव म्हणतातः

जो सर्वत्र सदा सरिसा। परिपूर्णु चंद्रु कां जैसा।
अधमोत्तमा प्रकाशा-। माझिं न म्हणें।।२-२९७।।
ऐसीं अनवच्छिन्न समता। भूतमात्रीं सदयता।
आणि पालटु नाहीं चित्तां। कव्हणीं कालीं।।२९८।।

"पूर्ण चंद्रमा नेहमी सर्वत्र उच्चनीच असा भेदभाव न करता सर्वांना जसा प्रकाश देऊन सुखवतो, त्याप्रमाणे तो स्थितप्रज्ञ पूर्ण समत्वबुद्धीने सर्व भूतमात्रांशी वर्ततो आणि आपल्या दयाबुद्धीचा सर्व जीवांवर भेदभाव न करता वर्षाव करतो."

याबाबत संत श्रीनामदेव महाराजांची गोष्ट प्रसिद्ध आहे. कुत्र्याने भाकरी पळविल्यावर ते तुपाची वाटी घेऊन त्याच्यामागे धावत गेले; कोरडी भाकरी खाऊन त्याचे पोट दुखेल म्हणून! असो.

गोमटें कांहीं पावे। तऱ्हीं संतोषें तेणें नाभिभवें।
जो ओखटेनि नांगवें। विषादासिं।।२-२९९।।
ऐसा हरिखशोकरहितु। जो आत्मबोधभरितु।
तो जाण पां प्रज्ञायुक्तु। धनंजेया।।३००।।
कां कूर्म जियापरीं। उवाइला अवेव पसरीं।
ना इछावसें आवरीं। आपुलें आपण।।३०१।।
तैसीं इंद्रियें आपैतीं होंति। जेयाचें म्हणितलें करिति।
तेयाचिं प्रज्ञा जाण स्थिति। पातलीं असें।।३०२।।

"त्या मुनीच्या चित्तात हर्षशोकादींमुळे काही बदल होत नाही. काही चांगले मिळाले, तर संतोषाने तो फुलून येत नाही; आणि मनाविरुद्ध काही घडले, तर विषादाने विमनस्क होत नाही. हर्षशोकरहित आणि आत्मज्ञानसंपन्न अशा त्या धीर पुरुषास, हे अर्जुना! स्थितप्रज्ञ म्हणून जाणावे. कासव जसे विहरतांना आपले अवयव पसरते व खुषीत सर्वदूर हिंडून येते आणि पाहिजे तेव्हा ते आखडून घेत एकाच ठिकाणी स्वखुषीने पडून राहते, त्याप्रमाणे ज्याची इंद्रिये आपल्या ताब्यात असतात व तो म्हणेल तेच करतात, त्याची प्रज्ञा योगस्थितीस पातली आहे, असे समजावे."

"इंद्रियें विषय विसरति"

पुढे श्रीकृष्ण म्हणतात:

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते।।२-५९।।

"विषय सेवन न करणाऱ्याचे विषय दूर झाल्यासारखे दिसतात, पण त्या विषयांची त्याला लागलेली गोडी काही दूर होत नाही; परंतु स्थितप्रज्ञाचे विषय त्यातील रसासह परमात्मज्ञानामुळे नाहीसे होतात., निवृत्त होतात."

ज्ञानदेव म्हणतात:

आतां अर्जुना आणिकही एक। सांघैन आइकैं कवतिक।
या विषयांतैं साधक। त्यजितिं नियमें।।२-३०३।।
श्रोत्रादि इंद्रियें आवरिति। परि रसनें नियमु न करिति।
तैं सहस्त्रधा कवलिजति। विषइं इहीं।।३०४।।
जैसीं वरिवरि पालवी खुडिजै। आणि मुळीं उदक घालिजै।
तऱ्हीं कैसेनि नाशु उफजै। तेयां वृक्षां।।३०५।।
तो उदकाचेनि बळें अधिकैं। जैसा आडवौनि आंगैं फांकैं।
तैसा मानसीं विखो पोखैं। रसनेद्वारें।।३०६।।

"अर्जुना! अजूनही कौतुकास्पद अशी त्या स्थितप्रज्ञाची एक गोष्ट ऐक. साधक श्रोत्रादी इंद्रियांचा यमनियम पाळत निग्रह करतात. पण जर त्यांनी रसनेंद्रियास मोकळे सोडले, तर इतर इंद्रियांचा संयम काही टिकत नाही. जसा आहार, तशी वृत्ती, या प्रकाराने आहाराचे नियमन न करणाऱ्यास विषय कवटाळून टाकतात. एखाद्या वृक्षाची पालवी खुडावी, पाने तोडावीत, पण त्याच्या मुळांना पाणी पण घालावे; असे केल्याने तो वृक्ष नष्ट कसा होईल! उलट पाण्याच्या जोरावर तो वृक्ष जसा आडवाउभा फुटून बहरतो, त्याचप्रमाणे रसनेद्वारे जो आहार घेतला जातो, तो मनातील सुप्त विषयांना उलटे खतपाणी घालून वाढवतो."

एरां इंद्रियां विखो तुटे। तैसा नियमु नैये रसें हटें।
जैं जीवन हें न घटें। एणेंविण।।२-३०७।।
मग अर्जुना स्वभावें। ऐसियांहीं नियमातैं पावे।
जैं परब्रह्म अनुभवें। होऊनि जाईजे।।३०८।।
तैं शरीरभाव नासति। इंद्रियें विषय विसरति।
जैं सोहंभावप्रतीति। प्रकट होये।।३०९।।

"इतर इंद्रियांचे विषय बळेबळे तोडता येऊ शकतात. पण रसनेचा आहार काही कोणास तोडता येत नाही. कारण अन्यथा जगणेच शक्य नाही. पण अर्जुना! परब्रह्माची अनुभूती घेऊन परब्रह्मस्वरूप झालेले जे स्थितप्रज्ञ योगी असतात, ते आपोआपच इतके निरिच्छ होतात की रसाहार घेऊनही विषय त्यांना आपण होऊन सोडून जातात. ज्यावेळी ***सोऽहंभावाची प्रचिती*** येते, त्यावेळी या देहाचे कामक्रोधादी विकार नष्ट होतात व इंद्रियांना विषयांचा कायमचा विसर पडतो."

"सोऽहंभावप्रतीती"

सोऽहंभाव हा शब्दप्रयोग या ठिकाणी ज्ञानदेव करतात, तो नीट ध्यानात ठेवला पाहिजे. *सोऽहं*ची प्रचिती ज्यास येते, तो योगी स्थितप्रज्ञतेला पोहोचलेला असतो, असे त्यांनी येथे प्रदर्शित केले आहे, याची नोंद घेऊन आता पुढे श्रीकृष्ण काय म्हणतात, ते पाहू या.

इंद्रियनियमन::::

इंद्रियसंयमनाचा उपाय

इंद्रियसंयमनाचा हा महत्त्वाचा मुद्दा स्पष्ट होतो, तो पुढील श्लोकांतून:

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः।।२-६०।।

"हे कौंतेया! इंद्रियांचे नियमन करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या बुद्धिमान मनुष्याच्या मनाचा निश्चय ही बलवान इंद्रिये साफ मोडून काढतात."

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः।
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-६१।।

"म्हणून त्या सर्व इंद्रियांचे संयमन करून माझ्याशी चित्त योगयुक्त करावे. अशा प्रकारे इंद्रियांचे संयमन शक्य होते. जो मनुष्य इंद्रियांस असे स्ववश करून घेतो, तो स्थितप्रज्ञ होय."

इंद्रियांचे बलाढ्यपण

याविषयी ज्ञानेशांच्या ओव्या अशा आहेत:

यऱ्हवीं तऱ्हीं अर्जुना। हें आया नैयें साधना।
जैं राहटताति जतना। निरंतर।।२-३१०।।
जेयांतैं अभ्यासाचीं घरटीं। यमनियमांचीं ताटीं।
जैं मनातैं सदा मुठीं। धरूनि आहाति।।३११।।
तैंहीं कीजति कासाविसि। एयां इंद्रियांचीं प्रौढी ऐसिं।
जैसीं मंत्रज्ञातैं विवसि। भुलवीं कां।।३१२।।
देखें विषय हें तैसें। पावति ऋद्धिसिद्धिचेनि मिसें।
मग आकलिति स्पर्शें। इंद्रियांचेनि।।३१३।।

"अर्जुना! तसे पाहिले, तर ही इंद्रिये अति उच्छृंखल असतात. योगी सदा यांना आपल्या कह्यात ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांच्या कठोर साधनेसही ही दाद देत नाहीत. सदैव अभ्यासाच्या घरातच जे राहतात, यमनियमांचे कुंपण ज्यांनी आपल्यासभोवार उभे केलेले असत, मनाला सदैव आपल्या मुठीत जे घट्ट धरून ठेवतात, त्यांना पण हे विषय कासाविस करतात. या इंद्रियांचा प्रताप हा असा आहे. मांत्रिकास हडळ जशी भुलवते, चकवते, तसेच हे विषयसुद्धा ऋद्धिसिद्धींच्या रूपाने योग्यांपुढे प्रकटतात आणि त्यांच्या चित्तात विभ्रम निर्माण करतात, त्यांच्या मनाला बेलगाम करतात व इंद्रियांना त्यांच्या हाताबाहेर करतात."

तियें संधीं मन जायें। मग अभ्यासीं ठोंठावलें ठायें।
ऐसें बलिकटपण आहे। इंद्रियांचें।।२-३१४।।
म्हणौनि आइकें पार्था। ययांतैं निर्दालीं जो सर्वथा।
सर्व विषइं आस्था। सांडौनियां।।३१५।।
तोचि तूं जण। योगनिष्ठेंसि कारण।
जेयाचें विषयसुखें अंतष्करण। झंकवेना।।३१६।।

"मनाची अशी मोहमय अवस्था करून टाकल्यावर ते पुढील योगाभ्यास करण्याबाबत पंगू होते. पांगळ्या झालेल्या अशा मनाकडून - ऋद्धिसिद्धींच्या कचाट्यात सापडलेल्या साधकाकडून मग पुढचा अभ्यास तो काय होणार! इंद्रिये अशी बलवान असतात व त्यांचे विषयांशी इतके उपजतच सांघष्ट्य असते. म्हणून हे पार्था! ऐक. सर्व विषयांसंबंधीची आसक्ती सोडून जो या इंद्रियांचे निर्दाळण करतो, ज्याचे अंत:करण ऋद्धिसिद्धींनी भुलून जात नाही, तो पुरुषच योगमार्गाचा अधिकारी आहे, असे समज."

जो आत्मबोधयुक्तु। होऊनि असें संततु।
जो मातें हृदयांआंतु। विसंभे ना।।२-३१७।।
यऱ्हवीं बाह्य विषय तऱ्हीं नाहीं।
परि मानसीं होईल जऱ्हीं काई।
तऱ्हीं साद्यंतूचि हा पाहीं। संसारु असें।।३१८।।
जैसा कां विखाचां लेसु। घेतलियां होय बहुंवसु।
मग निभ्रांतु करि नासु। जीवितासिं।।३१९।।
तैसीं एयां विषयांचीं शंका। मनीं वसति देखा।
घातु करी अशेखा। विवेकजातां।।३२०।।

"जो सतत आत्मबोधाने युक्त असतो व मला कधीही अंत:करणातून विसंबत नाही, असा योगी स्थितप्रज्ञ असतो. नाही तर बाह्यत: विषयत्याग करावयाचा व अंत:करणाने माझ्याऐवजी विषयांचे चिंतन करावयाचे, असे करणाऱ्याचा हा संसार जसाच्या तसाच राहतो. मग योगसिद्धी कशी मिळणार! विषाचा थेंबसुद्धा जसा मारकच असतो, तो प्राणांचा हमखास घात जसा करतो; त्याप्रमाणे या विषयांचे पण आहे. त्यांचे सूक्ष्मातिसूक्ष्मसे संस्कार जरी चित्तात उरले तरी ते संपूर्ण विवेकसंपत्तीचा नाश करतात, हे नक्कीच!"

विषयांपासून होणारा हा अध:पात जे टाळतात, ते विवेकमंत होत.

विषयजनित अज्ञान

विषयांचे आक्रमण कसे होते, ते सांगतांना श्रीकृष्ण म्हणतात:

ध्यायतो विषयान्पुसः सङ्गस्तेषुपजायते।
सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते।।२-६२।।

"विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषास त्यांची आसक्ती उत्पन्न होते. आसक्तीमुळे अभिलाषा उत्पन्न होऊन ती पूर्ण न झाली तर क्रोध निर्माण होतो."

क्रोधाद्भवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति।।२-६३।।

"क्रोधामुळे संमोह होतो. संमोहामुळे मनुष्यास अज्ञान ग्रासते. अज्ञानामुळे बुद्धिनाश होऊन त्याचे अध:पतन होते."

स्वरूपाची विस्मृती

ज्ञानदेव म्हणतात:

जऱ्हीं हृदइं विषय स्मरति। तऱ्हीं निसंगाहीं आपैजे संगति।
संगीं प्रगटें मूर्त्ति। अभिलाखाचीं।।२-३२१।।
जेथ कामु उपनला। तेथ क्रोधु आर्दिंचि आला।
क्रोधीं असें ठेविला। संमोह जाणें।।३२२।।
संमोहा जालियां व्यक्तिं। तऱ्हीं नाशु पावें स्मृति।
चंडवातें ज्योति। आहत जैसीं।।३२३।।
कां अस्तमानीं निशीं। जैसीं सूर्यतेजातैं ग्रासीं।
तैसीं दशा स्मृतिभ्रंशीं। प्राणियांसिं।।३२४।।

"अंत:करणात विषयांचा विचार आला तर सर्वसंगपरित्याग केलेल्या मनुष्याच्याही चित्तात त्यांची अभिलाषा मूर्त होते. काम उत्पन्न झाला की क्रोध तेथे ठेवलेला आहेच! क्रोधाबरोबर तेथे संमोह तर असणारच! वादळी वाऱ्यापुढे ज्योती जशी फडफडून विझून जाते, त्याप्रमाणे एकदा का संमोहाच्या वादळाने थैमान घालण्यास सुरुवात केली की स्वस्वरूपाची स्मृतिरूपी ज्योत मालवण्यास कितीसा वेळ लागणार! संध्यासमयी सूर्य अस्तास जातांना त्याला निशा जशी ग्रासून टाकते, तद्वतच स्मृतिभ्रंश पावलेल्या प्राण्यांना अज्ञान ग्रासून टाकते."

बुद्धिनाश

मग अज्ञानांध केवल। तेणें आप्लविजें सकल।
तेथ बुद्धि होय व्याकुल। हृदयामाझिं।।२-३२५।।
जैसें जात्यंधा पलणी पावें। मग तैं काकुलति सैरा धांवें।
तैसें बुद्धिसिं होति भवें। धनुर्द्धरा।।३२६।।
ऐसा स्मृतिभ्रंशु घडे। मग सर्वथा बुद्धि अवघडे।
तेथ समूल तैं उपडें। ज्ञानजात।।३२७।।
चैतन्याचां भ्रंशीं। शरीरां दशा जैशीं।
पुरुषा बुद्धिनाशीं। होय देखें।।३२८।।

"नंतर तो अज्ञानांधकार तमाच्या गर्तेत सर्व बुडवून प्राण्यांचा विवेक इ.वर आपले आवरण घालतो. मग जीवांची दशा काय विचारावी! त्यांच्या चित्तवृत्ती व्याकुळ होतात. जन्मांध जसा धावपळीत सापडला म्हणजे काकुळतीला येऊन वाटेल तिकडे धावत सुटतो आणि चेंगराचेंगरीत हमखास सापडतो, तसेच त्यावेळी बुद्धीचे होते. ती सैरभैर होते. हे धनुर्धरा! अशा प्रकारे स्वरूपाचा विसर पडल्यामुळे बुद्धीची वाताहत होते आणि तिच्या आश्रयाने राहणारे हे स्वरूपज्ञान समूळ उन्मळून पडते."

म्हणौनि आइकैं अर्जुना। जैसा विस्फुलिंगु लागे इंधना।
मग तो प्रौढु जालियां त्रिभुवना। पुरों शके।।२-३२९।।
तैसें विषयांचें ध्यान। जऱ्हीं विपायें वाहे मन।
तऱ्हीं येसणें हें पतन। गिंवसित पावें।।३३०।।

"अर्जुना! एकवेळ अग्नीच्या ठिणगीने इंधन पेटवले की मग जो लोळ उसळतो, तो त्रिभुवनाचाही जसा ग्रास करू शकतो, त्याचप्रमाणे चुकून जरी मनात विषयचिंतन घडले, तरी हे एवढे मोठे अध:पतन मनुष्यास हुडकत येते."

रागद्वेषांचा उपशम

म्हणून विषयाभिलाषा टाकणाऱ्या पुरुषाचे उन्नयन होते, ते स्पष्ट करत श्रीकृष्ण म्हणतात:

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति।।२-६४।।

"रागद्वेषविरहित असा पुरुष मात्र सर्व प्रकारच्या विषयांचा इंद्रियांद्वारे यथेच्छ उपभोग घेत असलेला दिसला, तरी त्याचे अंत:करण स्ववश असल्याने आत्मप्रसाद प्राप्त करून घेतो."

प्रसादे सर्वदु:खानां हानिरस्योपजायते।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धि: पर्यवतिष्ठते।।२-६५।।

"त्या आत्म्याच्या कृपेमुळे - आत्मप्रसन्नतेमुळे त्याच्या सर्व दु:खांचे ***हान*** म्हणजे नाश होतो; अंत:करणाची प्रसन्नता प्राप्त होते व अशा पुरुषाची प्रज्ञा स्थिर होते. तो स्थितप्रज्ञ म्हणजे आत्मवस्तूत अचल निष्ठा असणारा जीवन्मुक्त होतो."

हान

गीता सांगण्याचा भगवंताचा खरा उद्देश म्हणजे मनुष्यमात्राने हा आत्मप्रसाद - ही आत्मकृपा प्राप्त करून घ्यावी. त्याच्या कृपेने नराचा नारायण होतो. श्रीकृष्णावतारी नारायणऋषी हे रहस्य असे अर्जुनावतारी नरऋषींपुढे लोकहितार्थ प्रकट करत आहेत. याविषयी ज्ञानेश म्हणतात:

म्हणौनि विषय हें आघवें। सर्वथा मनौनि सांडावें।
मग रागद्वेष स्वभावें। नाशतील।।२-३३१।।
पार्था आणिकही एक। जऱ्हीं नाशिलें रागद्वेष।
तऱ्हीं इंद्रियां विषयीं बाधक। रमतां नाहीं।।३३२।।
जैसा सूर्य आकाशगतु। रश्मिकरीं जगातें स्पर्शतु।
तऱ्हीं संगदोषें काईं लिंपतु। तेथिंचेनि।।३३३।।
तैसा इंद्रियार्थी उदासीनु। आत्मरसेंचि निर्भिन्नु।
जो कामक्रोधविहिनु। होऊनि असें।।३३४।।

"विषयांचे असे सामर्थ्य लक्षात ठेवावे आणि साधकाने त्यांची मनातून पूर्णपणे हकालपट्टी करावी. म्हणजे रागद्वेष वा कामक्रोध यांच्या जोडगोळीचा आपोआप नाश होईल. एकवार रागद्वेष या जोडीचा नाश झाला की इंद्रिये आपापल्या विषयांत कशीही रमली, तरी अपाय पोहोचत नाही. जसा आकाशींचा सूर्य आपल्या किरणांनी सर्व विश्वाला स्पर्शतो. तरीही त्यास संसाराचा असा संग घडल्याने त्याचे काहीतरी बिघडते का! त्याचप्रमाणे जो इंद्रियांच्या विषयांबाबत आस्था ठेवत नाही, तो कामक्रोधरहित होतो. संसारात वावरूनही त्यास संसारदोष लागत नाही व आत्मानंदरसात तो निमग्न होतो."

गीतेतील योगयुक्त

तऱ्हीं विश्वीं आणिक काईं। आपणपेंवांचूनि नाहीं।
मग विषय कवण काईं। बाधितिल कवणा।।२-३३५।।
जऱ्हीं उदकें उदकीं बुडिजैं। कां अग्नि आगीं पोलिजैं।
तऱ्हीं विषयसंगें आप्लविजैं। परिपूर्णु तो।।३३६।।
ऐसा आपणचि केवल। होउनि असे निखल।
तेयाचि प्रज्ञा अचल। निभ्रांत मानीं।।३३७।।

"ज्या पुरुषास विश्वांत आत्म्यावाचून इतर काहीही दिसत नाही, त्याला विषयांची बाधा होईलच कशी! उदकात उदक बुडाले, तर त्याचे प्राण जातात काय! उलट ते एकरसच होऊन जाते की नाही! अग्नी अग्नीला पोळू शकतो काय! मग तो परिपूर्ण पुरुष विषयसंगाने लिप्त कसा होऊ शकेल! विशुद्ध अशा स्वस्वरूपात असा एकरूप होऊन जो राहतो, त्याची बुद्धी अचल असते, तो स्थितप्रज्ञ असतो, असे नि:संशय मानावे."

ज्याचे चित्त निरंतर प्रसन्न राहते, त्यास विषय ग्रासत नाहीत. अमृताचा झराच ज्याच्या जठरात स्रवतो, त्यास क्षुधातृषा यांचा कधी त्रास होईल का! हृदयच प्रसन्न असले की मग दु:ख ते कोठले!

अशा मनुष्याची बुद्धी मग आपण होऊन परमात्मरूपी निश्चळ राहते. आडोशाला ठेवलेल्या दिव्याची ज्योत जशी निष्कंप असते, त्याप्रमाणे अशा पुरुषाची बुद्धी स्वस्वरूपी स्थिर असते. अशा पुरुषासच गीता ***योगयुक्त*** म्हणते, हे जिज्ञासूंनी लक्षात घेतले पाहिजे. असो.

सर्वसामान्यांची स्थिती

जे योगयुक्त नसतात, त्यांची स्थिती वर्णितांना भगवंत सांगतातः

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना।
न चाभावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम्।।२-६६।।

"योगयुक्त नसलेल्या मनुष्याची बुद्धी स्थिर नसते. त्याला स्थिरबुद्धीची कल्पनासुद्धा नसते. मग ती मिळेल कशी! ज्याची अशी स्थिरबुद्धीविषयी अज्ञानी अवस्था असते, त्याला तिच्यापासून प्राप्त होणारी शांती व सुख कशी मिळतील!"

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते।
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि।।२-६७।।

"पाण्यातील तरंगणाऱ्या नावेला वारा जसे भरकटवत नेतो, त्याप्रमाणे अशा अयुक्त बुद्धी असणाऱ्या मनुष्याच्या मनाला स्वैर इंद्रिये विषयांमध्ये वाटेल तसे भरकटवत नेतात व त्या मनुष्याची बुद्धी सैरभैर होऊन वाटेल त्या विषयात प्रवृत्त होते."

आपण आतापर्यंत योगयुक्त परमभक्तांची कथा ऐकली. आता जी सर्वसामान्य माणसे किंवा इतर साधक असतात, त्याची गंभीर चिंताजनक स्थिती व त्यांची शोकप्रद कहाणी ज्ञानेशांच्या शब्दांत ऐकू याः

इयें युक्तीचि कडसणी। नाहीं जेयांचां अंतष्करणीं।
तो आकलिला जाण गुणीं। विषयादिकीं।।२-३४२।।
तेयां स्थिरबुद्धि पार्था। कंहीं नाहीं सर्वथा।
आणि स्थैर्याची आस्था। तैंहीं नुपजैं।।३४३।।
निश्चलत्वाचीं भावना। जऱ्हीं नव्हेंचि देखैं मना।
तऱ्हीं शांति केंवीं अर्जुना। आपु होये।।३४४।।
आणि जेथ शांतिचां जिव्हाला नहीं।
तेथ सुख विसरौनि न रिघें काईं।
जैसा पापियाचां ठाईं। मोक्षु न बैसें।।३४५।।

"ज्याला ही योगविषयक बुद्धी नसते, त्याचे अंतःकरण विषयादींनी जखडले जाऊन त्रिगुणांच्या पाशात गवसते. अशा मनुष्याची प्रज्ञा कधीच स्थिर नसते आणि त्याला ती स्थिर व्हावी असे पण वाटत नाही. जर स्थिरबुद्धीची साधी कल्पनासुद्धा त्याच्या मनात येत नाही, तर त्याला शांती कशी प्राप्त होणार! अर्जुना! पाप्यास कधी मोक्षसुख लाभते का! तसेच ज्या मनुष्याठायी शांतिरस नाही, त्याच्याजवळ सुख चुकून तरी येईल का!"

देखें अग्निमाजिं घापति। तियें बीजें जऱ्हीं विरूढिति।
तऱ्हीं अशांतां सुखप्राप्ति। घडों शके।।२-३४६।।
म्हणौनि अयुक्तपण मनाचें। तैंचि सर्वस्व दुःखाचें।
एया कारणें इंद्रियांचें। दमन निकें।।३४७।।
इयें इंद्रियें जैं म्हणति। तैं तैंचि पुरुखु जैं करिति।
तैं तरलैंचि ना तरति। विषयसिंधु।।३४८।।

"असे पहा की जर कदाचित अग्नीमध्ये भाजलेल्या बियांना अंकुर फुटतील, तर एखादे वेळी अशा अशांत मनुष्यांस सुखप्राप्ती होईल. मन योगयुक्त नसणे हेच दुःखाचे खरे कारण आहे. म्हणून इंद्रियांचे दमन करणे हेच उत्तम आहे. कारण इंद्रिये जे जे म्हणतील, ते ते करणारे पुरुष जरी भवसागर तरून गेल्यासारखे वाटले, तरी त्यांनी हा विषयसिंधु खरा पार केलेलाच नसतो."

जैसीं नाव थडियें ठाकितां। वरि वरपडी होय दुर्वाता।
तऱ्हीं चुकलाहीं माघौता। अपाओ पावें।।२-३४९।।
तैसीं प्राप्तेंहीं पुरुखें। इंद्रियें लालिलीं जऱ्हीं कवतुकें।
तऱ्हीं आक्रमिला देहदुःखें। सांसारिकें।।३५०।।

"नाव जर पैलतीरी पोहोचली व वादळात सापडली, तर जो पाण्यात बुडण्याचा प्रसंग टाळून ती तेथपावेतो पोहोचली होती, तो प्रसंग पुनः प्राप्त होतोच की नाही! पहा! त्याचप्रमाणे आप्तकाम पुरुषानेसुद्धा इंद्रियांचे लळे सहज कौतुक म्हणून जरी पुरवले, तरी त्यास पुनः देहादींचे संसारदुःख व्यापते."

ब्राह्मीस्थिती::::

योगयुक्ताच्या निद्रा व जागृति अवस्था

असे आहे म्हणून साधक, सामान्य मनुष्य, एवढेच काय! सिद्ध पुरुषांनासुद्धा या इंद्रियांबाबत सतत जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे, हे श्रीकृष्ण आपल्या मनावर पुरते बिंबविण्यासाठी म्हणताता:

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२-६८।।

"म्हणून हे महाबाहो! ज्याची इंद्रिये त्यांच्या विषयांपासून आवरलेली असतात, त्याची बुद्धी आत्मस्वरूपी निश्चल राहते."

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।।२-६९।।

"सर्व प्राणी विषयांच्या प्रकाशाने उजाडलेल्या वेळी जागृत असतात. ज्ञानी मुनीस हा प्रकाश नसून अज्ञानाचा अंधार असतो. त्यावेळी तो निद्रित असतो. सर्व प्राणी आत्मज्ञानाच्या प्रकाशापासून दूर असतात. तो प्रकाश म्हणजे जणू त्यांची रात्रच असते. त्यावेळी ते झोपी जातात. परंतु असा प्रकाश म्हणजे योगयुक्तांसाठी दिवसाचाच असतो व ते त्यावेळी जागे राहतात."

घुबड किंवा वटवाघुळ यांना रात्र कशी दिवसासारखी वाटते. त्या वेळी त्यांचे सर्व व्यवहार बिनघोर चालतात. सर्वसामान्य अज्ञानी मनुष्य असाच आत्मप्रकाशाच्या अंधारात त्याचे इंद्रिये व विषयसंबंधी व्यवहार - व्यापार उत्तमरीत्या रहाटत त्याबाबत जागरूक असतो.

आत्मज्ञान्यास अज्ञानांधकार व त्यातील विषयव्यापार याबाबत निद्रितावस्था असते. याच्या उलट दिवसाचा प्रकाश घुबडांना जसा सहन न होऊन ती अंधाऱ्या जागी राहणे पसंत करतात किंवा दिवसा जशी झोपी जातात, त्याप्रमाणे सामान्य मनुष्यांचे असते. आत्मप्रकाश त्यांना सहन न होऊन ती गाढ निद्राधीन होतात. तो प्रकाश पाहण्याचे नांवसुद्धा घेत नाहीत. परंतु स्थितप्रज्ञ मुनीस तर हा प्रकाश आनंदाने नाचण्याबागडण्यास प्रवृत्त करतो. त्या प्रकाशात विषयांधकार लोपून जातो; असा भाव या श्लोकात आहे.

"तेथ निद्रितु जो"

ज्ञानदेव म्हणतातः

म्हणौनि आपुलीं आपणपेयां। जऱ्हीं इयें इंद्रियें येती आया।
तऱ्हीं अधिकु कांहीं धनंजया। सार्थकु असे।।२-३५१।।
देखें कूर्म जियांपरी। उवाइलं अवयव पसरीं।
ना तऱ्हीं इछावसें आवरीं। आपणपेंचि।।३५२।।
तैसीं इंद्रियें आपैति होति। जेयाचें म्हणितलें करिति।
तेयाचि प्रज्ञा जाण स्थिति। पातलीं असे।।३५३।।

"धनंजया! या इंद्रियांचे असे माहात्म्य आहे. म्हणून जर ती आपली आपल्याच स्वाधीन करून घेता आली, तर त्याएवढे जन्माचे सार्थक दुसरे नाही. कासव त्याला वाटेल तेव्हा अवयव पसरते व इच्छा होईल तेव्हा त्यांना आवरून पण घेते. त्याचप्रमाणे इंद्रिये ज्याच्या स्वाधीन असतात व तो सांगेल तशीच वर्ततात, त्या पुरुषाची प्रज्ञा आत्मस्थितीस पोहोचल्याचे समजावे."

"तेथेंचि जेयां पाहलें"

आतां आणिक ही एक गहन। पूर्णाचें चिह्न।
अर्जुना तुज सांघैन। परियेसिं पां।।२-३५४।।
देखैं भूतजात निदैलें। तेथेंचि जेयां पाहलें।
आणि जीव जेथ चेईलें। तेथ निद्रितु जो।।३५५।।
तोचि तो निरुपाधि। अर्ज्जुना तो स्थिरबुद्धि।
तोचि जाणैं निरवधि। मुनीश्वरु।।३५६।।

"अशा पूर्णकाम पुरुषाची एक गूढ खूण पण ऐक. भूतमात्रे आत्मस्वरूपाठायी निद्रिस्त असतात. निद्रेत काही जाणवत नाही. त्यांची स्वरूपाची जाणीव लोपलेली असते. परंतु आत्मज्ञानी पुरुष स्वरूपाठायी टक्क जागृत असतो. त्यास स्वरूपाचे ज्ञान असते. या उलट जीव विषयांठायी जागे असतात. त्यांचे विषयांबाबतचे ज्ञान अगाध असते. परंतु आत्मस्थित पुरुषास त्याठायी निद्रित स्थिती असल्याने त्यास विषयांची जाणीवही नसते. असा जो उपाधिरहित पुरुष असतो, तोच स्थिरबुद्धी असतो. अर्जुना! तोच पुरुष सनातन स्वरूपात अखंड रममाण झालेला मुनीश्वर आहे, असे जाणावे."

ब्राह्मी स्थिती

अशा पुरुषाचे अधिक वर्णन करण्याचा मोह श्रीकृष्णांना आवरत नाहीसे दिसते. ते पुढे म्हणतातः

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं-
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी।।२-७०।।

"सर्व बाजूंनी परिपूर्ण असलेल्या सागरात नद्यांचे पाणी जसे सहजच समावून जाते, त्याप्रमाणे सर्व विषय त्या पूर्ण पुरुषाठायी त्याची शांती न ढळवता प्रवेशतात. परंतु विषयोपभोगांची कामना ज्यांच्याठायी असते, त्यांना अशी शांती प्राप्त होत नाही."

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः।
निर्ममो निरहङ्कारः स शान्तिमधिगच्छति।।२-७१।।

"जो मनुष्य सर्व कामनांचा त्याग करून ममतारहित, अहंकाररहित व निरिच्छ होऊन या विश्वात मुक्त विहरतो, तो शांती पावतो."

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति।
स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति।।२-७२।।

"हे पार्था! या स्थितीला *ब्राह्मी स्थिती* असे म्हणतात. ब्रह्मप्राप्ती ती हीच! ज्यास ही स्थिती प्राप्त होते, तो मोहित होत नाही. अंतकाळीही याच स्थितीत राहून तो ब्रह्माप्रत पावतो."

"तोचि स्थितप्रज्ञु भला"

याबाबत ज्ञानेश म्हणतातः

पार्था आणिकी ही परी। तो जाणों येईल अवधारीं।
जैसीं अक्षोभता सागरीं। अखंडित।।२-३५७।।
जऱ्हीं सरिताओघ समस्त। परिपूर्ण होऊनि मिलत।
तऱ्हीं अधिकु नोहें ईषत। मर्यादा न संडि।।३५८।।
ना तऱ्हीं ग्रीष्मकालीं सरिता। शोखौनि जाति समस्तां।
परि न्यून नव्हें पार्था। समुद्रु जैसा।।३५९।।
तैसा प्राप्ति ऋद्धिसिद्धि। तेयासिं क्षोभु नाहीं बुद्धिं।
आणि न पवतां न बाधिं। अधृति जेयातैं।।३६०।।

"अशा स्थितप्रज्ञाची अवस्था कशी असते, पहा! अर्जुना! सगळ्या नद्यांचे प्रवाह त्यात मिळत असले, तरी समुद्र आपली मर्यादा किंचितही ओलांडत नाही आणि फुगूनही जात नाही. त्या नद्यांचे जल तो सहजच जसे आपल्यात समावून घेतो, त्याप्रमाणे ऋद्धिसिद्धी जरी मिळाल्या तरी ज्याचा क्षोभ होत नाही, असा तो सिद्ध पुरुष असतो. ग्रीष्मकाली नद्या आटून जातात, पण सागर जसाच्या तसा राहतो. हा पुरुषही विषय प्राप्त न झाले, तरी स्थिरबुद्धीचा राहतो."

सांधैं सूर्याचां घरीं। प्रकाशु काय वातिवेरीं।
कीं न लविजैं चि तऱ्हीं अंधारीं। कोंदेल तो।।२-३६१।।

देखें ऋद्धिसिद्धि तेयापरीं। आलीं गेलीं से न करीं।
तो विगुंतला असें आंतरीं। महासुखीं।।३६२।।

"सूर्याच्या घरी प्रकाश काय कोणती वात उजळल्यामुळे पडतो की ती न लावल्याने त्या ठिकाणी अंधार दाटेल! आप्तकाम पुरुष अंतरी प्राप्त झालेल्या महासुखात निमग्न असतो, त्यामुळे ऋद्धिसिद्धी प्रकटल्या काय आणि न प्रकटता नाहीशा झाल्या काय, त्याला त्यांची वार्तासुद्धा नसते."

ऋद्धिसिद्धींनी प्राप्त होणाऱ्या महाविषयसुखाचीच जेथे मातब्बरी नसते, तेथे सर्वसामान्य विषयांची काय पत्रास असणार!

ज्ञानेश म्हणतातः

जो आपुलेनि नागरपणें। इंद्रभुवनातैं पाबलें म्हणें।
तो केविं रंजें पालिवणें। भिलांचेनि।।२-३६३।।
जो अमृतासिं ठी ठेवि। तो जैसा कांजि न सेविं।
तैसा स्वसुखानुभविं।न भोगि ऋद्धि।।३६४।।
पार्था नवल हें पाहीं। जेथ स्वर्गसुख लेखणियें नाहीं।
तेथ ऋद्धिसिद्धि काईं। प्राकृता होंतिं।।३६५।।
ऐसा आत्मबोधें तोखला। जो परमानंदें पोखला।
तोचि स्थितप्रज्ञु भला। वोलख तूं।।३६६।।

"जो आपल्या रंगमहालापुढे इंद्रभुवनालाही तुच्छ लेखतो, तो भिल्लांच्या पालांमध्ये रमेल का! जो अमृतालाच नांवे ठेवतो, तो कांजी आवडीने पिईल तरी का! आत्मसुखात रमलेला पुरुषसुद्धा सिद्धींच्या उपभोगांस तुच्छ समजतो. पार्था! हे असे आहे की तो स्वर्गसुखासच जेथे मान देत नाही, तेथे केविलवाण्या ऋद्धिसिद्धींची काय कथा! आत्मबोधाने तुष्ट झालेला अन् परमानंदरसाने पुष्ट झालेला पुरुष म्हणजे खराखुरा स्थितप्रज्ञ असतो."

तो अहंकारातैं दंडूनि। सकल काम संडूनि।
विचरें विश्व होऊनि। विश्वामाझिं।।२-३६७।।
हें ब्रह्मस्थिति निःसीम। जैं अनुभवितां निष्काम।
पातलें परब्रह्म। अनायासें।।३६८।।
जैं चिद्रूपीं मिलतां। देहांतिचि व्याकुलता।
आड ठाकों न शके चित्तां। प्राज्ञा जेयां।।३६९।।
तैंचि हें स्थिति। स्वमुखें श्रीपति।
सांगत अर्ज्जुनाप्रति। संजयो म्हणें।।३७०।।

"तो अहंकाराला पिटाळून लावून आणि सर्व कामनांचा त्याग करून या विश्वात विश्वरूप होऊन विचरतो. ही अनुपम अशी ब्राह्मीस्थिती आहे. निष्काम पुरुष हिची अनुभूती घेतात आणि परब्रह्माप्रत पावतात. अशी चिद्रूप स्थिती *"याचि देहीं याचि डोळां"* जे महाभाग भोगतात, त्या प्राज्ञ पुरुषांची देहांतसमयी सर्वसामान्यांची परमधामास पोहोचण्याच्या आड येणारी जी चित्ताची व्याकुळ अवस्था होते, ती होऊ शकत नाही."

संजय म्हणतो की "श्रीहरींनी स्वमुखाने ब्रह्मीभूत पुरुषांची अशी स्थिती असल्याचे अर्जुनास सांगितले." ती ऐकून अर्जुन विचारमग्न झाला.

समारोप

यानंतर **उन्मेष क्र.४१- कर्मपथ-३** यात ***कर्मज्ञानसमुच्चय आणि ज्ञान व कर्म*** यांच्या गहन संबंधावर प्रकाश पडणार आहे. त्यासाठी सिद्ध होऊ या! इत्यलम्।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४१::

::कर्मपथ-३::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४१:

गीताः
१:१०,११
२:४७,५५,७२
३:१-७,१८,२०-२४,२७-३५
५:१३
ज्ञानेश्वरीः
२:३६९,३७१-३७५
३:१-७५,१६०-१७४,१७६-२२९

कर्मपथदिग्दर्शन

::उन्मेष ४१::

::कर्मपथ-३::

कर्मज्ञानसमुच्चय::::

अर्जुनाची विपरीत बुद्धी

मागील उन्मेषात श्रीकृष्णांनी ***योगबुद्धी*** सांगितली. त्याअगोदर ***साङ्ख्यबुद्धी***चे विवेचन केलेले होते. *स्थितप्रज्ञलक्षणे* पण त्यानिमित्ताने सांगून झालीत. आणि त्यांनी ***"कर्मण्येवाधिकारस्ते...", "योगस्थः कुरु कर्माणि ...", "... योगः कर्मसु कौशलम", "कर्मजं बुद्धियुक्ता ...."*** असे *श्लोक क्र. २-४७ ते ५१* यांतून सांगून कर्मयोगाचा आदेश दिला. फलाची आसक्ती धरून कर्म करू नकोस; कर्मफलाची आसक्ती सोडून, लाभालाभाची, पापपुण्याची, सुखदुःखाची, कशाचीही चिंता न करता प्राप्त कर्म कर; स्वधर्मपालन कर; हे स्वच्छ शब्दांत सांगितले. पण या सर्व सांगण्याचा अर्जुनावर जरा वेगळाच परिणाम झाला.

अर्जुनाची संमोहग्रस्त बुद्धी त्या सगळ्याचा विपरीत अर्थ घेऊन कर्मच करू नये असे श्रीकृष्णांचे म्हणणे असल्याचा गैरसमज करून घेते. तो मनात विचार करू लागतो की, "देवांनी कर्म त्याज्यच ठरवले आहे. मग खुंटलेच की आता युद्ध करावे असे म्हणणे!"

ज्ञानदेव म्हणतातः

ऐसें कृष्णवाक्य आईकिलें। तेथ अर्जुनें मनीं म्हणितलें।
आतां आमुचियां काजा आलें। उपपत्ति इयां।।२-३७१।।
जैं कर्मजात आघवैं। एथ निराकरिलैं देवैं।
तरि पारुखलें म्यां झूजावैं। म्हणौनियां।।३७२।।
ऐसा श्रीअच्युताचियां बोलां। चित्तिं धनुर्द्धरु उवाईला।
आतां प्रश्नु करिल भला। आसंकौनियां।।३७३।।

"वास्तविक पाहता त्याला श्रीकृष्णांनी सकाम कर्म त्यागावयास सांगितले होते. तरी असा सगळेच कर्म टाकावे हा अर्थ घेऊन अर्जुनास आता युद्ध करणे टळेल, या विचाराने खूप प्रसन्न वाटले. कर्म करण्यापेक्षा ज्ञानच प्राप्त करून घेऊन सुखी व्हावे, असेही देवांचे साङ्ख्यबुद्धीविषयक विवेचन ऐकून त्याच्या मनात येऊ लागले. या विचारांची उकल करण्याकरता तो आता उत्तम प्रश्न विचारणार आहे."

तो प्रसंगु असें नागरु। जो सकल धर्मासिं आगरु।
किं विवेकामृतसागरु। प्रांतहीनु।।२-३७४।।
जो आपण सर्वज्ञनाथु। निरूपितां होईल श्रीअनंतु।
तैं ज्ञानदेओ सांघैल मातु। निवृत्तिदासु।।३७५।।

"त्याचा तो प्रश्न मोठा उत्कंठावर्धक आहे. सर्व धर्मांचे आगर किंवा विवेकामृतसिंधू असा तो मोठा खुणेचा प्रश्न आहे. धर्माचा खरा उलगडा त्याप्रसंगी होणार आहे. सर्व ज्ञात्यांचा राया जो श्रीअनंत - श्रीकृष्ण - श्रीअच्युत - तोच स्वतः त्या प्रश्नाचे धीरगंभीर उत्तर देऊन विवेचन करणार आहे. ते सर्व हा निवृत्तिदास ज्ञानदेव तुम्हाला साद्य निरूपिणार आहे," असे म्हणून ज्ञानेशांनी गीतेच्या दुसऱ्या अध्यायाकडून तिसऱ्या अध्यायाकडे वळण्याचे सूतोवाच केले आहे.

स्थितप्रज्ञाची देहांतसमयीची स्थिरबुद्धी

दुसऱ्या अध्यायातील विवेचनात ***(जैं चिद्रूपीं मिलतां। देहांतिचि व्याकुलता..।।२ -३६९।।)*** आपणास ज्ञानदेवांनी असेही सूचित केले आहे की स्थितप्रज्ञ माणसाची बुद्धी देहांतसमयी होणाऱ्या यातनांमुळेही चळत नाही. तेव्हाही ती आत्मस्थितच असते व देहत्यागानंतर तो पुरुष परब्रह्मात विलीन होतो. *योगिजनांचा अंतकाल, पुनर्जन्म वा गती, त्यावेळची त्यांची अवस्था* यांबाबत गीतेच्या *सहाव्या, सातव्या व आठव्या* अध्यायात विस्तृत विवेचन येते. ते आपण यथाकाल पाहणारच आहोत. सध्या तरी *योग व योगी, तसेच त्यांची साधनापद्धती* यांविषयी मिळेल तेवढी माहिती करून घेऊ या.

कर्म व ज्ञान यांचा संबंध

कर्म व ज्ञान यांच्या परस्परसंबंधाबद्दल अर्जुनाला जो संभ्रम उत्पन्न झाला आहे, तो महाप्राज्ञ थोर पुरुषांच्याही मतांमधून दिसून येतो. ***कर्म असते, तेथे ज्ञान नसते आणि ज्ञान वसते तेथे कर्म नसते,*** असा लौकिकार्थाने गैरसमज करून घेतल्यास असा संशय निर्माण होणे साहजिकच आहे. परंतु ***ज्ञानाची प्राप्ती कर्मे करत करतच होते, कर्म हे ज्ञानप्राप्तीचे साधन आहे, याबाबत गीता ठाम आहे.*** **कर्मयोग** असे गीतेच्या ज्ञानप्राप्तीच्या प्रतिष्ठित साधनाचे गोंडस नांव पण त्यामुळेच दिले गेले आहे. ***निष्काम कर्मयोग*** असे त्याचे अर्थवाही नाम जनसामान्यांतही रूढ आहे.

गीता लोकांपर्यंत पोहोचवणाऱ्यात ज्ञानदेवांचा अग्रक्रम आहे आणि सद्यःस्थितीत सुशिक्षित आणि आंग्लाळलेल्या समाजास गीताभिमुख करण्याचे महत्कार्य ***गीतारहस्य*** हा ग्रंथराज लिहून स्व.पू.लोकमान्य टिळकांनी केले असल्याचे आपणास विदितच आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या समाजापुरताच हा उल्लेख मर्यादित आहे, हे सूज्ञ जनांना मुद्दाम सांगावे, असे नाही. तरीही त्यानंतर ***ज्ञानेश्वरी*** आणि ***गीतारहस्य*** या दोन्हीही लोकोत्तर ग्रंथांचे इंग्रजी अनुवाद आणि त्याबाबत विद्वज्जनांच्या टीकाटिप्पण्या प्रसिद्ध झाल्यामुळे मराठी समाजाव्यतिरिक्त इतरही सुशिक्षित आधुनिक विचारसरणीच्या समाजातसुद्धा गीतेचा प्रसार त्यांच्याद्वारे होत आहे, हे एक विशेष! या दोन्हीही लोकोत्तर विभूतींनी आपापल्यापरीने गीतेतील केंद्रबिंदू असणाऱ्या या कर्मयोगाचे दर्शन आपल्या ग्रंथांतून घडविले आहे, हे एक निर्विवाद सत्य आहे.

कर्मयोग हाच गीतेचा केंद्रबिंदू आहे, या वरील विधानास भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्यांचासुद्धा आक्षेप नसल्याचे त्यांच्या भाष्यावरून जाणवते. याचा आढावा त्यांनी गीताभाष्यात दुसऱ्या अध्यायाची सुरुवात करतांना जे म्हटले आहे, ते पाहतांना आपण घेतलाच होता*(उन्मेषः३१-२ःकर्मपथदिग्दर्शन-१-२ःपृ.क्र.६३०,६३१ व उन्मेषः४०ःकर्मपथ-२ःपृ.क्र.६४४)*. त्यांचा ज्ञान व कर्म एतद्विषयक वाद अत्यंत सैद्धांतिक पातळीवरचा आहे आणि सिद्धकाम पुरुषांच्या चर्येबाबत तो आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

अर्जुनाचा कर्मज्ञानसमुच्चयविषयक प्रश्न

आता आपण तिसऱ्या अध्यायातील अवशिष्ट श्रीकृष्ण वचनामृताचा आस्वाद घेणार आहोत, तेव्हा या कपोलकल्पित वादाचा सोक्षमोक्ष श्रीगोपालकृष्णांनी स्वतःच कसा लावला आहे, ते प्रत्यक्षच अनुभवू या.

अर्जुन <u>*कर्म व ज्ञान यांचा समुच्चय होत नाही*</u>, हे तथाकथित आदिशंकरमत अंगात भिनल्याप्रमाणे प्रश्न कसे करत आहे पाहाः

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव।।३-१।।

"*(ज्ञानवानाचे)* नैष्कर्म्यच जर सामान्य कर्मी जनांच्या कर्मापेक्षा श्रेष्ठ आहे, असे तुझे मत आहे, तर या युद्धासारख्या घोर कर्माच्या ठिकाणी माझी योजना तू का करत आहेस, हे मला कळेनासे झाले आहे."

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्।।३-२।।

"वेगवेगळ्या प्रकारे भलभलते काहीतरी सांगून कसेही करून माझ्याकडून हे युद्ध करून घेण्याची तुझी इच्छा दिसते. त्यामुळे तू ज्यांचा एकमेकांशी काही मेळ नाही असे वाटेल ते तत्त्वज्ञान माझ्या गळी उतरवू पाहत आहेस, असे मला वाटते. मी तर तुला शिष्यभावाने शरण आलेलो आहे. तरी माझ्या बुद्धीला मोह पडेलसे काहीतरी भाषण न करता, तू मला ज्याच्या योगाने निश्चित हित प्राप्त होईल, ते मत नक्की सांग!"

अर्जुनाचा निर्व्याज भाव

अर्जुनाचा हा रांगडा भाव तंतोतंत टिपणारे ज्ञानदेव म्हणतातः

मग अर्ज्जुनें म्हणितलें। देवा तुम्हीं जैं वाक्य बोलिलें।
तैं नीकें म्यां परिसिलें। कमलापति।।३-१।।
तेथ कर्म आणि कर्ता। उरेचि ना पल्हातां।
ऐसें मत तुझें अनंता। निश्चित जऱ्हीं।।२।।
तरि मातें केंविं हरि। म्हणसिं पार्था संग्रामु करिं।
इयें लाजसिना महाघोरिं। कर्मीं सूतां।।३।।
हां गां कर्म तूंचि अशेख। निराकरिसिं निःसेख।
तरि मजकरविं हें हिंसक। कां करविसिं तूं।।४।।

साङ्ख्यांचे तत्त्वज्ञान, ज्ञान्याची उन्नतावस्था, कर्मफलत्याग, स्थितप्रज्ञाची अवस्था इ. सर्व ऐकून अर्जुन श्रीकृष्णांना म्हणाला, "देवा! कमलापती! तुम्ही सांगितलेल्या सर्व गोष्टी मी नीट ऐकल्या व विचार केला. तत्त्वतः कर्म आणि कर्ता हे जर अंतिम अवस्थेत उरत नाहीत, असे तुझे निश्चित मत आहे, तर हे अनंता! हे श्रीहरी! तू मला या महाघोर संग्रामात ढकलून कर्म करण्यास का भाग पाडतो आहेस! शेवटी जर कर्माचा लेश उरत नाही आणि कर्तेपणाही राखता येत नाही, जर ही अशीच उच्च आध्यात्मिक अवस्था असेल, तर मुळातच कर्म करण्याची आवश्यकताच उरत नाही, असे मला वाटू लागले आहे. तरीही हे भयंकर कर्म मला करायला लावतांना तुला काहीच कशी लाज वाटत नाही!"

तऱ्हीं हेंचि विचारीं हृषीकेशा। तूं मानु देसीं कर्मलेसां।
आणि येसणीं हिंसा। करवित आहासिं।।३-५।।
देवा तुंवाचि ऐसें बोलावें। तरि आम्हीं नेणतिं काएं करावें।
आतां सरलें म्हणें पां आघवें। विवेकाचें।।६।।

"अरे! तू जर शेवटी कोणतीच कर्मे उरत नाहीत, असे म्हणतोस, तर ही हिंसा मला का करायला लावतो आहेस! देवा! तूच असे करू लागलास, तर आमच्यासारख्या अज्ञान्यांनी कोणाकडे जावे! सर्वज्ञ अशा तुझ्यासारख्या पुरुषोत्तमानेच जर असे अविचारी मत सांगायला सुरुवात केली, तर या जगातून विवेकाचे समूळ उच्चाटन झाले आहे, असेच म्हणावे लागेल!"

अर्जुनाचे औपरोधिक भाषण

हां गां उपदेशु जऱ्हीं ऐसा। तऱ्हीं अपभ्रंशु तो कैसा।
आतां पुरला आम्हां धिंवसा। आत्मबोधाचा।।३-७।।
वैद्य पथ्य वारूनि जायें। मग आपणचि जऱ्हीं विख सूयें।
तरि रोगियां कैसेनि जियें। सांधैं मज।।८।।

"अध्यात्माचा उपदेश जर तू हा असा करू लागलास, तर मोह निर्माण करणारे वक्तव्य त्याहून वेगळे काय असू शकेल! आमची अध्यात्माची हौस आता पार फिटली म्हणायची वेळ तू आणली आहेस! वैद्याने रोग्यास बरे वाटावे म्हणून पथ्यपाणी काय करावयाचे, ते सर्व सांगून मग रोग्याला औषध म्हणून विष खायला घालावे, तसाच हा प्रकार आहे. त्याला वैद्य म्हणावे की मारेकरी म्हणावे, असेच तू पण करत आहेस. तू गुरू आहेस की भोंदू आहेस!"

श्रीकृष्णास इतके वेडेवाकडे बोलून पण अर्जुनाचे समाधान होइना. आपणास युद्धासारखे अप्रिय कर्म तो करायला लावत आहे, म्हणून नाराज झालेला अर्जुन पुढे म्हणतोः

जैसें आंधळेंयां सुईजैं आव्हांटा। कां माजवण दीजैं मर्कटां।
तैसा उपदेशु हा गोमटा। ओढवला आम्हां।।३-९।।
मी आदिंचि कईं नेणैं। वरि कवलिलों मोहें एणैं।
कृष्णा विवेकु इयां कारणैं। पुसिलां तूझ।।१०।।

तंव तुझीं एकएकिं नवाइं। एथ उपदेसामाझिं गांवांईं।
तरि अनुसरिलियां काईं। वोज सांधैं।।११।।
आम्हीं तनुमनुजीवें। तुझियां बोलां ओटंगावें।
आणि तुंवांचि ऐसें करावें। तरि सरलें म्हणें।।१२।।
आतां ऐसियांपरी बोधासिं। तरि नीकें काईं आम्हासिं।
एथ ज्ञानाचि आंस काइंसि। अर्जुनु म्हणें।।१३।।

"आंधळ्याला अंधकूपात टाकावे किंवा माकडाला मादक पदार्थ चारावा, तसा तुझा हा उपदेश अमच्याकरता आहे, झाले! मी मुळात अज्ञानी आहे. वर स्वकीयमोहाने मला घेरले आहे. म्हणून योग्यायोग्य काय ते जाणून घ्यावे या हेतूने तुला सारासार विचार काय तो पुसला. तर कृष्णा! तुझे भलतेच सांगणे चालू झाले. तुझा उपदेशच असा संभ्रमात पाडणारा निघाल्यावर तुझा शब्द प्रमाण मानणाऱ्या आम्ही काय करावे! आम्ही तन-मन-प्राण तुझ्या शब्दावरून ओवाळून टाकावेत आणि तू तर असे बोलावेस की ज्याचा थांगच लागू नये. यापरीस आमचे दुर्भाग्यच ओढवले आहे, असे वाटते. असाच उपदेश तू करणार असशील, तर आमची दैनाच उडाली हे खास! मग ज्ञानाची काय गोष्ट करायची!"

तरि इयें जाणिवेवैं कीरु सरलें। परि आणिकी एकु ऐसे झालें।
जैं थितें हें डहुललैं। हृदय माझें।।३-१४।।
तेंविंचि कृष्णा हें तूझें। चरित्र काईं नेणिजें।
जऱ्हीं चित्त पाहासिं माझें। एणें मिसें।।१५।।
ना तरि झांकवितु आहासिं आम्हांसिं मातें।
कीं तत्त्वचिं कथिलें ध्वनितें।
हें अवगमितां निरुतें। जाणवेना।।१६।।

अर्जुन आणिकही असे म्हणू लागला की, "ज्ञान तर दूरच राहू दे! पण माझे मन पण तू डळमळीत केले आहे तुझ्या या बोलण्याने! परंतु तुझे चरित्र अगाध आहे म्हणून मला, हे श्रीकृष्णा! असेही वाटते आहे की या उलटसुलट बोलण्यातून तू माझे मन पाहातो आहेस की काय न कळे! एक तर तू आम्हाला झकवत तरी आहेस किंवा अत्यंत महत्त्वाचे गहन असे तत्त्व तरी तू निरूपिले आहेस. पण खरे काय ते काही आम्हाला कळत नाही की तुझा नेमका रोख कशावर आहे व तुझा उद्देश काय आहे!"

"विवेकु सांघावा। मऱ्हाटा जीं"

असे म्हणून काकुळतीला येऊन तो कृष्णाला विनवू लागला की:

म्हणौनि आइकें देवा। हा भावार्थु आतां न बोलावा।
मज विवेकु सांघावा। मऱ्हाटा जीं।।३-१७।।
मी अत्यंतु जडु असें। परि ऐसाहिं नीकें परिहसें।
कृष्णा बोलावें तुंवां तैसें। एकनिष्ठ।।१८।।
देखैं रोगांतैं जिणावें। ओखद तरि देयावें।
परि तै अतिरुच्य होवावें। महुर जैसें।।१९।।
तैसें सकलार्थभरितु। तत्त्व तरिं सांघावैं उचितु।
परि बोधें माझें चित्तु। जेयांपरी।।२०।।
देवा तुज ऐसा निजगुरु। आणि आर्त्तिचिं धणीं कां न करूं।
एथ भीड कवणाचि धरूं। तूं माये आमुचि।।२१।।

"हे देवा! आता तुमची ही गूढ भाषा पुरे करावी आणि मला समजेल अशा साध्यासोप्या भाषेत तुमचे विचार सांगावेत. मी अत्यंत मंद बुद्धीचा आहे. पण मलासुद्धा सहज समजेल असे, हे कृष्णा! तू बोलावेस. रोग हटवण्यासाठी औषध द्यावे, पण ते मधुर अन चविष्टही असावे, तसे ज्ञानाने परिपूर्ण असलेले तत्त्वाचे विवेचन तुम्ही अशा रीतीने करा की माझ्या जडमूढ चित्तासमुद्धा नीट बोध होईल. देवा! तुझ्यासारखा आमचा जगद्वंद्य गुरू आहे. मग तुझी आम्ही आर्ततेने अशी विनवणी का करू नये आणि आमची इच्छा तुला का न सांगावी! तू तर आमची गुरुमाऊली आहेस. मग कसली भीड बाळगावी!"

हां गां कामधेनूचें दुभतें। दैवें जाहलें जऱ्हीं आपैतें।
तरिं कामनेचिं कां तेथे। वानि कीजैं।।३-२२।।
जऱ्हीं चिंतामणि हातां चडे। तरिं वांछेचें कवण सांकडें।
कां आपुलेनि सुरवाडें। इछावें ना।।२३।।
देखें अमृतसिंधुतैं ठाकावें। मग ताहाना जऱ्हीं फुटावें।
तरिं सायासु कां करावें। माघील तैं।।२४।।

"दैवयोगे जर कामधेनूचे दूध प्यावयास मिळाले, तर आपली ईप्सित कामना का न पुरवून घ्यावी! चिंतामणीच जर हाती असला तर इच्छा करण्यास का संकोचावे! आपल्याला जे काही हवे असेल, ते सरळ मागून घ्यावे की नाही! आणि अमृतसिंधूपर्यंत पोहोचण्याचे श्रम केल्यावरही त्याचा थेंबही न पिता तहानेने जीव व्याकुळ का करून घ्यावा! ते अमृत सरळ ओठांना लावावे, तेच बरे की नाही!"

"सांधैं एक निश्चितु"

आपल्या सद्भाग्याने हा कृष्णाएवढा थोर गुरू लाभला आहे, याची अर्जुनास जाणीव आहे. तो म्हणतो:

तैसा जन्मांतरीं बहुतिं। उपासितां लक्ष्मीपति।
तूं दैवें आजिं हातिं। जाहलासिं जऱ्हीं।।३-२५।।
तरिं आपुलियां सावेसां। कां न मागावासिं परेशा।
देवा सुकालु हा मानसां। पाहला असें।।२६।।
देखें सकलार्त्तिंचें जियालें। आजिं पुण्य यशासिं आलें।
हे मनोरथ जाहालें। विजई माझैं।।२७।।
जि जि परममंगलधामा। देवदेवोत्तमा।
तूं स्वाधिन आजिं आम्हां। म्हणऊनियां।।२८।।

"हे लक्ष्मीपती! जन्मजन्मांतरी तुझी भक्ती केल्याने माझे भाग्य आज उघडले आहे. तू आज मला लाभला आहेस. तर मग, हे परेशा! आपल्याला हवे ते तुझ्याजवळून कां न मागून घ्यावे! देवा! माझे मनोवांछित मिळणयाचा सुदिन आज आला आहे; सकल कामना संपूर्ण होण्याचा योग आता आला आहे. माझ्या पुण्यास आज फळ

लागले आहे; माझे मनोरथ पूर्ण झाले आहेत. कारण हे परम मंगलधाम अशा देवदेवोत्तमा! तू आज आम्हाला वश झाला आहेस."

तैसें मातेचां ठाईं। अपत्या अनवसरु नाहीं।
स्तन्यालागूनि पाईं। जियापरी।।३-२९।।
तैसें देवा तूंतैं। पुसिजतसें आवडें तैं।
आपुलेनि आर्त्तें। कृपानिधि।।३०।।
तरिं पारत्रिकीं हितु। आणि आचरितां तरिं उचितु।
तैं सांधैं एकु निश्चितु। पार्थु म्हणें।।३१।।

"लहान अर्भकास आईकडून स्तन्य घेण्यासाठी वेळअवेळ जशी नसते, त्याप्रमाणें हे कृपानिधी पुरुषोत्तमा! मी आता तुझ्याकडे मला इच्छेला येईल ते अन हवे तितके विचारतो. जे आचरण्यास उचित आणि पारत्रिक कल्याणप्रद असे असेल, जे मी करणे योग्य आहे, ते मला निश्चित काय ते सांग," असे पार्थाने देवांना विनविले.

गीताभाष्यारंभीचे श्रीशंकराचार्यांचे आमुख::::

अर्जुनाचा मूलभूत प्रश्न

अर्जुनाचा असा रोखठोक भाव आहे, तो श्रीकृष्णासारख्या जगद्वंद्य गुरुबाबत! गुरू म्हणतील ते गबाळग्रंथीपणाने करणाऱ्या शिष्यांपैकी अर्जुन नाही. तो गुरूंचे म्हणणे कसाला लावून पाहणाऱ्यांपैकी आहे. ते पटले नाही, तर त्यांना धारेवर धरायला पण तो मागेपुढे पाहत नाही. त्याच वेळी तो श्रीकृष्णांची खरी योग्यताही नीट जाणून आहे. त्याप्रमाणे विनम्र भावसुद्धा त्याचा उपजत गुण आहे. ज्ञानेश्वरी-गीता जाणून घ्यावयाच्या तर आपलाही भाव अर्जुनासारखा हवा*(उन्मेष:१-१::विषयप्रवेश-१:पृ.क्र.४-६).*

ज्ञानेश्वरांसारख्या थोर विभूतीस गुरुवत मानून आपण आपले भावाचे देणे त्यांच्या चरणी अर्पण करावे अन बाह्य जगतातील *अडक्याचे तीन* असे मिळणाऱ्या भोंदू गुरू-बुवा-बाबा-महाराज यांचा संग सोडून द्यावा, हाच बोध आपणास अर्जुनाच्या वर्तणुकीवरून घेता येतो. सुज्ञांस याविषयी अधिक काही सांगणे न लगे! असो.

आता अर्जुनाने मोठी मूलभूत जिज्ञासा प्रकट केली आहे. *ज्ञान व कर्म* यांच्या परस्परसंबंधावर आता त्याच्या समाधानासाठी श्रीकृष्ण जो प्रकाश टाकणार आहेत, तो पाहण्यापूर्वी आपण या विषयाच्या मुख्य चर्चेचे सद्यःस्त्रोत जे *श्रीमदाद्यशंकराचार्य* आहेत, त्यांच्या गीताभाष्यारंभीचा काही भाग पाहणार आहोत. फार वादग्रस्त ठरलेली त्यांची *ज्ञानकर्मसमुच्चय* ही जी कल्पना आहे, त्याबाबतची यथार्थ भूमिका घेण्यासाठी त्या प्रकरणाचा फार उपयोग होतो. म्हणून वळू या आता श्रीशांकरभाष्याकडे.

श्रीशाकरभाष्य - उपोद्घात

सुरुवातीसच आदिपुरुषाचे या प्रकृतीशी असणारे नाते स्पष्ट करत ते म्हणतात:

ॐ नारायण: परोऽव्यक्तादण्डमव्यक्तसम्भवम्।
अण्डस्यान्तस्त्विमे लोका: सप्तद्वीपा च मेदिनी।।शां.भा.।।

"अव्यक्त वा मायेपलीकडे तो नारायण वा आदिपुरुष आहे. सगळे ब्रह्मांड अव्यक्त प्रकृतीपासून उत्पन्न झालेले आहे. सप्तलोक व सप्तद्वीप असणारी पृथ्वी पण ब्रह्मांडाचा एक भाग आहे."

प्रवृत्तिरूप व निवृत्तिरूप धर्म

"आदिपुरुषाने मरीच्यादी प्रजापती उत्पन्न करून त्यांच्याद्वारे ***प्रवृत्तिलक्षणपर वेदोक्त धर्म*** प्रसृत केला. तसेच सनक-सनंदन-सनातनादी ऋषी उत्पन्न केले व त्यांच्याद्वारे ज्ञानवैराग्यादी लक्षणांचा ***निवृत्तिलक्षणपर धर्म*** प्रसृत केला. अशा प्रकारे भगवंतांनी जे दोन धर्म प्रसृत केले, ते ***१)प्रवृत्तिरूप व २) निवृत्तिरूप*** होत."

"जगद्व्यापार चालू ठेवणारा, त्यांना सुरळित राखून प्राण्यांचा अभ्युदय करणारा, त्यांना नि:श्रेयसाची प्राप्ती करवून देणारा, ब्राह्मणादी वर्णाश्रमधर्म पाळणारे ज्याचे अनुष्ठान करतात, त्यास *धर्म* अशी संज्ञा आहे."

श्रीकृष्णांचे अवतारकार्य

"कालांतराने कामनांचा अभिभव धर्मानुष्ठान करणाऱ्यांच्या अंत:करणात झाल्याने विवेकज्ञानाचा ऱ्हास होऊन त्यापासून *अधर्म* उत्पन्न झाला. त्यामुळे धर्माचा लोप होऊ लागला. त्यावेळी जगद्स्थितीच्या पालनकर्त्या त्या नारायणाने वर्णाश्रमधर्माचे रक्षण करावे या हेतूने श्रीवसुदेवदेवकीच्या उदरी आपला अंश प्रकट केला. तो *श्रीकृष्ण* म्हणून विख्यात असलेला अवतार धारण करून त्याने केलेले महत्कार्य सुप्रसिद्धच आहे."

"त्याने ब्राह्मणत्वाचे रक्षण केले. कारण ब्राह्मणत्व सुरक्षित असले की जगत सुरक्षित असते. ज्ञान, ऐश्वर्य, शक्ती, बल, वीर्य व तेजादी गुणांनी संपन्न असणारा भगवंत अज, अविनाशी, सर्व भूतांचा ईश्वर व नित्यशुद्धबुद्धमुक्त असा असूनही त्याने आपल्या त्रिगुणात्मिका मायेला स्ववश ठेवून स्वत:च्या सामर्थ्याने श्रीकृष्णरूपाने देहविग्रह धारण करून लोकांवर अनुग्रह केला."

गीताशास्त्र::::

दोन्ही धर्मांचे उपदेशक

"स्वत:चा कोणताही लाभ किंवा प्रयोजन नसूनही त्या श्रीकृष्णाने सर्व लोकांसाठी आदर्श असावा म्हणून नरोत्तम अशा अर्जुनाचे निमित्त करून त्यास ***प्रवृत्ति व निवृत्ति*** अशा दोनही प्रकारच्या वैदिक धर्मकर्मांचा उपदेश केला. अर्जुनासारख्या लोकोत्तर पुरुषाचा आदर्श लोकांपुढे ठेवल्यामुळे लोकही तसेच वागतील, असा उदात्त हेतू त्यामागे होता. त्या दोनही धर्ममार्गांचा त्यांनी जो उपदेश केला, तो जसाच्या तसा सर्वज्ञ श्रीवेदव्यासांनी गीतानामक सातशे श्लोकांच्या रूपाने ग्रथित केला. *गीताशास्त्र* हे असे समस्त वेदार्थसाराचा संग्रह करते व ते समजण्यास अत्यंत कठीण आहे."

गीतार्थाची कठिणता

"असे असल्याने अनेकांनी पदच्छेद, पदार्थ, वाक्यार्थ इ.लक्षात घेऊन केलेली भाष्ये, टीका इ. उपलब्ध आहेत. *परंतु परमार्थाची*

साक्षात अनुभूती नाही, अशा लौकिक अर्थांचा प्रचार जनमानसात रूढ झाला असल्याचे निदर्शनास येते. ते अर्थ परस्परांशी विभिन्न असल्याने लोकांना गीताशास्त्र समजणे अधिकच दुरापास्त होऊन बसले आहे. म्हणून मी *(श्रीशंकराचार्य)* गीताशास्त्राचा विवेकपूर्वक विचार करून त्याचा निश्चित अर्थ स्पष्ट करण्यासाठी संक्षेपाने हे भाष्य करीत आहे."

याप्रमाणे गीतेवर भाष्य करण्यामागची आचार्यांची भूमिका आहे. त्यांनी गीतेचा अर्थ करतांना लक्षात घेतलेले मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत:

ज्ञानाचे लक्षण: संन्यास

"गीतेतील धर्म कोणता हे स्पष्ट करतांना श्रीकृष्णांनी अनुगीतेत म्हटले आहे की मोक्षप्राप्तीसाठी गीतेतील धर्म सुपर्याप्त आहे. जो धार्मिकही नाही, तसेच अधार्मिकही नाही; जो पापीही नाही, तसेच पुण्यवानही नाही; जो कशाचेही चिंतन न करता, कामना न करता, शांतचित्ताने त्या एकमात्र ब्रह्मात लीन होऊन राहतो; तो मोक्षाचा अधिकारी होतो."

"यास्तव भगवंतांनी असे पण सांगितले आहे की ***"ज्ञानं संन्यासलक्षणम् "*** - म्हणजे ज्ञानाचे लक्षण संन्यास आहे. संन्यास कसा असतो, त्याचे वर्णन धार्मिकही नाही, अधार्मिकही नाही ... इ. प्रकारे वर केले आहे."

संन्यास म्हणजे लौकिकार्थाचा चतुर्थ आश्रम वा संन्यासाश्रम नव्हे, हे या विधानावरून ध्यानी घेतले पाहिजे. जन्माने ब्राह्मण असणाऱ्यास शास्त्र जसे ब्राह्मणत्व प्रदान करत नाही, त्याप्रमाणे निव्वळ परिव्राजकाची चर्या पत्करणे यास मोक्षाचे शास्त्र ***संन्यास*** म्हणून मान्यता देईल असे समजणे धाष्ट्र्याचे होईल. असो. **ज्याला ज्ञान प्राप्त झाले आहे, तो नित्यसंन्यासी आहे व जो नित्यसंन्यासी आहे, तो ज्ञानप्राप्तीचा अधिकारी आहे, असा भाव येथे आहे.**

मोक्षाचे साधन

धर्म म्हणजे *धर्म -अर्थ - काम* यांवर आधारित ***वेदोक्त प्रवृत्तिपर धर्म*** - यात मोक्षकामना असेल व त्यासाठी जर या धर्माचे यथातथ्य आणि विषयवासनारहित आचरण केले तर तो मोक्षास नेतो. जर विषयवासना ठेवून म्हणजेच आंशिक असे या धर्माचे पालन केले, तर पुण्य व त्याचे फल म्हणून सुखोपभोग व पुनर्जन्म प्राप्त होतात. धार्मिक नसणे याचा मोक्षकामनाविरहित आचरणाशी संबंध आहे. अधार्मिक म्हणजे श्रुतिबाह्य आचार, निषिद्ध कर्मे करणे असा आहे. यापासूनच पाप व धार्मिक आचरणापासून पुण्य प्राप्त होते. पापाचे फल दुःखे होत. पण असे पुण्य व पाप ही दोन्हीही पुनर्जन्माचे कारण होत. म्हणून पापपुण्यरहित व धर्म-अधर्मरहित अशा पुरुषास मोक्षप्राप्ती होते, असे आचार्यांचे मत आहे.

पण तो त्याच वेळी ब्रह्मात संतुष्ट - शांत चित्ताने लीन होणारा असला पाहिजे असेही आचार्य म्हणतात. येथूनच योगधारेचा उगम होतो. *मोक्षमार्गात चित्त व योग यांचा अन्योन्यसंबंध आहे.* चित्त लीन करण्यासाठी योगाभ्यास आहे. हा योग ध्यानविशिष्ट आहे. यासाठी निराकाराचे ध्यान करणे शक्य नसल्याने साकाराचे - सगुणाचे ध्यानच अभिप्रेत आहे. म्हणजेच ***ईश्वरप्रणिधान* हे योगास पायाभूत आहे**.

प्रवृत्तिलक्षणपर धर्म

याचे सार श्रीशंकराचार्य थोडक्यात सांगतात, ते असे: "अभ्युदयप्राप्ती ज्याचे फल आहे असा प्रवृत्तिलक्षणपर धर्म, वर्ण व आश्रमव्यवस्थेवर आधारित आहे. त्याचे फल म्हणजे स्वर्गादींची प्राप्ती इ.आहे. परंतु फलाकांक्षेविरहित राहून व ईश्वरार्पणबुद्धीने जर त्या धर्माचे आचरण केले, तर त्यामुळे सत्त्वशुद्धी प्राप्त होते; चित्तशुद्धी होते. अशा पुरुषास ज्ञाननिष्ठेचे आचरण करण्याची योग्यता प्राप्त होऊन त्याद्वारे ज्ञान उत्पन्न होत असल्याने हा ***प्रवृत्तिलक्षणपर धर्म*** निःश्रेयसाची प्राप्ती करून देणाराही होतो. याच अर्थाने गीतेत ***"ब्रह्मण्याधाय कर्माणि (श्लोक क्र.५-१०)"*** - कर्मे ब्रह्मार्पण करावीत; योगिजन आसक्तिरहित होऊन आत्मशुद्धीसाठी कर्मे करतात *(श्लोक क्र.५-११)*, इ.विधाने येतात."

दोन निष्ठा

"परम कल्याण वा मोक्षप्राप्ती हेच ज्यांचे प्रयोजन आहे, असे हे दोन प्रकारचे *धर्म वा निष्ठा* आहेत. त्यांचे लक्ष्य एकमात्र *वासुदेव* या नांवाने ख्यात असणाऱ्या परब्रह्माची प्राप्ती हेच आहे. त्या परमतत्त्वाची विशेष प्रकारे अभिव्यक्ती करून देणारे हे गीताशास्त्र असाधारण प्रयोजनाचे, संबंधांचे व विषयाचे असे एवंगुणविशिष्ट आहे. या शास्त्रास नीट जाणून घेणाऱ्याच्या समस्त पुरुषार्थांची सिद्धी होते."

अशा प्रकारे श्रीशंकराचार्य भाष्य रचण्यामागचा आपला उद्देश स्पष्ट करत सांगतात की गीताशास्त्राचा अर्थ नीट समजून घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी त्यांनी हे भाष्य रचले आहे.

समस्त पुरुषार्थांची सिद्धी करून देणारा हा जो धर्म आहे, तो अर्थातच *प्रवृत्तिलक्षणपर*, परंतु सर्व कर्मे ईश्वरार्पणबुद्धीने करण्यावर भर देणारा असला पाहिजे. धर्म-अर्थ-काम या तीन पुरुषार्थांविरहित मोक्षप्राप्ती वा मोक्षासाठी करावयाचे आचरण यांची या धर्माशी सांगड घालणे अवघडच नव्हे तर केवळ अशक्य आहे.

म्हणूनच *चतुर्थाश्रम* म्हणजेच लौकिकार्थाने संन्यास घेणे मोक्षप्राप्तीसाठी आवश्यक आहे, असे मत आत्यंतिक आग्रही स्वरूपाचे वाटते. श्रीशंकराचार्यसुद्धा स्वतः तसा आग्रह धरत नाहीत, हे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते. आचार्यांच्या भाष्यात इतरत्र जे *परिव्राजक* दशेसंबंधी क्वचित आग्रही वाटणारे सूर दिसून येतात, ते केवळ प्रासंगिकच म्हटले पाहिजेत. कारण उपोद्घातात त्यांनी तसा सूर आळवलेला नाही.

त्यामुळे ग्रंथाचे तात्पर्य ठरविण्याच्या नैय्यायिकांच्या युक्तीप्रमाणे त्यांच्या इतःपर तशा विधानांना कायद्याच्या भाषेत ज्याला *obitter ditta* असे म्हणतात, तेवढेच मूल्य आहे असे आपणास वाटते.

अशा प्रकारे एका मोठ्या वादंगातून आपल्यासारखा जिज्ञासू, अल्पमती साधक बाहेर पडतो, हे काही थोडेथोडके नव्हे. असो.

साङ्ख्ययोग::::

ज्ञानयोग व कर्मयोग

आता आपण या दोन्ही धर्मांचे -वा निष्ठांचे वा योगमार्गांचे म्हणा हवे तर - श्रीकृष्णांनी केलेले समालोचन पाहून धन्य होऊ या. ते म्हणतात:

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ।
ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।

"हे निष्पाप अर्जुना! मनुष्यांनी आचरण करावयाच्या निष्ठांचे दोन प्रकार मी तुला जे सांगितले आहेत, ते म्हणजे ***साङ्ख्यांचा ज्ञानयोग*** *व* ***योग्यांचा कर्मयोग."***

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते।
न च सन्न्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति।।३-४।।

"परंतु एक लक्षात घे. कर्म मनुष्यामागे जन्मापासूनच लागले आहे. कर्माची ही मातब्बरी असल्याने ***कर्म न आरंभता पुरुषास नैष्कर्म्यत्वप्राप्ती होऊ शकत नाही. निव्वळ कर्मांचा त्याग वा लौकिकतः संन्यास केल्याने पुरुषास नैष्कर्म्यसिद्धी वा ब्रह्माची प्राप्ती होत नाही."***

गीतेत ***संन्यास*** हा शब्द द्विविध अर्थाने येतो: *१)लौकिक संन्यास वा चतुर्थाश्रम किंवा ऐच्छिक कर्मव्यापार न करणे २) सर्वकर्मफलत्याग - संगत्याग - निष्काम कर्मयोग.* या विषयाचा पूर्वी सविस्तर विचार करण्यात आलेला आहे *(उन्मेष:३०: संन्यास, त्याग व कर्म, पृ.क्र.४५४ ते ४६१).* सध्या संन्यासाचा पहिला अर्थ अभिप्रेत आहे, हे ज्ञानदेवांच्या पुढील विवेचनावरून व गीतेच्या यानंतर येणाऱ्या श्लोकसंगतीवरून- विशेषत: ***"न हि कश्चित क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्। कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणः।।३-५।।"*** या पुढील श्लोकाने - स्पष्ट होते.

ज्ञानयोग कर्मयोगानिमित्त सांगितला आहे

तंव इयां बोलां अच्युतु। म्हणतसें विस्मितु।
अर्जुना हा ध्वनितु। अभिप्राओ।।३-३२।।
जैं बुद्धियोगु सांघतां। साङ्ख्यमतसंस्था।
प्रगटिलीं स्वभावता। प्रसंघैं आम्हीं।।३३।।
तो उद्देशु तूं नेणसीचि। म्हणौनि क्षोभलासिं वांयांचि।
तरि आतां जाणैं म्यांचि। उक्ता दोनीं।।३४।।
अवधारीं वीरश्रेष्ठा। इयें लोकीं इयां दोनीं निष्ठा।
मजचिपासूनि प्रगटा। अनादिसिद्धां।।३५।।

श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना! तुझ्या प्रश्नाचे मला आश्चर्य वाटते. कारण बुद्धियोग सांगत असतां प्रसंगोपात्त म्हणून ही साङ्ख्यमतप्रणाली पण मी तुला सहजच निवेदिली. माझा खरा उद्देश तुला बुद्धियोगच सांगण्याचा आहे. तो तुझ्या लक्षात न आल्याने, तू उगीचच वेडेवाकडे अर्थ काढून माझ्यावर चिडला आहेस. पण ध्यानात घे की हे दोन्ही मार्ग माझ्याचपासून प्रवर्तित झाले असून ते अनादिकाळापासून चालत आलेले आहेत."

एकु ज्ञानयोगु म्हणिजैं। जो साङ्ख्यीं अनुष्ठिजैं।
जेथ ओलखींसवेंचि पाविजैं। तद्रूपता।।३-३६।।
एरु कर्मयोगु जाण। जेथ साधकजन निपुण।
होओनियां निर्वाण। पावति वेलें।।३७।।
हें मार्गु तरिं दोनिं। परी एकवटतिं निदानिं।
जैसिं सिद्धसाध्यभोजनिं। तृप्ति एकीं।।३८।।

"ओलखिसवेंचि पाविजैं। तद्रूपता"

"त्यातील ज्ञानयोगाचे अनुष्ठान *साङ्ख्य* करतात. ज्ञान प्राप्त होताच परब्रह्माशी तद्रूपता होते. दुसरा जो *कर्मयोग* आहे, त्याची साधना करणारे लोक त्यात जसजसे निपुण होत जातात, तसतसे निर्वाणाप्रत जातात. या योगाचा काया-वाचा - मने अभ्यास करावा लागतो व पारंगत योगी कालांतराने परब्रह्मास पावतो. हे मार्ग दिसावयास जरी भिन्न असले, तरी ते एकाचठायी प्रवेशतात. रांधलेले अन्न आणि रांधावयाचे अन्न यांच्यापासून ते खाताच एकाच प्रकारची तृप्ती जशी मिळते, तसेच हे आहे."

विहंगममार्ग व कर्ममार्ग

या दोन मार्गांचे अधिक स्पष्टीकरण करत ज्ञानदेव म्हणतात:

कां पूर्वापर सरिता। भिन्नां दिसति पल्हातां।
मग सिंधुमिलनीं ऐक्यता। पावतिं शेखीं।।३-३९।।
तैसीं दोनिं इयें मतें। सूचिति एका कारणातें।
परि उपास्ति तैं योग्यते-। अधीन असें।।४०।।
देखें उत्प्लवनासरिसा। पक्षिया फलासिं झोंबिजैं जैसा।
सांघैं नरु केंविं तैसा। पावें वेगां।।४१।।
तो हलूं हलूं ढालें ढालें। केतुकेनि एकें वेलें।
मार्गाचेनि बलें। निश्चितु ठाकें।।४२।।
तैसें देख पां विहंगममतें। अधिष्ठूनि ज्ञानातैं।
साङ्ख्य सद्य मोक्षातैं। आकलिति।।४३।।
एर योगियें कर्माधारें। विहितैंचि निजाचारें।
पूर्णता अवसरें। प्राप्त होति।।४४।।

"पूर्व व पश्चिम दिशांकडील नद्या जशा शेवटी सागरालाच जाऊन भेटतात, तशी ***साङ्ख्य व योग*** या दोन्ही मार्गांची अंतिम स्थिती एकच आहे. पण साधकाच्या योग्यतेनुसार हे मार्ग ठरतात. झेपेसरसा पक्षी झाडावरील फळास जाऊन झोंबतो, पण मनुष्यास तसे शक्य आहे का! त्याला तर हळू हळू एकेका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर चढतचढत त्यायोगे, पण खात्रीने त्या फळापर्यंत जाऊन पोहोचता येते. त्या पक्षाप्रमाणेच साङ्ख्यांचे आहे. ते ज्ञानमार्ग ***(विहंगममार्ग)*** अवलंबून झपाट्याने मोक्षमार्ग आक्रमतात, तर इतर योगमार्गी

(कर्ममार्ग) साधक आपणास विहित अशा आचाराने काही कालाने पूर्णता प्राप्त करून घेतात."

कर्मे अव्हेरणे हा मूर्खपणाच!

वांचौनि कर्मारंभु उचितु। न करितांचि सिद्धवतु।
कर्महीना निश्चितु। होइजेना।।३-४५।।
कां प्राप्त कर्म सांडिजैं। येतुलेनि नैष्कर्म्या होईजै।
हें अर्जुना वांयांचि बोलिजैं। मूर्खपणें।।४६।।

"आणि तसे पाहिले तर काहीच न करता कोणी तरी सिद्ध होऊ शकेल का! कर्म न करणाऱ्यास इहलोकीही काही मिळत नाही, तेथे परलोकीचे काय बोलावे बरे! ज्ञानियांना सत्वर नैष्कर्म्यस्थिती प्राप्त होते, हे पाहून त्यांची नक्कल करण्यासाठी जर प्राप्त कर्मे करण्याचे सोडून दिले, तर त्यामुळे ज्ञानप्राप्ती होईल काय! कर्मे त्यागण्याने ज्ञानप्राप्ती होईल असे समजणे म्हणजे केवळ मूर्खपणा आहे."

कर्म टाकणे म्हणजे त्याग नव्हे!

सांधैं पैलतिरां जावें। ऐसें व्यसन कां जेथ पावें।
तेथ नावेंतैं त्यजावें। घडें केंविं।।३-४७।।
ना तरिं तृप्ति इछिजे। तरिं कैसेनि पाकु न कीजे।
कीं सिद्धुहीं न सेविजे। केंविं सांधैं।।४८।।
जंव निरार्त्तता नाहीं। तंव व्यापारु असें पाईं।
मग संतुष्टीचां ठाईं। कुंठें साहाजें।।४९।।

"नदीच्या पैलतीरी जावे अशी उत्कंठा असणाऱ्याने नावेचा त्याग कसा करावा! भूक भागवाविशी वाटली तर स्वयंपाकही न करता किंवा तयार असलेले अन्नही न सेवन करता भूक भागेल का! हे अर्जुना! त्याप्रमाणेच ज्याला *नैष्कर्म्यावस्था वा ज्ञान* प्राप्त व्हावे अशी प्रबळ इच्छा असेल, त्याने तेथपावेतो पोहोचण्यासाठी आवश्यक अशा कर्मांचा सर्वथैव त्याग करून चालत नाही. ***जोपावेतो निरिच्छता प्राप्त होत नाही, तोपावेतो हा कर्मव्यापार ठेवलेलाच आहे.*** आत्मप्रसादन झाले की तो व्यापार आपसुकच थंडावतो."

म्हणौनि आइकैं पार्था। जेयां नैष्कर्म्यपदीं आस्था।
तेयां उचित कर्म सर्वथा। त्याज्य नोहें।।३-५०।।
आणिक आपुलालियां चाडें। आपादिलें हें मांडें।
कीं त्यजिलें कर्म सांडें। ऐसें आहें।।५१।।
हें वांयांचि सैरा बोलिजैं। उकलु तरिं देखों पाहिजैं।
परि त्यजितां कर्म न त्यजैं। निभ्रांत मानीं।।५२।।

"आणि असे पहा की आपण करावयाचे म्हटले म्हणूनच कर्म होते की काय! व आपण थांबवू गेले तर ते करण्याचे थांबू शकते का! आपण कर्म करण्याचे सोडले आहे, हे बोलणे उगीच बाष्कळ आहे. सारासार विचार करून पाहिले की सरळ सरळ दिसून येते की कर्मत्यागाने ते त्यागले जात नाही. ती केवळ निष्क्रियता होईल फार तर! पण नैष्कर्म्यावस्था खचितच नव्हे!"

गीतेस संन्यासाने चतुर्थाश्रम अभिप्रेत नाही::::

निव्वळ कर्मत्यागाचे दांभिक स्वरूप

संन्यासाश्रमात सर्व नित्य-नैमित्तिक व काम्य कर्मांचा निषिद्ध कर्मांसह त्याग करणे अभिप्रेत असते. पण केवळ असा कर्मत्याग करणे वरवरचे समजले जाते. त्याचे नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होण्यात विशेष प्रयोजन नसते. मनुष्याचा क्षण न् क्षण कर्म करण्यात जातो. श्रीकृष्ण म्हणतातः

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणः।।३-५।।

"कोणाही मनुष्याचा एक क्षणसुद्धा कर्म केल्याविना जात नाही. प्रत्येकजण प्रकृतिजन्य गुणांच्या अधीन राहून कर्म करतच असतो."

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते।।३-६।।

"वर वर कर्मेंद्रिये आवरल्याचा देखावा करून मनात इंद्रियविषयांचे स्मरण करत राहणारा अत्यंत मूढ असून त्याचा कर्मत्याग दांभिक स्वरूपाचा असतो."

"म्हणौनि कर्मत्यागु नाहीं। प्रकृतिमंतां"

यावर ज्ञानेश म्हणतातः

जंव प्रकृतिचें अधिष्ठान। तंव सांडीं मांडीं हें अज्ञान।
जैं चेष्टा तैं गुणाधीन। आपैसिं असें।।३-५३।।
देखें विहितु कर्म जेतुलें। तैं सलें जन्हीं ओसंडिलें।
तरिं स्वभाव काइं निमालें। इंद्रियांचें।।५४।।

"मनुष्यास प्रकृतिकृत देह मिळालेला असतो. प्रकृतीचे अधिष्ठान असा हा देह आहे, तोपावेतो ***"मी कर्मे करणार किंवा ती करण्याचे मी टाकणार"* असे म्हणणे अज्ञानीपणाचे लक्षण आहे.** कारण हे शरीर चेष्टते, ते गुणांच्या अधीन असते म्हणूनच! गुण या शरीराद्वारे कर्मचेष्टा आपोआपच घडवत असतात. तेथे कर्तृत्वाचा भाग येत नाही. असे पहा की जेवढे जेवढे विहित-नित्य व नैमित्तिक–कर्म सांगितले आहे, त्याचा संन्यासाश्रमीवृत्तीने त्याग केला, तरी त्या आततायीपणाचा काहीच उपयोग होत नाही. कारण बळेबळेच कर्मे करणे सोडले म्हणून इंद्रियांचे स्वभाव काही पालटत नाहीत."

सांधैं श्रवणीं आइकों ठेलें। कीं नेत्रींचें तेज गेलें।
हें नासारंध्र बुझालें। परिमलु नेघें।।३-५५।।
ना तरिं प्राणापानगति। कीं निर्विकल्प जाहालीं मतिं।
कीं क्षुधातृषादि आर्त्ति। खुंटलियां।।५६।।
हें स्वप्नवबोधु ठेलें। कीं चरण चालों विसरलें।
हें असो काइं निमालें। जन्ममृत्यू।।५७।।
हें न ठकेंचि जन्हीं पाईं। तरिं सांडिलें तैं मग काईं।
म्हणौनि कर्मत्यागु नाहीं। प्रकृतिमंतां।।५८।।

"कर्णेंद्रिये ऐकण्याचे सोडत नाहीत; चक्षू पाहण्याचे काम करणे बंद करत नाहीत किंवा नाकपुड्या बुजून जाऊन गंध घेण्याचे काम

टाकत नाहीत; प्राण व अपानवायूंच्या गती खुंटत नाहीत; बुद्धी आपले कर्म जे विचार करण्याचे ते टाकून निर्विकल्प होत नाही; क्षुधातृषा व इतर इच्छा काही नाहीशा होत नाहीत; जागृती व स्वप्न या अवस्था काही विरून जात नाहीत. पायांनी चालण्याचे विसरले जात नाही. हे सर्व राहू दे! कर्मत्याग करतो म्हणणाऱ्याचे जन्म आणि मृत्यू हे कर्मचक्र काय त्याच्या अशा म्हणण्याने थांबते का कधी! ही सर्व कर्मे जर घडतच राहतात, तर त्याग तो कसा होईल! असे असल्याने देहधारी मनुष्यांकडून कर्मत्याग घडणे संभवतच नाही."

"तेयांचां आग्रहोचि उरें"

दैखें रथीं आरूढिजैं। मग निश्चलां बैसिजैं।
तरि चलां होऊनि हिंडिजैं। परतंत्रता।।३-६०।।
कां उचलिलें वायुवशें। चलें शुष्कपत्र जैसें।
निश्चेष्ट आकाशें। परिभ्रमें।।६१।।
तैसें प्रकृतिआधारैं। कर्मेंद्रियविकारैं।
निष्कर्म्युहीं व्यापारैं। निरंतर।।६२।।
म्हणौनि संगु जंव प्रकृतिचां। तंव त्यागु न घडे कर्माचां।
ऐसियांहिं करूं म्हणति तेयांचां। आग्रहोचि उरें।।६३।।

"हे पहा! रथावर बसलेला मनुष्य स्वतः निश्चल जरी राहिला, तरी रथाबरोबर परतंत्रासारखा हिंडतोच की नाही! किंवा वाऱ्याबरोबर उडालेले वाळके पान स्वतः निश्चेष्ट राहिले, तरी आकाशात भ्रमण करत राहतेच ना! तसाच खरोखर कर्मातीत वा नैष्कर्म्य अवस्थेस प्राप्त झालेला महाभागसुद्धा प्रकृतीच्या संयोगामुळे कर्मेंद्रियांच्या विकारांनुसार अखंड कर्मचेष्टा करत असतो. त्यालासुद्धा कर्मत्याग जर घडत नाही, तर इतरेजनांचे काय म्हणावे! प्रकृतीचा संग जोपावेतो आहे, तोपावेतो कर्माचा त्याग घडू शकत नाही. इतउपर कर्म त्यागू पाहणाऱ्यांचा तो केवळ दुराग्रहच असतो. यापेक्षा अधिक काही नाही."

कर्मत्यागाचा दुराग्रह

जैं उचित कर्म सांडिति। मग नैष्कर्म्य हों पाहाति।
परि कर्मेंद्रियप्रवृत्ति। निरुंधुनि।।३-६४।।
तेयां कर्मत्यागु न घडें। जैं कर्त्तव्य मनीं सापडें।
<u>वरि नटति तैं कुडें। दरिद्र जाण</u>।।६५।।
ऐसें तैं पार्था। विषयासक्त सर्वथा।
ओलखावें तत्त्वतां। येथ भ्रांती नाहीं।।६६।।

"जे लोक आपल्या वाटेची उचित कर्मे टाकतात आणि त्यायोगे कर्मातीत होऊ पाहातात, कर्मेंद्रियांच्या प्रवृत्तीचा असा निरोध करतात, त्यांना कर्मत्याग घडत नाही. कारण त्यांच्या अंतःकरणातून कर्माची आवड व त्यास प्रेरणा देणाऱ्या विषयवृत्ती तशाच राहातात. *उगीचच कर्मे त्यागण्याचा त्यांचा वरवरचा आव म्हणजे निव्वळ कर्मदरिद्रीपणाच म्हणायचा!* अर्जुना! अशा लोकांची विषयासक्ती सुटलेली नसते, हे मी निश्चयपूर्वक सांगतो."

कर्मयोग::::

नैष्कर्म्यावस्था

अशा प्रकारे चतुर्थाश्रमी वा कर्मत्यागी लोकांची योग्य श्रेणी दाखवून देत हा प्रसंग समाप्त होतो. *नैष्कर्म्यप्राप्तीचा मार्ग या प्रकारच्या संन्यासातून जात नाही,* हे निर्विवाद सिद्ध करून देत आतां प्रसंगच आला आहे म्हणून खऱ्या विरक्तांचे लक्षण ऐकवत श्रीकृष्ण म्हणतातः

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते।।३-७।।

"हे अर्जुना! जो पुरुष मनाने इंद्रियांचे नियमन करून आसक्तीचा त्याग करून कर्मेंद्रियांनी कर्मयोगाचे आचरण करतो, तो खरा नैष्कर्म्यावस्थेस प्राप्त झालेला भाग्यवंत होय."

कर्मयोग एवढाच गीतेचा मुख्य साधनभाग आहे. त्याचे संपूर्ण दिग्दर्शन वा व्याख्या या श्लोकात आहे. **<u>कर्मयोगाची अंगे अशी आहेतः १) मनाने इंद्रियांचे नियमन करणे. २) विषयासक्तीचा त्याग करणे - यातच कर्मफलत्यागही अंतर्भूत आहे. ३) कर्मेंद्रियांनी त्यांचे त्यांचे विहित वा प्राप्त व्यापार चालू ठेवणे</u>.**

नैष्कर्म्यस्थिती

या अशा कर्मयोग्याविषयी ज्ञानदेव म्हणतातः

आतां देईं अवधान। प्रसंगें तूझ सांघैन।
या नैराश्याचें चिह्न। धनुर्द्धरां।।३-६७।।
जो अंतरीं दृढु। परमात्मरूपीं गूढु।
बाह्य तरिं रूढु। लौकिकु जैसा।।६८।।
तो इंद्रियां आज्ञा न करीं। विषयांचें भय न धरीं।
प्राप्त कर्मु न अव्हेरीं। उचितु जैं।।६९।।
तो कर्मेंद्रियें कर्मीं। राहाटतां तरिं न नियमीं।
परि तेथिचेनि ऊर्मीं। झाकोलैना।।७०।।
तो कामनामात्रे न घेपें। मोहमलैं न लिंपें।
जैसें जलीं जलें न शिंपें। पद्मपत्र।।७१।।

"ज्याचे अंतःकरण दृढपणे परमात्म्याच्या निगूढस्वरूपी रममाण झालेले असते, त्याचा बाह्याचार लोकांसारखाच असतो. तो इंद्रियांना रोखून धरत नाही. त्याला विषयभोगांचे भय वाटत नाही. उचित कर्म प्राप्त झाले की तो ते करतो. कर्मेंद्रिये कर्मात रत असली तरी त्यांचे नियमन तो करत नाही. पण त्यांपासून जे कर्मफल व विषयविकार प्राप्त होतात, त्यांमुळे तो लिप्त होत नाही. ज्याप्रमाणे कमलपत्र जळात राहूनही पाण्याने भिजत नाही, त्याप्रमाणे तो संसारात सुखेनैव वर्तत असूनही कामनांनी व मोहमलाने लिप्त होत नाही."

"अर्जुना तोचि योगी"

तैसा संसर्गामाजिं असें। सकलांसारिखा दिसें।
जैसें तोयसंगें आभासें। भानुबिंब।।३-७२।।
तैसा सामान्यत्वें पाहिजैं। तरिं साधारणूचि देखिजैं।
यरवीं निर्धारितां नेणिजैं। सोय जेयाचिं।।७३।।

ऐसां चिह्निं चिह्नितु। देखसिं तोचि मुगतु।
आशापाशरहितु। ओलख पां।।७४।।
अर्जुना तोचि गां योगी। विशेषिजें जो जगीं।
म्हणौनि ऐसा होय इयालागीं। म्हणिपें तूंतैं।।७५।।

"सर्वसंगात राहणारा व इतर लोकांसारखाच तो दिसतो. ज्याप्रमाणे सूर्यबिंब पाण्यापासून अलिप्त असले तरी पाण्याबरोबर असल्यासारखे भासते, त्याचप्रमाणे तो पुरुष इतर सर्वसामान्य जनांबरोबर दिसत असला तरी त्याची खरी योग्यता ओळखण्यास कोण समर्थ आहे! अशा लक्षणांनी युक्त असणारा जो पुरुष असतो, तो आशापाशरहित असा मुक्त पुरुष असल्याचे ओळखावे. अर्जुना! हाच तो खूप वाखाणला जाणारा योगी पुरुष होय."

*योगी वा ज्ञानी*पुरुषाच्या नैष्कर्म्य वा निष्काम अवस्थेचे असे वर्णन करून श्रीकृष्ण अर्जुनास त्याने तसे होण्यासाठी प्रयत्न करावेत, असा त्यास उपदेश देतात.

कर्मयोगाची उपासनापद्धती::::

स्वधर्माचरणरूपी यज्ञ

नियत कर्म करावे; कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे चांगले; स्वधर्माचरण करावे; अन्यथा आचरण बंधनकारक ठरते. कर्मफलाची आसक्ती न ठेवता कर्म करावे, असेही श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात.

स्वधर्म हाच यज्ञ आहे. ब्रह्मदेवाने मनुष्यांना हाच यज्ञ नियोजित करून दिलेला आहे. त्याने ऐहिक व पारलौकिक असे दोन्ही प्रकारचे कल्याण होते. देव व मनुष्ये यांचा दृढ संबंध आहे. देवांचा भाग देवांना देऊन यज्ञावशिष्ट भागाचे आपण सेवन करावे. असे करणारे सर्व पापांपासून मुक्त होतात. परमात्म्यापासून वेद - कर्म - यज्ञ - पर्जन्य - अन्न -भूते असा सृष्टिक्रम आहे. परमात्मा नित्य यज्ञात प्रतिष्ठित असतो. म्हणून सृष्टिचक्र चालविणारा स्वधर्मरूपी यज्ञ करून त्याची आराधना करावी व किंकर्तव्यमूढ होऊन सृष्टिक्रमास घातक असे कर्मे करण्याचे टाकण्याचे कृत्य अवलंबू नये, असे श्रीकृष्णांनी या तृतीय अध्यायी म्हटलेले आपण पूर्वीच पाहिले आहे*(उन्मेष१८ :गीतेतील यज्ञाचे स्वरूप,पृ.क्र.२६२-२७२)* .

शाश्वत कल्याणाचा मार्ग

श्रीकृष्णांच्या या उपदेशास स्मरून जे वागत नाहीत, त्यांचे तसे आचरण अधर्ममय असते. विषयोपभोगात आसक्त होणारे, कर्मत्याग करणारे मानव पापी होत. म्हणून स्वधर्मकर्म करावे व विषयवासना त्यागाव्यात, असा त्यांचा साधकांच्या शाश्वत कल्याणाचा उपदेश आहे.

श्रीकृष्णांनी सांगितल्याप्रमाणे जो वागतो, त्यास कर्मयोगसिद्धी प्राप्त होऊन आत्मरती प्राप्त होते. त्याला कोणतेच कार्य उरत नाही. तरीही जनकाप्रमाणे असे मुक्त पुरुषही लोकसंग्रहार्थ कर्मे करतच राहतात.

लोकोत्तर पुरुषांची चर्या::::

कर्मकर्तव्य

म्हणून कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही मनुष्याने कर्मांचा त्याग करून स्वस्थ बसून राहणे योग्य नाही, हा मुद्दा प्रभावीपणे अर्जुनाच्या मनावर बिंबवण्यासाठी प्रभू म्हणतातः

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते।।३-२१।।

"आप्तकाम पुरुषाने आपल्या आचरणाने लोकांसाठी आदर्श निर्माण केला पाहिजे. कारण श्रेष्ठ पुरुष जसे वागतात, त्याचेच इतरेजन अनुकरण करतात. त्यांनी जी गोष्ट प्रमाण मानलेली असते, ती लोकमान्य ठरते व तसेच लोक वागतात."

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।।३-२२।।

"हे पार्था! या त्रैलोक्यातही मला करण्याजोगे असे काही पण नाही; तसेच प्राप्तव्य अशी कोणतीही गोष्ट नाही. तरीही याच कारणांनी मी कर्म करत असतो."

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।।३-२३।।

"जर मी कर्म करण्याविषयी उदासीन राहिलो, तर अर्जुना! हे सर्व लोक माझे तसे वर्तन प्रमाण मानून तसेच वागतील."

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम्।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः।।३-२४।।

"माझ्या अशा कर्म न करण्यामुळे हे सर्व लोक निष्कर्तव्य होऊन हे विश्वचक्र थांबेल. सर्व लोकांचा उच्छेद होईल. लोकांना अधर्माच्या मार्गाला मीच लावले असे होऊन या सर्व लोकांची - या प्रजेची कल्याणाची गती रुद्ध होईल."

"तरिं प्रजा हें कैसिं। निस्तरैल"

भगवंतांच्या स्वतःच्या कर्म करण्यामागची भूमिका ही अशी आहे. ज्ञानेश म्हणतातः

आतां आणिकाचियां गोठी। तुज सांघो काईं किरीटी।
देखैं मीचि किं इयें राहाटी। वर्तत असें।।३-१६०।।
काईं सांकडैं काईं मातें। कीं कवणें एकें आर्त्तें।
आचरें मी कर्मातैं। म्हणसिं जन्हीं।।१६१।।
तरिं पुरतेपणालागीं। आणिकु दुसरा नाहीं जगीं।
ऐसीं सामग्री माझियां आंगीं। जाणसिं तूं।।१६२।।
मृत गुरुपुत्र आणिला। तो तुवां पवाडा देखिला।
तोहीं मी उगला। कर्मीं वर्तें।।१६३।।
परि स्वधर्मिं वर्त्तें कैसा। साकांक्षु कां होय जैसा।
तेयांचिं एकां उद्देशा-। लागौनियां।।१६४।।

"महापुरुष, थोर संतमंडळी यांना कर्मत्याग करून चालत नाही, तो याच कारणासाठी. त्यांच्या गोष्टी तरी तुला सांगून काय करायचे

आहे! अर्जुना! प्रत्यक्ष मीही कर्मत्याग करत नाही व सर्व कर्मे यथायोग्य तऱ्हेने पार पाडण्यासाठी दक्ष असतो. मला काही कमी आहे व ते मिळवावयाचे आहे म्हणून किंवा कोणती कामना आहे, तर ती पूर्ण करावी म्हणून का मी कर्मे आचरतो! तुला तर माहीतच आहे की माझ्यासारखा सर्वकामतृप्त असा पुरुष मीच आहे! माझे सामर्थ्य तुला पूर्णपणे माहीत आहे. मृत गुरुपुत्राला मी समुद्राकडून पुन: जिवंत करून आणला, हे माझे असामान्यत्व तुला विदितच आहे. असा **मीसुद्धा ज्या धर्माचे आचरण करतो, तो धर्म म्हणजे *कर्मयोग*** हे सांगायला हवेच असे नाही. मी पण असे निमूटपणे कर्म करत राहतो, ते उगीचच की काय!"

जैं भूतजात सकल। असें आम्हांचि आधीन केवल।
तरिं न व्हावें बरल। म्हणौनियां।।३-१६५।।

"स्वधर्माचरण म्हणून मी जी कर्मे करतो, ती कशी असतात, तर सकाम पुरुष जितक्या दक्षतेने कर्मे सिद्धीस जावीत अशा प्रकारे ती करतो, अगदी तशाच प्रकारे मी पण माझी कर्मे करतो. पण असे करण्यामागचा माझा उद्देश मात्र वेगळा असतो. तो म्हणजे ही सर्व भूतमात्रे जी माझ्या अधीन आहेत, त्यांनी वेडेवाकडे वर्तन करू नये; मी जसा कर्म करण्याचा आदर्श त्यांच्यापुढे ठेवला आहे, तसेच त्यांनी वागावे म्हणून."

आम्हीं पूर्णकाम होऊनि। जऱ्हीं आत्मस्थिती राहूनि।
तरिं प्रजा हें कैसेनि। निस्तरैल।।३-१६६।।
इहीं आमुचिं वासु पाहवीं। मग वर्त्तति परी जाणावीं।
तैं लौकिक स्थिति आघवीं। नासिलीं होईल।।१६७।।

"महापुरुष, संत, अवतारी पुरुष हे सर्व जर आत्मसंतुष्ट होऊन स्वरूपानंदात निमग्न होऊन इतरेजनांना विसरून जातील, तर प्रजेला शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखवणारे कोण उरतील! त्यांना उपदेश करावा, त्यांना सन्मार्गास लावावे, त्यांनी आपले अनुकरण करून धर्मकार्य करावे, यासाठी ते आमच्याकडे मार्गदर्शनासाठी मोठ्या आशेने पाहतात. त्यांचा हा मार्ग जर मी आणि हे आप्तकाम पुरुष आपल्या उदासीनपणामुळे सुकर करण्यास साहाय्य करणार नसतील, तर या विश्वाचा उच्छेद होऊन अधर्माचे राज्य प्रस्थापित होण्यास कितीसा वेळ लागेल! "

लोकसंग्रहार्थ कर्म

म्हणौनि समर्थु जो एथें। लाणि सर्वज्ञतें।
तेणें सविशेषें कर्मातैं। त्यजावें ना।।३-१६८।।

"लोकांनी अपमार्गाने जाऊ नये म्हणून तर या लोकींच्या अशा श्रेष्ठींनी आपल्या सर्वज्ञतेचा उपयोग करून लोकांना सन्मार्गावर ठेवण्यासाठी जी कर्मे करावी लागतात, त्यांचा अजिबात त्याग करता कामा नये."

अशी कर्मेसुद्धा "मला काय त्याचे! माझे तर सर्व काम झालेले आहे!" या वृत्तीने न करता अहमहमिकेने केली पाहिजेत असे भगवंतांचे म्हणणे आहे. ब्रह्मचर्यपूर्वक संन्यासाश्रमात असणाऱ्या लोकांना कर्मे आवश्यक नसल्याचे प्रतिपादन आद्यश्रीशंकराचार्यांनी गीतेच्या *तिसऱ्या* अध्यायावरील भाष्यात केले आहे. त्याचा विचार आपणास याबाबत करणे क्रमप्राप्तच आहे. पण तत्पूर्वी कोणत्याही तात्त्विक वा वैचारिक कोलांटयाउड्या मारण्याची कसरत करावी न लागता याविषयी येणारी ज्ञानेशांची स्पष्टोक्ती पाहू या. कारण या श्रीशंकराचार्यांच्या गीताभाष्याच्या विद्वत्तापूर्ण अथांग अन गहन सागरात किनाऱ्याला लागू पाहणाऱ्या आपणासारख्या सामान्यांस ज्ञानेशोक्तीच दीपगृहासमान मार्गदर्शक आहे.

"अलौकिकां नोहावें। लोकांप्रति"

ज्ञानदेव म्हणतात:

देखैं फलाचियां आशा। आचरें कामुकु जैसा।
कर्मीं भरु होआवा तैसा। निराशाहीं।।३-१६९।।
जैं पुडुतीं पुडुति पार्था। हें सकल लोकसंस्था।
रक्षणिय सर्वथा। म्हणऊनियां।।१७०।।

श्रीकृष्ण पुढे सांगतात की, "फलाशेने वेडावलेला लोभी मनुष्य जेवढ्या उत्साहाने कर्मे करतो, तेवढ्याच उत्साहाने नैष्कर्म्यावस्था प्राप्त झालेल्यांनी पण कर्मे केली पाहिजेत. कर्माविषयी अनास्था बाळगणे, ती उदासीनपणे केली तर केली, नाही तर नाही, असे करणे, पदरी पडली आहेत म्हणून कशीतरी करणे, यामुळे जगरहाटी सुरळीत चालणार नाही."

मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहोरें लावावें।
अलौकिकां नोहावें। लोकांप्रति।।३-१७१।।

पुढे श्रीकृष्ण सांगतात: "तत्त्वज्ञानी पुरुषाने सकळ कर्मे यथायोग्य आचरून लोकांपुढे वर्तणुकीचा आदर्श निर्माण करावा. कारण कर्माधारे हे जग वर्तते, स्थित असते व सृष्टिक्रम चालतो. हे सर्व रक्षण करण्यायोग्य आहे. म्हणून त्याचा उच्छेद होईल, असे वागू नये. शास्त्र सांगेल तसे वागावे व जगाला सरळ मार्गाला लावावे. काहीतरी विक्षिप्तासारखे वागू नये. लोकबाह्य वर्तन करू नये."

विश्वाचा उच्छेद

सर्वांनीच समजा आजन्म ब्रह्मचर्य पाळले, धर्मविहित अशा कामास त्याज्य ठरविले, तर एखाद्या पिढीतच संपूर्ण मनुष्यजातीचा उच्छेद होईल, मानवसमाज नामशेष होईल, असा या श्रीकृष्णांच्या सांगण्याचा एक ध्वनितार्थ निघतो. आणि इतरही जी उपजीविकेसाठी करावयाची कर्मे तीही सर्व जनांनी त्यागली तर भुकेने सगळ्यांचे प्राणच जायचे! मग भिक्षापात्र हाती घेऊन दारी येणाऱ्या भगवे वस्त्र परिधान केलेल्या चतुर्थाश्रमी संन्याशास किती काळ जगता येईल व आपली ज्ञानसाधना करण्यापुरते आयुष्य त्यास कसे मिळेल!

जिज्ञासूंच्या लक्षात आपोआपच येईल की सगळे कर्म टाका व संन्यास घ्या, असे सांगणारे किती उथळ विचार करतात ते! कारण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागायचे असे जर सगळ्या जगाने ठरवले, तर मनुष्यजातीचा संहार होण्यास फारसा काळ लागणार नाही. तसेच ब्रह्म्याने सर्जिलेल्या या सृष्टीचा असा घात करणाऱ्या तत्त्वज्ञान्यांस अधर्मप्रवर्तक असेच म्हणावे लागेल. कारण हे विश्व व त्यातील सृष्टिचक्र ज्या ऋताद्वारे चालते, ते थांबेल असा मानवांस उपदेश करणारे तत्त्ववेत्ते, श्रीकृष्ण परमात्म्याच्या उपदेशाचा चुकीचा अर्थ लावत असतात व स्वतःसह जगताचे अकल्याण करून घेऊ पाहतात. असो.

आदर्श तत्त्वज्ञानी

भगवंत पुढे असे सांगत आहेतः

जैं सायासें स्तन्य सेविं। तैं पक्वान्नें केविं जेविं।
म्हणौनि बालकां जैसीं नेंदावीं। धनुर्द्धरा।।३-१७२।।
तैशीं कर्मीं जेयां योग्यता। तेयांप्रति निष्कामता।
न प्रगटावीं खेलतां। आदिकरूनि।।१७३।।

"जनसामान्य हे तान्ह्या बालकाप्रमाणे असतात. ते मोठ्या कष्टाने आईने पुढे केलेल्या स्तनातील दूध पिते. पक्वान्ने जर अति स्वादिष्ट म्हणून त्याला भरवू गेले, तर केवढा अनर्थ होईल! ते पक्वान्ने खाऊ तरी शकेल का! म्हणून तान्ह्या बालकास ती जशी देऊ नयेत, तशीच हे अर्जुना! अज्ञ जनांना नैष्कर्म्य स्थितीची माहिती व उपदेश चुकूनही करू नये. तसेच नैष्कर्म्यावस्था प्राप्त झालेल्याने सहज म्हणूनही अशा सामान्य जनांपुढे ती प्रकट करू नये. त्या लोकांना ज्ञानमार्ग उपदेशू नये. कारण तेवढी त्यांची पात्रता नसते. एवढ्या योग्यतेचा अधिकारी दुर्लभच असतो, हे नक्की ध्यानी ठेवावे."

तेथ सत्क्रियाचि लावाविं। तैंचि एकीं प्रशंसाविं।
नैष्कर्मिंहीं दावाविं। आचरौनि।।३-१७३।।

"म्हणून सर्वसाधारण जनांना विहित कर्माचरणाचाच उपदेश करावा. निषिद्ध कर्मे त्यागण्यास सांगावे व स्वधर्माचे पालन करण्याची आज्ञा द्यावी. फलासक्तीचा त्याग करण्यास शिकवावे. मनाचा व इंद्रियांचा संयम बाळगण्याचा अभ्यास करायला लावावे. कर्मयोगाची प्रशंसा करावी. सर्वकर्मत्यागपूर्वक ब्रह्मचर्यव्रताने करावयाची साधना म्हणजे लौकिक चतुर्थाश्रमी संन्याशांचा मार्ग त्यांच्यासाठी उपयुक्त नाही, असे ठामपणे सांगावे. तसेच कर्मयोगाचे निष्ठापूर्वक आचरण केल्याने आपोआपच ज्ञान प्राप्त होईल, हे त्यांस पटवून द्यावे."

तेयां लोकसंग्रहालागिं। वर्ततां कर्मसंगीं।
तो कर्मबंधु आंगीं। वाजैल ना।।३-१७४।।

"त्यांना तसा धडा घालून देणारी आपलीही वर्तणूक असावी. सत्कर्म ते हेच! हे केल्याने व लोकादर्शासाठी कर्मे केल्याने कर्मसंग व त्यापासून कर्मबंध होणे, हे अशा मुक्तांना सर्वथैव असंभव आहे. अशी ज्याची वर्तणूक असते, तोच आदर्श जीवन्मुक्त समजावा."

जनकादी ज्ञानी हे असेच जीवन्मुक्त होते, असा इतिहासाचा दाखला आहे.

जैसीं बहुरुपियाचिं राओराणी। स्त्रीपुरुषभाओ नाहीं मनीं।
परि लोकसंपादणी। तैशींचि करिति।।३-१७६।।

"बहुरूपी वेगवेगळी सोंगे आणतो. तो राजा होतो आणि राणी पण होतो. पण त्यामुळे पुरुषत्व वा स्त्रीत्व यांची वेगवेगळी भावना जशी त्याच्या मनात उत्पन्न होत नाही, तसेच निष्काम पुरुषाने कर्मे केल्याने कर्ममळ त्याला लागत नाही."

याप्रकारे या गीताश्लोकांचा *(श्लोक क्र.३-२१ ते २४)* ज्ञानेशांनी दर्शित केलेला अर्थ आपण पाहिला.

शाङ्करमत::::

तृतीय अध्याय

कर्मयोगाने मुक्ती प्राप्त होते, या मतास श्रीमदआद्यशंकराचार्यांचा विरोध होता, असे त्यांच्या गीताभाष्याच्या तृतीय अध्यायाच्या उपोद्घातावरून जाणवते. त्यांचे मत काय आहे, ते संक्षेपतः पाहू याः

"गीताशास्त्राच्या दुसऱ्या अध्यायात भगवंतांनी ***(अ) प्रवृत्तिपर योगबुद्धी व (ब) निवृत्तिपर साङ्ख्यबुद्धी*** यांविषयी विवेचन केले आहे. ***"प्रजहाति यदा कामान् ...।।२-५५।।" ते "एषा ब्राह्मी स्थिती पार्थ ...।।२-७२।।"*** या श्लोकांमध्ये साङ्ख्यबुद्धीचा आश्रय करणाऱ्यांसाठी सर्व कर्मे त्यागणे आवश्यक असून ज्ञाननिष्ठेनेच कृतार्थता मिळते," असे भगवंतांचे मत असल्याचे आचार्य प्रतिपादन करतात. अर्जुनाला जरी ***"कर्मण्येवाधिकारस्ते ...।।२-४७।।"*** इ.उपदेश त्यांनी केला असला, तरी कर्माने मुक्ती मिळते, असे गीतेचे मत नसल्याचे आचार्य म्हणतात.

ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम एकापाठोपाठ येतात. तर श्रीशंकराचार्य म्हणतात की श्रुतिवचनांप्रमाणे जो मुमुक्षू आहे त्याने *सर्वकर्मसंन्यास* घेतला पाहिजे; संन्यासाश्रमच ग्रहण केला पाहिजे. त्यासाठी ते पूरक विधाने देतात, ती अशीः ***"व्युत्थायात् भिक्षाचर्यं चरन्ति।।बृ.उ.।।३/५/१/।।"*** -सर्व प्रकारच्या भोगांपासून विरक्त होऊन भिक्षावृत्ती अवलंबावी. ***"तस्मात् सन्न्यासमेषां तपसामतिरिक्तमाहुः।।नारा.उ.।।२/७९।।"*** - सर्व तपांत संन्यास श्रेष्ठ आहे. ***"न्यास एवात्यचरेत"*** -संन्यासच श्रेष्ठ आहे. ***"इति न कर्मणा न प्रजया न धनेन त्यागेनैकेऽमृतत्वमानशुः।। नारा.उ. ।।"***-न कर्माने, न प्रजेने, न धनाने, न इतर कशानेही, पण केवळ त्यागानेच कित्येक पुरुष अमृतत्वप्राप्ती करते झाले आहेत, इ.

तसेच बृहस्पतीनेही कचास विवाह न करताच संन्यास घेतल्याने सार वस्तूचे दर्शन घडते, असे सांगितल्याचे उदाहरण आचार्य देतात. "जीव कर्माने बांधला जातो व ज्ञानाने मुक्त होतो, म्हणून आत्मतत्त्वाचे

ज्ञान झालेला कर्मे करत नाही," असा महाभारतातील शांतिपर्वाचा दाखला त्यांनी दिला आहे. आचार्य म्हणतात की भगवंतसुद्धा ***"सर्वकर्माणि मनसा संन्यस्य।।५-१३।।"*** म्हणजे सर्व कर्मे मनापासून सोडावीत असे सांगतात.

मोक्षसिद्धी व साधन

ते पुढे असेही म्हणतात की, "मोक्ष अकार्य म्हणजे कोणत्याही क्रियेने प्राप्त होणारा नसल्याने कर्मामुळे वा कर्मयोगाद्वारे मोक्षप्राप्ती असंभव आहे. तसेच असतापासून सत् कसे उत्पन्न होईल! कर्म हे असत् आहे. त्यापासून ज्ञान हे सत् कसे संभवेल! अर्थात केवळ ज्ञानानेच मोक्ष प्राप्त होतो. कर्माने नाही."

एक विचार

आपण सारांशाने आचार्यमत पाहिले. मुमुक्षूंसाठी येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो की, मोक्ष मिळावा म्हणून त्याने त्वरित संन्यासाश्रम स्वीकारावा का! या प्रश्नाचे उत्तर जिज्ञासूंना यथामती शोधावे लागेल. कारण प्रकांड पंडित श्रीशंकराचार्य हे वादविवादपटु असून अनेकानेक शास्त्रांचे सखोल अध्ययन केलेले ज्ञानी होते. त्यांच्या तोडीची आपणाजवळ बुद्धिमत्ता असणे अशक्यच आहे. त्यामुळे त्यांच्याशी वादविवादाची भूमिका घेणे आपणासारख्या सर्वसामान्यांस शक्यच नाही.

तरीही म्हणावेसे वाटते की ***"प्रजहाति यदा कामान् .."*** इ.श्लोक जीवन्मुक्त दशेचे वर्णन करतात. त्यातून कर्मे करू नयेत असा अर्थ काढणे योग्य वाटत नाही. ज्ञानी व कर्मी यांच्या शरीरधारणेत कोणताच फरक नसतो. दोघांना खाणे-पिणे-निद्रा इ.अवश्यंभावी आहेत. ***"न हि कश्चित्क्षणमपि जातु ..." "शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मण: ।।३-५८।।"*** हे श्लोक याचे निदर्शक आहेत. यामुळे ज्ञानी जनांसही कर्मांचा सर्वथैव त्याग करणे असंभव आहे.

संन्यासाश्रमाचा आत्यंतिक आग्रह

त्याचप्रमाणे जर ज्ञान्यांनी चतुर्थाश्रमी संन्याशाप्रमाणेच कर्मे त्यागावीत, असे जर श्रीगोपालकृष्णांचे मत असते, तर ***"... लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि", न मे पार्थास्तु कर्तव्यं ...।।", " न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां ....।।"(श्लोक क्र.३-२०, २२ व २६)*** इ.श्लोकांची संगती नीट लागत नाही. ज्ञान्यांनीच काय, भगवंतानेसुद्धा कर्मे व तीही, विहित व प्राप्त, करणे कसे अत्यावश्यक आहे, हे श्रीकृष्णांनी सांगितले आहे. त्यानुसार भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्यांचा संन्यासाश्रमाचा हा आत्यंतिक आग्रह आपणांस पटत नाही, असे धाष्टर्यपूर्वक म्हणावेसे वाटते. आणि ज्ञानेशांचेही मत असेच आहे की ***"अलौकिकां नोहावें। लोकांप्रति (३-१७१)", "ऐसियांहिं करूं म्हणति तेयांचा। आग्रहोचि उरें (३-६३)"*** इ.अनेक वचनांच्या आधाराने आपणास सखेद असेच जाणवते की हे संन्यासाश्रमाची आत्यंतिक भलामण करणारे श्रीमदाद्यशांकरमत आपणाकरता उपयुक्त नाही.

असत् व सत्

आता प्रश्न उरतो तो कर्माद्वारे ज्ञानप्राप्ती होते की नाही; सत् हे असताच्या साधनेने *(म्हणजे कर्मयोगाने)* प्राप्त होते का एवढाच. हे संपूर्ण जगतच जर असत् आहे, तर कर्म ते कोणते मोठे असत् व ज्ञान ते कोणते मोठे सत् हे प्रश्न सखोल विचार केल्यास उद्भवतात. सत् व असत् इ.विषयक प्रश्नच ह्या मितीत गैरलागू ठरतात, असे जाणिवपूर्वक म्हणावेसे वाटते. आणि या असत् जगतातील असत् अशा श्रीमदाद्यशंकराचार्यांचे मत, मग ते कितीही विद्वत्तापूर्ण का असेना! तरी तेही असत्च असणार नाही का! मुमुक्षू व ज्ञानी श्रीशंकराचार्य या दोघांचाही या असत् जगतातच समावेश नाही का होत! मग शांकरमत *असत्* म्हणून अग्राह्य का न धरावे, असे सामान्य जिज्ञासूस का वाटू नये!!!

निर्णयार्थ

तेव्हा ***"उत्सीदेयुरिमे लोका ...।।३-२४।।"*** या भगवंतोक्तीचा आधार घेतला पाहिजे. शास्त्र म्हणते की ***या असत् जगतातील सत् उक्ती ती केवळ त्या भगवंताचीच असू शकते.*** जर तो सर्वज्ञाता भगवंत स्वत:च कर्माविषयी एवढी आस्था दाखवत असेल, तर शास्त्रांच्या आलोडनाने विशाल बुद्धी प्राप्त झालेल्या आचार्यांनी त्याविषयी एवढी अनास्था का दाखवावी; इतर तीन आश्रमांनंतर विधिवत चतुर्थाश्रम घेण्याची सोय धर्मशास्त्राने करून ठेवली असता तरुण आणि म्हणूनच विषय सोडण्यास किंचितही समर्थ नसू शकणाऱ्या संन्याशांचे किंकर्तव्यमूढ तांडे उभे राहतील, असा सामान्यांची मतिविभ्रम करणारा उपदेश का करावा व तोही गीतेसारख्या सर्वांच्या हृदयात श्रेष्ठतम स्थान असणाऱ्या ग्रंथाच्या भाष्यानिमित्त, हे प्रश्न आपणासाठी अनाकलनीयच राहतात.

त्यातून गीतेचा भर मनाच्या योगसामर्थ्यावर आहे. बाह्य आचारांच्या दांभिकतेवर नाही, हे तर आपणास विदितच आहे. संन्यासाश्रम घ्यायचा व विषयांचे मनातील अतिक्रमण थोपवता येऊ नये, याने कोणते नि:श्रेयस पदरी पडणार आहे! उलट ***"तस्मादसक्त: सततं कार्यं कर्म समाचर।... ।।३-१९।।"*** असे म्हणत अनासक्त होऊन कर्माचरण करणाऱ्यांसाठी श्रीकृष्ण मोक्षपदाची ग्वाही देतात, हे आपणास आताच अवलोकण्यास मिळाले होते.

आचार्यांच्या मतामागील इतर संभाव्य कारणे

कदाचित बौद्ध धर्माच्या पराकोटीच्या श्रमण परिव्राजक वृत्तीचे सर्वसामान्य समाजातील त्यावेळचे आकर्षण लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी व वैदिक मताच्या जनसामान्यात पुन:प्रतिष्ठापनेसाठी आचार्यांनी प्रवृत्तिपर निष्काम कर्मयोगाच्या साधनेस दुय्यम स्थान देऊन यतिधर्मास उचलून धरणाऱ्या संन्यासाश्रम व परिव्राजकदशेस अवश्यंभावी मानणाऱ्या निवृत्तिपर मोक्षधर्मास ज्ञानयोगाच्या आधाराने तात्त्विक संतुलनासाठी उचलून धरले पण असेल, असेही आपल्या

मनास वाटून जाते. किंवा त्यांचे भाष्य आपणासारख्या अज्ञानी कर्ममार्गीयांसाठी नसेलच! ते फक्त ज्ञानवान लोकांसाठीच असेल!

पण मग कोणीही, अगदी आचार्यांनी पण, ज्ञानवानास अधिकउणे सांगण्याची काय आवश्यकता! त्याला काय खरा गीतार्थ अवगत झालेला नसेल! तसा तो गीतार्थ त्याला ज्ञात झाला नसेल तर मग त्यास ज्ञानवान तरी कसे म्हणावे! आणि जर परिव्राजकांसाठीच हा भाष्यार्थ असेल, तर ज्ञानवान नसलेले ते आणि सर्वसामान्य अज्ञानी यांच्यात तसा तत्त्वतः काय फरक आहे! अशा परिव्राजकांना तरी तो आम्हापेक्षा विशेष असा काय कळणार! म्हणजे असा जो गीतार्थ आचार्य प्रकट करतात, तो मग आहे तरी कोणासाठी असा एक नवीनच प्रश्न उद्भवतो. या सर्वांची उत्तरे शोधणे आपल्या कुवतीपलीकडील आहे. म्हणून इत्यलम्।

आणि स्वतःच्या आचरणातून आचार्यांनी कोणता आदर्श स्वीकारला याकडे लक्ष दिले तर असे दिसून येते की त्यांनी श्रीकृष्णांनी सांगितलेला ज्ञानवानांनीही कर्मे करावीत हाच आदर्श आपल्याही शिष्यसंप्रदायापुढे ठेवलेला होता. त्यांचे संन्यासोत्तर कार्य म्हणजे वैदिक धर्माची पुनःप्रस्थापना असो, पीठांची स्थापना असो, मुमुक्षूंसाठी उत्तमोत्तम ग्रंथांची, स्तोत्रांची रचना असो, ज्ञानप्रदानाचे कार्य असो, कितीतरी अशा विविध पैलूंतून आचार्यांनी ***"...स यत्प्रमाणं कुरुते। लोकस्तदनुवर्तते ।।३-२१।।"*** या श्रीकृष्णोपदेशाप्रमाणेच आजीवन कार्य केले असे स्पष्टच आहे. आणि तेही लौकिक दृष्ट्या घेतलेल्या संन्यासानंतर आणि आपल्या सर्वांच्या श्रद्धेप्रमाणे त्यांच्या आत्यंतिक ज्ञानी स्थितीत, हेही विशेषच मानावे लागते! कदाचित आचार्यांचा सर्वकर्मसंन्यासाचा अथवा कर्मत्यागाचा अभिप्राय केवळ इतर तीन आश्रमांच्या नित्य-नैमित्तिकादी शास्त्रोक्त कर्मांपुरताच असावा, असे त्यांच्या आचरणावरून वाटते! पण श्रीकृष्णांना हेही मान्य नाही असे आपण पाहतोच आहोत.असो.

गीतारहस्यकार स्व.श्री.लोकमान्य टिळकांनी या संन्यासविषयक प्रश्नाचा सविस्तर उहापोह त्यांच्या अप्रतिम ग्रंथात केला आहे. तो ज्यांना या वादंगात अधिक रस असेल आणि सखोल अवगाहन करण्याची जिज्ञासा असेल, त्यांनी त्या ग्रंथांतरी पहावा. आपले मुख्य प्रयोजन ते नाही. आपण माऊली संत श्रीज्ञानदेवांचे बोट धरून गीता अभ्यासत आहोत. तीही अज्ञ बालकाच्या भूमिकेतून! म्हणून लहान तोंडी मोठे घास न घेता, माऊली जे छोटे छोटे चिऊकाऊचे घास करून आपणास गीतेचे पक्वान्न भरवते आहे, तेच आनंदाने आपले चिमुकले मुख *वोडावून* ग्रहण करू या!! इत्यलम्।

कर्मांची प्रकृतिवशता::::

प्रकृति व गुणांद्वारे कर्म घडते

अज्ञानी पुरुषांचा बुद्धिभेद करू नये, त्यांना कर्मत्यागपूर्वक संन्यासाश्रमाचा अवेळी मार्ग दाखवू नये. त्यांना आपण स्वतः उत्तमरीत्या कर्तव्यकर्मांचे पालन करून तसा आदर्श घालून द्यावा, असे श्रीकृष्ण म्हणतात. आता त्या सामान्यांनी कर्मे कशी करावीत , याचा उपदेश करतांना ते म्हणतातः

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः।
अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते।।३-२७।।

"वास्तविक पाहता कर्मे टाकू पाहणाऱ्या मूढांच्या हे लक्षातच येत नाही की प्रकृतिजन्य गुणांमुळे कर्मे केली जातात. सर्व कर्मे गुणांद्वारे होत असतांनासुद्धा अहंकाराने भ्रांत बुद्धी झालेला मूर्ख मनुष्य आपणासच त्या कर्मांचा कर्ता समजतो;" आणि असा मूढ मनुष्य कर्मे करण्यासाठी किंवा सर्वकर्मसंन्यास करून यती वा भगवी वस्त्रे नेसणारा संन्यासी होण्यासाठी पुढे सरसावतो.

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते।।३-२८।।

"परंतु हे महाबाहो अर्जुना! गुण व कर्म यांचा परस्परसंबंध व प्रकृतीचा स्वभाव यांचे यथातथ्य ज्ञान ज्यांना असते, ते गुणच गुणांच्या *(कर्मांच्या)* ठायी प्रवृत्त होत आहेत, आपण कर्ते नाहीत, हे ओळखून, विषयासक्तीचा त्याग करण्यास प्रवृत्त होतात."

"न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिणाम्"

३-२७ व २८ या दोन्ही श्लोकांच्या परिशीलनाने आपणास पुनश्च आद्य श्रीशंकराचार्यांच्या संन्यासाश्रमाच्या आग्रही वाटणाऱ्या विधानांवर आक्षेप घ्यावासा वाटणे साहजिकच आहे. कारण गुण-कर्मे-इंद्रिये-विषय हे प्रकृतीच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे उद्भवतात. आपणाकडे त्यातील कर्मकर्तृत्व घेणे मूढपणाचे लक्षण आहे. मग कर्मे करावीतच असा हट्ट जसा धरता येत नाही, तसेच कर्मे टाकावीत असा दुराग्रह तरी का धरावा!

अर्थात कर्मयोग्यास ज्ञान व मोक्ष हे मिळणार नाहीत, हे आचार्यांचे अनुस्यूत मत, गीतेचा सरळ अर्थ ज्ञानदेवांच्या कृपाकटाक्षातून अवगत करून घेऊ पाहणाऱ्या आपणासारख्या भोळ्याभाबड्या भाविक भक्तांच्या आवाक्याबाहेरील आहे. एवढे म्हणून, तसेच श्रीमदाद्यशंकराचार्यांविषयीच्या आपल्या अत्यादरबुद्धीत यत्किंचितही उणेपणा येऊ न देता, आपण आपल्यापुरता या विषयावर पडदा पाडू या.

तसा हा सर्व शांकरमताचा भाग सैद्धांतिक तत्त्वज्ञानाचा आहे. प्रत्यक्षातील वास्तव अशा या जगात ज्यांना जगून कृतार्थ व्हावयाचे आहे, त्यांना यावज्जीव काही ना काही कर्म तर करावेच लागेल. बिथरलेला हत्ती जर मिथ्या असेल, तर त्याच्यापासून दूर पळून जाण्याची खरे तर काय आवश्यकता! कारण पळून ज्याने जावयाचे तोही मिथ्या व त्याचे पळणेही मिथ्याच नसणार काय! पण हत्तीवर माहुताच्या रूपाने जे *सत्* विराजमान होते, त्याने आपल्या *सत्* शब्दांद्वारे संन्याशास पळून जा, असे म्हटले होतेच ना! त्याच्या सत् शब्दांचा अवमान करणारा मिथ्या भ्रमाने हत्तीच्या पायाखाली चिरडला

जाणे ही या असत् जगातील सत् घटनाच होती ना! मग उगीच शब्दच्छल करून कोणास काय मिळणार आहे!

निष्ठापूर्वक वागून भगवंतांच्या शब्दांवर श्रद्धा ठेवून त्यांचा सरलार्थ घेणेच योग्य नव्हे काय! मिथ्या शब्दभ्रमात सापडले तर आपला पण त्या मूढ संन्याशी शिष्यासारखा या संसारगजाच्या पायदळी चुराडा होण्यास कितीसा वेळ लागेल, हे ज्याचे त्यानेच जोखावे व कर्मयोगाचा जो महान आदेश श्रीकृष्ण देतात, तिकडे अविचल चित्ताने अवधान द्यावे, असे नम्रतापूर्वक सुचवावेसे वाटते. असो.

"साक्षिभूतु होऊनि। वर्तति देहीं"

ज्ञानेश कृष्णोक्तीचे *(श्लोक क्र.३-२७ व २८)* स्पष्टीकरण असे करतातः

देखैं पुढिलांचें ओझें। जऱ्हीं आपुलां माथीं घेईजे।
तरिं सांधैं कां न दटिजै। धनुर्द्धरा।।३-१७७।।
तैसीं शुभाशुभें कर्में। जियें निफजति प्रकृतिधर्में।
तियें मूर्ख मतिभ्रमें। मी कर्ता म्हणें।।१७८।।
ऐसा अहंकाराधिरूढु। एकदेशीं मूढु।
तेयां हा परमार्थु गूढु। प्रगटावा ना।।१७९।।

"हे धनुर्धरा अर्जुना! दुसऱ्याचे ओझे आपल्या मथ्यावर घेणाऱ्याला निष्कारण श्रम पडतात. शुभाशुभ कर्मे प्रकृतीच्या स्वभावामुळे निपजतात. पण मूर्ख लोक बुद्धिभ्रंश झाल्याने त्यांचे कर्तृत्व स्वतःकडे घेतात. अहंकाराच्या वारूवर स्वार झालेल्या व स्वस्वरूपाची अनंत व्याप्ती न ओळखता देह म्हणजेच आपण असे मानणाऱ्या अज्ञानी जनांना ज्ञानमार्ग उपदेशू नये. त्यांना कर्तव्यकर्माकडेच प्रवृत्त करावे. म्हणजे हळूहळू तेही परमार्थाकडे वळतील. असो."

हें असो प्रस्तुत। सांधिजैल तुझ हित।
तैं अर्जुना देऊनि चित्त। अवधारीं पां।।३-१८०।।
जैं तत्वज्ञानियांचा ठाईं। तो प्रकृतिभाओ नाहीं।
जेथ कर्मजात पाहीं। निफजत असें।।१८१।।
तैं देहाभिमान सांडूनि। गुणकर्में ओलखौनि।
साक्षिभूतु होऊनि। वर्त्तति देहीं।।१८२।।
म्हणौनि शरीरिं जऱ्हीं होति। तरिं कर्मबंधा नाकलिति।
जैसा कां भूतचेष्टां गभस्ति। घेपवे ना।।१८३।।

"आता एक महत्त्वाची गोष्ट नीट लक्षपूर्वक ऐक. हे सर्व कर्मजंजाळ जिच्यापासून उत्पन्न होते, त्या प्रकृतीची तत्त्वज्ञानी मुक्तांपासून फारकत झालेली असते. कारण त्यांचा देहाहंकार निमालेला असतो. गुण व कर्मे यांचे उल्लंघन करून ते गेलेले असतात. या देही ते केवळ साक्षिचैतन्याच्या रूपाने विराजतात. सूर्याच्या प्रकाशात प्राणिजातांकडून होणाऱ्या कर्मांची बंधने जशी त्याला नसतात, त्याचप्रमाणे निव्वळ चैतन्यमय झालेल्या महापुरुषांना त्यांच्या देहाकडून केली जाणारी कर्मे बद्ध करत नाहीत."

सर्वसामान्यांसाठी कर्मयोगचः:::

ईश्वरप्रणिधान

एवढा उपदेश करून झाल्यावर आता भगवंत अर्जुनास त्याच्या परमहिताची गोष्ट म्हणजे ***कर्मयोगरहस्य*** व त्यातील ***ईश्वरप्रणिधानभाव*** सांगू इच्छितात. मुमुक्षूंसाठी तो त्यांचा खरा उपदेश आहे. आणि लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की या उपदेशातही त्यांनी कोठेही कषाय वस्त्रे परिधान करून त्वरित संन्यासाश्रम घ्यावा असे म्हटलेले नाही. उलट कर्मेच आचरावीत असे उपदेशिले आहेः

प्रकृतेर्गुणसम्मूढाः सज्जन्ते गुणकर्मसु।
तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत्।।३-२९।।

"प्रकृति व तिच्या गुणांनी संमोहित झालेले लोक कर्मे करणारच! कर्माचे कर्तृत्व स्वतःकडे घेणाऱ्या त्या मंदबुद्धी लोकांना ज्ञानी पुरुषाने अकस्मात ज्ञानमार्गाचा उपदेश करू नये. कारण त्यामुळे ते किंकर्तव्यमूढ होतील."

मयि सर्वाणि कर्माणि सन्न्यास्याध्यात्मचेतसा।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः।।३-३०।।

"निरिच्छ होऊन, ममत्वबुद्धी त्यागून, माझ्याठायी चित्तवृत्ती ठेवून सर्व कर्म मला अर्पण करावे, असा मार्ग त्या अज्ञ जनांना उपदेशावा. तू पण याचप्रमाणे वाग अन क्षोभरहित बुद्धीने युद्ध कर."

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यते तेऽपि कर्मभिः।।३-३१।।

"माझ्या या उपदेशानुसार संशयरहित होऊन श्रद्धायुक्त अंतःकरणाने जे लोक कर्मांचे अखंड आचरण करतात, तेसुद्धा ज्ञानी पुरुषांप्रमाणेच कर्मांपासून मुक्त होतात."

"चित्तवृत्ति न्यसावि। आत्मरूपिं"

म्हणूनच श्रीकृष्ण अर्जुनासही युद्ध करावे असा सल्ला देत आहेत. याबाबत ज्ञानेश म्हणतातः

एथ कर्मीं तोचि लिंपे। जो गुणसंभ्रमें घेपें।
प्रकृतिचेनि आटोपें। वर्त्ततु असें।।३-१८४।।
इंद्रियें गुणाधारें। राहाटती निजव्यापारें।
तैं परकर्म बलात्कारें। आपादी जो।।१८५।।
तरिं उचितें कर्में आघविं। तुंवां आचरौनि मज अर्पाविं।
परि चित्तवृत्ति न्यसाविं। आत्मरूपिं।।१८६।।

"अर्जुना! एक लक्षात घे! जो प्रकृतीस वश होऊन कर्मे करतो, जो गुणांच्या अधीन होतो, तोच कर्ममळाने लिप्त होतो. गुणांच्या अधीन होऊन इंद्रिये आपापले व्यापार करत असतात. ते कर्म स्वतःचे नसूनही त्यांचे कर्तृत्व बळेबळे स्वतःकडे घेऊ नये. परंतु कर्मे त्यागू नयेत, सर्व उचित कर्मे यथाशक्ती करावीत आणि ती ईश्वरास - मला - अर्पण करावीत. कर्मे करतांना ईश्वराच्याठायी (माझ्याठायी) चित्तवृत्ती ठेवावी."

"अवसरोचित भोगावें। भोग सकल"

हें कर्म मी कर्त्ता। कां आचरैन मी ययां अर्था।
ऐसा अभिमानु झनें चित्तां। रिघों देसीं।।३-१८७।।
तुवां शरीरपरां नोहावें। कामनाजात सांडावें।
मग अवसरोचित भोगावें। भोग सकल।।१८८।।

"अशा प्रकारे कर्मे केली असता *"हे कर्म आहे व त्याचा कर्ता मी आहे"* असा अभिमान वा अहंबुद्धी चित्तात येणार नाही. देहाएवढेच आपले आत्मस्वरूप मर्यादित नाही. आपण त्या चिन्मयाचे पूर्णांश आहोत, ही भावना मनात सतत जतन करावी. सर्व इच्छा करणे सोडून द्यावे. भगवंताच्या इच्छेनुसार आपल्या हातून कर्मे घडत आहेत, कर्ताकरविता एकमात्र प्रभूच आहे, आपण केवळ निमित्तमात्र आहोत, ही जाणीव बाळगावी. अशी केलेली कर्मे मनुष्यास बंधन करत नाहीत."

"आणि सर्व भोग प्राप्त होतील तसे भोगावेत, पण तेही वर सांगितलेल्या युक्तीनेच - म्हणजे माझ्याठायी चित्त लावून व ते भोग मला अर्पण करून भोगण्याने- मनुष्य विषयवासनांनी लिप्त होत नाही."

भक्ती काय, योग काय, या दोन्हींचे हे असे कर्मयोगाद्वारे श्रीकृष्णांनी दर्शन घडविले आहे. यास भक्तीही म्हणता येते व योगही म्हणता येते. ईश्वरप्रणिधानास अत्यंत महत्त्व असलेला हा मार्ग आहे व त्यास *कर्मयोग, बुद्धियोग, भक्ती, योग, नैष्कर्म्ययोग, संन्यास, कर्मसंन्यास, कर्मफलसंन्यास, कर्मफलत्याग* इ.नाना संज्ञा आहेत. पण *सर्वकर्मसंन्यास वा सर्वकर्मत्याग* असा माननीय श्रीशंकराचार्यांना भावणारा चतुर्थाश्रमी उपदेश यात कोठेही अनुस्यूत नाही. हा कर्मयोग्यांचा संन्यास आहे; चतुर्थाश्रमी संन्याशांचा कर्मत्याग नव्हे!

१) कर्मे योगबुद्धीने करत कर्मबंधापासून मुक्त होणे आणि २) कर्मबंधापासून मुक्त होऊन तरीही कर्मे करणे, **असे या कर्मसंन्यासाचे किंवा कर्मत्यागाचे किंवा कर्मयोगाचे दोन प्रभाग आहेत.** पहिला प्रभाग साधकांसाठी आहे तर दुसरा प्रभाग जीवन्मुक्तांचा व्यवहार कसा असावा, ते सांगतो. असो.

"अनुपरोध मत माझें। परमादरें स्विकारिजैं"

पुढे श्रीकृष्ण काय सांगतात, पाहाः

आतां कोदंड घेऊनि हातीं। आरूढ पां इयें रथीं।
देईं आलिंगन विरवृत्ति। समाधानें।।३-१८९।।
जगीं कीर्त्तितैं रूढविं। स्वधर्माचां मानु वाढविं।
ययां भरापासूनि सोडविं। मेदिनी हें।।१९०।।
आतां पार्था निःशंकु होईं। इयां संग्रामीं चित्त देईं।
एथ हें वंचूनि काईं। बोलों नैएं।।१९१।।

श्रीकृष्ण म्हणतातः "अर्जुना! तू पण मी आता सांगितले तसेच कर. चित्त माझ्याठायी ठेव. देहबुद्धी सोडून दे. अहंकाराने आपणाकडे कर्माचे कर्तृत्व न घेता सत्वर आपले कोदंड उचल व या रथावर आरूढ होऊन क्षात्रवृत्तीस प्रेमभराने आलिंगन देत युद्धासाठी सज्ज हो. जगात तुझी कीर्ती दिगंत पसरो! स्वधर्माचरण करून लोकांपुढे तसा आदर्श निर्माण करून या दुष्ट पापी कौरवांचा पृथ्वीवरला भार कमी कर. माझ्यावर श्रद्धा ठेव व माझ्या उपदेशाबाबत आता संशय घेऊ नकोस. आता या युद्धप्रसंगी युद्धाव्यतिरिक्त तुझ्यासाठी इतर काहीही उचित कर्म नाही, हे मी तुला निश्चयपूर्वक सांगतो आहे,तरी माझ्या म्हणण्यास मान देऊन युद्ध करण्याकडे लक्ष दे."

हें अनुपरोध मत माझें। जिहिं परमादरें स्विकारिजैं।
श्रद्धापूर्वक अनुष्ठिजैं। धनुर्द्धरां।।३-१९२।।
तैहिं सकल कर्मीं वर्त्ततु। जाण पां कर्मरहितु।
म्हणौनि हें निश्चितु। करणिय गां।।१९३।।

"माझे हे स्पष्ट मत तुला ऐकवले. आता तरी ***"व्यामिश्रेणेव वाक्येन ... ।।३-२।।"*** असे तुला वाटू नये. माझ्या या कर्मयोगपर उपदेशास जे लोक पूज्य बुद्धीने स्वीकारून त्याचे श्रद्धापूर्वक आचरण करतात, ते सगळी कर्मे करत असूनही नैष्कर्म्य होतात. त्यांना कर्मबंधन होत नाही. म्हणून कर्मे करणेच उचित आहे. कर्मत्याग सर्वथैव गर्ह्य आहे, हे सकळ जनांनी निश्चित ध्यानात असू द्यावे."

अश्रद्ध लोकांची स्थिती

भगवंतांचा हा उपदेश पचनी न पडणारे लोक दोन प्रकारचे असतातः १) अळेबळेच कर्मे टाकून देत स्वस्थ बसणारे व २) कर्मांचे कर्तृत्व आपल्याकडे घेऊन विषयवासनांत गुरफटून कर्मे करणारे. अशा अश्रद्ध लोकांना इंद्रिये व चित्त स्वतःच्या ताब्यात राखता येत नाही. त्यांच्याबाबत श्रीकृष्ण म्हणतात कीः

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम्।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः।।३-३२।।

"माझ्यावर श्रद्धा नसणारे लोक माझ्या या मताबाबत आस्था ठेवत नाहीत. हा जो सर्वमान्य योगमार्ग सकळ जनांसाठी मी पूर्वापार प्रकटविलेला आहे, त्यानुसार असे लोक आचरण करत नाहीत. उलटसुलट प्रकारची अनेकानेक मते व कर्म करण्याच्या पद्धती या जगात प्रचलित आहेत. त्यांच्यामुळे भ्रमित चित्त झालेले ते मूर्ख लोक माझ्या मताचा अनादर करतात व कल्याणमार्गापासून दूर भटकत जातात."

ज्ञानेश म्हणतातः

नां तरि प्रकृतिमंतु होऊनि। इंद्रियां लला देऊनि।
जैं हें मत माझें अव्हेरूनि। ओसंडितिं।।३-१९४।।
जैं सामान्यत्वें लेखिति। अवज्ञा करूनि देखति।
कां हा अर्थवादु म्हणति। वाचालपणें।।१९५।।

"असे लोक प्रकृतीचे गुलाम असतात. इंद्रियांना त्यांचे आवडते विषय पुरवून त्यांना लाडावून ठेवतात. मी जो हा सर्वांचा शाश्वत कल्याणाचा योगमार्ग सांगितला आहे, त्याचा ते अव्हेर करतात. माझा असा अवमान करतात. मला सामान्य लेखतात. वाचाळपणे माझ्या या गीतावचनांचा वेडावाकडा अर्थ घेतात आणि माझी विधाने गोंडस,

मोक्षाचे प्रलोभन दाखवणारी, सहेतुक प्रशंसापर पण वायफळ अन मूर्खपणाची आहेत, असे त्यांना वाटते."

येथे श्रीज्ञानदेवांनी ***"कां हा अर्थवादु म्हणति"*** असे म्हटले आहे आणि त्याद्वारे गीतेचा प्रलोभनकर पण पोकळ भगवद्वचने असा अर्थ, किंवा अज्ञान्यांस सांगण्याचा भगवंतांचा एक युक्तिवाद किंवा त्यांना समजावण्यासाठी केलेली अज्ञान्यांस साजेलशी समजावणी, किंवा गीतेचा तसा अर्थच नाही, भगवंतांस काहीतरी वेगळेच सांगावयाचे आहे, इ.अनेकानेक श्लेष केवळ स्वमतप्रतिपादनार्थ काढू पाहणाऱ्या विद्वद्वरांचा आणि टीकाकारांचासुद्धा अनुस्यूत असा एका प्रकारे निषेधच नोंदवलेला आहे, असे आपणास वाटते. वेळप्रसंगी आचार्यादिकांनीही असेच अर्थ प्रतिपादित करून गीतेचा स्वमतास पुष्टी देणारा अर्थ सिद्ध करण्याचा खटाटोप केला असल्याचे अभ्यासू जिज्ञासूंच्या त्वरित लक्षात येईलच! असो.

सूज्ञांस अधिक सांगणे न लगे! ज्ञानेश्वर गीतेची कोणतीच वचने काही अति विद्वज्जडांप्रमाणे बाष्कळ समजत नाहीत, तर स्पष्ट, स्वच्छ आणि प्रामाणिकच समजून व अज्ञानी जनांचा खरेखोटे सांगून त्यांचा बुद्धिभेद न करणारीच मानून सश्रद्ध अंत:करणाने त्यातील श्रीकृष्णार्जुनसंवादावर आपले प्रांजल भाष्य करतात, ही गोष्ट तर सूर्यप्रकाशाइतकीच स्पष्ट आहे! त्यांच्यात आणि श्रीगीतेच्या अन्य अनेक भाष्यकारांत हाही आणखी एक महत्त्वाचा फरक आहे. असो.

पुढे श्रीकृष्ण भगवत्वचनांची अवज्ञा करणाऱ्या अज्ञ अश्रद्ध लोकांविषयी काय म्हणतात, पाहा:

तैं मोहमदिरा भुललें। विषयविखें धारलें।
अज्ञानपंकीं बुडालें। निभ्रांत मानीं।।३-१९६।।
देखैं शवाचां हातिं दिधलें। जैसें कां रत्न वांयां गेलें।
ना तरिं जात्यंधें पाहलें। प्रमाण जैसें।।१९७।।
कां चंद्राचां उदो जैसां। उपेगां न वचें वायसां।
मूर्खां विवेकु तैसां। रुचैल ना।।१९८।।
तैसें तैं पार्था। जैं विमुख एयां परमार्था।
तेयांसिं संभाषण सर्वथा। करावें ना।।१९९।।

"कामनांची मदिरा पिऊन मत्त झालेले असे ते लोक विषयरूपी विष अंगांत भिनवून घेतात. अज्ञानपंकात ते पूर्णपणे बुडालेले असतात, याविषयी शंकाच नाही. प्रेताच्या हाती रत्न द्यावे; त्या रत्नाचा काय उपयोग! जन्मांध मनुष्यास सूर्य उगवल्यामुळे दिसू का लागणार आहे! चंद्रोदयाचा कावळ्यास कोणता आनंद होणार – तो तर चकोरच भोगू जाणे! त्या मूढ जनांसाठी विवेकाचा काहीही उपयोग नसतो. त्यांना विवेक रुचतच नाही. हे पार्था! त्या लोकांची अशी दुरवस्था असते. ते परमार्थापासून विमुख होतात. अशांशी संभाषणसुद्धा करू नये."

म्हणौनि तैं न मनितिं। आणि निंदाहिं करूं लागतिं।
साधैं पतंग काएं साहाति। प्रकाशांतैं।।३-२००।।
पतंगां दिपीं आलिंगनु। तेथ त्यासिं अचुकु मरणु।
तेविं विषयाचरणु। आत्मघातां।।२०१।।

"त्यांना परमार्थ उपदेशिणे व्यर्थ आहे. कारण ते त्या उपदेशाचा मतितार्थ जाणून घेत नाहीत आणि वर निंदा पण करू लागतात. पतंगांना दीप्रकाशाचा केवढा मत्सर असतो! तो विझवण्यासाठी ते आत्मघातसुद्धा करून घेण्यास मागे पुढे पाहत नाहीत. त्या अज्ञ जनांचे मजविषयीचे मत्सरीपण असेच असते. मी लावलेला हा *(गीतारूपी)* ज्ञानदीप त्यांना सहन होत नाही. त्याच्याकडे पाठ फिरवून विषयाचरण करत ते आपला निश्चित असा आत्मघात करून घेतात."

म्हणून ज्यांना आत्महित साधावयाचे आहे, त्यांनी गीतोपदेश समोर ठेवून वागावे.

प्रकृति व कर्म::::

इंद्रिये व विषय

पुढे योगाचरणाविषयी अधिक मार्गदर्शन करतांना भगवंत सांगतात की इंद्रिये प्रबळ असतात. ज्ञान्यांससुद्धा त्यांच्याप्रमाणे वागावे लागते. सामान्य मनुष्याने जर त्यांच्याबद्दल असावध राहिले, तर विचारावयासच नको! म्हणून श्रीगोपाल म्हणतात:

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति।।३-३३।।

"अर्जुना! सर्व भूतमात्रांस प्रकृतीच्या गुणांप्रमाणे वागावे लागते. ज्ञान्यांससुद्धा ते चुकलेले नाही. मग कर्मे त्यागून देऊ पाहणाऱ्यांचा असा हट्ट व इंद्रियनिग्रह कोठवर चालेल!"

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ।।३-३४।।

"इंद्रियाची आपापल्या विषयांची आवडनिवड ठराविक असते. त्यांना आपण वश होऊ नये. इंद्रियांचे लळे पुरवल्यास ते कल्याणमार्गास विघातक ठरते."

इंद्रियांच्या स्वाभाविक गुणधर्मांनुरूप ज्ञानी पुरुषासही वागावे लागते, तेथे सामान्य जनांना इंद्रियांची जी अंगभूत अशी कर्मे आहेत, ती आपण करणार नाही, त्यांना विषय पुरवणार नाही, असा सर्वसंन्यासाचा मार्ग कितपत साधेल, हा मोठाच प्रश्न आहे. परंतु मनातून विषय काढून टाकत जाण्याचा अभ्यास केला तर इंद्रियांचा निग्रह न करतांही शाश्वत सुखाचा मार्ग गवसतो, असा या श्लोकांचा अभिप्राय आहे.

"केवल देहभरण। तैं उघडीं नागवण"

आपण यावर ज्ञानेश काय म्हणतात, ते पाहू या:

म्हणौनि इंद्रियें इयें एकें। जाणतेनि पुरुषें।
लालाविं ना कवतुकें। आदिकरूनि।।३-२०२।।
हां गां सर्पेसिं खेलों येईल। व्याघ्रसंसर्ग सिद्धि जाईल।
सांधैं हालाहाल जिरैल। सेविलियां काईं।।२०३।।

देखें खेलतां अग्नि लाविला। मग तो न सांवरैं जैसा उधवला।
तैसां इंद्रियां लला दिधला। भला नोहें।।२०४।।
यरविं तरिं अर्जुना। ययां शरीरां पराधीना।
कां नानाभोगरचना। मेळवाविं।।२०५।।

"विषयात रममाण होणे म्हणजे आत्मघात करून घेणे होय. म्हणून समंजस मनुष्याने सहज म्हणूनसुद्धा इंद्रियांचे फाजिल लाड पुरवू नयेत. एकवेळ सर्पाशी खेळता येईल; व्याघ्रासोबत राहता येईल; हलाहल विषही पचवता येईल. परंतु सहज खेळता खेळता जर आग लागली व ती पसरली, तर जशी आटोक्यात आणता येत नाही, त्याप्रमाणे इंद्रियांना विषय पुरवत गेले की त्यांची लालसा अधिकच बळावते. अर्जुना! असे पहा की शरीर परतंत्र आहे. त्याच्यासाठी नाना प्रकारची भोगसामग्री जुळवत बसण्यासाठी व्यर्थ का श्रमावे!"

आपण सायासें करूनि बहुतें। सकलहिं समृद्धिजातें।
उदोअस्तु ययां देहांतैं। प्रतिपालावें कां।।३-२०६।।
सर्वस्वें शिणौनि एथें। अर्जवाविं संपत्तिजातें।
तेणें स्वधर्मु सांडूनि देहांतैं। पोखावें काईं।।२०७।।
मग हें तंव पांच मेलावा। शेखीं अनुसरैल पंचत्वा।
तैं वेलिं केला कें गिंवसावा। सीणु आपुला।।२०८।।
म्हणौनि केवल देहभरण। तैं जाणैं उघडी नागवण।
ययालागिं एथ अंतष्करण। देयावें ना।।२०९।।

"या देहाचे असणे अशाश्वत आहे. मग वर अशाश्वत असे सुख या नाशिवंत देहाला मिळावे म्हणून उगीचच कष्टावे ते किती! सर्वस्व झिजवावे अन संपत्ती मिळवावी इतके या देहास महत्त्व कां द्यावे! हा तर पंचतत्त्वांचा मेळा आहे. शेवटी तो त्यांच्याच मार्गाने जाणार आहे. त्यावेळी आपण याच्यासाठी जे काही कष्ट उपसले, त्यातून आपणास काय गवसले, असे काय शोधावे! काहीच शेवटी उरत नाही, म्हणून हे सुख म्हणजे निव्वळ आपली नागवणूक असते. कारण आत्महिताचा मार्ग त्यामुळे अवघड होतो. यासाठी देहेंद्रियांचे जे विषय असतात, त्यांच्यात चित्त गुंतू देऊ नये."

कामक्रोधांचे घालकीपण

यरविं इंद्रियांचियां आर्त्तां-। सारिखा विषयो पोखितां।
संतोखु किर चित्तां। आपैजैल।।३-२१०।।
परि तो संवचोराचां सांघातु। जैसा नावेक स्वस्थु।
जंव नगराचां प्रांतु। सांडिजैना।।२११।।
बापा विखाचिंयां महुरता। झनें आवडीं उपजैं चित्तं।
परि तो परिणामु विचारितां। प्राणु हरैं।।२१२।।
देखें इंद्रियीं कामु असें। तो लाविं सुख दुरासें।
जैसा गलीं मीनु आविसें। भुलविजैं गां।।२१३।।
परि तेयांमाझारिं गलु आहे। जो प्राणांतैं घेऊनि जाएं।
तो जैसा ठाऊआं नोहें। झांकलेंपणें।।२१४।।

तैसें अभिलाखें एणें कीजैल। जऱ्हीं विषयाचिं आशा धरिजैल।
तरिं वरपडेयां होईजैल। क्रोधानलां।।२१५।।

"वस्तुतः इंद्रियांना विषय देत गेले की चित्ताला संतोष होतो, हे खरेच आहे. परंतु ठगांच्या सोबतीसारखाच तो संतोष अल्पकाळ टिकतो. जोवर नगराची शींव ओलांडली नाही, तोवरच ठग सभ्य मनुष्यांप्रमाणे वागतात. नंतर आपले अस्सल रूप दाखवतात. काही विषे गोड लागतात. पण परिणामी घातक ठरतात. गळाला लावलेल्या आमिषाला भुलून माशाचा जसा प्राण जातो, तसेच या विषयांचे सुख आहे. इंद्रियांना विषय खेचून घेतात आणि अंती घात करतात. या विषयांची लालसा क्रोध उत्पन्न करते. मनुष्य विषयांमुळे क्षोभित होतो."

जैसा कवलौनियां पारधी। घातेचियें संधिं।
आणि मृगातैं बुद्धि। साधावेयां।।३-२१६।।
एथ तैसिंचि परी आहे। म्हणौनि संसर्गु हा तूझ नोहें।
पार्था दोनिं कामक्रोध हें। घातुक जाण।।२१७।।
म्हणऊनि हा आश्रोच न करावा। मनींहीं आठौ न धरावा।
एकु निजवृत्तिचां ओलावा। नासों नेदीं।।२१८।।

"पारधी जसा हरिणास सर्व बाजूंनी घेरून मारतो, तसे हे विषय इंद्रियांवर सर्व दिशांनी आक्रमण करून काम व क्रोध यांच्या कचाट्यात पकडून आपला घात करतात. म्हणून विषय विसरण्याचा प्रयत्न करावा. केवळ स्वधर्माचेच आचरण करावे.कारण यामुळेच आत्मघात टळतो."

स्वधर्म::::

"परधर्मो भयावह:"

इंद्रिये बलवत्तर असतात. त्यांना स्वधर्माचरणात लावावे. त्यांचा ओढा कर्मयोगाकडे वळवावा, असे भगवंतांचे सांगणे आहे. ते म्हणतातः

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठतात्।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।।३-३५।।

"आत्मकल्याण साधण्याचा शास्त्रानुसारी मार्ग म्हणजे स्वधर्म. त्याविरहित तो परधर्म. सर्वधर्माचरण कितीही कष्टप्रद असले व त्याविरहित आचरण कितीही सुखप्रद असले, तरी मनुष्याने स्वधर्मच आचरावा. त्याचे आचरण करत असता प्राण त्यागावे लागले तरी बेहतर, पण चुकूनही परधर्माचे आचरण करू नये. परधर्माचरण आत्मघात करते."

इंद्रियांना नीट वळण लावून वर्णाश्रमविहित कर्मे करणे याचा स्वधर्मात अंतर्भाव होतो. त्याविरुद्ध इंद्रियांना स्वैर सोडून हवे ते कर्म करणे म्हणजे परधर्म होतो. इंद्रियें बलवान असल्यामुळे त्यांचे योगाभ्यासपूर्वक नियमन करणे स्वधर्मात मोडते.

"कठिणु, स्वधर्मुचि भला"

ज्ञानेश स्वधर्माची महती सांगत म्हणतातः

अगां स्वधर्मु हा आपुलां। जऱ्हैं कठिणु जाहाला।
तरिं हाचिं अनुष्ठिलां। भला देखैं।।३-२१९।।

एरु आचारु जो परावा। तो देखतां किर बरवा।
परि आचरतैनि आचरावा। आपुलांचि।।२२०।।
सांधैं शूद्राघरीं आघवीं। पक्वान्नें आहाति बरवीं।
तीं द्विजें सेवावीं केंवीं। दुर्बलु जऱ्हीं जाहाला।।२२१।।
हें अनुचित कैसेनि कीजैं। अप्राप्य केंवीं इछिजैं।
अथवा इछिलेंहिं पाविजैं। विचारीं पां।।२२२।।

"कर्मयोगरूपी स्वधर्म हा साधकांस श्रेयस्कर आहे. त्याचे आचरण करणे जरी कठीण असले, तरी तोच अनुष्ठावा. त्यातच आपले कल्याण आहे. त्याव्यतिरिक्त जो आचार आहे, तो आसुरी आहे. आसुरी आचरण म्हणजे परधर्म. तो साधकांसाठी योग्य नाही. तो चित्तास आकर्षण करत असला तरी त्यास अनुसरून कधीही वागू नये. आपण आपलाच धर्म म्हणजे मार्ग अनुसरावा. शूद्राघरची उत्तमोत्तम पक्वान्ने अगदी हीनदीनही झालेल्या ब्राह्मणाने तरी कशी सेवन करावीत! अशी अयोग्य गोष्ट त्याने कशी करावी! ज्या वस्तूची इच्छा करू नये, ती इच्छावी का! अन समजा ती मिळाली तर घ्यावी का!"

तरिं लोकांचिं धवलारें। देखौनियां मनोहरें।
असति आपुलीं तणारें। मोडावि केंवीं।।३-२२३।।
हें असो वनिता आपुलीं। कुरुप जऱ्हैं जाहालीं।
तरिं भोगितां तैंचि भली। जियां परीं।।२२४।।
तेंविं आवडें तैसा सांकडु। आचरितां जरिं दुवाडु।
तरिं स्वधर्मुचि सुरवाडु। पारत्रिकीचां।।२२५।।

"दुसऱ्यांची देखणी घरे अन प्रासाद छान वाटतात, म्हणून काय आपली पर्णकुटी मोडून टाकावी का! हे राहू दे. आपली पत्नी कुरूप असली तरी ज्याप्रमाणे तिच्याबरोबरच नांदणे जसे योग्य असते, त्याचप्रमाणे आपला स्वधर्म-आपला योगमार्ग-जरी कितीही कंटाळवाणा, अवघड आणि अगदी सामान्य असा वाटला, तरी त्याचेच आचरण करण्याने परलोकी सुख मिळते. शाश्वत कल्याण अशाच आचरणाने होते."

स्वधर्मासाठी जीवितही वेचावे

पुढे ज्ञानेश या उपदेशास उजाळा देत म्हणतात:

हां गां साकर आणि दूध। हें गौल्य किर होये प्रसिद्ध।
परि कृमिदोषीं विरुद्ध। घेपें केंवीं।।३-२२६।।
ऐसेनि हिं जऱ्हीं सेविजैल। तरिं तैं अलुकिंचि अगां उरैल।
जैं तैं परिणामीं पथ्य नव्हेल। धनुर्द्धरां।।२२७।।
म्हणौनि आणिकांसिं जैं विहित। आणि आपणपेयां अनुचित।
तैं नाचरावें जऱ्हीं हित। विचारिजैं।।२२८।।
एयां स्वधर्मातैं अनुष्ठितां। वेंचु होइजैल जीवितां।
तोहिं नीका वर उभयतां। दिसत असें।।२२९।।

"साखर आणि दूधाची केलेली खीर उत्तम असते. पण कृमी झालेल्यास ती अपायकारक होते. असे असूनही कृमिदोष झालेल्याने ती हट्टाने सेवली तर कुपथ्य होईल व रोग बळावेल. म्हणून इतरांसाठी जो कर्माचरणाचा मार्ग विहित म्हणून नेमून दिलेला असला, तरी तो आपणासाठी अनुचित असल्यास आचरू नये. त्यातच आपले हित आहे. आपला स्वधर्म आचरतांना प्राणही वेचावे लागले, तरी उत्तम, पण परधर्मानुसार कधीही वागू नये."

स्वधर्म कोणता

अर्जुनास त्या देवदेवेश्वर श्रीकृष्णांनी असा वेदविहित स्वधर्माचरणाचा उपदेश केला. या ठिकाणी स्वधर्मविषयक एक बाब स्पष्ट होते. ती म्हणजे वेदविहित-शास्त्रानुसारी वर्णाश्रमधर्मानुसार पाळावयाची नित्य, नैमित्तिक व विहित कर्तव्ये व कर्मे, परमेश्वराप्रीत्यर्थ अकर्तृत्वभावनेने फलाशारहित होऊन परमेश्वरास अर्पण करत निष्ठापूर्वक सश्रद्ध भावाने उत्तमरीत्या करणे-ती सिद्धीस जावोत अथवा न जावोत, त्याबाबत स्थितप्रज्ञ असणे; इंद्रिये याव्यतिरिक्त विषयाचरणास न जुंपणे, असा भाग ***स्वधर्म*** म्हणून ओळखला पाहिजे.

गीतेत वारंवार *स्वधर्म* हा शब्द येतो. त्याची अशी ओळख ठेवली पाहिजे. ***उपरोल्लेखित स्वधर्माचे आचरण हाच कर्मयोग आहे.*** आपण ज्ञानयोगाचे अधिकारी नसता तशी हाव बाळगून कर्मयोगाचा त्याग करणे, याससुद्धा स्वधर्मच्युत होणे असेच एका अर्थी म्हणावे लागेल. गुरूंनीही शिष्याच्या अधिकाराचा व कुवतीचा विवार करूनच त्यास योग्य त्या मार्गास लावावे. उगीचच सगळ्या शिष्यांना सरसकट शांकरवेदांताची दीक्षा देणे घातक ठरेल-शिष्याच्या अंतिम हिताच्या दृष्टीने आणि गुरूच्याही कर्तव्याच्या दृष्टीने! अशा काही गुरूंचे हे अनिष्ट असे प्रताप निदर्शनास आल्यामुळे असे नाईलाजाने सांगावे लागत आहे. तरी सुज्ञ जिज्ञासूंनी वेळीच अशा गुरुवर्यांपासून सतर्क होऊन त्यांच्यापासून योग्य अंतरावर रहावे, हेच त्यांच्या हिताचे ठरेल! जिज्ञासूंनी या मुद्द्यांचा सखोल विचार करणे श्रेयस्कर होईल, असे वाटते. असो

समारोप

यानंतरच्या **उन्मेष क्र.४२ - कर्मपथ-४** यातून कर्मपथाच्या मूलभूत अशा काही सिद्धांताचा-पुनर्जन्मसंकल्पना, अवताररहस्य, कर्म - अकर्म इ.चा विचार केला जाईल. तर आता त्याकडे वळू या.

::उन्मेष ४२::

::कर्मपथ-४::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४२:

गीता:
४:१-४,७,१०-२२,२४,४१,४२
८:१-३,२८,२९
१३:१३
ज्ञानेश्वरी:
३:२३०,२३१,२७४-२७६
४:१-११,१३-४०,६०-८२,८५-१०३,१०६-११४,२११-२२५
६:१५२-१५६
८:२८-२९

::उन्मेष ४२::

::कर्मपथ-४::

उपोद्घात::::

पुढील विषयाचे अनुसंधान

मागील *उन्मेष क्र.४१* मध्ये आपण स्वधर्माविषयी भगवंतांचे मत पाहिले. त्यांचे बोलणे ऐकून झाल्यावर अर्जुन आता श्रीकृष्णांना काय म्हणतो पहाः

ऐसें समस्तसुरशिरोमणि। बोलिलें जेथ शार्ङ्गपाणि।
तेथ अर्जुन म्हणें विनवणि। आथि देवा।।३-२३०।।
हें जैं तुम्हीं सांघितलें। तैं सकल किर मियां परिसलें।
परि आतां पुसेन कांहीं आपुलें। अपेक्षित।।२३१।।

"देवा! हे शार्ङ्गपाणि! हे देवदेवेश्वरा! तुम्ही जे काही सांगता ते मी लक्षपूर्वक ऐकतोच आहे. आणि ते मला नीट कळतेही आहे.पण आता मला काही गोष्टी सांगा."

तो विचारतो की ज्ञानी पुरुषांनाही भ्रष्ट करणारे कोण होत. त्यावर प्रभूंनी *काम-क्रोध* या दूयीविषयी जे सांगितले, ते आपण यापूर्वीच्या विवरणात पाहिलेच आहे. कामरूपी अग्नीने ज्ञान झाकलेले असते. *इंद्रिये, मन व बुद्धी* ही याची आश्रयस्थाने आहेत, असे त्यावेळी श्रीकृष्णांनी म्हटल्याचे आपणास स्मरत असेलच.

ज्ञान आणि विज्ञान यांचा नाश करणारा *काम* हा महापातकी असून त्याचा नाश करावा. या घातकी शत्रूचा बिमोड केल्याने मनुष्यास स्वानंदसाम्राज्याचा लाभ होतो. त्यासाठी इंद्रिये, मन व बुद्धी यांचे नियमन करणे आवश्यक आहे. आप्तकाम पुरुषांनाही या प्रकृतीच्या गुणधर्मांनुरूप वर्तणाऱ्या इंद्रिय-मन-बुद्धी समुदायास अनुसरून वागावे लागते, तेव्हा सामान्य साधकांस यांचा निरोध वा निग्रह करणे कसे शक्य आहे, हा प्रश्न साहजिकच आपल्यापुढे येतो.

चतुर्थ अध्यायाचा संकेत व तृतीय अध्यायाचा समारोप

स्वधर्माचरण करावे , हा उपदेश चांगला आहे, पण या प्रमाथी इंद्रियांकडून ते कसे घडवावे! यासाठी योगबुद्धीचा आश्रय करावा लागतो. त्यासाठी अभ्यास करावा लागतो. आप्तकाम पुरुष तरी त्या स्थितप्रज्ञ अवस्थेस कसे पोहोचले, ते सांगणे म्हणूनच अवश्यंभावी ठरते.

या परीक्षणाचा काही भाग*(तृतीय अध्यायाचा) (उन्मेषः१-२::विषयप्रवेश -२ःपृ. क्र.३४ ते ३७ व उन्मेषः४१:कर्मपथ-३ :पृ.क्र.६७६-६७७)* आपण यापूर्वी पाहिलाच आहे. आता या परीक्षणाचा पुढील भाग भगवंतांनी चतुर्थ अध्यायी जसा निरूपिला आहे, तसा आपण पाहणार आहोत.

***पद-पिंड* मिळवणीची नांदी**

या उरलेल्या भागाचा संधी प्रस्तुत विषयाशी करत ज्ञानदेवांचे बोल उमटतात, ते असेः

आतां पुनरपि तो अनंतु। आद्य एकि मातु।
सांघैल तेथ पंडुसुतु। प्रश्नु करील।।३-२७४।।
तेयां बोलाचां हान पाडु। कां रसवृत्तीचां निरवाडु।
एणें श्रोतयां होईल सुरवाडु। श्रवणसुखाचां।।२७५।।
ज्ञानदेओ म्हणें निवृत्तिचां। चांग उवाओ करूनि उन्मेखाचां।
मग संवादु श्रीहरिपार्थाचां। भोगां बापां।।२७६।।

"*पद व पिंड* यांची मिळणी ज्याने होते, ती गुरुशिष्यातील गोष्ट पुढे ऐका. तो श्रीकृष्ण परमात्मा आता एक प्राचीन कथा सांगणार आहे व अर्जुन त्यावर आश्चर्यचकित होऊन बरेच प्रश्न विचारणार आहे. त्या संभाषणातून आत्मरस पाझरणार आहे. तो प्राशून श्रोतेजनांना आत्यंतिक श्रवणसुख मिळणार आहे."

तरी ज्ञानदेव श्रोत्यांस प्रोत्साहन देत आहेत की जिज्ञासेस जिवंत ठेवून तो श्रीहरी-पार्थाचा हर्षोन्मादक संवाद ऐकण्यास त्यांनी सिद्ध व्हावे.

गीतेतील तत्त्वज्ञानाचा सैद्धांतिक भाग

आतापावेतो श्रीज्ञानदेवांनी गीतेतील तत्त्वज्ञानाचा सैद्धांतिक भाग जो हाताळला आहे, तो आपण सविस्तर पाहिला. अध्यात्मशास्त्रात दोन भाग अंतर्भूत असतात, याची आपण पूर्वीच नोंद घेतलेली आहे. ते म्हणजे सैद्धांतिक व प्रायोगिक विभाग होत.

आत्म्याचे स्वरूप, सृष्टीची रचना, मनुष्यमात्रे व जड व चेतनसृष्टीचे अस्तित्व, त्यांचा उगम, त्यांचे इतर संलग्न अशा मूलतत्त्वांशी असणारे संबंध, परमतत्त्व वा ईश्वर वा तत्सदृश कल्पना, जीव व जगत वा विश्व यांची अभिव्यक्ती या सर्वांतील परस्परसाहचर्य व संबंधांवर जे जे प्रकाश पाडते, ते ते सैद्धांतिक तत्त्वज्ञानात मोडते.

याबाबत अनेक प्रमेये-सिद्धांत-प्रमाणे-तर्क-अनुमान-न्याय-वैशेषिकादी शास्त्रे,सिद्ध वा आप्तकाम पण बोलक्या जीवन्मुक्त व साधुसंतांची निरीक्षणे व त्यांना आलेल्या प्रज्ञामय जगतातील विविध अनुभूती, प्रारब्धानुसार त्यांनी त्यांबाबत केलेली विविध विधाने-विश्लेषणे, अनुभूतीच्या तीव्र-मध्यम वा मंद संवेगांनुसार त्यांच्या हाती लागलेला चिद्वस्तूचा कमीअधिक अंशात्मक भाग; उपनिषदरचयित्या द्रष्ट्या ऋषिमुनींचा सम्यक् भाव, अतींद्रिय पातळीवर जाणवलेल्या चिरंतन सत्याचे, तसेच जीव-जगत-परमेश्वर या त्रयीचे वास्तव स्वरूप व त्यांची व्युत्थानदशेत उतरलेली कमीअधिक प्रमाणातील प्रमाणभूत अथवा विपर्यस्त स्वरूपातील अभिव्यक्ती इ.प्रकारांनी हा सैद्धांतिक तत्त्वज्ञानाचा अनुभूतिपूर्ण तसेच अनुमानित *(conjectural)* भाग हिमालयाप्रमाणे विशाल स्वरूप पावला आहे.

त्यातही ज्यांचे विचार मूलभूत स्वरूपाचे व स्वनिर्मित *(basic & original)* आहेत, त्यांच्यावर अभ्यास करून, तसेच पूर्वग्रहाने मते बनवून, त्यासंबंधी दीपिका, वार्तिके, प्रकाशिका, बोधमाला, सुलभ प्राकाररचना इ.प्रकारे सामान्य जनांपासून तो तहत विद्वत् शिरोमणी, पंडितवर्य, वादवितंडा-जल्प-विवाद यात निष्णात असणारे बुद्धिगामी उच्चभ्रू *(intellegentia)* या सर्वांनी प्रसृत केलेल्या वाङ्मयाचे अध्ययन करणे म्हणजे क्षीरसमुद्राचे मंथन करून त्यातून हलाहलापासून तो अमृतापर्यंत रत्नभांडार प्रकटवण्याचा सर्वांच्या कुवतीबाहेरचा प्रयत्न ठरेल, इतकी मेरुमांदार-नगाधिराज हिमाद्रि हे सगळे तोकडे पडतील एवढी वाङ्मयीन रचना गेली सहस्रो वर्षे अनेकानेक प्रथितयश महाभागांनी केलेली आहे. असे हे गीतेतील सिद्धांतांचे व इतर सिद्धांतांचे अक्रीत स्वरूप आहे.

हा झाला एक भाग. हा इतका विस्तृत असल्याने श्रीगोपाल व श्रीज्ञानेश यांनी त्याचा अत्यंत विस्तृत असा परामर्श घेतला आहे. परंतु सर्वसामान्य पण बुद्धिमान साधकासाठी त्यांनी त्या विशाल वर्णनाचे संक्षिप्त स्वरूपही वेळोवेळी प्रकट करून ठेवलेले आहे व ते आपणही प्रसंगोपात्त अवलोकिले आहेच.

तत्त्वज्ञानाची अनुभूती व प्रायोगिक भाग

सिद्धांताची *(Theory ची)* पार्श्वभूमी अभ्यासणे ही तत्त्वज्ञानात प्रगतिपथावर अग्रेसर होण्याची पहिली पायरी आहे. नित्यानित्यविवेक, शाश्वत व अशाश्वताचे ज्ञान, सांसारिक व पारमार्थिक दृष्टीतील फरक, जगाचे खरे स्वरूप, त्यातील जीवमात्रांच्या अस्तित्वाचे सकारण स्पष्टीकरण इ.भाग अवलोकून मनुष्यास मुमुक्षुत्वाचा पहिला पाठ मिळतो.

मुमुक्षू म्हणजे जीव-जगत-ईश्वर यांचा संबंध जाणून घेत उत्क्रांतीच्या मार्गावर आक्रमण करून ईश्वरत्व प्राप्त करून घेण्याचा इच्छुक पुरुष असतो. सैद्धांतिक तत्त्वज्ञान या मार्गावर त्यास अग्रेसर होण्याची आकांक्षा निर्माण करून देण्याइतपतच उपयुक्त असते. खरी वाटचाल तर प्रयोगसिद्ध ज्ञानाच्या प्रात्यक्षिकानेच होणार असते.

जगाचा भूगोल वाचला; नकाशे रस्ते, डोंगर, नद्या, दऱ्या, खोरी, हवामान, पिकपाणी, लोक व समाजव्यवस्था इ.सर्व संबंधित गोष्टींची यथासांग माहिती करून घेतली व घरच्या आरामखुर्चीतून उठून प्रवास करण्याचे कष्ट मात्र घेतले नाही, तर हे पुस्तकी ज्ञान तेवढेच राहील नाही का! म्हणून जगाचा प्रवास केला पाहिजे, तरच त्याचे व्यावहारिक ज्ञान प्राप्त होईल; गंतव्य स्थानी पोहोचता येईल.

याचप्रमाणे अध्यात्मशास्त्रातील सिद्धांतांचे स्वरूप जाणून घेतल्यावर साधकाला-मुमुक्षूला-त्या परमसत्याचा साक्षात्कार करून घेण्याचा उपाय योजावा लागतो. ईश्वराची अनुभूती, अध्यात्माचे प्रत्यक्ष ज्ञान, प्रायोगिक व्यावहारिक पातळीवर अध्यात्माचा आविष्कार यासाठी साधकास जो उपक्रम हाती घ्यावा लागतो, त्यास बृहत्रूपाने ***योग*** अशी संज्ञा दिली जाते. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी पण या प्रभागाचे - प्रत्यक्ष ज्ञानाच्या अनुभूतीचे पुरेपूर महत्त्व जाणून तसे आपल्या गीताभाष्याच्या उपोद्घातात म्हटलेले आपण पाहिलेच आहे *(उन्मेष:४१: कर्मपथ-३ :पृ.क्र.६६४,६६५)*. तेव्हा त्यांनी परमार्थाची साक्षात अनुभूती असणे आवश्यक असल्याचे सूचित केले होते.

याही प्रभागावर, म्हणजे योगावर विपुल वाङ्मयसंपदा उपलब्ध आहे. योग साधण्याच्या विविध पद्धती प्रचुर आहेत. त्यांचा तौलनिक अभ्यासही व्यासंगी विद्वानांनी केलेला आहे. भगवंताचे स्वरूप अनाकलनीय-अनंत-अनेकविध-अप्रमेय असे असल्याने ज्या ज्या सिद्धपुरुषांना त्याचा साक्षात्कार झाला, तो जरी त्याच एकाच प्रकारचा असणे साहजिक असले, तरीही व्युत्थानदशेत अथवा त्यांच्या जीवन्मुक्तावस्थेत त्या सिद्धांनी त्याचे केलेले वर्णन व त्या साक्षात्कारासाठी करावयाचे उपाय म्हणजे ***योग*** यांचा तंतोतंत ताळमेळ जमणे ***"पिंडे पिंडे मतिर्भिन्ना"*** या न्यायाने कठीण वाटते.

कारण या सर्व गोष्टी ***परेपलीकडच्या*** असल्याने सिद्धपुरुषांनाही त्यांचे सांगोपांग रहस्य सांगणे जमत नसल्याचे जाणवते. श्रीकृष्णांनीही *अनुगीते* च्या प्रसंगी ह्यास दुजोरा दिल्याचे दिसून येते. कारण परत गीता जशीच्या तशी सांगावी या अर्जुनाच्या विनंतीस मान देता न येण्याचे जे कारण त्यांनी सांगितले, त्यानुसार गीता सांगतांना त्यांची जी अत्यंत योगयुक्त स्थिती होती, ती पुनश्च साकारणे त्यांनाही अशक्य वाटत होते. त्यामुळे गीतेचा उपदेश पूर्वी केला, तसाच्या तसा करणे त्यांना शक्य दिसत नव्हते, असा त्या प्रसंगी महाभारतात उल्लेख आहे.

अशा अनुभूतिवैलक्षण्यामुळेच *द्वैत, अद्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत, अवतारविग्रह, अनेकानेक दैवतरूपे साक्षात्कार* असे साक्षात्काराचे विविध प्रकार महात्म्यांच्या माध्यमांतून आपल्या माहितीत आले आहेत.

ज्याच्या त्याच्या उपासनापद्धत्यनुरूप तोच तो परमात्मा त्याला त्याला जशा भावेल तशा रूपाने व आवडेल त्या योगप्रणालीने आपले दर्शन घडवून देतो, असेही यावरून शक्य असल्याचे दिसते; किंवा व्युत्थित अवस्थेत सिद्धांनासुद्धा आपल्या अनुभूतीचे यथातथ्य वर्णन करता येत नाही असे पण असू शकते. श्रीरामकृष्ण परमहंसांची याबाबतची उक्ती ग्राह्य ठरते. त्यांना जेव्हा शिष्यांनी त्यांच्या कुंडलिनीविषयक अनुभूतींचे वर्णन करण्यास सांगितले, तेव्हा थोडेसे सांगून ते म्हणत की ती कालीमाता त्यांना आता पुढचे काही सांगू देत नाही म्हणून!

गीतेतील योगप्रणाली

गीतेतील श्रीकृष्ण परमात्म्याने सांगितलेला योगमार्ग या सर्व पद्धतींचा समन्वय करणारा, तसेच सर्व प्रणालीतील मूलभूत अशा अंगांचा अंतर्भाव करणारा असून प्रवृत्तिपर तसेच निवृत्तिपर अशा दोन्ही वृत्तींना समवेत घेऊन चालणारा असल्याने सर्वश्रेष्ठ ठरतो. योगाचा कोणताही मार्ग हा महात्म्यांनी अनुभूत असाच असणार. पण अनुभुतिवैलक्षण्य व त्या परेपलीकडील अनुभूतीचे यथातथ्य प्रकटन करणे त्या त्या सिद्धांना शक्य न झाल्याने, त्यांनी सांगितलेल्या गोष्टीत उणीवा असणे साहजिकच आहे. म्हणूनच कोणताही योगमार्ग

जसाच्या तसा त्यांनी प्रकट केलेला नसण्याचीच अधिक शक्यता आहे. यामुळेच त्यांनी प्रकट केलेल्या योगमार्गात वैविध्य आणि भिन्नता दिसून येणे साहजिक वाटते.

खरे तर मूळात *योगमार्ग* हा प्रत्येकाचा तोच तो असला पाहिजे, असे सैद्धांतिक भूमिकेतून - विश्वाच्या जडणघडणीच्या व संहाराच्या ज्ञानावरून वाटते. ज्ञानेश्वरांनीही यास त्यांच्या ***पंथराज*** विवरणात दुजोरा दिला आहे. त्यांच्या ***"अर्जुना हा अवधारीं। पंथराजु।। ..."*** ते ***"....आत्मविद थोरावलें। एणेंचि पंथें।।" (ओवी क्र. ६-१५२ ते १५६)*** या उद्गारांवरून हीच गोष्ट स्पष्ट होते.

श्रीकृष्णांनीही याचा विचार करूनच गीतेतील एकमेव योगमार्ग प्रकट केला आहे, तो या सर्वांच्या अनुभूतींचे समन्वयन करत, त्यातल्या त्रुटी दूर करत, खरी अनूभूती जी आहे तिला अनुसरतच, ह्यात आपल्याला तरी काही शंका नाही! म्हणूनच ***योगेश्वर*** असे त्यांना सर्व जण म्हणतात! त्यांची अनुभूती ही सर्वांच्या अनुभूती आणि प्रमाणांपेक्षा अंतिम आणि ग्राह्य समजली जाते, आणि म्हणूनच त्यांनी दर्शवलेला योगमार्ग हाच सत्य योगमार्गाचे व त्यातील अनुभूतींचे यथातथ्य दर्शन करून देणारा असल्याचे आपणास जाणवते.

त्यांचा हा योगमार्ग कर्माची लक्ष्मणरेखा न ओलांडता, सभ्यतेचा व संस्कृतीचा उत्कर्ष साधत सर्व जनांचे कल्याण साधणारा आहे. अशा या योगाच्या काही अंगांचे उदा.यम-नियम-ईश्वरप्रणिधान-प्रत्याहार-आसन-ध्यान इ.चे दर्शन थोड्याफार प्रमाणात आपण प्रत्यक्ष घेतले आहेच. आता यापुढे यातील महत्त्वाचा भाग आपण क्रमशः अवलोकणार आहोत.

चतुर्थ अध्यायाचा श्रीगणेशा

या अविनाशी योगाचे सूतोऽवाच होते गीतेच्या *चतुर्थ अध्यायी!* या योगाचे रहस्य अर्जुनावरील आत्यंतिक प्रेमभावनेपोटी श्रीकृष्ण सांगतात, असा आशय प्रकट करत ज्ञानेश त्या अध्यायारंभी म्हणतातः

आजि श्रवणेंद्रियां पीकलें। जैं एणें गीतानिधान देखिलें।
आतां स्वप्नचि हें तुकलें। सांचासरिसें।।४-१।।
आदिंचि विवेकाचिं गोठी। वरि प्रतिपादीं कृष्णु जगजेठी।
आणि भक्तराजु किरीटी। परिसतसें।।२।।
जैसा पंचमालापु सुगंधु। किं परिमलु आणि सुस्वादु।
तैं भला जाहला विनोदु। कथेचां इयां।।३।।
कैसिं आगलिक दैवाचिं। जैं गंगा वोललीं अमृताचिं।
हो कां जपतपें श्रोतयांचिं। फलां आलीं।।४।।

"स्वप्न सत्य व्हावे, तसे आता झाले आहे. गीतारूपी वाग्धनाचा श्रवणेंद्रियांना प्रत्यक्षात लाभ होतो आहे. अध्यात्मशास्त्रातील अंतरंगरहस्य स्वतः श्रीकृष्ण परमात्म्याच्या मुखातून प्रकट होत आहे आणि भक्तराज अर्जुन स्वतः ते ऐकून धन्य धन्य होतो आहे. पंचमालापास सुगंध मिळावा; रुचकर पदार्थांस सुवास असावा; तशी या गीतासंवादास बहार आली आहे. आणि आपणा श्रोत्यांचे सौभाग्य पाहा! आपली जपतपादी सर्व पूर्वपुण्याई फळाला येऊन आज ही अमृताची गंगा गीतेच्या रूपाने पावली आहे."

"अतिप्रीति नारायणें। बोलिजतु असें"

आतां इंद्रियजात आघवें। तिहीं श्रवणाचें घर रिघावें।
मग संवादसुख भोगावें। गीताख्य हें।।४-५।।
हा अतिसो अतिप्रसंगें। सांडूनि कथाचि तैं सांधैं।
जैं कृष्णार्जुन दोघैं। बोलत होते।।६।।
तैं वेलीं संजयो रायातैं म्हणें। अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें।
जैं अतिप्रीति नारायणें। बोलिजतु असे।।७।।

"सर्व इंद्रियांनी श्रवणेंद्रियाद्वारे एकवटून, मनाचे कान करून, आता हे गीताख्यानरूपी नरनारायणांमधल्या संवादाचे सौख्य उपभोगावे. ही अतिशयोक्ती राहू द्या! आपण आता श्रीकृष्ण आणि अर्जुनाचा संवादच ऐकू या." संजय धृतराष्ट्रास सांगू लागलाः "खरोखर अर्जुनाचे भाग्यच उदयाला आले. कारण तो नारायण स्वतः होऊन त्याच्याशी अतिप्रेमाने बोलत होता."

जगदीश्वराचे अर्जुनावरील निरुपम प्रेम

जैं न संघैंचि पितया वसुदेवासिं। जैं न संघैचिं माते देवकिसिं।
जैं न संघैचि बलिभद्रासिं। तैं गुह्य अर्जुनेसिं बोलत असें।।४-८।।
देवि लक्ष्मि येतुलीं जवलिक। तैहिं न देखैं ययां प्रेमाचें सुख।
आणि कृष्णस्नेहाचें पीक। ययांतैंचिं आथि।।९।।

संजय धृतराष्ट्रास सांगू लागलाः "खरोखर अर्जुनाचे भाग्यच उदयाला आले आहे. कारण तो नारायण स्वतः होऊन त्याच्याशी अतिप्रेमाने बोलत होता. आणि अशा गोष्टी सांगत होता की ज्या त्याने प्रत्यक्ष आपल्या पित्याला-वसुदेवाला, आपल्या मातेला-देवकीला, आपल्या भावाला-बलरामाला, कोणालाच कधीही सांगितल्या नव्हत्या. देवांची पत्नी स्वतः लक्ष्मीमाता तर सतत त्याच्या सहवासात असणारी! पण तिलासुद्धा एवढे प्रीतिसुख देवाकडून कधी मिळाले नव्हते."

सनकादिकांचियां आशा। वाढिन्नलियां होतियां किर बहुंवसा।
परि त्याहिं एणे मानें एषा। येतिचिना।।४-१०।।
ययां जगदीश्वराचें प्रेम। एथ दिसतसें निरुपम।
कैसें पार्थें एणें सर्वोत्तम। पुण्य केलें।।११।।

"श्रीकृष्णाच्या स्नेहाचा मळा एवढा बहराला आला, तो त्या भाग्यवंत अर्जुनासाठीच! सनक-सनंदन-सनातनादी थोर ऋषिवरांना फार कालाची इच्छा होती की प्रत्यक्ष त्या श्रीविष्णूने आपल्याला हे परमसुखाचे रहस्य सांगावे. पण त्यांची ती इच्छाही श्रीहरीने एवढ्या कौतुकाने कधीही पुरवली नव्हती. त्या जगदीश्वर श्रीकृष्णाचे इतके अनुमप प्रेम अर्जुनावर बसलेले दिसते की आपणाला अचंबा वाटावा की याने असे कोणते सर्वोत्तम पुण्य केले आहे, जेणेकरून श्रीकृष्णाचे हे अद्वितीय प्रेम त्याच्या वाट्याला आले आहे!"

"कैसा याचियां आवडिं। अवतरला असें"

यरविं हा योगियां नाडलें। वेदार्थासिं नाकलें।
जेथ ध्यानाचेंहिं डोलें। पावतिना।।४-१३।।

तैं हा निजस्वरूप। अनादि निष्कंप।
परि कवणें मानें सकृप। जाहाला आहें।।१४।।
हा त्रैलोक्यपटाचिं घडी। आकाराचिं पैल थडी।
आइकें कैसा ययाचियें आवडी। अवतरला असें।।१५।।

"त्याच्यावरील अर्जुनाच्या प्रेमाने अन भक्तिभावाने भुलून हा कृष्ण, जो वास्तविक निर्गुण निराकार आहे, तोसुद्धा असा सगुण साकार होऊन प्रकटला आहे. केवढे हे नवल आहे, पहा! आणि तो अर्जुन पण पहा! कसा त्या श्रीकृष्णाशी एकरूप झाला आहे ते! मला तर त्या भक्तशिरोमणी अर्जुनाची ही अवस्था फारच लोभावत आहे. कारण हा जगदीश्वर ना योग्यांना सापडतो, ना वेदांना निरूपिता येतो; ध्यानचक्षूंसही दृग्गोचर न होणारा असा हा ईश्वर आज असा कसा कृपाळू झाला आहे की आपली अचल स्थिती-आपले अव्यक्तापलीकडील रूप-त्र्यैलोक्यरूपी वस्त्रातही न समावणारी याची अनंत निजस्थिती-हे सर्व सर्व बाजूला सारून अर्जुनावरील प्रेमाने त्याच्यासमोर प्रत्यक्ष उभा राहिला आहे!"

योगपरंपरासंकेत::::

योगाचे उद्घाटन

आणि हाच कृष्ण योगासारख्या त्याच्या अत्यंत आवडत्या आणि गुह्य विषयावर अर्जुनाला हातचे काहीही राखून न ठेवता सांगतो आहे की:

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।
विवस्वान मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत।।४-१।।

श्रीकृष्ण म्हणतातः "अर्जुना! ज्या योगाचे फल अविनाशी आहे, अव्यय आहे; मोक्षरूप असे ज्याचे फल आहे, असा हा योग या लोकांचे पालन उत्तमरीत्या करता यावे म्हणून सृष्ट्योत्पत्तिकाली मी विवस्वानास सांगितला होता. त्याने आपला पुत्र जो मनु त्यास त्या योगाची दीक्षा दिली आणि मनुने मनुष्यांचा प्रथम नृपती जो इक्ष्वाकु, त्याला तो योग शिकवला."

एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः।
स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप।।४-२।।

"क्षत्रियधर्माचे परिपालन करण्यासाठीच प्रकट केलेला हा योग त्यानंतर अनेकानेक राजर्षींना परंपरेने प्राप्त होत गेला. हे परंतपा अर्जुना! परंतु कालाची महती अशी की क्षात्रधर्माचा प्राणच असा तो योग पुढे लोपला."

"इमं .. योगं ... रहस्यं"

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम्।।४-३।।

"सृष्टिचक्र सुनियंत्रितरीत्या चालावे म्हणून अत्यंत प्राचीन काळी मी स्वतःच प्रसृत केलेले ते योगरहस्य मी पुनः तुझ्या व या लोकांच्या हितार्थ तुला प्रकट करून सांगत आहे. कारण तू माझा सखा तर आहेसच, पण भक्तसुद्धा आहेस. म्हणून माझे कार्य नीट पार पाडण्यासाठी हे योगज्ञान तुला उपकारक ठरेल."

अर्जुनापुढे प्रकटवलेल्या क्षात्रपरंपरेतील या योगधर्माची थोडक्यात अशी पार्श्वभूमी आहे. ब्राह्मणांनीसुद्धा क्षत्रियांकडूनच ही योगविद्या शिकून घेतली, असे वैदिक वाङ्मयात दाखले आहेत. असो.

"हाचि योगु विवस्वतां"

ज्ञानेश या एकमेवाद्वितीय योगाच्या परंपरेबाबत म्हणतातः

मग देव म्हणें अगां पंडुसुता। हाचि योगु आम्हीं विवस्वतां।
कथिला परि तैं वार्त्ता। बहुवां दिहाचि।।४-१६।।
मग तेणें विवस्वतें रविं। हें योगस्थिति आघविं।
निरूपिलीं बरविं। मनूप्रति।।१७।।
मनुनें आपण अनुष्ठिलीं। मग इक्ष्वाकुवां उपदेशिलीं।
ऐसिं परंपरा विस्तारिलीं।आद्य तैं गां।।१८।।

श्रीकृष्ण म्हणतातः "अर्जुना! फार प्राचीन काळी हा योग मी विवस्वानास उपदेशिला होता. त्या विवस्वत रवीने या योगाचे पसायदान मनुला दिले. मनुने याच योगाचे उत्तम प्रकारे आचरण केले व नंतर इक्ष्वाकु राजास त्या योगाची दीक्षा दिली. तुला मी सांगत असलेल्या या योगधारेची अशी मूळापासूनची परंपरा आहे."

मग आणिकीहिं ययां योगातैं। राजर्षि जाहालें जाणतैं।
परि तेथौनि आतां सांप्रतैं। नेणिजैं कोण्हीं।।४-१९।।
जैं प्राणियां कामीं भरुं। देहाचिवरि आदरुं।
म्हणौनि पडला विसरुं। आत्मबोधाचां।।२०।।
अव्हांटिलियां आस्थाबुद्धि। विषयसुखाचिं परमावधि।
जीवु तैसा उपाधि। आवडें लोकां।।२१।।

"त्यानंतर बऱ्याच राजर्षींनी या योगाचे उत्तम प्रकारे अनुष्ठान करून या प्रजांचा सांभाळ केला. परंतु सांप्रत मात्र ही योगाची परंपरा खंडित झालेली आहे. त्यामुळे आता या योगप्रणालीस जाणणारा कोणीही नाही. कारण सर्वत्र लोकांना कामना अनावर झाल्यामुळे देहावरील प्रेमास बहर आला आहे. देहबुद्धी अशी प्रबळ झाल्याने जनांना आत्मबुद्धीचा विसर पडणे साहजिकच आहे. आत्मकल्याणाविषयींची आस्था आटून जाऊन विषयसुखाची परमावधीची आवड उत्पन्न झाल्यामुळे लोकांना हा क्षणभंगुर संसार जीवापेक्षा जास्त महत्त्वाचा झाला आहे."

"म्हणौनि योगु लोपला"

यरविं तरि खवणेयाचां गांविं। पाटाउवें काइं कराविं।
सांघैं जात्यंधां रविं। काजा आथि।।४-२२।।
कां बहिरयांचां आस्थानिं। कवण गीतातैं मानिं।
किं कोल्हेयां चांदिणिं। आवडि उपजैं।।२३।।
पैं चंद्रोदयां आरौतैं। जेयांचें डोळें फुटति असतैं।
तैं काउळें केंविं चंद्रातैं। ओळखति।।२४।।
तैसें वैराग्याचिं सिंवं ने देखिति। जैं विवेकाचिं भाख नेणति।
तैं मूर्ख केंविं पावति। मज ईश्वरांतैं।।२५।।

"म्हणून या योगाची किंमत हे लोक जाणत नहीत. नग्न लोकाच्या समाजात वस्त्रांचे मूल्य काय असणार आणि त्या वस्त्रांचा त्यांना

काय उपयोग! जन्मांधास सूर्य उगवला काय आणि मावळला काय, सारखेच! बहिरटांच्या मैफलीत गांधाराची काय महती असणार! आणि कोल्हा काय चकोर थोडाच आहे, तर त्याला चंद्राची आस लागावी! रातांधळे कावळे चंद्रास कधी ओळखतील तरी का! त्याचप्रमाणे जे वैराग्याचे नांवही ऐकून नाहीत, ज्यांना विवेकाची ओळखदेख नाही, त्या मूर्खांना मज ईश्वराप्रत येणे शिकवणारा योग कसा रुचेल!"

कैसा नेणों मोहों वाढिन्नला। तेणें बहुतें कालु वेर्थ गेला।
म्हणौनि योगु हा लोपला। लोकीं इयां।।४-२६।।

"प्राचीन काळी सत्त्वधर्मप्रवृत्ती उपजतच होती. ती लोपून आताच्या काळात या मोह-लोभ-अज्ञानांनी एवढे थैमान केव्हापासून घातले आहे, तेच कळेनासे झाले आहे मला. पण या आसुरी प्रवृत्तींच्या उत्कर्षामुळे या लोकी त्या अति उत्तम योगाचा लोप मात्र झाला आहे, हे अगदी खरे!"

पुनश्च त्या योगाचे अनावरण करण्यासाठी म्हणून श्रीकृष्ण म्हणतातः

तोचि हा आजि आतां। तुझप्रति कुंतिसुता।
सांघितला आम्हीं तत्त्वतां। भ्रांति न करिं।।४-२७।।
हें जिविंचें निज गूज। परि केंविं राखों तूझ।
जैं पढियेसिं तू मज। म्हणौनियां।।२८।।

"हे कुंतिपुत्रा! आतापर्यंत सारांशाने वर्णन करून मी तोच योग सूचित केला आहे, याबाबत किंचितही शंका नको. खरे तर हा योग म्हणजे माझ्या अंतरीची गूढ गोष्ट आहे. पण तू माझा प्रिय भक्त आहेस. म्हणून ती तुझ्यापासून लपवून ठेवणे कसे शक्य आहे!"

तू प्रेमाचां पूतला। भक्तीचां जिव्हाला।
मैत्रियेचिं चित्कला। धनुर्द्धरां।।४-२९।।
तूं अनुसंगाचां ठाओ। आतां तूझ काइं वंचूं जाओ।
जहैं संग्रामारुढ आहों। जाहालों आम्हीं।।३०।।
तहैं नावेक हें साहावें। गाजाबज्यहिं न धरावें।
परि तूझें अज्ञानत्व हरावें। लागें आदिं।।३१।।

"अर्जुना! तू म्हणजे भगवंतावरील मूर्त प्रेम आहेस. भक्तीचे कौतुक तर तूच आहेस. आपल्यातील सख्यभावाची चित्कला म्हणजे तूच तर आहेस! आपला अगदी निकटचा संबंध आहे. म्हणून तुला या योगरहस्याला पारखे करणे उचित नाही. खरे तर हा प्रसंग घनघोर संग्रामाचा आहे. या गोष्टी करण्याची ही वेळही नव्हे. परंतु तुझे अज्ञान घालवलेच पाहिजे. म्हणून हे युद्ध व ही गडबड यांकडे थोडे दुर्लक्ष करू या."

अवतारकर्तव्य::::

अर्जुनाचा अविश्वास

अर्जुनाला ही योगपरंपरा श्रीकृष्णांपासून प्रकटली आहे, हे ऐकून आश्चर्य वाटते; तो म्हणतोः

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वत।
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति।।४-४।।

"हे श्रीकृष्णा! तुझा जन्म तर अलीकडच्या काळात झालेला आहे आणि विवस्वान तर आपला पूर्वज आहे. असे असूनही तू म्हटलेस तसा हा योग त्याला तुझ्याकडून सांगितला जाणे कसे शक्य आहे?"

"तूं तंव कृष्ण सांपेचां"

याबाबत ज्ञानेशवाणी अशी आहेः

तंव अर्जुनु म्हणें हरि। माय आपुलेयाचां स्नेहो करिं।
एथ विस्मो काइं अवधारीं। कृपानिधि।।४-३२।।
तूं संवसारश्रांतांचिं साऊली। अनाथा जिवांचिं माउली।
आमुतें कीर प्रसवली। तुझीच कृपा।।३३।।
देवा पांगुलु एकाधें विईजैं। तहैं जन्मौनि जोजारु साहिजैं।
हें बोलों काइं तूझें। तूझचि फुडां।।३४।।

अर्जुन म्हणू लागलाः "श्रीहरी! माता आपल्या मुलांवर ममता करते, तशीच तू पण आम्हावर करतोस. हे कृपानिधी! संसारभाराने शिणलेल्यांना तू सावली करतोस. अनाथ जीवांची मायमाऊली तूच आहेस! आम्हासाठी तर तुझ्या कृपेचा उदयच झाला आहे. मातेने एखाद्या पांगळ्या अपत्यास जन्म दिला, तर कंटाळा न करता त्याचा ती जन्मभर सांभाळ करते व त्याच्यासाठी वाटेल ते कष्ट उपसते. तू तर साक्षात या जगताचीच माय आहेस. तुला हे सगळे आम्ही ते काय सांगावे!"

आतां पुसैन जैं मी काईं। तेथ नीकें चित्त देईं।
तेविंचिच देवें कोपावें ना काईं। बोलां एकां।।४-३५।।
तऱ्हैं माघील जैं वार्त्ता। तुवां सांघितलीं होतिं अनंता।
तैं नावेक मज चित्तां। मनेनाचिं।।३६।।
जैं तो विवस्वतु म्हणिजें काईं। ऐसें हें वडिलांहि ठाउवें नाहीं।
तऱ्हीं तुवांचिं केंविं पाईं। उपदेसिला।।३७।।
तो तऱ्हैं आइकिजैं बहुत कालाचां।आणि तूं तंव कृष्ण सांपेचां।
म्हणौनि गां इयें मातूचां। विसंवादु।।३८।।

"पण देवा! मला एक प्रश्न पडला आहे. तो मी विचारणार आहे. तरी त्याचे न रागावता खरे काय ते उत्तर दे. हे अनंता! तू मगाशी जे सांगितले, ते काही माझ्या मनाला पटत नाही. तो विवस्वान केव्हाचा हे आमच्या वाडवडलांनासुद्धा ठाऊक नाही. तेव्हा तू त्याला उपदेश केव्हा केला असशील! तो विवस्वत रवी तर फारफार प्राचीन काळींचा समजला जातो आणि तू श्रीकृष्ण तर आजकालचा आहेस. म्हणून तू त्याला योगाचा उपदेश केला असणे कसे शक्य आहे?"

तेविंचिं देवा चरित्र तूझें। आपण काईं काएं नेणिजैं।
हें लटिकें केंविं म्हणिजैं। एकि हेलां।।४-३९।।
परि हेंचि मातू आघविं। मी परियेसिं तैसिं सांघाविं।
जैं तुवांचि तेयां रवि केंविं। उपदेसु केला।।४०।।

"परंतु तू तर साक्षात ईश्वर आहेस. तुझे म्हणणे खोटे तरी कसे म्हणावे! तुझे चरित्र अगाध आहे. ते आम्ही पूर्ण जाणतही नाही. तरीही तू एक वेळ माझी खात्री पटवून दे की त्या विवस्वत आदित्याला योगाचा उपदेश तूच केला होतास अशी!"

पुनर्जन्मसिद्धांत व अवताररहस्य

यावर त्याच्या शंकेचे समाधान करत श्रीकृष्णांनी पुनर्जन्माचा सिद्धांत प्रकट केला. त्याचप्रमाणे आपले अवताररहस्यही प्रकट केले. ***"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।।४-७।।"*** इत्यादी श्लोकांद्वारे त्यांनी आपले अवतारकर्तव्य प्रकट केले. हा सगळा भाग आपण पूर्वीच अवतारकल्पनेचा परिचय करून घेतांना पाहिला आहे *(उन्मेष:१-२::विषयप्रवेश-२:पृ.क्र.३१ ते ३४)*. प्रभूचे हे दिव्य जन्म आणि असे कर्म जाणणारा नि:संशय मुक्त होतो, असे श्रीकृष्ण म्हणतांना आपण पाहिलेच आहे.

भक्तिधारा::::

भक्तिचिद्गंगा

योगप्रणालीत अनुस्यूत असणाऱ्या भक्तिचिद्गंगेची धारा त्यानिमित्त प्रकट करत ते म्हणतातः

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः।।४-१०।।
ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।।४-११।।

"हे अर्जुना! जे लोक मला ज्या ज्या भावाने भजतात, त्या त्या भावाने मी त्यांना पावतो. प्रीती, भय व क्रोध यांना पार करून मत्परायण झालेले व मला अनन्यचित्ताने शरण आलेले, आणि तसेच ज्ञानरूपी तपाने पवित्र अंत:करण केलेले असेही कित्येक लोक माझ्या स्वरूपी मिळालेले आहेत. हे जाणून सुज्ञ मनुष्ये सर्व प्रकारे माझ्याकडे पोहोचवणाऱ्या योगमार्गाचे अनुसरण करतात."

"मनुष्यजात सकल। भजनशील"

ज्ञानेश म्हणतातः

यरवीं परापर न शोचिति। जैं कामनाशून्य होतिं।
वाटा केंव्हलीं न वचति। क्रोधाचियां।।४-६०।।
जैं सदा मियांचिं आथिलें। माझियांचि सेवा जियालें।
कां आत्मबोधें तोखलें। वीतराग जैं।।६१।।
जैं तपोतेजाचियां रासि। कां एकायतन ज्ञानासिं।
जैं पवित्रता तिर्थांसिं। तिर्थरूप।।६२।।
तैं मद्भावा साहाजें आलें। मी तैचि तैं होऊनि ठेलें।
जैं मज तेयां उरलें। पदर नाहीं।।६३।।

"असे साधक जे कशाचेही दु:ख करत नाहीत; इच्छा-कामना ज्यांना सोडून गेल्या आहेत; जे कधीही क्रोधाच्या वाटेला जात नाहीत; माझ्या सेवेसाठीच ज्यांचे जीवन वाहिलेले असते, ते वीतराग सदा माझ्या स्वरूपी निमग्न राहतात व आत्मबोधाने तृप्त होतात. जे तपोरूपी तेजाचे पुंज असतात; ज्ञानाचे राहण्याचे एकमेव स्थान असतात; तीर्थांनाही पवित्र तीर्थ असे जे असतात; मूर्तिमंत तीर्थच ज्यांच्या रूपाने वावरत असते; त्यांच्यात आणि माझ्यात कोणतेच अंतर नसते. ते मीच होऊन राहतात आणि सहजच माझ्याठायी लीन होतात."

सांधैं पितलेचिं गंधिकालिक। जैं फीटलीं होय नि:शेख।
तैं सुवर्णवाईं आणिक। जोडूं जाईजैं।।४-६४।।
तैसें यमनियमिं कडिसलें। जैं तपोज्ञानिं चोखाललें।
मी तैंचिं तैं जाहालें। एथ संशो काईंसां।।६५।।

"गंज आणि काळिमा हे पितळेचे दोन दोष निवर्तले, तर त्या पितळेत अन सुवर्णात काय फरक राहिला! त्याप्रमाणेच यम-नियम पाळून, तप व ज्ञान यांनी ज्यांच्या अंतरीचे लोभमोहादी सर्व दोष निवारलेले असतात, ते आणि मी यांच्यात कोणताच फरक नसतो. ते महाभाग साक्षात मीच होत यात काहीच संशय नसावा."

यरविं तरिं पाईं। जैं जैसें माझ्यां ठाईं।
भजति तेयां मीहिं। तैसाचि भजे।।४-६६।।
देखें मनुष्यजात सकल। हें स्वभावतांचि भजनशील।
जाहालें असें केवल। माझ्यां ठाईं।।६७।।

"वस्तुतः मनुष्येकमात्र जसा माझ्या ठिकाणी भाव ठेवतात, त्या त्यांच्या भावाप्रमाणे त्यांना पावणारा मीच असतो. आणि मनुष्यजातीच भक्ती करणारी आहे. त्यांची स्वाभाविक श्रद्धा माझी भक्ती करण्याकडेच असते. म्हणून ते ज्या कोणत्या स्वरूपातल्या माझी भक्ती करतात, त्या त्या स्वरूपात त्यांना प्रसन्न होणारा मीच तो एकमात्र ईश्वर असतो."

देवतांची उपासना व तिचे फल

अनेक देवतास्वरूपात एकत्वच आहे. पण देवतांच्या गुणांनुसार त्यांच्या भक्तीचे फल त्या त्या स्वरूपात मिळते. ते कसे याची उकल करत भगवंत म्हणतातः

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा।।४-१२।।

"कामनांची सिद्धी व्हावी म्हणून मनुष्यमात्र या लोकी देवतांच्या उपासना करतात. त्या उपासनाकर्माचे फल या मृत्युलोकी सत्वर प्राप्त होते."

अज्ञान्यांची भक्ती

भगवंताच्या उपासनेचे फल भगवत्प्राप्ती असते. देवतांच्या उपासनेचे फल कामनापूर्ती असते. याविषयी ज्ञानेश म्हणतातः

परि ज्ञानेंविण नाशलें। जैं बुद्धिभेदासिं आलें।
तेणेंचिं ययां कल्पिलें। अनेगत्व।।४-६८।।
म्हणौनि अभेदीं भेदु देखति। ययां अनाम्यां नाम ठेविति।
देवि देवों म्हणति। अचर्चातैं।।६९।।
जैं सर्वत्र सदा सम।तेथ विभाग अधमोत्तम।
मतिवसें संभ्रम। विवंचिति।।७०।।
मग नाना हेतू प्रकारें। यथोचितेच उपचारें।
मानिलीं देवतांतरें। उपासिति।।४-७१।।
तेथ जैं जैं अपेक्षित। तैं तैसेंचि पावति समस्त।
परि तैं कर्मफल। निश्चित। ओलख तूं।।७२।।

"श्रद्धा आहे. भक्ती पण आहे. पण अज्ञानही आहे. यामुळे सारी घडी बिघडते. ज्ञान नसल्याने एकाठायी अनेकत्वाचा बोध होतो. अभेदाठायी भेद दिसतो. बुद्धिभ्रंश होऊन या मज अनाम्यास

नामे दिली जातात. अरूपाठायी रूप कल्पले जाते. वेगवेगळी दैवतारूपे मांडून त्यांची पूजाअर्चा केली जाते. ज्याचे वर्णन करता येत नाही, त्याच्यासाठी स्तुतिस्तोत्रांचे पठण केले जाते. जो सर्वदा सर्वत्र सम असतो, त्या माझ्याठायी विषमत्व, उच्चनिचत्व असे कल्पिले जाते. अज्ञानवशे त्यांची मती भ्रमित होऊन हे लोक नाना प्रकारच्या फळांची कामना करत आपण कल्पिलेल्या देवतास्वरूपांची नाना उपचारपूर्वक उपासना करतात. त्या उपासनांचे फलस्वरूप त्यांना त्यांच्या त्यांच्या कामनापूर्तीने मिळते. परंतु उपासना सकाम असल्याने ती वांछापूर्ती हे कर्मफलच म्हणून गणावे लागते."

वांचूनि देतें घेतें आणिक। निभ्रांत नाहीं सम्यक।
एथ कर्मचि फलसूचक। मनुष्यलोकीं।।४-७३।।
जैसें क्षेत्रीं जैं पेरिजे। तैंवांचूनि आन न निफजैं।
कां पाहिजे तैंचि देखिजैं। दर्पणादारें।।७४।।
ना तन्हैं कडेयातलवटीं। जैसा आपुलाचि बोलु किरीटी।
पडिसादु होऊनि उठीं। निमित्तयोगें।।७५।।
तैसा समस्तां ययां भजना। मी साक्षिभूतु पैं अर्जुना।
एथ प्रतिस्फलें तैं भावना। आपुलालीं।।७६।।

"मनुष्यलोकी फळ देणारी एकच गोष्ट आहे. ती म्हणजे कर्म. कर्मावाचून फळ देणारी देवतांतरे ही कल्पितच आहेत. आणि फळाची इच्छा धरून केलेली उपासना खरी भक्ती नव्हे. म्हणून अशी उपासना जरी अंती माझीच होत असली, तरी त्या उपासनेस कामनापूर्तीचे कर्मफळ निश्चित आहे. ती काही नैष्कर्म्यसिद्धिप्रदायक उपासना नव्हे, हे अगदी ठामपणे जाणावे. शेतात जे बी पेरावे, त्याच्याच जातीचे धान्य उगवते. किंवा जे समोर असते, तेच दर्पण दाखवतो. पहाडाच्या पायथ्याशी आपण काढलेले बोलच जसे प्रतिध्वनित होतात, त्यांना पहाडाचा उभा कडा हा केवळ निमित्तमात्र जसा असतो, त्याचप्रमाणे हे अर्जुना! या समस्त उपासनाभक्तिप्रकारांस भक्तांच्या भावाप्रमाणे फळ प्राप्त होते. मी केवळ त्या व्यवहाराचा साक्षिमात्र असतो."

भगवंताचे कर्मे करूनही अकर्तेपण

हे तर राहूच द्या! पण भगवंतास ज्या कर्माचा कर्ता असे लोक मानतात, त्यांचा तो कर्तासुद्धा नाही, असे श्रीकृष्ण सांगतात. ते म्हणतातः

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्।।४-१३।।

"मनुष्यांच्या गुणकर्मांनुसार त्यांची चातुर्वर्ण्य व्यवस्था मीच निर्मिली आहे. मी या निर्मितिकर्माचा कर्ता म्हणून जाणला जातो. परंतु जाणते लोक मला *अकर्ता व अव्यय* असा पुरुषोत्तम म्हणूनच ओळखतात."

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते।।४-१४।।

"कारण मला कर्मे बद्ध करत नाहीत. कर्मफलाविषयी मला आसक्ती नसल्याने कर्मे करूनही मी अकर्ता असतो."

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्।।४-१५।।

"माझे हे अकर्तृस्वरूप जे जाणतात, ते कर्मांनी बंधन पावत नाहीत. माझे हे स्वरूप आदर्शभूत मानणाऱ्या ज्ञात्या पुरुषांनी अशीच फलाशारहित कर्मे करूनच नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त केली. हे जाणून मुमुक्षूंनी पूर्वी कर्मे केली. तू पण अशाच प्रकारे कर्मयोग साध."

ज्ञानेश सांगतातः

आतां ययाचि परी जाण। चान्हीं आहेति हें वर्ण।
सृजिलें म्यां गुण-। कर्मविभागें।।४-७७।।
जैं प्रकृतिचेनि आधारें। गुणाचेनि व्यभिचारें।
कर्मे तदनुसारें। विवंचिलीं।।७८।।
एथ एकचि हें धनुषपाणि। परि जाहलें गां चहूं वर्णीं।
ऐसिं गुणकर्मिं कडसणि। केलीं साहाजें।।७९।।

"हे धनुर्धरा! गुण व कर्म यांच्या आधारावर जो चातुर्वर्ण्य समाज उभा आहे, त्याची निर्मिती मीच केली आहे. प्रकृतीच्या अंगभूत लक्षणांनी व त्रिगुणांच्या एकमेकात मिसळण्यानुरूप ही व्यवस्था मी केलेली आहे. मनुष्यजात खरी एकच आहे. परंतु त्रिगुणात्मका प्रकृतीच्या उपजत प्राप्त झालेल्या धर्मानुसार व करावयाच्या कर्मांनुसार त्यांना असे चतुर्विधपण साहजिकच प्राप्त होते."

मुमुक्षूंनी कर्मे करण्याची युक्ती

म्हणौनि आइकें पार्था। हें वर्णभेदसंस्था।
मी करिता नोहें सर्वथा। याचिलागिं।।४-८०।।
हें मजचिस्तंव जाहालें। परि म्यां नाईं केलें।।
ऐसें जेणें जाणितलें। तो सुटला गां।।८१।।
मागील मुमुक्षु जैं होतें। तिहिं ऐशियांचि जाणौनि मातें।
कर्मे केलीं समस्तें। धनुर्द्धरां।।८२।।

"ते सर्व मी केले म्हणून होते असे काही नाही. म्हणून या वर्णभेदसंस्थेचा मी कर्ता नव्हेच हे लक्षात घे. माझ्या आश्रयाने हे निर्मिले गेले असले, तरी मी याचा कर्ता मुळीच नाही. हे ज्याने जाणले तो या प्रकृतीच्या मायापाशातून मुक्त होतो. पूर्वीच्या मुमुक्षूजनांनी हे जाणून घेतले आणि समस्त कर्मे केली. परंतु माझे दिव्य स्वरूप अवगत असल्यामुळे त्यांनी केलेली सकल कर्मे दग्ध केलेली बीजे जशी उगवत नाहीत, तशी झाली. ते त्या कर्मांनी बंध पावले नाहीत, तर उलट त्याच कर्मांद्वारे त्या मुमुक्षूंना मोक्ष मिळाला."

कर्माकर्म निर्णय::::

क्रांतदर्शी तत्त्वज्ञांचे कर्माकर्मनिर्णय

कर्म व अकर्म यांचा विचार करून कोणती कर्मे करावीत याचा निर्णय करू जाणे मोठमोठ्या बुद्धिमान पुरुषांनाही शक्य होत नाही. म्हणून श्रीकृष्ण म्हणतातः

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्।।४-१६।।

"कर्म कोणते व अकर्म कोणते याबाबत ज्ञात्या मनुष्यांना पण भ्रम निर्माण होतो. ज्या कर्माद्वारे या संसाराच्या बंधनातून मुक्तता होते, ते कर्म कोणते, ते मी तुला सांगतो."

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः।।४-१७।।

"*कर्म* जाणून घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे *अकर्म* कोणते व *विकर्म* कोणते, तेही नीट जाणून घेतले पाहिजे. कारण कर्माची गती गहन असल्याने सूक्ष्म बुद्धीच्या योगानेच ती जाणता येते."

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत्।।४-१८।।

"जो मनुष्य कर्माच्या ठिकाणी अकर्म पाहतो व अकर्माच्या ठिकाणी कर्म पाहतो, तो मनुष्य निसंशय बुद्धिमान व योगी असून नैष्कर्म्यसिद्धीने युक्त होऊन सर्व कर्मे करू शकतो."

या श्लोकसमुदायास अनुसरत ज्ञानेश म्हणतात:

कर्म म्हणिजे तैं कवण। अथवा अकर्मा काय लक्षण।
ऐसें विचारितां विचक्षण। गुंपौनि ठेले।।४-८५।।
जैसें कां कुडें नाणें। खरेयाचेनि सारिखेंपणें।
डोलेयाचेंहिं देखणें। संशईं घालीं।।८६।।
तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें। गिंवसिजति आहाति कर्में।
जैं दुजिं सृष्टी मनोधर्में। करूं शकति।।८७।।
वांचूनि मूर्खाचिं गोठी काईसिं। एथ मोहलें गां क्रांतदर्शी।
म्हणौनि आतां तैंचिं परिहसैं। सांघैन तूझ।।८८।।

"कर्म कशास म्हणावे, अकर्म कोणत्या लक्षणांनी युक्त असते, याची चिकित्सा करणारे बुद्धिमानही भ्रमात पडतात. नकली नाणे जसे असली नाण्यासारखे हुबेहूब दिसते आणि दृष्टिभ्रम निर्माण करते; आणि मनोबलाने ब्रह्मदेवासारखी दुसरी सृष्टी रचण्याचे सामर्थ्य असणारे पुरुषसुद्धा कर्माच्याठायी नैष्कर्म्य समजून कर्मपाशात गुंतले जातात. त्यांच्यापुढे बिचाऱ्या संसारी लोकांची काय कथा! क्रांतदर्शी तत्त्वज्ञसुद्धा हा विचार करतांना भ्रमतात, असे हे कर्मअकर्मादी आहेत. म्हणून तो विचार तुला नीट समजेल असा सांगतो. तो नीट ऐक."

ज्ञानेश आता कर्म-अकर्म-विकर्मादींची उकल करण्यास सिद्ध झाले आहेत. त्यांचे विचारधन पाहण्याआधी श्रीमत् शंकराचार्य याविषयी काय म्हणतात, त्याचा आढावा घेणे उचित ठरेल. कारण त्यांनी या श्लोकत्रयीचा अर्थ लावतांना बरीच चर्चा केली आहे. पण ज्ञानेशमत याविषयी भिन्नसे आहे. क्रांतदर्शी पुरुषाना कर्म-अकर्मादी ठरवतांना कसे थोडे बावचळल्यासारखे होते, ते शांकरभाष्याशी ज्ञानेशमत ताडून पाहणाऱ्यांच्या सहज लक्षात येण्यासारखे आहे. म्हणून हा उहापोह करणे भाग आहे. असो. त्यातूनही जिज्ञासूंना काही गोष्टींचा नक्की उलगडा होतो, हाही भाग या विवेचनात आहे.

श्रीमत् शंकराचार्यांचा कर्माकर्माबाबतचा निर्णय

श्रीशंकराचार्य म्हणतात की "देहादींद्वारे घडणाऱ्या चेष्टांस कर्म समजणे व निव्वळ स्वस्थ बसून राहून काहीच न करणे यास अकर्म म्हणणे मूर्खपणाचे आहे. कर्म व अकर्म यांचा हा निव्वळ लौकिक अर्थ भगवंतांस कसा अभिप्रेत असेल! आणि हाच अर्थ असेल, तर त्यासंबंधी विद्वज्जनांस भ्रमण्याचे काय कारण! "*कर्म म्हणजे शास्त्रविहित कर्म व विकर्म म्हणजे शास्त्रनिषिद्ध कर्म* " असे श्रीशंकर म्हणतात.

"शरीरादींद्वारे होणारे व्यापार कर्म होत. त्यात अकर्म पाहणारा वा कर्माचा अभाव पाहणारा आणि शरीरादींच्या चेष्टा नसतांना होणारे जे अकर्म आहे, त्यात कर्म पाहणारा बुद्धिमान, योगी व सर्व कर्मे करणारा असतो."

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे कर्माठायी आत्म्याचे अकर्तृत्व ओळखले पाहिजे-म्हणजे अकर्तृत्व पाहिले पाहिजे. तसेच अकर्म म्हणजे स्वस्थ बसणे याठायी कर्तृत्वभाव वा कर्म पाहिले पाहिजे.

कर्मत्याग वा कर्महीनता या दोन्ही स्थिती अकर्म नसून कर्मच होत, अशी व्याख्या श्रीशंकराचार्य करतात.

ज्ञानेशमत

आता श्रीज्ञानेश अकर्म-कर्म-विकर्म या त्रयीचा कोणता अर्थ प्रकट करतात, ते पाहू या.

तऱ्हीं कर्म म्हणिजे स्वभावें। जेणें विश्वाकारु संभवें।
तैं सम्यक आधिं जाणावें। लागें एथ।।४-८९।।
मग वर्णाश्रमासिं उचितु। जैं विशेख कर्म विहितु।
तैंहिं ओलखावें निश्चितु। उपेगेंसिं।।९०।।
पाठिं जैं निषिद्ध म्हणिपें। तैंही बुझावें स्वरूपें।
येतुलेनि एथ काईं न गूंपैं। आपैसेंचि।।९१।।
यरविं जग हें कर्माधिन। ऐसिं ययांचि व्याप्ति गहन।..।।९२।।

ते म्हणतात: "ज्याच्यायोगे हा विश्वाकार संभवतो, त्या आत्म्याच्या स्वाभाविक स्थितीला *कर्म* म्हणावे. या कर्माची आधी नीट माहिती करून घेतली पाहिजे. तदनंतर जे वर्णाश्रमास उचित असे विशेष कर्म आहे - *विहित कर्म* असे ज्यास म्हणतात, ते नीट जाणून घ्यावे. त्यानंतर *निषिद्ध कर्म* म्हणजे काय, त्याचे स्वरूप जाणावे लागते. एवढे जाणले की झाले. मग मुमुक्षूला कर्मपाशात गुंतण्याचे होत नाही. हे सर्व जगच कर्माधीन आहे. याची व्याप्ती गहन आहे. ती सर्व नीट जाणून घेणे अवघड आहे."

आचार्यमत व ज्ञानेशमत यांवर एक विचार

आचार्य *कर्म, अकर्म व विकर्म* यांची व्याख्या करत या श्लोकत्रयीचा *(श्लोक क्र.४-१६ ते१८)* अर्थ करण्यासाठी व इतरेजनांनी केलेला अर्थ अमान्य करण्यासाठी मोठा युक्तिवाद रचतात. पण त्याचा मतितार्थ एवढाच आहे की:

(१) *कर्म म्हणजे शास्त्रविहित कर्म*-जे केलेच पाहिजे-ज्याचा त्याग करता कामा नये. अर्थात आपल्या वर्णाश्रमधर्मास अनुसरून करावयाची कर्मे यात मोडतात. परंतु ज्ञानेश कर्म म्हणजे जगद्व्यापार ज्या आत्मस्थितीमुळे प्रवर्तित केला जातो, त्यास *कर्म* म्हणतात. हा अर्थ आठव्या अध्यायींच्या ***"भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसञ्ज्ञितः।।८-३।।"*** याच्या अर्थाशी मिळणारा आहे. कर्त्याशिवाय अव्यक्ताठायी हा जो विश्वाकार गोचर होतो, त्या व्यापारास *कर्म* अशी संज्ञा त्या ठिकाणी दिली आहे.

(२) *विकर्म म्हणजे शास्त्रनिषिद्ध कर्म* असे आचार्य म्हणतात. ज्ञानेशांनी या शब्दाची उकल जरी केली नसली, तरी निषिद्ध कर्म जाणून घ्यावे असे म्हटले आहे. हेच विकर्म त्यांना अभिप्रेत असेल का हे कळत नाही.

(३)*अकर्म* या शब्दावर शंकराचार्य कोटी करतात. *अकर्म म्हणजे आत्मस्वरूप* असा अर्थ त्यांना अभिप्रेत आहे. अन्यथा अकर्म म्हणजे देहादींचे व्यापार वा चेष्टा यांचा अभाव हा अर्थ प्रथम उडवून लावल्यावरही, तोच अर्थ धरून ***"अकर्मणि च कर्म य:(पश्येत्)"*** या श्लोकार्धभागाचा सुसंवादी अर्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो.

ज्ञानदेव ***"कर्मण्यकर्म य: पश्येदकर्मणि च कर्म य:।..।।४-१८।।"*** या श्लोकाचा भाव प्रकट करतांना काय म्हणतात, ते पाहिल्याशिवाय याबाबत पुढील विचार करणे शक्य नाही. तर तिकडे वळू या:

"सकलकर्मीं नैष्कर्म्यता"

...। परि तैं असो आइकें चिह्न। प्राप्ताचें गां।।४-९२।।
जो सकलकर्मिं वर्त्ततां। देखें आपुली नैष्कर्म्यता।
कर्मसंगें निरासता। फलांचियां।।९३।।
आणि कर्तव्यतेलागिं। जेयां दुसरें नाहीं जगिं।
ऐसियां नैष्कर्म्यता तऱ्हीं चांगिं। बोधलां असें।।९४।।
परि क्रियाकलापु आघवा। आचरतु दिसें बरवा।
तऱ्हीं तो इहीं चिह्निं जाणावा। ज्ञानियां गां।।९५।।

श्रीकृष्ण म्हणतात: "कर्मविचार अति गहन आहे. तो राहू दे. आपण आप्तकाम पुरुषाची लक्षणे पाहू या. जो सगळी कर्मे करत असता आपण खरोखर कर्म करत नाही-आत्मा अकर्ता आहे व मी देहेंद्रियसंघात नसून आत्मा असल्याने कर्माचे कर्तृत्व आपल्याकडे येत नाही-हे ओळखतो; तसेच कर्माच्या फळाची आशा ठेवत नाही; आणि कर्म करावयाचे तर येथे एका आत्म्याशिवाय दुजे आहेच काय, तर कर्ता व कर्म असे कल्पिले जाऊ शकतील, हे जाणतो; त्याला नैष्कर्म्यतेचा चांगला बोध झालेला असतो. असा पुरुष सर्व प्रकारच्या क्रिया करत असतांना जरी दिसला, तरी या त्याच्या लक्षणांवरून तोच ज्ञानी असल्याचे जणावे."

जैसा कां जलपासिं उभा ठाकें।
तो जऱ्हीं आपणपे जलमाजिं देखें।
तरि तो निभ्रांत ओलखें। म्हणें मी वेगला आहे।।४-९६।।
अथवा नावें हान जो रिघैं। तो थडियेचें रुख जातां देखैं वेगें।
तैंचि सांचोकारें जों पाहों लागे। तंव रुखु म्हणे अचलु।।९७।।
तैसें सकल कर्मिं असणें। तैं फुडें मानूनि वांयांणें।
मग आपणपैं जो जाणें। नैष्कर्म्यु ऐसा।।९८।।

"पाण्याच्या जवळ उभे राहिले की जळात स्वत:चे प्रतिबिंब दिसते, पण ते पाहणाऱ्याहून भिन्न असते, हे त्यास जसे नक्की ठाऊक असते; किंवा नावेत बसून प्रवाहाबरोबर प्रवास करणाऱ्यास काठावरील वृक्ष वेगाने मागे जातांना दिसतात, पण तो खरेच पाहवयास गेला, तर वृक्ष स्थिर असून आपणच वेगाने पुढे पुढे जात आहोत, असे दिसेल; त्याचप्रमाणे तो आप्तकाम पुरुष सर्व कर्मी वर्तत असला तरी कर्मे करणे निव्वळ आभासात्मक आहे, हे ओळखून आपली नैष्कर्म्यस्थिती जाणतो."

आणि उदोअस्ताचेनि प्रमाणें। जैसें न चलतां सूर्याचें चालणें।
तैसें नैष्कर्म्यत्वीं जाणें। कर्मींचि असणें।।४-९९।।

(टीप: ***" ....उदोअस्ताचेनि प्रमाणें। जैसें न चलतां सूर्याचें चालणें।..।।४-९९।।"*** या ओवीनिमित्ताने असे जाणवते की सूर्याचे जाणेयेणे हे केवळ पृथ्वीच्या गतीमुळे आभासात्मक असते: पृथ्वी स्वत:भोवती फिरते व सूर्य अचल असतो, हे आपल्या पूर्वजांस-निदान ज्ञानेश्वरांच्या काळी तरी म्हणजे इ.१३००च्या सुमारास ज्ञात होते, याचा ही ओवी म्हणजे एक प्राचीन पुरावा आहे. कोपर्निकस *(इ.स.१४७३-१५४३)* व गॅलिलिओ *(इ.स.१५६४ - १६४२)* या *Heliocentric Theories (1543-1610 AD)*च्या उद्गात्यांचा काळ त्यानंतर २५०-३०० वर्षांचा आहे, हे पाश्चिमात्यांच्या अति प्रभावाखालील मंडळींनी येथे लक्षात घ्यावे.)

तो मनुष्यासारिखां तऱ्हें आवडें। परि मनुष्यत्व तेयांसिं न घडें।
जैसें जलीं जलामाजिं न बुडें। भानुबिंब।।१००।।

"सूर्याचे उदय व अस्त पाहून सूर्य पूर्वेकडून पश्चिमेकडे चालत गेला असे दिसले, तरी सूर्य तर अचलच जसा असतो, त्याचप्रमाणे कर्मांचा आभास केवळ दिसतो, पण खरे तर कर्म घडतच नसते, हे तो प्राज्ञ पुरुष ओळखून असतो. असा पुरुष दिसायला-चालायला-बोलायला-वागायला इतर मनुष्यांपेक्षा किंचितमात्रही वेगळा नसतो, पण त्यास मनुष्यत्वाचा स्पर्शसुद्धा नसतो. जळात सूर्याचे प्रतिबिंब पडलेले दिसते. पण म्हणून काही सूर्यबिंब पाण्यात बुडाले असे कोणी म्हणत नाही, तसेच हे आहे. असा मनुष्य कशानेही लिप्त होत नाही. आणि त्याने काही कर्म जरी केले नाही, तरी सगळी कर्मे त्यानेच केल्यासारखी असतात."

तेणें न पांतां विश्व देखिलें। न करितां सर्व केलें।
न भोगतां भोगलें। भोग्यजात।।४-१०१।।
एकेंचि ठायीं बैसला। परि सर्वत्र तोचि गेला।
हें असो विश्व जाला। आंगेंचि तो।।१०२।।

"त्याने विश्व पाहिले नसताही ते संपूर्ण पाहणारा तोच असतो. अकर्म राहूनही जगातील यच्चयावत कर्मे तोच करतो. कोणतेही भोग न भोगताच तो सर्व भोगांचा उपभोक्ता असतो. तो जरी एकाच ठिकाणी बसून राहिला, तरी सर्वत्र गमन करणारा तोच असतो. फार काय सांगावे! तो महात्मा हे विश्व होऊन या विश्वात विचरतो किंवा विश्वच होऊन जातो. मग त्याने कर्म ते कोणते करावे आणि कर्म न करता राहवे तरी कसे! अशा महापुरुषाने सर्व कर्मे करणे हे साहजिकच आहे. आणि कर्माच्याठायी नैष्कर्म्य व नैष्कर्म्याठायी कर्म पहाण्यास तोच एक समर्थ आहे. ***"आत्मविद् आत्मैव भवति"***

अशी जी श्रुति आहे, तिचे जिवंत असे उदाहरण हे जीवन्मुक्त असतात."

ज्ञानेशदृष्टीतून कर्म

या ठिकाणी असे लक्षात येते की *"कर्मविचार अति गहन आहे"* या श्रीकृष्णोक्तीचा आधार घेऊन ज्ञानदेवांनी कर्म, अकर्म व विकर्म यांच्याबाबतच्या वादात शिरणे व सखोल सैद्धांतिक चर्चा करणे टाळले आहे. त्यांच्या दृष्टीने साधकाने *कर्म* म्हणजे *"विश्वव्यापार जेणें संभवतो"* ते कारण सांगोपांग जाणून नीट ओळखावे लागते. तो विचार आठव्या अध्यायात अर्जुनाच्या ***"किं तद्ब्रह्म ...।।८-१ व २।।"*** या श्लोकांत केलेल्या पृच्छेनुसार तेथे यथातथ्य विवरला आहे. ***"भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसञ्ज्ञितः।।८-३।।"*** इ.त तेथे*कर्म, ब्रह्म, अध्यात्म* इ.चर्चा केलेली आहे. ती आपण मागे सविस्तर पाहिली आहे *(तृतीय स्कंध:उन्मेष क्र.१७:पृ.क्र.२५५ ते २५८).*

कर्माचे जे स्वरूप ज्ञानेश तेथे सांगतात, ते लक्षात ठेवले पाहिजे. ***"म्हणौनि कर्ता मुदल न दिसें। आणि शेखीं कारणहिं काईं नसें। माजिं कार्य आपैसें। वाढों लागें।।८-२८।। ऐसा करतेनविण गोचरु। अव्यक्तिं हा आकारु। निफजैं जो व्यापारु। तेयां नाम कर्म।।२९।।"*** असे कर्माचे स्वरूप आहे; त्यास कर्ता नाही व कारणही नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

ज्ञानेशांची साधकोपयोगी भूमिका

यानंतर साधकास वर्णाश्रमास उचित असे *विहित कर्म* जाणून घेण्यास ते सांगतात. त्याप्रमाणेच *निषिद्ध* कर्मेसुद्धा माहीत करून घ्यावी लागतात. *कर्म, विहित कर्म व निषिद्ध कर्म* ही कर्मत्रिसूत्री ज्ञानेशांनी उभी केली आहे आणि ते केवळ साधनेच्या भूमिकेतून तिकडे पाहात आहेत; असा फरक त्यांच्या योगविषयक प्रायोगिक भूमिकेत आणि श्रीशंकराचार्यांच्या केवळ सैद्धांतिक भूमिकेतून विवरण केलेल्या ***कर्म, अकर्म व विकर्म*** या गीतोक्त कर्मत्रिसूत्रीबाबत आपण करू शकतो.

कर्मत्रिसूत्रीच्या वादंगातून साधकाची सुटका

त्याचप्रमाणे *कर्म व अकर्म* यांच्या वादाच्या भोवऱ्यात ते श्रीशंकराचार्यांप्रमाणे शिरू इच्छित नसल्याचे ***"कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः।...।।४-१८।।"*** या श्लोकाचा भाव प्रकट करतांना त्यांनी साधकोपयोगी असे आप्तकाम पुरुषाचे वर्णन करणे पसंत केले आहे. *परंतु अकर्माच्या ठिकाणी कर्म पाहणे व कर्माच्या ठिकाणी अकर्म पाहणे यांचा अप्रतिम स्पष्ट अर्थ प्रकट करण्यास त्यांना त्या वर्णनाचा चांगलाच उपयोग करता आलेला आहे.*

कर्म म्हणजे हा विश्वव्यापारप्रवर्तक अवस्था. ही मुळातच नसल्याने - अद्वैताठायी द्वैत कल्पिणे शक्य नसल्याने - सर्व कर्मव्यापार वृथाच आहे, तो मुळात होतच नाही, असा भाग येतो. हेच कर्माठायी अकर्म पाहणे होय. साधकांसाठी कर्मे करतांना फळाशा ठेवू नये असा ध्वन्यर्थही प्रकट करण्यास ते विसरत नाहीत.

आपण कर्ते नाही, हे जाणणे म्हणजे कर्मी प्रवर्तत असताही अकर्मक असणे, असे त्यांचे सांगणे आहे. याच भूमिकेतून ते म्हणू शकताहेत की जो अकर्माशी - परब्रह्माशी - नैष्कर्म्याशी युक्त झाला आहे, त्याने काहीच न केले, तरी हा सगळा विश्वव्यापार केला असेही म्हटले जाऊ शकते. अर्थात हे आपण व्यावहारिक द्वैत भूमिकेवरूनच म्हणू शकतो.

आप्तकाम पुरुषास या कोणत्याही स्थितींची जाणीव उरत नाही, हे आपणास विदितच आहे.असा पुरुष हे जगद्व्यापार करतो, ते कसे याचे सविस्तर वर्णन तेराव्या अध्यायी येते. ***"सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्। सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति।।१३-१३।।"*** या श्लोकाधारे ज्ञान्याचे ते स्वरूप कसे स्पष्ट होते, ते आपण पूर्वीच पाहिले आहे *(तृतीय स्कंध उन्मेष क्र.११: पृ.क्र.२११ ते ३०२).*

वरील कर्मत्रिसूत्री व गीता *श्लोक क्र.४-१६,१७ व १८* यानिमित्ताने पंडितांमध्ये सर्व प्रकारचे वादंग गाजलेले आहेत. पण ज्ञानेशांच्या साधकोपयोगी योगमार्गी विवेचनामुळे ते आपणासाठी भूतकालाच्या उदरात गडप होतात. हेच सूत्र धरून त्यांनी पुढील *श्लोक क्र.४-१९ ते २२* चे विवेचन केले आहे. आणि तसे पाहिले तर या श्लोकांचा पूर्वीच्या श्लोक *क्र. ४-१६ ते १८* यांच्याशी कथित विषयाच्या अनुसंधानाच्या दृष्टीने पूर्वापर संबंधही आहेच.

नैष्कर्म्यसिद्धी

हे ध्यानी घेत असाच साधकोपयोगी ज्ञानेशोक्त भाग जीवन्मुक्तांची चर्या प्रकट करत पुढे येत आहे, तो पाहू या. श्रीकृष्णांनी म्हटले आहे की:

यस्य सर्वे समारम्भाः कामसङ्कल्पवर्जिताः।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः।।४-१९।।

"ज्यांची सर्व कर्मे कामना व संकल्प यांच्यावाचून केली जातात, त्यांची ती कर्मे ज्ञानाग्नीने भस्म होतात व अशा पुरुषांना ज्ञानी लोक पंडित असे म्हणतात."

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः।।४-२०।।

"कर्मफलाची आसक्ती टाकून देऊन, संसाराबाबत विरक्त होऊन, नित्य परमात्मस्वरूपी मग्न राहणारा पुरुष कर्माच्याठायी प्रवृत्त होतांना दिसला, तरी तो काहीच कर्म करत नसतो."

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्।।४-२१।।

"कारण फलासक्तिरहित झालेल्या व देहेंद्रियसमुदायास जिंकलेल्या आणि अंतःकरणातून भोगेच्छेचा त्याग केलेल्या पुरुषाकडून केवळ शारीरिक कर्म घडते. त्या कर्माचा संग त्यास होत नाही व म्हणून कर्म करूनही त्यास बंधन पडत नाही - संसारास कारण ठरणारे कर्मजन्य पाप त्यास लागत नाही."

यदृच्छालाभसन्तुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वाऽपि न निबध्यते।।४-२२।।

"यदृच्छेने जे प्राप्त होईल त्यात समाधानी असणाऱ्या, रागद्वेषादी द्वंद्वांपासून विमुक्त झालेल्या, मत्सररहित अशा आणि कर्मसिद्धी व असिद्धी यांबाबत उदासीन भाव धारण केलेल्या त्या पुरुषास कर्मे करूनही त्यांच्याकडून बंधन होत नाही."

"सगुण परि गुणातितु"

कर्मयोगाचा सारांश व त्यायोगे प्राप्त होणारे हे साफल्य ओवीबद्ध करत ज्ञानेश म्हणतातः

जेयां पुरुखाचां ठाईं। कर्माचां तन्हैं खेदु नाहीं।
परि फलापेक्षा कांहिं। संचरेना।।४-१०३।।
जो शरीरीं उदासु। फलभोगीं निरासु।
नित्यता उल्हासु। होओनि असें।।१०६।।
जो संतोखाचां गाभारां। आत्मबोधाचियां ओगरां।
पुरें न म्हणेंचि धनुर्द्धरां। आरोगितां।।१०७।।
कैसिं अधिकाधिक आवडिं। घेत महासुखाचिं गोडि।
सांडौनियां आशा कुरौंडि। अहंभावेंसिं।।१०८।।

"जे पुरुष तिरस्काराने कर्मे टाकूनही देत नाहीत, पण कर्मांच्या फळांची अपेक्षाही बाळगत नाहीत; जे शरीराच्याबाबत उदास असतात; देह म्हणजे आपण असा ज्यांचा समज नसतो; कर्मफळांचा उपभोग घेण्याविषयी जे उत्सुक नसतात; आणि नेहमी स्वरूपानंदात निमग्न राहतात; असे पुरुष तृप्तीच्या माजघरात आत्मबोधाचे पक्वान्न निरंतर सेवत असतात. अहंकार व फळाशा यांचा त्यांच्याठायी नित्य अभाव असतो. म्हणून त्या परमानंदाची गोडी चाखतांना मिळणारे त्यांचे महासुख सतत चढतेवाढते असते. ***"दिन दिन बढत सवायो"*** असे ते सुख ते आप्तकाम पुरुष नित्य उपभोगतात."

म्हणौनि अवसरें जैं जैं पावें। किं तेणेंचि तो सुखावें।
जेयां आपुलें आणि परावें। दोनहीं नाहिं।।४-१०९।।
तो दिठी जैं पाहें। तैं आपणचिं होऊनि जायें।
आइकें तैं आहे। तोचि जाहाला।।११०।।
चरणिं हन चालें। मुखैं जैं जैं बोलें।
ऐसें चेष्टाजात तेतुलें। आपणचि तो।।१११।।
हें असो विश्वें पाईं। जेयासिं आपणपेंवांचूनि नाइं।
आतां कवण तैं कर्म काइं। बाधिं तेयातैं।।११२।।
हा मत्सरु जेथ उपजैं। तेतुलें नुरेंचि जेयां दुजैं।
तो निर्मत्सरु काइं म्हणिजैं। बोलवेरि।।११३।।

"त्यांना आपपर भाव नसतो. आणि असेलच कसा! कारण द्वैतभावना त्यांना स्वप्नातही स्पर्श करत नाही. त्यांना यदृच्छया जे मिळेल, त्यात सुख-संतोष, समाधान असते. ते जे काही दृश्य पाहतात, ते स्वतःच ते होऊन जातात. जे काही ते ऐकतात, तेही ते आपणच होऊन जातात. चरणांचे चालणे, मुखावाटे बोलणे, जे काही इतर कर्म करणे, ते सर्व ते महापुरुष स्वतःच होऊन राहतात. ते राहू द्या! हे सगळे विश्वच जेथे त्यांना आपणाशिवाय दुसरे इतर असे वाटत नाही, त्यांना कर्म ते काय आणि ते कसे बद्ध करणार! मत्सर कोणाचा करतो आपण! आपल्याहून कोणी दुसरा असतो, त्याचाच ना! त्यांना तर द्वैतभावना नसतेच. मग ते सहजच निर्मत्सर का न व्हावेत! हे काय सांगायला हवे का की ते पुरुष असे निर्मत्सर असतात म्हणून! असो."

म्हणौनि सर्वांपरी जो मुक्तु। तो सकर्मुचि कर्मरहितु।
सगुण परि गुणातितु। ऐथ भ्रांति नाइं।।४-११४।।

"असे हे पुरुष सर्व प्रकारे खरेच मुक्त असतात. कर्मे करूनही कर्मरहित असतात. खरी नैष्कर्म्यस्थिती त्यांचीच असते. ते गुणांनी युक्त दिसले, तरी गुणातीत असेच असतात. हे पुरुष खरेखुरे जीवन्मुक्त होत, याविषयी संशयच नको."

ज्ञानाग्नीच्या मुखात सर्व कर्मांचा हवि देऊन त्याच्या कर्मफळांसह कर्मास जाळून टाकणारे ते पुरुष म्हणजे मनुष्यरूपाने वावरणारे साक्षात मूर्तिमंत परब्रह्मच होत.

योगनिष्ठ होण्याचा आदेश

यज्ञार्थ कर्म करणारे, कर्मास ब्रह्ममय करणारे, ***"ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।"*** असा ब्रह्मयज्ञ विविध प्रकारे करणारे जे जीवन्मुक्त असतात, त्यांचे विविध यज्ञप्रकार व जीवन्मुक्ती साधावयाचे यज्ञांचेच साधनाप्रकार इ.चा आपण पूर्वीच ***यज्ञ*** या संकल्पनेस सामोरे जातांना परिचय करून घेतला होता *(प्रथम स्कंधः उन्मेष क्र.१-२:पृ.क्र.२१ ते३१;तृतीय स्कंधःउन्मेष क्र.१८:पृ.क्र.२६२ ते २७२).*

"योगसन्न्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम्। आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनञ्जय।।४-४१।।" असा कर्मयोगी पुरुषाच्या चर्येचा आलेख श्रीकृष्ण आरेखतात. योगवृत्ती धारण करून व ज्ञानाने आत्म्याविषयी संशयरहित होऊन, तो सर्व कर्मे करतो. तरीही त्या पुरुषास कर्मे बंधन करत नाहीत. म्हणून ***"तस्मादज्ञानसम्भूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः। छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत।।४-४२।।"*** असा श्रीकृष्णांनी अर्जुनास कर्मविषयक आदेश दिलेला आहे.

ज्ञानरूप खड्गाने अज्ञानामुळे कर्माकर्माविषयी उत्पन्न झालेला संशय हृदयातून समूळ छेदून टाकून योगनिष्ठेचा अवलंब करून कर्म करण्यास सज्ज व्हा, असा संदेश त्याद्वारे ते मानव जातीस देत आहेत, असेही म्हटले तर ते उचितच ठरावे! सर्व ज्ञानाचा पिता व ज्ञानदीप अशा श्रीकृष्णाचे आपणा सर्वांना हे कृपावंत होऊन सांगणे आहे. ते आपल्या हृदयसंपुटी जतन करून ठेवू या.

चतुर्थ अध्यायाचा समारोपः:::

पाचव्या अध्यायाचे अनुसंधान

चवथ्या अध्यायाची समाप्ती करत पंचम अध्यायाचे गहिरे रंग श्रीज्ञानदेवनाथ कसे सजवतात, ते आता पाहू या! ते म्हणतातः

तंव एयां पूर्वापर बोलाचां। विचारुनि कुमरु पंडुचां।
कैसा प्रश्नु हन अवसरिचां। करितां होईल।।४-२११।।

तैं कथेचि संगति। भावाचिं संपत्ति।
रसाचिं उन्नति। म्हणिपेल फुडां।।२१२।।
जेयांचियें बरवेंपणीं। कीजैं आठां रसांचि वोवालणी।
सज्जनाचियें आयणीं। विसांवा जगिं।।२१३।।
तो शांतू चि अभिनवैल। तैं परियेसा मऱ्हाटें बोल।
जैं समुद्राहीहूनि खोल। अर्थभरितु।।२१४।।

भगवंतांनी ***"योगसन्यस्त कर्माणं"*** व ***"योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत"*** असे *श्लोक क्र. ४-४१ व ४२* मध्ये सांगितले आहे. त्याचा काहीतरी श्लेष अर्जुनाच्या मनात खळबळ निर्माण करत आहे.

ज्ञानदेव म्हणतात: "म्हणून या मागल्यापुढल्या बोलण्याचा विचार करून तो पंडुपुत्र समयोचित जो प्रश्न विचारणार आहे, ती कथा मी संगतवार त्यात भावधारा समावत व रसोत्कर्ष करत पुढे सांगणार आहे. ज्याच्या अभिभवावरून इतर रस ओवाळून टाकावेत, असा नवरसांपैकी सर्वश्रेष्ठ जो शांत रस आहे, तो सज्जनांसाठी या जगी एकमेव विसाव्याचे स्थान आहे. असा तो शांतरसच ज्यात प्रकर्षाने प्रकटेल, असे समुद्राहून गंभीर आणि अर्थपूर्ण असे माझे समर्थ शब्द ऐका."

जैसें बिंब तऱ्हैं बचकेंएवडें। परि प्रकाशां त्रैलोक्य थोकडें।
शब्दाचिं व्याप्ति तेणें पाडें। अनुभवाविं।।४-२१५।।
ना तऱ्हैं कामितेयाचियां इछा। फलें कल्पवृक्षु जैसां।
बोलु व्यापकु होये तैसा। तऱ्है अवधान देयावें।।२१६।।
हें असो काये म्हणावें। सर्वज्ञु जाणति स्वभावें।
तऱ्हैं नीकेंनि चित्त देयावें। हें विनंति माझिं।।२१७।।

"सूर्यबिंब जरी बचकेएवढे असले, तरी त्याचा प्रकाश त्रैलोक्यासही उजळून टाकतो आणि तरीही उरतो; त्याचप्रमाणे जे शब्द मी आता अनुवादणार आहे, त्यांची खोली श्रोत्यांनी अनुभवावी. आणि कल्पवृक्षापासून ज्याची इच्छा करावी, ते फळ जसे अवतीर्ण होते, त्याप्रमाणेच हे बोलही आपणा सर्वांची अध्यात्माची इच्छा सर्व प्रकारे पूर्ण करण्यास समर्थ होवोत. तरी कृपा करून इकडे अवधान द्या! पण असो. जे सर्वज्ञ श्रोते आहेत, त्यांना माझे म्हणणे आपोआपच कळत आहे. तरी सर्वांनी इकडे नीट लक्ष द्यावे ही विनंती!"

"एथ मोक्षु असें आइतां। श्रवणामाजिं"

श्रोत्यांना अशी विनंती करून ज्ञानेश पुढे म्हणतात:

जेथ साहित्य आणि शांति। हें रेखा दिसें बोलतिं।
जैसिं लावण्यगुण कुलवति। आणि पतिव्रता।।४-२१८।।
आदिंचिं साकर आवडें। आणि तैंचि जऱ्हैं ओखदिं जोडें।
तऱ्हैं सेवाविं ना कां कोडें। नावां नावां।।२१९।।
सहजें मलयानिलु मंदु सुगंधु। तेयांहिं अमृताचां होये स्वादु।
आणि तैथेंचि जोडें नादु। जऱ्हैं दैवंगत्यां।।२२०।।
तऱ्हैं स्पर्शें सर्वांग निवविं। स्वादें जिव्हेतैं नाचविं।
तेंविंचि कानाकरविं। म्हणवि बापु माझां।।२२१।।

"जशी लावण्य, गुण आणि शील यांनी युक्त असणारी कुलवती स्त्री पातिव्रत्याने मंडित असावी, त्याप्रमाणे हे माझे शब्दांकन शांतरस आणि सालंकृत भाषा यांनी सुशोभित झाले आहे. साखर मुळातच गोड असते. तीच जर औषध म्हणून कोणी दिली, तर तिचे आवडीने कां सेवन करू नये! मलयाचलावरून येणारा वायु स्वभावत:च चंदनगंधित असतो. त्याच्या सुगंधासमवेत जर दैववशात त्यात अमृताचा स्वाद आणि स्वर्गीय संगीताचे मधुर सुस्वर प्रकटले, तर किती छान होईल! स्पर्शाने तो वायु सर्वांगास सुखावेल; स्वादाने जिव्हेस वेड लावील आणि श्रवणेंद्रियांकडून दादही घेईल!"

तैसें कथेचें इयें आइकिणें। एक श्रवणासिं होये पारणें।
आणि संसारदु:खा मोकलवणें। विकृतिबिणें।।४-२२२।।
जऱ्हैं मंत्रेंचि वैरि मरे। तऱ्हैं वांयांचि कां बांधाविं कटारें।
रोग जाये दूधसाकरें। तऱ्हैं निंब कां पियावा।।२२३।।
तैसा मनाचां मारु न करितां। आणि इंद्रियां दु:ख नेदितां।
एथ मोक्षु असें आइतां। श्रवणाचि माझिं।।२२४।।
म्हणौनियां आथिलियां आराणुकां। गीतार्थु हां नीकां।
ज्ञानदेओ म्हणें आइकां। निवृत्तिदासु।।२२५।।

"या गीतासंवादांकनाचे तसेच कौतुक आहे. ते ऐकून कानाचे पारणे फिटेल आणि विनासायास संसारदु:खाचे निर्मूलन होइल! मंत्रप्रयोगानेच जर वैऱ्यास ठार करता येत असेल, तर उगीचच कट्यार का बाळगावी! आणि दूधसाखर घेऊन जर रोग हटत असेल. तर कडुलिंबाचा रस कां पित बसावे! माझा हा संवाद असाच गुणी आहे. मनास न निरोधता आणि इंद्रियांना यमनियमादींची जाचक कडसणी न लावता हे संवादांकन केवळ ऐकल्यानेच मोक्ष आयता लाभणार आहे. म्हणून प्रमुदित मनाने व सुशांत अंत:करणाने आपण सगळे या गीतार्थाचे नीट श्रवण करा," असे निवृत्तिशिष्य ज्ञानदेव श्रोत्यांना विनवत आहेत.

ज्ञानेश्वरी पारायणाची कल्याणकारकता

ज्ञानेश्वरीचे पारायण कल्याणकारक आहे, असे ज्ञानदेव या ओव्यातून व्यक्तवत आहेत. गीतार्थ कळण्यास अवघड आहे खरा! पण श्रीज्ञानेशांच्या संगतीने तो आपणास आपोआप भावतो. पंडित-आचार्य-श्रौत व स्मार्त वाङ्मयसंपदा या सर्वांचे मग वेगळे आलोडन करण्याची आपणास गरज उरत नाही. इतक्या अतीव प्रसादाने युक्त असणाऱ्या या दैवी वाङ्मयसंपदेचा अधिक आस्वाद घेण्यास आपण उत्सुक आहोत. तर वळू या गीतेच्या पाचव्या अध्यायाकडे!

समारोप

त्यासाठी आपणास आता पाहावा लागेल पुढील **उन्मेष क्र. ४३-कर्मपथ - ५**, ज्यातून पाचव्या अध्यायाची उर्वरित चर्चा येईल आणि हा **कर्मपथदिग्दर्शन**ाचा ***दशम स्कंध*** समाप्तीस जाईल. इत्यलम्।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४३::
::कर्मपथ-५::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४३:

गीताः
३:३
४:४१,४२
५:१-२६,२९
१३:१२

पा.यो.सू.:१:२४

ज्ञानेश्वरीः
४:४१
५:१-१४९
१८:९७२,९८८,९९१

अमृता.:
८:१-१७
९:१-७०

कर्मपथदिग्दर्शन

::उन्मेष ४३::

::कर्मपथ-५::

संन्यास व कर्म::::

अर्जुनाचा मुख्य प्रश्न

गीतेच्या पाचव्या अध्यायाच्या सुरुवातीस अर्जुनाचा आपल्या मनाचे श्रीकृष्णांनी पूर्ण समाधान केले नसल्याचे दर्शवणारा व स्वतःचा संभ्रम पुनश्च प्रकट करणारा प्रश्न येतो. तो म्हणतोः

सन्न्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि।
यच्छ्रेयं एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम्।।५-१।।

"श्रीकृष्णा! कर्मांचा संन्यास करावा असे तू म्हणतोस आणि पुनः कर्मयोगाचीही प्रशंसा करतोस. तर हे कसे काय! यांपैकी जे खरे श्रेयस्कर असेल, ते मला सांग."

मागील अध्यायाच्या दोन श्लोकांकडे पाहिले, तरच या अर्जुनाच्या प्रश्नाची काही संगती लागू शकते. ते श्लोक अर्जुनास ***"योगसन्न्यस्त कर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम्।....।।४-४१।।"*** व ***"…..।छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत।।४-४२।।"*** असा उपदेश देणारे आहेत. यातील ***"योगसंन्यस्त कर्माणं "*** व ***"योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत"*** या सांगण्याचा विचार केला पाहिजे.

ज्ञानेशांनी या दोन श्लोकांतून ***कर्मसंन्यास व कर्मयोग*** असा विशेष अर्थ काढलेला नाही. ते फक्त असा अर्थ करतात की, "अज्ञान कितीही प्रगाढ असले, तरी त्याचा एका उपायाने नाश करता येतो. तो म्हणजे ज्ञानरूप खड्गाने याचा समूळ नायनाट होतो. म्हणून हे अर्जुना! तत्काळ या अज्ञानाचा व त्यापासून निर्माण होणाऱ्या या त्रैलोक्यरूपी व्यामोहाचा नाश कर."

या ठिकाणी ज्ञानेशांनी ***ज्ञानोपाय*** सांगितलेला आहे. गीताकार कर्मांचा योगाश्रयपूर्वक संन्यास करण्यास सांगत आहेत. त्याआधी श्रीकृष्णांनी वेळोवेळी योगाचे आचरण कर असे अर्जुनास सांगितले होते. तसेच ***"लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ। ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"*** अशा दोन योगमार्गांचा त्यांनी पूर्वी उल्लेख केला होता. भगवंत सतत या दोन्ही मार्गांचा समन्वय साधत आहेत. परंतु अर्जुनास त्या दोन्ही मार्गांतील खरा फरक जाणून घ्यावयाचा आहे. म्हणून त्याचा हा पंचमाध्यायीचा प्रश्न येतो.

अर्जुनाच्या प्रश्नाचा साधकोपयोगी विचार

"श्रीकृष्णा! कर्मांचा संन्यास करावा असे तू म्हणतोस आणि पुनः कर्मयोगाचीही प्रशंसा करतोस. तर हे कसे काय ? यांपैकी जे खरे श्रेयस्कर असेल, ते मला सांग."

वास्तविक भगवंतांनी ***"योगसन्न्यस्तकर्माणं"*** असे सांगितले आहे. म्हणजे योगाचा आश्रय घेऊन कर्मे संन्यसित कर असे म्हटले आहे. कर्मत्याग वा कर्मसंन्यास वा चतुर्थाश्रमी संन्यास वा कर्मे करण्याचे सोडणे असे काही म्हटलेले नाही. परंतु अर्जुनाने आपल्या ऐकीव माहितीचा कदाचित आधार घेतला असावा.

"ज्ञान्यास कर्मे नसतात,""ज्ञानाने बंधन नाहीसे होते," "ज्ञान्यास तत्काळ मोक्ष प्राप्त होतो," "संन्यासी (नावापुरता असला तरी) म्हणजे ज्ञानी,""ज्ञानमार्गास कर्मांची आवश्यकता नाही," इ.शब्दजालात तो अडकला असावा, असे म्हणणे धाष्टर्याचे आहे. पण सर्वसामान्य मुमुक्षू मात्र या ऐकीव माहितीवर आपला तर्क चालवून असा काही विचित्र समज करून घेणे सहज शक्य आहे की *"ज्ञानमार्गात कर्मांचे प्रयोजन नाही"* व *"कर्मयोग हा त्याहून काही अत्यंत हीन प्रतीचा मार्ग आहे,"* इ. तसेच सामान्यांस ***कर्मसंन्यास व कर्मे टाकून देणे*** यातला फरकही उमजत नसतो.

अशा मुमुक्षूंना योग्य उपदेश देण्यासाठी अर्जुनाच्या उपरोक्त प्रश्नाचे प्रयोजन गीताकार करत आहेत, असे वाटते. त्याच दृष्टीने आपण पुढे जाऊ या. कारण आपण पूर्वी पाहिलेच आहे की ***संन्यास*** हा गीतेतील शब्द घेऊन पंडितांनी किती गदारोळ उडवला आहे ते! त्यांच्या त्या बृहत वादंगात आणि पूर्वपक्ष - उत्तरपक्ष करतकरत केलेल्या ठाम विधानांच्या प्रांतात फारसे न शिरता, साधकोपयोगी विचार करू याः

"दोहींमाजिं बरवा। मार्गु कवण"

ज्ञानेश वर्णितातः

मग पार्थु श्रीकृष्णातें म्हणे। हां हो हें कैसें तुमचें बोलणें।
एक होय तरी अंतष्करणें। विचारूं एं।।५-१।।
माघां सकल कर्मांचा संन्यासु। तुम्हीचि निरोपिला होता बहुवसु।
तेंविं कर्मयोगिं केंविं अतिरसु। पोखितसां पुढुति।।२।।
ऐसें द्व्यर्थ हें बोलितां। आम्हां नेणतयांचियां चित्तां।
आपुलियां चाडें अनंता। उमजु नोहे।।३।।

अर्जुन कृष्णाला म्हणू लागलाः "तुमचे हे सांगणे कसे विसंगत वाटते! निश्चित कळेल असे काही बोलाल, तर ते अंतःकरणात उतरेल तरी! अगोदर सर्व कर्मांचा संन्यास तुम्ही एवढा वाखाणून सांगता आणि त्याचप्रमाणे कर्मयोगाची एवढी महती पण तुम्हीच सांगता! वर *"हे पण कर अन ते पण कर"* असे तुमचे म्हणणे आहे. कर्मयोगाचे आचरण करावे की कर्मांचा संन्यास घ्यावा, हे तुमच्या अशा द्व्यर्थी बोलण्यामुळे आम्हा अज्ञान्यांच्या नीट लक्षात येत नाही."

आइकें एक सारातें बोधिजैं। तरी एकनिष्ठचि बोलिजैं।
हें आणिकीं काई सांघिजैं। तुम्हांप्रति।।५-४।।
तरी ययांचिलागिं तुमतें। मियां राऊलासिं विनविलें होतें।
जैं हा परमार्थु ध्वनितैं। ना बोलावा।।५।।
परि माघील हें असो देवा। आतां प्रस्तुतिं उकलु देखावा।
सांधैं दोहोंमाझिं बरवा। मार्गु कवण।।६।।

जो परिणामिंचां निर्वालां। अचुंबितु यें फलां।
आणि अनुष्ठितां प्रांजलां। सांवियांचिं।।७।।
जैसें निद्रेचें सुख न मोडें। आणि मार्गु तऱ्हैं बहुंसाल सांडें।
तैसें सोहोकासना सांघडें। सोहोपें होय।।८।।

"हे अनंता! जे काही सार म्हणून सांगायचे, ते कोणती तरी एक निष्ठा नक्की करून सांगावे. तुम्हाला काही हे वेगळे विचारायला नको. यासाठीच तर तुम्हा थोर पुरुषाला मी मागे विनवले होते की परमार्थ संदिग्ध भाषेत सांगू नका असे. बरे! ते आता राहू द्या! आता तरी नीट उलगडा करा की या दोन्ही निष्ठांपैकी कोणती निष्ठा उत्तम आहे? आचरण्यास सोपा मार्ग कोणता आहे? निद्रेचे सुख उपभोगत असता बरीचशी वाटचालही करण्यास उपयोगी पडणारे पालखीसारखे आरामदायक उत्तम वाहन जसे असावे, तसा अंतिम गतीपर्यंत अचूक नेऊन पोहोचविणारा व अनुष्ठानास सोपा, सुखकर असा यातील कोणता मार्ग आहे, ते सांगावे."

"देओ मनिं रिझलें"

अर्जुनाच्या या उद्गारांबद्धल ज्ञानेश म्हणतातः

एणें अर्जुनाचेनि बोलें। देओ मनिं रिझलें।
मग होईल आइकें म्हणितलें। संतोखौनियां।।५-९।।
देखा कामधेनु ऐसिं मायें। सदैवां जेयां होयें।
तो चंद्रुहिं परि लाहें। खेलावेयां।।१०।।
पाहें पां शंभुचिं प्रसन्नता। तेयां उपमन्यूचियां आर्त्तां।
काय क्षिराब्धि दूधभातां। देईजेचिना।।११।।
तैसां औदार्याचां कुरुठा। कृष्णु आपु जाहालेयां सुभटां।
कां सर्व सुखाचां वसौटा। तोचि नोहावां।।१२।।

अर्जुनाच्या बोलण्याने प्रसन्न झालेले श्रीकृष्ण मग म्हणाले की, *"तुझ्या म्हणण्याप्रमाणे करतो. ऐक."* कामधेनुसारखी माता ज्यांना लाभली असेल, त्यांनी खेळायला चंद्र जरी मागितला, तरी मिळेल. शंभूने प्रसन्न झाल्याबरोबर उपमन्यूला दूधभातासाठी क्षीरसागरच नाही का दिला! त्याचप्रमाणे तो औदार्याचे वसतिस्थान असा श्रीकृष्ण ज्याच्या स्वाधीन झाला, त्या वीराग्रणी अर्जुनाने सर्व सुखांचे भांडार का होऊ नये! त्यात नवल ते काय!"

एथ चमत्कारु काइंसां। गोंसाविं लक्ष्मिकांतां आइसां।
आतां आपुलालियां सवैसां। मागावा कीं।।५-१३।।
म्हणौनि अर्जुनें म्हणितलें। तैं हांसौनि येरें दिधलें।
तैंचि सांघैन बोलिलें। काइं कृष्णें।।१४।।

"लक्ष्मीपतीसारखा मातब्बर स्वामी असलेल्याने त्याच्याकडून जे हवे ते मागितल्यास का न मिळावे! म्हणून अर्जुनाने जे विचारले आहे, त्याचे समाधान करणारे भाषण त्या श्रीपतीने आनंदाने केले. तेच आता मी तुम्हाला सांगणार आहे."

ज्ञानदेव पूर्वपक्ष-उत्तरपक्षाच्या विशेष भानगडीत पडत नाहीत. पण ते श्रीकृष्णांच्या वक्तव्याचा निश्चित अर्थ करण्यासाठी अर्जुनाच्या शंकांचा खुबीदार उपयोग करून घेत असतात, असे दिसून येते.

"कर्मयोगो विशिष्यते"

तर ऐका कृष्ण काय सांगतात ते!

सन्न्यासः कर्मयोगश्च निःश्रेयस्करावुभौ।
तयोस्तु कर्मसन्न्यासात्कर्मयोगो विशिष्यते।।५-२।।

"संन्यास आणि कर्मयोग हे दोन्ही निःश्रेयस प्राप्त करून देतात. परंतु यापैकी कर्मयोग कर्मसंन्यासापेक्षा विशेष आहे."

ज्ञेयः स नित्यसन्न्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति।
निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते।।५-३।।

"हे महाबाहो! जो कोणाचा द्वेष करत नाही, जो कशाची अपेक्षा ठेवत नाही, तो नित्य संन्यासीच जाणावा. असा द्वंद्वरहित पुरुष सहजच बंधमुक्त होतो."

येथे स्पष्टच श्रीकृष्णांनी कर्मसंन्यासास कर्मयोगापेक्षा गौणत्व दिलेले आहे, असे आपणास सहजच दिसते.

संन्यासाचे तत्त्व::::

"सांघैन तूझ। संन्यासियाचें चिह्न"

ज्ञानदेव या कृष्णोक्तीचे वैशिष्ट्य स्पष्ट करतांना म्हणतातः

तो म्हणे गां कुंतिसुतां। हें संन्यासयोग विचारितां।
मोक्षकर तत्त्वतां। दोनिहिं होति।।५-१५।।
तऱ्हैं जाणां नेणां सकलां। हा कर्मयोगु किर प्राजलां।
जेसिं नाव स्त्रिया बालां। तोयतरणिं।।१६।।
तैसें सारासार पाहिजैं। तऱ्है सोहोपा हाचि देखिजैं।
एणें संन्यासफल लाहिजैं। अनायासें।।१७।।
आतां येयांचिलागिं सांघैन। तूझ संन्यासियांचें चिह्न।
मग साहाजें हें अभिन्न। जाणसिं तूं।।१८।।

कृष्ण म्हणतातः"हे कुंतिपुत्रा! ***संन्यास*** आणि ***कर्मयोग*** हे दोन्हीही मोक्षकारक आहेत, यात वाद नाही. परंतु जाणते व नेणते अशा सगळ्या लोकांना कर्मयोगच चांगला आहे. अबला व बालकांना पाण्यातून तरून जाण्यासाठी जसे नाव हेच उत्तम व सुलभ साधन आहे, तसाच ***सारासार विचारांती सर्वांसाठी योगच चांगला आहे.*** तसेच या योगाने अनायासे संन्यासाचे फळसुद्धा मिळते. पण मुळात संन्यासी कोणाला म्हणावे, ते ऐक. मग तुला सहजच आकळेल की संन्यास व योग यांत काहीच वेगळेपणा नाही."

आतां ज्ञानेश संन्यासाची व्याख्या करणार आहेत, ती ऐकल्यावर गृहत्याग करून, नातेसंबंध तोडून, शिखासूत्र त्यागून, स्वतःचे श्राद्ध घालून, अनामिक होऊन, छाटी - कमंडलू -दंड घेऊन, रानावनात जाऊन राहणाऱ्या व भिक्षापात्र अवलंबून चतुर्थाश्रम स्वीकारणाऱ्या भगव्या वस्त्रधारी संन्याशाचे जे चित्र ***संन्यास*** हा शब्द ऐकताच आपल्या मनीमानसी प्रकटते, त्याचा श्रीकृष्णांना अभिप्रेत असणाऱ्या संन्यासाशी - वा कर्मसंन्यासाशी - सुतरामही संबंध नसल्याचे आपल्या ध्यानात येते.

"गृहादिक आघवें। न लगे त्यजावें"

प.पू.लोकमान्य टिळकांनी जीवाचा आटापिटा करून या भगव्या वस्त्रांकित चतुर्थाश्रमी संन्यासास, त्याची इतर काहीही धर्मशास्त्रीय उपयुक्तता असली तरीही, गीतेच्या प्रांतातून जे हद्दपार केले आहे, तो त्यांचा पराक्रम किती स्तुत्य आहे, हे ज्ञानेशवचने ऐकताच आपल्या ध्यानी येते. असो.

ज्ञानेश समजावताहेतः

तन्हैं गेलियाचिं सें न करिं। न पवतां चाड न धरिं।
जो सुनिश्चलु आंतरीं। मेरु जैसां।।५-१९।।
आणि मी माझें ऐसीं आठवन। विसरलें जेयांचें अंतष्करण।
पार्था तो संन्यासी जाण। निरंतर।।२०।।
जो मनें ऐसा जाहाला। संगिं तोंचिं सांडिलां।
म्हणौनि सुखें सुख पातला। अखंडित।।२१।।
आतां गृहादिक आघवें। तैं कंहिंचि न लगे त्यजावें।
जैं घेतें जाहलें स्वभावें। निःसंगु म्हणऊनि।।२२।।

"गतगोष्टींची खंत जो करत नाही, मनासारखे झाले नाही, तर जो रुष्ट होत नाही; मेरूप्रमाणे ज्याचे चित्त सुस्थिर असते; मी आणि माझे असा अहंभाव ज्याच्या अंतःकरणात उरलेला नाही; त्यास हे पार्था! नित्य संन्यासी म्हणून जाणावे. जो अंतःकरणापासून हा भाव धारण करतो, त्याला विषय सोडून जातात; संकल्प त्याच्या वाटेला जात नाही. म्हणून त्यासच नित्य अखंड आत्मसुख पावून आनंद मिळतो. या संन्यासासाठी घरदार, परिग्रह इ.काहीच त्यागावे लागत नाहीत. कारण यांची आसक्तीच त्यांच्या चित्तात उरलेली नसते. असा तो खराखुरा निःसंग असतो."

"म्हणौनि कल्पना जैं संडीं। तैंचि गां संन्यासु घडें"

देखैं अग्नि विझौनि जायें। मग जैं राखौंडी केवलु होये।
तैं तैं कापुसें गिंवसु ये। जियेंपरी।।५-२३।।
तैसा असतेनि उपाधि। नाकलिजैं तो कर्मबंधीं।
जेयाचियें बुद्धिं। संकल्पु नाहीं।।२४।।
म्हणौनि कल्पना जैं सांडे। तैंचि गां सन्यासु घडें।...।२५।।

"विस्तव विझून गेल्यावर जी राख उरते, तिला कापसातही जसे ठेवता येते, त्याप्रमाणे ज्याच्या बुद्धीत संकल्पास स्थान नसते, त्यास उपाधीत राहूनही, कर्मे करूनही, त्यांचे बंधन पडत नाही. म्हणून संकल्पाचा जेव्हा ठाव उठतो, त्याच वेळी संन्यास घडतो आणि त्याच वेळी योगही साधतो."

"दोनिं सांगडें। संन्यासु योगु"

...। ययां कारणें दोनिं सांगडें। संन्यासु योगु।।२५।।

"म्हणून कर्मसंन्यास व कर्मयोग हे दोन्हीही वेगळे नाहीत. गृहादिक त्यागणे यास संन्यास म्हणणे ज्ञानेशांस मान्य नाही. अर्थातच *कर्मसंन्यास म्हणजे चतुर्थाश्रमी कर्मांचा त्याग असा अर्थ घेता येणार नाही. संकल्पाचा त्याग - फलाचा त्याग - फलाशेचा त्याग - निष्काम कर्म अशी लक्षणे ज्ञानेशविरचित कर्मसंन्यास प्रकट करतो.* आणि ही लक्षणे ज्यास ***कर्मयोग*** म्हणतात, त्याहून भिन्न नाहीत आणि त्यांची फळेही भिन्न नसून मोक्ष हे एकच फळ दोन्ही मार्गांत मिळते. मग त्यांना भिन्नभिन्न मार्ग असे म्हणणे कितपत योग्य आहे!

"एकं साङ्ख्यं च योगं च"

श्रीकृष्ण पण असेच म्हणतातः

साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः।
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम्।।५-४।।

"संन्यास वा ज्ञानमार्ग ***(साङ्ख्य)*** आणि योग ***(कर्ममार्ग)*** यांच्यात, तसेच त्यांच्या फलात भिन्नता असते, असे अज्ञानीच असतात तेच म्हणतात . पंडित मात्र म्हणत नाहीत. त्यातील कोणत्याही एकाठायी दोन्ही मार्गांचे फल एकवटलेले असून अनुष्ठान करणाऱ्यास ते प्राप्त होते."

यत्साङ्ख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते।
एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति।।५-५।।

"साङ्ख्य जे स्थान प्राप्त करतात, तेच स्थान योग्यांनाही प्राप्त होते. म्हणून साङ्ख्य तोच योग असे जाणून घेणाराच खरा ज्ञानी होय."

योगमार्गाशिवाय अन्य पर्याय नाही

योगमार्गाचे ***(कर्मयोग)*** मोक्षासाठी अनिवार्यत्व स्पष्टच सांगत श्रीकृष्ण पुढे काय म्हणतातः

सन्न्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाधिगच्छति।।५-६।।"

"तसेच हे महाबाहो! कर्मयोगावाचून संन्यास प्राप्त होणे दुष्कर आहे. योगयुक्त मुनीस ब्रह्मप्राप्ती लवकर आणि कष्टावाचून होते."

संन्यास **म्हणजे संकल्पत्याग; कामनांचा नाश.** *परंतु जो मनुष्य हट्टाग्रहाने मनास विरक्त करण्याचा प्रयत्न करतो, त्यास ते अत्यंत दुष्कर कार्य आहे. कारण मन अत्यंत अस्थिर आणि चंचल असते. ते केवळ योगाच्या युक्तीनेच वश करता येते. हा अभिप्राय ध्यानी घेऊन पुढील भाग पाहिला पाहिजे.*

त्याचप्रमाणे *कर्मयोगाचे फल ज्ञान व ज्ञानाचे फल मोक्ष* असाही एक अभिप्राय दिला जातो. त्याहीबाबत थोडासा विचार करणे आवश्यक आहे. एक तर कर्मयोगाचे फल मोक्ष हे ज्ञानाचा टप्पा सोडून मिळत असले पाहिजे किंवा ***"कर्मयोग -➤ ज्ञान -➤ मोक्ष"*** असा हा मार्ग जात असला पाहिजे. कसेही असले तरी ज्ञान म्हणजेच मोक्ष - साङ्ख्य म्हणजेच ज्ञान – असा जो एक अर्थप्रवाह प्रचुर आहे, त्याप्रमाणे पाहिले असता ***"कर्मयोग -➤ ज्ञान वा मोक्ष"*** असा हा मार्ग दिसतो. आणि ज्ञान तर संन्यासाशिवाय प्राप्त होत नाही आणि संन्यास तर कर्मयोगाशिवाय अशक्य आहे. त्याचप्रमाणे ***संन्यास*** म्हणजेच ***साङ्ख्य वा ज्ञान वा मोक्ष*** असेही म्हटले जाते.

या सगळ्याचा आपणा जिज्ञासू साधकांसाठी व्यावहारिक पातळीवर साधनोपयोगी असा एकच निष्कर्ष निघतो. तो म्हणजे *सर्वसामान्यांस तरी कर्मयोगाखेरीज दुसरा पर्याय नाही.* दैववशात अकस्मात ज्ञान प्राप्त होणारे पुरुष तर युगीयुगीही दुर्मीळच असतात, असा स्वतः ज्ञानेशांचाही दाखला आहे. ते म्हणतातः ***"तैसें जेयां कोण्हासिं दैवें। गुरुवाक्यश्रवणाचि सवें। द्वैत गिळौनि विसंबें। आपणयां वृत्ति।। म्हणौनि तेयांसिं कांहीं त्रिशुद्धि करणें नाहिं। परि ऐसें हें जन्हें हें काइं। नव्हे जेयां।।१८-९८८ व ९९१।।"*** - असे काही भाग्यवंत सोडले तर इतरांस कर्माधारेच जावे लागते.

अबोधाचा - अज्ञानाचा - नाश होताच क्रियाजात सगळे नाश पावून समूळ संभवणारा संन्यास जरी घडत असला, तरी तो क्वचित एखाद्या भाग्यवंतासच *(१८-९७२)!* ***"असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी"*** ही वृत्ती अध्यात्मात मान्य नाही. योगशास्त्रास तर मुळीच मान्य नाही. तेव्हा **ब्रह्मविद्या प्राप्तीसाठी *योगशास्त्र*** सांगणाऱ्या गीतानामक उपनिषत्कारांना हा क्वचितच संभवणारा संन्यास उचलून धरण्याचे प्रयोजन दिसत नाही. उलट योगशास्त्राचा प्रयत्नांवर दृढ विश्वास असल्याने कर्मयोगच त्यांना भावतो, असे म्हटले तर वावगे ठरू नये. म्हणून *खरा संन्यास प्राप्त व्हावा, असे इच्छिणाऱ्यांस योगमार्गाशिवाय पर्याय नाही.* असो.

"जो युक्तिपंथें चढें। मोक्षपर्वतां"

संन्यास व योग यांबाबत प्रात्यक्षिकाच्या भूमिकेवरून ज्ञानेश काय म्हणतात, ते पाहू याः

एरविं तरिं पार्था। जैं मूर्ख होतिं सर्वथा।
तैं सांख्यकर्मसंस्था। जाणिति केंविं।।५-२६।।
साहाजैं तैं अज्ञान। म्हणौनि म्हणति तैं भिन्न।
यरविं दीपाप्रति काईं आनान। प्रकाशु आहाति।।२७।।

"हे पार्था! अज्ञानी जनच ***साङ्ख्य व कर्म*** यात भेद मानतात. आणि त्यांना ***साङ्ख्यवृत्ती वा कर्मयोगवृत्ती*** यांचे रहस्य कळण्याइतकी पात्रता तरी कशी असणार! बोलून चालून ते अज्ञानी व मूढच असणार! अज्ञानवशे त्यांना या दोन्हीत फरक दिसतो. खरे तर दीपावेगळा प्रकाश कधी संभवतो का!"

पैं सम्यक् येकें अनुभवें। जिहिं देखिलें तत्त्व आघवें।
तैं दोहिंतेंहिं ऐक्यभावें। मानिति गां।।५-२८।।
आणि सांख्यी जैं पाविजैं। तैंचि योगिं गमिजैं।
म्हणौनि ऐक्यता दोहींतैं साहाजैं। इयांपरी।।२९।।
देखें आकाशा आणि अवकाशा। भेदु कां नाईं जैसां।
तैसें ऐक्य योगसंन्यासां। ओलखें जो।।३०।।

"ज्यांनी सम्यक अनुभवांती साक्षात्कार घडून त्या परमार्थतत्त्वाची प्रचिती घेतलेली आहे, असे त्या परतत्त्वास जाणणारे ब्रह्मविद मात्र ***सांख्य आणि योग*** यात काहीही फरक करत नाहीत. हे दोन्ही एकच आहेत, असे ते ज्ञाते जन म्हणतात. सांख्यांस जे स्थान प्राप्त होते, तेच योग्यांसही मिळते. म्हणूनसुद्धा या दोन्हींची अशी एकवाक्यता होते. आकाश आणि अवकाश यात तत्त्वतः काही भेद आहे काय!"

तेयांसिंचि जगिं पाहलें। आपणपें येणेंचि देखिलें।
जेयां सांख्ययोग जाणवलें। भेदेनविण।।५-३१।।
जो युक्तिपंथें पार्था। चढे मोक्षपर्वतां।
तो महासुखाचां निमथा। वहिला पावें।।३२।।

"*योग व संन्यास किंवा सांख्य* यांना असेच अभिन्नत्वाने ओळखणाऱ्यासच खरी ज्ञानदृष्टी प्राप्त होते व तोच आत्मस्वरूप पाहतो. योगयुक्तीच्या वाटेने जाणाराच मोक्षपर्वतावर चढून जाऊ शकतो आणि महासुखाच्या शिखरावर तोच लवकर जाऊन पोहोचतो."

योगाविण मोक्षाचा हव्यास व्यर्थ

येरां योगस्थिति जेयां संडें। तो वायांचि गां हव्यासिं पडे।
परि प्राप्ति कहिं न घडें। संन्यसाचिं।।५-३३।।

"योगास उपेक्षून जे कोणी त्या शिखरावर आरूढ व्हावे म्हणून प्रयत्न करतात, त्यांचा तो हव्यास व्यर्थ आहे. त्या योगाविण करावयाच्या प्रयत्नात केवळ शीण आहेत; ते प्रयत्न निष्फळ होतात; संन्यास काही कोणाला त्या रीतीने साधला जात नाही."

केवळ योगमार्गानेच संन्याससिद्धी

संन्यास केवळ योगमार्गानेच साधतो, अन्यथा नाही, असे ज्ञानेश स्पष्ट म्हणत आहेत. हेच पूर्वी श्रीकृष्णांनी ***"योगसन्न्यस्तकर्माणं।।४-४१।।"*** या पदातून निर्देशित केले होते. योगाश्रयपूर्वक कर्मांचा संन्यास करणे हाच खरा सांख्य वा संन्यासमार्ग असल्याने त्यात व कर्मयोगात काहीही अंतर राहत नाही, हे आता सर्व मुमुक्षूंस स्पष्ट कळून येण्यास प्रत्यवाय नसावा. असो.

अशा रीतीने ***संन्यास प्राप्त होण्याचा मार्ग कर्मयोगच आहे.*** तसेच ज्ञानप्राप्ती आकस्मिकरीत्या दैवयोगे होते, असा जो अठराव्या अध्यायींचा भाग आहे, त्यामागे पण ***कर्मयोग*** आहे. पण त्याबाबत सविस्तर चर्चा कर्मयोग न्याहाळतांना आपण करू या. सध्या कर्मयोगाशिवाय आपल्याला पर्याय नाही, हे लक्षात घेतले म्हणजे झाले.

योगसिद्धी::::

पद्मपत्राप्रमाणे अलिप्तता

आता कर्मयोग्याची व्याख्या सांगतांना गीता काय म्हणते, ते पाहू याः

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते।।५-७।।

"विशुद्ध चित्ताचा, जितेंद्रिय, आत्मसंयमी, सर्व भूतातल्या आत्म्याशी एकरूपता पावलेला असा योगी कर्मे करत असूनही त्यांनी लिप्त होत नाही."

नैव किञ्चित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्।
पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन्।।५-८।।

प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन्।।५-९।।

"तत्त्ववेत्ता योगी पाहत असता, ऐकत असता, स्पर्श करत असता, वास घेत असता, खात असता, झोप घेत असता, श्वास घेत असता, बोलत असता, देत-घेत असता, डोळे उघडत असता, डोळे मिटून घेत असता, काहीही करत असता आपण ते करत आहोत, असे न मानता, इंद्रियेच इंद्रियविषयांठायी वर्तत आहेत, असे जाणून असतो."

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा।।५-१०।।

"जो ब्रह्माठायी सर्व कर्मे अर्पण करतो आणि फलासक्तीचा परित्याग करतो, असा कर्मयोगी ज्याप्रमाणे कमलपत्र पाण्यावर राहूनही ओले होत नाही, तसा कर्मांद्वारे पापास स्पर्शत नाही. तो पापापासून अलिप्तच असतो."

जीवन्मुक्त

कर्मयोगी व त्याची स्थिती यांचे उत्कृष्ट पण संक्षिप्त दर्शन घडवत ज्ञानदेवही म्हणतातः

जेणें भ्रांतिपासूनि हिरतलें। गुरुवाक्यें मन धूतलें।
मग आत्मस्वरूपीं घातलें। हारौनियां।।५-३४।।
जैसें समुद्रीं लवण न पडें। तंव वेगळें अल्प आवडें।
मग होय सिंधूचिं येवढें। मिळें तेव्हां।।३५।।
तैसें संकल्पौनि काढिलें। जेयाचें मनचिं चैतन्य जाहालें।
तेणें एकदेशियें परि व्यापिलें। लोकत्रेय।।३६।।
आतां कर्ता कर्म करावें। हें खुटलें तेयां स्वभावें।
आणि करि जऱ्हैं आघवें। तऱ्हैं अकर्त्ता तो।।३७।।
जो पार्था तेयां देहीं। मी आइसां आठऊ नाइं।
तऱ्हैं कर्तव्य कैंचें काइं। उरें सांघैं।।३८।।

"संसारासक्तीतून आपले मन काढून घेऊन, गुरूपदेशाने ते स्वच्छ धुवून मग ज्याने ते आत्मस्वरूपात गुंतवले असते, त्या योग्याचे मन, समुद्राहून वेगळे राहून अल्पत्वाने दिसणारे लवण जेव्हा समुद्री पडते तेव्हा समुद्राएवढे विशाल जसे होते त्याप्रमाणे ते मन, संकल्पातून बाहेर निघाले की जीवभाव सोडून चैतन्याशी एकरूप होते आणि त्रैलोक्य व्यापून टाकते. त्या योग्याची कर्ता, कर्म व करणे ही त्रिपुटी स्वयेच लोप पावते आणि सर्व कर्मे करूनही तो अकर्ता होतो. कारण हे अर्जुना! त्यास मी देह आहे, असे स्मरण नसते. मग ते देहाचे कर्तृत्व त्याच्या अंगी उरेलच कसे, सांग बरे!"

ऐसें तनुत्यागेंविण। अमूर्त्ताचें गुण।
दिसति संपूर्ण। योगयुक्तां।।३९।।
यरविं आणिकांचियें परी। तोहिं एकु शरीरीं।
अशेखींहिं व्यापारीं। वर्ततु दिसें।।४०।।

"विदेहमुक्तीनंतर बरेच साधक परमात्मस्वरूपी लीन होतात. पण हा तर सदेहच सच्चिदानंदरूप पावतो. त्या योग्याठायी अमूर्त ईशस्वरूपाचे गुण प्रकटतात. वरवर पाहिले तर तोही इतरेजनांसारखाच देही राहून सर्व व्यापार करत असलेला दिसतो. या त्याच्या स्थितीस विदेहमुक्तीवेगळी विशेष अशी ***जीवन्मुक्ती*** असे नांव आहे."

योगयुक्त

या स्थितीचे अधिक वर्णन करत ज्ञानदेव म्हणतात कीः

तोहीं नेत्रीं पाहें। श्रवणिं आइकतु आहे।
परि तेथिंचा सर्वथा नोहें। नवल देखैं।।५-४१।।
स्पर्शासिं तऱ्हैं जाणें। परिमलु सेविं घ्राणें।
अवसरोचित बोलणें। तेयांहिं आथि।।४२।।
आहारातैं स्वीकारीं। त्यजावें तैं परिहरीं।
निद्रेचियां अवसरिं। निदिजैं सुखैं।।४३।।
आपुलेनि इछावसें। तोहिं गां चालतु दिसें।
पैं सकल कर्म आइसें। राहाटें किर।।४४।।
हें सांघों काइं येखेक। देखैं श्वासोछ्वासादिक।
आणि निमिषोन्निमिख। आदिकरूनि।।४५।।

"तो योगयुक्त जीवन्मुक्त पण डोळ्यांनी पाहातो, कानांनी ऐकतो. पण नवल म्हणजे तो त्यांपासून अलिप्त असतो. त्याला स्पर्शसुद्धा इतरांसारखाच कळतो. नाकाने त्यालाही वास घेता येतो. आणि तो समयोचित बोलतो पण. तो आहार घेतो. टाकावयाचे ते टाकतो व वेळेवर सुखाने निद्रिस्तही होतो. आपल्या तंत्राने तो चालतोही. असे सर्व व्यवहार तो करतो. सर्व कर्मांचे आचरण त्याच्याकडून घडतांना दिसते. ते सर्व वर्णन करत कितीदां बसायचे! पापण्यांची उघडमीट तो करतो. असेच इतर सर्व व्यापार तो करतो. देहादींचे व्यवहार त्यासही देह असल्या कारणाने घडणे साहजिकच आहे."

पार्था तेयाचां ठाईं। हें स्वभावोचिं आथि पाईं।
परि तो कर्ता नोहें काईं। प्रतितिबळें।।५-४६।।
जो भ्रांतिसेजें सुतलां। तैं स्वप्नसुखैं भुतलां।
मग ज्ञानोदयीं चेइंला। म्हणौनियां।।४७।।

"असे असले तरी साक्षात्कारानुभूतीच्या योगे आपण त्या सर्व कर्मांचे कर्ते नव्हेत, हे त्याला वेगळे सांगायची जरूर नसते. ते तो आपसुकच जाणत असतो. ज्यावेळी तो भ्रमाच्या शय्येवर सुखपूर्वक निदैला होता, त्यावेळी त्यास संसारसुखाचे स्वप्न घेरून होते. पण ज्ञानसूर्याचा उदय होताच तो जागृत झाल्याबरोबर त्याचे ते स्वप्न भंग पावले. म्हणून त्याची आता अशी स्थिती झाली आहे."

आतां अधिष्ठानसंघाति। असेखांहिं इंद्रियवृत्ति।
आपुलालियां अर्थिं। वर्त्ततु आहाति।।५-४८।।
दीपाचेनि प्रकाशें। गृहिंचें व्यापार जैसें।
देहिं कर्मजात तैसें। योगयुक्तां।।४९।।

तो कर्में करिं सकलें। परि कर्मबंधा नाकळे।
जैसें न सिंपें जलिं जलें। पद्मपत्र।।५०।।

"अधिष्ठान म्हणजे चैतन्याच्या आश्रयाने सगळ्या इंद्रियांच्या वृत्ती आपापल्या विषयांकडे धावत असल्या, तरी त्या योगयुक्ताचे सर्व व्यापार चैतन्याच्या प्रकाशात तसेच चालतात, जसे दीपाच्या प्रकाशात गृहातील व्यापार घडतात. दीपप्रकाश गृहादिक व्यवहारांपासून जसा अलिप्त असतो; किंवा जळात राहूनही कमलपत्र जसे ओले होत नाही; तद्वतच कर्मजंजाळात वावरूनही -सर्व कर्मे करूनही - त्या योगयुक्तास कर्मबंधाचा स्पर्शसुद्धा होत नाही."

"नैव कुर्वन्न कारयन्"

अशा कर्मयोग्यास जो संन्यास घडतो, त्याचे वर्णन करत गोपालकृष्ण म्हणतात की:

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि।
योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वात्मशुद्धये।।५-११।।
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम्।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते।।५-१२।।

"योगी कर्मफलाची आसक्ती न ठेवता केवळ इंद्रिये, शरीर, मन व बुद्धीने कर्म करतात. पण शुद्ध चित्ताने अशी कर्मे कर्मफलाचा त्याग करून करत असल्याने त्यांना शांतिस्वरूप मोक्ष लाभतो. इतरेजन सकाम कर्मे करतात व फलासक्ती धरतात आणि त्यायोगे बंधन पावतात."

सर्वकर्माणि मनसा सन्न्यस्यास्ते सुखं वशी।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन्।।५-१३।।

"सर्व कर्मांचा अंत:करणापासून त्याग करून देहेंद्रियांस वश करून घेतलेला योगी सर्व कर्मी जरी वर्ततांना दिसला, तरी खरा संन्यासी होय. कारण या नवद्वारांच्या शरीररूपी नगरात काहीही न करता व काहीही न करविता तो सुखाने राहतो."

येथे गोपालांनी खऱ्या संन्यासाची व्याख्या केली आहे. तदनुसार असा संन्यासी सर्व कर्मे करत असतो. अर्थातच चतुर्थाश्रम व अशा संन्यासाचा अर्थाअर्थी काहीही संबंध नही, हे परत परत आवर्जून सांगायला हवेच असे आहे का!

"तैंचिं तैं नैष्कर्म्य"

योगसंन्यस्ताबद्दल ज्ञानेशही म्हणतात की:

देखैं बुद्धिचिं भाख नेणिजैं। मनाचां अंकुरु नुदैजैं।
ऐसा व्यापारु तो बोलिजैं। शारिरु गां।।५-५१।।
हेंचिं मन्हाटें परिहसैं। तन्हैं बालकाचिं चेष्टा जैसिं।
योगियें कर्में करिति तैसिं। केवला तनू।।५२।।
मग पांचभौतिक संचलें। जेधवां शरीर असें निदैलें।
तेथ मनचि राहाटें एकलें। स्वप्निं जेंविं।।५३।।
नवल आइकें धनुर्द्धरां। कैसा वासनेचां संवसारा।
देहां होऊ नेदीं उजगरां। परि सुखदु:खें भोगिं।।५४।।
दाहिं इंद्रियांचां गांविं नेणिजैं। ऐसा व्यापारु जो निफजैं।
तो केवल गां म्हणिजैं। मानसिंचां।।५५।।

"मन आणि बुद्धी यांच्याशी संबंध न येता जे कर्म घडते, त्यास निव्वळ ***कायिक कर्म*** असे म्हणतात. निरागस बालकाची हालचाल जशी निर्हेतुक, निर्निमित्त, निर्वासन असते, त्याप्रमाणे योगी कर्मे करतो, ती अशी निव्वळ कायिक कर्मे या सदरात मोडतात. हा पंचभौतिक देह जेव्हा निद्रिस्त असतो, त्यावेळी एकटे मनच स्वप्नव्यापार करते. त्याचे नवल असे की वासनेच्या अफाट पसाऱ्यात स्वैर विहार करत असतांना ते सुखदु:खांचा जो भोग घडवून आणते, त्याचा देहाच्या उपभोगांशी किंवा देहाशी किंचितही संबंध नसतो. इंद्रियांना ज्यांचा पत्तासुद्धा लागत नाही, अशा त्या व्यापारास मानस कर्मे असे म्हटले जाते."

योगिये तोहिं करिति। परि कर्में तेणें न बांधिजति।
जैं सांडिलीं आहे संघति। अहंभावाचिं।।५-५६।।
आतां जहालियां भ्रमहत। जैसें पिशाचाचें चित्त।
मग इंद्रियांचें चेष्टित। विकलु दिसें।।५७।।
स्वरुप तन्हैं देखैं। आलविलें आइकें।
शब्दु बोलें मुखैं। परि ज्ञान नाहीं।।५८।।
हें असो काजेंविण। जैं जैं काइं कारण।
तैं केवल कर्म जाण। इंद्रियांचें।।५९।।

"असे ***मानस कर्म*** सुद्धा योगी करतो. पण त्यात अहंभावाचा अभाव असतो. म्हणून तसे कर्म त्यास बंधक होत नाही. आणि ऐक. पिशाचबाधा झालेल्या मनुष्याचे चित्त भ्रमिष्ट होते व तो ज्या क्रिया करतो, त्या विसंगत वाटतात. जसे तो जे पाहतो, बोललेले ऐकतो, मुखाने बोलतो, तरी या गोष्टींचे त्याच्या मन व बुद्धीशी काही देणेघेणे असत नाही. आपण काय करतो याची त्यास अशी जाणीवही नसता जे कर्म उपजते, ज्यास हेतू नसतो, कारण नसते, ते केवळ ऐंद्रिय कर्म होय. बुद्धीचा संबंध न येता हे कर्म घडते."

मग सर्वत्र जैं जाणतें। तैं बुद्धिचें कर्म निरुतें।
ओलख अर्जुनातें। म्हणें हरि।।५-६०।।
तैं बुद्धि धूरें करुनि। कर्में करिति चित्त देऊनि।
परि नैष्कर्म्यापासूनि। मुक्त दिसति।।६१।।
जैं बुद्धिचियें ठाऊनि देहिं। तेयां अहंकाराचि सेंचि नाइं।
म्हणौनि कर्मेंचि करितां पाइं। चोखाललें।।६२।।

श्रीकृष्ण अर्जुनाला पुढे म्हणतात की, "जाणणे हे बुद्धीचे कर्म आहे. योगी बुद्धी वापरून आणि लक्षपूर्वक सर्व कर्मे आचरतात. असे करूनही कर्मे त्यागून स्वस्थ बसणाऱ्या संन्यासाश्रमी पुरुषांपेक्षा तेच खरे जीवन्मुक्त असतात. कारण बुद्धीपासून देहापर्यंत कोठेही त्यांच्याठायी अहंकाराचे स्फुरण नसते. अशी कर्मे करून म्हणूनच त्यांचे चित्त शुद्ध राहते. कर्तृत्वाहंकार त्यागून अशी कर्मे करणे हीच खरी ***नैष्कर्म्यावस्था*** होय."

अगां करितेनविण कर्म। तैंचि तैं निष्कर्म।
हें जाणति सवर्म। गुरुगम्य तैं।।५-६३।।

"निव्वळ कर्मांचा त्याग वा संन्यासाश्रमाचा अंगीकार यांस नैष्कर्म्यस्थिती असे चुकूनही म्हणणें योग्य नाही. हे अंतरंग रहस्य फक्त गुरुपदेशानेच कळते, अन्यथा नाही."

संन्यासाश्रमाची उपयुक्तता

या प्रकारे ज्ञानदेवांनी अत्यंत परखड शब्दात ***"संन्यासाश्रमी यति"*** व ***"कर्मयोगाद्वारे खरा संन्यास प्राप्त झालेला नित्यसंन्यासी"*** यांतील अंतर स्पष्ट केले आहे. एवढे सांगितल्यावर संन्यासाश्रमास उचलून धरण्याचे आध्यात्मिकांना काही कारण दिसत नाही.

संन्यासाश्रमास महत्त्व द्यावयाचे ते केवळ दोन प्रमुख कारणांसाठी. एक म्हणजे कामक्रोधादी विकार ज्यायोगे बळावतात, त्यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करणे - हा गौणी साधनाप्रकार संभवतो. यमनियमांचा किंवा तप आचरण्याचा हा एक प्राथमिक प्रकार होय. अनेकानेक जन्म अशा प्रकारे विषयांपासून दूर राहून विरक्ती साधण्याचा तो प्रयत्न आहे.

अर्थात यापासून होणारा खरा लाभ किती असेल, हे शंकास्पदच आहे. विश्वामित्र-मेनकेच्या गोष्टीसारख्या अनेकानेक कथा या बळजबरीच्या विरक्तीविरुद्ध साक्ष देतात, हे आपणास विदित आहेच! असो.

दुसरे कारण म्हणजे वर्णाश्रमधर्माचे पालन करण्यासाठी गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थ व संन्यास या आश्रमांचा अंगीकार करणे विहित आहे. त्याप्रमाणे असे करणारे आस्तिक असून त्यांच्या या श्रद्धेचा लाभ त्यांना जन्मजन्मांतरी सद्बुद्धी प्राप्त होण्याकडे व विषयविकार नियंत्रणात उपजत नैपुण्य मिळण्यास कारणीभूत होतो.

त्याचप्रमाणे या वर्णाश्रमधर्माच्या पालनाचा उपयोग वेदोक्त मार्गावरून चालणाऱ्या त्यांना भगवंताचे साहाय्य प्राप्त होण्याकडे होतो, हेही तितकेच खरे.

संन्यासाश्रमाचे मर्म

असे असले तरी उगीचच अटीतटीने इतर आश्रमातील कर्तव्यपूर्ती न करताच संन्यासाश्रमाचा आग्रह धरणे सर्वसामान्यांस घातक आहे व ते समाजस्वास्थ्यही बिघडवणारे आहे. स्त्रीपुरुषांनी सर्रास असा यतिधर्म अविचाराने वा प्रलोभनाने पत्करल्यास त्यातून अनाचाराची निष्पत्ती होते व अशा यतिसंघांना उचलून धरणारे पंथ वा धर्म त्याबाबत वादग्रस्त होतात, अशी इतिहासाची साक्ष असल्याचे जाणकार म्हणतात.

अर्थात या सर्व विधानास एखाद्या शंकराचार्यांचा अपवाद असणेसुद्धा साहजिकच आहे. त्याचप्रमाणे अशा अपवादात्मक पुरुषांची लोकसंग्रहाची कार्ये पाहता त्यांना विभूतिमत्त्व प्राप्त होते. श्रीशंकराचार्य काय किंवा इतर श्रेष्ठ संन्यासाश्रमी काय, आनंदमठासारखा स्वातंत्र्यप्रिय क्रांतिकारी देशभक्तांचा पंथ तो काय, किंवा चैतन्यमहाप्रभूंसारखे आश्रमविरहित बालयोगी व भक्तराज ते काय, शुक-नारदांसारखे अनाश्रमी ब्रह्मचारी म्हणा! किंवा निवृत्ति-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताई या चौघा भावंडांसारखी वर्णाश्रमविरहित लोकोत्तर संतमंडळी म्हणा - या वर्णाश्रमाच्या चौकटीला तोडणाऱ्या व निर्दिष्ट मार्गाबाहेरचा प्रवास करणाऱ्या महनीय आत्म्यांना सामान्य साधकाच्या मापाने कोण तोलू शकेल!

त्यांचा असा लोकमार्गास अपवाद करून कार्य करण्याचा जीवनप्रवास हा त्यांचे अंगीकृत अवतारकार्य साध्य करण्यासाठी नियतीच्या नियोजनाचे एक अभूतपूर्व रहस्यच समजावे लागते. असो.

संन्यासाश्रमाची जी उपयुक्तता आहे, ती आहेच! फक्त अशा संन्यासाची नैष्कर्म्याशी तुलना करणे रास्त नाही, एवढ्यापुरते हे विवेचन आहे.

"यतो वाचा निवर्तन्ते"

इतके उत्कृष्ट विवेचन करून तोषलेले ज्ञानेश म्हणूनच म्हणताहेत की:

आतां शांतरसाचें भरितें। सांडित आहे पात्रांतैं।
जैं बोलणें बोलापरौतैं। बोलविलें।।५-६४।।
एथ इंद्रियांचां पांगुं। जेयां फिटला आहे चांगुं।
तेयांसिचिं आथि लागुं। परिसावेयां।।६५।।

"हे बोलासही कानडे असणारे बोल माझ्या वैखरीतून प्रकटले आहेत. त्यांच्यातून शांतरसाचा पूरच दुथडी भरून वाहत आहे. या सर्वांचा आनंद माझ्यासाखाच इतर कोणाला मिळेल, तर ज्यांच्या इंद्रियांचा विषयांशी संग तुटला आहे, त्यांनाच! हे बोल त्यांच्यासाठीच आहेत. हा अवर्णनीय विषय केवळ तेच जाणू शकतात."

"सांघैं कथा"

ज्ञानदेवांचा हा फुललेला अंतरीचा भाव ओळखणारे निवृत्तिनाथ श्रोत्यांच्या वतीने म्हणतात:

हें असों हा अतिप्रसंगु। न संडिं पां कथालागु।
होइल श्लोकसंघतिभंगु। म्हणऊनियां।।५-६६।।
जैं मनां आकलितांहिं कुवाडें। घांघवसतां बुद्धि नातुडें।
तैं दैवाचेनि सुरवाडें। सांघवलें तूझ।।६७।।
जैं शब्दातीत स्वभावें। तैं बोलिंचिं जन्हैं फांवें।
तन्हैं आणिकें काएं करावें। सांघैं कथा।।६८।।
हा आर्त्तिविशेखु श्रोतयांचां। जणौनि दासु निवृत्तिचां।
म्हणें संवादु तेयां दोघांचां। परिसौनि परिसा।।६९।।

"हे आता राहू दे! कथेचा धागा सोडू नकोस. नाही तर श्लोकांचा संदर्भ चुकेल. जे मनाला कळण्यास अति गहन, बुद्धीने कितीही उड्या मारल्या तरी तिला जे गंवसत नाही, असे हे नितांत सुंदर विश्लेषण तुला करता आले, ही देवाचीच कृपा म्हणा! जे मुळातच शब्दातीत आहे, ते जर तुला शब्दात गिवसता आले आहे, तर अधिक काय पाहिजे! तरी आता गीतेच्या मूळ पदांकडे वळ. श्रोत्यांच्या मनीची

उत्कंठा पाहून ते निवृत्तिदास ज्ञानदेव सहर्ष म्हणू लागले: "बरे तर तसेच करू या. तुम्ही आता त्या दोघांचा-श्रीकृष्णार्जुनांचा संवाद पुढे ऐका."

मग कृष्णु म्हणें पार्थातें। आतां प्राप्ताचें चिह्न पुरतें।
सांघैन तूझ निरुतें। चित्त देईं।।५-७०।।
तऱ्हैं आत्मयोगें आथिलां। जो कर्मफलासिं विटला।
तो घर रिघौनि वरिला। शांतिं जगिं।।७१।।
एरु कर्मबंधें किरीटी। अभिलाखाचियां गांठीं।
कालासला खुंटीं। फलभोगाचां।।७२।।

"मग श्रीकृष्ण पार्थास म्हणाले की, "हे पाहा! आता मी तुला कृतकृत्यता पावलेल्या त्या आप्तकाम पुरुषाची इत्थंभूत लक्षणे सांगतो. तिकडे लक्ष पुरव. ज्याने आत्मयोग साधला आहे, तो कर्मफळाला विटतो. त्याच्या घरात शांती येऊन त्यास आपण होऊन वरते. तिच्या शोधासाठी त्याला घरदार सोडून, संन्यास घेऊन हिंडावे लागत नाही आणि असे शांतीच्या शोधात भटकणाऱ्यास मात्र कर्मबंधन चुकत नाही. कारण ज्याची आसक्ती सुटलेली नसते, त्याने कितीही प्रकारे कर्मांचा त्याग केला तरी तो कर्मांच्या दाव्याने अभिलाषेच्या गाठीने फलभोगाच्या खुंट्याला बांधला जातोच."

जैसा फलाचियें आघवें। ऐसें कर्म करि आघवें।
मग न कीजैंचि एणें भावें। उपेक्षि जो।।५-७३।।
तो जेयाकडें वासु पाएं। तेऊति सुखाचि सृष्टि होये।
तो म्हणें तेथ राहें। महाबोधु।।७४।।
नवद्वारें देहीं। तो असतुचि परि नाहीं।
करितूचि न करिं काइं। फलत्यागी।।७५।।

"परंतु फलासक्ती नसलेला आप्तकाम पुरुष सकळ कर्मे जरी फळाची हाव असलेल्या मनुष्याप्रमाणे करतांना दिसला तरी ती कर्मे आपण केलेलीच नाहीत, अशा भावाने त्यांविषयी उदासीन राहतो. असा पुरुष जिकडे नजर टाकतो, तिकडे आत्मसुखाची सृष्टी करतो. तो म्हणेल, तेथे ***महाबोध*** स्वयेच राहतो. या नऊ द्वारांच्या देहात असूनही तो त्यात नसतो. तो कर्मफलांचा त्याग करणारा सकल कर्मे करूनही खरा निष्कर्म असतो."

खरा संन्यास कोणता याचे ज्ञानेश असे निःसंदिग्ध व साधकोपयोगी वर्णन करतात.

जीवन्मुक्ती::::

ईश्वराचे स्वरूप व जीवन्मुक्तावस्था

प्राप्त पुरुषाचे कर्म ईश्वराच्या कर्मासारखे अकर्तृत्ववान असते. मागे आपण **ईश्वरप्रणिधाना**संबंधी विचार करतांना तो ईश्वर कसा आहे, याचे पतञ्जलिप्रणीत सूत्रांकन अवलोकिले होते. तेव्हा त्या ईश्वराचा ***क्लेश, कर्म, कर्मविपाक व वासनाशय*** यांच्याशी कसल्याही प्रकारचा संबंध नसतो, असे ***"क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः।।१-२४।।पा.यो.सू.।।"*** या सूत्रात सांगितलेले वैशिष्ट्य पाहिले आहे.

गीता-ज्ञानेश्वरीला पण ईश्वर असाच असल्याचे मान्य आहे. याबाबत पुढील श्लोक प्रमाण आहेत. पण ते जरा वेगळ्या संदर्भात येतात. जीवन्मुक्ताची येथे ईश्वराच्या स्थितीशी तुलना केली आहे. ते श्लोक आपण पाहू या. त्यांवरून ***नित्यसंन्यासी*** जो ईश्वर, त्याचे व ***योगसंन्यासी*** जो जीवन्मुक्त वा ज्ञानी त्यांचे आपल्या मनावर कायम ठसा उमटविणारे दर्शन घडेल.

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते।।५-१४।।

"लोक म्हणतात की कर्ता-करविता तो एकमात्र ईश्वरच आहे. परंतु तो प्रभू ईश्वर लोकांना निर्मिण्याचे कर्तृत्व, त्या निर्मितीचे कर्म किंवा त्या कर्माचे फल भोगणे यांपैकी काहीच करत नाही. ही सर्व कर्मे घडतात ती केवळ प्रकृतीमुळे, जिचा गुणधर्मच अशा निर्मितीचा आहे."

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।५-१५।।

"प्राणिमात्रांकडून जी पाप-पुण्यादी कर्मे घडतात, त्यांची फळेही तो विभु परमेश्वर निर्माण करत नाही किंवा त्यांना देत नाही. ती सर्व प्रकृतिर्वशात असतात. परंतु अज्ञानाने ज्यांच्याठायीचे उपजत ज्ञान झाकलेले आहे, ज्यांनी परमेश्वराचा साक्षात्कार करून घेतलेला नाही, असे प्राणी मायेच्या प्रभावाखाली येतात आणि ईश्वराकडे या सृष्टीचे सर्व कर्तृत्व देतात."

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनाः।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम्।।५-१६।।

"पण ज्या पुरुषांठायीचे हे अज्ञान ईश्वराच्या अनुभूतिपूर्ण ज्ञानाने नष्ट झालेले असते, त्यांना त्या ज्ञानाच्या प्रकाशात ते परमतत्त्व कसे निष्कर्म आहे, हे सूर्यप्रकाशात पाहावे, तसे स्पष्ट दिसते."

"परि अमूर्तपण न मैलें। दादुलियांचें"

ईश्वराशी समभावाने विचरणारे योगयुक्त ना त्याच्याकडे कसले कर्तृत्व देतात, ना आपल्याकडे कर्माचे कर्तृत्व घेतात! परंतु अज्ञानी मनुष्ये मात्र ईश्वरास आपल्यासारखाच कर्ता समजतात. जीवन्मुक्त पुरुषांचा विवेक स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतातः

जैसा कां सर्वेश्वरु। पाहिजे तंव निर्व्यापारु।
परि तोंचि रचि विस्तारु। त्रिभुवनाचां।।५-७६।।
आणि कर्ता ऐसें म्हणिपें। तऱ्हैं कवणें कर्मीं न शिंपें।
जैं हातुपाओ न लिंपें। उदासु वृत्तिचां।।७७।।
योगनिद्रा तऱ्हैं न मोडें। अकर्तेपणा सांचलु न पडें।
परि महाभूतांचें दलवाडें। उभारिं भलें।।७८।।
जगाचां जिविं आहें। परि कवणाचां काइं नोहें।
जगचि हें होये जाये। तो शुद्धिहिं नेणें।।७९।।

"सर्वेश्वर जसा कर्तृत्वशून्य असतो आणि तरीही या त्रैलोक्याची अफाट रचना करतो, तसा तो जीवन्मुक्त योगी पण कर्तृत्वरहित

असतो, पण सर्व कर्मे करतो. बरे! ईश्वरास कर्ता म्हणावे, तर तो कोणत्याच कर्माने लिप्त होत नाही आणि त्याच्याठायी असणाऱ्या उदास भावाचा कोणताही भाग कर्ममळाने लिप्त होत नाही. त्याची योगनिद्रा तर भंग पावतच नाही आणि तरीही महाभूतांचा मेळावा तो उत्तम तऱ्हेने उभा करतो. तो जगातील यच्चयावत जीवांना - प्राणिमात्रांना व्यापून असतो. पण त्यांच्याशी त्याचा संबंध नसतो. हे जग उत्पन्न होते आणि नाशही पावते, पण त्याचा त्यास पत्ता पण नसतो."

पापपुण्यें अशेखें। पासिंचि असतु न देखैं।
आणि साक्षिहिं होऊं न ठकें। एरिं गोठि कायसिं।।५-८०।।
पैं मूर्तीचेनि मेलें। तो मूर्तचिं होऊनि खेलैं।
परि अमूर्तपण न मैलें। दादुलियाचें।।८१।।

"प्राण्यांची कर्मे - पाप व पुण्य - ही त्याच्या विद्यमान असतांनाच घडतात; पण तो ती पाहात नाही आणि त्या कर्मांचा साक्षी म्हणतात, तसा पण तो नाही. मग त्यांचे पाप व पुण्य तो घेतो किंवा त्यांची फळे त्यांना देतो, इ.बोलणे वायाच नाही का! सगुण साकार विश्वाच्या रूपाने तो मूर्त होतो व आपली आपणाशीच क्रीडा करतो. पण तरीही त्याचे अव्यक्तपण मोडत नाही किंवा त्याच्या निर्गुणत्वाला काहीही बाध येत नाही."

तो सृजिं पालिं संहारिं। ऐसें बोलति जैं चराचरिं।
तैं अज्ञान गां अवधारिं। पांडुकुमरां।।५-८२।।

"असा तो ईश्वर सृष्टी निर्मितो, तिचे पालन-पोषण करतो व तिचा संहार पण करतो, अशी जी चराचर लोकांत वदंता आहे, ती म्हणजे निव्वळ अज्ञान आहे."

"देखैं आपुलालियां परी। जगचिं मुक्तु"

अज्ञान्यांस परमेश्वराचे सत्य स्वरूप उमजत नाही. म्हणून ते त्याला वाटेल ते गुण, वाटेल ती उपाधि चिकटवतात. परंतु ज्ञानी अशा जीवन्मुक्त पुरुषांची मात्र तशी गोष्ट नाही. ज्ञानेश भगवंतांचे म्हणणे सांगतात, ते असेः

तैं चि अज्ञान जैं समूल तुटें। तैं भ्रांतिचें मसैरें फिटे।
मग अकर्तृत्व हें प्रगटे। ईश्वराचें।।५-८३।।
एथ ईश्वरु एकु अकर्त्ता। ऐसें मानिलें जऱ्हीं चित्ता।
तऱ्हैं तोचि मी हें स्वभावतां। आदिचिं आहे।।८४।।

"कारण ज्यावेळी अज्ञान समूळ नष्ट होते; अहंकार हे जे अज्ञानाचे मूळ आहे, ते तुटून जाते; त्यावेळी मोह नष्ट होतो. स्वस्वरूपाची स्मृती उजळली जाते आणि ईश्वराचे अकर्तृत्व - जरी हा सर्व पसारा त्याच्यापासून उद्भवला तरीही - स्पष्ट आकळून येते. आपणच ईश्वर आहोत किंवा तो ईश्वर व मी एकच आहोत, यात काहीच संदेह त्यावेळी उरत नाही. ईश्वर अकर्तृक आहे आणि आपण व ईश्वर वेगवेगळे नाही, या भावनेच्या प्रादुर्भावाबरोबरच आपण पण कर्ता नसतो, हे पण ठामपणे लक्षात येते."

ऐसेनि विवेकें उदो चित्तिं। तेयांसिं भेदु कैंचा त्रिजगतिं।
देखें आपुलालियां प्रतितिं। जगचिं मुक्तु।।५-८५।।
जैसिं पुर्वदिशेचां राऊलिं। उदयताचिं सूर्यें होएं दिवालि।
कीं एरिहिं दिखा तियेंचि कालीं। कालिमा नाहिं।।८६।।

"असा विवेक ज्याच्या चित्तात उदय पावतो, त्यास त्रैलोक्यात कर्ता-कर्म-कर्तृत्व हा त्रिपुटीभेद कसा दिसू शकेल! तो तर सर्व विश्वच आपणासारखे मुक्त आहे, ही अनुभूती साक्षात भोगतो. पूर्वदिशेच्या महाली सूर्योदयरूपी दिवाळी झाली की त्याचवेळी इतर दिशांचे महालही उजळून जातात व त्यातील काळोखाचा जसा अस्त होतो, त्याप्रमाणेच जीवन्मुक्तालाही स्वतःस मुक्ती प्राप्त होते वेळी जगही मुक्त असल्याची प्रचिती येते."

जीवन्मुक्ताची स्थिती शास्त्रे वर्णितात. श्रीकृष्ण स्वतः त्या स्थितीचे वर्णन करण्यात रंगून गेले आहेत. कारण जीवन्मुक्त हेच खरे भक्त होत. भक्तांचे हे वर्णन करतांना देवाला किती सांगू अन काय सांगू असे होऊन गेल्यास नवल नाही. या पाचव्या अध्यायीच काय पण इतरत्रही श्रीमुखातून भक्तांचे कौतुक ओसंडून वाहत असते.

भक्तांची कौतुकास्पद अवस्था

श्रीकृष्ण पुढे वर्णन करतात, ते असेः

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः।।५-१७।।

"कर्मयोगाने प्राप्त होणारी ही जी स्थिती आहे, ज्यात अज्ञान मिटून जाते व ज्ञान प्रत्यक्ष प्राप्त होते, ***"पाहे जगचि मुक्तु"*** अशा साक्षात्कारास पावलेल्या योग्याची बुद्धी त्या ज्ञानाने पापरहित होते. त्याची बुद्धी परमात्मरूप होते. त्याचे चित्त तद्रूप होते. तो स्वतःच परमात्मस्वरूप होतो. तो स्वस्वरूपी लीन होतो. अशा तत्परायण झालेल्या मनुष्यांना जन्ममरण काहीही नाही."

संजीवन समाधि ती हीच! शुक्ल-कृष्ण गतींचा अशा योग्यांशी कोणताही संबंध नसतो, असे नंतरच्या आठव्या अध्यायी श्रीकृष्णांनी म्हटले आहे. असो.

विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः।।५-१८।।

"असा योगी पुरुष ***पंडित*** या संज्ञेस पात्र होतो. कारण तो विद्याविनयसंपन्न मनुष्य ब्राह्मण, गाय, हत्ती, चांडाळ व कुत्रे इ.त भेद न वर्तता समभावाने पाहणारा असतो."

अहंभावाचा अभाव

आणि यात नवल ते काय! अहंकारापोटी विश्व उगवते, दिसते व मावळते. तो अहंकारच ज्यांचा निमाला आहे, त्यांना सर्वदूर ते एकमात्र सत्यच प्रतीतीस येणार! ज्ञानदेव म्हणतातः

बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भाविं आपणां आपण।
ब्रह्मनिष्ठा राखैं पूर्ण। तत्परायण अहर्निशिं।।५-८७।।

ऐसें व्यापक ज्ञान भलें। जेयांचियां हृदयां गिंवसित आलें।
तेयांचि समतादृष्टी बोलें। विशेखूं काईं।।८८।।
एक आपणपेंचि पां जैसें। तैं देखति विश्व तैसें।
हें बोलणें काईंसें। नवलु एथें।।८९।।

"बुद्धियोगाने ***(कर्मयोगाने)*** आत्मज्ञान प्राप्त झाले की साधकास आपल्याठायी ब्रह्मरूप दिसू लागते. त्याची ही निष्ठा पक्की असते. तो त्याचा हा योग अखंड असतो. ***"वासुदेव: सर्वमिति"*** अशी त्याची धारणा असते. त्या विशाल - सर्वव्यापी धारणेमुळे उत्तम ज्ञान त्याच्या अंत:करणाचा शोध करत त्याठायी प्रकटते. त्यास समत्वदृष्टी येते यात विशेष ते काय! स्वत:ठायीच जे ब्रह्म पाहतात, त्यांना विश्व ब्रह्मरूप न दिसेल तरच आश्चर्य म्हणावयाचे!"

परि दैव जैसें कवतिकें। कंहिंचि सरौनि दैन्य न देखैं।
कां विवेकु हा नोलखैं। भ्रांतितैं जेंविं।।५-९०।।
ना तऱ्हें अंधकाराचिं वानि। जैसा सूर्यो न देखैं स्वप्निं।
अमृत नायकें कानिं। मृत्युकथा।।९१।।
हें असो संतापु कैसा। चंद्रु कां न स्मरे जैसा।
भूतिं भेदु नेणति तैसा। ज्ञानियें तैं।।९२।।

"सद्भाग्यास दैन्य ते कसे दिसेल! विवेकास मोह कसा माहीत असणार! अंधकार सूर्याच्या स्वप्नात तरी येईल का! किंवा अमृताच्या कानी मृत्यूचे नांव तरी कसे पडेल! हे असो. चंद्रास संताप कसा असतो, ते ठाऊकच नसणार! त्याचप्रमाणे हे ज्ञानी मुक्तात्मे भूतांठायी भेद करणे वा पाहणे जाणत नाहीत."

मग हा मशकु हा गजु। कीं हा श्वपचु हा द्विजु।
पैल इतरु हा आत्मजु। हें उरैल कैं।।५-९३।।
ना तऱ्हें हें धेनू हें श्वानु। एकु गुरु एकु हीनु।
हें असो कैंचें स्वप्नु। जागतेयां।।९४।।
एथु भेदु तऱ्हें कीं देखावा। जऱ्हें अहंभाव उरला होआवा।
तो आदिंचिं नाइं जाहाला आघवां। आतां विषम काइं।।९५।।

"अशी त्यांची स्थिती असल्याने हे चिलट तर हा हत्ती, किंवा हा ब्राह्मण तर हा चांडाल, अथवा हा आपला पुत्र व तो इतर कोणी असा उच्च-नीच, आपपर भाव त्यांच्याठायी कसा उरेल! अथवा ही गाय व हा कुत्रा, हा थोर व हा लहान, हे कोठले त्यांच्या मनी यावयाचे! जागृत मनुष्यास कधीतरी स्वप्न पडते का! असा हा भेद त्यांच्याठायी प्रकटावा असे कारण तरी कोणते असणार! अहंभाव जर उरला असेल, तरच या भेदांची जाणीव होते. त्यांचा अहंकार तर उरलेलाच नसतो. मग भेदभाव तरी कसा उरेल!"

ब्रह्मात स्थिती

सर्वत्र समबुद्धी प्राप्त झालेल्या त्या ज्ञानी कर्मयोग्याचे म्हणजेच बुद्धियोग्याचे श्रीकृष्ण अजून वर्णन करतात, ते असे:

इहैव तैर्जित: सर्गो येषां साम्ये स्थितं मन:।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थिता:।।५-१९।।

"ज्यांचे मन असे समत्वबुद्धीत स्थित असते, त्यांनी जीवन्मुक्ती साधली असते. ब्रह्म हे सम व त्रिगुणातीत आहे. अशा ब्रह्मात त्या जीवन्मुक्तांची स्थिती असते."

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम्।
स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थित:।।५-२०।।

"प्रिय प्राप्तीने हर्ष न पावणारे व अप्रिय प्राप्तीने उद्विग्न न होणारे ते स्थिरबुद्धी, निर्मोही व ब्रह्मज्ञानी जीवन्मुक्त नि:संशयपणे ब्रह्मातच नित्य स्थित असतात."

"हरि म्हणें पंडुसुतां। तोचिं ब्रह्म"

जीवन्मुक्त हा परमात्माच असतो. ***"ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति"*** या श्रुतीचे रहस्य प्रकट करत ज्ञानदेवही श्रीकृष्णांना अनुसरत असेच म्हणतात की:

म्हणौनि सर्वत्र सदा सम। तैं आपणचि अद्वय ब्रह्म।
हें संपूर्ण जाणें वर्म। समदृष्ट्यांचें।।५-९६।।
जिहिं विषयसंघु न संडितां। इंद्रियांतैं न दंडितां।
परि भोगलीं निसंगता। कामेंनिविण।।९७।।
जिहिं लोकांचेनि आधारें। लौकिकाचेनि व्यापारे।
पण सांडिलें निदसुरें। लौकिकु हें।।९८।।
जैसा जनामाजिं खेचरु। असतूचि जनां नोहें गोचरु।
तैसा शरीरिं ते परि संसारु। नोलखैं तेयांते।।९९।।

"समदृष्टी म्हणजे सर्वत्र सर्वदा सम असणारे जे ब्रह्म, ते अद्वय ब्रह्म आपणच आहोत, हे जाणणे. हे रहस्य त्या जीवन्मुक्तास स्वानुभूतीने अवगत असते. विषयसंग न त्यागता, इंद्रियांचे संन्यासाश्रमी जसे दमन करू पाहतात तसे दमन न करता, तो जी नैष्कर्म्यतासिद्धी भोगतो, ती केवळ कामनेविरहित असण्यामुळेच! असा मनुष्य लोकांच्याचसारखा व्यवहार करत असतो. तो अलौकिक वर्तणूक करत नाही. परंतु लोकरीतीप्रमाणे जगूनच त्या महामानवाने लोकांठायी विशेषत्वाने नांदणाऱ्या अज्ञानाचा त्याग केलेला असतो. जसे पिशाच्च लोकांमध्ये वावरत असूनही त्यांना दिसत नाही, त्याप्रमाणे तो मनुष्य जरी देहरूपाने लोकात नांदत असला, तरी त्याचे अलौकिकत्व सामान्य जनांच्या दृष्टीस पडू शकत नाही. लोक त्या जीवन्मुक्ताची खरी स्थिती ओळखत नाहीत. असो."

हें असो पवनाचेनि मेलें। जैसें जलिंचि जल लोलें।
तैं आणिकें म्हणति वेगलें। कल्लोल हें।।५-१००।।
तैसें नामरुप तेयाचें। यरविं ब्रह्मचि तो सांचें।
मन साम्या आलें जेयाचें। सर्वत्र गां।।१०१।।
ऐसेनि समदृष्टी जो होए। तेयां पुरुषा लक्षणहीं आहे।
अर्जुना संक्षेपें सांघैन पाहें। अच्युतु म्हणें।।१०२।।

"वायूच्या संगतीने जळाच्याच लाटा जळावर लोळतांना दिसतात, त्यांना लोक जसे लाटा म्हणून जलपेक्षा भिन्नतेने ओळखतात, त्याप्रमाणे तो पुरुष वस्तुत: ब्रह्मच असतो, पण लोक त्यास नामरूपानेच ओळखतात. ज्यास सर्वत्र समदृष्टी प्राप्त झालेली आहे, तो खरेच

ब्रह्म असतो. अशा त्या समदृष्टी योगी पुरुषास ओळखण्याचीही खूण आहे. ती तुला सांगतो," असे तो अच्युत अर्जुनाला म्हणाला.

तन्हैं मृगजलाचेनि पुरें। जैसें न लोटिजैं कां गिरिवरें।
तैसा शुभाशुभीं न विकरें। पातलां जो।।५-१०३।।
तोचि तो निरुतां। समदृष्टि तत्त्वतां।
हरि म्हणें पंडुसुता। तोचि ब्रह्म।।१०४।।

"ज्याप्रमाणे मृगजळाचा पूर लोटलेला असता गिरिवर जागचा तसूभरही ढळत नाही, त्याप्रमाणे शुभ वा अशुभ गोष्टींमुळे जो विकार पावत नाही, असा समचित्ताचा पुरुष तत्त्वतः समदृष्टी म्हणून ओळखावा."श्रीहरी अर्जुनास असे म्हणतात की "असा पुरुषच ब्रह्म असतो."

"न तेषु रमते बुधः"

त्याची अधिक लक्षणे प्रकट करत ते पुढे सांगतात कीः

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम्।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते।।५-२१।।

"बाह्य इंद्रियविषयांच्या उपभोगात ज्यास आसक्ती नसते, त्यास अंतःकरणात आत्मसुख प्राप्त होते. परब्रह्माशी योगाने युक्त झालेल्या अशा पुरुषास अक्षय सुख प्राप्त होते."

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते।
आद्यन्तवन्त कौन्तेय न तेषु रमते बुधः।।५-२२।।

"हे अर्जुना! इंद्रिये व विषय यांच्या संयोगापासून उत्पन्न होणारे जे सर्व भोग आहेत, ते दुःखास कारण होतात. ज्यांना आत्मसुखाचे अक्षय्यपण उपभोगण्यास मिळते, ते त्या इंद्रियजन्य विषयसुखात रमत नाहीत. कारण त्या बुद्धिमान पुरुषांस अशा सुखास जसा आरंभ असतो, तसाच नक्की शेवटही असल्याचे ठाम उमजले असते."

"तो चकोरु काईं वालुवंटें। चुंबितु आहे"

ज्ञानेश म्हणतातः

जेयां आपणपें सांडूनि कंहिं। इंद्रियग्रामावेरि एणें नाहिं।
तो विषय सेविं हें काइं। विचित्र एथ।।५-१०५।।
साहाजें स्वसुखाचेनि अपारें। सुरवाडें अंतरें।
रचिलां म्हणौनि बाहिरें। पाऊल न घालीं।।१०६।।
सांधैं कुमुददलाचेनि ताटें। जो जेविला चंद्रकिरणें चोखटें।
तो चकोरु काइं वालुवंटें। चुंबितु आहे।।१०७।।
तैसें आत्मसुख उपाइलें। जेयांसि आपणपांचि फावलें।
तेयां विषय साहाजें सांडवलें। सांघो काइं।।१०८।।
यरविं तन्हैं कवतुकें। विचारूनि पाएं नीकें।
एयां विषयांचेनि सुखें। झकवति कवण।।१०९।।

"जो कायम आत्मावस्थित असतो, ज्याला आत्मसुख टाकून इंद्रियसंघाताच्या विषयांकडे वळावयाचे नाही, तो विषय सेवत नाही, यात आश्चर्य नाही. आत्मासुखाच्या रेलचेलीने ज्याचे अंतःकरण व्यापले आहे, तो ते अमित सुख सोडून बाह्यसुखाकडे चुकूनही वाकडी वाट धरत नाही. कमलपुष्पाच्या पाकळीतून शुद्ध चंद्रकिरणांचे सेवन ज्याने केले, तो चकोर पक्षी चुकून तरी वाळवंटातील रेती चाटेल काय! त्याप्रमाणें विशुद्ध आत्मसुखाची ज्याने गोडी चाखली, तो ते स्वतःच्याचठायी अनायासे प्राप्त झालेले सुख सोडून इतर गोष्टींकडे वळत नाही. त्याच्याठायी विषयसुखाची लालसा म्हणून आपोआपच राहत नाही."

योगस्थित ज्ञानी पुरुष बाह्यविषयसुखाकडे ढुंकूनही पाहत नाहीत, हे खरे. पण अज्ञानी जनांचे तसे नसते. त्यांना इंद्रियजन्य सुखाची हावच असते. ज्ञानदेव म्हणतात कीः

जिहिं आपणपें नाहिं देखिलें। तैंचि इहिं इंद्रियार्थिं रंजलें।
जैसें रंक कां आलुकैलें। तुषांतैं सेविं।।५-११०।।
ना तन्हैं मृगें तृषापिडितें। संभ्रमें विसरौनि जलांतैं।
मग तोयबुद्धिं बरडीतें। ठाकूनि एंतिं।।१११।।
तैसें आपणपें नाइं दिठें। जेहांतैं स्वसुखाचें सदा खरांटें।
तेयांसिचि विषय हें गोमटें। आवडति।।११२।।

"अर्जुना! नाहीतरी या सुखामागे धावून कोण फसतात, ते विचार करून पाहा. भुकेलेली दरिद्री माणसे कोंडा पण किती आवडीने खातात. त्याचप्रमाणे ज्यांनी आपल्या अंतरीच्या आत्म्याचा साक्षात्कार करून घेतलेला नाही, त्यांना आत्मसुख काय ते माहीतच नसते आणि तेच या इंद्रियविषयांमध्ये रंगतात. तृषार्त मृग ज्याप्रमाणे जळास विसरून मृगजलासच खरे मानून भ्रांतीने त्राहाटून उघड्याबोडक्या बरड माळरानाकडे धावत सुटतात, त्याप्रमाणे ज्यांना स्वतःचा विसर पडलेला असतो, तेच स्वस्वरूपाच्याठायीचे आत्मसुख सोडून विषयरूपी माळरानाकडे विषयजन्य सुखाच्या ओढीने धाव घेतात. त्या अज्ञान्यांनाच विषयांची गोडी असते."

विषयसुख::::
आद्यन्त दुःखच!

पुढे ऐकाः

एऱ्हविं विषइं काइं सुख आहे। हें बोलणेंचि सारिखें नोहें।
तरिं विद्युतस्फुरणें कां न पाहें। जगामाजिं।।५-११३।।
सांधैं वातवर्षाआतपु धरे। ऐसें अभ्रछायाचि जन्हैं सरें।
तन्हैं त्रिमालिकें धवलारें। करावि कां।।११४।।
म्हणौनि विषयसुख जैं बोलिजै। तैं नेणतां गां वायां जल्पिजैं।
जैसें महुर कां म्हणिजैं। विखकंदांतैं।।११५।।
ना तन्हैं भौमा नाम मंगलु। रोहिणितैं म्हणति जलु।
तैसा सुखप्रवादु बरलु। विषयकु हां।।११६।।

सामान्य साधकास विषयसुखाच्या अनर्थापासून ज्ञानदेव सावध करतात आहेत जणू! ते म्हणतातः "विषयांमध्ये सुख आहे, हे काय बोलणे झाले! मग विद्युल्लतेच्या प्रकाशाने जगात वावरले तरी चालेल. सांग पहा की वादळवारा, ऊनपाऊस यांच्यापासून जर अभ्रपटलाने

संरक्षण होणार असेल, तर तीन तीन मजली चुनेगच्ची घरे कशाला बांधायची! विषकंद मधुर असतो असे म्हणावे, त्याप्रमाणे विषयांपासून सुख होते हे म्हणणे आहे. भौम ग्रहास मंगल म्हणावे, मृगजळास जळ म्हणावे, तसेच हे म्हणणे व्यर्थच आहे की विषयांपासून सुख मिळते. हा निव्वळ प्रवाद आहे."

हें असो आघविं बोलिं। सांघ पां सर्पफणिचिं साऊलिं।
तैं शीतल होईल केंविं। मूखकासिं।।५-११७।।
जैसा अमिषकवलु पांडवा। मीनु न सेविं तेंविंचि बरवा।
तैसां विषयसंघु आघवा। निभ्रांत जाणें।।११८।।
हें विरक्तांचियें दिठीं। जैं निहालिजैं किरीटी।
तैं पांडुरोगाचियें पुष्टी-। सारिखें दिसें।।११९।।
म्हणौनि विखयभोगिं जैं सुख। तैं साद्यंतचि जाण दुःख।
परि काय करिति मूर्ख। न सेवितां सरे।।१२०।।

"हे सर्व राहू दे. सांग पहा की उंदराला सर्पफडेची सावली कितपत सुखदायक ठरेल! अर्जुना! जोपावेतो गळाला लावलेल्या आमिषाचा घास मासा खात नाही, तोवरच तो सुरक्षित असतो. त्याचप्रमाणे विषयभोग आहेत, हे साधकांनी लक्षात ठेवावे. कारण विरक्त पुरुषांच्या दृष्टीतून पाहिले तर विषयभोगी मिळणारे सुख पांडुरोगाने आलेल्या सूजेसारखे आहे. अंगावर चढलेल्या त्या सुजेला पुष्टी म्हणवेल का! म्हणून विषयोपभोगांपासून जे मिळते, ते सुख नसून निव्वळ दुःखच आहे. आद्यंत दुःख असूनही जे मूर्ख असतात, त्यांचे त्यावाचून चालत नाही. विषयसेवन करण्यात ते हर्ष मानतात."

अविद्या

कारण असे आहेः

तैं आंतर नेणति बापुडें। म्हणौनि अगत्य सेवणें घडें।
सांधैं पूयपंकींचें कीडें। काय चिलिसिं घेतिं।।५-१२१।।
तेयां दुःखियां दुःखचि जिव्हार। तैं विषयकर्दमिंचें दर्दुर।
तैं भोगजालांतैं जलचर। सांडिति केंविं।।१२२।।
आणि दुःखयोनि जियां आहाति। तियां निरर्थकां तऱ्है नहोति।
जऱ्हैं विषयांवरि विरक्ति। धरितिं जीव।।१२३।।

"विषयांचे खरे स्वरूप माहीत नसते. म्हणून ते बापडे त्यांचे सेवन करण्यात धन्यता मानतात. नाहीतरी त्यांनी दुसरे काय करावे! घाणीतल्या किड्यांना घाणीची कधी किळस वाटते का! त्या आत्मसुख न मिळालेल्या लोकांचे जीवनच दुःखमय असते. ते विषयरूपी चिखलात जगणारे मंडूक होत. विषयोपभोगरूपी जळातले ते मीनच असल्याने त्यांनी त्या जलाचा त्याग करून जगावे तरी कसे! शिवाय भूतांमध्ये ज्या योनी दुःख भोगण्यासाठीच आहेत, त्या निरर्थकच नाही का होणार जर अशा जीवांनी विषयासक्ती सोडली तर!"

ना तऱ्हैं गर्भवासादि संकट। कां जन्ममरणिंचें कष्ट।
हें विसांवेनविण वाट। वाहाविं कवणें।।५-१२४।।
जऱ्हैं विषइं विषयो सांडिजैल। तऱ्हैं महादोखिं कैं वसिजैल।
आणि संसारु हा शब्द नव्हैल। लटिका जगिं।।१२५।।
म्हणौनि अविद्याजात नाथिलें। हें तिहिंचि सांच दाविलें।
जिहिं सुखबुद्धीं घेतलें। विषयदुःख।।१२६।।
एयां कारणें गां सुभटा। हां विचारितां विषय वोखटां।
तूं झनैं कहिं इयां वाटां। विसरौनि जासिं।।१२७।।
पैं ययांतैं विरक्त पुरुख। त्यजिति जैसें कां विख।
निरासा तेयां दुःख। दाविलें नावडें।।१२८।।

"गर्भवासादी दुःखे, जन्ममरणांपासून होणाऱ्या यातना अशी जी विश्रांतिस्थले नसणारी वाट आहे, ती चालणारे हवेतच ना! विषयी जीवांनी विषयच जर त्यागले, तर महादोष कोणाकडे जातील! आणि हा संसारच लटका होणार नाही का! अशा सुख म्हणून विषयदुःखास स्वीकारणाऱ्या अज्ञ जनांनीच अस्तित्वात नसलेल्या अविद्येस रंगरूपास आणले आहे. म्हणून हे सुयोद्ध्या अर्जुना! तू चुकूनसुद्धा या दारुण विषयांच्या वाटेला जाऊ नकोस. विरक्त पुरुष तर यांना विष समजून त्यागतात. निष्काम असल्याने त्यांना हे विषयरूपी सुख आवडत नाही व त्यामुळे त्यातले दुःख त्यांच्या वाट्याला येत नाही."

ब्रह्मनिर्वाण::::

"लभन्ते ब्रह्मनिर्वाणं"

विषयसुखात राहूनही ते नावडणारे, किंबहुना आत्मसुखात सदैव मग्न असल्यामुळे विषयात वर्तूनही त्यांची जाण नसणारे ते पुरुष अज्ञानी असतात; ज्ञानी तेच योगी होत. म्हणून श्रीकृष्ण म्हणतातः

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात्।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः।।५-२३।।

"काम व क्रोध यांपासून उद्भवणाऱ्या वेगाला जो सहन करू शकतो, तो मनुष्य योगी असतो. तोच सुखी असतो."

योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति।।५-२४।।

"जो अंतःसुखी -आत्मसुखात रममाण असतो, अंतराराम - आत्मरती करणारा असतो, ***अंतर्ज्योति*** - अंतःकरणात आत्मप्रकाश असलेला असतो , तो योगी असतो व जीवन्मुक्त असतो."

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः।।५-२५।।

तो ब्रह्मरूप असतो व त्यास मोक्षरूप ब्रह्मप्राप्ती होते. त्याची सर्व पातके नष्ट झालेली असतात. त्यांचे अज्ञान नष्ट झालेले असते. सर्व प्राणिमात्रांचे कल्याण करण्यात रत असणाऱ्या त्या ब्रह्मवेत्त्या ऋषीस ब्रह्मरूप मोक्ष जिवंतपणीच मिळतो."

"साक्षी तरी कोण उरणार!"

ज्ञानेश म्हणतातः

ज्ञानियाचां ठाइं। एयांचि मातुहिं किर नाइं।
देहिं देहभाओ जिहिं। स्ववश केलें।।५-१२९।।

जेयातैं बाह्याचिं भाख। नेणिजैंचिं निःशेख।
आंतरीं चि सुख। एक आथि।।१३०।।
परि तैं वेगलेंपणें भोगिजैं। जैसें पक्षियें फलें चुंबिजैं।
तैसें नव्हें जेथ विसरिजैं। भोगितेपणहिं।।१३१।।
भोगिं अवस्था एकि उठीं। तैं अहंकाराचां अचलु लोटीं।
मग सुखेंसि घे आंटी। गाढेपणें।।१३२।।

"जिवंतपणीच ज्यांनी विदेही वृत्ती आत्मसात केली असते, त्या अशा तत्त्ववेत्त्यांठायी विषयेंद्रियांची मातब्बरी नसते. ते बाह्य विषयांची भाषाच जाणत नाहीत. कारण त्यांचे चित्त आत्मसुखाने ओतप्रोत भरलेले असते. पण ते सुख भोगण्याची त्यांची तऱ्हा जगावेगळी असते. पक्षी झाडावरील फळ खातांना जसा दिसतो, तसे काही यांचे आत्मसुख भोगणे दिसण्यासारखे नसते. आणि भोक्ता, भोग्य व भोग अशी त्रिपुटी पण त्यांच्याठायी नसते. आत्मसुख भोगणारा जो कोणी आहे, तो मी आहे, असा भोक्तेपणाचा अहंकार त्यांच्याठायी असूच शकत नाही. अहंकाराचा पडदा सारून आत्मसुखास प्रगाढ आलिंगन देणारी ती अनामिक अवस्था ते जीवन्मुक्त उपभोगतात."

तियें आलिंगनमेळीं। होये आपेंआप कवलीं।
तेथ जल जैसें जलीं। वेगलें न दिसें।।५-१३३।।
कां आकासिं वायु हारपे। तेथ दोन्हिं हें भाख जाएं।
तैसें सुखचि उरें स्वरूपें। सुरतिं तियें।।१३४।।
ऐसिं द्वैताचिं भाख जाएं। मग म्हणों जऱ्हैं एकचि होए।
तऱ्हैं तेथ साक्षि कवणु आहे। जाणतैं जैं।।१३५।।

"स्वतःस स्वतःनेच कवळावे अशी ती आलिंगनस्थिती असते. पाणी जसे पाण्यापेक्षा वेगळे दिसत नाही, तसे आलिंगन देणारा व आलिंगिला जाणारा असे कोणी दोन वेगवेगळे तेथे नसतात. आकाशात वायू विरून जावा व वायू आणि आकाश असे कोणी दोन तेथे उरू नयेत, तशी ही आत्मरती असते. तेथे आत्मसुख भोगणारा, आत्मसुख व स्वस्वरूप यांची अशी काही घट्ट मिठी पडते की हे तिन्ही स्वरूप होऊनच राहतात. द्वैतच असे जेथे नाहीसे होते, तेथे अद्वैतच उरते, असे म्हणणारा साक्षी तेथे कोण उरणार!"

"तो देहेंचि परब्रह्म"

त्या आत्मसुखाच्या अवस्थेचे तरी पण शब्दांकन करू शकणारे ज्ञानेश म्हणतातः

म्हणौनि असो हें आघवें। एथ न बोलणें काएं बोलावें।
तैं खूणचि पावेल स्वभावें। आत्माराम।।५-१३६।।
जैं ऐसेनि सुखें मातलें। आपणापांचिं आपण गुंतलें।
तैं मी जाणें निखल ओतलें। सामरस्याचें।।१३७।।
तैं आनंदाचें अनुकार। सुखाचें अंकुर।
किं महाबोधें विहार। केलें जैसें।।१३८।।
तैं विवेकाचें गांवं। कीं परब्रह्मींचें स्वभाव।
ना तऱ्हैं अलंकारिलें अवयव। ब्रह्मविद्येचें।।१३९।।
तैं सत्त्वाचें सात्त्विक। कीं चैतन्याचें आंगिक।....।।१४०।।

"असे हे बोलता न येण्यासारखे आहे, ते किती प्रकारे सांगावे! आत्मारामात रंगलेले जीवन्मुक्तच ही स्थिती जाणू शकतात. जे या परमसुखाने मत्त झालेले आहेत, जे आत्मानंदात रत आहेत, ते म्हणजे निखळ सामरस्याचे पुतळेच होत, असे मी समजतो. ते म्हणजे आनंदाचे प्रतिबिंबच होत. सुखास आलेले अंकुर तेच होत. ते म्हणजे महाबोधाचे विहार होत. ते विवेकाचे गाव होत. परब्रह्माचा सहज भाव तेच होत. ब्रह्मविद्येचे सालंकृत अवयव त्यांच्याच रूपाने मूर्त होतात. सत्त्वाचे सात्त्विकपण कोणी असेल, तर तेच जीवन्मुक्त होत. चैतन्याचे अंग असे तेच महाभाग होत!"

....।हें बहु असो एकैक। वानिसिं काइं।।५-१४०।।
तूं संतस्तवनिं रतसिं। तऱ्हैं कथेंसिं से न करिसि।
किर निरालिं बोल देखसिं। सनागर।।१४१।।
परि तो रसातिसो मुकुलीं। मग ग्रंथार्थुदीपु उजलीं।
करिं साधुहृदयराउलिं। मंगल उखा।।१४२।।

यावर श्रीगुरू निवृत्तिनाथ ज्ञानदेवांना म्हणू लागले की, "पुरे आता हे वर्णन! कारण त्यांचे वर्णन कधीच पूर्णपणे करता येणार नाही. आणि तू तर असा आहेस की एकदा संतांच्या स्तुतीत रत झालास की गीतेच्या श्लोकभागाकडे व पुढील भाग सांगण्याकडे लक्षच देत नाहीस. तुझे हे विषयांतर फार छान वाटते. पण हा रसविस्तार आता आवरता घे आणि गीतार्थाचा प्रदीप प्रज्वलित कर. म्हणजे या श्रोत्या साधूंच्या अंतरंगमंदिरात मंगल अशा ज्ञानसूर्याचा उषःकाल होईल!"

"ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति"

ऐसा गुरूंचा उवाईला। निवृत्तिदासासिं पातलां।
मग तो म्हणें कृष्णु काइं बोलिला। तैंचि आइका।।५-१४३।।

गुरूंनी असे ज्ञानेशांस म्हटले. श्रीगुरूंची अशी आज्ञा ज्ञानेशांना मिळताच ते विषयाकडे वळून सांगते झाले, "बरे तर मग कृष्ण काय म्हणतात, तेच ऐका."

कृष्ण म्हणतातः

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम्।
अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम्।।५-२६।।

"काम व क्रोध यांच्यापासून विमुक्त असणारे आणि चित्त स्वाधीन केलेले आत्मसाक्षात्कारी पुरुष अंतर्बाह्य ब्रह्मरूप होतात. हाच त्यांचा मोक्ष होय."

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति।।५-२९।।

"यज्ञ व तप यांचा भोक्ता, सर्व लोकांच्या ईश्वराचाही ईश्वर व सर्व भूतमात्रांचा सुहृद असा जो मी, त्या मला जाणणारे ते यती, शाश्वत अशी शांती पावतात."

याबाबत ज्ञानेश म्हणतातः

अर्जुना अंतःसुखाचां डोहिं। एकसरां तळुचि घेतलां जिहिं।
मग थिराऊनि तेहिं। तैंचि जाहालें।।५-१४४।।
अथवा आत्मप्रकाशें चोखें। जो आपणपां चि विश्व देखें।
तो देहेंचि परब्रह्म सुखें। मानूं येईल।।१४५।।

कृष्ण सांगतातः "अर्जुना! त्या अनंत आत्मसुखाच्या डोहात बुडी देऊन एकदम तळाशीच जे पोहोचतात, ते तेथेच स्थिरावून स्वतःच सुखरूप होतात. किंवा आत्म्याच्या विशुद्ध प्रकाशाने जे आपणातच विश्व पाहतात, ते देहात वावरणारे परब्रह्मच होत, असे खुशाल म्हणावे."

जैं सांचोकारें परम। ना तैं अक्षर निःसिम।
जियें गांविंचें निष्काम। अधिकारिएं।।५-१४६।।
जैं मर्हर्षि वांटलें। विरक्तां भागां फिटलें।
जैं निःसंशयां पीकलें। निरंतर।।१४७।।
जिहिं विषयांपासूनि हिरतलें। चित्त आपुलें आपण जिंतिलें।
तैं निश्चित जेथ सूतलें। चेंतिचिना।।१४८।।
तैं परब्रह्म निर्वाण। जैं आत्मविदांचें कारण।
तैंचिं तैं पुरुख जाण। पंडुकुमरां।।१४९।।

"जे खरोखरच परम आहे, जे अनंत, अक्षर तत्त्व आहे; ज्या स्थानींचे अधिकारी निष्काम पुरुषच होऊ शकतात; जे महर्षींच्या वाट्याचे सुख आहे; जे श्रद्धावानांस अखंड फलद्रूप होते; विषयांपासून चित्त हिरावून घेणारे व स्वतःचे चित्त जिंकलेले पुरुष जेथे लीन झाले की कधीच पुनः वृत्तीवर येत नाहीत; असे ते मोक्षरूप परब्रह्म, जे आत्मज्ञान्यांचे आत्मज्ञान असते, तेच ते जीवन्मुक्त पुरुष असतात." अर्जुनाला असे सांगून श्रीकृष्ण किंचित थांबतात.

ज्ञानखंडन::::

अमृतानुभव

जीवन्मुक्त संतांचे वर्णन गुरूंच्या सूचनेनुसार असे त्यांनी आटोपते घेतले असले, तरी आपली मनीषा **अमृतानुभवा**त ज्ञानेश पूर्ण करून घेतात. ***ज्ञानखंडन*** व ***जीवन्मुक्तदशाकथन*** या त्याच्या दोन प्रकरणात या विषयाचा मोठा काव्यात्म विस्तार आढळून येतो. ज्ञानेशांच्या मनींचे ते अधूरे राहिलेले बोल पाहू या.

आपण सांगितलेले ज्ञान अर्जुनाच्या पचनी पडावे म्हणून श्रीकृष्ण जरा थांबले आहेत. तोवर ज्ञानेशांचे ते ***ज्ञानखंडन*** व ***जीवन्मुक्ती*** या प्रकरणींचे विचार या स्थळी पाहणे उचित होईल. त्यानंतर पुनः आपल्याला गीतोक्त विषयाकडे वळता येईल.

ज्ञानखंडन (अमृतानुभवाचे आठवे प्रकरण)

अज्ञान व ज्ञान दोन्हीही निःशेष नाहीसे करणारी जीवन्मुक्ती असते. गुरुदेवांच्या कृपेने ती प्राप्त होते. म्हणून ज्ञानेश म्हणतातः

तैसें आमुचेनि नांवें। अज्ञानाचें ज्ञानहीं नोहें।
आम्हालागिं गुरुदेवें। आम्हींचि केलो।।८-१।।अ।।
परि आम्हां आम्हीं आहों। तें कैसें पाहों जाओं।
तंव काय कीजैं ठाओ। लाजिजैं आइसां।।२।।

"गुरुदेवांनी आम्हाला आम्हीच केलो आहोत. आम्हाला अज्ञानाचे ज्ञानही नाही. अशी आमची स्थिती पाहायला तरी कसे जावे! कारण हे पाहू जाणारी क्रियाच लज्जित होते. आत्मस्थ म्हणून याचे वर्णन करणे संकुचितपणाचे होते. सर्वत्र असणाऱ्यास आत्मस्थ तरी कसे म्हणावे! स्वसंवित्तीचे सुद्धा तसेच आहे. कैवल्य असे वर्णनसुद्धा बरोबर होत नाही. कारण चिदात्म्याच्या ठिकाणी वेगळे कैवल्य ते कोठून येणार!"

हा ठाओवरि गुरुराएं। नांदविलों उवाएं।
जैं आम्हीं न समाएं। आम्हांमाजिं।।८-३।।अ।।
अहो आत्मपणीं न संठो। स्वसंवित्ति न घंसवटो।
आंगिं लागलें न फुटो। कैवल्यहिं।।४।।
आमुचिं करवें गोठी। तैं जाहालींचि नाइं वाक्सृष्टी।
आमुतें देखों दिठीं। तैं दिठिचि नोहें।।५।।

"आमच्या गुरुराजाने आम्हाला याठायी आणून बसवले आहे. कारण आम्हाला राहण्यासाठी आम्ही पुरत नव्हतो. आम्ही असे आहोत. पण हे वर्णन करू धजणारी वाक् अजून जन्माला आलेली नाही. आम्हाला पाहू शकेल व या स्वरूपास ओळखू शकेल अशी दृष्टी पण कोणालाच नाही."

मायेचा मृत्यू

आमुतें करूनि विखो। भोगूच शके पारखों।
तैं आमुतें न देखो। आम्हीपणा।।८-६।।अ।।
प्रकटो लपो न लाहो। एथ नाहीं नवलाओ।
परि कैसेनेहीं विपाओ। असणेयाचां।।७।।
किंबहुना श्रीनिवृत्ति। ठेविलों असो जियें स्थिति।
तैं काइं देऊं हातिं। वाचेचियां।।८।।
एथ समोरु व्हावयां। अज्ञानाचां पाडु कासया।
केऊतें मेलियां माया। होऊं पाहिजे।।९।।
रातीं म्हणें दिवे। पडति कीं लावावें।
वांचूनि सूर्यासवें। सिणणें होय।।१०।।

"आम्हाला विषय करून कोण भोगू शकेल! जो असे करू जाईल तो आम्हीच होऊन राहील. प्रकटणे व लपणे हे धर्म आमच्याठायी नाहीत, असा हा आमच्या असण्याचा प्रकार आहे. आत्मा कधी प्रकटतो किंवा लपतो का! आणिक काय बोलावे! श्रीनिवृत्तिनाथांनी आम्हाला ज्या स्थितीत आणून ठेवले आहे, ती वाचेच्या हाती कशी देता येईल! या अवस्थेत आम्हाला अज्ञान सामोरे येईलच कसे! मेलेली माया पुनः जिवंत कशी होणार! अज्ञानच जेथे गेले, तेथे ज्ञानाचा काय उपयोग! रात्र असतांना दिवे लावावे लागतात. दिवसा दिवे लावणे वृथा शीणच आहे, नाही का!"

चिदादित्याचा उदय

यरविं तऱ्हैं ज्ञान अज्ञानें। दोहिंचि अभिधानें।
अर्थाचेनि आनानें। विप्लाविली।।८-१३।।अ।।
जैसिं दंपत्तें परस्परें। तोडूनि पालटिलीं शीरें।
तेथ पालटु ना सरे। दोहिंचें जिणें।।१४।।
कां पाठीं लाविला होएं। तो दीपुचि वांयां जाएं।
दिठीं अंधारें पाहें। तैं तैंचि वृथा।।१५।।
तैसें निपटूनि जैं नेणिजें। तैं अज्ञान शब्दें बोलिजें।
आतां सर्वहिं जेणें सूझें। तैं अज्ञान कैंचें।।१६।।
ऐसें ज्ञान अज्ञान आलें। अज्ञान ज्ञानें गेलें।
हें दोनिं वांझौलें। दोनिं जाहालीं।।१७।।

"ज्ञान व अज्ञान यांची भिन्न नावे व अर्थ असावेत, असे प्रथम जरी वाटले, तरी असे पहा की नवरा आणि बायको यांची मस्तके कापून ती एकमेकांच्या धडाला लावली की बायकोचे नवऱ्यात आणि नवऱ्याचे बायकोत रूपांतर होईल काय! उलट ती दोघे प्राणालाच मुकतील की नाही! पाठीकडे प्रकाश पाडणारा दिवा आणि अंधारात पाहू जाणारी दृष्टी ही दोन्ही असूनही व्यर्थच ठरतात. काहीच न जाणणे म्हणजे अज्ञान. पण सगळे काही ज्याने समजते, ते ज्ञान असले, तरी अज्ञानापोटी त्याचा जन्म कसा व्हावा! ज्ञान जर अज्ञानाच्या घरी गेले, तर अज्ञान व ज्ञान ही दोन्ही एकच होतात. मग त्या एकापोटी ही दोघे जन्मतीलच कशी! चैतन्याचे ज्ञान व अज्ञान या दोन्ही वांझ कल्पना आहेत. या दोघांना पोटी घालून चिद्गगनी चिदादित्याचा उदय होतो."

जीवन्मुक्तदशाकथन::::

अमृतानुभवातील जीवन्मुक्त

ज्यांच्या चिद्गगनात त्या चिदादित्याचा उदय झाला, ते महाभाग जीवन्मुक्त होत. त्या जीवन्मुक्तांच्या अवस्थेचे वर्णन करणे - *त्यांची दशा कथन करणे* - यासाठी अनेकानेक रूपके रचून त्यांचे अत्यंत साक्षेपी वर्णन ज्ञानदेवांनी *अमृतानुभवाच्या नवव्या प्रकरणी* केले आहे. त्याचा आस्वाद घेऊ या व नंतर गीता - ज्ञानेश्वरीकडे वळू या.

ज्ञानेश म्हणतातः

आतां आमोद सुनास जाहालें। श्रुतीसिं श्रवण रिघालें।
आरिसें उटिलें। लोचनांसिं।।९-१।।अ।।
आपुलेनि समीरपणें। वेल्हावति विंझणें।
कीं माथेचि चांपेपणें। बहकताति।।२।।
जिह्वा लोधलीं रसें। कमल सूर्यपणें विकाशें।
चकोरेंचि जैसें। चंद्रमा जाहालीं।।३।।
फुलेंचि जाहालीं भ्रमर। तरुणीच जाहालीं नर।
जालें आपुलें शेजार। निद्रालुंचि।।४।।

"सुगंधच नाक होऊन राहिला; शब्दच श्रवणेंद्रिय झाला; किंवा आरसाच डोळा व्हावा; तसा दृष्यासच द्रष्टेपणा आला आहे. पंखाच वारा होऊन आपला आपणास वारा घालत आहे. मस्तकच चाफा होऊन आपले आपणास सुशोभित करत आहे; जिह्वा स्वतःच रसमय झाली आहे; कमळच सूर्यपणे विकसले आहे; चकोरच जणू चंद्रमा झाला आहे; फुलेच भ्रमरांची पालिंगने जणू झाली आहेत; तरुणीच नर होऊन स्वरती करत आहे; हे असो! निद्राधीन मनुष्य स्वतःच निद्रा होऊन आपले सुख आपण भोगत आहे;"

दिठिवियेचां रवा। नागरुं इयां ठेवा।
घडिला कां कोरिवा। परीं जैसां।।९-५।।अ।।
<u>तैसें भोग्य आन भोक्ता। दिसें आन देखतां।</u>
***<u>हें सरलें अद्वैतां। अफूटामाजिं</u>* ।।६।।**
सेवंतेपण बाहेरिं। न निगतांचि परि।
पाति सहस्त्रवेरीं। उपलविजें।।७।।
तैसें नवनवा अनुभविं। वाजतां वाधाविं।
अक्रियेचां गांविं। नेणिजे तैं।।८।।

"सोनेच जसे काही अलंकाररूपे स्वतःसच नटवत आहे; ही अद्वयता जशी असावी, तसेच भोग्य आणि भोक्ता, दृश्य आणि द्रष्टा, ही त्या अफूट अद्वैतामध्ये जशी काही एकच झाली आहेत. त्यांच्यात भोग्य व भोक्ता असा तिळमात्रही भेद उरलेला नाही. त्या एकसंध ज्ञप्तिमात्री तो भेद लीन झाला आहे. सहस्त्रावेरीं अनेक पाकळ्या असलेले शेवंतीचे फूल जसे एकच असते, त्याप्रमाणे नित्य नवा अनुभव येत असला तरी जीवन्मुक्ताचा ब्रह्मभाव तोच्या तोच राहातो. अनुभवागणिक त्याचा भाव काही पालटत नाही."

तैसें बहुतांपरीं स्फुरतें। तैंचि स्फुरें"

म्हणौनि विषयांचेनि नांवें। सूनि इंद्रियांचें थवे।
सैंघ घेतिं धांवें। समोरहीं।।९-९।।अ।।
परि आरिसा सिवे सिवे। तंव दिठीसिं दिठी फांवें।
तैसें जाहालें धांवें। वृत्तिचियें।।१०।।
नाग मुदी कंकण। त्रिलिंगीं भेदिलीं खूण।
घेतां तऱ्हैं सुवर्ण। घेईजे कीं।।११।।
वेंचूनि आणूं कल्लोल। म्हणौनि घापें करतल।
तेथ तऱ्हैं निखल। पाणीचि फांवें।।१२।।
हातापासिं स्पर्सु। डोलियांपासिं रूपसु।
जिह्वेपासिं मिठांशु। कोण्हीं एकु।।१३।।
तऱ्हैं परिमलपरौतें। मिरवणें नाहिं कापुरांतें।
तैसें बहुतांपरीं स्फुरतें। तैंचि स्फुरें।।१४।।

"विषय पाहून जीवन्मुक्ताची सर्व इंद्रिये जरी त्यांच्या सेवनासाठी धाव घेत असली, तरी दृष्टीसमोर आरसा आला की दृष्टीच दृष्टीला जशी पाहते, त्याप्रमाणे वृत्तींचे स्फुरण विषयांनिमित्त जरी झाले, तरी विषयांद्वारे तो ज्ञाताच स्वतःस स्वतः पाहतो. नागबंद, अंगठी व कंकण ही वेगवेगळ्या आाकाराची असली, तरी शेवटी ती सगळी सुवर्णच होत. पाण्यावरल्या लाटा हाती घेऊ गेले तर पाणीच हाती येते. हाताने

स्पर्श केला किंवा डोळ्याने आपले प्रतिबिंब पाहिले; जिभेने आपलाच स्वाद घ्यावा; किंवा कापुराठायी सुगंधावाचून काहीच जसे नसते; त्याप्रमाणे <u>नाना प्रकारच्या रूपाने तेच ते एकले आत्मतत्त्व विनटलेले आहे. विविध विषय व इंद्रिये यांच्या रूपाने तेच स्फुरत असते</u>.

म्हणौनि शब्दादि पदार्थ। श्रोत्रादिकांचें हात।
घ्यावेयां जेथ। उजूं होति।।९-१५।।अ।।
तेथ संबंधु होयएं न होएं। तंव इंद्रियांचें तैं नोहें।
मग असतचि आहें। संबंधु ना।।१६।।

"म्हणून श्रोत्रादी इंद्रियपंचक आपापले शब्दादी विषय जेव्हा घेऊ जातात, तेव्हा त्यांचा परस्पर संबंध येतो न येतो, तोच आत्मतत्त्वाचा प्रत्यय येतो. आणि त्यांचा असा संबंध तरी कसा येणार! कारण विषय व इंद्रिये आत्ममयच असतात."

"अक्रियेचें न मोडें। पाऊल केंहिं"

जियें पेरिं दिसति ऊंसिं। तियें लभति कां रसिं।
कांति जेविं शशिं। पुनवेंचियां।।९-१७।।अ।।
पडिलें चांदावेरिं चांदिणें। समुद्रीं जाहालें वरखणें।
विषयां करणें। भेटिति तैसिं।।१८।।

"उसाच्या ठिकाणी वेगवेगळी पेरी दिसतात. पण त्यांच्यात एकचएक मधुर रस भरलेला असतो. चंद्र प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत वेगवेगळ्या कलांचा दिसतो. पण त्याचा विविध कलायुक्त प्रकाश - अगदी पौर्णिमेचा पूर्ण प्रकाश पण त्याच त्या चंद्राचा असतो. चंद्रावर आपलेच चांदणे पडावे किंवा समुद्रावर त्याच्यापासूनच उत्पन्न झालेल्या मेघांचा पाऊस वर्षावा; त्याचप्रमाणे विषय व इंद्रिये ही आत्म्याहून भिन्न नसल्याने त्यांच्या संयोगाने ज्ञानी पुरुषाचा अद्वैतभाव मोडत नाही."

(<u>**टीप:**</u> रोज वेगवेगळ्या कला असणारे चंद्र वेगवेगळे असतात, अशा कल्पना कित्येक महान प्रगत संस्कृतीत होत्या. परंतु ज्ञानदेवांच्या काळी भारतीयांना हे निश्चित ठाऊक होते की ते वेगवेगळे चंद्र नसून एकाच चंद्राच्या वेगवेगळ्या अवस्था - phases of the Moon - आहेत.)

म्हणौनि तोंडां आड पडें। तैंहिच वाचा बावडे।
परि समाधि न मोडें। मौनमुद्रेचिं।।९-१९।।अ।।
व्यापाराचें गाडें। मोडितांहिं आपाडें।
अक्रियेचें न मोडें। पाऊल केंहिं।।२०।।
पसरौनि वृत्तिचिं बावें। दिठी रूपांतैं दे खेवें।
परि सांचाचेनि नांवें। कंहिंचि नलगे।।२१।।

"तो पुरुष मुखाने हवे ते बोलो, पण त्याचे मौन अभंग असते. स्वाभाविकपणे जो कोणता व्यवहार त्याला करावा लागतो, त्याच्यामुळे त्याचे नैष्कर्म्य अजिबात ढळत नाही. ज्ञाता ज्या कोणत्या पदार्थास पाहतो, तो पदार्थ वा ते दृश्य आत्मरूपच होते. अशा त्या आत्मावस्थित जीवन्मुक्ताने जरी काही पाहिले, तरी तो काहीच पाहत नाही. तो आपल्याशीच आत्मक्रीडा करत असतो."

तमातैं घेआवेयां। उचलूनि सहस्त्र बाहियां।
शेवटीं रवि ययां। हांचि जैसा।।९-२२।।अ।।
स्वप्निचियां विलासां। भेटईन एयां आशा।
उठिला तंव जैसां। तोचि मां तो।।२३।।
तैसा उदयलियानि विषयें। ज्ञानिं विषयिं हों लाहें।
तंव दोनिं न होनि होएं। काय नेणों।।२४।।

"सूर्य आपल्या सहस्त्रावधी किरणरूपी हातांनी अंधार धरू पाहील, तर त्याला तो कसा सापडणार! तेजोमय ज्योतीस अंधार कसा दिसेल! स्वप्नातले विलास भोगण्याच्या इच्छेने जागृत होऊन जर कोणी उठला, तर त्यास कोणते भोग मिळतील! तो तर आपला आपणच असणार! त्याचप्रमाणे जीवन्मुक्त जरी नाना प्रकारचे भोग भोगत आहे, असे वाटले, तरी तो ज्ञातृत्वावस्थेतच अखंड विद्यमान असतो. त्यास भोग ते कोठले! विषय वा विषयी यांपैकी तो काहीच होत नाही. तो तर निव्वळ स्वतःशी क्रीडा करत असतो. अशी जी त्याची अवस्था असते, तिचे वर्णन करू जाणारी वाचा आपोआपच मौनावते."

"दशेचां वेवहारु। असाधारणु"

चंद्रु वेंचू गेला चांदिणें। तंव वेंचिलें काएं तेणें।
विऊनि वांझें स्मरणें। होति तैसिं।।९-२५।।अ।।
प्रत्याहारादि आंगीं। योगें आंग टेंकिलें योगिं।
तो जाहाला इयें मार्गिं। दिहाचां चंद्रु।।२६।।
जेथ प्रवृत्ति बहुडें जिणें। अप्रवृत्तिसिं बाधाविणें।
आतां प्रत्यङ्मुखपणें। प्रचारु दिसें।।२७।।

"चंद्र चांदणे वेचू गेला, तर कोणी काय वेचले असे म्हणावे! विषय आणि विषयी वेगवेगळे असले, तर विषयांची स्मृती होते. जीवन्मुक्तास अशी स्मृती होण्याचे काय कारण! विषय, विषयी व विषयांची स्मृती ही सर्व त्याला एकच होत. विषय वेचायला गेलेल्या जीवन्मुक्ताची स्थिती म्हणूनच चांदणे वेचू पाहणाऱ्या चंद्रासारखी असते. ज्ञान्याची ही स्थिती असल्याने साधनांचे तेथे काम उरत नाही. म्हणूनच मध्याह्नीचा चंद्र असावा, तसा त्याच्यासाठी अष्टांगयोग ठरतो. अर्थात अष्टांगयोगाने साध्य होणाऱ्या समाधीपेक्षा ही स्थिती वेगळीच आहे. ही ***संजीवन समाधि*** आहे. प्रवृत्तीचा सदासाठी लय होतो, पुनः व्युत्थानदशा प्राप्त होत नाही, अशा सौंदर्याने ही निवृत्ति अवस्था विनटलेली असते."

द्वैतदशेचें आंगण। अद्वैत वोलगें आपण।
भेदु तंव तंव दूण। अभेदासिं।।९-२८।।अ।।
कैवल्याहिं चढावा। करित विषयसेवा।
जाहाला मृत्यु भज्य कालौओ। भक्तिचां घरीं।।२९।।

"त्या निवृत्ति अवस्थेशी अंतर्निष्ठ राहून जीवन्मुक्तीत सर्व व्यवहार घडतात. म्हणून ज्ञात्याने कोणताही द्वैतात्मक व्यवहार केला, तरी

तो नित्य अद्वैतातच नांदतो. त्याला भेदभावाचा जो काही आभास व्यवहार करत असतांना घडत असतो, तो सर्व त्याची अद्वैतस्थिती बळकट करत असतो. जीवन्मुक्त हाच खरा ज्ञानी भक्त असतो. आणि त्याचे उपभोग घेणे हे कैवल्यप्राप्तीपेक्षाही श्रेष्ठ असते. देव आणि भक्त हे असे जेथे अभेदत्वाने एक होतात, अशी ती ज्ञानभक्ती असते."

घरामाजिं पायें। चालतां मार्गुहिं तोचि होएं।
ना बैसें तऱ्हैं आहें। पावणेंचि।।९-३०।।अ।।
तैसें भलतें करितां। एथ पाविजे काईं आतां।
ऐसें नाइं न करितां। किजैना।।३१।।
आठऊं आन विसरु। तेयांतैंहिं घेऊं नेदीं पसरु।
दशेचां वेवहारु। असाधारणु।।३२।।

"घरातल्या घरात जर कोणी हिंडू लागला, तर त्याचा रस्ता म्हणजे घरच होते. व घरच्या घरी जर तो स्वस्थ बसून राहिला, तर त्याचे प्राप्य स्थान घरच होते. प्राप्य वा गंतव्य स्थान व मार्ग हे असे दोन्हीही मग घरच जसे होते, त्याप्रमाणे ज्ञात्याने कर्म केले काय! आणि तो स्वस्थ बसून राहिला काय! तो जसाच्या तसा अद्वय स्थितीत स्थिर राहतो. कर्मे करूनही त्यास काही मिळवावयाचे नसते आणि कर्मे न करूनही त्याला काही गमवायचे नसते. ***"आठव नाठव गेले भावाभाव। जाला स्वयमेव पांडुरंग।।"*** अशी देहाची स्मृती व विस्मृती, किंवा आत्मस्वरूपाची जाणीव- नेणीव अशा स्मृती-विस्मृतींचे जेथे प्रयोजन नसते, अशी अपूर्व त्या जीवन्मुक्ताची स्थिती असते."

"जाला देओचि भक्तु"

जाहालीं स्वेच्छाचि विधि। स्वैर जाहाली समाधि।
दशें इयें मोक्षरिद्धि। बैसों धापें।।९-३३।।
जाला देओचि भक्तु। ठाओचि जाला पंथु।
होओनि ठेला एकांतु। विश्वचि तैं।।३४।।

"ज्ञात्यास विधिनिषेधांचा बागुलबोवा नसतो. निरंतर समाधिस्थ राहणाऱ्या त्याला कोणतीही बंधने नसतात. चालतबोलत वावरत असला तरी न भंगणारी अशी त्याची समाधि असते. तो जे काही करतो, ते विधिवत प्रमाण ठरते. मोक्षसिंहासनी बसून तो आत्मज्ञानी असा स्वच्छंद मुक्तपणे विहरतो. देव झालेला तो भक्त जीवन्मुक्त असतो. मार्गच गंतव्यस्थान व्हावा, तसे हे त्याचे होते. विश्वात्मक झाल्यामुळे त्यास सदैव एकांतवास प्राप्त होतो."

भलतेउतेनि देवें। भलतेन भक्त होआवें।
बैसला तेथ राणिवें। अकर्मु हों।।९-३५।।अ।।
देवाचियां दाटणि। देऊलां जालीं आटणि।
देशकालादि वाहाणिं। येईचिना।।३६।।

"भक्त देव होऊन राहिला आणि देव भक्त होऊन राहिला, असा देवभक्तांचा ऐक्यभाव त्याच्याठायी प्रकटतो. तो कसाही राहिला तरी, त्याने काहीही केले तरी, त्याच्याठायी अकर्माचे राज्य वसते. त्याच्या रूपात देवच वावरत असल्याने देव-भक्त-देऊळ असे दृश्य कसे पहायला मिळणार! ही तिन्हीही त्या एका भक्ताच्या आतच वसतात, ज्या ठिकाणी देशकाळाचे साम्राज्य नसते."

देवी देओचि नमायें। मां देवी कें अन्वयो आहे।
तेथ परिवारु बहुयें। आवडता कीं।।९-३७।।अ।।
ऐसाहिं स्वामिभृत्युसंबंधा-। लागिं उठलीं श्रद्धा।
तैं देओचि नसधा। कामविजें।।३८।।

"देवासच जेथे देवपण उरत नाही, तेथे देवीला आणि इतर दैवतांना कोणते देवपण उरणार! विश्वच जेथे नाही, तेथे विश्वाभास तरी कसा होणार! हे सगळे जाऊन त्याच्या रूपे एकरस अखंड असा देव जिता-जागता विहरतो. अशा त्या स्थितीत स्वामी-सेवक असा देवभक्तांचा संबंध दिसेल तरी कसा! पण तरीही लीला म्हणून तो देव भक्तरूपे स्वतःच स्वतःशी विलास करतांना दिसतो खरा!"

"तैसा भक्तिचा वेवहारु। कां न होआवा"

आघवियांचि उपचारां। जपध्यान निर्धारां।
नाहिं आन संसारां। देवेंवांचूनि।।९-३९।।अ।।
आतां देवांतैंचि देवें। देवावरि भजावें।
अर्पणाचेनि नांवें। भलतियां।।४०।।
देव देऊल परिवारु। कीजैं कोरूनि डोंगरु।
तैसां भक्तिचां वेवहारु। कां न होआवा।।४१।।

"देव व भक्त यांची अशी स्थिती असल्यावर तो वश झालेला देव स्वतःच जप, ध्यान, पूजा व उपचारादी विधी होतो. फार काय सांगावे! देवच आपण देव व भक्त होऊन आपणच आपली भक्ती करतो. तो स्वतःस स्वतःच पूजादी द्रव्ये अर्पण करून घेतो. डोंगरात मंदिर कोरावे, त्यात त्याच पाषाणाची सुंदर मूर्तीही कोरावी. त्या मूर्तीपुढे भक्तिभावाने पूजा करणारा तसाच त्याच पाषाणाचा पूजक पुजाद्रव्यादींसह कोरावा. एकाच पाषाणातून ही सर्व जशी घडवली जावीत, तसाच त्या एका चित्तत्त्वातून देव- भक्त- उपचार- पूजाद्रव्यादी असा व्यवहार का संभवू नये!"

पाहें पां आघवेयां। रुखां रुखचि ययां।
परि दुसरा नाईं तेयां। विस्तारु जेविं।।९-४२।।अ।।
अहो मुगीं मूग जैसें। घेतां न घेतां नवल नसें।
केलें देवपण तैसें। दोहिंपरीं।।४३।।
अखताचिं देवता। अखतींचि असें न पूजितां।
मां आखतिं काएं आतां। पूजों जावो।।४४।।

"अद्वैती भक्तीचा व्यवहार नसतो असे कोणी का व कसे म्हणावे! मुक्याने मौनव्रत घ्यावे, तसा हा देवभक्तांचा संबंध असतो, त्यात नवल काय! अक्षतांची जी देवता म्हणून स्थापना करून तिचे अक्षतांनीच पूजोपचारादी जे केले जातात, त्यात अक्षतांखेरीज इतर

काय असते! आणि त्या पूजादी विधींनी त्या अक्षतांचे स्वरूप बदलते काय!

कर्माकर्माचे प्रयोजन नसणे

दीप्तीचिं लुगडी। दीपकलिकें तूं वेढीं।
हें न म्हणतां तैं उघडी। ठाकें काई।।९-४५।।अ।।
कां चंद्रातैं चंद्रिका। न म्हणिजे तूं ले कां।
तऱ्हैं तो असिका। तियांचि कीं ना।।४६।।
आगीपणें आगिं। असतचि असें आंगिं।
मा कासयालागिं। देणें न देणें।।४७।।
...आतां भक्ति अभक्ति। जाहालें ताट एकां पांति।
कर्माकर्माचियां वाति। माल्हवूनियां।।४९।।

"दीपज्योतीला तेजाचे वस्त्र लेववावे लागते काय! ते तर तिच्या आंगी असतेच! आणि ती दिपज्योती उघडीवाघडी आहे, असे तरी कसे म्हणता येईल! तिचा स्वभावच असे तेजोमय आवरण घेण्याचा आहे. आपले चांदणे पांघरून घे असे चंद्राला मुद्दाम सांगावे लागते का! तो स्वभावतःच आपले चांदणे सभोवती घेऊन वावरतो. आणि कसेही असले, चांदणे व चंद्र एकमेकांहून भिन्न वाटले, तरी अभिन्नच नसतात का! अग्नी उष्णता देतो म्हणून त्यास अग्नी असे म्हणावे लागते का! उष्णता तर त्याच्या अंगीच वसते. या प्रकारेच तो भक्त भक्ती करो वा न करो, तो संपूर्णतया देवरूपच असतो. असा समाधिस्थ ज्ञानी भक्त ज्या ज्या अवस्थेत राहतो, ती ती देवाची भक्तीच असते. जेथे भक्ती व अभक्ती अशा एकाच स्वरूपाच्या असतात, तेथे कर्म, अकर्म, विकर्म वा निष्कर्म यांचा लेशही उरत नाही."

संजीवन समाधि

ज्ञानदेवांनी असे जीवन्मुक्ताचे जे वर्णन केले आहे, त्यात ***योगधारा, ज्ञानधारा व भक्तिमार्ग*** यांचा असा सुरेख संगम दाखवला आहे. त्यांचा अध्यात्ममार्ग या लौकिकतः वेगवेगळ्या समजल्या जाणाऱ्या ***ज्ञान - योग - भक्ती*** यांचा मेळ साधत, त्यांना भिन्नत्वाने न पाहता, कर्मांची कास न सोडता प्रकटतो, तो असा. याच मार्गाने जाणाऱ्यास सर्वश्रेष्ठ अशी ***संजीवन समाधि*** प्राप्त होते.

"स्वभावें। श्रीशिवूचिं असें"

त्या समाधीची लक्षणे अधिक वर्णन करत ज्ञानदेव सांगतातः

...म्हणौनि भजतां भजावें। मां न भजतां काय नोहें।
ऐसें नाहीं स्वभावें। श्रीशिवूचि असें।।९-४८।।अ।।...
म्हणऊनि उपनिषदें। दशें येति निंदें।
निंदाचि विशदें। स्तोत्रें होति।।५०।।
ना तऱ्हैं निंदास्तुति।
दोनिं मौनासाठीं जाति।...।।५१।।

"तो भक्ती करो अथवा न करो, ती सर्व भक्तीच त्याच्या रूपाने स्थित असते. तो भक्त साक्षात श्रीशिवस्वरूपच असतो. कर्म व अकर्म यांचे दृश्य मावळवून भक्ती व अभक्ती एकाच पंक्तीत बसून एकाच ताटातून भोजन करतात, हे त्याच्याबाबतीत घडते. त्या दशेचे वर्णन कोणी करावे! त्यासाठी दशोपनिषदांनी खूप प्रयत्न केले. पण प्रत्यक्ष वेदच जेथे कुंठित झाले, त्या आत्म्याचे वर्णन करू पाहणारी उपनिषदे स्तुतीऐवजी त्याचे निंदाव्यंजक वर्णन करण्याची भागीदार झाली. ब्रह्माचे वर्णन ***"नेति, नेति"*** असेच जेथे केले जाते, तेथे उपनिषदांनी केलेले वर्णनही लागू पडत नसल्याने ते सर्व खोटे पडते."

"ना सत् ना असत्"

.....। मौनीं मौन आथिं। बोलतां बोलीं।।९-५१।।अ।।

"परंतु ब्रह्म हे सर्वच असल्याने ती निंदा - ते असत्य बोलणे - पण खरे मानावे लागते. त्या जीवन्मुक्तीचे वर्णन ना निंदा ना स्तुती, ना खरे ना खोटे - या स्वरूपात करू गेल्यास मौनाचेही मौन प्राप्त होते. त्याच्यावर रूपक करा, ना करा! ते बोलणे मौनाच्याच प्रांतातले ठरते. कारण मौन म्हणजे न बोलणे. जे बोलणे त्या आत्मराजस्थितीस लागू पडत नाही, ते बोलूनही न बोलल्यासारखेच म्हणजे मौनासारखे होते."

या ब्रह्माच्या अवस्थेलाच उद्देशून ***नासदीयसूक्ता***त ते तत्त्व सतही नाही आणि असतही नाही असे म्हटलेले आहे. गीताही ***"न सत्तनासदुच्यते।।१३-१२।।"*** असे त्याचे वर्णन करते.

"देवा भक्ता दोहीं। एकचि पाडु"

घालितां अव्हासव्हां पायें। शिवयात्रा होत जाएं।
शिवा गेलियांहिं नोहें। केंहिं जाणें।।९-५२।।अ।।

"अशी दशा पावलेला तो भक्तराज जेथे पाऊल टाकतो, ते शिवस्थानच होते. अशी शिवयात्रा त्याला पावलोपावली घडत असते. आणि इतउपरही त्याने खरेच जर शिवाची यात्रा केली, तर त्यास कोणतीच यात्रा घडतही नाही. कारण तो आपल्याठायीचा ढळतोच कोठे, तर तो जाणार कोठे आणि यात्रा करणार ती कशी!"

चालणें आन बैसक। दोनिं मिळूनि एक।
नोहें ऐसें कवतिक। इयें ठाईं।।९-५३।।अ।।
यरविं आडोलिलियां डोलां। शिवदर्शनाचां सोहोला।
भोगिजे भलतें हेलां। भलतेणें।।५४।।
ना समोर दिसे शिवही। परि देखिलें काईं नाईं।
देवा भक्तां दोहीं। एकचि पाडु।।५५।।

"चालणे व बसणे या दोन्ही अवस्था एकमेकात मिसळून गेल्या असाव्यात, अशी त्या महात्म्याची स्थिती असते. एवढे त्या भक्ताचे माहात्म्य आहे. असा ज्ञानी भक्त सहजच ज्याकडे दृष्टी वळवतो, ते सर्व शिवरूपच होऊन जाते. म्हणून त्यास शिवाचे दर्शन नितनूतन स्वरूपात होत असते आणि शिवाला असे पाहूनसुद्धा तो त्यास पाहत नाही. कारण देवच भक्त आणि भक्तच देव असे जेथे आहे, तेथे

कोणता द्वैतभाव उरावा! आणि पाहणारा व दिसणारा असे कोणकोण तेथे असावे!"

कर्म-योग- ज्ञान -भक्ती यांचा समन्वय::::

"योगज्ञानादि विश्राम। भूमिका हें"

आपणचि चेंडू सुटे। मग आपणयां उपटे।
तेणें उंदलला दाटे। अपणपांचि।।९-५६।।अ।।
ऐसिं जन्हैं चेंडूफलीं। देखिजें कां केहेलीं।
तन्हैं बोलिजैं सरलीं। प्रबुद्धाचिं।।५७।।
<u>कर्माचां हातु न लगें। ज्ञानाचें कंहिं न रिघें।</u>
***<u>ऐसिंचा होतसें आंगें। उपास्ति हें</u>* ।।५८।।**

"चेंडूचे टप्पे खेळतांना हातही चेंडू आणि जमीन पण चेंडूच झाली तर काय होईल! आणि असा खेळ पाहायला कोणाला मिळेल का! स्वात्मस्थितीत हा जो भक्त आणि देव यांचा भक्तीचा खेळ चालतो, तो तरी कोण पाहू शकेल! आणि तो जर पहायलासुद्धा मिळायला अशक्य, तर त्या खेळाचे वर्णन कसे करता येईल! कर्माचा स्पर्शसुद्धा जेथे होत नाही, ज्ञानाचाही जेथे प्रवेश होत नाही, अशी ही भक्ती आहे."

निफजें ना निमें। आंगिं अंग घुमें।
सुखा सुख उपमे। देववेल इयां।।९-५९।।अ।।
<u>कोण्ही एक अकृत्रिम। भक्तिचें हें वर्म।</u>
***<u>योगज्ञानादिविश्राम-। भूमिका हें</u>* ।।६०।।**

"स्वतःतच परिपूर्ण अशी, सुखानेच सुखास सुखवावे तशी ही स्थिती आहे. त्रिपुटीविरहित अशा अकृत्रिम भक्तीचे हे रहस्य आहे. ***नारद-शांडिल्यादी*** ऋषिमुनींनी आपल्या भक्तिसूत्रांतून ***परमप्रेमा*** अशा याच भक्तीचे माहात्म्य वर्णिलेले आहे.या <u>अशा ***प्रेमरसा, चिदानंदा, अमृतोपमा, ज्ञानाज्ञानविवर्जिता, त्रिगुणातीता, निरंजना, पूर्णघना, निःश्रेयसा, आपूर्णा, सदसद्विवर्जिता, मधुरा, आह्लादिनी*** इ.अनेकानेक नामांनी विभूषित केलेल्या ***भक्तीठायी कर्म, ज्ञान आणि योग विसांवतात.***</u>"

आनंदभूमी

या स्थितीचे कितीही वर्णन केले तरी ते अपुरेच आहे, असे वाटून ज्ञानेश अजूनही म्हणतात की:

आंगें किर एक जाहालें। परि नामरूपाचें मासले।
होतें तेंहीं आटलें। हरि हर एथें।।९-६१।।अ।।
अहो अर्धनारीनटेश्वरें। गिलित गिलित परस्परें।
ग्रहण जाहालें एकसरें। सर्वग्रासें।।६२।।

"मुळचे हरि आणि हर एकच होते. मध्यंतरी हा जो नामरूपाचा पसारा त्यांनी मांडला होता, तो आटून जाऊन ते पुनः एक होतात, देव व देवी हे भेद मावळून जातात, ईश व जीव यांची मिळणी होते, ती अवस्था भक्तीची आहे. जीवन्मुक्त या अशा स्थितीत विचरत असतात. त्यांच्याठायी अर्धनारी अन नटेश्वर यांनी एकमेकांस गिळून टाकलेले असते, ते पुनः प्रसवण्यासाठी नव्हेच! "

वाच्यजात खाऊनि। वाचकत्वहीं गिळुनि।
ठाकिलीं निदैजोनि। परा एथें।।९-६३।।अ।।
शिवा शिवा समर्था स्वामि। एवढियें आनंदभूमि।
घेपें दीजैं आम्हीं। ऐसें केलों।।६४।।

"अकस्मात सर्व द्वैत मावळून अखंड ***अद्वैतभक्ती*** अशा वेळी प्रकटते. त्या समयी वाच्य-वाचक हे भाव गिळून परा वाणीसुद्धा विराम पावते, अशी **परेच्याही पल्याड राहणारी *सञ्जीवन समाधि* स्थिती** असते. श्रीगुरुंनी आपल्या सामर्थ्याने या अशा वर्णनातीत आनंदभूमिकेवर नेऊन आम्हाला बसविले आहे. त्या ठायीची स्थिती ***"आनंदाचें डोहीं। आनंद तरंग। आनंदचि अंग। आनंदाचें।।"*** अशी असते. सर्व काही ***शिवमय*** अशी ही अवस्था आहे."

अद्वैतभक्तीत स्थिरावलेल्या जीवन्मुक्तांचे असेच वर्णन ज्ञानेश्वरीतही ठिकठिकाणी येते. आपण त्याचा काही भाग आतापर्यंत पाहिला आहे. नंतरही प्रसंगोपात्त उर्वरित जीवन्मुक्तीदर्शन आपण ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून पाहणारच आहोत. असो.

"आत्माच गुरु व शिष्य"

चेतचिं मां चेववलें। निदैलेंचि मां निदविलें।
आम्हींचि आम्हां आणिलें। नवल जी तूझें।।९-६५।।

"अशी स्थिती उपभोगावयास देणाऱ्या आत्मरूपी गुरुदेवा! तू जागृत असणाऱ्यास स्वस्वरूपाची खूण दाखवून जागे केलेस. आणि झोपलेल्यास पुनः झोपवलेस, ते जे नव्हतेच, तेच नाहीसे करून! हे मोठे नवलच म्हणावयाचे!"

आम्हीं निखल मां तूझें। वरि लोभें म्हणसिं माझें।
हें पुनरुक्त साजे। तूंचि म्हणौनि।।९-६६।।
कोण्हाचें कांहिं नेघसिं। आपुलेंहिं तैसांचि नेदिसिं।
कोण्ह जाणें भोगसिं। गौरव कैसें।।६७।।

"तुझी अशी विलक्षण कृपा आहे की आम्हाला आता केवळ आम्हीच उरलो आहोत; आम्ही आमच्याचठायी संपूर्ण झालो आहोत; सहजानंद उपभोगत आहोत. आमचे सर्वस्व तूच आहेस! आमच्या अंतर्बाह्य तुझ्या स्वरूपाव्यतिरिक्त - सच्चिदानंदाशिवाय इतर काहीही नाही. अशा अद्वैतभावातही, द्वैतत्व प्रकटवून, तू गुरु व आम्ही शिष्य असा संबंध आणणे ही तुझे ऐश्वर्य प्रकटवणारी गोष्ट आहे. ही तुझी तुलाच शोभून दिसते. एक गुरु-एक शिष्य असा हा ऋणानुबंध प्रकट करतांना तू स्वतःचा विभाग केला नाहीस की कोणाचे काही घेऊन तो बंध निर्मिला नाहीस. असे असतांनाही गुरु-शिष्याची ही गोष्ट म्हणजे मोठी किमयाच तू केली आहेस."

गुरुत्वें जेव्हडा चांगु। तेव्हडाचिं तारुनि लघु।
गुरुलघु जाणें तो पांगु। तूझा करीं।।९-६८।।अ।।

शिष्या देतां वांटे। अद्वैताचां समो फुटें।
तऱ्हैं काह्यां होति भाटें। शास्त्रें तूझिं।।६९।।

"तुझ्याठायीचे गुरुत्व तसे विशाल आहे. परंतु शिष्याला संसारनदाच्या पैलतीरी घेऊन जाणारी हलकीफुलकी नाव जर कोणती असेल, तर ती तूच! तुझे हे माहात्म्य जाणणारा तुझाच होऊन जातो. आपल्या निरंजन अवस्थेची तूच शिष्याला प्राप्ती करून देतोस. पण तुझी निरंजन स्थिती तेव्हाही तशीच्या तशीच अबाध राहते, हे नवल जाणून सर्व शास्त्रे तुझी भाट झाली आहेत. शिष्याला आपल्या अद्वैताचा वाटा करून देतोस आणि त्याच्या *मी-तूरूपी* संसाराचा वेच करतोस असा सुहृद एकमात्र तूच आहेस."

किंबहु ये दातारां। मी तूं यांचा संसारां।
वेंचूनि होसि सोएरा। तेणेंचि तोखैं।।९-७०।।अ।।

"शिष्यास महासुख देणारा आणि त्याचे संसारदुःख हरण करणारा दाता तुझ्यासारखा कोणी नाही. आणि हे दान देऊन त्यामुळे संतोषणारा कोणी असला, तर तूच आत्मराज आहेस."

ज्ञानेश्वरांची अनुपम शैली

आत्म्याचा मुळचा अद्वैतभाव आणि तरीही गुरु तोच आणि शिष्यही तोच, असा त्याच्याठायी विलसणारा ***अद्वैताद्वैतभाव*** यांचे हे मनोरंजक चित्र ज्ञानेश जीवन्मुक्तावस्थेचे कथन करण्याच्या ओघात चितारून जातात. त्यांच्या अनुपम काव्यात्म-वाङ्मय-साहित्यशैलीचा रसास्वाद घेतल्यावर आपल्या मूळ विषयाकडे म्हणजे गीताश्लोकसंगती सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीच्या पाचव्या अध्यायातील उर्वरित भागाकडे वळू या.

समारोप

अशा रीतीने आपण निरीक्षिण्यास घेतलेला **कर्मपथ** हा या **कर्मपथदर्शन** नामे **दशम स्कंधा**तून आता जवळजवळ आक्रमून झाला आहे. त्याचा जो काही उर्वरित भाग भक्ति-योगादींचा आहे, तो पाहण्यासाठी गीतेच्या ५-*२७ते २९* या श्लोकांद्वारे ***एकादश स्कंध - योगवैभव*** याचा आता उपोद्घात होणार आहे. त्यातल्या पुढच्या ***उन्मेष क्र. ४४ - योगविभवभाण्डार*** याकडे त्यासाठी वळू या.

ज्ञानेश्वर आधीच आपल्याला या सगळ्या निरूपणात रमवत आहेत. आता येणारा भाग तर आपणा सर्वांची जी त्यांच्या योगविषयक निरूपणाबाबतची उत्कंठा व जिज्ञासा आहे, तिला सर्वथैव न्याय देणाराच आहे. तर जाऊ या रमायला त्यांच्या योगवैभवाकडे - त्या सर्व योगांच्या भांडाराकडे ज्यात योगदर्शनाची अमूल्य रत्ने अगणित भरलेली आहेत त्याकडे!

:::एकादश स्कंध:::
::योगवैभव::(४४-४६)
(पृ.क्र.७११ते ८३०)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४४-१::
::योगविभवभाण्डार::
:::पंथराज:::

कर्मयोग:"स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्या.."-७११
"तैसा साङ्ख्याहूनि प्रांजला"
"तैं अद्भुतपण स्नेहाचें"
पंथराजाचा ओनामा:कर्मत्याग न करता साधावयाचा योग-७१२
गीतेतील ध्वनित योग
सहाव्या अध्यायास प्रारंभ
"म्हातारा नासिलां मोहें"-७१३
योगविभवभांडार:"जेथूनि गीतावल्लीचे ठाणे। प्ररोह पावें"
"हलुवारपण चित्तां। आनौनियां"
संन्यासाश्रम व खरा संन्यास -७१४
कर्म, संन्यास व योग यांची एकवाक्यता
खरा संन्यासी हाच योगीश्वर
"अग्निसेवा न संडितां। कर्माचिं रेखा नोलांडितां"-७१५
योगाचा धावता आलेख:योगाची सिद्धी कर्मानेच
योगाचलाचे रूपक
योगारूढ:योगारूढाची लक्षणे
आपणच आपला उद्धार करावा-७१६
बंधाचे कारण
देहबुद्धी
योग्याचे वर्णन-७१७
"जीवो ब्रह्मैव ना परा"
"परमात्मा संचला। आदिंचि आहें"
"तंव ज्ञान तैं तोचिं"-७१८
आत्मरति
समबुद्धी
योग्याचे असाधारणपण-७१९
भगवंतांची लक्षणे
कृष्णार्जुनप्रेम:"ब्रह्मविद्या किजैल उघडीं"
द्वैताचा पडदा-७२०
"मोहाचिं त्रिपुटी। नाचों लागें"
"पूर्णाहिं परि लागें। अवस्था जेयाचिं"
अर्जुन म्हणजे आत्मनिवेदनाखालील सख्यभावाची मातृकाच!
ज्ञानदेवांच्या निरूपणशैलीचे कौतुक-७२१
"शेखिं उपेगां गेला। पांडवांसिं"
पंथराज:"तन्हैं ब्रह्म मियां होईल"
"सोऽहंभावमहुरैं। मोडौनि आला"-७२२
"अर्जुना हां अवधारीं। पंथराजु"
पंथराज आरेखन
योगाभ्यास:बंधत्रय-७२३
प्राणापानप्रक्रिया
औटवळणी कुंडलिनी:"नागाचें पीलें। कुंकुमैं नाहालैं"-७२४
कुंडलिनी जागृती
कुंडलिनीच्या उत्थापनादी क्रिया
चक्रनाड्यादी प्रक्रिया
कुंभकाची सिद्धी-७२५
"पिंडाचेनि आकारैं। कलाचिं अवतरैं"
"जैं वेलिं कुंडलिनी चंद्र पीएं"
"परि लाघव एं वायूचें"-७२६
समारोप

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४४-१

गीता:
५:२७-२९, ६:१-१०
ज्ञानेश्वरी:
५:१६२-१८०,६:१-१३,२६-२७,३७-५२,६१-१५२,२११-२२३,२२८-२६८

::एकादश स्कंध::
::योगवैभव::

::उन्मेष ४४-१::
::योगविभवभाण्डार::
:::पंथराज:::

कर्मयोग::::

"स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षु...।..ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति।।५-२७-२९।।गी।।"

अर्जुनाचा मुख्य प्रश्न

श्रीकृष्ण जीवन्मुक्तीचे योगरहस्य प्रकटवतांना सांगतात की:

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ।।५-२७।।
यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः।
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः।।५-२८।।
भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति।।५-२९।।

" विषयांना आपले चित्त न देता, दोन्ही भुवयांच्या मध्यभागी दृष्टी ठेवावी. नासिकेतून विचरणाऱ्या प्राण व अपानांना सम करावे. इंद्रिये, मन व बुद्धी यांचे नियमन करावे. मोक्ष हेच साध्य ठेवून इच्छा, भय व क्रोध यांचा नाश करावा. म्हणजे मुक्ती मिळते. यज्ञ व तप यांचा भोक्ता आणि सर्व लोकांचा महेश्वर असा सर्व भूतांचा सुहृद जो मी आहे, त्या मला या योगयुक्तीच्या द्वारे जो जाणतो, तो शांती पावतो."

"तैसा साङ्ख्याहूनि प्रांजलां"

यमनियमांचे डोंगर उल्लंघून अभ्यासाचे समुद्र लंघून जाऊन ज्यांनी स्वतःस त्या निरञ्जनाच्या रूपात मोजून घेतले, ते चालतेबोलते परमेश्वरच झाले. हे श्रीकृष्णांचे बोल संक्षेपाने योगयुक्ती कथन करणारे ऐकल्याबरोबर अर्जुन सावधान झाला. ज्ञानेश म्हणतात:

तैं देखिलियां कृष्णें जाणितलें। मग हांसौनि पार्थातें म्हणितलें।
हें काईं पां चित्त उवाईलें। इयें बोलिं तूझें।।५-१६२।।
तंव अर्जुनु म्हणे देओ। परचित्तलक्षणांचां राओ।
भला जाणितला जी भाओ। मानसु माझां।। १६३।।
मियां जैं काइं विवरूनि पुसावें। तैं आदिंचि कलिलें देवें।
तन्हैं बोलिलें तैंचि सांघावें। विवल करूनि।।१६४।।

अर्जुन सतर्क झाल्याचे जाणून श्रीकृष्ण हसले व म्हणाले, "देवा! तू तर मनकवड्यांचा राजाच आहेस! माझ्या मनींचा भाव तू अगदी बरोबर ओळखलास. मी जे जे विचारतो, ते ते तुला आधीच कळते.तरी तू आता जे सांगणार होतास, ते स्पष्ट कर."

यरविं तरिं अवधारां। जो दाविला तुम्हीं अनुसारा।
तो पव्हणेयेंहूनि पायउतारा। सोहोपा जैसां।।५-१६५।।
तैसां सांङ्ख्याहूनि पाहा प्रांजलां। तन्हैं आम्हां सारिखियां अभोलां।
एथ आहाति काहिं प्रकाला। तो साहों ये वर।।१६६।।
म्हणौनि एक हेल देवा। तोचि पडताला घेयावा।
विस्तरैल तन्हैं सांघावा। साद्यंतुचिं।।१६७।।

"तू हा जो योगमार्ग सांगितलास, तो सांख्यमार्गाहून सोपा वाटतो. नदीवरील उथळ पाण्याच्या भागातून पायी जाऊन ती पार करणे हे पोहत जाऊन नदी पार करण्यापेक्षा सोपे असते ना! तसेच हे या योगमार्गाचे पण वाटते. आमच्यासारख्या लहानांना जरी या मार्गे वेळ लागत असला, तरी तोच श्रेयस्कर आहे. म्हणून हा योगच तू सविस्तर सांग. त्याचे तू एकवार साद्यंत वर्णन कर."

"तैं अद्भुतपण स्नेहाचें"

तेव्हा कृष्ण म्हणतात:

तंव कृष्ण म्हणति हों कां। तुज हां मार्गु गमलां नीकां।
तन्हैं काइ जाहालें आइकिजो कां। सुखें बोलों।।५-१६८।।
अर्जुना तूं परियससिं। परिसौनि अनुष्ठिसिं।
तन्हैं आम्हांसिचिं वानि काइसिं। सांघैं बापां।।१६९।।

अर्जुनाच्या जिज्ञासूवृत्तीने प्रसन्न होत श्रीकृष्ण म्हणाले, "तुला हा योगमार्गच उत्कृष्ट वाटला काय! मग काय मी तुला आनंदाने त्याचे सर्व रहस्य स्पष्ट सांगतो. अर्जुना! नीट अवधानपूर्वक तू सर्व सांगितलेले ऐकून घेतोस आणि त्याप्रमाणे आचरणात आणतोस. मग आम्ही सांगण्यास काचकूच का करावयाची!"

आदिंचि चित्त मायेचें। वरि मिख जाहालें पढियंतयाचें।
आतां तैं अद्भुतपण स्नेहाचें। कवण जाणें।।५-१७०।।
तैं म्हणों कारुण्यरसाचिं वृष्टि। कि नवेया स्नेहाचिं सृष्टि।
हें असों नेणिजें दृष्टि। हरीचिं वानूं।।१७१।।
जैं अमृताचिं ओतलीं। कि प्रेमचिं पेऊनि मातलीं।..।।१७२।।

"आधीच कृष्णांची अर्जुनावर ममता होती. त्यातून तो त्यांचा फार लाडका होता. मग त्यांच्या त्या अद्भुत संवादात उणे ते काय राहणार! त्या लोकविलक्षण परस्पर स्नेहाचे वर्णन करावे तरी कसे! त्यास श्रीहरीच्या कारुण्यरसाची वृष्टी म्हणावे की नूतन प्रेमाची सृष्टी म्हणावे! श्रीकृष्णाच्या अर्जुनाकडे पाहण्याच्या दृष्टीस कसे वाखाणावे, कळत नाही. ती दृष्टी जणू अमृताचीच घडवलेली होती आणि अर्जुनावरील प्रीतीने उन्मत्त झालेली होती."

....। म्हणौनि अर्जुनुमोहें गुंतिलीं। नेघों नेणें।।५-१७२।।
हें बहू जैं जैं जल्पिजैल। तेथ कथेसिं चि फांकु होईल।
परि तैं स्नेह रूपां नै येइल। बोलवेरीं।।१७३।।

"म्हणून अर्जुनाच्या मोहपाशात गुंतलेली त्या जगन्नियंत्याची दृष्टी त्याच्यापासून दूर होण्याचे जाणीच ना! असे किती म्हणून त्या प्रेमदृष्टीचे वर्णन करावे! त्यामुळे अवांतर विस्तारच फार होत जाऊन मूळ कथावस्तू लांबच राहील आणि वर ते सगळे वर्णनही बोलांनी करता येण्यासारखे नसल्याने अपूर्णच राहील!"

पंथराजाचा ओनामा::::

कर्मत्याग न करता साधावयाचा *योग*

ज्ञानेश्वर पुढे म्हणतातः

म्हणौनि विसुरां काइं एणें। तो ईश्वरु आकलावां कवणें।
जो आपुलें मान नेणें। आपणचिं।।५-१७४।।
तऱ्हैं माघिलां ध्वनि आंतु। मज गमलां सांवियांचिं मोहितुं।
जैं बलात्कारैं असें म्हणतु। परियसैं बापां।।१७५।।
अर्जुना जेणें जेणें भेदें। तूझें कां चित्त बोधें।
तैसें तैसें विनोदें। निरूपिजैल।।१७६।।

"परमेश्वर व अर्जुन यांच्या प्रेमसंबंधांचे वर्णन करता येत नाही, यात काय आश्चर्य! जो स्वत:चेच मोजमाप जाणत नाही, अशा त्या परमेश्वरास कोणी आकळावे! पण त्यांच्या बोलण्यावरून मला आपले असे वाटते आहे की श्रीकृष्ण अर्जुनावर इतका मोहित झाला आहे की त्याला तो हे योगरहस्य मुद्दामच सांगण्यास उद्युक्त झाला आहे."

तो काइंसयां नाम योगु। तेयाचां कवणु उपेगु।
अथवा अधिकारप्रसंघु। कवणा एथ।।५-१७७।।
ऐसें जैं जैं काईं। उक्त असें इयें ठाईं।
तैं आघवेंचिं पाईं। सांघैन आतां।।१७८।।
तूं चित्त देऊनि अवधारिं। आइसें म्हणौनि श्रीहरि।
बोलिजैल तैं फुडारिं। कथा आहें।।१७९।।

कृष्ण परत अर्जुनाला म्हणतो की, "मी ते सगळे रहस्य तुला सांगतो. तू मनापासून ऐक. तुला आवडेल अशा सोप्या भाषेत ते तुला मी समजावून देतो. योग कशास म्हणतात, त्याचा काय विनियोग आहे आणि त्याचा अधिकारी कोण असतो, असे सर्व काही सांगतो. तू नीट लक्ष दे."

<u>श्रीकृष्णु अर्जुनासिं संघु। न सांडौनि सांघैल योगु।</u>
<u>तो व्यक्तु करूं प्रसंगु। म्हणे निवृत्तिदासु।।१८०।।</u>

"असे म्हणून श्रीहरी पुढील निरूपण करू लागले. ***कर्मत्याग न करता योगसाधना कशी करावी,*** हे ते अर्जुनास सांगत आहेत. मी निवृत्तिदास ज्ञानदेव तुम्हाला ते स्पष्ट करून सांगेन."

"जैं देहिंचिं ब्रह्मत्वा पावलें" ते कोणत्या मार्गाने हे जाणून घेण्यास अर्जुन अतीव उत्सुक आहे. ***"यमनियमांचे डोंगर आणि अभ्यासाचे सागर"*** क्रमून जाऊन जे ब्रह्मत्व पावले आणि ***"सांचाचेचि रूप होऊनि ठेलें"***, ते योगी व त्यांची चर्या पाहण्यास आपणही प्रथमपासूनच अति उत्सुक आहोत.गीतेचा *सहावा* अध्याय संपूर्णपणे याच विषयास वाहिलेला आहे. **अभ्यासयोग** म्हणून गीतेच्या योगास गौरवले जाते. **पंथराज वा क्रमयोग** म्हणून ज्ञानेश त्यास संबोधतात. त्या योगाचे सूतोवाच *पाचव्या* अध्यायी श्रीकृष्णांनी केल्यावर अर्जुनु ***"सुदंशु म्हणौनि चमत्कारिला."***

गीतेतील ध्वनित योग

"पिंडें पिंडाचा ग्रासु" असा जो ***"नाथसंकेतिंचां दंशु"***, तो प्रकट करण्यास व ऐकण्यास आपण सर्वच जण उत्सुक आहोत. महाविष्णुने ज्या संकेताचे रहस्य खुणावले, तो सगर्भ अभिप्राय श्रोतेजनांसाठी ज्ञानदेव ***"तेयां ध्वनिताचें केणें सोडूनि"*** व ***"यथार्थाची घडी उपलवूनि"*** आपल्या प्राज्ञबुद्धीची झळाळी दाखवत निरूपिणार आहेत.

योग्य त्या अधिकारी आणि भगवत्कृपेस पात्र असणाऱ्यांनाच त्याचे खरे मर्म जाणवणार आहे. व्यावहारिक बुद्धीस अगम्य असे ते गूढ रहस्य समजून घेण्यास आपण पात्र जरी नसलो, तरी ज्ञानेशकृपेच्या सामर्थ्याची मागणी करत आपण त्यांचे बोट धरून पुढे जाऊ या! आपल्या पदरी दैवयोगे जे पडावयाचे असेल ते पडेल! पण आपण आपला हा अभ्यास मात्र सोडता कामा नये. गीता - ज्ञानेश्वरीचा अभ्यास जन्मजन्मांतरी चालू राहणारा आहे. तरी त्या अभ्यासास न विसंबता श्रद्धापूर्वक आपणास आता काय काय उलगडा होतो, तो बघू या!

सहाव्या अध्यायाचा प्रारंभ

योगविभवभाण्डार आता आपल्यापुढे खुले केले जाणार आहे, या कल्पनेने संजय मनोमन हर्षित झाला आहे. तो धृतराष्ट्रास म्हणू लागतो की:

मग रायातैं म्हणें संजयो। तोचिं अभिप्राओ अवधारिजो।
कृष्ण सांघति जो। योगरूपु।।६-१।।
साहाजें ब्रह्मरसाचें परगुणें। केलें अर्जुनालागिं नारायणें।
किं तैंचिं अवसरें पाहुणें। पातलों आम्हीं।।२।।
कैसिं देवाचिं थोरि नेणिजैं। जैसें ताहानैलियां तोय सेविजैं।
किं तैंचिं चविं करूनि पाहिजैं। तंव अमृत आहे।।३।।
तैसें आम्हां तुम्हां जाहालें। जैं आडमुठीं तत्त्व फांवलें।...।।४।।

संजय राजा धृतराष्ट्राला सांगू लागला, "पाचव्या अध्यायी योगाचे सूतोवाच जे झाले आहे, त्यामागील रहस्य आता श्रीकृष्ण सांगणार आहेत. योगाच्या त्यांच्या निरूपणामागील परमगूढ आता ऐका. अर्जुनासाठी त्या श्रीनारायणाने ब्रह्मरसाचा आविष्कार केला आहे. योगायोग असा की त्याच वेळी अवचित आपणही पाहुणे म्हणून तेथे पोहोचलो आहोत. दैव किती कृपाळू आहे पाहा. जसे तहानेने जीव व्याकुळ झालेल्या मनुष्याने पाणी पिऊ लागावे आणि त्यास तोच कळून यावे की ते पाणी नसून अवीट गोडीचे अमृत आहे, तसे आपले झाले

आहे. कारण आपल्या भाग्यात नसूनही हे ***ब्रह्मज्ञान*** व ते प्राप्त करण्याचा मार्ग आपणापुढे आले आहेत."

"म्हातारा मोहें नासिलां"

...। तंव धृतराष्ट्रें म्हणितलें। हें न पुसों तूंतें।।६-४।।
तेयां संजया एणें बोलें। रायाचें हृदय चोजविलें।
जैं अवसरिं आहें ओतलें। कुमारांचियां।।५।।

परंतु धृतराष्ट्रास संजयाचे हे बोलणे रुचले नाही. त्याला फक्त माझे आणि ते काय करताहेत, यापलीकडे जिज्ञासा नव्हती. संजयास फटकारत तो म्हणाला, *"तुला हे सगळे चोंबडेपणाने सांगायला कोणी काही विचारले आहे का!"*

हैं जाणौनि मनिं हांसिलां। म्हणे म्हातारां मोहें नासिलां।
यरविं बोलु तन्हैं भला जाहला। अवसरिं इयें।।६-६।।
परि तैं तैसें कैसेनि होईल। जात्यंधा कैसें पाहैल।
तेंविंचिं एरु सें घेईल। म्हणौनि बिहें।।७।।

संजयास लागलीच कळून आले की या धृतराष्ट्रास पुत्रमोहाने घेरलेले आहे.म्हणून त्याला हे विषयांतर अजिबात रुचत नाहीसे दिसते. त्यावर तो मनोमन हसला. तो विचार करू लागला, "हा म्हातारा पुत्रमोहाने कामातून गेला आहे. एवढी उत्कृष्ट गोष्ट समोर येत आहे. स्वतः योगेश्वर श्रीकृष्ण योगरहस्य उलगडून सांगणार आहेत. पण याला ते कसे रुचेल! जात्यंधास सूर्य कधीतरी दिसेल काय!" पण आपल्या बोलण्यात असे विचार डोकावले, तर धृतराष्ट्राचा रोष होईल, म्हणून तो सावधपणे बोलू लागला.

योगविभवभाण्डार::::

जेथूनि गीतावल्लिचें ठाणें। प्ररोह पावें"

परि आपण चित्तिं आपुलां। निकियांवेरिं संतोखलां।
जैं तो संवादु फांवला। कृष्णार्जुनांचा।।६-८।।

श्रीकृष्णांचे ते योगाचे सूतोवाच ऐकून संजयास झालेला आनंद कसा लपून राहील!

तेणें आनंदाचें धालेंपणें। साभिप्राय अंतष्करणें।
आतां आदरेंसिं बोलणें। घडैल तेयां।।९।।
तो गीतेमाझिं षष्ठीचां। प्रसंगु असे आयणिचां।
जैसा क्षीरार्णविं अमृताचां। निवाडुं जाहाला।।१०।।
तैसें गीतार्थाचें सार। जैं विवेकसिंधूचें पार।
नाना योगविभवभांडार। उघडलें कां।।११।।

"आपल्याला कृष्णार्जुनांचा संवाद ऐकण्यास मिळत आहे, या विचाराने संजयास खूप संतोष वाटू लागला. त्याला आनंदाचे उधाण आले. त्या भरात तो आता श्रीकृष्णांचा अभिप्राय आता अंतःकरणापासून प्रकट करील. *योगाविषयीच्या आवडीने भारावून गेलेला संजय आता जो प्रसंग व्यक्त करणार आहे, तो गीतेच्या सहाव्या अध्यायातील भाग तसाच महत्त्वाचा आहे.* क्षीरसमुद्राचे मंथन केल्यावर जसे अमृत प्राप्त झाले, तसे गीतार्थाचे सारच सहाव्या अध्यायाच्या रूपाने प्रकटले आहे. विवेकसिंधूच्या पैलतीरास नेऊन पोहोचवणारा विचार त्यात व्यक्त होतो. "

योगसमृद्धिरूप भांडार असाच हा अध्याय आहे. त्याचे दर्शन स्वये श्रीकृष्णच त्या योगभांडाराचे द्वार उघडून आपणास घडविणार आहेत. आणि आपणास हवी तितकी अमूल्य रत्ने मनास हवी तितक्या वेळ मुक्त हस्ते वेचू देणार आहेत.

जैं आदिप्रकृतिचें विसंवणें। जैं शब्दब्रह्मासिं न बोलणें।
जेथूनि गीतावल्लिचें ठाणें। प्ररोह पावें।।६-१२।।
***तो अध्यावो हा साहावा।* वरि साहित्याचियां बरवां।**
सांघिजैल म्हणौनि परिसावा। चित्त देऊनि।।१३।।

"आदिमाया जेथे विसावते; शब्दब्रह्म ज्यास पाहून मुके झाले; गीतावल्लीचा उगम आणि विस्तार ज्यापासून होतो, ते त्या खजिन्याचे ठिकाण म्हणजे *सहावा* अध्याय होय."

"हलुंवारपण चित्तां। आनौनियां"

असा जो *सहावा* अध्याय आहे, त्याचे रूप अलंकारांनी सजवून, साहित्यातील अत्युत्कृष्ट कलाकृती ज्ञानदेव आता आपणापुढे प्रकटवणार आहेत. तरी भाविक श्रोत्यांनी मनःपूर्वक लक्ष देऊन त्यांचे हे अप्रूप अपूर्वाईचे बोल ऐकण्यास चित्त द्यावे. त्या बोलण्याचा ओघ आपल्या अंतर्यामात मुरवण्यास चित्तही तसेच हळुवार हवे.

ज्ञानेश म्हणतातः

ऐसें हलुंवारपण जन्हैं येईल। तन्हैंच हें उपेगां जाईल।
यरविं आघविं गोठी होईल। मुकेयांबहिरेयांचिं।।६-२६।।
परि तैं असो आतां आघवें। न लगें श्रोतेयांसि कडसावें।
जैं एथ अधिकारियें स्वभावें। निष्कामकाम।।२७।।

"चित्तास जर अशी संवेदनशीलता येईल, तरच माझे हे बोल सार्थकी लागतील. नाही तर मुक्याने बोललेले बहिऱ्याने ऐकावे, तसे हे सगळे निरूपण ठरेल. पण ते आता राहू द्या. आत्मबोधाच्या ओढीने ज्यांनी संसाराची कुरवंडी केली आहे, असे निष्काम निरिच्छ पुरुषच या बोलांस ऐकण्यास योग्य आहेत. म्हणून श्रोत्यांची अधिक परीक्षा करणे न लगे! "

आइकां *यश श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य।*
***हें साहीं गुणवर्य* । वसति जेथ।।६-३७।।**
म्हणौनि तो भगवंतु। जो निःसंघाचां सांगातु।
तो म्हणें पार्था दत्तचित्तु। होई आतां।।३८।।

"अशा सुयोग्य सुश्रुत श्रोत्यांना नीट उमगावे असेच मी कथन करणार आहे. अरूपाचे रूप मी प्रकटवणार आहे. सद्गुरुकृपांकित असा मी अतींद्रिय असणारे आत्मतत्त्व प्रत्यक्ष इंद्रियांकरवी भोगवणार आहे, ते ऐका! ***यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य*** या षट्गुणसंपत्तीचा स्वामी असा तो भगवान श्रीकृष्ण,तो निःसंगाचा सोबती - पार्थास म्हणू लागला की, "ऐक. चित्त माझ्या बोलण्याकडे दे."

संन्यासाश्रम व खरा संन्यास

तो पुढे म्हणाला:

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः।
स सन्न्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः।।६-१।।

"कर्मफलाची आशा न ठेवता कर्तव्य असे कर्म जो करतो, तोच खरा संन्यासी होय. आणि तोच खरा योगी पण होय. अग्निहोत्रादी गार्हस्थ्य धर्मास त्यागणारा किंवा कोणतेही कर्म करणार नाही, या निर्धाराने स्वस्थ बसून राहणारा परिव्राजक जरी असला, तरी तो ना तर खरा संन्यासी आहे, ना खरा योगी!"

कर्म व योग यांची एकवाक्यता

याप्रमाणे निःसंदिग्ध शब्दात भगवंतांनी लौकिकार्थी प्रसिद्ध असणाऱ्या चतुर्थाश्रमाची वा संन्यासाश्रमाची योगमार्गाच्या दृष्टीने खरी पायरी दाखवून दिली आहे. त्याचप्रमाणे खऱ्या संन्यासाचे योगरूप प्रकट करत ते पुढे असेही म्हणतात की:

यं सन्न्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव।
न ह्यसन्न्यस्तसङ्कल्पो योगी भवति कश्चन।।६-२।।

"हे अर्जुना! असा जो निष्कामकर्मयोग आहे, त्यासच संन्यास म्हणावे आणि असा संन्यासच खराखुरा योगमार्ग आहे. ज्या मनुष्याचा कर्मफलाविषयीचा संकल्प संन्यसिला गेलेला नाही, तो *संन्यासी* वा *योगी* कधीच होऊ शकत नाही."

चतुर्थाश्रमाचे असे मूल्यमापन करणाऱ्या सहाव्या अध्यायीं प्रथमारंभी येणाऱ्या या श्लोकांची काही विशिष्ट चिकित्सा श्रीमद्शंकराचार्य कशी करतात, ते जिज्ञासूंनी शांकरभाष्यात पाहावे. हे श्लोक लौकिक व शास्त्रोक्त संन्यासावर मर्माघात करणारे दिसत असल्याने त्यांनी त्यांच्या सरल अर्थाचा विस्तृत प्रमाणावर प्रतिवाद केलेला आहे व युक्तिवाद वापरून म्हटले आहे की श्रीकृष्ण शास्त्रोचित वेदोक्त अशा चतुर्थाश्रमाचा अधिक्षेप करणे शक्य नाही.

त्यांचे हे म्हणणे युक्तिसंगत जरी असले, तरी श्रीकृष्णांनी तथाकथित - शास्त्रोक्त म्हणा हवे तर- अशा मायावी संन्यासाचा निषेध केला असल्यास त्यात वावगे ते काय असणार! *कर्मफलाचा संकल्प त्यागून कर्मे आचरणारा तो खरा संन्यासी वा योगी, अशी श्रीकृष्ण येथे व्याख्या करतात.* त्या व्याख्येत बसेल तो त्यांच्या दृष्टीने संन्यासी होय. यात चतुर्थाश्रमी बसलेच पाहिजेत, हा केवळ आग्रहच उरतो असे आपणास जाणवते.

या व्याख्येत *लौकिक संन्यास* बसत नसला, तरी केवळ यामुळे श्रीकृष्णांनी शास्त्रोक्त संन्यास घेऊ नये, असे मत प्रदर्शित केले आहे, असे काही होत नाही. वर्णाश्रमास उचित कर्तव्य करावे, असेच गीतेचे सांगणे आहे.

फलासक्तीचा त्याग करून असे कर्तव्य केल्याने खरा संन्यास सिद्ध होतो, एवढेच येथे महत्त्वाचे आहे. फलासक्ती न सोडता वर्णाश्रमास उचित अशा संन्यासाश्रमाचे फल काय हा प्रश्न शास्त्रकारांनी सोडवायचा आहे. मुमुक्षुत्वाची प्राप्ती असे त्याचे फल असावे, असे समजण्यास काय प्रत्यवाय असावा, याचाही जिज्ञासूंनी जरूर विचार करावा. असो.

खरा संन्यासी हाच योगीश्वर

आता ज्ञानेश या श्लोकांबाबत काय म्हणतात, ते पाहू या:

आइकें योगी आणि संन्यासीं जनीं। हें एकचि सिनानें झनै मानि।
यरवि विचारिजति जंव दोनिं। तंव एकुचि तैं।।६-३९।।
सांडिजैं दुजेयां नामाचां आभासु। तन्हैं योगु तोचिं संन्यासु।
पांतां ब्रह्मिं नाइं अवकाशु। दोहिंमाजिं।।४०।।
जैसें नामाचेनि अनारिसेपणें। एकां पुरुषांतैं आलवणें।
कां दोहिं मार्गीं जाणें। एकाचि ठाईं।।४१।।
ना तन्है एकचि उदक साहाजें। परि सिनानां घटीं भरिजैं।
तैसें भिन्नत्व हें जाणिजैं। योगसंन्यासाचें।।४२।।
आइकैं सकल संमतें जगिं। अर्जुना गां तोचिं योगी।
जो कर्मैं करूनि रागि। नोहेचिं फलीं।।४३।।

"कोणी *योगी व संन्यासी* हे जरी वेगवेगळे मानत असले, तरी नीट विचार केला असता सहजच दिसून येते की ते दोन्ही भिन्न नाहीत. योगी व संन्यासी हे दोन शब्द वेगळे असले, तरी त्यांच्यामुळे एकाच गोष्टीचा बोध होतो. त्या एकाच गोष्टीची ही दोन नामे आहेत. ब्रह्मप्राप्तीच्या दृष्टीने पाहू गेल्यास त्यांच्यात काहीच तफावत नाही. वेगवेगळ्या नावांनी एकाच पुरुषास जसे बोलवावे किंवा दोन वेगवेगळ्या मार्गांनी शेवटी जसे एकाच ठिकाणी पोहोचावे, अथवा एकच उदक जसे वेगवेगळ्या घटात भरावे; तेवढाच फरक योग व संन्यास यांच्यात आहे. *कर्मे करूनही त्यांच्या फळांची आसक्ती न धरणाऱ्यांस योगी म्हणतात,* असे सर्वसंमतीनुसार अनेकानेक शास्त्रांनी एकमुखाने सांगितलेले नाही का! कर्मफलाशेचा त्याग हाच संन्यास व हाच योग आहे, या धर्मबिरुदाची ध्वजा सर्व शास्त्रे आदरपूर्वक मिरवतात, हे सर्वांस सहसा ज्ञात असेच आहे."

जैसिं मही हें उद्भिजें। जनिं अहंबुद्धिविण साहाजें।
आणि तेथिंचें तियें बीजें। अपेक्षिजैना।।६-४४।।
तैसा आम्नायाचेनि आधारें। जातिचेनि अनुकारैं।
जैं जेणें अवसरैं। करणें पावैं।।४५।।
तैं तैसेंचि उचित करिं। परि साटोपु नोहें शरीरीं।
आणि बुद्धिहिं करौनि फलावैन्हिं। जायेचिना।।४६।।
ऐसा तोचि संन्यासी। पार्था गां परियेसिं।
तोचि भंरवसेनिसिं। योगिश्वरु।।४७।।

"जशी ही धरणीमाता अंकुरांना जन्म देते, पण मातृत्वाचा अभिमान धरत नाही आणि त्या अंकुरांचे वृक्ष होऊन त्यांना लागलेल्या फळांची अपेक्षाही करत नाही, त्याप्रमाणे वेद-वर्णविहित अशी

प्रसंगोपात्त सर्व कर्मे करणारा व त्या कर्मांच्याठायी अहंकार वा फलाशा न राखणारा, एवढेच काय! तर कर्मफलास बुद्धिद्वारेही न स्पर्शिणारा असा पुरुषच खरा संन्यासी असतो. आणि हे अर्जुना! तो तसा पुरुषच खरा योगीश्वर असतो''.

"अग्निसेवा न संडितां। कर्माचिं रेखा नोलांडितां"

वांचूनि उचित कर्म प्रासंगिक। तेयांतैं म्हणें हें सांडीन बद्धक।
तन्हैं टांकोंटाकीं आणिक एक। मांडिचिं तो।।६-४८।।
जैसा झांलुनियां लेपु एकु। सवेंचिं लाविजें आणिकु।
तैसेंनि आग्रहाचा पाईकु। विचंबें वायां।।४९।।
गृहस्थाश्रमाचें ओझें। कपालीं आदिंचि आहें साहाजें।
कीं तैंचि संन्यासु सवां ठेविजैं। सरिसें पुड्डुति।।५०।।

"कोणी कोणी विहित कर्म प्राप्त झाले असता ते बंधन करील या भितीने त्याचा त्याग करतात.म्हणून त्याचा त्याग करतात. पण लागलीच दुसरे कर्म करण्यास सिद्ध होतात. जसा एक लेप धुवून टाकायचा आणि पुनश्च दुसरा लेप फासायचा, तसाच त्यांचा हा प्रकार असतो. त्यात व्यर्थ श्रमच ठेवलेले आहेतच. माथ्यावरचे गृहस्थाश्रमाचे ओझे कर्मबंधनांना घाबरून फेकून द्यायचे आणि संन्यासाश्रम स्वीकारून त्यातल्या कर्मांचे ओझे वागवत बसण्याने कोणता लाभ पदरात पडणार आहे!''

म्हणौनि अग्निसेवा न संडितां। कर्माचिं रेखा नोलांडितां।
आथिं योगसुख स्वभावतां। आपणपांचिं।।६-५१।।
आइकैं संन्यासी तोचि योगी। ऐसिं एकवाक्यता जैं जगिं।
गुढि उभविलीं अनेगिं। शास्त्रांतरीं।।५२।।

"त्यापेक्षा अग्निहोत्र व गृहस्थधर्म यांचा त्याग न करता प्राप्त कर्मे कर्तव्य म्हणून करत जाण्याने अनायासे प्राप्त होणाऱ्या योगसुखाचाच आश्रय करणे हितावह नाही का! आणि योगी तोच संन्यासी असतो, असे अनेकानेक शास्त्रांनी एकमुखाने सांगितलेले नाही का! कर्मफलाशेचा त्याग हाच संन्यास व हाच योग आहे, या धर्मबिरुदाची ध्वजा सर्व शास्त्रे आदरपूर्वक मिरवतात, हे सर्वांस सहसा ज्ञात असेच आहे.

योगाचा धावता आलेख ::::

योगाची सिद्धी कर्मानेच

कर्मांची महती सांगत श्रीकृष्ण म्हणतातः

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते।।६-३।।

"योग प्राप्त व्हावा अशी इच्छा धरणाऱ्या मुनीस कर्मच आवश्यक ठरते. योगारूढ झाल्यावर त्यास मनोनिग्रह हे फलित आहे.''

या श्लोकानिमित्त ज्ञानेश योगमार्गाचा धावता आढावा घेतात. ते म्हणतात की:***"योगाचलाच्या शिखरावर पाऊल रोवणाऱ्यास कर्ममार्गाचा सोपान चढून जाणे आवश्यक आहे.*** *यमनियमरूपी पायथ्यापासून निघून आसनाच्या पायवाटेने चालत जाऊन प्राणायामरूपी कठीण मार्गाने वर जात असता प्रत्याहाररूपी तुटका कडा लागतो.* तो इतका निसरडा असतो की त्यावर बुद्धीचेही पाऊल स्थिरावू शकत नाही. या ठिकाणी हटयोगी आपली योगारूढ होण्याची मनीषा गुंडाळून ठेवतात.''

विश्वामित्रादींना या प्रत्यहाररूपी कड्यावरूनच खाली लोटले जाऊन मेनकारूपी निसरड्या वाटेवरून पथभ्रष्ट व्हावे लागले होते, याची आठवण या ठिकाणी आपणास होते. असो.

योगाचलाचे रूपक

अभ्यासबलाने हळूहळू त्या प्रत्याहाररूपी निसरड्या कड्यावर वैराग्यरूपी नख्या रोवून चढून जाता येते. प्राणायाम - प्रत्याहार अशा या मार्गाने वर चढले असता पुढे धारणारूप पठारावरून जात असता ध्यानरूपी शिखर लागते. ते केव्हा मागे पडले, ते कळतच नाही. अशा या योगमार्गाने वाटचाल करत गेले की साध्य-साधन एकच होउन सामरस्याची प्राप्ती होते. पुढे जावयाचे बाकी राहत नाही. प्रवृत्ती विसावते. योगाभ्यास पूर्ण होऊन ***संचित, प्रारब्ध व क्रियमाण*** कर्मे थांबतात. अशा भूमिकेत प्राप्त होणारे समाधिसुख केवळ अवर्णनीयच आहे.

योगारूढ::::

योगारूढाची लक्षणे

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते।
सर्वसङ्कल्पसन्न्यासी योगारूढस्तदोच्यते।।६-४।।

"इंद्रियांच्या विषयांच्या ठिकाणी जेव्हा मनुष्य रत होत नाही व कर्मासक्तीचा त्याग करतो, तेव्हा सर्व संकल्पांचा त्याग घडतो. असा संन्यास प्राप्त झालेला मनुष्य योगारूढ म्हणून ओळखावा.''

याविषयी ज्ञानेश म्हणतातः

एणें उपायें योगारूढु। जो निरवधि जाहाला प्रौढु।
तेयाचियां चिह्नांचां निवाडु। सांघैन आइकें।।६-६१।।
तन्हैं जेयाचियां इंद्रियांचेयां घरिं। नाहीं विषयांचियां येरझारी।।
जो आत्मबोधाचियां वोवरिं। पवढला असे।।६२।।

"कर्ममार्गाने वाटचाल करून ध्यानयोगाचा अभ्यास करतकरत जे असे योगारूढ होतात; विनासायास ज्यांना अशी परिपूर्णता लाभते; त्यांची लक्षणे सांगतो, ती ऐक. त्यांच्या इंद्रियरूपी घरात विषयांची येरझार नसते. आत्मज्ञानरूपी ओवरीत ते शांत चित्ताने पहुडलेले असतात.''

जेयाचियां सुखदुःखाचेनि आंगें। झगटलें मानस चेवों नेघे।
विषय पासिं आलियां सें न रिघें। हें काइं म्हणौनि।।६-६३।।
इंद्रियें कर्माचां ठाईं। वाढिनलीं परि कंहिं।
फलहेतूचिं चाड नाइं। अंतष्करणिं।।६४।।
असतेनि देहें येतुलां। जो चेतूंचिं दिसें निदैलां।
तोचिं योगारूढु भलां। वोलखें तूं।।६५।।

"त्यांच्या अंगास सुखदुःखे झगटली तरीही त्यांचे मन आत्मनिद्रेतून जागे होत नाही. त्यांच्याजवळ विषय रिघाले, तरी चित्त त्या विषयांकडे ढुंकूनही पाहत नाही. त्यांची इंद्रिये कर्मरत असली तरी अंतःकरणी कर्मफलाची आसक्ती नसते. जो देहाने असा वर्तत असतो, पण जागृत असूनही विषयेंद्रिय-कर्मे- कर्मफल यांच्याप्रती निद्रित असतो, त्यास ***योगारूढ*** म्हणून खुशाल म्हणावे."

तेथ अर्जुनु म्हणें अनंता। हें मज विस्मो बहू आइकतां।
सांघैं तेयां ऐसिं योग्यता। कवणें दीजैं।।६-६६।।

हे ऐकून अर्जुन विचारतो की, "हे अनंता! हे तुझे सर्व सांगणे अत्यंत विस्मयकारक आहे. त्या योगारूढ पुरुषास अशी ही योग्यता कोणी मिळवून दिली ते सांग."

आपणच आपला उद्धार करावा

यावर श्रीकृष्ण म्हणतातः

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः।।६-५।।

"कोणी कोणास अशी योग्यता देत नाही. मनुष्यास आपला उद्धार स्वतःच करून घ्यावयाचा असतो. आपणच आपला घात करून घेऊ नये. आपणच आपले मित्र आहोत आणि आपणच आपले शत्रू आहोत."

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मनाजितः।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत्।।६-६।।

"ज्याने स्वतःवर विजय मिळवलाआहे, तो आपला आपण मित्र आहे. ज्याने स्वतःस देहेंद्रियबुद्धीच्या ताब्यात सोपविले आहे, तो स्वतःशीच शत्रूप्रमाणे वर्तणूक करतो.

बंधाचे कारण

याबाबत ज्ञानेश म्हणतातः

तंव हासौनि कृष्णें म्हणें। तूझें नवल ना हें बोलणें।
कवणासिं काय दीजैल कवणें। एथ अद्वैतिं इयें।।६-६७।।
पैं व्यामोहाचियें सेजें। बलियां अविद्या निद्रितु होइजे।
तैं हेलिं दुःखस्वप्न हा भोगिजैं। जन्ममृत्यूंचां।।६८।।
पाठीं अवसांत ये चेओं। तैं तैं आघवेंचिं हों वाओ।
ऐसां उपजैं नित्य सद्भाओ। तोहि आपणापांचि।।६९।।...।

श्रीकृष्ण हसले व म्हणाले, "अर्जुना! हे तुझे विचारणे कमालीचे आहे! अद्वैतात कोणी कोणास काय द्यावे अन कोणी कोणाकडून काय घ्यावे! परंतु व्यामोहामुळे जीवास अविद्येच्या शेजेवर निद्रा लागते आणि त्यामुळे तो जन्ममृत्यूंचे दुःस्वप्न पाहतो. पण अकस्मात जेव्हा त्याला जाग येते, तेव्हा ते सगळेच नाहीसे होते. आपल्या सत्स्वरूपाचे असे दर्शन आपले आपणासच होते."

....। म्हणऊनि आपणचिं आपणपेयां।
घातु किजतु असे धनंजया।
चित्त देऊनि नाथिलियां। देहाभिमानां।।७०।।
हा विचारूनि अहंकार सांडिजैं। मग असतिचिं वस्तू होइजैं।
तऱ्हैं आपुलिं स्वस्ति साहाजैं। आपण केलीं।।७१।।
यरविं कोशकीटकांचियां परीं। आपणयां आपण वैरीं।
जो आत्मबुद्धिं शरीरीं। चारुस्थलिं।।७२।।

"आपणच देहाभिमानास आपले चित्त वाहतो आणि आपला घात करून घेतो. हे धनंजया! विवेकांती हा अहंकार जर त्यागला गेला, तर आपण आपल्या स्वरूपास पावतो. म्हणजे आपणच आपले कल्याण करून घेतले असेच होते ना! नाहीतर कोशातील रेशमाच्या कीटकाप्रमाणे या देहरूपी कोशावर आत्म्यावर करावयाचे तसे प्रेम केल्याने व त्यास उत्तम समजून त्यातच कायमची वस्ती केल्याने त्या कीटकासारखाच आपण आपला घात करून घेतो.

देहबुद्धी

कैसें प्राप्तिचियें वेलें। निदैवां आंधलेपणाचें डोहालें।
किं असते आपुलें डोलें। आपण झाकिं।।६-७३।।
कां कवणु एकु भ्रमलां। मी तो नोहें गां म्हणें चोरिला।
ऐसां नाथिलां छंदु अंतष्करणें। घेऊनि ठाकें।।७४।।
यरविं होय तैं तैंचि आहें। परि काईं किजैं बुद्धि तैसिं नोहें।
देखां स्वाप्निंचेनि घाएं। किं मरें सांचें।।७५।।

"चिंतामणी हाती पडण्याच्या वेळी कमनशिबी माणसास आंधळेपणाचे डोहाळे लागून आपल्याच हाताने त्याने आपले डोळे झांकून घ्यावेत व हातचा चिंतामणी दवडावा; किंवा कोणी एकाने भ्रमिष्टपणाने *आपल्यास कोणीतरी चोरले आहे व आपण मी नव्हेच* असा धोशा करत स्वतःस शोधत बसावे; तसे काही जण करतात. एरवी आपण स्वतः जिथल्या तिथे जसे असतोच, पण दुर्दैवी मनुष्यास कोती बुद्धी होऊन त्याचा घात होतो. स्वप्नात अंगावर झालेल्या शास्त्राघाताने कोणी कधी मरतो का! पण स्वप्नच खरे समजून चालणाऱ्याला दुःख अटळच आहे. विवेकबुद्धी नसतांना मनुष्य संसारात गुंततो."

जैसिं तैं शुकाचेनि आंगभारें। नलिका भोविन्नलिं एरि मोहरें।
तरि तेणें नुडावें परि न पुरें। मनाशंका।।६-७६।।
वांयांचिं मान पीलीं। अटुवें हियें आवलीं।
टिटांतैं नलीं। धरूनि ठाकें।।७७।।
म्हणें बांधलां मी फुडां। ऐसियां भावनेचां पडें खोडा।
कि मोकलियां पायांचा चवडा। गोंविं अधिकें बांधिला।।७८।।
मग नोसंडिं जऱ्हैं नेलां। तोडूनि अर्धा।।७९।।
म्हणऊनि आपणयां आपणपैंचि रिपु। जेणें वाढविलां हां संकल्पु।
एर स्वयंबुद्धि म्हणें बंधुबापु। जो नाथिलें नेघें।।८०।।

"नलिकेवर पोपट बसतो. त्याच्या वजनाने ती गरगरा फिरू लागते. आपण धरले गेलो आहोत या भावनेने तो पोपट उडू शकत नाही. तो उगीचच मान वेळावतो. छाती संकोचून घेतो. चवड्यात

नळी आवळून घेत तिला घट्ट धरून बसतो आणि काही केल्या तेथून उडून जावे अशी बुद्धी काही त्याला होत नाही. आपण त्या नळीला बांधले गेलो आहोत, असे समजून केवढा घात तो करून घेतो आणि आयताच फासेपारध्याच्या हाती सापडतो. अर्जुना! सांग बरे त्या पोपटाला कोणी बांधून का घातला होता! तो तर आपला आपणच बद्ध झाला. मग त्याला नळीपासून ओढून काढतांना त्याची मान मुरगळली गेली, तरी त्या नळीला सोडून द्यावे अशी बुद्धी त्याला होत नाही. अशाच प्रकारे संकल्पाच्या आहारी गेल्याने मनुष्य बद्ध होतो. तो आपला घात आपणच करून घेतो. आपला आपणच शत्रू होतो. याउलट जो देहबुद्धी घेत नाही, तो महात्मा आत्मज्ञानी ठरतो. तो स्वतःचा खरा मित्र असतो."

योग्याचे वर्णन

अशा आत्मविद मनुष्याची लक्षणे अधिक स्पष्ट करत भगवंत म्हणतातः

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः।।६-७।।
ज्ञानविज्ञानतृप्तामा कूटस्थो विजितेन्द्रियः।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः।।६-८।।

"स्वतःवर ज्याने विजय मिळवला आहे; जो अत्यंत प्रशांत झालेला आहे; ज्याच्याठायीचे परमतत्त्व स्पष्ट झालेले आहे; शीत व उष्ण, सुख व दुःख, तसेच मान व अपमान इ.द्वंद्वे प्राप्त झाली असता ज्याची शांती ढळत नाही; ज्ञान व विज्ञान यांचे सम्यक् ज्ञान प्राप्त होऊन जो सर्व बाजूंनी तृप्त झाला आहे; आणि ज्याने आपल्या इंद्रियादींवर विजय मिळवलेला असल्याने आत्मतत्त्वात निश्चल स्थिती प्राप्त करून घेतली आहे; सुवर्ण, मातीचे ढेकूळ व दगड यांना जो सारखीच किंमत देतो; तो सतत आत्मतत्त्वाशी युक्त असलेला योगी असल्याचे ओळखावे."

योग्याच्या मनोभूमिकेविषयी हा विचार आहे. योगसिद्ध पुरुषांची बरीच लक्षणे गीताकार सांगतात. काहीकाही वेळा पुनरुक्तीचा दोषही म्हटला तर त्यापायी घडतो. पण सामान्य मुमुक्षू साधकाच्या अंतःकरणावर गीतेस कायमचा ठसा उमटावयाचा आहे, त्यासाठी पुनरुक्ती ही करावीच लागते. म्हणून त्या पुनरुक्तीत तसा दोष नाहीच. उलट आपल्या ती हिताचीच ठरते. असो.

सर्वसामान्य संसारापेक्षा अत्यंत भिन्न व अतिसूक्ष्म स्तरावरील असा हा गीतेचा योगविषय आहे. तो सामान्यांस नीट कळावा म्हणून गीताकार कित्येकदा तीच तीच गोष्ट परत परत सांगतांना दिसतात, त्याबद्दल आपणास कृतज्ञताच वाटली पाहिजे. त्याऐवजी काही बुद्धिमान विचारवंत गीताकारांस पुनरुक्तीदोषाबद्दल जबाबदार ठरवतात. पण आपणास या स्थळी असे जाणवते की जर असेच त्यांना वाटत असेल, तर हे अगदी स्पष्ट होईल की गीतेचे प्रयोजन मुळात त्यांच्यासारख्या अति बुद्धिमानांसाठी नाहीच! आणि म्हणूनच बुद्धिमंत अशांना गीतेचा खरा अर्थ कधीच लावता आलेला नाही. असो.

"जीवो ब्रह्मैव ना परा"

या *श्लोक क्र.६-७ व ८* यांच्यावर निरूपण करतांना ज्ञानदेवही गीतेच्या आणि ***"जीवो ब्रह्मैव ना परा"*** या उक्तीच्या पावलावर पाऊल टाकत सांगतात कीः

तेयां स्वांतष्करणजितां। सकल कामोपशांतां।
परमात्मा परौतां। दूरिं नाहिं।।६-८१।।
जैसां कीडालाचां दोखु जाएं। तन्हैं पंन्हरैं तैंचि होएं।
तैसें जीवां ब्रह्मत्व आहे। संकल्पलोपीं।।८२।।

"अशा त्या स्वतःचे अंतःकरण जिंकलेल्या व सकळ कामनांचा उपशम होऊन शांत झालेल्या पुरुषांना तो परमात्मा काही कोठे दूर जाऊन शोधावयाचा नसतो. कीडाळाचा दोष नाहीसा झाला की सुवर्णाठायीच त्याचेच विशुद्ध स्वरूप जसे प्रकटते, तसेच संकल्परूपी दोष निमाला की जीव मुळचाच जो ब्रह्मस्वरूप आहे, तो आपल्या त्या मुळच्या ब्रह्मस्वरूपानेच प्रकटतो."

"परमात्मा संचलां। आदिंचि आहें"

हा घटाकासु जैसां। निमालियां तेयां अवकासां।
न लगें मिळों जाणें आकासां। आनां ठाई।।६-८३।।
तैसा देहांहंकारु नाथिलां। हां समूल जेयांचां नासलां।
तोचिं परमात्मा संचलां। आदिंचिं आहें।।८४।।

"घटाकार नाहीसा झाला की घटाकाश जसे मुळच्या अवकाशाशी जागच्या जागीच मिळते, त्यास काही दुसरीकडे कोठे मिळण्यास जायला लागत नाही की इतर काही करावे लागत नाही, तसेच देहाहंकार समूळ नष्ट झाला की जीव परमात्माच होतो. मुळचा तो जीव परमात्म्यापेक्षा वेगळा का आहे, तर त्याला इतर काहीतरी परमात्मा होण्यासाठी करायला हवे!"

आतां शितोष्णाचियां वाहाणीं। तेथ सुखदुःखांचिं कडसणी।
इयें न समातिं कंहिं बोलणीं। मानापमानाचिं।।६-८५।।
जैं जेयां वाटा सूर्यु जाएं। तेऊतें तेजाचें चि विश्व होएं।
तैसें तेयां पावें तैं आहे। तोंचि म्हणौनि।।८६।।
देखें मेघौनि सुटति धारा। तियां न रुपति जैसियां सागरां।
तैसिं शुभाशुभें योगिश्वरां। नहोति आनें।।८७।।

"एकदा ही मूळ स्थिती प्राप्त झालेल्या जीवाला सुखदुःख, मानापमान, शीतोष्णादी द्वंद्वे संभवत नाहीत. सूर्य ज्या ज्या ठिकाणी जातो, तेवढा भाग तो आपल्या तेजाने भरून टाकतो. ते तेज सूर्याहून वेगळे म्हणता येते का! त्याचप्रमाणे आप्तकाम पुरुषास मग आपणाहून विश्व भिन्न नसते. अद्वैतावस्थेत वावरणाऱ्या त्याला मग द्वंद्वे ती उरतीलच कशी! सागरातून मेघ निर्मिले जातात. ते पुनः पर्जन्यधारेच्या रूपाने सागरावर कोसळतात, तेव्हा ते सागरास रुपतात का कधी! तसाच

जगातील शुभाशुभ गोष्टींचा त्या योगीश्वरावर कोणताही परिणाम होत नाही; कारण ती ती गोष्ट विश्वाकार झालेल्या त्या योगिराटाहून भिन्न नसते."

"तंव ज्ञान तैं तोंचिं"

पुढे ज्ञानदेव सांगतातः

जो हा विज्ञानात्मकु भाओ। तेयां विवरितां जाहाला वाओ।
मग लागला जंव पाहों। तंव ज्ञान तैं तोचिं।।६-८८।।
आतां व्यापकु किं एकदेशिं। हें उहीपोहिं जैं ऐसिं।
तैं कराविं ठेलिं आपैसिं। दुजेनविण।।८९।।

"विज्ञान म्हणजे अनुभवास येणारे हे विश्व त्याच्या लेखी मिथ्या ठरल्याने साहजिकच त्यास सर्वत्र ज्ञानाचीच म्हणजे परब्रह्माचीच अनुभूती येते. आणि स्वत:सकट सगळेच विश्व ज्ञानमय होऊन राहते. द्वैताचा असा अभाव झाल्यामुळे ते परब्रह्म व्यापक आहे, सर्वत्र आहे की एकदेशी- मर्यादित स्वरूपाचे आहे, ही द्वैती उठाठेव - हा भासमय उहापोह करण्याची त्यास आवश्यकता उरत नाही."

ऐसां शरीरीचिं परि कवतुकें। परब्रह्माचेनि पाडें तुकें।
जेणें जिंतिलीं इयें एकें। इंद्रियें गां।।६-९०।।
तो जितेंद्रियु साहाजें। तोचि योगयुक्तु चि म्हणिजे।
जेणें सानें थोर नेणिजें। कवणें कलीं।।९१।।
देखें सोनियाचें निखल। मेरु एसणें ढिसाल।
आणि मातियेचें डिखल। सरिसेंचिं मानिं।।९२।।
पाहातां पृथ्वियेचे मोल थोकडें। ऐसे अनर्घ्य रत्न चोखडें।
देखें दगडाचेनि पाडें। निचाडु ऐसां।।९३।।

"तरीही तो देहधारीच असतो. पण सर्व इंद्रिये जिंकलेली असल्याने त्याची तुलना केवळ परब्रह्मस्वरूपाशीच केली जाते. लहानथोर असा भेदभाव ज्याच्याजवळ उरलेला नसतो, अशा त्या जितेंद्रिय व्यक्तीसच योगयुक्त म्हणून ओळखावे. विशुद्ध सुवर्णाचा मेरुपर्वत व मातीचे ढेकूळ ही त्याच्या लेखी समानच असतात. पृथ्वीचे मोल कमी ठरेल, अशा अमूल्य रत्नाची आणि दगडाची किंमत त्याला सारखीच असते."

आत्मरति

त्या योग्याची अधिक चर्चा करत श्रीकृष्ण म्हणतातः

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु।
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते।।६-९।।
योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः।।६-१०।।

"सुहृद, मित्र, तटस्थ व्यक्ती, मध्यस्थ, शत्रू , अप्रिय माणसे, बांधव, आप्तस्वकीय, तसेच साधु-सज्जन आणि पापी व्यक्ती या सर्वांठायी त्याची समान बुद्धी असते. या विशेष लक्षणांनी मंडित असणारा असा तो श्रेष्ठ योगी वासनारहित असतो. परिग्रह नसलेल्या त्या पुरुषाने आपणास अंतर्बाह्य जिंकलेले असते आणि सतत एकांतसेवन करतकरत एकटाच राहून निरंतर तो आत्म्याशी रत असतो." ***आत्म्याशी असा युक्त असतो म्हणून त्यास योगी असे म्हटले जाते.***

समबुद्धी

योगिरायाची बिरुदावली अधिक स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतातः

तेथ सुहृद आणि शत्रु। कां उदासु आन मित्रु।
हा भावभेद विचित्रु। कल्पूं कैंचां।।६-९४।।
तेयां बंधु कोण काह्याचां। द्वेषियां कवणु तेयाचां।
मीचि विश्वु ऐसां जेयाचां। बोधु जाहाला।।९५।।
मग तेयांचियें दिठी। अधमोत्तम असें किरीटी।
काएं परिसाचियां कसवटीं। वानियां किजैं।।९६।।
तैं जैसिं निर्वाणवर्ण्णुचि करि। तैसिं जेयाचिं बुद्धि चराचरीं।
होय साम्याचिं उजरिं। निरंतर।।९७।।

"अशा योग्यास आपला आणि परका, सुहृद आणि शत्रू, तटस्थ आणि मित्र, असा विचित्र भेदभाव कल्पनेत तरी कसा करता येईल! आपणच विश्व आहोत अशी प्रतीती ज्यास येत असते, त्याच्या लेखी कोण कोणाचा बंधु, कोण कोणाचा शत्रू! मग अर्जुना! त्याच्या दृष्टीला कोण लहान कोण थोर, कोण अधम कोण सज्जन, असे कसे दिसेल! परिसावर घासून सोन्याचा कस पाहू गेल्यास सर्वच चोख सोने दिसणार नाही का! परीस जसा सर्व प्रकारच्या धातूंचे विशुद्ध सुवर्ण करतो, त्याप्रमाणे ज्या योगिराजाची बुद्धी चराचरात निरंतर साम्य पाहत असते, त्यास सर्व अनेकानेक आकाराप्रकारांचे प्राणिजात पाहून अखंड अशा परब्रह्माचाचाच त्यांच्याद्वारे बोध होत होतो."

जैं तैं विश्वालंकाराचेंनि विसुरें। जऱ्हैं आहाति आनानें आकारैं।
तऱ्हैं पडिलें एकेंचि भांगारें। परब्रह्में।।६-९८।।
ऐसें जाणणें जैं बरवें। तैं फांवलें तेयां आघवें।
म्हणौनु आहाचवाहाच न झंकवें। एणें आकारचित्रें।।९९।।

"परब्रह्मरसाचे वेगवेगळे घडवलेले अलंकार म्हणजे हा भूतसमुदाय अशी त्यास प्रतीती येत असते. अशी सर्वोत्तम दृष्टी त्याला लाभते. म्हणून वेगवेगळे प्राणी व प्रसंग इ.चा त्याच्या मनावर वेगवेगळा ठसा उमटत नाही, तर उमटते ते केवळ परब्रह्मरूपच!"

घापें पटामाजिं दृष्टी। दिसें तंतूंचिं सैंघ सृष्टी।
परि तो एकवांचूनि गोठी। दुजीं नाहीं।।६-१००।।
ऐसेनि प्रतिति हें गंवसें। ऐसा अनुभव जेयांतैं असें।
तोचि समबुद्धि हें अनारिसें। नोहें जाण।।१०१।।

"वस्त्रांची नवाई पहावी, झळाळी न्याहाळावी, रंगीबेरंगी दुनियेत हरवून जावे. पण वस्त्रावस्त्राच्या आत नीट डोकावून पाहिले तर तंतूंनी बनवलेली आणि विणलेली अशीच वस्त्रसृष्टी नसते का! वस्त्रावस्त्रातून तंतूच तंतू असतात! त्यांच्याशिवाय त्यांत इतर काय असते! अशाच प्रकारे या सर्व विश्वाकाराच्या बृहत सृष्टिलाघवातून ओतप्रोत भरून राहिले आहे, ते एकमेव ब्रह्मतत्त्वच होय, असा बोध

व अशी प्रतीती ज्यास असतात आणि असाच ज्याला साक्षात्कार झालेला असतो, तोच ***समबुद्धी*** म्हणून ओळखावा; त्याच्याशिवाय इतर कोणास अशी बुद्धी असणार, सांग बरे!"

योग्याचे असाधारणपण

त्या ब्रह्माकार झालेल्या योग्याचे वर्णन पुढे ज्ञानेश करतात, ते असेः

जेयाचें नांव गां तीर्थराओ। दर्शनें प्रशस्तिसिं चि ठाओं।
जेयाचेनि संगें ब्रह्मभाओ। भ्रांतांसिं।।६-१०२।।
जेयाचेनि बोलें धर्मु जिएं। दिठी महासिद्धितें विएं।
देखैं स्वर्गसुखादि इयें। खेलु जेयाचां।।१०३।।
विपाएं जन्हें आठवलां चित्तां। तन्हें दे आपुलीं योग्यता।
हें असो तेयातैं प्रशंसितां। लाभु आथि।।१०४।।

"तो योगी म्हणजे सर्व पावन तीर्थांचा राजाच होय. त्याच्या केवळ दर्शनानेच मनास प्रसन्नता येते. संसाराने भ्रमलेल्यांना त्याच्या संगतीने ब्रह्मभाव प्राप्त होतो. त्याचे शब्द म्हणजे धर्माचे जीवन असतात. तो म्हणेल ते ब्रह्मवाक्यच असते. त्याची कृपा मोठमोठ्या सिद्धी देते. स्वर्गसुख तर त्याच्या हातचा खेळच असतो. मनात त्याचे सहज जरी स्मरण घडले, तरी स्मरण करणाऱ्या पुरुषास स्वतःची योग्यता तो सहज देतो. त्याची स्तुती केल्याने अमाप लाभ पदरी पडतो."

पुडुति अस्तवेना ऐसें। जेयां पाहलें अद्वैतदिवसें।
मग आपणापांचि आपण असें। अखंडितु।।६-१०५।।
ऐसियां दिठीं जो विवेकी। पार्था तो एकाकी।
साहाजें अपरिग्रहि जैं तिहिं लोकिं। तोचिं म्हणौनि।।१०६।।
ऐसियें असाधारणे। निष्पन्नाचिं लक्षणें।
आपुलेनि बहुंवसपणें। कृष्णु म्हणें।।१०७।।

"असा तो महायोगी काय करत असतो पहा! पुनः कधीच मावळणार नाही असा अद्वैतरूपी दिवस त्याच्यासाठी सदाचाच उगवलेला असतो. तो निरंतर आत्म्यातच रममाण झालेला असतो. असा तो विवेकी पुरुष सहजच एकटा असतो. कारण द्वैत तर त्याच्यापुरते मावळलेले असते, मग दुजे तेथे कोण उरणार! आणि जो सर्व विश्वात्मकच झालेला आहे, तो परिग्रह तरी कशाचा करणार! आपणच आपला परिग्रह कसा करता येईल, सांग बरे!"

भगवंतांची लक्षणे

अशी निष्पन्न - प्राप्तकाम पुरुषाची लक्षणे अनेक प्रकारे ज्या श्रीकृष्णांनी अर्जुनास सांगितली, त्या श्रीहरीचे गुण ते किती वर्णावे! ज्ञानेश तर असे म्हणतात कीः

तो ज्ञानियांचां बापु। देखणेयांचिएं दिठीचां दीपु।
जेयां दादुलियाचां संकल्पु। विश्व रचिं।।६-१०८।।
प्रणवाचियें पेंठें। जाहालें शब्दब्रह्म मांजिठें।
तैं जेयाचियां यशां धाकुटें। वेढूं न पुरैं।।१०९।।

"ब्रह्मीभूत योग्याची लक्षणे भगवंताहून वेगळी थोडीच असतात! ज्ञानी लोकांत सर्वश्रेष्ठ, तत्त्वज्ञान्यांत अग्रणी, विश्वाचा प्रकाशक असा तो भगवंत साक्षात श्रीकृष्णरूपाने साकारलेला आहे. त्याचा संकल्प विश्वाची रचना करतो. प्रणवाच्या पेठेत शब्दब्रह्मरूपी वेदांचे मंजिष्ठी रंगाचे महावस्त्र निर्मिले गेले. पण तेसुद्धा त्याच्या सहा गुणांपैकी एका यश या गुणाला वेढण्याससुद्धा अपुरे ठरले."

जेयाचेनि आंगिकें तेजें। आओ रविशशिचियें वणिजें।
म्हणौनि जग हें वेसजें-। विण असे तेयां।।६-११०।।
हां गां नांवचि एक जेहाचें। पाहातां गगनहिं दिसें टांचें।
गुण एकैक तेयाचें। आकलिसिल तूं।।१११।।

"ज्याच्या अंगच्या तेजाच्या अंशैकमात्रे रविचंद्रम्याचे तेज प्रकाशते, त्या परमात्म्याच्या तेजाविना हे जग तरी अस्तित्वात येईल काय! त्या प्रभूच्या एकेका नामाचेच माहात्म्य एवढे आहे की त्यापुढे आकाशही ठेंगणे भासते. अशा त्या सर्वगुणसंपन्न भगवंतांचे गुण - त्यांची कीर्ती वर्णन करण्याचा अल्पसा प्रयत्न योगिवराचे वर्णन करतांना मी केला आहे खरा! पण मी पामर ते सगळे गुण कसे कसे आणि किती वर्णन करू शकणार आहे! म्हणून एवढे वर्णन पुरे करू या!"

कृष्णार्जुनप्रेम::::

"ब्रह्मविद्या किजैल उघडी"

म्हणौनि असो हें वानणें। सांघैं नेणों कवणाचिं लक्षणें।
दावविं मिरवें एणें। कां बोलिलों तैं।।६-११२।।
ऐकें द्वैताचां ठाओचि फेडी। तैं ब्रह्मविद्या किजैल उघडीं।
तन्हें अर्जुनु पढिये हें गोडी। नासैल हन।।११३।।

"आणि देवांनी तरी आप्तकाम पुरुषाची लक्षणे सांगतासांगता स्वतःच्याच गुणांचे हे असे वर्णन तरी का केले असावे, हे काही माझ्या पण ध्यानी येत नाही. कदाचित असा द्वैताचा आडपडदा ठेवून अर्जुनास अद्वैताची प्राप्ति करून देणारी ब्रह्मविद्या उघडी करण्याचा त्यांचा हेतू असावा. कारण आपले परमात्मस्वरूप उघडउघड दाखवले असते, तर सगळेच अद्वैतात बुडून गेले असते. त्या वेळी *हा अर्जुन व हा मी कृष्ण* असा भाव नावापुरता तरी कोठला उरला असता! मग या संवादसुखाची गोडी व अर्जुनावरील प्रेमाचा उपभोग भगवंताला कसा बरे घेता आला असता!"

म्हणौनि तैं तैसें बोलणें। नोहें सपातल आड लावणें।
केलें मनचि वेगलेंवाणें। भोगावेयां।।६-११४।।

"म्हणून संत-योग्यांचे वर्णन करण्याचा आडपडदा करून देवांनी आपले मन अर्जुनापासून वेगळे ठेवून ते प्रेमसुख मनमुराद भोगले असावे!"

द्वैताचा पडदा

अर्जुनाशी असा द्वैतभाव जागृत ठेवण्याचे कारण काय असावे, याचा अधिक शोध घेऊ पाहणारे ज्ञानेश पुढे असेही म्हणून जातात की:

जेयां सोऽहंभाव अटकु। मोक्षसुखालागौनि रंकु।
तेयाचियें दिठीचां झनैं कलंकु। लागैल तुझियां प्रेमा।।६-११५।।
विपाएं अहंभाव ययांचां जाईल। मी तैंचिं हा जऱ्हैं होईल।
तऱ्हैं मग काइं किजैल। एकलेयां।।११६।।

"द्वैताचा सूक्ष्मसा पडदा आपल्यात व अर्जुनात श्रीकृष्णांनी जो ठेवला, त्यामागे असे तर कारण नसेल ना की अर्जुनाला मोक्षसुखासाठी दीन झालेल्या व ***सोऽहंभावास ओलांडू न शकलेल्या*** इतर साधकांची दृष्ट लागू नये! त्यांची दृष्ट श्रीकृष्णार्जुनांच्या प्रेमाला लागू नये म्हणून भगवंतांनी बाह्यात्कारी हे असे द्वैताचे नाटक रचले असावे. किंवा चुकून जर अर्जुनाचा अहंभाव नष्ट झाला, तर तो श्रीकृष्णस्वरूप होईल; त्यावेळी आपण एकटे राहू व आपल्याला करमणार नाही, असेही त्यांना वाटले असावे."

दिठीचि पाहातां निविजैं। कां तोंड भरौनि बोलिजैं।
ना तऱ्हैं दाटूनि खेंव दीजैं। ऐसें कोण्ह आहें।।६-११७।।
आपुलियां मनां बरविं। असमाइं गोठी जीविं।
तैं कवण्हेसिं मग चावलाविं। जऱ्हैं ऐक्य जाहालें।।११८।।
इयां काकुलतिं जनार्दनें। अन्योपदेशाचेनि हातासनें।
बोलामाझिं मन मनें। आलिंगूं सरलें।।११९।।

"अर्जुन दृष्टीला पडला नाही, तर मग दृष्टिसुखाचा जिव्हाळा भोगण्यास मिळणार नाही; त्याच्याशी कौतुकाने प्रेमसंवादाची गोडी चाखता येणार नाही; ज्याला अंत:करणाच्या उमाळ्याने कडकडून जीवाभावाने आलिंगावे, असे कोणी उरणार नाही; आपल्या मनातले गूज जे चित्ताला ओसंडून बाहेर पडू पाहता आहे, ते जर आपले व अर्जुनाचे सामरस्य झाले, तर कोणास सांगावे! या प्रकारच्या दीनवाण्या अगतिकपणामुळे पण त्यांनी असे केले असावे, असे पण मला जाणवते आहे. म्हणून साधुसंतांची लक्षणे सांग, योग्यांची चर्या सांग, असे करत ते त्याला ब्रह्मविद्या आडूनआडून उपदेशित आहेत. अशा प्रकारे अर्जुनाच्या मनाला आपल्या मनाने संवादरूपी आलिंगन देण्याचे उत्कट प्रेमसुख श्रीकृष्ण उपभोगत आहेत."

"मोहाचिं त्रिपुटी। नाचों लागें"

हें परिसतां जऱ्हैं कानडें। तऱ्हैं जाण पां पार्थु उघडें।
कृष्णसूषाचेंचिं रूपडें। ओतलें गां।।६-१२०।।
हें असो वयसेचियें सेंवटीं। जैसें एकचिं वियें वांझोटीं।
मग तैं मोहाचिं त्रिपुटी नाचों लागें।।१२१।।

"हे माझे बोलणे तुम्हाला समजण्यास कदाचित आडवळणाचे आहे असे वाटेल. म्हणून स्पष्टच सांगतो, ते ऐका. हा पार्थ म्हणजे कृष्णाचे सुखच मूर्तरूपाने ओतलेला आहे जणू. एखाद्या वांझ स्त्रीने तारुण्य सरतासरता एकुलते एक मूल प्रसवावे आणि मग त्याच्यामागे रात्रीचा दिवस करावा, त्याला कोठे ठेवू अन कोठे नको, असे होऊन तिच्या रूपाने मोहाची त्रिपुटी - ती स्त्री, ते मूल व तिची ममता यांची - नाचू लागावी, तसेच श्रीकृष्णांचे झाले आहे. असे देवाला झाल्याचे मी म्हटले नसते. पण प्रत्यक्ष तसेच दिसत आहे. म्हणून असेच म्हणणे मला भाग आहे."

अर्जुन म्हणजे आत्मनिवेदनाखालील सख्यभावाची मातृकाच!

पुढे ज्ञानेश म्हणतात:

पाहां पां नवल कैसें चोज। कें उपदेशु केऊतें झूंज।
परि फुडां वालभाचें भोज। नाचत असें।।६-१२३।।
आवडिं आन लाजविं। वेसन आन सीणविं।
पिसे आन न भुलविं। तऱ्हैं तैंचिं काईं।।१२४।।
म्हणऊनि भावार्थु तो ऐसां। अर्जुनु मैत्रिएंचां कुवांसां।
किं सुखें शृंगारिलियां मानसां। दर्पणु तो।।१२५।।

"कारण असे पाहा की प्रसंग कसला आणि श्रीकृष्ण काय करत आहेत! युद्धास उभे ठाकलेले कौरव-पांडव आहेत आणि आश्चर्य असे की त्या प्रसंगी ते अर्जुनाला ब्रह्मविद्येचा उपदेश देत आहेत. पण अर्जुनावरील प्रेमामुळे वेडे झालेले श्रीकृष्ण न राहवून त्या तशा वेळीही त्याला आत्मज्ञान सांगत आहेत. त्या रणभूमीवर श्रीकृष्णरूपे अर्जुनावरील मूर्तिमंत प्रेम साकार होऊन नाचत आहे, पहा! प्रेमाठायी लाज असेल तर ते प्रेम कसले! व्यसनाचा कंटाळा येत असेल, तर मग त्यास व्यसन तरी कसे म्हणावे! हडळीने भुलवून भ्रमिष्ट केले नाही, तर ती हडळच नसणार! म्हणून माझ्या म्हणण्याचा भावार्थ लक्षात घ्या की ***अर्जुन सख्यभावाचा आश्रय आहे. तो भगवंताचे सख्यभक्तीने भरून आलेले मन दाखवणारा आरसा आहे."***

ययापरीं बाप पुण्यपवित्र। जगिं भक्तिबीजासिं सुक्षेत्र।
तो कृष्णकृपें पात्र। एयाचिंलागिं।।६-१२६।।
हो कां आत्मनिवेदनातलींचिं। जैं पीठिका आहें सख्याचिं।
पार्थु अधिष्ठात्री तेथिंचिं। मातृका गां।।१२७।।

"पुण्याचे आगरच असा तो अतिपवित्र स्थान आहे. या जगातील भक्तिरूप बीज धारण करण्यास उत्तम सुक्षेत्र म्हणजे अर्जुनच आहे! भक्तीची परिसीमाच असा तो अर्जुन म्हणूनच कृष्णाच्या एवढ्या कृपाप्रसादास पात्र झाला आहे. नवविधा भक्तीच्या ज्या भूमिका आहेत, त्यातील अंतिम भूमिका म्हणजे ***आत्मनिवेदन!*** त्याखालोखाल ***सख्यभक्ती*** प्रकट होते. अशा ***सख्यभक्तीच्या पीठावरील अधिष्ठात्री देवता*** म्हणजे ***अर्जुन***च होय!"

"पूर्णाहिं परि लागें। अवस्था जेयाचिं"

पासिंचिं गोसांविं वर न वनिजैं। मग पाईकाचां गुणु घेईजैं।
ऐसां अर्जुनुचिं तो सहाजें। पढिएं हरिं।।६-१२८।।

पाहां पां अनुरागें भजें। जैं प्रियोत्तमे मानिजैं।
तैं पतिहिंहूनि काइं न वर्णिजैं। पतिव्रता।।१२९।।
तैसां अर्जुनुचिं विशेषें स्तवावां। ऐसें आवडिलें मज जिवां।
जैं तो त्रिभुवनींचियां दैवां। एकायतनु जाहाला।।१३०।।
जेयाचियां आवडिचेनि पांगें। अमुर्त्तुहिं मूर्त्ति आंवंगें।
पूर्णाहिं परि लागें। अवस्था जेयाचिं।।१३१।।

"देव समोर उभा ठाकला तर त्याची स्तुती करण्याचे सोडून देऊन त्याच्या भक्ताचेच गुणगान केलेले त्याला आवडावे, इतका अर्जुन श्रीकृष्णांना प्रिय आहे.असे पहा की पतीवर जिवापाड प्रेम करणाऱ्या व पतीलाही आवडणाऱ्या पतिव्रता स्त्रीचे वर्णन पुराणांतरी मोठ्या कौतुकाने केले जातेच ना! त्याप्रमाणेच अर्जुनाचे विशेष गुणवर्णन करावे असे माझ्या फार मनात येत आहे. कारण त्रैलोक्यातील सर्व भाग्यच अर्जुनाठायी एकवटलेले आहे. म्हणून कृष्णप्रेम व कृष्णकृपेचा तो एकमात्र ठेवा होऊन राहिला आहे. त्याच्या प्रेमाच्या अधीन तो निर्गुण निराकार ईश्वर इतका झाला आहे की त्याच्यासाठी हे साकार सगुण रूप घेऊन तो अवतरला आहे आणि त्या अर्जुनाच्या प्रेमाने विव्हल होऊन काय वाटेल ते करायला सिद्ध झालेला आहे, पाहा!"

ज्ञानदेवांच्या निरूपणशैलीचे कौतुक

ज्ञानेशांचे हे बोल ऐकणारे श्रोते साहजिकच रंगून गेल्यास त्यात नवल ते कोणते! "

तंव श्रोते म्हणति दैवं। कैसिं बोलाचिं हंवाव।
काइं नादातैं हन बरव। जिणौनि आलीं।।६-१३२।।
हां हों नवल नोहें देशिं। मऱ्हाटी बोलिजैं तऱ्हैं ऐसिं।
वाणें उमटताहें मा आकासिं। साहित्यरंगाचें।।१३३।।

श्रोत्यांची ही मनस्थिती - ही तल्लीनता पाहणाऱ्या ज्ञानदेवांनी तिचे वर्णन करत स्वतःच्या निरूपणकौशल्याची पावती त्यांच्याच हस्ते घेत म्हटले कीः "आम्हां श्रोत्यांचे दैव कसे बलवान आहे पहा! काय तुझ्या बोलांचे मनोहारी दर्शन आहे बघ! स्वर्धुनींचे नादतरंग सप्तस्वर्गांना लंघून या बोलांच्या रूपाने अवतरले आहेत जसे काही! मराठमोळ्या भाषेत साहित्य निर्मावे तर असे की त्या देशी भाषेतूनही, नवल म्हणजे गगनात उषेने रंग उधळून शोभा आणावी तसे साहित्यरंग, उत्प्रेक्षादी अलंकार- रूपके इ.द्वारे मुक्त हस्ते विखुरत, अशी साजिरी रूपसंपदा प्रकट व्हावी."

कैसें उन्मेखचांदिणें तार। आन भावार्था पडें गार।
हेंचिं श्लोकार्थकुमुदि तऱ्हैं फार। सांवियां होति।।६-१३४।।
चाडवि निचाडां करि। ऐसिं मनोरथिं इएं थोरि।...।।१३५।।

"ज्ञानोन्मेषांचे पिठुर चांदणे त्या निर्मितीतून सर्वदूर विखुरावे तर असे! आणि त्या कलाकृतीतून भावार्थाची अशी बरसात व्हावी जशी चंद्रमा आपल्या चांदण्याची करतो तशी! आणि त्या चांदण्याने गीताश्लोकार्थरूपी कमले विकसावीत आणि त्यांनी आमच्यासारख्या रसिक श्रोत्यांची चित्ते प्रमुदित करावीत तर आता हा ज्ञानेश बोलतो आहे, तशीच! यापरते मराठी भाषेचे सौभाग्य आणिक कोणते असेल! या नादरंगी चित्तवेधक अपूर्व बोलांचे आकर्षण इतके आहे की ज्यास ते ऐकण्याची इच्छा नसेल, त्यांनाही ते ऐकावेत अशी इच्छा न होईल, तरच नवल!"

"शेखिं उपेगिं गेलां। पांडवांसिं"

...। तेणें निवललें आंतरिं। तेथ डोलु आला।।६-१३५।।
तैं निवृत्तिदासें जाणितलें। मग अवधान देआंवें म्हणितलें।
नवल पांडवकुलीं पाहलें। कृष्णदिवसें।।१३६।।
देवकियां उदरिं वाहिलां। यश्वदा सायासें पालिला।
किं शेखिं उपेगां गेलां। पांडवांसिं।।१३७।।
म्हणौनि बहुंदिवसु ओलगावां। कां अवसरु पाहौनि विनवावा।
हाहिं सोसु तेयां सदैवां। पडेचिना।।१३८।।

श्रोत्यांच्या अंतःकरणात असे अर्थघन भाव दाटून येऊन ते डोलू लागले. आनंदाने बेभान झाले. त्यांची ही अवस्था जाणून निवृत्तिदास ज्ञानेश म्हणू लागले की, "हे सज्जन संतांनो! इकडे आता अवधान पुरवा. पांडवांच्या कुळामध्ये श्रीकृष्णरूपी नवलाईचा सुदिन उगवला आहे पहा! नवल असे की हा गर्भात असतांना देवकीने त्याचा भार साहिला. त्याचा प्रतिपाळ मोठ्या कष्टाने अनंत संकटांना तोंड देत यशोदेने गोकुळी करून त्यास लहानाचा मोठा केले. पण तो त्या दोनही मातांच्या उपयोगास न येता, हे कोण कुठले पांडव! त्यांच्याच उपयोगी पडतो आहे! त्या पांडवांचे केवढे हे भाग्य की त्याची खूप काळ सेवा करावी व काळवेळ पाहून मग त्याची काहीतरी देण्यासाठी विनवणी करावी, असे काहीही न करता तो श्रीकृष्ण स्वतः होऊन त्यांचे कष्ट झेलतो आहे, त्यांचे प्रिय ते सर्व करतो आहे पहा!"

पंथराज::::

"तऱ्हैं ब्रह्म मियां होईजैल"

पण हे राहू द्या! पुढे ऐका!

हें असोनु कथा सांधिं वेगिं। मग अर्जुनु म्हणें सलगिं।
देवा इयें संतचिह्नें हान आंगिं। न ठकति माझां।।६-१३९।।
यरविं इयां लक्षणांचियां निजसारां। मी अपाडें किर अपुरा।
परि तुमचेनि बोलें अवधारां। थोरावें जऱ्हैं।।१४०।।
जी तुम्हीं चित्त देयाल। तऱ्हैं ब्रह्म मियां होईजैल।
काय जाहालें अभ्यासिल। सांघाल तैं।। १४१।।

श्रोते म्हणायला लागले आहेत की, "आता हे वर्णन पुरे! पुढचा कथाभाग लवकर सांग." त्यावर ज्ञानेश सांगू लागले कीः

मग अर्जुन अत्यंत सलगीने श्रीकृष्णास म्हणू लागला की, "देवा! तू वर्णन केलीस तसली संतांची का योग्यांची अन थोरांची - महापुरुषांची कोणतीच लक्षणे माझ्या अंगी नाहीत. त्या लक्षणांचे नीट परिशीलन

केले तर मी सर्वार्थाने तोकडा आहे. माझ्या अंगी जर थोरपण येणार असेल, तर ते केवळ तुमच्या उपदेशाने येईल. देवा! तुम्हीच जर मनावर घेतले, तर मीसुद्धा ब्रह्मपदी नाचेन! त्यासाठी तुम्ही सांगाल तो अभ्यास कितीही अवघड असला तरी मी करीन."

हां हों नेणों कवणाचिं काहाणि।
आइकौनि श्लाघिजत असों अंतष्करणिं।
ऐसिं जाहालेपणाचिं शिरियाणि। काइंसिं देवा।।६-१४२।।
हें आंगें चि मियां होईजो कां।
एंतुलें गोसाविं आपुलेपणें किजौ कां।
तंव हांसौनि कृष्ण म्हणति हो कां। करूं म्हणति।।१४३।।

"आपण कोणाची गोष्ट सांगत आहात ते योगी मी ओळखत नसलो, तरी त्यांची लक्षणे ऐकून मला त्यांच्याबद्दल फार आदर उत्पन्न झाला आहे. आणि ही लक्षणे अंगी मुरवलेल्यांचे केवढे माहात्म्य असेल बरे! हे प्रभू! मी पण योगसिद्ध पुरुष होईन असे तुम्ही करा ना!"

त्यावर हर्षून व त्याच्या भोळ्या भावाने हसू येऊन श्रीकृष्ण म्हणाले की, "हो का! तुला पण योगी व्हावेसे वाटते आहे ना! मग तसेच होईल."

"सोऽहंभावमहुरें। मोडौनि आला"

वास्तविक पाहता अर्जुनाची ही मागणी काय साधी होती का! पण कृष्णकृपा झाल्यावर त्याला कोणते उणे राहील! ज्ञानेश म्हणून म्हणताहेतः

देखा संतोखु एकु न जोडें। तंवचिं सुखाचें सैंघ सांकडें।
मग जोडिलियां कवणिकडें। अपुरें असें।।६-१४४।।
तैसां सर्वेश्वरु बलियां सौकें। म्हणौनि ब्रह्मही होय तो कवतुकें।
परि कैसां भारें आंतला पीकें। दैवाचेनि।।१४५।।
जो जन्मसहस्त्रांचियांसाठीं। इंद्रादिकांहिं महागु भेटीं।
तो आधिनु केतुला किरीटी। जैं बोलुंहिं न साहें।।१४६।।
मग ऐकां जैं पांडवें। म्हणितलें मियां ब्रह्म होआवें।
तैं अशेखहिं देवें। अवधारिलें।।१४७।।
तेथ आइसेंचिं एक विचारिलें। जैं ययां ब्रह्मत्वाचें डोहालें जाहालें।
परि उदरां वैराग्य आहें आलें। बुद्धिचियां।।१४८।।
यरविं दिवस तऱ्हैं अपुरें। परि वैराग्यवसंताचेनि भरैं।
जैं सोऽहंभावमहुरैं। मोडौनि आलां।।१४९।।
म्हणौनि प्राप्तिफलें फलतां।
एयासिं वेलु न लागेल आतां।...।।१५०।।

"मनुष्य जोपावेतो समाधानी वृत्ती अंगी बाणवत नाही, तोवर त्यास ***"सुख पाहातां जंवापाडें"*** असे असते. पण समाधान पदरी असले की सुखाला काय तोटा! दैव सानुकूल असल्यावर काय हवे ते मिळण्यास कोणता विलंब असणार! सौभाग्यवशात त्या अर्जुनास सर्वेश्वर कृष्णासारखा समर्थ पाठीराखा लाभला आहे. आता त्याच्या मनोरथांस त्रैलोक्यसुद्धा थोकडे न पडले तरच नवल! सहस्त्रावेरी जन्म गेले तरी इंद्रासारख्यांनासुद्धा ज्याची भेट मिळत नाही, तो असा अर्जुनाच्या अधीन झालेला आहे. त्या भगवंताला अर्जुनाने काही आपल्याकडे मागावे व नंतर आपण ते द्यावे, एवढासुद्धा धीर धरवत नाही. अशा त्या प्रभूने अर्जुनाची ***"मी ब्रह्म व्हावे"*** ही विनवणी जेव्हा ऐकली, तेव्हा ती ऐकून असा विचार केला की या अर्जुनास आता ब्रह्मत्वाचे डोहाळे लागले आहेत. याला नक्कीच बुद्धीच्या उदरात वैराग्याचा गर्भ राहिलेला आहे. पण अजून पुरते दिवस भरलेले नाहीत. खरे तर पूर्ण ब्रह्मत्वाचा जन्म होण्यास अजून यास काही वेळ लागेल पण वैराग्यरूप वसंताच्या आगमनाने यास ***सोऽहंभावाचा मोहोर*** गच्च दाटून आला आहे. त्या मोहरास फळ म्हणून ब्रह्मप्राप्ती येण्यास फारसा काही काळ लागणार नाही."

"अर्जुना हां अवधारिं। पंथराजु"

...।होय विरक्तु ऐसां अनंतां। भरंवसा जाहाला।।६-१५०।।
म्हणें जैं जैं हां अधिष्ठिल। तैं आतां आरंभीच ययां फलैल।
म्हणौनि सांघितलां न वचैल। अभ्यासु वांयां।।१५१।।
ऐसें विवरौनियां श्रीहरि। म्हणितलें तियें अवसरिं।
अर्जुना हां अवधारिं। पंथराजु।।१५२।।

अर्जुन एवढा विरागी झाला असल्याची खात्री त्या अनंतास पटली. म्हणून कृष्णास वाटू लागले की हा आता जे काही साधन अनुष्ठील, ते यास सुरुवात केल्याकेल्याच फळेल. म्हणून याला आता योगाभ्यासाचा उपदेश केला तर तो वायां जाणार नाही. असा दूरदर्शी विचार करून श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाले की, "हे पहा! तुला ब्रह्म व्हावयाचे आहे, तर अत्युत्कृष्ट मार्ग ऐक. त्याचे नांव **पंथराज** आहे."

पंथराज आरेखन

पंथराज नांवाने ज्ञानेशांनी ज्याचे समग्र दर्शन *सहाव्या अध्यायी* घडविले आहे, तो हाच मार्ग! याचे थोडेफार रूप आपण पूर्वी पातञ्जलयोगाचा विचार करतांना पाहिले होते. त्याचा धावता आलेख पाहू याः

पंथराज हा ***प्रवृत्ति-निवृत्ति*** दोहोंचा समन्वय साधणारा, तसेच ***कर्म, भक्ती, ज्ञान व कुंडलिनीचे उत्थापन*** यांचा समावेश करणारा **महायोग** आहे. प्रवृत्तिरूप वृक्षास निवृत्तिपर फळे लागून त्यांचा सडा खाली पडलेला दिसतो, तो याच मार्गावर! मृत्युंजय शंकरही याच मार्गाने चालतात. योगिवृंदांनी सतत त्यावरून वाटचाल केल्याने या आकाशींच्या (**योगपरिभाषेतील गगनातील**) मार्गावर मळलेली एक पाऊलवाट दिसू लागली. ती हाच ***पंथराज*** होय. याच मार्गाने महर्षी थोरावले; साधकांचे सिद्ध झाले. इतर मार्ग सोडून सर्व जाणकार याच मार्गाने योगसाधना करतात. एकदा का या मार्गास लागले की रात्रदिवस, तहानभूक , काळवेळ सर्व काही विसरायला होते. या मार्गावर पावलोपावली मोक्ष मिळतो

आणि चुकून या मार्गास सोडून आडवाट धरली तर त्या वाटांनीसुद्धा नाही म्हटले तरी स्वर्गसुखाचा लाभ होतो.

योगाभ्यास::::

बंधत्रय

ज्या ठिकाणी योगसाधकास पोहोचावयाचे आहे, तो गावच तो स्वतः या मार्गाने जातांना होऊन ठाकतो. या मार्गी साधकास स्वतः योगाभ्यास करावयाचे कष्ट करावे लागत नाहीत, तर तो अभ्यास आपोआपच केला जातो. या साधनेमुळे परमात्म्याचा स्पष्ट निःसंदेह साक्षात्कार घडतो.

सुंदर रमणीय अशा उपवनातील एकांत स्थानी साधकाने बसावे. आसन तयार करावे. त्यावर बसून मन एकाग्र करावे. चित्त व इंद्रिये यांचे नियमन करावे. सद्गुरुस्मरण करावे. ***मूळबंध*** लावावा. ***वज्रासन*** धारण करावे. शरीर, मस्तक व मान ही एका सरळ रेषेत ठेवून बसावे. निश्चळ राहावे. ***नासिकाग्रावर म्हणजे आज्ञाचक्रस्थानी अंतर्दृष्टी ठेवावी.*** इतर दिशांकडे पाहू नये. ***जालंधरबंध*** करावा. मूळबंध केल्याने प्राणापानांची गती रुद्ध होते व अपान आतल्या अंगाकडे वळू लागतो. जालंधरबंधानंतर ***वोढियाणाबंध (उड्डीयानबंध)*** केला जातो. त्यात पोट खपाटीला जाते व हृदयकोश प्रफुल्लित होतो. ***मूलबंध, जालंधरबंध आणि वोढियाणा बंध*** हेच योगशास्त्रात ***त्रिबंध वा बंधत्रय*** म्हणून विख्यात आहेत.

प्राणापानप्रक्रिया

असे हे तीन बंध जेव्हा घडतात, तेव्हा योगाभ्यासास खरी सुरुवात होते. आसनस्थ झाल्यावर सद्गुरुस्मरणपूर्वक हा प्राणायामाचा जो अभ्यास घडतो, त्यात *वज्रासनापासून सुरुवात करून मूळबंध, जालंधरबंध व वोढियाणा बंध असे त्रिबंध लावावे लागतात. या बंधत्रयांसह **अपानाची वाट मुरडणे** यांचा समावेश या अभ्यासाच्या प्रथम पायरीत केलेला आहे.* त्यासच ज्ञानेश ***"शरीराबाहेरिलीकडें पडणारी अभ्यासाची पांखर"*** असे म्हणतात. वस्तुतः हे सबाह्यांभ्यंतर ढवळून कढणारे साधन आहे. पण अद्याप अंतर्यामी त्या अभ्यासाचा प्रांत प्राथमिक पातळीपलीकडे विस्तारला गेलेला नाही. म्हणूनच ज्ञानेश या अवस्थेस ***"शरीराबाहेरील अभ्यासाची सावली"*** असे म्हणताहेत. पुढे वर्णन करत ज्ञानेश म्हणतातः

ऐसिं शरीराबाहेरिलिकडें। अभ्यासाचिं पांखर पडें।
तंव आंतु त्राएं मोडें। मनोधर्मांचिं।।६-२११।।
कल्पना निमें। प्रवृत्ति शमें।
आंग मन विरमें। सांवियांचि।।२१२।।
क्षुधा काइं जाहालिं। निद्रा केऊतिं गेलीं।
हें आठवणहिं हीरतलीं। न दिसें वेगां।।२१३।।

"अशी अभ्यासाची प्राथमिक अवस्था गाठली गेली की मनाचे धर्म लोपू लागतात. मनाचा कल्पना करणे, ही कल्पना घे, ती कल्पना सांड, या वृत्ती ओसरतात. त्याचप्रमाणे विषयांकडे धावण्याच्या व त्यांचे चिंतन करण्याच्या तसेच संकल्पप्रवण राहण्याच्या नैसर्गिक चित्तप्रवृत्तींचेही शमन होते आणि अंतःकरण आपल्यठायीच लीन होते. क्षुधा, निद्रा इ.स्वाभाविक प्रवृत्तींचा लोप होतो. त्यांची आठवणसुद्धा उरत नाही. हे सर्व अभ्यासास लागले की विनाविलंब घडते."

जो मूलबंधें कोंडला। अपानु माघौतां मुरडलां।
तो सवेंचिं वरिं सांकडलां। फुगु धरिं।।२१४।।
क्षोभलेपणें माजें। उवाइलां ठाईं गाजैं।
मणिपूरैंसिं झूंजैं। राहौनियां।।२१५।।
मग थांवलीं तैं वाहुंटलीं। सैंघ होऊनि घर डहुलीं।
बालपणींचिं कुहिटुलीं। बाहेरिं घालीं।।२१६।।
भीतरिं बलिं न धरैं। कोठेआं माझिं संचरैं।
कफपित्तांचें थारैं। उरौ नेदिं।।२१७।।

"मूळबंधामुळे कोंडून माघारी जो ***अपान*** मुरडलेला असतो, तो जेथल्या तिथे कोंडला जातो. त्यामुळे तो क्षोभतो आणि गर्जना करत नाभिस्थानचे ***मणिपूरचक्र*** जे असते, त्याच्यावर हल्ला करतो. त्यानंतर अपानवायूची ती वावटळ जरा स्थिरावते आणि सर्व शरीराचा शोध घेऊन लहानपणापासून नाड्यांमध्ये निर्माण झालेले व उपजत असलेले सर्व दोष हुडकून काढून त्यांचा नायनाट करते. मणिपूरचक्रात प्रवेश न मिळाल्याने तो अपानवायू उदरात संचार करतो आणि कफपित्त दोषांचा शोध करून ते समूळ नष्ट करतो."

धातूंचें समुद्र उलंडीं। मेदाचें पर्वत फोडिं।
आंतुलिं मज्जा काढिं। अस्थिगत।।६-२१८।।
नाडितैं सोडविं। गात्रांतैं विघडविं।
साधकांतैं भेडसविं। परि बिहावें ना।।२१९।।
व्याधितैं दाविं। सवेंचि हारविं।
आपु पृथ्वि कालविं। एंकवट।।२२०।।

"त्याचप्रमाणे सप्तधातूतील दोषांचा हुडकून नाश करत, मेदाचा जडपणासह बिमोड करत, अस्थीतील मज्जारज्जूंमध्ये प्रवेशून ते सर्व साफ करण्याचे कार्य तो माघौता फिरलेला अपानवायू करतो."

(**टीपः** यात पाठीच्या कण्यातून जाणाऱ्या पृष्ठवंशरज्जूचाही समावेश असतो. याच्याशीच संबंधित सुषुम्ना, इडा व पिंगला या नाड्याचे मार्ग असतात.)

"सर्व नाडिजाल साफसूफ करून देहदोष नष्ट करत असता त्या वायूद्वारे अवयवांतील रोग उफाळून येतात. तसेच साधकास भय वाटेल, असे विक्षेपही चित्तात त्या वेळी उपटतात. पण साधकाने यांमुळे घाबरून जाऊ नये. अवयवांना शैथिल्य येणे, व्याधी उपजणे, इ.विकारांचा परिहार तो अपानवायू स्वतःच करतो. साधकाच्या देहातील आप व पृथ्वी या दोन्ही महाभूतांचे अंश त्या वायूच्या क्रियेमुळे एकमेकांत कालवले जातात."

"औटवलणि कुंडलिनी"::::

"नागाचें पिलें। कुंकुमें नाहालें"

तंव एरिकडें अर्जुना। आसनाचां उबारां।
शक्ति करिं उजगरां। कुंडलिणिएं।।६-२२१।।
नागाचें पिलें। कुंकुमैं नाहालें।
वलण घेऊनि आलें। सेजैं जैसें।।२२२।।
तैसिं तैं कुंडलिणि। मोटकिं औठैवलणिं।
अधोमुख सर्पिणि। निदैलिं असें।।२२३।।

"कोंडलेल्या अपानाकडून हे कार्य बंधक्रियेमुळे घडत असता, वज्रासनामुळे उष्णता निर्माण होऊन त्यामुळे कुंडलिनीशक्तीस जागृती येते. केशराने न्हायलेले नागाचे पिलू वेटोळे घालून निद्रिस्त असावे, अशी दिसणारी ती सूक्ष्मातिसूक्ष्म द्रव्याच्या जडणघडणीची कुंडलिनी -मोटक्या साडेतीन मात्रांची ती शक्ती - सर्पिणीप्रमाणे भासते. ती आपले मुख अधोभागाकडे करून निद्रित असते. उपमा द्यावयाची तर विद्युल्लतेची वाटोळी कडी किंवा अग्नीच्या ज्वालेची केलेली घडी म्हणावी अथवा चोख चकचकीत सोन्याचे पिवळेधम्मक वळे असावे, तशी ती दिसते. संपुष्टात घट्टपणे दाबून ठेवावी, तशी ती असते."

कुंडलिनी जागृती

वज्रासनाच्या उष्णतेमुळे व योनिस्थानी पीडल्यामुळे ***("सव्य तो तळीं ठेविजैं। तेणें सिवणिमध्यु पीडिजैं।..।।६-१९७।।")*** ती चिमटे घेऊन जागे करावे तशी सावध होते. तारका तुटून पडावी किंवा सूर्याने स्थानावरून अकस्मात ढळून खाली पडावे, किंवा प्रकाशरूपी बीज अंकुरावे, तशी निमिषोन्मेषात आपले वेढे सोडवत, लीलया आपले अंग सरळ करत ती शक्ती कंदस्थानी खाली शेपूट व वर फणा केलेल्या नागिणीप्रमाणे उभी राहते.

कुंडलिनीच्या उत्थापनादी क्रिया

कुंडलिनीजागृती अवश्यंभावी **असणाऱ्या** पंथराजाचे पुढील मार्गक्रमण दर्शवत ज्ञानेश म्हणतातः

साहाजें बहुवां दिआंचिं भूक। वरि चेववि्लीं तैं होय मिख।
मग आवेसें पसरविं मुख। ऊर्ध्वा उजूं।।६-२२८।।
तेथ हृदयाकाशतलुवटीं। जो पवनु भरैं किरीटी।
तेयां सगलेंयांचि मिठी। देऊनि घालीं।।२२९।।
मुखिंचां ज्वालीं। तलीं वरीं कवलीं।
मांसाचिं वडवालीं। अरोगूं लागें।।२३०।।
जैं जैं ठांय समांस। तेथ आहाच जोडें घाऊस।
पाठीं एकदोन घांस। हियांहीं भरि।।२३१।।
मग तलुवैं तलुहाथ शोधिं। ऊर्ध्वींचें खंड भेदीं।
झाडां घें संधिं। प्रत्यांगाचां।।२३२।।

"निद्रेतून बऱ्याच काळाने जागृत झालेली ती कुंडलिनी भुकेने वखवखलेली असते. त्यातून तिला डिवचून जागे केल्याचे निमित्त मिळते. म्हणून काय गिळू अन काय नको- खाऊ की गिळू असे तिला होते. मग ती आपले मुख ऊर्ध्व बाजूकडे करून आ वासते. अर्जुना हृदयाकाशाच्या तळाकडील बाजूस जो प्राण भरलेला असतो, त्या सगळ्या वायूस ती खाऊन टाकते. मुखातून ज्वाळांचे लोळ टाकत, फुस्कारे सोडत ती देहांतरास खालपासून वरपर्यंत त्या ज्वाळांनी आक्रांत करते आणि त्यात सर्व दूरच्या मांसाचे घास ग्रस्त करते. जे जे मांसल ठिकाण असते, त्याचा वरच्यावर मोठा लचका तोडून तो भक्षिते आणि हृदयाच्याही मांसाचे एकदोन घास ती घेते. मग तळहात व तळपाय यातील सर्वांचे शोधन करून, अंगावरील मोठमोठे मांसखंड भेदून ती कुंडलिनी अंगप्रत्यंगांचा झाडा घेते."

आधार तन्हैं न संडी। परिं नखिंचेंहिं सत्त्व काढीं।
त्वचा धुवूनि जडी। पांजरेंसिं।।६-२३३।।
अस्थिंचें नलैं निरपैं। सिरांचैं हिर ओरपैं।
तंव बाहेरिं विरुढी करपैं। रोमबिजांचिं।।२३४।।
मग सप्तधातूंचां सागरिं। तान्हैलीं घोंटु भरिं।
आणि सवेंचिं उन्हाला करिं। खडखडीतु।।२३५।।
नासापुटौनि वारा। जो जात होतां आंगुलैं बारा।
तो गचियें धरौनि माघारां। आंतु घालिं।।२३६।।

"आपले मूलस्थान - आधार न सोडता ती हे सर्व करते. एवढेच काय त्याच ठिकाणी राहून नखांचे सत्त्व ओरबाडून घेते; त्वचेचा निचरा करते व तिला देहपंजराशी चिकटवून सोडते; अस्थिपंजर देहातील हाडांच्या नळ्या चोखून टाकते; शिरांच्या काड्यान्काड्या ओरपून घेते; अशा वेळी रोमकणिकांची बीजेच ती करपवून टाकते. सप्तधातूंचे सागर ती एकाच घोटात पिऊन टाकून देहांतरी उन्हाळ्याचा खडखडाट करते. नाकपुड्यातून सदोदित बारा अंगुळे येवढ्या परिसरात जो श्वास-प्रश्वाससंबंधाने वाहणारा वायू असतो, त्यास पकडून ती गच्च धरून पूर्णपणे देहांतरी दडपते." ***हीच कुंभकाची अवस्था आहे.***

चक्रनाड्यादी प्रक्रिया

तेथ अध वरौतैं आकुंचैं। ऊर्ध्व तलौतैं खांचैं।
तेआं खेंवांमाजिं चक्रांचें। पदर उरति।।६-२३७।।
यरविं तन्हैं दोनिं तेव्हांचि मिलति।
परि कुंडलिणी नांवेक दुश्चित होति।
तैं तेयांतैं म्हणें परौति। तुमिचिं कांइंसिं एथें।।२३८।।
आइकैं पार्थिव धातू आघवें। आरौगितां कांहिं नुरवैं।
आणि आपांतैं तंव ठेवें। पुसौनियां।।२३९।।
ऐसिं दोनिं भूतें खाएं। तैं वेलीं संपूर्ण धाएं।
मग सौम्य होऊनि राहें। सुषुम्नेपासिं।।२४०।।

"त्या समयी ऊर्ध्वीचा प्राणवायू तळाकडे खेचला जातो व अधोभागींचा अपान वायू वरच्या बाजूला ढकलला जातो. प्राणापान

एकमेकात मिसळतात. त्यांच्या त्या मिळणीत सापडलेल्या चक्रांचे केवळ नाममात्र अस्तित्व उरते. खरे तर प्राणापान आताच सम झाले असते. पण अजूनही कुंडलिनी क्षोभलेलीच असते. ती अद्याप शांत झालेली नसते. त्या क्षोभाने ती प्राणापानांनाही पुनः पिटाळून लावते. *"तुमची येथे काय गरज! तुम्ही चालते व्हा!"* असे ती प्राणापाणांना खडसावते. म्हणून ते सम न होता बाजूला सरतात. अर्जुना! अशा प्रकारे पृथ्वीतत्त्वास कुंडलिनी समग्र ग्रासते आणि आपतत्त्वासही चाटूनपुसून आपल्यात स्वाहा करते. पृथ्वी आणि आप तत्त्वांना -या दोन्ही महाभूतांना भक्षण केल्यावर तिची तृप्ती होते. मग ती सौम्य होऊन सुषुम्नामुखाजवळ पहुडते"

कुंभकाची सिद्धी

अशा प्रकारे पृथ्वी व आप या तत्त्वांचा ती ***कुंडलिनी*** आपल्यात लय करवून घेते. त्यापुढच्या प्रक्रिया सांगत ज्ञानेश म्हणतातः

तेथ तृप्तिचेनि संतोखें। गरल जैं वमि मुखें।
तेणें तियेचेनि पीयूखैं। प्राणु जियें।।६-२४१।।
तो आगिंआंतूनि निघें। परिं सबाह्य निववूंचि लागें।
तैं वेलीं कसु बांधिति आंगें। सांडिलां पुडुति।।२४२।।

"त्या वेळी तृप्तीने संतोष पावलेल्या त्या कुंडलिनीच्या मुखातून गरळ ओकले जाते. आणि तिच्या मुखातून अमृतही बाहेर पडते. त्या अमृताच्या योगाने पांगुळलेला प्राणवायू जिवंत राहतो. गरळरूपी अग्नीतूनच हे अमृत प्रकट होत असते. अमृतमंथनाच्या वेळी जसे हलाहल बाहेर पडले आणि नंतर अमृत मिळाले , तसेच हे देहाचे घुसळण होते. त्या अमृताचे सेवन केलेला प्राण मग सर्व शरीरास अंतर्बाह्य सुखावतो आणि शांत करतो."

(**टीप:**देवदानवांनी केलेले क्षीरसागरमंथन अन् त्यातून झालेली हलाहल व अमृतप्राप्ती यांचे रूपक येथे आहे. वासुकी सर्प म्हणजे कुंडलिनी, मेरुपर्वत म्हणजे मेरुदंड इ.उपमा येथे वापरल्या जातात.)

मार्ग मोडिथि नाडीचें। नवविधपण वायूचें।
जाएं म्हणौनि शरीरिचें। धर्मु नाहीं।।६-२४३।।
इडा पिगला एकवटथि। गांठी तिान्हिं सूटति।
साही पदर फुटथिं। चक्रांचें हें।।२४४।।
शशि आणि भानु। ऐसां कल्पजैं जो अनुमानु।
तो वातिवरिं पवनु। गिंवसितां न दिसें।।२४५।।

"तसेच सर्वांगात चेतना संचारते. देह निव्वळ चेतनामय होऊन जातो त्या वेळी शरीरातील नाड्या एकवटतात. शरीरातील वेगवेगळ्या नाड्या ज्या वेगवेगळ्या मार्गांनी जातात, त्यांचे विविधत्व लोपते. प्राणवायूचे ***अपान, उदान, समान, व्यान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय*** इ.नऊ प्रकार जाऊन केवळ एकला प्राणवायूच सर्वदूर संचारतो. **इडा-पिंगळा एकवटून सुषुम्नेत मिळतात. ब्रह्म, विष्णु व रुद्र या तिन्ही गाठी सुटतात. षट्चक्रे जी नाममात्र उरलेली असतात- मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा ही षट्चक्रे - ती लोपतात. *शशी व भानु*** हे उजव्या व डाव्या नासिकांतून वाहणारे ***इडा व पिंगलारूप* पूरक व रेचक** असे प्राणवायूचे अवस्थानिदर्शक प्रकार उरत नाहीत. नाकापुढे सूत लावले असता प्राणांचे वाहणे स्तब्धावले आहे, असे जाणवते व कुंभक साध्य होतो. त्यावेळी शरीरधर्म राहत नाहीत."

"पिंडाचेनि आकारें। कलाचिं अवतरैं"

बुद्धीची पुलिका वीरैं। परिमलु घ्राणिं उरैं।
तोहिं शक्तिसवें संचरैं। मध्यमेमाजिं।।६-२४६।।
तंवं वरिलेकडौनि ढाळैं। चंद्रामृताचें तळैं।
कानवडौनि मिळैं। शक्तिमुखिं।।२४७।।
तेणें नातकें रसु भरैं। तो सर्वांगामाझिं संचरैं।
जेथिंचां तेथ मुरैं। प्राणपवनु।।२४८।।

"अशा समयी बुद्धी विरून जाते. नासांतरी राहिलेला स्तंभित वायू शक्तीबरोबरच सुषुम्नेत प्रवेशतो. त्या वेळी वरलीकडले चंद्रामृताचे तळे हळूहळू कलते होऊन कुंडलिनीमुखात ओतले जाते. कुंडलिनीमध्ये ते अमृत भरते आणि सर्वांगात संचरते. त्या वेळी दशविध वायूंचा एकात समावेश होऊन जो उरलेला असतो तो प्राणवायू जिथल्या तिथे मुरतो."

तातलिएं मुसैं। मेण निघौनि जाएं जैसें।
कोंदलीं ठाएं रसें। वोतलेनि।।६-२४९।।
तैसें पिंडाचेनि आकारैं। तैं कलाचिं कां अवतरैं।
वरि त्वचेचैनि पदरैं। पांघुरिलीं असें।।२५०।।
जैसिं आभालाचिं बूंथि। करूनि राहें गभस्ति।
मग फिटैलेयां दीप्ति। धरूं नैएं।।२५१।।
तैसां आहाचिवरिं कोरडा। त्वचेचां असे पातवडा।
तो झडौनि जाएं कोंडा। जैसां होएं।।२५२।।

"तापवल्यावर मुशीत ठेवलेले मेण वितळून जाऊन द्रवरूप होऊन त्यामुळे ती मूस जशी भरून राहावी, त्याप्रमाणे वरील पिंडाकार शरीरात मूर्तिमंत ***सतरावी कळा***च अवतरते.अभ्राच्या आवरणाने अवगुंठित असा सूर्य जसा असावा, तसा त्वचेच्या पापुद्र्याच्या पडद्याआड त्या कळेचा झाकलेपणा असतो. अभ्र फिटून गेले की सूर्याचे तेज जसे आवरून धरता येत नाही, त्याप्रमाणे शुष्क झालेल्या कातडीचा कोंडा झडून गेल्यावर त्या कलेचे तेज सर्वदूर फाकते."

"जैं हेलिं कुंडलिनी चंद्रु पिएं"

मग काश्मिराचें स्वयंभ। कां रत्नबीजां निगालें कोंभ।
अवयवकांतिचिं भांभ। तैसिं दिसें।।६-२५३।।
ना तन्हैं संध्यारागिंचें रंग। काढूनि वलिलैं तैं आंग।
किं अंतर्ज्योतिचें लिंग। निर्वाललैं।।२५४।।
कुंकुआचें भरिंवं। सिद्धरसाचें ओतिवं।
मज पाहतां सावेव। शांतिचि तैं।।२५५।।

"तेव्हा मूर्तिमंत स्फटिकच दृश्यमान व्हावा , रत्नरूपी बीजास प्रकाशाचे अंकुर फुटावेत, तशी त्याच्या देहावयवांची कांती दिसू लागते. संध्यासमयी पश्चिमेकडे आकाशात उधळले जाणारे रंग घेऊन त्यांची मूर्ती घडवावी, चैतन्यज्योतीचे लिंग घडवावे, अथवा केशराची भरीव आकृती करावी किंवा अमृताचा ओतीव पुतळा घडवावा, तसा तो साधक दिसू लागतो. मला तर असेही वाटते की तो साधक म्हणजे सावयव शांतीचे मूर्त रूपच असतो."

तैं आनंदचित्रिचें लेप। ना तन्हैं महासुखाचें रूप।
किं संतोखतरूचें रोप। थांवलैं जैसें।।६-२५६।।
तो कनकचंपकाचां कलां। किं अमृताचां पुतलां।
नाना सांसिन्नलां मलां। कोंवलिकेचां।।२५७।।
हो कां जैं शारदियेचियें ओलैं। चंद्रबिंब पाल्हैलैं।
कां तेजचिं मूर्त बैसलैं। आसनावेरिं।।२५८।।
तैसें शरीर होएं। जै हेलीं कुंडलिनी चंद्रु पिएं।
मग देहाकृतिं बिहैं। कृदांतु गां।।२५९।।

"तो योगी जणू काय आनंदरूपी चित्रातील रंग अथवा महासुखाचे रुपडे किंवा जोमात उफाळलेले संतोषरूपी वृक्षाचे रोपटेच असतो. सोनचाफ्याची मोठी कळी किंवा अमृताचा भरीव पुतळा अथवा नजाकतीचा बहरलेला मळाच असावा, असा तो साधक तेव्हा भासतो. शारदीय वातावरणातील उल्हास पिऊन चंद्रबिंबाने पाझरावे किंवा मूर्तिमंत तेजच आसनस्थ व्हावे, तसा तो योगी मनोहारी रूप प्रकटवतांना दिसतो. कुंडलिनी जेव्हा चंद्रामृत पिते, तेव्हा योग्याचा देह अशा अद्वितीय स्वरूपात परिणत होतो. त्या समयी तो देह पाहून कळिकाळासही पळून जावे लागते."

"परि लाघौ ऐं वायूचें"

वृद्धाप्य तन्हैं बहुडैं। तारुण्याचिं गांठि विघडैं।
लोपलीं उघडैं। बालदशा।।६-२६०।।
वयसा तन्हैं येतुलेंवरीं। एरविं बलाचां बलार्थु करिं।
धैर्याचिं थोरिं। निरुपम।।२६१।।
कनकद्रुमाचां पालविं। रत्नकलिकांचि नित्य नविं।
नखैं तैसिं बरविं। नविं निघतिं।।२६२।।

"त्या देहापासून वृद्धत्व माघारी फिरते, तारुण्य फिटते आणि मूळ बाल्यावस्था विराजमान होते. बालकत्व अंगी आले तरी बळाची व धैर्याची थोरवी निरुपम असते. कुवलयापीड गजास किशोररूप श्रीकृष्ण-बलरामांनी जसे लीलया पीडले, त्याची आठवण जागी करून देणारे बल- वीर्य- धैर्य तो योगी अंगी बाळगत असतो. कांचनवृक्षास रत्नकलिका- शुक्तिपल्लव प्रकटावेत तशी नव्हाळीची नखे त्याला येतात. त्यांची कांती काही औरच असते."

दांतहिं आन होति। परि अपाडें सांनैजति।
जैसिं दोबाहिं बैसें पातिं। हिरेयांचिं।।६-२६३।।
माणिकुलियांचियां कणियां। सावियांचि अणुमानियां।
तैसियां सर्वांगिं उधवति अणिया। रोमांचियां।।२६४।।
करचरणतलैं। जैसिं कां रातोत्पलैं।...।।२६५।।

"दातांच्या नवीन कुंदकळ्याही प्रकटतात. त्या अशा दिसतात की जणू हिऱ्यांच्या दोन पंक्ती एकावर एक बसवल्या असाव्यात! सर्वांगावरील रोम तर असे असतात की जणू माणिकाचे सानुले कणच सर्वदूर पसरलेले आहेत. करतल व चरण तर जशी काही रक्तवर्ण कमलपुष्पेच असावीत असे दिसतात."

...। पाखालीं होथिं डोलैं। काइं सांघों।।६-२६५।।
निडाराचेनि कोंधाटें। मोतियें नावरति संपुटैं।
मग सिवणि जैसिं उतटें। शुक्तिपल्लवांचिं।।२६६।।
तैसिं पातिचियें कवलियें ना सामाएं।
दिठी जाकलौनि निगों पाहें।
आधिलिंचिं परि होएं। गगना कलितिं।।२६७।।

"चक्षू तर स्फटिकच असावेत असे स्वच्छ दिसतात. भरगच्च वाढलेला मोती जसा शिंपल्यात मावेनासा झाल्याने शिंपीच्या संपुटाची शिवण उकलते, तसे दृष्टीचे होते. पापण्यांच्या पात्यात दृष्टी मावत नाही, म्हणून त्या पापण्या अर्धोन्मीलितच राहतात. दृष्टी जरी अर्धोन्मीलित पापण्यांना भेदून बाहेर पडत असली, तरी ती गगनास गवसणी घालते."

आइकैं देह होएं सोनियाचें। परि लाघौ ऐं वायूचें।
जैं पृथ्वि आन आपाचें। अंशु नाइं।।६-२६८।।

"अर्जुना! त्या योग्याचा देह असा सुवर्णचंपकासारखा होतो. सुवर्णकांतीने वेष्टिला गेलेला तो देह मात्र वायूसारखा हलका व चपळ असतो. कारण मगाच सांगितल्याप्रमाणे त्यातील पृथ्वी व आपतत्त्वांचा निरास होऊन त्यांचा अंशही त्या देही उरत नाही."

समारोप

यानंतर अशा योग्यास प्राप्त होणाऱ्या सिद्धींचे ज्ञानेश अत्यंत संक्षिप्ततेने वर्णन करतात. त्याविषयी अधिक विचार व योगसिद्धींचे परीक्षण, तसेच पंथराजाचे पुढील मार्गक्रमण येत्या **उन्मेष क्र.४४-२: योगविभवभाण्डार - कुंडलिनी जगदंबा** यात करता येईल. तर आता वळू या कुंडलिनी जगदंबेच्या पुढील रूपदर्शनाकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४४-२::
::योगविभवभाण्डार::
:: कुंडलिनी जगदंबा::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४४-२:

गीताः
२:६१,६४
५:१६
६:१६,
७:६,७,१२,१६-१९
१०:२०
११:२५,३१,४४,४५
१४:६,११
१८:१६,१८,६२,

ज्ञानेश्वरीः
२:२७३
६:२४६-२९०,२९२-३३३
१८:१७१९-२०

पा.यो.सू.:
१:२,१५,१७-२२,२९,३२-५१
३:१-२६,२९-५५
४:५

::उन्मेष ४४-२::
::योगविभवभाण्डार::
::कुंडलिनी जगदंबा::

ऋतंभरा प्राप्तीचा मार्ग::::

योगसिद्धी

गत उन्मेषात आपण पंथराजाचे मार्गक्रमण पाहतांना योग्यास ज्या सिद्धी प्राप्त होतात, तेथपावेतो येऊन थांबलो होतो. योगसाधकांस भुरळ पाडणारा जो हा सिद्धींचा प्रांत आहे, त्याचे बरेच सविस्तर वर्णन इतरत्र पाहण्यास मिळते. उदा. पातञ्जलयोगसूत्रातील ***विभूतिपाद*** म्हणून विख्यात असणारे प्रकरण या सिद्धींच्या विषयासच वाहिलेले आहे.

श्रीमद्भागवताच्या ***एकादश***स्कंधातही सिद्धींचे एका संपूर्ण प्रकरणात वर्णन केलेले आहे. संत श्रीएकनाथांनी आपल्या भागवतात त्यांचे तसेच सविस्तर वर्णन केलेले आहे. लोकांची अशी श्रद्धा आहे व विद्वानांचे असे मत आहे की ज्ञानेश्वरीचा उर्वरित भाग तिला पूरक अशा समजल्या जाणाऱ्या श्रीएकनाथी भागवतात आहे म्हणून! गीतेत या सिद्धींविषयी प्रत्यक्ष उल्लेख आढळून येत नाही.

सर्वानुमते सिद्धी या योगमार्गात उद्भवणारे विघ्न आहे. सिद्धिप्रादुर्भवाने साधकास आपली योगमार्गात किती प्रगती झाली आहे, याचा अंदाज जरी घेता येत असला, तरी त्यांच्या मोहात गुंतून पडल्यास योगसाधनेत अंतराय येण्याची शक्यता फार असल्याने सर्व साधुसंत- योगी- द्रष्टे पुरुष साधकांस त्यांच्यांत भुलून कर्तव्यच्युत न होण्यासंबंधी निर्वाणीचे उद्गार काढतांना दिसतात. असो.

ज्ञानेश मात्र या योगसिद्धींचे त्रोटक पण प्रसंगोपात्त वर्णन करतांना आढळतात. परंतु त्याचवेळी योगसाधकांना सावधानतेचा इशारा देण्यास विसरत नाहीत, हेही खरे. ते म्हणतात की जेव्हा योग्याचा देह असा योगाने मंडित होतो(***आइकैं देह होएं सोनियाचें। .....।।६-२६८।।***-*उन्मेष:४४-१:योगविभवभाण्डार-पंथराज पृ.क्र.७२६*), तेव्हा:

मग समुद्रापैलाडीं देखैं। स्वर्गिचां आलोचु आइकैं।
मनोगत ओलखैं। मुंगिएंचें।।६-२६९।।
पवनाचां वारिका वलघैं। चालैं तऱ्हैं उदकीं पाओ न लगें।
एणें एणें प्रसंगें। एतिं बहुतां सिद्धीं।।२७०।।

"योगी जेव्हा या अवस्थेप्रत पोहोचतो, तेव्हा त्याला खूप सिद्धी प्राप्त होतात. सातासमुद्रापलीकडे घडणारी घटना पाहता येण्याची ***दूरदर्शन***नामक सिद्धी, स्वर्गात चालणारे विचार ओळखता येण्याची सिद्धी, मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वांच्या अंतर्यामीचे विचार ओळखता येण्याची सिद्धी, वायुप्रमाणे सर्वत्र संचार करता येणे अशी ***सर्वगामित्व*** सिद्धी, पाण्याचा स्पर्शही न होता पाण्यावरून चालत जाता येणे, अशा अनेकानेक सिद्धी त्याला त्या वेळी प्राप्त होतात."

याप्रमाणे योगसिद्धींचे ज्ञानदेव थोडक्यात वर्णन करतात.

पातञ्जलयोगविभूति व कुंडलिनी

असे आहे तरीही या विषयासंबंधी व मुख्यतः सिद्धी व योगसाधना यांचा वैज्ञानिक संबंध तपासून पाहण्यासाठी आपण साधकांच्या दृष्टीने यामागचे विज्ञान जमेल तेवढे जाणून घेणे योग्य ठरेल. तरी *पतञ्जली* या योगविभूतींविषयी काय म्हणतात, ते संक्षेपाने पाहू या. त्यासाठी आपणास पतञ्जलींनी सूत्रबद्ध केलेल्या समाधीच्या गूढ अंतरंगात डोकावणे आवश्यक ठरते.

अष्टांगयोगाची पाच ***बहिरंग*** अंगे म्हणजे ***यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार*** यांचा अभ्यास परिपक्व झाला की साधक आपोआपच ***धारणा, ध्यान व समाधि*** या त्याच्या तीन *अंतरंग* अंगांस आपलेसे करून घेण्याकडे वळतो. पहिल्या पाच योगांगांचा ***साधनपाद*** नावाच्या पातञ्जलयोगसूत्रांच्या द्वितीय भागात परामर्ष घेतलेला आहे. आपणास जमला तितका त्यांच्याविषयीचा तसेच समाध्यादी अंगांचाही विचार आपण पूर्वी केलेला आहे *(उन्मेष ६:श्रीगीता व पातञ्जलयोग:पृ.क्र.९५ ते १०१;उन्मेष(८):पंथराज:पृ.क्र.१२०ते१३१व इतरत्र).*

गीतेचा गाभा खरे तर ***धारणा, ध्यान व समाधि*** यांच्याशी अभिन्न आहे. त्यातही कुंडलिनीची अजोड सांगड या अंतरंग योगांगांशी घालून देऊन ज्ञानेशांनी गुह्यातिगुह्य असे योगरहस्य प्रकट केलेले आहे. हे रहस्य उघडउघड सांगण्यास ना तर श्रीकृष्ण तयार होते, ना पतञ्जली! याच एका कारणाने ज्ञानेश्वरीची योगप्रांतात एकमेवाद्वितीय अशी गणना केली पाहिजे. कुंडलिनीचे रहस्य व तिचे योगसाधनेत असणारे मध्यवर्ती स्थान लक्षात घेतलेल्या ***श्री. कृ.के. कोल्हटकर*** या आधुनिक योगमहर्षींनी तिचा पातञ्जल योगसूत्रांशी संबंध साधनपादाच्या प्रथम सूत्रावर भाष्य करतांना त्यांच्या ***भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ व सविवरण पातञ्जलयोग-दर्शन*** या ग्रंथात दर्शवला आहे. ***"देशबंधश्चित्तस्य धारणा।।३-१।।पा.यो.सू.।।"*** असे ते प्रथम सूत्र आहे.

अंतरंग योगांगे::::

धारणा व चित्ताचा निरोध

चित्त निश्चल करणे, स्थिर करणे, एखाद्या विषयावर ते एकाग्र करणे यासाठी ***धारणा, ध्यान व समाधि*** यांचा अभ्यास साधकाने करावयाचा असतो. या अभ्यासाने साध्य केलेल्या चित्ताचे वर्णन श्रीगीतेत येते, ते असे आहे:

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोमपा स्मृता।
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः।।६-१९।।

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति।।६-२०।।

"निर्वात स्थानी असणारी दीपज्योत जशी हलत नाही, त्याचप्रमाणे आत्मयोगाचे आचरण करणाऱ्या योग्याच्या चित्ताची स्थिरता असते. योगाभ्यासाने नियमन केलेल्या अशा सुस्थिर व निरुद्ध चित्ताने योग्यास आत्मसाक्षात्कार होतो. अतींद्रिय अशा त्या आत्म्याच्या साक्षात्काराने तुष्ट झालेला योगी परमाधिक सुख पावतो व आत्मज्योतीपासून पुनश्च कधीही विचलित होत नाही."

योगदर्शनशास्त्रात याच स्थितीस पोहोचण्यासाठी ***"योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।। पा.यो.सू.।।"*** असे परवलीचे सूत्र आरंभीच सांगितलेले आहे, हे जिज्ञासूंना निश्चितच स्मरत असेल. असो.

ध्यान, समाधि व संयम

चित्तास विवक्षित देशावर बांधून घालणे म्हणजे ***धारणा .*** देश म्हणजे चित्ताने लक्षिलेला विषय, स्थान, विचार वा तत्सम चित्ताकर्षण करणारी गोष्ट. धारणेचे सातत्य किंवा नैरंतर्य म्हणजे ***ध्यान.*** या अर्थी पतञ्जली म्हणतातः ***"तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्।।३-२।।पा.यो.सू.।।"*** - चित्ताने आलंबन म्हणून जी गोष्ट घेतली असेल, तिचे प्रतिक्षणी सातत्य राखणे - ***चित्त त्याच भावनेवर एकतान करणे व असे निरंतर करणे म्हणजे ध्यान करणे.***

ध्यानाची परिपक्व अवस्था म्हणजे *समाधि.* स्वतःचेही भान हरपून जाऊन भाव्य विषयाशी अखंड एकरूपता प्राप्त होणे ही समाधि होय. यास्तव पतञ्जली म्हणतात की, ***"तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः।।३-३।।पा.यो.सू.।।"*** - भाव्य वस्तुव्यतिरिक्त कोणताही अर्थ चित्तास प्रतीत न होणे, एवं च काय! आपण भाव्य वस्तूचे ध्यान करत आहोत, असे पण न जाणवणे, ध्येय्य वस्तू व आपण यातील अद्वैत प्रस्थापित होणे, हा समाधि होय. समाधिकाली स्वरूपशून्यता प्राप्त होत नसली, तरी तत्सदृश अवस्था प्राप्त होते. ध्येय्य वस्तूशी इतकी चित्ताची एकाग्रता होते, तो समाधि समजावा.

सर्वासाधारणतया धारणेचा देश, ध्यानाचा विषय व समाधि हे एकाच वस्तू वा भाव्याशी संबंधित असतात, त्यांचे असे अभिन्नत्व ध्येय्यवस्तुसापेक्ष असणे म्हणजे ***संयम.*** धारणा, ध्यान व समाधि एकाच भाव्य वस्तूशी पूर्णतया संबंधित असल्यास पतञ्जली म्हणतात तसा ***"त्रयमेकत्र संयमः।।३-४।।पा.यो.सू.।।"***- संयम साध्य होतो.

ऋतंभरा प्रज्ञा

संयम साध्य झाला म्हणजे संयमावर जय मिळवला की ***प्रज्ञा*** उदित होते. ***"तज्जयात्प्रज्ञालोकः।।३-५।।पा.यो.सू.।।"*** उत्कट, प्रकर्षाने एखाद्या विषयाचे ज्ञान प्राप्त होणे हे प्रज्ञेचे फल आहे. अशी प्रज्ञा संयमाच्या सिद्धीने प्राप्त होते, असे पतञ्जली म्हणताहेत. अशा प्रज्ञेचा जसा विनियोग साधक करील, तसे फल त्याला प्राप्त होते. ***ऋतंभरा*** असे या प्रज्ञेचे सार्थ नाम आहे.

ही प्रज्ञाच योग्याठायी सिद्धींचा प्रादुर्भाव करवते. खरे तर ही प्रज्ञा योग्यास ***असंप्रज्ञात समाधि*** प्राप्त करून देणारी आहे. परंतु चित्तातील संस्कारांचा पूर्ण लोप व्हावा म्हणून ही प्रज्ञा जेव्हा प्रथम उदित होते, तेव्हा विषयोपभोगसंस्कारांच्या प्राबल्यामुळे सिद्धींचा अभिभव होतो. योगी त्याने इच्छिलेली गोष्ट तत्काळ प्राप्त करून घेतो. पण ***"उपभोगेन न शम्यते कामम्"*** या वचनाप्रमाणे जर तो उपभोगलालसेत गुरफटला गेला तर त्याचे असंप्रज्ञात समाधीचे गंतव्यस्थान दूर जाते. याचसाठी सिद्धींना योगमार्गातील अडथळा असे ज्ञाते म्हणतात. असो.

निर्बीज समाधीचा मार्ग

सिद्धिदा अशी जी ही ***ऋतंभरा प्रज्ञा*** आहे, ती सर्वश्रेष्ठ प्रज्ञा होय. ही इतर प्रज्ञाप्रकारांहून कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे, ते स्पष्ट करत पतञ्जली म्हणतातः ***"श्रुतानुमानप्रज्ञाभ्यामन्यविषया विशेषार्थत्वात्।।१-४९।।पा.यो.सू.।।"*** - शब्द, वेद, आगम इ.पासून ज्ञान करून देणारी ती ***श्रुतप्रज्ञा.*** अनुमानाने ज्ञान होते. त्यास कारण असते ती ***अनुमानप्रज्ञा.*** या दोन्ही प्रज्ञाप्रकारांमुळे होणारे ज्ञान सर्वसामान्यांच्या पातळीवरचे असते. ऋतंभरा प्रज्ञेमुळे होणारे ज्ञान व त्याचा विषय या इतर प्रज्ञांना अगम्य असतो.

या प्रज्ञेचा उदय झाला की अन्य विषयांचे संस्कार लोपतात. या अर्थीच पतञ्जलींनी म्हटले आहे कीः ***"तज्जः संस्कारोऽन्य-संस्कारप्रतिबंधी।।१-५०।।पा.यो.सू.।।"*** ऋतंभरा प्रज्ञेचे संस्कार अत्यंत प्रबल असल्याने असे घडते. या प्रज्ञेच्या संस्कारांचासुद्धा योग्यास निरोध करावा लागतो. ***"तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः।।१-५१।।पा.यो.सू.।।"*** - अशा संस्काराचा निरोध केल्याने सर्वमेव संस्कार निरोधित होऊन ***निर्बीज समाधि - कैवल्यावस्था*** -प्राप्त होते.

समाधिश्रेणी

समाधीच्या उत्तरोत्तर अशा ***सवितर्क, निर्वितर्क, सविचार व निर्विचार*** या श्रेणी पतञ्जलींनी सांगितल्या आहेत. त्यातील निर्विचार समाधिव्यतिरिक्तच्या इतर अवस्था - ***"ता एव सबीजः समाधिः।।१-४६।।पा.यो.सू.।।"*** - अशा ***सबीज*** म्हणजे संसारातील आवागमन न चुकवणाऱ्या असतात. कारण त्यांत वासनांचा पूर्ण लोप होऊ शकत नाही. परंतु ***निर्विचार समाधि*** पुढील योगाभ्यास साधून देऊन साधकास मुक्तिप्रत पोहोचविते.

"निर्विचारवैशारद्येऽध्यात्मप्रसादः।।१-४७।। पा.यो.सू.।।"- निर्विचार समाधीत मल नाहीसा होऊन चित्त निर्मळ झाल्याने ***अध्यात्मप्रसाद*** होतो. अर्थात त्यासाठी हा समाधि पक्वावस्थेच्या ***वैशारद्यावस्थेप्रत*** अभ्यासावा लागतो. या समाधीतून ***ऋतंभरा प्रज्ञा*** प्राप्त होते. ***"ऋतंभरा तत्र प्रज्ञा।।१-४८।।पा.यो.सू.।।"*** अशी प्रज्ञा साधकास सिद्धिदा व मोक्षप्रद ठरते, असा पतञ्जलींचा योगविषयक दृष्टिकोन आहे.

ऋतंभरा प्रज्ञा, सरस्वती व कुंडलिनी

या सर्व विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे ही ***ऋतंभरा प्रज्ञाच कुंडलिनी उदयाशी व उत्कर्षाशी संलग्न असली पाहिजे.*** याचसाठी ***प्रबुद्धावस्था व कुंडलिनीजागृती यांचा अन्योन्य संबंध*** असल्याचे योगशास्त्राचे आनुभविक मत आहे. ***सरस्वति*** ही प्रबुद्धावस्थेची देवता असल्याने कुंडलिनीशक्तीचे ***सरस्वति*** असेही एक नाम प्रचुर आहे. ***ऋतंभरा प्रज्ञा, सरस्वति व कुंडलिनी*** ही नामे अशी एकमेकांशी घनिष्ट संबंध ठेवतात.

आतापावेतो ***विभूतिपाद*** या पातञ्जलयोगसूत्रांच्या प्रकरणी या प्रज्ञेसंबंधी व ती ***धारणा - ध्यान - समाधि - संयम*** या मार्गाने कशी उपलब्ध होते, त्याबाबत आपण परिशीलन केले. याच प्रज्ञेबाबत ***समाधिपाद*** या त्याच ग्रंथाच्या प्रकरणांती निर्देशित केलेल्या काही महत्त्वाच्या सूत्रांचा आपण पूर्वीच परिचय करून घेतला आहे *(उन्मेष क्र.६व८ उक्त)*. तेथील प्रज्ञाउदयाबाबतच्या इतर काही उल्लेखनीय सूत्रांचाही परामर्ष घेणे उचित ठरेल. तिकडे आता वळू या.

योगातील अंतराय व त्यावरील उपाय

"ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च।।१-२९।। पा.यो.सू.।।" - याद्वारे ईश्वरप्रणिधानामुळे साक्षात्कार होतो आणि योगसिद्धीतील अडथळ्यांचा नाश होतो, हे सांगितले आहे. *व्याधि, स्त्यान* इ.नऊ प्रकारचे योगमल वा योगातील विक्षेप होत. चित्तस्थैर्याची प्राप्ती होण्याच्या योगमार्गातील ही विघ्नेच होत. त्याचप्रमाणे या विघ्नांचे सहकारी असे *दुःख-दौर्मनस्यादी* पाच उपद्रवही साधकांना योगसिद्धीपासून विचलित करतात.

यांचा जसा ईश्वरप्रणिधानामुळे नाश होतो, तसाच ***एकतत्त्वाभ्यास*** म्हणजे ध्यानामुळे, मैत्री, करुणा, मुदिता व हर्ष अशा भावनांमुळे, प्राणायामादी उपायांमुळे, विषयवति प्रवृत्ती योगाभ्यासबलाने उत्पन्न केल्यामुळे, इ.मुळेही हे अडथळे दूर होतात. ***पातञ्जलयोगसूत्रे १-३२ ते १-४० समाधिपाद*** या भागात हा सर्व विषय येतो. त्यांचा धावता आढावा घेणे योगसाधकांसाठी इष्टच आहे.

एकतत्त्वाभ्यास

एकतत्त्वाभ्यास करण्याविषयी पतञ्जली म्हणतातः ***"तत्प्रतिषेधार्थमेकतत्त्वाभ्यासः।।१-३२।।पा.यो.सू.।।"*** - एका कोणत्याही तत्त्वावर वा विषयावर धारणा करून समाधिपर्यंत योगाभ्यास करावा. ***"मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्यविषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम्।।१-३३।।पा.यो.सू.।।"*** - *सुख, दुःख, पुण्य व पाप* या चार विषयांबाबात *मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा* असे भाव अनुक्रमे धारण करावेत. म्हणजे चित्त प्रसन्न होते. *राग-द्वेष व इच्छा* यांपासून हे चार विषय उत्पन्न होतात व त्यांच्यामुळे साधकास चित्यैकाग्र्य साधणे कठीण जाते. म्हणून पतञ्जली हे उपाय सांगतात.

प्राणायाम

"प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य।।१-३४।।पा.यो.सू.।।" - ***प्राणांचा आयाम म्हणजे प्राणायाम*** **विधिवत करणे**, त्यासाठी श्वास-प्रश्वासाची गती नियंत्रित करणे याने पण चित्त प्रसन्न व उपशांत होते. सर्वसामान्य साधकानेही हा अनुभव घेतला असेल की जेव्हा रागाने किंवा हर्षाने वा उन्मादाने आपले चित्त प्रक्षुब्ध झालेले असते, तेव्हा सावकाश दीर्घ श्वसन करून उच्छ्वासही सावकाश केल्याने चित्ताचा प्रक्षोभ कमी होतो. श्वासाचा चित्ताशी व एकूण शारीरिक व मानसिक क्रियांशी, तसेच कुंडलिनी उत्थापन व नियंत्रण यांच्याशी अत्यंत निकटचा संबंध आहे, असे योग्यांचे अनुभवसिद्ध मत आहे.

हठयोग्यांचा प्राथमिक अभ्यास तर प्रमुखतः श्वासोच्छ्वास प्रक्रियेवरच आधारलेला असतो. यालाही एक कारण आहे. पतञ्जली वा *हठयोगी* हे जाणून आहेत की मुख्य प्राणिक नाड्या ज्यांना योगशास्त्रात ***इडा, पिङ्गला व सुषुम्ना*** म्हणून नावे आहेत, त्या सर्व पृष्ठवंशरज्जूस्थानाशी संबंधित असलेल्या एका ***चित्रा*** नाडी व इतर सांघिक नाडीसमूहाचा भाग आहेत. सूक्ष्मातिसूक्ष्म चित्तसदृश द्रव्याच्या या सर्व नाड्या असून त्या प्राणवाहक आहेत.

त्यातील ***इडा व पिंगला*** यांचा एक फाटा अनुक्रमे वाम व दक्षिण नासिकांतून जात असतो, असे योगविज्ञान सांगते. श्वास व प्रश्वास यांचा या नाड्यांच्या स्थितीशी घनदाट संबंध आहे. म्हणून प्राणायामाने या नाड्यांच्या कार्यावर परिणाम होतो. चित्तातील क्षोभाचा *इडा व पिंगला* या नाड्यांच्या आतील प्राणप्रवाहावर विपरीत परिणाम होतो.

चित्त जेव्हा सुस्थिर असते, शांत असते, तेव्हा या नाड्यांचा प्रवाह सुनियंत्रित सुनिश्चित असा चालू राहतो. या नाड्यांच्या आतील प्राणांचा रागद्वेषादींमुळे होणाऱ्या विक्षेपाचा दृश्य परिणाम म्हणजे श्वासोच्छ्वासाच्या गतीत अनियंत्रितता येणे - ती जलद होणे वा संथावणे इ. या सर्वांवर ***प्राणायाम*** हा उपाय आहे आणि तोच पतञ्जलींनी उक्त सूत्रातून सांगितलेला आहे.

हठयोगीसुद्धा या इडा पिंगलांच्या नासिकामार्गे जाणाऱ्या प्रवाहावर प्राणायामाने नियंत्रण मिळवून त्याद्वारे सुषुम्ना नाडी, कुंडलिनी व योगचक्रादींवर प्रभुत्व स्थापन करू पाहतात, असे यामागील तत्त्व आहे. असो.

(**टीप:** प्राण म्हणजे प्राणवायु - ऑक्सिजन, हवेतील इतर घटक असा अर्थ योगशास्त्रात नाही, हे जिज्ञासूंना माहीतच असेल. प्राण ज्याचे अपानादी इतर नऊ उपभेद आहेत, ते सर्व नाड्या, योगचक्रे, चित्त यांसदृश तशाच एका सूक्ष्मातिसूक्ष्म द्रव्याचे असतात आणि यांना आजपावेतो तरी कोणत्याही वैज्ञानिक प्रयोगशाळेत मानवाद्वारे वा यंत्रांद्वारे परीक्षिता आलेले नाही. केवळ योगसिद्ध पुरुषांच्या आणि अन्य काही तरल ऐंद्रिय सिद्धी प्राप्त झालेल्या लोकांसच हे द्रव्य व त्याचे इडापिंगलादी प्रवाह, योगचक्रे इ.अंतःचक्षूंसमोर दिसतात. त्यातल्या त्यात आपल्या अनुभवांशी

अधिक प्रामाणिक असणाऱ्या काही योगी पुरुषांनी हे नाड्यादी योगविज्ञान गुप्ततेची अट घालून केवळ योगाभ्यासकांसाठीच प्रकट करण्याच्या अटीवर उघड केलेले आहे व तो ज्ञानप्रवाह आपणापर्यंत काही उदार महामना सिद्धांद्वारे उघड प्रकट होऊन आलेला आहे. पण तरीही त्यांचे एकूणएक - सर्वच्या सर्व - अनुभव कोठेही ग्रथित होऊ शकलेले नाहीत, असे याबाबतचे अनुभवसिद्ध मत योगी नोंदवतात.)

विषयवती वृत्तीचा योगाभ्यासार्थ उपयोग

"विषयवती वा प्रवृत्तिरुत्पन्ना मनसः स्थितिनिबन्धिनी।।१-३५।।पा.यो.सू.।।" - शब्द-स्पर्श-रसादी विषयांपैकी जो विषय चित्तात उदित होतो तत्स्वरूप अशी चित्ताची वृत्ती होते. मनातच अशी विषयवती प्रवृत्ति उत्पन्न करून त्यावर चित्त अवरुद्ध करण्याचा अभ्यास केल्यासही चित्तस्थैर्य प्राप्त होते. जिज्ञासू वाचकांस याबाबत श्रीरामकृष्णपरमहंसांची एक गोष्ट आठवत असेल की त्यांनी एका विषयासक्त साधकास विषयोपभोगातच कालिमातेस पाहत जा असा उपदेश दिला होता. त्यायोगे त्या साधकास चित्तैकाग्र्य करणे सुलभ झाले, असा अनुभव वाचण्यात येतो आणि पतञ्जलीही तेच सांगत आहेत.

तंत्रशास्त्रातील वामाचारही खरे तर याचसाठी प्रचलित झाला होता. परंतु योगसाधकांव्यतिरिक्त इतरांमध्ये तो पसरल्याने साधनेचे ध्येय डोळ्यांपुढून दूर होऊन निव्वळ ***विषयवति वृत्ती*** व त्यासाठी कामोपभोग घेतल्यास तंत्रसाधकांची अशाच कारणाने जी दुर्गती संभवते, तीच इतरही अर्धकच्च्या साधकांची होण्याची दाट शक्यता नजरेआड करून चालणार नाही. परंतु आजही या मार्गावरून जाऊन साधकांचे सिद्ध होणारे यशस्वी पुरुष आहेत, हेही योगशास्त्रजिज्ञासूंना दुर्लक्षून चालणार नाही. असो.

सत्त्वविवृद्धि

"विशोका वा ज्योतिष्मती।।१-३६।।पा.यो.सू.।।" - चित्तात शुद्धसत्त्वगुणाची प्रवृत्ती निर्माण करणे, त्या प्रवृत्तीचा जो ज्योतिःस्वरूप प्रकाश अंतरात प्रतीत होतो, तिच्यावर चित्त एकाग्र करणे हे चित्तातील शोकाचा नाश करणारे ध्यान आहे. ही ***विशोका ज्योतिष्मती*** म्हणून पतञ्जली म्हणतात ती चित्तप्रवृत्ती चित्तस्थैर्यप्रदायक ठरते. सात्त्विक मनोधर्माची जाणिवपूर्वक जोपासना करणे व सत्त्वगुणप्रवृत्ती वाढीस लावणे या साधनप्रणालीमागे त्याद्वारे ***शुद्धसत्त्वगुण*** प्राप्त करून घेण्याचा उदात्त हेतू असतो. कारण यापासून चित्तस्थैर्य प्राप्त होते व समाधिसाधना सुलभ होते.

यम व नियम पाळणे, तप आचरणे, दान करणे, यज्ञकृत्ये करणे इ.द्वारे सत्त्वगुण वृद्धिंगत होतो. गीतेनेही अशा साधनक्रमास वाखाणलेले आहे. एवढेच नव्हे तर सत्त्वगुण वर्धमान कसा करावा याचे आनुभविक शास्त्र गीतेत आढळते. त्या भागाचा ***दैवी व आसुरी संपदा, त्रिगुणरहस्य*** इ.भाग पाहतांना आपण यथातथ्य परामर्ष घेतला होता, हे वाचकांस स्मरत असेलच! असो.

संतस्मरण

"वीतरागविषयं वा चित्तम्।।१-३७।।पा.यो.सू.।।" - ***"शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे। वसिष्ठापरी ध्यान योगेश्वराचे। कवि वाल्मिकासारीखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा।।"*** अशी वैराग्यशाली श्रीरामदासस्वामींची वंदना करणारी ही पंक्तिमालिका लोकमान्य आहे. अशा योगिराटांची आठवण आपल्या चित्तात सदैव जागती ठेवणे, वैराग्यशील सत्पुरुषांचे सतत स्मरण करणे, ज्ञानेश्वरादी संतांस सदा स्मरणे, अशामुळे साधकाचे चित्तसुद्धा त्या त्या वंदनीय परमपुरुषांच्या चित्तासदृश होत जाते, असे पतञ्जलींचे हे सूत्र म्हणते. सद्गुरूंची केवढी महती गायली जाते व श्रीज्ञानेश्वरांसारखे थोर सद्गुरूंप्रति किती कृतज्ञ भाव ठेवतात, ते आपण पाहिलेच आहे. त्यामागे हेच रहस्य आहे व ते पतञ्जलींनी अत्यंत स्पष्टरीत्या उपरोक्त सूत्रात दर्शवले आहे.

एक आगळे आलंबन

"स्वप्ननिद्राज्ञानालम्बनं वा।।१-३८।।पा.यो.सू.।।" - चित्तप्रसादनाचा हा आणखी एक उपाय पतञ्जली सांगतात. चित्तास आह्लाद प्राप्त करून देणारे जे एखादे दृश्य स्वप्नांतरी साधकास दिसले असेल, त्याचे चित्तास आलंबन देणे, त्या स्वप्नदृश्यात रमून जाणे, अशा या प्रकाराने चित्तस्थैर्य व चित्तप्रसादन प्राप्त होतात. त्याप्रमाणेच जो एका गाढ निद्रेचा अनुभव आपल्याला आला असेल, त्याची चित्तात पुनरावृत्ती कल्पिणे, त्या अनुभवाशी तादात्म्य पावणे, या उपायानेही चित्तप्रसादन होते. किंबहुना या गाढ निद्रासदृश अनुभवाप्रत जाणिवपूर्वक पुन:पुन: जाता यावे, यासाठी शवासन करणे योगसंमत आहे, हेही योगजिज्ञासूंनी व योगसाधकांनी अवश्य लक्षात ठेवण्यासारखे आहे. परंतु शवासन करतांना निद्रा न लागली पाहिजे, म्हणजे योगसाधना जमू शकते.

ध्यानाचा विषय

एकतत्त्वाभ्यास हे ध्येय साध्य करण्यासाठी ***चित्तस्थैर्य, चित्तप्रसादन व ध्येय्य विषयाचे ध्यान*** अशा तीन पायऱ्या आहेत. चित्तस्थैर्य व चित्तप्रसादनाचे उपाय आपण उपरोक्त *पातञ्जल सूत्र क्र. १-३३ ते १-३८* यांद्वारे पाहिले आहेत.

यानंतर ध्यानाचा विषय कोणता असावा याबाबत पतञ्जलींचे मत पहा: ***"यथाभिमतध्यानाद्वा।।१-३९।।पा.यो.सू.।।"*** - जे कोणते आलंबन, जे कोणते ध्येय्य, जो कोणता विषय वा जी कोणती वस्तू अथवा जो कोणता भाव आपल्याला इष्ट असेल, आपल्याला आवडत असेल, आपले मन आकृष्ट करून घेत त्यावर ते स्थिर करण्यास सक्षम असेल, त्यावर चित्त केंद्रित करावे; त्या त्या गोष्टीचे ध्यान करावे.

या सूत्राद्वारे ध्यानासाठी किती वैविध्यपूर्ण, वैचित्र्यमय आणि असंख्य आलंबनविषय असू शकतात, हे सहजच स्पष्ट होते. या आलंबनविषयांनुसार साधनेचे भिन्नभिन्न प्रकार संभवतात. पण

खरे तर साधनामार्ग एकच असतो. ध्यान कसे करावे, ध्येय्य वस्तू कोणती असावी, हा केवळ साधकसंबंधित पिंडवैचित्र्याचा भाग आहे, एवढे नमूद करावेसे वाटते. स्थूलमानाने ध्येय्य विषय ***कर्म, ज्ञान वा भक्ती*** या सदरात मोडतात व त्याअनुसार त्यांचे ***कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग*** असे बाह्यात्कारी योगमार्गदर्शक रूप संभवते.

या तिन्ही प्रकारांचे सूक्ष्मतया अजूनही प्रविभाग करता येणे शक्य आहे. परंतु ***योगमार्ग*** म्हणून जो काही आहे, त्याचे हे अत्यंत भिन्न स्तरावरील वर्गीकरण आहे. हे वर्गीकरण केवळ ध्येय्य वस्तूच्या वा भावाच्या संबंधावरून केलेले असल्याने मूळ योगाच्या दृष्टीने त्यांचे गौणत्व सहज ध्यानी येण्यासारखे असूनही आजपावेतो विद्वज्जनांनी या विषयावर जी विविध मते अहमहमिकेने प्रतिपादली आहेत, त्यांचे जिज्ञासूंना आश्चर्य वाटणे साहजिकच आहे. या विविध प्रकारच्या ध्येय्य वस्तूंवर वा भावांवरच आपले लक्ष केंद्रित केल्यामुळे त्यांनी योगाची ***कर्मयोग, ज्ञानयोग भक्तियोग, ध्यानयोग*** इ.विविध शकले पाडलेली दिसतात.

गौण वस्तूस प्राधान्य दिल्याचा हा परिणाम आहे असे दिसते व त्यामुळे मुख्य वस्तूचे म्हणजे योगाचे स्वरूप नीटरीत्या आकलन करणे दुष्प्राय होत गेले आहे, असे आपणास जाणवते. तरी साधकांनी व जिज्ञासूंनी हा मुद्दा नीट लक्षात ठेवल्यास योगसाधनेत सौकर्य येईल, अशी आशा आहे. असो.

वैराग्य

यानंतरच्या ***"परमाणुपरममहत्त्वान्तोऽस्य वशीकारः।।१-४०।।पा.यो.सू.।।"*** या सूत्राद्वारे पतञ्जली चित्ताची ध्यानाद्वारे प्राप्त होणारी अत्युत्कट अवस्था ग्रथित करत आहेत. ***विषयवैतृष्ण्य*** प्राप्त झालेल्या चित्ताबाबतचा ***"दृष्टानुश्रविकविषयवितृष्णस्य वशीकारसंज्ञा वैराग्यम्।।१-१५।।पा.यो.सू.।।"*** या सूत्राशी असा पूर्वानुबंध आहे.

सर्व प्रकारच्या विषयांची आसक्ती नष्ट झालेले चित्त त्या ठिकाणी *(१-१५, पा.यो.सू.)* उल्लेखलेले आहे व त्यायोगे ***वशीकारसंज्ञक वैराग्य*** प्राप्त होते.

ध्यानाद्वारे चित्ताचा ***संपूर्ण वशीकार वा समाधि संस्कार*** कसा प्राप्त होतो, याचे समग्र दर्शन आतापावेतोच्या योगसूत्रातून घडवलेले आहे. अणुरेणूपरमाणूपासून तो परमतत्त्वापर्यंतच्या कोणत्याही आलंबनविषयाच्या सौकर्याने चित्त या स्थितीपावेतो येऊन पोहोचते, असे पातञ्जलमत उपरोक्त *१-४०* या सूत्रात प्रकट झालेले आहे, हे ध्यानी घेणे साधकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

समापत्तिः:::

समाधिस्थिती

समाधिसंस्कारांनी युक्त अशी जी ही चित्तस्थिती आहे, जी चित्तवृत्तींची तन्मयता आहे, ***समापत्ति*** म्हणून ज्या स्थितीस संज्ञा देतात, ती कशी असते, त्याचे दर्शन पुढील सूत्र घडवते:

"क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेर्गृहितृग्रहणग्राह्येषु तत्स्थतदञ्जनता समापत्तिः।।१-४१।।पा.यो.सू.।।"- चित्त जेव्हा अशा वशीकारसंज्ञक वैराग्यभावात स्थिर होते, विषयवैतृष्ण्य होऊन चित्त विषयातून उपराम होते, तेव्हा चित्तवृत्ती क्षीण होतात. स्फटिक मणी जसा त्याच्या परिसरातील वस्तूंचे रंग ग्रहण करून त्या त्या रंगांचा दिसू लागतो, त्याप्रमाणे असे चित्त ज्या ज्या विषयावर, वस्तूवर वा भावावर केंद्रित होते, तत्सदृश वृत्ती ग्रहण करते; चित्तास ज्या ध्येय्य वस्तूचे आकर्षण असते, त्या वस्त्वनुरूप भाव ते चित्त धारण करते; भाव्य वस्तुरूप ते चित्त होते.

या अवस्थेसच ***समान-प्रपत्ति वा तद्रूपापत्ति*** म्हणजेच ***समापत्ति*** अशी संज्ञा पतञ्जली देतात. धारणा- ध्यानाचा *(धारणा - ध्यान - समाधि यातील प्रथम अंतरंग साधनाचा)* हा परमोत्कर्ष बिंदू आहे. ***समाधि वा समापत्ति*** या शब्दांचा हाच एक अर्थ येथे अभिप्रेत आहे.

सबीज समाधि

याप्रमाणे प्राप्त झालेला समाधि - त्याची अवधि जशी वाढत जाते, धारणेचा काल जसा वाढत जातो - त्याप्रमाणे पक्वातिपक्व होत जातो, दृढ होत जातो. परंतु जोपावेतो चित्तात कसले ना कसले आलंबन घेण्याची वृत्ती उदित होत असते, तोपावेतो तो ***सबीज समाधी***च असतो. त्यातून व्युत्थान हे अवश्यंभावी आहे. ***व्युत्थानदशा*** ही संसारचक्रातील आहे. म्हणून हा समाधि वा समापत्ति ***सबीज*** असल्याचे म्हटले आहे. कारण त्यात भवप्रत्ययाचे बीज राहिलेलेच असते. ***या सबीज समापत्तीचे चार प्रकारात वर्गीकरण केले जाते.*** *ते पुढील सूत्रात स्पष्ट केले आहे:*

१) सवितर्क समाधि

"तत्र शब्दार्थज्ञानविकल्पैः संकीर्णा सवितर्का समापत्तिः।।१-४२।।पा.यो.सू.।।" - शब्द आणि त्याचा गृहित धरलेला अर्थ हे दोन्ही चित्तास शब्दाबरोबर आकलन होतात. अर्थाप्रमाणे रूप, रस, गंध, नाद व स्पर्श यांचा चित्तास आभास वा विकल्प होतो. अशा प्रकारे शब्द, त्याचा अर्थ व त्याने चित्तास होणारे ज्ञान यांच्या एकसमवायेकरून जो चित्ताभास निर्माण होतो - वस्तूचा, भावाचा, भावनेचा किंवा कोणत्याही मूर्त वा अमूर्त कल्पनेचा किंवा इतर कोणताही - त्यावर चित्त एकाग्र होऊ लागले म्हणजे ***सवितर्क*** नामक समाधीची प्राप्ती साधकास होते.

उदाहरणार्थ साधक एखाद्या देवतेचे मूर्त ध्यान करत असेल, तर ती मूर्ती चित्तात ठसणे; मंत्रजप करत असेल, तर मंत्राच्या शक्तीची, त्याच्या स्पंदनांची, त्याच्या इष्ट दैवतादींचा चित्तास साक्षात्कार घडणे, मंत्रजपात अशा साक्षात्कारी वृत्तीने चित्त तल्लीन होणे इ.***सवितर्क समापत्ति*** होत. हे ध्येय्यवस्तुसापेक्ष असतात.

२) निर्वितर्क समापत्ति

"स्मृतिपरिशुद्धौ स्वरूपशून्येवार्थमात्रनिर्भासा निर्वितर्का।।१-४३।।पा.यो.सू.।।" - सवितर्का समाधीचा अभ्यास जसा जसा दृढ होत जाईल, तसतसे शब्दाच्या व अर्थाच्या साहाय्यावाचून, स्मृतीस उजाळा न देता, ध्येय्य वस्तूचे ज्ञान जाणिवेच्या अतीत होऊन, सतत अखंड चित्तास ध्येय्य वस्तूचे स्फुरण होत राहणे ही ***निर्वितर्क समापत्ति*** होय.

स्मृतिपरिशुद्धा म्हणजे स्मृतीच्या साहाय्यावाचून आणि ***स्वरूपशून्य*** म्हणजे ध्याता आणि ध्यान ही जाणीव न उरता ***अर्थमात्रनिर्भासता*** म्हणजे ध्येय्य वस्तूच्या अर्थाने चित्त स्पंदित होणे, चित्त ध्येय्य वस्तूच्या तदाकार होणे, अशी निर्वितर्का समापत्तीची लक्षणे होत.

३) सविचार व निर्विचार समापत्ति

"एतयैव सविचारा निर्विचारा च सूक्ष्मविषया व्याख्याता ।।१-४४ ।।पा.यो.सू. ।।" - ***सवितर्क व निर्वितर्क*** हे समाधिप्रकार स्थूल विषयाच्या वा वस्तूच्या वा तत्सम भावभावनांच्या अनुरोधाने आणि त्यांच्या आलंबनाने संभवतात. चित्ताचे आलंबन जर सूक्ष्म विषय वा तन्मात्रा वा तत्सम असतील, तर जोपावेतो विचारांचा संबंध आलंबनाशी येत असतो, तोपावेतो ***सविचार समापत्ति*** व विचारांचा संबंध समाप्त होऊन जेव्हा चित्त सूक्ष्म विषयाकार होइल तेव्हा ***निर्विचार समपत्ति*** उदित होतात. *सविचार व निर्विचार हे समापत्ति वा समाधिप्रकार सवितर्क व निर्वितर्क समापत्ति वा समाधींसारखेच होत.* फक्त आलंबनविषयाच्या स्थूल-सूक्ष्मत्वाने वितर्कानुगत व विचारानुगत असे समापत्ति वा समाधिभेद होतात. हा संबंध पुढे आरेखित केला आहे.

पतञ्जल्युक्त समाधीचे अवलोकन

समाधि

- वितर्कानुगत **(स्थूलआलंबनविषयानुवर्ती)**
  - सवितर्क
  - निर्वितर्क **(ध्याता-ध्येय्य त्रिपुटीविरहित)**
- विचारानुगत **(सूक्ष्मआलंबनविषयानुवर्ती)**
  - सविचार
  - निर्विचार **(ध्याता-ध्येय्य त्रिपुटीविरहित)**

उपरोक्त सवितर्क, निर्वितर्क तसेच सविचार व निर्विचार हे चारही समाधिभेद संप्रज्ञात समाधीचे होत.

"वितर्कविचारानन्दास्मितारूपानुगमात् संप्रज्ञातः ।।१-१७ ।। पा.यो.सू. ।।"- या अनुसार १)वितर्कानुगत २) विचारानुगत ३) आनंदानुगत आणि ४) अस्मितानुगत असे हे संप्रज्ञात समाधीचे चार समाधिभेद सांगितले आहेत. त्यातील वितर्क व विचाराधारित समाधिभेद आपण आताच पाहिले.

त्याचप्रमाणे त्यातून निर्वितर्क व निर्विचार असे उत्तरोत्तर श्रेष्ठ व असंप्रज्ञात समाधिकडे नेऊन पोहोचवणाऱ्या समाधिस्थिती आपण पाहिल्यात. उत्तरोत्तर श्रेष्ठतर भूमिका प्राप्त करून देणारे समाधींचे आलंबनविषय असे आहेत.

समाधि

- संप्रज्ञात समाधि
  - **वितर्क**
    - सवितर्क
    - **१.निर्वितर्क**
  - **विचार**
    - सविचार
    - **२.निर्विचार**
  - **आनंद**
    - **३.सानंद**
  - **अस्मिता**
    - **४.सास्मित**
- **असंप्रज्ञात समाधि (५)**

(टीप:१: क्र. १,२,३,४ ते ५ या अवस्था उत्तरोत्तर श्रेष्ठ समाधिभूमिका दर्शवितात.)

(**टीप:२:** पातञ्जलदर्शन *समाधि व समापत्ति* यांमध्ये सूक्ष्मसा भेद करते., असे काही विद्वानांचे मत आहे. पण ***"तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः ।।३-३ ।।पा.यो.सू. ।।"*** हे सूत्र समाधीची व्याख्या करते; तर ***"क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेर्ग्रहीतृग्रहणग्राह्येषु तत्स्थतदञ्जनता समापत्तिः ।।१-४१ ।।पा.यो.सू. ।।"*** हे सूत्र समापत्तिची व्याख्या करते. या दोन्ही सूत्रांतून चित्ताच्या एकाच अवस्थेचा बोध होतो, हे स्पष्टच आहे. त्रिपुटी ***एकाकार*** म्हणजे ध्येय्य वस्तुरूप होणे हे ***समापत्तिलक्षण*** *(सूत्र क्र.१-४१)* आणि ***स्वरूपशून्य*** म्हणजे ध्याता आणि ध्यान ही जाणीव न उरता ***अर्थमात्रनिर्भासता*** म्हणजे ध्येय्य वस्तूच्या अर्थाने चित्त स्पंदित होणे, चित्त ध्येय्य वस्तूच्या तदाकार होणे, हे ***समाधिलक्षण*** *(सूत्र क्र. ३-३)* या दोन्हीत शब्दभेद सोडला तर तत्त्वतः कोणताही फरक नाही, असे जिज्ञासूंना विशेष विचारांती जाणवेलच. ***समापत्ति व समाधि* हे शब्द पतञ्जली एकाच अर्थाने उपयोजितात,** याचा स्पष्ट पुरावा म्हणजे *सूत्र क्र. १-४१* मध्ये समापत्तिलक्षण सांगून झाल्यावर पुढील सूत्रे *क्र. १-४२ ते ४४* या तीन सूत्रांतून त्या समापत्तीचे चार विभाग सवितर्कादी सांगून नंतरच्या *सूत्र क्र.१-४५* मध्ये चित्ताचीअलिंग (समापत्ति) अवस्था - ***"सूक्ष्मविषयत्वं चालिंङ्गपर्यवसानम् ।।१-४५ ।।पा.यो.सू. ।।"*** हिचा उल्लेख केल्यानंतर पतञ्जली सांगतात की - ***"ता एव सबीजः समाधिः ।।१-४६ ।।पा.यो.सू. ।।"***- म्हणजे येथवर वर्णिलेले सर्व समाधिप्रकार***सबीज*** होत.

समापत्तिप्रकारांचे वर्णन करून लगेच त्यांना असे समाधि म्हणणे म्हणजेच समापत्ति आणि समाधि हे दोन्ही पातञ्जलयोगसूत्रात एकाच अर्थाने वापरल्याचा स्पष्ट निर्देश आहे. याबाबत सूज्ञांस अधिक काय सांगावे!)

पुढील वाटचाल

आता ***वितर्कानुगत व विचारानुगत*** समाधिकडून ***सानंद ते सास्मित ते असंप्रज्ञात*** समाधींकडील वाटचाल पातञ्जल योगसूत्रांच्या

साहाय्याने समजावून घेऊ या. योगजिज्ञासू व साधकांसाठी हा सर्व विचार अत्यंत महत्त्वाचा असल्याने त्याचा तपशील खोलवर जाऊन पाहणे उचित ठरते.

संप्रज्ञात समाधि ते असंप्रज्ञात समाधि

संप्रज्ञात ते असंप्रज्ञात या परिवर्तनाबाबत निर्देश करणारे पातञ्जलयोगसूत्र आहे - ***"विराम प्रत्ययाभ्यासपूर्वः संस्कारशेषोऽन्यः ।।१-१८।।पा.यो.सू.।।"*** -सर्व प्रकारांच्या चित्तवृत्तींचा ***विराम*** म्हणजे उपरम करत जाऊन हा विरामप्रत्यय पुनःपुनः अभ्यासपूर्वक घेत जाणे या कृतीने अन्य म्हणजे दुसरा ***असंप्रज्ञात समाधि*** साध्य होत जातो.

"भवप्रत्ययो विदेहप्रकृतिलयानाम्।।१-१९।।पा.यो.सू.।।" या अनुसार १) ***विदेह*** म्हणजे अहंकार नाहीसा झालेले योगी आणि २) ***प्रकृतिलय*** म्हणजे चित्त प्रकृतीत लीन केलेले म्हणजे प्रतिप्रसवक्रमाने उलट दिशेने प्रवास करत स्थूलाकडून सूक्ष्मतम अशा ***प्रधान वा प्रकृति*** या तत्त्वात चित्ताचा लय साधलेले योगी अशांना हा समाधि प्राप्त होतो.

परंतु ***असंप्रज्ञात*** समाधिचेही ***सबीज व निर्बीज*** असे भेद आहेत. ***विदेही व प्रकृतिलय*** साधलेल्या योग्यांचा ***असंप्रज्ञात*** समाधि प्रथम ***भवप्रत्ययकारी*** म्हणजे व्युत्थानदशेत संसाराचा अनुभव आणून देणारा असतो. तेव्हा तो संसाराच्या आवागमनापासून मुक्ती मिळवून देत नसल्याने ***सबीज*** म्हणून गणला जातो.

जेव्हा योगी त्यापुढील पायरी गाठतो, तेव्हा त्यास ***निर्बीज*** असा असंप्रज्ञात समाधि प्राप्त होतो. या समाधिसाठी कोणती साधनसंपदा लागते, ते ग्रथित करत पतञ्जली म्हणतातः ***"श्रद्धावीर्यस्मृति समाधि-प्रज्ञापूर्वक इतरेषाम्।।१-२०।।पा.यो.सू.।।"*** - कैवल्यसाक्षात्कार घडेलच या विश्वासाने साधना करणे म्हणजे ***श्रद्धा;*** त्यासाठी लागेल तो अभ्यास करण्याचा उत्साह व बल म्हणजे ***वीर्य;*** या समाधीच्या क्षण-क्षण करत मिळवलेल्या अनुभवाचे वा साक्षात्कारी वृत्तीचे स्मरण आणि अखंड त्या वृत्तीची धारणा करण्याचा अभ्यास म्हणजे ***स्मृति;*** त्या समाधीचा सातत्याने केलेला अभ्यास आणि अशा योगाभ्यासानेउदित होऊन वर्धमान होणारी ***प्रज्ञा*** यांच्या योगाने ***पुरुषसाक्षात्कार*** किंवा ***कैवल्यप्राप्ती*** करून देणारा ***निर्बीज असा असंप्रज्ञात समाधि*** सिद्ध होतो.

हा समाधि कैवल्यप्राप्तीची उत्कट इच्छा ठेवणाऱ्या साधकांस शीघ्रतर साध्य होतो असे ***"तीव्रसंवेगानामासन्नः।।१-२१।। पा.यो.सू.।।"*** या सूत्रातून पतञ्जली म्हणतात. त्या तीव्रतेच्या ते ***मृदु, मध्यम व अधिमात्र*** अशा उत्तरोत्तर श्रेष्ठ अशा तीन श्रेणी कल्पितात. ***"मृदुमध्याधिमात्रत्वात्ततोऽपि विशेषः।।१-२२।। पा.यो.सू.।।"*** या सूत्रानुसार मृदुतीव्रसंवेगाने लवकर, तर मध्यतीव्रसंवेगाने अधिक लवकर आणि अधिमात्रतीव्रसंवेगाने अत्यंत शीघ्रतेने ***असंप्रज्ञात निर्बीज समाधि***प्राप्ती सांगितलेली आहे.

आलंबनार्थ अत्यंत सूक्ष्म अशी प्रकृति

संप्रज्ञात समाधि ते असंप्रज्ञात समाधि ते कैवल्यप्राप्ती ही वाटचाल आपण आता समाधिपादाच्या काही उर्वरित पण अत्यंत महत्त्वाच्या सूत्रांद्वारे करू या. ***वितर्क ते विचार*** ते सूक्ष्मातिसूक्ष्म विषयांचे चित्तास आलंबन देता देता त्या सूक्ष्मतर अशा आलंबनांची परिणती कशात होते, ते सांगणारे पातञ्जल योगसूत्र असे आहेः ***"सूक्ष्मविषयत्वं चालिङ्गपर्यवसानम्।।१-४५।।पा.यो.सू.।।"*** - पतञ्जली म्हणतात त्यानुसार अत्यंत सूक्ष्म असा ***प्रधान वा अलिंग वा प्रकृति*** हा त्यावेळी आलंबविषय असतो.

जेव्हा हा ***प्रधान*** हा आलंब विषय घेऊन निर्विचार समाधि पूर्णतेप्रत जातो, त्यावेळी ***आनंद*** प्राप्त होतो.अर्थातच हा आनंद विषयोपभोगातून मिळणाऱ्या आनंदापेक्षा अत्यंत श्रेष्ठ असा ***महानंद*** असतो. *"मला आनंद मिळतो आहे," "मी आनंदस्वरूप आहे" ते "मी आनंद आहे,"* अशा पायऱ्यांद्वारे चढत जाणाऱ्या या समाधीस ***सानंद समाधी*** असे म्हणतात. हा समाधीही निर्विचार संप्रज्ञातापेक्षा श्रेष्ठ असा पण संप्रज्ञातच समाधि आहे.

त्यातून ***मी व आनंद*** यांचा त्रिपुटीलय होऊन ***"मी (आनंद) आहे",*** असा ज्यात प्रत्यय येतो, तो अस्मितायुक्त असा ***सास्मित*** म्हणून ओळखला जाणारा संप्रज्ञात समाधि सिद्ध होतो. ***प्रकृतिलय व विदेहभाव आणि महत्तत्त्वात लय त्यापासून प्राप्त होतो.***

समाधीच्या या अवस्था एकमेकांहून भिन्न पण सूक्ष्म फरकाच्या पायऱ्या आहेत. या अवस्थेप्रत जाणारे योगी या तिनही पायऱ्या अभ्यासकाली परिपक्वतेनुसार चढतउतरत जात असतात. म्हणून **या १) *महत्तत्त्वलयी* २) *विदेही* ३) *प्रकृतिलयी* योगस्थिती *भवप्रत्यकारी* असल्याने सबीज समाधीत मोडतात.** म्हणूनच पतञ्जलींचे सूत्र असे आहे कीः ***"ता एव सबीजः समाधिः।।१-४६।।पा.यो.सू.।।"*** प्रकृतिपर्यंतचे व आनंद अस्मितादी सर्व विषय सूक्ष्मातिसूक्ष्म असले, तरी चित्तास संसारसंकेत देणारे असतात व म्हणून चित्तावरील संसाराचे संस्कार, अल्पतम का होईना! तसेच राहतात.

अस्मितेसह सर्वलय व अध्यात्मप्रसाद

म्हणून हा समाधिअभ्यास पुढे नेऊन ***सास्मित संप्रज्ञात*** समाधिकडून पुढे जावे लागते. अस्मितेचाही लय केल्यावर आणि अस्मितारहित अशा निर्विचार समाधीचा अभ्यास दृढ झाल्यावर ती समाधि परिपक्व होते.आणि अध्यात्मप्रसाद होतो. ***"निर्विचारवैशारद्येऽध्यात्मप्रसादः ।।१-४७।।पा.यो.सू.।।"***

हा ***अध्यात्मप्रसाद*** म्हणजे ना परतीची वाट दाखवणारा वाटाड्या होय. ***"प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते।।२-६५।।", "मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्।।१८-५६।।, "मत्प्रसादत्तरिष्यसि।।१८-५८।।", "तत्प्रसादातपरां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।१८-६२।।", "प्रसादमधिगच्छति।।२-६४।।"*** इ.गीतावचने याच अध्यात्मप्रसादाची भलावण करत असतात. आणि अर्जुनाच्याही तोंडी घातलेली ***"प्रसीद देवेश जगन्निवास।।११-२५ व ४५।।", "नमोऽस्तु ते देववर प्रसीद।।११-३१।।", प्रसादये त्वामहमीशमीड्यम्।।११-४४।।"*** इ.वचने भगवान श्रीकृष्णाकडे याच प्रसादाची आर्ततेने याचना करतांना दिसतात. असो.

या अध्यात्मप्रसादाचे फल ***"ऋतम्भरा तत्र प्रज्ञा ।।१-४८ ।। पा.यो.सू. ।।"*** असे ऋतंभराप्रज्ञाप्राप्तिरूप असते. त्या प्रज्ञेच्या संस्कारांमुळे प्रकृतीचे सर्व संस्कार - संसाराचे शेष सर्व संस्कार प्रतिबंधित होतात. ***"तज्जः संस्कारोऽन्यसंस्कारप्रतिबंधी ।।१-५० ।।"*** आणि ऋतंभरा प्रज्ञेच्या संस्कारांचाही निरोध करून ***"तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः ।।१-५१ ।। पा.यो.सू. ।।"*** - असा सर्व चित्तवृत्तींचा साक्षेपी निरोध करून ***कैवल्यप्राप्ती करवणारा निर्बीज समाधि*** प्राप्त होतो. योगाची पूर्णावस्था प्राप्त होते. ***"ॐ पूर्णमदः पूर्णमिदं"*** अशी अवस्था प्राप्त होते. ***"याचि देहीं। याचि डोळां"*** **कैवल्यसोहळा पाहावयास मिळतो.** अनंत जन्मांची युगानुयुगे केलेली योगसाधना सुफल आणि संपूर्ण होते. ***संजीवन समाधि*** सिद्ध होते!

समाधिसोहळ्याची इतिकर्तव्यता

हा सर्व समाधिसोहळा आपण एवढ्या तपशिलात शिरून पाहिले, त्याची दोन प्रमुख कारणे आहेतः १) योगसाधकांना त्याद्वारे सुयोग्य मार्गदर्शन घडावे व २) योगसिद्धींचा अभिभव कसा होतो, ते पाहण्यासाठी समाधि म्हणजे काय, ते नीट कळावे.

समाधिस्थ चित्त व योगविभूतिः:::

प्रज्ञेचा उदय

आता योगसिद्धींचा अभिभव कसा होतो या दुसऱ्या उद्देशाकडे वळू या; त्यासाठी विभूतिपादाच्या ***"तज्जयात्प्रज्ञालोकः ।।३-५ ।। पा.यो.सू. ।।"*** या सूत्राधारे मार्गक्रमणा करावी लागेल. सिद्धींच्या प्रांताचे यथोचित आलोडन करण्यासाठी आता त्या सूत्राकडे वळू याः

ध्यान, धारणा व समाधि हे तिन्ही एकत्र प्रवृत्त झाले म्हणजे त्यास ***संयम*** म्हणतात. थोडक्यात म्हणजे ज्याचे ध्यान करावयाचे, त्याच्याचवर धारणा करावयाची आणि समाधिसुद्धा त्याच ध्येय्य वस्तूवर प्राप्त करून घ्यावयाची. आपण वर विचार केल्याप्रमाणे अर्थातच हा संप्रज्ञाताचा प्रांत आहे. असंप्रज्ञाताचा प्रांत आपणास कैवल्याची प्राप्ती करून देतो, असे लाक्षणिक अर्थाने म्हणता येते. असो.

संयम उत्तम प्रकारे सिद्ध झाला की वस्तुमात्राचे प्रकर्षाने अतींद्रिय स्वरूपाचे ज्ञान होते, ते प्राप्त करून देणारी ***प्रज्ञा*** उदित होते *(सूत्र क्र.३-५)*. आताच म्हटल्याप्रमाणे *संयम सिद्ध झाला* की हिचाच उदय होतो. तसेच वर म्हटल्याप्रमाणे **ऋतंभरा**नामक **प्रज्ञा** निर्विचारवैशारद्यातून मिळणाऱ्या अध्यात्मप्रसादातून प्राप्त होते *(पा.यो.सू.१-४८)*.

प्रज्ञा व ऋतंभरा प्रज्ञा

(**टीप-१:** *सं.सूत्र.क्र.३-६वरील श्री. कृ.के.कोल्हटकर यांच्या पातञ्जल योगदर्शन या ग्रंथांतर्गत विवरणातून सू.क्र.३-५ मधील* ***प्रज्ञा हीच ऋतंभरा प्रज्ञा होय*** *असे मत दिसून येते.)*

(**टीप-२** *:* पातञ्जलयोगसूत्रांवरील व्यासभाष्यानुसार *"यदा निर्विचारस्य* ***समाधेर्वैशारद्यमिदं जायते,*** *तदा योगिनो भवत्यध्यात्मप्रसादो भूतार्थविषयः* ***क्रमाननुरोधी स्फुटप्रज्ञालोक...*** *।।१-४७ ।।", "तस्मिन्समाहित चित्तस्य* ***या प्रज्ञा जायते तस्या ऋतम्भरा संज्ञा*** *भवति....तथा ...आगमेनानुमानेन ध्यानाभ्यासरतेन च। त्रिधा प्रकल्पयन्प्रज्ञां लभते योगमुत्तमम् ।।१-४८ ।।", "...विशेषस्याप्रामाणिकस्याभावोऽस्तीति* ***समाधिप्रज्ञानिर्ग्राह्य स विशेषो*** *भवति... ।।१-४९ ।।",* ***"समाधिप्रज्ञाप्रतिलम्भे*** *योगिनः प्रज्ञाकृतः... ।।१-५० ।।" व "तस्य संयमस्य जयात्* ***समाधिप्रज्ञाया भवत्यालोकः,*** *यथा यथा संयमः स्थिरपदो भवति तथा तथा* ***समाधिप्रज्ञा विशारदी भवति ।।३-५ ।।",*** *"ईश्वरप्रसादात् जितोत्तरभूमिकस्य च नाधरभूमिषु परचित्तज्ञानादिषु संयमो युक्तः, कस्मात्, तदर्थस्यान्यत एवावगतत्वात्। भूमेरस्य इयमनन्तरा भूमिरित्यत्र योग एवोपाध्यायः, कथम्, एवमुक्तम्* ***"योगेन योगो ज्ञातव्यो योगो योगात्प्रवर्त्तते।योऽप्रमत्तस्तु योगेन स योगे रमते चिरम् "*** *इति ।।३-६ ।।"* या व्यासभाष्यानुसारी विवेचनांनुसारही सू.क्र.३-५ व ६ मधील समाधि-संयमज जी प्रज्ञा ती म्हणजेच सू.क्र.१-४७ व ४८मधील समाधिज असणारी ऋतंभरा प्रज्ञाच होय, असे म्हणावे लागते.- (सं.Yoga Philosophy of Patanjali by Swami Hariharananda Aranya English rendition by Shri P.N.Mukerji on Sutras no.1-47 to51)

थोडक्यात सांगायचे तर संयम सिद्ध झाला की प्रज्ञेचा उदय *(पा.यो.सू.३-५)*; आणि निर्विचारवैशारद्य व अध्यात्मप्रसाद *(सू.क्र.१-४७ व ४८)* यांतून तिचा विकास व ***ऋतंभरा*** या पूर्णत्वावस्थेत परिणती असा हा क्रम दिसतो. अर्थातच ही ***प्रज्ञा*** म्हणजेच *पा.यो.सू.क्र.१-४७ व ४८* यांच्यात जिचा गौरव केला आहे, त्या ***ऋतंभरा प्रज्ञे***ची पहिली पायरी होय, असा निष्कर्ष या संबंधित पातञ्जलयोगसूत्रांची सुसंगती लावण्यासाठी आवश्यक दिसतो.

प्रज्ञेचा विनियोग

या प्रज्ञेचा विनियोग निर्देशित करत पतञ्जली म्हणतात की, ***"तस्य भूमिषु विनियोगः ।।३-६ ।।पा.यो.सू. ।।"*** - त्या प्रज्ञेचा योग्य प्रकारे विनियोग करावा म्हणजे कैवल्यसिद्धी होते. असो या प्रज्ञेचेही निर्बीज समाधीच्या दृष्टीने गौणत्व आहे. म्हणून ***"त्रयमन्तरङ्गं पूर्वेभ्यः ।।३-७ ।।पा.यो.सू. ।।"*** व ***"तदपि बहिरङ्गं निर्बीजस्य ।।३-८ ।। पा.यो.सू. ।।"*** या सूत्रांतून ***संयम, ध्यान, धारणा आणि समाधि*** ही यमनियमादी पाच बहिरंगांच्या सापेक्ष योगाची अंतरंगे म्हणून जरी असली, तरी निर्बीज समाधिसापेक्ष त्यांना बाह्य अंगेच समजावीत असे सांगितले आहे.

समाधिस्थ चित्ताची अवस्था

समाधिस्थित चित्ताची स्थिती पुढील विषय समजून घेण्यासाठी आकळून घेणे महत्त्वाचे आहे. ती स्थिती आकळून घेण्यासाठी पतञ्जली पुढील सूत्रे सांगतात. त्या स्थितीची निदर्शक सूत्रे अशी आहेतः

१) "व्युत्थाननिरोधसंस्कारयोरभिभवप्रादुर्भावौ निरोधक्षण-चित्तान्वयो निरोधपरिणामः ।।३-९ ।।पा.यो.सू. ।।" - संप्रज्ञात समाधीतून व्युत्थान होण्याचे संस्कार जसजसे निर्बळ होत जातात आणि चित्ताची निरोधावस्था जसजशी टिकत जाते, तसतसे

निरोधपरिणाम प्रकटतात. चित्ताची निरोधावस्था टिकून राहणे याला येथे ***निरोधपरिणाम*** असे म्हटले आहे.

२)"तस्य प्रशांतवाहिता संस्कारात् ।।३-१०।।पा.यो.सू.।।" - निरोधपरिणामामुळे चित्ताचा ओघ एकाच दिशेने वाहत राहणे असा **संस्कार** चित्तावर घडतो. त्याद्वारे असंप्रज्ञात समाधिकडे प्रगत होता येते.

३) ***"सर्वार्थतैकाग्रतयोः क्षयादयौ चित्तस्य समाधिपरिणामः ।। पा.यो.सू.।।३-११।।"*** - समाधीमुळे चित्तास मूलतः सर्व विषयांची जी ओढ असते, ती क्षीण होत जाऊन एकाग्रतेचा उदय होतो.

४) ***"शान्तोदितौ तुल्यप्रत्ययौ चित्तस्यैकाग्रतापरिणामः।।३-१२।।पा.यो.सू.।।"*** - चित्तास क्षणोक्षणी तोच प्रत्यय येत राहणे, चित्तवृत्ती उदित होऊन शांत झाली तरी तोच प्रत्यय सातत्याने येत राहणे, यास **चित्ताच्या एकाग्रतेचा परिणाम** असे म्हणतात.

५) ***"एतेन भूतेन्द्रियेषु धर्मलक्षणावस्थापरिणामा व्याख्याताः।।३-१३।।पा.यो.सू.।।"*** - उपरोक्त ***निरोधपरिणाम, समाधिपरिणाम व एकाग्रतापरिणाम*** यांपासून *(यांद्वारे)* **भूते व इंद्रिये यांचे धर्म, लक्षण व अवस्थापरिणाम** समजून घेता येतात.

६) ***"शान्तोदिताव्यपदेश्यधर्मानुपाती धर्मी।।३-१४।। पा.यो.सू.।।"*** - भूतकालात जमा झालेला तो *शांत धर्म*, वर्तमानकाली व्यापणारा तो *उदित धर्म* आणि भविष्यात घडू घातलेला तो *अव्यपदेश्य धर्म* होत. या तिनही धर्मांना अनुसरून जो राहतो, तो *धर्मी* होय. **हे तीनही धर्म म्हणजे अनुक्रमे भोगून झालेले *प्रारब्ध, क्रियमाण व संचित कर्म* असे वेगळ्या परिभाषेत म्हणता येते. *धर्मी*** म्हणजे भोक्ता जीव.

७) ***"क्रमान्यत्वं परिणामान्यत्वे हेतुः।।३-१५।।पा.यो.सू.।।"*** - धर्मीला परिणामान्यत्वामुळे वेगवेगळे परिणाम भोगावे लागतात. *धर्म - लक्षण - अवस्था* हे परिणामत्रय धर्मीला क्रमाने भोगावे लागतात. *परिवर्तनशीलता हा जगाचा नियम आहे,* असे येथे सूचित केले आहे.

संयमाद्वारे सिद्धींची प्राप्ती

याप्रमाणे चित्ताची निरोधावस्था, संयमस्थिती, समाध्यवस्था आणि वस्तुमात्राची परिणामशीलता यांचे विवेचन पातञ्जलयोगसूत्रे करतात. आतां संयमाद्वारे सिद्धींची प्राप्ती होते ती कोणत्या क्रमाने, ते पाहू याः

१)भूतभविष्यादी त्रिकालज्ञानः

"परिणामत्रयसंयमादतीतानागतज्ञानम्।।३-१६।। पा.यो.सू.।।" - धर्म, लक्षण व अवस्था या परिणामत्रयांवर संयम केल्यास भूतकालीन व भविष्यकालीन घडामोडी, पदार्थांच्या स्थिती इ.गोष्टींचे ज्ञान होते. ***त्रिकालज्ञान*** ही सिद्धी अशी प्राप्त होते.

२) भूतमात्रांचे, पशुपक्ष्यादींचे बोलणे समजणेः

"शब्दार्थप्रत्ययानामितरेतराध्यासात् संकरस्तत्प्रविभागसंयमात् सर्वभूतरुतज्ञानम्।।३-१७।।पा.यो.सू.।।" - *शब्द, अर्थ व प्रत्यय* या तीन प्रविभागांद्वारे आपणास इतरेजनांचे बोलणे कळते. त्या तिन्ही संकरित अशा प्रविभागांवर संयम केला असता भूतमात्रांचे बोलणे, पशुपक्ष्यांची भाषा इ. कळतात.

३) पूर्वजन्माचे ज्ञानः

"संस्कारसाक्षात्करणात्पूर्वजातिज्ञानम्।।३-१८।। पा.यो.सू.।।" - चित्तातील वासनाकोषात अनंत जन्मार्जित वासनांचे संस्कार साठवलेले असतात. त्या संस्कारांवर संयम केल्याने ते योग्यास साक्षात होतात व त्यांवरून पूर्वजन्माचे ज्ञान होते.

४) परचित्तज्ञान

"प्रत्ययस्य परचित्तज्ञानम्।।३-१९।।पा.यो.सू.।।" व ***"न च तत्सालंबनं तस्याविषयीभूतत्वात्।।३-२०।।पा.यो.सू.।।"*** - दुसऱ्या माणसाच्या चित्तास जो प्रत्यय येत असतो, त्यावर संयम केल्याने त्याच्या चित्तस्थितीचे ज्ञान होते. परंतु ती चित्तस्थिती निर्माण होण्यास जे आलंबन वा विषय कारणीभूत आहेत, ते कळत नाहीत. त्यासाठी ***परचित्तप्रवेश*** करता येणे आवश्यक असते. तो पण योगसाधकांना जमू शकतो वा ***त्रिकालज्ञान*** या सिद्धीद्वारे तो आलंबनविषय जाणून घेता येऊ शकतो.

परव्यक्तीच्या वासनाकोषावर संयम केल्यास त्या व्यक्तीच्या चित्तातील सद्यःस्थितीस कारणीभूत असणाऱ्या घटना व विषय कळून येऊ शकतात. अर्थात उपरोक्त पातञ्जल योगसूत्रात हा भाग आता आलेला नाही, हे जिज्ञासूंच्या लक्षात आले असेलच.

५) अंतर्धान पावणे

"कायरूपसंयमात्तद्ग्राह्यशक्तिस्तम्भे चक्षुःप्रकाश असंयोगेऽन्तर्धानम् ।।३-२१।।पा.यो.सू.।।" - आपल्या शरीराचे प्रकाशामुळे दृश्यमान होणारे जे रूप असते, त्यावर संयम केल्याने आपले शरीर इतरेजनांस दिसत नाही.

६) मृत्यूचे पूर्वज्ञान

"सोपक्रमं निरुपक्रमं च कर्म तत्संयमादपरान्तज्ञानमरिष्टेभ्यो वा।।३-२२।।पा.यो.सू.।।" - *सोपक्रम*- ज्याचा विपाक लवकर होतो, ते कर्म. *निरुपक्रम* - ज्याचा विपाक दीर्घ कालाने होतो, ते कर्म. कर्मांचे हे प्रकार जाणून घेऊन त्यांवर संयम केला किंवा मृत्यूसूचक अरिष्टांवर संयम केल्याने मृत्यू जवळ आल्याचे ज्ञान होते.

७)भावसंधारणसिद्धी

"मैत्र्यादिषु बलानि।।३-२३।।पा.यो.सू.।।" - मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा या *सूत्र क्र. १-३३* मध्ये आलेल्या भावनांवर संयम केल्यास त्या त्या भावांची प्राप्ती होते. हे भाव स्वतः धारण करता येतात किंवा त्यांचा परचित्तात उदय करता येतो.

८) बलप्राप्ती इ.

"बलेषु हस्तिबलादीनि।।३-२४।।पा.यो.सू.।।" - हत्ती, व्याघ्र, हरिण इ.च्या ठिकाणी बल, लाघव, चापल्य इ.जे विशिष्ट गुण आहेत, त्यांच्यावर संयम केल्यास ते ते गुण प्राप्त होतात.

९)दूरदर्शनसिद्धी

"प्रवृत्त्यालोकन्यासात्सूक्ष्मव्यवहितविप्रकृष्टज्ञानम्।।३-२५।।पा.यो.सू.।।" - समाधिपादाच्या *सूत्र क्र. ३५ व ३६* मध्ये ***विषयवती आणि ज्योतिष्मती वा विशोका***नामक प्रवृत्तींचा

चित्तप्रसादनासाठी होणारा उपयोग सांगितला आहे. या प्रवृत्तींचा अभ्यास दृढ केल्यावर त्यांच्यापासून निर्माण होणारा ***चित्तप्रकाश*** जो पदार्थ ज्ञात व्हावा अशी इच्छा असेल, त्याच्याकडे न्यसावा. म्हणजे तो पदार्थ कोठेही असला, कितीही सूक्ष्म असला, तरी त्याचे सर्वंकष ज्ञान होते.

१०) ज्योतिष - खगोलविषयाचे ज्ञान

"भुवनज्ञानं सूर्ये संयमात्।।३-२६।।", "चन्द्रे ताराव्यूहज्ञानम् ।।३-२७।।" व "ध्रुवे तद्गतिज्ञानम्।।३-२७।। पा.यो.सू.।।" - सूर्यावर संयम केल्याने चतुर्दश भुवनांचे ज्ञान, चंद्रावर संयम केल्याने ताराचक्रव्यूहाचे ज्ञान आणि ध्रुवताऱ्यावर संयम केल्याने त्याच्या तारका - नक्षत्रे - ग्रहादींच्या गतीचे अशी खःज्योतिष संबंधित ज्ञाने प्राप्त होतात.

११) शारीरज्ञान, विज्ञान, चित्तस्थैर्य, शरीराचे नियमन करता येणे इ. सिद्धीः

"नाभिचक्रे कायव्यूहज्ञानम्।।३-२९।।";"कण्ठकूपे क्षुत्पिपासा- निवृत्तिः।।३-३०।।"व"कूर्मनाड्यां स्थैर्यम्।।३-३१।।पा.यो.सू.।।" - नाभिचक्रावर संयम केल्याने शरीरशास्त्राचे सूक्ष्म ज्ञान प्राप्त होते. याच मार्गाने पूर्वासूरींनी आधुनिक वैद्यकशास्त्र व जैविकशास्त्र यांना आकळू न शकणारे अतींद्रिय असे शरीररचना, षट्चक्रे, सुषुम्ना, इडा, पिंगला इ.नाड्यांचे, मनोमय, प्राणमय, आनंदमय इ.कोषांचे लिंगदेहाचे इ.अनेकानेक अतींद्रिय सूक्ष्मातिसूक्ष्म विषयांचे ज्ञान प्राप्त करून घेतले असले पाहिजे. आयुर्वेदाचा उगम खरे तर अशा प्रकारे योगशास्त्रातूनच झाला आहे. असो.

कंठकूपावर संयम केल्याने क्षुधा, तृष्णा इ.शारीर प्रवृत्तींचा निरोध होतो. *कूर्मनाडी*वर संयम केल्याने चित्तास स्थैर्य प्राप्त होते. त्याचप्रमाणे *शरीरात अनेकानेक नाड्या व चक्रे आहेत. त्यांच्यावर केलेल्या संयमांची विविध फले प्राप्त होतात.* परंतु हा सर्व भाग अत्यंत संक्षेपकरीत्या या सूत्राद्वारे सूचित केलेला आहे, याची जिज्ञासूंनी येथे जरूर नोंद घ्यावी.

१२) सिद्धपुरुषदर्शन, देवदेवताआलोकन, सूक्ष्मदेहनिरीक्षण इ. सिद्धीः

"मूर्धज्योतिषि सिद्धदर्शनम्।।३-३२।।पा.यो.सू.।।" - ब्रह्मरंध्रस्थित ज्योतीवर संयम केल्याने सिद्ध पुरुष, देवतादी सूक्ष्म देह धारण करणाऱ्यांचे दर्शन होते. तसेच ***सामान्यात मिसळून राहणारे सिद्ध पुरुष किंवा इतरत्र वावरणारे सिद्ध याच संयमाद्वारे योग्यांना ओळखू येतात.*** इतरेजनांस सिद्ध पुरुषांची बिनचूक ओळख पटणे दुष्प्रायच असते. सत्त्वाधिक्यामुळे मूर्ध्निस्थानी सत्त्वप्रकाश वृद्धिंगत होऊन त्याचे तेजोवलय फाकते.

साधु-संत-महात्मे-सिद्ध-देवदेवता यांच्या मस्तकावर जे तेजोवलय काढण्याची चित्रकारांची प्रथा आहे, तिचा उगम या योगविज्ञानात असल्याचे आपणास जाणवल्यावाचून राहत नाही. आणि हा तेजोवलयसंकेत केवळ भारतीय हिंदूधर्मापुरता मर्यादित नसून इतरही अनेक देशांतील विविध धर्मांत प्रचारात आहे, हेही एक ऐतिहासिक सत्यच होय. कदाचित त्या त्या महात्म्यांनाही या वलयाचे ज्ञान योगसिद्धीद्वारे प्राप्त झाले असावे असेही आपण म्हणू शकतो.

पुरुषसंयम व प्रातिभ सिद्धी::::

१) सर्वज्ञातृत्वसिद्धीः

"प्रतिभाद्वा सर्वम्।।३-३३।।पा.यो.सू.।।"-प्रतिभेवर संयम केल्याने सर्व विषयांचे ज्ञान होते.कित्येक योगी पुरुष एखाद्या विषयाचे क्षणात अचंबित करून टाकणारे ज्ञान मिळवतात, ते याच सिद्धिद्वारे. योग्यांची प्रतिभाशक्ती विकसित झालेली असते. त्यामुळे उत्स्फूर्त काव्य, नाट्य, लेखन इ.रचना त्यांच्याकडून झालेल्या आढळतात. **अत्यंत उच्च कोटीच्या प्रतिभेमुळेच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी आणि आपल्या इतर रचना केलेल्या आहेत.** त्या त्या विषयांचे सखोल ज्ञान व त्यास होणारा परतत्त्वाचा स्पर्श हे त्या रचनांचे मर्म जाणकारांनी ध्यानी असू द्यावे.

२) चित्तज्ञानः

"हृदये चित्तसंवित्।।३-३४।।पा.यो.सू.।।" - हृत्कोषावर संयम केल्याने चित्तज्ञान होते. दुसऱ्याच्या हृत्कोषावर संयम केल्याने त्याच्या चित्ताचे ज्ञान होते. *प्रत्यय आणि हृत्कोष* यांच्यावर केलेल्या संयमाचे फल हे एकच आहे.परंतु *हृत्कोषावर संयम केल्याने चित्त व पुरुष यांचे भिन्नत्व प्रत्ययास येते* हा विशेष आहे. ***हृत्कोष म्हणजे हृत्संवित्कमल वा आध्यात्मिक हृदय.*** याच्या स्थानासंबंधी आपण योग्य वेळी अधिक विचार करू या.

३) पुरुषज्ञान (आध्यात्मिक सिद्धी):

"सत्त्वपुरुषयोरत्यन्तसङ्कीर्णयोः प्रत्ययाविशेषो भोगः परार्थत्वात् स्वार्थसंयमात्पुरुषज्ञानम्।।३-३५।।पा.यो.सू.।।" - ***सत्त्व*** म्हणजे अंतःकरण. ***पुरुष*** म्हणजे द्रष्टा आत्मा. हे दोन्ही ***असंकीर्ण*** म्हणजे परस्परांहून अत्यंत भिन्नभिन्न आहेत. परंतु मायावशे कर्ता-भोक्ता हे गुणधर्म द्रष्ट्यास चिकटलेले आभासतात. चित्त वा अंतःकरण आणि आत्मा हे एकमेकांशी संबंधित, एकमेकांचे आहेत, असा मायेचा भास निर्माण होतो. खरे तर गुणच गुणात वर्तत असतात. आत्म्याचा त्या खेळात कोणताही भाग नसतो. परंतु असे न जाणवणे हा ***भोग*** होय.

हा भोग आत्म्याचा नसतो, हे जाणून त्या द्रष्ट्या आत्म्यावर - पुरुषावर - संयम केल्याने तो पुरुष कसा आहे, त्याचे ज्ञान होते. ***विवेकख्याती*** साधल्याचे फळ हेच आहे. आणि हा सांगितलेला सूत्रोक्त संयम म्हणजेच ***विवेकख्याती*** होय. या संयमाचे फल म्हणून प्रकटणारी ही ***पुरुषज्ञान*** म्हणून म्हटलेली सिद्धी ***आध्यात्मिक*** स्वरूपाची असून कैवल्यसाक्षात्काराच्या फक्त एक पायरीअलीकडील होय.

४) प्रातिभ सिद्धीः

"ततः प्रातिभश्रावणवेदनादर्शास्वादवार्ताजायन्ते।।३-३६।। ।।पा.यो.सू.।।" - पुरुषावर केलेल्या संयमाचे फलस्वरूप ***प्रतिभा***

प्रकाशते आणि प्रतिभसामर्थ्याच्या प्रभावाने सूक्ष्म, सुदूरच्या वस्तू इ.ची माहिती, ज्ञान आणि उपभोग प्राप्त होतो.

सूत्र क्र. ३-३३ मध्ये प्रतिभेवरील संयमस्वरूप सर्व विषय व त्यांचे ज्ञान प्राप्त होते, असे म्हटलेले आहे. परंतु प्रतिभा कशी प्रकटते, तो भाग येथे सूचित झाला आहे.

या सूत्रात ***दिव्यश्रावण, दिव्यवेदन(स्पर्श),दिव्यरूप दिसणे (आदर्श), दिव्य आस्वाद चाखणे आणि दिव्य गंध समजणे (वार्ता)*** या सिद्धी कशा उत्पन्न होतात, हे स्पष्ट केले आहे. किंबहुना याच प्रकारे ते ते पदार्थ वा वस्तू प्रत्यक्ष आपल्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य अशा योग्यात असावे असे वाटते. पण सदर सूत्रात तसा उल्लेख नाही. कदाचित पा.यो.सू.क्र.३-४८मध्ये म्हटल्याप्रमाणे *(पृ.क्र.७३८)* असे असावे की योगी त्या त्या पदार्थावर आपले चित्त ***विकीर्ण*** करून ते ते विषय आपल्याच ठिकाणी अनुभवत असेल. असो.

या ***प्रातिभ सिद्धी*** पुढील योगक्रमणेत बाधा निर्माण करू शकतात. जवळच आलेले कैवल्यसाक्षात्काराचे योग्यांचे मूळ ध्येय प्राप्त होण्यास या सिद्धींमुळे विलंब लागू शकतो, असा इशारा देतांना पतञ्जली म्हणतात की: ***"ते समाधावुपसर्गा व्युत्थाने सिद्धयः।।३-३७।। पा.यो.सू.।।"*** - ***प्रातिभ श्रावण, दर्शन, स्पर्शन, आस्वादन, गंध*** इ.इतके विलोभनीय असतात की व्युत्थानकालीच्या या सिद्धींच्या मोहात पडल्यास त्यांचे संस्कार प्रबल होऊन असंप्रज्ञात समाधीचे संस्कार दृढ होण्यास वेळ लागतो. कदाचित हा विलंब अनंत कालाचाही ठरणे शक्य आहे!! म्हणून योगसाधकांस हा निर्वाणीचा इशारा आहे.

५) परकायाप्रवेश:

या पुरुषसंयमाच्या सिद्धीमध्ये अनेकानेक अद्भुत सिद्धींचे भांडार दडलेले आहे. ते योगसाधकांपुढे उघडे करत पतञ्जली पुढे म्हणतातः ***"बन्धकारणशैथिल्यात्प्रचारसंवेदनाच्च चित्तस्य परशरीरावेशः ।।३-३८।।पा.यो.सू.।।"*** - पुरुषावर संयम केल्याने आणि चित्ताच्या चलनवलनाचे ज्ञान झालेले असल्याने, चित्तास स्वशरीरात बद्ध करणारे पाश शिथिल होतात. त्यामुळे चित्ताचा परशरीरात प्रवेश करता येतो.

भगवत्पाद श्रीमच्छंकराचार्यांची परकायाप्रवेशाची मंडनमिश्र - सरस्वतिवादासंबंधित अत्यंत प्रसिद्ध घटना आपणा सर्वांना विदित आहेच.

याबाबत असे म्हणतात की स्वशरीरात चेतना असते; परंतु ते अतिगाढ निद्रेत (hibernation)असल्याप्रमाणे असते व त्या शरीरात चित्त पुनः प्रवेश करेपर्यंत ते जपून ठेवावे लागते. नवनाथचरित्र व श्रीशंकराचार्य यांच्या मिथककथेवरून असेच दिसून येते. परंतु असेच असले पाहिजे असे नाही. कारण ***कैवल्यपाद सूत्रे क्र.२ ते ६*** मध्ये योग्याची अनेक शरीरे निर्मून ती धारण करण्याची, तसेच त्या त्या शरीरासाठी एक एक चित्त निर्माण करण्याची सिद्धी सांगितली आहे.

"प्रवृत्तिभेदे प्रयोजकं चित्तमेकमनेकेषाम्।।४-५।।पा.यो.सू.।।" या सूत्रामध्ये अशा सर्व चित्तांचे नियंत्रण योग्याचे मूळ चित्त करत असल्याचे म्हटले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता योग्यास स्वशरीराचे सर्व व्यवहार पूर्ववत ठेवून अन्य शरीरात *(एकाच वेळी एका वा अनेकांत)* चित्त प्रवेश करणे व त्या शरीरांचे स्वशरीराप्रमाणे नियंत्रण करणे शक्य असले पाहिजे. मूळ म्हणजे सूत्रात ***"परशरीरावेशः"*** असे म्हटले आहे, ***"परशरीरप्रवेशः"*** असे म्हटलेले नाही.***आवेश व प्रवेश*** यात जो फरक आहे, तोही येथे विचारात घेतला पाहिजे.असो.

स्वशरीरात राहूनच अन्य शरीरे निर्मून ती चालविणे या सिद्धीचा पण श्रीकृष्ण व ब्रह्मदेव यांच्या भागवतपुराणातील कथेत उल्लेख आहे. एकाचवेळी अनेकानेक गायीवासरे व गुराख्यांची, गोपबालकांची शरीरे निर्मून त्यात चित्तसंवहन करून श्रीकृष्णांनी ब्रह्मदेवाचे गर्वहरण केले होते, हे सर्वांस माहीत आहेच. असो.

६) शरीर पिसासारखे हलके करणे व ७) स्वेच्छामरण:

"उदानजयाज्जलपङ्ककण्टकादिष्वसङ्गः उत्क्रान्तिश्च।।३-३९।।पा.यो.सू.।।" - पंच प्राणांपैकी उदानावर संयम केल्याने तो वश होतो आणि योग्यास शरीर हलके करून पाणी, काटे, अग्नी इ.वरून त्यांचा स्पर्श न होता चालता येते. श्रीशंकराचार्यांचे शिष्य ***पद्मपाद*** यांचे या सिद्धीबाबतचे उदाहरण प्रसिद्धच आहे. तसेच या सिद्धीचे ***स्वेच्छेने मृत्यु येणे*** असेही एक फल आहे.

८) समानजय व अग्नीवर हुकमत चालणे:

"समानजयात्प्रज्वलनम्।।३-४०।।पा.यो.सू.।।" - त्याचप्रमाणे समान वायूचा संयम व वशीकरण यांमुळे कायाग्नी प्रज्वलित करता येतो. ज्ञानदेवांनी पाठ तव्यासारखी तापवून त्यावर मुक्ताबाईंस मांडे भाजायला दिले किंवा शंकराने तृतीय नेत्रातून ज्वाळा फेकून त्यात मदनास भस्म केले, या घटनांची या अनुषंगाने स्मृती होणे साहजिकच आहे. भागवतपुराणात सतीने दक्षयज्ञसमयी आपला अपमान झाला म्हणून अशाच प्रकारे स्वतःठायी योगाग्नी निर्माण करून त्यात आपले शरीर स्वाहा केले होते, अशी कथा आहे, ती पण याच सिद्धीच्या प्रभावाची! असो.

८) दिव्य श्रावण, वेदन, गंधादी सिद्धी:

"श्रोत्राकाशयोः सम्बन्धसंयमाद्दिव्यं श्रोत्रम्।।३-४१।।पा.यो.सू.।।" - श्रोत्रेंद्रिय व आकाशतत्त्व यांच्या परस्परसंबंधावर संयम केल्याने दिव्य श्रावण *(दूरश्रवण)* ही सिद्धी प्राप्त होते. इतरही ज्ञानेंद्रिय व त्यांच्यासंबंधित महाभूते यांच्याबाबतही अशाच प्रकारच्या संयमाने दिव्य वेदन, दिव्य गंध इ.सिद्धी प्राप्त होतात. ***पुरुषसंयमाचे उपफल म्हणूनही या प्रातिभ सिद्धी प्राप्त होतात***, असे यापूर्वी आलेच आहे.

९) आकाशगमन:

"कायाकाशयोःसम्बन्धसंयमाल्लघुतूलसमापत्तेश्चाकाशगमनम्।। ३-४२।।पा.यो.सू.।।" - शरीर व आकाश यांच्या परस्परसंबंधावर संयम करून कापसासारख्या हलक्या पदार्थावर तन्मयतावृत्ती धारण केल्याने आकाशगमन ही सिद्धी प्राप्त होते.

१०) महाविदेहावृत्ती व रजतममलक्षालन:

"बहिरकल्पिता वृत्तिर्महाविदेहा ततः प्रकाशावरणक्षयः।।३-४३।।पा.यो.सू.।।" - विदेहावृत्तीवर संयम केल्याने सात्त्विक

प्रकाशावरील रजस्तमोमलावरणाचा क्षय होऊन ***महाविदेहावृत्ती*** प्राप्त होते. फलस्वरूप ***"पिंडी ते ब्रह्मांडी"*** व ***"वासुदेवः सर्वमिति"*** आणि ***"अयमात्मा ब्रह्म"*** - ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** असा भाव दृढ होतो.

गीतेनेही प्रकाशावरणावरील रजस्तमोमलाचा क्षय होणे हा योगप्रक्रियेचा एक अवश्यंभावी घटक मानलेला आहे याची साक्ष पुढील श्लोकांतून मिळते:

१) ***"..। तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।।१४-६।।"*** - सत्त्वगुण हा निर्मल असल्यामुळे प्रकाशक आणि विकाररहित आहे;

२) ***"सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते। ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत।।१४-११।।"*** -रजस्तमोमलक्षालनाची प्रक्रिया सत्त्वगुणाच्या विवृद्धीमुळे होते आणि त्यात रजस्तमोमलाचे प्रकाशावरील आवरण दूर होऊन ज्ञानाचा प्रकाश फाकतो;

३) ***"ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः। तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम्।।५-१६।।"*** - अज्ञानाचा ज्ञानाने नाश होऊन आत्मप्रकाश फाकतो व त्याने परतत्त्वाचा साक्षात्कार होतो; इ.

अर्थात जरी गीतेने ***महाविदेहावृत्ती***चा शब्दशः उल्लेख केलेला नसला तरी वरील श्लोकांच्या अनुषंगाने आणि ***"वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।।७-१९।।"*** या गीतावचनातून प्रतीत होणाऱ्या महाविदेहावृत्तीच्या अनुभूतिप्रमाणावरून गीतेलाही योगातील हा महत्त्वाचा टप्पा अनुलक्षित होता, असे स्पष्ट दिसते. असो.

११) अष्टमहासिद्धी, कायसंपत आणि भूतजयः

"स्थूलस्वरूपसूक्ष्मान्वयार्थवत्त्वसंयमाद्भूतजयः।।३-४४।। ।।पा.यो.सू.।।" व ***"ततोऽणिमादिप्रादुर्भावः कायसंपत्तद्धर्मानभिघातश्च ।।३-४५।।पा.यो.सू.।।"*** - पदार्थांच्या ***स्थूल, सूक्ष्म, स्वरूप, अन्वय व अर्थवत्त्ववृत्ती*** यांवर संयम केल्याने ***भूतजय*** प्राप्त होऊन चराचरावर स्वामित्व प्राप्त होते.

पदार्थांचे इंद्रियगोचर रूप म्हणजे ***स्थूलत्ववृत्ती.*** त्यांची निर्व्यापारावस्था म्हणजे ***सूक्ष्मत्व.*** भूतांच्या ***तन्मात्रा*** हे त्या पदार्थांचे ***स्वरूप.*** त्या तन्मात्रांतर्गत ***सत्त्व-रज-तम*** हे गुण म्हणजे ***अन्वयवृत्ती.*** अन्वय आणि महत्तत्त्वापासून स्थूल भूतांपर्यंतचे सर्व गुणपरिणाम ज्या शक्तीमुळे घडून येतात, ती ***अर्थवत्त्वावस्था*** असे समजावे.

या पंचसंयमांपासून भूतजय प्राप्त झाला की ***अणिमादी अष्टमहासिद्धी*** प्राप्त होतात. उपफल ***कायसंपत*** **व भूतांकडून नाश न पावणे** असे आहे.

कायसंपत या सिद्धीचे स्वरूप ***"रूपलावण्यबलवज्रसंहननत्वानि कायसंपत्।।३-४६।। पा.यो.सू.।।"*** असे आहे. म्हणजे सुंदर रूप, लावण्य, श्रेष्ठ सामर्थ्य *(बल)* आणि वज्रासारखे काठिण्य अशी कायासंपदा प्राप्त होते. ज्ञानेश्वरांनी सहाव्या अध्यायात याच कायसंपदेचे वर्णन मोठे बहारीचे केले आहे. ***"बुद्धिचिं पुलिका विरैं। परिमळुं घ्राणिं उरैं।...... जैं आपां आन पृथिवियेचें। अंशु नाइं।।६-२४६ ते २६८।। ज्ञानेश्वरी।।"*** या ओव्यांतून हे समग्र दर्शन आपण करून घेतलेच आहे *(उन्मेष:४४-१:योगविभवभाण्डार-पंथराज पृ.क्र.७२५-७२६).* त्यानंतरच्या ओव्यातून येणारा सिद्धींचा प्रांत आपण आताच पातञ्जलयोगसूत्रांच्या साहाय्याने विस्तारपूर्वक अवलोकित आहोत. आता उरलेल्या पण महत्त्वाच्या अशा काही **आध्यात्मिक सिद्धीं**चा थोडक्यात परामर्ष घेऊन हा विषय आटोपता घेऊ या.

आध्यात्मिक सिद्धी::::

१) इंद्रियजयः

म्हटले तर ही सिद्धी आणि खरे तर हा आध्यात्मिकतेच्या मार्गावरील एक मोठा टप्पा आहे. ***"ग्रहणस्वरूपास्मितान्वयार्थवत्त्वसंयमादिन्द्रियजयः।।पा.यो.सू.।।३-४७।।"*** - भूतजयासाठी कराव्या लागणाऱ्या पंचविध संयमांसारखेच *(३-४४पा.यो.सू.)* या संयमाचे स्वरूप आहे. फरक फक्त भूतांऐवजी प्राधान्याने इंद्रियांसंबंधी हा ***पंचसंयम*** असणे असा आहे.

१) इंद्रिये विषयांशी संयुक्त होणे म्हणजे ***ग्रहणावस्था,*** २) विषयांशी संयोगित नसता निर्व्यापारस्थितीत प्रकाशरूप असणे ही इंद्रियांची ***स्वरूपावस्था,*** ३) चित्तात मी आहे, असे स्फुरण म्हणजे ***अस्मितावस्था,*** ४) अस्मितेतील त्रिगुणांचे असणारे अस्तित्व म्हणजे ***अन्वयावस्था*** व ५) त्रिगुणांतील भोग-अपवर्ग इ.प्रदान करू शकणारी जी शक्ती ती ***अर्थवत्त्वावस्था.*** या पाच अवस्थांवर संयम केल्यास ***इंद्रियजय*** सिद्ध होतो.

२) मनोजवित्व, विकरणभाव व प्रधानजयः

भूतजयापासून जशा ***अणिमादी सिद्धी, कायसंपत, अविनाशित्व (देहाचे)*** या सिद्धी उपफल म्हणून प्राप्त होतात, त्याचप्रमाणे वर सांगितलेल्या इंद्रियजयाच्या फलस्वरूप ***मनोजवित्व, विकरणभाव व प्रधानजय*** या सिद्धी प्राप्त होतात. ***"ततो मनोजवित्वं विकरणभावः प्रधानजयश्च।।३-४८।।पा.यो.सू.।।"*** - शरीरास मनासारखे चापल्य व गती प्राप्त होणे ***(मनोजवित्व),*** कोणत्याही देशकालातील विषयांचे इंद्रियनिरपेक्ष सेवन घडू शकणे ***(विकरणभाव)*** आणि ***प्रधानजय*** या सिद्धी ***इंद्रियजय*** झाल्याने प्राप्त होतात. **प्रधानजयाने योग्याच्या ठिकाणी विश्वामित्रासारखे संकल्पाने प्रतिसृष्टी, स्वर्गादी निर्मिण्याचे सामर्थ्य येते.**

इंद्रियजय व त्यापासून मनोजवित्वप्राप्तीचे मोठे उदाहरण म्हणजे ***"मनोजवं मारुततुल्य वेगं। जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठं"*** अशी जी हनुमंताची स्तुती आहे, त्यात येते. असो.

३) सर्वभावाधिष्ठातृत्व व सर्वज्ञातृत्वः

ही सर्वोच्च व शेवटची आध्यात्मिक सिद्धी आहे. ***"सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं ज्ञातृत्वं च।।३-४९।।पा.यो.सू.।।"*** - ***विवेकख्याती*** म्हणजे सत्त्व *(अंतःकरण)* व द्रष्टा पुरुष यातील वेगळेपणाची प्रतीती. हिलाच येथे

सत्त्वपुरुषान्ताख्याति असे म्हटले आहे. विवेकख्यातीवरील संयमाचे फलस्वरूप आपणच सर्व भावांचे अधिष्ठाते आहोत आणि सर्वज्ञही आपणच आहोत, अशी प्रतीती योग्यास येते. ही प्रतीती अत्यंत श्रेष्ठ आहे.

"अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा।।७-६।।"; "मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय।।७-७।।";"ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये। मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि।।७-१२।।"; "अहं क्रतुरहं यज्ञः ...।।९-१६ ते १९।।"; "अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः।।१०-२०।।" व *दशम* अध्यायातील बहुतेक सगळे विभूतिप्रकटीकरणाचे आणि तदनंतरचे गीताश्लोक यातून प्रकटवलेले असे या ***सर्वभावाधिष्ठातृत्व*** आणि ***सर्वज्ञातृत्व*** सिद्धींच्या अनुभूतीचे व प्रतीतीचे स्वरूप असते. योग्यास विवेकख्यातीमुळे हा असा ***ईश्वरीभाव वा आत्मभाव व सर्वज्ञातृत्वता*** प्राप्त होतात.

कैवल्य

या श्रेष्ठ आध्यात्मिक सिद्धींच्या प्राप्तीनंतर ***जीवन्मुक्ती वा कैवल्य*** प्राप्त होते. ***"तद्वैराग्यादपि दोषबीजक्षये कैवल्यम्।।३-५०।। पा.यो.सू.।।"*** असे पतञ्जलींचे म्हणणे आहे. **सर्वज्ञातृत्वतादी सिद्धींबाबत वैराग्यभावना प्रखर झाली की विवेकख्यातीचा अभ्यास परिपक्व होऊन *कैवल्य, जीवन्मुक्ती वा आत्मींचे स्वराज्य* असे ज्ञानेश म्हणतात, ते प्राप्त होते. योगमार्गाची संपूर्ण सुफळ सांगता होते.**

हा योगमार्ग असा विलोभनीय वाटणाऱ्या सिद्धींच्या प्रांतातून जात असतो. त्या त्या सिद्धींच्या अनुषंगाने दिव्यातिदिव्य भोग प्राप्त होत असतांना, चित्तास त्या विषयांचा संग घडू देऊ नये. देवदेवता आपापल्या मंडलात, स्वर्गादी प्रलोभनात गुंतवू पाहतात. त्यांच्याशी संबंध येऊ देऊ नये. अन्यथा कैवल्यप्राप्तीपासून दूर जाण्याचा मोठा धोका संभवतो, हा इशारा ग्रथित करण्यास पतञ्जली सतर्क आहेत. ***"स्थान्युपनिमन्त्रणे सङ्गस्मयाकरणं पुनरनिष्टप्रसङ्गात्।।३-५१।। पा.यो.सू.।।"*** असे ते म्हणतात.

योगसाधनेची इतिश्री

यानंतर समाधिश्रियेच्या अंतिम श्रेणीचे साक्षात्कार घडवणाऱ्या पतञ्जल्युक्त विभूतिपादातील उर्वरित सूत्रांचे विहंगमावलोकन करून ज्ञानेश्वरीकडे वळू या.

१) ***"क्षणतत्क्रमयोः संयमाद्विवेकजं ज्ञानम्।।३-५२।। पा.यो.सू.।।"*** - क्षण आणि त्याचा क्रम यांच्यावर संयम केला असता ***वस्तूतील सूक्ष्म भेद करून देणारे विवेकज ज्ञान*** उत्पन्न होते.

२) दोन वस्तू तुल्य दिसत असताही योग्यास त्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म भेदाचे ज्ञान होते असे ***"जातिलक्षणदेशैरन्यतानवच्छेदात्तुल्ययोस्ततः प्रतिपत्तिः।।३-५३।।पा.यो.सू.।।"***- त्या संयमज ज्ञानाचे फल आहे.

३) विवेकज ज्ञान तारणारे असते. त्या ज्ञानाचे लक्षण ***"तारकं सर्वविषयं सर्वथाविषयमक्रमं चेति विवेकजं ज्ञानम्।।३-५४।। पा.यो.सू.।।"*** असे सांगितले आहे.

४) ***विवेकज ज्ञान, विवेकख्याति*** या सर्वश्रेष्ठ भूमिकांची ज्या योग्यास प्राप्ती होते, तो सुखाच्या सिंहासनी बसतो; स्वानंदसाम्राज्य उपभोगतो; समाधिश्रियेचा भर्ता होतो.

"सत्त्वपुरुषयोः शुद्धिसाम्ये कैवल्यम्।।३-५५।।पा.यो.सू.।।" -चित्त हे सत्त्वगुणापासून उत्पन्न झालेले आहे. चित्तातील रजस्तमोमल नाहीसे जाले की ते शुद्धसत्त्वावस्थेत परिणत होते. अशा चित्तात व पुरुषात फरक राहत नाही. ***चित्त व पुरुष एकरूप होतात. साम्य प्राप्त होते.***

"अर्जुना समत्व चित्ताचे। तैंचि सार जाण योगाचें।। २-२७३।।" अशी ज्ञानेशांनी वर्णिलेली ही अवस्था आहे. **हेच कैवल्य! हाच योगपथाचा अंतिम आणि सर्वव्यापक टप्पा! हीच युगानुयुगी जन्मजन्मांतरी केलेल्या योगसाधनेची फलश्रुती!! हीच योगमार्गाची इतिश्री!!!**

कुंडलिनीचे उत्क्रमण(१)::::

पूर्वसूत्र

पतञ्जलींच्या सुसूत्र मार्गदर्शनाप्रमाणे ही सुखानंदाची पर्वणी कशी प्राप्त करून घ्यावी, हे आपण आतापावेतो बऱ्याच खोलात जाऊन पाहिले. समाधिश्रियेच्या समागमाचे ***"अतींद्रिय सुख, तरीही मी इंद्रियांकडून भोगविन"*** असे ज्ञानेशांचे प्रतिज्ञोत्तर आहे.

कुंडलिनी जगदंबेच्या राऊळी बसून ते सुख ज्ञानेशांच्या आनंदाच्या आवारात विहरत उपभोगण्यास उत्सुक झालेल्या साधक जिज्ञासूंना म्हणून परत ज्ञानेश्वरीकडे वळावे लागेल. आपण सिद्धींच्या झगमगत्या प्रांतापासून आता त्या प्रशांत, सुशांत, मनोहारी अशा कुंडलिनीदेवीच्या प्रांताकडे पुनश्च वळू या.

गीतेत सिद्धींचा अनुल्लेख

"आइकैं प्राणाचां हातु धरौनि। ....जैं प्राणांचिं उघडिं। जन्मभूमि।।६-२७१ ते २७३।।" मधून अनेकानेक सिद्धी कशा प्राप्त होतात, ते आपण पाहिलेच आहे. हा प्रांत ज्ञानेशांनी या अवघ्या काही ओव्यांतच लंघिला आहे. *सहाव्या* अध्यायात कुंडलिनीप्रक्रियेप्रसंगी साधकाच्या सिद्धदेहादींचे - ***खेचर*** अवस्थेचे इ.संक्षिप्त वर्णन केल्यावर अणिमादींचा उल्लेख करत ते या सगळ्या सिद्धींशी आपल्याला काय देणेघेणे असे या शब्दांत म्हणतातः

तेथ ठाईं ठाईं होएं। आणिमादिकिं।।६-२९७।।
पऱ्हें तेणें काइं काज आपणपेयां।...।।२९८।।

असो. गीतेत तर सिद्धींचे विशेष काहीच उल्लेख वा वर्णन नाही. कारण त्यातील अध्यात्म परमसिद्धीसाठी सांगितले आहे. **ब्रह्मविद्या प्राप्त करावी या एकाच हेतूने गीता - ज्ञानेश्वरीतील योगशास्त्र**

विनियोजिले असल्याने ते इतर सिद्धींबाबत गौणत्व, अनुल्लेख वा अल्प उल्लेख वा पुसटसा निर्देश असा मार्ग स्वीकारते. पतञ्जली मात्र योगशास्त्राचे समग्र दर्शन करवण्यास कटिबद्ध आहेत व ते सशास्त्र व्हावे म्हणून कटाक्षाने बारीकसारीक तपशील आणि योगविभूतींचे एवढे सांगोपांग पण संक्षिप्त वर्णन करत कैवल्याचा मार्ग दाखवतात. असो.

जगदम्बा कुंडलिनीचे उत्क्रमण

सिद्धींची जन्मभूमी खरे तर कुंडलिनी जगन्माताच आहे, हे जाणणारे ज्ञानेश म्हणून सिद्धींच्या उल्लेखानंतर त्वरित त्या जगदंबेचे बोट धरत म्हणताहेत की:

आइकैं प्राणाचां हातु धरौनि। गगनाचिं पाऊटी करौनि।
मध्यमेचेनि दादरैहूनि। हृदयां आलीं।।६-२७१।।
तैं कुंडलिणी जगदम्बा। जैं चैतन्यचक्रवर्त्तिचिं शोभा।
जियां विश्वबिजांचियां कोंभा। साऊली केलीं।।२७२।।
जैं शून्यलिंगाचिं पिंडी। जैं परमात्मेयां शिवाचिं करंडी।
जैं प्राणाचिं उघडीं। जन्मभूमि।।२७३।।

"प्राणाचा हात धरून गगनाच्या पाऊलवाटेने जाणारी ती कुंडलिनी मध्यमेचा *(सुषुम्नेचा)* दादरा चढून हृत्कोषात प्रवेशते. ही कुंडलिनी म्हणजे साक्षात चैतन्यचक्रवर्तीची सुंदरी आहे. विश्वबीजाच्या अंकुरास तीच सावली देऊन जोपासते. ***शून्यलिंगाची पिंडी, परमात्मा शिवास सांभाळणारी संपुटी*** अशी ती जगदंबा प्राणाची जन्मभूमी किंवा प्रणवाची मातृका आहे."

अनाहतनाद

कुंडलिनी म्हणजेच ***शिवा*** वा ***शक्ती.*** जग हा तिचाच विस्तार आणि व्यापार आहे. प्राणमय जगत असल्याने तिला प्राणाची वा प्रणवाची उघडी जन्मभूमी असे म्हटले आहे. ***प्रणव वा ॐकार वा उद्गीथ*** ही अवस्था तिच्यापासूनच उद्भवते.

शिवा असे तिचे स्वरूप असल्याने तिला ***चैतन्यचक्रवर्तीची शोभा, विश्वसाम्राज्ञी, विश्वसुंदरी, त्रिपुरसुंदरी, शिवाची करंडी, शून्यलिंगाची पिंडी*** अशी गूढगर्भ नामे योजिली जातात. अशी ती जगन्माता साधकाच्या हृत्कोषी आल्यावर काय होते, ते ज्ञानेशांच्या शब्दात ऐका. ते म्हणतात:

"त्यावेळी ती ***अनाहत*** ध्वनीच्या शब्दाने बोलू लागते. त्या शक्तीला लगटून बुद्धिरूपी चैतन्य जे तेथपावेतो पोहोचले होते, त्याच्या कानी ते बोल पडू लागले. बोल कसले ते! ते तर प्रणवाकृतीने रेखाटलेली नादमय चित्रांची साजिरी रूपेच होत जणू! घोषध्वनीच्या अग्निकुंडातून लवलवणाऱ्या चिन्मात्र ज्वालांच्या जणू आकृतीच असे ते ***<u>अनाहत ध्वनिरूपी बोल</u>*** होत *(ओवी क्र. ६- २७४ ते २७६)*."

"अनाहताचेनि मेघें। आकाश दुमदुमों लागें"

सुषुम्ना जणू अग्निकुंड आणि त्यातून प्राणाच्या रूपाने सुसाट वाहत ***अनाहतनाद*** उत्पन्न करणाऱ्या जणू अग्निज्वाला, त्यांच्या आकृती म्हणजे ***नादचित्रे*** असे रूपक येथे ज्ञानेश्वरांनी रेखाटले आहे.

"पण याची कल्पना करणारे मनच त्या समयी लय पावलेले असते. त्यामुळे कल्पना कशी करणार! म्हणून त्यावेळी काय गर्जत असते, ते कसे कळावे! पण एक गोष्ट मात्र लक्षात अजून घ्यावयाची राहिली आहे. ती म्हणजे **जोपावेतो प्राण वा पवन वा वायुतत्त्वाचा लय होत नाही, तोपावेतो गगनात वा आकाशात त्याचा शब्द अनाहत नादाच्या रूपाने प्रकटत राहतो** *(ओवी क्र.६-२७७ ते २७८)*."

"पृथ्वी व आप ही तत्त्वे आधीच लय पावलेली असल्याने आता पुढील ऐका! त्या ***अनाहत ध्वनीच्या मेघगर्जनेने हृदयाकाश दुमदुमू लागले की ब्रह्मरंध्र आपोआप उघडे होते.*** त्याकडे जावयाची वाट मोकळी होऊन त्याठायी असणाऱ्या महदाकाशात नंतर सर्व लय पावते *(ओवी क्र.६-२८१-२८०)*."

"द्वैत न देखैं। आइसें केलें"

आइकैं कमलगर्भाकारैं। जैं महदाकास दुसरैं।
जेथ चैतन्य आधुथुरैं। करौनि असिजैं।।६-२८०।।
तेयां हृदयाचां परिवरिं। कुंडलिणियां परमेश्वरिं।
तेजाचिं सिधौरिं। विनियोगिलीं।।२८१।।
बुद्धिचेनि शाकैं। हातबोनें नीकैं।
द्वैत जेथ न देखैं। तैसें केलें।।२८२।।

श्रीकृष्ण पुढे म्हणतात: "अर्जुना! ऐक! कमलाच्या आकाराचे भासणारे महदाकाश असते. त्यात वास करणारे चैतन्य अर्धतृप्त असते. जोपावेतो कुंडलिनी परमेश्वरी त्याला भेटत नाही, तोवर ते तृप्त होत नाही. त्या चैतन्याला हृदयकोषाच्या चिदाकाशात - माजघरात - कुंडलिनी घेऊन येते व तेजतत्त्वाची शिदोरी त्यास अर्पण करते. हातात बुद्धिरूपी भाजी घेऊन द्वैताचा जेथे प्रवेश होऊ शकत नाही, अशा त्या ठिकाणी त्या चैतन्यास ती भोजन करवते."

हा सर्व वृत्तांत गद्यात सांगायचा झाला तर तो असा की "कुंडलिनी जेव्हा हृत्काशात प्रवेशते, त्या वेळी ***अनाहतनाद*** उमटतो. त्या वेळी महदाकाशाकडे जण्याचा मार्ग चिदाकाशात प्रकटतो. त्या मार्गाने चैतन्य व कुंडलिनी यांचे सामरस्य होणार असते. या वेळी कुंडलिनी शक्ती तेजस्तत्त्वाचा लय करवून घेते. बुद्धी म्हणजेच तैजस. याचबरोबर बुद्धीचाही लय होतो, द्वैतबुद्धी नष्ट होते," असा हा भाग ज्ञानेशांच्या शब्दात येथे आलेला आहे. असो.

"सोनियाचिं सरी। प्रकाशजलाचिं झरी"

आइसिं निजकांति हारविलिं। मग प्राणुचि केवल जाहालीं।
तैं हेलीं कैसिं गमलीं। म्हणाविं पां।।६-२८३।।
हो कां जैं पवनाचि पुतली। पांगुतिलीं होति सोनेसलीं।
तैं फेडूनियां वेगलीं। ठेविलीं तिएं।।२८४।।
ना तऱ्हैं वारआचेनि आंगैं झगटलीं। दीपाचिं दिठी निमुटिलीं।
कां लखलखौनि हारपलीं। विजू गगनिं।।२८५।।
तैसिं हृदयकमलवेऱ्हीं। दिसैं सोनियाचि जैसिं सरी।
ना तऱ्हैं प्रकाशजलाचिं झरिं। वाहांति आली।।२८६।।

"त्या वेळी ती जगदंबा कशी दिसते सांगू! निजकांती हरवून केवळ प्राण-पवनरूप ती झालेली असते. वर तिने पांघरलेला भरजरी सोनेरी तासकामाचा नेसलेला शालू पण सोडून टाकावा अशी ती कशी दिसेल सांगा बरे! तेजस्तत्त्व लय पावले की जणू वाऱ्याच्या झोताने दीपज्योती मावळून जावी किंवा आकाशात क्षणैक वीज चमकून नाहीशी व्हावी; अथवा हृत्कमलापर्यंत सोन्याची सरी येऊन अदृश्य व्हावी; किंवा प्रकाशजलाची निर्झरी तेथवर वाहत येऊन हृत्कोषात जिरून जावी, तसे शक्तीचे रूप शक्तीतच सामावून जाते."

"नेणैं नादबिंदूकलाज्योति"

"तेव्हाही ती शक्तीच असते. ती केवळ प्राणस्वरूप झालेली असते. ***नाद, बिंदू, कला, ज्योती*** असे धर्म त्या वेळी उरत नाहीत. मनाचा निरोध करणे, प्राणसाधना करणे किंवा ध्यानधारणा करणे या गोष्टी त्या वेळी संभवत नाहीत. तर्क-वितर्क, विचार इ.त्या वेळी उरत नाहीत. पंचमहाभूतांची लयावस्था ती हीच *(ओवी क्र.६-२८७-२९०)!* ***(टीपःनाद,बिंदु, कला व ज्योती*** यांचे स्पष्टीकरण नंतरच्या उन्मेषांमधून योग्य त्या स्थानी करण्यात येईल.)

तेयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाचिं घडी झाडूनि।
उपलविलीं मियां जाणूनि। ग्राहिक श्रोते।।६-२९२।।

"पिंडातच पिंडाचा लय करण्याची नाथपंथीय साधना ती हीच! हेच मर्म श्रीकृष्ण सांकेतिक भाषेत प्रकट करत आहेत. ते मर्मज्ञ श्रोत्यांच्या आणि साधकांच्या दृष्टीआड होऊ नये, खूणेची ओळख नीट पटावी,***नाथांचा आदेश*** नीट समजावा, म्हणून श्रीकृष्णांच्या ध्वनितार्थरूपी त्या सणंगावरील गूढपणाची बंधने सोडवून, यथार्थाची घडी उपलवून त्या खूणेचे अंतरंगरहस्य मी ***(ज्ञानेश)*** तुम्हांसारख्या हे रहस्य ग्रहण करण्यास अति उत्सुक अशा श्रोत्यांपुढे दाखवत आहे."

पुढील कुंडलिनीप्रक्रिया

निर्वितर्क - निर्विचार - सानंद - सास्मित या समाधिभूमिका एकवटून ***असंप्रज्ञात*** समाधीचे अंतरंग प्रकटविणाऱ्या या अवस्थेचे पुढे वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

आइकैं शक्तीचैं रूप लोपैं। तेथ देहिंचें रुप हारपैं।
मग तो डोलियांचिमाझिं लपैं। जगाचियां।।६-२९३।।
यरविं आदिलांचि ऐसें। सावयव तऱ्हैं असें।
परि वायूचें कां जैसें। वलिलैं होएं।।२९४।।
ना तऱ्हैं कर्दलींचां गाभां। बुंथि सांडौनि उभा।
कां अवयवचि नभां। निवडलां जो।।२९५।।

"शक्तीचे तेज जेव्हा असे लय पावते, तेव्हा देहाचे रूप हरपते. देहरूप असा इतरेजनांना तो साधक दिसत असतांनाही विदेह होतो.बघताबघता अंतर्धान पावण्याची सिद्धी त्यास प्राप्त होते. वास्तविक तो देहधारीच असतो. इतरांप्रमाणेच पूर्वीसारखा अवयवधारी असतो. पण त्याच्या देहास जणू तो वायूचा बनवलेला असावा असे लाघव येते. आकाशगमनादी सिद्धी त्याच्यापुढे हात जोडून उभ्या असतात. त्या देहाचे वर्णन तरी किती करावे! केळीच्या सोपावरील साल काढून टाकल्यावर आतला कोमल गाभा जसा दिसतो, किंवा आकाशासच जणू त्याचे देहावयव फुटलेले दिसावेत, तसा तो त्या योग्याचा देह भासतो."

तैसें होए शरीरु। तैं तैं म्हणिजैं खैंचरुं।
हें पद होतां चमत्कारुं। पिंडु जनिं।।६-२९६।।
देखैं साधकु निगौनि जाएं। माघां पाऊलांचि ओलि राहैं।
तेथ ठाईं ठाईं होएं। आणिमादिकिं।।२९७।।
पऱ्हैं तेणें काइं काज आपणेयां।...।।२९८।।

"देह असा झाला की त्यास सिद्धयोगी ***खेचर*** अशी संज्ञा देतात. कारण ***आकाशगमन*** ही सिद्धी त्या योग्यास प्राप्त होते. देहधाऱ्यांना असा देह प्राप्त होणे ही आश्चर्यजनक किमया आहे. साधकाचा असा सिद्ध झाला की तो ज्या योगमार्गाने येथवर आलेला असतो, त्या मार्गावरील त्याच्या पावलांच्या खूणा म्हणून ठायीठायी तेथे अणिमादिक महासिद्धी दिसू लागतात. ***पण त्या सिद्धींशी आपल्याला काय करावयाचे आहे!"***

....। अवधारिं आइसां धनंजया।
लोप आथि भूतत्रेआं। देहिंचा देहीं।।६-२९८।।
पृथिवितैं आपु विरविं। आपांतैं तेजु जिरविं।
तेजातैं पवनु हारविं। हृदयामाझिं।।२९९।।
पाठिं आपण एकलां उरैं। परि शरिराचेनि अनुकारैं।
तोहिं निगैं अंतरैं। गगनां मिलैं।।३००।।
तैं हेलीं कुंडलिणी हें भाख जाएं। मारुत आइसैं नाम लाएं।
परि शक्तिपण तैं आहें। जंव न मिलैं शिविं।।३०१।।

"हे धनंजया! असे पहा की पृथ्वी, आप व तेज या तिन्ही तत्त्वांचा असा देहाच्या देहातच लय होतो. पृथ्वीतत्त्वाचा आपस्तत्त्वात, आपतत्त्वाचा तेजस्तत्त्वात आणि तेजाचा पवनतत्त्वात हृत्कोषी लय होतो. तेव्हा तो एक पवन तेवढा उरतो. वायुतत्त्व जे राहते, ते देहाच्या आकाराने देहास धरून काही काळ राहते. पण कालांतराने ते पण तेथून निघून मूर्ध्न्याकाशास जाऊन मिळते व तेथेच लय पावते. त्या वेळी कुंडलिनी हे नांव राहत नाही. पवन व आकाशतत्त्वांची मिळणी होण्यावेळी त्या शक्तीस***मारुत*** असे नांव सिद्धयोगी देतात. तरीही जोपावेतो तिचे शिवाशी मिलन होत नाही, तोवर तिच्यात शक्तित्व असतेच."

"पदीं पद प्रवेशें"

पुढे या लयाचे वर्णन करत ज्ञानेश म्हणतातः

मग जालांधर सांडिं। ककारांत फोडिं।
गगनाचिएं पाहाडिं। पैठिं होएं।।६-३०२।।

तैं ॐकाराचिएं पाठिं। पाएं देत उठाउठिं।
पश्यंतिचिएं पाउटीं। माघां घालिं।।३०३।।
फुडां तन्मात्रा अर्धवेरिं। आकासाचां आंतरिं।
भरति गमैं सागरिं। सरितां जैसिं।।३०४।।
मग ब्रह्मरंध्रि स्थिराओनि। सोऽहंभावाचियां बाह्या पसरौनि।
परमात्मलिंगा धांओनि। आंगां घडें।।३०५।।
तंव महांभूतांचि जवनिक फिटैं। मग दोघांसिहि होय झटैं।
तेथ गगनासगट आटैं। समरसिं तिएं।।३०६।।

"असो! त्यानंतर ती ***मारुत***नामक शक्ती हृत्कोषातून ***(आध्यात्मिक हृदयातून)*** पुढचा मार्ग आक्रमू लागते, तेव्हा जालंधरबंधाचे उल्लंघन करते. **ककारांत** विदीर्ण करून ती मूर्ध्न्याकाशरूपी पहाडावर चढून जाते आणि ॐकाराच्या पाठीवर पाय देत तत्काळ पश्यंतीची पायरी ओलांडून जाते. सर्व नद्या जशा सागरास मिळतात, तशा त्यानंतर ॐकाराच्या अर्धमात्रेसह साडेतीन मात्रा मूर्ध्न्याकाशी जाऊन मिळतात. मग ती ब्रह्मरंध्राच्या स्थानी स्थिर होते आणि **सोऽहंभाव**ाने त्वरेने परमात्मलिंगास आलिंगून त्याच्याशी एकरस होते. त्या वेळी पंचमहाभूते नाहीशी होतात, त्यांचा आडपडदा सरतो आणि शक्ती व परमात्मतत्त्व यांचे ऐक्य होते. त्या सामरस्यात आकाशतत्त्वासह सर्व विश्वाचा लय होतो. द्वैत असे ते तेथे उरतच नाही. अद्वैताशिवाय तिथे इतर काही असूच शकत नाही, अशी अनिर्वाच्य ती स्थिती असते."

[**टीप**ःज्ञानेशांनी येथे ***ककारांत*** असा शब्द वापरला आहे. काहींनी त्याचा अर्थ ***काकीमुख*** असा घेतला आहे. योग्य अर्थ ***ककारांत*** शब्दाच्या व्युत्पत्तीतून प्रकट होतो, तो असाः **"ककार आहे अंती ज्याच्या" ते *ककारांत* होय :** (संदर्भः श्री.मंगरूळकर केळकर यांची ज्ञानदेवी.)

क याचा अर्थ ***ब्रह्म*** असा आहे. ***ककार*** म्हणजे ***कं ब्रह्म*** - ते ज्याच्या अंती आहे असे जे स्थान, ते ***ककारांत*** होय. योगशास्त्रानुसार असे स्थान म्हणजे ***सुषुम्नामुख*** वा ***सुषुम्नापथाच्या अंतीचे स्थान होय, जे मूर्ध्निस्थ आहे.*** त्यानंतरचा प्रांत ब्रह्माचा आहे. असो.]

पैं मेघाचेनि मुखें निवडलां। समुद्रु कां ओघिं पडिलां।
तो माघुतां जैसां आला। आपणपेआं।।६-३०७।।
तेंविं पिंडाचेनि मिखैं। पदीं पद प्रवेशें।
तैं एकत्व होएं तैसें। पंडुकुमरां।।३०८।।

"मेघ वर्षतात तेव्हा समुद्रापासून मेघरूपे वेगळे झालेले पाणी सरितौघरूपे जाऊन जसे पुनः समुद्राशी एकरूप होऊन जाते, आपले आपल्याठायीच पुनश्च मिळून जाते, तसाच प्रकार या शक्ती आणि शिव यांच्या पुनर्मिलनाचा आहे. ***शरीराकारात राहूनही जेव्हा शिव आणि शिवा यांचे असे मिलन होते, तेव्हा पिंडदेहाच्या योगाने पदी पदच प्रवेशते."***

"गगनिं गगन लयां जाएं"

आतां दुजैं हान होतें। किं एकचिं हें आइतैं।
ऐसिएं विवंचनेपुरतैं। उरेचि ना।।६-३०९।।
गगनिं गगन लयां जाएं। आइसें जैं काइं आहे।
तैं अनुभवैं जो होऐं। तो होऊनि ठाकैं।।३१०।।

" हे पांडुपुत्रा! त्या स्थितीत द्वैत होते की अद्वैतच असते, हा विचारसुद्धा उरत नाही. विचारास थारा न देणारी ती स्थिती असते. आकाशात आकाशच कालवून समरस करावे किंवा गगनात गगनच प्रवेशावे, मठाकाश महाकाशात मिळावे व तेही मठ न फोडता, अशीच ती अवस्था असते. ज्याला ती प्राप्त होते, तो तेथे त्याच अवस्थेत ठाकतो. हा अनुभव ज्याचा तोच जाणे कसा असतो ते!"

"महाशून्याचां डोहिं"

वाचातीत अशा या अनुभूतीबद्दल ज्ञानेश अजून काय सांगतात, ते पहाः

म्हणौनि तेथिंचिं मातु। न चडेचि बोलाचां हातु।
जेणें संवादाचिआं गांवांआंतुं। पैठी किजैं।।६-३११।।
अर्जुना यरविं तन्हैं। एआं अभिप्रायाचां गर्वु धरिं।
तैं पाये वैखरिं। दूरिं ठेलिं।।३१२।।
भ्रूलता माघिलिकडें। मकाराचेचि आंग न मांडें।
सडेयां प्राणा सांकडें। गगना एतां।।३१३।।

"त्या अनुभूतीचे शब्दांकन करता येणे शक्य नाही, तेथे त्याबाबत संवाद तरी आपणात कसा करता येईल! अर्जुना! हा अनुभव कसा असतो, ते विशद करून आपण सांगू असा अहंकार मिरवणारी वैखरी वाणी तर या ब्रह्मैक्याच्या अवस्थेपासून खूपच दूर असते. दोन्ही भ्रूलतांच्या मध्यभागी ***आज्ञाचक्र*** असते. ते ओलांडून पलीकडील अवकाश ***सहस्रार*** म्हणून जो ओळखला जातो, त्याठायी ॐकाराच्या तृतीय मात्रेसही - मकारासही - स्थान नाही. विश्वातील सूक्ष्मातिसूक्ष्म जाणिवेचाही तेथे प्रवेश होऊ शकत नाही. एवढेच काय! तर एकट्या प्राणशक्तीसही त्याठायी येणे दुःसाध्य असते."

पाठीं तेथेंचि तो भांसलला। तंव शब्दाचां दिओ मावलला।
मग तेयांहिं वरि आटु भविन्नला। आकाशाचां।।६-३१४।।
आतां महाशून्याचां डोहिं। जेथ गगनासिंचि थाउं नाइं।
तेथ तागा लागैल काइं। एआं बोलाचा।।३१५।।

"ती प्राणशक्तीसुद्धा जेव्हा कुंडलिनीच्या बळावर तेथवर येऊन पोहोचते, तेव्हा मूर्ध्न्याकाशात लीन होते. अशा वेळी त्या प्राणशक्तीवर ज्याचे अस्तित्व कल्पिले जाते, त्या शब्दाचा दिवस मावळून अंधकार होतो. ***"नेति, नेति"*** असे त्या अवस्थेबाबत मौन बाळगून वेदही मग स्तब्धावतो. अशा त्या ***मकारापैलीकडील अर्धमात्रास्थानाचाही जेव्हा आकाशासह ब्रह्मतत्त्वात जेथे लय होतो, तेथे ज्या त्या महाशून्याच्या डोहात त्या आकाशाचासुद्धा थांग उरत नाही,*** तेथे ही आकाशाचीच

तन्मात्रा असणारी शब्दरूपी नाव त्यात कशाच्या आधाराने घालावयाची! आणि त्या अथांग ब्रह्मरूपी दर्यात त्या नावेला वल्हवणारा जाणिवरूपी वेळू तरी कोठून आणावयाचा, सांग बरे!"

"तैं आपणचिं ठाकावैं। होओनिआं"

म्हणऊनि आखरामाझिं सांपडें। किं कानवेरिं जोडें।
हें तैसें नोहें फुडें। त्रिशुद्धि मां।।६-३१६।।
जैं कंहिं दैवें। अनुभविलें फांकवै।
तैं आपणचि हें ठाकावैं। होओनिआं।।३१७।।
पुडुति जाणणैं तैं नाइं चिं। म्हणौनि असो केती हें चिं।
बोलावैं आतां वांयांचिं। धनुर्द्धरां।।३१८।।

"ती ब्रह्मैक्यावस्था अशी अगाध गूढतम असल्याने ती अक्षरात ग्रथित करता येईल किंवा कानांनी श्रवण करून समजेल अशी मुळीच नाही, हे त्रिवार सत्य आहे, असे नक्की जाण! आपल्या दैवयोगाने ती स्थिती जर आपल्याला प्राप्त झाली, तर तिचा मिळेल तो अनुभव घेऊन तसेच उगीच राहावे, हेच बरे! हे धनुर्धरा! आणखी उगाच किती वर्णन करावे त्या अवस्थेचे! कारण त्या अवस्थेत व तिच्यापुढे जाणीव अशी ती उरतच नाही, तर पुढे काय बोलावे!"

ब्रह्मैक्यानुभव

आइसें शब्दजात माघौतैं फिरैं। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरैं।
वाराहिं जेथ न शिरैं। विचाराचां।।६-३१९।।

"शब्दजात जेथून माघारी फिरते, संकल्पाचे आयुष्य जेथे पोहोचले की सरते, मन जेथे राहत नाही, विचाराचा वाराही ज्याठायी प्रवेशू शकत नाही, असे ते ***कैवल्य*** असते. उन्मनी स्थितीचे लावण्य जेथे वेड लावते, तुर्येचे तारुण्य जेथे मदोन्मत्त करते, असे ते ***अनादी अगम्य परमतत्त्वधाम*** आहे."

"विश्वाचा जे शेवट करते आणि मोक्षाशिवाय जेथे काहीही नाही, आदि, मध्य आणि अंत जेथे विरून जातात, जे विश्वाचे मूळ आहे, जे योगवृक्षाचे फळ आहे, आनंदाचाही आनंद असे जे चैतन्य आहे, पंचमहाभूतांचे जे बीज आहे, विश्वाची उत्पत्ति-स्थिती-लय ज्यात होतात, महातेजाचेही जे तेज आहे, किंबहुना हे पार्था! माझे निखळ निजरूपच जे आहे, भक्तवृंदांचा नास्तिकांनी केलेला छळ सहन न झाल्याने हे चतुर्भुजरूप माझ्याकडून धारण करवून जे मंडित झालेले आहे, ते अनिर्वाच्य असे हे महासुख आहे *(ओवी क्र.६-३२० ते ३२५).*"

"आम्ही जे हे योगसाधन सांगत आहोत, ते करून ते महासुख मिळवण्याचा जे निश्चय करतात, ते महापुरुष आमच्याप्रत येतात आणि नक्कीच त्या महासुखाची खाणच होऊन राहतात. योगसाधनाची मूर्तीच असे ते आपल्या देहाकृतीच्या मुशीत परब्रह्मरस ओतल्याप्रमाणे दिसू लागतात. हा ब्रह्मैक्यानुभव अंतरी प्रकटला की हे विश्वच मावळते *(ओवी क्र. ६-३२६ ते ३२८).*"

पुढील अनुसंधान

यावर अर्जुन म्हणू लागला की "देवा! तुम्ही म्हणता हे तर खरेच आहे. आपण सांगितलेला योग खरे तर ब्रह्मप्राप्ती करून देणारे स्थळच आहे. ज्यांनी हा योग दृढ अभ्यासला, ते निश्चयेकरून परब्रह्मत्व पावतात, हे तुम्ही सांगितलेले माझ्या अंतरंगात नीट ठसले! तरी हा योग कोणास साध्य होईल ते सांगावे *(ओवी क्र. ६-३२९ ते ३३३).*"

त्यावर श्रीकृष्णांनी दिलेले जे उत्तर ***"नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः। न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन।।६-१६।।";"युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा।।६-१७।।",*** त्यावरील ज्ञानेशांचे प्रत्याहारविषयक मार्गदर्शन आपण पूर्वी लक्षात घेतलेलेच आहे. *(उन्मेषः६::श्रीगीता व पातञ्जलयोग,पृ.क्र.९८-१००).*

या योगाभ्यासाचे फल व शांतिप्राप्ती इ.बद्दलचा उर्वरित गीतोक्त भाग आपण कालांतराने पाहणारच आहोत. परंतु या प्रसंगी कुंडलिन्युत्थापनादी योगक्रिया बव्हंशी निरूपण करून झालेल्या असल्याने त्यातील काही प्रमुख विषयाचा संकीर्णतया आढावा घेणे व जमेल तितके विश्लेषण करणे, तसेच तत्संबंधीच्या काही बाबींची माहिती करून घेण्याचा मानस आहे. त्यानंतर पुढील भागाकडे वळता येईल.

समारोप

योगसंबंधित हा एक अत्यंत महत्त्वाचा संकीर्ण भाग पाहण्यासाठी आपणास आता पुढील ***उन्मेष क्र.४५ - लययोग समालोचन*** पहावा लागेल, ज्यातून आपल्या मनातील कुंडलिनीलययोगविषयक अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील. तर वळू या तिकडे!

::उन्मेष ४५-१::
::लययोगसमालोचन::
::योगपथ::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४५-१:

ज्ञानेश्वरी:
६:५६,१५०-३२८
सि.सि.प.:
२:१-५,७-९
४:१८,२०,२५
पा.यो.सू.:
३:५५
४:१७,१८,२०,२५,३४
योगतारावलि:१-३,५,७,११-१४,२१,२२
सौंदर्यलहरी:८-१०
हठयोगप्रदीपिका:१००,१०४,१०९,११३,४-३-४,५,६,७

::उन्मेष ४५-१::
::लययोगसमालोचन::
::योगपथ::

कुंडलिनीशक्ती::::

उपोद्घात

मागील उन्मेषाच्या समारोपप्रसंगी सूचित केल्याप्रमाणे कुंडलिन्युत्थापनादी योगक्रियांसंबंधी काही प्रमुख विषयांचा संकीर्णतया आढावा घेणे व जमेल तितके विश्लेषण करणे हे या उन्मेषाच्या दोन्ही भागांचे प्रयोजन आहे. याबाबतची जमेल तितकी माहिती संकलित करणे व तिचा एकसंध विचार करणे आणि त्यासाठी कुंडलिनी व तिची उत्थापनप्रक्रियादी, योगचक्रे, लययोग, पंथराज यांचा अधिक अभ्यास करणे आणि आपल्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासास पुढील चालना देणे इ.बाबी *४५-१ व ४५-२* या दोन उन्मेषांत अंतर्भूत आहेत.

कुंडलिनीयोग, पंथराज इ.चे एक समालोचन

कुंडलिनी या विषयावर उपलब्ध असलेले ग्रंथादी विपुल आहेत. आजकाल तर पौर्वात्य व पाश्चिमात्य या दोघांनाही या विषयाचे फार आकर्षण आहे. इंग्रजी भाषेतील ***सर जॉन वुड्रॉफ (आर्थर ॲव्हलॉन)*** यांचा ***The Serpent Power*** हा विस्तृत प्रस्तावना असलेला, साधारणपणे सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला या विषयास वाहिलेला ग्रंथ सुविख्यात आहे. एका पाश्चिमात्याने संस्कृतातील शास्त्र व वैज्ञानिक ग्रंथांचा प्रदीर्घकाल अभ्यास करून, पौर्वात्य शास्त्रे, तंत्रविज्ञान आणि पौर्वात्य व विशेषतः वैदिक तत्त्वज्ञान यांचा समन्वय करून हा बृहत ग्रंथ निर्मिला आहे, ही मोठी कौतुकास्पद बाब आहे. विशेष म्हणजे या ग्रंथाच्या आवृत्त्या अजूनही निघतात. जिज्ञासूंनी तर हा ग्रंथ मुळातूनच समग्र वाचून मनन करावा इतकी या ग्रंथाची थोरवी आहे. इतके प्रकट चिंतन आणि तेही ***कुंडलिनी*** या गुह्यतम विषयावर आपल्याकडे पूर्वी याप्रमाणे कोणीही केलेले सहसा दिसून आलेले नाही.

कुंडलिनीविषयक वाङ्मय

याव्यतिरिक्त ***कुंडलिनी आणि योग*** या विषयावर अलीकडे इतरही लिखाण उपलब्ध आहे. रामकृष्ण परमहंसांचे शिष्यगण आणि स्वामी विवेकानंदांचे लिखाण, स्वामी शिवानंदांचे ***कुंडलिनीयोग*** हे पुस्तक, बी.एस. गोयल यांचे *Third Eye and Kundalini*, स्वामी विष्णुतीर्थमहाराज यांचे ***देवात्मशक्ती***, बाबामहाराज आर्वीकर यांचे ***दिव्यामृतधारा***, सौ. कमल बापट यांचा ***सौंदर्यलहरीचा भावानुवाद***, श्री.श्री.म.वैद्य यांचे ***षट्चक्र सोऽहंदर्शन व भेदन***, स्वामी शिवोमतीर्थ यांचे ***कुंडलिनी सिद्धमहायोग***, सौ.दीपा कोडिकल यांचे ***Journey Within The Self***, स्वामी सत्यानंद सरस्वति यांचे ***Kundalini Tantra***, डॉ.बां. त्रिं. शाळिग्राम यांचे ***श्रीज्ञानेश्वरांचा पंथराज***, हरीष जोहरी यांचे ***Leela***, श्री.के.रा.जोशी यांची ***ज्ञानेश्वरी सिद्धयोगदर्शन*** आणि ***शक्तिपातयोगरहस्य***, इ.अनेक पुस्तकांचे संदर्भ याविषयी देता येतात.

याव्यतिरिक्त ***पंडित गोपीकृष्ण, स्वामी मुक्तानंद, गुरुदेव रानडे, गजाननमहाराज गुप्ते*** इ.चे आनुभविक लिखाण आणि इतरही अनेकांचे तंत्र आणि योगविषयक ग्रंथ,संतवाङ्मय आणि इतर विपुल साहित्य याबाबत उपलब्ध आहे. संदर्भ ग्रंथसूचीत यातील मला मिळालेल्या ग्रंथांचा अंतर्भाव केलेला आहे. ती जिज्ञासूंनी अधिक माहितीसाठी पाहावी, अशी विनंती. असो. आता कुंडलिनीयोगविषयक इतर बाबींकडे वळू या.

सूक्ष्म देह व चक्रे

सामान्यपणे **कुंडलिनी** ही संकल्पना ***षट्चक्रे*** वा त्याहून अधिक अशा नऊ वा इतर चक्रविषयक संकल्पनाधिष्ठित आहे. मनुष्य देहांतर्गत ***स्थूल पिंड, सूक्ष्म पिंड वा सूक्ष्म देह*** असे दोन विभाग साधारणतया कल्पले जातात. योगशास्त्रानुसार स्थूल देह व सूक्ष्म देह यांचा घनिष्ट संबंध असतो.

मनुष्याचे आचार-विचार, आहार, भय, निद्रा इ.सर्व प्रक्रिया या स्थूल-सूक्ष्म संघातानुसारी असतात. स्थूलदेहाचे आधुनिक वैद्यकशास्त्रानुसार हस्तपादादी बाह्य अवयव व हृदय, मेंदू, जठर इ.अंतर्गत अवयव असतात. त्यांना रक्तपुरवठा व प्राणवायू आणि अन्न पुरवणारी व्यवस्था देहात विद्यमान असते. देहाचे चलनवलन होण्यासाठी मज्जासंस्था आणि स्नायू पण असतात. ***"चक्षुर्वै सत्यम्"*** असा पुरावा या सर्वांसाठी आधुनिक वैद्यकशास्त्र देऊ शकते. हा सर्व पुरावा योगशास्त्रास अमान्य असण्याचे काहीच कारण नाही.

पण त्यापुढे जाऊन योगिजनांची अशी आनुभविक धारणा आहे की जीवास स्थूल देहाव्यतिरिक्त सूक्ष्म देहही असतो. हा सूक्ष्म देह मनुष्यास त्याचा गर्भसंभव होतांना मिळतो आणि मनुष्याच्या मृत्यूपरांत तो सूक्ष्म देह स्थूल देहास सोडून इतर लोकांत जातो. जन्म-पुनर्जन्म या चक्रनेमिक्रमास या सूक्ष्म देहाचा आधार दिला जातो. हा सूक्ष्म देह कधीच नष्ट होत नाही, हे त्याचे स्थूल देहासापेक्ष वैशिष्ट्य आहे.

केवळ यौगिक प्रक्रियांद्वारे समाधि व तदनंतरच्या उच्च अवस्थांमध्ये हा सूक्ष्म देह ***कारण- महाकारण*** इ.प्राकृतिक अवस्थांमध्ये किंवा ***कैवल्य-मुक्ती*** इ.अवस्थांमध्ये विलीन झाल्याशिवाय मनुष्यास जन्म-मृत्यू -जरा-व्याधि - पुनर्जन्म - दुःख - भय -शोक इ.पासून मुक्ती मिळत नाही.

हा सूक्ष्म देह कसा असतो, याचे तेराव्या अध्यायाचा परामर्ष घेतांना आपण गीतेच्या माध्यमातून विवेचन केलेले पाहिले आहे. या देहात मनुष्याचा ***वासनाकोष*** संपुष्टात ठेवावा तसा ठेवलेला असतो व त्या वासनाकोषाचा नाश झाल्याशिवाय किंवा त्याचे उदात्तीकरण झाल्याशिवाय मनुष्य मुक्तीचा अधिकारी होऊ शकत नाही.

मनुष्याची कर्मे व त्यांचे संस्कार या वासनाकोषात साठवले जातात आणि पूर्वोक्त संस्कारांनुसार मनुष्य या जन्मी वर्तत असतो. या जन्माच्या वासना व कर्मसंस्कार घेऊन त्यांची जुन्या वासनाकोषात भर घालून मनुष्य मृत्यूप्रत जातो. उपभोगलेल्या वासनांपेक्षा उपभोग घ्यावयाच्या वासना खूप उरतात. त्यामुळे जन्मोजन्मी हा वासनाकोष क्षीण होण्याऐवजी फुगतच जातो, असे म्हटले तरी चालेल. म्हणून जन्म-मृत्यू-पुनर्जन्म हे चक्र लंघून जाणे दुरापास्त होते. यासाठीच गीता सांगते की मायेस लंघून जाणे अति दुष्कर आहे. असो.

नाडीविज्ञान

सूक्ष्म देहात ***इडा, पिंगला व सुषुम्ना*** या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या तीन प्रमुख योगनाड्या आणि इतर उपनाड्या यांची मोठी नाडीसंस्था विद्यमान असते. या नाड्यांची ग्रंथिस्थाने असतात. तसेच या नाडीसंस्थेची नियामक अशी काही विशिष्ट केंद्रेही असतात. त्यातील अत्यंत महत्त्वाची अशी जी केंद्रे आहेत, त्यांना ***षट्चक्रे*** वा त्याहून अधिक अशा प्रत्येक योगप्राणालीविशिष्ट चक्रनामांनी ओळखले जाते.

षट्चक्रे ही सहा असतात, पण त्यांव्यतिरिक्त जी अनेकानेक केंद्रे, उपकेंद्रे वा उपचक्रे असतात, त्यांपैकी बहुतांशांचे सर्वसामान्य योगसाधकांस फारसे ज्ञान नसते. परंतु योगसिद्धांची जी जाणीव किंवा प्रज्ञा म्हणून विशेष संवेदना असते, तिला त्या सर्व नाडीसंस्थांचे व चक्रग्रंथींचे समग्र ज्ञान असते, असे योगमार्तंडांचे एक मत आहे. किंबहुना योगसाधकांस जेव्हा अशा योगसिद्धांकडून ही जाणीव प्रदान केली जाते, किंवा त्यांच्यातील सुप्तावस्थेत असलेली ही जाणीव जेव्हा जागृत होते, तेव्हा योगसाधनेसाठी आवश्यक असणारे नाड्यादिसंस्थेचे संपूर्ण ज्ञान त्यांना प्राप्त होते.

फरक असलाच तर एवढाच की बऱ्याच योगिजनांत हे ज्ञान अंतर्मनात वा जाणिवेत दडून राहते व म्हणून त्यांना ते व्यक्त करता येत नाही, तर काही भाग्यवंतांना हे ज्ञान अंतर्मनातून बाहेर अभिव्यक्त करण्याची शक्ती असते. अशा या काही अभिव्यक्तिपात्र योगिजनांनी दिलेल्या वा ग्रथित केलेल्या अनुभवसिद्ध माहितीवरूनच योगधारेचे एतद्विषयक साहित्य संपादित केले असल्याचे आपणास जाणवते.

पण त्यातूनही या सर्व माहितीविषयी पराकोटीची गुप्तता बाळगण्याचा योगविज्ञानाचा दंडक असल्याने व गौप्य फोडल्यास योगमार्गातील प्रगती स्तंभित होण्याचा आदेश असल्याने या संपूर्ण योगधारेची अधिकृत माहिती मिळणे दुष्करच आहे. गुरु-शिष्यसंबंधातच ही माहिती रहावी अशी योगधारेची योजना आहे. म्हणून सर्वसामान्य जिज्ञासूंना ही माहिती मिळणे अति कठीण आहे. तरीही काही विचक्षण योग्यांनी, कोणी का होईना, योगसाधकास या माहितीचा उपयोग व्हावा या उदात्त हेतूने ही गुप्ततेची अट फोडून त्यांना वाटली तेवढी माहिती प्रसिद्ध केली आहे आणि तीच आपल्यापर्यंत येनकेनप्रकारेण पोहोचली आहे, म्हणूनच तर या प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन! असो.

चिच्छक्तिविलास

चक्रादी नाडीसंस्था सूक्ष्मदेहात विद्यमान असते व तिच्या साहचर्याने स्थूल देहातील मज्जा-रक्त-स्नायू-अवयव, मेंदू इ.सर्व संस्था कार्यरत होतात. त्यांच्यात एक सुप्तसा बंध असतो. जोपावेतो हा बंध विद्यमान असतो, तोवर देह जिवित असतो. हा बंध तुटला की सूक्ष्मदेह विलग होतो व स्थूल देहाचा मृत्यू घडून येतो. हा बंध जो आहे, त्यास ***कुंडलिनी*** असे नामाभिधान आहे, असे एक मत आहे.

सूक्ष्म देहाची पंचमहाभूतांच्या तन्मात्रांनी निर्मिती करणारी जी चिच्छक्ती असते, तिचे कार्य सिद्ध झाले की त्या देहात ती अंशरूपाने राहते. **सुप्तावस्थेत राहणाऱ्या या चिच्छक्तीच्या अंशासच कुंडलिनी असे म्हणतात.** कर्मानुसारी उपभोग देणारा जो स्थूलदेह असतो, त्याची स्थूल महाभूतांच्या साहाय्याने उभारणी करण्यास प्रकृती आणि कुंडलिनी या चिदंशभूत शक्तींचे सहकार्य अभिप्रेत असते.

गर्भसंभवापासून तो थेट मृत्यूपर्यंत या दोन शक्ती मनुष्यदेह चालवतात, त्याकडून कर्मे करवून घेतात, त्यास उपभोग देतात, त्याच्या वासनाकोषात जन्मोजन्मी पडणाऱ्या भरीसह तो कोष एका देहाकडून दुसऱ्या नवीन देहाकडे संक्रमित करण्याचे कार्य पार पाडतात.

खरे तर सर्व जगाचे कार्य याच शक्ती संपन्न करतात. ***परा माया व अपरा माया*** यांची या दोन शक्ती रूपे होत. यांच्या सांघष्ट्याने जीव निर्मिला जातो. गीतोक्त पंचवीस वा ज्ञानेशोक्त छत्तीस तत्त्वांचा जो संघात देह या स्वरूपात दृग्गोचर होतो, तो याच शक्तींचा विलास होय. ***"परास्य शक्ति त्रिविधा च श्रुयते। इच्छा ज्ञान बलक्रिया च।।"*** -अशी त्रिविध इच्छा, ज्ञान व क्रिया या शक्ती धारण करणारी परा माया वा अव्यक्त*(गीता श्लोक क्र.१३-५)* म्हणजेच ही कुंडलिनीशक्ती होय.

जीव, शिव व शक्ती

उपरोक्त तत्त्वांशिवाय अजूनही एक तत्त्व ***पुरुष*** म्हणून आहे. ते ***शिव*** म्हणून योगप्रणालीत ओळखले जाते. त्या शिवतत्त्वाची सहचरी म्हणून ***शक्ती वा कुंडलिनी*** समजली जाते. ***शिव व शक्ती*** ही जोडी ***पुरुष व प्रकृति*** या अनादिसिद्ध युगुलाची जीवभावाशी संलग्न अशी अभिव्यक्ती मानण्यास प्रत्यवाय नसावा. पुरुष व प्रकृति या युगुलाचा सविस्तर परिचय यापूर्वी तेराव्या अध्यायातील ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** संबंधाचे विवेचन करतांना आपण करून घेतलेलाच आहे.

योगधारेतील ***शिव व शक्ती*** यांचे स्वल्पसे रहस्य व परिचय आपण ***अमृतानुभव*** या ग्रंथातील ***शिव-शक्ती समावेशन*** या प्रकरणाचा प्रसंगोपात्त आधार घेतांना जिज्ञासूंना निवेदित केले आहेच

(उन्मेषः३६ःशिवशक्तीचा चिद्विलास-पृ.क्र.५५१ ते ५६८). त्या वेळी या शिवशक्तीचे अनाद्यरूप ज्ञानेश कसे वाखाणतात, ते आपण अनुवादिले आहे. त्याच अनाद्य रूपाचा आविष्कार योगधारेशी कसा समन्वय साधतो, ते ***जीव-शिव-शक्ती*** या योगभूत त्रिकूटावर आधारित पंथराजाच्या कुंडलिनीसंबंधित योगप्रणालीचे अवलोकन करण्यासाठी आपण पाहत आहोत.

लयप्रधान पंथराज

पंथराज अवलोकिला असता हे स्पष्ट होते की तो ***लयप्रधान*** योग आहे. *कुंडलिनीची जागृती, तद्विषयक प्राणायाम व मूलबंध-ओढियाणा बंध - जालंधरबंध, कुंडलिनीची चक्रमार्गे ऊर्ध्वचालना, चक्रे व तत्संबंधित पंचमहाभूतांची आटणी वा लय, आज्ञाचक्रापुढील गोल्हाट - भ्रमरगुंफा इ.गुह्य चक्रस्थानातून कुंडलिनीचे प्राणासह उन्नयन, अनाहतनाद, इडा - पिंगला- सुषुम्नासंबंधित कुंडलिनीचा प्रवास, कुंडलिनीचे शक्तीरूपात संक्रमण आणि शक्ती व शिव यांचे मेलन वा मिलन* अशा काही ठळक पायऱ्या या मार्गावर असल्याचे ज्ञानेश्वरांच्या याविषयीच्या आतापावेतो केलेल्या दिग्दर्शनावरून सूचित होते. ***कुंडलिनी*** या संकल्पनेचा स्वल्प परिचय आपण आताच करून घेतला आहे. आता लयप्रधान योगाचे रहस्य थोडे आकळून घेऊ या.

अव्यक्त ते व्यक्त प्रसवक्रम

अव्यक्त दशेतून जीवाची व्यक्तात अभिव्यक्ती होत असता कुंडलिनी व प्रकृतिभूत पंचमहाभूते, अहंकार, मन, बुद्धी इ.तत्त्वांचा संघात स्थापन होतो. या संघातात - गीतोक्त क्षेत्रात -पंचमहाभूते, अहंकार, बुद्धी, अव्यक्त *(मूलप्रकृति -जीव)* आणि दशेंद्रिये, मन, दहा इंद्रियांचे दशविषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, चेतना, धृती व या सर्वांचे सांघष्ट्य अशा छत्तीस तत्त्वांचा समावेश असतो. गीता या संघातास ***क्षेत्र*** असे नाव देते. हे क्षेत्र कुंडलिनीशक्तीच्या आधारे उभे राहते, एका देहाचा त्याग झाल्यावर हे सूक्ष्म क्षेत्र दुसरा देह त्याच शक्तीच्या आधारे संक्रमण करते. परकायाप्रवेशसुद्धा याच शक्तीच्या साहाय्याने सिद्ध होतो, इतके या शक्तीचे अनन्यसाधारण महत्त्व योगिजनांस विशद आहे.

देहनिर्मितेचे आपले कार्य संपन्न करून ती मूलशक्ती - चिदात्मिका शक्ती - कुंडलिनी मूलाधारी सुप्त वसते. ***मूलाधार*** हे एक सूक्ष्म देहस्थ बिंदुमात्र स्थान आहे. त्याठायी ज्यास ***कंद वा मूल*** असेही म्हणतात, तेथे ही कुंडलिनी स्थित असते. सुप्त असली तरी तिचा अंशमात्र चेतन असतो व त्यायोगे जीवाची या सृष्टीत कालक्रमणा, कर्मे उपभोग इ.व्यवहार संभवतो.

मूलस्थित सुप्त कुंडलिनीचे योगिजनांस अनुभूतिपूर्ण दर्शन घडते, ते ती जणू साडेतीन वेटोळी घालून मुख आतल्या बाजूस वळवून ***निदैलेली कुंकुमचर्चित सर्पिणी***च असावी तसे! योगी आपल्या अंतर्दृष्टीने तिचे जे असे रुप लक्षितो, न्याहाळतो आणि ध्यातो, त्याचे अत्यंत बहारीचे वर्णन सहाव्या अध्यायी ज्ञानेशांनी केलेले आहे. ***"नागाचें पिलें। कुंकुमैं नाहालें। ... तैसें सुबद्ध आटलीं। पुटीं होति दाटलीं।...।।६-२२१ ते २२३।।"*** या ओव्यातून केलेले त्याचे वर्णन आपण पूर्वीच पाहिले आहे. असो.

प्रतिप्रसव क्रम वा लय

अव्यक्त ते व्यक्त दशा हा कुंडलिनीचा प्रक्रम ***अधोगती वा अवरोह*** वा ***प्रसवक्रम*** म्हणून समजला जातो. ***(चैतन्य -➤ अव्यक्त–➤ व्यक्त)*** ही उत्तरोत्तर संसाराभिमुख अशी अभिव्यक्ती आहे. त्या उलट ***(व्यक्त-➤अव्यक्त -➤चैतन्य)*** ही चित्स्वरूपाकडे नेणारी मार्गक्रमणा आहे. यासाठी कुंडलिनीस ***ऊर्ध्वगती*** वा ***आरोहक्रम*** प्राप्त होणे आवश्यक असते. चैतन्याकडून चैतन्याकडे होणाऱ्या या पुनरागमनाचा स्थूल आलेख कुंडलिनीच्या माध्यमातून आपणास दिसतो तो असाः ***[(चैतन्य -➤ अव्यक्त -➤व्यक्त-➤कुंडलिनीचा अधोगतिप्रक्रम) -(हीच सुप्ता कुंडलिन्यवस्था होय.)-➤(कुंडलिनी जागृति -➤ व्यक्त -➤ अव्यक्त -➤ चैतन्य-➤ कुंडलिनीचे ऊर्ध्वक्रमण)].***

यातील ***(चैतन्य-➤ अव्यक्त-➤ व्यक्त)*** या प्रक्रमास ***प्रसवक्रम*** असे नांव आहे. कारण या मार्गे संसाराचा उदय होतो, जीव व्यक्तावस्थेत येतो, संसार - कर्म यांचे चक्र चालू होते. याउलट ***(व्यक्त -➤अव्यक्त -➤ चैतन्य)*** या क्रमास ***प्रतिप्रसव*** असे म्हणतात. यात संसाराचा लोप होणे, जीवाचे स्वरूप चैतन्यात परिणत होणे, संसारचक्राचा भंग होणे, नैष्कर्म्यावस्था प्राप्त होणे, या गोष्टींचा अंतर्भाव होतो. जीवसापेक्ष या सर्व क्रमांना कुंडलिनी शक्तीचा आधार असतो.

ज्याप्रमाणे चैतन्यापासून मायेच्या साहाय्याने विश्व आविर्भूत होते, त्याचप्रमाणे **कुंडलिनी शक्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मायेच्या या अंशाच्या साहाय्याने चिदांशात्मक जीव व्यक्त रूप धारण करतो.**

लययोग

संसाराच्या आवागमनचक्रापासून मुक्ती मिळवणे हे योगाचे मूळ उद्दिष्ट आहे. ***योगशास्त्रानुसार जोपावेतो प्रतिप्रसवक्रम साध्य होत नाही, तोपावेतो योग सिद्ध होत नाही.*** सृष्ट्युत्पत्तीच्या शास्त्रसंमत कल्पनेनुसार युगारंभी सृष्टी उत्पन्न होते व युगाअंती तिचा लय होतो. ***(व्यक्त-➤ अव्यक्त-➤ चैतन्य)*** असा हा प्रवास सर्वच जीवांना घडतो आणि प्रत्येक युगात जीवांचा हा प्रक्रम चालूच असतो.

परंतु ***(व्यक्त-➤ अव्यक्त-➤ चैतन्य)*** हा प्रक्रम घडण्यासाठी जीवास विशेष अवस्था प्राप्त करून घ्यावी लागते. ती योगाने प्राप्त होते. परंतु या प्रक्रमाचा व सृष्ट्युत्पत्ति- लयचक्राचा तसा काही संबंध नाही. ***(व्यक्त-➤चैतन्य)*** हा प्रक्रम साध्य करून घेणाऱ्या जीवांना सृष्ट्युत्पत्तिचक्रानुसार मार्गक्रमण करणे आवश्यक नसते. जन्म - पुनर्जन्म या साखळीतून ते कायमचे सुटतात. काही अनाकलनीय विधानानुसार त्यांनी जन्म घेतला, तर त्यास *अवतार* असे म्हणतात. अवतारी पुरुषांना प्रकृतिनियम बद्ध करत नाहीत.

प्रतिप्रसवक्रम साध्य झालेले पुरुष *जीवन्मुक्त* असतात. क्वचित योगभ्रष्टांचा प्रतिप्रसव क्रम पूर्णावस्थेत गेला नसल्यास ते पुनः देह धारण करून पुढील जन्मामध्ये तो क्रम पूर्णस्थितीला नेऊन मुक्त होतात. हे सर्व योगाच्या साहाय्याने होते.

असे असल्याने आणि **प्रतिप्रसव साध्य केल्याशिवाय मुक्ती मिळत नसल्याने, *प्रतिप्रसव -ज्यास लय असेही म्हणतात* - हा योगाचा अविभाज्य अवश्यंभावी भाग आहे.** या प्रतिप्रसव प्रक्रमाचा अंतर्भाव असल्यामुळे या योगास ***लययोग*** असेही म्हणतात. ***ज्ञानेशांच्या पंथराज साधनेत लययोगाचे प्राधान्य आहे,*** हे त्याबाबत सहाव्या अध्यायात केलेले वर्णन व वरील विवेचन यावरून स्पष्ट व्हावे.

लययोग, पातञ्जलसूत्रे व पिंडाची उभारणी

यापूर्वी एकदा ***पिंडाची उभारणी*** हा विषय हाताळतांना आपण मनाचे ज्ञानेशोक्त स्वरूप पाहिले *(उन्मेषः१९-१ःक्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१- पृ.क्र.२८५-२८७).* मन हे योगाचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. म्हणून ***ब्रह्मांडवृक्ष*** संकल्पनेतील मनाचे स्थान व त्याची उत्पत्ती याचा प्रक्रम आपण जो पाहिला, तिकडे निर्देश करणे आवश्यक आहे. हा ***ब्रह्मांडवृक्ष*** दोन प्रकारे दर्शवता येतो *(उन्मेषः१९-१ःक्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१- पृ.क्र. २८२ व २८६).* **तक्ता क्र. (१) व (२)** यातून तो पुढे दर्शविला आहे.

तक्ता क्र.(१)

ब्रह्मांडाचा वंशवृक्ष

पुरुष | प्रकृति (अव्यक्त व सूक्ष्म)

प्रकृति (अव्यक्त व सूक्ष्म)
→ महान किंवा बुद्धी (व्यक्त व सूक्ष्म)
→ अहंकार किंवा तैजस (व्यक्त व सूक्ष्म)
→ सात्त्विक सृष्टी (म्हणजे व्यक्त व सूक्ष्म इंद्रिये) | तामस सृष्टी (म्हणजे निरिंद्रियसृष्टी)

सात्त्विक सृष्टी → पाच बुद्धिंद्रिये | पाच कर्मेंद्रिये | मन

तामस सृष्टी → तामस म्हणजे निरिंद्रिय सृष्टी
→ पंच तन्मात्रे (सूक्ष्म)
→ विशेष किंवा पंच महाभूते (स्थूल)

तक्ता क्र.(२)

मन व सुधारित ब्रह्मांडवृक्ष

ब्रह्मांडाचा वंशवृक्ष

पुरुष + (आदि) मन (आदिसंकल्प करणारे) + प्रकृति (अव्यक्त व सूक्ष्म)

→ मन + महान किंवा बुद्धी (व्यक्त व सूक्ष्म)
→ मन + अहंकार किंवा तैजस (व्यक्त व सूक्ष्म)
→ मन +
→ सात्त्विक सृष्टी (म्हणजे व्यक्त व सूक्ष्म इंद्रिये) | तामस सृष्टी (म्हणजे निरिंद्रियसृष्टी)

सात्त्विक सृष्टी → पाच बुद्धिंद्रिये | पाच कर्मेंद्रिये | मन

तामस सृष्टी → तामस म्हणजे निरिंद्रिय सृष्टी
→ पंच तन्मात्रे (सूक्ष्म)
→ विशेष किंवा पंच महाभूते (स्थूल)

मन: लययोगात मनाचे स्थान अनन्यसाधारण आहे. **कल्पना निमून मनाचे *उन्मन* होऊन *मनाचा पट फाटणे* ही योगभूत प्रक्रिया आहे.** सृष्टी ब्रह्मांडापासून उत्क्रांत होत होत ***(पंचेंद्रिये + पंचमहाभूते + मन + अहंकार + बुद्धी)*** या स्वरूपाच्या संघातात प्रकट होते, असा हा ***प्रसवक्रम*** आहे. त्याविरुद्ध दिशेचा ***प्रतिप्रसव प्रक्रम* म्हणजे लय.** या लयक्रमात पंचेंद्रिये व पंचमहाभूते ही आपापल्या उपादान कारणात लय पावत अंती सर्वच आदितत्त्वात विलीन होतात. तसेच अहंकार, बुद्धी व मन यांचेही होते. ***"बुद्धीची पुलिका विरे"*** असे याबाबत ज्ञानेशांनी वर्णन केलेले आहे.

मीपणा अंत पावतो - अहंकार लय पावतो आणि हे सर्व सर्जणारी प्रकृति व पुरुषाचा आदिसंकल्प हेसुद्धा त्याच्यात लय झालेल्या उपरोक्त तत्त्वांसह पुरुषात विलीन होतात. शक्ती शिवास मिळते. ***"जंव न मिळें शिवीं"*** तोपावेतो शक्तीचे शक्तीपण उरते. प्रकृतीचे प्रकृतित्व तोपावेतोच शिल्लक राहते.

पातञ्जलयोगसूत्रांप्रमाणे त्या अवस्थेत एक म्हणजे ***"सत्त्वपुरुषयोः शुद्धिसाम्ये कैवल्यम्।।३-५५।।विभूतिपाद।।पा.यो.सू.।।"*** असे चित्त पूर्ण शुद्ध व सत्त्वात परिणत होऊन त्या चित्ताचे व पुरुषाचे ***शुद्धिसाम्य*** होते व चित्ताच्याठायी कैवल्याची सिद्धी होते.

दुसरे होते ते म्हणजे ***"पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यं स्वरूपप्रतिष्ठा वा चितिशक्तिरिति।।४-३४।।कैवल्यपाद।।।।पा.यो.सू.।।"*** - पुरुषार्थशून्य झालेले गुण उपादानकारणात लीन होतात. हा प्रतिप्रसव साध्य झाला की ***कैवल्यावस्था*** प्राप्त होते. अथवा दुसऱ्या प्रकारे म्हणावयाचे तर ***चितिशक्ती*** वा ***चेतनपुरुष*** आपल्या नित्यसिद्ध स्वरूपात प्रतिष्ठित झाल्याने अंतिम अशी ***कैवल्यस्थिती*** प्राप्त होते. ***पातञ्जलयोगसुद्धा अशा प्रकारे लयाशी साधर्म्य ठेवणारा आहे.***

योगचक्रे (१) व चक्रभेदन::::

लययोग, कुंडलिनीचे ऊर्ध्वगमन व योगचक्रे

ज्ञानेशांनी त्या अंतिम लयावस्थेचे वर्णन करतांना अनादी अगण्य परमतत्त्वात असा लय होतो, असे सूचित केले आहे. विश्वाचे मूळ आणि आनंदाचेच केवळ असे जे चैतन्य असते, त्यात योगवृक्षाच्या फलस्वरूप असा हा अंतिम लय होतो.

"महाभूतांचे बीज, महातेजाचेही तेज" अशा भगवत्स्वरूपात हा अंतिम लय होतो आणि ***"सुखाचेही सुख"*** ते योगिपुरुष होऊन राहतात. परब्रह्माचा रस त्यांच्या देहाकृतीत भरून ओसंडतो आणि त्या अंतिम योगप्रतीतीमुळे ***"विश्वचि हें आघवें झांकें"*** असा त्यांच्यासाठी ब्रह्मांडाचासुद्धा ***प्रतिप्रसवात्मक अंतिम लय*** साध्य होतो, असे सहाव्या अध्यायी या लयावस्थेचे वर्णन ज्ञानेशांनी केले आहे, ते आपण पूर्वीच पाहिले आहे. असो.

आता पंथराज - ***कुंडलिनीची उत्थापन-मार्गक्रमणादी क्रिया - पंचभूते व दशेंद्रिये यांचा मन-बुद्धी- अहंकारासह लय - प्रकृतिपुरुष मेळवणी*** - असा जो भाग ज्ञानेशांनी यापूर्वी वर्णन केला आहे, त्याचे थोडे विस्तारपूर्वक अवलोकन करू या:

त्यासाठी कुंडलिनी ऊर्ध्वगमन करत असता कोणकोणत्या प्रमुख चक्रांशी तिचा संबंध येतो, त्या चक्रांची योगशास्त्रानुसार थोडी माहिती असणे आवश्यक आहे. ती करून घेऊ या. यापूर्वी याविषयीचा थोडा भाग *सहाव्या* अध्यायातील योगारंभीच्या आसनविषयक चर्चा करतांना आपण श्रीगोरक्षनाथांच्या ***सिद्धसिद्धांतपद्धति*** या ग्रंथाधारे पाहिला होता *(उन्मेषः८::पंथराज-पृ.क्र.१२५ ते१२७ व १३१)*. योगसाधकांस मूलभूत असे जे *सोळा आधार, नऊ चक्रे, तीन लक्ष्ये व पंचव्योम* त्यांनी सांगितले आहेत, त्यांची नाथसांप्रदायिक धारणा माहीत करून घेणेही आवश्यक ठरते.

परंतु या ठिकाणी जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे की ही जी चक्रे इ. आहेत, त्यांची विशिष्ट योगपंथांत थोडीफार भिन्नभिन्न नावे प्रचलित आहेत. तसेच कुंडलिनीच्या प्रवासाची दिशासुद्धा ***पूर्वमार्ग व पश्चिममार्ग*** अशी भिन्नभिन्न असल्याची विविध पंथानुसारी विविध मते आहेत, परंतु पंथभेदांनुसार योगमार्ग वस्तुतः बदलत नाही. म्हणून या सर्व बाबींचा आपणास जमेल तसा समन्वय करत हा विषय समजून घेणे आपणास क्रमप्राप्त आहे. असो.

योगचक्रांचे विवरण

प्रथमतः नाथप्रणालीतील नऊ चक्रांची किमान माहिती ***सिद्धसिद्धांतपद्धति व सिद्धसिद्धांतसंग्रह*** या श्रीगोरक्षनाथांच्या ग्रंथाधारे घेऊ या. ही माहिती ज्ञानेश्वरीत नाही.

१)मूलाधारचक्र वा ब्रह्मचक्र

"पिंडेनवचक्राणि।। आधारे ब्रह्मचक्रं त्रिधावर्तं भगमण्डलाकारं तत्र मूलकन्दः तत्र शक्तिं पानाकारां ध्यायेत तत्रैव कामरूपं पीठं सर्वकामप्रदं भवति।।२।।१।।सि.सि.प.।।" - शरीररूपी पिंडात नऊ चक्रे असतात. मूलाधारात ***मूलाधारचक्र*** अथवा ***ब्रह्मचक्र*** या नावाचे चक्र असते. ते तीन वेढ्यांचे असते. त्याचा आकार योनिसदृश त्रिकोणासम असतो. **त्याच्या देठात *मूल वा कंद वा मूलकंद* या नावाचे नाड्यांचे आद्यस्थान व मूळ वा ग्रंथी असते.या स्थानी अग्निकांतितुल्य व अग्नीच्या आकाराची अशी कुंडलिनी शक्ती असते.**

(**टीप**:चक्र हे फूल आहे, असे समजल्यास त्याचा देठ म्हणजे मध्यस्थ बिंदु अथवा चक्रमूल समजावा.)

"विद्युल्लतेचि विडी। वह्निज्वालांचिं घडि। पंधरेयाचिं चोखडिं। घोंटिव जैसिं।।६-२२२।।" असे या शक्तीच्या स्वरूपाचे वर्णन ज्ञानेशांनी केले आहे. मूर्तिमंत विजेची वाटोळी कडी असावी किंवा प्रत्यक्ष अग्निज्वालेची दैदिप्यमान घडी दिसावी अथवा चोख सोन्याचे चकचकणारे पिवळेधम्मक वळे असावे, तसे तिचे रूप योग्यांच्या अंतर्दृष्टीस दिसते असे जे ज्ञानेश म्हणतात, ते नाथपंथाध्वर्यु श्रीगोरक्षमताशी इतके मिळतेजुळते आहे.

अशा त्या कुंडलिनी शक्तीचे ध्यान करावे असे ***अंतर्लक्ष्य*** गोरक्षनाथांच्या या श्लोकात निर्देशिले आहे. पतञ्जलींच्या देश व ध्येय्यवस्तुविषयक धारणा-संयमादींचे येथे स्मरण होते. अशा प्रकारची चक्रवर्णने एक तर देशाची व्याप्ती व वर्णन करतात आणि त्यात ध्येय्य वस्तू कोणती त्याचाही निर्देश देतात. **मूलाधारचक्र हा देश आणि तेथे कुंडलिनीचे ध्यान करावे असे सांगून गोरक्षनाथांनी पातञ्जलयोगसूत्रांस पूरक भूमिका बजावलेली आहे.** *मूलाधारचक्र हा धारणा देश व कुंडलिनी ही ध्येय्य वस्तू तर समाधि कोणत्या वस्तूवर अभिप्रेत आहे असा प्रश्न येथे उद्भवतो.* **समाधिफल म्हणून *कुंडलिनीजागृती* अपेक्षित आहे,** हेही आपल्या ध्यानात यावे! असो.

या मूलाधारचक्रात ***कामरूप*** म्हणून ओळखले जाणारे पीठ आहे. ***हे शक्तिपीठ म्हणजे शक्तीचे निजस्थान आहे.*** योग्याने हे चक्र सिद्ध केले की शक्ती जागृत होऊन या चक्राचा वेध करते व त्याचे फल सर्व कामनांची सिद्धी होणे असे आहे.

मूलाधारचक्राची अजूनही इतर काही वैशिष्ट्यै आहेत. ते लिंग वा गुह्यस्थानात जी चार बोटे लांबीची शिवण म्हणजे कातडीचा जोड असतो, त्याच्या मागच्या बाजूस असते. अपान वायूचे ते स्थान आहे. ***गुप्ता, प्रासका, कराळा व विक्राळा*** अशा चार तांत्रिक शक्तिदेवतांचे ते पीठ आहे. हे चक्र साध्य झाले की जो आनंद प्राप्त होतो, त्याची ***परमानंद, सहजानंद, वीरानंद व योगानंद*** अशी चार स्वरूपे आहेत. या चक्राची देवता गजानन आहे. वर्ण आरक्त आहे. हे चक्र वेधले की ***सलोकता मुक्ती*** मिळते, असेही एक मत आहे. रजोगुण येथे प्रबळ असतो. या चक्राचा वेध केला की *पृथ्वीतत्त्व* जिंकले जाते. मंत्रयोगाशी संबंधित ***वं, षं, सं व शं*** हे वर्ण वा मातृका या चक्राची साधना सफल करतात. ***लं*** हे या चक्राच्या मंत्रयोगसाधनेशी संबंधित ***मूलबीज*** आहे. ***ब्रह्मा व डाकिनी*** या मंत्रसंबंधित देवता या चक्रात विद्यमान असतात. या चक्रात ***स्वयंभू लिंग*** असते. अर्थात या स्थानी जे चैतन्य आहे, त्याचे हे मंत्रयोगोक्त स्वरूप आहे.

या चक्रात ***मूल नाडिग्रंथी*** असते. तेथून ***इडा, पिंगला व सुषुम्ना*** या प्रमुख तीन नाड्या उगम पावतात. इडेस ***चंद्र*** व पिंगलेस ***सूर्यनाडी*** अशीही नावे आहेत. सुषुम्ना नाडी त्रिगुणमयी म्हणून ओळखली जाते. ***या सर्व नाड्या या स्थानापासून निघून मेरुदंडातून जात जात शेवटी आज्ञाचक्रात पुनः मिळतात.*** सुषुम्ना नाडीचे ब्रह्मद्वाराकडील म्हणजे मूलाधाराच्या बाजूचे मुख कुंडलिनी शक्तीने बंद झालेले असते. जागृत झालेली कुंडलिनी जेव्हा कंदावर उभी राहते, तेव्हा ती या मुखाद्वारे सुषुम्नेत प्रवेश करते आणि त्यानंतर योगाच्या महत्त्वाच्या क्रिया घडू लागतात.

(**टीप**: **<u>कंदस्थान</u>**: कुंडलिनी शक्तीचे मूलस्थान कोणते असा एक प्रश्न सहसा योगसाधक विचारतात. याला कारण असे की काहींचे म्हणणे ते स्थान म्हणजे मूलाधार आहे, तर इतरांच्या मते ती मणिपूरचक्रात राहते. तर अजूनही काही तिचे स्थान ***कंद*** हे आहे असे मत नोंदवतात.

ज्ञानेश्वरीत कंदाचा उल्लेख ***"कंदावरि शक्ति उठिली दिसैं।।६-२२७।।"*** असा कुंडलिनीजागृतीच्या संदर्भात केलेला आहे. पण याचाही अर्थ काही ज्ञानेश्वरींच्या प्रतीत ***"आपल्या नाभिस्थानरूपी कंदावर"*** **तर इतरांनी *"नाभिस्थानाखालील कंदावर", "नाभीवर", "नाभिवरील कंदावर", "स्वाधिष्ठानचक्रावर*** (कुंटेप्रत)" इ.प्रकारे केलेला आहे.

आपण आताच पाहात आहोत त्या गोरक्षांच्या ***सिद्धसिद्धांतपद्धति (२-१)*** या श्लोकात मात्र ***"... आधारे ब्रह्मचक्रं त्रिधावर्तं भगमण्डलाकारं तत्र मूलकन्दः तत्र शक्तिं ....."*** असे मूलकंदाचे वर्णन केले आहे. त्यानुसार ***मूल वा कंद वा मूलकंदाचे स्थान मूलाधारचक्राच्या देठात असते व तेच नाड्यांचे आद्यस्थान व मूळ वा ग्रंथी आहे.*** कुंडलिनी शक्तीच्या त्रिधा स्थिती ***अधः- मध्य - ऊर्ध्व शक्त्यावस्था*** यांचाही एक वेगळाच विचार या ग्रंथात आहे. तो आपण नंतर पाहणार आहोत.

श्रीगुरु गोरक्षनाथांच्या या प्रमाणित विधानावरून आपणास इतरांच्या अननुभवी मतांचा त्याग करून ***मूलाधाराचे केंद्र हे कंदाचे स्थान*** म्हणून मान्य करण्यास प्रत्यवाय नसावा. कुंडलिनी सुप्तावस्थेत मूलाधारी राहते, असे तर सर्वांचेच म्हणणे आहे. अनेक योग्यांची पण तशी स्वानुभविक साक्ष आहे. असो.)

२)स्वाधिष्ठान चक्र

"द्वितीयं स्वाधिष्ठानचक्रं तन्मध्ये पश्चिमाभिमुखं लिङ्गं प्रवालाङ्कुरसदृशं ध्यायेत तत्रैवोड्यानपीठं जगदाकर्षणं भवति।।२-२।।सि.सि.प.।।" - एखाद्या वेलीवर फुले लटकावीत तशी ही चक्रे इडा-पिंगला-सुषुम्ना या नाड्यांची एकमेकात जी गुंफण होऊन तिपेडी वेणीसारखी रचना झालेली दिसते, तिच्यावर लटकलेली दिसतात. मूलाधारचक्र पहिले, तर दुसरे चक्र ***स्वाधिष्ठान*** म्हणून ओळखले जाते. ते सहा पाकळ्यांच्या कमळाच्या आकाराचे आहे. तेथे पश्चिमाभिमुख म्हणजे पाठीकडील बाजूस गुंजांच्या रंगाचे लिंग आहे. त्याचे ध्यान करावे. येथे ***ओडियाणपीठ*** असून या चक्राच्या साधनेमुळे जगदाकर्षणाची सिद्धी प्राप्त होते.

हे चक्र लिंगमूळाच्या स्थानी असते. तेथे ***अपान वायू*** असतो. ***अव्यंगता, शारदा, वाणी, अमृता, पूर्णा व रोहिणी*** अशा सहा मंत्रशास्त्रोक्त शक्तींचे हे पीठ आहे. या चक्राचा कुंडलिनीने वेध केला की जो आनंद प्राप्त होतो त्याची ***प्रशस्त, कुरंग, गर्वगत, अवज्ञ, अविश्वास व मूर्च्छित*** अशी रूपे आहेत.

या चक्राची देवता ***ब्रह्मा*** आहे. वर्ण पीत आहे. हे चक्र भेदले की ***सलोकता मुक्ती*** प्राप्त होते, असे एक मत आहे. मूलाधाराप्रमाणेच याही चक्रात **रजोगुणा**चे अधिष्ठान असते व याचे तत्त्व ***पृथ्वी***च आहे. तंत्रशास्त्रानुसार हे सहा पाकळ्यांचे समजतात. यांची मंत्रशास्त्रोक्त बीजे ***लं, रं, यं, बं, भं व मं*** अशी असून ***वं*** हे याचे मूलबीज आहे. तंत्रशास्त्राप्रमाणे हे ***जल वा आप***तत्त्वाचे असून त्याची देवता वरुण आहे. ***गरुडारूढ विष्णु व राकिणी शक्ती*** अशा तंत्रोक्त देवता तेथे वसतात.

(**टीप:भेदनक्रम -** सर्वसाधारणपणे चक्रक्रम जरी मूलाधार ते स्वाधिष्ठान असा असला तरीही त्यांचा भेदनक्रम वेगवेगळा असू शकतो. ***सौंदर्यलहरी*** या आदिशंकराचार्यांच्या प्रकरणग्रंथाचे जेव्हा आपण परीक्षण करू, तेव्हा याविषयी अधिक विचार होईल.)

३) मणिपूरचक्र अथवा नाभिचक्र

"तृतीयं नाभिचक्रं पञ्चावर्तं सर्पवत्कुंडलाकारं तन्मध्ये <u>कुण्डलिनीं शक्तिं</u> बालार्ककोटिसदृशीं ध्यायेत् सा मध्या शक्तिः सर्वसिद्धिदा भवति।।२-३।।सि.सि.प.।।" - तिसरे चक्र हे ***नाभिचक्र*** वा ***मणिपूर*** या नावाने विख्यात आहे. हे चक्र पाच आवर्तांचे असते. ते सर्पकुंडलाकार असते. ***तेथे बालसूर्याप्रमाणे रक्तवर्ण दिसणाऱ्या कुंडलिनी शक्तीचे वास्तव्य असते.*** ज्ञानेशांनीसुद्धा

रक्तवर्ण दिसणाऱ्या कुंडलिनीचे वर्णन ***"नागाचे पिलें। कुंकुमैं नाहालैं।।६-२२२।।"*** असे सहाव्या अध्यायात केल्याचे आपणास विदित आहे. या कुंडलिनीच्या स्वरूपास श्रीगोरक्षनाथ सर्वसिद्धिप्रदायक अशी ***मध्याशक्ती*** म्हणून गौरवितात.

कुंडलिनीचे स्थान

सिद्धसिद्धांतपद्धतिच्या या दोन श्लोकांमुळे असा प्रश्न येथे उद्भवतो की एकदा कुंडलिनी मूलाधारस्थित असल्याचे सांगून पुनः ती नाभिचक्रातही असल्याचे कसे म्हणता येते! याविषयी थोडा खुलासा आवश्यक ठरतो. श्रीगोरक्षनाथ कुंडलिनीचे ***परा व अपरा, सूक्ष्मा व कुंडलिनी , तसेच प्रबुद्ध व अप्रबुद्ध*** असे भेद करतात. त्याचप्रमाणे पिंडस्थ कुंडलिनीचेही ***अध:शक्ती, मध्याशक्ती व ऊर्ध्वशक्ती*** असेही भेद ते करतात. ***कुल म्हणजे पराशक्ती.*** **अकुल म्हणजे शिव वा चैतन्य.**

शिवशक्ती तसे अभिन्न असतात. पण विश्वाच्या संबंधात शक्तीचे हे ***परा (जीवात्मिका) व अपरा (अष्टधा)*** असे गीता *श्लोक क्र. ७-४ व ५* मध्ये वर्णन केल्याप्रमाणे भेद संभवतात. आता पिंडस्थ पराशक्तीसुद्धा ***स्थूला व सूक्ष्मा*** या दोन रूपात प्रकटते. ***स्थूला***शक्तीचे अस्तित्व सर्वांना जाणवते. पण ***सूक्ष्मा***शक्तीचे अस्तित्व फक्त योग्यांनाच माहीत असते. या **सूक्ष्माशक्तीचे पण *कुंडलिनी* हे सूक्ष्मातिसूक्ष्म स्वरुप आहे व परमात्मयोग साध्य होतो, तो या कुंडलिनीच्या जागृतीनेच!**

जेव्हा ही **कुंडलिनी** सुप्त असते, तेव्हा ती ***अप्रबुद्ध*** म्हणून ओळखली जाते. तीच जागृत झाली की तिला ***प्रबुद्ध*** असे म्हणतात. **ही शक्ती *सुप्त* असते, तेव्हा मूलाधारात राहत असली, तरी नऊ चक्रातही तिचे स्वरुप त्रिविध शक्तिरूपाने विद्यमान असते.** परंतु जोपावेतो शक्तिजागृती होत नाही तोपावतो इतर चक्रस्थित कुंडलिनीशक्तींचा आध्यात्मिक दृष्ट्या उपयोग होत नाही. त्या सुप्तच राहतात.

गोरक्षनाथांनी याविषयी स्पष्टीकरण केले आहे. ***"एकैव सा मध्योर्ध्वध: प्रभेदेन त्रिधा भिन्ना शक्तिरभिधीयते।।४-१७।। सि.सि.प.।।"*** - अध:शक्ती, मध्यशक्ती व ऊर्ध्वशक्ती अशा त्रिविध प्रकारांची शक्ती भिन्न नसून एकच आहे.

गोरक्षमताचा कुंडलिनीयोग प्रक्रियेवर प्रकाश

त्या तिन्ही शक्तींचे स्वरूप विशद करतांना ते म्हणतातः ***"बाह्येन्द्रियव्यापारनानाचिन्तामया सैवाध:शक्तिरुच्यते। अतएव ये योगिन: तस्या आकुञ्चनं मूलाधारबन्धनात् सिद्धं स्यात्।। ...।।४-१८।।"*** - बाह्येंद्रियांचे व्यापार व नाना प्रकारच्या चिंता धारण करणाऱ्या मूलाधारस्थित सुप्त शक्तीला ***अध:शक्ती*** असे म्हणतात. संसारातून विराम पावण्यासाठी ***मूलबंध*** लावून योगी या अध:शक्तीचे आकुंचन करत असतात. त्यायोगे ती जागृत होऊन ऊर्ध्वगमनशील होते.

ऊर्ध्वगमनाच्या मार्गात ***मध्याशक्ती*** तिला मिळते. त्या शक्तीबद्दल श्रीगोरक्ष म्हणतातः ***"तरङ्गितस्वभावं जीवात्मानं वृथा भ्रमन्तमपि स्वप्रकाशमध्ये स्वस्वरूपतया सर्वदा धारयितुं समर्था या सा मध्याशक्ति: कुण्डलिनी गीयते।।४-२०।।"*** -ही मध्याशक्ती चञ्चल जीवांना वृथा भ्रमण करण्यापासून वाचवणारा निजप्रकाश प्रदान करून स्वस्वरूप दाखविते.

असे कार्य करण्यास व योग्यांना परमपद प्राप्त करून देण्यास ***ऊर्ध्वाशक्ती*** साहाय्यकारी होते. ***"सर्वेषां तत्त्वानामुपरि वर्तमानत्वान्निर्नाम परमं पदमेव ऊर्ध्वं प्रसिद्धं तस्या: स्वसंवेदननानासाक्षात्कारं-सूचनशीला या ऊर्ध्वशक्तिरभिधीयते। तस्या निपातनमिति स्वस्वरूपद्विधाभासनिरास: किन्तु स्वस्वरूपाखण्डत्वेन भवति।।४-२५।।सि.सि.प.।।"*** - सर्व तत्त्वांहून श्रेष्ठ असलेले ***निर्नाम*** **(अनाम)** ***परमपद ऊर्ध्व*** म्हणून ओळखले जाते. **स्वसंवेदनापूर्वक नाना आकाराने साक्षात्कार प्रकट करण्याचा त्याचा जो स्वभाव आहे, त्यास *ऊर्ध्वशक्ती* असे म्हणतात.** शिवाची ***निजाशक्ती*** ती हीच आणि ***स्वसंवेद्या*** म्हणजे हीच ***ऊर्ध्वाशक्ती*** होय.

तिचा निपात झाला की जीवशिव द्विधा स्वरूपाचे नसून केवल अखंड एकरसात्मक आहेत, अशी अनुभूती प्राप्त होते. असो. ज्ञानेशही सहाव्या अध्यायात ***पंथराज*** निर्देशित करत असतांना कुंडलिनीशक्तीची ही स्वरुपे वा स्थित्यंतरे थोड्या वेगळ्या प्रकारे प्रकट करतात. ते कसे ते आपण नंतर पाहूच. पण सध्या चक्रवर्णनानिमित्त कुंडलिनीविषयक एवढी माहिती पुरे आहे.

(**टीपःचक्रभेदनाचा क्रम** - ज्ञानेश्वरांनी कुंडलिनीशक्तीचे स्वरुप दर्शन कसे केले आहे, ते सहाव्या अध्यायातील ओव्यांतून पाहाः ***"नागाचें पिलें। कुंकुमैं नाहालें। वलण घेऊनि आलें। सेजें जैसें।।२२२।। विद्युल्लतेचिं विडी। वह्निज्वालांचि घडी। पन्हरेयाचिं चोखडी। घोटीव जैसिं।।२२४।।"*** आणि ती जागृत होतांना तिचे रूप कसे दिसते ते पाहाः ***"जैसें नक्षत्र उलंडलैं। कां सूर्याचें आसन मोडलैं। तेजाचें बीज विरूढलैं। अंकुरैंसिं।।२२६।।"*** हे सर्व कुंडलिनीचे रूपवर्णन श्रीगोरक्षनाथांनी मणिपूरचक्रातील ***मध्या***कुंडलिनीच्या स्वरूपाचे जसे ***"बालार्ककोटिसदृश:"*** म्हणजे सूर्याप्रमाणे रक्तवर्ण दिसणारी असे केले आहे तसेच कसे आहे ते पाहा. यावरून अजूनही एका गोष्टीचा विचार केला पाहिजे. तो म्हणजे ***ज्ञानेशांचा चक्रभेदनक्रम मणिपूरातील कुंडलिनीपासून सुरु होतो का.*** याचा अधिक विचार नंतर करू.)

मणिपूरचक्राची आणखी माहिती

आता मणिपूरचक्राची आणखी काही वैशिष्ट्ये पाहू या. हे चक्र ***नाभिस्थानी*** असून तेथे ***समान*** वायूचे मूलकेंद्र आहे. तेथे ***सर्वगा, सोमा, या, भद्रा, तक्षिणी, सौंदर्या, शांतमुद्रा, विशाखा, दंशिनी आणि रुचिरा*** या शक्ती वास करत असतात. या चक्राचा जय केला असता ***सुषुप्त, वृष्ण, इच्छा, पिशुण, सल्लस, मोद, भय, कशाय व विशद*** या प्रकारांचा आनंद प्राप्त होतो. या चक्राची देवता विष्णु असून वर्ण ***नील*** आहे. या चक्राचा कुंडलिनीने भेद केला असता ***समीपता*** ही मुक्ती मिळते, असे एक मत आहे. हे चक्र *दहा पाकळ्यांचे* आहे.

सत्त्वगुणाचे हे केंद्र आहे. येथे ***आप*** हे तत्त्व विद्यमान आहे. याचे मंत्रबीज **रं** हे आहे व अन्य बीजाक्षरे ***डं, ढं, णं, तं, थं, दं, धं, नं, पं व फं*** ही होत. तंत्रशास्त्रानुसार ***तेज***तत्त्वाचे हे चक्र नियामक आहे. ***रुद्र व लाकिनी शक्ती*** अशा तेथील तंत्रोक्त देवता आहेत.

कुंडलिनी उत्क्रमण क्रिया

याव्यतिरिक्त योगजिज्ञासूंसाठी महत्त्वाची माहिती अशी की जेव्हा ***मध्या कुंडलिनीचे उत्थापन होते, तेव्हा मणिपूर चक्रास जोरदार झटके बसतात व ती क्रिया नाभिप्रदेशाचे तीव्र स्पंदन होऊन साधकास जाणवते.*** या वेळी अर्थातच अध:कुंडलिनी उत्थापित होऊन कंदापासून निघून मूलाधार-स्वाधिष्ठान मार्गे मणिपूरात पोहोचलेली असते, असे मत आहे.

येथे असाही प्रश्न उद्भवतो की प्रथम अध:कुंडलिनीचेच उत्थापन होते की मध्या कुंडलिनीच मणिपूरचक्रात उत्थापित होते. ***"नागाचे पिलैं[१] । कुंकुमें नाहालैं[२] ।।६-२२२।।"*** हे ज्ञानेशकृत वर्णन ***मध्या*** कुंडलिनीस लागू पडते. ती बालार्ककोटिसदृश:[२] व सर्पवलयांकित[१] असल्याचे गोरक्ष सांगतात. ज्ञानदेवांनी या दोन्ही चिह्नांप्रमाणेच ([१] व [२]) ***"विद्युल्लतेचि विडि, वह्निज्वालांचि घडि,पन्हरेयां चोखडिं, नक्षत्र जैसें उलंडलैं, कां सूर्याचें आसन मोडलैं, तेजाचें बीज[३](६-२२४,२२६)",*** याही शब्दात कुंडलिनीचे जे दीप्तिमान तेजस्वी स्वरूप सांगितले आहे, ते श्रीगोरक्षमते जे **अध:कुंडलिनीचे अग्न्याकार स्वरूप[३] आहे, तत्समान आहे.** जागृत कुंडलिनी अशी [१, २] व [३] प्रमाणे दिसते, असे ज्ञानराज म्हणतात. या विधानांवरून श्रीगोरक्षविरचित अध: व मध्या कुंडलिनी या दोन्हींचे एकसमयावच्छेदेकरून होणारे उत्थापन ज्ञानदेवांना अभिप्रेत असावे असे दिसते. तसेच ***"अध: वर आंकुंचैं। ऊर्ध्व तलौतैं खांचें।।६-२३७।।"*** असे म्हणून ज्ञानेशांनी ***अध: व ऊर्ध्व कुंडलिनींचे मध्या कुंडलिनीत त्यावेळी मिळणे*** **सूचित केले आहे,** असे पण म्हणता येते.

कुंडलिनीच्या उत्क्रमणाबद्दलही आनुभविक योग्यांत मतभिन्नता आहे. काहींच्या मते कुंडलिनीचा सर्व शक्तिसमुच्चय एका चक्राकडून दुसऱ्या चक्राकडे सुषुम्नामार्गे प्रक्रमित होतो. परंतु काही योगिजन असे मानतात की चेतनेच्या मृदु-तीव्र संवेगाच्या प्रमाणात कुंडलिनीच्या शक्तिसमुच्चयाचा कमी वा अधिक अंश असा एका चक्राकडून दुसऱ्या चक्राकडे प्रक्रमण करत जातो आणि शेष भाग आपल्याच स्थानी सुप्त वा प्रबुद्ध अवस्थेत तसाच राहतो. कुंडलिनी शक्तीचे पूर्णांशाने जागरण न होता साधकाच्या अवस्थेप्रमाणे कमीअधिक प्रमाणात आंशिक जागरणच होते आणि किंबहुना या शेष सुप्त भागामुळेच साधकाची जीवन यात्रा व देहादी व्यापार सुरळीत चालतात.

जर सर्वच्या सर्व शक्तिसमुच्चय एकाच वेळी आपले स्थान सोडून चलित झाला, तर साधक मूर्च्छित होईल किंवा त्याचा देहपातही होणे संभवनीय आहे, असे जे काही योगिजनांचे मत आहे, ते या दृष्टीने लक्षणीय आहे. याच कारणाने योगसाधना व कुंडलिनीजागृतीपरांत करावयाचा आचार यांसाठी योगी सिद्ध पुरुषांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता या मार्गात फार असते.

चक्रभेदनक्रम

अजूनही एक आनुभविक वैशिष्ट्य असे समजले जाते की ***चक्रभेदन*** ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. याची सुरुवात कुंडलिनीजागृतीच्या क्षणापासून होते व शेवट जेव्हा कुंडलिनीचा महत्तम भाग आज्ञाचक्रास ओलांडून पुढे जातो, तेव्हा होतो. याचाच एक अर्थ असा की कुंडलिनी जागृत झाल्यावर तिचा जो अंश उत्क्रमण करू लागतो, तो झिरपत झिरपत प्रत्येक चक्रापावेतो पोचतो, तो साधकाच्या स्थितीनुसार कमी-अधिक प्रमाणात असतो.

ज्या त्या चक्राच्या पूर्ण भेदनासाठी लागणारा शक्तीचा अंश जेव्हा त्या त्या चक्रात क्रियाशील होऊन सफल होतो, तेव्हाच एका *चक्राचा जय होतो वा भेद होतो.* म्हणजे एकदा कुंडलिनी जागृत झाली की वेगवेगळी चक्रे वेगवेगळ्या भेदनावस्थेत एकाच वेळी असू शकतात.उदाहरणार्थ मणिपूर पूर्ण भेदले गेले तरी स्वाधिष्ठान अंशमात्रच भेदलेले असू शकते. या आंशिक भेदनास उद्देशूनच योगी चक्राच्या एकेका दलाचा वेध झाल्यास काय काय फले मिळतात, ते सांगतांना दिसतात असे म्हणता येते.

याच कारणामुळे योगपद्धतीत थोडाफार फरक करून चक्रभेदनाचा सामान्य क्रम म्हणजे ***(मूलाधार -➤ स्वाधिष्ठान -➤ मणिपूर -➤ अनाहत -➤ विशुद्धि -➤ आज्ञा)*** हा बदलता येणे शक्य वाटते. म्हणजे ***(मूलाधार -➤ मणिपूर-➤ अनाहत -➤ स्वाधिष्ठान -➤ अनाहत -➤ विशुद्धी -➤ आज्ञा)*** असा जो क्रम काही योगी सांगतात, तो शक्य आहे.

ज्ञानेश व आचार्यमत

सौंदर्यलहरीत असाच एक वेगळा चक्रभेदनक्रम श्रीमदाद्यशंकराचार्यांनी सांगितलेला आहे, असे जाणकारांचे मत आहे. त्याचा विचार नंतर योग्य वेळी करू.त्याचप्रमाणे ज्ञानेशांनी **पंथराजा**त सांगितलेला क्रमही या दृष्टीने आगळावेगळा असणे पण संभवनीय आहे. यासंबंधी ज्ञानेशांची वचने पाहा:

१)"मग सौम्य होऊनि राहें। सुषुम्नेपासिं।।६-२४०।। २) "तैं हेलीं ... मार्ग मोडिति वायूचें।" ३) नवविधपण वायूचें। जाएं...।।" ४) "इडापिंगला एकवटिति।....." ५) "गांठिं तिहिं सुटति।" ६) "साहिं पदर फुटति। चक्रांचें हें।।(६-२४२ते २४४)" जागृत कुंडलिनी जेव्हा सुषुम्नामुखाशी ***"कंदावरी शक्ति। ऊठलीं दिसैं।।६-२२७।।"*** अशी सुषुम्नेत प्रवेश करण्यास सिद्ध होते, तेव्हा वरील या ओव्यांतून सूचित केल्याप्रमाणे काय काय होते पहा:

१) ***दशविध वायू (प्राणापानादी)*** आपापल्या गुणधर्मांना सोडून आपल्या वायू या मूलतत्त्वात विलीन होतात; २) ***इडा-पिंगला*** या **सुषुम्नेशी एकरुप होतात;** ३) ***कंद ते सहस्रारचक्र*** या योगपथावर इडपिंगला सुषुम्नेत ज्या ठिकाणी मिळतात, त्यांस ***ग्रंथिस्थान*** म्हणतात. कंदाव्यतिरिक्त अशी तीन स्थाने आहेत. मणिपूर चक्राखाली ***रुद्रग्रंथी*** असते. अनाहत चक्रावर ***विष्णुग्रंथी*** असते आणि आज्ञा चक्रावर ***ब्रह्मग्रंथी*** असते. या तिन्हीं ग्रंथींचा भेद करणे फार अवघड समजले जाते आणि त्यांचा भेद झाल्याशिवाय योगमार्ग प्रशस्त होत नाही. ज्ञानेशांनी तर असे सुचवले आहे की सुषुम्नेत प्रवेश केल्यावेळी

या तिन्ही ग्रंथी सुटतात. ४) त्याच वेळी सहाच्या सहा म्हणजे मूलाधार ते आज्ञाचक्र या षट्‌चक्रांचे भेदन होऊन त्यांचे नाममात्र अस्तित्व उरते. या ज्ञानेशकृत वर्णनावरून आांशिक चक्रभेदन व विविध चक्रभेदनक्रम यांविषयी वर मांडलेल्या उपपत्तीस दुजोरा मिळतो असे वाटते. असो.

अनाहतचक्र/ हृदयाधारचक्र/ हृत्चक्र व नाद

या चक्राचे गोरक्षकृत वर्णन असे आहेः ***"चतुर्थं हृदयाधारमष्टदल कमलमधोमुखं तन्मध्ये कर्णिकायां अधोमुखां लिङ्गाकारां ज्योतिर्ध्यायेत् सैव हंसकला: सर्वेन्द्रियवश्या भवति।।२-४।।सि.सि.प.।।"*** - आठ पाकळ्यांच्या कमळाच्या आकाराचे हे चक्र ***हृदयाधार*** म्हणून प्रसिद्ध आहे.ते अधोमुख आहे.

येथे हे ध्यानात घेणे आवश्यक आहे की काही टीकाकार व लेखक म्हणतात, तसे **हे सर्वसाधारणपणे *अनाहत* म्हणून ख्यात असणारे स्थूलहृदयनिर्देशित अनाहतचक्र नाही. ते चक्र बारा दलांचे असते, तर गोरक्ष सांगतात, ते हे चक्र *हृदयाधार* या नावाचे अष्टदलांचे आहे.** वास्तविक हे ब्रह्मांडीचे अष्टदलपद्मच असले पाहिजे, जेथे अनाहतनाद असतो. हे चतुर्थ चक्र आहे असे श्लोकात म्हटले आहे. पण हा क्रमनिर्णय करतांना सर्वसामान्य हृदयस्थान धरून कोणाची तरी श्लोकसंकलनात काही चूक झालेली असावी, अशी शक्यता वाटते. हा विचार सर्वांनी जरूर करावा.

त्याच्या कर्णिकेत लिंगाकार, उज्ज्वल व कांतिमान अशी अत्यंत प्रकाशमान ***ज्योती*** असते. तिचे ध्यान करावे. या ज्योतीसच ***हंसकला*** असे म्हणतात. हिच्या यथाविधी ध्यानाने सर्व इंद्रिये वश होतात. थोडक्यात **या अष्टदल हृदयाधारचक्राचा भेद झाला असता ही *इंद्रिजयाची सिद्धी* प्राप्त होते.** हे चक्र व अनाहत ही दोन्ही वेगवेगळी आहेत.

स्थूल हृदयनिर्दिष्ट द्वादशदलचक्रास ***अनाहत*** असे नाव असण्याचे एक कारण असे देतात की कुंडलिनीशक्ती जेव्हा येथपावेतो येऊन पोहोचते, तेव्हा साधकास बाह्य संवेदना वा इतरत्र आवाज नसतांनासुद्धा कर्णांतरी ***नाद*** ऐकू येतात. हे आघाताशिवाय उत्पन्न होणारे नाद ***अनाहतध्वनी*** म्हणून किंवा केवळ ***नाद*** म्हणून योग्यांस विदित आहेत. या नादांवरूनच या चक्राचे नांव ***अनाहत*** असे पडले आहे.

अर्थात या मतास विरोधी यौगिक मतही आहेच. त्यांच्या मते ***नाद*** ही सर्वात शेवटची लयावस्था असून ती अनाहतावर प्रकटणे अशक्यच आहे. **कुंडलिनी जेव्हा ब्रह्मरंध्रात प्रवेशते, तेव्हाच हे दशनाद ऐकू येतात.** पण **गोरक्ष यास अनाहतचक्र असे न म्हणता *हृदयाधार* असे म्हणत आहेत**, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. द्वादश दलांच्या चक्राचे ***अनाहत*** हे नांव ***नादचक्र*** या अर्थाने चुकीचे आहे, असेही एक यौगिक मत आहे. कदाचित स्थूलहृदयाच्या सन्निध असून त्याचे जे आपोआप पडणारे ठोके छातीला कान लावल्यास ऐकू येतात, त्या आवाजावरूनही यास ***अनाहत*** हे नाददर्शक नांव पडले असावे.

काहीही असले, तरी बऱ्याच योगमार्गियांनी या चक्रनामामुळे आणि आपल्या अनुभवांवरून नाद उत्पत्तिस्थान अनाहतचक्रच असल्याचे सांगितले आहे. पण ***ब्रह्मरंध्रस्थानीच हे नाद होतात, हे म्हणणे सयुक्तिक तर आहेच,पण शास्त्रशुद्ध व सिद्धानुभवप्रमाणितही आहे.***

ज्ञानेश्वरांचे म्हणणे तर असे आहे की:"**जेव्हा प्राणाचा हात धरून कुंडलिनी मध्यमेच्या सोपानाने गगनाच्या पायवाटेने हृदयात येते, त्यावेळी अनाहताचा नाद प्रकट होतो.** त्या नादाने गगन दुमदुमू लागते आणि ब्रह्मस्थानीचे द्वार***(बेगें)*** स्वाभाविकपणे उघडते. या सर्व क्रिया***"हृदयपरिवरीं*** "घडतात *(६-२७१ ते २७९)."*

आध्यात्मिक भाषेतील पंचहृदयांपैकी हे ***हृदयस्थान*** म्हणजे स्थूल हृदय नसून ***आज्ञाचक्रावरील मूर्ध्निस्थानापर्यंतचा भाग*** होय. त्या अर्थी पाहिले तर conventional***अनाहत चक्रावर नादोत्पत्तिस्थान नसून ते अर्धमात्रेत जे दाखवतात, तेच असले पाहिजे,*** या मतास दुजोरा मिळतो. याबाबत इतरत्र अधिक पाहू या. असो.

अनाहतनाद हे दशविध प्रकारचे नाद असून ते नाना प्रकारचे असतात. किणकिण, भेरी, समुद्रगर्जना, घंटानाद, शंख इ.दहा नाद उत्कृष्ट व महत्त्वाचे समजतात. या नादांचे अनुसंधान करण्याची विशिष्ट पद्धत योगशास्त्रात प्रचुर आहे. या पद्धतीचे अवलंबन करून साधक योगाच्या वरल्या पायऱ्या सहज ओलांडून जातो.

योगतारावलि व नादानुसंधान

या नादानुसंधानसाधनेविषयींची माहिती श्रीमदाद्यशंकराचार्यविरचित ***योगतारावलि*** या प्रकरणग्रंथात समग्र मिळते. जिज्ञासूंनी ती मुळातूनच वाचून काढावी. त्यासाठी१*) श्री. चं. वा.दांडेकर व २) डॉ. के.रा.जोशी* यांच्या योगतारावलीवरील पुस्तकांचा निर्देश करणे अवश्य आहे.

श्रीशंकराचार्यांच्या या रचनेआधारे आणि इतर आनुभविक सिद्धांच्या कथनानुसार जेव्हा कुंडलिनी जागृत होते, सुषुम्नेत प्रवेश करते, तेव्हाच सूं सूं असा नाद प्रकट होतो. ती जशी सुषुम्नामुखात मन व प्राणासह प्रवेशते, तसा हा नाद दृढ होतो. अनाहत चक्रापाशी जेव्हा हा शक्तिप्रवाह येतो, तेव्हा साधकास हा नाद गोचर होतो, ऐकू येऊ लागतो. तेथपासून पुढील पायऱ्या चढतचढत ***नादांत*** या पायरीपुढे गेले की हा नाद लय पावतो. साधक जेव्हा आपले जागृतावस्थेतील व्यवहार करत असतो, तेव्हा त्याला हा नाद सतत ऐकू येत असतो. लययोगात हा नाद प्रकट होतो आणि साधकास दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करत पुढल्या श्रेष्ठतर समाधिभूमिकांमध्ये पोहोचवतो. पण नादासंबंधित हे मतही विवाद्य आहे.

खरे पाहता नादाव्यतिरिक्त***"ध्वनि"*** म्हणून जो प्रभाग आहे, त्याला हे वर्णन जास्त लागू पडते. ध्वनि हा विश्वाभिव्यक्तीतील एक मूळ प्रमुख घटक आहे, ज्याचा निरोध ***नादांत*** या स्थानी होतो. नादसंबंधित ***"पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु। घोषध्वनिनादाकारु। तयाचें भुवन जो ॐकारु। तोही मी गां।। जया ॐकाराचिएं कुशी। अक्षरें होति अउमकारेंसि।..।।९-२७५,२७६।।"*** या शब्दांत ज्ञानदेवांनी परा-पश्यंति-मध्यमादी वाचांचा निर्देश करून या नादाचा (ध्वनीचा) विभाग सांगितला आहे.असो.

त्या नादानुसंधानाची इतकी महती असल्याने लययोगाची प्रशंसा करत श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे की***"सदाशिवोक्तानि सपादलक्षलयावधानानि वसंति लोके। नादानुसंधानसमाधिमेकम्***

मन्यामहे मान्यतमं लयानाम्।।२।।योग.।।" - श्रीशंकरांनी प्रतिपादिलेले चित्ताचा लय साधण्याचे सव्वा लक्ष प्रकार प्रचलित आहेत. परंतु ज्या प्रकारचा लय समाधिप्रत घेऊन जाऊ शकतो, तो नादानुसंधानानेच प्राप्त होणारा व एकमात्र असून तोच लयमार्ग सर्वश्रेष्ठ व प्रशंसनीय म्हणून मान्य करावा लागतो.

लययोग व पंथराज::::

आचार्य शङ्करभगवत्पूज्यपादांचा लययोग

पंथराजप्रणीत कुंडलिनीयोगात हा ***अंतर्नाद*** प्रकटतो. म्हणून वर म्हटल्याप्रमाणे ज्ञानेशांचा हा लययोग सर्वश्रेष्ठ असल्याचे ***योगतारावलि***तील शांकरमताप्रमाणेही दिसून येते. आचार्य त्यांचा हा लययोग सिद्ध करण्यासाठी दिशादर्शन कसे करतात, ते थोडक्यात पाहू या. म्हणजे त्यांचा योग व ***पंथराज*** यातील समान स्थले आपणास समजण्यास उपयोगी ठरेल. आचार्य म्हणतात: "रेचक, पूरक-कुंभकयुक्त प्राणायाम सातत्याने करावा. म्हणजे सर्व नाड्या मलरहित - विशुद्ध होतात. त्यामुळे विविध प्रकारचे नाद अंतर्यामी अखंड प्रकट होऊ लागतात. हा***अनाहतनाद*** साधकाचे मन व प्राण विष्णुपदी - समाध्यवस्थेत लीन करणारा असतो. साधकाने ***मूलबंध-जालंधरबंध-ओडियाणाबंध*** असे ***त्रिबंध*** साध्य करावेत. त्रिबंधयुक्त प्राणायामसाधनेमुळे कोमल नागिणीसम दिसणारी कुंडलिनी गाढ निद्रेतून हलवून जागी केल्यासारखी खडबडून जागी होते आणि प्राणांसह सुषुम्नेत प्रवेश करते *(श्लोक क्र.३,५ व ६ यो.ता.).*" त्यावेळी ज्ञानेश म्हणतात तसे वायूचे नववविधपण जाते व प्राणांचे जाणे येणे स्तब्धावते.

"त्रिबंधयुक्त प्राणायामामुळे अपानवायूचे आकुंचन होऊन मूलाधारचक्रातील वैश्वानर अग्नीच्या ज्वाळा वर उसळतात. त्यांच्यामुळे चंद्रनाडी प्रदीप्त होते. त्यामुळे तिच्या वरील टोकाकडे असणारे चंद्रामृताचे तळे कलंडून त्यातून अमृतधारा वर्षतात. त्या पिऊन साधक धन्य होतो *(श्लोक क्र.७ यो.ता.)*"

"अनाहतनादाच्या सततच्या अनुसंधानाने विषयप्रवाह कुंठित होतो आणि वृत्तिनिरोध करणारा ***केवलकुंभक*** प्रकटतो. त्यामुळे प्राणांचा स्वैर संचार थांबतो. केवलकुंभकाच्या अभ्यासाने प्राणांचे व्यापार थंडावले की मन निःस्तब्ध होउन ***इडा पिंगला व त्रिकूटी*** सोडून तो प्राण तत्काळ *(आज्ञाचक्रावरील)* त्रिकूटबिंदुच्या वरील भागात असणाऱ्या गगनगुंफेत - ब्रह्मरंध्रात लीन होतो. जागृत कुंडलिनीबरोबर तिने भक्षण केलेला प्राण असा सहस्त्रारचक्रात लीन झाला की सुषुम्ना नाडीने केवलकुंभकाच्या साहाय्याने धरून ठेवलेले शेष प्राणसुद्धा पश्चिममार्गाने हळूहळू ऊर्ध्वगतीने विष्णुपदी - ब्रह्मरंध्रात - लीन होतात *(श्लोक क्र. ११ व १२ यो.ता.).*"

"असा हा मरुल्लय एखाद्याच शूर-वीर-धीर साधकास साधतो. धारणा-ध्यान इ.परिश्रमविरहित असे हे सहज सोपे समाधिप्राप्तीचे साधन आहे. या समाधीत मन अखंड उन्मन राहते. चित्त व इंद्रियांचा व्यापार बंद पडतो. प्रापंचिक घडामोडींबाबत अनासक्तीचा अभ्यास करणे, वासना उन्मळून टाकणे, आशा - कामनांचा ऱ्हास करणे, या उपायांनी हा योग अभ्यासला जातो *(श्लोक क्र.१३ व १४ यो.ता.).*"

"या योगाचे फल म्हणजे ***अमनस्का*** भूमिका. त्यामुळे मी-माझे गळून पडते. मनाच्या कक्षेच्या अतीत असणारी ही भूमिका आहे.तेथे मरुताची गती शून्य असते. ***गगनावशेष*** असा ज्ञानभाव त्याठायी प्रकटतो. ***ज्ञान-वैराग्य*** प्राप्ती होते. संकल्प-विकल्पांचे जाळे नष्ट होते. ***प्रारब्ध- क्रियमाण - संचित*** कर्मांचा आशय निर्मूल व दग्ध होतो. ***चिन्मय योगनिद्रा*** प्राप्त होते. अनिर्वचनीय, निरुपाधिक - स्वस्वरूपी लीन अशी ही ***तुरिया*** आहे. ***निर्विकल्प समाधि*** ती हीच! अखिल जगत दिसेनासे होते. सर्वत्र ब्रह्मभाव - साम्यावस्था प्राप्त होते. जीवन्मुक्ती प्राप्त होते *(श्लोक क्र.२१ व २२ यो.ता.).*"

(**टीपःअनाहतप्राकट्य व कुंडलिनीजागृति** - नाडिशुद्धीचे फलस्वरूप म्हणून ***अनाहत नाद*** प्रकटतो असे आचार्य म्हणतात. पण नाडिशुद्धी त्रिबंधयुक्त प्राणायामाने होते असे शास्त्राचे मत आहे. नाडिशुद्धीमुळे कुंडलिनी जागृत होते, असेही मत आहे. या सर्वाचा विचार करता आचार्यांचा श्लोकक्रम धरून चालेलसे दिसत नाही. ***त्रिबंधयुक्त प्राणायाम, नाडिशुद्धी, कुंडलिनीजागृती आणि नंतर अनाहतनाद*** असाच क्रम घेणे सयुक्तिक आहे.

कित्येकदा ग्रंथ आपल्यापर्यंत येईस्तोवर त्यात अनाहूतपणे संकलक अनेक चूका करतात आणि फलस्वरूप आपणास क्रमाबद्दल आशंका उत्पन्न होते. अंती विज्ञानाच्या आधारानेच जायचे असते. श्रीएकनाथांनीही असेच विज्ञान वापरून मूळ ज्ञानेश्वरीत आलेले अपपाठ, अन्यओवीक्रमादी शुद्ध केल्याची नोंद आहेच. त्यातून **योगतारावली**स आचार्यांचा ग्रंथ म्हणून काही पीठांची मान्यता नसल्याचेही एक मत आहे, असे समजते. म्हणून **सर्व गोष्टींचा नीट विचार करून शास्त्र हाच मुख्य निकष मानून या सर्व बाबींचा निचरा आपणास करावा लागेल.** असो.)

ज्ञानेशांचा पंथराजप्रणीत लययोग::::

प्राथमिक

पंथराजाचे सहाव्या अध्यायी काही अवलोकन आपण केले होते. त्यावरून आचार्य म्हणतात त्या लययोगाचे आणि पंथराजाचे किती साधर्म्य आहे, ते सहजच दिसून येते. प्रापंचिक अनासक्ती - वासनाराहित्य-आशापाशविमुक्ती हा साधनाक्रम तर ज्ञानेशांचा मुळचाच आहे.

विवेक-वैराग्याभ्यास

विवेक व वैराग्य यांचा अभ्यास कसा करावा ते आपण ***दैवासुरसंपदा - क्षेत्रक्षेत्रज्ञविचार, गुणातीतदर्शन, श्रद्धात्रयविचार*** इ.भाग गीता-ज्ञानेश्वरीच्या साहाय्याने अभ्यासतांना यापूर्वी पाहिलेच आहे. पंथराजसाधनेचे यम-नियम-आसन ठरावेत, असे हे विवेकवैराग्यविचार होत.

वैराग्याविषयी ज्ञानेश्वर म्हणतात की :*"यमनियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार साध्य झाला की (ओ.क्र.६-५४ ते ५६)* - ***ऐसां पवनाचेनि पाठारैं। एतां धारणेचेनि पैसारैं। क्रमीं ध्यानाचे चवरैं। सांडैं तंव।। नखीं लगेल ढाले ढालैं वैराग्याची।।६-५७ व ५८।।"***

पंथराज सांगण्यास सुरुवात करण्यापूर्वी श्रीकृष्ण मनी उमजतात की अर्जुन आता विरक्त झाला आहे. योगसाधन अनुष्ठिण्याची आता त्याची तयारी झालेली आहे; ***"..।होय विरक्तु ऐसां अनंतां। भरंवसा जाहाला।।६-१५०।। म्हणें जैं जैं हां अधिष्ठिल। तैं आतां आरंभीच ययां फलैल। म्हणौनि सांघितलां न वचैल। अभ्यासु वांयां।।१५१।।"*** आणि म्हणून त्याला आता या अभ्यासाचे फलही लवकर मिळू शकेल.

पंथराजप्रक्रिया

प्राणायाम - प्रत्याहार - धारणा - ध्यान - संयम या भागांचीही पूर्वतयारी साधक विवेक-वैराग्य मार्गाने करत जातो. असे होत असता गुरुकृपेची उषा उदित होते. संयमाचे फळ कुंडलिनीजागृती प्राप्त होते. अष्टांगयोगाची फळी आपोआपच समाधिपूर्वस्थितीपर्यंत येऊन पोहोचते. पंथराजप्रक्रियेचे पायरीपायरीने संक्षिप्त वर्णन पुढे दिले आहेः

१) व २) स्थल व आसन(६-१६३ ते १८६)

यांचे पूर्ण वर्णन आपण पूर्वीच पाहिले आहे *(उन्मेषः८ ::पंथराज, पृ.क्र.१२७ ते१२९).* ज्ञानेश्वर म्हणतात, त्याप्रमाणे स्थल शोधून *(६-१६३ते १८१)* ***"बहुतकरूनि एकांतें। बैसिजें गां।।१८०।। म्हणौनि तैसें तैं जाणावें। मन राहातें पाहावें।..।।१८१।।"***-त्या ठिकाणी आसन मांडावे *(६-१८१ ते १८५).*

३) धारणा (६-१८६ ते १९१)

सद्गुरुस्मरण करून आसनावर बसावे. एकाग्र अंतःकरण, म्हणजे पतञ्जली म्हणतात तो संयम करावा. विषयांचा विसर पडून आणि इंद्रियांची कसमस मोडून मनाची घडी ह्रदयी पडते.*(६-१८६ते१८८).* मन स्तब्ध होते.

४),५) व ६) मुद्रा, वज्रासन व मूळबंध (६-१९२ ते २०२)

मग मूळबंध लागला की अपानवायू आतल्या अंगाकडे आकुंचन पावू लागतो *(६-१९९-२००).*

७) आज्ञाचक्रावर अंतर्दृष्टी(६-२०२ ते २०६)

नंतर दृष्टी नासाग्रपीठी राहते. ***नासाग्रपीठ म्हणजे आज्ञाचक्र.*** त्या देशावर गोरक्षांनी म्हटल्याप्रमाणे ज्ञानेशांचे अंतर्दृष्टीचे विधान आहे.

८) जालंधर व वोढियाणा बंध (६-२०७ ते२११)

मग जालंधरबंध लागतो आणि स्वाधिष्ठान आणि नाभी यांच्यातल्या भागात वोढियाणा बंध लागतो.

९) अभ्यासाची एकाग्रता (६-२११ ते २१३)

मनाचे चांचल्य नष्ट होते. कल्पना व प्रवृत्ती थांबतात. शरीर व मन शांत होतात.

१०) अपानाचे मुरडणे, व्याधींचा उद्भव व नाडिशुद्धी (६-२१४ ते २२०)

मूळबंधाने कोंडलेला अपानवायू क्षोभतो आणि माघारी वळून मणिपूराशी झुंजतो. त्यावेळी अनेक जुन्या शारीरिक व मानसिक व्याधी प्रकटतात. पण शेवटी नाड्या शुद्ध होण्यात या प्रक्रियेचे पर्यवसान होते.

११) पृथ्वी व आपतत्त्वाची सरमिसळ (६-२२०)

अपानाच्या या क्रियांमुळे पृथ्वी व आपतत्त्वांची घुसळण होऊन सरमिसळ होते.

१२) व १३) कुंडलिनी स्वरूप वर्णन आणि जागृती

नंतर ज्ञानदेव कुंडलिनीच्या स्वरूपाचे ***"नागाचें पिलैं....। ..विश्वबीजाचियां कोंभां। सांऊली केलीं।।"*** इ.वर्णन करून *(६-२२१ ते २२५ व २७२, २७३)* ती जागृत कशी होते, ते सांगतात . ती कंदावर उभी राहते आणि आपले मुख ऊर्ध्वीकडे वळवून पसरते *(६-२२५ ते २२८).*

१४) पवनाचा कुंडलिनीत समावेश (६-२२९)

मग ह्रदयाकाशाच्या खालचा सर्व पवन ती भक्षण करते, म्हणजे पवनाला आपल्यात समावून घेते. त्याचा लय गगनात व्हावयाचा अजून बाकी आहेच.

१५) शरीरस्थ सर्व गौण चक्रांचा वेध (६- २३० ते २३५)

मग ती कुंडलिनी अस्थि, मांसादी सप्तधातूंचा वेध घेते व त्यांना आपल्यात समावून घेते. शरीरात वेगवेगळी अनेक चक्रे असतात. त्यांचा संबंध इतरेतर अवयवांशी, धातू, मज्जा इ.शी असतो. कुंडलिनी त्या सर्वांचा वेध करते असा या ओव्यांचा भावार्थ आहे. सर्व ***पार्थिव धातू म्हणजे पृथ्वीतत्त्वाचा आणि आपतत्त्वाचा*** ती आपणात समावेश करून घेते असा यौगिक अर्थ येथे आहे.

१६) पृथ्वी व आपतत्त्वांचे कुंडलिनीत समावणे व सुषुम्नेत प्रवेशाची स्थिती (६-२३९ ते २४२ व २४०)

सर्व पृथ्वीतत्त्व व आपतत्त्वाचा असा समावेश करून घेतल्यावर ती तृप्त होऊन सुषुम्नामुखाशी प्रवेश करण्याच्या तयारीने राहते. त्यावेळी शरीरात जीवनाचा आधार जो असतो तो म्हणजे तिने आपल्या ***वैश्वानर*** अग्निमुखाच्या गरळातून उत्पन्न झालेल्या अमृताचे शरीरात केलेले सिंचन होय. त्यायोगे प्राणांस संजीवन मिळते.

१७) चक्रांचा वेध व नाममात्र उरणे (६-२४३, २४४ व २३७)

मग ती सर्व नाड्यांना व चक्रांना एकवटते. त्यामुळे नाड्यांचे मार्ग मोडतात, इडा-पिंगला या मुख्य नाड्यांचा तिच्यात समावेश होतो. वायूचे पण दशविधपण जाऊन तो तिच्यात पूर्णपणे सामावतो. ***ब्रह्म, विष्णु व रुद्र*** या सुषुम्नामार्गावरील ग्रंथी सुटतात.मूलाधारादी सहाही चक्रांचे नाममात्र अस्तित्व उरते. त्या सर्व चक्रांचा वेध होतो आणि त्यांच्यातील ***नाद, बिंदु, कला व ज्योती*** या तत्त्वांचा कुंडलिनीत समावेश होतो, असा या वर्णनाचा यौगिक अर्थ आहे.

१८) नासापुटातील इडा-पिंगलांची मिळवणी (६-२३६, २४५ व २३८) आणि १९) वायुतत्त्व आणि बुद्धितत्त्वाचे कुंडलिनीत समावणे (६-२४६)

"नासापुटौनि वारा।...।।२३६।।" यातून **इडा व पिंगला नाड्यांचा जो एक मार्ग *वाम आणि दक्षिण नासिकेतून* जात असतो,** त्याचेही कुंडलिनीशी मिलन होते. वस्तुतः या नाड्यांचे कधीच कुंडलिनीशी मिलन व्हावयाचे, पण कुंडलिनीच्या प्रक्रियेत हा क्रम नंतर येतो. हा मार्ग श्वासोच्छ्वासाशी संबंधित असतो. म्हणून **या नाड्यांचा असा वेध होताच *योगतारावलीत* म्हटलेली केवलकुंभकाची स्थिती होते.**

याबाबत तेथे असे म्हटले आहे कीः ***"त्रिकूटनाम्नि स्तिमितेऽन्तरङ्गे। खे स्तंभिते केवलकुंभकेन। प्राणानिलो भानुशशाङ्कनाड्यौ। विहाय सद्यो विलयंप्रयाति।।११।।यो.ता.।।"*** - इडापिंगला या योगनाड्यांचे संगमस्थान म्हणजे **त्रिवेणी.** केवलकुंभकात प्राणांचे स्तंभन झाल्यावर जो प्राण इडा-पिंगलांच्याअंतर्गत असणाऱ्या अवकाशात विहरत असतो, तो त्या नाड्यांना सोडून देऊन त्रिवेणीसंगमास ओलांडून गगनात प्रवेशून नंतर ***त्रिकूटावरील पोकळीत*** विलय पावतो. येथे ***गगन याचा अर्थ सुषुम्ना*** असाही होतो आणि तेथेच त्या प्राणाचा लय होतो.

पुढे आचार्य सांगतात की: ***"प्रत्याहृत: केवलकुंभकेन। प्रबुद्धकुंडल्युपभुक्तशेषः। प्राण: प्रतीचीनपंथेन मन्दम्। विलीयते विष्णुपदांतराले।।१२।।यो.ता.।।"*** - जागृत झालेल्या कुंडलिनीने समावून घेतल्यावरही उरलेला जो प्राण असतो, जो केवलकुंभकाद्वारे सुषुम्नेत धरून ठेवल्यासारखा असतो, तो नंतर हळूहळू पश्चिममार्गाने ऊर्ध्व दिशेने ब्रह्मरंध्राच्या पोकळीत शिरतो. "**याच केवलकुंभकामुळे मरुल्लय होतो** ***।।१३।।यो.ता.।।*** "ही सर्व प्रक्रिया आपणास ज्ञानेशांच्या पंथराजावरील ओव्यातून सहज दिसून येते. या वेळी प्राण जेथल्या तेथे मुरतो . याच वायुसमावेशाबरोबर बुद्धीचाही (महत्तत्त्वाचा) कुंडलिनीत समावेश होतो. ***"बुद्धिचि पुलिका विरे (६-२४६)".*** त्यायोगे मनाचा आकार - मनोधर्म नष्ट होतात.

२०) इडेच्या टोकावरील चंद्रामृताचे तळे कलंडणे व त्यातील अमृताचे कुंडलिनीने प्राशन करणे (६-२४७ व २४८)

"जैं हेलीं कुंडलिनी चंदु पिएं" या शब्दात ज्ञानदेव हे वर्णन करतात. ***इडेच्या अंती त्रिवेणीस्थित अमृताचे तळे म्हणतात ते असते.*** त्यातील अमृताचे कुंडलिनी प्राशन करते - म्हणजे तेही तिच्यात समावले जाते. तो रस सर्वांगाला पोहोचतो व योगी धन्य होतो.

२१) पिंडाचे रससिद्धदेहात परिवर्तन होणे (६-२४९ ते २६८)

"पिंडाचेनि आकारें। कलाचिं किं अवतरें" या शब्दात ज्ञानेश चंद्रामृतप्राशनामुळे सिद्धत्व पावणाऱ्या देहाचे वर्णन करतात. याच देहाच्या सिद्धीसाठी सिद्ध होऊ पाहणारे पुरुष रसायनादींचा वापर करतात. पृथ्वीतत्त्व व आपस्तत्त्वाचा लय झाल्याने त्यांचे अंश देहात नसतात. म्हणून तो असा होतो. ***"देह होएं सोनियाचां। परि लाघौ एं वायुचें"*** असे त्या देहाचे वर्णन ज्ञानदेव करतात. यौगिक संप्रदायात श्रीशैल्यपर्वतावरील रससिद्ध नागर्जुनसिद्धांचे या देहसिद्धीबाबत विशेष नांव आहे.

२२) सिद्धींचा अभिभव (६-२६९,२७०)

मग त्या वेळी साधकास अनेक सिद्धी प्राप्त होतात.

२३) पवनाची मेळणी झाल्यावर कुंडलिनीचे मध्यमामार्गे हृदयात (आज्ञाचक्रावरील अवकाशात) - महदाकाशात - उत्क्रमण(६-३०२,३०३ व २७१)

नंतर जालंधरबंध सांडून, ***"पश्यंतिची पाउटी"*** म्हणजे विशुद्धिचक्राची पायरी मागे टाकून, पवनाचा हात धरून मध्यमामार्गे म्हणजे सुषुम्नेतून गगनाच्या पायवाटेने कुंडलिनी हृदयात प्रवेशते. अगोदरच म्हटल्याप्रमाणे हे हृदय म्हणजे ***महदाकाश*** - आज्ञाचक्रावरील ब्रह्मांडाकडचा भाग होय. सुषुम्ना ही आकाशतत्त्वाची असते. म्हणून ***"गगनाची पाउटी करौनि"*** असे शब्द उपयोजिले आहेत.ज्ञानेशांच्या पंथराजावरील ओव्यातून सहज दिसून येते.

२४) अनाहतनादप्राकट्य (६-२७४)

तेथे कुंडलिनी आली की नाद प्रकट होतो. ***वैखरी, मध्यमा व पश्यंति*** या ॐकाराच्या तीन मात्रा त्या नादरूपाने प्रकटतात आणि तो नाद सुषुम्नाविवरात निनादतो. ***अनाहतनादस्थान कोणते*** याबाबत पूर्वी थोडे विवेचन केलेलेच आहे. आणखीही आवश्यक वाटल्यास नंतर करू.

२५) सहस्त्रदलकमलातील चैतन्याचा आविर्भाव (६-२८० व २७५)

तो नाद ऐकून कुंडलिनीबरोबर आलेले मन मोहित होते. त्या ठिकाणी कमलगर्भाकार हृदयाकाशी म्हणजे सहस्त्रदलकमलात विभक्त आत्मचैतन्य -जीवाच्या रूपाने जे असते- त्यास तो नाद ऐकू येऊ लागतो.

२६)तेजस्तत्त्वाचा लय (६-२७५ व २८१)

मग त्या हृदयस्थानी महदाकाशात कुंडलिनी चैतन्यास आपणाबरोबर आणलेली तेजस्तत्त्वाची आणि बुद्धितत्त्वरूपी - (तैजस म्हणजे बुद्धी) - शिधोरी त्याला अर्पण करते. म्हणजे तेजस्तत्त्वाचा लय होतो.

२७) लयक्रम (६-२९९,२९८ व २७८)

ज्ञानेश थोडक्यात आतापावेतो झालेल्या लयाची उजळणी करतात. पृथ्वीतत्त्वाचा आपतत्त्वात, आपाचा तेजात असा लय होतो आणि तेजस्तत्त्वाचा पवनात महदाकाश - हृदयस्थानी - लय होतो. पण अद्याप पवनाचा लय झालेला नसल्याने गगनास ***"वाचा आथि"***- वाचा असते आणि म्हणून अजूनही ***अनाहतनाद*** रूपाने त्याचे प्राकट्य होत असते.

२८) शक्तीचे पवनात संक्रमण आणि रूप मावळणे (६-२८३ ते २८८)

तेजस्तत्त्वाचा लय झाल्याने कुंडलिनीशक्तीचे तेजस्वरूप लोपते आणि तिला पवनाचेच स्वरूप उरते. तिचे अस्तित्व आता केवळ प्राणरूपाने राहते. कारण पृथ्व्यादी तिन्ही तत्त्वांचा लय झलेला असतो. त्यावेळी ती ***"लखलखौनि हारपली वीजू गगनिं"*** अशी होऊन ***पवनाची पुतळी*** होऊन राहते. हृदयाकाशाच्या पोकळ भूमीत ती जिरून जाते. हे जे वर्णन ज्ञानेश करतात, ते योग्यांच्या अनुभूतीनुसारच आहे.

ज्या वेळी ही क्रिया घडते, त्या वेळी सुषुम्नेतून वीजेचा लखलखता प्रवाह किंवा ज्ञानेशांनी इतर प्रकारे सांगितला तसा ***"सोनियाचिं सरी"*** वा ***"प्रकाशजलाचिं झरी"*** असा दिसणारा शक्तिप्रवाह मूर्ध्निस्थानाकडे चपळाईने धावतांना दिसतो आणि भालप्रदेशाअंती तो जिरून गेल्यासारखा होतो. अशा रितीने शक्तीचे रूप शक्तीतच लोपते आणि शक्ती म्हणावे, तरी ती केवळ प्राणच असते. इतर तत्त्वे तिच्यात लोपलेली असतात.

श्री. गजाननमहाराज गुप्ते यांच्या चरित्रग्रंथात याबाबत असे म्हटले आहे की आत्मा ब्रह्मरंध्रात शिरण्यापूर्वी थोडा वेळ विजेच्या रेषेसारखा सुषुम्नेत सावकाश चढत असतो. पण ही अनुभूती इतकी जलदगत्या येते की पूर्ण लक्ष असल्याशिवाय ते कळत नाही. ही आत्मानुभूतीची विशेष खूण असल्याचे महाराजांनी म्हटले आहे.

२९) मारुत अवस्था (६-३०१, ३०२)

शक्तीला त्या वेळी म्हणजे तेजस्तत्त्वाचा लय झाला की ***मारुत*** अशी यौगिक संज्ञा आहे. तरीही ती शक्तीच असते. कारण जोपावेतो शिवशी तिचे मिलन होत नाही तोवर तिचे शक्तित्व उरणारच!

३०) खेचर स्थिती (६-२९३ ते २९७) व ३१) अणिमादी सिद्धींची प्राप्ती (६-२९७, २९८)

असे शक्तीचे रूप हरपले की साधकास खेचर अवस्था प्राप्त होते. ही एक योगसिद्धाची अवस्था आहे. तिचे अधिक वर्णन या ओव्यांतून केले आहे. त्यावेळी अणिमादी सिद्धी प्रकट होतात.

३२) भ्रमरगुंफेत नादाचा आविर्भाव(६-३१३,३०४,२७९,२७७ व २२६)

तसे पाहिले तर एकट्या प्राणांना गगनी येणे अत्यंत अवघड असते. कारण भ्रूकुटीमागील बाजूस जे मकाराचे स्थान असते आणि त्याअंती जे आज्ञाचक्र असते, त्यांना उल्लंघणे त्यास शक्य नसते. आणि त्यावरील गगनातील ॐकाराच्या अर्धमात्रेत तर त्याचा एकट्याचा कधीच प्रवेश होऊ शकणार नाही. पण कुंडलिनीच्या आधाराने तो तेथवर येऊन पोहोचतो. आता तर ती स्वत: कुंडलिनीच प्राणस्वरूप झालेली आहे आणि तिला ***मारुत*** असे नामही प्राप्त झालेले आहे.

आता तो प्राण भ्रमरगुंफेत ***("घोषाचां कुंडिं")*** आलेला आहे आणि त्याचे तेथे गुंजन सुरू होते. प्रणवाच्या उगमाचे हे स्थान आहे. म्हणून ***"प्रणवाचिएं मोडिं। रेखिलिं ऐसिं"*** असे शब्द वापरले आहेत. त्या अनाहताच्या नादाच्या मेघगर्जनेने ***गगनमहाल*** म्हणजे आज्ञाचक्रावरील ब्रह्मरंध्रापर्यंतचा भाग - ***महदाकाश*** - गाजू लागते.पण तेथे कोणता शब्द होतो, ते कसे कळावे! कारण हे जाणवणारे कल्पना करणारे मन तर कार्यरत नाही. असो पण त्या अनाहताच्या दुमदुमण्याने कुंडलिनीसाठी ब्रह्मरंध्राची वाट मोकळी होते.

३३) मरुल्लय (६-३००व ३१४)

बऱ्याचशा पवनाचा कुंडलिनीने लय केलेला असतोच. पण हा ***मारुत*** नावाचा त्याचा जो अवशेष शरीराकाराने कुंडलिनी स्वरूपात असतो, तोही नंतर आकाशतत्त्वात मिळण्यासाठी निघतो. तेथे आकाशतत्त्वात त्याचा लय झाला की शब्दाचा पण लय होतो.

३४) आकाशतत्त्वाचा लय (६-३१४)

आणि नंतर आकाशतत्त्वाचाही कुंडलिनीत लय होतो.

३५) उन्मनीपलीकडील स्थिती (६-३०२ व २८८)

अशा प्रकारे आज्ञाचक्रावर जे मूळ ॐकाराचे स्थान असते, त्याला मागे टाकून ती कुंडलिनी गगनाच्या पहाडाचे शिखर गाठते ***("गगनाचिएं पाहाडिं। पैठीं होएं").*** त्या स्थितीत ***नाद-बिंदु - कला व ज्योती*** यातील कोणताही अंश उरत नाही. अगोदरच **शक्तीने प्रत्येक चक्रातील नाद - बिंदु -कला व ज्योतींचा त्या त्या चक्रलयाबरोबर आपल्यात लय करवून घेतलेला असतो.** असे हे मनाचे धर्म लोप पावतात. आता ती महदाकाशातील अंतिम तत्त्वांचा म्हणजे या नादादी उगमस्थांचाही लय करवून पूर्ण लयाकडे अग्रेसर होते. म्हणून ज्ञानेश म्हणतात की ***"नेणें नादबिंदु कला ज्योति"!*** समाधीच्या ***समना व उन्मना*** अशा ज्या अंतिम अवस्था आहेत, त्यांच्याहीपलीकडे ही स्थिती असते.

३६) अध:कुंडलिनी व ऊर्ध्व कुंडलिनीची मध्याशक्तीशी मिळणी (६-२३७) व मूर्ध्निस्थ सुषुम्नामुखाचा - ककारांताचा भेद - ब्रह्मरंध्री मिळणे (६-३०२, ३०४,३०५ व ३०६)

त्या वेळी ***अध:कुंडलिनी व ऊर्ध्वकुंडलिनी*** अशा अवस्था काही ***मध्या*** कुंडलिनीहून वेगळ्या राहत नाहीत ***("तेथ अध वरौतैं आकुंचें। ऊर्ध्व तलौतैं खांचै").*** त्या सर्वांचे पूर्वापारचे ऐक्य प्रकट होते. तेथे मग एकच एक शक्ती उरते. मग ती **सुषुम्नामुख**ाचा- जे ब्रह्मरंध्रात असते - त्याचे भेदन करते आणि सरिता जशी सागरात मिळते तशी ब्रह्मरंध्री स्थिरावून **सोऽहंभाव**ाच्या बाह्या पसरून परमात्मलिंगास आलिंगन देते. त्या वेळी पंचमहाभूतांचा पूर्ण लय होतो. आणि गगनसुद्धा आटते. ***शिव व शक्ती यांचे असे ऐक्य होते.*** त्यात मूर्ध्निस्थित आकाशतत्त्वासह सर्व तत्त्वे लय पावतात. आकाशात आकाश मिसळून जावे असे सामरस्य प्रकटते.

३७) "पदीं पद प्रवेशें" (६-२८२,३१२,३१५, ३०७ ते ३११, ३१६ व ३१७)

या स्थितीचा अभिमान वाटावा अशी ती स्थिती असते खरी! पण अभिमान धरणारी वैखरी वाचा तर त्या स्थानी, जेथे परेलाही स्थान नाही तेथे कशी पोहोचणार! ती तर दूरच असणार! महाशून्याच्या डोहात गगनाचासुद्धा जेथे थांग उरत नाही, तेथे अद्वैतत्व सिद्ध झाले आहे हे म्हणणे तरी कोठवर चालेल! समुद्रातील पाणी मेघाच्या रूपे परत समुद्री परतावे, तसे हे ***पिंडाच्या मिषाने पदी पदच प्रवेशते.*** जीवात्मा जो द्वैतात वावरत होता, तो परमात्मतत्त्वाशी पुन: एकरूप होतो. त्याठायी पूर्वी कधीतरी तो द्वैतरूपे होता का नाही, याचा विचार करण्यास पण वाव उरत नाही.

गगनावशेष समाधीच्याहीवरील पायरी प्राप्त होते. ***योगतारावली***त म्हटले आहे की ***"अमी यमिन्द्रा सहजामनस्कात्। अहं ममत्वे शिथिलायमाने।। मनोऽतिगं मारुतवृत्तिशून्यम्। गच्छंतिभावम् गगनावशेषम् ।२२।।" -मनोन्मनी*** समाधिनंतरची ही जी समाधि अवस्था आहे, ती ***सहजामनस्का*** या नावाने ओळखली जाते *(श्लोकक्र.१७ ते २१,यो.ता.).*

सहजामनस्का समाधीयोगे अहं ममत्वादी बंधने गळून पडल्यावर आणि जेथे पोहोचल्यावर ***मारुत*** गतिशून्य होतो,त्या अवस्थेला ***गगनावशेष*** असे म्हणतात. ही जाणिवेची अंतिमतम अवस्था आहे. योगवासिष्ठात म्हटलेली ***पदार्थाभाविनी*** ती हीच अवस्था होय. आता साधकास त्याहीपलीकडील म्हणजे ***निर्विकल्प निर्बीज समाधि*** प्राप्त झाली आहे, असे आताच्या ज्ञानेश्वरांच्या ओव्यांवरून

दिसून येते. ***योगतारावलि*** त हिलाच ***तुरीयतल्प*** असे म्हटले आहे *(श्लोक क्र.२६, यो.ता.).*

अशी अवस्था शब्दातीत असल्याने साधकाने तिचे विश्लेषण करत बसू नये. उगाच स्वस्थ राहून जे काही हे दैवयोगे प्राप्त झाले आहे, त्यातच रममाण व्हावे असे ज्ञानदेव सांगताहेत!

३८) अद्वैतस्थितीचे वर्णन (६-३१८ ते ३२७,२८९,२९० व ३२८)

यानंतरच्या ओव्यातून ज्ञानेश्वर त्या अद्वैतस्थितीचे अधिक वर्णन करतात. शब्दजात नाहीसे होऊन संकल्पाचे तेथे नांवही उरत नाही. विचाराचा वाराही तेथे लागत नाही. असे ***"उन्मनीचे लावण्य"*** आणि ***"तुर्येचे तारुण्य"*** साधकास उपभोगावयास मिळते. साधक केवळ आनंदस्वरूप होऊन राहतो. तो ***जीवन्मुक्त*** होतो. हे पंथराजाचे साधन करणारे परब्रह्म होतात. त्यांच्यासाठी विश्वाभासाचा लोप होतो. मग मनाचा निरोध करणे, प्राणायाम करणे, ध्यानधारणा करणे इ.गोष्टींची तेथे काय वार्ता असणार! देहाकृतीत परब्रह्माचा रसच ओतलेली अशी त्यांची मूर्ती असते. श्रीकृष्ण म्हणतात की, ***"तो योगी आता तर माझ्याच तोलामोलाचा झालेला असतो!"***

३९) "नाथसंकेतिचां दंसु" (६-२९१ व २९२)

असा हा ***पिंडाचा पिंडाठायीच लय होतो.*** हे रहस्य श्रीकृष्णनाथांनी पार्थास संकेताने निर्देशिले आणि ज्ञानदेवांनीही आपणास जाणकार श्रोते समजून त्याचा अर्थ समजावून दिला! जाणकार संशोधकांनी दाखवलेला ओव्यांचा क्रम पुढेमागे करून, त्यातील अर्धेल्यांचा आपल्यास योग्य वाटलेल्या जागी अंतर्भाव करून, याप्रमाणे आपण ही ***पंथराज प्रक्रिया*** सलग शास्त्रीय दृष्टीने निरीक्षिली. त्यामागे कारण एकच. ***पंथराज*** म्हणजे नेमका काय आहे, ते त्याद्वारे आपला भ्रमनिरास होऊन नीट लक्षात यावे, त्यातील यौगिक क्रिया आपणास नीट उलगडाव्यात आणि झालाच तर या सर्वांचा आपापल्या साधनेत सुयोग्य उपयोग व्हावा! असो.

संबंधित परिशिष्टे

या पंथराजसंबंधित ओव्यांचा नीट अभ्यास करता यावा म्हणून सोबत ***परिशिष्ट क्र.१ - पंथराजाच्या ज्ञानदेवीतील क्रमवार ओव्या*** यात त्यासंबंधित सगळ्या ओव्या *(६-१५० ते ३२८)* दिलेल्या आहेत.तसेच ***परिशिष्ट क्र.-२::पंथराजाच्या ज्ञानदेवीतील अभ्यासोपयुक्त नवनिर्धारित क्रमानुसार ओव्या*** यात पंथराजाच्या सुलभ संगतीसाठी लावलेला ओव्यांचा नवनिर्धारित क्रम अभ्यासार्थ दिला आहे. पाठनाविन्य वा विद्वत्व ही दृष्टी त्यामागे नाही आणि तसा आग्रहही नाही. पण जिज्ञासूंना या दोन्ही परिशिष्टांचे मूल्य आपच जाणवेल आणि ते त्यांचा यथायोग्य उपयोग करून घेतील, हे मात्र निश्चित वाटते!

योगतारावलि व ज्ञानेश्वरी

उपरोक्त विवेचनावरून ***योगतारावलि*** व ***ज्ञानेश्वरी*** यांचे ***कुंडलिनीप्रक्रिया, अनाहतनाद व पंथराज*** यात किती साम्य आहे, ते सहज स्पष्ट व्हावे. *जवळजवळ सर्वच साम्य स्थळे त्याच अनुक्रमाने येतात; दोघांचे विवेक वैराग्यसंपत्तीच्या पूर्वार्जनाबाबत एकमत आहे; त्रिबंधयुक्त प्राणायामापासून ते उर्वरित प्राणांचा आकाशात लय होणे, चिन्मय योगनिद्रा, मरुल्लय, उन्मनी व तुरीया अवस्था यांच्या प्रकटीकरणाविषयी एकमत; कुंडलिनीचे या दोन्ही मार्गातील वैशिष्ट्यपूर्ण अधिष्ठान; कुंडलिनीच्या मार्गक्रमणाबद्दल, अनाहतनाद प्रकटण्याबाबत;* अशी अनेकानेक साम्यस्थळे पाहून हे दोन्ही योग भिन्न नामाचे पण एकच आणि सर्वश्रेष्ठ एकमेवाद्वितीय असल्याची आपली खात्री होते.

श्रीशंकराचार्य व ज्ञानदेव यांचे योगाभ्यासाबाबत इतके जुळत असेल, याची आपल्याला पूर्वी कल्पना पण नव्हती. आता मात्र हे सर्व निर्विवाद दिसून येत आहे. असो. ***योगतारावलि*** आणि कुंडलिनीयोगाच्या अभ्यासकांनी *श्री.चं.वा.दांडेकर* यांचे ***योगतारावलि*** जरूर वाचावे असेच आहे, हे सांगून पुढील विषयाकडे वळू या.

योगचक्रे(२)::::

अनाहतचक्राची आणखी माहिती

आता गोरक्षविरचित अष्टदल हृदयचक्राव्यतिरिक्त दुसरे जे बहुसंमत ***द्वादशदल अनाहतचक्र*** म्हणून विख्यात आहे, त्याची काही वैशिष्ट्ये पाहू या. हृत्स्थानी असणाऱ्या या चक्रात प्राणवायूचे केंद्र आहे. हे पश्यंतिवाणीचे स्थान आहे. ती वाणी येथे व्यक्त होते. ***पद्मिनी, सदर्भा*** इ.बारा शक्तिदेवता येथे वसतात. *त्रैलोक्य, वित्कर* इ.बारा प्रकारचे आनंद या चक्रभेदनाने प्राप्त होतात. या चक्राची देवता महेश आहे. वर्ण धवल आहे. या चक्रजयाने ***समीपता मुक्ती*** प्राप्त होते, असे एक मत आहे.

तमोगुणाचे हे केंद्रस्थान आहे. याचे तत्त्व ***तेज*** आहे. ***कं, खं, गं, घं,*** इ.बारा वर्ण या चक्राची मंत्रबीजे आहेत. ***यं*** हे मूलबीज आहे. येथे शिव ***बाणलिंग*** या रूपात असतो. या चक्राशी संबंधित असे एक ***अष्टदल*** असणारे उपचक्र असते (सं.*The Serpent Power by John Woodroffe*). त्यात ***कल्पतरू*** असतो. या चक्रास ***आनंदकंद*** म्हणतात. कोणी यासच ***हृत्कमळ वा हृदयकमळ*** असेही म्हणतात. तंत्रशास्त्रानुसार अनाहतचक्राचे तत्त्व ***वायू*** हे आहे. हे ***ॐकाराचे पीठ*** समजले जाते. या ठिकाणी ***जीवात्मा*** हंसकलेने स्थित असतो. मानसपूजेचे हे पीठ आहे. हे **बारा दलां**चे असते.

विशुद्धिचक्र (कण्ठचक्र)

गोरक्षनाथ म्हणतातः ***"पञ्चमं कण्ठचक्रं चतुरङ्गुलं तत्र वामे इडा चन्द्रनाडी दक्षिणे पिंगला सूर्यनाडी तन्मध्ये सुषुम्ना ध्यायेत् सैवानाहतकला अनाहतसिद्धिर्भवति।।२-५।।सि.सि.प.।।"*** - पाचवे चक्र ***कण्ठचक्र*** वा ***विशुद्धिचक्र*** म्हणून ओळखले जाते. हे पाच अंगुळे व्याप्तीचे असते. बिंदुप्रमाणे वर्तुळाकार असणारे हे चक्र अत्यंत कांतिमान दिसते. त्याच्या डाव्या बाजूने जाणाऱ्या ***इडा*** व उजव्या बाजूने जणाऱ्या ***पिंगला*** नाड्यांमध्ये असणाऱ्या ***सुषुम्ना***

नाडीचे योग्यांनी ध्यान करावे. सुषुम्नेसच येथे ***अनाहतकला*** असे म्हणतात. तिच्या ध्यानाने ***अनाहतसिद्धी*** म्हणजे ***यथार्थज्ञान*** प्राप्त होते. (**टीप:अनाहत शब्दाचा अर्थ** - १) अनाहतचक्रास ते नांव पडण्याचे कारण काही जणांनी तेथे ***अनाहतनाद*** प्रकट होतो, असे दिले आहे.

२) अनाहताचा ***नादसंबंधित*** अर्थ घेऊन म्हणूनच काहीकाही जणांनी अनाहतकलेत म्हणजे सुषुम्नेत कुंडलिनी प्रवेशली की नादास प्रारंभ होतो, असे सांगितले असणे सहज शक्य आहे.

३) पण ***अनाहत*** या शब्दाचे इतरही यौगिक अर्थ संभवतात, असे आताच्या या *सि.सि.प.* मधील श्लोकावरून दिसून येईल. ***अनाहताचा अर्थ येथे यथार्थ ज्ञान असा दिला आहे. तसेच सुषुम्नेसच अनाहतकला असे म्हटले आहे. वास्तविक यथार्थ ज्ञानदात्री म्हणून तिला अनाहतकला हे नाम लाक्षणिक अर्थाने पडलेले आहे,*** असे या श्लोकावरून दिसते.

योगतारावलीवरील टीकाग्रंथांतही सुषुम्नाप्रवेशाबरोबर ***अनाहतनाद*** प्राप्त होतो, असे मत काहींनी मांडलेले असले, तरी ते मत असेच ***अनाहत*** या नामाचा वेगळा ***नाद*** हा अर्थ घेऊन आलेले असले पाहिजे.

विशुद्धिचक्रवर्णनातील सुषुम्नेचा ***अनाहतकला*** असा उल्लेख जो आहे. अनाहतचक्रात ***कुंडलिनी*** आल्यावर ***जीवात्म्यात परमात्मतत्त्वाची जाणीव जागृत होत असावी.*** या प्रकारचे ***यथार्थज्ञानप्राप्तिस्थल*** म्हणून त्या चक्राचे ***अनाहत*** हे नांव असणे शक्य आहे.

अर्थातच तेथे कुंडलिनी आली की अनाहतनाद निर्माण होतो, हे मत केवळ ***अनाहत*** या शब्दामुळे प्रमाण मानणे योग्य होणार नाही. शास्त्रकसोटीला हे मत उतरले पाहिजे आणि त्याच शास्त्रीय दृष्टीने ज्ञानेश्वर आणि श्रीशंकराचार्यांच्या ग्रंथांतरीच्या विधानांचा साक्षेप केला पाहिजे. या ***अनाहतनाद***प्राकट्याबाबत इतर माहितीचा विचार नंतर येणारच आहे.

तसेच अगदी श्रीशंकराचार्यांचे म्हणून जरी काही ग्रंथ असले, तरी ज्ञानेश्वरी आणि अशाच इतर प्राचीन ग्रंथांप्रमाणेच त्यांच्यात पाठलोप, पाठभेद, अपपाठ आणि जाणिवपूर्वक मिसळलेले प्रक्षिप्त पाठ शिरलेले असणे सहज शक्य आहे.

याला मुख्य कारण म्हणजे मध्यंतरीच्या सातआठशे वर्षांच्या काळातील असहिष्णू मुसलमानी सत्ता होत. त्यांनी येथील अनेकानेक धार्मिक स्थळे, देवदेवता मूर्ती, इ.तर नष्ट केल्याच पण अनेक ग्रंथांची होळी पण केल्याचे ऐतिहासिक सत्यच आहे. रोममधील लायब्ररीतील विशाल ग्रंथभांडारसुद्धा या आक्रमकांनी एके काळी सहा महिने पाणी तापवण्यासाठी जाळल्याची नोंद इतिहासात आहे. आजसुद्धा जगभर जेथे जेथे त्यांचे वर्चस्व आहे, तेथे तेथे तेच शतकृत्य ते धर्मांधपणे करतच आहेत. अगदी विसाव्या आणि एकविसाव्या शतकातही! अफगाणिस्थानमधील बुद्धमूर्तींचा तालीबानी विध्वंस हे एक ज्वलंत उदाहरण आजकालचेच ना!

याव्यतिरिक्त अन्य कारणे आहेतच. ग्रंथास कसर लागणे, नक्कल करतांना नक्कलकाराच्या अनवधानाने किंवा असामंजस्याने पाठात विकृति येणे अथवा अपपाठ वा प्रक्षिप्त पाठ शिरणे, वारशाने आलेल्या ग्रंथसंपदेचे योग्य मूल्य न जाणणाऱ्यांनी तिचा नाश करणे अशा काही गोष्टी वानगीदाखल सांगता येतात.

कालमानाने वेदांचासुद्धा अर्थ समजेनासा झाला. म्हणून निरुक्तकारांनी आपापल्या परीने त्यांचा अर्थ लावण्यासाठी ग्रंथ रचले. त्या काळजीपूर्वक जतन करून ठेवलेल्या वैदिक वाङ्मयात आणि इतर ग्रंथांतही काही अशीच पाठभेदादींची प्रक्रिया झाली असणे अशक्य नाही. त्यापुढे ज्ञानेश्वरी आणि आचार्यांचे ग्रंथ इ.मुस्लीम आक्रमकांच्या काळात कोणी किती दक्षतापूर्वक जपू शकले असतील, ते काय सांगावे!

अशा परिस्थितीत कोणत्यातरी स्वरूपात, अपपाठ असो, विकृत पाठ असो, ग्रंथ आपापल्या समजुतीप्रमाणे लावून घेण्यासाठी त्यात घुसडलेले विकृत पाठ वा प्रक्षिप्त पाठ असोत; काहीही असो, हे मौलिक वाङ्मय अद्यापपावेतो बाराशे तेराशे वर्षे तग धरून आहे, हेच कौतुकास्पद! पण हा वारसा जतन करणाऱ्या आपण त्यातील अपपाठ इ.ना शास्त्रीय बुद्धीने जोखून दुरुस्त करून घेणे ही काळाची गरज आहे. आणि प्रस्तुत ग्रंथात आपणसुद्धा आपल्यापरीने लहान प्रमाणावर तेच करत आहोत. असो.)

आता विशुद्धिचक्राची इतर माहिती अशी: हे चक्र सोळा दलांचे असते. त्यांवर ***अ, आ, इ, ई ...... ऋ, ॠ, लृ, ॡ ... अं व अः*** असे **सोळा स्वर *(कण्ठस्थ बीजाक्षरे)*** असतात. कंठस्थानी असणाऱ्या या चक्रात ***उदान***वायूचे केंद्र असते.

मध्यमा वाणीचे हे स्थान आहे. मणिपूरात ***परेचे स्थान*** असते. अनाहतात ***पश्यंतीचे स्थान*** असते. वैखरीरूपाने मुखाद्वारे वाणी प्रकट होण्यापूर्वीची पायरी म्हणजे मध्यमा वाणी. ***वैखरी - पश्यंति- मध्यमा*** या वाणींद्वारे होणारा जप त्या त्या ठिकाणी होत असतो, असे मंत्रज्ञांचे मत आहे. हा जप उत्तरोत्तर जसजसा सूक्ष्म होत जातो, तसतसा ***वैखरी - मध्यमा - पश्यंति*** या मार्गाने परेपर्यंत पोहोचतो. **परावाणीने साधक जेव्हा जप करू शकतो, तेव्हा त्यास *अजपाजप* प्राप्त होतो. *अजपाजपसिद्धी प्राप्त झाल्याशिवाय मंत्रसिद्धी होत नाही, असे मंत्रशास्त्राचे गृहीतक आहे.***

या चक्राच्या ***सर्वतोभद्रा, प्राणधारिणी*** इ.सोळा मंत्रशक्ती आहेत. ***हुम्, फट्, स्वधा*** इ.चौदा प्रकारचे आनंद या चक्राची सिद्धी झाल्याने प्राप्त होतात. या चक्राची देवता ***जीवात्मा*** असून वर्ण ***धूम्र*** आहे. या चक्राच्या सिद्धीने ***सरूपता मुक्ती*** मिळते असे एक मत आहे. मूर्तिमंत घनतमाचे हे स्थान आहे. अर्थात ***सुषुप्ति*** अवस्थेचे हे द्योतक आहे. कोणी या चक्राचे तत्त्व ***तेज*** हे समजतात, तर कोणी हे ***वायु***तत्त्वाचे केंद्र आहे, असे मनतात. या चक्राचे ***हं*** हे तंत्रोक्त मूलबीज आहे. येथे ***अर्धनारीनर स्वरूपात सदाशिव*** असतात. ***तंत्रशास्त्राप्रमाणे येथे अमृत स्रवणाऱ्या चंद्रमंडलाचे स्थान आहे. शाकिनी*** ही या चक्राची तंत्रोक्त देवता आहे. स्वात्मज्ञान झालेले योगी येथे स्थित असतात. त्यांना ***त्रिकालज्ञानसिद्धी*** प्राप्त झालेली असते.

६) आज्ञाचक्र व भ्रूचक्र

गोरक्ष म्हणतात: ***"सप्तमं भ्रूचक्रं मध्यमाङ्गुष्ठमात्रं ज्ञाननेत्रं दीपशिखाकारं ध्यायेत् वाचां सिद्धिर्भवति।।२-७।।सि.सि.प.।।"***

– गोरक्षनाथ हे सातवे चक्र आहे असे म्हणतात. त्यांच्या मते ***तालुचक्र*** म्हणून एक सहावे चक्र असते. ***शंखिनीविवर, घंटिकालिंग (पडजीभ), मूलरंध्र, राजदंत व दशमद्वार*** अशी स्थाने तालुचक्राशी संबंधित समजली जातात. यातून अमृतधारेचा प्रवाह स्त्रवून शरीरास जीवन देतो. जे योगी conventional सहा प्रमुख चक्रे मानतात, ते तालुचक्रास वेगळे चक्र समजत नाहीत. परंतु ***शंखिनीविवर, राजदंत, दशमद्वार*** या संज्ञा मात्र बहुतांश योगमार्गियांत प्रचुर आहेत.

कदाचित विशुद्धिचक्राच्या चंद्रमंडलातील अमृताशी या तालुचक्रातील अमृतधारेचे साम्य असल्याचे पाहून त्या चंद्रमंडलासच एक वेगळे चक्र मानलेले असावे. कसेही असले तरी चंद्रामृताच्या स्थानाबाबतही योगीमतांमध्ये एकवाक्यता दिसत नाही. असो. ***तालुचक्रात शून्याचे ध्यान करावे*** असे श्रीगोरक्ष म्हणतात.

(**टीप: दशमद्वार** –दशमद्वाराने अनेक योग्यांस ***ब्रह्मरंध्र*** अभिप्रेत असते, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. अर्थातच त्यांना दशमद्वार तालुचक्रात असते, हे म्हणणे मान्य होणारे नाही. या प्रकारे त्याच यौगिक संज्ञांचा वेगवेगळा वापर भिन्नभिन्न योगमार्गियांत केला जात असल्याचे सूचित होते.)

गोरक्षमते ***भ्रूचक्र वा आज्ञाचक्र*** हे अंगठ्याच्या मधल्या भागायेवढे असून त्यात दीपशिखेच्या आाकाराचा ***ज्ञाननेत्र वा तृतीयनेत्र*** असतो. त्याचे ध्यान केल्याने वाक्सिद्धी प्राप्त होते. ***आज्ञाचक्र*** हे सर्व चक्रात अति वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे ***त्रिवेणीसंगम*** होतो. म्हणजे ***इडा-पिंगला -सुषुम्ना*** या प्रमुख नाड्या एकत्र मिळतात. यापुढे इडापिंगला जात नाहीत. *सुषुम्नापथसुद्धा येथेच समाप्त होतो, असे काहींचे मत आहे. पण ते बरोबर नाही. तो पथ पुढे थेट ब्रह्मरंध्रापर्यंत जातो.*

ज्ञानेश्वरीतील चक्रे

आतापावेतो केलेल्या मुख्य अशा षट्चक्रविवेचनावरून स्पष्ट कळून येईल की या conventional षट्चक्रांबाबत योग्यात जर भिन्नभिन्न मते आहेत, तर आज्ञाचक्रापलीकडील अर्धमात्रेच्या प्रांताबाबत कोणतेही ठाम मत असणे शक्य नाही. या मतभिन्नतेची ज्ञानदेवांस जाणीव असावी असे वाटते. कारण त्यांनी ज्ञानेश्वरीत याबाबत सविस्तर अशी माहिती दिलेली नाही. परंतु सर्वमान्य वाटणाऱ्या तत्कालीन माहितीच्या अनुषंगानेच त्यांनी आपला पंथराजक्रम वर्णिला आहे.

मूळ म्हणजे ***"साही पदर फुटति। चक्राचे हें।।६-२४४।।"*** असे म्हणून त्यांनी अप्रत्यक्षपणे षट्चक्रकल्पनेला दुजोरा दिल्याचे वाटते. त्यातही मूलाधार ***("ऐसिं आधारिं मुद्रा पडे।।६-२००।।")***, स्वाधिष्ठान ***(स्वाधिष्ठानावरिचिलें कांठीं। नाभिस्थानातलौटीं।।६-२१०।।")***, मणिपूर ***("मणिपूरेंसिं झूंजैं। राहौनियां।।६-२१५।।")***, सुषुम्ना***("मग सौम्य होउनि राहे। सुषुम्नेपासिं ।६-२४०।।")***, मूळबंध ***("मूलबंधाचे लक्षण। वज्रासन गौण नाम।।६-१९९।।")***, जालंधरबंध ***("तो जालंधरु म्हणिपे। पंडुकुमरां।।६-२०८।।")***, वोढियाणाबंध***("नाभिस्थानातलौटीं। बंधु पडे तो किरीटी। वोढियाणा।।६-२१०।।")***,असे हे ***त्रिबंध*** इ.संज्ञांचे उल्लेख पंथराजवर्णन करतांना आलेले आहेत.***चंद्रामृताचें तळे, शक्ती (६-२४७), मध्यमा व हृदयस्थान (६-२७१), हृदय व अनाहतनाद (हें असो तैं कुंडली। हृदयाआंतु आली। तंव अनाहताचि बोलिं।चावलैं तैं।।६-२७४।।"), ब्रह्मस्थान (६-२७९), पद, पिंड (६–२९१ व ३०८), नाथसंकेत (६-२९१), ककारांत (६-३०२), ब्रह्मरंध्र (६-३०५), परमात्मलिंग (६-३०५), भ्रूलता व मकाराचे आंग (६-३१३), महाशून्य (६-३१५), उन्मनी (६-३२०), तुर्या (६-३२०), चैतन्य (६-३२२)*** इ.अशा आणखी काही मोजक्या नाथपंथीय संज्ञांचाच बहुधा उपयोग करून त्यांनी आपले पंथराजवर्णन संपन्न केले आहे.

नाथसंकेत

उपरोक्त संज्ञांत कोणत्याही चक्राचा चक्र म्हणून उल्लेख नाही. नाथपंथीय ***सोळा आधार*** मानतात. त्यात ***मूलाधार*** एक आहे. ***षोडष आधार, तीन दृष्टी वा लक्ष्ये व नऊ चक्रे*** हे त्यांच्या योगसाधनेचे मूल आधार आहेत, असे गोरक्षमत आहे. पंथराजात तसा काही विशिष्ट खुलासा नाही. तरीही ***पंथराज हा नाथसंकेत आहे***, असे ज्ञानेशांनी म्हटले आहे. ते स्वतः नाथपंथीय असल्याने ***पंथराज*** वर्णितांना त्यांनी त्यांच्या योगप्रणालीप्रमाणे ते करावे अशी जरी अपेक्षा असली, तरी ती पूर्णांशाने सफल होत नाही, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

कदाचित पंथराजाचे साद्यंत सुस्पष्ट पूर्ण असे विवरण करण्याचा त्यांचा मानस नसावा. त्यांना केवळ ***नाथसंकेताचा दंशु*** च दाखवायचा असेल. म्हणून पंथराजाचे महत्त्वाचे टप्पे सांगून इतर अवांतर माहिती देण्याचे त्यांनी टाळले असावे. किंवा काही टीकाकार म्हणतात तसा नाथसंकेताचा नाथसंप्रदायाशी संबंध नसून श्रीकृष्णनाथांचा संकेत असाही त्याचा अर्थ अभिप्रेत असू शकेल. असो.

आज्ञाचक्राची आणखी काही वैशिष्ट्ये

आज्ञाचक्राची अजून काही वैशिष्ट्ये आहेत. याचे ***अग्निचक्र*** असेही नांव आहे. हे दोन दलांचे असते. ***हं*** व ***क्षं*** ही त्याची मंत्रबीजे होत. ते भ्रूमध्यात असून प्राणांचे केंद्र तेथे असते. ***महाकाली*** व ***महालक्ष्मी*** या तेथील मंत्रदेवता आहेत. या चक्राच्या भेदनाने ***निरानंद*** प्राप्त होतो. याची देवता ***आत्मा*** असून वर्ण शुभ्र स्फटिकवत आहे. या चक्रजयाने ***सायुज्यता मुक्ती*** प्राप्त होते, असे पण मत आहे.

येथे ॐकाराची ***अमात्रा*** *वा* ***अर्धमात्रा*** वसते. ***मूलाधार*** व ***स्वाधिष्ठानात अकार, मणिपूर व अनाहतात उकार आणि अनाहत व विशुद्धी यात मकार असे ॐकाराचे दर्शन समजले जाते.*** या चक्राचा ***शुद्धसत्त्व*** हा गुण आहे. ***तुर्यावस्था*** येथे प्राप्त होते. थोडक्यात हे चक्र ***शब्दब्रह्म*** व ***शून्यब्रह्म*** यातील संधिस्थानी आहे. तिन्ही प्रमुख नाड्यांचा येथे संगम होत असल्याने या स्थानास ***त्रिकुटी,**** ***मुक्ता त्रिवेणी, प्रयागक्षेत्र***, इ.नामे पण आहेत. याचे तत्त्व ***आकाश*** मानतात, तर काहींच्या मते ***मानस*** हे याचे तत्त्व आहे.

(*टीप:* अन्य यौगिक पद्धतीनुसार ***त्रिकुटी*** हे स्थान ***आज्ञाचक्रस्थ*** नसून सहस्त्रदलचक्रावरील ***शून्य-महाशून्य-भ्रमरगुंफा*** या अवकाशाअगोदरचे स्थान होय.यास ***ब्रह्म, ओम्, प्रणव, गगनब्रह्म,महत्, महाकश, दिव्य ग्रंथ(किताब),वेद*** इ.संज्ञाही आहेत. त्या त्या संज्ञांनी सूचित केली जाणारी या स्थलाची वैशिष्ट्ये आहेत, असे समजण्यास प्रत्यवाय नाही.)

प्रणव हे या चक्राचे मूलबीज आहे. येथे जी दीपशिखेसमान ***ज्योती*** असते, ***तिच्या प्रकाशात मूलाधार ते ब्रह्मरंध्र हा मार्ग उजळून जातो.*** येथे ***परमशिव*** व ***हाकिनी शक्ती*** या तंत्रदेवता वसतात. येथे ***इतरलिंग*** या रूपाने शिव असतो. या चक्रावर ***मानसतत्त्व*** असते. स्वप्न व इंद्रियांचे शब्द-स्पर्शादी व्यापार जाणवण्यात मानसचक्राचाच भाग असतो. त्यांच्याही वर ***सोमचक्र*** असते. कदाचित इतर योगी ज्यास ***चंद्रामृताचे तळे*** वा ***सतरावी कला*** म्हणतात, ते त्या सोमचक्रासच उद्देशून असावे. या पुढील आसमंतास ***निरालंबपुरी*** असे म्हणतात.

आज्ञेच्या पुढील प्रांत

आज्ञाचक्रावरील प्रांताचा काही योगी आज्ञाचक्रातच समावेश करतात आणि म्हणूनच असे एक यौगिक मत आहे की आज्ञाचक्राचा जय झाला की जीवन्मुक्ती वा सायुज्यता प्राप्ती होते. पण सैद्धांतिक दृष्ट्या इतर अनेक योगी आज्ञाचक्रावरील प्रांतास वेगळे मानून त्यास ***अर्धमात्रेचा प्रांत*** असे म्हणतात. त्यामुळे आज्ञाचक्राचे वर्णन करतांना कोणी कोणता भाग लक्षित करून आपली माहिती सांगत आहे, त्याचा फार तारतम्याने विचार करावा लागतो.

जिज्ञासूंनी या प्रांताच्या व इतर चक्रांच्या सविस्तर तंत्रशास्त्रोक्त माहितीसाठी ***सर जॉन वुड्रॉफ ऊर्फ आर्थर अॅव्हलॉन*** यांचा ***द सर्पंट पॉवर*** हा ग्रंथराज जरूर पहावा. तसेच संदर्भग्रंथ यादीतील श्री.श्री.म.वैद्य यांचे ***षट्चक्रदर्शन*** आणि इतरांची पुस्तकेसुद्धा आवर्जून पहावी. त्या सगळ्यांचा सखोल परामर्ष येथे घेतला जाऊ शकणार नाही. पण याही प्रांतातील चक्र-स्थानादी वैशिष्ट्यांबाबत ग्रंथग्रंथांतरी विभिन्न मते व संज्ञांचा वापर केला जातो, याची जिज्ञासूंनी नोंद घ्यावी. म्हणजे संदेहास वाव मिळणार नाही. त्या सर्व संज्ञा व वैशिष्ट्यपूर्ण माहितीचा अत्यंत साक्षेपी वृत्तीने आणि सतर्कतेने समाचार घ्यावा लागतो, एवढे सांगितले म्हणजे पुरे! असो

निरालंबपुरी

आज्ञेवरील ***निरालंबपुरी*** या भागात ***ईश्वर*** वसतो. त्याच्याही पुढे ***प्रणव, नाद, बिंदु, सुधासागर, मणिद्वीप, मणिपीठ*** या संज्ञांची स्थाने असतात. त्यापुढे ***सहस्त्रारचक्र*** असते. सहस्त्र पाकळ्यांचे कमळ असावे, तसे हे चक्र दिसते. हेसुद्धा काहींच्या मते ब्रह्मांडाकडे कर्णिका असणारे तर काही योग्यांच्या मते त्याच्या उलट दिशेने कर्णिका असणारे असे असते.

काहींच्या मते अशी दोन कमले आहेत. ती ***सहस्त्रार*** व ***कोल्हाटचक्रे*** म्हणून ओळखली जातात. ***कोल्हाट*** असंख्य दलांचे असते व ते ब्रह्मांडाकडे उत्फुल्ल असते. त्याची कर्णिका मस्तकाच्या दिशेने सहस्त्राराच्या ब्रह्मांडाकडे असणाऱ्या कर्णिकेशी संयुक्त असते, असे काही योग्यांचे अनुभवसिद्ध मत आहे. ***सहस्त्राराच्या कर्णिकेतील एक बिंदुमात्र स्थान ब्रह्मरंध्र म्हणून असते.*** त्याबाबत गोरक्ष म्हणतात: ***"अष्टमं ब्रह्मरन्ध्रनिर्वाणचक्रं सूचिकाग्रवेध्यं धूमशिखाकारं ध्यायेत् तत्र जालन्धरपीठं मोक्षप्रदं भवति।।२-८।।"सि.सि.प।।"*** - यास ***ब्रह्मरंध्र, निर्वाणचक्र*** अशा संज्ञा आहेत. सुईच्या अग्राएवढे सूक्ष्म व तीक्ष्ण असे हे आकाराने आहे. यात धूमशिखेच्या आकाराने ***शिव*** वसतो. त्याठायी ***जालंधर***नामक पीठ आहे. त्या जालंधरस्थ शिवाच्या ध्यानाने मोक्ष प्राप्त होतो.

आकाशचक्र

यानंतर ***आकाशचक्र*** असते. गोरक्ष म्हणतातः ***"नवमाकाशचक्रं षोडषदलकमलमूर्ध्वमुखं तन्मध्ये कर्णिकायां त्रिकूटाकारं तदूर्ध्वशक्तिं तां परमशून्यां ध्यायेत् तत्रैव पूर्णागिरिपीठं सर्वेच्छासिद्धिर्भवति।।२-९।।सि.सि.प.।।"*** - येथेच ***पूर्णागिरीपीठ*** असते. परमशून्य निराकार - ऊर्ध्वमुख षोडषदल कमलाप्रमाणे हे भासते. त्याच्या कर्णिकेत ***त्रिकूटाकार*** जागेत ***ऊर्ध्वशक्ती कुंडलिनी*** असते. त्या पीठासनस्थ शक्तीचे ध्यान करावे. म्हणजे सर्व इच्छा पूर्ण होतात.

इतर उल्लेख

दिव्यामृतधारा कर्ते श्री.*बाबामहाराज आर्वीकर* नाथपंथीय साधनाक्रमानुसार नऊ चक्रे असल्याचे आवर्जून सांगतात. गोरक्षनाथांच्या ***सिद्धसिद्धांतपद्धति*** नुसार त्या नऊ चक्रांचे वर्णन आपण पाहिले. तसेच ज्ञानेश्वरीत त्यांबाबत कोणतेही स्पष्ट उल्लेख नसल्याचेही पाहिले. त्याशिवाय त्याचबरोबर ***The Serpent Power***कर्त्या *सर जॉन वुड्रॉफ* यांच्या मताचाही थोडाफार परामर्ष तंत्रशास्त्रातील चक्रकल्पना पाहतांना आपण घेतला आहे. *श्री स्वामी विष्णुतीर्थ महाराज* **शक्तिपातसंप्रदाया**चे एक अध्वर्यू म्हणून ओळखले जातात. जाताजाता त्यांनी दिलेला चक्रक्रम सहज नजरेखाली घालून हा चक्रविषय संपवू या.

पूर्वमार्गः:::

पू. विष्णुतीर्थांचा चक्रविचार

*संपूर्ण योगपथ बहुमते मूलाधार ते सहस्त्रार - ब्रह्मरंध्र असा आहे. त्याच्या मूलाधार ते आज्ञाचक्र या सुषुम्नापथास बहुमते **पूर्वमार्ग** वा **पूर्वपथ** अशी संज्ञा आहे. आज्ञाचक्रापुढील मार्ग **पश्चिमपथ** म्हणून ओळखला जातो.*

आपल्या ***Devatma Shakti*** या ग्रंथात त्यांनी योगिदेह व त्यातील चक्रे व योगपथ दाखविला आहे *(पृ.क्र.१६ तत्रैव)*. तेथे त्यांनी ***कंद, त्या स्थानी स्वयंभूलिंग, त्या लिंगास साडेतीन वेटोळी घालून बसलेली कुंडलिनी शक्ती, मूलाधार, योनिस्थान, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा*** *अशी* चक्रे सुषुम्नापथावर दाखवली आहेत. म्हणजे ***मूलाधार ते आज्ञा*** *अशी* ***षट्चक्रे*** त्यांना अभिप्रेत आहेत. त्याव्यतिरिक्त वेगळे ***हृदयचक्र***ही त्यांनी अनाहतचक्राजवळ दाखविले आहे. पण ते सुषुम्नापथाला विशुद्धिचक्र ते आज्ञाचक्र या मार्गात एका वेगळ्या नाडीद्वारे जोडले आहे.

आज्ञाचक्रावरील प्रांत

आज्ञाचक्रावरील प्रांत प.पू.विष्णुतीर्थजी असा दाखवतात:***आज्ञा -➢ बिंदु - ➢अर्धेंदु -➢निरोधिका -➢नाद -➢नादांत -➢शक्ति -➢व्यापिका -➢समनी -➢ उन्मनी -➢प्रतिष्ठा -➢गुह्यचक्र -➢ सहस्रार चक्र.*** असो.

सौंदर्यलहरीतील चक्रक्रम

श्रीमदाद्यशंकराचार्य यांनी ***सौंदर्यलहरी*** या आपल्या प्रकरणग्रंथामध्येसुद्धा सुषुम्नापथावरील केवळ षट्‌चक्रांचाच उल्लेख केला आहे. त्यासाठी त्यातील काही श्लोकांचे उद्धरण पाहू या:

सुधासिन्धोऽर्मध्ये सुरविटपिवाटीपरिवृते
मणिद्वीपे नीपोपवनवति चिन्तामणिगृहे।
शिवाऽऽकारे मञ्चे परमशिवपर्यङ्क निलयां
भजन्ति त्वां धन्याः कतिचन चिदानन्दलहरीम्।।८।।
महीं मूलाधारे कमपि मणिपूरे हुतवहं
स्थितं स्वाधिष्ठाने हृदि मरुतमाकाशमुपरि।
मनोऽपि भ्रूमध्ये सकलमपि भित्त्वा कुलपथं।
सहस्रारे पद्मे सह रहसि पत्या विहरसि।।९।।
सुधाधाराऽऽसारैश्चरणयुगुलान्तविगलितैः
प्रपंञ्चं सिञ्चन्ति पुनरपि रसाम्नायमहसा।
अवाप्य स्वां भूमिं भुजगनिभमध्युष्टवलयं
स्वमात्मानं कृत्वा स्वपिषि कुलकुण्डे कुहरिणि।।१०।।सौ.।।

"सुधासमुद्रामध्ये कल्पवृक्षांच्या ज्यात बागा आहेत अशा मणिद्वीपात नीपवृक्षांच्या उपवनात चिंतामणींच्या रचलेल्या गृहात त्रिकोणाकृती मंचावर परमशिवाच्या पलंगावर पहुडलेल्या तुझ्या चिदानंदलहरीस्वरूपाचे ध्यान कोणी तरी एखादाच भाग्यवान पुरुष करतो. पृथ्वीतत्त्वाचा मूलाधारात, जलाचाही तेथेच, स्वाधिष्ठानातील अग्नितत्त्वाचा मणिपूरात, हृदयात वायूचा आणि त्यावरील स्थानात आकाशाचा आणि मनाचा भ्रूमध्यचक्रात - अशा प्रकारे सकल कुलपथाचा - शक्तिमार्गाचा - वेध करून तू सहस्रारकमलात आपल्या पतीसह एकांत करतेस *(८ व ९ ।।सौं।।)*."

(**टीप**: या श्लोकांचा वेगवेगळा अर्थ समायाचारी व कौलाचारी सांप्रदायिक लावतात, असे सौंदर्यलहरीवरील स्वामी श्रीविष्णुतीर्थांचे लिखाण वाचून वाटते.)

"तदनंतर आपल्या चरणयुगुलांमधून स्त्रवणाऱ्या अमृतधारांचा वर्षाव करत, प्रपंचास जीवन देत, षट्‌चक्रांवर अमृतसिंचन करत तू आपल्या स्थानी उतरून येतेस आणि सर्पिणीसारखी साडेतीन वेटोळी घालून, हे कुहरात राहणाऱ्या कुंडलिनी देवी! तू कुलकुंडात *(अर्थात कंदस्थानी)* झोपून जातेस.(!) *।।१०।।सौं।।*"

पूर्वमार्गाचे समन्वयन

या उताऱ्यावरून श्रीशंकराचार्यांचे मत षट्‌चक्रे कोणती आहेत, ते समजून घेण्यास उपयुक्त ठरेल असे वाटते. ***सौंदर्यलहरी*** *(श्लोक क्र. ३६ ते ४१)* मध्ये त्यांनी जगदंबा कुंडलिनीची मूर्ती वर्णितांना तिच्या शरीरातील ***आज्ञाचक्र, विशुद्धि, संवित्कमल, स्वाधिष्ठान, मणिपूर व मूलाधार*** अशा सहा चक्रांचा याच क्रमाने उल्लेख केला आहे, हे विशेष आहे. *स्वामी विष्णुतीर्थ* यांच्या मते यातील ***संवित्कमल*** **म्हणजे स्थूल हृत्स्थानिचे *अनाहतचक्र* नसून दुसरे चक्र आहे. ते अष्टदलांचे असून हृदयात वसते. हे स्थान हृत् नामक मांसपिंडाचे नसून *आध्यात्मिक हृदय* ज्याला म्हणतात, ते आहे.** ***त्यात हंसांच्या युगुलाच्या रूपाने हं व सः असे हंसोपनिषदात सांगितलेले पुरुष व प्रकृतिचे युगूल वसते. रमणमहर्षि*** विरचित ***रमणगीतेत*** पण असेच म्हटले आहे *(सौं.श्लोक क्र.३८, तत्रैव)*.

या सर्व परिशीलनावरून एक गोष्ट आपल्या प्रामुख्याने ध्यानी येते. ती म्हणजे योगपथाची सर्वमान्य मूळ संकल्पना तीच आहे. सुषुम्नापथाचा निर्देश कोणी एका प्रकारे, तर कोणी दुसऱ्या प्रकारे करत असले, तरी स्वामी विष्णुतीर्थांनी दर्शविलेला चक्रक्रम व सुषुम्नास्थिती शांकरमताचे अवलोकन करता मान्य करावयास जिज्ञासूंच्या दृष्टीने फारसा प्रत्यवाय नसावा. असो.

पूर्व व पश्चिम पथ

आतापावेतो जो षट्‌चक्रविचार केला, तो योगशास्त्राप्रमाणे प्रामुख्याने ***पूर्व***मार्गाचा ठरतो. नाभिस्थानास ***पूर्व*** म्हणतात आणि ***मूलाधार ते आज्ञाचक्र*** हा पथ ***पूर्वपथ*** म्हणून ओळखला जातो.

आज्ञाचक्रावरील ब्रह्मरंध्राकडील भाग ***पश्चिम*** म्हणून योग्यात मान्य आहे. या भागातील ***बिंदुपासून व्यापिनीपर्यंतची स्थाने पश्चिममार्ग म्हणून समजली जातात.***

याही भागात ज्ञानेशांच्या योगपरिभाषेतील काही चक्रे असल्याचे जाणकारांचे मत आहे.***१) त्रिकूट (मुखस्थानी), २) गोल्हाट (चक्षुस्थानी), ३) श्रीहट (रसनास्थानी), ४) औटपीठ (भ्रूमध्यस्थानी), ५) भ्रमरगुंफा (श्रोत्रस्थानी) आणि ६) ब्रह्मरंध्र (मूर्ध्निस्थानी)*** अशी ही चक्रे असतात, असे काहींचे मत आहे. त्याबाबत अधिक विचार पुढे करता येईल.

यांबाबत काही विशिष्ट मतप्रदर्शन *डॉ.बा.त्र्यं.शाळिग्राम* यांच्या ***श्रीज्ञानेश्वरांचा पंथराज*** या ग्रंथात आढळते. त्यांच्या मते ***पंथराज*** हा पश्चिममार्गी आहे. ***पूर्वमार्ग म्हणजे मूलाधार ते आज्ञाचक्र आणि पश्चिम मार्ग म्हणजे त्रिकूटादी वर निर्देशिलेली षट्‌चक्रे होत.*** पंथराजात पूर्वमार्गियांना क्रमावी लागणारी षट्‌चक्रे नाहीत, असे त्यांचे मत आहे.*(पृ. क्र.१४ ते १७ आणि ४१४ ते ४१८-तत्रैव)*. त्यांच्या ग्रंथात अनेक मतांचा विचार व निर्देश केलेला आहे. त्यातील फरकांची कारणेसुद्धा त्यांनी विशद केली आहेत. जिज्ञासूंनी तो ग्रंथ जरूर वाचून आपली याविषयीची मते ठरवावीत असे सांगता येईल.

श्री.के.रा.जोशी त्यांच्या ***शक्तिपातयोगरहस्य अर्थात सिद्धमहायोगशास्त्र*** यात असे दर्शवतात की ***शरीरातील पुढील भागातून गुह्यस्थान, बेंबी, हृदय, कंठ व नाक यांच्याद्वाराने जो प्राणाचा प्रवाह चालू असतो,त्याला पूर्वमार्ग असे म्हणतात*** आणि ***शरीरात मूलाधारातून निघून सहस्रारापर्यंत पाठीमागून जी नाडी जाते, तिला सुषुम्णा म्हणतात. हिलाच पश्चिममार्ग असे म्हटले जाते*** *(पृ.क्र.३३२तत्रैव)*.

श्री.शाळिग्राम यांच्या मते ***ज्ञानेश्वर हे पश्चिममार्गी होते*** *(पृ.क्र.४२२-तत्रैव).* पंथराज हा पश्चिममार्गी आहे.

पूर्वमार्ग (मूलाधार ते आज्ञा)हा हठयोग्यांचा आहे, असेही काहींचे मत आहे. आपणास ही मते जशीच्या तशी मान्य करणे अवघड वाटणार आहे. ***हठयोग म्हणजे ह व ठ म्हणजे सूर्य-चंद्र या नाड्यांवर आधारित योग म्हणजे इडा-पिंगला- प्राणायाम - प्राणलय साधणारा योग*** असा मर्यादित अर्थ घेणे आपणास योग्य वाटत नाही.

स्वात्माराम योगींद्र यांच्या ***हठयोगप्रदीपिके***चा दाखला घेतला तर असे दिसते कीः ***"... मनस्तत्र लयं याति तद्विष्णोः परमं पदम्।।१००।। ह.यो.प्र.।।"*** *- अशा लयाचा - नादानुसंधानाचा -विष्णुपदप्राप्तीचा मार्ग या हठयोगांतर्गतच आहे.* ***"... उन्मनी कल्पलतिका सद्य एव प्रवर्तते।।१०४।।ह.यो.प्र.।।" - "... निरञ्जने विलीयते निश्चितं चित्रमारुतौ।।१०५।।ह.यो.प्र.।।"*** *- अशी उन्मनीप्राप्तीची, मन व प्राणाचे निरंजनात विलीन होण्याची;* ***"न विजानाति शीतोष्णं न दुःखं न सुखं तथा। न मानं नापमानं च योगी युक्तः समाधिना।।११३।।ह.यो.प्र.।।"*** *- अशी गीतोक्त योग्यासदृश समाधिस्थित योग्याच्या लक्षणांची;* ***"राजयोगः समाधिश्च उन्मनी च मनोन्मनी। अमरत्वं लयस्तत्त्वं शून्याशून्यं परं पदम्।। अमनस्कं तथा द्वैतं निरालम्बं निरञ्जनम्। जीवन्मुक्तिश्च सहजा तुर्या चेत्येकवाचकाः।।३-४।।चतुर्थोपदेश।।ह.यो.प्र.।।"*** *- अशी* ***राजयोग, समाधि, उन्मनी, मनोन्मनी, अमरत्व, तत्त्व, लय, शून्य, अशून्य, परंपद, अमनस्क, अद्वैत, निरालंब, निरञ्जन, जीवन्मुक्ती, सहजा, तुर्या*** *हे सर्व समानार्थक समाधिवाचक एकार्थाचे शब्द असण्याची;* ***"सलिले सैन्धवं यद्वत् साम्यं भजति योगतः। तथात्ममनसौरैक्यं समाधिरभिधियते। यदा संक्षीयते प्राणो मानस च प्रलीयते। तदा समरसत्वं समाधिरभिधियते।। तत्समं च द्वयोरैक्यं जीवात्मपरमात्मनोः। प्रनष्टसर्वसङ्कल्पः समाधि सोऽभिधियते।।५,६ व ७।। चतुर्थो.।।ह.यो.प्र.।।"*** *- अशी समाधीची ज्ञानेशसदृश व्याख्या - पाण्यात मीठ साम्य पावते तसे आत्मा व मन यांचे ऐक्य होणे, प्राण क्षीण होणे, मन चेतनारहित होणे व त्यांचे समरसत्व होणे; जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य होणे, मनाचे सर्व संकल्प जेव्हा नष्ट होतात, तेव्हा समाधिप्राप्ती होण्याची -*अशी अनेकानेक विधाने ***हठयोगप्रदीपिके***त आहेत. म्हणजे ***हठयोग हा मूलाधार ते ब्रह्मरंध्र अशा पथक्रमणाचा पूर्ण योगच आहे.***

योगतारावलीतील शांकरयोगाशी आणि तदनुषंगाने पंथराजाशीही मिळताजुळता असा हठयोग आहे. ज्ञानेशांनी गुरुकृपेव्यतिरिक्त समाधी साधण्याचा प्रयत्न करणाऱ्यांस उद्देशून ***"हठियें सांडिति होडां। कडेलग (६-५६)"*** असे विधान केले आहे. या विधानाचा अर्थ संपूर्ण हठयोगास निम्नप्रतीचा ठरवण्यासाठी करणे योग्य होणार नाही. केवळ आपलीच योगप्रणाली सर्वश्रेष्ठ आहे, असा आग्रह योगसाधकांनी धरू नये, हे उत्तम!

ज्ञानेशही तसे करत नाहीत, हे तर विशेष उल्लेखनीय आहे! तेराव्या अध्यायात ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** करतांना ज्ञानेश निरनिराळ्या तत्त्वज्ञानांचा, भिन्नभिन्न पारमार्थिक संज्ञांचा समन्वय करतात, असे आपण पाहिले आहे. *पंथराज व आपली योगप्रणाली* सांगतांनासुद्धा त्यांच्या विवेकी मनाने असेच केले असण्याची दाट शक्यता आहे. त्यांचे योगशास्त्र द्वैताद्वैतास कवेत घेऊन पुढे जाणारे असल्याने ***पातञ्जलयोग, हठयोग, भक्तियोग, साङ्ख्ययोग, ज्ञानयोग, कर्मयोग*** इ.अनेक प्रमुख योगधारांचा त्यांनी समन्वय साधत ज्ञानेश्वरीतील ***पंथराज*** सिद्ध केला आहे. त्या सर्वांचे - त्या समन्वयकौशल्याचे - महादर्शन आपण अठराव्या अध्यायातील ***क्रमयोगसोपान*** निरीक्षितांना घेणारच आहोत. तूर्त ***पूर्वमार्ग व पश्चिममार्ग*** कोणते एवढे जाणून घेणे योग्य ठरेल.

ज्ञानेशांचा पंथराज पूर्वमार्ग व पश्चिममार्ग या दोहोंवर आधारित आहे. याचा स्पष्ट पुरावा "निगिजैं पूर्विलियां मोहरां। किं येईजे पश्चिमेचियां घरां। निश्चलपणे धनुर्द्धरां। चालणें एथिंचें।।६-१५९।।" ही ओवी देते. पूर्वमार्गाने निघून पश्चिमेच्या घरात येऊन पोहोचावे, असा हा मार्गक्रम आहे. ***मूलाधार ते आज्ञाचक्र असा पूर्वमार्ग क्रमावा व नंतर पश्चिमेचे घर म्हणजे ब्रह्मरंध्र तेथे पोहोचावे,*** असा याचा अर्थ होतो. पंथराजविवरणास आरंभ करतांना दिलेल्या ओव्या व ही ओवी वाचणाऱ्या आपणास म्हणूनच पूर्व व पश्चिम यात मार्ग-अमार्ग असे काहीच दिसत नसल्यास नवल नाही! असो.

पश्चिमपथः:::

आज्ञाचक्रापुढील दोन मार्ग

आता पश्चिमपथावरील स्थानांचे थोडे माहात्म्य पाहू याः स्वामी विष्णुतीर्थ महाराजांनी पश्चिमपथावरील स्थाने ***बिंदु ते सहस्रारचक्र*** अशी दिली आहेत. डॉ. शाळिग्राम म्हणतात की ***औटपीठ - गोल्हाट, ब्रह्मरंध्रादी स्थाने*** ही पश्चिमपथावर आहेत.

पं. गोपीनाथ कविराज यांचे मत

पं. गोपीनाथ कविराज यांच्या मतानुसार आज्ञाचक्रापासून दोन मार्ग होतात. ***१) सहस्रदलात जाण्याचा व २) ब्रह्मरंध्राकडे जाण्याचा*** *(पृ. क्र.१९५ - शक्तीका जागरण और कुंडलिनी - म.म.प. गोपीनाथ कविराज).* *श्री. बाबामहाराज आर्वीकर* यांचे पण विशुद्धचक्रापासून दोन मार्ग होतात असे मत असल्याचे त्यांच्या दिव्यामृतधारा या ग्रंथामधून दिसून येते *(पृ.क्र.२६७-२६८प्रगतदर्शन तत्रैव).*

बिंदू

श्री.गोपीनाथ कविराज ***बिंदू*** पण दोन असल्याचे सांगतात *(पृ.क्र.५५ व ५६ तत्रैव)*. एक म्हणजे ***अधःबिंदु*** जेथे **कंदस्थ सुप्ता कुंडलिनी** वसते तो. **सुप्ता कुंडलिनीस ते अधःबिंदू असेही नांव देतात. दुसरा बिंदु ब्रह्मांडात असतो - म्हणजे आज्ञाचक्र ते ब्रह्मरंध्र या आसमंतात असतो.** ***मूलकंद ते आज्ञाचक्र*** हा भाग ***पिंड*** असून त्यातील **अधःबिंदूस उत्क्रांत करून ब्रह्मांडातील ऊर्ध्वबिंदूशी त्याचे मिलन करून देणे,** ही **कुंडलिनीयोगांतर्गत प्रक्रिया** असल्याचे ते म्हणतात.

ॐकाराच्या साडेतीन मात्रांपैकी अकार, उकार व मकार या तीन मात्रा मूलाधार ते आज्ञा अशा पिंडस्थ असून उर्वरित अर्धमात्रा वा अमात्रा ब्रह्मांड व्यापते- म्हणजे आज्ञाचक्र ते ब्रह्मरंध्र या आसमंतात असते, असे त्यांचे मत आहे. ते योगिजनांस मान्यच आहे.

या अमात्रेचे अंश त्यांच्या मते पुढीलप्रमाणे आहेत. *आज्ञाचक्रापासून किंचित ऊर्ध्वभागी **बिंदु,** बिंदुच्या किंचित वर **अर्धबिंदु** वा **अर्धचंद्र** वा ज्यास स्वामी विष्णुतीर्थ **अर्धेंदु** म्हणतात, तो असतो. त्यानंतर वरवर जात असता क्रमशः **रोधिनी, नाद, नादांत, शक्ति, व्यापिका, समना व उन्मना** असून तदनंतर **महाबिंदू** असतो. **महाबिंदू हेच परमस्थान असून हे निष्कल असते.***

ते पुढे असेही म्हणतात की या सूक्ष्म मार्गावर प्रथम स्थान बिंदुचे असते. ललाटावर हा दीपाच्या आकाराने प्रतिभासित होतो. याला ***अर्धमात्रा*** पण म्हणतात. कारण ऱ्हस्व स्वरांच्या उच्चारणाच्या कालापेक्षा (एका मात्रेऐवजी) येथील उच्चारणकाल अर्धा असतो. या बिंदुचा प्रकाश दीपवत असूनही ***वृत्ताकार*** असतो. हा प्रकाश कोटिसूर्यसमप्रभ असा असतो. या बिंदुच्या केंद्रात म्हणजे कर्णिकेत ***शान्त्यातीत ईश्वर*** वसतो. त्याच्या चोहो बाजूंस ***निवृत्त्यादी चार कला*** विद्यमान असतात. त्यांच्या वामांगी स्वतःची ***निजाशक्ती*** असते.

अर्धेंदु व रोधिनी

बिंदुपश्चात ***अर्धचंद्रस्थान*** असते. याचा उच्चारणकाल १/४ मात्रा असतो. ***अर्धचंद्रावर ज्योत्स्ना, ज्योत्स्नावती, आदिशक्तिसमन्वित रोधिनीचे स्थान असते.*** रोधिनीस ***रुंधिनी*** असेही नांव आहे. काही जण तिला चुकून ***बोधिनी*** असेही म्हणतात. पण ***रोधिनी*** हेच नाव सयुक्तिक आहे. कारण येथे ***रूपनिरोध*** होतो. ब्रह्मादी ईश्वर किंवा सिद्धवर्गांना परमतत्त्वापर्यंत पोहोचण्यास गतिरोध करणारे हे स्थान असल्यानेही त्यास ***रोधिनी*** असे नाम आहे. हेच कार्य करण्यासाठी ज्योत्स्नादी कला येथे प्रतिष्ठित असतात.

नाद, शक्ति वा व्यापिका,

रोधिनीनंतर ***नाद*** येतो. याचा आकार दोन बिंदुतील सरळ रेषेप्रमाणे असतो. नादानंतर ***नादांत*** हे स्थान असून त्यानंतर ***शक्ती*** हे स्थान आहे. ही ***शक्ती*** सर्व ब्रह्मांडभुवनाचा आधार आहे. हिच्या चारी बाजूंस ***सुसूक्ष्मा, सूक्ष्मता, अमृता व मृता*** या चार धारा असतात. हीच ***व्यापिनी वा व्यापिका*** म्हणून ओळखली जाते. व्यापिका बिंदुयुक्त त्रिकोणाच्या आकाराने प्रकाशमान असते.

समना व उन्मना

यानंतर ***उन्मना*** असते. शक्ती इ.चे स्वरूप द्वादश सूर्यांप्रमाणे प्रकाशमय असते. यानंतर असते ***मनोन्मनी*** आणि त्यानंतर ***उन्मनी.*** हा क्रम देतांन पं.कविराजजी चुकलेले वाटतात. कारण यापूर्वी एका ठिकाणी ते ***व्यापिका - समना - उन्मना - महाबिंदु*** असा हा क्रम देतात. मनोन्मनाऐवजी येथे समना असली पाहिजे. असो.

सकल, निष्कल, परमानंद *पराशिव*

उन्मनीच्या ऊर्ध्वस्थ भागी **हकारा**पासून आरंभ करून ***सकल, निष्कल आणि केवल निष्कल*** या तिन्ही अवस्थांच्याही ऊर्ध्वभागी देश व काल यांनी अनवच्छिन्न अशी परम रमणीय स्थिती असते. स्वभावतः सुंदर आणि परमानंदस्वरूप असे हे स्थान असते. ***त्या ठिकाणी परा व शिव यांचे सामरस्यात्मक परमानंदस्वरूप असते.***

पं.गोपीनाथांच्या मताचे महत्त्व

पं.गोपीनाथ कविराज यांचे हे तंत्रशास्त्राधारित मत उद्धृत करण्याचे एक प्रमुख कारण असे की त्यातील अनवधानाने आलेली काही तादृश विसंगती जर सोडली तर एकूणच त्यांनी केलेले हे पश्चिममार्गाचे समालोचन या विषयाचे अंतरंग समजून घेण्यास साहाय्यकारक ठरते.

चक्र व पद्म

त्यांनी असेही एक विधान केले आहे की जेव्हा कुंडलिनी ***सुप्तावस्थेत*** असते तेव्हा शक्तिस्थानांना ***चक्र*** असे म्हणतात. म्हणजे सूक्ष्म नाडिचक्रे ती हीच असावीत. आणि जेव्हा कुंडलिनी जागृत होऊन त्यांचा भेद करण्यासाठी सिद्ध होते, तेव्हा ती ***पद्म*** वा **कमळे** म्हणून ओळखली जातात *(पृ.क्र.११३ तत्रैव).*

नाद, बिंदु, कला व ज्योती

एकदा चक्रभेद झाला की त्या त्या कमलातील मातृका - वर्ण - मंत्रबीजे - तत्त्व इ.चा कुंडलिनीत समावेश होतो. **मातृकांना कला म्हणतात.** त्याव्यतिरिक्त **प्रत्येक चक्रात नाद व बिंदु असे दोन अंश असतात.** म्हणजे **नाद, बिंदु व कला** असे प्रत्येक चक्राचे तीन अंश असतात *(पृ.क्र.११४, शक्तिका जागरण और कुंडलिनी - पं. गोपीनाथ कविराज).* आणि **ज्योती म्हणजे स्वतः कुंडलिनीच असते. तिचा अंश प्रत्येक चक्राठायी विद्यमान असतो.** ज्ञानदेवांच्या ***"नेणें नादबिंदुकला ज्योति ।।६-२८८।।"*** या पंथराजाच्या ओवीत अडखळणाऱ्यांस या माहितीचा उपयोग जरूर होईल. असो.

डॉ. के.रा.जोशी यांचे मत

स्वामी विष्णुतीर्थमहाराज, म.म.प.गोपीनाथजी आणि डॉ.शाळिग्राम यांनी पश्चिममार्गाबाबत मांडलेल्या मतांचा परामर्ष घेऊन झाल्यावर त्यांचा समन्वय साधण्यासाठी*डॉ. के.रा. जोशी* यांनी आपल्या ***ज्ञानेश्वरी - सिद्धयोगदर्शन*** या ग्रंथात प्रकट केलेले मत उल्लेखनीय आहे.

बैन्दवादी स्थाने आणि गोल्हाटादींचा समन्वय

त्यांच्या मते ***"जैं आकाराचां प्रांतु। जैं मोक्षाचां एकांतु। जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलैं।।६-३२२।।"*** या ओवीत ज्ञानेश्वर पश्चिमपथाचा निर्देश करत आहेत.

हा पश्चिम मार्ग आक्रमतांना *त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ व भ्रमरगुंफा* या चक्रांना ओलांडून साधक ब्रह्मरंध्रात जातो. डॉ. जोशींच्या मते या स्थानांचेच वर्णन *बिंदु, अर्धेंदु किंवा अर्धचंद्रिका, निरोधिका, नाद, महानाद अथवा नादांत, शक्ति, व्यापिका, समनी व उन्मनी* या नांवांनी शास्त्रकारांनी केले आहे. परंतु यातील कोणत्या चक्रास काय शास्त्रनाम आहे, ते डॉ.जोशींनी विशद केलेले दिसून येत नाही *(पृ.क्र.१७१, १७२ तत्रैव).* पण त्यापुढील पृष्ठांवर *(पृ.क्र.१७४,१७५)* गुलाबरावमहाराजांच्या ***योगरहस्य*** या ग्रंथातील उद्धरण आहे. त्यात *डॉ.शाळिग्राम* यांच्या मतास दुजोरा मिळतो. डॉ. शाळिग्राम यांच्या प्रबंधातील पश्चिममार्गातील या गोल्हाटादी चक्रांच्या प्रतिपादनासंबंधात ***डॉ.वि.स. वाळिंबे*** यांनी ज्ञानेश्वरीतही

त्रिकूट - गोल्हाटादी चक्रांचा उल्लेख दूरान्वयानेही आढळत नाही, असे आपले मत त्याच ग्रंथाच्या प्रस्तावनेत नोंदविले आहे *(प्रस्तावना - डॉ.शाळीग्राम यांच्या "श्रीज्ञानेश्वरांचा पंथराज या ग्रंथाची).*

पश्चिम मार्गातील स्थानवैशिष्टये

त्रिकुटादी या चक्रांचे उल्लेख येतात, ते विशेषेकरून ज्ञानेशांच्या योगपर अभंगांतून, काही संतांच्या रचनांतून आणि विशिष्ट योगमार्गियांच्या साहित्यातून. पंथराज व ज्ञानेश्वरीतील योगविषयक ओव्यांत पश्चिमपथावरील श्रीहाटादी चक्रांची ही नांवे नसल्याने त्यांचा विषय तूर्त सोडून देऊ आणि तंत्रशास्त्रमताचीच म्हणजे बिंदु, इ.संज्ञा असणाऱ्या पश्चिममार्गी स्थानांची काही वैशिष्ट्ये समाजावून घेऊ. *डॉ.के.रा.जोशी* यांच्या ***अमृतबिन्दूपनिषद*** आणि***योगतारावली*** यांवरील विवरणात्मक ग्रंथांचा, *डॉ.म.म.प.गोपीनाथ कविराज* यांच्या साहित्याचा व सर जॉन वुड्रॉफ व इतर लेखकांच्या योगपर माहितीचा व काही प्रमाणात स्वानुभवाचा आधार घेऊन काही माहिती व विवेचन याबाबत देत आहे.

बिंदु, नाद व कला

मकार ही ॐकाराची तृतीय मात्रा आज्ञाचक्री असते. हे चक्र भेदणे अत्यंत अवघड आहे. यातील मुंगीतुल्य छिद्रातून सुषुम्ना पुढे जाते. आज्ञाचक्रापर्यंत जागृति - स्वप्न - सुषुप्ति हे त्रयभाव असतात. पुढे प्रणवाची चतुर्थ मात्रा असते. तिचा भाव ***तुरीय व तुरीयातीत*** असा असतो. आज्ञाचक्र भेदून ***तुरीय अवस्था*** प्राप्त होते. पुढील पथक्रमणाने अंती ***तुरीयातीत अवस्था*** प्राप्त होते.

प्रणवाची चतुर्थ मात्रा ***बिंदू*** आहे. या अर्धमात्रेत ***बिंदु, नाद व कला*** असे तीन विभाग असतात. बिंदुच्या विभागात तीन, नादाच्या विभागात दोन व कलेच्या विभागात इतर सर्व प्रविभाग असतात. बिंदुपासून समनेपर्यंतचा भाग वस्तुतः ॐकाराची अर्धमात्रा असली, तरी बिंदुसच अर्धमात्रा म्हणतात. त्यापुढील भागात पूर्वीच्या भागाच्या अर्धी मात्रा असते.

जशी बिंदूत अर्धमात्रा असते तर अर्धेंदूत १/४ मात्रा असते. याप्रमाणे समनीत १/२५६ मात्रा असते. उन्मनीत १/५२८ किंवा *Limit tends to Zero* असा हा जो कॅल्क्युलसमधील *concept* आहे, त्याप्रमाणे शून्य मात्रा असते. भारतीयांचे तत्त्वज्ञान व योगविज्ञान आधुनिक गणिताच्या साहाय्याने कसे छान समजावता येते, ते या उदाहरणावरून स्पष्ट व्हावे. असो.

मात्रा व महाशून्य

आता या मात्रा कशाच्या आहेत, याचे वर्णशास्त्रीय उत्तर म्हणजे *एका ऱ्हस्व स्वराच्या उच्चारणाचा काल* म्हणजे ***मात्रा*** असे जरी ग्रंथकार देत असले, तरी अधिक विचारांती खरे योगशास्त्रीय उत्तर त्या मनाच्या मात्रा आहेत असेच असले पाहिजे. जागृत - स्वप्न - सुषुप्ति या प्रत्येक अवस्थेत मन हे एका मात्रेचे म्हणजे पूर्णांशाने असते. सुषुप्ति अवस्थेत मन फक्त *hibernating* अशा अवस्थेत असले, तरी शून्य अवस्थेत नसते. पूर्णच असते. मूर्छितावस्थेत व जागृतावस्थेत जसा तोच मनुष्य पूर्णपणे असतो, तसेच हे आहे.

तुरीयावस्थेत मनाचे मनपण अर्धे होते. म्हणून बिंदूस अर्धी मात्रा दिली आहे. तुरीयेच्या प्रगत भूमिकांमध्ये मनाचे हे मनपण उत्तरोत्तर भौमितिक श्रेणीने ***(१/२, १/४, १/८, १/१६ ते १/२५६ अंश)*** अशा क्रमाने कमी कमी होत जात उन्मनीत *Limit tends to Zero* असे शून्यभावाचे होते. मनाचे अस्तित्व असते. पण ते नसल्यातच जमा असते, अशी ही ***उन्मनी अवस्था*** आहे. त्यापुढे ***निरंजनपद*** आहे. त्याठायी मात्र मनाचा पूर्ण लय होतो. उन्मनेसच ***अमात्र*** असेही याच कारणाने म्हणतात. कारण त्या अवस्थेत शून्यवत अशी मनाचीच मात्रा असते; चैतन्याचे पूर्णत्व त्याठायी नसते, तर चैतन्याकडे *Quantum Jump* घेण्याची ती अवस्था असते. तेथून नंतर चैतन्य कोणत्या प्रकारे आणि कोणत्या अंशाने येते किंवा वाढत जाते, हा निव्वळ अनुमानाचा व सैद्धांतिक चर्चेचा भाग आहे. असो.

मनाच्या या मात्रांनाच ***कला*** असेही म्हणतात. **मूलाधार ते आज्ञाचक्रा**पर्यंत मन***सकल*** असते. **बिंदू ते उन्मनी**पर्यंत***सकल-निष्कल*** असते आणि ***निरंजनपद - महाशून्य - महाबिंदु*** ही ***निष्कल*** अवस्था आहे.

प्रथम शून्य

बिंदू हे योग्यांचे ***प्रथम शून्य*** समजले जाते. अशी ***पाच शून्ये*** योगिदेहात कल्पिली आहेत. कोणी ती ***सात*** असल्याचे सांगतात. ***"शून्याचेही शून्य" - "महाशून्याचां डोहिं"*** इ.संज्ञाप्रयोग **पाचव्या शून्याला** उद्देशून आहेत. **बिंदू हा ज्योतिस्वरूप आहे.** या बिंदुरूप ज्योतीमध्ये समग्र विश्व अभिन्नरूपाने भासमान होते.

पंच ज्ञानेंद्रियांनी मनास मनपण येते. त्यांचे ***शब्द - स्पर्श - रस - गंध व रूप*** असे पंचविषय असतात. षट्चक्रभेदन करतांना कुंडलिनीत पंचमहाभूते व त्यांच्या तन्मात्रा लय पावतात. असे असले तरी त्या सुप्त रूपात मन-प्राणासह असतातच. **जोपावेतो मन व प्राण महाशून्यात विलीन होत नाहीत, तोपावेतो पश्चिममार्गावरही ज्ञानेंद्रियांच्या या पंचविषयांची - त्यातून प्रामुख्याने रुप-नाद (शब्द) यांची अनुभूती सूक्ष्मत्वाने येतच राहते.** अर्थात ही उदात्त अनुभूती असल्याने तिची पार्थिव अनुभूतीशी तशी तुलना करणे योग्य नाही.

काही अभ्यासकांच्या मते तसे पाहिले तर श्रीहाटादी चक्रांपैकी ***गोल्हाट हे चक्षूंशी, श्रीहट हे रसनेशी , भ्रमरगुंफा हे श्रोत्रांशी*** म्हणजे अनुक्रमे***रूप, रस व शब्दाशी संबंधित*** आहेत, असे दिसते. शास्त्रोक्त ***निरोधिका*** ही रूपाशी आणि ***नाद- नादांत -महानाद*** ही स्थाने शब्दाशी संबंधित आहेत. परंतु यौगिक अनुभूतिदृष्ट्या भ्रमरगुंफा ही अनाहतनादसंबंधित असल्याने आणि या नादाचा संबंध उन्मनीशी असल्याने, तेथील श्रोत्राकाश हे शब्द तन्मात्रासंबंधित नसून दिव्य नादासंबंधित असल्याचे आपणास जाणवते.

यांचा असा काही परस्पर संबंध जोडला जात असल्यास***बिंदु =त्रिकुट, अर्धेंदु =श्रीहट, गोल्हाट =निरोधिका, औटपीठ व भ्रमरगुंफा = नाद - नादांत - महानाद आणि शक्ती -व्यापिका - समना - उन्मना*** असे अनुमान करता येते.

बैन्दव प्रभाग - बिंदु, अर्धेंदु व निरोधिका,

योग्याच्या इच्छाशक्तीच्या प्रभावाने त्रिभुवनातील कोणत्याही काळातील कोणतीही गोष्ट तो या बिंदुरूपी ज्योतीत पाहू व अनुभवू शकतो. परंतु या ज्ञातृत्वात ***ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान*** असा ***त्रिपुटीभाव*** नसतो, जो पार्थिव अनुभवात असतो. यापुढील अर्धेंदुस्थानी त्रिपुटीतील ज्ञेयप्रधानभावाचा लय होतो. यानंतर बिंदुविभागातील शेवटची ***निरोधिका*** येते. विश्वशासक ब्रह्मादी गणांस याच भूमीत थोपवून ठेवले जाते. या निरोधिकेपुढे ऊर्ध्वगती प्राप्त करणाऱ्यांस विश्वकार्य करणे शक्य नसते. परंतु या स्थानाचे अतिक्रमण करणे अत्यंत दुरापास्त असते. ***निरोधिकेत बिंदुच्या आवरणाचा म्हणजे त्रिपुटीचा अवशिष्ट भाग असतो.*** या स्थानी ***रूपनिरोध*** होतो.

नादप्रभाग - नाद व नादांत

यानंतर ***नाद व नादांत किंवा महानाद*** या अवस्था येतात. ***नादाचे स्थान ब्रह्मरंध्राच्या मुखात असते.*** **या ठिकाणी विशुद्ध त्रिगुणातीत आणि चिदाभासयुक्त अनुभूती येते. नादांत हा नाड्यांच्या आधारात किंवा ब्रह्मबिळात लीन असतो. ही अनाहतनादसापेक्ष स्थिती नसून ध्वनिसापेक्ष स्थिती आहे, असे म्हणणे अधिक योग्य होईल. त्याच्यानंतरही *अनाहतनाद* होतच राहतो आणि जोपर्यंत महाशून्याची प्राप्ती होत नाही, तोपर्यंत अनाहतध्वनी गर्जतच राहतो.** ***नादांताने मोक्षद्वार अडवलेले असते. हा नादांत आपल्या अध:शक्तीच्या द्वारे सर्व जगताचा भेद करून त्रिपुटीचा नाश करून - ऊर्ध्वशक्तीत समाप्त होतो.***

शक्तिप्रभाग - शक्ती ते समना - ऊर्ध्वकुंडलिनी

यानंतर ***शक्तिस्थान*** असते. **हे स्थान ब्रह्मरंध्राच्या वर आहे.** ***सिद्धसिद्धांतपद्धती***त वर्णिलेली ***ऊर्ध्वकुंडलिनी*** **म्हणजे हे शक्तिस्थल.** या शक्तीच्या गर्भातच न उमललेले, प्रकट न झालेले वा मिटलेले विश्व समावलेले असते.

हिच्या केंद्रस्थानी ***व्यापिनी*** ही कला असते. शक्तीमध्येच आनंदसत्तेची अनुभूती येत असते. ***व्यापिनी*** ही शून्यस्वरूप आहे. पंचशून्यातील हे ***चवथे शून्य*** आहे. **यात ब्रह्माच्या सगुण शक्तीच्या आनंदाचा आभास असतो.**

व्यापिनीनंतर ***समना*** ही कला असते. ***शक्ती ते समना*** हा ***कलाविभाग*** आहे. **मन वा सत्ता ही येथे केवळ अस्तित्वरूपाने असल्यामुळे व त्यात पंचज्ञानविषयांचा व त्रिपुटीचा आत्यंतिक अभाव असल्याने या अवस्थांस फक्त *कला* असे म्हणतात.** शक्तीच्या **व्यापिनीपूर्व विभाग**ास योगी ***निरालंबपुरी*** असे म्हणतात.

समना ही पराशक्ती आहे. ही **व्यापिनी पद**ात स्थित असते. ही निरालंबपुरीच्या वर असते. ही समनाच सर्व कारणांची कर्तृत्वभूत आणि सर्व भुवनांची आधारभूत अशी शक्ती आहे. या शक्तीवर आरूढ होऊन शिव सर्व विश्वाची निर्मिती, रक्षण, संहार इ.कार्ये करत असतो.

उन्मना व सतरावी कला

याच्यानंतर **उन्मना** ***आहे. या ठिकाणी*** **नादरूप ब्रह्माची समाप्ती *होते.* उन्मना हे पाचवे शून्य आहे.** ***ही मनाच्या अतीत असते.*** **त्या ठिकाणी हंस म्हणजे जीवात्मा शुद्ध आत्म्याचे रूप धारण करतो.** ***येथे एकदमच सर्व विश्व अभेदरूपाने प्रकाशित होते. तेव्हा शिवत्वाची प्राप्ती होऊन हंस व्यापक होतो आणि छत्तीस तत्त्वांच्याही पलीकडील रूपात स्पंदित होतो. बिंदुपासून चिदानुभवास झालेला प्रारंभ असा पूर्णत्वात परिणत होतो.***

बिंदूत पूर्ण चंद्राच्या म्हणजे मनाच्या उत्क्रांत झालेल्या ***पंधरा कला*** असतात. मात्र ***षोडषी कला*** नसते. हिला ***अमाकला*** असेही म्हणतात. **उन्मनीमध्ये पंधरा कला अस्तंगत असतात, तर सोळावी कला गुप्तरूपाने असते.** अमाकलेस ***अमृतकला*** असेही एक नांव आहे. या सोळा कलांव्यतिरिक्त **उत्क्रांत जीवात्म्यास जेव्हा परमात्मपदाची प्राप्ती होते, तेव्हा षोडष कलांहून वेगळी अशी *सतरावी कला* प्रकट होते.** ***"सतरावीयेचें स्तन्य"*** असे या कलेपासून प्राप्त होणाऱ्या आनंदास ज्ञानदेव म्हणतात. असो.

स्वामी विष्णुतीर्थमत

या आज्ञाचक्रावरील ***बिंदु ते उन्मना*** अशा नऊ स्तरांबद्दल स्वामी विष्णुतीर्थांचे मत पाहून या पूर्व-पश्चिम मार्ग इ.चा समन्वय करू या.

त्यांच्या मतानुसार ***बिंदु, अर्धेंदु, निरोधिका, नाद व महानाद*** यातील प्रथम चार स्तरात पंचमहाभूतांची प्रत्येकी एक अशा पाच पाच कला विद्यमान असतात. ***नाद*** हा शब्दात्मक ***(ध्वन्यात्मक)*** स्तर आहे. **महानादात *(नादांतात)* वाच्यवाचक भेद लीन होतो.** ***बिंदु, अर्धेंदु व निरोधिका*** हे तीन स्तर **रूपात्मक** आहेत. निरोधिकेत रूपाचा निरोध होतो.

शक्ती या स्तरावर तीव्र आनंदलहरींची अनुभूती प्राप्त होते. ***व्यापिका*** हे शून्यस्थान आहे. त्याचा वेध दिव्यकरणाच्या विशेष अशा एका क्रियेद्वारे करावा लागतो. पातञ्जलयोगदर्शनाने सांगितलेली ***निर्वितर्क समाधि*** या स्तरावर प्राप्त होते.

निर्विचार समापत्तिचे महानाद (नादांत) हे स्थान आहे, तर व्यापिका स्तर सानंद समाधिदायक आहे. सास्मिता संप्रज्ञात समाधीचा स्तर समना असतो. उन्मना स्तरावर उन्मनी प्राप्त होते, असे विष्णुतीर्थांचे मत आहे. त्याबाबतचा विचार नंतर करू.

समारोप

या उन्मेषात व्यक्तवलेला विचार आपण पुढील **उन्मेष क्र.४५-२ :लययोगसमालोचन:योगशास्त्रसमन्वय** यात आणखी काही वेगळ्या पैलूतून पाहणार आहोत. तर वळू या आता तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::परिशिष्ट क्र.-१::

पंथराजाच्या ज्ञानदेवीतील क्रमवार ओव्या

"अर्जुना हां अवधारिं। पंथराजु"

..। होय विरक्तु ऐसां अनंतां। भरंवसा जाहाला।।६-१५०।।
म्हणें जैं जैं हां अधिष्ठिल। तैं आतां आरंभीच एआं फलैल।
म्हणौनि सांघितलां न वचैल। अभ्यासु वांयां।।१५१।।
ऐसें विवरौनियां श्रीहरि। म्हणितलें तियें अवस्वरिं।
अर्जुना हां अवधारिं। पंथराजु।।१५२।।
जेथ प्रवृत्तितरूंचां बुडीं। दिसती निवृत्तिफलांचियां कोडीं।
जियें मार्गीचा कापडी। महेशु आझुइं।।६-१५३।।
पैं योगिवृंदें वहिलीं। आडविं आकासिं निगालिं।
कि तेथ अनुभवाचां पाऊलिं। धोरणु पडिलां।।१५४।।
तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतलीं एकसरें।
कीं एर सगलें मार्ग निदसुरें। सांडूनियां।।१५५।।
पाठीं महर्षि एणें आले। साधकांचे सिद्ध झालें।
आत्मविद थोरावलें। एणेंचि पंथें।।१५६।।
हा मार्गु जैं देखिजे। तैं तहानभूक विसरिजे।
रात्रिदिवस नेणिजे। वाटें इयें।।१५७।।
चालतां पाऊल जेथ पडे। तेथ अपवर्गाची खाणि उघडे।
आव्हांटलियां तऱ्हीं जोडे। स्वर्गसुख।।१५८।।
निगिजें पूर्वीलियां मोहरां। कीं येईजे पश्चिमेचियां घरां।
निश्चलपणें धनुर्धरा। चालणें येथिंचे।।१५९।।
एणें मार्गें जेयां ठायां जाईजे। तो गांवो आपण होईजे।
हे सांगो काय साहजें। जाणसीं तूं।।१६०।।
म्हणौनि तैसे एक लागेल। स्थान पाहावें।।६-१६३।।
जेथ आराणुकेचेनि कोडें। बैसलियां उठो नावडे।
वैराग्यासीं दूण चढें। देखिलेयां जैं।।१६४।।
जो संतीं वसविला ठाओ। संतोषासि साव्हवो।
मना होय उत्साओ। धैर्याचां।।१६५।।
अभ्यासुचि आपणयांतैं करी। हृदयांतैं अनुभव वरी।
ऐसीं रम्यपणाची थोरी। अखंड जेथ।।१६६।।
जेयां आड जातां पार्था। तपश्चर्या मनोरथा।
पाखंडियांही आस्था। समूल होय।।१६७।।
स्वभावें वाटे येतां। जऱ्हीं वरपडा जालां अवचितां।
तऱ्हीं सकामुही परि माघौतां। निघों विसरें।।१६८।।
ऐसें न ऱ्हातयांतेही राहावीं। भ्रमातुकांतेंही बैसवीं।
थापटूनि चेववी। विरक्तीतैं।।१६९।।
हे राज्य वर सांडिजै। मग निवांता एथेचि असिजै।
ऐसें शृंगारियांही उपजैं। देखतखेवों।।१७०।।
जैं एणें मानें बरवंट। आणि तैसेंचि अति चोखट।
जेथ अधिष्ठान प्रकट। डोलां दिसें।।१७१।।
आणिकही एक पाहावे। जैं साधकीं वसतें होआवें।
आणि जनाचेनि पाएखें। मैलेचि ना।।६-१७२।।
जेथ अमृताचेनि पाडें। मुलांहिसकट गोडें।
जोडिती दाटें झाडें। सदा फलती।।१७३।।
पाऊलां पाऊलां उदकें। परि वर्षाकालींही चोखें।
निर्झरें कां विशेखें। सुलभें जेथें।।१७४।
हा आतपुही अलुमालु। जाणिजैं तऱ्हीं शीतलु।
पवनु अति निश्चलु। मंद झुलुकें।।१७५।।
बहुतकरूनि निःशब्दु। दाट न रिगे श्वापदु।
शुक हन षट्पदु। तेऊंतें नाहीं।।१७६।।
पाणिलगें हंसें। दोनीं च्यारीं सारसें।
कवणें एकें वेलें बैसें। तऱ्हीं कोकीलु ही होएं।।१७७।।
निरंतर नाहीं। तऱ्हीं आली गेली कंहीं।
होतु कां मयूरेंही। आम्हीं ना न म्हणो।।१७८।।
परि आवसिक पांडवा। ऐसा ठाओ जोडावा।
तेथ निर्गुडु मठु होआवा। कां शिवालय।।१७९।।
दोनींमाजि आवडे तैं। जैं मानिलें होय चित्तें।
बहुतकरूनि एकांतें। बैसिजें गां।।१८०।।
म्हणौनि तैसें तैं जाणावें। मन राहांतें पाहावें।
राहील तेथ रचावें। आसन ऐसें।।६-१८१।।
वरी चोखट मृगसेवडी। माझिं धूतवस्त्राची घडी।
तलुवटीं अमोडीं। कुशांकुर।।१८२।।
सकोमल सरिसें। सुबद्ध राहांती आपैसें।
एक पाडें तैसें। ओजा घालीं।।१८३।।
परि सांव्हियांचि उंच होईल। तऱ्हीं आंग हन डोलैल।
नीच तऱ्हीं पावेल। भूमिदोखु।।१८४।।
म्हणौनि तैसें न करावें। समधेनिआं एं धरावें।
हे बहु असो होआवें। आसन ऐसें।।१८५।।
मग तेथ आपण। एकाग्र अंतष्करण।
करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे।।६-१८६।।
तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्त्विकें भरें।
जंव कठिनपण कां विरे। अहंभावाचें।।१८७।।
विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। हृदयामाझिं।।१८८।।
ऐसें ऐक्य हे साहाजें। फांवें तंव राहिजे।
मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी।।१८९।।
आतां अंगांतैं अंग करी। पवनांतैं पवनुचि धरी।
ऐसीं अनुभवाचीं उजरी। होंचि लागे।।१९०।।

प्रवृत्ति मार्गौति मोहरे। समाधि ऐलाडीं उतरें।
आघवें अभ्यासूं सरे। बैसतखेंवों।।१९१।।
मुद्रेची प्रौढी ऐशी। तैंचि सांघिजैल आतां परिहसैं।
तऱ्हीं ऊरूं इयां जघनासीं। जडौनि घाली।।६-१९२।।
चरणतलें देव्हडीं। आधारद्रुमाच्या बुडीं।
सुघटित गाढीं। संचरीं पां।।१९३।।
सव्य तो तलीं ठेविजे। तेणें सिवणीमध्य पीडिजे।
वरी बैसें तो साहाजें। वामचरणु।।१९४।।
गुदमेंढ्रांआंतौतीं। चारीं अंगुलें निरुतीं।
तेथ सार्द्ध सार्द्ध प्रांतीं। सांडूनियां।।१९५।।
माझिं अंगुल एक नीगे। तेथ टांकेचेनि उत्तरभागें।
नेहटिजे वरी आंगें। पेललेनि।।१९६।।
उचलिजे कां नेणिजे। तैसें पृष्टांत उचलिजे।
गुल्फद्वय धरिजे। तेणेंचि मानें।।१९७।।
मग शरीरसंचु पार्था। हा अशेषुहि सर्वथा।
पार्ष्णिचां माथां। स्वयंभु होय।।१९८।।
अर्जुना हे जाण। मूलबंधाचें लक्षण।
वज्रासन गौण। नाम यासीं।।१९९।।
ऐसिं आधारिं मुद्रा पडें। आणि अधींचा मार्गु मोडें।
तेथ अपानु आंतुलीकडें। वोहटूं लागैं।।२००।।
तंव करसंपुट आपैसें। वामचरणीं बैसें।
बाहूमुलीं दिसे। थोरीव आली।।६-२०१।।
माझिं उभारलेनि दंडें। शिरकमल होएं गाढें।
नेत्राद्वारींचीं कवाडें। लागूं पाहाती।।२०२।।
वरचिलें पातीं न ढलती। तलींचीं तलीं पुंजालती।
तेथ अर्धोन्मिलित स्थिती। उपजे तेआं।।२०३।।
दिठी राहूनु आंतुलीकडें। बाहेर पाऊल घाले कोडें।
तैं ठायीं ठाओ पडे। नासाग्रपीठीं।।२०४।।
ऐसें आंतुचा आंतुचि रचे। बाहेरीं मागुतें न वचे।
म्हणौनि राहणें आधिएं दिठीचें। तेथेंचि होये।।२०५।।
आतां दिसांची भेटी घेयावी। कां रूपाची वास पाहावी।
हे चाड सरे आघवीं। आपैसियां।।२०६।।
मग कंठनाल आटे। हणौटी हडौति दाटे।
तैं गाढी होऊनि निहटें। वक्षःस्थलीं।।६-२०७।।
माझि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपें।
तो जालांधरु म्हणिपे। पंडुकुमरा।।२०८।।
नाभी वरी पोखे। उदर हें थोंके।
आंतरी फांकें। हृदयाकोशु।।२०९।।
स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं। नाभिस्थानातलुवटीं।
बंधु पडें तो किरीटी। ओडियाणु।।२१०।।
ऐसीं शरीराबाहिरीलीकडें। अभ्यासाची पांखर पडे।
तंव आंतु त्राय मोडे। मनोधर्माची।।२११।।

कल्पना निमें। प्रवृत्ति समें।
आंगें मन विरमें। सांव्हिआंचि।।२१२।।
क्षुधा काइं जाहालिं। निद्रा केऊतिं गेलीं।
हें आठवणहिं हीरतलीं। न दिसें वेगां।।२१३।।
जो मूलबंधें कोंडला। अपानु माघौतां मुरडलां।
तो सवेंचिं वरि सांकडलां। फुगु धरिं।।२१४।।
क्षोभलेपणें माजें। उवाइलां ठाइं गाजैं।
मणिपूरैंसिं झूंजैं। राहौनियां।।२१५।।
मग थांवलीं तैं वाहुंटलीं। सैंघ होऊनि घर डहुलीं।
बालपणींचिं कुहिटुलीं। बाहेरिं घालीं।।२१६।।
भीतरिं बलिं न धरैं। कोठेआं माझिं संचरैं।
कफपित्तांचें थारैं। उरौ नेदिं।।२१७।।
धातूंचें समुद्र उलंडीं। मेदाचें पर्वत फोडिं।
आंतुलिं मज्जा काढिं। अस्थिगत।।६-२१८।।
नाडितैं सोडविं। गात्रांतैं विघडविं।
साधकांतैं भेडसविं। परि बिहावें ना।।२१९।।
व्याधितैं दाविं। सवेंचि हारविं।
आपु पृथ्वि कालविं। एंकवट।।२२०।।
तंव एरिकडें अर्जुना। आसनाचां उबारां।
शक्ति करिं उजगरां। कुंडलिणिएं।।६-२२१।।
नागाचें पिलें। कुंकुमैं नाहालें।
वलण घेऊनि आलें। सेजैं जैसें।।२२२।।
तैसिं तैं कुंडलिणि। मोटकिं औठै वलणिं।
अधोमुख सर्पिणि। निदैलिं असें।।२२३।।
विद्युल्लतेचि विडि। वह्निज्वालांचि घडि।
पन्हरेयां चोखडिं। खोटी जैसिं।।२२४।।
तैसि सुबद्ध आडलिं। पुटीं होतिं दाटलिं।
तैं वज्रासनैं चिमुटलिं। सावध होएं।।२२५।।
तेथ नक्षत्र जैसें उलंडलैं। कां सूर्याचें आसन मोडलैं।
तेजाचें बीज विरूढलैं। अंकुरैंसिं।।२२६।।
तैसिं वेढियांतैं सोडी। कावतिकैं आंग मोडिति।
कंदावरी शक्ति। ऊठिलीं दिसैं।।२२७।।
साहाजें बहुवां दिआंचिं भूक। वरि चेवविलीं तैं होय मिख।
मग आवेसें पसरविं मुख। ऊर्ध्वा उजूं।।६-२२८।।
तेथ हृदयाकाशतलुवटीं। जो पवनु भरैं किरीटी।
तेयां सगलेंयांचि मिठी। देऊनि घालीं।।२२९।।
मुखिंचां ज्वालीं। तलीं वरीं कवलीं।
मांसाचिं वडवालीं। अरोगूं लागें।।२३०।।
जैं जैं ठांय समांस। तेथ आहाच जोडें घाऊस।
पाठीं एकदोन घांस। हियांहीं भरिं।।२३१।।
मग तलुवैं तलुहाथ शोधिं। ऊर्ध्वींचें खंड भेदीं।
झाडां घें संधिं। प्रत्यांगाचां।।२३२।।

आधार तन्हैं न संडीं। परिं नखिंचेंहिं सत्त्व काढीं।
त्वचा धुवूनि जडी। पांजरेंसिं।।६-२३३।।
अस्थिंचें नलैं निरपैं। सिरांचैं हिर ओरपैं।
तंव बाहेरिं विरुढी करपैं। रोमबिजांचिं।।२३४।।
मग सप्तधातूंचां सागरिं। तान्हैलीं घोंटु भरिं।
आणि सवेंचिं उन्हाला करिं। खडखडीतु।।२३५।।
नासापुटौनि वारा। जो जात होतां आंगुलें बारा।
तो गचियें धरौनि माघारां। आंतु घालिं।।२३६।।
तेथ अध वरौतैं आकुंचैं। ऊर्ध्व तलौंतैं खांचैं।
तेआं खेंवांमाजिं चक्रांचें। पदर उरति।।६-२३७।।
एरविं तन्हैं दोनिं तेव्हांचि मिलति।
परि कुंडलिणी नांवेक दुश्चित होति।
तैं तेयांतैं म्हणें परौति। तुमिचिं कांइंसिं एथें।।२३८।।
आइकैं पर्थिव धातू आघवें।आरौगितां कांहिं नुरवैं।
आणि आपांतैं तंव ठेवें। पुसौनियां।।२३९।।
ऐसिं दोनिं भूतें खाएं। तैं वेलीं संपूर्ण धाएं।
मग सौम्य होऊनि राहें। सुषुम्नेपासिं।।२४०।।
तेथ तृप्तिचेनि संतोखें। गरल जैं वमि मुखें।
तेणें तियेचेनि पीयूखैं। प्राणु जियें।।६-२४१।।
तो आगिंआंतूनि निघें। परिं सबाह्य निववूंचि लागें।
तैं वेलीं कसु बांधिति आंगें। सांडिलां पुडुति।।२४२।।
मार्ग मोडिथि नाडीचें। नवविधपण वायूचें।
जाएं म्हणौनि शरीरिचें। धर्मु नाहीं।।६-२४३।।
इडा पिंगला एकवटथि। गांठी तिान्हिं सूटति।
साही पदर फुटथिं। चक्रांचें हें।।२४४।।
शशि आणि भानु। ऐसां कल्पिजैं जो अनुमानु।
तो वातिवरिं पवनु। गिंवसितां न दिसें।।२४५।।
बुद्धीची पुलिका वीरैं। परिमलु घ्राणिं उरैं।
तोहिं शक्तिसवें संचरैं। मध्यमेमाजिं।।६-२४६।।
तंवं वरिलेकडौनि ढालैं। चंद्रामृताचें तलैं।
कानवडौनि मिलैं। शक्तिमुखिं।।२४७।।
तेणें नातकैं रसु भरैं। तो सर्वांगामाझिं संचरैं।
जेथिंचां तेथ मुरैं। प्राणपवनु।।२४८।।
तातलिएं मुसैं। मेण निघौनि जाएं जैसें।
कोंदलीं ठाएं रसें। ओतलेनि।।६-२४९।।
तैसें पिंडाचेनि आकारैं। तैं कलाचिं कां अवतरैं।
वरि त्वचेचैनि पदरैं। पांघुरिलीं असें।।२५०।।
जैसिं आभालाचिं बूंथि। करूनि राहें गभस्ति।
मग फिटैलेयां दीप्ति। धरूं नैएं।।२५१।।
तैसां आहाचिवरिं कोरडा। त्वचेचां असे पातवडा।
तो झडौनि जाएं कोंडा। जैसां होएं।।२५२।।

मग काश्मिराचें स्वयंभ। कां रत्नबीजां निगालें कोंभ।
अवयवकांतिचिं भांभ। तैसिं दिसें।।६-२५३।।
ना तन्हैं संध्यारागिंचें रंग। काढूनि वलिलैं तैं आंग।
किं अंतर्ज्योतिचें लिंग। निर्वाललैं।।२५४।।
कुंकुआचें भरिवं। सिद्धरसाचें ओतिवं।
मज पाहतां सावेव। शांतिचि तैं।।२५५।।
तैं आनंदचित्रिचें लेप। ना तन्हैं महासुखाचें रूप।
किं संतोखतरूचें रोप। थांवलैं जैसें।।६-२५६।।
तो कनकचंपकाचां कलां। किं अमृताचां पुतलां।
नाना सांसिन्नलां मलां। कोंवलिकेचां।।२५७।।
हो कां जैं शारदियेचियें ओलैं। चंद्रबिंब पाल्हैलैं।
कां तेजचिं मूर्त बैसलैं। आसनावेरिं।।२५८।।
तैसें शरीर होएं। जै हेलीं कुंडलिनी चंद्रु पिएं।
मग देहाकृतिं बिहैं। कृदांतु गां।।२५९।।
वृद्धाप्य तन्हैं बहुडैं। तारुण्याचिं गांठि विघडैं।
लोपलीं उघडैं। बालदशा।।६-२६०।।
वयसा तन्हैं येतुलेंवरीं। एरविं बलाचां बलार्थु करिं।
धैर्याचिं थोरिं। निरुपम।।२६१।।
कनकद्रुमाचां पालविं। रत्नकलिकांचि नित्य नविं।
नखैं तैसिं बरविं। नविं निघतिं।।२६२।।
दांतहिं आन होति। परि अपाडें सांनैजति।
जैसिं दोबाहिं बैसें पातिं। हिरेयांचिं।।६-२६३।।
माणिकुलियांचियां कणियां। सावियांचि अणुमानियां।
तैसियां सर्वांगिं उधवति अणिया। रोमांचियां।।२६४।।
करचरणतलैं। जैसिं कां रातोत्पलैं।
पाखालीं होथिं डोलैं। काइं सांघों।।६-२६५।।
निडाराचेनि कोंधाटें। मोतियें नावरति संपुटैं।
मग सिवणि जैसिं उतटें। शुक्तिपल्लवांचिं।।२६६।।
तैसिं पातिचियें कवलियें ना सामाएं।
दिठी जाकलौनि निगों पाहें।
आधिलिंचिं परि होएं। गगना कलितिं।।२६७।।
आइकैं देह होएं सोनियाचें। परि लाघौं ऐं वायूचें।
जैं पृथ्वि आन आपाचें। अंशु नाइं।।६-२६८।।
मग समुद्रापैलाडिं देखैं। स्वर्गिंचां आलोचु आइकैं।
मनोगत ओलखैं। मुंगियेचें।।२६९।।
पवनाचां वारिकां वलघैं। चालैं तन्हैं उदकिं पाऊल न लगैं।
एणें बहु काइं प्रसंगैं। होति सिद्धि।।२७०।।
आइकैं प्राणाचां हातु धरौनि। गगनाचिं पाऊटी करौनि।
मध्यमेचेनि दादरैंहूनि। हृदयां आलीं।।६-२७१।।
तैं कुंडलिणी जगदम्बा। जैं चैतन्यचक्रवर्तिचिं शोभा।
जियां विश्वबिजांचियां। कोंभा। साऊली केलीं।।२७२।।

जैं प्राणाचिं उघडीं। जन्मभूमि।।२७३।।
हें असो तैं कुंडली। हृदयां आंतु आली।
तंव अनाहताचि बोलिं चावलैं तैं।।२७४।।
शक्तिचियां आंगां लागलैं। बुद्धिचें चैतन्य होतें जालें।
तेणे तैं आइकिलैं। आलुमालु।।२७५।।
घोषांचां कुंडीं। नादचित्रांचि रुपडीं।
प्रणवाचियां मोडीं। रेखिलीं जैंसिं।।२७६।।
हेंचि कल्पावें तन्हीं जाणिजैं। परि आतां कल्पितें कैंचें आणिजैं।
तन्हैं नेणों काइं वाजैं। तेयां ठायां।।२७७।।
विसरौनि गेलों अर्जुना। जंव नासु नाइं पवना।
तंव वाचा आथि गगना। म्हणोनि घुमैं।।२७८।।
तेयां अनाहताचेनि मेघैं। आकाश दुदुमौं लागैं।
तवं ब्रह्मस्थानिंचें बेगें। फीटैं साहाजैं।।२७९।।
आइकैं कमलगर्भाकारैं। जैं महदाकास दुसरैं।
जेथ चैतन्य आथुधुरैं। करौनि असिजैं।।६-२८०।।
तेयां हृदयाचां परिवरिं। कुंडलिणियां परमेश्वरिं।
तेजाचिं सिधौरिं। विनियोगिलीं।।२८१।।
बुद्धिचेनि शाकैं। हातबोनें नीकैं।
द्वैत जेथ न देखैं। तैसें केलें।।२८२।।
आइसिं निजकांति हारविलिं। मग प्राणुचि केवल जाहालीं।
तैं हेलीं कैसिं गमलीं। म्हणाविं पां।।६-२८३।।
हो कां जैं पवनाचि पुतली। पांगुतिलीं होति सोनेसलीं।
तैं फेडूनियां वेगलीं। ठेविलीं तिएं।।२८४।।
ना तन्हैं वारआचेनि आंगैं झगटलीं। दीपाचिं दिठी निमुटिलीं।
कां लखलखौनि हारपलीं। विजू गगनिं।।२८५।।
तैसिं हृदयकमलवेन्हीं। दिसैं सोनियाचि जैसिं सरी।
ना तन्हैं प्रकाशजलाचिं झरिं। वाहांति आली।।२८६।।
मग तियें हृदयभूमिं पोकलैं। जिरालीं कां एकैं हेलें।
ऐसें शक्तिचें रूप मावलैं। शक्तिचि माझिं।।२८७।।
तेव्हां तन्हीं शक्तिचि म्हणिजैं।
एरविं तो प्राणु केवलु जाणिजैं।
आतां नादबिंदु नेणिजैं। कला ज्योति।।२८८।।
मनाचां हान मारु। कां पवनाचां धरुं।
ध्यानाचां आदरुं। नाना परीं।।२८९।।
हें कल्पना घें सांडिं। तैं नाइं इयें परवडिं।
हें महाभूतांचिं फुडी। आटणी देखां।।२९०।।
पिंडें पिंडाचां ग्रासु। तो हां नाथसंकैतिंचां दंसु।
परि दाऊनि गेला उद्देसु। माहाविष्णु।।२९१।।
तेयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाचिं घडी झाडूनि।
उपलविलीं मियां जाणूनि। ग्राहिक श्रोते।।६-२९२।।

आइकैं शक्तीचैं रुप लोपैं। तेथ देहिंचें रुप हारपैं।
मग तो डोलियांचिमाझिं लपैं। जगाचियां।।६-२९३।।
यरविं आदिलांचि ऐसें। सावयव तन्हैं असें।
परि वायूचें कां जैसें। वलिलैं होएं।।२९४।।
ना तन्हैं कर्दलीचां गाभां। बुंथि सांडौनि उभा।
कां अवयवचि नभां। निवडलां जो।।२९५।।
तैसें होए शरीरु। तैं तैं म्हणिजैं खैंचरुं।
हें पद होतां चमत्कारुं। पिंडु जनिं।।६-२९६।।
देखैं साधकु निगौनि जाएं। माघां पाऊलांचि ओलि राहैं।
तेथ ठाईं ठाईं होएं। आणिमादिकिं।।२९७।।
पन्हैं तेणें काइं काज आपणेयां। अवधारीं आइसां धनंजया।
लोप आथि भूतत्रेआं। देहिंचा देहीं।।६-२९८।।
पृथिवितैं आपु विरविं। आपांतैं तेजु जिरविं।
तेजातैं पवनु हारविं। हृदयामाझिं।।२९९।।
पाठिं आपण एकलां उरैं। परि शरिराचेनि अनुकारैं।
तोहिं निगैं अंतरैं। गगनां मिलैं।।३००।।
तैं हेलीं कुंडलिणी हें भाख जाएं। मारुत आइसैं नाम लाएं।
परि शक्तिपण तैं आहें। जंव न मिलैं शिविं।।३०१।।
मग जालांधर सांडिं। ककारांत फोडिं।
गगनाचिएं पाहाडिं। पैठिं होएं।।६-३०२।।
तैं ॐकाराचिएं पाठिं। पाएं देत उठाउठिं।
पश्यंतिचिएं पाउटीं। माघां घालिं।।३०३।।
फुडां तन्मात्रा अर्धवेरिं। आकासाचां आंतरिं।
भरति गमैं सागरिं। सरितां जैसिं।।३०४।।
मग ब्रह्मरंध्रिं थिराओनि। सोऽहंभावाचियां बाह्या पसरौनि।
परमात्मलिंगा धांओनि। आंगां घडें।।३०५।।
तंव महां भूतांचि जवनिक फिटैं। मग दोघांसिहिं होय झटैं।
तेथ गगनासगट आटैं। समरसिं तिएं।।३०६।।
पैं मेघाचेनि मुखैं निवडलां। समुद्रु कां ओघिं पडिलां।
तो माघुतां जैसां आला। आपणपेआं।।६-३०७।।
तेंविं पिंडाचेनि मिखैं। पदीं पद प्रवेशें।
तैं एकत्व होएं तैसें। पंडुकुमरां।।३०८।।
आतां दुजैं हान होतें। किं एकचिं हें आइतैं।
ऐसिएं विवंचनेपुरतैं। उरेचि ना।।६-३०९।।
गगनिं गगन लयां जाएं। आइसें जैं काइं आहे।
तैं अनुभवैं जो होऐं। तो होऊनि ठाकैं।।३१०।।
म्हणौनि तेथिंचिं मातु। न चडेचि बोलाचां हातु।
जेणें संवादाचिआं गांवांआंतुं। पैठी किजैं।।६-३११।।
अर्जुना एरविं तन्हैं। एआं अभिप्रायाचां गर्वु धरिं।
तैं पाये पां वैखरिं। दूरिं ठेलिं।।३१२।।

भ्रूलता माघिलिकडें। मकाराचेचि आंग न मांडें।
सडेयां प्राणा सांकडें। गगना एतां।।३१३।।
पाठिं तेथेंचिं तो भांसललां। तवं शब्दाचां दिओ मावललां।
मग तेयांहि वरिं आटु भविनला। आकासाचां।।३१४।।
आतां महाशुन्याचां डोहिं। गगनासिंचि थाउं नाइं।
तेथ तागा लागैल काइं। इयां बोलाचां।।३१५।।
म्हणऊनि आखरामाझिं सांपडें। किं कानवेरिं जोडें।
हें तैसें नोहें फुडें। त्रिशुद्धि मां।।६-३१६।।
जैं कंहिं दैवें। अनुभविलें फांकवै।
तैं आपणचि हें ठाकावैं। होओनिआं।।३१७।।
पुडुति जाणणें तैं नाइं चिं। म्हणौनि असो केती हें चिं।
बोलावैं आतां वांयांचिं। धनुर्द्धरां।।३१८।।
आइसें शब्दजात माघौतैं फिरैं। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरैं।
वाराहिं जेथ न शिरैं। विचाराचां।।६-३१९।।
जैं उन्मनियेचें लावण्य। जैं तुरियेचें तारुण्य।
अनादि जैं अगण्य। परमतत्त्व।।६-३२०।।
जैं आकाराचां प्रांतु। जैं मोक्षाचां एकान्तु।
जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलें।।३२१।।
जैं विश्वाचें मूल। जैं योगद्रुमाचें फल।
जैं आनंदाचें केवल। चैतन्य गां।।३२२।।
जैं महाभूतांचे बीज। जैं महातेजाचें तेज।
एवं पार्था जैं निज। स्वरूप माझें।।३२३।।
हं चतुर्भुज कौंभैलिं। जेयांचिं शोभा रूपां आलीं।
देखौनि नास्तिकीं नोकिलीं। साधुवृंदें।।३२४।।
तै अनिर्वाच्य माहासुख। आपणचिं जाहालैं जैं पुरुष।
जेयांचें कां निष्कर्ष। प्राप्तिवेरिं।।३२५।।
आम्हिं साधन जैं हें सांघितलें। तैंचि शरीरीं जिहिं केलें।
तैं आमचेन पाडें आलें। निर्वाललेयां।।३२६।।
परब्रह्माचेनि रसें। देहाकृतिचेनि मुसैं।
ओतिवं जालें तैसें। दिसथि आंगैं।।३२७।।
ना तऱ्हीं प्रतीति हान आंतरिं फांकैं।
तऱ्हैं विश्वचि हें आघवैं झांकैं।
तंव अर्जुन म्हणें नीकैं। सांचचि हें।।३२८।।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::परिशिष्ट क्र.-२::

पंथराजाच्या ज्ञानदेवीतील अभ्यासोपयोगी नवनिर्धारित क्रमानुसार ओव्या

::"अर्जुना हां अवधारिं। पंथराजु"::

१) वैराग्य::::

यमनियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार साध्य झाला की (ओ.क्र.६-५४ ते ५६) :

ऐसां पवनाचेनि पाठारैं। एतां धारणेचेनि पैसारैं।
क्रमीं ध्यानाचे चवरैं। सांडैं तंव।।
नखीं लगेल ढाले ढालैं वैराग्याची।। ...।
होय विरक्तु ऐसां अनंतां। भरंवसा जाहाला।।६-१५०।।
म्हणें जैं जैं हां अधिष्ठिल। तैं आतां आरंभीच एआं फलैल।
म्हणौनि सांघितलां न वचैल। अभ्यासु वांयां।।१५१।।
ऐसें विवरौनियां श्रीहरि। म्हणितलें तियें अवस्वरिं।
अर्जुना हां अवधारिं। पंथराजु।।१५२।।
जेथ प्रवृत्तितरूंचां बुडीं। दिसती निवृत्तिफलांचियां कोडीं।
जियें मार्गींचा कापडी। महेशु आझुइं।।६-१५३।।
पैं योगिवृंदें वहिलीं। आडविं आकासिं निगालिं।
किं तेथ अनुभवाचां पाऊलिं। धोरणु पडिलां।।१५४।।
तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतलीं एकसरें।
कीं एर सगळे मार्ग निदसुरें। सांडूनियां।।१५५।।
पाठीं महर्षि एणें आले। साधकांचे सिद्ध झालें।
आत्मविद थोरावलें। एणेंचि पंथें।।१५६।।
हा मार्गु जैं देखिजे। तैं तहानभूक विसरिजे।
रात्रिदिवस नेणिजे। वाटें इयें।।१५७।।
चालतां पाऊल जेथ पडे। तेथ अपवर्गाची खाणि उघडे।
आव्हांटलियां तऱ्हीं जोडे। स्वर्गसुख।।१५८।।
निगिजें पूर्वीलियां मोहरां। कीं येईजे पश्चिमेचियां घरां।
निश्चलपणें धनुर्धरा। चालणें येथिंचे।।१५९।।
एणें मार्गें जेयां ठायां जाईजे। तो गांवो आपण होईजे।
हे सांगो काय सहजें। जाणसीं तूं।।१६०।।

२) स्थान::::

म्हणौनि तैसे एक लागेल। स्थान पाहावे।।६-१६३।।
जेथ आराणुकेचेनि कोडें। बैसलियां उठो नावडे।
वैराग्यासीं दुणीव चढें। देखिलियां जैं।।१६४।।

जो संतीं वसविला ठावो। संतोषासि सावेव।
मना होय उत्सावो। धैर्याचां।।१६५।।
अभ्यासुचि आपणयांतैं करी। हृदयांतैं अनुभव वरी।
ऐसीं रम्यपणाची थोरी। अखंड जेथ।।१६६।।
जेयां आड जातां पार्था। तपश्चर्या मनोरथा।
पाखंडियांही आस्था। समूल होय।।१६७।।
स्वभावें वाटे येतां। जऱ्हीं वरपडा जालां अवचितां।
तऱ्हीं सकामुही परि माघौतां। निघों विसरें।।१६८।।
ऐसें न राहातयांतेही राहावीं। भ्रमतयांतेंही बैसवीं।
थोपटोनि चेववी। विरक्तीतैं।।१६९।।
हे राज्य वर सांडिजै। मग निवांत एथेचि असिजै।
ऐसें शृंगारियांही उपजैं। देखतखेवों।।१७०।।
जैं एणें मानें बरवंट। आणि तैसेंचि अति चोखट।
जेथ अधिष्ठान प्रकट। डोळां दिसें।।१७१।।
आणिकही एक पाहावे। जैं साधकीं वसतें होआवें।
आणि जनाचेनि पायरवें। मैलेचि ना।।६-१७२।।
जेथ अमृताचेनि पाडें। मुलाहिसकट गोडें।
जोडिती दाट झाडें। सदा फलती।।१७३।।
पाऊलां पाऊलां उदकें। परि वर्षाकालींही चोखें।
निर्झरें कां विशेषें। सुलभें जेथें।।१७४।
हा आतपुही अलुमालु। जाणिजैं तऱ्हीं शीतलु।
पवनु अति निश्चलु। मंद झुलुकें।।१७५।।
बहुतकरूनि निःशब्दु। दाट न रिगे श्वापदु।
शुक हन षट्पदु। तेऊंतें नाहीं।।१७६।।
पाणिलगें हंसें। दोनीं चारीं सारसें।
कवणें एकें वेलें बैसें। तऱ्हीं कोकील हे।।१७७।।
निरंतर नाहीं। तऱ्हीं आली गेली कंहीं।
होतु कां मयूरेंही। आम्हीं ना न म्हणो।।१७८।।
परि आवश्यक पांडवा। ऐसा ठाओ जोडावा।
तेथ निगूढ मठ होवावा। कां शिवालय।।१७९।।
दोनींमाजि आवडे तैं। जैं मानिलें होय चित्तें।
बहुतकरूनि एकांतें। बैसिजें गां।।१८०।।
म्हणौनि तैसें तैं जाणावें। मन राहातें पाहावें।..।।१८१..।।

३) आसन::::

राहेल तेथ रचावें। आसन ऐसें।।६-१८१।।
वरी चोखट मृगसेवडी। माजीं धूतवस्त्राची घडी।
तलुवटीं अमोडीं। कुशांकुर।।१८२।।
सकोमल सरिसें। सुबद्ध राहती आपैसें।
एक पाडें तैसें। वोजा घालीं।।१८३।।
परि सांवियांचि उंच होईल। तऱ्हीं आंग हन डोलेल।
नीच तऱ्हीं पावेल। भूमिदोषु।।१८४।।
म्हणौनि तैसें न करावें। समभागें धरावें।
हे बहु असो होआवें। आसन ऐसें।।१८५।।

४)धारणा::::

मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण।
करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे।।६-१८६।।
तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्त्विकें भरें।
जंव कठिणपण विरे। अहंभावाचें।।१८७।।
विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। हृदयामाजि।।१८८।।
ऐसें ऐक्य हे सहजें। फांवें तंव राहिजे।
मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी।।१८९।।
आतां अंगांतैं अंग धरी। पवनांतैं पवनुचि वरी।
ऐसीं अनुभवाचीं उजरी। होंचि लागे।।१९०।।
प्रवृत्ति माघौति मोहरे। समाधि ऐलाडीं उतरें।
आघवें अभ्यासूं सरे। बैसतखेंवों।।१९१।।

५)मुद्रा::::

मुद्रेची प्रौढी ऐशी । तैंचि सांघिजैल आतां परियेसीं।
तऱ्हीं उरु या जघनासीं। जडौनि घाली।।६-१९२।।
चरणतले देव्हडीं। आधारद्रुमाच्या बुडीं।
सुघटित गाढीं। संचरीं पां।।१९३।।
सव्य तो तलीं ठेविजे। तेणें सिवणीमध्य पीडिजे।
वरी बैसें तो सहजें। वामचरणु।।१९४।।
गुदमेढ्रांआंतौतीं। चारीं अंगुलें निगुतीं।
तेथ सार्ध सार्ध प्रांतीं। सांडूनियां।।१९५।।
माजीं अंगुल एक निगे। तेथ टांचेचेनि उत्तरभागें।
नेहटिजे वरी आंगें। पेललेनि।।१९६।।

उचलिजे कां नेणिजे। तैसें पृष्ठांत उचलिजे।
गुल्फद्वय धरिजे। तेणेंचि मानें।।१९७।।
मग शरीरसंचु पार्था। अशेषुहि सर्वथा।
पार्ष्णीचा माथां। स्वयंभु होय।।१९८।।

६)वज्रासन व मूळबंधः:::

अर्जुना हे जाण। मूलबंधाचें लक्षण।
वज्रासन गौण। नाम यासीं।।१९९।।
ऐसिं आधारिं मुद्रा पडें। आणि अधींचा मार्गु मोडें।
तेथ अपानु आंतुलीकडें। वोहटूं लागैं।।२००।।
तंव करसंपुट आपैसें। वामचरणीं बैसें।
बाहूमुलीं दिसे। थोरीव आली।।६-२०१।।
माजीं उभारलेनि दंडें। शिरकमल होय गाढें।

७) अंतर्दृष्टी आज्ञाचक्रावरः:::

वरचिलें पातीं ढलती। तलींचीं तलीं पुंजालती।
नेत्राद्वारींचीं कवाडें। लागूं पाहती।।२०२।।
तेथ अर्धोन्मिलित स्थिती। उपजे तेयां।।२०३।।
दिठी राहूनि आंतुलीकडें। बाहेर पाऊल घाले कोडें।
तैं ठायीं ठाओ पडे। नासाग्रपीठीं।।२०४।।
ऐसें आंतुचा आंतुचि रचे। बाहेरीं मागुतें न वचे।
म्हणौनि राहणें आधिये दिठीचें। तेथेंचि होये।।२०५।।
आतां दिसांची भेटी घ्यावी। कां रूपाची वास पाहवी।
हे चाड सरे आघवीं। आपैसियां।।२०६।।

८) जालंधर व वोढियाणा बंधः:::

मग कंठनाल आटे। हनुवटी हे हडौति दाटे।
तैं गाढी होऊनि नेहटें। वक्षःस्थलीं।।६-२०७।।
माजि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपें।
तो जालंधरु म्हणिपे। पांडुकुमरा।।२०८।।
नाभी वरी पोखे। उदर हें थोके।
अंतरी फांकें। हृदयाकाशु।।२०९।।
स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं। नाभिस्थानातलुवटीं।
बंधु पडें तो किरीटी। वोढियाणा।।२१०।।
ऐसीं शरीराबाहिरीलीकडें। अभ्यासाची पांखर पडे।..।।२११।।

९) अभ्यासाची एकाग्रताः:::

तंव आंतु त्राय मोडे। मनोधर्माची।।२११।।
कल्पना निमें। प्रवृत्ति समें।
आंग मन विरमें। सांवियांचि।।२१२।।
क्षुधा काइं जाहालिं। निद्रा केऊतिं गेलीं।
हें आठवणहिं हीरतलीं। न दिसें वेगां।।२१३।।

१०) अपानाचे मुरडणे, व्याधींचा उद्भव व नाडिशुद्धीः:::

जो मूलबंधें कोंडला। अपानु माघौतां मुरडलां।
तो सवेंचिं वरिं सांकडलां। फुगु धरिं।।२१४।।
क्षोभलेपणें माजें। उवाइलां ठाईं गाजैं।
मणिपूरैंसिं झूंजैं। राहौनियां।।२१५।।
मग थांवलीं तैं वाहुंटलीं। सैंघ होऊनि घर डहुलीं।
बालपणींचिं कुहिटुलीं। बाहेरिं घालीं।।२१६।।
भीतरिं बलिं न धरैं। कोठेआं माझिं संचरैं।
कफपित्तांचें थारैं। उरौ नेदिं।।२१७।।
धातूंचें समुद्र उलंडीं। मेदाचें पर्वत फोडिं।
आंतुलिं मज्जा काढिं। अस्थिगत।।६-२१८।।
नाडितैं सोडविं। गात्रांतैं विघडविं।
साधकांतैं भेडसविं। परि बिहावें ना।।२१९।।
व्याधितैं दाविं। सवेंचि हारविं।...।।२२०।।

११) पृथ्वी व आपतत्त्वाची सरमिसळः:::

आपु पृथ्वि कालविं। एंकवट।।२२०।।

१२) कुंडलिनी वर्णनः:::

तंव एरिकडें अर्जुना। आसनाचां उबारां।
शक्ति करिं उजगरां। कुंडलिणिएं।।६-२२१।।
नागाचें पिलें। कुंकुमैं नाहालें।
वलण घेऊनि आलें। सेजैं जैसें।।२२२।।
तैसिं तैं कुंडलिणि। मोटकिं औठैवलणिं।
अधोमुख सर्पिणि। निदैलिं असें।।२२३।।
विद्युल्लतेचि विडि। वह्निज्वालांचि घडि।
पन्हरेयां चोखडिं। खोटी जैसिं।।२२४।।
तैसिं सुब्द्ध आडलिं। पुटीं होतिं दाटलिं।
तैं कुंडलिणी जगदम्बा। जैं चैतन्यचक्रवर्तिचिं शोभा।
जैं प्राणाचिं उघडीं।जन्मभूमि।।२७३।।
जियां विश्व बिजांचियां कोंभा। साऊली केलीं।।२७२।।

१३) कुंडलिनी जागृतीः:::

तैं वज्रासनैं चिमुटलिं। सावध होएं।।२२५।।
तेथ नक्षत्र जैसें उलंडलैं। कां सूर्याचें आसन मोडलैं।
तेजाचें बीज विरूढलैं। अंकुरैंसिं।।२२६।।
तैसिं वेढियांतैं सोडी। कावतिकैं आंग मोडिति।
कंदावरी शक्ति। ऊठिलीं दिसैं।।२२७।।
साहाजें बहुवां दिआंचिं भूक। वरि चेवविलीं तैं होय मिख।
मग आवेसें पसरविं मुख। ऊर्ध्वा उजूं।।६-२२८।।

१४) पवनाचा कुंडलिनीत लय::::

तेथ हृदयाकाशतलुवटीं। जो पवनु भरैं किरीटी।
तेयां सगलेंयांचि मिठी। देऊनि घालीं।।२२९।।

१५) शरीरस्थ सर्व गौण चक्रांचा वेध::::

शरीरात वेगवेगळी अनेक चक्रे असतात. त्यांचा संबंध इतरेतर अवयवांशी, धातू, मज्जा इ.शी असतो. कुंडलिनी त्या सर्वांचा वेध करते असा भावार्थ आहे.

मुखिंचां ज्वालीं। तलीं वरीं कवलीं।
मांसाचिं वडवालीं। अरोगूं लागें।।२३०।।
जैं जैं ठांय समांस। तेथ आहाच जोडें घाऊस।
पाठीं एकदोन घांस। हियांहीं भरिं।।२३१।।
मग तलुवैं तलुहाथ शोधिं। ऊर्ध्वीचें खंड भेदीं।
झाडां घें संधिं। प्रत्यांगाचां।।२३२।।
आधार तन्हैं न संडीं। परिं नखिंचेंहिं सत्त्व काढीं।
त्वचा धुवूनि जडी। पांजरेंसिं।।६-२३३।।
अस्थिंचें नलैं निरपैं। सिरांचैं हिर ओरपैं।
तंव बाहेरिं विरुढी करपैं। रोमबिजांचिं।।२३४।।
मग सप्तधातूंचां सागरिं। तान्हैलीं घोंटु भरिं।
आणि सवेंचिं उन्हाला करिं। खडखडीतु।।२३५।।

१६) पृथ्वी व आपतत्त्वांचे कुंडलिनीत समावणे व सुषुम्नेत प्रवेशाची स्थिती::::

आइकैं पर्थिव धातू आघवें।आरौगितां कांहिं नुरवैं।
आणि आपांतैं तंव ठेवें। पुसौनियां।।२३९।।
तेथ तृप्तिचेनि संतोखें। गरल जैं वमि मुखें।
तेणें तियेचेनि पीयूखैं। प्राणु जियें।।६-२४१।।
तो आगिंआंतूनि निघें। परिं सबाह्य निववूंचि लागें।
तैं वेलीं कसु बांधिति आंगें। सांडिलां पुडुति।।२४२।।
ऐसिं दोनिं भूतें खाएं। तैं वेलीं संपूर्ण धाएं।
मग सौम्य होऊनि राहें। सुषुम्नेपासिं।।२४०।।

१७) चक्रांचा वेध व नाममात्र उरणे::::

मार्ग मोडिथि नाडीचें। नवविधपण वायूचें।
जाएं म्हणौनि शरीरिचें। धर्मु नाहीं।।६-२४३।।
इडा पिंगला एकवटथि। गांठी तिान्हिं सूटति।
साही पदर फुटथिं। चक्रांचें हें।।२४४।।
तेआं खेंवांमाजिं चक्रांचें। पदर उरति।।६-२३७।।

१८) नासापुटातील इडा व पिंगला नाड्यांची मिळणी::::

नासापुटौनि वारा। जो जात होतां आंगुलैं बारा।
तो गचियें धरौनि माघारां। आंतु घालिं।।२३६।।
शशि आणि भानु। ऐसां कल्पिजैं जो अनुमानु।
तो वातिवरिं पवनु। गिंवसितां न दिसें।।२४५।।
यरविं तन्हैं दोनिं तेव्हांचि मिलति।
परि कुंडलिणी नांवेक दुश्चित होति।
तैं तेयांतैं म्हणें परौति। तुमिचिं कांइंसिं एथें।।२३८।।

१९) बुद्धी व वायुतत्त्वाचे कुंडलिनीत सामावणे व सुषुम्नाप्रवेश::::

बुद्धीची पुलिका वीरैं। परिमलु घ्राणिं उरैं।
तोहिं शक्तिसवें संचरैं। मध्यमेमाजिं।।६-२४६।।

२०) इडेच्या टोकावरले चंद्रामृताचे तळे कलंडणे व त्याचा रस कुंडलिनीने पिणे::::

तंवं वरिलेकडौनि ढालैं। चंद्रामृताचें तलैं।
कानवडौनि मिलैं। शक्तिमुखिं।।२४७।।
जै हेलीं कुंडलिनी चंदु पिएं।
तेणें नातकैं रसु भरैं। तो सर्वांगामाझिं संचरैं।
जेथिंचां तेथ मुरैं। प्राणपवनु।।२४८।।

२१) पिंडाचे सिद्धदेहात परिवर्तन::::

तातलिएं मुसैं। मेण निघौनि जाएं जैसें।
कोंदलीं ठाएं रसें। ओतलेनि।।६-२४९।।
तैसें पिंडाचेनि आकारें। तैं कलाचिं कां अवतरैं।
वरि त्वचेचैनि पदरैं। पांघुरिलीं असें।।२५०।।
जैसिं आभालाचिं बूंथि। करूनि राहें गभस्ति।
मग फिटैलेयां दीप्ति। धरूं नैएं।।२५१।।
तैसां आाहाचिवरिं कोरडा। त्वचेचां असे पातवडा।
तो झडौनि जाएं कोंडा। जैसां होएं।।२५२।।
मग काश्मिराचें स्वयंभ। कां रत्नबीजां निगालें कोंभ।
अवयवकांतिचिं भांभ। तैसिं दिसें।।६-२५३।।
ना तन्हैं संध्यारागिंचें रंग। काढूनि वलिलैं तैं आंग।
किं अंतर्ज्योतिचें लिंग। निर्वाललैं।।२५४।।
कुंकुआचें भरिवं। सिद्धरसाचें ओतिवं।
मज पाहतां सावेव। शांतिचि तैं।।२५५।।
तैं आनंदचित्रिचें लेप। ना तन्हैं महासुखाचें रूप।
किं संतोखतरूचें रोप। थांवलैं जैसें।।६-२५६।।
तो कनकचंपकाचां कलां। किं अमृताचां पुतलां।
नाना सांसिन्नलां मलां। कोंवलिकेचां।।२५७।।
हो कां जैं शारदियेचियें ओलैं। चंद्रबिंब पाल्हैलैं।
कां तेजचिं मूर्त बैसलैं। आसनावेरिं।।२५८।।
........तैसें शरीर होएं।
मग देहाकृतिं बिहैं। कृदांतु गां।।२५९।।
वृद्धाप्य तन्हैं बहुडैं। तारुण्याचिं गांठि विघडैं।
लोपलीं उघडैं। बालदशा।।६-२६०।।

वयसा तऱ्हैं येतुलेंवरीं। एरविं बलाचां बलार्थु करिं।
धैर्याचिं थोरिं। निरुपम।।२६१।।
कनकद्रुमाचां पालविं। रत्नकलिकांचि नित्य नविं।
नखैं तैसिं बरविं। नविं निघतिं।।२६२।।
दांतहिं आन होति। परि अपाडें सांनैजति।
जैसिं दोबाहिं बैसें पातिं। हिरेयांचिं।।६-२६३।।
माणिकुलियांचियां कणियां। सावियांचि अणुमानियां।
तैसियां सर्वांगिं उधवति अणिया। रोमांचियां।।२६४।।
करचरणतलैं। जैसिं कां रातोत्पलैं।
पाखालीं होथिं डोलैं। काइं सांघों।।६-२६५।।
निडाराचेनि कोंधाटें। मोतियें नावरति संपुटैं।
मग सिवणि जैसिं उतटें। शुक्तिपल्लवांचिं।।२६६।।
तैसिं पातिचियें कवलियें ना सामाएं।
दिठी जाकलौनि निगों पाहें।
आधिलिंचिं परि होएं। गगना कलितिं।।२६७।।
आइकैं देह होएं सोनियाचें। परि लाधौं ऐं वायूचें।
जैं पृथ्वि आन आपाचें। अंशु नाइं।।६-२६८।।

<u>*२२) सिद्धींचा अभिभव::::*</u>

मग समुद्रापैलाडिं देखैं। स्वर्गिंचां आलोचु आइकैं।
मनोगत ओलखैं। मुंगियेचें।।२६९।।
पवनाचां वारिकां वलघैं। चालैं तऱ्हैं उदकिं पाऊल न लगैं।
एणें बहु काइं प्रसंगैं। होति सिद्धि।।२७०।।

<u>*२३) पवनाची मेळणी झाल्यानंतर कुंडलिनीचे मध्यमामार्गे हृदयात (आज्ञाचक्रावरील अवकाशात) महदाकाशात उत्क्रमण व पश्यंति-विशुद्धीचक्रक्रमण::::*</u>

मग जालांधर सांडिं।...।।३०३।।
पश्यंतिचिएं पाउटीं। माघां घालिं।।३०३।।
आइकैं प्राणाचां हातु धरौनि। गगनाचिं पाऊटी करौनि।
मध्यमेचेनि दादरैहूनि। हृदयां आलीं।।६-२७१।।

<u>*२४) अनाहतनादप्राकट्य::::*</u>

हें असो तैं कुंडली। हृदयां आंतु आलीं।
तंव अनाहताचि बोलिं। चावलैं तैं।।२७४।।

<u>*२६) सहस्त्रदलकमलातील चैतन्याचा आविर्भाव::::*</u>

<u>आइकैं कमलगर्भाकारैं। जैं महदाकास दुसरैं।</u>
<u>जेथ चैतन्य आथुधुरैं। करौनि असिजैं</u>।।६-२८०।।
तेणे तैं आइकिलैं। आलुमालु।।२७५।।

<u>*२७) तेजस्तत्त्वाचा लय::::*</u>

शक्तिचियां आंगां लागलैं। बुद्धिचें चैतन्य होतें जालें।..।।२७५।।
तेयां हृदयाचां परिवरिं। कुंडलिणियां परमेश्वरिं।..।।२८१।।
बुद्धिचेनि शाकैं। हातबोनें नीकैं।..।।२८२।।
तेजाचिं सिधौरिं। विनियोगिलीं।।२८१।।

<u>*२८) लयक्रम::::*</u>

<u>पृथिवितैं आपु विरविं। आपांतैं तेजु जिरविं।</u>
<u>तेजातैं पवनु हारविं। हृदयामाझिं</u>।।२९९।।
लोप आथि भूतत्रेआं। देहिंचा देहीं।।६-२९८।।
विसरौनि गेलों अर्जुना। जंव नासु नाइं पवना।
तंव वाचा आथि गगना। म्हणोनि घुमैं।।२७८।।

<u>*२९) शक्तीचे रूप मावळणे व पवन–मारुत रूपात संक्रमण::::*</u>

आइसिं निजकांति हारविलिं। मग प्राणुचि केवल जाहालीं।
तैं हेलीं कैसिं गमलीं। म्हणाविं पां।।६-२८३।।
हो कां जैं पवनाचि पुतली। पांगुतिलीं होति सोनेसलीं।
तैं फेडूनियां वेगलीं। ठेविलीं तिएं।।२८४।।
ना तऱ्हैं वारआचेनि आंगैं झगटलीं। दीपाचिं दिठी निमुटिलीं।
कां लखलखौनि हारपलीं। विजू गगनिं।।२८५।।
<u>तैसिं हृदयकमलवेऱ्हीं। दिसैं सोनियाचि जैसिं सरी।</u>
<u>ना तऱ्हैं प्रकाशजलाचिं झरिं। वाहांति आली</u>।।२८६।।
<u>मग तियें हृदयभूमिं पोकलैं। जिरालीं कां एकैं हेलें।</u>
<u>ऐसें शक्तिचें रूप मावलैं। शक्तिचि माझिं</u>।।२८७।।
तेव्हां तऱ्हीं शक्तिचि म्हणिजैं।
एरविं तो प्राणु केवलु जाणिजैं।।२८८।।

<u>*३०) मारुत अवस्था::::*</u>

तैं हेलीं कुंडलिणी हें भाख जाएं। मारुत आइसैं नाम लाएं।
परि शक्तिपण तैं आहें। जंव न मिलैं शिविं।।३०१।।

<u>*३१) खेचर स्थिती::::*</u>

आइकैं शक्तीचैं रूप लोपैं। तेथ देहिंचें रुप हारपैं।
मग तो डोलियांचिमाझिं लपैं। जगाचियां।।६-२९३।।
यरविं आदिलांचि ऐसें। सावयव तऱ्हैं असें।
परि वायूचें कां जैसें। वलिलैं होएं।।२९४।।
ना तऱ्हैं कर्दलींचां गाभां। बुंथि सांडौनि उभा।
कां अवयवचि नभां। निवडलां जो।।२९५।।
तैसें होए शरीरु। तैं तैं म्हणिजैं खेंचरुं।
हें पद होतां चमत्कारुं। पिंडु जनिं।।६-२९६।।
देखैं साधकु निगौनि जाएं।
माघां पाऊलांचि ओलि राहैं।..।।२९७।।

<u>*३२) अणिमादी सिद्धींची प्राप्ती::::*</u>

तेथ ठाईं ठाईं होएं। आणिमादिकिं।।२९७।।
पऱ्हैं तेणें काइं काज आपणेयां। अवधारिं आइसां धनंजया।

३३) भ्रमरगुंफेत नादाचा आविर्भाव::::

भ्रूलता माघिलिकडें। मकाराचेचि आंग न मांडें।...।।३१३।।
फुडां तन्मात्रा अर्धवेरि। आकासाचां आंतरि।..।।३०४।।
सडेयां प्राणा सांकडें। गगना एतां।।३१३।।
तेयां अनाहताचेनि मेधैं। आकाश डुमडुमौं लागैं।..।।२७९।।
घोषांचां कुंडीं। नादचित्रांचि रुपडीं।
प्रणवाचियां मोडीं। रेखिलीं जैंसिं।।२२६।।
तवं ब्रह्मस्थानिंचें बेगें। फीटैं साहाजैं।।२७९।।
हेंचि कल्पावें तन्हीं जाणिजैं। परि आतां कल्पितैं कैंचैं आणिजैं।
तन्हैं नेणों काइं वाजैं। तेयां ठायां।।२२७।।

३४) मरुल्लय::::

पाठिं आपण एकलां उरैं। परि शरिराचेनि अनुकारैं।
तोहिं निगैं अंतरैं। गगनां मिळैं।।३००।।
पाठिं तेथेंचिं तो भांसललां। तवं शब्दाचां दिओ मावललां।

३५) आकाशतत्त्वाचा लय::::

मग तेयांहि वरिं आटु भविनला। आकासाचां।।३१४।।

३६) उन्मनीपलीकडील स्थिती :आज्ञाचक्रोपरांत ॐकार(मन, हंस,बुद्धी वरील)::::

तैं ॐकाराचिएं पाठिं। पाएं देत उठाउठिं।
गगनाचिएं पाहाडिं। पैठिं होएं।।६-३०२।।
आतां नादबिंदु नेणिजैं। कला ज्योति।।२८८।।

३७) अध: कुंडलिनी व ऊर्ध्व कुंडलिनीशी मध्या कुंडलिनीची मेळणी व मूर्ध्निस्थानस्थ सुषुम्नामुखाचा - ककारांताचा –भेद ब्रह्मरंध्री मिळणे::::

तेथ अध वरौतैं आकुंचें। ऊर्ध्व तलौतैं खांचें।
ककारांत फोडिं।...।।३०३।।
भरति गमैं सागरिं। सरितां जैसिं।।३०४।।
मग ब्रह्मरंध्रिं थिराओनि। सोऽहंभावाचियां बाह्या पसरौनि।
परमात्मलिंगा धांओनि। आंगां घडें।।३०५।।
तंव महांभूतांचि जवनिक फिटैं। मग दोघांसिहिं होय झटैं।
तेथ गगनासगट आटैं। समरसिं तिएं।।३०६।।

३८) पदीं पद प्रवेशें::::

द्वैत जेथ न देखैं। तैसें केलें।।२८२।।
अर्जुना एरविं तन्हैं। एआं अभिप्रायाचां गर्वु धरिं।
तैं पाये वैखरिं। दूरिं ठेलिं।।३१२।।
आतां महाशुन्याचां डोहिं। गगनासिंचि थाउं नाइं।
तेथ तागा लागैल काइं। इयां बोलाचां।।३१५।।
पैं मेघाचेनि मुखैं निवडलां। समुद्रु कां ओघिं पडिलां।
तो माघुतां जैसां आला। आपणपेआं।।६-३०७।।
तेंविं पिंडाचेनि मिखैं। पदीं पद प्रवेशें।
तैं एकत्व होएं तैसें। पंडुकुमरां।।३०८।।
आतां दुजैं हान होतें। किं एकचिं हें आइतैं।
ऐसिएं विवंचनेपुरतैं। उरेचि ना।।६-३०९।।
गगनिं गगन लयां जाएं। आइसें जैं काइं आहे।
तैं अनुभवैं जो होएं। तो होऊनि ठाकैं।।३१०।।
म्हणौनि तेथिंचिं मातु। न चडेचि बोलाचां हातु।
जेणें संवादाचिआं गांवांआंतुं। पैठी किजैं।।६-३११।।
म्हणऊनि आखरामाझिं सांपडें। किं कानवेरिं जोडें।
हें तैसें नोहें फुडें। त्रिशुद्धि मां।।६-३१६।।
जैं कंहिं दैवें। अनुभविलें फांकवै।
तैं आपणचि हें ठाकावें। होओनिआं।।३१७।।

३९) अद्वैतस्थितीचे वर्णन::::

पुडुति जाणणैं तैं नाइं चिं। म्हणौनि असो केती हें चिं।
बोलावें आतां वांयांचिं। धनुर्द्धरां।।३१८।।
आइसें शब्दजात माघौतैं फिरैं। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरैं।
वाराहिं जेथ न शिरैं। विचाराचां।।६-३१९।।
जैं उन्मनियेचें लावण्य। जैं तुरियेचें तारुण्य।
अनादि जैं अगण्य। परमतत्त्व।।६-३२०।।
जैं आकाराचां प्रांतु। जैं मोक्षाचां एकान्तु।
जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलें।।३२१।।
जैं विश्वाचें मूल। जैं योगद्रुमाचें फल।
जैं आनंदाचें केवल। चैतन्य गां।।३२२।।
जैं महाभूतांचे बीज। जैं महातेजाचें तेज।
एवं पार्था जैं निज। स्वरूप माझें।।३२३।।
हें चतुर्भुज कौंभैलिं। जेयांचिं शोभा रूपां आलीं।
देखौनि नास्तिकीं नोकिलीं। साधुवृंदें।।३२४।।
तै अनिर्वाच्य माहासुख। आपणचिं जाहालैं जैं पुरुष।
जेयांचें कां निष्कर्ष। प्राप्तिवेरिं।।३२५।।
आम्हिं साधन जैं हें सांघितलें। तैंचि शरीरीं जिहिं केलें।
तैं आमचेन पाडें आलें। निर्वाललेयां।।३२६।।
परब्रह्माचेनि रसें। देहाकृतिचेनि मुसैं।
ओतिवं जालें तैसें। दिसथि आंगैं।।३२७।।
ना तन्हीं प्रतीति हान आंतरिं फांकैं।
तन्हैं विश्वचि हें आघवैं झांकैं।..।।३२८।।
मनाचां हान मारु। कां पवनाचां धरुं।
ध्यानाचां आदरुं। नाना परीं।।२८९।।
हें कल्पना घें सांडिं। तैं नाइं इयें परवडिं।
हें महाभूतांचिं फुडी। आटणी देखां।।२९०।।
तंव अर्जुन म्हणें नीकैं। सांचचि हें।।३२८।।

४०) नाथसंकैतिंचां डंसु::::

पिंडें पिंडाचां ग्रासु। तो हां नाथसंकैतिंचां दंसु।
परि दाऊनि गेला उद्देसु। माहाविष्णु।।२९१।।
तेयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाचिं घडी झाडूनि।
उपलविलीं मियां जाणूनि। ग्राहिक श्रोते।।६-२९२।।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४५-२::
::लययोगसमालोचन::
::योगशास्त्रसमन्वय::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४५-२:

गीता:
६:१७-१९
७:१,२
११:५५
१२:१-७

ज्ञानेश्वरी:
६:१४९-३२८, ३५४- ३६३
८:४८-५२
११:१०-३२
१२:४-७,२०-८०
१७:८

पा.यो.सू.:
१:३,२०-२८,३९,४०-४४, ४५, ४८, ५१
२:१-१०,११,१७,२५-२७,४६
३:५,६,३४,३९,४०,४२-५४,
४:२५-३४

सि.सि.प.:
१:१
२:१,३
५:४-७,२९,३१-३३,३५,६३

सौदर्य.:१,९,३६-४१

घेरंडसंहिता:६:१-२२

हठयोगप्रदीपिका:
१:१,२
३:१२९
४:३४

::उन्मेष ४५-२::
::लययोगसमालोचन::
::योगशास्त्रसमन्वय::

योगशास्त्रसमन्वय::::

उपोद्घात

मागील ***उन्मेष क्र. ४५-१*** मध्ये आपण लययोगाचे एक समालोचन केले. स्वामी विष्णुतीर्थांचे योगचक्रांबाबतचे व पूर्व व पश्चिममार्गावरचे मत पाहून त्या उन्मेषाचा समारोप केला होता. त्या समालोचनाचा काही अवशिष्ट भाग या उन्मेषातून आपण पाहणार आहोत आणि जमेल तितका या पंथराजविषयक लययोगाचा समन्वय करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

सर्व मतांचा समन्वय

मागील उन्मेषातील विचारांचा जो आढावा आपण घेतला होता, त्यानुसार सर्व बाबींचा साकल्याने विचार करता पुढीलप्रमाणे अनुमान करण्यास प्रत्यवाय नसावाः

१) ***कन्द ते आज्ञाचक्र*** हा सुषुम्नागत मार्ग ***पूर्वपथ*** आहे.

२) **आज्ञाचक्र ते पुढील ब्रह्मरंध्रा**पर्यंतचा मार्ग ***पश्चिमपथ*** आहे.

३) ***श्रीहट, गोल्हाट*** इ.संज्ञा कळून घेण्यासाठी ज्ञानेश्वरीव्यतिरिक्त प्रमाणे शोधावी लागतील. ज्ञानदेव व त्यांची भावंडे व इतर संतयोगी यांच्या अभंगादी रचना त्यासाठी विचारात घ्याव्या लागतील.

४) **आज्ञाचक्रापासून एक मार्ग सहस्त्रदलाकडे व दुसरा ब्रह्मरंध्राकडे जातो**, हे पं. गोपीनाथ कविराज यांचे म्हणणे पटण्यासारखे वाटत नाही. चक्रांचे कमलामध्ये कुंडलिनी जागृतिपरांत परिवर्तन होते, हे त्यांचे मत ग्राह्य धरले तर ब्रह्मरंध्रचक्राचेच सहस्त्रदलपद्मात रूपांतर होण्याची संकल्पना कदाचित मांडता येईल. परंतु हा विचारसुद्धा इतर यौगिक चक्रसंकल्पनांचा आढावा घेता टिकण्यासारखी नाही.

भक्तिरसशास्त्रानुसार प्राप्त होणाऱ्या आनंदावस्थांसाठी त्यांनी तसेच श्री. बाबामहाराज आर्वीकरांनी सहस्त्रदलकमलाकडे जाणाऱ्या वेगळ्या मार्गाचे विधान केले आहे. पण आपण मान्य केलेल्या पश्चिमपथावर म्हणजे बैन्दवादी स्तरांवर या अवस्था प्राप्त होण्यास काहीही प्रत्यवाय नसावा.

स्वामी श्रीविष्णुतीर्थ महाराजांच्याही मतानुसार उन्मनीनंतर ***गुह्यचक्र व सहस्त्रार*** असे दोन स्तर आहेत ***(सौंदर्यलहरी -योगिक चक्रचित्र -तत्रैव). सहस्त्रार चक्र*** हे शिवाचे स्थान, शक्तीचे अंतिम गंतव्य आणि परमपद आहे ***(देवात्मशक्ती -स्वा.श्रीविष्णुतीर्थ महाराज).*** म्हणून ***आज्ञाचक्रापासून सुषुम्नापथ जो वज्रा व चित्रिणी नाडी*** या संज्ञांनी ओळखला जातो, त्यावरच ***बिंदू ते सहस्त्रार वा ब्रह्मरंध्रचक्र*** असतात आणि हाच केवल एक मार्ग तेथे असतो, दोन वेगवेगळे मार्ग तेथे नसतात, असे आपणास म्हणावे लागते.

हेच मत साधारणपणे सर्व योग्यांस संमत असे असल्याचे वाटते. प्रत्येकास सर्वच चक्रांचे सर्वच अनुभव शास्त्रात सांगितलेल्या चक्रक्रमानेच येतात असे नाही. म्हणून ही मतमतांतरे होतात, असेही एक अनुमान आहे. असो.

"पैं योगिवृंदें वहिली। आडवि आकासिं निगालिं। किं तेथ अनुभवाचां पाऊलिं। धोरणु पडिलां।।६-१५४।। तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतलीं एकसरें। कीं येर सगळें मार्ग निदसुरें। सांडूनियां।।१५५।। पाठीं महर्षि येणें आले। साधकांचे सिद्ध झालें। आत्मविद थोरावलें येणेंचि पंथें।।१५६।।" या ओव्यांवरून ब्रह्मांडात जाण्याचा एकच सर्वसंमत पथ आहे, असे ज्ञानदेवांचेही म्हणणे आहे असे दिसते. आकाशातील आडरानात योगी जात असता अनुभवांती तेथे एक रुळलेली पायवाट झाली. इतर सर्व मार्ग सोडून योगसाधकांनी मग त्याच एका वाटेवरून धाव घेतली आणि ते सर्व त्याच वाटेने जाऊन साधकांचे सिद्ध झाले. महर्षीही झाले. असे या एकाच एका पायवाटेचे वर्णन ज्ञानदेवांनी पंथराजाच्या आरंभीच्या वर्णनात केले आहे.

५) ***पातञ्जलयोगाचा पथ व साध्य*** ही कुंडलिनीयोगापेक्षा वेगळी आहेत असे मत ग्राह्य ठरत नाही. दोघात यांबाबत अभिन्नता आहे.

६) त्याचप्रमाणे ***हठयोग*** सुद्धा कुंडलिनीयोगापेक्षा काही वेगळा आहे, असे मत अप्रमाण ठरते. दोन्हींमध्ये अभिन्नता असावी इतके साधर्म्य आहे.

(टीपः *पं.गोपीनाथ कविराज* यांच्या ***"भारतीय संस्कृतिका इतिहास-खंड१"*** प्रमाणे आणि अन्य यौगिक मतांनुसार ***"आज्ञा-➤ सहस्त्रदलकमल-➤ त्रिकूटी-➤ सहा शून्ये-➤ सातवे शून्य(दशमद्वार/ब्रह्मरंध्र)-➤ सहा महाशून्ये-➤ भ्रमरगुहा-➤ सत्यलोक-➤ अलक्ष्यलोक(अलख)-➤ अगम-➤अनामीलोक"*** असा सत्यपथ वा सुषुम्नामार्ग जातो. या मार्गावर सुषुम्नेव्यतिरिक्त इतर दोन महत्त्वाच्या नाड्या आहेतः

१)बंकनाल- *बंकनाल* ही नाडी मूलाधारचक्र ते आज्ञाचक्र जाते. मध्ये नाभीच्या डावीकडून जात हृदय व वक्षस्थल यांना स्पर्श करते. आज्ञाचक्रात रुद्रग्रंथीला मिळते. तेथून पुढे चढतचढत ती क्रमशः ब्रह्मरंध्रात पोहोचते. तेथून मस्तकामागे थोडी लटकत वर चढते. त्या ठिकाणी तिचा आकार अर्धचंद्राकार असतो. म्हणून तिला ***बंकनाल*** म्हणतात. पुढे जाऊन ती महाशून्याच्या अंती भ्रमरगुंफेत प्रवेशते. भ्रमरगुंफा हे सत्यलोक आणि वरचे लोक यांचे द्वार आहे. कुंडलिनी उत्क्रमणासाठी ही एक महत्त्वाची नाडी आहे.

२)गुह्यिनी - ही नाडी आज्ञाचक्रावरून थेट सहस्त्रारचक्रात जाते.)

७) पातञ्जलयोग, हठयोग, कुंडलिनीयोग यात ***गुरुकृपा*** असली की त्याच योगांचा ज्ञानेश्वरोक्त ***पंथराज*** होतो व तो मार्ग ***सुलभ*** होतो. या सुलभतेचे अधिक प्रमाण बाराव्या अध्यायात मिळते. तेथे ज्ञानदेवांनी गुरुमाऊलीचे कौतुक सांगतांना ***"अनुहताचां हल्लरु गासि", "समाधिबोधें बुझाविसिं"*** इ.वचनांद्वारे गुरुकृपेने योगमार्ग कसा सुकर आहे, याची साक्ष दिली आहे.

आपण पाहतच आहोत की ***गुरुकृपा, ईश्वरप्रणिधान व सगुणभक्ती*** **हा पंथराजाचा आत्मा आहे.** त्यास ***कुंडलिनीजागृतीचे अधिष्ठान*** आहे. ***नादानुसंधान*** तर आहेच. ***लयात्मक*** असे त्याचे स्वरूप आहे. पातञ्जलयोग, हठयोग व कुंडलिनीयोग यांद्वारे वांछित असे समाधिसुख वा पराकोटीची अवस्था पंथराजसापेक्ष भिन्न नसल्याचेही आपण पाहतोच आहोत. त्यामुळे **ते योग व पंथराज यातील क्रिया भिन्न नसून एकाच प्रकाराच्या असल्या पाहिजेत.** फरक कोठे पडतच असेल तर तो (अ) भिन्नभिन्न संज्ञांचा आणि (ब) त्या त्या योगविशिष्ट अवस्थांचा मेळ घालण्यात - त्यांचा समन्वय करण्यात! असो.

पातञ्जलयोग व पंथराज समन्वय

यानंतर आपण ***पातञ्जलयोग व पंथराज*** यांचा थोडा ***समन्वय*** करून पुढे जाऊ या:

याबाबत आतापावेतोच्या विवेचनावरून स्पष्ट होते की पतञ्जलींचा ***निर्बीज असंप्रज्ञात समापत्ति वा समाधि*** हा स्वरूपप्राप्ती करून देतो. हेच ***कैवल्य*** होय. प्रतिप्रसवक्रमाचे ध्येय ते हेच! पंथराजाचेही साध्य हेच आहे. ***यम-नियम-आसन - प्राणायाम - प्रत्याहार*** या बहिरंग साधनेचेही या दोहोत विलक्षण साम्य आहे. त्याचप्रमाणे ***धारणा व ध्यान*** यांनी पंथराजाच्या उत्तमांगांच्या अभ्यासास सुरुवात होते.

त्यानंतर समाधीचा टप्पा येतो. येथे एक फरक प्रकर्षाने जणवतो. ज्ञानेश जो समाधि सांगतात तो पतञ्जलींच्या समाधिपथाचा शेवटचा टप्पा म्हणजे ***असंप्रज्ञात समाधि*** आहे. **तत्पूर्वीचे समाधि संप्रज्ञात असून ज्ञानेश त्यांचा साधनात अंतर्भाव करतांना दिसतात.** नामसंकीर्तनादी भजनाचे ज्ञानेश्वरीतील जे स्थान आहे, ते पातञ्जलयोगातील संप्रज्ञात समाधिसिद्धिप्रीत्यर्थ असल्याचे आपणास जाणवते. ईश्वरप्रणिधानाचा हा सरळ सरळ मार्ग आहे. त्याचे दर्शन आपणास *८,९,१०,११ व १२* या अध्यायांच्या उर्वरित भागाचे समालोचन करतांना घडणार आहे.

पतञ्जलींच्याही मते ज्याला जे इष्ट वाटत असेल, प्रिय असेल, त्याच्या ध्यानाने - यात ईश्वरप्रणिधानसुद्धा आलेच - सूक्ष्मातिसूक्ष्म आलंबनविषयांपासून तहत महान आलंबनविषयांपर्यंत सहजच मनाची एकाग्रता होणे हा चित्ताचा ***वशीकार*** प्राप्त होतो***("परमाणुपरम-महत्त्वान्तोऽस्य वशीकार:।।१-४०।।पा.यो.सू.।।").***

त्यातूनच ***"क्षीणवृत्ते...।।१-४१।।पा.यो.सू.।।"*** या सूत्रातून सांगितलेला ***संप्रज्ञात समापत्ति*** प्राप्त होतो. स्थूलापासून सूक्ष्म आलंबनविषयांवर जसजसे चित्त केंद्रिभूत होत जाते, तसतसे ***सवितर्क –➤ निर्वितर्क -➤सविचार -➤ निर्विचार*** हे उत्तरोत्तर श्रेष्ठ ***संप्रज्ञात समाधि*** प्राप्त होतात *(१-४२ ते ४४, पा.यो.सू.).* या सर्व ***सबीज समाध्यवस्था*** आहेत.

यानंतर जेव्हा चित्ताचे ***अलिङ्गपर्यवसान*** होते, तेव्हा एकाग्रतेसाठी चित्तास आलंबनविषय लागत नाही. त्यावेळी ***निर्विचारवैशारद्यसिद्धी*** प्राप्त होते. यमनियमादी अष्टांगयोगाचे हे अनुष्ठान ***"अविप्लव विवेकख्याति"*** प्राप्त करून देते *(२-२६ व ३-४९ पा.यो.सू.).* यासच ***"सत्त्वपुरुषान्यताख्याति"*** असेही म्हणतात.

या योगाच्या ***वैराग्य - विवेक*** अशा प्रारंभीच्या पायऱ्या आहेत. या पण पंथराजासमानच आहेत. यातूनच प्रज्ञेचा उदय होतो. ***"तज्जयात्प्रज्ञालोक:।।३-५।।पा.यो.सू.।।"*** अशी ही ***प्रज्ञा*** संयमजयाचे फल असल्याचे आपण पाहिले आहे. संयमापासून प्राप्त होणाऱ्या सिद्धी हे या प्रज्ञेचे आनुषंगिक फल आहे. पण तिचा योग्य विनियोग करावा असे पतञ्जली म्हणतात *(३-६,पा.यो.सू.).* निर्विचारवैशारद्यातून ***अध्यात्मप्रसाद*** होऊन प्राप्त होणारी **ऋतंभरा प्रज्ञा** ती हीच आहे *(१-४८,पा.यो.सू.).*

सप्तधा प्रांतभूमी असणारी ही प्रज्ञा विवेकख्यातीतून साधकास पुढे घेऊन जाण्यास समर्थ असते ***("तस्य सप्तधा प्रान्तभूमि: प्रज्ञा।।२-२७।।पा.यो.सू.।।").*** याच प्रज्ञेच्या सामर्थ्याने ***गुणपरिणामक्रमसमाप्ती*** घडून साधकास ***विवेकजज्ञानप्राप्ति*** होते व ***द्रष्टादृश्यसंयोगाचे हान*** घडून येऊन ***प्रतिप्रसव*** साध्य होतो *(४-३१ ते ३३, ३-५२ ते ५४, ३-४९, ४-३४, २-१७, २-२५, २-१० व २-११,पा.यो.सू.).*

त्याद्वारे **अविद्या** व तिचे क्लेश ***(अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश)*** दूर होतात *(२-१ ते ९, पा.यो.सू.).* ही प्रज्ञा अशा प्रकारे ***कैवल्य*** प्राप्त करून देणारी ठरते *(१-२०ते २३).* ऋतंभरा प्रज्ञेमुळे चित्ताचे खरे स्वरूप कळून येऊन आत्मभावना दृढ होते *(४-२५,२६, पा.यो.सू.).* हे सर्व चित्तावरील संस्कार दूर करण्यास उपयुक्त ठरते *(४-२७ व २८,पा.यो.सू.).* ऋतंभरा प्रज्ञेचेही संस्कार दूर झाले, त्यांचा लय झाला की ***निर्बीज समाधि वा असंप्रज्ञात समाधि*** सिद्ध होतो *(१-५१,पा.यो.सू.).* कैवल्यप्राप्ती होते*(२-२५,४-३४ व ३-५०,पा.यो.सू.).* स्वरूपप्राप्ती होते *(१-३,पा.यो.सू.).* असा हा भाग आहे.

हाच समाधि ज्ञानेश्वरांस अभिप्रेत आहे आणि पतञ्जलींसही तोच मान्यतम आहे. म्हणून ते ***"समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।।२-४६।।पा.यो.सू.।।"*** असे योगसूत्र सांगतांना दिसून येतात.

प्रज्ञा व कुंडलिनी

प्रज्ञा वा ऋतंभरा प्रज्ञा हीच जागृत कुंडलिनी **होय असे जे आपण म्हटले, तोच** ***पंथराज व पातञ्जलयोग*** **यांचा समन्वय**

करणारा खरा दुवा आहे. या टप्प्यानंतरही योगाभ्यास पुढे न्यावा लागतो, हे ज्ञानेश व पतञ्जली या दोघांसही मान्य आहे.

ऋतंभरेचे संस्कार नाहीसे होईस्तोवर साधकास ***असंप्रज्ञात समाधि*** प्राप्त होत नाही. ***"निर्विचारवैशारद्य -➢अध्यात्मप्रसाद -➢ ऋतंभरा प्रज्ञाप्राप्ती"*** या पायऱ्यांनंतर जो प्रज्ञेचा प्रांत आहे, त्याची मगाच म्हटल्याप्रमाणे ***सप्तधा भूमी*** आहे *(२-२७,पा.यो.सू.).* हीच भूमी ***"प्रसंख्यानेऽप्यकुसीदस्य सर्वथा विवेकख्यातेर्धर्ममेघः समाधि।।४-२९।।पा.यो. सू.।।"*** याद्वारे पतञ्जलींनी ***धर्ममेघ समाधि*** म्हणून नामकरण केलेली आहे .

त्यातूनच ***"पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यं स्वरूपप्रतिष्ठा वा चितिशक्तिरिति।।४-३४।।पा.यो.सू.।।"*** याप्रमाणे त्रिगुणमयी मायेचा ***प्रतिप्रसवक्रम*** साध्य झाल्याने पुरुषार्थप्रयोजन नसलेले गुण उपादान कारण अशा प्रकृतीत लय पावतात आणि कैवल्यावस्था प्राप्त होते. अविद्येचा नाश होऊन ***शुद्धविद्या*** म्हणजे ***चितिशक्ती*** स्वस्वरूपाने प्रस्फुटित होते, असा पुढचा योगप्रवास पतञ्जली सांगतांना दिसतात ***(४-३०ते ३३,पा.यो.सू.).***

पंथराज व लयक्रम

कुंडलिन्युदयापासून ज्ञानेशही तत्त्वलयाचा क्रम सांगत शेवटी शक्तीचे शिवाशी मिलन होऊन सामरस्य होते, असे पंथराजफलश्रुती सांगतांना म्हणतात. म्हणजे हा ***प्रतिप्रसव*** पतञ्जलींप्रमाणेंच ज्ञानदेवांनाही मान्य आहे. फरक इतकाच आहे की हा तत्त्वलयाचा क्रम ज्ञानेश थोड्या विस्ताराने सांगतात, तर पतञ्जली ***"ते प्रतिप्रसवः हेयः सूक्ष्माः।।२-१०।।पा.यो.सू.।।"*** व ***"पुरुषार्थशून्यानां गुणांना प्रतिप्रसवः....।।४-३४।।पा.यो.सू.।।"*** या सूत्रांतून फक्त ***प्रतिप्रसव*** होतो, असे सूचित करतात.

गुरूबद्दल तर ज्ञानेश व पतञ्जलींचे एकमतच आहे. कारण ***"स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्।।१-२६।।"*** हे पातञ्जलसूत्र ***ईश्वरप्रणिधान व गुरुकृपा*** यांची जोड सूचित करणारे आहे. याप्रमाणे ***पंथराज व पातञ्जलयोग*** यांचा समन्वय कसा होतो, ते आपण पाहिले.

त्याचप्रमाणे ***त्रिबंध - प्राणायाम - कुंडलिनीसाधना*** यांचे हठयोगाशी फारच मिळतेजुळते आहे. त्यामुळे हठयोगही या दोन्ही योगांशी मिळणारा आहे. फरक असा आहे की कोणी एक योगमार्तंड योगाच्या विशिष्ट भागाचे खुलासेवार उद्‌घाटन करतात, तर दुसरा भाग गौण ठेवतात, तोच दुसरे अध्वर्यू नीट खुलासेवार सांगतात. यामागेही योगसाधनेचे रहस्य उकलून सांगू नये, हा संकेतच कारण असण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच या सर्व विविध योगपर माहितीचा समन्वय केल्याशिवाय खरे योगरहस्य उकलणे कठीण झाले आहे. असो.

आठव्या अध्यायातील पंथराज

पंथराजाचे अत्यंत संक्षिप्त वर्णन ज्ञानदेवांनी आठव्या अध्यायी ***अधियज्ञदर्शन*** घडवतांना केलेले आपणास स्मरत असेलच! त्या ठिकाणी ***संयम*** या शब्दाची विशेष योजना ते करतात. म्हणून त्या ओव्या पातञ्जलयोगाशी पंथराजाचा समन्वय करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात, त्या अशाः

पहिलें वैराग्य₁इंधनपूर्तिं। इंद्रियानलीं प्रदीप्तिं।
विषयद्रव्यांचियां₂ आहुति। देओनिआं।।८-४८।।
मग वज्रासन₃ तैंचिं उर्वि। शोधूनि आधारीं₄मुद्रा बरविं।
वेदिका रचैं मांडविं। शरीराचां।।४९।।
तेथ संयमाग्निचिं₅ कुंडें। इंद्रियद्रव्याचेनि पवाडें।
पूजिजति उदंडें। युक्तिघोषैं₆।।५०।।
मग मन प्राणु आणि ₇संयमु। हाचि हवनसंपदेचां संभ्रमु।
येणें संतोषविजैं निर्द्धूमु। ज्ञानानलुं₈।।५१।।
ऐसेनि हें सकल ज्ञानिं समर्पे। मग ज्ञान तैं ज्ञेयीं हारपें₉।
पाठीं ज्ञेयचिं स्वरूपें₁₀। निखिल उरैं।।५२।।

"वैराग्य -➢प्रत्याहार-➢वज्रासन-➢आधारमुद्रा-➢संयमाग्नी -➢युक्तिघोष -➢मन-प्राण व संयम -➢ ज्ञानानल -➢ ज्ञानात लय -➢ज्ञानाचा ज्ञेयात लय-➢स्वरूपप्राप्ती" (₁ ते ₁₀) असा पंथराजक्रमणाचा मार्ग तेथे लाक्षणिक रीत्या प्रकट केला आहे.

या ठिकाणी ***संयमाग्नी*** म्हणून ***कुंडलिनी*** चा उल्लेख केला आहे. ***संयमाग्निकुंडात युक्तिघोष करणे म्हणजे संयमाचा जय होणे*** अर्थात ***कुंडलिनीजागृती*** असा अर्थ येथे अभिप्रेत आहे.

"तज्जयात्प्रज्ञालोकः।।३-५।। पा.यो.सू.।।" हे पतञ्जलींचे सूत्र असेच आहे. संयमजयाने प्रज्ञेचा उदय तेथे सांगितला आहे. संयमाने प्रज्ञा जागृत होते आणि ***प्रज्ञा हीच ऋतंभरा प्रज्ञा तथा कुंडलिनी होय,*** हे आपण मागेच पाहिले आहे. याच कुंडलिनीत म्हणजे संयमाग्नीत ***इंद्रियद्रव्ये*** म्हणजे ***पंचमहाभूते, पंच पंच ज्ञान व कर्मेंद्रिये आणि त्यांचे दश विषय, अहंकार, प्राण, मन*** इ.सर्वांची आहुती द्यावयाची आहे, म्हणजे ज्ञानदेवोक्त क्षेत्रसंबंधित इतर सर्व तत्त्वादींचा कुंडलिनीत लय करावयाचा आहे. त्याद्वारे ज्ञानाचा उदय होतो.

ज्या ***विवेकख्याति वा सत्त्वपुरुषान्यताख्याति*** भूमिकेवर पतञ्जली अशा ज्ञानाची सिद्धी सांगतात, ती भूमिका आणि पंथराजप्रक्रियांतर्गत ज्ञानात सर्वांचा लय ज्या भूमिकेत होतो, ती भूमिका अशा मिळत्याजुळत्या आहेत. गुणांचा प्रतिप्रसव पूर्ण होणे व प्रकृतीचा चितिशक्तीत लय होणे म्हणजे कैवल्यप्राप्ती ही शेवटची पायरी योगानुष्ठानाची अंततः फलश्रुती म्हणून पतञ्जली देतात ***(४-३४,पा.यो.सू.).*** ज्ञानेशही ज्ञानाचा ज्ञेयात लय होतो व निखिल स्वरूप प्राप्त होते, असे वरील ओव्यांतून सांगत आहेत.

याप्रमाणे आठव्या अध्यायातील ज्ञानेश्वरोक्त प्रमाणाद्वारे पंथराजाचा पातञ्जलयोगाशी आपण पुनश्च समन्वय केला आहे. अंती जेव्हा अठराव्या अध्यायात आपण ***क्रमयोग*** निरीक्षू तेव्हा या समन्वयाचा काही उर्वरित भाग तेथे पाहू. तसेच मागे स्वामी विष्णुतीर्थमहाराजांचे सवितर्कादी समाधींबाबतचे जे मत उद्धृत केले होते, त्याचीही तेव्हाच चर्चा करू. पातञ्जलयोगशास्त्रानुसार योग्यांच्या ***शुभेच्छादी*** ज्या सप्तज्ञानभूमिका टीकाकार सांगतात, त्यांचीही चर्चा आपण नंतर करू.कारण हे सर्व करण्याआधी ईश्वरप्रणिधानाचा महत्त्वपूर्ण भाग आपणास ज्ञानेश्वरीच्या *अध्याय क्र. ८ ते १२* यातून परीक्षावयाचा आहे.

सिद्धसिद्धांतपद्धति:सोळा आधार

त्यामुळे ***पंथराज व पातञ्जलयोगसमन्वय*** हा विषय तूर्त येथेच आटोपून आपण नाथप्रणालीतील ***सोळा आधार, तीन लक्ष्ये व पंचव्योम*** यांची शेष माहिती करून घेऊ. त्यासाठी आपणास श्रीगोरक्षनाथांच्या ***सिद्धसिद्धांतपद्धति*** या ग्रंथाकडे पुनश्च वळावे लागेल. त्यातील ***नवचक्रे व कुंडलिनी*** या संकल्पनांचा आवश्यक तेवढा परामर्ष आपण यापूर्वीच घेतला आहे *(उन्मेष:८:पंथराज पृ.क्र. १२३-१२६,१३१-१३३ व उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ: पृ.क्र.७४८पासून पुढे).* असो.

गोरक्षमते ***सोळा आधार*** असे आहेत:

१)***पादांगुष्ठाधार*** - पायांच्या अंगठ्यावर तेजोमय वस्तुचे ध्यान केल्याने दृष्टी स्थिर होते.

२) ***मूलाधार*** - डाव्या पायाच्या घोट्याने मूलाधार दाबून ठेवल्याने अग्निदीपन होते.

३) ***गुदाधार*** - विकास संकोचाने अपानवायू स्थिर होतो. हीच ***अश्विनीमुद्रा*** म्हणून आहे.

४) ***मेंढ्राधार*** - लिंगसंकोचाने ***विष्णु -रुद्र - ब्रह्म*** या ग्रंथित्रयांचा भेद होतो. ***भ्रमरगुंफेत संयम केल्याने बिंदुस्तंभन होते.***

५) ***उड्याणाधार - ओढियाणा*** बंधाने मलमूत्राची मात्रा कमी होते.

६) ***नाभिआधार*** - ॐकाराचा एकचित्ताने उच्चार केल्यास ***नादलय*** होतो.

७) ***हृदयाधार*** - येथे प्राणनिरोध करण्याने ***हृत्कमल***ाचा विकास होतो. (**टीप**: ***हृदयाधार*** म्हणजे नेमके कोठे ते स्पष्ट नाही. मागे ***हृत्संवित***कमलाचा उल्लेख केलेला होता. त्याच्याशी हे संबंधित असणेही शक्य आहे *(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ - पृ.क्र.७६१-आध्यात्मिक हृदयासंबंधी).*

८) ***कंठाधार*** - कंठमूळ हनुवटीने बंद केल्याने इडा-पिंगलांतील वायू स्थिर होतो.*जालंधर* बंधाचे हेच प्रयोजन आहे व हीच क्रिया आहे.

९) ***घंटिकाधार*** - जिभेचे अग्र घंटिकाधाराला लावल्याने अमृतकला स्त्रवते.

१०) ***तालुआधार*** - तालूंतील छिद्रात लंबिकेला घुसळल्याने योगी काष्ठरूप होतो.

११) ***जिह्वाधार*** - जिव्हाग्राचे ध्यान केल्याने सर्व रोग नष्ट होतात.

१२) ***भ्रूमध्याधार*** - येथे चंद्राचे ध्यान केल्याने त्रिविध ताप नष्ट दूर होऊन शीतलता प्राप्त होते.

१३) ***नासाधार*** -नाासाग्रावर दृष्टी ठेवल्याने मन स्थिर होते.

१४) ***नासामूलकवाटाधार*** - भ्रूमध्याच्या किंचित खाली योग्याने ध्यान केल्यास सहा महिन्यांच्या आत त्यास ज्योति:पुंज दिसू लागतो.

१५) ***ललाटाधार*** - यावर ज्योति:पुंजाचे ध्यान केल्याने योगी तेजस्वी होतो.

१६) ***ब्रह्मरंध्राधार-ब्रह्मरंध्र-आकाशचक्र*** -या ठिकाणी गुरुपादपंकजाचे ध्यान सदोदित करणारा योगी आकाशाप्रमाणे पूर्ण होतो.

अशा प्रकारे हे जे ***सोळा आधार म्हणजे ध्यान करण्याची स्थाने*** आहेत, त्यातील काहींचा स्पष्ट उल्लेख पंथराज विवेचनात ज्ञानेशांनी केलेला आहे. ***मूलाधार (६-२००), अध आकुंचणे - गुदाधार (अन्वयाने -मूलबंध) -उड्याणाधार (ओढियाणाबंध) (६-२१०), मेंढ्राधार ("गुदमेंढ्राआंतौतिं" -६-१९५), अपान आतलीकडे वोहोटणे (६-२००), नासाग्रपीठी दृष्टी (६-२०४), कंठाधार (जालंधरबंध - ६-२०६ ते २०८), नाभिआधार व हृदयाधार आणि हृत्कोश विकासणे (६-२०९), ग्रंथीत्रय व इडापिंगलांतील वायू संचार थांबणे (अन्वयाने) (६-२४४), नाद (अनाहत - ६-२७४) व नादलय (६-२७८), ब्रह्मरंध्र (६-३०५), भ्रूमध्याधार ("भ्रूलता मागिलीकडें"-६-३१३),*** याप्रमाणे ज्ञानेश्वरीमध्ये गोरक्षनाथदर्शित जवळ जवळ सगळ्या आधारांचा पंथराजविवेचन करत असतांना उल्लेख येतो. वर दिलेल्या माहितीनुसार या सर्व आधारांचा पंथराजप्रणीत क्रियांशी काही ना काही मेळ घालणे जिज्ञासूंस सहज शक्य आहे. हे आधार म्हणजे एका प्रकारे पंथराजसाधनेची उपांगेच आहेत, असे म्हटले तरी चालेल.

त्रिलक्ष्ये व पंचव्योम

आता त्रिलक्ष्ये अशी आहेत -

१) ***अंतर्लक्ष्य*** - सुषुम्नाध्यान इ.अंतर्लक्ष्यध्याने होत.

२) नासाग्र इ.शरीराबाहेरील देशावरील ध्यान ***बहिर्लक्ष्य*** होय.

३) अंतर्देश व बहिर्देश यांचा आधार न घेता किंवा घेऊन केलेले ध्यान ***मध्यलक्ष्यध्यान*** असते. उदा. श्वेतवर्ण - कृष्णवर्ण - अग्निशिखा इ.चे ध्यान या सदरात मोडते.

याचप्रमाणे ध्यान करण्यासाठी ***पाच व्योम*** गोरक्षनाथांनी कल्पिले आहेत. आकाशतत्त्वाचे निर्गुण आणि सगुण ध्यान करण्याप्रमाणे त्यांचे पंचव्योम संभवतात.

१) ***आकाश*** (निर्गुण - आतबाहेर निर्मल - निराकार)

२) ***पराकाश*** (आतबाहेर अंधकारसदृश)

३) ***महाकाश*** (आतबाहेर कालानलसदृश)

४) ***सूर्याकाश*** (आतबाहेर कोटिसूर्यसमप्रभ)
५)***तत्त्वाकाश*** (आतबाहेर निजतत्त्वस्वरूप) अशी ही पंचव्योमध्याने आहेत.

पंथराजावर एक दृष्टिक्षेप::::

पंथराजाचे साधन

पंथराजसाधना करणाऱ्या योग्यास पातञ्जलयोगसूत्रान्वित संयम करण्यासाठी हे ध्यानविषय - लक्ष्ये, आधार व व्योम आहेत. यांचा स्पष्ट उल्लेख ज्ञानेश्वर करत नाहीत. पण मुळात योगाभ्यासासाठी जी एकाग्रता अपेक्षित आहे, ती धारणा-ध्यान यांनीच प्राप्त होऊ शकते आणि यासाठी विवक्षित देश – आलंबनविषय हे दोन्ही आवश्यक ठरतात. अत्यंत पुढच्या पायरीवरील योग्यास ***आकाशध्यान*** असे निर्गुणाचे ध्यान शक्य आहे. तरी हा भाग लक्षात घेऊन पुढे जाऊ या.

पंथराजाच्या पायऱ्या

त्यापूर्वी पंथराजाच्या पायऱ्यांचा एक धावता आलेख मनात ठसवून घेणे योग्य ठरेल. तो असा:

वैराग्य (६-१४९) - सोऽहंभाव (६-१४९) - अभ्यासयोग (६-१५१) - प्रवृत्ति-निवृत्तिपर (६-१५२,१५३) - आदर्श योगी - महेश (६-१५३) - आकाशींचा मार्ग - महर्षिसिद्धादींचा मार्ग (६-१५५,१५६) - आत्मविदांचा मार्ग - आनंदाचा मार्ग - सिद्धी - स्वर्गसुखाचा मार्ग - मोक्षसुखाचा मार्ग (६-१५६ ते १५८) - पूर्वेकडून निघून पश्चिमेच्या घरी येण्याचा मार्ग (६-१५९) - हमखास यशाचा मार्ग - अद्वैतप्राप्तीचा मार्ग - सामरस्याचा मार्ग (६-१५९,१६०) - साधनेसाठी स्थळ निवडणे - एकांत इ. (६-१६३ ते १८०) - आसन (गीतोक्त) (६-१८१ ते १८५) - आसनग्रहण - सद्गुरुस्मरण (६-१८६ते१८९) - स्थिरसुखमासनम् - सिद्धिदायक वज्रासन - आधारमुद्रा - मूळबंध (६-१९० ते १९९) - अपानप्रक्रिया - प्राणायामास सुरुवात (आसनयोगे) (६-२००) - नासाग्रदृष्टी -अंतर्दृष्टी - बहिर्लक्ष्य - अंतर्लक्ष्य (६-२०१ ते २०६) - व्योमलक्ष्य (६-२०६)-जालंधरबंध (६-२०७, २०८)-प्राणायाम - नाभिआधार - हृदयाधार - हृत्कमलविकास (६-२०९) - वोढियाणा बंध (६-२०९, २१०) - एकाग्रता (६-२११ ते २१३) - प्रत्याहार (६-२११ ते २१३) - प्राणायाम व नाडिशुद्धी (६-२१४ ते २१९) - पृथ्वी व आपतत्त्वांचे कालवणे (६-२२०) - कुंडलिनीजागृति (६-२२१ ते २२७)– शक्तीचे कंदस्थानी उभे राहणे - सरळ होणे - सुषुम्नामुखात प्रवेश करण्याची स्थिती (६-२२७) - ऊर्ध्वाभिमुख कुंडलिनी - सप्तधातुलय (६-२२८ ते २३५) - कुंडलिनीच्या ज्वाळा - प्राणांची गती निरुद्ध करणे - केवलकुंभक प्रकटणे (६-२३६) - अध:कुंडलिनी आकुंचन व ऊर्ध्वकुंडलिनी निपात - प्राणापानांची साम्यापूर्वीची स्थिती (६-२३७, २३८) - षट्चक्रभेदनाची प्राथमिक अवस्था - एकदम साही चक्रांचा वेध घेतला जाणे (६ - २३७) - पृथ्वी व आपतत्त्वांचा कुंडलिनीत लय व सुषुम्नाप्रवेश (६-२३८, २३९) - प्राणांचे मणिपूरचक्रावरून उत्क्रमण - नाड्यांचा लय - वायूचा प्राणात लय - इडा पिंगळांचा लय - त्रिग्रंथिभेदन - षट्चक्रभेदनसंपूर्णता (६-२४० ते २४४) -केवलकुंभकसिद्धी (६-२४५)- बुद्धितत्त्वाचा कुंडलिनीत लय - वायूचे कुंडलिनीसह सुषुम्नेत प्रवेशणे- मध्याकुंडलिनी निर्देश (६-२४६, २४८) - कायसंपतसिद्धी (६-२४९ ते २६८) - अन्यसिद्धिप्रकाशन (६-२६९ ते २७०) - प्राण = (मन + बुद्धि + वायुतत्त्व) यांचे कुंडलिनीसह सुषुम्नामार्गे हृदयस्थानी येणे (६-२७१) - अनाहतध्वनिप्राकट्य - जीवात्मा व कुंडलिनीची भेट - प्रणव वा अजपाजपसिद्धी (६-२७२ ते २७६) - ब्रह्मद्वार उघडणे व जीवात्म्यासह तेजतत्त्वाचा कुंडलिनीत प्रवेश - कुंडलिनीत केवळ वायू व आकाशतत्त्व उरणे (६-२७७ ते २८६) - हृदयचक्रावर ही स्थिती प्राप्त होणे - मनाचा लय (प्राथमिक) - नाद-बिंदु-कला-ज्योती न उरणे (६-२८६ ते २९०) - शक्तीत तेजतत्त्वाचा लय - खेचरीसिद्धी - अनेक उत्तमोत्तम सिद्धींची प्राप्ती (६-२९३ ते २९७) - अणिमादिक प्राकट्य (६-२९७) - पिंडे पिंडाचा ग्रासु = महाभूतांचा लय = लययोग = पंथराज (६-२९० ते २९२)- पृथ्वीतत्त्वाचा आपतत्त्वात - आपाचा तेजस्तत्त्वात - तेजाचा वायुतत्त्वात हृत्चक्रस्थानी लय होतो; हा पूर्वभागाचा सारांश येथे दिला आहे (६-२९८,२९९).

पंथराजाचा पुढील अनुक्रम

त्यानंतर पंथराजाचा अनुक्रम पुढीलप्रमाणे आहे:

पवन वा वायुतत्त्वाने संपन्न कुंडलिनीचे मारुत नाम - शक्तित्व अद्याप लय न पावणे - शिवतत्त्वात जेव्हा लय होईल तेव्हा शक्तित्वाचा लोप होईल (६-३००, ३०१) - जालंधरबंधाचे उल्लंघन - ॐकाराच्या पाठीवर पाय देणे - पश्यंतिवाणीस्थानाचे अतिक्रमण - भ्रूचक्रावरील स्थिती - अर्धमात्रेचा आकाशतत्त्वात लय होणे - ककारांतभेद - गगनावर कुंडलिनीचे आरोहण - गगनतत्त्वाचा कुंडलिनीत लय - ब्रह्मरंध्रस्थिती (६-३०२ ते ३०५) - सोऽहंतत्त्वाचा प्राणासह व कुंडलिनीसह (जीवात्म्याच्या शक्तीसह) परमात्मलिंगात लय - "गगनी गगन लय पावावे" इतके सामरस्य असणारी स्थिती - पिंडाच्या रूपाने पदाचा पदात प्रवेश (पिंड म्हणजे कुंडलिनी, तिच्या रूपाने जीवात्म्याचा म्हणजे पदाचा परमात्म्यात म्हणजे पदात लय होणे - "पिंडाचेनि मिखैं। पदीं पद प्रवेशें।।६-३०८)।।") (६-३०६ ते ३०९) - जिवाशिवाचे मिलन - अद्वैतप्राप्ती -महाशून्यात प्रवेश (६-३१०ते ३१५) - मन- प्राण -पंचमहाभूते -इंद्रियतन्मात्रा व त्यांचे विषय या सर्वांचा संकल्प - विकल्प - बुद्धी इ.सह पूर्ण लय झालेली उन्मनी -तुर्यातीत आदिअंतरहित मूळ चैतन्यमय मोक्षस्थितीची प्राप्ती - स्वरूपप्राप्ती - महासुखप्राप्ती - परमात्म्यैक्यस्थिती - जीवन्मुक्तावस्था - योगफलसिद्धी - पंथराजाचे गंतव्य प्राप्ती (६-३१६ ते ३२७) - विश्वाचा लोप (६-३२८).

पंथराजक्रमाचा पुनर्विचार

उपरोक्त पंथराजाच्या धावत्या आलेखाचा एकवार पुनर्विचार करू या:

वैराग्य हा पंथराजाचा पाया आहे. गीता-ज्ञानेश्वरीत सांगितलेल्या दैवीगुणसंपदेच्या अर्जनाने आणि आसुरीगुणांच्या त्यागाने यमनियमादी योगांगांचा अभ्यास होतो. कर्म करण्याचे कौशल्य, कर्म ब्रह्मार्पण करण्याची वृत्ती, सात्त्विक अंगांचा परिपोष आणि रजतमांचे प्राबल्य कमीकमी करत जाणे, ईश्वरप्रणिधान या आणि इतर गीता-ज्ञानेश्वरोक्त विविध उपायांचा अवलंब करून वैराग्य ठसते आणि ***विवेकशक्ती*** प्रबळ होत जाते. यातील **ईश्वरप्रणिधाना**च्या उपायाने आणि **स्वाध्याया**च्या अभ्यासाने साधकाच्या अंतरी ***सोऽहंभाव*** उदित होऊ लागतो. त्याला ***गुरुकृपा*** जेव्हा प्राप्त होते, तेव्हा तो हे पंथराजाचे साधन अभ्यासाच्या मार्गाने शेवटच्या महत्त्वाच्या टप्प्यात घेऊन जाऊ शकतो.

कुण्डलिनी उत्क्रमण (२)::::

कुण्डलिनी

आतापावेतो ***यमनियम -आसन -प्राणायाम - प्रत्याहार*** या अंगांचा तसेच ***धारणा - ध्यान - समाधि*** या अंगांचा बराचसा अभ्यास साधकाने विविध उपायांनी व प्रामुख्याने ईश्वरप्रणिधानाने केलेला असतो आणि ***संयम*** सिद्ध होऊन त्यास आता वरच्या म्हणजे आकाशाच्या मार्गात सुषुम्नामुखातून प्रवेश करून घ्यावयाचा असतो. पूर्वेच्या द्वारात कुंडलिनीशक्ती सुप्तावस्थेत सर्पिणीप्रमाणे वलयांकित स्थित असते. तिने ***ब्रह्मद्वार म्हणजे सुषुम्नामुख*** अडवलेले असते. ***मन व प्राण*** ही दोन्ही या पुढच्या अभ्यासासाठी विशिष्ट प्रकारे वापरून ***कुंडलिनीस जागृत करणे*** **हा संप्रज्ञात समाधीचा पुढील विनियोग आहे.**

संयमजयाने ***ऋतंभराप्रज्ञाप्राप्ती*** करणे हे त्यावेळचे पातञ्जलयोगाप्रमाणे ध्येय असते. ***ऋतंभरा हीच जागृत कुंडलिनी होय,*** असे आपण यापूर्वी अनुमानप्रमाणाने पाहिले आहे. संप्रज्ञात समाधीची परिपक्व भूमिका म्हणजे ***निर्विचारवैशारद्य*** प्राप्त झालेल्या योग्यास आता गुरुकृपेच्या साहाय्याने संयमजय करून प्रज्ञाजागृती वा प्रज्ञाप्राप्ती ***(ऋतंभरा वा कुंडलिनी)*** करणे हे या स्थितीतले ध्येय असते.

ज्यास सर्वसामान्यपणे ***कुंडलिनीयोग - हठयोग - लययोग - नादयोग - तारकयोग*** -अशा विविध नामांनी ओळखले जाते, तो खरे तर योगाचे एक अंतरंग साधन असा हा भाग आसनादींच्या विशिष्ट प्रयोगांनी साध्य केला जातो.

केवलकुंभक

ज्ञानेशांनी हा पुढचा पंथराजप्रणीत अभ्यास करण्यासाठी साधकांस उत्तम, मनोहर, सुशांत, प्रसन्न असे एकांत स्थळ निवडण्याची मौलिक सूचना केली आहे. त्या ठिकाणी मृगाजिनादी आसनाचा उपक्रम पुढे विशद केला आहे. त्यानंतर आसनावर बसतांना साधकाच्या चित्तवृत्ती एकाग्र होण्यासाठी सद्गुरुस्मरण करावे आणि पतञ्जली म्हणतात ते ***"स्थिरसुखमासनम्"*** कसे अवलंबावे, त्याचे वर्णन ते करतात.

हठयोगी ज्यास सर्वसिद्धिप्रदायक असे समजतात, त्या वज्रासनाचा योग्याने अवलंब करावयाचा आहे. मूलाधारस्थित - खरे तर मूलाधाराखालील कंदात असणाऱ्या कुंडलिनीशक्तीला जागृत करण्यासाठी यानंतर राजयोगादी सर्वमान्य असा ***मूळबंध*** करणे आवश्यक ठरते. हा बंध प्राणायामास चालना देणारा असतो. आता जो प्राणायाम अपेक्षित आहे, तो बहिरंग प्राणायाम म्हणजे पूरक - कुंभक - रेचक या प्रकारचा श्वास-प्रश्वास गतींच्या नियंत्रणाचा नसून ज्यास ***अंतरंग प्राणायाम*** म्हणायला हवे त्या स्वरूपाचा असतो.

श्रीमच्छंकराचार्यांनी ***योगतारावली***त सांगितलेला महान असा कुंभकांचा सम्राट म्हणजे ***केवलकुंभक*** ही या प्राणायामाची शिखरावस्था यापुढे प्राप्त करून घ्यावयाची आहे. **प्राणापानांचे आवागमनमार्ग म्हणजे अंतरंगातील सूर्य-चंद्र वा इडापिंगला या नाड्या. त्यांचे मार्ग बदलून त्यांचा सुषुम्नेशी समरसीकरणाचा प्रयोग केवलकुंभकात अभिप्रेत आहे.** ***मूलबंध*** साध्य करून योगी आता या पुढील अभ्यासाकडे वळणार आहे.

कुंडलिनीचे ध्यान

आधारमुद्रा वा मूलबंध साध्य झाला की अपानवायूचे मूलाधाराकडे आकर्षण होऊ लागते. योग्यास एकाग्र दृष्टीसाठी ज्ञानेश ***नासाग्रदृष्टी*** अवलंबण्यास सांगतात. गोरक्षनाथांनी सांगितलेले ***अंतर्दृष्टी - बहिर्लक्ष्य*** ध्यान येथे अभिप्रेत आहे. पुढील अभ्यासासाठी खरे तर ज्ञानेशांना येथे ***अंतर्लक्ष्य व सुषुम्ना - कुंडलिनीध्यान*** अभिप्रेत असले पाहिजे. म्हणजे श्रीगोरक्षांनी ***"त्रिधावर्तं भगमण्डलाकारं तत्र मूलकन्दं तत्र शक्तिं पानाकारां ध्यायेत् ...।।२-१।।सि.सि.प.।।"*** असे मूलकंदातील ***"पानाकारं "*** म्हणजे अग्नीच्या आकाराच्या म्हणजे अग्निज्वालासमान ***"(वह्निज्वालांचि घडि।।६-२२५।।)"*** अशा कुंडलिनीचे जे स्वरूपवर्णन ज्ञानेशांनी केले आहे, तिचे सुषुम्नाव्योमासहचे ध्यान योग्याने करावयाचे आहे. हे ध्यान गोरक्षादी योगमार्तंडांनाही या अवस्थेत अभिमत आहे. अशा ध्यानाचे अत्यंत सुंदर वर्णन **घेरंडसंहिते**च्या षष्ठोपदेशात दिलेले आहे *(षष्ठोपदेश श्लोक क्र.१ते २२ तत्रैव)*. ते जिज्ञासूंनी मुळातूनच पाहावे.

त्रिबंध व हृदयाकाश

यानंतरची पायरी म्हणजे ***जालंधरबंध.*** प्राणायामाच्या या अभ्यासाची पुढील पायरी म्हणजे ***वोढियाणाबंध*** किंवा ***उड्डीयानबंध (ओडियान). मूल-जालंधर-ओडियान*** हे त्रिबंध केले असता प्राणस्थिती हृदयात होऊन त्या चक्राचा विकास होतो. यासाठी येथे हृदयाधाराचे ध्यान अभिप्रेत असावे. कारण ज्ञानेश ***"आंतरीं फांकें। हृदयकोशु।।६-२०९।।"*** म्हणतात, त्यासाठी गोरक्षनाथांनी हे ध्यान सांगितलेले आहे. येथेही पूर्वीचाच महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो - तो म्हणजे ***हृदयकोश किंवा हृदयाकाश कोणते*** सांगितले आहे हा.

सौंदर्यलहरीत अनाहतचक्राचा *(स्थूल हृदयनिर्देशित)* उल्लेख नाही. जो उल्लेख आहे तो **हृद्देशा**चा ***"(हृदि मरुतम् आकाशम्***

या चक्रांचा उल्लेख ***"महीं मूलाधारे कमपि मणिपूरे हुतवहं। स्थितं स्वाधिष्ठाने हृदि मरुतमाकाशमुपरी। मनोऽपि भ्रूमध्ये सकलमपि भित्वा कुलपथं। सहस्रारे पद्मे सह रहसि पत्या विहरसे।।सौं.९।।"*** या श्लोकात आहे. तेथे **विशुद्धिचक्रा**चा पण उल्लेख नाही.

संवित्कमलाचा उल्लेख ***"समुन्मीलत्संवित्कमल मकरन्दैकरसिकं। भजे हंसद्वन्द्वं किमपि महतां मानसचरम्। यदालापादष्टादशगुणित-विद्यापरिणतिर्यदादत्ते दोषाद् गुणमखिलमद्भ्यः पय इव।।सौं.३८।।"*** हे ***स्थूलहृदयनिर्दिष्ट अनाहतचक्र*** नाही, असे श्री.विष्णुतीर्थ महाराज यांचे रमणगीतेवर आधारित मत आहे. हे स्थान म्हणजे आत्म्याचे आहे, जेथून मनाचे स्फुरण होते आणि जेथे परमात्मा असतो. याच ठिकाणी ***"हंसः"*** मंत्राचा जप केला जातो. ***हंसांची जोडी अष्टदलपद्मात विराजते.*** अर्थातच हे स्थान ब्रह्मांडस्थित अत्युच्च स्थान आहे आणि काही जण या **संवित्कमलाचा अनाहतचक्र असा जो अर्थ घेतात, तो अयोग्य दिसतो.**

आज्ञा, विशुद्धि, मणिपूर व स्वाधिष्ठान या चक्रांचे वर्णन अनुक्रमे *श्लोक क्र.३६,३७,४०व३९* **सौंदर्यलहरी** यातून येते. ***"तवाधारे मूले सह समयया लास्यपरया। शिवा(नवा)त्मानं मन्ये नवरस-महाताण्डवनटम्। उभाभ्यामेताभ्यामुद(भ)यविधिमुद्दिश्य दयया। सनाथाभ्यां जज्ञे जनकजननीमत् जगदिदम्।।सौं.१।।"*** मध्ये जो **मूला**चा निर्देश आहे, तो मूलाधार चक्राचा आहे, असे काही अभ्यासकांचे मत आहे. श्री.विष्णुतीर्थ यांचे असेच मत ***समयाचार - समयादेवी***च्या कथित निर्देशावरून ***"(सह समयया)"*** तसेच काही अन्य कारणांनी आहे. ***लक्ष्मीधरी*** टीकेच्या आधारे असे मत ***समयाचारी*** परंपरेस अनुरूप आहे. पण ***जॉन वुड्रॉफ*** आणि अन्य टीकाकार ***(सं.Saundaryalahari of Sri Shankaracarya by Swami Tapasyananda)*** यांच्या मते हा उलेख समयादेवीचा नसून ***"शिवासम जी"*** या अर्थी आहे.

"शिवः शक्त्या युक्तौ यदि भवति शक्तः प्रभवितुं। न चेदेवं देवो खलु कुशलः स्पन्दितुमपि। अतस्त्वामाराध्यां हरिहर - विरिञ्चादिभिरपि। प्रणन्तुं स्तोतुं वा कथमकृतपुण्यः प्रभवति।।सौं.१।।" हा *सौंदर्यलहरी* चा आरंभीचा श्लोक पाहिला तर *सौंदर्यलहरी* वरील ***शक्ती*** या आद्यतत्त्वाचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. ***शिव-शक्ती*** या आदियुगुलातील शक्तीस्तवनपर ही रचना आहे. हे लक्षात घेता ***सौं.४१*** या श्लोकात ***समयादेवी*** चा उल्लेख केल्याचे जे समजले जाते, तो तसा नसून तो ***श्री.स्वामी तपस्यानंद*** म्हणतात, तसा तो ***महाभैरवी***स अनुलक्षून असला पाहिजे. ***"शिवात्मानं (नवात्मानं)"*** हा निर्देश **महाभैरवा**चा आहे, असे ते म्हणतात. या सर्व गोष्टींचा विचार करता ही ***समयादेवी*** असो किंवा ***महाभैरवी*** असो, ती ***लास्य*** पर आहे; **महातांडवा**त शिवासह मग्न आहे; त्यांच्यापासून या जगताची उत्पत्ति आहे, इ.गोष्टी ही देवी व शिव हे ज्या स्थितीत आहेत, ती जगदुत्पत्तिपूर्व आणि जगताच्या अंतीची आहे. ती नक्कीच मूलाधारात जी कुंडलिनीची सुप्तावस्था असते, तिची निर्देशक नाही. ज्ञानदेवांनीही या शिवशक्तीच्या तांडवाचा अन् लास्याचा अशाच प्रकारचा उल्लेख ***"वामांगीचा लास्यविलासु। जो हा जगद्रूप आभासु। तो तांडवमिसे कलासु। दाविसि तूं।।१७-८।।ज्ञा.।।"*** या ओवीतून केला आहे!

यावरून येथे ज्या **मूला**चा निर्देश आहे, ते **मूलाधारचक्रा**चा नसून **ऊर्ध्वमूल** म्हणजे या जगताची आद्यस्थिती, तसेच अंतिम स्थिती यांची निर्देशक जी अवस्था असते तिचा आहे. हे स्थान आपल्या योगपरिचयानुसार **अष्टदल संवित्कमला**च्या अगोदरचे स्थान असले पाहिजे, जेथून ***हंसाची जोडी*** अस्तित्वात येते. ***"विशुद्धि-➢आज्ञा -➢सहस्रदलकमल-➢त्रिकूटी-➢६ शून्ये-➢ब्रह्मरंध्र (सातवे शून्य)-➢६महाशून्ये-➢भ्रमरगुहा-➢सत्यलोक-➢अलक्ष्य -➢अगम-➢अनामीलोक"*** हा योगपथ लक्षात घेता हे शिवशक्तीच्या लास्याचे-तांडवाचे स्थान निश्चितच ***भ्रमरगुंफेवरील अलक्ष्य*** आणि तत्सम अत्युच्च स्थान असले पाहिजे. काही योग्यांच्या अनुभूतीवरून ***भ्रमरगुंफा* हे स्थान त्यांच्या अभिव्यक्तीचे - नर्तनाचे स्थान असून *अलक्ष्य* हे त्यांच्या स्थितीचे स्थान आहे. त्यानंतर काही नाही - निर्गुण ब्रह्मच आहे!**

हृत्संवितचक्र व अनाहतचक्र इ.

पण टीकाकारांनी व लेखकांनी या स्थळी ***(हृदयाकाश-हृत्कोष-हृदि-हृद्देश*** इ.संज्ञांच्याबाबत, तसेच ***सौंदर्यलहरी*** तील वेगवेगळ्या श्लोकात निर्दिष्ट असलेली चक्रे) आपापल्या बुद्धीप्रमाणे **अनाहता**दी विख्यात चक्रे धरली आहेत. मुळात श्रीशंकराचार्यांना ***सहस्रार, हृत्संवित, आज्ञा, विशुद्धि, मणिपूर, स्वाधिष्ठान व मूलाधार*** ही चक्रेच अभिप्रेत असल्यास ती पण सहस्रारासह असणारी ***षट्चक्रसंस्था*** होऊ शकते. त्यातच ***मूल*** म्हणजे ***भ्रमरगुंफा*** व **कोल्हाट-अलक्ष्या**दी योगपथावरील स्थानांचा अंतर्भाव केला तर वस्तुतः कुंडलिनीयोगाचा, तसेच ज्या ***श्रीचक्र***साधनेचे ***सौंदर्यलहरी***त प्रामुख्य आहे असे टीकाकार म्हणतात, त्यांचा सर्वंकष उलगडा होण्यास साहाय्य होईल.

अनाहतचक्राचे सध्या अस्तित्वात असलेले माहात्म्य वगळल्यास वस्तुतः सौंदर्यलहरी श्लोक क्र.३८मध्ये सांगितलेली बहुतांश महत्त्वाची सर्व वैशिष्टये ***हृत्संवित*** या चक्रस्थानी म्हणजे ब्रह्मांडात आहेत असे स्पष्ट होते. ही वैशिष्ट्ये खरी तर अनाहतात नाहीत. पण ती सर्व अनाहतात धरून जीवात्म्याचे स्थानही **अनाहता**त धरल्याने लयक्रमात बऱ्याच अडचणी निर्माण होतात. अनाहतनादप्राकट्याबाबत आपण त्याबाबत उद्भवणाऱ्या अडचणींचा अगोदरच मागील उन्मेषात विचार केला होता*(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचनः योगपथ पृ.क्र. ७५१,७५२).*

त्या अडचणींचा निरास करण्यासाठी मग बऱ्याच कोलांट्या उड्या मारून अशास्त्रीय उपपत्त्या मांडून लयक्रम दाखवावा लागतो. त्याऐवजी

जीवात्म्याचे स्थान हृत्संवितकमलात आहे, असे मान्य केले तर ते शास्त्रशुद्धही आहे, तसेच ही बरीच यातायात वाचते.

रमणमहर्षींनी या प्रकारच्या चुकीच्या मतावर रमणगीतेत जो प्रकाश टाकला आहे, तो असा: ***"अहंवृत्तिः समस्तानां वृत्तीनां मूलमुच्यते। निर्गच्छति यतोऽहंधीहृँदयं तत्सामासतः।।३।। हृदस्य यदि स्थानं भवेच्चक्रमनाहतं। मूलाधारं समारभ्य योगस्योपक्रमः कुतः।।४।। अन्यदेव ततो रक्तपिण्डाद्धृदयमुच्यते। अहंहृदितिवृत्त्या तदात्मनो रुपमीरितम्।।५।। तस्य दक्षिणतो धाम हृत्पीठे नैव वामतः। तस्मात्प्रवहति ज्योतिःसहस्रारं सुषुम्नया।।६।।"-***

सर्व वृत्तींचे मूळ ***अहम् वृत्ती*** आहे. ***ज्या स्थानात या वृत्तीचा उदय होतो, ते हृदय असते.*** जर स्थूल हृदय हेच अनाहतचक्राचे स्थान समजले, तर मूलाधारचक्रापासून सुरू होणारा कुंडलिनीयोग कसा उपपन्न होईल? जर शिवणमध्यस्थित मूलाधारचक्रातून कुंडलिनी उत्क्रांत होऊन स्थूल हृत्प्रदेशातल्या म्हणून म्हटल्या जाणाऱ्या अनाहतचक्रातच तिची इति होणार असेल, तर मग ***विशुद्धी, आज्ञाचक्र, ब्रह्मरंध्र, भ्रमरगुंफा*** इ.स्थानांचे काय माहात्म्य उरेल?

या सगळ्याचा विचार करता आध्यात्मिक हृदयाचे स्थान व तत्स्थित जे खरे अनाहतचक्र आहे, जेथे अनाहतनादाचे प्राकट्य होते, त्याचे स्थान स्थूल हृत्स्थान नसून ते इतरत्र असले पाहिजे. ***"अयं हृद"*** या श्रुतीने आत्मस्वरूपाचा निर्देश होतो ***(हृद् + अयम् = हृदयम्,*** *इति छांदोग्य उप.८-३-३).* त्याचे स्थान दक्षिण आहे; वाम नाही. **त्या स्थानातून ज्योतीचा प्रवाह निघतो आणि सुषुम्नेतून सहस्रारात जातो.** ***अहंवृत्ती***चे अथवा ***अहंसंवित***चे ज्ञान ज्या ठिकाणी उदित होते, तेच ***हृत्स्थान*** म्हणून जाणले पाहिजे. ते आत्म्याचे स्थान आहे, जेथून अहंवृत्तीचे स्फुरण होते. तेथेच परमात्मा विराजतो आणि ***"हंसः"*** मंत्राचा जप होतो.

हंसोपनिषदानुसार तेथे ***अष्टदलपद्म*** असते ***("हृदयेऽष्टदले हंसात्मानं ध्यायेत।")***. त्यात हंस व हंसी यांची जोडी असते. ही पुरुष-प्रकृतिस्वरूप आहे. त्यांच्या संवादातून योग्यास १८ विद्यांचा उपदेश होतो (***"यदालापादष्टादशगुणितविद्यापरिणतिर्यदादत्ते दोषाद्गुणमखिलमद्भ्यः पय इव।।सौं.३८।।"***). गौडपादाचार्यांच्या **सुभगोदय**वरील शांकरभाष्यात या हंसांच्या जोडीचे रूप योग्यांना दीपशिखासदृश दृग्गोचर होते, असे म्हटले आहे. हंसेश्वराला ***शिखी*** व हंसेश्वरीला ***शिखिनी*** असे तेथे म्हटले आहे. या **आध्यात्मिक हृत्स्थाना**तील हृत्पद्मामध्ये त्यांचे ध्यान करणे अभिप्रेत आहे.

नारायणोपनिषदात या पद्माचे वर्णन आहे ***("तस्य मध्ये वह्निशिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थितः। नीलतोयदमध्यस्थाद्विद्युल्लेखेव भास्वरा, नीवारशूकवत्तन्वी पीता भास्वत्यणूपमा। तस्याः शिखाया मध्ये परमात्मा व्यवस्थितः, स ब्रह्मा, स शिवः, स हरिः, सेन्द्रः, सोऽक्षर परमः स्वराट।।खंड१३।।")*** - या हृत्कमलाच्या मध्ये अग्नीची लहानशी शिखा आहे. नीलवर्णाच्या मेघांमध्ये चमकणाऱ्या विद्युतरेखेसम ती बारीकशी दिसते. त्या शिखेमध्ये परमात्मा वसतो. त्या प्रकाशात दिसणारा श्यामवर्ण हंसेश्वराचा आणि पीत वर्ण हंसेश्वरीचा समजला जातो.

श्री.रमणमहर्षींचे फारसे ख्यात नसलेले मत असे आहे, हे ***श्री.स्वामी विष्णुतीर्थांच्या सौंदर्यलहरी*** *(हिन्दी टीका-सं.२०३४विक्रमी.)* या ग्रंथावरून दिसून येते *(पृ.क्र.१९७ ते २०१ तत्रैव).* तसेच **हे हृत्संवितचक्र अनाहतचक्रासारखे बारा दलांचे नसून अष्ट दलांचे असते,** हेही लक्षात घेण्यासारखे आहे. आणि लययोगांतर्गत स्थूल हृत्स्थाननिर्दिष्ट अनाहताठायी नादप्राकट्यासंबंधी जो वाद उद्भवतो, त्याचेही निराकरण होते. तसेच मग **हा नाद हृत्संवितकमलात स्थिती होतांना प्रकटतो, हा शास्त्रशुद्धत्वाच्या कसोटीवर टिकणारा निष्कर्ष निघतो.**

या ठिकाणी आणखीही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो म्हणजे ***श्रीगोरक्षनाथांनीही* सिद्धसिद्धांतपद्धति *या ग्रंथात अनाहतचक्राचा उल्लेख केलेला नसून हृदयाधारचक्राचा व तेही अष्टदलपद्म असल्याचा उल्लेख तेथे आहे (श्लोक क्र.२-४).*** याचा विचार आपण प्रथम मागील उन्मेषात केलेला होता. तिकडेही जिज्ञासूंचे लक्ष वेधणे योग्य होईल *(पृ.क्र. ७५१,७५२ -उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ).*

हा सर्व विचार मान्य करता एक प्रश्न अद्याप उरतो. तो म्हणजे योगशास्त्रात बहुचर्चित असे **अनाहत**ाख्य हे चक्र मग कुठले आणि त्याचे स्थान ते कोणते हा! याबाबत आपण सर्वसामान्य यौगिक ग्रंथांची भूमिका मान्य करून त्याचे स्थान स्थूलहृत्पिंडनिर्दिष्ट समजावयास काहीच प्रत्यवाय नाही. तसेच ते बारा दलांचे असते. तेथे वर्ण वा मातृका असतात, ही माहिती मान्य करावी. ***Arthur Avlon***च्या ***The Serpent Power*** या ग्रंथात दिलेल्या माहितीनुसार आणि इतर तंत्रशास्त्रोक्त माहितीवरून हे चक्रवर्णन पाहून पुढे जाऊ या.

हे प्रचलित **अनाहत**ाख्य चक्र प्राणाचे व पश्यंतिवाणीचे स्थान आहे. यात ***पद्मिनी, सदर्भा*** इ.बारा शक्तींचे वास्तव्य आहे. **त्रैलोक्य, वित्कर**ादी बारा प्रकारचे आनंद तेथे मिळतात. त्याचा वर्ण धवल आहे. हे **सरूपता मुक्ती**चे स्थान असल्याचे एक मत सांगते.या चक्राची शक्ती ***गौरी*** आहे. या चक्रावर ***"कं,खं,गं,घं,ङ,चं,छं,जं,झं,ञं,टं व ठं"*** ही बारा बीजाक्षरे वा मातृका असतात.या चक्राचे मंत्रबीज ***"यं"*** हे आहे. या चक्राच्या कर्णिकेत एक रक्तवर्णाचे ***अष्टदलपद्म*** असते. त्यात कल्पतरू, रत्नखचित सिंहासन असते. मानसपूजेचे हे स्थान आहे, असे तंत्रोक्त मत आहे.

सौंदर्यलहरी श्लोक क्र.८मध्ये ***"सुधासिन्धोर्मध्ये सुर विट-पिवाटीपरिवृते। मणिद्वीपे नीपोपवनवति चिन्तामणिगृहे। शिवाऽऽकारे मञ्चे परमशिवपर्यङ्क निलयां। भजन्ति त्वां धन्याः कतिचन चिदानन्दलहरीम्।।"*** असे म्हणून या परमशिवस्थानात कल्पतरू, मणिद्वीप, चिंतामणिगृह हे असल्याचा तेथे उल्लेख केला आहे. ***Arthur Avlon*** च्या ***The SerpentPower*** या ग्रंथातसुद्धा ***पादुकापंचक*** या प्रकरणात सहस्त्रदलपद्माच्या कर्णिकेला

जोडून वर ज्याची कर्णिका असते त्या रक्तवर्ण द्वादशदलपद्माचा आणि त्यातील मणिद्वीप, मणिपीठ इ.संज्ञांचा उल्लेख येतो.

यावरून १) द्वादशदलांचे ***अनाहतचक्र***, २) त्याखालील कल्पतरू, मणिपीठ इ.असणारे ***अष्टदलपद्म,*** ३) ***सौंदर्यलहरी***तील अष्टदलांचे ***हृत्संवितचक्र*** व ४) ***सिद्धसिद्धांतपद्धति*** या ग्रंथातील श्रीगोरक्षांनी वर्णिलेले ***हृदयाधार*** हे अष्टदलचक्र आणि ५) हे ***सहस्रदलावरील द्वादशदलपद्म*** यांचे स्थानमाहात्म्य, योगसंकेत आणि वर्णन यांबाबत जिज्ञासू आणि योगशास्त्राचे अनभिज्ञ आणि अनुभव नसणारे अभ्यासक, लेखक इ.चा योगशास्त्रसंबंधित विचार करतांना आणि ग्रंथ लिहितांना पुरेपूर गोंधळ उडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यात भर पडते ती अनेकानेक तंत्रग्रंथांची, त्यांवरील टीकांची आणि वेगवेगळ्या यौगिक संप्रदायांच्या एतद्विषयक विविध धारणांची आणि संज्ञांची!

असा हा सावळागोंधळ निस्तरून त्यातील योग्य अर्थ संपूर्ण माहितीसह देण्यासाठी जरूरच कोणातरी योगमार्तंडांची आवश्यकता जाणवते. पण त्यांचे ते गुह्यतेचे सांप्रदायिक दंडक आणि त्यातून त्यांनी क्वचित काही माहिती दिलीच तर त्याचा ज्ञानेश्वरी आदी योगप्रचुर ग्रंथांवर विचार आणि लिखाण करणाऱ्या बुद्धिमंत पण योगानुभव नसणाऱ्या साहित्यिक, लेखक आणि इतर अभ्यासकांस काय लाभ होणार हाही एक मोठाच प्रश्न आहे. असो.

तरी आपणास या सर्व मुद्द्यांचा परामर्ष जरूर घ्यावा लागेल. पण आताच्या प्रसंगी तो स्थगित ठेवू या. टीकाकारांनी, भाष्यकारांनी आणि ज्ञानेश्वरीवर लिहिणाऱ्या अनेक विचारवंतांनी सांगोवांगी ***हृत्कोश*** वा ***हृत्काश*** हे अनाहतचक्राच्या जागी धरल्याने होणारा वैचारिक कल्लोळ फक्त स्थगित करून सध्या तरी आध्यात्मिक हृत्स्थान कोणते व अनाहतनादाचा कोठे संभव होतो हे मुद्दे विचाराधीन ठेवून आणि बहुश्रुत अनाहतचक्र हेच ते स्थान हा पूर्वग्रह बाजूस ठेवून रमणमहर्षींच्या मतानुसार ते ***हृत्संवित*** ही असू शकेल हा विचार मनी ठेवून पंथराजाचे पुढील परीक्षण करू या.

[***(टीप-१:हृदयस्थान*** - शास्त्रमते सहा हृदयस्थाने आहेत. ती अशीः १) नाभिस्थ हृदय, २) भौतिकदेही हृदय (स्थूल रक्तमांसपिंड), ३) आज्ञाचक्रस्थ हृदय, ४) हृच्चक्रस्थित आध्यात्मिक हृदय, ५) ब्रह्मांडस्थ हृदय (अर्धमात्रासंधिपुढील म्हणजे आज्ञाचक्रावरील प्रांत) व ६) ब्रह्मरंध्रस्थ हृदय (सहस्रारचक्राच्या कमलदलकर्णिकाअंतर्गत स्थान)]

(टीपः२: गुर्वोपायाचे आत्यंतिक महत्त्व व योगानुभूती नसलेल्या आणि अर्धवट ज्ञानी योगसाधकांनी केलेले योगशास्त्रविषयक लिखाण : योगानुभूतिरहित्य आणि यौगिक दिव्यदृष्टीच्या अभावामुळे डॉ.रेळे, श्री.श्री.म.वैद्य आणि इतर अनेक पौर्वात्य आणि पाश्चिमात्य लेखकांनी षट्चक्रादी व कुंडलिन्याधारित योगशास्त्राबाबत जे काही लिहिले आहे, त्यात एक अत्यंत ***मोठी चूक*** सातत्याने पाहण्यात येते. **ती म्हणजे षट्चक्रे आणि कुंडलिनी ही शरीरशास्त्रातील पार्थिव** *(physical)* **अशी जी रचना आहे, त्यांची मिळून होते ही समजूत.**

ही समजूत कशी धादांत चुकीची आहे, याबाबत श्री.स्वामी विष्णुतीर्थ महाराज यांचे ***देवात्मशक्ती*** आणि *Arthur Avlon* यांचे ***The Serpent Power*** हे ग्रंथ प्रमाण देतात. **षट्चक्रादी आणि कुंडलिनी ही संस्था केवळ दिव्यातिदिव्य अशा अपार्थिव स्रोतांची आहे; ती *Physiological* नाही,** असे स्पष्ट मत या दोघा अधिकारी व्यक्तींनी व्यक्तवले आहे.

श्री.गुरुदेव रानडेलिखित ***योगतारावली*** या पुस्तकाच्या परिशिष्टात ***गुरुदेव रानडेःसाक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान*** या ***श्री.ग.वि.तुळपुळे***लिखित ग्रंथातील गुरुदेवांचे कुंडलिनीविषयक विचार दिले आहेत. त्यावरून असे मत दिसून येते कीः

१) पाठीच्या कण्याच्या मज्जारज्जूंतून *(spinal chord)* वाहणारी एक शक्ती आहे. त्यातून वाहणारा द्रव पदार्थ *(cerebro-spinal fluid)* म्हणजे ती शक्ती नव्हे; तो द्रव पदार्थ त्या शक्तीचा वाहक आहे. याचा निश्चय शरीरशास्त्रज्ञ व योगी यांनी करावा;

२) मज्जारज्जूतून वाहत मेंदूच्या पोकळ भागात *(ventricals)* प्रवेश करणारी अशी एक आध्यात्मिक शक्ती आहे आणि ती आयुर्वेदातील ***ओजस्*** किंवा पाश्चात्यांची ***न्यूरो-इलेक्ट्रिक (मज्जा-विद्युत) शक्ती*** यांच्यापेक्षा श्रेष्ठ, पलीकडची आहे; हिंदी संत ***अमीरस*** म्हणतात ती हीच शक्ती होय.

३) कुंडलिनी म्हणजे ही शक्ती होय, असे गुरुदेवांचे मत असल्याचे श्री.तुळपुळे सांगतात. गुरुदेवांच्या मते ***कुंडलिनी आहे की नाही,*** हाही एक प्रश्न आहे; ***असल्यास ती जड देहाचा एक भाग किंवा एखाद्या भागाचे ते कार्य आहे का,*** हा दुसरा प्रश्न आहे. याविषयक चर्चेत गुरुदेव शिरू इच्छित नाहीत, असे तुळपुळे यांच्या ग्रंथाच्या परिशिष्टात केलेल्या उद्धरणातून दिसून येते.

या विचारांचा मागोवा घेता असे दिसून येते की श्रीगुरुदेवांसारख्या श्रेष्ठ आध्यात्मिकांसही या कुंडलिनी शक्तीचे गूढ आकलन होत नव्हते. हे विचार आहेत ***कट्टाचे ध्यान*** लावणाऱ्या श्रीनिंबर्गीमहाराज संप्रदायातील एका श्रेष्ठ विचारवंताचे आणि योग्याचे! त्यावरून सर्वसामान्य योगोपदेशक वा कुंडलिनीयोगाभ्यासकांस या विषयाचे किती गम्य असेल, त्याची जिज्ञासूंना सहजच कल्पना येईल.

या गैरसमजूतींपैकी काही अशाः *१)* ***मेरु*** म्हणून जी योगशास्त्रीय संज्ञा पातञ्जलयोगसूत्रांवरील व्यासभाष्यात येते, तो म्हणजे शरीरशास्त्रानुसार पाठीचा जो कणा वा मेरुदंड (spinal column),तो आहे; २) डॉ.रेळेंच्या मते कुंडलिनी म्हणजे Vagus nerve हा मज्जातंतू, इडापिंगला, सुषुम्ना, इ.नाड्या म्हणजे शरीरांतर्गत मज्जासंस्थेतील sympathetic and parasympathetic nervous systems मधील वेगवेगळ्या nerves वा मज्जातंतू, षट्चक्रादी विविध चक्रे म्हणजेsympathetic and parasympathetic nervous systems मधील विविध coccygeal, solar, cardiac and other plexuses, ३) कुंडलिनीशक्तीचे प्रवहन वा चालन म्हणजे the brain, its lobes or the right and the left hemispheres, corpus callossum, medula oblangata आणि मेंदू व spinal chord मधील cerebro-spinal fluid यातून मेंदू व मज्जातंतूंमधील

संदेशवहनासाठी होणारे वैद्युतिक प्रवाहाचे वहन; ४) कुंडलिनी म्हणजे हा विद्युतप्रवाह, ५) अध:सहस्त्रार म्हणजे या प्रवाहासाठी लागणारा ऋण विद्युतभार (negative electric charge) धारण करणारे केंद्र आणि ऊर्ध्व सहस्त्रार म्हणजे त्या विद्युतप्रवाहासाठी आवश्यक असणारे धन विद्युतभार (positive electric charge) धारण करणारे शारीरिक केंद्र (centre); ६) विविध समाध्यवस्था व दिव्य गंध, स्वाद, नाद-प्रकाशादी योगानुभूती म्हणजे कुंडलिनीचे मेरुदंडातील पृष्ठवंशरज्जूद्वारे medula oblangata, the four ventricular cavities of the brain, pituitory gland and pineal body या ठिकाणी पोहोचणे आणि त्यामुळे भासमान होणाऱ्या विविध स्वप्नसदृश दृश्य, प्रकाश, नादादी संवेदना; ७) प्राण-अपानादी आणि इडा-पिंगला या नाड्या म्हणजेच नासारंध्र व फुफ्फुसे यांद्वारे होणारे श्वास-प्रच्छ्वासादी अशा निव्वळ भौतिक पातळीवरील क्रिया; ८) प्राण-अपानादी म्हणजे ऑक्सिजन व कार्बन डाय-ऑक्साईड इ.विविध वायू; अशा अनेकानेक उपपत्त्या या योगशास्त्राचा अनुभव नसणाऱ्या विद्वानांनी प्रसारित केल्या आहेत.

गुर्वोपायाचे महत्त्व

योगशास्त्राचे काही अर्धवट ज्ञान असणारे योगमार्तंडसुद्धा त्यांच्या या उपपत्त्यांना दुजोरा देतांना आढळतात. या सर्वांमुळे नवीन योगसाधक आणि जिज्ञासूंचा फार मोठा प्रायोगिक आणि वैचारिक गोंधळ उडतो. तसेच काही so-called गुरू-श्री समर्थरामदासस्वामी ज्यांना अडक्याचे तीन मिळतात, असे म्हणून हेटाळतात, तसले-आपल्या अज्ञानी शिष्यांना योगयुक्ती शिकवण्याच्या उद्देशाने विविध प्राणायामक्रिया, आसनादी, बंध, मुद्रा, षण्मुखी मुद्रा का चतुर्मुखी मुद्रा, इ.करावयास सांगून त्याने त्यांची कुंडलिनी जागृत होईल, असे हठयौगिक शिक्षण देतांना दिसतात.

कुंडलिनी जागृत्युपरांत अशा आसनादी, बंधादी, मुद्रादी कृति आपोआपच घडत असतात. पण त्या कृती करून कुंडलिनी जागृत होईल, असे मानण्यास आनुभविक आधार नाही. फारच झाले तर अशा शारीर प्रयोगांनी व्यायामाचे सुयोग्य लाभ, आरोग्य, रोगप्रतिकारक शक्ती वाढणे, इ.गोष्टी साधकांच्या पदरी पडतील. त्यांचीही योगसाधकांस जरूर आहेच! परंतु कुंडलिनीजागृती ही केवळ पूर्वजन्मीच्या संस्कारांनी, सद्गुरूकृपेने किंवा ईश्वरकृपेनेच शक्य होते, हे निर्विवाद सत्य आहे.

देवात्मशक्ती या ग्रंथात ***श्री स्वामी विष्णुतीर्थ*** म्हणतात की कुंडलिनीजागृतीच्या नंतर चार प्रकारच्या क्रिया होतात: ***"चतुर्विधा सा सन्दिष्टा क्रियावत्यादि भेदत:। क्रियावती वर्णमयी कलात्मा वेधमय्यपि।।"*** याच हठयोगप्रतिपादित बंध-आसन-मुद्रादी क्रिया, मंत्रोच्चारण व मंत्रशक्तीजागृती, भक्तिभाव, चक्रजय,कुंडलिनीचे विविध चक्रांतून उत्क्रमण इ.क्रिया, परोक्षज्ञान व आत्मानात्मविवेकज्ञानप्राप्ती व आत्मतत्त्वाचे दर्शन व साक्षात्कारादी होत.

थोडक्यात दाखवायचे तर ***"कुंडलिनीजागृति -➢ हठयोगी क्रिया; कुंडलिनीजागृति -➢ मंत्रयोग; कुंडलिनीजागृति -➢ चक्रादी दर्शने व वेध; कुंडलिनीजागृति -➢ भक्ती; कुंडलिनी जागृति -➢ परोक्षज्ञान -➢अपरोक्षज्ञान; कुंडलिनीजागृति -➢नादप्रकाशादी दर्शने व अनुभव;"*** अशा प्रकारच्या क्रिया-प्रतिक्रिया कुंडलिनीजागृतीने होतात.

त्यामुळे असा एक समज उद्भवतो की या प्रतिक्रियांच्या स्वरूपाच्या क्रिया जर साधकाने केल्या तर आपोआप मूळ क्रिया म्हणजे कुंडलिनीजागृती ही त्या क्रियांच्या प्रतिक्रियास्वरूप *(न्यूटोनियन सिद्धांतानुसार!!)* होईल!! यातूनच मग साधकांचे हठयौगिक क्रिया करणे; मंत्रजप करणे; देवदेवतांची भक्ती करणे; कुंडलिनी व चक्रांचे ध्यान करणे, त्यांचा वेध झाल्याचे कल्पिणे, त्यांची योग्यांना झालेली लाक्षणिक दर्शने जी अनेक योगविषयक पुस्तकांतून चक्रादींच्या चित्ररूपाने रेखाटलेली असतात, तशी ध्यानासाठी घेणे; डोळ्यांच्या बुबुळांवर दाब देऊन योग्यांना दिसणाऱ्या पांढऱ्या-काळ्या-पिवळ्या रंगाची वर्तुळे पाहणे, नाकपुड्या दाबून श्वासोच्छ्वास रोधणे *(केवलकुंभक होईल या समजुतीने);* कर्णविवरे बंद करून आत होणारा धमन्यांचा आवाज ***अनाहतनाद*** आहे असे समजून ऐकणे; शास्त्रग्रंथ, धर्मग्रंथ, तत्त्वज्ञानग्रंथ, अध्यात्म इ.चा परोक्षज्ञानी अभ्यास, इ.अनेकानेक साधना, त्यांमुळे प्रतिक्रियास्वरूप कुंडलिनीजागृती होईल या आशेने करणे हे प्रकार उद्भवतात.

कदाचित वैज्ञानिकांच्या न्यूटनच्या गतिविषयक तिसऱ्या सिद्धांताप्रमाणे ज्या क्रियाप्रतिक्रियादी सापेक्ष गोष्टी भौतिक विश्वात अनुभवण्यास येतात, तसाच काही प्रकार या प्राणायाम-बंध-मुद्रादी हठयौगिक कृतींनी, मंत्रजपाने किंवा औषधि-रसायनादींच्या प्रयोगादींनी होत असल्यास त्याचे योगशास्त्रोक्त निखळ आनुभविक प्रामाणिक प्रमाण अद्यापपावेतो कोणाही सज्जन-संतमहात्म्यादींनी दिलेले पाहण्यात येत नाही.

त्याउलट स्वप्रयत्नांचे महत्त्व प्रतिपादणाऱ्या पातञ्जलयोगसूत्रातूनही गुरूंचा - ईश्वराचा सादर उल्लेख येतो *(सू.क्र.१-२३ ते २८ व २-४५).* ***श्री.स्वात्माराम योगी*** यांच्या ***हठयोग*** प्रदीपिकेतही ***"श्रीआदिनाथाय नमोऽस्तु तस्मै येनोपदिष्टा हठयोगविद्या।..।।१-१।।"*** आणि ***"प्रणम्य श्रीगुरुं नाथं स्वात्मारामेण योगिना।।२।।"*** असे हठयोगाच्या उपदेष्ट्या आदिगुरु श्रीआदिनाथास आणि स्वत:च्या गुरूंनाही वंदन केलेले आढळते. त्याच ग्रंथात इतरत्रही ***"उपदेशं हि मुद्राणीं यो दत्ते सांप्रदायिकम्। स एव श्री गुरु: स्वामी साक्षादीश्वर एव स:।।३-१२१।।"*** असे सांप्रदायिक मुद्रोपदेश करणाऱ्या गुरूमुळे आणि त्यांच्या वाक्यानुसारच मुद्रादी प्रयोगांचे साफल्य होते, असे सूचित केले आहे. त्याच ग्रंथाच्या चतुर्थोपदेशातही ***"नम: शिवाय गुरवे नादबिंदुकलात्मने ।।४-२।।"*** अशा शिवस्वरूप नादबिंदुकलात्मक श्रीगुरुंना नमन केले आहे. थोडक्यात सांगायचे तर ***हठयोगसुद्धा श्रीशिवतुल्य गुरूंशिवाय सिद्ध होऊ शकत नाही.***

घेरंडसंहिता या योगशास्त्रावरच्या दुसऱ्या एका कमी प्रचलित पण उच्च श्रेणीच्या ग्रंथाचा उपोद्घातच मुळी ***चण्डकापाली***नामक योगजिज्ञासूच्या **घेरंड मुनीं**कडे जाऊन त्यांना सविनय प्रणाम करून केलेल्या योगजिज्ञासाविषयक पृच्छेतून होतो. श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलेल्या ***"तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।..।।४-३४।।"*** या उक्तीनुसारच हे ज्ञान महात्म्या अशा गुरूंच्या उपदेशातून प्राप्त झाले आहे.

सिद्धसिद्धांतपद्धति या नाथसांप्रदायिक श्रीगोरक्षविरचित ग्रंथातही गुरूंचा उपदेशच सिद्धिदायक असल्याचा निर्वाळा आहे. या ग्रंथाचा उपोद्घातसुद्धा ***"आदिनाथं नमस्कृत्य शक्तियुक्तं जगद्गुरुम्।..।।१-१।।"*** अशा आदिगुरु आदिनाथाला नमस्कार करूनच होतो. योगसिद्धीसाठी गुरुसेवाच आवश्यक आहे, असे विधान या ग्रंथातील ***"...गुरुचरणरतत्वात्..।।५-४।।"*** या श्लोकात आहे. गुरूच केवळ सन्मार्गप्रदर्शक आहे, इतर सर्व पाखंडी आहेत, योगमार्गच सन्मार्ग आहे, असा निर्वाळा त्यातील ***"गुरुरत्र सम्यक् सन्मार्गदर्शनशीलो भवति। सन्मार्गो योगमार्गस्तादितर: पाषंडमार्ग:।।५-५।।"*** या गोरक्षवचनाद्वारे दिलेला आहे.

तसेच ***"यस्मिन्दर्शिते सति तत्क्षणात् स्वसंवेद्यसाक्षात्कार: समुत्पद्यते। ततो गुरुरेवात्र कारणमुच्यते।।५-६।।"*** आणि

"तस्माद्गुरुकटाक्षपातात् स्वसंवेद्यतया च महासिद्धयोगिभिः स्वकीयं पिण्डं निरुत्थानानुभवेन समरसं क्रियते इति सिद्धान्तः।।५-७।।" या श्लोकांद्वारेही स्वसंवेद्यत्वाचा साक्षात्कार, निरुत्थानदशाप्राप्ती, आणि ***"पिंडें पिंडाचा ग्रासु"*** यांची सिद्धी केवळ एका गुरुकृपेनेच होते, असे सैद्धांतिक आणि स्वानुभवी साक्षात्कारी मत श्रीगोरक्षनाथ प्रकट करतात.

अत्यंत महत्त्वाचे असे गोरक्षांचे विधान येते, ते ***"सहजं स्वात्मसंवित्तिः संयमः स्वात्मनिग्रहः। सोपायं स्वस्य विश्रान्तिरद्वैतं परमं पदम्।।५-२९।।" व "तज्ज्ञेयंसद्गुरोर्वक्त्रात् नान्यथा शास्त्रकोटिभिः। न तर्कशब्दविज्ञानान्नाचाराद्वेदपाठनात्।।३१।। वेदान्तश्रवणान्नैव तत्त्वमस्यादिबोधनात्। न हंसोच्चारेणाज्जीवब्रह्मणोरैक्य-भावनात्।।३२।। न ध्यानान्न लयाल्लीनः सर्वज्ञः सिद्धिपारगः। स्वेच्छो योगी स्वयंकर्ता लीलया चाजरोऽमरः ।।३३।। असाध्या सिद्धयः सर्वाः सत्यमीश्वरभासितम्।..।।५-३५।।"*** इत्यादी श्लोकांतून!

ते म्हणतात की ***सहज*** म्हणजे आत्मस्वरूपाचे ज्ञान, ***संयम*** म्हणजे आत्मनिग्रह, ***सोपाय*** म्हणजे आत्मविश्रांती व ***अद्वैत*** म्हणजे परमपद ही सगळी केवळ गुर्वोपायाने - गुरुकृपा, गुरुवाक्य आणि आशीर्वादानेच प्राप्त होतात. अन्यथा कधीच आणि इतर कोणत्याही उपायांनी, प्रयोगांनी वा स्वप्रयत्नांनी नाहीच नाही! अनंत शास्त्रे, तर्क, व्याकरण, नाना आचार, वेदपाठ, वेदांतश्रवण, इत्यादींनी; आत्मनिष्ठ व स्वानुभवी गुरूंशिवाय इतरच कोण्यातरी अर्धवटाने तत्त्वमसिबोधवाक्य उपदेशणे किंवा स्वतःच त्याचा विचार करणे, हंसोच्चारण *(हंसजप करणे - **"सोऽहं"**जप करणे,)* मध्यसंधीचा अभ्यास करणे *(जीवब्रह्मएकरूपतेची - **"जीवो ब्रह्मैव ना परा"** अशी भावना करणे),* कोणत्याही ध्यानप्रकाराने, जपादींनी, लयाभ्यास इत्यादी अन्य कोणत्याही प्रयोगांनी, साधनांनी, अभ्यासाने ही प्राप्ती होत नाही; एवं च काय तर या इतरेतर कोणत्याही उपायाने हे होणे अशक्यच आहे! फक्त केवळ गुरुकृपेनेच योगी अजर अमर स्वात्मनिष्ठ असा होतो!

तसेच सर्व प्रकारच्या विकल्पांचे शमन जो करतो तोच खरा सद्गुरू, बाकी सगळे गुरुस्वरूपाचे विडंबन करणारे नट होत, असा या जगात ***"अडक्याचे तीन"*** मिळणाऱ्या गुरूंबाबतचा निर्वाणीचा इशाराही ***"नानाविकल्पविश्रान्तिं कथया कुरुते तु यः। सद्गुरुः स विज्ञेयो न तु मिथ्या विडम्बकः।।५-६७।।"*** या श्लोकातून गोरक्षांनी साधकांना दिलेला आहे.

गुरुमाहात्म्यपर इतरही अनेक श्लोक या ग्रंथात आहेत. शेवटी ***गोरक्षांच्या मते योगसिद्धी ही गुरुकृपेशिवाय नाहीच नाही,*** हे स्पष्ट करणारे एक निर्वाणीचे वचन पाहून हा विषय समाप्त करू याः

ते म्हणतातः ***"न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं। शिवशासनतः शिवशासनतः शिवशासनतः शिवशासनतः।।५-६३।।"*** अगदी तंतोतंत असेच वचन गुरुगीतेतही आहे. त्रिवार सत्य सांगत श्रीगोरक्ष म्हणतातः ***"गुरूंपेक्षा श्रेष्ठ काहीच नाही, काहीच नाही, काहीच नाही! हा शिवाचा आदेश आहे, हा शिवाचा आदेश आहे, हा शिवाचा आदेश आहे!"***

आणि हे साधकांच्या मनावर पूर्णपणे बिंबवावे म्हणून पुनश्च एकदा सांगतातः ***"गुरूंपेक्षा श्रेष्ठ काहीच नाही, असे आदिनाथ श्रीशिवांचे वचन आहे!!!"***

अलीकडल्या काळातील योगी अरविंद यांच्या Yogic Philosophy & Oriental Occultism या ग्रंथात असे मत व्यक्त केले आहे कीः

The Guru will seek to awaken more than to instruct, He will give a method as an aid, as an utilisable device not as an imperative formula or a fixed routine. His whole business is to awaken the Divine Light and set working the Divine Force of which he himself is only a means and an aid, a body or a channel.

या सर्व विस्तृत विवेचनावरून आणि गोरक्षादी अनेक महान सिद्धमहाभागांच्या कळकळीच्या आप्तवचनांवरून योगसिद्धी ही गुरुविना नाहीच नाही, हे सत्य प्रस्फुटित होतांना दिसते.

इतर अज्ञानी गुरूंनी षण्मुखी वा चतुर्मुखी मुद्रात करावयास सांगितलेल्या कानात बोटे घालून धमन्यांतील रक्तप्रवाहाचा अंतर्कर्णनाद ऐकण्याने ***(हा काही खरा अनाहतनाद नव्हे!),*** डोळ्यांच्या बाहुल्यांवर बोटांचा दाब देऊन काळीपिवळी वर्तुळे पाहण्याने ***(हे काही योग्यांना होणारे प्रकाशानुभव नव्हेत!)*** आणि नाकपुड्या दाबून केलेल्या घ्राणपीडणपूर्वक कुंभकादींनी ***(ज्यांची श्रीमच्छंकराचार्यांनी योगतारावलीत स्पष्टच हेटाळणी केलेली आहे -"न प्राणस्य प्राकृतवैकृताख्यौ।।१०।।यो.ता.")*** कुंडलिनीजागृती काही होत नसते, हे आनुभविक सत्य जितक्या लवकर जिज्ञासू आणि प्रामाणिक योगसाधकांच्या लक्षात येईल, तितक्या लवकर त्यांना खरा ***प्रज्ञोपाय,*** खरा राजयोगाचा मार्ग - ज्ञानदेवांचा ***पंथराज*** सापडेल, ही आर्तता मनी बाळगून आणि गुरूंची शास्त्राधारे पारख करण्याची त्यांना पुनः नम्र सूचना देऊन हे अनभिज्ञ लोकांनी आणि अज्ञानी, अर्धवट, भोंदू भोंगळ गुरूंनी योगशास्त्रात घातलेल्या गोंधळाचे प्रकरण आवरते घेऊ या आणि आपल्या मुख्य विषयाकडे वळू या.)

केवलकुंभक, अधःकुंडलिनी व ऊर्ध्वकुंडलिनी

"आंतरीं फांकें। हृदयकोशु।।६-२०९।।" *(पृ.क्र.७८१)*

या ओवीनंतरची पंथराजाची पुढील वाटचाल अशी आहेः त्रिबंधांनंतर यावेळी प्रत्याहाराचा अभ्यास पूर्णतेप्रत जाऊन प्रत्याहाराचे अंतरंगसाधन प्राप्त होते. प्राणायामाचीही पूर्णता झालेली असते. त्यामुळे ***नाडीशुद्धी*** होऊन पृथ्वी व आपतत्त्वांची एकमेकांत मिसळण होते. भूतजयाची ही प्रारंभिक अवस्था समजता येईल.

इंद्रियजय जवळजवळ पूर्णतेस गेलेला आहे, ***अशा अवस्थेत नाभिआधाराचे ध्यान अभिप्रेत आहे.*** नाभिआधारावर तेथे ***मध्याकुंडलिनीचे ध्यान*** करणे योगशास्त्रास अभिमत आहे. या कुंडलिनीचेच वर्णन ज्ञानेशांनी ***"नागाचें पिलें। कुंकुमें नाहालें।।६-२२२।।"*** या शब्दात केले आहे असे वाटते. कारण नाभिस्थित मध्या कुंडलिनीचे हेच स्वरूप गोरक्षांनी ***सिद्धसिद्धांतपद्धती***त सांगितले आहे ***("तृतीयं नाभिचक्रं पञ्चावर्तं सर्पवत्कुंडलाकारं तन्मध्ये कुण्डलिनी शक्तिं बालार्ककोटिसदृशीं ध्यायेत्।।२-३।। सि.सि.प.।।).***

यावरून एक स्पष्ट होते. ते म्हणजे अनेक लेखक व टीकाकार समजतात, तशा **मूलाधारस्थित कुंडलिनीचा** ***"नागाचे पिलें। कुंकुमें नाहालें (६-२२)"*** **या ओवीने बोध न घेता गोरक्षविवेचित** या **मध्याकुंडलिनीचाच बोध घेतला पाहिजे. हीच मध्या कुंडलिनी** ***"मग कंदावर शक्ती। उठिली दिसे (६-२२७)"*** **या ओवीत निर्देशिलेली शक्ती होय,** असे आपणास जाणिवपूर्वक म्हणावे लागते. असो.

ध्यानादी प्रक्रियांनी कुंडलिनी जागृत होऊन सुषुम्नामुखात प्रवेश करण्यासाठी सरळ म्हणजे दंडायमान होते. कंदावर ती उभी राहते. कुंडलिनी जागृत होऊन ऊर्ध्वाभिमुख म्हणजे सुषुम्नेत प्रवेश करण्याच्या स्थितीत जेव्हा येत असते, तेव्हा व तत्पूर्वी शरीरात प्राणापानांच्या समरसीकरणाच्या प्रक्रियेतून बऱ्याच घडामोडी घडलेल्या असतात व घडत असतात. अपान सुषुम्नामुखात प्रवेश करण्यासाठी एकत्र झालेला असतो. तो मणिपूरचक्रापाशी गर्जना करत असतो.

आसन-मुद्रा व प्राणायाम यांच्यातून जी उष्णता निर्माण होते, त्यामुळे ध्यानविषय कुंडलिनी जागृत होते. त्यानंतर सप्तधातू-अस्थि -मांस-मज्जादींचा कुंडलिनी ग्रास करते म्हणजे आपल्यात लय करते. तसेच इंद्रियांच्या पंचतन्मात्रा व पंचमहाभूतांच्या तन्मात्रा कुंडलिनीत लय पावण्यास सुरुवात होते. प्राणांची गती रुद्ध होते. प्राण व अपान यांच्या साम्यापूर्वीची स्थिती प्राप्त होते. ***केवलकुंभक*** साध्य होण्याची प्रारंभिक स्थिती प्राप्त होते. षट्‌चक्रांचा प्रारंभिक वेध होतो. कारण **अध:कुंडलिनीचे आकुंचन होणे व ऊर्ध्वकुंडलिनीचा निपात होणे या प्रारंभिक अवस्थेतील क्रिया केवलकुंभकामुळे साध्य होतात.**

धर्ममेघ समाधि

ही पायरी ***धर्ममेघ*** म्हणून पतञ्जलींनी ज्या समाध्यवस्थेचे वर्णन केले आहे, ती आहे. ***"निर्विचारवैशारद्य-➤ ऋतंभराप्राप्ती -➤ धर्ममेघसमाधि"*** असा या अवस्थांचा क्रम आहे. याच अवस्थेत ***विवेकख्याती*** चा उदय होतो. या धर्ममेघ समाधीचाच आता यापुढे साधकाने अभ्यास करावयाचा आहे.

खरे तर आता अभ्यास करावयाचा नसून तो आपोआपच होणार असतो. प्रज्ञेच्याच साहाय्याने हे कार्य सिद्ध होणार असते. ***प्रज्ञोपाय*** म्हणून शास्त्रात यालाच म्हणतात. ***"अभ्यासुचि आपणांतैं करी" हृदयांतैं अनुभवु वरी ।।६-१६६ ।।"*** असा जो आसनस्थ होतांनाचा संकल्प ज्ञानेशांनी सांगितला होता, तो कुंडलिनीजागृतीमुळे आता सिद्धीस जातो.

मध्याकुंडलिनी व तत्त्वलय

"केवलकुंभकप्राप्ती-➤ अध:कुंडलिनी आकुंचन-➤ ऊर्ध्वकुंडलिनीनिपात" या प्रक्रियांच्या प्रारंभिक अवस्थांमुळे यानंतर पंचमहाभूतांचा कुंडलिनीत लय होऊ लागतो. प्रथम पृथ्वी व आपतत्त्वांचा लय होतो. त्यासमवेत बराच काळ अपेक्षित असलेली कुंडलिनीच्या सुषुम्नाप्रवेशाची क्रिया होते.

प्राणांची स्थिती हृत्कमलात झालेली असते. त्यांचे मणिपूरचक्रावरून उत्क्रमण होऊन प्राणापानांचा कुंडलिनीसोबत सुषुम्नाप्रवेश होतो. त्याबरोबर प्राणाचे दशविध प्रकारचे भेद लयास जातात व प्राणतत्त्व समरस होते.

त्याबरोबर नाडीजाल लय पावते. बहात्तर सहस्त्र नाड्या व इडापिंगला एकवटून त्या सुषुम्नेशी एकरूप होतात. प्राणापानांचा वायुतत्त्वात लय होतो. केवलकुंभकाची ही अंतिम स्थिती आहे. त्याचप्रमाणे ***ब्रह्मा - विष्णु- रुद्र*** या तिन्ही ग्रंथींचा भेद होतो. षट्‌चक्रांचे भेदन साध्य होते. ही भेदनप्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचण्याच्या काळात बुद्धितत्त्वाचा सुषुम्नाप्रवेश होतो व त्याचा कुंडलिनीत लय होण्याची प्रक्रिया सुरू होते.

शरीरातील सर्व प्राण कुंडलिनीत प्रवेशतो. अशा प्रकारे दशेंद्रिये त्यांच्या तन्मात्रांसह, मन व बुद्धीसह, पृथ्वी व आप तत्त्वांसह, कुंडलिनीसह सुषुम्नेत स्थित होतात. त्यावेळी ***मध्याकुंडलिनी*** म्हणून जी असते, तिचा विकास होतो. हे ***परावाक्स्थान*** आहे. आतां कायसंपद व अन्य अनेक सिद्धींचे योग्याद्वारे प्रकाशन घडू लागते.

प्राण हे मनाचे तत्त्व समजतात. बुद्धीचेही तत्त्व तेच समजतात. मूळ अहंकाराचे मन, बुद्धी, चित्त व अंत:करण हे अंत:करणचतुष्ट्यादी विभाग असतात. ज्ञानेश त्यांचा स्थूलमानाने निर्देश करतात, तो असा: ***"प्राणाचा हातु धरूनि", "विश्वबीजाचियां कोंभां", "बुद्धिचें चैतन्य होतें। तैं आलें"*** इ.नी ***मन - प्राण - बुद्धी - जीव - अहंकार*** यांचा येथे निर्देश होत आहे. ***"चैतन्य आधतुरैं"*** याद्वारे ***जीवचैतन्य वा जीवात्मा वा पराप्रकृती***चा निर्देश आहे. कुंडलिनीद्वारे ज्ञानेश्वरनिर्देशित छत्तीस तत्त्वांची मूलतत्त्वात मिळणी करणारा हा योग असल्याचे निष्पन्न होते. असो.

[**टीप:लयावस्थेच्या पायऱ्यांचा अनुक्रम व शक्तीचे संपूर्णत्वाने उत्थान आणि आंशिक उत्थान:** आतापावेतो केलेल्या विवेचनात जिज्ञासूंनी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की वेळोवेळी आपण एकाएका क्रियेचे वर्णन करतांना तिची प्रारंभिक अवस्था इ.म्हटले आहे. त्याचे कारण असे की कुंडलिनी शक्ती मूलाधार सोडून पूर्णपणे ऊर्ध्वस्थ होते, असे जे मत आहे, ते बरोबर नाही. शक्तीने जर मूलाधार व इतर ठिकाणचे अस्तित्व पूर्णपणे सोडले, तर पिंडदेह टिकणार नाही. म्हणून प्रत्येक लययोगांतर्गतची क्रिया शक्तीच्या अंशात्मक उद्धरणाने सिद्ध होत असते, हेच मत मान्य करावे लागते. योगसाधकांस याची प्रत्यक्ष अनुभूती असतेच. म्हणूनच आपण प्रारंभिक अवस्था, इ.शब्दप्रयोग करत आहोत.

तसेच सर्व योगानुक्रम फक्त एक दिशा दाखवतो. एक क्रिया पूर्ण झाल्याशिवाय नंतरच्या क्रियेला सुरुवात होत नाही, असे नाही. सर्व क्रिया एकमेकांमध्ये गुंतलेल्या असतात. एक क्रिया चालू असतांना दुसऱ्या पुढच्या पायऱ्या पण अभ्यासल्या जात असतात, हा प्रत्यय पातञ्जलयोगक्रियांप्रमाणेच लययोगातही येत असतो. याबाबत स्वामी श्रीविष्णुतीर्थांचे असेच मत आहे. त्यांच्या मते संपूर्ण कुंडलिनी जागृत होऊन सुषुम्नेत प्रवेश करते हे मत चुकीचे आहे. जागृतीनंतर शक्ती सर्वच स्थानांवर पूर्वीप्रमाणेच राहत असते, पण तिचा लयासाठी आवश्यक तो भाग सुषुम्नादी स्थानांत संचार करतो ***(सौंदर्यलहरी हिन्दी टीका*** - *तत्रैव पृ. क्र.२०४,२०५)*].

या सर्व तत्त्वांसह कुंडलिनी जेव्हा ***हृत्स्थानी*** प्रवेशते, तेव्हा केवलकुंभकाच्या निष्पत्तिस्वरूप असा ***अनाहतध्वनी*** प्रकट होतो. **अजपासिद्धी *हृत्कमलात हंसरूपाने विद्यमान असणाऱ्या जीवात्म्याची कुंडलिनीशी भेट होते.*** प्राणांची अवरुद्ध झालेली गती आता उलटते,

***हंसः*चा आता *सोऽहं* होतो आणि अजपासिद्धी प्राप्त होते. हे प्राण आता मनोव्यापारगामी प्रवृत्तीचे न राहता निवृत्तिपर होत असल्याने ही गती उलटण्याची संज्ञा येथे वापरली आहे.**

प्राणांचे यापुढे कुंडलिनीसमवेत भ्रूचक्रावर उत्क्रमण होणार आहे, त्याची ही पहिली पायरी आहे. ***हृत्चक्र*** या स्थानावर येतांना कुंडलिनीने पश्यंति वाणीचे स्थान मागे टाकलेले असते. अजपा म्हणजे प्रणवजपाची सिद्धी येथे होत आहे. त्यावेळी सुषुम्नेचा हृत्चक्रापुढील मार्ग मोकळा होतो. ब्रह्मद्वार उघडण्याचा हा दुसरा निर्देश ज्ञानदेवांनी येथे सूचित केला आहे. या वेळी तेजस्तत्त्वाचा लय होतो. कुंडलिनी व तेजस्तत्त्व विलीन झालेला वायू ही एकरूप झाल्याने शक्तीचे तेज लोपते. ती पवनाची होते. या वेळी पंचमहाभूतांपैकी आकाश व वायू ही दोनच तत्त्वे उरलेली असतात. त्यावेळचे योगीदेहाचे मनोज्ञ रूप ज्ञानदेवांनी वर्णिले आहे, ते आपण मागेच पाहिले *(६-२४१ ते २५२)*. या वेळचा योगिदेह अजर अमर असा योगसिद्ध होतो.

प्रधानजय

या वेळचे शक्तिरूप म्हणजे निव्वळ प्राणरूपच असते. मनाचा ***नाद-बिंदू-कला-ज्योति*** प्रदर्शक गुणधर्म लोपलेला असतो. ***रूप - ध्वनी - विचार - सोऽहंभाव*** हे सर्व एकीभूत होतात. असे असले तरी शक्तीचे शक्तित्व व मनाचे मनपण नाहीसे झालेले नसते. ही ***खेचरीसिद्धी*** आहे. वायू - गगन तत्त्वांचे प्राबल्य या अवस्थेत असते. या वेळी अणिमादिक सिद्धी प्राप्त होतात.

पातञ्जलयोगसूत्रानुसार ***"संयम-➤त्याचा जय -➤प्रज्ञोदय -➤प्रातिभज्ञान -➤यांपुढे प्रातिभज्ञानामुळे त्यापुढील पायऱ्यांची सिद्धी"*** असा क्रम येतो. हृत्कोशावर प्रातिभज्ञानाद्वारे संयम केल्याने चित्ताचे स्वरूप कळते***("हृदये चित्तसंवित्।।३-३४।। पा.यो.सू. ।।")***. हृदय हेच चित्तातील ***अहं*** या जाणिवेचे मूळ स्थान आहे. अर्थातच आपल्या आतापर्यंतच्या विवेचनावरून हे ***हृत्स्थान म्हणजे स्थूल हृदय नसून हृत्संवितस्थान होय,*** हे लक्षात यावे.

हृत्कोशावर प्रातिभज्ञानाद्वारे संयम केल्याने चित्ताचे स्वरूप कळते. पुरुषाचे ज्ञान होते. अनेकानेक सिद्धी प्राप्त होतात. त्या सिद्धी योगसाधकांस अडथळे ठरण्याचा धोका असतो. या वेळी ***दिव्य नाद*** प्रकटतो. पतञ्जली त्यास ***दिव्य श्रोत्रप्राप्ती*** असे म्हणतात, असेही एक अनुमान आहे. ही सर्व वायुजयाची लक्षणे होत*(३-३१,४० व ४२।।पा.यो.सू.।।)*.

महाविदेहावृत्ती प्राप्त होते व सत्त्वगुणाचा प्रकाश म्हणजे ***शुद्धसत्त्वगुण*** प्रकटतो (३-४३,पा.यो.सू.). पंचमहाभूतांच्या स्थूल-सूक्ष्मादी अवस्थांवर संयम करून ***भूतजय*** प्राप्त होतो. ***कायसंपत*** प्राप्त होते *(३-४५ व४६,पा.यो.सू.)*.

या पातञ्जलयोगस्थ अवस्थांना पंथराजाची ***"शक्तीचे रूप मावळैं। शक्तिचिमाझिं।।", "आतां नादबिंदु नेणिजैं। कलाज्योति", "मनाचा हान मारु। कां पवनाचां धरुं। ध्यानाचां आदरुं। नाइं परि", "हें कल्पना घे सांडिं। तैं नाइं इयां परवडिं", "तैं तैं म्हणिजैं खेचर। हें पद होतां चमत्कार", "तेथ ठाइं ठाइं होएं। हें आणिमादिकीं "*** या ओव्यांतून प्रकट केलेली भूमिका समांतर पातळीवरील आहे.

थोडक्यात तेजस्तत्त्वाच्या लयाबरोबर ***महाविदेहावृत्ती, सत्त्वप्रकाश, भूतजय, अणिमादिप्राकट्य*** या सर्वांचे प्रकाशन होते, असा समन्वय येथे स्वीकारता येईल. असो. यापुढे ***"इंद्रियजय -➤ प्रधानजय -➤ सत्त्वपुरुषन्यताख्याति (विवेकख्याति) -➤ त्यांबाबतही वैराग्य -➤ कैवल्य"*** अशा पायऱ्या पातञ्जलसूत्रे देतात *(३-४७ ते५१,पा.यो.सू.)*. कुंडलिनीच्या पुढील क्रमणात या अवस्थांचे पूर्णत्व प्राप्त होत असते. ***इंद्रियजय*** म्हणजे प्रत्याहाराची पूर्णता. ***प्रधानजय*** म्हणजे प्रकृतीवर पूर्ण नियंत्रण. ***"सत्त्वपुरुषान्यताख्याति"*** म्हणजे विवेकज सत्य ज्ञान. त्याबाबत नंतर पुढे पाहू.

हंसस्वरूप

शक्ती जेव्हा अशी ***पवन*** या वायुतत्त्वाने संपन्न होते, तेव्हा तिला ***मारुत*** अशी संज्ञा ज्ञानदेव देतात. आता ती पुढील मार्ग उड्डाण करून क्रमणार आहे, असा भावार्थ येथे घेता येतो. ती अद्यापही शक्तीच असते. कारण शिवतत्त्वात तिचा लय व्हायचा अजून बाकी आहे. ती जालंधरबंधाचे उल्लंघन करून, पश्यंतीचे स्थान मागे टाकून, मकाराची आज्ञाचक्रावरील नड मागे टाकून, सुषुम्नेतून गगनाच्या महालात प्रवेशलेली असते. या ठिकाणी एकट्या प्राणांस येणे शक्य नसते. परंतु कुंडलिनीच्या साहाय्याने प्राणांसह मन आज्ञाचक्रात येते. तेथे त्याला शुद्ध हंसस्वरूप प्राप्त होते व मानससरोवरात म्हणजे पुढील अर्धमात्रेच्या प्रांतात विहार करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते, असा भाव या अवस्थेत असतो.

पुढील अवस्था

हृत्स्थानी ॐकार जप होत असतो. त्या स्थानावरून ती गगनावर उड्डाण करण्यास सज्ज होते. पण त्यासाठी ***ककारांत*** म्हणजे ***सुषुम्नेचे सहस्राराकडील ब्रह्मद्वार*** उघडले पाहिजे. ते अनाहतनादाने उघडते. त्याबाबत नंतर पाहू.

अर्धमात्रेच्या प्रांगणात येऊन दाखल झालेल्या या मारुतीला तेव्हा ***बिंदू -➤ अर्धेंदु -➤ निरोधिका*** इ.मार्गांनी उत्क्रमण करत पुढे जावे लागते. बिंदूत मनातील रूपसंकल्पना अति दिव्यतेला पोहोचते. तेथे दिव्य रूपदर्शनादी होतात. अर्धेंदूत या त्रिपुटीतील द्रष्टा - दृश्यभाव विरतो. ***निरोधिका ही रूपांत स्थिती होय. मनाचा रूपविषय तेथे लय पावतो.*** नंतर ***नाद, महानाद वा नादांत*** या पायऱ्यांवर मनातील ध्वनी या संकल्पनेचे उदात्तीकरण व लोप होतो. परंतु मनाच्या कला जोपावेतो लोपत नाहीत तोपावेतो रूप, ध्वनी हे सुप्तास्थितीत कुंडलिनीसह पुढे सरकतात.

त्यांचा लोप शक्तीच्या***ऊर्ध्व कुंडलिनी*** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रांतात होतो. ***शक्ति, व्यापिनी, समना*** हा मनाच्या कलांचा प्रांत आहे. ***कुंडलिनी ही स्थाने आक्रमून जेव्हा उन्मना या कक्षेत***

दाखल होते, तेव्हासुद्धा *अनाहतनादा*ची समाप्ती होत नाही. तर जेव्हा जीवत्वाचा शिवत्वात सामरस्यात्मक लय होतो, तेव्हापर्यंत नाद अस्तित्व ठेवून असतो. मनाच्या कलांचा लोप येथे होतो. राहते ती अभावात्मक ***अमाकला.*** म्हणजे ***"मनाचा पट्ट"* फाटण्याची** ज्ञानेश्वरोक्त अवस्था म्हणजे ही ***उन्मना*** च होय. असो.

ज्यावेळी ***उन्मना*** प्राप्त होते, तेव्हा वायुतत्त्व लय पावून निःशेष गगनतत्त्व उरते. कुंडलिनीचे हे गगनावरोहण आहे ***("गगनाचिएं पाहाडिं। पैठिं होएं"). अंती ती आकाशतत्त्वासह ब्रह्मरंध्री सोहंऽभावाच्या अंतिम स्थितिदर्शक अशा परमात्मलिंगात प्रवेशते. आकाशतत्त्वाचा लय होतो. शक्तीचे शिवाशी सामरस्य होते. पदी पद प्रवेशते. पिंड उरतो तो जीवन्मुक्तरूपाचा! अर्धमात्रा लोपते. महाशून्याच्या डोहात हे सर्व लोपतात. जीवात्मा शिवाशी एकरूप होतो. द्वैत मावळून अद्वैतसिद्धी होते. संकल्प-विकल्पादी करणारे मन मुदलासहित जाते.***

महासुख

अनादी, अगण्य परमतत्त्वाची प्राप्ती करून देऊन ***पंथराज*** तेथेच विराम पावतो.पूर्वेकडून निघून पश्चिमेकडचे घर गवसते. आाकाराचा - विश्वरूपाचा लोप होतो. मोक्षसुखाची लयलूट होते. मोक्षावाचून जेथे काहीच इतर नाही, अशी ही ***तुर्यातीत*** अवस्था आहे; किंवा ***तुर्येचा तारुण्यभर*** आणि ***उन्मनीचे लावण्य*** जेथे उपभोगण्यास मिळते, ती ही परब्रह्मस्थिती असते. विश्व झाकून जाते. महासुख प्राप्त होते. किंबहुना साधकाचा सिद्ध होऊन ते महासुख उपभोगण्याऐवजी तो स्वतःच ते होतो, असा ज्ञानेश्वरीचा दाखला आहे. ***ही जीवन्मुक्ती पंथराजाद्वारे प्राप्त करून घेऊन योगी कृतार्थ होतो.*** असो.

याप्रमाणे आपण पंथराजाची पूर्णानुभूती आतापर्यंत मनसोक्त घेतली. त्यापुढचा भाग व कृष्णार्जुनसंवाद याकडे आता वळणे क्रमप्राप्त आहे. तिकडे वळू या.

योगसिद्धी::::

पुढील विषयानुसंधान

हा योगमार्ग दुस्तर वाटला तरी त्याचे अधिकारी सर्वच आहेत, हा भाग पूर्वी येऊन गेला आहे. फक्त ***"मग म्हणे गां पार्था। तैं हें ऐसिं वेवस्था। अनियतासिं सर्वथा। योग्यता नाइं।।६-३४४।।"*** या ओवीत सांगितल्याप्रमाणे अनियमित वागणाऱ्यास या योगाची प्राप्ती होत नाही, एवढेच अनधिकारी वर्णन श्रीकृष्णांनी केले आहे.

योगसिद्धीलक्षणे

हा योग सिद्ध होण्याची लक्षणे नंतर श्रीकृष्ण सांगताहेत, ती बघू या. ते म्हणतातः

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते।
निस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा।।६-१८।।

"जेव्हा असे वृत्तींचा लय केलेले चित्त आत्म्यात लीन होऊन जाते आणि साधक सर्व प्रकारच्या कामेच्छांबाबत निःस्पृह होतो, तेव्हा त्याला योग सिद्ध झाला असे म्हणतात."

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोमपा स्मृता।
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः।।६-१९।।

"निर्वात स्थानीच्या दीपाची ज्योती जशी हलत नाही, त्याप्रमाणे आत्मयोग प्राप्त झालेल्या योग्याचे समाधिस्थ चित्त विषयांपासून रहित असल्याने चलित होत नाही."

ज्ञानदेव याबाबत काय म्हणतात, पाहाः

जैसें भाग्याचेनि भडसें। उद्यमाचेनि मिसें।
मग समृद्धिजात आपैसें। घर रिघें।।६-३५४।।
तैसा युगुतिमंतु कवतुकें। अभ्यासाचियां मोहरां ठाकें।
आणि आत्मसिद्धीचि पिकें। अनुभौ तेयाचां।।३५५।।
म्हणौनि युक्ति हें पांडवा। घडें जेयां सदैवां।
तो अपवर्गिचिएं राणिवा। अलंकारिजैं।।३५६।।

"जसे नशीब जोरावर असले की उद्योगाचे निमित्तमात्र कारण घडून घरदार समृद्धीने भरून जाते, त्याप्रमाणे सहजच म्हणून जेव्हा योगसाधक अभ्यास करू लागतो, तेव्हा त्यास आत्मसिद्धी प्राप्त होण्याची अनुभूती मिळू लागते. योगयुक्ती ज्यास आकळली आणि ज्याने सदैव तिची पाठपुरवणी केली, त्यास मोक्षाचे राज्य अलंकारिते."

युक्ति योगाचें आंग पावें। ऐसें प्रयाग होएं जेथ बरवें।
तेथ क्षेत्रसंन्यासें थिरावें। मानस जेहाचें।।६-३५७।।
तेयांतैं योगयुक्तु म्हण। हेंहिं प्रसंगें जाण।
तैं दीपाचें उपलक्षण। निर्वातिंचिआं।।३५८।।

"योगसाधना व ती करण्याची उचित पद्धत अशा दोन्हींचा जो प्रयागासारखा सुंदर संगम घडतो, त्या क्षेत्री ज्याचे मन संन्याशासारखे स्थिरावते आणि हा योगमार्ग जो मनापासून आचरतो, त्यास तू योगयुक्त म्हणून ओळखावे. योगाने असे प्रशांत स्थिर चित्त प्राप्त करून घेणाऱ्याच्या चित्तस्थितीस निर्वात स्थानी ठेवलेल्या दीपज्योतीची उपमा शोभून दिसते."

योगाचे सोपेपण

आतां तूझें मनोगत जाणौनि। काइंएक आम्हीं म्हणौनि।
तैं नीकैं चित्त देऊनि। परिसावें गां।।६-३५९।।
तूं प्राप्तिचिं चाड वाहसिं। परि अभ्यासु दक्ष नहोसिं।
तैं सांघ पां काएं बिहसिं। दुवाडपण।।३६०।।
तन्हें पार्था हें झनैं। सायास घेसिं हों मनैं।
वायां बागुल इयें दुर्जनें। इंद्रियें करिति।।३६१।।
पाहां पां आयुखाचां आडलु करि। जैं सरतैं जिवन वारि।
तेआं ओखदांतैं वैरी। काइ जिह्वा न म्हणें।।३६२।।
एसें हितासिं जैं नीकैं। तैं सदाचि ययां इंद्रियां दुखैं।
<u>एरविं सोहोपें योगासारिखैं। काइं आहे</u>।।३६३।।

"हे ऐकून तुझ्या मनात जो विचार येत आहे, तो जाणून मी तुला आता जे सांगेन, ते तू नीट लक्षपूर्वक ऐक. तुला योगप्राप्तीची मोठी इच्छा निर्माण झाली आहे. पण हा त्यासाठी जो अभ्यास करावा लागेल तो किती कठीण आहे असे वाटून तू बिचकतो आहेस. पण असा भिऊ नकोस. या अभ्यासात फार कष्ट आहेत, असा बागुलबुवा या द्वाड इंद्रियांनी उगीचच उभा केला आहे. मृत्युमुखी जाणाऱ्या रोग्यास वाचवून आयुष्य वृद्धिंगत करणाऱ्या अमृतोपम औषधाचे वरकरणीचे कडूपण जिह्वेला शत्रूवत वाटतेच ना! इंद्रियांनासुद्धा शाश्वत हित करणारा योगाभ्यास दुःखप्रद वाटतो. पण ***वस्तुतः योगासारखी सोपी साधना दुसरी कोणती सांग बरे!***"

योगसाधना सोपी की कठीण

ज्ञानेश्वर या ठिकाणी योगसाधना सर्वात सोपी आहे असे म्हणतात. वस्तुतः गीतोक्त *श्लोक क्र. ६-१९* ***("यथा दीपो निवातस्थो ...")*** बाबतचा भाग *ओवी क्र. ६-३५८* ***("...तैं दीपाचें उपलक्षण।...")*** येथपावेतो सांगून संपलेला आहे.

यानंतर येणाऱ्या "आता तुझे मनोगत। ...." ते "एरविं सोहोपें योगासारिखें। काई आहे।।६-३५९ ते ३६३।।" **या ओव्या ज्ञानेशांचे स्वतःचे योगाबाबतचे मत व्यक्तवणाऱ्या आहेत. त्यात योगसाधना सोप्यात सोपी साधना असल्याचे म्हटले आहे.**

तसेच तत्पूर्वी गीतोक्त *श्लोक क्र. ६-१७ व १८* ***("युक्ताहार विहारस्य ...।। युक्त इत्युच्यते तदा।।")*** यांद्वारे व त्याबाबतच्या *ओव्या क्र. ६-३४८ ते ३५६* ***("म्हणौनि अति विषो सेवावा। ..." ते "तो अपवर्गाचिआं राणिवा। ....अलंकारिजैं।।")*** मधून योग हा थोड्याफार युक्तीने, आहारविहार आणि चेष्टांचे नियंत्रण करू शकणाऱ्या कोणाही साधकास साधता येतो, असे ज्ञानेशांनी म्हटलेले आहे. आता या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित होतो, तो गीता व ज्ञानेश्वरी यांच्यात बाराव्या अध्यायात जे योगाचे काठिण्य प्रकट केले आहे, त्या संदर्भात. त्या प्रश्नाची चर्चा येथे करणे उचित ठरेल.

भक्तांचे योगित्व

हा प्रश्न अर्जुनाच्या पृच्छेद्वारे प्रकट होतो, तो असाः

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के *योगवित्तमाः*।।१२-१।।

"अहोरात्र जे भक्त अनन्य होऊन तुझी उपासना करतात आणि जे भक्त अव्यक्त ब्रह्माची उपासना करतात, त्या दोन प्रकारच्या भक्तातील श्रेष्ठ योगवेत्ते कोण ?"

या प्रश्नामागे पार्श्वभूमी आहे ती अकराव्या अध्यायातील भगवत्वचनांशी संबंधित आहे. वेद, यज्ञ, तप वा दान यांपैकी कशानेही भगवत्प्राप्ती होत नाही. फक्त अनन्यभक्तीनेच ती प्राप्ती शक्य आहे. म्हणून साधकाने ***"मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः। निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।"*** या श्लोकात म्हटल्यानुसार भगवत्प्रीत्यर्थ कर्म करणारा, भगवंतच ज्याची परमगती आहे, आसक्तिरहित आणि भूतमात्रांशी वैर नसणारा असा व्हावे. म्हणजे तो भगवंताप्रत जाऊन पोहोचतो.

या भगवंतोक्तीवरून अर्जुनास भक्तांचे दोन प्रकार आहेत, असे वाटून तो उपरोल्लेखित प्रश्न करत आहे. म्हणजे ***१) अनन्यभक्त वा सगुणभक्ती करणारे*** **व *२) अक्षरब्रह्म उपासणारे भक्त* असे हे दोन प्रकारचे भक्त अर्जुनाने कल्पिले आहेत. आता यांपैकी कोणा भक्तास *श्रेष्ठ योगी* समजावे, असे अर्जुन विचारत आहे. म्हणजे *भक्त हा योगीच असतो* असा याबाबतचा अर्जुनाच्या मुखाने गीता निर्वाळा देत आहे.**

भक्ती व योग भिन्न आहेत, असे समजणाऱ्यांच्या धारणेतील फोलपणा अर्जुनाच्या या प्रश्नाद्वारे स्पष्ट होतो. असो.

अर्जुनाचा प्रश्न

यावर ज्ञानेश्वरांचे भाष्य पाहू या.

तऱ्हें सकलवीराधिराजु। जो सोमवंशिं विजयध्वजु।
तो बोलतां जाहालां आत्मजु। पांडुनृपाचां।।१२-२०।।
कृष्णातैं म्हणे अवधारिलैं। आपण विश्वरूप मज दाविलैं।
तंवं नवल म्हणौनि बिहालैं। चित्त माझें।।२१।।
आणि इयें कृष्णमूर्तीचिं सवें। यालागिं सोएं धरिली जीवें।
तंवं नको म्हणति देवें। वारिलैं मातैं।।२२।।

सर्व वीरांचा अधिराज, चंद्रवंशाचा विजयध्वज असा तो पांडुनृपतिपुत्र अर्जुन श्रीकृष्णास अशी पृच्छा करत आहे. तो कृष्णास म्हणतो की "आपण मला जे दिव्य विश्वरूप दाखवले, ते विलक्षण होते. म्हणून माझे मन भीतीने व्याकुळ झाले. त्यामुळे मी तुम्हाला मला ज्या आपल्या सगुणमूर्तिरूपाची सवय आहे, ते दाखवा म्हणून विनवले. पण आपण मात्र माझ्या त्या तशा कृतीचा निषेध केला."

तऱ्हें व्यक्त आणि अव्यक्त। हें तूंचिं एक निभ्रांत।
भक्तिं पाविजें व्यक्त। अव्यक्त योगें।।६-२३।।
ययां दोनिं जी वाटा। तूंतैं पावावेआं वैकुंठा।
व्यक्ताव्यक्त दारवंठां। रिगिजैं एथ।।२४।।

"त्यावर हेही मी जाणतो की व्यक्त आणि अव्यक्त वा या विश्वापलीकडील तुझा निर्गुण भाव अथवा व्यक्तामागील स्थिती ही दोन्ही तुझीच रूपे आहेत. तुला प्राप्त करून देणाऱ्या मार्गाच्या दाराच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचण्याच्या ज्या दोन वाटा आहेत, त्याच ***योग व भक्ती*** म्हणून ओळखल्या जातात. ***भक्तियोगे व्यक्त असा तू प्राप्त होतोस आणि योगाने तुझ्या अव्यक्त स्वरूपाची प्राप्ती होते."***

(**टीपः योग = सगुणईश्वरप्रणिधानविरहित वा अव्यक्तध्यानी योगप्रक्रिया** आणि **भक्ती = ईश्वरप्रणिधानयुक्त - अनन्य - सगुणध्यानी पंथराजनिर्दिष्ट योगप्रक्रिया**; असे या ठिकाणी ***योग व भक्ती*** यांद्वारे सूचित होते, ते नंतरच्या विवेचनावरून स्पष्ट होईल.)

पैं जैं वानि श्येया तुकां। तैंचि वेगलिआं वालां एकां।
म्हणौनि एकदेशिआं व्यापकां। सरिसा पाडु।।१२-२५।।
अमृताचां सागरिं। जैं लाभें सामर्थ्याची थोरीं।
तैंचि दे अमृतलहरी। चुलीं घेतलिआं।।२६।।
हें किर माझां चित्तिं। प्रतिती आथि जी निरुति।
परि पुसणें योगपति। तैं याचिलागीं।।२७।।

"सोन्याच्या लगडीचा जो कस असतो, तोच जसा त्याच्यातून काढलेल्या एका वालभर सोन्याला पण असतो; त्याचप्रमाणे तुझ्या मूर्त सगुण रूपात आणि अव्यक्त निर्गुण स्वरूपात तत्त्वत: काहीच वेगळेपणा नाही. अमृतसमुद्रात सायासाने अवगाहन केल्याने जे अमरत्व प्राप्त होते, तेच अमृताची एक चूळ भरून घेतल्यानेही प्राप्त होते. तुझ्या व्यक्त आणि अव्यक्त स्वरूपाची मूलभूत एकता अशी माझ्या मनात बिंबलेली आहे. पण तरीही एक शंका विचारतो, ती ऐक."

दोन प्रकारच्या उपासनांपैकी उत्तम कोणती

जैं देवा तुम्हीं नांवेंक। अंगिकारिलैं व्यापक।
तैं सांचचि कीं कवतिक। जें जाणावेआं।।१२-२८।।
तऱ्हैं तुजलागिं कर्म। तूंचिं जेआंचें परम।
भक्तीसिं मनोधर्म। विकौनि घातलां।।२९।।
इत्यादी सर्विं परीं। जैं भक्त तूतैं हरि।
बांधौनिआं जिह्वारीं। उपासिति।।३०।।
आणि जैं प्रणवापैलिकडें। वैखरिएंसि जैं कानडें।
काइसियांहिं सांगडें। नोहें जैं वस्तू।।३१।।
तैं अक्षर जी अव्यक्त। निर्देशदेशरहित।
सोऽहंभावें उपासित। ज्ञानिएं जैं।।३२।।
तेआं आणि जी भक्तां। येरयेरांमाझिं अनंता।
कवणें योगु तत्त्वतां। जाणितलां सांघा।।३३।।

"हे श्रीकृष्णा! मागे तू आपल्या व्यापक स्वरूपाची वाखाणणी केलीस. ती खरेच मनापासून केलीस की माझी चेष्टा करण्यासाठी केलीस, हे मला जाणून घ्यावयाचे आहे. तुझ्यासाठीच कर्म करणारे ***(मत्कर्मकृत्)***, तुलाच परम आराध्य मानणारे ***(मत्परम:)***, तुझीच भक्ती करण्यासाठी मनोभावे झटणारे ***(मद्भक्त:)***, तुलाच सर्वतोपरी भजणारे ***(संङ्गवर्जित:, निर्वैर: सर्वभूतेषु,इ.गीता श्लोक क्र.११-५५)***,असे जे भक्त आपल्या अंत:करणात तुला दृढ धरून ठेवतात, ते भक्त आणि प्रणवापलीकडील, वैखरीस जिचे वर्णन करता येत नाही आणि जिला कसलीच उपमा देता येत नाही - ज्या वस्तूची या विश्वातील कशाशीही तुलना करता येत नाही - त्या अक्षर - अव्यक्त - निर्देशिता न येणाऱ्या - दाखविता न येणाऱ्या - स्थलकालादी बंधनातीत अशा ब्रह्माची जे ज्ञानी ***सोऽहं*** भावाने उपासना करतात, त्या ज्ञानी अशा या उपासकांपैकी कोणी योग खरा जाणला आहे, ते, हे श्रीहरी! अनंता! तू मला स्पष्ट करून सांग."

समन्वय

अर्जुनाच्या या प्रश्नाचा व त्यावर भगवंतांनी जे उत्तर दिले त्याचा समन्वय करतांना बऱ्याचदा गोंधळल्यासारखे होते. यामुळेच योग व भक्ती यांत साधनाभिन्नता असल्याचे मत प्रसृत झाले आहे. ***व्यक्त व अव्यक्त, अक्षर*** इ.ज्या स्थिती आहेत, त्यांची थोडी सरमिसळ अकरावा व बारावा अध्याय वाचतांना होते आणि ***व्यापक*** व ***एकदेशी*** या स्वरूपोक्तीमुळेही हे मत बळकटी धरते.

मूर्तिपूजकांना ***एकदेशी*** या वचनाने मूर्तीचा बोध होतो. ***व्यक्त*** हा शब्दसुद्धा मूर्तिपूजेशी संबंधित धरता येतो. ***श्रीकृष्ण हे अवतारस्वरूप व्यक्त या सदरात मोडते.*** अर्जुनाने पण विश्वरूपदर्शनामुळे व्यथित होऊन याच रूपाची आस धरली होती. **हे सर्व उल्लेख सगुण - साकार - मर्यादित - देहधारी अशा प्रकारच्या भगवंतांची उपासना करणे म्हणजेच *भक्ती* या धारणेस अनुकूल आहेत.**

व्यक्त आणि अव्यक्त

अकराव्या अध्यायातील ***("अनेकवक्त्रनयमनेकाद्भुतदर्शनम् ...शरीरे पाण्डवस्तदा।।११-१० ते १३।।"*** व ***"पश्यामि देवांस्तव देव देहे।...तव प्रवृत्तिम्।।११-१५ ते ३१।।")*** तसेच ***"कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो। ...।।११-३२।।"*** इ.श्लोकांतून अभिव्यक्त होणारे ***विश्वरूप*** असे जे बृहद्रूप, ते ***अव्यक्त*** म्हणून समजले जाते. त्याचप्रमाणे तशा रूपाची विभूतिवत वर्णने जी प्रामुख्याने दहाव्या व इतर अध्यायातून येतात, त्यांपैकी काहींची या अव्यक्त - अक्षररूपाशी, तर त्यातील सगुण-साकाररूपांची व्यक्तरूपांशी सांगड घातली जाते.

व्यक्त भाव म्हणजे विश्व - त्यापलीकडील ***अमूर्त भाव म्हणजे अव्यक्त*** असेही म्हणता येते. आदि -अंत-स्थिती यांपलीकडील भाव म्हणजे ***अक्षर व अव्यक्त*** असाही या वचनांचा बोध होतो. ***परंब्रह्म, परंधाम*** असे ज्याचे उल्लेख गीता करते, ते ***परमपद*** म्हणजे ***अव्यक्त*** वा ***अक्षर*** असा बोध पण याच वचनांवरून घेता येतो. तसेच अर्जुनाचा हा प्रश्न ज्ञानदेवांनी ज्या शैलीने मांडला आहे, त्यावरून अव्यक्ताची सोऽहंभावाने उपासना करणाऱ्यांबाबत त्याचा हा प्रश्न असल्याचे दिसून येते. म्हणजे ज्ञानमार्गियांना वा साङ्ख्यांना तो अव्यक्तोपासक म्हणत असल्याचेही दिसून येते.

भक्त व योगी

अशा प्रकारे विविध अर्थ घेऊन ***व्यक्त*** आणि ***अव्यक्त*** यांची उपासना करणाऱ्यांची ***भक्त व योगी*** (ज्ञानमार्गिय वा साङ्ख्य वा निर्गुणोपासक)या दोन सदरात विभागणी करणारी मते प्रसृत झालेली दिसतात. ही मते कितपत ग्राह्य आहेत आणि अर्जुनानेही जी ***व्यक्तोपासक व अव्यक्तोपासक*** अशी भक्तांची द्विविध श्रेणी कल्पिली आहे, त्याबाबत उलगडा करून घेण्यासाठी आपण आता श्रीकृष्ण काय सांगतात, ते पाहू या.

श्रीकृष्णांचे उत्तर

ते म्हणतात:

इयां किरीटीचिआं बोलां। तो जगद्बंधु संतोखला।
म्हणे हो प्रश्नु भला। जाणसि करूं।।१२-३४।।

अर्जुनाच्या या पृच्छेने जगद्बंधू श्रीकृष्ण संतोषून म्हणाले की "हे पार्था! तू फार छान प्रश्न विचारतोस. तर ऐक."

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता <u>उपासते</u> ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ।।१२-२।।

"माझ्या ठिकाणी मन एकाग्र करून नित्य माझी अनन्यचित्ताने भक्ती करणारे व माझ्यावर दृढ श्रद्धा असणारे **योगी** सर्वश्रेष्ठ ***(युक्ततमा मताः)*** होत असे मला वाटते."

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं <u>पर्युपासते</u> ।
सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ।।१२-३।।
सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ।।१२-४।।
क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ।।१२-५।।

"आणि जे इंद्रियसमुदायाचे नियमन करून अक्षर - अविनाशी - निर्देशरहित - अव्यक्त - सर्वव्यापी - अचिंत्य - इंद्रियांना विषय न होणाऱ्या - अविकारी - नित्य - अचल अशा स्वरूपाची उपासना करतात, ते सर्वांठायी समबुद्धी ठेवणारे व सर्व भूतमात्रांच्या हितासाठी झटणारे **योगी** पण मलाच प्राप्त होतात. पण अव्यक्ताच्या उपासनेत ज्यांचे चित्त आसक्त असते, त्यांच्या मार्गात क्लेश अधिक असतात. कारण **देहधारी** व्यक्तींना अव्यक्त उपासनेचा मार्ग कष्टप्रद ठरतो."

ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्न्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त <u>उपासते</u> ।।१२-६।।
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ।।१२-७।।

"परंतु जे सर्व कर्मे माझ्याठायी अर्पण करून मत्परायण होऊन **अनन्य चित्ताने योगमार्गाने *(अनन्येनैव योगेन)*** माझीच उपासना व माझे ध्यान करतात, त्या माझ्याठायी स्थिर चित्त ठेवणाऱ्या योग्यांचा ***(तेषामहं)*** या मृत्युरूपी संसारसमुद्रातून शीघ्रातिशीघ्र उद्धार करणारा मीच असतो.

"उपासते" व "पर्युपासते"

<u>व्यक्तोपासक आणि अव्यक्तोपासक यांची भक्त आणि योगी</u> अशी विभागणी श्रीकृष्णांच्या या वचनांत दिसून येत नाही. दोन्ही प्रकारच्या साधकांसाठी ***"उपासना करणारे"*** असाच शब्दप्रयोग या श्लोकांतून केला आहे. ***"उपासते - पर्युपासते - उपासते"*** हे शब्द येथे वेगवेगळ्या ठिकाणी वापरलेले आहेत. अर्जुनाचा प्रश्नसुद्धा ***भक्त आणि योगी*** हे शब्द भिन्नार्थी वापरणारा नाही. **(अ)*"सततयुक्त असणारे उपासक भक्त"* आणि (ब)*"अक्षर - अव्यक्त याची उपासना करणारे भक्त"* यातील अत्यंत उत्तम योगवेत्ते वा योगी कोण असतात, असा त्याचा मूळ प्रश्न आहे *(१२-१)*.**

त्याचप्रमाणे ***"एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।।१२-१।।"*** या उक्तिद्वारे त्याच्या प्रश्नाची सांगड अकराव्या अध्यायातील ***"नाहं वैदैर्न तपसा ...।।"*** ते ***"मत्कर्मकृन्मत्परमो ...."।।११-५३ ते ५५।।"*** या श्लोकांशी घातलेली दिसते. ***"एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ।।११-५३।।"*** म्हणजे अर्जुनाला भगवंताचे जे विश्वरूप स्पष्ट दाखविण्यात आले होते, ते स्वरूप यज्ञ, वेद, तप वा दान इ.कशानेही प्राप्त होणारे नाही. हे **असे स्वरूप केवळ अनन्यभक्ती करून प्राप्त होणारे आहे. त्यासाठी केवळ भगवंताप्रीत्यर्थ कर्म करणे, त्यालाच परम प्राप्तव्य समजून त्याची अनन्यचित्ताने भक्ती करणे इ.नी युक्त असा मार्ग तेथे सांगितला आहे.**

भगवंताचे स्वरुप

अर्जुनाला भगवंतांनी कोणते स्वरूप दाखवले, हा प्रश्न येथे उपस्थित होतो. लौकिकदृष्ट्या त्याचे उत्तर म्हणजे विलक्षण - चित्रविचित्र असे जे त्या स्वरूपाचे वर्णन अकराव्या अध्यायी येते, ते स्वरूप अर्जुनास दाखवले. परंतु ते स्वरूप भगवंताच्या अक्षर अव्यक्त अशा परमस्वरूपाशी पूर्णपणे मिळतेजुळते आहे, असे वाटत नाही.

भगवत्स्वरूप कसे आहे, हा पण गीतेचा एक वर्ण्य विषय आहे. त्याबाबत अनेकानेक विधाने गीतेत येतात. परंतु आपण पाहिलेल्या दिव्य विभूति - अष्टधा प्रकृतिस्वरूप, परा-अपरा प्रकृतिवर्णन - क्षराक्षरपुरुषदर्शन - पंचवीस तत्त्वविचार इ.सर्वांचा आढावा घेऊन जर आपण अकराव्या अध्यायातील विश्वरूपाकडे पाहिले, तर आपणास ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेल्या चिद्विलासवादाचे समग्र दर्शन घडते. ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** या श्रुतीचे अंतरंग गीता दाखवते. हेच परमश्रेष्ठ स्वरूप आहे. हेच परमस्वरूप आपणास विश्वरूपदर्शनाच्या उत्तुंग स्वरूपात दिसले पाहिजे.

अर्जुनाला सातव्या अध्यायारंभी श्रीकृष्णांनी म्हटलेले आहे की ***"मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जनमदाश्रयः। असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ।। ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः। यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ।।७-१ व २।।"*** आपल्याठायी मन आसक्त करून - आपला आश्रय करून योगाचरण करणारा ***योगी*** तेथे भगवानांनी कल्पिला आहे.

अर्जुनाला ज्ञान विज्ञानासह भगवत्स्वरूप कसे आहे, ते कळून यावे म्हणून त्यानंतर अकराव्या अध्यायाच्या अंतापर्यंत भगवत्स्वरूपाचे वर्णन आवश्यकतेप्रमाणे केलेले आहे. त्यासाठी सृष्ट्योत्पत्ती - विभूतिविस्तार इ.भाग वर्णिलेले आहेत. त्या सर्वांचा साकल्याने विचार करता ***"सर्वं खल्विदं ब्रह्म"*** हेच स्वरूप गीतेस अभिप्रेत आहे, असे दिसते. याचे ***व्यक्त व अव्यक्त*** असे विभाग अर्जुन करतांना वाटतो.

तसेच मुळात ***भक्त व योगी*** अशी विभागणी गीतेने केल्याचे दिसत नाही. ***भक्त तेच योगी अशी खरे तर गीतेची याबाबतची धारणा असल्याचे वाटते.*** अर्जुनाचे उपरोल्लेखित प्रश्न व श्रीकृष्णांची उत्तरे याबाबत निदर्शक आहेत, असे आपणास वाटते.

व्यक्तोपासक व अव्यक्तोपासक

त्याचप्रमाणे हे जे कोणी ***भक्त वा योगी*** आहेत *(प्रामुख्याने१२-१ ते ७ या श्लोकांतील)*, ते सहाव्या अध्यायात वर्णिलेल्या योगाचा आश्रय करणारे आहेत. अनन्यचित्त आहेत. परमस्वरूपावर दृढ श्रद्धा असणारे आहेत. नित्ययुक्त आहेत. सर्व कर्मे संन्यासिणारे आहेत.

आसक्तिरहित चित्ताचे आहेत. सर्वभूतांशी समभावाने आचरण करणारे आहेत. इंद्रियांचा संयम करणारेही आहेत. हे सर्व लक्षात घेऊन ***व्यक्तोपासक व अव्यक्तोपासक*** हे त्यांचेच प्रकार ठरतात. हे दोघेही परमपद प्राप्त करतात. परंतु व्यक्तोपासकांची साधना सुलभ आहे, तर अव्यक्तोपासकांची साधना क्लेशकर व कष्टसिद्ध असल्याचे श्रीकृष्ण म्हणतात, ते आपण वर पाहिले आहे.

आता व्यक्तोपासक कोण व अव्यक्तोपासक कोण याबाबत ज्ञानदेव काय म्हणतात, ते पाहू या. त्यांच्या ओव्यांतून हा विषय स्पष्ट होतो. काही टीकाकारांच्या मते ***सांख्य व योग*** हे जे मार्ग आहेत, त्यातील ***साङ्ख्य वा ज्ञानी*** यांस ***अव्यक्तोपासक*** असे येथे म्हटले आहे. श्रीमदाद्यशंकराचार्य हे मत उचलून धरतांना दिसतात. त्यांनी ***योगमार्ग म्हणजे कर्मयोग*** अशीही व्याख्या केली आहे. ज्ञानेश्वरांनीही ***"तैं अक्षर जी अव्यक्त। निर्देशदेशरहित। सोऽहंभावें उपासित। ज्ञानिएं जैं।।१२-३२।।"*** असा ज्ञान्यांचा व *१२-३३* या ओवीमध्ये ***"तेयां आणि जी भक्तां"*** असा भक्तांचा विशेष उल्लेख येथे केलेला आहे. आपण या बाबींची नोंद घेऊन ज्ञानेश काय म्हणतात, तिकडे वळू या.

व्यक्तोपासक -परमयोगयुक्त

तऱ्हें अस्तुगिरिचां उपकंठीं। रिघालिआं रविबिंबापाठिं।
रश्मि जैसें किरीटी। संचरति।।१२-३५।।
वर्षाकालीं सरिता। जैसिं चढों लागें पांडुसुता।
तैसिं नीच नवी भजतां। श्रद्धा दिसें।।३६।।
परि ठाकिलेआंहि सागरुं। जैसा माघिलहिं यावा अनिवारुं।
तिएं गंगेचिएं ऐसां पडिभारुं। प्रेमभावां।।३७।।
तैसें सर्वेंद्रियांसहित। मजमाझिं सूनिं चित्त।
जैं रातिदिओ न म्हणत। उपासिति।।३८।।
ययापरी जैं भक्तु। आपणपें मज देतु।
तैंचि मी योगयुक्तु। परम मानिं।।३९।।

श्रीकृष्ण म्हणतात की, "अस्ताचलास जाणाऱ्या सूर्यबिंबामागोमाग अनन्यगतीने जसे त्याचे किरण जातात, तसे जे भक्त मजशी अनन्यचित्त असतात; वर्षाकालात सरिता जशा उफाळून वाहतात, त्याप्रमाणे ज्यांची श्रद्धा मजवरच्या भक्तीने ओसंडून नित्य नव्या बळाने युक्त होत जाते; गंगानदी सागरास मिळाल्यावरही जसा तिच्या प्रवाहाचा लोट नंतरही सागराकडे जोरात येतच राहतो; तसे जे भक्त माझ्याशी नित्ययुक्त होत राहतात; ज्यांनी सर्वेंद्रियांसहित आपले चित्त माझ्याठायी समर्पण करून रात्रंदिवस माझी उपासना दृढपणे चालविली असते; अशा प्रकारे जे भक्त मला स्वात्म अर्पण करतात, त्यांना मी परमश्रेष्ठ योगी म्हणून मानतो. ते असो."

अव्यक्तोपासना::::

सोऽहंभाव

"**इतर जे माझे <u>भक्त</u> आहेत,** त्यांचे वर्णन आता ऐक."

आणि एर तेंहिं पांडवा। जैं आरूढौनि सोऽहंभावा।
झोंबति निरवयवां। अक्षरासिं।।१२-४०।।
मनाचिं नखिं न लगें। जेथ बुद्धिचि दृष्टी न रिघैं।
इंद्रियां किर जोगें। होईल काइं।।४१।।

"**सोऽहंभावा**ने माझी उपासना करणारे इतर ***भक्त ज्ञानी होत.*** अर्जुना! ते सोऽहंभाव धारण करून माझ्या निरवयव, अव्यक्त अशा अक्षरस्वरूपाला आलिंगितात. अशा त्या अक्षरस्वरूपाचे मनाला आकलन होऊ शकत नाही; बुद्धीच्या ते आवाक्यात येणारे नाही; तेथे इंद्रियांद्वारे ते कसे जाणले जाऊ शकेल! इंद्रियातीत असणाऱ्या त्या स्वरूपास ओळखणार तरी कसे आणि त्यांची उपासना मन - बुद्धी - इंद्रियसंपदा वापरून कशी करता येईल!"

परि ध्यानासिहिं कुवाडें। म्हणौनि एकें ठाइं न संपडें।
व्यात्किंसिं माझिवडें। कवणेंहिं नाइं।।१२-४२।।
जेआं सर्वत्र सर्वपणें। सर्वांहिं कालिं असणें।
जैं पावौनि चिंतवणें। हिंपुटी जाहालें।।४३।।
जैं होय ना नोहें। जैं नाहीं ना आहे।
ऐसें म्हणौनि उपायें। उपजतिचिना।।४४।।
जैं चलैं ना ढलैं। सरैं ना मैलैं।....।।४५।।

"हे असो! त्याचे ध्यान तरी कसे करावे! कारण ते ***अव्यक्त काही एकदेशी नाही.*** ते कोणत्याही प्रकारे व्यक्त असा आविष्कार करून दाखवत नसल्याने त्याचे चिंतन करण्याची क्रियाही निष्क्रिय होते. ते सर्वत्र सर्वदा विराजत असूनही म्हणूनच त्याचे ध्यान करण्यास दुर्घट ठरते. ते अस्तित्वात येते म्हणावे तर तसे नाही; नाही येत म्हणावे तर तसेही नाही; असे त्याचे विलक्षण स्वरूप असल्याने त्याच्या प्राप्तीसाठी करावयाचा उपायच संभवत नाही. जे चळत नाही, किंवा ढळतही नाही, जे संपतही नाही किंवा मलीनही होत नाही: अशी जी वस्तू आहे;"

कुंडलिनीयोग

...। तैं आपुलेनि बलैं। आंगविलैं जिहिं।।१२-४५।।
पैं वैराग्यमहापावकें। जालूनि विषयांचि कटकें।
अधपलीं तबकें। इंद्रियें धरिलीं।।१२-४६।।
मग संयमाचि धाटी। सूनि मुरडलीं उफराटी।
इंद्रियें कोंडिली कपाटीं। हृदयाचां।।४७।।

"अशा त्या ***अव्यक्त, अक्षर, अनिर्देश्य वस्तूस ज्यांनी स्वबळाने स्वाधीन करून घेतलेले असते*** आणि त्यासाठी कष्ट उपसलेले असतात, वैराग्यरूपी महाअग्नीने विषयरूपी सैन्ये ज्यांनी जाळून टाकलेली असतात; विषयांना थारा देणाऱ्या आधारभूत अशा इंद्रियांचे

ज्यांनी आपल्या सामर्थ्याने दमन केलेले असते आणि त्यांना उफराटे वळवलेले असते; म्हणजे इंद्रिये विषयांपासून विरक्त अशी करून त्यांना अंतःकरणात बंदिस्त करून ठेवलेले असते; चित्तवृत्तींचा प्रवाह अंतःकरणातून इंद्रिये व विषय यांजकडे जे जाऊ देत नाहीत;"

अपानिंचियां कवाडा। लावौनि आसन मुद्रा सुहाडा।
मूलबंधाचा हुडा। पन्नासिला।।१२-४८।।
आसेचें लाग तोडिलें। धैर्याचें कडें झाडिलें।
निद्रेचें शोधिलें। कालवखैं।।४९।।

"अधोगतीने संसाराभिमुख करणाऱ्या **अपाना**स बंदिस्त करून त्यास ***वज्रासन*** आणि **महा**मुद्रेचे ज्यांनी कुलुप ठोकले आहे; त्याउपरांत **मूलबंधा**ने युक्त अशा प्राणायामास ज्यांनी आरंभ केला आहे; ज्यांनी चित्तवृत्ती उदित करणाऱ्या संकल्पाचे वसतिस्थान उद्ध्वस्त केले आहे; मनास योगमार्गाकडे धैर्यपूर्वक वळविले आहे; ज्यांनी सुप्त **कुंडलिनी**चा कालविवरात प्रवेशून वेध केला आहे;"

वज्राग्निचां ज्वालीं। करूनु अपानधातूंचि होली।
व्याधिचां सिसाली। पूजिलीं यंत्रें।।१२-५०।।
मग कुंडलिनिएंचां टेंभा। आधारीं केला उभा।
तेआं चोजविलें प्रभा। निमथावेरीं।।५१।।
नवद्वाराचां चौचकीं। बाणूनि संयतिचि आडबंकी।
उघडलीं खिडकी। ककारांतिचिं।।५२।।

"वज्राग्नी प्रदीप्त करून ***(कुंडलिनीस जागृत करून)*** त्याच्या ज्वाळात ***(कुंडलिनीच्या जागृत अवस्थेतील ऊर्ध्वमुख प्रवाहात)*** ज्यांनी सप्तधातू अपानादींची होळी केलेली आहे; धातुदोष नष्ट करून ***(व्याधिंचां सिसाली)*** ज्यांनी नाडीसंस्था ***(यंत्रे)*** शुद्ध केली आहे; ***कुंडलिनी ऊर्ध्वमुख करून षट्चक्रभेदन करता करता ज्यांनी तिच्या प्रकाशात परमस्थानाचे - कुंडलिनीच्या गंतव्याचे - दर्शन घेतले आहे;*** इंद्रियांच्या विषयप्रवेशक नवद्वारांच्या चौक्या ज्यांनी प्राणापान सामरस्याच्या अडसराने बंद केल्या आहेत; ***षट्चक्रादींपुढील मार्ग कुंडलिनीद्वारे आक्रमण्यासाठी*** त्या मार्गावरील ***सुषुम्नामुख (ककारांतीची खिडकी वा ब्रह्मरंध्रस्थ दशमद्वार)*** ज्यांनी उघडले आहे;"

प्राणशक्ति चामुंडें। प्रहारूनि संकल्पमेंढें।
मनोम्हैषाचेनि मुंडें। दिधलीं बलीं।।१२-५३।।
चंद्रसूर्या बुझावणि। करूनि अनाहताचिं सूडावणि।
सतरावियेचें पाणि। जिंतिलें वेगिं।।५४।।

"ज्यांनी प्राणशक्ती चामुंडादेवीस म्हणजे कुंडलिनीस संकल्पविकल्पात्मक मेंढ्यांची आणि उन्मत्त मनोरूपी महिषांची मस्तके बळी देऊन अर्पण केली आहेत; ***इडा व पिंगला*** नाड्यांचे सामरस्य ज्यांनी साधलेले आहे; ***अनाहताचा नाद*** निनादवत ज्यांनी ***सतरावी कला*** जिंकून घेतली आहे;"

मग मध्यमामध्यविवरें। तेणें कोरिवें दादरैं।
ठाकिलें चवरैं। ब्रह्मरंध्रिचें।।१२-५५।।
वरी मकारांत सोपान। तैं सांडौनिआं गहन।
काखैं सूनिआं गगन। भरलें ब्रह्मीं।।५६।।
ऐसेनि जैं समबुद्धि। गिलावेआं सोऽहंसिद्धि।
आंगविताति निरवधि। योगदुर्गें।।५७।।
आपुलिआं साटोवाटीं। शून्य घेति उठाउठीं।
तैंहिं मातेंचि किरीटी। पावति गां।।५८।।

"**सुषुम्ना**मार्गे **कुंडलिनी**स ज्यांनी ***चक्रभेदनात्मक*** अशा सूक्ष्म पायऱ्यांवरून नेत नेत **ब्रह्मरंध्रा**च्या पठारी पोहोचवले आहे; **आज्ञाचक्रा**च्या शेवटी म्हणजे **मकारा**च्या अंती असलेल्या बिकट पायऱ्यासुद्धा चढून जाऊन ज्यांनी त्यावरील आकाशाला आपल्या काखोटीला मारलेले आहे; एवढे सायास करून जे योगी ***सोऽहंसिद्धी*** प्राप्त करून समबुद्धी होण्यासाठी सहजच हा अत्यंत अवघड असा योगदुर्ग चढून गेले आहेत आणि स्वतःचे मोल देऊन - अहंकार त्यागून - ज्यांनी त्वरेने अव्यक्त प्राप्त करून घेतले आहे; ते योगीही, हे अर्जुना! मलाच येऊन पोहोचतात."

(टीपः "एर तेहिं पांडवा (१२-४०)" या ओवीतून सोऽहंभावारूढ ज्ञानी भक्तांचा निर्देश आहे. या ओवीचा पूर्वापर संबंध *ओवी क्र. १२-३२* शी आहे. ***ज्ञानी*** हा शब्द येथे ***अव्यक्तध्यानी वा सगुणईश्वरप्रणिधानविरहित*** योग्यांसाठी वापरला आहे.)

भक्तीविण केलेला योग

परंतु पुढे ऐकाः

वांचूनि <u>योगाचेनि बलें</u>। अधिक काइं मिलें।
ऐसें नाइं आगलें। कष्टचि तेआं।।१२-५९।।
जिहिं सकल भुताचां हितिं। निरालंबिं अव्यक्तिं।
पसरलिआं आसक्ति। भक्तिविण।।६०।।
तेआं महेंद्रादि पदें। करिताति वाटवधें।
आणि ऋद्धिसिद्धींचिं द्वंद्वे। पडौनि ठाति।।६१।।
कामक्रोधांचें विलग। उठावति अनेग।
आणि शून्येंसि आंग। झूंजवावें किं।।६२।।

"अर्जुना! असा हा खडतर योगप्रवास करणारे साधक पण मला येऊन मिळतात आणि तेही शीघ्रातिशीघ्र *(पाहाः श्लोक क्र. १२-६ व ७)*! फरक थोडा असा आहे की अशी सगुणभक्ती नसलेले जे साधक योगाच्या दुर्गम मार्गाला लागतात, सर्वभूतांच्या हृदयस्थ अशा त्या निरालंबाची, त्या अव्यक्ताची आसक्ती धरतात आणि त्यांना सिद्ध होतांना अधिक कष्ट पडतात. इंद्रादी देवता त्यांना स्वर्गप्राप्तीची व देवतापदांची आमिषे दाखवून योगभ्रष्ट करतात. ऋद्धिसिद्धींची प्रलोभने सतत त्यांना दाखवली जातात. कामक्रोधांचे कित्येक हल्ले त्यांना परतवून लावावे लागतात. शून्याशी शरीर झुंजवावे लागते."

ताहानें ताहानचि पिआविं। भुकैलैआं भूकचि खाविं।
अहोरात्र वाविं। मवावा वारा।।१२-६३।।

उन्निद्रेआचें पहुडणें। निरोधाचें वेल्हावणें।
झाडासिं साजणें। चालावें गां।।६४।।
सीत वेढावें। उष्ण पांघुरावें।
वृष्टिचिआं असावें। घरांआंतु।।६५।।
किंबहुना पांडवा। हा अग्निप्रवेशु नीच नवा।
भातारेंविण करावा। तो हा योगु।।६६।।

"तहान भागवण्यासाठी तहानच प्यायला लागावी; भूक भागवण्यासाठी क्षुधाच भक्षण करायला लागावी; रात्रंदिवस वाऱ्याचे वावांनी मोजमाप करण्याचे दु:साध्य काम करायला लागावे; जागे राहूनच निद्रासुख प्राप्त करून घ्यावयाचा प्रयत्न करायला लागावा; इंद्रियनिरोध करतांनाच इंद्रियसुखे - विषयादी भोगण्याचा आनंद मिळवायला लागावा; निर्जन अरण्याशी मैत्री करायला लागावी; उबारा मिळवण्यासाठी थंडीच वेढून घ्यावी लागावी; सूर्याच्या प्रखरतेपासून शरीररक्षण व्हावे म्हणून पावसाच्याच घरात आसरा घ्यावा लागावा; फार काय! हे पंडुसुता! पती नसलेल्या स्त्रीस नित्यनूतन सहगमन म्हणून चिताप्रवेश करावा लागावा; असा हा भक्तिविरहित योग असतो."

निव्वळ क्लेशदायक योगप्रकार

पुढे ऐका:

एथ स्वामीचें काज। ना बापिकें व्याज।
परि मरणेंसि झूंज। निच नवें।।१२-६७।।
ऐसें मृत्युहूनि तिख। कां घोटें कढत विख।
डोंगर गिलितां मुख। न फाटे काइं।।६८।।
म्हणौनि योगाचिआं वाटां। जैं निगालैं गां सुभटा।
तेयां दु:खाचाचि वाटा भागां आला।।६९।।

"सगुणभक्तिविरहित असा हा योग का आचरावा! काही स्वामिकार्य आहे किंवा पैतृक आज्ञा आहे म्हणून मृत्यूशी असा सतत संग्राम करावा! आणि अशा सगुणभक्तिविरहित योगाचा प्रकार तरी कसा आहे पाहा! मृत्युपेक्षाही जलाल विषास गिळवेल काय! पर्वत गिळतांना मुखच फाटून जाईल ना! तसाच हा मरणापेक्षाही भयंकर योगप्रकार आहे. म्हणून हे वीराग्रणी! ज्यांनी अशा या भक्तिविण योगाचा आश्रय करून अव्यक्तास मिठी मारण्याचा मार्ग स्वीकारला, त्यांच्या नशिबी केवळ दु:खाचा शेलका वाटा आला."

अव्यक्ताचे अशक्यप्राय ध्यान

पाहें पां लोहाचें चणें। जैं बोथरिआं पडति खाणें।
तैं पोट भरणें किं प्राणें। त्रिशुद्धि म्हणों।।१२-७०।।
म्हणौनि समुद्रु बाहिं। तरणें आथि केंहिं।
कां गगनामाझिं पाईं। खोलिजतु असे।।७१।।
वलघलिआं रणाचि थाटी। आंगिं न लगतां काठी।
सूर्याचि पाऊटी। कां होएं गां।।७२।।
ययालागिं पांगुलां हेवा। नोहें वायूसि पांडवा।
तेंविं देहवंता जीवां। अव्यक्तीं गति।।७३।।
ऐसाहिं जऱ्हैं धिंवसा। बांधौनिआं आकाशा।
झोंबति तऱ्हैं क्लेशा। पात्र होति।।७४।।

"अरे अर्जुना! लोहाचे काटेरी चणे खायला जाणे म्हणजे पोट भरणे आहे की प्राणांस गमावणे आहे! भक्तिविरहित अशा या योगाचे आचरण करणेसुद्धा आत्मघातकीपणाचे आहे. आणि असे पहा की मनुष्यास अव्यक्ताचे ध्यान करणे किती दुरासाध्य आहे ते! समुद्र पोहून जाणे शक्य आहे का! आकाशात पायांनी चालता येईल का! युद्धात वीरगती प्राप्त होणाऱ्यास समरांगणी एकही घाव लागू नये अशी अपेक्षा किती फोल आहे नाही का! पांगळ्यांनी वाऱ्याशी शर्यत लावावी, तसे हे देहधारी जीवांनी सगुणभक्तीवाचून अव्यक्तात गती प्राप्त करून घेण्याच्या योगाचे प्रयोजन ठरते. आणि हे सर्व असे असतांनाही जे त्या अव्यक्तास असे बिलगण्याचा प्रयत्न करतात, ते निव्वळ क्लेशांना मात्र पात्र होतात." असो.

अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर

या सर्व विवेचनावरून ***अनन्यचित्त भक्त* व *अव्यक्तासक्त भक्त* यातील श्रेष्ठ योगी कोण**, या अर्जुनाच्या मूळ प्रश्नाचे उत्तर ज्ञानेशांनी काय दिले आहे, ते स्पष्ट होते. त्यांच्या मते जे सगुणभक्तिविरहित योगसाधना करून अव्यक्ताचे ध्यान करतात, त्यांना योग जरी सिद्ध झाला तरी कष्ट फार पडतात.

येथे फक्त त्यांचा ***भक्तिविरहित योग*** हा शब्दप्रयोग जरा समजावून घेतला पाहिजे.***अव्यक्ताचे ध्यान म्हणजे (सगुण) भक्तिविरहित योग (...भक्तिविण।।६०।।)*** असा अर्थ येथे अभिप्रेत आहे, असे दिसते. अव्यक्ताचे ध्यान करणे - त्याच्याशी एकरूपत्व पावणे हे देहवानास अशक्य कोटीतील जरी नसले, तरी दु:साध्य आहे, असे येथे सुचवले आहे. मार्ग अर्थात तोच आहे - जो योगमार्ग *ओवी क्र.१२-४० ते १२-५८* मध्ये वर्णिला आहे. पण यात *भक्तीचा अभाव* आहे. ***भक्तीसाठी आलंबन घ्यावयाचे ते असावे सगुण साकाराचे, असे सूचन यात आहे. निर्गुण निराकाराचे आलंबन शक्य नाही.*** म्हणून तसे आलंबन घेऊ पाहणे किंवा योग्य आलंबन घेतल्यावाचून स्वबळावर विसंबून आसनादी योगप्रयोग करण्याने परमात्मोपलब्धि होणे अशक्यच आहे, असा सूर यात आहे.

तसेच ***अभक्त*** म्हणजे जे आपला अहंकार त्यागून ईश्वराशी युक्त होऊ इच्छित नाहीत ते असाही एक अर्थ संभवतो. म्हणजे ज्या कारणासाठी योग अभ्यासावयाचा ते मूळ कारण म्हणजे परमात्मस्वरूपता पावणे हाच अशांना अभिप्रेत नसतो. जे ईश्वराशी विभक्त राहू पाहतात आणि तरीही त्याचे सामर्थ्य आपल्या अंगी यावे यासाठी योगप्रयोग करू जातात, ते म्हणजे ***अभक्त.*** असा अर्थ घेतल्यास तो अत्यंत मूलगामी होतो आणि श्रीकृष्णांच्या वचनाशी जुळतो पण.***"जिज्ञासुरपियोगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ।।६-४४।।"*** या भगवंतोक्तीनुसार त्यांनाही कधी ना कधी योगफल मिळतेच. पण विश्वामित्रासारखे खूप दूरचा फेरा घेऊन असे श्रीकृष्णमतावरून स्पष्ट व्हावे. असो.

पतञ्जलींची सूत्रे सांगतात ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।"*** आणि ***"यथा अभिमतध्यानाद्वा।।१-३९।।"*** जरी पतञ्जलींनी मुद्दामहून अमुकच ध्यान करावे असे स्पष्टपणे सांगितले नसले, तरी योगसाधना शीघ्र लाभदायी व्हावी आणि त्यातील अडथळे दूर व्हावेत म्हणून त्यांनी ***ईश्वरप्रणिधान आणि इष्टाचे ध्यान*** ही या सूत्रांद्वारे सांगितली आहेत. आणि ज्ञानेश काय किंवा श्रीकृष्ण तरी काय, आपल्याला ***"अव्यक्तासक्तचेतसाम्"*** - ज्यांनी अव्यक्ताची उपासना चालवली आहे, म्हणजे ***जे ईश्वरप्रणिधान वा अभिमतध्यान करत नाहीत,*** त्यांना योग साधणे अवघड असल्याचे सांगत आहेत. मुळात योग अवघड आहे, असे काही त्यांचे सांगणे नाही.

***"जिहिं सकलभुतांचां हितिं। निरालंबिं अव्याक्तिं। पसरलिआं आसक्ति। भक्तिविण।।१२-६०।।"* असे ज्ञानेशांनी म्हटले आहे, ते अव्यक्तोपासकांबाबत आहे.** अशा योग्यांना पण कुंडलिनीयोगमार्गाचेच अनुभव येतात, असे *ओवी क्र. १२-४६ ते ५८* वरून स्पष्ट होते. **या ओव्यात येणारे कुंडलिनी उत्थापनादी मार्गक्रमणेचे वर्णन सहाव्या अध्यायातील कुंडलिनीयोगमार्गाच्या - पंथराजाच्या - वर्णनाशी तंतोतंत जुळते.** फरक एवढाच आहे की सहाव्या अध्यायातील पंथराज वर्णन *(ओवी क्र. ६-१५१ ते ३२८)* जवळ जवळ १८० ओव्यांचे येवढे विस्तृत आहे, तर येथील बाराव्या अध्यायातील वर्णन अत्यंत संक्षेपाने उण्यापुऱ्या पंधरा ओव्यांत येते.

भक्तिसह योगाचे सोपेपण

यावरून जिज्ञासूंच्या सहज लक्षात येते की सहाव्या अध्यायात ज्या योगास ***पंथराज***नामे सोपे म्हणून ज्ञानेश गौरवितात, त्यासच बाराव्या अध्यायी तो क्लेशदायक आहे, दुःसाध्य आहे, टाकावू आहे असे ते कसे म्हणतील!

काही तथाकथित भक्तिवाद्यांनी योगास माउलीने त्याज्य समजले आहे असे मत व्यक्त केले आहे, ते किती अपरिपक्व आहे, ते समजण्यासाठी एवढे सांगणेच पुरावे! अधिकाची जिज्ञासा असणाऱ्यांनी या विषयाच्या समग्र समालोचनासाठी याबाबत ***पू.श्री.बाबामहाराज आर्वीकर*** यांचा ***दिव्यामृतधारा*** हा बृहत ग्रंथ जरूर पाहावा *(पृ.क्र. ४८० ते ४८२,ओवी क्र.१२-५९तत्रैव)*. आपला तो विषय नाही. प्रत्येकाने त्यास हवे तसे मत बनवावे. आपला त्यास आक्षेप असण्याचे काहीच कारण नाही. त्याचप्रमाणे आपणही जे मत अध्ययनांती विशद करत आहोत, त्यासही त्यांची आडकाठी असू नये हीच नम्र अपेक्षा!

याचाच अन्वयार्थ असा की बाराव्या अध्यायी क्लेशदायक असा जो योग आहे असे म्हटले आहे, तो भक्तीशिवाय म्हणजे ईश्वरप्रणिधानाशिवाय करावयास घेतलेला कुंडलिनीयोगच आहे. ***पंथराज व हा दुःसाध्य योग यांच्यात ईश्वरप्रणिधान असणे वा नसणे* हाच फक्त मूलभूत फरक आहे. बाकी क्रिया सर्व त्याच आहेत. त्यांचा अनुक्रमही तोच आहे.** कुंडलिनीयोगाचे येथील वर्णन *ओवी क्र.१२-४० ते ५८* मध्ये येते आणि ते ईश्वरप्रणिधानपूर्वक केलेल्या आणि त्याविरहित केलेल्या योगांस सारखेच लागू पडते. त्यापुढील *१२-५९ व ६०* या ओव्यांमध्ये *(* **"वांचूनि *योगाचेनि बळें।* अधिक काइं मिळें।.... पसरलिआं आसक्ति। *भक्तिविण।।६०।।"*** *)* *(सगुण)* भक्तिविना हा योग किती क्लेशदायक आहे, ते सांगितले आहे.

याही ओव्यांचा क्रम *१२-६०नंतर १२-५९* असला पाहिजे असे श्री.बाबामहाराज आर्वीकरांचे मत आहे आणि काही उत्साही भक्तिवाद्यांनी तो बदलला असल्याचे त्यांचे मत आहे *(दिव्यामृतधारा - पृ.क्र.४८१ तत्रैव)*. असो.

ईश्वरप्रणिधान नसल्याने व अव्यक्ताचे ध्यान करणे अशक्यप्राय ठरत असल्याने या दुसऱ्या योगप्रकारात ऋद्धिसिद्धी - इंद्रादी देवता इ.च्या प्रलोभनावर मात करणे साधकांस अवघड ठरते. तसेच ***धारणा-ध्यान -समाधि- संयम*** ही जी योगाची अंतरंग चतुःसूत्री आहे, ती साध्य करणे ***अव्यक्तध्यानाच्या कठीणतम प्रयोगाने*** दुरापास्त ठरते. एवढे सर्व खटाटोप करूनही समजा यदाकदाचित योग साध्य झाला, तरी ***भक्त योग्यांस म्हणजे सगुणात्मक ईश्वरप्रणिधान करणाऱ्यांना*** जे अंतिम योगफल प्राप्त होते, तेच त्यांनाही मिळते. आणि त्यासाठी कष्ट मात्र दारुण पडतात, असे ज्ञानेश आणि श्रीकृष्ण सांगतांना आपल्याला दिसत आहेत.

असे असूनही ***भक्त, भक्ती, योग आणि योगी*** या निर्णायक शब्दांचे वेगवेगळ्या प्रकारे संभवणारे अर्थ ध्यानी घेतल्याने सुज्ञ माणसाचीही मती हा भाग लक्षात घेतांना गोंधळून जाते, हे मात्र मान्य करायला हवे. तथाकथित *Bhaktiism* (!)वाल्यांची गोष्ट तर सोडूनच द्या! असो. या विषयावर अजून एक ओझरता प्रकाश ज्ञानेश्वरांच्याच हस्ते पाडून त्यास स्वल्पविराम देऊ या. स्वल्पविराम अशासाठी की या ईश्वरप्रणिधानयुक्त योगाचा उर्वरित भाग आपणास अजूनही पहावयाचा आहे.

कुंडलिनीयोग तसा कठीण नाही.

ज्ञानेश बाराव्या अध्यायाच्या आरंभी जे गुरुमाउलीच्या प्रेमाचे कौतुक सांगतांना दिसतात, त्यातूनही ते साधक कोणत्या मार्गाने जातो, त्याचा ओझरता उल्लेख ***"योगसुखाचें सोहालें।...समाधिबोधें निजविसिं। बुझावूनि।।१२-४ ते ७।।"*** या ओव्यांतून करतात. गुरुकृपांकित योगसाधकास ***सोऽहंसिद्धी, योगसुख, आधारशक्ती कुंडलिनीचा अंक, हृदयाकाशपल्लकात सुखैव योगनिद्रा, प्रत्यग्ज्योतीची वोंवालणी, मनपवनांचि गती, सामरस्य, सतरावियेचें स्तन्य, अनाहताचां हल्लरु, समाधिबोध,*** इ. योगगती सहजच प्राप्त होतात, असा भाग तेथे येतो. हे सर्व वर्णन अर्थातच पंथराजनिर्दिष्ट योगाचेच आहे, हे जिज्ञासूंच्या सहजच ध्यानी येईल.

पंथराज हा तसा ***गुरुकृपाधिष्ठित, सगुणईश्वरप्रणिधानयुक्त कुंडलिनीयोग*** असल्याचे आपणांस लक्षात येते, ते या ओव्यांतील गुरुनिर्देशावरून. येथील गुरूंचा निर्देश व सहाव्या अध्यायातील

"करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजें।।६-१८६।।" यातील गुरुनिर्देश यांची चांगली सांगड घालता येते. असो. जर कुंडलिनीयोग खरेच तसा अवघड असता, तर तो सद्गुरूंनी साधकास सांगण्याचे काय कारण! आणि खरा शिष्य तर कधीही गुरूने निर्देशिलेल्या मार्गाव्यतिरिक्त इतर मार्गाने जात नाही. तस्मात योगाचे प्रयोजन गुरुदत्तच असावे आणि तशा योगाच्या आचरणात बाराव्या अध्यायात वर्णिलेली योगसाधनेतील खडतरता नसते, असेच आपल्याला मान्य करावे लागते. असो.

भक्तिपंथ व पंथराज

त्याचप्रमाणे या विषयाबाबत ते पुढील ओव्यांतून म्हणजे ***भक्तयोग्यांविषयी - सगुणईश्वरप्रणिधान करून योगधारणा करणाऱ्यांविषयी*** जे म्हणतात, तेही पाहण्यासारखे आहे.

ज्ञानेश म्हणताहेतः

म्हणौनि एर तैं पार्था। नेणतिचिं हें व्यथा।
जैं कां भक्तिपंथां। वोटंगलें।।१२-७५।।
कर्मेंद्रियें सुखें। करिति कर्में अशेखें।
जिएं कां वर्णविशेखें। भागां आलीं।।७६।।
विधितैं पालित। निषेधांतै गालित।
मज देऊनि जालित। कर्मफलैं।।७७।।

"भक्तिपंथाला मात्र जे अनुसरले, त्यांना ही कष्टप्रद साधना करावी लागत नाही आणि त्या मार्गावरील व्यथांचा स्पर्शही होत नाही. अशा साधकांची इंद्रिये वर्णविहित कर्मे सुखेनैव आचरतात. शास्त्रानुसार कर्मे करत आणि निषिद्ध कर्मे त्यागीत ते साधक आपल्या सर्व कर्मांची फळे मला अर्पण करून जाळून टाकतात."

"ध्यानमिखैं घर। माझें जाहालें"

ययापरी पाइं। अर्जुना माझां ठाइं।
संन्यासूनि नाइं। करिति कर्में।।१२-७८।।
आणिकहिं जैं जैं सर्व। काइक वाचिक मानसिक भाव।
तेआं मीवांचूनि धांव। आनौति नाइं।।७९।।
ऐसें जैं मत्पर। उपासिति निरंतर।
ध्यानमिखैं घर। माझें जाहालैं।।८०।।

" हे अर्जुना! याप्रमाणे माझ्याठायी आपली कर्मे अर्पण करून ते त्यांचा नाश करून टाकतात. तसेच त्यांच्याकडून ज्या कोणत्या कायिक, वाचिक व मानसिक कृती घडतात, जे जे काही त्यांच्याकडून घडते, ते सर्व ते मदर्पण करतात. त्यांच्या मनीमानसी माझेच ध्यान सदासर्वदा असते. असे माझे निरंतर ध्यान करत मला उपासणाऱ्या त्या साधकांचे सर्वस्व आणि त्यांचे हृदय हे सगळे त्यांच्या त्या ध्यानाकार वृत्तीमुळे माझे नित्य वसतीचे स्थानच होऊन राहते, यात काय नवल!"

याप्रमाणे **पंथराजासच *भक्तिपंथ* असे आणिक एक नांव ज्ञानेश प्रदान करत आहेत. *या भक्तिपंथात, पंथराजात आणि सर्वंकष साधकचर्या वर्णन करणाऱ्या अठराव्या अध्यायातील क्रमयोगात वस्तुतः काहीच फरक नाही,*** हे आपणास विचारांती सहजच लक्षात येते. अर्थात ***या भक्तिपंथात अनन्यध्यान हे पायाभूत साधन असल्याचेही आणि हा कर्मयोगाचाच भाग असल्याचे*** आपल्या लक्षात त्यांच्या वरील ओव्यांवरून सहज येते. असो.

पंथराजाचे सूत्रसमन्वयन

आतापावेतो ***पंथराज*** व योगविषयक ज्ञानेशांच्या भूमिकेचे आपण बऱ्याच खोलात जाऊन अवलोकन केले. त्यावरून पंथराज साधनाक्रमाची काही ठळक वैशिष्ट्ये आपल्या नजरेत भरतात. ***कर्म, ज्ञान, भक्ती, कुंडलिनीजागृती, लययोगसाधन, शिवशक्तिसामरस्य; अनन्य(सगुण)ध्यान म्हणजेच पातंजलसूत्रोक्त ईश्वरप्रणिधान; गुरुवरण व गुरुपदिष्ट साधनापद्धती; अष्टांगयोगाची यमनियम-आसन -प्राणायाम - प्रत्याहार ही बहिरंग साधने व धारणा - ध्यान -समाधिसह संयम ही अंतरंगसाधने; चक्रनाडी इ.संस्थांवर आधारलेल्या योगक्रिया व त्यात कुंडलिनीशक्तीचे निर्विवाद महत्त्वपूर्ण स्थान; योगसाधनेची भिन्नता तसेच त्यांच्यातील समानता; तसेच कोणत्याही मार्गाने जा, कुंडलिनी जगदंबेच्याच प्रवेशद्वारातून मोक्षमार्ग जातो, हे त्या दोन्ही साधनामार्गातील समानतेवरून जाणवणारे प्रमेय; पंथराजप्रणीत ध्यान वा ईश्वरप्रणिधान सुलभरीत्या अवगत व्हावे म्हणून त्यासाठी १) कर्मे ईश्वराठायी फलांसह समर्पण करण्याची युक्ती २) तसेच अनन्यध्यान म्हणजे भक्ती (सगुणईश्वरप्रणिधान) आणि ३) या साधनेद्वारे प्रकट होणारे ईश्वराचे ज्ञानस्वरूप ही सर्व मिळून केवळ एकच योगमार्ग असण्याची निश्चित धारणा;*** अशा काही महत्त्वपूर्ण बाबी यानिमित्ताने आपल्यासमोर उभ्या राहतात.

या आणि तशाच इतरही काही विशिष्ट गोष्टींचे सूत्रसमन्वयन ज्ञानेश कसे करतात, ते आपण पुढे अठराव्या अध्यायातील ***क्रमयोग*** अवलोकितांना अभ्यासणारच आहोत. त्या वेळी हा विषय अधिक खुलासेवार पाहता येईल.

समारोप

तूर्त आपण मागे एक विषय नंतर पाहू म्हणून तसाच सोडून दिला होता, तिकडे वळू या. तो म्हणजे ***ज्ञानदेवांचे योगपर अभंग !*** यातून आपल्याला योगप्रक्रिया, चक्रे, पूर्व व पश्चिममार्गावरील वाटचाल इ.बाबत बरीच माहिती मिळेल. तर वळू या आता पुढील ***उन्मेष क्र.४६ - योगपर अभंग*** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४६::
::योगपर अभंग::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४६:
ज्ञानेश्वरी:
६:२२८,२३०,२४१,३१५
१२:४८
अभंग:
७३२-७३७,७४०-८०६, ८०८, ८०९, ८११-८१६,८२०,८२३-८२७,८३०-८३२,८३६,८३७, ८३९-८४१,१०६०
ना.भ.सू.:३

उद्धृत:
त्रिकूटादी संज्ञांबाबत मत: डॉ.प्र.न. जोशी:सार्थ श्रीज्ञानदेव अभंगमाला :७९८
शून्यस्थान माहिती: पं.गोपीनाथ कविराज:मनीषी की लोकयात्रा-भगवतिप्रसाद सिंह-८००
शून्य संज्ञार्थ:तत्रैव:८१०

::उन्मेष ४६::
::योगपर अभंग::

योगचक्रे(३)::::

पंथराज, योगचक्रे व ज्ञानेशांचे अभंग

योगचक्रांचे विवेचन करतांना ज्ञानेशांच्या अभंगांतून आढळणाऱ्या ***त्रिकूट, गोल्हाट, श्रीहाट, औटपीठ, भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र*** या योगस्थानांबाबत ***डॉ.के.रा.जोशी*** व ***डॉ.बा.त्रिं. शालिग्राम आणि डॉ.वि.शं.वाळिंबे*** यांच्या या चक्रांबाबतच्या मतांचा ओझरता उल्लेख केला गेला होता. या योगस्थानांचे ज्ञानेश योगपद्धतीतून इतर योगमतांशी समन्वयन करता येते का हे त्यांच्या अभंगरचनांद्वारे पाहण्याचा मानस तेव्हा व्यक्त केला होता *(उन्मेष ४१: लययोगसमालोचन: योगपथ पृ.क्र.७६१ते ७६४)*. तो भाग आता पाहू या. हा भाग पाहत असता ***पंथराज व ज्ञानेशांची योगविषयक अनुभूती*** यांचेही जमेल तेवढे आलोडन करू या.

हा भाग हाताळण्याआधी थोडी पूर्वपीठिका पाहू या. ज्ञानदेवांची अभंगसंपदा एकूण जवळ जवळ *११००* अभंगांची असावी. त्यातील बहुतेक अभंग मुद्रित स्वरूपात आज रोजी उपलब्ध आहेत. ***डॉ.प्र.न.जोशी*** यांनी ते अभंग ***सार्थ श्रीज्ञानदेव अभंगमाला*** या ग्रंथात संग्रहित केलेले आहेत. तसेच इतरांनीही ज्ञानदेवादी भावंडांचे अभंगवाङ्मय संपादित केल्याचे दिसून येते. प्रस्तुत विवेचनासाठी घेतलेले अभंग प्रामुख्याने डॉ.जोशी यांनी त्यांच्या ग्रंथात दिलेल्या अनुक्रमांकांचा निर्देश करून संदर्भ शोधण्यास सोपे पडावे म्हणून देण्याचा मानस आहे. अभंग जरी त्यांच्या अनुक्रमांकाप्रमाणे देत असलो, तरी त्यांचे विश्लेषण आपण अभ्यासकाच्या आपल्या वेगळ्या दृष्टिकोनातून आणि आपण हाताळत असलेल्या विषयास अनुलक्षून करणार आहोत, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे. असो.

योगपर अभंग

ज्ञानदेवांचे *योगपर अभंग क्र.७३२ ते ८४१* असे सदर ग्रंथाच्या *पृ.क्र.४४० ते ४८४*त संग्रहित केलेले आहेत. उणेपुरे *११०* असे हे योगविषयक अभंग आहेत. यांचाच आपण जमेल तसा परामर्ष घेत हा विषय पुढे पाहणार आहोत.

७३२व्या अभंगाखाली या अभंगांचे विवरण देतांना डॉ. जोशी यांचे म्हणणे असे दिसून येते की ***त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र*** ही ब्रह्मांडीची षट्चक्रे आहेत व ***मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञा किंवा अग्निचक्र*** ही पिंडीची सहा चक्रे आहेत. सर्वात वर ***सहस्त्रदलचक्र*** असते. ते परमात्म्याचे विश्रांतिस्थान होय. त्यालाच ***त्रिकूट, मेरुशिखर, शिखर*** अशीही नांवे आहेत. ***सत्रावी जीवनकला वा अमृताचे तळे*** येथेच असते. **येथे राहणारा परमात्मा नीळवर्ण तेजोबिंदु म्हणून कृष्णाच्या - विठ्ठलाच्या स्वरूपात संतांनी मानला आहे.** त्यांच्या या मताची योग्य ती नोंद घेतल्यानंतर पुढे जाऊ या.

सगुण व निर्गुण

सगुण-निर्गुण ध्यानाबाबत आपण यापूर्वी बराच उहापोह अर्जुनाच्या बाराव्या अध्यायारंभीच्या प्रश्नावरून केलेला आहे. ज्ञानदेव सगुण व निर्गुण ध्यानावर आपल्या अभंगातून प्रकाश पाडतात, तो असा:

निर्गुणाचे रंगीं रंगलें हें मन।
सांवलें सगुण ब्रह्म तैंचि।।१।।
मताभिमानी ऐसा विश्वास न धरिति।
वचनीं निर्गुण सगुण दोनिं भिन्न असति।।२।।
असिपद जैसें तत्पद तैं नाहीं।
सांवलें ब्रह्म पाहीं तैसें असे।।३।।
निवृत्तिदास म्हणे चांगया ब्रह्म तैंचि खरें।
सांवलें निर्धारें जाण रया।।४।।अ.क्र.७३२।।

"निर्गुण सगुण वेगळी रूपे आहेत, असा मताभिमान वृथा आहे. सावळे सगुण ब्रह्म योग्यांना निळबिंदुरूपात ध्यानी दिसते. हाच कृष्ण - हाच विठ्ठल! निर्गुणाच्या रंगात रंगलेल्या मनास याचाच साक्षात्कार घडतो. ***तत्*** भाव आणि ***त्वम्*** भाव हे ***असि*** या भावात जेव्हा लोपतात, तेव्हा हे सावळे परब्रह्मच ***असि*** या भावाने प्रकटते. ***"तत् त्वम् असि"*** हे महावाक्य असे या सगुण-निर्गुण श्यामल स्वरूपात लय पावते. हे चांगदेवा! ते श्यामल स्वरूप हेच खरे ब्रह्म आहे."

(***टीप***: अ.क्र.= अभंग क्रमांक - डॉ.प्र.न.जोशी यांच्या *सार्थ श्रीज्ञानदेव अभंगमाला* या ग्रंथातील अनुक्रमानुसार)

या अभंगातून योगिजनांना येणाऱ्या स्वरूपानुभूतीचे स्वल्पदर्शन ज्ञानदेव आपणास घडवतांना दिसतात.

शून्याचा शेवट

असे हे दुर्लभ स्वरूपदर्शन घडावे तरी कसे, यावर ज्ञानदेव सूचित करतात की:

डोलांचि पाहा डोलां शून्याचां शेवट।
नीलबिंदु नीट लखलखित।।१।।
विसांवों आलें पातलें चैतन्य तेथें।
पाहें पां निरुतें अनुभवें।।२।।
पार्वतिलागें आदिनाथें दाविलें।
ज्ञानदेवां फांवलें निवृत्तिकृपा।।३।।अ.क्र.७३३।।

"योगी ध्यान करतात. ***धारणा-ध्यान-समाधि-संयम*** या मार्गाने त्यांना कुंडलिनीउत्थापन व पुढील मार्गक्रमणा साध्य होते. त्या मार्गावर ***आज्ञाचक्र*** येते. तेथे ***तृतीय नेत्र वा डोळा वा अतींद्रिय जाणीव*** प्राप्त होते. हा जाणिवेचा प्रांत **शून्या**च्या म्हणजे **परब्रह्मा**च्या अंतरी

पोहोचतो. याची अनुभूती योग्यांना प्राप्त होते. ते परब्रह्म - शून्य - नीलबिंदुसमान प्रकाशत असते. त्याठायी चैतन्य विसावते."

"पंथराजाच्या आदिगुरूंनी म्हणजे आदिनाथ श्रीशंकरांनी आदिमाया पार्वतीस आपल्या कृपाप्रसादाने जी या ***नीळबिंदू*** आत्मरूपाची अनुभूती प्राप्त करून दिली, तीच मलाही या निवृत्तिनाथ सद्गुरूंच्या कृपाकटाक्षाने प्राप्त झालेली आहे, असे ज्ञानदेव सांगतात."

या अभंगाद्वारे पंथराजप्रणालीचे ज्ञानेशांच्या योगसाधनेतील महत्त्वपूर्ण स्थान पुनश्च प्रकट होते. स्वरूपदर्शनाचा खरा योगमार्ग तो हाच असल्याचेही आपणास या अभंगाद्वारे जाणवते. असो.

चार शून्ये

आता यापुढील अभंगात ज्ञानेश हे स्वरूपदर्शन ज्योतिस्वरूपातही होत असते, हे कसे सूचित करतात, ते पाहाः

शून्याचां शेवट डोळां पाहां निराला।
नीलबिंदु सांवला प्रकाशला।।१।।
ब्रह्म ज्योतिरूप विसांवलें जेथ।
अनुभव साद्यंत पाहा तुम्हीं।।२।।....।।अ.क्र.७३४।।

सावळ्या नीलबिंदूत ***ज्योतिरूप ब्रह्म*** समावलेले असते, अशी योग्यांना अनुभूती येते. या अनुभूतीचा प्रांत व त्यावरील ठळक स्थळांचा निर्देश करत ज्ञानदेव पुढे म्हणताहेतः

चहूं शून्यांचा भेद कैसा पाहावा देहीं।
ब्रह्मरंध्रीं निःसंदेहिं निजवस्तू।।१।।
सांवलें सुकुमार बिंदुचें अंतरीं।
अर्धमात्रेवेरीं विस्तारलें।।२।।
त्रिकूट श्रील्हट गोल्हाट तिसरें।
औटपीठादि सारें ब्रह्मांडासिं।।३।।
स्थूल सूक्ष्म कारणीं माया।
महाकारणाचां ठायां रीघ करा।।४।।
निवृत्ति ज्ञानदेव उभयतांचें बोल।
आकाश बुबुलीं पाहां असें।।५।।अ.क्र.७३५।।

देहांतरी ***चार शून्ये*** किंवा शून्यस्थाने आहेत. बिंदुच्या आत सावळे परब्रह्म व त्याच्या प्रांताचा विस्तार असतो. अर्धमात्रेच्या पुढचा हा प्रांत आहे. ***त्रिकूट, श्रील्हट वा श्रीहाट, गोल्हाट व औटपीठ*** ही ती चार शून्ये होत. ***स्थूळ, सूक्ष्म, कारण व महाकारण*** या चार देहांपरत्वे ही ती चार शून्यस्थाने समजली पाहिजेत. ***स्थूल - त्रिकूट, सूक्ष्म - श्रील्हट वा श्रीहट वा श्रीहाट, कारण - गोल्हाट व महाकारण- औटपीठ*** असे या स्थानांचे परस्परसंबंध असावेतसे दिसते.

"स्थूल-सूक्ष्म-कारण या मायिक देहांचा निरास करून म्हणजे ***त्रिकूट, श्रीहाट व गोल्हाट*** या स्थानांचा भेद करून महाकारणदेहविशिष्ट औटपीठात प्रवेश करून ब्रह्मरंध्री वसणाऱ्या परमात्म्याची अनुभूती घ्यावी. ज्ञानदेव व निवृत्तिनाथ दोघांचीही अशी अनुभूती आहे की ब्रह्मांडातील आकाशास पोहोचण्याचा मार्ग म्हणजे बुबुळ *(यालाच तृतीय नेत्र वा डोळा वा नयन इ. संज्ञा आहेत)* या आज्ञाचक्रस्थ स्थानातून पुढे जातो. औटपीठादी जी चार शून्ये आहेत, ती अर्धमात्रेतील म्हणजे आज्ञाचक्रावरील ब्रह्मांडीची स्थाने असल्याचा निर्देश या अभंगाद्वारे मिळतो.

(टीपः शून्यस्थान - म.म.प.गोपीनाथ कविराज यांनी केलेली शून्यस्थान कोणते याची व्याख्या ***"मनीषीकी लोकयात्रा"*** या ***डॉ. भगवतीप्रसादसिंह*** याच्या ग्रंथात *पृ.क्र. २८९,२९०* येथे दिलेली आहे. त्यावरून असा अर्थ निघतो की चैतन्यसत्तेच्या अभिव्यक्तीचे विशेष केंद्र ज्यास शक्तिविकासाचे केंद्र असे पण म्हणता येईल, ते देहाच्या अतीत असूनही देहात प्रतिभासित होते. **देहाचे कार्य सांभाळणाऱ्या या प्रतिभासित केंद्राला *शून्य* अशी संज्ञा आहे.** त्याच्या आधारानेच चैतन्याची बाह्यरूपात अभिव्यक्ती होऊ शकते. वस्तुतः असे **मूळ शून्य एकच आहे, ज्याला *महाशून्य* म्हणतात.** तेथून मूलचैतन्याचा प्रतिभास शक्तिविस्ताराचे कार्य करतो. असे शून्य एकच असले तरी प्रकृतिपरत्वे ते बहुत्वाने भासते. जसे नाभि, हृदय, मस्तक येथे या शून्याची सत्ता विद्यमान असते.)

सहस्त्रदल व ब्रह्मरंध्रः:::

पदपिंडसमावेशन

या परम आकाशात ***सहस्त्रदलकमल - सहस्त्रार - सहस्त्राधार*** या नांवांनी ओळखले जाणारे योगचक्र असते. त्याबाबत ज्ञानदेव म्हणतातः

१) **आकाश जैं दिसें दृष्टीचिआं पोटीं।**
शून्यत्वांसिं घोटीं चैतन्यांत।।१।।
अर्थ पाहातां सांकडें आईकितां।
कैसें करूं आतां निवृत्ती सांगें।।२।।
सांघतांचि गूज देखिलें नयनिं ।
हिंडताति मौनिं याचिलागिं।।३।।
ज्ञानदेवाचां अर्थ कूटस्थ परिपूर्ण।
अपूर्णहिं परिपूर्ण होएं जेथ।।३।।अ.क्र.७३६।।

आज्ञाचक्र वा त्रिकूटस्थानाच्या आत **तृतीयनेत्रातून जे आकाश दिसते, तेथेच शून्य व चैतन्य यांचा मिलाप होतो.** या अभंगात ***शून्य*** ही संज्ञा ***सुषुम्ना तसेच कुंडलिनी*** यांना उद्देशून वापरल्याचे दिसते. ***"शून्यत्वासिं घोटीं चैतन्यांत"*** या पदाचा अर्थ येथे ***शून्य व चैतन्य यांचे सामरस्य म्हणजे शक्ती व शिव यांचे यौगिक मिलन*** असा घ्यावा लागतो. ज्ञानदेव म्हणतात कीः

"हे कूट बोलणे ऐकून त्याचा अर्थ समजून घेण्यासाठी मी निवृत्तिनाथांना शरण गेलो. तेव्हा त्यांनी कृपाळूपणे तो अर्थ मला समजावून दिला. तो समजताच मला त्या गुह्याचा साक्षात्कार झाला. ज्याच्यासाठी मौनी तापस वणवण करतात, ते कूटस्थ - तो परमात्मा - हेच ते गुह्य होय. या परिपूर्ण कूटस्थाशी समरस होऊन अपूर्णासही पूर्णत्वप्राप्ती होते." ***योगी त्याचेच वर्णन करतांना दिसतात,*** हे पुनश्च लक्षात घेऊन पुढे जाऊ या.

अपूर्ण म्हणजे ***शिवा वा शक्ती - कुंडलिनी - जीव*** आणि ***कूटस्थ*** म्हणजे ***शिव - परमात्मा,*** अशा अर्थी हे शब्द वापरले आहेत. जीव जेव्हा शिवात मिळतो, तेव्हा अपूर्णत्वास पूर्णत्वप्राप्ती होते, असा **पदपिंडसमावेशना**चा संकेत या अभंगांतून मिळतो.

कूटस्थ

२) सहस्रदल१ ब्रह्मरंध्र२ ज्याचें घर।
सत्रावी निरंतर वसें जेथ।।१।।
रक्त शुभ्रवर्ण नील पीत दिसें।
दृष्टी शुद्ध असें तेयांनाचिं।।२।।
फार किती सांगों सज्ञान तुम्हीं जन।
अर्थ हा समजौनि मौन्य धरा।।३।।
गुह्याचेंहिं गुह्य निवृत्तीनें दाविलें।
मीच वाचा हों बोलें बोलतसें।।४।।अ.क्र.७३७।।

"अशा या **कूटस्थ परमात्म्याचे वसतिस्थान** म्हणजे **सहस्त्रदलकमलातील१ *ब्रह्मरंध्र*२** होय. ते या दिव्य आकाशात असते. त्याठायी ***सत्रावी कला*** निरंतर वसते." ***समना -उन्मनी - अमना*** अशा मनाच्या ज्या सकल - निष्कल अवस्था असतात, त्यातील ***अमना*** म्हणजेच ***सत्रावी कला.*** अर्थात त्याठायी मनाचे मनपण राहत नाही, असा भावार्थ ***सत्रावी कला*** या शब्दप्रयोगातून व्यक्त होतो.

"योगिजनांच्या अतींद्रिय जाणिवेस या प्रांतात जे तेजोमय दर्शन घडते, ते **रक्त, श्वेत, पीत व नील या रंगांच्या ज्योती**चे असते. त्या ***ज्योतीच्या आत शुद्ध म्हणजे परमात्मा असतो.*** हे गुह्याचेही गुह्य निवृत्तिनाथांनी ज्ञानेशांना प्रकट केले आहे. ते ऐकून सज्ञान सुज्ञ जीवांनी मौनावावे, अशी त्यांची सार्थ अपेक्षा आहे!!"

ब्रह्मांडभुवनी असणाऱ्या त्या सुंदर सहस्त्रदलकमलातील ब्रह्मरंध्री मसुरमात्र आकाराने ***महाकारण*** विद्यमान असल्याची योग्यांना अनुभूती असते. त्या कमलातील महत्त्वाच्या चार पाकळ्या म्हणजे चार शून्यांनी निर्दिष्ट असे ***स्थूल - सूक्ष्म - कारण - महाकारण*** हे देह होत. त्यांच्या आत ***कृष्ण-नीलवर्ण शोभा*** म्हणजे ***परमात्मा*** विसावलेला असतो. **सहस्त्रदलकमलात हा आत्मा निश्चयेकरून असल्याचे ज्ञानेश *अ.क्र.७३७* द्वारे साधकांस आश्वासन देतात.** अर्थातच तेथे जाण्यासाठी त्यांनी सांगितलेल्या योगमार्गास सोडून आपण इतरत्र धाव घेऊ नये, हे सुज्ञांस सांगणे न लगे!

पंथराज योगाविषयी अधिक विचार

येथपावेतो आपण विचारात घेतलेल्या ज्ञानेशकृत अभंगांतून पश्चिमेच्या मार्गाबाबत बरीच माहिती मिळते. पंथराजाशी ही माहिती अत्यंत निगडित असल्याने योगसाधकांनी ती सर्व माहिती ध्यानी घेणे आवश्यक ठरते. मुख्यतः पंथराजाच्या साधकांचे अनुभव कोणत्या स्वरूपाचे असतात, ते जाणून घेण्यासाठी ज्ञानदेवांच्या योगपर अभंगांकडे म्हणूनच वळावे लागते. उत्तरोत्तर त्यांचे असे अभंग आपण जसजसे पाहत जाऊ, तसतशी आपली ही धारणा अधिकाधिक प्रबल होत जाईल. असो.

शून्यांचा विचार::::

चार शून्ये व महाशून्य

ज्ञानेशांच्या अभंगांतून ***चार शून्ये व महाशून्य*** यांचे उल्लेख येतात. ही चार शून्ये ***स्थूल - सूक्ष्म - कारण व महाकारण*** या चार देहांच्याअवस्थांवत होत असे दिसते. तसेच ही चार शून्ये ***त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट व औटपीठ*** या नांवांनी त्यांना विदित असल्याचेही *अभंग क्र. ७३५* वरून दिसून येते. यापूर्वी ***पं.गोपीनाथ कविराज*** यांचे मत *(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ पृ.क्र. ७६२ ते ७६५)* विचारात घेतांना पश्चिमपथावरील स्थानांची व चार वा पाच शून्यांचा विचार ***डॉ.बा.त्र्यं. शाळिग्राम, डॉ.के.रा.जोशी व श्रीविष्णुतीर्थ*** महाराजादी योगमार्तंडांच्या विचारांना अनुलक्षून आपण पाहिल्याचे जिज्ञासूंना स्मरत असेलच. तसेच आज्ञाचक्रावरील स्थानांचा ओझरता विचार व काही तत्त्वेही आपण पूर्वी पाहिले होते *(उन्मेष:३७:ॐकार व प्रणव - पृ.क्र ५७१ ते ५८३).*

त्या वेळी पाहिलेली काही माहिती ज्ञानेशांचे अभंग पाहतांना जमेल तशी ताडून पाहण्यास काही प्रत्यवाय नसावा. त्यासाठी संक्षेपतः पश्चिममार्गाचे या मंडळींनी केलेले निर्देशन पाहून पुढे जाऊ या.

आज्ञाचक्र व निरालंबपुरी

आज्ञाचक्र म्हणजेच ***अग्निचक्र. हं*** व ***क्षं*** ही त्याची दोन बीजे आणि ***हकार व सकार*** या **हंसपदा**च्या दोन पाकळ्या . ***सायुज्यता*** मुक्तीचे हे स्थान. ***त्रिकूटी*** हे याचेच एका पद्धतीतील नांव. अकार, उकार व मकार ही ॐकारमात्रास्थाने मूलाधार ते विशुद्धी या चक्रस्थानात समावलेली असतात. हे चक्र शब्दब्रह्म व शून्यब्रह्म यांच्या संधीवर असते. ***मकाराची नड वा ॐकाराची अर्धमात्रा वा अमात्रा*** असे शब्द या संधीचे वर्णन करण्यासाठी प्रायोजित करतात.

येथून पुढचा म्हणजे ब्रह्मांडाचा प्रांत असतो. इडा, पिंगला व सुषुम्ना या तिन्ही मुख्य नाड्या येथे या चक्रात येऊन मिळतात. गंगा, यमुना व सरस्वती अशी त्यांची यौगिक सांकेतिक नावे आहेत. ***त्रिवेणीतीर्थ*** असेही आज्ञाचक्रास संबोधले जाते, ते यावरूनच. कारण या तीन पुण्यदा नद्यांचे - म्हणजे मुख्य यौगिक नाड्यांचे हे संगमस्थान आहे.

प्रणव हे या चक्राचे मूलबीज आहे. येथून पुढचा म्हणजे पिंडापासून पुढचा ब्रह्मांडाचा प्रांत प्रणवाचा समजला जातो. हा प्रणव योगसंज्ञेतील असून ॐकाराच्या अर्धमात्रेशी अभिन्न आहे, असा योगिजनांचा निर्देश आहे. ***प्रणव म्हणजे ॐकार*** **ही सर्वसामान्य समजूत येथे गैरलागू आहे.** ***प्रणवाच्या या प्रांतास निरालंबपुरी अशीही यौगिक संज्ञा आहे.***

त्रिकूट ही संज्ञा विभिन्न स्थानांस लावली जातांना दिसते. मागेच म्हटल्याप्रमाणे ***अनेकदा आज्ञाचक्र व त्यापुढचा प्रांत यांचे पृथकत्व***

न दाखवता दोन्ही मिळून आज्ञाचक्रच असे समजून लेखक व योगी त्याचे वर्णन करतांना दिसतात, हे पुनश्च लक्षात घेऊन पुढे जाऊ या.

विविध मते

या ***आज्ञाचक्र*** व ***निरालंबपुरी*** प्रांतातील स्थानविशेष असे आहेत:

१) विष्णुतीर्थमहाराज मते: आज्ञा ->बिंदु ->अर्धेंदु वा अर्धचंद्र ->निरोधिका ->नाद ->नादांत->शक्ती ->व्यापिका -> समनी -> उन्मनी ->प्रतिष्ठा ->गुह्यचक्र ->सहस्त्रारचक्र ->ब्रह्मरंध.

प्रणव हे आज्ञाचक्राचे मूलबीज आहे. येथून पुढचा म्हणजे पिंडापासून पुढचा ब्रह्मांडाचा प्रांत प्रणवाचा समजला जातो. हा प्रणव योगसंज्ञेतील असून ॐकाराच्या अर्धमात्रेशी अभिन्न आहे, असा योगिजनांचा निर्देश आहे.

२) पं.गोपीनाथ कविराज: ***आज्ञा ->बिंदु ->अर्धबिंदु वा अर्धचंद्र ->रोधिनी->नाद ->नादांत ->शक्ती ->व्यापिका ->समना ->उन्मना->महाबिंदु -> ब्रह्मरंध्र.*** यांच्या मते सहस्त्रार व ब्रह्मरंध्र यांकडे जाणारे मार्ग वेगवेगळे असतात. परंतु या मतांतरांचा समन्वय आपण पूर्वीच केलेला आहे *(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन: योगशास्त्रसमन्वय पृ.क्र.७६२ ते ७६५).*

३) सर जॉन वुड्रॉफ (आर्थर ॲव्हलॉन) (ले.सं.द सर्पन्ट पॉवर): ***आज्ञा->बिंदु->बोधिनी->नाद ->महानाद वा नादांत -> व्यापिका -> समनी-> उन्मनी(शिवतत्त्वाधीन)->सहस्त्रारचक्र ->ब्रह्मरंध्र ->पराबिंदु(परमशिव).*** लेखकाने आपल्या त्याच ग्रंथात *(पृ.क्र. १४३वर)* असे नमूद केले आहे की ***ललिता सहस्त्रनाम*** या ग्रंथात मात्र ***व्यापिकेचे शक्ती आणि व्यापिका असे दोन वेगळे स्तर*** आहेत, असे दिसते. परंतु त्यास हे ग्राह्य वाटत नसल्याचे मतही त्याने प्रदर्शित केले आहे. अर्थात हा शक्ती व व्यापिका अशा दोन वेगळ्या स्तरांचा विचार आपण गौण धरला तरी चालेल. हा केवळ सैद्धांतिक वा तात्त्विक मतभेद आहे.

ज्ञानेशोक्तीद्वारे समन्वय

पं.गोपीनाथ कविराज यांच्या मते ***बिंदु हे प्रथम शून्य आहे.*** त्यांच्या मताचा डॉ.के.रा.जोशी व वरील इतरांच्या मतांशी समन्वय केल्यावर आपणास असा बोध होतो की जर पं.गोपीनाथमतानुसार ***व्यापिका वा व्यापिनी हे चौथे शून्य*** आणि ***उन्मनी हे पाचवे शून्य*** मानले तर दुसऱ्या व तिसऱ्या शून्यस्थानासाठी ***अर्धबिंदु ते १) नादांत किंवा २) शक्ती*** येथपावेतोची स्थाने विचारार्ह आहेत.

ज्ञानेशमते पाच शून्ये महाशून्यासह आहेत, तर श्री. गोपीनाथजी इ.च्या विचारानुसार ***बैन्दव स्तर ते महाशून्य वा महाबिंदुपर्यंत*** ती सहा ठरतात. याचाच अर्थ असा की त्रिकूटीस जर प्रथम शून्य स्थान मानले तर त्याच्यापुढे अजूनही सहा शून्य स्थानांचा प्रांत गोपीनाथ मतानुसार असला पाहिजे. पं. गोपीनाथ व तत्सम इतरांच्या मते शून्यस्थाने अशी आहेत: ***१) बिंदु २) निरोधिका ३) नादांत ४) व्यापिका ५) उन्मनी.***

ज्ञानेशांनी महाशून्यापूर्वी ***त्रिकूट -श्रीहाट - गोल्हाट व औटपीठ*** अशी चार शून्ये असल्याचा संकेत *अभंग क्र.७३५* मध्ये दिला आहे. अर्थात गोपीनाथकथित दुसऱ्या व तिसऱ्या शून्यस्थानांचा ज्ञानेश स्वत: म्हटलेल्या चार शून्यस्थानांत अंतर्भाव व निर्देश करत नसावेत, असे धरले तर या मतांचा समन्वय करता येईल.

यावरून असा समन्वय करता येतो की ***१) प्रथमशून्य - त्रिकूट (आज्ञाचक्र) २) द्वितीय शून्य - बिंदु - श्रीहाट ३) तृतीय शून्य - व्यापिका - गोल्हाट ४) चतुर्थशून्य - उन्मना - औटपीठ व ५) पंचम शून्य - महाबिंदु - ब्रह्मरंध्रस्थ पराबिंदु - महाशून्य*** अशी असली पाहिजेत. हे विश्लेषण मान्य करण्यासारखे आहे. पं. गोपीनाथ कविराज यांच्या मते अनेक बिंदुस्थाने आहेत. त्यातील काही निवडक स्थानांचा संकेत योगी करतात. जाणकार योगी ज्या स्थानांचा प्रामुख्याने असा निर्देश करतात, त्यांचे तसेच काही महत्त्व असले पाहिजे.

यावरून ***डॉ.बा.त्र्यं.शाळिग्राम*** यांनी ***श्रीज्ञानेश्वरांचा पंथराज*** या त्यांच्या ग्रंथात चर्चा करून उपस्थित केलेल्या ***ज्ञानेशोक्त*** गोल्हाटादी चक्रांबाबत आपले मत असे ठरते की ज्ञानेशांनी उपयोजिलेल्या गोल्हाटादी संज्ञांतील:

१) ***त्रिकूट*** हे आज्ञाचक्रस्थ स्थान आहे. यासच ***डोळा, नयन व तृतीय नेत्र*** अशा संज्ञा आहेत.

२) ***श्रीहाट*** हे ज्ञानेशपद्धतीत बिंदुचेच नामांतर आहे.

३) व्यापिकेचेच ज्ञानेशसंज्ञापद्धतीत ***गोल्हाट*** हे नाम आहे.

४) ***औटपीठ*** हे उन्मनीस्थान आहे.

५) या ज्ञानेशचक्रविचारातील ***भ्रमरगुंफा*** हे स्थान औटपीठावर म्हणजे उन्मनी ते ब्रह्मरंध्र ते परमशिव या प्रांतात आहे.

५) ***महाशून्य*** हे ब्रह्मरंध्रस्थ परमात्मस्थान आहे.

६) सहस्त्रार व ब्रह्मरंध्र यांचे पथ भिन्न नसून ब्रह्मरंध्र हे सहस्त्रारचक्रस्थित स्थान आहे. सहस्त्रारचक्राचे सहस्त्रदलकमल हे दुसरे नांव आहे. पं.गोपीनाथ म्हणतात त्याप्रमाणे चक्र हे जेव्हा शक्तीने वेधले जाते, तेव्हा त्यास ***पद्म वा कमल*** ही संज्ञा प्राप्त होते. त्याप्रमाणे ***सहस्त्रारचक्र व सहस्त्रदलकमल ही एकाच योगस्थानाची नांवे असल्याचा संकेत प्राप्त होतो.***

[***टीप:आज्ञाचक्रावरील प्रांत-तंत्रशास्त्रोक्त मत*** – मागे आज्ञाचक्रावरील प्रांताचासुद्धा आज्ञाचक्रातच अंतर्भाव करणाऱ्या मताचा निर्देश केला होता. त्याचप्रमाणे आज्ञाचक्रावरील प्रांताचा उल्लेख ***ब्रह्मांड, सत्यलोक*** इ.संज्ञांनी केला जातो. त्यांच्यातही सूक्ष्मतर भेद समजणारी मते आहेत. काही योगी आज्ञाचक्रावरील सर्व प्रांताचा उल्लेख ***ब्रह्मरंध्र, सहस्त्रारचक्र, सहस्त्रदलपद्म*** इ.प्रकारे करतात. श्रीगोरक्षांसारखे काही जण ***तालुचक्र, आकाशचक्र, ब्रह्मरंध्र वा निर्वाणचक्र*** अशी चक्रे पण या विभागात असल्याचे मानतात.

तांत्रिकमते आज्ञाचक्रापुढील क्रम असाही देतातः **"आज्ञा ->मनश्चक्र ->इंदुचक्र ->कारणदेहाचे सात उपविभाग असलेला निरालंबपुरी** ***(बिंदु) ->निबोधिका (निरोधिका)->नाद ->नादांत ->व्यापिका ->समनी ->उन्मनी-(ईश्वराचे स्थान) ->शंखिनीविवर ->सहस्त्रदलपद्म ->हंस (जीवात्मा) ->शुभ्र*** **द्वादशारपद्म** ***(त्यात अकठ त्रिकोण, त्यात अमृतसागर-मणिद्वीप ->त्यात नाद व बिंदू आणि मणिपीठ ->त्यात–>कामकला त्रिकोण, त्रिकोणात गुरू वा परमशिव)*** **-> परमशिवानंतर सूर्यमंडल व चंद्र -> त्यावर चंद्रमंडल** ***(त्यात षोडषी वा अमाकला आणि निर्वाणकला, पराबिंदु त्यात सर्वात्मा व ब्रह्मपद)*** **->चंद्रमंडलावर महावायू ->ब्रह्मरंध्र ->महाशंखिनीविवर ->विसर्ग"***(पृ.क्र.१४३,१४४, ४१९,४५३ - द सर्पन्ट पॉवर)*]

आपण जे हे विश्लेषण व विवेचन आतापावेतो केले आहे, त्याचा आधार घेत घेत ज्ञानेशांचे आणिक काही योगपर अभंग पाहू या.

शून्यब्रह्म

ज्ञानेश म्हणतातः

त्रिगुणाचें मूल सत्रावीचें सार।
उन्मनीचें बीज जाण रया।।१।।
शून्य ब्रह्म पूर्ण चक्षूचें आंतरीं।
निर्विकार निरंजन तेचि तैं गां।।२।।
सूर्यचंद्र दोनिं प्रकाशिलें साजिरें।
त्रिकूट संचरें अनाठसा।।३।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्तिप्रसादें।
रहा रें निजबोधें निरंतर।।४।।अ.क्र.७४०।।

निर्विकार - निरंजन असे पूर्ण ब्रह्म ते महाशून्यच होय. तेथूनच त्रिगुणांचा विस्तार होतो. ***सत्रावीचे सार*** असे ते **शून्यब्रह्म**च होय. **उन्मनीचे बीज**ही ते हेच आहे. म्हणजे उन्मनीच्याही पलीकडे ते स्थान आहे. ***सूर्य - पिंगला व चंद्र - इडा*** या नाड्या पण त्या ब्रह्मातूनच प्रकटतात. किंवा असेही म्हणता येईल की ***सूर्यमंडल आणि चंद्रमंडल*** या ज्या संज्ञा आपण मगाशी पाहिल्यात, त्यांनी निर्देशिलेल्या अवस्थांचा तेथूनच उगम आहे. ***त्रिकूटातील चक्षूचे म्हणजे नयनाचे अंतरी हेच शून्य ब्रह्म ओतून भरलेले आहे,*** असा ज्ञानदेवांना निवृत्तिप्रसादाने बोध झाला आहे. त्या निजस्वरूपाच्या बोधात निरंतर राहण्याची त्यांची इच्छा हा अभंग प्रकट करतो.

अभंगांतून पंथराज

ज्या साधकांना हा बोध प्राप्त व्हावा अशी दुर्दम्य आकांक्षा आहे, त्यांच्या प्रबोधनार्थ ज्ञानेश पंथराजाचा आता ज्याद्वारे नर्दिश करणार आहेत, तो अभंग असा आहे:

मनें मुरडुनि करी राज रया।
प्रणवासिं सखयां साक्ष होई।।१।।
देहिं स्थानमान विवरण करीं आधीं।
पिंडिचिं हें शुद्धी प्रथम करीं।।२।।
औट हात देह ब्रह्मांड सगळें।
तयाचां निश्चित शोध करीं।।३।।
ज्ञानदेव म्हणें विवरण करीं वेगें।।
निवृत्तिच्या संगें साधिलें हेंचिं।।४।।अ.क्र.७४१।।

मनाचा लय करणे म्हणजे ***मन मुरविणे.*** मनाला मुरवून साक्षात्कार करून घ्या; देहांतर्यामीच्या चक्रादी संस्थेचे उद्बोधन करून पिंडाची शुद्धी करून घ्या. कुंडलिनीच्या साहाय्याने हे सगळे घडते. तरी या औट हात देहाचा नीट शोध घेऊन पिंडाचे पदाशी सामरस्य साधून घ्या. या देहातच ब्रह्मांड आहे. योगसाधनेने आत्म्याचा साक्षात्कार लवकरात लवकर करून घ्या, असे ज्ञानेश साधकांना उपदेशित आहेत. निवृत्तिनाथांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पण असा साक्षात्कार करून घेतला होता, असे ज्ञानदेव या अभंगाद्वारे स्पष्ट करत आहेत.

शून्य निरशून्यापलीकडे

हा साक्षात्कार शून्यांचा प्रांत ओलांडून गेल्यावर घडतो आणि तेव्हाच त्रिपुटीचा भंग होतो, असेही ते यापुढील अभंगातून सांगत आहेतः

चहूं शून्याआरुतें महाशून्यापरुतें।
सर्वांसिं पहातें तें गां।।१।।
दिसे तेंहिं शून्य पाहातेंहीं शून्य।
देहामाझिं निरंतर भिन्न रूप।।२।।
शून्य निरशून्य दोनिं हारपलीं।
तेथूनि पाहिली निजवस्तू।।३।।
ध्येय ध्यान ध्याता निरसूनि तिनिं।
जाहालों निरंजनीं अति लीन।।४।।
ज्ञानदेव म्हणे अनुभवी तो जाणें।
गुरुमुखें खूण सांगियेलीं।।५।।अ.क्र.७४२।।

या अभंगातून महाशून्याचा प्रांत अधिक विस्तारून दाखविला आहे. ***चार शून्ये ही जागृति-स्वप्न-सुषुप्ति-तुर्या या अवस्थांची आणि स्थूल-सूक्ष्म -कारण व महाकारण या देहांची द्योतक अशी संधिस्थाने आहेत,*** असेही समजता येते. म्हणजे त्रिकूटस्थानी जागृतीनंतरचा स्वप्नावस्थेचा प्रांत सुरू होतो. तो श्रीहाट वा बिंदुस्थानापर्यंत असतो. त्रिकूटीपर्यंत स्थूल व नंतर श्रीहाट ***(बिंदु)*** येथपावेतो सूक्ष्म यांचा प्रांत समजावा लागतो. म्हणून स्थूल देहातून सूक्ष्मदेहात अवगाहन करण्याचे स्थानही त्रिकूटच मानावे लागेल.

त्याचप्रमाणे ***गोल्हाट*** हे ***सूक्ष्म***देहातून ***कारण***देहात संक्रमण करण्याचे स्थान व स्वप्नावस्थेतून सुषुप्तीत अवगाहन करण्याचे संधिस्थान कल्पिता येते. यानंतर ***औटपीठ*** हे कारणदेहातून ***महाकारण***देहात संक्रमण करण्याचे स्थान समजून त्याच स्थानी सुषुप्तीतून तुर्या असे अवस्थांतर होणे संभवते.

उन्मनी हेच औटपीठ होय. तुर्येचा प्रांत औटपीठापासून सहस्त्रारापर्यंत असून महाकारण देहाची व्याप्ती तेथे संपते असाही एक तर्क संभवतो. पण महाकारण देहाची व्याप्ती इतकीच असल्याचे

सैद्धांतिक दृष्ट्या मानता येत नसल्याने *Limit tends to Infinity* या गणिती न्यायाने महाकारणाची प्रांतभूमी असीम असली पाहिजे असा निष्कर्ष काढावा लागतो.

म्हणून ***महाशून्यस्थान, ब्रह्मरंध्र, महाबिंदू, पराबिंदु, परमशिव*** इ.संज्ञांनी निर्देशिलेली सर्व स्थाने या महाकारणाच्या मर्यादेतच येतात, असे अनुमान करणे प्राप्त होते. हे लक्षात घेतले तरच ज्ञानेशांच्या याविषयीच्या अभंगांचा अर्थ लावता येतो.

महाशून्याचे रहस्य

ही पार्श्वभूमी लक्षात घेता आली तरच आपणांस ज्ञानेशांचा हा अभंग त्यातील यौगिक रहस्य कळून घेण्यासाठी उलगडता येईल. ते काय म्हणतात, ते आता पाहू या.

शून्य शोधिलें नाहीं जेणें। काय विवरण केलें तेणें।
अज्ञानपणें फुगणें। गाढव जिणें पशूचें।।१।।
वर्णाकृती शून्याचार। हा नाहीं ज्या विचार।
न घडें न घडें साक्षात्कार। जाण सर्वथा तयां नरां।।२।।
आधीं शून्याचिं शोधणी केलीं। मग सद्वस्तू प्राप्त जाहालीं।
अमृतवेलाचिं बोलीं। बोलतां नये।।३।।
आधीं शून्य तैं श्वेतवर्ण। मध्ये पीत रचिलें जाण।
अर्धशून्य तैं ताम्रवर्ण। प्रत्यक्ष जाण दिसतसें।।४।।
महाशून्याचां वर्ण निला। अव्यक्त तेजाचां ओतिला गोला।
ग्रासूनि ठेला भूगोलां। योगी डोलां पाहती।।५।।
ऐसें शून्याचें नाहीं ज्ञान। तंववरी अवघेंचि अज्ञान।
जनीं अवघा जनार्दन। अज्ञान सज्ञान काय बोलूं।।६।।
ब्रह्मज्ञानाचिं किल्ली। सांघितलीं एकेंचि बोलीं।
निवृत्तिराजें बोलविलीं बोली।
तैंचि बोलीं बोललों।।७।।अ.क्र.७४३।।

चारही शून्यांच्या आतील अवस्था आणि महाशून्यापलीकडेही ज्याची व्याप्ती असते, त्या तत्त्वाचाच साक्षात्कार घडावा लागतो. चारही देह हे त्याच तत्त्वाचे आहेत आणि त्यात वसणारा आत्माही त्याच तत्त्वाचा आहे. परंतु असे असूनही आत्मा देहाहून वेगळा आहे, या तत्त्वज्ञानाचा बोध ठसल्याशिवाय हा आत्मसाक्षात्कार होत नाही. महाशून्याच्या अंतिम स्थितीला *(Val} at Infinity)* ज्ञानेश ***निरशून्य*** ही संज्ञा देतात.

चारही शून्ये व हे निरशून्य यांचा निरास करून जेव्हा साधक त्याहीपुढे जातो, तेव्हा त्याला ***निजवस्तू*** म्हणजे परमतत्त्वाचा लाभ होतो. त्याठायी ***ध्येय - ध्याता– ध्यान, ज्ञेय - ज्ञाता - ज्ञान, दृश्य - द्रृष्टा - दर्शन*** या सर्व त्रिपुटींचा अस्त होतो. साधक निरंजनाशी आत्मरूप होतो. निरंजनी अशा प्रकारे जो साधक लीन होतो, त्याच्यासाठी हा विश्वाभास कायमचा मावळतो.

ज्ञानदेवांना हे योगरहस्य त्यांच्या सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथांकडून प्राप्त झालेले आहे आणि ज्या महाभागांस हे रहस्य अनुभवास आले असेल, त्यांना ज्ञानदेव काय म्हणताहेत ते कळेल, असेही त्यांचे बोल आहेत.

हा निरशून्याचा अवधि आक्रमावा असे ज्ञानेश सर्व साधकांना वरील अभंगात आवर्जून सागतात, ते त्यांनी ***तुर्यातीत अवस्था - निरशून्याच्याही पलीकडील स्थिती*** प्राप्त करून घ्यावी या कळकळीने!! त्यांच्या सांगण्यावरून असे दिसून येते की ज्याने या शून्यत्वाची अनुभूती घेतलेली नाही, त्याचे जीणें व्यर्थ आहे. ***हे सर्व विश्व शून्याठायीच वसते,*** हे ज्यास आकळत नाही, त्या साधकास कदापिही साक्षात्कार घडणार नाही.

ज्याने शून्य अनुभवले, त्याला सद्वस्तूची प्राप्ती हमखास झालेली असते. प्रथम शून्य शुभ्रवर्णाचे असते. त्यात श्वेतज्योतीचे दर्शन होते. ***अर्धशून्य*** म्हणजे महाशून्याअलीकडील व प्रथमशून्यानंतरची प्रांतभूमी. ही ताम्रपीतवर्णाची दृग्गोचर होते. ***महाशून्य नील वर्णाचे असते.*** अव्यक्त तेजाचा मूर्त गोल असा तो नीलवर्ण बिंदू अथांग विश्व व्यापून उरतो, अशी योगिजनांची साक्षात अनुभूती आहे. शून्याची अनुभूती मिळवणे ही ब्रह्मज्ञानप्राप्तीची जणू किल्लीच आहे, असे ज्ञानेश म्हणतात.

योगानुभूती::::

अव्यक्त ते व्यक्त

अशा या शून्याच्या अनुभूतीचे टप्पे ते पुढील अभंगाद्वारे व्यक्तवत आहेत. तो अभंग असा आहे:

अव्यक्त मसुराकार पूर्वार्ध संचलें।
लक्षा परिसें जाहालें लक्षासिं पैं।।१।।
अव्यक्त देखणें देखण्या व्यक्त।
पाहतां व्यक्त अव्यक्त दोनिं नाहीं।।२।।
जागृतिचां ठाईं निजतो सहस्त्रदलीं।
बिंदूचां समेलीं उच्चार होतो।।३।।
ज्ञानदेव शरण निवृत्तिचां चरणां।
समजूनि खूणा तटस्थ जाहालों।।४।।अ.क्र.७४४।।

अर्जुनाने उपस्थित केलेल्या पूर्वापरच्या ***व्यक्त-अव्यक्तस्वरूप***ाच्या चर्चेवर येथे जो प्रकाश पडतो, तो वेगळाच आहे. हे व्यक्त रूप योगिजन कसे अनुभवतात, ते ज्ञानेश सांगतात. पण त्याला अव्यक्ताची जोड देऊनच!

अव्यक्तच व्यक्तरूपात मसुराकार प्रकाशबिंदुरूपे योग्यांना प्रथम दिसते. त्या वेळी योगी ***आज्ञाचक्राच्या ओवरीत*** उभा असतो. **बिंदू वा द्वितीय शून्य**स्थानी जी ज्योत योगी पाहतात, तिच्यात त्यांच्या ध्यानी जे जे सगुण रूप ठसलेले असेल, त्या त्या रूपाचे दर्शन होते. ते अव्यक्तच असे लक्ष्यरूप होते म्हणा ना! ***अव्यक्ताचे ध्यान करू जावे, तर ते स्वत:च असे सगुणरूप घेते.*** पण ***खरे तर त्याठायी व्यक्तही नसते आणि अव्यक्तही नसते.*** कारण **परब्रह्मस्वरूप खरे तर *व्यक्ताव्यक्तविलक्षण* आहे.** असो.

हे बिंदुस्थानातील सगुणरूपदर्शनही नंतर पुढे जावे तसे लय पावते आणि पुढे योग्याचे जसे नादस्थानी उन्नयन घडून येते, तशी ***या सगुणरुपाची अनाहतनादात परिणती होते.*** हा **अनाहतनादच त्याला पुढे महाशून्यस्थानापावेतो साथ देतो. *उन्मनी*ठायी जेव्हा तो योगी पोहोचतो, तेव्हा *तुर्या अवस्थेतून तुर्यातीतावस्थेत संक्रमण* सुरू होते. हीच खरी *यौगिक जागृतावस्थेची सुरुवात* होय आणि ती जेव्हा प्राप्त होते, तेव्हा *योगी सहस्त्रदलकमली सुखाची महापर्वणी प्राप्त करून देणाऱ्या योगनिद्रेत मग्न होतो.***

सतरावी कला

संपूर्ण विश्वाचा तेव्हा लोप होतो, अशी ही महानिद्रा असते. ना तेथे नाद - ना बिंदु, ना कला - ना ज्योती! अशा या अवस्थेच्या खुणा ज्ञानेशांना निवृत्तिनाथांच्या कृपेने जेव्हा उपभोगावयास मिळाल्या, तेव्हा ते ब्रह्मानंदाने अवाक झाले! त्या अवस्थेत ***सत्रावी कला*** साक्षात त्यांच्या अंतरी प्रकटली. त्या सत्राव्या कलेला अनुलक्षून ज्ञानदेव म्हणताहेत:

सत्रावीचां खेल लक्षवेना कवणा।
ब्रह्मादिकां जाणा अगम्य तैं।।१।।
रात्रंदिवस मन चपलत्वें धंवतें।
तेंहिं सत्रावितैं न पवे चि।।२।।
सत्रावी अगम्य विधिहरिहरां।
लक्षूं पाहतां बरा गोविंदु गे।।३।।
ज्ञानदेव दर्शन सत्रावीचें घेतां।
उन्मनी ठंसविं निवृत्तिदासां।।४।।अ.क्र.७४५।।

उन्मनीचे अमृत जिच्यातून स्त्रवते, ती सत्रावी कला वश करून घेणे ब्रह्मादी देवांना पण अशक्य आहे. अतिचंचल असे मन हवे तेव्हा हवे तेथे धाव घेते. पण त्यासही ***सत्रावी कला*** आकळून घेणे अवघड आहे. ते तिच्यापर्यंत स्वप्नांतरीही पोहोचू शकत नाही. ब्रह्मा, विष्णू आणि महेशासही जिचा अंतपार लागला नाही, अशी ती ***सत्रावी जीवनकला*** - ती ***कलातीत आणि दिक्कालातीत कला*** - ज्ञानदेवांना मात्र परमात्म्याचे ध्यान करत असतांना निवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादाने अवचित प्राप्त झाली आणि ***अखंड उन्मनी स्थिती*** उपभोगण्यास मिळाली.

या ठिकाणी एक उल्लेख केला पाहिजे. उन्मनीच्याही पलीकडे अवस्था आहेत. ***तुर्यातीत* असे जिला म्हणतात, त्या तशा अवस्थेतही अनेक अवस्थांचा समावेश असतो. पण त्या सर्वांना तुर्यातीत किंवा बहुतेकदा निव्वळ *तुर्यावस्था अथवा उन्मनी* असेही म्हणण्याचा योगिजनांचा प्रघात आहे. *आज्ञाचक्र, अर्धमात्रेचा प्रांत*** या संज्ञांबाबत आपण जसा सर्वसमावेशक आणि *non-specific* निर्देशांचा प्रघात पाहिला, तसेच काहीसे या उन्मनीबाबतही म्हटले पाहिजे. वैज्ञानिक संज्ञांच्या काटेकोरपणाच्या दृष्टीने हे प्रघात जरी कसोटीला उतरणारे नसले, तरी तसे प्रघात रूढ आहेत, हे मात्र खरे आणि योगाभ्यासकास व जिज्ञासूस ते प्रघात जाणून घेतल्याशिवाय अशा योगपर रचनांचा खरा अर्थ आकळता येणे दुर्धरच आहे. श्रीज्ञानदेवांच्या त्रिकूट-गोल्हाटादी संज्ञा आणि त्यांनी निर्देशिलेली शून्ये, महाशून्य, निरशून्य यांचाही असाच प्रकार आहे. असो.

आकाशगुंफा

१) ***आकाशाचि गुंफा*** **अंत नाही जिचा।**
शोध करा तिचा सर्वभावें।।१।।
अनंत ब्रह्मांडांचा खेल जिच्या योगें चालें।
चांग्यासिं मीनलें तयां ठायां।।२।।
गुंफेच्या आधारें चंद्रसूर्य चालती **।**
विश्रांतीसिं येति तयें जवळीं।।३।।
ज्ञानदेव नयन धरितां समभावें।
सोऽहंस्वरूप भावें लाधलेसें।।४।।अ.क्र.७४६।।

२) ***षट्चक्रें बंद निघोनिआं गेलीं*** **।**
पाहों जो लागलीं तेयां गांवां।।१।।
निरंजन सभराभरीत वस्तू कोंदिलीं।
साक्षित्वासिं आलीं आत्मदशा।।२।।
वृत्ति झेंपावलीं आनंद जाहाला सैरां।
सत्रावी येरझारा करी जेथें **।।३।।**
ज्ञानदेव म्हणें लक्ष लाविं आकाशिं।
ब्रह्म पावसिं लौकरीं तूं।।४।।अ.क्र.७४७।।

आकाशाच्या गुंफेत अनंत ब्रह्मांडांचा खेळ चालतो. त्या गुंफेच्या आधारानेच जीवनयात्रा चालते. अंतकाळी प्राणज्योत त्या गुंफेतच मावळते. **प्राणापानांचे सामरस्य करून, इडापिंगला एकवटून, कुंडलिनीशक्तिद्वारे आज्ञाचक्राचे भेदन करून त्या गगनगुंफेत प्रवेश केला की अनायासेच *सोहंऽभाव* प्राप्त होतो.**

"सोऽहं तेहिं अस्तावलें" अशी जी निर्वाणदशा असते, ती जेव्हा प्राप्त होते, तेव्हा मूलाधारादी षटचक्रांचे साधे अस्तित्वही उरत नाही. त्याठायी निरंजन रसभरित अशी निखळ आत्मवस्तूच कोंदून भरलेली असते. त्या निरंजनास सर्वदूर साधक जेव्हा असा ***सोऽहं***च्या अतीत असणाऱ्या साक्षीभावाने ओळखू लागतो, तेव्हा आत्मा व परमात्मा असा भेद उरत नाही. ***जीव व शिव*** हे द्वैत उरत नाही. आनंदाचे तारू मोकाट सुटते. ***सत्रावीच्या शीवेवर पोहोचले की साधकास उन्मनीचे तारुण्य उपभोगण्यास मिळते.*** यासाठी ज्ञानदेव म्हणताहेत की योगधारणेने आकाशाच्या गुंफेत मन मुरवा. त्यायोगे त्वरित ब्रह्मप्राप्ती होईल.

या ठिकाणी एक मुद्दा विचारार्ह आहे. तो म्हणजे ही जी ***आकाशाची गुंफा*** आहे, तीच ***भ्रमरगुंफा*** म्हणून जिला म्हणतात, तिलाच उद्देशून म्हटले असावे. कारण ***भ्रमरगुंफेपासून सद्वस्तूचे राज्य सुरू होते.*** यौगिक संज्ञांच्या व्याप्तीबाबत आपणास जे काही समजले आहे, त्यानुसार ***आज्ञाचक्र, सहस्त्रदलकमल, गोल्हाट, कोल्हाट, त्रिकूटी,***

भ्रमरगुंफा, ब्रह्मरंध, शून्य, महाशून्य, तुर्या, तुर्यातीतावस्था, महाकारणदेह, नयन, नेत्र, डोळा, ॐकार, प्रणव, अक्षर, विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या चिदाकाश, गगन, गगनमंडल, महदाकाश, इ. आकाशनामक अशा बऱ्याच संज्ञा विशिष्ट स्थाननिर्देशपर *(specifically, exclusively)*, तसेच अतिव्याप्त स्थाननिर्देशपर *(non-specifically, all-inclusively, broadly)* अशा दोन्ही प्रकारे योगिजनांकडून उपयोजिल्या जातात.

चक्रसंख्या व पश्चिममार्गविषयक काही वादांचा समारोप

चक्रे सहा कीं नऊ किंवा याहून कमीजास्त असा वाद करणाऱ्यांना अधिक खाद्य मिळेल असा एक अभंग ज्ञानदेवांनी रचला आहे. तो पहा:

नयनाचें शेजारीं <u>दशवें द्वार</u> बापा।
एक मार्ग सोपा बोलतसें।।१।।
<u>आधारीं पवन अपान</u>₁ विराजें।
अंगुलें चार साजें तेयां ठाईं।।२।।
<u>मणिपूर चक्र नाभिस्थान</u>₂ कमल।
सहा अंगुलांचा खेल असे तेथ।।३।।
<u>वायुचक्र अनुहात हृदय</u>३ असे एक।
प्राणासिं निःशंक जेथ नेईं।।४।।
<u>अग्निचक्र भ्रुवांग</u>₄ शोभतें प्रकाशत्व।
प्राणासिं उलथावें तेयांवरीं।।५।।
<u>सहस्त्रदलीं ब्रह्मरंध्र</u>₅ शोभतसें निलें।
प्रकाशाचें उमालें जेथ असति।।६।।
ज्ञानदेव म्हणे ऐका प्राणायाम।
या अभंगीं निःस्सीम अर्थ जाहाला।।७।।अ.क्र.७४८।।

"आज्ञाचक्रावर ***दशम द्वार*** आहे. तेथे पोहोचण्याचा सोपा मार्ग सांगत आहे. आधारी प्राण आणि अपान वसतात. चार अंगुळे जागेत हे खेळत असतात. त्यांना त्यावर सहा अंगुळे स्थानी **नाभिस्थानी *मणिपूर* चक्र म्हणून जे *कमळ* असते**, तेथे घेऊन जावे. नंतर ***अनुहात*** म्हणून जे वायुचक्र ***हृदय***स्थानी असते, तेथे प्राणांना घेऊन जावे. त्याच्यावर ***भ्रुकुटीस्थ अग्नीचक्र*** प्रकाशाने चकाकत असते. त्या चक्राच्याहीवर प्राणांना उलथावे."

त्याठायी जो ***नयन (म्हणजे डोळा अथवा बिंदू)*** आहे, त्यातून वर प्राण घेऊन जावेत ते थेट ***सहस्त्रदलकमळी* निळ्या प्रकाशाचे उमाळे ज्यापासून फुटतात, त्या *ब्रह्मरंध्रात (म्हणजे दशमद्वारी)* प्राण नेऊन पोहोचवावे.** ज्ञानदेव म्हणतात की "मी ही जी ***प्राणायामाची प्रक्रिया*** तुम्हाला सांगितली आहे, ती नीट ध्यानी घ्या. कारण माझ्या या अभंगात पराकोटीचा अर्थ भरलेला आहे."

या अभंगातून चक्रे किती (₁ते₅)हा वाद घालणाऱ्यांचे समाधान होवो न होवो, आपल्याला मात्र ***पंथराजसोपान*** पुनः एकदा गंवसतो तो असा ज्ञानेशांच्या उघड्या बोलांतून! आणि त्याचबरोबर **श्री.बाबामहाराज आर्वीकर, पं.गोपीनाथ कविराजादी महाभागांचे "*सहस्त्रदळाचा मार्ग व ब्रह्मरंध्राचा मार्ग निरनिराळे असतात,*" असे मतही हा अभंग समजून घेतला की आपसुकच गळून पडते.** कारण या अभंगात ***सहस्त्रदलकमलात ब्रह्मरंध्र असून*** तेथे जाण्याचा मार्ग या गोष्टी स्पष्टपणे आपणास ज्ञानेशांच्या मुखातून ऐकण्यास मिळतात.

तसेच ***दशमद्वार*** कोणते याबाबत काही अभंगांतून व इतर यौगिक साहित्यातून विवादास्पद माहिती असली तरी येथे ***ज्ञानदेव ब्रह्मरंध्रासच दशमद्वार म्हणतांना दिसतात.*** ही गोष्ट पण बोधास्पद आहे आणि योग्यांतील सर्वमान्य मतास अनुसरूनच आहे. असो.

योगविषयक अधिकृत माहिती

योगविषयक अशी जी अधिकृत माहिती ज्ञानेशांच्या वाङ्मयीन कृतीतून आपणास मिळते,ती पाहिली की आपले मनःपूत समाधान जे होते, त्यातून जो अवर्णनीय आनंद प्राप्त होतो, त्यास तोडच नाही!! असो. **साधनामार्ग हा खरे तर योगमार्गच व आणि तो असा ज्ञानेशांनी उकलून दाखविलेला *पंथराज* आहे, हे तर आता निर्विवाद दिसून येत आहे.** त्याबाबत ज्ञानेशांचे असीम ऋण मनी वागवत असतांनाच साधकांची इतरेजनांकडून कदापिही दिशाभूल होऊ नये या हेतूने त्यांचे एकंदरीत सगळेच योगपर अभंग असे नीट समजावून घेण्याजोगेच ठरतात.

हे सगळे अभंगच मुळात शंभराहून अधिक आहेत. त्यांचा असा यथोचित मागोवा घेणे हे एक अत्यंत प्रदीर्घ कार्य आहे. परंतु साधकाने साधनेचा आळस करू नये आणि योगासाठी तर दीर्घोद्योगाची अपेक्षाच असते. तेव्हा या सर्वच अभंगांचा अर्थ ध्यानात ठसवून घेण्याचा आपला हा उपक्रम पुढे चालू ठेवणे अत्यावश्यक आहे. तरी तसेच करू या. या उपक्रमासाठी लागणारी चिकाटी, सातत्य आणि निष्ठा प्राप्त व्हावी म्हणून ज्ञानेशांना वंदित - त्यांना विनवत - आपले हे पंथक्रमण अग्रेसर करण्यासाठी दक्ष होऊ या!!!

उन्मनी व तुर्या::::

सतरावियेचें स्तन्य

योगानुसंधानाचे परिणत फल अशी ***सत्रावी कला*** ज्ञानराजांचे चित्त वेधून अवतरली हे आपण त्यांच्या *अ.क्र.७४५* मध्ये अनुभवले आहे.***सत्रावी कला*** म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी थोडे योगविज्ञान माहीत करून घ्यावे लागते.

कला ही संज्ञा योगी मनाच्या अंशाला देतात. या संज्ञेचे इतरही अनेक अर्थ योगी करतात. पंथराजसाधनेत मनाचा जसजसा लय होत जातो, तसतसा जाणिवेचाही लोप होत जातो. ही जाणिवही दोन प्रकारची असते. पहिली सर्वसामान्यपणे आपल्या प्रत्ययास येणारी ***सर्वसामान्य जाणीव व दुसरी अतींद्रिय जाणीव.***

ही बाह्य व अतींद्रिय जाणीव धरून असणारी संपूर्ण जाणीव साडेतीन मात्रांची धरावी लागते. मनोलयाच्या प्रमाणास *मात्रा* या संज्ञेने ओळखले जाते. *साडेतीन मात्रा हे पूर्ण मनाचे द्योतक आहे.* मनाची जागृत अवस्था, स्वप्नावस्था व सुषुप्त्यावस्था या

तीन मात्रा आणि तुर्यावस्थेची अर्धमात्रा अशा या साडेतीन मात्रा असतात.

साडेतीन मात्रांत पूर्ण जाणीव अभिप्रेत आहे. मनाच्या तीन मात्रा ***अ, उ*** व ***म*** या संज्ञांनी ओळखल्या जातात. यांच्या लोपाबरोबर सर्वसामान्य जाणिवेचा लय होतो व मनाचा आज्ञाचक्रातून वर प्रवेश होतो. तेव्हा हे अर्धमात्रेच्या प्रमाणात उरलेले मन त्यापुढच्या लयक्रमाने नेणे हा पुढचा मार्ग होय. ***बिंदू हे अर्धमात्रेचे द्योतक असे स्थान* आहे. यात मनाची अतींद्रिय जाणीव पूर्ण असते.**

अतींद्रिय जाणीव ही पंधरा कलांएवढ्या प्रमाणाची समजतात. **बिंदूत मनाच्या *पंधरा कला* प्रतिभासित होतात.** उत्तरोत्तर म्हणजे ***अर्धेंदु -रोधिनी*** – इ.पुढील स्थानांतही या कला विराजमान असतात. परंतु त्यांची मात्रा उत्तरोत्तर कमीकमी होत जाते. त्या कला क्षीण होत जातात त्या या अशा मात्राप्रमाणात – ***बिंदू -१/२ मात्रा, अर्धेंदु -१/४ मात्रा, रोधिनी वा निरोधिका - १/८ मात्रा, नाद - १/१६मात्रा, नादांत - १/३२ मात्रा, शक्ती - १/६४ मात्रा, व्यापिनी - १/१२८ मात्रा, समना - १/२५६ मात्रा, उन्मना - १/५१२ मात्रा,*** असे या मनोलयाने उरणाऱ्या मनाचे प्रमाण असते.

मनोलय जसजसा होत जातो, तसतशी ही मनाची मात्रा १/२, १/४, १/८ ....१/२५६, ...अशी फक्त उरते. ***कला मात्र जशाच्या तशाच म्हणजे पंधराच्या पंधराच बिंदू ते उन्मनी या प्रांतात वसतात.*** परंतु मनाचा **१/५१२** एवढाच अंश उन्मनीत असल्याने त्या कलांचा उपभोग घेण्याची मनाची शक्ती अत्यल्प असते. तसेच हा सर्व अर्धमात्रेचा प्रांत अतींद्रिय जाणिवा व संवेदना यांचा असल्याने मन तुर्यावस्थेत असते. त्यामुळे खरे तर या पंधरा कला उन्मनीत असूनही नसल्यासारख्याच असतात. असो.

उन्मनीत अजूनही एक गुप्त कला असते. ती म्हणजे परमात्मतत्त्वात विराजणाऱ्या अमृतकलेचा आनंद अल्प प्रमाणात देणारी ***सोळावी कला.*** उन्मनीतून साधक जेव्हा तुर्यातीत अवस्थेत प्रवेशतो, तेव्हा त्यास साक्षात अमृतकलेची प्राप्ती होते. हिलाच ***सतरावी कला*** असे म्हणून ज्ञानेश गौरवितात. काही योगमार्गीय उन्मनीत सोळावी कला असल्याचे मानत नाहीत. अर्थात त्यांच्या मते ***अमृतकला* हीच सोळावी कला असते. हिलाच *अमाकला* असेही म्हणतात.** हा भाग पण योगमार्गीय संज्ञांचा कधीतरी केल्या जाणाऱ्या सरधोपट वापराचा निदर्शक मानावा लागतो. **प्रायोगिक व खरे तर तात्त्विक दृष्ट्याही योगानुभूतीत *सतराव्या कलेस सोळावी कला म्हणणे* या प्रकाराने कोणतीही भिन्नता संभवत नाही.** असो.

[टीप:नाद, बिंदू, कला व ज्योति – आता केलेले विवेचन कलेच्या एका विशिष्ट अर्थास धरून केलेले आहे. पण ***कला*** ही संज्ञा योगमार्गियात वेगवेगळ्या अर्थांनी वापरली जाते. उदा. **प्रत्येक चक्रात तंत्रशास्त्रीय दृष्ट्या तीन अंश असतात. *मातृका, नाद आणि बिंदू.*** मातृकांच्या व्यावहारिक रूपास ***कला*** असे संबोधिले जाते *(पं. गोपीनाथ कविराज: शक्तीका जागरण और कुंडलिनी - पृ.क्र.१९४).* **याच नाद-बिंदु-कला यांच्या येथील कविराजांच्या अर्थाप्रमाणे ज्ञानदेवांनी *"नेणें नाद बिंदु कला ज्योति"* असे म्हटलेले आहे. *ज्योती*चा अर्थ जीवात्म्याचा त्या त्या चक्रातील आविर्भूत अंश** असे समजावे लागते.

अर्थातच प्रत्येक चक्रात जीवात्मा वा चैतन्य आणि त्याची शक्ती अथवा कुंडलिनी यांचे अंश असतात आणि त्यांच्यायोगेच त्या त्या चक्राचे कार्य संपन्न होत असते. ज्या वेळी त्या चक्राचा जय होतो, त्या वेळी या सर्व चक्रगत अंशांचा लय होतो, असा लयक्रम आहे. सरतेशेवटी ही सर्व मिळवणी उरते ती अर्धमात्रेच्या प्रांतातील ***नाद, बिंदू व कला*** विभागांच्या रूपाने. ***ज्योतीतत्त्वही मग प्रतीत होते ते परमज्योतीच्या रूपाने!*** असा हा लययोगाचा भाग शास्त्रीय व आनुभविक प्रमाणांच्या आधाराने जिज्ञासू व योगसाधकांच्या माहितीसाठी देत आहे. असो.]

याप्रमाणे विचार केला असता ***पंधरा कला या मनाच्या असतात. सत्रावी कला ही चैतन्याची आहे, तर सोळावी कला ही मन व चैतन्य यांच्या संधीवरची आहे.*** मागे आपण ब्रह्मांडाचा वंशवृक्ष पाहिला *(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ पृ.क्र.७४७).* तेव्हा ***मनाचे चैतन्य आणि विश्व यांच्याशी असलेले संबंध*** लक्षात घेतले होते. तसेच मनोलयाच्या प्रक्रियेचे त्या अनुषंगाने काही विश्लेषणही केले होते.

मनाच्या विश्वचैतन्याशी असणाऱ्या विवक्षित अनुबंधांचे प्रतिबिंबच असे या सतरा कलांच्या उपरोक्त विवेचनात पडलेले जिज्ञासूंना प्रतिभासित न झाले तरच नवल! असो. सत्राव्या कलेबाबतच्या एवढ्या आनुषंगिक विचारानंतर त्या अमृतकलेतून जी पसायधारा स्रवते, ती ज्ञानेशांच्या मुखातील अमृतबोलांसमवेत सेवू या!

औटपीठ

औटपीठ डोंगरीं गाय एक वसें।
क्षीर सेवितुसे निजयोगी।।१।।
धालें पूर्वपदीं समान लक्षिति।
क्षुधा चाड चित्तीं नाहीं।।२।।
भ्रुवांतरीं लक्ष लाऊनि बैसा ध्यानीं।
ऐक्यासिं उन्मनी होऊनि राहा।।३।।
ज्ञानदेव नमितो आदि देविप्रति।
नेत्रीं पाहें ज्योति शुद्धरूप।।४।।अ.क्र.७४९।।

औटपीठ हे ज्ञानेशपद्धतीत बसणारे ***चौथे शून्य*** असून तेथील अवस्था ***उन्मनी*** आहे. सर्वसामान्य यौगिक संज्ञांद्वारे दर्शवलेले ***उन्मना*** हे स्थान म्हणजेच ज्ञानेशांचे ***औटपीठ*** होय. यानंतर ***महाशून्य*** वा पाचव्या शून्याचा प्रांत लागतो इ.भाग आपण पूर्वीच पाहिला आहे. ज्ञानेश म्हणतात ती गाय म्हणजे ***सत्रावी कला* याच औटपीठाच्या डोंगरावर म्हणजे *महाशून्यस्थानी* वसत असते.** तिचे अमृतोपम पायस सेवन करून योगी संतुष्ट होतात.

***सतरावियेचे स्तन्य* असे या सत्राव्या कलेतून प्राप्त होणाऱ्या अमृतधारेस ज्ञानेशांनी बाराव्या अध्यायी संबोधले आहे.** या क्षीरसेवनामुळे तृप्त झालेल्या योग्यांना विश्वाकडे पाहण्याची समबुद्धी सदाकरता प्राप्त होते. इच्छा – वासना यांची चाड त्यांच्या मनात उरत नाही.

ज्ञानेश म्हणताहेत की **"भ्रूमध्यस्थ आज्ञाचक्रा**वर चित्त केंद्रित करून ***योगाभ्यासाच्या बळावर ही सत्रावी कला प्राप्त करून***

देणाऱ्या उन्मनीमध्ये प्रवेश करा आणि विश्व-परमात्म्याचे अद्वैत दाखवणारी समबुद्धी प्राप्त करून घ्या. **नीलबिंदूत *शुद्ध ज्योतिरूपाने प्रतीत होणाऱ्या त्या आदिमाया परमेश्वरी अशा सत्राव्या कलेस* ज्ञानेशांचे नमन असो!**"

आदिमाया

शिव आणि शक्ती किंवा शिवा यांचे जे समावेशन ज्ञानदेव अमृतानुभवात करतात, त्यातील शक्ती वा शिवा योग्यांना अशा या ***आदिमाया***रूपात आपला साक्षात्कार करून देते. ही ज्योती म्हणजे वस्तुतः परब्रह्मच! पण सगुण रूपातले! म्हणून ते आदिमायेच्या स्वरूपाचे आहे, असे ज्ञानदेवांचे सांगणे दिसते. या आदिमायेमुळेच ***सगुण व निर्गुण*** ही लक्षणे ब्रह्मात उद्भवतात, हे ज्ञानदेवांच्या पुढल्या अभंगातून आकळून येते:

सोऽहंकारी माया लक्षा आणि देहीं।
निरंजनीं पाहीं मायाकार।।१।।
निर्गुण सगुण माया तैंचिं खरी।
प्रसऊनि निर्धारीं वांझ असें।।२।।
ज्ञानदेव म्हणें मज माया कृपालु जाहालीं।
तिणें उजललीं माझिं काया।।४।।अ.क्र.७५०।।

सोहंऽध्यान करणे म्हणजे मायेचे ध्यान करणे. देहापासून ब्रह्मापर्यंत मायाच आहे. हीच आदिमाया या सर्व विश्वाचे आदिकारण आहे आणि ती म्हणजे ब्रह्माहून कोणी वेगळी नव्हे! तिचे ध्यान ***"सोऽहं, सोऽहं"*** असे करून हे सगळे ब्रह्मच आहे, अशी अनुभूती घ्यावी. सगुण आणि निर्गुण हे निरंजनाचे ब्रह्मभाव मायेनेच संभवतात.

हा देह जिने निर्मिला, हा अहंकार जिचा स्वर आहे, अशी ती माया सर्व विश्वाएवढ्या या बालकास प्रसवूनही वांझच आहे. कारण ***"अगां जे जालेंचि नाहीं"*** असे हे विश्व आहे. विश्व हा तर केवळ आभास आहे; असत् आहे.

"असा हा जगाचा खेळ रचणारी ती आदिमाया माझ्यावर प्रसन्न झाली आणि माझा देहात्मभाव तिने नाहीसा केला आहे. अशा या मायेचा चमत्कार नीट लक्षून पाहा म्हणजे परमसौख्य पावाल" असे ज्ञानेश म्हणताहेत.

प्रतिप्रसवक्रम व मन उफराटे करणे

भगवंतांनी म्हटले आहे की ***"मम माया दुरत्यया"***. संतांचे पण ज्ञानेशांसारखेच सांगणे आहे की मायेतून सुटायला मायेचीच अनुकूलता लागते. ते का त्यासाठी पुढील अभंग पाहू या.

आकाशीं मला लाविला बा एक।
वांझेचें बालक शिंपितसें।।१।।
अग्निकुंड मनें बालकें निर्मिलें।
प्रत्ययासिं देखिलें मी यालागिं।।२।।
ज्ञानदेव म्हणें उफराटें पाहतां।
सर्व सौख्यदाता निवृत्ति एक।।३।।अ.क्र.७५१।।

आकाशात मळा लावलेला आहे आणि वांझ स्त्रीचे मूल तो मळा शिंपित आहे. जेव्हा ***अग्निकुंड म्हणजे कुंडलिनी वा आदिवासनाकोष*** या मायेच्या बालकाकडून निर्मिला जातो, तेव्हा या उक्तीचा प्रत्यय आपणास येतो !! ज्ञानेश म्हणतात की "यातील सत्य मला तेव्हाच उमगले जेव्हा सर्वसौख्यदायक अशा श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने **मी मनास मुरडून उफराटे पाहू लागलो!**"

मनाला मरडून उफराटे पाहणे म्हणजेच कुंडलिनीयोग वा पंथराज! यातील प्रतिप्रसवक्रमास अनुलक्षून ज्ञानेशांच्या या उक्तीकडे पाहिले की आपणास थोडक्या शब्दात योगसाधनेचे रहस्य या अभंगातून स्पष्ट होते, हे सूज्ञांस सांगायलाच हवे का!

उन्मनीचा घाट

उफराटे पाहण्याच्या या मार्गावर उन्मनीचा घाट आहे, तुर्येची प्रभा आहे, हे ज्ञानेशांच्याच शब्दात ऐका.

१) पाहा त्रिभुवनीं न दिसें बाईयें।
नयनांजनीं पाहें आत्मरूप।।१।।
मन बुद्धि चित्त अंतःकरण जाण।
यावेगळें निर्वाण ब्रह्म तैंचि।।२।।
ज्ञानदेवां ब्रह्म लाधलें अवचट।
उन्मनीचां घाट चढतांचिं।।३।।अ.क्र.७५२।।

२) आत्मज्ञान जया न देखें निजदृष्टी।
तयां नरां गोष्टी करूं नयें।।१।।
तुर्यारूपें जाण प्रभा निस्सीम।
तया परतां राम असें बापा।।२।।
ज्ञानदेवां गूज दाविलें गुरुनें।
मनें अनन्ये कल्पितांचिं।।३।।अ.क्र.७५३।।

"परमात्म्याचा शोध सर्व त्रिभुवनात घेतला. पण तो काही मला सापडला नाही. जेव्हा गुरूंनी माझ्या नेत्रात ज्ञानांजन घातले, तेव्हा मात्र मला आत्मरूप गवसले. ***मन, बुद्धी, चित्त व अंतःकरण*** यांवेगळे ते स्वरूप आहे."

असे **ते ब्रह्म *उन्मनीचा घाट* चढून जाताच ज्ञानेशांना अवचित भेटले आहे.** म्हणून ते असे म्हणताहेत की "साधकांनी निजतत्त्वाचे ज्ञान ***"याचि देहीं याचि डोळां"*** करून घ्यावे." तुर्यारूपाने त्या तत्त्वाची प्रभा फाकतांना दिसते आणि ***उन्मनीचा हा घाट चढला की रामाचे खरे दर्शन घडते. गुरूंना अनन्यशरण होणे*** हाच यासाठी खरा **उपाय** आहे.

सद्गुरू व तुर्येचे प्रांगण

ज्ञानदेवांच्या लेखी सद्गुरूंचे किती माहात्म्य आहे, ते आपण पूर्वी त्यांच्या गुरुप्रशस्ति व स्तवनपर अशा ज्ञानदेवीच्या ओव्यांतून आणि अमृतानुभवाच्या प्रकरणांतून पाहिलेच आहे. आपल्या अनेक अभंगांतून ते आपल्या सद्गुरूंचा तसाच सातत्याने आदरपूर्वक उल्लेख न चुकता करतांना दिसतात. त्यातूनही त्यांच्या या गुरुप्रतीच्या परमभावाचे -

या भावनेचे - दर्शन घडते. त्यातही या अर्धमात्रेच्या प्रांतात आणि तुर्येच्या प्रांगणात गुरूशिवाय सोयच नाही, हा भाव ते कसा व्यक्त करतात, ते पाहू या पुढच्या दोन अभंगांतून.

१) आत्मा एक बाई स्थिरचरव्यापक।
सृष्टि तैसीं देख एकलीचि।।१।।
पंचमहाभूतें व्यापूनि निराला।
सौंदर्यपुतला काला बाई।।२।।
ज्ञानदेवें ध्यान धरिलें पुडुति।
त्रैलोक्याचिं वसति असे जेथ।।३।।अ.क्र.७५४।।

२) अकारीं अर्धमात्रा कवण रितीं दिसें।
उकारींहीं रसें कवणेंपरीं।।१।।
मकारीं संयुक्त जाहालीं कैशापरीं।
अर्धमात्रेवरी अर्धमात्रा।।२।।
अर्धमात्रेचा अर्थ अवचटचि दिसें।
गुरुगम्य सोए जाणति पैं।।३।।
ज्ञानदेवें अर्थ शोधूनि घेतला।
महाशून्यीं संचला निवृत्तिराज।।४।।अ.क्र.७५५।।

सर्व सृष्टीतील स्थिरचरास व्यापते असे ते एकमेवाद्वितीय आत्मतत्त्व आहे. पंचमहाभूतात्मक अशा या विश्वास व्यापूनही त्यावेगळे असणारे ते तत्त्व म्हणजेच घनश्यामसुंदर अशी सावळ्या विठ्ठलाची मनमोहक मूरत! तोच तो बाळकृष्ण अन तोच पांडुरंगही! ज्ञानदेवांच्या ध्यानी त्यांना त्रैलोक्यपालक अशा त्या श्यामसुंदर राजसाची मूर्ती घननीळ बिंदुरूपात दिसते! ***ॐकारस्वरूप सद्गुरू समर्थ असा निवृत्तिनाथ त्या श्यामसुंदराहून वेगळा कोठे आहे! तोच तर त्या महाशून्यात वास्तव्य करून आहे!!***

असे असले तरी अकार, उकार व मकाररूपे जागृति-स्वप्न-सुषुप्ति या अवस्थांतील हे विश्व कसे साकारते त्या परमात्म्यापासून, हे जाणून घ्यावे तर केवळ सद्गरूंची कृपाच हवी. त्याविना अर्धमात्रेचे रहस्य कसे उलगडेल! ***ज्ञानेशांपुढे मात्र निवृत्तिनाथाच्या वरदहस्तामुळे अर्धमात्रेचा अर्थ सहजच अवचित असा प्रकट झाला आहे तो त्या घननीळाच्या मनोहारी अशा साक्षात दर्शनातून!!***

"रंगला रंगीं श्रीरंगाच्या"

योगसाधकांना ***अंतिम अवस्थेत आत्मतत्त्वाचे दर्शन एका काळ्या पुतळ्याच्या स्वरूपात होते. तो तसा पुतळा म्हणायलाच फक्त. खरे तर ते दर्शन एका समाधिमग्न अशा काळ्याकभिन्न योगिराजस्वरूपाचे असते. तेच असते आत्मस्वरूप!*** म्हटले तर ते स्वतः योग्याचेच एक प्रतिरूप असते. मौन मुद्रा आणि लोचन मिटलेल्या अशा त्या स्वरूपातच ना पांडुरंग उभा आहे! तो योगासनस्थ बसलेला असा योग्यांना दिसतो.

योग्यांना असे दर्शन देणाऱ्या त्या घननीळाची - त्याच्या परमधामाची - महाशून्याची - साधकांना आतुर ओढ न लागली तरच नवल! त्याचे किती आणि किती अभंगांतून वर्णन करावे हे ज्ञानेशांना उमगेनासे झाले असावे. म्हणूनच अभंगांमागून अभंग त्या सावळ्या रूपाची नवाई वर्णन करण्यासाठी उत्स्फूर्तपणे त्यांच्या मुखकमलातून बाहेर येतात. पहा ते अजून काय म्हणतात तेः

१) शून्य हें चार महाशून्य दिसतसें।
निजरंग वसे सर्व त्यांत।।१।।
ऐसा रंग जया लाधतांचि पाहीं।
मनाचि हें सोई हारपलीं।।२।।
ज्ञानदेवाचां बोल बोलण्याचें रूप।
निवृत्तिस्वरूप सर्वत्र हें।।३।।अ.क्र.७५६।।

२) शून्याचें जैं बीज योगियांचें गूज।
स्वानंदाचें निजब्रह्म रया।।१।।
त्रिगुण त्रिविध तो सच्चिदानंद।
शब्दाचा अनुवाद नसें जेथ।।२।।
ज्ञानदेओ म्हणें सद्गुरु जाणिति।
इतरांचि वृत्ति चालेचि ना।।३।।अ.क्र.७५७।।

३) ऐसा योगिराज देखतां अवचट।
उन्मनी लंपट रात्रंदिवस।।१।।
सत्रावीचि शींव टाकूनि राहिला।
पाहण्यातीत जाहाला सर्वांठाईं।।२।।
असिपदीं आनंद प्रियरूप जाण।
ध्यानाचें कारण जेथ नाहीं।।३।।
ज्ञानदेओ म्हणें ऐसा योगिराणा।
तयाचिआं चरणां प्रणिपात।।४।।अ.क्र.७५८।।

भगवंताचे हे ***परमधाम चार शून्ये आणि महाशून्य यांचे मिळून झालेले आहे, अशी योगिजनांची अनुभूती सांगते.*** त्यामध्ये तो आनंदाचा कंद असा आत्मरंगाने विनटलेला ज्ञानेशांचा रंगा ***(श्रीरंग)*** वसलेला आहे. त्याच्या रंगांत जो रंगून जातो, त्याचे मन हरपून जाते. शून्यातले ते श्रीहरीचे रूप हे सर्व विश्वाचे बीज आहे. स्वानंदाचे माहेरघर असे ते सावळे परब्रह्म आहे. त्रिगुणात्मक असे ते रूप नाही; नादाचे - शब्दाचेही तेथे अस्तित्व नाहीच, जागृति-स्वप्न-सुषुप्ति या तिन्ही अवस्थासुद्धा तेथे नाहीत. पण सत्-चित्-आनंद असे पण त्या रूपाचे वर्णन होऊ शकत नाही. ते रूप कसे आहे, ते केवळ सद्गुरूच जाणोत! सद्गुरूंच्या कृपेने हे जे रूप ज्ञानेशांनी पाहिले, त्याचे गुणगान केवळ ज्ञानेशच करू जाणोत! इतरांची मती तर ते रूपवर्णन ज्ञानेशमुखे ऐकून गुंगच होऊन जाते, यात नवल नाही!

सत्रावीची शींव ओलांडून त्या रूपात रंगून गेलेला योगिराज इतरेजनांच्या दृष्टिअतीत होऊन रात्रंदिवस स्वानंदसुखात मग्न होऊन जातो. त्याचे ते सुख इतके अवीट गोडीचे असते की प्रत्यक्ष उन्मनीस्थितीलाही पण त्यासाठी रात्रंदिन लंपट होऊन बासावेसे वाटावे! ***"तत्त्वमसि"*** यात तीन पदे आहेतः ***"तत् -त्वम् -असि".*** ***तत्*** म्हणजे ते पाहण्याच्या अवस्थेत हा योगिराज नसतो. ***त्वम्*** म्हणजे आपला अहंकार तर त्याचा निजरूप झालेला असतो. आणि

असि म्हणजे केवळ असण्यातील स्वसंवेद्यतेचा प्रिय स्वरूपातील मकरंद असा आनंद मुक्त हस्ते लुटण्यात मश्गूल होऊन जाणाऱ्या त्या योगिराजास आता ध्यान करावे अशी कोणती वस्तू उरणार सांगा बरे!

"तुझें ध्यान लागो"

ज्ञानदेव तर अशा योगिराटाची चरणकमले वंदिण्यास तत्पर झाले आहेत! कारण त्यांना त्या श्यामसुंदर रूपमनोहर श्रीरंगाची कमालीची ओढ लागली आहे. म्हणूनच जणू ते स्वगत म्हणत आहेत की:

रंगा येई वो ये। रंगा येई वो ये।
विठाई किठाई माझे कृष्णाई। कान्हाई।।१।।
वैकुंठवासिनी। विठाई जगत्रजननी।
तुझा वेधु माझें मनीं। रंगा येई वो ये।।२।।
कटी कर विराजित। मुकुट रत्नजडित।
पितंबरु कासिला। तैसां येईं कां धांवत।।३।।
विश्वरूप विश्वंभरें। कमलनयन कमलाकरें वो।
तुझें ध्यान लागो। बापु रखुमादेविवरें वो।।४।।
।।अ.क्र.१०६०।।

विठाई, किठाई, कृष्णाई, कान्हाई अशा नावांनी ***महाशून्यींच्या*** त्या ***वैकुंठस्थानी*** निवास करणाऱ्या त्रिभुवनाच्या जननीस भावपूर्ण हाका मारत तिचा ज्ञानेश धावा करत आहेत. त्या निजरंगात रंगून गेलेल्या श्रीरंगाचा त्यांच्या मनाला वेध लागला नसता तरच नवल! सावळ्या परब्रह्मास पांडुरंगाच्या रूपात पाहणारे ज्ञानदेव तीच ती कटीवर कर ठेवलेली, मस्तकी रत्नजडित मुकुटाने शोभणारी, कासेला पितांबर परिवेष्टिलेली, भक्तांना प्रिय असणारी गोपाळाची छबी आपल्या ध्यानात साकारावी म्हणून आर्त होऊन त्या विश्वरूप विश्वंभर अशा कमलनयन कमलाकर मेघश्यामास दर्शन देण्यासाठी विव्हल होऊन साद घालत आहेत!

पंढरपूरचा विठ्ठल आपणास असा त्यांच्या अभंगांतून दर्शन देतो. अनेकानेक अभंगांवर ***"बाप रखुमादेविवरु"*** पांडुरंग श्रीविठ्ठलाची मुद्रा उठविणारे हे ज्ञानदेव तेच का ज्ञानदेवीकर्ते असे कोडे पंडितशिरोमणींना जरी पडत असले, तरी या ***योगपर अभंगांतून पंथराज किंवा भक्तिपंथाचे*** जे ***रहस्य प्रकट झालेले दिसते,*** निदान त्यावरून तरी आपणाला तसे कोडे पडू नये!! याच ज्ञानदेवांनी काही काही अभंगांतून आपल्यासह निवृत्तिनाथादी भावंडांचाही उल्लेख केलेला आहे. तसेच ज्ञानेश्वरी आपणच लिहिल्याचे सांगितले आहे. पंथराजही सांगितलेला दिसून येतो.

ज्ञानेश्वरीतून ***पंथराज - अद्वयभक्तियोग - क्रमयोगसोपान*** यांचे रहस्योद्घाटन करणारे ज्ञानदेवच त्रिपुटीविरहित करणाऱ्या योगपंथाचे बीज आपल्या अभंगांतून सांगतात आणि **अमृतानुभवा**तून तो अनुभव जीवन्मुक्त कसा चाखतात, ते व्यक्तवतात, हे आपणासारख्या जिज्ञासूंसाठी काही कूट असे नक्कीच नाही! असो.

"निवृत्ति सोपान मुक्ताईची खूण। ज्ञानदेवें सघन बोलियेली"

वैकुंठवासिनी विठाईचा शोध घेणाऱ्या ज्ञानदेवांचे हे वैकुंठधाम मात्र सलोकतादी मुक्ती देणाऱ्या शास्त्रांतरीच्या वैकुंठलोकापेक्षा वेगळेच आहे. ते त्या चिद्धामाचे वर्णन ऐकवत म्हणतात:

ऐक एक गूज बोलतों निर्वाण।
निवृत्तिचरण आठऊनि।।१।।
अर्धमात्राक्षरीं अक्षरें **पाहाति।**
अनाक्षरापरति **बाईयांनो।।२।।**
रज तम सत्त्व यांहूनि निरालीं।
लक्षांहिं वेगली **निवृत्ति जाणें।।३।।**
सत् चित् आनंद ब्रह्मा हरि हर।
तेहिं जिचा पार नेणविति।।४।।
सलोकता मुक्ती आदि तिनिंवरीं।
वसतें जैं घर योगियाचें।।५।।
त्वंपद तत्पद असिपदाचा रंग।
त्याचा अंतरंग देखा बाईयांनो।।७।।
निवृत्ति सोपान मुक्ताईची खूण।
ज्ञानदेवें सघन बोलिलीं हें।।८।।अ.क्र.७५९।।

"निवृत्तिनाथांच्या चरणांना वंदित एक महत्त्वाचे योगरहस्य प्रकट सांगतो, ते ऐका. **शब्दब्रह्माच्याही पलीकडे जी अर्धमात्रा आहे, तिच्याही पलीकडे ते *अनाक्षर - परब्रह्म* वसते, ज्याच्याबद्दल वेदांनीही *"नेति, नेति"* असे सांगत मौन पाळले आहे.** सत्त्व-रज-तम या त्रिगुणातीत अशी ती अलौकिक स्थिती आहे. ते मोक्षधाम ***"ध्यानासिहिं कुवाडें"*** असे ध्याता-ध्येय-ध्यान या त्रिपुटीच्या पलीकडील आहे. ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान या ज्ञान त्रिपुटीचा साक्षिमात्र केवल असा तो परमात्मा तेथे राहतो."

"सत्-चित्-आनंद" या सच्चिदानंदस्वरूपाच्याही पार पल्याडच्या त्या भगवंताचा ब्रह्मा-हरि-हर या आद्यदेवत्रयींसही पार लागत नाही. ***समीपता -सरूपता - सायुज्य*** या मुक्तित्रयीच्याही वर जे त्याचे धाम आहे, ते ***योगियांचे माहेरघर***च आहे. ***"तत्त्वमसि"*** मध्ये ***"तत् -त्वम् -असि"*** ही जी तीन पदे आहेत, त्यांना रंगवणाऱ्या त्या श्रीरंगाचे अंतरंगस्वरूप जाणून घ्या. त्याकरता योगिराजांची पाऊले वंदावीत. त्या त्रिगुणांच्या पलीकडील परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेणारा धन्य होय"

त्या आत्मस्वरूपाच्या अंतरंगी ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताई आणि निवृत्तिनाथ ही चारी भावंडे नित्य नांदताहेत, त्याचा ज्ञानेशमुखे वानगीदाखल निर्देश या अभंगात प्रकटलेला आहे. योग्यांना परम वंदनीय अशा या योगिराज निवृत्ति-ज्ञानदेव-सोपानदेव-मुक्ताबाईंना आपल्या अंतरीं वसवत, त्यांच्या आशीर्वादाने योगरहस्य जाणून घेता येईल, या भावनेने पुढील अभंगाकडे वळू या.

उन्मनीसंगें गोंसावी विराजें।
चहूं देहांचे ओझें निवारूनि।।१।।
सोहमस्मिचें छंदें परिपूर्ण।
विज्ञान हें खूण नाहीं जेथ।।२।।
चंद्रसूर्याहूनि तेज तैं आगलें।
अव्यक्तें व्यापिलें अनुभवें।।३।।
अनुभवाचीं खूण गुरुगम्य जाणिति।
ज्ञानदेवें विनंति हेंचि केलीं।।४।।अ.क्र.७६०।।

स्थूल - सूक्ष्म -कारण - महाकारण हे पिंडस्थ ***चार देह निवारून महाशून्यात उन्मनीसह प्रवेश करणारा योगी अर्थातच समीपता -सरूपता-सायुज्य या तिन्ही मुक्त्यवस्थांच्या अतीत अशा जीवन्मुक्तीत विराजतो.*** मागील अभंगात म्हटलेले तिन्ही मुक्तींच्या वर वसणारे योग्यांचे घर म्हणजे जीवन्मुक्तावस्था!

समाध्यवस्था व मुक्त्यवस्था यांचा समन्वय::::

मुक्ती व समाधिविचार

मागे आपण या तीन मुक्ती चक्रजयाने प्राप्त होतात, असे यौगिक मत असल्याचा उल्लेख पाहिला होता *(उन्मेष४५-१: लययोगसमालोचनः योगपथ पृ.क्र.७५७ ते ७६०).* **अनाहतजयाने *समीपता*, विशुद्धिजयाने *सरूपता* व आज्ञाजयाने *सायुज्य* अशा तीन मुक्ती प्राप्त होतात,** असे ते मत आहे. परंतु मूलाधार ते आज्ञाचक्र हा स्थूलदेहाचा प्रांत आहे. तेव्हा त्याअंतर्गत असणाऱ्या अनाहत - विशुद्धी या चक्रांवर समीपता व सरूपतादी मुक्ती प्राप्त होतात, हा विचार अत्यंत स्थूल असावा असे दिसते.

पूर्वमार्ग हा मोक्षद्वाराकडे नेणारा पथ आहे. मोक्षद्वार खरे तर आज्ञाचक्रस्थित असले पाहिजे. प्रथमशून्य वा त्रिकूट हे आज्ञाचक्रस्थ स्थान ज्ञानेशांच्या प्रथम शून्याशी जुळते, हे आपण पाहिले आहे. ***शून्य* ही मुक्तीची सांकेतिक संज्ञा ठरते.** कारण **पं.गोपीनाथ कविराज म्हणतात, त्याप्रमाणे शून्यस्थान हे चैतन्याच्या विशेष अभिव्यक्तीचे स्थान असते आणि या स्थानातून शक्तीचे देहकार्यार्थ प्रसरण होत असते *(सं.मनीषीकी लोकयात्रा-ले.भगवतीप्रसाद सिंह पृ.क्र.२१०,२११).***

म्हणून साधक जेव्हा या कोणत्याही एका शून्यावस्थेत पोहोचतो, तेव्हा त्याने चैतन्याशी जवळिकीचा एकेक विशेष टप्पा गाठला असे म्हणावे लागते. हीच एक प्रकारची मुक्त्यवस्था होय. विविध यौगिक मतांनुसार ***जी जी म्हणून शून्यस्थाने आहेत, ती ती कोणत्या ना कोणत्या मुक्तीची अवस्थानिदर्शक समजावी लागतात.*** मग त्या शास्त्रोक्त सलोकतादी मुक्ती असोत, वा अन्य विशेष प्रसिद्धीत नसलेल्या मुक्त्यवस्था असोत.

मुक्तींचे असे विविध प्रकार संभवत असले तरी त्यातील ***सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्य व जीवन्मुक्ती*** या केवळ पाच मुक्तींचाच विचार करणे सध्या अभिप्रेत आहे. त्यासाठी आतापावेतो आज्ञाचक्रापासून पुढे जाणाऱ्या **पश्चिमपथा**चे जे विवेचन केले, त्याचा थोडे पुनरावलोकन करावे लागते. तसेच समाधिस्थाने त्या पथातील स्थानांशी निगडित असल्याचे ***श्री विष्णुतीर्थ***स्वामींचे जे मत आपण पाहिले होते, तेही लक्षात घ्यावे लागते.

ज्ञानेशांची चौशून्ये व चार देह यांच्यासह या सर्व माहितीचे संकलन करून समन्वय केल्यानेच आपणास उपरोल्लेखित प्रमुख अशा तीन, चार वा पाच मुक्तींचे रहस्य आकळून घेता येते. त्यासाठी पुढील *पृष्ठ क्र.८११* वर दिलेल्या कोष्टकाचा उपयोग होईल. सदर कोष्टकाबरोबरच *उन्मेषः३७:ॐकार व प्रणव; पृ.क्र.५७९-५८३* वरील ***विविध योगमतांनुसार योगचक्रस्थाने*** हा तक्ता पण पुनः *पृ.क्र.८१२* वर उद्धृत केला आहे. त्याचा पण उपयोग हा सर्व समन्वयात्मक विचार करतांना होईल.

विष्णुतीर्थमत

प्रथम विष्णुतीर्थांचे मुक्तिविषयक मत पाहू या. ते **निरोधिकेत *संप्रज्ञात समाधि* आणि नादांतात *निर्विचार समाधि*** प्रकटतो असे म्हणतात *(सौंदर्यलहरी -ले. विष्णुतीर्थ महाराज - हिंदी टीका- पृ.क्र.११४).* यापूर्वीच आपण पाहिले आहे की ***निर्विचारवैशारद्य प्राप्त झाल्याविना प्रज्ञेचा प्रांत सुरू होत नाही.*** कुंडलिन्युत्थापनापासून या प्रदेशाचा प्रारंभ असल्याचेही आपण पाहिले होते.

अर्थात ***"सूक्ष्मविषयत्वं चालिङ्गपर्यवसानम्।।१-४५।। ।।पा.यो.सू.।।"*** या सूत्रात म्हटल्याप्रमाणे सविचार व निर्विचार समाधीसाठी उत्तरोत्तर अधिकाधिक सूक्ष्म विषयांचे आलंबन घेत गेल्याने त्या सूक्ष्म विषयांची परिसमाप्ती ***अलिङ्ग म्हणजे प्रधान*** या तत्त्वात होते. ***प्रधान म्हणजे प्रकृति वा शक्ती. कुंडलिनी*** असाही अर्थ घेणे या **सूक्ष्मविषयपर्यवसाना**संबंधी उचित ठरू शकते.

अर्थातच कुंडलिनी वा शक्ती या सूक्ष्म तत्त्वाच्या धारणा-ध्यान-समाधि-संयम परिणामी कुंडलिनी वा शक्तिजागृती होते. याप्रमाणे ***निर्विचार समाधीच्या पक्वावस्थेत कुंडलिनीचा प्रांत सुरू होतो,*** असे म्हणणे भाग आहे. त्यामुळे ***श्रीविष्णुतीर्थ*** म्हणतात ते ***सवितर्क व सविचार* समाधि** हे विभाग यापूर्वीच मागे पडले असणे जास्त संभवनीय आहे. आणि ***निर्वितर्क व निर्विचार*समाधि**सुद्धा या अवस्थेच्या म्हणजे कुंडलिनी उत्थापनापूर्वीच सिद्ध झालेले असल्याने त्यांच्या म्हणण्यानुसार या समाधींची ***निरोधिका व नादांत*** ही स्थाने सहज पटण्याजोगी नाहीत.

धर्ममेघ समाधि

या ठिकाणी थोडा विचार ***धर्ममेघ*** म्हणून जो समाधि पतञ्जलींनी सांगितला आहे, त्याचा करावा लागतो. ***निर्विचार ते सानंद व सास्मित हे संप्रज्ञात समाधि*** असा जो प्रवास साधक करतो, तो कोणत्या प्रांतातून असा प्रश्न येतो. याचे उत्तर असे की हा मार्ग ***धर्ममेघ*** या नावाने पातञ्जलसूत्रात विख्यात आहे. ***"प्रसङ्ख्यानेऽप्यकुसीदस्य सर्वथा विवेकख्यातेर्धर्ममेघः समाधिः।।४-२९।।पा.यो.सू.।।"*** असे कैवल्यपादातील पतञ्जलींचे सूत्र आहे.

(पुढे पाहा पृ.क्र.८१३वर)

पश्चिमपथ स्थाने व शून्ये / देहसंकेत / समाधि / मुक्ती

समाधि	१)विष्णुतीर्थमत	२)गोपीनाथमत	३)वुड्रॉफमत	४)ज्ञानेशवाङ्मयाधारे	(अ)देह	(ब)मुक्ती
सं}	**आज्ञा**	**आज्ञा**	**आज्ञा**		**स्थूल** }	
}	**बिंदू** (संप्रज्ञात सवितर्क	**बिंदू**	**बिंदू**	प्रथमशून्य-**त्रिकूटी**	}**सू** }	**सलोकता**
}	समाधि)				}	
}	**अर्धेंदु** (संप्रज्ञात सविचार	अर्धेंदु	अर्धेंदु	द्वितीयशून्य-**श्रील्हट** -➢	} -➢	**समीपता**
}	समाधि)				}	
प्र}	**निरोधिका**(संप्रज्ञात	**रोधिनी**	**बोधिनी**	-➢ -➢ -➢ -➢	} -➢	**सरूपता**
}	निर्वितर्क समाधि)				} **क्ष्**	
}	**नाद**	**नाद**	**नाद**		}	
ज्ञा}	नादांत (संप्रज्ञात निर्विचार	नादांत (मोक्षद्वार)	महानाद		}	
}	समाधि)				}	
}	शक्ति	शक्ति	-		} **म**	
}	**व्यापिका** (सानंद समाधि)	व्यापिका	व्यापिका	तृतीयशून्य -**गोल्हाट**} -➢	**का** -➢	**सा**
त}	समनी (सास्मिता समाधि)	समना	समनी	}	**र**	**यु**
				}	**ण**	**ज्य**
अ}	**उन्मनी**	**उन्मना**	**उन्मनी**	चतुर्थशून्य --➢	}**भ्र** -➢ **म** -➢	**जी**
}			(शिवतत्त्वाधीन)	**औटपीठ**}	}	
}	प्रतिष्ठा	-	-		} **हा**	
सं }	गुह्यचक्र	-	-		}**म**	**व**
}	-	महाबिंदू	-		} **का**	
}	**सहस्रारचक्र**	-	-		}**र**	
ज्ञा}	**ब्रह्मरंध्र**	**ब्रह्मरंध्र**	**ब्रह्मरंध्र**	**महाशून्य**	}**गुं** **र**	**न्मु**
}			**पराबिंदू**		}	
त}			**(परमशिव)**		}**फा** **ण**	**क्ती**
				निरशून्य -➢-➢ -➢-➢-➢	**कैवल्य देह**	**-➢विदेहमुक्ती**

विविध योगमतांनुसार योगचक्रस्थाने (पश्चिममार्गावरील)

चक्रक्रम-१	चक्रक्रम-२	चक्रक्रम-३	चक्रक्रम-४
आज्ञाचक्र		**आज्ञाचक्र**	**आज्ञाचक्र**
		त्रिकूट	त्रिवेणीचक्र (भ्रूमध्यस्थान)
चंद्रचक्र	ललाटचक्र	**श्रीहट्ट**	चंद्रचक्र (ललाटस्थान)
ब्रह्मरंध्र	**सहस्त्रदलकमल**		**ब्रह्मरंध्रचक्र (मूर्धास्थान)**
तालुचक्र	तालुचक्र		ऊर्ध्वरंध्रचक्र (तालुस्थान)
भ्रमरगुहा	**भ्रमरगुहा**		**भ्रमरगुंफा (अलक्ष्यचक्र)**
ब्रह्मचक्र			पुण्यागारचक्र
कोल्हाटचक्र		**कोल्हाट**	**कोल्हाटचक्र**
		औटपीठ	
		भ्रमरगुंफा	
		ब्रह्मरंध्र	

संक्षिप्त विहंगम मार्ग - प्रचलित संज्ञा (हा मार्ग आज्ञाचक्रापासूनच सुरू होतो.)

पिंड	स्थाननाम	स्थानीय अन्य विशेष
अंड	**आज्ञाचक्र**	स्थूल देहाची मर्यादा, आत्म्याचे स्थान
	सहस्त्रदलकमल	जोत, निरञ्जन, शिवशक्ती, निजमन
	त्रिकुटी (द्विदल)	ओम्, प्रणव, गगनब्रह्म, महत्, महाकाश, वेद इ.दिव्य ग्रंथ (ब्रह्म)
ब्रह्मांड	शून्यस्थान	(७ शून्ये आहेत - अंतीचे शून्य दशमद्वार वा ब्रह्मरंध्राकडील सुषुम्नामुख)
	महाशून्य	(६ महाशून्य स्थाने)
	भ्रमरगुंफा(द्विदल)	
व्याल -देश	सत्यलोक	महाप्रकाशमान निर्मल स्थानः संत येथेच वसतात.
	अलक्ष्य (अलख)	
	अगम	
	अनामी	परमसंतांचे वास्तव्यस्थान

(टीपः हा विहंगममार्ग येथे संक्षेपाने दाखवला आहे. पूर्ण मार्ग *उन्मेषः३७:ॐकार व प्रणव; पृ.क्र.५७९* वर दिलेला आहे.)

(पृ.क्र.८१०वरून पुढे)

आत्म्याचे निःसंदेह ज्ञान प्रकटणे, विवेकख्याति प्राप्त होणे व आत्मसाक्षात्कारावस्था प्रकटणे या सर्व धर्ममेघ समाधीच्या अवस्था होत. हा खरे तर पूर्णतया अतींद्रियाचा प्रांत आहे.

समाधिविधी

कुंडलिनीजागृतीपासून अतींद्रिय प्रांत सुरू होतो व पूर्वमार्गावरून पश्चिममार्गाकडे वळले की त्याचाही अत्युच्च श्रेणीचा प्रदेश प्राप्त होतो. या सर्व अवस्था निर्विचारवैशारद्यानंतरच्या असून त्यात *सानंद* व *सास्मित* या संप्रज्ञात समाध्यवस्था व असंप्रज्ञात समाधि यांचा अंतर्भाव होतो. पुढील बाणचक्राने हे दाखविले आहे.

(अ) समाधिविधि = सवितर्क -➢निर्वितर्क -➢सविचार -➢निर्विचार -➢धर्ममेघ समाधि

(ब) धर्ममेघ समाधि = (सानंद संप्रज्ञात -➢सास्मित संप्रज्ञात -➢असंप्रज्ञात)

त्यामुळे श्रीस्वामीविष्णुतीर्थांचे निरोधिकेत निर्वितर्क आणि नादांतात निर्विचार समाध्यवस्था हे उपरोक्त मत जसे आहे, तसेच ग्राह्य वाटत नाही. त्यांच्या मताचा योग्य अवलंब कसा करावा यासाठी अधिक खोलात जावे लागेल.

पातञ्जलयोगशास्त्रानुसार ज्या सवितर्कादी समाध्यवस्था आहेत, त्या एकामागून एक अशा उत्तरोत्तर प्रगतीने साध्य होणाऱ्या जरी असल्या तरी साधक एका वेळी कोण्या एकाच समाध्यवस्थेचा अभ्यास करत नसतो. खालच्या पायरीवरील अभ्यास जसजसा पक्व होत जातो, तसतसा तो वरील पायरीचा समाधि अभ्यासू लागतो. म्हणजे एकाच वेळी साधक किमानपक्षी दोन तरी समाधि अभ्यासार्थ घेत असतो.

त्याचप्रमाणे वितर्कानुसारी जे समाधि आहेत *(सविचार व निर्विचार)*, ते आणि जे विचारानुसारी समाधि आहेत *(सविचार व निर्विचार)*, त्यांच्या आलंबनविषयात स्थूल ते सूक्ष्म यात तसा फारसा फरक करणे शक्य नाही. त्यांच्या मूर्त व अमूर्त या आलंबविषयात फरक तो एवढाच आहे की मूर्त वस्तूस विश्वाच्या दृश्यात स्थान असते.म्हणजे रूप, रस, गंध, शब्द व स्पर्श या पंचविषयांशी ती वस्तू प्रत्यक्ष संबंधित असते. याउलट अमूर्त वस्तूस केवळ मनात अस्तित्व असते.

उदाहरण म्हणजे एखादी कल्पना - जसा न्यूटनचा गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत अथवा आईन्स्टाईनची सापेक्षतावादरचना. अमूर्त वस्तूचा मूर्त वस्तूशी तसा कोणत्या ना कोणत्या प्रकारचा संबंध विचाराद्वारे मनाने जोडलेला असतो. पंचविषयेंद्रिये व पंचज्ञानेंद्रिये यांच्या माध्यमातून भौतिक विश्वाचे मनावर जे संस्कार घडतात, त्या संस्कारांना अमूर्त स्वरूप लाभते.

हे संस्कार केवळ मन या इंद्रियाद्वारे ग्रथित व संग्रहित केले जातात. त्याही संस्कारांवर पुनर्संस्करण व संक्रमण इ. मनोवैज्ञानिक प्रक्रिया घडत जातात आणि केवळ मनाने निर्मिलेल्या मनोविश्वास आकार येतो. या मनोविश्वातील वस्तू अमूर्त असतात. पण त्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या भौतिक वस्तूंशी कोणता ना कोणता संबंध असतोच.त्याचप्रमाणे मूर्त वस्तूसुद्धा एकदा संपर्कातून निघून गेली तरी तिचे संस्कार मनात असतात. म्हणून ध्यानासाठी आलंबन घ्यावयाचा मूर्त विषय सुरवातीला जरी पंचेंद्रियगोचर असला तरी हळूहळू तो मनोगोचर या सदरात मोडू लागतो. म्हणूनच समाधीसाठी स्थूल व सूक्ष्म आलंबविषयात तसा फारसा फरक नाही असे म्हणावे लागते.

निर्वितर्क व निर्विचार समाधि

असे असल्याने *वितर्क व विचार* यांवर आधारित सर्व समाधि तसे मूलतः (substantially) एकाच प्रकारचे असले पाहिजेत. फरक एवढाच की वितर्कानुगम समाधि प्राथमिक व विचारानुगम समाधि थोडा उच्च श्रेणीचा कल्पावा लागतो. म्हणजे यातला फरक फक्त एकाच प्रकारच्या समाधीच्या अभ्यासाच्या वेगवेगळ्या पातळ्यांचा आहे. म्हणून *सवितर्क - निर्वितर्क - सविचार - निर्विचार* या समाधींचा प्रांत स्थूल मानाने एकच आहे.

निर्विचारवैशारद्य प्राप्त झाले की धर्ममेघ समाधीचा प्रांत सुरू होतो, असे वर म्हटले आहे. पण याचा अर्थ असा नाही की विचाराचा प्रांत येथे *धर्ममेघ समाधि* प्रकटताच संपतो, तर जोपावेतो मनाच्या कला आणि मात्रा अस्तित्वात असतात, तोपावेतो विचारांची प्रक्रिया चालूच असते. विचारांच्या श्रेणीत परिवर्तन मात्र जरूर होत असते. कारण *प्रज्ञा* जागृत झालेली असतां धर्ममेघ समाधीस आरंभ होतो.

सप्रज्ञ विचारांना त्यापूर्वीच्या विचारांपेक्षा वेगळे गणले तर आपणास *"सविचार -➢ निर्विचार -➢ प्रज्ञाप्राप्ती -➢ सप्रज्ञसविचार"* अशा विचारानुगत समाधीच्या विचारानुगत अवस्था असल्याचे आढळून येईल.

या दृष्टीने पाहता **श्रीविष्णुतीर्थांनी जे निरोधिका व नादांतस्थानी अनुक्रमे संप्रज्ञात निर्वितर्क समाधि आणि निर्विचार समाधि यांचे स्थान सांगितले आहे, ते स्थान प्रज्ञासापेक्ष वितर्क-विचारादींचे असले पाहिजे, असे दिसते. त्याचप्रमाणे सलोकता - समीपता - सरूपता -सायुज्य या मुक्ती उपभोगणारे मन अजूनही असंप्रज्ञात स्थितीत जात नसल्याने त्याला तेव्हा विषय म्हणून प्रज्ञाजागृतीनंतर अनुभवास येणारे हे अलौकिक रूपरसगंधादी विषयच असले पाहिजेत.**

याच अर्थाने साधकास होणारी दिव्य रूपादी दर्शने, श्रवणे, सलोकतादी सरूपतादी दृश्ये घ्यावी लागतात. अमूर्त असे हे विषय असून केवळ प्रज्ञाप्रभावाने साधक त्यांचा उपभोग घेत असतो. म्हणून या दिव्यविषयांनुसार त्यास विविध लोकदर्शन - गमन इ. प्राप्त होतात. तसेच उपरोक्त चारही मुक्तींचे प्रकार प्रज्ञायोगेच संभवतात.

संक्षेपतः समाधिक्रम

थोडक्यात ***"निर्विचारवैशारद्य-➤ प्रज्ञाजागृती -➤दिव्यविषयप्राप्ती -➤त्यांचे आलंबन घेत घेत प्राप्त होणारे धर्ममेघ समाधीच्या अंतर्गत समाधि-➤ त्या अंतर्गत दिव्यविषयानुलंबी सवितर्क-➤ निर्वितर्क -➤ सविचार-➤ निर्विचार समाधि -➤ सानंद संप्रज्ञातसमाधि -➤ सास्मित संप्रज्ञात समाधि -➤असंप्रज्ञात समाधि"*** असा साधकाचा मार्ग असल्याचे पातञ्जल योगदर्शनाच्या साहाय्याने आपणास प्रतीत होते. असो.

मुक्तीचा अधिक विचार::::

मुक्तिविचार

आता मुक्तीचा विचार करू या. पं.गोपीनाथ कविराज इ.मते ***निरोधिका*** या स्थानी रूपनिरोध होतो. म्हणजे यापुढील प्रांत रूपागम नाही. यापुढे फक्त ***नाद*** उरतो. म्हणूनच ***सलोकता ते सरुपता*** **या मुक्तींचा उपभोग निरोधिका ते शक्ती ओलांडीपर्यंतच आहे. पुढील प्रांत *सायुज्यता* या मुक्तीचा आहे.** आपण व आपले इष्ट यात कोणताही फरक साधकास जाणवत नाही; ***"अहं ब्रह्माऽस्मि"*** **या बोधावर साधक असतो, तो प्रांत म्हणजे सायुज्यतेचा होय. हा प्रांत तसा निरोधिकेपासून ते नादांतापर्यंतचा आहे. नादांती नादनिरोध होतो. पंचेंद्रिय विषय तेथे समाप्त होतात. अर्थात कनिष्ठ श्रेणीच्या सलोकतादी मुक्ती उपभोगून हे स्थान साधकास प्राप्त होते.**

सायुज्यानंतर जीवन्मुक्तीचा प्रांत सुरू होतो. परंतु वस्तुतः ***सानंद व सास्मित हे संप्रज्ञात समाधि*** याठायी प्रकट होतात. हे समाधि म्हटले तर सायुज्यांतर्गत धरता येतात आणि म्हटले तर जीवन्मुक्तिअंतर्गततही धरता येतात. स्वामी श्रीविष्णुतीर्थमते **व्यापिकेस्थानी *सानंद*** व **समनी स्थानी *सास्मित* संप्रज्ञात समाधि** राहतात. हे मत मान्य करण्यास प्रत्यवाय नाही. असे मानले तर हाही सायुज्यमुक्तीचा प्रांत ठरतो आणि तेही उचितच आहे. कारण उन्मनीअगोदरच्या या प्रांतात मनाचे विश्व अजून असतेच. म्हणून ***उन्मनी*पासून *असंप्रज्ञात समाधी*चा प्रांत आणि *जीवन्मुक्ती*चा प्रारंभ धरणे योग्य ठरते.** असो.

देहसापेक्ष मुक्त्यवस्था

सलोकता मुक्ती प्राप्त होणाऱ्या साधकाचा दिव्य लोकात प्रवेश होतो. हे आज्ञाचक्रोपरांत बिंदुस्थानी घडत असते. आज्ञाचक्री स्थूल देह संपून सूक्ष्म देहविभाग सुरू होतो. अर्थात दिव्य लोकसापेक्ष ***सलोकता*** ही मुक्ती बिंदुस्थानी म्हणजे ज्ञानेशविवेचित द्वितीय शून्यस्थानी - श्रील्हट चक्रात - प्राप्त होते. प्रथम शून्य म्हणजे ***त्रिकूट*** *(ज्ञानेशपद्धतीतील स्थाननाम)* या स्थानात साधक स्थूल जगापासून मुक्त होतो.

त्यानंतर ***अर्धेंदु*** या स्थानी ***समीपता*** व ***निरोधिका*** या स्थानी *सरूपता* या मुक्तींचा उपभोग घडतो. त्यानंतर तृतीयशून्य - ***गोल्हाट - व्यापिका*** हे सायुज्यमुक्तीचे प्रमुख स्थान होय. आणि चतुर्थशून्य - ***औटपीठ - उन्मनी*** येथे ***जीवन्मुक्तावस्था*** अवतीर्ण होते. येथून पुढे ***महाकारण*** देह आणि त्यापूर्वी ***व्यापिका ते समनी कारणदेह*** हे प्रांत असतात. सूक्ष्म देहाचा प्रांत त्यापूर्वीचा ***आज्ञा ते शक्ती*** असा असतो.

यावरून असे लक्षात येते की ***सलोकता-समीपता-सरूपता* या तिन्ही मुक्ती सूक्ष्म देहाने उपभोगल्या जातात.** सायुज्यमुक्ती ही कारणदेहाने अनुभूतीस येते. महाकारण देहाशी जीवन्मुक्ती संबंधित आहे. परंतु स्थूलमानाने पाहिले तर हा महाकारण देहसुद्धा समनी - उन्मनी यांच्या संधिस्थानीच असतो. म्हणून उन्मनी प्राप्त झाली की योगी स्थूल-सूक्ष्म - कारण व महाकारण या चारही देहांस निवारून जीवन्मुक्त होतो, असे म्हणता येते.

"चहूं देहांचे ओझें निवारूनि"

हा सर्व विषयप्रपंच आपण ज्ञानेशांचा *अभंग क्र.७६०* नीट समजावा म्हणून केला आहे. आता ***"उन्मनीसंगें गोसावी विराजें। चहूं देहांचे ओझें निवारूनि।।"*** आणि ***"सलोकता मुक्ती आदि तिन्हींवर। वसतें जैं घर योगियांचें।।अ.क्र.७५९।।"*** *(पृ.क्र.८०९ व ८१०)* यांतून ज्ञानेशांनी निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताई यांच्या स्थितीच्या ज्या खाणाखुणा आपणासाठी आशयघन शब्दात प्रकट केल्या आहेत, त्या समजू शकतील असा विश्वास वाटतो. असो.

अर्धमात्रेचा प्रांत::::

प्रणवसाधना

यानंरचे ज्ञानदेवांचे अभंग पाहू या.

नयनाचें अंजन मनाचें रंजन।
ठसा हा सघन बाईयांनो।।१।।
ॐकार अक्षर अक्षरीं हारपें।
अनुभवाच्या मापें मोजूं बापा।।२।।
बिंदूचें जें मूल प्रणवाचें फल।
योगियांचां खेल तैंचिं ठाईं।।३।।
ज्ञानदेओ म्हणें निवृत्तिप्रसादें।
स्वरूपाच्या विनोदें बोलिलें हें।।४।।अ.क्र.७६१।।

योगी कोणत्या स्थानी विराजतो, ते आपण पाहिले. निवृत्तिनाथांची कृपा झालेले ज्ञानेश आपणास स्वरूप स्पष्ट कळावे म्हणून म्हणतात की ***"बिंदूचे मूळ स्थान*** जे आहे ते प्रणवाच्या साधनेने फलस्वरूप असे प्राप्त होते. नेत्रात घालायचे अंजन म्हणजे ***प्रणवसाधना."***

प्रणवसाधना* म्हणजे *कुंडलिनी* उत्थापित करून तिच्यायोगे घडणारी साधना.** या साधनेची फलश्रुती सघन अशा नीलबिंदुदर्शनात होते. ***हा नीलबिंदू म्हणजेच श्रीगोपाळु, श्रीविठ्ठलु इ.नांवांनी संतांनी जिला आळविले आहे, ती आत्मज्योती! या ज्योतिदर्शनात मन रंगून जाते आणि मनाचे उन्मन होऊन जाते. **आत्मसाक्षात्काराच्या या अवस्थेत ॐकाराचा[१] अक्षरतत्त्वात[२] लय होतो. म्हणजे पिंड[१]ब्रह्मांडाची[२] मिळणी होते.** हा अनुभव फक्त साक्षात्कारी पुरुषांना

आकळू शकतो, असे ज्ञानेश म्हणतात. ***ॐकार*** हे येथे योगसाधक ज्यास ***आज्ञाचक्रावरील स्थान*** असे म्हणतात, त्यास उद्देशून आहे *(पृ.क्र. ८१२- विहंगममार्ग - स्थानांचा तक्ता).* त्यानंतरचा विभाग **अक्षरा**चा आहे. असो या अभंगात पुनश्च कुंडलिनीयोगाचा संबंध येतो.

गगनमंडल

कुंडलिनीच्या गगनगुंफेतील विहाराबाबत ज्ञानेश म्हणतातः

गगनमंडलीं **नारी सुकुमार दिसें।**
तिनिं लोक वसें तिचें उदरीं।।१।।
परादि वाचा तन्मय तैं जाहालीं।
साक्षित्वासिं आलीं *ब्रह्मरंध्रीं* ।।२।।
ज्ञानदेओ म्हणें नयनांतील ज्योती।
पाहातां वृत्ति हारे विषयांचिं।।३।।अ.क्र.७६२।।

आज्ञाचक्रावरील आसमंतास ***गगनमंडल*** अशी संज्ञा आहे. कुंडलिनी प्रमदेचा त्याठायी प्रवेश होतो, तेव्हा ती अलौकिक तेजाची दिसते. या नारीचे वर्णन सुकुमार या शब्दाने करतात. ***"हों कां जैं पवनाचिं पुतलिं। पांगुरिलीं होति सोनेसलीं।..... कां लखलखौनि हारपलीं। वीजु गगनिं।।..।।६-२८४,२८५।।"*** अशा शब्दात तिचे वर्णन ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत केले आहे.

सुषुप्ति-स्वप्न-जागृति या तिन्हीं अवस्था तिच्यातूनच प्रसवक्रमाने प्रकटतात. म्हणून तिच्याठायी तिन्ही लोक वसतात, असे म्हटले आहे. अथवा त्रिलोकरूप ब्रह्मांडास तीच जन्म देते, असाही अभिप्राय या ठिकाणी धरता येतो. **परादी वाचासुद्धा जेथे लीन होतात, अशा ब्रह्मरंध्रस्थानी जेव्हा ती कुंडलिनी प्रवेशते, तेव्हा केवळ साक्षिभाव उरतो.**

नयनातील ज्योती म्हणजे महाशून्य स्थानातील आत्मज्योत. तिचा साक्षात्कार घडून येऊन विषयवृत्ती हरपतात. विषयांची येरझार चुकते व साधक जीवन्मुक्ती पावून कृतकृत्य होतो. चौदेहांचे ओझे निवारून योगी त्या स्थानी विराजतो. *अभंग क्र.७६० (पृ.क्र.८१०)* मध्ये म्हटल्याप्रमाणे तेथे ***विज्ञान* म्हणजे विश्वाची खूण वा व्यापार** उरत नाही. ***"सोहम"* बोध परिपूर्ण होतो. *सास्मित* समाधि दृढ होतो** *("सोहमस्मिचें छंदें परिपूर्ण"- तत्रैव).*

आत्मज्योतीचे तेजोमय स्वरूप तेथे अनुभवास येते. पण त्या तेजास चंद्रसूर्यांच्या तेजाची उपमा देता येत नाही, इतके ते आगळेवेगळे असते. योग्यास अव्यक्ताची अनुभूती येते ती येथेच! पण त्याचे वर्णन वाचेने करता येणे अशक्य आहे. कारण ***परादी वाचा अगोदरच ब्रह्मरंध्री लीन झालेल्या असतात.*** ज्ञानदेव म्हणतात की "ही अनुभूती केवळ गुरुकृपांकित साधकांनाच कळू शकते. इतरांना ती समजावून देणे फार अवघड आहे."

अश्वत्थाचे परिपूर्ण फल

यानंतरच्या अभंगात ज्ञानेश ***"ऊर्ध्वमूलमधःशाखं"*** अशा अश्वत्थास उद्देशून म्हणतात कीः

वर मुळें शेंडा खाली दिसे बानो।
प्रपंचिं रानोंरान वृक्ष बा रे।।१।।
त्रिगुणाच्या शाखा उपशाखा बहुत।
नाना याति येत पत्रें ज्यास।।२।।
पक्व फल अहं सोहं गोडी त्याची।
सेवितां जिवाचि आंस पुरे।।३।।
ज्ञानदेओ म्हणें वृक्ष परिपूर्ण जाहाला।
बीज रूढला जाणिवेचां।।४।।अ.क्र.७६३।।

पंधराव्या गीताध्यायात ज्या प्रपंचवृक्षाचे ***(अश्वत्थाचे)*** वर्णन केले आहे, त्याचे येथे ज्ञानेश शब्दचित्र साकारतात. वर मुळे व खाली शाखा-उपशाखा व शेंडा असणारा हा जो वृक्ष आहे, त्यास त्रिगुणांच्या शाखा आहेत. नाना जातींची पाने त्यास लागली आहेत. देव-गंधर्व-मनुष्यादी सर्व योनी याच ती पाने होत. तो वृक्ष ऐन बहरास आला की त्यास ***अहं*** हे फळ लागून ते पक्व होते. पण या फळाने प्रपंचाचा विस्तार जरी होतांना दिसत असला, तरी ज्ञानी योगी त्या फळातील ***सोऽहं*** तत्त्वाची गोडी कशी चाखावी हे जाणतात. याच बीजातून ज्ञानतरूचा पूर्णपणे आविष्कार होतो.

या अभंगाची पंधराव्या अध्यायातील अज्ञानवृक्षाशी तुलना केली असता तेथे तो वृक्ष ***"दृढेन असङ्गशस्त्रेण छित्त्वा"*** असे म्हटल्याचे आपणास दिसते; तर येथे ज्ञानेश त्याच वृक्षाच्या अहंरूपी फलातील सोऽहंरूपी गोडी चाखून त्या फलातील ज्ञानबीजातून ज्ञानवृक्ष परिपूर्ण कसा करावा, हे सांगतांना दिसतात.

"तेथ प्रवृत्तितरुचिआं बुडिं। दिसति निवृत्तिफलांचिआं कोडिं। ... अर्जुना हा अवधारिं पंथराजु।।६-५३,५२।।" या ओव्यांतून ज्ञानेशांनी निर्देशिलेला ***पंथराज*** अशा प्रकारे या अभंगाद्वारे प्रकट होतांना दिसतो. ***"ऊर्ध्वमूल अश्वत्थ = प्रवृत्तितरु; अहंरूपी फळ + सोऽहंरूपी गोडी + ज्ञानरूपी बीज = निवृत्तिफळ;*** असा विचार त्यात अभिप्रेत होतो. पण त्यासाठी आपणास या अभंगाची जोड घ्यावी लागते. तसेच ही ***सोऽहं*****रूपी गोडी चाखण्यासाठी आपणास पंथराजाच्या मार्गाने जावे लागते;** इतक्या गोष्टींचा उलगडा या अभंगानिमित्त होतो.

या सर्व विवेचनावरून आपल्या वारंवार ध्यानात येते की ***ज्ञानदेवांना समजून घ्यावयाचे तर त्यांच्या समग्र वाङ्मयाचाच अभ्यास करावा लागतो.***

परेवरचा चक्षू

"सोऽहं" ज्ञानाचे अंजन घालून ज्ञाननेत्र उघडतो. पण **हा ज्ञानचक्षू *परेपल्याडचा* आहे. त्रिकूटीस्थित आज्ञाचक्रस्थ चक्षुवेगळा हा चक्षू आहे.** त्याबाबत ज्ञानेश म्हणतातः

१) धांवत धांवत आलों नयनांजनिं।
प्रकाश दिनमणि उणा वाटे।।१।।

निशिं दिवस दोनिं नाहीं जेथ बा रे।
अर्धमात्रेवरी लक्ष ठेविं।।२।।
अक्षय अक्षर क्षरविरहित साजे।
ज्ञानाचें जैं ओझें चालेचि ना।।३।।
ज्ञानदेव चक्षु जाहाला परेवरी।
यापरतीं बरोबरी नाहीं बापा।।४।।अ.क्र.७६४।।

२) **अजंनाचें अंजन सदोदित पाहिलें।**
पाहाणे होऊनि ठेलें सर्वांठाईं।।१।।
आतां बोलाबोली नको बा आणिक।
बिंदु ती निःशंक ब्रह्म रया।।२।।
अनुहात उन्मनी म्हणोनि वेर्थ काएं।
मुखीं धरीं सोएं ब्रह्मरंध्रीं।।३।।
ज्ञानदेओ म्हणें न बोलें आणिक।
डोलिआचिं बोल पाहातांचिं।।४।।अ.क्र.७६५।।

दिव्यरूपदर्शनाच्या ओढीने ज्ञानदेव लगबगीने आज्ञाचक्रस्थ बिंदुकडे धाव घेतात, तोच कोटिसूर्यसमप्रभ असे दिव्य तेज असणाऱ्या आत्मज्योतीचे त्यांना दर्शन होते. अर्धमात्रेपलीकडे ही जी ज्योत असते, ती अखंड प्रकाश देत असते व म्हणून लौकिकातील सूर्यास असणाऱ्या उदयअस्तांमुळे होणारा दिवसरात्रींचा खेळ त्याठायी नसतो.

क्षर जगतापलीकडे हा ***अक्षर*** पुरुषोत्तमाचा प्रांत आहे. ***अक्षय*** अशा त्या तत्त्वाशी एकरूप होतांना ज्ञानाचे ***(सोऽहं/अहं ब्रह्मास्मि या बोधाचे)*** ओझे फेकून द्यावे लागते. ***ज्ञानखंडन*** म्हणून अमृतानुभवाचे प्रकरण यावर प्रकाश टाकते, ते मुळातूनच पाहावे अशी जिज्ञासूंना सूचना आहे. असो. ***ज्ञानेश म्हणतात की ज्ञानखंडन होऊन ते स्वतः त्या परेपलीडील दिव्य तेज पाहणारे चक्षू झाले आहेत.*** यासारखी उच्च स्थिती अन्य कोणतीही नाही.

ते पुढे म्हणतात की "ज्ञानांजनाने ज्ञान प्राप्त होते, असे म्हणतात, ते ज्ञान त्यांनी प्रत्यक्ष पाहिले आणि ते ज्ञानच होऊन ते स्वतःराहिले आहेत. आता या अनुभवाविषयी अधिक काय बोलावयाचे! जिज्ञासूंनी नक्की समजून घ्यावे की ***बिंदू हेच ब्रह्म आहे.* कारण तेथपावेतो गेले की *अनुहात नाद आणि उन्मनी अवस्थेपलीकडे संक्रमण* करता येते. त्यासाठी साधकांनी ब्रह्मरंध्रास -सुषुम्नामुखास - लक्ष्य केले पाहिजे म्हणजे झाले!** बिंदू ते ब्रह्मरंध्र हा मार्ग चर्चित कोठवर बसायचा! कारण त्या चर्चेचे प्राप्तव्य त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे. आता तो अनुभव आपल्यात मुरवत बसावे हेच चांगले!"

निरंजन ब्रह्म

बिंदुच्या यौगिक अनुभूतीवर अधिक प्रकाश टाकत ज्ञानेश म्हणतातः

अकार उकार मकार ओंकार।
प्रणव हा साकार सुरेख रे।।१।।
मसुरामात्र सार योगी ध्याति देहिं।
निरंजन पाहिं ब्रह्म तैंचि।।२।।
ज्ञानदेओ म्हणें देह जाहालें देव।
प्रणवचि शिवु अनुभवें।।३।।अ.क्र.७६६।।

अकार, उकार व मकार यांनी ओंकार होतो. *ॐकारात बाह्य जगत व जागृति-स्वप्न व सुषुप्ति यांचा समावेश होतो. योगसाधनेने याच ॐकाराचा व्यष्टिसमष्टीसापेक्ष असा सुंदर सुरेख प्रणव होतो. "प्राणाचा प्रणवुचि" केल्यामुळे - अतींद्रिय तुर्या व तुर्यातीतावस्थांत प्रवेश केल्यामुळेच* - हे साध्य होते. या देहांतर्गत दिसणाऱ्या मसुराकार तेजाचे ध्यान योगी करत असतात आणि ते तेज म्हणजे साक्षात ब्रह्मानुभूती असते. ***प्राणाचा प्रणवु*** ही अवस्था प्राप्त झाली की योग्यांना आपला देह ॐकारस्वरुप झाल्याची अनुभूती येते, असा अनुभव आहे.

त्या निरंजन ब्रह्मतेजाशी एकरूप होऊन ***योगी सदेह सच्चिदानंद होऊन राहतो.*** प्रणवाचे शिवात मिलन करून - ***पदी पिंड प्रवेशल्याने*** योग्यांना ही स्थिती अनुभवायला मिळते, असे ज्ञानेश म्हणतात. यायोगे आपणास पुनश्च पंथराजाचे वैशिष्ट्य त्यांच्या या अभंगाद्वारे प्रतीत होते, हे सांगणे न लगे!

सहस्त्रदळीं शोभणारा काळा श्यामसुंदर

"सोऽहं" भावाच्या बाह्या पसरून ब्रह्मरंध्रीच्या आत्मतत्त्वास आलिंगन देणे ही पंथराजाची अंतिम गती आहे. त्या वेळी येणाऱ्या अनुभूतीचे निवेदन करत ज्ञानदेव म्हणतातः

१) **पाणियाचें मोतीं ज्योती वसें जेथ।**
महाकारण साद्यंत पाहा तुम्हीं।।१।।
जागृति स्वप्न सुषुप्ति जेथ उद्भव तिचा।
योगिराम ज्याचा अधिकारी।।२।।
गोल्हाटाचें मुळीं ज्ञानदेओ बैसला।
सहस्त्रदळीं शोभला काळा बाईं **।।३।।अ.क्र.७६७।।**

२) **सकारीं हकारीं नाडी दिसति कैशा।**
उलटल्या दशदिशा अमूपचि।।१।।
सूक्ष्म मूल सर्व बीजांचा उद्भव।
हाचि अनुभव देहामध्ये।।२।।
समान जैसा अर्क स्थिरचर एकला।
आत्मा हा संचला तैशापरी।।३।।
ज्ञानदेओ म्हणे याहून आणिक।
बोलाचें कवतुक नाहीं जेथ।।४।।अ.क्र.७६८।।

महाकारण देह साद्यंत पाहिला की त्यात पाणिदार मोत्याच्या तेजाप्रमाणे असणारी आत्मज्योती दिसते. विश्वाच्या जागृत-स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांचा उद्भव येथूनच होतो. अशा या महाकारण देहात स्थिती असणे हा योगिराजाचाच अधिकार आहे.

गोल्हाट **स्थानाचे जे मूळ पीठ असे सहस्त्रदळींचे स्थान आहे, तेथे ज्ञानदेव स्थित आहेत** आणि त्या श्यामसुंदराशी अभिन्न होऊन राहिल्याने त्यांचे नीळेसावळे काळे रूप शोभून दिसत आहे.

या स्थितीचे वर्णन ***"सोऽहं तेहिं अस्तावलें"*** या शब्दात ज्ञानदेवीत केले आहे. **"सोऽहम्" मध्ये *सकार* म्हणजे *ब्रह्म* व *हकार* म्हणजे *साधक* (जीव) यांचे अभिन्नत्व दर्शविले जाते. *"सोऽहं"*** भावाच्याही पलीकडे ज्ञानेश गोल्हाटाच्या मुळी बसले आहेत, तेव्हा तेथे नाड्या, चक्रे इ.संस्थांची अनुभूती नसते, हे सत्य त्यांना आकळून आले.

देश-काल व स्थिती यांचा त्या स्थानी कोणताही संबंध उरत नाही. ब्रह्मांडाच्या उगमस्थानी जे हे आत्मरूप मूळ आहे, त्याचाच दशदिशांना विस्तार होतो; देहातही तेच आत्मतत्त्व अखंड भरलेले आहे; याची अनुभूती तेव्हा येते. सर्व दिशांना सूर्याचा प्रकाश जसा एकसारखा पसरतो, तसेच हे आत्मतत्त्व सर्व विश्वाला व्यापते, ही अनुभूती घेऊन कृतार्थ झालेले ज्ञानदेव म्हणतात की आता यापरते अधिक काय त्या आत्मतत्त्वाबाबत बोलावे! कारण त्याठायी वेदवाणीसुद्धा मुकी होऊन मौनावते!

मुक्ताबाईस उमगलेले रहस्य

पृ.क्र.८२० वर दिलेल्या या ***काळ्याच्या योगानुभूतीविषयी*** हा *अभंग क्र.७६७* आणि पुढचे अभंग बरेच काही सांगतात. **सहस्त्रदळी शोभणारा हा *काळा*** जो आहे, त्याचे रहस्य पुढे उद्घाटित होईलच.त्याठायी वाणी जरी मौनावत असली तरी त्या अद्वैतावस्थेचे अधिक वर्णन करण्याचा मोह जणू न आवरता येऊन ते पुढे म्हणतातः

१) दिव्यरूप चक्षू कैशापरी जाहाला।
ठंसा हा उमटला कवण्यापरी।।१।।
चहूं देहांचा वर्ण अवर्ण देखिलें।
विश्व म्यां पाहिलें तेयामधें।।२।।
ज्ञानदेओ म्हणे सर्वांचें जैं मूल।
सत्रावी केवल शुद्धरूप।।३।अ.क्र.७६९।।

२) काळा पुरुष तो हा गगनांतैं जो नांदें।
अनुभवाचां भेदें भेदिला जो।।१।।
भेदूनि अभेद अभेदूनि भेद।
सच्चिदानंद जेथ नाहीं।।२।।
ज्ञानदेओ म्हणे तेथें अक्षय्य राहिला।
आत्मा म्यां पाहिला या दृष्टीसिं।।३।।अ.क्र.७७०।।

३) विश्व ब्रह्म भासे ऐक्य येतां देहिं।
अनुहातिं पाहिं अपार नाद।।१।।
देखिला परि संयोगें व्यापिला।
विश्व तरीच जाहाला बाईयांनो।।२।।
पिंडब्रह्मांडाचा विस्तार विस्तारिला।
माझा मीच जाहाला कोणपरी।।३।।
ज्ञानदेओ म्हणे या अर्थाची सोए।
धरी माझी माय मुक्ताबाई।।४।।अ.क्र.७७१।।

"ही दिव्य स्थिती कशी प्रकट होते, ते एक नवलच आहे.***सावळ्या नीलवर्ण श्यामसुंदराचा ठसा दाखविणारा दिव्य चक्षू प्राप्त होतो तरी कसा, हेही एक गूढच आहे.*** ताम्र-पीत-श्वेत-नील हे स्थूल - सूक्ष्म- कारण -महाकारण या देहांचे वर्ण ज्योतिरूपाने योग्यांना अंतरी दिसतात. ते दिसेनासे होऊन हा अवर्णनीय मेघश्याम मी पाहिला. त्या घननीळात हे विश्वच समावलेले मला दिसत आहे."

ज्ञानदेव म्हणतात की **"ही सर्व किमया *सत्राव्या कलेमुळे* घडून *येते.* आत्मदर्शन करवून देणारी ती *सत्रावी कला म्हणजे शुद्ध परमात्मतत्त्वच आहे."***

"असा हा परमात्मा गगनगुंफेत निवास करतो. विश्व त्याच्यापासून प्रकटते, म्हणून तो त्यापासून अभिन्न आहे, असे वाटते. परंतु असे असले तरी तो जसाच्या तसाच असतो. त्याच्याठायी विश्व झाले तरी त्याची स्थिती अभंगच असते. ***"सत् - चित् – आनंद"*** या त्रिपदांच्याही पलीकडे वसणारा तो अक्षय्य आत्मा मी या दिव्य दृष्टी देणाऱ्या सत्राव्या कलेच्या चक्षूंनी साक्षात पाहिला आहे."

ते पुढे म्हणतात की, **"योगी जेव्हा *महाकारणदेहात स्थित होतो,* तेव्हा त्याला विश्व-ब्रह्मैक्य जाणवू लागते. या अद्वैतबोधातच त्याला *अखंड अपार अशा अनुहत ध्वनीचा गजर* अनुभवण्यास मिळतो. आत्मरूपाचे दर्शन होते.** मायासंबंधामुळे आत्माच सर्व विश्व व्यापतो, हे रहस्य तेव्हाच खरे ज्ञात होते. पिंडापासून ब्रह्मांडाचा विस्तार कसा होतो, आपल्याच स्वरूपापासून या विश्वाची उत्पत्ती कशी होते, याचे रहस्य माझ्या लाडक्या मुक्ताबाईला छान उमगले आहे."

भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र

भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र या प्रांतांचे रहस्य यानंतरच्या एका अभंगात ओझरते दिसते. तो अभंगसुद्धा अद्वैतस्थितीचे वर्णन करण्याच्या भरात ज्ञानदेवांद्वारे प्रकटला आहे.

१) गुजगुजीत रूप सांवळे सगुण।
अनुभवतां मन वेडें होएं।।१।।
भ्रमरगुंफा ब्रह्मरंध्र तैं सुरेख।
पाहतां कवतुक त्रैलोक्यीं।।२।।
आनंदस्वरूप देखिलें प्रसिद्ध।
निजरूप संचलें सर्वां ठाईं।।३।।
ज्ञानदेओ म्हणे या सुखाचिं गोडि।
अनुभवचि आवडिं सेविं रया।।४।।अ.क्र.७७२।।

याचप्रमाणे सहस्त्रदळबिंदू ही एक योगसंबंधित संज्ञा ज्ञानदेव वापरतात. तो अभंगही याबरोबरच पाहू याः

२) सहस्त्रदल बिंदु त्यात तेज दिसें।
तैं हो काए ऐसें सांघा मज।।१।।

जेथ नाम रूप वर्ण नाहीं बा रे।
तैं रूप बा रे चैतन्य बा रे।।२।।
ज्ञानदेओ म्हणे अनुभवाचि खूण।
जाणें तो सुजाण अनुभविआं।।३।।अ.क्र.७७३।।

"गगनांतरी राहणाऱ्या त्या काळ्या पुरुषाचे ते सावळे मनमोहक रूप पाहून मन वेडावते. असे हे सगुण रूप भ्रमरगुंफेतील ब्रह्मरंध्री पाहूनच ***"तुज सगुण म्हणो की निर्गुण रे।"*** असा भ्रम योगिजनांना होतो. हे आनंदस्वरूपच अवघ्या त्रैलोक्यात ओतप्रोत भरलेले आहे आणि सर्व भूतमात्रांच्या अंतर्यामी तेच विराजते. विश्व म्हणजे त्या प्रसिद्ध परमात्म्याचे ओतीव साकार मूर्त रूप आहे."

हा जो अनुभव ज्ञानदेवांना येत आहे, त्यात अवीट सुख आहे आणि साधकांनी त्या सुखाची गोडी चाखावी असे त्यांचे आग्रहाचे सांगणे आहे.

या अभंगात येणारे ***भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र*** या शब्दांचे साहचर्य पाहण्यासारखे आहे. यावरून असे स्पष्ट होते की ***भ्रमरगुंफा ही ब्रह्मरंध्राच्या सन्निकट* आहे. *अनुहत नाद* ज्याठायी येतो, ते स्थान *आज्ञाचक्रावरील बिंदूहीपुढील उन्मनी*पासून सुरू होते. *भ्रमरगुंजनासम अनुहत नाद हाच तो भ्रमरगुंफेतील नाद होय.* अर्धमात्रेच्या या प्रांतास *गगनगुंफा, गगनमहाल* अशाही नांवांनी ओळखले जाते.**

स्थूलमानाने यासच ज्ञानेशयोगप्रणालीत***भ्रमरगुंफा*** म्हणत असावेत. पश्चिममार्गीच्या गोल्हाटादी षट्‌चक्रांतील***भ्रमरगुंफा*** हे ब्रह्मरंध्राअलीकडील शेवटचे चक्र समजतात. त्याच्या अंती ***ब्रह्मरंध्र*** असते. या सर्व विश्लेषणावरून ***भ्रमरगुंफा*** हे कोणत्या तरी चक्राचे नाव असावे असा कयास करता येणे जरा अवघडच वाटते. त्यापेक्षा ***बिंदू ते सहस्त्रारचक्र -ब्रह्मरंध्र*** या संपूर्ण प्रांतासच ***भ्रमरगुंफा*** असे स्थूलमानाने म्हणणे शक्य आहे. अनुहतनादाच्या त्या प्रांतात होणाऱ्या अभिव्यक्तीस अनुरूप असेच हे म्हणणे दिसते.

त्यातही उन्मनीपलीकडील जो प्रांत आहे, जो गोल्हाटादी चक्रप्रणालीत औटपीठानंतरचा आहे आणि थेट *ब्रह्मरंध्र -महाशून्य ते निरशून्य असा महाकारणदेह* स्थित आहे, त्यासच विशेषेकरून *भ्रमरगुंफा* म्हणणे सयुक्तिक ठरेल. असो.

सहस्त्रदलात असणारा बिंदू कोणता याचीही उकल ज्ञानदेवांच्या *अभंग क्र. ७७३* वरून होते. त्या बिंदूत तेज दिसते; तेथे नाम-रूप वर्ण नाहीत; ते तेज म्हणजे चैतन्यच! असे ज्ञानेश म्हणतात. अर्थातच ***हा सहस्त्रदलसंबंधित बिंदू ब्रह्मरंध्री असला पाहिजे,*** असे अनुमान करावे लागते. त्या तेथून पुढचा प्रांत नामरूपातीत परब्रह्माचा असतो.

वर्ण म्हणजे स्थूल-सूक्ष्म-कारण-महाकारण देहांचे योग्यांच्या प्रतीतीस येणारे ***ताम्र-पीत-श्वेत-श्याम*** हे जेथे नाहीत, असा हा ***महाशून्याचा प्रांत*** आहे. तो **सहस्त्रदळकमलस्थित ब्रह्मरंध्रबिंदुपासून सुरू होतो.** म्हणून **ब्रह्मरंध्रासही *महाशून्य* अशी यौगिक संज्ञा दिली जाते**, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. असो. ज्ञानेश म्हणतात की चैतन्याचे तेज ज्याने पाहिले आहे, तोच खरा सुजाण आत्मज्ञानी!

मकाराची नड

आत्मानुभूतीपर असे अजूनही काही अभंग पुढे दिले आहेत. चैतन्य लक्षिणाऱ्या साधकांना ते उद्बोधक ठरतात.

१) **कोणाचें हें रूप देह हा कोणाचा।**
आत्माराम सांचा सर्व जाणें।।१।।
मी तूं हा विचार विवेकें शोधावा।
गोविंद हा घ्यावा याचि देहिं।।२।।
ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटीवेगळां।
सहस्त्रदलीं उगवला सूर्यु जैसा।।३।।
ज्ञानदेओ म्हणे नयनांतील रूप।
या नांव चित् पद तुम्हीं जाणा।।४।।अ.क्र.७७४।।

२) ***डोलियांत डोला काळियांत काळा।***
देखण्या निराला निलारूप।।१।।
ब्रह्मतत्त्व जाणें ज्योतिरूपें सगला।
ज्योतिहिं वेगलां ज्योति वसें।।२।।
ज्ञानदेओ म्हणे देवा ऐसिं ज्योति।
अर्धमात्रा उत्पत्ती सर्वां जीवां।।३।।अ.क्र.७७५।।

३) **सद्गुरु निवृत्ति दिसतो घनदाट।**
सुषुप्तिचां घांट वेधितांचि।।१।।
आत्मा माया शिव शक्तीचें हें रूप।
दिसतें चिद्रूप अविनाश।।२।।
ज्ञानदेओ चढे ऐसिं वाट देख।
आकाशिं असें मुख तिचें कैसें।।३।।अ.क्र.७७६।।

"हा देह, हे विश्व हे सर्व कशापासून झाले आहे, ते जाणून घ्यावे. हे सर्व आत्माच आहे, हा विचार विवेकाने उमगतो. आत्मानात्मविवेक साधून या देहातच गोविंदास प्राप्त करावे. ध्येय-ध्याता -ध्यान या त्रिपुटीविरहित असणारा तो गोविंद आम्हाला सहस्त्रदलकमलात सूर्याप्रमाणे उगवलेला दिसतो."

"ज्ञानचक्षू प्राप्त झाला की त्यात त्याचे जे रूप दिसते, त्यास ***चित् पद*** म्हणून ओळखावे. कोणी त्या रूपास ***दिव्य चक्षू*** असे म्हणतात, तर कोणी त्यास घननीळ स्वरूपात पाहतात. ते रूप अरूप आहे, तरीही गुजगुजीत घनदाट नीलप्रकाशमय असे योगिजनांस भासते. कोणी या ***नयनातील ज्योती*** स ***परब्रह्म***च समजतात. पण खरे तर त्या ज्योतीहून निराळे, त्या तेजाहून वेगळे, त्या श्यामल रूपाहूनही भिन्न असणारे ते तत्त्व त्या सर्वांच्या रूपाने दिसते. ही ***जी अर्धमात्रेवर ज्योती दिसते,*** तिच्यापासूनच या सर्व विश्वाची व त्यातील जीवमात्रांची उत्पत्ती झालेली आहे."

ज्ञानदेव तर म्हणतात की त्यांचे सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथच या ज्योतीच्या रूपाने त्यांच्यापुढे साक्षात अवतीर्ण झाले आहेत. हा साक्षात्कार त्यांना ***सुषुप्तीचा घाट*** म्हणजे **आज्ञाचक्रातील *मकाराचा अवघड सोपान*** ओलांडल्याबरोबर झाला.

आज्ञाचक्रातील ***मकाराची नड*** या नावाने ओळखला जाणारा प्रांत योगिजन आक्रमण करून जाण्यास अवघड समजतात. त्यासच अनुलक्षून ***सुषुप्तीचा घाट*** किंवा ***मकारांत सोपान*** हे शब्द ज्ञानेश उपयोजित आहेत. एकदा हा घाट चढून गेले की साधकाचा आज्ञाचक्रस्थ बिंदुस्थानी प्रवेश होतो आणि अर्धमात्रेच्या प्रांतात त्याचे आगमन होते. तेथून साधकास आत्मा व माया ही किंवा शिव व शक्ती ही भिन्न असल्याचे प्रतीत होत नाही. ही सर्व चिद्रूप अशा त्या अविनाशी तत्त्वात लीन झालेली आहेत, अशी त्या वेळची प्रचिती असते.

परेचे शिखर

ज्ञानदेव म्हणतात की ते ही अशी ***वाट*** चढून जाताहेत की जिचे गंतव्यस्थान अकाशात आहे. ***आकाशी असणारे त्या वाटेचे मुख*** म्हणजे सुषुम्नेचे ब्रह्मरंध्रस्थ द्वार, ज्याला दशमद्वार असे म्हणतात ते! हे ***आकाश*** म्हणजे मागे आपण ***गगनमहाल, गगनगुंफा किंवा भ्रमरगुंफा*** या नावांनी उल्लेख केलेला प्रांत आहे, हे सूज्ञांस लागलीच समजते. ज्ञानदेवही त्याचा निर्देश करत म्हणतात की:

परेच्या शिखरावरी **वस्ती माझी जाहाली।**
समरसें विरालीं मज माझिं।।१।।
आत्मदशे योगी लक्ष लाविति देहिं।
ब्रह्मरंध्र **पाहिं सत् पद तैं।।२।।**
अणुरेणु शून्य गगना तेजें दिसें।
निरंतर वसें निरंतर।।२।।
ज्ञानदेओ म्हणे वृत्ती *सहस्रदलीं* लावा।
मसुरमात्र बरवा ध्यायीं जाईं **।।३।।अ.क्र.७७७।।**

"योगसाधनेमुळे मला परेच्या शिखरावर असणाऱ्या योगियांच्या घरी वास करायला मिळाला आहे आणि माझा अहंकार विरून गेला. आत्मदशा प्राप्त झालेल्या योग्यांना देहातच ब्रह्मरंध्री सत्पद प्राप्त होते. अणुरेणूरहित असणाऱ्या आकाशतत्त्वात लय साधून योग्यांना गगनगुंफेत जे तेज दिसते, त्यातच अखंड असा त्या सद्वस्तूचा वास असतो. सहस्रदलकमळी मसुराकार दिसणाऱ्या त्या तेजाचे ध्यान करून योगी ब्रह्मपदी लीन होतात. ***ज्ञानदेव ज्या वाटेने जात आहेत, तिचे आकाशाकडील मुख म्हणजे ब्रह्मरंध्रच असले पाहिजे,*** हे यावरून अनुमानता येते. असो.

पंथराजाचा इतर योगांशी समन्वय

यानंतर अष्टांगयोग व कुंडलिनीयोगासह ***पंथराज*** या दोन्हींचा समन्वय करणारे ज्ञानेशांचे अभंग पाहू या.

१) ***नासिकेचां प्राण कोण मार्गिं येत।***
नाद दुमदुमित अनुहातिं।।१।।
इडा पिंगळेचां ओघ सैर दिसतसें।
तयावरी प्रकाशें आत्मतेज।।२।।
ज्ञानदेओ म्हणे *अष्टांग योगियां।*
साधितो उपाया याचि मार्गें **।।३।।अ.क्र.७७८।।**

२) **प्रणवाचें भेद उकलावें देहांत।**
चंद्राचिं मी मात सांघतसें।।१।।
सहस्रदलावरी तेज शुद्ध असें।
त्या तेजें प्रकाशें चंद्र बापा।।२।।
उन्मनीचें ध्यासें सहस्रदल गाजें।
पश्चिममार्गीं बीजें दोन असति।।३।।
लक्ष लाविं ज्ञानदेओ एकलाचि।
शुद्ध ज्योती तोचि जाणें।।४।।अ.क्र.७७९।।

३) **मन हें लावा हें सालयीं निरुतें।**
सहस्रदलावरुतें परेजवळीं।।१।।
अनुहात नाद ब्रह्मस्थानीं असें।
तेथ रूप कैसें सांघा मज।।२।।
ज्ञानदेओ म्हणे तैं स्वरूप जो जाणें।
त्यासिं शरण होणें अनन्यभावें।।३।।अ.क्र.७८०।।

नासिका याचा लौकिक अर्थ नाक असा जरी असला आणि ***प्राण*** याचा अर्थ असाच श्वसनाद्वारे घेतला जाणारा प्राणवायू असा जरी सामान्य लोक करत असले, तरी योगपरिभाषेत यांचे वेगळेच अर्थ आहेत. **नासिका हे *आज्ञाचक्रस्थान* आणि प्राण म्हणजे *प्राणशक्ती*** असे ते अर्थ या अभंगात अभिप्रेत आहेत.

आज्ञाचक्री योगनाड्या इडा व पिंगला तसेच सुषुम्ना एकत्र येतात, हे योगजिज्ञासूंना विदितच आहे. त्यापुढे आकाशमार्गे सुषुम्ना नाडी ब्रह्मरंध्रापर्यंत पोहोचते आणि त्याठायी आत्मतेज प्रकाशत असते, असा योग्यांचा अनुभूतीपूर्ण दाखला आहे.

या अभंगातून ज्ञानदेव ***अष्टांगयोग*** म्हणजे पतञ्जलीप्रणीत ***यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि*** **अशा आठ अंगांचा योग कसा साधला जातो**, हे सांगतांना स्पष्ट म्हणतात की, "**प्राणशक्ती *आज्ञाचक्री* कोणत्या मार्गाने येते, ते पहा. *इडा व पिंगला यांच्यामार्गे ती शक्ती मूलाधार ते आज्ञाचक्र असे आवागमन करत असते,* हे योग्यांस माहीतच आहे. हीच प्राणशक्ती एकवटून सुषुम्नेत प्रवेशते. या सुषुम्नेच्या अंती असणाऱ्या ब्रह्मरंध्री आत्मतेज प्रकाशत असते. तेथे *अनुहत नाद* दुमदुमतो. *तेथे त्या प्राणशक्ती चामुंडेला नेले की अष्टांगयोग सिद्ध होतो.*"**

या ज्ञानदेवांच्या म्हणण्याप्रमाणे आपणास पतञ्जलिप्रणीत योग – *पातञ्जलयोग वा अष्टांगयोग* - या नांवानी प्रसिद्ध असणाऱ्या योगधारेचे खरे रहस्य समजून येते. त्यावरून त्या योगाचे आणि *हठयोग* तसेच *पंथराज* यांचे किती साधर्म्य आहे, हेही कळून येते.

या ज्ञानदेवांच्या अभंगावरून **असे स्पष्ट दिसते की *या तिन्ही योगप्रणालीत अत्यल्प फरक जरी यदाकदाचित असला, तरी मूलतः त्यांच्यात कोणताही मोठा भेद नाही.*** असो.

आज्ञाचक्रापुढील मार्ग नंतर दिग्दर्शित करत ज्ञानदेव म्हणतात कीः **पश्चिममार्गी दोन बीजे असतात. आज्ञाचक्राची दोन दले म्हणजे *हं* व *क्षं* ही होत. त्याहीपुढे जाता *हंस* पदाची *हकार* व *सकार* ही दोन बीजे असतात.**

ब्रह्मरंध्र ते आज्ञाचक्र या प्रांतात जीव-शिव सम असतात. आज्ञाचक्र ते मूलाधार या प्रभागात जीव प्रबल असतो व संसारासक्तीमुळे तो मायापाशात गुरफटून राहतो. ब्रह्मरंध्रापुढे शिव व जीव एकरूप असतात. संसार उरत नाही.

सकार शिवाचा तर हकार जीवाचा अशी ही दोन बीजे आहेत. एक बीज मूल आहे, तर दुसरे संसाराचे आहे, असा भाव येथे अभिप्रेत आहे. ***सकार व हकार ही ॐकार व प्रणव यांची मूलस्थ आहेत. हकाराचे प्राबल्य*** होण्याच्या अवस्थेत ***ॐकार*** प्रकटतो आणि ***सकार व हकार सम होतांना प्रणव आविष्करतो,*** असाही एक विचार सांगता येतो. थोडक्यात म्हणजे ***ॐकार व प्रणव हे संसारसापेक्ष ब्रह्मस्थितिनिदर्शक संकेत आहेत.*** याचे गूढ योगी स्वतःच्या देहात उलगडतात, जेव्हा ते या पश्चिमेच्या प्रांतात प्रवेशतात.

पश्चिममार्ग *आज्ञाचक्र ते ब्रह्मरंध्र* असा आहे. या मार्गावर येणारे **चंद्रस्थान म्हणजे *अर्धेंदु* अथवा *अर्धचंद्र.*** याठायी योगी जी ज्योत लक्षितो, ती आत्मरूप असते. पण खरे तर **शुद्ध ज्योत म्हणजे आत्मा वस्तुतः सहस्त्रदळी ब्रह्मरंध्रातच असतो.** त्या ज्योतीच्या प्रकाशाने ही चंद्रस्थानीची ज्योत प्रकाश पावते. म्हणून सहस्त्रदळावर असणाऱ्या शुद्ध तेजाने चंद्र प्रकाशतो असे ज्ञानेश म्हणत आहेत.

त्या **शुद्ध तेजाकडे जाणारा मार्ग उन्मनीतून जातो. या मार्गाने जात असता *प्रारंभी क्षीण असणारा अनुहत नाद गर्जनारूप होतो.* त्या आवाजाने सहस्त्रदळ गजबजून जाते. *त्या नादाचे विशुद्धातिविशुद्ध रूप ब्रह्मरंध्रीच प्रकटते असे ज्ञानदेव सांगतात.***

उन्मनी प्राप्त व्हावी हा ध्यास असावा असे ज्ञानदेव म्हणतात. शंकराचार्यांनीही आपल्या ***सौंदर्यलहरी*** या ग्रंथातून तसेच ***योगतारावली***मधून या उन्मनी अवस्थेचे महत्त्व विशद केलेले आहे, हे येथे नमूद करण्यायोग्य आहे.

ज्ञानदेव म्हणतात की या मार्गाने जाण्याचे एकमात्र ध्येय त्यांच्यापुढे आहे आणि शुद्ध आत्मज्योती कशी प्राप्त करून घ्यावयाची हे त्यांना एकट्यांनाच ज्ञात आहे. हे त्यांचे प्रतिज्ञोत्तर ऐकून आपणास ***ज्ञानेश पंथराजाची कास धरण्यास सुचवत आहेत, त्याव्यतिरिक्त विशुद्ध आत्मज्ञान प्राप्त होणार नाही असे त्यांचे निश्चयात्मक सांगणे आहे,*** असे दिसते. या त्यांच्या विधानावरून खरा साधनामार्ग कोणता आहे, त्याचे उत्तर मिळते. ***पंथराज हाच तो खरा साधनामार्ग असा निर्वाळा या अभंगातून सुज्ञांस प्रतीत होतो.***

अर्धमात्रेच्या प्रांतातील ध्येय्य वस्तू

नंतरच्या अभंगात *(क्र.७८०)* हे लक्ष्य अधिक स्पष्ट केले आहे. ***सहस्त्रदळावर परेच्या जवळ असणाऱ्या आत्मरूपाठायी मन लावावे असा स्पष्ट निर्देश ते देतात.* हे आत्मरूप ब्रह्मस्थानी असते म्हणजे *महाशून्य* हे त्याचे वसतिस्थान आहे. तेथे अनुहत ध्वनी नांदत असतो.** म्हणजे या प्रांतातून आत्म्याकडे जात असता अनुहत नाद प्रतीत होतो. तेथे कोणती ज्योती आणि कोणते रूप ध्यायावे असा प्रश्न आहे. ज्ञानेश तेथे स्वरूपध्यान सांगतात. पण हे ध्यान कसे करावे, हे समजावे म्हणून साधकांस स्वरूपज्ञानी सद्गुरूंना शरण जाण्याचे ते सुचवत आहेत.

पंथराज व पश्चिमपथ यांच्या खाणाखुणा::::

चिद्विलासवादाचा उगम

यानंतर **पंथराजा**च्या खाणाखुणा वर्णन करणारे काही अभंग पाहू या.

१) *महावाक्यार्थ तैं शून्य कैसें बापा।*
सत्वर नयनीं पाहा आत्मप्रभा।।१।।
प्रभा शीत उष्ण दोहिंचेंहीं सार।
प्रणव हा सारासार आरुता रया।।२।।
ज्ञानदेओ म्हणे सोपानातैं ऐसें।
निराकार असें आकारेंसि **।।३।।अ.क्र.७८१।।**

२) *दशमद्वार अग्र शून्य गगनीं।*
जेथ असे उन्मनी अखिल रूपें।।१।।
द्विविध भाग पिंडीं द्विविध ब्रह्मांडीं।
यातीं पडिपाडीं ब्रह्मरंध्रीं।।२।।
ज्ञानदेओ म्हणें शून्यातील रूप।
अनंत ब्रह्मांडे जेथ आहाति।।३।।अ.क्र.७८२।।

३) *जडांतील शुद्धांश कवतुकें रिझाला।*
निवृत्तिनें दाविला कृपा करूनि।।१।।
अनुहत भेद दाविला कृपेने।
सर्व हें चैतन्य गमलें तेव्हां।।२।।
ज्ञानदेओ नयनीं निवृत्तीचे पदीं।
आनंद ब्रह्मपदीं एक जाहाला।।३।।अ.क्र.७८३।।

तत्त्वज्ञानाचा कितीही अभ्यास केला, कितीही शांकरवेदांत पढला, अन्य आत्मानात्मविवेकपर ग्रंथ अभ्यासले, परोक्षज्ञान कितीही का होईना, मिळवले, कितीही प्रवचने केलीत किंवा ऐकलीत, पांडित्यादी व्यासंग केला, तरी साक्षात्काराच्या दृष्टीने ते सगळे अत्यंत फोल असते असा या अभंगाचा एक अभिप्राय आहे.

"तत् त्वम् असि", "अहं ब्रह्माऽस्मि", "सर्वं खलु इदं ब्रह्म" ही काही महावाक्ये आहेत. जीव, जगत व ईश्वर किंवा ब्रह्म यांचा परस्परसंबंध या महावाक्यांनी सूचित होतो. **सद्गुरू शिष्याला या महावाक्यांचा अर्थपूर्ण व *अनुभूती देणारा* उपदेश देतात.**

ज्ञानेश म्हणतात की: "वाच्यार्थाने ही महावाक्ये फोलच होत. त्यांचा खरा अर्थ शून्याच्या अनुभूतिविना समजत नाही. ही अनुभूती घेण्यासाठी सत्वर ***पूर्वमार्ग म्हणजे मूलाधार ते आज्ञा*** ही चक्रे लंघावी आणि नयनी म्हणजे आज्ञाचक्रस्थ बिंदुस्थानी असणाऱ्या तृतीय नेत्री जी आत्मप्रभा दिसते, ती पाहावी."

प्रभा म्हणजे सुषुम्ना, शीत म्हणजे इडा वा चंद्रनाडी आणि उष्ण म्हणजे सूर्य वा पिंगलानाडी. इडा व पिंगला या योगनाड्या संसाराच्या आवागमनाच्या निदर्शक आहेत. याच नाड्या उलटल्या म्हणजे त्यांची वक्रगती त्यागून सुषुम्नेशी एकरूप झाल्या, की संसाराचे आवर्त संपवणाऱ्या सुषुम्ना नाडीत जीवाचा प्रवेश होतो. म्हणून शीत उष्ण म्हणजे **संसाराभिमुख अशा या दोन्ही *इडा व पिंगला* नाड्यांचे सार खरे तर संसार असार करून देणाऱ्या *प्रभा* किंवा सुषुम्नेत आहे.**

या नाडीने जेव्हा जीव ऊर्ध्वगतिक होतो, तेव्हा ***प्राणाचा प्रणव* होतो.** अर्थात कुंडलिनी जागृत होऊन योगदृष्ट्या अग्रेसर होते. म्हणून या तिहींचेही सार म्हणजे ***कुंडलिनी*** होय. हिच्याच प्रभावाने जग विस्तारते आणि लय पावते. यासाठीच **प्रणव वा जागृत कुंडलिनी ही निराकार व साकार यातला दुवा आहे.** कुंडलिनीच्या संबंधाने निराकार साकार होते, असा भाव यात आहे.

पंथराजसाधना ही उत्थापित कुंडलिनीवर आधारलेली आहे, हे आपणास ज्ञातच आहे. ज्ञानेश ***या शक्तीला दशमद्वारी न्यावे*** असे म्हणतात.***दशमद्वार म्हणजे ब्रह्मरंध्र.*** हे सुईच्या अग्रासारखे सूक्ष्म असते. हे ***शून्य किंवा महाशून्य*** म्हणूनही ओळखले जाते. ते गगनगुंफेच्या अंती असते.

तेथे ***उन्मनी वा सत्राव्या*** कलेचे वास्तव्य असते. याच कलेतून जगातील अखिल रूपे प्रसवतात. ***ब्रह्मरंध्री पिंड व ब्रह्मांड हे सम असतात. म्हणजे तेथे अर्धा भाग जीवाचा तर अर्धा भाग शिवाचा असे संमीलन असते.***

ज्ञानदेव म्हणतात की "शून्यात जे रूप वा स्वरूप अवस्थित असते, त्याच्या पोटात अनंत ब्रह्मांडे समावलेली आहेत. ते स्वरूपच अशा प्रकारे ब्रह्मांडाचे बीज आहे."

जड विश्वातील शुद्ध अंश किंवा चिदंश तो हे स्वरूपच असतो, हे निवृत्तिनाथांच्या कृपेने ज्ञानदेवांना आकळले आहे. अनुहत नादाचे योगरहस्य त्यांनीच ज्ञानेशांना स्पष्ट केले आणि योगानुभूती दिली. त्यामुळे ***"विश्व ब्रह्मचि केले"*** अशी अनुभूती त्यांना आली.

ज्ञानेशांचा ***चिद्विलासवाद*** याच अनुभूतीतून उगम पावला असला पाहिजे. कारण हे सर्व चैतन्यच आहे अशी साक्षात अनुभूती त्यांना निवृत्तिकृपेने प्राप्त होऊन ***निवृत्तिपद व ब्रह्मपद*** यातील अभिन्नत्व त्यांना गमले. म्हणून आनंदाची प्राप्ती त्यांना निवृत्तिचरणी प्राप्त झाली असे ते म्हणतात. ही अनुभूती घेत ते नयनी स्थिरावलेत. येथे ***नयन म्हणजे ब्रह्मरंध्र*** असा अर्थ अभिप्रेत आहे.

प्रणवाचे स्वरूप

मागे आपण ॐकाररहस्य पाहिले *(उन्मेष:३७:ॐकार व प्रणव पृ.क्र.५६१ ते ५८३).* ***ॐकार व प्रणव*** यांना बऱ्याचदा समानार्थक समजले जाते. परंतु ज्ञानेशयोगप्रणालीत त्यांच्यात सूक्ष्म भेद आहे, असे जाणवते. वरील अभंगांच्या विवरणात ***ॐकार, प्रणव व कुंडलिनी*** यांचा संबंध ओझरता उल्लेखला आहे. ***प्रणवाचे*** ज्ञानेशमते जे ***स्वरूप*** आहे, ते स्पष्ट व्हावे यासाठी काही अभंग आपणास पहावयाचे आहेत. त्यांची पूर्वपीठिका असे अजूनही काही ***पंथराजसंबंधित अभंग*** पाहून मग तिकडे वळू या.

भक्तीचे नवविध अमृतजळ व त्याचे यौगिक रहस्य

१) ***नवाआंत ओंवरी औटपीठाजवळीं।***
शून्यातील काळीं सुकुमार।।१।।
अंगुष्ठ पूर्वार्ध मसुरमात्र दीर्घ।
उन्मनीचा मार्ग तैंचि ठाईं।।२।।
ज्ञानदेओ म्हणें पूर्वार्धांतील गीर।
सर्व हें साचार विश्व दिसें।।३।।अ.क्र.७८४।।

२) **भ्रुवामध्ये तेज चंद्रसूर्यविरहित।**
आदि मध्य अंत संचलेसें।।१।।
तुर्यारूपें तैं सुषुम्ना प्रकाशली।
नवविध अमृतजलीं तेयां तेजां।।२।।
ज्ञानदेओ वदे अष्टांगयोग साध।
पावाल ब्रह्मपद याचा भेद **।।३।।अ.क्र.७८५।।**

३) ***पश्चिममार्गें खूण बीजें दोन साजिरीं।***
अविनाश ओंवरी योगियांचिं।।१।।
त्रिकूट श्रीहाट चंद्रसूर्य जाणा।
पश्चिममार्गीं खूण याचि की रें।।२।।
ज्ञानदेओ म्हणें बीजें दोन बापा।
पाहें आत्मरुपा तेथ बा रे।।३।।अ.क्र.७८६।।

"नवद्वारे पुरे देही" म्हणजे मनुष्यदेहास नऊ द्वारे वा छिद्रे आहेत. ***दशमद्वार* ब्रह्मरंध्रास म्हणतात.** या नऊ द्वारे असलेल्या ***देहाची ओवरी म्हणजे त्यात प्रवेश करण्याची जागा औटपीठाजवळ असते. तेथे शून्याच्याही अतीत असे सावळे श्रीकृष्णरूप विराजते.*** याठायी ते रूप मसुरमात्र आकाराचे तेजबिंदुस्वरूपाचे दिसते, तर तत्पूर्वी आज्ञाचक्री ते रूप अंगुष्ठमात्र आकाराने दिसते. **आज्ञाचक्र ते ब्रह्मरंध्र यातूनच उन्मनीकडे जाण्याचा मार्ग असतो.**

ज्ञानदेव म्हणतात की "हे अंगुष्ठमात्र ज्योतिरूपच सर्व विश्व झाले आहे. भ्रूमध्यभागी जे हे तेज दिसते, ते चंद्र म्हणजे इडा आणि सूर्य म्हणजे पिंगला या नाड्यांचे नाही. त्या तेजात आदि म्हणजे अकार, मध्य म्हणजे उकार आणि अंत म्हणजे मकार अशा ॐकाराच्या तिनही मात्रा संचल्या आहेत. जागृति-स्वप्न-सुषुप्ति

या तिन्ही अवस्थांच्या किंवा साकार विश्वाच्या या मात्रा निर्देशक म्हणून ओळखल्या जातात. म्हणजे ***अंगुष्ठमात्र ज्योतीतून हे विश्व साकारते."***

तुर्या ही सुषुम्ना नाडीस प्रकाशवणारी अवस्था आहे. **सुषुम्नेस या *तुर्या*नामक ॐकाराच्या अमात्रेचा प्रकाश मिळतो,** असे ज्ञानेश म्हणतात. **नवविधा भक्तिरसाच्या जळास त्या तेजाने अमृतत्व प्रदान केले आहे.** ज्ञानदेव साधकांस म्हणत आहेत की ***अष्टांगयोग साधून ब्रह्मपद प्राप्त झाले की याचे रहस्य आकळून येते.***

या अभंगाद्वारे भक्तिसिद्धांतांनी गौरवलेली, नारदभक्तिसूत्राने आणि शांडिल्यादी प्रभृतींनी गायिलेली, प्रल्हादमुखे श्रीमद्भावतात सांगितलेली प्रख्यात ***नवविधा भक्ती*** ही योगमार्गाशी कशी अभिन्न आहे आणि तिच्या प्राप्तीचा मार्ग हा योगमार्गच कसा आहे, हे स्पष्ट दिसून येते. **अष्टांगयोगाने *(म्हणजेच येथे पंथराजाने)* जेव्हा साधक ब्रह्मपद पावतो, सहस्त्रदळी विराजतो, तेव्हाच त्याला जी तुर्यातीतावस्था प्राप्त होते, तीच ही ख्यातनाम नवविधा भक्ती होय. तुर्येच्या प्रकाशात ही भक्ती अमृतत्व पावते,** असे ज्ञानेश म्हणतात, ते याच अर्थी!

श्रवण, स्मरण, अर्चन,कीर्तन, वंदन, पादसेवन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन, इ.नवधा भक्तीचे प्रकार भक्तिशास्त्रात प्रमुख म्हणून गणले जातात. ***वात्सल्य, कांतासक्ती*** असेही काही प्रकार धरून कोणी भक्तिमार्तंड अकरा भक्तिप्रकार मानतात. यातील विविध संप्रदाय वा ***नारदभक्तिसूत्रे, शांडिल्यभक्तिसूत्रे*** इ.ना उभयमान्य असे प्रमुख नऊ भक्तिप्रकार विश्रुत आहेत. त्यांनाच या अभंगात ज्ञानेश ***नवविध अमृतजळ*** असे म्हणत आहेत. नारदसुद्धा भक्तीला ***"अमृतस्वरूपा च।।३।।ना.भ.सू.।।"*** असे म्हणतात.

या अभंगात ज्ञानदेव सूचित करताहेत की ***तुर्येचा म्हणजे सुषुम्नास्थित कुंडलिनीचा प्रकाशच असा नवविध प्रकारच्या भक्त्यमृतजळाने विकसत असतो. या अवस्था अष्टांगयोगांतर्गत असल्याचेही ते स्पष्ट करतात.*** यावरून असे दिसून येते की **साधक जेव्हा *धर्ममेघ* समाध्यवस्थेत जातो, तेव्हा ही खरी भक्ती प्रकटते. *योग्याचा जेव्हा बिंदुपासून उन्मनीपर्यंतचा प्रवास सुरू होतो, तेव्हा या भक्तीची उच्चतर श्रेणी विशेषेकरून प्रकटते.***

पातञ्जलयोगसूत्रात ईश्वरप्रणिधानाचे अनन्यसाधारण असे जे महत्त्व आहे, तेही याच अनुषंगाने असल्याचे ज्ञानेशांच्या उपरोक्त दाखल्यावरूनही ध्यानात येते. कारण भक्ती हा प्रांत ईश्वरप्रणिधानावाचून संपन्न होणे अशक्यच आहे.

अष्टांगयोग भक्तिविवर्जित असल्याचा जो एक समज विद्वानात प्रचुर होऊ पाहत आहे; योग व भक्ती हे भिन्न साधनाप्रकार आहेत, असाही जो एक समज स्थिरावू पाहत आहे; तो साधार आणि अनुभूतिसापेक्ष नसल्याचे आपणास या ज्ञानदेवांच्या अभंगानिमित्ताने जाणवते. तसेच भक्तीचा कुंडलिनीशी व तिच्या योगाशी काहीही संबंध नाही, असे समजणाऱ्या आधुनिक भक्तिप्रापंचिकांचे मतही किती चुकीचे, अनभ्यस्त आणि अनुभूतिरहित आहे, तेही जिज्ञासूंच्या लक्षात येते.

तूर्त भक्तीविषयी एवढे विवेचन पुरे करू या. कारण आपणास अजूनही ज्ञानेश्वरीतील भक्तीवरील विवेचन मुळातून पाहावयाचे राहिले आहे. त्या वेळी हा विषय अधिक सविस्तर पाहता येईल. त्याच प्रसंगी भक्ती म्हणजे खरी काय याचाही नारद-शांडिल्यभक्तिसूत्रादी भक्तिशास्त्राच्या मान्यतम ग्रंथांवरून विचार करता येईल आणि भक्तीचे योगरहस्य किंवा योगाचे भक्तिरहस्य तेव्हा उलगडता येईल. असो.

पश्चिमपथाच्या खाणाखुणा

नंतरच्या अभंगात *(अ.क्र ७८६)* ज्ञानेशांनी ***पश्चिममार्गाच्या काही ठळक खाणाखुणा*** सांगितल्या आहेत. त्यांत **आज्ञाचक्राची दोन दले आणि त्यापुढची *सकार व हकार* ही हंसपदाची दोन बीजे, औटपीठाची अविनाश ओवरी म्हणजे ब्रह्मरंध्री प्रवेश करण्याची जागा, त्रिकूट, श्रीहाट ही शून्ये वा चक्रे, चंद्र-सूर्य म्हणजे इडा व पिंगला या नाड्या,** यांचा ज्ञानदेव अंतर्भाव करतात.

या निर्देशांवरून पुनश्च त्यांच्या योगमार्गाचे म्हणजे पंथराजाचे हठयोगाशी असणारे साम्य प्रकट होते. ज्ञानदेव आज्ञाचक्रावर **हंसपद**ात सम असणाऱ्या **जीव *(हकार)* आणि शिव *(सकार)*** यांच्याकडे पुनः निर्देश करत म्हणतात की या दोन बीजांतच आत्मरूप गवसते. असो.

प्रणव रहस्य

आता प्रणवासंबंधी ज्ञानदेवांचे जे अभंग पाहवयाचे राहिले होते, त्यांच्याकडे वळू या. ते म्हणतातः

१) इडा वाम दक्षिणे पिंगला।
दोहिंत कळा ब्रह्मस्थानीं **।।१।।**
प्रणव सैरा बापा धांवें अवघड वाटे।
रिघा नवपाटें जीव जीवना।।२।।
ज्ञानदेओ म्हणें हाचि कीरें प्रणव।
यापरता अनुभव नाहीं नाहीं।।३।।अ.क्र.७८७।।

२) प्रणवासिं रूप नाहिं काहिं छाया।
दशमें द्वारीं मूळमाया असें कीरें।।१।।
सहस्त्रदळीं वृत्ति लावितां निःशंक।
मनासिं भवासिं ऐक्यता तेथ।।२।।
ज्ञानदेओ म्हणे यापरतें नाहिं।
बोलण्याचि सोयि अनुभविं जाणें।।३।।अ.क्र.७८८।।

३) प्रणवच देह देह हा प्रणव।
कल्पेचां भाव कल्पूं नयें।।१।।
अंजनाचें सार तेच देह बा रे।
आत्मा परिपूर्ण सारे पाहति ज्ञानी।।२।।
ज्ञानदेओ म्हणे *प्रणव माझा पिता।*
अक्षर तैं माता **याचि भेदें।।३।।अ.क्र.७८९।।**

शरीराच्या वामभागी इडा व दक्षिणभागी म्हणजे उजवीकडे पिंगला या योगनाड्या आहेत. संसारासक्त मनाच्या पंधरा कला समजल्या जातात. या दोन नाड्या प्राणांचे अध आणि ऊर्ध्वगमन करवत मनास

त्या कलांचा भोग घडवतात. परंतु या **सर्व कलांचे उगमस्थान ब्रह्मरंध्री आहे. पंथराज योगसाधनेत प्राणांचा आमूलाग्र कायापालट होतो व ते मनासह सुषुम्नेत प्रवेशतात. जागृत कुंडलिनीयोगे हे घडते.**

मन, प्राणासह सुषुम्नेत प्रवेश केलेल्या कुंडलिनीस येथे प्रणव म्हटले आहे. पूर्वमार्ग उल्लंघून पश्चिममार्गाकडे जाणारी अवघड वाट या प्रणवासाठी नियोजिलेली आहे. नऊ द्वारांनी म्हणजे इंद्रियोपभोगांच्या नऊ वाटांनी जीव इतस्ततः धावत असतो. तोच या प्रणवाच्या प्रकटीकरणाबरोबर मूलस्थानाकडे म्हणजे जीवन देणाऱ्या मूलस्त्रोताकडे याच नऊ वाटांनी परत फिरतो, असा अभिप्राय येथे व्यक्त झाला आहे. यासच ***वृत्ती पालटणे, प्राणाचा प्रणव करणे, इडा-पिंगलांची गती पालटणे, उफराटे पाहणे,*** इ.अनेक योगशास्त्रीय संज्ञा आहेत.

ज्ञानदेवमते योगसाधकांना प्रणवाचे हे स्वरूप अशा प्रकारे व्यक्त होते. प्रणवाचे हे स्वरूप प्रकटणे यापरती श्रेष्ठ अनुभूती कोणती असणार! असे ते म्हणतात. पुढे ते असेही म्हणतात की **प्रणवास रूपही नाही तर छाया ती कोठून असणार! ॐकाराचे असे नाही. त्यास रूपही आहे आणि छायाही आहे,** असा गर्भितार्थ येथे आहे. ***अ,उ,व म*** **या तीन मात्रा हे ॐकाराचे रूप आणि संसार ही छाया, असा भाव त्यात आहे.**

पण प्रणव तसा नाही. म्हणजेच योग्यांना प्रणवाची जी अनुभूती जागृत कुंडलिनीमुळे येते, ती शब्दात सांगणे शक्यच नाही. ती स्वप्नवत असण्याहीपलीकडची आहे. कारण ***प्रणव*** **खरा तर** ***परब्रह्मच*** **होय.** त्या परब्रह्मास ना रूप ना छाया! त्याचीच प्रतिकृती अशी ***मूळ माया दशमद्वारी म्हणजे ब्रह्मरंध्री प्रकटून हे विश्व सर्जते आणि अंती सुप्ता कुंडलिनीच्या रूपात मूलाधारस्थानी साडेतीन वेटोळी घालून राहते.*** अर्थात परब्रह्माची छाया अशी जी मूळ माया व तिचा कुंडलिनीनामक अवतार यांना तरी रूप कोठून असणार! म्हणून हे ***विश्व, कुंडलिनी, मन, प्राण, जीव, मूळ माया ही सर्व परब्रह्माचीच रूपे असून ही सर्व प्रणवच आहेत,*** असा निष्कर्ष निघतो.

याची अनुभूती घेण्यासाठी सहस्त्रदळी असणाऱ्या स्वरूपाकडे योग्याने वृत्ती केंद्रित करावी. तेथे मन व विश्व यांचा पसारा स्वरूपी लीन होतो. ज्ञानदेव म्हणतात की ***योगरहस्य ते हेच आहे*** आणि याची जाणीव अनुभूतिप्राप्त साधकांनाच लाभते.

विश्व-ब्रह्मैक्याचा सिद्धांत प्रणवाधारे साकार करत ते पुढे स्पष्ट शब्दात सांगतात की ***"प्रणव हाच देह आहे आणि देह वा विश्व हेच प्रणव आहेत. हे सर्व स्वरूपच आहेत."***

"मनसैवेदमाप्तव्यं नेह नानास्ति किञ्चन। मृत्योः स मृत्युं गच्छति य इह नानेव पश्यति।।२-१-११।।कठ.।।" या कठोपनिषदातील मंत्राची आठवण उपरोक्त प्रणववर्णनावरून येणे स्वाभाविक आहे. आत्म्यामध्ये अनेकपणा नाही. असा अनेकपणा पाहणारा जन्ममृत्युच्या चक्रात अडकतो. पण शुद्धांतःकरणाने आत्म्याच्या एकतेचा अनुभव घेणारा कृतार्थ होतो, असे ***कठ*** म्हणते. ज्ञानेशही हे सर्व प्रणवच आहे, असे म्हणून ***कठवल्ली***चा प्रणवपुष्पाने आदर करतांना दिसतात. आणि ***हा प्रणवच त्यांच्या चिद्विलासवादाचे मूळ आहे,*** हे सूज्ञांस परतपरत सांगायला नकोच!

प्रणवाचे मन-प्राणासहित जागृत कुंडलिनी हे रूपही ज्ञानेशांनी मूर्त केले आहे. ***"प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्षमुच्यते। अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत्।।२-२-४।। मुं.।।"*** असा मुंडकोपनिषदातील मंत्र आहे. ***प्रणव हेच धनुष्य, आत्मा वा जीव हाच बाण आणि ब्रह्म हे लक्ष्य*** असे समजून अत्यंत दक्षतेने त्याचा वेध करावा. बाण जसा लक्ष्यात रुतून राहतो, तसे जीवाने ब्रह्मात बुडून जाऊन तन्मय व्हावे. या मंत्राचाही उत्तम अर्थ ज्ञानदेवांच्या उपरोक्त ***मन-प्राणासह जागृत कुंडलिनी म्हणजेच प्रणव*** या व्याख्येने प्रकट होतो.

पंथराजात प्राणासह जागृत कुंडलिनीचे धनुष्य कल्पून त्यावर सुषुम्नेची प्रत्यंचा चढवली आहे आणि जीवाचा बाण करून ब्रह्मरंध्रीच्या शिवाला लक्ष्य केलेले आहे, असे लाक्षणिक अर्थाने म्हणावेसे वाटते. ज्ञानेशांचे अभंग असेच काही तरी निर्देशितांना दिसतात. पण त्याहीपुढे जाऊन ***"सुवर्णाची अंबिका, सुवर्णाचा त्रिशूळ आणि सुवर्णाचा महिषासुर"*** या प्रकारचे अद्वैत पाहणारे ज्ञानेश प्रणवरूपी धनुष्य, जीवरूपी आत्मबाण व ब्रह्म यात भेद न पाहता, त्या सर्वात प्रणवच पाहतांना दिसतात.

त्यांचे स्पष्टच म्हणणे आहे की यात ***"कल्पेचां भाव कल्पूं नयें".*** म्हणजे कल्पनेने या जगताचे ब्रह्मसापेक्ष नानात्व जे दिसते, ते उगीचच त्यांच्या मूळच्या अभिन्नत्वावर लादू नये. ज्ञानांजनाचे सार जे ज्ञानच आहे, तो हा देह आहे. ज्ञानी याच दृष्टीने आत्म्याचे पूर्णत्व पाहतात. ***"ॐ पूर्णमदः। पूर्णमिदं। पूर्णात्पूर्णमुदच्यते। पूर्णस्यपूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।"*** हा ज्ञान्याचा जो बोध आहे, तोच ज्ञानेशांच्या ***"आत्मा परिपूर्ण सारे पाहाति ज्ञानी"*** या अभंगोक्तीत आहे.

ॐकार व प्रणव

ब्रह्म व मूळ माया ही दोन्ही प्रणवच आहेत, असे मानणारे ज्ञानेश म्हणूनच प्रणवरूपी जीवाचे माता-पिता हे दोघेही प्रणवच असल्याचे म्हणतात. ते हा बोध ठसवण्यासाठी पुढे म्हणतातः

१) ***प्रणवचि शक्ति शिवु प्रणवचि।***
क्षर अक्षर सांची प्रणव तैं।।१।।
त्रिकूट श्रील्हट गोल्हाट ब्रह्मरंध्र।
प्रणव निरंतर ऐक्य जाहाला।।२।।
ज्ञानदेओ आपण प्रणव जाहाला आदिं।
ध्यातां ब्रह्मपदीं प्रणवचि **।।३।।अ.क्र.७९४।।**

२) **स्थावर जंगम प्रणव प्रसवला।**
आत्मा स्वयें संचला प्रणवाठाईं।।१।।

अवस्था भुक्ति मुक्ति प्रणवचि जन्मतां।
अर्धमातृकेपरतां प्रणवचि।।२।।
ज्ञानदेओ म्हणें प्रणवाचें ठाइं।
प्रणवीं प्रणव पाहीं तो निरालाचि।।३।।अ.क्र.७९५।।

३) **प्रणवाचें आकाश असें सर्वांवरी।**
आकाशिं भरोवरी प्रणवाचि।।१।।
प्रणव जैं गुह्य ऋषियोगियांचें।
सर्वांवरीष्ठ सांचें वेदआज्ञा।।२।।
एक वेदांत सिद्धांतिं प्रणव तो तत्त्वतां।
ज्ञानदेओ वक्ता सांघतसें।।३।।अ.क्र.७९१।।

प्रणव हाच शिव आहे आणि शक्ती पण प्रणवच आहे. क्षर आणि अक्षर ही प्रणवच आहेत. प्रणवाच्या पंथराजसाधनेने ज्ञानदेव प्रथम प्रणव झाले आणि ब्रह्मपदी असणाऱ्या प्रणवाचे ध्यान करत प्रणवाचे अखंड वैभव उपभोगत आहेत. चराचर विश्व या प्रणवानेच प्रसवले आहे. ज्ञानदेव म्हणतात की त्या प्रणवाठायी आत्माच संचला आहे. जीव, भुक्ती, मुक्ती ही सर्व उपजतच प्रणव आहेत.

अर्धमात्रेअलीकडे-पलीकडे प्रणवच भरलेला आहे.

ज्ञानदेव म्हणतात की ***प्रणवाठायी प्रणवाने प्रणव पाहणारा विरळा आणि असामान्य असतो.*** भावार्थ असा आहे की ***ब्रह्माठायी प्रणवोपासनेने देहाचे अभिन्नत्व पाहणारा योगी धन्य होय. देह हा प्रणव म्हणजे ब्रह्म आहे, हे प्रणवोपासनेने म्हणजे कुंडलिनीयोगाने पाहणे अशी जी प्रणवोपासना आहे, ती पंथराजाशी*** कशी ***अभिन्न आहे,*** ते आपण वर पाहिलेच आहे. अशा या प्रणवाचे आकाश सर्व तत्त्वात असते. अर्थात वस्तुमात्रात प्रणव वा परब्रह्म यांशिवाय दुसरे काहीच नाही.

या ठिकाणी ज्ञानदेवांनी ***प्रणवाचा अर्थ परब्रह्म*** असा केला आहे. त्या दृष्टीने पाहिले तर कित्येकदा ***ॐकार व प्रणव*** यांचे विभिन्न अर्थ प्रचुर असल्याचे दिसते. कधी कधी तर ज्ञानेश ते समानार्थीसुद्धा वापरतात, असे वाटते. वेदांतसुद्धा ***ॐकार, प्रणव व उद्गीथ*** हे शब्द ***समानार्थी व ब्रह्मवाचक*** म्हणून येतात. ***"तस्य वाचकः प्रणवः।। १-२७।पा.यो.सू.।।"*** असे पतञ्जलींचे सूत्र पण सांगते.

गीतेतसुद्धा ***प्रणव व ॐकार*** यांची अशीच सरमिसळ आढळते. ***"वेद्यं पवित्रमोङ्कार..।।९-१७।।", "ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्माम...।।८-१३।।", "ॐ तत्सदिति निर्देशो...।।१७-२३।।", तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपक्रियाः।...।।१७-२४।।", "प्रणवः सर्ववेदेषु..।।७-८।।"*** अशी त्याची उदाहरणे आहेत. गीतेतील ***अक्षर*** या शब्दाचाही असाच आयाम आहे.

त्यातला थोडा फरक असा की ***ॐकार हे साकार ब्रह्म, तर प्रणव हे ब्रह्माचे मूळ स्वरूप आणि उद्गीथ म्हणजे गायिलेला ॐकार*** वा प्रणवार्थ गायन किंवा ब्रह्मस्वरूपाचे सामवेदीय वर्णन.

ज्ञानेशांच्या अभंग क्र.७६६ मध्ये ***"अकार उकार मकार ॐकार। प्रणव हा साकार सुरेख रे।"*** असे म्हणतांना ॐकार म्हणजे साकार प्रणव असल्याचे स्पष्ट केले होते. म्हणजे देह वा बाह्य जगत हे ॐकार व ब्रह्म हे प्रणव असल्याचा त्यांचा अभिप्राय दिसतो. वरील अभंगातून (क्र.७९५) ***"प्रणवाचें ठाईं। प्रणविं प्रणव पाहिं।"*** असे म्हणून देह वा विश्व हे प्रणव, ब्रह्म हे प्रणव व योगसाधना हीही प्रणव असल्याचे दर्शविले आहे. हे सर्व बारकावे नीट लक्षात घेण्यासारखे आहेत. असो.

प्रणवोपासना

ज्ञानदेव म्हणतात की प्रणव हे ऋषी व योगी यांचे गुह्य आहे. ***वेदाज्ञेप्रमाणे प्रणव सर्वश्रेष्ठ आहे. वेदांतातील सुप्रसिद्ध सिद्धांताकडे निर्देश करत ज्ञानदेव सांगतात की तत्त्वतः हे सर्व तो एकलाएक प्रणवच आहे.*** प्रणवाच्या उपासनेचा पंथ कोणत्या मार्गाचा आहे यावर प्रकाश टाकणारे अजून काही अभंग पाहू या. त्यांवरून ***पंथराज व प्रणवोपासना*** **यांचे साधर्म्य आणि एकरूपत्व** स्पष्ट होते.

१) *पश्चिममार्ग बापां प्रणव कीं हें सांघ।*
जेथ असें महालिंग तेजोमय।।१।।
चंद्रातील जळ सत्रावी केवळ।
नादबिंदा कल्होळ गर्भीं जाहाला।।२।।
ज्ञानदेओ म्हणे देह हा दुर्लभ।
त्रैलोकी सुलभ भजनाचा हां।।३।।अ.क्र.७९०।।

२) **अमृताचिं क्षीर ब्रह्मांडभुवनीं।**
पाहातिं त्रिभुवनीं नवल जाहालें।।१।।
नादबिंबां भेटी जाहाली कवण्या रीतीं।
शुद्ध ब्रह्मज्योति संचलिसें।।२।।
प्रकृति पुरुष शिवशक्तिभेद।
त्याचे शरीरीं द्वंद्व देह जाणा।।३।।
ज्ञानदेओ म्हणे पिंडीं शोध घ्यावा।
ब्रह्मासिं पाहावा ब्रह्म ठंसा।।४।।अ.क्र.७९३।।

३) **प्रणवाचें रूप कोणें देहें देखिलें।**
निवृत्तिनें दाखविलें याचि देहिं।।१।।
सकार हकार तुर्या उन्मनी भेद।
अभेदुनि भेद केलें मज।।२।।
ज्ञानदेओ म्हणे प्रणवाचिं खोली।
अक्षरीचि बोलीं देह सार।।३।।अ.क्र.७९२।।

प्रणवोपासनेचा गाभा म्हणजे ***पश्चिममार्ग*** आहे, जेथे ***तेजोमय महालिंग*** असते. हे तेजोमय महालिंग म्हणजे ***महाशून्यस्थान.*** यासच वुड्रॉफ ***पराबिंदु किंवा परमशिव*** म्हणतात. *(पृ.क्र.८११वरचा तक्ता पाहावा.)* हे देहातीत स्थान आहे. हेच ***परमधाम वा परमव्योम*** आहे. ***योग्यांचे घर ते हेच! भ्रमरगुंफा व पुढील सत्य-अलक्ष्य-अगम-***

अनामी लोकादी स्थाने ती येथीलच! **विदेही साधुसंत आणि योगी यांची येथेच स्थिती असते. जीवन्मुक्तांचे हेच स्थान ध्येय असते.** कारण जीवन्मुक्तीच्या प्राथमिक अवस्था रूढ झाल्या की ते येथेच गती घेतात.

"नेणें नाद बिंदु कला ज्योति"

मनाच्या सोळा वा सतरा कलांबाबत मागे विवेचन केले आहे *(पृ.क्र.८०५,८०६).* पंधरा कला मूर्त मनाच्या असतात. सोळावी कला मूर्त मन व अमूर्त यांच्या संधीवरील असते आणि सत्रावी कला चैतन्याची असते, हे आपण पाहिले आहे. सत्राव्या कलेसच ***अमृतकला*** असेही म्हणतात. ***मन म्हणजे चंद्र*** असे रूपक योगशास्त्रात वापरतात. त्यामुळे ***चंद्रातील जळ*** असे ज्ञानेश म्हणतात, ते **सत्राव्या कलेतील अमृता**स लक्षून असल्याचे जाणवते. हे अमृत वा चंद्रामृत प्राशून योगी धन्य होतात.

नाद, बिंदु व कल्लोळ गर्भस्थ झाला, असे ज्ञानेश म्हणतात, ते योग्याच्या या स्थितीस अनुलक्षून आहे. ***नाद व बिंदू*** ही जगताची सूक्ष्म प्रतीके आहेत. ***बिंदू हे रूप आणि नाद हे विश्वस्पंदाचे प्रतीक*** **म्हणून येतात. *नाद, बिंदू, कला व ज्योती*** ही सर्व मिळून ज्ञानेशांचे योगविश्व साकारते. अस्तित्वाच्या चार खूणा त्या याच. या मावळल्या की विश्वाचा वा अस्तित्वाचा लय होतो. याच अर्थी ज्ञानेशांनी ***"आतां नाद बिंदु नेणिजे। कला ज्योति।।६-२८८।।"*** या ओवीत यांचा प्रयोग केला आहे. तेव्हा तो शक्तीचे रूपांतर आणि समावेशन सूचित करण्यासाठी केलेला प्रयोग होता.

पण आता या अभंगात त्यांनी ***ज्योतीसाठी तेजोमय महालिंग आणि नाद, बिंदु व कल्होळ हे शब्द अधिक उच्च श्रेणीचा योगाविष्कार सादर करण्याप्रीत्यर्थ वापरले आहेत.*** प्रतिप्रसवक्रमाच्या म्हणजे पंथराजाच्या अभ्यासाने साधक जेव्हा ॐकाराच्या ***अ, उ व म*** **या मात्रांचा लय करून अर्धमात्रेच्या प्रांतात येतो, तेव्हा विश्वाचा आभास त्यास *नाद, बिंदु, कला व ज्योती* या चतुर्विध प्रकारे होतो. *बिंदु*स्थानी** विश्वातील ***रूप*** हा घटक मूर्त होतो. त्याचा ***निरोधिका*** या स्थानी निरोध होतो. राहतो तो ***नाद*** त्याला अंतापर्यंत साथ देतो. ***अनाहतनाद* या रूपाने हा नाद घटक अस्तित्व दाखवतो.**

कला हा घटक मनाचा असून तो समनीपर्यंत साथ देतो. **उन्मनीत तोही लीन पावतो. महाशून्य वा ज्योतिस्थानी जेव्हा महालय होतो, तेव्हा मनाची *सत्रावी कला* प्रकटते आणि तिच्यात *नाद व कला, तसेच बिंदु व ज्योति* यांचे परमश्रेष्ठ विलीनीकरण होते. विश्वाचा लय संपूर्ण होतो, तो याच अवस्थेत.** अशी ही पार्श्वभूमी ध्यानी घेऊन ज्ञानेशांच्या उपरोक्त अभंगाकडे पहावे लागते.

"नेह नानास्ति किञ्चन"

त्याअनुसार ज्ञानेश म्हणतात ते असे की ***नाद, बिंदु व कला*** **यांचा शेवट *गर्भी* म्हणजे महाशून्यात** होतो, अशी त्या वेळची योग्याची स्थिती असते. असे फळ देणारा देह त्रैलोक्यात दुर्लभ आहे. पण त्या देहयोगे भक्ती सुलभतेने साकारते. अभक्त असा खरा तर देहच असतो. पण तो खराखुरा अभक्तपणे ब्रह्मरूप ज्यायोगे होतो, ती योगसाधना हीच म्हटले तर ***भक्ती किंवा भजन*** आहे, याचा निर्वाळा या अभंगातून मिळतो.

भक्ति - पंथराज - योग ही अशी समसमान असल्याचे यावरून सूचित होते. ही भक्ती किंवा योग सिद्ध झाला की त्रैलोक्यात एक नवल घडते. ***चंद्रामृताचे क्षीर वा सत्रावी कला*** **पूर्ण ब्रह्मांड व्यापून आहे, असे साधकास प्रतीत होते. *नाद व बिंदु यांची शुद्ध ज्योतीशी भेट होते. प्रकृति-पुरुष, शिव-शक्ती* हे भेद मावळतात.** ज्यांना यांच्यात द्वैत दिसते, ते देहाहंकारी असतात आणि प्रपंचाचे पाईक असतात. त्यांनी द्वैत मावळावे आणि सर्वत्र अद्वैतानुभूती यावी म्हणून देहांतरी शोध घ्यावा. ***"पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतिचां दंसु।"*** अशा पंथराजाचा अवलंब करावा आणि या ***ब्रह्मठशात म्हणजे देहात ब्रह्म पहावे,*** असे ज्ञानेशांचे सांगणे आहे.

सुज्ञांसाठी हा मार्ग आवर्जून सांगणारे ज्ञानेश पुढे म्हणतात की प्रणवाचे किंवा ब्रह्माचे असे रूप ***"याचि देहीं याचि डोलां"*** दिसावे म्हणून गुरूंना शरण जावे. त्यांनी स्वतःही श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंना शरण जाऊन हे साधन सिद्ध केले असल्याने ***सकार व हकार यातील*** **भेद मावळून *तुर्या व उन्मनी* या अवस्थांचे उन्नयन होऊन, त्यांच्यातील भेदही लोपून जाऊन त्यांना एक निराळीच अवस्था प्राप्त झाली आहे.**

शिव व जीव एकरूप झाले आहेत. उन्मनी तुर्येत विलीन झाली आहे. हे सर्व ज्ञानेशांनी गुरुकृपेने अवगत केले आहे. **पंथराजा**चा ***गुरुकृपांकित योग*** हा विशेष यानिमित्ताने पुनश्च आपल्यापुढे येत आहे. गुरुकृपेने हा योग सिद्ध होऊन वेदवाणीचा प्रत्यय येतो, श्रुति-उपनिषदांची अनुभूती येते की ***"नेह नानास्ति किञ्चन".*** देहच ब्रह्म आहे, हे आकळून आल्याने प्रणवाची खोली वा गूढ गर्भितार्थ उमजून येऊन साधक धन्य धन्य होतो!!

जीवन्मुक्तीच्या खुणा

जीवन्मुक्त, संत व योगी यांच्या या स्थितीच्या खुणा पुनः स्पष्ट करत असता ज्ञानेश म्हणतातः

१) ***शिवशक्तीचा भेद अर्धनारीरूप।***
याचा हा सौरस आणा चित्ता।।१।।
जागृति स्थूळ तुर्या महाकारण।
हेंचि कीर खूण तुझे ठाईं।।२।।
ज्ञानदेओ म्हणे कैसें हें जाणिजें।
देहिं नाद गाजे परेवरी **।।३।।अ.क्र.७९६।।**

२) **निळावर्ण ब्रह्मरंध्र एक निकें।**
पाहा माझें सखे भाविक हों।।१।।

उन्मनी सदैव वसे अक्षय पंथें।
लाऊनिआं चित्तें तेयां ठाईं।।२।।
ज्ञानदेओ म्हणे यापरति खूण।
नाहीं ऐसिं आण वाहतसें।।३।।अ.क्र.७९७।।

३) **आकाश हें असें माझें शीर बापा।**
कर्ण दिशा चिद्रूपा नाद उठति।।१।।
आधारापासौनि सहस्त्रदळावरी।
नि:शब्द निरंतर नारी एक।।२।।
ज्ञानदेओ म्हणे अनुभव ऐसा जेथ।
तोचि जीवन्मुक्त संत योगी।।३।।अ.क्र.७९८।।

शिव व शक्ती ही वेगवेगळी नसून अर्धनारीनटेश्वरासारखी एकरूपच आहेत. जागृति-स्वप्न-सुषुप्ति, स्थूल-सूक्ष्म-कारण-महाकारण देह, तुर्या इ.मध्ये फरक तो असाच आहे. ती तशी एकत्वाचीच बहुविध रूपे आहेत. पण त्यांच्यात वास्तविक भेद असा नाहीच.

ही खूण आपल्याठायी बाणली की ***अनाहत ध्वनी परेपल्याड गाजू लागतो. ब्रह्मरंध्रातील नीलवर्ण दिसू लागतो. ब्रह्मरंध्रापलीकडे जो अक्षय पंथ आहे, महाशून्याचा जो प्रांत आहे, तेथे उन्मनीची स्थिती सतत राहते.*** योगी आकाशास आपले शीर व दशदिशांना आपले कर्ण असलेले पाहून त्यांत ***अनाहत नाद*** ऐकण्यात गुंगून जातो. मूलाधारचक्रापासून ते ब्रह्मरंध्रापर्यंतचा प्रांत निरंतर प्रशांत कुंडलिनी व्यापून टाकते. अशा ***या खुणा अनुभवणारे निश्चित जीवन्मुक्त, संत आणि योगी असतात,*** असे ज्ञानदेव म्हणतात.

पश्चिमपथाचे संपूर्ण दर्शन

पंथराजाचा पश्चिम पथ तसा फारसा परिचयाचा नसलेला आहे. ही जाणीव ठेवून ज्ञानदेव आपल्या अभंगांतून या पथाचे अधिकाधिक विवरण करून साधकांना मार्गदर्शन करतात, ते असे:

१) **स्थूल देह सूक्ष्म कारण तिसरा देह।**
चौथा महाकारण देह ऐक।।१।।
औटपीठाचे उदरीं कर्पूर वर्णावरी।
शामाचें अंतरीं महाकारण।।२।।
महाकारणीं आतुला लक्षावा पुतळा।
उन्मनी हें कळा दैवी वरी।।३।।
सहस्त्रदळ तैंचि कीं आन नाहीं ऐसें।
महातेज वसे त्याचे आंत।।४।।
पश्चिम मार्ग तेथुनी ऊर्ध्व उंच गगनीं।
जेथ एक कामिनी एकलीचि।।५।।
मार्ग नाहीं तेथ कवण्यारितीं जावें।
सुषुम्नेवरी वळघावें सामर्थ्येंसिं।।६।।
तेथुनि ऊर्ध्व छिद्र मुंगीनेत्रतुल्य।
त्यांतून उडणें भलें चपलत्वेंसिं।।७।।
जडतां वळंघितां बरी नारी आपण एक।
नरनारी नपुंसक एकरूप।।८।।
ज्ञानदेओ म्हणे जो उडौनि जाएं तेथ।
परब्रह्मींचि मात तोचि जाणें।।९।।अ.क्र.८०२।।

२) ***सहस्त्रदळ साजिरें नयनाचां शेजारीं।***
अर्धमातृका अंतरीं चिन्मय वस्तू।।१।।
ॐकार नादीं कीं नाद ॐकारीं।
दैवी निरंतर प्रणवीं पाहा।।२।।
मकार अर्धमात्रा शून्यांचा निश्चय।
आत्मा एक असें स्वयें रया।।३।।
ज्ञानदेओ म्हणे कैवल्याचां दाता।
कोण पत्रीं हें कविता नाहीं ऐसिं।।४।।अ.क्र.८०१।।

स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीन देहांपलीकडे अजूनही ***महाकारण*** नावाचा एक देह असतो. ***औटपीठाच्याही पलीकडे;* श्वेत वर्णाच्या कारण देहाच्या पलीकडे जो श्यामवर्ण दिसतो, तो महाकारणदेहाचा असतो. या महाकारण देहाआत *योग्यांचे लक्ष्य असा श्रीरंग असतो. त्या श्रीरंगास उन्मनी या दैवी कलेने वरिले आहे. हा श्रीरंग घननीळा ज्यात वसतो, तेच सहस्त्रदलकमल असते.* त्या कमलात महातेज दिसते. तोच हा श्रीरंग!**

तेथूनच ब्रह्माकडे जाण्याचा मार्ग ऊर्ध्व आकाशी जातो. त्या गगनात मूळ मायेचा वास असतो. पण तिच्यापर्यंत जाण्याचा मार्ग दिसत नाही. तिच्याकडे जाण्यासाठी सहस्त्रदलापावेतो ज्या सुषुम्नेच्या मार्गाने प्रवास केलेला असतो, त्या सुषुम्नेवरून सामर्थ्याने निर्धारपूर्वक उड्डाण करून पुढे एक ***मुंगीच्या नेत्रासारखे सूक्ष्म छिद्र*** दिसते, त्यातून चपळपणे शिरावे.

असे केले की जड विश्वाचे उल्लंघन करून ***साधक त्या मूळमायेशी एकरूप होतो. त्यानंतर परब्रह्माशी मिलन होते.*** त्या वेळी ***शिव-शक्ति-जीव*** हे भेद वा लाक्षणिक अर्थाने ***नर-नारी-नपुंसक*** हे त्यांचे भेद मावळतात. ज्ञानदेव म्हणतात की ***ज्याने हे उड्डाण साधले असेल, त्यालाच परब्रह्म म्हणजे काय हे कळते.***

या अभंगावरून असे दिसून येते की ***सहस्त्रार चक्र* वा *सहस्त्रदलकमल* येथपावेतो महाकारण देहाची व्याप्ती असते** *(पृ.क्र.८११वरील तक्ता).* हा पिंडसापेक्ष महाकारण देह आहे. ***औटपीठ वा चौथे शून्य वा उन्मनी या स्थानापावेतो कारण देहाची व्याप्ती असते.*** उन्मनीच्या या अवस्थेत मिळणारा आनंद सगुणाचाच आहे. कारण ***तेज व नाद*** अजूनही अभिभवत असतात. अर्थात त्यांची श्रेणी ***बिंदु ते उन्मनी*** यात मिळणाऱ्या अनुभूतीपेक्षा वेगळी असते. पण हाही सगुणाचाच भाग आहे. फार तर त्याला निर्गुणाच्या सीमारेषेवरील सगुण असे म्हणता येईल.

याच स्थानीच्या वा अवस्थेतील श्रीकृष्णाचे वा विठ्ठलाचे रूप संतांनी वर्णिले आहे. परंतु निर्गुण निराकाराकडे - पिंडातून ब्रह्मांडाकडे जाण्याचा पुढील मार्ग अवघड आहे. ***सहस्त्रदलातील ब्रह्मरंध्र या मुंगीनेत्रतुल्य छिद्रास वळंघून जेव्हा जावे, तेव्हा मूळ मायेशी भेट होते. मूळ माया व परब्रह्म ही अर्धनारीनटेश्वरासरखी एकरूप असल्याने याबरोबरच साधकासाठी विश्वाचा महालय होतो. तो परब्रह्माशी एकरूप होऊन अद्वैत भोगतो.***

ज्ञानदेवांनी मुंगीनेत्रतुल्य छिद्र वळंघण्याचे जे म्हटले आहे, त्याच प्रकारचे मुक्ताबाईने ***"मुंगी उडाली आकाशीं। तिनें गिळिलें सूर्यासिं।"*** असे म्हटले आहे, हे जिज्ञासूंनी लक्षात असू द्यावे. असो.

या अभंगातून ज्ञानदेवांनी अर्धमात्रेचा प्रांत ब्रह्मरंध्रापर्यंत विस्तारला आहे. त्यांच्या पुढील अभंगावरून अधिक कळून येते. ते म्हणतात की ***औटपीठ*** **या चौथ्या शून्याच्या *(नयनाच्या)* जवळ सहस्त्रदलकमल आहे. *अर्धमात्रेच्या आतली चिन्मय वस्तू त्यात आहे.* ॐकार नादात आहे की नाद ॐकारात आहे, ही दिव्य अनुभूती निरंतर प्रणवीं राहून साधकाने घ्यावी.** त्यास असे आकळून येईल की विश्व हे प्रणवच आहे व प्रणव हे विश्वच आहे. **नादास अनुलक्षून येथे *विश्व* असे म्हटले आहे. *ॐकार व प्रणव* हे ब्रह्माचे सूचक म्हणून प्रायोजिले आहेत. हीच सगुणासह निर्गुणाची अनुभूती होय.**

ज्ञानदेव म्हणतात की ***मकार, अर्धमात्रा आणि शून्ये ही सर्वच आत्मा आहेत,*** ही अनुभूती कोणत्याही तत्त्वज्ञाने किंवा कोणत्याही ग्रंथात आजपर्यंत सांगितलेली नाही. ती ते आपणास स्पष्टपणे सांगत आहेत!!

योगधारेची भैरवी::::

पूर्व-पश्चिम पथ आणि सगुण-निर्गुण

यानंतरच्या काही अभंगांतून या सर्व पंथराजविषयक माहितीवर अजूनही काही प्रकाश पडतो. तो पाहू याः

१) सहस्त्रदळ ब्रह्मरंध्र एकें नेत्रीं देखें।
देखणा पारुखें तेयां ठाईं बा।।१।।
नादीं नाद भेद भेदुनि अभेद।
पश्चिममार्गीं आनंद देखुनि राहें।।२।।
मन पवन निगम आगम सुरेख।
आधार सहस्त्रदळ देख देहिं नयनीं।।३।।
ज्ञानदेओ म्हणे डोळां हा प्रणव।
निवृत्तिने अनुभव मज दिधला।।४।।अ.क्र.८०३।।

सहस्त्रदलकमल व ब्रह्मरंध्र **एकदा पाहिले की त्रिपुटीचा लोप होतो.** ***अनाहतनादाने विश्वाचा लय करून द्वैत विलयास जाते. पश्चिममार्गावर अद्वैत आनंद प्राप्त होतो. मन, प्राण, जीव, देह (मन, पवन, निगम व आगम)*** यांना **सहस्त्रदल** कसे आधार देते, हे योगसाधनेने आपल्याला देहींच्या देहीच कळून येते. सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथाच्या कृपेने हा प्रणवोपासनेचा आनंद ज्ञानदेवांना मिळाला आहे.

२) सगुण देह बापा निर्गुण माझें शीर।
हा तो भेदाकार कैशापरी।।१।।
दैवि आसुरी पूर्व पश्चिममार्ग की रें।
शून्यातील सारे चराचर हें।।२।।
ज्ञानदेओ म्हणे भेद ऐक गुरुपुत्रा।
नयनीं अर्धमात्रा सर्व जन।।३।।अ.क्र.८०४।।

देहास सगुण व मस्तकास निर्गुण मानणे म्हणजे पूर्वमार्ग सगुणाचा आणि पश्चिममार्ग निर्गुणाचा आहे, असे म्हणणे व्यर्थ आहे. पूर्वमार्ग ***आसुरी*** म्हणजे पिंडातर्गत आणि ***पश्चिममार्ग*** दैवी म्हणजे ब्रह्मांडातील असेही म्हणणे व्यर्थ आहे. महाशून्यातूनच हे चराचर आहे. हे सर्व विश्व महाशून्यातून व अर्धमात्रेतून झालेले आहे.

३) *अग्निचें पोटीं पुरुष उद्भवला अवचट।*
सत्रावी लंपट निशिदिनीं **।।१।।**
आधार नाहीं जेथ निराधार वर्तति।
निराधार न म्हणति आपणांलागीं।।२।।
ज्ञानदेओ म्हणे निवृत्तिने दाविलें।
या नयनीं पाहिलें अविनाश।।३।।अ.क्र.७९९।।

आज्ञाचक्रापुढे पुरुष (आत्मा) असतो. योगी त्याला वरतात आणि सत्राव्या कलेचा उपभोग घेतात. त्याठायी कसलाही आधार नसलेले ते निराधार योगी पुरुष वर्ततात. पण त्यांना आपण आता विश्वाचा आधार सोडून दिलेला आहे, याची जाणीव उरत नही. अविनाश परमात्म्याची ही अनुभूती ज्ञानदेवांना निवृत्तिकृपेने प्राप्त झाली, असे ते म्हणतात.

४) सत्रावीचें गांविं शून्याचां विस्तार।
प्रणव निराकार सदैव असें।।१।।
पश्चिम पूर्व असे शुक्ल कृष्ण नारी।
दैवी आणि आसुरी वेगें शोधा।।२।।
ज्ञानदेओ म्हणे अर्धमात्रा कोणती।
मसुरामात्र आहे ती दोनिं भावां।।३।।अ.क्र.८००।।

पूर्व व पश्चिम मार्गांनी अग्रेसर होऊन **पिंगला *(शुक्ल)*, इडा *(कृष्ण)*, सुषुम्ना *(नारी)*** यांच्या शोधनाने कुंडलिनीशक्तीला जागवून **ब्रह्म *(दैवी)* व देह *(आसुरी)*** यांचे रहस्य आकळून घ्यावे. ज्ञानदेव म्हणतात की ***मसुराकार अशी अर्धमात्रा*** जी आहे, तिची अनुभूती या साधनेने पिंड ***(देह)*** व ब्रह्मांड ***(ब्रह्म)*** या दोनही भावात घेता येते. **सगुण *(आसुरी)* व निर्गुण *(दैवी)*** अशा दोनही भावात तेच ते परब्रह्म मसुरमात्र चिद्रूपाने अनुभूतीस येते, असे ते म्हणतात.

इतर अभंगांतील योगरहस्य

आतापावेतो आपण ज्ञानदेवांचे जवळ जवळ ६०-६५ असे योगपर अभंग पाहिले. इतरही अभंगांतून थोड्याफार फरकाने या अभंगांत निवेदिलेली अनुभूती वर्णिली आहे. अभंगगाथेतून ते अभंग जिज्ञासूंना मुळातून पाहता येतील. यानंतरच्या अभंगांचे संक्षेपाने वृत्त पाहू या. नवीन काही माहिती वा वैशिष्ट्यपूर्ण अनुभूती असेल, तिचेच आता

संकलन करावयाचे आहे. मागे सागितल्याप्रमाणे श्री.प्र.न.जोशींच्या गाथेनुसार अभंग अनुक्रमांक देत आहे. पुढील अभंगांचे सार असे:

शून्याच्या भुवनी अविनाश पुरुष दिसतो. देहात प्रतीत होणाऱ्या त्या पुरुषाचे दर्शन निळ्या रंगाचे असते *(अ.क्र.८०८)*. सर्व चैतन्य त्या पुरुषाठायी समावलेले असते. हाच बापरखुमादेविवर विठ्ठल आहे *(अ.क्र.८०६)*.

सुषुम्नेस अविनाश कर्णकुमरी व बिंदूस वर्तुळाकार चंद्रमा असे म्हटले आहे. मुंगीनेत्रतुल्य छिद्रातून ***("रश्मीअग्रामधूनि")*** पुढे गेल्यावर शुद्ध ब्रह्म निर्वाण प्राप्त होते. ब्रह्मांडाचा अंत लागत नाही *(अ.क्र.८०५)*. या दृष्टीने ***"आतां महाशून्याचां डोहिं। जेथ गगनासिंचि ठाओ नाहीं। तेथ तागा लागेल काईं। ययां बोलाचां।।६-३१५।।"*** ही ज्ञानेश्वरीची ओवी अशीच या संदर्भात लक्षणीय आहे.

स्थूळ, सूक्ष्म, कारण व महाकारण **या देहांवेगळा एक *कैवल्यदेह* पाहून ज्ञानेश तोच होऊन गेले** *(अ.क्र.८०९)*. **डोळा, नयन हे शब्द बिंदु, गोल्हाट, श्रीहाट, औटपीठ, आज्ञाचक्र यांप्रमाणेच महाशून्यास उद्देशून वापरले आहेत** *(अ.क्र.८११)*. **शून्य महाशून्यासही म्हटले जाते** *(अ.क्र.८१२)*. महाशून्यात गोविंद वसतो *(अ.क्र.८१३)*. महाशून्याच्या अंगणात तुर्येचा प्रकाश पडतो. तुर्यावस्थेत उन्मनीचा आनंद असतो *(अ.क्र.८१४)*. रक्तवर्ण स्थूलदेहाचा, श्वेतवर्ण सूक्ष्म देहाचा, श्यामवर्ण कारण देहाचा व नीलवर्ण महाकारणदेहाचा असे योग्यास दिसतात. ***या वर्णांच्या आत दिसणारी ज्योती वा तेज हे अलक्ष वा निरंजन असते*** *(अ.क्र.८१५)*.

औटपीठानंतरचा आणि अर्धमात्रेपलीकडचा निरंतर देश म्हणजे शून्य किंवा महाशून्य असते *(अ.क्र.८१६)*. **तेथे जगदीश वसतो. ब्रह्मरंध्रातील ज्योतिस्थानास बिंदु तसेच शून्य अशा संज्ञा वापरल्या आहेत** *(अ.क्र.८२०)*. ***सत्रावीचे शिखर, महालिंगस्थान,*** **टाळू (तालु) या संज्ञा एकाच स्थानास उद्देशून वापरल्या जातात.** सत्रावीच्या शिखरी किंवा महालिंगी जाण्याच्या मार्गाचा अंत लागत नाही *(अ.क्र.८२३)*.

*(**टीप : तालुचक्र** -याच दृष्टीने श्रीगोरक्ष इ.नी जे **तालुचक्र** म्हणून उल्लेखले आहे, त्याचा पुनर्विचार करावा ही जिज्ञासूंस सूचना. कारण **तालुचक्र** हे मुखातील टाळक्यात असणे संभवनीय वाटत नाही, तर ते **मूर्ध्निस्थानी** असणेच जास्त संभवनीय आहे आणि योगशास्त्रदृष्ट्या सयुक्तिकही ठरेल.)*

बापरखुमादेविवर हा निखळ प्रणव आहे *(अ.क्र.८२४)*. आत्माराम आदिअंती निळ्या रंगात ओतला आहे *(अ.क्र.८२५)*. ***महाकारणदेहाची व्याप्ती कैवल्यदेहातही असली पाहिजे,*** असे अनुमान निघते *(अ.क्र.८०९,८२६) (पहा पृ.क्र.८११ वरचा तक्ता)*. ***अहं*** गेल्यावर **निळ्या रंगाची *"सोऽहं"* वस्तू** दिसते. त्या वेळी साधक महाकारणदेहात अवस्थित होऊन आनंद उपभोगतो *(अ.क्र.८२७)*. ***पंथराज मार्ग म्हणजे उफराट्या दृष्टीचा मार्ग आहे,*** असे सूचित होते *(अ.क्र.८२८)*. ***गोल्हाट, त्रिकूट व श्रीहाट*** यांचा उल्लेख केलेला आहे. ***कूटस्थ*** या सर्वांपलीकडे आणि महाकारणाच्याही पलीकडे आहे *(अ.क्र.८३०)*. सत्रावीचा चंद्र वा बिंब हे सुनीळ ब्रह्मच असते *(अ.क्र.८३१)*.

कुंडलिनी ऊर्ध्वमुख होऊन अग्नी सोडते, हा पंथराज योगानुभूतीशी साम्य दाखविणारा उल्लेख येतो *(अ.क्र.८३२)*. यासाठी ***"मुखिंच्या ज्वालीं", "मग आवेसें पसरी मुख। ऊर्ध्वा उजू", "तेथ तृप्तिचेनि संतोखें। गरल वमीं मुखें।"*** या ओव्या जिज्ञासूंनी ताडून बघाव्या *(६-२३०,२२८ व २४१)*.

या अभंगात ज्ञानेश्वर स्पष्टच म्हणतात की ***"कुंडलिनी ऊर्ध्व मुखें अग्नि सोडी। तेयाचिं हें जोडि संतजनां।।२।।"***. याचा असा पण अर्थ निघतो की ***केवळ योगीच नव्हे तर संत वा भक्त यांनासुद्धा कुंडलिनीयोगानेच श्रेष्ठत्व प्राप्त होते.*** पंथराजाचे हे वैशिष्ट्य भक्तांचा कुंडलिनीयोगाशी काहीच संबंध नसतो असे समजणाऱ्यांनी जरूर लक्षात घेण्यासारखे दिसते.

नंतरच्या अभंगात ***"नाभिस्थानींचा ठेवा", "हृत्कमळ", "कुंडलिनी," "बापरखुमादेविवरु विठ्ठलु"*** यांचा उल्लेख येतो. **पंथराज व भक्ती यांचे एकत्व या अभंगातून सूचित होते** *(अ.क्र.८३६)*.

"ऐका हा शेंवट। अभंगमाला जाहालिं"

यानंतर ***प्रतिपंथराज*** वर्णन करणारा एक महत्त्वाचा अभंग मुळातून पाहू या. आतापावेतोच्या विवेचनावरून त्याचा अर्थ सहजच कळण्यासारखा आहे, म्हणून अर्थ देत बसत नाही.

<u>उन्मनीं</u> रें लागों नीज। निज बाळा सहज।
<u>चैतन्याचि पालखि</u> बा। शुद्ध सुमनाचिं सेज।
तेथ तूं निद्रा करीं। चहूं वाचेंसि गूज।।ध्रुव.।।
<u>आधार मूळबंध</u>। वामचरणिं निरोध।
<u>स्वाधिष्ठान लिंगस्थान</u>। हें तो जाणसिं प्रसिद्ध।
दक्षिणेचां चरण माथां। ठेऊनिआं निबद्ध।।१।।
<u>मणिपुरीं नाभिस्थानीं</u>। जेथ स्वर्गगामिनी।
<u>कुंडलिनी</u> नाम तिचें। तिसिं करूनि ऊर्ध्व।
ब्रह्माग्नि चेतविला। पंचभूतें ग्रासूनि।।२।।
<u>अनुहात हृदयस्थान। जेथ वायूचें संधान</u>।
<u>साधना लावि तेयासिं। नित्य करूनि साधन</u>।
<u>घंटांचे नाद होती। तेथ राहें तूं लीन</u>।।३।।
<u>विशुद्ध कंठस्थान</u>। वेगिं जाएं जिंकून।
<u>अग्निचक्र भ्रुवोमध्यें</u>। भेदीं सुषुम्नेचें आंग।
रविशशि समरसें। प्रणवाचां संयोग।।४।।
विज्ञानें सिद्धि पाहिं। ज्ञान नुरेंचि समूळ।
पाहें पां <u>सहस्त्रदळ</u>। शुद्ध स्वरुप केवल।
अहं सोहं जाणसि। ब्रह्म होसि समूळ।।५।।

ययालागिं सद्गुरुपाएं। सेवि बापा निरंतर।
पावसि तूं ब्रह्मपद। हा तूं जाणसिं निर्धार।
स्वानंदाचें सुख थोर। निवृत्तिकृपें अपार।
त्याचें पाईं विनटलों। बाप रखुमादेविवर।।६।।
।।अ.क्र.८३७।।

या अभंगात ***मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनुहत, विशुद्ध, अग्नि (आज्ञा) व सहस्त्रदळ*** या चक्रांचे व स्थानांचे स्पष्ट उल्लेख आहेत. ***कुंडलिनीचे स्थानही मणिपूरी नाभिस्थानात असल्याचे म्हटले आहे.*** मूळबंधाचा सुस्पष्ट उल्लेख क्रियांसह आहे. ***उन्मनी*** ही अंतिम अवस्था सांगितली आहे. सद्गुरूंच्या कृपेने हा योग सिद्ध होतो, याचाही येथे उल्लेख आहे. ***हा संपूर्ण अभंगच पंथराजवर्णन करणारा आहे आणि ज्ञानेश्वरीतील वर्णनाला पूरक ठरतो.***

फक्त खटकणारी एकच गोष्ट आहे. ती म्हणजे मणिपूरानंतरच्या ओवीत अनाहत व घंटानादाचा उल्लेख. श्री.बाबामहाराज आर्वीकरांनी ***दिव्यामृतधारा*** या ग्रंथात इतरत्र अशा प्रकारच्या ओवीक्रमांबद्दल जे सूचित केले आहे, ते विचारात घेता कोणातरी अभंग संकलकाने आपल्या अनुमानानुसार ही ओवी मागेपुढे केली असण्याची शक्यता गृहीत धरावी लागते. कारण ज्ञानेशांचे इतरत्र जे अनाहतनादासंबंधी उल्लेख आहेत, त्यानुसार अनाहत हा महाकारणसंबंधित असल्याचे त्यांचे स्पष्ट मत दिसून येते.

आज्ञाचक्रसंबंधित ओवी क्र.४नंतर ही अनाहतसंबंधित ओवी क्र.३ धरणे सयुक्तिक व शास्त्रोक्त वाटते. हे सिद्धसिद्धांतपद्धतितील गोरक्षमतास धरूनच होईल. कारण गोरक्षांनी हृदयाधार (हृच्चक्र) हे सर्वसामान्यतया ख्यात असणाऱ्या द्वादशदल अनाहतचक्रापेक्षा वेगळे धरले आहे आणि ते अष्टदल असते, हेही ते सांगतात. गोरक्षमत आपण पूर्वीच पाहिले आहे*(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ,पृ.क्र. ७५१-७५२).* योग्यात प्रसिद्ध असणाऱ्या ब्रह्मांडीच्या अष्टदलपद्माचाच तो उल्लेख समजावा लागतो. तेथेच अनुहातनाद असतो.

पंथराजसंबंधित ओव्यांचा अनुक्रम सुधारून घेतांना अनाहतनादविषयक ओव्यांची एक वेगळी व्यवस्था आपण शास्त्रास धरून लावली होती, तिकडे जिज्ञासूंचे पुन: लक्ष वेधत आहे*(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ,२३) पवनाची मेळणी झाल्यानंतर कुंडलिनीचे मध्ममामार्गे हृदयात (आज्ञाचक्रावरील अवकाशात) महदाकाशात उत्क्रमण व पश्यंति-विशुद्धीचक्रक्रमण २४) अनाहतनादप्राकट्य व ३३) भ्रमरगुंफेत नादाचा आविर्भाव पृ.क्र.७७४,७७५).*

यानंतरच्या एका अभंगात *(अ.क्र.८३९)* या पंथराजासच त्यांनी ***अमृतयोग*** असे नांव दिले आहे. त्यात ***हुडा व मनोमयचक्र, मैलागिरी*** या खास कुंडलिनीयोगसंबंधित नाथपंथीय संज्ञा येतात. ज्ञानेश्वरीत ***"अपानाचिआं कवाडां। लावौनि आसनमुद्रा सुहाडा। मूलबंधाचां हुडा। पन्नासिला।।१२-४८।।"*** अशी एक ओवी आहे. ही पंथराजसंबंधित आहे. ***हुडा ही पंथराजसंबंधित प्राणायामप्रक्रिया आहे. या अभंगात "अमृतयोग निगमनीं हुडा" म्हणजे अमृतयोगाचा प्रारंभ हुडा या प्रक्रियेने होतो, असा निर्देश आहे. हुडा*** या शब्दाचे अधिक स्पष्टीकरण पाहू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंनी श्री.बाबामहाराज आर्वीकर यांचा ***दिव्यामृतधारा*** हा ग्रंथ जरूर पहावा. असो.

मूळपीठ ***कुलस्वामिनी,*** वैराग्य व पुण्य यांच्या प्रभावाने उत्थापित होणारी शेंदुरी रंगाची कनककांती असणारी ***कुंडलिनी,*** तिचा ***शून्यसंज्ञक*** कर्ण वा ***सुषुम्ना, कुंडलाकार, शेंदरी रंगाचे पाखरू*** इ.कुंडलीनी वर्णने या अभंगात येतात *(अ.क्र.८४०).*

ही जी योगपर अभंगमाला ज्ञानदेवांनी रचली आहे, तिचे गंतव्य तुर्यावस्थाप्राप्ती हेच आहे. तुर्याच उन्मनी असून क्षरच अक्षर असल्याची ती अनुभूती देते; निर्गुणच साकार असते; देहच विदेह असतो; महाकारणच ब्रह्म असते; असा निश्चय या योगसिद्धीने व गुरुकृपेने होतो, असा ज्ञानेशांचा अनुभव ते***"ऐका हा शेवट। अभंगमाला जाहालिं"*** असा पूर्णत्वास नेत सांगतात *(अ.क्र.८३४).*

योगपर अभंगमालेची भैरवी

या अनुभवाचे वर्णन करणारा त्यांचा अभंग घेऊन हा विषय येथेच थांबवू या. कारण योगवर्णनात अवीट आनंद असतो. ते कितीही केले तरी अपूर्णच राहणार!

औटाचें डोंगरीं गाय एक वसें।
क्षीर सेवितुसें योगी एक।।१।।
धालें पूर्णपदीं समाधि लक्षितां।
क्षुधा चाड चिंता नाहीं नाहीं।।२।।
नाहीं तैं सांडौनि आहें तैं पाहिलें।
मन उन्मन जालें आपेंआप।।३।।
ज्ञानदेवीं मोक्ष तो अभाव।
आनंद स्वयमेव एकविध।।४।।अ.क्र.८४१।।

"**औटपीठ**ाच्या डोंगरावर ***सत्रावी कला*** म्हणून एक गाय आहे. तिचे स्तन्य एक योगिराज सेवत असतो. ते पिऊन तो तृप्त झाला आहे. त्याला पूर्णपद प्राप्त झाले आहे. तो समाधिसुख भोगतो आहे. त्याला क्षुधा, चिंता इ.ची चाड राहिलेली नाही. क्षर सांडून त्याने अक्षरास पाहिले आहे. ***असत्*** त्यागून त्याने ***सत्*** अनुभवले आहे. त्याने त्याचे मन आपोआपच ***उन्मन*** झाले आहे. ज्ञानदेवांमध्ये आता देव असल्याने वेगळ्या मोक्षाची काय आवश्यकता! स्वसंवेद्य आत्मसुखाचा ठेवा ते आता स्वत:च झाले आहेत. हाच खरा आनंद आहे" असे ज्ञानदेव म्हणतात आणि ही अभंगमाला शेवटास जाते.

पंथराज मार्गातील योगवैशिष्ट्ये आपण आतापावेतो *ज्ञानेश्वरी* आणि *ज्ञानदेवांचे योगपर अभंग* यांच्याद्वारे ज्ञात करून घेतली. साधक योगपथावर अग्रेसर होत असतांना त्याला येणारे अनुभव, त्याच्या वेगवेगळ्या अनुभूती आणि त्याच्या विविध भावावस्था व समाधिस्थिती यांचेही दर्शन आपणास आतापर्यंत झालेले आहे.

अमृतानुभवासह ज्ञानदेवांचे हे सर्व वाङ्मय एक समृद्ध आणि विशाल असे योगानुभवभांडार आहे. म्हटले तर ते योगाचे प्रायोगिक क्रमिक पुस्तक आहे, आणि खरे तर शेकडो डॉक्टरेट्स ज्याच्यावर करता येतील अशी अमोलिक ***साहित्यसोनियांचि खाण*** आहे. पण आपण मात्र योगजिज्ञासू आणि अभ्यासकाच्या भूमिकेतून या सगळ्या संपदेचा आस्वाद घेतला आणि आपल्या योगमार्गक्रमणेत तिचे साहाय्य होईल या अपेक्षेने महत्त्वाच्या बहुतेक सर्व विषयांचा अभ्यास केला.

ज्ञानेशांनी सांगितलेल्या या सर्व योगभूमिकांचा **योगवासिष्ठा**तील सप्तयोगभूमिकांशी समन्वय करून पाहण्याचा उद्देश मागेच सूचित केला होता. तिकडे आता वळू या.

योगवासिष्ठातील सप्तभूमी

योग्याच्या योगाभ्यासकाच्या भूमिका समाधिस्थितिसह सात प्रकारच्या असल्याचे **योगवासिष्ठ** सांगते. श्रीमच्छशंकराचार्यांनीही या सांगितलेल्या आहेत. त्या म्हणजे ***१) शुभेच्छा २) विचारणा ३) तनुमानसा ४) सत्त्वापत्ति ५) असंसक्ति ६) पदार्थाभाविनी व ७) तुर्यगा*** अशा आहेत. त्यांचे खुलासेवार वर्णनश्री.कृ.के.कोल्हटकर या योगमहर्षींच्या ***पातञ्जलयोगदर्शन*** या बृहत ग्रंथात दिलेले आहे. जिज्ञासूंनी ते मुळातूनच पाहावे*(सू.क्र.४-२५पा.यो.द.तत्रैव)*. आपल्या विषयाच्या दृष्टीने आवश्यक तेवढा विचार येथे प्रस्तुत आहे.

शाश्वत सुखाची इच्छा निर्माण झाली व ऐंद्रिय सुखे क्षणभंगूर आहेत, अशी जाणीव चित्तात ठसली की साधक ***शुभेच्छा***नामक भूमीवर आरूढ होतो. पंथराजातील विवेक - वैराग्यभूमीची ही प्रथम पायरी होय.

शाश्वताची प्राप्ती करून घेण्यासाठी साधनाउपक्रमास जेव्हा सुरुवात होते, तेव्हा साधक ***विचारणा*** या भूमीवर पोहोचतो. शास्त्रोपदिष्ट साधनामार्गाची माहिती करून घेण्याची जिज्ञासा त्याच्यात उदित होते. साधनामार्ग त्यास आवडू लागला, ध्यानधारणा त्यास आकृष्ट करू लागली की तो ***तनुमानसा*** या तिसऱ्या भूमिकेवर येतो. निदिध्यासन, आत्मभावभावन, शास्त्र व गुरू यांच्यावर नितांत श्रद्धा त्या वेळी प्रकट होतात. यमनियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार ही बहिरंग योगसाधना त्या भूमीवर घडत जाते.

त्यातून चित्तशुद्धी साधत जाते आणि उपायप्रत्यय अशी कुंडलिनीची जागृती व सद्गुरूंची प्राप्ती या गोष्टी सिद्ध होतात. *धर्ममेघ*समाधीचा उदय तो हाच असे आपले मत येथे अभिप्रेत आहे. ते श्री.कृ.के कोल्हटकरांच्या मतापेक्षा भिन्न आहे, हे जिज्ञासूंसाठी येथे स्पष्ट करणे आवश्यक आहे. आपण त्यांच्या ग्रंथाचा फक्त संदर्भ आणि काही विशेष माहितीसाठी उल्लेख केलेला आहे. बाकी सर्व मते आपली स्वतंत्र व विवेचन करत असलेल्या विषयास अनुरूप अशी आहेत, एवढे मात्र जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे.असो.

पंथराजाचा हा मोठा टप्पा आहे. येथून पुढे साधकाची वाटचाल खऱ्या धर्ममार्गावरून होत जाते. अपरोक्षानुभूतीची प्रथमावस्था ती हीच आणि चित्ताची वा साधकावस्थेची ***सत्त्वापत्ति*** नामक चतुर्थ भूमी ती हीच! ***जीवन्मुक्तीची सुरुवात याच प्रांतात होते.***

यानंतर साधकास ज्या सिद्धी प्राप्त होतात, त्यांच्याबद्दल आसक्ती न उरणे अशी अवस्था जेव्हा येते, तिला ***असंसक्ती*** असे म्हणतात. ही साधकाची पाचवी योगभूमिका होय. ***षट्चक्रभेदन व कुंडलिनी शक्तीचे सहस्राराकडे उन्नयन या वेळी होत असते. पंथराजसोपान*** न्याहाळतांना या षट्चक्रभेदन व सिद्धी इत्यादींचे विशेष विवेचन केले होते, हे जिज्ञासूंस स्मरतच असेल.

सत्त्वापत्ति व असंसक्ती या योग्याच्या जागृत अवस्था समजल्या जातात. ***अ, उ व म*** या ॐकाराच्या तीन मात्रांचे अतिक्रमण घडत असता धर्ममेघ समाधीतील या भूमिका प्राप्त होतात.

त्यानंतर जेव्हा योग्याचे अर्धमात्रेकडे उन्नयन होते, तेव्हा स्वप्नतुल्य अशी ***पदार्थाभाविनी*** ही अवस्था वा भूमी प्राप्त होते. **बिंदू वा तृतीय नेत्र वा डोळा भेदून जेव्हा कुंडलिनी या प्रांतात प्रविष्ट होते, तेव्हा *योग्यासाठी जगाचे खरे अस्तित्व उरत नाही. आत्मवस्तूचा त्यास साक्षात्कार घडून येतो आणि याच अवस्थेत योगी परेपलीकडील प्रांत न्याहाळू लागतो.***

त्यानंतर *तुर्या* आणि सातवी भूमी *तुर्यगा* या त्यास प्राप्त होतात. *कैवल्यसाक्षात्कार* होतो. योगाची पूर्णता होते. जीव-शिव एकरूप होतात. शक्तीचे शिवाशी मिलन होते. परमधामात योगी जाऊन स्थित होतो. जीवन्मुक्तीची अंतिम स्थिती ती हीच! असो.

समारोप

योगवैभव या **एकादश स्कंधा**चे समालोचन केल्यानंतर आपण आता वळू या ***द्वादश स्कंध - भक्तिवैभव*** यातील प्रथम भागाकडे म्हणजे ***उन्मेष क्र.४७-१ - अनन्यभक्ती*** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::द्वादश स्कंध:::

::भक्तिवैभव::(४७-५१)

(पृ.क्र.८३१ते ९८०)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४७-१::

::अनन्यभक्ती::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४७-१

गीता:
९:१३,१४,२०-३३
ज्ञानेश्वरी:
९:३०२,३०५,३०६-४८९
१०:३१,३२
पा.यो.सू.:
१:२३

:::द्वादश स्कंध:::
::भक्तिवैभव::

::उन्मेष ४७-१::
::अनन्यभक्ती::

पूर्वानुसंधान::::

पूर्वविषयाचे एक विहंगावलोकन

मागील उन्मेषाअंती आपण योगधारेच्या सप्त ज्ञानभूमींचा परिचय नुकताच करून घेतला. विषयाच्या पूर्ततेसाठी तो आवश्यक आहे. असो. आतापावेतो आपण गीता-ज्ञानेश्वरीतील विविध विषयांचा सविस्तर परिचय करून घेतला. ***योगधारेच्या ज्ञान-कर्म-पंथराजयोग या तीन अंगांचा सर्वंकष स्पर्श आपणास आतापर्यंत केलेल्या विवेचनातून लाभला.*** ज्ञानेश्वरांच्या हाताला धरून आपण गीतामाऊलीच्या अनेकविध मनोज्ञतेचे दर्शन पावून धन्य झालो! त्या सर्व विचारविश्वाचे एक विहंगावलोकन करणे आता समयोचित होईल. तिकडे पुढील विषय हाताळण्यापूर्वी वळू या!

आत्मसाक्षात्काराचा मार्ग

ज्ञानेश्वरी हे आत्मसाक्षात्काराचे तत्त्वज्ञान व मार्ग सांगणारे गीतेवरील एक उत्कट भावपूर्ण दर्शन आहे, हे आपण पाहिले. त्यासाठी भगवत्कृपा व श्रीगुरुकृपा यांचे महत्त्व सांगितलेले आहे. ज्ञानेश्वरी हा अध्यात्मावरील स्वयंपूर्ण ग्रंथ आहे. अध्यात्माकडे वळणाऱ्या मनुष्याची मनोभूमिका अर्जुनाचे उदाहरण घेऊन आपण लक्षात घेतली आहे.

श्रीकृष्ण हे जगद्गुरू आहेत व त्यांनी लोकोद्धारार्थ गीता सांगितली आहे. प्राप्तार्थ पुरुषांची गीतोक्त स्थिती, सामरस्य, जीवाशिवाचे मिलन, संतमहात्म्यांचे कृपासामर्थ्य, ज्ञानदेवांची गुरुपरंपरा, नाथपंथीयांचे तत्त्वज्ञान, ज्ञानेश्वरी प्रकट करण्यामागील कलिग्रस्त जीवांचा उद्धार करण्याचा हेतू हे विषय आपण न्याहाळले आहेत.

ज्ञानेश्वरीतील *गीतामाहात्म्य, अद्वैतभक्ती व भक्तस्थिती, भगवंताचे भक्तावरील प्रेम, गीताफल, गीताध्यायसंगती* हेही विषय आपल्यापुढे येऊन गेले. गीतेतील *विभूतीं* चे व **विभूतितत्त्वा**चेही आपण दर्शन घेतले. **कर्मयोगा**चे रहस्य संक्षिप्ततया पाहून झाले. तसेच *ज्ञान - कर्म - योग* या त्रयीचा पण आपण सविस्तर परामर्ष घेतला. त्यासाठी **पातञ्जल योगसूत्रां**चा आवश्यक तो समन्वयही *पंथराज व गीतोक्त योग* यांच्याशी आपण केला.

यज्ञ या संकल्पनेचा परिचय आपण करून घेतला. **ब्रह्मयज्ञा**चे अप्रूप आपण पाहिले.ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांच्या आधारे आपण ***स्वामी श्रीस्वरुपानंदांच्या नित्यपाठ ज्ञानेश्वरी***ला समोर ठेवून ***कर्म-योग-ज्ञान व भक्ती*** या योगचतु:सूत्रीची सांगड घातली. ज्ञानेश्वरांनी गायिलेले गुरुऋण व गुरुमाहात्म्य अवलोकण्याचे महद्भाग्य आपणास प्राप्त झाले. प्रणवाच्या रेखाकृतीने रचलेल्या योगमार्गाची ओळख करून घ्यावी म्हणून ज्ञानदेवांचे बोट घरून आपण ज्ञानेश्वरी अभ्यासण्यास ***"ॐ नमो जी आद्या.."*** या प्रथमारंभीच्या ओवीपासून प्रारंभ कसा केला ते जिज्ञासूंस स्मरतच असेल.

ईश्वरप्रणिधानपूर्वक आचरावयाचा योगमार्ग

गीता व ज्ञानेश्वरी यातून योगाव्यतिरिक्त काहीही नाही. निखळ योगैकपरायण असे हे दिव्य ग्रंथ आहेत, असे प्रतिपादन किती सार्थ आहे, याची आपण अनुभूती घेत आहोत. यमनियमादींनी परिपूर्ण असणारा ***कुंडलिन्युत्थापनासह चक्रभेदनाचा पंथराज*** आपण आक्रमत आहोत.

त्यानिमित्ताने ***जीव-जगत-ईश्वर*** यांचा वेध घेणारे गीतेचे तत्त्वज्ञान व त्यावर प्रकाश टाकणारा श्रीज्ञानदेवांचा ***चिद्विलासवाद*** आपण समजावून घेतला. ***दैवासुरसंपत्तिविभाग*** आपण ध्यानी घेतला. त्या आधारे ***ईशत् संपत्तीचे अर्जन करण्याचा, रजस्तमोमलाचे क्षालन करून सत्त्वाधिष्ठित होण्याचा राजमार्ग कर्माधारे कसा वर्तावा*** हेही आपणास कळून आले.

गुणत्रय, श्रद्धात्रय, कर्मविभाग, कर्तृत्वशक्तीचे त्या अनुरूप असणारे सात्त्विकादी समुच्चय हे पाहून त्यांच्या आधारे ***कर्म ब्रह्मार्पण कसे करावे, याची युक्ती***ही आपण समजावून घेतली. *सात्त्विकतेकडून शुद्ध सत्त्वगुणाकडे कसे संक्रमण करावे, हे आपण ईश्वरास अनन्यशरण होण्यातून शिकलो.*

त्यासाठी ***ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनेचे रहस्य आपण पाहत आहोत. गीताभ्यासकांच्या दृष्टीने व साधकांसाठीही हा विषय तसा अति महत्त्वाचा आहे. म्हणून आपण तो शांत चित्ताने अत्यंत विस्तारपूर्वक पाहत आहोत.

हे *प्रणिधान डोळस असावे,* यासाठी आपण ***ज्ञानाचे डोळे*** बसवून घेतले. त्यासाठी *पुरुषोत्तमयोग, ईश्वराचे स्वरूप, जीव व जगत यांची विविध तत्त्वज्ञानोक्त स्थिती, ज्ञान व विज्ञान, अज्ञान म्हणजे काय; क्षेत्र-क्षेत्रज्ञविभाग, प्रकृति-पुरुषरहस्य, ब्रह्मांडाचा वंशवृक्ष व गीतारहस्य, अष्टधा प्रकृतिस्वरूप, साङ्ख्य तत्त्वज्ञान व ज्ञानमार्ग,* तसेच अनुषंगाने येणारे इतर विषय कौतुकाने पाहिले.

कर्म व संन्यास यांचे रहस्यही आपण विस्ताराने पाहिले. ***कर्मत्याग हा खरा संन्यास नव्हे, तर कर्मफलाचा त्याग हाच खरा संन्यास हे कर्मयोगाचे रहस्यपूर्ण सूत्र*** **त्यानिमित्ताने आपणास गंवसले.** हे सर्व विषय पाहतांना आपण जमेल तेवढा ***अमृतानुभव*** संदर्भानुरूप समजावून घेतला.

भक्तिमंदिराची नामदेवांची पायरी

या अमृतानुभवाची साक्षात अनुभूती प्राप्त व्हावी म्हणून आपण गीतेच्या गाभाऱ्याकडे वळलो. **सहाव्या अध्यायातील *ईश्वरप्रणिधानयुक्त राजयोग वा महायोग* हाच तो गीतेच्या गर्भागारातील पुराणपुरुष!! त्याचे दर्शन आपण ज्ञानदेवांच्या पंथराजसोपानात उभे राहून घेतले.** ज्ञानदेवांच्या अभंगसंपदेच्या प्रकाशात गीतेतील योगपुरुषाचा आपणास साक्षात्कार घडला!!

आपण आता उभे आहोत ते त्या योगोत्तमास उराउरी कवटाळून जन्मजन्मांतरीची त्याच्या भेटीची आस सफळ व्हावी म्हणून त्याच्या अंतरीच्या भक्तिमंदिराच्या दिंडीदरवाजात!! ईश्वरप्रणिधान मूर्त व्हावे, भक्तीचे योगमार्गातले उत्तुंग मेरुशिखर चढून जावे, मुक्तीवरला हा भक्तीचा मोती गवसावा, अशी उत्कट आर्तता आपणास लागलेली आहे. गीतेतील खऱ्याखुऱ्या ***भक्तिवेदांत*** प्रभूस आपण शरण होत आहोत. अद्वैतातही भक्तीचा महिमा ज्ञानदेव गातात; तो आपण अनुभवण्यास उत्सुक आहोत!!!

जीवाचे आता शिवाशी पुनर्मिलन होणार आहे. विराण्यांचा अंतरा वाजवत त्याच्या अखेरीच्या भैरवीकडे आपण वळणार आहोत! ***ज्ञान-कर्म-योग यांचा भक्तीशी होणारा समन्वय*** ज्ञानदेव आपल्यापुढे प्रकटवणार आहेत. गीतेतील एकमेवाद्वितीय अशा या ज्ञान-कर्म-योगत्रिवेणीचा संगम करत भक्तीची पुण्यपावन शीतल मधुरतोया रसधारा आता साकारणार आहे! भक्तिरसामृताची अवीट गोडी आता चाखावयास मिळणार आहे. त्या अमृताचे आकंठ पान करत शिवशक्ती या आद्य युगुलाचे आपण उत्रृण होण्यासाठी उत्सुक आहोत!

आपली ही आर्ती निववण्यासाठी, गीताप्रभूचे - त्या योगमार्तंडाचे साक्षात दर्शन घेण्यासाठी, अनंत जन्मांच्या कर्मयोगाधिष्ठित पुण्याईचा ठेवा त्या भक्तिमंदिरी अर्पिण्यासाठी, भक्तीच्या मऊसूत वाळवंटात विठ्ठलाच्या संगती शीतल रजनीनाथाच्या चंद्रिकासुधेत धुंद होऊन नाचण्या-बागडण्यासाठी, पंढरीच्या त्या पांडुरंगाच्या भेटीची आस पुरी करण्यासाठी, भक्तिकैलासाचे दर्शन घेऊन धन्य होण्यासाठी, भगवत्प्रेमात मग्न होऊन त्याच्याठायी लीन होण्यासाठी, त्या परमपद- अव्यय - अक्षय - अनादी - अनंत अशा निजधामात प्रवेशण्यासाठी आपण आता उतरत आहोत ते गीतेच्या गर्भागारात!!!

महाशून्याचे हे प्रांगण - हे विस्तीर्ण आनंदाचे आवार - आपणापुढे प्रकाशणार आहे, ते भक्तीच्या पायऱ्यांनी उतरून तेथे जावे म्हणून! चला जाऊ या त्या भक्तिमंदिराच्या संत श्रीनामदेवांच्या पायरीवरून पुढे! भक्तांनी भोळ्याभावाने आपली चिमुकली पावले या पायरीवर ठेवावीत, याचसाठी ना त्यांनी पांडुरंग विठ्ठलाच्या महाद्वारी समाधी घेतली होती! अनन्यभक्तीचा ठेवा आपणास तेथे संत श्रीनामदेवांकडून गवसणार आहे, तो पुढल्या वाटचालीसाठी!!

अनन्यभक्तीचा ठेवा

अनन्यभक्तीचा हा ठेवा लपवला आहे तो गीतेच्या नवव्या अध्यायात! ***राजविद्या - राजगुह्ययोग*** असे भलेमोठे नाम काहींनी या अध्यायास दिले आहे. पण संतसज्जन या अध्यायास ***अनन्यभक्तियोग*** असे संक्षिप्त पण सूचक संबोधन देतात. ज्ञानेश्वरीचा हा अध्याय किती उत्तुंगतेचा आहे, याची साक्ष श्रीज्ञानदेवांनी स्वतःच दिलेली आहे. ती आपण पूर्वीच पाहिली आहे. समाधिस्थ होतांना ज्ञानेशांच्या मांडीवर हाच ज्ञानदेवीचा अध्याय उघडून ठेवला होता!

"आतां अठरा पर्वीं महाभारतिं। तैं लाभे कृष्णार्जुनवाचोक्तीं। आणि जो अभिप्रावो सातेंशतीं। तो एकला नवमीं।१०-३१।।" अशी या अध्यायाची महती ज्ञानेशांनी सांगितली आहे. ***"म्हणौनि नवमींचिआं अभिप्रावां। सहसा मुद्रा लावावेआं। बिहालों मी वायां। गर्व कां करूं।।१०-३२।।"*** असे नम्रतापूर्ण उद्गार त्यांनी या अध्यायावरील रसग्रहण पूर्ण केल्यावर काढले आहेत, ते आपणास स्मरत असतीलच!

या अध्यायाचा काही भाग आपण पूर्वी ***ज्ञानविज्ञान, विभूतिमत्त्व, ईश्वराचे स्वरूप, दैवी व आसुरी संपदा, पंथराजदर्शन, गुरुवी भक्ती, ज्ञानयज्ञ*** इ.विषयांच्या निमित्ताने संदर्भानुरूप अवलोकिला आहे. आता ***अभक्त व भक्त*** यातील भेद समजावून घेण्यासाठी त्यातील काही उर्वरित भागाकडे वळणे इष्ट आहे. तरी तिकडे मोहरा वळवू या!

नवम अध्यायाचे पूर्वानुसंधान

"हे सर्व विश्व म्हणजे मीच" असे भगवंतांनी अर्जुनास सांगितले. ***"हें आंतुबाहेरीं मिआं कोंदिलें। जग निखिल माझेंचि वोतिलें"*** असे भगवंतांचे प्रतिपादन आहे. ज्ञानदेवांचा ***चिद्विलासवाद*** म्हणतात, तो हाच! असे असूनही ज्या मनुष्यांस त्याची प्रतीती येत नाही, त्यांना काय म्हणावे! असे श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणत आहेत. हा ***चिद्विलास न ओळखणारे ते अभक्त आणि हे प्रमेय आकळून घेऊन तसे आचरण करणारे ते भक्त*** अशी संक्षिप्त व्याख्या या प्रकरणी करता येते. अभक्तांना उद्देशून श्रीहरी ***"किं कर्म कैसें तेयां आलें। जैं मीचि नाहीं म्हणती।।९-३०२।।"*** असे म्हणत असल्याचे आपण पूर्वी पाहिले आहे. भगवंतांच्या विभूति आणि त्यांचा विस्तार न जाणणारे लोक आंधळ्यासारखे हाती आलेल्या चिंतामणी रत्नाचा गारगोटी समजून अव्हेर करतात. भगवंतांना सर्वत्र पाहण्याऐवजी नश्वरतेस कवटाळून संसार सार व सत्य समजण्याचा अज्ञानीपणा करतात. ***अज्ञान असणे ही अभक्ताची स्थिती आहे.***

भक्त हा ज्ञानीच असतो, अशी गीतेची श्रद्धा आाहे. भगवंताला न ओळखता केलेले सत्कर्मही वायाच जाते. म्हणून ज्ञानदेव म्हणतातः ***"तैसें ज्ञान सांडूनि जाएं। तैं ऐसिं हें दशा आहे। म्हणौनि कीजें तैं केलें नोहें। ज्ञानेंविण।। आंधलेआं गरुडाचें पांख आहाति। तैं कवणां उपेगां जाति। तैसें सत्कर्माचे उपखें ठाति। ज्ञानेंनवीण।।९-३०५,३०६।।"*** - ज्ञानाविण उपासना करणारा अज्ञानी अभक्त असतो, असे येथे स्पष्ट होते.

अभक्त म्हणजे जो विभक्त आहे तो! जो भगवंतापासून विलग आहे, तो अभक्त व जो त्याच्याशी युत आहे, तो भक्त अशी यामागील

संकल्पना आहे, हे जिज्ञासूंनी पुढील विवेचनाबाबत लक्षात घेण्यासारखे आहे. असो. अशा अभक्त दशेत उपजवलेले कर्म वाया जाते; भगवंतापासून वेगळे ठेवणारे ठरते, असे गीता म्हणते.

वेदोक्त यज्ञादी पुण्यकर्मे करूनही अभक्तांस स्वर्गापेक्षा मोठी अशी जी भगवत्प्राप्ती असते, ती बाकी होत नाही! फार फार तर स्वर्गफल, तेही नश्वरतेचे द्योतकच, असे लाभते.

अज्ञानी भक्त::::

वेदांचे फल

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा-
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते।
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोक–
मश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान्।।९-२०।।

"तिन्ही वेदांचे ज्ञाते यज्ञांद्वारे पवित्र होऊन सोमपान व स्वर्गात स्थान मागतात. कारण ते मला जाणत नाहीत. यज्ञात यजन करावयाचे असते, ते माझ्या प्राप्तीसाठीच हे ज्ञान नसल्याने ते पुण्यफल म्हणून स्वर्गलोक वांछितात आणि देवेंद्राच्या त्या लोकी दिव्य असे भोग भोगण्यात धन्यता मानतात."

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं-
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना-
गतागतं कामकामा लभन्ते।।९-२१।।

"पण पुण्यफल सरले की तो दिव्य उपभोग देणारा विशाल स्वर्गलोक त्यांच्या कवेतून निसटतो आणि ते पुनश्च या मृत्युलोकी आगमन करतात. विषयवासनांना बळी पडणारे असे ते लोक तिनही वेदांनी आश्वासलेल्या अशा नश्वर फलप्राप्तीचे धनी होतात. वेदांनी सांगितलेल्या उपासना, यज्ञादी अशा प्रकारे आचरणारे ते फलेच्छु जन मग त्या जन्ममृत्यूंच्या दुश्चक्रात अडकून राहतात."

भगवंतांचे हे स्पष्ट प्रतिपादन शब्दबद्ध करत ज्ञानदेव म्हणतातः

देख पां गां किरीटी। आश्रमधर्माचिआं राहाटी।
विधिमार्गा कसवटी। जैं आपणचि होति।।९-३०७।।
यजन करितां कवतुकें। तिहीं वेदांचां माथां तुकें।
क्रिया फलेंसि उभी ठाकें। पुढां जेआं।।३०८।।
ऐसें दीक्षित जैं सोमप। जैं आपणचि यज्ञाचें स्वरुप।
तिहिं तेआं पुण्याचेनि नांवें पाप। जोडिलें देख।।३०९।।

श्रीकृष्ण म्हणतात, "हे अर्जुना! आश्रमधर्म कसोशीने पाळून जे कोणी वेदोक्त मार्गाचे आपणच मार्गदर्शक ठरतात; जे सहज जरी यज्ञ करू लागले तरी तिनही वेद संतुष्ट होतात आणि यजनक्रियेचे फल त्यांच्यापुढे यज्ञदेवतेसह येऊन तिष्ठू लागते; असे जे सोमपान करण्याचे अधिकारी यज्ञवेत्ते ज्ञाते आहेत, ते स्वतःच यज्ञाचे मूर्तिमंत स्वरूपच जणू असतात. पण पहा! पुण्य करण्याच्या नावाने त्यांनी पापच कसे पदरी बांधून घेतले आहे!"

जैं श्रुतित्रयांतैं जाणोनि। शतवरी यज्ञ करौनि।
यजिलिआं मातें चुकौनि। स्वर्गु वरिति।।९-३१०।।
जैसें कल्पतरुतलौटीं। बैसौनि झोलिएं पाडिं गांठीं।
मग निदैव निगें किरीटी। दैन्यचि करूं।।३११।।
तैसें शतक्रतु यजिलें मातें। कीं इप्सिताति स्वर्गसुखातैं।
आतां पुण्य कीं हें निरुतें। पाप नोहें।।३१२।।
म्हणौनि मजविण पाविजैं स्वर्गु। तो अज्ञानाचां पुण्यमार्गु।
ज्ञानिएं तेआंतैं उपसर्गु। हानि म्हणति।।३१३।।

"वेदत्रयीचे ते ज्ञाते शतयज्ञ करूनसुद्धा मज यज्ञनारायणास विसरतात आणि यज्ञक्रियेच्या फलस्वरूपी नश्वर अशा स्वर्गास वरतात! खरे तर यज्ञयागादी जे काही विध्यनुरूप कर्म करायचे असते, ते केवळ माझ्या प्राप्तीसाठी करायला हवे! पण कल्पवृक्षाखाली बसलेला एखादा मनुष्य जसा दुर्भाग्यवश चांगली कामना न करता भीक मिळावी म्हणून झोळी काखेला लावून निघावा, त्याप्रमाणे शंभरदा माझ्या प्राप्तीसाठी करावयाचे यज्ञ केवळ त्या तुच्छ स्वर्गलोकाच्याच प्राप्तीसाठी करून माझी प्राप्ती करून न घेता ते स्वर्गच पसंत करतात. भगवंतापासून दुरावणारे असे हे यज्ञकर्म पुण्यप्रद खरेच आहे का! अरे! हे तर निव्वळ पापच नाही का! असा हा अज्ञानी भक्तांचा पुण्यमार्ग आहे. ज्ञानी भक्त तर त्याला विघ्नदायक व नाश करणारा पापमार्गच समजतात."

यज्ञाचे खरे स्वरूप न जाणण्याने अशा प्रकारे त्या अज्ञानी जनांची जी दशा होते, ती फारच केविलवाणी आहे. भगवंताचे निजधाम प्राप्त करून घेण्याऐवजी ते केवळ अनित्य असे स्वर्गसुख मिळवतात.

पुण्यात्मक पाप व पापात्मक पाप

एरविं तन्हैं नरकींचें दुःख। पावोनि स्वर्गा नाम कीं सुख।
वांचूनि नित्यानंद गां निर्दोख। तैं स्वरूप माझें।।९-३१४।।
मज एतां पैं सुभटा। या द्विविध गां आव्हांटा।
स्वर्गु नरकु ययां वाटा। चोरांचिआं।।३१५।।
स्वर्गा <u>पुण्यात्मकें पापें</u> येईजे।
<u>पापात्मकें पापें</u> नरकां जाईजे।..।।३१६।।

"आणि त्या स्वर्गसुखाची तरी एवढी काय मातब्बरी आहे! नरकातील दुःखांच्या तुलनेत स्वर्गीचे भोग सुख म्हणून मान्यता पावले आहेत. खरे तर निर्दोष निखळ आनंद देणारे सुख माझ्या स्वरूपी येऊन मिळण्यात आहे. कर्ममार्गाने माझ्याकडे येतांना स्वर्ग व नरक या दोन आडवाटा लागतात. त्या दोन्ही वाटांवर वाटमारी होऊन साधक नागवला जातो. ***पुण्यात्मक पाप म्हणजे विधिवत यजनयाजन, कर्मे-क्रिया, भजन-पूजन, अर्चना-उपासना ही करूनही भगवंतास विसरणे.*** यामुळे स्वर्ग प्राप्त होतो. ***विहित कर्मत्यागाचे फळ म्हणून पापात्मक पाप जोडले जाते*** व नरकाची प्राप्ती होते."

...। मग मातें जेणें पाविजें। तैं शुद्ध पुण्य।।९-३१६।।
आणि मजचिमाझिं असतां। जेणें मी दूरी होएं पांडुसुता।
तैं पुण्य ऐसें म्हणतां। जीभ न तुटें काईं।।३१७।।

परि हें असो आतां प्रस्तुत। आइकें इयांपरी जैं दीक्षित।
यजूनि मातें याचित। स्वर्गसुखभोगु।।३१८।।
मग मी न पविजें ऐसें। जैं पापरूप पुण्य असें।
तेणें लाधलेनि सौरसें। स्वर्गां एतिं।।३१९।।

"माझी प्राप्ती केवळ शुद्ध पुण्यसंचयाने होते. कर्मयोगाने असे शुद्ध पुण्य प्राप्त होते! आणि हे पांडुपुत्रा! स्वर्ग प्राप्त करून देणाऱ्या कर्मास पुण्यप्रद म्हणतांना जीभ का झडून जात नाही! अरे! ***ज्यामुळे जवळच असणारा मी आत्माराम दुरावला जातो व स्वर्गाचा लोभ जडतो, त्यास कोणीतरी पुण्य म्हणावे काय!*** पण हे असू दे. असे जे याज्ञिक वा दीक्षित असतात, ते माझ्यासाठी करावयाच्या यज्ञाद्वारे स्वर्गसुखाची याचना करून अशा त्या पापरूपी पुण्याईच्या जोरावर स्वर्ग पावतात. पण मला टाकतात आणि अशा त्या स्वर्गात मिळणारी नश्वर सुखे ते उपभोगतात."

स्वर्गसुख

जेथ अमरत्व हेंचि सिंहासन। ऐरावतासारिखें वाहन।
राजधानीभुवन। अमरावती।।९-३२०।।
जेथ महासिद्धींची भांडारें। अमृताचिं कोठारें।
जिएं गांविं खिल्लारें। कामधेनूंचि।।३२१।।
जेथ वोलगें देव पाईका। सैंघ चिंतामणिचिआं भूमिका।
विनोदवनवटिका। सुरतरूंचिआं।।३२२।।
गंधर्वगानगायनिं। जेथ रंभेचिआं ऐसिआं नाचणी।
उर्वशी मुख्य विलासिनी। आंतौरिआं।।३२३।।

"स्वर्गातील सिंहासन म्हणजे अमरत्व आहे. ऐरावतासारखे दिमाखदार वाहन तेथे मिळते. अमरावतीसारखी सुंदर नगरी तेथील राजधानी आहे. अणिमादी महासिद्धींची भांडारे आहेत. अमृताची कोठारे शिगोशिग भरून ओसंडली आहेत त्या स्वर्गात! कामधेनूंची खिल्लारे तेथे नांदतात. स्वर्गात देवच तुमची चाकरी करतात. सर्वत्र चिंतामणिरत्नखचित जमीन आहे. सहलीसाठी आणि सुखविलासासाठी कल्पतरूंची उद्यानेच्या उद्यानेच तेथे निर्मिली आहेत. आणि काय सांगावे! स्वर्गातील दिव्य गायक साक्षात गंधर्वच होत. रंभेसारख्या लावण्यखनी अप्सरांचा नाच पाहण्याचे नेत्रसुख तेथे प्राप्त होते! विलास करण्यासाठी शेजेवर अप्सरा असतात त्या उर्वशीसारख्या!"

मदन वोलगें शेजारें। जेथ चंद्रु सिंपें सांबरें।
पवना ऐसें म्हणयारें। धांवणें जेथ।।९-३२४।।
पैं बृहस्पति आपण। ऐसें स्वस्ति श्रिएंचें ब्राह्मण।
तटिएंचें सुरगण। विकार जेथ।।३२५।।
लोकपाल रांगेचें। राऊत जिएं पदींचें।
उच्चैःश्रवा खांचें। खोलणिएं।।३२६।।
हें असो बहु जैं ऐसें। भोग इंद्रसुखासरिसें।
तैं भोगिजति जंव असे। पुण्यलेसु।।३२७।।

"शय्यागृहात तर प्रत्यक्ष मदनच तुमची सेवा करतो. याहून उत्कट उपभोग ते कोणते असणार! स्वर्गात चंद्र आपल्या सुधेने सडासंमार्जन करत असतो. पवनच साक्षात तेथील जासूदाचे काम तत्परतेने करत असतो. प्रतिबृहस्पतीच असे ब्राह्मण स्वर्गातील यजमानांसाठी *स्वस्ति, श्री* असे शुभ चिंतितात! पंक्तीला देवगण शेजारी बसतात! स्वामींचे राऊत म्हणून खुद्द लोकपाळांच्या योग्यतेचे स्वार तेथे दिले जातात. बसण्यास स्वारीसाठी उच्चैःश्रवा नामक जातिवंत अश्वरत्न तेथे हजर असते. हे वर्णन किती करावे! तेथे साक्षात इंद्रास जे सुख मिळते, तेच इतरांनाही मिळते. स्वर्गकामी याज्ञिक मग त्या सर्व सुखांचा यथेच्छ उपभोग त्यांच्या पुण्याचा जेवढा वाटा असतो, त्याप्रमाणे भोगतात."

"तैं मातें चुकलें"

पण पुण्याचा लेश सरला की काय होते, पाहा:

मग तेआं पुण्याचिं पाउटीं सरें। सवेंचि इंद्रपणाचि उटी उतरें।
आणि येऊं लागति माघारें। मृत्युलोकां।।९-३२८।।
जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचें। मग दारहिं चेंपूं न एं तिऐंचें।
तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें। काइं सांघों।।३२९।।
एवं थितिआं मातें चुकलें। जिहिं पुण्यें स्वर्ग कामिलें।
तेआं अमरपण तैं वावों जाहालें। आतां मृत्युलोकु।।३३०।।

"पुण्याईने प्राप्त झालेले देवत्व पुण्याचा उपभोग घेत घेत सरते. पुण्य सरले की इंद्रत्वाचे ऐश्वर्य व भोग लुप्त होतात आणि यज्ञाच्या बळावर स्वर्ग गाठणाऱ्यास परत मृत्युलोकी येणे भाग पडते. वेश्यागमन करणाऱ्याची संपत्ती वेश्येवर उधळली गेली की जशी ती त्याच्यासाठी दारसुद्धा किलकिले करून पाहत नाही, तशी या यज्ञकर्त्या दीक्षितांची लाजिरवाणी स्थिती असते. यज्ञ करूनही त्यांना माझी प्राप्ती होत नाही आणि त्या पुण्यकर्माचे फल म्हणून त्यांना ज्या स्वर्गाची आस असते, तो पण त्यांच्या हातातून असा निसटून त्यांना पुनश्च मृत्युलोकी जन्म घ्यावा लागतो."

मातेचिआं उदरीं। पचूनि मलाचिआं दाठरीं।
उकडूनि नऊमासवरी। जन्मजन्मौनि मरति।।९-३३१।।
अगां स्वप्नीं निधान फांवें। परि चेइलिआं हारपें आघवें।
तैसें स्वर्गसुख जाणावें। वेदज्ञाचें।।३३२।।

"मातेच्या उदरात, गर्भाशयाच्या घन अंधतमात, मलमूत्राच्या कूपात नऊ नऊ मास सडत पडून रहावे लागते. जन्मामागून अनंत जन्म त्यांना या मृत्युचक्रातून फिरावे लागते. निद्रितास स्वप्न पडून खजिना मिळावा आणि जागे झाल्यावर तो दिसू नये, असे वेदज्ञांस मिळणाऱ्या सर्गसुखाची स्थिती आहे."

अर्जुना वेदु जऱ्हैं जाहाला। तऱ्हैं मातें नेणतां वायां गेला।
कणु सांडौनि उपणला। कोंडा जैसा।।९-३३३।।
म्हणऊनि मज एकेंविण। हें त्रयीधर्म कारण।
आतां मातें जाणौनि कांहिं नेण। तूं सुखिआं होसिं।।३३४।।

"हे अर्जुना! मूर्खपणे धान्य वेचून घेण्याऐवजी कोंडा पाखडून घ्यावा, तसे हे होते. वेदाचे फल म्हणून मला जाणून घेण्याऐवजी त्यातील कर्मकांडे प्रशस्त करणारे ते मूढ वेदज्ञ वायफळ स्वर्ग कवटाळायला जातात! म्हणून तू मला जाणून घे! माझ्यावाचून हे तिन्ही वेद निरर्थक आहेत. मला जाण आणि सोलीव सुख प्राप्त करून घे."

अनन्यभक्त::::

"मातें जाणौनि काईं नेण। सुखिआं होसिं"

आपल्या भक्तांचे अनन्यभाव सांगतांना श्रीकृष्ण म्हणतातः

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।

"अनन्यभावाने माझे चिंतन करणाऱ्या आणि ईश्वरप्रणिधानाची अशी जी श्रेष्ठ उपासना आहे, तिचा अवलंब करून माझ्याशी नित्य युत राहणाऱ्या त्या माझ्या भक्तांचा अनन्यभाव जाणून मी त्यांचा योगक्षेम वाहतो."

त्यांची काळजी भगवंत कशी घेतात, ते ज्ञानेशमुखे आपण श्रवण करू याः

पैं सर्व भावेंसि उखितें। जैं वोपिलें मज चित्तें।
जैसा गर्भगोलु उद्यमातें। कोणाहिं नेणें।।९-३३५।।
तैसां मीवांचौनि काईं। आणिक गोमटेंचि नाईं।
मजचि नाम पाहिं। जिणेआं ठेविलें।।३३६।।
ऐसें अनन्यगतिकें चित्तें। चिंतितसांतैं मातें।
जैं उपासिति तेआंतैं। मीचि सेविं।।३३७।।

"सर्व अष्टसात्त्विकादी भाव यांसह आपले संपूर्ण चित्त ज्यांनी मजप्रति अर्पण केले आहे; जे जीवाभावाने मजसाठी विकले गेले आहेत; मातेच्या गर्भातील बालक जसा कोणताही उद्यम करत नाही, त्याप्रमाणे ज्यांना मजवाचून दुसरी स्थिती माहीत नसते; ज्यांनी माझ्याठायी अवघे जीवन समर्पित केले आहे; अशा त्या माझे अनन्यगतिक चित्ताने सदा चिंतन करणाऱ्या - सर्वदा माझी अशी उपासना करणाऱ्या भक्तांसाठी मी काय करणार नाही सांग बरे! हे अर्जुना! माझ्या या अनन्यभक्तांची सेवा साक्षात मी श्रीहरी स्वतः करतो!"

"तेआंचेनि काईसेनिहिं। न लजे मी"

तैं एकवटूनि जिएं क्षणिं। अनुसरलें गां माझिआं वाहणि।
तेव्हांचि तेआंचिं चिंतवणि। मजचि पडिलीं।।९-३३८।।
मग तिहिं जैं जैं करावें। तैं मजचि पडिलें आघवें।
जैसिं अजातपक्षाचेनि जीवें। पक्षिणि जिएं।।३३९।।
आपुलीं तानभूक नेणें। तानेआं नीकैं तैं माऊलीसिचि करणें।
तैसें अनुसरलें जैं मज प्राणें।
तेआंचेनि काईसेनहिं मी न लजे।।३४०।।

"ज्या वेळी त्या भक्तांनी मजप्रति एकनिष्ठेची आण वाहिली, त्या क्षणीच मी त्यांचा भार माझ्या माथी घेतला, असे समज. पंख न फुटलेल्या पिलांची सर्व काळजी जशी पक्षिणीला असते; आपली तहानभूकही न ओळखता येणाऱ्या नवजात अर्भकाचे हवे नको ते सर्व जसे मातेसच पाहवे लागते; तसेच त्या अनन्यभक्तांचे - मला जीवाभावाने शरण आलेल्यांचे सर्व काही मीच करतो. त्यांची कोणतीही सेवा करणे मला हलकेपणाचे वाटत नाही."

तेआं माझिआं सायुज्याचि चाड। तऱ्हैं तैंचि पुरविं कोड।
कां सेवा म्हणति तऱ्हैं आड। प्रेम सूएं।।९-३४१।।
ऐसा मनीं जो जो धरिति भाओ।
तो तो पुढां पुढां लागें तेआं देओ।
आणि दिधलिआंचां निर्वाहों। तोहिं मीचि करीं।।३४२।।
हा योगक्षेमु आघवा। तेआंचां मजचि पडिला पांडवा।
जेआंचिआं सर्वभावा। आश्रओ मी।।३४३।।

"त्यांना माझ्या सायुज्याची आवड असली, तर ती मीच पुरवितो. किंवा जर ते माझी सेवा करू इच्छितील, तर तसा भाव मी त्यांच्यात पराकोटीला नेऊन पोहोचवतो! ते आपल्या मनात जे जे भाव कल्पितात, ज्या ज्या इच्छा धरतात, त्या सर्वांची आपूर्ती मी करतो. सर्व भावांना माझ्याठायी अर्पिणाऱ्या त्या भक्तांचा असा हा योगक्षेम मीच चालवितो! त्यांचा सर्व भार मीच वाहतो, यात कोणताही संशय नाही."

भगवत्स्वरूपाचे अज्ञान::::

अज्ञानभक्ती

परंतु भगवंताला न ओळखताच काही जण त्याची भक्ती करू पाहतात. त्यांच्याविषयी श्रीकृष्ण काय म्हणतात, पाहाः

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्।।९-२३।।
अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च।
न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते।।९-२४।।

"हे पृथापुत्रा! तरी पण श्रद्धायुक्त अंतःकरणाने काही इतर देवतांना भजणारेही भक्त असतात. खरे तर ते पण माझीच भक्ती करतात. परंतु ते अज्ञानपूर्वक अशी उपासना करत असतात. सर्व यज्ञांचा आणि सर्व कर्मांचा भोक्ता हा केवळ मी एकटाच असल्याने इतर देवतांची त्यांनी केलेली भक्ती माझीच भक्ती ठरते. पण अज्ञानपूर्वक ते ही भक्ती करत असतात आणि मला जाणून घेत नसल्याने मजप्रत येऊन पोहोचत नाहीत व जन्ममृत्यूच्या दुश्चक्रात सापडतात."

"मातें नेणौनि भजन। तैं वांयांचि गां"

अज्ञानी जनांची ही भक्ती वास्तविक खरी भक्ती नव्हेच! भक्त हा ज्ञानीच असला पाहिजे, हा भाव प्रकट करत ज्ञानदेवही म्हणतात कीः

आतां आणिकहिं संप्रदाएं। परि मातें नेणति सोमाएं।
जैं अग्नि इंद्र सूर्य सोमाएं।
म्हणऊनि यजति।।९-३४४।।

तैंहिं किर मातेंचि होएं। कां हें आघवें मीचि आहे।
परि तैं भजति उजरी नोहें। विषम पडें।।३४५।।
पाहें पां शाखा पल्लव वृक्षाचें। हें काएं नव्हति एकाचि बीजाचें।
परि पाणी घेणें मुलींचें। तैं मुलींचि घापें।।३४६।।

"याज्ञिक, वेदोक्त कर्मे आचरणारे आणि स्वर्गकामी असे जे उपासक यापूर्वी सांगितले, त्यांच्याव्यतिरिक्तही उपासकांचे आणखी इतर प्रकार आहेत. यज्ञ करून इंद्र, अग्नी, सोम, सूर्यादी देवतांना हविर्भाग अर्पण करणारे जे उपासक मला न जाणता - सर्व यज्ञांचा भोक्ता असणाऱ्या मला न ओळखता उपासना करतात, त्यांचा मार्ग सरळ नव्हे. जरी त्यांचे यज्ञ खरे तर माझ्यासाठीच असतात, तरीही इंद्रादी देव ही माझीच रूपे आहेत हे न ओळखल्याने, त्यांचे यज्ञयाग विफल होतात. शाखा-पल्लव इ.वृक्षाचेच अवयव असतात आणि एकाच बीजापासून ते निर्माण झालेले असतात. पण पाणी शोषणे हे कार्य मुळांचेच असल्याने पाणी द्यावयाचे झाले तर ते मुळांनाच घातले पाहिजे, नाही का!"

कां दाहाहिं इंद्रिएं आहाति। इएं जन्हैं एकेंचि देहिंचि होति।
आणि इहिं सेविलें विषयो जाति। एकाचि ठाईं।।९-३४७।।
तन्हैं करौनि रससोएं बरविं। कानीं केवीं भराविं।
फलें आणौनि बांधाविं। डोलां केंविं।।३४८।।
तेथ रसु तो मुखैंचि सेवावा। परिमलु तो घ्राणेंचि घेआवा।
तैसा मी तो यजावा। मीचि म्हणूनि।।३४९।।
एर मातें नेणौनि भजन। तैं वांयांचि गां आनेंआन।
म्हणौनि कर्माचें डोलें ज्ञान। तैं निर्दोख होआवें।।३५०।।

"दहाही इंद्रिये ही एकाच देहाची असतात आणि त्यांनी सेवन केलेले विषय एकाच एका उपभोक्त्याठायी पोहोचतात. पण म्हणून काय उत्तमोत्तम पक्वान्ने कानात भरावीत की फुले डोळ्यांवर माळावीत! सुग्रास अन्न तर मुखानेच सेवन केले जाते आणि फुलांचा परिमळ घ्राणेंद्रियाद्वारेच घेता येतो नाही का! त्याचप्रमाणे यजन करावयाचे तर ते माझ्याप्रीत्यर्थच केले पाहिजे! मला न जाणता केलेली भक्ती व्यर्थ ठरते! ***ज्ञान म्हणजे मला मी जसा आहे, तसा जाणणे! भक्तीचे कर्म सफल होण्यासाठी त्या कर्माला स्वच्छ ज्ञानदृष्टी असली पाहिजे."***

अज्ञानभक्तीचे फल

हे विधान अधिक स्पष्ट करत ज्ञानेश श्रीकृष्णोक्ती सांगतात:

एन्हविं पाहें पां पांडुसुता। या यज्ञोपहारां समस्तां।
मी वांचौनि भोक्ता। कवणु आहे।।९-३५१।।
मी सकलां यज्ञांचां आदि। आणि यजना यां मीचि अवधि।
कीं मातें चुकौनि दुर्बुद्धी। देवां भजलें।।३५२।।

"यज्ञादींतील समस्त उपहारांचा भोक्ता मज भगवंताशिवाय इतर कोणी आहे का! हे अर्जुना! सर्व यज्ञांचे प्रयोजन माझ्यासाठीच नसते का! आणि सर्व यज्ञ माझ्याठायीच समावत नाहीत का! सर्व यज्ञादी कर्मांच्या आदि-अंती असा जो मी प्रभू आहे, त्या मला भजावयाचे सोडून जे अन्य देवदेवतांतरांना भजत बसतात, ते मला कधीतरी येऊन पावतील का!"

गंगेचें उदक गंगें जैसें। अर्पिजें देवपितरोद्देशें।
माझें मज देति तैसें। परि आनानिं भाविं।।९-३५३।।
म्हणऊनि तैं पार्था। मातें न पवतिचि सर्वथा।
मग मनीं वाहिलीं जैं आस्था। तेथ आलें।।३५४।।

"गंगेतील पाणी घेऊन देव व पितर यांच्याप्रीत्यर्थ तर्पण करतांना पुनश्च गंगेतच जरी ते सोडून दिले तरी ते त्या त्या देवपितरांपर्यंत जसे पोहोचते, त्याप्रमाणेच त्या लोकांची भक्ती आहे. ही भक्ती अंती जरी माझ्याठायी पोहोचवत असली, तरी ती ज्यांच्यासाठी केली जाते, त्या त्या देवांप्रत पोहोचवणारी ठरते. जोपावेतो या अज्ञ उपासकांना माझे ज्ञान प्राप्त होत नाही, तोवर ते मला न पावता त्या त्या लोकांप्रति जातात. त्या त्या देवतेचे ते होऊन राहतात."

म्हणून भगवंत पुनश्च हा ***अनन्यभक्तीचा सिद्धांत*** स्पष्ट करत असता सांगतात की:

यान्ति देवव्रता देवान्पितॄन्यान्ति पितृव्रताः।
भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम्।।९-२५।।

"देवतांची उपासना करणारे उपासक देवत्वाप्रत जातात. पितरांस भजणारे पितृत्व पावतात. भूतांची भक्ती करणाऱ्यांस भूतलोक प्राप्त होतो. माझी भक्ती करणारे, माझेच केवळ भजन करणारे, एका मजसाठीच यजन-याजन करणारे मात्र मद्रूप होतात."

"जसा भाव तसा देव" हे भगवंतांचे म्हणणे आहे. ते स्पष्ट करतांना ज्ञानेश म्हणतात:

मनें वाचा करणीं। जेआंचि भजनें देवांचिआं वाहणि।
तैं शरीर जातिएं क्षणि। देवचि जाहालें।।९-३५५।।
अथवा पितरांचि व्रतें। वाहति जेआंचि चित्तें।
जिवित सरलेआं तेआंतैं। पितृत्व वरी।।३५६।।
कां क्षुद्रदैवतादी भूतें। तिएंचि जेआंचि परमदैवतें।
जिहिं अभिचारिकीं तेआंतैं। उपासिलें।।३५७।।
तेआं देहाचि जवनिक फिटली। आणि भूतत्वाचिं प्राप्ति जाहालीं।
एवं संकल्पवशें फललीं। कर्में तेआं।।३५८।।

"काया - वाचा - मन व इंद्रियांद्वारे देवतांची भक्ती करत ज्यांचे आयुष्य कारणी लागते, ते देहांतरी देवत्व पावतात. पितृगणांसाठी व्रते व वैकल्ये करण्यातच ज्यांचे चित्त रममाण होते, ते जीवित सरले की पितृत्व पावतात आणि क्षुद्र दैवते-भूतेखेते-पिशाच्चे यांची जारण - मारण आदी अभिचारक कर्मांद्वारे ज्यांनी उपासना केलेली असते, त्यांना मरणोत्तर भूतखेत-पिशाच्चादी योनींची प्राप्ती होते. याप्रमाणे विविध देवतांच्या उपासना करून आपापल्या कामनेप्रमाणे उपासकांस त्या त्या दैवतांप्रत त्यांचे यजनकर्म नेऊन ठेवते."

अनन्यभक्ती::::

"तैं मरणाचिएं ऐलिचकडें। मज मिळौन गेलें"

जे उपासक खरी साधना जाणतात, ते त्या एका जगन्नियंत्याला मात्र भजतात आणि त्याच्या निजधामात प्रवेशतात. कसे ते ज्ञानेशांच्या शब्दात ऐकू या:

मग मीचि डोळां देखिलां। जिहिं कानिं मीचि आईकिलां।
मनीं मी भाविन्नलां। वानिलां वाचा।।९-३५९।।
सर्वांगिं सर्वांठाईं। मीचि नमस्कारिला जिहिं।
दानपुण्यादिकें जैं काईं। तैं माझिआंचि मोहरां।।३६०।।
जिहिं मातेंचि अध्ययन केलें। जैं आंतरबाहेरीं मिआंचि धालें।
जेआंचें जिवित्व जोडिलें। मजचिलागिं।।३६१।।

मनीमानसी ज्यास स्मरावे; ज्याचे भजन-पूजन करावे; ज्याचे यजन-याजन करावे; ज्यास उपासावे, ज्याची सेवा-अर्चना-आराधना करावी; काया-वाचा-मने ज्यास वाहून घ्यावे, त्याच ध्येय्य वस्तूशी साधक एकरूप होतो, असा निष्कर्ष **पातञ्जल योगसूत्रां**वरून निघतो. **गीतासुद्धा हाच सिद्धांत ईश्वरप्रणिधानासह प्रकट करत आहे.** या सिद्धांताची पुष्टी भगवंतांच्या वाणीद्वारे होते. ते पुढे म्हणतात:

"हे पार्था! असे असल्याने जे डोळ्यांद्वारे सर्व जगतात मीच भरलेला आहे असे पाहतात; कानांद्वारे माझीच कीर्ती श्रवण करतात; मनी मलाच ध्यातात; चित्तात माझीच मूर्ती ठसवतात; वाचेद्वारे जे माझीच स्तोत्रे गातात; आपले सर्वांग - आपली सर्वेंद्रिये जे माझ्याठायीच, माझ्याच सेवेत वेचतात; सर्वत्र मज एकासच पाहत जे मला नमस्कारितात; दानादी पुण्यकर्मे जे माझ्यासाठीच करतात; जे निरंतर माझ्याच स्वरूपाचा ध्यास घेतात; जे मलाच अध्ययनाचा विषय करतात; जे अंतरबाह्य मलाच सेवून तृप्त झालेले असतात; ज्यांनी माझ्यासाठीच जन्म घेतलेला असतो; ज्यांचा जीवप्राण माझ्याच ठायी जडलेला असतो;"

जैं अहंकारु वाहत आंगिं। आम्हीं हरीचें भूषवयालागिं।
जैं लोभिएं एकचि जगिं। माझेनि लोभें।।३६२।।
जैं माझेनि कामें सकाम। जैं माझेनि प्रेमें सप्रेम।
जैं माझिएं भुलीं सभ्रम। नेणति लोक।।३६३।।
जेआंचि जाणति मजचि शास्त्रें। मी जोडें जेआंचेनि मंत्रे।
ऐसें जैं चेष्टामात्रें। भजलें मज।।३६४।।
तैं मरणाऐलीचिकडें। मज मिळौनि गेलें फुडें।
मग मरणिं आणिकीकडें। जातील केविं।।३६५।।
म्हणौनि मद्याजि जैं जाहालें। तैं माझिआं सायुज्यां आलें।
जिहिं उपचारमिखें दिधलें। आपणपें मज।।३६६।।

"आम्ही तर हरीचेच आहोत, या भावाचे भूषण बाळगण्याचा अहंकार जे राखतात; माझ्याच लोभावर जे लुब्ध होत जगात वावरतात; माझी कामना ठेवणे हाच ज्यांचा काम असतो; माझी भूल पडून जे भ्रमिष्ट होऊन मजवाचून इतरांस ओळखतही नाहीत; ज्यांची शास्त्रे केवळ मलाच जाणतात; ज्यांच्या मंत्रांनी केवळ माझीच प्राप्ती होते; अशी ही सर्व क्रियाकर्मे जे आजीव करत असतात; ते मृत्यूआधीच मला येऊन मिळालेले असतात. मग मृत्यूपरांत त्यांची काय गती असते, ते काय सांगायलाच हवे काय! ज्यांनी उपासनेसाठी आपले सर्वस्व मजठायी अर्पिलेले असते, ते असे सर्वार्थाने माझे यजन-याजन करणारे होऊन माझ्याठायी एकरूप झालेले असतात, यात काय नवल!"

अनन्यभक्ती

अनन्यभक्ती हाच भगवंताला भेटण्याचा एकमेव मार्ग आहे, असे श्रीकृष्णांचे सांगणे आहे; ते ज्ञानेशांच्या ओव्यातून दिसते, ते असे:

पैं अर्जुना माझां ठाईं। आपणपेनविण सौरसु नाहिं।
मी उपचारीं कवणाहिं। नाकळें गां।।९-३६७।।
एथ जाणिव करीं तोंचि नेणें। आथिलेपणें मिरविं तोचि उणें।
आम्हीं जाहालों आइसें जो म्हणे। तो काहिंचि नोहें।।३६८।।

"हे अर्जुना! माझ्याशी अनन्य असणे हाच खरा भक्तिमार्ग आहे. भक्तांच्या अनन्यभावानेच मी प्रसन्न होतो. इतर कोणत्याही विधि-उपचारादींनी मला जाणून घेणे अशक्य आहे. कारण जेव्हा कोणी असे म्हणतात की आम्हास भगवंताचे ज्ञान झाले आहे, तेव्हा त्यांना खरे ज्ञान झालेलेच नसते. आम्ही ज्ञानी झालो आहोत असा अभिमान मिरवणारेच वास्तविक अज्ञानी असतात. कारण एकदा माझे ज्ञान झाले की असे द्वैती भाव आणि द्वित्ववाचक भाषा उरतच नाही."

अथवा यज्ञदानादी किरीटी। कां तपें हन जैं हुटहुटीं।
तैं तृणा येकासाठीं। न सरें एथ।।९-३६९।।
पाहें पां जाणिवेचेनि बळें। कोण्हीं वेदापासूनि असें आगळें।
कीं शेषाहूनि तोंडागळें। बोलकें आथी।।९-३७०।।
तोहि हंथरूणातळौटीं दडें। एरु नेति नेति म्हणौनि बहुडें।
एथ सनकादिक वेडे। पिसें जाहालें।।३७१।।
करितां तापसांचि कडसणि। कवणु जवळां ठेविल शूळपाणि।
तोहिं अभिमानु सांडूनि पायवणि। माथां वाहें।।३७२।।

"किंवा हे किरीटी! कोणा साधकांचा जर असा गर्व असेल की यज्ञ, दान, तप इ.च्या द्वारे आम्ही परमेश्वरास आमच्या अंकित करून घेऊ, तर त्यांच्या त्या यज्ञदानतपादींची माझ्या लेखी काडीमोलाचीही किंमत नाही. हे पार्था! ज्ञानराशी जे वेद आहेत, त्यांच्याएवढे ज्ञान कोणापाशी तरी आहे का! पण तेसुद्धा ***"नेति, नेति"*** म्हणत त्यांचे मजविषयीचे अज्ञानच प्रकट करत नाहीत का आणि माझे वर्णन करावयाचे झाले तर शेषाएवढी मुखे कोणास तरी आहेत का! पण तो शेषसुद्धा माझे वर्णन न करता आल्यामुळे माझ्या अंथरूणाखाली दडून बसला आहे. माझ्या स्वरूपाचा थोडासा साक्षात्कार पावूनच सनकादिक वेडेपिसे होऊन विश्वभर भ्रमंती करत आहेत! तापसांमध्ये असा कोणीतरी सापडेल का की ज्याला श्रीशंभूच्या पंक्तीस बसवता येईल! पण तो श्रीशिवसुद्धा माझ्या चरणोदकास मस्तकी धारण करून आहे!"

"एर प्राकृत हेंदरें। केविं जाणों लाहें"

ना तऱ्हें आथिलेंपणें सरिसि। कवणि आहे लक्ष्मियेऐसी।
श्रियेसारिखिया दासी। घरीं जिएंतें।।९-३७३।।
तियां खेलतां करिति घरकुलीं। तेआं नामें अमरपुरें जऱ्हें ठेविलीं।
तऱ्हें न होति काईं बाहुलीं। इंद्रादिकीं तेआंचिं।।३७४।।
तिआं नावडौनि जंवं मोडिति। तंवं महेंद्राचें रंक होति।
तिआं झाडां जेऊतें पाहाति। तैं कल्पवृक्ष।।३७५।।

"ऋद्धिसिद्धींसारख्या दासी जिच्याजवळ असतात, त्या लक्ष्मीएवढे ऐश्वर्यमंत कोणीतरी आहेत का! श्रियेसारख्या तिच्या दासी सहज म्हणून जेव्हा भातुकलीचा खेळ खेळतात, तेव्हा त्यांनी रचलेली छोटीछोटी घरकुले म्हणजे साक्षात इंद्रनगऱ्याच नव्हेत का! आणि खरेखुरे इंद्रादी तर त्यांच्या हातातील त्या नगरीतील जणू बाहुल्याच असतात! त्यांचा खेळ जेव्हा आटोपता घेतला जातो, तेव्हा त्या सहजच ती घरकुले मोडून टाकतात आणि इंद्र-चंद्र सगळे देव क्षणार्धात होत्याचे नव्हते होतात. लक्ष्मीच्या त्या दासी इतक्या सामर्थ्यशाली आहेत की त्या ज्या ज्या तरूंकडे सहज म्हणून दृष्टी वळवून पाहतात, ते सर्व त्या तेवढ्याशा कटाक्षानेच कल्पवृक्षात परिणत होतात."

ऐसें जिएचिआं जवलिकां। सामर्थ्य घरांचिआं पाईकां।
तैं लक्ष्मि मुख्य नाईका। न मनेचि एथ।।९-३७६।।
मग सर्वस्वें करौनि सेवा। अभिमानु सांडौनि पांडवा।
तैं पाएं धुवावयाचिआं दैवां। पात्र जाहालीं।।३७७।।
म्हणौनि थोरपणा पऱ्हांचि सांडिजैं।
व्युत्पत्ति आघविंचि विसरिजैं।
जैं जगां धाकुटें होईजें। तैं जवलिक माझिं।।३७८।।

"जिच्या साध्या सान्निध्याने त्या दासींना एवढे असीम सामर्थ्य प्राप्त होते, ती महानायिका लक्ष्मीसुद्धा ज्ञानसामर्थ्याने तोकडीच पडते म्हणेनास का! अर्जुना! ती सत्त्वशीला लक्ष्मीसुद्धा जेव्हा आपल्या मोठेपणाचा अहंकार सांडून सर्वस्वाने माझी सेवा करू लागली, तेव्हा कोठे तिला माझे पाय धुण्याएवढे साधे भाग्य प्राप्त झाले! म्हणून आपल्यातला मीपणा टाकून, ज्ञानाचा गर्व सोडून देऊन आपल्याकडे क्षुल्लकपण घ्यावे, म्हणजे माझे सान्निध्य प्राप्त होऊ शकते."

अगां सहस्त्रकिरणाचिएं दिठीं। पुढां चंद्रुहिं लोपें किरीटी।
तेथ खद्योत कां हुटहुटीं। आपुलेनि तेजें।।९-३७९।।
तैंसें लक्ष्मिएंचें थोरपण न सरें।
जेथ शंभूचेंहिं तप ना पुरें।
तेथ एर प्राकृत हेंदरें। केविं जाणों लाहें।।३८०।।

"हे पृथापुत्रा! चंद्राचे तेजही ज्या सहस्त्ररश्मी दिनकरापुढे सरते, त्या रविराजापुढे काजव्यांनी आपले क्षुद्र तेज मिरवण्याचा अट्टाहास का म्हणून करावा! जेथे लक्ष्मीचे मोठेपण फिके पडते, शंभूमहादेवाचे तपही अपुरे ठरते, तेथे सर्वसामान्य हेंद्रट मनुष्याचा काय पाड लागणार!"

ईश्वरार्पण बुद्धी

यासाठी ज्यांना ज्ञान हवे, ज्यांना भगवंताचा साक्षात्कार हवा, ज्यांना शाश्वतधामात जायचे आहे, ज्यांना भगवंताचे सान्निध्य हवे आहे, त्यांनी सर्वस्वाची कुरवंडी करून अनन्यभक्ती करावी असे श्रीकृष्ण सांगतात. त्यासाठी काय करायला हवे ते ऐका:

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।

"भक्तिपूर्वक अर्पण केलेले पत्र, पुष्प, फल वा साधे जलसुद्धा मला *(भगवंताला)* प्रिय आहे. शुद्धबुद्धीच्या निष्काम भक्ताने भक्तीच्या भावाने भारलेले जे काही मजप्रीत्यर्थ केले असेल, ते सर्व मी संतोषपूर्वक ग्रहण करतो."

भक्ती करणे असे सहज आहे व अशी अनन्यभक्ती करण्याचा मार्ग श्रीकृष्ण परमात्मा सांगत काय म्हणत आहेत, पाहा:

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्।।९-२७।।

"हे कौंतेय! तू जे जे काही कर्म करतोस, जे कोणते हवनादी कार्य करतोस, जे दान देतोस, जे जे तप करतोस, ते ते सर्व मला अर्पण करत जा."

अनन्यभक्ती* ती हीच आणि *संन्यासमार्ग* तोही हाच आहे.** संन्यासाची लक्षणे आपण पूर्वी गीतेच्या अठराव्या अध्यायाचा पूर्वार्ध परीक्षितांना पाहिलेली जिज्ञासूंस स्मरतच असतील *(उन्मेष:३०: संन्यास, त्याग व कर्म पृ.क्र.४५४ ते ४६१)*. आता ***अनन्यभक्ती प्रकट करतांना तिचीही लक्षणे संन्यासलक्षणांशी किती मिळतीजुळती आहेत, ते भगवंतांच्या वरील भाषणातून स्पष्ट होते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

गीतेत वेगवेगळे योगमार्ग सांगितलेले नसून एकाच योगमार्गाचे बृहत दर्शन घडविलेले आहे, या सिद्धांतास अशा परीक्षणाने पुष्टी मिळते, हे पुनश्च प्रतिपादित करावयास हवेच असे नक्कीच नाही! असो.

भक्ताप्रती भगवंताचा भाव

अनन्यभक्तीवर ज्ञानेशांच्या ओव्यांतून कोणता प्रकाश पडतो, ते आता पाहू या:

ययांलागिं शरीरसांडोवा कीजैं। सकलगुणांचे लोण उतरिजें।
संपत्तिमदु सांडिजें। कुरवंडी करौनि।।९-३८१।।

"हे अर्जुना! असामान्य अशा इंद्रसोमादी देवता, लक्ष्मीसारखी ऐश्वर्यवती, तपस्व्यांचा मुकुटमणी असा शंभूमहादेव यांची काय कथा होते, ते तू ऐकलेस. सनकादिकांना माझ्या अमर्याद ऐश्वर्याचे स्वल्प दर्शनही किती वेडेपिसे करणारे झाले, तेही तुला मी आताच सांगितले. असे असले, मी अनंत, अक्षय्य, सूक्ष्माहूनही सूक्ष्म असा कसाही जरी असलो आणि द्वैतभावाच्या उपासनेची माझ्याठायी जरी कोणतीही

मातब्बरी नसली, तरीही सामान्य असे साधक मला वश करून घेतात ते अनन्यभक्तीने! मजसाठी यजन करणाऱ्या त्या भक्तांचे किती वर्णन करावे! आताच मी तुला ते सविस्तर सांगितले. पण कितीही केले तरी मीसुद्धा त्यांचे पूर्ण वर्णन करण्यास असमर्थ आहे. सर्वस्वाचे मला दान करून, सकलगुणसंपदा मजवरून ओवाळून टाकून, संपत्तिमदाचा फुंज निवारून, सर्व संसाराची कुरवंडी करून ते भक्त माझी भक्ती चालवत असतात."

मग नीस्सीमभाव उल्हासें। मज अर्पावयाचेनि मिसें।
फल आवडें तैसें। भलतयाचें हों।।९-३८२।।
भक्तु माझियाकडें दावीं। आणि मी दोनिं हातु वोडवि।
मग देठु न फेडितां सेविं। आदरेंसिं।।३८३।।
पैं गां भक्तिचेनि नांवें। फूल एक मज देयावें।
तैं लेखें तऱ्हैं मियां तुरंबावें। परि मुखैंचि घालीं।।३८४।।

"त्या निःसीम भक्तिभावाच्या भरात ते स्वतःस विसरून धुंद होतात, त्यांनी मला अर्पिण्यासाठी वाटेल ते फळ मजपुढे केले, तर आतुरतेने त्यांची वाट पाहणारा मी ते फळ त्याचा देठही न तोडता सगळेच्या सगळे मुखाने सेवितो! आणि भक्तिभावाने भारलेल्या त्या भक्ताने मला कोणतेतरी साधे एखादे फूल जरी मला दिले, तरी अत्यानंदाच्या भरात ते केसात माळण्याचे विसरून मी मुखानेच त्या फुलाला ग्रहण करू जातो."

हें असों कायसिं फुलें। पानचि एक आवडें तैं मज जाहालें।
तैं साजुकहिं न हों सुकलें। भलतैसें।।९-३८५।।
परि सर्व भावें भरलें देखैं। आणि भुकेला अमृतांतैं तोखैं।
तैसें पत्रचि परि तेणें सुखैं। आरोगूं लागें।।३८६।।

"हे असो! फूलच काय! पण त्याने मला एखादे पान जरी दिले, मग ते सुकलेले वाळलेले कसे का असेना! टवटवीतपणाचा लेशही जरीत्यात नसला, तरीही त्या पानात माझ्या भक्ताने आपला सर्व भाव ओतलेला असतो. भुकेलेल्याला परमामृतच लाभले, तर तो जेवढा संतोष पावेल, तेवढीच तृप्ती मला ते भावभारित पत्र सेवतांना मिळते!"

आणि पहाः

अथवा ऐसेंहिं न घडें। जैं पालाहिं परि न जोडें।
तऱ्हैं उदकाचें तऱ्हैं सांकडें। नव्हेल कीं।।९-३८७।।
तैं भलतेथ निमोलें। न जोडितां आहे जोडिलें।
तैंचि सर्वस्व करूनि अर्पिलें। जेणें मज।।३८८।।
तेणें वैकुंठापासूनि विशालें। मजलागिं केलीं राऊळें।
कौस्तुभाहूनि निर्मलें। लेणिं दिधलीं।।३८९।।
दुधाचिं सेजारें। क्षीराब्धिऐसिं मनोहरें।
मजलागिं अपारें। सृजिलीं तेणें।।३९०।।

"अथवा त्याला साधे पानही जर मिळू शकले नाही, अन त्याने सहज उपलब्ध असलेले उदक जरी मला अर्पिले, तरीही चालेल. कारण त्याच्या त्या उदकातूनही मला त्याची सर्वस्व अर्पण करण्याची भावना ओतप्रोत भरून ओसंडत असते. असे ते भावभक्तीने पवित्र असलेले जल मला अर्पून त्याने माझ्याकरता जशी वैकुंठाहूनही विशाल राऊळे निर्मिलीत; कौस्तुभापेक्षाही झगमगीत रत्ने जणू मला अर्पिलीत; क्षीरसागरासारखी अनेकानेक मनोहर दुग्धशय्यागृहे त्याने मजसाठी जशी सृजिलीत;"

कर्पूर चंदन आगरु। ऐसेआं सुगंधांचें महामेरु।
मज हातिं लाविला दिनकरु। दीपमाळें।।९-३९१।।
गरुडासारिखीं वाहनें। मज सुरतरूंचिं उद्यानें।
कामधेनूंचिं गोधनें। अर्पिलीं तेणें।।३९२।।
मज अमृताहूनि सुरसें। बोनि वोगरिलीं बहुंवसें।
आइसां भक्तांचेनि उदकलेसें। परितोखें गां।।३९३।।

"त्या भक्तिभावाच्या उदकधारेतून त्याने जणू कर्पूर,चंदन, आगरू अशा अत्यंत सुवासिक वस्तूंचे महामेरूच मला अर्पण केलेत; स्वहस्ते त्याने दीपमाळेवर मजसाठी जणू सूर्यासारखा तेजस्वी दीप प्रज्वलित केला; एवढेच काय! त्याच्या त्या उदकार्पणाद्वारे त्याने मजसाठी गरुडासारखी उत्तम अशी कित्येक वाहने, कल्पवृक्षांची असंख्य उद्याने आणि कामधेनूंची खिल्लारेच्या खिल्लारे असे गोधनच मला अर्पिले; अमृताहूनही स्वादपूर्ण असा स्वयंपाक रांधून त्याने मला वाढला असे मला वाटते. ***अनन्यभक्तीचे हे एवढे अपार सामर्थ्य आहे की अशा प्रकारे भक्ती करणाऱ्या प्रिय भक्ताने दिलेल्या थेंबभर पाण्यानेही मी संतुष्ट होतो."***

शबरी भिल्लीणीची उष्टावलेली बोरे ज्या भावाने श्रीप्रभुरामचंद्रांनी ग्रहण केली, सुदाम्याच्या पुरचुंडीतले पोहे जेवढ्या चवीने श्रीकृष्णांनी खाल्ले, त्याची आठवण करून देणाऱ्या ओव्या ज्ञानेश प्रभुमुखी घालतात, त्या अशाः

हें सांगावें काएं किरीटी। तुम्हींचि देखिलिआं आपुलिआं दिठीं।
मी सुदामयाचिआं सोडी गांठी। पव्हयालागिं।।९-३९४।।
पैं भक्ती एकीं मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणें।...।।३९५।।

"हे किरीटी! हे माझे कशाकशाने संतुष्ट होणे तुला सांगायलाच हवे असे नाही. सुदाम्याने आणलेल्या पोह्यांची पुरचुंडी मी आपल्या हस्ते किती अधीरतेनी सोडली आणि ते पोहे किती चवीने खाल्ले, ते तू प्रत्यक्षच पाहिले होतेस! मला भक्त काय अर्पण करतो, यापेक्षा त्यामागे कोणता भाव असतो, तेवढाच मी पाहतो. भक्तीशिवाय मी दुसरे काहीच ओळखत नाही. भक्ताचा लहानथोरपणा मला दिसत नाही. ध्रुवबाळही माझा अनन्यभक्त होता, तर मोठे थोर ऋषीही माझे भक्त असतात."

...। आम्हीं भावाचें पाहुणें। भलतेआं।।९-३९५।।
एर पत्र पुष्प फल। तैं भजावेआं मिस केवल।
वांचूनि आमुचा लाग निष्कल। भक्तितत्त्व।।३९६।।

"मी वाटेल त्याच्या - वैश्य, शूद्र, अंगना, वेश्या इ.कोणाच्याही भक्तिरूपी भावपक्वान्नांच्या मेजवानीचे आमंत्रण स्वीकारतो!!

अरे पत्र, पुष्प, फल, तोय ही सर्व काही मला भजावयासाठी हाती घेतलेली निमित्ते आहेत. माझा खरा लाग भक्तांना खरे तर शुद्ध, निष्कल अशा भक्तितत्त्वाद्वारे लागतो.''

अशा त्या अनन्यभक्तीचे रहस्य श्रीहरी आपल्या मुखाने आता स्पष्ट करत आहेत. ***योग-संन्यास-भक्ति-ज्ञान-कर्म*** **इ.संकल्पनांचा समावेश करणारे त्यांचे स्पष्टीकरण नवम अध्यायाच्या उर्वरित भागात आले आहे. गीतेतील योगमार्गाचे बृहत रहस्य यापुढे हा अध्याय उद्घाटीत करणार आहे.**

राजविद्या राजगुह्य असे संबोधन या नवम अध्यायास प्राप्त झाले आहे, ते याचसाठी की ***या अध्यायात योगधारेचे सुसूत्रीकरण, योग-भक्ति-कर्म व ज्ञान यांचा समन्वय, योगधारेचे साधनानिर्देशन ही सर्व समाविष्ट झाली आहेत.*** आतापावेतो आपण ***आसुरी व दैवी संपत्तिमान पुरुषांचे वर्णन, प्रकृति-पुरुष रहस्य, विश्वरचनेचा मानपट, भगवत्स्वरूपाचे ज्ञान, अनन्यभक्तीची महत्ता*** इ.विषय त्या अध्यायाचे वेळोवेळी परीक्षण करून अवलोकिले आहेत.

अनन्यभक्ती व योग यांचे घनिष्ट संबंध

गीतेतील **अनन्यभक्तीत** ***ज्ञान - कर्म - योग*** **या त्रिसूत्रीचे परिपूर्ण समावेशन आहे, याची जाणीव आपणास** ***''महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः। भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम्।।९-१३।।''*** **या ज्ञानपरक आणि भक्तिपरक अशा श्लोकातून; तसेच** ***''अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च। न तु मामभिजानाति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते।।९-२४।।''; यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्। यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्।।९-२७।।''; शुभाशुभ फलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः। सन्न्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि।।९-२८।।''*** **इ. कर्मपरक, ज्ञानपरक व संन्यासपरक अशा श्लोकांतून हा अध्याय करून देतो.**

ईश्वरप्रणिधानाचे योगधारेतील जे महत्त्वाचे स्थान आहे, त्याचे सर्व रहस्य ***''सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः। नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते।।९-१४।।''; ''अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।''*** **या योगपरक श्लोकांतून अनन्यभक्तीशी योगाचे अतूट नाते दर्शवीत स्पष्ट होते.**

''पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति। तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-२६।।'' **या श्लोकापासून पुढे योग व भक्ती यांचे अनन्य नाते पुनः गीता स्पष्ट करत असल्याचे दिसून येते, ते त्यांच्यातील** ***ईश्वरप्रणिधान*** **या उभयप्रतिपाद्य संकल्पनेद्वारे! भगवंताचे सतत ध्यान, त्याचे सतत चिंतन, त्याचे सर्वत्र अस्तित्व पाहणे, सर्व कर्मे निष्काम भावाने भगवत्प्रीत्यर्थ करून ईश्वरार्पण करणे, या ईश्वरप्रणिधानाच्या भावांचा उत्कट उत्कर्ष म्हणजे** ***अनन्यभक्ती!!!*** **हाच ज्ञानयोग कारण** ***''वासुदेवः सर्वमिति''*** **हे ज्ञान याच ईश्वरप्रणिधानयुक्त योगधारेतून गवसते!!**

कर्मयोग हा कर्मसंन्यास तरी याच ईश्वराप्रीत्यर्थ कर्मे करून ती त्यासच अर्पण करण्याच्या योगधारेतून सफल होतो. ***ईश्वरप्रणिधान हाच त्या कर्मयोगप्रणालीचा आधारस्तंभ आहे,*** असे असल्याचे आपण पूर्वी ***''ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।पा.यो.सू।।''*** या पातञ्जलयोगसूत्राचा अनेक ठिकाणी मागोवा घेत असतांना पाहिल्याचे जिज्ञासूंना स्मरत असेलच!

निष्कल भक्तितत्त्व

हाच ईश्वरप्रणिधानयुक्त योगाचा विषय पुनश्च अनन्यभक्तियोगाच्या विशाल प्रवाहातून नवम अध्यायी प्रकटतो आहे. ***निष्कल भक्तितत्त्व*** विवेचन करतांना हा विषय पुनः आपणांस दिसतो, तो असा! ईश्वराचे ध्यान करण्यास सांगत भगवंत याचे दिग्दर्शन करत आहेत. ते म्हणतातः

म्हणौनि अर्जुना अवधारीं। तूं बुद्धि एकिं सोपारीं करीं।
तन्हैं साहाजें आपुलिआं मनोमंदिरीं। न विसंबें मातें।।९-३९७।।
जैं जैं काइं व्यापार करिसि। कां भोग हन भोगिसि।
अथवा यज्ञ यजिसि। नानाविधिं।।३९८।।
ना तन्हैं पात्रविशेषें दानें। कां सेवकां देसिं जीवनें।
तपादि साधनें। व्रतें करिसिं।।३९९।।
तैं क्रियाजात आघवें। जैं जैसें निफजैल स्वभावें।
तैं भावना करौनि करावें। माझिआं मोहरां।।४००।।

''मला पावण्यास निष्कल भक्तितत्त्वाचा आश्रय केला पाहिजे. त्यासाठी अत्यंत सोपी योगयुक्ती मी सांगतो, ती ऐक. आपले मन-चित्त-बुद्धी यांना वश करून घे आणि आपल्या मनोमंदिरात तू माझे अखंड अहर्निश ध्यान कर! जे काही क्रियाव्यापार तू करतोस, ते सर्व मला अर्पण कर. जे भोग तू भोगतोस अथवा यज्ञकर्म -यजन-याजनादी करतोस; पात्रापात्र पाहून प्रसंगविशेषी तू जी काही दाने देतोस; आपल्या सेवकांस जी काही जीवनी तू देतोस; व्रते, तप इ. जी काही साधना भगवत्प्रीत्यर्थ तू करतोस; ते सर्व क्रियाजात ज्या प्रकारे जसे निपजेल तसे तू मजप्रीत्यर्थ करत आहेस, अशी भावना करून तू मला ते सर्व अर्पण करत जा!''

परि सर्वथा आपुलां जिवि। केलिआंचि शंका काहिंचि नुरवि।
ऐसिं धुवौनि कर्मे देयाविं। माझां हातिं।।९-४०१।।

''आणि आपण कोणतेही कर्म स्वतः करत नाही या अहंकारविवर्जित बुद्धीने युक्त होऊन त्या कर्मांचे कर्तृत्व स्वतःकडे न घेता निष्काम भावनेने ती सर्व कर्मे, त्यांचे कर्तृत्व आणि फल ही मला अर्पण करत जा. अशी स्वच्छ निर्मळ कर्मे तू मला अर्पण करत जा.''

म्हणजे कर्मबंधन न होता मोक्ष मिळेल असे भगवंत सांगत आहेत. ते म्हणून म्हणतात कीः

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनात्।
सन्न्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि।।९-२८।।

संन्यास म्हणजे कर्मसंन्यास वा कर्मफलसंन्यास. कर्मयोगी याच्या प्राप्तीसाठी झटतात. कर्मे करूनही कर्मबंधनापासून मोक्ष वा मुक्ती मिळवणे हे साध्य आपल्यासमोर प्रत्येक ***कर्मयोग*** आचरणारा साधक ठेवून असतो. कर्मांची ***शुभ*** म्हणजे पुण्यप्रद आणि ***अशुभ*** म्हणजे मृत्युलोक वा नरक प्राप्त करून देणारी अशी दोन प्रकारची फले शास्त्रे सांगतात. अशा दोनही प्रकारची फले प्राप्त न होणे म्हणजे कर्मबंधनातून मुक्त होणे.

भगवंत सांगतात की "निष्कल भक्तितत्त्वाचा अंगीकार करणारा अशा सर्व प्रकारच्या कर्मबंधनातून मुक्त होतो आणि ***संन्यासयोग*** पावून भगवंतास जाऊन मिळतो."

हा श्लोक तसा ***कर्म, योग व भक्ती*** या त्रयींच्या विचारासाठी महत्त्वाचा आहे. *९-२६, २७ व २८* या श्लोकत्रयीचा एकत्र विचार केल्यास असा अन्वयार्थ निघतो की ***"पत्रं पुष्पं फलं ...।।९-२६।।"* यात निर्देशिलेल्या भक्ताने *"यत्करोषि यदश्नासि ...।।९-२७।।"* अशी कर्मयोगपर चर्या ठेवून ईश्वरप्रणिधानपूर्वक सर्व कर्मफले भगवंतास अर्पण करून कर्मसंन्यासाने युक्त व्हावे.**

भक्ताचा ***कर्मयोग*** हा कर्मयोग्याच्या कर्मयोगाहून आणि योग्याच्या सरळमार्गी ***योगयुक्ती*** पेक्षा वेगळा नसल्याची साक्ष ही श्लोकत्रयी ***(९-२६ ते २८)*** आपणास देते. म्हणजेच योग,भक्ती आणि कर्म या तिन्ही उपासना खऱ्या तर एकच आहेत, हा आपला गीता-ज्ञानेश्वरीच्या अभ्यासातून आतापावेतो निघालेला निष्कर्षच येथेही पुनः आपल्यापुढे येतो.

निर्बीजावस्था

गीतेतील *ईश्वरप्रणिधानयुक्त योग* हा या तिन्ही *भक्ती - कर्म -योगयुक्तींचा मूळ गाभा* आहे, हे पुनश्च आपल्या मनावर ठसवून घेत ज्ञानदेव या श्लोकावर कोणत्या ओव्या रचतात, त्या पाहू या.

मग अग्निकुंडीं बीजें घातिलीं। तिएं अंकुरदशे जेविं मुकलीं।
तेंविं न फलतिचि मज अर्पिलीं। शुभाशुभें।।९-४०२।।
अगां कर्में जैं उरावें। तैं तिहिं सुखदुःखीं फलावें।
आणि तेयांतें भोगावेआं यावें। देहां एकां।।४०३।।

"सर्व कर्मे त्यांच्या कर्तृत्वासह आणि फलांसहित भगवंतास अर्पण करण्याने, जशी बीजे अग्निकुंडात घातल्यावर अंकुरावयाच्या गुणधर्मास मुकतात, त्याप्रमाणे फलधारणेचा गुणधर्म टाकून देतात. आणि मग कर्मांना शुभ आणि अशुभ अशी फळे मिळणारच कशी! अर्जुना! जेव्हा कर्म मला अर्पण केले जाते, तेव्हा जेथे जन्म-मृत्युचक्रच साक्षात थांबते, तेथे जन्मासवे उपजणारी शुभाशुभे व कष्ट इ.फले मिळावीच कशी! कारण कर्माने उरावे आणि सुखदुःखादी फळे त्यास लागावी, तर त्यासाठी देहप्राप्ती तर आवश्यक असते, नाही का!"

तैं उगाणिलें मज कर्म। तेंव्हांचि पुसिलें मरण जन्म।
जन्मासवें श्रम। वरचिलहिं गेलें।।९-४०४।।

म्हणऊनि अर्जुना ययापरी। पाहेंचां वेळु नव्हेल भारी।
हें संन्यासयुक्ती सोपारीं। दिधलीं तूझ।।४०५।।
ययां देहाचिआं बांदोडीं न पडिजें।
सुखदुःखाचिआं सागरीं न बुडिजें।
सुखें सुखरूपा घडिजैं। माझेआंचि आंगिं।।४०६।।

"देहप्राप्ती न होणे व जन्ममृत्युरूप संसाराचे दुष्चक्र टळणे यांसाठी केवढी सोपी युक्ती मी सांगतो आहे, पहा! ही कर्मसंन्यासाची सुगम वाट अनुसरण्यास मग विलंब कशाला! उद्याऐवजी आजपासूनच हा मार्ग अनुसरावा, हे सुज्ञांस काय सांगायलाच हवे काय! एकदा का या मार्गाला लागले की मग पुनः म्हणून या देहादींच्या बंधनात पडायला लागत नाही; आणि या योगाचे अनुपालन करून सहजच माझ्या स्वरूपात आनंदपूर्वक विलीन होऊन सुखरूप म्हणजे आत्मस्वरूप प्राप्त होते."

भगवत्स्वरूप

असे स्वरूप प्राप्त करून घेणारे भक्त खरे तर ***ज्ञानी***च होत. कारण परमेश्वराचे वास्तव ज्ञान त्यांनाच होते. अशा परमभक्तांना भगवंताचे स्वरूप कसे जाणवते व आपण कसे आहोत, हे स्पष्ट करत भगवंत म्हणतातः

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्।।९-२९।।

"मी सर्व भूतांप्रति सम आहे. माझे कोणी आवडते असे नाहीत; तसेच कोणाचा मी द्वेषही करत नाही."

याबाबत ज्ञानेश असे वर्णितात कीः

तो मी पुससि कैसा। तन्हैं जो सर्वभूतीं सदा सरिसा।
जेथ आपपरु आइसा। भागु नाहीं।।९-४०७।।
जैं आइसिआं मातें जाणौनि। अहंकाराचां कुरुठा मोडौनि।
जैं जीवें कर्म करौनि। भजति मातें।।४०८।।
तैं वर्तत दिसति देहिं। परि तैं देहिं ना माझां ठाईं।
आणि मी तेआंचां हृदयिं। समग्र असें।।४०९।।

भक्तांची स्थिती भगवंतातच होते

"त्या भक्तांना माझे खरे स्वरूप प्राप्त होते, ते कशा प्रकारचे असते असा तुला प्रश्न पडला असेल, तर ऐक. मी सर्व भूतात समान असा आहे. सदासर्वदा माझे हे समान स्वरूप सर्व प्राणिमात्रांस व्यापून असते. तेथे आपपर असा भाव मी ठेवत नाही. माझे हे स्वरूप जाणणारे भक्त, अहंकाराचा ठावठिकाणा मोडून काढून जीवाभावाने सर्व कर्मे करत, त्या कर्मांद्वारे मला भजतात. ***"कर्में ईशु भजावा"*** असा त्यांचा कर्मव्यवहार असतो. ते जरी देहाने वर्तत असतांना दिसले, तरी ते देहात नसतात. ते माझ्याठायी असतात आणि मी त्यांच्या हृदयांतरी असतो. माझे स्वरूप त्यांच्याठायी समग्रपणे वसते."

सविस्तर वटत्व जैसें। बीजकणिकेमाझिं असें।
आणि बीजुकणु वसें। वटीं जेविं।।९-४१०।।

तेंविं आम्हां तेआं परस्परें। बाहेरीं नामाचीचि अंतरें।
वांचूनि आंतुवट वस्तुविचारें। मी तैंचिं तैं।।४११।।
आतां जायांचें लेणें। जैसें आंगावरी आहाचवाणें।
तैसें देह धरणें। उदास तेआंचें।।४१२।।

"वटवृक्षाचे बीज जसे त्या वृक्षाचे विशालत्व आपल्याठायी वागविते आणि वटवृक्ष जसा बीजास आपल्याठायी ठेवून असतो, त्याप्रमाणे भक्त आणि मी या दोघांत केवळ नाममात्र अंतर असते. वस्तुरूपाने विचार केला तर ते आणि मी दोघे एकच आहोत!! उसना आणलेला दागिना जसा परक्याचा म्हणून समजला जातो आणि तो अंगास भूषवत असला तरी त्याचा अभिमान धरला जात नाही; तद्वतच त्या भक्तांचे आपल्या देहधारणेशी नाते असते."

परिमलु निगालिआं पवनापाठीं। मागें वोस फूल राहें देठीं।
तैसें आयुखाचिएं मुठीं। केवल देहो।।९-४१३।।
एर अवष्टंभु जो आघवा। तो आरूढौनि मद्भावा।
मजचि आंतु पांडवा। पैठा जाहाला।।४१४।।

"सुमनातील सुगंध वाऱ्यावर निघून गेला की ओस पडलेले फूल जसे देठास धरून राहते, त्याप्रमाणे त्यांच्या आयुष्याच्या मुठीस त्यांचा देह उदासपणे धरून राहतो. देहाहंकार नष्ट होऊन देह केवळ उर्वरित आयुर्भोगासाठी प्रारब्धवश होऊन राहतो, तो असा! खरे तर त्यांचा अहंकार कधीच माझ्या स्वरूपावर आरूढ झालेला असतो आणि मत्स्वरूपी त्यांची स्थिती झालेली असल्याने, आता असा कोणता देहाहंकार उरावा, सांग बरे!"

दुराचाऱ्यासही मिळणारे भक्तीचे फल

कर्मयोगाचे यथासांग आचरण करणारा भक्त कसाही असला, तरी तो साधूच समजावा, असे भगवंत म्हणतातः

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः।।९-३०।।
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।९-३१।।

"अत्यंत दुराचरणी असणारा जेव्हा मला अनन्यभावाने भजतो, तेव्हा त्यास साधू म्हणून जाणावे. माझ्याठायी त्याची बुद्धी स्थिर झाल्याने तो अल्पकाळातच धर्मात्मा होतो. त्याला शाश्वत अशी शांती प्राप्त होते. हे कौंतेया! माझा भक्त कधीही नाशाप्रत जात नाही, असे निश्चयपूर्वक जाणून घे!"

दुराचरणी भक्ताचे उत्तम उदाहरण वाल्या कोळयाचा वाल्मिकीऋषी झाला यात आहे. वाल्मिकींनी लिहिलेले रामायण खरे करण्यासाठी प्रभु श्रीरघुरामचंद्र जन्मले, हे सर्वविश्रुतच आहे! असो. ज्ञानेशांचे ही भगवंतोक्ती सुस्पष्ट करणारे बोल ऐकू या:

आइसें भजतेनि प्रेमभावें। जेआं शरीरहिं पाठीं न पवें।
तेणें भलतेआं होआवें। जातिचिआं।।९-४१५।।
आणि आचरण पाहातां सुभटां। तो दुष्कृताचां किर सेल वाटां।
परि जिवित वेंचिलें चोहटां। भक्तिचिआं कीं।।४१६।।

"अशा प्रकारे अनन्यप्रेमभावाने माझी भक्ती करणाऱ्यांची स्थिती होते; मग ते कोणत्याही जातीचे असेनात का! आणि त्यांचे कृताचरण जरी कसेही अधम असले; अगदी दुष्कर्माचा शेलका भागच असे जरी असले; तरी त्यांनी आपले जीवित भक्तीच्या चव्हाट्यावर वेचलेले असल्याने त्यांना माझे स्वरूप प्राप्त होते."

अगां अंतिचिआं मति। सांचपण पुढिलें गती।
म्हणोनि जिवित जेणें भक्ती। दिधलें शेखीं।।९-४१७।।
तो आधीं जऱ्हैं अनाचारी। तऱ्हैं सर्वोत्तमुचि अवधारीं।
जैसा बुडाला महापुरीं। न मरतु निगाला।।४१८।।
तेआंचें जिवित ऐलथडिएं आलें।
म्हणौनि बुडालेंपण जेविं वायां गेलें।
तेविं नुरेंचि पाप केलें। शेवटलिएं भक्तीं।।४१९।।

"देह ठेवते वेळी जशी वासना असेल, तशी पुढील गती प्राप्त होते. त्याप्रमाणे त्यांनी पूर्वी कोणतेही पापाचरण केले असले, तरी अंती माझ्या अनन्यभक्तीची कास धरलेली असल्याने ते सर्व जनात उत्तम ठरतात! महापुरात बुडताबुडता वाचून किनारा सापडलेल्यास जसे पूर्वीचे बुडालेपण बुडवत नाही, त्याचप्रमाणे त्यांचे पूर्वीचे पाप माझी भक्ती पावून शिल्लक उरत नाही."

"तेव्हांचि तो तत्त्वतां। स्वरूप माझें"

याबाबत ज्ञानेश अधिक विवेचन करतात, ते असेः

यालागिं दुष्कृति जऱ्हैं जाहाला। तऱ्हैं अनुतापतीर्थीं न्हाहाला।
न्हाऊनि मजआंतु आला। सर्वभावें।।९-४२०।।
तऱ्हैंच आतां पवित्र तेआंचेचि कुल। अभिजात्य तैंचि निर्मल।
जन्मलेआं फल। तयासिचि जोडिलें।।४२१।।
तो सकलहिं पढिन्नलां। तपें तोचि तपिन्नला।
अष्टांग अभ्यासिला। योगु तेणें।।४२२।।

"म्हणून दुराचरणी मनुष्य जेव्हा आपल्या पूर्वकृतीचा अनुताप होउन तीर्थात स्नान केल्याप्रमाणे पावन होतो आणि शुद्ध अंतःकरणाचा होऊन जेव्हा माझी सर्वभावे अनन्यभक्ती करून मजठायी स्थित होतो, तेव्हा त्याच्या कुलाइतके पवित्र कुल दुसरे कोणते असणार! हे पांडुपुत्रा! त्याचे कुळच एकमात्र शुद्ध आणि श्रेष्ठ असणार! आणि जन्माला आल्याचे सुकृत फलही त्यालाच मिळणार! समस्त शास्त्रांचे अध्ययन त्यानेच केलेले असणार! हेच काय! किंबहुना अष्टांगयोगाचा त्याच्याएवढा अभ्यास इतर कोणीच केलेला असू शकणार नाही! हो ना!"

हें असो बहुत पार्था। तो उतरला कर्मे सर्वथा।
जेआंचि अखंड आस्था। मजचिलागिं।।९-४२३।।
आघविआं मनोबुद्धिचिआं राहाटीं। भरौनि एकनिष्ठेचिआं पेटीं।
जेणें मजमाजिं किरीटी। निक्षेपिलीं।।४२४।।

तो आतां अवसरें मजसारिखा होईल।
आइसाहिं भाव तूझ जाइल।
हां गां अमृताआंतु राहील। तेआं मरण कैंचें।।४२५।।

"हे असो. फार काय सांगावे! ज्याने माझ्याप्रतिची एकनिष्ठा अनन्य अशा मनोबुद्धीच्या व्यापाराने माझ्याठायी अर्पिली; ज्याला अखंड माझे ध्यान लागले; तो सर्व कर्मबंधांपलीकडे पोहोचला, यात काहीच शंका नाही!! आणि असा तो भक्त कालांतराने मद्रूप होत असेल, अशी जर तुझी समजूत असेल, तर हे पार्था! तसे पण नाही. अरे! अमृताआंत राहणाऱ्याचे मरण केव्हांच नाहीसे होते, नाही का! अमृतात प्रवेशताक्षणीच त्यास अमरत्व नाही का प्राप्त होत!"

पैं सूर्यु जो वेलु नुदैजें। तेआं वेलां किं रातु म्हणिजें।
तेंवि माझिआं भक्तिविण किजैं। तैं महापाप नोहें।।९-४२६।।
म्हणौनि तेआंचिआं चित्तां। माझिं जवलिक पांडुसुता।
तेधवांचि तो तत्त्वतां। स्वरूप माझें।।४२७।।

"तशीच माझी स्वरूपस्थिती त्या भक्ताला तो माझ्याशी अनन्य होताक्षणीच प्राप्त होते! आणि पाप! पाप! ते कसले! अरे! सूर्य जेव्हा उगवलेला नसतो, त्या वेळेस रात्रच नाही का म्हणत! तशीच माझ्या भक्तिविना आचरलेली महापुण्ये पण खरी तर महापापेच होत!! अर्जुना! म्हणूनच त्या महाभागाच्या चित्तास माझी जवळीक घडली , त्या क्षणीच तो तत्त्वतः मत्स्वरूप झाला, यात संशय नाही!"

"परंपरा शुद्ध। कुल तेआंचें"

निरामय, पापरहित अशा त्या पुण्यात्म्याबाबत ज्ञानेश भगवंतांचे उद्गार सांगत आहेत, ते पाहाः

जैसा दीपें दीपु लाविजें। तेथ आदिल कोण हें नोलखिजें।
तैसा सर्वस्वें जो मज भजें। तो मी होऊनि ठाकें।।९-४२८।।
मग माझिं नित्य शांति। तेआं दशा तैंचि कांति।
किंबहुना जितिं। माझेंचि जीवें।।४२९।।
एथ पार्था पुढत पुढुति। तैंचि तैंच सांघों किती।
जऱ्हैं मिआं चाड जऱ्हैं भक्तीं। न विसंबिजें गां।।४३०।।

"एका दीपकावर दुसरा दीपक प्रज्वलित केला जातो. त्यानंतर मुळचा दीपक कोणता होता, हे सांगता येते का! सर्वस्व अर्पून जो माझी भक्ती करतो, तो असाच मद्रूप होऊन ठाकतो. मी आणि तो यातला मी कोण आणि तो कोण हे मुळीच ओळखता येऊ नये, अशी ती स्थिती असते. अशा भक्तांना मग माझ्याठायी नित्य असणारी शांती प्राप्त होते. ती शांतीच त्यांचे तेज होऊन राहते! किंबहुना ते माझ्याशी इतके एकजीव होऊन जातात की माझा जीवच त्यांचा जीव होतो! हे पार्था! ही त्यांची अवस्था कशी असते म्हणून किती बोलावे बरे! तुला एकच अखेरचे म्हणून सांगतो, ऐक. ***तुला जर माझ्या प्राप्तीची चाड असेल तर या अनन्याभक्तीला अजिबात विसंबू नकोस!"***

कर्मयोग व भक्ती

कर्मयोगपर अशी जी ही ***अनन्याभक्ती*** करण्यास श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतआहेत, तिचे स्वरूप यापूर्वीच ***"पत्रं पुष्पं फलं तोयं...।।९-२६।।"*** व ***"यत्करोषि यदश्नासि ...।।९-२७।।"*** या श्लोकांतून स्पष्ट केलेले आपण ज्ञानेशांच्या ***"ययालागिं शरीर सांडोवा किजैं। ...।।९-३८१।।"*** ते ***"परि सर्वथा आपुलां जिविं। ... ।।९-४०१।।"*** या ओव्यांच्या माध्यमातून अवलोकिले आहेच! अशी भक्ती करण्यास कुळ-शील- वित्त - आयु -योनी इ.चे प्रत्यवाय नाहीत, असेही भगवंतांनी स्पष्ट म्हटले आहे.

अनन्यभक्ती न करणारे पाषाण!

आणि अशी अनन्याभक्ती जे करत नाहीत, तेच खरे दुराचारी आणि महापापी होत, हा भाव व्यक्तवत ज्ञानेश काय सांगतात, ते पहाः

अगां कुलचिआं चोखटपणा न लगा। आभिजात्य झनै श्लाघा।
व्युत्पत्तीचां वाऊगां। सोसु कां।।४३१।।
कां रूपें वयसां माझां। आथिलेंपणें कां गाजा।
एक भाव नाहीं माझां। तऱ्हैं पाल्हाल तैं।।४३२।।
कणेंविण सोंपटें। कणसें लागलीं आथि एक दाटें।
काइं करावें गोमटें। वोस नगर।।४३३।।

"कुलीनपणाचा व्यर्थ अभिमान भक्ती करणाऱ्याने बाळगू नये! तोच खरा कुलीन जो अनन्यभक्त आहे! शुद्ध कुळ, शास्त्रज्ञानाचा अभिमान ही सर्व भक्ती करणाऱ्यांसाठी फोल आहेत. ***भक्ताचेच कुळ खरे शुद्ध आणि भक्तच खरा शास्त्रज्ञानी!*** भक्ती नसणाऱ्यांचे सुस्वरूप आणि तारुण्याची मस्ती व्यर्थ आहेत. संपन्नतेचे अभक्तांचे मिरवणे शुद्ध दंभच नाही का! दाणे न भरलेली गच्च दाट कणसे काय कामाची! ओस पडलेले आटपाटनगर काय उपयोगाचे!"

ना तऱ्हैं सरोवर आटलें। रानिं दु:खिआं दु:खी भेंटलें।
कां वांझ फुलीं फुललें। झाड जैसें।।९-४३४।।
तैसें सकल तैं वैभव। अथवा कुलजातिगौरव।
जैसें शरीर आहें सावेव। परि जीवचि नाहीं।।४३५।।
माझिएं भक्तिविण। जलों तैं जिआलेंपण।
अगां पृथिविवरी पाषाण। नसति काईं।।४३६।।

"अर्जुना! आटून गेलेले निर्जल सरोवर जसे असावे; रानात एका आर्त मनुष्यास दुसरा दु:खी इसम भेटल्यावर कोणाचीही कोणास मदत होत नसल्याने दोघांनीही अधिकच दीन जसे व्हावे; किंवा एखाद्या झाडाला निव्वळ वांझ फुलांचाच बहर येऊन फळांनी ते कधीच न लगडावे; त्यासारखेच हे भक्ती न करणाऱ्यांच्या वैभवाचा आव आणि कुळजातीचा अभिमान इत्यादी होत. मृत मनुष्याचे कलेवर जसे असावे. तसे हे सर्व होत. एका माझ्या भक्तिविना त्यांच्या त्या जीण्याला आग लागो! हे पार्था! अरे! पृथ्वीवर अशा पाषाणांची काही कमतरता का आहे!"

अभक्तांचे हे असे अनन्यभक्तीशिवाय जे ***"जलो जिणें लाजिरवाणें"*** असते, त्याबाबत कींव प्रकट करत ज्ञानेश म्हणतात:

पैं हिंवरांचि दाट साऊली। सज्जनीं जैसिं वालिलीं।
तैसिं पुण्यें डावलूनि गेलीं। अभक्तांतें।।९-४३७।।
निंब निंबोलिआं मोडौनि आला।
तऱ्हैं काऊलिआंसिचि सुकालु जाहाला।
तैसा भक्तिहीनु वाढिन्नला। दोखांचिलागिं।।४३८।।
कां षड्रस खापरीं वाढिलें। वाढूनि चोहटां रातीं सांडिलें।
तैं सुणियांचेचि आईसें जाहालें। जिआंपरीं।।४३९।।
तैसें भक्तिहीनाचें जिणें। जो स्वप्नीहीं परि सुकृत नेणें।
संसारदुःखासिं आवंतणें। वोगरिलें गां।।४४०।।

"हिंवर वृक्षाची सावलीसुद्धा सज्जन जशी टाळतात, तशीच पुण्येसुद्धा अभक्त लोकांना डावलतात. कडुलिंब लिंबोळ्यांनी बहरून आला, तर कावळ्यांसच धन होते. षड्रसयुक्त पक्वान्ने खापरावर वाढून चव्हाट्यावर नेऊन रात्री ठेवून दिली, तर ती कुत्र्यांच्याच वाट्यास जातात. भक्तिविहीनाचे वैभवयुक्त जिणें पण असेच पापांसाठी असते. पुण्य तर स्वप्नांतरीही त्याच्या वाटेलाही जात नाही. अभक्त असणे म्हणजे शेलक्या संसारतापास आमंत्रण देणेच होय!"

म्हणौनि कुल उत्तम नोहावें। जाति अंत्याहिं होआवें।
वरि देहाचेनि नांवें। पशुचेंहिं लाभों।।९-४४१।।
पाहें पां सावजें हातिरूं धरिलें।
तेणें तेआं काकुलतिं मातें स्मरिलें।
किं पशुत्व तेआंचें वावों जाहालें। पातलिआं मातें।।४४२।।

"म्हणून उत्तम कुळात जन्म झालेला नसला तरी चालेल; अगदी अंत्यजांत मोडत असलेले कुळ असले, तरीही हरकत नाही. एवढेच काय! अगदी पशुदेह जरी मिळाला असला तरी का असेना! पण भक्ती ही हवीच! ती असल्यावर कुळ-शील-जाति-वर्ण-योनी ही सगळी गौणच होत. गजेंद्राला पहा जेव्हा मकराने धरले होते, त्या वेळी त्याने काकुळतीने अनन्यशरण होऊन मला हाक मारली. त्याचा धावा ऐकून मी धावलो नाही का! त्याचा पशुदेह असूनही तो वावगा ठरला आणि मला तो येऊन मिळाला, हे तू जाणतोसच ना अर्जुना!"

अनन्यभक्ताचे कुल इ.::::

"कुल उत्तम नोहावें"

पापयोनीसुद्धा अनन्यभक्तीने उद्धरून जातात, असे भगवंत सांगत आहेत:

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्।।९-३२।।

"हे पार्था! स्त्रिया, वैश्य एवं च काय! शूद्र आणि इतरही पापयोनीत जन्मलेले प्राणी माझ्या अनन्य भक्तीचा आश्रय घेऊन परमगती पावतात."

अशा परमभक्तांचे वर्णन करत रंगून जात ज्ञानदेव म्हणतात:

अगां नांवें घेतां वोखटीं। जैं आघवेआं अधमांचिएं सेवटीं।
तिएं पापयोनिहिं किरीटी। जन्मलें जैं।।९-४४३।।
तैं पापयोनि मूढ। मूर्ख आइसें जैं दगड।
परि माझां ठाई दृढ। सर्व भावें।।४४४।।

"हे अर्जुना! नीचाहूनही अतिनीच अशा, वाचेने साधा उच्चारही करू नये त्या पापयोनीत जन्म होऊनही, त्यातूनही मूढातिमूढ अगदी दगडच असावेतसे प्राणीसुद्धा जेव्हा माझी दृढ भावाने सर्वदा अनन्यभक्ती करतात, तेव्हा उद्धरून जातात."

जेआंचेनि वाचें माझें आलाप। दृष्टी भोगिं माझेंचि रूप।
जेआंचें मन संकल्प। माझाचि वाहे।।९-४४५।।
माझिआं कीर्त्तीविण। जेआंचें रितें नाहीं श्रवण।
जेआं सर्वांगिं भूषण। माझिं सेवा।।४४६।।
जेआंचें ज्ञान विषो नेणें। जाणिव मज एकांतैंचि जाणें।
जेआं आईसें लाभें तऱ्हैं जिणें। एरविं मरण।।४४७।।
आईसा आघवाचिं परी पांडवा। जिहिं आपुलिआं सर्वभावा।
जिआवेआलागिं वोलावा। मीचि केला।।४४८।।
तैं पापयोनिहिं होतु कां। श्रुताधितहिं न होतु कां।
परि मजसिं तुकितां तुकां। तुटी नाहीं।।४४९।।

"ज्यांची वाणी माझे गुणगान करण्यात लुब्ध झालेली आहे; ज्यांची श्रवणेंद्रिये माझी कीर्ती ऐकण्यावाचून दुसरे काही करत नाहीत; ज्यांची दृष्टी मला क्षणभरही डोळ्यांआड होऊ देत नाही; ज्यांचे मन सर्वदा माझेच चिंतन करते; ज्यांच्या सर्वांगांची आभूषणे म्हणजे सर्वोपरी माझी सेवा करणे हीच आहेत; ज्यांची जाणीव मज एकालाच जाणते; ज्यांना विषयांचे ज्ञान न होता सतत माझेच स्वरूप दिसते; ज्यांना माझी अशी अनन्यभक्ती न करता आली तर मरणच इष्ट वाटते; माझ्याप्रति असा भाव ठेवूनच जे जगतात; सर्व वृत्ती अशा प्रकारे माझ्याठायी ठेवून ज्यांनी जगण्याचे प्रेय मलाच केले आहे; ज्यांच्या जिवाचा जिव्हाळा मीच झालो आहे; असे जे भक्तोत्तम असतात आणि ते जरी पापयोनीतील असले आणि श्रुतिपरायण वेदवेत्तेही नसले, तरीही माझ्या लेखी त्यांची किंमत माझ्याहूनही कितीतरी पट आहे."

असे भगवंताचे कितीतरी भक्तवर्य होऊन गेलेत. त्यांनी तर अनेक मान्यतम भक्तांनाही उणे आणले आहे. वरिष्ठ कुळात न जन्मलेल्या ***संतश्री चोखामेळा, बंका महार, रायदास, गोरा कुंभार, जनाबाई, नामदेव, सज्जन कसाई, रोहिदास कबीर, शेख महंमद*** इत्यादी अनेकानेक संतांपुढे श्रेष्ठ कुळातल्या वेदज्ञ विप्रांची काहीच मातब्बरी नाही. पण हे सगळे संतश्री ***एकनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, चांगदेव*** इ.अन्य श्रेष्ठकुलीन भगवद्भक्तांच्याच मान्यतेचे ठरले, हे प्रसिद्धच आहे.

"कुल जाति वर्ण। हें आघवेंचि गां अकारण"

हाच भाव ***"विटू माझा लेंकुरवाळा। संगें गोपाळांचा मेळा।"*** या पद्यरचनेतून संत जनाईने साकार केला आहे. या अवीट गोडीच्या पद्याची आठवण व्हावी अशाच काही ओव्या ज्ञानेशांनी रचलेल्या आहेत. त्या पाहाः

पाहें पां भक्तिचेनि आथिलेंपणें। दैत्यीं देवां आणिलें उणें।
माझें नृसिंहत्व लेणें। जेआंचिएं महिमें।।९-४५०।।
तो प्रह्लादु गां मजसाठीं। घेतां बहुतें सदा किरीटी।
कां जैं मिआं देयावें तैं गोठी। तेआंचिआं जोडें।।४५१।।
एरविं दैत्यकुल सांचोकारें। परि इंद्रहिं सरी न लाहें उपरें।
म्हणौनि भक्ति गां एथ सरे। जाति अप्रमाण।।४५२।।

"अर्जुना! असे पाहा की भक्तीच्या उत्तुंगतेने दैत्य देवांहून सरस ठरले. दैत्यकुळी जन्मूनसुद्धा प्रह्लादाच्या भक्तीचा अलंकार असे नृसिंहरूप मी धारण केले. प्रह्लादाची ती भक्ती देवांनासुद्धा उणेपणा आणणारी आहे, यात शंकाच नाही. त्या प्रह्लादाचा एवढा महिमा आहे की त्याचे नाम घेऊन, त्याचे गुणसंकीर्तन करून मनुष्य तरून जाईल! माझ्या नामाइतकाच श्रेष्ठ महिमा त्या दैत्यराज प्रह्लादाच्याही नामाचा आहे, तो केवळ त्याच्या भक्तीमुळेच! त्याचे कुळ खरे तर दैत्यांचे! पण इंद्रालाही त्याच्या नखाएवढी पण सर नाही! म्हणून कुळाची ख्याती याबाबत नगण्य आहे. केवळ भक्तीचेच परिमाण येथे लागू आहे."

राजाज्ञेचिं आखरें आहाति। तिएं चामा एकां जेआं पडति।
तेआं चामासाठीं जोडिति। वस्तु सकल।।९-४५३।।
वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहें। एथ राजाज्ञाचि समर्थ आहें।
तैंचि चाम एक जैं लाहें। तेणें विकति आघविं।।४५४।।

"सोन्यारुप्याच्या तुकड्यांना काही फार प्रामाण्य नसते. पण त्यांच्यावर जेव्हा राजमुद्रा टंकीत होते, तेव्हा ते चलन म्हणून सर्रास वापरले जातात आणि त्यांच्या बदल्यात इतर कोणतीही वस्तू सुकरपणे प्राप्त होते. एवढेच काय पण राजाज्ञा लिहिलेले कोणतेही भिकार ताडपत्र जरी असले, तरी त्याच्यावर कोरलेल्या राजाच्या आदेशामुळे त्याला फार महत्त्व येते आणि तो आदेश तंतोतंत पाळला जातो. म्हणून वस्तूचा हलकेपणा वा किंमतीपणा यांना व्यवहारात तेवढी किंमत नसते, जेवढी त्यांच्यावर उठवलेल्या राजमुद्रेला असते."

तैसें उत्तमत्व तैंचि तरें। तैंचि सर्वज्ञता सरे।
जैं मनोबुद्धि भरें। माझेनि प्रेमें।।९-४५५।।
म्हणौनि कुल जाति वर्ण। हें आघवेंचि गां अकारण।
एथ अर्जुना माझेंपण। सार्थक एक।।४५६।।

"तशीच माझ्या भक्तिप्रेमाची मोहोर आपल्या उत्तमत्वावर जेव्हा पडते; जेव्हा मन व बुद्धी माझ्याठायी अनन्य होतात; जेव्हा अंतर्यामी मला स्थापिले जाते; तेव्हाच सर्वज्ञता प्राप्त होते; तेव्हाच साधकास मान्यता प्राप्त होते. म्हणून जाति-कुळ-वर्ण-उत्तमत्व-अधमत्व हे सगळे माझ्याठायी अप्रमाण आहेत. केवळ मजठायी लीन होऊन राहणे हाच भाव मी जाणतो!!"

"मज येवों यें। भलतेणि भावें"

अनन्यभक्तीचा हा असा महिमा आहे आणि म्हणून भगवंत सांगतातः

तैंचिं भलतेणि भावें। मन मजआंतु येतें होआवें।
आलें तऱ्हें आघवें। माघिल वावों।।९-४५७।।
जैसें तंवचिं वाहाल वोहल। जंव न पवति गंगाजल।
मग होउनि ठाकति केवल। गांगरूप।।४५८।।

"मनुष्यप्राणी जेव्हा असा अनन्यभाव धारण करतो, मग तो कोणत्याही वृत्तीचा भाव असेना का! तो मलाच येऊन मिळतो. वात्सल्यभाव, दास्यभाव, स्नेहभाव, कांताभाव, बाल्यभाव असे भक्तांच्या चित्तात जे वेगळाले भाव असतात, त्यांपैकी कोणत्याही एका भावाने भारलेले त्यांचे मन जेव्हा मजआत प्रवेशते, त्या वेळी त्यांचे जाति-कुल-वर्णादी विशेष गळून पडतात. वहाळ जोपावेतो गंगाजलात जाऊन मिळत नाहीत, तोवरच त्यांना वहाळाचे क्षुद्र व हीन रूप असते. पण एकदा का ते गंगेस जाऊन मिळाले की त्यांना गंगेचेच रूप प्राप्त होते. तद्वतच हे घडते."

कां खैर चंदन काष्ठें। हें विवंचना तंवचि घटें।
जंव न घापति एकवटें। अग्निमाझिं।।९-४५९।।
तैसें क्षत्रि वैस्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यादि इयां।
जाति तंवचि वेगलालिआं। जंव न पवति मातें।।४६०।।
मग जाति व्यक्तिं पडिलें बिंदुलें। जंव भाव होति मज मिनलें।
जैसें लवणकण घातिलें। सागरामाझिं।।४६१।।

"किंवा खैर, चंदन बाभूळ इ.काष्ठभेद ते जोवर अग्नीशी एकरूप होत नाहीत, तोवरच संभवतात. नंतर ती सर्व काष्ठे निव्वळ अग्निमयच होऊन जातात, हे अर्जुना! याचप्रमाणे क्षत्रिय - वैश्य - शूद्र - स्त्रिया इ.विविध जातिप्रकार व त्यांच्यातले श्रेष्ठत्व - कनिष्ठत्व हे भाव ते जोपावेतो मला येऊन मिळत नाहीत, तोवरच विद्यमान असतात. लवणकण सागरात घातले की जसे लवणत्वास मुकतात आणि सागराची विशालता धारण करतात, तसेच जेव्हा व्यक्ती माझ्याशी एकरूप होतात, तेव्हा त्यांच्या जात्यादी लक्षणांचा पूर्ण ऱ्हास होतो - त्यांना शून्यत्व येते, त्यांच्याठायी गौणत्वसुद्धा उरत नाही, इतकी ही जाति-कुळ-वर्णादी त्या एकरूपतेनंतर लोपतात."

"जैसें लवणकण घातिलें। सागरामाझिं"

हा विचार विस्तारित ज्ञानदेव सांगतातः

तंववरी नदनदिंची नांवे। तंवचि पूर्वपश्चिमेचें यावें।
जंव न येति आघवें । समुद्रामाझिं।।९-४६२।।
हेंचि कवणें एकें मिसें। चित्त माझां ठाईं प्रवेशें।
येतुलें हों मग आपैसें। मी होणें असें।।४६३।।

अगां जन्हैं फोडावयाचि लागिं।
लोहों मिळें कां परिसाचिआं आंगिं।
कां जैं मिलतिआं प्रसंगिं। सोनेंचि होईल।।४६४।।

"हे कुंतीपुत्रा! नद आणि नदांची भिन्नता आणि त्यांची वेगवेगळी सिंधू, ब्रह्मपुत्र, गंगा, यमुना इ.नामे आणि त्यांचे पूर्व-पश्चिमाभिमुख प्रवाहित्व, ते जोपावेतो सागरास जाऊन मिळते नाहीत तोवरच असतात. सागरातील जलाशी एकदा का हे नदनदी मिळाले की त्यांचे जल वेगळे काढता येते का की हे गंगाजल आहे की सिंधुजल आहे म्हणून! असेच जेव्हा चित्त माझ्याठायी प्रवेशते, मग ते कोणत्याही मिषाने का होईना! मजठायी ते एकरूप जाले की ते मीच होऊन ठाकते! परिसाला फोडण्यासाठी म्हणून चुकून का असेना! जेव्हा लोखंडाचा घण त्याच्यावर आदळतो, तेव्हा त्याचे सोने नाही का होत!"

पाहें पां वालभाचेनि व्याजें। तिआं व्रजांगनांचि निजें।
मज मीनलिआं काएं माझें। स्वरूप न होतिचि।।९-४६५।।
ना तन्हैं भयाचेनि मिसें। मातें न पविजेचि काएं कंसें।
कीं अखंड वैरवशें। चैद्यादिकीं।।४६६।।
अगां सोयरेपणेंचेनि पांडवा। माझें सायुज्य यादवां।
कीं ममत्वें वासुदेवा-। दिकां सकलां।।४६७।।

"त्या व्रजगोपिकांची चित्ते व्यभिचारी वृत्तीने का होईना! जेव्हा मजठायी कांतासक्तीने मिळाली, तेव्हा काय त्यांना माझे स्वरूप लाधले नाही का!! कंसाला भयाच्या मिषाने का होईना! माझी प्राप्ती शेवटी झालीच ना! आणि चैद्यशिशुपालादी राजांस अखंड माझ्याप्रत वैरभावना बाळगण्यानेही मद्रूपत्व प्राप्त झालेच ना! ज्ञातिबंधुत्वाच्या सोयरिकीने यादवांस माझे सायुज्य मिळाले, तर ममत्व स्नेहसंबंधाने वसुदेव इ.ना मी प्राप्त झालो."

नारदां ध्रुवां अक्रूरां। शुकां हन सनत्कुमारा।
ययां भक्तीं मी धनुर्द्धरां। प्राप्य जैसां।।४६८।।
तैसाचिं गोपिंसिं कामें। तेआं कंसा भयसंभ्रमें।
एरां घातकां मनोधर्मे। शिशुपालादिकां।।४६९।।
अगां मी एकुलाणिंचें खागें। मज येवों यें भलतेनि मार्गें।
भक्तीं कां विषयवैराग्यें। अथवा वैरें।।४७०।।

" नारद, अक्रूर, शुक आणि सनत्कुमार यांना हे धनुर्धरा! मी भक्तियोगे जसा प्राप्त झालो, तसाच मी गोपींना विषयसेवनानिमित्ताने, कंसाला भयाकुलतेमुळे, तर शिशुपालादिकांना माझ्याकडून त्यांचा घात होईल अशा सततच्या चिंतेमुळे प्राप्त झालो, हे सर्व जाणतात! मी तर सर्वांची अंतिम गती आहे; चिरंतन विश्रांतीचे स्थान आहे. सर्व मार्गांनी पोहोचण्याचे गंतव्य मीच आहे. मग कोणीही तेथे कोणत्याही मार्गाने यावे! अगदी विषयबुद्धीने किंवा अगदी वैरभावनेनेही माझी प्राप्ती करून घेतली तरी चालेल! भक्ती किंवा वैराग्यभावनेने मला येऊन मिळाले तर उत्तमच!"

"येऽपि स्युः पापयोनयः"

म्हणून भगवंत सांगतात की :

म्हणौनि पार्था पाहिं। प्रवेशावयां माझिआं ठाईं।
उपायांचिं नाहिं। केणि एथ।।९-४७१।।
आणि भलतेआं जाति जन्मावें। मग भजिजें कां विरोधावें।
परि भक्त कां वैरिआं होआवें। माझिआंचिं।।४७२।।
अगां कवणें एकें बोलें। माझेंपण जन्हैं जाहालें।
तन्हैं मी होणें आलें। हातां निरुतें एक।।४७३।।
ययापरी पापयोनिहिं अर्जुना। कां वैश्य शूद्र अंगना।
मातें भजतां सदनां। माझिआं एतिं।।४७४।।

"हे पार्था! माझ्याठायी येऊन मिळण्याच्या उपायांना कोणतेही निषेध नाहीत. आणि कोणत्याही जातीत जन्म झालेला असला, अगदी हीनातिहीन जाती-कुल-वर्ण असले तरीही होईना! माझी भक्ती तरी करावी किंवा माझ्या विरोधी भाव तरी धरावा! भक्ती म्हणा किंवा वैर म्हणा! माझेच करावे! असे पाहा की कोणत्याही प्रकारे का होईना! एकदाचे माझ्याविषयी अनन्यचिंतन झाले; माझे ध्यान लागले; मीच सर्व चित्तवृत्तींचा कोणत्या तरी प्रकारचा कसाही विषय झालो; चित्त एकदा माझ्यामुळे भरून गेले की नक्कीच मद्रूपप्राप्ती होणारच! हे अर्जुना! याप्रमाणे भक्ती करून पापयोनीत जन्मलेलेसुद्धा माझ्या परमधामात प्रवेशतात. स्त्रिया - वैश्य - शूद्र यांनाही माझी ही अनन्यभक्ती मजप्रती आणून सोडते."

कुलीन भक्तांची स्थिती

असा हा अनन्यभक्तीचा महिमा आहे. त्यातून उत्तम कुळात जन्मलेल्या भक्तांचे तर काय विचारावे! श्रीकृष्ण म्हणतातः

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा।
अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम्।।९-३३।।

"हे पार्था! रजतमोयोनीत जन्मूनही माझी अनन्यभक्ती करणारेसुद्धा जेथे तरून जातात, तेथे पुण्यशील ब्राह्मण आणि राजर्षी हे माझी भक्ती करून उत्कृष्ट परमगती न पावतील, तरच नवल! या अनित्य व असुखकर अशा मृत्युलोकी जन्म पावलेल्या सगळ्यांनी माझ्या अनन्यभक्तियोगाने आपला उद्धार करून घेणे हेच श्रेयस्कर!!"

श्रीकृष्णांचा हा उपदेश आपल्या शब्दात ज्ञानदेव मांडत आहेत, तो असाः

मग वर्णांमाझिं छत्रचामर। स्वर्ग जेआंचें अग्रहार।
मंत्रविद्येसिं माहेर। ब्राह्मण जैं।।९-४७५।।
जेथ अखंड वसिजैं यागिं। जैं वेदांचिं वज्रांगिं।
जेआंचिएं दिठिचिएं उत्संगिं। मंगल वाढें।।४७६।।
जैं पृथिवितलींचें देव। जैं तपोवतार सावयव।
सकल तीर्थासिं दैव। उदईलें जैं।।४७७।।

जेआंचिएं आस्थेचिएं बोलें। सत्कर्म पाल्हालीं गेलें।
संकल्पें सत्य जिआलें। जेआंचेनि।।४७८।।
जेआंचेनि गां बोलें। अग्निसिं आयुख जाहालें।
म्हणौनि समुद्रें पाणी आपुलें दिधलें। यांचिआं प्रीतीं।।४७९।।

"पापयोनीसुद्धा माझ्या अनन्यभक्तीने तरून जातात. मग सर्व वर्णांमध्ये वरिष्ठ असलेले, स्वर्ग हे ज्यांचे वतन आहे; मंत्रविद्येचे जे माहेर आहेत; ज्यांच्याठायी यज्ञाची अखंड वस्ती असते; वेदांचे अभेद्य कवच जे आहेत; ज्यांच्या दृष्टिरूपी अंकावर कल्याणरूपी बालक दिसेंमासें वाढत असते; भूतलींचे जे साक्षात देव आहेत; तपाचा मूर्तिमंत अवतार असे जे आहेत; ज्यांच्या दर्शनाने समस्त तीर्थांचेही भाग्य उदय पावते; ज्यांच्या जिव्हाळ्यावर सत्कर्मरूपी वेल गगनाच्या मांडवावर चढतो; सत्यास ज्यांच्या संकल्पामुळे जीवन लाभते; ज्यांच्या सांगण्यावरून वडवाग्नीस समुद्राने आपल्या पोटी आश्रय दिला; अग्नीस ज्यांनी आयुष्य प्रदान केले आहेः "

आणि

मिआं लक्ष्मी डावलौनि केलीं परौति।
फेडौनि कौस्तुभ घेतलां हातिं।
मग वोढवलीं वक्षस्थलाचि वोखति। चरणरजां।।९-४८०।।
आझुनि पाऊलाचि मुद्रा। मी हृदयीं वाहें गां सुभद्रा।
जैं आपुलिआं दैवसमुद्रा। जतनेलागिं।।४८१।।
जेआंचां कोपु सुभटां। कालाग्निरुद्राचा वसौटा।
जेआंचां प्रसादीं फुकटां। जोडिति सिद्धी।।४८२।।
आईसें जैं पुण्यफुंज ब्राह्मण। आणि माझां ठाईं अतिनिपुण।
मातें पावति हें कवण। समर्थणें।।४८३।।

"ज्यांच्या चरणधूलीसाठी मी लक्ष्मीला बाजूला सारली, कंठीचा वक्षावर रुळणारा कौस्तुभमणि हाती घेऊन वक्षस्थलाचा खोलगट भाग पुढे केला आणि ज्यांच्या पदचिह्नास मी माझ्या वक्षस्थलावर अजूनही माझे सौभाग्य जतन व्हावे म्हणून वागवत आहे; हे पार्था! ज्यांचा कोप हे प्रत्यक्ष कालाग्निरुद्राचे वसतिस्थान आहे; जे प्रसन्न झाले की याचकास अष्टमहासिद्धीसुद्धा सहजच देऊ शकतात; असे पुण्याचे प्रत्यक्ष पुंजच म्हणावेत, ते ब्राह्मण माझी अनन्यभक्ती करून मला पावतात, यात नवल ते काय!!"

आता राजर्षींची गती ती तरी काय वेगळी असणार!

पाहें पां चंदनाचेनि आंगानिलें। शिवतिलें लिंब होतैं तैं जवलें।
यिहि निर्जिविहि देवांचीं निडलें। बैसणिं केलीं।।९-४८४।।
मग तो चंदनु तेथ न पवें। आईसें मनीं कैसेनि धरावें।
अथवा पातलां हें समर्थावें। तेधवां काईं सांच।।४८५।।
जेथ निवविल ऐशिआं आशा। हरें चंद्रमा आधा आईसा।
वाहिजत असें शिरसां। निरंतर।।४८६।।
तेथ निवितां आन सगला। परिमलें चंद्राहूनि आगला।
तो चंदनु केविं अवलीलां। सर्वांगिं न बैसें।।४८७।।

"अर्जुना! चंदनवृक्षाच्या अंगावरून वाहणाऱ्या वाऱ्याने जवळच्या कडुलिंबाच्या वृक्षांनी जरासा सुगंध धारण केला न केला, तोच त्या कडुलिंबाच्या लाकडांपासून देवांना देव्हाऱ्यात बसावयाची आसने होतातच ना! मग प्रत्यक्ष चंदनाच्या लाकडांना देव्हाऱ्याची जागा का घेता येणार नाही सांग बरे! आणि त्यांचे जोपर्यंत देव्हारे करत नाहीत, तेव्हापर्यंत ते त्या योग्यतेचे नाहीत, असे कसे बरे समजावे! हलाहल पिऊन सर्वांगाचा दाह होऊ लागला. तो शमवावा म्हणून हराने अर्धचंद्राची कोर मस्तकी धारण केली. मग चंद्राहूनही परिपूर्ण शीतल आणि वर उत्तम सुगंधी असे चंदन सर्वांगावर का न चर्चिले जावे!"

कां रथ्योदकें जिआंचिएं कांसें।
लागलिआं समुद्रु जाहालीं अनायासें।
तिऐं गंगेसिं काएं अनारिसें। गत्यंतर असें।।९-४८८।।
म्हणौनि राजर्षि कां ब्राह्मण। जेआं गति मति मीचि शरण।
तेआं त्रिशुद्धी मीचि निर्वाण। स्थितिहिं मीचि।।४८९।।

"चंदनाची शीतलता देणारी उटी अंगांगावर लेपून घेतलीच जाणार नाही का! सांडपाण्याचे ओहोळ गंगेस मिळून समुद्रास पावतात; तेथे ती गंगा स्वतःच समुद्रास पावणार नाही असे कधीतरी होईल का! अशाच प्रकारे ज्यांची मती मीच आहे; ज्यांची गती पण मीच आहे; जे मलाच केवळ अनन्यशरण आहेत; अशा ब्राह्मणांची आणि राजर्षींची स्थिती माझ्यातच असणार आणि त्यांची परमगतीही मीच आहे, हे तू निश्चयपूर्वक जाण."

समारोप

असो. आता ***यापुढचा अनन्यभक्तीचा भाग*** पाहण्यासाठी वळू या ***उन्मेष क्र.४७-२ - परमभक्ती*** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४७-२::
::परमभक्ती::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४७-२

गीता:
६:३७,४०,४१
७:१८
९:२७,३४
१०:७-९
११:५४,५५
१८:६५,७१
ज्ञानेश्वरी:
९:३९६,४००,४९०-५३५
१०:१०४-१४८
१८:११२९-११३४
सोपानदेवी:
९:३८-४५
पा.यो.सू.:
१:२३

::उन्मेष ४७-२::

::परमभक्ती::

अभक्तांची स्थिती::::

भक्तिविना निश्चिंतता हा केवळ मूर्खपणाच!

मागील उन्मेषात आपण ***अनन्यभक्तीचा पूर्वरंग*** पाहिला. आता या उन्मेषात तिचा**उत्तररंग** पाहू या. ***मृत्युलोकी तरून जाण्याचा भक्ती हाच एकमेव उपाय आहे. तो न जाणणारे आणि त्यास न अनुसरणारे अभक्त होत.*** याबाबत ज्ञानेश म्हणतात:

ययालागिं शतजर्जरें नावें। रिघौनि केवि निश्चिंत होआवें।
कैसेंनि उघडिआं असावें। शस्त्रवर्षी।।९-४९०।।
अंगावेरीं पडतां पाषाण। न सुवावें केंविं वोडण।
रोगिं दाटलेआं आणि उदासपण। ओखदेंसिं।।४९१।।
जेथ चहूंकडें जलत वणवा। तेथूनि न निगिजें केविं पांडवा।
तेवि लोकां येऊनिआं सोपद्रवां। केंवि न भजिजें मातें।।४९२।।

"हे अर्जुना! ब्राह्मण आणि राजर्षीसुद्धा या भयावह मृत्युलोकी जन्मून त्यातून सुटका व्हावी म्हणून मला असे अनन्यचित्ताने भजतात! मग इतर सामान्य जनांची काय कथा! शतधा खिळखिळ्या झालेल्या तकलुपी नावेचा आधार कधी निश्चिती देतो कां! अंगावर पाषाणांचा वर्षाव केला जात असता त्यांपासून बचाव करण्यासाठी ढालेचा वापर करायलाच हवा की नाही! रोगग्रस्त शरीरावर औषधयोजना केलीच पाहिजे ना! चहूकडून वणव्याने वेढले गेल्यावर त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न न करता स्वस्थ राहणे, हे शहाणपणाचे ठरेल काय! हे पार्था! आणि तसेच या उपद्रवकारक दुःखकर अशा लोकी जन्मल्यावर मला न भजता राहणे निव्वळ मूढपणाचेच नाही का!"

अगां मातें न भजावेआंलागिं। कवण बल पां आपुलां आंगिं।
काईं घरीं कीं भोगिं। निश्चिंति केलीं।।९-४९३।।
ना तन्हें विद्या कां वयसा। ययां प्राणियांसि हा आईसां।
मज न भजतां भंरवसा। सुखाचां कोण्ह।।४९४।।
तन्हें भोग्यजात जेतुलें। तें एका देहाचिआं निकिआं लागलें।
आणि एथ देह तंव असे पडिलें। कालाचां तोंडीं।।४९५।।

"आणि मला भजू नये अशी कोणती मातब्बरी त्या प्राण्यांत आहे सांग बरे! विद्येचे असे कोणते बळ आहे की तारुण्याची अशी कोणती मस्ती त्यांच्या अंगी भरली आहे की त्यांच्या जोरावर ते हा मृत्युलोक तरून जाणार आहेत! त्यांनी असा सुखाचा भरवसा कशाच्या जोरावर धरावा! काय घरदारसंपत्ती किंवा उपभोग त्यांना एवढी निश्चिंती देतात की त्यांनी मला भजू नये! आणि समस्त भोग ज्यायोगे घ्यावयाचे त्या देहाच्या जोरावर इतके माजावे म्हटले तर तो देह तर उपजताच काळाच्या तोंडी लागला आहे! मग मला न भजण्याचे एकतरी सबळ कारण आहे का!"

बाप दुःखाचें केणें सुटिलें। जेथ मरणाचें भरें लोटिलें।
तिएं मृत्युलोकिंचिएं सेवटिलें। एणें जाहालें हाटवेलें।।९-४९६।।
आतां सुखेंसिं जिवितां। कैंचिं ग्राहकी कीजैल पांडुसुता।
काएं राखौंडीं फुंकितां। दीपु लागें।।४९७।।
अगां विखाचें कांदें वांटूनि। जो रस घेईजें पिळूनि।
तेआं नाम अमृत ठेऊनि। अमर होणें।।४९८।।

"हे अर्जुना! ज्यात निव्वळ दुःखरूपी माल भरलेला आहे आणि जेथे मरणाच्या मापाने तो तोलला जात आहे, अशी ही मृत्युलोकरूपी बाजारपेठ आहे. तिथेही जेव्हा उरलाउसुरला गाळसाळ माल मात्र उरला आहे, त्या सांजवेळी जीवरूपी ग्राहक सुख खरीदावे म्हणून आले आहे. जिविताचे मोल देऊन ते या हाटात सुख खरीदू पाहत आहे!! या ग्राहकास आता काय म्हणावे! अरे पांडुपुत्रा! राखुंडी फुंकून का कधी तेथे दीप प्रज्वलीत होतांना दिसेल! विषारी कंद वाटून त्याचा रस काढावा अन त्याचे नांव अमृत ठेवून अमर व्हायच्या आशेने तो प्यावा ना, तसा हा प्रकार आहे, झाले!"

तेंविं विषयांचें जें सुख। तें केवल परमदुःख।
परि काएं कीजें मूर्ख। न सेवितां सरें।।९-४९९।।
काइ सिस खांडूनि आपुलें। पाईचां खतिं बांधिजैं।
तैसें मृत्युलोकींचें भलें। आहें आघवें।।५००।।
म्हणौनि मृत्युलोकीं सुखाचिं काहाणि।
आइकिजैल कवणांचिआं श्रवणिं।
कैंचिं सुखनिद्रा हांथरूणिं। इंगलांचां।।५०१।।

"विषयसुख या मृत्युलोकरूपी बाजारात भरपूर मिळते. पण ते तर सर्व दुःखमय आहे, हे न जाणणारे मूर्ख जीव तोच माल जिविताचा मोबदला देऊन खरीदत बसतात! आणि कितीही उपभोगले तरी त्यांचे विषय सरता सरतच नाहीत! शेलक्या दुःखांची ही ग्राहके असे जणू आपले मस्तक तोडून पायींच्या व्रणावर ते बांधावे अन व्रण भरून येईल असे मानावे, अशी वागतात!! या मृत्युलोकी जीवांचा हा असा व्यवहार चालू आहे, पहा! अशा या मृत्युलोकी सुखाची गोष्ट तरी कानांना ऐकू येईल का कधी!! अरे पार्था! विस्तवाच्या अंथरूणावर सुखनिद्रा लागेल कां केव्हा!"

मृत्युलोकाची दारुणता

मृत्युलोक असा दारुण आहे. पुढे ऐका:

जिएं लोकींचा चंद्रु क्षयरोगि। जेथो उदो होत अस्तालागिं।
दुःख लेऊनि सुखाचिं आंगिं। सलित जगांतें।।९-५०२।।
जेथ मंगलाचां अंकुरीं। सवेंचि अमंगलाचि पडे पोरी।
मृत्यु उदराचां परिवरीं। गर्भु गिंवसिं।।५०३।।

जैं नाहिं तेआंतैं चिंतविं। तंव तैंचिं नेईजें गंधर्विं।
गेलिआंचि कवणें गांविं। शुद्धि न लभे।।५०४।।
अगां गिंवसितां आघवां वाटीं। परतलें पाऊलचि नाहि किरीटी।
सैंघ निमालिआंचिआं गोठी। तिएं पुराणें जेथिंचिं।।५०५।।

"या मृत्युलोकाची कहाणी पुढे ऐक! ज्या लोकीचा चंद्रमा हा क्षयरोगाने ग्रस्त आहे; जेथे अस्त होण्यासाठीच वस्तुमात्रांचा उदय होतो; ज्या लोकी सुखाचे आंगडे घालून दु:खच लोकांना छळते; जेथे मंगळाच्या अंकुरावर उपजतच अमंगळाची कीड लागलेली असते; गर्भ उदरी प्रकटताच जेथे त्यास मृत्यू घेरतो; जे नाही त्याचे दु:ख जेथे केले जाते; ते मिळाले की न मिळाल्यासारखे क्षणात नाहीसे होते आणि त्याची गंधवार्ताही उरत नाही; अरे अर्जुना! सर्व प्रकारे शोध करून पाहिला, सर्व वाटा धांडोळल्या तरी मृत्युमुखी प्रवेशलेल्या प्राण्यांचे परतणारे पाऊलही ज्या लोकी दिसून येत नाही; ज्या ठिकाणी पुराणे तर निवर्तलेल्या पुराणपुरुषांच्याच कथांनी भरलेली असतात;" आणि

जेथिंचिएं अनित्यतेचिं थोरी।
करितआं ब्रह्मयाचिआं आयुखवेरीं।
कैसें नाहिं होणें अवधारीं। निपटूनिआं।।९-५०६।।
आइसिं लोकीचि जिएं नांदणूक। तेथ जन्मलें आथि जैं लोक।
तेआंचिएं निश्चिंतिचें कवतुक। दिसत असें।।५०७।।
पैं दृष्टादृष्टाचिएं जोडी-। लागिं भांडवल न सुटें कौडी।
जेथ सर्वस्व हानि तेथ कोडी। वेंचिति गां।।५०८।।

"जेथली अनित्यता-क्षणभंगुरता ब्रह्मदेवाच्या आयुष्याचेही मोजमाप करण्यास भाग पाडते; असा सर्वस्वी विनाशच ज्या लोकी लिहिलेला आहे, त्या लोकी जन्म घेणाऱ्या आणि नांदणाऱ्यांच्या निश्चिंततेचे कौतुक करावे, तितके थोडेच आहे पाहा! इहपरलोकी लाभप्रद असणाऱ्या गोष्टींसाठी हे लोक कवडीसुद्धा वेचायला तयार नसतात. पण ज्यापायी सर्वस्वाची हानी होते, त्यासाठी मात्र हे सहजच कोट्यवधीची संपत्ती खर्चण्यास मागेपुढे पाहत नाहीत!!"

प्राणिमात्रांची उफराटी रीत

या लोकींची अशा त्या प्राणिमात्रांची वर्तणूक कशी अजब असते, पहा!

जो बहुवें विषयविलासें गुंफे। तो म्हणति उवायें पडिला सापें।
जो अभिलाखभारें दडपें। तेआंतैं सज्ञान म्हणति।।९-५०९।।
जेआंचें आयुख धाकुटें होएं। प्रज्ञा बल जिरौनि जाएं।
तेआंचें नमस्कारिति पाएं। वडिल म्हणौनि।।५१०।।

"दु:ख हेच ज्यांचे फल आहे, अशा विषयांत विलास करणारा येथला प्राणी आपण सुखाच्या राशीवर लोळत आहोत, असे समजतो. जो मनुष्य लोभाच्या ओझ्याने दडपून गेला आहे, त्याला येथले लोक ज्ञानवान म्हणतात. ज्याचे आयुष्य सरत आले आहे; ज्याची प्रज्ञा निर्बल झाली आहे, बुद्धी नाठी झाली आहे, त्याला येथले लोक वडील म्हणून नमस्कार करतात!!"

जंव जंव बाल बलिआं वाढें। तंव तंव भाजें नाचति कोडें।
आयुख निमालें आतुलिकडें। तैं ग्लानिचि नाहीं।।९-५११।।
जन्मलिआं दिवसदिवसें। हों लागें कालाचिआंचि आईसें।
कि वाढिति करिति उल्हासें। उभविति गुढीआं।।५१२।।

"हे पृथापुत्रा! या लोकींची रीत कशी उफराटी आहे ती! मूल लहानाचे मोठे होत असतांना पाहून त्यांना कौतुक वाटते. खरे तर त्याचे आयुष्य कमीकमी होत चाललेले असते. पण त्याची खंत काही या लोकांना वाटत नाही. जन्मल्या क्षणापासून ते मूल काळाच्या तावडीत दिवसेंदिवस अधिकाधिक जात असते. पण हे लोक उत्साहाने गुढ्या तोरणे उभारतात आणि त्याच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ आनंदोत्सवाचा जल्लोष करतात!!"

अगां मर हा बोलु न साहाति। आणि मेलिआं तन्हैं रडति।
परि असतें जात न गणिति। गहिंसपणें।।९-५१३।।
दर्दुर सापें गिलिजत आहे उभा।
किं तो मासिआं वेटालिं जिव्हा।..।।५१४।।

"यांना मृत्यू हा शब्दही सहन होत नाही. कोणी मेले की यांच्या शोकास पारावार राहत नाही. मृत्यू ही शाश्वत गोष्ट असूनही हे तिचा विचारही करायला तयार नसतात. असलेले आयुष्य पुढे येणाऱ्या मृत्युचे भान न राखता ही माणसे वाऱ्यावर उधळून टाकतात. त्याचा अदृष्टातील भल्यासाठी विनियोग करावा, हे त्यांच्या गावीही नसते. सर्प एखाद्या बेडकास जिवंत गिळत असावा आणि तेव्हाही त्या बेडकास वास्तवाचे भान नसावे, उलट भोवतालच्या माशा खाण्यासाठी त्याने आपली जीभ वेटाळत बसावे! तसे या लोकांचे वागणे आहे."

..। तैसें प्राणिआं कवणां लोभां। वाढिविति तृष्णा।।९-५१४।।
अहा कटां हें वोखटें। मृत्युलोकींचें उफराटें।
एथ अर्जुना जन्हैं अवचटें। जन्मलासिं तूं।।५१५।।
तन्हैं झडझडौनि वहिला निग। इयें भक्तिचिएं वाटें लाग।
जिआं पावसिं अव्यंग। निजधाम माझें।।५१६।।

"हा असा कोणता मोह या प्राण्यांना पडला आहे की सतत चाहूल देणाऱ्या मृत्यूचे त्यांना भानही उरत नाही! सतत विषयवासनांच्या मागे हे लोक असे का लागले आहेत, ते काही उमजत नाही पहा! अरे अर्जुना! ज्या मृत्युलोकी तू जन्मला आहेस, तिथळे सगळे कसे हे उफराटे आहे!"

गीतेचा दिव्य भक्ती संदेश::::

"एथ एकचि लीला तरलें"

दैववशात अशा या विचित्र मृत्युलोकी अवचित जन्म पावलेल्या प्राण्यांनी काय करावे, ते श्रीकृष्ण अर्जुनाला सांगणार आहेत. या मृत्युलोकास तरून जाण्याचा एकमेव उपाय त्यांच्याकडून ऐका! ते म्हणतात:

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।

"माझ्याठायीच मन ठेवावे. माझा भक्त व्हावे. माझेच यजनपूजन करावे. मलाच एकाला सर्वत्र पाहत नमस्कारावे. या प्रमाणे मत्परायण होत मजठायी योगयुक्त झालेला साधक निश्चितपणे हा मृत्युलोक तरून जाऊन मलाच येऊन मिळतो."

गीतेतील एकमेव योग तो हाच! **हीच योगयुक्ती परमगुह्य म्हणून या नवम अध्यायी श्रीकृष्ण सांगत आहेत. हे *राजगुह्य* आहे. *राजविद्या* ती हीच! साक्षात ब्रह्मविद्येचे हे अवतरण श्रीकृष्णमुखातून होतांना आपण पाहत आहोत.** हेच गुह्य त्यांनी पुनश्च इतर गीता अध्यायातून वेगवेगळ्या शब्दात सांगितलेले आहे.

गीता खरे तर नवव्या अध्यायी संपूर्ण सांगून झाली आहे, असे काही ज्ञात्यांचे मत आहे. पुढचे अध्याय विस्तारवजा आहेत. मूळ नऊ अध्यायांचा दहावा ते अठरावा अध्याय असा विस्तार असल्याचे म्हणूनच समजले जाते. ज्ञानेशही नवव्या अध्यायाचे अप्रूप जाणून आहेत, हे आपणास विदित आहेच.

"मन्मना भव मद्भक्तो ... ।।९-३४।।" हा श्लोक अल्प फरक करून आपल्या भेटीस पुनः अठराव्या अध्यायीही येतो. ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोसि मे।।१८-६५।।"*** असे त्या श्लोकाचे स्वरूप आहे. या दोन्ही श्लोकांचा भावार्थ तसा एकच आहे.

अकराव्या अध्यायी ***विश्वरूपदर्शन*** घडवल्यानंतर पुनः भगवंत म्हणाले आहेत की ***"भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन। ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप।।११-५४।।"*** केवळ अनन्यभक्तियोगाद्वारेच परमात्म्याचे ज्ञान होते. त्यायोगेच परमात्मस्वरूपी तत्त्वतः प्रवेश करणे शक्य होते, असे श्रीकृष्ण म्हणतात.

तेथेही शेवटच्या श्लोकातून या भक्तियोगाचे स्वरूप स्पष्ट करत ते म्हणतात की ***"मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः। निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।"*** सर्व कर्मे परमात्म्याप्रीत्यर्थ करणे, ***परमात्मपरायणता म्हणजेच ईश्वरप्रणिधान*** राखणे; संगविरहित म्हणजे विषयांपासून चित्त उपराम करणे, संसाराचा संग न बाळगणे, फलाशा ठेवून कर्मे न करणे; सर्व भूतांप्रति निर्वैर असणे, भगवंतास - परमात्म्यास सर्वांठायी सम पाहणे; असा हा ***अनन्यभक्तियोग*** श्रीकृष्ण संपूर्ण गीतेतून विवेचितात. ***हा एकच एक योग गीतेचे खरे रहस्य आहे,*** हे आपणास आतापावेतो झालेल्या चर्चेवरून निश्चितच कळून येते. असो.

श्लोक क्र. ९-३४चे विवरण

तूर्त वरील ***"मन्मना भव ... "*** या श्लोकाचा अर्थ नीट समजून घेऊ या. त्यासाठी श्रीमदाद्यशंकराचार्य काय म्हणतात ते पाहू या:

"मयि मनो यस्य स त्वं मन्मना भव तथा मद्भक्तो भव।" - माझ्याठायी मन ठेवणारा हो. माझा भक्त हो. ***"मद्याजी मद्यजनशील भव।"*** - माझे यजन - माझ्याप्रीत्यर्थ याजन करणारा हो. ***"माम् नमस्कुरु।"*** - मलाच नमस्कारित जा. ***"माम् एव ईश्वरम् एष्यसि आगमिष्यसि युक्त्वा समाधाय चित्तम्।"*** - याप्रमाणे चित्तास समाधि प्राप्त होऊन मजशी युक्तता पावेल आणि तू मलाच म्हणजे ईश्वराला येऊन मिळशील. ***"एवम् आत्मानम् अहं हि सर्वेषा भूतानाम् आत्मा परा च गतिः परम् अयनम्, तं माम् एवं भूतम् एष्यसि इति अतीतेन पदेन सम्बन्धः। मत्परायणः सन् इत्यर्थः।"*** - मीच सर्व भूतांचा आत्मा आणि परम गती आहे. अशा मलाच तू येऊन मिळशील. मत्परायणतेचे - माझ्या अनन्यभक्तीचे हे फल तू पावून कृतार्थ होशील, असा भाव भगवंत येथे व्यक्तवत आहेत.

जराशा विस्ताराने आपण हा श्लोक पाहत आहोत. कारण हा श्लोक अत्यंत महत्त्वाचा आहे. ***गीतेतील परवलीचा शब्दसमूह म्हणावा तर तो हाच श्लोक!*** या श्लोकाची मोहर उमटविली की गीतेतील गुप्ततेचा - तिच्यातील गुह्य धनाचा ठेवा सहजच स्वाधीन होतो. जिज्ञासूंनी ध्यानी धरावे की बऱ्याच विद्वद्वरांचेही या श्लोकाकडे म्हणावे तितके लक्ष गेलेले दिसत नाही. हाच श्लोक गीतेच्या मूलस्थानी कल्पिला की गीतेचे अनेक अर्थ लावू पाहणाऱ्या विद्वानांची मती योग्य प्रकारे चालू लागेल, यात शंकाच नाही. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी या श्लोकाचा केलेला अर्थ हेच सत्य आपणास सांगत आहे.

सोपानकाका काय म्हणतात

गीतेचा शब्दच्छल करण्याचे पांडित्य या श्लोकापुढे थिटे पडावे, इतकी या एका श्लोकाची महती आहे. ज्ञानदेव तर या श्लोकाचा उत्तम अर्थ करतातच यात नवल नाही. तो अर्थ पाहण्यापूर्वी त्यांचे कनिष्ठ बंधू व शिष्यवर ***श्रीसोपानदेव*** काय म्हणतात, ते पाहणेही तसे उचितच ठरावे. त्यांच्या गीतेवरील ***श्रीसोपानदेवी*** च्या ओव्यांत ते म्हणतात की:

माझें ठाइं अंतःकरण। भक्तिरूप मज अर्पण।
मज उद्देशें याग करून। नमस्कार तोही मज करी।।९-३८।।
याकारणें ते तूं सत्य जाण। हा लोक दुष्टरूप पावोन।
तें अनित्य ऐसें जाणोन। माझें भजन करिसि।।३९।।
माझें चिंतन आणि भजन। माझें करीं वाचें नामस्मरण।
सदा श्रवणीं माझी कीर्ती श्रवण। नित्य करी अर्जुना।।४०।।
करीं माझें पूजन करी। चरणीं माझीं यात्रातीर्थे करीं।
मन माझें ठाईं धरीं। नेमस्त ठेवीं मत्स्वरूपीं।।४१।।
ऐसीं निरंतर करीं भक्ती। अर्जुना येणेंकरूनि तूं तरसी।
या मोहांतें नाशिसि। मज तत्पर होओनियां।।४२।।
अर्जुना हा दुष्ट लोक पावोन। या कारणें भक्ती करी जाण।
तूझें कल्मष सर्व नासोन। पद पावसी परम जैं।।४३।।
येणेंकरुनि मज पावसि। मी आत्मा ऐसें जाणिसी।
योगयुक्त होसी। मजपरायण।।४४।।

ऐसें गुह्य जाण। अर्जुनाप्रति सांगें श्रीकृष्ण।
सोपान म्हणे श्रोतियांलागोन। श्रवण करावें।।४५।।
।।सोपान.।।

सोपानदेवांचे हे उघड बोल आहेत भक्तीवर! अनन्यभक्तीचा मार्ग त्यांच्या शब्दांतून असा प्रकटला आहे! शाब्दपांडित्याचे लाघव या ठिकाणी कामाचे नाही. हे अंतरंगीचे श्रीकृष्णगुज सांगत आहेत त्यांचे परमभक्त श्रीकृष्णमय असे श्रीसोपानकाका!! शतकानुशतके त्यांच्या सासवड मुक्कामी असलेल्या समाधीभोवती वारकरी भक्तांचा मेळावा आषाढी-कार्तिकीला न विसरता जमतो, तो या शब्दांच्या मोहिनीनेच जणू!!

गीताभाष्ये वाचा किंवा न वाचा! एक सरळसोपी ***श्रीसोपानदेवी*** जरूर वाचा! प्रथम तिला शरण जा! मग श्रीज्ञानदेवीच्या माध्यमातून श्रीगोपालकृष्णाच्या स्वरधुनीकडे वळा! कृष्णमय झालेल्या सोपानदेवांच्या प्रसादाने आपणही सारे भक्तीच्या सोपानावर चढून जाऊ या!! त्या भक्तिरसाच्या गंगौघात आपणही विलीन होऊ या! वाचेने ***श्रीसोपानदेवी*** म्हणताम्हणता आपणास गीता येऊ लागेल! विद्वानांसही अवघड वाटलेली गीतेतील प्रमेये आपणास श्रीकृष्णपरायण श्रीसोपानदेवांच्या आशीर्वादाने सहजच आकलन होतील!! महाभागवत अशा त्या श्रीसोपानकाकांच्या चरणी मस्तक ठेवून आता वळू या ज्ञानेशांच्या भावगंभीर ओव्यांकडे!!

ज्ञानेशांच्या ओव्या

"मन्मना भव ..." या श्लोकावर ते रचतात, त्या ओव्या अशाः

तूं मन हें मीचि करीं। माझां भजनिं प्रेम धरीं।
सर्वत्र नमस्कारीं। मज एकांतैं।।९-५१७।।

"हे अर्जुना! हा अत्यंत दारुण असा मृत्युलोक तू पावला आहेस. त्यातून उद्धरून जाण्याचा मार्ग तू विनाविलंब चोखाळ! येथे क्षणभरही उगीच उभा राहू नकोस! तत्काळ माझ्या भक्तीची वाट धर! त्या मार्गाने लवकरच तू माझ्या निरंजन अशा निजधामाला पावशील! या मृत्युलोकास तरून जाऊन तू आपले अविनाशी, अव्यय, अभंग, विशाल असे आत्मस्वरूप गिंवसशील! त्या स्वरूपाहून मग पुनः कधी चळणे नाही; ढळणे नाही! अनन्यभक्तीच्या मार्गाने जाणे फार सोपे आहे पहा! ***तू आपले मनच मत्स्वरूप कर! तुझ्या चित्ताला चैतन्याने भरून टाक!*** माझ्या या अशा अनन्यभक्तीची आवड तुझ्याठायी सदैव वसव! माझ्या भक्तियोगाचे प्रेमपूर्वक आणि श्रद्धायुक्त अंतःकरणाने अवलंबन कर! सर्व विश्वांतर्यामी वसणाऱ्या मज परमात्म्यास तू ओळख आणि मला सर्व भूतात पाहत जा!"

माझेनि अनुसंधानें देख। संकल्पु जालणें निःशेख।
मद्याजी चोख। याचि नांव।।९-५१८।।

"सर्वत्र असणाऱ्या मज एकासच तू अनन्यशरण होऊन नमस्कारीत जा! ***सदैव माझे असे अनुसंधान ठेव! सर्व कर्मे माझ्याठायीच आहेत, असे जाणून कर्मे कर्मे कर.*** फलाशारहित विहित कर्मे आचरून ती मजप्रीत्यर्थ केल्याचे स्मरण सतत ठेव! ती त्यांच्या फलांसह मजठायी अर्पण कर! माझ्या अनुसंधानाने सतत असे आचरण करणे म्हणजेच मजप्रीत्यर्थ यज्ञ करणे होय! हा ब्रह्मयज्ञ सांग सुफल करणारा माझा याजक तू हो! याप्रमाणे संकल्पांना तू सर्वथैव माझ्याप्रीत्यर्थ केल्या जाणाऱ्या या यागात आहुती देऊन निःशेष कर!"

आईसा मिआं आथिलां होसिं। तेथ माझिआंचि स्वरुपा पावसिं।
हें अंतःष्करणिंचें तूझपासिं। बोलिजतु असें।।९-५१९।।
अगां आघविआं चोरिआं आपुलें। जैं सर्वस्व आम्हीं असें ठेविलें।
तैं पावौनि सुख संचलें। होऊनि ठासिं।।५२०।।
आईसें सांवलेनि परब्रह्में। भक्तकामकल्पद्रुमें।
बोलिलें आत्मारामें। सञ्जयो म्हणें।।५२१।।

"तू जेव्हा असा माझ्या स्वरूपाने संपन्न होशील, तेव्हा तुझे हे ***ईश्वरप्रणिधान*** संपूर्णतेस जाईल! तू त्या वेळी माझ्या स्वरूपी येशील! हे माझ्या अंतःकरणीचे गुह्य मी तुला आता सांगत आहे. त्याप्रमाणे तत्काळ आचरण करून या भक्तियोगे तू माझे निजधाम प्राप्त करून घे आणि या दुःखमय संसारापासून आपली सुटका करून घे! हे **अंतःकरणातले माझे गुप्तधन म्हणजे ही *अनन्यभक्ती!*** मी सगळ्यांपासून हे माझे सर्वस्व लपवून ठेवले होते; ते तुझ्या कणवेने आता प्रकट करत आहे!! या धनाच्या साहाय्याने तू प्रत्यक्ष सुखरूप होऊन ठाक!!"

संजयाने असे त्या सावळ्या परब्रह्माचे - त्या आत्मारामाचे - त्या भक्तकामकल्पद्रुमाचे उघडे बोल आपणापावेतो आणून पोहोचवले आहेत, असे ज्ञानदेव म्हणतात.

समारोपः:::

"जैसा म्हैसा नुठीं कां पुरां"

साक्षात परब्रह्माचे बोल कानी पडूनही त्यांच्याकडे लक्ष न देणारे अभागीच नाहीत का! अभक्त असे संसारमोहग्रस्त जीव भगवंताकडे कसे वळत नाहीत, ते धृतराष्ट्राचे उदाहरण देऊन ज्ञानेश स्पष्ट करतात, ते पाहाः

अहो आईकिजत असें किं अवधारा।
तंव इयां बोलां निवांत म्हातारा।
जैसा म्हैसा नुठी कां पुरां। तैसा उगाचि असे।।९-५२२।।
तेथ संजएं माथा तुकविला। अहा अमृताचां पाऊस वर्षला।
किं हा एथ असतुचि गेला। सेजिआं गांवां।।५२३।।
तऱ्हैं दातारु हा आमुचा। म्हणौनि बोलतां हें मैलेल वाचा।
काईं जाहालें ययाचां। स्वभावो आईसा।।५२४।।
परि बाप भाग्य माझें। जैं वृत्तांतु सांघावयाचेनि व्याजें।
कैसा रक्षिलों मुनिराजें। व्यासदेवें।।५२५।।

संजय धृतराष्ट्राला विचारतो की, "आपण हे श्रीकृष्णांनी सांगितलेले परमगुह्य ऐकत आहात ना!" तर तो वृद्ध धृतराष्ट्र काहीच

न बोलता निवांत राहिला. ज्याप्रमाणे पाण्यात बसलेला रेडा उठू पाहत नाही, तसा चित्तात कोणताही भाव प्रकट होऊ न देता तो धृतराष्ट्र संसारमोहाने चित्त व्यापलेलाच राहिला. धृतराष्ट्र असा ढिम्म बसून होता की जसे ते श्रीकृष्णांचे अमृतमय बोल त्याच्या गावीही नव्हते. त्या वेळी संजयाने मान तुकवली.

तो म्हणू लागला,"कसे या म्हाताऱ्याचे दुर्भाग्य आहे, पहा! अमृताचा पाऊस आपल्या गावी वर्षतो आहे आणि त्याच नेमक्या वेळी हा इथेच असूनही परगावी गेल्यासारखा झाला आहे! असे याच्याबद्दल न बोलणेच चांगले! कारण हा आमचा धनी आहे. त्याच्याबद्दल असे अनुदार उद्गार काढल्याने आपलीच वाचा उगीचच मलिन होईल! काही झाले तरी याचा स्वभाव का बदलणार आहे! हा असाच राहणार!"

एवढे बोलून संजय विचार करू लागला की माझे भाग्य मात्र धन्य! श्रीकृष्णांचे हे गीतानिरूपण - हा श्रीकृष्णार्जुनांचा गुह्य संवाद ऐकण्याचे महद्भाग्य मला व्यासदेवांच्या कृपेने कसे बरे मिळाले आहे! त्यांची आज्ञा म्हणून हा समाचार धृतराष्ट्रास सांगण्याच्या निमित्ताने त्या मुनिवर्यांनी मला खरेच तारले आहे, पाहा!"

सञ्जयाचे अष्टसात्त्विक भाव

श्रीकृष्णांचे बोल ऐकणारा संजय खरा भक्त होता. श्रद्धावान होता. श्रीकृष्णांबद्दल धृतराष्ट्रास वाटत असे तशी असूया त्याच्याठायी नव्हती. भगवंत म्हणतात त्याप्रमाणे ***"श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः। सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम्।।१८-७१।।"*** असा संजय गीतेचा खरा अधिकारी होता. म्हणून तो तत्क्षणीच मुक्त होऊ लागला. भगवंताची ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। ... "*** ही वाणी त्याच्या कानी पडण्याचाच अवकाश, की त्याला अष्टसात्त्विक भावांचे भरते आले.

येतुलें हें वाडें सायासें। जंव बोलत आहें दृढ मानसें।
तंव न धरवेचि आपुलिआं आईसें। सात्त्विकें केलें।।९-५२६।।
चित्त चाकाटलें आंतु घेत। वाचा पांगुललीं जेथिंचि तेथ।
आपादकंचुकित। रोमांच आलें।।५२७।।

"मोठ्या कष्टाने त्याने मनास आवरत आपले धृतराष्ट्राप्रत करावयाचे निवेदन केले खरे! पण तेवढ्यात त्याच्या मनाचा धरबंध फुटून गेला आणि अष्टसात्त्विक भावांनी त्याच्यावर मात केली. त्या भावोर्मींनी त्यास अगदी जखडून टाकले! चित्त चाकाटले; मन उन्मन झाले; वाचा जेथली तेथे कुंठित झाली; आपादमस्तक त्याच्या शरीरावर कवच शोभावेत इतके रामांच उभे राहिले!"

अर्धोन्मिलीत डोलें। वर्षताति आनंदजलें।
आंतुलिआं सुखोर्मिचेनि बलें। बाहेरीं कांपें।।९-५२८।।
पैं आघवांचि रोममुळीं। आलीं स्वेदकणिका निर्मळीं।
लेईलां मोतिआंचि कडियाळीं। आवडें तैसा।।५२९।।
आईसां महासुखाचेनि अतिरसें। जेथ आटणि होईल जिवदसें।
तेथ निरोविलें व्यासें। तैं नेदीच हों।।५३०।।

"अर्धोन्मिलित नेत्रांतून आनंदाश्रूंचा पात होऊ लागला. अंतःकरणातील आनंदोर्मी उचंबळून येऊ लागून त्याची तनू कापू लागली. सर्वच्या सर्व रोमांचांच्या मुळाशी निर्मळ स्वेदबिंदू प्रकट झाले. त्यामुळे मोत्यांचा जाळीदार अंगरखा ल्यावा तसा तो दिसू लागला. महासुखाचा त्याच्या ठायी इतका परिपोष झाला की जीवदशा आटून जाईलसे वाटू लागले. पण तेवढ्यात श्रीव्यासदेवांनी त्याला सावरले!"

आणि कृष्णार्जुनांचें बोलणें। घों करी आलें श्रवणें।
कीं देहस्मृतिचा तेणें। वापसा केला।।९-५३१।।
तंव नेत्रींचें जल विसर्जी। सर्वांगिचां स्वेदु परिमार्जी।
तेंविचि अवधान म्हणें हो जी। धृतराष्ट्रांतैं।।५३२।।

तेवढ्यात त्याच्या कानी श्रीकृष्णार्जुनांचे घनगंभीर बोल पडले. त्यामुळे तो पुनश्च देहभाानावर आला. मग डोळ्यांतील अश्रू पुसून आणि अंगीचे स्वेदबिंदू निपटून टाकून तो धृतराष्ट्रास कृष्णार्जुनांचे बोलणे *"पुढे ऐका"* म्हणून सांगू लागला.

आतां कृष्णवाक्यबीजां निवाडु।
आणि संजयो सात्त्विकाचां बिवडु।
म्हणौनि श्रोतेआं होईल सुरवाडु। प्रमेयपिकाचां।।९-५३३।।
अहो आलुमालु ध्यान देयावें।
येतुलेनि आनंदाचिआं रासिवेरी बैसावें।..।।५३४।।

"आधीच श्रीकृष्णांची वाक्यरूपी बीजे उत्तम होती. त्यांत त्यांना पेरण्यासाठी संजयरूपी उत्कृष्ट मशागत केलेली सुपीक भूमी लाभली. त्यामुळे श्रोतेमंडळींचे भाग्यच उदयास आले, असे झाले. त्यांना आता अमाप असे प्रमेयपीक हाती लागणार आहे, यात काय संशय! थोडेथोडके लक्ष दिले तर ते पीक आपणासही घ्यावयास मिळणार आहे. ते लाभून त्याची मळणी करून मिळणाऱ्या आनंदाच्या धान्यराशीवर आरामात पहुडण्यास आपल्याला सहज मिळेल."

....। बाप श्रवणेंद्रिआं दैवें। घातिलीं माल।।९-५३४।।
म्हणौनि विभूतींचा ठाओ। अर्जुना दाविल सिद्धांचा राओ।
तो आईका म्हणे ज्ञानदेओ। निवृत्तिचां।।५३५।।

"बाप हो! श्रवणेंद्रियांचे आज इतके महद्भाग्य उदयले आहे की ***राजयोगाची श्रीकृष्णार्जुनोक्तिरूपी माळ*** त्यांना घातली गेली आहे आणि महासुखाच्या सिंहासनावर त्यांना बसवून अभिषेकिले जात आहे!! आनंदाचे आवार आता त्यांचे जणू साम्राज्यच झाले आहे! तो सिद्धांचा राव श्रीकृष्ण पुढे आपल्या विभूतींचा ठाव सांगणार आहे. ते ऐका," असे निवृत्तिशिष्य ज्ञानदेव आपणास सांगत आहेत.

अनन्यभक्ती व पंथराज

अनन्यभक्तियोग प्रकट करणारा हा नवम अध्याय ज्ञानेश असा पूर्णत्वास नेतात. ***विभूतियोग*** तर आपण पूर्वीच ***ईश्वरप्रणिधान व त्यासाठी आलंबविषय*** यांचा विचार करतांना लक्षात घेतलेला आहे.

***अनन्यभक्तियोग* हा *पंथराज* च आहे. त्यासच *क्रमयोग* असे पण नांव ज्ञानेश देतात.** अठरावा अध्याय त्यातील क्रमयोगासाठी आपण पाहू तेव्हा हे अधिक स्पष्ट होईल.

कर्म, योग, भक्ती व ज्ञान यांचे घनिष्ट साहचर्य

***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण:।।९-३४।।"* या श्लोकात अनन्यभक्तियोगाचे संपूर्ण सार प्रकटले आहे. *"मन्मना"* मध्ये मन आत्मस्वरूपी लीन करण्याचा लययोगाचा भाग येतो. *"मद्याजी"* मध्ये कर्मयोगाचा भाग येतो. *"मद्भक्तो"* मध्ये *"वासुदेव: सर्वमिति"* असा ज्ञानयोगाचा भाग येतो.**

***"मन्मना"* हा *ईश्वरप्रणिधान* पूर्णत्वास नेणाऱ्या *ध्यानयोग* अथवा कुंडलिनीच्या उत्थापनासह साध्य होणाऱ्या *लयप्रधान हठयोग* वा *राजयोग* यांच्याशी संबंधित आहे. *"मां नमस्कुरु"* यात भक्तीचा भाग येतो. *ज्ञान, कर्म, योग व भक्ती* या अशा चतुष्ट्यांचा मिळून *पंथराज* अथवा *क्रमयोग* असा अनन्यभक्तियोगाद्वारे संपन्न होतो. या योगाचा अवलंबच *"मामेवैष्यसि"*, *"युक्त्वैवमात्मानम्"* आणि *"मत्परायणता"* यांप्रत नेतो.**

ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग व ध्यानयोग वा राजयोग वा कुंडलिनीयोग हे वेगवेगळे योग नाहीत; तर ती सर्व पंथराज वा क्रमयोग या एकाच योगाची परस्परसंबंधित अंगे होत. या मूळ एका योगमार्गाचे अजाणता असे प्रभाग कल्पिले जातात आणि जणू काही हे प्रभाग म्हणजे स्वयंपूर्ण योगच आहेत - विभिन्न योग आहेत, अशी उगीचच कल्पना केली जाते.

आपल्या आतापावेतोच्या विवेचनावरून ही गोष्ट जिज्ञासूंच्या पूर्णपणे लक्षात आलीच आहे! **या चतुरंगयोगाचे फल म्हणजे निरंजन निजधामाची प्राप्ती, परमात्ममीलन, निरंतर अखंड समाधि असे आहे, हे *"मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायण:"* या भगवंतोक्तीवरून स्पष्ट होते.** असो.

अभेदभक्तियोगाचे उद्घाटन

भक्तीचा अंतरंगदीप असा कर्माच्या तेलवातीने, योगाच्या शलाकेने आणि ज्ञानाच्या ज्योतीने प्रज्वलित होतो. त्याचा प्रकाश बाह्याभ्यंतर पसरतो. विश्वाची चवदाही भुवने उजळून टाकत त्यापलीकडील अनंताच्या प्रवासास त्याची प्रकाशकिरणे सहजच उद्युक्त होतात. त्या भक्तिदीपाच्या उज्वल प्रकाशात आपण यापुढे भक्तीच्याही अंतरंगात उतरणार आहोत.

नवम अध्यायाच्या आधाराने आपण ईश्वरप्रणिधानाचे खरे रूप आकळून घेतले आहे. पतञ्जलींच्या ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।"*** या सूत्राने आपणास निरंजन समाधिपर्यंत आणून सोडले आहे. हे सूत्र अजूनही आपणास साथ देणार आहे. ज्या समाधीकडे आपण आता वळणार आहोत, ती आहे गीतेच्या दहाव्या अध्यायी!! ईश्वरप्रणिधानास साहाय्यकर अशा परमात्मस्वरूपाच्या प्रमुख प्रमुख ***विभूती*** त्या अध्यायी निवेदिल्या आहेत. त्यांचे स्वरूप आपण यापूर्वीच पाहिले आहे.

ईश्वरप्रणिधान* हे भक्तीचे मुख्य अंग आहे. पण ते सहाव्या अध्यायी वर्णिलेल्या पंथराजाहून भिन्न नाही.** ज्ञानदेवीतून ज्या एकाच एका योगाचे माहात्म्य सर्वदूर सांगितले आहे, त्यास प्रसंगपरत्वे ज्ञानेश वेगवेगळी नामाभिधाने देतांना दिसतात. सहाव्या अध्यायी त्यास ते ***पंथराज ही संज्ञा देतात; तर अठराव्या अध्यायी तोच योग ***क्रमयोग*** या नावाने ओळखला जातो. दहाव्या अध्यायी ***"एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वत:। सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशय:।।१०-७।।"*** या श्लोकानिमित्त त्याच योगाचे ***अभेदभक्तियोग*** असे ज्ञानेशांनी नामकरण केल्याचे दिसून येते. त्यालाच तेथे ***महायोग*** *(१०-१०७)* अशीही संज्ञा त्यांनी बहाल केली आहे.

महायोग

हा ***भक्तियोग*** सर्वश्रेष्ठ ज्ञानावर आधारित आहे, असेही या श्लोकावरील ओव्यांतून दिसून येते. ***ज्ञानयोग*** तो हाच! अशी **ज्ञान, योग आणि भक्ती यांची सांगड घालणाऱ्या अभेदभक्तियोगाचे दर्शन** ज्ञानेशांच्या वाणीतून घेऊ या:

ययांलागिं सुभद्रापति। हें भाव इयां माझिआं विभूति।
आणि यांचिआं व्याप्ति। व्यापिलें विश्व।।१०-१०४।।
म्हणौनि गां ययावरी। ब्रह्मादिपिपीलिकेवरी।
मीवांचूनि दुसरी गोठी नाहीं।।१०५।।
आईसें जाणें जो सांचें। तेआं चेईरें जाहालें *ज्ञानाचें*।
म्हणौनि उत्तम मध्यम भेदाचें। दु:स्वप्न तेआं।।१०६।।
मी माझिआं विभूति। आणि विभूतिं व्यष्टिलिआं व्यक्ती।
हें आघवें *योगप्रतीति*। एकचि मानी।।१०७।।
म्हणौनि नि:शंकें एणें *महायोगें*। मज मिनला मनाचेनि आंगें।
एथ संशय करणें न लगें। तो त्रिशुद्धि जाहाला।।१०८।।

"हे सुभद्रापती! या विश्वातील समस्त भाव माझ्या विभूती आहेत. त्या सर्व भावांद्वारे मीच हे सर्व विश्व व्यापले आहे. ब्रह्मापासून तहत मुंगीपर्यंत माझ्यावाचून दुसरी वस्तू नाही. ज्यास या वास्तवाचे ज्ञान उत्पन्न झाले, त्यास उत्तम - अधम या भेदाचे दु:स्वप्न पडत नाही. मी आणि माझ्या विभूती आणि त्यांद्वारे व्यक्त झालेले हे विश्व ज्याला योगप्रतीतीने एकच आहेत असे जाणवते, तो नि:संशय या महायोगाने मजशी जीवाभावाने ऐक्य पावला आहे, असे तू खात्रीपूर्वक समज!!"

का जैं आईसें किरीटी। मातें भजें जो अभेदां दिठीं।
तेआंचिएं भजनाचिएं नाटीं। सूतीं मज।।१०-१०९।।
म्हणऊनि *अभेदें* जो *भक्तियोगु*। तेथ शंका नाहीं न ये खंगु।
करितां ठेलां तन्हैं चांगु। तैं सांघितलें *पष्ठीं*।।११०।।
तोचि अभेदु कैसा। हें जाणावेआं मानसां।
साद घालिं तन्हैं परिएसां। बोलिजैल।।१११।।

"हे किरीटी! जो मला अशा अभेद दृष्टीने पाहतो, तोच माझी खरी भक्ती करतो. अद्वैतभक्तीने विनटलेल्या त्या माझ्या भक्ताच्या भजनाच्या सर्व अंगांत मीच भरून राहिलेला असतो! हा जो माझा ***अभेदभक्तियोग*** मी सांगितला, त्यात कधीच खंड पडत नाही. तो आचरत असता काही कारणाने त्यात थोडाबहुत व्यत्यय आला, तरी त्याचे अंतिम फल प्राप्त होतेच होते! याबाबत मी तुला पूर्वीच *(सहाव्या अध्यायी)* सांगितले होते."

सहाव्या अध्यायातील पंथराजाचा पूर्वापर संबंध

सहाव्या अध्यायी भगवंतांनी याबाबत काय सांगितले होते, अशी जिज्ञासा उत्पन्न होणे साहजिकच आहे. तेथे अर्जुनाने असे विचारले होते की ***"अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः। अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति।।६-३७।।"*** - श्रद्धापूर्वक योगाभ्यास करत असता जर मन विचलित होऊन योगसिद्धी झाली नाही, तर कोणती गती प्राप्त होते, असा तो प्रश्न होता.

त्याचे उत्तर तेथे भगवंतांनी जे दिले ते असे की: ***"पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते। न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति।।६-४०।।"*** - श्रीकृष्ण म्हणाले की अभ्यासयोगाचे आचरण करणाऱ्याचा कधीच विनाश होत नाही. शुभ असे हे कर्म करण्याने इह व परलोकीही तो दुर्गतीस जाण्यापासून वाचतो आणि अनेक जन्म योगसिद्धीसाठी अभ्यासरत राहण्याची बुद्धी त्याला जन्मजन्मांतरीही प्राप्त होत जाते. आणि अंती ***"अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।।६-४५।।"*** या श्लोकात म्हटल्याप्रमाणे तो परमगती पावतो.

हा सर्व भाग ज्ञानेशांनी आपल्या ओव्यांतून अर्थातच पंथराजसापेक्ष वर्णिलेला आहे. तो भाग आपण ***योग्याचे प्रयाण आणि निर्वाणगती*** हा विषय अभ्यासतांना पाहणारच आहोत. तूर्त एवढे ध्यानात घेऊ या की ***अभेदभक्तियोग*** **हाच** ***ज्ञानयोग*** **आहे. सहाव्या अध्यायीचा** ***पंथराज*** **वा** ***अभ्यासयोग*** **वा** ***ध्यानयोग*** **तोही हाच!**

परमभक्ती

या योगास ***ज्ञानभक्ती*** असेही ज्ञानेश म्हणतात *(१८-११३०).* ***चवथा भक्तियोग*** तोही हाच*(१८-११२९)!* या योगाचे अधिक वर्णन करत अठराव्या अध्यायी ज्ञानेश म्हणतातः

म्हणौनि दृश्यपथा-। अतितु माझा पार्था।
भक्तियोगु चवथा **। म्हणितलां।।१८-११२९।।**
ययां *ज्ञानभक्ती* सहज। *भक्तु* एकवटलां मज।
तो मीचि केवल हें तूझ। श्रुतहिं आहें।।११३०।।
जैं उभऊनिआं भुजा। ज्ञानिआं आत्मा माझां।
हें बोलिलों कपिध्वजा। सप्तमाध्यायीं।।११३१।।
तैं हें कल्पादि आदि मिआं। भागवतमिखें ब्रह्मेआं।
उत्तम म्हणौनि धनंजया। उपदेसिलीं।।११३२।।

"या ज्ञानभक्तिद्वारे मजशी एकरूप होणारा भक्त म्हणजे मीच आहे, हे अर्जुना! तुला मी मागेच *(सप्तमाध्यायी)* सांगितलेच आहे. ज्ञानी हा माझा आत्माच आहे, असे तुला मी म्हटले होते ***("उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।.... ।।७-१८।।").*** **हीच भक्ती मी कल्पारंभी श्रीमद्भागवताद्वारे ब्रह्मदेवाला उपदेशिली होती.** भागवतपुराणातील श्रेष्ठ म्हणून गौरवलेली भक्ती हीच आहे."

ज्ञानी इयेंतैं *स्वसंवित्ति* । शैव म्हणति *शक्ति* ।
आम्हीं *परमभक्ती* । आपुलीं म्हणों।।१८-११३३।।
हें मज मिलतिएं वेलें। तेआं क्रमयोगिआं फलें।
मग समस्तहिं निखलें। मिआंचिं भरें।।११३४।।

"हिलाच ज्ञानी ***स्वसंवित्ती*** या नामे ओळखतात. शैव हिलाच ***शक्ती*** असे म्हणतात. आम्ही हिला आपले ***परमभक्ती*** असे म्हणतो. ***क्रमयोगाचे फल ही भक्तीच आहे.*** मला पावून क्रमयोग्यास ती प्राप्त होते. या भक्तियोगे त्याच्यासाठी हे अखिल विश्व माझ्याच स्वरूपाने भरून गेलेले दिसते. किंबहुना त्याला या **क्रमयोगाने ही *स्वरूपसमाधि* प्राप्त होते**," असे श्रीकृष्ण म्हणतात.

"बोधयन्तः परस्परम्"

हा ***स्वरूपसमाधि*** कशा प्रकारचा असतो, हे जाणून घ्यावे असे अर्जुनास वाटणे साहजिकच आहे. त्याबाबत श्रीकृष्ण सांगतात कीः

अहं सर्वस्य प्रभवः मत्तः सर्वं प्रवर्तते।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः।।१०-८।।
मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम्।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च।।१०-९।।

"सर्व काही मजपासून उत्पन्न झालेले आहे आणि होते. माझ्यापासूनच सर्व वस्तूंची प्रवृत्ती असते, हे जाणून ज्ञानी पुरुष माझी भावयुक्त चित्ताने भक्ती करतात. माझ्या ठिकाणी चित्त ठेवणारे आणि जीवभाव मला अर्पण करून मजठायी भाव ठेवणारे ते ज्ञानी भक्त एकमेकाला माझा बोध करून देण्यात आणि माझ्या गुणवर्णनादी करण्यात नेहमी रममाण असतात. अशा भक्तीतच त्यांना खरा संतोष प्राप्त होतो."

"खेलत सुखें त्रिभुवनिं"

याविषयी ज्ञानेश म्हणतातः

तऱ्हैं मीचि एक सर्वां। ययां जगां जन्म पांडवा।
आणि मजपासूनि आघवा। निर्वाहो ययांचां।।१०-११२।।
कल्लोलमाला अनेगां। जन्म जलींचि पैं गां।
आणि तेआं जलचि आश्रो तरंगां। जीवनहिं जल।।११३।।
आइसें आघवांचि ठाईं। तेआं जलचि जेविं पाहिं।
तैसां मीवांचौनि नाहीं। विश्विं इयां।।११४।।

ज्ञानाशी अभिन्न अशा या भक्तियोगाविषयी श्रीकृष्ण म्हणतातः "हे अर्जुना! या विश्वातील अखिल वस्तूंचा जन्म माझ्यापासूनच आहे आणि यांची स्थितीही मजपासूनच आहे. पाण्याच्या पृष्ठभागावर

लाटांमागून लाटा येतात आणि जातात. त्यांना जळच निर्मिते आणि त्यांना आश्रयही जळाचाच असतो. त्यांचे अस्तित्व जळावरच अवलंबून असते. सर्व स्थितीत त्या लाटांना जसे जळ आहे, तसाच या समस्त वस्तुजातांना मी आहे."

आईसिआं व्यापकां मातें। जाणूनि जैं भजति भलतैथें।
परि सांचोकारें उदितें। प्रेमभावें।।१०-११५।।
देशकालवर्तमान। आघवें मजसिं करूनि अभिन्न।
जैसा वायू होउनि गगन। गगनिचिं विचरें।।११६।।
ऐसेनि जैं निजज्ञानी। खेलत सुखें त्रिभुवनिं।
जगद्रूपा मनीं। सांठऊनि मातें।। ११७।।
जैं जैं भेटें भूत। तैं तैं मानिजें भगवंत।
हा भक्तियोगु निश्चित। जाण माझां।।११८।।

"माझे हे व्यापकत्व जाणून ते भक्त मला सर्वत्र भजतात. त्यांची ती भक्ती मोठ्या प्रेमपूर्ण भावाने होत असते. देश, काळ व वर्तमान ही सर्व मजशी अभिन्न आहेत, हे जाणणारे ते, वायू जसा गगनात गगन होऊन विचरतो, तसे मी होऊन मजमध्ये विचरतात. जगद्रूप असणाऱ्या मला असे चित्ती ठसवून घेतलेले ते आत्मज्ञानी भक्त या त्रिभुवनात सुखेनैव क्रीडत असतात असतात. जे जे भूत भेटेल ते ते भगवंतच आहे, असा बोध करून देणारा हा योग माझा भक्तियोग आहे, असे निश्चित समज!"

गीतेतील एकमेवाद्वितीय योग

अशा प्रकारे **ज्ञानाशी अभिन्न असणारा हा योग आहे, *"हे ऐसेनि जैं निजज्ञानी (१०-११४)"* या ओवीवरून आणि हाच *भक्तियोग* आहे, हे *"हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा(१०-११८)"* या ओवीवरून सुस्पष्ट होते.**

हाच ***पंथराज***नामक ज्ञानेश्वरसंज्ञित सहाव्या अध्यायातील ***अष्टांगयोग वा योग*** आहे, हेही ***"म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगु। ते सांघितलें षष्ठीं(१०-११०)"*** या ओवीवरून स्पष्ट झालेलेच आहे. हा जो ***भक्तियोग*** गीता सांगते, तो कर्मयोगाशीही अभिन्न आहे, हे आपण यापूर्वी ***"यत्करोषी ... ।।९-२७।।"*** या श्लोकावरील ***"वांचूनि आमुचा लाग। निष्कल भक्तितत्त्व(९-३९६)"*** व ***"तैं क्रियाजात आघवें। जैं जैसें निफजैल स्वभावें। तैं भावना करौनि करावें। माझिआं मोहरां।।९-४००।।"*** या ओव्यांवरून पाहिलेच आहे.

अशा प्रकारे ***कर्मयोग, ज्ञानयोग, कुंडलिनीअधिष्ठित - अष्टांगसंबंधित पंथराज वा योग वा लययोग यांचा*** या***गीतेतील भक्तियोगाशी*** कसा ***अभिन्न वा अभेद संबंध आहे***, ते आपण ध्यानी घेतलेच पाहिजे. किंबहुना हे प्रमेय मनी नीट ठसवून घेतच आपण गीता-ज्ञानेश्वरीचा अभ्यास करणे सयुक्तिक ठरते!! असो.

"तैं संवादचतुष्पथींचें। गणेशु जाहालें"

असा हा योग सफल झाल्याची काही लक्षणे आणि साधकांची चर्या आपण तूर्त पाहत आहोत. त्याबाबत ज्ञानदेव पुढे काय म्हणतात, ते पहाः

चित्तें मीचि जाहालें। मिआंचि प्राणें धालें।
जीवों मरों विसरलें। बोधाचिएं भुलीं।।१०-११९।।
मग तेआं बोधाचेनि माजें। नाचति संवादसुखाचि भोजें।
आतां एकमेकां घेपें दीजें। बोधचि वरी।।१२०।।
जैसिं जवलिकेचिं सरोवरें। उचंबललीआं कालवति परस्परें।
मग तरंगासि धवलारें। तरंगचि होति।।१२१।।
तैसिं एर एरांचिएं मिलणिं। पडत आनंदकल्लोलांचि वेणि।
तेथ बोध बोधांचि लेणिं। बोधेंचि मिरविं।।१२२।।

"त्यांचे चित्त मत्स्वरूप असते. त्यांचे जीवप्राण मला पावून धन्य होतात. माझ्या बोधाने भारलेल्या त्या भक्तांना जीवनमरणाचा पण विसर पडतो. त्या बोधभरात अत्यानंदाने उल्हसित होत ते संवादसुखाची मूर्तीच जणू होतात. ते भक्त आपापसात माझीच चर्चा करतात आणि एकमेकांपर्यंत माझा बोध पोहोचवितात. जवळ जवळ असणारी सरोवरे उचंबळली तर एकमेकात जशी मिसळून जातात; लाटांना जशी लाटांचीच घरे राहण्यासाठी असतात; तसे भक्त जेव्हा एकमेकांना भेटतात, तेव्हा आनंदाची वेणी गुंफली जाते. तेव्हा बोध जणू बोधाचीच लेणी बोधानंदात घालून मिरवतो."

जैसें सूर्ये सूर्यांतैं वोवालिलें। किं चंद्रें चंद्रम्यां क्षेम दिधलें।
ना तऱ्हैं सरिसेनि पाडें मीनलें। दोनिं बोध।।१०-१२३।।
तैसें प्रयाग होत सामरस्याचें। वरी वोसाण पडें सात्त्विकाचें।
तैं संवादचतुष्पथींचें। गणेशु जाहालें।।१२४।।
तेधवां तेआं महासुखाचेनि भरें। धांवौनि गांवांचिएं भाईरें।
मिआं धालें तेणें उद्गारैं। लागति गाजौं।।१२५।।

"सूर्याने जसे सूर्यासच ओवाळावे; चंद्राने जसे चंद्रम्यासच आलिंगावे; किंवा सारख्याच श्रेष्ठत्वाचे दोन नद एकमेकांत मिळून प्रयागक्षेत्र प्रकटावे; तसे जेव्हा भक्त एकमेकांना मिळतात, तेव्हा होते. सामरस्याचा तेथे जणू महापूरच येतो आणि त्यावर अष्टसात्त्विक भावांचे पुराड तरंगत राहते!! चौरस्त्यावर बसवलेल्या गणेशमूर्तीस तेथून जाणारेयेणारे जसे वंदन करतात, तसेच हे भक्त म्हणजे आत्मसंवादाच्या चतुष्पथावर वसलेले जातायेता अध्यात्मसाधकांनी वंदावेत असे ***स्वरूपगणेश*** होत!! त्यांच्या परस्पर आत्मसंवादामुळे महासुखास भरती येते आणि देहविस्मृती होऊन माझ्या स्वरूपप्राप्तीने तृप्त झालेले ते भक्त माझ्या रंगांत दंग होउन जल्लोष करू लागतात."

गुरुवी भक्ती

पुढे ऐकाः

पैं गुरुशिष्याचां एकांतिं। जैं आखरां एकाचिं वदंति।
तैं मेघांचिआंपरी त्रिजगतिं। गर्जति सैंघ।।१०-१२६।।
जैसिं कमलकलिका जालेंपणें। हृदयिंचिआं मकरंदां राखों नेणें।
दें राया रंकां पारणें। आमोदाचें।।१२७।।
तैसेनि मातें विश्विं कथित। ...।।१२८।।

"जे अक्षर शिष्यास गुरू एकांतीच उपदेशितात, त्या नामाची ते भक्त मेघगर्जनेप्रमाणे घोष करत त्रिजगती नांदी पिटवतात. ब्रह्माचा मंत्र ते गुप्त न ठेवता बेहोषपणे साऱ्या विश्वास गर्जून सांगतात!! कमलकलिका उत्फुल्ल विकसली की आपला मकरंद जसा राखून ठेवणे जाणत नाही आणि राजापासून तर रंकापर्यंत सुगंधभांडार मुक्तहस्ते उधळत सुटते, त्याप्रमाणे ते भक्त माझी कीर्ती, माझे गुणगान, माझे वर्णन, माझे गुप्त ठिकाण, माझे परमधाम, माझ्या कथा, माझे स्वरूप इ.सर्व हातचे काहीही राखून न ठेवता सर्व विश्वभर कथित करत सुटतात."

....। कथितेनि तोषें कथूं विसरत।
मग तेआं विसरामाझिं विरत। आंगें जिवें।।१०-१२८।।
आईसें प्रेमाचेनि बहुंवसपणें।
नाहीं राति दिओ जाणणें।...।।१२९।।

"ते करत असता त्यांना अति तोष होतो आणि त्या तोषाने तृप्त होत माझी कीर्ती सांगण्याचे पण विसरू लागतात. आपण काय सांगत आहोत याचे साधे भानही त्यांना त्या संतोषाच्या भरात उरत नाही. आणि त्या आवेगात ते इतके देहभान विसरतात की जणू त्यांचा देह, त्यांची अंगे, त्यांचे जीव - प्राण - मन- चित्त ही विरूनच गेलेली असावीत!! ज्यांनी माझ्या स्वरूपाची अशी गोडी चाखलेली असते, जे ते महासुख आपणच होऊन ठेले असतात, त्यांच्या त्या मजप्रतिच्या प्रेमाची - भक्तिभावाची श्रेणी नेहमी चढतीवाढती असते. रात्र आणि दिवस यातला फरकसुद्धा त्या धुंदीत ते विसरतात."

....। केलें माझें सुख अव्यंगपणें।
आपणपेआं जिहिं।।१०-१२९।।
तेआं मग आम्हीं काईं। देयावें अर्जुना पाहीं।
तैं ठाईंचिचि तिहिं। घेतलीं सेल।।१३०।।
कां जैं तैं जिआं वाटां। निगालें गां सुभटा।
तैं सोएं पाहूनि आव्हांटा। स्वर्गापवर्ग।।१३१।।

"दिन दिन बढत सवायो" अशा प्रकारे त्यांचा आत्मानंद सतत वाढतच असतो. "हे अर्जुना! त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना जे काही मी द्यावयास हवे, ते तर त्यांनी आधीच आपलेसे करून घेतलेले असते. माझ्या प्रीतीचा शेलका वाटा त्यांनी स्वतःच हस्तगत करून घेतलेला असतो!! हे पार्थ! त्यांनी ही जी भक्तीची वाट चोखाळलेली असते, तिच्यापुढे स्वर्ग आणि मोक्ष ही दोन्ही आडवाटेवरची स्थळे ठरतात."

म्हणौनि तिहिं जैं प्रेम धरिलें। तैंचि आमुचें देणें उपाईलें।
परि आम्हीं देयावें हेंहि केलें। तिहिंचि म्हणौनि।।१०-१३२।।

"त्यांनी जे माझे प्रेम मिळवले, ते खरे तर मीच त्यांना देणे लागत होतो! पण ते तर त्यांनी आपल्याच जोरावर मिळविले. आता मी त्यांना द्यावे असे मजजवळ काय उरले सांग बरे! पण तरीही ते जगाला असे सांगत सुटले की ही प्रीती, हे प्रेम, ही ***गुरुवी भक्ती*** मीच त्यांना मिळवून दिली म्हणून!!"

"सुख साझूक। ठेविलें सप्रेमलालागिं"

त्यांनी भगवंताची अशी दातृत्वशक्ती कशा प्रकारे जगात प्रसिद्ध केली ते, श्रीकृष्णमुखानेच ऐका:

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते।।१०-१०।।
तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।१०-११।।

आणि त्या भक्तवर्यांचे समाधान व्हावे म्हणून क्षणभर भगवंत त्यांचे हे म्हणणेही खरे करण्यासाठी कबूल करतात की, "हे अर्जुना! अशा त्या मजशी अखंड युक्त असलेल्या आणि मजला प्रीतिपूर्वक भजणाऱ्या भक्तांना ते मजप्रती येऊन पोहोचतील असा सद्बुद्धियुक्त योग मीच बहाल करतो!! आणि त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठी मीच त्यांच्या अंतःकरणात आत्मभावाने राहून तेजस्वी ज्ञानदीप होऊन त्यांच्या मनातील व चित्तावरील अज्ञानापासून उत्पन्न होणाऱ्या तमांधःकाराचा नाश करतो."

भगवंताचे हे बोल साकारणारे ज्ञानदेव म्हणतातः

आतां ययावरी येतुलें घडें। जैं तैंचि सुख आगलें वाढें।
आणि कालाचि दिठी न पडें। हें आम्हां करणें।।१०-१३३।।
ललेआंचिआं बालकां किरीटी।
गंवसणि करूनिआं स्नेहाचिआं दिठीं।
जैसिं खेलतां पाठोंपाठीं। माऊली धांवें।।१३४।।
तो जो जो खेल दाविं। तो तो सोनयाचां करूनि ठेविं।
तैसिं उपास्तिचिं पदविं। पोषित मी जाएं।।१३५।।

"मी खरे तर एवढेच त्यांच्यासाठी करतो की जेणेकरून त्यांना मजपासून मिळणारे सुख वृद्धिंगत व्हावे आणि त्याच्यावर काळाची वक्रदृष्टी पडू नये! लाडक्या बालकावर आई जशी आपल्या दृष्टीची पाखर सदैव घालत असते आणि स्नेहाळपणे त्याच्या मागोमाग ते जेथे जेथे खेळतबागडत जाते, तेथे तेथे जात असते; त्याला जो जो खेळ आवडतो, तो तो खेळ ती माऊली जशी सोन्याचा करून द्यायलाही मागे पुढे पाहत नाही; त्याप्रमाणे मी त्या भक्तांचा योग चालवतो. त्यांच्याठायीचे उपासनेचे प्रेम व सुख सतत वाढत राहील असे मी करतो."

जिएं पदविचेनि पोषकें। तैं मातें पावति यथासुखें।
हे पालति मज विशेखें। आवडें करूं।।१०-१३६।।
पैं गां भक्तांसि माझें कोड। मज तयाचिआं अनन्यगतिचिं चाड।
कां जैं प्रेमलाचें सांकड। आमतें घरीं।।१३७।।
पाहें पां स्वर्गमोक्ष उपाईलें।
दोहिं मार्ग तेआंचिआं वाहाणि केलें।...।।१३८।।

"उपासनेच्याद्वारे ते मला पावतील, इतका अधिकार मी त्यांना बहाल करतो. त्यांचा असा योगक्षेम वाहणे हे माझ्या अत्यंत आवडीचे काम आहे, पहा! हे अर्जुना! अशा प्रेमळ भक्तांची जी जी इच्छा असेल, ती ती मी पुरवितो. त्यांना माझी आवड वाटते, तर त्यांना मी तीच सदैव राहील असे करतो. त्यांना माझी अनन्यगतिकता हवी असते, तर तीच त्यांच्याठायी मी दृढ करतो. त्यांना स्वर्ग वा मोक्ष जे काही हवेसे वाटेल, ते त्यांच्यासाठी राखून ठेवतो."

...। आम्हीं आंगाहिं शेषां वेंचिलें। लक्ष्मिएंसि ।।१०-१३८।।
परि आपणपेंविण जैं एक। तैं तैसेंचि सुख साझूक।
सप्रेमलालागिं देख। ठेविलें जतन।।१३९।।
हा ठांयवरी किरीटी। आम्हीं प्रेमलु घेवों आपणपयासाठीं।
ययां बोलीं बोलिजत गोठी। तैसिआं नहोति गां।।१४०।।

"मी तर शेषाच्या भक्तीला भुलून जाऊन माझी तनू लक्ष्मीसह त्याच्या अधीन केली आहे. आणि मुख्य म्हणजे ते जे एक अत्यंत साजूक असे सोलीव सुख आहे, ते तर खास या माझ्या भक्तांसाठीच काळजीपूर्वक जतन करून ठेवले आहे. मी स्वतःच त्यांना स्वतःला त्यांच्या भक्तिप्रेमापोटी देऊन टाकतो! मी इतका त्या भक्तांच्या अधीन आहे पहा!! या गोष्टी सांगून समजतीलच अशा नाहीत!!"

"मीचि होऊनि दिवटा"

तरीही श्रीकृष्ण अर्जुनास अजून म्हणतात कीः

म्हणौनि मज आत्मयाचां भाओ। जिहिं जिआवेआं केला ठाओ।
एक मीवांचूनि वावों। एर मानिलें जिहिं।।१०-१४१।।
तेआं तत्त्वज्ञां चोखटां। दिवी पोतासाची सुभटा।
मग मीचि होऊनि दिवटा। फुडां फुडां चालें।।१४२।।
अज्ञानाचिएं रातीं।- माझिं तमाचिं मिळणि दाटिति।
तैं नाशौनि घालीं परौति। करीं नित्योदयो।।१४३।।
आईसें प्रेमलाचेनि प्रियोत्तमें। बोलिलें जेथ पुरुषोत्तमें।..।।१४४।।

त्या भक्तांच्या प्रियतम अशा श्रीकृष्णाने म्हटले, "हे अर्जुना! ज्यांनी आत्मभाव हेच जगण्याचे ठिकाण केले आहे; माझ्याशिवाय इतर सर्व ज्यांनी तुच्छ मानले आहे; त्यांच्यापुढे मी तत्त्वज्ञानाच्या मशालीची शुद्ध ज्ञानस्वरूप ज्योत पाजळवत चालतो. त्यांच्या भोवताली दाटलेल्या अज्ञानाच्या रात्रीला, त्यातील तमासह हाकलून लावून ज्ञानाचा नित्य उदय होईल असे मी करतो."

...। तेथ अर्जुनु मनोधर्मे। निवालों म्हणतसें।।१०-१४४।।
अहों जी अवधारां। भला केरु फेडिला संसारां।
जाहालों जननीजठरजोहरां-। वेगलां प्रभू।।१४५।।
जी जन्मलेंपण आपुलें। हें आझि मिआं डोलां देखिलें।
जिवित हातां चढलें। मज आवडतसें।।१४६।।

ते ऐकून अर्जुन म्हणाला, "देवा! तुमचे हे बोल ऐकून मी धन्य झालो! माझ्या मनाला अपार शांती मिळाली हे सर्व ऐकून!! तुम्ही हे ज्ञान देऊन माझ्याठायी संसारचक्रात भ्रमंती करत राहण्याचा जो मळ भरलेला होता, तो समूळ नाहीसा केलात. मला पुनः कधी दारुण अग्निकुंडासम गर्भवास येणार नाही, असे तुमच्या कृपेने केलेत! हा माझा पुनर्जन्मच जणू झाला म्हणानात का! आज मी कृतार्थ झालो! खरेखुरे अमरत्व आपण मला आता प्रदान केलेत!!"

"जैं वाक्यकृपा लाधली"

आझि आयुखां उजवण जाहालीं। माझिआं दैवाचि दशा उदयलीं।
जैं वाक्यकृपा लाधलीं। देविकेचेनि मुखें।।१०-१४७।।
आतां एणें वचनतेजोकारें। फिटलें आंतिल बाहेरील आंधारें।
म्हणौनि देखतसें सांचोकारें। स्वरूप तूझें।।१४८।।

"आज माझ्या जीवनाचे सार्थक झाले. माझे आयुष्य सत्कारणी लागले! माझे परमभाग्यच आज उदयाला आले आहे, असे मला वाटते. कारण हे देवकीनंदना! तुझ्या मुखीचा कृपाप्रसादरूपी उपदेश मला आज प्राप्त झाला! तुझ्या या वचनरूपी चित्प्रकाशात माझे अज्ञान समूळ फिटले. तूच परब्रह्म आहेस! तूच अतीव पवित्र आहेस! अनादिसिद्ध असा पुराणपुरुष तूच आहेस! सर्व देवांचाही देव तूच आहेस! तूच भूतांचे परमधाम आहेस! तू अज आहेस! सर्वव्यापी तूच आहेस!! हे अनंता! तुझे हे स्वरूप मला यथार्थ कळले आहे. हे तुझे दिव्य स्वरूप जाणून मी धन्य झालो. तुझे जे हे स्वरूप मला जसे भावले, ते पाहता माझ्यासारखा भाग्यवान इतर कोण बरे असेल!"

समारोप

भक्तीवरील हा विषय पुढे चालवण्यासाठी आता आपण वळू या ***उन्मेष क्र. ४८-१ - विश्वरूपप्रकटन*** याकडे! भगवत्स्वरूपाची आपण आतापावेतो यथावत चर्चा केली. ते खरेच कसे आहे, ते ***चक्षुर्वै सत्यं*** पहावे, अशी अर्जुनाची इच्छा भगवंत कशी पूर्ण करतात, ते आपणास त्या उन्मेषात अकराव्या गीताध्यायातून ज्ञानेश्वरांच्या वाणीतून दिसेल! आणि कदाचित आपणासही त्या दर्शनाचा झाला तर निश्चितच लाभही होईल! तर घेऊ या **भगवंतांचे *विश्वरूपदर्शन!!***

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४८-१::
::विश्वरूपप्रकटन::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४८-१

गीता:
७:१९
१०:१६,१७,४२
११:१-१३
१२:१
ज्ञानेश्वरी:
७:१३६
१०:१८९
११:१-२४४

::उन्मेष ४८-१::
::विश्वरूपप्रकटन::

पूर्वपीठिका::::

पुढील चर्चेचे अनुसंधान

भक्तांचे अलौकिकत्व व भगवंताचा भक्तांप्रतीचा भाव आपण मागील *उन्मेष क्र.४७-२* यातून पाहिला. तो समजून घेतलेला अर्जुन फार भारावला गेला. त्यांतच भगवंतांनी त्याला आपले शुद्ध स्वरूप कसे आहे आणि त्याचा दृश्य विश्वाशी कोणता संबंध आहे, हे पण आपल्या अनेकानेक विभूती वर्णित सांगितले. त्यामुळे ***अव्यय परब्रह्म आणि व्यक्त विश्व यांचा समन्वय*** कसा करावा, तेही अर्जुनास जाणवले.

चिद्विलासवाद म्हणून जो म्हणतात, त्याचे रहस्य म्हणजे या समन्वयाचे ज्ञान!! पंडित याच वादास ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान म्हणून मान्यता देतांना दिसतात. काही अभ्यासकांच्या मते ***चिद्विलास*** ही शाङ्करतत्त्वज्ञानातील एक पायरी होय. ***अव्यय परब्रह्म व व्यक्त विश्व ही एकच होत,*** असे ***चिद्विलास***ज्ञान झाल्यावर अर्जुन फार सुखावला. त्यातून त्याला श्रीकृष्णपरमात्म्यासारखा जगद्गुरू प्रत्यक्ष लाभल्याने त्याची सर्व जिज्ञासा पूर्ण होत होती.

यातूनच त्याला विश्वरूपदर्शनाची उत्सुकता निर्माण झाली. श्रीकृष्ण ती पूर्ण करू शकतील याची त्याला खात्री होती. यातूनच गीतेच्या अकराव्या अध्यायाची निर्मिती झाली आहे. ***विश्वरूपदर्शन*** हा अर्जुनास मिळणारा अनुभव त्यात वर्णिला आहेच. पण त्यानिमित्ताने श्रीकृष्ण योगानुभूतीचे आणखी एक दालन आपल्यासाठी खुले करत आहेत. ***"वासुदेवः सर्वमिति।।७-१९।।"*** या श्लोकातून सांगितलेली प्रचिती योग्याच्या दृष्टीसमोर कोणकोणत्या प्रकारांनी साकारत असते, त्याचे समग्र चित्रणच या विश्वरूपदर्शनावरील अकराव्या अध्यायी केलेले दिसते.

योग्याची अनुभूती ही भक्ताच्या व ज्ञान्याच्या अनुभूतीवेगळी नसणार, हे आतापर्यंतच्या विवेचनास स्मरून मुद्दाम सांगायलाच हवे असे नाही, हे आता सूज्ञांस उमजून आले असणारच! यापुढे म्हणूनच ***भक्त, योगी, ज्ञानी वा कर्मयोगी*** हे सर्व शब्द गीता-ज्ञानेश्वरीच्या आपल्या यापुढील विवेचनात समानार्थक म्हणून वापरण्यास प्रत्यवाय नसावा!! काही विशिष्ट वेगळा विचार जेथे करणे असेल, तेथे मात्र हेतुपूर्वक यातील विवक्षित अशा शब्दांचा उपयोग करू म्हणजे झाले!! एरवी या सर्वांचा प्रयोग समानार्थकच समजावा, असे शेवटचे सांगणे आहे. कारण आपण आता आपल्या विषयाच्या अंतिम टप्प्याकडे वळत आहोत.

आतापावेतो योग-भक्तिशास्त्राची बहुतेक सर्व महत्त्वाची प्रमेये मांडून झाली आहेत. आवश्यक त्या सर्व बाबींचा बराचसा खुलासा जिज्ञासूंसमोर करून झाला आहे. महत्त्वाच्या सिद्धांतांची चर्चा करून झाली आहे. त्यांचे सारसर्वस्व आपणास पूर्णपणे विदित केलेले आहे, अशा वेळी उर्वरित विषयांचीच मांडणी करावयाचे कार्य शेष आहे.

हे जे विषय यापुढे आपण हाताळणार आहोत, ते आतापावेतोच्या विवेचनास पूरक आणि समर्थनपर असे आहेत. याआधी चर्चिलेल्या विषयांच्या समालोचनाचाही एक मोठा भाग त्यात येणार आहे. त्या दृष्टीने पुढील विषयात अवगाहन करण्याआधी ही प्रस्तावना उचित आहे आणि पर्याप्त पण ठरावी. असो.

दहाव्या अध्यायाचे प्रयोजन

दहाव्या अध्यायींच्या विभूतींचे समग्र दर्शन आपणास यापूर्वीच घडलेले आहे. या विभूती सांगण्याचे कारण अर्जुनाच्या एका प्रश्नात आहे. ***"वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः। याभिर्विभूतिभिर्लोकानिमास्त्वं व्याप्य तिष्ठसि।।१०-१६।।"*** व ***"कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन्। केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया।।१०-१७।।"*** या दोन श्लोकात अर्जुनाचा हा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

सर्व भूते उत्पन्न करणाऱ्या त्या भूतेशास , त्या जगत्पतीस, त्या देवदेवास, त्या पुरुषोत्तमास अर्जुन विनवतो की आपल्या ज्या दिव्य विभूतींनी त्या पुराणपुरुषाने हे अवघे विश्व व्यापून टाकले आहे, त्यांचे कथन करावे. तसेच सदैव ज्याचे चिंतन करावे, अशा त्या योगेश्वरास या विश्वात कोणत्या रूपात पाहावे आणि त्याच्या - त्या विश्वात्म्याच्या कोणत्या रूपात त्याचे ध्यान करावे, असा पण विनंतीवजा प्रश्न अर्जुनाने या प्रसंगी श्रीकृष्णास केला आहे.

गीतेत प्रसंगोपात्त विभूतींचे वर्णन थोडेबहुत यापूर्वीच्या अध्यायात जरी आलेले असले, तरी अर्जुनास ते सविस्तर कळून घ्यावेसे वाटल्याने हा ***दहावा अध्याय*** उपपन्न झाला आहे.

ध्यानासाठी श्रेयस्कर आलंबविषय

तसेच विश्वरूपाचे कोणत्या रूपात ध्यान करण्याने योग सहजच सिद्ध होतो, तेही ऐकण्याची त्याला उत्कंठा होती. ***"जेआं जेआं भावांचां ठाईं। तूंतैं चिंतितां मज सायासु नाहीं। तो विवल करूनि देईं। योगु आपुला।।१०-१८९।।"*** या ओवीतून हे प्रश्न विचारण्यामागचा उद्देश ज्ञानेश स्पष्ट करतांना दिसतात!!

नवव्या अध्यायी ***कर्म-ज्ञान-योगपर भक्तियोग*** वर्णन केल्यावर दहाव्या अध्यायी येणारे अर्जुनाचे हे मीमांसक प्रश्न आपल्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. गीतेने सांगितलेल्या एकमेवाद्वितीय योगाची चर्या व अभ्यास यांचे विस्तृत दर्शन आतापावेतो आपणास घडलेले आहे. ***निष्काम कर्म - कर्मफलार्पण - नैष्कर्म्य बुद्धी*** या कर्मपथावरून अग्रेसर होणारा साधक ***"हे समस्तहिं श्रीवासुदेओ। ऐसा प्रतीतीरसाचां ओतिला भाओ" या ज्ञानाप्रत येत असता "म्हणौनि भक्तांमाझिं***

राओ। आणि ज्ञानिआं तोचिं।।७-१३६।।" या योगस्थितीस पावण्यासाठी ध्यान वा योगाचा आश्रय घेत असतो. त्यासाठी ध्यानाचा आलंबविषय ठरवणे अत्यंत आवश्यक आहे.

दहाव्या अध्यायी विभूती कोणत्या हे सांगून श्रीकृष्णांनी योगातील ***धारणा, ध्यान व समाधि*** या अंतरंगाचे आलंबन कोणते असावे, हे स्पष्ट केले आहे. ध्यान कोणत्याही विषयाचे करता येत असले आणि त्यापासून अंती समाधि आणि संयम जरी साध्य होत असले, तरी सुलभतेने कैवल्यप्राप्ती होण्यासाठी असणारे विवक्षित ध्यानविषय हे या विभूती होत.

ध्यानासाठी विश्वात्म्याच्या उत्कृष्ट व उत्तम विभूती घेणेच योग्य असे यावरून आपणास जाणवते. तसेच सगुण ध्यानच निर्गुण ध्यानापेक्षा सरस असावे असा कयासही आपण करू शकतो. या प्रश्नाचे भगवंतोक्त उत्तरही आपण पूर्वी बाराव्या अध्यायीच्या अर्जुनाच्या ***"एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते। ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः।।१२-१।।"*** या प्रश्नाच्या अवलोकन प्रसंगी पाहिलेलेच आहे.

त्या वेळीही अव्यक्त स्वरूपाच्या उपासनेपेक्षा - अव्यय रूपाचे ध्यान करण्यापेक्षा व्यक्त रूपाचे ध्यान करणे मनुष्यमात्रांस सुलभ व लवकर योगसिद्धी प्राप्त करून देणारे असते, असे भगवंतांचे मत आपण लक्षात घेतले होते. अर्थातच गीतोक्त योगात विभूतींचे निर्विवाद महत्त्वाचे स्थान असल्याचे स्पष्टच आहे.

चिद्विलासानुसारी योगप्रणाली

गीतेत तत्त्वज्ञानाच्या विभिन्न मतप्रणालींचा परामर्ष घेतलेला आहे, ते आपण प्रमुखतः तेराव्या व पंधराव्या, तसेच सातव्या अध्यायांनिमित्ताने पाहिले आहे. त्या सर्वांचा समन्वय ज्ञानेश त्यांच्या विवरणात कसा करतात, तेही आपण पाहिले आहे. परंतु गीतेचा मूळ गाभा ***चिद्विलासवाद*** आहे, असे ज्ञानदेवांच्या विवेचनावरून आपणास जाणवून आलेले आहे.

म्हणून ***चिद्विलासवाद*** हाच गीतेतील योगाचा पाया असला पाहिजे. या तत्त्वज्ञानाची साक्षात अनुभूती गीतोक्त योगाने मिळाली पाहिजे, असा एक निकष म्हणूनच अवलंबता येतो. ही अनुभूतीच ***"वासुदेवः सर्वमिति"*** होय. त्यासाठी गीता उचलून धरते तो ***योग ध्यानयोगपर असून सगुण ध्यानविषयावर आधारित*** **आहे. या योगाच्या अनुभूतीचा प्रांत म्हणूनच *सगुण ते निर्गुण* असा आहे.**

या अनुभूतीच्या तपशीलाचे आपण सखोल परिशीलन यापूर्वी केलेले आहे. त्यातील महत्त्वाचा भाग आपण ज्ञानदेवांच्या योगपर अभंगांच्या माध्यमातून समजावून घेतला आहे, हे सर्व आपल्या नजरेसमोर आहे. *सहाव्या अध्यायी* ज्ञानदेवांनी या अनुभूतींचे जे काही वर्णन केलेले आहे, ते कुंडलिनीजागृती व तिच्या ऊर्ध्वसंचलनामुळे प्राप्त होणाऱ्या साक्षात्काराविषयीचे आहे. ते निखळ योगानुभूती दर्शवणारे आहे आणि काही प्रमाणात लाक्षणिक वाटावे, असे आहे. त्या अनुभूतींची सुयोग्य उकल आपण त्यांच्या योगपर अभंगांचा आधार घेऊन केली होती.

"वासुदेवः सर्वम्"

आता आपण त्याच अनुभूतींचे दर्शन जरा एका वेगळ्या जाणिवेच्या प्रांतातून घेणार आहोत. त्यासाठी गीतेच्या अकराव्या अध्यायाचे प्रयोजन आहे. ***"वासुदेवः सर्वमिति"*** ही अनुभूती त्या ठिकाणी जराशी लाक्षणिकरीत्या पण समग्र वर्णिली आहे. ही अनुभूती कुंडलिनीच्या जागृत होण्यापासून ते तिच्या उन्मनी अवस्था प्राप्त होण्यापर्यंतच्या स्थित्यंतरांशी तशी संबंधितच आहे, असे योग्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांवरून आकळून येते. कसे ते आपण प्रसंगोपात्त पाहूच!!

अकराव्या अध्यायातील विश्वरूपदर्शन हा भाग मात्र खरे तर ***"दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्।।११-८।।"*** या श्लोकाशी महत्त्वाचा अनुबंध राखून आहे. हे ***दिव्य चक्षूंचे श्रीकृष्णांनी अर्जुनास केलेले प्रदान म्हणजे खरे तर कुंडलिनीची जागृती असली पाहिजे,*** असे हा विषय अभ्यासतांना आपणास वाटते. कारण ज्ञानचक्षू वा कुंडलिनी उदित झाल्याशिवाय साधकाचा या सूक्ष्माच्या प्रांती प्रवेश संभवत नाही. ***धर्ममेघ समाधि*** या वेळी प्राप्त होतो आणि अनुभूतींचा प्रांत सुसंपन्न होतो, हे आपण पूर्वी पातञ्जल योगसूत्रांचा पंथराजाशी समन्वय करतांना पाहिल्याचे जिज्ञासूंस स्मरत असेलच! अर्थातच ***विश्वरूपदर्शन ही धर्ममेघ समाधि अवस्थेतील अनुभूती आहे,*** असा निष्कर्ष निघतो. असो.

आता आपण वळू या अकराव्या अध्यायाकडे, ज्यात ही अनुभूती वर्णिली आहे. सहाव्या अध्यायातील योगधारेचा या अनुभूतीशी आणि म्हणूनच या अकराव्या अध्यायाशी घनिष्ट संबंध आहे, हे लक्षात ठेवून पुढील भाग पाहू या!

"रसां जाहालें प्रयाग"

सगुण साक्षात्कार वा कैवल्य - मोक्ष हे या अकराव्या अध्यायी प्रकट केले आहेत, असे ज्ञानेशही त्यांच्या त्या अध्यायारंभीच्या बाराव्या ओवीतून ***"हें अल्पचि परि उघडें। कैवल्य जेथ।।११-१२।।"*** या शब्दात सांगत आहेत. तरी आता ज्ञानेशांच्या ओव्यांकडे वळू या.

आतां ययावरीं एकादसिं। कथा आहें दोनिं रसिं।
जेथ पार्था विश्वरूपेंसिं। होईल भेंटी।।११-१।।
जेथ शांताचिआं घरां। अद्भुत आला आहें पाहुणेरां।
आणि एरांहिं रसां पांतिकरां। जाहाला मानु।।२।।
अहों वधुवरांचिआं मिलणिं। जैसिं वराडिआंहिं लुगडीलेणिं।
तैसें देसिएंचिएं सोकासनिं। मिरविलें रस।।३।।

"पार्थाची विश्वरूपाशी गाठ आता अकराव्या अध्यायात पडणार आहे. ती सुरस कथा शांत आणि अद्भुत अशा दोन्ही रसांनी भरलेली आहे. शांत रसाच्या घरी अद्भुत रस पाहुणा म्हणून येणार आहे आणि

इतरही रसांना त्यांच्या पंक्तीचा मान मिळणार आहे या अध्यायी! वधुवरांच्या विवाहप्रसंगी वऱ्हाडी मंडळींही जशी लेणीलुगडी घालून मिरवतात, तसेच गीतेच्या देशी मराठी भाषेशी होणाऱ्या या सुखद मिलनात सर्व रसांना अलंकार घालून मिरवायला मिळत आहे.''

परि शांताद्भुत बरवें। जैं डोलिआंचिआं अंजुलीं घेयावें।
जैसें हरिहर प्रेमभावें। आलें खेंवां।।११-४।।
ना तऱ्हैं आंवसेंचां दिसिं। भेंटलीं बिंबें दोनिं जसिं।
तेविं एकहेलां रसिं। केला एथ।।५।।

''पण या सर्व समारंभात शांत आणि अद्भुत हे दोन रस मात्र फारच उठून दिसताहेत! त्यांचे रूप इतके सोज्वळ आहे की ते नेत्रांच्या ओंजळीने पिऊन घ्यावे! हरी आणि हर यांनी प्रेमभावाने परस्परांना मिठी द्यावी; किंवा अमावास्येला चंद्र आणि सूर्य यांची बिंबे एकमेकात मिसळावी; त्याप्रमाणे या अकराव्या अध्यायी हे दोन रस एकत्र आले आहेत, म्हणा ना!''

मीनलें गंगेयमुनेचें वोघ। तैसें रसां जाहालें प्रयाग।
म्हणौनि सुस्नात होत जग। आघवें एथ।।११-६।।
माझिं गीतासरस्वती गुप्त। आणि दोनिं रस तैं वोघ मूर्त्त।
ययालागिं त्रिवेणि हें उचित। फांवलीं बापां।।७।।

''गंगा आणि यमुना यांच्या संगमाप्रमाणे या दोन्ही रसौघांच्या मीलनाने या अध्यायास प्रयागतीर्थाचे पवित्र असे रूप पावले आहे. सरस्वती नदी प्रयागक्षेत्री जशी गुप्त असते, तशी गीतासरस्वती या रसांच्या पुण्यपावन अशा संगमी मिळाली असल्याने हा त्रिवेणी संगम झाला आहे. गंगेयमुनेच्या प्रयागसंगमी सर्व जगच स्नान करून पावन होते; तसेच या अकराव्या गीता अध्यायाचे हे तीर्थक्षेत्र आहे.''

''रचिलीं धर्मनिधानें। निवृत्तिदेवें''

एथ श्रवणाचेनि द्वारें। तीर्थिं रिघतां सोपारें।
ज्ञानदेओ म्हणें दातारें। माझेनि केलें।।११-८।।
तीरें संस्कृताचिं गहनें। तोडौनि मऱ्हाटिआं शब्दसोपानें।
रचिलीं धर्मनिधानें। निवृत्तिदेवें।।९।।

ज्ञानदेव म्हणतात की, ''या पुण्यपावन तीर्थक्षेत्री प्रवेशण्याचे राजद्वार म्हणजे श्रवणेंद्रिये! माझे श्रीगुरू निवृत्तिनाथ यांनी उदारपणे या संगमावरील कठीणतम अशा संस्कृतभाषारूपी डगरींचे कडेकपारे फोडून येथे सोप्या मराठी भाषेच्या शब्दांच्या रूपाने पायऱ्यापायऱ्यांनी उतरून जाऊन स्नान करता यावेत असे घाट बांधले आहेत.''

''उघडें कैवल्य जेथ''

म्हणौनि भलतेणें एथें सद्भावें नाहावें।
प्रयागमाधव विश्वरूप पाहावें।
एतुलेनि संसारेंसिं देयावें। तिलोदक।।११-१०।।
हें असों आईसें सावयव। जेथ सासिन्नलें आथि रसभाव।
जैं श्रवणसुखाचिं राणिव। जोडिलीं जगां।।११।।
जेथ शांताद्भुत रोकडें। आणि एरां रसां पडप जोडें।
हें अल्पचि परि उघडें। कैवल्य जेथ।।१२।।

''त्यांच्या या अपार दातृत्वामुळे कोणीही या तीर्थक्षेत्री सहज प्रवेश करू शकतो. या माधवरूपी प्रयागक्षेत्रात आस्तिक्यबुद्धीने न्हाऊन विश्वरूप पाहावे आणि धन्य व्हावे!! या विश्वरूपदर्शनाने पावन व्हावे आणि संसारास तिलांजली देऊन मुक्त व्हावे. असो. सर्व रस ज्यात ओतप्रोत समावले आहेत, असा हा अकरावा अध्याय आहे. श्रवणभक्तीचे राज्यसुख या अध्यायाने जोडले जाते. सर्व जगाने ते उपभोगावे, इतक्या सहजपणे हे सुख उपलब्ध झाले आहे. शांत आणि अद्भुत रस या अध्यायी मूर्तिमंत अवतरले आहेतच! पण इतरही रसांनी येथे रंग भरला आहे. हे सर्व तर काहीच नाही! या अध्यायी उघडउघड मोक्षच आहे!''

तो हा अकरावा अध्यावो। जो देवाचा आपणपें विसंवता ठाओ।
परि अर्जुनु सदैवाचां राओ। जो एथहिं पातलां।।११-१३।।
एथ अर्जुनचि काएं म्हणों पातलां।
आझि आवडतेआंहिं सुकालों जाहाला।.. ।।१४।।

''देवाचे खास विश्रामस्थान याच अध्यायात आहे. असा हा गीतेचा अकरावा अध्याय आहे. आणि अर्जुन पहा कसा भाग्यवंतांचा राजा म्हणावा तसा आहे! तो सहजच या भगवंताच्या विश्रामगृहात येऊन दाखल झाला आहे! खरे तर वेदांनाही अगम्य असे हे भगवंताचे धाम आहे. आणि अर्जुन तेथे इतका अकस्मात येऊन पोहोचला आहे की त्याचे नवल करावे, तेवढे थोडेच आहे!''

.... । जैं गीतार्थु हां आला। मऱ्हाठिएं।।११-१४।।
याचिलागिं माझैं। विनविलें तैं आईकिजैं।
तऱ्हिं अवधान दीजैं। सज्जनीं तुम्हीं।।१५।।

''पण नवल तरी का म्हणून करावे! तो काय एकटाच थोडा तेथे पोहोचला असणार! हा मराठीत प्रकटलेला गीतार्थ ऐकणारा कोणीही तेथे सहजच जाऊन पावणार नाही का! याचसाठी मी तुम्हा संतसज्जनांना विनवतो आहे की माझे सांगणे जरा ऐका. माझ्या बोलण्याकडे अवधान द्या! म्हणजे तुमचे तुम्हालाच सहज कळून येईल की माझे हे सांगणे किती सत्य आहे ते!''

''सारस्वताचें गोड''

ज्ञानेश अजूनही विनवतात की:

तेंविंचि तुम्हां संतांचिएं सभें। आईसिं सलगि किर करूं न लभें।
परि मनावें जी तुम्हीं लोभें। अपत्या मझ।।११-१६।।
अहो पुंसा आपणचि पढविजे। मग पढें तऱ्हैं माथां तुकिजैं।
कां करविलेनि चोजें न रिझें। बालकां माएं।।१७।।
तेविं मी जैं जैं बोलें। तैं प्रभु तुमचेचि सिकविलें।
म्हणौनि अवधारां आपुलें। आपण देवां।।१८।।

''खरे तर तुम्हासारख्या श्रेष्ठींशी असे सलगीचे भाषण करणे उचित नाही. पण मला तुमचे लेकरू समजून माझी ही सलगी तुम्ही

गोड मानून घ्यावी! माझ्यावर लोभ करावा हीच माझी तुम्हा संतांच्या सभेला विनंती आहे. आपणच पोपटाला बोलायला शिकवतो आणि तो तसे बोल बोलू लागला की त्याचे कौतुक आपणच करत नाही का! बाळाकडून आई चेष्टा करवून घेते अन त्याच्या त्या लडिवाळ लीलांनी प्रसन्न होतेच ना! त्याचप्रमाणे हे संतजनहो! मी जे काही बोलतो आहे, ते तुम्हीच मला शिकवलेले आहे. तुमचीच शिकवण मी सांगतो आहे. ती आपण ऐकावी."

हें सारस्वताचें गोड। तुम्हिंचि लाविलें जी झाड।
तन्हें आतां अवधानामृतें वाढ। सिंपौनि कीजैं।।११-१९।।
मग हें रसभाव फुलेल। नानार्थ फळां येईल।
तुमचेनि धर्मे होईल। सुकाळु जगां।।२०।।

"हा सारस्वताचा वृक्ष तुम्हीच लावला आहे. तुमच्या अवधानरूपी अमृताची त्याच्यावर शिंपण करा. मग तो वाढेल; नानारसांच्या वेगवेगळ्या भावरूपी फुलांनी तो बहरून येईल; विविध प्रकारच्या तत्त्वार्थप्रकटनरूपी फळांनी तो लगडून जाईल!! त्या मधुर फलांचे जगाला दान केल्याचा धर्म तुमच्या पदरी पडेल!"

अर्जुनाची उत्कट इच्छा::::

"तो होआवा गोचरु लोचनासिं"

ययां बोलां संत रिझले। म्हणति तोखलों गां भलें केलें।
आतां सांघैं जैं बोलिलें। अर्जुनें तेथ।।११-२१।।

ज्ञानेशांच्या या बोलांनी संतोषलेले संतश्रोते म्हणू लागले की व्वा! तू किती चतुर आहेस! आता आम्हाला अर्जुनाचे पुढे काय म्हणणे आहे, ते सांग!"

तेव्हा ज्ञानेश म्हणतातः

तंव निवृत्तिदासु म्हणें। जी कृष्णार्जुनांचे बोलणें।
मी प्राकृत काएं सांघों जाणें। परि सांघवा तुम्हीं।।११-२२।।
अहो रानिंचिआं पालेखाईरां। नेवाणें करविजें लंकेश्वरां।
एकला अर्जुन परि अक्षौहिणि अकरा। न जिणेंचि काई।।२३।।

निवृत्तिदास ज्ञानेश्वर म्हणू लागले, "श्रीकृष्णार्जुनांच्या त्या गीतासंवादाचे कथन माझ्यासारख्या अतिसामान्य मनुष्याने काय करावे! पण तुम्हीच ते माझ्याकडून करवून घ्या! अहो! रानातील पानाफळांवर गुजराण करणाऱ्या साध्या वानरांनी लंकेश्वराचे कसे निर्दाळण केले, ते आपण जाणताच! श्रीरामप्रभुच्या पाठबळाने त्यांनी ती अशक्य गोष्टही करून दाखविलीच ना! आणि अर्जुन एकटाच कौरवांच्या त्या अकरा अक्षौहिणी सैन्यास जिंकणार आहेच ना श्रीकृष्णांच्या साहाय्याने!"

म्हणौनि समर्थु जैं जैं करी। तैं न हों नये चराचरीं।
तुम्हीं संत तेयांपरी। बोलवा मातें।।११-२४।।
आतां बोलिजतसें आइका। हा गीताभाव नीका।
जो वैकुंठनायकां-। मुखौनि निगाला।।२५।।
बाप बाप ग्रंथ गीता। जो वेदीं प्रतिपाद्य देवता।
तो श्रीकृष्ण वक्ता। जिएं ग्रंथीं।।२६।।
तेंथिंचें गौरव कैसें वानावें। जैं शंभुचिआं मति नागवें।
तैं आतां नमस्कारिजें जीवेंभावें। हेंचि भलें।।२७।।

"समर्थांनी जे जे मनात योजावे, ते ते चराचरात घडावे असाच या सृष्टीचा न्याय नाही का! तुम्ही संतजनही समर्थच आहात! तरी तुम्हीच माझ्या मुखातून गूढ गीतार्थ प्रकट करवा! तेव्हा ऐका आता तो वैकुंठनायकाच्या मुखातून अवतीर्ण झालेला गीतानामक सर्वोत्कृष्ट अभिप्राय!***धन्य आहे तो गीता ग्रंथ, ज्याचा वक्ता साक्षात वेदप्रतिपाद्य देवता असा तो श्रीकृष्णच आहे!!*** त्या ग्रंथाचा अर्थ मजसारख्या पामराने सांगावा तरी कसा! तो ग्रंथ उमगत नाही म्हणून प्रत्यक्ष श्रीशंभूच्याही मतीने जेथे माघार घेतली, तेथे आम्हा सामान्यांची मती काय चालणार! तरी त्या ग्रंथास आपण वंदन करावे जीवाभावाने, हेच भले!"

मग आईका तो किरीटी। घालूनि विश्वरूप दिठीं।
पहिली कैसिं गोठी। करितां जाहाला।।११-२८।।
हें सर्वहिं सर्वेश्वरु। आईसा प्रतीतिगत जो पतिकरु।
तो बाहेरीं होआवा गोचरु। लोचनासिं।।२९।।
हें जिवाआंतुली चाड। परि देवासिं सांगतां सांकड।
कां जैं विश्वरूप गूढ। कैसेनि पुसावें।।३०।।

"असो. ऐका आता पुढे! विश्वरूपावर दृष्टी ठेवत अर्जुन काय म्हणतो ते!***"वासुदेवः सर्वमिति।।७-१९।।" -"हें समस्तहिं श्रीवासुदेओ। आइसा प्रतितिरसाचां वोतिला भाओ।।७-१३६।।"*** असे जे श्रीकृष्णांचे सांगणे होते, त्याची प्रतीती यावी म्हणून तो अधीर झालेला होता. सर्व विश्वच अंतर्यामीच्या वासुदेवाने भरलेले आहे, हे नेत्रांना गोचर व्हावे अशी त्याच्या मनातील इच्छा आहे. ती देवाला कशी सांगावी याचे त्याला अनमान वाटते आहे. भगवंताचे गुह्य असे विश्वरूप उघड करून दाखवण्यास त्याला कसे सांगावे, याचे अर्जुनाला संकट पडले आहे."

विश्वरूपदर्शनाची तळमळ

तो विचार करू लागलाः

म्हणे कवणिं काईं। जैं पढियंतेनि पुसिलें नाहीं।
सहसा कैसें काईं। सांघां म्हणों।।११-३१।।
मी जन्हैं सलगिचां चांगु। तन्हैं काइं आईसिहूनि अंतरंगु।
परि तैंहिं हें प्रसंगु। बिहालीं पुसों।।३२।।
माझिं आवडें तैसिं सेवा जाहालीं।
तन्हैं काईं होईल गरुडाचिआं एंतुलीं।
परि तोहिं हें बोलीं। करिचिना।।३३।।

"यापूर्वी कोणीही भक्ताने देवाला हे विचारलेले नाही, ते आपण कसे एकदम विचारावे! देवाला माझी सलगी जरी आवडत असली, तरी लक्ष्मीमातेएवढी माझी जवळीक थोडीच आहे! ती पण त्याला ही गोष्ट विचारायला घाबरली! मी देवाची खूप सेवा केली आहे. पण ती

काय गरुडाच्या तोडीची थोडीच ठरणार आहे! त्याने पण याविषयी देवाला कधीही एका शब्दाने पण विचारले नाही!"

मी काईं सनकादिकांहूनि जवलां।
परि तेआंहिं नागवेंचि हा चाला।
मी आवडेन काईं प्रेमलां। गोकुलिचिआं आईसां।।११-३४।।
तेआंतेंहि लेंकुरपणें झंकविलें। एकाचें गर्भवासहिं साहिलें।
परि विश्वरूप हें राहविलें। न दाविंचिं कवणां।।३५।।

"आणि सनकादिकांहून का मी देवाला अधिक प्रिय आहे! पण त्यांनीही कधी देवाशी ही गोष्ट पुसण्याची धिटाई केली नाही. गोकुळवासी जनांएवढा का मी देवाला प्रिय असेन! पण त्यांच्यात लेकरू म्हणून वावरून याने विश्वरूपाचा थांगपत्ता लागू दिला नाही. स्वतः यशोदामातेला याने माती खातांना तोंड उगडून विश्वरूप दाखवले होते खरे! पण नंतर आपली मोहिनी पाडून ते विसरायला पण लावले! अंबरीषाचे तर गर्भवासही स्वतःच साहिले. पण त्यालासुद्धा याने आपले विश्वरूप दाखविले नाही."

हां ठाएंवरी गुज। याचिएं अंतरीचें हें निज।
केंविं उघडीं मज। पुसों एं पां।।११-३६।।
आणि न पुसेंचि जन्हैं म्हणें। तन्हैं विश्वरूप देखिलिएंविणें।
सुख नोहेंचि परि जिणें। तेंहिं विपाएं।।३७।।

"आपले विश्वरूप कोणालाही हा दाखवत नसतांना, त्याच्या अंतर्यामीची ही गुह्य गोष्ट त्याला आपण उघडउघड दाखव असे कसे बरे म्हणावे! पण याला याविषयी जर काही विचारू नये असे म्हणावे, तर ते विश्वरूप पाहिल्याविना आपणाला आता सुख मिळणार नाही आणि त्याशिवाय जगणे पण निरर्थकच आहे."

"देव विश्वरूप होईल आपैसा"

पार्थ असा विचार करण्यात मग्न झाला आहेः

म्हणौनि आतां पुसों आलुमालुसें। मग करूं देवा ठाकें तैसें।
एणें प्रवर्तला सावधसें। पार्थु बोलों।।११-३८।।
परि तैंचि आईसेनि भावें। जैं एका दों उत्तरासवें।
दाविं विश्वरूप आघवें। झाडा देऊनि।।३९।।
अहो वांसुरु देखिलिआंचिसाठीं। धेनु खडबडौनि मोहें उठीं।
मग स्तनमुखाचिएं भेंटीं। काएं पान्हा न एं।।४०।।
पाहें पां तेआं पांडवाचेनि नांवें। जो कृष्ण रानिंहि प्रतिपालु धांवें।
तेआंतैं अर्जुनें जंव पुसावें। तंव साहिल काईं।।४१।।

"म्हणून आता थोडेसे विचारून पाहावेच! मग देवाला पटेल तसे करावे." अशा विचाराने प्रवृत्त झालेला अर्जुन देवाला जरा भीतभीतच प्रश्न करू पाहत आहे. पण ते अशा भावाने की तो पाहताच त्याच्या एकदोन शब्दांपोटीच देव झाडा देऊन आपले विश्वरूप दाखवण्यास उद्युक्त झाले. अहो! वासरु पाहिले की गाय खडबडून वात्सल्यभराने उठत नाही का! आणि त्याने स्तनांना मुख लावले की पान्हा सोडत नाही काय! अहो ज्या पांडवांच्यासाठी तो कृष्ण रानावनातही त्यांचा प्रतिपाळ करण्यास धावून गेला, तो काय अर्जुनाने त्याला काही विचारावे याची वाट का बघत बसेल!"

तो साहाजेंचिं स्नेहाचें अवतरणु।
आणि एरुं स्नेहां घातिलें आहे माजवणु।
आईसिएं मिलणिं वेगलेंपण। उरें हेंचि बहु।।११-४२।।
म्हणौनि अर्जुनाचिआं बोलासरिसां।
देओ विश्वरूप होइल आपैसा।
तोचि पहिला प्रसंगु आईसा। आईकिजौ तन्हैं।।४३।।

"मुळात श्रीकृष्ण हा अर्जुनावरील देवाच्या प्रेमाचा मूर्तिमंत आविष्कार आणि वर त्याला अर्जुनमोहाचे मादक द्रव्य खायला घातलेले! असे असता तो अर्जुनापेक्षा आपले वेगळेपण राखू शकला, हेच मोठे नवल! आता अर्जुनाने काही म्हणण्याचीच खोटी की देव त्याच्या विचारण्याबरोबर विश्वरूप होईल. अर्जुनाला जे असे सहजासहजी विश्वरूप दिसणार आहे, तो प्रसंग ऐका."

"द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं"

"विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत।।१०-४२।।"

- "मी आपल्या एकाच अंशाने हे सर्व जगत व्यापून राहिलो आहे," असे गुह्य अध्यात्मरहस्य श्रीकृष्णांनी दहाव्या अध्यायाअंती अर्जुनास स्पष्ट केले होते. त्यावर अर्जुन म्हणतोः

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसञ्ज्ञितम्।
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम्।।११-१।।
भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तारशो मया।
त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम्।।११-२।।
एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम।।११-३।।
मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो।
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम्।।११-४।।

अर्जुन म्हणतोः"हे श्रीकृष्णा! माझ्यावर अनुग्रह करण्यासाठी जे हे गुह्य अध्यात्मतत्त्व तू मला सांगितलेस, ते ऐकून माझ्याठायी वसणारा मोह आता नष्ट झाला आहे. हे कमलपत्राक्षा! भूतांची उत्पत्ती व लय तुझ्याचपासून व तुझ्याठायीच कशी होतात, ते मी तुझ्याकडून ऐकून धन्य झालो आहे. तसेच तुझ्या अव्यय, अविनाशी स्वरूपाचे माहात्म्यही तूच मला सांगितलेस. हे परमेश्वरा! तू स्वतःचे हे जे स्वरूप वर्णन करून सांगितलेस, ते, हे पुरुषोत्तमा! तुझे दिव्य स्वरूप पाहण्याची उत्कंठा मला लागली आहे. हे योगेश्वरा! हे प्रभो! तुझे ते तसे अव्यय रूप पाहणे मला शक्य असेल, तर ते तुझे आत्मरूप मला दाखव."

श्रीकृष्णांना अर्जुन अशा प्रकारे *दिव्य, अव्यय, अविनाशी असे निजरूप* दाखवण्यास विनवत आहे. या रूपासच ज्ञानेश्वर *विश्वरूप* असे म्हणतात. दहाव्या अध्यायांती जे ***अद्वैत तत्त्वज्ञान***

श्रीकृष्णांनी अर्जुनास स्पष्ट केले, त्याची प्रत्यक्ष अनुभूती घेण्याची इच्छा अर्जुन या श्लोकांतून व्यक्तवत आहे. ***"वासुदेवः सर्वमिति"* या तत्त्वज्ञानाचा साक्षात्कार म्हणजेच हे *विश्वरूपदर्शन* होय.**

ज्ञानी - योगी - भक्त - कर्मयोगी हे चतुर्विध भेद या ***"वासुदेवः सर्वमिति"*** रूपास पावून विलीन होतात. मूळात हे असे भेद नसतातच, हे आपण गीता - ज्ञानेश्वरीच्या आधाराने आतापावेतो पाहिलेच आहे. आता त्या सर्वांना भगवत्स्वरूपाचा जो एक विशाल साक्षात्कार घडत असतो, त्याचे अवलोकन करू या. त्यामुळे आपल्या मनात ***ज्ञान - कर्म - भक्ति - योग*** या चार धारांबाबतचा उरलासुरला संदेह मिटेल व त्यांचे फलही जर तेच आहे, तर त्यांच्यात दिसणारी भिन्नता वरपांगीची कशी आहे, हे कळण्यास मदत होईल. असो.

"आईसें देखत होतो दुःस्वप्न"

ज्ञानेश्वरीतील अर्जुनाच्या विनंतीवरील भागाकडे वळू या:

मग पार्थु देवातें म्हणे। जी तुम्हीं मझकारणें।
वाच्य केलें न बोलणें। कृपानिधी।।११-४४।।
जैं महाभूतें ब्रह्मीं आटति। जीवमहदादिंचें ठाओ फिटति।
तैं जैं देओ होऊनि ठाकति। तैं विसंवणें शेषिचें।।४५।।
होतें हृदयाचां परिवरीं। रोंविलें कृपणाचिआं परी।
शब्दब्रह्मासिहिं चोरी। जेआंचिं केलीं।।४६।।
तैं तुम्हीं आझि आपुलें। मजफुडां हियें फेडिलें।
जेआं आध्यात्मां वोवालिलें। ऐश्वर्य हरें।।४७।।
तैं वस्तु मज स्वामी। एकिहेलां दिधलीं तुम्हीं।...।।४८।।

मग अर्जुन श्रीकृष्णास म्हणू लागला की, "हे कृपानिधी! जे वाचातीत आहे, ते तुम्ही मजवर अनुग्रह करून सांगितलेत! पंचमहाभूते जेव्हा लय पावून ब्रह्मी मिळतात; जीव आणि महत्तत्त्वादींचा जेव्हा ठावठिकाणा उरत नाही; ते सर्वांचे अंतिम विश्रांतिस्थान आपणच आहात. जी ही आपली स्वरूपस्थिती अंतःकरणरूपी गृही आपण कृपणासारखी पुरून गुप्तधनासारखी सर्वांपासून लपवून ठेवली होती; जी शब्दब्रह्म अशा वेदराशीलाही गंवसली नाही; ज्या अध्यात्मवस्तूवरून हराने आपले ऐश्वर्य ओवाळून टाकले आहे; ती निजवस्तू आपण सहजच अशी मला दिलीत!"

...।हेंबोलोंतन्हैंआम्हीं। तुझ पावौनि भिन्न कैंचें।।११-४८।।
परि सांचि महामोहाचिआं पुरीं। बुडालेआं देखौनि सीसवरी।
तुवां आपणपें घालौनि श्रीहरी। मग काढिलें मातें।।४९।।
एक तूंवांचौनि काईं। विश्विं दुजेआंचिं भाख नाहीं।
कीं आमुचें कर्म पाहीं। जैं आम्हीं आथि म्हणों।।५०।।

"पण असे तरी म्हणावे कसे! कारण तुम्ही आणि मी भिन्नभिन्न थोडेच आहोत! हे अद्वैतरहस्य, हे स्वामी! तुम्ही मला देऊन कृतार्थ केलेत! महामोहाच्या पुरात सचैल बुडणाऱ्या मला, हे श्रीहरी! आपण स्वतः उडी घालून वाचवलेत! तुझ्या एकाशिवाय या अखिल विश्वात दुजी वस्तू नाही. पण आमचे दुर्दैव पहा कसे आहे ते! आम्ही कोणीतरी वेगळे आहोत, असे स्वतःला समजतो."

मी जगीं एकु अर्जुनु। आईसा देहें वाहें अभिमानु।
आणि कौरवांतैं इयां स्वजनु। आपुलां म्हणें।।११-५१।।
याहिवरी यांतैं मी मारीन। म्हणें तेणें पापें कैं रिघैन।
आईसें देखत होतो दुःस्वप्न। तो चेवविला प्रभु।।५२।।

"हा मी अर्जुन आहे" असा या देहाचा अहंकार माझ्याठायी गाजत होता. या कौरवांना माझे स्वजन असेही मी समजत होतो. यापरते यांना मी मारीन आणि त्यामुळे मला स्वजनघाताचे पाप लागेल, असेही मला जे वाटत होते, ते सगळे निव्वळ एक दुःस्वप्नच होते. हे भगवंता! तुम्हीच मला त्यातून जागे केलेत."

"हें जोहरवाहर दुसरी"

पुढे अर्जुन काय म्हणतो पहा:

देवा गंधर्वनगरींचि वसति। सोडून निगालों लक्ष्मीपति।
होतों उदकाचिआं आर्तिं। रोहिणी पीत।।११-५३।।
जी किरडूं तन्हैं कापडाचें। परि लहरी येत होतिआं सांचें।
आइसें वांयां मरतयां जिवाचें। श्रेय तुवां घेतिलें।।५४।।
आपुलें प्रतिबिंब नेणतां। सिंह कुहां घालील देखौनि आतां।
आइसां धरिजें तेविं अनंता। राखिलें मातें।।५५।।

"हे श्रीकृष्णा! मायानगरीतून तुमच्या कृपेने मी बाहेर पडलो आहे. तहान भागवण्यासाठी मी मृगजळ पिऊ लागलो होतो. कापडी सर्पावर पाय पडून त्याने दंश केला आहे या भ्रमाने विषाच्या लहरी सर्वांगात येत होत्या. त्यामुळे माझा जीव मरणासन्न झाला होता. या सर्व प्रकारच्या भ्रमातून मला वाचवण्याचे श्रेय तुमचेच आहे. हे लक्ष्मीपती! विहिरीत दिसणारे सिंहाचे प्रतिबिंब म्हणजे काही खरा सिंह नव्हे. पण ते आपलेच प्रतिबिंब न ओळखता त्यावर झेपावून जाण्याच्या बेतात असणाऱ्या सिंहाला धरून त्याला विनाशाच्या खाईतून वाचवावे, तसे तुम्ही मला वाचवलेत!"

एरविं माझां तन्हैं एतुलेंवरीं। एथ निश्चयो होता अवधारीं।
जैं आतांचि सातांहिं सागरीं। एकत्र मिलिजैं।।११-५६।।
हें युगचि आघवें बुडावें। वरी आकाशहिं तुटौनि पडावें।
परि झूंजणें न घडावें। गोत्रेंसिं मज।।५७।।
आईसिआं अहंकाराचिएं वाढी।
मिआं आग्रहजलो दिधलीं होति बुडीं।
चांगचि तूं एरविं काढीं। कवणु मातें।।५८।।

"हे अनंता! खरे तर माझा इतका निश्चय झाला होता की हे दिसणारे द्वैती जग अगदी सत्यच आहे. अगदी सप्तसागरांची एकत्र मिळणी होऊन जगबुडी जरी झाली आणि आकाशही त्यावेळी अकस्मात कोसळून पडले, तरी त्या माझ्या धारणेपासून मी माघारा वळणे शक्यच नव्हते. मी अर्जुन आहे आणि या गोत्रजांशी मी युद्ध

करणार नाही, अशा आग्रहरूपी जळात मी दडी देऊन बसलो होतो. त्या अहंकारापासून आपण मला वाचवले आणि दडी देऊन बसलेल्या मज दीनास बाहेर आणलेत. नाही तर हे काम इतर कोण करू शकले असते!"

नाथिलें आपणपें एक मानिलें। आणि नव्हतयां नाम गोत्र ठेविलें।
थोर पिसें होतें लागलें। परि राखिलें तुम्हीं।।११-५९।।
माघां जलत काढिलें जोहरीं। तैं तैं देहासिंचि भय अवधारीं।
आतां हें जोहरवाहर दुसरीं। चैतन्याचिं।।६०।।

"वस्तुतः मी कोणी वेगळा जीव नसतांना मी वृथा द्वैत कल्पिले. असत्यासच सत्य मानून कवटाळले. नसलेले गोत्र खरे समजून बसलो. हे असे मोठे पिसे मला लागले होते. पण तुम्ही त्यापासून माझे रक्षण केलेत. मागे असेच तुम्ही आम्हा पांडवांना जळत्या लाक्षागृहातून बाहेर काढून वाचवले होतेत. पण तेव्हा तर केवळ आमच्या देहासच भय निर्माण झाले होते. आता मात्र ही अति मोठी पीडा निर्माण झाली होती. तिच्या आगीत आमचे चैतन्यसुद्धा देहासकट जळून भस्म होणार होते."

"उद्धरिलों तूझें पाएं"

अजूनही अर्जुन काय म्हणतो पहा:

दुराग्रहें हिरण्याक्षें। माझिं बुद्धिवसुंधरा सूदलीं कांखें।
मग मोहार्णवगवाक्षें। रिघौनि ठेला।।११-६१।।
तेथ तूझेनि गोंसाविंपणें। एकहेल बुद्धिचिआं ठाआं येणें।
हें दुसरें वराह होणें। पडिलें तूझ।।६२।।
आईसें अपार तूझें केलें। एकीं वाचां काएं मी बोलें।
परि पांचहिं पालव मोकलिलें। मजप्रति।।६३।।

"दुराग्रहरूप हिरण्याक्ष दैत्याने माझी बुद्धिरूपी वसुंधरा काखोटीस मारून मोहरूपी सागराच्या गवाक्षात आश्रय घेतला होता. तूच पुनः वराह अवतार धारण करून माझी बुद्धी मूळ स्थानी आणून स्थापन केलीस. हे स्वामी! तुला माझ्यासाठी हे कष्ट घेणे भाग पडले. तू तर माझ्यावर अपार उपकारांची अनंत राशी रचली आहेस. वेळोवेळी तू माझ्यासाठी जे काही केलेस, त्याचे माझी एकुलती एक वाचा किती वर्णन करू धकेल! हे जगदीशा! माझ्यावरून तू तर आपले पंचप्राणही ओवाळून टाकले आहेस!"

तैं कांहिं न वचेचिं वांयां। भलें यश फावलें देवराया।
जैं साद्यंत माया। निरसिलीं माझिं।।११-६४।।
जीं आनंदसरोवरींचिं कमलें। तैसें जें हें तूझें डोलें।
आपुलिआं प्रसादाचिं राऊलें। जेआंलागिं करिति।।६५।।
हां हों तेआंहिं आणि मोहाचिं भेंटीं। हें काईंसि पाबलीं गोठी।
केऊति मृगजलाचि वृष्टी। वडवानलेंसिं।।६६।।

"हे देवाधिदेवा! पण तुझे हे सगळे कष्ट काही वाया गेले नाहीत. तुला घवघवीत यश लाभले आहे. कारण माझी माया - माझे अज्ञान समूळ नष्ट पावली आहेत. आनंदरूप सरोवरातील कमळेच असावेत असे तुझे हे नेत्र ज्यांच्यासाठी तुझ्या कृपाप्रसादाची राऊळेच होऊन राहिले आहेत, त्यांच्यासाठी मोहाची - अज्ञानाची काय महती असणार! वडवानळ समुद्राच्या पाण्यात असतो. अपार सागर जलराशींनी तो विझवला जात नाही. तेथे मृगजलाच्या वर्षावाने तो काय विझेल!"

आणि मी तंव दातारां। कृपेचां ये रिघौनि गाभारां।
घेत आहे चारा। ब्रह्मरसाचां।।११-६७।।
तेणें माझां जी मोहों जाएं। एथ विस्मो काईं आहें।
तन्हैं उद्धरलों कीं तूझें पायें। शिवतलें आहाति।।६८।।

"तुझ्या प्रसादापुढे माया - मोह - अज्ञान यांचे काय चालणार! आणि हे दातारा! मी तर तुझ्या कृपाप्रसादाच्या गाभाऱ्यात शिरून ब्रह्मरसाचे आकंठ पान करत आहे. तेव्हा माझा मोह नाश पावला यात विस्मय वाटावा असे काय आहे! हे श्रीकृष्णा! तुझे पाय धरून मी सहजच उद्धरून गेलो आहे!"

अर्जुनास पडलेली भीड

ज्ञानेश्वर असे अर्जुनाचे हृद्गत श्रीकृष्णाप्रति आपल्या शब्दांत विदित करत आहेत. अर्जुनाचा हा भाव ज्ञानेशांनी फार समर्थपणें टिपला आहे. त्याला जे गूढ श्रीकृष्णांकडून उलगडून हवे आहे, ते विचारण्याचे संकट त्याला वाटते आहे. ***"हें जिवाआंतुली चाड। परि देवासिं सांघतां सांकड। कां जैं विश्वरूप गूढ। कैसेनि पुसावें।।११-३०।।"*** अशी त्याची अवस्था आहे. तरीही तो म्हणतो की:

पैं कमलायत डोलसां। सूर्यकोटितेजसा।
मिआं तूझपासूनि महेशा। परिसिलें आझि।११-६९।।
इयें भूतें तूझपासौनि होति। अथवा लयां हन जैसेनि जाति।
तैं मजफुडां प्रकृति। विवंचिलीं देवें।।७०।।
आणि प्रकृति किर उगाणा दिधला।
परि पुरुषाचाहिं ठाओ दाविला।
जेआंचां महिमा पांघरौनि झाला। धडौता वेदु।।७१।।
जी शब्दरासि वाढें जिएं। कां धर्माऐसिआं रत्नातैं विएं।
तैं ऐथिंचें प्रभेचें पाएं। वोलगें म्हणौनि।।७२।।

"ज्याचे नेत्र कमलांचे आयतनच आहेत; कोटिकोटी सूर्यांचे तेज ज्याच्याठायी आहे; जो साक्षात महेशच आहे, अशा तुझ्याकडून, हे श्रीकृष्णा! भूतांची उत्पत्ती कशी होते, त्यांचा लय कसा होतो, त्याचे रहस्य कळले. प्रकृतिविषयक सर्व विज्ञान तू मला सांगितलेस. प्रकृतीच्या स्वरूपाचे साद्यंत रहस्य तू मला कथिलेस. एवढेच नव्हे, तर ज्याच्या माहात्म्यरूपी वस्त्रास पांघरून वेद सवस्त्र झालेत, त्या पुरुषाचाही ठाव तू मला दाखवलास! किंबहुना शब्दराशी असा वेद जगतो, वाढतो आणि धर्मरत्नप्रमेयांना प्रसवतो, ते केवळ त्या पुरुषाच्या तेजोमय पावलांना वंदूनच! असे हे अगाध माहात्म्य मला आज कळले."

आईसें अगाध मााहात्म्य। जैं सकलमार्गैकगम्य।
जैं स्वात्मानुभवरम्य। तैं इयांपरी दाविलें।।११-७३।।

जैसा केरु फिटलेआं आभालीं। दिठी रिघें सूर्यमंडलीं।
कां हातें सारुनि बाबुली। जल दाविजैं।।७४।।
ना तऱ्हें उकलतआं सापाचें वेढें। जैसें चंदना खेंव देणें घडें।
अथवा विवसिं पलें मग चढें। निधान हातां।।७५।।
तैसें प्रकृति हें आड होति। तैं देवेंचि सारिली परौति।
मग परतत्त्व माझिएं मतिं। सेजार केलें।।७६।।

"स्वसंवेद्य असे ते रमणीय आत्मतत्त्वच सर्व मार्गांचे एकमेवाद्वितीय असे गंतव्यस्थान आहे, हे तू माझ्यापुढे प्रकट केलेस! जसे नभास आक्रमणाऱ्या मेघमालिका लोप पावल्या की सूर्यमंडळ दृष्टिगोचर होते; पाण्यावरील शेवाळे हाताने बाजूला सारले की शुद्ध जल दृष्टीस पडते; सर्पाचे वेढे दूर सारले कीच चंदनाला मिठी मारता येते; किंवा जशी विवसी पळवून लावली की मगच गुप्तधन हाती लागते; त्याप्रमाणे परतत्त्वाच्या आड येणारी ही प्रकृती दूर सारून देवाने माझ्या मतीला त्या तत्त्वाचा शेजार घडवून दिला."

सुप्त इच्छेचे निवेदन

एवढी प्रस्तावना केल्यावर अर्जुन ***"हें सर्वहिं सर्वेश्वरु। आईसा प्रतितिगत जो पतिकरु। तो बाहेरीं होआवा गोचरु। लोचनांसिं।।११-२९।।"*** ही आपली अंतर्यामीची इच्छा व्यक्तवत म्हणतो:

म्हणौनि इयें विखिंचा मज देवा। भंरवसा किर जाहाला जिवां।
परि आणिक एक हेवा। उपनला असें।।११-७७।।
तो भिडां जऱ्हें म्हणों ऱ्हाओं। तऱ्हें आनां कवणां पुसों जाओं।
काई तूंवाचूनि ठाओं। जाणत आहों आम्हीं।।७८।।
जलचरु जलाचां आभारु धरीं। बालक स्तनपानि उपरोधु करीं।
तऱ्हें तेआं जिणेआंसि श्रीहरी। आन उपाओ असें।।७९।।
म्हणौनि भीडसांकडी न धरवें।
जिविं आवडें तैंहिं तूझफुडां बोलावें।
तंव राहें म्हणें देवें। चाड सांघैं।।८०।।

"तरी हे श्रीकृष्णा! तूच हे समस्त विश्व आपल्या अंशमात्राने व्यापून आहेस, याविषयी माझी खात्री झाली आहे. परंतु अजून एक उत्कट इच्छा मला उपजली आहे. भिडेमुळे ती तुला सांगू नये. तर मग इतर कोणाला ती सांगावी! तुझ्याशिवाय दुसरा आश्रय आम्ही जाणत नाही. मग भीड तरी कशी बाळगावी! जलचराने जलाचे उपकार मानायला सुरुवात केली, तर कुठे जावे! बालकाने स्तनपान करण्याविषयी अनमान केले तर त्याने कशाच्या आधारावर जगावयाचे! म्हणून आता भीड किंवा संकोच न बाळगता आपल्या मनीची इच्छा तुझ्यापुढे प्रकट करावी, हेच बरे!" हे ऐकून श्रीकृष्ण म्हणाले की, "ते सर्व राहू! तुझ्या मनातली इच्छा कोणती, ते स्पष्ट सांग!"

"देखावयां चित्त। उतावील माझें"

मग बोलिला तो किरीटी। म्हणें तुम्हीं जैं केलीं गोठी।
तिआं प्रतितिचिं दिठी। निवालीं माझिं।।११-८१।।

त्यावर अर्जुन म्हणू लागला की, "तुम्ही आतापावेतो जे विवेचन केलेत, त्यामुळे माझी अनुभवसमृद्धी झाली. दहाव्या अध्यायींचे विभूतिवर्णन मला भावले आहे. तूच या विश्वातील एकमेव तत्त्व आहेस, हे मला पटलेले आहे. म्हणून मला आता असे वाटते की:

आतां जेआंचेनि संकल्पें। हें लोकपरंपरा होएं हारपें।
जेआं ठायांतैं आपणपें। मी आईसें म्हणसिं।।११-८२।।
तैं मुदल स्वरूप तूझें। जेथूनि इयें द्विभुजें आन चतुर्भुजें।
सुरकार्याचेनि व्याजें। घेवों घेवों येसिं।।८३।।
पैं जळशयनाचिआं अवगणिआं। कां मत्स्य कूर्म इयां मिरवणिआं।
खेल सरिलिआं तूं गुणिआं। सांठविसि जेथ।।८४।।
उपनिषदें जैं गाति। योगिएं हृदयिं रिघौनि पाहाति।
जेआंतैं सनकादिकु आहाति। पोटालुनिआं।।८५।।
आईसें अगाध जैं तूझें। विश्वरूप कानिं आईकिजैं।
तैं देखावेआं चित्त माझें। उताविल देवा।।८६।।

"हे श्रीकृष्णा! जे तुझे मूळ स्वरूप आहे; ज्यास तू ***मी*** असे म्हणतोस; ज्याच्या संकल्पमात्रे ही सृष्टी उत्पन्न होते आणि लयास जाते; ज्या ठिकाणांहून सुरकार्यार्थ ही तुझी द्विभुज आणि चतुर्भुज रूपे वेळोवेळी अवतीर्ण होतात; मत्स्य, कूर्म इ.सोंगे मिरवून झाली की जलशयनाच्या पडद्याआड जेथे ती नेऊन साठवून ठेवतोस; सगुणाची रूपे रचणाऱ्या हे बहुरूप्या! उपनिषदे ज्याची स्तुतिस्तोत्रे सांगतात; ज्यास योगिजन हृदयांतरी रिगून पाहतात; सनकादिक ज्याला कवटाळून आहेत; असे जे तुझे अगाध विश्वरूप आहे म्हणून आम्ही ऐकून आहोत, ते पाहण्यासाठी माझे चित्त उतावळे झाले आहे."

चिद्विलासाचे प्रत्यंतर

देवें फेडुनिआं सांकड। लोभें पुसिलीं जऱ्हैं चाड।
तऱ्हें हेंचि एकी वाड। आर्त्ति जी मज।।११-८७।।
तुझें विश्वरूपपण आघवें। माझिएं दिठींसि गोचर होआवें।
आईसिं थोर आंस जिवें। बांधूनि आहें।।८८।।

"तू अत्यंत प्रेमाने माझी इच्छा निःसंकोच सांगावी असे म्हटलेस, म्हणून म्हणतो की माझी इतकीच एक उत्कट इच्छा आहे. तुझे विश्वरूपत्व सगळेच्या सगळे मला दृष्टिगोचर व्हावे या इच्छेने माझा जीव आसुसलेला आहे."

विश्वरूप हा चिद्विलासवादाचा दाखला आहे. **गीतेच्या दहाव्या आणि अकराव्या अध्यायांतून हा मूळचा *चिद्विलासवाद* मूर्त होतो. त्यास *ज्ञानदेवांचा चिद्विलासवाद* असे आपण बऱ्याचदा म्हणतो. पण *तो खरे तर मूळ गीताकारांचाच आहे.*** गीतेचे भाष्य रचतांना कोणी कदाचित त्याकडे पुरेसे लक्ष दिले नसावे अथवा त्यास गौण लेखून आपलेच स्वतःचे काही विशिष्ट तत्त्वज्ञान प्रसृत करण्याचा प्रयत्न केला असावा की ज्यामुळे या वादास गीतेचे तत्त्वज्ञान म्हणून ओळखण्यात तत्पर असणाऱ्या ज्ञानदेवांच्या नांवाने तो हल्ली ओळखला जाऊ लागला आहे.

हे विश्व चैतन्यमय आहे; चैतन्याशिवाय इतर सर्व असत्य आहे; त्याशिवाय येथे काहीही नाही; ***"नेह नानाऽस्ति किञ्चन।।"*** असा हा विश्वाचा आणि चैतन्याचा संबंध आहे; विश्व हा चैतन्याचा विलास

आहे आणि त्याच्याइतकेच हे विश्व सत्य आहे; असे चिद्विलासवादाचे स्थूल स्वरूप आहे.

योग्यतेची आशंका

या तत्त्वज्ञानाची प्रचिती घेण्यासाठी गीताकारांचा अर्जुन अत्युत्सुक झाला आहे. पण ही स्वात्मानुभूती आपणास घेता येईल का या शंकेने तो श्रीकृष्णास म्हणत आहे की:

परि आणिक एक एथ शार्ङ्गी। तूझ विश्वरूपातें देखावेयालागीं।
योग्यता माझां आंगीं। असे कीं नाहीं।।११-८९।।
हें आपुलें आपण मी नेणें। तें कां नेणसिं जन्हैं देओ म्हणें।
तन्हैं सरोगु काएं जाणें। निदान रोगाचें।।९०।।
आणि जी आर्तिचेनि पडिभारें। आर्तु आपुली टांकी पैं विसरैं।
ताहनेला म्हणें न पुरें। समुद्रु मज।।९१।।
आईसि सचाडपनाचिएं भुलीं। न सांभालावें समस्या आपुलीं।
ययालागिं योग्यता जेविं माऊली। बालकाचिं जाणें।।९२।।
तेआंपरी जनार्दना। विचारिजो माझिं संभावना।
मग विश्वरूपदर्शना। उपक्रमु कीजैं।।९३।।

"पण हे शार्ङ्गधरा! अजून एक अडचण आहे. ती अशी की तुझे विश्वरूप पाहण्याची कुवत माझ्यात आहे की नाही! हे काही मला उमजत नाही. का म्हणून विचारशील ते सांग बरे! रोग्याला आपल्या रोगाचे निदान करता येते का! तसेच उत्कंठेच्या भरात मनुष्य सारासारविचार करण्याचे विसरून जातो. तहानेने जीव व्याकुळ झाला की माणसास समुद्रसुद्धा पिऊन टाकीन असे वाटते. विश्वरूपदर्शनाच्या तीव्र इच्छेने वेड्या झालेल्या मला माझी त्याबाबतची पात्रता कळून येईनासे झाले आहे. माऊली जशी बालकास योग्य ते देते, तसेच हे जनार्दना! तू पण मला काय योग्य ठरेल ते पहा आणि मगच विश्वरूपदर्शनाचा उपक्रम आरंभ!"

तन्हैं तैसिं तैं कृपा कारा। एरविं नव्हें हें म्हणा अवधारां।
वायां पंचमालापें बधिरा। सुख केऊतें देणें।।११-९४।।
एरविं एकलिआं बापिआंचिआं तृषें। मेघ जगापुरतें काय न वर्षे।
परि जाहालीहिं दृष्टी उपखैं। जन्हैं खडकी होएं।।९५।।

"बहिऱ्याला पंचमाचा आलाप कोणते सुख देणार! तरी माझी विश्वरूप पाहण्याची योग्यता असेल तर तेवढी कृपा कर व दर्शनाचा सोहळा दाखव. नाही तर स्पष्ट नकार द्यावा. चातकाची तृषा ती केवढी! पण मेघ त्याच्यासाठी जगाला पुरून उरेल एवढी वृष्टी करतो. तरीही खडकावरली वृष्टी वायाच जात नाही का!"

चकोरां चंद्रामृत फांवलें। एरां आणि वाहूनि काएं वारिलें।
परि डोलियांविण पाहलें। वायां जाएं।।११-९६।।
म्हणौनि विश्वरूप तूं सहसा। दाविसिं हा किर भंरवसा।
कां जैं कडाडा आणि गंहिसां - । माझिं नीच नवा तूं।।९७।।

"चकोरासाठी चंद्राची ज्योत्स्ना अमृतवर्षाव करते. तो इतरांनी उपभोगू नये असे का चंद्र कधी म्हणतो! पण त्यांना चंद्रामृतसेवनाची दृष्टीच नसल्याने काही उपयोग होत नाही. तसेच तर नाही ना माझे!"

तरीही आपला उदार सखा श्रीकृष्ण आपली योग्यता नसली तरी आपल्याला विश्वरूपदर्शन घडवून आणीलच असा विश्वास अर्जुनास वाटतो आहे. म्हणून तो म्हणतो की, "जाणते आणि नेणते असे भेदाभेद तुजपाशी नाहीत. म्हणून मला खात्री आहे की मला तू विश्वरूप जरूर दाखवशील."

श्रीकृष्णांचे दातृत्व

कारण:

तुझें औदार्य जाणों स्वतंत्र। देतां न म्हणसि पात्रापात्र।
पैं कैवल्याआईसें पवित्र। किं वैरिआंहि दिधलें।।११-९८।।
मोक्षु दुराराध्यु किर होएं। परि तोहिं आराधिं तूझें पाएं।
म्हणौनि धाडिसिं तेथ जाएं। पाईकु जैसा।।९९।।
तुवां सनकादिकांचेनि मानें। सायुज्यीं सौरसु केला पूतने।
जैं विखाचेनि स्तनपानें। मारूं आलीं।।१००।।

"तू औदार्याची देवता आहेस. पात्र-अपात्र असा विचार न करणारे दातृत्व तुझ्याठायी वसते. मोक्षासारखी दुर्लभ वस्तुसुद्धा तू तुझ्या वैऱ्यांना सहजच दिली आहेस. दुस्साध्य असा मोक्षसुद्धा तुझ्या चरणी लीन आहे. म्हणून तू ज्याच्याकडे पाठवितोस, त्याच्याकडे सेवकाप्रमाणे तो जातो. स्तनाग्रांना विष माखून पूतना राक्षसीने तुला स्तनपान करविले होते. तुला असे कपटीपणे स्तनपानाच्या मिषाने ठार मारू पाहणाऱ्या त्या राक्षसीलासुद्धा तू मोक्ष देणारा उदार आहेस.सनकादिकांच्या बरोबरीने तू तिला मोक्ष दिलास!"

हां गां राजसूयाचां सभासदीं। देखतां त्रिभुवनाचि मांदी।
कैसा शतधा दुर्वादी। निस्तेजिलासिं।।११-१०१।।
ऐसिआं अपराधिआं शिशुपालां।
आपणपेआं ठाओ दिधला गोपाला।
आणि उत्तनपादाचिआं बालां। काएं ध्रुवपदीं चाड।।१०२।।
तो वनां आला याचिलागिं। जैं बैसावें पितयाचां उत्संगिं।
कीं तो चंद्रसूर्यादिकांपरिस जगिं। श्लाघ्यु केला।।१०३।।
आईसा वनवासिआं सकलां। देतां एकुचि तूं धसाला।
पुत्रां आलवितां अजामिलां। आपणपें देसिं।।१०४।।

"त्रिभुवनातील मान्यवर उपस्थितांसमोर राजसूय यज्ञाच्या सभेत शिशुपालाने शेकडो प्रकारच्या अपशब्दांनी तुझा केवढा पाणउतारा केला होता! त्यालासुद्धा तू, हे गोपाला! स्वतःत समावून घेतलेस! पित्याच्या मांडीवर बसायला मिळावे, एवढ्याच हट्टासाठी उत्तानपाद राजाच्या बाळाने तपश्चर्या केली होती. त्याला तू ध्रुवपद दिलेस. त्याला त्याची काही चाड होती का! पण तू मात्र त्याला चंद्रसूर्यापेक्षाही वंदनीय असे स्थान देणारा उदारधी आहेस! अजामीळाने तर केवळ पुत्रास अखेरचे पाहण्यासाठी त्याचे नांव घेतले होते. पण तेवढ्यानेसुद्धा त्याने अखेर आपले नाम घेतले, असे समजून तू त्यालाही मोक्ष दिलास!"

जेणें उरीं हाणिलासि पांपरां। तेआंचां चरणु वाहसिं दातारां।
अझुनि वैरिआंचिआं कलेवरां। विसंबसीना।।११-१०५।।
आईसा अपकारिआं तुझा उपकारु।
तूं अपात्रींहिं परि उदारु।..।।१०६।।

"सर्व दीन-अनाथांचे कल्याण करणारा तूच एक आहेस! भृगूने त्वेषाने तुझ्या वक्षस्थलावर मारलेल्या लाथेचे पदचिह्न गौरवाने मिरवणारा तूच एक उदारहृदयी महानुभाव आहेस. पाञ्चजन्य शंखाच्या स्वरूपातल्या शत्रूचे कलेवर जमिनीवर न पडू देणारी उदारमनस्कता केवळ तुझ्याठायीच पाहण्यास मिळते. तुझ्यावर अपकार करणाऱ्यांवर उपकार करण्याची आणि अपात्रीही उदारता दाखवण्याविषयीची तुझी कीर्ती त्रिभुवनात पसरली आहे."

"तन्हैं आर्त्तिचें डोहालें। पुरवा देवा"

...। दान मागौनि दारवंटेकरु।
जाहालासि बलिचां।।११-१०६।।
तूतैं आराधि ना आयकें। होति पुंसा बोलावित कौतुकें।
तिएं वैकुंठीं तुवां गणिकें। सुरवाडु केला।।११-१०७।।

"बळीचे राज्य हरण करावे म्हणून तू वामनाचे छद्मरूप घेतलेस. शुक्राचार्य नकोनको म्हणत असता त्याने तुझ्या हातावर दानाचे उदक सोडून त्रिभुवनाचे खुशीने समर्पण केले. अशा त्या दैत्यराजाचाही द्वारपाल होणारा उदार स्वामी तूच आहेस. तुझी कधीही जिने आराधना केली नव्हती; तुझे गुणश्रवणही जिने कधीकाळी पण केले नव्हते; जिचा व्यवसायच गणिकेचा होता; अशा वेश्येचाही तू उद्धार केलास. तिचे पुण्य कोणते म्हणशील तर एकच! आपल्या पाळीव पोपटास *"राघव, राघव"* अशी ती हाक मारायची! तेवढेच तुझे नामसुद्धा तिला तारून नेणारे ठरवणारा दातार तूच आहेस! तिला वैकुंठाचे सुख अशा किरकोळ कारणानेसुद्धा तू दिलेस!"

आईसिं पाहूनि वायाणिं मिरवें।
लागलासिं आपणपें देओ वानिवसें।
तो तूं कां अनारिसें। मजलागिं करिसि।।११-१०८।।
हां गां दुभतेआंचेंनि पवाडें। जैं जगाचें फेडी सांकडें।
तिएं कामधेनूचें पाडें। काएं भुकेलें ठाति।।१०९।।
म्हणौनि मिआं विनविलें जैं कांहीं।
तैं देव न दाखविति हें किर नाहीं।
परि देखावेयालागिं देईं। मज पात्रता।।११०।।
तुझें विश्वरूप आकलें। आईसें जन्हैं जाणिसिं माझें डोलें।
तन्हैं आर्त्तिचें डोहालें।पुरवि देवा।।१११।।

"अशी पोकळ निमित्ते शोधूनसुद्धा तू सहजासहजी कोणालाही आपले निजपद देतोस. तो तू काय माझी उपेक्षा थोडीच करणार आहेस! साऱ्या जगालाच जी विपुल दुभते देते, त्या कामधेनूची वासरे भुकेजली थोडीच राहणार आहेत! म्हणून मला खात्रीने वाटते की मी तुला विश्वरूप दाखव म्हणून जी विनवणी केली आहे, त्याप्रमाणे नक्कीच माझी इच्छा तू पूर्ण करशील. पण त्यासाठी मला पात्रता दे! तुझे विश्वरूप पाहण्यास माझे चक्षू जर समर्थ असतील, तर ही माझी आर्त इच्छा तू पुरी कर! नाही तर काहीही करून मला विश्वरूपदर्शन घडवूनच आण!"

आईसिं ठायेंठाओं विनंति। जंव करूं सरैल सुभद्रापति।
तंव तेआं षड्गुणचक्रवर्ति। साहवेचिना।।११-११२।।
तो कृपापियूखसजलु। आणि एरु जवलां आला वर्षाकालु।
नाना कृष्णु कोकिलु। अर्जुनु वसंतु।।११३।।
ना तन्हैं चंद्रबिंब वाटोलें। देखौनि क्षीरसागर उचंबलें।
तैसा दुणेंहिं वरें प्रेमबलें। उल्लसितु जाहाला।।११४।।

"याप्रमाणे त्या सुभद्रापती अर्जुनाची विनवणी ऐकून त्या षड्गुणैश्वर्यमंडित भगवंतास काही धीर धरवेना! श्रीकृष्ण म्हणजे जणू कृपामृतजलाने भरलेला मेघ! अर्जुन जणू वर्षाकाल! किंवा कृष्ण जसा काही कोकील आणि अर्जुन तर जणू वसंतऋतू! अर्जुन जणू पौर्णिमेचे चंद्रबिंब व कृष्ण जणू क्षीरसागर! अर्जुनावरील प्रेमाच्या आवेगाने दुप्पटीहूनही अधिक असा तो श्रीकृष्णकृपासिंधू उचंबळून आला! मेघकृपामृत वरिषले! आत्मकोकीळ पंचमात गाऊ लागला!"

विश्वरूपाचे प्रकटन::::

"पश्य मे पार्थ रूपाणि"

मग तिएं प्रसन्नतेचेनि आटोपें। गाजौनि म्हणितलें सकृपें।
पार्था देख देख उमपें। स्वरूपें माझिं।।११-११५।।

श्रीकृष्ण अति प्रसन्न होऊन आवेशात आले आणि म्हणू लागले,

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च।।११-५।।

"पहा माझी अनंत रूपे! नाना प्रकारची, नाना वर्णांची, नाना आकृतींची माझी शेकडो सहस्रो दिव्य रूपे पहा!" असे म्हणून ते आपली दिव्यातिदिव्य रूपे दाखवू लागले.

एकचि विश्वरूप देखावें। आईसा मनोरथु केला पांडवें।
कीं विश्वरूपमय आघवें। करूनि घातिलें।।११-११६।।
बाप उदार देओ अपरिमितु। याचक स्वेच्छा सदोदितु।
असें सहस्रवरी देतु। सर्वस्व आपुलें।।११७।।

"पार्थ एक विश्वरूप पाहू इच्छित होता. पण त्या उदार हरीने सगळे काही विश्वरूपमय करून सोडले. धन्य त्या श्रीकृष्णपरमात्म्याची, जो याचकाने इच्छिलेले सहस्रो पटीने त्याच्या पदरी घालतो! आपले सर्वस्व असणारे विश्वरूपही त्याने पार्थास दिले!"

अहो शेषाचेंहिं डोलें चोरिलें। वेद जेआंलागिं झंकविलें।
लक्षुमियेसिहिं परि राहिलें। जिव्हार जैं।।११-११८।।
तैं आतां प्रकटूनि अनेकधा। करित विश्वरूपदर्शनाचा धांदा।
बाप भाग्य अगाधा। पार्थाचिआं।।११९।।

"शेषाच्या सहस्त्रावधी नेत्रांपासूनही लपवून ठेवलेले; वेदांनाही गुह्य न दाखवता फसवून आपल्यापाशीच राखलेले; साक्षात अर्धांगिनी जी लक्ष्मी तिच्याही पदरी न पडलेले ते अगाध विश्वरूप अर्जुनाला सहजच देणाऱ्या त्या भगवंताचे नवल करावे तेवढे थोडेच! पार्थाचे भाग्यच विलक्षण म्हटले पाहिजे की अनेक प्रकारांनी ते विश्वरूप भगवंत त्यास दाखवू लागले!"

जो जागता स्वप्नावस्थें जाएं। तो जेविं स्वाप्निचें आघवें होएं।
तेविं अनंत ब्रह्मकटाह आहे। आपणचि जाहाला।।११-१२०।।
तेथिंचि सहसा मुद्रा सोडिली।
आणि स्थूलदृष्टीची जवनिका फेडिली।
किंबहुना उघडिली। योगऋद्धी।।१२१।।

"मनुष्य स्वप्न पाहू लागला की जसा आपणच स्वप्नसृष्टीतील प्रत्येक वस्तू होतो, त्याप्रमाणेच जणू तो भगवंत आपणच अनंत ब्रह्मांडे झाला! स्थूलदृष्टीचा पडदा दूर सारला आणि आपली सहजस्थिती तो श्रीकृष्ण अर्जुनास दाखवू लागला. योगऋद्धीचे वैभवच त्याने त्याच्या डोळ्यांपुढे प्रकट केले."

श्रीकृष्णांची उताविळी

परि हा हें देखैल कीं नाहीं। आईसिं सेंचि न करीं कांहीं।
एकसरां म्हणितसें पाहीं। स्नेहातुर।।११-१२२।।

अर्जुनाला हे दिसेल की नाही याचा विचारही मनात न येऊ देता त्याच्यावरील प्रेमाने उतावीळ झालेले श्रीहरी म्हणू लागले:

अर्जुना तुवां एक दावा म्हणितलें।
आणि तैंचि दावूं तऱ्हैं काएं दाविलें।
आतां देखें आघवें भरिलें। माझांचि रूपीं।।१२३।।
एकें कृशें एकें स्थूलें। एकें ऱ्हस्वें एकें विशालें।
पृथुतरें सरलें। अप्रांतें एकें।।१२४।।
एकें अनावरें प्रांजलें। सव्यापारें निश्चलें।
उदासीनें स्नेहालें। तीव्रें एकें।।१२५।।
एकें घूर्णितें सावधें। असलगें एकें अगाधें।
एकें उदारें अतिबुद्धें। क्रुद्धें एकें।।१२६।।

"अर्जुना! तू मला विश्वरूप दाखव असे म्हणावेस आणि मीही तुला तेवढेच एक रूप दाखवावे, तर त्यात काय मोठे! हे पहा माझ्याठायीच सर्व विश्व कसे समावलेले आहे ते! नानाविध आणि दिव्यतेजप्रकाशमय अशी ही माझी अनेकानेक रूपे पहा. त्यातील काही कृश तर काही स्थूल आहेत. काही लहान तर काही विशालकाय आहेत! काही मर्यादित तर काही अमर्याद अशी रूपेही तू पहा! काही रूपे प्रांजल आहेत, तर काही अनावर आहेत. काही व्यापार करणारी तर काही स्तब्ध असणारी आहेत. काही उदासीन, काही प्रेमळ, काही उग्र, काही धुंदफुंद, काही सावध, काही गोचर तर काही अगोचर, काही उदार तर काही कृपण, काही क्रुद्ध अशी ही माझी रूपे पहा."

एकें संतें सदामदें। स्तब्धें एकें सानंदें।
गर्जितें निःशब्दें। सौम्यें एकें।।११-१२७।।
एकें साभिलाषें विरक्तें। उन्निद्रितें एकें निद्रितें।
परितुष्टें एकें आर्तें। प्रसन्नें एकें।।१२८।।
एकें अशस्त्रें सशस्त्रें। एकें रौद्रें अतिमित्रें।
भयानकें एकें पवित्रें। लयस्थें एकें।।१२९।।
एकें जनलीलाविलासें। एकें पालनशीलें लालसें।
एकें संहारकें सावेशें। साक्षिभूतें एकें।।१३०।।
एवं नानाविध परि बहुवसें। आणि दिव्यतेजप्रकाशें।...।।१३१।।

"काही शांत तर काही सदा मद चढलेली, काही स्थिर, काही आनंदी, काही गर्जना करणारी तर काही निःशब्द, काही सौम्य, काही विरक्त तर काही लालसी, काही निद्रिस्त तर काही जागृत, काही संतुष्ट तर काही आर्त, काही प्रसन्न, काही निःशस्त्र तर काही शस्त्रास्त्रधारी, काही रौद्र तर काही स्नेहशील, काही भयानक अशी माझी ही रूपे पहा. काही रूपे पूजनीय आहेत; काही रूपे समाधिमग्न असलेलीही आहेत. काही रूपे सर्जनशील आहेत, तर काही पालनशील आहेत. आणि संहार करणारी विदारक, दारुण अशीही काही रूपे पहा! काही रूपे निव्वळ साक्षिभूत अशी चैतन्यमय आहेत. ही अशी माझी रूपे पहा!"

"नानावर्णाकृतीनि च"

..।तेंविंचिं एकाएका आईसें। वर्णेहिं नव्हें।।११-१३१।।
एकें तांतलें साडेपंधरें। तैसिं कपिलवर्णें अपारें।
एकें सरागें जैसें सेंदुरें। डंवरिलें नभ।।१३२।।
एकें सवियांचिं चुलुकीं। जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं।
एकें अरुणोदयासारिखीं। कुंकुमवर्णें।।१३३।।
एकें शुद्धस्फटिकसोज्वलें। एकें इंद्रनीलसुनीलें।
एकें अंजनाचलसकालें। रक्तवर्णें एकें।।१३४।।
एकें लसत्कांचनसम पिंवलीं। एकें नवजलदश्यामलीं।
एकें चांपेगौरीं केवलीं। हरितें एकें।।१३५।।
एकें तप्तताम्रतांबडीं। एकें श्वेतचंद्र चोखडीं।
आईसिं नानावर्णें रूपडीं। देख माझिं।।१३६।।

"त्यांचे वर्णही नानाविध आहेत. ते पण पहा. काही तावून सुलाखलेल्या शुद्ध सुवर्णाच्या वर्णाची आहेत. पिंगट रंगाची पण अनेक रूपे आहेत. काही रूपे शेंदुरवर्णाने भरलेल्या नभोमंडलाच्या वर्णाची आहेत. माणकांनी जडवलेल्या ब्रह्मांडासम चमचमणारी काही रूपे आहेत, तर काही अरुणोदयी दिसणाऱ्या कुंकुमवर्णी प्रभेसारखी आहेत. काही रूपे निर्मल स्फटिकाच्या वर्णासारखी आहेत. तर काही इंद्रनीलाप्रमाणे अत्यंत नीळ्या रंगाची आहेत. काही काजळाचा पर्वत दिसावा तशा वर्णाची, तर काही तांबड्यालाल रंगाची आहेत. काही सतेज कांचनाच्या वर्णाची पिवळीधमक, तर काही आषाढाच्या मेघासारखी सावळी आहेत. काही रूपे निखळ हिरव्या रंगाची आहेत.

काही तापवलेल्या तांब्याच्या ताम्रवर्णाची, काही चाफ्यासारखी गौरवर्ण, काही चंद्राप्रमाणे श्वेतवर्णाची अशी नाना वर्णांची माझी ही रूपे पहा!"

हें जैसें कां आनान वर्ण। तैसें आकृतिहिं अनारिसेंपण।
लाजां कंदर्प निगाला शरण। तैसें सुंदरें एकें।।११-१३७।।
एकें अतिलावण्यसाकारें। एकें स्निग्धवपुमनोहरें।
शृंगारश्रियेचिं भांडारें। उघडिलीं जैसिं।।१३८।।
एकीं पीनावयवमांसालें। एकें शुष्कें अतिविक्रालें।
एकें दीर्घकंठें वितालें। विकटें एकें।।१३९।।
एवं नानाविधाकृति। इयां पाहतां पारु नाहीं सुभद्रापति।
जेआंचां एकेकीं अंगप्रांति। देख पां जग।।१४०।।

"त्याचप्रमाणे विलक्षण आकृत्यांची माझी विविध रूपे आहेत. तीही तू पहा. मदनाने पण जी पाहून लज्जित व्हावे इतकी सुंदर अशी माझी काही रूपे पहा. काही रूपे म्हणजे जणू मूर्त लावण्यच आहेत. काही सुंदर बांध्याची आहेत, तर काही मृदुल तनुची आहेत. शृंगारलक्ष्मीचे भांडारच जणू असावे अशीही काही रूपे आहेत. काही रूपाकृती पुष्ट अवयव व मांसल असणारी आहेत. काही अतिविक्राळ तर काही अतिकृश अशीही आहेत. काही रूपे लांब मानांची आहेत. अतिभयंकर अश आकृत्यांची पण माझी रूपे पहा. हे सुभद्रापती! विविध आकृत्यांच्या माझ्या या रूपांचा अंत लागत नाही. त्या रूपाकृतींच्या एकाएका अवयवावर एकेक विश्व उभे आहे. तेही तू पहा!"

"इहैकस्थं जगत्कृत्स्नम्"

तसेच ऐक:

पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा।
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत।।११-६।।
इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम्।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि।।११-७।।

"आदित्य, वसू, रुद्र, अश्विनीकुमार, मरुद्गण इ.सर्व माझ्याठायी कसे वसतात, ते पहा. हे भरतकुलोत्पन्ना! पूर्वी कधीही न अवलोकिलेली अनेकानेक अद्भुते तू पहा! हे गुडाकेशा! चराचर असे सर्व विश्व आणि इतरही अनेक काही पाहण्याची तुझी इच्छा असेल, ते सर्व काही माझ्या शरीरात एका ठिकाणी स्थित आहे; ते सर्व पहा!"

जेथ उन्मीलन होत आहें दिठीं। तेथ पसरति आदित्यांचिआं सृष्टी।
पुढुति निमिलनिं मिठी। देत आहाति।।११-१४१।।
वदनिंचिआं वाफेसवें। होत ज्वालामय आघवें।
जेथ पावकादिक पावें। समूह वसूंचें।।१४२।।
आणि भ्रूलतांचें सेंवट। कोपों मिलों पाहति एकवट।
तेथ रुद्रगणांचे सांघात। अवतरत देख।।१४३।।
पैं सौम्यतेचां वोलावा। मिति नेणिजें अश्विनौदेवां।
श्रोत्रीं होतिं पांडवा। अनेग वायू।।१४४।।

"या माझ्या विश्वमूर्तीच्या दृष्टी उघडण्यात सूर्यमालिकांच्या अनंत सृष्टी पसरतात आणि दृष्टी मिटताच त्या मावळतात. मुखावाटे निघणाऱ्या बाष्पेमधून ज्वाला प्रकटतात आणि पावकादिक अग्नींचे समुदाय, तसेच अष्टावसूंच्या सृष्टी तेथे उत्पन्न होतात. आणि भुंवया जेथे मिळतात, तेथे क्रोधावेश दिसू लागताच रुद्रगणांचे संघातच्या संघात अवतीर्ण होतात. विश्वमूर्ती जेव्हा सौम्यत्व धारण करते, तेव्हा तिच्या स्नेहाळ भावातून अगणित अश्विनीदेवांची उत्पत्ती होते. श्रोत्रस्थानी तर कित्येक मरुद्गण, वायू होत जात असतात."

ययापरीं एकएकांचिएं लीलें। जन्मति सुरसिद्धांचिं कुळें।
आईसिं अपारें आणि विशालें। रूपें इयें पाहीं।।११-१४५।।
जेआंतैं सांघावेआं वेद बोबडें।
पाहावेआं कालाचें आयुखहिं थोकडें।
धातयांहिं परि न सांपडें। ठांओ जेआंचां।।१४६।।
जेआंतैं देवत्रयी कहिं नायकें। तियें इयें प्रत्यक्षें देखैं अनेगें।
भोगिं आश्चर्याचिं कवतुकें। महाऋद्धि।।१४७।।

"ज्याच्या एकाएका स्वरूपाच्या आविष्कारात देवगण व सिद्धादींच्या अनेकानेक कुळी जन्मतात अशी ही माझी अनंत विशाल रूपे तू पहा! हे अर्जुना! त्या रूपांचे वर्णन बोबडे वेद ते काय करू शकणार! आणि त्यांना पाहण्यास काळाचेही आयुष्य तोकडे पडेल! ब्रह्मदेवासही या रूपांचा अंत लागत नाही. जी रूपे ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रयीच्या ऐकिवातही नाहीत, अशी अनेकानेक विश्वरूपे प्रत्यक्ष पहा. हे अद्भुत तू उपभोग. हे महासिद्धींचे भांडार तुझ्यासाठी मी प्रकटवले आहे. ते पाहणारा तुझ्यासारखा तूच!"

"तंवं आर्त्तिचें लेणें लेईला। तैसांचि आहें"

इयां मूर्त्तिचिआं किरीटी। रोममूलीं देखें पां सृष्टी।
सुरतरुतलौटीं। तृणांकुर जैसें।।११-१४८।।
आणि वाताचेनि प्रकाशें। उडतां परमाणु दिसति जैसें।
भ्रमत ब्रह्मकटाह तैसें। अवयवसंधिं।।१४९।।
आणि एकैकाचिआं प्रदेशिं। विश्व देख विस्तारेंशिं।
आणि विश्वाहिं परौतें मानसिं। जन्हें देखावें वर्त्तें।।१५०।।
तन्हें तिएंहिं विखिंचे कहिं। एथ सर्वथा सांकडें नाहिं।
सुखैं आवडें तैं माझां देहिं। देखसि तूं।।१५१।।

"वृक्षातळी जसे अगणित तृणांकुर असतात, तद्वत माझ्या या विश्वरूपाच्या रोममुळात अनेकानेक सृष्टी कशा वसलेल्या आहेत, ते पहा! अर्जुना! कवडशातून हवेच्या झोतावर उडणारे अनेकानेक परमाणू जसे दिसावेत, त्याप्रमाणे दिसणारी अनंत ब्रह्मांडे माझ्या या रूपाच्या अवयवसंधिस्थानी तू पहा! या विश्वरूपाच्या एकेका भागावर संपूर्ण विस्तारलेली असंख्य विश्वेही तू पहा आणि त्या विश्वांच्याही पलीकडील जे काही आहे, तेही तुझी इच्छा असेल तर पहा! तुला जे काही पहावेसे वाटेल, ते तू पहा! तुझी इच्छा असेल, ते तुला माझ्या या विश्वमूर्तीठायी सहजच दिसेल!"

आईसें विश्वमूर्ति तेणें। बोलिलें कारुण्यपूर्णें।
तंवं देखत आहें कीं नाहि न म्हणें। निवांतचि एरुं।।११-१५२।।
एथ कां पां हा उगला। म्हणौनि कृष्णें जंवं पाहिलां।
तंव आर्त्तिचें लेणें लेईला। तैसाचि आहें।।१५३।।

"असे त्या करुणाघन विश्वमूर्ती श्रीहरीने पार्थास म्हटले आणि तो काय पाहत आहे, ते पहावे असा विचार करून भगवंत पार्थाकडे पाहू लागले, तर त्यांना असे दिसले की पार्थ उगीचच जसाच्या तसा बसून आहे. हा स्तब्धच असा का आहे, म्हणून कृष्ण त्याच्याकडे पाहू लागले, तेव्हा त्यांना असे दिसले की विश्वरूप पहावे या कामनेचा अलंकार लेवून पार्थ ते केव्हा दिसणार आहे, या उत्कंठेने व्याकुळलेला आहे."

मग श्रीकृष्ण म्हणू लागले की:

मग म्हणें उत्कंठें वोहट न पडे। अझुनि सुखाचि सोएं न सांपडे।
परि दाविलें तैं फुडें। नाकलेंचि येयां।।११-१५४।।
हें बोलोनि देओ हांसिलें। हांसौनि देखनिआं म्हणितलें।
आम्हीं विश्वरूप तन्हें दाविलें। परि न देखसिचि तूं।।१५५।।

ते पाहून श्रीकृष्णांना वाटले की "याची उत्कंठा जशीच्या तशीच आहे. याला विश्वरूप दाखवले तरी ते कळत नाही. म्हणून याला विश्वरूपदर्शनाचे सुख अजून मिळत नाही." श्रीकृष्णांना हसू आले. ते म्हणू लागले, "अर्जुना! तुला मी एवढे विश्वरूपासारखे दुर्लभ दर्शन घडवले. पण तू जसाच्या तसाच ते न पाहता निवांत बसून आहेस!"

ययां बोलां एरें विचक्षणें। म्हणितलें हां जि कवणासिं।
तुम्हीं बकाकरविं चांदिणें। चरऊं पाहा मां।।११-१५६।।
हां हों उटोनिआं आरिसा। आंधलिआं दाऊं बैसा।
बहिरिआपुढां हृषीकेशा। गाणिव करा।।१५७।।
मकरंदकणाचा चारा। जाणतां घालूनि दर्दुरा।
वायां धाडा शार्ङ्गधरा। कोपा कवणां।।१५८।।

हे ऐकून भांबावून गेलेला अर्जुन म्हणू लागला, "हे श्रीकृष्णा! हे तू काय म्हणतो आहेस! तू विश्वरूप दाखवूनही ते मला जर दिसत नसले, तर त्यात कोणाचा बरे दोष आहे! बगळ्याला चंद्रामृताचा उपभोग तुम्ही देऊ पाहत आहात! आरसा स्वच्छ घासूनपुसून आंधळ्याला दाखववा तसेच ते नाही का! हे हृषीकेशा! गायनाचा जलसा बहिऱ्यापुढे करावा; मकरंदकणांचा चारा बेडकांना खायला घालावा, असे तुमचे करणे झाले आहे. वायाच तुम्ही विश्वरूपदर्शन करण्याचा सोहळा केलात! मग कोपावे तरी कोणावर!"

जैं अतींद्रिय म्हणौनि व्यवस्थिलें।
केवल ज्ञानदृष्टिचिआं विभागां फिटलें।
तैं तुम्हीं चर्मचक्षुफुडां सूदलें। मी कैसेनि देखों।।११-१५९।।
परि हें तुमचें उणें न बोलावें। मीचि साहें तैंचि बरवें।
एथ आथि म्हणितलें देवें। मानूं बापा।।१६०।।

"हे शार्ङ्गधरा! जे विश्वरूप अतींद्रिय म्हणून ऐकण्यात येते, जे केवळ ज्ञानदृष्टीलाच गोचर होऊ शकते असे म्हणतात, ते तुम्ही माझ्या चर्मचक्षूंपुढे जर प्रकट केले, तर मला ते कसे पाहता येईल, सांगा बरे! पण तुमचा तरी त्यात काय दोष आहे, म्हणावे! आमच्या भाग्यात ते विश्वरूप तुम्ही दाखवूनही पाहण्याचे नसलेच तर काय करावे! उगीच मुकाट गप्प बसावे, तेच बरे!"

"दिव्यं ददामि ते चक्षु"

त्यावर श्रीकृष्णांच्या लक्षात आले की अर्जुन म्हणतो ते बरोबरच आहे. साध्या चर्मचक्षूंनी विश्वरूप दिसणे केवळ अशक्यच आहे. त्यावर श्रीकृष्ण त्याला म्हणतातः

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव चक्षुषा।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्।।११-८।।

"अर्जुना! खरे आहे तुझे म्हणणे! साध्या चर्मचक्षूंनी माझे हे विश्वरूप पाहता येणार नाही! तुला मी दिव्यदृष्टी देतो. त्यायोगे तू माझे हे दिव्य स्वरूप पहा. मज ईश्वराच्या योगसामर्थ्याने ते मी तुला दाखवणार आहे."

ते पुढे म्हणतातः

सांच स्वरूप जन्हैं आम्ही दावावें।
तन्हैं आधिं देखावेआं सामर्थ्य कीं देयावें।
परि बोलत प्रेमभावें। धसाल गेलों।।११-१६१।।
काएं जाहालें न वाहतां भुई पेरिजें। तन्हैं तो वेलु विलआं जाईजें।
तन्हैं आतां माझें निजरूप देखिजें। दृष्टी देवों तूझ।।१६२।।
मग तिआं दृष्टी पांडवा। आमुचा ऐश्वर्ययोगु आघवा।
देखौनिआं अनुभवां। माजिवटा करीं।।१६३।।
तैसें तेणें वेदांतवेद्यें। सकललोकआद्यें।
बोलिलें आराध्यें। जगाचेनि।।१६४।।

"अर्जुना! तुला माझे दिव्य स्वरूप दिसण्यासाठी खरे तर अगोदर ते दिसण्याचे सामर्थ्य द्यायला हवे होते. पण बोलण्याच्या भरात ते देण्याचे मी विसरूनच गेलो होतो. जमिनीची मशागत न करता बी पेरले, तर तसे करणे म्हणजे वेळेचा निव्वळ अपव्यय ठरतो. तसेच ते झाले. तुला माझे योगसामर्थ्य व त्यायोगे प्रकटणारे विश्वरूप पाहता येईल. तरी तुला ते दृश्य दिसेल अशी दृष्टी देऊ. त्याचा तो अनुभव तू आपल्या स्मृतिकोषात जतन करून ठेव."

"परब्रह्म हें सांवलें। भोगावेआं सदैव याचेचि डोलें"

संजय हे पाहत होता. तो धृतराष्ट्रास म्हणतोः

एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः।
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम्।।११-९।।

"हे राजा धृतराष्ट्रा! महायोगैश्वर्यसंपन्न अशा त्या श्रीहरीने अर्जुनाला आपले श्रेष्ठ ईश्वरी रूप दाखवले."

संजय पुढे सांगतोः

पैं कौरवकुलचक्रवर्ति। मज हाचि विस्मो पुढतपुढति।
जैं श्रियेहूनि त्रिजगतिं। सदैव असें कवणिं।।११-१६५।।

ना तऱ्हैं खुणेचें वानावेआंलागिं। श्रुतिवांचूनि दावा पां जगिं।
ना सेवकपण आंगिं। शेषाचांचि आथि।।१६६।।

"हे कौरवकुलचक्रवर्ती! हे धृतराष्ट्रा! श्रीकृष्णांचा हा अर्जुनाप्रतिचा स्नेहभाव पाहून मला फारफार नवल वाटते. लक्ष्मीपेक्षा अधिक भाग्यवंत इतर कोणी दाखवा बरे! आणि श्रीहरीने अंतरीचे आपले गुह्य ज्याला सांगावे, असा वेदांहूनही श्रेष्ठ अधिकारी कोणता बरे दाखवता येईल! बरे! सेवावृत्तीत शेषापेक्षा सरस कोणीतरी असेल का!"

हां हो जेआंचेनि सोसें। शिणत आठहिं पाहार योगी जैसें।
अनुसरलें गरुडाआईसें। कवण आहे।।११-१६७।।
परि तैं आघवेंचि एकीकडें ठेलें।
सापें कृष्णसुख एकंदरें जाहालें।
जिएं दिऊनि जन्मलें। पांडव हें।।१६८।।

"योगी ज्याच्या प्राप्तीसाठी आठही प्रहर दक्ष असतात, त्या श्रीहरीसाठी गरुडापेक्षा अधिक झटणारे योगवरिष्ठ कोणीतरी दिसतात का! पण हे सर्व एकीकडे राहून सांप्रत मात्र श्रीकृष्णाचे सुख त्या पांडवांठायीच समावलेले आहे. अगदी ज्या दिवशी हे पांडव जन्माला आले, तेव्हापासून श्रीकृष्णाचा सगळा ओढा त्यांच्याचकडे आहे. असे काय महत्पुण्य या पांडवांनी केले होते कोण जाणे!"

परि पांचांहिं आंतु अर्जुना।
कृष्ण सांविआंचि जाहाला अधिना।
कामुक कां जैसा अंगना। आपैता कीजैं।।११-१६९।।
पढविलें पांखिरूं आइसें न बोलें।
ययापरी क्रीडामृगहिं तैसा न चलें।
कैसें दैव एथ सुरवाडलें। तैं जाणों न एं।।१७०।।

"त्यातूनही त्या पाचही पांडवांमधल्या अर्जुनाची गोष्ट तर विचारूच नका! कामुक पुरुषास स्त्री जशी आपल्या मुठीत ठेवते, तसाच हा श्रीकृष्णही अर्जुनाच्या सहज अधीन झालेला दिसतो. शिकवलेला पक्षी पण आपण म्हणू ते एकवेळ बोलणार नाही; पाळलेले हरीणही आपल्या मागेमागे हवे तसे कदाचित येणार नाही; इतका हा श्रीकृष्ण अर्जुनास वश झाला आहे. अर्जुनाचे नशिब इतके फळफळलेले आहे की त्याला काहीच तोड नाही.

आजि परब्रह्म हें सांवलें। भोगावेयां सदैव याचेचि डोलें।
कैसें वाचेचें हन ललें। पालित असें।।११-१७१।।
हा कोपें किं निवांतु साहें। हा रुसें तऱ्हैं बुझावित जाएं।
नवल पिसें लागलें आहे। पार्थाचें देवा।।१७२।।

"परब्रह्माचे हे सावळे रूप भोगणारे एकमेव नेत्र त्याचेच आहेत! आणि याच्या वाचेचे हवे ते लाडलळे तो श्रीहरी पुरवीत आहे. याला राग आला तरी श्रीकृष्ण तो निवांतपणे सहन करतो अन हा रुसला तर त्याची हवी तितकी मनधरणी पण करण्यात श्रीकृष्ण मागेपुढे पाहत नाही! मला राहूनराहून याचेच नवल वाटते की या कृष्णाला पार्थाचे कसे हे एवढे वेड लागले आहे!"

"मग दिव्यचक्षु प्रकटला"

एरविं विषों हें जिणौनि जन्मलें। जैं शुकादिक दादुलें।
तैं विषयोचि वानितां जाहालें। भाट एयाचें।।११-१७३।।
हा योगियांचें समाधिधन। कीं होऊनि ठेलें पार्थाअधीन।
एयांलागिं विस्मो माझें मन। करीतसें राया।।१७४।।

"शुकादिक महामुनी इंद्रियजय पावूनच जरी जन्माला आले असले, तरी त्यांनाही श्रीकृष्णाच्या विषयविलासांचे वर्णन करण्यात धन्यता वाटते! आणि योग्यांचे समाधिधनच असा हा श्रीहरी आहे. हा आपण होऊन पार्थाच्या इतका अधीन झाला आहे की विचारता सोय नाही! हे राजा धृतराष्ट्रा! मला राहूनराहून याच गोष्टीचे आश्चर्य वाटते आहे की हे असे कसे घडले असावे!"

तेंविंचिं संजयो म्हणें काईसां। विस्मो एथ कौरवेशा।
कृष्णें स्वीकारिजैं तेआं आईसा। भाग्योदयो होएं।।११-१७५।।
म्हणौनि तो देवांचा राओ। म्हणें पार्था तैं तूझ दृष्टी देवों।
जेआं विश्वरूपांचा ठाओ। देखसि तूं।।१७६।।

हे आश्चर्य प्रकट करणारा संजय पुढे आपणच म्हणतो की, "हे कौरवेशा! पण यात खरे तर आश्चर्य करावे असे काय आहे! श्रीकृष्णाने ज्याला एकदा का आपला म्हणून अंगिकारले, त्याचा असाच भाग्योदय होणार नाही का! त्याला विश्वरूप पाहण्याचे अतींद्रिय सामर्थ्य श्रीकृष्ण नक्कीच पुरवणार!" म्हणून तो श्रीहरी पार्थाला म्हणू लागला की, "ज्यायोगे तुला विश्वरूप आद्यंत पाहता येईल अशी दिव्यदृष्टी मी तुला देतो, पहा!"

आईसिं श्रीमुखौनि आखरें। निघति ना जंवं एकसरें।
तंवं अविद्याचेनि आंधारें। जावोंचि लागें।।११-१७७।।
ती आखरें नव्हति देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका।
अर्जुनालागिं चित्कलिका। उजललिआं श्रीकृष्णें।।१७८।।
मग दिव्यचक्षु प्रगटला। तेआं ज्ञानदृष्टी फांटा फुटला।
एयांपरी दावितां जाहाला। ऐश्वर्य आपुलें।।१७९।।

"अशी अक्षरे भगवंताच्या मुखातून बाहेर पडतात न पडतात, तोच अर्जुनाच्या दृष्टीपुढील अविद्येचे तिमिर नाहीसे होऊ लागले. ती अक्षरे अशी नव्हतीच! खरे तर अर्जुनासाठी श्रीकृष्णाने त्या अक्षरांच्या रूपाने ज्ञानज्योतीच उजळून प्रकटवली होती. तिच्या प्रकाशाने परब्रह्माचा अवघा प्रांतच प्रकाशला गेला. अर्जुनास दिव्यदृष्टी लाभली. ज्ञानदृष्टीचा उदय झाला आणि त्याच्यापुढे श्रीकृष्ण आपले विश्वरूपाचे ऐश्वर्य प्रकटवू लागले."

"विश्वरूपकवतुकीं पार्थु लोलें"

विश्वरूप म्हणजे काय व ते कसे असते, याचा उलगडा *अकरावा* अध्याय पाहतांना होत जातो. या विश्वातील यच्चयावत चेतन-अचेतन सृष्टी, मूर्त-अमूर्त, क्षुद्रातिक्षुद्र ते भव्यातिभव्य, व्यक्त-अव्यक्तादी,

साकार-निराकार वस्तुजातादी, कृमिकीटक ते देवदानवादी, यक्षराक्षसभूतगणादी जे जे काही आहे, त्या सर्वांचे मिळून हे विश्वरूप आहे.

गीतेत हे विश्वरूप दाखवतांना याच संकल्पनेचा उपयोग केलेला आहे व म्हणूनच हे रूप आविष्कारतांना ***"नानाविधानि दिव्यानि", "पश्यादित्यान्वसून्रुद्रान्", "इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम्"*** इ.वचनांद्वारे ते मूर्त केले गेले.

परंतु भगवंत ***"विश्वरूपाचा ठाओ (११-१७६)"*** दाखवत आहेत म्हणजे या विश्वरूपाचे आदि जे आहे, ते आता पार्थापुढे प्रकट करत आहेत. त्याविषयी संजय म्हणतोः

हें अवतार जैं सकल। तैं जिएं समुद्रींचें कल्लोल।
विश्व हें मृगजल। जेआं रश्मीस्तंव दिसें।।११-१८०।।
जिएं अनादिभूमिकें नीटें। चराचर हें चित्र उमटें।
आपणपें वैकुंठें। दाविलें तेआं।।१८१।।

संजय सांगू लागलाः "ज्या चैतन्यसमुद्रावरील लाटा म्हणजे भगवंतांनी धारण केलेले अनेक अवतार होत; ज्या चैतन्याच्या किरणांमुळे हे विश्वरूपी मृगजळ भासून येते; ज्या मूळ अनादिभूमिपटावर या चराचराचे चित्र उमटते; ते आपले निजस्वरूप मग श्रीकृष्णांनी अर्जुनाला दाखविले."

माघां बालपणीं एणें श्रीपति। जैं एक हेल खादिलीं होति माती।
तैं कोपौनिआं हातिं। यश्वदें धरिलां।।११-१८२।।
मग भेणें भेणें जैसें। मुखिं झाडा द्यावयाचेनि मिसें।
चवदांहिं भुवनें सावकासें। दाविलीं तिएं।।१८३।।
ना तन्हें मधुवनिं ध्रुवासिं केलें। जैसें कपोल शंखें सिवतलें।
आणि वेदांचिएंहि मति ठेलें। तैं लागला बोलों।।१८४।।

"या श्रीपतीने लहानपणी एकदा तोंडात माती घातली होती, तेव्हा त्याला यशोदामाता रागे भरली होती. त्या वेळी आपल्या तोंडात माती कुठे आहे, ते पहा म्हणत त्याने आईला भ्यायल्याचा आव आणून रडतरडत आपले मुख उघडून दाखविले आणि त्याठायी तिला विश्वातील चवदाही भुवने दाखवून कृतार्थ केले होते. तसेच पूर्वी मधुवनात तपश्चर्या करणाऱ्या ध्रुवबाळाच्या गालाला आपल्या हातातील शंखाचा स्पर्श करून त्याच्या तोंडातून वेदांचीही मती गुंगवून टाकतील असे बोल प्रकट करविले होते."

तैसा अनुग्रहो पैं राया। श्रीहरी केला धनंजया।
आतां कवणिकडेंहि माया। आईसिं भाख नेणें तो।।११-१८५।।
एकसरें ऐश्वर्यतेजें पाहलें। तेआं चमत्काराचें एकार्णव जाहालें।
चित्त समाजिं बुडौनि ठेलें। विस्मयाचां।।१८६।।
जैसा आब्रह्म पूर्णोदकीं। पव्हें मार्कंडेय एकाकी।
तैसा विश्वरूपकवतुकीं। पार्थु लोलें।।१८७।।

"हे राजा धृतराष्ट्रा! आता पण त्या श्रीहरीने तसाच अनुग्रह अर्जुनावर केला. म्हणून त्याला कोणीचकडे मायेची भाषा ओळखू येईनाशी झाली. भगवंताच्या ऐश्वर्यतेजाचा प्रकाश त्याच्या दृष्टीपुढे अकस्मात फाकला. कल्पांती जशी सर्व सर्व सृष्टी प्रलय पावते आणि तेथे एकचएक समुद्र प्रकटतो, तसेच सर्व विश्वाचा लोप त्या भगवत्तेजामध्ये होऊन अर्जुनासमोर केवळ त्या तेजार्णवाचे अस्तित्व केवळ उरले. आणि त्या भगवदैश्वर्यतेजाच्या लोंढ्यामुळे त्याचे चित्त विस्मयात बुडून गेले. कल्पांती जेव्हा ब्रह्मापर्यंत तुडुंब उदकच उदक भरते, त्यात मार्कंडेय जसा कौतुकाश्चर्याने पोहतो, तसेच अर्जुनाचेही झाले. तोही त्या विश्वरूपात्मक निजस्वरूपाच्या तेजोमय लाटांवर लोळू लागला."

"श्रीकृष्णें सोहोळा। पुरविला आईसा"

आश्चर्यमग्न होऊन तो म्हणू लागलाः

म्हणें केवढें एथ गगन होतें। तैं कवणें नेलें पां केऊतें।
ती चराचर महाभूतें। काईं झालीं।।११-१८८।।
दिशांचें ठाओहिं हारपलें। अधोर्ध्व काइं नेणों जाहालें।
चेईलिआं स्वप्न तैसें गेलें। लोकाकार।।१८९।।
नाना सूर्यतेजप्रतापें। सचंद्र तारांगण जैसें लोपें।
तैसिं गिलिलीं विश्वरूपें। प्रपंचरचना।।१९०।।

विस्मित होऊन अर्जुन विचारात पडला की, "विशाल असे जे गगन आताच येथे होते, ते कोणी कोठे नेऊन घातले, कळेना! आणि स्थावरजंगम सृष्टीसह ती सर्व पंचमहाभूते कोठे अदृश्य झाली! अष्टदिशांचा मागमूसही उरलेला दिसत नाही. अध आणि ऊर्ध्व यांचा तर मेळच बसत नाही! या दिशा पण कोठे अंतर्धान पावल्या ते कसे कळावे! जागृती आली की स्वप्न जसे नाहीसे होते, तसे हे समस्त लोक आणि साकारलेली सृष्टी नाहीशी झाली वाटते! किंवा सूर्याचे तेज फाकताच त्याच्या प्रभावामुळे चंद्रासह जसे सगळे तारकामंडल लोप पावते, त्याप्रमाणे तर या विश्वरूपाने ही सर्व सृष्टीरचना गिळून नाही ना टाकली!"

तेधवां मनासिं मनपण न स्फुरैं। बुद्धि आपणपें न सांवरैं।
इंद्रियांचें रश्मी माघारैं। हृदयवरी भरलें।।११-१९१।।
तेथ ताटस्थ्या ताटस्थ्य पडिलें। टकासिं टक लागलें।
जैसें मोहनास्त्र घातिलें। विचारजातां।।१९२।।

"दिङ्मूढ झालेल्या त्याच्या तशा त्या अवस्थेत मनाला मनपण स्फुरेना! बुद्धीही आपली आपणाला सावरेना! आणि इंद्रियांतील चेतनास्त्रोत माघारे वळून मुळस्थानी परतलें! तटस्थतेलाही ताटस्थ्य प्राप्त व्हावे; स्तिमिततेलाही स्तिमितता यावी; विचारजातांवर मोहनास्त्र घालावे; अशी त्याची अवस्था झाली."

तैसा विस्मितु पाहें कोडें। तंव फुडां होतें चतुर्भुज रूपडें।
तैंचि नानारूप चहूंकडे। मांडूनि ठेलें।।११-१९३।।
जैसें वर्षाकालींचे मेघौडें। कां महाप्रलयींचें तेज वाढें।
तैसें आपणेनविण कवणिकडें। नेदींचिं उरों।।१९४।।

"आश्चर्यातिरेकाने स्तिमित होऊन तो सहजच इकडेतिकडे पाहू लागला की तो श्रीकृष्ण तरी कोठे दिसतो का, तर ते चतुर्भुज आवडते रूप त्याच्याचपुढे उभे होते आणि नाना रूपे धारण करून तेच रूप सर्वत्र भरून गेले होते. वर्षाऋतूत येणारी मेघडंबरी जशी नभांगणात आपल्याशिवाय काही उरू देत नाही; अथवा महाप्रळयकाळचे तेज जसे सर्व ग्रासून एकटे आपणच शिल्लक राहते; त्याप्रमाणे त्या विश्वरूपाने आपल्याव्यतिरिक्त इतर काहीच राहू दिले नाही."

प्रथम स्वरूपसमाधान। पावौनि ठेला अर्जुन।
सवेंचि उघडी लोचन। तंव विश्वरूप देखैं।।११-१९५।।
इहींचिं देहीं डोलां। पहावें विश्वरुप सकलां।
तोहिं श्रीकृष्णें सोहोला। पुरविला आईसा।।१९६।।

"दिलेल्या दिव्यदृष्टीने निजस्वरूप पाहून समाधान पावलेला अर्जुन पुनश्च ते स्वरूप पाहू लागला, तो त्याला सर्वत्र ते विश्वरूप दिसू लागले. निजस्वरूप, विश्वरूप आणि सर्व चराचर सृष्टी यात एकलीएक ती चेतना कशी ओतप्रोत भरून राहिली आहे, याचा दिव्य साक्षात्कार पावून अर्जुन धन्य झाला!"

"याचि देहीं याचि डोळां" विश्वरूप पाहण्याचा सोहोळा श्रीकृष्णाने असा इत्थंभूत पुरवला!

अनंताचे दर्शन

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम्।
अनेकदिव्याभरणं दिव्यनेकोद्यतायुधम्।।११-१०।।
दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम्।
सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम्।।११-११।।

"अनेक मुखे व अनेक नयन असणारे, अनेक आश्चर्यजनक अद्भुत दर्शने व अनेकानेक दिव्यालंकारयुक्त, अनेक दिव्य वस्त्रे ल्यायलेली रूपे असणारे, अनेक दिव्य आयुधे धारण केलेले उगारलेले अनेक हस्त असणारे, दिव्य पुष्पमाला व दिव्य गंधाची उटी धारण केलेले असे सर्व आश्चर्यांनी युक्त, अनंत, सर्वतोमुख असे ते दिव्य विश्वरूप होते."

मग तेथ सैंघ देखैं वदनें। जैसिं रमानायकाचिं राजभुवनें।
नाना प्रकटलीं निधानें। लावण्य श्रियेचिं।।११-१९७।।
कां आनंदाचिं वनें सासिन्निलीं। जैसिं सौंदर्या राणिव जोडिलीं।
तैसिं मनोहरें देखिलीं। हरीचिं वक्त्रें।।१९८।।

"अर्जुनास त्याठायी अनेक मुखे दिसली. विश्वरूपाची ती मुखे म्हणजे जणू श्रीहरीची राजभुवनेच असावीत, इतकी रमणीय दिसत होती. ती मुखे म्हणजे जणू सौंदर्यलक्ष्मीची प्रकटलेली भांडारेच असावीत, तशी भासत होती. आनंदाचे बहरलेले उद्यान असावे, सौंदर्याचे राज्यच असावे, अशी ती हरीची मुखे अति मनोहर होती."

तेआंहिं माझिं एकैकें। साविआंचिं भयानकें।
कालरात्रिचिं कटकें। उठावली जैसिं।।११-१९९।।
कीं येंमृत्यूसिचिं मुखैं जाहालीं। हो कां भयाचिं दुर्गें पन्नासिलीं।
कीं महाकुंडें उघडिलीं। प्रलयानलाचिं।।२००।।
तैसिं अद्भुतें भयासुरैं। तेथ वदनें देखिलीं वीरैं।
आणिकें असाधारणें सालंकारें। सौम्यें बहुतें।।२०१।।

"पण आणखी इतरही मुखे त्या विश्वरूपास होती. ती अति विकट होती. काळरात्रीची सैन्येच असावीत अशी ती भयानक होती. मृत्युचेच जबडे वासलेले जणू दिसत होते त्या मुखांच्या रूपाने! अथवा साक्षात भयदुर्गच मांडलेले असावेत किंवा प्रळयाग्नीची धडाडून पेटलेली कुंडेच भासावीत, अशी ती अद्भुत भीषण मुखे अर्जुनास दिसली. आणि अलंकारांनी युक्त सौम्यशी अशीही असाधारण अनेकानेक मुखे त्यास दिसली."

ज्ञानदृष्टिचेनि अवलोकें। परि वदनांचां सेंवटु न टकें।
मग लोचन तैं कवतुकें। लागला पाहों।।११-२०२।।
तंव नानावर्ण कमलवनें। कीं विकासिलीं जैसिं अर्जुनें।
डोलें देखिलें पालिंगनें। आदित्यांचि।।२०३।।

"प्राप्त झालेल्या दिव्य अशा ज्ञानदृष्टीने ती तो पाहत होता. पण तरीही त्याला त्या तोंडांचा अंत काही लागत नव्हता. म्हणून मुखे पाहण्याचा नाद त्याने सोडून दिला आणि तो विश्वरूपाचे नेत्र पाहू लागला. ते पाहून त्याचे डोळे आश्चर्यातिरेकाने विस्फारले गेले. अनंतरंगांच्या कमलांचे प्रफुल्लित झालेले ताटवे असावेत इतके सुंदर ते हरीचे नेत्र होते. आदित्यांचे समुदायच त्याच्यात प्रकटले होते."

तेथेंचि कृष्णमेघांचिएं दाटी-। माझीं कल्पांत विजूंचिआं स्फुटी।
तैसिआं वह्नि पिंगला दिठीं। भ्रूभंगातलीं।।११-२०४।।
हें एकैक आश्चर्य पाहतां। तिएं एकेंचि रूपें पांडुसुता।
दर्शनाचि अनेगता। प्रतिफललीं।।२०५।।

"इतके तेजस्वी नेत्र पाहतांना सहजच त्याची दृष्टी भुवयांच्या मध्यभागाकडे गेली. तेव्हा घनमेघांतून वीज चमकावी तशी विस्तवाप्रमाणे पिंगट वर्णाची दृष्टी त्यातून बाहेर पडतांना दिसली. त्या दृष्टीचे तेज पाहून चकित झालेल्या अर्जुनास विश्वरूपाचे अजूनही अनेक अंगांनी दर्शन घडले. ते बहुविध दर्शन पाहून तो हरखून गेला."

विश्वतोमुखाचे दर्शन

त्याला वाटू लागले की:

मग म्हणें चरण तैं कवणिकडें। केऊतें मुकूट कीं दोर्दंडें।
आईसिं वाढविताहे कोडें। चाड देखावेयाचिं।।११-२०६।।
तेथ भाग्यनिधि पार्था। कां विफल होईल मनोरथा।
काय पिनाकपाणिचां भाता। वायकांडी आहाति।।२०७।।

"या विश्वरूपाचे चरण कोणीकडे आहे आणि मुकुट कोठे दिसतात; त्याच्या बलशाली भुजा कोणीकडे आहेत, तेही पाहू या." विश्वरूपाची अशी अंगप्रत्यंगे पाहण्याची इच्छा अर्जुनाच्या मनात उत्पन्न न झाली तरच नवल! त्याचे तेही कोड श्रीकृष्णाने पुरविले. अर्जुन श्रीकृष्णांचा लाडका असल्याने त्याचे कोणते बरे मनोरथ असफळ होतील!

साक्षात भाग्याचा ठेवाच असावा, तसा तो झाला होता! पिनाकपाणी शंकराच्या भात्यामध्ये कधी फुसके बाण असतील का!"

ना तऱ्हैं चतुराननाचिएं वाचें।
आहाति लटकिआं आखरांचें सांचें।
म्हणौनि साद्यंतपण अपारांचें। देखिलें तेणें।।११-२०८।।
जेआंचि सोएं वेदां नाकळें। तेआंचें सकलावयव एकेंचि वेळें।
अर्जुनाचे दोनिं डोळें। भोगितें जाहालें।।२०९।।

"ब्रह्मदेवाच्या मुखातील वैखरीत कधी असत्य वाचेचा प्रादुर्भाव असेल काय! भाग्यनिधी अशा त्या पार्थाचे सगळेच मनोरथ पूर्ण झाले, त्यात काहीच शंका नाही! म्हणूनच त्या अपार विश्वरूपाचे आदि आणि अंत दोन्हीही त्याला पाहण्यास लाभले.ज्याचा थांग वेदांनाही लागत नाही, त्याच्या सर्व अवयवांना साद्यंत पाहण्याचे भाग्य अर्जुनाच्या नेत्रांस लाभले!"

चरणौन मुकुटवेरीं। देखतु विश्वरूपाचिं थोरी।
जैं नाना रत्न आलंकारिं। मिरवित असें।।११-२१०।।
परब्रह्म आपुलेनि आंगें। ल्यावया आपणचि जाहाला अनेगें।
तिएं लेणीं मी सांधैं। काईसयासारिखी।।२११।।
जिएं प्रभेचिएं झलालां। उजालु चंद्रादित्युमंडलां।
जैं महातेजाचां जिव्हाला। जेणें विश्व प्रकटें।।२१२।।
तो दिव्यतेज शृंगारु। कोणाचिएं मतिसिं होएं गोचरु।
देओ आपणपेंचि लेईलें आईसें वीरु। देखत असें।।२१३।।

"नाना रत्नालंकारांनी युक्त अशा त्या विश्वरूपाचे ऐश्वर्य चरणांपासून तो मुकुटांपर्यंत यथासांग असे अर्जुनाने पाहिले. आपल्या शरीरावर धारण करण्यासाठी परब्रह्म स्वतःच जेथे त्या अलंकारस्वरूप झाले, तेथे त्या रत्नालंकारांचे वर्णन माझ्यासारख्या पामराने ते काय करावे! ज्या प्रभेच्या झळाळीमुळे चंद्रसूर्यांना तेज प्राप्त होते; महातेजाचाही जी प्रभा प्राण आहे; ज्या प्रभेतूनच हे अवघे विश्व प्रकट झाले आहे; त्या प्रभेच्या दिव्य तेजाने मंडित झालेले ते अलंकार देव ल्यायला होता. त्या शृंगाराचे वर्णन करणे कोणाच्या बुद्धीच्या आवाक्यात येईल!"

आपण आंग आपण अलंकार। आपण हाथ आपण हाथिएर।
आपण जीव आपण शरीर।
देखैं चराचर कोंदिलें देवें।।११-२१४।।

"श्रीकृष्ण परब्रह्म स्वतःच त्या विश्वरूपाचा देह आणि अंगांग झाले होते. धारण केलेले अलंकारही ते स्वतःच झाले होते. त्या विश्वरूपाचे हात आणि त्यात धरलेली आयुधे ते स्वतःच झाले होते. एवढेच काय! तर त्या विश्वरूपाचे शरीर आणि जीव असे सर्व काही ते परब्रह्मच झाले होते. त्यामुळे त्याचे वर्णन करणे वाचेच्या अतीत आहे!"

मग तेथचि ज्ञानाचां डोलां। पाहात करपल्लवां जंवं सरला।
तंवं तोडित कल्पांतिचिआं ज्वालां।
तैसिं शस्त्रें झलकति देखें।।११-२१५।।
जेआंचिआं किरणांचेनि निखरेपणें। नक्षत्रांचें होत फुटाणें।
तेजां खिरडलां वह्नि म्हणें। समुद्रीं रिघौं।।२१६।।
मग कालकूटकल्लोलीं कवलिलें। नाना महावीजूंचें दांग उमटलें।
तैसें अपार कर देखिलें। उदितायुधिं।।२१७।।

"दिव्य ज्ञानदृष्टीने अर्जुन जेव्हा हे सर्व पाहू लागला, तेव्हा सहजच त्या विश्वतोमुखाच्या लांबसडक हातांकडे त्याची दृष्टी गेली. कल्पांतीच्या अग्निज्वाळांहूनही दाहक आणि तेजस्वी अशी अनेकानेक शस्त्रे त्या अनंत हस्तांमध्ये धारण केलेली त्याला दिसली. त्यांच्या किरणांची प्रखरता पाहून अग्नीसुद्धा खिरून जावा आणि त्याने समुद्री लाजेने प्रवेश करावा, अशी ती शस्त्रे दैदिप्यमान होती. त्या शस्त्रांच्या तेजापुढे नक्षत्रांचे फुटाणे व्हावेत, इतकी ती तेजस्वी होती. आयुधे उगारलेले ते अगणित कर काळकूट विषाच्या लाटांवर लाटा उचंबळाव्यात; प्रळयकाळच्या तडिताघातांचे प्रचंड तांडव व्हावे, तसे काळजाचे पाणीपाणी करणारे वाटत होते"

कीं भेणें तेथूनि काढिलीं दिठी। मग कंठमुगुट पाहातसें किरीटी।
तंवं सुरतरूंचि सृष्टी। जेआपासौनि जाहाली।।११-२१८।।
जिएं महासिद्धीचि मुलपीठें। शिणलीं कमला जेथ वावटें।
तैसिं कुसुमें अतिचोखटें। तुरंबिलीं देखैं।।२१९।।
मुगुटावेरी स्तबक। ठाईं ठाईं पूजाबंध अनेग।
कंठीं रुलताति अलौकिक। मालादंड।।२२०।।

"त्या दृश्यास घाबरून अर्जुनाने त्या आयुधधारी हस्तांवरली दृष्टी काढली आणि तो त्या विश्वमूर्तीचे कंठमुकुटादी पाहू लागला. महासिद्धींची मूळ पीठे अशी, कल्पवृक्षांची ज्यांपासून सृष्टी झाली आणि ज्यांच्या उद्यानात शिणलेली कमला विसावा घेते, ती अतिशुद्ध सुमने त्या विश्वरूपाने मस्तकी धारण केलेली त्याला दिसली. मुकुटांवर त्या फुलांचे झेले होते. ठिकठिकाणी ती फुले पूजा करतांना वाहावीत, तशी वाहिलेली होती. आणि त्या विश्वमूर्तीच्या कंठी अलौकिक पुष्पमाळा रुळत होत्या. ते अतिप्रसन्न व मनोहारी दर्शन पाहून पार्थ धन्य झाला."

विश्वरूपाची शृंगारशोभा

स्वर्गे सूर्यतेज वेढिलें। जैसें पंधरेनें मेरुतैं मढिलें।
तैसें नितंबावरी गढिलें। पीतांबरु झलकें।।११-२२१।।
श्रीमहादेओ कापुरें उटिला। कां कैलासु पारदें डंवरिलां।
नाना क्षीरोदकें पांघुरविला। क्षीरार्णव जैसा।।२२२।।
जैसिं चंद्रम्याचिं घडी उपलविलीं।
मग गगनाकरविं बुंथि घालविलीं।
तैसिं चंदनपिंजरीं देखिलीं। सर्वांगिं तेणें।।२२३।।

"आकाशाने सूर्यप्रभेची सोनसळी वेढून घ्यावी; शुद्ध सोन्याने सुवर्णखचित मेरुपर्वतास मढवावे, तशी त्या विश्वमूर्तीच्या नितंब-जघन, उरूभागी पीतांबर झळकत होता. हिमगौर शंभूने कापुराची उटी लावावी; औषधींनी व्यापलेल्या कैलासपर्वतास महौषधी अशा पारदाचा लेप करावा; क्षीरसागरास क्षीरोदकाचे पांघरूण घालावे;

चंद्राच्या ज्योत्स्नाप्रकाशाच्या शेल्याची घडी उलगडून आकाशाकडून तो पांघुरावा; त्याप्रमाणे रमणीय दिसणाऱ्या चंदनाच्या उटीने चर्चित असे ते विश्वरूप अर्जुनास दिसू लागले."

जेणें स्वप्रकाशा कांति चढे। ब्रह्मानंदाचा निदाघु मोडे।
जेआंचेनि सौरभ्यें जिवित जोडें। वेदवतिएं।।११-२२४।।
जेआंचें निर्लेप अनुलेपु करी। जैं अनंगुहिं सर्वांगिं धरीं।
तेआं सुगंधाचिं थोरी। कवण वानिं।।२२५।।

"स्वरूपाचा प्रकाश ज्यायोगे कांतिमान होतो; ब्रह्मानंदाचा दाह ज्यामुळे शमतो; ज्याच्या सुवासाने पृथ्वीला गंधवती असे म्हटले जाते; ज्याचा अनुलेप निर्लेप असे ब्रह्मही धारण करत असते; अनंग असा मदनही ज्या चंदनगंधास धारण करतो, त्या सुगंधाची थोरवी मी किती सांगू!"

आईसिं एकैक शृंगारशोभा। पाहातां अर्जुनु जातसें क्षोभा।
तेविचिं देओ बैसला कीं उभा। कां सेयांतु हें नेणवें।।११-२२६।।
बाहेर दिठी उघडौनि पाहें। तऱ्हें आघवें मूर्तिमयु देखतु जाएं।
मग आंतु न पाहें म्हणौनि उगा राहें।
तऱ्हें आंतुहिं तैसेंचि।।२२७।।
अनावरें मुखैं समोर देखैं। तयाभेणें पाठिमोरा जंवं ठाकें।
तंवं तेयांहिकडें श्रीमुखैं। करचरण तैसेचि।।२२८।।

"विश्वमूर्तीचा शृंगार पाहणारा अर्जुन जसजसा ती शोभा निरखून पाहू लागला, तसतसा तो अचंब्यात पडत होता आणि ती मूर्ती उभी आहे की बसलेली आहे, अथवा ती शयन करत आहे, हे पाहू जाता ती कशी आहे, ते पण त्याला कळेनासे झाले. डोळे उघडून पाहावे, तर ती मूर्ती सर्व विश्व व्यापून होती आणि डोळे मिटावे म्हटले तरीही अंतःश्चक्षूंसमोरही सर्व अवकाश व्यापून तीच मूर्ती दिसत होती. विलक्षण रूपांची ती मूर्ती समोर उभी होती. तिला भिऊन तो पाठमोरा वळला, तर तिकडेही तशीच मुखे, कर-चरण दिसत होते."

अहों पाहातां किर प्रतिभासें। एथ काईं नवलाओ काईं असें।
परि न पाहातांहिं दिसें। चोज आईका।।११-२२९।।
कैसें अनुग्रहाचें करणें। पार्थाचें पाहाणे आणि न पाहाणें।
तेआंहिंसगट नारायणें। व्यापूनि घातिलें।।२३०।।
म्हणौनि आश्चर्याचां पुरीं एकीं। पडिलां ठायेंठांव थडी ठाकी।
तंवं चमत्काराचिंएं आणिकीं। महार्णविं पडे।।२३१।।
आईसा अर्जुनु असाधारणपणें। आपुलिआं दर्शनाचेनि विंदाणें।
कवलुनि घेतिला तेणें। विश्वरूपें।।२३२।।

"डोळे उघडे ठेवून पार्थास ते विश्वरूप दिसत होते, त्यात काही नवल नाही. पण डोळे मिटूनही ते तसेच दिसत होते, हे खरे आश्चर्य तेथे प्रवर्तले! श्रीकृष्णांचा अनुग्रह केवढा सामर्थ्यशाली होता! त्याने विश्व अंतर्बाह्य नारायणस्वरूप करून टाकले पार्थासाठी! आश्चर्याच्या महानदात त्यास त्या अनुभूतीने बुडवून टाकले. कसाबसा त्याच्या किनाऱ्याला तो लागतो न लागतो, तोच चमत्कारांच्या समुद्रात तो फेकला जाई! अर्जुनास त्या अनंतरूपाने आपले असे दर्शन देऊन विश्वरूपात कवळून घेतले."

तो विश्वतोमुख स्वभावें। आणि तैंचि दाखवावेआंलागिं पांडवें।
प्रार्थिला आतां आघवे। होऊनि ठेला।।११-२३३।।
आणि दीपें कां सूर्य प्रगटें। अथवा निमुटिलिआं देखावेंचि खुंटें।
तैसिं दिठीं नव्हेंचि वैकुंठें। दिधलीं आहे।।२३४।।
म्हणौनि किरीटीसि दोहीं परीं। तैं देखणें देखैं आंधारीं।..।।२३५।।

"स्वभावतःच विश्वतोमुख असणाऱ्या त्या भगवंतास अर्जुनाने विश्वरूप प्रकट करावे, अशी प्रार्थना केल्यावर दुसरे काय होणार! तो विश्वव्यापी होऊन राहिला आणि अर्जुनास अंतर्बाह्य असे त्या विश्वरूपाने व्यापून टाकले! कारण त्याला जी दिव्य दृष्टी दिली होती, तिचे स्वरूपच तसे होते. ती दृष्टी काही सूर्यप्रकाशात किंवा दीपप्रकाशातच पाहू शकेल आणि त्यांअभावी काहीच पाहू शकणार नाही, अशा प्रकारची स्थूल दृष्टी थोडीच होती! म्हणून पार्थाला डोळे मिटल्यावरही ते विश्वरूप जसेच्या तसेच दिसत होते."

..।हें संजयो हस्तिनापुरीं। सांघतसें राया।।११-२३५।।
म्हणें किंबहुना अवधारिलें। पार्थें विश्वरूप देखिलैं।
नाना आभरणिं भरिलें। विश्वतोमुख।।२३६।।

"संजयाने याप्रमाणे हा कुरुक्षेत्री घडणारा विश्वरूपाचा सोहळा राजा धृतराष्ट्रास निवेदिला. तो म्हणू लागला, "हे राजा! नाना अलंकारांनी दीप्तिमान होणारे असे ते विश्वरूप पार्थ पाहात आहे, हे तुम्ही ऐकलेत ना!"

विश्वरूपाचे तेज

त्या रूपाचे तेज कसे होते, पहाः

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता।
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः।।११-१२।।
तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा।।११-१३।।

"आकाशात सहस्रावधी सूर्य एकदम प्रकटले तर त्यांची प्रभा त्या महात्म्या विश्वरूपाच्या प्रभेसारखी काहीशी होईल. नाना प्रकारे विभक्त दिसणारे विश्व विश्वेदेवाच्या त्या शरीरात एकाच ठिकाणी स्थित आहे व असे दिव्य कांतिमान आहे, हे अर्जुनाच्या दृष्टीस पडले."

ज्ञानदेवांच्या शब्दांत ते रूप पाहू याः

तिएं अंगप्रभेचां देवा। नवलाओ काईसयासारिखा सांघावा।
कल्पांति एकुचि मेलावा। द्वादशादित्यांचा होएं।।११-२३७।।
तैसें तैं दिव्य सूर्य सहस्रवेरी।
जऱ्हैं उदयजति कां एकेंचि अवसरीं।
तऱ्हैं तेआं तेजाचिं थोरी। उपमूं न यें।।२३८।।
आघवेयांचि वीजूंचां मेलावा कीजैं।
आणि प्रलयाग्निचिं सर्वैं सामुग्रि आणिजैं।
तेविंचि दशकुहिं मेलविजैं। महातेजांचां।।२३९।।

तऱ्है तिएं अंगप्रभेचेनि पाडें। हें तेज काहि काई होईल थोकडें।
आणि तेआं आईसें कीं चोखडें। त्रिशुद्धि नोहें।।२४०।।
आईसें महात्मेआं हरीचें सहज। फांकतसें सर्वांगिचें तेज।
तैं मुनिकृपा कीं मज। दृष्ट जाहालें।।२४१।।

"भगवंताच्या त्या विश्वरूपाच्या शरीराच्या कांतीचे वर्णन ते कसे करावे! द्वादश आदित्य एकाच वेळी कल्पांती प्रकटावेत; किंवा सहस्त्रावधी सूर्य एकाच वेळी आकाशात उगवावेत; तरीही त्यांचे तेज त्या विश्वरूपाच्या अंगप्रभेच्या पासंगासही पुरणार नाही. त्या तेजास उपमा तरी कसली द्यावी! नाना विद्युल्लतांचा समुदाय गोळा केला; माहतेजांचे दशधा भागही सर्व एकत्र केले; तरीही त्या विश्वेदेवाच्या अंगप्रभेपुढे हे सर्व अल्पच ठरेल! त्या तेजाएवढे शुद्ध, स्वयंप्रकाशी, नित्य, दिव्य, द्युतिमय असे दुसरे तेज या अखिल विश्वात शोधूनही सापडणार नाही. त्या महात्म्या श्रीहरीचे असे स्वभावज तेज त्याच्या अंगागांतून फाकत होते. व्यासमुनींनी कृपा करून मला जी दिव्यदृष्टी प्रदान केली, त्यायोगे मला ते स्वच्छ दिसत आहे."

आणि तिएं विश्वरूपीं एकिकडें। जग आघवें आपुलेनि पवाडें।
जैसें महोदधिमाझिं बुडबुडें। सिनानें दिसति।।११-२४२।।
कां आकाशिं गंधर्वनगर। भूतलीं पिपीलिका बांधैं घर।
नाना मेरुवरी सपूर। परमाणु बैसलें।।२४३।।
विश्व आघवेंचि तेआंपरीं। तेआं देवचक्रवर्तिचिआं शरीरीं।
अर्जुनु तिएं अवसरीं। देखतां जाहाला।।२४४।।

"अति अवर्णनीय असे ते विश्वरूप आहे. महोदधीवर इवलाले बुडबुडे प्रकटावेत; किंवा गगनात गंधर्वनगरांचा आभास व्हावा; अथवा विशाल अशा मेरुपर्वताच्या शिखरावर सूक्ष्म परमाणूंनी वसावे; त्याप्रमाणे त्या विश्वरूपाच्या एका अंगी हे समस्त विश्व आपल्यातील प्रकृतीसह नांदतांना अर्जुनास दिसले. त्या देवांच्या चक्रवर्तीच्या शरीरावर दिसणारा हा चमत्कार पाहून अर्जुन थक्क होऊन गेला."

"सहस्त्रशीर्षा पुरुषः सहस्त्राक्षः सहस्त्रपाद्" असे ज्याचे ***पुरुषसूक्त*** वर्णन करते, त्या **उच्छिष्टब्रह्मा**चे असे रूप अर्जुनास आणि संजयासही पहायला मिळत होते. ते रूप पाहून अर्जुनाच्या शरीरावर रोमांच उभे झाले.

समारोप

अशा प्रकारे श्रीकृष्णांनी जे विश्वरूप अर्जुनास दाखविले, त्याचे वर्णन ज्ञानदेव करतात. या ***विश्वरूपाच्या अजूनही काही पैलूंचे दर्शन*** आपण घेणार आहोत पुढील ***उन्मेष क्र.४८-२ - विस्मयकारक विश्वरूप*** यातून. तर वळू या तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४८-२::
::विस्मयकारक विश्वरूप::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ४८-२:

गीताः
२:२४
३:११
४:२४
६:२९
७:१९
९:२९
१०:४२
११:१४-३४,४०
ज्ञानेश्वरीः
११:२४५-३०५,३०७-४७८
पा.यो.सू.:
२:१२
३:४३

उद्धृतः पुरुषार्थबोधिनी टीका - पं.सातवळेकर:८८७

::उन्मेष ४८-२::
::विस्मयकारक विश्वरूप::

विस्मय व भयकारक स्वरूप::::

अर्जुनास अद्वैतभावाची प्राप्ती

अनेक स्वरूपांचे, विश्वांचे आणि चमत्कारांचे समावेशन असलेले ते ***विश्वरूप*** अर्जुन पाहत होता, हे आपण मागील उन्मेषात पाहिले. ते पाहून त्यास अष्टसात्त्विक भावांचे उधाण आले. संजय म्हणतोः

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनञ्जयः।
प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत।।११-१४।।

"अत्यंत आश्चर्ययुक्त झालेल्या अर्जुनाच्या शरीरी रोमांच उभे राहिले. देवाधिदेव अशा त्या विश्वेशापुढे नतमस्तक होऊन त्याने हात जोडले."

त्याविषयी ज्ञानेश असे वर्णन करतात कीः

तेथ एक विश्व एक आपण। आईसें अलुमालु होतें जैं दुजेपण।
तैंहि आटौनि गेलें अंतःकरण। विरलें सहसा।।११-२४५।।
आंतुलां महानंदां चेईरें जाहालें।
बाहेरीं गात्रांचें बल हारपौनि गेलें।
आपाद पां गुंतिलें। पुलकांचलें।।२४६।।
वार्षिएं प्रथमदशें। वोहललेआं शैलांचें सर्वांग जैसें।
विरूढें कोमलांकुरें तैसें। रोमांच आलें।।२४७।।
सिवतलां चंद्रकरीं। सोमकांतु द्राओ धरीं।
तैसिआं स्वेदकणिका शरिरीं। दाटलिआं।।२४८।।

"आपण कोणी एक आणि विश्वाहून वेगळे आहोत, असा जो द्वैतभाव अर्जुनाठायी होता, तो ते विश्वरूप पाहून नाहीसा झाला. अद्वैतभाव उपजला आणि त्याचे अंतःकरण त्या भावात विरघळून गेले. महानंदाचा आविर्भाव झाला. गात्रे शिथिल पडली. आपादमस्तकी शरीरावर रोमांचरूपी वस्त्राने अवगुंठन करावे, तशी त्याची काया झाली. वर्षाऋतूच्या आगमनानंतर थोड्याच दिवसांनी पर्वतराजींच्या सर्वांगभर जसे कोमल मखमाली तृणांचे अंकुर उगवून हिरवाकंच शेला पांघरावा तसे त्यांचे रूप भासते, तसे रोमांच त्याच्या शरीरी उभे राहिले. चंद्रकांत मण्यास चंद्रकिरणांचा स्पर्श होताच तो जसा पाझरतो, तसा स्वेदबिंदूंचा अर्जुनाच्या अंगांगी प्रदुर्भाव झाला."

अष्टसात्त्विक भावांचा बहर

माझिं सांपडलेनि अलिकुलें।
जलावरी कमलकलिका जेविं आंदोलें।
तेवि आंतुलिआं सुखोर्मिचेनि बलें। बाहेरि कांपें।।११-२४९।।
कर्पूर केलीचिं गर्भपुटें। उकलतां कापुराचें कोंदाटें।
पुलिका गलति तेंविं थेंबुटें। नेत्रौनि पडति।।२५०।।
आईसा सात्त्विकांहिं आठां भावां। परस्परें वर्ततसें हेवा।
तेथ ब्रह्मानंदाचिं जीवां। राणिव फांवली।।२५१।।

"भुंग्यांचा समुदाय कमलिनीत बंदिस्त झाल्यावर त्यांच्या धडपडीमुळे ती जशी पाण्यावर आंदोळते, त्याप्रमाणे अंतःकरणात भरलेल्या सुखोर्मींच्या लाटांनी त्याची तनू थरथर कापू लागली. कर्पूरगौर असा केळीचा सोपटा उकलतांना त्यात दाटलेले पाण्याचे थेंब जसे पडू लागतात, तशी त्याच्या नेत्रातून आसवे ठिबकू लागली. अष्टसात्त्विक भावांचा असा उदय होताच ते भावही एकमेकांशी जणू चढाओढ करावी तसे अधिकाधिक उत्कर्ष पावू लागले!! त्याचा जीव ब्रह्मानंदाच्या सिंहासनावर आरूढ झाला. स्वानंदसुखाचे साम्राज्य त्यास मिळाले!"

आदि-मध्य-अंत नसलेले रूप

उदयलेनि सुधाकरें। जैसा भरलाचि समुद्र भरें।
तैसा वेलोवेलां उर्मीभरें। उचंबलतु असें।।११-२५२।।
तैसाचिं तेआं सुखानुभवापाठीं। केला द्वैताचां सांभालु दिठी।
मग उससौनि किरीटी। वासु पाहिली।।२५३।।
तेथ बैसला होतां जिआं सवां।
तेयाचिकडें मस्तकु खालविला देवा।
जोडौनि करसंपुटु बरवा। बोलतु असें।।२५४।।

"चंद्रास पाहताच आधीच उचंबळून जाणाऱ्या समुद्रासही जसे उधाण येते, त्याप्रमाणे आनंदाच्या उर्मींची त्याच्या अंतःकरणसागरावर भरती आली. त्या वेळी कृपावंत श्रीकृष्णांनी त्या सुखानुभवानंतर अर्जुनास पुनः द्वैतस्थितीवर आणले. म्हणून तो भानावर आला. उसासे सोडत तो श्रीकृष्णाकडे पाहू लागला. जेथे बसलेला होता, तेथेच त्याने देवापुढे मान लववली आणि हात जोडून म्हणू लागला":

पश्यामि देवांस्तव देव देहे
सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान्।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थ-
मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्।।११-१५।।
अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं-
पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम्।
नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं-
पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप।।११-१६।।

"हे देवा! तुमच्या या देहात सर्व देव व नाना भूतांचे समुदाय मला दिसत आहेत. कमलासनावर बसलेले ब्रह्मदेव, सर्व ऋषी आणि सर्व दिव्य सर्पही मला आपल्या या शरीरात दिसत आहेत. अनेक बाहू, अनेक उदरे, अनेक मुखे आणि असंख्य नेत्र असणारे सर्वत्र भरून असलेले आपले हे अनंत रूप पाहत असतांना, हे विश्वेश्वरा! आपल्या या विश्वरूपाचा आदि कुठे, मध्य किंवा अंत पण कुठे, ते मला कळून येत नाही."

"तुझां दिसतसें। एकें अंशीं"

ज्ञानेश्वर म्हणतात:

म्हणें जयजयाजि स्वामी। नवल कृपा केलीं तुम्हीं।
जैं हें विश्वरूप कीं आम्हीं। प्राकृत देखों।।११-२५५।।
परि सांचचि भलें केलें गोसाविआं।
मज परितोखु जाहाला सांविआं।
जी देखलासिं जो इयां। सृष्टीसिं तूं आश्रो।।२५६।।
देवा मंदराचेनि अंगलगें। ठाईं ठाईं श्वापदांचिं दांगें।
तैसिं इयां तुझिआं देहिं अनेगें। देखतसें भुवनें।।२५७।।

भावविव्हल होऊन अर्जुन म्हणतो, "हे विश्वेदेवा! हे स्वामी! तुझा जयजयकार हे सर्व विश्व करत आहे. तुझ्या अगाध कृपेने मज सामान्यासही तुझे हे अद्भुत असे विश्वरूप पहावयास मिळाले. आज हे नवल पाहून मी धन्य झालो! तू मोठी कृपा केलीस आणि या विश्वाचा आश्रय तूच आहेस, हे मला दाखवलेस. हे कळून मला अत्यंत संतोष झाला आहे. मंदार पर्वताच्या अंगावर ठिकठिकाणी हिंस्त्र पशूंचे समुदाय असतात. त्याचप्रमाणे तुझ्या या विश्वरूप देहावर अनेकानेक लोक आणि भुवने मला पहावयास मिळाली."

अहो आकाशाचिएं खोलें। दिसति ग्रहगणांचि कुलें।
कां महावृक्षीं अविसालें। पक्षिजातिचिं।।११-२५८।।
तेआंपरी श्रीहरी। तुझां विश्वात्मकीं इयें शरीरीं।
स्वर्ग देखतसें अवधारीं। सुरगणेंसिं।।२५९।।
प्रभु महाभूतांचें पंचक। एथ देखत आहें अनेग।
आणि भूतग्राम एकैक। भूतसृष्टीचें।।२६०।।
जी सत्यलेकु तूझमाझिं आहें। देखिलां चतुराननं हा नोहें।
आणि एरिकडें जंवं पाहें। तंवं कैलासुहिं दिसें।।२६१।।
श्रीमहादेव भवानिएंसिं। तुझां दिसतसें एकें अंशीं।
आणि तूंतैंहिं गां हृषीकेशी। तुझमाझिं देखैं।।२६२।।

"आकाशाच्या खोळेत ग्रहतारकांचे समुदाय दिसतात. विशाल अशा महावृक्षांच्या खांद्यांवर अनेक पक्ष्यांची घरटी असतात. हे श्रीहरी! त्याप्रमाणे तुझ्या या विश्वात्मक देहाठायीसुद्धा सुरगणांसह स्वर्ग वसतांना मला दिसला. हे प्रभू जगन्नियंत्या! पंचमहाभूते येथे अनेकानेक भूतसृष्टीतील असंख्य प्राणी उत्पन्न करतांना मला दिसत आहेत. सत्यलोकही या तुझ्या विश्वरूपी देहात वसलेला आहे. त्यात असणारा ब्रह्मदेव मला जो आता दिसत आहे, तोच तो नव्हे काय! आणि तो पलीकडे कैलास आहे नाही का! भवानीसह श्रीमहादेव तुझ्या अंगाच्या त्या भागात आहेत, हे मला स्पष्ट दिसते आहे. आणि हे श्रीकृष्णा! हे हृषीकेशा! तू पण मला या तुझ्या विश्वरूपाचाच एक अंश आहेस, असेही दिसत आहे!"

"महाशून्याचेनि पैसारें। उघडिलीं ब्रह्मकटाहाचिं भांडारें"

पैं कश्यपादि ऋषिकुलें। इयें तुझ्या स्वरूपिं सकलें।
देखतसें पातालें। पन्नगेंसिं।।११-२६३।।
किंबहुना त्रैलोक्यपति। तुझिआं एकैकां अवयवांचिआं भिंतीं।
इयें चतुर्दशभुवनें चित्राकृति। अंकुरलीं जाणों।।२६४।।
आणि तेथिंचें जैं जैं लोक। तैं चित्ररचना जी अनेग।
आईसें देखतसें अलौकिक। गांभीर्य तूझें।।२६५।।

"कश्यप इ.ऋषिवर आपापल्या समस्त कुळांसह मला तुझ्या या स्वरूपात अवस्थित असलेले दिसत आहेत. सर्पांसह पाताळलोक साक्षात तुझ्याठायी वसलेला मी पाहत आहे. हे त्रैलोक्याधिशा! काय सांगावे! तुझा एकेक अवयव म्हणजे जणू भिंतच आहे आणि तिच्यावर चवदाही भुवने जशी चितारावीत, तशी दिसत आहेत. आणि त्या लोकात वसणारे प्राणिमात्र म्हणजे त्या चित्रांतील आकृतीच अशा भासत आहेत. अलौकिक असे हे तुझे महान विश्वरूप मला जिकडे पहावे तिकडे दिसत आहे."

तेआं दिव्यचक्षूंचेनि पैसें। चहूंकडें जंवं पाहात असें।
तंवं दोर्दंडीं जैसें। आकाश कोंभैलें।।११-२६६।।
तैसें एकचि निरंतर। देवा देखतसें तुहें कर।
करीत आघवेंचि व्यापार। एकें कालीं।।२६७।।
मग महाशून्याचेनि पैसारैं। उघडिलीं ब्रह्मकटाहाचिं भांडारैं।
तैसिं देखतसें अपारैं। उदरैं तुहीं।।२६८।।
जी सहस्त्रशीर्षयाचें देखिलें। कोडीवेरी होति एकें हेलें।
किं परब्रह्मचि वदनफलें। मोडौनि आलें।।२६९।।
तैसिं वक्त्रें जी जेऊति तेऊतिं। तुहीं देखतसें विश्वमूर्ति।
आणि तेआंचिपरी नेत्रपंक्ति। अनेगां सैंघ।।२७०।।

"तू दिलेल्या दिव्यदृष्टीच्या योगे मला चौफेर जे काही दिसत आहे, त्यात तुझे निरंतर व्यापार करत असलेले असंख्य हस्त आहेत. सर्वत्र आकाश जसे चराचरास व्यापून असते, त्याप्रमाणे तुझ्या बळकट भुजा आणि हस्त तुझ्या बलदंड बाहुदंडांपासून अंकुरून या विश्वास व्यापून टाकतात आहेत. महासुखाच्या आगमनावेळी ब्रह्मानंदाचे भरगच्च रूप जसे प्रकट व्हावे, तशी ही अनेक अतिविशाल अशी तुझी उदरे मला दिसत आहेत. सहस्त्रशीर्ष असे श्रुती तुझे रूप वर्णितात. पण येथे पहावे तर अशी कोट्यवधी सहस्त्रशीर्ष रूपे मला दिसत आहेत. परब्रह्मास जणू अनंत वदनरूपी फळे फुटावीत, तशी तुझी असंख्य तोंडे मला दिसत आहेत आणि तुझ्या अनेकानेक नेत्रज्योती त्यात मला दिसत आहेत."

"तूंचि आघवें अनंता"

हें असो स्वर्ग पाताल। कीं भूमि दिशा अंतराल।
हें विवक्षा ठेलीं सकल। मूर्तिमय देखतसें।।११-२७१।।
तूझविण एकादिआंकडें। परमाणुहिं एतुलां कोडें।
अवकासुं पाहातां परि न सांपडें। ऐसें व्यापिलें तुवां।।२७२।।
इहिं नाना भूतींसहितें। जेतुलीं सांठविली होति महाभूतें।
तेतुलाहिं पवाडु तुवां अनंतें। कोंदला देखतसें।।२७३।।

"हे असो! तुझ्या या विश्वमूर्तीने सर्व आसमंत इतका व्यापून टाकला आहे की स्वर्ग कोणता, पृथ्वी कोणती, पाताळ कोणते, अंतराळ कोणते, दिशा कोणीकडे, हे काहीही कळेनासे झाले आहे. या ठिकाणी सहज म्हणूनसुद्धा एका परमाणुएवढी पण जागा शिल्लक उरलेली नाही. सर्व अवकाश तूच व्यापून टाकले आहेस. नाना भूतमात्रांनी जेवढी म्हणून पंचमहाभूते आपल्यात साठवून ठेवली होती, ती सगळी तू आपल्या या विश्वरूपाच्या अमर्याद विस्तारात समावून घेतली आहेस."

आईसा कवणें ठायांहूनि तूं आलासिं।
एथ बैसलासिं कां उभा आहासिं।
आणि तूं कवणिएं मायेचिएं पोटीं होतासिं।
तुझें ठाणें केवढें।।११-२७४।।
तूझें रूप वय कैसें। तूझपैलिकडें काएं असें।
तूं कायसयावेरी आहासिं ऐसें। जंवं पाहिलें मिआं।।२७५।।
तंव देखिलें जी आघवेंचि। तन्हैं आतां तुज देवा ठाओ तूंचिं।
तूं कवणाचां नव्हेसिं आईसाचि। अनादि आयता।।२७६।।

"असा जो तू हे विश्वरूप धारण करून आहेस, तो तू कोठून आलास; आता उभा आहेस की बसला आहेस; तुझे रूप कसे; वय किती; तुझी आकृती कशावर उमटली आहे; तुझ्यापलीकडे काय आहे; याचा मी जेव्हा शोध घेऊ गेलो तेव्हा हे सर्व तुझे तूच आहेस; तुझे स्थान तूच आहेस; तू कोणापासूनही जन्मला नाहीस; तर तू अनादी व स्वत:सिद्ध असाच आहेस, हे मला आता उमगले आहे."

तूं उभा ना बैठा। दिघटु ना खुजटा।
तुज तळीं वरी वैकुंठां। तूंचि आहासि।।११-२७७।।
तूं रूपें आपणपयांचिं आईसा। देवा तुहिं तूंचि वयसा।
पाठीं पोट परेशा। तूझें तूं गां।।२७८।।
किंबहुना आतां। तुज तूंचि आघवें अनंता।
हें पुढुत पुढुति पाहातां। देखिलें मिआं।।२७९।।

"तू उभाही नाहीस आणि बसलेलाही नाहीस; तू ना उंच आहेस ना खुजा आहेस! हे वैकुंठाधिपती! तुझ्या तळवटी तूच आहेस आणि वरलीकडेही तूच आहेस. तुझे स्वरूप तुझ्यासारखेच आहे. हे परेशा! तुझे वय तूच आहेस; आणि आपली पाठ आणि पोटही तूच आहेस! तुझे स्वरूप तुझ्यासारखें आहे. फार काय सांगावे! हे अनंता! तुझे हे रूप स्वत:चे स्वत:च धारण केलेले आहे. हे अवघे तुझे तूच असे आहे. वारंवार मनाशी विचार करून मला हे आता उमगले आहे की तुझ्यासारखा तूच आहेस!"

"तूं देखिलासि गां तत्त्वतां"

परि या तुझिआं रूपाआंतु। जी उणिव एक असें देखतु।
जैं आदि मध्य अंतु। तिनिहीं नाहीं।।११-२८०।।
एरविं गिंवसिलें आघवां ठाईं। परि सोएं न लहेंचि काईं।
म्हणौनि त्रिशुद्धि हें नाहीं। तिनहीं एथ।।२८१।।
एवं आदि मध्यांतरहिता। विश्वेश्वरा अपरिमिता।
तूं देखिलासि जी तत्त्वतां। विश्वरूपा।।२८२।।

"परंतु हे विश्वमूर्ती! तुझ्या या रूपात मला एक उणीव भासते आहे. तुझे हे विश्वरूप कोठून उद्भवले आहे; ते कोठे कसे पसरले आहे आणि त्याच्या अंती काय आहे, ते काही केल्या कळत नाही. मी त्यासाठी खूप शोध घेतला. बराच विचारही केला. पण याबाबत काहीच गवसत नाही. म्हणून मला असे निश्चयेकरून वाटते की तू या तिन्हींव्यतिरिक्त आहेस. तुझ्या या विश्वरूपास आदी नाही, मध्य नाही आणि अंतही नाही! आदि-मध्य-अंतरहित अशा हे अपरिमित विश्वरूपा! तुझे हे सत्यस्वरूप पाहून धन्य झालो आहे!!"

तूझ महामूर्त्तिचां आंगिं। उमटलिआं पृथक् मूर्ती अनेगिं।
लेईलासि वानें परींचिं आंगिं।
आईसा आवडतु आहासि।।११-२८३।।
नाना पृथक् मूर्ती तिआं द्रुमवेली। तूझां स्वरूप महाचलीं।
दिव्यालंकारफुलीं फलीं। सासिन्निलिआं।।२८४।।
हो कां जैं महोदधि तूं देवा। जाहालासिं तरंगिच मूर्ती हेलावा।
कीं वृक्षु एकु बरवा। मूर्त्तिफलिं फललासिं।।२८५।।
जीं भूतीं भूतल मांडिलें। जैसें नक्षत्रीं गगन गूढलें।
तैसें मूर्त्तिमय भरिलें। तूझें देखतसें रूप।।२८६।।

"तुझ्या या विश्वरूपातल्या महामूर्तिठायी अनेक भिन्नभिन्न मूर्ती उमटलेल्या दिसत आहेत. जणू तू नाना प्रकारची वस्त्रे परिधान करावीस, तसा या विभिन्न मूर्तींचा मेळावा अंगी धारण केला आहेस, असे मला वाटते. किंबहुना तुझ्या स्वरूपरूपी नगाधिराजावर या मूर्तींच्या रूपाने जणू दिव्यालंकाररूपी फळाफुलांनी लगडलेले वृक्षवेलीच उत्पन्न झालेले आहेत, असे भासते. अथवा तुझे हे विश्वरूप म्हणजे जणू महासागर आणि या मूर्ती म्हणजे त्यावरील लाटा असेही म्हणावेसे वाटत आहे मला! मूर्तींच्या या फळांनी लगडलेला तू जणू एक विशाल वृक्षच आहेस! भूतमात्रांनी जसे हे भूतल आच्छादून टाकले आहे किंवा नक्षत्रांनी जसे आकाश खच्चून भरलेले आहे, तसे तुझे हे विश्वरूप या अनेकानेक मूर्तींनी भरून टाकले आहे."

"तोचि तूं एवढें। रूप जाहालासिं"

जीं एकेकींचां अंगप्रांतिं। होएं जाएं हें त्रिजगतिं।
येवढिआंहिं तूझां आंगिं मूर्ती।
किं रोमां जालिआं।।११-२८७।।
आईसा पवाडु मांडूनि विश्वाचां। तूं कवण पां एथ कैंचां।
हें पाहिलें तंवं आमुचा। सारथी तोंचि तूं।।२८८।।
तन्हैं मज पाहातां मुकिंदा।
तूं आईसाचि व्यापकु सर्वदा।..।।२८९।।

"आणि त्यातील ही एकएक मूर्ती तरी केवढी विशाल आहे म्हणून सांगू! आपल्या अंगी त्रैलोक्य समावून घेऊन त्याचा अस्तही करवणारी यातील प्रत्येक मूर्ती आहे. पण या मूर्ती तर निव्वळ तुझ्या या विश्वरूपाच्या

रोमांप्रमाणे भासाव्यात इतक्या तुझ्या मानाने स्वल्पाकृती आहेत. विश्वाचा हा असा पसारा मांडून बसलेला तू खरा कोण आहेस, याचा मला विसर पडलेला होता. पण माझी आता खात्रीच पटू लागली आहे की तू तर तोच श्रीकृष्ण आहेस, जो माझे सारथ्य करत आहे. आणि मला तर असे वाटते की हे मुकुंदा! तुझे खरे स्वरूप असेच व्यापक असले पाहिजे."

... । भक्तानुग्रहें तेआं मुग्धा । रूपांतें धरिसि ।।११-२८९ ।।
कैसें चहूं भुजांचें सांवळें । पाहातां वोल्हावति मन डोळें ।
खेंव देऊं जाईजें तन्हैं आकळें । दोहिंचि बाहिं ।।२९० ।।
आईसि मूर्त्ति कोडिसवाणि कृपा ।
करूनि होसि विश्वरूपा ।... ।।२९१ ।।

"तुझे नित्य रूप असेच असले पाहिजे. पण तरीही आम्हा भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी तू तुझ्या या गोजिऱ्या श्रीकृष्णरूपाची छबी धारण करतोस. ते तुझे सुंदर सुकुमार सावळे चतुर्भुज रूप आमचे मन वेडावून टाकते. डोळ्यांचे पारणे त्याने फिटते आणि त्याला दोन भुजांमध्ये घट्ट धरून आलिंगन देता येते. मनाला अतीव समधान देणारे असे हे रूप तू धारण करतोस."

.. । कीं आमुचिआं दिठीं सलेपा ।
जैं सामान्यत्वें देखिति ।।११-२९१ ।।
तन्हैं आतां दिठीचां विटालु गेला । तुवां साहाजें दिव्यचक्षु केलां ।
म्हणौनि यथारूपें देखविला । महिमा तूझा ।।२९२ ।।
परि मकरतुंडामाघिलीकडें । होतासि तोचि तूं येवढें ।
रूप जाहालासिं हे फुडें । वोलखिलें मिआं ।।२९३ ।।

"पण हे विश्वरूपा! तुझी ही अमर्याद कृपा न ओळखणारे आम्ही लोक तुझ्या त्या दिव्य अवतारी रूपालाही आमच्या सामान्य दृष्टीने पाहतो आणि तू खरा कोण आहेस, हे ओळखू शकत नाही. आमची मलिन दृष्टी तुझ्या त्या सगुण सुंदर रूपालाही सामान्यत्वाने लेखते. पण आता माझ्या दृष्टीचे मालिन्य दूर झाले आहे. कारण तू तिचे दिव्यदृष्टीत परिवर्तन घडवून आणले आहेस. म्हणून तुझा हा सत्यस्वरूपाचा महिमा मला प्रत्यक्ष अवलोकण्याचे भाग्य प्राप्त झाले आहे. माझ्या रथचक्राच्या मकरतुंडाकडील बाजूस जो तू बसलेला आहेस, तो तूच हे एवढे अद्वितीय असे अपरिमित विश्वरूप होऊन मजपुढे ठाकला आहेस, हे मी आता निश्चित ओळखले आहे."

श्रीकृष्ण व विश्वरूप यातले अद्वैत

अर्जुन पुढे म्हणतोः

किरीटिनं गदिनं चक्रिणं च
तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम्।
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ता-
द्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम्।।११-१७ ।।

"किरीट, गदा व चक्र धारण करणारे तुम्ही श्रीकृष्णच हे सर्वदूर प्रभा फाकलेले. तेज:पुंज, दृष्टी दिपवून टाकणारे दैदिप्यमान, सूर्यतेजाप्रमाणे लखलखीत, चर्मचक्षूंनी पाहण्यास अशक्य आणि अपरिमित असे विश्वरूप धारण करून आहात. तुमचे खरे स्वरूप हेच आहे."

अर्जुनास जाणवलेले हे श्रीकृष्ण आणि विश्वरूप यांचे अद्वैत कसे आहे, ते ज्ञानेशमुखाने पुढे ऐका!

नोहें तोचि हा शिरीं । मुकुट लेईलासि श्रीहरी ।
परि आतांचें तेज आणि थोरी । नवल कीं बहुवें ।।११-२९४ ।।
तैंचि हें वरिचिलिएं हातिं । चक्र परिजितआं आयति ।
सांवरितासि विश्वमूर्ति । न मोडें खूण ।।२९५ ।।
एरिकडें तैंचि हें नोहें गदा । आणि तलिलिआं भुजा निरायुधा ।
वागोरें सांवरावेआं गोविंदा । संसरलिआं ।।२९६ ।।
आणि तेणेचि वेगें सहसा । माझिआं मनोरथासरिसां ।
जाहालासि विश्वरूपा विश्वेशा । म्हणौनि जाणें ।।२९७ ।।

"तू तुझा तोच तो मुकुट आताही शिरी धारण केला आहेस. पण आताचे त्याचे तेज आणि विस्तार अति विलक्षण आहेत. हे विश्वमूर्ती! तू वरल्या हातात परजलेले चक्र पण तेच आहे. ती खूण पण जशीच्या तशीच आहे. आणि ती गदासुद्धा पूर्वी होती तशीच आहे. तसेच खालचे दोन हात शस्त्र नसलेले आहेत. तेही तू, हे श्रीकृष्णा! अश्वांचे लगाम सावरण्यासाठी जसे ठेवत होतास, तसेच दिसताहेत! आणि माझ्या मनात तू विश्वरूप दाखवावेस अशी इच्छा प्रकट झाली न झाली, तोच त्याच मनोवेगाच्या गतीने तत्काळ हे विश्वरूप तूच धारण केलेस, हे खरे नाही का! हे विश्वेशा! हे गोविंदा! केवढे हे आश्चर्य आहे!"

परि काएसें बा हें चोज । विस्मो करावेआंहि पवाडु नाहीं मज ।
चित्त होऊनि जात आहे निर्बुझ । आश्चर्यें एणें ।।११-२९८ ।।
हें एथ आथि कां एथ नाहीं । आईसें श्वसोंहिं नयें काईं ।
नवल अंगप्रभेचि नवाई । कैसिं कोंदलीं सैंघ ।।२९९ ।।
एथचिहिं दिठी करपत । सूर्य खद्योतिं जैसें हारपत ।
आईसें तीव्रपण अद्भुत । तेजाचें येयां ।।३०० ।।

"मला नवल करण्याइतकाही अवकाश नाही. तुझे हे अत्यद्भुत रूप पाहून माझे चित्त चाकाटून जात आहे. तुझे जे हे विश्वरूप मी पाहत आहे, ते खरेच माझ्यापुढे अवतीर्ण झाले आहे की हा केवळ आभास आहे, या विचाराने गोंधळून जाऊन मला धड श्वासही घेण्यास उसंत मिळत नाही. आणि तुझ्याठायी प्रकटलेल्या या तेजाची थोरवी काय वर्णावी !सर्वदूर ही तुझी अंगप्रभा घनदाट फाकली आहे. त्या तेजाने माझे नेत्र दीपून जात आहेत. सूर्यापुढे काजवे जसे हरपून जातात, तशी माझी दृष्टी तुझ्या या तेजापुढे हरवून गेली आहे."

हो कां जैं महातेजाचां महार्णवि । बुडौनि गेलीं सृष्टी आघवि ।
किं युगांतवीजूंचां पालवि । झांकिलें गगन ।।११-३०१ ।।
ना तन्हैं संहारतेजाचिआं ज्वालां ।
तोडौनि माचु बांधिला अंतरालां ।
आतां दिव्य ज्ञानाचाहिं डोलां । पाहवेना ।।३०२ ।।

उजालु अधिकाधिक बंहुवसु। धडाडित आहे अतिदासु।
पडत दिव्यचक्षूंसहिं त्रासु। न्याहालितां।।३०३।।

"महातेजरूपी महासागरात जणू ही अवघी सृष्टी बुडून गेली आहे. आकाश जणू कल्पांतीच्या तडितकल्लोळांनी झांकोळून गेले आहे. प्रळयाग्नीच्या ज्वाळा तोडून जणू त्यांचा आकाशी मांडव घातला आहे. हे तेज अत्यंत अद्भुत असे आहे. ते इतके प्रखर आहे की दिव्य अशा ज्ञानचक्षूंसही ते सहन होईनासे झाले आहे. त्याचा दाहक प्रकाश अधिकाधिक धडाडून पेटलेल्या अग्निकुंडासमान पसरत जात आहे. दिव्यचक्षूंनीही त्याच्याकडे पाहणे कष्टप्रद वाटते आहे."

हो कां जैं महाप्रलयींचा भडाडु। होतां कालरुद्राचां ठाईं गूढु।
तो तृतीयनेत्राचा मढु। फुटला जैसां।।११-३०४।।
तैसें पसरलेनि प्रकाशें। सैंघ पांचवनिआं ज्वालांचे वलसें।
पडतां ब्रह्मकटाह कोलसें। होत आहाति।।३०५।।

"महाप्रळयाचा भडका उडवणारा तृतीय नेत्र शिवाने उघडावा व आपल्याठायीच्या काळाग्नीचा रुद्रावतार प्रकट करावा आणि त्या तेजातून प्रकटलेल्या पंचाग्नींच्या ज्वाळांच्या वलयात ब्रह्मांडाचे कोळसे व्हावेत, तसे तुझ्या तेजाने होत आहे. जन्मजन्मांतरीही ही अशी अद्भुत तेजोराशी पहायला मिळणे अशक्यच आहे. माझे भाग्यच थोर की तुझ्या या अपार असीम अशा दिव्य कांतिमान तेजाचे मला आज दर्शन घडले आहे."

परमपुरुषाचे महातेजस्वी दर्शन

अर्जुनास परमपुरुषाचे दर्शन घडत आहे, हे जाणून तो म्हणतो की:

त्वमक्षरं परमं वेदितव्यं-
त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता
सनातनस्त्वं पुरुषो मतो मे।।११-१८।।
अनादिमध्यान्तमनन्तवीर्य-
मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम्।
पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं-
स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम्।।११-१९।।

"हे परेशा! तूच परम ज्ञेय अक्षर ब्रह्म आहेस. विश्वाचा परम आश्रय तूच आहेस. हे अव्यया! शाश्वत धर्माचे रक्षण करणारा व सनातन पुरुष तूच आहेस. तुला आदि, मध्य वा अंत ही तिन्ही नाहीत. अनंत बाहू असलेले, चंद्र-सूर्य हे नेत्र असलेले, दीप्तिमान अग्नी हे मुख असणारे, अनंतशक्तिमान असे हे तुझे विश्वरूप आपल्या तेजाने या विश्वास क्षोभित करत आहे."

आत्म्याचे मूळ ठिकाण

ज्ञानेश पुढे म्हणतातः

देवा तूंचि अक्षर। औटाविएं मात्रेसिं पर।
श्रुति जेआंचें घर। गिंवसित आहाति।।११-३०७।।

जैं आकाराचें आयतन। जैं विश्वनिक्षेपैकनिधान।
तैं अव्यय तूं गहन। अविनाश जी।।३०८।।

अर्जुन म्हणतो, ***"देवा! तू अक्षर आहेस. ॐकाराच्या साडेतीन मात्रांपलीकडे तुझी वसती आहे.*** श्रुतींनी त्या तुझ्या परमधामाचा पाठपुरावा अति दक्षतेने केला आहे. तरीही तू वेदातीत असे तत्त्व आहेस!! या आकारास आलल्या विश्वाचे - या शब्दब्रह्माचे तूच मूळ ठिकाण आहेस. विश्वरूपी ठेव्याचा खजिना तूच आहेस. अव्यय, अविनाशी आणि गूढातिशय असे परमतत्त्व तूच आहेस."

तूं धर्माचा वोलावा। अनादिसिद्ध तूं नीचनवा।
जाणें मी सदतिसावा। पुरुषु विशेषु तूं।।११-३०९।।
तूं आदिमध्यांतरहितु। स्वसामर्थ्यें तूं अनंतु।
विश्वबाहु अपरिमितु। विश्वचरणु तूं।।३१०।।

"मोक्षधर्म तुझ्यामुळेच सिद्ध होतो. अनादि-स्वतःसिद्ध असूनही नित्य नूतनत्वाने प्रकटणारा छत्तीस तत्त्वांपलीकडील ***सदतिसावा पुरुष*** तूच आहेस. तुला पावून योगी धन्य होतात. भक्तांचे परमप्रिय तूच करतोस. आदि-मध्य-अंत या अवस्था तुला नाहीत. स्वतःचा स्वतः समर्थ आणि अनंतास व्यापून असणारा तुजविना दुसरा कोण असणार! सहस्त्रबाहू- सहस्त्रपाद - विश्वबाहू - विश्वपाद ही विशेषणे तुझीच आहेत."

पैं चंद्रचंडांशुडोलां। दावितासिं कोपप्रसादलीलां।
एकां रुससिं तमाचां डोलां।
एकां पालितोसि कृपादृष्टी।।११-३११।।
जी एवंविधा तूंतैं। मी देखतसें हें निरुतैं।
पेटलें प्रलयाग्निचें उजितैं। तैसें वक्त्र हें तुझें।।३१२।।
वणिवेनें पेटलें पर्वत। कवलूनि ज्वालांचे उभड उठत।
तैसें चाटीत दाढा दांत। जीभ लोलें।।३१३।।
इयें वदनिंचिआं उबा। आणि जी सर्वांगकांतिचिआं प्रभा।
विश्व तांतिलें अति क्षोभा। जात आहें।।३१४।।

"चंद्र-सूर्य हे तुझे नेत्र आहेत. कृपाप्रसाद आणि कोप यांची त्यातून वृष्टी होत असते. कोणावर कोपदृष्टी तर कोणाला कृपादृष्टीने पाळणे या तुझ्या लीला आहेत. अपरिमित असे तुझे स्वरूप आहे. ते मला सुस्पष्ट दिसत आहे. प्रळयाग्नीचेच जणू असावे, असे हे तुझे तोंड दिसत आहे. पर्वतावर चहूकडे वणवा पेटावा आणि त्याच्या ज्वाळांचा भडका उडावा, तशी ही तुझ्या मुखातील दात-दाढा व चाटणारी जीभ आहे. ती जणू अग्निज्वाळांचीच असावीत तशी दिसत आहेत. या तुझ्या मुखातून प्रसरणाऱ्या अग्निज्वाळांनी आणि अंगावरील तेजस्वी प्रभेमुळे हे संपूर्ण विश्व होरपळून निघत आहे. विश्वाचा क्षोभ करणारे हे तुझे अत्यंत जाज्वल्य आणि प्रखर दीप्तिमान असे अनंत स्वरूप न सहन होणारे असे आहे."

अद्भुत व उग्र रूप

तो पुढे म्हणतो:

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि
व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः।
दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं-
लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन्।।११-२०।।

"स्वर्ग व पृथ्वी यांमधील सर्व अवकाश आणि सर्व दिशासुद्धा तू एकट्याने व्यापून टाकल्या आहेस. हे महात्म्या! तुझे हे अद्भुत व उग्र रूप पाहून तिन्ही लोक भयव्याकुळ झाले आहेत."

कां जैं भुर्लोक पाताल। पृथिवी हन अंतराल।
अथवा दशदिशा समाकुल। दिशाचक्र।।११-३१५।।
तैं आघवेंचि तुवां एकें। भरिलें देखत आहें कवतुकें।
परि गगनाहिसगट भयानकें। आप्लविजें जेविं।।३१६।।
ना तन्हैं अद्भुतरसाचां कल्लोलीं।
जाहालीं चवदांहिं भुवनांसिं कडियाली।
तैसें आश्चर्यचि मग मी आकलीं। काय एक।।३१७।।
नावरें व्याप्ति ही असाधारण। न साहवें रूपाचें उग्रपण।
सुख दूरी गेलें परि प्राण। विपाएं धरीं जग।।३१८।।

"भूलोक, पाताळ, स्वर्ग, अंतराळ, दशदिशा, क्षितिज ही सर्व तू व्यापून ठेला आहेस, हे मला सहजच दिसत आहे. परंतु गगनासह सर्व जसे एखाद्या भयानक वस्तूने व्यापून टाकावे, तसे हे तुझे व्यापकपण त्रैलोक्यास व्याकुळ करून सोडणारे वाटते आहे. अद्भुत रसांच्या कल्लोळात चवदाही भुवने बुडून जावीत, तसे हे एक आश्चर्यच मला तुझ्या या विश्व व्यापण्यामुळे निर्माण झाले आहे. पण ते पण मला नीट आकळेनासे झाले आहे. कारण तुझ्या या विश्वरूपाचे उग्रपण सहन करण्यापलीकडचे आहे. या तुझ्या दर्शनाने खरे तर सुख व्हावयास हवे. पण ते तर दूरच गेले; तुझ्या या रूपाच्या दाहकतेने होरपळून निघणारे हे विश्व प्राणांसदेखील अति प्रयासाने धारण करत कसेबसे तग धरून आहे."

देवा देखौनिआं तूंतैं। नेणों कैसें आलें भयाचें भरितें।
आतां दुःखकल्लोलीं झलंबतें। तिनहीं भुवनें।।११-३१९।।
एरविं तूझ महात्मेआंचें देखणें। तन्हैं भयदुःखासिं कां मेलविणें।
परि हें सुख नोहेंचि जेणें गुणें। तैं जाणवत आहें मज।।३२०।।
जंवं तूहें रूप नोहें दिठें। तंवं जगासिं सांसारिक गोमटे।
आतां देखिलासिं तन्हैं विषयविटें। उपनला रसु।।३२१।।
तेविंचि तूंतैं देखिलिआंसाठीं। काईं तूज सहसा देओं येईल मिठी।
आणि नेदीं तन्हैं संकटीं। राहों केविं।।३२२।।
म्हणौनि माघां सरों तंवं संसारु। आडवीत एत असें अनिवारु।
आणि फुडां तूं तंवं अनावरु। न येसिं घेवों।।३२३।।

"आणि हे विश्वेशा! तुझे हे रूप पाहून उलटे भयाचेच भरते आले आहे; दुःखाच्या लाटांमध्ये त्रैलोक्य गटांगळ्या खात आहे! तुज महात्म्याच्या या अपूर्व दर्शनाने दुःख व भय यांची प्राप्ती खरी तर होऊच नये! पण तरीही हे असे का होत आहे, ते मला आता उमजू लागले आहे. कारण सुख-सुख असे आम्ही ज्याला म्हणतो, ते खरे तर विषयसंगाने होत असते. पण तुझे दर्शन घडल्यावर विषय ते कोठून उरणार! विषयांपासून चित्त असे उफराटे वळतांना, त्याला त्रास हा वाटणारच! आणि तुझ्या या रूपास आलिंगू जावे, तर तुझे हे रूप मिठीत समावेल असे कोठे आहे! बरे! तुला मिठी न द्यावी, तर मागे परत संसारभय ते आ वासून उभे आहे! मागे सरावे तर हा संसार पाठी लागणार आहे आणि पुढे सरावे तर तुझे हे अतर्क्य रूप मानवत नाही!"

लोकत्रयास विस्मित करणारे रूप

देवासुरांनाही हे रूप भयविव्हल करणारे आहे, असे अर्जुनाला वाटते आहे. तो म्हणतो:

अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति
केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः
स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः।।११-२१।।
रुद्रादित्या वसवो ये च साध्या-
विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च।
गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा-
वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे।।११-२२।।

"आपल्या या तुझ्या रूपाठायी काही देवांचे गण प्रवेश करत आहेत. काहींना हे रूप पाहून भय उत्पन्न झाले आहे. ते तुझी प्रार्थना करत आहेत. *"स्वस्ति", "स्वस्ति"* असे म्हणत अनेक प्रकारच्या स्तोत्रमंत्रांनी महर्षी व सिद्ध यांचे गण तुझे स्तवन करत आहेत. तसेच रुद्र, आदित्य, वसु व साध्य यांचे गण, अश्विनीकुमार, मरुद्गण, उष्मपा म्हणजे पितर, आणि गंधर्व, यक्ष, राक्षस व सिद्ध यांचे समुदाय विस्मित होऊन तुझे हे उग्र रूप पाहत आहेत."

या रूपाचे देवासुरांना जाणवणारे स्वरूप ज्ञानेश शब्दबद्ध करत म्हणतात:

आईसा माझारिलीं सांकडा। बापुड्या त्रैलोक्याचा होत हुरडा।
हा ध्वनि जी फुडां। चोजविला मज।।११-३२४।।
जैसा आरंबललां आगिं। समुद्रा ये निवावेआंलागिं।
तंवं कल्लोल पाणिआंचां तरंगिं। आगला बिहें।।३२५।।
तैसें ययां जगासिं जाहालें।
तूंतैं देखौनि तलमलत ठेलें।..।।३२६।।

"तुझे हे स्वरूप असे असल्याने तिन्ही लोकांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. जे कोणी तुला पाहू शकत आहेत, मग ते स्वर्ग, पाताळ वा पृथ्वीलोक कोठलेही का असेनात, तुझ्या या अमर्याद स्वरूपाच्या दर्शनाने असे द्विधा मनस्थितीत होरपळले जात आहेत. तुला ते जवळही घेऊ शकत नाहीत आणि तुझ्याविना ते दूरही जाऊ

शकत नाहीत. जसा आगीने होरपळलेला मनुष्य अंग निववावे म्हणून समुद्राजवळ गेला, तरी त्याच्या लाटांना भिऊन त्यात प्रवेशून अंगाची लाही निववू शकत नाही, पण तेथून दूरही जाऊ शकत नाही. कारण त्याला निववणारे पाणी समोरच दिसत असते. जगाचेही सगळ्या असेच झाले आहे तुझ्या या असीम दर्शनाने! तुला पाहून ते तसेच तळमळत आहे!"

... । ययामाजिं पैल भलें। ज्ञानसुरांचें मेळावें।।११-३२६।।
हें तुझेनि आंगिकें तेझें। जालूनि सर्व कर्मांचिं बीजें।
मिलत तुज आंतु निजें। सद्भावेंसिं।।३२७।।

"पण पलीकडे जे ज्ञानी अशा सुरगणांचे मेळावे आहेत, त्यांना मात्र तुझ्या या दर्शनाने अतीव आनंद झाला आहे. तुझे हे दर्शन म्हणजे एक मोठी पर्वणीच झाली आहे त्यांना! तुझ्या या अंगभूत तेजात आपल्या सर्व कर्मांची बीजे जाळून घेत ते सुरगण सद्सद्विवेक करत तुझ्याठायी एकरूप होत आहेत."

आणिकु एकु सांविआं भयभीरु। सर्वस्वें धरूनि तुझिं मोहरुं।
तूझ प्रार्थितााति करु। जोडौनिआं।।११-३२८।।
देवा अविद्यार्णविं पडिलों। जी विषयवागुरें आंतुडलों।
स्वर्गसंसाराचां सांकडिलों। दोहिं भागिं।।३२९।।
आईसा आमुतें सोडवणें। तूझवांचौनि कीजल कवणें।
तुज शरण सर्वप्राणें। म्हणत देवा।।३३०।।
आणि महर्षि अथवा सिद्ध। कां विद्याधरसमूह विविध।
हें बोलत तूझ स्वस्तिवाद। करिति स्तवन।।३३१।।

"तर इतर काही सुरगणादी तुझे हे विश्वरूप पाहून गर्भगळीत झाले आहेत. पण तुला ओळखून ते तुझी प्रार्थना करत आहेत की, "हे प्रभू! तुला आमचा प्रणाम आहे. आम्ही अविद्यारूपी महासागरात बुडतो आहोत. विषयरूपी जाळ्यात आम्ही अडकलो आहोत. स्वर्ग व संसार यांच्या कचाट्यात आम्ही सापडलो आहोत. तुजवाचून आम्हाला यातून दुसरा कोण सोडवील! आम्ही जीवेभावे तुला शरण आहोत. तू आम्हाला या संकटातून सोडव!" ते तुला असे विनवतांना दिसत आहेत. तसेच काही महर्षी, सिद्ध, विद्याधर इ.चे वृंदही मला दिसत आहेत. ते तुला *"स्वस्ति", "स्वस्ति"* अशा शुभवचनांद्वारे स्तवत आहेत." आणि

"जैं अगाध तुझें देखिलें विश्वरूप"

हें रुद्रादित्यांचें मेलावें। वसु हन साध्य आघवें।
अश्विनौदेव विश्वेदेव विभवें। वायूहिं हें जी।।११-३३२।।
अवधारा अग्नि हन गंधर्व। पैल यक्षरक्षोगण सर्व।
जी महेंद्रमुख्यदेव। कां सिद्धादिक।।३३३।।
हें आघवेंचि आपुलां लोकीं। सोत्कंठित अवलोकीं।
हें महामूर्ति दैविकी। पाहात आहाति।।३३४।।
मग पाहात पाहात प्रतिक्षणीं। विस्मित होऊनि अंतःकरणिं।
करित निजमुकुटीं वोवालणिं। प्रभुजी तूझ।।३३५।।

"रुद्र व आदित्यगण, अष्टावसु, साध्य*(देव)*, विश्वेदेव, वायू, अश्विनीकुमार इ.सर्व वैभवशाली देव आणि ते अग्नी, गंधर्व, यक्ष व राक्षसगण, सिद्धादिक, महेंद्रप्रभृति प्रमुख देव इत्यादी सर्वच आपापल्या लोकातून उत्कंठित अंतःकरणाने तुझी ही दिव्य महामूर्ती पाहात आहेत. तुझे हे रूप पाहून क्षणोक्षणी ते अधिकाधिक आश्चर्यचकित होत जाताहेत आणि मुकुट घातलेली आपली शिरे तुजपुढे लववत जणू आपल्या मुकुटांनी तुला ओवाळीत आहेत."

तैं जयजयघोष कलरवें। स्वर्ग गाजवितााति आघवें।
ठेवित ललाटावरी बरवें। करसंपुट।।११-३३६।।
तिएं विनयद्रुमाचिएं आरविं। सुरवाडिलीं सात्त्विकाचिं माधवि।
म्हणौनि करसंपुटपल्लविं। तूं होतासि फल।।३३७।।
जी लोचना भाग्य उदैलें। जीवां सुखाचें सुयाणें पाहलें।
जैं अगाध तुझें देखिलें। विश्वरूप।।३३८।।

"हे प्रभू! ते तुझा जयजयकार करून स्वर्ग दुमदुमवून टाकत आहेत आणि ललाटी हात जोडून तुला सतत नमस्कारित आहेत. त्यांच्या त्या नम्रताभावरूपी वृक्षांच्या उद्यानात अष्टसात्त्विकभावरूपी वसंताचेच जणू आगमन झाले आहे आणि त्यामुळे जणू त्यांच्या करांजलिरूपी पल्लवात तुझे स्वस्वरूपी फल लगडले आहे. हे विश्वेशा! माझ्या लोचनांचे भाग्यच आज उदयास आले आहे. जीवास सौख्याचा सुकाळ प्राप्त झाला आहे. कारण आज तुझे हे अद्भुत असे विश्वरूप मला पाहण्यास मिळत आहे."

"प्रसीद देवेश जगन्निवास"

अर्जुनास हे असे विश्वरूप दिसत आहे. परंतु त्या रूपास भयानकतेचा स्पर्शही आहे. ती भीषणता पाहून तो म्हणतोः

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं-
महाबाहो बहुबाहूरुपादम्।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं-
दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम्।।११-२३।।
नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं-
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम्।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमं च विष्णो।।११-२४।।
दंष्ट्राकरालानि च ते मुखानि
दृष्ट्वैव कालानल सन्निभानि।
दिशो न जाने न लभे च शर्म
प्रसीद देवेश जगन्निवास।।११-२५।।

"हे महाबाहो! तुझे हे अवाढव्य, अजस्त्र असे अनेकानेक मुखांचे, अनेक नेत्रांचे, अनेक बाहूंचे, अनेक मांड्यांचे, अनेक उदरांचे आणि अनेक कराल दाढांमुळे विकराळ दिसणारे रूप पाहून सर्व लोकांना आणि मलाही भीती उत्पन्न झाली आहे. नभास स्पर्शणारे हे उत्तुंग असे सर्वव्यापी तेजस्वी, अनेक रंगांचे, जबडे पसरून *आ* वासलेले

आणि दीप्तिमान व अति विस्फारलेल्या वटारलेल्या डोळ्यांचे हे तुझे रूप पाहून माझा धीर सुटला आहे. आणि शांतीही नाहीशी झाली आहे. विक्राळ दाढांची आणि प्रलयकाळच्या अग्नीसारखी तुझी ही तोंडे पाहून मला अवकाश दिसेनासे झाले आहे. दिशा लुप्त झाल्या आहेत. माझे समाधानही हे तुझे उग्र रूप पाहून नष्ट झाले आहे. हे जगन्निवासा! देवदेवा! प्रसन्न हो. तुझे हे रूप पाहून व्यथित झालेल्या माझ्या चित्तास शांती दे!"

ज्ञानेश यावर ओव्या रचतात, त्या अशा:

हें लोकव्यापकु रूपडें। पाहातां देवांहिं चवकु पडें।
याचें सन्मुखपण जोडें। भलतेआंकडूनि।।११-३३९।।
आईसें एकुचि परि विचित्रें।
आणि भयानकें तेंविचि बहु वक्त्रें।
बहुलोचन हें सशस्त्रें। अनंतभुजा।।३४०।।
हें अनंत चारु चरण। बहु उदर आणि नाना वर्ण।
कैसें प्रतिवदनिं मातलेंपण। आवेशाचें।।३४१।।

"तुझे हे विश्वव्यापी विकराल रूप पाहून देवांनाही दरारा वाटतो आहे. जिकडे पहावे तिकडे ते आपल्याकडे डोळे वटारून पाहत आहे, असे भासते. हे विश्वरूप एकमेवाद्वितीय आहे. अति विलक्षण आणि भीषण असे ते दिसते आहे. अनेकानेक वक्त्रांचे, अनेक नेत्र असणारे, अनंतहस्तात विविध शस्त्रे धारण केलेले, अनंत सुंदर पायांचे, अनेकानेक विशाल उदरे असणारे, नाना वर्णांचे असे हे रूप आहे. त्याच्या प्रत्येक वदनावर आवेशाचा उन्माद चढलेला आहे."

हो कां जैं महाकल्पाचां अंतिं। तवकलेनि यमें जेऊत तेऊतिं।
प्रलयाग्निचीं उजिति। आंबुखलीं जैसिं।।११-३४२।।
ना तऱ्हैं संहारत्रिपुरारीचि यंत्रें। कीं प्रलयभैरवांचिं क्षेत्रें।
नाना युगांतशक्तीचि पात्रें। भूतखिंचा वोढविलीं।।३४३।।
तैसिं जिएंतिएंकडें। तुझिं वक्त्रें जी प्रचंडें।
न समाति दरीमाझिं सिंहाडें। तैसें दांत दिसति रागिट।।३४४।।

"महाप्रलयकाळी बलाढ्य यमराजाने जिकडेतिकडे प्रलयाग्नीच्या डोंब उसळणाऱ्या आगट्या पेटवाव्यात; अथवा संहार करण्यासाठी त्रिपुरारी शंकराने अस्त्रे उगारलेली असावीत; किंवा प्रळयकाळीच्या भैरवगणांचे तांडेच्या तांडे असावेत; वा युगांतकाली शक्तीने भूतमात्रांची खिचडी वाढण्यासाठी अजस्त्र पात्रे मांडावीत; तशी सर्वत्र ही तुझी अकराळविकराळ मुखे जबडे वासून राहिलेली दिसत आहेत."

तैसें कालरात्रिचेनि आंधारें। उल्हासत निघति संहारखेंचरें।
तैसिआं वदनिं प्रलयरुधिरें। कांटलिआं दाढा।।११-३४५।।
हें असो कालें अवंतिलें रण। कां सर्वसंहारें मातलें मरण।
तैसें अतिभिंगुलवाणेंपण। वदनिं तुझिएं।।३४६।।

"दरीमध्ये क्रोधाविष्ट सिंहांचा कळप दिसावा, तसे त्या मुखांतील दातांचे रौद्र स्वरूप दिसत आहे. अघोर अशा काळ्याकभिन्न रात्रीत संहारक पिशाचे असावीत, तशा प्रलयकाळाच्या प्राणिसंहाराच्या रक्ताने माखलेल्या तुझ्या भीषण दाढा त्या अजस्त्र जबड्यांमध्ये दिसत आहेत, काळाने युद्धाची दुंदुभी वाजवावी किंवा सर्वसंहार करून मृत्यूने माजावे, तसे या तुझ्या मुखांचे अति भयानक रूप मला दिसत आहे."

प्राण व्याकुळ करणारे भयानक रूप

हें बापुडीं लोकसृष्टी। मोटकिएं विपाइलीं दिठीं।
आणि दुःखकालिंदिचां तटीं। झाड होउनि ठेलीं।।११-३४७।।
तुज महामृत्युचां सागरीं। हें त्रैलोक्यजिविताचि तरी।
शोकदुर्वातलहरीं। आंदोलित असें।।३४८।।
एथ कोपौनि जऱ्हैं वैकुंठें। ऐसें हन म्हणिपेल अवचटें।
जैं तूझ लोकांचें काईं वाटें। तूं ध्यानसुख भोगिं हें।।३४९।।
वरी जैं लोकांचें किर साधारण। वायां आड सूतसें वोडण।
केंविं सहसा म्हणें प्राण। माझेंचिं कांपति।।३५०।।

"या समस्त लोकांकडे आणि त्यातील सृष्टीकडे माझी सहज नजर वळली, तर असे दिसते की ते सर्व जणू एखाद्या दुःखस्वरूप यमुनेच्या काठावर असणारे वृक्ष होत. त्यांच्या वाटेस सतत दुःखच पाहणे आले असावे जणू! महामृत्युरूपी अशा तुझ्या या विश्वरूपी सागरावर दुःखमय सोसाट्याच्या वादळात उसळलेल्या लाटांवर या त्रैलोक्यरूपी जीवननौकेचा काय पाड लागणार! माझे हे उद्गार ऐकून तुला कदाचित राग येईल आणि कोपून तू म्हणशीलही की, *"तुला या लोकांची चिंता कशासठी पडली आहे! तू आपले मी जे हे विश्वरूप दाखवतो आहे, त्याच्या ध्यानाचे सुख निवांत उपभोग!!"* खरे तर या लोकांच्या चिंतेचा मी आडोसा घेतो आहे. स्पष्टच सांगू का! तुझे हे भयानक रूप पाहून माझेच प्राण थरकापून गेले आहेत."

जिआं मज संहाररुद्र वासिपें। जिआं मज भेणें मृत्यु लपे।
तो मी आहलबाहलीं कांपें। आईसें तुवां केलें।।११-३५१।।
परि नवल बापां हें महामारी। इयां नाम विश्वरूप जऱ्हैं।
हें भ्यासुरपणें हरी। भयासि आणि।।३५२।।
ठेलीं महाकालेंसिं हटेंतटें। तैसिं कितिएक मुखें रागिटें।
इहिं वाढौनिआं धाकुटें। आकाश केलें।।३५३।।
गगनाचेनि वाडपणें ना कलें। त्रिभुवनिंचिआंहि वारिआं वेंटालें।
एआंचेनि वाफा आगि जलें। कैसें धडाडित असें।।३५४।।

"ज्याचा धाक धरून संहारक रुद्रासही धडकी भरते; ज्याला घाबरून जाऊन मृत्यू लपून बसतो; त्या मलाच चळाचळा कापायला तुझे हे विश्वरूप लावत आहे. श्रीकृष्णा! हे तुझे विश्वरूप म्हणावे की आणखीच दुसरे काही अति भयानक प्रळयंकर असे आहे की ज्याच्या भेसुरपणामुळे सर्व विश्वाचा भयाने थरकाप उडतो आहे! महाकाळाशी स्पर्धा करावीत अशी अनेक क्रोधाविष्ट मुखे या ठिकाणी मला दिसत आहेत, ज्यांच्या विस्तारापुढे आकाशही ठेंगणे आहे. जी आकाशाहूनही विशाल आहेत; त्रिभुवनातील वायूचीही ज्यांच्याठायी पत्रास नाही; अशा या मुखांच्या वाटे निघणाऱ्या अग्निज्वालांनी हे आसमंत व्यापून टाकले आहे."

"विश्वसुद्धा एका घासास पुणार नाही"

त्या तोंडांचे भयाणपण पुढे वर्णित ज्ञानदेव म्हणतातः

तेंविचिं एकसारिखें एकु नोहें। एथ वर्णावर्णाचा भेदु आहें।
हों कां जें प्रलयिं सावावो लाहें। वह्नि येयाचां।।११-३५५।।
जेआंचिएं आंगिंचि दीप्ति एवढीं। जैं त्रैलोक्य कीजैं राखौंडी।
किं तेआंहिं तोंडें आणि तोंडीं। दांत दाढा।।३५६।।

"ही तोंडे पुन्हा पहावे तर एकासारखी एक नाहीत. वर ती वेगवेगळ्या वर्णांची पण आहेत. त्यांच्यातून जे ज्वाळांचे लोट बाहेर पडत आहेत, त्यांचे सामर्थ्य घेऊनच जणू प्रलयाग्नी प्रज्वलित होतो, म्हणा ना! त्या मुखांतून प्रकटणारे हे तेज आणि शरीरकांतीची दीप्ती इतकी प्रचंड आहेत की त्यांच्यामुळे उभ्या त्रिभुवनाची सहजच राखरांगोळी होऊन जाईल! अशा त्या तोंडामध्ये दात आणि दाढाही तशाच कराल आहेत."

कैसा वारया धनुर्वात चढिला। समुद्र कीं महापुरीं पडिला।
विषाग्निं मारा प्रवर्तला। वडवानलासिं।।११-३५७।।
हालाहल आगिं पिआलें। नवल मरण मारा पेटलें।
तैसें संहारतेजां ययां जाहालें। वदन देखा।।३५८।।

"जणू वाऱ्याला धनुर्वात व्हावा; समुद्राने मर्यादा उल्लंघून अवघी सृष्टी गिळण्यास प्रवृत्त व्हावे; विषाग्नीने वडवानळास आपल्या पोटी समावून घ्यावे; अथवा कालकूट विषाने अग्नी प्यावा; मृत्यूने मृत्यूस मारण्यास प्रवृत्त व्हावे; किंवा मृत्यूस मृत्युरूप अग्नीने वेष्टून घ्यावे; त्याप्रमाणे हे तुझ्या मुखातील संहारक तेज दिसत आहे."

परि कोणें मानें विशाल। जैसें तुटलिआं अंतराल।
आकाशासिं कव्हल। पडौनि ठेलें।।११-३५९।।
ना तन्हैं कांखें सूनि वसुंधरी। जैं हिरण्याक्षु रिघाला विवरीं।
तैं उघडिलें हाटकेश्वरीं। जेंविं पातालकुहर।।३६०।।
तैसा वक्त्रांचा विकासु। माजिं जिह्वांचा आगलाचि आवेसु।
विश्व न पुरे म्हणौनि घांसु। न भरीचि कोडें।।३६१।।

"आणि तुझे हे जबडे किती प्रचंड आणि विशाल आहेत म्हणून सांगावे! जसे काही अंतरीक्षच तुटून पडल्यासारखे ते दिसत आहेत. पृथ्वी बगलेत मारून *हिरण्याक्ष* पाताळाच्या विवरात शिरला आणि हाटकेश्वरी त्यातून बाहेर पडला, तेव्हाच्या पाताळकुहरासारखे हे *आ* वासलेले तुझे हे जबडे अतिप्रचंड - मिती नसलेलेच जसे काही आहेत! आणि त्यांच्यातील जिह्वांचा जोष तर काही आगळाच विलक्षण असा आहे. सहज म्हणून त्यांच्या घासास हे विश्वही पुरणार नाही!"

भयाण शहारे आणणारे रूप

आणि पातालव्यालांचां फूत्कारीं। गरलज्वाला लागति अंबरीं।
तैसिं पसरलिआं वदनदरी-। माजिं हें जिह्वा।।११-३६२।।
काढूनि प्रलयवीजूंचिं जुंबाडें। जैसें पन्नासिलें गगनाचें हुडें।
तैसें आवालुवांवरी आंकडें। धगधगित दाढांचें।।३६३।।
आणि ललाटपटांचिएं खोलें। कैसें भयांतैं भेडवताति डोलें।
हो कां जैं महामृत्यूचें उमालें। कवडसां राहिलें।।३६४।।
आईसें वाऊनि महाभयाचें भोज।
एथ काएं निफजवूं पाहतोसि काज।
तैं नेणें परि मज। मरणभय आलें।।३६५।।

"आणि पाताळलोकींच्या सर्पांच्या फूत्कारांनी त्यांच्या विषाच्या ज्वाला थेट स्वर्गापर्यंत जाउन भिडतात, तशी या तुझ्या वासलेल्या मुखरूपी दरीतील जिह्वा दिसत आहे. प्रळयकालाच्या विद्युल्लतांचे लोळ एकत्र करून गगनात बुरुज उभारावेत, तशी तुझ्या हिरड्यांवर असणाऱ्या तीक्ष्ण दाढांची टोके दिसत आहेत. ललाटपट्टीच्या खळग्यात दिसणारे तुझे डोळे तर भयासही धाक पाडतील असे आहेत. जणू महामृत्यूचा लोटच त्यांच्या रूपाने डोळ्यांच्या गवाक्षांतून बाहेर पडत आहे. या महाभीतिदायक विश्वरूपाचे कौतुक दाखवून तू काय साधू पाहत आहेस, ते कळत नाही. पण मला मात्र ते पाहून मृत्युपेक्षा मोठे भय वाटू लागले आहे."

देवा विश्वरूप पाहावयाचें डोहलें। केलें तिएं पावलोंपावलें।
बा देखलासि आतां डोलें.। निवावें तैसें निवालें।।११-३६६।।
अहो देहों पार्थिव कीर जाएं। येयाचि काकुलुति कवणां आहे।
परि आतां चैतन्य माझें विपाएं। वांचें किं न वांचें।।३६७।।
एरविं भयास्तंव आंग कांपें। नांवेक आगलें तन्हैं मन तापें।
अथवा बुद्धिहीं वासिपें। अभिमानु विसरिजैं।।३६८।।
परि एतुलाहिं वेगला। जो केवल आनंदैककला।
तेआं अंतरात्मयाहिं निश्चलां। शियारी आलीं।।३६९।।

"तुझे विश्वरूप पाहण्याचे मला डोहाळे लागले होते. ते बाकी आता छान पुरवले गेलेत! तुझे हे स्वरूप पाहून माझे डोळे अगदी छान निवलेत, बरे का! मी म्हणतो की देह केवळ पार्थिवच असतो. तो गेला तर जाऊ द्या! पण तू तर हे असले घोर रूप दाखवून माझ्यातील चेतना पण घालवली आहेस, झाले! तू माझी इच्छा छानच पुरवलीस आणि मला चांगलीच अद्दल घडवलीस! भयामुळे फार तर अंगाचा थरकाप होतो. झाले तर मन खूप व्याकुळ होते किंवा बुद्धी धसका घेते. अहंकार जिरून जातो! पण हे तर महाभय तू मला घातले आहेस की ज्याच्यामुळे या मन-बुद्धि-शरीर व अहंकाराहून वेगळा असा जो केवळ आनंदाचा अंश मजठायी अंतरात्म्याच्या रूपाने वसतो आहे, त्यालाही त्या तुझ्या रूपाच्या भयाणपणामुळे शहारे आले आहेत!!"

"कसली ही कृपा"

अर्जुनाच्या या उपरोधोक्तीची धार काही वेगळ्याच प्रकारची आहे. तो पुढे म्हणतोः

बाप साक्षात्काराचा वेधु। कैसा देशधडी केला बोधु।
हा गुरुशिष्यसंबंधु। विपाएं नांदें।।११-३७०।।

देवा तुझां एं दर्शनीं। जैं वैकल्य उफजलें आहें अंत:करणिं।
तैं सांवरावेआंलागिं गंवसणि। धैर्याचि करितसें।।३७१।।
तंव माझेनि नामें धैर्य हारपलें।
कीं तेआंहिं वरी विश्वरूपदर्शन जाहालें।...।।३७२।।

"काय हा आदर्श असा आपला गुरुशिष्यसंबंध आहे पहा! त्याने साक्षात्काराचे निमित्त करून बोधासच देशोधडी पाठवून दिले आहे!! देवा! तुझ्या या दर्शनामुळे माझ्या अंतःकरणास विकलता आली आहे. ते सावरण्यासाठी मी धैर्याची गवसणी करत आहे. तोच माझ्या धैर्याची नांवनिशाणी पण लोपली! काय झाले कोण जाणे! मला तर वाटते की धैर्यालासुद्धा तुझ्या या विश्वरूपाचे दर्शन झाले असावे!"

..।हें असो परि मज आंतुडविलें। उपदेशासिं।।११-३७२।।
जीव विसंवावआंचिआं चाडां। धांवाधावि करितसें बापुडा।
परि सोएं हिं कवणाकडां। न लभें एथ।।३७३।।

"काही का असेना! तू मात्र मला चांगलेच तुझ्या या गुरुपदेशाच्या जंजाळात सापडवले आहेस! कोठून मला ही तुझा उपदेश घेण्याची बुद्धी झाली, कळेना! जीवाला शांती प्राप्त व्हावी, विसावा लाभावा म्हणून मी बापडा धावाधाव करत होतो. तुला त्यासाठी मी गुरू पण करून घेतले. पण या तुझ्या दर्शनाने काही ती सोय उरू दिली नाही."

आईसें विश्वरूपाचिआं महामारीं। जिवित्व गेलें आहें चराचरीं।
जीं न बोलें तऱ्हैं काएं करीं। कैसेनि राहें।।११-३७४।।
पैं अखंड डोलांपुढें। फुटिलें जैसें महाभयाचें भांडें।
तैसिं तुझीं मुखें वितंडें। पसरलीं देखें।।३७५।।

"या तुझ्या विश्वरूपाच्या महामृत्युपुढे चराचरातील जीवितच उरलेले नाही. मग मी दुसरे ते काय म्हणू तुला! न बोलावे काही, तर मग गप्प तरी कसे बसावे! डोळ्यांसमोर महामृत्यूचे अजस्र भांडार फुटावे, तशी तुझी ही विस्तृत पसरलेली मुखे माझ्या दृष्टीसमोर अचानक आली आहेत."

असो दांतदाढांचि दाटी। न झांकवें मा दों दों वोठीं।
सैंघ प्रलयशस्त्रांचिआं दाट कंठीं।
लागिंलिआं जैशां।।११-३७६।।
जैसें तक्षका विख भरिलें। हों कां जैं कालरात्रीं भूत संचरलें।
कीं आग्नेयास्त्र परजिलें। वज्राग्नि जैसें।।३७७।।
तैसिं तुझीं वक्त्रें प्रचंडें। वरी आवेश हा बाहेरीं वोसंडें।
आलें मरणरसाचें लोंढें। आम्हांवरी।।३७८।।

"प्रळयकालाच्या महारुद्राची शस्त्रे घनदाट कुंपणे बनून राहिलीत तर जशी दिसतील, तशा तुझ्या या मुखात दाढा आणि दात यांची भयावह दाटीवाटी झाली आहे. इतकी की दोन्ही ओठांना ती झाकता पण येत नाहीत! तक्षकाच्या अति विषारी मुखात कालकूट जहर भरावे; किंवा कालरात्रीने आपला जबडा पसरावा व त्यात भुते शिरावीत; अथवा वज्राग्नीने स्वतःहाती आग्नेयास्त्र परजावे; तशी तुझी ही अति प्रचंड वक्त्रे मला भासताहेत! त्या भयंकर मुखातून त्वेष, आवेश, आवेग इतका ओतप्रोत भरून बाहेर पडतो आहे की जणू विश्वावर मृत्युरूपी लाव्हारसाचे लोंढेच्या लोंढेच कोसळून पडावेत!"

"संहर संहरी आपुली माया"

हे भयावह वर्णन अजून संपलेले नाही. पुढे ऐकाः

संहारसमयींचा चंडानिलु। आणि महाकल्पांत प्रलयानलु।
या दोहिं जैं होएं मेलु। तैं काएं एक न जलें।।११-३७९।।
तैसिं संहारकें तुझिं मुखें। देखोनि धीरु कां आम्हां पारुखें।
आतां भुललों दिशा मी न देखें। आपणपें नेणें।।३८०।।
मोटकें विश्वरूप डोलां देखिलें। आणि सुखाचें अवर्षण पडिलें।
आतां जापाणि जापाणि आपुलें। अवास्तव हें।।३८१।।

"संहारसमयीच्या चंडवात आणि प्रळयांतीचा अग्नी यांचा जेव्हा मेळ होतो, तेव्हा न जळणारे असे काय उरते! तुझी मुखेही त्या महाकल्पांतीच्या प्रळयाप्रमाणे संहारक आणि जीव विदारून टाकणारी आहेत. त्यांना पाहून माझे धैर्य मला सोडून गेले आहे. दिङ्मूढ होऊन मला दिशासुद्धा दिसेनाशा झाल्या आहेत. स्वतःचे भानही मला त्यांच्यामुळे उरले नाही. तुझे हे विश्वरूप माझ्या डोळ्यांनी जो पाहिले न पाहिले, तोच सुखाचा दुष्काळ पडला आहे. हे अनंता! दयाघना! तुझे हे घोर अकटोविकट रूप आता आवरून घे! आणि माझे आणि या विश्वाचे प्राण वाचव!"

आईसें करिसिं म्हणौनि जऱ्हैं जाणें।
तऱ्हैं हें गोष्टी सांघाविं कां मी म्हणें।
आतां एक हेल वांचविं जी प्राणें।
ययां स्वरूपप्रलयापासौनि।।११-३८२।।
जऱ्हैं तूं गोसांवि आमुचा अनंता।
तऱ्हैं सुईं वोडण माझिआं जिवितां।
सांटविं पसारा हा माघुता। माहामारीचां।।३८३।।

"विश्वरूप दाखव असे मी म्हटले, तेव्हा तू हे असे अति दारुण स्वरूप प्रकटवशील, हे जर मला माहीत असते, तर त्याची वार्ता पण मी कधी काढली नसती! आता एकच कर! या तुझ्या स्वरूपप्रळयापासून मला सोडव आणि माझ्या प्राणांचे रक्षण कर! हे श्रीकृष्णा! तू आमचा स्वामी खरेच जर असशील, तर माझ्या प्राणांपुढे तू ढाल धर आणि या भयानक स्वरूपाच्या महामारीची माया आवरून घे!"

आईकें सकल देवांचिएं परदेवतें। तुवां चैतन्यें गां विश्व वसतें।
तैं विसरलासि हें उपरतें। संहारु आदरिलें।।११-३८४।।
म्हणौनि वेगिं प्रसन्न होईं देवराया। संहरी संहरी आपुलीं माया।
काढीं मातें महाभया। पासौनिआं।।३८५।।
हा ठायवरी पुढतपुढुति। तूंतें म्हणिजे बहुवा काकुलुति।
आईसा मी विश्वमूर्ति। भेडका जाहालों।।३८६।।

"हे सर्व देवांहून श्रेष्ठतर देवा! ऐक! तुझ्या चैतन्यामुळे हे विश्व वसते. तू हे विसरलास की काय! हे कोणते उफराटे कार्य तू करत आहेस! या विश्वाचा संहार का तू करू पाहत आहेस! हे देवराया!

सत्वर प्रसन्न हो आणि आपली ही माया आवर! मला या महाभयापासून तार! तुला हे वारंवार विनवायला लगत आहे, इतका मी तुझ्या या विश्वाकार महाभयंकर रूपाने भ्यालो आहे."

विश्वरूपाची इतर वर्णने::::

वैदिक वाङ्मयातील विश्वरूप

अर्जुनाचे प्राण कंठाशी आणणारे, विश्वाचा स्वाहाकार करू पाहणारे, महाकल्पांताचा प्रळय उडवून देणारे, **गगनाहूनही *वाड*** असे हे विश्वरूप त्याच्यापुढे साकारले होते. ते पाहण्यासाठी त्याला भगवंतांनी दिव्यचक्षू दिले होते. त्या चक्षूंशिवाय, नुसत्या चर्मचक्षूंना हे विश्वरूप कृष्णांनी दाखवले असताही, अर्जुनास ते दिसू शकत नव्हते.

गीतेने प्रकट केलेले हे विश्वरूप असेच अथवा कमीअधिक फरकाने इतरही वैदिक वाङ्मयात वर्णिलेले आहे. पं.वि.दा.सातवळेकर यांनी त्यांच्या भगवद्गीतेवरील ***"पुरुषार्थबोधिनी"*** या टीकेत याविषयी विस्तृत विवेचन केलेले आहे. जिज्ञासूंनी ते मुळातूनच पाहणे योग्य ठरेल. वैदिक विश्वातील विश्वरूपदर्शनाचे बृहत संकलन त्यांच्या ग्रंथात अकराव्या अध्यायप्रसंगी केलेले दिसते. आपणास त्यांच्या ग्रंथातील काही भागाचा या विषयानिमित्त स्फुट उल्लेख आणि विचार करणे उचित ठरेल. त्यामुळे ***विश्वरूप*** या संकल्पनेचा उचित परामर्ष घेता येईल.

गीतेत विखुरलेली विश्वरूपाची संकल्पना

गीतेचे तत्त्वज्ञान चिद्विलासी अद्वैताचे आहे. एकच आत्मा हे सर्व विश्व व्यापून उरलेला आहे; ***"त्यतिष्ठत् दशाङ्गुलम्"*** अशी त्याची व्याप्ती आहे. महाभूते व सर्व चराचर, प्राणिमात्र यात तोच आत्मा वसतो; त्याच्याच आधाराने हे विश्व स्थित आहे; तो एकमेवाद्वितीय आहे; चेतनेचा मूलस्त्रोत तो आत्माच आहे; इत्यादी गोष्टी या तत्त्वज्ञानात अभिप्रेत आहेत. त्यांचा सविस्तर विचार पिंड-ब्रह्मांडाचा विचार करतांना - विशेषतः तेराव्या अध्यायप्रसंगी ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** विचारानिमित्ताने आपण केलेलाच आहे.

ज्ञानदेव म्हणतात तसा हा आत्मा ***स्वसंवेद्य*** आहे. तो तसा असल्यानेच त्याचा साक्षात्कार घडून येऊ शकतो. **साक्षात्कार म्हणजे स्वतःच स्वतःच्या स्वरूपाची अनुभूती घेणे. *विश्वरूपदर्शन* हा याच साक्षात्काराचा एक भाग आहे.** विश्वरूपाची संकल्पना गीतेने वेगवेगळ्या अध्यायी मांडली आहे, हे पुढील श्लोकांवरून स्पष्ट होते.

१) ***"सर्वगतः (आत्मा) (२-२४)"*** - आत्मा सनातन आहे. सर्वत्र स्थित आहे. तो नित्य आहे. अचल आहे. अचिंत्य आहे. तो असा असूनही सामान्यांस दिसत नाही. त्यासाठीच दिव्यचक्षूंचे प्रयोजन श्रीकृष्णांना करावे लागले.

२) ***"सर्वगतं ब्रह्म (३-१५)"*** - ब्रह्म सर्वव्यापक आहे. त्याच्यापासूनच सर्वांची उत्पत्ती आहे.

३) ***"ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् (४-२४)"*** - यज्ञच ब्रह्म आहे. सर्व यज्ञीय वस्तुही ब्रह्मच आहेत. कर्मच ब्रह्मरूप आहे. ब्रह्माची अशी ओळख करून घेणारी बुद्धी ब्रह्मप्राप्ती करून घेते. सर्वच विश्व ब्रह्म आहे.

४) ***"सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि। ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।६-२९।।"*** - ज्याचा आत्मा योगयुक्त झाला आहे, तो सर्वत्र समदृष्टीने पाहतो. सर्व भूतांना आत्म्याठायी पाहतो आणि आत्म्यास सर्व भूतांठायी पाहतो. आत्मा विश्वव्यापी आहे. त्याचे असे दर्शन योगामुळे प्राप्त होते. हाच स्वसंवेद्य आत्म्याचा साक्षात्कार! हीच स्वरूपानुभूती!

५) ***"वासुदेवः सर्वम् (७-१९)"*** - जे काही आहे, ते सर्व वासुदेवच आहे. ***"हें समस्तहिं श्रीवासुदेओ"*** अशी ज्यास अनुभूती येते, तो महात्मा आहे. हे असे विश्वरूपदर्शन अत्यंत दुर्लभ आहे.

६) ***"समोऽहं सर्वभूतेषु (९-२९)"*** - आत्मा सर्व भूतांशी समभाव ठेवतो. त्याला कोणी जवळचा नाही. कोणी दूरचा नाही. त्याची अनन्यभक्ती करणारा सन्मार्गगामी होतो. त्यास निरंतर शांती प्राप्त होते.

७) ***"विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् (१०-४२)"*** - आत्मा अमर्याद विस्तारला आहे. हे सर्व जगत तो आपल्या केवळ एका अंशाने व्यापून राहिला आहे. त्यातील जे जे काही आहे, ते ते सर्व आत्म्यानेच व्यापले आहे. सर्व काही आत्माच आहे.

८) ***"अनंतरूप विश्वरूप (११-१६)"* व *"(सर्वे) सर्वः (११-४०)"*** - आत्म्याची अनंत रूपे आहेत. तो विश्वरूप आहे. आत्मा सर्वात्मक आहे. तोच सर्व आहे.

याप्रमाणे गीता ठिकठिकाणी विश्वरूप आत्म्याचे दर्शन घडवत असते. जिज्ञासूंना असे अजूनही बरेच गीताश्लोक सापडतील. कारण **गीतेचे तत्त्वज्ञान याच आत्मरूपावर - *सर्वगत* आत्म्यावर आधारित आहे.** असो.

पुरुषसूक्तातील विश्वरूप

गीतेतील विश्वरूपास बरेच समांतर असे विश्वरूप ***पुरुष सूक्त***ात आढळते *(ऋग्वेद १०/९० व अथर्ववेद)*. सहस्त्रशीर्ष असणारा, सहस्त्रो नेत्र असणारा, सहस्त्रो पायांचा, सर्व पृथ्वी व्यापणारा, ती व्यापूनही दशांगुले उरणारा असा हा विश्वपुरुष त्यात वर्णिला आहे. भूत-वर्तमान-भविष्यत् जे काही झाले - आहे - होणार आहे, ते त्याचेच रूप आहे. ***चंद्रमा हे या पुरुषाचे मन आहे. सूर्य त्याचा चक्षू आहे,*** इ.वर्णन ***"सहस्त्रशीर्षाः पुरुषः सहस्त्राक्षः सहस्त्रपात्। स भूमिं विश्वतो-वृत्वाऽत्यतिष्ठद्दशाङ्गुलम्।।"*** या मंत्राने आरंभ होणाऱ्या सूक्तातून आले आहे. त्या पुरुषाचे मुख इंद्र व अग्नी आहेत. प्राण वायू आहे. नाभिस्थान अंतरीक्ष असून मस्तक म्हणजे द्युल्लोक, पाय म्हणजे भूमी, कान दिशा आणि सर्व लोक वा भुवने त्याचे इतर अवयव आहेत, अशी स्पष्ट कल्पना या सूक्तात मांडलेली आढळते. गीताभ्यासकांसाठी हे सूक्त फार महत्त्वाचे आहे आणि विश्वरूपाची संकल्पना खरी काय आहे, यावर त्यातून बराच प्रकाश पडतो, हे सांगणे न लगे!

मुण्डकातील विश्वरूप

पुरुषसूक्ताशी समानधर्मा असा मुंडकोपनिषदाचा एक मंत्र घेऊ या:

"अग्निर्मूर्धा चक्षुषी चन्द्रसूर्यौ दिशः श्रोत्रे वाग्विवृताश्च वेदाः। वायुः प्राणो हृदयं विश्वमस्य पद्भ्यां पृथिवी ह्येष सर्वभूतान्तरात्मा।।२/१/४।।मुं।।" - अग्नी मूर्धा, सूर्य-चंद्र नेत्र, दिशा कान, वेद म्हणजे वाणी, वायू प्राण, विश्व हृदय, पृथिवी पाय अशा रूपात हा ***विश्वांतरात्मा*** मुंडकातील ऋषींना दिसतो आहे. ***पुरुषसूक्त*** व हा मुंडकातील मंत्र यांच्या विश्वरूपकल्पनेचा ताळमेळ चांगलाच बसतो, हे आपणास त्वरित जाणवते. सूक्त काय किंवा उपनिषद काय, द्रष्ट्या ऋषींनी आपली अनुभूती त्यात ओतलेली असल्याने, आत्म्याचे असे सारख्याच प्रकाराने त्यांना दर्शन होते, यात काय नवल! वैदिक वाङ्मयात इतरत्रही अशीच या विश्वरूप आत्म्याची वर्णने येतात.

ऋग्वेद व विश्वरूप

"तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चन्द्रमाः। तदेव शुक्रं तद् ब्रह्म ता आपः स प्रजापति।।वा.य.३२/१।।" - ते एकच अग्नी, आदित्य, वायू, चंद्र, शुक्र, जल, प्रजापती आणि ब्रह्म बनले आहे. ***"तवाग्ने होत्रं तव पोत्रमृत्वियं तव नेष्ट्रं त्वमग्निधृतायवः। तव प्रशास्त्रं त्वमध्वरीयसि ब्रह्मा चासि गृहपतिश्च नो इमे।।ऋ.२/१/२।।"*** - अग्नी हाच आमचा गृहाचा स्वामी आहे. अर्थात तोच यजमान आहे. तोच होता आहे; पोता आहे; ऋत्विज, नेष्टा, अग्नीध्र, प्रशास्ता, अध्वर्यु, ब्रह्मा इ.याजक गणांचे कर्म करणारा हा अग्नीच आहे.

गीतेतील ***"ब्रह्मार्पणं ब्रह्महवि ... ।।४-२४।।"*** या श्लोकाची येथे आठवण होते. ***"अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम्। मंत्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम्।।९-१६।।"*** हा गीताश्लोक वरील ऋग्वेदीय ऋचेशी फार मिळताजुळता आहे. यज्ञात ब्रह्म पाहणारे ते ऋषी होत, ज्यांनी हे द्रष्टेपण आपल्यासाठी या ऋचा व श्लोकांद्वारे परंपरेने आणून पोहोचवले आहे. ब्रह्मच अर्पण, हवि, अग्नी, आहुती आहे; असे यातून प्रतीत होते. यज्ञात ब्रह्म वा आत्मा पाहणारे हे द्रष्टे ऋषी विश्वरूपाचे साक्षात दर्शन करून धन्य झाले! आपणही त्यांच्या या संकल्पनांचा वेध घेत विश्वरूपाला गंवसणी घालण्याचे स्वप्न पाहू या!!

रुद्र, यजुर्वेद व विश्वरूप

यजुर्वेदाची मुख्य देवता ***रुद्र*** आहे. गीतेच्या विभूतिदर्शनासारखेच रुद्रस्वरूपाचे दर्शन यजुर्वेदाच्या रुद्रपाठात होते. त्यातून रुद्रदेवतेचे विश्वरूप दाखविले आहे. ***रुद्रपाठ*** करणाऱ्यांस रुद्राच्या विश्वरूपाची अनुभूती मिळावी, अशी स्वाभाविक इच्छा असते. किंबहुना त्या प्रकारच्या साक्षात्काराविना रुद्रपाठ करणे व्यर्थच ठरेल, नाही का! रुद्रपाठ जिज्ञासूंनी मुळातूनच पहावा. कारण तो विस्तृत आहे. आपल्या विवेचनासाठी एवढी माहिती रुद्रसूक्ताबद्दल पुरेशी आहे. असो.

अथर्ववेदातील विश्वरूप

आता अथर्ववेदातील विश्वरूप संक्षिप्तपणे पाहू या. ***"एतद्वै विश्वरूपं सर्वरूपं गोरूपं।।अ.९/७/२५।।"*** - इंद्रियांना प्रतीत होणारी जी काही रूपे आहेत, ती सर्व रूपे विश्वरूप होत. ***"पृथिव्यां विश्वरूपम्। अन्तरिक्षे विश्वरूपम्। दिवि विश्वरूपम्। देवेषु विश्वरूपम्। लोकेषु विश्वरूपम्।।अ. ९/६(११)।।७ ते ११।।"*** - या मंत्रातून म्हटल्याप्रमाणेसुद्धा पृथिवी, अंतरीक्ष, द्युलोक, देव आणि सर्व लोक वा भुवने, त्यातील भूतजात इ.सर्व मिळून हे विश्वरूप होते. सर्व विश्वरूप परमेश्वराने उत्पन्न केले आणि तो त्या सर्वात प्रविष्ट होऊन राहिला आहे. हे सर्व मिळून एकच होते ***("तत् संभूय एकं एक भवति।। अ.१०/८/११।।").*** *अथर्ववेद* व इतर वैदिक वाङ्मय यांद्वारे विश्वरूपाची एकच एक संकल्पना असल्याचे यावरून दिसून येते.

ईशोपनिषद

ईश उपनिषदही काय म्हणते, पहा: ***"यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः। तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः।।ईश.।।७।।"*** - सर्व भूतमात्रच आत्मा होऊन गेलेले आहेत. हे ओळखून त्याची अनुभूती घेणाऱ्या, त्या एकत्वाचा साक्षात्कार ज्याला झाला आहे, त्यास शोक व मोह कसा होणार! अर्थातच ***"वासुदेवः सर्वम्"*** असे हे गीतेप्रमाणेच ईशोपनिषदाच्या अनुभूतीचे स्वरूप दिसत आहे, हे जिज्ञासूंच्या लक्षात आलेच असणार! असो.

कठोपनिषद

कठोपनिषद सांगते, ***"नेह नानाऽस्ति किञ्चन।।"*** - कोणत्याही प्रकारचे नानात्व येथे नाही. मनानेच हे ओळखले पाहिजे. यासाठीच दिव्यदृष्टी हवी. प्रश्नोपनिषद, मुंडकोपनिषद यातूनही असेच ***विश्वरूप*** दिसते.

मांडुक्य तर उच्चरवाने हेच रूप सांगतांना म्हणते: ***"ओमित्येतदक्षरमिदँ सर्वम्। भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोङ्कार एव। यच्चान्यत्त्रिकालातीतं तदप्योङ्कार एव।। सर्वँ ह्येतद् ब्रह्मायमात्मा ब्रह्म।।मां.।।१ व २।। एकात्मप्रत्ययसारं ... शिवमद्वैतम्।।७।। शिवोऽद्वैत ... आत्मा।।१२।।मां।।"*** - ॐ या एकाच अक्षराने या सर्व विश्वाचा बोध होतो. भूत-वर्तमान-भविष्यातील सर्व काही हाच ***ॐकार*** आहे. ***त्रिकालातीत असे पण सर्व ॐकारच आहे. हे सर्वच ब्रह्म आहे. हा आत्माही ब्रह्म आहे. हा आत्मा सर्वांचा एक आहे. हा मंगल आत्मा सर्वत्र एकच आहे.*** अशीच उपनिषदद्रष्ट्या ऋषींची अनुभूती असल्याचे या सूत्रातून स्पष्ट होते आहे. ***विश्वरूपदर्शन*** याहून वेगळे ते काय असणार!

औपनिषदिक विश्वरूप

तैत्तिरीयोपनिषद् (१/७) हे **पुरुषसूक्त**ासारखेच या सद्वस्तूचे वर्णन करते. ***"ओमेति ब्रह्म। ओमितीदँ सर्वम्।। तै.उ.।।१/८।।"*** - हे सूत्र तर स्पष्टच मांडूक्याप्रमाणे ***"ॐकारच ब्रह्म आहे, हे सर्व ॐकारच आहे,"*** अशी अनुभूती प्रमाणित करतांना दिसते.

ऐतरेयोपनिषद् (१/१/४) प्रमाणे आरंभी आत्मा कसा एकच होता व त्यापासून या सर्वांची कशी धारणा झाली इ.सांगितले आहे. ***"प्रज्ञानं ब्रह्म (ऐ.उ.३/१/३)"*** मध्ये ***आत्माच ब्रह्म आहे,*** असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे.

छांदोग्य उपनिषदसुद्धा ***"गायत्री वा इदं सर्वं भूतं यदिदं किञ्च।।"; "सर्वं खल्विदं ब्रह्म।।छां.उ.।।"*** असे म्हणते आहे. ***जे काही येथे आहे, ते गायत्री आहे. गायत्री ही प्राणांची देवता आहे. ही सर्व ब्रह्मच आहेत.*** पुढे *सूत्र क्र.६/८/७* मध्ये हा संदेश स्पष्ट केला आहेः ***"स य एषोऽणिमैतदात्म्यमिदँ सर्वं तत्सत्यँ स आत्मा, तत् त्वं असि श्वेतकेतो।।" - "ते तू आहेस! ते तो आहे! ते मी आहे! ते सर्व आहे! तेच हे सर्व आहे!"*** असे ऋषींनी येथे म्हटले आहे.

अर्जुनासही अर्थातच या वैदिक सूक्तांतून व औपनिषदिक सूत्रांतून वर्णिलेली अनुभूती घ्यावीशी वाटत होती. श्रीकृष्णांनी त्याला ते विश्वरूप दाखवले. पण युद्धाच्या छायेत त्या रूपात घोर विनाशकारी भाव आला की काय न कळे! विश्वरूप पाहून कृतार्थ होण्याऐवजी तो आपली मनःशांती हरवून बसलेला दिसतो. असे का व्हावे, त्याचाही योगवैज्ञानिक दृष्ट्या आपण विचार करणार आहोत. पण तत्पूर्वी ऋषिमुनींनी, योगवेत्त्यांनी, द्रष्ट्यांनी जे मंगल असे विश्वरूप पाहिलेले वेदवाङ्मयातून प्रतीत होते, त्याचा थोडा अधिक परिचय करून घेऊ या!

बृहदारण्यक

बृहदारण्यकोपनिषदातूनसुद्धा ***("आत्मैवेदमग्र आसीत्पुरुषविधः ..।।१/४/१।।" व "ब्रह्म वा इदमग्र आसीत्तदात्मानमेवावेत् अहं। ब्रह्मास्मीति। ...।।१/४/१०।।")*** **प्रारंभी ब्रह्म होते; त्याने आपल्याला मी ब्रह्म आहे, असे ओळखले; त्या ज्ञानाने तो हे सर्व झाला; असे आत्म्याचे स्वसंवेद्य विश्वरूप वर्णिलेले आढळून येते.** ***ब्रह्मज्ञान म्हणजे याच रूपाची अनुभूती वा साक्षात्कार! ज्याला हे ज्ञान होते, ही अनुभूती प्राप्त होते, तो ब्रह्मच होतो.*** अर्जुनासही ब्रह्मच व्हावयाची अभिलाषा होती आणि त्याच मनीषेपोटी त्याला हे ***विश्वरूप*** पहावयाचे होते, हे आपल्या आता लक्षात आलेच असेल!! बृहदारण्यकातील *सूत्रे क्र. ३/७/३ ते २२* ही पुरुषसूक्ताची आठवण व्हावी अशीच आहेत. जिज्ञासूंनी ***"यस्य पृथिवी शरीरं, यस्य आपः शरीरं, ... "*** इ.भाग जरूर त्या उपनिषदातून पहावा.

श्वेताश्वतर

श्वेताश्वतरोपनिषद ईश-जीव-प्रकृति व ब्रह्म यांविषयी थोडे स्पष्टीकरण करत म्हणत आहे कीः ***"ज्ञाज्ञौ द्वावजावीशनीशावजा ह्येका भोक्तृभोगार्थयुक्ता। अनन्ताश्चात्मा विश्वरूपो ह्यकर्ता त्रयं यदा विन्दते ब्रह्ममेतत्।।१/९।।श्वे.उ.।।"*** - **एक ज्ञाता आहे आणि दुसरा अज्ञ आहे.** एक ***ईश्वर*** आहे आणि दुसरा असमर्थ आहे; परंतु हे दोन्ही न जन्मणारे आहेत. तिसरी एक न जन्मणारी ***प्रकृति*** आहे. ही जीवाच्या उपभोगार्थ आहे. याप्रमाणे हे ***ईश, जीव व प्रकृति*** असे तीन पदार्थ आहेत. एक अनंत अकर्ता ***विश्वरूपी आत्मा*** आहे. यांच्या मीलनास ***ब्रह्म*** असे म्हणतात. ***आत्माच ब्रह्म आहे.*** ब्रह्माची अशी व्याख्या हे उपनिषद करते. *श्वेत.उप.३/१४ ते २१* या मंत्रांतून विश्वव्यापक आत्म्याचे ***विश्वरूपदर्शन*** दिसते. ते वैदिक वाङ्मयातील इतर ठिकाणी असलेल्या वर्णनाशी तसे मिळतेजुळतेच आहे.

उच्छिष्टसूक्त

यानंतर एक अत्यंत महत्त्वाचे अथर्ववेदीय सूक्त पाहू या. ***उच्छिष्टसूक्त*** म्हणून ते प्रसिद्ध आहे. हे सूक्त गीतेशी फारच समांतर असे वर्णन करणारे आहे. पं.सातवळेकरांनी अभ्यासकांचे त्याकडे लक्ष वेधले आहे, ते प्रसंगोचितच ठरते. हे सूक्त मुळापासून येथे देणे शक्य नाही. तरी जिज्ञासूंनी ते संदर्भांकित ग्रंथात पहावे. आपण येथे फक्त त्या सूक्ताचा गोषवारा पहाणार आहोत.

उच्छिष्टनामक देवतेनेच हे सर्व विश्व कसे धारण केले आहे, हा भाग त्या सूक्तात येतो. या सूक्ताची सुरुवात होते, ती अशीः ***"उच्छिष्टे नाम रूपं चोच्छिष्ट लोक आहितः। उच्छिष्ट इन्द्रश्चाग्निश्च विश्वमन्तः समाहितम्।। ....."*** - "उच्छिष्टात नाम-रूप आणि सर्व लोक राहिले आहेत. इंद्र, अग्नी व संपूर्ण विश्व यातच समावलेले आहे. द्युलोक, भूलोक आणि सर्व काही वस्तुमात्र यातच राहिलेले आहे. जल, समुद्र, चंद्रमा, वायू सर्व यातच आहेत. ही सर्व माझ्यात आहेत. ऋग्वेदादी सर्व उच्छिष्टात आहेत."

"ऋत, सत्य, तप, राष्ट्र, श्रम, धर्म, कर्म, भूत, भविष्य, वीर्य, लक्ष्मी, बल, समृद्धी, शक्ती, व्यवसाय, क्षात्रबल, सहा भूमी, संवत्सर, वाणी, दान, ग्रह, हवि, चार होता, अग्नी, सर्व यज्ञ, होम, मास, ऋतू, अयन, दगड, रेत, औषधी, वनस्पती, गवत, अभ्र, वीज, प्राप्ती, व्याप्ती, समाप्ती, पूर्ण विस्तार, उन्नती, अत्यंत समृद्धी इ.सर्वच या उच्छिष्टात राहिले आहेत."

"जो प्राणांच्याद्वारे जीवन करतो आणि जो डोळ्यांनी पाहतो ते सर्व, तसेच द्युलोकाच्या आश्रयाने राहणारे सर्व देव उच्छिष्टापासून उत्पन्न झालेले आहेत. ऋग्वेद, सामवेद, छंद, पुराण, यजुर्वेद, प्राण, अपान, चक्षू, क्षोत्र, अविनाश, आनंद, हर्ष, प्रमोद, तृप्ती, संतोष, देव, पितर, मनुष्य, गंधर्व, अप्सरा हे सर्व उच्छिष्टापासून झाले आहेत."

या सूक्तातून सांगितलेले हे **सर्व भाव वा पदार्थ उच्छिष्टात आहेत, त्याच्या आधाराने राहतात आणि त्याच्यापासून उत्पन्न झालेले आहेत**, असे म्हटले आहे. याचा भावार्थ असा की **हे सर्व ब्रह्म आहेत, हे सर्व ब्रह्मात वसतात आणि त्याच्यापासूनच उत्पन्न झालेले आहेत.** दूरान्वयाने हा ***"सुवर्णाची अंबिका, सुवर्णाचा त्रिशूळ व सुवर्णाचाच महिषासुर"*** असा प्रकार आहे.

विश्वाचे हे जे स्वरूप ***उच्छिष्टसूक्त*** वर्णिते, ते गीता-ज्ञानेश्वरीतील रूपाहून भिन्न नाही. गीतेतील विभूतीसुद्धा या सूक्तात त्याचप्रकारे

दाखवल्या आहेत. ***विभूतियोग*** या अध्यायाशी असे या सूक्ताचे जवळचे नाते असल्याचे स्पष्ट आहे. म्हणूनच या सूक्ताचे हे विस्तृत विवेचन अभ्यासकांच्या उपयोगाचे आहे. असो.

पं.वि.दा.सातवळेकरांचे विश्वरूपदर्शनविषयक मत

आतापावेतो आपण वैदिक वाङ्मयातून होणारे ***विश्वरूपदर्शन*** पाहिले. पं.सातवळेकरांनी केलेल्या याविषयक संकलनात्मक अभ्यासाचा आपणास त्यासाठी बराच उपयोग झाला. त्यांच्या आपल्यावरील या ऋणाचा निर्देश येथे केलाच पाहिजे. त्यांच्यासारख्या महर्षितुल्य व्यक्तीच या ***भारतीय विद्येच्या भवना***च्या आणि त्यातील भांडाराच्या खऱ्या रक्षक होत. जिज्ञासूंनी त्यांचे वैदिक वाङ्मयावरील ग्रंथ आणि विशेषेकरून त्यांची गीतेवरील ***पुरुषार्थबोधिनी टीका*** जरूर अभ्यासावी व समजावून घ्यावी, अशीच आहे! इत्यलम्।

पं.सातवळेकरांनी भगवद्गीतेतील विश्वरूपाबाबत जे मत व्यक्त केले आहे, तेही उल्लेखनीय आहे, म्हणून जाताजाता तेही पाहू या *(भगवद्गीता:पुरुषार्थबोधिनी टीका)*: त्यांचे असे मत दिसून येते की भगवद्गीतेच्या विश्वरूप वर्णनात संपूर्ण विश्वरूपाचे वर्णन नाही; फक्त विनाशक कालस्वरूपाचे वर्णन तेथे आहे. म्हणून ते वर्णन परिपूर्ण समजणे उचित नाही. परमेश्वराची उत्पत्ती, स्थिती, संहार इ.अनेक कार्ये आहेत आणि तदनुरूप त्याची रूपे विश्वात प्रकट होत असतात. ती सर्वच्या सर्व रूपे परमेश्वराच्या विश्वरूपात संमीलित आहेत आणि ज्या वेळी साधक ती सर्व रूपे परमात्म्याच्या स्वरूपात समाविष्ट झालेली पाहील, त्यावेळी त्याला परमात्म्याच्या विश्वरूपाचे ज्ञान झाले आहे, असे होऊ शकेल.

यावरून भगवद्गीतेतील **अकराव्या अध्यायातील विश्वरूपाचे जे वर्णन आहे, ते विशेषतः*ईश्वराच्या संहारभावाचे* आहे**, असे पं.सातवळेकरांचे म्हणणे आहे. मनुष्य ईश्वराच्या अनंत अशा विश्वरूपाचे वर्णन करू शकणार नाही. म्हणून इतर वैदिक वाङ्मयाद्वारे त्याचा जमेल तितका परिचय करून घेणे इष्टच आहे. तरीही ते वर्णन पूर्णतया करणे अशक्यच आहे.***विश्व,सर्व*** या शब्दांनीच ते कदाचित करता येईल, असे पं.सातवळेकर म्हणतात. इतर वर्णन अंशैकमात्र केवळ ठरेल!

पं.सातवळेकरांचे वरील मत जिज्ञासूंनी जरूर विचारात घ्यावे. आपल्या पुढील विवेचनाला त्याचा उपयोग होणार आहे. विश्वरूपाचे दर्शन योग्यांना केव्हा व कसे होते, याची योग-वैज्ञानिक पार्श्वभूमी आपणास अभ्यासावयाची आहे. त्यावेळी या मताचा अधिक विचार करता येईल. एवढी भूमिका समजावून घेतल्यावर गीतेच्या अकराव्या अध्यायातील भागाशी पुनः अनुसंधान साधू या.

भयानक कालस्वरूपाचे प्रयोजन::::

अर्जुन व विश्वरूप

विश्वरूपाचे अति दारुण दर्शन होऊन, रुद्रासही धाक पाडणारा अर्जुन भयभीत झाला, हा भाग आपण पाहिलाच आहे. आपल्यासारख्या धैर्यवान पुरुषासही त्या रूपाने कसे गर्भगळीत करून सोडले आहे, याची स्पष्ट कबुली देत तो पुढे म्हणतोः

जैं अमरावतिएं आला धाडा। तैं मियां एकलेनि केला उबेडा।
जो मी कालाचिआंहि तोंडां। वासिपु न धरी।।११-३८७।।
परि तेआं आंतुल नोहें हें देवा। एथ मृत्यूसही करूनि चढावा।
तुवां आमुचाचि घोंटु भरावा। ययां सकल विश्वेंसिं।।३८८।।

"प्रत्यक्ष कळिकाळाच्या जबड्याचाही मी धाक धरत नाही. जेव्हा इंद्राच्या अमरपुरीवर राक्षसांची धाड आली होती, तेव्हा मी एकट्याने ती परतवून लावली होती. त्यांचे अतुल सामर्थ्य मी केवळ माझ्या एकट्याच्या बाहुबलाने जिंकले. परंतु हे श्रीकृष्णा! आताची गोष्ट त्यातली नव्हे. हे विश्वरूप तर प्रत्यक्ष मृत्यूवरही चढाई करून जात या सकळ विश्वासह आमचा सर्वांचा मृत्यूसह एकाच घोटात अंत करणार असे समोर दिसत आहे."

कैसा न होतां प्रलयाचां वेलु। गोरवां तूंचि मिनलासि कालु।
बापुडा हा त्रिभुवनगोलु। अल्पायु जाहाला।।११-३८९।।
अहा भाग्यां विपरितां। विघ्न उठिलें शांत करितां।
कटां विश्व गेलें आतां। तूं लागलासि ग्रासु।।३९०।।
हें नोहें मा रोकडें। सैंघ पसरूनिआं तोंडें।
कवलितासि चहूंकडें। सैन्यें इयें।।३९१।।

"आता प्रळयाची वेळ आलेली नसतांनाही तूच अकस्मात काय हा प्रळयकाळ मांडला आहेस! बिचाऱ्या त्रैलोक्याच्या आयुष्याची दोरी आता तुटल्यातच जमा आहे! काय दुर्भाग्य आहे पहा! विश्वरूप पाहून शांती प्राप्त व्हावी असा विचार मी करतो आहे, तोच हे विघ्न येथे उपटले आणि तू या विश्वाचा ग्रास करू लागलास! हाय रे दुर्दैवा! आता जगबुडीच झाली आहे! आणि एवढेच काय! आपली ही असंख्य तोंडे वासून ही सैन्ये तू चहूकडून गिळू लागला आहेस!"

"विशन्ति नाशाय समृद्धवेगाः"

तो पुढे हणतोः

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः
सर्वे सहैवावनिपालसङ्घैः।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ
सहस्मदीयैरपि योधमुख्यैः।।११-२६।।
वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति
दंष्ट्राकरालानि भयानकानि।
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु
सन्दृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः।।११-२७।।
यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः
समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति।
तथा तवामी नरलोकवीरा-
विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति
।।११-२८।।

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा-
विशन्ति नाशाय समृद्धवेगाः।
तथैव नाशाय विशन्ति लोका-
स्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः।।११-२९।।
लेलिह्यसे ग्रसमानः समन्ता-
ल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं-
भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो।।११-३०।।

"पहा राजांच्या क्षात्रसमुदायासह धृतराष्ट्राचे सर्व पुत्र, भीष्म, द्रोण, तसेच हा सूतपुत्र कर्ण, आमच्या पक्षाच्या प्रमुखप्रमुख योद्ध्यांसह तुझ्या या विक्राळ दाढांच्या भयानक तोंडामध्ये भराभर शिरत आहेत; काहींच्या मस्तकांचा तुझ्या दाढांमध्ये सापडून चुराडा झाल्याचेही मला दिसत आहे. नद्यांच्या पाण्याचे मोठाले लोंढेच्या लोंढे समुद्राकडे ज्या त्वरेने धावत जाऊन मिळतात, तसेच हे नरवीर सर्व बाजूंनी तुझ्या प्रज्वलित अशा या अनेक मुखात प्रवेशत आहेत. प्रदीप्त ज्वालाग्नीत पतंग जसे मरणास कवटाळत वेगाने उड्या घालतात, तद्वतच तुझ्या या भयंकर मुखांमध्ये हे सर्व लोक आपल्या विनाशास कवटाळत अत्यंत वेगाने शिरत आहेत. हे विष्णो! आपल्या जिह्वा चाटत या सर्व लोकांना आपल्या जाज्वल्य मुखांनी तू ग्रासून टाकत आहेस! तुझे प्रखर तेज सर्व जगास व्यापून टाकत आहे. तुझी प्रभा उग्रतेने या त्रिभुवनात सर्वत्र तळपत आहे."

समोर युद्धाचा प्रसंग उभा आहे. घनघोर रणसंग्राम होऊ घातला आहे. अठरा अक्षौहिणी सैन्य युद्धास सज्ज झाले आहे. अतुल पराक्रमी व बलशाली वीर आणि योद्धे, अतिरथी, महारथी, हत्ती, घोडे, सैनिक झुंजीत भाग घेण्यास उत्सुक होऊन गर्जना करत आहेत. रणदुंदुभी, भेऱ्या, शिंगे, शंख, नौबती वाजत आहेत. संहारापूर्वीचा मोठा कोलाहल तेथे माजला आहे.

अटीतटीचे युद्ध होऊन एक तर कौरव तरी उरतील किंवा पांडव वाचतील, अशा कृतनिश्चयाने सगळे जमा झाले आहेत. रुधिराचे समुद्र आता उसळणार आहेत. कळिकाळ आपले अत्युग्र रूप प्रकट करत सर्वांना ग्रासणार आहे. अर्जुनाच्या मनावर याचे चित्र चांगलेच ठसले आहे. अशा मानसिकतेत त्याला विश्वरूपाचे हे घोर, विनाशक स्वरूप दिसले नसते, तरच नवल!

ज्ञानदेवांच्या शब्दात हे वर्णन ज्या प्रकारे साकारते, ते असेः

नोहेति हें कौरवकुळिंचें वीर। आंधळिआं धृतराष्ट्राचें कुमर।
तैं गेलें गेलें सपरिवार। तुझां वदनिं।।११-३९२।।
आणि जैं जैं यांचेनि सांवांएं। आलें देशोंदेशिंचें रायें।
तेआंचें सांघावेआं जाओ न लाहें।
आईसें सरकटितु आहासि।।३९३।।
मदमुखाचिआं संघटां। घेत आहासि घटघटां।
आरणिं हन थाटा। देतोसि मिठी।।३९४।।
जंत्रावरीचिल मार। पदातिंचें मोगर।
मुखाआंतु भार। हारपताति मां।।३९५।।
कृतांताचिआं जावलीं। जें एकचि विश्वातैं गिळीं।
तिएं कोटीवरील सगळीं। गिळितसें शस्त्रें।।३९६।।

अर्जुन म्हणतो: "हे पहा ते आंधळ्या धृतराष्ट्राचे पुत्र! पहा ना कसे ते सगळे आपापल्या परिवारासह तुझ्या मुखी पडताहेत! आणि यांच्या साहाय्यार्थ जे कोणी देशोदेशींचे राजे येथे कुरुक्षेत्री जमले आहेत, ते पण तू ग्रासत आहेस. त्यांचा मागमूसही उरेल की नाही, कळत नाही! मदोन्मत्त गजांचे कळपच्या कळप तू गिळून टाकत आहेस. युद्धभूमीवरील सेनासमुदायासही तू स्वाहा करत आहेस! युद्धयंत्रांवरून मारा करणारे सैनिक व पायदळ यांच्या झुंडीच्या झुंडी तुझ्या मुखात गडप होत आहेत. यमाची जुळी भावंडेच जणू शोभतील आणि विश्वाचा एकेकटेच जे ग्रास करू शकतील, अशी कोट्यवधी शस्त्रे तू गिळून टाकत आहेस."

चतुरंगा परिवारां। संजोडिआं रहिवरां।
दांत न लाविसि मा परमेश्वरा।
कसा तुष्टालासि बरवा।।११-३९७।।
हां गां भीष्माआईसा कवणु। सत्यशौर्यनिपुणु।
तोहीं आणि ब्राह्मणु द्रोणु।
ग्रासिलासि कटाकटां।।३९८।।
अहा सहस्त्रकराचा कुमरु। एथ गेला गेला कर्णवीरु।
आणि आमुचिआं आघविआंचा केरु।
फेडिला देखैं।।३९९।।
कटकटां धातआं। कैसें जाहालें अनुग्रहां एआं।
मिआं प्रार्थौनि जगां बापुडिआं।
आणिलें मरण।।४००।।

"हत्ती, अश्व, रथ, पायदळ अशी सज्ज चतुरंगदले तू त्यांच्या परिवारासह आणि अश्व जोडलेल्या रथांसह दातही न लावता सहजच मुखाद्वारे गिळत आहेस! एवढा विस्तृत *आ* पसरून तू उभा आहेस! आणि हे सर्व भक्षून तुला किती आनंद झालेला दिसतो आहे म्हणून सांगू! अरे! भीष्माएवढा सत्यप्रतिज्ञ आणि शूरवीर दुसरा कोणीतरी या अवनीतलावर आहे का! तू त्याला आणि त्या द्रोणाचार्य ब्राह्मणालाही गिळून टाकलेस की! आणि तो सूर्यपुत्र कर्ण! तोही वीर तू आपल्या मुखात घातलास! आणि आमच्याकडचे सगळेच्या सगळे वीर तू कस्पटाप्रमाणे ग्रासून घातलेस! हाय रे विधात्या! हा कोणत्या प्रकारचा अनुग्रह मी आवर्जून मागितला! विश्वरूपदर्शनाचा हा विपरीत अनुग्रह प्रार्थून मी तर बिचाऱ्या या जगाला मरणाच्या खाईतच लोटले आहे!"

"कसला हा अनुग्रह"

पुढे तो म्हणतोः

माघां थोडिआं बहुवां उपपत्ति। एणें सांघितलिआं विभूति।
तैसा नसेचि मां पुढुति। बैसलों पुसों।।११-४०१।।

म्हणौनि भोग्य तैं त्रिशुद्धि न चुके।
आणि बुद्धिहिं होणिएरां सारखी ठाके।
माझां कपालीं पीटावां लोकें।
तैं लोटेल काह्यां।।४०२।।

"देवाने कृपाळुपणे मागे त्याच्या विभूतींचा विस्तार किती आहे, ते सांगितले होते. पण प्रत्यक्षात ते तसे दिसत नव्हते. म्हणून मी त्याला तुझे विश्वरूप दाखव म्हणून विनवले. तो अगदी मोठा अविचारीपणा झाला माझ्याकडून! होणारी गोष्ट त्रिकाळीही चुकत नाही. जसे ब्रह्मदेवाने भाळी लिहिले असेल, तसे करण्याची बुद्धी मनुष्यास होते. माझ्यामुळे विश्वाचा ग्रास झाला असा लोकांनी माझ्या नांवाने शंख करावा, अशीच जर माझी नियती असेल, तर ती चुकेल तरी कशी!"

पूर्वीं अमृतहिं हातां आलें। परि देव नसतेंचि उगलें।
मग कालकूट उगवलें। सेंवटां जैसें।।११-४०३।।
परि तैं एकबगिं थोडें। केलिआं प्रतिकारामाजिवडें।
आणि तिएं अवसरींचें तैं सांकडें।
निस्तरविलें शंभू।।४०४।।
आतां हा जलता वारा कैं वेंटालें।
कोणा हें विषभरिलें गगन गिलें।
महाकालेंसिं खेलें। आंगवत असें।।४०५।।
आइसा अर्जुनु दुःखें सिणतु। शोचितु असें जीवाआंतु।
परि न देखें तो प्रस्तुतु। अभिप्राओ देवाचा।।४०६।।

"पूर्वी देवदानवांनी समुद्रमंथन केले, तेव्हा चांगले अमृत प्राप्त झाले होते! ते पावून त्यांनी संतोषाने रहावे की नाही! पण ते काही तसे स्वस्थ बसून राहिले नाहीत आणि समुद्रास आपले ढवळतच सुटले! मग शेवटी त्याचे किती घोर परिणाम झाले! त्या वेळचे ते कालकूट हलाहल तरी बरेच म्हणावयाचे! ते निस्तरता तरी आले. त्या वेळचे ते संकट शंभूमहादेवाने निवारले. पण आताच्या या विश्वरूपाचे काय करावे! हा जळता वायू कोणास आवरेल! हे विष भरलेले अवकाश कोण गिळेल! महाकाळाशी झुंज देईल असा कोण आहे या त्रिलोकी! हे विश्वरूपाचे भयानक संकट मी जगावर ओढवून आणले आहे. अरेरे!" अर्जुन असा हळहळत होता. त्याच्या जीवांतर्यामी विषाद भरून राहिला होता. कारण तो देवाचे मनोगत ओळखू शकत नव्हता."

जैं मी तारितां हें कौरव मरतें।
आईसेनि वेंटालिला होता मोहें बहुतें।
तो फेडावेयालागिं अनंतें।
हें दाखविलें निज।।११-४०७।।
अरे कोण्ही कोण्हातें न मारी। एथ मीचि हो सर्व संहारीं।
हें विश्वरूपव्याजें हरी। प्रकटवितु असें।।४०८।।
परि वांयांचि व्याकुलता। तैं न चोजवेंचि पांडुसुता।
मग अहा कंपु नसता। वाढवित असें।।४०९।।

"मी यांना मारणारा आणि हे कौरव माझ्या हातून मारले जाणारे" असा जो अज्ञानजन्य भ्रम त्याला पडला होता, तो फेडण्यासाठी अनंत अशा त्या श्रीकृष्णभगवंतांनी आपले निजस्वरूप त्याच्यासाठी प्रकट केले होते. *"अरे कोण मारणारा आणि कोण मरणारे! मी स्वतःच सर्वांचा नाश करतो. कोणी कोणास मारत नाही. मीच त्यांना मारणारा आणि तारणारा!"* असे विश्वरूप प्रकटवून श्रीहरी त्याला दाखवत होते. पण तो भगवंताचा भाव न समजल्याने अर्जुन व्यर्थच व्याकुळ झाला; उगीचच भीती धरून कष्टी होत होता!"

तत्त्वज्ञानाचे मूर्त रूप न ओळखणारा अर्जुन

त्याचे अधिक वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

तेथ म्हणे पाहा हो एकें हेलें। सासिकवचेंसिं दोनिं दलें।
वदनिं गेलीं आभालें। गगनिं कां जैसिं।।११-४१०।।
कां महाकल्पाचां सेंवटीं। जैं कृतांतु कोपला होएं सृष्टी।
तैं एकविसाहिं स्वर्गा मिठी। पातालासगट दें।।४११।।
ना तन्हें उदासीनें दैवें। संचकाचि वैभवें।
जेथिंचि तेथ स्वभावें। विलआं जाति।।४१२।।
तैसिं सांचलीं सैन्यें एकवाटें। इयें मुखिं जाहालीं प्रविष्टें।
परि एकहिं तोंडौनि न सुटे। कैसें कर्म देखा।।४१३।।

अर्जुन भयकंपित होत म्हणू लागलाः "आकाशात आलेले ढग जसे भराभर नाहीसे व्हावेत, तशी ही दोन्ही सैन्ये तलवार, ढाली, चिलखत इत्यादी सर्वांसकट या विश्वरूपाच्या मुखात जाऊन अदृश्य होत आहेत, पहा! महाकल्पांताच्या अखेरीस कोपलेल्या कृतांतकालाने सृष्टीची एकवीसच्या एकवीस भुवने स्वर्गपाताळासकट ग्रासून टाकावीत; किंवा दैव फिरल्यावर कृपणाने साठवून ठेवलेले सर्व द्रव्य अकस्मात जसे काहीसे व्हावे, तशी ही एकत्र जमलेली सैन्ये याच्या मुखात प्रविष्ट होत एकदम नाहीशी होत आहेत. त्याच्या या भयाण तोंडांतून कोणी एकही वाचत नाही, पहा! कसे हे विपरीत कर्म आहे!"

अशोकाचें अंघवसें। चघलिलें कन्हेनि जैसें।
वक्त्रामाजिं तैसें। वायां गेलें।।११-४१४।।
परि सिसालें मुगुटेंसिं। पडिलीं दाढांचां सांडसीं।
पीठ होत कैसिं। दिसत आहाति।।४१५।।
तिएं रत्ने दांतांचिआं सवडीं। कूट लागलें जिभेचां बुडीं।
काहिं कंहिं आगरडीं। दंष्ट्रांचि माखली।।४१६।।
हो कां जैं विश्वरूप कालें। ग्रासिलीं लोकांची शरीरें बलें।
परि जीवदेहिंचि सिसालें। अवश्य कीं राखिलीं।।४१७।।
तैसिं शरीरामाजिं चोखडीं। होतिं उत्तमांगें इयें फुडीं।
म्हणौनि महाकालांचांहि तोंडिं। परि उरलीं शेखिं।।४१८।।

"उंटाने अशोकाचे ढगळे चघळून फस्त करावेत, तसे हे सैन्य याच्याकडून ग्रासून टाकले जात आहे. आणि मुकुटांसह शिरे दातांच्या सांडशीत कशी अडकलेली दिसताहेत म्हणावे! मुकुटांतील रत्नांचे दातांत सापडून चूर्ण होत आहे. काही रत्ने दातांच्या फटीत अडकून

पडलेलीही दिसताहेत आणि रत्नचूर्णाने दातांची अग्रे माखली गेली आहेत. विश्वरूप काळाने लोकांचे देह बळेकरून ग्रासून टाकले आहेत खरे! पण मला वाटते की शरीराचा उत्तम भाग असणारी मस्तके त्याने उरू दिली असावीत. महाकाळ अशा त्या विश्वरूपाने त्यांना शिल्लक ठेवलेले दिसत आहे!"

अर्जुनास विश्वरूपदर्शनाने आलेली विषण्णता

मग म्हणे हें काईं। जन्मलिआं आन मोहरचि नाहीं।
जग आपैसेंचि वदनडोहिं। संचरताहें।।११-४१९।।
इयां आघविआंचि सृष्टी। लागलिआं आहाति वदनाचिआं वाटीं।
आणि हा जेथिंचा तेथ मिठी। देतसें उगला।।४२०।।
ब्रह्मादिकु समस्त। उंचा मुखामाजिं धांवत।
एर हें सामान्य भरत। ऐलिंचि वदनिं।।४२१।।
आणिकहिं भूतजात। तैं उपजलेंचि ठाईं ग्रासित।
परि याचिआं मुखां निभ्रांत। न सुटेंचि काईं।।४२२।।

अर्जुन पुढे म्हणू लागला: "जन्माला आलेल्या प्राण्यांना दुसरी गतीच नसावी! सर्वांचीच वाटचाल आपोआप त्या विश्वरूपाच्या मृत्युमुखाकडे कशी होत आहे, पहा! सगळे जगच त्या विश्वरूपाच्या कालमुखात प्रवेशत आहे. सगळ्याच्या सगळ्या सृष्टी त्या विश्वरूपाच्या मुखरूपी डोहात बुडून जात आहेत. आणि हे विश्वरूप जागच्या जागीच त्यांना गिळून टाकत आहे. ब्रह्मदेवादी देव याच्या मुखात सरळ धाव घेत आहेत, तर सामान्य प्राणी याच्या मुखात सहजच पडतांना दिसत आहेत. जे जे भूतमात्र म्हणून आहे, त्याचा उपजल्याठायीच याच्या मुखात ग्रास होतो आहे. याच्या तावडीतून कोणीच सुटत नाही."

जैसें महानदीचें वोघ। वहिलें ठाकिति समुद्राचें आंग।
तैसें आघविआंचिकडूनि जग। प्रवेशत मुखें।।११-४२३।।
आयुष्पपंथें प्राणिगणीं। करौनि अहोरात्रांचि सोवाणि।
वेगें वक्त्रामिळणिं। साधिजत आहाति।।४२४।।

"महानदीचे प्रवाह जसे वेगवेगळ्या मुखांनी धावत येऊन समुद्राच्या अंगी येऊन ठाकतात, तसे सर्व बाजूंनी हे जग या विश्वरूपाच्या मुखी प्रवेशतांना दिसत आहे. आयुष्यक्रमणाच्या पंथावर अहोरात्रांच्या पायऱ्या करून हे सर्व प्राणी वेगाने त्या चढून जात आहेत आणि त्या मुखामध्ये जाऊन पडत आहेत. ज्वालामुखीने पेटलेल्या पर्वताच्या गवाक्षात पतंगांच्या झुंडीच्या झुंडी जशा उड्या घालतात, तसे हे समग्र लोक या विश्वरूपाच्या वह्नीसम मुखात उड्या घेतांना मला दिसत आहेत. तापलेल्या लोखंडावर पडलेल्या पाण्याप्रमाणे, जे जे काही याच्या मुखी पडत आहे, ते गिळले जात आहे; आणि वहिवाटीपुरतेसुद्धा त्यांचे नामरूप उरलेले दिसत नाही."

आणि एतुलेंहिं आरोगण। करितां भुकें नाहीं उणेपण।
कैसें दीपन असाधारण। उदयलें एयां।।११-४२७।।
जैसा रोगिआं ज्वराहूनि उठिला। कां भणंगा दुकालु पडिला।
तैसा जिह्वांचा ललललाटु देखिला।
आवलुवें चाटितां।।४२८।।
तैसिं आहाराचेनि नांवें काहिं।
तोंडापासौनि उरलेंचि नाहिं।
कैसिं समसमित नवाई। भुकेलेपणाचिं।।४२९।।

"आणि हे एवढे प्रचंड खाद्य मिळूनही तुझी भूक कशी ती शमतांना दिसतच नाही! जठराग्नीला ही असामान्य दीप्ती कशामुळे आली आहे तुझ्या! रोगी ज्वरातून उठावा किंवा भिकाऱ्याला दुष्काळातून सुकाळात आणावे म्हणजे त्यांना काय खाऊ अन काय नको, असे होऊन जाते, तसेच तू करत आहेस! इतके सगळे गिळूनही तुझी वखवख तशीच्या तशीच आहे आणि आणखी काही खाण्यासाठी तू जिभल्या चाटत बसला आहेस. तुझ्या मुखी न पडलेली अशी आता कोणतीही वस्तू उरलेली नाही. केवढी खरमरीत भूक आहे तुझी!"

काएं सागराचां घोंटु भरावा। किं पर्वताचां घांसु करावा।
ब्रह्मकटाहो घालावा। आसकाचि दाढें।।११-४३०।।
दिशा सगलिआंचि गिलाविआं। चांदिणिआं चाटूनि घेआविआं।
आईसें वर्तत आहें सांविआं। लौल्य बा तूझें।।४३१।।

"सागराचा एकाच घोटात फडशा पाडावा; पर्वताचा एकच घास करावा; अख्खे ब्रह्मांड दाढेखाली घालावे; दिशा सगळ्या गिळून घ्याव्यात; चांदण्यांसह आकाश चाटून टाकावे; असेच ना तुला भुकेजल्यापोटी वाटत आहे!"

जैसा भोगु कामु वाढे। कां इंधनें आगिसिं हकाक चढें।
तैसिं खातखातांचि तोंडें। खाकतैं ठेलीं।।११-४३२।।
कैसें एकचि एवढें पसरिलें।
त्रिभुवन आहें जिह्वाग्रीं टेंकिलें।
जैसें कां कविठ घातिलें। वडवानलीं।।४३३।।
आईसिं अपारें वदनें। आतां एतुलीं कैंचि त्रिभुवनें।
कां आहारु न मिलतां एणें मानें।
वाढविलीं असह्या।।४३४।।

"उपभोगांनी काम जसा वाढतो, इंधनाने अग्नी जसा अधिकाधिक प्रदीप्त होतो; तशीच तुझी ही सर्व काही गिळंकृत करणारी तोंडे एवढे विश्व गिळूनही अधिकच खाखा करत राहिली आहेत!! वडवानळी कवठ टाकावे, तसे हे त्रिभुवन तुझ्या लवलवणाऱ्या जिह्वाग्री दिसत आहे, इतका तुझ्या मुखाचा विस्तार आहे. आणि ती मुखे तरी इतकी अगणित आहेत की त्यांना प्रत्येकाला चाटायला एकएक त्रिभुवन इतकी त्रिभुवने तरी कोठून असणार! या मुखांचा ताप कोणालाही सहन होत नाही. त्यांच्या आहाराची काहीच सोय केलेली नसतांना तू ती एवढी कशासाठी वाढवून ठेवली आहेस ही तोंडे!"

अगां हा लोकु बापुडा। जाहालां वदनज्वालां वरपडा।
जैसिं वणवेआंचिआं वेढां। सांपडति मृगें।।११-४३५।।

आतां तैसें विश्वासि जाहालें। देओ नोहें हें कर्म आलें।
किं जगजलचरां पांगिलें। कालजालें।।४३६।।
आतां इयें अंगप्रभेचिएं वागुरें।
कोण्हीकडूनि निगिजैल चराचरें।
वक्त्रें नहोति जोहरें। वोडविलीच जगां।।४३७।।

"त्या तुझ्या वदनांतून निघणाऱ्या ज्वाळांनी हा सर्व लोक जळून टाकला जात आहे. वणव्याने वेढलेल्या मृगांसारखी जगाची गत झाली आहे. तू देव नाहीस! तुझे हे विश्वरूपही नाही! काय कर्म निपजले म्हणू! पण काळाने जगरूपी जळचरासाठी हे जाळेच फेकले आहे! आता त्यातून या चराचर विश्वाची सुटका कशी होणार! तुझ्या या विश्वरूप शरीराच्या तेजोरूपाच्या होरपळीतून जग कसे काय वाचणार! ही तुझी तोंडे नव्हेत! ती तर जगासाठी भयंकर लाक्षागृहेच पेटवलेली आहेत."

आगिं आपुलेनि दाहकपणें। कैसेनि पोलिजें तैं नेणें।
परि जेआं लागें तेआं प्राणें। सुटिका नाहीं।।४३८।।
माझेनि तिखटपणें। कैसें निवटें हें शस्त्र काईं जाणें।
कां आपुलिआं मारा नेणें। विख जैसें।।४३९।।
तैसिं तुज काईं। आपुलिआं उग्रपणाचि सेंचि नाहिं।
परि ऐलिकडें मुखीं खाईं। हों सरलीं जगाचिं।।४४०।।

"आपल्या अंगीचे दाहकपण कसे पोळवते, ते अग्नीस ठाऊकही नसते. पण ज्यास तो लागतो, त्याचे प्राण काही वाचत नाहीत. आपल्या अंगीचे घातकपण कसे आहे, ते शस्त्र जाणत नाही. विषास आपण मारक आहोत, हे माहीतही नसते. पण म्हणून शस्त्राने आणि विषाने प्राण्यांचा घात व्हायचा कधी राहिला आहे का! त्यांच्याचप्रमाणे तुलाही तुझ्या या विश्वरूपाचे उग्रपण किती दाहक आहे, हे बिलकुल आठवणीत नाही. पण इकडे तुझ्या या मुखांमुळे जगाची मरणघटिका ओढवलेली आहे!"

अगां आत्मा तूं एकु। सकलविश्वव्यापकु।
तऱ्हें कां आम्हां अंतकु। वोढविलासिं।।११-४४१।।
तऱ्हैं मिआं सांडिलीं जिविताचि चाड।
आणि तुवांहिं न धरावीं भीड।
मनिं आहें तैं उघड। बोल पां मुखैं।।४४२।।
किती वाढविसि या उग्ररुपा।
अंगिंचें भगवंतपण आठविं बापा।
नाहिं तऱ्हैं कृपा। मजपुरतिं पाहिं।।४४३।।

"हे विश्वेश्वरा! हे विष्णो! अरे, तू तर सकल विश्वव्यापक आत्मा आहेस! तू आमचा अंत करणाऱ्या यमासारखा का पुढे आला आहेस! मी तर तुझी ही अगोचर करणी पाहून जीविताची आशाच सोडून दिली आहे. तेव्हा तू पण भीड न धरता स्पष्टच सांग की हे उग्र रूप असे किती तू वाढवत बसणार आहेस! जरा आपल्या अंगीचे भगवंतपण आठव. कमीतकमी माझ्यापुरते तरी कृपादृष्टीने पहा आणि हे उग्ररूप आवरून घे!"

"न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्"

पण तरीही ते उग्र रूप काही हटेना! मग काकुळतीला आलेला अर्जुन म्हणू लागला:

आख्याहि मे को भवानुग्ररूपो-
नमोऽस्तु ते देववर प्रसीद।
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं-
न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्।।११-३१।।

"हे उग्र रूप धारण केलेला तू कोण आहेस, ते मला सांग. हे देवश्रेष्ठा! मी तुला नमस्कार करतो. माझ्यावर अनुग्रह कर. तुला जाणून घ्यावे अशी माझी इच्छा आहे. तू कोण आदिपुरुष आहेस आणि तू येथे असे हे रूप का धारण केले आहेस, ते मला सांग. ते मला कळेनासे झाले आहे."

परि एक हेल वेदवेद्या। त्रिभुवनाचिआं आद्या।
विनवणि विश्ववंद्या। आइकें माझिं।।११-४४४।।
आईसें बोलौनि वीरें। चरण नमस्कारिलें शिरे।
मग म्हणें तऱ्हैं सर्वेश्वरें। अवधारिजों।।४४५।।
मिआं होवाआं समाधान। पुसिलें विश्वरूपध्यान।
आणि एकें कालें त्रिभुवन। गिलितुचि उठिलासिं।।४४६।।

अर्जुन विनवतो की: "हे वेदवेद्या! हे विश्वाच्या आद्या! हे विश्ववंद्या! माझी एक विनंती ऐक!"असे म्हणून त्या वीरशिरोमणीने त्या विश्वमूर्तीच्या चरणांवर शिर ठेवून नमस्कार केला व म्हटले, "माझी इच्छा होती की विश्वरूपाचे ध्यान करावे. त्यासाठी ते कसे दिसते ते तर पाहिले पाहिजे. म्हणून तुला विश्वरूप दाखवण्यास मी विनवले. तो काय! तू हे त्रिभुवनच एकदम गिळायला उठलास!"

तऱ्हें तूं कोण्ह कां एतुलीं। इयें भ्यासुरें मुखें कां मेलविलीं।
आघवांचि करीं परिजिलीं। शस्त्रें काह्यां।।११-४४७।।
जी जंव तवं रागिटपणें। वाढौनि गगना अणितोसि उणें।
कां डोलें करूनि भिंगुलवाणें। भेडसावित आहासि।।४४८।।
एथ कृतांतेसिं देवा। कासया किजतसें हेवा।
आपुलां तुवां सांघावा। अभिप्राव मज।।४४९।।

"तेव्हा तू आता सांग की तू कोण आहेस? ही इतकी भेसूर मुखे घेऊन तू येथे का उभा राहिला आहेस? आणि तुझा रागीटपणा एवढा वाढला आहे की तो आकाशालाही न्यूनत्व आणत आहे. डोळे वटारून रागाने पाहत तू आम्हाला काय म्हणून भिववत आहेस? तू ही कृतांतकाळाशी स्पर्धा कशासाठी आरंभली आहेस? तुझा हे असे भयंकर रूप धारण करण्यामागे कोणता उद्देश आहे, तो मला सांग!"

अनंतोक्ती

अर्जुन देवाला हे म्हणाल्यावर देव बोलू लागले:

ययां बोलां म्हणे अनंतु। मी कोण्ह हें आहासि पुसतु।
आणि कायिसयालागिं असें वाढतु। उग्रतेसिं।।११-४५०।।

"मी कोण आहे, हे तू विचारत आहेस. आणि हे रूप इतके उग्र का केले आहे, ते तू जाणून घेऊ इच्छित आहेस ना! ऐक तर मग!"

असे म्हणून तो अनंत म्हणाला:

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो-
लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः।
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे
येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः।।११-३२।।

"मी लोकांचा क्षय करण्यासठी वृद्धिंगत झालेला काळ आहे. आता येथे लोकसंहार करण्यासाठी उपस्थित झालो आहे. तू काहीही केले नाहीस, युद्ध न केलेस तरीही, सैन्यातून उभे असलेले हे सर्व योद्धे विनाश पावणार आहेत."

"मी काळ आहे"

याबाबत ज्ञानेशांच्या ओव्या अशा आहेत:

तऱ्हैं मी कालु गां हें फुडें। लोक संहारावेआंलागिं वाढें।
सैंघ पसरिलीं तोंडें। आतां ग्रासीन हें आघवें।।११-४५१।।
तेथ अर्जुनु म्हणें कटकटां। उबगिलों माघिल्या संकटां।
म्हणोनि आलविलों तंव वोखटां। उधाइला हा।।४५२।।

श्रीकृष्ण म्हणाले: "मी प्रत्यक्ष काळ आहे. या लोकांचा संहार करावा, म्हणून मी हे उग्र रूप धारण केले आहे. चहूकडे पसरलेल्या या तोंडांनी या सगळ्याचा मी ग्रास करणार आहे." हे ऐकून अर्जुनास वाटू लागले की, "सर्वविनाशक युद्धाचे एक संकट टळावे, म्हणून मी याची आळवणी केली, तर हा श्रीकृष्ण त्याऐवजी हे अनिष्ट रूप धारण करून येथे उभा ठाकला आहे. काय हे दुर्दैव!"

तेंविचि कठिण बोलें आंसतुटी। अर्जुनु होईल हिंपुटी।
म्हणौनि सवेंचि म्हणें किरीटी।
परि आन एक असें।।११-४५३।।
तऱ्हैं आतांचिएं संहाराबाहरें। तुम्हीं पांडव असा बाहिरें।
तेथ जात जात धनुर्धरें। सांवरिलें प्राण।।४५४।।
होतां मरणमहामारीं गेला।
तो माघुता सावधु जाहाला।..।।४५५।।

आपले कठोर भाषण ऐकून अर्जुन हिंपुटी झाला आहे, हे पाहून श्रीकृष्ण म्हणाले की, "पण हा जो सर्वसंहार होणार आहे, त्यातून तुम्ही पांडव तेवढे वाचणार आहात. तरी भीती धरू नकोस!" महाघोर मरणसंकटाच्या भयाने ग्रासलेला अर्जुन हे ऐकताच जरा सावरला. नाही तर त्याचे प्राण त्याला सोडून जाण्याच्या अगदी बेतातच होते.

... । मग लागला बोलां। चित्त देऊं।।११-४५५।।
आईसें म्हणत आहें देवें। अर्जुना तुम्हीं माझें हें जाणावें।
एर जाण मी आघवें। सरलों ग्रासूं।।४५६।।
वज्रानलीं प्रचंडीं। जैसिं घापें लोणिआंचि उंडी।
तैसें जग हें माझां तोंडीं। दाविलें तुवां।।४५७।।
तऱ्हैं तेआं माझारीं कांहिं। भंरवसेनि उणें नाहिं।
इयें वांयांचि सैन्यें पाहिं। वल्गिजत आहाति।।४५८।।

मग तो श्रीकृष्णाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागला. देव म्हणत होते की, "अर्जुना! तुम्ही पांडव माझे लाडके आहात. तुमच्याव्यतिरिक्त हे अवघे सैन्य मी आता ग्रासणार आहे. वज्राग्नीत लोण्याचा गोळा सापडावा, तसे हे जग माझ्या तोंडी पडलेले तू पाहिलेच आहेस! त्यात असत्य असे काहीच नाही. आता हा महाविनाशाचा काळ प्राप्त झाला आहे. व्यर्थ वल्गना करणाऱ्या या सैन्याचे दिवस आता भरत आले आहेत."

हें जैं मिलौनिआं मेलें। कुंथति वीरवृत्तिचेनि बलें।
यमावेरी गजदलें। वाखाणिजताति।।११-४५९।।
म्हणति सृष्टीवरी सृष्टी करूं।
आण वाहूनि मृत्युतैं मारूं।
जगाचां भरूं। घोंटु ययां।।४६०।।
पृथ्वी सगलींचि गिलूं। आकाश वरिचिआंवरीं जालूं।
काईं बाणावेरी खिलूं। वारिआंतैं।।४६१।।
ऐशा चतुरंगाचिआं संपदा।
करित महाकालेंसि स्पर्धा।..।।४६२।।

"अश्व, गज इ.समुदाय गोळा करून हे सैन्य आपल्या शौर्याच्या बळावर गुरगुरत आहे. आपली गजदले यमालाही डोईजड आहेत, म्हणून वल्गना करत आहे; किंबहुना आम्ही ब्रह्मदेवाहूनही मोठे आहोत; प्रतिसृष्टी निर्मू! पैज मारून मृत्युलाही आम्ही जिंकू! हे जग एकाच घोटात संपवून टाकू; पृथ्वी सगळीच्या सगळी एका घासात गिळू; आकाश वरच्यावर जाळून टाकू; बाणांनी वारा अडवू; असे मनाचे मांडे खात हे ते सैन्य चतुरंगदलाच्या बळावर महाकाळाशीही स्पर्धा करू पाहात आहे."

... । वांटिवेचिआं मदा। वलघलें जैं।।११-४६२।।
बोल हातिएराहूनि तिखट। दिसति अग्निपरिस दासट।
मारकपणें कालकूट। महुर म्हणत।।४६३।।
तऱ्हैं हें गंधर्वनगरीचें उमालें। जाण पोंकलींचें पेंडवलें।
अगां चित्रींचि फलें। वीर हें देखें।।४६४।।
हा मृगजलाचा पुरु आला। दल नोहें कापडाचा साप केला।
इयां शृंगारूनिआं खालां। मांडिलिआं पैं।।४६५।।

"स्वपराक्रमाच्या मदाने धुंद झालेल्या या सैन्याचे बोल शस्त्राहूनही तीक्ष्ण आणि अग्नीपेक्षा दाहक आहेत. काळकूटही यांच्यापुढे मधुर ठरेल, इतके जहरी हे बोल आहेत. पण अर्जुना! हे सर्व वीर म्हणजे चित्रातील फळे किंवा गंधर्वनगरीचे आभास आहेत. पेंडा भरलेले प्राणी असावेत, तसे हे तकलुपी सैन्य आहे. मृगजळाचा पूर यावा, तसा हा सैन्यसंभार आहे. कापडाचा साप किंवा शृंगारलेली चर्मे इतका नकली तो आहे." या सैन्याचे भवितव्य आधीच ठरलेले आहे.

"तूं निमित्तमात्रचि होएं"

म्हणून श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात की:

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून्भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम्।
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्।।११-३३।।

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च
कर्णं तथान्यानपि योधवीरान्।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा-
युध्यस्व जेतासि रणे सपत्नान्।।११-३४।।

"तू उठ! यश मिळव! शत्रूंना जिंक आणि समृद्ध राज्याचा उपभोग घे! मी यांना पूर्वीच मारलेले आहे. तू निमित्त म्हणून फक्त पुढे हो. हे सव्यसाची! द्रोण, भीष्म, जयद्रथ, कर्ण व इतर सर्व योद्धे मी पूर्वीच माझ्या संकल्पाने मारलेले आहेत. त्यांना तू ठार करणार आहेस. घाबरू नकोस! युद्ध कर! तू शत्रूला रणांगणात जिंकून विजय मिळवणार आहेस!"

ज्ञानदेवांच्या ओव्यांतून हे ऐकू याः

एर चेष्टवितें जैं बल। तैं मिआं माघांचि ग्रासिलें सकल।
जातां कौलरीचें वेताल। तैसें निर्जिव हें आहाति।।११-४६६।।
हालविति दोरी तुटली। तन्हैं तिएं खांभावरील बाहुलीं।
भलतेनें लोटिलीं। उलथौनि पडति।।४६७।।
तैसा सैन्याचा ययां बगा। मोडतां वेलु न लगेल पैं गां।
म्हणौनि उठीं उठीं वेगां। सिहाणा होईं।।४६८।।
तुवां गोग्रहणाचेनि अवसरें। घातिलें मोहनास्त्र एकसरें।
मग विराटाचेनि महाभेडें उत्तरें। आसडूनि नागविलें।।४६९।।

"या सैन्याचे सामर्थ्य मी अगोदरच ग्रासून टाकले आहे. कुंभाराघरच्या मातीच्या खेळण्यातील वेताळासारखे हे निर्जीव आहेत. त्यांची भीती अजिबात धरू नकोस! कळसूत्री बाहुल्यांना हलवणारी दोरी तुटली की थोड्याही धक्क्याने ती जशी वरून खाली उलथून पडतात, त्याप्रमाणे या सैन्याचा कणा मोडायला वेळ लागणार नाही, हे ओळख आणि युद्धास सज्ज हो. गोग्रहणप्रसंगी या सर्वांना तू एकट्यानेच मोहनास्त्र टाकून जिंकले होतेस. त्या वेळी विराटराजाच्या महानेभळट अशा **उत्तर** नांवाच्या राजकुमाराने यांची वस्त्रे काढून घेतली होती."

आतां हें तेआंहूनि निपटारें जाहालें। निवटीं आयतें रण पडिलें।
घेईं यश रिपु जिंतिलें। एकलेनि अर्जुनें।।११-४७०।।
आणि कोरडें यशचि नोहें। समग्र राज्यहीं आलें आहें।
तूं निमित्तमात्रचि होएं। सव्यसाची।।४७१।।
द्रोणाचां पाडु न धरीं। भीष्माचें भय न धरीं।
कैसेनि कर्णावरी। परजूं हें न म्हण।।४७२।।

"आता तर हे तेव्हापेक्षाही निःसत्त्व झाले आहेत. आयता युद्धाचा प्रसंग मिळाला आहे. यांचा तू निःपात कर. या शत्रूसैन्यास जिंकून घे! धवल यश मिळव! एकट्याने या महान सैन्याचा पाडाव केला अशी उज्ज्वल कीर्ती प्राप्त कर! आणि केवळ यशच नव्हे, तर पृथ्वीचे निष्कंटक राज्यही उपभोग! हे सव्यसाची! यांना मारण्यासाठी तू केवळ निमित्तमात्र पुढे हो! द्रोणाच्या पराक्रमाची क्षिती बाळगू नकोस! भीष्माच्या महाप्रतापास घाबरू नकोस! कर्णावर शस्त्र कोणते चालवावे याची चिंता करू नकोस!"

कोण उपाओ जयद्रथा किजैं। हें न चिंतूं चित्त तूझें।
आणिकहिं एथ जैं जैं। नावगिणें वीर।।११-४७३।।
तेंहिं एक एक आघवें। चित्रिंचें सिंहाडें मानावें।
जैसें वोलेनि हातें घेयावें। पुसौनिआं।।४७४।।

"जयद्रथाला मारण्यासाठी कोणता उपाय योजावा, याचा विचार करून शिणू नकोस! आणिक इतरही जे जे नावाजलेले म्हणून अतिरथी, महारथी व वीरवर येथे युद्ध करावे म्हणून जमले आहेत, त्यांची पर्वा करू नकोस! हे तर जणू भिंतीवरील चित्रांतील सिंह आहेत. ओल्या हाताने सहजच पुसले जाणारे! कशाकशाचेही भय धरू नकोस. युद्ध कर आणि या सर्वांना जिंकून घे!"

ययावरी पांडवा। काईंसा झूंजाचां मेलावा।
हा आभासु गां आघवा। एर ग्रासिलें मिआं।।११-४७५।।
तंव तुवां देखिलें। हें माझिआं वदनिं पडिलें।
तेधवांचि ययांचें आयुख सरिलें। आतां रीतीं सोपें।।४७६।।
म्हणौनि वहिला उठीं। मिआं मारिलें हें निवटीं।
न रिघैं शोकसंकटीं। नाथिलिआं।।४७७।।
आपणचि आखिला किजैं। तो कौतुकें जैसा विंधौनि पाडिजैं।
तैसें देख गां तूझें। निमित्त आहें।।४७८।।

"हे वरवर दिसणारे या सैन्याचे सामर्थ्य फोल आहे. युद्ध करावे म्हणून हे सगळे येथे जमले आहेत खरे! पण ही सेना म्हणजे निव्वळ आभास आहे. या सगळ्यांचा मी ग्रास केला आहे. माझ्या मुखात यांना पडलेले तू जेव्हा पाहिलेस, तेव्हाच त्यांचे आयुष्य सरले. हे सर्व आता केवळ पोकळ सोपटासारखे उभे आहेत. म्हणून प्रथम उठ आणि मी मारलेल्या यांचा निःपात कर. नसत्या शोकसंकटात पडू नकोस! आपणच निशाण उभे करावयाचे आणि बाणाने विंधून ते आपणच पाडावयाचे, तितके हे सोपे आहे."

बापा विरुद्ध जैं जाहालें। तैं उपजतांचि वाघें नेलें।
आतां राज्येसिं संचलें। यश तूं भोगिं।।११-४७९।।
सांविआंचि उतत होतें दायाद। आणि बलिएं जगिं दुर्मद।
तैं वधिलें विशद। सायासु न लगतां।।४८०।।
आईसिआं इयां गोठी। विश्वाचां वाक्पटीं।
लिहौनि घालीं किरीटी। जगामाझिं।।४८१।।

"तुझ्याविरुद्ध जे उपजले होते, ते उपजताच वाघाच्या तोंडी पडले, असे समज! यांना मारण्यास तुझे निमित्त होऊ दे आणि त्यांना मारून राज्यासह यशाचा उपभोग घे! तुझे हे बलवान आणि मदोन्मत्त भाऊबंद गर्वाने फुगून गेले होते. अत्याचाराने ते जगास छळत होते. त्यांचा सहजरीत्या तू नाश केलास, असा इतिहास तू घडव! विश्वाच्या वाक्पटावर ही गोष्ट तू लिहून घाल!"

अशा प्रकारे भगवंतांनी अर्जुनास आपल्या विश्वरूपाच्या भयानकतेचे काय प्रयोजन आहे, ते स्पष्ट केले.

विश्वरूपाची योगवैज्ञानिक पार्श्वभूमी::::

धर्ममेघ समाधि

आतापावेतो आपण अकराव्या अध्यायात अर्जुनास घडलेल्या विश्वरूपदर्शनाचे स्वरूप आणि युद्धजन्य परिस्थितीनुरूप त्यात उद्भवलेल्या भीषणतेचे अवलोकन केले. योग्यांना विश्वरूपाचे जे दर्शन घडते, त्या मागची ***योगवैज्ञानिक पार्श्वभूमी*** पाहण्याचा मनोदय पूर्वी व्यक्तवला होता. त्या विषयाकडे वळू या:

धर्ममेघसमाधीचा विचार करतांना*(उन्मेष ४६:योगपर अभंग पृ.क्र.८१० ते ८१४)* पूर्वी आपण पाहिले होते की साधकांस जी दिव्य रूपादी दर्शने-श्रवणे होतात, ती ***संप्रज्ञात*** अवस्थेतील असतात. अलौकिक रूप-रस-गंधादी अनुभव प्रज्ञाजागृतीनंतर येणारे आहेत. अमूर्त अशा त्या त्या विषयांचा उपभोग साधक केवळ प्रज्ञाप्रभावाने घेत असतो.

निरोधिका या स्थानी रूपाचा निरोध होतो. पुढे केवळ नादाचा प्रांत असतो. ***सलोकता, सरूपता, समीपता*** या मुक्तींचा उपभोग ***निरोधिका*** ओलांडेपर्यंतचाच आहे. ***सलोकता मुक्ती*** प्राप्त होणाऱ्या साधकाचा दिव्य लोकात प्रवेश होतो. आज्ञाचक्रोपरांत ***बिंदुस्थानी*** हे घडत असते. आज्ञाचक्री स्थूल संपून सूक्ष्माचा प्रांत सुरू होतो. ***अर्धेंदुस्थानी समीपता मुक्ती***चा उपभोग घडतो. **निरोधिकेत *सरूपता*** प्राप्त होते. असा हा विषय तेव्हा आपण परीक्षिला होता.

विश्वरूपदर्शन, पश्चिममार्ग व पतञ्जली

विश्वरूपदर्शन हे अलौकिक रूप-रसादींचे आविष्करण आहे. भगवंतांचे विश्वरूपाने होणारे हे दर्शन असल्यामुळे ते ***समीपता व सलोकता*** या मुक्तींच्या प्रांतातील आहे. अर्जुनास आपण त्या रूपासमीप असल्याचे दिसतच होते. त्याचप्रमाणे त्याचे त्या विश्वरूपाशी आपलेपणाने भाषणही होत होते. अर्थातच हे ***सलोकता व समीपता*** यांसापेक्ष आहे; पण सरूपतेच्या अलीकडील आहे.

म्हणून ***विश्वरूपदर्शन*** घडण्याची यौगिक केंद्रस्थाने म्हणजे पश्चिममार्गावरील ***आज्ञाचक्रापुढील बिंदुस्थान ते अर्धेंदु व निरोधिकेपर्यंतचा प्रांत*** होय. बिंदूत योग्यांस देवदेवतांची दर्शने घडतात; हवे ते रूपरसादी विषय बिंदूत अवतीर्ण होतात; असा योग्यांचा दाखला आहे. त्यामुळे ***विश्वरूपदर्शन*** घडण्याचा हा प्रांत आहे. परंतु ***महाविदेहा वृत्ती*** प्राप्त होण्यापूर्वीची ही स्थिती आहे. पतञ्जलिप्रणीत संयमाचा आलंबनविषय ***विश्व*** हाच ठेवून ***विश्वरूपदर्शन*** ही स्थिती व त्यापुढील ***महाविदेहा वृत्ती*** प्राप्त होतात.

योगमार्गातील एक महत्त्वाचा टप्पा

आता थोडा याचा विचार करू की अर्जुनास भयाण असे विश्वरूप का दिसले असावे. याचा संबंध योगाच्या आलंबनविषयाचा ***देश*** कोणता आहे, त्याच्याशी असला पाहिजे. रणांगण व त्यावरील युद्धोन्मुख स्थिती, महायोद्धे, सैन्य इ.आलंबनासाठी ***देश*** म्हणून घेतले गेले असावेत व म्हणून त्याला युद्धातील वीरांचा संहार करणाऱ्या ***कालस्वरूप*** विश्वरूपाचे दिव्य दर्शन घडले असावे, असे म्हणावेसे वाटते. **योग्याच्या दिव्यविषय चिंतनाच्या धारणा-ध्यान इ.चा देश त्याला कशा प्रकारचे दर्शन होईल, ते ठरवत असतो.** म्हणूनच विश्वरूप दर्शनाबाबत वैदिक वाङ्मयातील वर्णनात वैविध्य आढळते. तसेच अर्जुनासही त्याला होत असलेल्या विश्वरूपदर्शनाचे जे विविध पैलू दिसतात, त्याचेही कारण याच मानसिक प्रक्रियेत असले पाहिजे.

सलोकता, समीपता व सरूपता या तिन्ही मुक्तिप्रकारांतील वैचित्र्ये याचमुळे संभवतात. कोणाला ***वैकुंठ*** तर कोणाला ***कैलास,*** तर कोणाला आपापल्या **इष्ट दैवताचे *लोक*,** त्यांचे त्यांचे ***सामीप्य*** व त्या त्या प्रकारचे ***सारूप्य*** याच कारणाने प्राप्त होतात. मुळात हे सर्व ***वितर्क-विचारानुगत समाधि*** आहेत. त्यामुळे त्यांत येणारे अनुभव तसे ***त्रिपुटीसापेक्ष***च आहेत. मग ते कितीही दिव्यातिदिव्य असेनात का! याच कारणाने संत-महात्मे या ***सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यादी*** चार मुक्तिप्रकारांना फारसे महत्त्व देत नाहीत.

परंतु ***विश्वरूपदर्शन*** हा प्रकार यांपेक्षा थोडा वेगळ्या श्रेणीचा समजावा लागतो. कारण त्याच्यापुढे ***महाविदेहावृत्ती*** प्राप्त होऊन पतञ्जली म्हणतात तो प्रकाशावरणाचा क्षय होणार असतो***("बहिरकल्पिता वृत्तिर्महाविदेहा ततः प्रकाशावरणक्षयः।।३-४३।।"*** तसेच ***"ततः क्षीयते प्रकाशावरणम्।।२-५२।।पा.यो.सू.।।").***

***सत्त्वगुणावरील आवरणाचा क्षय होणे* आणि *शुद्धसत्त्वगुण* प्रकाशित होण्याच्या क्रियेचा हा एक टप्पा आहे.** हा म्हणूनच योगमार्गावरचा एक मोठा टप्पा आहे आणि **गीतेतील*"वासुदेवः सर्वमिति"* अशी महत्त्वपूर्ण अनुभूती याच *विश्वरूपदर्शन* आणि *महाविदेहावृत्ती*च्या टप्प्यावर प्राप्त होत असते.**

साक्षात्काराच्या या उज्ज्वल पाऊलखुणा चिह्नित कराव्यात, ईश्वरप्रणिधानाचे फल साकार व्हावे, अनन्यभक्तीचा सोपान दृष्टीस पडावा, यासाठीच गीताकारांनी हा विश्वरूपदर्शनावरील ***अकरावा अध्याय*** उभा केला आहे. असो.

समारोप

आतापर्यंत आपण श्रीकृष्णांनी दाखवलेले रौद्रभीषण विश्वरूप आणि त्यावरील अर्जुनाच्या प्रतिक्रिया निरीक्षिल्या. नुकतेच श्रीहरींनी अर्जुनास भीतिमुक्त करून आश्वस्त केलेले आपण पाहिलेच आहे. या विश्वरूपदर्शन प्रसंगाची योगवैज्ञानिक भूमिकाही आपण विचारात घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर आपणास आता अर्जुनाकडून पुढे होणाऱ्या **विश्वरूपा**च्या **सम्यग्दर्शना**बाबतचे अनुभव परीक्षावयाचे आहेत. तसेच एकूणच **सगुण-निर्गुण स्वरूपाचा विचार आणि ज्ञानदेवांचे यांबाबतचे काही अभंग** समयोचित म्हणून पहावयाचे आहेत. त्यासाठी आयोजन आहे पुढील ***उन्मेष क्र.४८-३: विश्वरूपाचे सम्यग्दर्शन*** याचे. तर वळू या त्या भागाकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४८-३::
::विश्वरूपाचे सम्यग्दर्शन::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

<u>उन्मेष ४८-३:</u>

गीताः
११:३५-४२,४५-५५
१२:१-६
ज्ञानेश्वरीः
११:४८२-५५८,५७९-७०८
१२:१-८०
अभंगः१,४,५,७,१७,१९-२४,४४,४७,२२२,३५१,५२९,
५४४,८७५,९५९

::उन्मेष ४८-३::
::विश्वरूपाचे सम्यग्दर्शन::

विश्वरूपाचे स्तवन::::

अर्जुनाचा भावातिरेक

विश्वरूपदर्शनाचे विविध पैलू आपण मागील दोन उन्मेषांतून पाहिले *(उन्मेष क्र.४८-१ व २)*. आता आपणास विश्वरूपाचे खरेखुरे सैद्धांतिक आणि अनुभूतींचे विश्लेषण करणारे ***सम्यग्दर्शन*** घ्यावयाचे आहे. तसेच ***ईश्वरप्रणिधानासाठी विश्वरूपातून इष्ट रूपे*** पहावयाची आहेत. त्यासाठी प्रथम वळू या अर्जुनास मिळत असलेल्या विश्वरूपाच्या अनुभूतींकडें!

भगवंतांचे आपल्या कालस्वरुप प्रकटनाबाबतचे आणि पांडव त्या सर्वसंहाराबाहेर आहेत अशा आश्वासनाचे बोलणे ऐकून अर्जुनाची जी स्थिती होते, तिचे वर्णन करत संजय म्हणतो कीः

एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य
कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं-
सगद्गदं भीतभीतः प्रणम्य।।११-३५।।

"केशवाचे भाषण ऐकून अर्जुनाने हात जोडले. थरथरणारी तनू तो सावरू लागला. सद्गदित होऊन तो त्याला साष्टांग नमस्कार घालू लागला."

ज्ञानदेव सांगतातः

आईसिं आघविंचिं कथा। तेआं अपूर्णमनोरथां।
सञ्जयो सांधैं कुरुनाथा। ज्ञानदेओ म्हणे।।११-४८२।।
मग सत्यलोकौनि गंगाजल। सुटलिआं वाजत खलाल।
तैसिं वाचा विशाल। बोलतां तेआं।।४८३।।
ना तन्हैं महामेघांचें उमालें। घडघडित एकें हेलें।
घुमघुमिला मंदाराचलें। क्षीराब्धि जैसा।।४८४।।
तैसें गंभीर महानादें। हें वाक्य विश्वकंदें।
बोलिलें अगाधें। अनंतरूपें।।४८५।।

ज्ञानदेव म्हणतात की, "हे सगळे संजयाने त्या अतृप्त धृतराष्ट्राला कथिले. त्याला या सर्व कथेत कोणतीच रुची नव्हती असे दिसते. कारण तो अंध राजा निव्वळ आपल्या पुत्रांच्या विजयाविषयीची वार्ता ऐकण्यासाठी उत्सुक होता. पण ते काही घडणार नव्हते. श्रीकृष्णांची ती घनगंभीर वाणी तर त्याला ऐकायलाही नकोच होती. पण सत्यलेकातून गंगाजळाचा ओघ पृथ्वीकडे लोटावा, तशा खळखळाटाची बोली श्रीकृष्णमुखातून बाहेर पडतांना अर्जुनाने ऐकली. मोठमोठाले मेघ गडगडावेत, मंदार पर्वताची रवी क्षीरसागरात फिरवावी, तसा त्या अगाध अनंतरूपधारी अशा विश्वकंदाचा गंभीर महानाद त्याच्या मुखातील वाचेस विशाल रूप देतांना अर्जुन ऐकत होता."

तैं अर्जुनें मोटकें आईकिलें। आणि सुख कीं भय दुणावलें।
हें नेणों परि कंपिन्नलें। सर्वांग तेआंचें।।११-४८६।।
सखोलपणें वललीं मोट। आणि तैसेंचिं जोडिलें करसंपुट।
वेलोंवेलीं ललाट। चरण ठेविं।।४८७।।
तेंविचि काईं बोलों जाएं। तंवं गला बुजालाचि ठाएं।
हें सुख कीं भय होएं। हें विचारा तुम्हीं।।४८८।।
परि तेधवां देवाचेनि बोलें। अर्जुना हें आईसें जाहालें।
मिआं पदांवरीं देखिलें। श्लोकींचिआं।।४८९।।
मग तैसाचि भेणभेण। पुढुति जोहारूनि चरण।
मग म्हणे जी आपण। आईसें बोलिलेति।।४९०।।

"श्रीकृष्णाचे ते बोल अर्जुनाच्या थोडेफार कानी पडले न पडले तोच त्याच्या तनूचा थरकाप झाला. सुखाने की भयाने, ना कळे! खाली वाकून तो वारंवार त्या विश्वरूपाच्या चरणी ललाट ठेवू लागला. दोन्ही हात जोडून त्याला नमस्कारू लागला. भावनातिरेकाने त्याचा कंठ दाटून आला. त्याच्या मुखातून शब्द फुटेनासे झाले."

ज्ञानदेव म्हणतातः "आता या भावाविष्कारास सुख म्हणावे की भय, ते तुम्ही श्रोत्यांनीच ठरवावे! पण गीतेचा हा श्लोक पाहून अर्जुनाची कशी अवस्था झाली, ती मी माझ्या शब्दांत तुम्हाला सांगितली."

अर्जुनाचे विश्वरूपस्तवन

भीतभीत श्रीकृष्णांच्या चरणांस स्पर्शून सतत नमस्कार करत अर्जुन म्हणू लागला कीः

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या
जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति
सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः।।११-३६।।
कस्माच्च ते न नमेरन्महात्मन्
गरीयसे ब्रह्मणोप्याऽदिकर्त्रे।
अनन्त देवेश जगन्निवास
त्वमक्षरं सदसत्तत्परं यत्।।११-३७।।
त्वमादिदेवः पुरुषः पुराण-
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप।।११-३८।।

"ॐ नमो जी आद्या"**चा साक्षात्कार**

"हे हृषीकेशा! अखिल जगत तुझ्या गुणांचे कीर्तन ऐकून आनंदते. तुझ्यावर हे विश्व अनुरक्त आहे. सिद्ध पुरुषांचे संघच्या संघ तुला नमस्कारित आहेत, तर तुला भिऊन राक्षसगण दशदिशांना पळून

जात आहेत. हे सर्व योग्यच आहे. हे महात्मन! तू तर ब्रह्मदेवाचेही आदिकारण आहेस. त्याच्याहूनही श्रेष्ठ अशा तुला कोण वंदणार नाही! हे अनंता! हे देवदेवा! हे जगन्निवासा! सत् आणि असत् यांपलीकडचे ***अक्षर अविनाशी ब्रह्म*** तूच आहेस! तूंच आदिदेव आहेस! पुरातन पुरुष तूच आहेस! तूच या विश्वाचा परम आधार आहेस! ज्ञाता आणि ज्ञेय तूच आहेस! परंधाम तूच आहेस! हे अनंतरूपा! तूच हे विश्व व्यापिले आहेस!"

ज्ञानदेवांचे *आद्य, ॐकारस्वरूप, वंदनीय, वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य आत्मरूप* असेच हे परब्रह्म आहे. गीतेच्या उपरोक्त श्लोकांतून तेच प्रकाशतांना दिसत आहे.

अर्जुनास त्या परब्रह्माचा हा जो साक्षात्कार घडत आहे, त्यामुळे स्तिमित झालेला तो म्हणतो आहे:

ना अर्जुना मी कालु। आणि ग्रासिजे तो माझां खेलु।
हा बोलु किर अढलु। मानूं आम्हीं।।११-४९१।।
परि तुवां जैं कालें। आजि स्थितिचिएं वेलें।
ग्रासिजें हें न मिलें। विचारासिं।।४९२।।
आईसेनि आंगिचें तारुण्य मोडावें। कैचें नोहें तैं वार्धक्य काढावें।
म्हणौनि करूं म्हणसि ती नोहें। बहुतकरूनि।।४९३।।
हां जी चौपाहारीं न भरितां। कोण्हेंहीं वेलें श्रीअनंता।
काएं मध्याह्नीं सविता। मावलतु आहे।।४९४।।

"हे भगवंता! तुझे म्हणणे मी खरेच मानतो की, "हे अर्जुना! मी काळ आहे आणि सर्वांचा ग्रास करणे हा माझा खेळ आहे." पण तू जरी काळ असलास तरी सध्या तर विश्वाची स्थितीच आहे. या अवेळी तू विश्वाचा ग्रास करण्यास उपस्थित झाला आहेस, हे काही माझ्या बुद्धीला पटत नाही. कारण तरुण शरीरातील तारुण्य काढून त्या जागी वार्धक्य कसे आणता येईल! चार प्रहर दिवस भरला नसता सूर्य मध्याह्नीसच मावळला आहे, असे कधीतरी घडले आहे काय! तुझे म्हणणे म्हणूनच मला पटत नाही."

पैं तूझ अखंडिता काला। तिनिं आहाति जी वेलां।
त्या तिहिं परि सबला। आपुलालां समईं।।११-४९५।।
जैं वेलीं हों लागे उत्पत्ति। तैं वेलीं स्थिति प्रलओ हारपति।
आणि स्थितिकालीं न मिरविति। उत्पत्ति प्रलओ।।४९६।।
पाठीं प्रलआचिएं हेलें। उत्पत्ति स्थिति मावलें।
हें काईसेनिहिं न ढलें। अनादि आईसें।।४९७।।
म्हणौनि आजि तऱ्हें भरों भोगें। स्थिति वर्जिजत आहे जगें।
एथ ग्रासिसिं तूं हें न लगे। माझां जीवीं।।४९८।।

"उत्पत्ति-स्थिति आणि प्रलय ही एकामागून एक अखंडितपणे होतच असतात, हे अगदी निर्विवाद आहे. पण या तिन्ही गोष्टी आपापल्या वेळीच होतात. उत्पत्ती जेव्हा होत असते, तेव्हा स्थिती व प्रळय होत नाहीत. स्थितीच्या वेळी उत्पत्ती आणि प्रळय नसतात. तसेच प्रळयकाळी उत्पत्ती व स्थिती या अवस्था उरत नाहीत. या विश्वनेमिक्रमात कोणताही फरक पडत नाही. अनादी अशी ही रचना आहे. आजचा काळ तरी स्थितीचा जोम असणारा आहे. तेव्हा तू हे जग आता ग्रासू पाहत आहेस, असे काही मला वाटत नाही."

अर्जुनाच्या मनाचा पालट

यावर खुलासा करत ज्ञानदेव पुढे म्हणतात:

तंवं संकेतें देव बोलें। अगां ययां दोनि सैन्यासिंचि मरण पुरलें।
तैं प्रत्यक्ष तूझ दाविलें। एर यथाकालें जाण।।११-४९९।।
हा संकेतु जंवं अनंता। हेलु लागला बोलतां।
तंवं अर्जुनें लोकु माघुतां। देखिला यथास्थिती।।५००।।

"अर्जुनाचे हे विचार ऐकून देवांनी संकेत दिला की त्या कौरव-पांडवांच्या सेनेचाच काळ तेव्हा ओढवलेला होता. तेच दृश्य पार्थ पाहत होता. इतर लोक आपापल्या काळीच नाश पावणार आहेत. श्रीकृष्णांनी हे त्याच्या लक्षात आणून दिले न दिले, तोच सर्व लोक जागच्या जागी जसे होते, तसे झालेले अर्जुनाने पाहिले."

मग म्हणतसें देवा। तूं सूत्री विश्वलाघवा।
जग आला मा आघवा। पूर्वस्थिती पुढुति।।११-५०१।।
परि पडिलिआं दुःखसागरीं। तूं काढिसिं कां जिआंपरीं।
तैं कीर्त्ति तूझिं हरी। आठवित असें।।५०२।।
कीर्त्ति आठवितां वेलोंवेलीं। भोगितसें महासुखाचां सोहोला।
तेथ हर्षामृतकल्लोलां। लोलुतु असें।।५०३।।

ते पाहून आश्वस्त होत तो म्हणू लागला की, "हे श्रीकृष्णा! या विश्वरूपी नाट्याचा खरा सूत्रधार तूच आहेस! तुझ्या कृपेने हे जग पुनः पूर्वस्थितीला आले आहे. भक्तजनांना दुःखसागरातून तू नेहमीच तारतोस, अशी तुझी सुकीर्ती आहे. तुझ्या त्या कीर्तीचे स्मरण जेव्हा जेव्हा मी करतो, तेव्हा मला महासुखाचा सोहोळा घडतो. एवढेच काय! हर्षामृतसिंधूच्या लाटांवर मी तेव्हा जणू पहुडतोच!"

देवा जिआंलेंपण जग। धरीं तूझां ठाईं अनुराग।
आणि दुष्टां तेआं भंग। अधिकाधिक।।११-५०४।।
पैं त्रिभुवनिंचिंआं राक्षसां। महाभय तूं हृषीकेशा।
म्हणौनि पलताति दिशां-। पैलींकडें।।५०५।।
एर सुर सिद्ध किन्नर। किंबहुना चराचर।
तैं तूझ देखौनि हर्षनिर्भर। नमस्कारित असति।।५०६।।

"तुझ्याकडून पुनश्च जीवन पावून हे जग तुझ्याठायी अनुरक्त झाले आहे. आणि दुष्टांना तू ताडतोस, हे ओळखून ते सर्व त्रिभुवनींचे राक्षसगण तुला पाहताच दशदिशांपलीकडे पळून जात आहेत. त्या दुष्टांसाठी तुझ्या रूपाने जणू महाभयच उत्पन्न झाले आहे. इतर सुर, सिद्ध, किन्नरादी गण, किंबहुना हे अखिल चराचर विश्वच तुला पाहून हर्षनिर्भर झाले आहे. ते तुला अत्यादराने नमस्कारित आहेत."

"तूंचिं संतासंत देवा"

तो पुढे म्हणतो:

एथ गां कवणां कारणा। राक्षस हें नारायणा।
न लगतिचि चरणां। पलतें जाहालें।।११-५०७।।

आणि हें तूंतैं काईं पुसावें। एतुलालें आम्हांसिहिं जाणवें।
तऱ्हें सूर्योदयीं राहावें। कैसेनि तमें।।५०८।।
तूं स्वप्रकाशाचा आगरु। आणि जाहाला आहासि गोचरु।
म्हणौनिआं निशाचरु केरु। फिटला साहाजें।।५०९।।

"आणि हे राक्षस मात्र तुझ्या पाया न पडता का पळून जात आहेत, हे तुला न विचारताच आमच्या लक्षात आले आहे. हे नारायणा! सूर्य उगवताच अंधकार तेथे कधी राहू शकतो का! स्वयंप्रकाशाची खाणच असा तू प्रकट झाला आहेस. म्हणून तर या राक्षसांची अशी दैना उडाली आहे. तुझे हे अगाध माहात्म्य आमच्या काही आतापावेतो लक्षात आले नव्हते. हे श्रीरामा! सत्त्वापेक्षाही पलीकडील असणारा तुझा हा प्रकाश या तमोगुणी राक्षसांना जिवंत असे जवळ तरी उभे राहू देईल का!"

हें एतुलें दिवस आम्हां। कांहीं नेणवेंचि श्रीरामा।
आतां देखतसों महिमा। गंभिर तूझा।।११-५१०।।
जेथूनि नाना सृष्टिचिआं वोलीं। पसरति भूतग्रामाचिआं वेली।
तेआं महदब्रह्मांतैं विआलीं। दैविकी इच्छा।।५११।।
देओ निःसीम तत्त्व सदोदितु। देओ निःसीम गुण अनंतु।
देओ निःसीमसाम्य सततु। नरेंद्र देवांचां।।५१२।।

"हे आदिदेवा! तुझ्या संकल्पाने महदब्रह्म झाले. तेथून अनेकानेक सृष्टींचे चास आणि त्यांच्यांत या भूतसमुदायांच्या वेली उत्पन्न झाल्या. त्यामागे तुझा संकल्प आहे. हे हृषीकेशा! तू तर तत्त्वांपलीकडील अमर्याद तत्त्व आहेस! सदासर्वदा तूच विद्यमान असतोस! हे देवा! तू अनंत आहेस! गुणांच्या सीमेपलीकडे असणारा जो कोणी, तो तूच आहेस! देवांचा देव, सर्वलोकपालक असा तूच आहेस! अनाकलनीय असा समभाव तुझ्याठायी आहे."

जी तूं त्रिजगतिएं ओलावा। अक्षर तूं सदाशिवा।
तूंचिं संतासंत देवा। तेआंहि अतितु तैं तूं।।११-५१३।।

"तू हे तर सर्व व्यापतोसच! पण त्यापलीकडेही तुझी अमर्याद अशी व्याप्ती आहे. हे सकलमांगल्याच्या मूर्त रूपा! अक्षर असा तू आहेस; ज्यापासून जगत उत्पन्न होते आणि जगतास जीवनदात्रा तूच आहेस! ***सत्* आणि *असत्* ही दोनही तूच आहेस!** किंबहुना हे परमेशा! त्यांच्याही पलीकडील ***सदसद्विलक्षण*** असा जो कोणी आहे, तोही तूच आहेस!"

"अनंताचे वर्णन करणे कसे शक्य आहे!"

प्रकृतिपुरुषांचां आदि। जी महत्तत्वां तूंचि अवधि।
स्वयें तूं अनादि। पुरातनु।।११-५१४।।
सकल विश्वजीवन। जीवांसिं तूं निधान।
भूतभविष्याचें ज्ञान। तूझांचिं हातिं।।५१५।।
जी श्रुतिचिआं लोचना। स्वरूपसुख तूं अभिन्ना।
त्रिभुवनिंचिआं आयतना। आयतन तूं।।५१६।।
म्हणौनि जी परम। तूंतैं म्हणिजे महाधाम।
कल्पांतिं महदब्रह्म। तूझां अंकीं रिघैं।।५१७।।

"प्रकृति-पुरुषांचे मूळस्थान तूच आहेस! महत्तत्वाचा अंत तुझ्यातच होतो. अजन्मा तूच आहेस. पुराणपुरुषोत्तम तूच आहेस! विश्वाला जीवन तूच देतोस. जीवांची गती तुझ्यातच होते. भूतभविष्य जाणणारा केवळ तूच एक आहेस. त्रिभुवनास जो आधार आहे, त्याचाही परम आधार तूच आहेस. परमधाम तूच आहेस. विश्वाशी अभेद असा तूच आहेस. श्रुतीच्या डोळ्यांनी पाहण्याचे स्वरूपसुख तूच आहेस! कल्पांती आपल्या अंकी तू महदब्रह्मास ठाव देतोस. म्हणून तूच ***परम महाधाम*** आहेस."

किंबहुना देवें। विश्व विस्तारिलें आहें आघवें।
अनंतरूपें वानावें। तूंतैं कवणें।।११-५१८।।
जी काएं एक तूं नव्हसिं। तूं कवणें ठाईं गां नससिं।
हें असो जैसा आहासि। तैसिआं नमो।।५१९।।

"तुझ्या अनंतरूपाचे वर्णन कोणी करावे! हे परमात्म्या! तूच हे सर्व विश्व व्यापले आहेस. तू काय काय आहेस आणि काय नाहीस; तू कोणकोणत्या ठिकाणी आहेस आणि कोठे कोठे नाहीस; याचे किती वर्णन करावे! हे असो! तू जसा आहेस, जिथे कुठे आहेस, तशा त्या तुला नमस्कार असो!"

विश्वरूपाचे खरे आकलन

विश्वरूपाचे खरे स्वरूप आता अर्जुनास आकळू लागले आहे. तो पुढे म्हणतोः

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते।।११-३९।।
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं-
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः।।११-४०।।

"हे देवदेवा! वायु, यम, अग्नी, वरुण, चंद्र, प्रजापती आणि विश्वाचा प्रपितामहही तूच आहेस. तुला सहस्त्रशः नमस्कार असोत. तुला माझा वारंवार नमस्कार असो. तुला पुढून नमस्कार असो. पाठीमागून नमस्कार असो. हे सर्वात्मका! तुला माझा सर्व बाजूंनी नमस्कार असो! सर्वांना पुरून उरणारे वीर्य आणि अतुल पराक्रम तुझ्याठायी आहेत. तुझे वीर्य अनंत आहे. तूच हे सर्व व्यापून आहेस. तुला माझे कृतानेक प्रणिपात असोत!"

परमेश्वरात अर्जुनास सर्व विभूतिमत्वांचा साक्षात्कार होत आहे. आता तो इतर वैदिक वाङ्मयातून घडणाऱ्या विश्वरूपदर्शनाच्या वास्तव पातळीवर आलेला आहे. परमेश्वराचे त्याला खरेखुरे विश्वरूप आता भावू लागले आहे. त्याचे हे उद्गार ग्रथित करणारे ज्ञानदेव काय म्हणताहेत पहाः

वायु तूं अनंता। यम तूं नियमिता।
प्राणिगणिं वसता। अग्नि जी तूं।।११-५२०।।
वरुण तूं सोम। स्त्रष्टा तूं ब्रह्म।
पितामहाचाही परम। आदिजनक तूं।।५२१।।
आणिकहीं जैं जैं काहीं। रूप आथि अथवा नहीं।
तेआं नमो तूझ तैसिआंहीं। जगन्नाथा।।५२२।।

"हे अनंता! तूच वायू आहेस! सर्वांवर शासन करणारा यम तूच आहेस! प्राणिमात्रांच्या देहीं अग्नी म्हणून तूच विद्यमान असतोस! तूच वरुण, तूच सोम! स्त्रष्टा ब्रह्मदेवही तूच आणि पितामहाचा पिताही तूच आहेस! इतरही या सृष्टीत जे जे काही आहे, मग त्याला रूप असो की नसो, तेही तूच आहेस! हे जगन्नाथा! अशा तुला माझा नमस्कार असो."

आईसें सानुरागें चित्तें। स्तवन केलें पांडुसुतें।
मग पुढुति म्हणें नमस्ते। नमस्ते प्रभो।।११-५२३।।
पाठीं तिएं साद्यंतें। निहालीं श्रीमूर्तीतैं।
आणि पुढुति म्हणें नमस्ते। नमस्ते प्रभो।।५२४।।
पाहातां पाहातां प्रांतें। समाधान पावें चित्तें।
आणि पुढुति म्हणें नमस्ते। नमस्ते प्रभो।।५२५।।

"सानुराग चित्ताने पांडुसुताने अशा प्रकारे श्रीहरीचे स्तवन केले आणि तो त्या श्रीमूर्तीला नमस्कारत राहिला. ती मूर्ती पाठीकडून पाहत, पुढून पाहत, तिला साद्यंत न्याहाळीत तो सर्व बाजूंनी तिला नमस्कारू लागला; म्हणू लागला की, "हे प्रभो! तुला वंदन असो." त्या विश्वमूर्तीची अंग-प्रत्यंगे तो जसजसा निरखून पाहू लागला, तसतसे त्याचे चित्त अधिकाधिक संतोष पावू लागले. तो म्हणू लागला,"या चराचरात अखंडपणे तूच भरलेला मी पाहत आहे. तुला माझा नमस्कार आहे."

इयें चराचरीं नमस्ते। अखंडितां देखें तेआंतैं।
आणि पुढुति म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो।।११-५२६।।
आईसिं रूपें तिएं अद्भुतें। आश्चर्यें स्फुरति अनंतें।
तंवं तंवं नमस्ते। नमस्तेचि म्हणें।।५२७।।

"भगवंताची अनेकानेक रूपे तो जसजसा निरखून पाहू लागला, त्याच्यापुढे जसजशी त्या मूर्तीची अत्यद्भुत रूपे प्रकट होत होती, तसतसा विस्मित आणि आनंदविभोर होउन तो त्या पुरुषास नमस्कार करून म्हणू लागला की, "हे आदिदेवा! हे विश्वात्म्या!हे सूत्रात्म्या! हे विश्वपुरुषा! तुला माझे कोटिकोटी प्रणाम असोत!"

"येन सर्वमिदं ततम्"

अशा त्या अनंत रूपातून अखंडपणे वेगवेगळी आश्चर्यकारक रूपे सतत प्रकट होतच होती:

आणिक स्तुति नाठवें। आणि निवांताहिं नसवें।
नेणों कैसा प्रेमभावें। गाजोंचि लागें।।११-५२८।।
किंबहुना इयांपरी। नमन केलें सहस्त्रावेरीं।
किं पुढुति म्हणें श्रीहरी। तूझ सन्मुखा नमो।।५२९।।
देवासि पाठी पोट आथि कीं नाहीं। एणें उपेगु आम्हां काईं।
तर्‍हैं तूझ पाठमोरेआंहिं। नमो स्वामी।।५३०।।
उभा माझिएं पाठीसिं। म्हणोनि पाठिमोरे म्हणावें तुम्हांसिं।
सन्मुख विन्मुख जगेंसि। न घडें तूझ।।५३१।।

"ती रूपे पाहत असता त्याला त्यांची स्तुती कोणत्या शब्दांत करावी, ते कळत नव्हते आणि स्वस्थ चित्ताने ती पाहत बसणेही शक्य होत नव्हते. केवळ प्रेमातिरेकाने तो त्या विश्वचैतन्यास *"नमस्कार असो! नमस्कार असो!"* असे गर्जून गर्जून म्हणत राहिला. अर्जुनाने याप्रमाणे सहस्त्रो वेळा त्या श्रीहरीस नमन केले. तो म्हणू लागला,"देवा! तुला पाठपोट आहे किंवा कसे, ते आम्ही जाणत नाही. तरीही तुला समोरून नमस्कार करतो. तसेच पाठीमोरा पण नमस्कार करतो. तूच माझ्या पाठीशी सदोदित उभा राहून आमचा सांभाळ करतोस. म्हणून असे मी म्हणतो आहे. खरे तर जगाशी सन्मुख असणे वा विन्मुख असणे हे तुझ्याबाबतीत कसे संभवेल!"

आतां वेगलालिआं अवेवां। नेणें रूप करूं देवा।
म्हणौनि नमो तूझ सर्वा। सर्वात्मका।।११-५३२।।
जी अनंतबलसंभ्रमा। तुज नमो अमितविक्रमा।
सकलकालीं समा। सर्वदेवा।।५३३।।
आघवां आकासिं जैसें। अवकासुचि होउनि आकास असें।
तूं सर्वपणें तैसें पातलासि सर्व।।५३४।।
किंबहुना केवल। सर्व हें तूंचि निखिल।
परि क्षीरार्णविं कल्लोल। पयाचें जैसें।।५३५।।
म्हणौनिआं देवा। तूं वेगला नव्हसि सर्वां।
हें आलें मज सद्भावा। आतां तूंचि सर्व।।५३६।।

"हे अनंता! तुझ्या अवयवांचे वर्णन करणे मला शक्यच नाही. म्हणून तुझे स्तवन मी कोणत्या शब्दांनी करू! मी तुज सर्वात्मकास सर्व तर्‍हेने नमस्कारच करतो! हे अनंतबलशाली! हे अमितविक्रमा! सर्वदा सम असणार्‍या तत्त्वा! सर्व अवकाशात आकाश जसे अवकाश होऊन राहते, तसे या विश्वात तू विश्व होऊन राहतोस. हे सर्व तूच आहेस! हे जगत निखळ तुझ्याच स्वरूपाचे ओतले आहे. क्षीरसमुद्रावरील दुधाच्या लाटा असाव्यात, तद्वत हे विश्व तुझ्या स्वरूपसागरावर कल्लोळत आहे. देवा! या सर्व जगताहून तू काही कोणी वेगळा नाहीस, हे आता मला स्पष्ट दिसत आहे."

अर्जुनाची क्षमायाचना

"येन सर्वमिदं ततम्" अशी अनुभूती घेणारा अर्जुन पुढे नम्र भावाने म्हणतो:

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं-
हे कृष्ण हे यादव हे सखेति।
अजानता महिमानं तवेदं-
मया प्रमादात्प्रणयेन वापि।।११-४१।।

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं-
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्।।११-४२।।

"हे श्रीकृष्णा! तुझा हा असा महिमा मला माहीत नव्हता. त्यामुळे तुला मी मित्र समजून तसे वर्तन करत होतो. सलगीने किंवा कधी उपहासाने मी तुला जे काही म्हटले असेन; हे कृष्णा! हे यादवा! हे सख्या! असे कदाचित अवज्ञापूर्वकही मी तुझ्याशी बोललो असेन; आहारविहार, शय्या, आसनग्रहण, भोजन इ.प्रसंगी मी तुझी जी काही अमर्यादा केली असेल; एकटा असतांना किंवा लोकांसमक्ष मी तुझा जो काही अपमान केला असेल; तुझी जी काही चेष्टा माझ्याकडून केली गेली असेल; त्या सर्वांची, हे अप्रमेया! तू मला क्षमा कर!"

"तूं योगियांचें समाधिसुख"

श्रीकृष्णाचे खरे स्वरूप न ओळखता त्याच्याशी तो मनुष्य समजून केलेल्या वर्तणुकीबद्दल पश्चात्ताप व्यक्तवणारा अर्जुन ज्ञानदेव उभा करतात, तो असाः

परि आईसिआं तूंतें स्वामी। कंहिंचि नेणों आम्हीं।
म्हणौनि सोएरेंसंबंधधर्मी। राहाटलों तूझसिं।।११-५३७।।
अहा थोर वाउर जाहालें। अमृतें संमार्जन मिआं केलें।
वारिकें देऊनि दिधलें। कामधेनूंतें।।५३८।।
परिसाचां खडवाचि जोडिला।
कीं फौडौनि गाडौरा आम्हीं घातिला।
कल्पतरु तोडौनि केला। कुंपु सेतां।।५३९।।
चिंतामणीचिं काठी लागलीं। तेणेंवरीं वोढालें वोल्हांटिलीं।
तैसिं तूझि जवलिक धाडिलीं। सांघातिपणें।।५४०।।

"देवाधिदेवा! तू एवढा महान असूनही आम्ही तुला ओळखू शकलो नाही. म्हणून तुझ्याशी आम्ही सोयरिकीच्या नात्याने वागलो. आम्ही फार मोठी चूक केली. सडा घालण्यासाठी अमृत वापरून ते वाया घालविले. शिंगरू मिळते म्हणून त्याबदली कामधेनू विकली. परिसाचा खडकच्या खडक आमच्या हाती लागला. पण आम्ही तो फोडून पाया भरण्यासाठी वापरून टाकला! कल्पतरू तोडून त्याचे शेताला कुंपण घातले! चिंतामणिरत्नांची काठी हाती लागली. तिचा ओढाळ गुरे हाकण्यासाठी उपयोग केला! तुझी प्राप्ती कोणालाही सहजासहजी होत नाही. आम्हाला ती झाली तरी नातेसंबंधाचा भाव मनी ठेवून आम्ही तुला दूरच ठेवले."

हें आजिचेंचि पाहें पां रोकडें। कवण झूंज हें केवढें।
परि परब्रह्म तूं उघडें। सारथि केलासि।।११-५४१।।
ययां कौरवांचिआं घरां। शिष्टाई धाडिलासि दातारां।
आईसा वणिजेसाठीं जागेश्वरा। विकलासि आम्हीं।।५४२।।
तूं योगियांचें समाधिसुख। कैसा जाणेचिना मी मूर्ख।
उपरोधु जीं सन्मुख। तुजसिं करूं।।५४३।।

"आताचेच पहा ना! हे युद्ध किती कवडीमोलाचे आहे! पण मूर्तिमंत परब्रह्मास आम्ही सारथ्य करायला लावले आहे! या दुष्ट दुर्मद कौरवांच्या घरी तुला शिष्टाई करण्यासाठी पाठवले! हे दातारा! तू आमची जागृत देवता असूनही व्यवहारासाठी आम्ही तुला विकले! तू तर योग्यांचे निजधन चिरंतन समाधिसुखच आहेस. हे मज मूर्खास केव्हाच कसे उमजले नाही!"

विश्वाची *अनादि आदि*

अनुतापाचे बोल पार्थाच्या मुखातून येतच आहेतः

तूं ययां विश्वाचि अनादि आदि। बैससिं जिएं सभासदीं।
तिएं सोयरिकीचिएं शब्दीं। रालिं बोलों।।११-५४४।।
विपाएं राऊलां एवों। तऱ्हैं तूझेनि आंगें मानूं पावों।
मानसिं तऱ्हैं जाओ। रुसौनि सलगिं।।५४५।।
पायां लागौनि बुझावणि। तुझां ठाईं शार्ङ्गपाणि।
पाहिजे आईसिं करणि। बहु केलीं आम्हीं।।५४६।।
सजनपणाचिआं वाटां। तूझफुडां बैसलों उफराटा।
हा पाडु काएं वैकुंठा। परि चुकलों जी।।५४७।।

"तू या विश्वाचे अनाद्य मूळ आहेस. पण आमच्यासमवेत तू बसल्यावर आम्ही तुझ्याशी नातेवाईकांशी बोलावे, तसे तुला सामान्यांसारखे समजून बोलत असू! तुझ्या घरी जेव्हा आम्ही यायचो, तेव्हा तू आमचे आदरातिथ्य जातीने करीत असस! पण तरीही क्षुल्लक मानापमान काढून आम्ही तुझ्यावर सलगीचा भाव न ठेवता रुसून जायचो! तू आमच्या पाया लागून आमची समजूत काढली पाहिजेस, असे आम्हाला वाटत असे. असे कित्येक प्रसंग घडून गेले आहेत. मी तुझा जिवलग मित्र म्हणून रुसून तुझ्याशी अबोला धरायचो! आमची इतकी कोणती योग्यता होती की तुजसारख्या अप्रमेयाशी आम्ही असे वागण्यास धजावे! देवा! आमच्या हातून या खूप मोठ्या घोडचुका झाल्या!"

देवेंसिं कोलकाठी धरूं। आखाडां झोंबाझोंबि करूं।
सारी खेलतां अस्करूं। निकरेंहिं भांडों।।११-५४८।।
चांग तैं उराउरीं माघों। देवासि कीं बुद्धि सांघों।
तेविंचि म्हणो काय लागों। तूझें आम्हीं।।५४९।।
आईसा अपराधु हा आहे। जो त्रिभुवनिं न सामाएं।
जीं नेणेंचि कां पाएं। सिवतलें तूझें।।५५०।।

"तुझ्याशी आम्ही दांडपट्टा खेळलो. आखाड्यात कुस्ती पण खेळलो. सारीपाटाचा डाव मांडून हमरीतुमरीवर येत होतो आणि निकराचे भांडणही करत होतो. तुझ्याजवळच्या चांगल्याचुंगल्या वस्तू पाहताक्षणीच मागून घेत असू. सर्वज्ञ असा तू! पण तुलाही शहाणपणा शिकवत असू! वर आम्ही तुझे ऋणही मानत नसू! तुझे आम्ही काय देणे लागतो, असे सरळ म्हणत असू! देवा! त्रैलोक्यातही समावणार नाहीत इतके घोर अपराध आमच्या हातून तुझ्याबाबत घडलेत! पण तुझ्या पायांची आण वाहतो की ते सगळे नकळत आमच्याकडून झाले आहे."

"मी रासिं आहें समस्तां। अपराधांचिं"

देव बोनयाचां अवसरीं। लोभें किर आठवण काढिं।
परि माझा निसुग गर्व अवधारीं। जैं फुगूनचि बैसें।।११-५५१।।
देवांचिआं भोगायतनिं। खेलतां आशंकेना मनिं।
जीं रिघौनिआं शयनिं। सरिसा पहुडें।।५५२।।
कृष्णा म्हणौनि हांकारिजैं। यादवपणें तूंतैं लेखिजैं।
आपुलीं आण घालिजैं। जातां तूझ।।५५३।।
मज एकासनिं बैसणें। कां तूझा बोलूं न मानणें।
हें ओलखिंचेंनि दाटपणें। बहुत घडिलें।।५५४।।

"जेवणाखाण्याच्या वेळी, देवा! तू लोभाने मला बोलावत असस! पण मी उगाचच मान धरून गर्वाने रुसून फुगून बसत असे. तुझ्या शय्यागृहात खेळतांना मला काहीच लाज कशी वाटली नाही! तुझ्या शेजारी अंथरुणावर पहुडतांना माझ्या मनास काहीच कसे वाटत नसे! तुला *"कृष्णा!"* म्हणून मी हाकारित असे. तुला वर्मी लागतील असे बोल मी बोलत असे. तू इतर यादवांतील एक असे समजून वागत असे. येताजाता तुला माझी आण घालून अडवत असे. तुझे म्हणणे ऐकून घेत नसे. अतिपरिचयाने माझ्याकडून अशा खूपशा गोष्टी झाल्या आहेत. किती म्हणून सांगाव्यात!"

म्हणौनि काएं काइं आतां। निवेदिजैल अनंता।
मी रासिं आहें समस्तां। अपराधांचिं।।११-५५५।।
ययालागिं फुडां आणि पाठीं। जिएं राहाटिलों बहुवें वोखटीं।
तिएं मायेचिआं परीं पोटीं। सामाविं प्रभो।।५५६।।
जी कोण्हें एकें हेलें। सरिता घेऊनि एति खडुलें।
तिएं सामाविजेति सिंधुजलें। आन उपाओ नाहीं।।५५७।।

"हे श्रीकृष्णा! मी तर समस्त अपराधांची राशी आहे! पण तू तर आमच्या आईसारखाच वत्सल आहेस! पूर्वी आणि आताही माझ्याकडून जे जे असे वर्तन घडले, ते तू पोटी घाल! सरिता जेव्हा सागरास येऊन मिळते, तेव्हा ती जर मातीची ढेकळे आणि गढूळ पाण्याचे लोट घेऊन येत असली, तरी तिला सागर आपल्या पोटात समावून घेतोच ना! त्याला इतर तरी काय दुसरे करता येणार!"

तैसिं प्रीति कां प्रमादें। देवेंसिं मज विरुद्धें।
बोलविलीं तिएं मुकिंदें। उपसाहाविं जीं।।११-५५८।।

"हे मुकुंदा! प्रेमाने म्हणा! की प्रमाद म्हणून म्हणा! मी तुला जे काही बरेवाईट बोललो असेन, तुझ्याशी जसे काही वागलो असेन, ते सर्व तू सोडून दे आणि मला त्या अपराधांची क्षमा कर! तू तर साक्षात क्षमेची मूर्ती आहेस! या चराचराचा तूच पिता आहेस. मी तुला साष्टांग प्रणिपात करतो. पिता जसा पुत्राचे अपराध सहन करतो; सखा जसे सख्याचे अपराध क्षमा करतो; तसे तूही माझे अपराध सहन कर!"

उपनिषदांनाही न गवसलेली गोष्ट

आणिकही काही एक आहे. ते अर्जुन सांगतोः

तऱ्हैं देवेंसि सलगि केलीं। तैं विश्वरुपाचि आली घेतलीं।
तैं मायबापें पुरविलीं। स्नेहालाचेनि।।११-५७९।।
सुरतरूंचि झाडें। आंगणिं लावाविं कोडें।
देयावें कामधेनूचें पाडें। खेलावेआं।।५८०।।
मिआं नक्षत्रीं डाव पाडावा। चंद्रु चेंडुवालागिं देयावा।
हा छंदु सिद्धि नेला आघवां। माउलिएं तुवां।।५८१।।

"हे श्रीकृष्णा! तू माझ्या वर्तनाबाबत क्षमा करशीलच, असा मला भरवसा आहे. कारण विश्वरूपदर्शनाचा माझा हट्ट पण तू पुरवलास. भक्तांचा वत्सल असा मायबाप तूच आहेस. म्हणून तू माझे कृतापराध नक्कीच आपल्या पोटी घालशील! अंगणी कल्पतरू लावावेत; कामधेनुची वासरे खेळण्यासाठी द्यावीत;नक्षत्रांच्या फांद्यांतून सुरपारंब्या खेळाव्यात; चंद्र चेंडू म्हणून खेळायला द्यावा; असे आमचे लाडकोड पुरवणारा तूच आहेस! माझे सगळे हट्ट तू जातीने पुरविलेस!"

जेआं अमृतलेसालागिं सायास।
तेआंचां पाऊस केला चारीं मास।
पृथ्वी वाहूनि चासेंचास। चिंतामणी पेरिलें।।११-५८२।।
आईसा कृतकृत्य केला स्वामि। बहुवें ललें पालिला तुम्हीं।
दाविलें जैं हरब्रह्मिं। नायकिजैं कानिं।।५८३।।
मग देखावआचिं गोठी। जेआंचिं उपनिषदां नहीं भेटीं।
तैं जिव्हारींचि गांठीं। मजलागिं सोडिलीं।।५८४।।

"ज्याचा थेंबसुद्धा दुष्प्राप्य, त्या अमृताचा चारी महिने वर्षाव करून, क्षिती कसून, तिच्यात चास न चास चिंतामणीची रत्ने तू माझ्यासाठी पेरलीस. मला तू फार प्रेमाने लाळलेस,पाळलेस! महेश-ब्रह्मदेवांसारख्यांनीसुद्धा कधी ऐकले नाही, ते विश्वरूप तू मला प्रत्यक्ष दाखवून कृतार्थ केलेस! जी कोणीही कधीही पाहिलेली नव्हती; उपनिषदांनाही जी गवसलेली नाही; ती आपल्या जीवींची गुह्य वस्तू तू मला दिलीस! विश्वरूप दाखविलेस!"

"रूप सांवळे सुकुमार"

अदृष्टपूर्व रूप

अर्जुन पुढे म्हणतोः

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे।
तदेव मे दर्शय देवरूपं-
प्रसीद देवेश जगन्निवास।।११-४५।।
किरीटिनं गदिनं चक्रहस्त-
मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन
सहस्रबाहो भव विश्वमूर्ते।।११-४६।।

"पूर्वी कोणीही न पाहिलेले हे तुझे रूप पाहून मी हर्षित झालो आहे. पण तुझ्या या रूपाची भयानकता पाहून माझे मन भयाने व्यथित झाले आहे. म्हणून हे देवा! तू तुझे हे विश्वरूप आवरून घे आणि मला तुझे ते पूर्वीचेच सुंदर रूप दाखव! हे देवाधिदेवा! हेजगन्निवासा! प्रसन्न हो आणि तुझे किरीटधारी, हातात गदा आणि चक्र धारण

केलेले असे पूर्वीचेच रूप दाखव! मला तेच रूप पाहण्याची इच्छा आहे. हे सहस्त्रबाहो! हे विश्वमूर्ते! तू पुनः तेच चतुर्भुज रूप धारण कर."

ज्ञानेश अर्जुनाचा भाव ओव्यातून व्यक्तवतात, तो असाः

जीं कल्पादि लागौनि। आजिचि घडी धरौनि।
माझीं जेतुलीं होऊनि। गेलीं जन्में।।११-५८५।।
तेआं आघविआंचिआं आंतु। घरडोली घेऊनि असें पाहतु।
परि ही देखिलीं आईकिलीं मातु। आतुडेचिना।।५८६।।
बुद्धिचें जाणणें। कहिं न वचेचि याचेनि आंगणें।
हें सादहिं अंतष्करणें। करवेचिना।।५८७।।
तेथ डोलिआं देखि होआवि। ही गोठीचि काईसिंआं करावि।
किंबहुना पूर्वी। दृष्ट ना श्रुत।।५८८।।
तैं हें विश्वरूप आपुलें। तुम्हीं मज डोलां दाविलें।
तन्हैं माझें मन जाहालें। हृष्ट देवा।।५८९।।

"कल्पारंभापासून आतापावेतो माझे अनेकानेक जन्म होऊन गेले. पण त्यांचा आढावा घेतला तरी मला कधीही या विश्वरूपाचे दर्शन तर दूरच राहू द्या! साधी माहितीही ऐकण्यात आलेली नाही, असे दिसते. अंतःकरणाने हे विश्वरूप कल्पिण्याजोगे नाही. बुद्धीचा त्याच्या अंगणातही प्रवेश होऊ शकत नाही. असे हे पूर्वी कोणीही न पाहिलेले वा कोणीही न ऐकलेले विश्वरूप आपल्याला डोळ्यांनी पाहता येईल याची गोष्टच का करावी! पण तरीही तू आपले ते रूप मला दाखवलेस. त्यामुळे माझे मन अति हर्ष पावले आहे!"

परि आतां आईसिं चाड जीविं। जैं तुजसि गोठी करावि।
जवलिक हें भोगावि। आलिंगावासिं।।११-५९०।।
तैं याचि स्वरूपि करूं म्हणिजे। तन्हैं कोण्हें एकें मुखेंसि चावलिजें।
आणि कोण्हा खेंव देईजे। तुज लेख नाहीं।।५९१।।

"पण मला आता तुझ्याशी जवळीक करावी; हितगुज तुला सांगावे; तुला आलिंगावे, असे वाटते आहे. पण तुझ्या या स्वरूपी ते शक्य नाही. तुझ्या या अनेक मुखातील कोणत्या मुखाशी वार्तालाप करावा! कोणत्या अंगास मिठी मारावी! हे काहीच कळत नाही."

"पुनः चतुर्भुज रूप घे"

पुढे अर्जुन म्हणतोः

म्हणौनि वारियासारिखें धांवणें। न ठकें गगना खेंव देणें।
जलकेली खेलणें। समुद्रीं केऊतिं।।११-५९२।।
ययालागिं जीं देवा। एथिंचें भय उपजतसें जीवां।
म्हणौनि एतुलां लला पालावा। जैं पुरें हें आतां।।५९३।।
पैं चराचर विनोदें पाहिजें। मग तेणें सुखें घरें राहिजें।
तैसें चतुर्भुज रूप तुझें। तो विसांवा आम्हां।।५९४।।

"वाऱ्याबरोबर कोण धावू शकेल! गगनास आलिंगन देता येईल का! समुद्राशी जलक्रीडा कशी करावी! तसेच तुझ्या या विश्वरूपाबरोबर सख्यभावाने वागावे तरी कसे, हे कळत नाही. त्याचप्रमाणे हे तुझे विश्वरूपही तसे भय उत्पन्न करणारेच आहे. म्हणून पुनः तुला मी प्रार्थितो की ते आता आवरून घे! चराचर सृष्टीचे कौतुक पाहून झाले की घरीच येऊन विसावा घ्यावा लागतो की नाही! का सारखी उगीच भटकंतीच करत बसावयाचे असते! सुख खरे तर घरी निवांत राहण्यातच जसे असते, त्याप्रमाणे तुझे चतुर्भुज रूपच खरे पाहता आमचे मन विसावण्याचे ठिकाण आहे. तुझ्या या विश्वरूपाचे कौतुक आता पुरे झाले! म्हणून माझे हे लाड आता पुरव! मला तुझे चतुर्भुज रूप दाखव!"

आम्हीं योगजात अभ्यासावें। तेणें याचि अनुभवां यावें।
शास्त्रांतैं आलोडावें। परि सिद्धांतु तो हाचि।।११-५९५।।
आम्हीं यजनें कीजति सकलें। परि तिएं फलावि एणेंचि फलें।
तीर्थें होतु सकलें। याचिलागिं।।५९६।।
आणिकहिं काईं जैं जैं। दानपुण्य आम्हीं कीजैं।
तेआं फलीं फल हेंचि तुझें। चतुर्भुज रूप।।५९७।।
आईसिं तेथिंचिं जीवा आवड।
म्हणौनि तैंचि देखावेआं लवडसवड।
वर्तत असें तैं साकडी। फेडीं वेगां।।५९८।।
अगां जिविंचें जाणतेआं। सकलविश्वसवितेआं।
प्रसन्न होईं पूजितआं। देवांचिआं देवा।।५९९।।

"योगशास्त्रादी अभ्यासाचे फळ असणारे, शास्त्राध्ययन करून जाणून घ्यावयाचे, ते हेच सुंदर चतुर्भुज रूप! यज्ञादींचे फळ तेही हेच आहे. तीर्थाटने करून हेच फळ मिळवायचे असते. समस्त दानपुण्यादी कृत्यांचे फळ तेही तुझे हे लाघवी चतुर्भुज रूपच ना! ***मलाही तेच तुझे चतुर्भुज रूप फार प्रिय आहे. ते पाहण्यासाठी जीवाला तळमळ लागली आहे. तरी माझी ही आर्ती तू त्वरित दूर कर!*** माझ्या अंतःकरणाचा ठाव तुलाच लागतो! देवा! हे सर्व विश्व तुझ्याच सत्तेवर चालते आहे. तू प्रसन्न हो! हे देवांकडूनही पूजिल्या जाणाऱ्या परमात्मन्! माझी ही इच्छा पुरव! मला ते आपले मनमोहक चतुर्भुज रूप परत दाखव!"

"आम्हां भोगमोक्षाचां ठाईं। श्रीमूर्त्तिवांचौनि नाहीं"

ते चतुर्भुज रूप कसे आहे, त्याचे वर्णन पहाः

कैसें निलोत्पलातैं रांवित। आकाशाहिं रंगु लावित।
तेजाचिं वोज दावित। इंद्रनीलां।।११-६००।।
जैसा परिमलु जाहाला मरगजां।
कां आनंदासिचिं निगालिआं भुजा।
जेआंचें जानुवरी मकरध्वजा। जोडिलीं बरव।।६०१।।

"चतुर्भुज रूप सावळे आहे. ते घननीळ आहे. नीलकमलांना रंग त्याचाच आहे. गगनासही त्याच रंगाने रंगविले आहे. इंद्रनीलाचे तेज असाच तो नीलवर्ण आहे. ते तुझे घनश्याम रूप पाहण्यास मी अति उत्कंठित झालो आहे. पाचू रत्नास परिमळ असावा, असे ते सुकुमार रूप आहे. आणि त्या रूपाच्या भुजा म्हणजे जसे आनंदासच उगवलेले बाहू आहेत. त्या तुझ्या रूपाच्या मांड्यांवर खेळून मदनास म्हणजे श्रीकृष्णपुत्र प्रद्युम्नास सौंदर्य प्राप्त झाले."

मस्तकीं मुगुटांतैं ठेविलें। कीं मुगुटां मुगुट मस्तक जाहालें।
शृंगारां लेणें लाधलें। अंगाचेनि जेआं।।११-६०२।।
इंद्रधनुषाचिएं आडणिं-। माजिं मेघ गगनरंगणिं।
तैसें आवरिलें शार्ङ्गपाणि। वैजयंतियां।।६०३।।
कवणिं तैं उदार गदा। आसुरां देत कैवल्य सदां।
कैसें चक्र हन गोविंदा। सौम्यतेजें मिरवें।।६०४।।
किंबहुना स्वामी। तैं देखावेयां उत्कंठित पां मी।
म्हणौनि आतां तुम्हीं। तैसेआं होआवें।।६०५।।

"मस्तकी मुकुट तरी असा शोभतो आहे की जणू मस्तकाचाच मुकुट त्या मुकुटाने ल्यायला आहे. मस्तक आणि मुकुट कोण कोणाची शोभा वाढवत आहेत, कळेना! गगनांगणातील मेघांनी इंद्रधनुला सावरावे, तशी तुझ्या देहाने ती वैजयंतीमाला सावरून धरली आहे. तुझ्या सुंदर सर्वांगाने त्यावरील बहुविध अलंकारांस जणू भूषवले आहे. हे शार्ङ्गपाणी! तुझ्या हातात असणारी ती उदार गदा मला दिसू दे! असुरांना ती कनवाळूपणे सदा मोक्ष देण्यास तत्पर असते!आणि तसेच तुझ्या हातात सौम्य तेजाने मिरवणारे चक्रही मला पाहू दे! हे स्वामी! ***तुझे असे सुशोभित चतुर्भुज सावळे सुकुमार रूप पहाण्यास मी अति उत्सुक आहे. तरी तू तेच रूप आता घे!"***

हें विश्वरूपाचें सोहळें। भोगूनि निवालें जीं डोळें।
आतां होताति आधलें। कृष्णमूर्त्तिलगौनि।।११-६०६।।
तैं साकार कृष्णरूपडें। वांचौनि पाहों नावडें।
तैं न देखितां थोडें। मानिताति हें।।६०७।।
आम्हां भोगमोक्षाचां ठाईं। श्रीमूर्त्तिवांचौनि नाहीं।
म्हणौनि तैसाचिं साकारु होईं। हें सांवरीं आतां।।६०८।।

"तुझ्या या विश्वरूपाचा सोहळा पाहून माझे डोळे आता निवाले आहेत. ते पुनः कृष्णमूर्ती पाहण्यास अधीर झाले आहेत! त्या तुझ्या सगुण साकार रूपाशिवाय त्यांना इतर काहीही पहायला आवडत नाही. त्या रूपापुढे या तुझ्या विश्वरूपाची त्यांना काहीच मातब्बरी वाटत नाही. मलाही ऐहिक भोग आणि पारलौकिक कल्याण वा मोक्ष म्हणजे ती तुझी श्रीमूर्तीच आहे! म्हणून हे विश्वरूप आता आवरून घे आणि तसाच सगुण साकार तू परत हो!"

श्रीहरीचे रूप :::::

ज्ञानदेवांचे रूपानुभूतीचे अभंग

अर्जुनाचे हे बोल आपणास ज्ञानदेवांच्या सगुणभक्तिपर अशा काही अभंगांचे स्मरण करून देतात. ***सगुण नि निर्गुण असे रूप ज्ञानदेव पाहत असतात. कधी ते रूप सगुण असते, तर कधी निर्गुण!*** पण ते रूप अतीव समाधान आणि सुख देणारे असते. त्यांचे असे काही अभंग पाहू या.

आपण आता जे ज्ञानदेवांचे अभंग पाहणार आहोत, त्यांतील चरणानुक्रम ***श्री.प्र.न.जोशी*** यांनी संकलित केलेल्या ज्ञानेशांच्या अभंगगाथेप्रमाणे आणि वारकरी गाथेनुसार आहेत. ते अभंग पूर्वीप्रमाणेच जसे आपण *श्री.प्र.न जोशी* यांच्या गाथा अनुक्रमांकाप्रमाणे घेतले, तसेच अनुक्रमांक आताही सर्वांच्या सोयीसाठी स्वीकारले आहेत. असे असले तरी अर्थ मात्र स्वतंत्र आणि आपल्या विषयानुसार आपण स्वतःच मागीलप्रमाणेच करणार आहोत, एवढे परत जिज्ञासूंच्या निदर्शनास आणत आहे. यापुढेही जेव्हा जेव्हा श्रीज्ञानदेवांचे अभंग उद्धृत करण्याचा प्रसंग येईल, तेव्हा पण आपण याच पद्धतीचा प्रयोग करणार आहोत. असो.

ज्ञानदेवांच्या अभंगांतील रूपदर्शन

रूप पाहतां लोचनिं। सुख जालें वो साजणि।।१।।
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा।।२।।
बहुतां सुकृतांचि जोडी। म्हणौनि विठ्ठलीं आवडीं।।३।।
सर्व सुखाचें आगर। बापरखुमादेविवर।।४।।अ.क्र.१।।

"श्रीहरीचे रूप पाहून मला फार सुख झाले आहे. विठ्ठल तो हाच! माधवही हाच! सर्व सुखाचे आगर असा रखुमादेवीवर विठ्ठलमूर्ती श्रीकृष्ण तो हाच! मला पूर्वसुकृताने या रूपाची - या विठ्ठलाची आवड निर्माण झाली आहे," असे ज्ञानेश म्हणतात.

तो कसा दिसतो, ते ऐका:

अनुपम्य मनोहर। कांसें शोभें पितांबर।
चरणिं ब्रीदाचां तोडर। देखिला देओ।।१।।
योगियाचां कसवटी। दावितसें नेत्रत्रिपुटीं।
उभा भिवरेचां तटीं। देखिला देओ।।२।।
बाप रखुमादेविवरु। पुंडलिकां अभयकरुं।
परब्रह्म साहाकारु। देखिला देओ।।३।।अ.क्र.४।।

"याचे रूप मनोहर आहे. कासेला पितांबर झळकत आहे. पायी भक्तवात्सल्याच्या ब्रीदाचे तोडे त्याने ल्यायले आहेत. योग्यांच्या कसोटीला उतरणारे हे रूप नेत्रांच्या पुटात पाहून मी धन्य झालो! पुंडलिकाला अभय देणारे हे साकार परब्रह्म भींवरेच्या तीरी अवतीर्ण झाले आहे. या बापरखुमादेवीवराला पाहून नेत्र तृप्त झाले."

या सगुण रूपातील निर्गुण रूपास लक्षिणारे ज्ञानदेव पुढे म्हणतात:

सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण।
नाहीं रूप गुण वर्ण जेथें।।१।।
तो हा रे श्रीहरी पाहिला डोळेभरी।
पाहतें पाहणें दूरीं सारौनिआं।।२।।
ज्ञानदेओ म्हणें ज्योतीचिं निजज्योति।
तैं हें मूर्त्ति उभी विटेवरी।।३।।अ.क्र.५।।

"रूप, गुण आणि वर्ण ज्याला नाहीत, असा हा श्रीहरी मी डोळे भरून पाहिला. साक्षात सत्य ते हाच! गगनाचे आवरण हा त्याला आहे. अनंत ज्ञान ही याची व्याप्ती आहे. विटेवर उभी असलेली ही विठ्ठलमूर्ती म्हणजे योग्यांस दिसणाऱ्या ज्योतीचीही ***निजज्योती*** आहे. ***द्रष्टा व दृश्य दोनही बाजूस सारून मी ही पाहिली आहे."***

"तुज सगुण म्हणूं कीं निर्गुण रें"

त्रिपुट्यवस्थित दर्शनापेक्षा हे त्रिपुटीविरहित दर्शन काही वेगळेच आहे. यास ***सगुण म्हणावे की निर्गुण*** असा विचार ज्ञानदेवांनाही पडलेला दिसतो. ते म्हणतातः

तुज सगुण म्हणूं कीं निर्गुणु रें।
सगुण निर्गुणु एकु गोविंदु रें।।१।।
अनुमानें ना अनुमानें ना।
श्रुती नेति नेति म्हणति एकु गोविंदु रें।।२।।
तुज स्थूल म्हणों कीं सुक्ष्मु रें।
स्थूलु सूक्ष्मु एकु गोविंदु रें।।३।।
तुज आकारु म्हणों कीं निराकारु रें।
आकारु निराकारु एकु गोविंदु रें।।४।।
तुज व्यक्त म्हणों कीं अव्यक्त रें।
व्यक्त अव्यक्तु एकु गोविंदु रें।।५।।
निवृत्तिप्रसादें ज्ञानदेओ बोलें।
बापु रखुमादेविवरु विठ्ठलु रें।।७।।अ.क्र.१८।।

"तुला सगुण म्हाणावे की निर्गुण म्हणावे! सगुण आणि निर्गुण ही दोन्ही तुझीच रूपे आहेत. अनुमान, तर्क यांनी तुझे रूप जाणता येत नाही. तू कसा आहेस, ते श्रुतींनाही सांगता येत नाही.त्या केवळ ***"नेति, नेति"*** एवढेच शब्द तुझ्याबाबत उच्चरतात. तुला स्थूळ म्हणावे की सूक्ष्म! साकार म्हणावे की निराकार! दृश्य म्हणावे की अदृश्य! तू तर हे सर्वच आहेस. हे गोविंदा! व्यक्त आणि अव्यक्त दोन्ही तूच आहेस!"

निवृत्तिप्रसादाने ज्ञानदेवांस हे पूर्णपणे उमगले आहे की हा परमपिता बाप रखुमादेवीवर विठ्ठलच हे सर्व आहे!

मुरली वाजवणारा, नादब्रह्माला जागवणारा, सकल आणि अकल श्रीकृष्णही हाच आहे, असे ज्ञानेश पुढील अभंगातून मोठ्या लाक्षणिक रीत्या सांगतातः

त्रिभंगिं देहुडा ठाण मांडूनिआं माएं।
कल्पद्रुमातलीं वेणु वाजवितु आहें।।१।।
गोविंदु वो माएं गोपालु वो ।
सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु वो।।२।।
सांवलें सकलां जीवांचें जीवन।
घनानंद मूर्त्ति पाहतां हारपलें मन।।३।।
शून्य स्थावर जंगम व्यापूनि राहिला अकल।
बापु रखुमादेविवरु सकल गां।।४।।अ.क्र.१९।।

"दिडक्या पायावर उभा राहून तो गोपाळ, तो गोविंद कल्पवृक्षातळी वेणू वाजवीत आहे. सावळी सगुण अशी ती घनानंद मूर्ती म्हणजे मला जीव की प्राण आहे! अंतर्बाह्य परमानंदाने ओतप्रोत भरलेल्या श्रीकृष्णाचे हे रूप पाहताच माझे मन हरपून गेले आहे. स्थावर-जंगमादीच काय! पण शून्यासही ते रूप व्यापून राहिले आहे! सकल असा हा बाप रखुमादेवीवर निष्कलासही व्यापून असतो, हे एक आश्चर्यच आहे," असे ज्ञानदेव उद्गारतात.

वरील अभंगातून ***सगुण रूपाचे महत्त्व व व्याप्ती*** सांगितली आहेत. **योग्यांच्या व भक्तांच्या मते हे सगुणच निर्गुणासही व्यापते. यापरता अनुभव नाही! सकल तेच निष्कल *(अकल)* आहे**, ही त्यांची अनुभूती यात आली आहे.

योगानुभूतींचे रमणीय दालन

केवळ परमानंदच अशा या स्वरूपाचे दिव्य दर्शन घडवीत ज्ञानेश म्हणतातः

पांडुरंग कांति दिव्य तेज झलकति। रत्नकीला फांकति प्रभा।।
अगणित लावण्य तेज पुंजाललें।न वर्णवें तेथिंचि शोभा।।१।।
कानडा हो विठ्ठलु करनाटकु। तेणें मज लाविएला वेधु।।
खोल बुंथि घेऊनि खुणाचि पालवि। अलविल्या नेदी सादु।।२।।
शब्देंविण संवादु दुजेंविण अनुवादु। हें तंव कैसेनि गमें।।।।
परेहि परतें बोलणें खुंटलें। वैखरी कैसेनि सांघें।।३।।
पायां पडूं गेलें तंवं पाऊलचि न दिसें। उभाचि स्वयंभु असें।
समोर कीं पाठिमोरा न कलें। ठकचि पडलें कैसें।।४।।
क्षेमालागिं जीव उतावील माझां। म्हणूनि स्फुरताति बाहो।
क्षेम देऊं गेलें तंवं मीचि मी एकलीं। आसांवला जीव राहो।।५।।
बापु रखुमादेविवरु हृदयिंचां जाणौनि। अनुभवु सौरसु केला।
दृष्टीचां डोलां पाहों मी गेलिएं।
तंवं भीतरु पालटु जाला।।६।।अ.क्र.२०।।

"या पांडुरंगाच्या रूपाची कांती केवढ्या दिव्य तेजाने झळकते आहे, पाहा! नाना रत्नांची प्रभा पसरावी, तसा हा अगणित लावण्याचा पुतळा तेजाने पुंजाळला आहे.त्याची शोभा अवर्णनीय आहे. **परेपलीकडच्या प्रांतातील *(करनाटकु)* असा हा विठ्ठल जाणिवेस न आकळणारा *(कानडा)* आहे.** पण याने मला वेध लावला आहे!"

"सगुणाची खोळ पांघरून घेतली आहे याने आणि मला सारखा खुणावतो आहे. पण याला साद घातली, तरी हा जवळ का येत नाही? याच्याजवळ शब्दांची भाषा चालत नाही का? याच्याशी संभाषण करण्यासाठी कोणास मध्यस्थ करावे बरे! परेच्याही हा पलीकडे आहे, म्हणून वैखरीचे बोल त्याच्यापावेतो पोहोचावे तरी कसे! बरे याच्या पाया पडायला गेलो, तर त्याची पावलेही दिसत नाहीत. पण समोर तर त्याची स्वयंभू मूर्ती प्रत्यक्ष उभी दिसत आहे! हा सामोरा आहे की पाठीमोरा तेही मला कळत नाही! याचे अचिंत्य रूप पाहून मन संमूढ होऊन गेले आहे."

"याला आलिंगण्यासाठी मी उतावीळ झाले आहे आणि माझे बाहू स्फुरत आहेत. पण जेव्हा याला मी आलिंगू गेले, तो काही हा त्या मिठीत सापडला नाही! माझी मीच मला मिठी दिली! आणि हा समोरचा दिसेनासा झाला! माझ्या जीवाची आस तशीच्या तशीच अधुरी राहिली आहे."

"हा बापरखुमादेवीवर असा तसा कोणी नसून मी स्वतःच आहे, हे जाणून मग मी जेव्हा त्याला अंतर्दृष्टीने पाहिले, तेव्हा महदानंदाची अनुभूती येऊन माझा कायापालट झाला. मी अंतर्बाह्य पालटून गेले."

ज्ञानदेवांनी आपल्या अनुभूतीची ही अशी प्रामाणिक साक्ष आपल्यामागे ठेवली आहे या प्रभावी शब्दांत! *सगुण रूप, निर्गुण रूप, स्वसंवेद्यता, आत्मरूपत्व, वेदप्रतिपाद्यत्व, अनादित्व* इ.विशेषांनी विनटलेले हे श्रीकृष्णरूप ज्ञानेशांच्या अभंगागणिक स्पष्ट होत जाते. *योगानुभूतीचे हे एक दालन* त्यातून आपल्या दृष्टीसमोर उघडत जाते. *परमात्म्याचा साक्षात्कार* आपणास या अभंगांतून त्याच्या *रूपानुभूतीद्वारे* ज्ञानेश घडवत आहेत. *विश्वरूपाच्या खऱ्या मितीची एक चुणूक* या अभंगांतून आपण पाहू शकतो.

"आदि अंतु एकु पूर्णु सनातनु"

१) बरवा हो हरि बरवा हो।
गोविंदु गोपालु गुण गरुवा हो।।१।।
सांवला हो हरि सांवला हो।
मदनमोहन कान्हो गोंवला हो।।२।।
पाहातां वो हरि पाहातां वो।
ध्यान लागलें या चित्तां वो।।३।।
पढिएं वो हरि पढिएं वो।
बापरखुमादेविवरु घडिएंवो।।४।।अ.क्र.१७।।

त्या श्रीहरीरूपास ते नाना विशेषणांनी गौरवतात. गुणांचा सागर ***("गोविंद गोपाल गुण गरुवा हो।")***, सावळा, मदनमोहन, कान्हा,गोपाळ, चित्तास ध्यान लावणारा हा श्रीधर त्यांना अति प्रिय आहे ***("बरवा हो हरि बरवा हो।")***.

या चिदानंद रूपाचे सगुण-निर्गुणपर वर्णन करत ते म्हणतातः

२) चिदानंद रूप चेतवितें एक।
एकपणें गुणागुणीं दाविं अनेक।।१।।
आदि अंतीं गुण सर्वत्र निर्गुण।
गुणासिं अगुण भासति ना।।२।।
कैसें जालें अरूपीं गुणीं गुणवृत्ति।
सगुण पाहतां अंतरलें गति।।३।।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलु नंदनंदनु।
आदि अंतीं एकु पूर्णु सनातनु गे माएं।।४।।अ.क्र.२१।।

"चैतन्याचेच हे रूप आहे. आनंदकंद असा हा श्रीहरी सर्व जगास चेतवतो. एकलाच असूनही गुणांनी हा अनेक रूपे दाखवितो. पण हा अगुणच आहे. आदि-अंती गुणमय दिसणारा हा खरे तर निर्गुण रूपाने सर्वदूर भरून राहिला आहे. पण गुणांतरी वसणारे त्याचे हे निर्गुण रूप कसे बरे दिसावे! या निर्गुण गोपाळाने अरूपी हे गुण तरी का धारण करावेत, ते कळत नाही. पण याचे हे सगुण रूप पाहिले, तरी गती नाहीशी होते! नंदाचा नंदन असा हा बाप आहे! रखुमादेवीवर आहे! आदि-अंती एकच एक, पूर्ण सनातन असे जे तत्त्व, तो हाच आहे!"

गोपाळाची लोभस मूर्ती

१) तुरे कांबळें डांगेवरीं विषाण वेणु घेऊनि करीं।
वैजयंती रुळे कैसिं वक्षस्थलावरी।।१।।
गोविंदु वो पैल गोपालु माएं।
सुरतरुतलुवटीं देखें कैसा उभा राहें।।२।।
आड त्रिपुंड्र शोभत द्रुमिल भारेंसिं जात।
नागर केशरींचि पुष्पें कैसिं पैं मिरवित।।३।।
हिरिआं ऐसिआं दंतपंक्ति अधर पोंवल वेली।
श्रवणिंचि कुंडले ब्रह्मरसाचिं वोतिलीं।।४।।
विश्वाचें जीवन ते मिआं सार देखियलें।
योगी ध्याति ध्यानिं ब्रह्म तेंचि गोकुळासिं आलें।।५।।
आजि धन्य जालें राया कृष्णासिं देखिलें।
निवृत्तिमुनिरायप्रसादें ध्यान तें हृदयासिं आलें ।।
।।६।।अ.क्र.२२।।

डोक्यावर मयूरपिच्छांचा तुरा ल्यायलेला, खांद्यावर घोंगडी व हातात गोवळकाठी घेऊन चालणारा, बासरी वाजवणारा, सुरतरुतळवटी उभा असा गोपाळही ज्ञानेशांना दिसतो. यमुनेच्या पैलतीरी तो आहे. गोपालबालक त्याच्या समवेत आहेत. कपाळावर चंदनाचे त्रिपुंड्र आणि मस्तकी सुंदर केशरी दुर्मीळ अशी वृक्षवेलींची फुले त्याने धारण केली आहेत.

हिऱ्यांसारख्या त्याच्या दंतपंक्ती आहेत. ओठ पोवळ्यासारखे लालचुटुक आहेत. कानांतील कुंडले तर ब्रह्मरसाचीच ओतलेली आहेत. विश्वाचे जीवन, निजसार, योगी ध्यातात ते ब्रह्म असाच हा गोकुळी असणारा श्रीकृष्ण आहे. निवृत्तिप्रसादाने त्यास पाहून आणि हृदयी ते ध्यान धरून ज्ञानदेव कृतार्थ होतांना दिसतात.

२) सुंदर वोतिलें। परब्रह्म तेज फांकलें।
तें व्योमीं व्योम सामावलें। नयनिं वो माय।।१।।
कमलनयन। सुमन फांकलें।
त्या परिमलां आथिलें। मकरंदीं वो माय।।२।।
संकोचलां संसार। पारुषला व्यवहार।
ब्रह्मानंद अपार जाला वो माय।।३।।
मधुर वेदवाणी। न पवें ज्याचां गुणीं।
तें ठाकवलें निर्वाणीं। नेति मुखें वो माय।।४।।
यापरतें बोलणें। न बोलणें होणें।
तैं मिआं आपुलिआं आंगवणें।केलें वो माय।।५।।
ऐसिआंतैं वोठीं। लागलें तयाचें पाठीं।
रखुमादेविवरां भेटीं। विठ्ठलीं वो माय।।६।।अ.क्र.२३।।

सुंदर सुरेख ओतीव अशी ती मूर्ती आहे. परब्रह्माचे तेज तिच्यातून फाकते आहे. आकाशी आकाश समावून जावे, तसे ते रूप ज्ञानदेवांच्या नयनी समावून गेले आहे. कमलनयन अशा त्या मूर्तीस मकरंदाचा परिमळ आहे. त्याच्या दर्शनाने संसाराचा संकोच झाला आहे. व्यवहार

स्तब्ध झाला आहे. अपार ब्रह्मानंद झाला आहे. मधुर अशा वेदवाणीसही न सापडलेला तो श्रीहरी ज्ञानेशांच्या चित्ती येऊन बसला आहे. त्याला आपल्या ओठांच्या संपुटात त्यांनी बंदिस्त केले आहे. असा हा श्रीविठ्ठल ज्ञानेशांना त्यांच्या अभंगांतून गवसतो!

द्वैताद्वैतविलक्षण रूप

१) देओ आहे जैसा तैसा नेणवें सहसा।
भांबावला कैसा विश्वजनु।
तया रूप ना रेखा लय ना लक्षण।
तैं प्रतिमेसिं आणूनि वासनारूपें।।१।।
देव सर्वगत निराला अद्वैत। तयां मूर्त्तिमंत ध्याईजेतु।
तिहीं देवांसिं आकारु जेथूनि विस्तारु।
तो ध्वनी औंकारु त्या आरुता।
तेथ नाद ना बिंदु कळा ना छंदु।
अक्षय परमानंदु सदोदितु।।२।।
अवतरें तैसाचि नव्हें होएं तैं संभवें।
आहें हें आघवें लाघव रया।
तो एकवट एकला रचला ना वेंचिला।
आदिअंतीं संचला अनंतपणें।
पृथ्वी आप तेज वायु आकाश। हीं सकल हारपति प्रलयांतीं।
तीं निरशून्य निरुपम निरंजन निर्वाण।
तैं दशा पाषाण केंविं पावती।।३।।
पाहतां या डोलां न दिसें कांहीं केलिआं।
व्यापूनिआं ठेला बाहिजु भीतरीं।
तो *पदपिंडा अतीतु भावाभाव रहितु* ।
बापरखुमादेविवरु विठ्ठलु हृदयांआंतु रया।।४।।अ.क्र.२४।।

हा श्रीहरी जसा आहे तसा कोणासही जाणवून येत नाही. सर्व जण म्हणून भांबावून गेले आहेत. त्यास रूप ना आकार, विनाश ना लक्षण! पण ***जीवांच्या इच्छेनुसार तो रुपे घेतो. अद्वैत निराकार अशा त्यास मूर्तिरूपाने ध्याता येते! ॐकार, ध्वनी, नाद, बिंदू, कला, छंद* यांपलीकडचा तो आहे. अक्षय असा परमानंद म्हणजेच हा श्रीहरी! सगुणरूप हा घेतो म्हणावे तर तसेही नाही.** हे विश्व म्हणजे सगळे याचेच लाघव आहे. आदि-अंत-स्थिती यांपलीकडे असणाऱ्या या निराकारास चर्मचक्षूंनी पाहावे तरी कोणी आणि कसे! ***पदपिंडातीत, भावाभावरहित अशा या रखुमादेवीवर विठ्ठलाने अंतर्बाह्य सर्व विश्व कोंदाटून टाकले आहे.*** त्याला ***हृदयाच्या आत पाहून*** ज्ञानेश सुखी होतात.

द्वैताद्वैतविलक्षण अशा या रूपाबद्दल ते म्हणतातः

२) जयाचें गुणगान आठवितां मनचि नाहीं होएं।
अनुभवाचें पाएं पुढें चालति।।१।।
निर्गुण गे माये गुणवंत जाला।
प्रतिबिंबें बिंबतसें चैतन्याचें मुसें।
प्रति ठंसावत तैं वृंदावनीं। ब्रह्म असे गे माये।।२।।
बापु रखुमादेविवरु डोलसु सांवला।
द्वैत अद्वैत सोहला भोगविं गे माये।।३।।अ.क्र.४४।।

याच्या रूपगुणनामाचे ध्यान करत ध्याते मनच नाहीसे होते आणि अनुभूतीच्या पावलांवर जीव चालू लागतो. जीव असा अनुभूती घेतघेत चैतन्याजवळ जाऊन पोहोचतो तोच आपणच त्या चैतन्याचे प्रतिबिंब होऊन जातो. वृंदावनींचा तो श्रीकृष्ण म्हणजेच ते प्रतिबिंब! ते म्हणजेच सगुण झालेले निर्गुण ब्रह्माचे रूप! अंतरी दिसणारे ते सावळ्या रखुमादेवीवराचे सगुण रूपच हा द्वैत-अद्वैताचा विलक्षण सोहळा ज्ञानदेवांकडून भोगवत आहे.

हा सोहळा भोगून ज्ञानदेव कृतार्थ होत म्हणतातः

३) आजि देखिलें रें आजि देखिले रें।।ध्रु.।।
सबाह्य अभ्यंतरीं। अवघा व्यापकु मुरारी।।१।।
दृढ वीटे मनमुलीं। विराजित वनमालीं।।२।।
आजि सोनियाचां दिनु। वरी अमृतांतैं वरिषे घनु।।३।।
बरवा संतसमागमु। प्रकटला आत्मारामु।।४।।
बाप रखुमादेविवरु। कृपासिंधु करुणाकरु।।५।।
।।अ.क्र.४७।।

आज सोनियाचा दिवस उगवला आहे. त्यात वरून मेघांतून अमृतधारा वर्षतात आहेत. माझे सद्भाग्यच आज उगवले आहे. संतसमागमाचे फळ असा हा कृपासिंधू प्रकटला आहे. करुणाकर अशा त्या बाप रखुमादेवीवराचे दर्शन मला झाले आहे. माझ्या बाह्याभ्यंतरी हा आत्माराम प्रकटला आहे. त्याने सर्व काही व्यापून टाकले आहे. ***मनाची वीट करून तिच्यावर हा वनमाळी स्थिरावला आहे! तेथे हा मुरारी विराजला आहे!"***

आपणास झालेला ब्रह्मानंद ज्ञानेश अशा या शब्दांत प्रकट करतात. हाच त्यांचा साक्षात्कार आहे. ***आज्ञाचक्रापलीकडील प्रांत रूपाचाच असतो.*** अर्जुनासही त्याच रूपाची ओढ लागणे स्वाभाविक आहे. म्हणूनच तो ते ***"रूप सांवळें सुकुमार"*** दिसावे म्हणून श्रीकृष्णाची मनधरणी करतांना दिसत आहे.

ज्ञानदेवीचा आत्मज्ञानदीप::::

"एथूनि जैं अवतार। कृष्णादिक"

पण श्रीकृष्णांना काही त्याचा हा अडाणीपणा आवडत नाही. कारण अर्जुनास अद्यापही ती दृष्टी प्राप्त झालेली नाही, जी ज्ञानदेवांनी वरील अभंगांतून साकारली आहे.

ययां अर्जुनाचिआं बोलां। विश्वरूपां विस्मो जाहाला।
म्हणें आईसा नाहीं देखिलां। धसाल कोण्हीं।।११-६०९।।

अव्यक्त तेच व्यक्त, निराकार तेच साकार, निर्गुण तेच सगुण. अलक्ष्य तेच लक्ष्य, अशी ती त्रिपुटीविरहित दृष्टी अर्जुनास प्राप्त व्हावी म्हणून भगवंतांनी हा विश्वरूपदर्शनाचा सोहळा संपन्न केला! पण अर्जुन आपला सगुण रूपासच कवटाळू पाहत आहे. म्हणून ते किंचित रागावून त्याच्या या म्हणण्याचे आश्चर्य दाखवत त्यास म्हणतात की "तुझ्यासारखा अडाणी माणूस दुसरा कोणी मी पाहिलेला नाही."

कारण काय ते सांगतांना ते म्हणतातः

कोण हें वस्तु पावला आहासिं। तेआं लाभाचां तोषु न घेसिं।
मग भेणें काएं नेणों बोलसिं। हेकाडु आईसा।।११-६१०।।
आम्हीं सांवियांचि जैं प्रसन्न होणें। तैं आंगचिवरी म्हणें देणें।
वांचौनि जीव असे वेंचणें। कवणासिं गां।।६११।।
तैं हें तुझिएं चाडें। आजि जीवाचेचिं दलवाडें।
कामऊनिआं एवढें। रचिलें ध्यान।।६१२।।

"तुला केवढी मोठी ही वस्तू प्राप्त झाली आहे. विश्वरूपदर्शनाने तू संतोष मानण्याऐवजी मूर्खासारखा घाबरटपणाने असे काय बोलतो आहेस! मी प्रसन्न झालो की माझे शरीरसुद्धा देऊन टाकतो. पण मी कोणाला कधी जीवींची गोष्ट दिल्याचे तुला माहीत आहे का! तुझ्या इच्छेखातर हे घडले आहे. हे विश्वरूप माझा जीव-प्राण गोळा करून तू पहावेस म्हणून मी रचले."

आईसिं काय नेणों तुझिं आवडी।
जाहालीं प्रसन्नता आमुचिं वेडी।
म्हणौनि गौप्याचिंहीं गुढी। ऊभविलीं जगिं।।११-६१३।।
तैं हें अपारां अपार। स्वरूप माझें परात्पर।
एथूनि जैं अवतार। कृष्णादिक।।६१४।।

"तुझ्यावरील प्रेमाच्या भरात मी मोठ्या प्रसन्नतेने हे गुप्त रूप तुझ्यासमोर प्रकट केले. त्यामुळे हे गौप्य जगास जाहीर झाले आहे. ***अपरा प्रकृतीच्या पलीकडील हे रूप आहे. परात्पर असे हे माझे स्वरूप आहे आणि कृष्णादिक जे अवतार आहेत, ते सगळे येथूनच होतात."***

हें ज्ञानतेजाचें निखल। विश्वात्मक केवल।
अनंत हें अढल। आद्य सकलां।।११-६१५।।
हें तूझवांचौनि अर्जुना! पूर्वीं श्रुत दृष्ट नाहीं आना।
जैं जोगें नोहें साधना। म्हणौनिआं।।६१६।।

"हे स्वरूप निखळ ज्ञानमय आहे. हे विश्वात्मक रूप आहे. आद्य स्वरूप ते हेच! अचल आणि अनंत असे माझे स्वरूप तुला मी दाखवले. हे तुझ्याशिवाय आजपावेतो कोणीही पाहिले नाही. एवं च काय! या रूपाविषयी कोणी पूर्वी ऐकलेलेही नाही. हे रूप कोणतीही यज्ञादी साधने करून प्राप्त होणारे नाही."

"रूपं परं दर्शितमात्मयोगात्"

श्रीकृष्ण अर्जुनास या रूपाचे माहात्म्य समजावून सांगत पुढे म्हणतातः

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं-
रूपं परं दर्शितमात्मयोगात्।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं-
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम्।।११-४७।।
न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै-
र्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः।
एवंरूपः शक्य अहं नृलोके
द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर।।११-४८।।

"अर्जुना! अति प्रसन्न होऊन मी माझ्या आत्मयोगाने समृद्ध असे हे परम रूप तुला दाखविले. तेजोमय, विश्वात्मक, अनंत, आद्य असे हे रूप तुझ्याखेरीज आतापावेतो कोणीही पाहिलेले नाही. हे कुरुकुलातील श्रेष्ठ वीरा! वेद, यज्ञ, अध्ययन, दान, क्रिया वा उग्र तप यांनीदेखील हे असे रूप पाहणे या मनुष्यलोकी शक्य नाही. हे केवळ तुलाच पाहायला मिळाले आहे."

"हें वांचूनि चांग। न मनिं कंहिं"

याचिं सोएं पातलें। आणि वेदीं मौनचि घेतलें।
यज्ञ कीं माघौतें आलें। स्वर्गाहूनि।।११-६१७।।
साधकीं देखिला आयासु। म्हणौनि वालिलां योगाभ्यासु।
आणि अद्ययनें सौरसु। नाहीं एथ।।६१८।।
सीगेचिं सत्कर्में। धाविन्नलीं संभ्रमें।
तिहीं बहुतेकीं श्रमें। सत्यलोकु ठाकिला।।६१९।।
तपीं ऐश्वर्यु देखिलें। आणि उग्रपण उभयांचि सांडिलें।
एवं तपसाधन जैं ठेलें। अपारांतरीं।।६२०।।

श्रीकृष्ण म्हणतातः "हे विश्वरूप पाहण्यास वेदसुद्धा असमर्थ आहेत. याला जाणण्यासाठी शेवटीशेवटी तर त्यांनी मौनसुद्धा घेतले. यज्ञ तर स्वर्गातून परत आले. कारण यज्ञ स्वर्गाहून पुढे जाऊ शकले नाहीत. अध्ययनाने वा स्वाध्यायानेही हे प्राप्त होत नसते. साधकांनी योगाभ्यास करण्यातले कष्ट पाहून तो सोडून दिला. कारण हे रूप त्यांना पण कधी दिसेल याची आशा उरली नाही. उत्कृष्ट कर्माचरणांस ते प्राप्त होईल असे वाटून ते विश्वरूपामागे धावत सुटले. पण त्यांची मजल फक्त सत्यलोकापर्यंतच गेली. विश्वरूपाचे उग्रपण पाहताच तपांनीसुद्धा आपले उग्रपण सामान्य म्हणून टाकून दिले. ती तर त्या रूपापासून अपार अंतरावरच राहिली आहे."

तैं हें तुवां अनायासें। विश्वरूप देखिलें जैसें।
इयें मनुष्यलोकीं तैसें। न फांवेंचि कवणां।।११-६२१।।
आजि ध्यानसंपत्तिलागिं। तूंचि एकु आथिला जगिं।
हें परमभाग्य आंगिं। विरंचिहीं नाहीं।।६२२।।
म्हणौनि विश्वरूपें लाभें श्लाघ। एथिंचें भय नेघ नेघ।
हें वांचूनि चांग। न मनिं कंहिं।।६२३।।

"तू जे अनायासपणे विश्वरूप पाहिलेस, तसे या मनुष्यलोकी कोणासही बघावयास मिळाले नाही. ब्रह्मदेवासही हे परमभाग्य लाधले नाही. अर्जुना! केवळ ध्यानसंपत्तीच्या जोरावरच हे रूप पाहता येते. आणि ध्यानसंपदेत श्रेष्ठ असा तुजवाचून अन्य कोणी या जगात आज नाही! म्हणून या विश्वरूपदर्शनाचा लाभ तुला मिळाला आहे. त्याने तू संतोषित हो. या रूपाचे भय यत्किंचितही बाळगू नकोस. या विश्वरूपाहून इतर कोणतेही रूप-अवतारादी तू श्रेष्ठ मानू नकोस."

यज्ञादी कर्मांची योगव्यवस्था

श्रीकृष्ण विश्वरूपदर्शनास साक्षात्काराची परमोच्च स्थिती म्हणून सांगत आहेत. ध्यानसंपदेशिवाय इतर कोणत्याही मार्गाने हे दर्शन

होत नाही, असे ज्ञानेश श्रीकृष्णमुखातून सांगतांना दिसतात. ***ध्यानसंपदा ही ईश्वरप्रणिधानानेच प्राप्त होणारी आहे. म्हणून गीतोक्त मार्ग म्हणजे ईश्वरप्रणिधानयुक्त सगुणभक्तीचा आश्रय करणारा असला पाहिजे,*** असे अनुमान निघते.

परंतु ***ही सगुणभक्ती सगुण ते निर्गुण व निर्गुण ते सगुण या मार्गावरील आहे.*** यज्ञांची धाव स्वर्गापर्यंतच आहे. याचा अर्थ *यज्ञादी कर्मे आज्ञाचक्रापर्यंत नेऊन पोहोचवतात. सत्कर्माचरणांनी त्या उपरांत सत्यलोक म्हणजे बिंदुपर्यंत गती मिळते. तपे तर आज्ञाचक्रापासूनही खूप लांब म्हणजे स्वाधिष्ठानादी चक्रांच्या स्थानापावेतोची गती देतात.*

ईश्वरप्रणिधानाविरहितच्या योगमार्गियांस आज्ञाचक्रापुढील कठीण मार्ग - मकाराची नड म्हणा - ओलांडणे कठीण जाते, इत्यादी योगशास्त्रविषयक खुलासा येथे ध्यानी घेणे आवश्यक आहे. जिज्ञासूंनी तो आपल्या निकषांवर तपासून पाहावा.

ज्ञानदेवांच्या ***पंथराज***नामक योगमार्गात या यज्ञ-कर्म-तपादींतील सर्व उणिवा नष्ट होतात. कारण तो ईश्वरप्रणिधानावर आधारलेला आहे. त्यातील **सगुणभक्ती आज्ञाचक्रावरील बिंदु ते महाशून्य या प्रांतातील आहे.** ***निर्गुण ते सगुण* व *सगुण ते निर्गुण*** असे जे या भक्तीचे वा योगाचे गंतव्य आहे, तेथे होणाऱ्या रूपसाक्षात्काराचे स्वरूप आपण नुकतेच थोड्या वेळापूर्वी पाहिले आहे. श्रीकृष्णही अर्जुनास तेच रूप दाखवत आहेत. ***अव्यक्त तेच व्यक्त, निर्गुण तेच सगुण*** असा अभिप्राय येथे आहे.

सर्वत्र सम अस *विश्वरूपा*

ज्ञानदेवीतील विश्वरूपदर्शनाबाबत दाखला देणारा ज्ञानेशांचा पुढील अभंग यानिमित्त पाहण्यासारखा आहे. ते म्हणतातः

१) स्वभावें विचरितां मही। सम ब्रह्म दिशा दाहीं।
एकु एकला असें पाहीं। सर्वांघटीं बाईये वो।।१।।
दुजें द्वैत हेतु सांडीं। एकतत्त्वसार मांडीं।
हरिविण इयें पिंडीं। नाहीं वासु वो माये।।२।।
काय सांघो याचिआं गोठी। अवघा दिसें हाचि सृष्टीं।
<u>विश्वरूपस्वरूप किरीटी। अर्जुना दिठीं दावियेलें</u>।।३।।
<u>ज्ञानदेवीं दीप उघड। उजळूनि केलासें वाड</u>।
मायादेवीं आम्हां नाहीं चाड।
अवघा गोड हरी आम्हां।।४।।अ.क्र.९५९।।

"सर्व गोष्टी धुंडाळून पाहिल्या. पृथ्वीपर्यटन केले. तेव्हा एकच एक गोष्ट आढळून आली. ती म्हणजे सर्वांघटीं तेच ते एकले तत्त्व आहे. सर्वदूर सम ब्रह्म आहे. म्हणून द्वैत टाकून देऊन त्या एकाच एका तत्त्वाचे स्मरण करा. त्या एकट्या श्रीहरीशिवाय या पिंडीं इतर कोणाचाही वास नाही. याबाबत अधिक काय सांगावे! सर्व सृष्टीत मला हाच श्रीहरी दिसतो आहे."

<u>"हेच विश्वरूप श्रीकृष्णपरमात्म्याने आपले स्वरूप म्हणून अर्जुनास दाखवले होते.</u> **<u>ज्ञानदेवीत याच आत्मज्ञानाचा दीप उजळून मी मोठा करून हे विश्वरूप सर्वांपुढे प्रकट दाखवले आहे.</u>** आम्हाला आता फक्त त्या विश्वरूप श्रीहरीची आवड आणि गोडी लागली आहे. इतर मायिक रूपे कोणाला हवीत आता!"

ज्ञानदेवांनी येथे विश्वरूपाचे निरुपाधिकत्व दाखवले आहे.इतर रूपे गौण वा मायिक आहेत, असेही ते स्पष्ट म्हणतात. त्याचप्रमाणे **ज्ञानेश्वरीत आपण निखळ स्वरूपदर्शनच कसे केले आहे, त्यातील साक्षात्कार कसा स्वरूपाचाच आहे,** या गोष्टीसुद्धा त्यांच्या या अभंगांतून स्पष्ट होतात. तसेच हा अभंग ज्ञानदेवीकर्ते ज्ञानेश्वर आणि अभंगकर्ते ज्ञानदेव हे दोघे एकच व्यक्ती असल्याचे दर्शवितात.

याचप्रमाणे दुसरा एक अभंग पाहू या. ईश्वरप्रणिधानाचे महत्त्व त्यातून स्पष्ट होतेः

२) विष्णुवीण मार्ग घेशील अव्यंग।
तन्हैं वांयांचि सोंग करणि तुझिं।।१।।
येऊनि संसारां वांयांचि उजिगरा।
कैसेनि ईश्वरा पावसि हरी।।२।।
नरदेह कैंचें तुज होएं सांचें।
नव्हें रे देहिंचें सुख तूझ।।३।।
ज्ञानदेओ म्हणे शरण रिघणें।
वैकुंठीचें पेणें अंतीं तुज।।४।।अ.क्र.८७५।।

"एका विष्णुशिवाय इतर सर्व मार्ग व्यर्थ आहेत. जन्माला येऊन इतर मार्गांचे परिश्रम केल्यास नरदेह वाया जाईल. ईश्वराला पावायचे तर त्या श्रीहरीलाच शरण जावे! म्हणजे अंती वैकुंठाचा मुक्काम नक्कीच लाभेल," असे ज्ञानेश म्हणतात.

सगुण-निर्गुण साक्षात्कारामागील त्रिपुटीरहस्य

या विष्णूचे स्वरूप आणि वैकुंठ कोणता, ते पाहू या पुढील अभंगातूनः

सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण। ब्रह्म सनातन विठ्ठल हा।।१।।
पतितपावन मानसमोहन। ब्रह्म सनातन विठ्ठल हा।।२।।
ध्येय ध्याता ध्यान चित्त निरञ्जन।
ब्रह्म सनातन विठ्ठल हा।।३।।
ज्ञानदेओ म्हणे आनंद चिद्घन।
ब्रह्म सनातन विठ्ठल हा।।४।।अ.क्र.२२२।।

"सगुण आणि निर्गुण असा विलक्षण हा विठ्ठल आहे. हा मनमोहन आहे. पतितपावन आहे. ***ध्येय, ध्याता व ध्यान आणि चित्त*** ही सर्व निरंजन ब्रह्मच होत. चिद्घन आनंद असा हा विठ्ठलच सनातन ब्रह्म आहे."

त्रिपुटीसापेक्ष सगुण आणि त्रिपुटीनिरपेक्ष निर्गुण रूपाचा विठ्ठलच आहे. ध्येय-ध्याता-ध्यान-चित्तासह त्रिपुटीचा आविर्भाव होतो. त्यात ***विठ्ठलाचे सगुण रूप*** दिसते. ***त्रिपुटी अंतर्धान पावते, तेव्हा निरञ्जन***

रूपाने विठ्ठल प्रकाशतो. असे हे सगुण-निर्गुण विष्णुस्वरूप विलक्षणच आहे, हे ज्ञानदेवांच्या या अभंगावरून दिसून येते.

ते असेही म्हणतात कीः

३) निर्गुणाचिं छाया सगुणिं बिंबलीं।
तत्त्विं तत्त्वें गेलीं अनुठायां।।१।।
निश्चलिं निश्चल नलगे अलुमाल।
तत्त्वतां अढल तैं वेगळेंचिं।।२।।
नातलतां पंथीं शब्दाचा सुहाओ।
परेसहित दोहावा भरला दिसे।।३।।
ज्ञानदेवीं रम्य दिसौनि न दिसें।
निराकारीं भासें तदाकार।।४।।अ.क्र.५२९।।

"सगुण जे रूप दिसते, ते म्हणजे निर्गुणाचीच छाया होय. तत्त्वात तत्त्वे मिसळून गेली की हे सगुण रूप दिसते. पण त्याने मूळ निश्चळ स्वरूपास थोडाही धक्का लागत नाही. तत्त्वतः ते स्वरूप वेगळेच आहे. त्याला शब्दप्रामाण्य नाही. ***सगुण ते निर्गुण अशा परेसहित व पलीकडच्या प्रांतास ते तत्त्व व्यापून आहे.*** ज्ञानदेवांना ते रम्य सगुण रूप दिसूनही दिसत नाही." ***निराकारच त्याच्या सगुण रूपाने दिसत आहे,*** असे खुणेचे रहस्य ते सांगत आहेत.

ते पुढे म्हणतातः

४) योगियां दुर्लभ तो मिआं देखिलां साजणि।
पाहतां पाहतां मना न पुरेचि धणि।।१।।
देखिला देखिला माये देवाचा देओ।
फिटला संदेहो निमालें दुजेपण।।२।।
अनंतरूपें अनंतवेषें देखिलें म्यां त्यासिं।
बाप रखुमादेविवरु खूण बाणलीं कैसिं।।३।।अ.क्र.५४४।।

"योग्यांनाही दुर्लभ असा तो देवाचाही देव मी पाहिला. त्याला कितीही पाहिले, तरी मनाचे समाधान होत नाही; तृप्ती काही होत नाही. त्याला पाहताच मनातील संदेह निमाला; द्वैत नष्ट झाले. त्याला मी अनंत रूपात, अनंत वेषात विनटलेले पाहिले. हाच रखुमादेवीवर विठ्ठल आहे, याची खूण मला मिळाली आहे."

अष्टांगयोग, नवविधा भक्ती व पंथराज

श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात, त्याप्रमाणे ध्यानसंपदेनेच हा श्रीहरी प्राप्त होतो. विश्वरूपाचे गमक हेच ध्यान आहे; ***ईश्वरप्रणिधान*** हाच याचा मार्ग आहे! ***नवविधा भक्ती*** किंवा ***अष्टांगयोग*** **हा मार्ग एकच आहे.** कसे ते पाहू या ज्ञानदेवांच्या एका अभंगातूनः

मन हें राम जालें मन हें राम जालें।
प्रवृत्ति ग्रासूनि कैसें निवृत्तिसिं आलें।।१।।
श्रवण कीर्तन पादसेवन *कैसें* विष्णुस्मरण *केलें।*
अर्चन वंदन दास्य सख्य आत्मनिवेदन *केलें।।२।।*
यम नियम प्राणायाम प्रत्याहार *संपादिलें।*
ध्यान धारणा आसन मुद्रा कैसें समाधिसिं आलें।।३।।
बोधीं बोधिलें बोधितां नयें आईसें जालें।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलें माझें मीपण हारपलें।।४।।
।।अ.क्र.३५१।।

"मन हे रामच होऊन गेले आहे! मन हे रामरूपच झाले आहे! प्रवृत्ति गिळून ते निवृत्तीस आले आहे. त्यासाठी कोणते साधन केले म्हणून सांगू! ***श्रवण, कीर्तन, पादसेवन, विष्णुस्मरण, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन*** **या नवविधा भक्तीने त्याच मनाने मी रामाचे अनन्यध्यान केले.** ***यम, नियम, प्राणायाम, प्रत्याहार, आसन, मुद्रा, ध्यान, धारणा आणि समाधि*** **या अष्टांगयोगाचे आचरण केले.** या उपायाने माझ्या मनाला रामरूप आले."

पंथराजाचा हा योगमार्ग ज्ञानदेवांनी ईश्वरप्रणिधानपूर्वक आक्रमिला. **भक्ती आणि योग यांचा सुंदर मिलाप त्यांच्या *पंथराजक्रमात* केलेला आहे.** प्रवृत्तिवृक्षातळी निवृत्तीची गोमटी फळे मिळणारा हा मार्ग आक्रमून त्यांची ***बोध-बोधि-बोधिता*** ही त्रिपुटी नाहीशी झाली. ***ध्यान-ध्याता-ध्येय*** या त्रिपुटीविरहित असणाऱ्या बापा रखुमादेवीवर विठ्ठलाने त्यांचे मीपण नष्ट केले.

मीपण हरपून टाकणारा असा हा राजमार्ग म्हणजे पंथराजच हे सांगणे नलगे! त्यातील नवविध भक्तींसह ईश्वरप्रणिधान आणि अष्टांगयोग यांचे पंथराजाशी समांतरत्वच नव्हे तर एकरूपत्वही आपण वेळोवेळी दाखवून दिले आहेच. किंबहुना अष्टांगयोग आणि ईश्वरप्रणिधानाविना म्हणजे भक्तिविना - त्यातील नवधा म्हणा, की दशधा वा एकादश म्हणा, भक्तिवैचित्र्याविना पंथराजाचे अस्तित्वही कल्पिणे म्हणजे आपणास ज्ञानेश्वरीचे गमकच कळले नाही, असे होईल!

"आंग सांडौनि छाया। आलिंगितोसिं मा"

ध्यानसंपदा मिळवून देणारा महायोगाचा राजमार्ग अशी पंथराजाची ही खूण आहे; त्यानेच विश्वरूपदर्शन होणार असते, हे दृढ ध्यानी धरून श्रीकृष्ण गीतेत सगुण-निर्गुण रूपाविषयी अर्जुनास काय सांगतात, ते पहू या. ते म्हणतातः

मा ते व्यथा मा च विमूढभावो-
दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम्।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं-
तदेव मे रूपमिदं प्रपश्य।।११-४९।।

"माझे हे अशा प्रकारचे घोर रूप पाहून तू व्यथित होऊ नकोस. चित्ताची भ्रांती सोडू दे. भयरहित हो! तुझी इच्छाच आहे, तर मी तुला पुनः माझे पूर्वीचेच रूपही दाखवतो. तुझ्या मनाला आनंद देणारे ते रूपही तू पाहा"

यावरील ज्ञानदेवांच्या ओव्या पाहू याः

हां गां समुद्रु अमृताचा भरला। आणि अवसांत वरपडा जाहाला।
मग कोण्ही आथि वोसंडिला। बुडिजैल म्हणौनि।।११-६२४।।
ना तन्हैं सोनियाचां डोंगरु। एसणा नचलें हा थोरु।
आईसें म्हणौनि अव्हेरु। करणें घडे।।६२५।।

दैवें चिंतामणि लेईजे। कीं हें ओझें म्हणौनि सांडिजैं।
कामधेनु दवडिजे। न पोसवें म्हणौनि।।६२६।।
चंद्रमा आलियां घरां। म्हणिजे निगें न करितोसि उबारा।
पडिसायि पाडितो दिनकरा। परता सर।।६२७।।

श्रीकृष्ण म्हणाले,"अर्जुना! अमृताच्या समुद्रात अकस्मात पडलेला मनुष्य जर *"मी यात बुडून मरून जाईन"* असे म्हणत त्यातून बाहेर पडण्यासाठी धडपडू लागला, तर त्याला काय म्हणावे बरे! आणि जर कोणास सोन्याचा पर्वतच मिळाला, तर त्याने *"हा उचलून कसा न्यावा"* असे म्हणत त्याचा त्याग करावा काय! दैववशात चिंतामणिरत्नाचा अलंकार अंगावर धारण केला गेला, तर त्याचे ओझे वाटते म्हणत त्याला टाकून द्यावे काय! कामधेनूला पोसावे तरी कसे, म्हणून तिला हाकलून देण्यासारखेच हे सर्व नाही का! चंद्रमा घरास पातला की त्याला म्हणावे, *"हो बाजूला! निघ येथून! तू सूर्याच्या आड येऊन सावली पाडतो आहेस. त्यामुळे आम्हाला उष्णता मिळत नाही."*

तैसें ऐश्वर्य हें महातेज। आजि हातां आलें आहें सहज।
कीं एथ तुज गजबज। होआविं कां।।११-६२८।।
परि नेणसिंचिं गांवढिआं। काय कोपों आतां धनंजया।
आंग सांडौनि छाया। आलिंगितोसि मा।।६२९।।
हें नोहें जो मी सांचें। एथ मन करूनिआं काचें।
प्रेम धरिसिं अवगणिएंचें। चतुर्भुज तैं।।६३०।।
तऱ्हैं अझूनिवरी पार्था। सांडीं सांडीं हें वेवस्था।
इयेंविखिं आस्था। झणें करिसि।।६३१।।

"हे महातेजरूपी विश्वदर्शन तुला मोठ्या भाग्याने होत असतांना होणारी तुझी कासाविशी त्याचप्रमाणे आहे. तू अगदीच गावढळ आहेस, अर्जुना! तुला काय म्हणावे! आणि तुझ्यावर कोपावे तरी कसे! पण तू तर मला आलिंगण्याऐवजी माझ्या पडछायेलाच आलिंगू पाहत आहेस! मनाचे दुबळेपण पुढे करत तू या विश्वरूपाला माझे रूप म्हणून मानायला तयार नाहीस आणि त्या गौण अशा माझ्या चतुर्भुज रूपाचे एवढे प्रेम बाळगतो आहेस! ही अवदसा तुला कोठून सुचली म्हणावे! हे पार्था! अजून तरी तुझे हे अज्ञान त्याग. या सुंदर दिसणाऱ्या लाघवी अशा चतुर्भुज रूपाठायीची तुझी आसक्ती सोड."

विश्वरूप घोर असले तरी तेच हरीचे खरे रूप आहे. म्हणून श्रीकृष्ण त्याला सांगत आहेत की:

हें रूप जऱ्हैं घोर। विकृति आणि थोर।
तऱ्हैं कृतनिश्चयाचें घर। हेंचि करीं।।११-६३२।।
कृपण चित्तवृत्ति जैसिं। रोवोनि घालीं ठेवयापासिं।
मग नुसधेंचि देहेंसिं। आपण असें।।६३३।।
कां अजातपक्षियाजवळां। जीव बैसऊनि अविसाळां।
पक्षिणि अंतराला-। माझिं जाएं।।६३४।।
नाना गाय चरैं डोंगरीं। परि चित्त बांधिलें असें वत्सें घरीं।
तैसें प्रेम एथिंचें करीं। स्थानपति।।६३५।।

"क्षुल्लक अशा त्या माझ्या सगुण सावळ्या चतुर्भुज रूपावरील लोभाचा तू त्याग कर. हे माझे विश्वरूप जरी भयानक वाटत असले, तरी या रूपाच्या रौद्रतेकडे दुर्लक्ष कर आणि आपल्या चित्तात हेच रूप नीट ठसवून घे. याच माझ्या अव्यक्त रूपातून ती गौण अशी द्विभुज आणि चतुर्भुज रूपे अवतरतात, हे नीट ध्यानी असू दे! कृपण मनुष्य कोठेही असला तरी त्याच्या चित्तवृत्ती जशा त्याने ठेवलेल्या धनराशीजवळच निर्धारपूर्वक वसतात; किंवा पक्षिणी जरी अंतराळात विहरत असली तरी तिचा जीव जसा आपल्या पंख न फुटलेल्या पिलाजवळ घरट्यातच ठेवलेला असतो; गाय जरी रानावनात, डोंगरदऱ्यात चरत हिंडत असली, तरी तिचे चित्त जसे घरी राहिलेल्या वासरातच गुंतलेले असते; त्याचप्रमाणे, हे अर्जुना! तू पण ***तुझी प्रीती या माझ्या विश्वरूपाठायीच जडवून टाक!"***

एरें वरिचिलेनि चित्तें। बाह्यसौख्यसुखापुरतें।
भोगिजैं कां श्रीमूर्त्तितैं। चतुर्भुज।।११-६३६।।
परि पुढत पुढुति पांडवा। हा एकु बोलु न विसरावा।
जैं इयें स्वरूपौनि सद्भावा। नेदावें निगों।।६३७।।
हें कहिं नव्हतें देखिलें। म्हणौनि भय जैं तुझ उपजलें।
तैं सांडीं एथ संचलें। असों दे प्रेम।।६३८।।
आतां करूं तुजयासारिखें। म्हणितलें विश्वतोमुखें।
तऱ्हैं रूप सुखें। निहालीं पां तूं।।६३९।।

"मग तू *आपल्या मनाने बाह्यात्कारी त्या माझ्या चतुर्भुज श्रीकृष्णमूर्तीचे कितीही सुख भोगेनास का!* काहीही झाले तरी तू माझे हे सांगणे विसरू नकोस! ***माझ्या स्वरूपापासून तुझे अनुसंधान कधीही ढळू देऊ नकोस!*** हे माझे खरे स्वरूप तुला पूर्वी कधी पाहायला मिळाले नव्हते. अकस्मात त्याचे दर्शन झाल्याने तुला त्या रूपाचे भय वाटते आहे, ते सोड आणि या विश्वरूपाठायी तुझ्या प्रेमाचे जतन कर! असो. आता तुझी इच्छाच आहे, तर तसे करू या! तुला पूर्वीचे माझे रूप न्याहाळावयाचे आहे ना! मग तेच सुखेनैव पाहा!"

"भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा"

संजय हे सर्व ऐकत होता. व्यासांनी दिलेल्या दिव्यदृष्टीने हा सर्व प्रसंग टिपत होता. तो उद्गारला:

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः।
आश्वासयामास च भीतमेनं-
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा।।११-५०।।

"असे बोलून त्या वासुदेवाने पुनः आपले स्वतःचे पूर्वीचे रूप धारण केले. अर्जुनाला धीर देत ते सौम्य रूप त्याला दाखवून त्याची भीती त्याने घालवली."

ज्ञानेश त्या प्रसंगाचे आपल्या शैलीत वर्णन करतात, ते असेः

आईसें वाक्य जी बोलतखेंवों। मागुता मनुष्य जाहाला देओ।
हें ना परि नवलाओ। आवडीचा तिएं।।११-६४०।।
श्रीकृष्णचि कैवल्य उघडें। वरी स्वरूप विश्वरूपाएवढें।
हातिं दिधलें कीं नावडें। अर्जुनासिं।।६४१।।
वस्तु घेऊनि वालिजैं। जैसें रत्नासिं दूषण ठेविजैं।
जा तन्हैं कन्या पाहूनि म्हणिजे। मना न एं हें।।६४२।।

"असे म्हणून तो विश्वतोमुख पुनश्च मनुष्यरूपाने प्रकट झाला. यात काही फार आश्चर्य वाटावे असे नाही. श्रीकृष्ण प्रत्यक्ष परब्रह्मच होते. आपले सर्वस्व विश्वरूपाने प्रकट करून त्यांनी ते अर्जुनाहाती सोपविले. पण अर्जुनास काही ते आवडत नव्हते. एखादी वस्तू मागून घ्यावी आणि मग ती नावडून टाकून द्यावी; किंवा अस्सल रत्नातही काहीतरी खोड उगीचच काढावी; अथवा सुंदर सुलक्षणी कन्येस पाहूनही ती नाकारावी; तसेच त्या अर्जुनाने केले."

तेआं विश्वरूपाएवढीं दशा। करितां प्रीतिचां वाढु कैसा।
सेल दिधलीसें उपदेशा। किरीटीसिं देवें।।११-६४३।।
मोडौनि भांगाराचां रवा। लेणें घडिलें आपुलिआं सवा।
मग नावडें जन्हैं जीवा। तन्हैं आटिजैं पुढति।।६४४।।

"श्रीकृष्णांनी अर्जुनावर एवढे प्रेम दाखवले; त्याच्यासाठी विश्वरूपाचे उत्कृष्ट दर्शन प्रकटवले; त्याला उत्तम उपदेशही केला; तत्त्वज्ञानाची परिसीमा असे आपले रूप त्यांनी त्याच्यासाठी व्यक्तत्वासही आणले; अतुलनीय असे आपले योगैश्वर्य त्याच्यापुढे उघडे केले. पण त्याला ते पसंत पडेना. म्हणून सोन्याच्या तुकड्याचा अलंकार बनवावा आणि नापसंत पडल्यास तो आटवून पुनः त्याचे सोने करावे, त्याप्रमाणे श्रीकृष्णांनी केले."

तैसें शिष्याचेनि प्रीति जाहालें। कृष्णत्व होतें तैं विश्वरूप केलें।
तैं मनां नयेचि मग आणिलें। कृष्णपण माघुतें।।११-६४५।।
हां ठांववेरीं शिष्याचिं निसी। साहातें गुरु आहाति कवणें देशीं।
परि नेणिजे आवडी कैसिं। संजयो म्हणें।।६४६।।
मग विश्वरूप व्यापूनि भोंवतें। जैं दिव्य योगतेज प्रकटलें होतें।
तैंचि सामावलें माघुतैं। कृष्णरूपीं तिएं।।६४७।।

"प्रथम त्यांच्या कृष्णरूपाचे त्यांनी विश्वरूपात रूपांतर केले आणि अर्जुनास ते रूप आवडेना. म्हणून पुनः तेच कृष्णरूपात परिणत केले. शिष्याच्या आवडीनिवडीकरता एवढा त्रास घेणारे गुरू कोठे मिळतात!" संजय म्हणाला, "कृष्णाचे अर्जुनाठायी हे केवढे प्रेम होते! त्याचे कारण काही मला उमजत नाही."

"श्रीकृष्णें योगु तैसा। संहारिला तो"

तो पुढे म्हणतो कीः

जैसें त्वंपद हें आघवें। तत्पदार्थीं सामावें।
अथवा द्रुमाकारु साठवें। बीजकणिकें जेविं।।११-६४८।।
ना तन्हैं स्वप्नसंभ्रमु जैसा। गिलीं चेईलीं जीवदशा।
श्रीकृष्णें योगु तैसा। संहारिला तो।।६४९।।
जैसिं प्रभा हारतिं बिंबीं। कीं जलदसंपत्ति नभीं।
भरतें सिंधुगर्भीं। रिघालें राया।।६५०।।

"मग श्रीकृष्णाने विश्वरूपाच्या भव्य पसाऱ्याने जे दिव्य तेज प्रकट केले होते, ते परत कृष्णरूपात समावून घेतले. जसे ***"त्वम्"*** पद ***"तत्"*** या पदी समावून जावे; ***"तत् त्वम् असि"*** असा महावाक्योपदेश झाल्याबरोबर जीव शिवस्वरूपी जसा लीन व्हावा; बीजकणात वृक्षाकार जसा समावून असावा; स्वप्नसंभ्रमास जागृत जीवदशा जशी गिळते; तद्वत श्रीकृष्णाने आपला ***ऐश्वर्यदर्शनयोग*** आवरला. सूर्यास्त होताच त्याची प्रभा जशी सूर्यबिंबात समावून जाते; अथवा मेघमंडल जसे नभात विरून जाते; सागराची भरती जशी त्याच्या पोटात गडप होते; त्याप्रमाणे श्रीकृष्णांनी आपले विश्वरूप कृष्णरूपी समावून टाकले."

हो कां जैं कृष्णाचिएं मोडीं। होति विश्वरूपपटाचिं घडी।
तैं अर्जुनाचिएं आवडी। उकलूनि दाविलीं।।११-६५१।।
तंवं परिमाणा रंगु। तेणें देखिला सांविआं चांगु।
तेथ ग्राहकीएं नव्हेचि लागु। म्हणौनि घडी केली पुढति।।६५२।।

"कृष्णाकृतीच्या रूपाने विश्वरूपपटाची घडी होती. अर्जुनास ते वस्त्र पसंत पडावे म्हणून श्रीहरीने तो पट त्याला उकलून दाखविला. पण तो त्याच्या पसंतीस उतरला नाही. तेव्हा पुनः त्या विश्वरूपी वस्त्राची घडी त्याने करून टाकली. त्या वस्त्राचा पोत, रंग, वीण, जर, नक्शीकाम हे अर्जुनाने पसंत करून ते वस्त्र विकत घ्यावे, असे श्रीकृष्णास वाटत होते. पण गिऱ्हाईकास ते नापसंत दिसत असल्याने त्याची पुनः कृष्णाकार घडी श्रीहरीने घालून ते वस्त्र आवरले."

तैसें वाढिचेनि बहुंवसपणें। रूपें विश्व जिंतिलें जेणें।
तैं सौम्य कोडिसवाणें। साकार जाहालें।।११-६५३।।
किंबहुना अनंतें। धरिलें धाकुटपण माघौतें।
परि आश्वासिलें पार्थातैं। बिहालिआंसि।।६५४।।

"वाढतां वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडला" असे कृष्णरूपाचे विश्वरूप श्रीहरीने केले होते, विश्वच ज्या आकाराने व्यापून टाकले होते, ते त्याने पुनः सुंदर साकार सगुण अशा सौम्यशा कृष्णरूपात आणून सोडले. भयव्याकुल पार्थास दिलासा देण्यासाठी त्याने पुनः लहानसे रूप धारण केले."

अर्जुनास पुनः भान येते

ते रूप पाहताच काय झाले, ऐकाः

तेथ जो स्वप्निं स्वर्गां गेला। तो अवसांत जैसा चेईला।
तैसा विस्मो जाहाला। किरीटीसिं।।११-६५५।।
ना तन्हैं गुरुकृपेसवें। वोसरलेआं प्रपंचज्ञान आघवें।
स्फुरें तत्त्व तेविं पांडवें। श्रीमूर्त्ति देखिलीं।।६५६।।
तेआं पांडवां आईसें वित्तिं। आड विश्वरूपाचि जवनिका होति।
तैं फिटौनि गेलीं परौति। हें भलें जाहालें।।६५७।।

"स्वर्गात गेल्याचे स्वप्न पाहणाऱ्या मनुष्यास अकस्मात जाग यावी, तसे अर्जुनाचे झाले. समोरचे विश्वरूप अचानक नाहीसे होऊन

तेथे कृष्णरूप दिसताच तो विस्मयचकित झाला. गुरुकृपा होताच संसाराचा अवघा पसारा ओसरून निखळ तत्त्वाचेच स्फुरण जसे उरते, त्याप्रमाणेच ते विश्वरूप आटोपले जाऊन दिसणारी सगुण सुंदर श्रीमूर्ती त्याने पाहिली. ती पाहून हर्षित झालेल्या अर्जुनास असे वाटू लागले की *"या सुंदर विश्वरूपास झाकून टाकणारा तो विश्वरूपाचा पडदा पार नाहीसा झाला, ते फार बरे झाले."*

काय कालातैं जिणौनि आला। महावातु माघां सांडिलां।
आपुलिआं बाहिं उतरला। सात सिंधु।।११-६५८।।
आईसा संतोखु बहुं चित्तें। घेईजत असें पांडुसुतें।
विश्वरूपापाठीं कृष्णातैं। देखोनिआं।।६५९।।

"जणू कळिकाळास जिंकून जिवंत परत यावे; प्रचंड वादळास हातांनीच दूर लोटावे; किंवा केवळ आपल्या बाहुबलाने सातही समुद्र पार करून घरी परतून यावे, तसा त्याच्या चित्तास अति संतोष झाला. श्रीकृष्णरूप विश्वरूपापश्चात पुनः पाहून अर्जुनास फार आनंद झाला."

मग सूर्याचां अस्तमानिं। माघुता तारा उगवति गगनिं।
तैसिं देखों लागें अवनि। लोकांसहितु।।११-६६०।।
पाहें तंवं तैं कुरुक्षेत्र। तैसेंचि दोहिं भागिं जाहालें गोत्र।
वीर वर्षताति शस्त्रास्त्र। संघाटावेरिं।।६६१।।
तेआं बाणांचिआं मांडवांआंतु। तैसाचि रथु आहे निवांतु।
धुरें बैसला लक्ष्मीकांतु। आपण तलीं।।६६२।।
एवं माधिल जैसें तैसें। तेणें देखिलें वीर्यविलासें।
मग म्हणें जिआलों आईसें। जाहालें आतां।।६६३।।

"सूर्यास्त झाल्यावर उदैजलेल्या तारांगणाचे कुतूहलाने निरीक्षण करावे, तसे तो सर्व लोकांसह दिसणाऱ्या अवनीस पाहू लागला, तेव्हा त्याला पुनः ते युद्धक्षेत्र जसेच्या तसे, जागच्या जागी दिसले. कुरुक्षेत्र, त्याच्यावर दोन पक्षात विभागलेले त्याचे गोत्रज, शस्त्रास्त्रांच्या झुंडींचा वर्षाव करणारे योद्धे इ.सर्व त्याला दिसले आणि बाणांच्या मांडवात उभा असणारा आपला रथ, त्याच्या धुरेवर बसलेला लक्ष्मीपती आणि खाली जमिनीवर बसलेलो आपण असे त्याला सगळे दृश्य दिसले. सर्व गोष्टी जशाच्या तशा त्या वीरवराने पाहिल्या. *"हुश्श"* असा सुस्कारा सोडून तो म्हणाला की, *"वाचलो आता त्या महाभयंकर विश्वरूपाच्या संहारातून!"*

तो श्रीकृष्णास म्हणतो कीः

दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन।
इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः।।११-५१।।

"हे जनार्दना! तुझे शांत सौम्य असे हे मनुष्यरूप पाहून माझे मन आता पूर्ववत ताळ्यावर आले आहे. मी पुनः पूर्वस्थितीला येऊन शांतचित्त झालो आहे."

तो पुढे काय म्हणतो पहाः

बुद्धितैं सांडूनि ज्ञान। भेणें वलघलें रान।
अहंकारेंसिं मन। देशोधडी जाहालें।।११-६६४।।
इंद्रियें प्रवृत्ति भुललीं। वाचा प्राणा चुकलीं।
आईसिं आपांपरीं होति जाहालीं। शरीरग्रामीं।।६६५।।
तिएं आघविंचि माघुति। जिवंत भेटली प्रकृति।
आतां जिताणें श्रीमूर्त्ति। जाहालें इयां।।६६६।।

"बुद्धीला सोडून ज्ञानाने भयाकुलतेने रानोमाळांचा आश्रय घ्यावा; अहंकारासह मनाने परागंदा व्हावे, तसे माझे झाले होते. इंद्रिये आपापल्या प्रवृत्तींना विसरली होती. वाचा निष्प्राण झाली होती.शरीररूपी गावात असा अनर्थ माजला होता. या सर्वांनाच पुनर्जीवन मिळाले आहे. आता ही सगळी आपापल्या प्रवृत्तिधर्मास अनुरूप वर्तत आहेत. ही श्रीमूर्ती पाहून सगळे ठिकच्या ठिकाणी आले आहे." असा विचार करून अर्जुनास अत्यंत आनंद झाला.

आईसें सुख जेविं घेतलें। मग श्रीकृष्णांतैं म्हणितलें।
मिआं तुमचें रूप देखिलें। मानुष हें।।११-६६७।।
हें रूप दाखविणें देवराया। कीं मज अपत्यां चुकलिआं।
बुझावोनि तुवां मायां। स्तनपान दिधलें।।६६८।।
जी विश्वरूपाचां सागरीं। होतो तरंग मवित वांवेवरी।
तो इयें निजमूर्त्तिचां तीरीं। निगालों आतां।।६६९।।
आईका द्वरकापुरीसुहाडा। मज सुकतिआं जी झाडां।
हें भेटी नव्हें बहुडा। मेघाचां केला।।६७०।।

सुखाने संतोषत तो श्रीकृष्णास म्हणतोः "हे देवराया! तुझे हे मानुष रूप पाहून धन्य धन्य वाटले आहे. चुकलेल्या वत्सास माता भेटावी व तिने त्याला स्तनपान द्यावे, तसे तुम्ही मला हे रूप दाखवून केलेत! त्या विश्वरूपाच्या सागरात उचंबळणाऱ्या लाटांवर हात मारत कसाबसा जीव तगवीत होतो मी! तो आता या कृष्णमूर्तिरूपी तीरी येऊन ठाकलो आहे! हे द्वारकानगरीच्या प्रिय राजा! सुकत असलेल्या वृक्षाला जलाची साधी भेट घडवावी, तरी तो हर्षित होईल. तुम्ही तर मेघांद्वारे त्याच्यावर अतीव वृष्टीच जणू केलीत!"

सांविआंचि तृषा फुटलां। तेआं मज अमृतसिंधु हा भेटला।
आतां जिणयाचां फिटला। अभंरवसा।।११-६७१।।
माझां हृदयरंगणिं। होताहें हरिखलतांचि लावणि।
सुखैंसिं बुझावणि। जाहालीं मज।।६७२।।

"तहानेने व्याकुळलेल्या जीवाला पाणीच काय! अमृताचा सागरच भेटवावा, तसे मला झाले आहे. आता जिविताबाबतची अशाश्वती दूर झाली आहे. माझ्या हृदयांगणात हर्षरूपी लतांचे वेल लावले जात आहेत. सुखाबरोबर माझी तोंडमिळवणी आता झाली आहे!"

विश्वरूपास भावाञ्जली::::

विश्वरूपदर्शनाची अतिदुर्लभता

त्यावर श्रीकृष्ण म्हणतातः

सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः।।११-५२।।
नाहं वेदैर्न तपसा दानेन न चेज्यया।
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा।।११-५३।।

"महत्प्रयासानेही ज्या रूपाचे दर्शन घडणे कठीण आहे, ते माझे विश्वरूप सौभाग्यवशात तुला पाहण्यास लाभले. अर्जुना! त्या माझ्या रूपाचे दर्शन घेण्यासाठी देवसुद्धा नित्य उत्सुक असतात. तू मला जसे पाहिलेस, तसे वेदाध्ययनाने, तपाने, दानाने किंवा यज्ञानेसुद्धा कोणीही पाहू शकत नाही."

ययां पार्थाचिआं बोलासवें। हें काएं गां म्हणितलें देवें।
तुवां प्रेम ठेऊनि यावें। विश्वरूपिं कीं।।११-६७३।।
मग इयें श्रीमूर्त्ति। भेटावें सडिआं आयति।
हें शिकवण सुभद्रापति। विसरलासि।।६७४।।
अगां आंधलिआं अर्जुना। हाता आलिआं मेरुहि होएं साना।
आईसा आधिं मना। चुकीचा भाओ।।६७५।।

अर्जुनाचे बोलणे ऐकून श्रीकृष्ण म्हणतात: "काय हे असे तू म्हणतो आहेस! तुला हीच का शिकवण मी दिली होती! विश्वरूपावर निभ्रांत प्रेम ठेव आणि मग माझ्या चतुर्भुज श्रीमूर्तीची भेट घे, असेच ना मी तुला समजावले होते मागे! हे सुभद्रापती! तू ते सर्व विसरून गेलास वाटते! विश्वरूप आणि श्रीमूर्ती यातील अधिकउणें न समजणाऱ्या अर्जुना! अरे! एवढा मोठा सोन्याचा पर्वत तो मेरुही एकदा का प्राप्त झाला की मनुष्य त्यालाही लहानच लाभ समजू लागतो! तू पण अशीच चूक करत आहेस."

तऱ्हैं विश्वात्मक रूपडें। जैं दाविलें आम्हीं तुजफुडें।
तैं शंभूहिं परि न जोडें। तप करितां।।११-६७६।।
आणि अष्टांगादिसंकटीं। योगी शिणतातिं किरीटी।
परि अवसरु नाहीं भेंटीं। जेआंचिएं।।६७७।।
तैं विश्वरूप एखादें हेल। कैं देखों अलुमाल।
आईसें स्मरतां काल। जातसें देवां।।६७८।।
आशेचिआं अंजुलीं। ठेऊनि हृदयाचां निडलीं।
चातक निरालीं। लागलें जैसें।।६७९।।
तैसें उत्कंठानिर्भर। होओनिआं सुरनर।
घोकीत आठांहिं पाहार। भेटी जेआंचिं।।६८०।।
परि विश्वरूपासारिखें। स्वप्निंहि कोण्हीं न देखैं।..।।६८१।।

"तुला माझे जे विश्वात्मक रूप मी दाखविले, ते शंभूसारख्या तपस्वी श्रेष्ठासही कृतानेक तपांनीही पाहण्यास मिळत नाही. अष्टांगयोगसाधनेचे कष्ट उपसणाऱ्या योग्यांनाही त्या रूपाची भेट होत नाही. ते रूप एकदा तरी ओझरते का होईना! पहायला मिळावे या आकांक्षेत देवांचा स्वर्गातील अनंत काळ तसाच निघून जातो. या रूपाचे दर्शन घेण्यासाठी वाट पाहणारे देव आणि मनुष्य दिवसाचे अष्टौप्रहर चातकासारखे होऊन प्रतीक्षा करत असतात; आशेच्या ओंजळी पुढे धरून बसतात. सदोदित हृदयी उत्कंठा भरून राहणाऱ्या त्यांच्या त्या ओंजळी तशाच रिकाम्या राहतात. त्यांना या विश्वरूपासारखे साधे कस्पटही स्वप्नांतरी पण कधी दिसत नाही!"

...। तैं प्रत्यक्ष तुवां सुखैं। देखिलें हें।।११-६८१।।
पैं उपायासिं वाटा। न वाहति एथ सुभटा।
साहिंसहित वोहटा। वाहिला वेदीं।।६८२।।
मग विश्वरूपाचिआं मोहरां। चालावेआं धनुर्द्धरा।
तपाचिआं सर्वभारा। नोहेचि लागु।।६८३।।
आणि दाना किर कानडें। मी यज्ञिहिं तैसा न सांपडें।
जैसेनि कां सुरवाडें। देखिला तुवां।।६८४।।

"तुला तर हे रूप सहजच पहायला मिळाले! या रूपाठायी कोणतेच साधन चालत नाही. साही शास्त्रांसह वेदाचाही येथे लाग लागला नाही. म्हणून ते मागे सरले. तपांचे भारही वाहून या विश्वरूपाच्या दिशेने थोडीही वाटचाल होत नाही. दानाला तर ते सापडणे कठीणच आहे. आणि तू जसे माझे समग्र विश्वरूप पाहिलेस, ते यज्ञांद्वारेसुद्धा जाणणे शक्य नाही."

अनन्यभक्ती हा एकच विश्वरूपदर्शनाचा उपाय

पण तरीही हे रूप एका प्रकाराने पाहायला मिळते. तो प्रकार म्हणजे भक्ती! भक्तीने येऊन चित्तास वरले की भगवंत सापडतो! म्हणून श्रीकृष्ण म्हणतात:

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप।।११-५४।।

"हे अर्जुना! माझे हे खरे स्वरूप केवळ अनन्यभक्तीद्वारेच पाहणे, त्यास तत्त्वतः जाणणे आणि माझ्यात प्रवेशणे शक्य आहे."

त्या भक्तीचे वर्णन ज्ञानेशांद्वारे कसे होते, पहा:

परि तैंचि भक्ति आईसिं। पर्जन्याचिं सुटिका जैसिं।
धरावांचूनि अनारिसिं। गतिंचि नेणें।।६८६।।
का सकलजलसंपत्ति। घेऊनि समुद्रांतैं गिंवसिति।
गंगा जैसिं अनन्यगति। मिलालींचि मिलें।।६८७।।
तैसें सर्वभावसंभारें। न धरत प्रेम एकसरें।
मजमाजिं संचरें। मीचि होऊनि।।६८८।।

"पर्जन्यवृष्टीस जशी धरेवाचून दुसरी गतीच माहीत नसते; किंवा सर्व जलसंपत्ती घेऊन निघालेली गंगा जशी समुद्राचाच शोध घेत अनन्यगतीने त्यालाच जाऊन मिळते; तशी ती भक्ती असते. सर्व भावांचा समुच्चय घेऊन अनावर प्रेमाने ती भक्ती मीच होऊन मजमध्ये येऊन मिळते."

आणि तेंविचिं मी आईसा। थडिएं माझारीं सरिसा।
क्षिराब्धि कां जैसा। क्षीराचाचि।।११-६८९।।
तैसें मजलागौनि मुंगीवरी। किंबहुना चराचरीं।
भजनासिं कां दुसरी। भ्रांति नाहीं।।६९०।।
तेआंचि क्षणासवें। एवंविध मी जाणावें।
जाणितला तऱ्हैं स्वभावें। दृष्ट होएं।।६९१।।

"क्षीरसागर जसा मध्यापासून तो किनाऱ्यापर्यंत निखळ दुधाचाच असतो, त्याचप्रमाणे मलासुद्धा मुंगीपासून तहत ब्रह्मापर्यंत सर्व चराचरात एकच एक पाहणारी ही भक्ती असते. त्यात दुजे काही

दिसण्याचा भ्रम नसतो. अशी अनन्यभावाची भक्ती ज्या क्षणी प्रकटते, त्याच क्षणी मी विश्वरूप आहे याची जाणीव होते आणि मग मी त्या विश्वरूपाने दृष्ट होतो.''

मग इंधन अग्नि उद्दीपें। आणि इंधन हें भाख हारपें।
तैं अग्निचि होऊनि आरोपें। मूर्त जेंवीं।।११-६९२।।
कां उदय ना कीजैं तेजाकारें।
तंवं गगनचि होऊनि असें आंधारें।
मग उदैलिआं अवसरें। प्रकाशु होएं।।६९३।।
तैसें माझां साक्षात्कारीं। सरें अहंकाराची वारी।
अहंकारलोपीं अवधारीं। द्वैत जाएं।।६९४।।
मग मी तो हें आघवें। एकु मीचि आथिं स्वभावें।
किंबहुना सामावें। समरसिं तो।।६९५।।

''इंधनसामग्री घेऊन अग्नी प्रदीप्त होतो आणि मग इंधन व अग्नी ही भाषा उरत नाही, त्याप्रमाणे इंधनच जसे अग्निरूप होऊन जावे, तसे भक्ताचेही होते. सूर्य जोपावेतो उगवत नाही, तोवर आकाशच अंधाररूप असते. पण सूर्य उगवताच तेच आकाश अकस्मात मूर्तिमंत प्रकाश होऊन जाते. त्याप्रमाणेच माझ्या अशा अनन्यभक्तीमुळे जो माझा साक्षात्कार विश्वरूपाने घडतो, तो होताच अहंकाराची येरझार त्याच्या पाऊलखुणांसह सरते आणि अहंकार लोपताच द्वैत नाहीसे होते. तेव्हा ***मी, तो आणि हे अवघे विश्व* स्वभावत: *मी*च होते.** किंबहुना तो ***अनन्यभक्त*** या सामरस्यात समावून जातो.''

''अहंकारलोपीं अवधारीं। द्वैत जाएं''

सगुण कृष्ण रूपडे हे बिंदु ते निरोधिका या प्रांतातील साक्षात्कार आहे. त्याचे यथातथ्य स्वरूपदर्शन ज्ञानेशांच्या काही अभंगांद्वारे आपण करून घेतले आहेच. ***विश्वरूपदर्शन* ही सगुण कृष्णरूपापेक्षा पुढील पायरी आहे. हे दर्शन सायुज्याअलीकडील पायरी आहे. पण सगुण साक्षात्काराची ही अंतिम अवस्था आहे.**

सायुज्य या मुक्तीत साक्षात्कार द्वैताद्वैतस्थितीतील असतो. त्या वेळी सूक्ष्मसा अहंकार उरत असतो. ***महाविदेहा*** अवस्थेत तो *अहंकार* अत्यंत सूक्ष्म होतो. **प्रकाशावरणाचा क्षय होऊन शुद्ध सत्त्वावस्था लाभली की या*सायुज्य व महाविदेहावृत्ती* लोपून *सानंद समाधि* व तदनंतर *सास्मित समाधि* लाभतो.**

त्याहीपलीकडे ***सास्मित* समाधीची द्वैतस्थिती लोपून अहंकार लोप पावतो. *अद्वैतसमाधि वा कैवल्य* ते हेच! अनन्यभक्तीचे वा ईश्वरप्रणिधानाचे महत्तम असे हे फल आहे.** हाच भाग ***''तैसें माझां साक्षात्कारीं। सरें अहंकाराचिं वारी। अहंकारलोपिं अवधारीं। द्वैत जाएं।।११-६९४।।''*** या ओवीतून आला आहे.

सगुण कृष्णरूपडे (बिंदु ते निरोधिका)-➢ विश्वरूपदर्शन -➢ सायुज्य-महाविदेहावृत्ती (द्वैताद्वैतावस्था) -➢शुद्ध सत्त्वावस्था -➢ सानंद समाधि -➢सास्मित समाधि -➢अहंकारलोप -➢अद्वैतसमाधि अशा या मार्गावरच्या ठळक ठळक पायऱ्या आहेत.

अद्वैतावस्था वा *कैवल्यप्राप्ती* चे यथार्थ वर्णन ज्ञानदेवांनी ***''मग मी तो हें आघवें। एक मीचि आथि स्वभावें। किंबहुना सामावें। समरसिं तो।।११-६९५।।''*** या ओवीतून जसे केले आहे, त्याहून ते अधिक समर्थपणे कोण करू शकेल!!***जीव-जगत-ईश्वर* या तत्त्वज्ञानत्रयीचे *सामरस्य* अद्वैतसिद्धांत प्रसृत करतो आणि अनन्यभक्तियोगाने तो असा साकार होतो**, हेच ज्ञानेश सूचित करत आहेत. **तत्त्वज्ञानप्राप्तीचा परमोच्च योगबिंदु ती हीच ओवी नाही का!**

तत्त्वज्ञानप्राप्तीचा परमोच्च योगबिंदु

कैवल्य, अद्वैतसमाधि, विदेहमुक्ती, संजीवन समाधि इ.विविध नामांनी ओळखली जाणारी योगस्थिती कशी अनन्यभक्तीद्वारे प्राप्त होते, हे भगवंतांचे म्हणणे आपण समजावून घेतले आहे. ***हाच परमोच्च योगबिंदु वा तत्त्वज्ञानप्राप्तीचा उत्कर्ष आहे.*** ही अनन्यभक्ती कर्माच्या लक्ष्मणरेषेत उभी असते. हाती ज्ञानाचा दीप तिने उजळून घेतलेला असतो. त्याची प्रकाशकिरणे योगमार्गाने अनंताकडे निघून तेथे त्या परमधामास कशी जाऊन पोहोचतात, ते पहा! श्रीकृष्ण म्हणतातः

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।

''अर्जुना! जो योगी केवळ मजप्रीत्यर्थ कर्मे आचरतो (***कर्मयोग*** आचरतो); सर्व भूतांप्रति समबुद्धी ठेवून निर्वैर होतो (***ज्ञानयोग*** आचरतो); माझ्या प्राप्तीसाठी तत्पर असतो (***योग*** आचरतो); जो माझी भक्ती करतो (***अनन्यभक्तियोग*** आचरतो); तो मलाच प्राप्त होतो.''

कर्म-ज्ञान-योग-भक्ती या चतुरंगयोगाचे हा श्लोक उत्तम निर्देशन करत आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये! हीच ***अनन्यभक्ती*** होय. याविषयी ज्ञानेशांच्या ओव्या पाहू याः

जो मजचिं एकांलागिं। कर्मे वाहातसें आंगिं।
जेआं मीवांचौनि जगिं। गोमटें नाहीं।।११-६९६।।
दृष्टादृष्ट सकल। जेआंचें मीचिं केवल।
जेणें जिणयांचें फल। मजचि नाम ठेविलें।।६९७।।
भूतें हें भाख विसरला। जैं दिठीं मीचिं आहे बांधिलां।
म्हणौनि निर्वैर जाहाला। सर्वत्र भजे।।६९८।।
आईसा जो भक्तु होएं। तेआंचें त्रिधातुक हें जाएं।
तैं मीचि होऊनि ठाएं। पांडवा गां।।६९९।।
आईसें जगदुदरदोंदिलें। तेणें करुणारसरसालें।
सञ्जयो म्हणें बोलिलें। कृष्णदेवें।।७००।।

''जो माझ्याप्रीत्यर्थच कर्मे आचरतो; ज्याला जगात माझ्याशिवाय दुसऱ्या कशातही गोडी नाही; ज्याचा इहपरलोक मीच आहे; ज्याचे जीवन केवळ मलाच वाहिलेले आहे; आपण आणि इतर भुते यांतील भेदभाव जो विसरला आहे; ज्याच्या दृष्टीस मजवाचून इतर काहीं दिसत नाही; जो सर्वत्र मलाच भजतो; त्या भक्ताचे सत्त्व-रज-तम

हे त्रिगुण सांडले जाऊन तो गुणातीत होतो. तो भक्त मत्स्वरूप होऊन राहतो," *असे जगतास आपल्या उदरात आश्रय देणाऱ्या, करुणारसाने ओथंबलेल्या त्या श्रीकृष्णदेवाने अर्जुनास सांगितले. संजय याप्रमाणे धृतराष्ट्रास ही कथा सांगत होता."*

योगानुभूतींचा एकत्र विचार::::

या उन्मेषातून विवेचिलेल्या विषयानुरूप या ठिकाणी आपण पूर्वी पाहिलेले *(उन्मेष ४६:योगपर अभंग पृ.क्र.८११)* ***"पश्चिमपथस्थाने व शून्ये"*** यासंबंधीचे कोष्टक कसे बसवता येते, ते पाहू या:

पश्चिमपथ स्थाने व शून्ये / देहसंकेत / समाधिस्थिती / मुक्तिप्रकार

१)समाधि	२)स्थान	शून्य	देह	मुक्तिप्रकार	अनुभूती १)	अनुभूती २)	समाधिस्थिती	प्रक्रिया
सं}	**आज्ञा**		**स्थूल**	}	**स**	**वि**	}	
				}**सलोकता**			}	
}	**बिंदू**	प्रथम -**त्रिकूटी**	**सू**	}	**गु**	**श्व**	}**संप्रज्ञात सवितर्क**	
}	**अर्धेंदु**	द्वितीय-**श्रील्हट**		**समीपता**			**संप्रज्ञात सविचार**	
प्र }	**निरोधिका**		**क्ष्**	**सरूपता**	**ण**	**रू**	**संप्रज्ञात निर्वितर्क**	
}	नाद							
ज्ञा}	**नादांत**				**सा**	**प**	**संप्रज्ञात निर्विचार**	
}	शक्ति		**म**		**क्षा**	**द**		
						र्श		
}	**व्यापिका**	तृतीय-**गोल्हाट**	**का**	**सायुज्य**	**त्का**	**न**	**सानंद समाधि**	
}			**र**					
त}	**समनी**		**ण**		**र**	**महा**	**सास्मित समाधि**	
						विदेहा->->->->->	**शुद्ध सत्त्वावस्था**	
								⇓
अ }	**उन्मनी**	चतुर्थ -**औटपीठ**	}**भ्र म**	**जीवन्मुक्ती**		**नि**		**प्रकाशावरणक्षय**
}	प्रतिष्ठा		}**म हा**					⇓
सं }	गुह्यचक्र		}			**र्गु**		⇓
}	**सहस्त्रारचक्र**		}**र का**					
ज्ञा }	**ब्रह्मरंध्र**	**महाशून्य**}				**ण**		⇓
}			}**गुं र**					
}	पराबिंदू					**सा**		⇓
त }	(परमशिव)		}**फा ण**			**क्षा**		
						त्का		⇓
	निरशून्य->-> ->		->**कैवल्य देह**	-> **विदेहमुक्ती** ->	->	**र**	-> -> -> ->	**कैवल्य**
								⇓
								अद्वैत स्थिती

"कृष्णचरणचतुरु। पांडुकुमरु"

ययावेरीं तो पांडुकुमरु। जाहाला आनंदसंपदाथोरु।
आणि कृष्णचरणचतुरु। एक तो जगीं।।११-७०१।।
तेणें देवाचिआं दोन्हीं मूर्ति। नीकिआं निहाललिआं चित्तिं।
तंवं विश्वरूपाहूनि कृष्णाकृति। देखिला लाभु।।७०२।।
परि तेआंचिएं जाणिवें। मानु न किजैंचि देवें।
जैं व्यापकाहूनि नोहें। एकदेशिं।।७०३।।
हेंचिं समर्थावयालागिं। एक दोन चांगिं।
उपपत्ति शार्ङ्गी। दाविता जाहाला।।७०४।।

"श्रीकृष्णचरणरज सेवण्यात तत्पर असा जो जगीं एकलाच होता, तो पांडुकुमर अर्जुन हे सर्व ऐकून आनंदसंपदेचा मोठा धनी झाला. त्याने देवाच्या त्या दोन्ही मूर्ती परतपरत नीट न्याहाळून पाहिल्या. तेव्हा त्याला विश्वरूपापेक्षा कृष्णाकृतीच जास्त लाभदायक वाटली. पण त्याच्या या मतास देवाची अजिबात मान्यता मिळत नव्हती. सगुण श्रीकृष्णरूपापेक्षा विश्वरूपच कसे अधिक चांगले आहे, हे पटवून देण्यासाठी श्रीकृष्णांनी अर्जुनास अजूनही काही उपपत्ती सांगितल्या."

तिआं आईकौनि सुभद्राकांतु। चित्तिं आहें म्हणितु।
तन्हैं होएं बरवें दोहिंआंतु। तैं पुढ्ढुति पुसों।।११-७०५।।
आईसा आलेचु करौनि जीवीं। आतां पुसतिं वोज बरविं।
आदरिल तैं परिसाविं। फुडां कथा।।७०६।।
प्रांजल ओविप्रबंधें। गोठी सांधिजैल विनोदें।
निवृत्तिकृपाप्रसादें। ज्ञानदेओ म्हणें।।७०७।।
भरौनि सद्भावाचिं अञ्जुली। मिआं वोविआं फुलें मोकलीं।
अर्पिलीं अंघ्रियुगुलीं विश्वरूपाचां।।७०८।।

"शार्ङ्गधराचे हे बोल ऐकून सुभद्रापती मनात विचार करू लागला की या दोनही रूपात अधिक चांगले काय आहे, ते परत विचारू या! कारण त्याच्या मनात काही विश्वरूप चांगले हे ठसेना! पण हे पुनः विचारावयाचे तर देवाला राग येणार नाही अशा युक्तीने विचारले पाहिजे, हे जाणून तो आपल्या मनातील हा संभ्रम देवाला चतुरपणे सांगणार आहे. ती कथा आता येईल. श्रोत्यांनी ती ऐकावी." आपण निवृत्तिनाथांची पावले वंदित त्यांना स्मरत ती गोष्ट सुंदर ओवीछंदात बद्ध करून सांगणार आहोत, असे ज्ञानदेव म्हणतात.

विश्वरूपाचे खरे माहात्म्य::::

"भरौनि सद्भावाचिं अञ्जुली"

सताच्या ओंजळीत सुंदर ओव्यांची भावफुले घेऊन *अकरावा* अध्याय संपन्न करत ज्ञानदेव ती विश्वरूपाच्या पावलांवर वाहत बाराव्या अध्यायाचे सूतोवाच करत आहेत. **पुढचा बारावा अध्याय *भक्ती या विषयास जवळपास वाहिलेला आहे. म्हणून त्याला* भक्तियोग असे म्हणतात.**

चिद्विलासाचा साक्षात्कार म्हणजे विश्वरूपदर्शन! हा साक्षात्कार अनन्यभक्तियोगाने होतो, हे आपणास विदित केलेच आहे. त्यातून***अव्यक्तोपासना व व्यक्तोपासना*** या जरा आडवळणाने विचारून अर्जुनाने भगवंताकडून आपले शंकासमाधान कसे करून घेतले, ते आपण *गीता श्लोक १२-१ ते १२-६* आणि *ओव्या क्र.१२-१ ते १२-८०* हा भाग पाहिला, तेव्हा अवलोकिलेच आहे *(उन्मेष ४५-२: लययोगसमालोचनःयोगशास्त्रसमन्वय, पृ.क्र. ७१० ते ७१७).*

त्यानुसार श्रीकृष्णांच्या मते ***ईश्वरप्रणिधान*** न करता जे योग आचरतात किंवा अव्यक्ताचे ध्यान करू पाहतात, ते कष्टकारक मार्गाने जातात; ईश्वरप्रणिधान सगुण साकार रूपाचेच करता येते; त्यासाठीच विभूति सांगितलेल्या आहेत; म्हणून असे ***ईश्वरप्रणिधान*** करणाऱ्यांची भक्ती सुकर आहे, इ.भाग आपण तेव्हा पाहिलेला आहे. ***योगी आणि भक्त*** या दोन्ही संकल्पना गीतेच्या दृष्टीने अभिन्न आहेत, हे पण आपल्या निदर्शनास वेळोवेळी आलेलेच आहे.

अव्यक्तस्वरूपाचे ध्यान करणे देहधारी मानव प्राण्यास कसे क्लेशप्रद आणि म्हणूनच जवळजवळ असंभवच आहे, त्याबाबतची भगवद्वचने आपण अभ्यासली आहेत. म्हणून परमात्म्याच्या व्यक्तस्वरूपाचे ध्यान श्रेयस्कर आहे व ते करण्यासाठी विभूतींचा वा कदाचित विश्वरूपाचा आश्रय घेतला जाणे योग्य ठरते, असे अनुमान निघते.

परंतु श्रीकृष्ण अर्जुनाला वारंवार आपल्या विश्वरूपाची महती सांगतांना दिसतात. ते का असा प्रश्नही जिज्ञासूंना पडेल. त्याचे आंशिक उत्तर आपणास पूर्वीच उपरोल्लेखित बाराव्या अध्यायाच्या विचारप्रसंगी मिळालेले आहेच. ***विश्वरूप* हा साधकाच्या प्रगतिमार्गावरील एक अत्यंत महत्त्वाचा संक्रमणबिंदु आहे, व्यक्त आणि अव्यक्त यांच्या सीमारेषेवरील ती अनुभूती आहे,** हे आपणास आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट झालेले आहे. याच उन्मेषाच्या *पृ.क्र.९१७* वर दिलेल्या ***पश्चिमपथ स्थाने व शून्ये / देहसंकेत / समाधिस्थिती / मुक्तिप्रकार*** या कोष्टकात दाखवलेल्या समालोचनावरूनही ही गोष्ट अधिक स्पष्ट होइल. ***विश्वरूपदर्शन* ही अनुभूती *महाविदेहावृत्ती* या सगुणसाक्षात्कारातील सर्वश्रेष्ठ अनुभूतिपूर्वीची आहे.**

असे असल्याने अर्जुनाने या सर्वश्रेष्ठ सगुण साक्षात्काराचे महत्त्व ओळखावे आणि त्यापूर्वीच्या वा समांतर अशा ***सलोकता, समीपता, सारुप्यादी* मुक्तींसापेक्ष विश्वरूपानुभूतीस कवटाळावे** असेच श्रीकृष्णांचे म्हणणे दिसते. त्यांच्या मते ***भक्ती किंवा योग ही डोळसच असली पाहिजेत. म्हणून आपल्या ईश्वरोपासनेच्या मार्गावरील सर्व खाणाखुणा साधकाच्या माहितीत असल्याच पाहिजेत आणि त्यांचे यथायोग्य मूल्यमापनही त्याला करता आले पाहिजे,*** हे

श्रीकृष्णांच्या या सर्व विश्वरूपाच्या महत्तेबाबतच्या विवेचनामागचे सूत्र असल्याचे आपणास जाणवते.

मूर्तरूपाचे महत्त्व

असे असले तरी ईश्वरप्रणिधानातील मूर्तरूपाचे महत्त्वही ते सांगतात आणि सगुण श्रीकृष्णमूर्तीचा भावानुभवही भक्तांस किती प्रिय असतो, हेही ते जाणून आहेत. तसेच साधनेच्या प्रथमारंभापासून तर पुढच्या सर्व टप्प्यात मूर्तरूपाचे काय वैशिष्ट्य आणि कोणती उपयुक्तता आहे, याचेही योगशास्त्रोक्त महत्त्व जाणून ते मूर्तस्वरूपाच्या ध्यानाचा अनादर करत नाहीत, तसेच सर्वसामान्य साधकांसाठी तोच ध्यानप्रकार उचलून धरतात, असे आपल्याला बाराव्या अध्यायातील ***सगुण-निर्गुण वा व्यक्ताव्यक्त*** उपासनेबाबतच्या त्यांच्या मार्गनिर्देशनावरून कळून येते.

त्यांचे हे सर्व विवेचन आपण पूर्वी पाहिलेल्या पातञ्जलसूत्रोक्त संकल्पनांच्याच मार्गावरून जाते, हेही यानिमित्ताने आपल्या लक्षात येते. **सगुण आलंबनविषय घेतघेतच साधकाची उन्नती *धारणा-ध्यान-समाधि* या मार्गावरून होत जाते आणि अंती कैवल्य प्राप्त होते, असे योगसूत्रे सांगतात.** तदनुसार योग्य वेळी योग्य ते आलंबन असणे प्रगतीच्या दृष्टीने आवश्यकच असते आणि हेच सगुण मूर्तरूपापेक्षा विश्वरूपासारख्या व्यक्ताव्यक्ताच्या सीमारेषेवरील ध्यानविषयास विशेषेकरून लागू पडते.

अर्जुनाने या सर्व यौगिक प्रक्रिया व प्रगतीचे टप्पे नीट डोळसपणे जाणून घ्यावेत आणि पुढील मार्गक्रमण सज्ञानतेने करावे, ही श्रीकृष्णांची तळमळ विश्वरूपाचे जे माहात्म्य अर्जुनास ते पटवून देऊ पाहतात, त्यामागे दिसून येते. म्हणूनच प्रसंगविशेषी अर्जुनाच्या अज्ञानास वैतागून ते त्याची ***"अगां आंधलेआं अर्जुना"***, ***"परि नेणसिंचि गांवढिआं"*** इ.शेलक्या शब्दांत संभावना करून त्याच्या अज्ञानाची निर्भर्त्सना करत त्यांनी सतत त्याच्या मनावर हेच डोळस साधनेचे महत्त्व बिंबवण्याचे प्रयत्न केले, असे आपणास पूर्वीच्या सर्व निरूपणावरून दिसून येते. असो.

समारोप

अकराव्या गीताध्यायात सुरू केलेला हा विषय पुढे सगुणोपासनेची वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी बाराव्या अध्यायाच्या उर्वरित भागाच्या अवलोकनानिमित्त आपण आता वळत आहोत पुढील ***उन्मेष क्र.४९ - सगुणोपासना*** याकडे. तेव्हा वरील विचारांची अधिक चिकित्सा करता येईल. तूर्त इत्यलम्।

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ४९::
::सगुणोपासना::

उन्मेष ४९:
गीता:
४:२४
९:१०
१०:१०,११
११:५५
१२:१-१९
ज्ञानेश्वरी:
१२:३८-४०,५८-६०,७५-१४३
पा.यो.सू.:
१:२३-२९,५१
३:४४,४७,४९
४:२५

उद्धृत:
कोल्हटकर::ईश्वरप्रणिधान-९२० (सर्वदर्शनसंग्रहकार?), ९३६
लो.टिळक:गीतारहस्य:९२९
के.वि.बेलसरे:९३०
मामा दांडेकर:९३०
पं.वि.दा.सातवळेकर:९३०
बाबामहाराज पंडित:९३१
शंकरमहाराज खंदारकर:९३१
स्वामी चिन्मयानंद:९३२
देसाई:गीतातत्त्वविवेक:९३२
बाबामहाराज आर्वीकर:९३३-९३७
साखरेमहाराज:९३४

::उन्मेष ४९::
::सगुणोपासना::

उपासना शाङ्करभाष्य::::

व्यक्त व अव्यक्ताची उपासना

मागील उन्मेषातून आपण विश्वरूपाचे सम्यग्दर्शन घेतले. तेव्हा सांगितल्याप्रमाणे आता आपण ***व्यक्ताव्यक्त आणि सगुण उपासनेचा विचार*** करणार आहोत. विश्वरूप तर तसे अव्यक्तच आहे. त्याचे ध्यान करणेही कठीणच असले पाहिजे. सूक्ष्मातिसूक्ष्म विषयांच्या ध्यानाची पायरी साधकाने गाठल्याशिवाय असे अमूर्ताचे ध्यान होऊ शकत नाही. व्यक्त आणि अव्यक्त पदार्थांच्या ध्यानाविषयी पतञ्जलींनी दोन अत्यंत महत्त्वाची सूत्रे सांगितली आहेतः

१) स्थूलस्वरूपसूक्ष्मान्वयार्थवत्त्वसंयमात् भूतजय।।३-४४।।" व **२) ग्रहणस्वरूपास्मितान्वयार्थवत्त्वसंयमादिन्द्रियजयः।।३-४७।। पा.यो.सू.।।**

याप्रमाणे धारणा-ध्यानादी संयमासाठी पदार्थांच्या स्थूल,सूक्ष्म, स्वरूप, अन्वय व अर्थवत्त्व अशा एकाहून एक पांच उत्तरोत्तर सूक्ष्म आलंबनावस्था पतञ्जली निर्देशितात. ***धारणा-ध्यानासाठी आलंबविषय सुरुवातीला तरी व्यक्त म्हणजे सगुण असावा असा योगशास्त्राचा अभिप्राय असल्याचे यावरून स्पष्ट होते.*** म्हणून सगुण मूर्त अशा विभूति वा तत्सम विषय ध्यानाच्या आलंबनासाठी घेणे सयुक्तिक ठरते.

त्याचप्रमाणे गीता *श्लोक क्र. ११-५५* मध्ये म्हटल्याप्रमाणे सर्व कर्मे ईश्वराप्रीत्यर्थ करणे, सर्व भूतात ईश्वरासच पाहणे, याप्रमाणे आचरण केल्याने विश्वरूपाचे ध्यान केल्यासारखे होत असले पाहिजे. हा मार्ग व्यक्तोपासकांचा आहे. अव्यक्तोपासक याऐवजी अव्यक्ताचे ध्यान करू पाहतात. त्यांचा त्याप्रति ***"सोऽहंभाव"*** असतो. पण यात *श्लोक क्र. ११-५५* मध्ये येणारा भाग असेलच असे नाही.

केवळ ज्ञानमार्गाचीच त्यांची ही ***अव्यक्तोपासना*** ठरत असल्यामुळे त्याचे अधिकारी क्वचितच असतात. ध्यानासाठी आलंबन म्हणून ***निरालंब अव्यक्त*** घेणे सर्वसामान्यांसाठी महाकठीण आहे. म्हणून सरतेशेवटी असा निष्कर्ष निघतो की **आलंबनासाठी परमात्म विभूति घेऊन *ईश्वरप्रणिधानयुक्त उपासनापद्धती* स्वीकारणे अधिक श्रेयस्कर आहे.**

ईश्वरप्रणिधानयुक्त उपासना

त्यासाठी ***ईश्वरप्रणिधान*** कसे करावे हा गीतेने विस्तृतपणे चर्चिलेला विषय आपण आतापावेतो यथातथ्य व बराच सखोल पाहिला आहे. पतञ्जली ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।पा.यो.सू.।।"*** हे सांगून असंप्रज्ञात समाधिसिद्धीसाठी ईश्वरप्रणिधानाचा उपाय सांगतात, हेही आपण पाहिलेच.

त्या ईश्वराचे स्वरूप *पातञ्जल योगसूत्रे क्र.१-२४ ते २९* मध्ये स्पष्ट केले आहे आणि ते गीतेतील ईश्वरस्वरूपाशी किती प्रमाणात जुळते, तेही आपण पाहिलेच आहे. ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।।"*** व ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।पा.यो.सू.।।"*** याद्वारे हे ईश्वरप्रणिधान कसे करावे याचा निर्देश येतो. तोही आपण पाहिलाच आहे. श्री.कृ.के.कोल्हटकर आपल्या ***पातञ्जलयोगदर्शन*** या ग्रंथात *सूत्र क्र.१-२३* बाबत काय म्हणतात, ते पाहून या विषयाची पूर्तता करू या. ते म्हणतातः

"चित्त कधी समाहितावस्थेत असते, तर कधी व्युत्थितावस्थेत असते. त्याप्रमाणे ईश्वरप्रणिधानातही दोन प्रकार होतात. चित्त जेव्हा समाहितावस्थेत असते, तेव्हा पश्यंति, मध्यमा अथवा वैखरी वाणीने ईश्वराच्या प्रणवादी नाममंत्रांचा जप करणे आणि आपल्या निरुपाधिक स्वरूपात ईश्वर आणि मी एकच आहोत, अशी भावना करणे हे ***ईश्वरप्रणिधान*** होय."

"ते जेव्हा व्युत्थितावस्थेत असेल तेव्हा आपल्या हाताने घडणारी सर्व प्राप्त कर्मे ईश्वरार्पण बुद्धीने करणे, हे ***ईश्वरप्रणिधान*** होय. अशा उभयविध ईश्वरप्रणिधानाने चित्त सर्वदा ईश्वराकडे लागलेले असल्याने त्या साधकास ***"तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम्। ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते।।१०-१०।।;"तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः। नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता।।१०-११।।"*** या आश्वासनानुसार साक्षात ईश्वरच असंप्रज्ञात समाधिद्वारे आत्मसाक्षात्कारापर्यंत नेऊन पोहोचवतो."

सोऽहं व अनन्यभक्ती

पातञ्जल योगसूत्रांवर ***सर्वदर्शनसंग्रह, श्रीव्यासभाष्य*** आणि श्री.कोल्हटकरांचे सविस्तर विवेचन आपल्या या विषयाच्या अभ्यासासाठी उपयोगी असल्याने त्यांचे या प्रसंगी ऋण स्मरणे उचितच ठरेल. त्यांच्या वरील विवेचनास थोडी जोड दिली पाहिजे, असे वाटते.

ती म्हणजे ***सर्व भूतांप्रति ईश्वर पाहणे हाही ईश्वरप्रणिधानाचा अविभाज्य भाग आहे. गीता यास समबुद्धी म्हणते.*** गीतेचा भर या समत्वबुद्धीवर जास्त आहे. ***"मीच ईश्वर आहे," ही भावना ("सोऽहं") दृढ करण्यास गीता फारसा पाठिंबा देत नाही. यात ज्ञानमार्ग आहे. "सोऽहं"*** चे आलंबन गीतेस फारसे उपयुक्त वाटत नसावे, असे अनुमान आहे. त्याऐवजी ***गीतेचा मुख्य भर*** अनन्यचिंतनावर ***सर्वत्र ईश्वर पाहणे, अशा अनन्यभावावर आहे.*** त्याच्यावाचून दुसऱ्याचा विचारही भक्त करत नाही. ***जीव-जगत-ईश्वर*** या त्रयीतील जीवाचा जगत व ईश्वराशी हा असा संबंध गीता प्रस्थापित करते.

हा द्वैताभासात्मक दिसतो खरा! पण अंती त्याच भावनेचे अहंकारलोपाने अद्वैतभावात पर्यवसन होते, हे आपणास गीतेतील विविध वचनांद्वारे तसेच त्यावरील ज्ञानेश्वरांच्या विवेचनावरून स्पष्ट

दिसून आले आहे. ***"सोऽहं" भाव*** हा त्यानुसार आपोआपच प्रकट होतो. त्याची ***"सोऽहं"ध्यान करणे*** अशी काही वेगळी प्रक्रिया आहे, असे काही गीता स्पष्ट करत नसल्याचे दिसते.

त्याचप्रमाणे आपल्या ***निरुपाधिक*** स्वरूपात ईश्वर व मी एकच आहोत, अशी भावना करणे यासही गीतेचा पाठिंबा नसल्याचे स्पष्टच आहे. **निरुपाधिक स्वरूप म्हणजेच *अव्यक्त, अविकारी, अक्षय, अव्यय* इ. नामांनी प्रसिद्ध असलेले स्वरूप - ज्याबाबत श्रीकृष्णांनी स्पष्टच म्हटले आहे की *"... । क्लेशोऽधिकतरस्तेषां अव्यक्तासक्त चेतसाम्।।१२-५।।"!***

अर्थात या प्रकारची भक्ती गीता त्याज्य मानत नसली, हाही खरे तर भक्तीचाच प्रकार जरी असला आणि ईश्वरप्रणिधानाचा हा प्रकारही तसा शास्त्रोक्तच असला, तरी तो सर्वसामान्यांसाठी नाही. म्हणूनच ज्ञानेशांनी या मार्गास ***भक्तिविरहित मार्ग*** असे म्हटले आहे. ***"जिहीं सकल भुतांचां हितिं। निरालंबिं अव्यक्तिं। पसरलिआं आसक्ति। भक्तिविण।।१२-६०।।"*** असे त्यांचे बोल आहेत. कदाचित अशी भक्ती करणे जवळजवळ अशक्यच असल्याने ती भक्ती नसून आसक्ती आहे, असा त्यांचा अभिप्राय असावा!

तसेच ***"आणि एर तैंहिं पांडवा। जैं आरुढौनि सोऽहंभावा। झोंबति निरवयवा। आखरासिं।।१२-४०।।"*** असाही मार्ग म्हणूनच गीताकारांस अनुकरणीय वाटत नाही. कारण ***"आपुलिआं साटोंवाटीं। शून्य घेति उठाउठीं। तैंहिं मातेंचि किरीटी। पावति गां।।१२-५८।।"*** असे असूनही ज्ञानेश्वर म्हणतात तसे ***"वांचूनि योगाचेनि बळें। अधिक कांहिं मिळें। आईसें नाहिं आगळें। कष्टचि तेआं।।१२-५९।।"*** असा तो निरालंबाचा, अव्यक्तोपासनेचा, *सोऽहं* साधकाचा मार्ग आहे.

अनन्ययोग

म्हणून सरतेशेवटी ***"मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते। श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः।।१२-२।।"*** हीच भक्ती वा हाच योग गीता उचलून धरत असल्याचे स्पष्ट आहे. तसेच ज्ञानेश्वर असेही म्हणतात की, ***"तैसें सर्वेंद्रियांसहित। मज माझिं सूनि चित्त। जैं रातदिवो न म्हणत। उपासिति।।१२-३८।। ययापरी जैं भक्त। आपणपें मज देत। तैंचि मी योगयुक्त। परम मानिं।।१२-३९।।"*** याप्रमाणे योगयुक्त असणे व भक्त असणे हे एकच आहे. ***योग व भक्ती* ही काही वेगवेगळी नसून ती एकच आहेत, हे स्पष्ट आहे. यासच *अनन्ययोग* असे म्हणून भगवंत गौरवतात.**

ते म्हणतातः

ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्न्यस्य मत्पराः।
***अनन्येनैव योगेन* मां ध्यायन्त उपासते।।१२-६।।**
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्।।१२-७।।

"सर्व **कर्मे** मजठायी संन्यस्त करत, **अनन्ययोगा**ने माझे **ध्यान** करत जे माझी **भक्ती** करणारे मत्परायण **योगी** *(वा भक्तयोगी अथवा योगिभक्त)* असतात; त्या मज ठिकाणी तद्रूपतेने चित्त लावणाऱ्या भक्तांचा मी अल्पकाळातच या मृत्युरूप संसारसागरातून उद्धार करतो."

भक्ती, योग, कर्म व ज्ञान या चतुष्टीचा असा समन्वय केल्यावर त्या साधकास भक्त म्हणा, किंवा योगी म्हणा, अथवा कर्मयोगी म्हणा, अथवा ज्ञानयोगी, योगिभक्त, भक्तयोगी वा ज्ञानीभक्त म्हणा! काहीही योग्य वाटेल ते म्हणा! त्या सर्व संबोधनांनी आपल्यापुढे गीता जी प्रतिमा उभी करते, ती अशी एकाच एका अनन्ययोगसाधकाची असते! असो.

श्लोक क्र. १२-१ ते ७वरील शाङ्करभाष्य

भक्तिविषयक आणि तसेच योगविषयक महत्त्वाच्या अशा या *गीता श्लोक क्र. १२-१ ते १२-७* बाबत श्रीमच्छंकराचार्यांचे विवरण पाहून पुढे जाऊ या. ***अव्यक्तोपासक, व्यक्तोपासक, भक्ती, योग, ज्ञान, कर्म, ईश्वरप्रणिधान*** इ.वर त्यातूनही जो प्रकाश पडतो, तो जिज्ञासूंना हा सर्व विषय आकळून घेण्यासाठी तसा मार्गदर्शकच ठरेल! ते म्हणतातः

"द्वितीयप्रभृतिषु अध्यायेषु विभूत्यन्तेषु परमात्मनो ब्रह्मणः अक्षरस्य विध्वस्तसर्वविशेषणस्य उपासनम् उक्तम्। सर्वयोगैश्वर्य-सर्वज्ञानशक्तिमत्सत्त्वोपाधेः ईश्वरस्य तव च उपासनं तत्र तत्र उक्तम्। विश्वरूपाध्याये तु ऐश्वरम् आद्यं समस्तजगदात्मरूपं विश्वरूपं त्वदीयं दर्शितम् उपासनार्थम् एव त्वया, तत् च दर्शयित्वा उक्तवान् असि मत्कर्मकृत इत्यादि, अतः अहम् अनयोः उभयोः पक्षयोः विशिष्टतरबुभुत्सया त्वां पृच्छामि इति -"एवम् सततयुक्ता ये ...।।१२-१।।"

"दुसऱ्या अध्यायापासून विभूतियोगसंबंधित दहाव्या अध्यायापर्यंत ***समस्त विशेषणरहित अशा अक्षरब्रह्म*** परमात्म्याच्या उपासनेचे जसे वर्णन केले आहे, त्याचप्रमाणे त्याच अध्यायांतून ठिकठिकाणी ***संपूर्ण योग-ऐश्वर्य, ज्ञानशक्तीने युक्त अशा, सत्त्वगुणउपाधियुक्त*** अशा परमेश्वराची (अर्जुनाच्या भाषेत ***"तुझी"***) उपासना करण्याचे वर्णनही येते. अकराव्या अध्यायी उपासना करण्यास योग्य असे म्हणून संपूर्ण ऐश्वर्ययुक्त, सर्वांचे आदि आणि जगताचे आत्मरूप असे विश्वरूप दाखवले आणि ***"माझ्याचसाठी कर्मे करणारा हो"*** इ.वचने भगवंतांनी सांगितली."

"म्हणून ***या दोन्ही पक्षात श्रेष्ठतर कोणता आहे,*** म्हणून अर्जुनाने प्रश्न केला आहे. तो असा की "अशा प्रकारे निरंतर उपरोक्त साधनांमध्ये म्हणजे भगवदर्थ कर्मे करणे इत्यादींमध्ये चित्त लावून, अनन्यशरण होऊन, पूर्वदर्शित विश्वरूपधारी परमेश्वराची जे उपासना करतात आणि दुसरे साधक जे सर्व वासनांचा त्याग करून, ***सर्वकर्मसंन्यासी*** होऊन, उपरोक्त परम अक्षर, उपाधिरहित अव्यक्त, इंद्रियांस अगोचर अशा ब्रह्माची उपासना करतात; त्या दोघांमध्ये अधिकत्वाने योग जाणणारे कोणास म्हणावे ?"

यावर भगवंत म्हणतात की ***"ये तु अक्षरोपासकाः सम्यग्दर्शिनो निवृत्तैषणाः ते तावद् तिष्ठन्तु तान् प्रति यद् वक्तव्यं तद् उपरिष्टाद्***

वक्ष्यामः। ये तु इतरे - "मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते। ...।।१२-२।।"-"कामनारहित, सम्यग्दर्शी *(ज्ञानी)*, अक्षरोपासकांचा विचार नंतर करू. पण **जे भक्त मज परमेश्वरात मनास समाधिस्थ करून, सर्व योगेश्वरांचा अधीश्वर अशा, रागादी पञ्चक्लेशांच्या अज्ञानदृष्टिरहित सर्वज्ञ अशा मज परमेश्वराशी** ***(एकादश अध्यायाच्या अंतिम श्लोकानुसार-११-५५)*** **सतत युक्त होऊन, उत्तम श्रद्धेने युक्त होऊन, माझी उपासना करतात, ते *युक्ततम* आहेत,** असे माझे मत आहे. कारण रात्रंदिवस ते माझ्यात चित्त ठेवून असतात. म्हणून त्यांना ***युक्ततम*** म्हणणे योग्य ठरते."

पण म्हणून काय ते दुसरे साधक युक्ततम नाहीत, असे नाही. पण भगवंत त्यांच्याविषयी काय म्हणतात, ते पाहा: ***"ये त्वमक्षरनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते। ...।। ... संनियम्येन्द्रियग्रामं ...। ...।। क्लेशोधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।.. ...।।१२-३,४व५)"*** ***(टीपः*** येथे ***"योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना। श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः।।६-४७।।"*** यातील ***युक्ततम*** या शब्दाकडे जिज्ञासूंनी लक्ष द्यावे. यातही ***श्रद्धावंत आणि भगवंतातच (माझ्यात)चित्त असणाऱ्या योग्यास युक्ततम म्हटले आहे.*** हा श्लोक पण एका अर्थी व्यक्तोपासनेची उत्तमता दर्शवतो.)

"परंतु जे त्या अक्षराची उपासना करतात - जे अव्यक्त असल्याने शब्दाचा विषय होत नाही, म्हणून ज्याचा निर्देश केला जाऊ शकत नाही; जे कोणत्याही प्रमाणाने प्रत्यक्ष केले जाऊ शकत नाही म्हणून अव्यक्त आहे; आकाशासमान जे सर्वव्यापक आहे; ***अव्यक्त असल्याने जे अचिंत्य आहे, कारण वस्तू इंद्रियादी करणांद्वारे जाणल्या जात असल्याने मनाने त्यांचे चिंतन करता येते, तसे अक्षराचे नसल्याने त्याचे चिंतन करता येत नाही;*** मायेत स्थित असणारे म्हणून जे ***कूटस्थ*** आहे - [मायेस ***कूट*** म्हणतात. मायेत पण अविद्यादी अनेक असे संसारांना बीजभूत असणारे अंतःस्थ दोष आहेत. ***"मम माया दुरत्यया"।।गी।।,"मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्।।४-१०।।श्वेता.उप.।।"*** अशा श्रुतिस्मृतिवचनांनी जी ***माया*** म्हणून निर्देशिलेली आहे, तिचेच ***कूट*** असेही नाम आहे. त्या कूटात म्हणजे मायेत जो अध्यक्षरूपाने वा ***अधिष्ठाता*** म्हणून स्थित असतो, त्यास ***कूटस्थ*** म्हणतात. ***("मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्। ...।।९-१०।।गी।।");*** अथवा जे राशि*(कूट)* प्रमाणे *(ढिगाप्रमाणे)* आहे, म्हणून ***कूटस्थ*** आहे;] - जे ***अचल*** आहे म्हणून ***ध्रुव*** म्हणजे नित्य आहे; अशा ब्रह्माची जे उपासना करतात, इंद्रियग्रामाचे व्यवस्थितरीत्या नियमन करून, सर्व काल इष्ट व अनिष्टाच्या प्राप्तीविषयी जे समबुद्धी धरून असतात, ते सर्वभूतांच्या हितासाठी तत्पर असणारे, ***सर्व प्रकारे अक्षराची उपासना करणारे*** ही मलाच प्राप्त करून घेतात."

"अशा त्या अक्षरउपासकांविषयी ***"ते मला प्राप्त होतात"*** हे काय सांगायलाच हवे! ***"ज्ञानी त्वात्मैव मे मतम्"*** असे अगोदरच भगवंत म्हणून चुकले आहेत. "जे भगवत्स्वरूपच आहेत, त्यांच्याविषयी युक्ततम वा अयुक्ततम अशी भाषा कशी वापरता येईल! पण त्यांना ***"अधिक एव क्लेशः अधिकतरः तु अक्षरात्मनां परमार्थदर्शिनां देहाभिमानपरित्यागनिमित्तःअव्यक्तासक्तचेतसाम् अव्यक्ते आसक्तं चेतो येषां ते अव्यक्तासक्तचेतसः तेषाम् अव्यक्तासक्तचेतसाम्।"*** -साधनेपायी अधिक क्लेश होतात.

"यद्यपि मत्कर्मादिपराणां क्लेशः अव्यक्ता हि यस्माद् या गतिः अक्षरात्मिका दुःखं सा देहवद्भिः देहाभिमानवद्भिः अवाप्यते अतः क्लेशः अधिकतरः।" - "जरी मत्प्रीत्यर्थ कर्मे करणे इ.प्रकारे साधना करणाऱ्या साधकांनासुद्धा खूप क्लेश होतात, तरी पण ***ज्यांचे चित्त अव्यक्तात आसक्त आहे, त्या अक्षरचिंतक परमार्थदर्शिकांना त्याहूनही अधिक क्लेश देहाभिमानाचा परित्याग करतांना होतात. कारण अक्षरात्मिका अशी जी अव्यक्तगती आहे, ती देहाभिमानयुक्त पुरुषांना मोठ्या कष्टाने साध्य होणारी असते.*** म्हणून त्यांना अधिकतर क्लेश होतात."

उपासनेवरील शाङ्करभाष्यविवरण

श्रीमच्छंकराचार्यांचे भाष्य सविस्तर असे आपण या श्लोकांनिमित्त पाहिले. ज्ञानदेवीतील एतद्विषयक ओव्यांचा परामर्ष आपण पूर्वीच घेतला आहे. या ठिकाणी जाताजाता श्रीमच्छङ्कराचार्य म्हणतात की, ***"अक्षरोपासकानां यद् वर्तनं तद् उपरिष्टाद् वक्ष्यामः।।१२-५।।"*** त्याचा उल्लेख केला पाहिजे. नंतर बाराव्या अध्यायी ***"अद्वेष्टा सर्वभूतानां ... । .... अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः।।१२-१३ ते १९।।"*** असे जे श्लोक येतात, त्यातून अक्षरोपासक ज्ञाननिष्ठ अशा संन्याशांची धर्मलक्षणे सांगितल्याचे सूतोवाच येथे त्यांनी केले आहे. त्यांच्या या मताविषयी योग्य वेळी विचार करू.

तूर्त एवढेच सांगून ज्ञानेशांकडे वळू या. तसेच उपासना म्हणजे काय याचाही त्याअगोदर श्रीशाङ्करमते परामर्ष घेऊ या. श्रीशंकराचार्य म्हणतात:

"उपासनं नाम यथाशास्त्रम् उपास्यस्य अर्थस्य विषयीकरणेन सामीप्यम् उपगम्य तैलधारावत् समानप्रत्ययप्रवाहेण दीर्घकालं यद् आसनं तद् उपासनम् आचक्षते।।१२-३।।" - उपास्यवस्तूस शास्त्रोक्त प्रकारे बुद्धीचा विषय करणे, त्या वस्तूच्या अर्थास इंद्रियांद्वारे ग्रहण करणे, त्या वस्तूचे दीर्घकाल चिंतन करणे, त्या वस्तूचे सामीप्य प्राप्त करून घेऊन अखंड तैलधाराप्रवाहाप्रमाणे तिचा प्रत्यय वृत्तिप्रवाहाने घेणे, अशा चिंतनावस्थेत स्थित असणे, इ.उपासनालक्षणे होत."

म्हणजे ***धारणा व ध्यान*** **या पातञ्जल योगशास्त्रानुसार अष्टांगयोगाच्या दोन अंगांची साधना म्हणजे शांकरमते उपासना होय. समाधि हे अष्टांगयोगाचे मेरुशिखर म्हणजे उपासनेचा परमोच्च बिंदु आहे असे म्हटले तरीही चालेल.** ***उपासना*** या संकल्पनेचा हा विचार जिज्ञासू साधकांनी अवश्य ध्यानी ठेवला पाहिजे.

त्याचप्रमाणे याच उपासनेचा शास्त्रोक्त विचार पातञ्जलयोगदर्शनाने केलेला आहे, हेही लक्षात आणून दिलेच पाहिजे असे नाही. ***"धारणा–➤ध्यान-➤समाधि-➤संयम-➤कैवल्यप्राप्ती"*** **असा या उपासनामार्गाचा आलेख कोणत्याही साधनप्रणालीस म्हणूनच अनुलंघ्य आणि अवश्यंभावीच आहे - मग ते ज्ञानोपासक असोत,**

सगुणोपासक असोत, अव्यक्तोपासक असोत, योगोपासक असोत, उपासक भक्त असोत, कोणीही असोत!!

याबाबत साङ्ख्य मताकडे जसे उदार दृष्टीने आचार्यांनी पाहिले तसेच पातंजलोक्त योगशास्त्राबाबतचा द्वैती की अद्वैती, शांकरमते प्रत्युक्त की प्रमाणित, इ.वादविवाद टाकून देऊन निखळ वैज्ञानिक दृष्टीने त्यातील ग्राह्य ते घ्यावे अशाच आचार्यांसारख्या दृष्टीने श्रीशांकरमतानुयायांनी उपासनेचे शास्त्र म्हणून पातञ्जलयोगशास्त्राकडे पाहणे हिताचे ठरेल.

अशा **या अष्टांगयोगशास्त्रोक्त उपासनेसच शास्त्रविधियुक्त उपासना म्हटले पाहिजे. उपरोल्लेखित गीताभाष्योक्त श्रीशांकरमतानुसार अर्थातच भक्ती वा योग यांचे यामुळे सहजच समन्वयन होते. त्याने भक्तीत धारणा-ध्यानविधी अवश्यंभावी असल्याचे स्पष्ट झालेले आहेच. हाच भक्ती आणि योगाचा मिलनबिंदू नव्हे काय!**

यानंतर विवेचनाकरता फरक राहतो तो शेवटी अव्यक्त वा व्यक्त अशा उपास्यवस्तूपुरताच! क्लेश तर दोघांनाही - अव्यक्तोपासक आणि व्यक्तोपासक यांना खूपच आहेत. पण अव्यक्तोपासनेत अधिक क्लेश आहेत आणि सिद्धिप्राप्ती अत्यंत दु:साध्य आहे, हाच महत्त्वाचा मुद्दा गीता सांगत आहे, असे शांकरमत असल्याचे दिसून येते.

उपासनेचे रहस्य::::

अनन्योपासक

ज्ञानेश्वर मात्र व्यक्तोपासकांचा मार्ग खूपच सुलभ असल्याचे म्हणतांना दिसतात. कारण त्यांनी गीतेतील ***नाथसंकेतीचा दंशु असणारा पंथराज*** शोधून काढला आहे. **कर्मे करत, फळे ईश्वरास अर्पण करत, सर्व भाव ईश्वराप्रति ठेवून, निरंतर त्या सगुणउपाधियुक्त अशा परमेश्वराची *(गीतेच्या भाषेतील "माझी")* उपासना करण्याचा हा मार्ग आहे. तो *कर्म-ज्ञान-योग-भक्ती* असा चतुष्टीचा आहे. त्यात *गुरुकृपा* वा *ईश्वरकृपा* आहे; *धारणा-ध्यान –समाधिविधी* तर आहेच; *कुंडलिनीसंबंधित लययोगही* त्यातच अंतर्भूत आहे.**

अशा विविध लक्षणांनी संपन्न असणाऱ्या या भक्तिमार्गास - व्यक्तोपासनेस- ज्ञानदेव म्हणूनच गौरवतांना म्हणतात की, ***"म्हणौनि एर तैं पार्था। नेणतिचिं हें व्यथा। जैं कां भक्तिपंथां। वोटंगलें।।१२-७५।। कर्मेंद्रियें सुखे। करिति कर्मे अशेखें। जिएं कां वर्णविशेखें। भागां आलीं।।७६।। विधितैं पालित। निषेधांतैं गालीत। मज देऊनि जालीत। कर्मफलें।।७७।। ययापरीं पाहीं। अर्जुना मज ठाईं। संन्यासूनि नाहीं। करिति कर्मे।।७८।। आणिकहिं जैं जैं सर्व। कायिक वाचिक मानसिक भाव। तेआं मीवांचूनि धांव। आन नाहीं।।७९।। आईसें जैं मत्पर। उपासिति निरंतर। ध्यानमिखें घर। माझें जाहालें।।८०।। जेआंचिआं आवडीं। केलीं मजशीं कुलवाडी। भोग मोक्ष बापुडीं। त्यजिलीं कुलें।।८१।। आईसें अनन्ययोगें। विकलें जीवें मनें आंगें। तेआंचें काईं एक सांघैं। जैं सर्व मी करीं।। ८२।।"***

"मज ठिकाणी निरंतर तत्पर राहून जे माझी उपासना करतात; ध्यान करत जे माझे राहण्याचे ठिकाण स्वत:च होऊन गेले आहेत; ज्यांचा समस्त व्यवहार माझ्याशीच केला जातो; भोग व मोक्ष यांचे नांवसुद्धा ज्यांनी टाकून दिले आहे; जे असे अनन्ययोगाने मला आपले शरीर, एवढेच काय मन आणि जीवही देऊन टाकतात; माझे जे निव्वळ दासच झालेले असतात; त्यांच्यासाठी काय काय मी करतो म्हणून सांगावे! त्या अनन्योपासकांचे सर्व काही मीच करतो!!"

भगवंत पुढे म्हणतात:

किंबहुना धनुर्द्धरा। जो मातेचिआं एं उदरां।
तिएं मातेचां संसारा। केतुला पां।।१२-८३।।
तेविं मी तेआं। जैसें असति तैसिआं
कलिकाल नोकौनिआं। घेतला पटा।।८४।।
एरविं तन्हें माझिआं भक्तां। आणि संसाराचिं चिंता।
काएं समर्थाचि कांता। कोरान्न मागें।।८५।।
तैसें तैं माझें। कलत्र हें जाणिजें।
काईसेनिहिं न लजे। तेआंचेनि मी।।८६।।

"फार काय! हे धनुर्धरा! जो मातेच्या उदरी जन्मतो, त्याचा त्या मातेला केवढा व्याप असतो. त्याचे काय काय ती माता करत नाही सांग बरे! त्याचप्रमाणे अनन्ययोगाने जे मला उपासतात, त्यांचे जे असेल नसेल, ते सर्व कसेही का असेना, मीच पाहतो! कळिकाळावरही मी त्यांच्यासाठी मात करतो. त्यांचा मी कैवारी आहे. त्यांचा सगळा भार मी माझ्या शिरी घेतला आहे. माझे जन आणि त्यातूनही जे असे अनन्ययोगी भक्त असतात, त्यांनी संसाराची काय म्हणून चिंता करावी! समर्थाच्या कांतेला भिक्षा मागण्याची कधी वेळ येते का! ते भक्त पण माझे कलत्रच आहेत, असे समज!"

जन्ममृत्युचां लाटीं। झलंबति इयां सृष्टी।
तैं देखौनिआं पोटीं आईसें जाहालें।।१२-८७।।
भवसिंधुचेनि माजें। कवणासिं धाकु नुपजें।
एथ जन्हें कां माझें। बिहिति हन।।८८।।
म्हणौनि गां पांडवा। मूर्त्तिंचां मेलावा।
करूनि तेआंचिआं गांवां। धांवतु आलों।।८९।।

"जन्ममृत्युसागराच्या लाटांवर हेलकावणाऱ्या या सृष्टीस पाहून माझ्या पोटात त्यांच्याकरता कालवाकालव होते. या भवसिंधुचा माज कोणास धाक पाडत नाही! मग ते माझे भक्त जरी असले, तरी ते कदाचित भितीलही! ते घाबरून जाऊ नयेत म्हणून देह धारण करून मी त्यांच्यासाठी या पृथ्वीतलावर धावत येतो. सगुण रूपे मला त्यांच्यासाठी धारण करावीच लागतात."

भक्तांसाठी नाम व रूप यांची साधने

नामाचिआं सहस्त्रावेरी। नावा इयां अवधारीं।
सजूनिआं संसारीं। तारु जाहालों।।१२-९०।।
सडे जैं देखिलें। तैं ध्यानकांसें लाविलें।
परिग्रहीं घातिलें। तरियावरी।।९१।।

प्रेमाचि पेटी। बांधिलीं एकाचां पोटीं।
मग आणिलें तटीं सायुज्याचां।।९२।।
परी भक्तांचेनि नांवें। चतुष्पदादी आघवें।
वैकुंठीचिएं राणिवें। योग्य केलें।।९३।।

"सहस्त्रावधी नामे धारण करून त्या मूर्तींच्या रूपाने मी येथे अवतीर्ण झालो आहे. त्याच नामांच्या नावा करून त्यांना या संसारार्णवातून तारणारा नावाडी मीच झालो आहे. जे सडे भक्त आहेत, त्यांना ध्यानरूपी सांगडीत उभे करून मी परतीरी नेऊन लावतो. जे गृहस्थ आहेत, त्यांना त्यांच्या कुटुंबकबिल्यासह तरीवर घेऊन मी तारून नेतो. काही भक्तांच्या पोटी माझ्या प्रेमाची हलकी तरण्यास सोपी अशी पेटी बांधून मी त्यांना सायुज्यरूपी पैलतीरी सुखरूप नेतो. अशा प्रकारे सर्व प्रकारच्या माझ्या भक्तांना मी तारतो. मग ते अगदी चतुष्पाद, हीन योनी, स्त्रिया, अंत्यज - कोणीही का असेनात! त्या सर्वांना मी वैकुंठाचे राज्य प्राप्त करून देतो."

म्हणौनि गां भक्तां। नाहीं एकहीं चिंता।
तेयांतैं समुद्धर्ता। आथि मी सदा।।१२-९४।।
आणि जेव्हांचि कां भक्तीं। दिधलीं चित्तवृत्ति।
तेव्हांचि मज सूति। तेआंचिएं नाटीं।।९५।।
ययां कारणिं गां भक्तराया। हा मंत्र तुवां धनंजया।
किजैं जैं ययां। मार्गां भजिजें।।९६।।

"माझ्या भक्तांना मग कसली चिंता उरणार, सांग बरे! कारण त्यांचा नित्य उद्धार करणारा, सर्व संकटांतून तारून नेणारा मी त्यांच्याजवळ सतत असतोच की नाही! ज्या क्षणी भक्तांनी आपली सर्व चित्तवृत्ती मला अर्पण केली, त्याच क्षणी त्यांनी मला आपल्या पाशात गोवलेच म्हणून समज! याकरता हे भक्तराज अर्जुना! माझा हा मंत्र पक्का लक्षात ठेव की आचरण करावे, ते याच अनन्ययोगमार्गाचे! यातच खरे हित आहे. हाच खरा शाश्वत कल्याणाचा मार्ग आहे."

भगवत्स्वरूपी मनबुद्धी ठेवणे

अशा या अनन्ययोगाची साधना कशी करावी, ते भगवंत सांगत आहेतः

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः।।१२-८।।

"माझ्याठायीच मन लावावे; चित्त ठेवावे. माझ्याठायीच बुद्धी स्थिर करावी. म्हणजे माझ्याठायीच निवास होतो, यात काहीच शंका नाही."

ज्ञानेश म्हणतातः

अगां मानस हें एक। माझां स्वरूपीं सवृत्तिक।
करूनि घालिसिं निष्टंक। बुद्धिनिश्चयेंसिं।।१२-९७।।
इयें दोनिं सरिसिं। मजमाजिं प्रेमेंसिं।
रिघालीं तन्हैं पावसिं। मातें तूं गां।।९८।।
जैं मन बुद्धि इहीं। घर केलें माझां ठाईं।
तन्हें सांधैं मग काहिं। मी तूं आईसें उरें।।९९।।

"अर्जुना! ही साधना कशी करावी ते ऐक. आपले मन चित्तवृत्तींसह माझ्या स्वरूपी जडवावे. माझ्या स्वरूपाविषयी बुद्धीचा निश्चय ठामपणे करावा आणि तो ढळू देऊ नये. बुद्धीने माझे जे विश्वरूपी स्वरूप अथवा विश्वांतरीचे रूप अवगत करून घेतले असेल, त्याच्यावरच मन चित्तवृत्तींसह केंद्रित करावे. मनाने त्याच स्वरूपाचे मनन, चिंतन, ध्यान करावे. माझ्या स्वरूपाने आकर्षित होऊन जेव्हा ही दोन्ही मनबुद्धी त्यातच स्थिर होतील, तेव्हा तू माझ्या स्वरूपी पावशील! द्वैत उद्भवते ते या मन व बुद्धी यांच्याच प्रभावाने! जर ती दोन्ही माझ्याठायीच वसू लागली, तर मग द्वैतभाव उरेलच कसा! ***मी, तू*** हा भाव मग विलीन होईल."

म्हणौनि दिवा पालवें। सवेचि तेज मावलें।
कां रविबिंबासवें। प्रकाशु जाएं।।१२-१००।।
उचललेआं प्राणासरिसिं। इंद्रियेंहिं निगति जैसिं।
तैसा मनोबुद्धिपासिं। अहंकारु ये।।१०१।।
म्हणौनि माझां स्वरूपिं। मनबुद्धि इयें निक्षेपि।
येतुलेनि सर्वव्यापि। मीचि होसिं।।१०२।।
ययां बोलां काईं। अनारिसें नाहिं।
आपुलीं आण पाहीं। वाहतु असें गां।।१०३।।

"दिवा पदराच्या वाऱ्याने जातो, तेव्हा त्याचा प्रकाशही नाहीसा होतो. प्राणांसमवेत इंद्रियेही निघून जातात. त्याचप्रमाणे जेथे मनबुद्धी जातात, तेथेच अहंकारही जातो. माझ्या स्वरूपी तू जेव्हा मन बुद्धी निष्टंक ठेवशील, तेव्हा त्यांच्याचसमवेत तेथेच तुझा अहंकारही राहील. तोही माझ्यातच विलीन होईल. मग द्वैत जाऊन अफूट असे अद्वयच केवळ उरेल! याप्रकारे तूही मजमध्ये विलीन होऊन सर्वव्यापी होशील. माझे हे म्हणणे अन्यथा नाही, याविषयी खात्री बाळग," असे गोपालकृष्ण प्रतिज्ञापूर्वक सांगत आहेत.

अनन्यभक्ती साधण्याची युक्ती

ते पुढे म्हणतात की असे एकदम करणे जमत नसेल, तर युक्तियुक्तीने करावेः

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनञ्जय।।१२-९।।

"हे धनंजया! जर माझ्या ठिकाणी असे चित्त स्थिर करणे चटकन जमत नसेल, तर **अभ्यासयोगा**ने मला प्राप्त करून घ्यावे."

ज्ञानेश यावर ओव्या करताता, त्या अशाः

अथवा हें चित्त। मनबुद्धिसहित।
माझां हातिं अचुंबित। न शकसिं देवों।।१२-१०४।।
तन्हैं गां आईसें करीं। ययां आठां पाहारांमाझारिं।
मोटकें निमिखभरी। देतु जाएं।।१०५।।
मग जैं जैं कां निमिख। देखैल माझें सुख।
तेतुलालें अरोचक। विषयीं घेईल।।१०६।।

"अर्जुना! पण समज की तुला हे असे मन बुद्धिसहित पूर्णतया माझ्याठायी लावता येत नसले, तर असे कर. ***अष्टौप्रहर दिवसातील निदान एक निमिषमात्र तरी ते मजठायी लावण्याचा प्रयत्न करत जा!*** एक एक निमिष असे जरी तुझे चित्त मजठायी रत झाले, तरी त्यास माझी गोडी लागत जाऊन त्यास विषयांबाबत शनैःशनैः अरुचि निर्माण होत जाईल."

जैसा शरत्कालु रिघें। आणि सरिता वोहटूं लागें।
तैसें चित्त काढैल वेगें। प्रपंचौनि।।१२-१०७।।
मग पुनवेंहूनि जैसें। शशिबिंब दिसें दिसें।
हारपत आंवसें। नाहींचि होएं।।१०८।।
तैसें भोगांआंतुनि निगतां। चित्त मजमाझिं रिघतां।
हलुंहलुं पांडुसुता। मीचि होईल।।१०९।।
अगां अभ्यासयोगु म्हणिजे। तो हा एकु जाणिजें।
येणें कंहिं न निफजें। आईसें नाहिं।।११०।।

"शरदाच्या आगमनानंतर सरितांचे पाणी जसे हळूहळू कमी होऊ लागते, तसे तुझे चित्त प्रपंचातून निघू लागेल. पौर्णिमेनंतर दिवसेंदिवस शशिबिंब कमीकमी होत शेवटी अवसेला दिसेनासे होते, त्याप्रमाणे चित्त जसजसे माझ्यात लागत जाईल, तसतसे हळूहळू ते भोगांमधून बाहेर पडू लागून अंती मजठायी पूर्णपणे लीन होऊन जाईल; माझेच स्वरूप त्यास प्राप्त होईल! अर्जुना!***अभ्यासयोग*** ज्यास म्हणतात तो हाच! याद्वारे सिद्ध होणार नाही अशी कोणती गोष्ट आहे सांग बरे!"

पैं अभ्यासाचेनि बळें। एकां गति अंतराळें।
व्याघ्र सर्प प्रांजळें। केलें कीं।।१२-१११।।
विख कीं आहारीं पडें। समुद्रीं पायवाट जोडें।
एकीं वाग्ब्रह्म थोकडें। अभ्यासें केलें।।११२।।
म्हणौनि *अभ्यासासिं काईं। सर्वथा दुष्कर नाहिं।*
ययालागिं माझ्यां ठाईं। अभ्यासें मिळ।।११३।।

"अरे अभ्यासबलाने काही जण अंतराळसंचाराची सिद्धी प्राप्त करून घेतात. तर कोणी व्याघ्रसर्पादी क्रूर प्राण्यांनासुद्धा आपल्या कह्यात ठेवतात. अभ्यासाने विषसुद्धा पचनी पडते; समुद्रावरून चालत जाता येते. अभ्यासाने अथांग वेदराशीसुद्धा अल्प ठरावी, असे ज्ञान प्राप्त करता येते; त्यात प्रावीण्य संपादता येते. अभ्यासास दुष्कर असे काहीच नाही. म्हणून ***तू अभ्यासयोगाने मजठायी प्रवेश कर!"***

परंतु अभ्यासाचे श्रमसुद्धा करणे सुरुवातीस जड वाटत असले, तर:

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि *मत्कर्मपरमो भव।*
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि।।१२-१०।।

"अभ्यास करण्यास जर तू असमर्थ असशील, तर असे कर की ***मजप्रीत्यर्थ कर्मे करणारा हो!*** माझ्यासाठी कर्मे करूनही तू सिद्धी प्राप्त करून घेशील!"

कर्मभक्ती

अनन्ययोगाचे - **भक्तियोगा**चे - योगाचे गमक म्हणजे असा या श्लोकी पुनः उल्लेखलेला ***कर्मयोग*** होय. सर्वानुमते *बारावा* अध्याय भक्तियोग सांगतो. या भक्तियोगाचे खरे स्वरूप आपण पाहत आहोत. जिला कोणी कोणी कुचेष्टेने टाळकुटी भक्ती असे म्हणतात, तिचे स्थान आपण यथायोग्यरीत्या पाहणारच आहोत, पण जरा नंतर! परंतु सध्या या अध्यायातून या श्लोकी वाहणारा भक्तिप्रवाह कर्माच्या पात्रात प्रवेशतांना दिसतो आहे. त्याबाबतीत ज्ञानेशविचार काय आहेत, ते पाहू याः

कां अभ्यासाहीं लागिं। कसु नाहीं तुझां आंगिं।
तऱ्हैं आहासि जेआं भंगिं। तैसाचि अस।।१२-११४।।
इंद्रियें न कोंडीं। भोगांतैं न तोडीं।
अभिमानु न संडीं। स्वजातिचां।।११५।।
कुलधर्मु चालीं। विधिनिषेधु पालीं।
मग सुखें तूझ सगलीं। दिधलीं आहाति।।११६।।

"अर्जुना! कदाचित अभ्यास करणे तुला जमत नसेल असे जर तुझ्या मनात येत असले, तर मग तू जसा आहेस, तसाच राहा. इंद्रिये निरोधू नकोस! सुखोपभोग घेण्याचे टाकू नकोस! स्वजातीचा अभिमानही सोडू नकोस! कुळधर्म पाळत जा. पण कर्मे करतांना विहित कर्म कर आणि निषिद्ध कर्मे करू नकोस. याप्रमाणे वर्तत असतांना मिळतील ती सर्व सुखे तुझीच आहेत. ती पण यथेच्छ उपभोगत जा."

परि मनें वाचें देहें। जैसा जो व्यापारु होएं।
तो मी करितु आहें। आईसें न म्हणें।।१२-११७।।
करणें कां न करणें। हें आघवें तोचि जाणें।
विश्व चलतसें जेणें। परमात्मेनि।।११८।।
उणेयापुरेआंचें कंहिं। उरों नेदीं आपुलां ठाईं।
स्वजातिचि करूनि घेईं। जिवित हें।।११९।।

"पण एक लक्षात ठेव! मन, वाचा व देहादी यांद्वारे जो काही व्यापार घडत जाईल, तो मी करतो आहे, असे मात्र समजत जाऊ नकोस! जे काही कर्म हातून घडते आहे किंवा घडत नाही, ते सर्व काही ज्याच्या सत्तेने हे विश्व चालते, तो एक परमात्माच जाणतो! काय कर्म आपण करावे किंवा करू नये, हे केवळ त्याच्याच हातात आहे. आपण केवळ त्याच्या हातातील एक कळसूत्री बाहुले जणू आहोत, हे जाणून आपल्या हातून घडणारे कर्म पूर्णतेस जाते किंवा अपूर्ण राहते, याचे सुखदुःख मानू नकोस. अशा प्रकारे आपले जीवित तू स्वधर्माचरणास वाहून टाक."

मालिएं जेऊतें नेलें। तेऊतें निवांतचि गेलें।
तेआं पाणियाआईसें केलें। होआवें गां।।१२-१२०।।
एरविं तऱ्हैं सुभटा। उजूं कां अव्हांटा।
रथु काईं खटपटा। करितु असें।।१२१।।
म्हणौनि प्रवृत्ति आणि निवृत्ति। इयें वोझीं नेघें मति।..।।१२२।।

"माळी नेईल त्या त्या वाटेने पाटाचे पाणी जसे बिनतक्रार जाते, त्या पाण्यासारखे आपले आयुष्य व कर्म त्या परमात्म्याच्या हाती सोपवून तो वर्तवेल तसे वर्तावे! आणि हे सुवीरा! असे पहा की रथ मार्ग सरळ आहे की आपणास आडवाटेने नेले जात आहे, हे काही पाहतो का! ज्या मार्गाने सारथी त्याला चालवील, त्या मार्गाने तो जातोच ना!

आपणही त्याचप्रमाणे कर्माविषयी ते करावे, हा प्रवृत्तिपर भाव किंवा ते करू नये, असा निवृत्तिपर विचार मनातही आणू नये! प्रवृत्ती आणि निवृत्तीची ही ओझी आपल्या बुद्धीवर आपण लादूच नयेत!"

... । अखंड चित्तवृत्ति । आठविं मातें ।।१२-१२२।।
आणि जैं जैं कर्म निफजैं । तैं थोडें बहु न म्हणिजें ।
निवांतचि अर्पिजें । माझां ठाईं ।।१२३।।
आईसिआं मद्भावना । तनुत्यागिं अर्जुना ।
तूं सायुज्यसदनां । माझिआं येसिं ।।१२४।।

जे जे कर्म स्वभावेकरून जसजसे प्राप्त होईल, ते कमीअधिक, चांगलेवाईट, आवडणारे - नावडणारे, असा कोणताही विचार न करता अखंड चित्तवृत्ती माझ्याठायी ठेवून करत जावे. आणि हातून घडणारे ते सर्व कर्म मजठायी अर्पण करावे. त्याच्या फलाची आसक्ती चित्ती उरू देऊ नये. हे अर्जुना! अशा प्रकारे कर्मे करूनही ती मजप्रीत्यर्थ करीत गेल्याने तुला तनू त्यागतांना माझे सायुज्य प्राप्त होईल. माझ्या परमधामात कर्माधारे वर्तूनही तुला प्रवेश मिळेल!"

उपासनेचे मुख्य मार्गदर्शक सूत्र - गीताश्लोक क्र.१२-१२::::
फलासक्तीचा त्याग

फलासक्तीचा त्याग करणे महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट करत भगवंत पुढे म्हणतातः

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ।।१२-११।।

"आणि जर तुला मत्प्रीत्यर्थ कर्मे करण्याचा योग आचरणे अशक्य वाटत असेल, तर असे कर की आत्मसंयमपूर्वक तू सर्व प्रकारच्या कर्मफलांचा त्याग कर."

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ।।१२-१२।।

"साधनामार्ग हा खरे तर असा आहे की ***अभ्यास*** हा याचा पाया आहे. त्यातून ***ज्ञान*** उदय पावते. ज्ञानाद्वारे ***ध्यान*** घडते. **ध्यानाद्वारे जेव्हा *सर्वभावाधिष्ठातृत्व* होते, तेव्हा कर्म दुरावते व कर्मफलत्याग संभवतो. त्यापासून शांती प्राप्त होते."**

श्लोक क्र.१२-१२वर थोडे विवेचन

या श्लोकाबाबत *(१२-१२)* सविस्तर विचार करत असता ***"अभ्यास –➤ ज्ञान –➤ ध्यान –➤ कर्मफलत्याग –➤ शांति"*** असा हा साधनाक्रम असल्याचे आपण पाहिले आहे *(उन्मेषः१४:दैवी संपदा,पृ.क्र.२१६ ते २१९)*. त्यावेळी आपल्या असेही निदर्शनास आले होते की या गीताश्लोकावरील म्हणून ज्या ओव्या काही ग्रंथकार घेतात, त्यांवरून या श्लोकाचा अर्थ ज्ञानेशांद्वारे नीट स्पष्ट होत नाही, असे वाटते.

याला कारण म्हणजे ज्ञानेशांच्या ***"अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान । ...." ते "... शांतिचां माजिवठा । ठाकिलां जेणें ।।१२-१४१ ते १४३।।"*** अशा ओव्या या श्लोकावर असल्याचे बहुसंख्य ज्ञानेश्वरीच्या प्रतीत दिसून येते. याला श्री.कुंटे यांची ज्ञानेश्वरी पण अपवाद नाही. खरे तर कुंटेप्रतीत गीताश्लोक पदांनुसार ओव्यांचे भाग स्पष्ट केले आहेत. तरीही तेथे असाच प्रकार आहे.

श्लोक क्र.१२-१२वरील समर्पक अर्थानुवाही ओव्या

पण खरी वस्तुस्थिती अशी आहे की ***"श्रेयो हि ... ।।१२-१२।।"*** या श्लोकानुसारी म्हणून ***"पैं अभ्यासाचि पाउटी । करूनि ठाकिजें किरीटी । ... " ते शांतिचां माजिवठा । ठाकिलां जेणें ।।१२-१३७ ते १४३।।"*** या सगळ्याच ओव्या धरल्या पाहिजेत. अशा प्रकारेच *श्री.केळकर-मंगरूळकर* यांच्या ज्ञानेश्वरीप्रतीतही ओव्या दिलेल्या दिसून येतात. आपल्या पूर्वपरीक्षणाच्या आधारेही *(उन्मेषः१४:दैवी संपदा पृ.क्र.२१६ ते २१९)* याच ओव्या *१२-१२* या गीताश्लोकाचा खरा अर्थ प्रकट करतांना दिसून आलेल्या आहेत. याप्रमाणे ओव्यांचा उचित क्रम-स्थलनिर्देश *१२-१२* या श्लोकासाठी घेतला की श्लोकार्थनिर्णयाचे सर्व चित्र अगदी स्पष्ट होते.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर ज्ञानेश्वरांच्या अलौकिक प्रतिभेबाबतचा आपला आदर द्विगुणितच काय, तर शतगुणितही होतो! विद्वान, पंडित, भाष्यकार इ.ना ***"श्रेयो हि ज्ञान ... ।।१२-१२।।"*** या गीताश्लोकाचा न उमगलेला अर्थ किती सहजपणे ज्ञानेश सूचित करतात, ते पाहून आपण विस्मित होतो!! श्लोकावरील ओव्या देण्यात काहींनी जी अनवधानाने चूक केली आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाचा विपर्यास आणि ज्ञानेशांच्या निर्देशाबाबत जो संदेह निर्माण झाला होता, तो असा दूर केल्यावर श्लोकार्थ स्पष्ट सूर्यप्रकाशाप्रमणे प्रकट होतो आणि विद्वरांस न उलगडलेले कोडे आपणांसारख्या सामान्य जिज्ञासूंनाही उलगडते!

यामागे अर्थातच माऊली श्रीज्ञानदेवांची आपल्या ज्ञानेश्वरी उमजून घेण्यामागल्या तळमळीमुळे प्रकटणारी कृपाच आहे, हे निर्विवादच आहे! आम्हा बालकांना त्यांचे असेच सततचे मार्गदर्शन आणि कृपा लाभावी, अशी त्यांची प्रार्थना करत अखंड त्यांच्या चरणी विनम्र राहू या! त्यांच्या ज्ञानेश्वरीचा खरा प्रकाश आपल्या मन-बुद्धी-चित्तात प्रकटावा म्हणून त्यांच्या चरणी लीन होऊन राहू या!

खरे तर विद्वानांनी दिलेल्या ओव्या ओलांडून या *१२-१२* गीताश्लोकाचा जो चपखल अर्थ आपण पूर्वी केला, तो ज्ञानेश्वरमाउलीच्याच प्रेरणेनुसार असला पाहिजे! त्या अंतःस्थ प्रेरणेचा नंदादीप सतत तेवत ठेवू या आणि पुढील भागाकडे वळू या!! त्यासाठी ज्ञानेश्वरांकडे त्यांच्या कृपामृताचे पसायदान मागू या!

उपासनाकांडाची समाप्ती

गीतेचा हा *१२-१२* श्लोक तसा दुसऱ्याही दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. अठराव्या अध्यायात ज्ञानेशांनी गीतेतील कांडे स्पष्ट केली आहेत*(१८-१४३० ते १४५६)*. त्या प्रसंगी चवथा ते बारावा अध्याय म्हणजे ***देवताकांड*** म्हणजेच ***उपासनाकांड*** असल्याचे ते सांगतात. ***"अद्वेष्टादिप्रभृतिकीं । ..।।१८-१४४७।।"*** या ओवीनुसार

"अद्वेष्टा सर्वभूतानां ... ।।१२-१३।।" या श्लोकापासून ***ज्ञानकांड***निरूपणास सुरुवात होते, असे त्यांचे म्हणणे दिसते.

तदनुसार ***देवताकांड*** म्हणजे ***उपासनाकांड*** गीतेच्या बाराव्या अध्यायाच्या ***"श्रेयो हि ज्ञान ...।।१२-१२।।"*** या श्लोकांती पूर्ण होते. गीतेच्या उपासनाकांडाच्या अंती असणारा हा श्लोक म्हणूनच अत्यंत महत्त्वाचा समजला पाहिजे. उपासनेचे सार त्यात ग्रथित झालेले आहे. ***"अभ्यास –➢ ज्ञान –➢ ध्यान –➢कर्मफलत्याग –➢शांति"*** असा उपासनामार्ग त्यात दिसून येतो.

गीतेतील उपासना कशी आहे, ते हाच श्लोक प्रमाणित करतो. तसेच ***शांतिप्राप्ति*** हे त्या मार्गाचे गंतव्य असल्याचेही याच श्लोकातून सूचित होते. शांतीचे विविध अर्थ आणि *श्लोक क्र.१२-१२* मध्ये लागू होणारा अर्थ याचे विवेचन आपण पूर्वीच पाहिलेले आहे *(उन्मेष:१४:दैवी संपदा,पृ.क्र.२१६ ते २१९)*.

गीतेने *कर्मयोग* सांगितला आहे की *ज्ञानयोग*; अथवा *ध्यानयोग* सांगितला आहे की ***भक्तियोग; कर्मसंन्यासयोग*** सांगितला आहे की ***ज्ञानकर्मसंन्यासयोग; पुरुषोत्तमयोग*** गीता प्रतिपादते की इतर अनेकानेक योगप्रकार गीतेस अभिप्रेत आहेत, या सर्व वादविषयांचा निचरा अशा प्रकारे गीतेचा ***"श्रेयो हि ज्ञान ...।।१२-१२।।"*** हा श्लोक करतो. उपासनाकांडाच्या अंती असणारा हा श्लोक असाच असला पाहिजे व त्याचे गीताभ्यासकांसाठी असाधारण महत्त्व आहे, ते याचसाठी! असो.

"ॐ तत् सत्"

एवढी चर्चा केल्यानंतर वरील श्लोकांशी संबंधित ओव्यांकडे वळणे क्रमप्राप्त ठरते. ज्ञानेश म्हणतात:

ना तऱ्हैं हेंही तूझ। नेदवें कर्म मज।
तऱ्हें गां तूं भज। पांडुकुमरा।।१२-१२५।।
बुद्धिचां पाठीं पोटीं। कर्माआदिं कां सेंवटीं।
मातें बांधणे किरीटी। दुवाड जऱ्हैं।।१२६।।
तऱ्हें हेहीं असो। सांडीं माझा अतिसो।...।।१२७।।

श्रीकृष्ण अर्जुनाला पुढे सांगतात: "आणि जर समजा तुला कर्म मजठायी अर्पण करणे जमत नसेल, तर तेही राहू दे! तू असे कर की माझी ***भक्ती*** करत जा! ***कर्मास प्रवृत्त करणारी बुद्धी जी असते, त्या बुद्धीच्या पाठीस व पोटासही मला बांधत जा!*** संकल्प उद्भवतो आणि कार्यारंभ होतो. **संकल्पावेळी ईश्वरस्मरण करावे. कर्मारंभी तसेच अंतीही ईश्वरस्मरण करावे. *"ॐ तत् सत्"* या त्रिविध ब्रह्मनाममंत्राची अशी ही उपासना आहे. कर्म ब्रह्मार्पण करण्याची युक्ती आहे."**

गीतेच्या सतराव्या अध्यायी ***"ॐ तत् सत्"*** या ब्रह्मनामाने सिद्ध करावयाची कर्मोपासना येते. याच भक्तीचा येथे श्रीकृष्णमुखे उल्लेख केलेला आहे. त्या उपासनेचे यथोचित दर्शन आपण मागे *सतरावा* अध्याय अभ्यासतांना घेतलेले आहेच *(उन्मेष:३३:स्वधर्मकर्तव्य, पृ.क्र.५१६ ते ५२१)*.

"ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।" असा त्या उपासनेचा आदिमंत्र आहे.

कर्म ब्रह्मच आहे, अशी समताबुद्धी धारण करून अर्पण करावयाचे कर्म ब्रह्म, ज्याला अर्पण करतो ते ब्रह्म, स्वतः कर्ताही ब्रह्मच अशा बुद्धीने करावयाची ही क्रिया आहे. या क्रियेचाच वरील ओवीत *(१२-१२५मध्ये)* ***भक्ती*** असा अर्थ आहे. ही भक्तीची रीतच भगवंत सांगत आहेत.

फलत्यागाची युक्ती

अर्जुनास तीही जर जमणार नसेल, तर पुढे ते सांगतात की:

...। परि संयतिसिं वसो। बुद्धि तुझिं।।१२-१२७।।
आणि जेणें जेणें हेलें। घडति कर्मे सकलें।
तेआंचि तिएं फलें। त्याजितु जाएं।।१२८।।
वृक्षु कां वेली। लोटति फलें आलीं।
तैसिं सांडीं निफजलीं। कर्मे सिद्धें।।१२९।।

"अर्जुना!जर हेसुद्धा तुला अवघड वाटत असेल, तर तेही राहू दे! माझे स्मरणसुद्धा करत जाऊ नकोस! माझा ध्यास घेणे नकोच! त्याऐवजी तू आपली बुद्धी आत्मसंयमाठायी नित्य वसव! इंद्रियांवर नियंत्रण ठेव आणि मग जी काही कर्मे जेव्हा केव्हा त्यांद्वारे घडतील, त्यांची फळे तू त्यागत जा! वृक्षवेली जसा आपला फलसंभार सहजगत्या टाकून देतात, त्याचप्रमाणे तूही प्राप्त झालेली व केलेली सर्व कर्मे त्यांच्या फलांसह टाकून देत जा!"

परि मातें मनिं धरावें। कां मजउद्देशें करावें।
हें काहिं नको आघवें। जाऊं दे शून्यीं।।१२-१३०।।
खडकीं जैसें वरुषलें। कां आगिंमाझिं पेरिलें।
कर्म मानिं देखिलें। स्वप्न जैसें।।१३१।।
अगां आत्मजेचां विखीं। जीवु जैसा निरभिलाखि।
तैसा कर्मिं अशेखिं। निष्कामु होईं।।१३२।।
वह्निचिं ज्वाला जैसिं। वायां जाएं आकासिं।
क्रिया जिरों दे तैसिं। शून्यामाजिं।।१३३।।

"ही कर्मे आरंभतांना अथवा करतांना माझे स्मरण करणेसुद्धा नकोच! ती मत्प्रीत्यर्थ करणेसुद्धा नको! त्यांचे फलही मला अर्पण करावे, हेही नको! तर हे सगळे शून्यात विरून जाऊ दे! खडकावर वृष्टी झाली, तरी त्यावरील बीज कधी अंकुरते का! अग्निज्वाळांत पेरलेले बी कधी उगवते का! स्वप्नी करावे, तसे तू कर्म केल्याचे मानत जा! स्वप्नींच्या कर्माचे कर्तृत्व कोणाकडे जाते का! आणि त्या कर्माचे फल ते काय असते आणि कोण ते उपभोगू शकणार, सांग बरे! आपल्या कन्येविषयी जीवास कधी विषयवासना असते का! अग्नीची ज्वाला आकाशात पसरून जशी निष्प्रभ होऊन जाते; तिचे दाहकत्व जसे हवेत विरून जाते, त्याचप्रमाणे तूही आपले कर्म शून्यात जिरवून टाक!"

अर्जुना हा फलत्यागु। आवडे किर असलगु।
परि योगामाझिं योगु। धुरेचा हा।।१२-१३४।।
एणें फलत्यागें सांडें। तैं तै कर्म न विरूढें।
एकेंचि हेलीं वेलुझाडें। वांझें जैसिं।।१३५।।
तैसें एणेंचि शरीरें। शरीरां एणें सरें।
किंबहुना येरझारें। चिरा पडें।।१३६।।

"अर्जुना! असा हा कर्मफलत्याग तू आचरत जा! दिसायला हा सोपा वाटतो. पण योगांत हा योग श्रेष्ठ आहे. या फलत्यागाने जे जे कर्म सांडले जाते, त्यास बीज येत नाही. एकदा व्यालेले वेळूचे झाड जसे नंतर सदासर्वदा वांझच राहते, तसे त्या कर्मांचे होते. याच शरीराने हे साधन केले जाते आणि जन्ममरणाचा फेरा चुकतो! पुनः देह धारण केला जात नाही. म्हणून हे साधन अति श्रेष्ठ आहे."

श्लोक क्र.१२-१२::::

उपासनेचे अंतिम सूत्र

अशा प्रकारे भगवंत अर्जुनास उपासना कशी करावी ते विविधरीत्या समजावून सांगतात. त्यावरून **सगुण उपासना व निर्गुण उपासना असे उपासनेचे दोन प्रमुख प्रकार असल्याचे दिसून येते. एका प्रकारात ईश्वराचे अधिष्ठान घेतले जाते, ती सगुण उपासना. दुसरा प्रकार शून्याच्या उपासनेचा आहे. ती आहे निर्गुण उपासना!** या दोन्ही प्रकारच्या उपासनामार्गांच्या काठिण्य व सुलभता यांविषयीची चर्चा बाराव्या अध्यायारंभी ***व्यक्तोपासक*** आणि ***अव्यक्तोपासक*** यांसंबंधी अर्जुनाने केलेल्या ***"एवं सततयुयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते। ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ।।१२-१।।"*** या प्रश्नानिमित्त झालेलीच आहे.

या सर्व उपासनामार्गांचे अंतिम सूत्र म्हणजे ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्याग-स्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।"*** हा श्लोक! त्यावरील ज्ञानेश्वरांच्या ओव्यांकडे आपण आता वळू याः

पैं अभ्यासाचां पाउटीं। ठाकिजैं ज्ञान किरीटी।
ज्ञानें येईजें भेंटीं। ध्यानाचिएं।।१२-१३७।।
मग ध्यानासि खेंव। देति आघवेंचिं भाव।
तेधवां कर्मजात सर्व। दूरी ठाकें।।१३८।।
कर्म जेथ दुरावें। तैथ फलत्यागु संभवें।
त्यागास्तव आंगवें। शांति सगलीं।।१३९।।

श्रीकृष्ण म्हणतातः "हे सुभद्रापती! ऐक! साधनाक्रम कसा आहे तो! प्रथम ***अभ्यास*** करावा. अभ्यासाची पायरी करून ***ज्ञानशक्ती*** प्राप्त करून घ्यावी! त्या ज्ञानशक्तिद्वारे ***ध्यान*** करावे. ध्यान सिद्ध झाले की **सर्वभावाधिष्ठातृत्व** प्राप्त होते. ध्यानाद्वारे जेव्हा सर्व भावांस आलिंगता येऊ लागते, तेव्हा कर्म दुरावते. ***कर्म घडत असले तरी कर्तृत्वाभिमान उरत नाही. हेच कर्माचे दुरावणे होय.*** असे झाले की आपसुकच सहजपणे ***फलत्याग*** घडून येतो. खरा कर्मफलत्याग तो हाच! हा घडून आला की ***शांती*** आपलीशी होते. ***ब्रह्माचेच दुसरे नांव म्हणजे ही शांती!"***

म्हणौनि यावया शांति। हाचि अनुक्रमु सुभद्रापति।
अभ्यासुचि प्रस्तुतिं। करणें एथ।।१२-१४०।।
अभ्यासाहूनि गहन। पार्था मग ज्ञान।
ज्ञानापासौनि ध्यान। विशेषिजे।।१४१।।
मग कर्मफलत्यागु। तो ध्यानापासौनि चांगु।
त्यागाहूनि भोगु। शांतिसुखाचा।।१४२।।
आईसिआं ययां वाटां। इहिंचिं पेणें सुभटा।
शांतिचां माजिवठा। ठाकिला जेणें।।१४३।।

"म्हणून ब्रह्मप्राप्तीसाठी-***शांती*** मिळवण्यासाठी हाच साधनानुक्रम पाळला पाहिजे. ***"अभ्यास –➤ज्ञान–➤ध्यान–➤कर्मफलत्याग –➤शांति"*** असा हा ***क्रममार्ग*** आहे. म्हणून या सर्वारंभी अभ्यासच प्रमुख आहे. कारण अभ्यासाद्वारे गूढ अशा **ज्ञानशक्तीची *(कुंडलीनीची)* जागृती** होते. त्यानंतर **जागृत ज्ञानशक्तियोगे खरे ध्यान सिद्ध होते. विशिष्ट असे जे ते ध्यान असते, त्यापासून सर्वश्रेष्ठ प्रतीचा कर्मफलत्याग संपन्न होतो. त्या खऱ्याखुऱ्या उत्तम त्यागामुळे शांतिसुख उपभोगायला मिळते. ब्रह्मानंद प्राप्त होतो.** याच साधनाक्रममार्गाने आणि ***"अभ्यास –➤ज्ञान–➤ ध्यान –➤ कर्मफलत्याग –➤शांति"*** असे टप्पे आक्रमत जाऊन साधकांचे सिद्ध होतात आणि शांतीचे मूळ ठिकाण गवसते. ब्रह्मप्राप्ती होते."

साधनेचा हा जो क्रम आपण *गीताश्लोक क्र.१२-१२* निमित्त अभ्यासला, तो पंथराजक्रमाशी अभिन्न आहे. तसेच पातञ्जलयोगसूत्रांचा जो अभ्यास आपण त्यानिमित्त केला होता, त्या अष्टांगयोगमार्गाशी साधर्म्य असणारा असाच आहे. विवेक-वैराग्यप्राप्तीसाठी इंद्रियसंयमादी अभ्यास, त्यासाठी निष्काम कर्माचरण, स्वाध्याय, चित्तशुद्धीचे उपाय, यमनियमादींचे पालन, अशा अनेक गोष्टी मूलभूत आहेत. ***अभ्यास*** या व्यापक संज्ञेत त्यांचा अंतर्भाव होतो.

या अभ्यासाने हळूहळू ज्ञानशक्ती जागृत होऊ लागते. हीच ***कुंडलिनीशक्ती*** होय. ही जागृत झाली असता ध्यान होऊ लागते. हेच खरे ध्यान. इतर ध्यानकृती या केवळ आण्विक उपायांतील होत. ***धारणा-ध्यान, समाधि व संयम अशी त्या ध्यानाची विशेष अंगे होत.*** पातञ्जलसूत्रात वर्णिल्याप्रमाणे यातून ***धर्ममेघादी समाधि*** सिद्ध होतात. यातूनच कर्म दुरावणे संभवते. **खरा कर्मफलत्याग हा *निर्बीज समाधि* वा *असंप्रज्ञात समाधि* वा *संजीवन समाधि* प्राप्त होताच घडून येतो. अन्यथा तो असंभव आहे.** त्यापाठोपाठ ***कैवल्य*** वा ***शांति*** अथवा ***ब्रह्म*** ही प्राप्त होतात. **अद्वैतसिद्धी होते. असा हा मार्ग आहे. हाच खरा साधनाक्रम आहे.**

ध्यानाच्या टप्प्यावरच पातञ्जल योगसूत्र *क्र. ३-४९* मधील *"सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं सर्वज्ञातृत्वंच ।।"* अशी *सर्वभावाधिष्ठातृत्व व सर्वज्ञातृत्व* ही भूमिका प्राप्त होते.

याच भूमिकेचा उल्लेख ज्ञानेशांच्या ***"मग ध्यानासिं खेंव। देति आघवेंचि भाव..।।१२-१३८।।"*** या ओवीत आलेला असला पाहिजे! त्याबाबत अधिक विचार नंतर करू या.

ज्ञानेश्वरीच्या आधारे ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ...।।१२-१२।।"*** हा श्लोक आपण अभ्यासला आहे. या श्लोकावरील वक्तव्य पूर्ण करण्यापूर्वी विषयाच्या पूर्णतेसाठी काही इतर मान्यवरांनी या श्लोकाच्या केलेल्या अर्थाकडे अंगुलिनिर्देश करणे क्रमप्राप्तच आहे. म्हणून तिकडे वळू या.

आदरणीय श्री.लो.टिळकांचे मत

प्रथम लोकमान्य टिळकांचे मत पाहू या. **गीतारहस्या**त वरील श्लोकाच्या भाषांतरप्रसंगी ते म्हणतात की: ***"मदर्थ*** ही कर्मे केल्यानेही तू सिद्धी पावशील. पण हे करण्यासही जर तू असमर्थ असशील, तर मद्योग म्हणजे मदर्पणपूर्वक जो योग, अर्थात ***कर्मयोग*** त्याचा आश्रय करून ***यतात्मा*** म्हणजे हळूहळू चित्त आवरीत होत्साता तदनंतर *(अखेर)* सर्व कर्माच्या फलाचा त्याग कर. कारण **अभ्यासापेक्षा ज्ञान अधिक चांगले, ज्ञानापेक्षा ध्यान अधिक योग्यतेचे, ध्यानापेक्षा कर्मफलाचा त्याग *(श्रेष्ठ)* आणि *(या कर्मफलाच्या)* त्यागापासून पुढे लगेच शांती *(प्राप्त)* होत्ये."**

स्व.श्री.लो.टिळक यांच्या मते *गीता श्लोक क्र.९ ते १२* - ***"अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम्। ..."*** ते ***"... त्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।"*** हे श्लोक कर्मयोगदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहेत; व त्यात भक्तियुक्त कर्मयोग सिद्ध होण्यास अभ्यास, ज्ञानभजनादी साधने सांगून या व इतर साधनांच्या तारतम्य विचारांती अखेर म्हणजे *१२व्या* श्लोकात कर्मफलत्यागाचे म्हणजे निष्कामकर्मयोगाचे श्रेष्ठत्व वर्णिले आहे.

त्यांच्या मते गीतेत **निष्काम कर्मयोग**च प्रतिपाद्य आहे असे मानले म्हणजे या श्लोकांच्या अर्थाबद्दल काहीच अडचण राहत नाही. निष्काम कर्मयोग याप्रमाणे श्रेष्ठ ठरल्यावर त्यात अवश्य लागणारी भक्तियुक्त साम्यबुद्धी संपादन करण्यास उपाय काय, एवढाच काय तो प्रश्न शिल्लक राहतो.

हे उपाय तीन आहेत. ***अभ्यास, ज्ञान व ध्यान.*** पैकी कोणाला अभ्यास करवत नसेल तर त्याने ज्ञान किंवा ध्यान यांपैकी कोणताही उपाय स्वीकारावा. हे उपाय आचरण्यास यथोक्त क्रमाने सुलभ आहेत, असे गीता सांगत असल्याचे लो.टिळक म्हणतात. पण हेही न साधले तर मनुष्याने कर्मयोगाच्या आचरणासच एकदम सुरुवात करावी, म्हणजे झाले, असे या बाराव्या गीताश्लोकात सांगितल्याचे लो.टिळकांचे मत आहे.

ते असेही म्हणतात की बाराव्या श्लोकात ***सर्वकर्मफलत्याग*** **एकदम कर असे म्हटलेले नाही,** तर भगवंतांनी वर्णिलेल्या कर्मयोगाचा प्रथम आश्रय करून ततः तदनंतर हळूहळू ही गोष्ट अखेर सिद्ध करून घ्यावयाची आहे; असा अर्थ केला म्हणजे काहीच विसंगती राहत नाही, असे ते म्हणतात. लो.टिळक या श्लोकाचा *(१२-१२)* आधार घेऊन म्हणतात की, "सारांश ***कर्मफलत्यागरूपी योगच म्हणजे ज्ञानभक्तियुक्त निष्काम कर्मयोगच*** सर्व मार्गात श्रेष्ठ असे भगवद्गीतेचे ठाम मत असून त्याला अनुकूलच नव्हे, तर पोषक युक्तिवाद बाराव्या श्लोकात आहे."

लो. टिळकांना अशा प्रकारे या श्लोकातून ***कर्मयोगाचा संदेश*** मिळतो. त्याच्या आचरणापुढे ***अभ्यास, ज्ञान व ध्यान*** हे उपाय गौण ठरतात. सर्वोत्तम उपाय म्हणजे ***कर्मयोग*** - हे साधन आचरणेच योग्य असे त्यांचे मत असल्याने, अभ्यासादी उपायांचे परस्परश्रेष्ठत्व चर्चिणे किंवा १२-१२ या गीताश्लोकाचा तात्त्विक वा योगमार्गिय उहापोह करणे महत्त्वाचे नाही, अशा दृष्टीने त्यांनी वर सांगितलेला अर्थ दिसतो. *त्यांनीही गीताश्लोकातील* ***अभ्यास, ज्ञान, ध्यान व कर्मफलत्याग*** *यांना उत्तरोत्तर क्रमाने सुलभत्व आणि श्रेष्ठत्व असल्याचे प्रतिपादन केले आहे,* याची जिज्ञासूंनी नोंद घ्यावी.

शाङ्करभाष्य

तदनंतर आपण ***शांकरभाष्य*** काय म्हणते, ते पाहू या. श्रीमच्छंकराचार्य *गीता श्लोक १२-८ ते १२-१२* यांवर असे म्हणतात की "जर चित्त परमात्म्याठायी अचलरीत्या स्थापन करणे जमत नसेल, तर अभ्यासयोगाद्वारे विश्वरूप अशा परमेश्वरास प्राप्त करून घेण्याची इच्छा ठेवावी."

अभ्यास म्हणजे काय ते सांगतांना आचार्य म्हणतात: ***"चित्तस्य एकस्मिन आलम्बने सर्वतः समाहृत्य पुनः पुनः स्थापनम् अभ्यासः तत्पूर्वको योगः समाधानलक्षणः तेन अभ्यासयोगेन मां विश्वरूपम् ... प्राप्तुं ..."*** - **चित्ताला सगळीकडून ओढून आणून वारंवार एकाच आलंबनावर लावण्यास *अभ्यास* असे म्हणतात.** अशा अभ्यासाने साध्य करावयाचा समाधानरूप जो योग तो ***अभ्यासयोग*** होय.

असा अभ्यास करण्यास साधक जर असमर्थ असेल, तर त्याने **परमेश्वराप्रीत्यर्थ कर्म करण्यात तत्पर असावे.** ***"मदर्थं कर्म तत्परमो मत्कर्मप्रधानः इत्यर्थः"*** असा अर्थ ते देतात. ***"मदर्थ कर्म म्हणजेच मत्कर्म*** - त्यात तत्पर असणे म्हणजे परमेश्वराप्रीत्यर्थ कर्म करण्यासच प्रमुख समजणे."

आचार्य म्हणतात की अभ्यासाविनासुद्धा असे कर्म करत साधकास अंतःकरणशुद्धी, योग आणि ज्ञान यांची प्राप्ती होऊन त्यांद्वारे परमसिद्धी प्राप्त होते. परमेश्वराप्रीत्यर्थ कर्मे करण्यास जर साधक असमर्थ असेल, तर ***"मद्योगम् आश्रितो मयि क्रियमाणानि कर्माणि सन्न्यस्य यत्करणं तेषाम् अनुष्ठानं स मद्योगः तम् आश्रितः सन् सर्वकर्मफलत्यागं सर्वेषां कर्माणां फलसन्न्यासं सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् संयतचित्तः सन् इत्यर्थः।"*** असा *गीता श्लोक क्र.१२-११* चा अर्थ करत आचार्य म्हणतात.

मद्योग म्हणजे केली जाणारी सर्व कर्मे परमेश्वरास समर्पण करण्याचे अनुष्ठान होय. या अनुष्ठानाचा आश्रय साधकाने करावा

आणि ***संयतात्मा (यतात्मवान्)*** म्हणजे वशीभूत चित्ताचा होऊन समस्त कर्मांच्या फलांचा त्याने त्याग करावा.

गीता श्लोक १२-१२ ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासा..."*** याकडे वळत आचार्य म्हणतात की ***"इदानीं सर्वकर्मफलत्यागं स्तौति ..."*** म्हणजे आता भगवंत सर्व कर्मांच्या फलत्यागाची स्तुती करत म्हणतात की **"निःसंदेह *ज्ञान* श्रेष्ठतर आहे. अविवेकपूर्वक केलेल्या अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे. त्या ज्ञानापेक्षा ज्ञानपूर्वक *ध्यान* विशेष आहे आणि तसेच ज्ञानयुक्त ध्यानापेक्षा *कर्मफलत्याग* विशेष आहे. अशा कर्मफलत्यागी पुरुषास त्वरित शांती प्राप्त होते; हेतुसह संसाराचा उपशम तत्काल घडून येतो."** असा अर्थ श्रीशंकराचार्य करत आहेत.

पण **त्यांच्या मते सर्वकर्मफलत्याग हे कल्याणसाधन *अभ्यास, ज्ञान व ध्यान* यांपेक्षा निकृष्ट प्रतीचे असून कर्मप्रिय अज्ञानी जनांच्या उद्धारासाठी उगीचच चढवून वाढवून सांगितले आहे.** अज्ञानी कर्ममार्गी जन ***ध्यान, ज्ञान व अभ्यास*** ही श्रेष्ठ साधने करू शकत नसल्यास त्यांनी पहिल्या पायरीवरचे कर्मफलत्यागाचे साधन करावे. अशा प्रकारे **"कर्मफलत्याग–➢ ध्यान–➢ ज्ञान –➢ अभ्यास"**ही एकापेक्षा एक श्रेष्ठ असल्याचा ध्वन्यर्थ शांकरभाष्यातून मिळतो. सर्वसामान्य गीताटीकाकारांपेक्षा अगदी उलट्या श्रेणीचा हा अर्थ वाटतो. तसेच **लो.टिळक ज्यास गौरवतात तो *कर्मफलत्याग* आचार्यांस अज्ञान्यांची पहिली प्रारंभिक साधना वाटते.** असो.

आता काही अलीकडील विद्वानांनी या श्लोकाचा कसा अर्थ घेतला आहे, ते पाहू या:

श्री.के.वि.बेलसरे यांचे मत

श्री.के.वि.बेलसरे आपल्या ***श्रीमद्भगवद्गीता - मनाला उन्मन करणारी राजविद्या*** या ग्रंथात या श्लोकाचा अर्थ देतात, तो असा: ***"अभ्यासात्"*** **- मनाला वारंवार आवरून धरून माझ्याच ठिकाणी ते स्थिर करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अभ्यास."** अर्थात अशा अभ्यासाहून ***ज्ञान*** अधिक प्रशंसनीय आहे, हे तर प्रसिद्धच आहे. पण त्या ज्ञानाहूनही ज्ञानासह केलेले ध्यान अधिक चांगले आणि त्या तसल्या ध्यानाहूनही ध्यानयुक्त कर्मांच्या फलांचा त्याग अधिक चांगला आहे. कारण कर्मफलांचा त्याग केल्याने परमशांती मिळते.

याप्रमाणे त्यांच्या मते येथे ***"अभ्यास –➢ ज्ञान –➢ ज्ञानयुक्त ध्यान –➢ध्यानयुक्त कर्मफलत्याग "*** अशा चार एकापेक्षा एक श्रेष्ठ अशा साधनांचा हा श्लोक अंतर्भाव करतांना दिसतो.

श्री. दांडेकरांचा अर्थ

श्री.शं.वा.तथा मामासाहेब दांडेकर आपल्या ज्ञानेश्वरीत या श्लोकाचा असा अर्थ देतात: "अभ्यासापेक्षा ज्ञान गहन आहे, ज्ञानापेक्षा ध्यान श्रेष्ठ आहे, ध्यानापेक्षा कर्मफलत्याग अधिक बरा आणि कर्मफलत्यागापेक्षाही शांति श्रेष्ठ आहे."

पं.श्री.वि.दा.सातवळेकर यांचे मत

महर्षि पं.वि.दा.सातवळेकर आपल्या गीतेवरील***पुरुषार्थबोधिनी*** या टीकाग्रंथात उपरोक्त श्लोकाचा काय अर्थ सांगतात, पहाः "अभ्यासयोगापेक्षा ज्ञानयोग अधिक श्रेयस्कर आहे. ज्ञानयोगापेक्षा ध्यानयोग अधिक श्रेयस्कर आहे. ध्यानयोगापेक्षा कर्मफलत्यागाची विशेषता अधिक आहे व शेवटी या कर्मफलत्यागाने लवकरच शांती प्राप्त होते."

अभ्यासयोगापेक्षा ज्ञानयोग, त्यापेक्षा ध्यानयोगाची विशेषता आणि त्यापेक्षाही कर्मफलत्याग हे उत्तरोत्तर विशेष आहेत. शेवटी कर्मफलत्यागानेच तत्काल शांती प्राप्त होते, असे त्यांचे मत दिसते. त्यांच्या म्हणण्यानुसार ***"ये तु सर्वाणि कर्माणि मयि ... ।।१२-६।।"*** या गीताश्लोकात ***अनन्ययोग*** करण्याचा उपदेश केलेला असून ***"मय्येव मन आधत्स्व ...।।१२-८।।"*** या श्लोकापर्यंत अनन्ययोगाचे विवरण येते. ज्याच्याकडून हा ***अनन्ययोग*** होणे शक्य नाही, त्यांनी वारंवार अभ्यास करून सिद्धी प्राप्त करावी, असे नवव्या श्लोकात सांगितले असल्याने, अर्थातच अनन्ययोगापेक्षा हा अभ्यास सुगम असलाच पाहिजे, असे ते म्हणतात.

पुढे पं.वि.दा.सातवळेकर म्हणतात की "या अभ्यासयोगापेक्षा ज्ञानयोग आणि ज्ञानयोगापेक्षा ध्यानयोग श्रेयस्कर आहे, यात संशय नाही. हा ज्ञानयोग दुसऱ्या अध्यायात सर्वांआधी सांगितला आहे. ध्यानयोगाचे थोडेसे वर्णन सहाव्या अध्यायात आले आहे आणि याचाच निर्देश बाराव्या अध्यायातील आठव्या श्लोकात***"मन आणि बुद्धी परमात्म्याठायी लावण्याचा उपदेश करून"*** केला आहे."

"ज्यांच्याकडून हे योग होऊ शकत नाहीत, त्यांनी सर्वकर्मफलत्याग करावा असे अकराव्या श्लोकात सांगितले आहे. या कर्मफलत्यागाची विशेषता ही की तो सर्वांहून सुगम आणि सर्वांहून अधिक परिणामकारक आहे. ***कर्मफलत्याग*** केला नाही तर कोणताही अन्य योग सफल आणि सुफल होत नाही. हा ***कर्मफलत्यागयोग*** सर्वांहून सुगम आणि सर्व इतर योगांशी संबंध राखणाराही आहे. याच्या योगानेच सर्व अन्य योगांची सफलता होते; म्हणून सुगमता आणि सर्व योगांच्या दृष्टीने उपयोगिता असल्याने कर्मफलत्यागाचे महत्त्व सर्वात विशेष आहे."

"कर्मफलत्यागानेच खरी शांती प्राप्त होते. फलत्यागावाचून शांती मिळत नाही. याप्रमाणे **कर्मफलत्याग, कर्मफलदान*(भगवंताप्रति)* व कर्मफलसंन्यास** यांचे महत्त्व आहे." हे ओळखून सर्व साधकांनी कर्मफलत्याग करून शांती मिळवावी, असे पं.सातवळेकर म्हणतात.

कर्म दुरावणे व त्यातून कर्मफलत्याग घडून येणे, अशी जी साधनाश्रेणी ज्ञानेशांनी आपल्या या श्लोकावरील ओव्यांतून सांगितली आहे, त्यापेक्षा श्री.सातवळेकर वेगळेच सांगतांना दिसत आहेत. ज्ञानेश अभ्यासास प्रथम पायरी समजून***"अभ्यास –➢ज्ञान –➢ध्यान –➢कर्मफलत्याग"*** अशा पायऱ्यापायऱ्यांचा योगसोपान वर्णितात.

पण आपण आतापावेतो ज्या मान्यवरांची मते पाहिली, त्यातील प्रत्येक जण या चारहींचा अंतर्भाव वेवेगळ्या पृथक (exclusive) अशा साधनश्रेणीत करतांना दिसून येतात. असो.

श्री.बाबाजीमहाराज पंडित यांचे मत

वेदांतकेसरी श्री.बाबाजीमहाराज पंडित आपल्या ***श्रीज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका*** या ग्रंथात सदर श्लोकाचा काय अर्थ देतात, तोही पहा: ***"अभ्यासापासून लाभदायक अशी आत्मज्ञानाची प्राप्ती होते. आत्मज्ञानापासून विशेष अशी ध्यानाची प्राप्ती होते. ध्यानाने कर्मफलत्याग होऊन, कर्मफलत्यागानंतर शांती प्राप्त होते."***

"मन, इंद्रिये यांचा निरोध करून कर्मफलत्याग करण्याचा जो अभ्यास, त्या अभ्यासाच्या पायरीने आत्मज्ञान प्राप्त करून, पुढे आत्मज्ञानाच्या द्वारे ध्यानाच्या भूमिकेची भेट घ्यावी. ***अभ्यासाने आत्मज्ञान प्राप्त होऊन, त्या ज्ञानाचे, भगवंताच्या ध्यानात पर्यवसान होते.*** असे झाले तरच अभ्यास व ज्ञान यांचे सार्थक झाले असे समजावे, असा भाव ते यानिमित्त व्यक्तवतात.

१२-१२ या गीताश्लोकावरील ओव्या तेही श्री.केळकर-मंगरूळकरांप्रमाणेच ***"पैं अभ्यासाचिआं पाउटीं। ..." ते "शांतिचा माजिवठा। ठाकिला जेणें।।१२-१३७ ते १४३।।"*** अशाच देतात, हे उल्लेखनीय आहे.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अभ्यासाने भगवंताचे ज्ञान व ज्ञानाने त्याचे अंतःकरणात ध्यान दृढ झाले असता, सर्व व्यापार भगवंताप्रीत्यर्थच होत जाऊन ***"कृष्णीं ज्याचें निश्चळ मन। त्याचे कर्म तितुकें कृष्णार्पण। त्यासीं न अर्पितांहीं जाण। सहजें मदर्पण होतसे।।१०-६६।।एकनाथी भागवत।।"*** या नाथांच्या वचनाप्रमाणे अनायासे जीवाचा कर्माशी संबंध तुटतो. **कर्माचा निःशेष संबंध सुटला असताच कर्मफळ भोगण्याचा प्रसंग येत नाही, म्हणून *कर्मफलत्याग* होतो."**

अशा कर्मफलत्यागानेच चित्त पूर्ण शांत होते. श्री.पंडित पुढे म्हणतात की "येथे ***शांति म्हणजे चित्ताची निर्वासन स्थिती होऊन ते ब्रह्मज्ञानात निमग्न होणे होय.*** म्हणून चित्ताला अशी निर्वासन स्थिती प्राप्त होण्याकरता भगवंत अर्जुनाला आता सांगितलेला हाच ***क्रम*** इष्ट असल्याचे सांगून आता प्रथम अभ्यासच करण्यास सांगत आहेत."

अभ्यासापासून दुर्गम असे आत्मज्ञान प्राप्त होते. मग त्या ज्ञानापासून विशेष अशा ध्यानाची प्राप्ती होते. त्या ध्यानापासून उत्तम असा कर्मफलत्याग प्राप्त होतो. त्या त्यागापासून परमेश्वराच्या शांतिसुखाचा किंवा निर्वासन अशा ब्रह्मसुखाचा लाभ होतो. ब्रह्मसुखाची प्राप्ती करण्याच्या या निरनिराळ्या प्रक्रियामार्गांचा आणि टप्प्यांचा या बाराव्या अध्यायी उल्लेख येतो, असे त्यांचे म्हणणे दिसते.

श्री.पंडितांचे एकूण भाष्य लक्षात घेता ते त्यांच्या शैलीनुरूप ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचा समर्पक अर्थ सांगतांना दिसून येतात. तसेच यासाठी *१२-१२* या गीताश्लोकाचाही त्यास योग्य असा अर्थ घेतात, हेही विशेषत्वाने लक्षात येते. असो.

श्री.शंकरमहाराज खंदारकर यांचे मत

आता श्री.शंकरमहाराज खंदारकरांची ***ज्ञानेश्वरी भावदर्शन*** या ग्रंथातील टिप्पणी पाहू या. त्यांच्या मते प्रथम वर्णाश्रमविहित निष्काम कर्माचा अभ्यास, नंतर सगुणाच्या ठिकाणी मन स्थिर करण्याचा अभ्यास, नंतर एकाग्र मनाने गुरुमुखाने ब्रह्मश्रवणाचा अभ्यास, त्यानंतर दृढनिश्चयाकरता मननाचा अभ्यास अशा प्रकारच्या अभ्यासाच्या पायरीने प्रथम ***अपरोक्ष ज्ञान*** प्राप्त करून घ्यावे.

नंतर त्याच अपरोक्षज्ञानाच्या साधनाने ***"ब्रह्म मी आहे"*** अशा अखंड ब्रह्माकार निदिध्यासनाच्या भेटीला यावे - निदिध्यासन करावे. मग निदिध्यासनाने चित्तवृत्ती ब्रह्मनिष्ठ झाल्यानंतर शरीर, कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये, मन आणि बुद्धी हे सर्व पदार्थ *(भाव)* त्या ध्यानाला आलिंगन देतात - त्या ध्यानात समरस होतात, तेव्हा सर्वच कर्मे सहजच दूर राहतात. मग कर्म जेथे दुरावले आहे, तेथे फलत्याग आपोआपच संभवतो; आणि या त्यागामुळे पूर्ण ब्रह्मरूप शांती आपल्याशी एकरूप होते.

शांतिपर्यंत येण्याकरता साधनांचा हाच अनुक्रम आहे. श्रीकृष्णही अर्जुनास सांप्रत अभ्यास करणेच योग्य असल्याचे सांगतांना दिसतात. *१२-१२* या गीताश्लोकाचा यानंतर श्री.खंदारकरमहाराज अर्थ देतात, तो असा: ***"अभ्यासापेक्षा ज्ञान चांगले आहे. ज्ञानाहून ध्यान अधिक श्रेष्ठ आहे, ध्यानापेक्षा कर्मफलत्याग उत्तम आहे. त्याग झाल्यानंतर लागलीच अज्ञानासह संसाराची निवृत्ती होऊन मोक्षरूप शांती प्राप्त होते."***

त्यांच्या मते निष्काम कर्माच्या अभ्यासापेक्षा व सगुणरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर करण्याच्या अभ्यासापेक्षा आणि निर्गुण ब्रह्माच्या श्रवण-मननाच्या अभ्यासापेक्षा, प्रमाणसंशय आणि प्रमेयसंशय निवृत्त होऊन होणारे दृढनिश्चयात्मक ***अपरोक्षज्ञान*** श्रेयस्कर आहे. कित्येकांना श्रवण, मनन करूनही ब्रह्माचे अपरोक्षज्ञान होत नाही. कदाचित अपरोक्षज्ञान झाले, तरी अपरोक्षज्ञान्याचे प्रारब्धकर्म अवशिष्ट राहत असल्याने स्वदेहाची प्रतीती, जगत्प्रतीती आणि पूर्वसंस्काराने भोगाकडे प्रवृत्ती होण्याची शक्यता असते. म्हणून **अपरोक्षज्ञानापेक्षा *ध्यान म्हणजे निदिध्यासन* श्रेष्ठ आहे. कारण ध्यानात्मक निदिध्यासनाने ज्ञान्याला समाधि प्राप्त होते.**

ते पुढे म्हणतात की "त्या निदिध्यासनाने चित्तवृत्ती अखंड ब्रह्मनिष्ठ राहत असल्यामुळे स्वभावतःच कर्म व कर्मफल या विक्षेपांचा त्याग संभवतो. तो कर्माचा व कर्मफलाचा त्याग अज्ञानाने, आळसाने किंवा वेदशास्त्रावरील अविश्वासाने केलेला नसून ***अपरोक्षज्ञान*** झालेल्या ***मुक्त*** पुरुषाकडून ब्रह्मानंदाच्या तृप्तीने, कर्तव्याभावस्थितीला प्राप्त झाल्याने, देहादिकांचे भान न राहिल्याने, वृत्तीच्या ब्रह्मनिष्ठेने सहजच झालेला असतो. म्हणून निदिध्यासनाहून स्वभावतः झालेला ***कर्मफलत्याग*** चांगला आहे."

"याचे कारण निदिध्यासनाने ज्ञान्याला समाधि प्राप्त होत असली, तरी समाधि नसते त्या व्युत्थान अवस्थेत ज्ञान्याच्या अंतःकरणात पूर्वसंस्कारांने बाधितानुवृत्तीने विषयासक्तीचा दोष असेल, तर त्यामुळे बहिर्मुखवृत्ती होते व त्या बहिर्मुखवृत्तीमुळे ज्ञान्याच्या अंतःकरणातील वृत्तीत ब्रह्मसुखाचा आविर्भाव होत नाही. त्याकरता कर्म व कर्मफल अर्थात क्रिया व क्रियाजन्य विषय, यांचा स्वाभाविकपणे त्याग होण्याची आवश्यकता असते. कारण कर्म व कर्मफल यांचा त्याग झाल्याशिवाय ब्रह्मसुखाचा अनुभव येत नाही."

"म्हणून कर्मफलत्यागापासून ब्रह्मरूप शांतिसुखाचा साक्षात्कारात्मक भोग प्राप्त होतो. म्हणून कर्मफलाचा त्याग चांगला आहे. याच मार्गाने इहलोकीच्या मुक्कामातच - वर्तमान मनुष्यशरीरातच ब्रह्मरूप शांतीचे अंतःपुर ज्ञानी भक्त करून घेतात," असे श्री.शंकरमहाराज म्हणतात.

श्री.शंकरमहाराजांचे हे विवेचन तसे विस्तृत आहे. पण त्यात काही ठिकाणी विरोधाभास निर्माण होतो. मुख्यतः *१२-१२* या गीताश्लोकासाठी ज्ञानेश्वरांच्या ओव्यांचा योग्य अनुक्रम व तसे अनुसंधान नसल्याने आणि वेदांत परिभाषेचा उत्कर्ष साधण्यामुळे विसंगतिसदृश परिस्थिती उद्भवली आहे. श्लोकापूर्वीच्या ओव्यांचा अर्थ सुयोग्य आहे. पण त्या अर्थाशी श्लोकावरील म्हणून घेतलेल्या ओव्यांचा अर्थ म्हणूनच त्वरित जुळत नाही. असो. *१२-११ व १२-१२* या श्लोकांसंबंधीचा त्यांचा ओवीअनुक्रम तसा श्री.शं.वा. दांडेकरादी इतर मान्यवरांसाखाच आहे. कदाचित याच कारणाने ओव्यांचा अनुबंध त्यांच्याही नजरेआड इतरांप्रमाणेच झाला असावा.

स्वामी श्री.चिन्मयानंदांचे विचार

स्वामी श्री.चिन्मयानंद भगवद्गीतेवरील आपल्या ग्रंथात या श्लोकाचा विचार करतांना दिसतात. त्यांच्या मते बाह्यकर्मापेक्षा किंवा साधनेपेक्षा त्याबाबतचे ज्ञान महत्त्वाचे आहे. त्या ज्ञानाचे चिंतन करणे म्हणजे ध्यान ज्ञानापेक्षा वरचे आहे. कर्मफलत्यागवृत्ती ही त्याहून अधिक महत्त्वाची आहे. त्यागानंतर सत्वर शांतीचा लाभ होतो. **त्याग *(संन्यास)* म्हणजे बाह्य इंद्रियभोग्य विषयवस्तूंशी येणाऱ्या आपल्या संपर्कामुळे निर्माण होणाऱ्या आपल्या सुखासंबंधीच्या आसक्तीचा त्याग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.**

"अभ्यासापेक्षा ज्ञान खरोखरच अधिक चांगले, ज्ञानापेक्षा ध्यान अधिक योग्यतेचे, ध्यानापेक्षा कर्मफलत्याग अधिक श्रेष्ठ; कर्मफलत्यागाने तत्काल शांती प्राप्त होते," असा या श्लोकाचा अर्थ ते करतात. त्यांच्या मते ***अभ्यास, ज्ञान, ध्यान व कर्मफलत्याग*** या साधनेच्या वेगवेगळ्या श्रेणी आहेत; त्यांचा सर्व मिळून काही एक क्रममार्ग किंवा साधनामार्ग असावा, असे त्यांच्या विवरणावरून दिसत नाही. तसेच त्यांनी जे या विविध साधनांचे वर्णन केले आहे, ते गौणी साधनापद्धतीचे दिसते, असेही आपणास वाटते. येथील त्यांचे ज्ञान हे *परोक्ष* आहे आणि ध्यानसुद्धा धारणा करण्याचा प्रयत्न या स्वरूपाचे आहे. ते काही सहज होणारे ध्यान नाही, जे कुंडलीनी अभ्युदयानंतर होत असते. कर्मफलत्यागवृत्ती हीसुद्धा ब्रह्मनिष्ठाची नसून गीतेच्या सतराव्या अध्यायात भगवंतांनी सांगितलेली ***"ॐ तत् सत्"*** या ब्रह्मनामाच्या गौणी विनियोगाच्या स्वरूपाची दिसते. असो.

श्री.देसाई यांचा गीतातत्त्वविवेक

यानंतर या श्लोकासंबंधी श्री.नारायण गोविंद देसाई यांच्या ***गीतातत्त्वविवेक*** नामक अमूल्य ग्रंथात काय म्हणतात, ते पाहणे उचित ठरेल. ते म्हणतात की "ज्ञान हे अभ्यासापेक्षा श्रेष्ठ आहे. ज्ञानापेक्षाही ध्यान श्रेष्ठ. ध्यानापेक्षाही कर्मफलत्याग श्रेष्ठ. या कर्मफलत्यागानंतर आपोआपच शांतिलाभ घडतो."

अभ्यास म्हणजे काय तर त्यांच्या मते त्याचे स्वरूप काहीसे *श्लोक क्र.६-३६* यात विशद केले आहे. ***"असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः।.."*** असे भगवंतांनी तेथे म्हटले आहे. आत्मसंयमनाचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे. ***इंद्रियनिग्रह, चित्तनिरोध, अष्टांगयोगसाधना, शमदमादी षट्संपद, विवेक, वैराग्य व मुमुक्षा*** हे साधनचतुष्ट्य यांचा अभ्यासात अंतर्भाव करता येतो. ***स्वाध्याय, श्रवण, मनन, निदिध्यासन*** इ.चाही त्यात समावेश होऊ शकेल.

भगवंताच्या ठिकाणी मन व बुद्धी स्थिर करण्यास उपयोगी पडणारे हे व असे उपासनेचे विविध प्रकार ***अभ्यास*** वा ***अभ्यासयोग*** या शब्दांनी सुचवलेल्या साधनात घालणे उचित ठरेल, असे श्री.देसाई म्हणतात. पुढे ते म्हणतात की "अहंकारप्रेरित कर्मे भक्तियुक्त अंतःकरणाने ईश्वरार्पण करावयाची जर आपण अंतःकरणाला सवय लावत गेले, तर ते अंतःकरण अभ्यासयोगरत होते. अशा या भक्तियुक्त अभ्यासयोगाने ईश्वरविषयक ज्ञानाचा प्रकाश हलकेहलके प्राप्त होतो."

"या ज्ञानप्रकाशात ईश्वरध्यानाची प्रक्रिया वा साधना सुकर होते. ही ध्यानसाधना जसजशी परिणतावस्थेला जाते, तसतशी स्थितप्रज्ञता वाढत जाते. जीवाला शिवत्व प्राप्त होणे व शिवाला म्हणजेच व्यष्टिगत कूटस्थ आत्म्याला परमेश्वरात एकरूप होण्यात त्याची परिसमाप्ती होते. अशा स्थितीत उपाधींकडून घडणाऱ्या कर्मांचा व त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या फलांचा आत्म्याशी कोणताच संबंध राहत नाही. हाच कर्मफलत्याग होय. अशी अवस्था हीच ***सायुज्यमुक्ती*** व परमशांतीचे स्थान होय."

गीता श्लोक क्र.१२-९ ते १२ यांचा समन्वय करत श्री.देसाई म्हणतात की "या श्लोकांत सांगितलेल्या विषयाचा संकलित तत्त्वार्थ ईश्वरप्रीत्यर्थ व ईश्वरार्पण अशी कर्मे केल्याने अभ्यास साधतो; अभ्यासयोगाने ज्ञानप्राप्ती घडते व ज्ञानाच्या द्वारे ध्यान सुकर होते, हाच असल्याने ध्यानापेक्षा ज्ञान कनिष्ठ, ज्ञानापेक्षा अभ्यासयोग कनिष्ठ व अभ्यासयोगापेक्षा कर्मार्पण कनिष्ठ, असा भेददर्शक उतरत्या श्रेणीने श्रेष्ठकनिष्ठ असा अर्थ लावण्याकडे गीताभ्यासकांची जी प्रवृत्ती होते, त्याऐवजी तसे वर्गीकरण न करता त्या त्या गोष्टीची प्रतिष्ठा वा महत्त्व समजून घेणे एवढाच त्या पर्यायांचा अर्थ समजावा."

हा विषय ज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या अर्थवाही व सुबोध शब्दांत मांडला असल्याची दखलही श्री.देसाई यांनी घेतली आहे. असो.

श्री.बाबामहाराज आर्वीकरकृत दिव्यामृतधारा

सरतेशेवटी जिज्ञासूंचे लक्ष श्री.बाबामहाराज आर्वीकर यांच्या ***दिव्यामृतधारा*** या श्रेष्ठतम ग्रंथाकडे वेधावेच लागेल. ***गीता अध्याय बारावा*** यासच त्यांचा हा त्रिखंडात्मक बृहत ग्रंथराज वाहिलेला आहे. त्या ग्रंथाचे सर्व योगजिज्ञासू अभ्यासकांनी जरूर परिशीलन करावे इतका तो अमूल्य आहे. ***योगसाधना व भक्ती यांचे सांगोपांग दर्शन त्यांच्या प्रतिभामय शैलीत त्या ग्रंथांतरी श्रीबाबामहाराजांनी जे घडवले आहे,*** ते चिरंतन व्हावे असेच आहे. त्यांचे वरील विषयावरील काही विचार संक्षेपाने पाहू या. अधिक जिज्ञासा असणाऱ्यांनी मूळ ग्रंथच पहावा अशी सूचना करून पुढे जाऊ या.

ते म्हणतात त्याप्रमाणे ***कर्मफलत्याग*** या भक्तिप्रधान साधनाने जन्ममरणाची येरझार चुकते. कर्मफलत्यागाने प्राप्त होणारी उच्चतम अवस्था केवळ मुक्ती नसून मुक्तीपुढील सेवामय भक्तिसुखाची झालेली पहाट होय. **प्रभुच्या ठायी चित्त लावणे, हळूहळू स्थिर करणे, त्याच्या प्रेमात चित्त लावणे म्हणजे *अभ्यास.*** चित्तात अतीव हळुवारपणा वा कारुण्य येणे म्हणजे चित्त शुद्ध होणे होय. अशी चित्तदशा झाल्यावर ईश्वरस्वरूपाचा लाहो वाढून संतसहवास व सत्संग करण्याची इच्छा होते.

मग संतवचनांद्वारे परमेश्वराचा निश्चित ***स्वरूपभाव*** कळू लागतो. हे ***ज्ञान*** केवळ प्रेमाचेच भातुके असल्याने चित्त ईश्वराठायी अधिकाधिक स्थिर होऊ लागते व असे झाले म्हणजे हे ज्ञान ध्यानस्वरूप होते. ***ध्यान*** ही करावयाची गोष्ट नाही. **सप्रेम ज्ञानच साधकाला - भक्ताला- ध्यानारूढ करते, शुष्क ज्ञान नव्हे!** एकंदरीत हे ध्यान सुरू झाले म्हणजे ***ज्ञान व ध्यान*** एकरूप होते. ज्ञान आपला ज्ञानपणा सांडून ध्यानाच्या पांघरूणात आपल्या प्रिय प्रभुशी क्रीडत असते. हीच ज्ञानाची झोप होय. **ध्यानात ज्ञान शिल्लक राहत नाही. कारण *ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता* ही त्रिपुटी मावळते, तेव्हाच ध्यान होते. म्हणून ध्यानस्थिती ही ज्ञानोत्तर आहे.**

ध्यान म्हणजे भक्तचित्त भगवंताशी समसंवित होणे नव्हे, तर तदाकार होणे होय. याचमुळे जेथे हे ज्ञान संतुष्ट होते, तेथेच ध्यान सुरू झाले, असे समजावे. ध्यान ही शुद्ध चित्ताच्या सप्रेम ज्ञानाची उत्कट व मधुर निद्रास्थिती होय. ज्ञानच सप्रेम भावाच्या हिंदोळ्यावर झोपी गेले की ध्यानाचे मधुर स्वप्न पडते. असे मधुर व सहज ध्यान प्राप्त झाले म्हणजे चित्तात दुसरी वृत्तीच उठत नाही. तर ***सर्व भाव*** एकाठायीच येतात.

या चित्ताचा साधक निरंतर ध्यानातच राहतो. परमेश्वराशिवय आता स्मरणच उरत नाही.तो सर्वभावे त्याचे सुख अनुभवतो. ध्यान कालभेदाने न होता सर्वकाळ सहजगतीने होऊ लागते. हेच प्रेमपुरस्सर ध्यान होय. असा ध्यानविलास सुरू झाला की भक्तचित्तात अन्य संकल्पच उठत नाही. अवघी कर्मे दूर सरतात. यालाच ***भक्ती*** असे म्हणतात.

त्या अवस्थेत कर्माकरता जो कर्ताहंकार हवा असतो, तोच पूर्णपणाने विलीन झाल्यामुळे कर्मे तरी करणारा तेथे कोण आहे! त्यामुळे कर्मे करूनही अकर्ता असा जो झाला, त्यास कर्मफल तरी कसे मिळावे बरे! अर्थातच हा कर्मफलत्याग होतो. त्या त्यागामुळेच भक्तास निरपेक्ष शांतीचा लाभ होतो. चिरंतन शांति ती हीच! परमभक्तीची अनौपम्य सुंदरता ज्ञानाने अलंकृत होऊन ***शांति*** या नांवाने प्रसृजित होते.

श्री.बाबामहारांजाची स्पष्टोक्ती

"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्.... ।।" या श्लोकावरही श्री.बाबामहाराज अत्यंत समर्पक विचार प्रकट करतात. ते म्हणतात, "काही मंडळींनी ***"अभ्यासाहूनि गहन। पार्था मग ज्ञान। ज्ञानापासौनि ध्यान। विशेषिजे ।।१२-१४१ ।।"*** या ओवीचा अर्थच्छेदच केला आहे. ***गहन* या शब्दाचा *कठीण* असा अर्थ करून अभ्यासापेक्षा ज्ञान कठीण व ज्ञानापेक्षा ध्यान अवघड असा विलक्षण अर्थ नको तेथे निर्माण केला आहे. वास्तविक *ज्ञान व ध्यान* हे अभ्यासातील टप्पे होत. येथे ज्ञान व ध्यान असा स्वतंत्र उपासनांचा उल्लेख नाही, तर प्रभुप्राप्तीकरता करावयास लागणाऱ्या अभ्यासक्रमाच्या या पायऱ्या होत."**

म्हणून ***"अभ्यास –➤ ज्ञान –➤ ध्यान –➤ कर्मफलत्याग"*** **या चढत्या क्रमात अभ्यासाच्या दिव्यानुभूतीची व्यवस्था वाढत्या क्रमाने सांगितली असल्याचे श्री.बाबामहाराज स्पष्ट करतात.** त्यांनी निरूपिलेली ज्ञानेश्वरी एका सांप्रदायिकांची आहे, हे सांगणे न लगे! **निव्वळ *शास्त्राभ्यासनिर्मित ज्ञान* असा *ज्ञान* या येथील शब्दाचा अर्थ घेऊ नये,** असा इशाराही ते देतात.

ऋणनिर्देश

सुज्ञ वाचक व विचारवंत साहित्यिकांनी वाचतांना व लिहितांना त्यांच्या अनुभवपूर्ण उपासनेअंती प्रकट केलेले हे विचार आढ्यतेने भ्रष्ट करू नयेत, अशी नम्र प्रार्थनाही त्यांनी त्या प्रसंगी केलेली आहे!! कोणत्या विचाराचे खंडन करण्याचा त्यांचा मानस नाही. पण उपासकांच्या हितासाठी हा सर्व प्रपंच त्यांनी केला आहे. तरीही विचारवंत लेखकांची ते त्यासाठी क्षमा मागतात.

आपणही तसेच करू या! कारण आपण या विषयाचा अभ्यास करत आहोत. तेव्हा मान्यवर, विद्वान, साहित्यिक, प्रथितयश लेखक, सांप्रदायिक महानुभाव, भाष्यकार, आचार्यादी महान थोर अशा वरिष्ठांच्या विचारांबद्दल दुमत, शंका इ.प्रकट होणे साहजिकच आहे. त्यांचा अवमान करावा किंवा आपले महत्त्व प्रस्थापित करावे, असा आपला यत्किंचितही हेतू नाही. उलट त्या थोरांनी आपले विचारधन अत्यंत उदारतेने आपणास उपलब्ध करून दिलेले आहे, त्याबद्दल त्या आदरणीय व्यक्तींचे आपण शतशः ऋणीच आहोत!! असो!!!

दिव्यामृतधारेतील भक्तिसोपान

पुढे श्री.बाबामहाराज या विषयाचा समारोप करतांना काय म्हणतात, ते पहाः **"ध्यान परिपक्व होणे म्हणजे *ध्येय, ध्याता व ध्यान* ही त्रिपुटी मावळणे होय. असे ध्यान जेव्हा होते, तेव्हा त्या स्थितीला *ध्यानस्थिती* न म्हणता *भावस्थिती* म्हणतात.** परमात्म्याचे प्रेमस्फुरण त्याच्याठायी अखंड नांदत असल्याने भेदातीत सुखच तो भक्त अनुभवत असतो. ***भोक्ता, भोग्य व भोग*** हे सर्व घटकच प्रभुप्रेमाचे सुखरूप आकार असतात. त्यामुळे येथे न भोगताच सुख अनुभवास येते. ध्यान न करताच ध्येयरूपता येते. ध्यानस्थिती पूर्णता पावते."

"पुढे या भक्ताकडून घडणारी सकळ कर्मे भगवंतच घडवत असतो. येथे भगवंतच कर्माचा अभिमानी असतो. यामुळे सहजच ***कर्मफलत्याग*** घडतो. ब्रह्मसुखही येथे ठेंगणे मानावे लागते!! अखंडतृप्तीच्या शांतानुभवात रसाळलेल्या भक्तिसुखाने अखंड भजन येथे घडत असते." भक्तिपथ स्वीकारून भक्त परमेशाच्या शांतिसिंहासनावर अधिरूढ होतो, तो असा!

भक्तिसोपानाचे विहंगम वर्णन पूर्ण करत श्री.बाबामहाराज असे म्हणतात कीः **"भक्तीत *स्मरण, चिंतन, कीर्तन* घडणे हाच *अभ्यास* असतो. अभ्यासाच्या या सखोल प्रेमस्फुरणात पुढे *ज्ञान* प्राप्त होते. ज्ञानाला तृप्त करून हे प्रभुप्रेम *ध्यानारुढ* होते. ध्यानाला घेऊनच हे प्रेमसुख *कर्मफलत्यागी* बनते. *कर्मफलत्याग* होताच प्रेमच प्रेमाचा भोग घेत *शांती* पावते.** अशी अद्वितीय शांती प्राप्त झाली म्हणजे शांतिसिंहासनाधिष्ठित भक्त भक्तीचे साम्राज्य अखंडतेने चालवतो. असा हा भक्तिमार्गाचा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासात सहजताच ध्येयाकडे परिणत होत होत ध्येयरूप होते."

साधनभक्तीची व्याख्या करत श्री.बाबामहाराज पुढे म्हणतात कीः ***"ज्या उपासनेत क्रमशः उपास्यच साधकरूप व साधनरूप बनते, ती या भक्तीची उपासना होय."*** भक्तीचा हा अभ्यासयोग अतिसुलभ व मधुर असल्याचा आपला अनुभव सांगून ते हा विषय पूर्ण करतात!! असो!

भावाविषयी विवेचनः:::

"ध्यानासिं खेंव। देतिं आघवेंचिं भाव"

"श्रेयो हि ज्ञानम...।।१२-१२।।" या श्लोकाचा व त्यावरील ज्ञानेश्वरीच्या ओव्यांचा विचार आपण केला. अजूनही एका ओवीचा अधिक विचार करावयाचा आहे. ती ओवी संक्षेपाने आपण पाहिली तेव्हा साधकाच्या ***सर्वभावाधिष्ठातृत्व व सर्वज्ञातृत्व*** या लक्षणांचा स्फुट उल्लेख पातञ्जलयोगसूत्रांचा दाखला देत *(३-४९पा.यो.सू.)* केला होता. त्याबद्दल अधिक तपशील पाहणे राहिले होते *(पृ.क्र.१२८ व १२९)*. तिकडे वळू या.

ती ओवी अशी आहेः ***"मग ध्यानासिं खेंव। देति आघवेंचि भाव। तेधवां कर्मजात सर्व। दूरी ठाकें।।१२-१३८।।"*** येथील भाव या शब्दाचे वेगवेगळे अर्थ विद्वद्वरांनी केले आहेत.

श्री.शं.वा.दांडेकर यांच्या मते कायिक, वाचिक व मानसिक भाव जेव्हा ध्यानाला आलिंगन देतात म्हणजे ध्यानात गढून जातात, त्या वेळेला कर्ममात्र जेवढे आहे, ते दूर राहते; म्हणजे होत नाही. कारण कर्मे करण्याची साधने किंवा द्वारे जी काया, वाचा व मन ती सर्व ध्यानात गढून गेल्यामुळे कर्मे करण्यास जाग्यावर कोणीच नसतात; म्हणून कर्मे होत नाहीत.

श्री.केळकर-मंगरूळकरद्वयी म्हणते की "जेव्हा सर्वच मनोवृत्ती ध्यानासह *(मला)* आलिंगन देतात, तेव्हा सर्व कर्मसमुच्चय दूर ठाकतो."

श्री.शंकरमहाराज खंदारकर ***भाव*** या शब्दाचा ***पदार्थ*** असा अर्थ घेत म्हणतात की "निदिध्यासनाने चित्तवृत्ती ब्रह्मनिष्ठ झाल्यानंतर शरीर, कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये, मन व बुद्धी हे सर्व पदार्थ त्या ध्यानाला आलिंगन देतात - त्या ध्यानात समरस होतात, तेव्हा सर्व कर्मे सहजच दूर राहतात."

श्री.बाबाजीमहाराज पंडित ***भाव*** या शब्दाचा **चित्त व इंद्रिये यांचा सर्व व्यापार** असा अर्थ घेतात. श्री.साखरेमहाराज या ओवीचा अर्थ देतात तो असाः "नंतर सर्व मनोवृत्ती व धर्म ध्यानाला आलिंगन देतात; तेव्हा कर्म आपोआप दूर राहते."

दिव्यामृतधारा व भाव

श्री.बाबामहाराज आर्वीकर म्हणतातः "मधुर असे जे सहजध्यान प्राप्त झाले म्हणजे चित्तात दुसरी वृत्तीच उठत नाही, तर सर्व भाव एकाठायीच येतात; आठवनाठव उरत नाही. या चित्ताचा साधक निरंतर ध्यानातच राहतो. परमेश्वराशिवाय आता स्मरणच उरत नाही. तो सर्वभावे त्याचे सुख अनुभवतो. सर्व भावोर्मी एकत्र येतात. एकाकार दशेचा अनुभव येतो. हे ध्यान अखंड निरंतर सर्वकाळ सहजगतीने भावभावातीत अवस्थेत सर्व अवस्थांतून होते."

या स्थितीचे वर्णन करणारा एक अभंगही महाराजांनी उद्धृत केला आहे. तो असा -

आपुलेनि रंगें येति होति हें साजिणिं।
तंवं वनवासिं एकें आलिंगिले गे माये।।१।।
बोलें ना बोलों देईना। तेथ पाहणें तैं पारुषले गें माये।।२।।
आपुलें केलें कंहिंचि न चले वो आतां।
बाप रखुमादेविवरें विठ्ठलें देखतां।।३।।अ.क्र.२९८।।

हाच तो ध्यानानुभव निळोबारायांस कसा प्रतीत होतो, ते पहाः ***"ऐकतां निजानंदा होतसें चेईरे। निळा म्हणे माझें तेथेंचि मन मुरें वो।।१८४।।अ.गा.निळोबा.।।"***

पुढे श्री.बाबामहाराज आर्वीकर सांगतात की या सिद्ध अनुभवाला हा भक्तवर ध्यानाने प्राप्त झाल्यानंतर त्याला स्व-अस्तित्व सांभाळण्याचे भान उरत नाही. या वेळी आपण कोण, कुठले हेसुद्धा त्याला कळेनासे होते. या ध्यानमग्न ध्यानरत अवस्थेत एक विलक्षण अलौकिक सुख अनुभवास येत असल्यामुळे त्या अनुभवापूर्वी असलेले

सारे संबंध, सर्वच कर्मवृत्ती, जात, वित्त, गोत्र या सर्वांची आशा स्वाभाविकच सुटते. अन्य संकल्प चित्तात उठत नाहीत."

"सागराला नदी मिळताच तिचे नदीपण जाते, तद्वत या ध्यानाने परमात्म्याला आलिंगिले की त्या अवर्णनीय सुखात ध्यातेपणाचाही विसर पडतो. ***जेथे ध्येय -ध्याता नाही, तेथे ध्यानही उरत नाही, अशी स्थिती येते.* प्रभुप्रेमसुख थबथबलेल्या रसाच्या अनंत भावमधुर लहरींनी जागे होते, तेव्हा हे भाव या ध्यानाला *खेंव आणतात* म्हणजे दूर *करतात.* म्हणजे ध्यान ही क्रिया न राहता चित्त भगवत्सुखात अशी काही डुबी देते की ते भगवत्सुखच घेऊन बाहेर येते.** प्रत्येक वेळी प्रेममग्न होऊन भगवंताच्या सुखसलिलात सुखानेच उडी घ्यावी, सुखानेच बाहेर यावे व सर्वत्र विहरावे असा मोठा अद्वितीय भावपूर्ण मधुर विहार त्या भक्ताचा होऊ लागतो."

येथे ***ध्यानाला खेंव आणणे*** ही एक सुंदर अनुभूती ज्ञानदेवांनी चित्रित केली असल्याचे ते म्हणतात. ***"ध्येय, ध्याता ध्यान। त्रिपुटीवेगळा"*** असा ज्ञानदेवांच्या अभंगात वर्णिलेला सिद्ध अनुभव त्यांना स्मरतो. ते सांगतात की "**परमार्थातील या सूक्ष्म अनुभवाला न जाणले, तर निश्चितच अननुभवी लोक *भाव* याचा अर्थ मनातील विनाशी संकल्प म्हणजे *वृत्ती* असा करून *खेंव देणे* या शब्दाचा *आलिंगिणे* असा अर्थ करतील.**"

"वास्तविक ***खेंव आणणे* या शब्दात *त्रस्त करणे* व *खेंव देणे* या शब्दात *खो देणे* असा अर्थबोध आहे;** पण ध्यानाच्या उच्चतम स्थितीचा म्हणजे भावाचा ज्यांच्या ठिकाणी अनुभव घडला नाही, ती मंडळी असा विचार करतात की ध्यान दूर सारून परमार्थात कसे चालेल! ज्यांना भाव म्हणजे मनाठायी उठणाऱ्या अनंत भावना होत असे वाटते, ती मंडळी निश्चितच या साऱ्या ओवीचा मधुरभाव व मंगलप्रसाद आपल्या अमंगल बुद्धीने विटाळतात," असे बाबामहाराजांस वाटते.

ते पुढे म्हणतात की "ध्यानानंतर प्राप्त झालेल्या मधुर अवस्थेत ध्येय व ध्याता एकरस झाल्यामुळे ध्यान उरत नाही. भक्तजीवनात भावांच्या मोठ्या मधुर लाटा उफाळतात. हे भावतरंग म्हणजे भावनांचे काल्पनिक तांडव नव्हे, तर दिव्य सुखाच्या उच्च अनुभूतींचे मंगल नर्तन असते! येथे समूळ देहभाव दूर होतो व एकनिष्ठ भगवद्भावात भक्त भगवंताबरोबर क्रीडत असतो. ही कल्पना नव्हे, तर भक्तिमार्गी लोक सर्वच असा अनुभव करतात. अशा अवस्थेत ध्यान दूर सरते वा ध्यानच भावरूप होते. हेच भक्ताचे दिव्य भावान्वेषण होय." राधा, ज्ञानदेव, गौरांगप्रभू, रामकृष्ण परमहंस हे सर्व थोर त्याच अवस्थेत असल्याचे श्री.बाबामहाराज म्हणतात.

"असे मधुर भाव भक्ताठायी जागे होताच अवघी कर्मे एकदम दूर जातात. अर्थात भक्ताचे होणारे कर्म जरी वेगवेगळ्या इंद्रियांच्या सापेक्षतेत घडत असले, तरी त्या भावोत्पन्न अवस्थेत त्या सर्व कर्मांत त्याने हरीलाच धरलेले असते. **जर त्या कर्मांचे सर्व फळ प्रभुप्राप्ती व प्रभुमिलनच होय, तर त्यांना कर्म म्हणून तरी काय उपयोग! यालाच *भक्ती* असे म्हणतात. ज्ञानानंतरची स्थिती म्हणजे *ध्यान* होय, तद्वत ज्ञान ध्यानरूप होताच ध्यानाला भावरूपात यावेच लागते व हा भाव निर्माण होताच भक्ताची सर्व कर्मे, सर्व संचित पार विलयास जाते.** याचाच निर्देश करत तुकाराममहाराज म्हणतात – ***"प्रारब्ध क्रियमाण। भक्तां संचित नाही जाण। अवघा देवचि जाला पाहीं। भरोनियां आंतर्बाहीं।।" आघवेंचि भाव*** यामध्ये बहुवचनी भावस्थिती जरी असली, तरी भक्तिठायी वेगवेगळे भाव असतात, हे विदित आहेच." असो.

श्री.बाबामहाराज आर्वीकरांचे *श्लोक क्र.१२-१२* वरील ज्ञानेश्वरांच्या ओवीसंभाराचा अर्थ करतांना येणाऱ्या अडचणी व मतभेद आणि त्यातील संकल्पनांबाबत असणारे गैरसमज यांचा अचूक निर्देश करणारे अत्यंत उद्बोधक असे हे विवेचन विस्तृत असले तरी जिज्ञासूंच्या अभ्यासासाठी मुळातून देण्याचा मोह आपणास आवरता आला नाही. अनेक गैरसमजुतींना कायमचा पूर्णविराम देण्यास ते खूप उपयुक्त आहे. तसेच ज्ञानेश्वरीचा अभ्यास किती सतर्कतेने करावा लागतो, तेही त्यांच्या विवेचनावरून स्पष्ट होते.

रामानुजाचार्यांचे भाष्य:

गीता *१२-१२* या श्लोकावरील भाष्यात श्रीरामानुजमते आत्मनिष्ठ वा ज्ञानमार्गियांसाठी स्मृतींचा अभ्यास, अर्धकच्च्या श्रुत्यभ्यासापेक्षा अक्षराच्या अनुसंधानातून मिळणारे अपरोक्षज्ञान, अर्धकच्च्या अपरोक्षज्ञानापेक्षा आत्मध्यान, अर्धवट आत्मध्यानापेक्षा कर्मफलत्याग ही एकाहून एक विशेष आहेत. म्हणून कर्मफलत्याग करावा. म्हणजे मानसशांती प्राप्त होते. मानसशांतीपासून आत्मध्यान, तदुत्तर ज्ञान, अपरोक्षज्ञानातून पराभक्ती प्राप्त होतात. भक्तिमध्ये आस्थित असणाऱ्यांसाठी भक्ती हाच श्रेष्ठतम उपाय असल्याचे त्यांच्या भाष्यावरून सूचित होते.

श्री.आर्वीकरादींच्या विचारांचे समालोचन

इतर मान्यवरांची मतेही आपण पाहिलीत. तेसुद्धा ओव्यांचा अर्थ करतांना योगशास्त्राचा अनुभव नसल्यामुळे कसे चाचपडतात आणि परस्परविरोधी उलटसुलट अर्थ करतात, तेही त्यांच्या वरील एकूण विचारांवरून आपल्या लक्षात आलेच असेल. तसेच त्यांचे परस्परमतभेद आणि मतामतातल्या विसंगतिसदृश काही बाबीही आपल्या प्रसंगोपात्त लक्षात आल्या.

त्याचप्रमाणे संदर्भित *गीताश्लोक क्र.१२-८ ते ११* यांच्या पार्श्वभूमीवर *गीता श्लोक क्र.१२-१२* याचा अर्थ करण्यातल्या अडचणी पण आपण या सर्वांच्या विविध मतांतून आणि त्यानी सूचित केलेल्या अर्थातून पाहिल्यात. या सर्व उहापोहावरून दिसून येते की मान्यवरांचा शब्ददेखील अखेरचा असे आपणास धरून चालता येत नाही असा हा गीता-ज्ञानेश्वरीचा विषय आहे. त्याच्यात जितके खोल अवगाहन करावे,तितके हे सर्व आपल्या अधिकाधिक लक्षात येत जाते.

हे सर्व मोठमोठ्यांचे विचार ग्रथित करण्यामागे आपला उद्देश मुख्य म्हणजे गीता-ज्ञानेश्वरीचा अभ्यास आणि सत्यशोधनाचाच आहे; गीतेचा आणि ज्ञानेश्वरीचा निखळ सत्य अर्थ आमच्यापुढे उजळावा हीच आपली एकमेव आकांक्षा आहे आणि तिच्या पूर्तीस या सगळ्या विचारप्रौढ दिग्गजांनी आपल्या अक्षरधनातून जो हातभार लावला आहे आणि आपले विचारधन आपणास मुक्तहस्ते देऊ केले आहे, त्याबद्दल पुनश्च त्यांचा ऋणनिर्देश करून आपण आपल्या विषयाकडे वळू या.

पतञ्जलींचे सर्वभावाधिष्ठातृत्व व सर्वज्ञातृत्व

ही सगळी पार्श्वभूमी तपासण्यामागे *ज्ञानेश्वरीच्या १२-१३८* या ओवीतील भावानुभवासंदर्भात जो आजपावेतो कोणीही केलेला दिसत नाही असा एक वेगळा विचार दाखवण्याचा हेतू आहे. आपण आता तो मांडू या. त्यासाठी आपणापुढे आहे ते सूत्र असेः ***"सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं सर्वज्ञातृत्वं च।।३ ४१।।पा.यो.सू.।।"***

पातञ्जलयोगसूत्र एकूण चार पादांत विभागलेले आहे. प्रथम पादास ***समाधिपाद*** म्हणतात. त्याची एकूण ५१ सूत्रे आहेत. ***योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध. तो निर्बीज समाधि सिद्ध केल्याने पूर्णत्वास जातो.*** हे सर्व कसकसे होत जाते; त्यामागची तात्त्विक व सैद्धांतिक पार्श्वभूमी काय आहे; ***निर्बीज समाधि प्राप्त करण्याचे निरोधोपाय कोणते; संप्रज्ञात व असंप्रज्ञात समाधिभेद व त्या त्या समाधिसन्निध जाणाऱ्या चित्ताचे स्वरूप; निर्विचार समाधीचे महत्त्व व त्यापासून अध्यात्मप्रसाद व ऋतंभराप्रज्ञाजागृती*** असे विषय या प्रथमपादात आहेत.

साधनपाद म्हणून दुसऱ्या पादात एकूण ५५ सूत्रांतून ***योगसाधनांचे स्वरूप; क्रियायोग; स्वरूपोपलब्धीचे प्रमाण; विवेकख्याति; योगाची अष्टांगे; यमनियमादी पाच बाह्यांगांचे विशेष विवेचन; इंद्रियनिग्रह व प्राप्तीचे उपाय*** असे विषय येतात.

नंतरच्या म्हणजे तृतीय पादाचे नांव ***विभूतिपाद*** आहे. त्यातल्या ५५ सूत्रांतून अष्टांगांपैकी उर्वरित तीन अंतरंगांचा म्हणजे ***धारणा, ध्यान व समाधि*** यांचा विषय येतो. त्याचप्रमाणे ***संयम, प्रज्ञाजागर, सिद्धिप्राप्ती, योगाभ्यासाच्या संयम ते निर्बीज समाधिपर्यंतच्या पायऱ्या, कैवल्यप्राप्ती*** असे विषयही त्या पादात विवेचिले आहेत.

यानंतरच्या चौथ्या म्हणजे **कैवल्यपादा**त एकूण ३४ सूत्रांतून **वासनाशय *(वासनाकोष)* व समाधिसिद्धी** इ.बाबत राहिलेल्या विषयांचा विचार येतो. उपरोक्त ***"सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य... ।। ३-४१।।पा.यो.सू.।।"*** हे सूत्र विभूतिपादात येते.

सत्त्वपुरुषान्यताख्याति

आपणास ***सर्वभावाधिष्ठातृत्व*** व ***सर्वज्ञातृत्व*** यांचा विचार आता विषयानुरूप अभिप्रेत आहे. ***ध्यान, धारणा, समाधि व संयम यांनी निर्बीज*** **समाधीचा *बहिरंग* बनतो.** वेगवेगळे संयम केल्याने वेगवेगळ्या प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. त्यांचे वर्णन आपण पूर्वीच केलेले आहे *(उन्मेषः४४-२ःयोगविभवभाण्डार-कुंडलिनी जगदम्बा पृ.क्र.७३४ ते ७३१).* यातील काही आध्यात्मिक सिद्धी सोडल्या तर इतर सिद्धी म्हणजे असंप्रज्ञात समाधिप्राप्तीतील अडथळेच होत.

आध्यात्मिक प्रगतीसाठी सत्त्वगुणाची विवृद्धी झाल्यावर चित्तातील सत्त्वप्रकाशावरील रजस्तमोमलाच्या आवरणाचा क्षय व्हावा लागतो. **महत्त्वाची आध्यात्मिक सिद्धी म्हणजे महाविदेहा वृत्ती. ही प्राप्त झाली की हे घडून येते. योग्यास "वासुदेवः सर्वमिति" अशी अनुभूती येते. *भूतजय, अणिमादी सिद्धींची प्राप्ती, कायसंपतप्राप्ती, इंद्रियजय, मनोजवित्व, विकरणभाव (इंद्रिये आणि विषय यांचा संबंध न येता विषयांचे ज्ञान होणे)* व *प्रधानजय*** या विविध आध्यात्मिक मार्गावर अग्रेसर करू शकणाऱ्या गोष्टींचीही तेव्हा योग्यास प्राप्ती होते. त्यासाठी करावयाचे वेगवेगळे संयम विभूतिपादात दिलेले आहेत आणि आपण ते सर्व पूर्वीच सविस्तर पाहिले आहेत *(उन्मेषः४४-२ःयोगविभवभाण्डार-कुंडलिनी जगदम्बा,पृ.क्र.७३६ते७३१).*

तसेच ***विवेकख्याति*** **प्राप्त होते. म्हणजे अंतःकरण *(सत्त्व)* व त्याचा द्रष्टा *(पुरुष)* यातील वेगळेपणा *(अन्यता)* यांची प्रतीती *(ख्याति)* प्राप्त होते. यासच *पातञ्जलयोगसूत्र क्र.३-४१* मध्ये *"सत्त्वपुरुषान्यताख्याति"* असे म्हटले आहे.** याच सूत्राचा आपण आता विशेष विचार करत आहोत. ही स्थिती दृढ झाली की ***"आपणच सर्व भावांचे अधिष्ठाते आहोत व म्हणून सर्वज्ञताही आपणाठायीच आहे"अशी प्रचीती येऊ लागते.*** यास उद्देशूनच पतञ्जली ***"सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं सर्वज्ञातृत्वं च।।३-४१पा.यो.सू.।।"*** असे म्हणतात.

श्री.कोल्हटकरांनी दाखवलेला सूत्रसमन्वय

सर्वभावाधिष्ठातृत्वासंबंधी एक खुलासा पुढीलप्रमाणे आहेः ***"व्यवसायात्मक भाव*** म्हणजे ज्ञानग्रहण करणारी इंद्रिये व ***अव्यवसायात्मक भाव*** म्हणजे त्या इंद्रियांचे विषय व ते विषय ज्याच्या आश्रयाने राहिलेले असतात ती पृथिव्यादी स्थूल पंचमहाभूते होत. **त्रिगुणपरिणामरूप जे हे सर्व भाव, त्यांच्यावर स्वामीप्रमाणे अधिकार चालविता येणे ही *सर्वभावाधिष्ठातृत्वसिद्धी* होय,"** असे श्री.कृ.के.कोल्हटकर ***"सर्वेषां व्यवसायाव्यवसायात्मकानां गुणपरिणामरूपाणां भावानां स्वामिवदाक्रमणं सर्वभावाधिष्ठातृत्वम्।"*** या ***सर्वदर्शनसंग्रहकारां***च्या स्पष्टीकरणास अनुसरत आपल्या ***पातञ्जलयोगदर्शन*** या ग्रंथात म्हणतात आणि पुढे सांगतात की **"अपरोक्षानुभूतीची प्रथम भूमिका म्हणजे *सत्त्वापत्ती* होय."**

मागे आपण सप्तज्ञानभूमींचा परिचय करून घेतला होता *(उन्मेष ४६ःयोगपर अभंग पृ.क्र.८३०).* त्यातील ही चौथी भूमिका होय. ***शुभेच्छा, विचारणा व तनुमानसा*** या तीन भूमी आक्रमून योग्यास ***निर्विकल्प समाधि*** प्राप्त होतो व आत्म्याचे विशेष दर्शन होते. ***आत्मभावभावना*** असे त्या वेळी व नंतरच्या तीन भूमींचे म्हणजे ***असंसक्ती, पदार्थाभाविनी व तुर्यगा*** यातील अनुभूतींचे स्वरूप असते. प्रथमच्या

तीन भूमी ***परोक्षानुभूती***शी संबद्ध असतात व यानंतरच्या चार भूमी जीवन्मुक्तावस्थेच्या असून ***अपरोक्षानुभूती***च्या होत. **अष्टभावां**चा संवेग हा आत्मभावभावनेचा परिपाक असतो. ***"सानंद संप्रज्ञात समाधि –➤ सास्मित संप्रज्ञात समाधि –➤ निर्विकल्पसमाधि"*** अशा समाधिश्रेणीने ही *आत्मभावभावना* फलद्रूप होत जाते. विवेकख्याति प्राप्त झालेल्या ***विवेकनिम्न व कैवल्यप्राग्भार*** अशा चित्तास *(४-२६पा.यो.सू.)* ही अवस्था प्राप्त होते. ***सत्त्वपुरुषान्यताख्याति*** म्हणजे काय ते आपण पाहिले आहे*(३-४९पा.यो.सू.)*. त्याचप्रमाणे ज्यास ***विशेषदर्शिन*** असे म्हटले जाते *(४-२५पा.यो.सू.)*, त्याचा अर्थ असा देतात: ***"मी पुरुष सत्-चित्-आनंदरूप असून चित्ताहून वेगळा आहे,"*** अशी प्रतीती अंतःकरणात आरूढ होणे म्हणजे ***आत्म्याचे विशेषदर्शन*** होय. **अशा वृत्तीचे अनुसंधान म्हणजे *आत्मभावभावना* होय.**

जीवन्मुक्तांच्या उपरोक्त असंसक्त्यादी अवस्थात हे अनुसंधान ठेवावे लागत नाही, तर ते आपोआपच राखले जाते; आत्मस्फुरणाने हे ***आत्मभावभावन*** घडून येते. म्हणूनच पतञ्जली म्हणतात की: ***"विशेषदर्शिन आत्मभावभावनाविनिवृत्तिः।।४-२५।।पा.यो.सू.।।"***– विशेषदर्शन झालेल्यांच्या आत्मभावभावनेची समाप्ती होते; त्यांस अशी भावना न करताच आत्मस्फुरण होते.

ज्ञानेश्वरीचे पूर्वानुसंधान

सर्वभावाधिष्ठातृत्व व ***सर्वज्ञातृत्व*** यांचा योगभूमिकांशी असणारा अनुबंध आपण पाहिला. **आत्मभावभानेची जी विशेष निवृत्ती *(विनिवृत्ति)* येथे सांगितली आहे, ती *"ध्यानासिं खेंव। देति आघवेंचि भाव।..।।१२-१३८।।"* या ओवीच्या संदर्भात लक्षणीय आहे.** श्री.बाबामहाराज आर्वीकरांनी याचा केलेला अर्थ आपण मध्यंतरी लक्षात घेतला होता. **ध्यान सरणे वा ध्यान न उरणे** असा ***ध्यानासिं खेंव देणे*** याचा अर्थ त्यांनी केला आहे.

"आघवेंचि भाव" याचा अर्थ वरील पातञ्जलयोगसूत्राच्या विवरणाप्रमाणे ***आत्मस्फुरण*** असा घेतला पाहिजे. म्हणजे **ध्यान सरून आत्मस्फुरण होत राहणे या स्थितीस उद्देशून ज्ञानेशांनी ही ओवी रचली असली पाहिजे, असे दिसेल. असे होणे ही *जीवन्मुक्तावस्था* होय. *"तेधवां कर्मजात। दूरी ठाके।"* ही स्थिती जीवन्मुक्ताचीच असू शकते. *फलत्याग* तेव्हाच संभवतो. *शांति* ही तेव्हाच आंगवते!**

"पैं अभ्यासाचिआं पाउटीं। ठाकिजें ज्ञान किरीटी।... शांतिचा माजिवठा। ठाकिला जेणें।।१२-१३७ ते १४३।।" या ज्ञानेशांच्या ओव्यांचा समुचित अर्थ आपणापुढे प्रकटतो, तो असा!! आणि त्या अनुषंगानेच ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ....।।१२-१२।।"*** या गीताश्लोकाचा योग्य तो सारवाही अर्थही आपणास करावा लागतो, तो ***"अभ्यास –➤ज्ञान –➤ ध्यान –➤ कर्मफलत्याग –➤ शांति"*** अशा या साधनागत पायऱ्यांचा आलेख ध्यानी घेत घेतच!! असो.

निर्बीज समाधीची सिद्धता

आत्मस्फुरणाचे अनायासत्व हा *ऋतंभरा* प्रज्ञेचा सर्वोत्कर्ष बिंदु असून त्यानंतर लगेचच तिचेही संस्कार निःशेष व्हावे लागतात. म्हणजे ***"तस्यापि निरोधे सर्वनिरोधान्निर्बीजः समाधिः।।१-५१।। पा.यो.सू.।।"*** यात म्हटल्याप्रमाणे ***निर्बीज समाधि*** सिद्ध होतो. ***ऋतंभरा प्रज्ञा, धर्ममेघ समाधि*** इ.बाबतचे विवेचन आपण पूर्वीच पाहिले आहे *(उन्मेषः४४-२ःयोगविभवभाण्डार-कुंडलिनी जगदम्बा, पृ.क्र.७२८ते ७३५ व उन्मेष ४५-२ःलययोगसमालोचनः योगशास्त्रसमन्वय, पृ.क्र.७८६,७८७)*, तिकडे जाताजाता जिज्ञासूंचे परत लक्ष वेधणे विषयास अनुसरून उचितच ठरेल. तो भाग आवश्यक वाटल्यास पुनः अवलोकन करावा. असो.

समन्वय

हे सर्व विचार पाहिल्यानंतर आपणास आता त्यांचा समन्वय करणे अभिप्रेत आहे. आपणास त्वरितच दिसून येते की *श्लोक क्र.१२-१२* वरील जे विचार श्री. देसाईंच्या ग्रंथातून तसेच श्री. बाबामहाराज आर्वीकरांनी प्रामुख्याने माडलेले आहेत, ते आपणास बरेच जवळचे आहेत. मुख्य म्हणजे भगवंतांनी *श्लोक क्र.१२-८* पासून जे विविध साधनाप्रकार एकाऐवजी एक असे सांगितले आहेत, ते नेमके अभ्यास या सदरातच मोडतात, हे आपले विधान जाणून घेण्यास ते पूरकच आहेत.

या सर्व श्लोकांचा संकलित विचार करणे जाताजाता आता या ठिकाणी करणे क्रमप्राप्तच आहे. आपण त्या सर्व श्लोकांचा अर्थ व ज्ञानदेवांच्या त्यांवरील ओव्या अगोदरच *(पृ.क्र.१२१ ते १२८)* पाहिल्याच आहेत. तिकडेही परत जिज्ञासूंचे लक्ष वेधत आहे.

"मय्येव मन आधत्स्व ...।।१२-८।।" हा श्लोक ध्यान सांगतो. भगवंताच्या ठिकाणी मन, बुद्धि, चित्त लावणे हे ध्यानच होय. हे ज्याला एकदम जमत नसेल, त्याने ***"..। अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंञ्जय।।१२-९।।"*** यातून सांगितल्याप्रमाणे अभ्यासयोगाचा आश्रय करावा अशी प्रेरणा भगवंत देत आहेत.

अभ्यास कोणता करावयाचा ते श्री.देसाई यांनी सविस्तर विवेचिले आहेच. तसेच त्या अभ्यासाचा एक भाग ***निदिध्यासन*** आहे, हे सांगून तो ***परोक्ष*** ज्ञानाशी संबंधित असल्याचे सूचन त्यात आपणास दिसते. ***निदिध्यासन*** हे साधन अपरोक्षज्ञान्यास आवश्यक नसून तो तर स्वयमेव ती वस्तूच होतो, असे शास्त्र सांगत नाही का! ***निदिध्यासनाचा खरा उपयोग* परोक्षज्ञान्यासच आहे; *अपरोक्षज्ञान्यास नाही,* हे अगदी स्पष्ट आहे.** पण श्री.शंकरमहाराज खंदारकरांचे मत यावेगळे आहे, हे आपण पाहिलेच आहे. असो.

आता जर हा इंद्रियनिग्रहादी अभ्यासाचा मार्गही कोणाला जमत नसेल तर त्याला भगवंत सांगतात तो ***"... मत्कर्मपरमो भव।.. ।।१२-१०।।"*** हा मार्ग निव्वळ संकल्पाचा आहे. म्हणजे असे की यात काहीच परिश्रम करावयाचे नाहीत. फक्त कर्माच्या आदि-मध्य-अंती भगवंताला ज्ञानेश्वर सांगतात तसे बांधून घालणे एवढाच

संकल्प आहे. सतराव्या अध्यायात मागेच सूचित केल्याप्रमाणे ***"ॐ तत् सत्"*** या त्रिप्रकारच्या ब्रह्मनामाचा विनियोग फक्त गीता सांगते तसा केला म्हणजे झाले. आपण कर्म केवळ भगवंताप्रीत्यर्थ करतो आहोत, तोच आपणाकडून कर्म करवून घेत आहे आणि त्याचे फलही त्यालाच अर्पण करावे, या भावनांनी प्रेरित होऊन जे काही कर्म स्वाभाविकरीत्या निपजेल, ते चित्त अविरोध ठेवून सतत करावे, अशी युक्ती ***मत्कर्मपरमो*** यांत आहे. हा वस्तुतः ***(निष्काम)*** कर्मयोगच आहे.

परंतु त्यानंतर ***"अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः। सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान्।।१२-११।।"*** या श्लोकाचा अर्थ ***"कर्तुं मद्योगमाश्रितः"*** व ***"यतात्मवान्"*** या शब्दांचा नेमका कोणता अर्थ अभिप्रेत आहे , यावर अवलंबून आहे. ***मद्योगमाश्रितः म्हणजे मत् (माझ्या प्राप्तीच्या) योगमाश्रितः (योगाचा आश्रय करून)*** **आणि** ***यतात्मवान् म्हणजे संयत*** **चित्ताचा** असे अर्थ घेऊन या श्लोकाचा अर्थ केला जातो.

योग हा शब्द नेमका कोणत्या योगास उद्देशून आहे, किंवा त्याचा अन्य काही अर्थ आहे का, याचा विचार टीकाकारांगणिक बदलत असतो. तसेच ***संयत चित्त*** म्हणजे नेमके काय व ते कोणत्या प्रकारे प्राप्त करावे, हाही मतमतांतरांचा मुद्दा आहे.

ज्ञानेश्वरांनी या श्लोकावरील ज्या ओव्या दिल्या आहेत, त्यांचा अर्थ आपण अगोदरच समजावून घेतला आहे. त्याप्रमाणे आत्मसंयमाकडे बुद्धी लावून, इंद्रियांवर नियंत्रण ठेवून, घडणारी सर्व कर्मे व त्या कर्मांची फले टाकून द्यावीत, असे साधन सांगितले आहे. ***"परि मातें मनिं धरावें। कां मजउद्देशें करावें। हें काहिं नको आघवें। जाऊ दे शून्यी।।१२-१३०।।"*** ही यातील परवलीची म्हणता येईल अशी ओवी आहे.

जर साधकाची भगवंतावर कोणत्याही कारणाने श्रद्धा नसेल किंवा त्याचे चित्त त्याच्याठायी अनुरक्त होऊ शकत नसेल किंवा इतरही कारणाने जर त्याला कर्मे भगवत्प्रीत्यर्थ करणे जमत नसेल, तर त्याने भगवंतास विसरावे आणि एखादी वस्तू टाकून द्यावी, तशी **कर्मे व त्याची फले *"इदं न मम"* या बुद्धीने सरळ आपली नाहीतच असे दृढ चित्ताने, सुनिश्चयाने ठरवून टाकावे,** असा या ज्ञानेशांच्या ओव्यांचा भावार्थ दिसतो. यातही भगवंत संकल्पावरच भर देत आहेत.

संकल्प हाच मूळ कर्माची व कर्मफलाची जनित्री आहे. जर साधकाने असा दृढबुद्धीने संकल्प केला की त्याचे कर्माशी व त्यांच्या फलांशी काहीही देणेघेणे नाही, तर त्यास त्या कर्मांची फले भोगायला लागणार नाहीत, असा कार्यकारणभाव येथे आहे. या साधनात अर्थातच अहंकारलोपाचा भाग येतो आणि ***अहंकार*** हे तर सर्व संसाराचे मूळ आहे. ***"अहंकारलोपिं देख। द्वैत जाय"*** असे ज्ञानेश म्हणतात. म्हणूनच ज्ञानदेव या युक्तीला ***"योगामाजिं हा। धुरेचा योगु"*** असे म्हणत आहेत. असो.

१२-८ ते १२-११ या श्लोकातून भगवंत जे साधनाक्रम सांगतात, तो ज्ञानेश्वरीच्या साहाय्याने आपणास दिसतो तो अशा प्रकारेः

(१) ध्यान *(१२-८)* - मन-बुद्धी -चित्त भगवंताच्या ठिकाणी लावणे;

(२) अभ्यासयोग *(१२-९)* - अष्टांगयोगसाधना, शमदमादी षट्संपद, विवेक, वैराग्य व मुमुक्षा हे साधनचतुष्ट्य, स्वाध्याय, श्रवण, मनन, निदिध्यासनादी, प्रामुख्याने सहाव्या अध्यायात सांगितलेला;

(३) भगवंताप्रीत्यर्थ निष्काम कर्मयोग - कर्म फलासह भगवंतास अर्पण *(१२-१०)* आणि

(४) ***(भगवंताचा आश्रय घ्यायचा नसल्यास तसाच करावयाचा) निष्काम कर्मयोग*** आणि कर्म फलासह ***("इदं न मम्" या वृत्तीने)*** जेथल्या तेथे टाकून देणे.

याचाच अर्थ असा की हे जे मार्ग एकास एक पर्यायी असे भगवंत सांगतात, ते म्हणजे थोडक्यात सांगायचे झाले तर ***ध्यान (१), अभ्यास (२) आणि निष्काम कर्मयोग (३ व ४)*** होत. त्यांचे एकमेकांपेक्षा श्रेष्ठत्व वा कनिष्ठत्व अथवा उत्तम, मध्यम वा निकृष्ट असे वर्गीकरण काही गीता करत नाही. ज्या साधकास जो मार्ग आचरता येईल, तो त्याने घ्यावा एवढेच *१२-८ ते ११* या श्लोकांतून भगवंतांचे म्हणणे आहे.

त्यानंतर *१२-१२* या गीताश्लोकात ***अभ्यास, ज्ञान, ध्यान आणि कर्मफलत्याग*** असे साधनाविभाग सांगून काही तरी पौर्वापर्य दाखविण्याचा उद्देश दिसतो. *श्लोक क्र. १२-८ ते १२-११* मधील ***अभ्यास, ध्यान आणि कर्मफलत्याग*** यांव्यतिरिक्त **ज्ञाना**चाही येथे उल्लेख आहे. पण त्यांचे परस्पर श्रेयस्करत्वही तेथे दाखविले आहे, असा काहीसा समज टीकाकारांच्या ग्रथनातून दिसून येतो.

या सगळ्यांची सोडवणूक करावयाची झाली तर आपणास काही गोष्टींचा पुढीलप्रमाणे निर्णय करावा लागतो.

१) *१२-८ ते १२-१२* यातील साधना गौणी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे तेथे साधकाचे चित्त भगवंताकडे वा आत्मतत्त्वाकडे वळवणे याव्यतिरिक्त इतर काही उद्देश नाही. योगशास्त्रानुसार जी ***शुभेच्छा*** व ***विचारणा*** यानामक साधकभूमिका आहेत, त्यांचा अवलंब येथे अभिप्रेत आहे. ***मुमुक्षूला अध्यात्माकडे वळवणे हाच उद्देश यामागे आहे. मग तो कोणत्याही गौणी स्वरूपाच्या साधनेमुळे का होईना!***

२) ***श्लोक क्र.१२-८ ते १२-११* यातील साधना गौणी व तत्सापेक्ष १२-१२ यातील साधनाश्रेणी या साधकाचा वरिष्ठ पातळीवरील पथक्रमणा दाखविणाऱ्या आहेत. त्यामुळे *अभ्यास* ही त्यातील पहिली पायरी आणि त्यातून *ज्ञान (परोक्ष), ध्यान आणि कर्मफलत्याग* अशा उच्च श्रेणीच्या भूमिका प्राप्त होतात असे १२-१२ या गीताश्लोकानुसार दिसते.** ***श्रेयस*** या शब्दाचा अर्थ ***गुण*** असाही आहे. ***अभ्यासाचा गुण ज्ञान आहे, म्हणजे त्यापासून ज्ञानप्राप्ती होते,*** इ.अर्थ ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्..।।"*** यापासून म्हणूनच संभवतात. ज्ञानदेवांनीही याच प्रकारे या विषयाकडे पाहिले आहे, हे आपणास विदित आहेच.

अभ्यास हा येथे परिपक्व पातळीचा ज्यातून कुंडलिनीशक्तीचे उत्थापन होईल असा आहे. **कुंडलीनीशक्तीचे उद्बोधन झाल्यानेच खरी ज्ञानावस्था प्राप्त होते, *प्रज्ञाशक्ती* प्राप्त होते, असे येथे अभिप्रेत आहे. त्यातून *ध्यान* म्हणजे समाधिस्थ वृत्तींचा आविर्भाव अभिप्रेत आहे. आणि अशा समाधिस्थ अवस्थेत खरा कर्मफलाचा त्याग घडून येतो.** कारण कर्मे करणारा कोणी कर्ता तेथे विद्यमान नसतोच. किंबहुना अशा स्थितीत तो ज्ञानी म्हणा, योगी म्हणा, जीवन्मुक्त म्हणा, त्याचा प्रारब्धावशेष नसतोच.

जनांना तो राहटत असतांना जरी दिसला तरी अहंवृत्तीने त्याची कोणतीही कृती होत नसल्याने त्या कर्मांचा तो कर्ता नसतो आणि त्याला कर्मफलाची बाधाही होत नसते. कारण कर्मच उरत नाही, तेथे कर्मफलाचा आपोआपच त्याग संभवतो असे म्हणणेही खरे तर वदतोव्याघातच आहे; पण तरीही सामान्य साधकांच्या समजुतीसाठी भगवंत त्या अवस्थेत खरा ***कर्मफलत्याग*** होतो असे म्हणतात.

अशा समाधिस्थितीत खरी ***शांति*** सत्वर प्राप्त होते, असे ***"त्यागाच्छान्तिरनन्तरम्"*** या पदाने सांगितले आहे. **थोडक्यात आपणास उपासनाकांडाच्या *१२-८ ते १२-१२* या अंतिम पाच श्लोकातून साधकाने करावयाची उपासना आणि उपासनासाफल्याचा पथ वा क्रम यांचे भगवंतानी समुचित निर्देशन केले आहे, असे दिसून येते. उपासनाकांडाच्या अंती ते तसे होणे सयुक्तिकच आहे आणि समयोचितही! *उपासनेचा सारांश अशा प्रकारे येथे ग्रथित केला आहे, असे आपणास ज्ञानदेवीच्या आधाराने दिसून येत आहे.***

ज्ञानदेवांनी पूर्वसूरींचा अर्थ प्रमाण न धरता आपल्या स्वयंप्रज्ञेने या पाचही श्लोकांचा जो उत्तम अर्थ प्रकटवला आहे, त्यावरून त्यांना देवाचे काय म्हणणे आहे, ते अंतर्यामी सहजच जाणवत होते, असेही आपणास वाटते आणि त्यामुळेच भगवंतांचे खरे एकमेव उत्तम मत प्रतिपादन करणारे गीतेचे भाष्यकार म्हणा, आचार्य म्हणा, टीकाकार म्हणा किंवा आमचे भोळेभाबडे भाविक जन म्हणतात, तसे ***"ज्ञानदेवो स्वयं भगवान विष्णु:"*** असे साक्षात श्रीकृष्ण-विष्णु-विठ्ठलस्वरूप म्हणा, त्यांच्यासारखे तेच असे आपणास वाटणे साहजिकच आहे!

श्रीज्ञानदेवांच्या चरणी आपले हे विचारपुष्प अर्पण करून नतमस्तक होऊ या आणि असा उत्तम अर्थ आपल्या अल्पमतीत प्रकट केल्याबाबत त्यांच्याप्रति कृतज्ञ राहू या. असाच उत्तम गीतार्थ आमच्या सर्वांच्या मतीत उत्तरोत्तर प्रकटावा हेच एक मागणे - ***"हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा"*** - अशा प्रकारचे त्यांच्याकडे हट्टाने मागून घेत आपली पुढची वाटचाल क्षेमपूर्वक पार पडावी असे त्यांच्याकडे प्रार्थत पुढील विषयाकडे वळू या!! इत्यलम्।

पुढील अनुसंधान

ज्ञानदेवांच्या मते गीतेच्या बाराव्या अध्यायाच्या या ***"श्रेयो हि ज्ञानम् ...।।"*** या बाराव्या श्लोकाअंती उपासनाकांडाची समाप्ती होते. त्यानुसार *चवथा अध्याय ते हा १२-१२वा श्लोक* अशा आठ अध्यायात असणाऱ्या ज्ञानेश्वरीच्या उपासनाकांडाचा सविस्तर अभ्यास थोडासा भाग वगळता आपण पूर्ण केला आहे.

उर्वरित भागात गीतेच्या सहाव्या अध्यायातील योगस्थिती व योगाचे सोपेपण *(६-३६३ ते ४३०)*, ज्ञानी व श्रद्धावान भक्तांचे माहात्म्य *(६-४३० ते ४९७)*, प्रयाणकाळची भक्तांची स्थिती; पदप्राप्ती *(८-६१ ते २७१)* हा आठव्या अध्यायातील भाग आणि बाराव्या अध्यायाचा भक्तलक्षणे व भक्त-भगवंतसंबंध *(१२-१४४ ते २०६, २३० ते २४७)* असा भाग आपणास अद्याप निरीक्षिण्याचा आहे.

उपासनेचा हा सगळा प्रांत ***ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनेशी निगडित आहे. त्याचा आपणास पूर्वपरिचय वेळोवेळी झालेला आहे! त्याबाबत उरलेल्या काही संकल्पनांचा विचार पाहण्यासाठी आपण वळू या पुढील **उन्मेष क्र.५०-ईश्वर आणि त्याचे प्रणिधान** याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५०::
::ईश्वर व त्याचे प्रणिधान::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५०:

गीताः
१:१,११,१४,१५,२८,३२,३४
२:७,११,१४,१६,१९-२५,२८,२९,४८,५०,५१,५४,६५, ६९-७२
३:१,३,१५,१९,२२,२३,२७,२८,३१-३३,४२,४३
४:१,४-७,९,११,१३,१४, २४,३३-४१
५:५-७,१०,११,१४-२८
६:५,६,१०-४७
७:३,४,६-३०
८:१,३-१६,१६-२२
९:४-६,११-१३,१६-१९,२२-३४
१०:२,३,१५
११:२-५,९,११,१४,१५,२४, २५,३०,३१,३६,४१,४५-४७,५५
१२:१२-२०
१३:१३-३४
१४:१-२६
१५:१-५,७-२०
१६:१-४,२१-२४
१७:२३-२८
१८:१-४६,५०-७८

ज्ञानेश्वरीः
१:१,
२:२७३
५:५२५-५५७
११:६०९-६१५
१७:३५३-३८६,४०१-४०४
१८:१२०९-१२१३,१२१८,१२३६-१२४४,१४४०-१४४७,१६३२-१६३७,१६५७,१८००

पा.यो.सू.:
१:२३-२९,३२,४७
२:३-१३,४५
३:११,५५
४:३४

::उन्मेष ५०::
::ईश्वर व त्याचे प्रणिधान::

ईश्वरप्रणिधान::::

उपोद्घात

मागील उन्मेषात सूचित केल्याप्रमाणे आपण आता ***ईश्वरप्रणिधानाचे काही उर्वरित महत्त्वाचे पैलू*** पाहण्याकडे वळू या. उपासनाकांडाच्या या अंतिम टप्प्याचे निरीक्षण करण्याआधी ***ईश्वर व ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनांचा थोडा अधिक विचार करणे श्रेयस्कर आहे. त्याचप्रमाणे ***गीता व पातञ्जलयोगसूत्रे*** यातील एतद्विषयक विचार आपण आतापावेतो ठिकठिकाणी जे पाहिले आहेत, त्यांचा समन्वय करणेही योग्य ठरेल. आपण आतापर्यंत या दोन्ही शास्त्रात किती कमालीचे साधर्म्य आहे, ते पाहिलेच आहे. आता ईश्वरविषयक कल्पना या दोन्ही शास्त्रात किती जुळतात, त्याचा पण एकवार आढावा घेऊ या.

ज्ञानेश्वरांचे ईश्वरप्रणिधानविषयक संकेत

ईश्वरप्रणिधानाचे गीतेच्या योगमार्गाशी असणारे अभिन्नत्व, त्याचे अनन्यसाधारण स्थान व महत्त्व आहे. ते स्पष्ट करणारे ज्ञानदेव म्हणूनच म्हणतात कीः

आणि तैंचि नित्यादिक। अज्ञानाचें आवश्यक।
आचरितां मोचक। केंविं होएं पां।।१८-१४४०।।
आईसिं अपेक्षा जालियां। बद्ध मुमुक्षुतैं आलिआं।
देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया। सांघितली।।१४४१।।
जैं देहवाचामानसें। विहित निफजैं जैं जैसें।
तैं एक ईश्वरोद्देशें। किजैं म्हणितलें।।१४४२।।

"अज्ञानबद्धांना मोक्षपदी बसवण्याच्या साधनाचा उपोद्घात श्रीकृष्ण तिसऱ्या अध्यायी करतांना म्हणतात की देहाहंकाराचा जो बंध असतो, तो पडू नये म्हणून काम्य व निषिद्ध कर्मे करणे टाकावे व विहित कर्म बिनचूकरीत्या आचरावे. अशी कर्मे अज्ञानमोचक कशी होतील अशी पृच्छा करणाऱ्या मुमुक्षूंसाठी देवांनी ***ब्रह्मार्पणक्रिया*** निवेदिली आहे, ती अशी की ***देह-वाचा-मनाने जे जे विहित कर्म होते, ते केवळ ईश्वराप्रीत्यर्थ करावे."***

हेंचि ईश्वरीं कर्मयोगें। भजनकथनाचेनि खागें।
आदरिलें शेषभागें। चतुर्थाचेनि।।१८-१४४३।।
तैं विश्वरूप अकरावा। अध्यावो संपें जंव आघवां।
तंवं कर्में ईशु भजावा। हें जैं बोलितलें।।१४४४।।
तैं अष्टाध्यायीं उघड जाण एथ देवताकांड।
शास्त्र सांघतसें आड। मोडौनि बोलें।।१४४५।।

"कर्मयोगाद्वारे ईश्वराची भक्ती कशी करावी हे चतुर्थ अध्यायाच्या उर्वरित भागात त्यांनी सांगितले आहे. तेथपासून तो अकरावा अध्याय संपेपर्यंत ***[आणि अद्वेष्टादी गुणांच्या विवेचनास प्रारंभ ज्यानंतर होतो त्या १२-१२ या गीताश्लोकापर्यंत ("आणि तेणेंचि ईशप्रसादें .....। सांच ज्ञान उद्बोधें जैं कोंवलें।...।अद्वेष्टादिप्रभृतिकीं। अथवा अमानिकत्वादि।.....।।१८-१४४६, १४४७।।)]*** श्रीकृष्ण कर्माद्वारे ईश्वराची भक्ती कशी करावी ते जे सांगतात, ते सर्व ***अष्टाध्यायरूपी देवताकांड वा उपासनाकांड*** असल्याचे गीताशास्त्रावरून स्पष्ट दिसून येते," असे शास्त्राचा आडपडदा न ठेवणारे ज्ञानेश उघड सांगत आहेत.

ईश्वराच्या या उपासनेद्वारे व गुरुसंप्रदायाच्या मार्गाने जाऊन ईश्वरप्रसाद प्राप्त होतो; ज्ञानप्राप्ती होते. उपासना म्हणजे काय, ईश्वरप्रणिधान कशाला म्हणावे याचा सारांश या ओव्यांतून व्यक्त होतो. असा हा ईश्वरप्रणिधानाचा गीतोक्त मार्ग अंती योगाचे गंतव्य म्हणजे कैवल्य प्राप्त करून देतो, असे श्रीज्ञानदेवांनी या ठिकाणी स्पष्ट केले आहे. अंतिम अध्यायी येणाऱ्या या ओव्या गीतेवरील ज्ञानेश्वरांच्या निरूपणातील एक महत्त्वाचा भाग आहेत.

श्वेताश्वतरातील ईश्वरप्रणिधान -पराभक्ती

ज्ञानदेव जसे गुरूंना आत्मप्राप्तीसाठी महत्त्वाचे कारक मानतात, तसेच ***श्वेताश्वतरोपनिषद*** ही म्हणतेः***"यस्य देवे परा भक्तिः यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः। ।६-२३।।"*** - "ज्याची परमेश्वराविषयी पराभक्ती आहे आणि देवाप्रमाणेच गुरुविषयी ज्याची पराभक्ती आहे, अशा महात्म्याच्या हृदयात या उपनिषदात सांगितलेला पुढील अर्थ प्रकाशित होतो."

तो म्हणजे ***"यदाऽऽत्मतत्त्वेन तु ब्रह्मतत्त्वं। दीपोपमेनेह युक्तः प्रपश्येत्। अजं ध्रुवं सर्वतत्त्वैर्विशुद्धं। ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः।।२-१५।।श्वेता.।।"*** - "जेव्हा हा योगी दीपाप्रमाणे प्रकाशमान असलेल्या आत्मतत्त्वाद्वारे ब्रह्मतत्त्वाचा साक्षात अनुभव घेतो, तेव्हा तो अज, ध्रुव आणि सर्व तत्त्वांहून विशुद्ध अशा परमात्म्याला जाणून सर्व पाशांतून मुक्त होतो."

योग व भक्ती ही एकाच गंतव्यपथाची दोन नांवे आहेत हे जसे यावरून दिसून येते, तसेच अद्वैतब्रह्माचा साक्षात्कार याच मार्गाने होतो, असेही दिसते. तसेच ***ईश्वर - परमात्मा - परमेश्वर - देव - गुरू - आत्मतत्त्व - ब्रह्मतत्त्व*** हे सर्व शब्द समान अशा एकाच तत्त्वाचे वाचक असल्याचेही स्पष्ट होते ते वरील सूत्रांवरून!! ***जीवशिव अद्वैत असल्याचे हे उपनिषद्वचन स्पष्ट सांगते आणि त्याच्या साक्षात्कारासाठी पराभक्तीचा आश्रय करण्यासही सुचवते.***

पातञ्जलविचार::::

ईश्वरप्रणिधानाचा मार्ग

पातञ्जलयोगसूत्रसुद्धा कैवल्यसाक्षात्कारासाठी योगमार्ग सांगते. ***"सत्त्वपुरुषयोः शुद्धिसाम्ये कैवल्यम्।।३-५५।। पा.यो.सू.।।"*** - चित्त व पुरुष यांच्यात शुद्धिसाम्य झाले की ***कैवल्य*** प्राप्त होते. ***श्वेताश्वतर ज्याला पराभक्ती म्हणते ती हीच शुद्धिसाम्यावस्था*** - **जिला ज्ञानेश्वरी *"सार जाण योगाचें।।२-२७३।।"* असे म्हणते.** जीवशिव ऐक्य घडून येऊन ही स्थिती प्राप्त होते. त्यासाठी पातञ्जलयोगसूत्रे जे उपाय सांगतात, त्यात ***ईश्वरप्रणिधान*** अंतर्भूत आहे. त्या सर्वाचा विशेष विचार आपण पूर्वी केलाच आहे *(उन्मेषः६::श्रीगीता व पातञ्जलयोग, पृ.क्र.१०६ते१०८; उन्मेषः३५:राजविद्या-राजगुह्य, पृ.क्र.५३४व५३५ व उन्मेषः३६:शिवशक्तीचा चिद्विलास, पृ.क्र.५६०व५६१).*

सध्या ईश्वरसंबंधित संकल्पनांचा मागोवा घ्यावयाचा असे आपण ठरवले आहे. हा ईश्वर प्रस्फुटित होतो तो ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।"*** या पातञ्जलयोगसूत्रातून. पतञ्जली म्हणतात की इतर उपायांप्रमाणेच ईश्वराच्या प्रणिधानानेसुद्धा ***असंप्रज्ञात समाधि*** सिद्ध होतो. ***निरिच्छ मनाने व निर्मळ भावाने ईश्वराचे नामस्मरण, चिंतन, मनन करणे; आपले सर्व व्यवहार ईश्वरार्पण बुद्धीने करणे, यास ईश्वराचे प्रणिधान करणे असे योगशास्त्र म्हणते.*** **हाच भक्तिमार्ग होय. योगसूत्रे हा भक्तिमार्ग योगात समाविष्ट करतात, तो असा.**

ईश्वराचे पतञ्जल्युक्त स्वरूप

त्या ईश्वराचे स्वरूप स्पष्ट होते ते *१-२४ ते २७* या सूत्रांतून. तसेच ईश्वरप्रणिधानाची क्रिया *१-२८* या पातञ्जलयोगसूत्रातून स्पष्ट होते. ईश्वरप्रणिधानाची फलश्रुती *१-२९* या योगसूत्रात दिलेली आहे. अशी ही *१-२३ ते २९* ही पातञ्जलसूत्रे ***ईश्वर व ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनांशी निगडित आहेत.

पंचक्लेश

ईश्वराचे स्वरूप अत्यंत कमी शब्दात सांगणारी ही सूत्रे काय म्हणतात, ते पहाः ***"क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः।।१-२४।।पा.यो.सू.।।"*** पातञ्जलयोगसूत्र *क्र.२-३* अनुसार ***अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश*** असे पाच क्लेश आहेत. ***अविद्या*** हे उरलेल्या चार क्लेशांचे कारण आहे *(२-४पा.यो.सू.).*

अविद्या

अविद्येचे स्वरूप ***"अनित्याशुचिदुःखानात्मसु नित्यशुचि - सुखात्मख्यातिरविद्या।।२-५।।पा.यो.सू.।।"*** असे आहे. अनित्य वस्तूला नित्य मानणे म्हणजे ***संसार*** सत्य मानणे; अपवित्र वस्तूला पवित्र मानणे म्हणजे देहाला सत्य मानणे; दुःखद वस्तूला सुखद मानणे म्हणजे देहेंद्रियभोगात आनंद मानणे; व **जी वस्तू आत्मरूप नाही तिला आत्मरूप मानणे म्हणजे देहभावास *आत्मा* मानणे म्हणजे *अविद्या* होय.** हीच सर्व क्लेशांची जननी आहे. ***अज्ञान*** हे तिचे दुसरे नांव आहे.

अस्मिता

अस्मितेचे स्वरूप कसे आहे, ते पहाः ***"दृग्दर्शनशक्त्योरेकात्मतेवास्मिता।।२-६।। पा.यो.सू.।।"*** - ***दृग्शक्ती*** म्हणजे ***द्रष्टा, दर्शनशक्ती*** म्हणजे दृश्य जगाचे दर्शन वा ज्ञान ज्याच्या मध्यस्थीने होते ते ***चित्त*** ही दोन्ही परस्परांहून भिन्न असतात. तरीही ती एकरूपच आहेत असे वाटणे व त्यातून ***"अस्मि"*** म्हणजे ***"मी आहे"*** असे स्फुरण होणे, असे ***अस्मिता*** या क्लेशाचे कार्य आहे. ***अहंकार*** असेही त्याला म्हणता येते.

रागद्वेष

"सुखानुशयी रागः।।२-७।।पा.यो.सू.।।" व ***"दुःखानुशयी द्वेषः।।२-८।। पा.यो.सू.।।"*** - सुखाच्या अनुभवानंतर अशीच सुखे मिळावीत अशी लालसा चित्तात उत्पन्न होणे हा ***राग*** नावाचा क्लेश आहे. तसेच दुःखाच्या अनुभवानंतर अशी दुःखे आपल्या वाट्यास येऊ नयेत अशी प्रतिकूल भावना चित्तात निर्माण होते. तिला ***द्वेष*** म्हणतात.

अभिनिवेश

"स्वरसवाही विदुषोऽपि तन्वनुबन्धोऽभिनिवेशः।।२-९।। ।।पा.यो.सू.।।" - विद्वान व अडाणी या दोघांच्याही ठायी शरीराची जी आसक्ती असते व हा देहरूपी जो मी आहे, तो कधीही मरू नये अशी जी इच्छा असते, ती या क्लेशाशी संबद्ध आहे. हा क्लेश म्हणजे ***अभिनिवेश*** होय. ***"देह म्हणजे मी"*** ही भावना एखाद्या नदीप्रवाहाप्रमाणे अखंडपणे नांदणे असे त्या क्लेशाचे स्वरूप आहे. ***देहात्मभावना*** असे याचे दुसरे नांव आहे.

विपाकाशयादींशी ईश्वराचा संबंध

क्लेश ***स्थूल व सूक्ष्म*** या दोन्ही स्वरूपांचे असतात. ध्यानाने सूक्ष्म क्लेश नष्ट होतात. कर्माशयास मूळ म्हणजे हे पंचक्लेशच असतात. कर्मसुद्धा तीन प्रकारचे असते. ***चांगले, वाईट व मिश्र.*** अविद्यादी क्लेश यांच्यामुळेच ***जन्म, मृत्यू, आयु व सुखदुःखात्मक भोग*** प्राप्त होतात *(१-२४,२-१० ते १३पा.यो.सू.).*

जाति, आयु व भोग हा ***कर्मविपाक*** होय. या विपाकास कारण म्हणजे चित्तातील प्रसुप्त वासनांचा आशय होय. ईश्वराचा या सर्वांशी म्हणजे ***क्लेश, कर्मविपाक व वासनाशय*** यांच्याशी कसल्याही प्रकारचा संबंध नसतो. पतञ्जलींचा ***पुरुषविशेष*** म्हणजे पुरुषांतील विशेष असा हा ***ईश्वर*** आहे.

याचे दोन प्रकारचे अर्थ होतात. एक म्हणजे हा जो ईश्वर आहे, त्याला या पंचक्लेशादींची बाधा नसते आणि दुसरा म्हणजे जीवाच्या म्हणजे पुरुषाच्या पंचक्लेशादींशी, सुखदुःखादी भोगांशी आणि कर्मविपाकादींशी ईश्वराचे काहीही घेणेदेणे नसते. ईश्वर सुखदुःख देतो, कर्मांची फळे जीवाकडून भोगवतो, इ.कल्पनांशी या पतञ्जल्युक्त ईश्वराचा काडीमात्रही संबंध नाही.

गीताही एका प्रकारे यासम अर्थानेच असे म्हणते की ***"न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः। न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते।।५-१४।। नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः। अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।१५।।"*** - मनुष्याचे कर्तृत्व, कर्म वा कर्मफलाचा उपभोग यांचा कर्ता ***ईश्वर*** नाही. तो कोणाच्याही शुभाशुभकर्मांशी संबंध ठेवत नाही. जीवास सुखदुःखादी कर्मफले यांचा उपभोग त्याच्या अज्ञानाने ज्ञानास झाकून टाकलेले असल्याने घडतो. या सर्वास कारण असते ती एकमात्र ***प्रकृति*** म्हणजे ***स्वभाव*** वा ***माया*** वा ***अविद्या*** च होय, असा आचार्यादी थोरांच्या भाष्याचा आपणास प्रतीत होणारा भावार्थ आहे. हे श्लोकही गीतेतील ईश्वराचा पतञ्जल्युक्त ईश्वराशी किती जवळचा संबंध आहे, ते दर्शवतात.

असे ज्या ईश्वराला पतञ्जली ***विशेष असा पुरुष*** म्हणून म्हणतात, त्याला गीता ***उत्तम पुरुष*** अशी संज्ञा देते. त्या उत्तम पुरुषाचे स्वरूप ज्ञानेश्वरांनी त्याचे जे वर्णन केलेले आपण पाहिले आहे *[(ओवी क्र.१५-५२५ ते ५५७) उन्मेषः२८ ::परमात्मस्वरूप क्षर-अक्षर-उत्तम पुरुष विचार, पृ.क्र.४२१ ते ४३१]*, त्यावरून लक्षात येते. हे स्वरूप अधिक स्पष्ट होते, ते पुढील पातञ्जलसूत्रावरून: ***"तत्र निरतिशयं सार्वज्ञबीजम्।।१-२५।। पा.यो.सू.।।"***-त्या ईश्वराठायी पूर्ण ***सार्वज्ञत्व*** आहे. विश्वोत्पत्ती - स्थिती व प्रळयकाळीही त्याच्या ठायी ***सार्वज्ञत्व*** बीजरूपाने असते.

सार्वज्ञत्व म्हणजे ज्ञान. असे ज्ञान ईश्वराठायी असते. सर्व प्रकारच्या ज्ञानास ***ब्रह्मज्ञान*** हेच मूळ आहे. या ज्ञानासच येथे ***सर्वज्ञान*** म्हटले आहे. विश्वातील उत्पत्ती-स्थिति-लय या त्रिकालीही हेच ज्ञान सर्व ज्ञानाचे बीजरूप असते. म्हणून ***पतञ्जली म्हणतात तो ईश्वर आत्यंतिक ज्ञानवान असून सर्व ज्ञानाचे बीजस्वरूप तोच आहे.*** ज्ञान व अज्ञान यांचा आपण गीतेच्या तेराव्या अध्यायानिमित्त जो विचार केला होता, तिकडे लक्ष दिले तर आपणास **हा ईश्वर गीतोक्त ईश्वराशी मिळताजुळता असल्याचे दिसून येईल.** असो. ज्ञान हे ब्रह्माचे स्वरूप आहे. ***सर्वज्ञानी*** **असा हा पातञ्जल ईश्वर म्हणूनच *ब्रह्मस्वरूप* असला पाहिजे.**

ईश्वराचे गुरुत्व

ईश्वराचे स्वरूप अजून स्पष्ट करणारे पतञ्जली म्हणतात: ***"स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्।।१-२६।। पा.यो.सू.।।"*** - दिक्कालातीत असा हा ईश्वर असून तो सर्वांचा - गुरूंचाही गुरू आहे. विश्वाचा गुरू असणाऱ्या या ईश्वरास कोणी कोणी ***गुरुतत्त्व*** म्हणून ओळखतात. श्रीकृष्णांनाही अर्जुनाने गुरू म्हणूनच मान्यता देत ***"शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।"*** अशी विनंती केलेली आपण पूर्वी पाहिलीच आहे.

पतञ्जलींचा हा ***"पूर्वेषामपि गुरुः"*** असा जो ***ईश्वर*** आहे, त्यास आपण गीतेत श्रीकृष्णवचनांतून अनेकदा ओळखू शकतो. याचे ठळक उदाहरण म्हणजे योगाचा आद्य प्रवक्ता आपणच असल्याची ग्वाही देत श्रीकृष्ण म्हणतात: ***"इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्। विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।।४-१।।"*** - "अव्यय असा हा योग मीच विवस्वानाला सांगितला होता. परंपरेने तोच योग विवस्वानापासून मनूला, मनूपासून ईक्ष्वाकुला व नंतर राजर्षींना प्राप्त झाला."

ब्रह्मस्वरूप प्राप्त करून देणारा हा जो योग आहे, तो भगवंतांनीच प्रसृत केला आणि त्यांच्यापासून तो ग्रहण करून ***"विवस्वान –➤ मनू –➤ ईक्ष्वाकू –➤ राजर्षी"*** अशा परंपरेने सर्व जगात पसरला. म्हणून गीतोक्त भगवंत हा असा गुरूंचाही गुरू होय.

तसेच तो देशकालाच्या मर्यादेपलीकडीलही असल्याचे स्पष्ट करणारी श्रीकृष्णवचने पहा: ***"अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्। प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया।।४-६।।"***- "भूतमात्रांचा मी ईश्वर आहे. मी अज आहे. मी अव्यय आत्मा आहे. माझ्या प्रकृतीठायी अधिष्ठित होऊन आपल्या मायेने मी जन्म घेतो."

भगवंतांचे असे जन्म व त्यातील कर्मे दिव्यच असतात. धर्मसंस्थापनेसाठी ते अवतार धारण करतात. ***धर्म*** **म्हणजे त्यांचे आद्य कर्तव्य जे गुरू म्हणून आहे, त्यानुसार केलेला उपदेश होय.** सृष्ट्युत्पत्तीनंतर हाच उपदेश त्यांनी विवस्वानास केल्याचे आपण पूर्वीच पाहिले आहे. तो उपदेशच हा ***धर्म*** होय. त्याचीच पुनर्प्रस्थापना करण्यासाठी, दुष्टांचे निर्दालन व साधूंचे संरक्षण करणे यासाठी भगवंतांचे हे जन्म असतात. असो.

प्रणव - ईश्वराचे सगुण रूप

ईश्वराचे स्वरूप असे *१-२४ ते २६* या सूत्रांतून ग्रथित केल्यानंतर पतञ्जली त्याची सगुण साकाराशी जोडणी करत म्हणतात: ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।। पा.यो.सू.।।"*** *ईश्वर* हा सर्वांचा कालातीत असा गुरू आहे, हे अगोदरच प्रतिपादले आहे. **ईश्वर व गुरू यांचे अभिन्नत्व जसे त्यातून दिसून येते, तसेच अध्यात्मातील गुरुरूपही त्याचद्वारे स्पष्ट होते. गुरूचे कार्य करण्यास सदैव तत्पर असणाऱ्या अशा त्या ईश्वराची सगुण साकार अशा विश्वाशी सांगड घालणारा *प्रणव* होय.**

म्हणूनच ***वाच्य-वाचकभाव*** प्रकट करत पतञ्जली म्हणतात की ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२७।।पा.यो.सू.।।"*** म्हणजे ***प्रणव*** **हा ईश्वराचा वाचक आहे; *प्रणव* हे त्याचे प्रकटलेले स्वरूप आहे; ते त्याचे नांव आहे.**

या प्रणवास वाचकता येते ती ***ॐ*** या अक्षराच्या उच्चारणाने! ***ॐकार*** हाच प्रणवाचा साधकांसाठी होणारा आविष्कार होय. ॐकार व प्रणव यांचे वेदोपनिषदांतून होणारे दर्शन आपण पूर्वीच घेतले आहे *(उन्मेषः३७:ॐकार व प्रणव पृ.क्र.५६१ ते ५८३)*. जरूर असल्यास जिज्ञासूंनी ते पुनः अवलोकन करावे. म्हणजे पतञ्जलींस प्रणवाचे कोणकोणते स्वरूप या सूत्रातून अभिप्रेत आहे, त्याचा उलगडा होईल. प्रणवात ***सगुण ते निर्गुण*** असे सर्व ब्रह्मांड समावते, एवढेच निर्देशन येथे केले तरी जिज्ञासूंस पुरेलसे वाटते.

ईश्वरप्रणिधानाचे मूळ सूत्र

यानंतरच्या सूत्रात सधकांसाठी साधनामार्ग स्पष्ट करत पतञ्जली म्हणतात: ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।पा.यो.सू.।।"*** प्रणव जपावा; वैखरी - मध्यमा - पश्यंति या तिन्ही वाचांद्वारे ॐकार जपावा; श्वासोच्छ्वासाशी संबंधित असा ***सोऽहं*** मंत्र जपावा; सर्व भूतमात्रांत - एवं च काय, सर्व विश्वातील यच्चयावत स्थावरजंगमात ईश्वरभाव कल्पून अजपा जपावा; ***"वासुदेवः सर्वमिति"*** ही भावना हा ईश्वरजप करत असता करावी; असे अनेक विकल्प या सूत्राद्वारे प्रकट होतात.

ईश्वरप्रणिधानाचे अनेकानेक प्रकार वा युक्त्या संभवतात. परंतु त्या सर्वांचे सूत्र एकच आहे. ते म्हणजे ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।१-२८।।पा.यो.सू.।।"*** - सतत ईश्वराचे अनुसंधान ठेवणे व त्याचे स्वरूप ध्यानी दृढ करत जाणे हेच ते मूळ सूत्र होय. जप व त्याच्या अर्थाची भावना ठेवणे हा धारणेचा भाग आहे.

हा जप जसजसा दृढ होत जातो तसतसे ***ध्यान - समाधि - संयम*** इ.पुढील अंगे प्रकट होत जातात. त्यातूनच ईश्वराचा साक्षात्कार प्रकटतो आणि ***"निर्विचारवैशारद्ये ऽध्यात्मप्रसादः।।१-४७।। पा.यो.सू.।।"*** - अध्यात्मप्रसाद; निर्बीज समाधि; ***"सत्त्वपुरुषयोः शुद्धिसाम्ये कैवल्यम्।।३-५५।।पा.यो.सू.।।"*** ते ***"पुरुषार्थशून्यानां गुणानां प्रतिप्रसवः कैवल्यं स्वरूपप्रतिष्ठा वा चितिशक्तिरिति।।४-३४।।पा.यो.सू.।।"*** - कैवल्य इ. अवस्था प्राप्त होऊन योगसिद्धी होते.

ईश्वरप्रणिधान व अंतराय

तसेच पतञ्जली सांगतात की ***"ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च।।१-२९।।पा.यो.सू.।।"*** - ईश्वरप्रणिधानामुळे योगमार्गातील अडथळे दूर होतात आणि ईश्वराचा साक्षात्कार होतो; ईश्वराचे ज्ञान होते; निर्विघ्नपणे निर्विकल्प समाधि प्राप्त होतो; आत्मसाक्षात्कार घडतो; कैवल्यसिद्धी प्राप्त होते.

गीतेतही श्रीकृष्ण योग पूर्ण करण्याचे आश्वासन देत असेच म्हणतात की ***"अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।"*** व ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"*** - हा गीतोक्त ईश्वरप्रणिधानाचा उपाय गीता व पातञ्जलसूत्रात समसमानच आहे, हेउपरोल्लेखित पातञ्जलयोगसूत्रांवरून आपल्या लक्षात आलेच असेल.

"अनन्याश्चिन्तयन्तो मां" म्हणजेच पतञ्जलींचे ***"तज्जपस्तदर्थभावनम्"*** होय. ***"पर्युपासते"*** म्हणजेच ***"ईश्वरप्रणिधान"*** हा उपाय होय. ***"अप्यन्तरायाभावश्च"*** हे पतञ्जलींचे म्हणणे म्हणजेच भगवंतांचे ***"तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्"*** हे आश्वासन होय.

हे ईश्वरप्रणिधान कसे करावे याचे निर्देशन ***"मन्मना (भव), मद्भक्तो (भव), मद्याजी (भव) मां नमस्कुरु"*** या सर्वांतून गीता करते. ***"ततः प्रत्यक्चेतनाधिगमो"*** याचे समानार्थक म्हणजे ***"मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं पत्परायणः"*** हे बोल होत.

एकतत्त्वाभ्यासाचा मार्ग

ईश्वरप्रणिधान हे *"तत्प्रतिषेधार्थमेकतत्त्वाभ्यासः।।१-३२।। ।।पा.यो.सू.।।"* या सूत्रात सांगितलेल्या उपायांपैकी योगातले अंतराय दूर करण्यासाठी करावयाच्या एकतत्त्वाभ्यासाचा भाग होय. एकाच कोणत्यातरी तत्त्वाचा अभ्यास वा त्यावर संयम करणे असे या उपायाचे स्वरूप आहे. **ईश्वर या तत्त्वाचा असा अभ्यास करणे म्हणजेच *ईश्वरप्रणिधान* होय.** गीताही हाच अभ्यास मुख्य योगोपाय मानते हे स्पष्टच आहे. असो.

गीतेचा प्रतिपाद्य विषय::::

मीमांसकांची युक्ती

स्व.श्री.लो.टिळकांनी ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय कोणता आहे, हे ओळखण्याच्या काही महत्त्वाच्या मीमांसकांच्या खुणा त्यांच्या ***गीतारहस्य*** या प्रसिद्ध ग्रंथांतरी व्यक्त केल्या आहेत. ***विषयप्रवेश*** या प्रकरणी मीमांसकांचा ***"उपक्रमोपसंहारौ अभ्यासोऽपूर्वता फलम्। अर्थवादोपपत्ति च लिङ्गं तात्पर्यनिर्णये।।"*** हा श्लोक त्यांनी तेथे उद्धृत केला आहे *(पृ.११- गीतारहस्य १५वी मराठी आवृत्ती).*

ग्रंथाचा **१)** ***उपक्रम,*** **२)** ***उपसंहार,*** **३)** ***अभ्यास*** म्हणजे पुनरुक्ती किंवा वारंवार काय सांगितले आहे, **४)** ***अपूर्वता*** म्हणजे पूर्वीपेक्षा नवीन काय ग्रंथकार सांगत आहे, **५)** ***फल*** म्हणजे ग्रंथाचा परिणाम, **६)** ***अर्थवाद*** म्हणजे आगंतुक विषय व **७)** ***उपपत्ती*** वा उपपादन म्हणजे एखादी विशिष्ट गोष्ट सिद्ध करण्यासाठी केलेली प्रमाणांची तर्कशुद्ध मांडणी - या गोष्टी लक्षात घेऊन **ग्रंथाचे सत्त्व** काढले पाहिजे. या सात गोष्टी त्यासाठी ***लिङ्ग*** म्हणजे साधनीभूत ठरतात. उपरोक्त पद्धतीचा आपापल्या परीने विचार करून अनेक विद्वानांनी व आचार्यादींनी गीतेचा प्रतिपाद्य विषय कोणता ते ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्या सर्वांची याबाबत एकवाक्यता होत नाही, हे विद्वानांस विदितच आहे.

ईश्वरप्रणिधान

ईश्वराचे स्वरूप वारंवार स्पष्ट करून सांगणे, त्याचा जीव व जगताशी असणारा संबंध स्पष्ट करणे आणि ईश्वरप्रणिधान कसे करावे, ते सफल झाल्याची लक्षणे कोणती हे तर गीतेत वेळोवेळी येणारे प्रमुख विषय होत. संपूर्ण गीताच ***ईश्वर व ईश्वरप्रणिधान*** या विषयांना वाहून टाकलेली आहे असे दिसते. वर सांगितलेल्या मीमांसकांच्या युक्तीचा अवलंब करून आणि ज्ञानेश्वरीचा आधार घेत आपणास याविषयी काय उमजते आणि **गीतेचे *सत्त्व*** काय सापडते ते पाहू याः

१)उपक्रम

गीतेतील उपक्रम म्हणजे ***"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ... ।।१-१।।"*** हा धृतराष्ट्राचा प्रश्न!! याकडे दुर्लक्षच केलेले बरे! ज्ञानेश्वरीचा उपक्रम मात्र ***"ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।"*** या प्रख्यात प्रासादिक ओवीने होतो.

ईश्वराचे निखळ स्वरूप स्पष्ट करणारी ही ओवी आहे, हे आपण पूर्वीच पाहिले आहे *(उन्मेष:१-१::पूर्वरंग-१पृ.क्र.१ ते ३).* गीतेसाठीही ही ओवीच उपक्रमस्वरूप समजणे उचित ठरेल. असो.

२) उपसंहार

"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।१८-७८।।" हा गीतेचा उपसंहार होय. त्याचाही विचार आपण पूर्वी केला आहे *(उन्मेष:१-१::पूर्वरंग-१ पृ.क्र.११ व १२).* ***ज्ञानेश्वरीचा उपसंहार पसायदानाने होतो. ईश्वराशी एकरूपता मागणारे हे पसायदान आहे,*** हे वेगळे सांगायला नको. जेथे ***कृष्ण तेथे पार्थ*** **ही गीताप्रतिमासुद्धा *ईश्वर व भक्त* यांचे अनन्यत्व**च नाही का दर्शवत! ***ईश्वरप्रणिधानाचे साफल्य ते हेच!*** सारांश **गीता व ज्ञानेश्वरीचाही *उपसंहार* ईश्वरप्रणिधानाचे साफल्य सूचित करतो.**

३) अभ्यास

अभ्यास या दृष्टीने ***गीता वारंवार ईश्वर, ईश्वरप्रणिधान, त्याची रीत, त्याची महत्ता, भक्त व योग्याची स्थिती व महती, ईश्वराचे जीव-जगतसापेक्ष स्वरूप व त्यापरोक्ष निरुपाधिक असे त्याचे स्वरूप या विषयांची पुनरुक्ती वा सतत विचार करतांना दिसून येते,*** हे आपण आतापावेतो पाहिलेच आहे. परंतु निव्वळ ईश्वरस्वरूपाच्या वर्णनासच हा ग्रंथ वाहिलेला नाही. ***ईश्वरप्रणिधान*** **या विषयाचा विचार करतांना ईश्वर, त्याचे स्वरूप, प्रणिधानकर्ता साधक-योगी वा भक्त व तत्संबंधित इतर विषय येणे साहजिकच आहे. म्हणून *अभ्यास* या दृष्टीने गीतेचा प्रमुख विषय *ईश्वरप्रणिधान* हाच होय.** हा विषय उपक्रम व उपसंहाराशीही सुसंगत असाच आहे.

४)अपूर्वता

गीता ***योगशास्त्र*** सांगते हे तर स्पष्टच आहे. ***"ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे"*** हा तर गीताध्यायांतीचा परवलीचा पदप्रयोग आहे त्याचाही विचार आपण पूर्वीच केला आहे *(उन्मेष:४::ब्रह्मविद्या व योगशास्त्र पृ.क्र.८१ ते ८२).* योगशास्त्रावर अनेकानेक ग्रंथ आहेत. ***पातञ्जलयोगसूत्रे*** हा तर अत्यंत शास्त्रशुद्ध असा या विषयावरचा प्रमाणित आणि प्रायोगिक ग्रंथ आहे. तोही अत्यंत पुरातन अशा पीठिकेचा असल्याचे श्री.कृ.के.कोल्हटकर यांनी आपल्या ***भारतीय मानसशास्त्र*** या योगदर्शनावरील श्रेष्ठ ग्रंथात सूचित केले आहे *[भूमिका परिच्छेद ९(४) व १०(२) तसेच परिच्छेद ८,९ व १० - पृ.क्र. ९२ ते १२० पातञ्जलयोगदर्शन, ६वी आवृत्ती].*

योगाच्या सर्व प्रचलित पद्धतींचा व शास्त्रांचा समावेश पतञ्जलिकृत योगसूत्रात होतो, हे आपण पाहिलेच आहे. ***पातञ्जलयोगसूत्रे*** हा या विषयावरील विचारांस सूत्रबद्ध करणारा परंपराप्राप्त असा ग्रंथ होय. **गीता मात्र त्यातील *"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।"* या सूत्रास मुख्य विषय करून चालणारा ग्रंथ दिसतो.** हीच गीताग्रंथाची ***अपूर्वता*** होय. प्रत्यक्ष ईश्वरावतार कृष्णाचीच गीता ही वाणी आहे. हीसुद्धा ***अपूर्वता*** नव्हे काय!

५) फल

फल **या दृष्टीने विचार करता गीतेचा परिणाम *ईश्वरस्वरूपाची प्राप्ती* हाच असल्याचे आपल्या आतापावेतोच्या परीक्षणावरून स्पष्ट दिसून येते.** ज्ञानदेवही ज्ञानेश्वरीचे फल म्हणून ***"आणि ग्रंथोपजिविएं। विशेषें लोकें इयें। दृष्टादृष्ट विजएं। होआवें जी।।१८-१८००।।"*** असे पसायदान मागतांना दिसतात. **<u>इहलोक तरून जावे, मोक्ष मिळावा, ईश्वरस्वरूपाची प्राप्ती व्हावी, हेच गीतेचेही फल असल्याचे त्यावरून दिसून येते</u>.**

तसेच अठराव्या अध्यायी *ओवी क्र.१२३६ ते १२४४* यातून हेच गीतेचे फल वेगळ्या शब्दांत पण स्पष्टपणे सांगितले आहे. ***"हेंच असो एणें शास्त्रेश्वरें। माघां उपाय बहुवें विस्तारें। सांघितला जैसा करें। घेवों एं आत्मा।।१८-१२३६।। ... एथ अविद्यानाशु हें स्थल। तेणें मोक्षोपादन फल। या दोन्हीं केवल। साधन ज्ञान।।१२४३।। हे इतुलेंचि नानापरीं। निरूपिलें ग्रंथविस्तारीं। ..।।१२४४।।"*** या ओवीसंभारातून आपण आतापावेतो उपक्रमादींविषयी जी विधाने केली आहेत, ती प्रकट होतांना दिसतात. **गीतेचा परिणाम अथवा *फल* हे ईश्वरस्वरूपाची प्राप्ती, मोक्ष, स्वरूपप्राप्ती, अद्वैतसिद्धी इ.नाना संज्ञांनी भूषविलेली स्थिती प्राप्त होणे, साक्षात्कार घडणे हेच आहे.**

किंबहुना हे असेच असल्याने ज्ञानदेवांनी गीतेस उचलून धरले आणि आपली प्रासादिक वाणी तिच्यावरून ओवाळून ज्ञानेश्वरीरूपाने आपल्या पदरी टाकली आहे, हे सत्य आपणास तरी उमगले पाहिजे! असो!

६) अर्थवाद व उपपत्ती

वरील गोष्टी विचारात घेतल्या आणि गीतेचे ज्ञानेश्वरीसह परिशीलन केले की गीतेतील ***अर्थवाद आणि उपपत्ती*** सहज ओळखू येतात. **<u>"ईश्वरप्रणिधानाद्वा" हाच उपाय उत्तमोत्तम असल्याचे गीता स्पष्ट करते आणि हाच गीतेचा प्रतिपाद्य विषय होय</u>,** असे आपणास मीमांसकांच्या उपरोल्लेखित कसोटीवरून दिसून आल्यास नवल नाही. असो.

गीतेतील ***अभ्यास*** या वरील एका कसोटीस उतरणारे ***ईश्वर व ईश्वरप्रणिधान*** यांबाबतच्या उर्वरित विवेचनाकडे आता वळू या.

गीतोक्त विचार (१): ईश्वर::::

गीतेतील ईश्वराचे स्वरूप

पातञ्जलयोगसूत्रांनुसार ***ईश्वर व ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनांचा आपण आताच विचार केला. आता ***गीता*** ईश्वराचे कोणते स्वरूप दाखवते, तिकडे वळू या.

ईश्वराची गीतोक्त संबोधने

गीतेत ईश्वराची वेगवेगळी नामे आहेत. **श्रीकृष्ण हे स्वतःच ईश्वर आहेत. त्यांची वेगळाली नामे म्हणूनच *ईश्वरवाचक* वा त्याची नावे होत.** माधव*(१-११)*, हृषीकेश *(१-१५)*, कृष्ण *(१-२८,३२)*,

गोविंद *(१-२८)*, मधुसूदन *(१-३४,२-१४)*, केशव *(२-५४)*, जनार्दन *(३-१,११-५)*, पुरुषोत्तम *(८-१,१०-१५)*, कमलपत्राक्ष (११-२), परमेश्वर *(११-३)*, प्रभु *(११-४,१४-२१)*, योगेश्वर *(११-४)*, हरि *(११-९)*, देव *(११-१४,१५,४५)*, विष्णु *(११-२४,३०)*, जगन्निवास *(११-२५)*, देववर *(११-३१)*, देवेश *(११-३६,४५)*, यादव *(११-४१)*, विश्वमूर्ति *(११-४६)*, महाबाहु *(१८-१)*, अच्युत *(१८-७३)*, वासुदेव *(१८-७४)* इ.ही ईश्वराची वानगीदाखल संबोधने म्हणून सांगता येतील.

गीतेतील अवतारी ईश्वर

कृष्णाच्या हाती पाञ्चजन्य शंख असल्याचा निर्देश व उल्लेख ***"पाञ्चजन्यं हृषीकेशो (१-१४,१५)"*** या श्लोकात येतो. विष्णू या देवतेचे हे लाञ्छन आहे. म्हणून ***कृष्ण तोच विष्णू*** असाही निर्देश येथे आहे. अर्थातच विष्णू या देवतेची अन्य नामे व ईश्वरलक्षणे कृष्णात असल्याचे याद्वारे सूचित केले गेले आहे. कृष्णास ***विष्णू*** असेसुद्धा *११-२४ व ३०* या श्लोकांत म्हटले आहे. **या सर्व ईश्वरवाचक संबोधनांवरून गीतेतील ईश्वर हा अवतारी आहे, हे दिसून येते. सांप्रत गीतेत तो श्रीकृष्ण या विष्णूच्या अवतारस्वरूपात दिसतो.**

"इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् (४-१)," "अपरं भवतो जन्म (४-४)," "बहुनि मे व्यतितानि (४-५),""अजोऽपि सन्नव्ययात्मा (४-६)," "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत (४-७)," "जन्मकर्म च मे दिव्यं (४-९)" इ.श्लोकांवरून ईश्वराचे हे अवतारी स्वरूप, त्या स्वरूपातील कार्य, त्याचे दिव्य स्वरूप ही जशी स्पष्ट होतात, तसेच हा ईश्वर अज, अव्यय असाही असल्याचे दिसते.

भगवंत अर्जुनास अकराव्या अध्यायात हे सूचित करतात की या अवतारी रूपापलीकडील जे त्यांचे **अव्यय, अविनाशी, सर्वव्यापक *विश्वरूप*** आहे, साकाराच्या पलीकडील जे बृहद्रूप आहे ***("रूपं परं -११-४७)***, त्याचे महत्त्व त्याने ओळखून असावे. ज्ञानेश्वरांनी या सूचनाचे प्रकटीकरण ज्ञानेश्वरीत केलेले आहे ***("ययां अर्जुनाचिआं बोलां। ..आद्य सकलां।।११-६०९ ते६१५।।")***.

"न मां कर्माणि लिम्पन्ति (४-१४)", "मां विद्ध्यकर्तारमव्ययम (४-१३)" या वचनांवरून ईश्वरास कर्मे बद्ध करत नहीत, कर्ता असूनही तो अकर्ताच आहे, असेही ईश्वरस्वरुप असल्याचे आपणास जाणवते. **गीतेतील हा ईश्वर स्वतःस *"मी"* असे म्हणवून घेत असतो.** त्याबाबत असंख्य वचने गीतेत येतात. ***"मच्चित्तो युक्त आसीत मत्परः (६-१४)," "ये यथा मां प्रपद्यन्ते (४-११)," मन्मना भव मद्भक्तो (९-३४,१८-६५)"*** इ.अनेकानेक स्थळे त्यासाठी वानगीदाखल देता येतील. असे असूनही त्या ईश्वरास अहंकाराचा स्पर्शही नाही, हे उल्लेखनीय आहे. **गीता ही साक्षात ईश्वरमुखातून प्रसृत झालेली आहे, त्याची मान्यता स्वतःस *मी* असे म्हणवून घेत हा ईश्वर करत आहे.**

गीतेतील ईश्वराचे जगद्गुरुत्व

पतञ्जलींच्या ईश्वराप्रमाणेच हा गीतोक्त ईश्वरही जगाचा आद्यगुरू आहे. ***"शिष्यस्तेऽहं (२-७)"*** या श्लोकावरून तसेच ***"इमं विवस्वते योगं (४-१)"*** या विधानावरून हे सूचित होते. अवतार घेणाऱ्या या ईश्वरास त्रिलोकात कोणतेही कर्तव्य नसले, तरी लोकांस आदर्श घालून देणे व लोकसंग्रहाचे आपण आद्यगुरूच्या नात्याने करावयाचे कार्य यासाठी अवतार घेतल्यावर तो आदर्शवत वागतो, असे ***"न मे पार्थास्ति कर्तव्यं (३-२२)"*** **व** ***"यदि ह्यहं न वर्तेयं (३-२३)"*** या श्लोकांतून सांगत आहे.

ईश्वराचे असे हे जगद्गुरुस्वरूप गीता स्पष्ट करतांना दिसते. अर्थातच ईश्वर या स्वरूपातून कार्य करत असता ***गुरू*** म्हणून तो जो उपदेश करतो, त्याचा कोणीही अनादर करू नये या अर्थाने गीतेत बऱ्याचदा ईश्वराची स्पष्टोक्ती येते. ***"ये मे मतमिदं ..(३-३१,३२)," "निश्चयं शृणु मे (१८-४)," निश्चितं मतमुत्तमम् (१८-६)," "निबोध मे (१८-१३)," "शृणु मे भरतर्षभ (१८-३६)," "सर्व गुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः (१८-६४)"*** ही वचने याची साक्ष देतात.

ईश्वराच्या या विविध उपदेशाचा अनादर करणाऱ्यांबाबत तर श्रीकृष्ण स्पष्टच म्हणतात की ***"इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन (१८-६७)"!!*** त्याचप्रमाणे ***"य इदं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति। ... प्रियतरो भुवि।।१८-६८,६९।।"*** या श्लोकांतून स्पष्टच म्हणतात की "मात्र हे गुह्य माझ्या भक्तांना सांगणाऱ्याची माझ्याठायी परमभक्ती होईल व तो मलाच येऊन पावेल यात संशय नाही आणि त्याच्यापेक्षा माझे जास्त प्रिय करणारा सर्व मनुष्यांत कोणीही दुसरा मिळणार नाही व या लोकी त्याच्यापेक्षा अधिक प्रिय असा मला कोणीही असणार नाही."

गुरुशिष्यपरंपरा यातूनच प्रकट होते. ***भगवंतांचा उपदेश सर्वश्रेष्ठ मानून तशी उपासना करणारा त्यांना प्रिय आहेच. पण तो उपदेश दुसऱ्यांप्रति पोहोचवणारा शिष्य त्यांना सर्वाधिक प्रिय आहे, असे या वचनांवरून स्पष्ट होते. असो.***

ईश्वर व विश्व

असा हा गीतेतील ***ईश्वर*** अनेकदा आपले या विश्वाशी कोणते नाते आहे, तेही स्पष्ट करतांना दिसतो. ***प्रकृति, माया (परा व अपरा), जीव, जगत, ब्रह्म, ईश्वर, आत्मवस्तू, परमात्मा, परब्रह्म, परंधाम, पुरुष व प्रकृतिरहस्य, कर्म*** इ.संज्ञाचा यासंबंधात गीता प्रयोग करते. हा सर्व भाग आपण यापूर्वीच वेगवेगळ्या उन्मेषांतून सविस्तर खोलात जाऊन पाहिलेला आहे *(विशेषेकरून तृतीय स्कंध - विश्वव्यापारःउन्मेष क्र.१६ ते २२,पृ.क्र.२५० ते ३४३; षष्ट स्कंध - उन्मेषः२१::गीता तत्त्वज्ञान व उपासना समन्वय पृ.क्र. ४४२ ते ४५३ यातून आणि इतरत्र)*. ***ब्रह्मांड*** ही संकल्पना व ***ब्रह्मांडाचा वंशवृक्ष*** तसेच ***तत्त्वांचे वर्गीकरण*** यांचे विवेचन त्याप्रसंगी आपण केलेले जिज्ञासूंना स्मरत असेलच *(उन्मेषः१९-१ःक्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१ पृ.क्र. २८२,२८६; षष्ट स्कंध -उन्मेषः२१::गीता तत्त्वज्ञान व उपासना समन्वय पृ.क्र. ४४२ ते ४५३ आणि इतरत्र)*.

समालोचन म्हणून थोडक्यात गीता काय म्हणते ते पाहू या याविषयीः कर्माची उत्पत्ती ब्रह्मापासून प्रकृतिद्वारे होते; ब्रह्म अक्षरापासून म्हणजे परमेश्वरापासून निघाले आहे; हे ब्रह्म नित्य यज्ञी प्रतिष्ठित असते ***("कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ... नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।।३-१५।।").*** प्रकृतीच्या सत्त्व-रज-तम या त्रिगुणामुळे सर्व प्रकारे कर्म होते ***("प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः..।।३-२७।।").***

प्रकृतीच्या या गुणांनी संमूढ केलेले लोक गुण व कर्मे यांचा स्वतःशी संबंध जोडतात आणि कर्तृत्वाभिमानी होत त्यात आसक्त होतात. आपण ***आत्मा*** आहोत याची नेणीव असणारे ते लोक हा गुणांचा आपापसात चालणारा खेळ समजू शकत नाहीत. केवळ आत्मवेत्ते पुरुषच हे रहस्य ओळखून कर्मासक्तीपासून दूर राहतात ***("तत्त्ववित्तु महाबाहो ..। इति मत्वा न सज्जते।।३-२८।।").***

असे असले तरी प्रकृतीचा रेटा इतका जबरदस्त असतो की त्यांच्यासह सर्व भूते प्रकृति करवील ते ते करतात; इतकेच काय तर ज्ञानवानसुद्धा प्रकृतिप्रमाणेच वागतात ***("सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि।...।।३-३३।।").***

मनुष्याने इंद्रिये, त्यांच्यापलीकडील मन, त्याहीपलीकडील बुद्धी यांना जाणून घ्यावे व आपला उद्धार करून घ्यावा, असे हा गीतेचा ईश्वर स्वमुखे सांगतो ***("इंद्रियाणि पराण्याहु ..। .. एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यानमात्मना।..।।३-४२,४३।।)".***

ईश्वराचे आत्मरूप

हा आत्मा कसा आहे म्हणजेच आपले ईश्वरस्वरूप कसे आहे, ते श्रीकृष्णांनी गीतेच्या दुसऱ्या अध्यायी स्पष्ट केले आहे. साङ्ख्यतत्त्व सांगण्याच्या निमित्ताने ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं ...।।२-११।।"*** या श्लोकापासून हे विवेचन केलेले आहे. आत्मा अविनाशी आहे. देहांचे होणेजाणे आत्म्यास अबाधितच ठेवते. बाह्यसृष्टी नश्वर आहे. **असता**स अस्तित्व नाही व **सता**स नास्तित्व नाही ***("नासतो विद्यते भावो .. ।।२-१६।।").***

हे सर्व जग ज्याने व्यापले आहे, ते अविनाशी तत्त्व कशानेही नाश न पावणारे असेच आहे. तेच नित्य, अविनाशी व अचिंत्य तत्त्व या शरीरात वसते. ते मारले जात नाही व कोणाला मारूनही टाकत नाही. अज, नित्य, अविनाशी असे हे तत्त्व जुनी वस्त्रे टाकावीत, तसे एक देह टाकते व नवी वस्त्रे परिधान करावीत, तसा नवीन देह घेते ***("अजो नित्यः ...।।२-१९,२० २१व २२।।).***

या तत्त्वास शस्त्रे तोडत नाहीत; अग्नी जाळत नाही; पाणी भिजवत नाही; वायू सुकवत नाही. पंचमहाभूतांपासून अलिप्त असणारे हे तत्त्व आहे. अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य, अशोष्य असे हे तत्त्व सर्वत्र आहे, नित्य आहे, स्थिर आहे. अचल असे हे सनातन तत्त्व आहे ***(नैनं छिदन्ति शस्त्राणि ...।।२-२३ व २४।।).***

अव्यक्त, अविकारी, अचिंत्य असा हा आत्मा आहे. त्यास जाणून घेणे मनुष्याचे परम कर्तव्य आहे ***("अव्यक्तोऽयमचिन्त्यो ... ।।२-२५।।").*** याच्यायोगे सर्व भूते प्रकटतात व पुनः व्यक्तातून अव्यक्ताकडे जातात ***("अव्यक्तादिनि भूतानि ... ।।२-२८।।").***

यास जाणणारे आश्चर्यचकित होऊन त्याच्याकडे पाहतात; त्याचे आश्चर्यजनक वर्णन करतात. पण त्या तत्त्वाचे यथार्थ वर्णन करणे कोणासही शक्य नाही. ईश्वराचे स्वरूप हे असे अवर्णनीय व अचिंत्य आहे, असे गीता म्हणते ***("आश्चर्यवत्पश्यति ...।।२-२९।।").***

मुक्तीचा मार्ग

कर्मे व आपला संबंध ***"न मां कर्माणि लिम्पन्ति (४-१४)"*** व ***"मां विद्धय अकर्तारं (४-१३)"*** यात ईश्वराने सांगितला आहेच. त्याचे अधिक स्पष्टीकरण देतांना श्रीकृष्ण सांगतात ***"न कर्तृत्वं न कर्माणं लोकस्य सृजति प्रभुः। मा कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते।। नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः। अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः।।५-१४ व १५)"*** - प्रभू लोकांचे कर्म, त्याचे कर्तृत्व व कर्मफल यातील काहीही निर्मित नाही. हे सर्व प्रकृतीच करते.

विभु म्हणजे सर्वव्यापी परमेश्वर कोणाच्या पापाचा वा पुण्याचाही धनी होत नाही. अज्ञानाने प्राणी मोह पावतात. हे अज्ञान प्रकृतिजन्य असून ती त्याद्वारे ज्ञान म्हणजे आत्मस्वरूप झाकून टाकते. बाह्य पदार्थांच्या संयोगातून भोग निर्माण होतात. ते दुःखाचे कारण होत. ज्ञानी त्या भोगात रमत नाहीत. असे पुरुष मुक्त होऊन ब्रह्माशी एकरूप होतात ***("बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा ..।..सर्वभूतहितेरताः।।५-२१ ते २५।।").***

ईश्वरप्रणिधान

ईश्वराचे प्रणिधान करण्याची युक्ती सांगत श्रीकृष्ण म्हणतातः ***"कामक्रोधवियुक्तानां ..। .. मुक्त एव सः।।५-२६ ते २८।।")*** - कामक्रोधरहित, आत्मसंयमी व आत्मज्ञानसंपन्न व्हावे. बाह्य पदार्थांशी होणारा संयोग टाकून द्यावा व दृष्टी दोन्ही भुवयांच्यामध्ये ठेवून नासिकांतून वाहणारे प्राण व अपान सम करावेत. इंद्रिये, मन व बुद्धी संयमित करून इच्छा, भय व क्रोध यांच्या विरहित व्हावे. अशा प्रकारे ईश्वरप्रणिधान केल्याने ब्रह्मनिर्वाण होते; मुक्ती मिळते; आणि ***"भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्। सुहृदं सर्वभूतानां"*** अशा ईश्वरास त्याद्वारे जाणता येऊन शांती प्राप्त होते.

ईश्वरप्रणिधानाचा हा गीतोक्त मार्ग आपण फारच सखोल पाहिल्याचे जिज्ञासूंस विदितच आहे. विशेषतः सहाव्या अध्यायातील या भागाचे व तदनुषंगाने गीतेच्या इतर अध्यायातील संबंधित भागाचे सविस्तर विवेचन आपण केलेलेच आहे. त्यामुळे तूर्त त्याविषयी एवढाच उल्लेख पुरे ठरावा! असो.

ईश्वर व माया

असे असले तरी ईश्वराचे खरे स्वरूप जाणणारे पुरुष क्वचितच असतात ***("मनुष्याणां सहस्त्रेषु .. । .. कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः।।७-३।।"). "प्रकाशयति क्वापि पात्रे"*** असे याबाबत नारद भक्तिसूत्रही सांगते. तरीही आपले स्वरूप प्रकट सांगत प्रभू म्हणतात की

"भूमिरापोऽनलो वायुः .. । .. भिन्ना प्रकृतिरष्टधा ।।७-४।।" - "पृथ्वी, आप, वायू, अग्नी, आकाश, मन, बुद्धी व अहंकार मिळून *अष्टधा प्रकृति* आहे."

"हिच्याहून वेगळी अशी माझी ***पराप्रकृति*** आहे. जीवस्वरूपी अशी ती श्रेष्ठ प्रकृति जगतास धारण करते. या दोहींपासून भूते उत्पन्न होतात. पण या सर्वांचे मूळ व शेवट मीच आहे. माझ्यापेक्षा दुसरे येथे काहीही नाही. दोऱ्यात मणी ओवावेत तसे माझ्याठायी हे सर्व स्थावर - जंगम, स्थूल - सूक्ष्म, व्यक्त - अव्यक्तादी यच्चयावत पदार्थ या विश्वासह ओवलेले आहेत ***("एतद्योनिनि भूतानि .. । ... मणिगणा इव ।।७-६ व ७ ।।)."***

ईश्वराचे ऐश्वर्य

ईश्वरच या जगतातील सर्व काही आहे. रस आपातील तोच आहे. चंद्रसूर्यातील प्रभा तोच आहे. सर्व वेदांतील प्रणव, आकाशातील शब्द, पुरुषातील पौरुष, पृथ्वीचा गंध, अग्नीतील तेज, भूतमात्रांतील जीवन, तपस्वी जनांचे तप ही सर्व तोच आहे. सर्व भूतांचे सनातन बीज ईश्वरच आहे. बुद्धिमंतांची बुद्धी व तेजस्व्यांचे तेजही तोच आहे. कामरागविवर्जित असे जे बल बलवंतांच्या ठायी वसते ते आणि भूतमात्रांठायी वसणारा धर्मविहित कामसुद्धा हाच ईश्वर आहे. सर्व त्रिगुणात्मक भाव तेही ईश्वरापासून प्रकटतात ***("रसोऽहमप्सु कौन्तेय ... । ...ये चैव सात्त्विका भावा .. ।।७-८ ते १२ ।।").***

असे असूनही ते ईश्वराठायी असतात, पण त्यांच्यात - या पदार्थांत - ईश्वरत्व नाही. अशा या ईश्वरास ओळखणे हे या जगतास त्रिगुणांनी मोहित झाल्याने शक्य नसते. ***परम अव्यय असे ईश्वराचे स्वरूप आहे.*** ईश्वराची माया दुस्तर आहे. त्यामुळे मायेस उल्लंघून त्रिगुणातीत अशा ईश्वरास ओळखणे लोकांस कठीण आहे. पण जे ईश्वरास सर्वभावे शरण जातात, ते मायेस तरून जातात व ईश्वराप्रत पोहोचतात ***("ये चैव सात्त्विका भावा.. । ... ।..मायामेतां तरन्ति ते ।।७-१२ ते १४ ।।").***

ईश्वराची भक्ती

ईश्वर परमश्रेष्ठ, उत्तमोत्तम व अव्यय असा आहे. पण योगमायेने आच्छादित असल्याने त्याचे हे स्वरूप दिसणे कठीण आहे. मूढ लोक त्यास व्यक्त मानतात आणि देवदेवतांतरांना भजतात. त्याचे फळही त्यांना ईश्वरकृपेमुळेच प्राप्त होते. पण ते फल शाश्वत नसते. फक्त सुकृत जनांना ईश्वराच्या यथार्थ स्वरूपाची भक्ती लाभते आणि त्याचे उत्तम फल पावून ते धन्य होतात. असे भक्त चतुर्विध प्रकारचे असतात - ***आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू आणि ज्ञानी.*** त्यातील ज्ञानी भक्त म्हणजे ईश्वरच! याउलट मायेने ज्ञान नष्ट झालेल्यांना हे ईश्वरस्वरूप आळखू येत नाही. ते ईश्वरास शरण जात नाहीत ***("न मां दुष्कृतिनो ... । .. लोको मामजमव्ययम् ।।७-१५ ते २५ ।।")***

ईश्वरप्रणिधान म्हणजे नित्ययुक्त असणे व एका ईश्वराचीच भक्ती करणे. त्यामुळे उत्तम गती मिळते म्हणजे भगवंताठायी साधक स्थिरावतो. असा साधक ज्ञानी व धन्य होय. ***"वासुदेवः सर्वमिति"*** असे याचे फल त्यास प्राप्त होते. जन्मांतरी तो भगवंताप्रति जाऊन मिळतो ***("तेषां ज्ञानी नित्ययुक्त ... । वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।७-१७ ते १९ ।।).***

द्वंद्वमोह यांपासून मुक्त असणारे पुण्यवान लोक ईश्वरास भजतात. ते जरामरणाच्या फेऱ्यातून सुटतात.***कर्म, अधियज्ञ, अधिभूत, अधिदैव, अध्यात्म व ब्रह्म*** यांसह ईश्वरास तो जसा आहे, तसा जाणून हे भक्त अंतकालीदेखील त्यास स्मरतात ***(येषां त्वन्तगतं पापं ... । ... मां ते विदुर्युक्तचेतसः ।।७-२८ ते३० ।।").*** ईश्वर त्रिकाली होणारे सर्व जाणतो. पण त्यास जाणणे अवघड आहे. इच्छा, द्वेष, द्वंद्व, मोहादींनी भ्रम पावून भूते त्यास ओळखत नाहीत ***("वेदाहं समतीतानि ... । ... यान्ति परन्तप ।।७-२६ व २७ ।।").***

ब्रह्म

सर्वांहून परम असे जे ***अक्षर*** म्हणजे कधीही नाश न पावणारे तत्त्व ते ***ब्रह्म.*** भूतमात्रांची उत्पत्ती करणारा जो ***विसर्ग*** म्हणजे सृष्टिव्यापार त्यास ***कर्म*** असे गीता म्हणते. ***क्षर*** म्हणजे नाशवंत पदार्थ म्हणजे ***अधिभूत*** आणि या पदार्थांतील जो ***पुरुष म्हणजे*** **सचेतन अधिष्ठाता तो** ***अधिदैवत*** अशा संज्ञा गीतेने वापरल्या आहेत. या देहाठायी सर्व नामरूपात्मक यज्ञांचा अधिपती वसतो, तोच ***ईश्वर*** होय. देहाठायी त्यास ***अधियज्ञ*** म्हणूनही कोणी कोणी ओळखतात ***("अक्षरं ब्रह्म परमं ... । .. देहे देहभृतां वर ।।८-३ व ४ ।।").*** काहीशा आडवळणाने व जरा वेगळ्या प्रकारच्या अधियज्ञादी विशिष्ट संज्ञांचा प्रयोग करत येथे गीता जीव-जगत-ईश्वर यांच्या व्याख्या करते.***अधिदैवत-जीव, अधियज्ञ-ईश्वर*** या संज्ञांचे समानार्थकत्व त्यावरून दिसून येते.

या ***ईश्वराचे स्वरूप*** कवि म्हणजे सर्वज्ञ, सनातन तत्त्व, शास्ता, अणूपेक्षाही सूक्ष्म, सर्वांचा धाता म्हणजे आधार किंवा कर्ता, अचिंत्य, अंधकारापलीकडील सूर्याप्रमाणे दैदिप्यमान पुरुष, परमपुरुष, वेदवेत्त्यांचे अक्षर, ॐकार ब्रह्म, दिव्य पुरुष, परमपद असे असल्याचे सूचित केले आहे ***("अभ्यासयोगयुक्तेन ... । .. परमां गतिम् ।।८-८ ते १३ ।।"). मुक्तांची परमगती म्हणजे हाच ईश्वर!!***

अव्यक्त

अहोरात्र म्हणजे ब्रह्मदेवाचा दिवस व रात्र. त्याचा दिवस सुरू झाला की अव्यक्तापासून सर्व पदार्थ व्यक्त दशेत येतात; रात्र सुरू झाली की ते पुनः अव्यक्तात लीन होतात. भूतसमुदाय या चक्रनेमिक्रमातून फिरतो. पण ईश्वर हा सनातन अव्यक्त पदार्थ कधीही नाहीसा होत नाही. अव्यक्त तेच अक्षर! हीच परम वा उत्कृष्ट गती! हेच मूलस्थान! हेच परमस्थान! ज्याने सर्व विस्तारले आहे तो पर पुरुष ईश्वरच होय ***("आब्रह्मभुवनाल्लोकाः ... । ... येन सर्वमिदं ततम् ।।८-१६ ते २२ ।।").***

जीव-जगत-ईश्वर यांविषयी गीता वारंवार विधाने करते. "मी आपल्या अव्यक्त स्वरूपाने हे सर्व जगत व्यापले आहे. माझ्याठायी सर्व भूते आहेत, पण मी त्यांच्याठायी नाही आणि माझ्याठायी ही सर्व भूतेही नाहीत. भूते उत्पन्न करणारा माझा आत्मा भूते धारण करूनही भूतात नाही. सर्वत्र वावरणारा महान वायू ज्याप्रमाणे सर्वदा आकाशाच्या ठायी असतो, त्याप्रमाणे सर्व भूते माझ्याठायी आहेत;" अशी कोड्यात पाडणारी विधाने श्रीकृष्णनामक हा गीतेतील ईश्वर करतो ***("मया ततमिदं सर्वं .. । ... मत्स्थानीत्युपधारय।।९-४ ते ६।।").***

प्रकृतीशी असणारा आपला व सर्व भूतांचा संबंध दर्शवत गीता म्हणते: ***"सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्। ... ज्ञात्वा भूतादिमव्ययम्।।९-७ ते १३।।"*** - "सर्व भूते कल्पांती मला येऊन मिळतात. कल्पारंभी मीच त्यांना पुनः निर्माण करतो. मी प्रकृतीला हाताशी धरून या परतंत्र अशा भूतसमुदायास पुनःपुनः निर्मितो. मी अध्यक्ष होऊन प्रकृतीकडून सर्व चराचर सृष्टी प्रसवतो. या कारणामुळे जगाची ही घडामोड चालली आहे. पण हे सर्व करूनही मी अकर्ताच आहे. या कर्मात माझी आसक्ती नाही. मी उदासीनवत राहत असल्याने ही कर्मे मला बद्ध करत नाहीत."

"मीच भूतांचे अव्यय असे आदिस्थान आहे हे दैवी प्रकृतीचा आश्रय करणारे महात्मे जाणतात. पण भूतांचा महेश्वर असे माझे हे स्वरूप न जाणणारे मूढ लोक मला मनुष्यदेहधारी समजून अवमानतात ***("अवजानन्ति मां मूढा ... ।...ज्ञात्वा भूतादिमव्ययम्।।९-११ते१३।।").***

ईश्वराचे विभूतिमत्व

ईश्वरच ***क्रतु*** म्हणजे यज्ञ आहे; यज्ञ, स्वधा, औषध, मंत्र, घृत, अग्नी आणि यज्ञिय आहुती तोच आहे. जगताचा पिता, माता, धाता, पितामह, पवित्र असे ज्ञेय, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, ॐकार, सर्वांची गती, भर्ता, प्रभू, साक्षी, निवास, शरण, सखा, उत्पत्ती-स्थिति-प्रलय, निधान आणि अव्यय बीजही हा गीतेचा ईश्वरच आहे. अमृत व मृत्यू, सत् आणि असत् तोच आहे. तोच ऊन पाडतो, पाऊसही त्याचीच यंत्रणा आहे ***("अहं क्रतुरहं यज्ञः ..। ... सदसच्चाहमर्जुन।।९-१६ ते १९।।").***

ईश्वर आणि त्याची भक्ती

भक्तांचा योगक्षेम तोच वहन करतो ***(अनन्याश्चिन्तयन्तो मां ...।... योगक्षेमं वहाम्यहम्।।९-२२।।").*** श्रद्धापूर्वक केलेले इतर देवतांचे यजनही ईश्वरासच पावते. कारण तोच सर्व यज्ञांचा भोक्ता आणि स्वामी आहे. पण ***खरे ईश्वरप्रणिधान तेव्हाच होते जेव्हा भक्त ईश्वराप्रीत्यर्थच यजन करतो,*** असे रहस्यही भगवंत सांगतात ***("येऽप्यन्यदेवता भक्ता..।..मद्याजिनोऽपि माम्।।९-२३ ते२५।।").***

ईश्वराचे भजनपूजन कोणत्याही स्वल्प वस्तूने केले तरी तो त्याचा स्वीकार करतो. म्हणून सर्व काही ईश्वराप्रीत्यर्थच करावे व त्यासच ते अर्पण करावे. म्हणजे आपोआप कर्मसंन्यास घडतो ***("पत्रं पुष्पं फलं तोयं ...। .. विमुक्तो मामुपैष्यसि।।९-२६ ते २८।।").***

अनन्यभाव

ईश्वर सर्वांप्रति सम आहे. त्याचा प्रिय-अप्रिय असा कोणी नाही. मोठा दुराचारीही त्याला अनन्यभावाने भजू गेला तर लवकरच महात्मा होतो. ईश्वराच्या भक्ताचा विनाश कधीच होत नाही. पापयोनी भक्तसुद्धा परमगती पावतात. पुण्यवंतांची तर गोष्टच विचारू नये! म्हणून या अशाश्वत लोकींच्या सुज्ञ मनुष्याने ईश्वरासच भजावे. ईश्वरप्रणिधान करावे. त्याच्याठायीच मन ठेवावे. त्याचाच भक्त व्हावे. त्याचेच यजनपूजन करावे. त्यालाच नमस्कारावे. ईश्वरपरायण व्हावे. योग साधावा. म्हणजे तो ईश्वराप्रत जाऊन ईश्वरमय होईल ***("समोऽहं सर्वभूतेषु ..।... मत्परायणः।।९-२९ ते ३४।।").***

अशा प्रकारे **गीता ठिकठिकाणी *ईश्वरप्रणिधान* कसे करावे ते सांगते व हाच गीतेचा योग साधण्याचा प्रमुख उपाय असल्याचे त्या विधानांवरून स्पष्ट होते.** असो.

ज्ञानमार्गातील ईश्वरप्रणिधान

देव आणि महर्षींचाही आद्य अशा ईश्वरास कोणीही जाणत नाहीत. ईश्वर सर्व लोकांचा महेश्वर आहे. त्याला जन्म व आदि नाहीत. जो हे जाणतो, तो मोहरहित होतो व सर्व पापांपासून मुक्त होतो ***("न मे विदुः सुरगणाः ..। .. सर्वपापैः प्रमुच्यते।।१०-२ व ३।।").***

ईश्वराच्या स्वरूपाचे असे यथार्थ ज्ञान झाले तरी मुक्ती मिळते. हाच गीतेचा ईश्वरसाक्षात्काराचा ज्ञानमार्ग होय. ठिकठिकाणी गीतेत या मार्गाचा उल्लेख येतो. ***ईश्वरस्वरूपाचे ज्ञान म्हणजे खरे ज्ञान वा अपरोक्षज्ञान! पढीक ज्ञान वा परोक्षज्ञान वा वेदोपनिषदादी आणि आदिशंकरादी आचार्य इ.च्या वेदांत-भाष्ये-आणि तत्सम अनेकानेक ग्रंथांवर पांडित्य संपादन करून झालेले ज्ञान ते खरे ज्ञान नव्हे*** हे येथे ध्यानी घेतले म्हणजे हा ***गीतेचा ज्ञानमार्गसुद्धा ईश्वरप्रणिधान साधणारा असल्याचे स्पष्ट होते.***

ईश्वराचे विभूतिमत्व

आपले स्वरूप विभूतींद्वारे दहाव्या गीताध्यायात श्रीकृष्णांनी दाखवले आहे. त्यांच्या अनेकानेक विभूतींचा सविस्तर परिचय आपण विभूति व तद्द्वारे करावयाचे ईश्वरप्रणिधान यांचा विचार करतांना पूर्वी करून घेतलाच आहे *(उन्मेष:३८ :विभूतिदर्शन ५८४ ते ६१०).* तिकडे जिज्ञासूंचे लक्ष ईश्वरस्वरूप व त्याचे प्रणिधान करण्याची युक्ती या विषयांच्या यथातथ्य आकलनासाठी पुनश्च वेधले म्हणजे झाले. असो. ईश्वराने आपल्या केवळ एका अंशमात्राने हे समस्त जगत व्यापले आहे, इतका तो अनंत आहे, असे भगवंत स्वतः सांगतात ***("अथवा बहुनैतेन .. . ... स्थितो जगत्।।१०-४२।।").***

विभूति या ईश्वराची ध्यान करण्यायोग्य अशी सर्वसाधारण सगुण रूपे होत. सर्व भूते त्या ईश्वरापासूनच उत्पन्न पावतात व त्याच्याठायीच लीन होतात. ईश्वराचे त्याहूनही वेगळे असे अव्यक्त अव्यय ***विश्वरूप*** गीता वर्णिते. त्या विश्वरूपाचे वर्णन आपण पूर्वीच

पाहिले आहे. विश्वरूपाचे वैदिक वाङ्मयातून दिसणारे विविध पैलूसुद्धा आपण निरखून पाहिले आहेत. ***विश्वरूपाचे ईश्वरप्रणिधानातील अनुभूतींसाठी असणारे महत्त्व आणि साधकाच्या यौगिक अवस्थांचा तत्संबंधीचा आकृतिबंधही आपण सखोल अभ्यासला आहेच.***

सगुण रूप व निर्गुण स्वरूप यांची ईश्वरप्रणिधानसापेक्ष तुलनासुद्धा आपण तेव्हा केलेली होती. तिकडे जिज्ञासूंचे लक्ष क्षणमात्र वेधल्याशिवाय पुढे जाणे शक्य नाही. तरी आवश्यक वाटल्यास तो भाग जिज्ञासूंनी गीतेच्या ईश्वर व ईश्वरप्रणिधानविषयक संकल्पनांचा अभ्यास करतांना पुनः अवलोकन करावा *(द्वादश स्कंध : उन्मेष ४८-१:विश्वरूपप्रकटन; उन्मेष ४८-२:विस्मयकारक विश्वरूप; उन्मेष ४८-३:विश्वरूपाचे सम्यग्दर्शन पृ.क्र.८५८ते९११)*

ईश्वरप्रणिधान कसे करावे याचे मार्गदर्शन ***"मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः। निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।"*** या श्लोकातून केलेले आहे. त्याचाही विचार आपण पूर्वीच केलाआहे *(उन्मेष ४८-३:विश्वरूपाचे सम्यग्दर्शन व उन्मेष ४९:सगुणोपासना,पृ.क्र.९२०).*

व्यक्तोपासना व अव्यक्तोपासना

ईश्वरप्रणिधानाबाबत गीतेतील प्रमुख विषय म्हणजे बाराव्या अध्यायातील ***व्यक्तोपासना*** व ***अव्यक्तोपासना*** आणि त्यांचे गीतोक्त उपासनामार्गांतील स्थान! या सर्वांचे सविस्तर विवेचन आपण पूर्वीच केले आहे, हे जिज्ञासूंस स्मरत असेलच*(उन्मेष ४५-२:लययोगसमालोचनः योगशास्त्रसमन्वय,पृ.क्र.७१० ते ७१६ व उन्मेष ४९:सगुणोपासना,पृ.क्र.९२० ते ९२३).*

ईश्वरप्रणिधानाची गीतोक्त रीती व त्या मार्गावरील ***"अभ्यास –➢ ज्ञान –➢ ध्यान –➢ कर्मफलत्याग –➢शांति"*** हे टप्पे यांचे तर आपण नुकतेच सखोल दर्शन ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ... ।।१२-१२।।"*** या गीताश्लोकाच्या व त्यावरील ज्ञानदेवांच्या अधिकारवाणीने केलेल्या दिग्दर्शनाचा विचार करतांना घेतलेच आहे *(उन्मेष ४९: सगुणोपासना पृ.क्र.९२३ ते ९३१).* ज्ञानदेवमते उपासनाकांडाची गीतेत १२-१२ या श्लोकी समाप्ती होते.

बाराव्या अध्यायाअंती येणाऱ्या अनेक श्लोकांतून ईश्वराचा स्वभाव अजून प्रकट होतो. गीतेतील ईश्वरास त्याचे भक्त अत्यंत प्रिय आहेत, हाच त्याचा तो भक्तवत्सल स्वभाव ***"अद्वेष्टा सर्वभूतानां ... । ... भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।१२-१३ ते २०।।"*** या श्लोकांतून स्पष्ट प्रकट होतो. त्यानिमित्ताने हे भगवद्भक्त किती उदात्त स्वभावाचे असतात, हेही ***अद्वेष्टा, निर्ममा, निरहंकारः, क्षमी, संतुष्टं सततं, योगी*** इ.अनेकानेक भक्तलक्षणांनी याच श्लोकांवरून दिसून येते. भक्त-भगवंतसंबंधाचे परीक्षण करतांना आपण या सर्वांचा विचार करूच. तूर्त इत्यलम्।

क्षेत्र-क्षेत्रज्ञ स्वरूप

क्षेत्र-क्षेत्रज्ञ यांचा विचार करतांना आपण ***जीव-जगत व ईश्वर*** यांचा परस्परसंबंध फारच विस्ताराने पाहिला होता *(उन्मेषः१९-१:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-१; उन्मेषः१९-२:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार-२; उन्मेषः२०:प्रकृति-पुरुष विचार व उन्मेषः२१:क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार सार - पृ.क्र.२७३ ते ३२४).* ***"सर्वतः पाणिपादं ... । .. इति क्षेत्रं ..।।१३-१३ ते १८।।" या*** श्लोकांतून प्रकटणारे ईश्वराचे स्वरूप तेव्हाच आपण पाहिले होते. ***प्रकृतिपुरुषरहस्य*** आणि तत्संबंधित विवक्षित अशा साङ्ख्यादी सिद्धांतांचे आपण तपशिलात जाऊन विवेचनही तेव्हाच ज्ञानेश्वरांच्या आधाराने अवलोकिले होते.

उपद्रष्टा, अनुमंता, भर्ता, भोक्ता, महेश्वर, परमात्मा, परपुरुष इ.नामांनी ओळखल्या जाणाऱ्या ईश्वरास आपण ज्ञानेशांचे बोट धरून ओळखण्यास तेव्हा शिकलो ***("प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि। ... य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह। ...।।१३-१९ ते २३।।").*** त्या ईश्वराचे प्रणिधान कसे करावे, त्याचे मार्ग ***"ध्यानेनात्मनि पश्यन्ति ... । ... मृत्युं श्रुतिपरायणः।।१३-२४ ते २५।।"*** या श्लोकांच्या आधारे तेव्हा पाहिलेच होते.

"यावत्सञ्जायते किञ्चित्सत्त्वं ... । ... ये विदुर्यान्ति ते परम्।।१३-२६ ते ३४।।" या श्लोकांत वर्णिलेल्या ***क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोग***रहस्यास जाणणारे पुरुष, क्षेत्रज्ञ परमेश्वराचे भूतमात्रांठायी समत्व ओळखणारे ज्ञानी, प्रकृतीचे कार्यकारणकर्तृत्वादी गुण आणि आत्म्याचे अकर्तृत्व पाहणारे वेत्ते, अनादि-निर्गुण अव्यय अशा परमात्म्याचे स्वरूप पाहणारे आणि त्यास क्षेत्रज्ञ रूपाने जाणणारे विद्वान हे सर्व ज्ञानचक्षू उन्मीलित झाल्याने परमगती पावतात. या श्लोकातून ***ज्ञानचक्षूने परमात्मस्वरूप कसे पाहावे*** ते स्पष्ट केले आहे. या तेराव्या गीताध्यायाचे परिशीलन करत असता ज्ञानचक्षुद्वारे ईश्वरस्वरूप यथातथ्य पाहण्यास आपणास मिळाले होतेच. त्याचा असा ओझरता उल्लेख करून पुढे जाऊ या!

गुणातीतत्व

श्रीकृष्ण ज्ञानाची खूपच महती सांगतात. ज्ञान मनुष्यास मुक्ती मिळवून देते. ***ईश्वरप्रणिधान करण्याचा ज्ञान हा एक उत्तम मार्ग*** असल्याचेही त्यांच्या गीतावचनांद्वारे स्पष्ट होते. चौदाव्या अध्यायारंभीसुद्धा ते हेच म्हणतात ***("परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्। ... इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः। ..।।१४-१ व २।।").***

हे ज्ञान म्हणजे ज्ञानविज्ञानात्मक असे परमेश्वराचे स्वरूपज्ञान व जीव-जगत-ईश्वर या त्रयीच्या परस्परसंबंधाबाबतचे ज्ञान होय. महद्ब्रह्म म्हणजे प्रकृति! ही परमात्म्याची योनी असून तिच्याठायी त्याचा गर्भ तो ठेवतो; त्या गर्भापासून सर्व भूते उपजतात. ईश्वर हाच बीजदाता पिता होय.

प्रकृतीपासून उत्पन्न झालेले सत्त्व, रज व तम हे त्रिगुण अव्यय अशा आत्म्यास देहात बद्ध करतात. सुख व ज्ञान यांच्यायोगे सत्त्व बद्ध करतो, तर तृष्णा व आसक्ती यांच्यायोगे रज बांधून ठेवतो. प्राण्यांस कर्म करण्याचा प्रवृत्तिरूप संग या रजोगुणानेच घडतो. प्रमाद, आळस व निद्रा यांद्वारे तमोगुण प्राण्यांस मोह घालतो ***("मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्। ... प्रमादे सञ्जयत्युत।।१४-३ ते ९।।").***

गुणांखेरीज येथे दुसरा कोणीच कर्ता नाही *("नान्यं गुणेभ्यः कर्तारं .. ।।१४-१९।।").* सर्व सृष्टी ही या त्रिगुणांचा परस्परसापेक्ष खेळ आहे. तो कसा हे आपण ***"रजस्तमश्चाभिभूय ... । .. अधो गच्छन्ति तामसाः।।१४-१० ते १८।।"*** या गीताश्लोकांचे अवलोकन करतांना पाहिलेच आहे *(उन्मेषः२२:त्रिगुणमयी प्रकृति,पृ.क्र. ३३३ ते ३३९).* मनुष्य जेव्हा हे रहस्य जाणून घेतो आणि ***पुरुष हा उदासीनपणे हा खेळ पाहणारा द्रष्टा वा साक्षी आहे,*** हे जेव्हा ओळखतो, तेव्हा तो ईश्वरस्वरूपास पावतो आणि मनुष्यदेहयोगे प्राप्त होणाऱ्या जन्म, मृत्यू, जरा यांच्या दुःखापासून मुक्त होऊन अमृतस्वरूप मोक्षास अनुभवतो ***("नान्यं गुणेभ्यः कर्तारं ... । .. दुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते।।१४-१९ व २०।।").***

ईश्वराचे हे द्रष्टे स्वरूप पतञ्जलींच्या ***"क्लेशकर्मविपाकाशयै-रपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः।।१-२४।।पा.यो.सू.।।"*** यातील ईश्वरस्वरूपाशी तंतोतंत मिळतेजुळते आहे, हे जिज्ञासूंच्या त्वरित लक्षात येण्यासारखेच आहे. असा हा ईश्वरच अमृत व अव्यय ब्रह्माचे, शाश्वत धर्माचे व एकांतिक म्हणजे परमावधीच्या अतीव सुखाचे अंतिम स्थान आहे ***("ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च। शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च।।१४-२७।।").***

ईश्वराचे हे स्वरूप पावण्यासाठी मनुष्यास गुणातीत व्हायला हवे. ते गुणातीतत्व कसे असते हे ***"प्रकाशं च प्रवृत्तिं च ... । .. गुणातीतः स उच्यते।।१४-२२ ते २५।।"*** या गीताश्लोकांवरील ज्ञानेश्वरीच्या ओव्यांद्वारे सविस्तर पाहिलेच आहे *(उन्मेषः२३::गुणातीत दर्शन पृ.क्र.३४४ ते ३४९).*

ईश्वरप्रणिधान कसे करावे तेसुद्धा पुनश्च अनन्यभक्तीचे महत्त्व स्पष्ट करत भगवंत या शब्दात सांगतात - ***"मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते। स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।१४-२६।।" अव्यभिचारी भक्ती वा अनन्यभक्ती*** **हेच वास्तविक गीतेतील *ईश्वरप्रणिधान* होय.**

गीतोक्त विचार(२)::::

परमपुरुष

गीतेच्या पंधराव्या अध्यायी आपण विराट अशा **जीव-जगत-ईश्वररूपी अश्वत्था**चे सांगोपांग दर्शन घेतले *(उन्मेषः२६::विश्वाभासात्मक अश्वत्थ पृ.क्र.३८८ ते ४११).* **"उर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्"** असा अश्वत्थ गीतेच्या १५-१ ते १५-३ या श्लोकांतून दिसतो. हा वृक्ष जाणणाराच खरा वेदवेत्ता होय ***("यस्तं वेद स वेदवित्।।१५-१।।").***

या वृक्षास असंगशस्त्राने छेदून टाकावे आणि पुरातन प्रवृत्ती ज्या आद्य पुरुषापासून निघाली, ज्याठायी गेले असता पुनः परत यावे लागत नाही, ते परमपद शोधून काढावे, अशी ईश्वरप्रणिधानाची रीत ***"न रूपमस्येह तथोपलभ्यते ...।।१५-३ व ४।।"*** या श्लोकांतून भगवंतांनी प्रकट केली आहे.

"ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः। तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी।।१५-४।।" या श्लोकातून त्या **परमपदा**ची मुख्य लक्षणे प्रकट केली आहेत. हा ***आद्यपुरुष*** वा ***परमपद,*** ज्यापासून प्रकृती प्रसवली, तोच गीतेतील ***ईश्वर*** होय, हे आता वेगळे म्हणून सांगायला हवे काय!

परमपद

त्या पदास चंद्रसूर्य प्रकाशित नाहीत. ***"निर्मानमोहा ...। द्वंद्वैर्विमुक्ताः .. ।।१५-५।।"*** असे ज्ञाते पुरुष त्या अव्ययपदास जाऊन पोहोचतात. ***स्वयंप्रकाशित असे ते पद म्हणजे ईश्वरच होय.*** त्याचाच सनातन अंश जीवलोकी जीव होऊन प्रकृतीतील मनासह सहा इंद्रिये आपल्याकडे ओढून घेतो. स्थूल देहातून प्रयाण करतेवेळी हा जीव या इंद्रियांसह निघून जातो.

या इंद्रियांद्वारे तो जीव विषयांचा उपभोग घेतो. गुणांद्वारे उपभोग घेणाऱ्या अशा पुरुषास ज्ञानचक्षू असणारे योगी जाणतात. अज्ञान्यांस हे रहस्य आकळता येत नाही ***("ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः। ... नैनं पश्यन्त्यचेतसः।।१५-७ ते ११।।").***

सूर्यचंद्रांचे तेज - जगास प्रकाशवणारे तेज, अग्नीतील तेज ईश्वराचेच आहे. रसात्मक सोम होऊन ईश्वरच औषधींचे पोषण करतो. वैश्वानररूपी अग्नी होऊन तोच प्राणापानयुक्त होत्साता चतुर्विध प्रकारचे अन्न पचन करतो. सर्वांच्या हृदयात ईश्वरच अधिष्ठित असतो. स्मृती, ज्ञान व विस्मृती ही त्याच्यापासूनच आहेत. वेदांनी ज्यास जाणावयाचे तो ईश्वरच होय आणि वेदांचा कर्ता आणि वेद जाणणाराही हा स्वयमेव ईश्वरच आहे ***("यदादित्यगतं तेजो ...। ... वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्।।१५-१२ ते १५।।").***

गीतेतील ईश्वरसूचक आणि इतर तत्त्वविषयक विविध संज्ञा

गीतेस ईश्वरतत्त्वाची वेगळाल्या पद्धतींनी आणि काही विशेष संज्ञांचा प्रयोग करून मांडणी करण्याची हातोटी विलक्षण साधली आहे. तेराव्या अध्यायी ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ, पुरुष-प्रकृति, ईश्वर-प्रकृति, अव्यय परमात्मा, आत्मा, भूतप्रकृति*** अशा संज्ञांचा प्रयोग करून साङ्ख्यादी पद्धतींचा समन्वय करत श्रीकृष्णांनी ***ईश्वरी तत्त्व*** प्रकट केले होते. *यामागे गीतेच्या प्रकटनकाळात विद्वज्जनात प्रचुर असणाऱ्या विविध तत्त्वज्ञानप्रणालींचा समन्वय करणे, त्यांच्यातील मूलतत्त्वविषयक बाबींचे साधर्म्य दाखवून देणे, इतरही महत्त्वाचे तत्त्वविषयक तपशील जुळवून देणे, औपनिषदिक महत्त्वाच्या तत्त्वविषयक आणि उपासनाविषयक विचारप्रणालींचा समन्वय करणे, या सर्वांचे वेदांशी असणारे तेच ते नाते दाखवून देणे असा बहुविध दिसणारा पण मुळात एकच असणारा उद्देश आहे, हे आपणास जाणवून येते.* असो.

पुरुषोत्तम

अश्वत्थ संकल्पनेचा उपयोग करून अत्यंत चातुर्याने गीतेने पुनः त्या अव्यय ईश्वराचे दर्शन घडविलेले आपण नुकतेच पाहिले

आहे. आता ***"द्वाविमौ पुरुषौ लोके ..।।१५-१६ ते १८।।"*** यांमधून ***क्षर पुरुष*** व ***अक्षर पुरुष*** अशा संकल्पना मांडून ***उत्तम पुरुष*** म्हणजे ***पुरुषोत्तम*** अशी ईश्वराची ओळख हीच गीतामाउली तुम्हाआम्हास करून देतांना दिसते. त्यांच्या **मूलस्थ असणारे प्रकृतिरूप अव्यक्त तत्त्व म्हणजे *कूटस्थ*.** त्यासच गीता ***अक्षर पुरुष*** अशी संज्ञा देते. **या दोन्ही पुरुषांहून भिन्न असा *परमात्मा* आहे. *उत्तम पुरुष* तो हाच!**

हाच अव्यय ***ईश्वर*** या नावाने ओळखला जातो. तो तिन्ही लोकांत भरलेला आहे. श्रीकृष्ण म्हणतात की ***"यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः। अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः।।१५-१८।।"***- "क्षराहूनही पलीकडचा व अक्षराहूनही उत्तम असा असल्याने लोकांत आणि वेदांतही ***पुरुषोत्तम*** या नावाने मी प्रख्यात आहे."

ईश्वरप्रणिधान कसे करावे हे पुनश्च सांगत श्रीकृष्ण म्हणतात ***"यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम्। स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।"*** - "मला पुरुषोत्तम म्हणून जाणून घ्यावे. गुह्यातले गुह्य असे हे ईश्वरप्रणिधानाचे शास्त्र मी सांगत आहे. हे जाणून बुद्धिमान मनुष्य कृतकृत्य होईल व मोह न पावता सर्वज्ञ होऊन सर्वभावेकरून मलाच भजून मलाच पावेल.

"ईश्वरास तो जसा आहे त्या स्वरूपात जाणणे व अनन्यत्वे त्यालाच भजणे म्हणजेच ईश्वरप्रणिधान **असे गीता वारंवार सांगतांना दिसते** *("इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ... ।।.... भारत।।१५-२०।।").*

गीतेतील ईश्वरप्रणिधान::::

शास्त्रविहित चर्या

"अभयं सत्त्वसंशुद्धि ..। दैवीमभिजातस्य भारत।।१६-१ ते ३।।" यातून भगवद्भक्तांचे दैवी गुण संपत्तिरूपाने वर्णिले आहेत. आढ्य अशा आसुरांचे वर्णन ***"दम्भो दर्पोऽभिमानश्च ..। ... सम्पदमासुरीम्।।१६-४।।"*** इ.श्लोकांतून येते. स्वतःसच ईश्वर समजणाऱ्या अशा त्या पापात्म्यांस विनाशाप्रत जावे लागते, इ.भाग उर्वरित सोळावा अध्याय सांगतो.

साधकाने ***काम-क्रोध-लोभ*** अशा नरकद्वारांतून सुटून विधिपूर्वक आचरण ठेवावे. कर्तव्य व अकर्तव्य यांचा निर्णय शास्त्राधारे करावा. असे आचरण श्रेयस्कर असते, असे श्रीकृष्ण म्हणतात. साधकांसाठी ही अशी चर्या दिलेली आहे गीतेने ***("त्रिविधं नरकस्येदं ... । कर्म कर्तुमिहार्हसि।।१६-२१ ते २४।।")!***

ईश्वरप्रणिधानपूर्वक कर्माचरण

चर्या, आहार-विहार, श्रद्धा, तप, यज्ञ, दान इ.कसे करावेत, आचरण कसे असावे याचा साधकास त्रिगुणाधारित उपदेश सतराव्या अध्यायी केला आहे. ***ईश्वरप्रणिधान*** साधण्यास उत्तम अशी चर्या कशी असते ते या अनुषंगाने आपणास ओळखता येते. ***"तज्जपस्तदर्थभावनम्।।"*** व ***"तस्य वाचकः प्रणवः।।१-२८ व २७।। पा.यो.सू.।।"*** या सूत्रांस समांतर अशी ईश्वरप्रणिधानाची युक्ती कर्माद्वारे कशी आचरावी, हे या अध्यायात सविस्तर सांगितल्याचे दिसून येते. हे येथील वैशिष्ट्य ठळक लक्षात घेण्याजोगे आहे.

"ॐ तत्सदितिनिर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः। ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा।।१७-२३।।" या श्लोकापासून हा उपदेश सांगण्यास श्रीकृष्ण सुरुवात करतात. परब्रह्माचा ***ॐ तत् सत्*** अशा तीन प्रकारे शास्त्रात निर्देश केला जातो. ***ब्राह्मण, यज्ञ व वेद*** हे सृष्टीसह याच ***ॐतत् सत्*** संकल्पाद्वारे सर्जले गेले. म्हणून यज्ञ-दानादी सर्व शास्त्रोक्त कर्मे **ॐ** असा निर्देश करत आरंभली जातात. **तत्** म्हणून फलाशारहित कर्मे मोक्षार्थी लोकांकडून आचरली जातात. श्रद्धेने करावयाचे कर्म **सत्** म्हणून ओळखतात.

कर्मे करण्याची ही हातोटी जिने मोक्ष प्राप्त होतो ती गीता *श्लोक क्र.१७-२४ ते २८* यांतून येते. पण या सर्वांचा उत्तम उलगडा कसा होतो तो ज्ञानेश्वरीच्या साहाय्याने आपण आधीच अवलोकिला आहे *(उन्मेषः३३:स्वधर्मकर्तव्य,पृ.क्र.५१६ ते ५२१).* ***"म्हणौनि वर्णत्रयात्मक। जें हें परब्रह्मनाम एक। विनियोगु तूं आईक। आतां ययाचां।।१७-३५३।।"*** असे म्हणून ज्ञानेश हे ***"तस्य वाचकः प्रणवः"*** चे रहस्य उलगडून सांगण्यास प्रारंभ करतात.

"नामींची आखरें तिनि। कर्मा आदिमध्य निदानीं। प्रयोजावीं पैं स्थानीं। इहीं तिनि।।१७-३५५।। ..." ते ***"आदि तंवं ॐकारु। ध्यानें करिति गोचरु। पाठीं आणिति उच्चारु। वाचेहिं तो।। १७-३५७।। ... आतां ॐकारें आदरिलें। तत्कारें समर्पिलें। इयां रिती जेआं आलें। ब्रह्मत्व कर्मा।। तैं कर्म किर ब्रह्माकारें। जालें तेणेंहिं न सरें। जैं करितेणेंसिं दुसरें।आहें म्हणौनि।।१७-३७३ व ३७४।। ... म्हणौनि परत्वें ब्रह्म असें। तैं आत्मत्वें परिवयसें। सच्छब्द या रिणादोखें। ठेविला देवें।।१७-३७७।। ... तऱ्हैं ॐकारें तत्कारें। जैं कर्म दाविलें ब्रह्माकारें। तैं गिळूनि होईजे एकसरें। सन्मात्रचि।।१७-३८४।। ऐसा हा अंतरंगु। सच्छब्दाचा विनियोगु। तऱ्हैं श्रीरंगीं दुजें हेंचि उणें। म्हणौनि हें बोलणें। देवाचेचि।।३८५ व ३८६।।"*** अशा शब्दांत ज्ञानेश श्रीकृष्णांचे गीतावचन स्पष्ट करतात.

ॐतत् सत् अशा त्रिवर्णाकार सुंदर फुलाचा सुवास घेत उपनिषदे दंग होऊन बसली आहेत. हे ब्रह्मनाम विनियोजण्याचा प्रकार असा आहे - कर्माच्या आदि ***ॐकार*** योजावा; मध्ये म्हणजे कर्म करत असतांना ***तत्कार*** उपयोजावा आणि कर्म समाप्ती ***सत्*** या शब्दाच्या उच्चाराने करावी. ***परब्रह्म*** आपल्यास अनेक नावांनी हाका मारल्याचे ओळखते. **कर्मे करावीत पण ब्रह्मनाम उपयोजूनच! म्हणजे ती बद्ध न करता मोक्षाप्रत नेतात.** ***ध्यानाने ॐकार सिद्ध करावा ("तज्जपस्तदर्थभावनम्"प्रमाणेच म्हणा ना!!").***

ॐतत् सत् **प्रयोजनाने केलेले कर्म, करणारा कर्ता आणि ज्यास ते कर्म समर्पिले ते ब्रह्म, ही तिन्ही ब्रह्मरूप होऊन जातात,** अशी युक्ती श्रीरंगांना सांगायची आहे असे ज्ञानेश विशद करतात.

नामजप व कर्म

कर्म कोणास चुकले आहे! पण ईश्वरप्रणिधानपूर्वक असे ते उपरोक्त युक्तीने केल्यास ते मोचक होते. असे कर्म साधकास कोणत्या पदी नेते म्हणता! ते ऐका - ***"पाहें पां ॐतत् सत् आईसें। हें बोलणें तेथ नेतसे। जेथूनि कां हें प्रकाशें। दृश्यजात।। तैं तंवं निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट। तेयाचें हें आंतुवट। व्यंजक नाम।।१७-४०१ व ४०२।।"*** - "ज्याकडून हे दृश्यमान प्रकाशिले जाते, तेथे हे हे ***ॐतत् सत्*** उच्चारण नेऊन पोहोचवते. निर्धर्म शुद्ध असे ते परब्रह्म आहे. त्याठायी हे नाम घेऊन जाते. त्या परब्रह्माचे अंतरंग प्रकट करणारे ***ॐतत् सत्*** असे नाम आहे."

"परि आश्रयो आकाशा। आकाशचि कां जैसा। ययां नामा नामी आश्रयो तैसा। अभेदु असे।। उदईला आकाशिं। रविचिं रवितैं प्रकाशिं। हें नामव्यक्ति तैशि। परब्रह्मा करी।।१७-४०३ ते ४०४।।" - "आकाशास जसे आकाशच आधार असते, तसे ***ॐ तत् सत्*** या नामास व ***परब्रह्म*** या नामीस एकमेकच आधार आहेत, इतके हे दोन्ही अभेद आहेत ***("तस्य वाचकः प्रणवः"या संकल्पनेवेगळे काय आहे यात!).*** आकाशींचा सूर्य जसा स्वतःस प्रकाशवतो, तसाच या ***ॐतत् सत्*** नामाचा उच्चार परब्रह्मास व्यक्तवतो."

या रहस्यात मुरलेल्या साधकाचे अंतरंग ***"मन रामीं रंगलें"*** असे न झाले, तरच नवल! ईश्वरप्रणिधानाचा असा हा कर्मपथ ज्ञानेश गीतेच्या आधाराने आपणासाठी प्रकाशवितात!

"स्वकर्मे ईशु पूजावा"

ईश्वरप्रणिधान* साधता यावे म्हणून कर्मांचा सर्वथैव त्याग करावा असे गीता म्हणत नाही. फलाशारहित होऊन कर्मे करणे व कर्म फलासह ब्रह्मार्पण करणे असा गीतेचा कर्ममार्ग आहे.** स्वधर्मच आचरावा. यज्ञ-दान-तप या कर्मांनी चित्तशुद्धी होते. म्हणून ती कधीच त्यागू नयेत. ***संन्यास व त्याग या कर्मविषयक सिद्धांतवजा संकल्पना अशा रीतीने श्रीगोपालकृष्ण गीतेत स्पष्ट करतात.

त्याविषयी सखोल विवेचन अठराव्या अध्यायी येते. ***"सन्न्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम।... ।।१८-१।।"*** या अर्जुनाच्या प्रश्नावरून प्रकट होणारे श्रीकृष्णांचे याबाबतचे विवेचन १८-२ या श्लोकापासून सुरू होऊन चातुवर्णियांची कर्मे इ.वर्णन करून ***"स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः। ... ।।१८-४५।।"*** या उपदेशाने समाप्त होते.

स्वकर्मात रत असणाऱ्या मनुष्यास परमसिद्धी प्राप्त होते, असे श्रीकृष्ण म्हणतात. ***कर्माधारे*** वर्तून ***ईश्वरप्रणिधान*** करण्याचा हा मार्ग आपण पूर्वीच सविस्तर पाहिला होता *(उन्मेषः२८::[परमात्मस्वरूप क्षर-अक्षर-उत्तम पुरुष विचार] पृ.क्र.४३१ ते ४३३).* स्वकर्मकुसुमांनी ईश्वराची पूजा केल्यास तो अपार संतोषतो ***(" ... स्वकर्मणा तमभ्यर्च सिद्धिं विन्दति मानवः।।१८-४६।।").***

अठरावा अध्याय::::

गीतेतील ईश्वरप्रणिधानविषयक संकल्पनेचे संक्षेपतः अवलोकन

आतापावेतो जो गीतेचा विहंगम आलोक आपण दृष्टिक्षेपात पाहिला, त्यानुसार ईश्वराचे स्वरूप कळून घेऊन ईश्वरप्रणिधान कसे करावे, ते आपण श्रीकृष्णोक्ती आणि त्यावरील ज्ञानदेवांचे भाष्य यांद्वारे पुनः जाणून घेतले. योगस्थ होऊन कर्मे करावीत ***("योगस्थः कुरु कर्माणि ...।।२-४८।।");*** समत्वबुद्धीने युक्त व्हावे, कर्मफलाचा त्याग करावा ***("बुद्धियुक्तो जहातीह ...। फलं त्यक्त्वा मनीषिणः।।२-५० व ५१।।").*** म्हणजे अनामय पद प्राप्त होते. चित्त प्रसन्न केल्याने सर्व दुःखांचा नाश होतो ***("प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते। ...।।२-६५।।").***

सर्व विषय उपभोगूनही त्यात रममाण न होणे, हेच मुनीचे खरे लक्षण ***("या निशा सर्वभूतानां ..।।२-६९।।")!*** त्यासच शांति किंवा ब्रह्म प्राप्त होते***("आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं ...।।२-७० ते ७२।।").*** ईश्वरप्रणिधानाच्या दोन मुख्य रीती आहेत, पण त्यांच्यात भिन्नता नाही ***("लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा ...।।३-३।।" व "एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति।।५-५।।").***

सतत आसक्तिरहित राहून कर्म केल्याने परमपद प्राप्त होते ***("तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।..।।३-१९।।").*** हा योग मीच प्रवर्तला आहे ***("इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।..।।४-१।।").*** कर्म ब्रह्मयज्ञ म्हणून करावे ***("ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।").*** म्हणजे ब्रह्मप्राप्ती होते.

ज्ञान प्राप्त करावे, त्याने योग सिद्ध करावा. म्हणजे परमशांती लाभते ***("श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप। .. योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत।।४-३३ ते ४१।।").*** त्यासाठी तत्त्वदर्शी महात्म्यांना शरण जावे व त्यांचा उपदेश घ्यावा ***("तद्विद्धि प्रणिपातेन ...।।४-३४ ।।").*** योगानेच ब्रह्मप्राप्ती होते ***("सन्न्यासस्तु महाबाहो ...।।५-६ व ७।।").***

ब्रह्माठायी कर्मे अर्पण करावीत ***(ब्रह्मण्याधाय कर्माणि ...।।५-१० व ११।।").***

ज्ञानाने परमात्मतत्त्व प्रकाशित करून घेणाऱ्यास संसार उरत नाही ***("ज्ञानेन तु तदज्ञानं ..।.. ज्ञाननिर्धूतकल्मषाः।।५-१६ व १७।।").*** साम्यबुद्धी प्राप्त करून घेणाऱ्यास ब्रह्मप्राप्ती होते ***("विद्याविनयसम्पन्ने ..। ... अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदित्मनाम्।।५-१८ ते २६।।").***

स्वतःच स्वतःस ओळखावे व आपला उद्धार करून घ्यावा ***("उद्धरेदात्मनात्मानं... ।।६-५ व ६।।").*** योग्याने एकांतात राहून आसनादी साधून मन एकाग्र करून प्राणायामपरायण होऊन एकाग्र मनाने चित्त व इंद्रिये आवरून परमेश्वराठायी चित्त लावावे व तत्परायण होत योग साधावा ***("योगी युञ्जीत ..। .. मत्संस्थामधिगच्छति।।६-***

*१० ते १५।।" व "**स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्या ...।.. मुक्त एव सः।।५-२७ व २८।।**").*

ईश्वरप्रणिधानाविषयी ही खुलासेवार रीत गीता पाचव्या व सहाव्या अध्यायी सांगते. हाच गीतेचा मूळ गाभा होय. ***पंथराज*** असे नांव देऊन ज्ञानराज या पद्धतीस किती खुलासेवार प्रकट करतात, ते आपण विस्तारपूर्वक पाहिलेच आहे *[एकादश स्कंधःयोगवैभवः(उन्मेष क्र.४४-४६)४४-१:योगविभवभाण्डार -पंथराज; ४४-२:योगविभवभाण्डार -कुंडलिनी जगदंबा; ४५-१:लययोगसमालोचन - योगपथ; ४५-२: लययोगसमालोचन-योगशास्त्रसमन्वय व ४६:योगपर अभंग पृ.क्र.७११ते ८३०].*

योगसाधना

साधकाची युक्ताहारविहार इ.चर्या ***"नात्यश्नतस्तु योगोऽस्ति ..। ..योगो भवति दुःखहा।।६-१६ व १७।।"*** या श्लोकातून येते. ती आपणास विदित आहेच. योगस्थिती व समाधि कशी असते, ते ***"यदा विनियतं ..। .. योगोऽनिर्विण्णचेतसा।।६-१८ ते २३।।"*** यातून स्पष्ट केले आहे. निर्वातठायीचा दीप असावा, तसे योग्याचे चित्त असते. मन आत्म्याठायीच स्थिरावते. उपभोगांची इच्छा उरत नाही. चित्ताचा निरोध होतो. चित्त तदाकार होते. संतुष्ट होते.

हा योग वा ईश्वरप्रणिधानाने समाधि कसा प्राप्त करावा याचे पुनश्च दिग्दर्शन ***"सङ्कल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा ...।... सुखमश्नुते ।।६-२४ ते २८।।"*** या श्लोकातून येते. योग्यास सर्वत्र ईश्वर दिसू लागतो. अशा प्रकारे तो सतत ईश्वरास भजू लागतो. सर्वत्र समबुद्धी असणारा योगीच परमश्रेष्ठ आहे ***("सर्वभूतस्थमात्मानं ..। ... स योगी परमो मतः।।६-२९ ते ३२।।").***

योगाचे फल

योग साध्य होणे कठीण नाही. जन्मजन्मांतरी तो सफल होतोच होतो. योगजिज्ञासूसही शब्दब्रह्मापलीकडील गती प्राप्त होते. सर्वात योगीच श्रेष्ठ आहे. त्यातूनही ईश्वराठायी आपले अंतःकरण ठेवून श्रद्धेने त्यास भजणारा हा योगीच खरा योगी असतो, असे श्रीकृष्ण सांगतात ***("योऽयं योगस्त्वया प्रोक्तः ... । .. स मे युक्ततमो मतः।।६-३३ ते ४७।।").***

अंतकालीही तो योगी ईश्वरास स्मरत देह त्यागतो आणि ईश्वराप्रत जाऊन पोहोचतो ***("अन्तकाले च मामेव ...।।८-५ ते ६।।").*** म्हणून सतत ईश्वरप्रणिधान करावे ***("तस्मात्सर्वेषु कालेषु ..।।८-७।।").*** प्रयाणकाली भुवयांमध्ये प्राण ठेवून दैदिप्यमान अशा त्या परमपुरुषाचे स्मरण करावे. सर्व इंद्रियरूपी द्वारांचे संयमन करून व मनाचा हृदयात निरोध करून प्राण मस्तकी *(मूर्ध्निस्थानी)* न्यावेत. योगधारणा करावी. ***ॐ*** या एकाक्षर ब्रह्माचा जप करत, ईश्वराचे स्मरण करत, प्राण सोडावा. म्हणजे परमगती प्राप्त होते ***("अभ्यासयोगयुक्तेन चेतसा ...।.. परमां गतिम्।।८-८ ते १३).***

अनन्यचित्ताने सतत ईश्वराचे ध्यान करणाऱ्या योग्यास परमेश्वराची सुलभरीत्या प्राप्ती होते. त्यास पुनर्जन्म प्राप्त होत नाही ***(अनन्यचेताः सततं ... । ... पुनर्जन्म न विद्यते।।८-१४ ते १६।।").*** म्हणून ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"*** या श्लोकात सांगितलेला ईश्वरप्रणिधानाचा मार्गच प्रशंसावा तेवढा थोडाच आहे! असो.

ईश्वरप्रणिधानविचाराचा सारांशः:::

गीताश्लोक १८-५० ते ७८

सारांश असा की एकूण सातशे श्लोकांतून गीता ईश्वराचे एकच एक स्वरूप स्पष्ट करते. ते स्वरूप पतञ्जलिप्रणीत ईश्वरस्वरूपाशी मिळतेजुळते आहे. तसेच ईश्वरप्रणिधानाची गीतोक्त रीतही त्याच्या फलासह पतञ्जलींच्या सूत्रांद्वारे सांगितलेल्या रीतीशी व फलाशी सदृश अशीच आहे.

ईश्वरप्रणिधानाची गीतोक्त रीत वा युक्ती फलासह पुनः संक्षेपाने सांगण्यास भगवंत सिद्ध होतात ते त्यांच्या ***"सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे। समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा।।१८-५०।।"*** या अठराव्या अध्यायांतीच्या वचनाने! ती पाहून हा ईश्वर व ईश्वरप्रणिधानाचा विषय तूर्त पुरा करू या! हा सर्व भाग १८-५१ ते ७८ या गीतासमाप्तीच्या श्लोकसंभारातून व्यक्त झालेला आहे.

श्रीकृष्ण या श्लोकांत काय सांगतात, ते पहा. ते म्हणतात की *"ज्ञानाची परमावधी वा ब्रह्म कसे प्राप्त होते, ते थोडक्यात सांगतो. शुद्ध बुद्धीने युक्त व्हावे. धैर्याने आत्मसंयमन करावे. शब्दादी इंद्रियविषय सोडून राग व द्वेष दूर सारून विविक्त म्हणजे शुद्ध एकांत स्थळी रहावे. मिताहार ठेवावा. काया, वाचा व मन ताब्यात ठेवावीत. नित्य ध्यानयुक्त व विरक्त असावे. अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध व परिग्रह यांचे पाश तोडून टाकावेत. शांत व ममत्वरहित व्हावे. म्हणजे ब्रह्मभूत होता येते."*

*"तेव्हा प्रसन्नचित्त होऊन कसलीही आकांक्षा उरत नाही. कशाचाही द्वेष न करता सर्वांभूती सम होऊन माझी परमभक्ती लाभते. त्याद्वारे माझे यथार्थ ज्ञान होते आणि भक्त माझ्याठायीच प्रवेशतो **("...। ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्।।१८-५५।।").** सर्व कर्मे करत असूनही माझा प्रसाद लाभतो आणि शाश्वत पदाची प्राप्ती होते **("सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः। मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्।।१८-५६।।")."***

"म्हणून मनाने सर्व कर्मे मला अर्पण करत जावे. मत्परायण व्हावे. बुध्दियोग साधावा व माझ्याठायी नेहमी चित्त ठेवावे. म्हणजे माझा अनुग्रह प्राप्त होऊन त्या प्रसादाने सर्व दुःखांचे हान होईल."

"सर्व भूतांच्या हृदयात राहून आपल्या मायेद्वारे ईश्वर त्यांना यंत्रवत चाळवत असतो. सर्वभावाने त्याच ईश्वरास शरण जावे. म्हणजे त्याच्या प्रसादाने परम शांती व शाश्वत पद प्राप्त होइल. हे गुह्यातले गुह्य असे ज्ञान आहे."

ते ज्ञान परत सांगत भगवंत म्हणतातः ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि***

मे।। सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः।।१८-६५ व ६६।।" - "माझ्याठायी मन ठेव. माझा भक्त हो. माझेच यजनयाजन, भजनपूजन करत मलाच नमस्कारत जा. म्हणजे तू मलाच येऊन मिळशील. तू माझा भक्त आहेस. म्हणून तुला हे गुह्यातिगुह्य मी सत्य तेच सांगण्याच्या प्रतिज्ञेने बद्ध होऊन सांगत आहे. *सर्व धर्म सोडून तू मलाच शरण ये. मी तुला सर्व पाप, संसारभय इ.पासून मुक्त करीन!"*

ईश्वरप्रणिधानाचे फल

साक्षात ईश्वरच अशा श्रीकृष्णाकडून आपले स्वरूप आणि प्रणिधान करण्याची पद्धत ऐकून अर्जुनास महाप्रसादच मिळाल्याचा आनंद झाला. त्याचा मोह नष्ट झाला. स्वरूपज्ञान जागृत झाले ***("नष्टो मोहः .. ।।१८-७३।।").*** एवढेच काय तर हा श्रीकृष्णार्जुनांचा अद्भुत ज्ञानसंवाद ऐकून सञ्जयही हर्षाने रोमांचित झाला आणि त्याने कृष्णार्जुनसंवादरूपी गीतेच्या फलश्रुतिरूपच जणू असा तो प्रसिद्ध ***"यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम।।१८-७८।।"*** हा श्लोक उच्चारून देवभक्तांचे अद्वैत सिद्ध केले!!!

"ईश्वरप्रणिधानाद्वा।।" या सूत्राने साध्य होणारा समाधि तो हाच! ***जेथे कृष्ण तेथे अर्जुन! श्री तेथे श्रीमंती! देव तेथेच भक्त! विष्णु तेथेच लक्ष्मी!*** ज्ञानेश्वर म्हणतात कीः

जेथ तो श्रीवल्लभु। जेथ भक्तकदंबु।
तेथ सुख आणि लाभु। मंगलाचा।।१८-१६५७।।
चंद्र तेथ चंद्रिका। शंभु तेथ अंबिका।
संत तेथ विवेका। असणें की जी।।१६३२।।
राओ तेथ कटक। सौजन्य तेथ सोयरिक।
वह्नि तेथ दाहक। सामर्थ्य कीं।।१६३३।।
दया तेथ धर्मु। धर्मु तेथ सुखागमु।
सुखिं पुरुषोत्तमु। असे जैसा।।१६३४।।
वसंत तेथ वनें। वन तेथ सुमनें।
सुमनीं पालिंगनें। सारंगांचि।।१६३५।।
गुरु तेथ ज्ञान। ज्ञानीं आत्मदर्शन।
दर्शनीं समाधान। आथिं जैसें।।१६३६।।
भाग्य तेथ विलासु। सुख तेथ उल्लासु।
हें असो तेथ प्रकाशु। सूर्यू जेथ।।१६३७।।

"देव व भक्त यांचे हे परस्परअभिन्नत्व जेथे सिद्ध झाले, त्या स्थितीला समाधि हे नावसुद्धा अपुरेच ठरावे! योगशास्त्र जिच्याठायी कृतकार्य होते, ती ही अवस्था! *संजीवन समाधी* म्हणा की *जीवन्मुक्ती* म्हणा, ही अवस्था म्हणजे *"ईश्वरप्रणिधानाद्वा।।"* या सूत्राचे गमकच होय.

तैसा मी तो हें जैं असें। तैं स्वानंदानुभवसमरसें।
कालऊनिआं प्रवेशें। माझांचि माजिं।।१८-१२०९।।
आणि तो हें भाख जेथ जाएं। तेथ मी हें कव्हणा आहे।
आईसा मी ना तो तिएं समाएं। माझांचि रूपीं।।१२१०।।
<u>तेथ ब्रह्मा आत्मा ईशु। ययां बोलां मोडें सौरसु।</u>
<u>न बोलणेआंही पैसु। नहीं तेथ।।१२१३।।</u>
किंबहुना आईसें निखल।
मीपणा जोडें तेआं फल। ...।।१२१८।।

या ज्ञानेशांच्या शब्दांत ती अवस्था समावलेली आहे! ***"समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।।२-४५।। पा.यो.सू.।।"*** याने निर्देशित केलेला जो निर्विकल्प समाधि, जो ईश्वरप्रणिधानाने सिद्ध होतो, तोही याच अवस्थेचा द्योतक होय. असो.

<u>ग्रंथाचे सत्त्व काढण्याची मीमांसकांची फल वा परिणाम ही कसोटी गीतेला लावता गीतेचे सत्त्व वा मुख्य प्रतिपादनाचा विषय ही अशी ईश्वरप्रणिधानाद्वारे साक्षात्कार, समाधिसिद्धी, अद्वैतप्राप्ती इ.नावांनी ओळखली जाणारी स्थितीच आहे,</u> हे अशा प्रकारे परत दिसून येते.

समारोप

यानंतर आपणास उपासनामार्गातील एक महत्त्वाचा अंतिम टप्पा म्हणजे ***उपासकांचा प्रयाणकाल व गती*** अभ्यासावयाचा आहे. त्यासाठी वळू या पुढील ***उन्मेष क्र.५१ - प्रयाणकाल व गती*** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५१::
::प्रयाणकाल व गती::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५१:

गीता:
४:१-३,८,१०,२४
५:२७-२९
६:१०-१५
७:१-३
८:५,७-२७

ज्ञानेश्वरी:
६:१५९,२४४
८:६९-२७०

अभंग:८२८,८२९,८३७

उद्धृत:

परमहंस योगानंद-गीता:९७०-९७१

शैलेंद्र शर्मा:योगेश्वरी श्रीमद्भगवद्गीता-एक यौगिक व्याख्या:९७६-९७९

::उन्मेष ५१::
::प्रयाणकाल व गती::

भक्तांचे प्रयाण::::

उपासनाकांडाचे पूर्वानुसंधान

ईश्वर व ईश्वरप्रणिधान या संकल्पनांचा ***गीता, पातञ्जलसूत्रे व ज्ञानेश्वरी*** यांच्या आधारे आपण पुरेसा मागोवा घेतला आहे आणि गीता व पातञ्जलयोग या शास्त्रांचे त्या संकल्पनांबाबतचे अभिन्नत्वही अभ्यासले आहे. म्हणून मागील उन्मेषातला आपला त्याबाबतचा संकल्प पूर्ण झाला आहे. तरी आता उपासनाकांडाच्या उर्वरित भागाकडे वळू या. त्यासाठी प्रथम ***भक्तांची प्रयाणकालची स्थिती*** हा आठव्या अध्यायातील भाग पाहू या.

"अंति मति सा गति"

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः।।८-५।।

"हे कुंतीपुत्रा! ज्या ज्या वस्तूचे स्मरण करत मनुष्य अंतकाली देहास त्यागतो, त्या त्या वस्तूठायी त्याचे चित्त नित्य एकाग्र झालेले असल्याने , तो तिच्याप्रत जातो."

हे जे भगद्वचन आहे. त्याचा विचार आपण पूर्वी केला आहे *(उन्मेष:१७:अर्जुनाचे सप्तप्रश्न पृ.क्र.२६०)*. ***"म्हणौनि ययापरीं मातें। अंतकाळीं जाणितसांतें। जैं मोकलिति देहांतैं। तैं मीचि होति"*** या शब्दांत ज्ञानेशानी भक्तांचा प्रयाणकाल सूचित केला आहे.

प्रयाणकालची भक्तांची स्थिती

भक्तांस अंती भगवत्स्वरूप का प्राप्त होते त्याचे सर्वसाधारण कारण स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतात:

एरविं तऱ्हें साधारण। उरीं आदललिआं मरण।
जो आठऊ धरीं अंतष्करण। तैंचि होईजे।।८-६९।।
जैसा कवणु एकु काकुलुति। पलतां पवनगति।
दुपाऊलीं अवचितिं। कुहामाजिं पडिला।।७०।।
आतां तेआं पडणयाआरौतें। पडण चुकवावेआं परौतें।
नाहीं म्हणौनि तेथें। पडावेंचि पडें।।७१।।
तेंविं मृत्युचेनि अवसरें एकें। जैं येऊनि जिवासामोरें ठाकें।
तैं होणें मग न चुकें। भलतेआंपरी।।७२।।
आणि जागतां जंव असिजें। तंव जेणें ध्यानें भावना भाविजें।
डोलां लागतखेंवा देखिजें। तैंचि स्वप्निं।।७३।।
तेंविं जीतेनि अवसरें। जैं आवडौनि जिविं उरें।
तैंचि मरणाचिएं मेरें। फार हों लागें।।७४।।

"नाही तरी मनुष्य ज्या ज्या वस्तूचे मृत्युसमयी स्मरण करतो, ती ती वस्तूच तो होत नाही का! अंतकाळी जे स्मरते, त्याच रूपाने मनुष्य पुनर्जन्म पावतो! एखादा मनुष्य जीवाच्या आकांताने वायुवेगाने पळत सुटला असता अचानक एखाद्या विहिरीच्या काठावर पोहोचला, तर तो त्या गतीने विहिरीत पडेलच की नाही! ते पडणे चुकवण्यासारखे त्याच्या हाती तेव्हा काय असते बरे! तो जसा त्या विहिरीत पडणारच त्याचप्रमाणे मृत्युसमयी मनास ज्याचा ध्यास लागतो, जे त्याच्यासमोर दृग्गोचर होते, ते तो होतोच! असे होण्याचे काही केल्या चुकवता चुकत नाही!" याबाबत श्रीमद्भागवतातील जडभरताची गोष्ट प्रसिद्धच आहे.

" तसेच जागृतावस्थेत मनाने ज्याचे चिंतन घडते - मन ज्याचा ध्यास घेते - ते वस्तुमात्र स्वप्नी दिसतेच ना! याप्रमाणेच जिवंतपणी मनुष्यास ज्याची फार आवड असते, तीच वस्तू मृत्युसमयी त्यास आठवते आणि त्याला मृत्यूनंतर तिचेच स्वरूप प्राप्त होते."

म्हणून भगवंतांचा उपदेश त्यांनाच सतत स्मरावे असा आहे. निदिध्यास घ्यावा तर ईश्वराचाच! चिंतन करावे तर ईश्वराचेच! भक्ती करावी तर त्याचीच! ***"मन्मना व्हावे; मद्भक्त व्हावे; मद्याजी व्हावे; मत्परायण व्हावे; मदर्थ सर्व कर्मे करावीत; ईश्वरास सर्वत्र वंदावे; सर्व धर्मांचा परित्याग करून त्यास एकट्यासच शरण जावे; त्याच्याठायीच मन व बुद्धी ठेवावीत; ईश्वरासच सर्व कर्मे अर्पण करावीत; अनन्ययोगाने त्याचेच ध्यान करावे; त्यासच उपासावे; ईश्वरासच प्राप्तव्य करावे; मच्चित्त व्हावे; ईश्वराठायीच प्राण ठेवावेत; सतत त्याचेच प्रीतिपूर्वक भजन करावे; सर्व भूतांठायी त्यासच पहावे; अगदी युद्ध जरी करावयाचे झाले, तरी अर्जुनाने ईश्वरास स्मरतच युद्धासाठी सज्ज व्हावे,"*** असे श्रीकृष्णांचे निकडीचे म्हणणे आहे.

सर्वकाळ ईश्वरस्मरण करण्याचे महत्त्व

भगवंत म्हणतात:

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम्।।८-७।।

"हे कुंतिपुत्रा! म्हणून तू सर्वकाळी माझेच चिंतन करत जा. युद्धसुद्धा मला स्मरतस्मरत कर! मन व बुद्धी मला अर्पिलीस की तू निःसंशय मलाच प्राप्त होशील."

यावर ज्ञानदेव म्हणतात:

आणि मरणिं जेआं जैं आठवें। तो तेंचि गतितैं पावें।
म्हणौनि सदा स्मरावे। मातेंचि तुवां।।८-७५।।
डोलां जैं देखावें। कां कानिं हन आईकावें।
मनिं जैं भावावें। बोलावें वाचें।।७६।।
तैं आंतु बाहेरीं आघवें। मीचि करूनि घालावें।
मघ सर्वी कालीं स्वभावें। मीचि आहे।।७७।।

"अर्जुना! मृत्युसमयी मनुष्य ज्याचे स्मरण करतो, त्याची गती त्याला मिळते. म्हणून माझी गती मिळवण्यासाठी तू नित्य माझेच स्मरण - चिंतन करत जा. डोळ्यांनी सर्वत्र माझेच रूप पाहत जा. सर्वांठायी वसणाऱ्या मला तू नित्य पाहत जा. कानांनी माझीच कीर्ती श्रवण करत जा - माझाच नामघोष ऐकत जा! मनाने जे जे ध्यावे, ते ते माझेच रूप असावे. वाचेने माझेच स्मरण करत जा - माझेच नाम घेत जा! जो काही व्यवहार काया-वाचा-मनेकरून होईल, तो सर्व मजठायी चित्त ठेवून करावा आणि त्या सर्वात माझेच स्वरूप पाहत तो अंतर्यामी व बाहेरही मद्रूप करून सोडावा! असे झाले की तू सर्वदा माझ्याच स्वरूपी राहशील!"

अगां आईसिआं जऱ्हैं जाहालिआं। मग न मरिजे देह गेलिआं।
मां संग्रामु केलिआं। भें काएं तूझ।।८-७८।।
तूं मनबुद्धि सांचेंसिं। जऱ्हैं माझिआं स्वरूपिं अर्पिसि।
तऱ्हैं मातेंचि गां पावसिं। हें माझिं भाख।।७९।।
हेंचि काईसियावरी होएं। आईसा जऱ्हैं संदेहो वर्तत आहे।
तऱ्हैं अभ्यासूनि पाहें। मग नोहें तऱ्हैं कोपें।।८०।।

"असे एकदा का होऊन गेले की देह पडला तरी मरण नाही! मग युद्ध करण्यात भय ते कसले! हे अर्जुना! मी तुला सदैव हेच सांगतो आहे की तू बुद्धिसहित मन माझ्या स्वरूपी अर्पण कर! असे केलेस की तू निःसंशय मलाच पावशील, हे मी तुला प्रतिज्ञापूर्वक सांगतो आहे! पण अजूनही तुला अशी शंका येत असेल की हे एवढे कोठले व्हायला, तर ऐक! निदान मी म्हणतो आहे, त्याचा अभ्यास करून तरी पाहा! मग मग जर मी म्हणतो आहे तसे तुला मद्रूप प्राप्त झाले नाही, तर माझ्यावर तू खुशाल रागव!"

अभ्यासाचे फल

पुढे भगवंत सांगतात कीः

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्।।८-८।।

"असा अभ्यास करून योग साधलेल्या पुरुषाचे चित्त अन्यत्र कोठेही जात नाही. अशा चित्ताने सतत त्या परमपुरुषाचे चिंतन करणारा साधक त्या दिव्य पुरुषाप्रत सहजच जातो."

ज्ञानेश्वर म्हणतातः

येणेंचि अभ्यासेंसिं योगु। चित्तासिं करी पां चांगु।
अगां उपावबळें पंगु। पहाड ठाकी।।८-८१।।
तेविं अभ्यासें निरंतर। चित्तासिं परमपुरुषाचि मोहर।
लाविं मग शरीर। असो अथवा जाओ।।८२।।

"अर्जुना! प्रयत्नबळाने पांगळासुद्धा गिरिशिखर गाठू शकतोच की नाही! मी सांगितलेल्या योगाचा मनापासून अभ्यास कर. सतत हा अभ्यास करत जा व चित्तावर त्या परमपुरुषाची मोहर ठसवून घे. असे झाले की मग देह राहो अथवा जावो!"

जैं नानागति पावतें। तैं चित्त वरील आत्मयांतैं।
मग कवण आठविं देहांतैं। गेलें कीं आहे।।८-८३।।
पैं सरिताचेनि ओघें। सिंधुजलां मीनलें घोघें।
तैं काएं वर्तत आहें मागें। म्हणौनि पाहों एति।।८४।।
ना तैं समुद्रुचि होऊनि ठेलें। तेविं चित्ताचें चैतन्य जाहालें।
जेथ यातायात निमालें। घनानंद जैं।।८५।।

"पुरुषास नाना गती देणारे व अनेकानेक योनीतून भ्रमण्यास लावणारे चित्तच असते. एकदा का त्या चित्ताने आत्मराजास वरले की देहाची आठवण - तो आहे की गेला ही कोणास उरणार! घों घों नाद करत सरितेचा प्रवाह जेव्हा समुद्रजळी प्रवेशतो, तो काय पुनः मागे वळून पाहण्यासाठी तरी परत माघारा फिरतो काय! तो तर समुद्रच होऊन राहतो की नाही! तसेच एकदा का चित्त चैतन्यरूप झाले की होते. जन्मभराची यातायात - हा इहलोक, परलोक, सर्व काही निमटून जाते."

मागेच आपण *श्लोक क्र.१२-१२* ***("श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ..।।")*** यानिमित्त अभ्यास म्हणजे काय व त्याचे साधनाक्रमातील स्थान जाणून घेतले होते *(उन्मेष ४१:सगुणोपासना पृ.क्र.१२२ ते१३१).* ***"अभ्यास –➢ ज्ञान –➢ध्यान –➢कर्मफलत्याग –➢ शांति"*** असा पायऱ्यापायऱ्यांचा साधनामार्गही तेव्हा आपण समजावून घेतला होता. निरंतर अभ्यास करणाऱ्या साधकास देहांतसमयी भक्ती व योग यांचे बल अनायासेच लाभते व तो घनानंद अशा चैतन्यास सहज जाऊन मिळतो.

अंतःस्मरण

श्रीगोपालकृष्ण त्या चैतन्यघनाचे स्वरूप वर्णन करत म्हणतातः

कविं पुराणमनुशासितार-
मणोरणीयांसमनुस्मरेद्यः।
सर्वस्य धातारमचिन्त्यरूप-
मादित्यवर्णं तमसः परस्तात्।।८-९।।
प्रयाणकाले मनसाचलेन
भक्त्या *युक्तो योगबलेन* चैव।
***भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्*-**
स तं परं पुरुषमुपैति दिव्यम्।।८-१०।।

"सर्वज्ञ, पुरातन, नियंता, अणूहूनही लहान, सर्वांचा आश्रय, अचिंत्य रूप असलेला, आदित्यसम वर्णाचा, अंधकारापलीकडील प्रकाशमान असा जो परमपुरुष आहे, त्याचे जो सतत स्मरण करतो, तो मृत्युसमयीसुद्धा एकाग्र मनाने, भक्तियुक्त अंतःकरणाने व योगबलाने युक्त होत आपल्या ***भ्रूमध्यात प्राणांचे सम्यक धारण करत*** त्या तेजस्वी परमपुरुषाप्रत जातो."

अभ्यासाच्यायोगे त्याला हे करणे शक्य होते. दीर्घाभ्यास वा सद्भ्यास साधकास अंती अशी गती प्राप्त करवून देतो. या श्लोकातून

पुनश्च **अभ्यास *(कर्म)*, भक्ती व योग** यांचे घनिष्ट साहचर्य व निकटचे संबंध दिसून येतात. **गीतेचा योगमार्ग हा *कर्म व भक्ती* यांविरहित किंवा *योग* यांशिवायचा नाही,** हे परत आपणास या श्लोकांतून दृग्गोचर होते. असो.

शाङ्करविचार

या श्लोकाचे विवरण शाङ्करभाष्याधारे पाहणे आपणासाठी उपयुक्त ठरेल. तिकडे वळू याः

प्रथम ***अभ्यास*** म्हणजे काय यावर ते काय म्हणतात पहाः ***"मयि चित्तसमर्पणविषयभूते एकस्मिन् तुल्य प्रत्ययावृत्तिलक्षणो विलक्षणप्रत्ययानन्तरितः अभ्यासः।।८-८।।"*** - **चित्तसमर्पणाचा एकमात्र आश्रय वा विषय भगवंतच होत. त्यांच्याठायी चित्त लावणे व चित्तात तद्विरोधी वा इतर प्रतीती न येऊ देणे , तसेच चित्तास केवळ भगवंताचेच आलंबन ठेवणे व सातत्याने असे करणे म्हणजे *अभ्यास* होय.** चित्तास अशा अभ्यासाद्वारे अन्यत्र न जाऊ देणे व ते केवळ भगवंताठायीच जडवून ठेवणे अशी ही साधना आहे. हे ज्यास पतञ्जली ***ईश्वरप्रणिधान*** म्हणतात, तेच आहे.

त्या भगवंताचे स्वरूप स्पष्ट करत आचार्य म्हणतातः

"कविं क्रान्तदर्शिनं सर्वज्ञं पुराणं चिरंतनम् अनुशासितारं सर्वस्य जगतः प्रशासितारम् अणोः सूक्ष्माद् अपि अणीयांसं सूक्ष्मतरम् अनुस्मरेद् अनुचिन्तयेत् यः कश्चित् सर्वस्य कर्मफलजातस्य धातारं विचित्रतया प्राणिभ्यो विभक्तारं विभज्य धातारम् अचिन्त्यरूपं न अस्य रूपं नियतं विद्यमानम् अपि केनचित् चिन्तयितुं शक्यते इति अचिन्त्यरूपः तम् आदित्यवर्णम् आदित्यस्य इव नित्यचैतन्यप्रकाशो वर्णो यस्य तम् आदित्यवर्णं तमसः परस्ताद् अज्ञानलक्षणाद् मोहान्धकारात् परम्।।८-९।।"

याचा अर्थ असाः "भगवंत म्हणजे भूत-भविष्य-वर्तमान जाणणारा सर्वज्ञ, सनातन असा संपूर्ण विश्वाचा शास्ता पुरुष होय. हा अणूपेक्षाही अणू - सूक्ष्माहूनही सूक्ष्मतर - असा आहे. सर्व प्राण्यांच्या कर्मफलास हा धारण करतो व वेगवेगळ्या प्रकारे त्याचे विभाजन करून त्यांना कर्माचे फल प्रदान करतो. हा अचिंत्यस्वरूपाचा आहे. याचे स्वरूप नियत व विद्यमान असूनही कोणीही त्या रूपाचे चिंतन करू शकत नाही.***आदित्यासम व नित्यचेतनप्रकाश असा त्याचा दिव्य वर्ण आहे.*** अज्ञानरूप मोहमय अंधकाराच्या अतीत असे त्याचे परमस्वरूप आहे."

प्रयाणकाली *(मृत्युसमयी)* अशा त्या परमपुरुषाचे स्मरण करत मनुष्याने काय करावे, ते सांगतांना आचार्य म्हणतातः

"मनसा अचलेन चलनवर्जितेन भक्त्या युक्तो भजनं भक्तिः तया युक्तो *योगबलेन च एव योगस्य बलं योगबलं* तेन च युक्तः इत्यर्थः। *पूर्वं हृदयपुण्डरीके वशीकृत्य चित्तम्, तत् उर्ध्वगामिन्या नाड्या भूनिजयक्रमेण भ्रुवोः मध्ये प्राणम् आवेश्य स्थापयित्वा, सम्यग् अप्रमत्तः* सन्।"

श्रीमच्छंकराचार्य सांगतात ते फार महत्त्वाचे आहे. साधकाने आयुष्यभर केलेल्या योगाभ्यासाची ही सांगता आहे, हे ठळक अक्षरांनी दाखवलेल्या त्यांच्या अवतरणातील शब्दांवरून कोणाच्याही सहजच लक्षात येईल. ***योगाभ्यास न करता कोणालाही - भक्त म्हणा, कर्ममार्गी म्हणा वा इतर कोणीही म्हणा, त्याला अशी परमपुरुषाप्रत गती प्राप्त होणे अशक्यच असावे असे त्यांचे भाष्य सूचित करते.***

सर्व प्रकारच्या साधनेचे फल म्हणजे ही अंतकालची गतीच होय. अर्थातच ब्रह्मप्राप्तीचा म्हणा, समाधिसाधनेचा म्हणा, परंधामाचा म्हणा, अंतिम गंतव्याचा जो कोणताही मार्ग असेल, तो योगाविना ***("युक्तो योगबलेन चैव")*** -आणि तोही ***"भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्"*** अशा प्रकारच्या योगसाधनाच्या साफल्याविना थडीस लावणार नाही, हे उपरोक्त *गीताश्लोक क्र.८-९ व १०* यांवरून आणि तदुपरांत आचार्यांच्या त्यावरील ***योग*** म्हणजे कोणता याच्या स्पष्ट भाष्यावरून, तसेच आपण नंतर या श्लोकावरील ज्ञानेश्वरांच्या ज्या ओव्या पाहणार आहोत त्यांवरून सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ दिसून यावे.

गीताभ्यासकांच्या दृष्टीने हे स्थळ अति महत्त्वाचे आहे आणि गीतेच्या दृष्टीने उपासनेचा खरा मार्ग कोणता, याचा उहापोह सतत जन्मभर केलेल्या वरिष्ठ अभ्यासकांच्या नजरेतून हे स्थळ सहज सुटू नये असेच आहे. आणि तसे श्रीशंकराचार्य व ज्ञानेश्वर यांचे येथील सांगणे कधीतरी नीट आकळले तरच गीताभ्यासाचा काही खरा उपयोग या जन्मी होण्याची शक्यता! असो.

आता श्रीआचार्यांच्या भाष्यार्थाकडे वळू या. ते म्हणताहेत, ***"भक्ती व योगबलाने युक्त व्हावे."*** **भजन म्हणजे भक्ती आणि समाधिजन्य संस्कारसंचयाने निर्माण झालेल्या चित्तस्थैर्य म्हणजे *योगबल* अशा संज्ञा आचार्य देत आहेत.** असो.

"भक्ती आणि योग यांनी युक्त होऊन, अचल मन ठेवून प्रथम *हृदयकमलात* चित्त स्थिर करावे आणि मग *उर्ध्वस्थ नाडिद्वारे वशीकार केलेल्या चित्ताच्या प्रत्येक भूमीचा क्रमाक्रमाने जय करावा आणि भ्रूकुटीमध्यात प्राणांस सावधानतेने उत्तमरीत्या प्रस्थापित करावे,*" असा हा क्रम श्रीमच्छंकराचार्य देतात.

आपण वेगळाल्या संदर्भात ***पातञ्जलयोगसूत्रे*** पाहिलीच आहेत. त्याच अनुरोधाने ***हृदयकमल, वशीकार चित्त, सप्तभूमी*** इ.गोष्टी आपण वेळोवेळी समजावून घेतल्या आहेत. ***पंथराजक्रम*** ही आपण षट्चक्रांसह व त्यातील कुंडलिन्युत्थापनप्रक्रियेच्या अनेकानेक बारकाव्यांसह जाणून घेतला होता. त्या सर्व योगविज्ञानाचे साहाय्य घेऊन आपणास या श्लोकांतील सूक्ष्मातिसूक्ष्म अशी योगक्रिया जाणून घेतली पाहिजे, तरच आपल्या या गीता-ज्ञानेश्वरीच्या अभ्यासास काही तरी साफल्य प्राप्त होईल. कारण या श्लोकांतून मनुष्यजीवनाच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा असा प्रश्न चर्चिला जात आहे.

जीवनाचे श्रेयच कसे प्राप्त करून घ्यावे याचा सध्या विचार चालू आहे. त्यासाठी जन्मभर करावयाची साधना येथे स्पष्टपणे

सांगितली जात आहे. अर्थातच हे जीवाच्या अंतिमगतिसंबंधित स्थल आपणासाठी जिव्हाळ्याने समजावून घेण्याचेच आहे, यात संशय नाही!

आपणास हे स्थळ नीट समजावून देणारे आपले श्रीगुरूवर्य, सर्वआचार्यवरिष्ठ, योगियांचे राणे, ज्ञानाचे चैतन्य, प्रत्यक्ष ब्रह्मानंदस्वरूपच असे जे श्रीज्ञानदेव आहेत, त्यांच्याकडे पुनश्च वळणे अर्थातच क्रमप्राप्त आहे.

घनानंद पुरुष

ज्याच्याठायी समाधिस्थ होण्यास हे श्लोक सांगत आहेत, ज्याचे स्मरण व ध्यान करण्यास त्यांत सांगितले आहे, त्या परम अशा ***घनानंद पुरुषाचे दर्शन*** प्रथम या श्लोकांवरील ज्ञानेशांच्या विवेचनातून घेऊ या व नंतर पुढील भूमिकेकडे वळू या.

जेयाचें आकाराविण असणें। जेयां जन्म ना निमणें।
जैं आघवेंचिं आघवेंपणें। देखत असे।।८-८६।।
जैं गगनाहूनि जुनें। जैं परमाणुहूनि सानें।
जेयांचेनि संन्निधानें। विश्व चलें।।८७।।

"आकार नसूनही असणारे असे त्या पुरुषाचे रूप आहे. त्यास जन्म नाही; मृत्यूही नाही. अखिल ब्रह्मांड त्यानेच व्यापले असून तो स्वतःच त्या ब्रह्मांडाचा द्रष्टा आहे. आकाशाहून सनातन असा हा परमपुरुष आहे. तो परमाणुहूनही सूक्ष्म आहे. त्याच्या सान्निध्याने हे विश्व व्यापारते."

जैं सर्वांतैं ययां विएं। सर्व जेणें जिएं।
हेतु जेआं बिहें। अचिंत्य जैं।।८-८८।।
देखें वोलंबां ईंगलु न चरे। तेजिं तिमिर जेथ न सरे।
जैं देहाचें आंधारें। चर्मचक्षूसिं।।८९।।
सुसडा सूर्यकणांचा रासिं। जो नित्य उदो ज्ञानियांसिं।
अस्तमानाचें जेयांसिं। आडनांव नाहीं।।९०।।

"तोच या विश्वास प्रसवतो आणि त्याचे पोषणही करतो. कार्यकारणभाव त्याच्या वाऱ्यालाही उभा राहत नाही. असा हा पुरुष अचिंत्य आहे. अग्नीस वाळवी जशी लागत नाही, तशी या पुरुषाच्या तेजस्वी रूपास अज्ञानांधकाराची लागण होत नाही. परंतु देहाहंकारामुळे हे रूप चर्मचक्षूंस दिसणे शक्य नसते. हे पुरुषचैतन्य म्हणजे सूर्यकणांची जणू राशीच असावी असे दैदिप्यमान आहे. ते ज्ञानी पुरुषांसमोर सदैव प्रकाशात असते. त्यास अस्त कधीच नसतो."

प्रयाणसमयींचे योगाचरण::::

अंतकालची प्रक्रिया

प्रयाणकाल प्राप्त झाला असता साधक योगी पुरुष त्या परमरूपास कसे पावतात, ते ज्ञानेश पुढे सांगतात.

तेयां अव्यंगवाणेआं ब्रह्मेयांतैं। प्रयाणकालें प्राप्तें।
जो थिरावलेनि चित्तें। जाणौनि स्मरें।।८-९१।।
बाहेरीं पद्मासन रचूनि। उत्तराभिमुख बैसौनि।
जिविं सुख सूनि। कर्मयोगाचें।।९२।।
आंतु मीनलेनि मनोधर्में। स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें।
आपेंआप संभ्रमें। मिलावेआं।।९३।।

"अंतकाल प्राप्त होतेवेळी योगी त्या अव्यंग ब्रह्मास स्मरतो. स्थिर चित्त असलेल्या योग्याने आपले अंतिम गंतव्य म्हणजे हे ब्रह्मच आहे, असे जाणलेले असते. शरीरास पद्मासनात ठेवून तो त्यावेळी उत्तराभिमुख बसतो. आयुष्यभर ***"ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्। ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना।।४-२४।।"*** अशा निष्ठेने त्याने *कर्मयोग* आचरलेला असतो. त्यामुळे त्यास सहजच ***समत्वबुद्धी*** प्राप्त झालेली असते. आत्मसुख त्याच्याठायी त्यामुळे अनायासच संचलेले असते. त्याचे सर्व मनोधर्म - चित्तवृत्ती अशा ब्रह्माठायी तदाकार झालेल्या असतात. अशी स्वरूपस्थिती त्याला प्राप्त झालेली असते. स्वरूपीच आपला अंतिम लय व्हावा या ओढीने अंतकाली तो साधक सत्वर त्या ब्रह्मास मिळण्यासाठी सिद्ध होतो."

आकललेनि योगें। मध्यमामध्यमार्गें।
अग्निस्थानौनि निगें। ब्रह्मरंध्रां।।८-९४।।
तेथ अचेत चित्ताचां सांघातु। आहाचवाणा दिसें मांडतु।
तेथ प्राणु गगनाआंतुं। संचरें कां।।९५।।
परि मनाचेनि स्थेर्यें धरिला। भक्तिचिआं भावना भरिला।
योगबलें आवरिला। सज्ज होऊनि।।९६।।

"आपण साध्य केलेल्या योगबलाने तो कुंडलिनीसह मन व प्राण यांना अग्निस्थानाहून म्हणजे आज्ञाचक्रावरून मध्यमामार्गे म्हणजे सुषुम्नेद्वारे ब्रह्मरंध्राप्रत उर्ध्व करून नेतो. चित्तसंघात संज्ञारहित झालेला असतो. पण तरीही त्याचे अस्तित्व नाहीसे झालेले नसते. अशी स्थिती प्राप्त झालेली असता प्राण आकाशात म्हणजे गगनात संचरतो. ***हा प्राण चित्तस्थैर्याने बांधलेला असतो; भक्तिभावनेने ओतप्रोत भरलेला असून योगबळाने आवरलेला असतो."***

ही स्थिती म्हणजे अभ्यासाने प्राप्त झालेली कर्म-भक्ती-योग व ज्ञान यांच्या संगमातून उद्भवलेली प्रणवस्थिती होय. *"प्राणांचा प्रणवुचि करावा"* असे पुढे *ओवी क्र. ८-११४* मध्ये ज्ञानदेव या स्थितीचे वर्णन करत म्हणतात. थोडक्यात सांगावयाचे तर ज्ञानेशप्रणीत योगमार्गात ***कर्मयोग- भक्तियोग- योग व ज्ञान*** या सर्वांच्या संमीलनाने ही स्थिती योगी प्राप्त करून घेत असतो. ***पंथराज वा क्रमयोग*** यांचे खरे रहस्य या अंतकालस्थितिविषयक ज्ञानेशांच्या ओव्यातून पुनश्च दृग्गोचर होते, ते असे, हे जिज्ञासू ओळखतीलच! असो.

तो जडाजडातैं विरवितु। भ्रूलतामाजिं रचतु।..।।८-९७।।

"मूर्ध्न्याकाशात असा ***प्रणवरूपाने*** सज्ज होऊन ***राहिलेला प्राण*** जड व अजड, स्थूल व सूक्ष्म यांच्यातील फरक नाहीसा करतो; सर्व तत्त्वांचा लय करतो. **भ्रूलतेच्या मध्यभागी एकवटून ही सूक्ष्मातिसूक्ष्म क्रिया सिद्ध करण्यास तो प्राण प्रवर्ततो."**

ज्ञानेशांचे ***प्रथमशून्य म्हणजे आज्ञाचक्रस्थ बिंदु*** असल्याचे आपण पूर्वीच पाहिले आहे *(उन्मेष ४६:योगपर अभंग,पृ.क्र.७९८,७९९ व ८११).*

जिज्ञासूंनी जरूर तर तो भाग पुनः पहावा. म्हणजे या गुह्य क्रिया आकळून घेण्यास साहाय्य होईल. ***आज्ञाचक्रस्थ अशा या प्रथमशून्यस्थानी संक्रमित झालेला हा प्राण कुंडलिनी उत्थापनक्रियेद्वारे प्रभारित झालेला असतो.*** त्याच्या पुढील क्रियेची दिशा धनुष्यामधून सुटलेल्या बाणाप्रमाणे निश्चित ठरलेली असते. ब्रह्म हेच त्याचे लक्ष्य असते.

प्रथमशून्य ते निरशून्य असा त्याचा मार्ग असतो *(तत्रैव)*. त्या मार्गावरून जात असता **मन-प्राण-चित्त-जीव या सर्वांचा शिवात लय होतो; कुंडलिनीशक्ती शिवाशी एकरूप होते;** या सर्वांची खूणही उरत नाही. म्हणून ज्ञानेश म्हणतात कीः

...। जैसा घंटानादु लयस्थु। घंटेसिचि होएं।।८-९७।।
कां झांकलेआं घटींचां दिवा। नेणिजे काएं जाहाला केधवां।
ययां रीति जो पांडवा। देह ठेवी।।९८।।
तो केवल परब्रह्म। जेआं परमपुरुष आईसें नाम।
तैं माझें निजधाम। होऊनि ठाकें।।९९।।

"जड-अजड ही सर्व अशी विरून जातात जशी घंटानाद घंटेतच लय पावावा! अंतिमकाली अशी लययोगस्थिती प्राप्त करून तो योगी धन्य होतो. घटाखाली झाकून ठेवलेला दिवा केव्हा विझला हे कळून न यावे त्याप्रमाणे तो योगी अशा प्रकारे त्या अवस्थेत जेव्हा देह ठेवतो, तेव्हा ***जे केवळ परब्रह्म आहे व ज्यास परमपुरुष असे नाम आहे, ते माझे निजधाम तो प्रत्यक्ष होऊन ठाकतो."***

ॐकारस्मरण करत देहाचा त्याग

श्रीकृष्ण अर्जुनास हे सांगून पुनश्च या गोष्टीचे अधिक स्पष्टीकरण करत म्हणतातः

यदक्षरं वेदविदो वदन्ति
विशन्ति यद्यतयो वीतरागाः।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति
तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये।।८-११।।
सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम्।।८-१२।।
ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।८-१३।।

"ज्या परमपदास वेदवेत्ते ***अक्षर*** असे म्हणतात, विरक्त महात्मे ज्या पदात प्रवेशतात, ज्याची इच्छा धरणारे ***ब्रह्मचर्य*** पाळतात, ते परमपद अंतकाली कसे प्राप्त होते, ते मी तुला संक्षेपाने सांगतो. ऐक! **सर्व द्वारांचे संयमन करून, मन हृदयामध्ये स्थिर ठेवून व आपल्या प्राणांस मूर्ध्निस्थानी स्थापन करून योगधारणेत स्थित होत जो पुरुष ॐ या एकाक्षराने निर्दिष्ट केलेल्या ब्रह्माचे स्मरण करत देह त्यागतो, तो माझ्या परमगतीला प्राप्त होतो.**"

श्रीकृष्णांचे हे बोल आपल्यापर्यंत पोहोचवत ज्ञानदेव म्हणतातः

सकळां जाणणेआं जैं लाणि। तिएं जाणियेचिं जैं खाणि।
तेआं ज्ञानियांचिएं आयणि। जेयांतैं अक्षर म्हणिपे।।८-१००।।
चंडवातेंहिं न मोडे। तैं गगनचि किं फुडें।
वांचुनि जन्हैं होईल मेहुडें। तन्हैं उरेल कैंचें।।१०१।।
तेंवि जाणणेआं जैं आकलिलें। तैं जाणावलेपणेंचि उमाणलें।
मग नेणवेंचि तेआंतैं म्हणितलें। अक्षरे सहजें।।१०२।।
म्हणौनि वेदविद नर। म्हणति जेआंतैं अक्षर।
जैं प्रकृतिसिं पर। परमात्मरूप।।१०३।।

"सर्व तऱ्हेच्या ज्ञानाचा शेवट असे जे ज्ञान असते, त्या ज्ञानाची खाणच असे जे ज्ञानी असतात, ते त्यास ***अक्षर*** असे म्हणतात; प्रचंड वाऱ्यापुढेही जे टिकाव धरून राहते, ते क्षणभंगुर अभ्र नसून निखळ गगनच जसे नित्य अविनाशी असते, तसेच ***क्षर*** नसणारे असे जे ते ***अक्षर*** आहे; ज्ञान झाले की अज्ञान नाहीसे होते आणि मग तेथे निव्वळ ज्ञानच उरते; असे झाले की ज्ञानसुद्धा जाणवेनासे होते; कारण ज्ञान म्हणावे तर तेथे अज्ञान कोठे असते! अशा प्रकारे जे सहजच असते, त्यास ***अक्षर*** असे वेदवेत्ते पुरुष म्हणतात; ते ***अक्षर म्हणजे प्रकृतीपलीकडील परमात्मरूपच होय!"***

आणि विषयांचें विष उलंडूनि। जैं सर्वेंद्रियां प्रायश्चित्त देऊनि।
आहाति देहाचिआं बैसौनि। झाडातलीं।।८-१०४।।
तैं ययापरीं विरक्त। जेआंचि निरंतर वाट पाहात।
निष्कामासि अभिप्रेत। सर्वदा जैं।।१०५।।
जेआंचिआं आवडी। न गणिति ब्रह्मचर्याचिं सांकडीं।
निष्ठुर होउनि बापुडीं। इंद्रियें करिति।।१०६।।
आईसें जैं पद। दुर्लभ आणि अगाध।
जेआंचिएं थडिएंचि वेद। चुबकलौनि ठेलें।।१०७।।
तैं तैं पुरुष होति। जैं ययापरीं लया जाती।
तन्हैं पार्था हेंचि स्थिती। एक हेल सांघों।।१०८।।

" ज्या पदासाठी विषयांचे विषवत वर्जन करून, सर्वेंद्रियांना प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेऊन, सर्वथा विरक्त होऊन संन्याशाप्रमाणे देहतरूच्या - त्या अश्वत्थाच्या तळी आसन ठोकून निरंतर मुमुक्षू पुरुष बसतात; जे पद प्राप्त व्हावे अशी निष्काम पुरुषांचीही सदा कामना असते; ज्या पदाच्या प्राप्तीसाठी इंद्रियांचे कठोर नियमन करून त्यांना दीनवाणे करून सोडले जाते; ज्या पदासाठी ब्रह्मचर्यासारखी कठीण व्रतेसुद्धा कष्टांची तमा न बाळगता आचरली जातात; दुर्लभ आणि गहन गूढ असे जे पद आहे; ज्याच्या अलीकडील काठावरच त्याच्याकडे जाण्यासाठी निघालेले वेद गटांगळ्या खात बसले आहेत; असे ते पदच ते अशा प्रकारे लय पावणारे पुरुष होतात. पार्था! तुला ते कसे होते, हे आताच सांगितले. तरीही अजून पुनः एक वेळ सांगतो; अंतकाली ही परमपदसिद्धी कशी होते, ते ऐक!"

पंथराजाचा अखेरीचा पदविन्यास

तेथ अर्जुनें म्हणितलें स्वामी। हेंचि म्हणावेयां होतो पां मी।
तंवं साहाजें कृपा केली तुम्हीं।
तऱ्हीं बोलिजो कां जी।।८-१०९।।
परि बोलावें तैं अति सोहोपें। तेथ म्हणितलें त्रिभुवनदीपें।
तूझ काय नेणों संक्षेपें। सांघैन आईक।।११०।।

तेव्हा अर्जुन अति उत्सुकतेने म्हणू लागला, "हे स्वामी! श्रीकृष्णा! फारच महत्त्वाचा असा हा विषय आहे. माझी पण तू पुनः हे सांगावे अशी फार इच्छा आहे. तरी तूच आता कृपाळू झाला आहेस, तर सांग बरे हे सगळे मला पुनः! पण एक कर. अति सोप्या शब्दात सांग. म्हणजे ते मला नीट समजेल." तेव्हा तो त्रिभुवनदीप असा श्रीकृष्ण म्हणतो, "तुझे मनोगत काय मी ओळखत नाही काय! तुला हवे ते सोप्या रीतीने थोडक्यात सांगतो. ते नीट ऐक बरे!"

तऱ्हें ययां मना बाहेरिलीकडें। यावियाचि सावियां सवें मोडें।
हें *<u>हृदयाचां डोहीं बुडे</u>* । तैसें कीजैं।।८-१११।।
परि हें तऱ्हैंचि घडें। जऱ्हें संयमाचिं अखंडें।
सर्वद्वारीं कवाडें। कलासिति।।११२।।
तऱ्हें साहाजें मन कोंडलें। *<u>हृदयींचि असेल</u>* उगलें।
जैसें करचरणीं मोडलें। परिवरु न संडीं।।११३।।

"आपल्या मनास जी नेहमी बाहेर धावण्याची सवय असते, ती मोडेल आणि ते **हृदयी** स्थिरावेल - अंतःकरणाच्या डोहात बुडून ते नेहमी राहील - असे अभ्यासपूर्वक साध्य करावे. पण हे व्हावयाचे कसे! मनास तर संकल्पविकल्प करत बसण्याची - प्रवृत्तींमागे धावण्याची - विषय आवडण्याची खोडच जन्माची लागली आहे ना! तर मग काय करावे! हे पहा! या मनास सर्वेंद्रियांची द्वारे घट्ट बंद करून हृदयात कोंडून घालावे. म्हणजे मग जसा हातपाय मोडलेला अपंग मनुष्य आपल्या घरीच स्वस्थ बसतो, तसे हे मन अंतःकरणाठायी उगे स्वस्थ बसून राहील."

तैसें चित्त राहिलिआं पांडवा। *<u>प्राणांचा प्रणवुचि करावा</u>*।
मग <u>अनुवृत्तिपंथें आणावा</u>। <u>मूर्ध्निवेरीं</u>।।८-११४।।
तेथ आकाशिं मिळे न मिळें। तैसा धरावा धारणाबळें।
जंवं *<u>मात्रात्रय मावळें। अर्धबिंबीं</u>*।।११५।।
तंववेरी तो *<u>समीरु। निरालीं कीजैं थिरु</u>*।
मग लग्नीं जेविं *<u>ॐकारु। बिंबिचि विलसें</u>*।।११६।।
तैसें *<u>ॐ हें स्मरों सरें</u>*। आणि तेथेंचि प्राणु पुरें।...।।११७।।

"चित्तास अशी स्थिरता आली की ***<u>प्राणांचा प्रणव करून त्यास अनुवृत्तिपंथाने मूर्ध्निस्थानी आणावा</u>. तेथील आकाशात तो लय पावेल न पावेल, असा त्यास तेथे धारणाबळाने धरावा.*** जोपावेतो त्रिमात्रा अर्धबिंबात मावळून जाणार नाहीत, तोवर त्या समीरास तेथेच स्थिर धरावे. ***<u>जेव्हा ॐकार आपल्या बिंबात मिळून जाईल, तेव्हा ॐकाराने प्रतीत होणारे हे दृश्य जगत पूर्णपणे लयास जाईल आणि प्राणाचे कार्य समाप्त होऊन तोही लयास जाईल</u>."***

... । मग प्रणवांति उरें। पूर्णघन जैं।।८-११७।।
म्हणौनि *<u>प्रणवैकनाम। हें एकाक्षरब्रह्म</u>*।
***<u>जो माझें स्वरूप परम</u>।* स्मरतसांता।।११८।।**
ययापरी त्यजिं देहांतैं। तो त्रिशुद्धि पावें मातें।
जेआं पावणेयापरौतें। आणिक पावणें नाहीं।।११९।।

"तदनंतर उरेल ते केवळ प्रणवांतीचे पूर्णघन असे ब्रह्मच! ***प्रणव (ॐ)* या एकाक्षरी नामाने ओळखले जाणारे ब्रह्म म्हणजे माझेच परमस्वरूप!** ते असे स्मरत असता त्या पुरुषास अशा प्रकारे देह त्यागून मला सहजच पावता येते! किंबहुना त्याच्यासाठी मला असे प्राप्त होणे यापेक्षा दुसरे प्राप्त होण्यासारखे इतर काहीच नसते, असे मी तुला त्रिवार सांगतो!" तो पुरुष अंतकाली असा ब्रह्मीभूत होतो.

पंथराजाच्या अखेरीच्या खाणाखुणा

या ओव्यांतून आणि अगोदरही अंतकाली योग्यास ब्रह्मप्राप्ती कशी होते, ते यौगिक प्रक्रियांचा उल्लेख करत ज्ञानेशांनी स्पष्ट केले आहे. खरे तर ही सर्व प्रक्रिया पंथराज उपक्रमाचीच आहे, हे वादातीत आहे. पूर्वी आपण या प्रक्रियेचे सखोल निरीक्षण व परीक्षणही केलेले आहे. ते जिज्ञासूंस स्मरतच असेल

अंतकालीही पंथराजप्रक्रियाच केली जाऊन साधकाचे प्राण अंतिम लयास जातात. वरील ओव्यांतून याच प्रक्रियेचा संक्षिप्त उल्लेख येतो. **कुंडलीनीचे अग्निस्थानाहून म्हणजे आज्ञाचक्रावरून निघून पुढे उत्क्रमण करणे ही क्रिया *"मध्यमामध्यमार्गे। अग्निस्थानौनि निगें (८-९४)"* या ओवीतून सूचित केली असून तिचा *मन-पवन (प्राण)* यांसहचा सुषुम्नामार्गे होणारा पश्चिममार्गावरचा प्रवासही *"मध्यमामध्यमार्गे"* तें *"निगें ब्रह्मरंध्रा"* या शब्दांतून लक्षित केलेला आहे.**

[**टीप:१: अग्निस्थान** - ओवी क्र.८-९४ मध्ये योगी आपणास अभ्यासाने साध्य झालेल्या योगमार्गाने ***("आकललेनि योगें")*** **अग्निस्थानाहून निघून *मध्यमामध्यमार्गे (सुषुम्नेद्वारे)* ब्रह्मरंध्री जातो;** म्हणजे तो आपल्या उत्थापित कुंडलिनीशक्तीस पुढे नेतो, असे म्हटले आहे. येथील ***अग्निस्थान*** म्हणजे कोणते असा प्रश्न उपस्थित होतो.

अग्निस्थान म्हणजे *अग्निचक्र* म्हणजेच *आज्ञाचक्र* असा आपण अर्थ घेत आहोत. पण त्याचा दुसरा अर्थ ***नाभिस्थानातील कंद, जे कुंडलिनीचे मूलस्थान आहे,*** तेथून तिला योगी उत्थापित करतो व पुढे पूर्वमार्गाने व नंतर पश्चिममार्गाने तिला ब्रह्मरंध्री नेतो, असाही एक अर्थ संभवतो.

अंतकाली योग्याची कुंडलिनी कोणत्या स्थानी आहे, त्यावर हे अवलंबून आहे. ***योग साध्य झालेल्या पुरुषाची कुंडलिनीशक्ती सर्वसाधारणपणे आज्ञाचक्री आणि त्यावरच्या प्रांतात राहते*** असे शास्त्रमत आहे. त्या दृष्टीने आपण केलेला अर्थ सुयोग्यच आहे. तसेच ***"भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् (८-१०)"*** या श्लोकाप्रमाणे

भ्रूमध्यस्थानाचाच निर्देशअसल्याने गीतेच्या मताशीही आपला अर्थ सुसंगत असाच आहे.

तसेच गीता प्राणांचा निर्देश करते तेव्हा तो कुंडलिनीचा समजावा असाही एक संकेत आपणास गीता*श्लोक क्र.५-२७ व २८* ***".. चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः। प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ .. ।।"*** यांचा अभ्यास केला तेव्हा प्राप्त झाला होता. कारण गीता कुंडलिनीचा तसा स्पष्ट उल्लेख करत नाही, तर ***काही उपनिषदांना अनुसरत प्राणांचाच किंवा चित्ताचा अथवा मनाचा त्याऐवजी उल्लेख करून तेच कुंडलिनीचे पर्यायशब्द म्हणूनही कधीकधी प्रयोगात आणते.*** हे सर्व विवेचन त्यासही धरूनच आहे.

तरीही अग्निस्थानाचा दुसरा पर्यायही तसा चुकीचा नाही. कारण योगाची संपूर्ण प्रक्रिया ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असल्याने ***कुंडलिनीच्या मूलस्थानाहून म्हणजे कंदावरून तिचे उत्क्रमण होऊन ती आज्ञाचक्रावरून पुढे ब्रह्मरंध्री जाते,*** असेही धरणे अयोग्य नाही. जिज्ञासूंच्या समाधानासाठी ही टीप देत आहे. असो.]

पद्मासन रचणे, ब्रह्माचे वा ईश्वराचे वा गुरूचे स्मरण करणे, त्यांचे अनुसंधान ॐ वा *प्रणवजप* तदर्थभावनेने करणे हे पंथराजाचे भागही *"जीवीं सुख सूनि। कर्मयोगाचें (८-९२)," "थिरावलेनि चित्तें," "तेयां अव्यंगवाणेंया ब्रह्मेयातें (८-९१)," "ॐ हें स्मरों (८-११७)" व "प्रणवैकनाम। हें एकाक्षरब्रह्म," "माझें स्वरूप। स्मरतसांता (८-११८)"* या शब्दांतून अनुलक्षिले आहेत.

शिवशक्तिसामरस्य सूचित केले आहे ते ***"आपेंआप संभ्रमें। मिलावेयां (८-९३)," "प्राणांचा प्रणवुचि करावा (८-११४)* या शब्दांद्वारे! *(प्राण म्हणजे कुंडलिनी वा शक्ती आणि प्रणव म्हणजे शिव असा येथे निर्देश आहे)."***

"जिविं सुख सूनि। कर्मयोगाचें (८-९२)," "मनाचेनि स्थैर्यें धरिला (८-९६)," "भक्तिचिआं भावना भरिला (८-९६)," "योगबळें आवरिला (८-९६)," "अव्यंगवाणेयां ब्रह्मेयांतैं। जाणोनि स्मरें (८-९१)" या शब्दांतून अनुक्रमे ***कर्मयोग, भक्तियोग,(पंथराज वा अष्टांग) योग आणि ज्ञानयोग*** या योगचतुष्ट्याचा ***पंथराज वा क्रमयोग*** उपक्रमातील घनिष्ट संबंध आणि समन्वय सूचित होतो.

"आकळलेनि योगें (८-९४)," "योगबळें आवरिला। सज्ज होऊनि (८-९६)"हे शब्द ***पंथराज वा क्रमयोग*** या योगाचा अभ्यास सूचित करतात. ***"यमनियम-आसन - प्राणायाम-प्रत्याहार - धारणा - ध्यान -समाधि"*** ही योगाची अष्टांगेसुद्धा उघडच या ओव्यांतून जिज्ञासूंना वाचता येतील इतकी स्पष्ट निर्देशिलेली आहेत, हे सांगणे न लगे!

लययोगाची तर महत्त्वाची सर्वच लक्षणे वरील ओव्यांतून उघडउघड सांगितलेली दिसतातः ***"तो जडाजडातैं विरवितु ," "जैसा घंटानादु लयस्थु। घंटेसिंचि होएं (८-९७)," "प्राणांचा प्रणवुचि करावा," अनुवृत्तिपंथें आणावा। मूर्ध्निवेरीं (८-११४)," "तेथ आकाशिं मिळें न मिळें (८-११५)," मात्रात्रय मावळें अर्धबिंबीं (८-११५),""तेथेचि प्राणु पुरें (८-११७)," "प्रणवांतिं उरें। पूर्णघन जैं (८-११७)," "लग्निं ॐकारु। बिंबिचि विलसें (८-११६)," "आकळलेनि योगें। मध्यमामध्यमार्गें। अग्निस्थानौनि निगें। ब्रह्मरंध्रा (८-९४)," "जैं ययापरीं लया जाति (८-१०८)"*** इत्यादी शब्दांतून हा ***लययोग*** सूचित होतो.

तसेच तो योग कुंडलिन्युत्थापनप्रक्रियेवर अधिष्ठित असल्याचेही दिसते. तो गुरुकृपेने साध्य होणारा आहे, हेही ***गुरू-ब्रह्म*** व ***ईश्वर*** हे एकच असतात, यावरून स्पष्ट होते. यांचे स्मरण सतत तसेच अंतकालीही योग्याने करावे हे***"स्मरतसांता (८-११८)"*** या शब्दप्रयोगातून व्यक्त होते.

कुंडलिनीचे ***आधारचक्र ते आज्ञाचक्र ते सहस्त्रारचक्र ते ब्रह्मरंध्र*** हे निर्गमनसुद्धा ***"प्राणांचा प्रणवुचि करावा (८-११४)," "अनुवृत्तिपंथे आणावा। मूर्ध्निवेरीं (८-११४)" व "ॐ हें स्मरों सरे (८-११७)"*** या शब्दांतून व्यक्तवले आहे.

"*अनुवृत्तिपंथें (८-११४)*" म्हणजे परंपरासिद्ध पद्धतीने वा क्रमाक्रमाने एका चक्रावरून दुसऱ्या चक्रावर याप्रमाणे *पूर्व ते पश्चिमपंथापर्यंत* होणारे शक्तिमार्गक्रमण येथे सुचविले आहे.

श्रीमदाद्यशंकराचार्यसुद्धा आपल्या *श्लोक क्र.८-९ व१०* यांवरील भाष्यातून **योगबळा**संबंधी ***"समाधिसंस्कारजनितचित्तस्थैर्यलक्षणं"*** असा निर्देश करतात. म्हणजे समाधीच्या संस्कारातून, वारंवार सतत केलेल्या अभ्यासातून निर्माण झालेल्या चित्तस्थैर्याचा ते येथे निर्देश करत आहेत. तसेच ***"पूर्वं हृदयपुण्डरीके, ऊर्ध्वगामिन्या नाड्या, भूमिजयक्रमेण, भ्रुवोः मध्ये प्राणम् आवेश्य स्थापयित्वा"*** या शब्दांतून ***हृत्कमलाचा, सुषुम्ना नाडीचा (मध्यमामध्यमार्गे म्हणजे सुषुम्नेच्याही आतील चित्रा, वज्रिणि,ब्रह्मनाडी इ.नाड्यांचा ज्या थेट ब्रह्मरंध्रापर्यंत जातात, त्यांचा), भूमिजयक्रमेण म्हणजे "अनुवृत्तिपंथे"*** अर्थातच **परंपरासिद्ध पद्धतीने एका चक्रावरून दुसऱ्या चक्रावर** असे निर्देशितांना दिसतात.

"*आज्ञाचक्र–➤सहस्त्रार–➤ब्रह्मरंध्र*" असे कुंडलिनीचे मनप्राणासह उत्क्रमण - *अ, उ व म* या ॐकाराच्या त्रिमात्रांच्या अर्धमात्रेत होणारा लय - *प्रथमशून्य ते उन्मनी ते निरशून्य* हा कुंडलिनीचा मन-प्राणासह - जीवभावासह होणारा प्रवास इ.सर्व पंथराजखुणा आपणास उपरोक्त ओव्यांमधून दृग्गोचर होतात, इतकेच शेवटी म्हटले तरी ते जिज्ञासूंसाठी पूर्वीच्या **पंथराज**विषयक सखोल विवेचनाधारे पर्याप्त ठरावे असे वाटते.इत्यलम्!!

*(**टीप:२:भूमिजयक्रमेण*** – आचार्यांच्या या शब्दप्रयोगाचा दुसरा गौणार्थ शुभेच्छादी सप्त योगभूमिकेंतून असा घेणे शक्य आहे. पण हे सहसा मान्य होणारे नाही. कारण ज्या योग्याने आयुष्यभर सफल योगाभ्यास केलेला असतो, तो शुभेच्छादी खालच्या पायऱ्यांवर असणे शक्य नाही. अर्थात येथे त्यातील केवळ असंप्रज्ञात समाधीच्या वा जीवन्मुक्तीच्या ***सत्त्वापत्ति, असंसक्ती, पदार्थाभाविनी, तुर्यगादी***

उच्च स्तरावरील भूमिकांचाच संबंध ग्राह्य धरता येईल. पण हेही जरा आडवळणाचेच पडते व येथील संदर्भानुसारी दिसत नाही. ***भूमिजयक्रम***, तसेच ***हृदयपुण्डरीके, ऊर्ध्वगामिन्या नाड्या*** या आचार्यांनी येथे केलेल्या शब्दसमुच्चयाच्या प्रयोगावरून एका चक्रावरून दुसऱ्या चक्राकडे, एका योगभूमिकेवरून दुसऱ्या योगभूमिकेवर म्हणजे ***षट्चक्रादी व आज्ञाचक्रानंतर बैंदवादी स्तरांवर व पुढे ब्रह्मरंध्रावर*** असाच अर्थ घेणे सयुक्तिक आहे. असो. यावरूनही ***आचार्यांना येथे कुंडलिनीयोगच अभिप्रेत आहे,*** ते स्पष्ट होते.)

अनुस्यूत शंकेचे समाधान

श्रीकृष्ण हा क्रम स्पष्टपणे सांगतात. पण तरीही पार्थास हे सगळे अंतकाली कोणी कसे करू शकेल ही शंका येणे शक्य आहे. त्यास अनुसरत ते म्हणतातः

एथ अर्जुना जऱ्हें विपाएं। तूझां जिंविं हन आईसें जाएं।
ना हें स्मरण मग होएं। कायसयावेरीं अंतिं।।८-१२०।।
इंद्रियां अनुघडु पडिलिआं। जिविताचें सुख बुडालिआं।
आंतुबाहेरीं उघडलिआं। मृत्युचिह्नें।।१२१।।
तैं वेलीं बैसावेंचि कवणें। मग निरोधी करणें।
तेथ काह्याचेनि अंतष्करणें। प्रणव स्मरावा।।१२२।।
तऱ्हें अगां आईसियां ध्वनी। झणैं थारा देसिं हों मनीं।
पैं नित्य सेविला मी निधनीं। सेवकु होएं।।१२३।।

"अर्जुना! कदाचित तुला वाटेल की अंतकाली हे असे माझे स्मरण कोठले घडायला! इंद्रिये जीवाच्या आकांताने कसमस करताहेत; जिवितसुख बुडू लागले आहे; अंतर्बाह्य मृत्युचिह्ने स्पष्ट उमटलेली आहेत; अशा वेळी आसन घालून बसणार कोण! आणि इंद्रिये पण कोणी निरोधावी त्या वेळी! अन प्रणव तरी कोणाच्या अंतःकरणापासून स्मरला जाईल तेव्हा! पण अर्जुना! अशा शंकेला तू अजिबात मनात थारा देऊ नकोस. अरे! ज्यांनी माझी नित्य सेवा केलेली असते, त्यांचा अंतकाळी मीच सेवक होतो, हे तुला माहीत नाही काय!"

"भक्तांचियां तनुत्यागिं। मीचि परिचर्या करीं"

श्रीकृष्ण पुढे म्हणतातः

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः।।८-१४।।
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः।।८-१५।।

"हे पार्था! जो माझे सतत अनन्यचित्त होऊन नित्य स्मरण करतो, त्या माझ्याशी नित्य एकवटून राहिलेल्या योग्याला मी त्याच्या अंतकालीही सुलभतेने प्राप्त होतो आणि मला येऊन मिळाल्यावर त्यास या दुःखाचे आगरच असणाऱ्या व अशाश्वत अशा संसारात पुनः कधीही जन्म मिळत नाही. त्यास अशी श्रेष्ठ सिद्धी व माझी गती प्राप्त होते व तीही अत्यंत सुलभतेने!"

ज्ञानेश्वर हे भगवंतांचे मनोगत कसे व्यक्त करतात, पहाः

जैं विषयांसि तिलांजली देऊनि। प्रवृत्तिवेरीं निगड घालूनि।
मातें हृदयीं सूनि। भोगितातिं।।८-१२४।।
परि भोगतिआं नाराणुका। भेटणें नाहीं क्षुधादिकां।
तेथ चक्षुरादिकां। कवणु पाडु।।१२५।।
आईसें निरंतर एकवटिलें। जैं अंतष्करणिं मजसिं लिगटिलें।
मीचि होऊनि आटिलें। उपासिति।।१२६।।

श्रीकृष्ण म्हणतातः "विषयभोगांना तिलांजली अर्पून आणि प्रवृत्तीला बेड्या घालून जे भक्त मलाच आपल्या अंतःकरणात साठवत भोगतात आणि कितीही भोगले तरी माझे सुख पावूनही ते अतृप्त राहत मला अधिकाधिक भोगण्यात दंग होऊन क्षुधातृषादी विसरून जातात, त्यांना दृश्यसुखाचे ते काय अप्रूप असणार, सांग बरे! अशा जीवींच्या जिव्हाळ्याने जे भक्त निरंतर मजशी एकरूप होऊन अंतःकरणापासून माझ्यात समरस झालेले असतात, ते मीच होऊन माझी उपासना करतात."

तेयां देहावसान जैं पावें। तैं तिहीं मातें स्मरावें।
मग मिआं जऱ्हें पावावें। तऱ्हें उपास्ति तैं कायसिं।।८-१२७।।
पैं रंकु एकु आडलेपणें। काकुलुति अंतिं धांवा गां धांवां म्हणें।
तऱ्हें तेआंचिएं ग्लानि धांवणें। काय न घडें मज।।१२८।।
आणि भक्तांहीं तैंचि दशा।
तऱ्हें भक्तीचा सोसु कायसा।..।।१२९।।

"अशा भक्त योग्यांचे जेव्हा देहावसान प्राप्त होते तेव्हा त्यांनी माझे स्मरण केल्यासच मी त्यांना पावावे असे असले, तर मग त्यांनी माझी अशी उपासना कशासाठी करावयाची! कोण्या एका दीनानेही त्याच्या अंतसमयी काकुळतीने माझा धावा केला तर त्याच्या त्या आर्ततेने पण मी धावून त्याच्या मदतीसाठी जात नाही काय! अन् माझ्या भक्तांचीही इतरांसारखीच जर अंतकाळची अवस्था होणार असेल तर मग भक्तीची उठाठेव कोणी आणि कशासाठी करावी!"

..।म्हणऊनि हा ध्वनि आईसा। न वाखाणावा।।८-१२९।।
तिहीं जैं वेलीं मी स्मरावा। तैं वेलीं स्मरला कीं पावावा।
तो आभारुहीं जिवां। साहवेचि ना।।१३०।।
तैं ॠणवेपण आंगिं। मी आपुलिआंचि उत्तीर्णत्वालागिं।
भक्तांचिआं तनुत्यागिं। परिचर्या करीं।।१३१।।

"हे अर्जुना! म्हणून तू अशा तुझ्या शंकेला अजिबात थारा देऊ नकोस की भक्त अंतकाळी मला स्मरतील कसे आणि तसे न झाले तर त्यांची काय गती होईल! अरे! त्यांनी माझे स्मरण करावे आणि मगच मी त्या त्या वेळी त्यांना पावावे, असे नातेही मला जड वाटते. ज्यांनी जन्मजन्मांतरी माझी उपासना केलेली आहे, त्या भक्तांचा ॠणी असणारा मी उॠण व्हावे म्हणून अंतकाली त्यांची सेवा स्वतःच करतो."

"देहांतिं निश्चित। मीचि होति"

भगवंत पुढे म्हणतातः

देहवैकल्याचा वारा। झणें लागेल ययां सुकुमरा।
म्हणौनि आत्मबोधाचां पांजिरा। सूयें तेआंतैं।।८-१३२।।
वरी आपुलिआं स्मरणाची उवाईली। हींव आईसिं करीं सांऊली।
आईसेनि नित्यबुद्धि संचलीं। मी आणी तेआंतैं।।१३३।।
म्हणौनि देहांतिंचें सांकडें। माझिआं कंहिंचि न पडें।
मी आपुलिआंतैं आपुलिकडें। सुखेंचि आणी।।१३४।।

"अंतकाळी जिवाची तगमग होते. इंद्रिये तडफडतात. माझ्या भक्तांची अशी स्थिती होऊन त्या सुकुमारांचे हाल होऊ नयेत म्हणून त्यांना मी आत्मज्ञानाच्या पिंजऱ्यात ठेवतो आणि त्यांच्यावर माझ्या स्मरणरूपी शीतल सावलीचे छत्र धरतो. नित्य अशी आत्मस्थिती त्यांच्याठायी मी जतन करून ठेवतो.म्हणून देहांतसमयीचे कोणतेही कष्ट माझ्या भक्तांना होत नाहीत. सहजच मी त्यांना माझ्याकडे घेऊन येतो."

वरीचिल देहाचि गंवसणि फेडूनि।
आहाच अहंकाराचें रज झाडूनि।
शुद्ध वासना निवडुनि। आपणपां मेलविं।।८-१३५।।
आणि भक्तां तन्हैं देहिं। विशेष एकवंकीचा ठाऊं नाहीं।
म्हणौनि अव्हेरि करितां कांहीं। वियोगु आईसा न वाटें।।१३६।।

"देहाची वरलीकडली उरलेली खोळच ती काय त्यांना तेवढी फेडायची राहते. अहंकाराची धूळ झाडून, देहाची घोंगडी टाकून देऊन, सद्वासना जतन करून त्यांना मी माझ्याठायी एकरूप करून घेतो. आणि माझ्या भक्तांचे देहाशी विशेष असे तादात्म्य नसतेच! म्हणून देहत्याग करते वेळी त्यांना देहवियोगाचे दुःख ते काही वाटतच नाही."

ना तन्हैं देहांतिचि मिआं येआवें। मग आपणपयांतैं नेयावें।
हेंहि नाहीं स्वभावें। जैं आधिंचि मज मिनलें।।८-१३७।।
एरीं शरीराचिआं सलिलीं। असतेपण हेंचि साऊली।
वांचूनि चंद्रिका तैं ठेलीं। चंद्रीचि आहे।।१३८।।
आईसें जैं नित्ययुक्त। तेआंसिं सुलभ मी सतत।
म्हणऊनि देहांतिं निश्चित। मीचि होति।।१३९।।

"आणि खरे तर त्यांचा देहांत होते वेळीच त्यांना नेण्यासाठी मी जावे, असे काहीही जरूरीही नाही. कारण ते अगोदरचेच मजठायी लीन होऊन मद्रूपी मिळालेलेच नसतात का! वस्तुतः शरीराठायी जीवाचे असणे हे जलात पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबवतच नसते का! चंद्राचे प्रतिबिंब आपल्याठायीच वसते, तसे जीवाचे आत्मठायी सदैव सनातन असणे असतेच ना! म्हणून माझ्याठायी नित्ययुक्त असणाऱ्यांना मी नित्य त्यांचाच आहे; देहांतसमयी मी त्यांना अत्यंत सुलभ आहे आणि त्या वेळी ते निश्चितपणे मत्स्वरूपी पावतात, यात शंकाच नको."

अपुनरावृत्तीः:::

पुनर्जन्मचक्राचा भेद

पुढे भगवंत म्हणतातः

मग क्लेशतरूचि वाडी। जैं तापत्रयाचिं सगडीं।
जैं मृत्युकाकासिं कुरोंडी। सांडिलीं आहे।।८-१४०।।
जैं दैन्याचें दुभतें। जैं महाभयांतैं वाढवितें।
जैं सकलदुःखाचें पुतें। भांडवल।।१४१।।

"एकदा का माझे भक्त असे मत्स्वरूपी लीन झाले की त्यांना पुनर्जन्म नसतो. हे जे शरीर आहे, ते म्हणजे साक्षात क्लेशतरूंची बागच आहे; त्रितापांची पेटलेली शेगडी आणि मृत्युरूपी कावळ्याचा बळी असे हे शरीर आहे; दैन्यदुभते असणारे हे शरीर महाभय अशा मृत्यूस पोसणारे सकळ दुःखांचे भांडवलच आहे म्हणेनास!"

जैं दुर्मतिचें मूल। जैं कुकर्माचें फल।
जैं व्यामोहाचें केवल। स्वरूपचि।।८-१४२।।
जैं संसाराचें बैसणें। जैं विकाराचें उद्यानें।
जैं सकल रोगांचे भाणें। वाढिलें आहे।।१४३।।
जैं कालाचा खिंचउशिटा। जैं आशेचां आंगवठा।
जन्ममरणाचा वोलिंवटा। स्वभावें जैं।।१४४।।
जैं भुलींचे भरिंव। जैं विकल्पाचें वोंतिव।
किंबहुना पेंव। विंचवाचें।।१४५।।

"हे तर दुर्मतीचे मूळ, अविवेकाचे मूर्त रूपच आहे. जे संसाररूपी गाड्याखालील भूमी आहे; विकारांचे उद्यान आहे; सर्व रोगांचें भरलेले पात्र आहे; जे काळाने उष्टावलेले अन्न आहे; जे आशेचा निवासस्थान आहे; जे जन्ममृत्यूंच्या वहिवाटीची वाट आहे; भ्रमाचा पुतळा, विकल्पाची ओतीव मूर्ती, विंचवाचे पेवच असे हे शरीर आहे."

जैं व्याघ्राचें क्षेत्र। जैं पण्यांगनेचें मैत्र।
जैं विषय विज्ञानयंत्र। सुपूजित।।८-१४६।।
जैं लावेचां कलवला। निवालिआं विखोदकांचां गलाला।
जैं विश्वासु आंगवला। संवचोरांचा।।१४७।।
जैं कोढियाचें खेंव। जैं कालसर्पाचं मार्दव।
जैं गोरीचें स्वभाव। गायन जैं।।१४८।।
जैं वैरिआंचां पाहुणेरु। जैं दुर्जनाचां आदरु।... ।।१४९।।

"व्याघ्राचे वसतिस्थान, वेश्येच्या प्रेमासारखे दिखाऊ, विषय साक्षात करणारे मंतरलेले यंत्र, लावेचा नकली कळवळा, विषाचा निववलेला घोट, ठगाने दिलेले आश्वासन, महारोग्याने मारलेली मिठी असेच हे शरीर आहे. ते तर काळसर्पाच्या शरीराचे मार्दव, फासेपारध्याने सावज पडण्यासाठी काढलेली मोहक साद, वैऱ्याने केलेला पाहुणचार, दुर्जनाने केलेला सत्कार असेच आहे."

... । हें असो जैं सागरु। अनर्थाचां।।८-१४९।।
जैं स्वप्निं देखिलें स्वप्न। जैं मृगजलें सासिन्नलें वन।
जैं धूम्ररजांचें गगन। वोंतिलें आहे।।१५०।।

आईसें हें शरीर। तैं तैं न पवतिचि पुढुति नर।
जैं होऊनि ठेलें अपार। स्वरूप माझें।।१५१।।

"अनर्थाचा निव्वळ सागरच असे हे शरीर आहे. स्वप्नांतरी पाहिलेल्या स्वप्नासारखे किंवा मृगजळावर बहरलेल्या उद्यानाप्रमाणे अथवा धूम्रकणांनी आच्छादलेल्या अवकाशाप्रमाणे मायावी असे हे आहे. असो. असे जे शरीर असते, ते माझे जे भक्त असतात, त्यांना मत्स्वरूपी मिळाल्यावर धारण करावे लागत नाही."

भगवंताचे अपरंपार स्वरूप पावून ते धन्य होतात. ही स्थिती सामान्य जनांना, एवढेच काय, देवादिकांना मिळणाऱ्या गतीपेक्षा वेगळीच आणि अत्यंत श्रेष्ठ असते. असा हा भगवद्भक्तांचा महिमा आहे.

अभक्त व अज्ञानी लोकांची गती

इतरेजनांची काय अवस्था असते, ती सांगतांना श्रीकृष्ण म्हणतातः

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन।
मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते।।८-१६।।

"हे अर्जुना! ब्रह्मलोकासकट सर्व लोकांतील प्राण्यांना पुनर्जन्म आहे. पण मला जे येऊन मिळतात, ते पुनर्जन्म पावत नाहीत."

ज्ञानेश म्हणतातः

एरविं ब्रह्मपणाचेनि भडसे। न चुकतिचि पुनरावृत्तिचें वलसें।
परि निवटिलिआंचें जैसें। पोट न दुखें।।८-१५२।।
ना तन्हैं चेईलिआनंतरें। न बुडिजें स्वप्निचेनि महापुरें।
तेंवि मातें पावलें तैं संसारें। लिंपतिचि ना।।१५३।।

"तसा विचार केला तर पहा! अगदी ब्रह्मपद जरी प्राप्त करून घेतले तरी हा जन्ममरणाचा फेरा काही चुकत नाही. पण मेल्यानंतर जसा पोटशूळ होऊ शकत नाही किंवा जागृतीवर आल्यावर कोणी स्वप्नींच्या महापुरात बुडून मरत नाही, तद्वतच जे मला पावले, ते संसाराने लिप्त होत नाहीत."

विश्वातील प्राणिमात्रांचे कालचक्रातील भ्रमण

सहस्त्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः।
रात्रिं युगसहस्त्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः।।८-१७।।

"अहोरात्र म्हणजे काय याचे ज्ञान असणारे पुरुष असे जाणतात की ब्रह्मदेवाचा एक दिवस हा चार युगांच्या सहस्त्र चौकड्यांएवढा मोठा असतो आणि त्याची रात्रही तेवढीच दीर्घ असते. "

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे।
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसञ्ज्ञके।।८-१८।।

"त्याचा *(ब्रह्मदेवाचा)* दिवस सुरू झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त पदार्थ उत्पन्न होतात आणि त्याची रात्र सुरू झाली की ते पुनः अव्यक्तात लीन होतात."

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते।
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे।।८-१९।।

"भूतांचा हा समुदाय परत परत जन्मतो आणि रात्र झाली की परवश असल्यासारखा पुनश्च लय पावतो. दिवस सुरू झाला की हा पुनः जन्मतो."

हे विचार समजावून सांगत ज्ञानदेव म्हणतातः

एरविं जगदाकाराचें सिरें। जैं चिरस्थायियांचें धुरें।
ब्रह्मभुवन गां चवरें। लोकाचलाचें।।८-१५४।।
जिएं गांविचा पहारु दिवोवरी। एका अमरेंद्राचें आयुख ना धरीं।
विलौनि पांति उठीं एकसिरीं। चवदा जनांचिं।।१५५।।

"खरे पाहता ब्रह्मलोक म्हणजे चिरस्थायी पदार्थांतील अग्रगण्य असे लोकरूपी पर्वताचे शिखर किंवा विश्वाकाराच्या मूर्धिनस्थानींचा प्रांतच आहे, म्हणेनास! त्या सत्यलोकरूपी गावाचा दिवस एवढा मोठा असतो की एका देवेंद्राचे आयुष्यसुद्धा त्याच्या प्रहरभरही टिकत नाही. आणि तेथील एका दिवसात लागोपाठ चौदा इंद्रांची रांगच्या रांग एकामागून एकेक इंद्रपद उपभोगत नाहीशी होते."

जैं चौकडिआं सहस्त्र जाएं। तैं ठायेंठाओ विलुचि होएं।
आणि तैसेंचि सहस्त्रं भरिएं पाहें। रात्री जेथ।।८-१५६।।
एवढें अहोरात्र जेंथिंचें। तेणें लोटति जैं भाग्याचें।
देखति तैं स्वर्गिंचें। चिरंजीव।।१५७।।
एरां सुरगणाचिं नवाई। विशेख सांघाविं एथ काईं।
मुदला इंद्राचिचि दशा पाहीं। जैं दिहाचें चवदा।।१५८।।
परि ब्रह्मेयाचिआंहीं आठां प्रहरांतैं। आपुलिआं डोलां देखतें।
आहाति गां तेआंतैं। अहोरात्रविद म्हणिजे।।१५८।।

"जेव्हा सहस्त्र चतुर्युगे उलटून जातात, तेव्हा तेथील एक दिवस कोठे सरतो आणि अशीच सहस्त्र युगांयेवढी तेथील रात्र दीर्घ असते. हे ***अहोरात्र*** उपभोगूनही तेथील प्राण्यांच्या आयुष्याचा केवळ एकच दिवस तेवढा सरतो, इतके ते भाग्यवंत आणि चिरंजीव असतात, बघ! स्वर्गीचें देवसुद्धा त्यांच्या आयुष्याचा हेवा करतात आणि त्यांना मृत्युंजयी म्हणून मान देतात, पहा! त्यांच्या या दीर्घायुष्यापुढे देवांच्या आयुष्याचे नवल तरी कसे वानावे! मूळ देवेंद्राचीच दशा पहा ना! अशा त्या **ब्रह्मदेवाच्या सुदीर्घ दिवस व रात्रींस प्रत्यक्ष पाहणारे जे जीव असतात, त्यांना *अहोरात्रविद* अशी संज्ञा आहे**."

पुढे भगवंत सांगतातः

तिएं ब्रह्मभुवनिं दिवसें पाहें। तैं हेलीं गणना केंहिं न समाएं।
आईसें अव्यक्ताचें होएं। व्यक्त विश्व।।८-१६०।।
पुढुति दिवसाचि चौपाहारीं फिटें। आणि हा आकारसमुद्रु आंटें।
पाठीं तैसाचि मग पाहांटें। भरों लागें।।१६१।।
शारदिएंचिएं प्रवेशीं। अभ्रें जिरति जैशीं आकाशिं।
मग ग्रीष्मांती तैसिं। निगति पुढुति।।१६२।।
तैसिं ब्रह्मदिनाचिएं आदि। हें भूतसृष्टीचि मांदी।
मिलें जंव सहस्त्रावधि। निमित्त पुरें।।१६३।।

"अशा त्या ब्रह्मभुवनाचा दिवस उजाडला की अव्यक्तातून ज्याची गणती करता येत नाही असे अनंत व्यक्त विश्व निर्माण होते. हा दिवस चार प्रहराचा झाला की हा व्यक्त आकाराचा समुद्र आटतो आणि पुनः पहाट होताच जसाच तसा तो भरला जातो. शरदाच्या आगमनाबरोबर मेघडंबर जसे आकाशातल्या आकाशातच विरून जाते आणि ग्रीष्म सरला की तो मेघसंभार जसा पुनः आकाशी अवतीर्ण होतो, त्याचप्रमाणे ब्रह्मदिनाच्या प्रारंभी हा भूतसृष्टीचा मेळावा अवतरतो आणि सहस्त्रयुगचौकड्या सरेपर्यंत हाच उपक्रम चालू राहतो."

पाठीं रात्रिंचा अवसरु होएं। आणि विश्व अव्यक्तिं लया जाएं।
तोहीं युगसहस्त्र मोटका पाहें। आणि तैसेंचि रचें।।८-१६४।।
हें सांघावेआं उपपत्ति। जैं जगाचां प्रलयो आणि संभूति।
इयें ब्रह्मभुवनिंचिएं होति। अहोरात्रामाजिं।।१६५।।
कैसें थोरीवेचें मान पाहें पां। तो सृष्टिबीजाचां साटोपा।
परि पुनरावृत्तिचिआं मापां। सिग जाहाला।।१६६।।

"पुनः ब्रह्म्याची रात्र होताच हे व्यक्त विश्व अव्यक्तात लय पावते. रात्रसुद्धा एक सहस्त्र युगचौकड्यांची असते व ती संपताच हा भूतग्राम पुनः जसाच्या तसाच रचला जातो. म्हणजे या ब्रह्मभुवनाच्या अहोरात्रीत जगाची उत्पत्ती व प्रळय होतात. ब्रह्मभुवनाच्या या अहोरात्रीचे मान केवढे प्रचंड आहे पहा! विश्वाच्या पुनरावर्तनाची बीजे साठवणारे ते ब्रह्मभुवनाचे विशाल कोठार विश्वाची व्याप्ती आपल्यात सामावून घेणारे, विश्वाच्या देशकालाचे माप घेणारे शिगोशीग भरलेले मापटेच आहे जसे!"

एरविं त्रैलोक्य हें धनुर्द्धरां। तिएं गांविंचा गां पसारा।
तो हा दिनोदयीं एकसरां। मांडत असें।।८-१६७।।
पाठीं रात्रिंचां समो पावें। आणि आपैसाचिं सांठवें।
म्हणिएं जेथिंचें तेथ स्वभावें। साम्यासिं एं।।१६८।।

"हे त्रैलोक्य म्हणजे खरे तर त्या ब्रह्मभुवनाच्या गावाचा पसारा आहे जो तेथील दिवस उगवताच एकरकमी मांडला जातो. रात्रीच्या समयी पुनश्च तो आवरला जातो; यासच विश्वाची ***साम्यावस्था*** असे म्हणतात."

जैसें वृक्षपण बीजासिं आलें। कीं मेघ हें गगन जाहालें।
तैसें अनेगत्व जेथ सामावलें। तैं साम्य म्हणिपें।।८-१६९।।
तेथ समविषम न दिसें काईं। म्हणौनि भूतें हें भाख नहीं।
जेंविं दूधचि जाहालिआं दहीं। नामरूप जाएं।।१७०।।

"वृक्षत्व जसे बीजरूपात साठवलेले असते किंवा मेघ विरून जसे गगनरूप होतात, तसे अनेकत्व जेव्हा एकाठायी समावले जाते, त्या विश्वस्थितीस ***साम्य*** असे म्हणतात. तेव्हा समविषम, एक-अनेक असे काहीच दिसत नाही. म्हणून ***भूते*** या शब्दाचे साधे अस्तित्वही तेव्हा उरत नाही. दुधाचे विरजून दही झाले की त्याचे नामरूप लोपतात व सगळे दहीच असते, त्याप्रमाणे आकार लोपला की जगाचे जगपण भंगते."

भक्तीने प्राप्त होणारा पुरुषविशेष

पण तरीही त्या अव्यक्तापलीकडील ***सनातन तत्त्व*** जसेच्या तसेच राहते. गोपालकृष्ण सांगतातः

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति।।८-२०।।

"हे पार्था! यापूर्वी सांगितलेल्या अव्यक्तापलीकडील असा जो सनातन भाव आहे, तो मात्र सर्व भूते नाहीशी होतात, तेव्हाही नाश पावत नाही."

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्माहुः परमां गतिम्।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम्।।८-२१।।

"त्या अव्यक्त पदार्थास अक्षर असेही म्हणतात. प्राण्यांची परमगती तोच पदार्थ आहे. तसेच तेथे एकदा पोहोचले की पुनः संसारात आगमन होत नाही. माझे परमधाम ते हेच आहे."

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया।
यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम्।।८-२२।।

"सर्व शरीरात शयन करणारा जो पुराणपुरुष आहे, तोच तो सनातन अव्यक्त भाव होय. त्याच्यातच सर्व भूते आहेत आणि त्यानेच हे सर्व व्यापलेले आहे. तो पर म्हणजे श्रेष्ठतम पुरुष अनन्यभक्तीने लाभतो."

असा हा जो ***अव्यक्ताहूनही अव्यक्त*** असणारा ***"पुरुषविशेषः ईश्वरः"*** आहे, त्याचे स्वरूप वर्णन करत ज्ञानदेव म्हणतातः

तेंविं आकारलोपासरिसें। जगाचें जगपण भ्रंशें।
परि जेथ जाहालें तैं तैसें। तैसेंचि असें।।८-१७१।।
तैं तेआं नांव साहाजें अव्यक्त। आणि आकारावेलीं तैंचि व्यक्त।
हें एकास्तव एक सुचित। एरविं दोनिं नाहीं।।१७२।।
जैसें आटिलिआं रुपें। आटिलेपण तैं खोटें म्हणिपे।
पुढुति तो घनाकारु हारपें। जैं वेलीं अलंकारु होति।।१७३।।
इयें दोनहीं जैसिं होणिं। एकीं साक्षिभूतिं सुवर्णि।
तैसिं व्यक्ताव्यक्तािचं कडसणि। वस्तूचां ठाईं।।१७४।।

"दृश्य विश्व लोपले तरी ते जेथून आकारास आले होते, ते जसेच्या तसेच राहते. म्हणून त्यास ***अव्यक्त*** असे म्हणतात. **जगदाकाराने तेच अव्यक्त व्यक्त स्वरूपात प्रकटते. *व्यक्त आणि अव्यक्त* या दोनही दशा एकमेकांसापेक्ष अशा आहेत. खरे तर या दोनही अवस्था भासमय असतात.** सोन्याची लगड अलंकार आटवून होते आणि त्या लगडीपासून अलंकार तयार होतात. वस्तुतः लगड व अलंकार हे दोनही सुवर्णावर दिसलेले आकारच होत. सुवर्ण त्या दोनही अवस्थांचे जसे साक्षिभूत असते, तसेच ***व्यक्त आणि अव्यक्त*** यांस मूळ वस्तू - जिला ***ब्रह्म, चैतन्य*** इ.नामे आहेत, ती ***साक्षी*** असते. म्हणून खरे तर ***व्यक्त आणि अव्यक्त*** हे त्या वस्तूठायी उद्भवलेले क्षणभंगुर आभास होत."

तैं तन्हें व्यक्त ना अव्यक्तु। नित्य ना नशिवंतु।
या दोहीं भावाअतितु अनादिसिद्धु।।८-१७५।।
जैं हें विश्व होऊनि असें। परि विश्वपण नासिलेनि न नासें।
अक्षरें पुसिलिआं न पुसें। अर्थु जैसा।।१७६।।
पाहें पां तरंगु होत जात। परि उदकु तैं अखंड असत।
तेंविं भूतभाविं नाशिवंत। अविनाश जैं।।१७७।।

"मूळ वस्तू ना व्यक्त ना अव्यक्त, ना नित्य ना नाशिवंत अशी या दोन्ही भावांच्या अतीत आणि अनादिसिद्ध अशीच आहे. जशी पाटीवर लिहिलेली अक्षरे जरी पुसून टाकली, तरी त्यांच्या अर्थाचा लोप होत नाही, तसेच या वस्तूचे आहे. ती हे विश्वच होऊन असते. पण विश्वाच्या लोपाने काही ती लोप पावत नाही, तर जशीच्या तशीच राहते. पाण्यावर तरंग येतात आणि जातात. पण ते पाणी जसे जेथल्या तेथेच अखंड असते, तसेच भूतसृष्टीस आधारभूत असणारे तत्त्व भूतांच्या विनाशाने नाश न पावणारे - अविनाश असेच असते."

ना तन्हें आटतिएं अलंकारीं। नाटतें कनक असे जिआंपरीं।
तेंविं मरतिएं जिवाकारीं। अमर जैं आहे।८-१७८।।
जेआंतैं अव्यक्त म्हणो एं कोडें। म्हणतां स्तुति हें आईसें नावडें।
जैं मना बुद्धि न संपडें। म्हणौनिआं।।१७९।।
आणि आकारां आलिआं जेआंचें। निराकारपण न वचें।
आणि आकारलोपें न विसंचें। नित्यता गां।।१८०।।
म्हणौनि अक्षर जैं म्हणिजे। तेंविचि म्हणतां बोधुही उपजे।
जेआं परौता पैसु न देखिजे। ययां नाम परमगति।।१८१।।

"अलंकार आटवल्याने सोने काही आटत नाही. त्याचप्रमाणे मर्त्य प्राण्यांच्या मृत्यूबरोबर ते तत्त्व मरत नसते. कारण ते तर नित्य आहे; अमर आहे. त्यासच कौतुकाने कोणी ***अव्यक्त*** असे म्हणतात. पण तसे म्हणण्याने काही त्या तत्त्वाची स्तुती केल्यासारखे होत नाही. कारण ते तर मन व बुद्धीच्याही पलीकडील आहे. मन व बुद्धी त्याचे यथार्थ वर्णन करण्यास निव्वळ असमर्थच आहेत. ते आकारास आले असताही त्याचे निराकारपण लोपत नाही. तसेच आकाराच्या लोपाबरोबर त्याची नित्यता भंगत नाही; ते जसेच्या तसेच राहते. याकारणे त्या तत्त्वास ***अक्षर*** असे म्हणतात. ***अक्षर*** या शब्दमात्रेकरून त्याच्या स्वरूपास तत्काळ ओळखले जाते आणि त्याच्यापलीकडे काहीही नाही म्हणून त्यासच ***परमगती*** असेही म्हणतात."

शारीरी पुरुष

हे तत्त्वच शारीरी पुरुष म्हणून कसे विद्यमान असते, पहा:

पैं आघवां इहीं देहपुरीं। आहे निजेलिआंचें परी।
जैं व्यापारु करविं ना करीं। म्हणौनिआं।।८-१८२।।
एरविं जैं शारीरचेष्टा। त्यांमाजिं एकुहि न ठके गां सुभटा।
दाहीं इंद्रियांचिआं वाटा। वाहतचि आहाति।।१८३।।
उकलूं विषयांचा पेटा। होतां मनाचां चोहटां।
तो सुखदुःखाचां राजवांटा। भीतराहिं पावे।।१८४।।

"या संपूर्ण देहनगरीत ते तत्त्व गृही निजून राहिलेल्या पुरुषाप्रमाणे वसते. कारण देहात राहूनही ते त्याचे व्यापार करत नाही आणि करवतही नाही. असे असूनही शरीरव्यापार सगळेच्या सगळे चालूच असतात; कोणत्याही इंद्रियांचा व्यापार न खळता दहाही इंद्रियांचे व्यापार अव्याहत चालूच राहतात. मनाच्या चव्हाट्यावर विषयांची बाजारपेठ वसते. तेथील व्यापारउदीमहीअसेच अखंड चालू राहतात आणि त्यातील सुखदुःखरूप उलाढालीतील राजस्वभोगाचा हिस्सा आत निजलेल्या पुरुषालाही पावतच राहतो."

परि राओ पहुडिलिआं सुखें। जैसा देशिंचां व्यापारु न ठके।
प्रजा आपुलालेनि अभिलाखें। करितचि असति।।८-१८५।।
तैसें बुद्धिचें हन जाणणें। कां मनाचें घेणेंदेणें।
इंद्रियांचें करणें। स्फुरण वायूचें।।१८६।।
हें देहक्रिया आघविं। न करवितां होएं बरविं।
जैसा चालवितेनि रवि। लोकु चाले।।१८७।।

"राजा आरामात शयन करत असला तरी देशभरातील व्यापार जसे न थांबता सुरळीतपणे चालूच राहतात, प्रजाजन आपापल्या स्वार्थास अनुसरत व्यवहार करतच राहतात, तसेच बुद्धीचा जाणणे हा व्यापार, मनाचा संकल्प-विकल्पादी व्यापार, इंद्रियांच्या क्रिया, वायूचे चलनवलनादी व्यापार हे सर्व होतच राहतात. रवीच्या प्रकाशात लोकव्यवहार चालत असतो. पण तो काही रवी चालवित नाही. शरीरी हे तत्त्व असेच विद्यमान असते. ते न करवताही सगळी देहक्रिया आपसुकच होत असते."

अर्जुना तेआंपरी। सुतला आईसा आहे शरीरीं।
म्हणौनि पुरुषु गां अवधारीं। म्हणिपे तेआंतैं।।८-१८८।।
आणि प्रकृतिपतिव्रतें। पडिला एकपत्नीव्रतें।
एणेंहिं कारणें जेआंतैं। पुरुषु म्हणो एं।।१८९।।

"अशा प्रकारे शरीरात हे तत्त्व विराजते आणि निजल्यागत स्वस्थ पडून राहते. त्यास ***"पुर-स्थ"*** म्हणजे शरीरात राहणारा म्हणून पुरुष असे म्हणतात. तसेच आपली पतिव्रता स्त्री जी प्रकृति, तिच्याशी हा एकपत्नीव्रताने नांदतो. म्हणूनही त्यास पुरुष असे जाणकार म्हणतात."

"अनन्यगतिचें घर"

हेच तत्त्व परमश्रेयसही आहे, असे सांगणाऱ्या ओव्या पहा:

पैं वेदांचें बहुंवसपण। देखेचिना जेआंचें आंगण।
हें गगनाचें पांघरुण। होएं देखा।।८-१९०।।
आईसें जाणुनि योगेश्वर। जेआंतैं म्हणति परमपर।
जैं अनन्यगतिचें घर। गिंवसित एं।।१९१।।
जैं तनुवाचाचित्तें। नाईकति दुजिएं गोष्टीतैं।
तेआं एकनिष्ठेचें पिकतें। सुक्षेत्र जैं।।१९२।।

"त्या परमतत्त्वास पाहण्यासाठी वेदांनी धाव घेतली. पण त्याच्या अंगणापर्यंतही ते पोहोचू शकले नाहीत. त्यास पांघरूण म्हणून गगनही लहान पडते. हे जाणून योगिराट त्यास ***परम पर*** असे म्हणतात.

पण तरीही ते तत्त्व अनन्यगतिक साधकांचे घर शोधत त्यांच्याकडे येते. जे कायावाचामनेकरून त्याच्याविना दुसरे काहीच चिंतित नाहीत, पाहत नाहीत, ऐकत नाहीत, त्या एकनिष्ठ साधकांच्या एकनिष्ठत्वाचे बहुवस पीक देणारे सुक्षेत्र ते हेच ***परम तत्त्व*** ज्यास ***परम पर वा पुरुष*** असे म्हटलेले आहे."

हें त्रैलोक्यचि पुरुषोत्तमु। आईसा सांचु जेआंचा मनोधर्मु।
तेआं आस्तिकांचा आश्रमु। पांडवा गां।।८-१९३।।
जैं निर्गुणाचें गौरव। जें निर्गुणाचिं जाणिव।
जैं सुखाचिं जाणिव। निरासांसिं।।१९४।।
जैं संतोखिआं वाढिलें ताट। जैं अचिंतां अनाथांचें मायपोट।
भक्तिसिं उजूं वाट। जेआं गांवां।।१९५।।
हें एकेक सांघौनि वांयां। काय फार करूं धनंजया।
पैं गेलिआं जेआं ठायां। तो ठाओचि होईजे।।१९६।।

"हे त्रैलोक्य पुरुषोत्तमच आहे अशी ज्यांची मनोवृत्ती आहे, त्या आस्तिक साधकांचा आश्रम म्हणजे हे तत्त्व होय. अर्जुना! निगर्वी पुरुषांची महानता, गुणातीतांची ओळख, निष्काम पुरुषांचे स्वंनंदसाम्राज्य, संतोषी पुरुषांपुढे वाढलेले पंचपक्वान्नांचे ताट, अनाथांचे आणि संसारचिंता सोडून दिलेल्यांची काळजी वाहणारे कनवाळू हृदय असे हे तत्त्व आहे. ज्या गावाला भक्तीची सरळधोपट वाट नेऊन पोहोचवते, ते गाव हेच आहे. धनंजया! हे वर्णन किती म्हणून करावे! अरे! ज्या ठिकाणी पोहोचले की आपण ते ठिकाणच होऊन राहतो, ते हे परमधाम आहे."

अपुनरावृत्ती

हिंवाचिआं झुळुकां. जैसें हिंवचि पडें उष्णोदका।
कां समोर जालिआं अर्का। तमचि प्रकाशु होएं।।८-१९७।।
तैसा संसारु जेआं गांवां। गेला सांता पांडवा।
होऊनि ठाकें आघवा। मोक्षाचाचि।।१९८।।
तऱ्हैं अग्निमाजिं आलें। जैसें इंधनचि अग्नि जाहालें।
पाठीं न निवडेचि कांहीं केलें। काष्ठपण।।१९९।।
ना तऱ्हैं साखरेचा माघौता। बुद्धिमंतपणेंहिं करितां।
परि ऊंस नोहें पांडुसुता। जिआपरी।।२००।।

"बर्फाळ हवेच्या झुळुकांनी उष्ण उदक जसे बर्फाळ होऊन जाते; किंवा सूर्यासमोर आलेला अंधारसुद्धा जसा प्रकाशरूप होऊन जातो; त्याचप्रमाणे, अर्जुना! त्या स्थानी पोहोचताक्षणीच हा प्रपंचच मोक्षरूप होऊन ठाकतो पहा! अग्निमुखी प्रवेशलेले इंधन जसे अग्निस्वरूप होऊन जाते व त्यानंतर त्यातले काष्ठत्व जसे शोधू गेले तरी सापडत नाही; अथवा साखरेपासून पुन: पूर्वीचा ऊस करण्यासाठी बुद्धिमंतानेही आपली बुद्धी पणाला लावली, तरी तिचा ऊस जसा होऊ शकत नाही; हे असो!"

लोहाचें कनक जाहालें। हें एकें परिसें केलें।
आणि आतां आणिक कैंचें तैं गेलें। लोहत्व आणी।।८-२०१।।
म्हणौनि तूप होऊनि माघौतें। जेविं दूधपण न येचिं।
तेंविं पावोनिआं जेआंतैं। पुनरावृत्ति नाहीं।।२०२।।
तैं माझें परम। सांचोकारें निजधाम।
हें आंतुवट तूझ वर्म। दाविजत असें।।२०३।।

"लोखंडाचे परीसस्पर्शाने एकदा का सुवर्ण झाले की त्या सुवर्णास परत लोहत्व आणून देईल अशी वस्तू शोधू गेले तरी सापडेल का! दुधापासून तूप झाले की काहीही केल्या त्याचे पुन: दूध जसे होत नाही; या सर्वांप्रमाणेच ते माझे जे परम असे निजधाम आहे, ते सर्वश्रेष्ठ तर आहेच, पण एकदा तेथे जाऊन पोहोचले की पुनर्जन्म, संसार हे चक्र कायमचे थांबते. माझे हे अंतरीचे गूढ मी तुला प्रकट सांगतो आहे. ते जाणून घे व शाश्वत कल्याणाचे निधान असे ते परमधाम तू प्राप्त करून घे!"

शुक्ल कृष्ण गती::::

अर्चिरा व धूम्र मार्ग

श्रीकृष्णांनी आताच आपल्या परमधामाचे जे गूढ सांगितले, ते सांगण्यामागे एक कारण आहे. **गीता जो योग सांगते, त्याचे *अपुनरावृत्ती* असे फळ आहे.** पण इतर योगमार्गांचे तसे नाही. भगवंत म्हणतात:

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिन:।
प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ।।८-२३।।

"हे भरतश्रेष्ठा! इतर जे योगमार्ग आहेत, त्यांच्या साधकांचे देहावसान कोणत्या काली झाले, त्यावर त्यांची गती अवलंबून असते. पुनरावृत्ती होणे व न होणे यांसाठी देहावसानकाल कोणते, ते तुला सांगतो. ऐक."

अर्चिरा व ***धूम्रमार्ग*** अशा दोन प्रकारच्या गती अशा योग्यांना प्राप्त होतात. त्या अंतकाल व त्या वेळची यौगिक देहस्थिती यांवर अवलंबून असतात. ज्ञानेश म्हणतात:

तेंविंचि आणिकेंहीं एकें प्रकारें। हें जाणतां आहे सोपारें।
तऱ्हैं देह सांडितेनि अवसरें। जेथ मिलति योगी।।८-२०४।।
अथवा अवचटें आईसें घडें। जैं अनवसरें देह सांडें।
तऱ्हैं देहांतैं माघौतें एणें घडें। देहासिचि।।२०५।।
म्हणौनि कालशुद्धी जऱ्हैं देह ठेविति।
तऱ्हैं ठेवतखेंविं ब्रह्मचि होति।
एरविं अकालीं तऱ्हैं एंति। संसारा पुढुति।।८-२०६।।
तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ति।
इयें दोनहीं अवसराअधीन आहाति।
तो अवसरु तूझप्रति। प्रसंगें सांघों।।२०७।।

"देहींचि ब्रह्मत्व पावले" असे जे भक्त वा योगी मागे सांगितले, त्यांच्याव्यतिरिक्त अजूनही दुसऱ्या प्रकारचे योगी आहेत. देहत्याग करतेवेळी ते ब्रह्मत्वास कसे पावतात आणि यदाकदाचित अवेळी जर त्यांचा देहपात घडून आला, तर ते पुनश्च देहधारण का करतात,

या गोष्टी जाणून घेणे अवघड नाही. **कालशुद्धी असता जे योगी देह ठेवतात, ते देहत्यागसमयीच ब्रह्मत्त्व पावतात आणि जर अकाली देहत्याग झाला, तर ते पुन: संसारी जन्म घेतात.**"

शुक्लगती

योग्यास कोणत्या गोष्टींची प्रयाणसमयी अनुकूलता असली पाहिजे, ते श्रीकृष्ण सांगतात. ते म्हणतात:

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम्।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः।।८-२४।।

"***अग्नी व ज्योतीचा प्रकाश, दिवस, शुक्ल पक्ष, उत्तरायणाचे सहा महिने*** यांच्यात ज्यांचे देहावसान होते, ते ब्रह्मवेत्ते जन ब्रह्माप्रत जातात."

याचे स्पष्टीकरण देत ज्ञानदेव म्हणतात:

तऱ्हैं आईकें गां सुभटा। पातलिआं मरणाचां माजिवठा।
पांचैं आपुलालिआं वाटां। निघतिं अंतिं।।८-२०८।।
आईसा वरिपडिलिआं प्रयाणकालीं। बुद्धितैं भ्रमु न गिलीं।
स्मृति नोहें आंधलीं। न मरे मन।।२०९।।
हा चेतनवर्गु आघवां। मरणिं असे टवटवा।
परि अनुभविलिआं ब्रह्मभावां। गंवसणि होऊनि।।२१०।।
आईसा सावध हा समवाओ। आणि निर्वाणवेऱ्हीं निर्वाहो।
हें तऱ्हैंचि घडे जऱ्हैं सावाओ। अग्निचां आथिं।।२११।।

"सायुज्य आणि पुनर्जन्म ही दोन्ही देहत्यागाच्या काळवेळेशी कशी संबंधित असतात, ते सांगतो. ऐक. हे योद्धया! मरणाची सांजवेळ प्राप्त झाली, मृत्यूचा घोर सुरू झाला की पंचमहाभूते शरीर सोडून आपापल्या वाटेस लागतात. त्या वेळी जर ***अग्नीचे साहाय्य*** असेल, तर बुद्धी भ्रमाकडून गिळली जात नाही. ती जशीच्या तशी शाबूत राहते. स्मरणशक्ती आंधळी होत नाही. ***मन, बुद्धी, चित्त व अंतःकरण*** हा चेतनासमुदाय त्या योग्याने वेळोवेळी अनुभवलेल्या ब्रह्मभावाची जणू खोळच होऊन राहतो. ***चेतना टवटवीत व सावध असते.*** हे असे निर्वाणसमयी घडून यावे, यासाठी **देहींचा*अग्नी*** कारण असतो."

पाहां पां वारेन कां उदकें। जैं दिवियाचें दिवेपण झांकें।
तैं असतचि काएं देखें। दिठी आपुलीं।।८-२१२।।
तैसें देहांतिचें विषम वातें। देह आंतुबाहेरीं श्लेष्मा आते।
तैं विझौनि जाएं उजितें। अग्निचें जेधवां।।२१३।।
तैं हेलीं *प्राणासिचि प्राणु नाहीं।* तेथ बुद्धि असौनि करील काईं।
म्हणौनि अग्निविण देहीं। चेतना न थरें।।२१४।।
अगां देहिंचां अग्नि जऱ्हैं गेला। तऱ्हैं देहु नोहें चिखलु वोला।
वांयां अयुखवेलु आपुलां। आंधारां गिंवसिं।।२१५।।

"असे पहा की पाण्याने किंवा वाऱ्याने दीप मालवला गेला की दीपप्रकाश नाहीसा होतो व त्या वेळी दृष्टी असूनही आपणास काही दिसते का! त्याचप्रमाणे देहांतसमयीच्या झंझावातात आणि शरीरात कालवलेल्या त्रिदोषांमुळे जेव्हा शरीरस्थ अग्नीचे तेज विझून जाते, त्या वेळी प्राणांसच प्राणपण उरत नाही; तेथे बुद्धी असूनही ती काय करील! अग्निविना देहात चेतना ठरत नाही. आणि हा देहींचा अग्नी जेव्हा जातो, तेव्हा हा देह म्हणजे निव्वळ ओल्या चिखलाच्या गोळ्यासारखा पार्थिवच होऊन जातो! आयुष्य आपला उरलेला वेळ व्यर्थ अंधारात धडपडण्यात घालवते!"

आणि माघिल स्मरण आघवें। तैं तेणें अवसरें सांभालावें।
मग देह त्यजूनि मिलावें। स्वरुपिं कीं।।८-२१६।।
तंव तेआं देहश्लेष्माचां चिखलीं। चेतनाचि बुडौनि गेलीं।
तेथ माघिलीं पुढिलीं हें ठेलीं। आठवण साहाजें।।२१७।।

"खरे तर त्या वेळी पूर्वी केलेल्या साधनाचे स्मरण शाबूत ठेवून देह त्यागावयाचा असतो आणि परमात्मस्वरूपी अनुसंधानाच्या बळावर जाऊन मिळावयाचे असते. पण अशा या देहातील श्लेष्मरूपी चिखलात त्या वेळी चेतनाच जेथे बुडून गेली, तेथे ते मागलेपुढले साधन, स्मरण, परमात्मस्वरूप इ.कोठून आठवणार!"

म्हणौनि आदिंचां अभ्यासु जो केला।
तो मरण न एतांचि निमौनि गेला।
जैसें ठेवणें न दिसतां मालविला। दीपु हातिंचां।।८-२१८।।
आतां असो हे सकल। जाण पां *<u>ज्ञानासिं अग्नि मूल।</u>*
<u>तेआं अग्निचें प्रयाणिं बल। संपूर्णु आथिं</u>।।२१९।।

"आधी केलेला अभ्यास अशामुळे मरण येण्यापूर्वीच नाहीसा झाला, जसा वस्तू पाहण्यासाठी घेतलेला दिवा वस्तू न दिसताच मालवून जावा! असो. हे लक्षात घे की ज्ञानास मूळ कारण अग्नी आहे. म्हणून अग्नीचे संपूर्ण बळ प्रयाणकाळी असावे!"

अग्नीचे हे महत्त्व स्पष्ट केल्यावर इतर गोष्टींची अनुकूलता कशासाठी आवश्यक आहे, ते सांगतांना ज्ञानदेव म्हणतात:

***<u>आंत अग्निज्योतीचा प्रकाशु</u>।* बाहेरी शुक्लपक्षु परि दिवसु।**
आणि सामासांमाजिं मासु। उत्तरायण।।८-२२०।।
आईसिआं समायोगाचिं निरुति। लाहौनि देह जैं ठेविति।
तैं ब्रह्मविद होति। परब्रह्म।।२२१।।
अवधारीं गां धनुर्द्धरां। एथवेरी सामर्थ्य ययां अवसरां।
तेंविचिं <u>उजू मार्गु</u> स्वपुरा। यावयासि।।२२२।।

"देहांतर्यामी अग्नी व ज्योतीचा प्रकाश, शुक्लपक्षातील दिवस, आणि उत्तरायणाच्या सहा महिन्यांपैकी एक महिना, अशा उत्तम जुळून आलेल्या योगावर जे ***ब्रह्मवेत्ते*** देह ठेवतात, ते परब्रह्मच होतात. आत्मस्वरूप पावण्याचा हा निर्विघ्न मार्ग आहे, इतके या योगाचे सामर्थ्य आहे."

<u>एथ अग्नि हें पहिलें पायतरें। ज्योतिर्मय हें दुसरें।</u>
<u>दिवस जाणें तिसरें। चवथें शुक्लपक्ष</u>।।८-२२३।।
<u>आणि सामास उत्तरायण। तैं वरिचिल गां सोपान।</u>
<u>एणें सायुज्यसिद्धिसदन। पावति योगी</u>।।२२४।।

हा उत्तमु कालु जाणिजे। यांतैं *अर्चिरा मार्गु* म्हणिजे।
आतां अकालु तोहि साहाजें। सांधैंन आईक।।२२५।।

"या मार्गीची पहिली पायरी ***अग्नी*** आहे. ***ज्योतिस्वरूप*** ही दुसरी पायरी आहे. ***दिवस*** ही तिसरी पायरी आहे आणि चौथी म्हणजे ***शुक्लपक्ष. उत्तरायणाचे सहा महिने*** हे वरच्या पायऱ्या आहेत. या मार्गाने जाणारे योगी ***सायुज्य*** रूपी सदनास पावतात. हा उत्तमकालमार्ग ***अर्चिरा*** या नावाने विख्यात आहे."

येथे काही गोष्टींचे स्पष्टीकरण आवश्यक आहे. ***उत्तरायणातील शुक्लपक्षातील दिवस*** ही वेळ योग्याच्या प्रयाणसमयीची असावी. हा ***बाह्य जगतातील काल*** आहे.

अंतरजगतातील काल म्हणजे सुषुम्ना होय. योग्याचे प्राण,मन व बिंदु ही सर्व त्या वेळी अग्नीसोबत म्हणजे कुंडलिनीच्या संपूर्ण स्रोतासह आज्ञाचक्र वा "षण्मासा उत्तरायणम्" म्हणजे उत्तरेकडील म्हणजे पश्चिममार्गावरील षट्चक्रातील कोणत्या तरी एका चक्रावर असावेत. ही त्रिकूट, श्रीहाट,गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र नामक षट्चक्रे आणि इतर तत्सम पश्चिममार्गावरील चक्रे आपण पूर्वी पाहिलीच आहेत.

तसेच प्राणादींनी कुंडलिनीसह पुढील *ज्योती* कडे म्हणजे *सगुण ते निर्गुण* या प्रांताकडे प्रस्थान ठेवले पाहिजे, असा संकेत या श्लोकातून आणि या ओव्यांतून मिळतो आहे.

तसेच *दिवस* म्हणजे कुंडलिनी आज्ञाचक्रापर्यंत तरी उत्क्रामित असावी व तिच्या प्रकाशाने सुषुम्नामार्ग उजळून गेलेला असावा.

***शुक्ल पक्ष* म्हणजे चंद्रम्याचा प्रकाश असावा. याचा अर्थ तिने आज्ञाचक्रावरील परमशिवापलीकडील सूर्यमंडलावरील इंदु *अथवा चंद्रा* पर्यंत उत्क्रमण केले पाहिजे.**

*[**टीपः चंद्रः** (पहा-उन्मेष ४६:योगपर अभंगः आज्ञाचक्रावरील प्रांत-तंत्रशास्त्रोक्त मतावरील टीप पृ.क्र.८०१ व ८०२:)* त्यात ***"अमृतसागर ->मणिद्वीप - त्यात नाद व बिंदू आणि मणिपीठ -त्यात कामकलात्रिकोण, त्रिकोणात गुरु वा परमशिव) -> परमशिवानंतर सूर्यमंडल व चंद्र -> त्यावर चंद्रमंडल (त्यात षोडषी वा अमाकला आणि निर्वाणकला , पराबिंदु त्यात सर्वात्मा व ब्रह्मपद) ->चंद्रमंडलावर महावायू ->ब्रह्मरंध्र->महाशंखिनीविवर ->विसर्ग"*** असा जो तंत्रशास्त्रोक्त क्रम दिला आहे, ज्यास आचार्यांच्या ***सौंदर्यलहरी*** या ग्रंथातही प्रमाण मिळते, त्यातील ***चंद्र आणि चंद्रमंडल*** म्हणजेच हा आठव्या अध्यायातील *श्लोक क्र.८-२४* संबंधित उपरोल्लेखित **चंद्र** होय.]

हा सगळा आपणासारख्या योगविज्ञान जाणणाऱ्यास उमगणारा या संज्ञांचा गूढार्थ आहे. असो. हे सर्व साध्य झाल्यास योग्यास आपण पूर्वापार केलेल्या ब्रह्मोपासनेचे तथोचित फल म्हणजे सायुज्य वा ब्रह्मप्राप्ती होते.

कृष्णगती

आता अकाल कोणता ते श्रीगोपाल सांगत आहेतः

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम्।
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते।।८-२५।।

"धूम्र, रात्र, कृष्णपक्ष आणि दक्षिणायनाचे सहा महिने या अवस्थेत जो योगी देह ठेवतो, तो चंद्राच्या ज्योतीपर्यंत जाऊन पुनः संसारी जन्म घेतो."

ज्ञानेश हे स्पष्ट करत म्हणतातः

तन्हैं प्रयाणाचेनि अवसरें। वातुश्लेष्मु सुभरें।
तेणें अंतःकरणिं आंधारें। कोंदलें ठाकें।।८-२२६।।
सर्वेंद्रिया लाकूड पडें। स्मृति भ्रमामाजिं बुडें।
मन होएं वेडें। कोंडें प्राण।।२२७।।
अग्नीचें अग्निपण जाएं। मग तो धूमचि आघवा होएं।
तेणें चेतना गिंवसिली ठाएं। शरीरींचि।।२२८।।

"प्रयाणाच्या वेळी वात व कफाच्या आधिक्यामुळे अंतःकरण अंधाराने कोंदाटून जाते. सर्व इंद्रिये लाकडासारखी चेतनाहीन होऊन जातात. मन वेडावते. प्राण कोंडतो. स्मरणशक्ती भ्रमात बुडून जाते. अशांच्या देहींचा अग्नी अग्निपण सोडून देतो. तो निव्वळ धूमच होतो. त्या धुराने शरीरातील चेतना वेटाळली जाते."

जैसें चंद्राआड आभाल। सदट दाटें सजल।
मग गडद ना उजाल। आईसें झांवलें होएं।।८-२२९।।
कां मरे ना सावध। आईसें जिवितासिं पडें स्तब्ध।
आयुख मरणाचि मर्याद। वेलु ठकीं।।२३०।।
आईसिं मनबुद्धिकरणिं। सभोंवति धूमाकुलाचिं कोंडणी।
जेथ जन्मे जोडिलिएं वाहणि। युगचि बुडें।।२३१।।

"जसे सजल घन चंद्राआड आले की गडद अंधकारही नाही आणि धड उजेडही नाही, असा ग्रहणवेळेसारखा अशुभ सावलीचा खेळ सुरू होतो. त्या वेळी साधकाची अवस्था ना धड मेलेला ना जिवंत अशी होऊन ठाकते. आयुष्य मरणाच्या वेळेसाठी तिष्ठून बसते. जीवित थबकून उभे राहते. मन, बुद्धी व इंद्रिये यांच्यासभोवती अशी ही धूम्राची अन अंधकाराची कोंडाळी उभी होतात. असा जणू युगांतच तेथे पाततो. त्या वेळी सर्व जन्म ज्या साधनाची जोडणी करण्यात घालवला, ते साधनही हातचे सुटून जाते."

हां गां हातींचे जैं हेलीं जाएं।
तैं वेलीं आणिका लाभाचिं गोठी कें आहे।
म्हणौनि प्रयाणिं तंव होएं। एतुली दशा।।८-२३२।।
आणि देहांआंतु आईसि स्थिती। बाहेरी कृष्णपक्षु वरी राति।
आणि सामासही तैं वोडवति। दक्षिणायन।।२३३।।
इयें पुनरावृत्तिचिं घराणिं। आघवि एकवटति जेआंचिएं प्रयाणिं।
तो स्वरूपसिद्धिचि काहाणि। कैसेनि आईकें।।२३४।।

"जेथे जन्मभर केलेला हातचा अभ्यासही निघून जातो, तेथे आणखी कोणत्या मोठ्या लाभाची अपेक्षा करावी! प्रयाणकाळी ही अशी अवस्था झाली, देहांतरी मगाशी म्हटली तशी स्थिती झाली आणि त्यातच कृष्णपक्षातल्या रात्रीची आणि दक्षिणायनाच्या सहा मासांपैकी कोणत्यातरी महिन्याची भर पडली की आणखी काय हवे! ज्याच्या प्रयाणसमयी ही सगळी पुनर्जन्माची मांडणी जुळून येते, त्याने ब्रह्मप्राप्तीची वार्ता कोणत्या कानांनी ऐकावी!"

आईसा जेआंचा देहो पडें।
तेआं योगी म्हणौनि चंद्रावरी जाणें घडें।
मग तेथूनि माघुता बहुडें। संसारा एं।।८-२३५।।
आम्हीं अकालु जो पांडवा। म्हणितला तो हा जाणावा।
आणि हाचि धूम्रमार्गु गांवा। पुनरावृत्तिचिआं।।१३६।।
एर तो अर्चिरा मार्गु। तो वसता आणि असलगु।
साविआं स्वस्ति चांगु। निवृत्तिवेरी।।२३७।।

"अशा योगावर ज्याचा देहपात होतो, तो केवळ योगीच असला तर त्यास ***चंद्रलोकी*** जावयास मिळते. पण तेथूनही त्यास पुनर्जन्म घ्यावाच लागतो. अर्जुना! देहपातासाठी ***अकाळ*** म्हणून मी जो मागे म्हटला होता, तो हाच होय. योग्यांच्या पुनरावृत्तीचा मार्ग वा ***धूम्रमार्ग*** असे पण यास म्हणतात. दुसरा मार्ग तो ***अर्चिरा*** मार्ग होय. तो सुगम व वाहता आहे. त्या मार्गावरून पुनः मागे फिरून यावे लागत नाही. तो कल्याणकारक व मोक्षप्रद आहे."

या कृष्णगतीचेही यौगिक रहस्य असे आहे की ***धूम्रावस्था*** म्हणजे कुंडलिनीची सुप्त अवस्था वा पूर्वमार्गातील कोणत्या तरी एका चक्रावर तिचे असणे म्हणजे अग्नि वा वज्राग्नीचे बळ कमी असणे; ***दक्षिणायन*** म्हणजे ***पूर्वमार्ग*** आणि **त्याचे *षण्मास म्हणजे मूलाधार ते आज्ञाचक्रापर्यंतची सहा चक्रे,* तेथे कोठेतरी कुंडलिनीचे असणे.** ***रात्र*** म्हणजे सुषुम्ना अप्रकाशित असणे – हा प्रकाश तिचे ब्रह्मांडातील त्रिकूटादी चक्रावर उत्क्रमण झाले की मिळतो, तशी अवस्था नसणे म्हणजे रात्र. ***कृष्णपक्ष*** **म्हणजे चंद्राचा प्रकाश नसणे.**

[**टीप (१) -"चांद्रमसं ज्योति":** हा चंद्र म्हणजे शुक्ल गती सांगतांना टीपेत जे परमशिवापलीकडील सूर्यमंडलावरील ***चंद्रस्थान*** सांगितले ते होय. अशा स्थितीत निर्वाण झाल्यास केवळ तो योगीच असल्यामुळे त्यास केलेल्या योगाभ्यासाचे फल म्हणून ***"चांद्रमसं ज्योतिः"*** प्राप्त करतो. म्हणजे या परमशिवापलीकडील सूर्यमंडलावरील चंद्रस्थानीच्या ज्योतीत {(**परमशिवानंतर सूर्यमंडल व चंद्र -➤ त्यावर चंद्रमंडल *(त्यात षोडषी वा अमाकला आणि निर्वाणकला पराबिंदु त्यात सर्वात्मा व ब्रह्मपद)*** }म्हणजे **चंद्रमंडल**ात निवास करतो आणि तेथून पुढे म्हणजे ***"चंद्रमंडलावर महावायू -➤ब्रह्मरंध्र -➤महाशंखिनीविवर -➤विसर्ग"*** अशी पुढील निर्वाणगती त्यास प्राप्त होत नाही. तो तेथून पुनः जन्म घेतो.

याला कारण म्हणजे ***अग्नीचे बल कमी पडणे म्हणजे कुंडलिनीचा संपूर्ण अंश उत्थापित न होणे*** असे आहे. शुक्लगतीच्या योग्यांना मात्र हे अग्निबल लाभल्यामुळे संपूर्ण कुंडलिनीचे उत्थापन होऊन ती सर्व चक्रांवरून उत्क्रमण करून हा पुढला मार्ग उपलब्ध होतो आणि अंती ती विसर्गात लय पावते. त्यामुळे त्यांचे परमनिर्वाण होते; ते पुनः जन्म घेत नाहीत, असा या ***शुक्लकृष्णगतिविषयक श्लोकांतील संज्ञांचा यौगिक गूढार्थ*** जिज्ञासूंसाठी स्पष्ट करत आहे.]

[**टीप (२) -परमहंस योगानंदांचे विचार**: तसेच या श्लोकांच्या *(८-२५ व २६)* एका विशेष प्रकारच्या यौगिक विवरणासाठी जिज्ञासूंनी *"God Talks With Arjuna -The Bhagvad Gita -Royal Science of God-Realization"* हा श्री श्री परमहंस योगानंद यांचा द्विखंडात्मक बृहद्ग्रंथ जरूर पहावा. त्यातील काही कल्पनांचा विचार पुढे दर्शवल्यानुसार आहे. परमहंस योगानंद म्हणतातः

"These MYSTERIOUS STANZAS, woefully misinterpreted by nearly all commentators, in reality contain symbolic references to the science of yoga. They describe the opening of the spiritual eye*(दिव्य चक्षू - डोळा - तृतीय नेत्र - बिंदु)*, the awakening of the cerebrospinal centers*(षट्चक्रे)*, and the ascension of life force and consciousness *(कुंडलिनी)* through them to Cosmic Consciousness and liberation in Spirit of the yogi who follows "the way of light *(अहः-दिवस)*" ... .. The ponderous scriptures of the Rishis have defined in veiled terms the labyrinth of the soul's descension and ascension. ... Here Fire means the life energy, the kundalini power. ... course of Prana downward, way of darkness *(रात्रि)*, ..upward, the way of light *(अहः-दिवस)* ..Sun of Cosmic Consciousness .. in the seventh .. spiritual center ... in the thousand petalled lotus... Light *(ज्योति)* in stanza 24 refers to the divine eye in the forehead, Daytime *(अहः-दिवस)*... manifestation of the spiritual eye during the samadhi state of meditation ... "bright half of lunar month" *(शुक्ल पक्ष)* is ... advanced yogi's consciousness that remains awake and tuned to Cosmic Consciousness ... "six months"*(षण्मास)* are the six spinal centers, the coccygeal*(मूलाधार)* to the spiritual eye *(आज्ञाचक्र)*. .. the yogi moves along way of light ... is intricate transition of his life and consciousness through the spiritual eye: life and consciousness move upward through

physical spine and brain, ... then ... through the three astral spines of light *(sushumna, vajra, chitra),* ... lastly ascension through the causal spine of consciousness *(brahmanadi),* whereby the soul is liberated in Spirit. ... "Smoke" *(धूम्र)* means ignorance, or delusion ... "Nighttime" *(रात्रि)* is the the state of darkness caused by ignorance. "The six months of the southern course of the sun *(दक्षिणायन)*" refers to the descent of the delusion clouded sun of Cosmic Consciousness through the six spinal centers to the lower or "southern" part of the body, specifically to the three lower spinal centers ..."

(कंसातील पर्यायवचक शब्द आपल्या आतापावेतोच्या माहितीच्या समन्वयासाठी आपल्या पद्धतीस व गीतोक्तीस अनुसरून **योगदा श्रीज्ञानेश्वरी***च्या प्रस्तुत लेखकाने जिज्ञासूंच्या आकलनासाठी दिले आहेत. मूळ ग्रंथ इंग्रजीत आहे. तो वाचकांनी पूर्ण माहितीसाठी जरूर पाहावा. येथे फक्त त्या ग्रंथातील आवश्यक तेवढाच भाग त्रोटकरीत्या आपल्या अभ्यासासाठी दिला आहे.)*

श्रीयोगानंदांच्या सांगण्याचा मतितार्थ असा की बव्हंश टीकाकारांनी ८-२४ व २५ या गूढगर्भ गीताश्लोकांचा योग्य तो यौगिक अर्थ केलेला नाही. या श्लोकांतून ***दिव्य चक्षुचे उन्मीलन, षट्चक्रांचे उन्नयन, कुंडलिनीशक्तीचे सुषुम्नेद्वारे ऊर्ध्वमार्गक्रमण,*** इ.सूचित होतात. पूर्वसूरींनी हे गूढ आडपडदा राखून येथे ग्रथित केले आहे. ***अहः*** म्हणजे दिवस. हाच प्रकाशाचा मार्ग. त्याने जाणाऱ्या योग्याच्या मार्गावरील महत्त्वाच्या खाणाखुणा यांत आहेत, तसेच जो योगी प्रकाशाच्या मार्गाने आपले अंतिम गंतव्य साधू शकत नाही त्याची अनुभूतीही येथे दर्शविली आहे.***अग्नी*** **म्हणजे येथे कुंडलीनी असा अर्थ आहे.*****ज्योति*** म्हणजे ***सहस्त्रार-कमलातील वैश्विक चेतनेचा सूर्यासम तेजस्वी असा मध्यबिंदु होय.*** ***शुक्ल*** पक्षाने योग्याच्या चेतनेचे वैश्विक चेतनेशी असणारे सामरस्यात्मक संबंध दाखविले आहेत. **षण्मास म्हणजे सुषुम्नापथावरील मूलाधार ते आज्ञाचक्र ही षट्चक्रे होत.** योगी प्रगतिपथावर जातांना आपली चेतना शारीरिक मज्जारज्जूतून तसेच मेंदूतून ***(सुषुम्ना व आज्ञाचक्र आणि वरील अर्धमात्रेचा प्रांत यातून)*** उत्क्रामित करतो. त्यानंतर ती चेतना किंवा कुंडलिनीशक्ती प्राणांसह या चक्रांचे अतिक्रमण करून ***सुषुम्ना, वज्रा व चित्रा*** या यौगिक देहनाड्यांतून उत्क्रमण करत ***ब्रह्मनाडी***द्वारे वैश्विक चेतनेत उत्क्रांत होते. योगी प्रकाशाच्या या मार्गाने जातो, तेव्हा या सहा चक्रांना ***उत्तरायणाचे षण्मास*** अशी संज्ञा वापरलेली आहे. यालाच योग्याचा ***शुक्ल*** गतीचा मार्ग असे म्हटले आहे. ***धूम्रमार्ग*** म्हणजे अज्ञानाचा मार्ग होय. ***रात्र*** ही अज्ञानावस्थेची द्योतक आहे. ***कृष्णपक्ष*** म्हणजे योग्याचे वैश्विक चेतनेशी अपेक्षित सामरस्यात्मक संबंध जुळून न येण्याची अवस्था. तसेच ***दक्षिणायन*** म्हणजे चेतनेची ऊर्ध्वगती न होता बळ कमी पडल्याने होणारी अधोगती - वरील चक्रातून खालील, विशेषेकरून ***मूलाधार ते मणिपूर*** या चक्रांकडे परतण्याचा मार्ग, अशा गूढ संज्ञांचा या श्लोकांत प्रयोग केलेला आहे.असो.]

सनातन मार्ग

श्रीकृष्ण म्हणतात:

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते।
एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः।।८-२६।।

"***शुक्ल व कृष्ण*** असे हे दोन मार्ग आहेत. ते सनातन आहेत. जगतातून निवृत्ती होणे व जगतात पुनरागमन घडणे हे यांपैकी कोणत्या मार्गाने गेले, त्यावर अवलंबून असते."

याबाबत ज्ञानेश सांगतात की:

आईसिआं अनादि ययां दोनहीं वाटा। एकीं उजू एकीं अव्हांटा।
म्हणऊनि बुद्धिपूर्वक सुभटा। दाविलिआं तूझ।।८-२३८।।
कां जैं मार्गामार्ग देखावें। सांच लटिकें जाणावें।
हिताहित जाणावें। हिताचिलागिं।।२३९।।
पाहें पां नाव देखतां बरविं। कोण आड घालीं अथाविं।
कां सुपंथ जाणौनिआं आडविं। रिगवित असें।।२४०।।

"हे वीरश्रेष्ठा! तुला मुद्दामच या दोन्ही मार्गांची ओळख करून दिली. हे दोन्ही मार्ग अनादी आहेत. त्यातील एक सरळ आहे, तर दुसरा आडवळणाचा आहे. यांची माहिती असणे आवश्यकच आहे. कारण आपले कल्याण कशात आहे, हे ओळखण्यासाठी खरे काय, खोटे काय, योग्य काय, अयोग्य काय हे सर्व जाणून घेतले पाहिजे. समोर चांगली नाव दिसत असताही अथांग पाण्यात कोणी उडी घेईल का! चांगला मार्ग माहीत असताही कोणी अरण्यातली आडवाट धरील का!"

जो विख अमृत वोलखें। तो अमृत काएं सांडों शकें।
तेंविं जो उजूं वाट देखें। तो अव्हांटा न वचे।।८-२४१।।
म्हणौनि फुडें। पारखावें खरें कुडें।
पारखिलें तऱ्हैं न पडें। अनवसरें कहिं।।२४२।।

"जो विष कोणते व अमृत कोणते ते ओळखू शकतो, तो अमृत टाकून विषाकडे कधी वळेल तरी का! त्याचप्रमाणे जो सरळ वाट कोणती ते ओळखतो, तो आडवाटेला कसा बरे लागेल! म्हणून असली कोणते व हीन कोणते, ते प्रथम नीट पारखून घ्यावे. म्हणजे अप्रसंग टळेल."

एरविं देहांतिं थोर विषम। ययां मार्गाचे आहें संभ्रम।
जन्में अभ्यासिलिआंचें हन काम। जाईल वांयां।।८-२४३।।
जऱ्हैं अर्चिरा मार्गु चुकलिआं। अवचटें धूम्रपंथे पडिलिआं।
तऱ्हैं संसारपांतिं जुंतलिआं। भंवतचि असावें।।२४४।।

"खरे तर देहांतकाळ मोठा कठीण असतो. त्या वेळी अवचित कोणता मार्ग सापडेल ते सांगणे मोठे अवघड आहे. जन्मभर केलेला अभ्यास वाया जाण्याचे संकट त्या वेळी प्राप्त होते. अर्चिरादी मार्ग चुकून अकस्मात या धूम्रमार्गी पडल्यास संसाराच्या पातीला जुंपले जाऊन परत भ्रमत राहवे लागणे त्या वेळी शक्य असते."

हें सायास देखौनि मोठें। आतां कैसेनि पां एकहेल फिटे।
म्हणौनि योगमार्ग गोमटें। शोधिलें दोनहीं।।८-२४५।।
तंवं एकें ब्रह्मत्वा जाईजे। आणि एकें पुनरावृत्ति येईजे।
परि दैवगत्या जो लाहिजे। देहांतिं जेणें।।२४६।।

"ते सायास केवढे कष्टदायक आहेत, हे पाहून ते दूर करावेत म्हणून मी तुला हे दोन्ही योगमार्ग नीट दाखवले आहेत. त्यातील एका म्हणजे ***अर्चिरा मार्गाने ब्रह्मत्व पावते, तर दुसऱ्या म्हणजे धूम्रमार्गाने पुनर्जन्मास यावे लागते.*** दैवगतीने जो मार्ग मृत्युसमयी लाभेल, त्यानुसार योग्यांस पुढील गती मिळते."

सर्व फलांचा अतिक्रम करणारा योगमार्ग

हे मार्गामार्गांचे संकट टळावे, यासाठी भगवंत अर्जुनाला सांगतात की सदैव योगयुक्त असावे. कसे ते ऐका:

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन।।८-२७।।

"हे पार्थ! हे जाणून घेऊन तू खरा मार्ग कोणता ते नीट पारखून घे. तो मार्ग जाणणारा योगी कधीही मोह पावत नाही. हे अर्जुना! तू सर्वकाळी योगयुक्त हो! म्हणजे सहजच अंतकाळीही योगयुक्त राहशील."

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परमस्थानमुपैति चाद्यम्।।८-२८।।

"हे रहस्य जाणणारा योगी वेदाध्ययन, यज्ञ, तप, दान इत्यादी करण्याचे जे फळ श्रुती सांगतात, त्या सर्वांचे उल्लंघन करून, त्या श्रेष्ठ अशा **सनातन पदा**स प्राप्त होतो."

गीता हा जो योगमार्ग सांगते, तो अर्चिरा व धूम्रमार्ग यांवर अवलंबून नाही. गीतेतील ही योगयुक्ती स्वतंत्र आहे. ज्ञानेश या विषयावर काय प्रकाश टाकतात, तो पाहू या:

तैं हेलीं म्हणितलें हें नोहें। वायां अवचटें काय पावें।
देह जाऊनि वस्तू होआवें। मार्गेंचि कीं।।८-२४७।।
तऱ्हैं आतां देह असो अथवा जावो।
आम्हीं तों केवल वस्तूचि आहों।
कां जैं दोरीं सर्पत्व वावों। दोराचिकडूनि।।२४८।।
मज तरंगपण असे कां नसे। आईसें हें उदकासि कंहि प्रतिभासें।
तैं भलतेव्हां जैसें तैसें। उदकचि कीं।।२४९।।
तरंगाकारें न जन्मेंचि। ना तरंगलोपें न निमेचि।
तेंविं देहीं जैं देहेंचि। वस्तू जाहालें।।२५०।।

भगवंत म्हणतातः "या अर्चिरादी मार्गांच्या व्यर्थ भ्रमात पडू नये. कारण प्रारब्धामुळे ऐन वेळी कोणता मार्ग सापडेल, ते कोणी सांगावे! देहांती ब्रह्मत्व पावण्याची गोष्ट निरर्थकच आहे. त्यापेक्षा असे पहा की देह असो अथवा जावो, आपण तर केवळ ब्रह्मच आहोत नाही का! दोरीवर सर्पत्वाचा भास झाला तरी दोरीच्या दृष्टीने ती दोरीच नसते का! आपल्यावर लाटा येताहेत -जाताहेत, आपणास लाटांचे रूप येते आहे, जाते आहे, हे उदकास कधीतरी जाणवेल काय! केव्हाही त्याच्याठायी उदकत्व जसेच्या तसेच नसते का! लाटेच्या रूपाने प्रकटले की उदक जन्मते आणि लाट निमाली की उदक लोपते की काय! त्याचप्रमाणे देह असतांनाच जे देहातच ब्रह्मत्व पावतात त्यांचे असते."

आतां शरीराचें तेआं ठाईं। आडनांवहीं उरलें नाहीं।
तऱ्हैं कोण्हें कालें काई। निमें तैं पाहें पां।।८-२५१।।
मग मार्ग तैं कायसा शोधावें। कोण्हें कोठूनि कें जावें।
जऱ्हैं देशकालादि आघवें। आपणचि असिजे।।२५२।।

"शरीराचे त्यांच्याठायी आडनावसुद्धा जेथे उरत नाही, तेथे कोणत्या काळी काय निमाले, ते कोणी सांगावे! आणि देशकालादी अवघे जेथे आपणच झालो, तेथे मार्ग कोठले शोधावे आणि कोण कोठून कोठे कोणत्या मार्गाने जावे, ते सांग बरे!"

आणि हां गां घटु जैं हेलीं फुटें।
तैं हेलीं तेथिंचें आकाश लागे नीट वाटें।
वाटा लागे तऱ्हैं गगना भेंटें। एरविं चुकें।।८-२५३।।
पाहें पां आईसें हन आहे। कीं तो आकारुचि म्हणो जाएं।
एर गगन तैं गगनिंचि आहे। घटत्वाहीं आधीं।।२५४।।
आईसिआं बोधाचेनि सुरवाडें। मार्गामार्गाचें सांकडें।
तेआं सोऽहंसिद्धा न पडे। योगियांसि।।२५५।।

"अर्जुना! जेव्हा घट फुटतो तेव्हा नीट वाटेला लागले तरच त्यातले आकाश आकाशास मिळते आणि नाही तर ते तसे मिळण्याचे चुकते की काय! वास्तविक पाहिले तर घटत्वाच्या आधी गगन ते गगनच होते आणि घटत्वाचा त्याला केवळ आकार मिळाला होता. त्या वेळीही ते जसेच्या तसेच आकाशरूपच नव्हते काय! हे पहा! एकदा का हा बोध पक्का ठसला की अर्चिरादी मार्गांचे संकट पडत नाही. ज्याने शरीरीच आपण ब्रह्म आहोत, या ज्ञानाची संपादणी केली, त्या योग्यास मृत्युकाली मार्गामार्गाचे संकट पडत नाही."

"अबंधा नित्य ब्रह्मभावा। विघडु नाहीं"

पुढे श्रीकृष्ण म्हणतातः

ययाकारणें पांडुसुता। तुवां होआवें योगुयुक्ता।
एतुलेनि सर्वकालीं साम्यता। आपणपां होईल।।८-२५६।।
मग भलतेथ भलतेव्हां। देहबंधु असो वा जावा।
परि अबंधा नित्य ब्रह्मभावा। विघडु नाहीं।।२५७।।

"म्हणून हे पांडुपुत्रा! तू योगयुक्त हो, जेणेकरून सर्व काळीं तुझ्याठायी स्वरूपसाम्यता राहील! मग वाटेल त्या वेळी आणि वाटेल त्या परिस्थितीत देहबंध निमाला तरी आणि तो बंध जसाच्या तसा असला तरी, या बंधमुक्त ब्रह्मभावात कधीच बिघाड येणार नाही."

तो कल्पादि जन्मां नागवें। कल्पांतिं मरण नाप्लवें।
माजिं स्वर्गसंसाराचेनि लाघवें। झकवेना।।८-२५८।।
एणें बोधें जो योगी होएं। तेआंसि ययां बोधाचेंचि नीटपण आहे।
कां जैं भोगांतैं पेलूनि पाहें। निजरूपां एं।।२५९।।
पैं गां इंद्रादिकां देवां। जेआं सर्वस्वें गाजति राणिवा।
तैं सांडणें मानूनि पांडवा। डावली जो।।२६०।।

"असा जो योगसंपन्न झाला, तो कल्पारंभी जन्मतही नाही आणि कल्पांती बुडतही नाही; तसेच सृष्टीकाळी स्वर्गसंसारादींच्या मोहाने तो फसतही नाही. असा जो बोध घेऊन ब्रह्मत्वास येतो, तो योगी हा बोध सदासर्वदा नीटरीत्या सांभाळून असतो. कारण त्याने स्वर्ग व संसारातील भोग या ब्रह्मबोधाशी जोखून पाहिलेले असतात आणि इंद्रादिक देवांची सर्वस्व म्हणून असणारी राज्यसंपदा तुच्छ म्हणून त्याने या बोधावरून ओवाळलेल्या बळीप्रमाणे टाकून दिलेली असते."

जऱ्हैं वेदाध्ययनाचें जालें। अथवा यज्ञाचें सेतचिं पिकलें।
कां तपोदानांचे जोडिलें। सर्वस्व हन जैं।।८-२६१।।
तेआं आघविआंचि पुण्याचां मला। भारु आंतौनि जेआं एं फलां।
जैं परब्रह्म निर्मला-। सांठी न सरें।।२६२।।

"हे अर्जुना! यज्ञाचे अगदी शेतच जरी पिकले, वेदाध्ययनाने अथवा तपदानादींनी अगदी सर्वस्व असे पुण्यच पुण्य जरी मिळाले, तरी त्या पुण्याच्या मळ्याला लगटून आलेले फळरूपी भोग वा आनंदाच्या राशीच्या राशी पण त्या निर्मळ परब्रह्माच्या तुलनेला येणे शक्य नाही."

परब्रह्मसुख

जैं नित्यानंदाचें मानें। उपमेचां कांटाला न दिसे साने।
पाहा पां वेदयज्ञादि साधनें। जेआं सुखां।।८-२६३।।
जैं विटे ना सरें। भोगितयाचेनि पवाडें पुरें।
पुढुति महासुखाचें सोएरें। भावंडचि कीं।।२६४।।
आईसें दृष्टीचेनि सुखपणें। जेआसि अदृष्टाचें बैसणें।
जैं शतमखिंहीं आंगवणें। नोहेंचि एकां।।२६५।।
तेआंतैं योगिश्वरें अलौकिकें। दिठीचेनि हाततुकें।
अनुमानिति कवतुकें। तंव हंलुवट आवडे।।२६६।।

"तसे पाहिले तर स्वर्गसुख म्हणजे परब्रह्मरूपी महासुखाचे धाकटे भावंडच असे आहे. नित्य अशा ब्रह्माचा आनंद आणि हे स्वर्गसुख जर उपमेच्या ताजव्यात तोलून पाहिलीत तर कोण मोठे आणि कोण धाकटे हे सहजासहजी कळून येणार नाही. वेद-यज्ञ इ.मोठमोठी साधने केली तर कोठे ते स्वर्गसुख थोडेसे पहायला मिळते! जे अदृष्टाचा आधार आहे; स्वर्गाच्या मुळाशी जे सुख आहे; जे शंभर यज्ञ करूनही प्राप्त होण्यास दुर्लभ आहे; जे सुख उपभोगतांना पुरे असे कधीही वाटत नाही; ज्या सुखाचा कधीही वीट येत नाही; जे पाहूनही दृष्टी सुखावते; अशा त्या अनुपम स्वर्गसुखास योगीश्वरच आपल्या अलौकिक दृष्टीरूपी तळहातावर तोलून त्याची परब्रह्मसुखाशी तुलना करून पाहतात, तेव्हा त्यांना ते किती हलक्या प्रतीचे आहे, ते दिसून येते! सामान्य जनांची तेथे काय मात!"

मग तेआं सुखाचि किरीटी। करूनिआं गां पाउटी।
परब्रह्माचिएं पाठीं। आरूढति।।८-२६७।।
आईसें चराचरैकभाग्य। जैं ब्रह्मेशा आराधनायोग्य।
योगियांचे भोग्य। योगधन जैं।।२६८।।
जैं सकल कलांचि कला। जो परमानंदाचा पुतला।
जो जिवाचां जिव्हाला। विश्वाचिआं।।२६९।।
तो सर्वज्ञतेचा वोलावा। जो यादवकुलींचा कुलदिवा।
तो कृष्णु जी पांडवा-। प्रति बोलिला।।२७०।।
आईसा कुरुक्षेत्रींच वृत्तांतु। संजयो रायासि सांघतु।
तैंचि परियेसा फुडां मातु। ज्ञानदेओ म्हणें निवृत्तिचां।।२७१।।

"असो. योग्यांनी स्वर्गसुखाची अशी वास्तविक प्रतवारी ठरवलेली आहे. त्यांच्याशिवाय हे जाणण्यास कोण इतर अनुभवी आहेत, सांग बरे! अर्जुना! एकदा का या स्वर्गसुखाच्या हीणकसपणाचा असा निर्णय केला की मग तो योगिराज त्या स्वर्गसुखाचीच पायरी करतो आणि थेट परब्रह्माच्या पटावर आरूढ होतो."

"योगमार्गाचा हा असा अमूल्य उपदेश त्या चराचराचे सौभाग्य असणाऱ्या, ब्रह्माशंकरांचे आराध्यदैवत अशा, योग्यांनी भोगण्याचे योगधन अशा, सर्व कळांची कळा आहे त्या, सर्व जिवांचा जिव्हाळा अशा, सर्वज्ञतेचे जो जीवन आहे त्या यादवकुळींच्या कुलदीपक अशा श्रीकृष्णाने अर्जुनास केला. कुरुक्षेत्री घडणाऱ्या घटनेचा हा वृत्तांत संजय धृतराष्ट्रास याप्रमाणे विदित करत आहे आणि निवृत्तिसुत ज्ञानदेव तो आपणा सर्वांना येणेप्रमाणे सांगत आहेत. तो आपण नीट ऐकावा अशी त्यांची इच्छा आहे." असो.

वैदिक विचार

योग्यांची अंतकाळची स्थिती व अंतिमगती यांविषयी गीता काय म्हणते, ते आपण ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून सविस्तर पाहिले. अर्चिरा व धूम्रमार्ग यांचे प्रयोजन कोणासाठी आहे, हे त्यावरून आपणास कळून आले.

गीतेचा योग साध्य करणारा मात्र या मार्गामार्गांच्या यातायातीत न पडता निर्वाण का व कसे ***"याचि देही याचि डोळां"*** प्राप्त करून घेतो, तेही त्या विवेचनाद्वारे आपल्यासमोर स्पष्ट झाले. यातच ज्ञानेश्वरादी भावंडांच्या संजीवन समाधीचे रहस्य साठविलेले आहे. संतांची निर्वाणावस्था व त्यांच्या समाधीचे माहात्म्य यांविषयी थोडी

चर्चा करून आणि मनुष्यांच्या अर्चिरादी यौगिक गतींविषयी वैदिक वाङ्मयात इतरत्र कोणते विचार मांडले आहेत, ते पाहून हा विषय पूर्ण करू!

अर्चिरादी मार्गाविषयीच्या वैदिक वाङ्मयाचे संकलन व त्यावर उत्कृष्ट संकलन व विवेचन *पं.वि.दा.सातवळेकर* या महर्षींच्या ***पुरुषार्थबोधिनी*** या गीतेवरील टीकाग्रंथात आढळते. जिज्ञासूंनी ते मुळातूनच पाहावे. येथे फक्त मूळ वैदिक कल्पनांचा धावता परामर्ष घेऊ या! *पं.गोपीनाथ कविराज* यांनीसुद्धा त्यांच्या ग्रंथांतून या विषयावर समुचित प्रकाश टाकला आहे, हे येथे नमूद करण्यासारखे आहे. असो!

देवयान व पितृयान मार्ग

वैदिक ग्रंथांत ***अर्चिरा*** मार्गास ***देवयान मार्ग*** व ***धूम्र*** मार्गास ***पितृयान मार्ग*** असेही म्हटले आहे. मानवी देहातून बाहेर पडून परत देह धारण न करणे व पुनश्च देहधारणा करावी लागणे असे हे दोन मार्ग आहेत. त्याव्यतिरिक्त तिसरा मार्ग जो आहे, त्यात देहातून बाहेर पडण्याचा प्रश्नच येत नाही. हाच गीतेचा पुरस्कृत योगमार्ग आहे.

मनुष्यदेहप्राप्तीसाठी पाप व पुण्य ही समसमान असावी लागतात. पाप म्हणजे आसुरी वासना व पुण्य म्हणजे शुभ वासना. आसुरी वासना जन्ममृत्यूचे रहाटगाटगे चालवितात, तर शुभ वासनांमुळे मनुष्य ब्रह्मप्राप्तीसाठी तत्पर होतो. ***पुरुषार्थ*** म्हणतात तो हाच की आसुरी वासनांचे नियमन करून - निरोध करून - ईश्वरप्रणिधान करणे व याच देही परमात्मप्राप्ती करून घेणे. ज्या प्रमाणात हे प्रयत्न यशस्वी होतात, त्याप्रमाणे योग्याचे देवयान-पितृयाण यांपैकी कोणत्या गतीने प्रयाण व्हावयाचे ते ठरते.

या मार्गांचे वर्णन थोड्याफार फरकाने ***बृहदारण्यक*** व ***छांदोग्य*** ही उपनिषदे करतात. ***प्रश्नोपनिषद*** सुद्धा ***प्राणमार्ग व रयिमार्ग*** असे अर्चिरा व धूम्रमार्गसदृश दोन मार्ग सांगते. ***मुण्डक उपनिषद देवयान मार्ग* हा आप्तकाम ऋषींचा मार्ग असल्याचे सांगते.** छांदोग्यात ***"एष देवपथो ब्रह्मपथः।।४-१५-५।।"*** असे म्हटले आहे - "देवपथ ब्रह्माला नेऊन पोहोचवतो."

कठोपनिषद म्हणतेः ***"हन्त त इदं प्रवक्ष्यामि गुह्यं ब्रह्म सनातनम्। यथा च मरणं प्राप्य आत्मा भवति गौतम।।६।। योनिमन्ये प्रपद्यन्ते शरीरत्वाय देहिनः। स्थाणुमन्येऽनुसंयन्ति यथाकर्म यथाश्रुतम्।।७।।२-२।।कठ.।।"*** - "मेल्यानंतर आत्म्याची गती कशी होते, ती गुप्त गोष्ट सांगतो. कित्येक आत्मे दुसरा देह धारण करण्यासाठी गर्भामध्ये येतात, तर दुसरे स्थाणु ब्रह्माला प्राप्त होतात. जसे ज्याचे कर्म व जसे ज्याचे ज्ञान, तशी त्याला गती प्राप्त होते."

शुक्ल व कृष्ण अशा जगातल्या प्राण्यांच्या गती आहेत म्हणून गीता जे सांगते, त्याचा उगम ऋग्वेदात असावा. ***"द्वे सृती अश्रृणवं पितृणामहं देवानामुत मातरं च।।ऋ.।।१०/८८/१५/।।"*** - "मनुष्यांच्या देव आणि पितर अशा दोन प्रकारच्या गती होतात असे आम्ही ऐकत आलो आहोत. हे जे मातापितारूपी जगत आहे - जन्ममृत्युवश प्राणी आहेत - ते या दोन मार्गांनी जाते."

ब्रह्मसूत्रे व अंतिम गती

ब्रह्मसूत्रे वा वेदान्तदर्शन व त्यावरील ***शाङ्करभाष्य*** या मार्गांवर अधिक प्रकाश टाकते. जीवात्मा सूक्ष्म तत्त्वांनी युक्त होऊन एका शरीरातून दुसऱ्या शरीरात जातो. मानसेंद्रियादी संघात घेऊन प्राणांसहित आपल्या संकल्पानुरूप तो भिन्नभिन्न लोक व योनी प्राप्त करतो.

शुभकर्मांनी उच्च योनी व पापकर्मांनी हीन योनी प्राप्त होते. पुण्यक्षय होताच स्वर्गलोकातूनही त्यास पुनः मृत्युलोकी जन्म घ्यावा लागतो. इष्टापूर्त व दानादी शुभ कर्मे करणारे धूम्रमार्गे चंद्रलोकास जातात. पापकर्मे करणारे यमलोकास जातात. आपापल्या कर्मांची फळे भोगून हे सर्व जीवात्मे पुनश्च मृत्युलोकी शरीर धारण करतात.

शुभकर्मे करणारे पितृयान वा इतर मार्गे स्वर्गात जातात. ***देवयान व पितृयान हे ऊर्ध्वगतीने जाणारे जे जीवात्मे आहेत, त्यांचे मार्ग आहेत.*** इतर अधोगतीने जाणारे जीवात्मे अन्य मार्गाने आपापल्या लोकात जातात. त्याव्यतिरीक्त अनेक जीवात्मे मृत्यूपरांत कोणत्याही लोकी न जाता येथेच मृत्युलोकी पुन:पुनः जन्मतात व मरतात.

देवयानमार्गाने ब्रह्मलोकी जाणाऱ्यांची शुभाशुभ कर्मे याच लोकी समाप्त होतात.***याच लोकी मुक्त होऊ इच्छिणारे व तसे साधन करणारे कोठेही न जाता न येता येथेच मुक्त होतात.*** परंतु ब्रह्मलोक मिळावा असा संकल्प करणारे तेथे जाऊन नंतर मुक्त होतात. अर्थातच ते देवयानमार्गी होत *(३/३/२८।।).*

बृहदारण्यकः "तस्य प्राणा न उत्क्रामन्ति"

याबाबत ***बृहदारण्यक*** ही असेच म्हणते की ***"योऽकामो निष्काम आप्तकाम आप्तकामो <u>न तस्य प्राणा उत्क्रामन्ति</u> ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति।।४-४-६।।बृह.।।"*** - "जो कामनारहित असतो, निष्काम असतो, पूर्णकाम असतो आणि जो केवळ परमात्मप्राप्तीचाच इच्छुक असतो, ***त्याचे प्राण ऊर्ध्वलोकी जात नाहीत; तर तो ब्रह्म होऊन याच लोकी ब्रह्मास प्राप्त करतो."***

इतर ब्रह्मेच्छु साधक मात्र ***देवयान म्हणजे अर्चि***मार्गाने आपापल्या साधनापथाने जात अंती ब्रह्म प्राप्त करून घेतात ।।३/३/३१।।ब्रह्म.।।

महापुरुषांची गती

वसिष्ठ, व्यास इ.अधिकारप्राप्त ऋषिगणांची अर्चिरामार्गे गती होते किंवा ते याच देहाने ब्रह्मलोकी जातात, या प्रश्नाचे उत्तर देणारे सूत्र असे आहेः ***"यावदधिकारमवस्थितिराधिकारिणाम्।।३/३/३२।।ब्रह्म.।।"*** - "हे जे महापुरुष आहेत, ते अधिकारी असून परमेश्वराच्या आज्ञेने लोककल्याणार्थ प्रकटतात. त्यांचे सामान्य जीवांसारखे जन्ममृत्यू - आवागमनादी नसतात. सर्वसाधारण जीवांपेक्षा त्यांच्या सर्व कर्मांत विलक्षणता व दिव्यता दिसते. ते आपल्या इच्छेनुसार शरीर धारण करू शकतात."

"जोपर्यंत त्यांचे अधिकार अबाधित असतात व कार्य चालू असते, तोवर ते या लोकी तसेच इतर लोकी स्वेच्छेने जाणेयेणे करू शकतात.

त्यांना त्यासाठी अर्चिरादी मार्गांची आवश्यकता नसते. अंती ते परमात्म्यात विलीन होतात. म्हणून इतर साधक व मुक्त पुरुष त्या महापुरुषांपेक्षा कार्य व गती यांबाबत भिन्न असतात."

आचार्य श्रीशंकरपूज्यपाद यांचे हे वरील सूत्रावरील भाष्य आपणास ज्ञानदेवादी संतांचे कार्य व संजीवनसमाधी इ.विषय अभ्यासण्यासाठी फार उपयुक्त आहे. त्याचा विचार नंतर करू!

देवयान वा अर्चिमार्ग

जे देवयानमार्गाने जाणारे आहेत, त्यांच्याविषयी ब्रह्मसूत्रे काय सांगतात, ते पहा: "**ब्रह्मवेत्ता ब्रह्मलोकी जातो. ज्यांनी याच लोकी ब्रह्मसाक्षात्कार करून घेतला आहे, ते येथेच ब्रह्मात लीन होतात. हृदयस्थ परमात्म्याच्या कृपेने *ब्रह्मवेत्ता सुषुम्ना नाडिद्वारे ब्रह्मरंध्रातून लिङ्गशरीराने बाहेर पडतो व सूर्याच्या रश्मीत अवस्थित होऊन ब्रह्मलोकी जातो* (४/२/१७ व १८।।ब्रह्म.।।)."**
[***टीपःसूर्यरश्मी*** - येथे जो हा उल्लेख आहे, तो मागे आपण सागितलेल्या सूर्यमंडलातील गतिनिर्देशक आहे. "***{परमशिवानंतर सूर्यमंडल व चंद्र ->त्यावर चंद्रमंडल* (त्यात षोडषी वा अमाकला आणि निर्वाणकला पराबिंदु त्यात सर्वात्मा व ब्रह्मपद) *चंद्रमंडलावर महावायू ->ब्रह्मरंध्र ->महाशांखिनीविवर ->विसर्ग}"*** हा जो क्रम आपण मागे उल्लेखिला होता, त्यातील सूर्यमंडलाची ही रश्मी आहे. "***भेदिले सूर्यमंडला***" असे जे श्रीरामदासस्वामींनी हनुमंताच्या स्तोत्रात म्हटले आहे आणि वीरगती पावणारे योद्धे सूर्यमंडलास भेदून जातात, असे जे म्हटले जाते, ते सगळे याच **सूर्यमंडल**ास उल्लेखून आहे, हे जिज्ञासूंना आकळावे असेच आहे. असो.]

गीतेतील गती या***कालनिर्देशक*** नसून ***देवतानिदर्शक*** आहेत. त्या योग्यांच्या गती होत; सामान्यांच्या नव्हेत आणि ब्रह्मवेत्त्यांच्याही नव्हेत. अर्थात योग सिद्ध केलेल्या पुरुषांच्या गती गीता सांगते, त्या त्यांनी योग ईश्वरप्रणिधानासह केला किंवा नाही, यानुसार ***शुक्ल*** किंवा ***कृष्ण*** होतात. **ईश्वरप्रणिधानपूर्वक योग साधणारा ईश्वराच्या अनुकंपेने शुक्लगती पावतो. इतर योगमार्गी शुक्ल वा कृष्णगती प्रारब्धानुसार पावतात. ब्रह्मवेत्ता ब्रह्मलोकीच जातो. हा मार्ग विभिन्न नामांनी प्रसिद्ध आहे *(४/३/१।।ब्रह्म.।।).अर्चि, उत्तरायण, देवयान* इ.ती नांवे होत. त्या मार्गाने जाणारे कार्यब्रह्माला जात नाहीत, तर ते परब्रह्मास पावतात. *(४/३/१२।।ब्रह्म.।।).***

"ॐ क्रतो स्मर"

ज्या महापुरुषांनी जीवन्मुक्ती प्राप्त करून घेतली आहे, ते निरंतर परब्रह्मातच स्थित असतात. त्यांचे प्रारब्ध संपले की शरीराचा नाश होतो. तेव्हा शरीर, अंत:करण व इंद्रिये इत्यादी सर्व कलांसहित ते परमात्म्यात विलीन होतात *(४/२/१४,१५ व१६।।ब्रह्म.।।).*

परमात्मप्राप्ती हाच जीवनाचा हेतू आहे. तो ध्यानात ठेवूनच मनुष्याने कर्मे आचरावीत, असा उपनिषदांचा संदेश आहे, हेही जाताजाता सांगितले पाहिजे. ***"ॐ क्रतो स्मर कृतं स्मर क्रतो स्मर कृतं स्मर।।बृहद.।।"*** हा बृहदारण्यकाचा असा जो आदेश आहे, त्याचे पालन करणाराच जीवन्मुक्त होतो!!"

शाङ्करमत

उपनिषदे, ब्रह्मसूत्र, वेद इ.वैदिक वाङ्मयाद्वारे अर्चिरादी मार्गांसंबंधी अधिक विवेचन आपण पाहिले. ब्रह्मसूत्रभाष्यानुसारी श्रीशंकराचार्यांचे मत आपण जे वर पाहिले, त्यानुसार ***शुक्ल व कृष्ण* या गीतोक्त गती *अर्चिरा व धूम्र* या गतीपेक्षा वेगळ्या प्रकारचे प्रयोजन असणाऱ्या आहेत. त्या योगिजनांसाठी सांगितल्या आहेत,** असे त्यांचे मत आहे. अर्थात त्यांचे गीताभाष्य यासाठी पाहणे उचित ठरेल. ***ज्ञानदेव मात्र शुक्लगतीस अर्चिरामार्गच म्हणतात व कृष्णगतीस धूम्रमार्गच म्हणतात,*** हे आपणास विसरून चालणार नाही ***("जन्हें अर्चिरा मार्गु चुकलिआं। अवचटें धूम्रपंथे पडिलिआं ...।।२४४।।")!*** असो.

आचार्य काय म्हणतात, ते पहा: ***"प्रकृतानां योगिनां प्रणवावेशित-ब्रह्मबुद्धीनां कालान्तरमुक्तिभाजां ब्रह्मप्रतिपत्तये उत्तरो मार्गो वक्तव्य इति यत्र काले इत्यादि विवक्षितार्थसमर्पणार्थम् उच्यते। आवृत्तिमार्गोपन्यास इतर मार्ग स्तुत्यर्थः।।८-२२।। गीताभाष्य।।"*** - "ज्यांनी ॐकारात ब्रह्मबुद्धी संपादित केली आहे, ज्यांना कालांतराने मुक्ती मिळणार आहे व येथे *(अष्टमाध्यायी)* ज्यांचे प्रकरण चालू आहे, त्या योग्यांचा ब्रह्मप्राप्तिपर्यंतचा पुढील मार्गक्रम विवक्षित अर्थाने सांगण्यासाठीच गीतेचे ***"यत्र कालेत्वनावृत्तिमावृत्तिं ... "*** इ.श्लोक सांगितले आहेत. पुनरावृत्तीचा मार्गसुद्धा दुसऱ्या मार्गाची ***(अनावृत्तीच्या)*** स्तुती व्हावी, या हेतूने तसा वर्णिला आहे."

गीता हे ***पुनरावृत्ती - अनावृत्ती*** यांचे मार्ग ज्या योग्यांसाठी सांगते, त्यात श्रीशंकराचार्य मते कर्म करणाऱ्या लोकांचा समावेश ती काही विशेष प्रयोजनाने करते.***अग्नी, ज्योती, उत्तरायण* इ.संज्ञा त्या त्या देवतांच्या सूचक आहेत; काल वा वस्तुवाचक नाहीत.**

ब्रह्मवेत्ते शुक्लमार्गाने जाऊन *क्रममुक्ती* पावून ब्रह्मास मिळतात. पूर्णपणे सम्यग्दर्शननिष्ठ जन *सद्योमुक्ती*चे अधिकारी असल्याने त्यांच्यासाठी शुक्ल - कृष्ण इ.मार्गांचे प्रयोजन नाही. *"न तस्य प्राणा उत्क्रामन्ति"* ही श्रुती पण हेच दर्शविते. असे लोक *"ब्रह्मसंलीनप्राण"* म्हणजे ब्रह्ममय -ब्रह्मरूपच असतात, असे आचार्य म्हणतात.

धूम्रमार्गाचा अधिकारी म्हणजे इष्टापूर्तादी कर्मे करणारा कर्मी होय. शास्त्रोक्त कर्मे फलराहित्याने न केल्याने त्यास ही गती प्राप्त होते. शास्त्रनिष्ठेचे आचरण केल्याने त्यास योगी असे स्तुतिपर म्हटले असावे. तो चंद्रम्याच्या ज्योतीस म्हणजे आपल्या इष्टादी कर्मांच्या फलांचा परलोकी उपभोग घेऊन या लोकी पुनः जन्म पावतो.

शुक्लमार्गात ज्ञानप्रकाश असतो. कृष्णमार्गात त्याचा अभाव असतो. या गती जगतासाठी नसून केवळ ज्ञानी व कर्मी अशा योग्यांसाठीच आहेत. शुक्लगती अपुनरावर्ती आहे, तर कृष्णगती पुनरावर्ती आहे. त्यांच्याऐवजी सर्व काळ योगयुक्त म्हणजे समाधिस्थ होणे जास्त योग्य!!

समन्वय

आचार्यांचे हे विवेचन योग्यांचे ***कर्मी व ज्ञानी*** असे दोन भाग कल्पिते. ज्ञानेश मात्र तसे करत नाहीत. ***आचार्य इष्टापूर्तादी कर्मे करणाऱ्यास येथे कर्मी तसेच योगी म्हणतात.*** ज्ञानेश तसे करत नसून त्यांच्या मते असे विभाग दिसून येत नाहीत. ***योगी म्हणजे ब्रह्मोपासक*** **असे ज्ञानेश अध्याहृत धरत आहेत व जो *ब्रह्मसंलीनत्व* अद्याप पावलेला नाही, त्या योगमार्गियास अवचित मृत्युसमयी जो शुक्ल वा कृष्ण मार्ग गवसेल, त्याप्रमाणे त्याची पुढील गतिस्थिती होईल, असे त्यांचे मत आहे.** म्हणून देहातच ब्रह्मत्व प्राप्त करून घेणे योग्य आहे, असे ते म्हणतात.

त्याचप्रमाणे ***"अनन्यचेताः सततं ...।।८-१४।।"*** असे जे भगवंतांचे नित्ययुक्त भक्तयोगी असतात, तेही देहांती श्रीहरिकृपेने भगवत्स्वरूपी लीन होतात. तसे म्हटल्यास तेही देह असतांनाच खरे तर भगवत्स्वरूप झालेले असल्याने ब्रह्मसंलीनत्व पावून जीवन्मुक्त झालेले असतात!

यावरून फार तर असे म्हणू या की **ज्यांनी ब्रह्माची उपासना त्याच्याशी एकरूप व्हावे या संकल्पाने आरंभलेली असते, त्या योग्यांसाठी *शुक्ल व कृष्ण* या गती गीता सांगते. त्यातही ईश्वरप्रणिधानरहित असा योग साधू इच्छिणाऱ्यांसाठी या गती विशेषेकरून गीता सांगते आणि जे कोणतेही योगी *(मग ते ईश्वरप्रणिधान करणारे असोत वा नसोत)* अद्याप जीवन्मुक्ती पावलेले नाहीत, त्यांना हे मार्ग अवचित प्राप्त होतील, तसे घ्यावे लागतात,** हे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. कर्मी वा इष्टापूर्तादी कर्मी यांना कृष्णगतीचे अधिकारी असे ठरवण्याबाबतचे आचार्यांचे मत म्हणूनच आग्रही वाटते, असे म्हणावे लागते.

लाहिडीपरंपरागत विचार::::

महावतार बाबाजींचा गतिविषयक विचार

हा गतिविषयक विचार पूर्ण करतांना अलीकडेच मराठीत प्रसिद्ध झालेल्या ***योगेश्वरी श्रीमद्भगवद्गीता - एक यौगिक व्याख्या*** या श्री.शैलेंद्र शर्मालिखित ग्रंथातील आठव्या गीता अध्यायावरील यौगिक दृष्टीने प्रकाश टाकणाऱ्या काही विधानांचा परिचय करून घेणे अभ्यासकांसाठी मनोरंजक व माहितीपूर्ण ठरेल.

महावतार बाबाजी म्हणून उत्तर भारतात एक प्रसिद्ध योगी व महापुरुष होऊन गेले. ते अजूनही आहेत अशी त्यांच्या शिष्यगणांची श्रद्धा आहे. त्यांची परंपरा ***श्री.लाहिडीमहाशय*** म्हणून जे एक लोकोत्तर योगी होते, त्यांच्याद्वारे श्री.शर्मा यांजपर्यंत येऊन पोहोचली. त्यांच्या मते ***गीतेचा प्रतिपाद्य विषय जरी ब्रह्मविद्या व योगशास्त्र असल्याचे विद्वत्संमत असले, तरीही गीतेवर कोण्या योग्याने केलेली यौगिक व्याख्या विद्वत् समाजात दृष्टीस पडत नाही.*** पण आपल्या माहितीप्रमाणे ***ज्ञानेश्वरांची गीताटीका अशी एक उत्तम बृहद्व्याख्या आहे, जी पुरातन आहे.*** अर्थातच हे श्री.शर्मांना माहीत नसले पाहिजे, असे वाटते. असो.

अशी एकमेव यौगिक व्याख्या सुमारे शंभर वर्षापूर्वी सदर ***श्रीश्यामाचरण लाहिडीमहाशय*** यांनी आपल्या अंतरंगशिष्यांसाठी केली होती. गीतेतील अनुस्यूत असा तेजोमय कालस्वरूप भगवान श्रीकृष्णांचा साक्षात्कार ज्या गीतोक्त योगसाधनेद्वारे करून घ्यावयाचा आहे, तो योगमार्ग पुनश्च श्री महावतार बाबाजी यांनी आपल्या शिष्यांस उपदेशिला.

त्या परंपरेनुसार गीतेतील पुरातन साधनेचे जे यौगिक रहस्य श्री.शैलेंद्र शर्मा यांना प्राप्त झाले, त्याचा समावेश त्यांच्या उपरोल्लेखित ग्रंथात झालेला आहे. त्याचा विशेष विचार करणे हे म्हणूनच गीतेतील योगमार्गाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना भाग आहे. तिकडे वळू या! तरी त्या ग्रंथातील मते पहा!

योगमार्ग

"गीतेतील भगवदोक्त योगमार्ग पुरातन आहे *(श्लोक क्र.४-१,२ व ३).* महापुरुषांकडून व्यक्त केलेल्या योगविद्येचे अवलंबन करून त्या कालस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार करून घेणारे साधक मृत्यूच्या माध्यमातून जन्म घेण्याच्या महद्बंधनातून मुक्त होतात. स्वतःच्या देहाला आधारभूत असणाऱ्या विराट चैतन्यास साधकाने पाहिले पाहिजे *(श्लोक क्र.४-८).*"

"योग्याने कालतत्त्वास शरण जावे व योगकर्माद्वारे स्वतःच्या विराट चेतनेस जागृत करून त्या विराट अव्यक्त चैतन्यकालतत्त्वाशी समरस व्हावे *(श्लोक क्र.४-१०).*"

"मस्तक हे अक्षरब्रह्माची अभिव्यक्ती आहे. ते ब्रह्मरूप आहे. त्याच्या अनंत शक्तींना जागृत करण्यासाठी देहात योगाग्नी प्रज्वलित करून देहालाच हविरूपाने त्यात अर्पण केले असता योगी देह असतांनाच त्या अनंत विराटतेचा साक्षात्कार करून, मृत्यूच्या आधाराने दैहिक मर्यादांच्या अतीत होऊन स्वतः विराटतेप्रत पोहोचतात."

"हा देह, त्यात प्रज्वलित झालेला योगाग्नी, सुप्तचेतना, जागृत चेतना ही सर्व त्या कालतत्त्वाचीच अभिव्यक्ती असल्यामुळे ब्रह्मस्वरूप आहेत*(श्लोक क्र.४-२४).* अव्यक्त कालतत्त्वाचे प्रत्यक्ष दर्शन घडवणाऱ्या ***अंतिम योगक्रमात योनिमुद्रेत स्थिर होऊन प्राणांचे प्राणांत हवन करतात.*** या प्राणायामाला ***ॐकार क्रिया*** असे म्हणतात. ॐकारक्रियेच्या परिणामस्वरूप योगी त्या कालस्वरूप परमात्म्याचे प्रत्यक्ष दर्शन करून त्यास तत्त्वासह जाणतात आणि ***देहयात्रेच्या समाप्तीच्या क्षणी योगसामर्थ्याने देहत्याग करण्याची क्षमता पण या ॐकारक्रियेनेच त्यांना प्राप्त होते."***

"महान परिणाम देणाऱ्या त्या गुह्य पुरातन योगाचा प्रथम उपक्रम म्हणजे **ब्रह्मग्रंथीभेदना**च्या साधनेचा परिणाम भगवान श्रीकृष्ण स्पष्टपणे सांगतात. ***खेचरीमुद्रेत स्थिर होऊन, नेत्र व दृष्टी भ्रूमध्यात स्थिर करून प्राण व अपान यांना एका विशिष्ट प्राणायामाने समान करून साधकाने योगाभ्यासात स्थिर व्हावे.*** म्हणजे तो इंद्रियांच्या पलीकडे असणाऱ्या मन व बुद्धी यांना यथार्थतेने जाणून घेतो. त्याची चेतना विराट होऊन शरीराच्या सीमा पार करून जाते व विराट मस्तकाच्या अनिर्बंध सीमेला स्पर्श करू लागते. असा महापुरुष आपली चेतना विराट केल्यामुळे शारीरिक बंधनातून मुक्त होतो *(श्लोक क्र.५-२७,२८ व २९)."*

"ब्रह्मग्रंथिभेदनाची साधना सिद्ध करून नंतर हृदयात वास करणाऱ्या वासुदेवाला तत्त्वासह जाणण्यासाठी करावयाची ही साधना सांगतांना श्रीकृष्ण म्हणतात की या साधनेची पात्रता लाभलेल्या साधकाने गुरूकडून या गुह्य योगसाधनेचा उपदेश प्राप्त करून घ्यावा. मग एकांतात आणि शुद्ध स्थानी, जे अत्यंत उंच पहाडावर नाही आणि समुद्रकाठीही नाही, अशा ठिकाणी निवास करत असता सर्वात प्रथम दर्भाचे आसन टाकून, त्यावर मृगचर्म व त्यावर रेशमी वस्त्र पसरून, त्या आसनावर बसून हृदयस्थ कालस्वरूप विराटतेला ज्याला ***वासुदेव*** म्हणतात, त्यांना त्यांच्या संपूर्ण विराटतेसह जाणण्याकरता या विशिष्ट योगसाधनेचा अभ्यास करण्यास सुरुवात करावी *(श्लोक क्र.६-१० ते१२)."*

"स्वत:च्या देहाच्या पलीकडे चेतना स्थिर केलेला असा योगी आपल्या देहाला समान करून, तद्योगाने अचल होऊन, नाकाच्या अग्रभागी गळा व शिर यांच्या एका विशिष्ट क्रियेचा अभ्यास करून स्थान व ***दृष्टी स्थिर करून हे अनुष्ठान करत असता शून्यत्वाच्या चेतनेत स्थिर होऊन त्या चैतन्यशून्यतेचा जो भाव त्याला यथार्थतेने जाणून घेतो;*** ती शून्यता पदार्थाला धारण करून तद्बरोबरच पदार्थाच्या गतीला पण आधारभूत आहे आणि पदार्थाला धारण केल्यामुळे सर्व जगताला धारण करणाऱ्या ***भगवान विष्णू*** या नावाने ऋषींनी तिला संबाधिले आहे."

"असे स्थिरत्व पावणाऱ्या महापुरुषास तो ब्रह्मचर्यात स्थिर झाला असे म्हणतात. ज्याचे क्षरण होत नाही, ते ब्रह्म - ***"अक्षरं ब्रह्म परमं"*** - असे भगवंत म्हणतात. हृदयग्रंथिभेदनाच्या या साधनेत तन्मय झालेला योगी आधीच शरीराच्या सीमांतून मुक्त झाल्यामुळे मनाचे नियमन करणारा असा होऊन शरीर असतांनाच मृत्यूच्या पलीकडील स्थिती जाणून, पदार्थाला त्याच्या गतीसह धारण करणाऱ्या त्या चैतन्यशून्यतेच्या चेतनेत स्थिर होऊन शांत होऊन जातो *(श्लोक क्र.६-१३ ते १५)."*

"हृदयग्रंथिभेदनाचा परिणाम ज्याला प्राप्त झाला, अशा योगसाधकाला सर्व जगताचे आधारस्वरूप असणाऱ्या भगवान विष्णूंचा प्रत्यक्ष अनुभव येतो. किंबहुना चैतन्यशून्यत्वाच्या चेतनेला तो तत्त्वासह जाणतो. या अवस्थेप्रत पोहोचल्यावर तो श्रेष्ठ योगसाधक आपल्या गुरूकडून शून्यतेच्या चेतनेत ओतप्रोत अशा त्या कालचेतनेचा परिचय प्राप्त करून घेतो आणि या पुरातन योगक्रमाच्या अंतिम उपक्रमाचा अधिकारी होतो. या साधनेला **रुद्रग्रंथिभेदना**ची किंवा यौगिक भाषेत **मूलाधारग्रंथिभेदना**ची साधना असे म्हणतात. या गुह्य श्रेष्ठ साधनेच्या प्राप्तीनंतर या जगात आणखी जाणण्यासारखे काही उरत नाही *(श्लोक क्र.७-१ व२)."*

"मस्तकाच्या विराट चेतनेला चैतन्य करणाऱ्या या पुरातन योगाला क्रियायोग असे म्हणतात (श्लोक क्र.७-३)."

हा झाला गीतेतील पुरातन योगसाधनेचा महावतार बाबाजीप्रणीत परंपरायुक्त विचार! त्यातील यौगिक परिभाषेचा आपणास पुरेसा परिचय जरी नसला तरी आपण आतापावेतो ज्ञानेश्वरांच्या आधाराने ज्या या विविध योगभूमिकांचा वेगवेगळ्या परंपरांच्या यौगिक परिभाषांसह परिचय करून घेतला आहे, त्याद्वारे श्री.शैलेंद्र शर्मा यांना काय म्हणावयाचे आहे, ते अंतर्यामी जाणून घेऊ शकतो.

परिभाषा तशी वेगळी असली तरीही ***क्रियायोग*** या महावतार बाबाजी-लाहिडीमहाशयपरंपरामान्य गीतोक्त योगमार्गाची ठळक वैशिष्ट्ये व अनुक्रम दिसून येतो, तो असा: ***"कालतत्त्वास शरण जाणे (अनन्यशरणत्व) -➤ योगकर्म -➤ पिंडस्थ विराट चेतनाजागृती -➤कालस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार -➤ विराट चैतन्य कालतत्त्वाशी सामरस्य -➤ अनंत विराटतेचा साक्षात्कार -➤जीवन्मुक्ती."***

[***टीप: (१) विराट अव्यक्त चैतन्य कालतत्त्व, कालस्वरूप परमात्मा व विराट चैतन्य इ. संज्ञांचा विचार*** - येथे श्री.शर्मांनी ज्या या अभिनव संज्ञांचा प्रयोग केला आहे, त्यांचा आपल्या विचारांशी समन्वय करावयाचा तर असे म्हणता येईल की ***कालस्वरूप भगवंत वा तत्त्व म्हणजे परमात्मा, परमेश्वर इ.संज्ञांनी ज्या महत्तम तत्त्वास आपण ओळखतो, ते तत्त्वच होय.*** आपल्या संज्ञाप्रक्रमात त्यांच्याप्रमाणे विराट चैतन्य व कालतत्त्व यांत विशेषसा फरक करता येणार नाही, असे त्यांच्या या संकल्पनांवरून वाटते. तसेच **ते *भगवान विष्णू* म्हणून जे एक तत्त्व सांगतात, ते एक *शून्य*च आहे असे दिसते. कदाचित *महाशून्य अथवा निरशून्य* या आपल्या ज्ञानेशप्रणालीतील संज्ञा त्यांच्या या विष्णुतत्त्वाच्या समांतर मानता येतील असे वाटते. काही यौगिक परिभाषात यासच *महाकुंडलिनी* अथवा *विश्वकुंडलिनी* असे म्हणतात,** असेही समजता येईल. ***श्री. शैलेंद्र शर्मांच्या मते हाच योगाचा परमोच्च साक्षात्कारबिंदु आहे. जो योगसाधक यात स्थिर होतो, तो जीवन्मुक्ती पावतो.***

(२) कुंडलिनी: तसेच त्यांची ***पिंडस्थ चेतना*** तिच्या सुप्त व जागृत अवस्थांसह आपण जिला ***कुंडलिनी*** म्हणतो तीच होय.

(३) ॐकारक्रिया: कुंडलिन्युत्क्रमणाच्या आणि त्यापुढील पंथराजमार्गाच्या क्रियेलाच ते ***ॐकारक्रिया*** असे म्हणत आहेत.]

क्रियायोग व पंथराज

बाबाजीमहाराजांच्या योगकर्माचा मार्गही कसा आहे पहा: ***"योगाग्नी प्रज्वलित करणे -➢ब्रह्मग्रंथिभेदन -➢विष्णुग्रंथिभेदन -➢रुद्रग्रंथिभेदन पिंडस्थ चेतना विराट होऊन तिने विराट मस्तकाच्या अनिर्बंध सीमेस स्पर्शू लागणे -➢ विराट अव्यक्त चेतन कालतत्त्वाशी सामरस्य."***

पिंडस्थ चेतनेचे विराटीकरण करवून तिचे चैतन्यशून्यत्वाच्या चेतनेशी सामरस्य करवणारा हा महावतार बाबाजीप्रणीत योग आहे."पिंडें पिंडाचा ग्रासु" **या ज्ञानदेवांच्या पंथराजविषयक उक्तीशी या क्रियायोगाचे साधर्म्य असल्याचे या विवेचनावरून स्पष्ट व्हावे.** ***"ब्रह्मग्रंथी -➢ विष्णुग्रंथी -➢रुद्रग्रंथिभेदन"*** अशा षट्चक्राधिष्ठित क्रिया त्या दोन्ही योगात स्पष्ट जुळवता येतात.

*[टीपः (१) **ब्रह्मादिग्रंथी व भेदनक्रम*** - शैलेंद्र शर्मांनी त्रिग्रंथिभेदनाचा क्रम ***"ब्रह्मग्रंथिभेदन -➢ विष्णुग्रंथिभेदन -➢रुद्रग्रंथिभेदन"*** असा दिला आहे. त्यातही त्यांच्या एकूण साधनावर्णनावरून दिसते की त्यांच्या मते या ग्रंथी अनुक्रमे ***मस्तक, हृदय व मूलाधारचक्र*** या स्थानी असाव्यात आणि त्यांचा जो भेदनक्रम दिसतो, त्याप्रमाणे प्रथम मस्तकग्रंथी, नंतर हृदयग्रंथी व सर्वात शेवटी मूलाधारस्थ ग्रंथी यांचे त्यांच्या पद्धतीत भेदन होते.

काही योगमतांनुसार या ग्रंथींचा क्रम कधीकधी मस्तक,हृदय व मूलाधार यात या विपरीत सांगतात, तो असा मस्तक -रुद्रग्रंथी, हृदय - विष्णुग्रंथी आणि मूलाधार - ब्रह्मग्रंथी. श्री स्वामी विष्णुतीर्थ महाराज त्यांच्या ***सौंदर्यलहरी*** - हिंदी टीकेत सांगतात की रुद्रग्रंथिस्थान मूलाधार आहे; विष्णुग्रंथी हृदयात व ब्रह्मग्रंथी आज्ञाचक्रात असते. पण ***ललितासहस्त्रनाम***स्तोत्रात असे सांगितले आहे की ***मूलाधारात ब्रह्मग्रंथी, मणिपूरात विष्णुग्रंथी आणि आज्ञाचक्रात रुद्रग्रंथी*** अशा क्रमाने या ग्रंथी असतात *(पृ.क्र.२०८व २०९तत्रैव).*

स्थूल देहाध्यास आणि तमोगुणाच्या योगाने ***रुद्रग्रंथी,*** इंद्रियजनित अध्यास व रजोगुणाच्या योगाने ***ब्रह्मग्रंथी*** आणि अंतःकरणाशी तसेच सत्त्वगुणाच्या योगे ***विष्णुग्रंथी*** अशा या जडचेतनाचा योग करणाऱ्या त्रिग्रंथी असतात. ***तत् तत् अध्यास व गुणजयाचे लक्षण*** म्हणून या ग्रंथी सुटतात किंवा ज्ञानदेव म्हणतात, तशा***"गांठी तिनिं सुटति"*** असे होते. सर्वसाधारण यौगिक मते प्रथम तम, नंतर रज व शेवटी सत्त्वगुणाची गाठ सुटायला हवी. म्हणून असे दिसते की श्री.शर्मांनी दिलेला क्रम त्या विपरीत आहे.

(२)चक्रवेधक्रम - त्याबाबत असे म्हणता येईल की काही यौगिक प्रणाली सर्वप्रथम आज्ञाचक्राचा वेध सांगतात व शेवटी मूलाधार स्वाधिष्ठान यांचा क्रम येतो.***समयाचार व कौलमार्ग*** इ.चे विवेचन करतांना श्रीस्वामी विष्णुतीर्थमहाराज हा भाग स्पष्ट करतात *(सौंदर्यलहरी पृ.क्र.१३ ते १९).* त्यांच्या मते ***कौलाचारी "मूलाधार -➢स्वाधिष्ठान ते ...-➢ आज्ञा"*** **अशा क्रमाने चक्रवेध करतात.** पण ***समयाचारी*** **स्वाधिष्ठानास फक्त प्रदक्षिणा करून पुढे इतर चक्रानुक्रमेण आज्ञाचक्राकडे मार्गस्थ होतात.**

काही ***विहंगम***मार्गाचे उत्तर भारतीय यौगिक संप्रदायिक ***आज्ञाचक्राचा प्रथम वेध करावा असे म्हणतात.*** आज्ञाचक्राचा वेध झाला की इतर चक्रांचा कालमानेकरून आपोआपच वेध होतो, असे त्यांचे व इतरही मान्यवरांचे मत आहे. ***समयाचारी आणि विहंगममार्गी*** **यांच्या मते स्वाधिष्ठानचक्राचा आधी वेध केल्यास साधकास कामवासनेचा त्रास होऊन योगात विघ्न येते.** म्हणून त्याचा प्रारंभिक पायऱ्यांवर वेध करणे निषिद्ध मानले आहे.

ज्ञानेशांचे पंथराजविषयक विवेचन आपण पाहिले, त्यात त्यांनी कोणत्याही चक्रवेधक्रमाचा उल्लेख केलेला नाही. ते फक्त म्हणतात की ***"इडापिंगला एकवटति। गांठी तिनिं सुटति।साही पदर फुटति। चक्रांचे हें।।६-२४४।।"*** त्यांच्या अभंगांतून मात्र चक्रवेधक्रमाचा काही निर्देश प्राप्त होतो. आपण त्यांचा***"उन्मनीं रें लागों नीज। निज बाला सहज। चैतन्याचि पालखि बा। शुद्ध सुमनाचिं सेज।।... ।।अ.क्र.८३७।।"*** हा अभंग पूर्वी पाहिला होता*(उन्मेष ४६:योगपर अभंग पृ.क्र.८२८ व ८२९).* त्यात ***मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनुहत, विशुद्ध, अग्नि (आज्ञा) व सहस्त्रदळ*** या चक्रांचे व स्थानांचे स्पष्ट उल्लेख व क्रम आढळतो. त्यावरूनही असे अनुमान होते की कदाचित त्यांना काही तरी चक्रवेधक्रम असल्याचे मान्य असावे. असो.]

मस्तकात ***(म्हणजे आपल्या संज्ञेतील ब्रह्मरंध्रात)*** विराट चेतनेचा साक्षात्कार करवून घेण्याची व पिंडस्थ चेतनेचे अनंत विराट कालचैतन्याशी सामरस्य घडवून आणून या देहीच जीवन्मुक्तीचा जो सोहोळा भोगणे महावतार बाबाजींस अभिप्रेत आहे, तोच भाग***"निगिजें पूर्विलिआं मोहरां। कीं येईजे पश्चिमेचिआं घरां। ..।।६-१५९।।"*** या ज्ञानेश्वरांच्या ओवीत संक्षेपाने सांगितला आहे, हे जिज्ञासूंना सहजच समजावे!! असो.

इतर यौगिक क्रियांचा जो उल्लेख क्रियायोगात येतो, त्या ज्ञानेश्वरांचे अभंग व ज्ञानेश्वरीतील पंथराज यांचा पूर्वपरिचय करून घेतल्यामुळे आपणास सहजच उमगण्यासारख्या व ज्ञानेशवर्णित योगाशी ***(पंथराजाशी)*** मिळत्याजुळत्या असल्याचे स्पष्ट आहे. आहे ती फक्त काही प्रमाणातील संज्ञाभिन्नता! ज्ञानेश्वर व महावतार बाबाजींचा मार्ग एकच आहे, असे जिज्ञासूंना जाणवल्यास नवल नाही!

यानंतर वळू या श्री.शैलेंद्र शर्मांच्या योगेश्वरी श्रीमद्भगवद्गीतेतील आठव्या अध्यायाच्या विवेचनाकडे!

लाहिडीपरंपरागत अंतगती विचार

श्री.शैलेंद्र शर्मा असे म्हणतात की "कालाचे परमतेज ***("आदित्यवर्णं ..।।८-९।।")*** अनुभवल्यानंतर ***जेव्हा योग्याची शेवटची वेळ येते, तेव्हा तो त्या प्रचंड तेजाचे ध्यान करत करत, काळाला शरण जाऊन, प्राण योगबलाने सुषुम्नेच्या मार्गाने मस्तकापर्यंत उचलून भ्रूमध्यात स्थापित करून देहत्याग करतो आणि त्या महान तेजाशी एकरूप होतो.*** हे योगबल रुद्रग्रंथिभेदनाच्या साधनेचा प्रबळ अभ्यास केल्याने उत्पन्न होते."

"या साधनेद्वारे सर्व आधारांचे आधार असणाऱ्या त्या कालाचे प्रचंड तेज प्रत्यक्ष पहता येते. या विशिष्ट क्रियेला योगी ***ॐकार क्रिया*** असे म्हणतात. **मृत्यूसमयी एका श्वासात २०७३६ वेळा *ॐकारक्रिया* केल्याने ब्रह्मरंध्र फुटते व योगी त्या विराट तेजाशी एकरूप होतो** *(८-१०)."*

(टीप: चांगदेवांनी मुक्ताई तोंडी घातलेल्या ***"एकविस सहस्त्र श्वास वेळोवेळां। बाळा तोहीं डोळां स्थिर करी।अ.क्र.८।।;***उन्मेष५५-*१:योगसारसर्वस्व •क्रमयोगारंभ,पृ.क्र.१०५६)* यातूनही या श्वासप्रश्वासगतीचा काही विशेष संदर्भ येतो, असे योगजिज्ञासुंसाठी सांगितले पाहिजे.)

"जे जन्मभर प्रबल योगसाधना करत राहिले त्या योग्यांसाठी या शेवटच्या योगक्रमाच्या आधारे कालाच्या विराट तेजाचे दर्शन घेणे सुलभ आहे ***("अनन्यचेताः सततं ... ।।८-१४।।")."***

"मृत्यूच्या क्षणी मनुष्य क्षणमात्र कालाचे विकराल तेज, सहस्त्रावधी मेघांच्या गर्जनेसारखा महान अनहतनाद इ. अनुभवतो. विशुद्ध प्रकाशाप्रमाणे झळाळणारे, दीप्तिमान व अत्यंत चमकणाऱ्या सोनेरी विराट गोलाकाराचे व मधोमध गहन निळा रंग असणारे ते कालाचे तेज असते. चैतन्यशून्यतेचे प्रत्यक्ष दर्शन ते हेच! त्या महान ज्योतीच्या केंद्रात महान असा अनाहतध्वनी गूंजत असतो."

"सर्वसामान्य मनुष्यास ते तेज व तो ध्वनी योगाभ्यास केलेला नसल्याने सहन होत नाही व तो त्या तेजात आपली चेतना समरस करू शकत नाही. त्यामुळे स्वर्ग वा नरक असा आपल्या पातळीनुसार अनुभव घेऊन तो पुनर्जन्म पावतो."

"योग्यांनी जिवंत असतांनाच या स्थितीचा वारंवार अनुभव घेतलेला असल्याने ते मृत्यूच्या आधाराने सर्व तेजांचे जे तेज, त्या कालाच्या तेजाशी एकाकार होतात *(८-१६)."*

"त्यांना पुनर्जन्म नसतो *(८-२१)*. जे अव्यक्त कालतत्त्व आपल्या गर्भापासून सर्व सृष्टी व्यक्त करते, ते प्रबळ योगसाधनेच्या योगे अनुभवास आल्यावर त्या कालचेतनेविषयी उत्पन्न झालेल्या ***अनन्यभक्ती***च्या योगे प्राप्त होते *(८-२२)."*

"या जगात ब्रह्मवेत्त्या महापुरुषांनी मानवांच्या दोन गती आहेत असे सांगितले आहे. त्यांस ***शुक्ल व कृष्ण*** असे म्हणतात *(८-२४ व २५)."*

"जे योगी आपल्या मस्तकातील सुप्त क्षमतांना जागृत करून शून्यतेच्या चेतनेला जाणतात, ते तिच्यात ओतप्रोत भरून असलेल्या सूर्याप्रमाणे वर्ण असलेल्या सर्व तेजांचे तेज अशा अव्यक्त कालपरमात्म्याला प्रत्यक्ष पाहतात. त्यांची गती शुक्लमार्गाची होते. हाच त्या अव्यक्त कालरूप अक्षरब्रह्माच्या परम ज्योतिर्मय रूपाचा, आपल्या मस्तकाच्या संपूर्ण विराटतेला चैतन्य केल्यामुळे होणारा साक्षात्काररूपी ज्ञानाचा ज्योतिर्मय मार्ग आहे, ज्या मार्गाने गेलेला योगी पुनः परत येण्यास बाध्य होत नाही."

"परंतु जे योगी स्वतःच्या मस्तकाच्या विराटतेला जागृत करण्याच्या प्रयत्नात योगसाधना करत असता चैतन्यशून्यतेच्या चेतनेला जाणण्यापूर्वीच मृत्यू पावतात, ते सर्व ज्योतींची जी ज्योती, त्या प्रचंड तेजोमय काळाची केवळ एक आंशिक झलकच पाहू शकतात, जी सूर्याच्या तुलनेत चंद्रासारखी आहे. असे योगी पुनः जन्माला येऊन आपले योगकर्म आरंभतात. मस्तकाच्या क्षमता जागृत न झाल्यामुळे कालपरमेश्वराला न जाणले जाऊन जो मार्ग अज्ञानरूपी अंधकाराने भरलेला आहे, त्या मार्गाने जाणारा मनुष्य पुनःपुनःजन्मत असतो."

पण प्रयत्न करणारा योगी मात्र कृष्ण मार्गाने जाऊनही पुनश्च योगकर्म करत राहून जन्मजन्मांतरी शुक्लमार्गाने जाण्यात यशस्वी होतो, असा या विवेचनाचा मतितार्थ दिसून येतो *(८-२६)*.

"जो योगी ज्ञान व अज्ञान या दाहोंना जाणून, किंबहुना स्वतःच्या मस्तकातील क्षमता सुप्त असल्यामुळे त्या अव्यक्त कालाला तो जाणू शकत नाही असे समजून त्या क्षमतांना जागृत करण्यासाठी योगाभ्यास आरंभतो, असा योगी आपल्या योगाभ्यासाचा परिणाम प्राप्त करून कालचेतनेला तत्त्वासह जाणून, कालचैतन्य होऊन, मृत्यूच्या आधाराने मृत्यूपलीकडे जाऊन त्या महाकालाच्या तेजाशी एकाकार होऊन अमृततत्त्व भोगतो ***("योगी परमस्थानमुपैति चाद्यम्।।८-२८।।")."***

ज्ञानेशमताचे समानधर्मा

अशा प्रकारे ***शुक्ल व कृष्ण गती योग्यांसाठीच सांगितल्या आहेत, असे या क्रियायोगपरंपरेचे मत असल्याचे आपणास दिसून येते.*** साधारणपणे श्री.शर्मांच्या ग्रंथातील गीतेविषयक यौगिक दृष्टिकोनाशी समांतर असे मत आपण याच उन्मेषात ***श्री.परमहंस योगानंद*** यांची गीताव्याख्या विचारात घेतांना पाहिले होते *(पृ.क्र.१७० व १७१)*. सर्वश्री योगांनंद व शर्मामहोदय हे दोघेही ***महावतार श्री.बाबाजी*** यांच्या एकाच यौगिक परंपरेतील आहेत, हे विशेष येथे दिसून येते.

या महाभागांची ही मते **श्रीमच्छंकराचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्य व गीताभाष्य, ज्ञानेश्वरी व उपनिषद्विचारां**शी ताडून पाहता ती ज्ञानेशमतांशी फार मिळतीजुळती असल्याचे दिसून येते. श्री.महावतार बाबाजींची श्री.लाहिडीमहाशय तसेच श्री.परमहंस योगानंदांद्वारे प्रवाहित झालेली योगधारा अशी ज्ञानेशमताशी समन्वय पावणारी आहे, हे ज्ञानेशमतातील यौगिक विचारधारेचे जे यापूर्वी आपण आलोचन केले होते, त्याच्याशी जुळवून पाहतांना आपणांस सहज दिसून येते. यापूर्वी याच उन्मेषात आपण ज्ञानेशमत, शाङ्करमत इ.चे जे समालोचन केले होते, त्याकडे जिज्ञासूंची दृष्टी यासाठी पुनः वेधणे सयुक्तिकच ठरेल *(पृ.क्र.१७३ ते १७६)*.

जाताजाता एक विलक्षण योगायोगाची गोष्ट नमूद करणे योग्य ठरेल. हे लेखन मध्यंतरी लेखकाची हृदयशल्यचिकित्सा व्हावयाची असल्याने *(२००१-०२मध्ये काही काल)* स्थगित झाले होते *(पृ.क्र.१७६*

पर्यंत लिहून). ज्ञानेश-शाङ्करमतांचे समालोचन केल्यावर हा शुक्ल व कृष्णगती विषय समाप्त झाल्याचे सूचित होत होते. परंतु सदर शल्यचिकित्सा डॉ. पांडा, M.Ch.(AIMS) M.D.(USA), Ex-Consulting Cardio-Thoracic Surgeon, Jaslok Hospital, now Managing Director and Chief Surgeon -Asian Heart Institute, BKC complex, Mumbai, (ज्यांचे ऋण मानावे तेवढे थोडेच,) यांच्या उत्कृष्ट शल्यविशारदत्वामुळे नीटरीत्या पार पडल्यावर दीड महिना होत असतांनाच श्री.शैलेंद्र शर्मांचा तसेच श्री.योगानंदांचे उपरोल्लेखित ग्रंथ हाती पडले, तेही अचानकपणेच!

रश्मि जवळकर या मूळ ग्रंथाच्या अनुवादकर्त्या! त्यांनी प्रभावी समर्थ भाषेत योगासारख्या गूढ विषयाची काही विशिष्ट जाण असल्यासारखा हा अनुवाद केल्याचे दिसून आले. त्यांचे ग्रंथारंभीचे जे हृद्गत आहे, त्यात त्या म्हणतात की ***"अमृतांतैंहीं पैजां जिंकें"*** अशी ज्या भाषेची गोडी गायिली जाते, त्या मराठी भाषेत *(त्यांच्या)* श्रीसद्गुरूंच्या या श्रेष्ठ ग्रंथाचे पहिले भाषांतर झाले हा केवळ दैवयोग आहे, असे मला *(त्यांना)* वाटते." त्यांनी सद्गुरूमाऊली श्रीज्ञानदेवांच्या वाग्धनाचा आधार घेतला आहे, ते फार लक्षणीय आहे.

आपला हा विषय संपवत असतांना हा उत्कृष्ट ग्रंथ हाती पडावा व जिज्ञासूंना त्यातील विचारधनाचा व योगधारेच्या ***श्री. महावतार बाबाजी*** कृत प्रकटीकरणाचा अंशतः का होईना, योग्य वेळी लाभ व्हावा हाही एक विशेष असा दैवयोगच आहे, अशी माझी मनोमन श्रद्धा आहे! ***आपणावर ज्ञानेशमाऊलीची कृपा आहेच! त्यात त्या थोर महावतार बाबाजींचेही आशीर्वाद आपणास या ग्रंथरूपे असे अचानक प्राप्त झाले! त्यांची ही योगधारा पण ज्ञानेशांच्या योगप्रवाहाशी - गीतेच्या एकमेवाद्वितीय योगप्रणालीशी - किती समानधर्मा आहे, हे जाणून आपण धन्य झालो!!*** त्या श्री.महावतार बाबाजी - लाहिडीमहाशय; परमहंस योगानंद परंपराप्राप्त योगधारेचा असा पर्याप्त परिचय आपणास घडवून देण्यास प्रेरक असणाऱ्या श्री ज्ञानेशमाउलीच्या कृपादृष्टीचे सामर्थ्य आपण वर्णू तितके थोडेच ठरेल!

काल

जिज्ञासूंनी श्री.शैलेंद्र शर्मांचा ग्रंथ मुळातूनच वाचावा असा आहे. त्यांचे कालविषयक हृद्गत येथे दिल्यावाचून राहवत नाही, इतके ते सुंदर आहे. ते म्हणतातः ***"काळाला जणण्यासाठी हे यौगिक पैलू घेऊन मी एकाकी कुठवर देऊ हाक! आणि कोण देईल प्रतिसाद! मी कालमर्यादांनी बांधलेला पाहून कोणास वाटेल काळाच्याविषयी मी काही (का) सांगत आहे!"***

त्यांच्या या हाकेला प्रतिसाद दिल्यावाचून आपण राहूच शकत नाही. कारण ती वैश्विक पातळीवरील, किंबहुना त्याहीपलीकडील ब्रह्मांडाला गंवसणी असणाऱ्या विराट अनंत अशा कालस्वरूप भगवंताचीच हाक आहे!! तसेच त्यांनी ***ब्रह्मा - विष्णु -महेश*** या सदराखाली जे ***"सत्यम् - शिवम् - सुन्दरम्" असे "विश्व - पदार्थ - काल - शून्यत्व - परमाणु - पदार्थाच्या गतीचा विचार - चेतना - चैतन्यशून्यता - परमतत्त्व - समय - काल - शिव - अर्धनारीनरेश्वर"*** यांविषयी विचार प्रकट केले आहेत, ते वाचून आपणास त्यांची आधुनिक भौतिक विज्ञान - गणित - खगोलशास्त्र *(Cosmology and Cosmogony)* यांच्याशी तुलना केल्याविना राहवत नाही.

अगदी नुकतेच Stephen Hawking या आंग्ल खगोलतज्ज्ञांचे *A Brief History of Time* हे अत्युत्कृष्ट पुस्तक वाचनात आले. त्यात आईन्स्टाईनचा सापेक्षतावाद *(Theory of Relativity),* Quantum Mechanics, Modern Physics, ईश्वराचे अस्तित्व व इतर संबंधित विषयांचा विचार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे Modern Physicsमध्ये त्यातल्या त्यात अद्यतन अशा Strings Theoriesसुद्धा विश्वोत्पत्ती, मूलकणांची संरचना, विश्वाचे कार्य-कारण-कर्तृत्व, काल, विश्वातील पदार्थांचे अनेकानेक मितीतून अवलोकन इ.चा विचार करण्यासाठी प्रचलित झाल्या आहेत.

हे सर्व विचार विश्वाच्या मुळाचा शोध घेणारे असून विज्ञानविश्वाच्या अतिविस्तृत क्षितिजावर नुकतेच कुठे भासमान होऊ लागले आहेत. या सर्व विचारधनाचा येथे मागोवा घेणे शक्य नाही. जिज्ञासूंनी आपापल्यापरीने जमेल तेवढा त्यांचा वेध जरूर घ्यावा. पण असे नमूद करणे भाग आहे की श्री.शैलेंद्र शर्मांचे ***"ब्रह्मा - विष्णु - महेश"*** या सदराखाली जे विचार प्रकट झाले आहेत, त्यातील कालविषयक कल्पना आधुनिक विज्ञानाच्या कल्पनांपलीकडल्या पण त्यांच्याशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत. अर्थातच विज्ञान अद्यापही त्यांनी नमूद केलेल्या ***"विशुद्ध शक्ती ते शिव-अर्धनारीनरेश्वर"*** इ. कल्पनांपासून अतिदूरच आहे, हेही निर्विवाद मान्य केले पाहिजे. असो.

समारोप

आतापावेतो आपण हा ***योग्यांच्या महानिर्वाणाचा विषय*** बऱ्याच खोलात जाऊन अभ्यासला. यानंतर ***प्रयाणकालाची गती*** यासंबंधित एक विषय उरला आहे. तो म्हणजे ***ज्ञानदेवादी संतांचे प्रयाण*** कसे झाले हा. तो पुढील ***त्रयोदश स्कंध - योगभक्तिसार*** यातील ***उन्मेष क्र.५२ - सञ्जीवन समाधि*** यातून येणार आहे. तर वळू या त्या महत्त्वपूर्ण आणि आपल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या सद्गुरूमाऊली श्रीज्ञानदेवांच्या जीवनातील अंतिम स्थितीकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::त्रयोदश स्कंध:::

::योग-भक्तिसार::(५२-५६)

(पृ.क्र.९८१ते १०९५)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५२:

ज्ञानेश्वरी:

३:१५५

६:२५०,२५७,२६८,२९६,३२७

१८:१७५४

नामदेव गाथा:८९९,९०२,९०७,९०८,९६५-९६७,९६९,९७६, ९८१,९८४,९८६,९८७,१००४,१०१०-१०१३,१०३१, १०३२,१०३६,१०५७,१०५८,१०६८,१०७३,१०७६,१०८०,१०९१,१०९२,११२९,११५५,११५७,११५८,११७३,११७४,११७७,

दासबोध:१०/७

सि.सि.प.::

२:२६-३०

उद्धृत:शि.शां.कवाडे: लघुग्रंथसप्तक:९८८-९८९

::उन्मेष ५२::

::सञ्जीवन समाधि::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

:::त्रयोदश स्कंध:::
::योग-भक्तिसार::

::उन्मेष ५२::
::सञ्जीवन समाधि::

ज्ञानदेवादी संतांचे निर्वाण::::

संतांचे समाधिनिर्वाण

यानंतर आपण पूर्वी म्हटल्याप्रमाणे ***ज्ञानेश्वरादी संतांच्या संजीवनसमाधी व तत्सम समाधिविचारा***कडे वळू या *(उन्मेष ५१:प्रयाणकाल व गती, पृ.क्र.९७३ ते९७५)*. निवृत्ति, ज्ञानेश्वर व सोपानदेव या भावंडांनी ***संजीवनसमाधी*** घेतल्याचे सुप्रसिद्धच आहे. परंपरेनुसार त्यांच्या जन्मतिथी व समाधी घेण्याचे दिवस पुढीलप्रमाणे आहेत:

१) ज्ञानदेव - जन्म शके ११९३ श्रावण वद्य ८, आळंदी येथे; समाधी शके १२१५, कर्तिक वद्य १३, आळंदी येथे

२) सोपानदेव - जन्म शके ११९६, आळंदी येथे; समाधी शके १२१५, मार्गशीर्ष वद्य १३, सासवड येथे

३) मुक्ताई - जन्म शके ११९९, आळंदी येथे; समाधी शके १२१६, वैशाख वद्य १२, मेहुण (जि.जळगाव) येथे. नामदेवांच्या अभंगांनुसार मुक्ताईंचे समाधिस्थ होणे अथवा अदृश्य होणे वैशाख वद्य१०, शके १२१६, महतग्राम सोमेश्वर येथे घडले.

सर्वात शेवटी समाधी घेतली ती **श्रीनिवृत्तिनाथां**नी. त्यांचा जन्म शके ११९०, आळंदी येथील आणि समाधी शके १२१६, ज्येष्ठ वद्य ११, त्र्यंबकेश्वर येथे झाली. नामदेव आपल्या अभंगांत हीच तिथी ज्येष्ठ वद्य१२ असल्याचे म्हणतात. असो.

मुक्ताईंखेरीज इतर तिन्ही भावंडांनी जिवंतपणीच समाधी घेतली. मुक्ताईंनी अशी समाधी घेतली किंवा कसे याबाबत दुमत आहे. एका प्रचंड वावटळीत मुक्ताई विजेसारखी चमकून अदृश्य झाली असेही मानले जाते.

ही घटना थोड्याफार फरकाने संत श्रीतुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठास जाण्यासारखी वाटते. जरी नामदेव अभंगांतून वेगळे सांगत असले, तरी मेहुण येथे मुक्ताईंची समाधी आहे; तसेच वर दिलेल्याप्रमाणे त्या त्या तिथिविशेषांसच श्रीनिवृत्तिनाथ, ज्ञानदेव आणि सोपानदेव यांचे समाधिउत्सव व यात्रा त्या त्या ठिकाणी परंपरेने होत आले आहेत. असो.

सञ्जीवनसमाधि व पारमार्थिक श्रेष्ठत्व

आपणास या संतांच्या संजीवनसमाधीविषयी जो विचार पहावयाचा आहे, त्याचे मूळ नामदेवांच्या ***श्रीज्ञानेश्वरांची आदि*** *(श्रीनामदेव गाथा -शासन प्रत - पृ.क्र.३२५ ते ३७७)*,***श्रीज्ञानेश्वर समाधिमहिमा*** *(पृ.क्र.३८१ ते४३१ तत्रैव)*,***श्रीज्ञानेश्वरांची समाधी*** *(पृ.क्र.४३५ ते ४५३ तत्रैव)*,***श्रीसोपानदेवांची समाधी, श्रीमुक्ताबाईची समाधि*** व ***श्री निवृत्तिनाथांची समाधी व श्रीचांगदेवांची समाधी*** *(पृ.क्र.४३५ ते ४५३ तत्रैव)* यात आहे.

तसेच योग्यांच्या निर्वाणगतीविषयी गीता-ज्ञानेश्वरीच्या आधारे आपण जे विवेचन पाहिले त्याचे व श्री स्वामी समर्थ रामदासांचा ***दासबोध*** या ग्रंथाचेही त्यासाठी आपणास साहाय्य होणार आहे, एवढेच जिज्ञासूंच्या कानांवर घालून ठेवणे इष्ट होइल. असो. यापुढील विवेचनात येणारे अभंग क्रमांक नामदेवांच्या गाथेतील *(शासनप्रत)* यानुसार आहेत.

परब्रह्माचे ठसे

"तिन्ही देव जैसें परब्रह्मींचें ठंसे। जगीं सूर्य जैसें प्रकाशलें।. *...।।अ.क्र.८९९।।ना.गा.।।"* - नामदेव म्हणतात की निवृत्ति-ज्ञानेश-सोपान ही भावंडे जणू परब्रह्माचे ठसेच आहेत. ते उपजताच ज्ञानी होते.

"ज्ञानराज माझी योग्यांची माऊली। तेणें निगमवल्ली प्रगट केली।। गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मानंदलहरी प्रगट केली।। *....।अ.क्र.९०२।।ना.गा.।।"* - ज्ञानदेवांठायी नामदेवांचा जो भाव होता, तो व ज्ञानेश्वरांची महत्ता प्रकट करणारा त्यांचा हा अभंग प्रसिद्धच आहे. ज्ञानदेवांची पारमर्थिक श्रेष्ठता या अभंगांतून स्पष्ट होते. ब्रह्मानंदलहरी प्रकट करणारे मूर्तिमंत परब्रह्मच असा श्रीज्ञानदेवांचा महिमा ते गातात. हेच त्यांच्या इतर भावंडांविषयीही म्हटले जाते.

"म्हणे तूं ज्ञानशीळ चिद्रूप केवळ। सबाह्य निर्मळ स्फटिक जैसा।।...।।अ.क्र.९०७।।" आणि ***"हांसोनि पंढरीनाथ पाहें नाम्याकडे। म्हणे नवल केवढे भाग्य तुझें।। प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ती ज्ञानेश्वर। करितसे आदर संगतिचा।।***... *।।अ.क्र.९०८।।" ना.गा.।।"* - या अभंगांतून नामदेवांनी काढलेली श्रीविठ्ठलाची साक्षही याबाबत लक्षणीय आहे.

ज्ञानदेवादी भावंडांची पारमार्थिक योग्यता केवढी उत्तुंग होती, हेच नामदेवांचे वरील बोल दर्शवतात. या संतांची ही पारमार्थिक पात्रता व ज्येष्ठता आपण ***संजीवनसमाधी*** या प्रकरणी लक्षात ठेवली पाहिजे, म्हणून हा नामदेवांच्या अभंगाचा उल्लेख!! संजीवनसमाधीचे रहस्य आकळून घेण्यासाठी त्यांची ही विशेष योग्यता लक्षात घेणे आवश्यक ठरते.

दीनपतितांच्या उद्धारार्थ समाधी

ज्ञानदेव समाधी घेऊ इच्छितात. ते विठ्ठलास म्हणतात: ***"ज्ञानदेओ म्हणे विठ्ठलासि। समाधान तूंच होसि। परि समाधी हे तुजपासिं। घेईन देवा।।१।। नलगे मज मुक्ती। तूझां चरणिं आर्ति। थोर आथि।।२।।अ.क्र.९६५।।ना.गा.।।"- "नलगे मज मुक्ती।"*** मुक्ती न मागणाऱ्या ज्ञानदेवांची आर्ती दीनपतितांचा उद्धार करण्यासाठी संजीवनसमाधी घेण्याची आहे. ती विठ्ठलाने जाणली आहे.

तो म्हणतो: ***"आईकें ज्ञानचक्रवर्ति। तूं तंव ज्ञानाचिच मूर्ति। परि पुससि जें आर्ति। कळली मज।।४।। ... म्हणे तुवां घेतली जें आळी। तें सिद्धितें पावेल।।७।।अ.क्र.९६५।।ना.गा.।।"*** - ज्ञानाच्याच मूर्तीस समाधी घेणे हे कसे संभवणार! परंतु तरीही सकल जनांचे हित करण्यासाठी असलेली ज्ञानदेवांची आर्तता पाहून विठ्ठलाने हे असंभवही संभव करून दाखवण्याचे मान्य केले! त्यासाठी त्यांना ***निरंतर समाधी*** देण्याचे आश्वासन दिले *(अ.क्र.९६६ ना.गा.).*

निरंतर समाधी म्हणजेच आपण जिला ***संजीवन समाधी*** असे म्हणतो तीच! त्यासाठी त्यांना विठ्ठलाने अलंकापुरी क्षेत्र नेमून दिले व त्यांनी तेथे ***नित्यरूपसमाधी*** ठेवावी असेही सांगितले. तसेच कार्तिक कृष्ण एकादशीस आळंदीची यात्रा पण ठरवून देऊन म्हटले की दर कृष्ण पक्षी एकादशीस विठ्ठल ज्ञानेशांना भेट देत जाईल *(अ.क्र.९६७ ना.गा.).*

ज्ञानदेवांच्या त्या समाधीचे वर्णन करत नामदेव म्हणतात: ***"धन्य भूमि अळंकापुरी। ज्ञान समाधी खेचरी। करि परिपूर्ण श्रीहरि। स्वयें आपण उभा असे।।२।।"*** - ज्ञानेश्वरांच्या मस्तकी आपले करकमळ ठेवून स्वत: श्रीहरीने त्यांना समाधीच्या स्थानी बसविले *(अ.क्र.९६९ व ९७६, ना.गा.).*

त्यावेळचे वर्णन करत नामदेव म्हणतात: ***"तंव अंतरिक्ष गगनिं। अवचित जालीं वाणी। भक्त तरतील मेदिनी। ज्ञानदेव दरुषणें।।१।। आईसें खवाणी वदलीं। जयजयकारें टाळी पिटिलीं। तंव स्नानसंध्या सारिली। देवभाक्तिं सकळिकीं।।२।। धन्य धन्य वृक्ष अजान। धन्य धन्य सिद्धेश्वरस्थान। ज्ञानदेवा समाधान। आळंकापुरीं।।३।।*** *अ.क्र.९८१।।ना.गा.।।"*

ज्ञानदेव समाधिस्थ झालेले पाहून ***"नामा होतसे खेदक्षीण। ज्ञानदेवाकारणें।।४।।****अ.क्र.९८१।।ना.गा.।।"* असे नामदेवांचे मन विषण्ण झाले.

संजीवनसमाधिस्थाच्या दोन अवस्था

ज्ञानदेव समाधिस्थ झाले तरी त्यांच्या दोन अवस्था होत्या, असे नामदेव म्हणतात:

१)विठ्ठल म्हणतो: ***"तूं करिसि खेद त्याचा। तरी तो माझा आत्मा सांचा। भाव सांडी सांडी द्वैताचा। निखळ स्वरुप पाहें पां।।*** *अ.क्र.९८४।।ना.गा.।।"* - चिदात्मा अशी ही ती ज्ञानदेवांची अवस्था होय. परब्रह्मलीन पावलेली ही अवस्था आहे.

२) तरीही ज्ञानदेवांचे दर्शन झालेच पाहिजे असा हट्ट नामदेव देवाजवळ घेतात आणि ज्ञानदेवांचे दिव्य दर्शन त्यांना घडवत श्रीहरी म्हणतो: ***" मग नामयासि सावध। करूनियां तो गोविंद। म्हणे तुझा पुरविला रे छंद। पैल ज्ञानदेव येत आहे।।४।। नेत्र विकसित पाहें। तंव गगनिं विमान दिसताहे। पुंडलिक गरुड आहे। दिव्य देहीं दिव्य विमानीं।।****५।।अ.क्र.९८६।।ना.गा.।।"* ज्ञानदेवांस पाहून व भेटून नामदेव हर्षित झाले.

"नामदेवें आळंगुनि प्रीतीं। शिर चरणावरी अवचितिं। ज्ञानदेवांच्या ठेवीं पुढति। म्हणे धन्य क्षितीं मी एक।।३।।*अ.क्र.९८७।। ना.गा.।।"* - त्यांना आलिंगून आणि त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून ते धन्य झाले!! नामदेवांना जे हे ज्ञानदेवांचे समाध्युपरांत दर्शन घडले, ते त्यांच्या दिव्य देहाचे! अर्थातच ही ज्ञानदेवांची समाध्युत्तर दुसरी अवस्था म्हटली पाहिजे. दिव्य देहाने असणे हीच ती अवस्था होय.

ज्ञानदेवांची ही समाधिस्थिती वर्णन करणारे नामदेव म्हणतात की, ***"देव म्हणे ज्ञानेश्वरा। चंद्र सूर्य जंव तारा। तुझी समाधि स्थिरा। राहो हें निरंतर।।६।। जंववरी हें क्षितीमंडळ। जंववरी हें समुद्रजळ। मग कल्पक्षयीं यथाकाळ। माझां हृदयीं ठंसावे।।****७।।अ.क्र.१००४।। ना.गा.।।"* - यावरूनही असे दिसून येते की **कल्पांतापर्यंत टिकणारी अक्षय्य अशी समाधी ज्ञानदेवांनी घेतली. तीच पुढे संजीवनसमाधी म्हणून प्रसिद्ध झाली.** याच देहावस्थेत ते आळंदी येथे राहणार आहेत, असे वरील अभंगातून नामदेव सूचित करत आहेत!!!

ज्ञानदेवांच्या समाधीचे ऐश्वर्य

ज्ञानदेवांनी ही जी समाधी घेतली, तिचे माहात्म्य खुद्द विठ्ठलमुखे वदवत नामदेव म्हणतात: ***"देव म्हणे ज्ञानेश्वरा। ... आणिक एक सोपारें। ज्ञानदेव च्यार अक्षरें। जो जप करील निर्धारें। त्यासि ज्ञान होईल।।८।। आईसा दिधला आशिर्वाद। ...*** ।।अ.क्र.१००४।।;"

"देव म्हणे तूं होसि। साक्षात ज्ञानरूप।।६।। ज्ञानदेओ साक्षात नाम तुझें। ते ज्ञान हृदयींचें माझें। हें जन तारावया काजें। तुवां अवतार घेतला।।७।। अ.क्र.१०१०।।ना.गा.।।;"

"मग नेमिलियां तिथी। कृष्णपक्ष अष्टमी समर्थी। नामसंकीर्तन संतसंगति। तो ब्रह्मप्राप्ति पावला।।३।। नवमीं गजर कथेचां। तरी वैष्णव तोचि सांचा। चतुर्भुज होईल हें वाचा। वदोनियां गेलें।।४।। सहज तें दशमी। दिंडी जागरण आश्रमीं। तो येईल वैकुंठग्रामीं। किर्तन करितचि।।५।। एकादशीं श्रेष्ठ गाढी। नामस्मरणें कोटी याग जोडी। एकीं घडी युगाएवढें। एवढें सामर्थ्य इयेंचें।।६।। एकादशीं दिननिशीं। जागरणीं हृषीकेशिं। कीर्तन करीं अहर्निशीं। तरि तो तारील सर्व जनां।।७।। द्वादशीस क्षीराब्दीं। कीर्तन करील आह्लादीं। तो पावन होइल गोविंदीं। निजपदीं विष्णुचां।।८।। त्रयोदशी उत्तम थोर। करिल दिंडी पताका गजर। टाळ मृदंगें झणत्कार। तरि तो सकळ कुळ तारील।।९।। नामा म्हणे चतुर्दिशीं। अमावास्येचां दिवशीं।ज्ञानदेवीं राहेल नेमेंसिं। तरि तो तरेल भूतकाळीं।।१०।। अ.क्र.१०११।।;"

"येथें रामकृष्ण कथा। जो करील सर्वथा। तो पुढें न पवेल व्यथा। बंधनापासोनि सुटेल।।७।। सप्तद्वीप नवखंड। आणि अवघें गणितां ब्रह्मांड। त्याहूनि हें हो उद्दंड। पुण्य जोडेल नामें।।८।। आईसें उत्तमोत्तम थोर। सकळ जीवांचे हें माहेर। नाम घेतां तरति चराचर। दिला वर रुक्मिणिवरें ।।९।।.. ।।अ.क्र.१०१२।।ना.गा.।।;"

"नित्य अनुष्ठान ये तीर्थीं। त्याचें पूर्वज उद्धरिति। जें कां अन्नदान करिति। तें पावति वैकुंठीं।।१।। .. अनंत पुण्य ज्याचें गांठीं। तरीच ज्ञानदेव पडेल दिठीं। जोडें तप कोट्यानुकोटीं। आईसें धूर्जटी बोलिलें।।४।। सिद्ध साधकांचे स्थळ। सर्व तीर्थांचे हेंचि मूळ। वास केलियां सर्वकाळ। महादोष हरतील।।५।। अजान वृक्षातळीं हरिकथा। नित्य जो नर करील तत्त्वतां। तो न जाय यमपंथां। आईसें जगन्नाथें बोलिलें।।६।। द्वारीं सुवर्णाचा अश्वत्थ। नित्य पूजिलियां स्वस्थ। लक्ष्मी न सांडी तेयां सत्य। सकळ आर्ती पूर्ण होति।।७।। नित्य प्रदक्षिणा सप्त। तरी अगाध पुण्य त्वरित। पूर्वज वैकुंठासि जात। बेचाळिसांसहित।।८।। नित्य विष्णुचें पूजन। नित्य नामसंकीर्तन। नित्य वैष्णवसंत भोजन। धन्य पावन इहलोकीं।।९।। अ.क्र.१०१३।।;" ...

ज्या समाधीचा असा महिमा आहे, तेथे पहा: ***"ज्ञानदेव बैसलें समाधि। पुढें अजानवृक्ष निधि। वामभागीं पिंपळ क्षितीं। सुवर्णाचा शोभत।।४।।*** *।।अ.क्र.१००४।।ना.गा.।।"* - या अभंगावरून दिसून येते की **ज्ञानदेवांची समाधिस्थ स्थिती मुख्य नगारखान्याच्या दरवाज्याकडे मुख करून आहे. सिद्धेश्वराचा नंदी उजव्या हातास येतो.**

द्वारी सुवर्णाचा पिंपळ आणि पुढ्यात अजानवृक्षांची बाग असे ज्ञानेशांचे समाधिस्थळ आहे. अजानवृक्ष तेव्हा सर्व बाजूस असतील. पण आता फक्त एकाच बाजूचे राहिले आहेत. सभामंडपाच्या जागी कधीतरी अजानवृक्ष असले पाहिजेत असे या अभंगावरून वाटते.

वरील अभंगांचे सार असे की ***ज्ञानेश्वर - ज्ञानदेव*** या चार अक्षरांचा जप ज्ञान देतो. ज्ञानदेवांचा अवतार भगवंतांनी जनांस उद्धरण्यार्थ घेतला. कृष्ण पक्षातील अष्टमी ते अमावास्या या काळात त्यांच्या समाधिसन्निध नामसंकीर्तन, संतसमागम, कथानिरूपण, दिंडी, जागरण, हरीनामाचा कल्लोळ, नामस्मरण, कीर्तन, टाळ - मृदंग - दिंडी– पताका - गजर इ.करणारा अगणित पुण्य जोडून मुक्ती पावतो. तेथे नित्य अनुष्ठान, अन्नदान इ.करणारे वैकुंठलोकास पावतात.

साधक-सिद्ध या सर्वांसाठी त्यांची समाधी अगणित फळ देते. अजानवृक्षातळी हरिकथा करण्याची थोरी फार आहे. सुवर्णपिंपळाचेही मोठे महिमान आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधीचे दर्शन अनंत पुण्य गाठी असल्याशिवाय होत नाही. ज्ञानेश्वरांचे दर्शन कोटी कोटी तपश्चर्येएवढे पुण्यप्रदायक आहे. त्यांचे दर्शन घेणे हे नित्य विष्णूचे पूजन करणे, नित्य नामसंकीर्तन करणे, नित्य वैष्णवांस व संतांस भोजन घालणे यापरीस पावन करणारे आहे. यासाठीच त्यांनी या लोकी संजीवन समाधी घेतली व अगणित जीवजंतूंवर थोर उपकार केले आहेत; त्यांचे उपकार व ऋण स्मरावे तेवढे थोडेच ठरेल!!

समाधिरहस्य::::

संजीवन समाधीचे योगरहस्य

ज्ञानदेवांच्या संजीवनसमाधीचे रहस्य उकलण्यास साहाय्यक असणारे संत नामदेवकृत काही अभंगांचे उतारे पुढे दिले आहेत:

१) हरिहरविधाता आले आळंकापुरीं। इंद्रायणी तीरीं एक थाटी।।१।। योगियांचा सखा कोठे ज्ञानेश्वर। जाति ऋषीश्वर भेटावया।।२।। शून्याचियां पोटीं निरंजनगुंफा। ज्ञानयज्ञ सोहोपा सिद्ध केला।।३।। उन्मनीं निद्रा लागलिसें फार। स्वरूपीं ज्ञानेश्वर जागा झाला।।४।। नामा म्हणे देवा भली केली बुद्धी। लागली समाधि ज्ञानदेवा।।५।। अ.क्र.१०३१।।ना.गा.।।

२) लागली उन्मनी वैराग्याचि धूणी। जागा निरंजनीं निरंतर।।१।। भूचरी खेचरी चाचरीच्या छंदें। अगोचरीच्या नादें सहस्त्रदळीं।।२।। औटहातध्वनि (अनुहातध्वनी) चित्तवृत्ति जेथें। उजळलीं ज्योत चैतन्याचिं।।३।। नामा म्हणे देवा करा सावधान। नाहीं देहभान ज्ञानदेवा।।४।। अ.क्र.१०३२।।ना.गा.।।

योगशास्त्रदृष्टीने ज्ञानदेवांच्या चिरंतन समाधीचे यौगिक रहस्य सूचित करणारे हे दोन अभंग फार महत्त्वाचे ठरतात. सांप्रदायिकांचे जे मत आहे ते असे की आळंदी येथील त्यांच्या समाधिस्थळी ज्ञानदेव आजही आपल्या मूळ स्थूलदेहासह विद्यमान आहेत, त्यास हे अभंग पुष्टिकर होतात.

देह त्यागून ब्रह्मीभूत होणारे ***शुक्लमार्गी योगी*** व **देहीच ब्रह्मत्व पावल्यावर प्रकृतिचेष्टेनुसार आपल्या स्थूलदेहाचा त्याग करत ब्रह्मी घटाकाशाने महदाकाशात घट फुटल्यावर मिळून जावे तसे एकरूपत्व पावणारे *जीवन्मुक्त योगी*** या दोहोंपेक्षा ज्ञानदेवांनी वेगळाच मार्ग स्वीकारलेला दिसतो.

हरिहर-ब्रह्मा यांचे या लोकीचे अवतार म्हणजे ज्ञानेश-निवृत्ति व सोपानदेव हे तिघे महापुरुष होत. ज्ञानेश्वर तर योगिजनांचे सखे असेच होते! त्यांनी देहाचा त्याग न करता चिरंतन समाधी घेतली असे नामदेव सूचित करत आहेत. ***देहीच ब्रह्मत्व पावलेले, प्रत्यक्ष परब्रह्माचाच ठसा असे ते होते. घटाकाश महदाकाशाशी घट न फुटताच मिळालेले असते. त्यासाठी घट फुटणे आवश्यक नाही.***

या दृष्टांताप्रमाणेच अशा योगिराजांस देह ठेवणे वा न ठेवणे काहीच कर्तव्य नसते. परंतु ***"देखें प्राप्तार्थ जाहालें। जैं निष्कामता पावलें। तेआंहिं कर्तव्य असें उरलें। लोकांलागिं।।३-१५५।।"*** या ओवीनुसार त्यांचे कर्तव्य इतरांस तारणे हेच ठरते. हेच आपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी घट भंगू न देता, **स्थूलदेहासह विद्यमान राहून या लोकी ज्ञानदेवांनी *संजीवनसमाधी* घेतली!!**

शून्य-निरशून्यापलीकडील निरंजनगुंफेतील समाधी

शून्य-निरशून्य यांपलीकडे **निरंजन तत्त्व** वसते, ते या देहींच! शून्याच्या पोटीच्या ***निरंजनगुंफेत*** ते वसते असे नामदेव म्हणतात.

उन्मनीत चिरयोगनिद्रेत पहुडलेले ज्ञानदेव त्या समाध्यवस्थेतून थेट स्वरूपावस्थेत पोहोचले! याच देहास साक्ष ठेवून त्यांनी *निरंजन अवस्था* प्राप्त करून घेतली. तेथे सर्वदा वास करून ते सतत आपल्या भक्तांवर तसेच इतर सामान्य जनांवर आपली कृपादृष्टी ठेवत असतात. स्वरूपी चेतनाजागृतता सतत ठेवत त्यांचे हे जगदुद्धाराचे कार्य अविरत चालूच आहे. हे असेच व्हावे अशी आर्ती त्यांनी पंढरीनाथापुढे व्यक्तवली होती, हे आपणास माहीतच आहे *(अ.क्र.९६५,ना.गा.).*

ज्ञानेशांच्या या असामान्य समाधीचे इतर यौगिक पैलू पण नामदेवांनी सांगितले आहेत. वरील अभंगांत ते स्पष्टच म्हणतात की ***उन्मनी अवस्था म्हणजे वैराग्याची धुनी आहे.*** बैरागी जसे धुनी पेटवून तिच्या सान्निध्यात ध्यानस्थ बसतात, तसेच ***योगीही उन्मनीच्या सान्निध्यात निरंजनाच्या चैतन्यमय ज्योतिस्वरूपाच्या ध्यानात तल्लीन होऊन जातात.***

भूचरी, खेचरी, चाचरी, अगोचरी व उन्मनी **अशा योगशास्त्रोक्त पंचमुद्रांच्या सामर्थ्याने *अनाहतनाद* जेथे दुमदुमतो, ते *सहस्त्रदळपद्म* ज्ञानदेवांनी स्वाधीन करून घेतले आणि ॐकारासह चित्तवृत्ती ज्यात लय पावतात ती *चैतन्याची ज्योती* - ज्योतींची निजज्योती उजळून घेत तिच्या प्रकाशात निरंजनी ठाव मांडला आहे!**

उन्मनीत निद्रिस्त झालेला हा योगियांचा राणा निरंजनाच्या जाणिवेने जागृत होऊन आळंदीस ठेला आहे!! त्याला देहाचे भान तिळमात्रही उरलेले नाही, असे पण नामदेवांनी सूचित केलेले आहे व त्यांचे हे विधान ***ज्ञानदेव त्यांच्या समाधिस्थली स्थूलदेहासह विद्यमान आहेत*** असे सूचित करत आहे!!

"अष्टोत्तरशें वेळां। साधिली समाधि"

आळंदी वा अलंकापुरी या क्षेत्री ज्ञानदेवांनी युगानुयुगे समाधी घेतली असल्याचेही नामदेव सूचित करतातः ***"पुसताती संत सांगा देवा मातें। पूर्वी येथें होते कोण क्षेत्र।।१।। देव म्हणे स्थळ सिद्ध हें अनादि। येथेंच समाधि ज्ञानदेवा।।२।। अष्टोत्तरशे वेळां साधिली समाधि। आईसें हें अनादि ठांव असे।।३।। नामा म्हणे देवा सांगितलें उत्तम। ज्ञानअंजन सुगम देखें डोळां।।४।।*** *अ.क्र.१०३६ ।।ना.गा.।।"* - पांडुरंग सांगतात की कल्पांमागून कल्प झाले. प्रत्येक वेळी ज्ञानदेवांचा अवतार झाला व त्यांनी याच क्षेत्री अशीच समाधी घेतली.

असे एकशेआठ वेळा म्हणजे अगणित वेळा घडत आले आहे. प्रत्येक युगी अशा प्रकारे ज्ञानदेव जडमूढांस उतरवून नेणारे तारू झाले आहेत. अज्ञान्यांस स्वप्रकाशाची दिशा दाखवणारे दीपगृहच जणू ते आहेत!

एकशेआठ वेळा यात दुसराही अर्थ आहे. पांडुरंग ***"युगे अठ्ठावीस विटेवरी ठेला"*** असे म्हणतात. हे **युग म्हणजे *महायुग.*** सत्य, त्रेतादी चार युगांचे मिळून एक महायुग होते. अशी सत्तावीस महायुगे झाली आहेत. अशा सत्तावीस महायुगांची एकूण युगसंख्या एकशेआठ होते. त्याचाही संदर्भ या ओवीस असावा. अज्ञान्यांस स्वप्रकाशाची दिशा दाखवणारे दीपगृहच जणू ते आहेत!

त्यांच्या या अविरत चाललेल्या कार्याविषयी - त्यांच्या दीनपतितांना उद्धरून नेण्याच्या ब्रीदाविषयी नामदेव काय म्हणतात पहाः

१) तिघां जणांलागिं केलें समाधान। सांघितली खूण अंतरीचि।।१।। कलियुगीं जग अत्याती करिति। साहवेना कीं यासि कांहीं केल्या।।२।। पापी ऊद्धरिलें पतित तारिलें। जड ते लावलें मोक्षपंथीं।।३।। नामा म्हणे याचें करितां समाधान। कळलें अंतःकरण मन याचें।।४।। अ.क्र. १०५७।।ना.गा.।।

२) निसंगासि संग न लगे आणिकाचा। परमार्थ हा सांचा गहन केला।।१।। जड या जीवाचें हरविलें अज्ञान। नेलें उतरून भवसिंधु।।२।। ज्ञानियासि केली सिंधुसंजीवनी। जालें जनीं वनीं एक तारु।।३।। नामा म्हणे सत्य बा माझ्याचें बोलणें। करी निंबलोण पदीं त्यांचें।।४।। अ.क्र. १०५८।।ना.गा.।।

ज्ञानेश्वर समाधी घेणार म्हणून निवृत्ति-सोपान-मुक्ताई तिघेही विषण्ण झाले. त्यांचे समाधान करणाऱ्या पांडुरंगाने ज्ञानेशांचा समाधी घेण्यामागील उद्देश स्पष्ट केला. कलियुगी जन जे बुडताहेत, त्यांचा कळवळा घेऊन ज्ञानदेवांनी अनेक पापी व पतित तारले; अगणित जड जीवांना मोक्षपंथ दिला. अनंतर असेच कार्य आपल्याकडून घडावे अशा आर्ततेने ते ***संजीवन समाधी*** घेतात.

जड जीवांचे अज्ञान घालवणे; आत्म्याचे निःसंगत्व त्याना जाणवून देऊन त्याचा साक्षात्कार घडवून आणणे; त्यांना भवसिंधूपार नेण्यासाठी आपण तारू होणे; ज्ञानी जनांस संजीवनी देणारा सिंधू होऊन ठाकणे, हे त्यांचे कार्य समाधिरूपाने चालूच असणार आहे, असे त्रिवार सत्य नामदेव उच्चारत आहेत!!

ज्ञानदेव समाधी घेतात

ज्ञानदेव अशी जी समाधी घेतात, तिचे वर्णन नामदेवांनीच करावे! ते म्हणतातः

१) अष्टोत्तरशें वेळां समाधि निश्चळ। पूर्वी तुझें स्थळ वाहनाखाली ।।१।। उठविला नंदी शिवाचा धवळा। उघडिली शिळा विवराची।।२।। आसन आणि धुनी मृगछालावरती। पाहाति ऋषीश्वर वोसंडोनि।।३।। बा माझी समाधि पहिली जुनाट। केवळ वैकुंठ गुह्यगोप्य।।४।। नामा म्हणे देवा पुरातन स्थान। आईसें नारायणें दावियेलें।।५।। अ.क्र.१०६८।।ना.गा।।

२) ब्रह्मादिक तेथें करिताति पूजा। घालिताति सेजा समाधिसि।।१।। चिद्रत्न आसन उन्मनीचि धुनि। समाधि सज्जनिं पाहियेलीं।।२।।धुवट वस्त्राचि घडी ते अमोल। तुळसि आणि बेल आंथरिलें।।३।। दुर्वा दर्भ वरी टाकिलें मोकळें। पुष्पें ती सकळें समर्पिलीं।।४।। नामा म्हणे येथें छाया निरंतर। सुखी ज्ञानेश्वर सुखावला ।।५।। अ.क्र.१०७६।। ना.गा.।।

३) देव आणि निवृत्ति यांनी धरिलें दोनिं कर। जातो ज्ञानेश्वर समाधी।।१।। नदीचियां माशां घातिलें माजवण। तैसें जनवन कालवलें।।२।। दाहीं दिशा धुंद उदोअस्ताविण। तैसेचि गगन कालविलें।।३।। जाऊनि ज्ञानेश्वर बैसलें आसनावरी। पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली।।४।। अ.क्र.१०९१।।ना.गा.।।

४) ज्ञानदेवालागिं चंदनाचि उटी। पंचारति होति आनंदाच्या। गंध आणि अक्षता पुष्प परिमळा। घेति वोसंगळा नामदेव।।२।। ज्ञानदेव स्वस्थ देवा वोसंगळा। माळां घालिति गळां ज्ञानदेव।।३।। अ.क्र.१०७३ ।।ना.गा.।।

५) पुढें ज्ञानेश्वर जोडोनियां कर। बोलतो उत्तर स्वामीसंगें।।१।। पाळिलें पोसिलें चालविला लळा। बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा।।२।। स्वामिचियां योगें जालों स्वरुपाकार। उतरलो पार मायानदी।।३।। अ.क्र.१०८०।।ना.गा.।।

६) ***निवृत्तिने हात उतरिला वदना। त्यागिलें निधाना आम्हांलागिं ।।४।। नामा म्हणे देवा देखवेना मज। ब्रह्मीं ज्ञानराज मेळविला।।५।।*** अ.क्र.१०८०।।ना.गा.।।

७) ज्ञानदेव म्हणे सुखीं केलें देवा। पादपद्मीं ठेवा निरंतर।।५।। तीन वेळां जेव्हां जोडिलें करकमळ। झांकियेलें डोळें ज्ञानदेवें।।६।। <u>भीममुद्रा</u> डोळां निरंजनी लीन। जालें ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव।।७।। नामा म्हणे आतां लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ।।८।। अ.क्र.१०९१।।

८) निवृत्तिने बाहेर आणिलें गोपाळा। घातियेली शिळा समाधिसि।।१।। सोपान मुक्ताई सांडिति शरीरां। म्हणति धरा धरा निवृत्तिसि।।२।। आणिकांचि तेथें उद्विग्न ती मनें। घालिताति सुमनें समाधिसिं।।३।। नामदेवें भावें केली असे पूजा। बाप ज्ञानराजा पुण्यपुरुषा।।४।। अ.क्र.१०९२।।

नारायणाने सांगितले की "सिद्धेश्वराच्या नंदीखाली अत्यंत पुरातन स्थानी ज्ञानदेवांनी यापूर्वी एकशेआठ वेळा समाधि घेतली आहे. <u>हे स्थान म्हणजे विष्णूचे प्रिय असे भूलोकीचे वैकुंठच जसे आहे</u>! ब्रह्मादी देवसुद्धा त्यांच्या समाधीची पूजा करतात."

तेथे उन्मनीरूपी धुनीजवळ मांडलेले ज्ञानदेवांचे चिद्रत्न आसन पाहून संतसज्जन धन्य झाले. अमोल वस्त्राची धुवट घडी व त्यावर तुळशी, बेल, दुर्वा व दर्भ आच्छादून त्यावर त्या संतांनी विविध पुष्पे अर्पिली. निरंतर सावली देणाऱ्या त्या स्थानास पाहून ज्ञानेश सुखावले.

देव विठ्ठलराज आणि निवृत्ति यांनी ज्ञानदेवांचे कर आपल्या हाती घेतले व त्यांना समाधीच्या जागी नेऊ लागले. ज्ञानेश्वर आता कायमचे आपल्या दृष्टीआड होणार हे ओळखून आसमंत हेलावून गेला! ज्ञानदेवांना चंदनाची उटी लावलेली होती. गंध, अक्षता व पुष्पे यांनी विनटलेले ज्ञानराज पाहून नामदेवांनी त्यांच्या गळ्यात हार घातले; आनंदाची पंचारती ओवाळली.

दोन्ही कर जोडून ज्ञानदेवांनी निवृत्तीस नमस्कार केला. ते म्हणाले, "हे स्वामी! हे कृपाळू निवृत्तिराजा! तू माझे पालनपोषण केलेस! माझे लळे पुरवलेस! तुझ्यामुळे मी स्वरूपाकार झालो अन मायानदीच्या पैलथडीला लागलो. तुला हे माझे अखेरचे वंदन आहे!"

निवृत्तिनाथांचा शोक

निवृत्तिनाथ खिन्न झाले. हनुवटीखाली हात ठेवून स्तब्ध बसून राहिले. *"आमचे हे निधान आमचा त्याग करून जात आहे"* असा विचार मनी येऊन ते शोकाकुल झाले. ज्ञानदेव त्यांना समजावत म्हणू लागले, *"देवा! निवृत्तिराया! तू मला अपार सुखी केले आहेस! तुझ्या पादपद्मी माझा निरंतर वास असू दे! मी तुला सोडून कोठेही जाणार नाही!!"* असो म्हणून ज्ञानेश्वर आसनावर जाऊन बसले.

त्यांच्या पुढ्यात ज्ञानेश्वरी ठेवली होती व तिचा नवम अध्याय उलगडलेला होता. त्रिवार नमस्कार करून ज्ञानदेवांनी डोळे मिटले. ***<u>भीममुद्रा</u> लावली. पंचमुद्रांचा समन्वय करणारी ही मुद्रा लावताच ज्ञानदेव निरंजनी लीन झाले; ब्रह्मत्वपूर्ण झाले!*** ज्ञानराजांचे ते ब्रह्मी मिळणे नामदेवांस पाहवेनासे झाले! ते म्हणू लागले,"बापा ज्ञानेश्वरा! तू समाधिस्थ झालास! दिनकरच लोपला ! आता आम्ही काय करावे!"

ज्ञानदेवांच्या समाधीबाहेर सगळे पडले. गोपाळास*(विठ्ठलास)* हात धरून निवृत्तींनी बाहेर आणले आणि त्यांनी समाधीची शिळा जागेवर बसवली. सगळ्यांची मने उद्विग्न झाली. मुक्ताई आणि सोपानांनी तर जमिनीवर अंगच लोटून दिले. निवृत्तींचा तर काहीच ठिकाणा लागेना, इतके ते सैरभैर झाले! जन खिन्न मनाने समाधीस पुष्पे वाहू लागले; नामदेवांचे भाव उचंबळून आले आणि ते समाधीची पूजा करत बसले. पुण्यपुरुष बापा ज्ञानराजांच्या समाधीचे हे असे अत्युत्कट भावपूर्ण वर्णन नामदेव करतात.

नामदेवांचे समाधीवरील अभंग

आतापावेतो केलेल्या विवेचनावरून ज्ञानदेवांनी घेतलेल्या संजीवनसमाधीचे खरे स्वरूप जिज्ञासूंस सहजच आकळले असेल! या प्रकारच्या संतसमाधीचा योगदृष्ट्या विचार पूर्ण करण्यासाठी मुक्ताई, निवृत्ति इ.संतांच्या समाधीबाबत नामदेवांच्या अभंगांतून आलेले काही योगविषयक वैशिष्ट्यपूर्ण वाटणारे निर्देश पाहू या.

सोपानदेवांची समाधी

१) समाधि पायरीवरी वटेश्वर सोपान। मागितला मान पांडुरंगा।।५।। प्रतिवर्षी भेटी देऊं उभयतां। आळंकापुरीं जातां उत्सवासि।।६।। नामा म्हणे देवा कृपा केली फार। दिधला कीं वर भक्तराजा।।७।। अ.क्र.११२९।।ना.गा.।। – सोपानांस समाधीवर विठ्ठलाने दिलेले हे आश्वासन सूचक आहे. रुक्मिणीसह विठ्ठल दरवर्षी आळंदीच्या उत्सवास जातांना त्यांना भेटणार आहे. संत स्थूल देहासह समाधी घेऊ शकतात. ज्ञानदेवांनी अशीच समाधी घेतली होती.

त्याबाबत योगशास्त्रदृष्ट्या केलेले विवेचन आपण नुकतेच अवलोकिले आहे *(पृ.क्र.९८१ ते ९८५).*

चांगदेवांची समाधी

१) संतसमागम फळला तुजला। एकांत फावला मुक्ताई।।४।। मसुरेप्रमाणे दावियेली खूण। तेंचि पूर्ण ब्रह्म योगियाचें।।५।। अ.क्र.११५५।।ना.गा.।।

२) झांकियेलें नेत्र उन्मनीच्या संगें। निवृत्ति पांडुरंग ओसंडलें।।५।। नामा म्हणे झाला समाधिस्थ योगेश्वर। निघाले बाहेर देवभक्त।।६।। अ.क्र.११५७।।ना.गा.।।

३) ***भूचरी खेचरी चांचरी*** **निश्चळा।** ***अगोचरी*** **डोळां स्थिरावली ।।१।। झांकिली समाधि संतसज्जनांनी। तुलसिपुष्पें वरूनि वर्षताति।।२।।**अ.क्र.११५८।। - चांगदेवांच्या समाधीसंदर्भात नामदेव पुनः योगमुद्रांचा ***उन्मनी-भूचरी*** **इ.पंचमुद्रांचा -** ***संजीवन समाधी*** घेतेवेळी होणारा प्रयोग उल्लेखत आहेत. ज्ञानदेवांच्या समाधिप्रकरणीसुद्धा असाच या मुद्रांचा उल्लेख त्यांनी केलेला आपण पाहिलाच आहे.

"कडाडली वीज निरंजनीं जेव्हा। मुक्ताई तेव्हां गुप्त जाली"

मुक्ताईचे निरंजनाशी एकरूप होणे मात्र वेगळे आहे. संत श्रीतुकाराम सदेह स्वर्गास गेले, त्याप्रमाणे ते आगळेवेगळे आहे. मुक्ताई विजेसारखी निमिषार्धात अदृश्य झाली असे नामदेव म्हणतातः

१) निवृत्तिने केला एकांत मुक्ताईशी। गमन कोणे दिवशीं आरंभिलें।।१।। ***मुक्ताई म्हणे जावें येवें कोठें। अवघें निघोट स्वरूप स्वामी।।२।।*** **गर्जतां गगन कडाडली वीज। स्वरूपिं सहज मिळयेली।।३।। मावळला दीप ज्योत होति कोठें। सहज सामावति निरंजनीं।।४।। नामा म्हणे हरि जाईल पाहतां। आईसें माझें चित्तां कळों आलें।।५।।**अ.क्र.११७३।।ना.गा.।।

२) आमुच्या स्वस्थानीं नाहीं पां आंधार। अवघीं चराचर प्रकाशत्वें।।१।। उदयु अस्तु नाहीं स्वरूपासिं। आईसें मुनि ऋषि जाणितााति।।२।। आम्हीं कधीं आलों स्वरूप सोडोनि। जावें पालटूनि जेथिल तेथें।।३।। **आंत बाहेर स्वरूप स्वामीचें।** ***स्वयें नंदादीप उजळिला।।४।।***अ.क्र.११७४।।

३) कडाडली वीज निरंजनीं जेव्हां। मुक्ताई तेव्हां गुप्त जालीं।।३।। वैकुंठीं लक्ष घंटा वाजति एकघाईं। जालीं मुक्ताई स्वरूपाकार।।४।। एक प्रहर जाला प्रकाश त्रिभुवनीं। जेव्हां निरंजनीं गुप्त जालीं।।५।। गेलें निवारूनि आकाश अभूट। नामा म्हणे कोठें मुक्ताबाई।।६।। अ.क्र.११७७।।

"घटाकाश चिदाकाशापासून वेगळे केव्हा असते, तर त्याने त्याच्यात मिसळून जावे! स्वरुप सोडून आपण कोठे गेलोच नाही, तर स्वरूपी पुनः मिळावे असे कसे म्हणावे!" ज्ञानदेवांच्या ***चिद्विलासवादाचा हा अत्युत्कर्ष परमबिंदु*** मुक्ताईच्या मुखे नामदेव ऐकवत आहेत!!!

"दीपाबरोबर ज्योतही मिटून जाते, तसेच सहजपणे निरंजनी समावणे आहे. त्यासाठी वेगळा खटाटोप नकोच! चर व अचर सगळेच प्रकाशाने भरलेले आहे. आपल्या स्वस्थानी अंधार नाही. मग तो येथे तरी कसा असेल! वस्तूला उदय आणि अस्त दोन्ही नाहीत. वीज कडाडते, गर्जते, आकाशी प्रकट होते आणि तशीच आकाशीच्या आकाशीच मिळून जाते!"

मुक्ताईचे हे बोल ऐकून नामदेवांनी मनाशी खूणगाठ बांधली की ही मुक्ताई पाहता पाहता निघून जाणार आहे. ***अंतर्बाह्य नंदादीपाचा प्रकाश असणारी आत्मस्वरूपाकार अशी ती मुक्ताई खरेच तशीच अदृश्य झाली! एक लक्ष घंटांचा एकदम नाद झाला! मुक्ताई स्वरूपाकार झाली तेव्हा एक प्रहरभर तिन्ही लोकी प्रकाश पसरला!*** पुनः आकाश जसेच्या तसे अफूट झाले! नामदेव म्हणतातः "आता मुक्ताईचे दर्शन पुनः कसे होणार! ती तर कोठच्या कोठे निघून गेली!"

"न तस्य प्राणा उत्क्रामन्ति"

योग्यांचा देहत्याग, शुक्लकृष्णगती, संतांचे संजीवनसमाधी घेणे इ. विचार आपण पाहिले. त्या संदर्भात अजूनही थोडा विचार करणे शेष आहे. तिकडे वळू या. स्वरूपाकार झालेल्या ब्रह्मनिष्ठांच्या स्थूलदेहत्यागासंबंधी तसा कोणताही नियम नाही. त्यांचा स्थूलदेह अंती पाचोळ्यासारखा गळूनही पडतो; ज्ञानदेवांसारखा चिरंतन राहूही शकतो किंवा मुक्ताईसारखा त्या देहाचा मागमूसही उरत नाही.

श्रुती म्हणतेः ***"योऽकामो निष्काम आप्तकाम आप्तकामो न तस्य प्राणा उत्क्रामन्ति ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति।।४-४-६।।बृहदा.उप.।।"*** - स्वरूपस्थित महात्म्यांच्या प्राणांचे इतरेजनांसारखे उत्क्रमण होत नाही. या श्रुतीचा अर्थ दोन प्रकारांनी करता येतो.

जेव्हा साधकास स्वरूपप्राप्ती होते, त्या वेळीच त्याचे प्राण स्वरूपी लय पावले जातात; प्राण पुनश्च स्थूल देहात येत नाहीत. प्रकृतीच्या म्हणा, देहाचे प्रारब्ध म्हणा, अशा कोणत्यातरी नियमानुसार त्यांचा देह प्राण असल्याप्रमाणेच टिकतो व यथाकाल गळून पडतो; किंवा मुक्ताईसारखा नाहीसा तरी होतो; किंवा ज्ञानदेवांसारखा चिरंतन कालासाठी जपून तरी ठेवला जातो; असा एक अर्थ आहे.

दुसरा अर्थ असा आहे की स्वरूपप्राप्ती झालेल्या महापुरुषांच्या देहातून प्राण कधीच निघून जात नाहीत. ते मृतसदृश झाले तरी त्यांच्या देही प्राण विद्यमान असतातच. प्राण त्या वेळी समाधिस्थितीप्रमाणेच ब्रह्मरंध्री लयस्थ असतात. असा योगिदेह किती काळ टिकेल, त्याबाबत अनुमान करता येत नाही.

याच कारणासाठी अशा योग्यांचा देह दहन न करता त्यास समाधी देण्याची पूर्वापार प्रथा आहे. स्वामी स्वरूपानंद, गजानन महाराज (शेगांवचे), अक्कलकोटचे स्वामी समर्थ इ.संतांची त्यासाठी अलीकडची उदाहरणे देता येतील. स्वामी स्वरूपानंदांनी तर स्वतःचे समाधिस्थल निवडले होते व त्या समाधिविधीबाबत यथोचित सूचना देऊन

ठेवल्या होत्या. यावरून योगिदेहास समाधी देण्याचा हाही प्रकार संतमान्यच दिसतो.

योग्यांचा दिव्य देह

योग्यांचा देह संजीवन होतो, असे ज्ञानेशच म्हणतात. तो काळापलीकडे गेललेला असतो. ***"तैसें होएं शरीर। तैं तैं म्हणिजे खेचर। हें पद होतां चमत्कार। पिंड जनीं।।६-२१६।। तैसें पिंडाचेनि आकारें। तैं कलाचि कां अवतरें। वरि त्वचेचेनि पदरें। पांघुरिलीं असें।।२५०।। तो कनकचंपकाचा कला। कीं अमृताचा पुतला। नाना सासिन्नला मला। कोंवलिकेचां।।२५७।। आइकें देह होएं सोनियाचां...।।२६८।। परब्रह्माचेनि रसें। देहाकृतिचिएं मुसें। वोंतिव जाहालें तैसें। दिसति आंगें।।६-३२७।।"*** - अशा शब्दांनी त्या योगिदेहाचे ज्ञानेश वर्णन करतात.

असा देह चिरकाल टिकू शकतो. त्याला सामान्य देहविषयक नियम लागू नसतात. म्हणूनच योगानंदांचा देह मृत्यूनंतरही काही दिवस जसाच्या तसा राहिल्याचे अमेरिकन डॉक्टरांना पाहण्यास मिळाले *(Ref:Sri Sri Paramhansa Yoganand : The Bhagvad Gita)*. आणि कबीर, साईबाबा यांचे देह मुक्ताईसारखे अकस्मात अदृश्य झाले! तुकाराम महाराज सदेह वैकुंठास गेले!! तर रामकृष्ण परमहंसांसारख्या श्रेष्ठ संताचा देह सामान्य जनांप्रमाणेच दहन केला गेला! संन्याशांचे देहसुद्धा कधी दहन करतात, तर कधी त्यांना समाधी देतात. त्यांना सामान्य मनुष्यदेहाचे नियम लागू नसल्याचा हा दाखला आहे. असो.

श्रीसंत रामदासस्वामींनी मांडलेला समाधिविचार

संत-सत्पुरुष जी अशी ज्ञानेश्वर-निवृत्ति-सोपानदेवांप्रमाणे किंवा स्वामी समर्थ, गजानन महाराज, स्वामी स्वरूपानंद यांप्रमाणे समाधी घेतात, त्या समाधीच्या पारमार्थिक सामर्थ्याविषयी आणि संतांनी तेथे देहाने वास्तव्य करण्याविषयी एक महत्त्वाचे मत संत श्रीरामदासस्वामींनी आपल्या ***श्रीमत् दासबोध*** या श्रेष्ठ आध्यात्मिक ग्रंथात नोंदवले आहे. जाताजाता त्याचाही परामर्ष घेऊन हा विषय पूर्ण करू.

दासबोधाच्या दहाव्या दशकाच्या सातव्या समासात समर्थांनी समाधिविषयक आपले विचार मांडले आहेत. जिज्ञासूंनी ते मुळातूनच पाहावेत. आपल्या निवेदित विषयानुषंगाने तूर्त ते संक्षेपाने पाहू या.

समर्थ म्हणतातः***"।।श्रीराम।। अवतारादिक ज्ञानी संत। सारासारविचारें मुक्त। त्यांचे सामर्थ्य चालत। कोण्या प्रकारे।।१।। हें श्रोतयांची आशंका। पाहातां प्रश्न केला नीका। सावध होऊनि आईका। म्हणे वक्ता।।२।। ज्ञानी मुक्त होऊनि गेलें। मागें त्यांचे सामर्थ्य चालें। परंतु ते नाहीं आलें। वासना धरूनि।।३।। लोकांस होतो चमत्कार। लोक मानिति साचार। परंतु याचा विचार। पाहिला पाहिजे।।४।। जीत अस्त नेणों किती। जनामध्यें चमत्कार होति। ऐसियाचि सद्यप्रचिति। रोकडी पाहावी।।५।। तो तरी आपण नाहीं गेला। लोकीं प्रत्यक्ष देखिला। ऐसा हा चमत्कार जाला। यासि काय म्हणावें।।६।। तरी हा लोकांचा भावार्थ। भविकां देव येथार्थ। अनेत्र कल्पना वेर्थ।कुतर्काचि।।७।।...।। द.१०स.७।।दास.।।"***

अध्यात्मशास्त्रात जे अनुभव येतात, ते अत्यंत चमत्कृतिपूर्ण असतात. जप, योग, भक्ती इ.साधना करणाऱ्यांस तेज, रंग, गंध, स्पर्शन, संभाषण, नाद इ.अनेक प्रकारचे अतींद्रिय अनुभव येतात. सिद्ध, योगी, संत यांच्याशी चर्चा केल्यासच त्या अनुभवांचे सत्यत्व आणि त्यांचा अर्थ कळू लागतो. संतसत्पुरुषांची चरित्रे व त्यांचे ग्रंथ हेसुद्धा त्याविषयी मार्गदर्शक ठरतात.

सत्पुरुषांची गती

या समासात श्रीरामदासस्वामींपुढे असाच एक प्रश्न चर्चेस आलेला आहे. ज्ञानी पुरुषांनी, संतांनी, अवतारी पुरुषांनी देह ठेवल्यावर त्यांचे दर्शन घडते. त्या ठिकाणी त्यांची पूजा केली तर त्यांच्यासंबंधी काही प्रचिती येते. रामकृष्णादी अवतारांची समाप्ती कधीच होऊन गेली. तरी त्यांचे आध्यात्मिक सामर्थ्य अद्यापही प्रत्ययास येते.

हे सर्व सत्पुरुष तर केव्हाचेच मुक्त होऊन गेले. मग त्यांचे असे अस्तित्व व प्रचिती का यावी; समाधिस्थानी ते ज्ञानी पुरुष अजूनही कोणतीतरी वासना ठेवून राहिले आहेत काय; त्यांचे दिव्य किंवा सूक्ष्म देह अजूनही या अवनीतलावर वावरत आहेत काय; अशा शंका यामागे आहेत. त्या पुरुषांना अजूनही कोणतीतरी वासना उरली असेल, तर मग ते ज्ञानी आणि मुक्त कसे म्हणता येतील, असा प्रश्न पण यामागे आहे.

जिवंत असतांना यांनी चमत्कार केले असले तर ते एक ठीक आहे म्हणू या. पण ब्रह्मलीन झाल्यावरसुद्धा ते असे चमत्कार कसे करू शकतात, याचा विचार जरूर केला पाहिजे असे समर्थ म्हणतात.

सत्पुरुषांचे पुण्य

याचे उत्तर असे की हे सर्व साधकांच्या वा भक्तांच्या आपापल्या भावबळाने घडून येते. त्यात त्या सत्पुरुषांचा काहीही संबंध नसतो. ***"भाव तसा देव"*** असे म्हणतात, ते हेच! जे आवडते ते आपणास स्वप्नी दिसते. ती वस्तू तर तेथें काही येत नाही. तसेच हे आहे. सत्पुरुषांचे दर्शन, प्रचिती इ.आपल्या ध्यासाचा परिणाम आहेत.

सत्पुरुष काही वासना धरून राहिले आहेत किंवा त्यांचे दिव्य देह येथे अस्तित्वात आहेत किंवा त्यांनी पुनर्जन्म घेतला आहे, असे काही त्यामागचे कारण नसते. खरे तर जे महापुरुष असे शाश्वत पुण्याई संपादन करून गेले, त्यांची सत्ता, त्यांचे सामर्थ्य आपोआपच त्यांच्या अस्तित्वाशिवायच चालते. कारण त्यांचे माहात्म्य भगवंतच वाढवत असतो.

सगुणभक्ती व ईश्वरप्रणिधान

असा पुण्यमार्ग म्हणजे देवाचे अविरत भजन करणे, न्यायनीतीने वागणे, पुरश्चरण-जपादी करणे, अखंड तीर्थाटन करणे, वैराग्याने राहणे, वस्तूचे निदिध्यासन करणे इ.होय. हे सर्व जमेल त्याप्रमाणे

अत्यंत निष्ठापूर्वक करावे. म्हणजे पुण्याई साचते. देवावर किंवा गुरूवर पूर्ण श्रद्धा ठेवावी.

निर्गुणाचे ज्ञान झाले तरी सगुण लवंडू नये. तसे केले नाही तर निर्गुणाचा मन व इंद्रिये यांना अनुभव येत नसल्याने त्याच्यावरही श्रद्धा ठरत नाही आणि सगुणाबाबत प्रीती आटल्याने त्याचीही भक्ती घडत नाही. असा साधक दोहींकडून ठकवला जातो. धड भक्ती नाही, धड ज्ञान नाही, असे होऊ नये म्हणून निर्गुण जरी गवसले, तरीही सगुणाची भक्ती, जप, ध्यानादी त्यागू नये. सगुण लवंडून टाकणारा ज्ञाता अपयशीच म्हणा ना!

समाधी का फळते

निष्काम होऊन सगुणास भजणाऱ्याच्या पुण्याईला त्रैलोक्यात तुलना नाही. सकाम भजनाचेही फळ मिळतेच. पण निष्काम भजनाने भगवंतच जोडला जातो! सकाम व निष्काम भक्तीच्या फलात केवढे मोठे अंतर आहे पहा! निष्काम भजनाने अगणित पुण्याई गाठीस बांधली जाते. भगवंत भक्ताचे मानस पूर्ण करतो. भक्त-भगवंत असे एक झाले की त्यांचे सामर्थ्य काळालाही आटोपत नाही.

निष्काम भक्ती आणि ब्रह्मज्ञान **(सगुण आणि निर्गुण उपासना)** यांचा योग घडून आलेल्या संतांचे सामर्थ्य तर विचारूच नका! त्यांचा प्रताप, यश, कीर्ती यांची प्रचिती ते जिवंत असतांना तर येतेच, पण देहत्यागानंतर अनंत काळापर्यंत त्यांची ही सत्ता अखंड चालते. भक्त-भगवंत अनन्य झालेले असतात, म्हणून त्यांची समाधी फळते; त्यांचे दर्शन होते; त्यांची प्रचिती येते. असे सार सांगून निष्काम भक्ती व ज्ञान यांची पुण्याई विशेष आहे, असे समर्थ म्हणतात.

ज्ञानदेवांची समाधी

समाधीची प्रचिती का येते इ.मुक्त पुरुषांच्या गतिविषयक विचार सांगत असतांना अचानकपणे समर्थांनी हा विषय सगुण भक्तीच्या माहात्म्याकडे कसा वळवला, ते आपल्या लक्षात आलेच असेल. ***सगुण भक्ती हा ईश्वरप्रणिधान*** **या संकल्पनेचाच अविभाज्य भाग होय. अशा प्रकारे ज्ञानेश्वरांचा *सगुणोपासनेवर आधारलेला पंथराज* व समर्थांची *सगुणभक्ती* यांचे दृढ संबंध असल्याचे आपल्या निदर्शनास येते.** त्या दृष्टीनेही वरील विवेचन अर्थपूर्ण ठरते.

समर्थांनी जरी ज्ञात्या व मुक्त पुरुषांचे चिरंतन अस्तित्व नाकारल्यासारखे दिसत असले, तरी त्यांचे विवेचन देहत्यागानंतरच्या समाधी इ.बाबींशी संबंधित आहे. म्हणूनच त्यांनी या विषयाचा केलेला विवेक ज्ञानदेवांसारख्या अगणित सामर्थ्यवान पण देह न ठेवताच संजीवन समाधी घेणाऱ्या संतांस लागू पडत नाही. त्यातील सगुणभक्ती आणि त्यामुळे त्यांना मिळालेले सामर्थ्य या बाबी मात्र सगळ्याच संतांना लागू पडत असल्यामुळे ज्ञानदेवसमाधीची प्रचिती त्या कारणाने येणे साहजिकच आहे. परंतु संतांच्या जीवित कालात येणाऱ्या प्रचितीनुसार ती आहे, एवढे मात्र जिज्ञासूंच्या निदर्शनास आणून दिलेच पाहिजे! असो!

योगविचार::::

"भीममुद्रा डोळां। निरंजनीं लीन"

जाताजाता एक महत्त्वाची योगशास्त्रविषयक बाब पाहणेही अगत्याचे ठरते. संत नामदेवांच्या अभंगांतून ***भीममुद्रा*** उल्लेखलेली आहे. ज्ञानदेवांनी समाधी घेतांना केलेला यौगिक क्रियाक्रम आपण *अभंग क्र. १०३१ व १०३२* मध्ये पाहिला आहे *(पृ.क्र.९९८)*. तसाच सर्वसाधारणपणे हाच क्रम चांगदेवांच्या समाधी घेतांनाही वर्णिलेला आहे *(अ.क्र.११५७ व ११५८, पृ.क्र.१००१)*.

"भीममुद्रा डोळां। निरंजनीं लीन। झालें ब्रह्मपूर्ण। ज्ञानदेव।। *अ.क्र.१०९१, पृ.क्र.१०००।।"* याही ठिकाणी असाच विशिष्ट योगक्रियेचा उल्लेख नामदेव करतात. त्याविषयी थोडा अधिक विचार करणे आता अभिप्रेत आहे.

भीम म्हणजे समर्थांनी वर्णिलेला ***"भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुति"! भीम म्हणजे प्राण! भीममुद्रा*** ही प्राणसंबंधित आहे. ती ***डोळां*** कशी लावता येईल, हे पाहू या. मागे आपण ज्ञानदेवांचे योगविषयक अभंग बरेच खोलात जाऊन पाहिले होते *(उन्मेष ४६: योगपर अभंग,पृ.क्र.७९८ ते ८३०)*. त्यात ***डोळा*** या योगपारिभाषिक शब्दाचा अर्थ स्पष्ट केला होता.

डोळा **म्हणजे *तृतीय नेत्र* -*नयन* किंवा *बुबुळ* या संज्ञांनी निर्देशिलेले आज्ञाचक्रस्थ वा त्रिकूटीस्थित *शून्यस्थान.***

ज्ञानदेवांनी जी ***पाच शून्ये*** वर्णिलेली आहेत, त्यातील ***डोळा हे प्रथमशून्य होय***, असा भाग आपण त्या वेळी लक्षात घेतला होता, हे जिज्ञासूंस स्मरतच असेल. या संज्ञांचा उल्लेख ज्यात आहे, ते ***तत्त्वमसि महावाक्य पंचीकरण*** म्हणून ज्ञानदेवकृत समजले जाणारे प्रकरण नुकतेच अवलोकनात आले. *श्री.शिरीष शांताराम कवाडे* यांनी ***लघुग्रंथसप्तक*** संपादित केले आहे. त्यात त्यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या तत्त्वपरंपरेत हा लघुग्रंथ असल्याचे सूचित केले आहे. हा अप्रचलित ग्रंथ असल्याचे ते म्हणतात.

साहित्यिक विद्वानांत ज्ञानदेवांच्या नांवे असलेल्या विविध ग्रंथांच्या कर्तृत्वाविषयी एकमत नाही, हे आपणास विदित आहेच! परंतु ते सोडून देऊ या! भीममुद्रेनिमित्त आपण या विषयाकडे वळलो असल्याने श्री.कवाडे यांनी सदर प्रकाशनात जी परिशिष्टे व पारंपारिक माहिती सांप्रदायिकतेनुसार प्राप्त झालेली मांडली आहे, तिकडे या विषयाच्या अभ्यासासाठी जिज्ञासूंचे लक्ष वेधणे क्रमप्राप्त आहे.

मुद्रा, शून्ये इ.

श्री.कवाडेंच्या सदर पुस्तकातील *परिशिष्ट -३, चतुर्थ प्रकरण* यात ब्रह्मांडीची चक्रे - ***त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा, ब्रह्मरंध्र***, तसेच सलोकतामुक्ती इ.चा एक तक्ता दिला आहे. तसेच ही स्थाने स्थूलदेहाची नसून सूक्ष्म देहाची आहेत व म्हणून त्यांचा शब्दशः अर्थ न घेता गूढ ध्वनितार्थ बघावा, अशी सूचना केली आहे. त्यांचे म्हणणे व ग्रंथोक्त प्रकरणाचा विशिष्ट भाग

संक्षेपाने खालील तुलनात्मक तक्त्यात देत आहे, अर्थातच आपल्या विषयाच्या अभ्यासापुरता! जिज्ञासूंनी मूळ प्रकरण त्या लघुग्रंथातून पाहणे योग्य ठरेल. असो.

चक्रादींचा तुलनात्मक तक्ता

चक्रसंज्ञा	मुक्त्यादी स्थिती	स्थान	अवस्था +	देह
१) **त्रिकूट**	@सलोकता	*मुख	+जागृतावस्थेची परी	@स्थूल
२) **श्रीहाट**	@समीपता	*रसना	+स्वप्नावस्था	@सूक्ष्म
३)**गोल्हाट**	*सरूपता	*चक्षु	+सुषुप्त्यावस्था	@कारण
४)**औटपीठ**	*सायुज्यता	पुण्यगिरी	+तुर्यावस्था	@महाकारण
५)**भ्रमरगुंफा**	*कैवल्य	*श्रोत्र	+उन्मनी	*ज्ञानदेह
६)**ब्रह्मरंध्र**	*पूर्णता	@सहस्त्रदळ	+सर्वलय समाधि	*आनंददेह

संप्रदायाच्या दंडकामुळे श्री.कवाडे काही अधिक माहिती व खुलासा देऊ शकत नसल्याचे त्यांनी ग्रथित केले आहे.

पूर्वी आपण *श्री.बा.त्र्यं. शाळिग्राम, श्री.वि.स.वाळिंबे* इत्यादिकांच्या विचारांचा परामर्ष घेतला होता*(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ,पृ.क्र.७६१ ते ७६५ व उन्मेष ४६:योगपर अभंग, पृ.क्र.७१८ ते ८३०)*. तेव्हा आपण जे निष्कर्ष काढले होते, त्यांचा एक तक्ता *(उन्मेष ४६:योगपर अभंग, पृ.क्र.८११)* तेथे दिलेला होता. जिज्ञासूंनी सदर कोष्टक वरील संदर्भांकित श्री.कवाडे यांच्या पंचीकरणविषयक ग्रंथाशी ताडून पहावे व आपापले मत निश्चित करावे. उपरोक्त *पृ.क्र.८११* वरील माहिती सुलभतेसाठी पुढील पानावरील *(पृ.क्र.९९०)* तक्त्यात दिलेली आहे.

या सर्व माहितीचे विश्लेषण करता श्री. कवाडे यांनी पुस्तकात दिलेल्या माहितीतील वरील तक्त्यात ***(१) * अशा चिह्नांनी दर्शविलेली माहिती आपल्या निष्कर्षांशी जुळत नाही. (२) @ अशा चिह्नांनी दर्शविलेली माहिती आपल्या निष्कर्षांशी जुळते. (३) + अशा चिह्नांनी दिलेल्या माहितीसाठी आपले निष्कर्ष वेगळे असून ते संक्षेपाने येथे नोंदणे शक्य नाही.*** त्यासाठी उपरोल्लेखित उन्मेषातील संदर्भांकित पृष्ठांवरून सविस्तर माहिती पुनश्च पाहून तिचे जिज्ञासूंनी योग्य ते विश्लेषण करावे.

असो. ***डोळा व प्रथमशून्य*** या संज्ञा स्पष्ट व्हाव्यात म्हणून हे एवढ्या विस्ताराने पाहावे लागले.

भीममुद्रेचे रहस्य

आता नामदेवांच्या संदर्भित अभंगांतून ***चाचरी, भूचरी, खेचरी व अगोचरी*** या मुद्रांचाही उल्लेख येतो. श्री.कवाडेंनी ***पंचीकरण*** विषयक लघुग्रंथाच्या सातव्या प्रकरणी त्याबद्दल ज्ञानदेवांच्या म्हणून काही ओव्या दिलेल्या आहेत. त्या अशा:

"तरी *चांचरी भूचरी खेचरी* / चवथी बोलिजे *अगोचरी* / तें दृष्टिद्वारें लक्षितां निर्धारीं। मानिति मोक्ष।।५।। *चांचरी* तें आडवियां दृष्टी पाहणें। *भूचरीं* नासाग्रीं लक्ष लावणें। *खेचरी* आकाशीं लक्षणें। तिमिरासि।।६।। *अगोचरी* म्हणजे नेत्रीचि मिळणि। आंतर अवलोकीं बैसोनि आसनिं। म्हणति वस्तु द्रष्टा तत्त्वज्ञानी। आपणांसि।।७।। परि हें आघवेंचि खंडज्ञान। जोंवरी देहीं असे वर्तमान। देहें नासिलियां नाहीं दर्शन। डोळियाचें।।८।। ... म्हणौनि वस्तु सर्वांहूनि सार। पाहतां वेदांसि अगोचर। तें देखिलियां नाहीं थार। देहधर्माचा।।९।।"

योगमुद्रांचे असे हे वर्णन तेथे येते. परंतु हे सर्व नामरूपाच्या प्रांतातील अनुभूती देणारे मुद्राप्रयोग होत. त्यांव्यतिरिक्त नामदेवांच्या अभंगातून ***उन्मनी*** चाही मुद्रेप्रमाणे उल्लेख आहे. येथून खरा **अलक्ष**ाचा प्रांत सुरू होतो, हे आपणास पुढील पृष्ठावर दिलेल्या तक्त्यातील शून्यविषयक माहितीमुळे सहजच लक्षात येते.

श्रीगोरक्षनाथांच्या ***सिद्धसिद्धांतपद्धति*** या ग्रंथाशी आपण परिचित आहोतच. त्यातील *श्लोक क्र.२-२६ ते३०* यांप्रमाणे आणि ज्ञानेश्वरीतील **पंथराज**ाचा आपण जो बृहदाभ्यास केला त्यावरून **चांचरी म्हणजे अर्धोन्मीलित दृष्टीने परमात्मस्वरूपी लक्ष लावणे ही *बहिर्लक्ष्य मध्यदृष्टी* होय. *भूचरी ही नासाग्रदृष्टी* म्हणजे आपण पाहिलेली भ्रूमध्यावरील आज्ञाचक्रावर लावलेली *अंतर्लक्ष्य अंतर्दृष्टी* होय. *खेचरी* हे व्योमध्यान होय. गोरक्षांनी धारणा-ध्यानासाठी *पंचव्योम* सांगितले आहेत**(*२-३०,सि.सि.प.*)**. त्यातील *तिमिर* म्हणजे आतबाहेर अंधकारसदृश पराकाशावरील - अंधकारी व्योमावरील हे धारणा ध्यान म्हणजे *खेचरी* होय. *अगोचरी* हे परमात्मवस्तूवरील *अंतर्ध्यान अंतर्लक्ष्य* होय.**

मुद्रा, त्रिबंधादी पंथराजोक्त यौगिक प्रयोग करून पुढे अग्रेसर होणाऱ्या साधकाच्या पंथराजयोगाची सिद्धता करण्यासाठीच अर्थातच ***धारणा-ध्यान-समाधि-संयम*** अशा अंतरंग योगांगांचे अवलंबन करण्यासाठीच या चार मुद्रांच्या प्रयोगांचे प्रयोजन आहे, हे आपल्या निश्चितच ध्यानात यावे. असो.

चाचरी, भूचरी, खेचरी व अगोचरी आणि उन्मनी **या सर्वांची मिळून *भीममुद्रा* होते. *प्राणांचा ब्रह्मांडी लय घडवून आणणारी ही मुद्रा होय,*** हेही आपल्या लक्षात आलेच असेल. ज्ञानेशांनी ***संजीवनसमाधी*** घेताना त्यांनी ***डोळां लावलेल्या* भीममुद्रेचा उल्लेख** करून नामदेवांनीसुद्धा आपल्या लक्षात या मुद्रेचे असेच रहस्य आणून दिले आहे.

***डोळा* हे *शून्य* होय. व्यापक अर्थाने *डोळा* म्हणजे ज्ञानेशांची *पंचशून्ये - त्रिकूट ते ब्रह्मरंध्र व त्यापलीकडील विदेहस्थ चौशून्ये, महाशून्य व निरशून्य* - हा प्रांत होय.** महाशून्यापर्यंतचा हा प्रांत

शक्ती व शिवाचा अर्धा अर्धा असतो; शक्ति व शिव हे येथे प्रभवावस्थेत सर्जनावस्थेत असतात, तर अप्ययावस्थेत सामरस्यावस्थेत राहून मूलाकडे प्रगमन करण्याच्या अवस्थेत असतात. हा भाग लक्षात घेऊन ***भीममुद्रेचे रहस्य*** लक्षात घ्यावे लागते.

या शून्यांच्या प्रांतात भीममुद्रेचा प्रयोग करणे **याचा यौगिक अर्थ *महासमाधी* घेणे - हीच *संजीवनसमाधी* होय. ज्ञानेशांनी *"डोळां भीममुद्रा लावियेली"* म्हणजेच चिरंतन कालासाठी *"याचि देहीं याचि डोळां"* अखंड मुक्तीचा सोहोळा भोगवणारी *महासमाधी* घेतली!!!**

नाथपंथियांत अशी समाधी परंपरासिद्धच आहे. मत्स्येंद्रनाथांनीसुद्धा अशीच अखंड समाधी घेतल्याचा उल्लेख असणारी ***"मग समाधि अव्यत्यया। भोगावी वासना इयां। तैं मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं।।१८-१७५४।।"*** ही ज्ञानेश्वरीतील ओवी सुप्रसिद्धच आहे. मत्स्येंद्रनाथांनी अव्यत्यय अखंड समाधिसुख भोगण्याच्या इच्छेने अशी ***महासमाधी*** घेतली, तर त्यांचे सांप्रदायिक **श्रीज्ञानेश्वरांनी जीवजंतूंना तारावे म्हणून ही *महासमाधी* घेतली, जी *"जंववरी रवि-शशि-तारा-पृथिवी"* तंववरी अक्षय्य राहणार आहे!!**

संतश्रीएकनाथांचा भावसौरभ

ज्ञानदेवांच्या सञ्जीवनसमाधीच्या अंतरंगात आपण प्रवेश केला. त्यानिमित्ताने आपणास श्रीएकनाथ महाराजांची आठवण होणे साहजिकच आहे. पूर्वी तेच श्रीज्ञानराजांना त्यांच्या समाधीत उतरून जाऊन प्रत्यक्ष भेटून आले असा सांप्रदायिक इतिहास आहे. ज्ञानदेवांची जनांच्या दृष्टीआड झालेली संजीवनसमाधीची जागा त्यांनीच आपल्या यौगिक सामर्थ्याने आणि ज्ञानदेवांच्या स्वप्नदृष्टांतावरून शोधून काढून तिचा सर्वप्रथम जीर्णोद्धार केला असे सर्वच भाविकजण मानतात!!

पुढील ***उन्मेष क्र.५३-योगविचाराचा अनुशेष*** पाहण्यापूर्वी श्रीएकनाथ काय म्हणतात पहा:

कैवल्याचा पुतळा। प्रगटला भूतळां।
चैतन्याचा जिव्हाळा। ज्ञानोबा माझा।।१।।
साधका मायबाप। दरुशनें हरी ताप।
सर्वांभूतीं सुखरूप। ज्ञानोबा माझा।।२।।
ज्ञानियांचा शिरोमणि। वंद्य जो कां पूज्यस्थानिं।
चिंतकाचा चिंतामणि। ज्ञानोबा माझा।।३।।..
मोक्षमार्गींचा सांगाति।.. शांतिरूप प्रगटला।..
ब्रह्मसाम्राज्यदीपिका। वर्णियेली गीतेची टीका।
विठोबाचा प्राणसखा। ज्ञानोबा माझा।।६।।
गुरुसेवेलागिं जाण। शरण एका जनार्दन।
त्रैलोक्याचें जीवन। ज्ञानोबा माझा।।७।।...
ज्ञानदेव ज्ञानदेव म्हणतां। ज्ञान देव देतो।...
नमन करूनि सद्भावें जपतां। होय विज्ञान।..
देशिकराज दयानिधी। अलंकापुरीं जो नांदें।...
वक्ता श्रोता श्रवणें पठणें। पावति समभाव।
वर्णूं जातां अघटित महिमा। होतो जीव शिव।
वंदुनि अनन्य। एका जनार्दनीं धरीं दृढभाव।
वर्षति निर्झर। ज्ञानदेव नामें पुष्पांचा वर्षाव।।४।।...

कैवल्याचा पुतळा - दरुषनें ताप हरणारा - विठोबाचा प्राणसखा - मोक्षमार्गींचा सांगाति - त्रैलोक्याचे जीवन - जीवास शिवी मेळविणाऱ्या अशा ज्ञानराजांना एकनाथ वंदित आहेत, ते अत्यंत विनम्र भावाने! हा दयानिधी अलंकापुरीस अजूनही नांदतो आहे, अशी एकनाथांची साक्ष आपणास प्रमाण आहे!! ज्ञानदेवांनी घेतलेल्या समाधीची संजीवनीच ते आपल्या हाती देत आहेत!!!

त्यांच्याबरोबरच आपणही श्रीज्ञानदेवांच्या समाधीस – नव्हे नव्हे! प्रत्यक्ष श्रीज्ञानदेवांसच आपली भावपुष्पे अर्पू या! एकनाथांनी व नामदेवांनी आपणासाठी हा जो अपूर्व योग जुळवून आणला आणि त्यांचे हे समाधिस्थित जे उदात्त दर्शन आपणास घडवून आणून आपला उद्धार केला, त्या पोटी अतीव ऋजुतेने सर्व संतसभेसमवेत या संतद्वयीस साष्टांग नमन करू या अन् धन्य धन्य होऊ या!!

ज्ञानदेव म्हणजे आपणासाठी विश्वात्मक परब्रह्मच!! म्हणून त्यांच्याच शब्दात म्हणू या: ***"भरौनि सद्भावाचि अंजुली। मियां वोंविआं फुलें मोकलीं। अर्पलीं अंघ्रियुगुलीं। विश्वरूपाचां।।११-७०८।।"*** आपण अर्पिलेल्या या भावकुसुमांजलीचा सौरभ शून्य-महाशून्य-निरशून्याच्याही पलीकडे अनंतापर्यंत पसरू दे, हीच ज्ञानेशचरणी नम्र प्रार्थना!!!

योगपर अभंग पृ.क्र.८११ वरील तत्त्याची पुनर्रचना

अनु.	चक्र	शून्य	स्थान	देह	मुक्ती
१.	**त्रिकूट**	प्रथम	आज्ञाचक्रस्थ	स्थूल }	
अ)	**बिंदु**			सूक्ष्म }	सलोकता
२.	**श्रील्हट**	द्वितीय		सूक्ष्म }	
अ)	**अर्धेंदु**	-	-	सूक्ष्म }	समीपता
ब)	**निरोधिका**	-	-	सूक्ष्म	सरूपता
३.	**गोल्हाट**	तृतीय	व्यापिका	कारण	सायुज्य
४.	**औटपीठ**	चतुर्थ	उन्मनी	महाकारण	जीवन्मुक्ती
५.	**ब्रह्मरंध्र**	महाशून्य	-	महाकारण	-
क)	**निरशून्य**	-	-	**कैवल्य**	विदेहमुक्त
ड)	**भ्रमरगुंफा** – चतुर्थशून्य ते महाशून्य असा शून्यांचा सूक्ष्मादी देहांतील प्रांत				

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५३::

::योगविचाराचा अनुशेष::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५३:

गीता:

६:२०-४६

ज्ञानेश्वरी:

६:३३७,३३८,३६३-४५६, ४६२-४८१

७:१३६

::उन्मेष ५३::
::योगविचाराचा अनुशेष::

निरुद्ध चित्तलक्षणे::::

आत्मसंयमयोग **अध्यायाचा शेष भाग**

ज्ञानेशांचा समाधिसोहोळा अनुभवून आपण तृप्त झालोत! आता आपणास योगाविषयीचा सहाव्या अध्यायातील उर्वरित भाग पहावयाचा आहे. योग्यांचे प्रयाण पाहून झाले. आपण आतापावेतो ***योग-भक्ती-ज्ञान इ.चा परस्पर ऋणानुबंध*** हे विषय खुलासेवार पाहिलेत आणि ***साधकावस्था ते सिद्धदशाप्राप्ती*** हा प्रांत सखोल पाहिला. आता ***योगाची महती, भक्त-भगवंतसंबंध*** असा थोडा माहितीपूर्ण भाग पहावयाचा राहिला आहे. हा *सहाव्या व बाराव्या अध्यायातील भाग* क्रमवार पाहणे आता अभिप्रेत असल्याने तिकडे वळू या.

पूर्वानुसंधान

अर्जुनाने प्रश्न केला होता की ***"हां हो जी अवधारिलें। हें जें साधन तुम्हीं निरूपिलें। आवडतयाहि अभ्यासिलें। फावों शके।।३३७।। कीं योग्यतेविण नाहीं। आईसें हन आहें काहीं। ...।।६-३३८।।"...***

पंथराजसाधन श्रीकृष्णांनी सहाव्या अध्यायाच्या पूर्वभागी अर्जुनास निरूपिले होते. त्याचा परामर्ष आपण पूर्वीच घेतला आहे. अर्जुन श्रीकृष्णांना त्या साधनाबाबत एक प्रामाणिक शंका विचारतो की हे साधन कोणीही करू शकतो का अथवा त्या साधनासाठी आपल्या अंगी काही विशेष पात्रता लागते. त्याचे श्रीकृष्णांनी दिलेले उत्तर आपणास विदित आहेच!

पण ***मनुष्याने योग्य ती पात्रता अंगी बाणवावीच आणि हा पंथराज साधावाच,*** असे भगवंतांचे मत दिसते. त्यास पुष्टी देत त्यांनी ***"एरवीं सोहोपें योगासारिखें। काहीं आहें ।।६-३६३।।"*** असे म्हटलेले जिज्ञासूंस स्मरत असेलच!

योगाने निरुद्ध झालेल्या चित्ताची लक्षणे

योगाची महती व त्यापासून होणारा लाभ पुनश्च प्रकट करत श्रीकृष्ण म्हणतातः

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति।।६-२०।।
सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम्।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः।।६-२१।।

"योगानुष्ठानाने निरुद्ध झालेले चित्त आत्म्याठायी रममाण होते व आत्म्यास अवलोकून - आत्म्याचा साक्षात्कार आपल्याठायीच होऊन ते संतुष्ट होते. बुद्धी व इंद्रियांस अगोचर असलेले आत्यंतिक सुख त्या अवस्थेत लाभते आणि त्या सुखाचा एकदा का अनुभव आला की योगी तत्त्वाशी अनन्य होऊन राहतो; त्याची ही समाधी कधीही भंग पावत नाही."

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते।।६-२२।।
तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसञ्ज्ञितं।
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा।।६-२३।।

"या अवस्थेत स्थिरावलेला योगी कितीही मोठे दुःख भोगायला लागले, तरी विचलित होत नाही. दुःखस्पर्शरहित अशी ही योगस्थिती आहे आणि या योगापेक्षा मोठा लाभ दुसरा कोणताच नाही. म्हणून मनुष्यमात्रांनी हा योग मन कंटाळू न देता निश्चयपूर्वक उत्साहप्रेरित होऊन आचरला पाहिजे."

श्रीकृष्णांचे हे वचन आपणापर्यंत प्रवाहित करणारे ज्ञानदेव काय म्हणतात, पहाः

म्हणौनि आसनाचिआं गाढिका।
जो आम्हीं अभ्यासु सांघितला नीका।
तेणें होईल तऱ्हैं हो कां। निरोधु ययाचां।।६-३६४।।
एरविं तऱ्हैं एणें योगें। जैं इंद्रियां विंदाण लागे।
तैं चित्त भेटों रिगें। आपणपेयां।।३६५।।
परतौनि पाठिमोरें ठाकें। आणि आपणियांतैं आपण देखें।
देखतखेंवों वोलखें। म्हणें तत्त्व तैं मी।।३६६।।

"आसनस्थैर्यापासून सुरुवात करून जो हा अभ्यास सांगितला, तो नीट रीतीने केल्यासच झाला तर या चित्ताचा निरोध होईल. आणि एकदा का या योगाने इंद्रियांचा निरोध झाला की चित्त उपशमून आत्म्याच्या भेटीस निघते. चित्त असे विषयविन्मुख झाले आणि आत्म्याकडे वळले की त्याच्या नजरेसमोर ते स्वतःच आत्म्याच्या जागी उभे ठाकलेले दिसते अन ते पाहताच त्यास आपण आत्मतत्त्व आहोत, याची ओळख पटते."

तिएं ओलखिएंसरिसें। सुखाचिआं साम्राज्यीं बैसें।
चित्तपण समरसें। विरौनि जाएं।।६-३६७।।
जेआंपरतें आणिक नाहीं। जेआंतैं इंद्रियें नेणति कंहिं।
तैं आपणचि आपुलिआं ठाईं। होऊनि ठाकें।।३६८।।

"अशी ओळख पटताच ते सुखाच्या साम्राज्याचा अधिपती होते. चित्त आणि आत्मा समरस आहेत असे जाणताच चित्ताचे चित्तपण विरून जाते; ज्यापलीकडे दुसरे काहीच नाही, ज्यास इंद्रिये जाणू शकत नाहीत असे ते आपणच आपल्याठायी होऊन ठाकते. चित्त-चैतन्य एकरसता ती हीच!"

मग मेरुपासूनि थोरें। देह दुःखाचेनि डोंगरें।
दाटिजो पां परि भारें। चित्त न दटें।।६-३६९।।

कां शस्त्रेंवरी तोडिलिआं। देह आगीमाजिं पडिलिआं।
चित्त महासुखीं पहुडिलिआं। चेओचि न ये।।३७०।।
आइसें आपणपां रिघौनि ठाएं। मग देहाचि वास न पाहें।
आणि सुख होऊनि जाएं। म्हणौनि विसरें।।६-३७१।।

"ही समाध्यवस्था प्राप्त झाली की मग मेरूएवढे दुःख जरी कोसळले तरी तो विषण्ण होत नाही. अथवा शस्त्राने जरी त्याचा देह तोडला किंवा देह अग्नीत जरी पडला, तरी निरतिशय अशा महासुखात पहुडलेले त्याचे चित्त तिकडे जात नाही. चित्त असे आपल्याठायीच रममाण झाले की त्यास देहाची शुद्ध उरत नाही. देहापासून मिळणारे सुख अल्प असते. एकदा का ते समाधीचे सुख – स्वसंवेद्यतेचे महासुख चित्ताला प्राप्त झाले की देहाचे सुखदुःख काहीच त्याला समाधीपासून विचलित करू शकत नाही."

जेआं सुखाचिआं गोडी। मन आर्त्तिचि सें न सोडी।
संसाराचिआं तोंडीं। गुंतलें जैं।।६-३७२।।
जैं योगाचें बरव। संतोखाचिं राणिव।
ज्ञानाचि जाणिव। जेआंलागिं।।३७३।।
तैं अभ्यासिलेनि योगें। सावेव देखावें लागें।
देखिलें तन्हैं आंगें। होईजेल गां।।३७४।।

"असे चित्त स्वतःच सुखमय होऊन राहते. या सुखाची गोडी लागलेले मन मग संसाराच्या कालमुखातच सापडणाऱ्या विषयसुखापासून आपच निवृत्त होते. अर्जुना! ते समाधिसुख म्हणजे योगाची शोभा आहे; संतोषाचे साम्राज्य आहे; ज्ञानाचे ज्ञातृत्व या सुखाच्यासाठीच असते. योगाभ्यासाने ते सुख साक्षात होते; ते मूर्तिमंत पुढे ठाकते. त्याला पाहून आपण स्वतःच तद्रूप होऊन जातो."

योगाभ्यासाची रीत

चित्तस्थैर्य व चित्तवृत्तींचा निरोध साधणे* हे योगाचे प्रमुख अंग आहे.** पातञ्जलयोगसूत्रे तर ***"योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।।" अशीच योगाची सूत्रमय व्याख्या करतात. हा भाग आपण पूर्वीच पाहिला आहे. गीतेचाही भर याच अंगावर आहे.

जरा वेगळ्या शब्दात गीताकार म्हणतातः

सङ्कल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः।
मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य संमन्ततः।।६-२४।।
शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत्।।६-२५।।

"संकल्पासून उत्पन्न होणाऱ्या सर्व इच्छांचा त्याग करून आणि सर्व इंद्रियसंघाताचे सर्वथा नियमन करून धैर्यशील बुद्धीने चित्ताचा हळूहळू सर्व विषयांपासून उपरम करावा. मनाला आत्म्याठायी गुंतवावे आणि इतर कसलेही चिंतन करू नये."

यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम्।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत।।६-२६।।
प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम्।
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम्।।६-२७।।

"हे क्रमाक्रमाने करत असता मूळचे चंचल व अस्थिर मन वेगवेगळ्या विषयांकडे धाव घेते. तरी त्या त्या विषयाचा विवेक करावा व मनास वारंवार आत्म्याच्या ध्यानात परतवत जावे. असे करत राहून मनास आत्मवश करून घ्यावे. या प्रकारे योग अभ्यासला जाऊन मन स्थैर्याला पावते; चित्तास शांती प्राप्त होते. योग्याचा रजोगुण उपशमतो. तो पापरहित होतो आणि ब्रह्मस्वरूप होऊन जातो. अशा योग्यास श्रेष्ठ असे आत्मसुख प्राप्त होते."

ज्ञानदेव चित्त वश करण्याच्या या पायऱ्या वर्णित म्हणतातः

परि तोचि योगु बापा। एके परी आहे सोहोपा।
जन्हैं पुत्रशोकु संकल्पा। दाखविजे।।६-३७५।।
हा विषयांतैं निमालिआं आईकें।
इंद्रियें नेमाचिएं धारणिं देखें।
तन्हैं हियें घालुनि मुकें। जीवितासिं।।३७६।।

"अर्जुना! तुला सांगितलेला हा योग तसा सोपा आहे. जर संकल्पाला पुत्रनिधनाचे दुःख घडवून आणले, तर वैराग्यप्राप्ती सहजच होते. त्याचे पुत्रादी संतती म्हणजे विषय हेच जर निवर्तल्याचे त्याच्या कानी पडले आणि जर त्याने इंद्रिये यमनियमाच्या कचाट्यात सापडल्याचे पाहिले, तर आपले सर्वस्वच नष्ट झाले असे समजून ऊर फुटून तो मरतो."

आईसें वैराग्य हें करी। तन्हैं संकल्पाचि सरे वारी।
सुखें धृतिचां धवलारीं। बुद्धि नांदें।।६-३७७।।
बुद्धि धैर्या होएं वसौटा। तन्हैं मनातैं अनुभवाचिआं वाटा।
हलूं हलूं करी प्रतिष्ठा। आत्मभुवनिं।।३७८।।
याहिं एकें परी। प्राप्ति आहे विचारीं।...।।३७९।।

"संकल्प नष्ट केला की त्याने वैराग्य प्राप्त होते. याउलट वैराग्यपूर्वक इंद्रिये आणि विषयांचे नियमन केले तरीही संकल्पाची चित्तातील येरझार खुंटते आणि सहजच बुद्धी धैर्याच्या महालात जाऊन विलसते. बुद्धीने धैर्याचा असा आश्रय मिळवला की मग तीच अनुभूतीच्या वाटेने मनाला आत्मसाक्षात्कार घडवून देण्यात पुढाकार घेते. अशा साक्षात्कारास पावलेले मन हळूहळू आत्मभुवनी कायमचे स्थिरावते. अशा पायऱ्यांनी जाऊन योगसाधना सहज करता येते."

एक लक्ष्य वा आलंबन

...। हें न ठके सोपारी। आणिक आईकें।।६-३७९।।
आतां नियमुचि हा एकला। जीवें करावा आपुला।
जैसा कृतनिश्चयाचिआं बोलां-। बाहेरा नोहें।।३८०।।
जन्हैं एतुलेनि चित्त थिरावें। तन्हैं काजा आलें स्वभावें।
न राहें तन्हैं घालावें। मोकलुनि।।३८१।।
मग मोकलिलें जेथ जेथ जाईल। तेथूनि नियमुचि घेऊनि येईल।
आईसेनि स्थैर्याचि होईल। सवें ययां।।३८२।।

"पण अर्जुना! तुला जर असे वाटत असेल की ही काही सोपी गोष्ट नाही, तर अजूनही एक युक्ती आहे. चित्तास आत्मस्थ करण्यासाठी असे करावे की त्याला एक कोणतेतरी निश्चित असे लक्ष्य बांधून द्यावे. जीवाभावाने ते लक्ष्य साध्य करण्याचा प्रयत्न करावा. काहीही झाले तरी लक्ष्यापासून ढळावयाचे नाही असा कृतनिश्चय करावा. असे करून जर चित्त स्थिर झाले तर उत्तमच! सहजच काम झाले! पण तसे न करता आले तर त्यास मोकळे सोडून द्यावे. ते जेथे जेथे जाईल तेथे त्यास जाऊ द्यावे. पण वेळोवेळी त्यास लक्ष्याकडे लावावे. असे वारंवार घडले की त्या लक्ष्यावर स्थिरावण्याची सवय चित्तास आपसूकच पडेल."

पाठीं केतुलेनि एकें हेलें। तेआं स्थैर्याचेनि मेलें।
आत्मस्वरूपाजवळें। येईल साहाजें।।६-३८३।।
तेआंतैं देखौनि आंगा घडेल। तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल।
आणि ऐक्यतेजें उघडेल। त्रैलोक्य हें।।३८४।।

"त्यानंतर असे स्थिर चित्त कधी ना कधी आत्मस्वरूपाजवळ सहजच येईल. एकदा का त्यास आत्मस्वरूपाचे दर्शन झाले की ते आत्मरूपच होऊन जाईल. त्याचे द्वैत अद्वैतात सामावून जाईल. सामरस्य होईल आणि त्रैलोक्य त्या ऐक्यतेजाने भरून जाईल."

आकाशीं दिसें दुसरें। तैं अभ्र जैं विरें।
तैं गगनचि कां भरें। विश्व जैसें।।६-३८५।।
तैसें <u>चित्त लया जाएं। आणि चैतन्यचि आघवें होएं</u>।
आईसिं प्राप्ति सुखोपाएं। आहे एणें।।३८६।।
ययां सोपिया योगस्थिति। उकलु देखिला गां बहुतिं।
संकल्पाचिआं संपत्ति। रुसौनिआं।।३८७।।
तैं सुखाचेनि सांघातें।
आलें परब्रह्माआंतौतें।...।।३८८।।

"आकाशामध्ये दिसणारी अभ्रे जशी त्यातच विरून जाऊन आकाशरूप होतात व सर्व विश्व आकाशाने भरलेले दिसू लागते, तसे चित्त चैतन्यात लय पावले की ते चैतन्यरूप होऊन जाते व सर्वदूर चैतन्याचीच अनुभूती येते. हा उपाय किती सोपा आहे, पहा! आणि त्यापासूनही योगप्राप्ती होते!! <u>संकल्पसंपत्तीचा त्याग करून अनेक साधकांनी या सहज प्राप्त होणाऱ्या योगस्थितीची अनुभूती घेतली आहे आणि योगसुखाचे सोहाळे उपभोगत ते सहजच परब्रह्माच्या घरात दाखल होऊन गेले आहेत</u>."

...। तेथ लवण जैसें जलातें। सांडो नेणें।।६-३८८।।
तैसें होएं तिएं मेळीं। मग सामरस्याचिआं राऊळीं।
महासुखाचि दिवाली। जगेंसि दिसें।।३८९।।

"पाण्यात विरघळलेले किंवा पडलेले मीठ जसे पुनः पाण्याबाहेर पडण्याचे विसरून जाते, तसे ते साधक परब्रह्मात प्रवेशून तेथेच समरस झालेत. त्या सामरस्याच्या मंदिरी महासुखाची दिवाळी भोगून धन्य होणारे असे कितीतरी महाभाग या जगाने पाहिले आहेत."

श्रीकृष्ण योगप्राप्तीसाठी वेगवेगळे सोपे असे चित्तस्थैर्याचे उपाय सांगत आहेत. हे सर्व ***धारणा व ध्यान*** या पतञ्जलींच्या अष्टांगांपैकी होत. धारणेचे विविध आलंबविषय असतात. चित्त त्या त्या विषयांवर केंद्रित करण्याचे हे उपाय आहेत.

एकतत्त्वाभ्यास करणे

अर्जुनास आणिकही उपाय ऐकवत श्रीकृष्ण म्हणतातः

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते।।६-२८।।

"अर्जुना! कोणत्या का उपायाने होईना! मन सर्वदा आत्म्याठायी लावावे. म्हणजे योग साध्य होतो. एकदा का ही स्थिती प्राप्त झाली की योगी पापरहित होतो. व सहजच ब्रह्माची अनुभूती घेतो. त्यात त्याला अत्यंत सुख प्राप्त होते."

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।६-२९।।
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति।।६-३०।।

"सर्व प्राणिमात्रांठायी मला पाहावे व माझ्याठायी सर्व भूते पाहावीत. असे केल्याने साधक योगयुक्त होतो. जो मला सर्वत्र पाहतो व सर्वांस माझ्याठायी पाहतो, तो माझ्यापासून विलग होत नाही."

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः।
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते।।६-३१।।

"नेहमी तो मजठायी वसतो. सर्व भूतांठायी वसणाऱ्या मला जो अशा दृढ एकत्वभावाने भजतो, तो जीवन्मुक्त होतो. या जगात वर्तत असूनही तो मत्स्वरूप होतो."

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः।।६-३२।।

"असा जो योगी असतो; जो सर्व भूतमात्रांस आत्मवत पाहतो, त्याला सुखदुःखांची बाधा होत नाही. माझ्या मते असा योगी श्रेष्ठ आहे."

याविषयी ज्ञानेश काय म्हणतात, पहाः

आईसें आपुलें पायवरी। चालिजें आपुलें पाठीवरी।
हें पार्था नागवें तऱ्है। आन आईकें।।६-३९०

"अर्जुना! मी तुला आतापावेतो योग साधण्याच्या वेगवेगळ्या युक्त्या सांगितल्या. त्या ऐकून तुला जर असे वाटत असेल की असे करणे फार कठीण आहे; त्यापेक्षा आपण आपल्याच पायांनी आपल्याच पाठीवर चालणे हेही कदाचित सोपे ठरेल, तर ऐक. दुसरी सोपी पद्धत सांगतो जेणेकरून तुला सहजच योग साधता येईल."

तऱ्हैं मी तंव सकल देहीं। असें एथ विचारु नाहीं।
आणि तैसेंचि माझां ठाईं। सकल असे।।६-३९१।।
हें आईसेंचि संचलें। परस्परें मिसललें।
बुद्धि घेपें एतुलें। होआवें गां।।३९२।।

"असे पहा की हे तर स्वयंसिद्धच आहे की मी सर्व प्राण्यांमध्ये आहे आणि हे सर्व चराचर विश्वही माझ्याठायी वसते. हे सर्व विश्व असेच बनले आहे आणि सर्वत्र अद्वैतच आहे. मी आणि भूतमात्रादी सर्व यात कोणतीही भिन्नता नाही. पण हे सर्व आपल्याला पटले पाहिजे. आपल्या बुद्धीवर हे अद्वैतपण पूर्णतया ठसेल असे करावे."

एरवीं तऱ्हैं अर्जुना। जो एकवटिलिआं भावना।
सर्वभूतिं अभिन्ना भजें मातें।।६-३१३।।
भूतांचेनि अनेगपणें। अनेक नोहें अंतष्करणें।
केवल एकत्वचि माझें जाणें। सर्वत्र जो।।३१४।।
मग तो एक हा मियां। बोलतां दिसतसें वांयां।
एरवीं न बोलिजें तऱ्हैं धनंजया। तो मीचि आहे।।३१५।।

"हा योग सिद्ध करण्याचा उपाय करून पाहण्यासारखा आणि सुलभ आहे. अशा प्रकारे या अद्वैतभावाने जो मला भजतो; सर्व भूतात विद्यमान असणाऱ्या माझी उपास्ति करतो; अनेक भूते पाहून ज्याच्या चित्तात द्वैतभावाचा उदय होत नाही; सर्वत्र जो मलाच पाहतो; तो माझ्याहून कोणी वेगळा थोडाच असेल! तो म्हणजे मीच! पण हे बोलणेही व्यर्थ आहे. कारण त्याच्या त्या अद्वैतावस्थेत तो आणि मी हे बोल तरी कसे उमटतील! पण तरीही सांगतो की असा योगी आणि मी एकच आहोत!"

दीपा आणि प्रकाशा। एकवंचिचा पाडु जैसा।
तो माझां ठाईं तैसा। मी तेयामाजिं।।६-३१६।।
जैसा उदकाचेनि आयुखें रसु। कां गगनाचेनि मानें अवकाशु।
तैसा माझेनि रूपें रुपसु। पुरुषु तो गां ।।३१७।।

"दीप आणि प्रकाश हे दोन्ही एकात्मच जसे असतात, तसेच तो माझ्याठायी व मी त्याच्याठायी एकात्म असतो. उदक आणि रस, आकाश आणि अंतराळ ही जशी अभिन्न असतात, तसा तो पुरुष माझ्याशी अभिन्न असतो. त्या पुरुषाचे रूप म्हणजे माझेच रूप होय, हे तुला वेगळे सांगायला नकोच!"

"हें समस्तही श्रीवासुदेओ"

जेणें ऐक्याचिएं दिठीं। सर्वत्र मातेंचि किरीटी।
देखिला जैसा पटीं। तंतु एकु।।६-३१८।।
कां स्वरूपें तऱ्हैं बहुतें आहाति। परि तैसिं सोनीं बहुवें न होति।
आईसिं ऐक्याचलाचिं स्थिती। केली जेणें।।३१९।।
ना तऱ्हैं वृक्षाचि पानें जेतुलीं।
तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं।...।।४००।।

"वस्त्रात केवळ सूतच जसे असते, तसे ***"हें समस्तही श्रीवासुदेओ। आईसा प्रतितिरसाचा वोतला भाओ।।७-१३६।।"*** अशा प्रकारे या विश्वात केवळ एक आत्माच भरून राहिलेला आहे असे जो पाहतो; नाना अलंकारांत विविधता दिसत असली तरी त्यांत एकच एक घनीभूत असे सुवर्णच जसे असते, तसे या समस्त भिन्नभिन्न भासणाऱ्या भूतमात्रांत केवळ श्रीवासुदेवच असल्याचे ज्याने ओळखले आहे; किंबहुना वृक्षास अनेक पाने जरी असली तरी पानागणिक काही वेगळी रोपे अन वृक्ष लावलेले नसतात, तद्वत ज्याने या संसारातील वस्तुमात्राचे एकच एक परब्रह्मरूपी मूळ असल्याचे जाणून घेतले आहे, त्याची स्थिती काय वर्णावी!"

...। आईसिं अद्वैतदिवसें पाहिली। रात्र जेयां।।६-४००।।
तो पंचात्मकीं सांपडें। मग सांघ पां कैसेनि अडे।

"तो पुरुष म्हणजे अद्वैताचलच जणू! स्थिर आणि अचल असा अद्वैताचा मेरुपर्वतच असणारा खराखुरा माझा भक्त अन भक्तशिरोमणी आणि ज्ञानीही तोच! अद्वैतसूर्याने ज्याचा दिवस असा उजळून जाऊन द्वैतरूपी रात्रीचा तम नाहीसा केला आहे, तो पंचमहाभूतांच्या या जंजाळात सापडून अडकेलच कसा!"

जो प्रतीतिचेनि पाडें। मजसि तुकें।।६-४०१।।
माझें व्यापकपण आघवें। गंवसलें तेयाचेनि अनुभवें।
तऱ्हैं न म्हणतां स्वभावें। व्यापकु जाहाला।।४०२।।
आतां शरीरीं तऱ्हैं आहे। परि शरीराचा तो नोहें।
आईसें बोलवरी होएं। तैं करूं ये कांहिं।।४०३।।

"माझ्या सर्वव्यापकत्वास ज्याने आपल्या अनुभूतीने व्यापून सोडले आहे, त्यास सर्वव्यापक असे विशेषण कोणी बहाल केले नाही, तरी तो दुसरा कोण असणार, सांग बरे! तो देहातच राहूनही देहाशी सोयरीक न ठेवणारा जीवन्मुक्तच असतो, हे शब्दांनी कितीही सांगितले तरी त्याची खरी स्थिती कशी वर्णावी! त्यास येणारी अनुभूती ही मला येणाऱ्या अनुभूतीचीच आवृत्ती असते!!"

"साम्यापरौति जगिं। प्राप्ति नाही"

म्हणौनि असो तैं विशेषें। आपणपयासारिखें।
जो चराचर देखें। अखंडित।।६-४०४।।
सुखदुःखादि वर्मे। कां शुभाशुभ कर्में।
दोनिं आईसिं मनोधर्में। नेणेंचि जो।।४०५।।
हें समविषमभाव। आणिकही विचित्र जैं सर्व।
तैं मानीं जैसें अवयव। आपुलें होतिं।।४०६।।
हें एकैक काएं सांगावें। जेआं त्रैलोक्यचि आघवें।
मी आईसें स्वभावें। बोधां आलें।।४०७।।

"अरे! आणिक काय सांगावे! तो आपणासहित सर्व चराचरात एकच एक तत्त्व भरलेले असल्याचे अखंडित पाहतो. सुख वा दुःख, शुभ वा अशुभ कर्म अशी द्वंद्वे त्याच्या अंतरंगात उरतच नाहीत. सर्व सम विषम भाव, अनुकूल व प्रतिकूल वस्तुमात्र यांना तो जसे आपलेच अवयव असावेत तसे मानून आनंदात राहतो. अशा त्या महाभागाला हे सर्व त्रैलोक्य म्हणजे आपणच आहोत असा ठाम बोध असतो."

तेआंहिं देहु एकु कीर आथि।
लौकिकीं सुखदुःखी तेआंतैं म्हणति।
परि आम्हां आईसिचि प्रतिति। परब्रह्मचि हा।।६-४०८।।

म्हणौनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे।
आईसें साम्यचि एक उपासिजे। पांडवा गां।।४०९।।
हें तूंतैं बहुत प्रसंगीं। आम्हीं म्हणो याचिलागीं।
जैं साम्यापरौति जगीं। प्राप्ती नाहीं।।४१०।।

"पण तरीही त्यास एक देह हा असतोच आणि परिस्थितिसापेक्ष तो लोकांना सुखी वा दुःखी झालेला वाटतोही! परंतु आमचा अनुभव तर असाच आहे की तो पुरुष साक्षात परब्रह्मच आहे! म्हणून हे पांडवा! मी तुला सांगतो की हे विश्व आपणात पहावे आणि आपणच विश्व होऊन जावे! ***"हें समस्तहिं श्रीवासुदेओ"*** अशा भावाने उपासना करावी; ती सुलभरीत्या योगप्राप्ती करून देते. म्हणूनच मी वेळोवेळी तुला असाच ***समदृष्टिभाव*** धर असे सांगत आलो आहे. या भावावेगळी अन्य मोठी कोणतीही प्राप्ती या जगात नाही, हे नीट जाणून घे."

भिन्नभिन्न आलंबनविषय पण योग एकच

वरील ओव्यांतून योगप्राप्तीचे तीन सुलभ उपाय सांगितले आहेत. (१)***इंद्रियनियमन -➢वैराग्य-➢संकल्पसंन्यास -➢आत्मप्राप्ती;*** (२) ***धारणा -➢ध्यान -➢समाधि***-(अ) **चित्तवृत्तींचा निरोध करून व (ब) चित्तवृत्तींचा निरोध न करता शनैः शनैः आलंबविषयावर चित्त केंद्रित करणे आणि (३) सर्वांभूती एकात्मभावना करणे.** हे तीनही उपाय पातञ्जलयोगांतर्गत येतात.

पहिल्या उपायात ***इंद्रियनियमन*** हा चित्ताचा आलंबविषय आहे. त्यानंतर या धारणेतून ध्यान व समाधीकडे प्रगती होत जाऊन यथानुक्रमे कैवल्यप्राप्ती होते.

(२)(अ) हा उपाय सरळसरळ ***"योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।।"*** या पातञ्जलींच्या सूत्रानुसार आहे. यात ***चित्तवृत्ती*** हा आलंबविषय आहे. *(२)(ब)* हा उपाय असाच आहे. फक्त आलंबविषय अन्य कोणताही असू शकतो. यात ***ईश्वरप्रणिधान*** अंतर्भूत आहे.

तिसऱ्या उपायात ***सर्वत्र परब्रह्मभावना करणे*** हा चित्ताचा आलंबविषय आहे. ***धारणा -➢ ध्यान -➢समाधि व कैवल्यप्राप्ती*** यथानुक्रमे अपेक्षित आहेत.

हे सर्व प्राथमिक आलंबविषय होत. उत्तरोत्तर प्रगती होत जाईल तसे सूक्ष्मातिसूक्ष्म आलंबविषय घेऊन ***कैवल्य*** प्राप्त होते. ***हे तीन उपाय म्हणजे तीन वेगवेगळे योगप्रकार नसून एकच योग होय.*** कारण त्या उपायात भिन्नता केवळ आलंबविषयांची मात्र आहे. एवढे त्यांचे वैशिष्ट्य सोडले तर योगाचे इतर टप्पे व सर्व मार्ग तिन्ही उपायात तेच आहेत, हे जिज्ञासूंनी ध्यानी घेण्यासारखे आहे.

गीतेत जे योगप्राप्तीचे विभिन्न उपाय सांगितले आहेत, ते केवळ आलंबविषयाच्या भिन्नतेनुसारच आहेत. बाकी *क्रमावयाचा योगमार्ग एकच एक आहे.* किंबहुना ***ज्ञान, कर्म, भक्ती*** **इ.संज्ञा केवळ आलंबविषयाच्या भिन्नतेनुसारच प्रयोगात आणल्या गेल्या आहेत,** हे जिज्ञासूंनी निश्चित जाणून घेतले पाहिजे.

गीतेचा योग तसा *ज्ञान, कर्म, भक्ती व योग* या सर्वांच्या समुच्चयाचा सर्वसमन्वायक आहे. हे आतापावेतो आपण वेळोवेळी पाहिलेच आहे. आपण जेव्हा ज्ञानेशवर्णित ***क्रमयोगसोपान*** पाहू तेव्हा याचा अंतिम उलगडा होईल. तूर्त इत्यलम्।

योगभ्रष्टता::::

मनाचे चांचल्य व योगप्राप्ती

श्रीकृष्णांनी योगाचे सुलभत्व व उपायांची विविधता अर्जुनास समजावून दिल्यावरही अर्जुनास पुढील शंका उत्पन्न होतेच. तो म्हणतोः

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन।
एतस्याहंन पश्यामि चञ्चलत्वात्स्थितिं स्थिराम्।।६-३३।।
चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम्।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्।।६-३४।।

तो म्हणतो की, "हे मधुसूदना! हा जो चित्ताच्या समत्वाचा योग तू कथिलास, तो चंचल मनास कसा भावेल! या योगात मन कसे स्थिरावणार! हे कृष्णा! मन तर अतिशय चंचल असते व ते क्षोभत असते. विषयांकडे सतत धावणाऱ्या अशा बलवान मनास आवरणे फारच कठीण आहे. ते वळवून आलंबविषयावर स्थिर करणे व त्याचा निग्रह करणे हे वायूला आवरून धरून हव्या त्या दिशेने त्याला फिरवण्यासारखे दुष्प्राय नही का!"

ज्ञानेश अर्जुनाच्या या रास्त शंकेचे कसे शब्दांकन करतात, ते पहाः

अर्जुनु म्हणे देवा। तुम्हीं सांघा कीर आमुचियां कणवा।
परि न पुरो जी स्वभावा। मनाचिआं।।६-४११।।
हें मन कैसें केवढें। आईसें पाहों म्हणो तन्हैं न सांपडें।
एरविं राहाटावेयां थोडें। त्रैलोक्य ययां।।४१२।।
म्हणौनि आईसें कैसें घडेल। जैं मर्कट समाधि येईल।
कां राहें म्हणतलिआं राहैल। महावातु।।४१३।।

अर्जुन श्रीकृष्णांस म्हणतो की "देवा! ही योगयुक्ती अत्यंत सोपी करून तुम्ही आमच्या कणवेखातर सांगितली खरी! पण या मनाचा चंचल स्वभाव लक्षात घेता हे उपाय कसे काय पुरे पडणार! हे मन केवढे आणि कुठे आहे हे पाहू जाणाऱ्यास त्याचा थांगपत्ताही लागत नाही. तरीही त्याला विहरण्यास त्रैलोक्य पण अपुरे पडते. म्हणून मनाला स्थिर करण्याची गोष्टच सोडून द्या! माकड कधीतरी स्वस्थ बसेल काय! झंझावाताला आपण *"थांब"* म्हटले म्हणून तो कधी वाहायचा राहील काय!"

जैं बुद्धितैं सलीं। निश्चयांतैं टालीं।
धैर्येसि हातफली। मिलऊनि जायें।।६-४१४।।
जैं विवेकातैं भुलवी। संतोषासिं चाड लावि।
बैसिजे तन्हैं हिंडवि। दाहीं दिशा।।४१५।।

जैं निरोधिलें घे उवावो। जेआं संयमुचि होएं सावावो।
तैं मन आपुला स्वभावो। सांडील काईं।।४१६।।
म्हणौनि मन एक निश्चल राहील। मग आम्हांसि साम्य येईल।
हें विशेषेंहि न घडेल। तेयांलागिं।।४१७।।

"जे बुद्धीला गांजते, जे निश्चयाला चुकवून दशदिशा पळत सुटते, धैर्याच्या हातावर टाळी देऊन जे पळून जाते - जे धैर्यास गवसत नाही; जे विवेकास भ्रमात पाडते, जे संतोषासही आस लावते, जे एकाच ठिकाणी राहणाऱ्या क्षेत्रसंन्याशासही दाही दिशा हिंडवते; जे निरोधले असता जोराने उसळ्या मारून निरोधाचा कांच तोडून फेकून देते; संयमासुद्धा जे आपला सहकारी करून सोडते; ते मन कधीतरी आपला उपजत स्वभाव सोडेल काय! असे मन अखंड निश्चल राहील आणि आम्हास योगप्राप्ती घडेल, हे म्हणूनच केवळ अशक्यप्राय आहे. असे कालांतरीही घडून येणार नाही."

अभ्यासाचा उपाय

यावर श्रीकृष्ण उत्तरतातः

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते।।६-३५।।
असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः।
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः।।६-३६।।

"हे महाबाहो! या चंचल मनाचा निरोध करणे निःसंशय फार कठीण आहे. परंतु सातत्याने अभ्यास करून व वैराग्यवृत्ती अंगी बाणवून घेत जाऊन त्याचा निग्रह करता येतो. जे आत्मसंयमनाचा निश्चय कृतीत आणू शकत नाहीत, त्यांच्यासाठी योगप्राप्ती दुष्प्रायच आहे. पण स्वाधीन अंतःकरणाच्या निश्चयी पुरुषास अभ्यासपूर्वक उपाय करून मनाचा निग्रह पूर्णत्वास नेणे जमते आणि योगप्राप्ती होते."

ज्ञानेश हे श्रीकृष्णवचन आपल्या बोलीत स्पष्ट करतात, ते असेः

तंव कृष्ण म्हणति सांचि। बोलत आहासि तैं तैसेंचि।
ययां मनाचा कीर चपलचि। स्वभावो गां।।६-४१८।।
परि वैराग्याचेनि आधारें। जन्हैं लाविलें अभ्यासाचिएं मोहरें।
तन्हैं केतुलेनि एकें अवसरें। थिरावेल।।४१९।।
कां जैं येयां मनाचें एक नीकें।
जैं हें देखिलें गोडिचियां ठायां सोकें।
म्हणौनि अनुभवसुखचि कवतुकें। दावित जाईजे।।४२०।।

कृष्ण म्हणाले, "कौंतेया! तू मनाबद्दल जे म्हटले ते खरेच आहे. ते फारच चंचल असते. पण वैराग्य अंगी बाळगून त्यास जर अभ्यासाकडे प्रवृत्त केले, तर ते काही काळाने स्थिर होते. या मनाचे एक चांगलेपण आहे. ते असे की त्याला कोणत्याही विषयाची गोडी लागली की त्याच्यासाठी ते सवकते. त्याला जर आत्मानुभूती चाखवली तर ते त्या अनुभवासाठी उत्कंठ होते. म्हणून त्याला हसतखेळत सहजच थोडे आत्मसुख दाखवावे. मग ते आपोआपच योगाकडे प्रवृत्त होते."

एरवीं विरक्ति जेयांसि नहीं। जैं अभ्यासिं न रिघति कंहिं।
तेआं नाकळें हें आम्हीहीं। न मनूं काईं।।६-४२१।।
परि यमनियमांचिआं वाटा न वचिजे।
कंहिं वैराग्याचि सें न करिजे।
केवल विषयजलीं ठाकिजे। बुडी देऊनि।।४२२।
ययां जालियां मानसा कंहिं। युक्तीचि कांबि लागली नहीं।
तन्हैं निश्चल होईल कांइं। कैसेनि सांघें।।४२३।।
म्हणौनि मनाचा निग्रहो होएं। आईसा उपावो जो आहे।
तो आरंभीं मग नोहें। कैसा पाहों।।४२४।।

"नाही तर जे थोडेही विरक्त नाहीत आणि ज्यांना अभ्यास करावासा वाटत नाही, त्यांना योगप्राप्ती होणार नाही, हे काय मला पटत नाही असे का आहे ! जे यमनियमांच्या वाटेलासुद्धा कधीही जात नाहीत; सहजसुद्धा वैराग्याची गोष्टही काढत नाहीत; जे केवळ विषयजळी बुडी देऊन बसले आहेत; जन्मल्यापासून तहहयात ज्यांना योगाची शिस्त पण माहीत नाही, त्यांचे मन कसे निश्चलत्व पावेल, सांग पाहू! म्हणूनच मी म्हणतो आहे की मनाचा निग्रह ज्याने होऊ शकेल असा उपाय मी सांगितला तसा करण्यास प्रारंभ तरी करून बघ! मग हे मन निश्चळ कसे होत नाही, ते पाहू या आपण!"

पुढे श्रीकृष्ण सांगतातः

तन्हैं योगसाधन जितुकें। तैं आघवेंचि काएं लटिकें।
परि आपणपयां अभ्यास न ठाके। हेंचि म्हणें।।६-४२५।।
आंगिं योगाचें होएं बल। तन्हैं मन केतुलें चपल।
काय महदादि हें सकल। आपु नोहें।।४२६।।

"अर्जुना! अरे मोठेमोठे आत्मदर्शी लोक योगसाधन सांगतात, ते काय उगीचच काही थोतांड आहे काय! योग जमणे कठीण आहे असे तू म्हणतोस. पण आपली त्यासाठी अभ्यास करण्याची खरी इच्छाच नाही असे का नाही सांगत! योगाभ्यासाचे बळ अंगी असले की या चपळ मनाची धाव कोठवरी असणार! अभ्यास करून हे सर्व महत्तत्त्वादी स्ववश होत नाहीत का!"

तेथ अर्जुनु म्हणें नीकें। देओ बोलति तैं न चुकें।
सांच योगबलेंसि न तुकें। मनोबल।।६-४२७।।
परि तोचि योगु कैसा केंविं जाणों।
आम्हीं एतुलें दिया मातुहि नेणों।
म्हणौनि मनांतैं जी म्हणों। अनावर हें।।४२८।।
हा आतां आघवेयां जन्मा। तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा।
योगपरिचओ आम्हां। जाहाला आजि।।४२९।।
परि आणिक एक गोंसांवियां। मज संशयो असें सांवियां।
तो तूंवाचौनि फेडावेया। समर्थु नाहीं।।४३०।।

यावर अर्जुन संमती दर्शवत म्हणतो की "देवा! तुम्ही सांगता ते सत्यच आहे. तुम्ही म्हटलेले कधी वावगे कसे होईल! खरोखरीच योगबलापुढे मनोबलाची मात्रा काही चालणार नाही. पण आम्हाला

योगाची ओळखही नव्हती. त्याची महत्ता इतके दिवस आम्हाला अजिबात माहिती नव्हती. म्हणूनच आम्ही मनाचे सामर्थ्य अनावर आहे असे म्हणत होतो. आमचा उभा जन्म असाच गेला. पण आज तुझ्या कृपेने आम्हाला योगाचा खरा परिचय झाला आणि आम्ही धन्य झालो! पण हे प्रभो! मला अजूनही काही एक संशय आहे. तो दूर करण्यासाठी तुझ्यावाचून कोण समर्थ आहे!"

अर्जुनाची दुसरी शंका

अर्जुनाची शंका काय आहे, पहा:"

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति।।६-३७।।

"हे कृष्णा! श्रद्धापूर्वक एखादा मनुष्य योगासाठी प्रयत्न करू लागला, पण स्वभाववश होऊन त्याच्या हातून पुरेसे प्रयत्न न होऊन त्याचे मन योगाभ्यासापासून ढळले तर त्याला योगसिद्धी कशी होईल आणि त्याला कोणती गती प्राप्त होईल, ते सांग!"

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति।।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि।।६-३८।।
एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः।
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते।।६-३९।।

"हे महाबाहो! मोहवश होऊन योगापासून भ्रष्ट झालेला पुरुष ब्रह्मपथात स्थिर न होणे आणि संसारापासूनही भ्रष्ट होणे असा तो कोणीकडचाही नाही असा होऊन आकाशात फुटलेला ढग जसा विरून जातो, तसा शून्यवत तर होत नाही ना! कृष्णा हा माझा संशय तूच दूर कर. तुझ्यासारखा या संशयाचे निःशेष निराकरण करणारा दुसरा कोण आहे!"

योगभ्रष्टास कोणती गती

ज्ञानदेव अर्जुनाची ही शंका मांडतात ती अशीः

म्हणौनि सांगे गोविंदा। कवण एकु मोक्षपदा।
झोंबत होता श्रद्धा। उपायेंविण।।६-४३१।।
इंद्रियग्रामौनि निगाला। आस्थेचियां वाटां लागला।
आत्मसिद्धिचियां पुढिला। नगरां यावया।।४३२।।
तंव आत्मसिद्धि न ठकेचि। आणि माघुतैं न येववेंचि।
आईसा अस्तु गेला माझारींचि। आयुखभानु।।४३३।।

"हे गोविंदा! समज की कोणी एक साधक आस्थापूर्वक मोक्षपदप्राप्तीसाठी झटू लागला. पण त्याच्या हातून योगसाधनेचे पुरेसे प्रयत्न काही घडले नाहीत, तर त्याचे काय होईल! इंद्रियांचा निग्रह करून तो आत्मसिद्धिरूपी नगराकडे मोक्षमार्गाने वाटचाल तर करू लागला. इंद्रियग्राम तर मागेच पडले आणि आत्मसिद्धिनगरापावेतो तर तो पोहोचू शकला नाही. पुनः मागे परतून संसाराकडेही तो वळू शकला नाही आणि त्याच्या आयुष्यभानूचा तेव्हाच जर अस्त झाला, तर त्याची स्थिती काय होईल, हे तू मला सांग."

जैसें अकालीं आभाल। अलुमालु सपातल।
विपाएं आलें केवल। वसें ना वर्षे।।६-४३४।।
तैसिं दोनिं दुरावलीं। जैं प्राप्ति तंव अलग ठेलीं।
आणि अप्राप्तिहीं सांडविली। श्रद्धा तेआं।।४३५।।
आईसा वोलांतरला काजिं। जो श्रद्धेचांचि समाजिं।
बुडाला तेयां हों जी। कवण गति।।४३६।।

"जसे भलत्या काळी आभळात विरळ ढग आले तर ते वर्षतही नाहीत आणि टिकूनही राहत नाहीत, त्याप्रमाणेच त्याची दोन्हीकडूनही नागवणूक नाही का होणार! आत्मप्राप्ती तर दूरच राहिली आणि साधे संसारसुखही त्याने लाथाडले, असा त्याच्या मोक्षावरील श्रद्धेचा परिणाम तर होणारच ना! मोक्षसुखावरील श्रद्धेच्या लोंढ्यात असा बुडून जाऊन ज्याचा कार्यभाग नासला, त्याला, हे श्रीकृष्णा! कोणती गती प्राप्त होते, ते मला सांग. तो तर मोक्ष आणि प्रपंच या दोन्हीनांही मुकला असेच मला वाटते."

योगसाधनेचा विनाश होत नाही

यावर श्रीकृष्ण त्याच्या शंकेचे निरसन करत म्हणतातः

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते।
न हि कल्याणकृत् कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति।।६-४०।।

"हे प्रिय पार्था! त्या मनुष्याचा इहलोकही नाशत नाही आणि परलोकही नाशत नाही. तसेच अशा प्रकारे शाश्वत कल्याण प्राप्त करून घेण्याचा शुभ प्रयत्न करणाऱ्या साधकास कोणतीही दुर्गती प्राप्त होत नाही."

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते।।६-४१।।
अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्।।६-४२।।

"प्रयत्न अपुरे असल्यामुळे मोक्षसिद्धी प्राप्त न होताच जर त्याचे देहावसान झाले तरी त्या योगाचे पुण्यकर्म आचरू पाहणाऱ्या पुरुषास उत्तमोत्तम पुण्ये करणाऱ्यांचा लोक प्राप्त होतोच. पण तेथे अनेक काळपर्यंत वास्तव्य करून तेथील उपभोग यथेच्छ भोगून झाल्यानंतर त्या योगभ्रष्ट साधकास शुद्धाचरणी व श्रीमान अशा कुलात जन्म मिळतो. अथवा अत्यंत बुद्धिमान अशा योग्यांच्या कुळात तो जन्म पावतो. असा जन्म घ्यावयास मिळणे हे या जगामध्ये अत्यंत दुर्लभ आहे."

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन।।६-४३।।
पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।
प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।।६-४५।।

"हे कुरुनंदना! मग त्या जन्मी त्याला पूर्वजन्मीच्या संस्कारांनी युक्त असलेल्या योगाचरणाच्या बुद्धीचा संयोग घडून येतो. त्या बुद्धिप्रभावाने तो पुनः योगसिद्धीसाठी प्रयत्न करतो. त्या पूर्वाभ्यासयोगे तो आपोआपच योगाकडे आकर्षित होतो. अर्जुना! **योगाविषयी साधारण जिज्ञासा असणारासुद्धा *शब्दब्रह्मास ओलांडून* पलीकडील आत्मतत्त्वाकडे खेचला जातो.** अनेक जन्म योगप्राप्तीसाठी प्रयत्न करत आलेला तो योगसाधक पापापासून शुद्ध होऊन अंती परमगती पावतोच पावतो!"

यावर नितांतसुंदर काव्यात्म भाषेत ज्ञानदेव सांगतातः

तंव कृष्ण म्हणति पार्था। जेआं मोक्षसुखीं आस्था।
तेयां मोक्षावांचौनि अन्यथा। गति आहें गां।।६-४३७।।
परि एतुलेचि एक घडे। जैं माझारीं विसंवावें पडे।
तेंहि परि आईसेनि सुरवाडें। जो देवां नाहीं।।४३८।।
एरविं अभ्यासाचां उचलतां। पाऊलीं जन्हैं चालतां।
तन्हैं दिवसाआधीं ठाकितां। सोऽहंसिद्धीतैं।।४३९।।
परि तेतुला वेगु नोहेंचि। म्हणऊनि विसांवा तन्हैं नीकाचि।
पाठीं मोक्षु तंव तैसाचि। ठेला असे।।४४०।।

कृष्ण म्हणाले, "अर्जुना! ज्याला मोक्षसुखाची चाड आहे, त्याला मोक्षावाचून दुसरी कोणती गती मिळणार सांग बरे! पण प्रयत्नांत शिथिलता असणाऱ्या योगसाधकाच्या बाबतीत एवढे बरीक होते की त्याला मध्यंतरी विसावा घ्यावा लागतो. पण तो विसावा इतका सुखदायक असतो की जो प्रत्यक्ष देवादिकांनाही भोगावयास मिळत नाही. जर त्या साधकाने आपली अभ्यासाची पावले जलद उचलली असती, तर त्याचा आयुष्यसूर्य अस्तास जाण्यापूर्वीच तो ***सोऽहंसिद्ध*** झाला असता. पण वेग कमी पडल्याने मध्ये हा विसावा घेणे भागच पडते. पण कसेही असले तरी त्याच्यासाठी मोक्ष जसाच्या तसा राखून ठेवलेलाच असतो."

आईकें कवतुक हें कैसें। शतमखा लोक सायासें।
तैं तो पावे अनायासें। कैवल्यकामु।।६-४४१।।
मग तेथिंचें जैं अमोघ। अलौकिक भोग।
भोगितांहि सांग। कांटाळें मघ।।४४२।।
हा अंतराओ अवचितां। कां वोढवला भगवंता।
दिविभोग भोगितां। अनुतापी नित्य।।४४३।।

"ऐक! हे अप्रूप कसे आहे ते. शंभर यज्ञ करून स्वर्लोकी जाणाऱ्या पुण्यवंतांस जे उपभोग एवढे कष्ट करून मिळतात, ते त्या कैवल्येच्छू साधकास सहजच प्राप्त होतात. पण तेथील ते दिव्य अवीट अलौकिक असे उपभोग घेण्याचाही त्याला कंटाळा येऊ लागतो. ते देवांचे उपभोग भोगत असतांना त्यास नित्य अनुताप होत असतो की "देवा! माझ्या मोक्षमार्गात हा अंतराय कोठून उपटला बरे!"

उत्तम कुळी पुनर्जन्म

शेवटी एकदाची त्याची त्या स्वर्गसुखाच्या आडंबरातून सुटका होते. आणिः

पाठीं जन्में संसारीं। परि सकल धर्माचिआं माहेरीं।
लांबा उगवें आगरीं। विभवश्रिएंचां।।६-४४४।।
जेआंतैं नीतिपंथें चालिजे। सत्यधूत बोलिजे।
देखावें तैं देखिजें। शास्त्रदृष्टी।।४४५।।
वेद तो जागेश्वरु। जेआं वेवसाय निजाचारु।
सारासारविचारु। मंत्री जेआंतैं।।४४६।।
जेआंचिआं कुलीं चिंता। जाहाली ईश्वराचि पतिव्रता।
जेआंतैं गृहदेवता। आदि ऋद्धि।।४४७।।
आाईसिं निजपुण्याचिआं जोडी।
वाढिन्नली सर्वसुखाचि कुलवाडी।
तिएं जन्मे तो सुरवाडी। योगच्युतु।।४४८।।

"तो मग या लोकी जन्मतो तो अशा कुलात की जे सर्व धर्माचे माहेरच असते. ते कुल म्हणजे ज्यात विभवश्री पिकते ते आगरच जणू आणि हा त्यात उगवलेला नवजात कोवळा लोंबच जसा! ते कुल नीतिमार्गाने चालणारे, शास्त्रदृष्टीने सर्व अवलोकणारे, वेद म्हणजे ज्याची यज्ञदेवता आहे, असे असते. त्या कुळी ***स्वधर्म*** हाच व्यवसाय असतो; सारासारविचार हा मंत्री असतो; ईश्वराचे चिंतन हीच त्या कुळाची सौभाग्यलक्ष्मी असते. ऋद्धिसिद्धी या तर त्या कुळीच्या प्रमुख देवता असतात. स्वपुण्याईद्वारे त्या कुळाची शेतेभाते सर्वसुखरूपी पिकाने भरघोस पिकत असतात. अशा संपन्न घराण्यात तो योगभ्रष्ट पुनः जन्म घेतो."

अथवा ज्ञानाग्निहोत्री। जैं परब्रह्मण्य श्रौत्री।
महासुखक्षेत्रीं। आदिवंत।।६-४४९।।
जैं सिद्धांताचां सिंहासनीं। राज्य करिति त्रिभुवनिं।
जैं कुंजते कोकिल वनीं। संतोखाचां।।४५०।।
जैं विवेकग्रामींचें मुलीं। बैसलें आहाति नित्य फलीं।
तेआं योगियांचां कुलीं।जन्म पावें।।४५१।।

"किंवा ज्यांच्या गृही ज्ञानरूपी अग्नीचे अग्निहोत्र सतत प्रज्वलित झालेले असते; जे परब्रह्माचे श्रोत्रिय असतात; महासुखाच्या क्षेत्रात वसणारे जे मुळचे रहिवासी असतात; जे सिद्धांताच्या सिंहासनावर अधिष्ठित होऊन त्रिभुवनाचे साम्राज्य सुखेनैव राहटत असतात; जे संतोषरूपी उपवनात मंजुळ रव करणारे कोकीळ आहेत; विवेकरूपी ग्रामास ज्यांनी वसवलेले असते; जे मोक्षरूपी फलावर बसलेले पक्षी असतात, अशा योग्यांच्या कुळी तो योगच्युत जन्मतो."

आईसें जैं जन्म। जेआंलागिं देव सकाम।
स्वर्गीं ठेलें जपहोम। करिति सदा।।६-४५५।।
अमरीं भाट होईजें। मग मृत्युलोकांतैं वानिजें।
आईसें जन्म पार्था गां जैं। तैं तो पावें।।४५६।।

"असे जे जन्म तो पावतो, त्यांच्यासाठी देवही अत्युत्सुक असतात आणि तसे जन्म मिळावेत म्हणून ते स्वर्लोकी सतत यज्ञयाग, जपतपादी

साधने करत असतात. स्वर्गात राहूनही मृत्युलोकींच्या ज्या जन्माची स्तुतिस्तोत्रे गावीत असे ते जन्म त्या योगभ्रष्टास पावतात."

जन्मताच ज्ञानसूर्याची प्रभा फाकवत तो योगभ्रष्ट मृत्युलोकी अवतरतो. ***बाळपणीच सर्वज्ञता त्याला वरते; सिद्धप्रज्ञा प्राप्त होते;*** मनातून सारस्वत दुभू लागते. सर्व शास्त्रे आपोआप त्याच्या मुखातून प्रकट होतात. पूर्वजन्मीच्या सद्बुद्धीचा त्याला पुनश्च लाभ होतो. केवळ गुरुगम्यच असे जे रहस्य असते, ते त्यास सहजच अवगत होते.

बलाढ्य इंद्रिये मनाला आपच वश होतात; मन प्राणांशी एकवटते आणि तो प्राण सहजच मूर्ध्निस्थानी जाऊन गगनात विलीन होऊ लागतो. योगाभ्यास असा सहजगत्या वश होतो, जणू त्याने त्या योगभ्रष्टास वरमालाच घातली असावी. समाधी त्याच्या मनाचा ठिकाणा पुसत येते.

"म्हणौनि उपजतखेंवों बुडाली। लग्नघटिका"

त्या साधकाचे सहज सुंदर वर्णन करत ज्ञानेश म्हणतातः

जाणिजे योगपीठीचां भैरवु। कां हा आरंभरंभेचा गौरवु।
कीं वैराग्यसिद्धिचां अनुभवु। रूपां आला।।६-४६२।।
हा संसार उमाणितें माप। कां अष्टांगसामग्रीचें दीप।
जैसें परिमळेंचि धरिजें रूप। चंदनाचें।।४६३।।
आईसा संतोखाचां काएं घडिला। कीं सिद्धभांडाराहूनि काढिला।
दिसें तेणें मानें रूढला। साधकदशें।।४६४।।

"तो जणू योगपीठाधिष्ठित भैरवच होऊन राहतो. कुंडलिनी जगदंबा, ती आदिमाया त्याच्या रूपाने प्रत्यक्ष प्रकटते. वैराग्यसिद्धीचा अनुभव त्याची मूर्तीच होय. चौदाही भुवनांचे माप घेऊन तो परमात्मस्वरूपी विराजमान होतो. तो म्हणजे अष्टांगयोगाचा तेवता नंदादीपच म्हणेनास! परिमलाने चंदनाचे रूप घ्यावे, तसा तो साक्षात योगाची मूर्ती असतो. तो जसा संतोषाने घडवलेला असतो. सिद्धांच्या भांडारातून किंवा खाणीतून बाहेर काढलेले दैदिप्यमान सिद्धरत्न दिसावे, तसाच तो अगदी बाळपणी साधकदशेतही दिसतो."

जैं वर्षशतांचिआं कोडीं। जन्मसहस्त्रांचिआं आडी।
लंघितां पातला थडी। आत्मसिद्धीची।।६-४६५।।
म्हणौनि साधनजात आघवें। अनुसरें तेआं स्वभावें।
मग आयतिएं बैसें राणिवें। विवेकाचिएं।।४६६।।
पाठीं विचरतिआं वेगां। तो विवेकुहि ठाके माघां।
मग अविचारणीय तैं आंगां। घडौनि जाएं।।४६७।।

"कोट्यवधी संवत्सरशतांनी सहस्त्रो जन्मांचे उंबरठे ओलांडता ओलांडता तो या जन्मी आत्मसिद्धीच्या परतीरास लागतो. ही पक्वदशा त्याला जन्मोजन्मी केलेल्या योगसाधनेच्या फलस्वरूप लाभलेली असते. म्हणूनच ते साधनच आता त्याचा पाठपुरावा करत त्याला अनुसरून विवेकाच्या राज्यसिंहासनावर अधिष्ठित करते. ***सविचार समाधी*** **कडून त्याची *निर्विचार समाधी* कडे वेगाने प्रगती होते आणि तो *विवेक* तर केव्हाच मागे पडतो.** तो ***निर्बीज*** समाधीत केव्हा प्रवेशतो, ते त्याच्या या झपाट्याच्या मार्गक्रमणामुळे कळूनही येत नाही. कैवल्य प्राप्त करूनच त्याची ही घोडदौड थांबते."

तेथ मनाचें मेहुडें विरें। पवनाचें पवनपण सरें।
आपणपां आपण मुरे। आकाशही।।६-४६८।।
प्रणवाचा माथा बुडे। एतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडें।
म्हणौनि आधींचि बोलु बहुडें। तेयांलागिं।।४६९।।
आईसिं ब्रह्माचिं स्थिति। जैं सकलां गतींसिं गति।
तेयां अमूर्ताचिं मूर्त्ति।होऊनि ठाकें।।४७०।।

"जेथे मनरूपी मेघ विरून नाहीसा होतो; वायूचे वायूपण सरते; आकाशही आपल्याठायीच मुरून जाते; जेथे सर्व तत्त्वे लय पावतात; ज्यात ***प्रणवाची वा ॐकाराची अर्धमात्रा* सुद्धा बुडून जाते;** जेथून शब्द तेथे पोहोचण्याआधीच माघारी फिरतो; जाणिवेचा जेथे प्रवेशही होत नाही; जे सकळ गतींची परमगती आहे; जे अमूर्त ब्रह्म आहे, त्या ब्रह्माची मूर्तीच तो योगभ्रष्ट होऊन या लोकी राहतो."

तेणें बहुतिं माघिलीं जन्मीं। विक्षेपांचि पाणियालें झाडिलीं।
म्हणौनि उपजतखेंवों बुडाली। लग्नघटिका।।६-४७१।।
आणि तद्रूपतेशीं लग्न। लागौनि ठेलें अभिन्न।
जैसें लोपलें अभ्र गगन। होऊनि ठाकें।।४७२।।
तैसें विश्व जेथ होएं। माघौतें जेथ लया जाएं।
तैं विद्यमानचि देहें। जाहाला तो गां।।४७३।।

"त्याने मागील अनेक जन्मातील विक्षेपांची शेवाळी दूर सारली असतात. म्हणून ब्रह्माशी संलग्न होण्याची वेळ त्याचा जन्म होतांनाच घटिकापात्र बुडून प्राप्त झालेली असते. आणि लोपलेले अभ्र गगनच होऊन जसे ठाकते, तसे त्याचे तद्रूपतेशी लग्न लागून तो तिच्याशी अभिन्न होऊन ठाकतो. विश्व जेथे होते व नंतर जेथे ते लयास जाते, ते तो या विद्यमान देहानेच होऊन जातो."

योगभ्रष्टानिमित्त पुनः *पंथराजदर्शन*

योगभ्रष्टाची ही स्थिती आणि गती सांगतांना ज्ञानेश्वर पुनश्च त्यात ***पंथराज*** गुंफण्यास विसरत नाहीत, हे विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखे आहे. अभ्यासाचे पाऊल जलद न उचलल्यामुळे पूर्वजन्मी योग अपुरा राहिलेला साधक पुढील जन्मी योग कसा पूर्णत्वास नेतो, किंबहुना पूर्वजन्मीचा योगाभ्यासच त्याला पूर्णत्वाकडे कसा नेतो, याचे अनुभवसिद्ध वर्णन ज्ञानदेवांनी वरील ओव्यांतून केलेले आहे. ***"जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते।।६-४४।।"*** या भगवदुक्तीची उकल त्यांनी पंथराजाच्या प्रमुख टप्प्यांद्वारे येथे केली आहे:

"सद्बुद्धी ->निजज्ञान -> सिद्धप्रज्ञा -> योगाचरण-> इंद्रियनिग्रह ->मनोनिग्रह -> मन-पवनाचा गगनी लय होणे -> मनाचा पट्टु फाटणे -> तत्त्वलय ->ॐकाराच्या अर्धमात्रेचा लय ->तुर्यातीतावस्था प्राप्त होणे" असे महत्त्वाचे टप्पे त्यांच्या या ओव्यांतून निर्देशित केलेले आहेत व ते सर्व पंथराजविशिष्ट आहेत, हे जिज्ञासूंच्या लक्षात आलेच असेल.

गीतेतील एकमेवाद्वितीय योग म्हणजे ज्ञानेशांनी वर्णिलेला पंथराजच होय, हे आपण आतापावेतो पाहिलेल्या विस्तृत विवेचनाचे सार होय! असो.

योग्याचे श्रेष्ठत्व

योगी सर्वश्रेष्ठ आहे, असे भगवंत म्हणतातः

तपस्विभ्योऽधिको योगी
ज्ञानिभ्योऽपि मतोधिकः।
कर्मिभ्यश्चाधिको योगी
तस्माद्योगी भवार्जुन।।६-४६।।

"तपस्वी, ज्ञानी वा कर्मी या सर्वांपेक्षा योगी श्रेष्ठ आहे, असे माझे मत आहे. हे अर्जुना! म्हणून तू योगी हो."

ज्ञानेश यातील तपस्वी, ज्ञानी व कर्मी कोण यावर प्रकाश टाकत म्हणतातः

जेयां लाभाचिआं आशा। करूनि धैर्यबाहूंचा भंरवसा।
घालीत षट्कर्मांचा धारसा। *कर्मनिष्ठ* ।।६-४७४।।
कां जिएं एकी वस्तूलागिं। बाणौनि ज्ञानाचि वज्रांगी।
जूंझत प्रपंचेशीं समरंगिं। *ज्ञानिएं* गां।।४७५।।
अथवा निलागें निसरडा। तपोदुर्गाचां आडकडा।
झोंबति *तपिएं* चाडां। जेयांचिएं।।४७६।।
जैं भजतियांसि भज्य। याज्ञिकांचे याज्य।
एवं जैं पूज्य। सकलां सदा।।४७७।।
तैंचि तो आपण। स्वयें जाहाला निर्वाण।
जैं साधकांचे कारण। सिद्धतत्त्व।।४७८।।

श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना! ज्या लाभाच्या आशेने धैर्याचे बाहू करून त्या बळावर कर्मनिष्ठ लोक अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, प्रतिग्रह व दान या षट्कर्मांच्या धारदार प्रवाहात उडी घालतात; ज्या एका वस्तूपायी ज्ञाननिष्ठ लोक अंगी आत्मज्ञानाचे ज्ञानकवच चढवून या प्रपंचाशी समरांगणी झुंजावे तसे झुंजतात; ज्याची चाड बाळगून तपी लोक तपोदुर्गाच्या निसरड्या, अडचणीच्या आणि ताशीव सुळका असावा तशा कड्याला चिकटून चढून जाण्याचा कसोशीने प्रयत्न करतात; सकळ काळी सर्वांना पूज्य जे आहे; असे जे सर्वांची अंतिम अवस्था आहे; जे साधकांचे साध्य असे एकमेवाद्वितीय सिद्ध तत्त्व आहे; ते तो योगी स्वतःच साक्षात होऊन जातो."

म्हणौनि कर्मनिष्ठां वंद्यु। तो ज्ञानियांसिं वेद्यु।
तापसांचां आद्यु। तपोनाथु।।६-४७९।।
पैं जीवपरमात्मसंगमा। जेयांचे येणें जाहालें मनोधर्मा।
तो शरीरीचि परि महिमा। आईसि पावें।।४८०।।
म्हणौनि ययाकारणें। तूंतैं सदा मी म्हणें।
योगी होएं अंतष्करणें। पांडुकुमरा।।४८१।।

"म्हणूनच असा योगी कर्मनिष्ठांस वंद्य असतो. तो ज्ञान्यांचेही ज्ञेय असतो. आणि तापसांचा आद्य तपोनाथही तोच असतो! ज्याचा मनोधर्म असा जीवपरमात्मसंगमी लीन झाला, तो देहीच असतो खरा, पण त्याचे महिमान असे सर्वश्रेष्ठत्वाचे असते! म्हणूनच मी तुला नेहमी सांगत आलो आहे की पार्था! तू योगी व्हावेस!"

समारोप

श्रीकृष्णांच्या ***"तस्मात् योगी भवार्जुन।।६-४६।।"*** या निर्वाणीच्या उद्गारांनी आपला हा गीता-ज्ञानेश्वरीतील योगविचार बव्हंशी पूर्ण होतो. आता प्रथम वळू या बाराव्या अध्यायातील भक्तीचे उर्वरित दर्शन घेण्यासाठी पुढील ***उन्मेष क्र.५४-१: योग व भक्ती*** आणि त्यानंतर ***उन्मेष क्र.५४-२: भक्तिदर्शन*** यांकडे. या चालू **त्रयोदश स्कंधा**त आपण ***योग व भक्ती यांचे सार*** पाहत आहोत, हे जिज्ञासूंस सांगणे न लगे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५४-१::
::योग व भक्ती::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५४-१

गीता:

६:४७

१२:१२-२०

ज्ञानेश्वरीः

६:३८२-४९७

१२:१४१-२०८,२३०-२४७

::उन्मेष ५४-१::
::योग व भक्ती::

योग व भक्ती::::

योग व भक्ती यांचे अनन्यत्व

मागील उन्मेषातून आपण योगाचा उर्वरित विचार क्रमयोग सोडता पूर्ण केला. वेळोवेळी भक्ती व योगाचा अनुबंध काय आहे, याची आपण चर्चाही केली. आता या उन्मेषात ***योग व भक्ती*** यांच्या विशेष संबंधांवर पुन: एकवार नजर फिरवू या.

योग हा भक्तिपूर्वकच असावा असे सांगत श्रीकृष्ण पुढे म्हणतात:

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मत:।।६-४७।।

"सर्व योग्यांमध्येही जो योगी श्रद्धापूर्वक माझ्याठायी अंत:करण जडवून मला भजतो, तोच खरा सर्वश्रेष्ठ योगी होय असे मला वाटते."

ईश्वरप्रणिधानयुक्त योग आचरणे सुलभ असते आणि योग व भक्ती यांचा असा संगम करणारा कर्म-ज्ञान-भक्तिपूर्ण योगच सर्वश्रेष्ठ असतो, असे भगवंतांचे सांगणे आहे. नंतर बाराव्या अध्यायी अर्जुनाने १२-१ याद्वारे केलेल्या पृच्छेचे भगवान या श्लोकातून अगोदरच उत्तर देत आहेत! ज्ञानेश म्हणतात:

अगां योगी जो म्हणिजे। तो देवांचा देव जाणिजे।
आणि सुखसर्वस्व माझें। चैतन्य तो।।६-४८२।।
जेआं भजतां भजन भजावें। हें भक्तिसाधन जैं आघवें।
तैं मिचि जाहालों अनुभवें। अखंडित।।४८३।।
मग तेयां आम्हा प्रीतीचें। स्वरूप बोलीं निर्वचें।
आईसें नोहें गां तो सांचें। सुभद्रापति।।४८४।।
तेयां एकवटिलिआं प्रेमा। जन्हैं पाडें पाहिजे उपमा।
तन्हैं मी देह तो आत्मा। हेंचि होय।।४८५।।

"जो योगी ***भजन करणारा, भजन आणि भज्य*** ही जी भक्तीची त्रिपुटी आहे, तिच्यात परब्रह्माला पाहतो आणि ही त्रिपुटी सांडून परब्रह्मरूप होऊन अखंड वसतो, तो म्हणजे देवांचाही देव होय. तो माझे सुखसर्वस्व असतो. तो माझे चैतन्य असतो. त्याच्या व माझ्या प्रीतीचे स्वरूप शब्दात सांगता येईल, असे ते स्वरूप खरोखर नसते. पण आमच्या एकात्म प्रीतीला योग्य उपमा द्यावयाचीच असेल तर अर्जुना! तो आत्मा व मी देह असे आमचे नाते असते म्हणेनास!"

आईसें भक्तचकोरचंद्रें। तेथ त्रिभुवनैकनरेंद्रें।
बोलिलें गुणसमुद्रें। संजयो म्हणे।।६-४८६।।
तेथ आदिलापासौनि पार्था। आईकिजैं आईसिचि अवस्था।
दुणावली हें यदुनाथा। पावों सरलें।।४८७।।
कीं सावियांचि मनीं तोखला। जैं बोलां आरिसा जोडिला।
तेणें हरिखें आतां उपलवला। निरूपील।।४८८।।

संजय म्हणतो की "त्या गुणसागर, त्रिभुवनाच्या एकच एक नरेंद्र अशा भक्तचकोरचंद्र श्रीकृष्णाने योग्याची भक्ती वर्णित असे सांगितले. भगवंतांचे हे बोल लक्षपूर्वक ऐकणाऱ्या अर्जुनाला ते ऐकून अजूनही प्रभूचे निरूपण ऐकावे अशी इच्छा दुणावली. ते पाहून भगवंतांना मनी संतोष झाला. यदुनाथ श्रीकृष्णांना जणू आपले बोल प्रतिबिंबित करणारा अर्जुनरूपी आरसाच गवसला. त्यामुळे त्यांच्या आनंदाला उधाण आले आणि ते पुढील सविस्तर निरूपण करण्यासाठी हर्षोत्सुक झाले."

"माथां हातु ठेविला"

त्या प्रसंगाचे वर्णन करण्यास ज्ञानदेव सिद्ध झाले आहेत. त्या प्रसंगाबाबत आता ते काय म्हणतात, ते त्यांच्याच रसाळ वाणीने ऐका:

तो प्रसंगु आहे फुडां। जेथ शांतु दिसेल उघडा।
तो पालविजैल मुडा। प्रमेयबीजांचां।।६-४८९।।
जैं सात्त्विकाचेनि वडपें। गेलें आध्यात्मिक खरपें।
साहाजें निरोललें वाफें। चतुरचित्ताचें।।४९०।।
वरी अवधानाचां वाफसा। लाधला सोनयाआईसा।..।।४९१।।

"श्रीकृष्णांचे ते अमृतमय बोल निरूपिण्याचे भाग्य मला लाभले आहे. ते बोल ऐकवण्याची वेळ आता आली आहे. त्या निरूपणात शांत रस उघडउघड दिसून येईल. गीतेतील प्रमेयरूपी बीजांचा मोकळा केलेला कणगाच मी तुम्हापुढे उघडा करणार आहे. त्यातील बीजे तुम्हा श्रोत्यांच्या चित्तभूमीत पेरावयाची आहेत. तुमच्या श्रवणभक्तींच्या सरींनी चित्तभूमी वर्षली गेली आहे. त्यातली प्रपंचाची ढेकळे मोडली जाऊन तेथील अध्यात्माची जमीन मऊसूत झाली आहे. तिचे चतुरचित्तरूपी सोन्यासारखे अध्यात्मवाफे आयतेच तयार झाले आहेत. अन् त्यांत अवधानरूपी बाष्पोदकाने बीज पेरण्यास योग्य अशी मनाची ऊब धरली आहे."

...। म्हणौनि पेरावया धिंवसा। निवृत्तिसि।।६-४९१।।
ज्ञानदेओ म्हणे मी चाडें। सद्गुरूंनी केला कोडें।
माथां हातु ठेविला तैं फुडें। बीजचि वाईलें।।४९२।।
म्हणौनि एणें मुखें जैं निगें। तैं संतांचिआं हृदयीं सांचि लागें।
हें असो सांघें श्रीरंगें। बोलिलें जैं।।४९३।।

"हे सगळे निवृत्तिनाथांना सहजच लाभले आहे. म्हणून गीताबीजे पेरण्यासाठी सगळे काही चांगले जुळून आलेले पाहून व पेरणीस योग्य काल आल्याचे पाहून ते अतिहर्षित चित्ताने पेरणी करण्यास फार उत्सुक झाले आहेत. माझ्या त्या प्रेमळ सद्गुरूंनी कौतुक म्हणून माझेच चाडे बनवले आहे आणि गीताबीजे धरलेला हात माझ्या मस्तकी ठेवून ते माझ्यातून पेरण्यासाठी ठेवलेली बीजे सांडू लागले आहेत. म्हणूनच माझ्या मुखातून जे जे निघत आहे, श्रीरंगाने सांगितलेले जे

काही मी सांगत आहे, ते तुम्हा संतांच्या अंतःकरणास फार रुचते आहे."

ज्ञानदेवांचे आश्वासन

परि तैं मनाचां कानिं आईकावें। बोल बुद्धिचां डोलां देखावें।
हें सांटोवांटी घेयावें। चित्ताचिआं।।६-४९४।।
अवधानाचेनि हातें। नेयावें हृदयाआंतौतें।
हें रिझवितिल आयणितैं। सज्जनांचिआं।।४९५।।
हें स्वहितांतैं निववितिा परिणामातैं जिवविति।
सुखाचि वाहविति। लाखोली जीवां।।४९६।।
आतां अर्जुनेंसिं मुकुंदें। नागर बोलिजैल विनोदें।
तैं वोवियेचेनि प्रबंधें। सांघैन मी।।४९७।।

"ते सर्व खरे तर मनाच्या कानांनी ऐकावे. ते बोल बुद्धीच्या डोळ्यांनी पाहावेत. चित्ताचा मोबदला देऊन ते घ्यावेत. अवधानाच्या हाताने ते चित्तात नेऊन ठेवावेत. संतसज्जनांच्या बुद्धीला रिझवणारे हे बोल आत्महित स्थिर करतात; पूर्णत्वाला जीवन देतात; जीवाला सुखाची लाखोली वाहतात. आता मी श्रीकृष्णाने– त्या मुकुंदाने - अर्जुनाने दाखवलेल्या उत्कंठेने आनंदित होऊन जे सर्वोत्कृष्ट बोल बोलले, ते ओवीछंदात तुम्हास निरूपण करीन."

हे ऐकून श्रोते म्हणतातः "हे राहू दे! श्रीकृष्णांचे बोल तू आम्हाला लवकर सांग."

"भजतां -भजन–भजावे" हे भक्तिसाधन व अद्वैतस्थिती

योगी कसे श्रेष्ठ असतात, त्यातूनही भक्ती करणारे योगी कसे भगवंतास प्रिय असतात, ते आपण ***"तन्हें मी देह तो आत्मा"*** या ज्ञानेश्वरांच्या शब्दांतून पाहिले. ***"भजतां-भजन- भजावे"*** ही भक्तिसाधनाची त्रिपुटी होय. तीत आपणासह परब्रह्मच पाहणाऱ्या योगिभक्तांची अवस्था ती काय वर्णावी! या त्रिपुटीचाही लय होऊन सर्वत्र ***"तैं मीचि जाहाला अनुभवें। अखंडितु"*** असा योगी भगवंतांना आपल्यावेगळा वाटतच नाही! ***ईश्वरप्रणिधानयुक्त योग*** आचरण्याचे हे फल आहे. ***कर्म-ज्ञान-योग*** या त्रयीच्या संगमात भक्तीचा प्रवाह समरस होतो आणि गीतेतील हा एकमेवाद्वितीय असा वैशिष्ट्यपूर्ण योग प्रकटतो.

अवघे ज्ञान, अवघे कर्म, अवघे भक्तिसाधन असे योगमय करून परब्रह्मात त्यासह मिळून जाण्याचा हा योग आहे. ***"हें भक्तसाधन जैं आघवें। तैं मीचि जाहाला अनुभवें। अखंडित"*** असे त्याचे वर्णन ज्ञानदेव करतात. ***योगी तोच भक्त व तोच ज्ञानी*** हे आपणास अनेकदा दिसून आले आहे. किंबहुना ***गीतेतील या परब्रह्माच्या साधनाला योग, भक्ती, कर्मयोग वा ज्ञानयोग यातील कोणत्याही संज्ञेने संबोधले तरी चालेल,*** असेच आपणास दिसून आले आहे.

याच सूत्रास अनुसरत आपला हा गीता-ज्ञानेश्वरीचा आलेख अंती उंचावत जाणार आहे, तो अठराव्या कलशाध्यायातील ***क्रमयोग*** सोपानाकडे! त्या मार्गावर आता एक महत्त्वाचा टप्पा येणार आहे, तो म्हणजे बाराव्या अध्यायात वर्णिलेल्या योगिभक्तांच्या स्थितीचा. तिकडे वळू या.

भक्तलक्षणे व भगवंताची प्रीती::::

योगी भक्तांचे वर्णन

श्रीकृष्ण अशा भक्तांचे वर्णन करत बाराव्या अध्यायात म्हणतातः

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी।।१२-१३।।
सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः।।१२-१४।।

"कोणाचाही द्वेष न करणारा, सर्व भूतांप्रती मित्रभावाने वागणारा, सर्वांप्रती करुणा बाळगणारा, ममत्वबुद्धी व अहंकाररहित असा, ज्याला सुख व दुःख समान आहे; जो क्षमाशील आहे; जो सदैव संतुष्ट असतो; जो संयमी व दृढनिश्चयी आहे; ज्याने मलाच मन व बुद्धी अर्पण केली आहेत; असा जो भक्त योगी असतो, तो मला सदैव प्रिय असतो."

श्रीकृष्णांनी हा योगिभक्त ***"अभ्यास -➢ ज्ञान -➢ ध्यान -➢कर्मफलत्याग -➢शांतिसुख"*** अशा वाटेने चालत आलेला असतो, हे गीता *श्लोक क्र.१२-१२* त दर्शविले आहे. ***"अभ्यासाहूनि गहन। पार्था मग ज्ञान। ज्ञानापासौनि ध्यान। विशेषिजे।। मग कर्मफलत्यागु। तो ध्यानापासौनि चांगु। त्यागाहूनि भोगु। शांतिसुखाचा।। आईसिआं इयां वाटा। इहींचि पेणां सुभटा। शांतीचा माजिवठा। गांठिला तेणें।।१२-१४१ ते १४३।।"*** या ज्ञानेशांच्या ओव्यांतून ही वाटचाल कशी स्पष्ट होते, ते आपण पूर्वीच सविस्तर पाहिले आहे.

"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।" हा गीतेतील साधनेचा परवलीचा श्लोक कसा आहे, त्याचे विस्तृत विवेचन त्या वेळी आपण केले होते. ***कर्म-ज्ञान-भक्ती व योग*** यांचा हा गंगौघ कसा एकरस आहे, त्याचे बृहत दर्शन आपणांस घडलेच आहे. आता अशा साधनेतून सिद्धत्व पावलेल्या योगीभक्तांचे विशेष वर्णन आपण पाहत आहोत.

महात्म्यांची लक्षणे

त्यावर ज्ञानदेवांच्या ओव्या अशा आहेतः

जो सर्व भूतांचां ठाईं। द्वेषांतैं नेणेंचि कंहिं।
आपपरु नाहीं। चैतन्या जैसा।।१२-१४४।।
उत्तमातैं धरिजे। अधम तन्है अव्हेरिजे।
हें कंहिंचि नेणें। वसुधा जेविं।।१४५।।
कां रायाचें देह चाळूं। रंका परौतें गाळूं।
हें न म्हणेचि कृपाळु। प्राणु पैं गां।।१४६।।
गाईचि तृषा हरूं। कां व्याघ्रा विष होऊनि मारु।
आईसि नेणेंचि कां करूं। तोय जैसें।।१४७।।

"त्या महात्म्याची वैशिष्ट्ये ऐक. अर्जुना! तो कोणत्याही भूताचा द्वेष करणे जाणत नाही. जसा चैतन्यास आपपर भाव नाही, तसा तो सर्वांप्रति सम असतो. वसुंधरा अधमास टाकून देते आणि उत्तमासच धारण करते, असे कधी झाले आहे काय! मी फक्त राजाच्या देहाचेच काय ते चलनवलन करीन; रंकाचे करणार नाही, असे कधी तो कृपाळू प्राण म्हणतो काय! जल फक्त गाईची तृषा हरण करणार आणि वाघास विष होऊन मारणार, असा भेदभाव जाणते काय!"

तैसिं आघवांचि भूतमात्रीं। एकपणें जेआं मैत्री।
कृपेसिं धात्री। आपणपां जो।।१२-१४८।।
आणि मी तूं हें भाख नेणें। माझें कांहीहीं न म्हणें।
सुखदुःख जाणणें। नाहीं जेयां।।१४९।।
तेविंचि क्षमेलागिं। पृथिविसि पवाडु आंगिं।
संतोखा उत्संगिं। दिधलें घर।।१५०।।

"तो योगिभक्तही तसाच असतो. सर्व भूतमात्रांशी आपपरत्व न जाणवणारा तो असतो; त्याची सर्वांशी मैत्री असते. त्याची कृपा धरित्रीप्रमाणे सर्वांप्रती सम असते. तो *मी-तू* ही भाषा जाणत नाही. त्याला स्वतःचे असे काहीच नसते; तो ममत्वरहित असतो. त्याला सुखे व दुःखे जाणवत नाहीत; तो सुखदुःखातीत असतो. पृथ्वीएवढेच त्याचे क्षमत्व असते. अन संतोषाला तर त्याने उदारपणे आपल्या मांडीवरच बसवून घेतलेले असते."

पुढे ऐकाः

वार्षियेंविण सागरु। जैसा जलें नित्य निर्भरु।
तैसा निरुपचारु। संतोषी जो।।१२-१५१।।
वाहूनि आपुली आण। धरीं जो अंतष्करण।
निश्चया सांचपण। जेआंचेनि।।१५२।।
जीव परमात्मा दोनिं। बैसोनि ऐक्यासनिं।
जेआंचां हृदयभुवनिं। विराजति।।१५३।।

"वृष्टी झाली काय आणि न झाली काय, सागर जसा नित्य जळाने परिपूर्ण भरलेलाच असतो, त्याप्रमाणे तो योगी कोणतेही उपचार मिळोत वा न मिळोत, सदैव आपल्याठायी संतुष्ट असतो. तो चित्तास आपली शपथ वाहून त्याचा निर्धारपूर्वक निग्रह करतो. निश्चयास निश्चयत्व त्याच्यामुळेच येते. जीव व परमात्मा दोन्ही एकाच आसनावर अशी त्याच्या हृदयभुवनात विराजतात."

आईसा योगसमृद्धि। होऊनि जो निरवधि।
अर्पी मनोबुद्धि। माझां ठाईं।।१२-१५४।।
आंतु बाहेरीं योगु। निर्वाललेयांहिं चांगु।
तन्हैं माझां अनुरागु। सप्रेम जेआं।।१५५।।
अर्जुना गां <u>तो भक्तु। तोचि योगी तोचि मुक्तु</u>।
तो वल्लभा मी कांतु। आईसा पढिएं।।१५६।।

"योगाने एवढी समृद्धी प्राप्त केलेला तो योगी अखंड माझ्याठायी मनबुद्धी अर्पून असतो. अंतर्बाह्य ज्यास उत्तम योग सिद्ध झालेला आहे आणि तसाच ज्याच्याठायी माझा सप्रेम अनुराग वसत असतो, अर्जुना! तोच माझा खरा भक्त! तोच योगी! तोच मुक्त! तो मला स्त्री पतीला जेवढी प्रिय असते, तेवढाच प्रिय असतो! मी कांत व तो वल्लभा असे आमचे प्रेम असते."

भक्तावरील भगवत्प्रीती

हें ना तो आवडे। मज जिवाचेनि पाडें।
हेंहि एथ थोडें। रूप करणें।।१२-१५७।।
तन्हैं पडियंतयाचि काहाणि। हें भुलीचि भारणि।
इयें तंव न बोलणिं। परि बोलवि श्रद्धा।।१५८।।
म्हणौनि गां आम्हां। वेगां आली उपमा।
एरविं काय प्रेमा। अनुवादु असें।।१५९।।

"काय सांगू तुला! तो मला एवढा आवडतो की त्यासाठी ही उपमाच काय पण कोणतीही उपमा थिटी पडेल. तो मला प्राणांहूनही प्रिय असतो, असे म्हटले तरी आमचे प्रेम कसे असते त्याचे वर्णन होत नाही. माझ्या प्रिय भक्तांची गोष्ट बोलून सांगण्याजोगी नाही. पण त्यांच्या प्रेमामुळे भूल पडून मी भारला जातो आणि ते प्रेम मला हे बोलण्यास भाग पाडते आहे. त्या भरात मी उपमा देत सुटलो आहे. पण प्रेम कसे असते ते काही शब्दांनी व्यक्तवण्याजोगे कधी असते काय!"

आतां असो हें किरीटी। पैं प्रियाचिआं गोठी।
दुणां थांव उठी। आवडी गां।।१२-१६०।।
तेआंहिं वरी विपाएं। प्रेमलु संवादियां होएं।
तिएं गोडिसि आहे। कांटालें मग।।१६१।।
म्हणौनि गां पांडुसुता। तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता।
वरी प्रियाचि वार्ता। प्रसंगें आलीं।।१६२।।
तन्हैं आतां बोलों। भलेयां सुखां मीनलों।
आईसें म्हणतखेंवि डोलों। लागलें देओ।।१६३।।

"अर्जुना! हे सर्व राहू दे. माझ्या प्रियोत्तम भक्तांच्या गोष्टी काढल्या की आमच्या प्रेमास भरती येते. आणि या गोष्टी करण्यास कधी प्रिय भक्तच जर भेटला तर मग विचारूच नको! त्यात जी गोडी असते ती अनुपमच आहे. हे पांडुपुत्रा! आता तरी असेच झाले आहे. तू प्रिय भक्त आणि श्रोता मला लाभला आहेस आणि अवचित ही प्रिय भक्तांची गोष्ट निघाली. मग मला हे बोलल्याशिवाय कसे बरे राहवेल! या गोष्टीतून मोठे सुख मला लाभते. तो योग आज जुळून आला आहे." असे म्हणून श्रीकृष्णांना आनंदाचे उधाण आले. त्या भरात ते डोलू लागले.

भक्तलक्षणे

मग म्हणे जाण। तेयां भक्ताचें लक्षण।
जेआं मी अंतष्करण। बैसों घालीं।।१२-१६४।।

मग म्हणू लागले, "ज्या भक्तांसाठी मी आपल्या अंतःकरणाचे आसन करतो, त्यांना माझ्या हृदयी ठाव देतो, त्यांची लक्षणे ऐक."

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः।।१२-१५।।
अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः।।१२-१६।।

"ज्याला लोक त्रासत नहीत आणि त्यास लोकांचा त्रास वाटत नाही; जो हर्ष, क्रोध, भय व विषादरहित असतो, असा तो भक्त मला अति प्रिय असतो. माझा भक्त निरपेक्ष, शुचिर्भूत, दक्ष आणि प्रपंचाप्रति उदासीन असतो. तो संसारभयापासून मुक्त असतो. कर्मारंभाचा त्याने त्याग केलेला असतो. अहंतेविना तो कर्मे करतो."

ज्ञानेश या श्रीकृष्णोक्तीस स्पष्ट करत म्हणतातः

तऱ्हैं सिंधुचेनि माजें। जलचरां भय नुपजे।
आणि जलचरीं नुबगिजे। समुद्रु जैसा।।१२-१६५।।
तेंविं उन्मत्तें जगे। जेयांसिं खंति न लगें।
आणि जेयाचेनि आंगें। न शिणे लोकु।।१६६।।
किंबहुना पांडवा। शरीर जैसें अवयवां।
तैसा नुबगें जीवां। जिवपणें जो।।१६७।।
जगचि देह जाहालें। म्हणौनि प्रियाप्रिय गेलें।
हर्षामर्ष ठेलें। दुजेनविण।।१६८।।

"ज्याप्रमाणे सागराच्या खवळण्याने, त्याच्या घनगंभीर गर्जनांनी, त्यावरील उन्मत्त राक्षसकाय लाटांनी जलचरांच्या मनी भयाचा कधीच उदय होत नाही आणि कोट्यवधी जलचरे पोटी बाळगूनही त्यांच्या चेष्टाकुचेष्टांनी समुद्र जसा कधीही उबगून जात नाही; त्याप्रमाणे या उन्मत्त जगात वावरूनही त्यातील जीवांच्या चेष्टितांची ज्यास कधी खंती वाटत नाही आणि ज्याच्या वागण्याने लोकांना उद्वेग वाटत नाही, असा तो महापुरुष असतो. शरीर जसे आपल्या अवयवांना उबगत नाही, त्याप्रमाणे सर्व जीवांच्या ठायी त्याचा प्राण एकवटून गेला असल्याने प्रिय-अप्रिय, हर्ष-खिन्नता या द्वंद्वांतून तो मुक्त होऊन जातो."

आईसा द्वंद्वनिर्मुक्तु। भयोद्वेगरहितु।
ययाहींवरी भक्तु। माझां ठाईं।।१२-१६९।।
तऱ्हैं तेयांचा गां मज मोहो। काय सांघू तो पढियाओ।
हें असो जीवें जीवो। माझेनि तो।।१७०।।
जो निजानंदें धाला। परिणामु आयुखा आला।
पूर्णते जाहाला। वल्लभु जो।।१७१।।

"तो पुरुष असा द्वंद्वरहित आणि भयोद्वेगादी क्लेशांपासून मुक्त असलेला योगी तर असतोच. पण त्यातही तो माझा भक्त होऊन राहिलेला असतो. त्याचे मला किती प्रेम वाटते, ते काय सांगावे! ते असो! तो केवळ माझ्याच जीवाने जगतो, इतके तो व मी एकजीव, एकप्राण, एकदेह झालेले असतो. तो आत्मानंदाने तृप्ती पावलेला, परिपूर्णतेचे आयुष्यच असलेला - साक्षात ब्रह्मच जन्मास यावे तसा पूर्णतारूपी स्त्रीचा प्राणप्रिय पती असाच असतो, हे काय वेगळे सांगायला हवे!"

जेआंचा ठाईं पांडवा। अपेक्षे नाहिं रिगावा।
सुखाचि चढावा। जेयांचें असणें।।१२-१७२।।
मोक्ष देऊनि उदार। काशी होएं कीर।
परि वेंचें शरीर। तिएं गांविं।।१७३।।
हिमवंतु दोखु खाएं। परि जिविताचि हानि होएं।
तैसें शुचित्व नोहें। सज्जनाचें।।१७४।।

"अपेक्षेस त्याच्याठायी प्रवेशही नसतो. त्याचे आयुष्य उत्तरोत्तर महासुखाची वाढ करण्यासाठीच असते. ***"दिन दिन बढत सवायो"*** असे त्या सुखाच्या चढत्या भांजणीविषयी संतांचे उद्गार आहेत. काशीपुरी मोक्ष देण्यात अत्युदार आहे. पण त्यासाठी तेथे देहत्याग झाला पाहिजे. हिमालय पापांच्या राशीच्या राशी नाहीशा करतो. पण त्यासाठी सारे जीवित तेथे व्यतीत करावे लागते. पण त्या सज्जन महापुरुषाठायी जे शुचित्व वसत असते, ते मात्र अशा श्रेणीचे नसते."

शुचित्वें शुचि गांग होएं। आणि पापतापही जाएं।
परि तेथ आहे। बुडणें एक।।१२-१७५।।
खोलिएं पारु नेणिजे। तऱ्हैं भक्तीं न बुडिजे।
रोकडाचि लाहिजे। न मरतां मोक्षु।।१७६।।
संतांचेनि आंगलगें। पापातैं जिणणें गंगें।
तेणें संतसंगें। शुचित्व कैसें।।१७७।।

"गंगाजळ तर शुचित्वासही शुचित्व प्रदान करते. पण त्यात बुडी मारल्याशिवाय काही पापहरण होत नाही. गंगौघ खोल असतो. त्यामुळे त्यात बुडून मरणेही अशा प्रसंगी संभवते. सज्जनवनचंदन अशा त्या भक्तयोगी साधूंचे हृदय सखोल असते, त्याचा ठावही लागत नाही. पण त्यांच्या भक्तिगंगेत आपण बुडी मारली तर शुचित्व तर पावतोच, पण तिच्यात बुडून मरण्याचाही धोका नाही. वर न मरताच रोकडा मोक्ष वा जीवन्मुक्ती अनायासे लाभते! माझ्या त्या भक्तयोगी महापुरुषांच्या अंगस्पर्शाने तर गंगेचेही पाप-ताप-दैन्य-दुःख हरण होते; मग त्यांच्या संगतीत येणाऱ्या महापातक्यांच्या पापांची काय कथा! इतकी त्या पुरुषाच्या शुचित्वाची थोरवी आहे. असो."

म्हणौनि असो जैं आईसा। शुचित्वें तीर्थां कुवासा।
जेणें लंघविलें दिशा। मनोमल।।१२-१७८।।
आंतु बाहेरीं चोखालु। सूर्यू तैसा उजालु।
आणि तत्त्वार्थी पायालु। देखणा जो।।१७९।।
व्यापक आणि उदास। जैसें कां आकाश।
तैसें जेआंचें मानस। सर्वत्र गां।।१८०।।

"तो पुरुष आपल्या पवित्रपणाचा तीर्थांस उदारपणे आश्रय देतो! तो इतका पवित्र असतो कारण आपले मनोमळ त्याने दशदिशांच्या पार पिटाळून लावलेले असतात! सूर्य जेवढा प्रकाशमान असतो, तेवढाच तो अंतर्बाह्य निर्मळ असतो व त्याची प्रभा तशीच सूर्यासम प्रकाशमान असते. आणि पहा! तत्त्व किती गूढ असते!

आपल्या पायांतळी पुरलेले धन असावे तसे ते तत्त्व जवळ असूनही दिसत नाही. पायाळू मनुष्यास मात्र भूमिगत धन सहजच दिसते. त्याप्रमाणेच माझ्या भक्तांअंगी तत्त्व पाहण्याचे पायाळूपण वसत असते. माझा हा भक्तसुद्धा आकाशासारखाच सर्वव्यापक आणि तरीही संसाराविषयी उदासीन असतो."

संसारव्यथे फिटला। जो नैराश्यें विनटला।
व्याधाहातूनि सुटला। विहंगमु जैसा।।१२-१८१।।
तैसा सतत जो सुखें। कोणिहीं टवंच न देखें।
नेणिजे गतायुष्यें। लज्जा जेविं।। १८२।।

"त्याचे मानस म्हणजे जणू विश्वाचे अंतर्यामच! पण तरीही संसारदु:खापासून अलिप्त आणि आशा-मोह यांपासून तो जसा पारध्याच्या हातून विहंग सुटावा, तसा सुटलेला असतो. नैराश्याने तो जणू विनटलेला असतो. मृतास जशी लाजलज्जा काहीही जाणवत नाही, तसा तो सतत आत्मानंदी रममाण होऊन देहभान हरपलेला असल्यामुळे केव्हाही बघा! संसारातील दु:खांना जाणत नाही."

भक्त भगवंताचे एकत्व व द्वित्व

आणि कर्मारंभालागिं। जेयां अहंकृति नाहिं आंगिं।
जैसा निरिंधन आगी। विझौनि जाएं।।१२-१८३।।
तैसा उपशमुचि भागां। जेयांसि आला पैं गां।
जो मोक्षाचिआं आंगां। लिहिला असे।।१८४।।
अर्जुना हा ठाओवरी। जो सोऽहंभाव सरोभरीं।
तो द्वैताचां पैलतीरीं। निगों सरला।।१८५।।

"इंधन नसलेला अग्नी जसा विझून जातो, तद्वतच त्याच्या अंगीच्या अहंकाराचा लोप झालेला असल्याने कर्मे करण्यास तो जरी प्रवृत्त झाला, तरी कर्तेपण त्याच्याकडे नसल्यामुळे तो शांती प्राप्त केलेला असतो. तो मुक्तीच्या खतावणीत नोंदवलेला असतो. तो इतका ब्रह्मैक्यभावाने - सोऽहंभावाने भरलेला असतो की त्याने द्वैताचे पैलतीर जे अद्वैत आहे, तेच गाठलेले असते."

कीं भक्तसुखालागिं। आपणपेंचि दोहों भागिं।
वांटूनिआं आंगिं। सेवकैं बाणि।।१२-१८६।।
एरां नाम मी ठेवि। मग भजति वोज बरविं।
न भजतया दाविं। योगियां जो।।१८७।।

"पण त्या अद्वैतातही त्याने भक्ती करणे सोडलेले असते का, तर नाही! भक्तीचे सुख उपभोगता यावे म्हणून ते अद्वैतसुद्धा तो दोन भागात वाटून उपभोगतो. एक भाग म्हणजे त्याचा सेवकभाव वा भक्तभाव होऊन राहतो, तर दुसरा भाग म्हणजे सेव्यभाव वा भगवद्भाव! अद्वैतातही एका भागी मला ठेवून दुसऱ्या भागी आपले भक्तपण अंगी बाळगणारा तो योगी अद्वैतातही भक्ती कशी असते, त्याचे आपल्या या भक्तिसुखाच्या अनुभूतीने, तशी भक्ती करणाऱ्या व न करणाऱ्या सर्व साधकांस एक उत्तम उदाहरण घालून देतो."

तेयांचे आम्हां वेसन। आमुचें तो निजध्यान।
किंबहुना समाधान। तो मिळे तैं।।१२-१८८।।
तेआंलागिं मज रूपां एणें। तेआंचेनि मज एथें असणें।
तेआं लोण कीजैं जीवें प्राणें। आईसा पढिये।।१८९।।

"असा तो भक्तयोगी मला किती प्रिय असतो, ते किती तऱ्हांनी तुला सांगावे! पार्था! त्याचे मला वेडच असते. तो माझा ध्यानविषय असतो! तो मला भेटला की मला खरे समाधान मिळते. त्याच्यासाठी सगुण साकार रूप घेऊन या जगात मला अवतरावे लागते. त्याच्यासाठी मला या लोकी वास करावा लागतो. तो माझा एवढा लाडका असतो की त्याच्या माझ्यावरील भक्तिप्रेमाला कोणाची दृष्ट लागू नये म्हणून मी जीवाभावाने त्याच्यावरून आपल्या प्राणांचे लिंबलोण उतरवून टाकतो."

द्वंद्वराहित्य

त्याचे गुणवर्णन करणे हे श्रीकृष्णांस अवीट गोडीचे वाटते. ते पुढे त्या भक्ताचे कौतुक वर्णित सांगतात की:

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्य: स मे प्रिय:।।१२-१७।।

"जो हर्ष पावत नाही, जो कोणाचा द्वेष करत नाही, जो कशाचीही इच्छा करत नाही, जो लाभहानीचा शोक करत नाही, शुभ-अशुभ या दोन्हींचाही ज्याने मनातून त्याग केलेला आहे, असा तो असतो. तो पुरुष भक्तीने युक्त असतो. तो मला प्रिय असतो, हे वेगळे काय सांगावे!"

सम: शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयो:।
शीतोष्णसुखदु:खेषु सम: सङ्गविवर्जित:।।१२-१८।।
तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्।
अनिकेत: स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नर:।।१२-१९।।

"शत्रू व मित्रांप्रति तो सम असतो; मान व अपमान दोन्ही त्याच्या लेखी सारखेच असतात. शीत-ऊष्ण, सुख-दु:ख, निंदास्तुती या द्वंद्वांशी समान भावाने वर्तणारा तो असतो. तो संगरहित व मौनी असतो. सर्वदा संतुष्ट राहून माझी स्थिरबुद्धीने भक्ती करणारा तो पुरुष मत्प्रिय प्राणसखा असाच असतो."

यावर ज्ञानदेव सांगतात:

जो आत्मलाभासारिखें। गोमटें कांहीचि न देखें।
म्हणौनि भोगविशेखें। हरिखेजना।।१२-१९०।।
आपणचि विश्व जाहाला। तऱ्हैं भेदभावो साहाजेंचि गेला।
म्हणौनि द्वेषु ठेला। जेआं पुरुखां।।१९१।।
पैं आपुलें जैं सांचें। तैं कल्पांतिहीं न वचे।
हें जाणौनि गताचें। न शोचि जो।।१९२।।
आणि जेआंपरौतें काई नाहीं। तैं आपणचि आपुला ठाईं।
जाहाला ययालागिं जो काईं। आकांक्षी ना।।१९३।।

"आत्मलाभाएवढी सुंदर वस्तू त्याला प्राप्त झालेली असते. मग त्यास उपभोगांची काय मातब्बरी असणार! आणि त्यांच्या लाभाने त्यास हर्ष तरी कसा व्हावा! तो स्वयेच विश्वरूप झालेला असतो.मग ज्याचा द्वेष करावा असा दुजा तेथे कोण उरणार! आपली आत्मवस्तू कल्पांतीही हरवणार नाही याची ज्याला पूर्ण खात्री आहे, तो इतर क्षुल्लक वस्तूंच्या हरपण्याने कसा खिन्न होईल बरे! तो पुरुष कसलाच शोक करत नाही. आणि ज्यापरौती दुसरी कोणतीच गोष्ट नाही, ती तो स्वतःच झालेला असतो. मग त्याने कामना करावी अशी गोष्ट कोठून आणावी!"

वोखटें कां गोमटें। हें कांहींचि तेआं नुमटें।
रात्रिदिवसु न घटे। सूर्यासि जेंवि।।१२-१९४।।
आईसा बोधुचि केवलु। जो होऊनि निष्कलु।
तयाहीवरी भजनशीलु। माझां ठाईं।।१९५।।
तऱ्हें तेयाआईसें दुसरें। आम्हां पढियंते सोएरें।
नाहीं गां सांचोकारें। तुझी आण।।१९६।।

"सूर्यास जशी रात्र व दिवस काहीच ठाऊक नसतात, तसेच त्याला बरे व वाईट काहीही जाणवत नाही. अशा प्रकारे तो केवळ विशुद्ध बोधरूपच होऊन गेलेला असतो. आणि भरीत भर म्हणजे तरीही माझी भक्ती पण तो त्याही अवस्थेत करत असतो. अर्जुना! तो असा असतो म्हणून त्याच्याएवढी माझी सोयरीक इतर कोणाशीही नसते. तो मला अति प्रिय असतो, हे तुझी आण वाहून मी सांगतो."

पुढे श्रीकृष्ण म्हणतातः

पार्था जेआंचां ठाईं। वैषम्याचिं वार्ता नाहीं।
रिपुमित्रा दोहां। सरिसा पाडु।।१२-१९७।।
कां घरींचियं उजेडु करावा। पारखियां आंधारु पाडावा।
हें नेणेंचि गां पांडवा। दिपु जैसा।।१९८।।
जो खांडावया घाओ घालीं। कां लावणि जेयानें केली।
दोघां एकचि साऊली। वृक्षु दे जैसा।।१९९।।
ना तऱ्हैं इक्षुदंडु। पालितयां गोडु।
गालितयां कडु। नोहेंचि जेविं।।२००।।
अरिमित्रीं तैसा। अर्जुना जेआं भावो आईसा।
मानापमानीं सरिसा। होतु जाएं।।२०१।।

"आणि पार्था! त्या पुरुषास भूतमात्रात भेदभावना करणे माहीतही नसते. शत्रू आणि मित्र दोन्ही त्याला समानच असतात. दीप जसा फक्त आपण ज्या घरी असतो तेथील लोकांनाच आपला उजेड द्यावा व इतरांस अंधार पाडावा असे करणे जाणत नाही; वृक्ष जसा त्याला तोडण्यासाठी घाव घालणाऱ्यावरही त्याला लावणाऱ्यास देतो, तेवढीच सावली करतो; ऊस जसा त्याला जोपासणाऱ्यास जेवढी गोड चव देतो, तितकीच त्याला गुऱ्हाळात घालून पिळून काढणाऱ्यासही देतो; त्याचप्रमाणे, हे अर्जुना! तो पुरुषही शत्रू आणि मित्रांप्रति समानच वर्तता."

तिहीं ऋतु समान। जैसें कां गगन।
तैसें एकचि मान। शीतोष्णिं जेआं।।१२-२०२।।
दक्षिण उत्तर मारुता। मेरु जैसा पांडुसुता।
तैसा सुखदुःखाप्राप्ता। मध्यस्थु जो।।२०३।।
माधुर्यें चंद्रिका। सरिसिं रायां रंकां।
तैसा जो सकलिका। भूतां समु।।२०४।।
आघवियांचि जगां एक। सेव्य जैसें उदक।
तैसें तेयांतैं तिहीं लोक। आकांक्षिति।।२०५।।

"मान व अपमान दोन्हीही त्याला सारखीच वाटतात. तिन्ही ऋतूत गगन जसे समान असते, तसाच तो पुरुषही शीत व उष्ण या दोहोंप्रति समान असतो. वारे दक्षिण व उत्तर कसेही वाहोत , त्यांच्यात मेरु जसा अचळच राहातो, तसाच तो पुरुष सुख व दुःख दोन्हीतही स्थिरबुद्धीने असतो. चांदणे आपली सुधा जशी राजा व रंक या दोघांसही सारखीच माधुरी चाखवते, तसाच तो पुरुषही सर्व भूतांप्रति आपला स्नेह सारखाच वाटतो. अखिल जगासाठी जसे सेव्य एक उदकच असते, सर्वांना तेच तोषवण्यासाठी हवे असते; त्याप्रमाणेच सर्व विश्व त्या पुरुषाची कामना करते. त्यातील सर्व प्राणिमात्रांस तोच एक तोषवतो."

जो सबाह्यसंगु। सांडौनियां लागु।
एकाकी असें आंगु। आंगिच सूनी।।१२-२०६।।
जो निंदेतैं नेघे। स्तुति न श्लाघे।
आकाशा न लगे। लेपु जैसा।।२०७।।
तैसें निंदे आणि स्तुति। मानु करूनि एके पांति।
विचरे प्राणवृत्ति। जनिं वनिं।।२०८।।

"तो अंतर्बाह्य आसक्ती सांडून एकाकी राहतो. त्याने अनासक्ती अंगी बाणवलेली असते. आकाश जसे कधीही कशानेही लिप्त होत नाही, तसाच तो पुरुषही निंदा व स्तुती यांचा आपल्या मनावर परिणाम होऊ देत नाही; निंदेचे मनाला लावूनही घेत नाही आणि स्तुतीने गर्वही करत नाही. स्तुती आणि निंदा यांना सारख्याच एकाच पंक्तीत सन्मानाने बसवून तो जनी, वनी, सगळीकडे सारख्याच तटस्थ वृत्तीने संचार करतो."

मौनी, जे काही मिळेल त्याच्यात संतुष्ट असणारा, कोठेही घर करून न राहणारा, स्थिरबुद्धीचा असा तो भक्तिमान पुरुष भगवंतांना अत्यंत प्रिय असतो.

योगरूप भक्तियोगधारा

बाराव्या अध्यायी अर्जुनाने ***उत्तम योगी कोण*** अशी पृच्छा केली होती. त्यास भगवंतांनी ***"मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते। श्रद्धया परयापेतास्ते मे युक्ततमा मताः।।१२-२।।"*** असे उत्तर दिले होते. "माझ्याठायी मन ठेवून, नित्ययुक्त होऊन, अत्यंत श्रद्धायुक्त अंतःकरणाने जे माझी उपासना करतात, ते उत्तम योगी होत," असे आपले मत श्रीकृष्णांनी व्यक्तवले आहे. असे करण्यासाठी जे साधन

आहे, ते त्या अध्यायी त्यांनी सविस्तर निरूपिले आहे. त्याचे यथोक्त श्रवण आपण केलेच आहे.

साधनाचा परिपाक म्हणून भगवंतांनी म्हटलेले ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।"*** हेही आपणास स्मरतच असेल! ***"अभ्यास -➢ ज्ञान -➢ ध्यान -➢कर्मफलत्याग-➢ शांति"*** असा साधनाक्रम आपण विस्ताराने ज्ञानेशांच्या साहाय्याने जाणून घेतला.

श्रीकृष्णांस हाच साधनाक्रम प्रशस्त वाटतो. हाच योगमार्ग व हाच भक्तिमार्ग, तसेच कर्मयोग आणि ज्ञानमार्गही तो हाच! या मार्गाचे पाईक भगवंतांस अत्यंत प्रिय आहेत. अठराव्या अध्यायी या मार्गाचे अंतिमतः आलोकन करतांना ज्ञानदेवांनी त्याचेच पुनः ***क्रमयोग*** म्हणून विस्तृत विवेचन केलेले आहे. ते योग्य वेळी आपण पाहणारच आहोत. **धर्म व धर्ममार्ग तो हाच!** यासच आता पुढील *श्लोक क्र. १२-२०* मधून श्रीकृष्ण धर्म्यामृत म्हणून गौरवत आहेत. या साधनापथाची महती अधिक काय वर्णावी! भगवंतांनी उपदेशिलेला योग वा भक्ती ती हीच!

धर्म्यामृतधारा

पुढे श्रीकृष्ण हा बारावा अध्याय समाप्त होण्याच्या प्रसंगी आपल्या या अशा धर्ममार्गी भक्तांचे अजूनही गुण गात म्हणतातः

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।१२-२०।।

"अर्जुनास भगवंतांनी प्रस्तुत जो साद्यंत योगरूप भक्तियोग कथन केला आहे, त्यात रममाण झालेला तो पुरुष त्यांना फार प्रिय असतो. त्यांच्या या अमृततुल्य धर्मधारेचे प्रभुपरायण होऊन श्रद्धायुक्त अंतःकरणाने सेवन करणारे - त्यांच्या उपदेशानुसार साधना करणारे - ते भक्त त्यांना अतिशय प्रिय असतात, हे काय वेगळे सांगितले पाहिजे!"

ज्ञानदेव या बाराव्या योगभक्तिपर अध्यायावर आपली मुद्रा उठवत काय म्हणतात, पहाः

तैं हें गोठी रम्य। अमृतधारा धर्म्य।
करिति प्रतितिगम्य। आईकौनि जैं।।१२-२३०।।
तैसिंचि श्रद्धेचेनि आदरें। जेआंचां ठाईं विस्तरें।
जीविं ययां धारें। जैं अनुष्ठिति।।२३१।।
परि निरूपिलीं जैसिं। तैसिंचि स्थिति मानसिं।
मग सुक्षेत्रीं जैसिं। पेरणी केली।।२३२।।
परि मातें परम करूनि। इयें अर्थी प्रेम धरूनि।
हेंचि सर्वस्व मानूनि। घेति जैं पैं।।२३३।।
पार्था गां जगिं। तैंचि भक्त तैंचि योगी।
उत्कंठा तेयालागिं। अखंड मज।।२३४।।

"ही माझी रम्य गोष्ट ऐकून जे त्यानुसार प्रवर्तून ही धर्ममय अशी अमृतधारा सेवन करतात, तिची अनुभूती साक्षात करतात; जे तिचे अनुष्ठान करतात; श्रद्धा व आदरपूर्वक माझे हे वचन ऐकून ते ज्यांच्याठायी स्थिरावून विस्तारते; मी सांगितल्याप्रमाणे जे आपल्या अंतःकरणास भगवन्मय करून टाकतात, ते भक्त म्हणजे जणू सुक्षेत्र! त्यांच्याठायी हे उपदेशबीज अंकुरते, वाढते, रोप होते व त्याचा ***"वेलु गगनावेरी जावा"*** तसा वृद्धिंगत होतो, फुलाफळाला येतो. जे मला परम प्राप्तव्य करून या उपदेशाच्या अंतरंगरहस्यास जाणून घेतात; माझ्या वचनावर सर्वस्वाने प्रेम करून त्याप्रमाणे वर्ततात; हे पार्था! तेच या जगात खरे भक्त आणि तेच खरे योगी! मला सतत त्यांचीच ओढ असते."

तैं तीर्थ तैं क्षेत्र। जगिं तैंचि पवित्र।
भक्तिकथेसिं मैत्र। जेयां पुरुखा।।१२-२३५।।
आम्हीं तेयांचें करूं ध्यान। तो आमुचें देवतार्चन।
तैं वांचूनि आन। गोमटें नाहीं।।२३६।।
तेयांचें आम्हां वेसन। तो आमुचें निधिनिधान।
किंबहुना समाधान। तो मिलें तैं।।२३७।।
पैं प्रेमलाचि वार्ता। जैं अनुवादिति पांडुसुता।
तैं मानूं परमदेवता। आपुली आम्हीं।।२३८।।

या भक्तिकथनाशी ज्यांचे मैत्र आहे, तेच खरे तीर्थ! तेच क्षेत्र! जगी तेच पवित्र! आम्ही त्यांचे ध्यान करू! त्यांचेच आम्ही पूजन अन देवतार्चन करू! त्यांच्यापेक्षा आम्हाला अधिक प्रिय असे काहीही नाही. त्यांचा आम्ही छंदच घेतला आहे! आमचे सारसर्वस्व, भांडार इ.सर्व काही तेच आहेत! ते भेटले कीच आम्हाला समाधान मिळते. आणि अशा आमच्या प्रियतम भक्तांची ही गोष्ट जे ऐकतात; त्यांची कथा जे गातात; त्यांना आम्ही आमच्या परमदेवतेप्रमाणेच मानतो."

"अवधारिजो रसाल कथा"

ज्ञानदेव सांगतातः

आईसें निजजनानंदें। तेणें जगदादिकंदें।
बोलिलें मुकुंदें। संजयो म्हणे।।१२-२३९।।
राया जो निर्मलु। निष्कलु लोककृपालु।
शरणागतां प्रतिपालु। शरण्यु जो।।२४०।।
जो धर्मकीर्त्तिधवलु। अगाध दातृत्वें सरलु।
अतुलबलें प्रबलु। बलिबंधनु।।२४१।।
जो पैं सुरसाहायशिलु। लोकलालनलीलु।
प्रणतप्रतिपालु। हा खेलु जेयाचां।।२४२।।
जो भक्तजनवत्सलु। प्रेमजनप्रांजलु।
सत्यसेतु सरलु। कलानिधि।।२४३।।
तो कृष्ण जी वैकुंठीचां। चक्रवर्ति निजांचां।
सांघतुसें एरु दैवाचां। आइकितु असें।।२४४।।

आतां ययावरी। निरूपिति परी।
संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रांतें।।२४५।।

संजय म्हणाला "असे त्या निजभक्तांचा आनंद असणाऱ्या, जगताच्या आदिकारण अशा मुकुंदाने अर्जुनास सांगितले." तो पुढे धृतराष्ट्रास म्हणतोः "राजा! जो निर्मळ आहे, निष्कलंक आहे, सर्व लोकांवर आपल्या कृपेचे छत्र धरणारा आहे; शरणागतांचा प्रतिपाळ करणारा आहे; सर्वांचे जो आश्रयस्थान आहे; ज्याची धर्मकीर्ती उज्ज्वळ आहे; जो ऋजु अंतःकरणाचा व अगाध दातृत्वशील आहे; ज्याने आपल्या अतुल बळाने प्रबळ अशा बळीराजाचेही बंधन केले; जो सुरवरांचा साहाय्यकर्ता आहे; लोकांचे लीलेने लालन-पालन करणारा आहे; जो भक्तजनवत्सल आहे; प्रियजनांशी निष्कपट असणारा जो आहे; सत्यास जाण्याचा सेतू जो आहे; सकल कलांचा निधी जो आहे; आत्मज्ञांचा चक्रवर्ती जो आहे; असा तो वैकुंठीचा राणा श्रीकृष्ण हे सर्व सांगत आहे आणि तो भाग्यवान अर्जुन हे सर्व लक्षपूर्वक ऐकून कृतार्थ होतो आहे. तो आणिक काय निरूपण करणार आहे, ते ऐका!"

तैंचि रसाल कथा। मऱ्हाटियां प्रतिपथा।
आणिजैल आतां। अवधारिजो।।१२-२४६।।
ज्ञानदेओ म्हणे तुम्ही। संत ओलगावेति आम्हीं।
हें पढविलो जी स्वामी। निवृत्तिदेविं।।२४७।।

ज्ञानदेव म्हणताात: "तीच रसाळ कथा मी आता मराठी शब्दसोपानातून आणणार आहे. तुम्हा संतांची ही अशी सेवा करण्याची माझे स्वामी निवृत्तिनाथ यांनी आम्हाला शिकवण दिली आहे. तरी आपण सकळ संतसज्जनांनी माझ्यावर कृपा करावी व माझे बोल ऐकावेत."

ज्ञानेशांच्या या बोलांनी साधनाक्रमाविषयी निश्चये सांगणाऱ्या या ***भक्तियोग***नामे ओळखल्या जाणाऱ्या द्वादश गीताध्यायाची सांगता होते. त्या साधनाक्रमाबाबतचे अधिक निरूपण त्यांच्या मुखातून आपण नंतर ऐकणारच आहोत.

समारोप

यानंतर आपण भक्तीचा यथायोग्य अधिक परिचय करून घेण्यासाठी वळू या पुढील ***उन्मेष क्र.५४-२:भक्तिदर्शन*** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५४-२::

::भक्तिदर्शन::

ॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५४-२:

गीता:
२:२९,६२,६३
३:३७
४:१९,२०,३४
६:१०,२९
७:१६
९:३०,३२
१२:१२
१३:७-११
१६:१०,१८,२१
१८:५,१२,१३,६७
ज्ञानेश्वरी:
१:१७
६:१८६-१९१,२९३,३२१,४२०
१२:८९-९२,१५६,
१७:३४३,४००-४०५
१८:१११३,१११४,१११७,११२४,११२५,११३०,११३२,११३३,११८१,११८२
ना.भ.सू.:२-१४,१६-३०,३३,३५-५८,६०-८३
शां.भ.सू.:१-५,७-८,१९,२०,८२,८४,९०,९६,१००
पा.यो.सू.:
१:२,२३
अभंग:६,७,११,१२,१५,७५,७६,८२,८५,९४,९७,९८,१०४,१०९,११४,११६, ११७,१२३,१३१,१३३,१३६,१३८,१४३,१४५,१५०,१५८,१६२,१६८,१६९,१७१,१७३,१७५,१८८,१९०,१९४,१९६,२००,२०१,२०६,२०८,२१६,२१७,२१८,२२०,२२३,२२५,२३०,२३५,२४१,२४२,२४५-२५०,२५२,२५३,२५५,२५७,२५८,२६०,२६२,२६३,२६५,२६६,२६९,२७२,२७३,२७५,२७७,२८०,२८३,२८८,२९१,२९४,२९५,२९७,२९८,३०२,३०३,३१४,३२४,३२५,३२९,३३३,३३४,३३६,३४३,३४४,३६२,३७७,३८७,४०५,४१३,४१७,४२०,४२२
हरिपाठ:ज्ञानदेव-४८-७४
निवृत्तिनाथ,एकनाथ,नामदेव,सोपानदेव,तुकाराम

::उन्मेष ५४-२::
::भक्तिदर्शन::

नारदादी भक्तिसूत्रे::::

भक्तिवाङ्मय

भक्ती आणि योग यांचा समन्वयकारक असाच योग गीता सांगते, हे आपण पुनः एकदा मागील ***उन्मेष क्र.५४-१:योग व भक्ती*** याद्वारे पाहिले. आता आपण भक्तिविषयक महत्त्वाच्या इतर काही वाङ्मयाचा परिचय करून घेणार आहोत. भक्ती व योग यांचे एकत्व कसे आहे, हे त्यांद्वारेही आपण परीक्षिणार आहोत. तिकडे वळू या!

ज्ञान, कर्म, भक्ती व योग **ही सर्व गीतेतील साधनापथाची अविभाज्य अंगे होत,** हे आपल्या निदर्शनास आलेले आहे. ***भक्ती*** या अंगावरील ज्ञानदेवांचा ***हरिपाठ व इतर भक्तिपर अभंग*** प्रसिद्धच आहेत. तसेच ***नारदभक्तिसूत्रे व शांडिल्यभक्तिसूत्रे*** हे ग्रंथही भक्तीचे शास्त्र सांगतात, तेही विद्वन्मान्यच आहेत. भक्तीच्या सोपानाचे हे उत्तुंग दर्शन ज्ञानदेवांचे हरिपाठादी भक्तिपर अभंग आणि नारदादी भक्तिसूत्रे यांचे परीक्षण केल्यावाचून अपूर्णच ठरेल. म्हणून त्यांतील भक्तीकडे एक विहंगम दृष्टिक्षेप करू याः

नारदभक्तिसूत्रे व भक्तीची व्याख्या

नारदभक्तिसूत्रे भक्तीची व्याख्या करतात, ती अशीः ***"सा परमप्रेमरूपा।।२।। अमृतस्वरूपा च।।३।।ना.भ.सू.।।"*** - परमात्मस्वरूपी परमप्रेमरूप असणारी ही भक्ती असते. ती अमृतस्वरूप असते. या भक्तीत भक्त-भगवंत एकरूप असतात; हेच परमात्म्याचे परमप्रेम असणे होय. परमात्मा अमृततत्त्व आहे. म्हणून ही भक्तीही अमृतच आहे.

अशा भक्तीचे फलस्वरूप म्हणजे ***"यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति अमृतो भवति तृप्तो भवति।।४।। यत्प्राप्य न किञ्चिद्वाञ्छति न शोचति न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति।।५।। यज्ज्ञात्वा मत्तो भवति स्तब्धो भवति आत्मारामो भवति।।६।।ना.भ.सू.।।"*** - या भक्तीची प्राप्ती होताच भक्त सिद्ध होतो, अमृतत्त्व पावतो, तृप्त होतो. असा भक्त कसल्याही वस्तूची इच्छा करत नाही. तो कशाचाही शोक करत नाही. संसारात आसक्त होत नाही.

तो सर्व कर्मांबद्दल उदासीन राहतो; कर्मफलांची त्यास कोणतीही स्पृहा उरत नाही. ही भक्ती पावलेला सर्वदा आत्मदृष्टीने मत्त होऊन जातो. शांती पावतो. असा भक्त सतत आत्मतत्त्वाशी रममाण होऊन जीवन्मुक्ती पावतो. नारद सांगतात ती ही भक्तीची व्याख्या गीतेने प्राप्तार्थ पुरुषाची जी स्थिती सांगितली आहे, तिच्याशी जुळणारी आहे. स्थितप्रज्ञ पुरुषाची लक्षणे जी गीता सांगते ती व या सूत्रातील भक्तलक्षणे यांत कमालीचे साम्य असल्याचे आपणास दिसून येते. अजूनही अशी बरीच साम्यस्थले आपल्या निदर्शनास येणार आहेत.

भक्तीतील निरोध

या भक्तीचे स्वरूप व साधनाक्रम स्पष्ट करणारी काही सूत्रे पहाः ***"सा न कामयमाना निरोधरूपत्वात्।।७।। निरोधस्तु लोकवेदव्यापारन्यासः।।८।। ना.भ.सू.।।"*** - ही भक्ती निरोधरूप असते. कामनायुक्त नसते. लौकिक व समस्त वैदिक व्यापार यांचा त्याग म्हणजे खरा निरोध होय, असे देवर्षी नारद म्हणतात. ***"योगश्चित्तवृत्तिनिरोधः।।१-२।।"*** या पातञ्जलयोगसूत्राची येथे आठवण होते. इंद्रियांच्या विषयांचा निराहार येथेही अभिप्रेत आहे. गीता ज्यास संन्यास म्हणते, तो अफलाकांक्षी कर्तृत्वरूपी संन्यास येथेही अभिप्रेत दिसतो. कारण देहवानास कोणतेही कर्म मूलतःच त्यागणे शक्य नाही. कोणता ना कोणता लौकिक वा दैहिक व्यापार नेहमीच चालू असल्याने या भक्तिसूत्रातील निरोधाची व्याख्या तपासून घ्यावी लागते. म्हणून लौकिक व वैदिक अशा समस्त व्यापारांचा त्याग म्हणजे संन्यास म्हणजेच कर्मफलेच्छा न ठेवता आचरले जाणारे कर्म असाच त्याचा अर्थ केला पाहिजे.

ईश्वरप्रणिधानाने भक्तीचे साध्यत्व

निरोध कसा साध्य करावा ते नारद सांगतात. ते म्हणतातः ***"तस्मिन्नन्यता तद्विरोधिषूदासीनता च।।९।। अन्याश्रयाणां त्यागोऽनन्यता।।१०।। ना.भ.सू.।।"*** - परमात्म्याठायी अनन्य चित्ताने राहणे, त्याव्यतिरिक्त इतर व्यापारविषयात उदासीनता ठेवणे, भगवंताव्यतिरिक्त अन्य आश्रयांचा त्याग करणे यास ***अनन्यता*** म्हणतात. निरोध साध्य व्हावा म्हणून ही अनन्यता ठेवली पाहिजे. चित्तास आलंबनविषय केवळ नारायणच असला पाहिजे; इतर विषयही नारायणरूपत्व पावले पाहिजेत, म्हणजे ही अनन्यता सिद्ध होते. हा पातञ्जलोक्त ***ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनेचाच भाग आहे.

लोकाचाराचे पालन

परंतु लोकाचाराचा त्यागसुद्धा करून चालणार नाही. नारद सांगतातः ***"लोके वेदेषु तदानुकूलाचरणं। तद्विरोधिषूदासीनता।।११।। भवतु निश्चयदार्ढ्यांदूर्ध्व शास्त्ररक्षणाम्।।१२।। अन्यथा पातित्याशाङ्कया।।१३।। लोकोऽपि तावदेव किन्तु व्यापारस्त्वाशरीर धारणावधि।।१४।।ना.भ.सू.।।"*** - लौकिक व वैदिक कर्मे भगवत्प्राप्तीसाठीच करावीत; इतर फलांच्या आशेने करू नयेत. शास्त्रप्रणीत धर्म आचरावा; अन्यथा पतन होणे संभनीय असते. शरीर धारण करण्यासाठी आवश्यक ते व्यवहार करावेच लागतात. परंतु ते

गीतेने ***"ॐ तत् सत्"*** या क्रियेचे स्पष्टीकरण करतांना सतराव्या अध्यायात सांगितले आहेत,तसेच करावेत. ***"ब्रह्मार्पणं ब्रह्महवि..।।"*** या गीताश्लोकाचे मर्म ते हेच आहे. नारदही तेच सांगत आहेत.

भक्तीची लक्षणे

अशा परमप्रेमस्वरूपा भक्तीची लक्षणे काय असतात, ते पराशर मुनींनी व इतर ऋषि-द्रष्टे इ.नी सांगितली आहेत. नारदही त्याचा उल्लेख करतातः ***"पूजादिश्वनुराग इति पाराशर्याः।।१६।। कथादिष्विति गर्गः।।१७।। आत्मरत्यविरोधेनेति शाण्डिल्यः।।१८।। ना.भ.सू.।।"*** - ***अनुरागपूर्वक परमात्म्याची पूजा करणे ही भक्ती होय*** असे ***पराशर*** ऋषी म्हणतात, ***भगवल्लीलांचे संकीर्तन म्हणजे ही भक्ती*** असे ***गर्गाचार्य*** म्हणतात. ***आत्मतत्त्वात रत होणे, तद्विरोधी नसणे,*** असे या भक्तीचे स्वरूप असल्याचे **शांडिल्य**मत आहे.

नारद मात्र या भक्तीची सर्वंकष व्याख्या करतात. ते म्हणतातः ***"नारदस्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परमव्याकुलतेति।।१९।। अस्त्येवमेवम्।।२०।।ना.भ.सू.।।"*** - सर्व कर्मे परमात्म्यास अर्पिणे, परमात्मस्वरूपात अहर्निश रमणे, परमात्म्यावाचून इतर विषयात राहवे लागल्यास व्याकुलता प्राप्त होणे, हीच खरी भक्ती होय, असे नारद म्हणतात.

ही भक्ती गोपींनी केली. नारद त्यांचा उल्लेख करत आहेतः ***"यथा व्रजगोपिकानाम्।।२१।। तत्रापि न माहात्म्यज्ञान-विस्मृत्यपवादः।।२२।। तद्विहिनं जाराणामिव।।२३।। नास्त्येव तस्मित्सुखसुखित्वम्।।२४।।ना.भ.सू.।।"*** - गोकुळींच्या ***गोपींचे कृष्णप्रेम*** हा या भक्तीचाच आविष्कार होता. त्यांच्या त्या अवस्थेत परमात्म्याचे माहात्म्य त्या पार विसरून गेल्या. पण तो दोष नव्हे. खरे तर त्या अंतर्बाह्य कृष्णस्वरूपच होऊन गेल्या होत्या. अन्यथा त्यांची कृष्णभक्ती, त्यांचे कृष्णप्रेम हे जारावरील प्रेमासारखे ठरले असते. त्यात आनंद तो कोठून आला असता!

अशा या भक्तीचे खरे पूर्ण वर्णन ज्ञानेशांनी ज्ञानेश्वरी व काही अभंगांतून केलेले आहे. हीच ***पराभक्ती*** वा ***परमभक्ती!*** ते वर्णन आपण यथाक्रम पाहणारच आहोत. तूर्त नारदोक्त ***भक्तिदर्शन*** काय सांगते, ते पाहू या!!

सर्व साधनांची पराकाष्ठा अशी भक्ती

हीच भक्ती खरी होय. खरे परमात्मसाधन ते हेच! म्हणून नारद म्हणतातः ***"सा तु कर्मज्ञानयोगेभ्योऽप्यधिकतरा।।२५।। फलरुपत्वात्।।२६।।ना.भ.सू.।।"*** - कर्म, ज्ञान व योग यांची पराकाष्ठा म्हणजे ही भक्ती होय. त्या सर्व साधनांचे फलरूप म्हणून ही भक्ती प्राप्त होते.

ही भक्ती अहंकाररहित असते. ***"ईश्वरस्याप्यभिमानद्वेषित्वाद् दैन्यप्रियत्वाच्च।।२७।।ना.भ.सू.।।"*** - ही सर्व साधने अहंकाररहित्याने केली असता भक्ती साध्य होते. परमात्मरूपी लीन होणे हे तिचे फल आहे. ***सानंद व सास्मित*** या समाधींपलीकडील ही अवस्था आहे. पतञ्जलींची ***निर्विचार समाधी*** ती ही अवस्था होय.

त्या भक्तीचे खरे साधन कोणते याबाबत द्रष्ट्यांत मतभिन्नता दिसून येते असे नारद म्हणतातः ***"तस्याः ज्ञानमेव साधनमित्येकम्।।२९।। स्वयंफलरुपतेति ब्रह्मकुमाराः।।३०।। ना.भ.सू.।।"*** - ***भक्तीचे ज्ञान हेच एकमेव साधन*** असल्याचे काहींचे मत आहे. तर ***भक्ती व ज्ञान परस्परावलंबी आहेत,*** असेही कोणी म्हणतात. ***भगवद्भक्ती ही स्वतःच स्वतःचे फल आहे; त्यासाठी अन्य साधने नाहीत,*** असे ब्रह्मकुमार म्हणतात. परंतु नारदमते ही सर्व भक्तीच्या परिसरातील साधने आहेत, हे जाणून ***"तस्मात्सैव ग्राह्या मुमुक्षुभिः।।३३।। ना.भ.सू.।।"*** या सूत्रानुसार मुमुक्षूंनी खऱ्या भक्तीचे सेवन करावे.

भक्तीची साधना

भक्तीचे साधन कसे होते, त्याबाबत विविध आचार्य इ.मान्यवरांची मते नारद सांगतात. ***"तत्तु विषयत्यागात् सङ्गत्यागाच्च।।३५।। अव्यावृतभजनात्।।३६।। लोकेऽपि भगवद्गुणश्रवणकीर्तनात्।।३७।। ना.भ.सू.।।"*** - विषयत्याग, संसारासक्तीचा त्याग, परमात्म्याचे अखंड भजन करणे इ.साधने त्यासाठी ते मान्यवर सांगतात. लोकही भगवंताचे गुणश्रवण, कीर्तन इ.करण्याने भक्ती प्राप्त होते, असे मानतात.

प्रह्लादाने ***१)श्रवण, २) कीर्तन, ३) स्मरण, ४) पादसेवन, ५) अर्चन, ६) वंदन, ७) दास्य, ८) सख्य व ९) आत्मनिवेदन*** अशा भक्ती करण्याच्या नवविध प्रकारांचे वर्णन केले आहे. त्याच्या मते ***"श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं। अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्।।२३।। इति पुंसाऽर्पिता विष्णौ भक्तिश्चेन्नवलक्षणा। क्रियते भगवत्यद्धा तन्मन्येऽधीतमुत्तमम्।।२४।। स्कंध७, अ.५।। श्रीमद्भागवत।।"*** या नवविध भक्ती करणारा पुरुष भगवंतात उत्तम बुद्धी ठेवणारा होय.

महत्संग

परंतु नारद म्हणतात की ही सर्व साधने जरी उत्तमच आाहेत तरीही ***"मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा।।३८।। ना.भ.सू.।।"*** - खरी भक्ती ही मुख्यतः महात्म्यांच्या कृपेनेच किंवा भगवंताच्या अंशमात्र कृपेनेच प्राप्त होते. म्हणूनच तर ***विवेकचूडामणी***त आचार्य ***महापुरुषांचा संश्रय*** म्हणजे महात्म्यांच्या संगतीचे महत्त्व सांगतात.

नारद म्हणतातः ***"महत्सङ्गस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च।।३९।। लभ्यतेऽपि तत्कृपयैव।।४०।। तस्मिंस्तज्जने भेदाभावात्।।४१।। तदेव साध्यताम् तदेव साध्यताम्।।४२।।ना.भ.सू.।।"*** - महात्म्यांचा संग प्राप्त होणे दुर्लभ तर असतेच पण महात्मे कोण ते ओळखणेही अशक्यप्राय असते. पण तरीही त्यांचा संग हा भक्तिप्राप्तीचा अमोघ उपाय आहे. भगवत्कृपेने मुमुक्षूंना अशा महात्म्यांचा संग घडून येतो.

त्यांच्याठायी भेदाचा पूर्ण अभाव असतो. म्हणून त्यांची संगती कशी मिळेल ते पहावे. ते आपल्याठायीचा भेद मिटवून टाकून खऱ्या भक्तीचा मार्ग आपणास लावून देतात. महात्म्यांची कृपा हाच खरा भक्ती प्राप्त करण्याचा सर्वोत्तम उपाय होय, असे नारद म्हणतात.

गीताही ***"तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानम् ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ।।४-३४।।"*** असेच सांगते. महात्मेच खरा तत्त्वबोध करून देऊ शकतात. तेच ज्ञानप्राप्तीचे खरे साधन होय. याच कारणाने संतांस शरण जायचे असते!

भक्तीचे प्रतिबंध व उपाय

पतञ्जलींनी योगसूत्रात दुःखदौर्मनस्य आलस्यादी साधनेचे प्रतिबंध सांगितले आहेत. नारदसुद्धा भक्तीसाधनेतील प्रतिबंध स्पष्ट करतांना म्हणतातः ***"दुःसङ्गः सर्वथैव त्याज्यम्।।४३।। कामक्रोधमोह-स्मृतिभ्रंशबुद्धिनाशसर्वनाशकारणत्वात्।।४४।। तरंगायिता अपीमे सङ्गात्समुद्रायन्ति।।४५।।ना.भ.सू.।।"*** - दुर्जनांचा - दुष्टांचा संग सर्वथैव त्याज्य मानावा. काम, क्रोध, मोह, स्मृतिभ्रंश व बुद्धिनाश हे सर्व वाईट विषयांच्या व दुष्ट-दुर्जनांच्या संगतीचा परिणाम होऊन सर्वनाशास कारण ठरतात. प्रारंभी हे दोष समुद्रावरील तरंगाप्रमाणे अल्पत्वाने विराजतात. पण दुःसंगामुळे ते समुद्राचे रूप धरण करतात व साधकास बुडवतात.

नारद जे हे भक्तिप्रतिबंध सांगतात, ते पतञ्जलींपेक्षा गीतेतील साधनाविक्षेपांशी अधिक साम्य दाखवितात. दुःसंग म्हणजे दुर्जनांचा संग तसाच विषयांचा संग. त्याचप्रमाणे अज्ञ, अश्रद्ध, परमात्म्यास निंदणाऱ्या, अतपस्वी, अभक्त अशा अल्पज्ञ मतिमंद मनुष्यांचा संग हा दुःसंगच होय. हे सर्व भक्तीस बाधक होतात. म्हणूनच अशा मनुष्यांना गीता सांगू नये असे भगवंतांचे वचन आहे. ***"इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन। न चाशुश्रुषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ।।१८-६७।।"*** या गीतावचनातून अशा मनुष्यांचा संग टाळावा, असेच भगवंत अप्रत्यक्षपणे सुचवत आहेत.

"काम एष क्रोध एष रजोगुण समुद्भवः। महशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम्।।३-३७।।", "काममाश्रित्य दूष्पूरं दम्भमानमदान्विताः। मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ।।१६-१०।।", "अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः। मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः।।१६-१८।।", "त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्।।१६-२१।।", "ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते। सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।।२-६२।।," "क्रोधात्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।२-६३।।" अशी अनेक गीतावचने नारदोक्तीशी गीतोक्तीचे असणारे साम्य दर्शविण्यासाठी उद्धृत करता येतात.

काम-क्रोध रजोगुणापासून प्रसवतात. ते ज्ञान्यांचे तर वैरीच असतात. दुर्जन लोक कामाचा आश्रय करून दंभ-दर्प, अहंकार-गर्व इ.वाहतात. मोहाने अंध होऊन ते भयंकर कृत्ये करतात. स्वतःच्या आत्म्यासही दुखवतात. इतरांचे तर विचारूच नका! त्यांना ते अपार कष्टवतात.

काम, क्रोध व लोभ ही तीनही नरकाची द्वारे होत. त्यांचा त्याग करावा. ***विषयांचा संपर्क दुःसंगच होय.*** त्यापासून काम व क्रोध हे उपजतात. क्रोध संमोह निर्माण करतो. त्यामुळे स्मृतिभ्रंश व नंतर बुद्धिनाश होतो. असा विनाशाचा मार्ग या काम-क्रोधांपासून प्रवर्तित होतो. असो.

सर्वसामान्यपणे ***संसारासक्ती, संसारसंग हाच खरा दुःसंग होय.*** त्यातूनच हे साधनाविक्षेप उद्भवतात. साधकांना ते टाळण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा लागतो, असा सर्वच अध्यात्मशास्त्रांचा आणि योगप्रणालींचा निष्कर्ष आहे. गीता काय, पतञ्जली काय आणि नारदही काय! मुमुक्षूंना हाच उपदेश देत आहेत!!

नारद तर या मुद्द्यावर भर देत म्हणतातः ***"कस्तरति कस्तरति मायाम्। यः सङ्गास्त्यजति। यो महानुभावं सेवते निर्ममो भवति।।४६।।ना.भ.सू.।।"***- जो संगत्याग करतो, महात्म्यांची सेवा करतो, सर्वस्वाने संतांस भजतो, तोच मायानदास तरून जातो. तोच खऱ्या अर्थाने ममत्वरहित होतो. त्याचाच अहंकार निमून जातो.

गीता व नारदभक्तिसूत्रे यांची एकवाक्यता

नारद पुनश्च सांगतातः ***"यो विविक्तस्थानं सेवते लोकबन्धन्मूलयति। निस्त्रैगुण्यो भवति। योगक्षेमं त्यजति।।४७।। यः कर्मफलं त्यजति कर्मणि सन्न्यस्यति ततो निर्द्वन्द्वो भवति।।४८।। यो वेदानपि सन्न्यसति केवलमविच्छिन्नानुरागं लभते।।४९।। स तरति स तरति स लोकांस्तारयति ।।५०।। ना.भ.सू.।।"*** -

मायानद उतरून जाण्यासाठी साधकास एकांतसेवन करणे आवश्यक आहे. योगक्षेम -संसार चालवणे याचाही त्याग करणारा संसाराच्या बंधनास तोडून टाकतो. कर्मफलाचा त्याग करणारा, सर्व कर्मांचा त्याग करणारा द्वंद्वरहित होतो. जो वेदांचाही त्याग करतो, त्यास अविच्छिन्न असा भगवदनुराग वा कैवल्यप्राप्ती होते. तो स्वतः तर मायेस तरून जातोच जातो, पण इतरांसही तारतो!!

नारदांचे हे उपाय गीतेशी पूर्ण सादृश्य दर्शवितात. ***"योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः। एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ।।६-१०।।", "विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः। ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रतः।।१८-५२।।", "अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्। विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते।।१८-५३।।", "अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्। आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।१३-७।।", "इंद्रियार्थेषु वैराग्यमनहङ्कार एव च। जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्।।", "असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु। नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु।।", "मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी*** **विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि।।",**

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्।..।।१३-८, ९, १०, ११।।", "यस्य सर्वे समारम्भाः कामसङ्कल्पवर्जिताः।... ।।४-१९।।, "त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः। कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चित्करोति सः।।४-२०।। ... " इत्यादी अनेकानेक गीतावचने याची साक्ष देतात. किंबहुना नारदांचा आशय गीता विस्तृत करते आणि अधिक स्पष्टपणे सांगते, असे म्हणणे उचितच ठरेल.

"प्रतिक्षणवर्धमानं"

भक्तीचे स्वरूप स्पष्ट करत नारद म्हणतातः ***"अनिर्वचनीयम् प्रेमस्वरूपम्।।५१।। मूकास्वादनवत्।।५२।। प्रकाशयति क्वापि पात्रे।।५३।। गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानं। अविच्छिन्नं सूक्ष्मतरं अनुभवरूपं।।५४।। तत्प्राप्य तदेवावलोकयति तदेव श्रुणोति। तद्भाषयति तदेव चिन्तयति।।५५।।ना.भ.सू.।।"*** - ही भक्ती कशी असते, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे, असे नारद म्हणतात. ही भक्ती प्रेमस्वरूपा असते, ***भक्त-भगवंत- भक्ती*** ही त्रिपुटी लोप पावून या भक्तीचा व्यवहार चालतो.

द्वैत उरत नसल्यामुळे तिचा आनंद घेणारा तिचे वर्णन करू शकत नाही. मुक्या मनुष्यास जसा रसास्वाद कळतो, पण तो वर्णन करता येत नाही, तसा या भक्तीचा प्रकार आहे. ही भक्ती प्राप्त होणे दुर्लभच आहे. ***"वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।।७-१९।।"*** या गीतोक्तीप्रमाणेच ही भक्ती प्राप्त होणारा भक्त विरळाच!!

असा भक्त कामनारहित होतो. ही भक्ती प्रतिक्षणी वर्धायमान असते. ***"दिन दिन बढत सवायो"*** अशी ती असते. ही भक्ती म्हणजे साक्षात्कार! तोही त्या अविच्छिन्न अशा परमतत्त्वाचा सूक्ष्मातिसूक्ष्म अनुभूतिरूप असतो. त्या साक्षात्कारासंबंधीचेच चिंतन सदैव तो महात्मा करत असतो. त्याचे बोलणेही केवळ याच विषयासंबंधी असते आणि तो श्रवण करतो, तेही याच साक्षात्काराबाबत असते!!

गीता पण याबाबत असेच नाही का म्हणत की ***" आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः। आश्चर्यवच्चैन्यमन्यः श्रृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।।२-२९।।"*** - त्या तत्त्वाचे दर्शन वा साक्षात्कार झालेले महात्मे कोणी त्याचे आश्चर्यविमूढ भावाने वर्णन करू पाहतात, तर कोणी त्या साक्षात्काराच्या दर्शनात गुंगून जातात; आणि श्रुत्यादींनी त्या तत्त्वाचे केलेले वर्णन आणि दिलेले दाखले यांनी काही विमूढ होऊन त्यांचा अधिकाधिक व्यासंग करू पाहतात! पण त्यांना आलेल्या अनुभूतींचेच काहीएक वर्णन जरी त्या श्रौत वाङ्मयात आढळत असले, तरी त्यांचा साक्षात्कार अशा काही श्रेणीचा असतो की त्यांच्या साक्षात्काराशी नीटरीत्या जुळू शकेल असे त्याचे पूर्ण वर्णन करणे श्रुतींना अशक्यच आहे!

नारदांच्या भक्तीची ज्ञानेश्वरीतील विशालता

नारदांनी भक्तीचे जे स्वरूप अल्पशब्दात प्रकट केले आहे, त्याचे विशालत्व आपण जेव्हा ज्ञानदेवीच्या अठराव्या अध्यायातील (१८-५) या श्लोकावरील ओव्या पाहतो, तेव्हा कळून येते. ***"ययां ज्ञानभक्ती साहाज। भक्तु एकवटला मज। तो मीचि केवळ हें तुज। श्रुतही आहे।।१८-११३०।। तैं हें कल्पादि भक्ति मिआं। भागवतमिषें ब्रह्मेयां। उत्तम म्हणौनि धनंजया। उपदेशिली।।११३२।। ज्ञानी इयैतें स्वसंविती। शैव म्हणति शक्ती। आम्ही परमभक्ती। आपुली म्हणो।।११३३।।"***

ज्ञानभक्ती, स्वसंविती, शक्ती, इ.नावांनी ही भक्ती प्रसिद्ध आहे. ज्ञानेश या भक्तीस ***परमभक्ती*** असे म्हणतात. ***"एरवीं तिजी ना चवथी। हें पहिली ना सरति। पैं माझिएं सहजस्थिति। भक्ति नांव।।१११३।। जैं नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथात्वें मातें दाऊन। सर्वहि सर्वीं भजौनि। बुझावितसे।।१११४।। आईसा हा साहाज माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति ययां वोजा। बोलिजैं गां।।१११७।। तैसा सर्वत्र मीचि मिआं। घेपतसें भक्ती इयां। परि दृश्यत्व हें वांयां। अज्ञानवशें।।११२४।। तैं अज्ञान आतां फिटलें। माझें द्रष्टत्व मज भेटले निजबिंबी। प्रतिबिंब जैसें।।११२५।।"*** असे त्या भक्तीचे विशालत्व आहे.

ही भक्ती म्हणजे परमात्म्याचा सहज प्रकाश! सर्वत्र दिसणारे दृश्य हे परमात्मस्वरूपच आहे, याची अनुभूती म्हणजे ही भक्ती! ***"तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जपु माझा। तो असे तैंचि कपिध्वजा। समाधि माझी।।१८-११८१।। जैसें कनकेंसि कांकणें। असिजे अनन्यपणें। भक्तियोगें तेणें। मजसि तैसा।।११८२।।"*** असे त्या भक्ताच्या स्थितीचे - जीवन्मुक्तावस्थेचे वर्णन ज्ञानदेव करतात. हे सर्व वर्णन आपण पूर्वीही प्रसंगोपात्त पाहिले होतेच. असो. ज्ञानेश्वरी वाचतांना किती तरी वेळा आपणास जाणवते की ***भक्तीचे खरे भाष्यकर्ते ज्ञानेश्वरच म्हटले पाहिजे!!***

भक्तीचे प्रकार

यानंतर नारद ही भक्ती कोणत्या साधनाक्रमाने करावी, ते स्पष्ट करतांना सांगतातः ***"गौणी त्रिधा गुणभेदाद् आर्तादिभेदाद् वा।।५६।।ना.भ.सू.।।"*** - परा भक्ती वा परमभक्ती प्राप्त करणाऱ्या साधकांचे तीन भेद आहेत. ते त्यांची भक्ती कोणत्या भावनेतून प्रकट झाली, त्यानुसार ***अर्थार्थी, आर्त व जिज्ञासू*** या प्रकारांचे आहेत. ***"उत्तरस्मादुत्तरस्मात् पूर्वपूर्वा श्रेयाय भवति।।५७।।ना.भ.सू.।।"*** हे प्रकार अर्थार्थी, जिज्ञासू, आर्त अशा श्रेणीने वाढत्या फलाचे आहेत.

काहीतरी वस्तू-विषय प्राप्त व्हावेत, म्हणून अर्थार्थी भक्ती घडते. ते प्राप्त झाले की ज्या भगवंताच्या भक्तीमुळे हे घडून आले, त्याचे स्वरूप जाणण्याची जिज्ञासा प्राप्त होते. ते स्वरूप जाणले की त्याचे दर्शन व्हावे, त्याचा साक्षात्कार घडावा ही प्रबळ आर्तता निर्माण होते. त्यातच भक्तीची वाढ होते.

गौणी भक्तीचे हे तीन प्रकार साधकास या मार्गाने पराभक्तीकडे नेतात. गीतेतसुद्धा हे प्रकार ***"चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन। आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।।७-१६।।"*** याप्रमाणे

सांगितले आहेत. अशा भक्तांचे ज्ञानेश्वरकृत दर्शन आपण पूर्वीच घेऊन कृतार्थ झालो आहोत. त्यातील ***ज्ञानी भक्त*** हाच खरा परमभक्त हे आपणास ठाऊकच आहे.

भक्तीचे सुलभत्व व स्वप्रमाणत्व

भक्ती हाच सुलभ ***योगसोपान*** आहे. **सगुण भक्ती ही सर्व *योग-कर्म-ज्ञान* या मार्गत्रयीचा आधार आहे**, हे आपण पाहिले आहेच. नारदही भक्ती सर्वसुलभ आहे, असे म्हणतात. ***"अन्यस्मात् सौलभ्यं भक्तौ ।।५८।। प्रमाणान्तरस्यानपेक्षत्वात् स्वयं प्रमाणत्वात् च। शांतीरूपात् परमानन्दरूपाच्च परमानन्दरूपाच्च।।६०।। ना.भ.सू.।।"***- सर्व मार्गात भक्तीच सुलभ आहे. तर्क-न्यायादी चर्चा भक्तीस आवश्यक नाही. भक्ती स्वतःच शांतिरूप आहे; परमांनदरूप आहे.

भक्तांची चर्या

भक्ताने भक्ती प्राप्त होईपर्यंत काही बंधने पाळलीच पाहिजेत. त्याची चर्या सुनियत करत नारद म्हणतातः ***"लोकहानौ चिन्ता न कार्या निवेदितात्मा लोकवेदशीलत्वात।।६१।। न तत्सिद्धौ लोकव्यवहारो हेयः किन्तु फलत्यागः तत्साधनं च कार्यमेव।।६२।। स्त्रीधननास्तिकवैरिचरित्रं न श्रवणीयम्।।६३।। अभिमानदम्भादिकं त्याज्यम्।।६४।। तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्।।६५।। त्रिरूपभंङ्गपूर्वकं नित्यदास-नित्यकांताभजनात्मकं प्रेमकार्यं प्रेमैव कार्यम्।।६६।।ना.भ.सू.।।"***

- लौकिक व वैदिक कार्ये भगवदर्पण करावीत. लोकहानीची चिंता करू नये. आपण सतत भक्तीच करावी. परंतु जोपावेतो ***पराभक्ती*** सिद्ध होत नाही. तोवर लोकव्यवहार सोडू नये, तर सर्व कर्माचे फल त्यागत भक्तीचे साधन करावे. स्त्री, धन, वैरी, नास्तिक यांची वार्ता करू नये. त्यांच्याठायी मन क्षोभवू नये. दंभ, अभिमान इ.चा त्याग करावा. सर्व कर्म फलासह भगवंतास अर्पण केल्यावरही काम-क्रोध-अभिमानादी अवशिष्ट राहत असतील, तर तेसुद्धा भगवंताठायी अर्पण करावेत.

गौणी भक्तीच्या त्रिधा प्रकारांचा भंग करून सतत कांताभाव वा दास्यभावाने भगवंतास भजावे; त्याच्याठायी रममाण व्हावे.

"वादो नावलम्ब्यः"

"वादो नावलम्ब्यः।।७४।। बाहुल्यावकाशत्वादनियत्वाच्च।। ७५।।ना.भ.सू.।।"- भक्ताने परमात्मस्वरूपाचे ज्ञान करून घेण्यासाठी युक्तिवादाचे अवलंबन करू नये. कारण युक्तिवादास अंतच नाही. तसेच त्यातून कोणतीही निश्चित अशी उपपत्ती होत नाही. प्रत्येक पूर्वपक्षाचे उत्तरपक्ष स्वयंसिद्ध असतात. याच कारणाने आचार्यादी मान्यवरांची गीताभाष्ये गीतेचा बोध करून देण्यास वस्तुतः असमर्थ ठरली आहेत व श्रीशंकराचार्य-रामानुजाचार्य-निंबार्काचार्य इ.मान्यवरांची भाष्ये केवळ गीतेवरील विविध मते म्हणूनच उरली आहेत.

खरी गीता त्यालाच कळते, ज्याने त्या वादांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष त्या गीतातत्त्वाचा साक्षात्कार करून घेतला!! असो.

"भक्तिशास्त्राणि मननीयानि तदुद्बोधककर्माणि करणीयानि ।।७६।। सुखदुःखेच्छालाभादित्यक्ते काले प्रतीक्ष्यमाणे क्षणार्धमपि व्यर्थ न नेयम्।।७७।। अहिंसासत्यशौचदयास्तिक्यादि-चारित्र्याणि परिपालयानि ।।७८।। ।।ना.भ.सू.।।"-

भक्तिशास्त्राच्या अध्ययन व स्वाध्यायासही ***नारद*** फार महत्त्व देतात. तसेच त्या शास्त्रानुसार भक्तीची वृद्धी व्हावी अशी कर्मे करण्यास प्रोत्साहन देतात. भक्ती करण्यासाठी योग्य काल प्राप्त होईल अशी वाट पाहू नये. सुख-दुःख, लाभहानी, इच्छापूर्ती इ.मुळे कालक्षेप करू नये. तर भक्ती केल्यावाचून क्षणार्धही वाया घालवू नये. ***पतञ्जली*** जसे यमनियमादी पालन करण्यास सांगतात, तसेच नारदही ***अहिंसा, शौच, दया, आस्तिक्य*** इ.सद्गुणांचे परिपालन करण्यास सांगतात. हे गुण ***योग व भक्ती*** यांचा पायाच आहेत व उभयमान्य आहेत, असेही या नारदभक्तिसूत्रावरून दिसून येते.

भक्तीतील भेद व त्यांचे अभेद

"भक्ता एकान्तिनो मुख्याः।।६७।। सर्वदा सर्वभावेन निश्चिन्तितै-र्भगवाननेव भजनीयः।।७९।। स कीर्त्यमानः शीघ्रमेवाविर्भवति। अनुभावयति च भक्तान्।।८०।। त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसी भक्तिरेव गरीयसी।।८१।।ना.भ.सू.।।" -भक्ताने एकांतसेवन करावा व एकाग्रतेने भक्ती करावी. सर्व काळी निश्चिंत होऊन सर्वभावे करून एकमात्र श्रीभगवानांचे भजन करावे. तेच केवळ भजनीय आहेत. त्यांचे कीर्तन मनापासून केले असता ते शीघ्रातिशीघ्र प्रकट होतात आणि भक्तांना आपली दिव्य अनुभूती - आपला दिव्यातिदिव्य साक्षात्कार घडवून आणतात. तिन्ही काळी- भूत-वर्तमान-भविष्यातही काया-वाचा-मने केलेली भगवद्भक्तीच सर्वश्रेष्ठ आहे, असे नारद उच्चरवाने त्रिवार सांगत आहेत.

"गुणमाहात्म्यासक्ति रूपासक्ति पूजासक्ति स्मरणासक्ति दास्यासक्ति सख्यासक्ति कान्तासक्ति वात्सल्यासक्ति आत्मनिवेदनासक्ति तन्मयासक्ति परमविरहासक्तिरूपा-एकधाप्येकादशधा भवति।।८२।।ना.भ.सू.।।"-

भक्ती किती प्रकारांची आहे - नवधा वा इतर याबाबत नारद मात्र म्हणतात की ही भक्ती खरे तर एकाच प्रकाराची आहे. मात्र भक्तांच्या आवडीनुसार तिचे ते एकादशभेद सांगतातः ***१)गुणगान करणे, २)रूपासक्ती, ३) पूजा, ४) स्मरण, ५) दास्य, ६)सख्य, ७) कांतासक्ती, ८) वात्सल्यभाव, ९) आत्मनिवेदन, १०) तन्मयासक्ती व ११) परमविरहासक्ती*** असे ते अकरा भेद आहेत. नवधा भक्तीतील ***श्रवण, कीर्तन*** इ.गुणगानात येतात; ***पादसेवन, अर्चन, वंदन*** इ.पूजेत मोडतात. अशा प्रकारे नारद नवधा भक्तीस आपल्या एकादशप्रकारात अंतर्भूत करतातच; पण तदुपरांत इतरही प्रकार सांगतात.

खरे तर ***आत्मनिवेदन, तन्मयता, विरहव्याकुलता, रूपासक्ती*** हे तर कोणत्याही भक्तीचे सर्वसामान्य भावच आहेत. म्हणून भक्तीचे हे प्रकार खरे तर ***कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग*** इ.योगप्रकारांइतकेच परस्परअभिन्न आहेत. ध्येय्य वस्तूचे कोणते आलंबन कशा प्रकारे साधकाने घेतले आहे, त्यापुरताच फरक योग वा भक्तीच्या या प्रकारच्या भेदांसाठीच करावयाचा झालाच तर करावा लागेल! असो.

पराभक्तीचे स्वरूप

गौणी भक्तीपासून सुरुवात करून, भक्तीच्या नानाविध प्राकारातून प्रवेशत, शेवटी भक्तास परमभक्ती वा पराभक्ती प्राप्त होते!! अशा भक्तांचे महिमान ते किती सांगावे! नारद केवळ वानगीदाखल म्हणतातः ***"कण्ठावरोधरोमाञ्चाश्रुभिः परस्परं लपमानाः पावयन्ति कुलानि पृथिवीं च।।६८।। तीर्थी कुर्वन्ति तीर्थानि सुकर्मी कुर्वन्ति कर्माणि सच्छास्त्री कुर्वन्ति शास्त्राणि।।६९।।ना.भ.सू.।।"*** -

आत्यंतिक भक्तीने अंतःकरण विद्ध झालेले, कंठ दाटून येऊन सर्व शरीरावर प्रभुसाक्षात्काराने रोमांच उठलेले ते भक्त आपल्या कुटुंबाला, कुळाला, एवढेच नव्हे तर अखिल पृथ्वीलाही पावन करतात. त्यांचे अस्फुट परस्परसंवाद ऐकण्यास मिळणारा अत्यंत भाग्यवानच म्हणावा! अष्टसात्त्विक भावांचे सागरच असणारे ते भक्त आपल्या पुण्याईने तीर्थांनाही पावन करतात; कर्मांस पवित्रता देतात; सर्व शास्त्रांना सनाथ करतात!!

"मोदन्ते पितरौ नृत्यन्ति देवताः सनाथा चेयं भूर्भवति।।७१।। नास्ति तेषु जातिविद्यारूपकुलधनक्रियादिभेदः ।।७२।। ।।ना.भ.सू.।।" - निरंतर परमतत्त्वात लीन होऊन राहणारे ते भक्त म्हणजे साक्षात झालेली जीवन्मुक्तीच!! त्यांच्या सहवासात देव हर्षभरित होऊन नृत्य करू लागतात; पृथ्वी त्यांच्यामुळे सनाथ होते. पितृगण तोष पावतात. भक्तांमध्ये जाति-विद्या-कुल-धन-कर्म इ.चा भेद पाहू नये. भक्त या सर्वांच्या अतीत असतो. ***"यस्तदीयाः।।७३।। ना.भ.सू.।।"*** - कारण भक्त सर्व तत्त्वांपलीकडील भगवत्तत्त्वाचाच केवळ होऊन गेलेला असतो, असे नारद म्हणतात.

नारदांनी केलेला भक्तिसमन्वय

"इत्येवं वदन्ति जनजल्पनिर्भयाः एकमताः कुमारव्यास-शुकशाण्डिल्यगर्ग विष्णुकौंडिन्यःशेषोद्धवारुणिबलि हनुमद्विभिषणादयो भक्ताचार्याः।।८३।।ना.भ.सू.।।"-

भक्तिशास्त्राची एकवाक्यता दाखवत भक्तिमार्गांचा समन्वय करणारे नारद म्हणतात की "जननिंदेला वा स्तुतीला महत्त्व न देता आपले मत निर्भयपणे मांडणारे समस्त भक्तवर्य - भक्ताचार्य असे सनत्कुमार, व्यासमहर्षी, शुकाचार्य, शांडिल्यमुनी, गर्गाचार्य, श्रीविष्णू, कौंडिण्यऋषी, शेष, उद्धव, आरुणि, बली, हनुमान, बिभीषण इत्यादींचे मत या भक्तिशास्त्राबाबत असे एकच एक आहे!!" आणि तेच एकमत आपल्या या भक्तिसूत्रांतून ग्रथित करत नारद धन्य होतात!

आपल्या भक्तिसूत्रांचा समारोप करत नारद म्हणतातः ***"य इदं नारदप्रोक्तं शिवानुशासनं विश्वसति श्रद्धते स भक्तिमान्भवति स प्रेष्टं लभते। स प्रेष्टं लभते इति।।८४।।ना.भ.सू.।।"*** - नारदांच्या या मंगलमय उपदेशावर श्रद्धा व विश्वास ठेवून भक्ती करावी. जो तसे करील तो परमभक्ती पावेल! त्याला परमात्म्याचा साक्षात्कार जरूर होईल!!

शाण्डिल्यभक्तिसूत्रे

नारदभक्तिसूत्रांप्रमाणेच ***शांडिल्यभक्तिसूत्रे*** पण भक्तीच्या क्षेत्रात सुप्रसिद्धच आहेत. त्यांचे संक्षेपतः समालोचन केल्याने भक्तीचा आवाका केवढा आहे, त्याची कल्पना करता येईल.

"सा परानुरक्तिरीश्वरे।।१।।शां.भ.सू.।।" - ईश्वराप्रति परम अनुराग हीच भक्ती होय, असे शांडिल्य म्हणतात. पातञ्जलयोगसूत्रे समोर ठेवून ही सूत्रे रचली असावीत असे वाटते. ***ईश्वर*** ही संकल्पना आपण पूर्वी पातञ्जलयोगसूत्रांचे परीक्षण करतांना समजावून घेतली होती. ईश्वर हा पंचक्लेशरहित असतो. त्याच्याप्रति असणारा भक्ताचा परमअनुराग हा क्लेश नव्हे हे सूचित करत शांडिल्य म्हणतात ***"हेया रागत्वादिति चेन्नोत्तमास्पदत्त्वात् सङ्गवत्।।२।।शां.भ.सू.।।"*** - असा अनुराग त्याज्य नाही. कारण तो उत्तम आहे. ***"तत्संस्थस्यामृत - त्वोपदेशात्।।३।।शां.भ.सू.।।"*** - श्रुती म्हणते की जो मनुष्य अशा उत्तम अनुरक्तीने ईश्वरात स्थित होतो, तो अमृतत्त्व प्राप्त करतो.

भक्ती, ज्ञान व कर्म

ज्ञान म्हणजे भक्ती नव्हे. ***"ज्ञानमिति चेन्न द्विषतोऽपि ज्ञानस्य तद् संस्थिते।।४।। तयोपक्षयाच्च।।५।।शां.भ.सू.।।"*** ज्ञानाचे फळ भक्ती आहे. हा भक्तीचा शिरोबिंदु आहे. हीच अवस्था सर्वश्रेष्ठ असल्याचे ज्ञानेश्वरादी संत-भागवत एकमुखाने सांगतात. ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाध्यानं विशिष्यते। ... ।।१२-१२।।"*** या गीताश्लोकासंबंधी ज्ञानेश्वरीचा अभ्यास करतांना आपणास ***"अभ्यास -➢ज्ञान -➢ध्यान -➢कर्मफलत्याग -➢शांति -➢ निर्वाणप्राप्ती"*** असा साधनाक्रम असल्याचे लक्षात आले होते, त्याची जिज्ञासूंना आठवण असेलच! ही भक्ती क्रियारूप नाही. तिला कर्माची अपेक्षा नाही. ***"न क्रिया कृत्यनपेक्षणाज्ज्ञानवत्।।७।। अतएव फलानन्त्यम् ।।८।।शां.भ.सू.।।"*** - म्हणून तिचे फल अनंत आहे. ज्ञानसाधनेस कर्त्याचे प्रयत्न आवश्यक असतात. त्यांसच गीता ***अभ्यास*** असे म्हणते *(श्लोक क्र.१२-१२).*

समन्वयः:::

योग व भक्ती यांचा समन्वय

कर्मासक्त पण कर्मे करूनही ईश्वराची भक्ती करू इच्छिणारे साधक ***कर्ममार्गी*** *होत;* पण *कर्मे ईश्वरेच्छेवर सोडून भक्ती करणारे साधक* ***भक्तिमार्गी*** *होत; कर्मे त्यागू इच्छिणारे साधक* ***ज्ञानमार्गी*** *होत,* असेही एक मत आहे. या तिन्ही मार्गांत योगबळाची अपेक्षा आहे. पण योगातील समाधी ही एक अवस्था वा अंग आहे. तीसुद्धा

अंती गौण असल्याचे मत ***"गौण्यातु समाधिसिद्धि: ।।२०।। शां.भ.सू. ।।"*** असे म्हणून शांडिल्य नोंदवतात. *हा विचार अर्थातच सविकल्पादी समाधींना लागू आहे;* ***निर्विचार समाधी त्यात अंतर्भूत नाही,*** *हे आपण योग व भक्तीचा समन्वय साधत म्हणू शकतो.*

सगुण प्रेम

गीता म्हणते की ***"अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्। साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।।९-३०।।"*** - दुराचारी पण ईश्वरभक्ती करणारा साधूच समजावा. शांडिल्यही म्हणतात की ***"महापातकीनांत्वातौ ।।८२।।शा.भ.सू. ।।"*** - अंत्यजादी जाती, महापातकी मनुष्य इ.सर्वांना भक्ती करण्याचा अधिकार आहे. गीता पण म्हणते की ***"मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः। स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्।।९-३२।।"*** - स्त्रीशूद्रादी सर्व जण भगवद्भक्तीने परमगती पावतात.

या सर्वांना परमभक्ती प्राप्त होते, तिची सुरुवात ***गौणी*** किंवा ***आण्वी*** भक्तीने होते. ***"परां कृत्यैव सर्वेषां तथा ह्याह ।।८४।। शां.भ.सू. ।।"*** - श्रवण, कीर्तन, अर्चनादी नव वा एकादश भक्तिप्रकार हे गौण वा आणव प्रकार होत. यांच्या साधनाने अंती ***पराभक्ती*** प्राप्त होते.

"तासु प्रधानयोगात् फलाधिक्यमेके ।।९०।।शां.भ.सू. ।।" - ***पराभक्ती*** **प्राप्त झाल्यावरही मनुष्याने या साधनांचा त्याग करू नये. समर्थ रामदाससुद्धा** ***निर्गुण*** **प्राप्त झाले तरी** ***सगुण*** **लवंडू नये, असे सांगतात.** हेही तसेच आहे.

शांडिल्य म्हणतात की कीर्तनादी साधने पराभक्तीचे फल वाढवतात!! म्हणूनच आत्यंतिक भक्त सदासर्वदा सगुणप्रेमात रंगून गेलेले दिसतात. ***मीराबाई, कबीर, तुकाराम, रामदास, सोपानदेव, गोरा कुंभार, सावता माळी, संत शेखमहम्मद, चोखा मेळा, नामदेव, निवृत्तिनाथ, रामकृष्ण परमहंस, गोंदवलेकर महाराज, ज्ञानदेव*** इ.किती म्हणून संतांची अन भक्तांची नामावळी घ्यावी यासाठी!! तीही थोडीच आहे!

भक्ती व लययोग

"अनन्य भक्त्या तद्बुद्धि लयादत्यन्तम् ।।९६।।शां.भ.सू. ।।" - भक्तीचा डांगोरा पिटत तिचे आणि योगाचे काही मोठे वितुष्ट आहे, असा डंका वाजवणाऱ्या आधुनिक विद्वान आणि भक्तिमार्तंडांनी भक्तीत लययोग आहे, हे खरोखरच मनावर ठसवून घ्यावे अन आपल्या व्यर्थ अट्टाहासाचा वेळीच सर्वथैव आपल्याच संपूर्ण कल्याणार्थ त्याग करावा, हेच या शांडिल्यसूत्रांपासून सहजच उद्बोधित होते!!

अनन्यभक्तीने ***बुद्धी*** **या तत्त्वाचा म्हणजेच** ***महत्*** **तत्त्वाचा आत्यंतिक लय होतो, असे शांडिल्य म्हणतात.** ज्ञानदेवांचा ***लययोग*** अथवा ***पंथराज*** वा ***क्रमयोग*** त्यातही हेच तत्त्व आहे, हे आपल्या सहजच ध्यानात येते. अहंकार परमात्मस्वरूपी लीन होतो आणि ***"आविस्तिरोभावा विकाराः स्युः क्रियाफल संयोगात् ।।१००।। शां.भ.सू. ।।"*** - त्यापासून अनासक्त कर्म उदित पावते; कर्मसंस्कार होणे लय पावते. नैष्कर्म्यसिद्धी ही भक्तीची फलश्रुती आहे!!

गीता कर्मयोग सांगते, भक्तियोग सांगते, ज्ञानयोग सांगते, ध्यानयोग सांगते आणि हे सर्व परस्पर अतिभिन्न आहेत, असे मानणाऱ्यांनी हे ***शांडिल्यसूत्रां***चे जरूर मनन करावे. खरे तर आपणासारख्या ज्ञानेशोक्तीच्या आधारे चालणाऱ्यांना हा विचार करणे तसे आवश्यक नाही. पण त्यातीलही कित्येक ज्ञानेशभक्तांना त्यांच्या सांगण्यातील ही गमके दिसून येत नाहीत आणि काही एकांतिक विचारांच्या विद्वानांच्या प्रेरणेने ते ही ज्ञानेशसत्ये दृष्टीआड करून जन्मभर वाटचाल करत कष्ट पावतात, हे निदर्शनास आल्यावरून आणि आपणासारख्या इतरांच्या जिज्ञासापूर्तीसाठी एवढे विवेचन करणे भाग पडले. असो!

हरिपाठ::::

"रामरतनधन"

भक्तीने जे रत्न प्राप्त होते, त्याचे दर्शन मीराबाईच्या शब्दांत घेऊ या. ती म्हणते: ***"पायो जी मैने रामरतनधन पायो। वस्तु अमोलिक दी मोरे सद्गुरु, किरपा कर अपनायो।।"*** - अमूल्य वस्तू असे अमूप धन म्हणजे हे रामरत्न - ही कृष्णकृपा!! या रत्नावरचे अवगुंठन नाजूक हातांनी बाजूला सारणे ज्ञानराजांशिवाय कोण करू शकेल! त्या अमूल्य भक्तिरत्नाचे दर्शन त्यांच्या **हरिपाठा**दी अभंगांद्वारे आपण घेऊ या!! त्याविना भक्तीचे सार आपणास गवसणार नाही!!

कृष्णकृपारत्नाचे अनवगुंठन

"देवाचिया द्वारी उभा क्षणभरी। तेणें मुक्ति चारीं साधियेल्या।।" या मुखड्याच्या अभंगाने ज्ञानदेवांचा हरिपाठ सुरू होतो.नभांगणातील सत्तावीस नक्षत्रांप्रमाणे अध्यात्माच्या तारांगणात त्यांचे हरिपाठाचे सत्तावीस अभंग शोभून दिसतात. ***"ज्ञानदेवा प्रमाण। निवृत्तिदेवीं ज्ञान। समाधि संजीवन हरिपाठ।।"*** असे संजीवनसमाधीचे आश्वासन देत त्या अभंगांची संपूर्णता होते. आपण आता प्रामुख्याने त्या अभंगांचे परिशीलन करण्यास उद्युक्त झालो आहोत. या वेळी या अभंगांची थोडी पूर्वपीठिका जाणून घेणे प्रशस्त ठरेल.

हरिपाठ

तसे पाहिले तर इतरही संतांनी हरिपाठाचे अभंग रचलेले आहेत. वारकऱ्यांत तर श्रीज्ञानदेवांबरोबरच ***श्रीएकनाथ, श्रीनामदेव, श्रीतुकाराम व श्रीनिवृत्तिनाथ*** यांचे हरिपाठ ***पंचरत्न हरिपाठ*** म्हणून फार प्रचलित आहेत. भक्तीची चिद्गंगा त्या हरिपाठांच्या सुशांत पात्रातून वाहत जाऊन सर्वांना पवित्र करत, धन्यता देत गेली अनेक शतके प्रवाहित होत आहे.

ज्ञानेशांचा ***पंथराज*** हा खरे तर ***सगुण ध्यानावर आधारलेला लयात्मक कुंडलिनीयोग*** आहे. त्याचे समग्र दर्शन आपण यापूर्वी घेतलेच आहे. ***स्मरण-ध्यान*** हा त्याचा गाभा आहे. ***"मग तेथ आपण।***

एकाग्र अंतष्करण। करूनि सदगुरुस्मरण। अनुभविजैं।।६-१८६।। जेथ स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्त्विकें भरें। जंव काठिण्य विरें। अहंभावाचें।।१८७।। विषयांचा विसर पडें। इंद्रियांचि कसमस मोडें। मनाचिं घडी घडें। हृदयामाजिं।।१८८।। आईसें ऐक्य हें साहाजें। फांवें तंव राहिजे। मग तेणेंचि बोधें बैसिजें। आसनावरी।।१८९।। ... पवनांतैं पवन धरीं।... प्रवृत्ति माघोति मोहरें। समाधि ऐलाडी उतरें। आघवें अभ्यासूं सरें। बैसतखेंवों।।१९१।।" या परवलीच्या ओव्यातून ***स्मरण आणि ध्यान*** यांचा या योगमार्गाशी होणारा उत्तम मिलाप वर्णिलेला आहे.

"योगयागविधि एणें नोहें सिद्धि। वांयांचि उपाधि। दंभधर्म।।" या हरिपाठातील ओवीचे खरे मर्म जाणून घेण्यासाठी वरील योगप्रक्रियापर ओव्या नीट आकळून घेतल्या म्हणजे जो योग दंभ देतो, तो ज्ञानेशांचा ***पंथराजयोग*** नव्हेच, हे कोणासही कळून येईल. मग ज्ञानेश हेटाळतात, तो योग कोणता याचा भक्तीचा निव्वळ अभिनिवेश बाळगणाऱ्यांनी शोध जरूर घ्यावा!

आपणास मात्र ज्ञानेश प्रशंसितात, तो ***पंथराज* नावाचा योग आणि *भक्ती* यांत कोणताच विरोध आढळत नाही.** उलट शांडिल्य म्हणतात तसा ***"योगस्तूभयार्तमपेक्षणात् प्रयाजवत्।।१९।। शां.भ.सू.।।"*** -***भक्ती व योग* यांत अविरोधच आहे; एकमेकास पूरकच हे दोन्ही आहेत,** हे सहज स्पष्ट व्हावे.

भक्तीचे जे नवधा वा एकादश प्रकार आहेत, त्यांचा नीट विचार केला की आपणास दिसून येते की त्या सर्वांच्या मुळाशी मुख्य आहे ती ***ईश्वर*** ही संकल्पना! ईश्वराचे स्वरूप, गुण, चरित्र इ.विशेष ध्यानी घेतले की ईश्वर ही संकल्पना समजते. ईश्वराचे नामरूप, गुण, चरित्र ही सर्व त्यासाठी पायाभूत होत. श्रोत्र, चक्षू, मन व बुद्ध्यादी इंद्रियादिंद्वारे ही संकल्पना साकार होते.

त्यामुळे ***ईश्वर*** म्हटला की त्याचे ***स्मरण व ध्यान, त्याचे रूपगुणचरित्रादी*** व त्याचे ***नाम*** यांना फार महत्त्व आहे. **ईश्वराचे नाम,रूप, गुण, चरित्र यांचे स्मरण असणे हा सगुणध्यानाचा विषय आहे.** कोणी सद्गुरूसच ईश्वर समजून त्याचे स्मरण-ध्यान करतात; तर कोणी ईश्वराचा विग्रह व अवतार त्यासाठी ध्येय्य विषय म्हणून घेतात.

पंथराजप्रणेते ज्ञानेश सद्गुरूसच ईश्वराच्या ठिकाणी घेऊन त्याचे ***प्रणिधान*** म्हणजे स्मरण, ध्यान इ.करतात. सद्गुरूवर एकाग्र अंतःकरण करून त्याचे स्मरण करून ते योग आरंभतात. हे ध्यान त्यांना सात्त्विकता देते; अहंकार नष्ट करते; मनास स्थिर करते; सद्गुरूंशी ऐक्यबोध प्राप्त करून देते; विषयांचा विसर पाडते; इंद्रियांची तगमग दूर करते; पवनादी योगक्रिया साध्य करून देते; प्रवृत्तीस मागे वळवते; अभ्यासाच्या ऐलतीरीच समाधी प्राप्त करून देते, असा त्या ईश्वर - सद्गुरुध्यानाचा प्रभाव ज्ञानदेव ६-१८६ *ते* १९१ या ओव्यांतून सांगत आहेत. ***योग सिद्ध होण्यासाठी स्मरण-ध्यान या भक्तीनेच सुरुवात करावी लागते, हे यावरून सहज स्पष्ट होईल.***

ईश्वरस्मरण व नाम

अर्थातच ***स्मरणासाठी सोपे व उत्तम म्हणजे ईश्वराचे नाम*** होय. ***नाम तेथे नामी*** असतोच. नाम घेतले की ईश्वराचे स्वरूप, रूपगुणादी मनाच्या चक्षूंपुढे साकारतात. आपोआपच नामस्मरणामुळे ध्यानही घडून येते. त्यातूनच ***साकार -स्थूल वा मानस*** अशा ईश्वराच्या विग्रहाची वंदन, कीर्तन, पूजन इ.भक्ती सिद्ध होते. ही सर्व भक्ती मूलतः स्मरण व ध्यान या स्वरूपाचीच आहे. म्हणून ***नामस्मरणास संत अत्यंत महत्त्व देतात.*** कारण भक्ती व योग यांची ***नामस्मरण*** उत्तम सांगड घालून देते व ***योगाचे श्रेष्ठ फल*** प्राप्त करून देते; ***पराभक्ती* (परानुरक्ती)** प्राप्त करून देते.

या नामस्मरणाचे महत्त्वच ***हरिपाठ*** रचून संतांनी आपणापुढे स्पष्ट केले आहे.***साधनाचे प्रवेशद्वार असे हे हरिपाठ आहेत.*** त्यातून स्पष्ट होणारी भक्ती व योगाची प्रमेये पाहू या.

नामस्मरण-ध्यानादी भक्तीसाठी भक्तांची मनीषा कोणती असते, ते नामदेवांसारखे श्रेष्ठ भक्तच सांगू शकतात. ***"घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यांनी पाहीन। रूप तुझें।। प्रेमें आलिंगिन। आनंदे पूजिन। भावें ओवाळीन। म्हणे नामा।।"*** या शब्दांत त्यांचे मनोगत व्यक्त होते. **अर्चन, वंदन, पूजन, सख्य, वात्सल्य** इ.भक्तींचे सर्व भाव या ओळींतून व्यक्त होतात.

नामस्मरणाचे फल

या सर्व भक्तिभावाची ठेव घेऊन भक्ताने ***देवाचियां द्वारी*** उभे रहावयाचे असते. म्हणून ज्ञानदेवांचा हरिपाठ सुरू होतो, तोच मुळी या अभंगाने:

१) "देवाचिएं द्वारीं उभा क्षणभरी। तेणें मुक्ति चारीं। साधियेल्या।।१।। हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा। पुण्याची गणना कोण करी।।२।। असोनि संसारीं जिव्हें वेगु करी। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा।।३।। ज्ञानदेव म्हणे व्यासाचिएं खुणें। द्वारकेचां राणा पांडवाघरीं।।४।। अ.क्र.४८।।" -

मूर्तिपूजा ही गौण आहे. खरी पूजा करावयाची ती त्या अंतस्थ परमेशाची! अंतरी वसणाऱ्या परब्रह्माची! ***हृदयी वसणाऱ्या*** त्या ***परमात्म्याचे द्वार*** कोणते, तर ते ***मनोबुद्धिरूप*** होय. ते अंतःकरणाच्या गाभाऱ्यात उघडते. ***मन-बुद्धी सम करणे*** म्हणजे ते दार उघडून परमेश्वरासमोर उभे राहणे. हेच मनोबुद्धीचे द्वार सतत उघडे टाकावे म्हणूनच **संत श्रीसमर्थ रामदासां**नीही ***मनोबोध*** अथवा मनाच्या श्लोकांची रचना केली आहे, असेही आपणास जाणवते. त्या अर्थी ***मनाचे श्लोक*** हा श्रीसमर्थांचा **हरिपाठ**च आहे, म्हणा ना! असो.

हृदय याचा अध्यात्मात व योगशास्त्रात काय अर्थ होतो, त्याची आपण सविस्तर चर्चा पूर्वीच केली आहे. हृदय ते हेच आणि ***त्रिकूटीस्थ शून्य हे प्रथमद्वार*** होय. आज्ञाचक्राच्या बिंदूत हे आहे.

ज्ञानदेवांची ***पाच शून्ये*** आपण पाहिलीत. ही एकामागून एक उघडत जाणारी द्वारे होत. त्यांच्यातून प्रवेशत आपण चारही मुक्तींचे धनी तर होतोच! पण द्वारकेचा राणा असा जो सगुण सावळा

निजानंदरूप श्रीकृष्ण, त्यासही उराउरी भेटू शकतो. हे रूप निरंजनाची धन आहे. त्याचे दर्शनही आपण पूर्वी ज्ञानेशांच्या काही अभंगातून घेतलेलेच आहे *(विशेषत:उन्मेष ४८-३:विश्वरूपाचे सम्यग्दर्शन, पृ.क्र.१०४ ते १०८)*. संसारी राहूनही पांडवांनी ही धन सहज प्राप्त करून घेतली ती हरिभजनाच्या अगणित पुण्याईच्या बळावरच! अशा रीतीने ज्ञानदेवांनी पुनश्च या अभंगातून तोच तो आपला ***पंथराज*** निर्देशिला आहे, असे आपणासारख्या जिज्ञासूंना सहजच दिसून येते.

सर्व शास्त्रे व वेदसुद्धा उच्चरवाने हेच सांगत आहेत की हरिभक्तीचे फळ अमूप आहे. **सदासर्वदा, कर्म करतांनासुद्धा हरिनाम स्मरावे. *वैखरी, मध्यमा, पश्यंति* यांनी ते घ्यावे व थेट परेत ते उतरवावे. हरीचे ध्यान करत जावे. ते ध्यान एकदा का ज्ञानेशांच्या प्रथमशून्यापलीकडे पोहोचले की क्रमशः ते परेतून स्मरू लागते. *अजपाजप* तो हाच! *ध्यान व नाम* यांचा सहयोग म्हणजे हा जप होय. स्वतः न करता तो अंतरातून उमटतो, हे त्याचे वैशिष्ट्य!** वैखरी वाचेने नाम स्मरतास्मरता ते केवढे फळ हाती आणून देते पहा!

हरिनामस्मरणाची हीच महती ज्ञानेशांनी या अभंगातून सांगितलेली आहे. ***"मैं तो निरञ्जन ध्याऊं"*** असे हरिनामफल आहे. साक्षात जीवन्मुक्ती देणारे हे साधन आहे.

स्मरण हाच सोपा मार्ग

या साधनाची सुलभता सांगत ज्ञानदेव पुढे म्हणतातः

२) "चहूं वेदीं जाण साही शास्त्रीं कारण। अठराही पुराणें हरिसी गाती।।१।। मंथूनि नवनीता तैसें घे अनंता। वायां वेर्थ कथा सांडी मार्गु।।२।। एक हरि आत्मा जीवशिवसमा। वायां तूं दुर्गमा न घालीं मन।।३।। ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ। भरला घनदाट हरि दिसे।।४।।अ.क्र.४१।।" -

चारही वेद, षट्शास्त्रे आणि अठरा पुराणे ही सर्व त्या हरीचे स्वरूप-गुण-कीर्ती-लक्षणे-चरित्रादी कथन करण्यासाठी उत्पन्न झाली ़हेत. हरीशिवाय अन्य सत्य तत्त्व या विश्वात नाहीच, असा त्यांचा निष्कर्ष आहे. दही घुसळून त्यातील लोणी काढून घ्यावे, तसे या सर्व श्रुतिशास्त्रादी सागराचे मंथन करून दृष्टीला हे हरिरूपी नवनीत पडते. या अनंताशिवाय इतर काही मनी ठसवण्याजोगे नाही, हा बोध ध्यानी घेऊन हरिभक्तीशिवाय इतर साधनामार्ग आणि प्रवृत्तिपर कर्मे सांडून टाकावीत, असे नारदादी भक्तिसूत्रांप्रमाणेच ज्ञानदेवही सांगत आहेत.

हरी हाच आत्माराम आहे. तोच जीव आणि शिव यांना सारखेपणाने व्यापून आहे. त्याच्याशिवाय इतर कशातही लक्ष घालू नये. साधनाचे वर्म ते हेच आहे. अशा साधनानेच ज्ञानदेवांना वैकुंठी वसणाऱ्या या हरीचे नित्य दर्शन सर्वत्र घडले. घननीळ अशा त्या श्रीहरीला या अखिल विश्वातील अणूरेणूतही पाहून ज्ञानदेव धन्य झाले, ते या हरिपाठाच्या बळावरच! नाम घेऊन व ध्यान करून त्यांना हा हरी पावला. त्यांचे हे उदाहरण घेऊन साधकांनी हा आपला स्मरण-ध्यानाचा सुगम मार्ग - हा ***पंथराज*** सोडून अन्यत्र कोठे अवघड दुर्गम मार्गाला लागू नये अशी ज्ञानेशांचे सर्वांच्या कळवळ्याने त्यांना सांगणे आहे.

हरीचे स्वरूप

हरीचे स्वरूप आकळून घ्यावे व त्याचे ध्यान करावे, असे ते पुढील अभंगातून सूचित करतातः

३) "त्रिगुण असार निर्गुण हें सार। सारासार विचार हरिपाठ।।१।। सगुण निर्गुण गुणाचे अगुण। हरिविण मन वेर्थ जाएं।।२।। अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार। जेथोनि चराचर हरीसि भजे।।३।। ज्ञानदेवा ध्यान रामकृष्ण मनीं। अनंत जन्मोनी पुण्य होएं।।४।।अ.क्र.५०।।" -

सारासारविचार करणे म्हणजेच हरीचे भजन करणे होय. त्रिगुण असार आहेत व निर्गुण हेच सत्य रूप आहे. पण हे सर्व गुणसापेक्ष आहे. सगुणही खरे नाही आणि त्यासापेक्ष असणारे निर्गुणही खरे नाही. तर ***सगुण-निर्गुणाव्यतिरिक्तचे अगुण हेच हरीचे खरे स्वरूप आहे. अव्यक्त निराकार असा हरी आहे.*** त्याला आकार नाही. पण त्याच्यापासूनच हे चराचर विश्व उद्भवते. ***हरीचे हे स्वरूप ज्याने जाणून घेतले नाही म्हणजे ज्याने ज्ञान प्राप्त करून घेतले नाही, त्याचा जन्म व्यर्थ गेला.***

अनंत जन्मांच्या पुण्याईने ज्ञानदेवांना हे स्वरूप जाणून घेता आले. त्यांच्या मनात रामकृष्णरूप अशा त्याच हरीचे स्मरण ठसले आहे आणि त्याचेच ध्यान त्यांना लागले आहे.

"जिस नामसे ध्रुव प्रह्लाद तरे। वो नाम कछु और"

त्या हरीची भक्ती कशी करावी ते ज्ञानेश पुढे सांगत आहेतः

४) "भावेंविण भक्ति भक्तिविण मुक्ति। बळेंविण शक्ति बोलूं नये।।१।। कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित। उगा राहे निवांत शिणसि वायां।।२।। सायासें करिसि प्रपंच दिननिशीं। हरीसि न भजसि कवण्या गुणें।।३।।ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें। तुटेल धरणें प्रपंचाचें।।४।।अ.क्र.५१।।"-

मनुष्य रात्रंदिवस कष्टाची ओझी ओढत राहून प्रपंच करू पाहतो. पण तरीही प्रपंच अपुराच होतो. एवढा त्रापदायक संसार करणारी माणसे हरीचे भजन का बरे करत नाहीत! त्यांनी खरे तर जरा निवांत राहावे. ***प्रपंचाचा भार थोडा वेळ का होईना, उतरवून ठेवावा आणि हरीचे स्मरण करावे. म्हणजे हे प्रपंचाचे संकट कायमचे टळेल.***

पण **ते हरिनाम घेणे - मग ते रामकृष्णादी असो, *ॐकार* असो, *"ॐ तत् सत्"* असे गीतोक्त असो, कोणतेही का असेना! हरिस्मरण करणे, हरिध्यान करणे या सर्व गोष्टीत भाव असला पाहिजे.** शक्तीची गोष्ट बळावाचून जशी करता येत नाही, तसेच भक्ती पण भावावाचून करता येणे अशक्य आहे. ***रामकृष्ण परमहंसांचा भाव, एकनाथ -नामदेवांचा भाव, ज्ञानेशांचा निवृत्तिनाथांप्रतिचा भाव, कबीराचा रामभाव, तुलसीदास-मीरेचा भाव, प्रह्लादाचा***

भाव असे भाव लाभलेली भक्तीच मुक्तीचे दर्शन घडवून आणू शकते. भावाविण भक्ती आणि मुक्ती शक्यच नाहीत.

" जिस नामसे ध्रुव पह्लाद तरे। वो नाम कछु और।।" -तसे हे स्मरण असले पाहिजे. संत श्रीकबीर म्हणतातः ***"माला तो करमें फिरैं। जिभ फिरे मुखमाहिं। मनुवा तो दहु दस फिरैं। ये तो सुमिरन नाहीं।।"*** मन तन्मय करून स्मरण केले तरच ते फळते. दशेंद्रियांनी नाम घेतले पाहिजे, तरच ते खरे नामस्मरण! ***ध्रुव-प्रह्लाद यांनी ज्या भावाने नामस्मरण केले, तसा भाव असला तर ती खरी भक्ती होईल.***

ज्ञानेश याप्रमाणे या अभंगातून गौणी भक्तीच्या मर्यादा व तिचे उच्चतम भक्तीत संक्रमण करणे या दोन्ही गोष्टी स्पष्ट करतांना दिसतात.

"महापुरुषसंश्रयः"

भावपूर्ण भक्तीने परमेश्वर त्वरित प्रसन्न होतो. म्हणून तिचाच अवलंब केला पाहिजे. पण हा भाव प्राप्त होण्यासाठी संतांस शरण जावे लागते. ज्ञानेश म्हणतातः

५) "योगयागविधि एणें नोहें सिद्धि। वांयांचि उपाधि दंभधर्म।।१।। भावेंविण देव न कळे निसंदेह। गुरुविण अनुभव कैसा कळे।।२।। तपेंविण दैवत दिधल्याविण प्राप्त। गुजेंविण हित कोण सांगे।।३।। ज्ञानदेव सांगें दृष्टांताची मात। साधूचें संगति तरणोपाय।।४।। अ.क्र.५२।।" -

"राम राम सब कोई कहें। ठग ठाकूर और चोर।। दसरथ कहें न कोय।।" - रामनाम घेणे, हरिस्मरण करणे कोणीही करतो. पण ***दसरथ*** म्हणजे दशेंद्रियांनी रत म्हणजे एका भावाने ते करणारा विरळा असे **कबीर** म्हणतात. तसे नाम घेणे, तसे स्मरण करणे हा भक्तीचा आत्मा आहे. त्या ***भक्तीभावाविना केलेले योगाचरण व वेदोक्त यागादी साधने विफल होत.*** ती साधने क्षुद्र सिद्धी देतील, स्वर्गादी भोग देतील.पण ज्यासाठी हे एवढे सायास करावयाचे तो हरी-आत्मा काही मिळवून देणार नाहीत.

आत्यंतिक फल ते तो हरीच आहे आणि त्यासाठीच तर खरे म्हणजे योग करावयाचा, यज्ञादी कृत्ये करावयाची! पण हरिभक्तिविना - त्या नामस्मरणध्यानादींविना, त्या भावाविना केलेली ही सर्व साधना व्यर्थ ठरते. त्यातून साधनेचा अहंकार मात्र पोसला जातो आणि अहंकाराद्वारे पतनाचा मार्ग धरावा लागतो.

गुरुविना परमेश्वराचा साक्षात्कार होत नाही. देव जसा तप केल्यावाचून प्रसन्न होत नाही; काहीतरी मिळावे असे वाटत असेल तर इतर काहीतरी जसे द्यावे लागते; तसेच ***भक्ती ही भावाविण सिद्ध होत नाही.*** त्या भावाविना देव भेटत नाही; त्याचा साक्षात्कार होत नाही.

अंतरी प्रेम असले, जिव्हाळा असला तरच कोणी दुसऱ्याच्या हिताची गोष्ट सांगतो. ज्ञानदेवांच्या हृदयी आपणा सर्वांबद्दल असेच प्रेम, असाच जिव्हाळा वसत आहे. म्हणून ते आपणास त्यांच्या अनुभवाची खास अशी हितकारक गोष्ट सांगत आहेत. ती म्हणजे हा भाव, ही भक्ती, ते ***दशरत*** नाम, तो परमेश्वराचा साक्षात्कार, ते आत्मज्ञान ही प्राप्त व्हावीत म्हणून साधूंची - संतांची संगत धरावी. ***संतांच्या संगतीतच हा संसार तरून जाण्याचा उपाय गवसतो; अन्यथा तो सापडणे अवघड आहे.***

संत-सज्जन-महात्मे यांचे हे ऐश्वर्य, त्यांचा हा मुक्तिदायक गुणधर्म नारद-शांडिल्यादी भक्ताचार्यांप्रमाणे, श्रीशंकराचार्यांप्रमाणेच ज्ञानेश्वरांनीही ओळखलेला आहे. श्रीमच्छंकराचार्य ***विवेकचूडामणी***त असा ***महापुरुषसंश्रय*** दुर्लभ असल्याचे मान्य करतात. क्वचित कोणा भाग्यवंतासच तो लाभतो. पण आपणासारख्या भाग्यवंतांस मात्र ज्ञानदेवांच्या रूपाने त्यांनी घेतलेल्या संजीवनसमाधीमुळे तो सहजच गेली सातशे वर्षांहूनही अधिक काळ उपलब्ध झाला आहे!!

नारद ***"मुख्यतस्तु महत्कृपयैव"*** असे त्या संतसंगतीचे माहात्म्य भक्तिप्राप्तीसाठी सांगतात. शांडिल्यादी संतमहात्म्यांचे, भगवंतांचे जे अवतार होतात, ते ***"मुख्यं तस्य हि कारुण्यम्।।४९।।शां.भ.सू.।।"*** असे सर्वांवर कृपा करण्यासाठी असतात, असे सांगतात. **गीताही *"तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। ...।।४-३४।।"* अशी त्या महात्म्यांची सेवा करण्यास सांगते, ते त्यांच्यापासून हे दिव्य साधन, ही भक्ती, हे ज्ञान , हा भाव, हे नाम, हा साक्षात्कार प्राप्त व्हावा यासाठीच!**

साधूंच्या संगतीचा सुपरिणाम

ज्ञानेश साधूंच्या संगतीचा दृश्य परिणाम सांगत आहेतः

६) "साधुबोध जाला। नुरोनिआं ठेला। ठायींच मुराला अनुभव।।१।। कापुराचि वाटी उजलली ज्योति। ठायींचि समाप्ति जाली जैसिं।।२।। मोक्षरेखें आला भाग्यें विनटला। साधुचा अंकिला हरिभक्त।।३।। ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं। हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्त्वीं।।४।।अ.क्र.५३।।"-

साधूसंत, महात्मे करुणाकर असतात. संसारश्रांत जीवांवर कृपा करण्यासाठीच त्यांचा जन्म असतो. त्यांनी एकदा का मुमुक्षू जीवास बोध करून दिला की तो त्याच्याठायी ठसतो. त्यांनी **दिलेले नाम वा साधन करून जीवास सोऽहंसाक्षात्कार होतो.**

पण कापुराची वाटी जशी पेटवली की ज्योत होऊन स्वतःतच विलीन होऊन जाते, तसाच हा साधुबोधही - हा ***सोऽहं***साक्षात्कारसुद्धा साधकाठायी विरून जातो. त्याची खूणसुद्धा मागे न ठेवता ***सोऽहं***चा आत्मतत्त्वात लय होतो; अद्वैतसाक्षात्कार प्राप्त होतो; हा बोध ठायीच मुरून जातो.

हरीची भक्ती करण्यास साधूंपासून शिकलेला हा साधक भाग्यवंतच होय. तो मोक्षमार्गावर आरूढतो. ज्ञानदेव म्हणतात की सज्जनांची संगत गोड मानल्याने त्या साधकास सर्वत्र - जनी, वनी, स्वात्मस्थानी - तो एकच एक हरी असल्याचा साक्षात्कार होतो.

"वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः।।७-१९।।" अशी गीतेची साक्ष आहे. तो साधक म्हणजे या गीतोक्तीची

जीवन्मुक्तावस्थेतील साक्षात मूर्तीच होय!!***"सर्व भूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि। ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।६-२९।।"*** अशी गीतेतील तत्त्वानुभूती पावून तो धन्य होतो.

ज्ञानदेवांनी हरिपाठाच्या पहिल्याच अभंगात ***"ज्ञानदेओ म्हणे व्यासाचिएं खुणे। द्वारकेचा राणा पांडवाघरीं।।"*** अशी हरिभक्तीची अंतिम मिती दाखवली होती. श्रीकृष्ण पांडवांघरी होता असे व्यासांच्या साक्षीने त्यांनी दर्शवलेले गूढ ज्ञानदेव सांगतात. श्रीकृष्ण त्यांच्या घरी होता हे म्हणणे म्हणजे खरे तर तो त्यांच्या ***हृदयमंदिरी*** वसत होता, असे म्हणण्यासारखे आहे. हेच गूढ माऊली श्रीज्ञानदेवांनी या ओळींतून अंकित केले आहे. ***हृदय म्हणजे आध्यात्मिक हृदय*** हे काही पुनः सांगायला नको! पहिल्या हरिपाठाच्या अभंगानिमित्त हे सांगून झालेच आहे *(पृ.क्र.१०१६)*. ही व्यासखूण नीट ओळखणारे ज्ञानेश ती स्पष्ट करत ***"हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्त्वीं"*** या शब्दांत ते रहस्य आपणापर्यंत आणून पोहोचवत आहेत, हे सुज्ञांस सांगणे न लगे!

हरिपाठाचा अभ्यास

हरिपाठ म्हणजे गुरुगृही जसा अभ्यासाचा पाठ वा धडा आत्मसात करावा तसा हरी आत्मसात करणे. त्यासाठी ज्ञानदेव ***हरिजप*** करण्यास सांगत आहेत. **हरिजप करणे म्हणजे नाम घेणे, स्मरण करणे, भजन-पूजन-अर्चन-वंदनादी करणे.** अगदी आत्मनिवेदन करणेसुद्धा त्यात येते. ***सर्व प्रकारची एकधा - नवधा - दशधा वा एकादशधा प्रकारची भक्ती हरिजपच होय.*** या सर्व प्रकारांनी ***हरीचा पाठ गिरवून*** साधक धन्य होतो; अद्वैत वा पराभक्ती पावतो, असे नारदोद्धव- शांडिल्यादी प्रभृतींसह ज्ञानेशांचेही सांगणे आहे. ***"ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे।।"*** या शब्दांत त्यांचा हा उपदेश ग्रथित होतो.

ते पुढे म्हणतातः

७)"पर्वताप्रमाणे पातक करणें। वज्रलेप होणें अभक्तांसि।।१।। नाहीं ज्यासिं भक्ति तो पतित अभक्त। हरिसि न भजत दैवहत।।२।। अनंत वाचाळ बरळति बरळ। त्या कैसेनि दयाळ पावे हरि।।३।। ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान। सर्वांघटीं पूर्ण एक नांदे।।४।।अ.क्र.५४।।"-

पर्वताएवढी पातकेसुद्धा हरिभक्तीने जळून खाक होतात. पण अभक्तांना हरिभक्तीची आवड नसल्याने त्यांची पातके वज्रलेपासारखी दृढ होतात. जे भक्ती करत नाहीत ते पतित होत. दैवहीन माणसे हरिभक्ती करत नाहीत. हरिजप करण्याऐवजी आपल्या वाचेने ते अमाप वेडीवाकडी दंभदर्पोक्तीपूर्ण बरळ करत बसून आयुष्य नासवतात. अशांना हरी कसा बरे प्राप्त होईल! त्या दयाळू श्रीहरीला त्यांनी अनन्यशरण व्हावे अन आपला खरे तर उद्धार करून घ्यावा.

संतांचे वचन प्रमाण मानणाऱ्या ज्ञानदेवांना ***आत्मा हीच खरी उपलब्धी आहे, श्रेयस आहे, गंतव्य आहे, खरे निधान आहे, अंतरीची सर्वसाक्षी ठेव आहे याची पूर्ण अनुभूती आली आहे.*** तोच सर्व घटांमध्ये नांदतो आहे; सर्व भूतमात्रांचा अंतःस्थ आहे; तोच पूर्ण आहे; त्याच्याशिवाय या विश्वात दुजे कोणीही नाही याचा साक्षात्कार संतांच्या आशीर्वादाने सर्वांनी पावावा व कृतार्थ व्हावे; हे आयुष्य सार्थकी लावावे असे ज्ञानेश आपणा सर्वांस कळवळ्याने सांगत आहेत.

नामाचे दुर्लभत्व

संतांच्या संगतीचा परिणाम पुढे स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतातः

८) "संतांचे संगति मनोमार्गें गती। आकळावा श्रीपति एणें पंथें।।१।। रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा। आत्मा तो शिवाचा रामजप।।२।। एक तत्त्व नाम साधिति साधन। द्वैताचें बंधन न बाधिजे।।३।। नामामृत गोडी वैष्णवां लाधलीं। योगियां साधलीं जीवनकळा।।४।। सत्वर उच्चार प्रह्लादीं बिंबला। उद्धवा लाधला कृष्ण दाता।।५।। ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणें।।६।।अ.क्र.५५।।"-

"मन हें उन्मन जालें", "मन हें उन्मन जालें", मन रामीं रंगलें", अशी मनाची उच्चतम अवस्था संत वर्णितात. ***न मन होणे, अमन होणे, अमनस्कयोग*** इ.संज्ञांनी मनाचा हा साक्षिभाव संबोधिला जातो. ***"मनाचा जंव पटु फाटे"*** अशा शब्दांनी ज्ञानेश या स्थितीचे वर्णन करतात.

"जैं आकाराचा प्रांतु। जैं मोक्षाचा एकांतु। जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलें।।६-३२१।।" या ओवीतून संतांच्या संगतीने प्राप्त होणाऱ्या त्या स्थितीचे वर्णन ज्ञानेश्वरीत येते. नामस्मरण-ध्यान हा भक्तीचा प्रकार मनाच्या आधारावर चालतो. संतांच्या आशीर्वादाने या पंथावर आरूढ झालेला साधक श्रीहरीस - श्रीपतीस पावतो व धन्य होतो. वाचेने त्यांनी ***दिलेले नाम भावभक्तीने उच्चारत साधक जेथे शिव आहे तेथे जाऊन पोहोचतो. जीवशिवाचे ऐक्य होते.***

शिवासही हा हरिजप आत्म्याइतकाच प्रिय आहे. हरिजप साधकास कोठे घेऊन जातो पहा!! वाचेने केलेला रामकृष्णाचा जप जेथे द्वैताचे बंधन पडत नाही, ते एक - अद्वैततत्त्व साधून देतो. ***"पाहें पां ॐ तत् सत् आईसें। हें बोलणें तेथ नेतसें। जेथूनि कां हें प्रकाशें। दृश्यजात।। तैं तंव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट। तेयांचें आंतुवट। व्यंजक नाम।। परि आश्रो आकाशां। आकाशचि कां जैसा। या नामा नामी आश्रो तैसा। अभेदु असे।। उदयिला आकाशिं। रवीचि रवीतें प्रकाशिं। हें नाम व्यक्तीं तैसिं। ब्रह्मा करी।। म्हणौनि त्र्यक्षर हें नाम। नोहें जाण केवल ब्रह्म। ... ।।१७-४०१ ते ४०५।।"*** या शब्दांत ज्ञानेश्वरी हा अद्वैत साधण्याचा मार्ग आखून देते.

नाम व नामीचा अतूट संबंध, नामातून नामीकडे होणारी प्रगती यांचे सार या ओव्यांतून सांगितले आहे. **सर्व हरिनामे ही ब्रह्मवाचकच होत; ॐकाररूप होत, हे वेगळे सांगायला नकोच!** ***"ॐतत्सदाकारु। ब्रह्मनाम हें त्रिप्रकारु। हें फूल तुरंबिं सुंदरु।***

उपनिषदु तैं।।१७-३४३।। घेऊनि एथिंचें वर्म। जैं विचारिसि हें नाम। तैं केवल हेंचि ब्रह्म। जाणसि तूं।।१७-४००।।" - ***"ॐतत् सत्"*** अशा त्रिप्रकारचे ब्रह्मनामाचे सुंदर फूल आहे. ते उपनिषदांनी मस्तकी खोवलेले आहे. या नामाचे हेच वर्म आहे की ते साक्षात ब्रह्मच आहे," या शब्दांत ज्ञानेश नाम म्हणजे काय ते स्पष्ट सांगतात.

अशा **नामाचे अमृत चाखून वैष्णव धन्य होतात. त्याच नामाची गोडी पावणारे योगी *जीवनकळा* पावतात; *सतराव्या कलेचे अमृत* पितात.** ही ***कला*** म्हणजे काय याचा विचार आपण पूर्वीच योगाविषयी विस्तृत अभ्यास करतांना पाहिलेच होते *(उन्मेष ४५-१:लययोगसमालोचन:योगपथ,पृ.क्र.७६३ ते ७६५)*. नामाशिवाय योगयाग व्यर्थ होतात. ***"क्लेशोधिकतरस्तेषां"*** असे नामाविण योग साधू इच्छिणाऱ्यांबाबत गीतेने सांगितले आहे.

हरिनाम उच्चारल्याने सहजच प्रह्लाद भगवद्रूप झाला; उद्धवास मोक्षदाता श्रीकृष्ण भेटला! ज्ञानदेव म्हणतात नामाने ही प्राप्ती सुलभरीत्या होते. पण हे नाम जाणणारा अत्यंत दुर्लभ आहे. ***"प्रकाशयति क्वापि पात्रे।।"*** असे या भक्तिभावाचे विरळेपण नारदही सांगतात!!

सगुणध्यानानेच अद्वैतप्राप्ती

हरिस्मरण, नामजप, भगवंताचे ध्यान करणे हे सर्व सगुणातील उपाय होत. त्यांनीच अद्वैत प्राप्त होते, असे ज्ञानदेव म्हणतात. हे वर्म विरळे लोकच जाणतात, असा त्यांचा भाव आहे. या उपायांविण सर्व मार्ग निष्फळ होत. ते म्हणतात:

१) "विष्णुविण जप व्यर्थ त्याचे ज्ञान। रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें।।१।। उपजौनि करंटा नेणें अद्वैतवाटा। रामकृष्णीं पैठा कैसा होएं।।२।। द्वैताची झाडणि गुरुविण ज्ञान। तयां कैंचें कीर्तन घडें नामीं।।३।। ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान। नामपाठ मौन प्रपंचाचें।।४।।अ.क्र.५६।।" -

"माला तो करमें फिरैं। जिभ फिरैं मुखमाहीं। मनुवा तो दहु दस फिरैं। ये तो सुमिरन नाहीं।।" या शब्दांत कबीरही ज्ञानेशांसारखें हरिजप कसा नसावा ते सांगतात. ***हरिजप करावा तो हरीच्या सगुण ध्यानासह, आपले तन-मन त्याच्याठायी लावून!*** अन्यथा तो व्यर्थ होय. मग तो साधक कितीही ज्ञानी असला तरी तेही व्यर्थच होय. रामकृष्णांठायी मन ठेवल्याशिवाय कोणतेही साधन निष्फल होते.

मनुष्यजन्म मोठ्या भाग्याने मिळतो. श्रीमच्छंकराचार्यांनी ***"मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रय:"*** ही त्रयी देवदुर्लभ असल्याचे आणि महाभाग्यानेच प्राप्त होणारी असल्याचे ***विवेकचूडामणी*** त म्हटले आहे. ज्ञानदेव तर पुढे जाऊन म्हणतात की मनुष्यजन्म पावून तो सार्थकी न लावणारा, अद्वैताची वाट न चालणारा नर भाग्यहीन, करंटा असाच होय!

रामकृष्णांठायी मन स्थिर करण्यासाठी या द्वैतातून जाणारी वाट दाखवायला सद्गुरूंची कृपा- ***महापुरुषसंश्रय*** - आवश्यक आहे. द्वैत झाडून टाकणारे ज्ञान ते देतात आणि अद्वैताकडे जाणारी वाट ते दाखवून देतात. हे भाग्य ज्याला लाभले नाही त्याला नामजप, कीर्तन, ध्यानादी कशी सिद्ध होतील!

हरिस्मरण हे सगुण ध्यान आहे. ते ज्याला प्राप्त होते, त्याचा नामजप सार्थकी लागतो आणि प्रपंच मौनावतो! ***"यज्ञानां जपयज्ञोऽस्मि"*** असे गीता सांगते; **जपयज्ञ ही भगवंतांची विभूती आहे. तो ध्यानाने - सगुण ध्यानाने - सिद्ध होतो, अशी संतांची साक्ष आहे.**

त्यासाठीच ज्ञानेश्वरीत भगवंतांनी म्हटले आहे की ***"म्हणौनि गां पांडवा। मूर्तींचा मेलावा। करूनि त्यांचिआं गांवां। धांवतु आलो।। नामाचिआं सहस्त्रवेरी। नावा इयां अवधारीं। सजूनिआं संसारीं। तारूं जाहालों।। सडे जैं देखिलें। तैं ध्यानकासें लाविलें। परिग्रही घातिलें। तरियावेरी।। प्रेमाचि पेटी। बांधिली एकाचां पोटीं। मग आणिलें तटीं। सायुज्याचां।।१२-८९ ते ९२।।"*** - भवसिंधूस पाहून कोणाला धाक वाटणार नाही! सामान्य जनच काय पण प्रभूंच्या भक्तांनाही त्याची भीती वाटते. त्या सर्वांना तारण्यासाठी सगुण रूपांच्या मूर्तींचा मेळावा भगवंतांनी रचला आहे; नामाच्या सहस्त्रावधी नौका सज्ज ठेवल्या आहेत; ध्यानाच्या पेट्या, प्रेमाचे तारू, अशी अनेकानेक साधने तयार करून चतुष्पादादी अवघ्या भक्तांना ते भवसिंधू पार करून सायुज्याच्या किनाऱ्यावर आणतात. असे हे जप, ध्यान, प्रेम, भक्ती व सगुणासक्त्यादींचे माहात्म्य आहे! असे एकचित्तत्व ठेवून नाम घेणे हाच उत्तम मार्ग आहे.

नामाविना सर्व साधने निष्फळ

१०) "त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थें भ्रमीं। चित्त नाहीं नामिं तरीं तैं वेर्थ।।१।। नामासि विन्मुख तो नर पापिया। हरिविण धांवया न पवे कोणी।।२।। पुराणप्रसिद्ध बोलिलें वाल्मिक। नामें तिनिं लोक उद्धरति।।३।। ज्ञानदेव म्हणे नाम जपे हरीचें। परंपरा त्यांचे कुळ शुद्ध।।४।।अ.क्र.५७।।"-

ज्ञानदेव म्हणतात की नामात चित्त लावावे. त्याविना केलेली तीर्थाटने, प्रयागस्नाने इ.सर्व निष्फळ होतात. नामविन्मुख नरास मोठे पाप आहे. हरीवाचून मनुष्यास संकटातून सोडवण्यास कोण धावून येईल! नामाने तिनही लोकांचा उद्धार होतो. वाल्मिकींची रामनामाने मुक्ती झाली ही गोष्ट पुराणातून प्रसिद्धच आहे. ***वाल्यासारख्या महापाप्याचा रामरूप वाल्मिकीऋषी केला तो नामस्मरणभक्तीनेच! हरीनाम जपणारा, त्याचे कुळ, त्याची परंपरा सगळेच शुद्ध होते.***

हरिनामाचे अपार सामर्थ्य

११) "हरि उच्चारणीं अनंत पापराशि। जातील लयासिं क्षणमात्रे।।१।। तृण अग्निमेळें समरस जाहालें। तैसें नामें केलें। जपतां हरि।।२।। हरि उच्चारण मंत्र हा अगाध। पळें भूतबाधा। भेणें तेथें।।३।। ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ। न करवें अर्थ उपनिषदां।।४।।अ.क्र.५८।।" -

हरिस्मरणाने, हरिध्यानाने, हरिनामाने पापांच्या अनंत राशी तृण जसे अग्नीत जळून खाक होते, तशा जळून नष्ट होतात; एवढेच काय तर तृण जसे अग्निरूप होऊन त्याच्यात समरसता पावते, त्याप्रमाणे ते पापच हरिरूपी पुण्यात हरिनामजपाने परिवर्तन पावते. हरिनाम हा अगाध मंत्र आहे. त्याच्यापुढे भूत, प्रेत, पिशाच्च-राक्षसादी नष्ट बाधा भिऊन पळून जातात; इतके हरिनामाचे सामर्थ्य आहे.

ज्ञानदेव म्हणतात की त्यांच्या या श्रीहरीचे सामर्थ्य अतर्क्य आहे. त्याचे स्वरूप अनाकलनीय आहे. ते जाणून घेण्यास वेदच काय, पण द्रष्ट्यांनी रचलेली उपनिषदेसुद्धा असमर्थ आहेत.

सगुणातूनच निर्गुणाची प्राप्ती

१२) "तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि। वायांचि उपाधि करिसि जना।।१।। भावबळें आकळें एरविं नाकळे। करतळीं आंवळें तैसा हरि।।२।। पारियाचा रवा घेतां भूमीवरी। यत्न परोपरी साधन तैसें।।३।। ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण। दिधलें संपूर्ण माझें हातीं।।४।।अ.क्र.५९।।" -

हरीविषयी आस्तिक्यबुद्धी ठेवून केलेली साधने सुफल होतात. अन्यथा तीर्थाटन केले, व्रतवैकल्ये, नेमधर्म केले, काहीही साधना केली तरी ती निव्वळ कष्टप्रदच ठरते. जसे ***अव्यक्तासक्त*** **योगोपासकांबद्दल *"क्लेशोधिकतरस्तेषां"* असे गीतेने म्हटले आहे, तसेच सगुण हरीच्या स्मरण-ध्यान-नामजपाशिवाय सर्व साधने निरुपयोगी व कष्टप्रद होतात.**

जाणिवेच्या माध्यमात भावाद्वारेच हरी प्रकटतो. करतळी आवळा घ्यावा, तसा हरिरूपाचा सर्वदूर साक्षात्कार केवळ भावसामर्थ्यानेच घडतो - अन्यथा नाही. प्रकृतिनिर्मित या विश्वात जे मन अनंतठायी धाव घेते, ते भूमीवर पडून विखुरलेल्या पाऱ्याच्या गोळीसारखे अनेक ठिकाणी विभक्त होते. त्यास हरी कसा दिसणार! पाऱ्याचे विखुरलेले कण गोळा करणे जेवढे कठीण असते, तेवढेच अनेक विषयांत विभ्रांत झालेल्या चित्तात हरिरूप सामावणे अशक्य असते.

एकचित्त करून हरी जेव्हा ध्यावा, तेव्हा तो आकळून येतो. हरिस्मरणाचा मार्ग ज्ञानदेवांना सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथांनी दाखविला आणि त्यांच्या हाती हरीचे संपूर्ण निर्गुण रूप सोपविले. **सगुणातूनच निर्गुणाचा साक्षात्कार घडतो, ही अंतरीची खूण येथे ज्ञानेश सांगत आहेत. *"नामस्मरण -➤ ध्यान -➤ निर्गुण"* असा हा मार्ग त्यांना गुरुकृपेने प्रकाशित करून मिळाला.**

द्वैतबुद्धीचे आध्यात्मिक स्थान

१३) "समाधि हरीची समसुखेंविण। न साधेल जाण द्वैतबुद्धि।।१।। बुद्धीचे वैभव अन्य नाहीं दुजें। एका केशवराजें सकळ सिद्धि।।२।। ऋद्धिसिद्धि निधि अवघीच उपाधि। जंव त्या परमानंदीं मन नाहीं।।३।। ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान। हरीचें चिंतन सर्वकाळ।।४।।अ.क्र.६०।। " -

भक्तीचा अर्थ केवळ सगुणाची भक्ती असा घेणाऱ्यांनी ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान व हरिपाठातील भक्तिमार्ग यांचे बृहदावलोकन करणे इष्ट ठरेल. **अद्वैतास उच्च तत्त्व म्हणून मान्यता देणारे ज्ञानदेव *"द्वैताद्वैत तेचि निकुंभ। सरिसें एकवटत इभ-। मस्तकावरी।।१-१७।।"* ही ओवी रचून *द्वैत* व*अद्वैत* दोन्हीही ब्रह्माचा भाव असल्याचे दर्शवत आपले चिद्विलासाचे तत्त्वज्ञान प्रकट करतात,** हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच **त्यांनी प्रतिपादिलेल्या हरिपाठभक्तीचा मार्ग *सगुण -➤निर्गुण* असा प्रवास घडवतो.**

मागील अभंगात त्यांनी आपली ही निर्गुणप्राप्ती आणि तीही सगुणाच्या मार्गे झालेली स्पष्ट दर्शवत म्हटले होते की ***"भावबळें आकळें। एरविं नाकळें।...ज्ञानदेव म्हणे। निवृत्ति निर्गुण। दिधलें संपूर्ण माझें हातीं।।अ.क्र.५९।।"*** **भाव केवळ सगुणाठायीच जडवता येतो. *"भाव (भावनम्) -➤भक्ती"* असा हा प्रपंच भक्तीत घडतो, तो सगुणध्यानाच्याच! पण निवृत्तिकृपेने ही सगुणभक्तीच पुढे निर्गुण निरंजनाची प्राप्ती ज्ञानदेवांना करून देते, असे तो अभंग स्पष्ट सुचवतो, इकडे जिज्ञासूंनी जरूर लक्ष द्यावे आणि गीता *श्लोक क्र.१२-१२ - "श्रेयो हि ज्ञानम् ...।।"* यावरील ज्ञानेशविरचित ओव्यांचा दाखला घेऊन भक्तीचा मार्ग योगाचाच असून *"अभ्यास – हरिस्मरणध्यानादिरूपी -➤ज्ञान - हरिस्वरूपाचे -➤ ध्यान -हरीच्या सगुणरूपाचे -➤कर्मफलत्याग -➤ शांति - निर्गुणब्रह्मप्राप्ती"* असाच तोही आहे, हे ध्यानात ठेवावे.** हे मार्ग समांतर नसून एकच आहेत, हे पुनश्च वेगळे काय सांगावे! असो.

सगुणातून निर्गुणात जाणारे ज्ञानेश तेच सांगत म्हणतात: "द्वैतबुद्धीने हरीठायी खरी समाधी प्राप्त होत नाही, तर अद्वैताठायी समबुद्धी झाल्यानेच ती लाभते. बुद्धीचे खरे वैभव त्यातच आहे. एका केशवावर भावभक्ती ठेवून सगुण उपासनेद्वारे पुढे जातजात सर्व सिद्धींचे आगर अशी निर्विचार समाधी साधून ब्रह्मसुख लाभते. तसे पाहता ऋद्धी, सिद्धी, संपत्ती ही सर्व उपासनामार्गातील उपाधीच होत. त्यांचा त्याग करावा व केवळ परमानंदीच मन लावावे. सर्वदा हरिचिंतन करणाऱ्या ज्ञानदेवांचे मन त्या रम्य समाधानकारक आनंदात रमले आहे."

शिवाचा हरिपाठाचा नेम

१४) "नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासि। कळिकाळ त्यासि न पाहें दृष्टी।।१।। रामकृष्ण उच्चार अनंत राशी तप। पापाचे कळप पळति पुढें।।२।। हरि हरि हरि हा मंत्र शिवाचा। म्हणती जैं वाचा तेयां मोक्ष।।३।। ज्ञानदेवा पाठ नारायण नाम। पाविजे उत्तम निजस्थान।।४।।अ.क्र.६१।।" -

नित्य हरिस्मरण करावे; खरे स्मरण करावे - एकचित्ताने हरीचे ध्यान करावे; नेमाने हरिजप करावा. असे करणाऱ्या भक्ताकडे कळीकाळही वाकड्या दृष्टीने पाहू शकत नाही. त्या भक्तास अगणित

पुण्य घडते आणि त्याच्या भयाने पापांचे कळप त्याच्यापासून दूर पळत सुटतात. रामकृष्णनाम उच्चारणे इतके सामर्थ्यवान आहे.

आदिगुरू शिवसुद्धा हरिजप करतो. जे वाचेने हरिनाम उच्चारतात, त्यांना मोक्ष मिळतोच मिळतो! ज्ञानदेवांनीसुद्धा ***"नारायण - नारायण"*** असा जप करून निजस्थान - स्वात्मसमाधान - निर्गुण निरंजन तत्त्व पावून घेतले आहे.

सर्वत्र सम अशा हरीचे ध्यान

१५) "एक नाम हरि द्वैत नाम दुरी। अद्वैतकुसरी विरळा जाणें।।१।। समबुद्धि घेतां समान श्रीहरि। शमदमावरी हरि झाला।।२।। सर्वांघटीं राम देहादेहीं एक। सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी।।३।। ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा। मागिलियां जन्मीं मुक्त जालों।।४।।अ.क्र.६२।।"-

हरीचे स्मरण करा. द्वैत दूर सरते. पण हे करणे आणि अद्वैत प्राप्त करून घेणे यात कुशलता असणारा विरळाच! समबुद्धी करून सर्वत्र सम असलेला हरी ध्याऊ जाणाऱ्यास शमदमादी षट्संपत्ती हरीच देतो.

सर्व देहांतरी, सर्व घटांत तो एकच राम भरून राहिला आहे. जसा सूर्य सर्व जगत आपल्या सहस्त्र किरणांनी एकलाच प्रकाशवतो, तसा तो आत्माराम सर्व भूतमात्रांस चेतना देतो. असा हा हरी स्मरावा. ज्ञानदेवांनीही आपले चित्त त्याच्या स्मरणाने भरून टाकले आणि पुढे येणाऱ्या जन्ममृत्यूच्या चक्रक्रमातून आपली मुक्तता करून घेतली आहे.

हरिपाठाने उन्मनीची प्राप्ती

१६)"हरि बुद्धि जपे तो नर दुर्लभ। वाचेसि सुलभ रामकृष्ण।।१।। रामकृष्णनामीं उन्मनी साधिलीं। तयासिं लाधली सकळ सिद्धि।।२।। सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आलें। प्रपंची निवालें साधुसंगें।।३।। ज्ञानदेवीं नाम रामकृष्णठसा।। एणें दशदिशा आत्माराम।।४।।अ.क्र.६३।।" -

हरिसंकीर्तन, स्मरण, ध्यानाकडे ज्याची बुद्धी धाव घेते, तो मनुष्य विरळाच! खरे तर रामकृष्णनाम वाचेने सुलभरीत्या घेता येते. रामकृष्णनाम घेऊन उन्मनीसुद्धा सहज साधते; सर्व सिद्धी लाभतात. एका हरीच्या सेवनाने सिद्धी लाभते, बुद्धी स्थिरावते; साधुसंग घडतो आणि प्रपंच उपशमतो. ज्ञानदेवांच्या बुद्धीवर रामकृष्णनामाचा ठसा उमटलेला आहे व त्यांना दाहीदिशा आत्मारामाने व्यापून सोडलेल्या दिसत आहे. नामाची इतकी थोरवी आहे.

हरिभक्तीच्या संकीर्तनाचे माहात्म्य

१७) "हरिपाठ कीर्ती मुखें जरी गाय। पवित्रचि होएं देह त्याचा।।१।। तपाचें सामर्थ्ये तपिन्नला अमूप। चिरंजिव कल्प वैकुंठी नांदें।।२।। मातृपितृ भ्राता सगोत्र अपार। चतुर्भुज नर होऊनि ठेलें।।३।। ज्ञान गूढगम्य ज्ञानदेवा लाधलें। निवृत्तीनें दिधलें माझां हातीं।।४।।अ.क्र.६४।।" -

हरिपाठ म्हणजे हरीची भक्ती! हरिभक्तीचे माहात्म्य कोणी सांगितले; हरिभक्तीचा कोणी गौरव केला; हरिनामाची कोणी वाखाणणी केली, तरीही त्याचा देह शुद्ध होतो, पवित्र होतो, एवढे हरिभक्तीचे सामर्थ्य आहे.

असा माणूस अमूप तप केलेल्या तपस्व्याबरोबरीचा असतो. तो कल्पकल्प वैकुंठी चिरंजीव स्वरूपात वास करतो. त्याचे माता, पिता, बंधू, एवढेच काय गोत्रजसुद्धा सगळेच्या सगळे त्याच्या त्या पुण्याईच्या या बळावर सरूपता पावतात, नारायणाचे चतुर्भुज रूप पावून मुक्त होतात. हरिभक्तीचे हे गुह्य ज्ञान निवृत्तींपासून ज्ञानदेवांना लाधले आहे. तेच गूढ ते आपल्या कल्याणासाठी आपणा सर्वास उघड सांगताहेत!

हरिपाठ हाच योगमार्ग

१८) "हरिवंश पुराण हरिनाम संकीर्तन। हरिविण सौजन्य नेणें कांहीं।।१।। तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें। सकळही घडलें तीर्थाटन।।२।। मनोमार्गें गेला तो एथें मुकला। हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य।।३।। ज्ञानदेवा गोडी हरिनामाचि जोडी। रामकृष्णीं आवडी सर्वकाळ।।४।।अ.क्र.६५।।" -

हरिवंश हे महाभारताचे समाप्तीचे ***खिलपर्व*** म्हणतात, ते आहे. त्यात श्रीकृष्णाच्या वंशवेलीचे वर्णन येते. त्याचे श्रवण-मनन करणे, त्याचप्रमाणे हरिनामाचे संकीर्तन करणे, तसेच पुराणांतरीची हरिकथा वाचणे, श्रवण करणे, सांगणे; हरीवाचून इतर कोणाशीही जिवाभावाची जवळीक न करणे, यांमुळेसुद्धा मनुष्य वैकुंठास पावतो. सर्वच्या सर्व तीर्थांची यात्रा केल्याचे पुण्य त्याच्या गाठी बांधले जाते.

हरिभक्तीच्या मार्गी जो स्थिरत्व पावतो, त्या मार्गाने जाण्यास सुरुवात करतो, तो नर धन्य होय. त्यास मनाचा मार्ग प्राप्त होतो. ***योग म्हणजे हा मनोमार्ग*** त्यास मिळतो व त्याच्या साहाय्याने तो या लोकास तरून जाऊन पुनश्च जन्म पावत नाही. अशा या हरिभक्तीची ज्ञानदेवांस फार आवड आहे. हरिनामाची त्यांनी खूप साठवण केली आहे. त्याची गोडी चाखून ते धन्य झाले आहेत.

(टीप: हरिवंशाचा गूढार्थ - हरिवंशाचा गूढार्थ म्हणजे हरी जेथे असतो, जसा तो आहे, त्या ठिकाणाहून निघणारी त्याची वंशवेल. हरी हा अवतारी श्रीकृष्ण असा अर्थ न घेता जर आपण त्याचे आध्यात्मिक व यौगिक आत्मरूप घेतले, तर हा **हरी म्हणजे हृदयी निवसणारे *आत्मतत्त्व* होय. त्याचा *वंशवेल* म्हणजे महत्तत्त्वादी जगताचा पसारा. *पंचवीस म्हणा, छत्तीस म्हणा, जी तत्त्वे आहेत, ती हरीची वंशवेल होय.* हरिवंशाचे पुराण व नामसंकीर्तन म्हणजे हा गूढार्थ जाणून या सर्व तत्त्वांचा वंशक्रमानुसार सिद्ध केलेला त्यांचा *लयक्रम* अथवा *लययोग* वा *पंथराज!* यातच *मनोमार्गे गती* असते, उन्मनी अवस्था प्राप्त होते**, इ.भाग आपणास अवगत आहेच.)

हरिनाममंत्ररूपी शस्त्र

१९) वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचें वचन। एक नारायण सार जप।।१।। जप तप कर्म हरिविण धर्म। वाउगाचि श्रम वेर्थ

जाय।।२।। हरिपाठीं गेलें तें निवांतचि ठेलें। भ्रमर गुंतले सुमनकळिकें।।३।। ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र। यमें कुळगोत्र वर्जियेलें।।४।। अ.क्र.६७।।" -

श्रुती, वेद, शास्त्रे सर्व एकमुखाने हरिभक्तीच करण्यास सांगतात. ***सर्व साधनांचे सार एकच आहे - ते म्हणजे नारायणाची भक्ती करणे, त्याचा जप करणे, त्याच्यासाठी तप करणे, त्याच्यासाठी कर्म करणे.*** हरिभक्तिविना केलेली सर्व धर्मसाधने व श्रम विफल होतात. उलट मनुष्य त्यांच्या फलामुळे संसारात अधिकाधिक गुंततच जातो. गीताही हेच सांगते व म्हणून हरिप्रीत्यर्थ कर्मे, जपतपादी करण्याचा आग्रह धरते.

सुमनकलिकेने मुग्धावलेले भ्रमर जसे सहजच त्या कलिकेच्या अधीन होतात, तसाच हरिभक्तीने लोभावलेला नारायण सहजच त्या भक्तीच्या अधीन होऊन राहतो. हरिभक्तांस असे हरिप्रेम सुलभतया लाभून ते धन्य होतात.

ज्ञानदेवांना यमाला पळवण्याचा एकच मंत्र माहीत आहे; त्यासाठी एकच शस्त्र ते वापरतात. ते म्हणजे हरिनाम! त्याच्या धाकाने यम त्यांच्यापासूनच काय, पण त्यांच्या कुल-गोत्रातील सर्वांपासून दूर पळून गेला आहे, असे ज्ञानदेव म्हणतात ते काही उगीच नाही. नाम हा मंत्र तर आहेच. पण मंत्रासाठी लागणारे साधकबाधकत्व त्याच्याठायी नाही.

हरिनाम हेच सर्वमार्गांचे सार

२०)"नामसंकीर्तन वैष्णवांचि जोडी। पापें अनंत कोडी गेलीं त्यांची।।१।। अनंत जन्मांचे तप एक नाम। सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।२।। योगयाग क्रिया धर्माधर्म माया। गेलें ते विलया हरिपाठीं।।३।। ज्ञानदेवीं यज्ञयागक्रिया धर्म। हरिविण नेम नाहीं दुजा।।४।।अ.क्र.६६।।" -

वैष्णवांचे-हरिभक्तांचे खरे धन तर नामसंकीर्तनच आहे. त्याच्या बळावर अनंत कोटी अशा पातकांच्या राशी पण उरत नाहीत. नाम घेणे हेच अनंत जन्मी करावे असे तप आहे. त्याच्यामुळे सर्व मार्ग सुगम होतात. हरिपाठाच्या प्रभावाने योग-यज्ञ, कर्म, धर्म इ.सगळे प्राप्त होतात; अधर्म व माया यांचा लोप होतो.

अंती ***कर्म-भक्ति-ज्ञान आणि योग*** हे सर्वच हरिभक्तीशी एकरूप होतात. म्हणून ज्ञानदेव यज्ञयाग, कर्म,धर्म इ.ऐवजी केवळ हरिस्मरणाचाच नेम धरून राहतात. दुसरे साधन ते जाणत नाहीत.

हरिनामच भवतारक - सकलउद्धारक

२१) "काळवेळ नाम उच्चारितां नाहीं। दोन्ही पक्ष पाहीं उद्धरिति।।१।। रामकृष्णनाम सर्व दोषां हरण। जड जीवां तारण हरि एक।।२।। नाम हरि सार जिव्हा या नामाची। उपमा त्या दैवाचि कोण वानि।।३।। ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ। पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा।।४।।अ.क्र.६८।।" -

मंत्रास काळवेळ, शुचित्व इ.सर्व गोष्टी पाळाव्या लागतात. परंतु नाम हा असा मंत्र आहे की तो जपतांना कसलेच बंधन पाळावे लागत नाही. हरिनाम घेणारा स्वतः तर तरतोच! पण त्याच्या माता व पिता यांच्याही कुळांचा उद्धार होतो. एवढेच काय पण त्या हरिभक्ताच्या संगतीने इतरेजनही तरून जातात. सर्व प्रकारचे दोष, सर्व पापे हरण करणारे असे हे रामकृष्णनाम आहे. भगवंताचे नाम सर्वांचा उद्धार करते. जड जीवांना पण हरिनाम तारते.***<u>सर्व साधनांचे सार एकच आहे - ते म्हणजे हरिनाम, ईश्वरस्मरण, अनुसंधान, ईश्वरप्रणिधान!</u>***

ज्याच्या वाणीवर हरिनाम ठसले, परेपलीकडे उतरले; ज्याची जिव्हा या नामसंकीर्तनास वाहिली गेली; ज्यास सर्वत्र हरीचे अनुसंधान लाभले, तो धन्य होय! त्याचे दैव थोर होय! त्याच्या पूर्वजांना वैकुंठ लाधले! ज्ञानदेवांनाही ही हरिभक्ती पावली आहे. त्यांचा हरिपाठ सांग झाला! तो त्यांना फळला! त्यांच्या अध्यात्माची इमारत हरीच्या अनुसंधानाने संपूर्ण झाली! इतकी या हरिप्रेमाची महती आहे.

"गगनाहूनि वाड नाम आहे"

२२) "नित्य नेम नामीं तो नर दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ तयाजवळीं।।१।। नारायण हरि नारायण हरि। भुक्ति मुक्ति चारी घरीं त्याच्या।।२।। हरिविण जन्म तो नरकचि पैं जाणा। यमाचा पाहुणा प्राणि होएं।।३।। ज्ञानदेव पुसें निवृत्तिसिं चाड। गगनाहूनि वाड नाम आहे।।४।।अ.क्र.६९।।" -

नामाची इतकी थोरवी आहे. पण ती जाणणारे विरळाच! नित्य नामाचे अनुसंधान करणारा मनुष्य दुर्मीळच असतो. अशा मनुष्याजवळ तर लक्ष्मीवल्लभाचे सतत वास्तव्य असते. त्याच्या अंतर्यामी व सर्वत्र त्याला हरीचे दर्शन घडत असते. ***नारायण, हरी, राम,कृष्ण*** असे नाम सतत घेणाऱ्या मनुष्याच्या घरी ऋद्धिसिद्धी तर वसतातच, सर्व प्रकारचे ऐश्वर्य त्याच्याकडे असतेच; पण **समीपतादी चारही मुक्ती**सुद्धा त्यांना सुलभ असतात.

हरिभक्ती न करणाऱ्या मनुष्याचा जन्म व्यर्थ होय. जिवंतपणी तो नरकच भोगतो. मृत्यूपरांत त्याला मुक्ती ती कशी मिळावयाची! उलट यमाचा पाहुणचार भोगून तो पुनः जन्मतो. ***"पुनरपि जननं पुनरपि मरणं"*** असे चक्र त्याला काही सोडत नाही.

ज्ञानदेवांनी नामाची थोरवी किती आहे असा प्रश्न निवृत्तिनाथांना केला. तेव्हा ते म्हणाले की ***"नाम हे तर गगनाहूनही विशाल आहे! सूक्ष्म आहे!"*** नाम आणि नामी एकच! हरी जसा ***"अणोरणीयान्"*** **आहे, तसाच** ***"महतो महीयान्"*** असाही आहे. सूक्ष्मत्व आणि सर्वव्यापित्व या गुणात हरी आकाशतत्त्वाहूनही ***वाड*** आहे आणि तसेच त्याचे नाम पण गगनाहूनही *वाड* आहे!

नामानेच अजपासिद्धी व द्वैतनिरास

२३) "सात पांच तीन दशकाचा मेळा। एकतत्त्वीं कळा हरी दाविं।।१।। तैसें नोहें नाम सर्व मार्गां वरिष्ठ। एथें कांहीं कष्ट न लगति।।२।। अजपा जपणें उलट प्राणाचा। तेथेहीं मनाचा निर्धारु

असे।।३।। ज्ञानदेवा जिणें नामेंविण वेर्थ। रामकृष्णीं पंथ क्रमियेला।।४।।अ.क्र.७०।।" -

नाम म्हणजे *ॐकार!* ॐकारच हरी होय! पण ॐकार व नाम द्वैतात नसते - ते अद्वैततत्त्वातच विराजते! हरी मात्र अद्वैतात असतो तसा द्वैती रूपही प्रकट करतो. पंचप्राण, मन व बुद्धी ही सात तत्त्वे, पंच महाभूते, सत्त्व-रज-तम हे त्रिगुण आणि पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये असे दशक ही सर्व मिळून पंचवीस तत्वे होतात. त्यांचा बनलेला जीव नित्य संसारी वसतो. ***हरीचे रूप तो हा जीव होय. पण तो द्वैती होय.***

हरीच्या एकाच तत्त्वावर या पंचवीस तत्त्वांचा खेळ चालतो. त्या खेळात जीव गुंततो. पण हरीनाम मात्र असे गुंतवणारे नाही. उलट कोणतेही कष्ट करावे न लागता या प्रपंचदु:खातून सुटण्याचा खरा उपाय हरिनामच आहे. ते सर्व साधनांहून श्रेष्ठ आहे.

"सोऽहं",हंस:, "सोऽहं" असा ***अजपाजप*** सर्व प्राणी अव्याहत करतात. त्यातून जर हरीस पावावयाचे असेल तर तो मनाच्या निर्धाराने उलटवून ***"हंस:-सोऽहं"*** असा जपावा लागतो. प्राणाची गती प्रयासाने उलटवून हा जप केला तर अनाहतचक्रापर्यंत गती होते. पण पुढला मार्ग ईश्वरस्मरणानेच आक्रमावा लागतो. मग एवढे सायास करण्यापेक्षा मुळापासूनच नामस्मरण का करू नये! हरिनामाने हा अजपाजप उलट करणे सहज शक्य होते - ही क्रिया सहजच घडून येते, असे ज्ञानदेव म्हणतात.

नामाशिवाय जीवन व्यर्थच होय. ज्ञानदेवांनी पंथराज आक्रमिला तो या नामाच्याच बळावर! रामकृष्णहरी या ईश्वरप्रणिधानाने त्यांचा मार्ग सुगम झाला - ***क्रमयोग*** त्यांना सहजच फळला, असे अनुभवाचे बोल ते सांगत आहेत.

"नामा म्हणे नाम। ॐकाराचें मूळ"

२४) "जप तप कर्म क्रिया नेम धर्म। सर्वांघटीं राम भावशुद्ध।।१।। न सोडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णीं टाहो नित्य फोडी।।२।। जात वित्त गोत कुळ शीळ मात। भजे कां त्वरित भावनायुक्तु।।३।। ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं। वैकुंठभुवनीं घर केलें।।४।।अ.क्र.७१।।" -

"नामा म्हणे नाम ॐकाराचे मूळ। ब्रह्म ते केवळ वीटेवरी।।" असे हरिनाम असते. ॐकाराचे मूळ असे ब्रह्म त्याने गवसते. जीवाच्या चिन्मय विटेवर अधिष्ठित असणारा पांडुरंग-विठ्ठल हेच ते परब्रह्म! त्याला पावण्यासाठीच तर धर्मकर्म, क्रिया-नेम, जपतप करावयाचे!

सर्व घटांमध्ये हाच परब्रह्म राम भरून राहिलेला आहे याचा विसर न पडू देता संदेहरहित होऊन सर्वत्र समभावाने वावरत सतत रामकृष्णनामाचा उच्चरव करावा! जात-वित्त, कुळ-शीळ यांचा अभिमान सोडून त्वरित भावयुक्त व्हावे व हरीस भजावे. ध्यानीमनी रामकृष्णास ठेवावे म्हणजे साक्षात वैकुंठभुवनात वास्तव्य घडते, असे ज्ञानदेव म्हणतात.

नामास सर्वत्रच वैकुंठ

२५) "जाणिव नेणिव भगवंतीं नाहिं। उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा।।१।। नारायण हरि उच्चार नामाचा। तेथे कळिकाळाचा रीघ नाहीं।।२।। तेथील प्रमाण नेणवें वेदांसि। तैं जीवजंतूंसिं केविं कळें।।३।। ज्ञानदेवा फळ नारायण पाठ। सर्वत्र वैकुंठ केलें असे।।४।।अ.क्र.७२।।" -

हरिभक्ती करणारा ज्ञानी असो की अज्ञानी, त्याला सदाचाच मोक्ष ठेवलेला आहे. ज्ञान व अज्ञान यांचा संसर्ग भगवंतास नाही. त्याच्या नामाचेही तसेच आहे. नारायण, हरी इ.भगवंताची नामे जेथे उच्चारली जातात, तेथे कलीचा शिरकाव होत नाही.

हरीचा व हरिनामाचा महिमा केवढा आहे ते वेदांनाही कळून येत नाही. त्यांनी खूप प्रयत्न केले की तो कळावा म्हणून. पण ते निष्फळ झाले. वेदांपुढे बापुड्या अज्ञ जनांची ती काय कथा! ज्ञानदेव म्हणूनच सर्वांच्या हिताची गोष्ट उघडपणे सांगत आहेत की हरिभक्तीने सर्वत्र वैकुंठ वसतो. हरी, नारायण असे सतत स्मरणाऱ्यांसाठी वेगळे वैकुंठात जावे लागणे नसतेच! या भक्तीचे परिमाण असे अमाप आहे. ईश्वरप्रणिधान करण्याचे केवढे हे फळ!

"राम हमारा जप करे"

२६) "एकतत्त्व नाम दृढ धरीं मना। हरिसि करुणा येईल, तुझी।।१।। तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद। वाचेसि सदगद जपे आधीं।।२।। नामपरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा। वायां आणिक पंथा जाशी झणीं।।३।। ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं। धरोनि श्रीहरि जपे सदा।।४।।अ.क्र.७३।।" -

हरी हे एकच तत्त्व दृढ धरावे. त्याचे नाम सतत घ्यावे. ध्यानी त्यासच ध्यावे. म्हणजे भगवंतास नक्कीच करुणा येऊन तो आपला अंगीकार करील.***राम-कृष्ण-गोविंद*** असे ते नामसाधन अति सोपे आहे. सहज करता येण्यासारखे आहे. सद्गद चित्ताने हाच जप सातत्याने करावा. वाचेला दुसरे कामच देऊ नये. नाम व हरी यात काहीच फरक नाही. हरिनामापरते तत्त्वही वेगळे नाही. त्याचाच स्वीकार करावा.

याच हरिस्मरणाच्या पंथराजाने जावे. इतर यज्ञयागादी साधनांचा खटाटोप करण्याच्या भरीस पडू नये. ज्ञानदेवांनीसुद्धा हाच मार्ग स्वीकारला आणि आता तर असे झाले आहे की त्यांची वाचासुद्धा मौनावली आहे. परेपलीकडे उतरलेले ते नाम आता अव्याहतपणे चालू आहे. खरे तर आता स्वत: श्रीहरीच जपमाळ घेऊन त्यांच्या अंतरी वसत हरिजप करतो आहे! ***"राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।"*** अशी ही अवस्था त्यांना हरिभक्तीने प्राप्त झाली आहे!!

नामाने संजीवनसमाधी प्राप्ती

हरिपाठाच्या अभंगांची सांगता करत ज्ञानदेव म्हणतात:

२७) "सर्व सुख गोडी सर्व शास्त्र निवडी। रिकामा अर्धघडी राहूं नको।।१।। लटिका व्यवहार सर्व हा संसार। वायां येरझार

हरिविण।।२।। नाम मंत्र जप कोटी जाईल पाप। कृष्णनामीं संकल्प धरूनि राहे।।३।। निजवृत्ति काढी सर्व माया तोडी। इंद्रियां सवडीं लपो नको।।४।। तीर्थव्रतीं भाव धरी रे करुणा। शांति दया पाहुणा हरि करी।।५।। ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान। समाधिसंजीवन हरिपाठ।।६।।अ.क्र.७४।।" -

सर्व शास्त्रे बघितली तर हेच एक सार सापडते की सर्व सुखे, सर्व गोडी त्या हरिनामातच आहे. ते घेतल्यावाचून मनुष्याने अर्धघटिकासुद्धा वाया घालवू नये. सर्व प्रपंच व त्यातील व्यवहार लटका आहे. ते सगळे मायावी फसवे मृगजळ आहे. त्याच्या नादी लगून व्यर्थच जन्ममृत्यूच्या चक्रात येरझारा घालाव्या लागतात. केवळ हरीच त्यातून सोडवणारा आहे. म्हणून हरिनाम जपावे. त्यायोगे कोडीच्या कोडी पापे भस्म होतात. प्रपंच सरतो.

म्हणून कृष्णनामाचा संकल्प चित्ती दृढ धरावा. *मी-माझे* हे सोडावे. सर्व मायापाश तोडावे. अहं-ममतेची ठाणी मोडून काढावी. त्याआड इंद्रियांची तृष्णा येऊ देऊ नये. विषयांआड दडून हरिनाम घेणे टाकू नये. ***तीर्थे-व्रते-धर्म-कर्म ही सर्व पुण्यप्रद होतात ती केवळ हरियोगे. म्हणून ती सेवन करतांना हरीस विसरू नये.*** हरीसाठीच हे सर्व करावयाचे असा दृढ भाव मनी-मानसी वागवावा.

करुणा-शांति-दया यांना चित्ती दृढ आश्रय द्यावा. असे करून हरीस त्या चित्तात आणून बसवावा. क्षण-दोन क्षण का होईना, हरीस ध्यावे! असे करत असतांना ***"कां जैं यया मनाचें एक नीकें। जैं हें देखिलें गोडीचिआं ठायां सोकें।"*** **असे मनाचे होते. म्हणून त्यास *"अनुभवसुखचि कवतुकें। दावित जाईजें।।६-४२०।।"* असे ज्ञानदेव म्हणतात ते *ध्यानसुख* दाखवत जावे.**

तसे करत गेले की क्षणभर-निमिषमात्र मनी आणलेला पाहुण्यासारखा हरी कायमचा आपला होऊन अंतःकरणी वसतो. ज्ञानदेवांना निवृत्तिनाथांनी हेच ज्ञान करून दिले आहे. ते प्रमाण आहे आणि हरिभक्तीने - हरिजपाने - हरिपाठाने - हरीच्या अनुसंधानाने - ईश्वरप्रणिधानाने ***ज्ञान-कर्म-योग-भक्ती*** या सर्वांची सुफळ सांगता होऊन ***संजीवनसमाधी*** प्राप्त होते, असा संकेत ज्ञानेश या निवृत्तिनाथांच्या प्रमाणानुसार देतात.

संजीवनसमाधी हीच जीवन्मुक्ती! ज्ञानेशांना जे ***"हरिप्रणिधानाद्वा"*** प्राप्त झाले, तेच निःश्रेयस - तेच निरञ्जन - तेच अमृततत्त्व - तेच परमधाम आपणासही प्राप्त व्हावे म्हणूनच हरिपाठाच्या या सत्तावीस दीपज्योतींची दीपमाळा उजळवत ते आपणास हरिपाठाचा सुगम ब्रह्मसोपान दाखवत आहेत. हरिपाठाच्या या सत्तावीस रत्नांचा हार कंठी रुळवणारा त्यांचा सखा - जीवाचा जिवलग - तो निळा - तो घनश्याम श्रीहरी तुम्हाआम्हाला त्यांनी भेटवला आहे, तो असा!!

"ज्ञानदेव म्हणे व्यासाचिएं खुणें। द्वारकेचा राणा पांडवाघरीं।।" असा तो श्रीहरी आपणही नित्य गाऊ या! नित्य ध्याऊ या! नित्य पाहू या! तोही आपल्या घरी नित्य राहो! त्या अनिकेताचा निवास आमच्या हृदयात असो! अन त्याला आपले अंतःकरण देऊन कृतार्थ होऊ या!!

ईश्वरप्रणिधानाचे मर्म::::

इतर संतांचे हरिपाठ

ज्ञानदेवांचा हरिपाठ अनुभवून आपण धन्य झालो! इतरही संतांनी याच धर्तीवर रचलेले हरिपाठ आहेत. त्यांतील विशेष विचारांचे विहंगमावलोकन करणे आपल्या विषयपूर्तीसाठी उचितच ठरेल. तिकडे वळू याः

१) श्रीएकनाथमहाराज

"हरिचियां दासा हरि दाहीं दिशा" अशी एकनाथांची अनुभूती आहे. वासना हरिरूप झाली की जाणीव हरपते व *मी-तूपण* हरिठायी लीन होते. मग जन्म घेणे लागत नाही. ***"साधूचें संगति हरि जोडे", हरिविण कोणी नाहीं सोडवितां", "हरिपदप्राप्ति भोळ्या भाविकांसि", हरि बोला देतां हरि बोला घेतां", "इच्छावें तें जवळी हरीचे चरण", "सर्व नारायण तुज देतो", "भावाविण देव कैंचा पावें", "करा रे बापांनो साधन हरीचें", "साधनाचें सार मंत्रबीज हरि", "शुक याज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी। हरिसिं जाणोनि हरि झालें", "आवडीने भावें हरिनाम घेसिं। तुझी चिंता त्यासि सर्व आहे", "नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा। पति तो लक्ष्मीचा जाणतसे", "सकळ जीवांचा करितो सांभाळ। तुज मोकलील ऐसें नाहीं", "जैशी स्थिती आहे तैशापरी राहे। कौतुक तूं पाहें संचिताचें", "एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा। हरिकृपें त्याचा नाश झाला"*** अशी गहिरी साक्ष स्वामी श्रीएकनाथ देतात.

"देव भक्त दोन्हीं एकरूप जालें", एका जनार्दनीं कल्पेचि मुराला। तोचि हरि जाला ब्रह्मरूप" अशी साक्षात्काराची ज्योत त्यांच्या अंतःकरणी प्रकटली ती हरिभक्तीनेच!***"कर्म उपासना ज्ञानमार्गी आले। हरिपाठीं आलें सर्व मार्ग"*** असे सर्व साधनांचे समन्वयन ते करतांना दिसतात.

त्यांचे परवलीचे बोल ऐकाः***"नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय। हरिकृपा होय तयावरी। ...एका जनार्दनीं हरि बोला।"*** अशा या नाथांघरी श्रीकृष्ण स्वतः श्रीखंड्याच्या रूपाने येऊन राहिले, ज्ञानेश्वरमाऊलींनी त्यांना अजानवृक्षाच्या मुळीच्या निमित्ताने बोलावून घेऊन संजीवन समाधीतही प्रत्यक्ष भेट देऊन ज्ञानेश्वरीचे गुह्य त्यांना समक्ष सांगितले, यांपरती दुसरी कोणती खूण आपणास पाहिजे!

२)श्रीनामदेवमहाराज

गोणाई, राजाई, दामाशेटी, नारा, म्हादा, गोंदा, विठा, लाडाई, गोडाई, येसाई, साकराई, निंबाई, नाऊबाई असे हे नामदेवांसह चौदा जणांचे विश्वकुटुंब जगाच्या कल्याणासाठी भूतली प्रकटले. ***जनाबाई***सारखी संत त्यांची दासी! त्या सर्वांनी मिळून नामदेवांच्या अभंगांची कोटी संख्या पूर्ण केली अशी आख्यायिका

वारकऱ्यांत प्रचलित आहे. पांडुरंगाचा श्रेष्ठ भक्त अशी संत श्रीनामदेवांची ख्याती आहे.

या सर्व हरिभक्त कुटुंबाने पंढरपुरी विठ्ठलाच्या महाद्वारी देवळाच्या पायरीवर संजीवन समाधि घेतली ती जाणाऱ्यायेणाऱ्या विठ्ठलभक्तांची पायधूळ आपणावर पडून आपण धन्य व्हावे म्हणून! केवढी ही लीनता! नामदेवांचे ज्ञानदेव आणि भावंडांच्या संजीवनसमाधिप्रकरणीचे भावस्पर्शी अभंग आपण पूर्वीच पाहिले आहेत *(उन्मेष ५२:सञ्जीवन समाधि पृ.क्र.९८१ ते ९८६).* अशा श्रीसंतश्रेष्ठ नामदेवांचा हरिपाठ हरिभक्तीने ओतप्रोत भरलेला नसेल, तरच नवल!

नाम हा परम महाजप असून ते घेणारा देह मृत्युलोकी उत्तम असल्याचे ते हरिपाठाच्या पहिल्याच अभंगातून सांगतात. श्रीरामास एकाभावे जपावे; द्व्यक्षरी रामजप परम आहे; श्रीरामचरित्र पवित्र आहे, असे ते म्हणतात.

गोविंद -गोपाळ –नारायण यांच्या पारायणाने इहलोकींचे जन उद्धरून जातात. जड जीवांनी हेच सोपे साधन करावे. आणिक स्तोत्रे – मंत्रे – यंत्रे करण्याची जरूरी नाही असाही उपदेश ते करतात. ***राम-जनार्दन - मुरारी - अच्युत - गोविंद - हरे - कृष्ण*** असा नामांचा सप्रेम जप करावा. त्याने संसाराचे मायाजाळ, इंद्रियबंध सगळे काही सरतात; कोटी यज्ञांचे पुण्य जोडले जाते; विठ्ठल हे नाम निर्धाराने तारते, असे त्यांचे अनुभूतीचे सांगणे आहे.

कृष्णकथा गावी; शिवनाम घ्यावे; ***"ॐ नमः शिवाय"*** हे षडक्षरी नाम जपावे; शिवाचे उत्तम ध्यान करावे, असाही शैव वैष्णवांचा समन्वय ते करतांना दिसतात. ***ध्रुव, प्रह्लाद, बळी, अंबऋषी हे सर्व नामानेच चित्पद पावले,*** अशी खूण ते प्रकट करतात.

त्रिपुरारीसुद्धा या आदिब्रह्म हरीस आळवतो आणि उमेला उपदेश म्हणून हे विष्णुनामच शिवाने दिले, असा ***"आदिनाथ उमा बीज प्रकटलें"*** बाबतचा निर्वाळा देऊन हे कृष्णनामच ते बीज असल्याची ग्वाही नामदेवांकडून आपणास मिळते. ***"नाथसंकेतीचा दंशु"*** तो हे नामबीजच होय.

नाम हा श्रेष्ठ बीजमंत्र होय! सर्व ऋषिमुनी याच हरिभक्तीच्या श्रेष्ठ पंथराजाने गेले; भजनाने ती वैकुंठाची वाट नीट गवसते, असे त्यांचे बोल आहेत. भावच संपन्न आहे; कलीमध्ये उद्धारक विठ्ठलच आहे; ***"हरिकथा हरी भवव्यथा"; "हरि हरि म्हणतां तरशील", माधव श्रीकृष्ण श्रीहरि नरहरि। वेगीं हा उच्चारीं लवलाहीं।। घडतील यज्ञ पापें भग्न होत। प्रपंच सर्वत्र होईल ब्रह्म।"*** असे निर्वाणीचे बोल ते सांगतात. ***"नामा म्हणे नाम घेईं तूं झडकरीं"*** असा काकुळतीचा उपदेश करत त्यांचे हरिपाठाचे चौतीस अभंग संपन्न होतात!

३) श्रीतुकाराममहाराज

"देऊळाच्या कामा कळस" असा भक्तिमंदिराचा साक्षात कळसच असणारे हे संतश्रेष्ठ जिवंतपणी कधीकाळी उपेक्षिले गेले. पण सदेह वैकुंठगमन होताच भाविकांच्या हृदयी ते कल्पकल्प नांदण्यासाठी पुनश्च अवतरले!! त्यांचा तेहतीस अभंग असलेला हरिपाठ हरिभक्तीच्या सर्व अंगांनी सुसंपन्न आहे, त्यात काय आश्चर्य!

गणपती, सारजा, गुरुराज या परम दैवतांना वंदन करत ते हरिपाठ गायनास प्रारंभ करतात. हा गुरुराय म्हणजे त्यांचा पांडुरंगच! ***"तुका म्हणे माता पिता गुरु बंधु। तूंचि कृपासिंधु पांडुरंगा।।"*** अशी अंतरीची खूण ते सुरुवातीसच प्रकट करतात. तीर्थांचे आणि नद्यांचे पावित्र्य जाणून श्रीतुकाराम त्या सर्वांना मनःपूर्वक वंदितात. नाम घेण्यापरते सुख नाही, असा त्यांचा निर्वाळा आहे.

कश्यप, गौतम, भरद्वाज, अत्री, विश्वामित्रादी थोर ऋषी व जमदग्नी, वसिष्ठादी मुनी नामानेच तिन्ही लोकी वंद्य झाले; ***"नाम घेतां नुरे पाप ताप दैन्य। होय थोर पुण्य उच्चारितां।"*** अशी त्यांची साक्ष आहे.

पवित्र अशा नद्या, तीर्थे, ऋषी, मुनी यांप्रमाणेच तुकाराममहाराज अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा व मंदोदरी या पंच पतिव्रतांच्या नामोच्चारणाचीही महती जाणतात. हरिनामासारखेच त्यांच्याही नामाचे श्रेष्ठ फळ असल्याचे ते म्हणतात. तसेच फळ भक्तभागवतोत्तम अशा व्यास, अंबरिष, वसिष्ठ, नारद, शौनक, प्रह्लादादींच्या नामाचे असते.

शुक, पराशर, पुंडलिकमुनी, अर्जुन, वाल्मिकी, बली, बिभिषण, भीष्म, रुक्मांगद, बकदाल्भ्य यांची नाम गाण्याबाबत उज्ज्वल परंपरा आहे. ***"तुका म्हणे यांची नामें येतां वाणी। प्रत्यक्ष तो प्राणी देवाऐसा।।"*** असे त्यांच्याही नामाचे माहात्म्य श्रीतुकाराम वर्णितात.

"गीता भागवत देव उच्चारितां। पापाचि तें वार्ता कोठें राही" असे गीता व भागवत यांचे माहात्म्य ते सांगतात. गीतेवर श्रीतुकाराममहाराजांनी श्लोकवार अभंगरचना केल्याचे जिज्ञासूंना विदितच असेल.

श्रीविठ्ठलाचे दर्शन

"तीर्थांचे जें मूळ व्रतांचें जें फळ। ब्रह्म तेंच केवळ पंढरिएं" अशा ***"जीविंचा जिव्हाळा सुखाचा शेजार। उभें कटी कर ठेऊनियां"*** त्या सगुण साकार व निर्गुण निराकार परब्रह्म विठ्ठलाची भेट त्यांना ***"गीतीं गातां"*** झालेली आहे. श्रुतीलाही त्याची भेट मिळालेली नाही, असा श्रीतुकारामांचा अभिप्राय आहे.

त्या विठ्ठलाचे दर्शन कसे आहे, त्याचे ध्यान कसे करावे, याचे सविस्तर वर्णन ते हरिपाठाच्या काही अभंगांतून करतात. ***"राजस सुकुमार मदनाचा पुतळा", "रविशशि कळा लोपलियां"*** इतका दैदिप्यमान, ***"कस्तुरी मळवट चंदनाची उटी"*** ल्यालेला, कंठीं वैजयंती माळ रुळणारा, मुकुट कुंडले ज्याच्या श्रीमुखाची शोभा वाढवत आहेत असा, ***"कांसे सोनसळा"*** वेष्टिलेला, पाटोळा पांघरलेला, असा ***"घननीळ सांवळा"*** त्यांचा विठ्ठल आहे.

असे ते रूप त्यांच्या फार आवडीचे आहे. ते पाहून त्यांचे लोचन सुखावतात. पांडुरंगाने असेच त्यांच्या दृष्टीपुढे सतत राहावे, अशी

आळी ते त्या मायबापाकडे घेतात. शंख, चक्र गदा हाती घेतलेले, कुंडले कानी तळपणारे, मस्तकी मुकुट असणारे, नवरत्नांचा हार धारण करणारे, रत्नहिरेजडित कडदोरा कटी असलेले, बेंबीपाशी रम्य हिरा शोभणारे, जडित कंकण, मुद्रिका ल्यालेले, ते अतीव मनोहर रूप त्यांच्या ध्यानी-मनी-स्वप्नी आहे.

त्याची पंचोपचार पूजा करून ते धन्य होतात. त्याला ***"मन हा मोगरा", "मन हे सेवंति", "मन हें तुलसि"*** अर्पून पुनरपि संसाराला येणे नाही, असे महत्त्वाचे वचन तुकाराम सहजच एका अभंगातून सांगतात. भक्तीतील ***"मनोमार्गे गती"*** चे हे असे अनवगुंठन आपोआपच त्यांच्या भोळ्याभाबड्या भाविक हातातून घडले आहे!

गळ्यात नामपुष्पांची माळ, वर विवेक सारासाराचा तुरा खोवलेला, भाळी बोधाचा बुक्का अशा त्या गोपाळावर तुळशीदळ वाहणारे तुकाराम धन्य होत! कीर्तनाने गोपाळास संतोषवून ते भावे त्याची आरती ओवाळतात. आचमन करून, फळे-पुष्पे, धूप-दीप यांनी सेवा केलेल्या त्या पांडुरंगास शब्दसुमनांची मंत्रपुष्पे व भावाच्या ओंजळीतून जल अर्पून व मुखशुद्धीस तांबूल म्हणुन तुळशीदल देऊन सर्वत्र आनंद साजरा करणारे तुकाराम सहजच म्हणून जातात की ***"तुका म्हणे आतां उरलें तें नाहीं। नामाविण बोलावया।।"*** त्या अशा विठ्ठलाचे ते चरण आलिंगतात. त्याला लोटांगण प्रदक्षिणा नमस्कार घालतात. त्याला क्षेम देता देता ते त्याला आपल्या हृदयसंपुटी साठवून घेतात!!

हरिभक्तीने तृप्त केलेले संत श्रीतुकाराम हे जाणून आहेत की हरीचा महिमा अगाध आहे. त्याने कृपा केली म्हणूनच तो त्यांच्यासारख्या पामराला भेटला आहे, असा त्यांचा भाव आहे. म्हणूनच एवढ्या धीटपणाने त्यांनी या अभंगांचा प्रपंच केला आहे. रामकृष्णनामाची साजिरी माळ कर्णी व मनी ओवून घेत त्यांची तनू शीतळ झाली आहे; प्रपंच निवाला आहे. ते देवाला अखेरचे विवतात की ***"समूळ अभिमान जाळिं माझां"; "सर्व समदृष्टि देखें तुज"; "संतचरणरज वंदीं माथां".***

पुढे ते म्हणतातः ***"इतुकें करी देवा आइकें हें मात। हृदयिं पंढरीनाथ। दिवसारात्रीं।। भलतियां भावें तारीं पंढरीनाथा। तुका म्हणे आतां शरण आलों।।"*** भावभक्तीने ओथंबलेला त्यांचा असा हा हरिपाठ आहे. भक्तीचे अमूप दर्शन त्यातून घडते. ***"हरिचियां दासा। हरि दाहीं दिशा"*** या उक्तीचे खरे वैभव तुकोबारायांच्या या हरिपाठात सामावलेले आहे. त्या वैभवाचे दर्शन घेणारे धन्यच होत!!

४) श्रीनिवृत्तिनाथ

ज्ञानदेवांचे सद्गुरू, त्यांना कृष्णनाम देणारे ते निवृत्तिनाथच! सर्व हरिपाठांचे सार त्यांच्या हरिपाठाच्या पहिल्याच अभंगात येते. ते म्हणतातः ***"हरिविण दैवत नाहीं पैं अनुचित्तिं। अखंड श्रीपति नाम वाचे।।१।। रामकृष्ण मूर्ती या जपा आवृत्ति। नित्य नामें तृप्ति जाली आम्हां।।२।। नामाचेनि स्मरणें नित्य पैं सुखांत। दुजियाचि मात नेणों आम्हीं।।३।। निवृत्ति जपतु अखंड नामावळी। हृदयकमळीं केशीराज।।४।।"*** -

सर्व ग्रंथांचे सार हे रामनामच आहे. त्याने विश्वाचे गूढ कोडे उकलते. प्रेमाने नारायण नाम जपावे. हरि हे एकच तत्त्व सर्वत्र आहे. त्याच्या नामाने त्वरित उद्धार होतो. ईश्वरच सेवावा; अन्य काही साधन नको. हरिनामाचे रसाळ अमृत वाचेने घ्यावे. हरीचे ध्यान धरावे. ध्यानाविना मन म्हणजे सूर्याविना गगन! ***विठ्ठलकीर्तनाने उन्मनी साधते;*** अद्वैत अशा नारायणाचे भजन करून कल्पनाच हरिरूप होते; प्रपंच सरतो; मोहाचे मोहन सरते, असे निवृत्तिनाथ म्हणतात.

एकतत्त्वाचे बीज ते हरिनामच होय. त्याने नित्य समाधान प्राप्त होते. नामस्मरणाने स्वतःची झालेली अवस्था ते सांगतात ती अशीः ***"निवृत्ति तिष्ठतु एकरूप चित्त। अवघीचि समस्त गिळियेली।। आम्हीं चकोर हरि चंद्रमा। आम्हीं कळा तो पौर्णिमा।। कैसा बाहिजु भीतरीं हरी। बिंब बिंबला एकसूत्रीं।। आम्हीं देहीं तो आत्मा। आम्हीं विदेही तो परमात्मा।।"*** द्वैतबुद्धी न उरू देणारे असे हरिनाम असते. अव्यक्त रामनाम जपून निवृत्ति धन्य होतात. रामनाम मंत्रसार आहे; बीज आहे. ते जपून नित्यत्व हरिरूप प्राप्त होते, असे स्वतःच हरिरूप झालेले श्रीनिवृत्तिनाथ सांगतात.

पंथराज व भक्ती यांचा समन्वय

आताच आपण पंचरत्नहरिपाठांद्वारे ईश्वरप्रणिधानाचे वर्म जाणून घेतले आहे. ***नारद-शांडिल्य* यांच्याप्रमाणेच या पाच संतांचे *हरिपाठ* हे भक्तिसूत्रात मोडण्यासारखेच ठरतात. भक्तीची मिती व योगाचे परिमाण आपणास या सर्वांतून गवसते. *पंथराजयोग* व ही *भक्ती* यांचे सामरस्यच आहे.**

पराभक्ती प्राप्त होतांना कुंडलिनीशक्तिजागर होतो. भक्तिमार्गात या शक्तीस ***आह्लादिनी शक्ती*** म्हणतात, असे स्वामी शिवोमतीर्थ त्यांच्या ***आह्लादिनी सिद्ध महायोग*** या ग्रंथात म्हणतात. त्यांच्या मते या ***कुंडलिनी वा आह्लादिनीच्या जागृतीनंतर भक्ती, योग व ज्ञान इ.चे वर्गीकरण उरत नाही आणि सर्व साधने एकाच साधनात समाविष्ट होऊन जातात.*** त्या स्वतःसिद्ध साधनास ***सिद्ध महायोग*** अशी संज्ञा ते देतात.

खरे तर हाच ज्ञानेशांचा ***पंथराज*** होय असे सूक्ष्मतेने या विषयाचे अवलोकन करणाऱ्यास समजून येईल. ज्ञानेशप्रणीत पंथराजयोगात म्हणूनच ***ज्ञान-कर्म-भक्ती व योग*** या सर्वांचे समावेशन दिसून येते. कारण हा त्यांचा व गीतेचा योग मूळ म्हणजे कुंडलिनीवर आधारित आहे. याबाबत आपण पूर्वीच साकल्याने पाहिले असल्याने तूर्त एवढीच सूचना पुरे!!

भक्तीचे हे योगामृत सेवणाऱ्या सज्जनांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठी आपण ***भक्तिसूत्रे व हरिपाठ*** यांत शिरलो होतो. ते कार्य पूर्ण झाले; अर्थातच आपल्या शक्ति-बुद्धीनुसारच! भक्ती व योग यांचे एकत्व आपण समजावून घेतले. त्यासाठी आपणास पतञ्जलींच्या ईश्वरप्रणिधान व ध्यान, धारणा, समाधि इ.कल्पना फार उपयुक्त ठरल्या. किंबहुना ***कर्म-ज्ञान-योग व भक्ती*** यांचा समन्वय

होतो तो याच संकल्पनांच्या आधारे! तो कसा ते आपण पूर्वीच पाहिले आहे. ***पंथराज व क्रमयोग*** ही त्या समन्वयाची दोन ज्ञानेशप्रणीत ठळक उदाहरणे आहेत.

योग व भक्तिपर अभंग::::

ज्ञानेशांची भक्तिपर अभंगवाणी

पंथराजाचे दर्शन आपण पूर्वीच घेतले आहे. आता अठराव्या गीता अध्यायानिमित्त ज्ञानेशांनी प्रकट केलेला ***क्रमयोग*** व इतर विषयांकडे वळावयाचे आहे. म्हणजे या संपूर्ण विषयाची सांगता होईल. पण तत्पूर्वी आपण एकवार ज्ञानेशांचे भाक्तिसंबंधित काही विशेष अभंग विचारात घेऊ या!

"सोनियाचा दिवस आजि अमृतें पाहिला। नाम आठवितां रूपीं पैं प्रगट झाला।।अ.क्र.७५।।" या अभंगामध्ये नामाने रूपदर्शन होऊन धन्य झालेले ज्ञानदेव दिसतात.

"अवचितिं वाट सांपडली पंथें। ब्रह्मनाम तेथें आलें हातिं।।अ.क्र.७६।।" मध्ये सर्व नामे ब्रह्माचीच होत व ती ब्रह्मप्राप्ती करून देण्यात समानच सामर्थ्याची आहेत, असा भाव आहे.

"कापुरीं परिमळु दिसे वो अळुमाळु। हळुं हळुं सुढाळु पवनपंथें।।१।। पवनीं न धायें। परतला खायें आपणांसिं।।२।। अ.क्र.८२।।" यातून **नामाची गती प्राणपंथाचीच असल्याचे आणि प्राणांचे उलटणे असा कुंडलिनीयोगाचा व पंथराजाचा भाग नामस्मरणात असल्याचे सूचित होते.**

"हरि सर्वकाळ अविकळ। स्मरे तो योगिया धन्य केवळ। त्याचेनि दर्शनें सर्व काळ। सुफळ संसार होतसे।।५।। ज्ञानदेवीं जप केला। मन मुरडुनि हरि ध्याईला। तेणें सर्वांगीं निवाला। हरिच जाला निजांगें।।६।।अ.क्र.८५।।" यातून भक्ती व योग यांचे साहचर्य स्पष्ट होते; तसेच **नामातही योगासारखीच मन मुरडणे व उफराटे पाहणे या क्रिया असल्याचे स्पष्ट होते.**

गीतेचा योगमार्ग

समरसें घटु विराला विनटु।
एकरूपें पाटु गेला सांगसिं।।१।।
कृष्ण कृष्ण वाट सांपडली नीट।
जिह्वेसिं धडधडाट इंद्रियेंसहित।।२।।
मनाचियां भोवनीं समाधिच्या ध्यानीं।
चिंतिला पद्मासनीं आत्मराजु।।३।।
ज्ञानदेवा चित्त कृष्णध्यानीं रत।
जन्मजरामृत्यु हारपली।।४।।अ.क्र.९४।।

सामरस्य, ***"पिंडें पिंडाचा ग्रासु"*** असा ***पंथराज***च या भक्तिपर नामसंकीर्तनात्मक अभंगातून आपणास दृग्गोचर झाल्यास नवल नाही!

असे हे नाम समाधि संजीवनाचे साधन आहे *(अ.क्र.९७)*. **"परेसि परतें स्वरुप या हरीचे *(अ.क्र.९८)"*** याद्वारे हरीची ही समाधी निरंजनाच्या गुंफेतीलच आहे; हरी परेपल्याडचा आहे, हे कळून येते. पंथराजाची ही निशाणीच आहे; गीतेचा योगमार्ग तो हाच आहे म्हणून ज्ञानेश शांगतात की ***" रामनाम वाट हेंचि वैकुंठ। ऐशिं भगवद्गीता बोलतसें";*** अठराही पुराणे व चारही वेद यांची हीच साक्ष आहे *(अ.क्र.१०४)*.

अभंगातील गणेशरूपक

असा हा हरिपंथ केवळ गुरू व देवता यांच्या कृपेने प्राप्त होत असतो. म्हणून ज्ञानेशांनी त्यांच्या माहात्म्यपर अनेक अभंग रचलेले आहेत. गणेश आणि विठ्ठल ही त्यांची फार आवडीची दैवते आहेत. ***"बापरखुमादेविवरु"*** या मुद्रेचे अभंग त्यांचे विठ्ठलप्रेम दर्शवतात. ज्ञानेश्वरीप्रारंभी येणारे गणेशरूपक त्यांच्या गणेशभक्तीची साक्ष देते.

गणेश त्यांना आत्मरूपी दिसतो. भक्ती व उपदेश हे त्याचे दोन श्रवण असून अगम्य असा श्रवणविषय गजानन आहे. ध्यान व मनन हे दोन कर असलेला वटेश्वर शिव हा त्याचा पिता आहे. भजन हे गणेशाचे तुंदिल दोंद आहे. त्याच्या मुकुटी निवृत्तीने केलेला गुह्य उपदेश विराजतो आहे. अशा गणेशास ज्ञानदेव पूजितात *(अ.क्र.६)*. तो पतितपावन आहे. निर्गुण-निर्मळ-निर्विकार असा हा गणेश समाधीतले समाधान आहे. ***निवृत्तीच्या सिद्धिपंथाचा हा स्वामी आहे. त्याने उन्मनी रुप होऊन ज्ञानेशांवर कृपा केली आहे*** *(अ.क्र.७)*.

***"लिङ्गदेहाची गाठ"* सोडवणारा संतकुळीचा राजा**

गणेश तसा गुरूच आहे. ज्ञानेशांचा हा गुरुदेव भाव-अभाव निमावून अनादी स्वरूपात स्वयमेव विराजतो. तोच आदिदेव आहे. मानवी मनाचे मूळ हेच आहे. तो मनोबुद्धीस अगोचर आहे. तोच निवृत्तिनाथरूपे प्रकट होऊन ज्ञप्तिरूप झाला आहे. ***"एकदंत नामे ज्ञानदीप"*** होऊन तो ज्ञानेशांना बोधस्वरूप झाला आहे *(अ.क्र.११)*.

अशा गुरूचे गुण गातागाता ज्ञानेशांच्या मुखी एक अति रसाळ अभंग येतो. ***"गुरु हा संतकुळीचा राजा। गुरु हा प्राणविसांवा माझा। गुरुविण देव दुजा। पाहतां त्रिलोकीं नाहीं।।"*** परब्रह्मच असा हा गुरू लिंगदेहाची गाठ सोडवतो. त्याच्या कृपेने तारक मंत्र प्राप्त होतो आणि ***"बाप रखुमादेविवरा"* शी मानसीं *"ध्यान लागते"*** *(अ.क्र.१२)*.

"निवृत्तीने गूज। स्वतंत्र ओतिलें"

ज्ञानेशांचा गुरुपंथ आदिनाथांपासूनचा आहे.

आदिनाथें बीज सांगितलें कानीं।
सोऽहं हे शिराणी कैवल्याचि।।१।।
मच्छेंद्र गोरक्ष पावलें या सुखा।
उजळिल्या आशंका ज्ञानाचियां।।२।।
निवृत्तीने गूज स्वतंत्र ओतिलें।
अपार पावलें सिद्धपंथें।।३।।
सोऽहं या मंत्राचा वेदाचा गव्हर।
म्हणे ज्ञानदेव सिद्धयोगी।।४।।अ.क्र.१५।।

या अभंगातून त्यांचा संप्रदाय व त्याचे साधनरहस्य सांगितले आहे. ***सोऽहं*** मंत्र हा कसा सहज सिद्ध करावा ते गूज निवृत्तींनी या

पंथात ओतले. कृष्णनाम आणि ज्ञानेश्वरीसह नाथसांप्रदायिक पंथराजसाधना हेच ते गूज आहे.

कर्म आणि धर्म यांच्या अनेक साधनांचा खटाटोप करून साधक शिणतात. पण त्यांनी हा निवृत्तिपंथ स्वीकारल्यास ते सुखी होतात. ***"प्रवृत्तितरुचियां बुडीं। दिसति निवृत्तिफलांचियां कोडी।।६-२५३।।"*** असे ज्ञानेश्वरीत याच पंथास उद्देशून म्हटलेले आहे, हे जिज्ञासूंस स्मरतच असेल! भुक्ती आणि मुक्ती दोन्हीही देणारे ते ***"गोड नाम तुझे विठोबा"*** ज्ञानेशांना फार आवडते *(अ.क्र.१०५).*

"विठ्ठल नाम तीन अक्षरे" आहे. त्यानेच शंकरांना अमृतपान घडून आले; महापातकी उद्धरले, असे ज्ञानेशांची वाणी सांगते *(अ.क्र.१०९).* ***"समाधिचें साधन"*** ते हेच रामनामचिंतन होय *(अ.क्र.११४).* ज्ञानदेवांनीही सर्व काळ हरीच सेविला *(अ.क्र.११६).* ***"ज्ञानदेवें जप केला। मग समाधिसि बैसला। नाम घेतां बोध जाहाला। देव आला हृदयासिं।।****अ.क्र.११७।।"* याच हृदयस्थ विठ्ठलास लक्षित, त्याचेच नाम घेत ज्ञानदेवांना बोध प्राप्त झाला आणि त्याच्याच ध्यानी तल्लीन होऊन त्यांनी आळंदी येथे संजीवन समाधी घेतली *(अ.क्र.११७).*

(**टीप: हृदयस्थ विठ्ठल व त्याचे नाम** - *अ.क्र.११७* मध्ये ज्ञानदेव सांगतात तो विठ्ठल म्हणजे आपण पंढरपूरीचा जो विठ्ठल म्हणतो त्याहून वेगळा कसा आहे, हे मुद्दाम सांगायला नकोच! संतांनी हृदयालाच ***पंढरपूर*** म्हटले आहे आणि तेथे जे सगुण-निर्गुण ध्यान होते, ते आत्मतत्त्वास लक्षूनच हेही आपणा सर्वांस विदित आहेच. हे ***हृदय*** कोणते तेही आता जिज्ञासूंना परतपरत सांगायला नको इतकी त्याच्याबद्दल माहिती आपणा सर्वांस आतापावेतोच्या विवेचनातून झालेलीच आहे. ***परेपलीकडले ते हृदय आणि तेथील ध्यानविषय*** **तो हा श्रीकृष्ण म्हणा, राम म्हणा, विठ्ठल म्हणा, हेच ज्ञानदेवांच्या या सर्व अभंगांतून आपणास वारंवार दर्शन देतात, ते असे!**)

"हरि हृदयीं साठविला" हेच निवृत्तीचे गूज

कर्मयोग म्हणजे ***"कर्माचिआं रेखा। नुलंघिति अशेखा। म्हणौनि विशेखा। केशवसेवा।।"*** असे ज्ञानदेव म्हणतात. **कर्मी केशवास भजणे म्हणजे *कर्मयोग*** *(अ.क्र.१२३)!* गोकुळवासियांनी -नंद व यशोदेनेसुद्धा हाच कर्मयोग आचरून श्रीकृष्णाची भक्ती साधली. यशोदामाई म्हणूनच सांगते की:

माझ्या कान्ह्याचे तुम्हीं नांव भरी घ्या वो।
हृदयीं धरूनि यासि खेळावया न्या वो।।१।।
भक्तांकारणें एणें घेतलीसे आळी।
दहा गर्भवास सोसि स्वयें वनमाळी।।२।।
कल्पनेविरहित भलतिया मागें।
अभिमान सांडूनि दीनापाठीं लागें।।३।।
शोखिलीं पूतना येणें मोहिलें लेंकरूं।
आळी न संडी बाप रखुमादेविवरु।।४।।

।।अ.क्र.१३१।।

असा हरी पावून धन्य झालेले ज्ञानेश म्हणतात: ***"हरि आला रे हरि आला रे। संतसंगें ब्रह्मानंदु जाला रे।।****अ.क्र.१३३।।"* अशा हरीतच सर्व साधने आहेत. ***"सकळ नेणोनियां आन। एक विठ्ठलुचि जाण।।१।। हेंचि भक्ति हेंचि ज्ञान।"*** असे ज्ञानेश म्हणतात *(अ.क्र.१३६).* ***"निजानंद पैं हें ब्रह्म"*** असे या विठ्ठलाचे वर्म योगीजनांस माहीत आहे *(अ.क्र.१३८).* त्यांची समाधी रामनामें धन्य होते; सर्व कर्मे सम होतात *(अ.क्र.१४३).*

"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।पा.यो.सू.।।" असे पतञ्जलींनी म्हटले आहे. योगसिद्धी ईश्वरप्रणिधानाने होते. आपण आतापावेतो जे हे ज्ञानेशांचे अभंग पाहिलेत, त्यांवरून हेच दिसून येते. <u>**खरे तर *योग, ज्ञान, कर्म व भक्ती* या चौविध साधनांचा पाया हे ईश्वरप्रणिधानच आहे; त्यांचा मार्ग ईश्वरप्रणिधानात्मकच आहे आणि त्यांची फलश्रुती ईश्वरप्रणिधानातून योगसिद्धी वा समाधीच आहे आणि ज्ञानेश या सर्व अभंगमालिकेतून, हरिपाठातून आणि ज्ञानेश्वरी व त्यांच्या इतर ग्रंथांतून सतत हेच निवृत्तिनाथांनी नाथसंप्रदायात ओतलेले स्वतंत्र गूज आपणास सातत्याने सांगत आहेत.**</u> जिज्ञासूंनी हे नीट लक्षात घेणे जरूरीचे आहे. कारण त्याशिवाय गीता-ज्ञानेश्वरीचा अर्थ आणि ज्ञानेशांचा साधनामार्ग त्यांना आकळणे दु:साध्य ठरेल! असो.

हाच भाव ***"सकळ संप्रदाय श्रीहरी। जो बैसोनि जप करी। जिव्हे महादेवाचियां अंतरीं। सर्व काळ वसे।। बाप रखुमादेविवरु सिद्धि। तरणोपाय हेंचि बुद्धि।।"*** या अभंगातून व्यक्त होतो *(अ.क्र.१४५).* ***"ज्ञानदेवें सुकाळ केला। हरि हृदयिं सांठविला। हरिपाठ हाचि साधिला। अनंत अनंत परवडीं।।****अ.क्र.१४५।।"* - ज्ञानदेवांनी हरिपाठ अनंत प्रकारे कसा साधावा हे आपल्या उदाहरणाने जगास दाखवून दिले आणि हरी हृदयी साठवूनच समाधी घेतली!!

"नित्य ध्यान श्रीविठ्ठल"

"ज्ञानदेवीं ध्यान केलें। हरिरत्न ऐसें साधिलें। तें आणुनियां घातिलें। हृदयकमळिकें।।अ.क्र.१५०।।" - हरिरत्न पावून ज्ञानदेव धन्य झाले, ते असे!! त्यामुळे ***"मीपण मावळले। सद्भाव उजळलें। सुखाचें सोहोळें। गुरुखूण।।"*** अशी त्यांची अवस्था होऊन ठाकली. ***"ज्ञानदेवें केलें कीर्तन। मन मारूनि वेधलें ध्यान। रामकृष्ण हें संजीवन। भक्त चकोर चित्ताचा।।"*** असा संदेश त्यांनी आपणास दिला आहे *(अ.क्र.१५८).*

आपले हित व्हावे म्हणून परत परत ते वेगवेगळ्या अभंगांतून हेच कसे सांगतात, ते पाहा: ***"ज्ञानदेवीं जप साधिला। सर्वत्र हरि चित्तीं ध्याईला। जीवेसिं शिव मेळविला। आपैता केला श्रीहरी।।****अ.क्र.१६८।।"*; ***"विसावा तो धरावें ध्यान। एकचित्त करावें***

मन। राम राम स्मरावें।।अ.क्र.१६९।।"; "साध्य साधन श्रीहरि। जपमूळ जिह्वाग्रीं। ध्यानसामग्री। हरिचरणिं लावावें।। राम राम सप्रेम। जप करावा।।अ.क्र.१७१।।"; "ज्ञानदेवा मोल प्रमाण। वाचा निमाली केली जाण। नामेंचि जालों सज्ञान। नित्य ध्यान श्रीविठ्ठल ।।अ.क्र.१७२।।"; "ज्ञानदेवीं अभ्यास सार। रामकृष्ण निरंतर। रामकृष्णें तरिलें पामर। साधन हेंचि साध।।अ.क्र.१७३।।"; "त्रिपुटी छेदूनियां जाति। तारावया संसार येती। हरिभक्ति उपदेशति। भजनमार्ग तारक।।४।। हरि अवतरे भक्तालागिं। साह्य होऊनि रक्षी वेगिं। दोष लागों नेदी अंगीं। भक्तां सर्वांगिं रक्षितु।।५।।अ.क्र.१७५।।" असे साध्य-साधन, अभ्यास, नाम,संत-भगवंतांचे कार्य इ.ज्ञानेश स्पष्ट करतात.

या हरिभक्तीने शंकरादिक सर्वांना तारले. प्रह्लाद, रुक्मांगद, भीष्म, उद्धव, अक्रूर, अर्जुन एवढेच काय, गणिकेलासुद्धा हरीनेच तारले. म्हणून अखेरचे ऐका: *"ज्ञानदेवीं ध्यान केलें। नामें सर्व कर्म सारिलें। नामें रामकृष्ण ऐसें आलें। निरंतर सुखासिं।। अ.क्र.१६२।।"*

हरिभक्ती हा तर संतांचा ठेवा! पूर्ण चंद्राच्या दर्शनाने सागरास उचंबळून येते. तसेच हरिदर्शनाने संतांच्या अंतःकरणास उधाण येते. *"सोळा कळीं चंद्रु पौर्णिमें पूर्ण बोधु। संतजनां उद्बोधु। सागरन्यायें ।।अ.क्र.१८८।।"* असे संत असतात. त्यांच्या भेटीने भवदुःख हरते *(अ.क्र.१९०)*. ईश्वरच दीनपतितांवर दया करण्यासाठी संतरूप घेतो. *"बाप रखुमादेविवरु। तो हा तारक निर्धारु। विश्वाकारणें निरंतरु। अवतार घेतलें।।६।।अ.क्र.१९४।।"* असे संतांचे माहात्म्य ज्ञानेश वर्णितात.

"मन उन्मनीं उन्मन ग्रासिलें"

"संतांचियें संगति मनोमार्गें गति। आकळावा श्रीपति। येणें पंथें।।अ.क्र.५५।।" असे या संतसंगाचे अपूर्व ज्ञानेशांनी स्पष्ट केले आहे. हरिपाठ, ध्यान, भजन, कीर्तन, संतसंग, नवधादी भक्ती इ.द्वारे हरिपांडुरंगाची भेट होते; त्याचे दर्शन घडते. ते दर्शन आपण पूर्वी ज्ञानदेवांच्या योगपर अभंगांतून एकदा घेतलेच आहे. आता इतरही काही अभंगांतून घडणारे त्या श्रीहरीचे मनोज्ञ रूप पाहू या. पांडुरंगाच्या रूपाने हा श्रीहरी तेथे अवतरतो.

"बाप रखुमादेविवरु पंचविसावा। चोविसा मूर्तीवेगळा।।" असे त्याचे तत्त्व आहे *(अ.क्र.१९५). "तें हें रूपडें रूपस विठ्ठल (अ.क्र.१९६)"; "अनंतीं अनंत ओतिलें संचित। वैकुंठ अद्भुत। उभें असें।।अ.क्र.२००।।";"सोऽहंकथा उघडी। पंढरिएं।। अ.क्र.२०१।।"; "जें ब्रह्मरसाचें गोठलें। तें पंढरिएं प्रगटलें ।। अ.क्र.२०३।।";"श्रीमुख दिसते वेल्हाळ। तें देखोनि मन संतुष्टी।।अ.क्र.२०६।।"; "रूप पाहतां तरी डोळसु। सुंदर पाहतां गोपवेषु।।अ.क्र.२०८।।"; "त्रिपुटी भेदुनि। मनाचियां मौळीं। तें आले भूमंडळीं। पंढरिएं।।अ.क्र.२१६।।"; "येणें आपणिएं समान मज केलें गे माये। मन उन्मनीं उन्मन ग्रासिलें।।अ.क्र.२१८।।"; "पांडुरंगीं मन रंगलें। गोविंदाचें गुणीं वेधलें। जागृति स्वप्न सुषुप्ति नाठवें। पाहतां रूप आनंदीं आनंद सांठवें। बापरखुमादेविवरु सगुण निर्गुण। रूप विटेवरी दाविली खूण।।अ.क्र.२२०।।"; "सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण।।"* असे ते रूप आहे. आनंद चिद्घन सनातन ब्रह्मच असे ते रूप आहे, असे ज्ञानेश म्हणतात *(अ.क्र.२२२)!!*

बाळकृष्णाचे रूपडे

बाळकृष्ण हे त्या रूपाचे गोंडस सगुण रूप! ते पाहून संत धन्य होतात. गोकुळवासियांना तेच रूप दिसत असे. ज्ञानदेवांनाही तेच रूप फार आकर्षिते:

यमुनेचियां पाबळीं। मूर्ति देखिली सांवळी।
चिदाकाशाचि वोतिली। प्रेमतनु गे माय।।१।।
कांबळीचि बुंथि घेऊनि। कल्पद्रुमातळीं।
त्रिभंगीं ठाण। मांडियेलें गे माय।।ध्रु.।।..
.. प्रणवाचा मरिगळा। पूजनासि आला भाळां।
तुर्येसहित त्रिपुंड्र टीळा। अर्धऊर्ध्व मात्रीं।।
अभिनव महाकारणीं। पवनपंचकाचि खेळणी।
कुंडलें परावाणी। ढाळ देति गे माये।।८।।..
माथां मोरपिसावेठीं।.. बाप रखुमादेविवरु।
विठ्ठलु सुखाचें निधान। तें मियां हृदयीं।
संपूर्ण सांठविलें। गे माय।।११।।अ.क्र.२२३।।

त्याच्या शिरी प्रणवरूपी पांचूचे रत्न शोभते आहे. तुर्येसहित जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांचे त्रिपुंड्र त्याने भाळी लावले आहे. महाकारणी प्राणपंचकाचे भूषण ल्यालेला, कानात परावाणीची कुंडले शोभणारा असा हा परब्रह्म गोपाळ ज्ञानदेव साकार करतात तो त्यांच्या अभंगांतून!! त्याला त्यानी आपल्या हृदयी साठवून घेतला आहे!

त्याचे गोपिकांना कसे दर्शन होत असे ते सांगणारा एक अभंगही पहा:

जटील धूलिधूसर। दोंदिल डोळसु।
अंगणीं बालचंद्र। खेळतां दिसे।।१।।
विश्वाचें प्रतिबिंब बिंब। सांवळा सुजेडु।
कृष्ण परब्रह्म पुतळा। कीं आनंदाचि कीळा।।२।।
तो हा भोगितां हें लीळा।
मदनाचि गे माय।।३।।अ.क्र.२२५।।

"नाच चिदानंदा। सुख होईल सकळां"

त्याचे वर्णन करतांना दंग होत ज्ञानराज म्हणतात: *"कल्पद्रुमातळी। ब्रह्म पुंजाळलें कैसें। दिसते सुनीळ तेज गे। मज पाहतां वेणुध्वनि नाद। उमटति सहज गे बाई ये।।अ.क्र.२३०।।"; "गोपवेषें नटलें चैतन्य।।अ.क्र.२३१।।"; "लक्ष लावोनि अंतरीं। कृष्णा पाहति नरनारी।लावण्यसागरु हरि। परमानंदु।। अ.क्र.२३४।।;" "गुणाचें पैं निर्गुण। जें प्रकाशक थोर। सकळ योगाचें। आनंदोनि पाहा सांचें। मनी मनचि मुरोनि राहें तैसें। बापरखुमादेविवरें विठ्ठलें।*

कीं मुसेमाजिं अळंकार मुरालें।। अ.क्र.२३५।।" असे ते रूप ज्ञानेश वर्णितात, त्याची आस बाळगतात! त्याच्यासह खेळताबागडतांना ज्ञानेश सहजच उद्गारतातः

भोंवरी सांडूनि पाव ठेवि रे गोपाळा।
नाच चिदानंदा सुख होईल सकळां।।१।।
रंगु रंगला रे रंगु रंगला रे।
आदि मध्य अंत त्रिगुणविरहित
विश्वीं प्रकाशला रें।।२।।
रंगु रंगला रे सुरंग जाहाला।
पहिलिएं रंगीं निवृत्ति भला।।३।।
सुखीं सुख मुरें प्रेमें चिदानंद उरें।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलु रे।।४।।अ.क्र.२४१।।

तो अडखळून पडू नये या बेताने गोपाळास ज्ञानदेवादी सवंगडी नाचण्यास सांगत आहेत. त्या चिदानंदाचा नाच सर्वांना अतीव सुखकारी व मनोहारी वाटतो आहे. त्या नृत्यविलासात अतिशय गहिरा प्रेमरंग भरला आहे. आदि-मध्य-अंत-त्रिगुणविरहित अशा त्या परमात्म्याचा प्रकाश विश्वात पसरलेला पाहून ज्ञानदेवांच्या त्याच्यावरल्या प्रेमाला मोठा रंग चढतो आहे. तो रंग आता निवृत्तिप्रेमाच्या रंगावर चढून सुखात सुखच मुरावे तसा होऊन गेला आहे आणि सर्वत्र प्रेममय चिदानंद असा बाप रखुमादेविवरच भरून गेला आहे; सर्वत्र आता तो गोपाळच उरला आहे, अशी सुंदर अनुभूती ज्ञानेश वर्णित आहेत.

"घडिये घडिये गुज बोल कां रें"

याच श्रीकृष्णाचे रूप ***"तुझिएं निढळीं कोटि चंद्र प्रकाशे। कमलनयन हास्यवदन हांसे। कृष्णा हाल कां रे कृष्णा डोल कां रें। घडिये घडियें गुज बोल कां रें।।"*** असे या शब्दांत सांगत ज्ञानेश ते सतत पाहू इच्छितात. कपाळावर कोटी चंद्रांचा प्रकाश असणारे, कमलनयन, हास्यवदन, चालतेबोलते, गुजगोष्टी सतत सांगणारे ते रूप पाहणारे धन्य होत *(अ.क्र.२४२)!* शिवाने शक्तीस तेच रूप दाखवले. विटेवर तेच रूप ठेले आहे (अ.क्र.२४५). तेच रूप पाहू इच्छिणारी साधकवृंदे योगविद्येच्या पंथे वाटचाल करतात *(अ.क्र.२४६).*

"यथा व्रजगोपिकानाम्"

हे रूप मन वेधून घेते. मनाचे मोहन करते. ते सतत दिसावे असे वाटते. ते दृष्टीआड झाले तर विरहवेदना लावते; भेटीची आस लावते. त्यातूनच गौळणी-विरहिणींचा जन्म झाला! कृष्णध्यानात मग्न झालेल्या गोपिका दूध विकतांना *"दूध घ्या"* असे म्हणण्याऐवजी ***"गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो"*** असे वेड्यासारखे बोलू लागलेल्या पाहून लोक हसू लागले *(अ.क्र.२४७).* अशा या त्यांच्या वेड्या प्रेमाची महती ***"यथा व्रजगोपिकानाम्।।२१।।ना.भ.सू.।।"*** या शब्दांत नारदांनी भक्तिसूत्रांत सांगितली आहे.

गौळणी-राधा यांनी वात्सल्य, कांतासक्ती अशा भावांतून श्रीकृष्णावर प्रेम केले. गोपाळांनी सख्यत्व, मैत्री या भावनांतून श्रीकृष्णरूप न्याहाळले. कांताभाव वरवर विषयासक्तीचा दिसला, तरी ते प्रेम दिव्य होय. याचसाठी ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण म्हणतातः ***"अर्जुना गां तो भक्त। तोचि योगी तोचि मुक्त। तो वल्लभा मी कांतु। आईसा पढिये।।१२-१५६।।"***

या भावानेच भारावून गोपी द्वैताद्वैतविरहित झाल्या. त्यांना सतत कृष्णरूप दिसू लागले. ***"पूर्ण चैतन्य भोगिलें हें तंव दुजें निमालें। देहीं अखंडित ठेलें होते जैसें।। आलिंगूनियां अंतरीं रिगु न पुरें बाहेरी। निर्विकाराचियां सेजारीं प्रेम दुणावत।। बाप रखुमादेविवरु विठ्ठलेसिं भेटी। आजि संसारां संसाटी घेऊनि गेला।।४।। अ.क्र.२४८।।"*** अशी गोपिकांची अवस्था झाली.

चैतन्य भोगून द्वैत उपशमले. निर्विकार परमात्म्यास त्यांनी आलिंगन दिले. त्याला अंतरंगात साठवून त्यांनी दडवून ठेवले. त्याच्याबरोबर क्रीडत गोपींचा आनंद दुणावला. त्याची भेट होऊन त्यांचा संसार उधळला गेला. गोपाळ त्यांना मोहवून आपल्या स्वस्वरूपाच्या ठिकाणी घेऊन गेला, अशी या कांतासक्तीची खरी खूण ज्ञानेश आपणास दाखवतात. हा दिव्य शृंगार पाहून आपण धन्य होतो!!

परेपरते निळे रूप

त्या श्रीकृष्णाला भुललेली एक नारी पाहाः

सांवळियें निळीं भुललीं एक नारी।
परेचां वो घरीं शुद्धी पुसिं।।१।।
सांग गे बाईये कवणें घरीं नांदें।
कैसें या गोविंदें हिंडविलें।।२।।
चहूं मार्गीं गेलें न संपडें वाट।
मग चैतन्याचा घाट वेधिलियें।।३।।
ज्ञानदेवीं समाधि स्थान पैं विठ्ठल।
अवघा चित्तीं सांडल हारपला।।४।।अ.क्र.२४९।।

परेपरते निळे रूप पाहून मुग्धावलेली ही गोपी त्याचा शोध परेकडे घेऊ जाते. चारी वेदांना विचारते. पण त्याचा पत्ता सापडत नाही. शेवटी ***अर्धमात्रेपलीकडचा चैतन्याचा घाट ती उतरते, तेव्हा समाधिस्थानी निरंजनाच्या गुंफेत तो विठ्ठल सापडतो आणि तिचे चित्त धाते!!***

गोपींना मोहवणारा कान्हा

गोपींना हा चित्तचकोर घनश्याम सतत खुणावी - ***"तेथे नंदाचा कान्हा डोळा घाली गो आई यो";*** तो त्यांची छेड काढी - ***"धरी माझां आचुळा। मग मी पळालिये गो";*** मनोहर असा तो श्रीकृष्ण त्यांच्या पाठी लागे - ***"गळां गुंजमाळा गांठीं डांगा मोरपिसा वेठीं। सोकरु लागें पाठीं नंदरायाचा गो आईयो";*** गळा गुंजमाळा आणि माथीं मयूरपिच्छ धारण केलेले ते रूप त्यांच्याशी चुंबन- आलिंगन असा शृंगार करी.

"एक्या करें धरीं बीज्या करें वेढारीं चुंबन दे हरि। मग मी पळालिये गो"; गोपी त्याच्यापासून पळून जाऊ पाहत, पण पळतापळता त्याच्याशी एकरूप होऊन जात देहमुक्त होत अशी खूण पण मिळते ज्ञानेशांच्या या शृंगाररसपूर्ण अभंगांतून! - ***"ऐसिं पळत पळत गेलिये कान्होनि मोहलिये। माझी मीचि जालिये मग मी समोखिलिये गो।।"***

संतोषलेल्या गोपींना कृष्णाचे वेधच लागतात; त्याचे बोलणे गोड लागते; त्याचे करणे गोड लागते; त्याच्यासारख्याच त्याही होऊन जातात अशी अनुभूती प्रकट करत त्या म्हणतात: ***"पूर्वपुण्य फळले देहमुक्त जालें। बाप रखुमादेविवरें विठ्ठलें ऐसें केलें गो आई यो।।अ.क्र.२५०।।"***

ज्ञानदेवांनी अभंगांत कधीकधी कानडी तर कधी बागलाणी *(बहुधा आजची कान्हदेशी वा खान्देशी वा अहिराणी)* बोली व त्यातील शब्द वापरलेले दिसतात. ***"आकानिकेळे चिकनामातु। कोकिळे धनिगे मरुळादेने।।...।।अ.क्र.२१७।।"*** हा असा सुरेख कानडी अभंग त्यांचाच आहे. श्रीहरीच्या मुरलीनादाने गोपी वेड्या झाल्या. त्याचे अतिसुंदर रूप त्यांना लोभावते. असा हा रखुमादेविवर पंढरीराय श्रीविठ्ठल आपणास कधी अन कोठे मिळणार! भक्तांसाठी भक्त पुंडलिकाने मात्र त्याला बंदिवान केले आहे आणि म्हणून त्यास आपणाला दर्शन द्यावेच लागते आहे, असा काहीसा भाव या अभंगात आहे.

तत्त्वज्ञान व उपासना यांचे सार

मैं दुरथी कर जोडुं। तान्हों सेवा न जाणुं।।१।
मन्हा रे कान्हा मन्हा रे कान्हा।
देखी का न गिणा रे। मन्हा कान्हा रे।।२।।
तान्हा मराठा देश। मन्हीं बागलाणी भाष।।३।।
घटिं पटिं विचार। खंडे भाले तरवार।
बाप रखुमादेविवरु जाण।
ऐसें मन्हा कान्हा रे।।४।।अ.क्र.२५२।।

कान्होबाला दोन्ही कर जोडून गोपी शरण आहे. त्याची भक्ती कशी करावी ते ती जाणत नाही. पण त्याला नित्य डोळे भरून पाहावे, त्याच्या गाण्यात तल्लीन व्हावे, एवढेच ती जाणते. हा कान्हा आहे मराठमोळा अन गोपी तर बागलाणी! ***"कानडा विठ्ठलु करनाटकु। तेणें मज लावियेला वेधु।।"*** असे हे ***"परदेसीसे लागी रे लगन"*** आहे. मग कसे व्हायचे!

पण गोपी सहजभोळी असली तरी घटपटादी चर्चेवर आघात करत सांगते की या शुष्क विचारांवर चालणारी ढाल-तरवार एकच आहे - ती म्हणजे ***"माझ्या कान्ह्याचे नित्य दर्शन!!"*** सर्व तत्त्वज्ञानाचा मेरुमणी व सर्व ज्ञान-कर्म-योग-भक्तीचे सार या अभंगात आहे - ते म्हणजे भगवंताचा साक्षात्कार! तो गोपींना जसा झाला, तसा आपणासही लाभो!!

ज्ञानदेव हे भाषाप्रभू आहेत! कानडी आणि बागलाणी भाषेतले त्यांचे हे अभंग तर नितांतसुंदर आहेत!! आपला भाव व्यक्तवण्यासाठी त्यांनी या अभंगांतून बागलाणी भाषेची गोपी आणि मराठमोळा घनश्याम सहजच साकार केले आहेत- आणि तेही मोठ्या चतुराईने!

तत्त्ववेत्ती आणि योगज्ञानी गोपी

गोपी इतक्या भोळ्याभाळ्या असल्या तरी त्या सर्व तत्त्वज्ञान उत्तम जाणतात. ***"आकाश तेंचि अवकाश तुजमाजिं। हें विश्व तूं विश्वीं अससि।।"*** असे श्रीहरीचे स्वरूप असल्याचे त्या उमजून आहेत. पंचमहाभूते व हे विश्व त्याच्याठायीच आहे, याची त्यांनी प्रचिती घेतलेली आहे *(अ.क्र.२५३)*.

योगकर्म पण त्या उत्तम जाणतात. आधारचक्ररूपी चुंबळीवर हा देहजगद्रूपी डेरा ठेवलेला आहे. त्यात परमात्मा संचला आहे. मेरुपर्वताची रवी करून त्याला घुसळले पाहिजे. ***मेरु म्हणजे पृष्ठवंशमज्जारज्जू व तत्संबंधित सुषुम्ना नाडी!*** गुरूच्या मार्गदर्शनाखाली हे केले की परब्रह्मरूपी नवनीत हाती येते. शरीर हे ब्रह्मविद्येचे पात्र आहे, त्यात ब्रह्मज्ञानरूपी नवनीत सापडते.

.. गुरुउपदेशें रवि धरी अर्धऊर्ध्व मांजिरी।
पांचै प्राण मंथन केलें निरुतें वो।
इडा पिंगळा कुंडळिणीयां ब्रह्मसूत्र दोरु तो आणिया वो।
उभी राहौनि गगनीं अनुहातें अंबर गर्जे वो।।२।।
... काया हें नगरी गौळणी गोरसु।
पुकारें नवहीं दारवंठे सांडूनि वो।।३।।
दशवेंद्वारीं पातली कैसिं विनटलीं गोविंदीं वो।
दंभ विकरा जाला अधर्म धर्म लोपला वो।।४।।
अवघीं काया झांकुळली।
बाप रखुमादेविवरा विठ्ठलीं वो।।५।।अ.क्र.२५५।।

ज्ञानदेव ***गोपींची योगानुभूती आणि पंथराजक्रमण*** वर्णिताहेत ते या शब्दांतून! गुरुउपदेशरूपी हातांनी मेरुदंडरूपी ही रवी त्या परब्रह्म असणाऱ्या शरीररूपी डेऱ्यात धरून घुसळावयाची असते. त्या रवीची *मांजिरी* म्हणजे खालचा घुसळणारा भाग जेथे असतो तो म्हणजे **अर्धमात्रा**च होय. अर्थात हे नाथाघरची उलटी खूण या न्यायाने ब्रह्मरंध्राकडील अर्धमात्रेचे मंथन होय. या रवीने पंचप्राणांचे मंथन करावयाचे आहे. ब्रह्मसूत्राचे त्रिपदर म्हणजे ***इडा, पिंगळा व कुंडलिनी.***

यांसच दोरी करून मेरुपर्वताची म्हणजे पृष्ठवंशरज्जुस्थित सुषुम्नेची ही रवी चांगली घुसळली की ती गगनात म्हणजे **गगनमहाल**ात **अनुहात**ाच्या नादाने गर्जते. अंबरमहाली जो ***अनुहातनाद*** योगी ऐकतात, तो म्हणजे या रवीच्या घुसळणाचाच आवाज होय.

कायारूपी नगरीत गोरस विकू पाहणारी गौळण म्हणजे जीव! तो ही घुसळण करतो. त्यात तयार होणारे ताक म्हणजे अमृत तो इंद्रियांची नवद्वारे पुकारत विकू पाहतो. ते त्यांना वाटून देत त्यांना

अमृतपान करवत शेवटी ही जीवरूपी गौळण ***दशमद्वार वा ब्रह्मरंध्र*** तेथे येऊन पोहोचते आणि तेथील गोविंदाला पाहून लोभावते. आपल्या हातातील नवनीत त्याला खाऊ घालत ती तेथेच रमते.

हे नवनीत खरे तर दंभ- धर्म-अधर्म इ.वृत्तींचेच परिवर्तन होऊन तयार झालेले संजीवन असते. ते नवनीत खाणाऱ्या त्या गोपालाचे दर्शन घेऊन धन्य होणारी ती जीवरूपी गौळण केव्हा त्या रखुमादेविवरात समावून जाते, ते तिचे तिलाही कळत नाही!!

"भावें भोगूनि श्रीहरी"

या अशा चतुर सुजाण गौळणीला कृष्णाचा छंद असतो. ***"देखोनि सांवळी तनु। लुब्धला माझा मनु। लागलेसे ध्यानु। द्वैत निवडे ना।। अवस्था लावूनि पुरी। भावें भोगूनि श्रीहरी। मन मुक्त साजणी।।अ.क्र.२५७।।"; "इंद्रनीळा घनसांवळा कृष्ण सांवळा डोळसु", "सहज परमहंसु"(अ.क्र.२५८); "तुजवीण एकली रे कृष्णा न गमे राती (अ.क्र.२६०)"; "कृष्णें वेधिली विरहिणी बोले। चंद्रमा करितो उबारा गे माय", "नंदनंदनु घडी घडी ये आणा। तयावीण न वांचति प्राणा वो माये (अ.क्र.२६२)"*** अशा शब्दांत ज्ञानेश त्यांचा तो कृष्णछंद व्यक्त करतात.

कृष्णवेडी विरहिणी

"सांवळे परब्रह्म आवडें या जीवा। मनें मन राणिवा घर केलें।।अ.क्र.२६५।।"; "ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचें खुणें। सांवळेंचि होणें यासिं ध्यातां।।अ.क्र.२६६।।";"निळियेचियां निशीं विरहिणी पिशी। कृष्णसंगें बाली विव्हळ जालीं निळीं।।अ.क्र.२६९।।" अशी त्या गौळणींची कृष्णसंगाची आर्तता आहे.

कृष्ण न भेटल्याने जी त्यांच्या जीवाची तगमग होते, ती सांगणारी एक अति सुंदर विरहिणी पाहाः

घनु वाजे घुणघुणा। वारा वाहें रुणझुणा।
भवतारकु हा कान्हा। वेगीं भेटवा कां।।१।।
चांद वो चांदणें। चापे वो चंदनु।
देवकी नंदनु। वीण अणु नावडे वो।।२।।
चंदनाचि चोळी। माझें सर्व अंग पोळी।
कान्हो वनमाळी। वेगीं भेटवा कां।।३।।
सुमनाची सेज। सितळ वो नीकी।
पोळे आगीसारिखी। वेगीं विझवा कां।।४।।
तुम्हीं गातसा सुस्वरें। ऐकोनि द्या उत्तरें।
कोकिळें वर्जावें। तुम्हीं बाईयांनो।।५।।
दर्पणीं पाहतां। रूप न दिसे आपुलें।
बापरखुमादेविवरें विठ्ठलें।
मज ऐसें केलें।।६।।अ.क्र.२६३।।

"आषाढस्य प्रथमे दिवसे" असे मेघदूतात वर्णन येते. घन गर्जत आहेत; रुणझुण वाराही वाहतो आहे. पण तो भवतारक कृष्णकान्हा वनमाळी काही कोठे दिसत नाही. सख्यांनी काहीही करून त्याची भेट घालून द्यावी असे ही कृष्णवेडी विरहिणी आर्त स्वरात म्हणते आहे. बिछान्यावरील छतच असे ते छान चांदणे, चाफ्याची मादक वासाची फुले अन चंदनाची सर्वांगी उटी चर्चिलेली आहे. पण कृष्णाविना तिला ते काहीच गोड वाटत नाही.

चंदनाची चोळी घालूनही तिच्या अंगागांत अग्निदाह होतो आहे. म्हणून आता कोणीतरी तिची गाठ कान्हो वनमाळीशी घालून दिलीच पाहिजे!सुमनांची शेज पण तिला आगीसारखी पोळते आहे. कोणी तरी ती आग लागलीच विझवा ना! "तुम्ही सख्या माझे समाधान व्हावे म्हणून सुस्वरात गायन करता आहात. पण त्यात कोकिळेचा पंचम आलाप मात्र चुकूनसुद्धा मिळवू नका. त्याने मला कृष्णाविना अधिकच कष्ट होतील!" असे सख्यांना विनवणाऱ्या या विरहिणीस दर्पणी स्वतःचे रूपदेखील दिसत नाहीसे झाले आहे. तिला तेथे अंतरंगात भरून उरलेल्या सावळ्या घननीळ कृष्णाचीच छबी दिसत आहे!! तिची ही अशी अवस्था करणारा तो मोहन तिला लवकरच भेटो!!

"पैल तो गे काओ कोकताहे"

असा हा श्रीकृष्ण तिचा प्राणप्रिय सखा आहे. तो ***"सौभाग्यसुंदरु गुण लावण्यसागरु"*** आहे *(अ.क्र.२७२)*. तो गुणाचा दुकाळ पडलेल्या देशींचा निर्गुण आहे. त्याला ती भुलून गेली आहे *(अ.क्र.२७३)*. ***"अवचिता परिमळु। झुळकला अळुमाळु। मी म्हणे गोपाळु। आला गे माये।।"*** या शब्दांत त्याची वाट पाहत ती उत्कंठ मनाने ***"चांचरती चांचरती"*** उत्सुक होऊन बाहेर पडते. पण तो काही दिसत नाही कोठे आणि ती फसते! ***"तो सांवळा सुंदरु। कासें पितांबरु। लावण्य मनोहरु।"*** तिला भेटायलाच हवा आहे! त्याने तिचे प्राणच शोषून घेतले आहेत. त्याने तिची ***"कायामनेंवाचा वेधियली"*** आहेत *(अ.क्र.२७५)*.

तो यावा अशी आस ती मनीमानसी वाहत आहे. त्यासाठी ***"काऊ"***ला पण ती साकडे घालते. ती म्हणतेः

पैल तो गे काओ कोकताहे। सकुन गे माये सांगताहे।।१।।
उड उड रे काऊ। तुझे सोन्याने मढवीन पाऊ।
पाहुणे पंढरीराओ। घरां कैं येती।।२।।
दहिभाताची उंडी। लावीन तुझें तोंडीं।
जीवा पढिये त्याची गोडी। सांग वेगीं।।३।।
दुधें भरुनि वाटी। लावीन तुझें वोंठीं।
सत्य सांगें गोठी। विठो येईल काईं।।४।।
आंबया डहाळी चुंबी। फळें रसाळीं।
आजचि रे काळीं। सकून सांगें।।५।।
ज्ञानदेव म्हणे। जाणिजे ये खुणें।
भेटति पंढरीराणें। सकून सांगें।।६।।अ.क्र.२७६।।

ती कृष्णवेडी विरहिणी या शब्दांत ***काऊ*** ला शकुन सांगायला विनवत आहे. विरहिणीस पंढरीनाथ केव्हा भेटतील असे झाले आहे.

त्यासाठी काऊला ती त्याचे पाय सोन्याने मढवण्याचे, त्याच्या तोंडी दहिभाताची उंडी लावण्याचे, त्याच्या ओठी वाटी भरून दूध लावण्याचे, आंब्याच्या डहाळीवरील रसाळ गोड आम्रफळे चाखवण्याचे अशी वेगवेगळी प्रलोभने निरागसपणे दाखवत आहे. काहीही करून काऊने कावकाव करून उडावे व पंढरीनाथ येण्याचा शकुन सांगावा असे तिला वाटते!!

खरे तर सोन्याची आभूषणे फक्त देवाच्याच पायी घालतात. दहिभाताची मूद पण पांडुरंगाच्याच मुखी लावतात. ती त्या बाळकृष्णास अति प्रिय आहे. दुधाची वाटी विठ्ठलाच्याच ओठांस लावायचा संकेत आहे. आणि रसाळ मधुर असे आम्रफळ तर भगवंतासच अर्पण करावयाचे असते. हे सर्व उपचार त्या काऊस करू पाहणारे ज्ञानदेव धन्य होत! त्यांना तो काऊ पंढरीनाथ येणार असा शकुन देणार आहे. त्यासाठी त्याला प्रत्यक्ष पंढरीनाथासारखेच समजणारे समदृष्टीचे ज्ञानदेवांसारखे भक्त विरळाच होत!! काऊतही अशा रीतीने पंढरीराय पाहणारी ही विरहव्याकूळ गौळण ही काही सामान्य नव्हे!!

"सत्य जालें माझें। स्वप्न गे मायें"

श्रीकृष्णभेटीच्या शकुनांसाठी आतुरलेल्या वेड्या गोपीस मग ध्यानी-मनी-स्वप्नी त्याचाच एक छंद जडतो.

...रात्रीचें ठायीं देख।
<u>मेघ:श्याम बोलला अंबरीं ये माये</u>।।५।।
ऐसियें निवांत मूर्ति। ऐकोनि ठेली श्रुति।
आकर्षोनि चित्त चैतन्य। भरूनि ठेलें लोचन।
ध्यानीं विसर्जिलें मन। परमात्मया रामा तूं एक लाघवी।
सावेव पावलें ज्ञान। बाप रखुमादेविवरा विठ्ठला।
सुमन संयोगीं आजि सत्य जालें।
माझें स्वप्न गे माये।।६।।अ.क्र.२७७।।

हा तिचा असा मेघश्याम शेवटी तिला भेटतो. शकुन खरे होतात. <u>चिदाकाशात तो परमेश अवतरतो. त्याचा अनाहतनाद ऐकून आणि ती नितांतसुंदर मूर्ती पाहून श्रुती उगी राहते. चित्ताचे आकर्षण होते व ते चैतन्याने भरून जाते</u>. लोचन त्याच्या रूपात गुंतून राहतात. ज्ञानास जणू अवयव फुटतात व ही मूर्ती प्रकटते. त्या भावविभोर गौळणीचे मन त्या सावळ्या घननीळा लडिवाळाच्या ध्यानात विसर्जन पावते. असा तो राम - तो परमात्मा - अति लाघवी आहे. त्या रखुमादेविवराच्या संयोगाने तिचे मन सुमन होते आणि स्वप्न सत्य होते!!

"त्रिभुवनींचे असे ते सुख" नयनी पाहतांना गोपीला दिवस-रात्र कितीही वेळ ते पाहिले तरी समाधान होत नाही *(अ.क्र.२८०)*. त्या श्रीकृष्णाबरोबर सुवास, आमोद, प्रमोद, गायनवादन, भोजन इ.अष्टभोग भोगतांना गोपीला कोणतीच लज्जा वाटत नाही. तो तिच्या जीवींचा जिव्हाळा रखुमाईचा पती काही केल्या तिच्यापासून वेगळा होत नाही *(अ.क्र.२८३)*! ***तो सगुण आहे असे समजून गोपी त्याला मिठी मारते, तो ती त्याच्यासारखीच होऊन जाते; तो विठ्ठल आपले अंग चोरतो आणि तिचे चित्त चोरून नेतो*** *(अ.क्र.२८५)*!

घनश्यामाचे स्वरूपदर्शन

"पंढरपुरींचा निळा", "लावण्याचा पुतळा (अ.क्र.२८८)" ती गोपी नयनी निरखते. तो तिला ***"मज बोलों न ये ऐसें"*** करतो. **<u>तिचे मन तुर्येच्या अनाहतनादगर्जनेने भरून जाते आणि उन्मनीत विसावते</u> *(अ.क्र.२९१)*. <u>तेथे तिला सतत तो काळा कृष्ण दिसतो</u>** *(अ.क्र.२९३)*. त्याचा तिला चाळा लागतो. तिची ती अवस्था ऐका:

श्यामाचियां घरां वासना पैं नेति।
मनें मन गुंति तयें रूपीं।।१।।
बिंबाचें स्वरूप छाया पैं घनदाट।
दिननिशीं अवीट शामतेज।।२।।
तें रूप देखिलें कोण्या भाग्ययोगें।
निवृत्तिप्रसंगें आम्हां घरीं।।३।।
दिठिवेचेनि वोपें सानुलें स्वरूप।
मुरालीं वालिप कल्पनेचि।।४।।..।।अ.क्र.२९४।।

त्या शामसुंदरातच तिच्या वासना विरघळून जातात. मन त्याच्याच रूपात जडून जाते. त्याच्या छबीची छाया घनदाट सर्वत्र पसरते. दिवस अन् रात्र ते सावळे तेज तिचे चित्त मोहून घेते. अति भाग्याने हे दिठीत मावणारे सानुले स्वरूप घरच्याघरी निवृत्तिंच्यामुळे ज्ञानदेवांस पाहण्यास मिळाले आहे. त्याच्याठायी सर्व कल्पना लयास जातात. केवळ त्या शामतेजाची दीप्तीच आसमंत भरून टाकते!

त्या निर्गुणाने गोपीचेही मन वेधून टाकले आहे. ती आता परत फिरू शकत नाही. तन-मन-धारणा-ध्यान सगळी काही ती त्या गोपाळाठायी अर्पून चुकली आहे *(अ.क्र.२९५)*. **त्याने अवचित गोपीस आलिंगन दिले आणि तिचे तो काहीच चालू देत नाही *(अ.क्र.२९८)*. सगुण बुडवून तोच आता निर्गुण झाला आहे *(अ.क्र.२९७)*.**

"मैं तो मेरे नारायणकी आपही हो गई दासी रे। लोग कहे मीरा भई बावरी न्यात कहे कुलनासी रे।।" अशी मीराबाईसारखीच या गोपीची अवस्था झाली आहे. ती त्या अद्वैताशी अलौकिक अशा विवाहबंधनाने बांधली गेली आहे व म्हणते: ***"अद्वैत अंबुला परिणिला देखा।।अ.क्र.३०२।।"*** त्याच्यासाठी तिने घरदार सोडले आहे. कुळाचार सांडून लोकलज्जाही त्यागली आहे *(अ.क्र.३०३)*. त्याच्याशी ती नित्य एकांत करते *(अ.क्र.३१४)*. त्याच्या निळाईत ती बुडून जाते. त्या सावळ्या निळ्या रंगात प्रेमरसाचे कल्लोळ खात गोपी बेधुंद होते *(अ.क्र.३२४)*. ***ती सावळी कृष्णमूर्ती सदैव तिच्या <u>हृदयी</u> वसती होते*** *(अ.क्र.३२५)*.*(या अभंगांचा अर्थ नीट समजण्यासाठी हृदयावरील टीपा पाहाव्यात.)*

"कृष्ण निळियें पदीं ठांव जाला"

त्या गोपीस येणाऱ्या अनुभूती वर्णित ज्ञानदेव म्हणतात:

निळियें रजनीं वाहें। मोतियां सारणी।
निळेंपण खाणी। सांपडली।।१।।

अंगणीं चिंतामणी। जलधरु सिंपणी।
अमृत साजणी। जीवनकळा।।२।।
सुमनाचें सेजें। विरहिणी विराजें।
शयनीं सुलजे। आरळ सेज।।३।।
माजयानें हटीं। मुखकमळ टेंकी।
निळियें अवलोकीं। कृष्णमूर्ति।।४।।
कमळिणी आमोद। सुस्वाद मकरंद।
चंदनाचि अभेद। उटी आंगिं।।५।।
कर्पूरपरिमळें। दिव्य खाद्य फळें।
ठेवूनि सोज्ज्वळ। वाट पाहें।।६।।
मन तो निळिये। गोविंदाचियें सोसें।
विरहिणी पाहें। वाटुली ऐसें।।७।।
ज्ञानदेवीं निळियें। वाटुनि गोंविंदें।
कृष्ण निळियें पदीं ठांव जाला।।८।।
।।अ.क्र.३२९।।

हे वर्णन योगपर अभंगांतील अनुभूतींशी अत्यंत मिळतेजुळते आहे. त्या गोपीस कृष्णाचा क्षणाचाही विरह सहन होत नाही. कारण तिला त्या काळ्यानिळ्या रात्री मोत्यांची खाणच असे हे जे कृष्णरूप गवसले, तो आनंदाचा ठेवा ती निमिषमात्रही दूर करण्यास तयार नाही. तिच्या अंतःकरणरूपी अंगणात तो चिंतामणी मेघ होऊन अमृतरूपी जीवनकला शिंपतो आहे.

त्याच्याबरोबर सुमनांची शेज करून झोपल्याविना तिला करमत नाही. हट्टाने त्याला जवळ घ्यावे, त्या नीलकृष्णमूर्तीच्या ओठांवर आपले मुखकमल टेकवावे, आपल्या अंगावरील चंदनाची उटी त्याला आलिंगून त्याच्याही अंगावर चढवावी, आपल्या संगमोत्सुकतारूप कमळिणीच्या सुवासाचा अन मकरंदाच्या स्वादाचा मधु त्याला चाखवावा, त्याच्या ध्यानात मग्न व्हावे, कर्पूरपरिमळाने तनु वेष्टावी व त्याच्यासाठी दिव्य खाद्यफळे घेऊन त्याची वाट पाहावी यातच तिचे खरे सुख आहे.

त्या गोविंदाच्या ध्यासाने तिचे मनही निळे होऊन गेले आहे. तिच्यासारखाच त्या निळ्याचा ध्यास घेणाऱ्या ज्ञानदेवांनाही त्या निळ्या कृष्णाच्या पदी ठाव मिळाला आहे. ***"हिरयाचि खाणी"***, ***"दिव्यतेजमणि"*** असा तो श्रीहरी लाभून तेही हर्षित झाले आहेत *(अ.क्र.३२९)!*

"नवल देखिलें कृष्णरूप बिंब"

पंच ज्ञानेंद्रिये, अंतःकरणचतुष्ट्य, सप्तधातू, पंचप्राण या सर्वांच्याही पल्याड तो श्रीहरी आहे. तेथे योगी सत्रावीचे स्तन्य पिऊन धन्य होतात. आदि-मध्य-अंतविरहित अनंत असे ते स्थान आहे. द्वैताद्वैताच्या पलीकडे ते आहे *(अ.क्र.३३३ व ३३४)*. अशा त्या कृष्णाचा साक्षात्कार वर्णित ज्ञानदेव म्हणतातः

नवल देखिलें कृष्णरूप बिंब।
सांवळी स्वयंभ मूर्ति हरीची।।१।।
मन निवालें समाधान जालें।
कृष्णरूपें बोधलें मन माझें।।२।।
बाप रखुमादेविवरु सांवळा सर्व घटीं।
चित्त चैतन्या मिठी घालीत खेंवों।।३।।
।।अ.क्र.३३६।।

ज्योतच कृष्णरूप होते; तिच्यातच त्यांना श्रीहरीची सावळी स्वयंभू मूर्ती दिसू लागते. त्यांचे मन तिच्या दर्शनाने निवते; त्यांचे पूर्ण समाधान होते. मन कृष्णरूप होते. तो रखुमादेविवर त्यांना सर्व घटी दिसू लागतो. त्या सावळ्या चैतन्यास त्यांचे मन घट्ट मिठी घालते!!

"मूस ओतूनियां मेण सांडिलें"

आता त्यांच्या डोळ्यांना सार-असार काहीच दिसत नाही. त्या दिव्य तेजापुढे रविशशि-तारा लोपून जातात. **कुंडलिनीचे हे दिव्य तेज आहे *(अ.क्र.३४३)*.** ते सावळे देखणे चतुर्भुज रूपडे असे समोर प्रकट झाले आहे. सर्वत्र तेच संचले आहे *(अ.क्र.३४४)*, अशा शब्दांत ज्ञानेश आपली दिव्य अनुभूती साकारतात!!

उन्मनीची निशाणी प्रकट झाली आहे. तन्मयताभक्ती परिसीमेस पोहोचली आहे. म्हणून ते म्हणतातः ***"मन नाहीं तेथ पाहासिं रें तें कांहीं। सर्व हरिडोहीं बुडी दे कां।।अ.क्र.३६२।।"*** त्या ***<u>महाशून्याच्या हरिडोहात ते बुडून जातात</u>.*** ती अनुभूती सांगत ते म्हणतातः

निरखित निरखित गेलिये। पाहें तंव तन्मय जालियें।।१।।
उन्मनीं मन निवालें। .. सांवळे परब्रह्म अवतरलें।।२,३।।
बाप रखुमादेविवरें विठ्ठलें।
मूस ओतूनियां मेण सांडिलें।।४।।अ.क्र.३६५।।-

त्या ज्योतिरूप घननीळ हरीला निरखत निरखत राहत ज्ञानाई त्याच्याशी तन्मय होते. मन उन्मनीत विसावते. सर्वत्र तेच सावळे परब्रह्म संचते. तेच रूप डोळ्याच्या बाहुलीत येऊन बसते! देहाच्या या मुशीत त्या विठ्ठलाने परब्रह्मरस ओतताच त्यातील देहाहंतेचे - जीवभावाचे मेण सांडून गेले. देहच चिन्मय झाला! काहीच मोल न वेचता त्या ***"बापरखुमादेविवरे विठ्ठलें। विकत घेतलें।।अ.क्र.३७७।।"*** अशी झालेली आपली अवस्था ज्ञानदेव वर्णितात.

"सांवळें सानुलें। हृदयघटीं"

"चित्तींचे चैतन्य" च त्यांना विश्वात वेगवेगळे आकार घेऊन वावरतांना दिसते. त्या घनदाट रूपात ते एकच तत्त्व भरून राहिलेले आहे अशी त्यांच्या साक्षात्काराची परिसीमा आहे *(अ.क्र.३८७)*. मोठ्या नवससायासाने त्यांना ही पंढरीची विठ्ठलदेवता प्रसन्न झाली आहे. तिची सेवा करण्यात ते मनोभावे रंगून गेले आहेत *(अ.क्र.४०५)*.

<u>नामामृताने तो काळासही परता असा *काळा गोपाळ* त्यांना लाभला आहे</u>. *"<u>चैतन्याशेजारीं मन पैं मुरालें। सांवळें सानुलें हृदयघटीं</u>।। अ.क्र.४१३।।"* अशी रम्य अवस्था ते उपभोगत आहेत. तो सानुला बाळकृष्ण आता त्यांच्या हृदयी विराजतो आहे. त्यांचा देह केवळ आता त्या विठोबाचे दर्शन घेण्यापुरताच उरलेला आहे *(अ.क्र.४१७)*.

"परि तुझा मुद्रांकित"

त्यांच्या देहाची अवस्था आता कशी झालेली आहे, ते त्यांच्याच शब्दांतून ऐकाः

पाहें पां ध्वजाचें चिरगुट।
रायां जतन करितां कष्ट।
तैसा मी एक पतित।
परि तुझा मुद्रांकित।।१।।
मसीपत्र तें केवढें।
रावो चालवी आपुलियां पाडें।।२।।
बाप रखुमादेविवरदा।
सांभाळावें आपुलियां ब्रीदा।।३।।
।।अ.क्र.४२०।।

त्यांचा देह आता तो गोपाळच संभाळतो आहे. ***ध्वजाची पताका जशी सायासाने राजा जतन करतो, तसे देव भक्ताला संभाळतो.*** राजाने ज्याच्यावर मुद्रा उठवली, ते सर्व राजाच्या बळावर खरे होते, त्याच्या शब्दाच्याच तोडीचे होते. ईश्वर पण आपल्या भक्तांवर अशीच मुद्रा उठवून त्यांना धन्य करतो, आपल्याच तोडीचे करतो! खरी मुद्रा घ्यायची ती हीच!! परिमळाच्या ओढीने भ्रमर जसा फुलांकडे धाव घेतो, तशीच या गोविंदाची गोडी भक्तांना लागून ते धन्य होतात *(अ.क्र.४२२)!!* ***भक्तीचा हा परमोत्कर्षबिंदू आहे!!!***

समारोप

अशा प्रकारे आपण या ग्रंथातील योग व भक्तीबाबतचे महत्त्वाचे सर्व विषय जवळजवळ हाताळून पूर्ण करत आणले आहेत. या ***योगभक्तिसार***नामक **त्रयोदश स्कंध**ातील पुढील ***उन्मेष क्र.५५-१ - योगसारसर्वस्व • क्रमयोगारंभ*** याकडे आता आपण वळणार आहोत ते गीतेतील ज्ञानेश्वरीच्या अनुरोधाने आपण घेत असलेल्या या सगळ्या योगविषयाचा अवशिष्ट विचार पाहण्यासाठी व समन्वयन करण्यासाठीच! आणि तद्द्वारे ज्ञानेश्वरीतील अजूनही अवशिष्ट राहिलेल्या ***क्रमयोग*** या एका योगसमन्वयाच्या महत्त्वाच्या अशा समजल्या जाणाऱ्या गीतेतील योगमार्गप्रदर्शक साद्यंत योगविचाराचाही आपण परामर्ष घेणार आहोत. तर वळू या तिकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५५-१::
::योगसारसर्वस्व • क्रमयोगारंभ ::

उन्मेष ५५-१:

गीता:
४:२४-३०
१८:१,४५-५८

ज्ञानेश्वरी:
६:१५९,१९९,२००,२०८,२१०,२१४, २१५,२२१,२२३, २२५, २२७, २२८, २४०-२४३,२४६,२४७, २५९, २६८, २७२, २७४, २७६,२७८-२८१, २८८, २९०, २९१, २९८-३००, ३०२-३०६, ३१०, ३१३, ३१५,३२०-३२२
१२:५,७
१८:३०-४३,५०,७६-८६,८८५-१२७७

सौंदर्यलहरी:१०३ श्लोक-९,१०,
योगतारावलि:२-२९
मुक्ताई:अभंग:७,८,११,३२
ज्ञानेश:१०२०

एक.भागवत:
१२:३००-३५२
१४:३९८-५४२
१५:१३०-१३६
२०:२५०-२६८

::उन्मेष ५५-१::
::योगसारसर्वस्व • क्रमयोगारंभ ::

पूर्वपीठिका::::

परमभक्तीचा अनुशेष

ज्ञानदेवांच्या अभंगांतून परमभक्तीवर पडलेला प्रकाश आपण मागील ***उन्मेष क्र. ५४-२ - भक्तिदर्शन*** यातून साद्यंत निरखून पाहिला. भक्ताच्या मनोज्ञ अवस्थांचे आणि त्याच्या रम्य अनुभूतींचे विहंगम दर्शन आपण त्यांद्वारे घेतले. ***नारदभक्तिसूत्रे, शांडिल्यभक्तिसूत्रे, संतांचे हरिपाठादी अभंग, ज्ञानेशांचा हरिपाठ आणि इतर अभंग*** यांतून साकारलेले योगभक्तिविश्व हृदयंगम आहे. ज्ञानेश्वरीच्या ओव्यांतून आणि अमृतानुभवातून आपण ते काही प्रमाणात अनुभवलेच आहे. या परमभक्तिविचाराचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी पुनश्च आपण ज्ञानदेवीकडे आणि प्रमुखतः तिच्या अठराव्या अध्यायाकडे वळू या!

पूर्वानुसंधान व अठरावा अध्याय

ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय १८१० ओव्यांनी सुबद्ध झाला आहे. त्यातील जवळजवळ ११०० ओव्यांचा रसास्वाद आपण विषयोपात्त घेतलेला आहे. आता साधारणपणे ७०० ओव्या आपणास अनुभवायच्या आहेत. आतापावेतो लक्षिलेल्या अदमासे ८३०० ओव्यांचा सारांश या ७०० ओव्यांतून येतो. ज्ञानेश अठराव्या अध्यायाचे महत्त्व असे असल्याने म्हणतात:

जी गीतारत्नप्रासादाचा। कलसु अर्थचिंतामणिचां।
सर्व गीतादर्शनाचा। पाढाऊ जो।।१८-३०।।
लोकीं तऱ्हीं आथि आईसें। जें दुरूनि कलसु दिसें।
आणि भेटीचें हातवसें। देवतेचि तिएं।।३१।।
तैसेचि एथही आहे। जें एकेंचि एणें अध्यायें।
आघवाचि दृष्ट होएं। गीतागमु हा।।३२।।
मी कलसु याचि कारणें। अठरावा अध्यावो म्हणें।
उवाईला बादरायणें। गीताप्रासादा।।३३।।
नोहें कलसापरतें काईं। प्रासादीं काम नाहीं।
तैं सांघतसें गीता ही। संपलेपणें।।३४।।
व्यासु साहाजें सूत्रीं बली। तेणें निगमरत्नाचलीं।
उपनिषदार्थाचि माली। माजिं खांडिलीं।।३५।।

गीतामंदिराचे रूपक

"गीतारत्नरूपी मंदिरावर हा अठरावा अध्याय कळस म्हणून शोभतो आहे. तो गीतार्थरूपी चिंतामणी रत्नांनी घडवला आहे. गीतेचे दर्शन करवून देणारा हा वाटाड्या आहे. कळसाचे दुरून जरी दर्शन झाले आहे की लोक मंदिरातील देवतेचीच भेट झाली असे नाही का समजत! या अध्यायरूपी कळसाचेही तसेच आहे! त्याचे दर्शन झाले की संपूर्ण गीतावेद स्पष्ट होतो. म्हणून मी याला ***कलशाध्याय*** असे म्हणत गौरवत आहे. व्यासांनी गीताप्रासादावर या अध्यायाचा कळस चढवला आहे. कळस चढवला की देवळाचे काम पूर्ण होते. हा अध्याय संपन्न करून व्यासही हेच सूचित करत आहेत की गीतामंदिराचे काम संपूर्ण झाले आहे. आता अजून काही करावयाचे उरलेले नाही."

तेथ त्रिवर्गाचा अणुआरु। आडऊ निगाला जो अपारु।
तो महाभारतप्राकारु। भोंवता केला।।१८-३६।।
माजिं आत्मज्ञानाचें एकवट। दलवाडें झाडूनि चोखट।
घडिलें पार्थ-वैकुंठ-। संवाद कुसरीं।।३७।।

"व्यास हे उत्तम जातिवंत त्वष्टे होते. त्यांनी वेदरत्नरूपी पर्वतावरील उपनिषदरूपी पठारास खणती लावली. त्यातून धर्म-अर्थ-कामरूपी पुरुषार्थांचा बहुतसा चाराचुरा निघाला. तो रत्नखचित चुरा वापरून त्यांनी या गीतामंदिराभोवतालचा महाभारतरूपी कोट सिद्ध केला. त्या खणतीतून आत्मज्ञानरूपी अखंड अभंग चिरे शेवटी त्यांच्या हाती लागले. ते नीट साफसूफ करून त्यातून श्रीकृष्णार्जुनसंवादाच्या कौशल्याने त्यांनी या गीतामंदिराची उभारणी केली आहे."

निवृत्तिसूत्रसोडणिया। सर्व शास्त्रार्थ पुरवणिया।
आवो सांधिला मांडणीया। मोक्षरेखेचा।।१८-३८।।
आईसेनि करितां उभारा। पंधरा अध्यायात पंधरा।
भूमी निर्वाललियां पुरा। प्रासादु जाहाला।।३९।।
उपरि सोलावा अध्यावो। तो ग्रीवघंटेचा आवो।
सप्तदशु तोचि ठावो। पडघाणिये।।४०।।
तेयाहिवेरी अष्टादशु। तो आपैसा मांडिला कलसु।
उपरी गीतादिकीं व्यासु। ध्वजें लागला।।४१।।

"निवृत्तिरूपी सूत्राचा ओळंबा हाती घेऊन तो व्यासांनी शास्त्ररूपी आधारावर टेकवून यातील बांधकामाची मोक्षरूपी रेषा धरीत हे चिरे एकावर एक बांधण्याचे काम केले आहे. अशी उभारणी करत त्यांनी पंधरा अध्यायांच्या रूपाने या मंदिराचे पंधरा प्रस्तर बांधून काढले आणि त्यावर सोळाव्या अध्यायाच्या आकाराची ग्रीवघांट उभारली. सतरावा अध्याय कळसाची बैठक म्हणून रचला आणि त्यावर सहजच या अठराव्या अध्यायरूपी कळसाचे काम पूर्ण केले. त्या कळसावर गीताकार असे श्रीव्यास स्वतःच ध्वजरूपे विराजमान झाले आहेत!"

म्हणौनि माघील जैं अध्याय। तैं चढतें भूमीचें आय।
तेयांचें पुरें दाविताहें। आपुलां आंगिं।।१८-४२।।
जालेयां कामा नाहीं चोरी। तैं कलसें होएं उजरीं।
तेंविं अष्टादशु विवरी। साद्यंत गीता।।४३।।

"असा हा कळसरूपी अठरावा अध्याय मागील सतरा अध्यायांवर आधारलेला आहे. म्हणून तो चढत्या श्रेणीने पूर्वीच्या अध्यायांचीवैशिष्ट्ये आपल्याही अंगी बाणवून आहे, यात काय नवल! मंदिर उभारले,

पण कळस काही चढवला नाही असे काही येथे नाही. उलट हा अठरावा अध्याय गीतेचे सांगोपांग दर्शन घडवून आणत गीतामंदिराचे काम व्यासमहर्षींनी साद्यंत संपूर्ण केल्याचे जगजाहीर करत नाही का!"

अठराही अध्यायांचे तात्पर्य एकच

म्हणूनच ज्ञानदेव म्हणतात की हे ***गीतारूपी वैष्णवमंदिर आहे व अठरावा अध्याय त्याचा कळस आहे.*** सतरा अध्यायातून हा अध्याय कसा निर्माण झाला, तो पूर्वापर संबंध स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतात:

आतां सप्तदशापाठीं। अध्याय कैसेनि उठी।
तो संबंधु सांघों दिठीं। दिसें तैसा।।१८-५०।।
न मोडितां दोनीं आकार। घडिलें एक शरीर।
हें अर्धनारीनटेश्वर-। रूपीं दिसें।।५१।।
कां गंगायमुना उदक। वोघबगें वेगलिक।
दाविं होओनि एक। पाणीपणें।।५२।।
नाना वाढिलीं दिवसें। कला बिंबीं पैसें।
परि सिनानें लेवें जैसें। चंद्रीं नाहीं।।५३।।
तैसिं सिनानिं चारीं पदे। श्लोक श्लोकावच्छेदें।
अध्यावो अध्यायभेदें। गमें कीर।।५४।।

"सतरा अध्यायांवर हा अठरावा अध्याय कसा वठतो, ते स्पष्टच दिसेल असे सांगतो. ऐका! अर्धनारीनटेश्वराठायी जसे दोन आकार एकाच शरीराठायी एकवटतात; किंवा गंगा व यमुना यांच्या प्रवाहात भिन्नत्वाने दिसणारे पाणी जसे एकच एक असते; अथवा दिवसागणिक वाढणाऱ्या वेगवेगळ्या कला पौर्णिमेला जशा एकाच चंद्रबिंबात सामावून गेलेल्या असतात; त्याचप्रमाणे पदभेदाने चतुर्धा दिसणारा श्लोक आणि श्लोकभेदाने वेगळे दिसणारे सातशे श्लोक, तसेच अध्यायभेदाने वेगवेगळे दिसणारे अठरा अध्याय या सर्वांत ***एकच एक गीतातत्त्व*** भरून राहिलेले आहे."

परि प्रमेयाचिं उजरी। आनान रूप न धरी।
नाना रत्नें मणीं दोरी। एकचि जैसिं।।१८-५५।।
मोतिएं मिलौनि बहुवें। एकावलीचां पाडु आहे।
परि शोभें रूप होएं। एकचि तेथ।।५६।।
फुलां फलसरां लेख चढें। द्रुतिंमाजिं अंगुलीं न पडें।
श्लोक अध्याय तेणें पाडें। जाणावें हें।।५७।।

"देओ बोलिलें एक। जैं दुजें नाहीं"

"गीता या सर्वांद्वारे एकच एक प्रमेय मांडते. नाना रत्ने-मणि-भूषणे एकत्र गुंफावीत, तर ती एकाच सूत्राने; किंवा अनेक मोत्यांचा सर करावा, तो काही जसा मोत्यागणिक वेगळा नसून एकावळीचाच एक सर असतो; फुले गुंफून माळ करावी, माळेचे अनेक सर असावेत, पण त्यातून फुलागणिक दरवळणारा परिमळ जसा वेगवेगळा मोजावा लागत नाही, तसेच या गीता अध्यायांचे व त्यातील श्लोकांचेआहे, असे जाणा!"

सात शतें श्लोक। अध्यायां अठरांचे लेख।
परि देओ बोलिलें एक। जैं दुजें नाहीं।।१८-५८।।
आणि मियांहि तैं न संडूनि सोएं। ग्रंथां व्यक्ती केली आहे।
प्रस्तुत तेणें निर्वाहें। निरुपण आईका।।५९।।

"सातशे श्लोकांतून व अठरा अध्यायलेखांतून भगवंतांनी एकच एक गोष्ट, एकच रहस्य, एकच सिद्धांत प्रकट केला आहे. त्याविना ते दुसरे काहीच बोलत नाहीत. आणि मी पण हेच लक्षात ठेवून त्याच अनुरोधाने ही ग्रंथरचना केली आहे! मनात आपणही हेच विचार ठेवून माझे पुढील निरूपण ऐका!"

गीता एकाच एका तत्त्वाचे प्रतिपादन करते; त्यातील गुह्य वा योगमार्ग एकच आहे, अनेकविध नाही, याचे सूचन करणारे ज्ञानेश गीताध्यायपरत्वे वेगळे विवेचन वा सिद्धांत असल्याचे स्पष्टच अमान्य करतात. गीतेत प्रसंगोपात्त आलेले याबाबतचे वेगवेगळे वाटणारे विवेचन मूळ सिद्धांताची व योगाची उपांगे असल्याचे त्याने स्पष्ट व्हावे. शरीराची अंगोपांगे मिळून जसा एकच देह सिद्ध होतो, तसेच हेही आहे. ज्ञानदेवांनीही गीतेचा हाच भाव वा रहस्य मनी आणून ज्ञानेश्वरीद्वारे ते प्रकट केले असल्याचे मागील *ओवी क्र.१८-५८ व ५९* यांतून ते सांगत आहेत.

एकाध्यायी गीता - अठरावा अध्याय

अध्यायातून अध्याय प्रकट होत ते निरूपण ज्ञानदेवांद्वारे संपन्न होत आहे. श्रीकृष्णांचे सांगणे ऐकणारा अर्जुन भारावून गेलेला आहे. आता सतराही अध्याय ऐकून कृतकृत्य झालेला अर्जुन तरीही मनात का बरे खिन्न होत आहे, ते ज्ञानदेवांच्या मुखे श्रवण करा:

तऱ्हैं पांडुकुमार तेणें। देवाचें सरतें बोलणें।
जाणौनि अंतष्करणें। काणी घाली।।१८-७६।।
एरविं तत्त्वविषयीं भला। तो निश्चितु कीर असे जाहाला।
परि देओ राहे उगाला। तें साहवेना।।७७।।
वत्स धालयाहीं परि। धेनु न वचावी दूरी।
अनन्य प्रीतीची परी। आईसिचि आहे।।७८।।
तेणें काजेंवीणही बोलावें। तैं देखिलें तऱ्हैं पाहावें।
भोगितां चाड दुणावें। पढियंतयाठाईं।।७९।।

"गीतेत निरूपण केलेला तो महासिद्धांत श्रवण करून तो खरा तर कृतार्थ झाला होता. पण गीता सांगणे आता संपते आहे, हे काही त्याच्या मनाला रुचत नव्हते. श्रीकृष्णांचे ते उगे राहणे त्याला काही आवडेना! गायीचे पुरेसे स्तनपान केलेले वासरू जसे तरीही गायीपासून दूर होऊ पाहत नाही, तशीच त्याच्या श्रीकृष्णांप्रतिच्या अनन्यप्रेमाची तऱ्हा होती. म्हणून कारणाशिवायही त्याने आपल्याशी बोलावे, त्याला पुन:पुन: डोळे भरून पाहावे, एकदा आवडलेला हा विषय त्यानिमित्त दुप्पट जोमाने पुन: ऐकायला मिळावा याची अर्जुनाच्या मनी मोठी आस लागली."

पुढील निरूपणासाठी भगवंताला तो कसा उद्युक्त करू पाहत आहे, पहा:

आईसि प्रेमाचि हें जाती। पार्थ तंव तेचि मूर्त्ति।
म्हणौनि करूं लागे खंती। उगेपणाचि।।१८-८०।।
आणि संवादाचेनि मिषें। जैं अव्यवहारी वस्तू असे।
तैंचि भोगिजें कां जैसें। आरिसा रूपु।।८१।।
मग संवादु तोही पारुखे। तन्हैं भोगणें भोगितां थोकें।
हें कां साहवेल सुखें। लांचावलेयां।।८२।।
ययालागिं त्याग संन्यास। पुसावयाचें घेऊनि मिस।
उपरतविलेंचि दुस। गीतेचें तैं।।८३।।

"प्रेमाची परी अशीच नसते का! अर्जुन तर श्रीकृष्णावरील प्रेमाची प्रत्यक्ष मूर्तीच झाला आहे. म्हणून श्रीकृष्णाचे उगे राहणे त्याला साहवेना. बरे त्यांचा संवाद ज्या त्या अनिर्देश्य स्वसंवेद्य अशा वस्तुविषयी चालला होता, ती त्या संवादातच आरशात लौकिक वस्तू पाहावी तशी स्पष्ट दिसत होती. मग तो संवाद थांबवून ती दिसेनाशी होईल, ही भीती त्याला अस्वस्थ करू लागली। ब्रह्मसुखास चटावलेल्या अर्जुनास ते दुरावेल ही आशंका येऊ लागली. काहीही करून श्रीकृष्णांचे बोल पुनः कानी पडावेत व ते सुख असेच मिळत राहावे म्हणून ***त्याग आणि संन्यास यातील भेद काय आहे,*** असा प्रश्न उगीचच विचारून त्याने श्रीकृष्णाला हे गीतारूपी अमोल देखणे सुंदर भरजरी वस्त्र पुनः उलगडायला लावले. खरे तर ते सर्व अगोदरच सांगून झाले होते!"

हा अठरावा अध्यावो नोहें। हें एकाध्यायी गीताचि आहे।
जैं वांसरुचि गाय दुहें। तैं वेलु काईसा।।१८-८४।।
तैसिं संपतां अवसरीं। गीता आदरविलीं माघारीं।
स्वामीभृत्याचां न करी। संवादु काईं।।८५।।
परि हें असों आईसें। अर्जुनें पुसिजत असें।
म्हणें विनंति विश्वेशें। अवधारिजो।।८६।।

"म्हणून हा पुढील संवाद अठरावा गीताध्याय आहे असे म्हणू नये. कारण ती एकाध्यायी गीताच आता आपण ऐकणार आहोत. वत्सास गाईस लुंचण्यास कधी अवेळ असते का! श्रीकृष्णार्जुनांचे स्वामीभृत्य नाते तसेच असल्याने अवसर न पाहताच पूर्ण झालेली गीता पुनः सांगण्यास भगवंत उद्युक्त झाले. प्रेमळाच्या सांगण्याप्रमाणे हवे ते हवे तेव्हा केले जाते. असो. आता अर्जुन काय विचारतो, ते ऐका."

क्रमयोगारंभ::::

क्रमयोगाचा श्रीगणेशा

इतउपरांत अर्जुनाचा ***"सन्यासस्य महाबाहो... ।।१८-१।।"*** हा प्रश्न येतो. त्याचे व त्यावरील श्रीकृष्णोक्त सविस्तर उत्तर यांचे मनसोक्त परिशीलन आपण पूर्वीच केले होते *(उन्मेष:३०:संन्यास, त्याग व कर्म,पृ.क्र.४५४ ते ४६१).* ते जिज्ञासूंस स्मरतच असेल. ***शांकरभाष्य व संन्यास*** यांचा सखोल विचार आपण ज्ञानेशांच्या आधारे तेव्हा केला होता. वर्णाश्रमविहित कर्मे कोणती त्याचाही विचार तेव्हा झाला होता *(उन्मेष:३३:स्वधर्मकर्तव्य पृ.क्र.५०७ ते ५१६).* त्या कर्मांद्वारेच मोक्ष कसा प्राप्त होतो, याचे विवेचन आता पहावयाचे आहे.

कर्मापासून सुरू होणारा व अंती ***ज्ञान-भक्ती-योग*** या त्रयीद्वारे मोक्षात परिणत होणारा ***<u>पंथराज</u>*** च आपण पुनः त्यानिमित्त पाहणार आहोत. या ठिकाणी ज्ञानेश या राजमार्गास **<u>क्रमयोग</u>** अशी संज्ञा देतात. त्याचप्रमाणे ***"एकं साङ्ख्यं च योगं च"*** या गीतोक्तीचीही पूर्णता करून ते हा ***क्रमयोग*** सिद्ध करतात; तसेच ***कर्म, योग, ज्ञान व भक्ती*** यांना त्याची उपांगे म्हणून सिद्ध करत त्यांचे पृथकत्व नष्ट करतात. अर्थातच गीतेत एकच एक योगतत्त्व गव्हरिले असल्याचे त्यांची धारणा या क्रमयोगविषयक सविस्तर विवेचनावरून आपणास दिसून येणार आहे.

अध्याय क्र. १८ मधील *ओवी क्र.८८५ ते १२७५* या अंदाजे ४०० ओव्या त्यांनी या क्रमयोगसिद्धीस वेचल्या आहेत. त्यावरून त्यांना हा विषय किती जिव्हाळ्याचा आणि साधकांच्या किती कल्याणाचा वाटतो, ते कळून येते. आपणसुद्धा ज्ञानदेवांचे हेच सूत्र धरून आतापावेतो गीता-ज्ञानेश्वरीचे अध्ययन चालवले असल्याचे चतुर जिज्ञासूंनी ओळखले असेलच!! चला तर पुनः सिद्ध होऊ या त्या महाशून्याच्या अथांग डोहात बुडी द्यायला!

योगारंभ

वंदू या श्रीकृष्णचरण; लावू या भाळी ज्ञानेशांची समाधिधूली; घेऊ या संतसज्जनांचे आशिष! अन जाऊ या त्या सञ्जीवनसमाधीच्या मार्गाने - जी कर्माच्या धारेतून प्रकटते!! या मार्गाचे - क्रमयोगाचे निरूपण श्रीकृष्णांच्या कर्म व मोक्ष यांची सांगड घालणाऱ्या सुवचनाने आरंभले जाते. साक्षात ***आरंभरंभा*** च अशी ***योगाची कुलदेवता*** - ती ***कुंडलिनी जगदंबा*** अशी ही श्रीकृष्णोक्ती ऐका:

स्वे स्वे कर्मण्यभिरत: <u>संसिद्धिं</u>@ लभते नर:।
<u>स्वकर्मनिरत:</u> <u>सिद्धिं</u>@ यथा <u>विन्दति</u> तच्छृणु।।१८-४५।।

"आपापले विहित कर्म करण्यात रत असणाऱ्या मनुष्यास परमसिद्धी वा मोक्ष प्राप्त होतो. स्वकर्मी रत असणारा तो कशा प्रकारे सिद्धीस पावतो, ते ऐक."

याप्रमाणे कर्मातून मोक्ष सिद्ध करून देण्यास भगवंत प्रवृत्त होत आहेत. हे सर्व आख्यान गीताभ्यासकांसाठी फार महत्त्वाचे आहे. आणि यावरचे खरे भाष्य करणारे एकमात्र ज्ञानी महापुरुष म्हणजे ज्ञानदेवच! त्यांचे हे भाष्य *गीताश्लोक क्र.१८-४५ ते ५८* यांद्वारे प्रकटलेल्या श्रीकृष्णविचारांचे प्रतीक अशा *१८-८८५ ते १२७७* या ओव्यांतून स्पष्ट होते.

अर्थातच ज्ञानेशांच्या या ओव्यांकडे वळण्यापूर्वी आपण या श्लोकांचे विहंगावलोकन करू या. तसेच त्यांबाबत श्रीमदाद्यशंकराचार्य काय म्हणतात, तेही पाहू या. म्हणजे हा विषय त्याच्या विविध कंगोऱ्यांसह आपणास अवलोकता येईल. तसेच *श्लोक क्र.१८-४५* मध्ये सांगितलेला ज्ञान हा मोक्षप्राप्तीचा एकमेव उपाय असल्याबाबतचे आचार्यमत आणि गीताशास्त्राच्या उपसंहारप्रसंगी आचार्यांनी कोणते

गीताशास्त्रसार काढले आहे,तेही आपणास परिचित होईल. अर्थातच या श्लोकांसंबंधी ज्ञानेश्वरीच्या ओव्या या आचार्यमतांशी जुळतात का तेही नंतर आपण अभ्यासू शकू!

कर्माने योगाचरणाचा प्रारंभ

गीतासमारोपाचा हा प्रसंग तसा निर्वाणीचा आहे व म्हणूनच विषयाचे नीट आकलन करून घेण्यासाठी आत्यंतिक महत्त्वाचा आहे, हे नीट लक्षात ठेवून पुढील विवेचनाकडे वळू या. त्यासाठी प्रथम संदर्भित गीताश्लोक पाहू या. ते असे आहेतः

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
***स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति*[१] *मानवः* ।।१८-४६।।**

"ज्याच्यापासून भूतमात्रांची उत्पत्ती होते व जो हे सर्व काही आहे, त्याची स्वकर्माद्वारे अर्चना केल्याने मानवास परमसिद्धी प्राप्त होते."

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
***स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति*[२] *किल्बिषम्*।।१८-४७।।**

"परक्याचा धर्म जरी सुखाने आचरता येत असला आणि त्यापेक्षा आपला स्वधर्म जरी गुणहीन असला, तरी तो स्वधर्मच श्रेष्ठ आहे, तोच श्रेयस्कर आहे. आपले स्वभावसिद्ध कर्म करत असता पापाचा स्पर्शही होत नाही."

***सहजं कर्म*[३] कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्।**
सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।।१८-४८।।

"हे कौंतेय! म्हणूनच आपले सहज कर्म जरी सदोष असले तरी त्याचा त्याग करू नये. तसे सर्वच कर्म अग्नी जसा धूमाने परिवेष्टिलेला असतो, तसे दोषयुक्तच नसते काय!"

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।
***नैष्कर्म्यसिद्धिं परमां*[४] *सन्न्यासेनाधिगच्छति*[५] ।।१८-४९।।**

"सर्वत्र आसक्तिरहित बुद्धी ठेवणाऱ्या, स्पृहारहित व जितेंद्रिय मनुष्यास संन्यस्तपणाच्या योगे परम अशी नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते."

***सिद्धिं प्राप्तो*[६] *यथा ब्रह्म तथाप्नोति*[७] निबोध मे।**
समासेनैव कौन्तेय *निष्ठा ज्ञानस्य या परा*[८] ।।१८-५०।।

"ज्ञानाची परम निष्ठा असे जे ब्रह्म आहे, ते तो कोणत्या क्रमाने प्राप्त करून ही सिद्धी मिळवतो, तेही तू माझ्याकडून संक्षेपतः जाणून घे. हे कौंतेय! ते ऐक."

योग-भक्ती-ज्ञान या त्रयीने योगसिद्धी

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च।।१८-५१।।
विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
***ध्यानयोगपरो*[९] नित्यं वैराग्यं समुपाश्रितः।।१८-५२।।**
अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो *ब्रह्मभूयाय कल्पते*[१०] ।।१८-५३।।

"शुद्ध बुद्धीने युक्त होऊन चित्ताचे धैर्यपूर्वक नियमन करून, इंद्रियांचा प्रत्याहार साधून, रागद्वेष नष्ट करून, एकांत सेवन करणारा, मिताहारी, काया-वाचा व मन यांचे नियमन केलेला, वैराग्याचा आश्रय केलेला; अहंकार, बल, दर्प, दंभ, काम, क्रोध व परिग्रह यांचा त्याग केलेला; ममत्वरहित व शांत अतःकरणाने युक्त असलेला नित्य ध्यानयोगपरायण मनुष्य ब्रह्मीभूत होण्याची योग्यता ठेवतो."

***ब्रह्मभूतः*[११] प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।**
समः सर्वेषु भूतेषु *मद्भक्तिं लभते*[१२] पराम्।।१८-५४।।

"ब्रह्मीभूत झाला की आत्म्याची प्रसन्नता पावून तो कशाचे दुःख करत नाही किंवा कशाचीही इच्छा बाळगत नाही. तो सर्व भूतांप्रति समत्वभाव ठेवतो. त्याला माझ्या परमभक्तीची प्राप्ती होते."

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां *तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्*[१३] ।।१८-५५।।

"भक्तिद्वारे तो मला तत्त्वतः जाणतो; मी कोण कसा आहे ते जाणून त्यास मत्स्वरूपाचे ज्ञान होते व त्याच वेळी तो माझ्यामध्ये प्रवेशून कल्याण पावतो.."

सर्व कर्माण्यपि सर्दा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः।
***मत्प्रसादादवाप्नोति*[१४] *शाश्वतं पदमव्ययम्* ।।१८-५६।।**

"माझाच नित्य आश्रय करून सर्व प्रकारची कर्मे करून त्याला माझा प्रसाद प्राप्त होतो व त्याद्वारे शाश्वत असे पद त्याला प्राप्त होते."

*(**टीप**- वरील श्लोकांतील अधोरेखित अनुक्रमांकासहितची पदे त्यांचा अर्थ करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत, हे जिज्ञासूंनी लक्षात घ्यावे.)*

आचार्यभाष्य

या श्लोकांतून गीताच एक प्रकारे ***कर्मयोग, ध्यानयोग, भक्ती व ज्ञानयोग*** यांची सांगड घालत मोक्षाचा मार्ग स्पष्ट करते. श्रीमच्छंकराचार्य या मार्गक्रमणेचे आपल्या भाष्यातून कसे प्रकाशन करतात, ते पाहू याः

आचार्यमते स्वकर्माचरणाद्वारे म्हणजे वर्णविहित कर्मांद्वारे अंतर्यामी असणाऱ्या ईश्वराची पूजा केल्याने मनुष्यास केवळ ज्ञाननिष्ठेची योग्यता ही सिद्धी प्राप्त होते. अर्थात हे आचरण ज्ञानोपासनेची पूर्वतयारी म्हणूनच ते समजतात *(श्लोक क्र.१८-४६)*.

अज्ञानी मनुष्य कर्मे केल्याशिवाय क्षणभरही राहू शकत नाही. म्हणून स्वभावनियत कर्मे करणे त्याच्यासाठी दोषास्पद ठरत नाही. ही कर्मे जन्मतःच प्राप्त होतात. त्यांचा त्याग करून अन्य कर्मांचा म्हणजे परधर्माचा स्वीकार म्हणूनच करू नये *(श्लोक क्र.१८-४७ व ४८)*.

ज्ञाननिष्ठेची योग्यता ज्यांना स्वकर्माचरणाद्वारे प्राप्त होते, त्यांना फलस्वरूप ज्ञाननिष्ठारूप नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते. अनासक्त, जितात्मा, विगतस्पृहा अशा लक्षणांनी तो या नैष्कर्म्यासाठी योग्य होतो. **निष्क्रिय ब्रह्मच आत्मा आहे, असे ज्ञान झाल्याने सर्व कर्मांची निवृत्ती होणे यास आचार्य *नैष्कर्म्यसिद्धी*[१] असे म्हणतात.**

***कर्मजनित सिद्धी* म्हणजे ज्ञाननिष्ठा आचरण्याची योग्यता₂ होय. त्या सिद्धीपेक्षा(२पेक्षा) ही सिद्धी(१) विलक्षण असून सद्योमुक्तीत स्थित असणे अशी असते. हीच सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ सिद्धी असून ती संन्यासाद्वारे प्राप्त होते.**

यथार्थज्ञान किंवा ज्ञानपूर्वक सर्वकर्मसंन्यासाद्वारे ती प्राप्त होते ज्यास आचार्य *संन्यास* म्हणतात. *"सर्वकर्माणिमनसा सन्न्यस्य नैव कुर्वन्नकारयन"* येथे कर्मसंन्यास म्हणजे मनाने कर्मे सोडणे असा अर्थ आचार्यांस अभिप्रेत आहे *(श्लोक क्र.१८-४९).*

कर्माचरणाद्वारे ***ज्ञाननिष्ठेची योग्यता*₁ व आत्मविषयक *विवेकज्ञान*₂** मनुष्यात उत्पन्न होते व तो ***आत्मज्ञाननिष्ठारूप नैष्कर्म्यसिद्धी*** पावतो. त्याचा क्रम कसा असतो, ते आचार्य सांगतात. ***"निष्ठा ज्ञानस्य या परा"*** याचा अर्थ आचार्य ***ब्रह्मज्ञानाची परमावधी*** असा करतात. ***निष्ठा म्हणजे मार्ग*** असा अर्थ ते येथे घेत नाहीत. ***ज्ञाननिष्ठा* म्हणजे *ज्ञानमार्ग* असा अर्थ येथे गैरलागू आहे.**

आचार्यमते ***ज्ञान* अत्यंत प्रत्यक्ष आहे. *ज्ञाता*ही तसाच आहे. म्हणून ज्ञानासाठी प्रयत्न आवश्यक वा उपयुक्त ठरत नाहीत.** केवळ अविद्येच्या निवृत्तीसाठी प्रयत्न उपयुक्त असतात. अर्थात ही आचार्यांची बौद्धिक झेप आपल्या सवयीची नसल्याने त्यांचा हा विचार समजणे कठीणच आहे. असो.

ध्यानयोग* म्हणजे आत्मस्वरूपचिंतन करणे व आत्म्यावर चित्ताची एकाग्रता साधणे होय. त्यात मंत्र, जप इ.चा अभाव असतो असे आचार्य म्हणतात. मनुष्य ध्यानयोग व वैराग्य यांनी युक्त झाला की परमहंस *परिव्राजक* असा *संन्यासी* होतो.** असा ज्ञाननिष्ठ यती ब्रह्मरूप होण्यास योग्य होतो. त्यास आत्मप्रसाद लाभतो. त्यास परमेश्वराची ***ज्ञानलक्षणा चतुर्थभक्ती प्राप्त होते. आत्मा कसा अद्वैत आहे, अजर आहे, अमर आहे, अभय आहे, निधनरहित आहे हे तो तत्त्वतः जाणून घेतो व तत्काळ त्यात प्रवेशतो.

आचार्यमत

समारोप करत आचार्य आपले मत मांडतात की **अंतरात्मविषयक प्रतीतीचे नित्यत्व म्हणजे ज्ञाननिष्ठा होय. ती कर्मांबरोबर असू शकत नाही. म्हणून सर्वकर्मसंन्यासपूर्वक ज्ञाननिष्ठाच अवलंबली पाहिजे.** त्यानेच अंती मोक्षरूप फल प्राप्त होते *(श्लोक क्र.१८-५०ते ५५).*

सर्वदा कर्मे करणारा व भगवंतात आश्रय ठेवणारा जो भक्त असतो, तोसुद्धा ईश्वराच्या अनुग्रहाने अविनाश पदास पावतो *(श्लोक क्र.१८-५६),* असा उपसंहारात्मक भाग त्यांच्या विवेचनात येतो. आचार्यांचे हे सर्व विवेचन कर्मास गौणत्व देते. कर्मयोगासच आचार्य ***भक्ती*** असे म्हणतांना दिसतात *(श्लोक क्र. १८-५६ गी.भा.).* ***ध्यानयोग वा योग वा ईश्वरप्रणिधानात्मक योग* ते कर्मयोगातील साधनांतर्गत मानतात.**

कर्मयोग, भक्तियोग व योग यांची अशी अज्ञानांच्या साधनात ते गणना करून ***ज्ञाननिष्ठा***च कशी एकमेव मोक्षाची कारक आहे ते प्रतिपादन करतात. ***परमहंस परिव्राजक असा सर्वकर्मसंन्यासी होणे ही त्यांच्या दृष्टीने ज्ञाननिष्ठेसाठी अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.*** त्यांच्या संन्यासविषयक कल्पनांचा पुरेसा मागोवा आपण पूर्वीच घेतला आहे *(उन्मेषः३०:संन्यास, त्याग व कर्म,पृ.क्र.४५४ ते ४६१).* म्हणून त्यांच्या ***कर्मयोग, योग व भक्ती*** यांविषयींच्या मुख्य कल्पनांचा हा परिचय झाल्यावर आपण त्वरित ज्ञानदेवीतील या विषयाकडे - **क्रमयोग**कडे वळणे क्रमप्राप्तच ठरते! कारण आपणास ज्ञानदेवांचीच वाणी प्रमाण आहे. त्यांनी उपरोक्त गीताश्लोकांवर कोणता प्रकाश टाकला आहे तो पाहू या!

स्वकर्मविचार::::

शास्त्राद्वारे स्वकर्मनिर्णय

ज्ञानदेव या श्लोकांचा विचार करतांना स्वकर्माचरणाविषयी असे म्हणतात की :

आतां इयेंचि विचक्षणा। वेगलालियां वर्णां।
उचित जैसें करणां। शब्दादिक।।१८-८८५।।
ना तऱ्है जलदच्युता। पाणिया उचितु सरिता।
सरितेसिं पांडुसुता। सिंधु उचितु।।८८६।।
तैसें वर्णाश्रमवशें। जें करणीय आलें असें।
गोरेयां आंगां जैसें। गोरेपण।।८८७।।

श्रीकृष्ण म्हणतात:"हे चतुरा! इंद्रियांद्वारे वर्णवशेकरून करावयाची जी उचित कर्मे सांगितली आहेत, ती शास्त्रमुखे पारखून घ्यावीत. मेघापासून ढळलेल्या जळास एकच उचित गती असते. ती म्हणजे सरिता! आणि हे पांडुसुता! सरितेसही उचित गती सिंधूच असते. गोरेपणास गोरे अंगच लागते. त्याप्रमाणे वर्णाश्रमविशेषेकरून जी विहित कर्मे आहेत, तीच स्वकर्मे म्हणून शब्द-स्पर्शादी इंद्रियविषय होत. इंद्रियांद्वारे मनुष्याने त्याच कर्मांत प्रवर्तावे."

तेयां *स्वभावविहितां कर्मां। शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा।*
प्रवर्तावियालागिं प्रमा। अढल कीजैं **।।१८-८८८।।**
पैं आपुलेंचि रत्न थितें। घेपें पारखियाचेनि हातें।
तैसें स्वकर्म आपैतें। शास्त्रें करावें।।८८९।।
जैसिं दिठी असे आपुलां ठाईं। परि दीपेंवीण भोगु नाहीं।
मार्गु न लाहातां काईं। पाय असतां होएं।।८९०।।
म्हणौनि ज्ञातिवशें साचारु। सहज असे जो अधिकारु।
तो आपुलालियां शास्त्रें गोचरु। आपण कीजैं।।८९१।।

"शास्त्राद्वारे ती कर्मे सुनिश्चित करून घेतली की दृढबुद्धीने तीच आचरावीत. आपलेच रत्न जसे त्याचे निश्चित मूल्यांकन करण्यासाठी रत्नपारख्याकडून पारखून घ्यावे, तशीच आपली निर्दिष्ट स्वकर्मेसुद्धा शास्त्राच्या कसोटीवर पारखून करावीत. रात्रीच्या वेळी वावरतांना दिव्यावाचून आपल्या दृष्टीचा उपयोग होत नाही. पाय असूनही मार्ग सापडला नाही, तर काय चालता येते! म्हणूनच आपला ज्ञातिविशेषेकरून जो कर्मे करण्याचा सहज अधिकार असतो, तो आपण शास्त्राधारे नीट पाहून घ्यावा."

स्वकर्माचरण व मोक्षमार्ग

मग घरींचाचि ठेंवा। जेविं डोलयां दावि दिवा।
तऱ्हैं घेतां काएं पांडवा। आडलु असे।।१८-८९२।।
तैसें *स्वभावें भागां आलें। वरी शास्त्रें खरे केलें।*
***तैं विहित जो आपुलें। आचरें गां* ।।८९३।।**
परि आलस सांडूनि। फलकाम दवडूनि।
आंगें जीवें मांडूनि। तेथेचि भरु।।८९४।।
वोघीं पडिलें पाणी। नेणें आनानीं वाहाणी।
तैसा जाएं आचरणीं। व्यवस्थोनि।।८९५।।

"घरचेच धन जसे दिव्याने एकदा दिसले की ते घेण्यास कोणतीच अडचण नसते, त्याचप्रमाणे स्वभावेकरून जे कर्म आपणास विहित असते, त्याची शास्त्राधारे एकदा खात्री करून घेतली की ते आचरण्यास काहीच अडचणीचे वाटू नये. पण ते मात्र आळस सांडून, तसेच फलेच्छा सोडून करावे. ओघाने वाहणारे पाणी जसे प्रवाहाविरुद्ध जाऊ शकत नाही, तसेच आपले विहित कर्म जीवाभावाने अंग मोडून करावे. त्यांत कसूर करू नये व तद्विरहित कर्मे आचरू नयेत. स्वकर्मच व्यवस्थित आचरावे."

अर्जुना *जो एयांपरी। तैं विहित कर्म स्वयें करी।*
***तो मोक्षाचां ऐलद्वारीं। पैठा होएं* ।।१८-८९६।।**
जैं अकरणा आणि निषिद्धा। न वचेचि काईं संबंधा।
म्हणौनि भवाविरुद्धा मुकला तो।।८९७।।

"अर्जुना! अशा प्रकारे जो आपली स्वकर्मे व विहित कर्मे आचरतो, तो मोक्षाचे अलीकडचे द्वार गाठतो आणि अकरणीय व निषिद्ध कर्माच्या संपर्कातसुद्धा असा मनुष्य कधीही येत नसल्याने, तसेच कर्मे न करणे हेसुद्धा त्याच्या गावीही नसल्याने त्यास मोक्षद्वाराविरुद्ध जाणे घडत नाही. तो संसाराच्या वाटेविरुद्धची मोक्षाची वाटचालच करतो."

आणि काम्यकर्माकडे। न परतेचि तेथ कोडें।
तेथ चंदनाचेही खोडें। न लेंचि तो।।१८-८९८।।
एर *नित्य कर्म तंव। फलत्यागें वेंचिलें सर्व।*
***म्हणौनि मोक्षाचि शीवं। ठाकूं लाहें* ।।८९९।।**
आईसेनि शुभाशुभीं संसारीं। सांडिला तो अवधारीं।
वैराग्यमोक्षद्वारीं। उभा ठाके।।९००।।

"आणि तो काम्य कर्माकडे कधी वळतच नाही. म्हणून स्वर्गादी भोगरूपी चंदनाच्या खोड्यातही तो आपली मान अडकवून घेत नाही. तसेच फलत्याग करून त्याने नित्य कर्मही सर्व वाया घालवलेले असते. म्हणून तो मोक्षाच्या शीवेवर जाऊन पोहोचू शकतो. ऐक. तो संसार-स्वर्गादींकडून टाकला गेल्याने वैराग्यरूपी मोक्षद्वारी उभा ठाकतो."

जैं सकल भाग्याची सीमा। *मोक्षलाभाची जैं प्रमा।*
***नाना कर्ममार्गश्रमा। शेवटु जेथ* ।।१८-९०१।।**
मोक्षफलें दिधलीं वोल। जैं सुकृततरूचें फूल।
तयें *वैराग्यीं ठेवीं पाऊल। भंवरु जैसा* ।।९०२।।
पाहीं आत्मज्ञानसुदिनाचा। वादावा सांगतेयां अरुणाचा।
उदो त्या वैराग्याचा। ठाओ पावें।।९०३।।
किंबहुना आत्मज्ञान। जेणें हातां एं निधान।
तैं वैराग्य दिव्यांजन। जीवें लें तो।।९०४।।
आईसिं मोक्षाची योग्यता। सिद्धि जाएं तेयां पांडुसुता।
अनुसरोनि विहिता। कर्मा एयां।।९०५।।

"भाग्याची परिसीमा, सर्व कर्ममार्गांचा शेवट असे मोक्षलाभाचे ज्ञान करून देणारे जे वैराग्य, ते तो पावतो. मोक्षफलाचे तारण म्हणून सत्कृत्यरूपी पुण्यवृक्षाचे फूल म्हणजे हे वैराग्य होय. भ्रमराने फुलावर अलगद पाय टेकून बसावे, तसा तो त्या पुण्यवृक्षाच्या वैराग्यरूपी फुलावर टेकतो. आत्मज्ञानाचा सुदिन उगवण्याचा शुभसंकेत देणारा उदयाचलीचा अरुण म्हणजे ते वैराग्यच होय. किंबहुना आत्मज्ञानाचे निधान प्राप्त करून देणारे जे वैराग्यरूपी दिव्यांजन, ते तो आपल्या बुद्धिरूपी डोळ्यांत घालून घेतो. मग त्याला मोक्षप्राप्ती हमखासच होणार, नाही का! हे पांडुसुता! आपापल्या विहित कर्मांना अनुसरून मनुष्यमात्रांस ही अशी मोक्षाची पात्रता प्राप्त होते. हीच एक या मोक्षमार्गावरची अत्यंत महत्त्वाची सिद्धी होय!"

सर्वात्मक ईश्वराची स्वकर्मकुसुमांनी पूजा

हें *विहित कर्म* पांडवा। आपुला अनन्य वोलावा।
आणि *हेंचि परमसेवा। मज सर्वात्मकाचि* ।।१८-९०६।।
पैं आघवांचि भोगेंसि। पतिव्रता क्रीडें प्रियेंसि।
कीं तेयाचि नामें जैसिं। तपें तिएं केली।।९०७।।
कां बालकां एकीं माएं-। वांचौनि जिणें कैं आहें।
म्हणौनि सेविजे कीं तो होएं। पाटाचा धर्मु।।९०८।।
नाना पाणी म्हणौनि मासा। गंगा न संडितां जैसा।
सर्वतीर्थसहवासा। वरपडा जाहाला।।९०९।।
तैसें आपुलियां विहितां। उपावो असें न विसंबितां।
आईसा कीजैं कीं जगन्नाथा। आभारु पडें।।९१०।।

"अर्जुना! विहित कर्म हेच आपले जीवन होय आणि मज सर्वात्मकाची परमसेवाही तेच होय. सर्व भोग घेत पतिव्रता पतिसंगें क्रीडते आणि ते भोगच तिने आचरलेली तपे होतात. बालकासाठी एका आईवाचून जगण्याचा दुसरा कोणता आधार असतो! म्हणून मातेला अनुसरणे हाच त्याचा श्रेष्ठ धर्म ठरत नाही का! तेच त्याचे कर्तव्यही नसते का! गंगेत राहणारा मासा तिच्याद्वारे सर्व तीर्थांचा राजा जो सागर, त्याला जाऊन पोहोचतोच ना! म्हणून सर्व सिद्धींचे आगर म्हणजे आपले विहित कर्म. त्यास न विसंबता आचरावे. आणि ते पण इतक्या उत्तम रीतीने की त्याचेही जगन्नाथावर ऋण व्हावे!"

अगां जेयांचें जैं विहित। तैं ईश्वराचें मनोगत।
***म्हणौनि केलियां निभ्रांत। सांपडेंचि तो* ।।१८-९११।।**
पैं जीवाचां कसीं उतरली। तैं दासी कीं गोसांविण जाहाली।
सीसें वेंचि तेयां मविलीं। वही जेविं।।९१२।।

तैसें स्वामीचियां मनोभावा। न चुकिजे हेंचि परमसेवा।
एर तैं गां पांडवा। वाणिज्य करणें।।९१३।।

"असे पाहा की प्रत्येकाने आपापली विहित कर्मे आचरावीत अशीच ईश्वराची इच्छा असते. त्याच्या इच्छेनुरूप वागणाऱ्या मनुष्याचा तो ऋणकरी होतो अन त्या ओझ्याखाली दबलेला ईश्वर मनुष्याला सहजच वश होतो. मनुष्यास आवडलेली दासी पण घरधनीण होऊन बसते; किंवा शीर हातावर घेऊन स्वामीची सेवा करणाऱ्यास तो इनाम देतो; तद्वतच त्या परमेश्वराच्या मनोगतास अनुसरणे हीच त्याची परमसेवा करणे होय. ती करण्यास तत्पर असावे. म्हणजे तो प्रसन्न होतो. तद्व्यतिरिक्त इतर व्यवहार करणे म्हणजे केवळ वैश्यवृत्ती होय!"

म्हणौनि विहित क्रिया केली। नव्हे तेयाचि खूण पालिली।
जेयापासूनि कां आली। आकारा भूतें।।१८-९१४।।
जो अविद्येचियां चिंधियां। गुंडूनि जीव बाहुलीयां।
खेलवितसें तिगुणियां। अहंकाररज्जू।।९१५।।
जेणें जग हें समस्त। आतंबाहेरी पूर्ण भरित।
जालें आहें दीपजात। तेजें जैसें।।९१६।।
<u>तेयां सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा।</u>
***<u>पूजा केली होएं अपारा। तोषालागिं</u>* ।।९१७।।**

"ईश्वराने अविद्येच्या चिंधड्या गुंडाळून या जीवरूपी बाहुल्या निर्मिल्या आहेत.त्याच्यापासून ही सर्व भूते साकारली आहेत. त्रिगुणांचे सर गुंफून तयार केलेल्या अहंकाररूपी सूत्रावर त्यांना तो कळसूत्री कठपुतळ्यांप्रमाणे खेळवत आहे. विहित कर्माचरण करणे म्हणजे त्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या आज्ञेचे यथासांग पालन केले असेच होते. दीप आणि आसमंत जसे एका दीपाच्या तेजानेच उजळतात, तसे हे जग ज्याच्या आत्मप्रकाशाने अंतर्बाह्य ओतप्रोत भरून ठेले आहे, त्या सर्वात्मक ईश्वरास स्वकर्मकुसुमे वाहून पूजावे. त्या पूजनाने तो अपार तोषतो."

वैराग्यसिद्धी

म्हणौनि *<u>तिएं पूजें। रिझालेनि आत्मराजें।</u>*
<u>वैराग्यसिद्धि देईजे। पसाय तेयां</u>।।१८-९१८।।
<u>जिएं वैराग्यदशें। ईश्वराचेनि वेधवशें।</u>
***<u>हें सर्वही नावडे जैसें। वांत होएं</u>* ।।९१९।।**
प्राणनाथाचिआं आधी। विरहिणीतें जिणेंहीं बाधी।
तैसें सुखजात बाधी। दुःखाचा लागें।।९२०।।

"असा स्वकर्मसुमनांच्या पूजेने आनंदलेला तो आत्मराज मग साधकास वैराग्यसिद्धीचे पसायदान देतो. तेव्हा जी वैराग्यदशा उपजते, ती ईश्वराचा वेध साधून देते. त्यामुळे सतत ईश्वराचे अनुसंधान घडते आणि त्यापुढे जगातील सुखोपभोग, संपत्ती इ.ओकून टाकलेल्या पदार्थांप्रमाणे घृणाजनक वाटू लागतात. प्राणनाथाच्या विरहव्याकुलतेने विद्ध केलेल्या विरहिणीस सुखेसुद्धा जशी दुःखवत तापदायक वाटतात, त्याप्रमाणे त्या साधकास ईश्वराशिवाय जगत शून्यवत वाटू लागते."

<u>सम्यग्ज्ञान नुदैजतां। वेधेंचि तन्मयता।</u>
***<u>उपजे आईसि योग्यता। बोधाचि लाहें</u>* ।।१८-९२१।।**
म्हणौनि मोक्षालागिं। जो व्रत वाहतसें आंगिं।
तेणें स्वधर्मु आस्था चांगि। अनुष्ठावा।।९२२।।

"ईश्वराच्या या संतत प्रणिधानाने त्याला अजून सम्यग्ज्ञानाचा उदयसुद्धा झालेला नसतांही ईश्वराशी तन्मयता प्राप्त होऊन वैराग्याचा असा भर प्राप्त होतो. *विवेकख्याती*वर तो आरूढतो *(पहा -२ -२६,पा.यो.सू.)!* अर्जुना! जो मोक्षेच्छु आहे व त्यासाठी व्रते, उपासना इ.चा आश्रय घेऊ पाहतो, त्याने आपल्या परीने उत्तमरीत्या हे स्वधर्माचरणाचे अनुष्ठान आचरावे, इतकी स्वधर्माची थोरवी आहे."

स्वधर्माची महती

अगां आपुला हा स्वधर्मु। आचरणीं जऱ्हैं विषमु।
परि पहावा परिणामु। फलेल जेणें।।१८-९२३।।
जैं सुखालागिं आपणपेयां। निंबचि आथि धनंजया।
तैं कडुवटपणा तेयांचिआं। उबगिजेना।।९२४।।
फलणियां ऐलीकडें। केलीतैं पाहतां आस मोडे।
आईसि त्यजिलीं तऱ्हैं जोडें। तैसें के गोमटें।।९२५।।

"असे पहा की कितीही कठीण असला तरी आपला स्वधर्मच आचरावा. त्याच्या परिणामाकडे पाहता हेच हितावह ठरते. अर्जुना! कडुलिंबच आपल्यास पथ्यकर असला तर त्याच्या कडवटपणाकडे लक्ष न देता तोच अगत्याने सेवला पाहिजे, नाही का! केळीचे झाड दिसण्यात किती बेढब असते. पण ते एकदा का फळे धरू लागले की केवढी गोड केळी देते! मग केवळ दिसण्याखातर केळीचा नायनाट करणे योग्य होईल का!"

तेंवि स्वधर्मु सांकडु। देखौनि केला जऱ्हैं कडु।
तऱ्हैं मोक्षसुरवाडु। अंतरला कीं।।१८-९२६।।
आणि आपुली मायें। कुब्ज जऱ्हैं आहे।
तऱ्हैं जीजैं तैं नोहें। स्नेह कुऱ्हें कीं।।९२७।।
एरीं जियां पराविया। रंभेहूनि बरवियां।
तियां काएं कराविया। बालकें तेणें।।९२८।।

"स्वधर्मसुद्धा आचरण्यास अवघड वाटून त्यागला तर मग मोक्षसुखाची अमृतमधुर फळे कशी बरे चाखावयास मिळतील! आई जरी कुब्जा असली तरी तिच्या ज्या प्रेमाने बालकाचे पोषण होते, ते प्रेम तर काही वाकडेतिकडे नसते ना! आणि दुसऱ्यांच्या आया अगदी रंभेहूनही सुंदर सुस्वरूप असल्या तरी आपल्या आईची जागा त्या कशा घेतील!"

अगां पाणियाहूनि बहुवें। तुपीं गुण कीर आहे।
परि मीना काएं होएं। असणें तेथ।।१८-९२९।।

पैं आघवियां जगां जैं विख। तैं विख कीडियां पियूख।
आणि जगां गूळ तैं देख। मरण तेयां।।९३०।।
म्हणौनि जैं विहित जेयां जेणें। फिटे संसाराचे धरणे।
क्रिया कठोर तऱ्हैं तेणें। तैंचि करावि।।९३१।।
एरां पराचारा बरवियां। आईसें होईल टेकिलियां।
पायाचें चालणें डोईयां। केलें जैसें।।९३२।।

"अरे! पाण्याहून तूप कितीतरी गुणकारी असते. पण म्हणून मासा तुपात जिवंत राहू शकेल काय! अवघ्या जगासाठी विष हे विषच असते. पण किड्याला मात्र ते अमृतासमान असते. पण सर्वांना गोड असणारा गूळ किड्याला मात्र मारक असतो. म्हणून आपले विहित कर्म करण्यास कितीही कठीण असले, तरी त्यानेच या संसाराचे धरणे फिटणार आहे व तेच करावे. दुसऱ्याचा आचार कितीही चांगला वाटला तरी तो स्वीकारणे म्हणजे पायांऐवजी डोक्यावर चालण्यासारखे होईल."

ययालागिं कर्म आपुलें। जैं जातिस्वभावें असे आलें।
तैं करी तेणें जिंतिलें। कर्मबंधातैं।।१८-९३३।।
आणि *स्वधर्मुचि पालावा। परधर्मु तो गालावा।*
हा नेमुहीं पांडवा। न कीजेचि मां।।९३४।।
तऱ्हैं *आत्मा दृष्ट नोहें। तंव कर्म करणें कां ठाएं।*
आणि करणें तेथ आहे। आयासु आधीं।।९३५।।

"यासाठी आपल्या वाट्याला जे जन्मानुसार प्राप्त झालेले कर्म आलेले असेल, तेच करावे. तसे कर्मच या कर्मबंधास उल्लंघून नेते. बरे स्वधर्मच पाळावा आणि परधर्म वाळावा असा नियम तुला पटतच नसला तरी जोपावेतो आत्मा दृष्ट होत नाही, तोवर कर्मे करणे थांबत नाही आणि कोणतेही कर्म असले तरी त्यासाठी काही ना काही कष्ट करणे भागच नाही का! म्हणून स्वकर्म आचरणेच श्रेयस्कर ठरते."

परधर्म टाळावा.

म्हणौनि भलतिएं कर्मीं। आयासु जऱ्हें उपक्रमीं।
तऱ्हैं काईं स्वधर्मीं। दोषु सांचें।।१८-९३६।।
अगां उजूं वाटां चालावें। तऱ्हैं पायचि शिणवावें।
ना आडरानें धरावें। तऱ्हैं तैंचि।।९३७।।
पैं शिला कां सिदौरियां। दाटणें एक धनंजया।
परि जैं वहातां विसांवियां। मिळिजैं तैं घेपे।।९३८।।

"कोणत्याही कर्मारंभी सायास करावे लागतातच. मग स्वकर्म सायासाचे आहे म्हणून त्यास दोष का द्यावा! आडरानाने धावले तरी पाय शिणतात; सरळ वाटेने गेले तरी पायांना शिणवावेच लागते. मग सरळ वाट सोडून कष्टाची वाकडी वाट का घ्यावी! धोंडा पदरी बांधून वाटचाल केली काय अन शिदोरी डोक्यावर घेऊन चालले काय, श्रम तर तेवढेच असतात. मग विसाव्याच्या वेळी कामाला येणाऱ्या शिदोरीचेच ओझे वाहण्यास का नाखूष असावे!"

एरविं कणा आणि भुसा। कांडितांहीं सोसु सरिसा।
जैंचि रंधन श्वानमांसा। तैंचि हवि।।१८-९३९।।
दधिजलाचियां घुसलणां। व्यापार सारिखेंचि विचक्षणा।
वालुवें तिलां घाणा। गालणें एक।।९४०।।
पैं नित्य होम देयावेयां। कां सैरा आगी सुवावयां।
फुंकितां धूमु धनंजया। साहणें तैंचि।।९४१।।
परि धर्मपत्नी धांगडी। पोसितां जऱ्हें एकी वोढी।
तऱ्हें कां अपरवडी। आणावी आंगां।।९४२।।

"श्वानासाठी मांस कापणे आणि हविसाठी कापणे यात कष्ट तेवढेच आहेत. दही घुसळणे व पाणी घुसळणे कष्टाच्या दृष्टीने सारखेच असते. तिळाचा घाणा चालवणे व वाळूचा घाणा ओढणे यात काही कमी कष्टाचे आहे काय! नित्य होमाचा अग्नी प्रज्वलित करण्यासाठी जसा धूराचा त्रास सहन करावा लागतो, तसाच वाटेल त्या गोष्टीला आग लावण्यासाठीसुद्धा तो त्रास सहन करणे भाग पडते. मग यातील कोणती गोष्ट शहाण्याने करावी, सांग बरे! धर्मपत्नी आणि कुलटा पोसणे यात सारखेच परिश्रम असतात. कोणी धर्मपत्नीस सोडून कुलटा आणली तर त्याला काय म्हणावे!"

हां गां पाठीं लागला घाईं। मरण न चुकेचि पाहीं।
तऱ्हैं समोरला काईं। आगलें कीजें।।१८-९४३।।
अकुलस्त्री दांड्याचें घायें। परघर रिघालीही जऱ्हें साहें।
तऱ्हैं स्वपतितैं वायें। सांडिलें कीं।।९४४।।
तैसें आवडतेंही करणें। न निफजें शिणल्याविणें।
तऱ्हें विहित बा रे कोणें। बोलें भारी।।९४५।।

"शस्त्राचा घाव पाठीवर झाला तर जसा मृत्यू येतो, त्याहून समोरून अंगावर पडलेला घाव काही वेगळे घडवून आणतो काय! घाव तो घावच! पती दांडुक्याने ताडण करतो म्हणून एखादी व्यभिचारिणी जाराचे घरी जाऊन राहू लागली आणि जर तोही तिला तसेच बडवू लागला, तर तिने आपल्या पतीला व्यर्थच सोडले, नाही का! त्याचप्रमाणे कोणतेही कर्म आवडते म्हणून करू गेले तरी जर त्यातही कष्ट ठेवलेलेच असतात, तर आपले विहित कर्म कष्टप्रद आहे असे कोणत्या तोंडाने म्हणावे!"

वरी थोडेंचि अमृत घेतां। सर्वस्व वेंचों कां पांडुसुता।
जेणें जोडें जीवितां। अक्षय्यत्व।।१८-९४६।।
एर काह्यां मोलें वेंचूनि। विख पियावें घेऊनि।
आत्महत्येसि निमौनि। जाईजे जेणें।।९४७।।
तैसें जाचूनियां इंद्रियें। वेंचूनि आयुष्याचेनि दियें।
सांचला पापी आन आहे। दुःखावांचौनि।।९४८।।
म्हणौनि करावा स्वधर्मु। जो करितां हिरौनि घे श्रमु।
उचित देईल परमु। पुरुषार्थराजु।।९४९।।

"अगदी सर्वस्व खर्च करून चुळकाभर जरी अमृत मिळत असेल, तर तेच करावे. उगाचच पदरचे धन खर्च करून त्याऐवजी विष का विकत घ्यावे! ते पिऊन आत्मघातच नाही का होणार! मग इंद्रियांना जाचून आयुष्याचे दिवस वेचून जे काही कर्म करावयाचे, त्यायोगे

दु:खाचे आगर असे परधर्मरूपी पाप का जोडावे! त्यापेक्षा जो संसाराचे श्रम, त्यातील येरझारीचे कष्ट वाचवतो, तो स्वधर्मच आचरून पुरुषार्थाचा राजा असा परम जो मोक्ष, तो का मिळवू नये सांग बरे!"

ययाप्रमाणें किरीटी। स्वधर्माचिएं राहाटी।
न विसंबिजे संकटीं। सिद्धमंत्रु जैसा।।१८-९५०।।
कां नाव जैसिं उदधीं। महारोगी दिव्यौषधी।
न विसंबिजे तेयां बुद्धी। स्वकर्म येथ **।।९५१।।**

"हे अर्जुना! स्वधर्माची ही अशी थोरवी आहे. म्हणून संकटकाळी जसा सिद्धमंत्राचा विसर पडू देऊ नये, तसे ***या संसारसंकटी आपण स्वकर्मास चुकू नये.*** समुद्रात जशी नाव, तसा भवसागरात हा स्वधर्म आहे. महारोगावर जसा दिव्यौषधी सेवन करण्याचा आळस उपयोगी नसतो, तसा या भवरोगावरचा रामबाण इलाज जे ***स्वकर्म*** त्याचा मनुष्याने कंटाळा करू नये."

मग ययाचि गां कपिध्वजा। ***स्वकर्माचियां महापूजा।***
तोखला ईशु तमरजा। झाडा करूनि।।१८-९५२।।
शुद्धसत्त्वाचियां वाटां। आणि आपुली उत्कंठा।
भवस्वर्ग कालकूटा। आईसें दाविं।।९५३।।

"हे कपिध्वजा! स्वकर्मरूपी महापूजेने तोषलेला ईश्वर मग तमरजांची साफ झाडणी करून साधकास शुद्ध सत्त्वगुणाच्या वाटेला आणून सोडतो. त्या वेळी भव व स्वर्ग ही काळकूटासारखी जहाल विषे असल्याचा विवेक उत्पन्न होतो व साधकास आपले निजधाम प्राप्त व्हावे अशी उत्कंठा निर्माण होते. ईश्वरच हे घडवून आणतो."

वैराग्यप्राप्ती::::

वैराग्याचे महत्त्व

जिएं ***वैराग्य एणें बोलें। माघां संसिद्धि रूप केलें।***
किंबहुना तैं आपुलें। मेलविं खागें **।।१८-९५४।।**
मग जिंतिलियां हें भोयें। पुरुखु सर्वत्र जैसा होएं।
कां जालाहीं जैं लाहें। तैं सांघो आतां।।९५५।।

"मागे वैराग्यनामक सिद्धीचे जे वर्णन केले होते (@श्लोक क्र.१८-४५, पृ.क्र.९४१), ती भूमिका ईश्वरकृपेने तो साधक पावतो. या भूमिकेस प्राप्त झालेला पुरुष या जगात कसा राहतो आणि पुढे काय होतो, ते आता तुला सांगतो."

तऱ्हैं देहादिक हें संसारें। सर्वहि मांडलेसें जैं गुंफिरे।
तेथ नातुडे तो वागुरें। वारा जैसा।।१८-९५६।।
पैं परिपाकाचिएं वेलें। फल देठें ना देठु फलें।
न धरें तैसें स्नेह खुलें। सर्वत्र होएं।।९५७।।
पुत्र वित्त कलत्र। हें जालयांहीं स्वतंत्र।
माझें न म्हणें पात्र। विखाचें जैसें।।९५८।।
हें असो ***विषयजातिं। बुद्धि पोली आईसिं माघौति।***
पाउलें घेओनि एकांतिं। हृदयाचां रिघें **।।९५९।।**

"वारा जसा जाळ्यात सापडत नाही, तसा तो साधक या देहादी मायिक गुंताड्यात अडकत नाही. फळ जेव्हा पिकते, तेव्हा ते देठाला धरून राहत नाही. त्याचप्रमाणे तो सर्वत्र अनासक्त बुद्धीने वावरतो. त्याचे चित्त कोणत्याही वस्तूला चिकटत नाही. विषयुक्त अन्नाचे ताट जसे कोणीही जवळसुद्धा करत नाही, तसाच तो पुत्र, धन, कलत्र इ.कोणासही, ती जरी स्ववश असली तरीही आपली म्हणून म्हणत नाही. विस्तवाने पोळल्याने पुढे टाकलेले पाऊल जसे चटकन माघारी घेतले जाते, त्याप्रमाणे विषयजातांनी पोळलेली त्याची बुद्धी मागे वळून हृदयाच्या एकांत स्थानी जाऊन बसते."

आईसियां अंतष्करण। बाह्य एतां तेयाचि आण।
न मोडी समर्थाभेण। दासी जैसिं।।१८-९६०।।
तैसें ***ऐक्याचिएं मुठीं-। माजिवडें चित्त किरीटी।***
करूनि वेधीं नेहटीं। आत्मयाचां **।।९६१।।**
तेंव्हां दृष्टादृष्ट स्पृहें। निमणें जालेंचि आहे।
आगी दडपलियां धूयें। राहिजे जैसें।।९६२।।
म्हणौनि नियमिलियां मानसीं। स्पृहा नासौनि जाएं आपैसीं।
किंबहुना तो आईसि। भूमिका पावें।।९६३।।
पैं ***अन्यथा बोधु आघवा। मावलौनि तेआं पांडवा।***
बोधमात्रींचि जीवा। ठाओ होएं **।।९६४।।**

"राजाने केलेली आज्ञा दासी जशी भीतीने मोडत नाही, तसेच त्याचे अंत:करण त्याने बाह्य विषयांकडे वळू नकोस असे आज्ञापिल्यासारखे वागते. हे अर्जुना! एकाग्रतेच्या मुठीत धरलेले त्याचे चित्त, हातात एखादे शस्त्र असावे तसे असते. ते बरोबर आत्म्याचा अचूक वेध घेते. अग्नीस राखुंडीत दडपून टाकले की धूर जसा नाहीसा होतो, तद्वतच चित्तास बाह्य विषयांपासून दडपून ठेवल्याने त्याच्या ऐहिक व पारलौकिक इच्छा निमून जातात. त्याच्या या स्ववश केलेल्या अंत:करणातील स्पृहेचा सर्वथा नाश होऊन जातो. त्याला तेव्हा जी भूमिका लाभते, तिच्यात अज्ञान मावळते आणि ज्ञानाठायी त्याचे चित्त जडते."

सद्गुरूप्राप्तीचा योग

धरवणी वेंचें सरें। तैसें भोगें प्राचीनें पुरें।
नवें तंव नुपकरें। काईंचि करूं।।१८-९६५।।
आईसि कर्मसाम्यदशा। होएं तेथें वीरेशा।
मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गां।।९६६।।
रात्रींचि चौपहरी। वेंचिलियां अवधारीं।
डोलियां तमारी। मिलें जैसा।।९६७।।

"अज्ञान नाशून ज्ञानात स्थिती ईश्वरप्रसादाने होते. त्यासाठी सद्गुरूंची आधी भेट व्हायला हवी. साचवलेले धन जसे खर्चून जाते, त्याप्रमाणे भोगून प्रारब्ध पार केले जाते. नवे कर्म तर काही होत नाही. त्यामुळे ***प्रारब्ध व क्रियमाण*** या कर्मांचा नाश

होतो. या दशेस ***कर्मसाम्याची दशा*** असे म्हणतात. ***ती दशा प्राप्त होते ती ईश्वरकृपेने आणि त्या वेळी श्रीगुरुंची भेट व्हावी असा संकेत असतो. त्याप्रमाणे सद्गुरू अनायासेच भेटतात.*** रात्रीचे चार प्रहर संपले की अंधःकाराचा नाश करणारा सूर्य जसा उगवतोच, तसे ते गुरूरूपी आदित्य उगवून अज्ञानाचा अंधःकार नाहीसा करतात.''

कां येऊनि फलाचा घडु। पारुषवि केलीचि वाढु।
गुरु भेटौनि करी पाडु। बुभुत्सु जैसा।।१८-९६८।।
मग *आलिंगिला पूर्णिमा। उणिव सांडीं चंद्रमा।*
तैसें होएं वीरोत्तमा। गुरुकृपा तेयां।।९६९।।
तेव्हां अबोधमात्रु असे। तो तंव तेयां कृपा नासें।
तेथ रात्रिसवें जैसें। आंधारें जाएं।।९७०।।
तैसि *अबोधाचिएं कुशीं। कर्म कर्ता कार्य ऐसिं।*
त्रिपुटी असे ती जैशिं। गाभिणी मारिली।।९७१।।
तैसें अबोधनाशासवें। नाशें क्रियाजात आघवें।
आईसा समूल संभवें। संन्यासु हा।।९७२।।

''केळ्यांचा घड लागला की केळीचे झाड जसे वाढण्याचे थांबते, तसे श्रीगुरू भेटले की संसाराचे प्रसरण थांबते. पौर्णिमेस आलिंगन दिले की चंद्रम्याठायीची कलांची उणीव जशी सांडली जाते, त्याप्रमाणे गुरूंना आलिंगून साधकाठायीचे अपूर्णत्व टाकून दिले जाते. पौर्णिमेपूर्वी चंद्रात केवळ नाममात्र उणेपण असते. गुरुकृपेने त्याचा नाश होतो. जसा रात्रीबरोबर अंधार जातो, तसा अज्ञानाबरोबर संसारही जातो. अज्ञानाच्या कुशीत कर्म-कर्ता-कार्य अशी जी त्रिपुटी असते, ती गर्भिणीबरोबर पोटातील मूलही जसे मरते, तशी नष्ट होते.''

अज्ञाननाशासह सर्व क्रियाजातच नाश पावते आणि समूळ संन्यास म्हणतात, तो सिद्ध होतो.

अज्ञाननाश व नैष्कर्म्यता::::

अज्ञानाचा नाश

एणें मूलाज्ञानसंन्यासें। दृश्याचा ठाओ जेथ पुसे।
तेथ बुझावें तैं आपैसें। तोचि आहे।।१८-९७३।।
चेईलियावरी पाहीं। स्वप्नींचियां तिएं डोहीं।
आपणयांतैं काईं। काढूं जाईजे।।९७४।।
तैं मी नेणें आतां जाणौन। हें सरलें तेयां दुःस्वप्न।
जाला ज्ञातृज्ञेयविहिन। चिदाकाश **।।९७५।।**

''या संसारास व त्यातील कर्मास कारण मूळ अज्ञानच असते. ते जेव्हा असे त्यागले जाते, तेव्हा दृश्यजात सर्वांचा ठावठिकाणाही उरत नाही. तेव्हा जे ज्ञेय असते, ते तो स्वतःच असतो! स्वप्नातील डोहात बुडणाऱ्या मनुष्यास जाग आली की काय त्याला स्वतःस त्या डोहातून बाहेर पडण्याची खटपट करावी लागते का! ''माझे स्वरूप मी जाणत नाही; त्याचा साक्षात्कार मला झाला पाहिजे'' असे अज्ञानवशे स्वप्न जो पाहत होता, ते सर्वथा भंगून गेले व आता ज्ञातृ-ज्ञेयाविरहित जे चिदाकाश असते, तेच तो होऊन राहतो.''

मुखाभासेंसि आरिसा। परौता नेला वीरेशा।
पाहातेंपणेंवीण जैसा। पाहातां ठाकें।।१८-९७६।।
तैसें *नेणणें जैं गेलें। तेणें जाणणेंही नेलें।*
मग निष्क्रिय उरलें। चिन्मात्रचि **।।९७७।।**
तेथ स्वभावें धनंजया। नाहीं कोणीचि क्रिया।
म्हणौनि प्रवादु तेयां। निष्कर्मु आईसा।।९७८।।

''हे वीरश्रेष्ठा! मुख पाहण्यासाठी समोर ठेवलेला आरसा दूर केला की प्रतिबिंबाचा आभास दूर होऊन द्रष्टा जसा दृश्याविरहित जसाचा तसा राहतो, तद्वत त्याचे नेणिवेसह जाणणे पण जाते व केवळ क्रियाशून्य चिन्मात्र उरते. हे धनंजया! त्या अवस्थेत कोणतीच क्रिया घडत नाही; कोणतेही कर्म केले जात नाही; कर्ता व कर्तृत्व लोपते; अहंकार निमतो. म्हणून ती स्थिती ***नैष्कर्म्य*** म्हणून विख्यात आहे.''

नैष्कर्म्यसिद्धीची प्राप्ती

तैं आपुलें आपणपें। असें तैंचि होऊनि आरोपें।
तरंगु कां वायुलोपें। समुद्रु जैसा।।१८-९७९।।
तैसें *न होणें निफजे। तें नैष्कर्म्युसिद्धी जाणिजे।*
सर्व सिद्धींत सहजें। परम हें **।।९८०।।**

''हे अर्जुना! ही ***परम अशी नैष्कर्म्यसिद्धी एखाद्या भाग्यवंतास गुरुकृपा लाभताच प्राप्त होते.*** आत्मा आत्मरूपाने असूनही स्वतःवरच जगद्रूपाने आरोपिला जातो. पण वायू थांबला की समुद्राहून अभिन्न असणारी लाट जशी समुद्रच आहे म्हणून कळून येते, त्याचप्रमाणे ***कर्मे होण्याचे थांबले की आपणच आपल्याठायी आत्मत्वाने विराजत असतो, हे कळून येते. स्वरूपसाक्षात्कार तो हाच! यासच*** **नैष्कर्म्यसिद्धी** (४-पृ.क्र.१०४०)***अशी संज्ञा आहे. सर्व प्रकारच्या सिद्धींमध्ये हीच स्वतःसिद्ध अशी सर्वश्रेष्ठ सिद्धी आहे.*** **परमसिद्धी** ***ती हीच!''***

देऊलाचियां कामां कलसु। परम गंगेसि सिंधुप्रवेशु।
कां सुवर्णसुद्धि कसु। सोलावा जैसा।।१८-९८१।।
तैसें आपुलें नेणणें। फेडिजें कां जाणणें।
तेंहीं गिळूनि असणें। आईसिं जैं दशा।।९८२।।
तिएंपरतें काहीं निफजणें एथ नाहीं।
म्हणौनि म्हणिपे पाहीं। परमसिद्धि तैं।।९८३।।

''देवळाच्या कामाची कळस ही जशी परमव्याप्ती आहे; गंगेस सिंधुप्रवेश ही जशी परमगती आहे; शुद्ध करण्यात येणाऱ्या सुवर्णाचा सोळावा कस ही जशी गुणवत्तेची अखेरची श्रेणी आहे; तद्वतच ही ***नैष्कर्म्यदशा*** असते. नेणीव फेडणारी जी जाणीव असते, ती पण गिळून टाकणारी ही अवस्था आहे. या अवस्थेपलीकडे जावे अशी कोणतीही दशा नाही. त्यापलीकडे काहीच मिळवावे असे नाही. म्हणून हिला ***परमसिद्धी*** असे म्हटले जाते.''

परि हेंच आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधी।
श्रीगुरुकृपालब्धि। कालीं पावें।।१८-९८४।।

उदयजतांचि दिनकरु। प्रकाशचि आंते आंधारु।
कां दीपासंगें कापुरु। दीपुचि होएं।।९८५।।
तयां लवणाचि कणिका। मिलतखेंवों उदकां।
उदकचि होऊनि देखा। ठाकें जेविं।।९८६।।
कां निद्रितु चेवविलियां। स्वप्नेंसिं नीद वायां।
जाऊनि आपणपयां। मिळें जैसा।।९८७।।
तैसें जेयां *कोण्हासिं दैवें। गुरुवाक्यश्रवणाचि सवें।*
द्वैत गिलौनि विसांवें। आपणयां वृत्ति।।९८८।।

"ज्या कोण्या भाग्यवानास ही आत्मसिद्धी गुरुकृपा होताच पावते, त्याचे काय वर्णन करावे! सूर्य उगवताक्षणीच जसा अंधारच प्रकाश होतो; दीपासंगे कापुरच जसा दीपाकार होऊन जातो; मिठाचा कण जसा पाण्यात मिळून पाणीच होऊन जातो; किंबहुना निद्रिस्त मनुष्यास जाग आली की तो जसा निद्रा व त्यातील स्वप्नाचा लोप होऊन जागृतावस्थेत विनासायास विराजमान होतो; त्याप्रमाणे त्या दैववानाच्या वृत्ती गुरुवाक्यश्रवण करताच द्वैत गिळून आत्मप्रतीतीत विसावतात."

कानावचनाचिएं भेटी-। सरिसाचि पैं किरीटी।
वस्तु होऊनि उठी। कवणु एकु जो।।१८-९८९।।
तेयांसिं मग करणें। हें बोलिजैलचि कवणें।
आकाशां येणेंजाणें। आहें काई।।९००।।
म्हणौनि तेयांसि काई। त्रिशुद्धि करणें नाहीं।..।।९९१।।

"गुरुमुखींचे बोधवचन वा महावाक्य आणि त्याचे श्रवणेंद्रिय यांची ही अशी अपूर्व भेट होताच जो कोणी आत्मरूपच होऊन राहतो, त्याला कर्म कसे उरेल! आणि तो कर्मे करत असतो हे म्हणावे तरी कोणाला! आकाशाला जाणेयेणे असते काय! गुरुवचनासवेच स्वरूपस्थित जो होऊन जातो, तो कर्मापुरताही उरत नाही, हे त्रिवार सत्य आहे!!"

सामान्यांसाठी क्रममार्ग::::

कर्मयोगाचे रहस्य

कर्मे अटळ आहेत. भगवंताला कर्मांशी कसे जोडावे व ती कशी करावीत याचा गीता उपदेश करते. सामान्यपणे विद्वान त्यासच ***कर्मयोग*** असे म्हणतात. काही असामान्य बुद्धीचे लोक तर भगवंतासही गाळू पाहून कर्मे फलाशेरहित करण्याचे प्रतिपादन करतात व त्यास ***कर्मयोग*** असे म्हणू पाहतात. पण कर्मे ब्रह्मार्पण करण्याच्या गीतेच्या सतराव्या अध्यायातील कल्पनेवर ज्ञानेशांनी जो प्रकाश टाकला आहे, त्यावरून या तथाकथित कर्मयोगाचा वास्तविक गीतार्थ लक्षात येतो.

कर्मे करत असता ती **स्वधर्म-स्वकर्म-शास्त्रविहित-वर्णाश्रमा**स अनुसरून केली पाहिजेत. ती फलाशा त्यागून केली पाहिजेत. ती ईश्वराप्रीत्यर्थ केली पाहिजेत. ती ईश्वरास समर्पित केली पाहिजेत. ***कर्ता-कर्म-क्रिया*** या तिन्ही ईश्वरस्वरूप आहेत या भावनेने कर्म केले पाहिजे. कर्तृत्वाभिमान न बाळगता अनहंकारी वृत्तीने ते केले पाहिजे. कर्मारंभी , मध्ये व अंती ईश्वरस्मरण केले पाहिजे. ***"ॐ तत् सत्"*** या त्रिपादमंत्राचा त्यासाठी कसा विनियोग करावा, ते आपण पूर्वी त्या सतराव्या अध्यायानिमित्त पाहिलेच आहे *(उन्मेष:३३:स्वधर्मकर्तव्य पृ.क्र.५१६ ते ५२१).*

त्या सर्व विवेचनावरून गीतेतील हा ***कर्मयोग*** म्हटला जाणारा उपासनामार्ग ईश्वराच्या उपासनेशी कसा घनिष्ट संबंध ठेवून आहे आणि त्यासाठी ईश्वर कोण व कसा आहे, याचे ज्ञान कसे आवश्यक आहे, ते सहज कळून येते. **ईश्वरोपासना म्हणजेच *भक्ती वा भक्तियोग* म्हणतात, ती संकल्पना होय. *ज्ञानयोग* म्हणतात त्याचा ईश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान असणे हा अविभाज्य भाग होय. भक्तीसाठी याचीही आवश्यकता आहेच.**

याचबरोबर **ईश्वरास चित्तवृत्ती अर्पण करून मनोभावे ही कर्मक्रिया यथासांग पार पाडण्यासाठी ज्यास *धारणा-ध्यानात्मक योग* म्हणून म्हणतात, त्याचीही अत्यंत आवश्यकता आहे.** अर्थातच हा **जो तथाकथित *कर्मयोग* आहे, तो *भक्तियोग, ज्ञानयोग व योग* या योगत्रयीसह करावयाचा योग आहे**, हे स्पष्ट होते.

मध्यम व मंद अधिकाऱ्यांची मार्गक्रमणा

ज्ञानदेवांनी या कर्मधारेचा विचार केला आहे व आपला ***क्रमयोग*** तिच्यापासूनच प्रारंभ करून ते आता म्हणताहेत:

...। परि *आईसें जऱ्हें हें काईं। नोहें जेयां* ।।१८-९९१।।
एरविं *स्वकर्माचेनि वह्निं। काम्यनिषिद्धाचियां इंधनिं।*
***रजतमें कीर दोनिं। जालिलीं आधीं* ।।१८-९९२।।**
पुत्र वित्त परलोकु। ययां तिहींचा अभिलाखु।
धरीं होएं पाईकु। हेंहीं जालें।।९९३।।
इंद्रियें सैरपदार्थी। रिघतां विटाललीं होती।
तिएं प्रत्याहारतीर्थीं। न्हाणिली कीर।।९९४।।
आणि स्वधर्माचें फल। ईश्वरीं अर्पूनि बल।
***घेऊनि केलें अढल।। वैराग्यपद* ।।९९५।।**

परंतु जो कोणी साधक इतका भाग्यवंत नाही, जो गुरुवचनासवे आत्मरूप होऊ शकलेला नाही, त्याचा मार्ग कोणता, ते वर्णित ज्ञानदेव म्हणतात:

"गुरुवचनासवे तद्रूपता पावणाऱ्या विरळ्या भाग्यवंताची गोष्ट राहू दे. ज्या कोणा इतर साधकांचे भाग्य तसे नाही, त्यांचा विचार करू या. तसे तर त्यानेसुद्धा स्वकर्माच्या अग्नीत काम्यनिषिद्ध कर्माच्या इंधनात आपले रजतम हे मल पूर्णपणे जाळून टाकलेले असतात. धन, पुत्र, पारलौकिक कल्याण यांची अभिलाषा तर त्याच्या दारीचा सेवक झालेली असते. इंद्रिये स्वैरपणे आपापल्या विषयी रत झालेली होती. तो विषयांचा विटाळ त्यांना प्रत्याहारतीर्थी न्हाणवून त्याने घालवलेला असतो आणि स्वधर्म आचरण्याचे फळसुद्धा ईश्वरास अर्पून त्या बदल्यात त्याने ईश्वराकडून अढळ वैराग्यपद मिळवलेले असते."

आईसिं *आत्मसाक्षात्कारीं। लाभें आत्मज्ञानाचि उजिरी।*
तैं सामुग्री कीर पुरी। मेलविली।।१८-९९६।।
आणि तैंचिं समईं। सद्गुरु भेंटलें पाहीं।
तेंविंचि तिहीं काईं। वंचिजेना।।९९७।।

परि ओखद घेतांखेंवों। काय लभे आपुला ठाओ।
कां उदयजतांचि दिओ। मध्यान्ह होएं।।९९८।।

"ज्ञानाचा उत्कर्षबिंदू आत्मसाक्षात्कारात लाभतो. त्यासाठी त्याने सगळी पूर्वतयारी केलेली असते आणि आवश्यक ती साधनसंपत्ती मिळवलेली असते. तसेच त्यालाही त्या भाग्यवान साधकासारखे हे सगळे होताच वेळेवर सद्गुरूही भेटतात. त्या सद्गुरूंनी त्याच्यावर पूर्ण कृपाही केलेली असते. त्यात त्यांनी हातचे काही थोडेच राखून ठेवले असते! पण औषध घेताक्षणीच रोगी पूर्णपणे बरा होतो का! सूर्य उगवताच त्याचा मध्याह्नीएवढा पूर्ण प्रभाव पडतो का!"

सुक्षेत्रीं आणि वोलटें। बीजहीं पेरिलें गोमटें।
तऱ्हें अलोट फल भेंटें। परि वेलें कीं गां।।१८-९९९।।
जोडिला मार्गु प्रांजलु। मिनला सुसंगाचाही मेलु।
तऱ्हें पाविजे वांचूनि वेलु। लागेंचि कीं।।१०००।।

"उत्तम क्षेत्री सुयोग्य ओल पाहून चांगले बी पेरले की अलोट फळ धरते. पण त्यासही काही काळ जावाच लागतो ना! मुक्कामाला जाण्यासाठी सुयोग्य मार्ग धरला. सज्जनांचीही सोबत मिळाली. तरीही तेथे पोहोचण्यापूर्वी वाटचालीएवढा वेळ लागेलच ना!"

क्रमानुक्रमे आक्रमावयाचा मार्ग

तैसा *वैराग्यलाभु जाहाला। वरी सद्गुरुही भेंटला।*
जिविं *अंकुर फुटला। विवेकाचां* ।।१८-१००१।।
तेणें *ब्रह्म एक आथि। एर आघविंचिं भ्रांति।*
***हेंहि कीर प्रतीती। गाढी केली* ।।१००२।।**
परि तैंचि जें परब्रह्म। सर्वात्मक सर्वोत्तम।
मोक्षाचेंही काम। सरें जेथ।।१००३।।
ययां तिनहीं अवस्था पोटीं। जिरविं जैं गां किरीटी।
ययां ज्ञानासिहीं मिठी। दे जैं वस्तू।।१००४।।
ऐक्याचें एकपण सरें। जेथ आनंदकणुही विरे।
काईंचि नुरौनि उरें। जैं काईं गां।।१००५।।
तिएं *ब्रह्मीं ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊनि असणें।*
तैं क्रमेंचि करूनि तेणें। पाविजें गां।।१००६।।

"म्हणून ज्याला ***वैराग्यलाभ*** झाला आहे, वर **सद्गुरू**ही भेटले आहेत; **विवेका**चा अंकुर जीवाच्या चित्तभूमीत रुजला पण आहे; त्यायोगे ***ब्रह्मच एकमेवाद्वितीय आहे, त्याशिवाय हा सर्व संसार ही भ्रांतीच आहे, अशी गाढी प्रतीती*** ज्याने घेतली आहे; जे सर्वात्मक सर्वोत्तम असे ***परब्रह्म*** जेथे **मोक्षा**चेही प्रयोजन उरत नाही, जे जागृति-स्वप्न-सुषुप्ति या तिन्ही अवस्था आपल्या पोटात जिरवते, ज्ञानासही जे मिठी देऊन आपल्यात सामावून घेते, ज्या त्या ब्रह्मवस्तूत ऐक्याचे ऐक्यत्व सरते, आनंदकणही जेथे विरून जातो व काहीच शिल्लक न ठेवून जे उरते, त्याच्याशी **तो ऐक्यत्वाने ब्रह्म होऊन ज्या क्रमाने राहतो, ज्या क्रमाने अद्वैतपणे तो ते ब्रह्मच पावतो, तो *क्रम* ऐक.**"

भुकेलियापासिं। वोगरिलें षड्रसिं।
तो तृप्ति प्रतिग्रासिं। लाहें जेविं।।१८-१००७।।
तैसा वैराग्याचा वोलावा। विचाराचां तो दिवा।
आंबुथितां आत्मठेवा। काढीचि तो।।१००८।।
तऱ्हें भोगिजें आत्मऋद्धि। एवढीं योग्यतेचि सिद्धि।
जेयाचां आंगिं निरवधि। लेणें जाहालीं।।१००९।।
तो जेणें *क्रमें* ब्रह्म। होणें करी गां सुगम।
तेयां *क्रमाचें वर्म* । आईक सांघों।।१०१०।।

"भुकेजलेल्या मनुष्यास षड्रस अन्न वाढले असता तो ज्याप्रमाणे ग्रासागणिक तृप्तता पावत जातो व अंती पूर्ण तृप्त होतो, त्याप्रमाणे वैराग्यरूपी भुयारात सुरक्षित ठेवलेले आत्मधन विवेकाच्या दिव्याच्या प्रकाशात तो साधक कालक्रमाने हस्तगत केल्याशिवाय राहत नाही. ***आत्मस्वरूपाचे ऐश्वर्य भोगण्याची सिद्धी ज्याला प्राप्त झालेली असते, किंबहुना या पात्रतेचे अलंकार ज्याला भूषवतात, तो कोणत्या सुगम मार्गाने ब्रह्म होतो, ते क्रमरहस्य, हे अर्जुना! मी तुला सांगतो. ऐक."***

क्रमरहस्य

क्रमयोगरहस्य सांगण्यास ज्ञानदेव आता सिद्ध झाले आहेत. क्रमयोगाच्या आतापर्यंत निर्देशिलेल्या पायऱ्या अशा आहेत: ***स्वधर्म-स्वकर्माचरण (ईश्वरप्रणिधानासह) -➢ईश्वरप्रसाद -➢ वैराग्यप्राप्ती -➢भक्ती (ईश्वरप्रणिधानात्मक) -➢ प्रत्याहार (योगसाधना)-➢ अज्ञाननिवृत्ती -➢बोधप्राप्ती -ज्ञानोदय -➢ नाममात्र अबोधावस्था -➢ कर्मसाम्यदशा -➢श्रीगुरुपलब्धि -➢ श्रीगुरुकृपा -➢ -➢ -➢ -➢*** यानंतर साधकांचे दोन वर्ग होतात:

*१) **श्रीगुरुकृपा -➢ अज्ञाननाश -➢ पूर्ण ज्ञान -➢ नैष्कर्म्यसिद्धी :*** यात ज्ञानही लोपते.

२) आता आपण दुसऱ्या वर्गातील साधकांचा पुढील क्रम पाहत आहोत. पहिल्या वर्गात "***ओलखिसवेंचि पाविजे। तद्रूपता***" असे भाग्यवान साधक मोडतात, ज्यांना गुरुवाक्य ऐकताच स्वरूपप्राप्ती होते. असो.

विवेक व प्रत्याहारसिद्धी

दुसऱ्या वर्गाचे साधक गुरुकृपा झाल्यावर जो मार्ग आक्रमतात, तो ज्ञानेश वर्णित आहेत, तो असा:

तऱ्हें *गुरु दाविलियां वाटा। येऊनि विवेकतीर्थतटां।*
***धुऊनियां मळकटा। बुद्धीचा जेणें* ।।१८-१०११।।**
मग राहूनें उगललीं। प्रभा चंद्रें आलिंगिलीं।
तैसिं शुद्ध तैं जडलीं। आपणयां बुद्धि।।१०१२।।
सांडूनि कुलें दोनिं। प्रियासिं अनुसरें कामिनी।
द्वंद्वत्यागें स्वचिंतनिं। पडिली तैसिं।।१०१३।।

"श्रीगुरूंनी दाखवलेल्या वाटेने विवेकतीर्थाच्या काठी येऊन त्याने बुद्धीचे मालिन्य स्वच्छ धुवून टाकलेले असते. मग राहूने उगळलेली चंद्रिका चंद्र जशी आलिंगितो, तशी ती शुद्ध झालेली बुद्धी

स्वस्वरूपाकडून आलिंगिली जाते. सासर व माहेर ही दोन्ही कुळे त्यागून कामातुर स्त्री जशी प्रियकरास अनुसरते, त्याप्रमाणे इहलोक व परलोक या दोन्ही कामनांचा त्याग करून ती शुद्ध बुद्धी आत्मचिंतनात रममाण होते.''

आणि ज्ञाना आईसें जिव्हार। नेवों नेवों निरंतर।
इंद्रियीं केलें थोर। शब्दादिक जैं।।१८-१०१४।।
तैं रश्मिजाल काढलेयां। मृगजल जाएं लयां।
तैसें धृतिरोधें तेयां। पांचाहीं केलें।।१०१५।।
नेणतां अधमाचियां अन्नां। खादिलियां कीजे वमना।
तैसा वोकविलीं सवासना। इंद्रियें विषयिं।।१०१६।।

''आणि ज्ञानासारखे अंतर्यामीचे जे सुख, ते दवडून इंद्रिये जीवास विषयांकडे ओढून नेऊन शब्दादिक इंद्रियसुखांचे जे बंड माजवतात, त्या पंचेद्रियसुखाचा, सूर्यकिरण लोपताच मृगजळ जसे लयास जाते त्याप्रमाणे त्या बुद्धीच्या निरोधामुळे निरास होतो. अजाणता खाल्ल्या गेलेल्या अधम मनुष्याच्या अन्नास सज्जन जसे ओकून टाकतात, त्याप्रमाणे इंद्रियादींकडून त्यांचे पंचविषय वासनांसह वमन केले जातात.''

योगधारणा

मग प्रत्यगवृत्ति चोखटें। लाविलीं गंगेचेनि तटें।
आईसिं प्रायश्चित्तें धुवटें। केलीं तेणें।।१८-१०१७।।
पाठीं *सात्त्विकें धीरें तेणें। शोधारिलीं तिएं करणें।*
***मग मनेंसिं योगधारणें। मेळविलीं*।।१०१८।।**
तेंविंचि प्राचीनें इष्टानिष्टें। भोगेंसि येऊनि भेंटें।
तेथ देखिलियांही वोखटें। द्वेषु न करीं।।१०१९।।
ना गोमटेंचि विपाएं। तैं आणूनि पुढां सूयें।
तेयांलागां न होएं। साभिलाखु।।१०२०।।
ययापरी *इष्टानिष्टीं। रागद्वेषु किरीटी।*
***त्याजूनि गिरिकपाटीं। निकुंजीं वसें*।।१०२१।।**

''मग विषयांपासून परावृत्त केलेली चित्तवृत्ती तो साधक आत्माकारवृत्तिरूपी गंगेच्या पवित्र तीरावर आणून प्रक्षाळतो. अशा प्रकारे सर्वेद्रियांचे प्रायश्चित्त करून ती निर्मल होतात. शुद्ध झालेली ती इंद्रिये मग तो सात्त्विक धृतीच्या बळाने मनासहित योगधारणेत लीन करतो. प्रियाप्रिय भोगांद्वारे प्राक्तन त्याची भेट घेते तेव्हा अप्रिय गोष्टींचा तो तिटकाराही करत नाही अथवा यदाकदाचित प्रिय गोष्टच समोर आली, तरी तिचा अभिलाष करत नाही. प्रियाप्रिय गोष्टींबाबत उपजतच असणाऱ्या रागद्वेषांचा असा त्याग करून तो साधक डोंगराच्या गुहेत अथवा कुंजनिकुंजात वसतीला राहतो.''

गजबजा सांडिलियां। वसवी वनस्थलियां।
अंगाचियां मांदियां। एकलेयां।।१८-१०२२।।
शमादिकीं खेळें। न बोलणेंचि चावळें।
***गुरुवाक्याचेनि मेळें। नेणें वेळु*।।१०२३।।**

''गजबज नसलेले एकांत वनस्थल शोधून ते तो आपल्या अवयवसमूहाने वसते करतो. शमदमांशी तो खेळतो. मौन हेच त्याचे बोलणे असते. गुरुवचनाचे मनन करत त्याचा वेळ कसा व्यतीत होतो, हे त्यास जाणवतही नाही.''

आणि आंगां बल एयांवें। ना तन्हैं क्षुधा जावें।
कां जीभेचें पुरावें। मनोरथ।।१८-१०२४।।
भोजन करतांविखीं। ययां तिहींतैं न लेखीं।
आहारीं मितीं संतोखीं। माप न सूयें।।१०२५।।
आसनाचेनि पावकें। हारपतां प्राणु पोखें।
***याचि भागु मोटकें। अशन करीं*।।१०२६।।**
आणि परपुरुखें कामिलीं। कुलवधू आंग न घालीं।
निद्रालस्या मोकलीं। अशन तैसें।।१०२७।।

''भोजन करावयाचे तर ते अंगी बळ यावे किंवा क्षुधा शांत व्हावी अथवा जिभेचे चोचले पुरवावे म्हणूनच लोक करतात. पण या साधकाचे तसे काहीच नसते. मित आहारानेच तो संतोषतो. खाण्याची लालसा म्हणून काही तो अन्नग्रहण करत नाही. तर आसनधारणेने गलित होणारा प्राण पोषण्याइतकाच थोडासा आहार तो सेवन करतो. आणि परपुरुषाने कामेच्छा प्रकट केली असता कुळवधू त्याच्या स्वाधीन आपले शरीर जसे कधीच करत नाही, तसेच तोही निद्रा व आळस यांच्या अधीन आपले शरीर होणार नाही, इतकाच अल्प आहार सेवतो.''

दंडवताचेनि प्रसंगें। भुईं आंग लागें।
वांचूनि एर नेघें। राभस्य तेथ।।१८-१०२८।।
देहनिर्वाहापुरतें। राहाटविं हातपायांतैं।
किंबहुना आपैतें। सबाह्य केलें।।१०२९।।

''त्याचे शरीर केवळ देवादिकांना दंडवत करण्यापुरते तेवढे जमिनीस स्पर्श करते. इतर वेळी ते कधीही कोठेही गर्दभासारखे लोळण घेत पडत नाही. त्याची हस्तपादादी कर्मेंद्रियेसुद्धा केवळ देहनिर्वाहापुरतीच व्यापारतात. अन्यथा तीही स्तब्धच असतात. आपले अंतर्बाह्य शरीर व इंद्रिये त्याच्या अशी वश केलेली असतात.''

ध्यानारूढ वृत्ती

आणि *मनाचां उंबरा। वृत्तिसिं देखों नेदी वीरा।*
तेथ कें वाग्व्यापारा। अवकाशु असे।।१८-१०३०।।
आईसेनि देह वाचा मानस। हें जिणौनि बाह्यप्रदेश।
आकलिलें आकाश। ध्यानाचें तेणें।।१०३१।।

''हे धनुर्धारी वीरा! हे झाले इंद्रियादिकांचे! तसेच तो ***साधक आपल्या चित्तवृत्तींवरही इतका कटाक्ष ठेवतो की त्यांना मनाचा उंबरठाही तो पाहू देत नाही. संकल्पविकल्प असे मनाबाहेरच तो संयमित करतो!*** तेथे मग वाचेचा व्यापार तरी कसा चालेल! अशा रीतीने बाह्य प्रदेश जिंकून घेऊन तो साधक ध्यानाचे आकाशही मग आपल्या स्वाधीन करून घेतो.''

गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चो आपुला।
न्याहालीं हातिं घेतिला। आारिसा जैसा।।१८-१०३२।।
पैं *ध्याता आपणचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं।*
ध्येयत्वें घें हें अवधारिं। ध्यानारूढीं गां।।१०३३।।
तेथ ध्यान ध्येय ध्याता। ययां तिहीं एकरूपता।
होएं तंव पांडुसुता। किजैं तैं गां।।१०३४।।
म्हणौनि तो *मुमुक्षु। आत्मज्ञानीं जाला दक्षु।*
परि पुढां सूनि *पक्षु। योगाभ्यासाचां* **।।१०३५।।**

"गुरुवाक्याने त्याचा बोधाठायी दृढ भाव बसलेला असतो. त्याचे तो आरशात निरखत आपले रूप पाहत बसावे तसे अविरत दर्शन घेत बसतो. ह्या आत्मबोधाचे चिंतन हेच खरे ध्यान! ***ध्याता स्वात्मा जो आपणच आपणासच ध्येयरूपाने वृत्तीद्वारे ध्यान करण्यास घेतो. हीच नाही का ध्यानाची खरी जगन्मान्य रीत! ध्यान, ध्येय व ध्याता ही सर्व एकरूपत्व पावणे ही ध्यानारूढत्वाची खूण आहे.*** ती पावेस्तोवर साधकास ध्यान सिद्ध करावे लागते. असा तो मोक्षेच्छु साधक आत्मज्ञानप्राप्तीसाठी दक्ष होतो. अर्जुना! अर्थातच त्याला त्यासाठी ***योगाभ्यासाचा आश्रय*** घ्यावा लागणारच, नाही का!"

पंथराजाचे प्रमुख टप्पे

याप्रमाणे **क्रमयोगा**च्या वाटेने जाता जाता हे योगाभ्यासाचे ठिकाण येते. यापुढील ओव्यांत ज्ञानेश्वर त्यांच्या सुप्रसिद्ध ***पंथराज***सोपानाच्या प्रमुख टप्प्यांचा निर्देश करत म्हणतात:

अपानरंध्राद्वया। माझारीं धनंजया।
पार्ष्णी पिडूनियां। कांवरूमूल।।१८-१०३६।।
आंकुंचूनि अध। देऊनि तिनीं बंध।
करूनि एकवद। वायुभेद।।१०३७।।
कुंडलिनी जागवूनि। मध्यमा विकाशूनि।
आधारादि भेदूनि। आज्ञावरी।।१०३८।।
सहस्त्रदलाचां मेघु। पीयूषें वर्षूनि चांगु।
तो मूलवरी वोघु। आणूनियां।।१०३९।।

"गुद आणि लिंग या दोन अपानद्वारांमध्ये जी शिवण असते, तिच्या मध्यभागी पायाची टाच जोराने दाबून बसवावी. तेथे मूलाधारचक्र असते. ***मूलबंध, वोढियाणाबंध आणि जालंधरबंध*** हे ***त्रिबंध*** लावून अधस्थानाकडे असणाऱ्या अपानाचे आकुंचन करावे व ***प्राण आणि अपान यांची मिळणी*** करावी. ***आधारचक्र ते आज्ञाचक्रापर्यंतची स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धादी षट्चक्रे भेदावीत.*** *त्यासाठी कुंडलिनी जागृत करून सुषुम्नेचा प्रशस्त मार्ग चोखाळावा लागतो. त्यानंतर कुंडलिनीचे सहस्त्रदलचक्रापर्यंत मार्गक्रमण झाले की तेथील अमृताचे तळे कलंडून त्यातील अमृतधारेचा मेघासमान वर्षाव होतो. तो कुंडलिनी व मध्यमेच्या साहाय्याने मूलाधारचक्रापर्यंत आणून शरीर पुन: चैतन्यमय करावे लागते."*

नाचतयां पुण्यगिरीं। चिद्भैरवाचां खापरीं।
मनपवनाचि खीचपुरी। वाढूनियां।।१८-१०४०।।
जालियां योगाचां गाढा। मेलावा हा सूनि फुडां।
ध्यान माघिलाकडां। स्वयंभ केलें।।१०४१।।
आणि ध्यान₁ योग₂ दोनिं। इयें आत्मतत्त्वज्ञानिं₃।
पैठीं होआवयां निर्विघ्निं। आधिंचि तेणें।।१०४२।।
वीतरागतेसारिखा। जोडौनि ठेविलां सखा।
तो आघवियांचि भूमिका। सवें चालें।।१०४३।।

"मन व प्राण यांची एकत्र शिजवलेली खिचडी स्वहस्ते औटपीठी नाचणाऱ्या चिद्भैरवाच्या खापराच्या पात्रात वाढावी आणि या योगाचा अभ्यास दृढ करावा. ***मन, प्राण व कुंडलिनी यांचा असा हा मेळ साधला की महाशून्याच्या द्वारी ध्यानाची मूर्ती आपच स्थिरावते. आत्मतत्त्वाच्या ज्ञानाची ध्यान(भक्ती)₁ व योग₂ यांच्याठायी*** अशी निर्विघ्नपणे ***मिळणी*** होण्यास साहाय्यकारी असे जे वैराग्य असते, ते त्या साधकाने आधीच जोडून ठेवलेले असते. ते सख्यासारखे पावलोपावली त्याची सोबत करत असते. त्यायोगे ***ध्यान म्हणजे भक्ती व योग यांचा ज्ञानाशी ₃संयोग होऊन आत्मतत्त्व लाभते."***

भक्ती, योग व ज्ञान यांच्या मिलापातून मोक्षस्थिती

मोक्षरूपी लक्ष्मीस वरण्यासाठी सुयोग्य साधनासंपन्न झालेला साधक ज्ञानेश रेखाटतात, तो असा त्याच्या या ओवीचित्रातून! हेच चित्र अजून स्पष्ट करणाऱ्या त्यांच्या काही ओव्या पाहा:

पहावें तैं दिसें तंववरी। दिठीतैं न संडीं दीपु जन्हैं।
तन्हैं कें आहें अंवसरीं। देखावेयां।।१८-१०४४।।
तैसें *मोक्षीं प्रवर्तलेयां। वृत्ति ब्रह्मीं जाएं लयां।*
तंव वैराग्य आथिं तेयां। भंगु कैंचा।।१०४५।।
म्हणौनि *सवैराग्यु। ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु।*
करूनि जाला योग्यु। आत्मलाभां।।१०४६।।

"जी वस्तू पहावयाची आहे, ती दिसेस्तोवर दिव्याने डोळ्यांची साथ सोडली नाही, तर ती वस्तू दृष्टीस पडण्यास कितीसा वेळ लागेल! त्याचप्रमाणे जो मोक्षेच्छु साधक असतो, त्याची वृत्ती ब्रह्मी लय पावेस्तोवर जर वैराग्य त्याची साथ देईल, तर ब्रह्मत्व पावण्यात अडचण ती कोणती येणार! अशा वैराग्याच्या सोबतीने तो भाग्यवान साधक ज्ञानाभ्यास पूर्ण करतो आणि आत्मप्राप्तीचा अधिकारी होतो."

आईसि वैराग्याचिं आंगिं। बाणूनियां वज्रांगीं।
राजयोगतुरंगिं। आरूढला **।।१८-१०४७।।**
वरी आड पडिलें दिठीं। सानें थोर निवटीं।
तैं बलीं *विवेकमुष्टीं। ध्यानाचें खांडें* **।।१०४८।।**
आईसेनि संसाररणांआंतु। आंधारीं सूर्यु तैसा असे जातु।
मोक्षविजयश्रिये वरैतु। होआवयालागिं **।।१०४९।।**

"वैराग्याचे कवच अंगावर चढवून तो राजयोगरूपी अश्वावर आरूढतो. हाती ध्यानाची तलवार मुठीने घट्ट पकडून तिने दृष्टीस पडणाऱ्या लहानथोर गोष्टींतील भेदभावना निवटून टाकत, सूर्य अंधारात जसा बेडरपणे प्रवेशतो तसा तो साधक या संसाररणांगणावर मोक्षश्रीस वरण्यासाठी निर्भयपणे प्रवेशतो."

सौंदर्यलहरी व योगतारावलि::::

श्रीमच्छंकराचार्य व कुंडलिन्यधिष्ठित योग

***योग, ध्यान व ज्ञान* या त्रयींचा पंथराजाशी मेळ घालीत ज्ञानदेव साधकास राजयोगाच्या अश्वावर आरूढ करत आहेत.** त्यानंतरचा भाग आपण अजून पाहणार आहोत. तत्पूर्वी पंथराजानिमित्ताने एकदोन शेष संदर्भ तपासण्याचे राहिलेले आहेत, त्यांचा थोडा परामर्ष घेऊन जिज्ञासापूर्ती आणि विषय विवेचन सांग करू या.

त्यासाठी ज्ञानेश्वरांचे समानधर्मा व श्रेष्ठ योगी आद्य श्रीमच्छंकराचार्य कुंडलिनीजागृतीच्या या योगमार्गाबाबत काय सांगतात, ते पाहणे आवश्यक आहे. आचार्यांच्या दोन उत्कृष्ट प्रकरणग्रंथांतून हा विषय येतो. ते म्हणजे ***१)सौंदर्यलहरी*** व २) ***योगतारावलि.*** त्यांबाबत थोडा विचार करू या:

१)सौंदर्यलहरी:

१०३ श्लोकांचे हे स्तोत्र आहे. श्रीविद्यातंत्रास ते वाहिलेले आहे. श्रीयंत्राद्वारे जगदंबेची श्रीचक्राद्वारे अर्चना करण्याचा संकेत त्यात आहे.*श्लोक क्र.१ ते ४१* हे***सौंदर्यलहरी*** म्हणून प्रसिद्ध आहेत. ***कुंडलिनीजाग्रण, षट्चक्रभेदन*** इ.विषय त्यात येतात. आपणास प्रामुख्याने हाच भाग विषयानुरूप पाहावयाचा आहे. उर्वरित *श्लोक क्र.४२ ते १०३* हा भाग ***आनंदलहरी*** म्हणून प्रसिद्ध आहे. आदिशक्तीचे सगुण रूप व त्याचे ध्यान हे विषय त्यात येतात.

शिव व शक्ती या जगदाधार द्वयीवर हे स्तोत्र आधारित आहे. ***"पिंडी ते ब्रह्मांडी"*** हा संकेत मान्य करत हे स्तोत्र ***लययोगाचे साधन*** त्यात अंतर्भूत करते. ***शक्ती म्हणजेच कुंडलिनी* होय.** कुंडलिनीद्वारे षट्चक्रवेधाची क्रिया सूचित करणारे ***सौंदर्यलहरी***तील श्लोक असे आहेत:

"महीं मूलाधारे [१] कमपि मणिपूरे [२] हुतवहं। स्थितं स्वाधिष्ठाने [३] हृदि [४] मरुतमाकाश [५] मुपरि। मनोऽपि भ्रूमध्ये [६] सकलमपि भित्त्वा कुलपथं। सहस्त्रारे [७] पद्मे सह रहसि पत्या विहरसि।।९।। सुधाधाराऽऽसारैश्चरणयुगलान्तर्विगलितेः। प्रपंञ्चं सिञ्चन्ती पुनरपि रसाम्नाय महसा। अवाप्य स्वां भूमिं भुजगभमध्युष्टवलयं। स्वमात्मानं कृत्वा स्वपिषि कुलकुण्डे कुहरिणी।।१०।।सौं.।।"-

पृथ्वीतत्त्वास मूलाधारचक्री, आप तत्त्वासही तेथेच, मणिपूरचक्री अग्नितत्त्वास, हृत्चक्री *(अनाहतचक्री)* वायुतत्त्वास, त्यावरील विशुद्ध चक्री आकाशतत्त्वास, मनास भ्रूमध्यस्थ आज्ञाचक्री अशा प्रकारे सकल कुलपथाचा म्हणजे सुषुम्नेसह षट्चक्रे व तेथील सर्व तत्त्वांचा वेध अथवा भेदन करून शक्ती अंती सहस्त्रारदलकमलातील आपल्या पतिसमवेत म्हणजे शिवाशी एकांतात विहार करते *(९,सौं.).*

तेव्हा जे अमृत स्त्रवते, ते शक्तीच्या पायांतून ठिबकत प्रपंचाचे सिंचन करत षट्चक्रभूमींना सिंचून मूलाधारी जाऊन पोहोचते. सर्व शरीरास योगभूमीवर स्थित करून पुनश्च ती शक्ती जगद्धारणेसाठी मूलाधाराजवळील आपल्या कंदस्थानीच्या कुलकुंडात सर्पाप्रमाणे साडेतीन वेटोळे घालून निद्रिस्त होते *(१०,सौ.).*

या दोन्ही श्लोकांतून **कुंडलिनीचा आरोह-अवरोहक्रम, तसेच षट्चक्रभेदन, पंचतत्त्वांचा लय, शिवशक्तिसामरस्य इ.पंथराजसंबंधित योगक्रियां**चा विचार केलेला आहे. त्याद्वारे ज्ञानेशाच्या पंथराजावर पडणारा प्रकाश आपल्या दृष्टिक्षेपात येतो. म्हणून हा संदर्भ जिज्ञासूंसाठी उद्धृत केला. अधिक विचार करू इच्छिणाऱ्यांनी *श्रीस्वामी विष्णुतीर्थमहाराज* यांचे ***सौंदर्यलहरी,*** तसेच *सौ. कमल बापट* यांचे ***सौंदर्यलहरी*** मुळातून पाहावेत. असो. आता ***योगतारावलि*** कडे वळू या.

२) योगतारावलि::::

नादानुसंधान

यात एकूण *२९* श्लोक आहेत. ***केवलकुंभकविद्या*** हा त्यातील विषय आहे. ***अनाहतनादाची उत्पत्ती व त्याच्या अनुंधानाने निर्विकल्प समाधीची प्राप्ती*** याबाबत यात विशेष विचार केलेला आहे. **गुरुपदिष्ट मार्गाने साधना करून *लययोग* सिद्ध करून घ्यावा असा संकेत येथे अभिप्रेत आहे.** लययोगप्राप्तीच्या अनेक क्रियाविधीतील ***नादानुसंधानक्रिया* हीच खरा लययोग साधून देणारी होय,** असे श्रीमच्छंकराचार्य म्हणतात *(२-यो.ता.).*

नाद म्हणजे अनाहतनाद. रेचक-पूरक-कुंभकासहित प्राणायामक्रिया सातत्याने केली असता शरीरस्थ नाडीजाल मलरहित व पूर्णपणे शुद्ध होऊन अखंड निनादणारा ***अनाहतनाद*** प्रकटतो. तो अनेक प्रकारचा असतो व योगसाधकाला सतत ऐकू येतो *(३-यो.ता.).*

(टीप:प्राणायामक्रिया व श्वासोच्छ्वास - यातील रेचक-पूरकादी प्राणायामक्रिया म्हणजे सर्वसामान्य हठयोगसाधक समजतात तशा श्वासोच्छ्वासाच्या क्रिया नव्हेत, हे आवर्जून सांगायलाच हवे. या क्रिया श्वासोच्छ्वास प्रक्रिया व इतर दैहिक क्रिया ज्यांवर अवलंबून असते त्या सूक्ष्मातिसूक्ष्म अशा प्राणशक्तीच्या सूक्ष्म यौगिक देहाशी संबंधित आवागमन क्रिया होत. त्यांचा संबंध ***इडा व पिंगला*** आणि अंती ***सुषुम्ना*** या अंतर्नाड्यांशी निगडित आहेत.

गीतेतील*अध्याय क्र.४* मधील यज्ञविषयक *श्लोक क्र.२४ते ३०* मधील यज्ञांप्रमाणे विविध सूक्ष्म प्राणक्रियांवर आधारित असे हे प्राणायामप्रकार ***योगतारावलि***त सांगितले आहेत. श्रीमच्छंकराचार्यही योगतारावलीत म्हणतात की: ***"यत्र प्राणस्य न प्राकृतवैकृताख्यौ।।१०।।यो.ता.।।"*** - म्हणजे यात सामान्यतः होणारे प्राणांचे चलनवलन किंवा हट्टाने प्राणापानांचे रोधून धरणे ही दोन्ही नाहीत.

यावरून स्पष्ट व्हावे की ***योगतारावलि,* तसेच योगशास्त्रात इतरत्र जे प्राणापानांचे नियमनादी सांगितले आहेत, त्यांचा योगशास्त्रदृष्ट्या स्थूल श्वसोच्छ्वासादी क्रियांशी अजिबात सरळचा संबंध नाही.** जरी हठयोगाच्या ग्रंथांवरून आपला तसा समज होतो आणि काही मोठ्या लेखकांनी तसे आग्रहपूर्वक प्रतिपादिले असले, तरी वस्तुस्थिती अशी अत्यंत भिन्न आहे, हे त्यांना खऱ्या योगशास्त्राचा

किंचितही परिचय नसल्यामुळे व सुयोग्य मार्गदर्शक गुरूच्या अभावी त्यांच्या ध्यानीही नसते. त्यामुळे सामान्य साधकांची व वाचकांची फारच दिशाभूल झालेली दिसून आल्यामुळे सदर टीपेचा प्रपंच करावा लागला. असो.)

त्या अनाहतनादाच्या अनुसंधानाने योगसाधकाचे मन प्राणासमवेत विष्णुपदी लीन होते. परब्रह्माचे प्रकट रूप असा हा ***नाद*** असतो. म्हणून त्यास ***नादपुरुष*** अशीही संज्ञा देतात. ***"सतराविएंचें स्तन्य देसिं। अनाहताचां हल्लरु गासिं।।१२-७।।"*** असे यास उद्देशून ज्ञानेशांनी म्हटले आहे. ***"अनुहतिं गुंतलों नेणें बाह्य रंग। आंतरीं निमालों ब्रह्मरसें।।"*** अशी ***नाद आणि ब्रह्मभाव यांची अभिन्नता*** तुकाराम महाराजांनी वर्णिली आहे. ***"अनुहतघंटा श्रवणीं"*** ऐकून जनाबाईला विस्मय वाटतो!! निवृत्तिनाथांना तर ***"नादाची अखंडित निशाणी"*** प्राप्त झाली होती. संतांचे अनुभव आचार्यांच्या विचारांशी किती मिळतेजुळते आहेत, पहा!!

पंथराज व योगतारावलि

या नादाचा मार्ग ***"प्राणायाम -➢ त्रिबंध -➢ कुंडलिनीजागृती -➢ चंद्रामृताची प्राप्ती -➢केवलकुंभकाची प्राप्ती -➢ मरुल्लय -➢ राजयोगप्राप्ती -➢केवलसंवितभाव -➢मनोन्मनी -➢संकल्पांचे निःशेष उन्मूलन -➢शांतिप्राप्ती -➢ अमनस्कासमाधी -➢ गगनावशेष समाधी -➢ योगनिद्रा -➢तुरियावस्था -➢ज्ञानावस्था"*** असा असल्याचे ***योगतारावलि*** वरून दिसून येते.

ज्ञानेशांचा ***पंथराज*** व या नादाचा मार्ग यांचे बरेच टप्पे तेच असल्याचे स्पष्ट दिसते. आचार्यांनी ***पंथराज***योगाचाच भाग वैज्ञानिकरीत्या एकसमयावच्छेदेकरून येथे प्रकट केला आहे, असे म्हटले तरीही चालेल. पंथराजसापेक्ष काही योगभूमिकांचा परिचय करून घेण्यासाठी ***योगतारावलि***चे श्लोक अत्यंत उपयुक्त आहेत. म्हणून ते थोडक्यात पाहू या.

प्राणायाम, नाद, त्रिबंध इ.

"सरेचपूरैरनिलस्य कुंभैः। सर्वासु नाडीषु विशोधितासु। अनाहताख्यो बहुभिः प्रकारैः। अंतःप्रवर्तेत सदा निनादः।।३।। यो.ता.।।" - नाडिशुद्धीमुळे हा नाद प्रकट होतो. ***"नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यम्। त्वां साधनं तत्त्वपदस्य मन्ये। भवत्प्रसादात्पवनेन साकम्। विलीयते विष्णुपदे मनो मे।।४।।यो.ता.।।"*** - "हे नादानुसंधाना! तुला नमस्कार करतो. तत्त्वाची प्राप्ती करून देणारे साधन तूच आहेस. तुझ्या कृपेने माझे मन प्राणांसह विष्णुपदी लय पावत आहे."

"जालन्धरोड्याणनमूलबन्धान्। जल्पन्ति कण्ठोदरपायुमूलान्। बन्धत्रयेऽस्मिन्परिचीयमाने। बन्धःकुतो दारुणकालपाशात्।।५।। यो.ता.।।" - कंठ, उदर आणि गुदद्वार येथे अनुक्रमे ***जालंधर, उड्डियान व मूलबंध*** लावण्याची योगी प्रशस्ति करतात. या त्रिबंधक्रियांत प्रावीण्य मिळवलेल्या योग्यास दारुण असा कालपाशही बद्ध करू शकत नाही.

सूक्ष्म योगक्रिया वर्णन

"ओड्याणजालन्धरमूलबन्धैः। उन्निद्रितायामुरगाङ्गनायाम्। प्रत्यङ्मुखत्वात्प्रविशन्सुषुम्नाम्। गमागमौ मुञ्चति गन्धवाहः।।६।। यो.ता.।।" - या त्रिबंधांमुळे सर्पिणी म्हणजे ***कुंडलिनी*** झोपेतून हलवून जागी केली जाते व ती आत्माभिमुख होऊन सुषुम्नामुखात प्रवेशून उर्ध्वस्थ होते. तिच्याबरोबर प्राणसुद्धा आपली गती त्यागून सुषुम्नेत प्रविष्ट होतात.

"उत्थापिताधारहुताशनोल्कैः। आकुञ्चनैःशश्वदपानवायोः। सन्तापिताच्चन्द्रमसः पतन्तीम्। पीयूषधारां पिबतीह धन्यः।।७।। यो.ता.।।" - अपानवायूच्या सतत होणाऱ्या आकुंचनामुळे मूलाधारचक्रातील अग्नीच्या ज्वाळा प्रदीप्त होऊन उसळतात. त्यामुळे ***चंद्रमंडल तप्त होऊन तेथील अमृताचे तळे कलंडून ओसंडू लागते. त्या अमृतधारा पिणारे इहलोकी धन्य होत.***

पंथराजाशी साधर्म्य

योगाच्या या खुणा पंथराजदर्शनातही जागोजागी विखुरलेल्या आहेत. ***"आईसिं आधारीं मुद्रा पडें। आणि अधींचा मार्गु मोडे। तेथ अपानु आंतुलीकडें। वोहटूं लागें।।६-२००।।; अर्जुना हें जाण। मूलबंधाचें लक्षण। ..।।६-१९९।।; वरी बंधु जो आरोपे। तो जालंधरु म्हणिपे।..।।६-२०८।।; स्वाधिष्ठावरिचिलें कांठीं। नाभिस्थानातलौटीं। बंधु पडे किरीटी। वोढियाणा तो।।६-२१०।।;"*** असे ***त्रिबंध*** ज्ञानेश सांगतात.

"जो मूलबंधे कोंडला। अपानु माघौता मुरडला। तो सवेंचि वरी सांकडला। फुगु धरीं।। क्षोभलेपणें माजे। उवाईला ठाईं गाजे। मणिपुरेंसिं झूंजें। राहौनियां।।६-२१४,२१५।।; तंव एरिकडें धनुर्द्धरां। आसनाचा उबारा। शक्ति करी उजगरा। कुंपलिणिएं।।६-२२१।।; तैसिं तैं कुंडलिणि। मोटकी औटवलणि। अधोमुख सर्पिणि। निदैली असें।।६-२२३।।; तैं वज्रासनें चिमुटिली। सावध होएं।।६-२२५।।; तैसिं वेढियांतैं सोडीति। कवतुकें आंग मोडिति। कंदावरी शक्ति। उठिलीं दिसें।।६-२२७।।; मघ आवेशें पसरी मुख। ऊर्ध्वा उजूं।।६-२२८।।; मग सौम्य होउनि राहें। सुषुम्नेपासिं।।६-२४०।।; तेथ तृप्तिचेनि संतोखें। गरल वमी जैं मुखैं। तेणें तियेचेचिं पियूखें। प्राणु जियें।।६-२४१।।; तो आगीतूनि निगें। परि सबाह्य निववूंचि लागें।.. ।।६-२४२।।; मार्ग मोडिति नाडीचें। नवविधपण वायूचें। जाएं ..।।६-२४३।।; परिमलु घ्राणिं उरें। तोहि शक्तिसवें संचरें। मध्यमेमाजिं।।६-२४६।।; तंव वरिलेकडौनि ढालें। चंद्रामृताचें तलें। कानवडौनि मिलें।शक्तिमुखीं।।६-२४७।।; जैं हेलीं कुंडलिनी चंद्रु पिएं। ..।।६-२५९।।; इ.परवलीच्या शब्दांतून ज्ञानेश्वर कुंडलिन्युत्थापन आणि चंद्रामृतप्राशनादी क्रिया सांगतांना दिसले आहेत, ते जिज्ञासूंच्या लक्षात आलेच असेल! असो.

चंद्रामृत पिणाऱ्या योग्यांच्या स्थितीचे व देहाचे मोठे लालित्यपूर्ण वर्णनही त्यांनी त्या वेळी केलेले आहे. धन्य ते योगी!

श्रीमच्छंकराचार्यांप्रमाणेच ज्ञानदेवही म्हणतात की त्यांना कळिकाळाचेही भय नसते. ***"तैसें शरीर होएं। जैं हेलीं कुंडलिनी चंद्र पिएं। मग देहाकृति बिहें। कृतांतु गां।।६-२५९।।"*** उलट कृतांतच त्याला भिऊन वागतो!!

केवलकुंभकविद्या

कुंडलिनीची जागृती जगाची जाणीव नष्ट करून देणारी असते; वायूचे संसारात्मक आवागमन थांबवून ***केवलकुंभक*** सिद्ध करून देणारी असते. हीच ***विद्या*** होय. श्रीमच्छंकराचार्य तिची प्रशस्ती करत आहेत:

"बन्धत्रयाभ्यासविपाकजाताम्। विवर्जितां रेचक पूरकाभ्याम्। विशोषयन्ति विषयप्रवाहाम्। विद्यां भजे केवलकुम्भरूपाम्।।८।। यो.ता.।।" - या त्रिबंधांच्या व कुंडलिन्युत्थापनादी अभ्यासामुळे रेचक व पूरक थांबून प्राणांचे विशेष म्हणजे विषयप्रवाहांकडे वाहणे पूर्णतया स्तब्धावते. विषयप्रवृत्तींचे समूळ शोषण घडून येते. असे सिद्ध करून देणारी ही ***जी केवलकुंभकरूपी विद्या आहे, तिची उपासना सर्वश्रेष्ठ आहे.***

आचार्य या विद्येचा पुरस्कार करतात: ***"अनाहते चेतसि सावधानैः। अभ्यासशूरैरनुभूयमाना। संस्तंभितश्वासमनःप्रचाराः। सा जृम्भते केवलकुंभकश्रीः।।९।।यो.ता.।।"*** - अनाहतध्वनीमध्ये सावधान चित्ताने तन्मय होण्याचा हा दीर्घाभ्यास चिकाटीने पूर्ण करणाऱ्या साधकांस श्वासांचे ***(म्हणजे प्राणांचे)*** गमनागमन थांबून मनाची विषयवती प्रवृत्ती निरोधल्याचे सुख प्राप्त होते. अशी प्राप्ती करून देणाऱ्या या केवलकुंभकविद्येची प्रशंसा किती करावी! तिचे वैभव दिव्य आहे!

"सहस्रशः सन्तु हठेषु कुम्भाः। सम्भाव्यते केवलकुम्भ एव। कुम्भोत्तमे यत्र तु रेचपुरौ। प्राणस्य न प्राकृतवैकृताख्यौ।।१०।। त्रिकूटनाम्नि स्तिमितेऽन्तरङ्गे। खे स्तंभिते केवलकुम्भकेन। प्राणानिलो भानुशशाङ्कनाड्यौ। विहाय सद्यो विलयम्प्रयाति।।११।।यो.ता.।।"-

हठयोगात हजारो प्रकारचे कुंभक जरी सांगितले असले, तरी खरा कुंभक एकच आहे, ज्यात प्राणांचे अनायासे होणारे रेचक-पूरक असतात. हट्टाने रेचक-पूरक करणे, त्यासाठी नाकतोंड विद्रूप वेडेवाकडे करणे असा भाग नसलेला हा ***केवलकुंभक*** त्या सहस्रावधी कुंभकांत सर्वश्रेष्ठ आहे. केवलकुंभकाने प्राणांचे स्तंभन झाले व चित्तास प्रशांतता आली की ***इडा व पिंगला या नाड्यांतून वाहणारा प्राणांचा अवशिष्ट भाग त्या नाड्या त्यागून त्रिकूटावरील गगनात प्रवेशतो आणि तेथेच लय पावतो.***

राजयोग

"प्रत्याहृतः केवलकुम्भकेन। प्रबुद्धकुण्डल्युपभुक्तशेषः। प्राणः प्रतीचीनपथेन मन्दम्। विलीयते विष्णुपदान्तराले।।१२।। निरङ्कुशानां श्वसनोद्गमानाम्। निरोधनैः केवलकुम्भकेन। उदेति सर्वेन्द्रियवृत्तिशून्यो। मरुल्लयः कोऽपि महामतीनाम्।।१३।।यो.ता.।।" -

कुंडलिनी जागृत झाली की प्राणांचा बराचसा भाग फस्त करते म्हणजे बव्हंश प्राणांचा तिच्यात लय होतो. तिने खाऊन उरलेला अवशिष्ट भाग केवलकुंभकाद्वारे सुषुम्नेत धरून ठेवलेला असतो. तो प्राणसुद्धा *पश्चिम* मार्गाने *विष्णुपद* अथवा ब्रह्मरंध्रातील अवकाशात जाऊन तेथेच विलीन होतो.

स्वैरपणे होणारी श्वास-उच्छ्वासक्रिया ***(म्हणजेच प्राणापानांची गती)*** व तिच्यासह उफाळून येणाऱ्या विषयेंद्रियप्रवृत्ती यांचे ***केवलकुंभक*** सिद्ध झाल्याने निरोधन होते. केवलकुंभकामुळे जो एवंगुणविशिष्ट ***मरुल्लय*** प्रकट होतो, त्यामुळे मन-प्राण-इंद्रिये यांचे वृत्तिशून्यत्व साध्य होते. **असा मरुतलय क्वचितच एखाद्या मेधावी अभ्यासदक्ष पुरुषाठायी प्रकट होतो. हाच *राजयोग* होय.**

श्रीमच्छंकराचार्य त्याचे लक्षण सांगतात: ***"न दृष्टिलक्षाणि न चित्तबन्धो। न देशकालो न च वायुरोधः। न धारणाध्यानपरिश्रमो वा। स मेधमाने सति राजयोगे।।१४।। अशेषदृश्योज्झितदृङ्मयानाम्। अवस्थितानामिह राजयोगे। न जागरो नापि सुषुप्तिभावः। न जीवितं नो मरणं विचित्रं।।१५।।यो.ता.।।"*** - दृष्टी, लक्ष्य, चित्तबंध, देश, काल, प्राणनिरोध, धारणाध्यान इ.परिश्रम यांची ज्यात अपेक्षा नसते, असा हा ***राजयोग*** त्या मेधावी पुरुषास प्राप्त होतो.

जो पुरुष अशा योगात स्थित होतो, त्यास द्रष्ट्याात जगत पूर्णपणे विलीन झालेले प्रतीत होते. ***दृश्य-द्रष्टा - दर्शन*** ही त्रिपुटी मावळते. जागृती नाही, सुषुप्तीही नाही, जीवित नाही, पण मृतही नाही, अशी वैचित्र्यपूर्ण अवस्था त्याला लाभते. ही अद्भुत अनुभूती घेणारे धन्य होत!

"अहं ममत्त्वाद्यपहाय सर्वम्। श्रीराजयोगे स्थिरमानसानाम्। न द्रष्टुता नास्ति न दृश्यभावः। सा जृम्भते केवलसंविदेव।।१६।।"- ममत्व, अहंकारादी सर्व अज्ञानबंधांचा परिहार करून स्थिरचित्त झालेला योगी अशा राजयोगात स्थित होतो तेव्हा त्यास दृश्यभाव, द्रष्टृत्व इ.काहीच उरत नाहीत. केवल ***ज्ञप्तिमात्र संवित*** अशा ज्ञानप्रकाशाचा उदय होतो. त्यातच तो बुडून जातो.

पूर्व-पश्चिमपथ व योगचक्रे

राजयोग ही कुंडलिनीची अत्युत्क्रांत अवस्था होय. चंद्रामृतप्राशनानंतर तिचा हा उत्क्रमणमार्ग आपण श्रीमच्छंकराचार्यांच्या शब्दांतून वरील काही श्लोकांतून पाहिला. ज्ञानेश्वरीतील या मार्गाच्या सूचक खाणाखुणा जिज्ञासूंना सहज ओळखता येतील अशाच आहेत. ***"निगिजे पूर्विलियां मोहरां। कीं येईजे पश्चिमेचियां घरां।।६-१५९।।"*** या ओवीत स्पष्टच ज्यास ***प्रतीचीन पंथ*** असे आचार्य म्हणतात, त्याचा निर्देश दिसतो. पूर्व व पश्चिम असे दोन योगचक्रक्रम असल्याचे जाणकार म्हणतात. पण त्या क्रमांबाबत एकवाक्यता दिसून येत नाही.

एक मत असे आहे की कंठप्रदेशासमीपच्या विशुद्धचक्रापासून दोन मार्ग फुटतात. पश्चिम मार्ग वा प्रतीचीन पंथ व पूर्व मार्ग असे

***ते* दोन मार्ग होत. *पश्चिममार्ग* मानेच्या मागच्या बाजूने सरळ आज्ञाचक्रावर जाऊन पोहोचतो. *पूर्वमार्ग* मुखाच्या दिशेने वर जातो. त्यात *श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ* आदी उपचक्रे लागतात. शेवटी तोही मार्ग आज्ञाचक्रात जाऊन पोहोचतो.**

श्री.बाबामहाराज आर्वीकर यांचे मतही उल्लेखनीय आहे. त्यांच्या मते **विशुद्धचक्रानंतर *पूर्व* व *पश्चिममार्ग*** वेगवेगळे होतात. ***सहजावस्था*** हवी असणारे योगी ***पश्चिममार्ग*** घेतात. मोक्ष वा स्वर्गसुख हवे असणारे पूर्वमार्गाने जातात. ***पूर्वमार्ग*** म्हणजे ***"आधारचक्र -➢ स्वाधिष्ठान -➢ मणिपूर -➢ अनाहत -➢विशुद्ध -➢आज्ञा -➢ सहस्रदल"*** आणि ***पश्चिममार्ग*** म्हणजे ***"त्रिकूट -➢ श्रीहाट -➢ गोल्हाट -➢औटपीठ -➢भ्रमरगुंफा -➢चैतन्यचक्र -➢ ब्रह्मरंध्र"*** याप्रमाणे चक्रक्रम असल्याचे ते म्हणतात *(सं.दिव्यामृतधारा - ले. श्री.बाबामहाराज आर्वीकर).*

दुसरे मत असे आहे की *मूलाधार ते अनाहत चक्र* हा *पूर्वमार्ग* व पुढील आज्ञाचक्राचा मार्ग हा *पश्चिममार्ग* होय.

आपण यापूर्वी साकल्याने हा सर्व चक्रविचार केलेला आहे. ज्ञानेशांच्या ***पंथराज व अभंग*** यांचे संदर्भ एकत्रित पाहता वरील सर्व मते विवाद्य वाटतात. पूर्वेकडून निघून पश्चिमेकडे येणे हा क्रम ज्ञानेश सांगतात *(ओवी क्र.६-१५१)*, त्यानुसार दोन वेगवेगळे पूर्व व पश्चिम मार्ग गृहित धरणे अनावश्यक आहे. उलटपक्षी ते एकाच मार्गाचे दोन उपविभाग होत; आणि आधीचा भाग म्हणजे पूर्व मार्ग व नंतर येणारा भाग तो पश्चिममार्ग असाच या ओवीचा सरलार्थ आहे. म्हणजेच ***संपूर्ण योगपथाचे (सुषुम्नामार्गाचे) पूर्व व उत्तर असे जे दोन उपविभाग आहेत, तेच पूर्व पथ व पश्चिमपथ होत.***

(**टीप:स्वानुभवाधिष्ठित विचार** - लेखकाच्या स्वानुभवाधारित दृष्ट्या या सर्व मतमतांतरांबाबत विचार करता असे दिसते की प्रगतावस्थेत पोहोचलेल्या योग्यास जे दृश्यानुभवादी येतात, त्यांचे भासणारे स्थान हे मुख, श्रोत्र, रसना इ.असण्यामुळे काही विवेचकांनी ती ती वेगवेगळी चक्रस्थाने श्रीहट, गोल्हाट,औटपीठादी कल्पून व त्यांची स्थाने मुख, श्रोत्र, रसनादी अशी त्या त्या अनुभूतिसापेक्ष समजून हे दोन वेगळे मार्ग असल्याचे कल्पिले असावेत.

तसेच इडा व पिंगला या नाड्यांचे मार्गही काहींच्या मते मूलाधार ते आज्ञाचक्र आणि पुढे आज्ञाचक्र ते दक्षिण व वाम नासिका असेही दाखवण्यात येतात. श्वासोच्छ्वासाशी प्राणांचा असणारा संबंध दाखवणे हे या प्रकारच्या आरेखनामागचे पाहिले तर खरे कारण आहे. आपण पाहिलेच आहे की स्थूल श्वासोच्छ्वास आणि प्राणापानांचे आवागमन यांचा सरळ सरळ (direct) काहीही संबंध नाही. जो काही संबंध आहे, तो सूक्ष्म देहाच्या क्रियादींचा स्थूल देहाशी असावा तसाच आणि तितकाच या उभयतांचा संबंध आहे.

विशुद्धचक्र कंठस्थ असल्याने त्यापुढचा सहस्रारापर्यंतचा मार्ग आरेखणाऱ्यांना ही मार्गामार्गांची युक्ती सुचली असावी. पाठीतील कण्यातून जात असता afferent and efferent nerve systems द्वारे पृष्ठवंशमज्जारज्जू विविध शारीरयंत्रणांशी संबंध व त्यांवर नियंत्रण प्रस्थापित करत मानेच्यावर *(कंठस्थानानंतर)* cephalic cavity त शिरतात. तेथे पृष्ठवंशमज्जरज्जू cervical vertebraeच्या शेवटी medula oblangataला जाऊन मिळतो.

हे रज्जू स्थूलदेहातील विविध चेतासंस्थांशी संबंध ठेवून असतात आणि तेथून पुढे या स्थूलदेहांतील मज्जारज्जूंचा संबंध लहान मेंदू व मोठा मेंदू यांच्याशी एका क्लिष्ट व गुंतागुंतीच्या मज्जासंस्थेच्याद्वारे प्रस्थापित होतो. यात दर्शन, गंध, श्रवण, स्पर्श, रसना या पंचेंद्रियविषयक संवेदनाकेंद्रांचा आणि तत्संबंधित मज्जासंस्थांचाही समावेश आहे. तसेच चेतनेच्या विविध स्तरावरील अनेकानेक Physiological चेतासंस्थांचाही संबंध आहे. त्यांचा हा संबंध अनेकविध मार्गांनी जोडलेला आहे. मेंदूच्या उजव्या आणि डाव्या भागांना जोडणाऱ्या corpus callosum या मज्जासंधिसंस्थेचाही त्यात घनिष्ट संबंध आहे. स्थूल देहविशिष्ट असेच सूक्ष्मदेहाचेही स्थान असल्याचे मानले जाते. म्हणून सूक्ष्मदैहिक विविध अनुभूतींच्या दृष्टीने पाहता, त्यांचा काहीतरी संबंध या स्थूल देहातील विविध शारीर केंद्रांशी आणि या मज्जारज्जूप्रणालीशी जोडला जाऊ लागून मग सूक्ष्मदेह हा जसा काही स्थूल देहच आहे, असे कल्पिण्यास काहींनी सुरुवात केली. आणि तदनुसार सगळ्या योगनाड्यांना व चक्रांना ती सर्व जणू काही चेतासंस्थांतर्गत स्थूलच आहेत, असे समजून काही अनभिज्ञ विद्वानांनी त्यांचे वर्णन करण्यास सुरुवात केली. असो.

या सर्व गुंतागुंतीच्या नाडिजालाचा परिणाम असा होतो की योगसाधकाची दृष्टी जेव्हा स्थूलावर केंद्रित झालेली असते तेव्हा त्यास येणाऱ्या अनुभूती खऱ्या तर सूक्ष्म देहातील असूनही त्यांचा संबंध त्याची मज्जासंस्था स्थूल देहातील या मज्जारज्जूंच्या नाडीजालाशी जोडते आणि म्हणूनच वेगवेगळी चक्रस्थाने व इडापिंगलादी नाड्यांचा स्थलनिर्देश योगशास्त्रात अशा स्थूलदेहसंबंधित स्थलानुक्रमे केला जातो.

त्यामुळे सूक्ष्मदेहातील गंध-नाद-रसादी दिव्य अनुभूतींची स्थाने घ्राण, रसना, श्रवणेंद्रिये, मुख इ.च असल्याचे कल्पून ती ती श्रीहाट-गोल्हाटादी चक्रस्थाने असल्याचे मत प्रसृत झाले असले पाहिजे.

वास्तविक सुषुम्नादी नाड्या सूक्ष्मदेहातील आहेत आणि त्यांचे स्थान आपण जसे समजतो, तसे स्थूलदेहांतर्गत नाही. असे असूनही शेवटी शारीरविज्ञानदृष्ट्या पाहता स्थूलशरीरातील मज्जारज्जूसंस्थेशी आणि लहान व मोठ्या मेंदूशी संबंधित स्थानांशी आणि विविध चेतासंस्थाप्रणालींशी त्यांचा संबंध दाखवत सूक्ष्मदेहातील योगपथाचा स्थूलदेहात शोध घेणे सुरू झाले. त्यातूनच हे विशुद्ध चक्रानंतर दोन मार्ग असणे, इ.विचारधारा प्रसृत झाल्या आहेत, असे जाणवते. असो.

वास्तविक पाहता सूक्ष्मदेह व स्थूलदेह यांची देशकालातील स्थाने वेगवेगळी असूनही केवळ शाखाचंद्रन्यायाने ती स्थूलदेहसापेक्ष दाखवण्याची योग्यांची मूळ पद्धत आहे. परंतु अनभ्यस्त योगसाधक व त्यांचे शास्त्र न जाणणारे कच्चे गुरू यांच्यामुळे योगशास्त्राचे खरे रहस्य त्यांना अवगत न होणे हे सर्व या विविध पूर्व-पश्चिमादी मार्गांबाबतच्या आणि चक्रादिस्थाननिर्देशांमागच्या गोंधळामागचे खरे कारण आहे,असे दिसते.

इतर दैहिक अनुभूतींप्रमाणेच सर्व यौगिक अनुभूतीही चेतासंस्थेशी स्थूलमानाने संबंध ठेवणाऱ्या आणि तशाच क्लिष्ट स्वरूपाच्या क्रिया-

प्रक्रियास्वरूप असतात. असे असले तरी अंतिमतः त्या सर्वांचे स्वरूप एकत्वाचेच असते आणि साधकास त्यांचा अनुभव unified असाच येतो. सर्वसामान्य अनुभवांसाठी जसा मेंदूसह सर्वच मज्जासंस्थेचा सहभाग आवश्यक असतो, त्याचप्रमाणे यौगिक अनुभूतींसाठी एकूण सगळाच सूक्ष्मदेह व त्यातील विविध प्रभागांचा संबंध येतो. या unificationलाच यौगिक परिभाषेत ***सहस्त्रदलपद्म*** असे म्हटले जाते. या यौगिक अनुभूती आणि सर्वसामान्य इंद्रियजन्य अनुभव यात मात्र विलक्षण अंतर असते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

चेतनेच्या अनेकविध प्रकारांच्या आविष्कारांस समावून घेण्याचा व समजावून घेण्यासाठी त्यांना लाक्षणिक स्वरूप देण्याचा हा योग्यांचा प्रयत्न आहे. त्यातही त्यांना ज्या काही अनुभूती येतात, त्या नाम-रूपाच्याच प्रांतातील असल्याने त्यांनी निर्देशिलेल्या त्या त्या चक्रस्थानी व स्थूलमानेकरून त्या त्या श्रवणादी इंद्रियस्थानी तसे तसे रंगरूपाचे-ध्वनीचे, भावनांचे आविष्कार सर्वच साधकांत होत असतात, हाही एक विशेष लक्षात घेतला पाहिजे. परंतु बऱ्याच योगशास्त्राच्या ग्रंथांतून दाखवलेल्या योगनाड्या, चक्रादींच्या आकृति इ.चा या योगचक्रांशी लाक्षणिक सोडला तर इतर वास्तविक काहीही संबंध नसतो, हे एक आनुभविक मत येथे नोंदवून हा विषय पुरे करू या!)

आधारादी चक्रे ते आज्ञाचक्र हा पूर्वपथ आणि त्यापुढील त्रिकूट ते ब्रह्मरंध्र हा पश्चिमपथ असा संकेत गृहीत धरला तरी योगप्रक्रियेचे स्पष्टीकरण होते. आचार्यांनी उपयोजिलेल्या ***"प्रतीचीनपथेन (१३-यो.ता.)"*** या संज्ञेचा एक अर्थ ***"नंतरचा*** (subsequent)"असाही होतो. म्हणजे हा मार्ग पूर्वमार्गानंतरचा वा पुढचा आहे, असाही अर्थ संभवतो. त्या मार्गावर सरूपतादी मुक्ती व जीवन्मुक्ती वा सहजावस्था कोणत्या टप्प्यावर प्राप्त होतात, त्याचाही विचार आपण पूर्वी केला आहे *(उन्मेष ४६:योगपर अभंग पृ.क्र.८१० ते ८१४)*. तेव्हा श्री.विष्णुतीर्थमहाराजांनी निर्देशिलेला चक्रक्रम याबाबत आपण विचारात घेतला होता. जिज्ञासूंना त्याची एकदा आठवण करून देत हा पूर्व-पश्चिमेच्या रंगांचा खेळ येथेच थांबवू या!!

नादब्रह्म

"आईकें देह होएं सोनियाचां..।।६-२६८।।" याप्रमाणे योगी सिद्धी पावतो. ज्ञानेश त्या सिद्धींना दारी वोळंगत ठेवून पुढे जातात. ***"जैं कुंडलिनी जगदंबा। जैं चैतन्यचक्रवर्तिचिं शोभा।..।।६-२७२।।; हें असो तैं कुंडली। हृदयां आंतु आली। तंव अनाहताचां बोलीं। चावलें तैं।।६-२७४।।"***या परवलीच्या खुणात नादब्रह्मास साकार करत ज्ञानेश नाद्पुरुषास वंदन करतात.

"घोषाचां कुंडीं। नादचित्रांचिं रुपडीं। प्रणवाचिएं मोडीं। रेखिलीं जैसिं।।६-२७६।।" असे त्या नादब्रह्माचे रूप ते वर्णितात. पुढे ***"विसरौनि गेलों अर्जुना। जंव नाशु नाहीं पवना। तंव वाचा आथि गगना। म्हणौनि बोलें।।६-२७८।।"*** असे अवशिष्ट प्राणांबद्दल ते सांगतात. ***"तेयां अनाहताचेनि मेघें। आकाश दुमदुमों लागें। तंव ब्रह्मस्थानींचें बेगें। फिटें साहाजें।।६-२७९।।"*** असे त्या नादाने होणाऱ्या ब्रह्मप्राप्तीबाबत त्यांचे शब्द आहेत.

लययोग व मनोन्मनी अवस्था

उर्वरित प्राणांचा कुंडलिनीद्वारे महदाकाशाशी लय होतो. ***"आईकें कमलगर्भाकारें। महदाकाश जैं दुसरें। जेथ चैतन्य अधातुरें। करूनि असिजे।। तेयां हृदयाचां परविरीं। कुंडलिनियां परमेश्वरी। तेजाचिं सिदोरी। विनियोगिली।।६-२८०,२८१।।; आतां नादबिंदु नेणिजे। कलाज्योति।।६-२८८।।; हें महाभुतांचि फुडी। आटणि देखा।।६-२९०।।; पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतिचां दंसु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९१।।"*** या ज्ञानेशांच्या शब्दानी प्राणांचा लय निर्दिष्ट होतो.

"पृथ्वितें आपु विरवि। आपांतैं तेज जिरवि। तेजांतैं पवनु हारविं। हृदयामजिं।। पाठीं एकला उरें। परि शरिराचेनि अनुकारें। मग तोहीं निगें आंतरें। गगना मिळों।। तेव्हलीं कुंडली हें भाख जाएं। मग मारुत आईसें नाम लाहें। परि शक्तिपण तैं आहें। जंव न मिळें शिवीं।।६-२९८ ते ३००।।; मग जालंधर सांडीं। ककारांत फोडी। गगनाचिएं पाहाडीं। पैठीं होएं।। तेथ ॐकाराचिएं पाठीं। पाएं देत उठाउठीं। पश्यंतिचिएं पाऊटी। माघां घालीं।। फुडां तन्मात्रा अर्द्धवेरीं। आकाशाचां आंतरीं। भरति गमें सागरीं। सरिता जैसिं।।६-३०२ ते ३०४।।; मग ब्रह्मरंध्रीं थिरावोनि। सोऽहंभावाचां बाहा पसरौनि। परमात्मलिंगा धांवौनि। आंगां घडें।। तंव महाभूतांचि जवनिक फिटे। मग दोहोंसिही होएं झटें। तेथ गगनासह आटें। समरसिं तिएं।।६-३०५,३०६।।" या समर्थ योगप्रवाही ओव्यांतून ज्ञानेश हा लय कसा संपूर्णत्वास जातो, ते चित्रित करतात.

"पिंडाचेनि मिसें। पदीं पद प्रवेशें। ..।।६-३१०।।; भ्रूलता माघिलीकडें। तेथ मकाराचेचि आंग न मांडें। सडेयां प्राणां सांकडें। गगनां एंतां।।६-३१३।।; आतां महाशुन्याचां डोहीं। गगनासिचिं थाओं नाईं।..।।६-३१५।।" या शब्दांकनाद्वारे ज्ञानेश ती नादब्रह्मलयाची अंतिम पूर्णत्वाची अनुभूती आपणापुढे साकार करतात.

उन्मनीचें लावण्य आणि तुर्येचे तारुण्य

"जैं उन्मनिएंचें लावण्य। जैं तुरिएंचें तारुण्य। ..।।६-३२०।।" अशा त्या अवस्थेची श्रीमच्छंकराचार्यांनाही फार उत्कंठा आहे, ते म्हणतात:

"नेत्रे ययोन्मेषनिमेषशून्ये। वायुर्यया वर्जितरेचपूरः। मनश्च सङ्कल्पविकल्पशून्यम्। मनोन्मनी सा मयि संविधत्ताम्।।१७।। चित्तेन्द्रियाणां चिरनिग्रहेण। श्वासप्रचारे शमिते यमीन्द्रा। निवातदीपा इव निश्चलाङ्गा। मनोन्मनीमग्नधियो भवन्ति।।१८।।यो.ता.।।" - "ज्या अवस्थेत नेत्रांची उघडझाप होत नाही; वायूच्या रेचक-पूरकादी क्रिया ज्यात नसतात; मन ज्यात संकल्पविकल्पशून्य होते; अशी ती मनास उन्मन करणारी अवस्था मला प्राप्त व्हावी, जिच्यात मग्न झालेल्या महायोग्यास चिरकालाचा निग्रह साध्य झालेला असून त्यामुळे चित्तेंद्रियक्रिया, श्वासप्रवाह यांचे उपशमन होऊन त्याचे सर्व चित्त, इंद्रिये इ.निवातस्थ दीपाप्रमाणे निश्चल झालेले असतात."

अमनस्का समाधी

आचार्यांचा ***योगतारावलि***चा विषय ***उन्मनिएंचें लावण्य*** अन ***तुर्येचे तारुण्य*** यांच्या प्रांगणात असा प्रवेशतो व **उन्मनी, *मनोन्मनी, अमनस्का, सहजामनस्का, गगनावशेष, तुर्यगा***दी या दालनांचा अंगुलिनिर्देश करत ***"जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेलें"*** त्या परमसमाधिस्थानी नेऊन पोहोचवतो; कसा तो त्यांच्याच शब्दांत पाहू या:

"उन्मन्यवस्थाधिगमाय विद्वन्। उपायमेकं तव निर्दिशामः। पश्यन्नुदासीनतया प्रपञ्चम्। सङ्कल्पमुन्मुलय सावधानः।।१९।। प्रसह्य सङ्कल्पपरम्पराणाम्। सम्मर्दने सन्ततसावधानम्। आलम्बनाशादपचीयमानम्। शनैः शनैः शान्तिमुपैति चेतः।।२०।। निःश्वासलोपैर्निभृतैः शरीरैः। नेत्राम्बुजैरर्धनिमीलितैश्च। आविर्भवन्तीमनस्कमुद्राम्। आलोकयामो मुनिपुङ्गवानाम्।।२१।। यो.ता.।।" -

या अवस्था प्राप्त करून घेण्याचा उपाय ऐका! प्रपंचाकडे उदासीनतेने पहावे; तसेच संकल्पविकल्पांचे ठाणे मोडून टाकावे. दक्षतापूर्वक हा उपाय अवलंबवा. पुष्कळ प्रयत्न करावे. संकल्पपरंपरा मोडून टाकावी. आशेचे आलंबन त्यागावे. संकल्प व आशा यांचा हळूहळू पण निश्चित ऱ्हास होत जातो आणि चित्त शांती पावते. अशा प्रकारे श्वसनक्रियेचा लोप होतो, शरीर निश्चल होते. नेत्र अर्धवट मिटलेल्या कमलाप्रमाणे होतात. या लक्षणांनी प्रतीत होणारी ***अमनस्का*** मुनिश्रेष्ठांठायीच प्रकटते.

सहजामनस्का व योगनिद्रा

"अमी यमीन्द्रा सहजामनस्कात्। अहं ममत्वे शिथिलायमाने। मनोऽतिगं मारुतवृत्तिशून्यम्। गच्छन्ति भावम् गगनावशेषम्।।२२।। विवर्तयन्ती निखिलेन्द्रियाणि। प्रवर्तयन्ती परमात्मयोगम्। संविन्मयीं तां सहजामनस्काम्। कदा गमिष्यामि गतान्यभावाम्।।२३।।" - ***सहजामनस्का*** प्राप्त झालेले योगी अहंममत्वाचे बंध जेथे नाहीत, जेथे घेऊन जाण्यास मनाची गती असमर्थ आहे, प्राण -मरुतशक्तीची जेथे वृत्तिशून्यता आहे, त्या ***गगनावशेष*** समाधीत विराजतात.

आचार्य उत्कंठ होत पुढे म्हणतातः "मनासह सर्वेंद्रिय वृत्ती जेथे विराम पावतात आणि परमात्म्याशी जेथे सतत मिलन होत असते; जी सर्व भावांच्या, गतींच्या, कल्पनांच्या, वृत्तींच्या अतीत आहे, ती ***सहजामनस्का*** अवस्था मला केव्हा बरे प्राप्त होईल!!"

तुरियेची नीज आणि अव्यक्ताचा पर्यंक

"प्रत्यग्विमर्शातिशयेन पुंसाम्। प्राचीनगन्धेषु पलायितेषु। प्रादुर्भवेत्काश्चिदजाड्यनिद्रा। प्रपञ्चचिन्तां परिवर्जयन्ती।।२४।। विच्छिन्नसङ्कल्पविकल्पमूले। निःशेषनिर्मूलितकर्मजाले। निरन्तराभ्यासनितान्तभद्रा। सा जृम्भते योगिनी योगनिद्रा।।२५।। विश्रान्तिमासाद्यतुरीयतल्पे। विश्वाद्यवस्थात्रितयोपरिस्थे। संविन्मयींकामपि सर्वकाले। निद्रांसखे निर्विश निर्विकल्पाम्।।२६।।"-

"आत्माभिमुख वृत्तींचे अतिशय आलंबन प्राप्त होऊन आत्मानात्मविवेक सुस्थिर झालेल्या भाग्यवंत पुरुषांचे पूर्वप्राचीन संस्कार आत्यंतिक लोप पावतात आणि प्रपंचचिंतांचा पूर्णतया त्याग घडून येऊन योगनिद्रा प्राप्त होते, जिच्यात आलस्य, जाड्य इ.निद्रागुण नसतात. पण योगी संसारात राहूनही निद्रिस्ताप्रमाणे विषयांसंबंधी वर्ततो. संकल्पविकल्पांचा मूलच्छेद झाल्याने, कर्मजालाचे निःशेष निर्मूलन केलेले असल्याने निरंतर अभ्यासामुळे शाश्वत कल्याणप्रद अशी योगाची परिपूर्णता असलेली योगनिद्रा प्रकाशमान होऊन योग्याठायी प्रकटते."

"तुरीयावस्थेच्या विश्रांती घेण्यासाठी सुयोग्य अशा या प्रशांत स्थानीच्या सुमनोहर पर्यंकावर, विश्वाच्या जागृति-स्वप्न-सुषुप्त्यादी त्रिक अवस्थांपलीकडे आत्म्याच्या संवितस्वरूपाशी एकरूप झालेल्या अवर्णनीय अशा निर्विकल्प स्थितीतील या योगनिद्रेत चिरकालासाठी, हे मित्रा! मी केव्हा बरे प्रवेश करीन!!"

हा जो तुरीयावस्थेचा निद्रेसाठीचा पर्यंक श्रीमच्छंकराचार्य वांछितात, त्याचा उल्लेख अनेकदा संतांच्या अभंगांतून येतो. ज्ञानेशांनी याच अर्थी म्हटले आहे की ***"हृदयाकाशपल्लकीं। परियें देसिं नीजें।।१२-५।।"*** मीराबाईही याच पलंगास उद्देशून म्हणते की ***"पिवके पलँगा जा पौढूँगी मीरा हरि रँग राचूँगी।।"***

मुक्ताई पण अशाच अर्थी म्हणते आहे की ***"निर्गुणाची सेज सगुणाची बाज"(अ.क्र.३२).*** चांगदेवांच्या मुक्ताईशी संवाद साधणाऱ्या अभंगांतून ती सांगते आहेः ***"गुण ना निर्गुण शब्दातीत। तेथे तू निश्चिंत बाळा नीज।।१।। पाळणा लाविला हृदयकमळीं। मुक्ताई जवळीं सादविते।।२।।अ.क्र.७।।";"अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला। तेथ पहुडला योगिराज।।अ.क्र.११।।"; "ब्रह्मांडगोलकीं। पवनाच्या पालखीं। अवधूत कवतुकीं पहुडलासे।।अ.क्र.१२।।"***

अजून एका अभंगातून मुक्ताई काय म्हणते ते आपण मुद्दाम लक्षात घ्यावे असेच आहे; ती म्हणतेः

गुणातीत डाहाळीं पाळणा लाविला।
तेथ सुत पहुडला। मुक्ताईचा।।
निजी नीज बाळा न करी आळी।
अनुहात टाळी वाजविते।।२।।
निद्रा ना जागृति भोगी पैं उन्मनी।
लक्ष तैं भेदूनि निज पाटीं।।३।।
निभ्रांत आतां पाळणा विणवुनि।
मन हें बोधौनि पवन दोरा।।४।।
एकविस सहस्र श्वास वेळोवेळां।
बाळा तोहीं डोळां स्थिर करी।।५।।
निद्रा ना जागृति निजसिल काई।
परियेसि चांगया बोले मुक्ताई।।६।।अ.क्र.८।।

या अभंगातून या अव्यक्तस्थानीच्या पर्यंकाची वा पाळण्याची काही तरी कल्पना जाणकार करू शकतात. श्रीज्ञानदेवांच्या संजीवन समाधिप्रसंगी नामदेवांनी ज्या भीममुद्रेचा उल्लेख केलेला आपण पाहिला होता, तिच्याही काही खाणाखुणा आपणास चांगदेवांनी मुक्ताई तोंडी घातलेल्या ***"एकविस सहस्त्र श्वास वेळोवेळां। बाळा तोहीं डोळां स्थिर करी।।५।।*** **निद्रा ना जागृति निजसिल काई।"** या शब्दांतून मिळतात.असो.

मनोलयाची अंतिम योगस्थिती

"प्रकाशमाने परमात्मभानौ। नश्यत्यविद्यातिमिरे समस्ते। अहो बुधा निर्मलदृष्टयोऽपि। किञ्चिन्न पश्यन्ति जगत्समग्रम्।।२७।। सिद्धिं तथाविधमनोविलयां समाधौ। श्रीशैलशृङ्गकुहरेषु कदोपलप्स्ये। गात्रं यदा मम लताः परिवेष्टियन्ति। कर्णे यदा विरचयन्ति खगांश्च नीडान्।।२८।।यो.ता.।।" -

"परमात्मरूपी चित्सूर्याचा उदय होऊन हा जो त्याचा प्रकाश पसरला आहे, त्यात अविद्येचा सर्व अंधकार लोपून गेला आहे. हे विबुध जनांनो! या प्रकाशात पाहणाऱ्या निर्मल दृष्टीच्या योगिराजास हे अखिल जगत जसेच्या तसेच असूनही दिसत नाही!! केवढे हे महदाश्चर्य!!!"

"श्रीशैलपर्वताच्या गुहेत मी ही योगसाधना करत आहे. केव्हा बरे मला ही स्थिती प्राप्त होऊन मनोलयाची अंतिम समाधी अशी ही अवस्था मी उपभोगीन! माझी गात्रे लतांनी परिवेष्टित केव्हा बरे होतील! काडीकाडी जमवून पक्षी केव्हा बरे माझ्या कर्णविवरात आपले घरकुल करतील!! केव्हा बरे मला ही योगसमाधी प्राप्त होईल!!!"

श्रीमच्छंकराचार्य या योगनिद्रेसाठी साधना करत आहेत. त्यासाठी मल्लिकार्जुनाचे सुंदर देवालय असणारा, किरातार्जुनीयाचे अद्भुत नाट्य जेथे आविष्कारले तो श्रीशैलगिरीचा रम्य परिसर त्यांनी आपल्या या योगसाधनेसाठी निवडला आहे. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात साधनेसाठी जसे स्थान असावे असे म्हटले आहे, थेट तसाच हा श्रीशैलातील पातालगंगेचा नितांतरमणीय परिसर आहे. त्यात श्रीमच्छंकराचार्यांसारख्या श्रेष्ठ योगसाधकाने चालवलेली त्यांची योगसाधना विफल थोडीच होणार! त्याचे फल प्रकटतेच प्रकटते!

निर्विकल्प समाधी

"विचरतु मतिरेषा निर्विकल्पे समाधौ। कुचकलशयुगे वा कृष्णसारेक्षणानाम्। चतुरजडमते वा सज्जनानां मते वा। मतिकृतगुणदोषा मां विभुं न स्पृश्यन्ति।।२१।।यो.ता." - "माझी मती कोठेही जावो! विबुध जनांच्या विचारात गढून जावो अथवा मूढांच्या विचारांकडे आकृष्ट होवो; सज्जनांची मते मला मोहून टाकोत किंवा मी निर्विकल्प समाधीत रममाण होवो; मृगांच्या अंगावरील कृष्ण ठिपक्यांसारखे विशाल नेत्र असणाऱ्या रमणींचे मला प्रलोभन पडो किंवा कलशासदृश उत्तुंग स्तनयुग्म असणाऱ्या प्रमत्त युवती माझे चित्त आकर्षित करोत! मतीपासून उत्पन्न झालेले हे गुणदोष मज विभु आत्म्यास स्पर्शू शकत नाहीत!!!"

"जैं उन्मनीयेंचें लावण्य। तुरियेचें तारुण्य। अनादि जैं अगण्य। परमतत्त्व।। जैं आकाराचां प्रांतु। जैं मोक्षाचां एकांतु। जेथ आदि आणि अंतु। विरौनि गेली।। जैं विश्वाचें येयां मूल। जैं योगद्रुमाचें फल। जैं आनंदाचें केवल। चैतन्य गां।।६-३२० ते ३२२।।" अशी ती परमात्म अवस्था उपभोगणारे ज्ञानदेव व श्रीमच्छंकराचार्य धन्य होत!!

नादावरचा ज्ञानदेवांचा अभंग

आपण आतापावेतो ***नादानुसंधानाने लययोगप्राप्ती*** या विषयाचा ***योगतारावलि***निमित्ताने जो आढावा घेतला, त्याच्या अंती ज्ञानदेवांचा एक अनाहतनादावरचा उत्कृष्ट अभंग पाहणे समुचित होईल. ते म्हणतातः

भवाब्धिसागरीं मांडिली टिपरी।
परि <u>अनुहात वाजे गजरु</u> वो।
ताळकछंदें उमटति पदें।
वरी टिपरें टिपरी वाजे वो।।१।।
टिपरियां घाई गोपाळ भाई।
घुळुं घुळुं पाईं नादु वाजे वो।।।२।।
ताळकछंदें वेगु आह्लादें।
टिपरी नादें वाजे वो।
<u>सांडूनि अहं धरिलें सोऽहं</u>।
<u>तयासिं टिपरें साधलीं वो</u>।।३।।
औटहात भूमिका नीट तालछंदें।
टिपरी धरी वो।
<u>विरुळा जाणें एथिंचें खुणें</u>।
<u>टिपरें वाजे शिरीं वो</u>।।४।।
एकटसंगें टिपरें वेगें।
<u>ध्वनी गगनीं गाजे वो</u>।
बाप रखुमादेविवरु टिपरी गाजति।
घाई जालीं टिपरियांजोगी वो।।४।।
।।अ.क्र.१०२०।।

"भवाब्धिसागरात पोहत असतांना टिपरीचा खेळ मांडला आहे. एकावर एक आघात करून वाजवायची ही टिपरी कसली आहे? प्राणापानाच्या या टिपऱ्या आहेत वाटते! मनपवनाची ही टिपरी एकावर एक वाजते आहे अन त्यातूनच हा अनाहताचा गजर निघतो आहे वाटते! या गोपाळांना टिपरीचा हा खेळ किती आवडतो आहे! पावलापावलाला घुळुघुळु असा अनाकलनीय नाद प्रकटतो आहे. ***<u>मनपवनाच्या या खेळात अहं सांडून सोऽहंला पकडणाऱ्या गोपाळांनाच - कृष्णाच्या त्या सख्यांनाच - हा खेळ साधतो</u>."***

औटहाताच्या या देहातच नीट ताल अन छंदावर कशी ही टिपरी खेळायची याचे रहस्य - ***कुंडलिनीचा हा लययोग*** - हा महायोग

विरळाच कोणी जाणतो. ही शिरी वाजणारी टिपरी कोणाची हे तो नीट जाणून असतो. मनपवनाची ही एकच एक टिपरी वेगाने गगनी ध्वनी कशी निनादवते, अनाहतनाद बह्मरंध्री कसा ताल धरून प्रकटतो, हे कोणी विरळाच ओळखतो. बाप रखुमादेविवराच्या कृपेने ही अनाहतनादाची टिपरी जोरजोराने दुमदुमत असते आणि त्याने हा कृष्ण आणि गोपाळांत रंगणारा टिपरीचा खेळ रंगात आला आहे!

जाताजाता जिज्ञासू वाचकांसाठी *योगतारावलि* या श्री.चं.वा.दांडेकर यांच्या या विषयावरील अभ्यासपूर्ण ग्रंथाचा संदर्भ निर्दिष्ट करणे उचितच ठरेल. त्याचप्रमाणे श्री.के.रा.जोशी यांचाही याबाबतचा ग्रंथ जिज्ञासूंनी परिशीलन करावा असाच आहे, हेही येथे नमूद केले पाहिजे. असो.

पंथराजविषयाचा अनुशेष::::

पंथराजसंबंधित उर्वरित योगविचार

आता पुनश्च *क्रमयोग* परीक्षिण्यासाठी उर्वरित विषयाकडे वळू या! पंथराजनिमित्ताने अजूनही काही महत्त्वाचे संदर्भ तपासणे जरूर आहे. त्यातील एक म्हणजे *एकनाथी भागवत.* ज्या संतश्रेष्ठ एकनाथमहाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाचे मूल संशोधन केले, ज्ञानेशांची समाधिस्थली प्रत्यक्ष भेट घेतली, त्यांचे योगविषयक विचार महत्त्वाचे आहेत. पंथराजप्रक्रिया समजून घेण्यासाठी ते निश्चितच साहाय्यकारी ठरतात. ते पाहणे सुयोग्य होईल.

एकनाथमहाराजांचा योगचक्रानुक्रम

नाथमहाराज योगचक्रक्रम देतात, तो असा:

१)***आधारचक्र*** - परावाणीचे स्थान, सूक्ष्मनाद + सूक्ष्मप्राणांचे स्थान + मनाचे सूक्ष्म स्फुरण

२) ***स्वाधिष्ठानचक्र*** - पश्यंति वाचेचे स्थान + प्राणांचे स्थान- येथून पंचप्राण व उपप्राण भिन्नत्व पावतात.

३)***मणिपूरचक्र*** - येथे जीव व मन यांचे ऐक्य होते.

४) ***अनाहतचक्र*** - मध्यमा वाचेचे स्थान - मनाची मुग्धावस्था

५) ***विशुद्धिचक्र*** - परा-पश्यंति व मध्यमा यांचे ऐक्यस्थान - वैखरीवाणीचे उत्पत्तिस्थान

६) ***आज्ञाचक्र*** - भुवयांमध्ये असते. हंसस्थान आहे. तेथे वाणी जाऊ शकत नाही - ऋद्धिसिद्धिप्राप्तिस्थान.

यापुढे एकनाथमहाराज ***औटपीठ, गोल्हाट, भ्रमरगुंफा, सहस्रदल*** असा चक्रक्रम असल्याचे सूचित करतात *(ओवी क्र. ३०० ते ३५२अ.१२, ए.भा.).* त्यांच्या भागवतातील *अ.क्र.१४ ओव्या क्र. ४१० ते ४५३* मधील प्रकट होणारा चक्रस्थानादी क्रम असा आहे:

(त्रिगुणावस्था-➢) ***षट्चक्रे - आज्ञाचक्र -➢ काकीमुख -➢ त्रिकूट -➢ औटपीठ -➢ गोल्हाट -➢ सत्रावी कला*** *(मूळ अनाहतसिद्धी)* *(गुणातीतावस्था)* ***-➢ भ्रमरगुंफा*** *(जीवशिव/शक्तिसंयोगाचे स्थान)* ***-➢ सहस्रदळकमल -➢ परब्रह्म.*** **सहस्रदलाअंती परब्रह्म असते.**

एकनाथी भागवत *अ.क्र.२० ओवी क्र.२५० ते २६८* या ओव्यांतून दिलेले ***योगमार्गक्रमण*** संक्षेपाने असे आहे:

वैराग्य - विवेक -➢ यमनियम -➢ आसन -➢ मुद्रा-मूलाधारी -➢अपानाचे मूलाधार-स्वाधिष्ठानचक्री ऊर्ध्वमुख होणे + प्राणांचे विशुद्धि, अनाहत, मणिपूर चक्री अधोमुखी होणे + मणिपूरचक्री प्राणापानांचे समत्व होणे -➢ प्राणापानसामरस्य -➢ १)पिंडक्षालन (स्थूलदेहक्षालन) + २) ब्रह्मांडक्षालन (सूक्ष्म-कारण-महाकारणदेहक्षालन) + कफपित्तनाश + नाडिशोधन -➢ संचित कर्मांचा नाश (वायू म्हणजेच प्राणापानाच्या सामरस्याद्वारे सर्व कर्ममळाचा अशेष नाश) -➢ रोग + महाविघ्ने + विकल्प + सिद्धी यांचे प्राकट्य.

यातूनही साधकाने स्थिरता ठेवल्यास ***प्राणापान सम होतात -➢ षटचक्रे निमावतात -➢ कुंडलिनीजागृती -➢ तिचा प्राणापानांसह सुषुम्नेत प्रवेश -➢ पश्चिमेचा महाघाट(षट्चक्रांपुढील मार्गक्रमणा) -➢ ब्रह्मरंध्र.***

या कुंडलिनीचालनाचा परिणाम असा होतो: ***आधिव्याधी + विकल्प + महाविघ्ने यांचा नाश -➢ काकीमुख (ब्रह्मरंध्राचे कपाट)उघडते -➢सहस्रदलचक्रावरून अमृतवर्षाव (चंद्रामृत स्रवणे) -➢ कुंडलिनीचे अमृतप्राशन -➢ कुंडलिनीचे गरळवमन (इंद्रियांस शक्ती प्रदान करणे) -➢ दिव्यदेहप्राप्ती -➢ पवनाची पायरी (पाऊटी करणे) -➢गगनमार्गक्रमण*** [सुषुम्नेत प्राणांसह *(वायूसह)* संचरलेली कुंडलिनी त्यांच्या सहयोगाने आज्ञाचक्रावरील चिदाकाश क्रमून जाते. त्या वेळी तिला **खेचरी** अशी संज्ञा देतात.]

या पुढील मार्गक्रमणातील चक्रानुक्रम असा: ***आज्ञा -➢ काकीमुख -➢औटपीठ -➢गोल्हाट -➢भ्रमरगुंफा-➢ शिवशक्तिसामरस्य (सोऽहंहंसाचे पीठ) -➢ परमात्मा (सद्गुरु)***

यातील काकीमुखाचा जो उल्लेख आहे त्याबाबत क्रम असा आहे: ***मकाराची नड -➢ अमात्राप्रवेश -➢ आज्ञाचक्रोपरांत अर्धेंदुचा मार्ग -➢ काकीमुख.***

संतश्रीएकनाथांचा योग व भक्तिसमन्वय

एकनाथी भागवताच्या चौदाव्या अध्यायात ***ध्यानयोग*** सांगितला आहे. श्रीकृष्णांच्या***"सम आसन आसीनः समकायो यथासुखम्। हस्तावुत्सङ्ग आधाय स्वनासाग्रकृतेक्षणः।।३२।।श्रीमद्भागवत।।"*** या श्लोकवचनानिमित्त ते निरूपण केले असून अध्यायसमाप्तीपर्यंत सलग योगविषय वर्णिला आहे.

त्यानुसार ***नासाग्रदृष्टी*** **म्हणजे अग्नी वा आज्ञाचक्री दृष्टी ठेवण्याचे तेथे विधान असल्याचे श्रीएकनाथ म्हणतात.** याबाबत थोर संशोधकांचे आणि योगी म्हणवून घेणाऱ्यांचे किती चुकीचे मत असते, ते आपण पाहतच असतो. ***नासाग्र म्हणजे नाकाचा शेंडा असा अर्थ केवळ योगशास्त्राचे अनभिज्ञच घेऊ शकतात, योगी नव्हेत!!*** असो.

प्रथम दर्भ, नंतर वस्त्र, कांबळे व चर्मासन असा आसन रचण्याचा क्रम एकनाथ सांगतात. तेथे शुद्ध मुद्रा लावून वज्रासन, कमलासन किंवा सहजासनात बसावे. मेरुदंड सरळ ठेवावा. मूलाधारादी बंध लावावेत. मुंगी पर्वत चढून जाते तितक्या सातत्याने योगाभ्यास करावा. प्राणायाम साध्य करावा. त्यामुळे प्राणापान हे भेद नाहीसे होतात व चक्रांचे पदर फुटतात. ***ॐकारयुक्त सगर्भ प्राणायाम व सगुणध्यानयुक्त अगर्भ प्राणायाम होत.*** प्राणाचा प्रणव होतो. ॐकाराचे स्मरणही नष्ट होते. अक्षरांचे उत्पत्तिस्थान - स्फूर्ती तोच प्रणव होय. त्यायोगे षट्चक्रे भेदून घेता येतात.

तेव्हा कुंडलिनीशक्ती वा उल्हाटशक्तीच्या योगे वैराग्याच्या जोरावर काकीमुख ओलांडून त्रिकूट गाठले जाते. अनुहतनादाचे निशाण लागते. औटपीठ व गोल्हाट ओलांडून सत्रावी कळा लाभते. सहस्त्रदलचक्र गाठून गुणांची त्रिवेणी नाहीशी होते. पुढे भ्रमरगुंफेआत जीवाशिवाचे मिलन होते. शिवशक्तिसंयोग होतो. सगुणाद्वारे निर्गुणही प्राप्त होते. त्रिपुटीराहित्य प्राप्त होते.

हीच खरी भक्ती व हाच खरा योग होय, असे एकनाथ म्हणतात *(ओवी क्र.३९८ ते ५४२, अ.१४, ए.भा.).* मूलाधारचक्र ते ब्रह्मरंध्र असा हा जीवाचा उत्क्रांतिमार्ग आहे *(ओवी क्र.१३० ते १३६,अ.क्र.१५,ए.भा).* ज्याला ज्ञानेश ***पंथराज*** असे म्हणतात त्याची अनेक वैशिष्ट्ये श्रीएकनाथांनी अवचितच उलगडून दाखवली आहेत. यासाठीच एकनाथी भागवतास ज्ञानेश्वरीचा पूरक ग्रंथ असे म्हणून भाविक जाणतात आणि ***"नामाचा तुका आणि ज्ञानाचा एका"*** अशी म्हण वारकऱ्यात रुजली आहे!

एकनाथमहाराज असे ***भक्ती व योग*** यांचे ऐक्य स्पष्ट करतांना दिसतात. त्यांचा ग्रंथ ज्ञानेश्वरीस पूरक समजला जातो हे मगाच सांगितले. त्यावरून त्यांच्या विचारांचे ज्ञानेश्वरीचा अभ्यास करणाऱ्यांस किती महत्त्व आहे, ते पण स्पष्ट व्हावे. जिज्ञासूंनी मूळ ग्रंथच पाहावा. त्याची ओवीसंख्या १८,७९८ म्हणजे ज्ञानेश्वरीच्या ओवीसंख्येच्या अदमासे दुप्पट आहे. पण अभ्यासकांस तो निश्चितच मूल्यवान आहे.

त्या विस्तृत ग्रंथराजाचा तूर्ततरी एवढाच ऋणनिर्देश करणे आपणास शक्य आहे. अन्यथा विषयविस्तारास अंतच उरणार नाही. असो.

समारोप

आता ज्ञानेश्वरीकडे पुनः वळू या. राजयोगतुरंगावर स्वार झालेला ***क्रमयोगी*** पुढे काय करतो, त्याचे ज्ञानेशांनी जे वर्णन केले आहे, ते पाहणार आहोत आपण या ***स्कंध क्र.१३*** च्या पुढील महत्त्वाच्या ***उन्मेष क्र.५५-२ - क्रमयोगसांगता*** यांतून! तर वळू या आता तिकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५५-२::
::योगसारसर्वस्व•क्रमयोगसांगता::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५५-२:

गीताः
३:२,३
५:४-६,१६
७:७,१६
९:३४
१०:११
१२:१२
१८:५५,६५-७८
ज्ञानेश्वरीः
६:२९१-२९२
७:१०८-११२,१३६
१८:१०५०-११७५,११७७, ११८३,११८५-११९२, १२०१-१२२२,१२४४-१२७३,१३३३-१४१६
शां.भ.सू.:४,५,७,१६

::उन्मेष ५५-२::

::योगसारसर्वस्व•क्रमयोगसांगता::

राजयोगाचा अंतिम टप्पा::::

उपोद्घात

मागील उन्मेषात आपण ***क्रमयोगाचा सुरुवातीचा भाग*** पाहिला. आता त्यापुढील भागातून ***क्रमयोगाची सांगता*** कशी होते, ते पाहून गीतेतील या एकमेवाद्वितीय योगाचे परिशीलन संपूर्णत्वास नेऊ या.

राजयोगतुरंगारूढ क्रमयोगी

मागील उन्मेषात क्रमयोगी राजयोगावर कसा आरूढ होतो, ते आपण पाहिले *(ओवी क्र.१८-१०४७;पृ.क्र.१०५०)*. राजयोगतुरंगावर स्वार झालेला क्रमयोगी पुढे काय करतो, ते ज्ञानेश असे वर्णितातः

अहंकाराचे निर्दालन

तेथ आडवावयां आलें। दोखवैरी तैं धोपटलें।
तेयांमाजिं पाहिलें। देहाहंकारु।।१८-१०५०।।
जो न मोकलीं मारुनि। जीवों नेदी उपजवौनि।
विचंबवि खोडा घालूनि। हाडांचियां।।१०५१।।
तेयाचां देहदुर्ग हा थारा।
मोडौनि घेतला तो वीरा।..।।१०५२।।

"हातात घेतलेल्या ध्यानरूपी खड्गाचे वार करत तो योगी आपल्याला मार्गात अडविण्यास उभ्या ठाकलेल्या दोषरूपी शत्रूंचा निःपात करतो. ***देहाहंकार*** हा तर एक मोठाच शत्रू, जो देह पडला तरी जीवास सुटून जाऊ देत नाही; तर पुनर्जन्म घेण्यास भाग पाडतो आणि हाडकांच्या खोड्यात या जीवाला कुंचबत ठेवतो. देह हा त्याचा बालेकिल्ला होय. योगी त्याला देहाचा थाराच ठेवत नाही."

दर्प व कामनेचे निखंदन

...। आणि बल हा दुसरा। मारिला वैरी।।१८-१०५२।।
जो विषयांचेनि नांवें। चौगुणेंहीं वरी थांवें।
जेणें मृतावस्था धांवें। सर्वत्र जगां।।१०५३।।
तो विषयविषाचा अथावो। आघवियां दोषांचां राओ।
परि ध्यानखड्गाचा घावो। साहैल कैंचा।।१०५४।।

"***वासनाबळ*** हा दुसरा शत्रू! विषय पाहिले की त्याचे सामर्थ्य चौपटीपेक्षाही खूप वाढते. वासनांच्या योगे जग झपाट्याने मृतावस्थेकडे चालले आहे. वासनांचे बल हा सर्व दोषांचे आगर असा विषयविषाने भरलेला अथांग डोह आहे. पण विषयांचा हा सम्राट ध्यानखड्गाचा घाव साहू शकत नाही.आणि हे दोन शत्रू निवटले की योग्याच्या दृष्टीसमोर येतो ***दर्प*** जो अति त्राप देतो!"

आणि प्रियविषयप्राप्ति। करी जेयां सुखाचिं व्यक्ति।
तैंचि घालूनि बुंथी। आंगिं जो वाजे।।१८-१०५५।।
जो सन्मार्गु भुलवि। मग अधर्माचां आडविं।
सूनि वाघां सांपडविं। नरकादिकां।।१०५६।।
तो विश्वासें मारितां रिपु।
निवटूनि घातला दर्पु।..।।१०५७।।

"प्रिय विषयांची प्राप्ती झाली की जे सुख अनुभवायला मिळते, त्या सुखाची खोळ पांघरलेला हा ***दर्प*** अंगी गर्वाचा फुंज चढवतो. मनुष्य त्याच्या प्रभावाने वाटेल तसे बरळू लागतो. सन्मार्गावरून मानवास भ्रष्ट करून तो अधर्माच्या अरण्यात नेऊन सोडतो आणि तेथील नरकादिरूपी वाघांच्या तावडीत देऊन हमखास जीव घेतो. विश्वास देऊन असा गळा कापणाऱ्या या दर्पनामक शत्रूचे तो योगी आपल्या हातीच्या ध्यानखड्गाच्या घावाने पुरते निर्दाळण करतो."

क्रोध व परिग्रह यांवर विजय

...। आणि जेयाचां आहां कंपु। तापसांसिं।।१०५७।।
क्रोधाआईसा माहादोखु। जेयाचां देखा परिपाकु।
भरिजे तंव अधिकु। रिता होएं।।१८-१०५८।।
तो कामु कोणेंचि ठाईं। नसें आईसें केलें पाहीं।
कीं तैंचि क्रोधाहीं। साहाजें जालें।।१०५९।।
मुलाचें तोडणें जैसें। होएं कां शाखोद्देशें।
कामु नाशिलेनि नाशें। तैसा क्रोधु।।१०६०।।
म्हणौनि कामु वैरी। जाला जेथ ठाणौरी।
तेथ सरली वारी। क्रोधाचिहीं।।१०६१।।

"आणि जो तापसांना सर्वाधिक छळणारा व ज्याची त्यांना भयंकर धास्ती वाटते तो ***क्रोध*** एक महादोष आहे. असा क्रोधच ज्याचा परिपाक आहे, कितीही भरला तरी जो रिक्तच राहतो असा घडा आहे, ज्याची तृप्ती केली असता तो अधिकच वखवखतो, असा कामसुद्धा तो योगी नष्ट करून टाकतो. त्या कामरूपी शत्रूचा नाश होताच क्रोधरूपी दुरासदाचाही आपसुकच नाश होतो. कारण मूळ तोडले असता वृक्षाच्या शाखापल्लवांचा नाश होतो ना, तसेच कामाचे समूळ उच्चाटन केले की त्याच्या आश्रयाने राहणारा क्रोधही पूर्णतया नाश पावतो. ***काम*** या शत्रूस या योगरूपी रणांगणावर जेव्हा मरण येते, तेव्हा क्रोधाचीही वारी सरते."

आणि समर्थु आपुला खोडा। शिसें वाहाविं जैसा होडां।
तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो।।१८-१०६२।।
जो माथांचि पालावणि। आंगां अवगुण घालविं।
जीवें दांडीं घेवविं। ममत्वाचिं।।१०६३।।

"तसेच उपभोग घेऊन बलिष्ठ झालेल्या ***परिग्रह***रूपी शत्रूचे निर्दाळणही तो योगी करतो. सत्ताधीश ज्याप्रमाणे एखाद्या अपराध्यास

घालावयाचा खोडा त्याच्याच शिरावर वाहण्यास लावतो, तसा हा बलवान परिग्रह जीवाच्या मस्तकावर आपले बस्तान ठेवतो. आपले अवजड खोगीर त्याच्यावर टाकून ते जीवास वाहण्यास भाग पाडतो. जीवाच्या अंगावर अवगुणांचे ओझे ठेवतो. त्याच्या तोंडी ममत्वाच्या काढण्या लावून त्याला हवे तसे नाचवतो."

शिष्यशास्त्रादिविलासें। मठादिमुद्रेचेनि मिसें।
घातिलें आहेति फांसें। निसंगा जेणें।।१८-१०६४।।
घरीं कुटुंबपणें सरें। तन्हैं वनीं वन्य होऊनि अवतरें।
नागवियांहीं शरीरें। लागला आहे।।१०६५।।
आईसा दुर्जयो जो परिग्रहो। तेयाचां फोडूनि ठाओ।
भवविजयाचा उत्साहो। भोगितसें जो।।१०६६।।

"शिष्यसंग्रह करणे, मठ बांधून तेथे वस्ती करणे, मुद्रा सिद्ध करणे व त्यासाठी स्त्री बाळगणे, अशा चेष्टा निःसंगांनासुद्धा तो परिग्रह करावयास लावून त्यांना आपल्या लगामात अडकवतो. घर त्यागून कुटुंबाचे पाश तोडू पाहणाऱ्या वनवासी तापसांना वनातील वस्तूंचा परिग्रह करण्यास लावून तो त्यांना आपल्या जाळ्यातून सुटू देत नाही. नागव्या साधूंसाठी तो त्यांच्या शरीराच्या रूपाने अवतरतो. अशा विजय मिळवण्यास दुःसाध्य असणाऱ्या परिग्रहरूप शत्रूचाही ठाव मोडून काढून तो राजयोगी संसारावर विजय मिळवतो आणि मग विजयोत्सवात मग्न होऊन जातो."

राजयोगाश्वाचे मुक्काम गाठणे

तेथ अमानित्वादि आघवें। ज्ञानगुणांचें जैं मेळावें।
तैं कैवल्यदेशींचे आघवें। राओ जैसें आलें।।१८-१०६७।।
तेधवां सम्यग्ज्ञानाचियां। राणिवा उगाणौनि तेयां।
परिवारु होऊनियां। राहात आंगें।।१०६८।।
प्रवृत्तिचियां राजबिदीं। अवस्थाभेदप्रमदीं।
कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लोण।।१०६९।।

"संसारसमरात विजयश्रीस वरलेल्या त्या योगिराजापुढे सकल ज्ञानगुणांचे अमानित्वादी जे कैवल्यदेशींचे राजेरजवाडे असतात, ते सगळे प्रत्यक्ष येऊन हजर होतात आणि आपली सम्यग्ज्ञानरूपी राज्यसंपदा त्यास अर्पण करण्यात धन्यता मानतात. ते ज्ञानगुणसमुदायरूपी राजे त्याच्या परिवाराचा एक भाग होऊन राहतात. प्रवृत्तीच्या राजमार्गावरून तो जेव्हा सहजगत्या चालू लागतो, तेव्हा जागृति-स्वप्न-सुषुप्ति या त्रिक्अवस्थारूपी प्रमदा त्याच्यावरून सुखाचे लिंबलोण पावलोपावली उतरवून टाकत धन्य होतात."

फुडां *बोधाचिएं कांबीवरी। विवेकु दृश्याचिं मांदी सारीं।*
योगभूमिका आरति करीं। येति जैसियां।।१८-१०७०।।
तेथ ऋद्धिसिद्धीचिं अनेगें। वृंदें मिलति प्रसंगें।
तयें पुष्पवर्षीं आंगें। नाहातसें तो।।१०७१।।
आईसेनि *ब्रह्मैक्यासारिखें। स्वराज्य एंतें जवलिकें।*
झलंबित आहे हरिखें। तिनिं लोक।।१०७२।।

"***विवेक***रूपी वेत्रधारी त्याच्या पुढेपुढे चालतो आणि आपल्या हातातील बोधरूपी छडीने दृश्यांची गर्दी दूर सारत त्या योग्याचा मार्ग मोकळा करतो. **योगभूमिका *(विविध समाध्यवस्थादी सप्तज्ञानभूमी)*** त्याच्यापुढे हाती आरती घेऊन ओवाळण्यास सरसावतात. **ऋद्धिसिद्धीं**चे समुदाय त्याच्यावरून पुष्पवृष्टी करतात. त्या कुसुमांनी तो नाहून निघतो. अशा रीतीने तो ब्रह्मैक्यरूपी स्वराज्याच्या निकट येऊन पोहोचतो. ते पाहून त्रैलोक्य हर्षित होऊन आनंदाने भरून जाते."

तेधवां वैरियां कीं मैत्रियां। तेयांसि माहें म्हणावेयां।
समानता धनंजया। उरेचिही ना।।१८-१०७३।।
हें ना भलतेणें व्याजें। तो जेयांतैं म्हणें माहें।
तैं नोडवेंचि कां दुजें। अद्वितीय जाहाला।।१०७४।।

"साम्यावस्थेच्याही अतीत तो झालेला असतो. मग शत्रू वा मित्र असा भेदभाव त्याच्याठायी उरेलच कसा! अर्जुना! त्यातूनही जर तो काही कारणाने कोणास आपले म्हणाला तर ते खोटे थोडेच असते! द्वैतापलीकडे गेलेल्या त्या योगिराजास दुजे म्हणून कोणीतरी असते का!"

पैं आपुलियां एकीं सत्ता। सर्वहीं कवलूनियां पांडुसुता।
कहिं न लगति ममता। धाडिली तेणें।।१८-१०७५।।
आईसा जिंतिलियां रिपुवर्गु। आपुं मानिलियां हें जगु।
आपैसा योगतुरंगु। थिरु जाहाला।।१०७६।।

"अशी ऐक्यात्मभावाची सत्ता त्याने मिळवलेली असते की त्यायोगे ममतेस आपल्याला स्पर्शिताही येणार नाही अशा दूर देशी त्याने हद्दपार केलेले असते. कारण सर्व परिसरच त्याच्या सत्तेने अंगीकृत होऊन ऐक्यभावाने भरून गेलेला असतो. मग आपले व परके असा ममत्वभाव कोठे राहील! सर्व रिपुवर्गास त्याने जिंकून घेतलेले असते, सर्व विश्व तो आपणच झालेला असतो, असे झाले की त्याचा राजयोगरूपी अश्व आपल्या मुक्कामास पोहोचतो!"

साधनेची अंतिम सीमा

वैराग्याचं गाढलें। आंगिं त्राण होतें भलें।
तैंहिं नावेक ढीलें। तेधवां करी।।१८-१०७७।।
आणि निवटीं ध्यानाचें खांडें। तैं दुजें नाहींचि फुडें।
म्हणौनि हातु आसुडें। वृत्तिचाहीं।।१०७८।।
जैसें रसौषध खरें। आपुलें काज करूनि पुरें।
आपणहीं नुरें। तैसें होतसें।।१०७९।।
देखौनि ठांकतां ठांओ। धांवतां थिरावें पावो।
तैसा *ब्रह्मसामीप्यें थांवो। अभ्यासु सांडीं*।।१०८०।।

"मग त्या योग्याने अंगी जे वैराग्यरूपी भक्कम चिलखत चढवलेले असते, त्याचे बंध तो ढिले करतो आणि ध्यानरूपी खड्ग तो म्यान करतो. कारण दुजे असे जेथे कोणीच नसते, तेथे वृत्तिरूप हात आपोआपच आखडतो. त्या हाती द्वैताचा निरास करणारे खड्ग आता काय उपयोगाचे!! रसौषधी जशी रोग बरी करून आपणही लुप्त

होते, तसेच हेही आहे. मुक्कामाचे ठिकाण आले की धावणारी पावले जशी थबकतात, तसेच ***ब्रह्मसामीप्य प्राप्त झाले की योगी योगाभ्यासास विराम देतो.***"

घडतां महोदधिसिं। गंगा वेगें सांडिजैं जैसिं।
कां कामिनी कांतापासिं। थिरु होएं।।१८-१०८१।।
नाना फलतिएं वेलिं। केलीचिं वाढी मांटुलें।
कां गांवाफुडें वलें। मार्गु जैसा।।१०८२।।
तैसा *आत्मसाक्षात्कारु। होईल देखौनि गोचरु।*
***आईसा साधनहतिएरुं। हलुंचि ठेविं* ।।१०८३।।**
म्हणौनि *ब्रह्मेंसि तेयां। ऐक्याचां समो धनंजया।*
***होतसें तैं उपायां। वोहटु पडें* ।।१०८४।।**

"महासागराची भेट होतेवेळी गंगा आपला वेग जसा टाकून देते व शांत होते, कामिनी जशी प्रियकरासमीप आली की लगबग टाकून त्याच्याजवळ स्थिरावते, केळी फळास आली की तिची वाढ जशी खुंटते, किंवा गावात शिरणारा रस्ता जसा आपला मार्ग टाकून गावाकडे वळतो; त्याचप्रमाणे ***आता आत्मसाक्षात्कार प्रत्यक्ष अनुभवास येणार आहे, हे जाणून तो योगिराज आपले साधनारूपी शस्त्र हलक्या हाताने खाली ठेवून त्या अनुभूतीस सामोरा जातो.*** अर्जुना! ***त्या वेळी ब्रह्मैक्य होण्याचा समय प्राप्त झाला आहे, हे पाहून साधने व मोक्षोपाय यांचा भर ओसरू लागतो.***"

शांत्यावस्था

मग वैराग्याचि गोधुलुक। जैं ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य।
योगफलाचा परिपाक। दशा जैं कां।।१८-१०८५।।
तैं शांति पैं गां सुभगा। संपूर्ण एं तेयांचियां आंगां।
तैं ब्रह्म होआवेयाजोगा। होएं तो पुरुखु।।१०८६।।

"हा समय कसा असतो, ती कोणती अवस्था त्या योगिराजास लाभते, ते ऐक! वैराग्यरूपी दिवसाची गोरजधूलच जणू, ज्ञानाभ्यासाचे परिपक्व ज्ञानवार्धक्यच जसे, योगफलाचा जणू परिपाकच अशी ती शांतिदशा संपूर्णपणे त्याच्या अंगी विलसते. ***तो योगिराज आता ब्रह्म होण्यायोग्य झालेला असतो. ब्रह्म होणे आणि ब्रह्म होण्यायोग्य असणे यात असे अंतर तरी कितीसें असते म्हणा!***"

पुनवेहूनि चतुर्दशिं। जेतुलें उणेंपण शशि।
कां सोलेपाऊनि जैसिं। पंधरावि वानी।।१८-१०८७।।
सागरींही पाणी वेगें। संचरें तैं रूप गंगें।
एर निश्चल तैं उगें। तैं समुद्रु जैसा।।१०८८।।
ब्रह्मा आणि ब्रह्महोतिएं। योग्यते तैसा पाडु आहे।
तैंचि शांतिचेनि लवलाहें। होएं तो गां।।१०८९।।
पैं तैंचि होणेनविण। प्रतीती आलें जैं ब्रह्मपण।
तैं ब्रह्म होति जाण। योग्यता एथ।।१०९०।।

"चतुर्दशीच्या चंद्रकलेस पुनवेच्या चंद्रम्यापेक्षा कितीसे उणेपण असते! पंधराव्या कसाचे सोने सोळाव्या बावनकशी सोन्याहून कितपत हीण असते! सागरात प्रवेश करतांना गंगेचे पाणी वेगवान असते. सागरात प्रवेशले की स्थिर निश्चल अशा सागराचे रूप तेच ग्रहण करत नाही का! त्या प्रवेशणाऱ्या गंगाजलात आणि त्याच्या सागरजलात झालेल्या रूपांतरात जेवढा फरक असतो, तेवढाच फरक ***ब्रह्म होण्याची योग्यता असणे व ब्रह्म होणे*** यात आहे. **शांत्यावस्था प्राप्त झालेला योगी निश्चितच आणि विनाविलंब ब्रह्मत्व पावतो, हेच खरे!**"

आत्मबोध::::

आत्मबोधप्राप्ती

त्या ***शांती*** प्राप्त झालेल्या योगिराजाची अवस्था आणि त्यास होणाऱ्या ब्रह्मलाभाची - खऱ्या भक्तीची स्थिती वर्णित ज्ञानेश सांगतात:

तैं ब्रह्मभावयोग्यता। पुरुखु तो मग पांडुसुता।
आत्मबोधप्रसन्नता-। पदीं बैसें।।१८-१०९१।।
जेणे निफजें रससोएं। तो तापुही जैं जाएं।
तैं तैं कां होएं। प्रसन्न जैसिं।।१०९२।।
नाना भरतियां लगबगां। शरत्कालीं सांडिजैं गंगा।
कां गीत राहतां उपांगां। वोहटु पडें।।१०९३।।
तैसा नाना बोधीं उद्यमु। करितां होएं जो श्रमु।
तोहीं जेथ समु। होऊनि जाएं।।१०९४।।

"शांती प्राप्त केलेला तो योगी ब्रह्म होण्यास पात्र असतो. आत्मबोधाने प्राप्त होणाऱ्या प्रसन्नतेच्या पदावर तो आरूढ होतो. रससिद्धी झाली, पक्वान्ने अग्नीच्या आचेवरून निघून निवाली की क्षुधाशमन करण्यास जशी सुग्रास वाटतात, खाणारा त्यांनी जशी प्रसन्नता पावतो, तसाच आत्मबोध होऊन तो योगी प्रसन्न होतो. शरदऋतू प्राप्त झाला की वर्षाकाळीची दुथडी भरून वाहण्याची लगबग टाकून गंगेचा प्रवाह कसा शांत सुस्थिर होतो किंवा गीतगायन संपले की वाद्यवादनही जसे स्तब्धावते, त्याचप्रमाणे आत्मबोधासाठी साधनांचा खटाटोप करत राहण्यात जे श्रम होतात, त्यांचेही आत्मबोधप्राप्तीबरोबरच शांतवन होते."

आत्मबोधप्रशस्ति। हें तिएं दशेचि ख्याति।
***तैं भोगितसें महामति* । योग्यु तो गां।।१०९५।।**
तेधवां आत्मत्वें शोचावें। कांहीं पावावयां कामावें।
हें सरलें समभावें। भरितें तेयां।।१०९६।।
उदयां एंतां गभस्ति। नाना नक्षत्रव्यक्तीं।
हारविजति दीप्ति। आंगिकां जेविं।।१०९७।।
तेंवि उठतिया आत्मप्रभा। हें भूतभेदुवेवस्था।
मोडीत मोडीत पार्था। वासु पाहें तो।।१०९८।।

"***आत्मसाक्षात्कारातील प्रसन्नता*** असे याच अवस्थेस म्हणतात. हे महाबुद्धिवंत अर्जुना! तो योगिराज मग हीच अवस्था

उपभोगून धन्य होतो. तेव्हा त्याला आपले परके काही उरत नाही. स्वार्थही उरत नाही. म्हणून कोणत्या गोष्टीच्या अलाभाने किंवा कोणत्याही वस्तूच्या हानीने दु:खी व्हावे किंवा कशाचीही इच्छा धरावी हे खरे तर सर्वच सरते. सर्वत्र समदृष्टी लाभून त्याला इच्छाद्वेष, रागलोभ इत्यादी द्वंद्वे उरत नाहीत. रविउदय होताच सगळी नक्षत्रमालिका आपली दीप्ती जशी हरवून बसते, त्याप्रमाणे आत्मानुभव उदित झाला की भूतभावांचा आत्यंतिक लोप होऊन त्या योग्यास सर्वत्र आत्मरूपाचाच साक्षात्कार होत जातो."

पाटियेवरील आखरें। जैसिं पुसतां एंति करें।
तैसिं हारपति भेदांतरें। तेयांचिएं दिठीं।।१८-१०९९।।
तैसेनि *अन्यथाज्ञानें। जिएं घेपति जागरस्वप्नें।*
तिएं दोनिंहीं केली लीनें। अव्यक्तामाजिं।।११००।।
मग तैंहीं अव्यक्त। बोध वाढतां झिझत।
पुरलां बोधिं समस्त। बुडौनि जाएं।।११०१।।

"पाटीवरील अक्षरे हाताने जशी पुसून टाकावीत, तशी, हे अर्जुना! भूतभिन्नता त्याच्या आत्मानुभवाने लोप पावते. त्याच्या दृष्टीस भूते गोचरच होत नसतात. ***अन्यथाज्ञानाने ज्या जागृति-स्वप्न-सुषुप्त्यादी अवस्थांचा आविर्भाव होतो, त्यासुद्धा अव्यक्तात लीन होतात आणि जसजसा आत्मबोध दृढ होत जातो, तसतसे ते अव्यक्तसुद्धा झिजत जाऊन पूर्णबोधरुपी महापुरात बुडून सगळेच्या सगळे लय पावते."***

आत्मबोधप्राप्ती::::

"हें चवथी भक्ति पाहीं। माही तो लाहें"

जैसिं भोजनाचां व्यापारीं। क्षुधा जिरति अवधारीं।
तृप्तिचां अवसरीं। नाहींचि होएं।।१८-११०२।।
नाना चालिचियां वाटीं। वाट होत जाएं थोडी।
मग पातलां ठाइं बुडी। देऊनि निमें।।११०३।।
कां जागृति जंव उद्दीपें। तंव तंव निद्रा हारपे।
मग जागिनिलियां स्वरूपें। नाहींचि होएं।।११०४।।
हें ना आपुलें पूर्णत्व भेंटें। जेथ चंद्रासिं वाढी कुंठें।
तेथ शुक्लपक्षु आटे। नि:शेषु जैसा।।११०५।।
तैसा *बोध्यजात गिळितु। बोधु बोधें एं मजआंतु।*
***मिसळला तेथ सांद्यंतु। अबोधु गेला*।।११०६।।**

"भोजन करत असता घासागणिक क्षुधा जशी जिरत जाऊन तृप्ती होतेवेळी सगळीच्या सगळी नाहीशी होते; जसजसे चालत जावे, तसतशी वाट जशी सरत जाऊन शेवटी मुक्कामाच्या ठिकाणी बुडी मारून नाहीशी होते; अथवा जसजशी जागृतावस्था उदित होत जाते, तसतशी निद्रा हरपत जाऊन पूर्ण जाग येताच आपले स्वरूप सांडते; हे असो! चंद्रास जेव्हा आपले पूर्णत्व प्राप्त होते, तेव्हा त्याची वाढ खुंटून शुक्लपक्षच नि:शेष आटून जातो; त्याप्रमाणे ज्ञानायोगे समस्त ज्ञेय वस्तूंना गिळून टाकत ज्ञान जेव्हा मजआत प्रवेशते, तेव्हा तो योगिराट मजशी एकरूप होऊन त्याचे सर्व अज्ञान लयाला जाते."

तेधवां कल्पांताचिएं वेळें। नदी सिंधूचें पेंडवळें।
मोडौनि भरलें जळें। आब्रह्म जैसें।।१८-११०७।।
ना ना गेलिआं घटमठ। आकाश ठाकें एकवट।
कां जळौनि काष्ठें काष्ठ। वह्निचि होएं।।११०८।।
ना तन्हैं लोणियाचें ठंसें। आटौनि गेलिआं मुसें।
नामरुपभेदें जैसें। सांडिजें सोने।।११०९।।
हेंही असो चेईलिआं। तैं स्वप्न नाईं जालिआं।
मग आपणचि आपणयां। उरिजे जैसें।।१११०।।
तैसा *मी एकवांचूनि काईं। तेयां तेयाहिसगट नाईं।*
***हें चवथी भक्ति पाहीं। माही तो लाहें*।।११११।।**

"कल्पांतसमयी नदी आणि नद इ.सर्व जलांचे पेंडाळे आपापले वेगळाले अस्तित्व मोडून गेल्याने जसे आब्रह्मपावेतो एकाच एका जलरूपाने भरून जाते; घटमठादी आकार मोडताच आकाश जसे एकलेएक आपणाठायीच उरते; अथवा अग्नी लावून दुसरे काष्ठ पेटवताच तेही जसे काष्ठरूप टाकून केवळ अग्निरूपच घेते; सोन्याचे अलंकार मुशीत घालून आटवले असता जसे आपापले रूप टाकून देत केवळ सुवर्णरूपाने उरतात; हे असो! जागृति येऊन स्वप्न नाहीसे होताच जसे आपणच आपल्याठायी एकले उरतो, स्वप्नसृष्टी तेव्हा जशी लय पावते; त्याप्रमाणे **जेव्हा ज्ञानासह तो योगिराणा मजआत प्रवेशतो तेव्हा होते** *(तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्*[१३] *।।१८-५५।।उन्मेष५५-१:योगसारसर्वस्व•क्रमयोगारंभ,पृ.क्र.१०४०)*.. **त्याला केवळ मजवाचून त्याच्याहीसकट इतर काहीच उरत नाही. हीच माझी *चतुर्थ भक्ती* होय, जी त्या भाग्यवंतास लाभते."**

सहजप्रकाश व भक्ती

आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी असे जे भक्तीचे तीन प्रकार आहेत, त्यांच्यापरोक्ष असा हा चौथा भक्तिप्रकार असून तो फार श्रेष्ठ असल्याचे भगवंत सूचित करतात. ***"माझी सहजस्थिती म्हणजेच भक्ती होय"*** असे ते म्हणतात.

"हीच खरी भक्ती! वास्तविक पहिली, दुसरी किंवा तिसरी अशी भक्तीची श्रेणी नसतेच! तर माझा प्रकाश पाहूनही जे मला नेणणे; अज्ञानवशे इतर वस्तूंवर जे माझा आरोप करणे; सर्वत्र मला पाहत असतांनाही तेथे अन्य वस्तुजात कल्पिणे; ज्यास जसे पाहावेसे वाटते, तसे त्यास पाहण्यास मिळणे, हे सर्व ज्या माझ्या अखंड प्रकाशामुळे घडून येते, दृग्गोचर होते; जसे स्वप्नातील वस्तूंचे असणे, नसणे व दिसणे आपल्या आत्मसत्तेने घडून येते, तसे **या विश्वाचे *अस्ति-नास्ति* रूप ज्या माझ्या चिद्प्रकाशाने गोचर होते, तो माझा *सहजप्रकाश* हाच अर्जुना! *भक्ती* म्हणून म्हटला जातो**, अशी या ***सहजभक्ती*** ची भगवंत व्याख्या सांगतात *(१८-१११२)*.

"दृश्यपथाअतीतु पथु"

"आईसा हा सहजु माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति ययां वोजां। बोलिजे गां।।१८-१११७।।" असे त्यांचे शब्द

आहेत. यापूर्वी सातव्या अध्यायी भगवंतांनी ***आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू व ज्ञानी*** असे आपल्या भक्तांचे चार वर्ग सांगितले होते: ***"चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन। आर्तो जिज्ञासूरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।।७-१६।।"***

त्यांच्याबाबत तेव्हा ज्ञानदेव असे म्हणाले होते की ***"आईकां चतुर्विध मज भजलें। जेहीं आत्महित केलें। वाढतें गां।।७-१०८।। तो पहिला आर्त्तु म्हणिजे। दुसरा जिज्ञासू बोलिजे। तिजा अर्थार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा।।१०९।। तेथ आर्त्तु तो आर्त्तिचेनि व्याजें। जिज्ञासू तो जाणावयाचिलागिं भजे। तिजेनि तेणें इच्छिजे। अर्थसिद्धि।।११०।। मग चौथियाचां ठाईं। काईंचि करणें नाहीं। म्हणौनि भक्तु एकु पाहीं। ज्ञानिया जों।।१११।। जैं तेयां ज्ञानाचेनि प्रकाशें। फिटलें भेदाभेदांचें कवडसे। मग मीचि जाहाला समरसें। आणि भक्तुही तेंविचिं।।११२।।"*** या ओव्यांतून त्यांनी ज्या ज्ञानप्रकाशाचा उल्लेख केला आहे, त्याची अमर्याद व्याप्ती कशी आहे, ते ज्ञानेश *१८-१११ ते ११२१* या ओव्यांतून सूचित करत आहेत; तसेच **अज्ञानी भक्तांसकट इतर चतुर्विध भक्तही हाच *ज्ञानप्रकाश* वा *सहजप्रकाश* कसा पाहत असतात, ते स्पष्ट करत आहेत.**

भक्तीवरील भगवद्वचनांवर प्रकाश टाकणारे ज्ञानेशांचे बोल ऐका:

म्हणौनि *आर्त्ताचां ठाईं। हें आर्त्ति होऊनि पाहीं।*
अपेक्षणीय जैं काईं। तैं मीचि केला।।१८-१११८।।
जिज्ञासूफुडां वीरेशा। हेंचि होऊनि जिज्ञासा।
मी कां जिज्ञास्यु आईसा। दाखविला।।१११९।।
हेंचि होऊनि अर्थना। मीचि माझां अर्थां अर्जुना।
करूनि अर्थाभिधाना। आणी मातें।।११२०।।
एवं घेऊनि अज्ञानांतें। माझी भक्ति हें जैं वर्ते।
तैं दावीं मज द्रष्टयांतें। दृश्य करूनि।।११२१।।

"**आर्त भक्तां**पुढे माझा हाच ***सहजप्रकाश*** उत्कट इच्छेच्या पूर्ततेच्या रूपाने ***आर्ततानिवारणाच्या मिषाने प्रकटतो.*** हे वीरेशा! **जिज्ञासू भक्ता**बाबत हाच प्रकाश ***जिज्ञासापूर्तीच्या मिषाने ज्ञानवस्तूच्या रूपाने प्रकटतो.*** **अर्थार्थी भक्ता**बाबत त्याचप्रमाणे हा प्रकाश ***अर्थसाधनमिषाने अर्थ होऊन प्रकटतो. अज्ञान घेऊन माझी भक्ती करू जाणाऱ्या भक्तांपुढे अशा प्रकारे ती भक्ती मज द्रष्ट्यालाच दृश्यस्वरूपात प्रकटवते."***

ही सर्व ***गौणी*** वा ***आणवी*** भक्ती होय. ज्ञानेश पुढे म्हणतात:

एथ मुखचि दिसें मुखें। ययां बोलां काईं न चुकें।
परि दुजेपण लटिकें। आरिसा करीं।।१८-११२२।।
दिठी चंद्रचि घे सांचें। परि एंतुलें हें तिमिराचें।
जैं एकचि असे तेयाचें। दोनिं दावीं।।११२३।।
तैसा मीचि सर्वत्र मिया। घेपतसे भक्ति इयां।
परि दृश्यत्व हें वांयां। अज्ञानवशें।।११२४।।
तैं *अज्ञान आतां फिटलें। माहें द्रष्टृत्व मज भेंटलें।*
निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें।।११२५।।

"आरशात प्रतिबिंबरूपाने मुखच दिसते. पण ते आभासात्मक असते. तिमिरदृष्टीच्या मनुष्यास तसा खरा तर चंद्रच दिसतो, पण दृष्टिव्यंगामुळे एकाऐवजी त्यास दोन बिंबे दिसतात. त्याचप्रमाणे या ***अज्ञानभक्तीमुळे भक्तांस वस्तुत:माझीच उपलब्धी होते. पण माझे द्रष्टा हे स्वरूप अज्ञानामुळे तसे न दिसता दृश्यरूपाने मीच त्यांना दिसतो. जेव्हा ते अज्ञान नाहीसे होते, तेव्हा दृश्य माझ्यामध्ये एकवटते;*** प्रतिबिंब नाहीसे झाले की ते जसे बिंबाशी एकरूप होते, त्याप्रमाणे ***दृश्य व द्रष्टा ही माझ्याठायी एकवटून मद्रूप प्रकटते."***

पैं जेधवां असे इं कीडाल। तेधवांहीं सोनेंचि अढल।
परि तैं गेलियां केवल। उरे जैसें।।१८-११२६।।
हां गां पौर्णिमेआदिं काईं। चंदरु सावेव नाईं।
परि तिएं दिसीं भेंटे पाहीं। पूर्णता तेयां।।११२७।।
तैसा मीचि ज्ञानद्वारें। दिसें परि हस्तांतरें।
मग द्रष्टृत्वीं तैं सरें। मियांचि मी लाभें।।११२८।।
म्हणौनि दृश्यपथा-। अतीतु माझा पार्था।
भक्तियोगु चवथा। म्हणितला गां।।११२९।।

"कमी कसाचे सोने पण सोनेच जरी असले तरी जेव्हा त्यातील हीण जाऊन जसे शुद्ध सोने उरते; किंवा चंद्र जरी पौर्णिमेआधीही सावयवच असला तरी त्या दिवशी त्याला जसे पूर्णत्व भेटते; त्याचप्रमाणे ज्ञानेंद्रियांद्वारे जे दृश्य अज्ञानामुळे दिसते, ते जरी मीच असलो, तरी ते माझे रूपांतर जेव्हा सरते, तेव्हा माझा ज्ञानप्रकाश फाकून द्रष्टास्वरूपाच्या माझी मजशीच भेटी होते. एवंच भक्त मजशी एकवटतो, त्याला माझा लाभ होतो, हे म्हणणेही वावगे ठरते. कारण मी आणि तो यात दुजेपण कोठे असते! **ज्ञानी भक्ताची ही भक्ती *चतुर्थ भक्ती* होय** असे मी म्हटले आहे. **दृश्याच्या पलीकडे ही भक्ती घेऊन जाते. म्हणून *दृश्यपथातीत मार्ग* असे मी या मार्गास - या योगास म्हणतो."**

भक्त भगवंतात प्रवेशतो

"भक्त्या मामभिजानाति ..।.. विशते तदनन्तरम्।।१८-५५।।" -"असा हा ***ज्ञानीभक्त*** **माझे स्वरूप जाणतो व मजमध्ये प्रवेशतो"** असे भगवंत म्हणतात. ***क्रमयोगाचे हे फल आहे.*** ज्ञानेश याविषयी म्हणतात:

इयां *ज्ञानभक्ति साहाज। भक्तु एकवटला मज।*
तो मीचि केवल हें तूझ। श्रुतहीं आहे।।१८-११३०।।
जैं उभऊनियां दोनिं भुजा। ज्ञानियां आत्मा माझा।
हें बोलिलों कपिध्वजा। सप्तमाध्यायीं।।११३१।।
तैं हें कल्पादि भक्ति मियां। भागवतमिखें ब्रह्मेयां।
उत्तम म्हणौनि धनंजया। उपदेशिलीं।।११३२।।

"या भक्तीच्या मार्गाने - या ज्ञानप्रकाशात जो भक्त मजशी एकरूप होतो, तो केवळ मद्रूपच असतो असे नाही, तर तो म्हणजे

मीच हे तुला ठाऊकच आहे! सप्तमाध्यायी, हे अर्जुना! ***"ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।।७-१८।।"*** असे मी तुला दोन्ही बाहू उंचावत म्हटले होते, ते तुला स्मरतच असेल!!"

ज्ञानी इयेंतें स्वसंवित्ति। शैव म्हणति शक्ति।
आम्हीं परमभक्ती। आपुलीं म्हणों।।१८-११३३।।
हें मज मिलतिएं वेलें। तेआं क्रमयोगियां फलें।
मग समस्तहीं निखलें। मियांचिं भरें।।११३४।।

"हीच ***ज्ञानभक्ती*** मी **भागवता**द्वारे कल्पारंभी ब्रह्मदेवास ***सर्वोत्तम भक्ती*** म्हणून उपदेशिली होती. ज्ञानी या भक्तीस ***स्वसंवित्ति*** **म्हणजे आत्मज्ञान म्हणून म्हणतात. शैव हिला *शक्ती* असे म्हणतात. आम्ही मात्र ही *परमभक्ती* वा *पराभक्ती* आहे असे म्हणतो. क्रमयोग्यास ही भक्ती *क्रमयोगाच्या फलस्वरूप* अशी प्राप्त होते.** मग सर्व विश्व माझ्यानेच ओतप्रोत भरून गेले आहे अशी प्रतीती त्याला येते. किंबहुना असेही म्हणणे योग्य नाही. कारण त्या वेळी तो आणि मी कोणी वेगळे का असतो!"

तेथ *वैराग्यविवेकेंसिं। आटें बंध मोक्षेंसिं।*
वृत्ति तयें आवृत्तिसिं। बुडौनि जाएं।।१८-११३५।।
घेऊनि ऐलपणातें। परत्व हारपें जेथें।
गिळूनि चाऱ्हीं भूतें। आकाश जैसें।।११३६।।
तेयां परी थडथांद। *साध्यसाधनातीत शुद्ध।*
तैं मी होऊनि एकवद। भोगीं तो मातें।।११३७।।

"ऐलतीरासह पैलतीर हरपून गंगा जशी सागरास मिळते; चारही महाभूते समावून घेत एकटे आकाश जसे उरते; त्याप्रमाणे ***वैराग्यविवेक हरपून बंध मोक्षाशी एकरूप होतो; वृत्तीची आवर्तने लोपतात; साधन-साध्य एकरूप होतात; आणि त्यांपलीकडे माझे जे शुद्ध स्वरूप आहे, ते पावून माझ्याशी एकरूप होऊन तो क्रमयोगी मद्रूप होऊन मलाच भोगतो."***

क्रमयोगाची सांगता::::

परमभक्तीची अवस्था

या अवस्थेचे निरूपण करत ज्ञानेश्वर म्हणतातः

घडौनि सिंधूचियां आंगां। सिंधूवरी तलपें गंगा।
तैसा पाडु तेयां भोगां। अवधारिजो।।१८-११३८।।
कां आरिसयांसिं आरिसा। उटूनि दाविलियां जैसां।
देखणा अतिसो तैसा। भोगणां तिएं।।११३९।।
चेइलियां स्वप्न नासें। आपुलें ऐक्यचि दिसें।
तैं दुजेनविण जैसें। भोगिजे कां।।११४०।।
हें असो दर्पणु नेलियां। तो मुखबोधुहीं गेलियां।
देखलेपण एकलेयां। आस्वादिजे जेविं।।११४१।।

"सागरास मिळालेली गंगा जशी त्याच्या अंगावर उठून दिसते, तसे त्या मद्रूप होऊनही माझ्या भक्तीचा उपभोग घेणाऱ्या क्रमयोग्याबाबत घडते. ऐक. अर्जुना! जागृतावस्थेत निद्रेतले स्वप्न नाहीसे होऊन आपले आपणच एकटेपणाने उरलो तरी ते अद्वैतपण - एकलेपण - जसे आपण उपभोगतो; मुखासमोरील आरसा दूर केला आणि मुखाचे प्रतिबिंब नाहीसे झाले, तरी मुखाचे अस्तित्व जसे आपणास जाणवतच राहते; किंवा आरशापुढे आरसा ठेवून एका आरशाचे प्रतिबिंब दुसऱ्या आरशात पडते व तेच पुनः त्या आरशात समावून जाऊन तो आरसा जसे स्वतःचेच रूप स्वतःतच समावून घेऊन स्वतःच आपले द्रष्टेपण उपभोगतो; त्याप्रमाणे ***मद्रूप झालेला तो योगी हे परिसीमेचे द्रष्टेपण आपण द्रष्ट्याशी अभिन्न झाल्यावरही उपभोगतो."***

तोचि गेलियां भोगु तेयाचां। न घडे हा भावो जेयाचां।
तिहीं बोलें केविं बोलाचा। उच्चारु कीजैं।।१८-११४२।।
तेयांचां नेणों गांवीं। रवि प्रकाशि हन दिवीं।
कीं व्योमालागिं मांडवी। उभिलीं तिहीं।।११४३।।
हां गां राजन्यत्व नव्हता आंगिं। रावो रायपण काएं भोगिं।
कां आंधारु हन आलिंगिं। दिनकरांतैं।।११४४।।
आणि आकाश जैं नव्हें। तेयां आकाश काएं जाणवें।
रत्नाचां रुपीं मिरवें। गुंजांचें लेणें।।११४५।।
म्हणौनि मी होणें नाहीं। तेयां मीचि आहे केंहीं।
मग भजैल हें काईं। बोलों कीर।।११४६।।
ययालागिं *तो क्रमयोगी। मी जालाचिं मातें भोगिं।*
तारुण्य कां तरुणांगिं। जियापरी।।११४७।।

"कोणाला जर हे कसे घडू शकेल अशी शंका अजूनही असेल तर सांग बरे! शब्दाचा उच्चार शब्दांद्वारेच होत नाही का! ज्यांना हे अशक्य वाटते त्यांच्या गावी सूर्याला दिवटी प्रकाश देत असणार! आकाश मांडवाने आच्छादले जात असणार! कोणा अंगी राजेपण नसता तो राजेपण कसे उपभोगू शकेल! आणि आकाश झाल्याशिवाय आकाशत्व कसे असते, ते कळू शकेल काय! गुंजांचे लेणे रत्नालंकाररूपाने कधीतरी झळकेल काय! अंधार सूर्यास आलिंगूनही आपले रूप टिकवून राहील का कधी! तरुणी जसे स्वतःच्या अंगीचे तारुण्य आपले आपणच उपभोगते, त्याप्रमाणे ***तो क्रमयोगी मद्रूप होऊनही मला उपभोगतो,*** यात संशय नही!"

"दृश्यीं नाहीं द्रष्टता"

तरंगिं सर्वांगिं तोय चुंबिं। प्रभा सर्वत्र विलसें बिंबिं।
नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा।।१८-११४८।।
कां चंदनाचि द्रुति जैसिं। चंदनिं भजे आपैसिं।
कां अकृत्रिम शशि। चंद्रिका जेविं।।११५०।।

क्रमयोग्याच्या या अवस्थेचे विवेचन आपण पूर्वीही प्रसंगोपात्त पाहिले होतेच. ज्ञानेश म्हणतातः "लाट जशी सर्वांगाने पाण्यास उपभोगते, प्रभा जशी बिंबास पूर्णालिंगन देते, अवकाश गगनाच्या अंगावर जसे पहुडते, चंदनगंध जसा चंदनास परिवेष्टितो, चंद्रप्रकाश जसा सहजच चंद्राच्या सहवासाचा उपभोग घेतो, त्याचप्रमाणे तो

<u>*मद्रूप झालेला क्रमयोगी मला भक्तिभावे उपभोगतो*</u> ***(मद्भक्तिं लभते पराम्*** *।।१८-५४।।उन्मेष५५-१:योगसारसर्वस्व●क्रमयोगारंभ,पृ.क्र.१०४०)*. अद्वैतावस्थेत क्रियाशीलत्व नसते, द्वैत तर नसतेच नसते, तरीही अद्वैतात भक्ती असते. पण ते कसे हे सांगता येत नाही. ही गोष्ट अनुभूतिगम्यच आहे! दृश्याचा निरास होऊन द्रष्टा जेव्हा स्वस्वरूप पावतो, तेव्हा केवळ द्रष्टाच उरतो! दृश्यच द्रष्टा होते, दृश्यत्वही द्रष्टारूप होऊन त्रिपुटी लोपते."

तेथ स्वप्नींचियां प्रिया। चेवोनि झोंबों गेलियां।
ठाईजे दोनहीं न होनियां। आपणचि जैसें।।१८-११५८।।
कां दोनहीं काष्ठांचिएं घृष्टि-। माजिं वह्नि एकु उठी।
तो दोनिं हें भाख आटी। आपणचि होएं।।११५९।।
नाना प्रतिबिंब हातिं। घेऊं गेलियां गभस्ति।
बिंबताहीं असती। जाएं जैसिं।।११६०।।
तैसा मी होऊनि देखतें। तो घेऊं जाएं दृश्यातें।
तेथ दृश्य ने तेथें। द्रष्टृत्वेंसिं।।११६१।।
रवि आंधारु प्रकाशितां। नुरेचिं जेंविं प्रकाश्यता।
तेंविं दृश्यीं नाहीं द्रष्टृता। मी जालियां।।११६२।।

"या अवस्थेत द्रष्टेपण लोपते, एकलेपणही लोपते. स्वप्नातील प्रियकरास आलिंगन देतांना जागृती आलेली स्त्री जसे आपलेपण आणि प्रियकरस्वरूप दोन्ही नष्ट होऊन आपली आपणच उरते किंवा दोन काष्ठे घासून त्यातून जेव्हा अग्नी प्रकटतो, तेव्हा जसे त्यांचे द्वैत व काष्ठत्व जाऊन ती केवळ अग्निरूपच होऊन राहतात; किंवा सूर्य जर आपलेच प्रतिबिंब हाती घेऊ जाईल तर प्रतिबिंबाबरोबर बिंबत्वसुद्धा हरवून बसेल; त्याप्रमाणे जेव्हा मद्रूप झालेला तो योगी दृश्यास उपभोगू पाहतो, तेव्हा तो त्यातील दृश्यत्वास उपभोगू न शकता केवळ माझे द्रष्टुत्वच उपभोगतो. पण ***वस्तुतः त्या अवस्थेत द्रष्टेपणा व दृश्यत्व ही काहीच नसतात.*** सूर्याने अंधारास उजळवले की त्याची प्रकाश्यता जशी उरत नाही, त्याचप्रमाणे दृश्यत्वसुद्धा जेव्हा मद्रूप होते, तेव्हा द्रष्टृत्व कसे बरे उरेल!"

अद्वैतावस्था

मग ***<u>देखिजे ना देखिजे। आईसिं दशा जैं निफजे।</u>***
<u>तैं तैं दर्शन माझें। सांचोकारें</u>।।१८-११६३।।
<u>तैं भलतेयांहीं किरीटी। पदार्थाचियां भेटी।</u>
<u>द्रष्टृदृश्यातीता दृष्टी। भोगी तो सदा</u>।।११६४।।
आणि आकाश हें आकाशें। दाटलें न ढळें जैसें।
मियां आत्मेनि आपणपें तैसें। जाहालें तेयां।।११६५।।

"तो योगी मग काही पाहो अथवा न पाहो, तेच त्याचे पाहणे व न पाहणे म्हणजे माझेच दर्शन होय! आणि कोणत्याही वस्तूच्या दर्शनात त्याला द्रष्टा व दृश्य यांच्या अतीत असणाऱ्या माझेच सदैव दर्शन होते. आकाशात कितीही आकाश भरले तरी ते आपणावेगळे दुसरे काही होणे जसे जाणत नाही, तसेच हे अर्जुना! त्या योग्याचे असते. ***तो मद्रूप झालेला असतो आणि अखिल विश्वच मद्रूप असल्यामुळे त्याने कोणताही उपभोग घेतला तरी त्याला सर्वत्र सर्व प्रकारे माझाच उपभोग घडत असतो.*** तो जे काही ज्ञानेंद्रियांद्वारे घेऊ जातो, जे काही कर्मेंद्रियांद्वारे करू पाहतो, मनाने जे काही चिंतू जातो, ते ते सर्व त्याला मत्स्वरूप असते."

कल्पांतिं उदक उदकें। रुंधिलियां वाहों ठाकें।
तैसां ***<u>आत्मेनि मियां एकें। कोंदला तो</u>*** **।।१८-११६६।।**
पावों आपणयां वलघे। केंविं वह्नि आपणयां लागें।
आपणपें पाणी रिघें। स्नाना कैसें।।११६७।।
म्हणौनि ***<u>सर्व मी जालेंपणें। ठेलें तेयां जाणेंयेणें।</u>***
<u>हेंचि गां यात्रा करणें। अद्वया मज</u> **।।११६८।।**

"माझा आत्मभाव त्याच्याठायी कोंदाटून भरलेला असतो. म्हणून कल्पांती जलाशय जलाशयात मिसळून एक होऊन जसे वाहायचे थांबतात, त्याप्रमाणे त्याच्या वृत्तींचा प्रवाह सर्व मीच झाल्याने स्तब्धावतो. पाऊल आपणच आपल्याला कसे ओलांडून जाईल! अग्नीस अग्नी कसा जाळेल! पाणी स्वतःच स्नानास निघाले आहे, असे कधी तरी कसे होईल! सर्वत्र मीच असल्याने त्या मद्रूप योग्याचेही जाणेयेणे खुंटते. हेच त्याने मज अद्वयाची यात्रा करणे होय!"

पैं जलावरील तरंगु। जऱ्हीं धांविन्नला सवेगु।
तऱ्हीं नाहीं भूमिभागु। क्रमिला तेणें।।१८-११६९।।
जैं सांडावें कां मांडावें। जैं चालणें जेणें चालावें।
तैं तोयचि एक आघवें। म्हणौनियां।।११७०।।

"आणि असे पहा की लाट पाण्यावर कितीही वेगाने धावली तरी ती कोणता भूभाग आक्रमून जाते! ती लाट जेथे जाते तेथे पाणीच असते; जे स्थळ मागे टाकले जाते, तेही पाणीच असते; ती ज्यावर चालते, तेही पाणीच असते. असा हा पाण्याचा पाण्याशीच होणारा खेळ जसा असतो, तशीच त्या मद्रूप योग्याची मजमध्ये जी लीला होते, तिच्यात वेगळे काय असणार!"

अनन्यभक्तीची सिद्धी

पुढे ऐका:

पैं दर्पणांतैं दर्पणें। पाहिलियां होएं न पाहाणें।
सोनें झांकिलियां सुवर्णें। न झांके जेविं।।१८-११७५।।
उदकीं कल्लोलु। कापुरीं परिमलु।
रत्नीं उजालु। अनन्य जेविं।।११८३।।

"आरशाने आरसा पाहिला तर आरशाव्यतिरिक्त दुसरे काय दिसणार! सुवर्णाने सुवर्णास मढवले तर सुवर्ण काय झाकले असे होईल! ते तर सर्वच सुवर्ण असणार नाही का! ***अनन्यभक्तियोग*** पावलेल्या तया योगिराजाची स्थितीही अशीच असते. लाट जशी उदकाशी अभिन्न असते, कापूर व त्याचा परिमळ यांना जसे वेगळेपणाने राहता येत नाही, रत्नास जशी त्याची प्रभा एकनिष्ठपणे वरते, कंकण जसे सुवर्णाशी अभेदभावाने नांदते तसाच हा ***<u>क्रमयोगीही भक्तियोगाद्वारे मजशी अनन्य होऊन राहतो</u>."***

किंबहुना तंतूसि पटु। कां मृत्तिकेसिं घटु।
तैसा तो एकवटु। मजसिं माझां।।१८-११७७।।
इयां अनन्यसिद्धां भक्तीं। इयां आघवांचि दृश्यजातिं।
मज आपणपेयां सुमती। द्रष्ट्यातें जाणणें।।११८५।।

"तंतू जसा वस्त्राशी एकरूप होऊन असतो, घट जसा मृत्तिकेचे स्वरूप धरून राहतो, तसा तो माझ्याशी एकरूप झालेला राहतो. ***ही सिद्ध अशी अनन्यभक्ती पावल्याने तो बुद्धिमंत हे सर्व वस्तुजात, हे दृश्यमात्र सर्व काही मज द्रष्ट्याचेच स्वरूप असल्याचे जाणतो. आपणही द्रष्टा व हे दृश्यही द्रष्टाच असल्याच्या बोधाच्या मत्ततेत आणि या अनुभूतीच्या भरात तो नाचू लागतो."***

रज्जु जालियां गोचरुं। आभासतां तो व्यालाकारुं।
रज्जुच आईसा निर्धारुं। होएं जेविं।।१८-११८६।।
भांगारापरतें काईं। लेणें गुंजहीभरी नाहीं।
हें आटौनियां ठाईं। कीजैं जैसें।।११८९।।
उदक एकापरतें। तरंग नाहींचि हें निरुतें।
जाणोनि तेयां आकारांतैं। न घेपें जेविं।।११९०।।
ना तऱ्हैं स्वप्नविकारां समस्तां। चेऊनियां उमणें घेतां।
तो आपणयांपरौता। न दिसें जैसा।।११९१।।
तैसें *<u>जैं काईं आथी नाथी। एणें होएं ज्ञेयस्फूर्ति।</u>*
***<u>तैं ज्ञाताचि मी हें प्रतीति। होऊनि भोगिं</u>* ।।११९२।।**

"रज्जुवर झालेला सर्पाचा आभास नाहीसा होऊन रज्जू जसा स्पष्टपणे प्रतीत व्हावा; अलंकारात सोन्यापरते गुंजभरही दुसरे काही नाही, हे तो आटवल्यावर जसे ठामपणे कळून यावे; लाटेत उदकावेगळे काहीही नाही हे कळून आल्यावर जलतरंगाचे खरे स्वरूप जसे माहीत व्हावे किंवा जाग आल्यावर स्वप्नाचा विचार करू जाता त्या स्वप्नींच्या जगड्व्याळ पसाऱ्यात आपणाशिवाय दुसरे काहीही जसे शोधूनही सापडू नये; त्याप्रमाणे जे काही अस्तिनास्तिरूपाने स्फुरण पावते, जे काही ज्ञेय म्हणून प्रतीत होते, ते सर्व मी ज्ञाताच आहे, या प्रतीतीचा तो ***क्रमयोगी अनन्यभक्त*** भोग घेत राहतो."

"ठाइंचि मुराला अनुभव"

ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय यांचे हे एकरूप स्पष्ट करत ज्ञानेश म्हणतात:

पैं चेईलियानंतरें। आपुलें एकपण उरें।
तैंहीं तोवरी स्फुरे। तेयाशींचि जैसें।।१८-१२०१।।
कां प्रकाशतां अर्कु। तोचि होएं प्रकाशकु।
तेयांहिं अभेदां द्योतकु। तोचि जैसा।।१२०२।।
तैसा वेद्याचां विलयीं। केवल वेदकु उरें पाहीं।
तेणें जाणावें तेयांतैंहीं। हेंहीं जो जाणें।।१२०३।।

"स्वप्नातून जागृतावस्थेत आले की जसे स्वप्नींचे विश्व लयास जाऊन आपण एकटेच उरतो आणि ही एकटेपणाची जाणीवही जशी आपली आपणासच असते; तिला जशी दुसऱ्या वस्तूच्या सापेक्षतेची गरज नसते; किंवा सूर्य प्रकाशला की तो जसा स्वतःच स्वतःचा प्रकाशक होतो आणि प्रकाशक आणि प्रकाश्य ही दोन्हीही जशी त्याच्याठायी अभिन्नत्वाने अभेदाने असतात; त्याचप्रमाणे ज्ञेय लयास गेले की केवळ एकमात्र ज्ञाताच उरतो आणि ***"मी ज्ञाता आहे"*** अशी जी जाणीव असते, तीच ज्ञात्याचे ज्ञान करून देत आहे, हेही त्यास जाणवते."

<u>अद्वयपण आपुलियां। जाणति ज्ञप्ति जैं धनंजया।</u>
<u>तैं ईश्वरचि मी हें तेयां। बोधासिं एं</u>।।१८-१२०४।।

"याप्रमाणे ज्ञाता आपणास आपलेच ज्ञान करून देऊन ज्ञाता व ज्ञेय यांचा अभेद असल्याचे प्रकाशवतो. हे अर्जुना! याप्रमाणे आपले अद्वयपण जे जाणतात, ज्यांना अद्वैततत्त्वाची अशी अनुभूती येते, त्यांची जी ही जाणीव असते, तिला ***ज्ञप्ति*** असे म्हणतात. हेच ज्ञान होय! ज्याला ही ज्ञप्ति प्राप्त होते, तो आपणच ईश्वर आहोत या बोधाप्रत येतो."

मग द्वैताद्वैतातीत। मीचि आत्मा एकु निभ्रांत।
हें जाणौनि जाणणें जेथ। अनुभविं रिघें।।१८-१२०५।।
तेथ चेईलियां एकपण। दिसें जैं आपुलियां आपण।
तेंहीं जातां नेणों कोण। होईजें जेविं।।१२०६।।
कां डोलां देखतिएं क्षणीं। सुवर्णपण सुवर्णी।
नाटितां होएं आटणी। अलंकारांचिंहीं।।१२०७।।

"आणि त्यानंतर तर ***"द्वैत आणि अद्वैत यांच्याहीपलीकडील जो आत्मा तो मीच आहे"*** या बोधावर तो निभ्रांतपणे येतो. हा बोध त्याच्या अनुभूतीत रिगाला की काय होते, ते ऐक! स्वप्नातून जागृतीत आल्यावर जसे आपले एकटेपण दिसून येते आणि थोड्या वेळाने ती एकटेपणाची जाणीवही नाहीशी होऊन आपणास जी अवस्था प्राप्त होते, ती जशी स्वप्न व जागृती या जाणिवांपलीकडील असते; किंवा अलंकारातील सुवर्णपणास एकदा डोळ्यांनी नीट ओळखले की अलंकार न आटवताही जसा त्याचा अलंकारपणा आटल्यासारखा होतो; त्याचप्रमाणे हा बोध अनुभवांती जेव्हा आपणात मुरून जातो तेव्हा होते. ***"ठाईंचि मुराला अनुभव"*** **अशी ही अवस्था आहे! आपण द्वैताद्वैतातीत आत्मा आहोत हे स्फुरणही तेव्हा राहत नाही.** अखिल विश्व आणि आपण यांसकट सर्व आत्माच आहे, ही प्रतीतीही तेव्हा मुरून जाते."

नाना लवण तोय होएं। मग क्षारता तोयत्वें राहें।
तैंहीं जिरतां जेविं जाएं। जालेपण तैं।।१८-१२०८।।
तैसा *<u>मी तो हें जैं असें। तैं स्वानंदानुभवसमरसें।</u>*
<u>कालवूनियां प्रवेशें। मजचिमाजिं</u>।।१२०९।।
<u>आणि तो हें भाख जाएं। तेथ मी हे कोण्हासिं आहें।</u>
***<u>आईसा मी ना तो तिएं समाएं। माझांचि रूपीं</u>*।।१२१०।।**

"लवणाचे पाणी केले असता त्यात क्षारता द्रवरूपाने राहते आणि त्यातील पाणी जेव्हा आटून जाते, तेव्हा लवणास आपले मूळ स्वरूप प्राप्त होते. त्याप्रमाणेच या विश्वाचे विश्वरूपत्व आटून जाऊन त्यातील

मज आत्म्याचा जो आविष्कार उरतो, त्या स्वानंदरसात मी व तो यांना एकत्र मिळवून तो प्रवेशतो! मी व तो यांना असे कालवून मजआत त्याने प्रवेश केला की तो हा शब्दच जेथे आटून नाहीसा होतो, तेथे तत्सापेक्ष मी हा शब्द तरी कोणासाठी वापरावा! मी आणि तो ही भाषाच तेथे खुंटते!! आणि जो मीही नाही व जो तोही नही, असा तो माझ्याच रूपात सामावून जातो."

क्रमयोगाची सांगता

अस्तिनास्ति या जाणिवेपलीकडील या प्रांतात तो ***क्रमयोगी*** जाऊन पोहोचतो. ***"जाणीव नेणीव भगवंती नाहीं"*** अशी ही अवस्था उपभोगून तो धन्य धन्य होतो! त्या अवस्थेचे वर्णन कितीही केले तरी थोडेच! तरीही आपल्या शब्दालंकारांचा साज त्या अवस्थेलाही लेववत ज्ञानेश म्हणतातः

जेधवां कापुर जळों सरें। तेयांचि नाम अग्नि पुरें।
मग उभयातीत उरें। आकाश जेविं।।१८-१२११।।
कां धाडिलियां एका एकु। वाढें तो शून्य विशेखु।
तैसा आहेनाहींचा शेखु। मीचि मग आथी।।१२१२।।
तेथ ब्रह्म आत्मा ईशु। ययां बोलां मोडें सौरसु।
न बोलणेयांहीं पैसु। नाहीं तेथ।।१२१३।।

"कापूर जेव्हा विझतो, तेव्हा त्याच्याबरोबरच अग्नीही विझून त्या दोहोंच्या अतीत असणारे आकाशच केवळ जसे उरते; किंवा एकातून एक वजा केला की त्यांच्या जागी केवळ शून्यच जसे विशेषत्वाने दिसते; त्याचप्रमाणे ***अस्ति* आणि *नास्ति*** या दोहोंच्या लोपानंतर केवळ मीच राहतो. त्या मीला ***ब्रह्म, आत्मा* किंवा *ईश्वर*** ही संबोधने लागू पडत नाहीत आणि मौन स्वीकारावे तर त्याचाही तेथे पाड नाही."

न बोलणेंहीं न बोलौनि। तैं बोलिजें तोंड भरूनि।
जाणीव नेणीव नेणोनि। जाणिजें तैं।।१८-१२१४।।
तेथ बुझिजें बोधु बोधें। आनंदु घेपें आनंदें।
सुखवरी नुसधें। सुखचि भोगिजें।।१२१५।।
तेथ लाभु जोडिला लाभां। प्रभा आलिंगिलीं प्रभा।
विस्मो बुडाला उभा। विस्मयामाजिं।।१२१६।।
समु तेथ सामावला। विश्रामु विश्रांति आला।
अनुभव वेडावला। अनुभूतिपणें।।१२१७।।
किंबहुना आईसें निखल। मीपणा जोडें तेयां फल।
सेवौनि वेली वेल्हाल। क्रमयोगाचिं तैं।।१२१८।।

"वाणी आणि मौन या दोहोंपलीकडील असा तो मी आहे. मौनानेही मौन स्वीकारले,जाणीव आणि नेणीव दोन्हीही नेणिवेपलीकडे पोहोचल्या की तो मी जाणला जातो. त्याला जाणले की जाणीव वा ज्ञान वा बोध आपल्याद्वारे आपणास जाणतात; आनंद आनंदानेच उपभोगला जातो; केवळ सुखच सुखास भोगते; लाभास लाभ प्राप्त होतो; तेजच तेजास आलिंगते; आत्मा गवसल्याचे आश्चर्य ***("आश्चर्यवत् पश्यति ...।।२-२९।।")*** त्याच आश्चर्यात उभेच्या उभे बुडून जाते; शमाचे शमन होते; विश्राम विश्रामास पोहोचतो; अनुभवास अनुभूती वेडावते; फार काय! ***क्रमयोगाची ही मधुर वेल सेविल्याचे फल म्हणून माझे हे विशुद्ध स्वरूपच त्याला प्राप्त होते!!"***

पैं क्रमयोगां किरीटी। चक्रवर्तिचां मुगुटीं।
मी चिद्रत्न तो सांटोवांटी। होएं माजां।।१८-१२१९।।
कीं क्रमयोगप्रासादाचां। कलसु जो हा मोक्षाचां।
तेयावरील अवकाशाचां। उवावा जाला तो।।१२२०।।
नाना संसारआडविं। क्रमयोग वाट बरविं।
जोडिलीं तैं मदैक्यगांविं। पैठी जालीसें।।१२२१।।
हें असो क्रमयोगबोधें। तेणें भक्तचित्तें गांगें।
मी स्वानंदोदधि वेगें। ठाकिलां कीं गां।।१२२२।।

"किंबहुना हे अर्जुना! ज्याच्या मुकुटीचे चिद्रत्न मी स्वतःच आहे, असा क्रमयोगाचा सम्राटच तो स्वतःला मजला देऊन होतो!!! असेही म्हणेनास की क्रमयोगाचा हा जो प्रासाद तू पहिलास, त्याच्यावर असलेल्या मुक्तिकलशावरील अथांग आकाश म्हणजेच तो मद्रूप झालेला योगी होय!!! संसाररूपी वनात त्याला हा क्रमयोगरूपी मार्ग मिळाल्याने मदैक्यग्रामी तो असा प्रविष्ट होतो. भक्तचित्तरूपी गंगेतील ***क्रमयोग*** ओघाने हा मत्स्वरूप स्वानंदोदधी त्याने सत्वर गाठला, हे तुला किती प्रकारे सांगावे!"

गीतेने प्रतिपादिलेले एकमेव साधन

गीतेतील प्रतिपाद्य साधन हा ***क्रमयोग*** च आहे. ***पंथराज*** असे त्यासच उद्देशून सहाव्या अध्यायी ज्ञानदेव संबोधतात. **सहाव्या अध्यायी क्रमयोगाचा कुंडलिन्युत्थापन, आसन, प्राणायामादी भाग त्यांनी सविस्तर निरूपिला आहे. आता त्यांनी गीतेच्या या अठराव्या अध्यायात *गीतेचे साधनसर्वस्व* म्हणून याच *पंथराज* अथवा क्रमयोगाचे सविस्तर विवेचन केले आहे. *गीतेचे साधनसर्वस्व हा पंथराज - क्रमयोग* च आहे,** हे मुमुक्षूंच्या मनावर नीटपणे ठसावे म्हणून अर्जुनास या क्रमयोगाची उपलब्धी व साध्य प्राप्त करून दिल्यावरही भगवंत पुनश्च संक्षेपाने क्रमयोगाचे हे साधन सांगण्यास उद्युक्त होतात.

हें इतुलेंचि नाना परी। निरूपिलें ग्रंथविस्तारीं।
तैं आतां दोहीं आखरीं। अनुवादावें।।१८-१२४४।।
म्हणौनि उपेयहीं हातिं। जालेयां उपायस्थिति।
देव प्रवर्तलें तैं पुढुतिं। एणेंचि भावें।।१२४५।।
मग म्हणें गां सुभटा।...।।१२४६।।

ज्ञान, कर्म, भक्ती आणि पंथराज वा योग यांचे अभिन्नत्व या ओव्यांतून परत एकदा स्पष्ट दाखवत ज्ञानेश म्हणतातः "गीता या ग्रंथात नाना परीने हा ***क्रमयोग अथवा पंथराज*** च साधन म्हणून प्रतिपादिलेला आहे. त्यात हे जे विस्तारपूर्वक सागून झाले आहे, ते दोन शब्दात पुनः सांगावे या हेतूने भगवंत प्रेरित झाले आहेत." म्हणूनच साध्य गंवसल्यावरही पुनश्च एकदा हे साधन सांगत भगवंत म्हणतातः

.... । तो क्रमयोगी इयां निष्ठां ।
मी होऊनि होएं पैठा । माझां रूपीं ।।१८-१२४६ ।।
स्वकर्माचां चाखौलीं । मज पूजा करूनि भलीं ।
तेणें प्रसादें आकलिं । ज्ञाननिष्ठेतैं ।।१२४७ ।।
तैं ज्ञाननिष्ठा जेथ हातवसें । तेथ भक्ति माझिं उल्लासें ।
तियां मजसिं समरसें । सुखियां होएं ।।१२४८ ।।

"हे अर्जुना! तो ***क्रमयोगी*** मी सांगितलेल्या **या निष्ठेचे - या पंथराजाचे वा क्रमयोगाचे - आचरण करूनच मी होऊन माझ्या स्वरूपी प्रवेशतो. स्वकर्मकुसुमांची लाखोली वाहून तो माझी उत्तम पूजा करतो आणि माझा प्रसाद अशी *ज्ञाननिष्ठा* प्राप्त करून घेतो.** ही ***ज्ञाननिष्ठा*** (***निष्ठा ज्ञानस्य या परा*** *।।१८-५०।।उन्मेष५५-१:योगसारसर्वस्व•क्रमयोगारंभ,पृ.क्र.१०४०)* जेव्हा हाती गवसते, तेव्हा माझी भक्ती उत्कर्ष पावते आणि मजशी समरस होऊन तो योगी सुखी होतो."

आणि विश्वप्रकाशतियां । आत्मेयां मज आपुलियां ।
अनुसरें जो करूनियां । सर्वत्रता ।।१८-१२४९ ।।
सांडूनि आपुला आडल । लवण आश्रयीं जल ।
कां हिंडौनि राहें निश्चल । वायु व्योमीं ।।१२५० ।।
तैसा बुद्धि वाचा कायें । जो मातें आश्रयोनि ठाएं ।
तो निषिद्धेहीं विपाएं । कर्में करूं ।।१२५१ ।।
परि गंगेचां संबंधी । बिदी आणि महानदी ।
एक तेविं माझां बोधीं । शुभाशुभांसिं ।।१२५२ ।।

"विश्वाला प्रकाशवणाऱ्या मज आत्म्यास स्वत:सकट सर्वत्र पाहत तो जेव्हा वावरू लागतो, तेव्हा आपले स्वत्व टाकून जळाचा जसा आश्रय करून लवण राहते किंवा कितीही वावरला तरी वायू जसा गगनाचा आश्रय धरून राहतो; तसा शरीर, वाचा व बुद्धींनी माझाच आश्रय घेतलेल्या त्या योग्याकडून अगदी निषिद्ध अशी कर्मेही जरी कधी घडली तरी गंगेस मिळताच वहाळ-ओहोळ व महानदी या सगळ्यांचेच जसे गंगेशी एकत्व होते, त्याप्रमाणे ***माझा असा साक्षात्कार झालेल्या त्याची शुभाशुभ कर्मे मजठायी प्रवेशतात आणि मद्रूप होतात (सर्व कर्माण्यपि सर्दा कुर्वाणो मद्व्यपाश्रय: ।..*** *।।१८-५६ ।।उन्मेष५५-१:योगसारसर्वस्व•क्रमयोगारंभ,पृ.क्र.१०४०)*."

आत्मप्रसादाची प्राप्ती

कां बावनें आणि धुरें । हा निवाडु तंवचि सरें ।
जंव न घेपति वैश्वानरें । कवळूनि दोन्हीं ।।१८-१२५३ ।।
नाना पांचिकें आणि सोलें । हें सोनयां तंवचि आलें ।
जंव परिसु आंगमेलें । एकवटेना ।।१२५४ ।।
तैसें शुभाशुभ आईसें । हें तंवचिवरी आभासें ।
जंव एकु न प्रकाशें । सर्वत्र मी ।।१२५५ ।।

"चंदन आणि निकृष्ट झाडाचे काष्ठ हा भेद जोपर्यंत त्यांना अग्नीने कवळून घेतले नाही तोवरच असतो. पाचकशी व सोळाकशी सोन्यातला भेदही जोवर त्यांना परिसाने आपला अंगस्पर्श केलेला नसतो, तोवरच असतो. त्याचप्रमाणे ***शुभ व अशुभ कर्मांत फरक तोपर्यंतच असतो, जोपर्यंत एकमेवाद्वितीय असा जो मी तो सर्वत्र प्रकाशलेला दिसत नाही.***"

अगां रात्रि आणि दिवो । हा तंवचि द्वैतभावो ।
जंव न रिगिजे गांवों । गभस्तिचां ।।१८-१२५६ ।।
म्हणौनि माझियां भेटीं । तेयाचिं सर्व कर्में किरीटी ।
जाऊनि बैसें तो पाटीं । सायुज्याचां ।।१२५७ ।।
देशें कालें स्वभावें । वेंचु जेयां न संभवें ।
तैं पद माझें पावें । अविनाश तो ।।१२५८ ।।
किंबहुना पांडुसुता । मज आत्मेयाचि प्रसन्नता ।
लाहें तेणें न पविजतां । लाभु कवणु असें **।।१२५९ ।।**

"अर्जुना! रात्र आणि दिवस हा भेद जोवर सूर्याचा प्रदेश लागत नाही, तोवरच असतो. म्हणून माझी भेट घडताच त्याची सर्व कर्मे लयास जाऊन तो योगी मोक्षपदी जाऊन बसतो. **देश, काल व स्वभाव यांच्याबरोबर ज्याचा व्यय होत नाही, जे यांसारखे नश्वर नाही असे माझे *अविनाश पद* त्याला प्राप्त होते.** फार काय! त्याला ***मज आत्म्याची प्रसन्नता प्राप्त होते. माझा प्रसाद तो पावतो.*** *(**मत्प्रसादादवाप्नोति**[१४] **शाश्वतं पदमव्ययम्** ।।१८-५६ ।।उन्मेष५५-१:योगसारसर्वस्व•क्रमयोगारंभ,पृ.क्र.१०४०)* यापरता आणखी लाभ तो कोणता आहे!!"

प्रकृतिनाश

यया कारणें गां तुवां । ***सर्व कर्म आपुलियां ।***
माझां स्वरूपीं धनंजया । संन्यासु कीजे **।।१८-१२६० ।।**
परि तोचि संन्यासु वीरा । करणीयेचा झनैं करा ।
आत्मविवेकीं धरा । चित्तवृत्ति हें ।।१२६१ ।।
मग तेणें विवेकबलें । आपणपें कर्मावेगलें ।
माझां स्वरूपीं निर्मलें । देखिजैल ।।१२६२ ।।

"क्रमयोगाचे हे केवढे फळ आहे, जे मोक्षसुख प्रत्यक्ष करते. म्हणून मी तुला वारंवार सांगत आलो आहे की हे अर्जुना! ***"झडझडौनि वहिला निग"*** आणि या मार्गाला लाग! त्यासाठी प्रथम सर्व कर्मे माझ्याठायी अर्पण कर. मात्र कर्तव्यकर्मे करण्याचे कधीही टाकू नकोस. तुझी सर्व चित्तवृत्ती आत्मविवेकाने मजठायी लाव. त्या विवेकबळाने आपण कर्माचे कर्ते नव्होत हे तू ओळखशील. कर्मावेगळे आपण असून आपण भगवंताचे निर्मळ स्वरूपच आहोत याचा तुला साक्षात्कार होईल."

आणि कर्माचि जन्मभोएं । प्रकृति जैं कां आहे ।
आपणयां वेगलीं बहुवें । देखसिं दूरीं ।।१८-१२६३ ।।
तेथ प्रकृति आपणयां- । वेगलीं नुरे धनंजया ।
रूपेंविण छाया । जेयांपरी ।।१२६४ ।।
आईसेनि ***प्रकृतिनाशु । जालेयां कर्मसंन्यासु ।***
निफजैल अनायासु । सकारणु **।।१२६५ ।।**

"तसेच कर्माची जन्मदात्री जी प्रकृती असते, ती म्हणजे आपण नाही; ती तर छायेसमानच आहे. रूप नसले तर छाया कोठली! हे तुला प्रत्यक्ष होईल. कर्तेपणा मावळला की ही प्रकृतिरूपी छायासुद्धा नामशेष होईल. अशा प्रकारे प्रकृतिनाश होताच विनासायास कर्मसंन्यास समूळ संपन्न होईल!"

संसारदुर्गत्युद्धरण

मग कर्मजात गेलियां। मी आत्मा हें उरें आपणपयां।
तेथ बुद्धि घापें करूनियां। पतिव्रता।।१८-१२६६।।
बुद्धि अनन्यें एणें योगें। मजमाजिं जैं रिगें।
तैं चित्त चैत्यत्यागें। मातेंचि भजे।।१२६७।।
आईसें चैत्यजातें सांडिलें। चित्त माझां ठाईं जडलें।
ठाकें तैसें विहिलें। सर्वदा करी।।१२६८।।
मग *अभिन्न इयां सेवा। चित्त मियांचि भरेल जेधवां।*
***माझा प्रसादु जाण तेधवां। संपूर्ण जाहाला* ।।१२६९।।**

"आणि कर्मे अशी समूळ नाहीशी झाली की त्यांचे बंधन ते कोठून उरणार! मग केवळ एक मी आत्माच उरतो. बुद्धी मग माझी पतिव्रता होऊन ठाकते. ***बुद्धी अशी माझ्याशी अनन्य होऊन राहते, तेव्हा योग साध्य होतो आणि चित्त आपले चिंतनाचे विषय त्यागून माझ्या भक्तीत रत होते.*** चित्ताने आपले चित्तत्वच टाकून ते माझ्याठायी असे जडून जाईल यासाठी तू सत्वर प्रवृत्त हो आणि सदैव या मार्गास अनुसरत जा! ***माझी अशी अनन्यभक्ती तुजकडून घडून येऊन तुझे चित्त जेव्हा माझ्याने तुडुंब भरून जाईल, तेव्हा तुला माझा संपूर्ण प्रसाद प्राप्त होईल!"***

तेथ सकलदु:खधामें। भुंजिजति जिएं मृत्युजन्में।
तिएं दुर्गमेंचि सुगमें। होति तूझ।।१८-१२७०।।
सूर्याचेनि सावायें। डोळां सावाइला होएं।
तैं आंधाराचा आहे। पाडु तेयां।।१२७१।।
तैसा माझेनि प्रसादें। जीवकणु जेयाचां उपमर्दे।
तो संसाराचेनि बाधें। बागुलें केंविं।।१२७२।।
म्हणौनि धनंजया। तूं संसारदुर्गति इयां।
तरसिल माझियां। प्रसादास्तव।।१२७३।।

"मग सर्व दु:खांचे आगरच असे जन्ममृत्यू अगदी दुर्गम असूनही तुला सुगम होतील. सूर्याने सावरलेल्या डोळ्यांपुढे अंधाराचा काय पाड! माझ्या प्रसन्नतेमुळे तुझे दारुण असे भवबंध दूर होऊन जातील. माझ्या प्रसादामुळे ज्याचा जीवकण मर्दिला गेला, त्याला संसाररूपी बागुलबुवाची कसली भीती! हे धनंजया! मी सांगितलेला हा मार्ग चोखाळून माझ्या प्रसादाने तू संसाराच्या दुर्गम अशा या चक्रातून मुक्त होशील!"

क्रमयोगसंक्षेप::::

संक्षेपत: सांगितलेला क्रमयोग

ओवी क्र.१८-१२४५ ते १२७३ यांतून संक्षेपाने भगवंतांनी ***क्रमयोग*** सांगितलेला आहे. आपण नुकतेच त्याचे परिशीलन केले. ***क्रमयोग*** हे ***पंथराज***मार्गाचे दुसरे नाम आहे, हे या विषयावरील आतापावेतो केलेल्या एकूणएक विवेचनाचनाद्वारे स्पष्ट प्रतीत होते. गीतेचे सार म्हणून हे योगसाधन ज्ञानेश्वर निरूपितात. गीतेत अनेक योगप्रकारांचा पुरस्कार केला आहे, असे एक मत प्रचलित आहे. ते मत या निष्कर्षापुढे टिकत नाही.

कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग व पातञ्जलयोग वा हठयोग यांसदृश योग असे किमान चार तरी विविध प्रकारचे योगमार्ग गीतेने सांगितले आहेत, असे मतही ज्ञानदेवांच्या साक्षेपी विवेचनापुढे आणि आपण त्याच्या केलेल्या परीक्षणापुढे टिकणे अशक्यप्रायच दिसते.

अठराव्या अशा या शेवटच्या गीतासाराच्या *कलशाध्यायी सर्व साधनांचे सार* सांगण्यास ज्ञानदेव प्रवृत्त झालेले आहेत. ते त्यांनी वरील ओव्यांतून हातचे काहीही न राखून ठेवता स्पष्टरीत्या प्रकट केले आहे. हे जाणण्यास मात्र मागे सांगितलेली कोणत्याही विवेचनाचे वा ग्रंथाचे सार काढण्याची, त्याचे प्रतिपाद्य काय आहे हे ठरवण्याची मीमांसकांची युक्ती वापरता आली पाहिजे. ती युक्ती लावून पाहताही ***ज्ञानदेवांच्या मते गीतेचा साधनमार्ग आताच सांगितलेला क्रमयोगच आहे,*** हे पुन:पुन: स्पष्ट होईल.

या संदर्भित *ओवी क्र.१८-१२४५ ते १२७३* यांमधून ज्ञानेश जो ***क्रमयोग*** सांगतात, तो ***कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग व पातञ्जल + हठ + ध्यान*** या सर्व योगविशेषांचा समन्वय करून साकारतो. मूळात हे चार वा अनेक प्रकारचे योगप्रकार स्वयंपूर्ण नसून क्रमयोगाचे टप्पे आहेत; प्रत्येकाचे या समन्वयित योगात एक विशिष्ट स्थान आहे आणि मोक्षप्राप्तीसाठी योग्यास हे सर्व टप्पे अवलंबावे लागतात, असे ज्ञानेश सांगत आहेत. या सर्व टप्प्यांचा परामर्ष आपण *गीताश्लोक क्र. १२-१२*"***श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।***" याच्या सविस्तर विचारप्रसंगी घेतलेला आहेच.

शांडिल्य भक्तिसूत्रातूनही हे स्पष्टच प्रतीत झालेले आहे की ते म्हणतात ती ***पराभक्ती*** कोणत्याही एका साधनविशेषाने साध्य होत नसून तिचा उद्भव केवळ या सर्व प्रकारच्या साधनांचा समन्वय करूनच होतो *(उन्मेष ५४-२:भक्तिदर्शन पृ.क्र.१०१४,१५)*. तसेच"***ज्ञानमिति चेन्न द्विषतोऽपि ज्ञानस्य तद् संस्थिते।।४।। तयोपक्षयाच्च।।५।। न क्रिया कृत्यनपेक्षणाज्ज्ञानवत्।।७।। अतएव फलानन्त्यम्।।८।। अनन्यभक्त्या तद्बुद्धि लयादत्यन्तम्।।९६।।शां.भ.सू.।।***" -भक्ती ही ज्ञानासाठी अपरिहार्य आहे; भक्तीने ज्ञानाचा क्षय होतो; पराभक्तीला कर्माची आवश्यकता नाही; तिचे फळ अनंत आहे; अनन्यभक्तीने बुद्धी म्हणजे महत्तत्त्वादींचा आत्यंतिक लय होतो, इ.सूत्रांतून पराभक्तीचे स्वरूपही स्पष्टच होते. असो.

गीता श्लोक क्र.१२-१२वर स्पष्ट प्रकाश

आता ***क्रमयोग*** संक्षेपाने सांगतांना हेच कर्मयोगादी विशिष्ट टप्पे (गीता श्लोक क्र.१२-१२) ज्ञानेश पुनरपि सांगत आहेत.

योगाभ्यासकांचे लक्ष या विषयाकडे जरूर वेधले पाहिजे. हे टप्पे क्रमयोगावरील ओव्यांतून असे दिलेले आहेत: ***"(कर्म -➢ स्वकर्म)*** १-अभ्यास ***-➢ ज्ञान*** २-ज्ञान ***-➢ कर्मसंन्यास -➢ अनन्यबुद्धी -➢ध्यान*** ३-ध्यान ***-➢ भक्ती*** ४-कर्मफलत्याग ***-➢मोक्ष*** ५शांती ***".***

या टप्प्यांपैकी ***कर्म व स्वकर्म*** हे टप्पे १***अभ्यासयोग व कर्मयोग*** या सदरातील आहेत. ***ज्ञान*** २ ***व कर्मसंन्यास*** हे येथे एकत्र येतात. ***अनन्यबुद्धी*** हा विचारवंत ज्यास बुद्धिसापेक्ष असा योगप्रकार समजतात, त्याच्याशी संबंधित टप्पा आहे. ***ध्यान*** ३ हा ***पातञ्जलयोग - हठयोग -ध्यानयोग*** सापेक्ष टप्पा आहे. ***भक्ती*** ४ हा ***भक्तियोग*** सापेक्ष टप्पा आहे. ***(टीप: श्लोक क्र.१२-१२"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्..।" नुसारचे*** १,२,३,४ ***व*** ५ ***हे साधनामार्गाचे टप्पे आहेत.)***

थोडक्यात पूर्वी *गीता श्लोक क्र.१२-१२* निमित्त ज्ञानदेवांनी या टप्प्यांचा जो योगाशी समन्वय केलेला होता, साधारण तसाच समन्वय ते आता क्रमयोगानिमित्त करू जात आहेत. परंतु **आताचा विशेष हा आहे की ते *कर्मयोग, ज्ञानयोग, ध्यानयोग व भक्तियोग* या योगविशेषांचा स्पष्टरीत्या समन्वय करत आहेत.**

क्रमयोगाचे जे विस्तृत विवेचन त्यांनी *ओवी क्र.१८-८८५ ते १२४४* यांतून केले आहे, ते पाहून हा त्यांचा दृष्टिकोन अधिक स्पष्ट होतो. त्याचाही योग्य तो परामर्ष आपण पूर्वीच घेतलेला आहे *(उन्मेष५५-१:योगसारसर्वस्व•क्रमयोगारंभ पृ.क्र.१०३७ ते १०५०)*. जिज्ञासूंस तो स्मरत असेलच.

त्या वेळी आपण प्रामुख्याने ***आचार्यांचे गीताभाष्य*** आणि ***ओळखीसवेंचि तद्रूपता*** पावणाऱ्या **ज्ञाननिष्ठ साधकांचा *क्रमयोग*** यांचे अवलोकन केले होते *(ओवी क्र.८८५ ते ९१०)*. त्यानंतरच्या *ओवी क्र.१८-९१० ते १२२२* यांतून सर्वसामान्य ***कर्मयोगी*** साधकांचा **सदगुरुभेटीनंतरचा *क्रमयोग*** येतो. हा दोन्ही प्रकारच्या साधकांमधील भेद म्हणजे ज्ञान व कर्मसापेक्ष द्विविध निष्ठांचा जो प्रकार भगवद्वचनावर अधिष्ठित असा आहे, त्याचे प्रकटीकरण आहे. ते वचन म्हणजे तृतीय अध्यायींचा ***"लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ। ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"*** हा श्लोक होय.

ज्ञानयोग व ***कर्मयोग*** अशा दोन भगवंतांनी पूर्वापार प्रसृत केलेल्या ***निष्ठा*** वा ***योगयुक्त्या*** आहेत. परंतु **सर्वसामान्यांसाठी *कर्मयोग* ही योगनिष्ठा भगवंत आवर्जून सांगतात.** ***"तन्हें जाणां नेणां सकळां। हा कर्मयोगु कीर प्रांजळा।।५-१६।।"*** असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थातच **हा *कर्मयोग* फार व्यापक आहे. सर्वमान्यतेने जो कर्मसापेक्ष योग *कर्मयोग* म्हणून प्रसिद्ध आहे, तो या क्रमयोगांतर्गतच्या कर्मयोगाचा निव्वळ एक पण महत्त्वाचा भाग वा टप्पा आहे. *क्रमयोगांतर्गतचा कर्मयोग कर्म, ज्ञान, योग व भक्ती यांचा समुच्चय आहे.***

साङ्ख्य व योगनिष्ठांचा समन्वय

हे विचार निःसंदिग्धपणे प्रकट व्हावेत म्हणून गीतेच्या अठराव्या अध्यायी गीतामंदिरावर कळस चढवण्याच्या प्रसंगी क्रमयोगदर्शनाचा हा प्रसंग ज्ञानदेवांनी साधलेला आहे. **त्याद्वारे *साङ्ख्य व योग* अथवा *ज्ञानयोग व कर्मयोग* या दोन्ही निष्ठांचा ते समन्वय करतात. तसेच *कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग व ध्यानयोगादी* मुख्य अशा चतुर्धा योगप्रकारांचा क्रमयोगात अंतर्भाव करून त्यांचे समन्वयन करत त्यांचे आपापले योग्य स्थानही ते स्पष्ट दर्शवतात.** या साङ्ख्य व योगनिष्ठांचे ज्ञानेशवर्णित टप्पे एकदा संक्षेपाने पुनश्च पाहू या. ते असे आहेत:

क्रमयोग

|

(प्रारंभीचे टप्पे)

|

स्वधर्म -➢ स्वकर्माचरण ईश्वरप्रणिधानासह -➢ईश्वरप्रसाद -➢ वैराग्यप्राप्ती-➢ भक्ती (ईश्वरप्रणिधानात्मक) -➢ प्रत्याहार -➢ अज्ञाननिवृत्ति -➢ बोधप्राप्ती -➢ ज्ञानोदय -➢नाममात्र अबोधावस्था -➢ कर्मसाम्यदशा -➢ श्रीगुरुपलब्धी -➢ श्रीगुरुकृपा

|

या प्रारंभिक मार्गक्रमणानंतर ***साङ्ख्य व योग*** या निष्ठांचे मार्ग असे आहेत.

(१) साङ्ख्य (ज्ञानयोगनिष्ठा)

|

श्रीगुरुकृपा -➢ अज्ञाननाश -➢ पूर्णज्ञान -➢नैष्कर्म्यसिद्धी -➢ ज्ञानलोप (ज्ञान गिळून असणे)

या सविशेष अशा ज्ञानसाधकांच्या निष्ठेप्रमाणेच सर्वसामान्य अशा कर्मयोग्यांचा मार्ग पुढीलप्रमाणे आहे:

(२) योग (कर्मयोगनिष्ठा)

|

श्रीगुरुकृपा -➢ शुद्धबुद्धी -➢ आत्मचिंतन -➢ योगधारणा (पंथराजसापेक्ष) कुंडलिन्युत्थापनादी क्रिया -➢ स्वरूपनिश्चय -➢ विवेकवैराग्य यांचा आश्रय -➢ ज्ञानाभ्यास -➢ ब्रह्मीभूतता प्राप्त होण्याची अवस्था -➢शांती -➢ ज्ञानभक्ती -➢ नैष्कर्म्यसिद्धी (ज्ञानलोप -ज्ञान गिळून असणे)

वरील टप्प्यांच्या निर्देशाने सहजच स्पष्ट होते की ***ज्ञानयोगी व कर्मयोगी*** या दोघांच्याही उत्क्रांतीत ***कर्मयोग (स्वकर्माचरण), भक्ती(ईश्वरप्रणिधान), ज्ञानयोग व ध्यानयोग*** या वारंवार उपयोगात

येणाऱ्या संज्ञांनी सर्वसामान्यपणे जे योगविशेष निर्दिष्ट केले जातात, त्या सर्वांचा समावेश होतो. तद्व्यतिरिक्त विवेकवैराग्यादी साधनसंपत्तीचा, तसेच कुंडलिनीप्रक्रियांचा, बुद्धिविशिष्ट योगविशेषाचा आणि अशाच इतर योगप्रांतीय विशेषांचा समन्वय करतच ही उत्क्रांती - ही ***क्रमयोगक्रमणा*** साध्य होते. यावरूनही गीतेतील सारभूत साधन साधन तो हाच ***क्रमयोग* - हा *पंथराज***च होय, असे प्रतिपादणे हाच ज्ञानेशांचा सहज स्पष्ट उद्देश आहे, हे आपणास कळून यावे!

योग, कर्म, ज्ञान व भक्ती यांचा बृहत् समन्वय

कर्म, ज्ञान व भक्ती यांचा समन्वय पाहण्यासाठी ज्ञानदेवीच्या *१८-१२४६ ते १२४८* या ओव्या महत्त्वाच्या आहेत. ***क्रमयोगी*** ही ***क्रमयोगनिष्ठा*** आचरून योगाची परिपूर्णता साधतो, असे ज्ञानेश सांगतात. **स्वकर्मे उत्तम तऱ्हेने *कर्मयोग*पर आचरून योगी भगवत्प्रसाद पावतो व तेव्हा त्यास *ज्ञानयोग* प्राप्त होतो. ही ज्ञाननिष्ठा प्राप्त झाली की *भक्तियोग* प्रकट होतो. चित्त समरसत्व पावून *योग* पूर्णत्वास जातो; मोक्षप्राप्ती होते**, असा हा भाग या ओव्यांतून आला आहे.

पंथराज* वा *क्रमयोग रहस्याचे उद्घाटन करणाऱ्या या ओव्या अशा आहेतः ***" ...तो क्रमयोगी ययां निष्ठां। मी होऊनि होएं पैठा। माझां रूपीं।।१८-१२४६।। स्वकर्माचां चाखोलीं। मज पूजा करूनि भली। तेणें प्रसादें आकलीं। ज्ञाननिष्ठेंतैं।।१२४७।। तैं ज्ञाननिष्ठा जेथ हातवसें। तेथ भक्ति माझिं उल्लसें। तियां मजसिं समरसें। सुखियां होएं।।१२४८।।"*** या ओव्यांतील ***कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग*** हे सर्व ज्ञानेशांनी सहाव्या अध्यायी ***"आसनालागौनि"*** जो कुंडलिनीप्रक्रियासमावेशक योग सांगितला आहे, त्याच्यावर उभे आहेत, हे जिज्ञासूंना सांगणे न लगे! गीताचतुर्विधयोगसमन्वयपर अशा या ओव्यांचे पुनरुद्धरण केल्यावर आता पुढील भागाकडे वळू या.

गीतेचे साधनसार::::

अर्जुनाची श्रवणेच्छा

क्रमयोगांतर्गतचा उपदेश ऐकूनही अर्जुन स्तब्धच राहतो. ज्ञानेश म्हणतातः

ययां देवाचियां बोलां। अर्जुनु उगाचि ठेला।
तेथ देव म्हणति भला। अवंचकु होसि।।१८-१३३३।।
वाढितयां पुढें भुकेला। उपरोधें म्हणें मी धाला।
तैं तोचि पीडें आपुला। आणि दोखुहीं तेयां।।१३३४।।
तैसा सर्वज्ञु श्रीगुरु। भेटिलियां आत्मनिर्धारु।
न पुसिजे जैं आभारु। धरूनियां।।१३३५।।
तैं आपणपेंचि वंचे। आणि पापहीं वंचनाचें।
आपणयांचि सांचें। चुकविलें तेणें।।१३३६।।
पैं उगेपण तुझियां। हा अभिप्रावो कीं धनंजया।
जैं एकहेल आंवाकुनियां। सांघावें ज्ञान।।१३३७।।

देवांचा हा क्रमयोगपर उपदेश ऐकून अर्जुन उगाच राहिला. ते पाहून श्रीकृष्ण त्याला म्हणाले, "माझे सांगणे तुला फारच आवडले, नाही का! नाही तर जेवणारा मनुष्य भूक असूनही संकोचाने वाढप्यास *"पुरे! पुरे! तृप्त झालो!"* असे म्हणू लागला तर त्यालाच उपाशीपोटी राहावे लागणार आणि त्याचा दोषीही तोच ना! तसेच श्रीगुरू भेटूनही जर भीडेपोटी शिष्याने त्याला आत्महिताची गोष्ट विचारण्यास अनमान केले, तर त्याचे कल्याण व्हायचे दूरच राहिले; उलट आत्मवंचनेचे पाप मात्र पदरी पडायचे! असे न विचारून त्या शिष्याने आपला आत्माच हातचा घालवला असे नाही का होणार! परंतु हे धनंजया! तू तर सुज्ञपणे उगा राहिलेला दिसतोस. तुझ्या मनात हे ज्ञान पुनः एक वेळ संक्षेपाने का होईना, ऐकावे असे दिसते. तू खरोखरच आत्महिताचा इच्छुक आहेस!"

तेथ पार्थु म्हणें दातारां। भलें जाणसि माझियां अंतरां।
हें म्हणों तऱ्हैं दुसरा। जाणता असें काईं।।१८-१३३८।।
एर ज्ञेय हें जी आघवें। तूं ज्ञाता एकचि स्वभावें।
मी सूर्यु म्हणौनि वानावें। सूर्यातें काईं।।१३३९।।
ययां बोलें श्रीकृष्णें। म्हणितलें काईं एणें।
हेंचि थोडें गां वानणें। जैं बुझतासि तूं।।१३४०।।

त्यावर पार्थ म्हणतो की "हे कृपानिधी! माझे अंतरंग इतके चांगले जाणणारा तुजवाचून कोणी आहे का! बरे! असे म्हणावे तर या ब्रह्मांडाचा तूच तर एकमात्र ज्ञाता आहेस. इतर सर्व केवळ ज्ञेय आहे! स्वभावतःच तू ज्ञाता आहेस. म्हणून तुझी ही ओळख सांगणे म्हणजे खरे तर सूर्यालाच *"तू सूर्य आहेस"* असे सांगण्यासारखे नाही का होणार!" पार्थाचे हे स्तुतिपर बोल ऐकून श्रीकृष्ण म्हणाले, "अर्जुना! येवढी माझी स्तुती नको. अरे! मी सांगितलेले तू ग्रहण करत आहेस आणि तुला हे सर्व कळते आहे, यातच माझी खरी स्तुती होते आहे."

गुह्यातिगुह्य उपदेशाचे पुनर्निरूपण

ते पुढे म्हणतातः

सर्वगुह्यतमं भूयः श्रृणु मे परमं वचः।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्।।१८-६४।।

"अर्जुना! तू तर माझा अत्यंत आवडता भक्त आहेस. माझा हा सर्व गुह्यात गुह्य असा उपदेश तुझे परम कल्याण करावे म्हणून सांगतो, तो पुनश्च ऐक."

तऱ्हैं अवधान पघल। करूनियां आणिक एकहेल।
वाक्य माझें निर्मल। अवधारीं पां।।१८-१३४१।।
हें वाच्य म्हणौनि बोलिजें। कां श्राव्य म्हणौनि आईकिजैं।
तैसें नोहें परि तुझें। भाग्य बरवें।।१३४२।।
कूर्मिचियां पिलियां। दिठी पान्हा एं धनंजया।
आकाश वाहें बापियां। घरींचे पाणी।।१३४३।।
जो वेवहारु जेथ न घडें। तेयाचें फलचि तेथ जोडें।
काएं दैवें न सांपडें। सानुकुलें।।१३४४।।

"तरी चित्त पुनः एकाग्र करून तू मी काय सांगतो तो परमश्रेयस असा उपदेश ऐक. तुझे भाग्य थोर आहे. कासवीच्या पिलांना तिच्या

दृष्टीतूनदेखील स्तन्य सेवण्यास मिळते. चातकासाठी आकाशाच्या पोकळीत पाणी समावते आणि ते त्याच्यापर्यंत कोठल्या कोठून आणून पोहोचवले जाते. खरे तर दृष्टीतून पान्हा फुटणे आणि अवकाशाने पाणी वाहून आणणे हे व्यवहारतया कसे संभवते! पण दैव अनुकूल असले तर अशक्य तेही शक्य होते आणि न घडलेल्या क्रियेचेही फल प्राप्त होते, पाहा!"

एरविं द्वैताचिं वारी। सारूनि ऐक्याचां परिवारीं।
भोगिजें तैं अवधारीं। रहस्य हें।।१८-१३४५।।
आणि निरुपचारां प्रेमा। विषय होएं जैं प्रियोत्तमा।
जैं दुजें नोहें कीं आत्मा। आईसेंचि जाणावें।।१३४६।।

"अर्जुना! खरे तर द्वैतापलीकडे पोहोचून अद्वैताच्या परिवारात राहूनच भोगायला मिळणारे रहस्य म्हणजे आत्मा! हा वाचेचा विषय नाही आणि श्रवणाचाही विषय नाही. वाणी आणि श्रवणेंद्रिये त्याला आकळू शकत नाहीत. पण हे प्रियोत्तमा! तुझ्यावरील माझ्या निरुपाधिक प्रेमामुळे तुझे भाग्य उजळले आहे आणि दुसरे तिसरे काही नाही, तर प्रत्यक्ष हा आत्माच तुझ्यामाझ्या संभाषणाचा कसा विषय झाला आहे, पहा!"

आरिसाचियां देखिलियां। गोमटें कीजें धनंजया।
तैं तेयां नोहें आपणयां-। लागिं जैसें।।१८-१३४७।।
तैसें पार्था तूझेनि मिषें। मी बोलें आपणयाचि दोषें।
माझां तूझां ठाईं असें। मीतूंपण गां।।१३४८।।
म्हणौनि जिव्हारींचे गूज। सांगतसें जीवासिं तूझ।
हें अनन्यगतीचें मज। आथी वेसन।।१३४९।।

"आणि तुझे भाग्य उजळले आहे, म्हणून हे तुला ऐकायला मिळते आहे, असे तरी कसे म्हणावे बरे! आरसा स्वच्छ करायचा तो काय आरशासाठी की आपणास नीट बघता यावे म्हणून! पार्था! खरे तर तुझ्या मिषाने मी हा सुखकर आत्मसंवादच माझ्याप्रीत्यर्थ साधून घेतो आहे. दुसरे असे की आपणा दोघांच्यात काही आपलेपरकेपण आहे का! तू अन मी काही वेगळे आहोत का! म्हणून हे जीवींचे गूज मी तुला जिव्हाळ्याने सांगतो आहे. माझा जीव की प्राण तूच तर आहेस! अनन्यगतिक भक्तांचा मला छंदच आहे.त्यात मी भुलून जातो."

पैं जलां आपणपें देतां। लवण भुललें पांडुसुता।
कीं आघवें तेयाचें होतां। न लजेचि तैं।।१८-१३५०।।
तैसा तूं माझां ठाईं। राखों नेणसिं काईं।
तऱ्हैं आतां तुज काईं। गोप्य मी करीं।।१३५१।।
म्हणौनि आघविंचि गूढें। जैं पाऊनि अति उघडें।
तैं गोप्य माझें चोखडें। वाक्य आईक।।१३५२।।

"आपले सर्वस्व जलास समर्पण करणारे लवण आपले मीपण कसे विसरून जाते आणि सर्वार्थाने जलाशी एकरूप होतांना लज्जा कशी ती बाळगतच नाही; तूही तसाच माझ्याशी एकरूप झाला आहेस आणि स्वतःचे स्वत्व मलाच पूर्णपणे देण्यात कसर अशी ती कोणतीही ठेवणे जाणत नाहीस. मग मला तरी तुझ्यापासून काहीही गुप्त कसे बरे ठेवता येईल! म्हणून हे पांडुपुत्रा! गुह्यातिगुह्य रहस्य विशुद्धतया स्पष्ट करणारा माझा हा उपदेश पुनः ऐक, ज्याच्यापुढे जगातील सर्वच गुह्ये सहज उलगडतील!"

गीतेचे साधनसार

श्रीकृष्ण पुढे म्हणतातः

<u>मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।</u>
<u>मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे</u>।।१८-६५।।

"हे मत्प्रिय अर्जुना! मला पावण्याचा खरा आणि सुगम मार्ग मी प्रतिज्ञापूर्वक तुझ्यावरील प्रेमाखातर पुनः सांगतो, तो नीट अवधान देऊन ऐक. तुझे मन माझ्यानेच भरून टाक; तू केवळ माझीच भक्ती कर; तू माझेच यजन-याजन, भजन-पूजन करत जा; मज एकासच सर्वत्र पाहात नमस्कारित जा. म्हणजे तू मला निश्चितच येऊन मिळशील."

<u>साधारण याच अर्थाचा गीतेतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण असा श्लोक आपण नवमाध्यायसमाप्तीच्या प्रसंगी अवलोकिला होता. ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"*** हा तो श्लोक आहे आणि त्यावरील जे निरूपण आपण पाहिले, त्यानुसार ***गीतेचे उपदेशसार* या श्लोकात सामावले आहे**.</u>

गीतासमाप्तीचा प्रसंग जवळ येत आहे आणि या अठराव्या अध्यायी भगवंत ***"सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः।"*** असे सूचन करून त्याच अर्थाचे वचन सांगत आहेत, हे अति वैशिष्ट्यपूर्ण आहे. जिज्ञासूंनी इकडे पूर्ण अवधान देऊन ***गीतेचे साधनसार*** या दोन श्लोकांतून तपासून घ्यावे इतके या श्लोकांचे माहात्म्य आहे. असो.

श्रीकृष्णांच्या गीतोक्त उपदेशाचे सार सांगणारा हा श्लोक आहे व त्यानंतरचा श्लोक याला पूरक असा आहे. तो श्लोक असा आहेः

<u>सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।</u>
<u>अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः</u>।।१८-६६।।

भगवंत म्हणतातः "अर्जुना! सर्व धर्मांचा परित्याग करून मज एकावर पूर्ण निष्ठा ठेवून मला अनन्यभावाने शरण हो! मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन, असे तुला वचन देतो. तू निश्चिंत अस!"

श्लोक क्र.१८-६५ व ६६ हे गीतेचे उपदेशांतीचे दोन मूळ श्लोक आहेत. नंतर ***संप्रदाय, गीताशास्त्र जतन करणे, गीतेची फलोपलब्धी, गीतामाहात्म्य*** याविषयीचे श्लोक येतात ***("इदं ते नातपस्काय ...।। ....पुण्यकर्मणाम्।।१८-६७ ते ७१।।")***. ते सांगून तदनंतर अर्जुनास हा उपदेश पटला का; त्याचा कर्तव्याकर्तव्य, धर्माधर्म, पापपुण्य इ.विषयीचा संदेह नष्ट झाला की नाही; त्याचे अज्ञान फिटले की नाही; असा प्रश्न भगवंतांनी केला आहे ***("कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ ...। ... धनञ्जय।।१८-७२।।")*** आणि नंतरच्या श्लोकातून अर्जुन उत्तरतो ***"नष्टो मोहः ...। ..करिष्येवचनं तव।।१८-७३।।"*** **याचबरोबर *श्रीकृष्णार्जुनांचा गीतासंवाद* समाप्त होतो.**

त्यानंतरचे सञ्जयाचे चार श्लोक गीतेतील या उपदेशाचे रसग्रहण करणारे असून त्यांनी गीतेच्या संपूर्णतेचा सोहोळा संपन्न होतो ***("इत्यहं वासुदेवस्य ... । ... रोमहर्षणाम्।।...१८-७३ ते ७८।।").*** आपणास हा उर्वरित गीता-ज्ञानेश्वरीविभाग अजून अभ्यासावयाचा आहे. तर वळू या प्रथम गीतासारदर्शक श्लोक क्र. १८-६५ व ६६ यांच्या विवेचनाकडे!

गीताश्लोक क्र.१८-६५ व ६६वरील शाङ्करभाष्य

या श्लोकांबाबत श्रीमच्छंकराचार्य काय म्हणतात, ते प्रथम पाहू या. ***मन्मना म्हणजे "मच्चित्तो भव"*** - "माझ्याठायी चित्त अर्पिलेला हो"; ***मद्भक्तो म्हणजे "मद्भजनो भव"*** - "माझे भजन करणारा हो"; ***मद्याजी म्हणजे "मद्यजनशीलो भव"*** - "माझे पूजन करणारा हो"; ***मां नमस्कुरु म्हणजे "नमस्कारम् अपि माम एव कुरु"*** - "मलाच नमस्कार करत जा"; असे आचार्य म्हणतात.

"असे केल्याने, तसेच मज वासुदेवात सर्व साध्य, साधन आणि प्रयोजन यांचे समर्पण केल्यास तू मला प्राप्त होशील, ही माझी सत्य प्रतिज्ञा आहे," असा अर्थ आचार्यांनी केलेला आहे.

भगवंतांचे हे सत्य वचन ऐकून ***भगवद्भक्तीचे मोक्ष हेच निःसंदेह फल असल्याचे जाणून मनुष्यमात्राने भगवंतास त्वरित शरण जावे व भगवद्भक्तीस तत्पर व्हावे, असा संदेश आचार्य देतात.*** अर्थातच आचार्य हे सांगण्यासही विसरत नाहीत की भगवंतांचे वरील वचन ***कर्मयोगनिष्ठा*** आचरणाऱ्या सामान्य साधकांसच लागू आहे. **या निष्ठेचे फल म्हणजे *ज्ञान* होय व *ज्ञानानेच मोक्ष लाभतो,*** असे तर आचार्यांचे निःसंदिग्ध प्रतिपादन आहे. हा अर्थ ते पुढील ***"सर्वधर्मान्परित्यज्य ..।।१८-६६।।"*** या श्लोकाचे विश्लेषण करत असता प्रकट करतात. किंबहुना १८-६५ व ६६ या श्लोकद्वयीस ते आपल्या विचारप्रणालीशी अनुरूपत्व देऊन ***"ज्ञानादेव तु कैवल्यम्।"*** या श्रुतीकडे गीतेचा प्रवाह घेऊन जातात.

"धर्मशब्देन अत्र अधर्मः अति गृह्यते नैष्कर्म्यस्य विवक्षितत्वात्" - ***धर्म*** शब्दाने ***अधर्म*** याचाही बोध होतो, कारण येथे भगवंतांस नैष्कर्म्याचे प्रतिपादन अभिप्रेत आहे, असे आचार्य म्हणतात. ***"सर्वधर्मान् परित्यज्य"*** म्हणजे ***"सन्न्यस्य सर्वकर्माणि इति एतत्"*** - "सर्व कर्मांचा संन्यास करून सर्वात्मा, सर्वभूतस्थित, सम, अच्युत, गर्भ-जन्म-जरामरणरहित अशा मज एकमेव ईश्वरास तू शरण जा" असा या कृष्णोक्तीचा अर्थ आचार्य घेतात.

"मज एकाला शरण जा" असे म्हणण्याचे कारण आचार्यमते ***"मत्तः परतरं नान्यत्किञ्चिदस्ति धनञ्जय। ..।।७-७।।"*** - *"मजवाचून येथे अन्य असे काहीच नाही"* असे भगवद्वचन होय. सर्व कर्मे अशा निश्चयी प्रकारे संन्यासल्याने सर्व धर्म-अधर्मरूपीबंधने व पापातून मनुष्यास भगवंत मुक्त करतात आणि अंतरीचा ज्ञानदीप उजळून अज्ञानजन्य अंधकाराचा नाश करून आपले स्वरूप त्याच्यापुढे प्रकाशवतात ***("नाशम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता। ...।। १०-११।।")*** , असे आचार्यभाष्य आहे.

थोडक्यात म्हणजे या भगवदुपदेशातून *(१) ज्ञान हेच मोक्षाचे एकमेव साधन आहे; आणि (२) त्यासाठी सर्वकर्मसंन्यास अंगिकारावा - हीच ज्ञाननिष्ठा वा हाच साङ्ख्यमार्ग होय; व भगवंत गीतेतील उपदेशाद्वारे हाच उचलून धरतात,* असे आपले मत आचार्य सिद्ध करू पाहत आहेत.

शास्त्राचा उपसंहार करतांना त्यांनी हे मत पूर्वपक्ष-उत्तरपक्ष या प्रचलित युक्त्यांद्वारे आपल्यापरीने सिद्ध केले आहे. जिज्ञासूंनी तो सविस्तर भाग मूळ गीताभाष्यातूनच पाहणे उचित ठरेल. असो.

ईश्वरप्रणिधानाचे सुंदर निरूपण

ईश्वरप्रणिधान हा तर गीतोपदेशाचा आत्माच आहे. गीतागोविंदाचे ते मनोगत आहे. ***"मन्मना भव ..। मा शुचः।।१८-६५ व ६६।।"*** या श्लोकद्वयीतून तेच व्यक्त झालेले आहे. ज्ञानेश्वरही ***कर्मयोगनिष्ठा*** सांगतांना ईश्वरप्रणिधानाचे हे महत्त्व ध्यानी आणून वरील श्लोकांवर विवरण करण्यास उद्युक्त झाले आहेत. आपण आता या भगवदुक्तीविषयी ज्ञानदेवांचे मत काय आहे, ते पाहू याः

तन्हें बाह्य आणि आंतरां। आपुलियां सर्व व्यापारां।
मज व्यापकातैं वीरा। विषो करी।।१८-१३५३।।
आघवां आंगिं जैसा। वायु मिळौनि आहे आकाशां।
तूं सर्व कर्मी तैसा। मजसींचि अस।।१३५४।।
किंबहुना आपुलें मन। करीं माझें एकायतन।
माझेनि श्रवणें कान। भरूनि घालीं।।१३५५।।
आत्मज्ञानें चोखडीं। संत जैं माझिं रूपडीं।
तेथ दृष्टी पडों आवडीं। कामिनी जैसिं।।१३५६।।

ईश्वरप्रणिधानाचे संक्षिप्त पण अत्यंत सुंदर असे हे विवेचन करत ज्ञानदेव श्रीकृष्णोक्ती स्पष्ट करतांना सांगत आहेतः "अर्जुना! मज सर्वव्यापी ईश्वराला आपल्या अंतर्बाह्य सर्व व्यापारांचा - सर्व कर्मांचा, सर्व वृत्तींचा, सर्व क्रियांचा तू विषय कर. जसा वायू सर्व अंगांनी आकाशाशी मिळून असतो, तूही तसाच सर्व कर्मे करत असता मजशी एकरूप होऊन राहा. किंबहुना तुझे मन हेच माझ्या राहण्याचे एकमेव गृह करून टाक! आत्मज्ञानाने विशुद्ध झालेले साधुसंत म्हणजे तर इहलोकींची माझीच रूपडी! लोलुप पुरुषाची कामिनीठायी दृष्टी जशी जडते, तशी तुझी दृष्टी त्या माझ्या रूपांठायी जडू दे!"

मी सर्व वस्तिचें वसौटें। माझिं नामें जिएं चोखटें।
तिएं जीवां यावयां वाटें। वाचेचियां लावि।।१८-१३५७।।
हाताचें करणें। कां पायांचे चालणें।
तैं होएं मजकारणें। तैसें करीं।।१३५८।।
आपुला अथवा परावा। ठाईं उपकरसि पांडवा।
तेणें यज्ञु होईं बरवा। याज्ञिकु माझां।।१३५९।।

"माझी नामे मजसारखीच विशुद्ध असतात. सर्व निवासांचाही निवास असणाऱ्या माझी ती आवडती वस्तिस्थाने आहेत. ती तुझ्या

जिह्वेवर नाचावीत यासाठी त्यांना वाचेच्या वाटेवर रिघव. म्हणजे ***वैखरी-मध्यमा-पश्यंति-परा*** या वाचामार्गे ती तुझ्या अंतरी वसती होतील. हस्तपादादी अवयवांच्या क्रिया व कर्मे, चालणे, कर्मे करणे हे सर्व मजसाठी होईल असे तू कर."

"काया, वाचा व मन असे तू माझ्याने अंतर्बाह्य भरून टाक," असा ईश्वरप्रणिधानात्मक उपदेश श्रीकृष्ण अर्जुनाला करत आहेत. ते पुढे म्हणतातः

हें एकैक सिकऊं काईं। पैं सेवकै आपुलां ठाईं।
उरौनि एर सर्वहीं। मी सेव्यचि करिं।।१८-१३६०।।

"आणि स्वजनांवर व लोकांवर तू जे काही उपकार करशील, जो काही त्यांच्या उपयोगी पडशील, ते सर्व काही मजप्रीत्यर्थ केलेले यज्ञ होवोत. असे यज्ञ करून तू माझा उत्तम याज्ञिक हो! आतापर्यंत वारंवार मी तुला हे सगळे वेगवेगळ्या रीतींनी कितीतरी समजावून सांगितले आहे. तुला हे सारखे पढवण्याची तशी काही आवश्यकता आहे का! हे बुद्धिमंता! हे अखिल जगत केवळ मीच आहे, हे तू नीट जाणतोसच! आपल्या अंगी सेवकाचा भाव ठेवून सर्वात्मक अशा या विश्वरूपाची तू सेवा कर, त्यलाच भज!"

तेथ जाऊनियां भूतद्वेषु। सर्वत्र मन वै नम मीचि एकु।
आईसेनि आश्रयो आत्यंतिकु। लाहासिं तूं माझां।।१८-१३६१।।

"माझेच सर्वत्र असे दर्शन घेतल्याने तुझ्याठायी कोणत्याही भूतमात्रांचा द्वेषभाव मग उरेलच कसा! भेदभावातीत अशा वृत्तीने हे जगत पाहून तू त्यातील प्रत्येक प्राणिमात्रात मलाच पाहत तेव्हा नमस्कार करशील. अशा रीतीने मला वंदन करत तू मला अनन्यशरण होशील आणि सर्वांचे शरण्यस्थान असा जो मी आहे, त्या माझा आत्यंतिक परम आश्रय तुला प्राप्त होईल. तु माझाच होशील."

ईश्वरप्रणिधानोपायाने मोक्षप्राप्ती

मग भरलेयां जगांआंतु। जाऊनियां तिजेयाचिं मातु।
होऊनि ठाईल एकांतु। आम्हां तुम्हां।।१८-१३६२।।
तेव्हां भलतिएं अवस्थें। मी तूंतैं तूं मातें।
भोगिसिं आईसें आइतें। वाढेल सुख।।१३६३।।

"जगद्रूप तुझ्यासमोरून असे मावळले की मग या भरलेल्या अखिल विश्वात त्या आपल्या दोघांच्या एकांतात अडचण आणणाऱ्या या तिसऱ्यास म्हणजे या जगतास वावच उरणार नाही. आपणास असा निवांत एकांत मिळेल; या विश्वाची वार्तासुद्धा राहणार नाही. त्या वेळी कोणत्याही अवस्थेत मी तुला व तू मला उपभोगू! आपले हे सुख आयतेच असे वाढत जाईल." याच स्थितीस उद्देशून कबीर तिला ***"दिन दिन बढत सवायो"*** असे वाखाणतात. भगवंत पुढे म्हणतातः

आणि तिजें आडल करितें। निमालें अर्जुना जेथें।
तैं मीचि म्हणौनि तूं मातें। पावसिं शेखीं।।१८-१३६४।।

जैसिं जलींचिं प्रतिमा। जलनाशिं बिंबां।
एतां गाभागोभा। काईं आहे।।१३६५।।
पैं पवनु अंबरां। कां कल्लोलु सागरां।
मिलतां आडवारा। कोणाचां गां।।१३६६।।
म्हणौनि तूं आणि आम्हीं। हें दिसताहें देहधर्मीं।
मग याचां विरामीं। मींचि होसिं।।१३६७।।

"आपल्या या मिलनात बाधा आणणारे तिजें जे विश्व, तेच निमाले की तू अंती माझ्याप्रत येऊन पावशीलच! जळातील प्रतिबिंबास जळ आटून गेल्यावर मूळ बिंबाशी एकरूप होण्यात कोणती अडचण असते! वायू गगनास मिळत असता त्याला कोणी अडथळा आणू शकते का! लाट समुद्रात विलीन होण्यात कसला तरी प्रतिबंध असतो का! तुझे आणि माझे हे द्वैत - हा दुजाभाव - हे दुजेपण - ज्या देहधर्मामुळे उपटले आहे, त्या देहधर्माचा या जगतासोबतच जेव्हा असा लोप होईल, तेव्हा परिणामस्वरूप तू मीच होशील!"

क्रमयोग हाच मोक्षप्राप्तीचा एकमेव मार्ग

"हें समस्तहीं श्रीवासुदेओ। आईसा प्रतितीरसाचां वोतिला भाओ। म्हणौनि भक्तांमाजिं राओ। आणि ज्ञानियां तोंचि।।७-१३६।।" ही ज्ञानेशांची ओवी त्या भक्त-ज्ञानी अशा साधकाची स्थिती समर्थपणे सांगते! ईश्वरप्रणिधानपूर्वक आचरावयाच्या या कर्मयोगनिष्ठेमुळे***(श्लोक क्र.३-२ - "लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा..। ...कर्मयोगेन योगिनाम्।।" यातील कर्मयोगनिष्ठा)*** - या पंथराजाच्या अनुष्ठानापासून मोक्षाची प्राप्ती होतेच होते. श्रीकृष्ण आपल्या वचनाची ग्वाही देत म्हणतातः

ययां बोलामाझारीं। होएं न होएं तैं झनैं करीं।
एथ आन आथी तऱ्हैं। तुहींचि आण।।१८-१३६८।।

"पण अर्जुना! तुला मी सांगितलेल्या या मार्गाविषयी व त्याचे अंतिम फल मोक्ष हे त्यायोगे खरेच प्राप्त होते की नाही याविषयी जर कोणताही संदेह अजूनही उरला असेल, तर तुझी शपथ घेऊन सांगतो की ***मोक्षप्राप्तीचा याहून वेगळा मार्गच नाही!! हाच मोक्षसाधनाचा एकमेव उपाय आहे!"***

पैं तुहीं आण वाहाणें। हें आत्मलिंगातैं शिवतणें।
प्रीतीचिं जाति लाजणें। आठवो नेदी।।१८-१३६९।।

"आता तुझी आण वाहणे म्हणजे खरे तर मज आत्म्याचीच शपथ घेणे होय. कारण तू व मी काही दोन का आहोत! माझी शपथ अशी घ्यायला मला भाग पडावे हे किती लाजिरवाणे वाटेल! पण तुझ्यावरील अतीव प्रीतीने भुलून जाऊन मी सगळी लाजलज्जा हरवून बसलो आहे. प्रेमाची जातकुळीच अशी असते की तिच्यापुढे कोणतीच भीडमुरवत टिकत नाही!"

एरविं वेदु निष्पपंचु। जेणें विश्वाभासु हा सांचु।
आज्ञेचां नटनाचु। कालातैं जिणें।।१८-१३७०।।

तो देओ मी सत्यसंकल्पु। आणि जगाचां हितु बापु।
मां आणेचां आक्षेपु। कां करावा।।१३७१।।

"आणि मी तर प्रत्यक्ष या प्रपंचाला साकारून वेदांनी ज्यास विश्वाभास म्हणून वर्णिले आहे, तोच साक्षात करणारा, ज्याच्या आज्ञेचा भृकुटिभंग प्रत्यक्ष काळासही जिंकतो, तो सत्यसंकल्प जगत्पिता ईश्वरच आहे. तुला माझे हे हितपर बोल पटावे म्हणून अगदी शपथही घ्यायला माझे मोठेपण बाजूला सारून मी तयार झालो आहे."

परि अर्जुना तूझेनि वेधें। मियां देओपणाचि बिरुदें।
सांडिली गां मी हें आधें। सगलेनि तुवां।।१८-१३७२।।
पैं काजां आपुलियां। राओ आपुली आपणयां।
आण वाहें धनंजया। तैसें हे कीं।।१३७३।।

"आणि अर्जुना! खरे तर ते मोठेपणाही आता माझ्या अंगी राहिलेले नाही. जेव्हापासून तुझी माझी भेट झाली, तेव्हापासून तुझ्या अनन्यभक्तीला भुलून मी माझी ईश्वरत्वाची सारी बिरुदे टाकून दिली. तुझाच वेध लागल्याने मी पूर्ण ईश्वर अर्धा झालो; मला जीवपणा प्राप्त झाला आणि आता तूच माझा ईश्वर - तूच पूर्णपुरुष - आणि मी संसारी जीव अशी तुझ्यावरील प्रेमाच्या मोहात अडकून माझी अवस्था झाली आहे!! आणि राजासुद्धा नाही का आपल्या कामासाठी सेवकांपुढे प्रतिज्ञा घेत! तसेच मज ईश्वराचेही झाले आहे."

कर्माचरण ते स्वरूपप्राप्तीचा मार्ग

भगवंतांच्या या उद्गारांवर अर्जुनाची कोणती प्रतिक्रिया आहे, ती ज्ञानदेव आता वर्णित आहेतः

तेथ अर्जुन म्हणे देवें। अचाट हें न बोलावें।
जी आमचें काज नांवें। तूझेनि एकें।।१८-१३७४।।
ययावरी सांघो बैससिं। कां सांगतां भाखहीं देसिं।
ययां तुझियां विनोदासिं। पारु आहे जीं।।१३७५।।

अर्जुनाचा भगवंतावर पूर्ण विश्वास आहे. भगवंतांचा उपदेश तर त्याला पूर्णपणे मानवलेला आहे. श्रीकृष्ण मात्र आपले ***पूर्णप्राज्ञ पुरुषत्व*** विसरून अशा आणाभाका घेत आपल्या गीतोपदेशाचे हे ***क्रमयोगसार*** पुनःपुनः त्याच्या मनावर ठसवण्याच्या प्रयत्नात मग्न आहेत.

श्रीकृष्णांची ही अगतिकता अर्जुनाला सहन होत नाही. तो म्हणतो, "देवा! हे निर्वाणीचे भाषण - तुझा उपदेश सत्यमार्गदर्शक असल्याची ग्वाही भरणे - त्यासाठी आण घेणे - या सर्व गोष्टी कशाकरता! आमचा तुझ्यावर विश्वास नाही का! अरे! तुझ्या केवळ एकाही शब्दाने आमचे कोटकल्याण साधेल, असा तू पुरुषोत्तम! तरीही तू सतत आमचे कल्याण करण्यासाठी एवढा मोलाचा उपदेश करतो आहेस आणि वर त्याच्याविषयी खात्री पटावी म्हणून भाकही वाहतो आहेस! ही तर तुझी लीलाच म्हटली पाहिजे. तिचा काही पार लागत नाही."

कमलवना विकाशु। करी रवीचां एकु अंशु।
तेथ आघवांचि प्रकाशु नित्य दे तो।।१८-१३७६।।

"कमलपुष्पे उमलावीत म्हणून रवी प्रकाशतो. खरे तर रविप्रकाशाच्या एका अंशानेही कमलांची उपवनेच्या उपवने उमलतील! पण कमलांसाठी उगवणारा सूर्य सर्व विश्वच उजळवून टाकत लोकांवर अनंत उपकार करतो."

पृथिवि निवऊनि सागरु। भरिजति एवढें थोरु।
वर्षे तेथ मिषांतरुं। चातकु कीं।।१८-१३७७।।
म्हणौनि औदार्या तुझेयां। मज निमित्त ना म्हणावेयां।
प्राप्ति असें दानीं रायां। कृपानिधि।।१३७८।।

"चातकाचा कैवारी मेघ वर्षतो आणि पृथ्वीस शांत करून सागरही जलाने पूर्ण भरून टाकतो. खरे तर चातकाच्या तृषाशांतीसाठी वृष्टीचा केवळ एकच थेंबुटलाही पुरेसा असतो. पण चातकाच्या मिषाने वर्षून मेघ लोकांनाही तृप्त करतात. हे श्रेष्ठ दात्या! हे कृपानिधी! माझ्या निमित्ताने तू हे जे उपदेशरूपी कृपाधन प्रकट केले आहेस, त्याचा अखिल विश्वाला लाभ झाला आहे. कोण हे तुझे औदार्य! कोण हे तुझे दातृत्व! केवढी ही तुझी विश्वकल्याणाची आर्तता!"

तंव देओ म्हणति राहें। ययां बोलाचां प्रस्तावो नोहें।
पैं *मातें पावसिं उपायें। सांचचि एणें* ।।१८-१३७९।।
सैंधव सिंधु पडिलियां। जो क्षणु धनंजया।
तेणें विरेंचि कीं उरावेयां। कारण काईं।।१३८०।।
तैसें *सर्वत्र मातें भजतां। सर्व मी होतां अहंता।*
निःशेष जाऊनि तत्त्वतां। मीचि होसिं।।१३८१।।
एवं माझिएं प्राप्तिवेरीं। कर्मालगौनि अवधारीं।
***दाविलीं तूझ उजरी। उपायाचिं* ।।१३८२।।**

अर्जुनाच्या बोलांनी सुखावलेले श्रीकृष्ण म्हणतातः "अरे! माझी इतकी प्रशंसा करण्याचे काहीच कारण नाही. तू फारच बोलतोस! असो! पण पुनः ऐक. मी सांगितलेल्या या उपायाने - या साधनानेच - तू खरोखरी मला पावशील. अर्जुना! मीठाचा खडा समुद्रात पडल्याक्षणीच त्याच्यात विरघळून जायला लागतो. त्याला समुद्रावगळे राहणे जमते का! त्याचप्रमाणे सर्व भूतमात्रांठायी मला भजण्यास लागले असता सर्व विश्व माझ्याने भरलेले दिसू लागून, मीपणा जाऊन देहअहंकारादी सर्व पूर्णपणे लोपून मद्रूप होण्यास कितीसा वेळ लागणार! ***असा हा कर्माचरण ते माझ्या स्वरूपाची प्राप्ती येथपर्यंतचा साधनाक्रमाचा सरळधोपट असा मार्ग मी तुला साद्यंत स्पष्ट करून दाखवला आहे.*** तू सुज्ञ आहेस. अधिक काय सांगू!"

क्रमयोगाची पूर्णता

जैं आधीं पांडुसुता। सर्व *कर्मे* मज अर्पितां।
***सर्वत्र प्रसन्नता। लाहिजे माहीं* ।।१८-१३८३।।**
पाठीं *माझां* तिएं *प्रसादीं* । *माहें ज्ञान जाएं सिद्धि।*
***तेणें मिसलिजें त्रिशुद्धि। स्वरूपीं माह्यां* ।।१३८४।।**
मग पार्था तिएं ठाईं। *साध्यसाधन* होएं नाहीं।
किंबहुना तूझ काईं। उरेचिना।।१३८५।।

"अर्जुना! ***घडणारी सकळ कर्मे सर्वत्र असणाऱ्या मज ईश्वरास अर्पण करून मला प्रसन्न करून घ्यावे; माझा प्रसाद प्राप्त करून***

घ्यावा. त्या प्रसादाच्या फलस्वरुप माझे ज्ञान होते. त्या ज्ञानास पूर्णता येते; ज्ञान सिद्धीस जाते; आणि निश्चितपणे माझ्या स्वरूपी मिळविले जाते. मद्रूपाठायी साध्यसाधनांचें वेगळे अस्तित्व उरत नाही. फार काय! ही अवस्था तुला प्राप्त झाली की पुढे काहीच करणे उरत नाही. **क्रमयोगाचे हे साधन पूर्ण होते. *कर्मयोग* पूर्णत्वास जाऊन *योगनिष्ठाफल* प्राप्त होते."**

गीतेतील ईश्वरप्रणिधानयुक्त क्रमयोग वा पंथराज याचा विवेक

श्रीकृष्णांनी *गीता श्लोक क्र.३-३(**"लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा।.."**)* यात ज्या दोन निष्ठांचा अथवा योगमार्गांचा पुरस्कार केला होता, त्या म्हणजे ***(१)ज्ञानयोग वा साङ्ख्यांचा योगमार्ग व (२) कर्मयोग वा योग्यांचा योगमार्ग.*** त्यातील ***कर्मयोगनिष्ठा* वा *योगमार्ग* हा सुलभ व श्रेयस्कर असल्याचेही त्यांनी *गीता श्लोक क्र.५-२ ("सन्न्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ। तयोस्तु कर्मसन्न्यासात् कर्मयोगो विशिष्यते।।")* यात स्पष्ट सागितले होते.**

तसेच या ज्ञानयोगनिष्ठेचे किंवा कर्मयोगनिष्ठेचे - कोणत्याही एका निष्ठेचे अनुष्ठान उत्तमरीत्या केले असता ***मोक्ष*** हेच फल प्राप्त होते; तसेच यातील कोणत्याही एका मार्गाचे अनुसरण करणाऱ्यास या दोन्ही मार्गांचे फल लाभते; त्यांना मिळणारा मोक्षही एकाच योग्यतेचा असतो. ***ज्ञानयोग्याची मुक्तावस्था व कर्मयोग्याची मुक्तावस्था अथवा साङ्ख्यांची मुक्ती व योग्यांची मुक्ती यात कोणतीच भिन्नता नसते,*** असेही श्रीकृष्ण *गीता श्लोक क्र.५-४ व ५-५ (**"साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः। एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दतेफलम्।।५-४।। यत् साङ्ख्यै प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते। एकं साङ्ख्यं च योगं च यःपश्यति स पश्यति।।५-५।।"**)* यातून स्पष्ट करतात.

तसेच वस्तुतः या दोन निष्ठांचे आचरण मुळात भिन्न नाही, एकच आहे, याचाही स्पष्ट निर्देश येथे भगवंतांनी केला आहे. त्यातूनही याबाबत शंका राहू नये यासाठी *गीता श्लोक क्र.५-६ (**"सन्न्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः। योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाधिगच्छति ।।५-६।।"**)* यातून त्यांनी ***कर्मयोगाचे म्हणजे योगनिष्ठेचे आचरण केल्याविना ज्ञानयोग वा साङ्ख्यनिष्ठा या म्हणजे कर्मसंन्यास सिद्ध होऊ शकत नाही,*** हेही सांगितले आहे. योगाचे श्रेष्ठत्व सांगून योगयुक्तास ब्रह्मप्राप्ती त्वरित होते हे पण भगवंतांनी या श्लोकी स्पष्ट केले आहे.

या सर्व गीतावचनांचा इत्यर्थ कोणता आहे, हे जिज्ञासूंनी ध्यानी घेतले तर ***गीतेतील निर्दिष्ट व उपदिष्ट योग*** त्यांना सहजच सापडतो. तो म्हणजे ***योग्यांचा योग - योगनिष्ठा* वा *कर्मपर योगमार्ग!*** हाच योग ज्ञानदेवांनी ***पंथराज* तसेच *क्रमयोग*** या संबोधनांनी प्रतिपादित केला आहे. गीतेतील खरा पुरस्कृत योग तो हाच! म्हणूनच पंथराजाबाबत ज्ञानेशांनी म्हटले आहे की ***"पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतिचां दंसु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९१।। तेयां ध्वनिताचें केणें सोडूनि। यथार्थाचिं घडी झाडूनि। उपलविलीं मियां जाणूनि। ग्राहीक श्रोते।।६-२९२।।"***

श्रीकृष्णांनी पुरस्कारलेला योग म्हणजे हा ***पंथराज*** च होय असे ज्ञानदेव म्हणतात. पण **_पंथराज_ म्हणजे केवळ _आसनालागौनि_ करावयाचा _कुंडलिनी लययोग_च आहे, असा कोणाचाही गैरसमज होऊ नये म्हणून _क्रमयोग_ विवरण करत असता अठराव्या अध्यायी या कुंडलिनीलययोगाचे त्यातील स्थानही त्यांनी निर्दिष्ट केले आहे.**

या सर्व गोष्टींचा समग्र विचार करता ज्ञानेश गीतेतील पुरस्कृत योगाचे सविस्तर विवेचन क्रमयोगनिरूपणाद्वारे कसे करतात, ते स्पष्ट होते. हे सर्व विवेचन आपण आतापावेतो यथासांग पाहिले आहेच. ***"एवं माझिएं प्राप्तिवेरीं। कर्मालागौनि अवधारीं। दाविलीं तूझ उजरी। उपायाचिं।।१८-१३८२।।"*** ही ओवी ***"कर्म -➤ मोक्ष"*** हाच ***क्रमयोग*** निर्देशिते.

"जैं आधीं पांडुसुता। सर्व कर्मैं(१) मज अर्पितां। सर्वत्र प्रसन्नता। लाहिजे माहीं।। पाठीं माह्यां तिएं प्रसादीं। माहें ज्ञान(२) जाएं सिद्धि। तेणें मिसलिजे(३) त्रिशुद्धि। स्वरूपीं माह्यां।।१८-१३९३,१३८४।।" या ओव्या पण ***कर्मयोग* व *ज्ञानयोग*** यांचा समावेश करत ***"कर्म(१) -➤ ज्ञान(२) -➤ योग -➤मोक्ष(३)"*** असा हाच ***क्रमयोगमार्ग*** प्रदर्शित करतात. या सर्व गोष्टींचा उल्लेख करून आपण श्रीकृष्ण अर्जुनास काय सांगत आहेत, ती पाहू याः

अर्जुनसुद्धा क्रमयोगीच!

तऱ्हैं सर्व कर्मे आपुलीं। तुवां सर्वदा मज अर्पिलीं।
तेणें प्रसन्नता लाधली। आजि हें माहीं।।१८-१३८६।।
म्हणौनि एणें प्रसादबळें। नोहें झूंजाचेनि आडळें।
न ठकेचि एकें हेलें। भाललों तूझ।।१३८७।।
जेणें सप्रपंच अज्ञान जाएं। एकु मी गोचरु होएं।
तैं उपपत्तिचेनि उपायें। गीतारूप हें।।१३८८।।
मियां ज्ञान तूझ आपुलें। नाना परी उपदेशिलें।
एणें अज्ञानजात सांडीं वियालें। धर्माधर्म जैं।।१३८९।।

ते म्हणतात कीः "अर्जुना! तूही याच योगाचे अनुष्ठान केले आहेस. तू योगी आहेस. ***कर्मयोगनिष्ठा*** आचरत आपली सर्व कर्मे तू मला अर्पित आला आहेस. त्यामुळे तुला आज ही मज ईश्वराची प्रसन्नता लाभली आहे. म्हणून या युद्धप्रसंगाच्या आडवेळीही तुला ज्ञान देण्यात मी अंतर करणार नाही. तुला माझा प्रसाद प्राप्त झाला आहे. मी तुझ्यावर भाळलो आहे. म्हणून ज्यामुळे प्रपंचासह अज्ञानाचा लोप होतो; ***ज्यामुळे एकमेवाद्वितीय अशा माझा साक्षात्कार घडतो; ते गीतारूपी मत्स्वरूपाचे ज्ञान मी तुला अनेक उपपत्तींच्याद्वारे उत्कर्षास नेत नाना परींनी स्पष्ट उपदेशिले.*** या ज्ञानाधारे तू ज्याने धर्माधर्म निर्माण केले आहेत, ते स्वरूपीचे अज्ञान त्याग!"

क्रमयोग फलनिरूपण

ज्ञानाने अज्ञान खंडते; सर्व पापे नष्ट होतात; मोक्षप्राप्ती होते. श्रीकृष्ण अर्जुनास त्याचेच उदाहरण देऊन क्रमयोगाचे फल सांगत आहेत. ते म्हणतातः

आशा जैसिं दुःखातैं। व्यालीं निंदा दुरितें।
हें असो जैसें दैन्यातैं। दुर्भगत्व।।१८-१३९०।।
तैसें स्वर्गनरकसूचक। अज्ञान व्यालें धर्मादिक।
तैं सांडूनि घालीं अशेख। ज्ञानें एणें।।१३९१।।

"अर्जुना! आशा जशी दुःखाला, निंदा जशी पातकास, दुर्भाग्य जसे दैन्याला जन्म देतात; त्याचप्रमाणे धर्म व अधर्म, स्वर्ग व नरकसूचक असे जे असते, त्यांची जननी अज्ञान होय. या ज्ञानाने – जे मत्स्वरूपाचे ज्ञान हा गीतोपदेश प्रकट करत आहे, त्याने तू त्या अज्ञानाचा निःशेष नाश कर."

हातिं घेऊनि तो दोरु। सांडिजैं जैसा सर्पाकारु।
कां निद्रात्यागें घराचारु। स्वप्नींचा जैसा।।१८-१३९२।।
नाना सांडिलेनि कवलें। चंद्रींचें धुपें पिवलें।
व्याधित्यागें कडुवालें-। पण मुखाचें।।१३९३।।
अगां दिवसां पाठीं देऊनि। मृगजल घापें त्यजूनि।
कां काष्ठत्यागें वह्नि। त्यजिजे जेविं।।१३९४।।
तैसें धर्माधर्माचें टवाल। दावि अज्ञान जैं कां मूल।
तैं त्यजूनि त्यजिं सकल। धर्मजात।।१३९५।।

"रज्जुवर भासणारा सर्प जसा रज्जू हाती घेताच टाकून दिला जातो; स्वप्नातील गृहव्यापार जसा निद्रात्यागाने टाकून दिला जातो; फार काय! काविळीचा त्याग होताच चंद्राचे पिवळेपण जसे लोपते; व्याधी नष्ट होताच तोंडाचे कडवटपण जसे नाहीसे होते; दिनमणीचा अस्त होताच मृगजळ जसे दवडून दिले जाते; किंबहुना काष्ठे त्यागताच त्यांच्यातील अग्नीचाही जसा त्याग घडतो; त्याचप्रमाणे हे धर्माधर्माचे बंड पसरवणारे मूळ जे ***अज्ञान*** आहे, त्याचाच त्याग कर आणि त्याबरोबर आपच सकळ धर्मजात त्यागून टाक!"

अनन्यशरणत्वभाव

भगवंतास साधकाने शरण गेले पाहिजे, असा याचा अर्थ ज्ञानेश सांगतात, तो पाहाः

मग अज्ञान निमालियां। मीचि एकु असें आपैसयां।
सनिद्र स्वप्न गेलियां। आपणपें जैसें।।१८-१३९६।।
तैसा मी एकवांचूनि काईं। मग भिन्नाभिन्न आन नाहीं।
***<u>सोऽहंबोधें तेयाचां ठाईं। अनन्यु होएं</u>*।।१३९७।।**

"मामेकं शरणं व्रज" यातील ***शरण येणे*** हे वाच्यार्थाने व लौकिकार्थाने सर्वसामान्यपणे शत्रूला शरण जाणे, हात टेकणे, काकुळती करणे इ.अर्थाचे शरण येणे नव्हे, असे ज्ञानेशांच्या वरील ओव्यांवरून स्पष्ट होते. ***"पैं आपुलेनि भेदेंविण। माझें जाणिजें एकपण।"*** यास ज्ञानेश ईश्वरास शरण येणे असे म्हणतात. ही तर अद्वैताची भावना – ईश्वराशी सामरस्यात्मक भूमिका – अनन्यभक्तीची पायरीच नव्हे का! हेच ज्ञान नव्हे का!

<u>**योगी कर्मे करत प्रभुप्रसाद पावतो. त्यापासून ज्ञान प्राप्त होते, अज्ञान लोपते आणि नंतर ही *ज्ञानभक्ती* - अद्वैतभक्तीची श्रेणी प्रकटते. क्रमयोगाच्या अंतर्गत *कर्मयोग, ध्यान वा तत्सदृश योग, ज्ञानयोग व भक्तियोग* हे असे अविच्छिन्न रूपांनी समावलेले आहेत**</u>, ते परत परत जिज्ञासूंच्या मनावर ठसवलेच पाहिजे का! असो.

भगवंत अर्जुनाला म्हणतातः "मिथ्या धर्माधर्माला प्रकटवणारे अज्ञान जेव्हा त्यांच्यासह समूळ नष्ट होते, तेव्हा मीच एकटा उरतो, नाही का! स्वप्नासह निद्रा भंग पावली की आपणच एकटे जसे उरतो, तसा भेदाभेदविरहित असा केवळ मीच अज्ञानाच्या निरासाअंती उरतो. कर्मयोगाने सर्व भूतजातात – वस्तुमात्रात ईश्वरभावना ठेवत आल्याने, योग्यास अज्ञान परास्त होताच भूतमात्रे व सर्वत्र यात आपणासकट सर्वात ***ईश्वर - आत्मा -ब्रह्म - परमात्मा - भगवंत*** यांव्यतिरिक्त अन्यत्वाने कहीही दिसत नाही. **सोऽहंबोधा**ने तो त्या ईश्वराठायी अनन्यत्वाने जडून जातो. जीवभाव नष्ट होतो; जगत लोपते; सर्वत्र परमात्मतत्त्व विकाशते!"

पैं आपुलेनि भेदेंविण। माहें जाणणें जैं एकपण।
तेयाचें नांव शरण। एणें मज गां।।१३९८।।
म्हणौनि घटाचेनि नाशें। गगनिं गगन प्रवेशें।
मज शरण एणें तैसें। ऐक्य करी।।१८-१३९९।।
<u>सुवर्णमणि सोनियां। एं कल्लोलु जैसा पाणियां।</u>
<u>तैसा धनंजया। शरण एं तूं</u>।।१४००।।

"आपला अहंकार आणि जगत्प्रतीतिभाव यांचा असा पूर्णपणे लोप होणे; जीव, जगत व परमात्मा यातील भेदभाव संपूर्णतया लोपणे; ईश्वराचे अद्वयत्व प्रकट होणे याचेच नांव ***मजला शरण येणे*** होय. अर्जुना! घटनाशाबरोबर घटाकाश जसे गगनाचे गगनात एकरूप होते, तसाच तूही मजशी एकरूप हो! मला शरण ये! सोन्याचा सुवर्णमणी सोन्याला जसा अभिन्नत्वाने शरण असतो; लाट जशी पाण्यास शरण जात, त्याच्याशी एकरूप होत, आपले अस्तित्व विरवून टाकते; हे धनंजया! तू पण मला तसाच शरण ये!"

वांचूनि सागराचां पोटीं। वडवानलु शरण आला किरीटी।
जालूं न ठाकें तेयां गोठी। वालूनि दे पां।।१८-१४०१।।
<u>मजहीं शरण रिघिजें। आणि जीवत्वेंचि असिजे।</u>
<u>धिग् बोलीं इयां न लजे। प्रज्ञा केंविं</u>।।१४०२।।

"नाही तर वडवानळ सागरास शरण गेला खरा! पण त्या अथांग जळराशीत आश्रय घेतल्यानंतरही जळावयाचा काही थांबला नही, तशीच गोष्ट व्हावयाची! मला शरण आलो म्हणावयाचे आणि वर तसेच जीवभावाने पृथक राहावयाचे, असे म्हणतांना बुद्धी कशी लाजत नाही! या प्रकाराला तर धिक्कारावे तेवढे थोडेच!"

अगां प्राकृताहीं राया। आंगिं पडें जैं धनंजया।
तैं दासिरुंही कीं तेयां। समान होएं।।१८-१४०३।।
<u>मां मी ईश्वरु भेटें। आणि जीवग्रंथी न सुटे।</u>
***<u>हें बोल नको वोखटें। कानिं लाऊं</u>* ।।१४०४।।**

"हे धनंजया! अगदी सामान्य दासीचा राजाने अंगीकार केला तर ती बटकीदेखील त्याच्या बरोबरीने मिरवतेच ना! मग साक्षात मज विश्वेश्वराची भेट होऊनही जीवग्रंथी सुटत नाही, असे जे अमंगळ विचार, ते कानावर पडूही देऊ नकोस!"

"घेईं मज प्रकाशोनियां"

भगवंतास शरण येणारा त्याचाच होतो, त्याचेच स्वरूप पावतो. हाच मोक्ष! यात पापपुण्याचा सगळा हिशेब चुकता होतो; अद्वैतात स्थिती होते. हीच क्रमयोगाची अंतिम फलप्राप्ती आहे. श्रीकृष्ण सांगतातः

म्हणौनि मी होऊनि मातें। सेवणें आहे आईतें।
तैं करीं हातां एंतें। ज्ञानें एणें।।१८-१४०५।।
मग ताकौनियां काढिलें। लोणी माघौतें ताकीं घातिलें।
परि न घेपें काईं केलें। तेणें जेविं।।१४०६।।
लोह उभें खाएं माती। तैं परिसाचिएं संगति।
सोनें जालेयां पुढुति। न सिविजें मलें।।१४०७।।
हें असो काष्ठापासौनि। मथूनि घेतलियां वह्नि।
मग काष्ठेंहीं कोंडौनि। न ठकें जैसां।।१४०८।।
तैसें अद्वयत्वें मज। शरण रिघालियां तूझ।
धर्माधर्म हें सहज। लागतिल ना।।१४०९।।

"हे अर्जुना! अज्ञान लुप्त होऊन जे ज्ञान उरते, त्याच्यायोगे तू मला अनन्यशरण हो व मला हस्तगत कर. मी होऊन - मद्रूप पावून माझीच भक्ती करणे ही याची फलश्रुती आहे. मग जसे ताक घुसळून काढलेले लोणी परत ताकात जिरत नाही; किंवा नुसते लोखंड उभेच्या उभे गंजून माती होऊन जाते, पण तेच परीसस्पर्श होऊन जेव्हा सोन्यात परिणत होते, तेव्हा त्याला जशी मलिनता स्पर्शूही शकत नाही; काष्ठांचे मंथन करून उत्पन्न झालेला अग्नी जसा एकवार प्रकटला की त्या काष्ठांत त्याला पुनः कोंडून ठेवता येत नाही; त्याचप्रमाणे ***एकवार मला अद्वैतभावाने शरण आले की तुला परत अज्ञानाचा वा तज्जन्य धर्माधर्मांचा स्पर्शही होणार नाही."***

अर्जुना काएं दिनकरुं। देखत आहें आंधारुं।
कीं प्रबोधीं होएं गोचरुं। स्वप्नभ्रमु।।१८-१४१०।।
<u>तैसें मजसिं एकवटिलियां। मी सर्वरूप वांचौनियां।</u>
***<u>आन काईं उरावेयां। कारण असें</u>* ।।१४११।।**

"अर्जुना! सूर्याने अंधार पाहिल्याचे कोणी कधी ऐकले तरी आहे का! स्वप्नींचा संभ्रम जागृतीत अनुभवता येतो का! त्याप्रमाणेच माझ्याशी एकरूप झाल्यावर मज विश्वरूपियावाचून अन्य काही उरण्यासाठी काही प्रयोजन राहते का!"

म्हणून श्रीकृष्ण परतपरत आपणास शरण होण्यासाठी अर्जुनाला उपदेशित आहेतः

म्हणौनि तेयाचें काईं। चिंतिं ना आपुलां ठाईं।
तुझें पापपुण्य पाहीं। मीचि होइन।।१८-१४१२।।
जलीं पडिलियां लवणा। सर्वहीं जल होएं विचक्षणा।
तूझ मी अनन्यशरणा। होईन तैसा।।१४१३।।
तेथ सर्व बंधनलक्षणें। पापें उरावें दुर्जेपणें।
तैं माझां बोधीं वायाणें। होऊनि जाईल।।१४१४।।

"मग पापपुण्याची चिंता तरी कशी उरेल! अर्जुना!मद्रूप झालास की तुझी पापपुण्येही मीच होईन! मीठ पाण्यात पडले असता जसे ते पाण्याचे आणि पाणी त्याचेच होऊन जाते, त्या अभिन्नत्वाने मी तुज अनन्यशरणाशी एकरूप होऊन राहीन. त्या वेळी जी सर्व बंधांची सामग्रीच असतात, ती पापेसुद्धा कोठून वेगळी उरतील! माझा हा स्वरूपसाक्षात्कार तुला घडला की ती पापेसुद्धा मद्रूपात नष्ट होऊन जातील."

एतुलेनि आपैसयां। सुटलाचि आहासिं धनंजया।
***<u>घेईं मज प्रकाशोनियां। सोडवीन तूंतें</u>* ।।१८-१४१५।।**
ययांकारणीं पुढुति। हें आधीं न वाहें चित्तीं।
***<u>मज एकासिं एं सुमति। जाणौनि शरण</u>* ।।१४१६।।**

"हे धनंजया! थोर आहे तुझे भाग्य! म्हणून तू आता त्या पापादिकांपासून सुटल्यातच जमा झाला आहेस; तर ***या ज्ञानप्रकाशात माझ्यात मिळून जा!*** मद्रूप झालास की आपच मी तुला मुक्त करीन! हे सुमती! यास्तव तू पापपुण्यांची वाया चिंता करत बसू नकोस! या प्राप्त झालेल्या ज्ञानप्रकाशात मला नीट जाणून घे आणि मला तत्काळ शरण ये! तुला मुक्त करण्यास मला आता वेळ तो कितीसा लागेल!"

समारोप

<u>क्रमयोग</u> जाणून घेण्याच्या निमित्ताने असे आपण हे ***<u>योगसारसर्वस्व</u>*** पाहिले. या अठराव्या अध्यायीच गीतोपदेशाची सांगता *श्लोक क्र. १८-५८* व त्यापुढील श्लोकांतून श्रीकृष्ण करणार आहेत. त्यासाठी वळू या ***स्कंध क्र.१३***च्या शेवटच्या ***उन्मेष क्र.५६- गीतोपदेशाची सांगता*** याकडे.

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५६::
::गीतोपदेशाची सांगता::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

<u>उन्मेष ५६:</u>

गीता:
१:२१
२:७,६९,
४:२४
५:२०
६:२१,३२
७:१७
८:११,२१,२८
९:३२
११:५४
१४:२७
१५:६
१७:२३
१८:४५,४९,५६,५८-७३
ज्ञानेश्वरी:
१८:११९२-११९९,१२२३-१२४३,१२७३-१३३२,१४१७-१४२५,१४६६-१५७८

::उन्मेष ५६::
::गीतोपदेशाची सांगता::

उपदेशाचे सार::::

श्रीकृष्णांचे निर्वाणीचे बोल

मागील ***उन्मेष क्र.५५-२*** मधून आपण पाहिले की श्रीकृष्ण कळकळीने हा उपदेश करत आहेत. भगवत्प्रसाद प्राप्त आहे, तर अर्जुनाने मुक्त व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. त्याचा युद्धजन्य परिणामांविषयीचा पापपुण्यविषयक संभ्रम आता तरी मिटावा, असे त्यांना वाटते. ते म्हणतातः

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ।।१८-५८।।

"अर्जुना मला शरण येऊन मजठायी अनन्यभावे चित्त ठेवून माझ्या प्रसादाने तू जन्ममरणरूपी दुर्गम संकटास पार करून जाशील; कर्माच्या शुभाशुभ फलातून मुक्त होऊन कर्मबंधनास उल्लंघून जाशील. पण जर आपला अहंकार न सोडल्यामुळे तू हे माझे उपदेशपर सांगणे ऐकले नाहीस, तर तुझा विनाश होणे अटळ आहे."

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।।१८-५९।।

"कारण अहंकाराचा आश्रय करून मी युद्ध करणार नाही असा जर तू विचार करत असशील, तर तो सिद्धीला जाणार नाही. ही प्रकृती तुझ्या क्षात्रस्वभावानुसार युद्ध करण्यास तुला प्रवृत्त करील. आपला अहंकार त्यागून मला शरण येऊन युद्ध केलेस तर *(आतापर्यंत केलेल्या गीतोपदेशानुसार कर्म केल्याने)* त्या कर्माचे तुला पाापपुण्य लागणार नाही."

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत्।।१८-६०।।

"पण अहंकारी राहून त्यापासून उत्पन्न झालेल्या मोहाने ग्रस्त होऊन तू जरी युद्ध करू इच्छित नसलास तरी प्रकृतिजन्य क्षात्रवृत्तीने बद्ध असणाऱ्या तुझ्याकडून ती बलात्काराने युद्धकर्म करवीलच आणि त्याचे पापपुण्यरूपी फल मात्र तुला नक्कीच भोगायला लागेल. मोहग्रस्ततेमुळे व प्रकृतिवशात असे कर्म घडल्यास दुर्गती पावून तुझा विनाश होईल. म्हणून मला शरण ये व युद्ध कर. म्हणजे हा घोर आत्मविनाश टळेल!"

गोपालकृष्णांचे हे निर्वाणीचे बोल आपल्यापर्यंत पोहोचवत ज्ञानेश सांगतातः

म्हणौनि धनंजया। तूं संसारदुर्गती ययां।
तरसिल माझियां। प्रसादास्तव।।१८-१२७३।।
अथवा हन अहंभावें।। माझें बोलणें हें आघवें।
कानामनाचिएं सिवें। नेदिसिं टेंकों।।१२७४।।
तऱ्हें नित्यु मुक्तु अव्ययो। तूं आहासिं तैं होऊनि वावो।
देहसंबंधाचां घावो। वाजैल आंगिं।।१२७५।।

श्रीकृष्ण म्हणाले: "हे धनंजया! अहंकार त्यागून मला अनन्यभावें शरण ये! माझा प्रसाद तुला संसाराच्या या दुर्गतिमान चक्रातून सोडवील! परंतु अहंकारी वृत्ती न टाकता आल्याने तू जर माझे हे सगळे उपदेशपर संभाषण कानामनाच्या वेशीवरही येऊ देणार नसशील, तर मुळात नित्य, मुक्त, अविनाशी, अव्यय असा तू असूनही ते सर्व व्यर्थ ठरेल आणि देहरूपी उपाधीचा घाव तुझ्या अंगावर आदळेल."

जेयां देहासंबंधांआंतु। प्रतिपदीं आत्मघातु।
भुंजतां उसंतु। कंहिंचि नाहीं।।१८-१२७६।।
एवढेनि दारुणें। निमणेंनवीण निमणें।
पडैल जऱ्हैं बोलणें। नेघसिं माहें।।१२७७।।

"माझे सांगणे कानामनाआड केल्याने ज्या देहतादात्म्यामुळे जन्म-मृत्युरूपी घोर संकटे भोगावी लागतात, भोग भोगतांना आत्मविचार करण्याएवढी उसंत ज्यामुळे कधीच मिळत नाही, ज्यामुळे पावलोपावली आत्मघातच होत असतो, ते संकट तुझ्यामागे कायमचे लागेल."

पथ्यद्वेषियां पोखी ज्वरु। कां दीपद्वेषियां अंधकारुं।
विवेकद्वेषें अहंकारुं। पोखूनि तैसा।।१८-१२७८।।
स्वदेहां नाम अर्जुनु। परदेहां नाम स्वजनु।
संग्रामा नाम मलिनु। पापाचारुं।।१२७९।।
इयां मतिं आपुलियां। तिघां तीन नामें ययां।
ठेऊनियां धनंजया। न जूंझें आईसा।।१२८०।।
जीवामाजिं निष्टंकु। करिसिं जो आत्यंतिकु।
तो वांयां धाडील नैसर्गिकु। स्वभावोचि तूहां।।१२८१।।

"पथ्याचा द्वेष करणारा रोगी जसा आपला ज्वर विकोपास नेतो; दिव्याचा द्वेष करणारा जसे अंधाराचे भक्ष्य होतो; तद्वत हे धनंजया! विवेकाचा द्वेष करून या अहंकाराला तू जर पोसशील आणि प्रबल अहंकारसंयोगवश स्वदेहास अर्जुन, परदेहास स्वजन आणि या प्राप्त संग्रामास मलिन पापाचार अशी स्वबुद्धीने नावे देत युद्ध न करण्याचा अतिरेकी निर्धार करू जाशील, तर तुझ्या हाती काहीच पडणार नाही. कारण तुझा निसर्गदत्त क्षात्रस्वभाव, जो प्रकृतीने घडवलेला आहे, तो उफाळून येऊन तुला युद्ध करण्यास प्रवृत्त करून तुझा त्या वेगळा युद्धविन्मुख होण्याचा निर्धार सर्वथैव निष्फळ करील."

भगवंताचा प्रसाद या संकटापासून सोडवील व युद्धकर्म आचरूनही हा अहंकारजन्य प्रमाद टळेल, असा उपदेश श्रीकृष्ण करत आहेत.

प्रकृतिदत्त कर्माचे अटळपण

आणि मी अर्जुनु हें आत्मिक। ययां वधु करणें हें पातक।
हें माया वांचूनि तात्त्विक। काईं आहें।।१८-१२८२।।
आधीं झुंजार तुवां होआवें। मग झुंजावेयां शस्त्र घेयावें।
कां न झुंजावेयां करावें। देवांगण।।१२८३।।

"बरे! तू जो आपल्याच मतीप्रमाणे मी अर्जुन आहे आणि हे सगळे योद्धे माझे आप्तस्वकीय आहेत; त्यांचा वध करणे पाप आहे, असा निश्चय केला आहेस, त्यात मायेवाचून काय आहे! या विचारास तत्त्वाचे कोणते अधिष्ठान आहे, सांग बरे! खरे तर *"मी योद्धा आहे"* असा विचारच मायिक भ्रम आहे; त्यातून *"युद्धासाठी मी हाती शस्त्र घेतले होते, ते आता टाकून देऊन मी युद्ध करणार नाही,"* असा तुझा निश्चय हा पण केवळ मायिक भ्रमच नव्हे का! मुळात तू कोण आहेस आणि कर्ता-अकर्ता तो तरी कोण आहे, हे तू ओळखतोस का!"

म्हणौनि न झुंजणें। म्हणसिं तैं वायाणें।
ना मानूं लोकपणें। लोकदृष्टीहीं।।१८-१२८४।।
तऱ्हें न झुंजें आईसें। निष्टंकिसिं जैं मानसें।
तैं प्रकृति अनारिसें। करवीलचि।।१२८५।।

"तुझे हे सर्व विचार फोल आहेत. त्यांना तत्त्वज्ञानाचा स्पर्शही नाही. बरे! लौकिक दृष्टीने जरी पाहिले, तरी तुझा युद्ध न करण्याचा हा निश्चय टिकू शकणार नाही. कारण तू क्षात्रप्रवृत्तीचा आहेस. काहीही झाले तरी युद्धाला तोंड फुटताच प्रकृती तुझ्याकडून नक्कीच युद्ध करवून घेऊन तुझा हा निश्चय विफल करील."

पैं पूर्वे वाहतां पाणी। पव्हिजें पश्चिमेचियां वाहाणिं।
तऱ्हें आग्रहो उरें तैं आणी। आपुलेयां लेखां।।१८-१२८६।।
कां सालीचां कणु म्हणें। मी नुगवें सालीपणें।
तऱ्हें आहें आन करणें। स्वभावासिं।।१२८७।।
तैसा क्षात्रसंस्कारसिद्धा। प्रकृति घडिलासिं प्रबुद्धा।
आतां नुठीं म्हणसिं हा धांदा। परि उठविजसिचि तूं।।१२८८।।

"प्रवाह पूर्वेकडे वाहत असता आपण पश्चिमेकडे पोहत जाऊ असा निश्चय करणाऱ्यास तो सफल करता येईल का! साळीचा दाणा *"मी साळी म्हणून उगवणार नाही,"* असे म्हणेल, तर तसे होईल का! निसर्गदत्त उपजत गुणांना अनुसरून साळी म्हणून त्याला उगवावेच लागेल की नाही! त्याचप्रमाणे प्रकृतीच्या विरुद्ध जाऊन आचरण करणे कोणालाही शक्य नाही. कोणी तसे करू जाईल, तर तो केवळ दुराग्रहीच ठरेल! हे बुद्धिमंता! तू तर क्षात्रसंस्कारांनी घडवला गेला आहेस. *"मी युद्धास उभा राहणार नाही"* असे जरी तू आता घोकत असलास तरी तुला क्षत्रिय म्हणून घडवणारी ती प्रकृती तुझ्याकडून युद्ध करवूनच घेईल!"

क्षात्रस्वभावाची सहजप्रवृत्ती

शौर्य तेज दक्षता। एवमादिक पांडुसुता।
गुण दिधलें जन्मतां। प्रकृति तूझ।।१८-१२८९।।
तऱ्हें तेयांचियां समवाया। अनुरूप धनंजया।
न करितां उगलियां। नयेल असो।।१२९०।।
म्हणौनियां तिहीं गुणीं। बांधिलासिं तूं कोदंडपाणि।
त्रिशुद्धिं निघालासिं वाहणिं। क्षात्राचियां।।१२९१।।

"हे पांडुपुत्रा! शौर्य, तेज, दक्षता इ.क्षात्रगुण प्रकृतीने उपजतच तुला दिलेले आहेत. धनंजया! त्यांना अनुरूप अशी कृती करण्याचे तू नाकारलेस, तर ते गुण उगे राहतील काय! या त्रिगुणांच्या समुच्चयाने तू घडला आहेस; हे गांडीव धनुष्य हातात घेतले आहेस; तेव्हा निश्चितच तू क्षात्रोचित धर्मास अनुसरशील! आपल्या उपजत अशा गुणांना दुर्लक्षून तू जरी युद्ध न करण्याचे अढळ व्रत स्वीकारलेस, तरीही तुझा क्षात्रस्वभाव तुला युद्ध करण्यास निश्चितच लावेल."

ना हें आपुलें जन्ममूल। न विचारिजतचि केवल।
न झूजें आईसें अढल। व्रत जऱ्हैं घेसिं।।१८-१२९२।।
तऱ्हैं बांधौनि हातेंपाएं। जो रथीं घातिला होएं।
तो चलें तऱ्हैं जाएं। दिगंता जेविं।।१२९३।।
तैसा तूं आपुलियांकडूनि। मी काईंचि न करीं म्हणौनि।
ठासिं परि भंरवसेनि। तूंचि करिसिं।।१२९४।।
उत्तर वैराटींचा राजा। पलतां तूं कां निघालासिं झुंजा।
हा क्षात्रस्वभावो तुझा। झूंजविल तूझ।।१२९५।।

"हातपाय बांधून रथात टाकलेला मनुष्य स्वतः चालत नसताही त्या रथाबरोबर जसा दूरदेशी जातो, त्याप्रमाणे *"मी युद्ध करणार नाही"* असा कृतनिश्चय करणारा तूसुद्धा, विराटदेशींचा राजपुत्र उत्तर रणभूमी सोडून पळून जात असता तू ज्या क्षात्रस्वभावामुळे युद्ध केलेस, त्या स्वभावामुळेच आतासुद्धा तू या कुरुक्षेत्री नक्कीच युद्ध करशील!"

महावीर अकरा अक्षौहिणी। तुवां एकें नागविलें रणांगणीं।
तो स्वभाव कोदंडपाणि। झूंजविल तूझ।।१८-१२९६।।
हां गां रोगु काईं रोगियां। आवडें दारिद्र्य दरिद्रियां।
परि भोगविजे बलियां। अदृष्टें जेणें।।१२९७।।

"ज्या क्षात्रवृत्तीने तुला तेव्हा अकरा अक्षौहिणी सैन्याशी एकट्याने युद्ध करून त्यांना पराजित करायला लावले, तीच वृत्ती आताही तुझ्या हातून हे युद्धाचे कर्म करवून घेईल! अर्जुना! रोगी मनुष्यास रोग काय आवडतो का! दरिद्री मनुष्य दारिद्र्य वांच्छितो का! पण अदृष्ट प्रकृती बळेच त्यांना जसे रोग किंवा दारिद्र्य भोगवते, तीच तुलाही या युद्धात झुंजवील! हे समस्त जगत त्या अदृष्ट प्रकृतीच्या अधीन असून ती करवेल ते कर्म, आपली इच्छा असो की नसो, करत आहे."

प्रकृतीसुद्धा ईश्वराधीन आहे

प्रकृतीच्या अधीन राहून कर्मे करणे मनुष्यमात्रांस भाग पडते आहे. त्यातून मुक्त व्हावयाचे असेल तर तिचा नियंता जो ईश्वर आहे,

त्याला शरण गेले पाहिजे. गोपालकृष्ण अर्जुनास वारंवार हाच उपदेश करत पुनः सांगतातः

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।१८-६१।।

"देहरूपी यंत्रावर सर्व भूतांना आपल्या मायेद्वारे आरूढ करवून त्यांना जन्ममृत्यूच्या चक्रातून फिरविणारा जो ईश्वर आहे, तो सर्वांच्या ***हृदयदेशी*** स्थित असतो. मायेचा नियंता असूनही तो अकर्ता आहे; विशुद्ध आहे."

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्।।
।।१८-६२।।

"हे भरतकुलभूषणा! तू त्या सर्वशक्तिमान ईश्वरालाच शरण जा! सर्वभावे त्याला शरण गेल्याने त्याचा प्रसाद पावून तुला परमधाम व परमशांती प्राप्त होतील."

गीतेचा हा परमसंदेश आपणाकडे पुनःप्रसारित करत ज्ञानदेव म्हणतातः

तैं अदृष्ट अनारिसें। न करील ईश्वरवशें।
तो ईश्वरुहीं असें। हृदयीं तूझां।।१८-१२९८।।
सर्व भूतांचां अंतरीं। हृदय महाअंबरीं।
चिद्वृत्तींचां सहस्रकरीं। उदैला असें जो।।१२९९।।
अवस्थात्रय तिहीं लोक। प्रकाशूनि अशेख।
अन्यथादृष्टि पांथिक। चेवविलें।।१३००।।

"प्रकृती जीवाला भोग भोगण्यास व कर्मे करण्यास लावते. पण तीही ईश्वराच्या स्वाधीन आहे. म्हणून ईश्वराच्या संकल्पानुसार ती वागते; त्याहून वेगळे काही ती करू जात नाही. तर तो जो ईश्वर आहे, तोही तुझ्या हृदयाकाशी वास करून आहे. हा ईश्वर सर्व भूतांच्या अंतःकरणातील हृदयनामक महाकाशात चिद्वृत्तींच्या सहस्रकिरणांना तिन्ही लोकात फाकवत, स्वप्न-जागर- सुषुप्ती या अवस्थात्रयीला पूर्ण प्रकाशवीत उगवलेला जणू सूर्यच आहे. प्रवृत्तिमंत पांथिक त्याच्या प्रकाशात वाटचाल सुरू करतात."

[***टीप:*** आपण पूर्वीच ***हृदय*** याचा आध्यात्मिक अर्थ पाहिला आहे. ज्ञानेशाही त्याच अर्थाने येथे ***हृदय महाअंबर (आकाश)*** हा शब्द उपयोजित आहेत.]

वेद्योदकाचां सरोवरीं। फांकतां विषयकल्हारीं।
इंद्रियषट्पदां चारीं। जीवभ्रमरांतैं।।१८-१३०१।।
असो रूपक हें तो ईश्वरु। सकल भूतांचां अहंकारु।
पांघरौनि निरंतरु। उल्हासत असें।।१३०२।।

"त्या ईश्वररूपी सूर्यास पाहून या विश्वरूपी सरोवरातील विषयरूपी कमलिनी उत्फुल्ल विकसतात. तो ईश्वर पंचेंद्रिये व मन असे सहा पाय असलेल्या जीवरूपी भ्रमरांना त्यातील ऐंद्रियसुखरूपी परागकण चारतो. असो. हे रूपक राहू दे! सर्व भूतांचा अहंकार हेच त्याचे वस्त्र! ते पांघरून तो नित्य लीला दाखवत असतो."

स्वमायेचे आडवस्त्र। लाऊनि एकला खेलविं सूत्र।
बाहेरीं नटीं छायाचित्र। चौऱ्यांशी लक्ष।।१३०३।।
तेयां ब्रह्मादिकीटांतां। अशेखांहीं भूतजातां।
देहाकार योग्यता। पावोनि दाविं।।१३०४।।
तेथ जैं देह जेयांफुडें। अनुरूपपणें मांडें।
तैं भूत तियें आरूढें। हें मी म्हणौनि।।१३०५।।

"आपल्याच मायेचा आडपडदा करून त्याच्याआडून तो सूत्रे हलवतो आणि चौऱ्यांशी लक्ष योनींच्या आभासात्मक चित्रांना ती जणू खरी आहेत, इतक्या लीलेने खेळवतो. ब्रह्मदेवापासून तहत् मुंगीपर्यंतच्या सर्व जीवमात्रांना अनुरूप असे देहाकार तो देतो. आणि ती ती भूतेही जो आकार दिलेला असतो, त्यास अनुरूप असे वागतात आणि अहंकार धारण करून त्या देहासच आपण म्हणून ओळखू लागतात."

ईश्वराचे सर्वहृदयाधिष्ठातृत्व

सूत सूतें गुंतलें। तृण तृणेंचि बांधिलें।
कां आत्मबिंबां घेतिलें। बालकें जलीं।।१८-१३०६।।
तेयांपरी देहाकारें। आपणपेंचि दुसरें।
देखौनि जीव आविष्करें। आत्मबुद्धि।।१३०७।।
आईसेनि शरीराकारीं। यंत्रीं भूतें अवधारीं।
वाऊनि हालविं दोरी। प्राचीनाचिं।।१३०८।।

"सूतानेच सूताची गुंडी बांधावी; तृणानेच तृणाची पेंढी बांधावी; त्याप्रमाणे हा जीवरूपी आत्मा अहंकाराने आपला आपणासच बद्ध करतो. बालक जसे आपल्या प्रतिबिंबास आपणच ते खरेखुरे आहोत, असे समजते, त्याप्रमाणे देहाकारासच आपण असे समजून जीव देहात्मबुद्धी घेतो. अर्जुना! याप्रमाणे देहरूपी यंत्रावर भूतांना आरूढ करून ईश्वर त्यांच्या प्राक्तनाची सूत्रे मायेच्या पडद्याआड राहून हलवतो."

तेथ जेयां जैं कर्मसूत्र। मांडूनि ठेवलें स्वतंत्र।
तैं तिएं गति पात्र। होंचि लागें।।१८-१३०९।।
किंबहुना धनुर्द्धरा। भूतांतैं स्वर्गसंसारा-।
माजीं भोंवडीं तृणें वारा। आकाशिं जैसा।।१३१०।।
भ्रामकाचेनि संगें। जैसें लोहो वेढा रिघें।
तैसिं ईश्वरसत्तायोगें। चेष्टति भूतें।।१३११।।

"मग ज्या ज्या भूताला ज्या ज्या कर्मसूत्राने बांधलेले असते, त्या त्या स्वतंत्र सूत्राचे चालन होऊन ते ते भूत आपापल्या कर्मगतीला अनुसरून हलतडोलत राहते; संसारपथ आक्रमते. हे असू दे. हा ईश्वर मग त्या भूतांना स्वर्गसंसारामध्ये असा काही गिरकावतो, जशी वावटळ गगनात गवताच्या पात्यांना भोवंडवते! लोहचुंबकाच्या सान्निध्याने लोखंड जसे गिरकू लागते, तद्वतच या ईश्वरी सत्तेयोगे प्राणिमात्र चेष्टा करू लागतात."

जैसें चेष्टा आपुलियां। समुद्रादिक धनंजया।
चेष्टति चंद्राचियां। सन्निधीं एकीं।।१८-१३१२।।
तेयां सिंधु भरितें दाटें। सोमकांता पाझरुं फुटें।
कुमुदाचकोरांचां फिटें। संकोचु तो।।१३१३।।
तैसिं बीजप्रकृतिवशें। अनेगें भूतें एकें ईशें।
चेष्टविजति तो असें। हृदयीं तूझां।।१३१४।।

"चुंबकाचे चुंबकत्व जसे लोखंडास चेष्टवते; चंद्राच्या सान्निध्याने समुद्रादिक जसे चेष्टतात, सिंधूस भरते येते, चंद्रकांत मणी पाझरतो, चकोराचा संकोच दूर होतो, रात्रिकमलांचा विकास होतो; त्याचप्रमाणे हे धनुर्धारी! तो ईश्वर आपल्या मूल अव्यक्त प्रकृतिवशे या अनेकानेक भूतांना चेष्टवत असतो. असा तो ईश्वर प्राणिमात्रांच्या सन्निध वसतो. त्यांच्या हृदयाकाशी राहून हे सूत्रसंचालन तो करतो. अर्जुना! तुझ्याही हृदयी तोच वसत आहे!"

"तेयां ईश्वरां शरण रीघ"

अर्जुनपण न घेतां। मी आईसें जैं पांडुसुता।
उठतसें तैं तत्त्वतां। तेयाचें रूप।।१८-१३१५।।
ययालागिं तो प्रकृतीतैं। प्रवर्तविल हें निरुतें।।
आणि झूंजवील तूंतैं। न झूंजसिं जन्हैं।।१३१६।।

***"मी म्हणजे अर्जुन"* असे जे *मीपण* तुझ्याठायी आहे, त्यातील अर्जुनपणाचा भाव टाकून दिल्यावर जे *मीपण* उरते, ते वास्तविक त्या हृदिस्थ ईश्वराचेच रूप होय.** हा हृदिस्थ ईश्वर प्रकृतीला प्रवृत्त करवून, तू कितीही युद्ध न करण्याचा अभिनिवेश धरलास तरी, तिच्याद्वारे तुझ्याकडून युद्ध करवून घेईल, हे निश्चित!"

म्हणौनि ईश्वरुं तो गोसांविं। तेणें प्रकृति हें नेमाविं।
तियां सुखें राबवाविं। इंद्रियें आपुलीं।।१८-१३१७।।
तूं करणें न करणें दोनिं। लाउनि प्रकृतिच्यां मानिं।
प्रकृतिहीं कां आधीनि। हृदयस्था जेयां।।१३१८।।
तेयां अहं वाचा चित्त। देऊनियां शरण रीघ।
महोदधि कां गांग। रिघालें जैसें।।१३१९।।

"असा हा ईश्वर भूतमात्रांचा शास्ता आहे, स्वामी आहे. तो या प्रकृतीचे नियमन करतो. अन ही प्रकृती आपल्या इंद्रियांकडून सहजच कर्मे घडवून आणते. म्हणून तू कर्म व अकर्म यांचा विचार करत बसू नकोस. तुझ्या हातून जे काही कर्म होणार आहे, ते सर्व प्रकृतीवर सोडून ती ज्या हृदयस्थ ईश्वराधीन आहे, त्याला आपला अहंकार, काया, वाचा,मनेंकरून शरण जा! गंगाजल जसे आपणास समुद्रात झोकून देते, तसा ***तू स्वतःस पूर्णपणें त्या ईश्वरास समर्पित कर!"***

मग तेयाचेनि प्रसादें। सर्वोपशांतिप्रमदें।
कांतु होऊनियां स्वानंदें। स्वरूपींचि रमसिं।।१८-१३२०।।
संभूति जेणें संभवें। विश्रांति जेथ विसंवें।
अनुभूतिहीं अनुभवें। अनुभवा जेयां।।१३२१।।
तिएं निजात्मपदींचा रावो। होओनि ठाकसिं अव्ययो।
म्हणें लक्ष्मीनाहो। पार्था तूं गां।।१३२२।।

"मग त्याच्या प्रसादाने सर्व वासनांचा - जन्ममृत्यूच्या बीजांचा परिहार होईल व तुला स्वरूपशांतिरूपी प्रमदा पत्नी म्हणून प्राप्त होइल. तिचा उपभोग घेत धन्य होऊन तू आनंद पावून सर्वदा आत्मस्वरूपी रत होशील! हे पार्था! ज्यापासून उत्पत्तीचा उगम होतो; विश्रांतीचे जे अंतिम विश्रांतीस्थान आहे; अनुभूतीही ज्याचा अनुभव अनुभवण्यात मग्न होते; अशा त्या निजात्मपदीचा तू राजा होऊन ठाकशील! ते अक्षय्य - अविनाशी - अव्यय परमपद तुला प्राप्त होइल; तुझे चिरंतन कल्याण होईल!" असे तो लक्ष्मीपती श्रीकृष्ण अर्जुनास सांगता झाला!!!

मनुष्यजन्मातील खरे कर्तव्य

शांतिप्रमदेचा हात श्रीकृष्ण पार्थाच्या हाती देऊ करत आहेत; आंदण म्हणून हे परमपद - स्वानंदधाम - मुक्ती ते त्याला देऊ पाहत आहेत. अर्जुन त्यांचा शिष्य आहे. ***"यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे।।२-७।।"*** अशी त्याची विनंती होती. ती श्रीकृष्णांनी मान्य करून हा गीतारूपी बोध त्याच्या हाती सोपवला आहे. युद्ध कर्तव्य आहे किंवा नाही, हा त्यांच्या उपदेशाच्या दृष्टीने खरे तर नगण्य प्रश्न आहे.

मनुष्यजन्मातील खरे कर्तव्य कोणते आहे, हे त्यांनी पार्थापुढे उघड केले आहे. युद्ध हे प्रकृती प्रवर्तेल तसे घडणारच! अर्जुनाच्या इच्छेचा त्यात भाग नाही, हेही श्रीकृष्ण त्याला स्पष्टच सांगत आहेत. ***परमपदाची प्राप्ती हेच त्याचे या जन्मीचे मुख्य व एकमेव कर्तव्य असले पाहिजे असा त्यांचा त्याला उपदेश आहे.***

ते पार पाडण्यासाठी आवश्यक ते ज्ञानविज्ञान व साधना त्यांनी त्याला सांगितली आहेत. हा सर्व भाग आपण ज्ञानेश्वरीद्वारे आतापर्यंत समीक्षिला आहे. ***गीतेचे तत्त्वज्ञान आणि त्यातील योग ते हेच!*** त्याचा आपण समारोपाच्या वेळी आढावा घेऊच! सध्या अर्जुनास भगवंतांनी ज्या परमपदासंनिध आणून पोहोचविले आहे, ते अवलोकू या!

परमपदाची प्राप्ती

या पदी पोहोचणारा पुरुष स्थितप्रज्ञ असतो. त्याची लक्षणे, गती आणि इतर विवरण आपण पूर्वीच पाहिले आहे. ***"या निशा सर्वभूतानां ..।।२-६९।।; ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः...।।४-२४।।; स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः।।५-२०।।;सुखमात्यन्तिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतिन्द्रियम्।... ।।६-२१।।; आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति ...।।६-३२।।; तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते। ..।।७-१७।।; मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्। ..।।८-१५।।; यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।८-२१।।; योगी परं स्थानमुपैति चाद्यम्।।८-२८।।; स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्।।९-३२।।;भक्त्या त्वनन्यया शक्य***

अहमेवंविधोऽर्जुन।..।।११-५४।।; ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृत-स्याव्ययस्य च। ...।।१४-२७।।; न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः। यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।।१५-६।।; ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः। ...।।१७- २३।।; स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः। ..।।१८-४५।।; असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा ..।।१८-४९।।; सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः। ...।।१८-५६।।; तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत। ...।।१८-६२।।" इ. ठळक गीतावचने या परमपदाविषयी व त्याच्या प्राप्तीसंबंधी गीतेचा काय रोख आहे आणि गीतेचा आवाका काय आहे, त्यांचा निर्देश करतात.

"निजात्मपदींचा राओ। होऊनि ठाकसिं अव्ययो"

भूते विषयमग्न असतात; पण या स्वसंवेद्यपदी पोहोचलेला निर्विषय असतो. तो कर्मे तर सकळ करतो, पण त्यांत आसक्त असत नाही. सर्वत्र ब्रह्मास पाहत, आपण ब्रह्मरूप असून तो ब्रह्मरूप कर्मे करत असतो. खरा ***ब्रह्मयज्ञ*** तो हाच! तो स्थिरबुद्धी असतो. मोहापासून विमुक्त असतो. ब्रह्मात ब्रह्म होऊन तो स्थित असतो.

त्यास अतींद्रिय असे आत्यंतिक सुख प्राप्त झालेले असते. तो ज्ञानी असतो. तोच खरा भक्त असतो. तो भगवंतास अति प्रिय असतो. या परमपदी पोहोचले की जन्ममृत्यूचे दुष्चक्र संपते; तेथून परतून येणे नाही; योगी हे परमधाम पावतात. एवढेच काय तर ***स्त्रिया-वैश्य-शूद्रादिकांनासुद्धा अनन्यभक्तिद्वारे हे पद प्राप्त होते; अनन्यभक्ती हेच याचे प्रमुख साधन आहे.***

अमृत, अव्यय ब्रह्म, शाश्वत धर्म व परमानंद यांचे स्थान हे परमपद जे आहे, तेथेच भगवंत असतात. हे स्थान म्हणजेच भगवंत! तेथील प्रकाशास सूर्य-चंद्राच्या प्रकाशाची उपमा थिटी पडते, इतके परमप्रकाशमय ते स्थान आहे. त्याचा निर्देश ***ॐ, तत् व सत्*** असा केला जातो.

हे पद स्वकर्माचरणाने प्राप्त होते. अनासक्त राहून, निष्काम बुद्धीच्या जितेंद्रिय पुरुषास हे पद प्राप्त होते. नैष्कर्म्यसिद्धी ती हीच पदप्राप्ती होय! भगवंतास शरण जावे; त्याच्या आश्रयाने सर्व कर्मे करावीत. म्हणजे त्याचा प्रसाद होऊन हे शाश्वत, अव्यय असे पद प्राप्त होते; शांती लाभते.

स्वसंवेद्यतेची अनुभूती

असे हे स्वसंवेद्य परमपद प्राप्त झालेल्यांची अनुभूती वर्णित ज्ञानेश म्हणतातः

तैसें जैं काईं आथी नाथी। एणें होएं ज्ञेयस्फूर्ति।
तैं ज्ञाताचि मी हें प्रतीती। होऊनि भोगीं।।१८-११९२।।
जाणें अजु मी अजरु। अक्षयो मी अक्षरु।
अपूर्व मी अपारु। आनंदु मी।।११९३।।
अचलु मी अच्युतु। अनंतु मी अद्वैतु।
आद्यु मी अव्यक्तु। व्यक्तुही मी।।११९४।।

"स्वानंदसाम्राज्यात रममाण होऊन या परमपदी विराजणाऱ्याची अनुभूती विलक्षण असते. जे काही ***"अस्तिनास्ति"*** रूपाने स्फुरण पावते आहे, ते मीच आहे; ज्ञाता तोही मीच आहे, या जिवंत अनुभवात तो सदा निमग्न असतो. मी अजन्मा आहे. मी जरारहित आहे. मी अपूर्व आहे. मी अनंत आहे. मी अपार आहे. आनंदही मीच आहे. मी अचल आहे; अच्युत आहे. मी अद्वय आहे. मीच आद्य आहे. अव्यक्त तेही मीच आहे आणि व्यक्त तेही मीच आहे."

ईश्य मी ईश्वरु। अनादि मी अमरु।
अभय मी आधारु। आधेय मी।।१८-११९५।।
स्वामी मी सदोदितु। सहजु मी सततु।
सर्व मी सर्वगतु। सर्वातीतु मी।।११९६।।
नवा मी पुराणु। शून्यु मी संपूर्णु।
स्थूलु मी अणु। जैं काईं तैं मी।।११९७।।

"ईश्वरही मीच आहे आणि ईशनही मीच आहे. मी अनादी आहे; अमर आहे. अभय मी आहे. आधार व आधेय दोन्ही मीच आहे. मी नित्योदित आहे. स्वामीही मीच आहे. मी अखंड आहे. मी सहज आहे. मीच निरंतर आहे. मीच निरंजन आहे. मीच सर्व आहे. सर्वांच्या अतीत तोही मीच आहे. मीच नवा - मीच पुराणपुरुषोत्तम - मीच शून्य - मीच संपूर्ण - स्थूलही मीच अन सूक्ष्मही मीच - जे जे काही आहे आणि नाही, ते सर्व मीच आहे."

अक्रियु मी एकु। असंगु मी अशोकु।
व्याप्यु मी व्यापकु। पुरुषोत्तमु मी।।१८-११९८।।
अशब्दु मी अश्रोत्रु। अरूपु मी अगोत्रु।
समु मी स्वतंत्रु। ब्रह्मु मी परु।।११९९।।

"क्रियाशून्य मीच आहे. सत्यही मीच आहे. एकमेवाद्वितीय मीच आहे. तत्त्व ते मीच आहे. मी असंग आहे. मी अशोक आहे. व्यापणारा मी आणि व्यापलेलेही मीच आहे. पुरुषोत्तमही मीच आहे. शब्द-श्रोत्ररहित मीच आहे. मी अरूप आहे. मी अगोत्र आहे. मी सम आहे; मी स्वतंत्र आहे. परब्रह्म ते मीच आहे. आत्मा तो मीच आहे आणि ज्ञप्तीही मीच आहे."

अद्वैतातीत असा आत्मा आपणच आहोत, अशी अनुभूतींची अनुभूती उपभोगण्यात तो महापुरुष रममाण होतो. ***क्रमयोगाचा तो चक्रवर्ती होतो.*** स्वरूपशांतिप्रमदेशी तो नित्य रत असतो. शिवशक्तीचे अद्वैत तो अखंड भोगतो. तोच शिव आणि शक्तीही तोच! ***त्याच्या मुकुटींचे चिद्रत्न म्हणजे साक्षात परब्रह्म!*** त्याच्या अनन्यभक्तीची गंगा चित्सागरात मिळते ती अशी!

त्याच्या योगाचा दीप त्या चित्प्रकाशाशी एकत्व पावतो! त्याचे ज्ञान म्हणजे परब्रह्माचा ज्ञानसागरच! त्याचे कर्म ते परब्रह्माचे नैष्कर्म्य अशी ही अवस्था! या संसाररूपी दारुण अरण्यातून सापडलेल्या क्रमयोगपंथाने तो परमात्मस्वरूपी जाऊन पोहोचतो आणि या अनुभूतींस अखंड उपभोगतो!!

गीतेतील साधनसर्वस्वाची महती

गीतेतील या ***साधनसर्वस्व*** अशा **क्रमयोगा**द्वारे साधकांचे सिद्ध होतात. ***क्रमयोग व पंथराज*** ही याच गीतासाधनाची दोन संबोधने होत. या मार्गावरून साधकांना नेण्यासाठी महेश अजूनही या मार्गाचा ***कापडी*** आहे. प्रवृत्तितरूंच्या तळी निवृत्तिफळांच्या कोडी याच मार्गी चाखावयास मिळतात. **योगिवृंदाच्या आनुभविक पावलांनी जो *आकाशमार्ग* धरला, तो हाच!** असा याचा महिमा श्रीकृष्णांनी सांगितला आहे. पुढे हा महिमा सांगत ते म्हणतातः

हा ठायवरी सुवर्मा। *<u>क्रमयोगीं आहे महिमा</u>* ।
म्हणौनि वेलोंवेलां तुम्हां। सांघतो आम्हीं।।१८-१२२३।।
पैं देशें कालें पदार्थें। साधूनि घेईजें मातें।
तैसा नोहें मी आईतें। सर्वांचेहीं सर्वही।।१२२४।।
म्हणौनि *<u>माझां ठाईं। जचावें न लगें काईं।</u>*
***<u>मी लाभें इयें उपायीं। सांचचि गां</u>* ।।१२२५।।**

"हे मर्मज्ञ अर्जुना! क्रमयोगाचे हे एवढे मोठे फल आहे. सर्व योगांत हाच श्रेष्ठ आहे. म्हणून मी वारंवार तुला याचाच उपदेश करत आहे. तू याच मार्गाने जा! ***देश, काल व पदार्थांशी संबंधित असणाऱ्या कोणाही साधनाने माझी प्राप्ती होत नाही.*** मी जरी सर्वव्यापी असलो, तरी ही साधने मजपावेतो पोहोचू शकत नाहीत. तसे पाहिले तर सर्वांचे सर्व असणारा मी तसा सहजच लाभतो. माझ्यासाठी काही फार मोठे कष्ट घ्यावे लागत नाहीत. ***क्रमयोगाच्या या सुलभ उपायाने मी निश्चित गवसतो."***

एक शिष्य एक गुरु। हा रूढला सांच वेवहारु।
तो मत्प्राप्तिप्रकारु। जाणावेयां।।१८-१२२६।।
अगां वसुधेचां पोटीं। निधान सिद्ध किरीटी।
वह्नि सिद्ध काष्ठीं। वोहां दूध।।१२२७।।
परि लाभें तैं असतें। तेयां कीजें उपायांतैं।
एरविं सिद्धचि तैसा एथें। उपायीं मी।।१२२८।।

"आणि माझ्या प्राप्तीचा उपाय असा हा ***क्रमयोग वा पंथराज*** जाणून घ्यावा यासाठीच ***गुरुशिष्य*** हा व्यवहारही रूढ झाला आहे. अर्जुना! वसुंधरेच्या पोटी रत्ने असतात; काष्ठीं अग्नी असतो; धेनूच्या कासेत दूध असते. पण तरीही ही सर्व प्राप्त करून घेण्यासाठी उपाय करावेच लागतात. मीही स्वतःसिद्ध आहे. पण सिद्ध गोष्टी प्राप्त व्हाव्यात म्हणून जसे उपाय करावे लागतात, तसेच माझ्याही प्राप्तीसाठी उपाय करावे लागतात. ते उपाय स्वानुभवी परमज्ञानी असे गुरूच सप्रयोग सांगतात."

गीतामाहात्म्य

हा फलहींवरी उपावो। कां पां प्रस्तावितसें देओ।
हें पुसतां तऱ्हें अभिप्रावो। येथिंचा आईसा।।१८-१२२९।।

भगवान श्रीकृष्णांनी मोक्षाच्या उपायाचे साद्यंत विवेचन केले आणि त्याची फलश्रुतीही निरूपिली. आता समारोपाच्या प्रसंगी हे उपायांचे पुनः प्रवचन का करत आहेत, असे कोणास वाटेल; त्यासाठी ज्ञानेश भगवंतांचा अभिप्राय आपल्यापरीने स्पष्ट करत म्हणतातः

जैं गीतार्थाचें चांगावें। मोक्षोपायपर आघवें।
आणि शास्त्रोपाय कीं नोहें। प्रमाणसिद्ध।।१८-१२३०।।
वारा आभालचिं फेडी। वांचूनि सूर्यातैं न घडी।
कां हातु बाबुली धाडी। तोय न करी।।१२३१।।
<u>तैसा आत्मदर्शनीं आडलु। असे अविद्येचां जो मलु।</u>
<u>तो शास्त्र नाशी एरुं निर्मलु। मी प्रकाशें स्वयें</u>।।१२३२।।

"गीतेच्या उपदेशाचा श्रेष्ठपणा यात आहे की ती मोक्षप्राप्तीचा उपाय साद्यंत सांगते. इतर शास्त्रांचे मात्र असे नाही. गीता प्रत्यक्ष मोक्षप्राप्ती करून देते. इतर शास्त्रे तशी मोक्षसिद्धी करून देण्यास असमर्थ आहेत. वायू अभ्रपटलांस सारून सूर्यदर्शन घडवण्यास मदत तेवढी करतो, तो काही सूर्यास निर्मित नाही; पाण्यावरील शेवाळे हात बाजूला सारतात आणि पाणी दिसू लागते, पण हात काही पाण्यास निर्मित नाहीत. त्याचप्रमाणे ***आत्मदर्शन घडण्याआड अविद्यारूपी जो मल प्रतिबंधक असतो, तेवढा मात्र नाहीसा करण्यास त्या इतर शास्त्रांचे साहाय्य होते. आत्मा तर स्वयंप्रकाशच असतो.*** त्यास काही ती शास्त्रे प्रकाशवत नाहीत."

म्हणौनि *<u>आघविंचि शास्त्रें। अविद्यानाशाचिं पात्रें।</u>*
वांचौनि न होतीं स्वतंत्रें। आत्मबोधीं।।१८-१२३३।।
तेयां अध्यात्मशास्त्रांसिं। जैं सांचपणाचि एं पुसी।
तैं येईजे जेयां ठायांसिं। तैं हें गीता।।१२३४।।
भानुभूषितयां प्राचियां। सतेजा दिशा आघवियां।
तैसिं शास्त्रेश्वरां गीता या। सनाथें शास्त्रें।।१२३५।।

"आत्म्याचे ज्ञान करून देण्यास ही शास्त्रे स्वयंसिद्ध नाहीत. ती केवळ अविद्याविनाश करण्यास अंगभूत असतात. तत्त्वज्ञानप्रतिपादक अशा या शास्त्रांची उपयुक्तता आणि सत्यता यांची कसोटी ज्या एका अद्वितीय शास्त्राधारे लावली जाते, ते म्हणजे गीता! सूर्याने मंडित केलेली प्राची इतर दिशांना आपल्या प्रकाशाने जशी उजळून टाकते, तशीच ही गीता इतर सर्व शास्त्रांना आधार देऊन सनाथ करते. गीतेविना ती शास्त्रे अनाथ, अपंग, मुकी होत."

ज्ञानदेवांनी अभिव्यक्तीसाठी गीताच का निवडली

ज्ञानदेवांनी आपल्या तत्त्वज्ञान व योगनिरूपणासाठी गीतेचेच माध्यम का स्वीकारले असावे, या विद्वानांस पडलेल्या प्रश्नाचे उत्तर या ओव्यांतून ज्ञानदेवांच्याच हस्ते उपलब्ध होते. ***गीता हा शास्त्रेश्वर आहे. गीता स्वयंप्रमाण आहे. इतर ग्रंथांना व शास्त्रादींना तिच्या या प्रमाण असण्याचाच एकमेव खरा आधार आहे. ती भगवदुक्ती आहे, हे तर सविशेषच!*** वेद हे परमात्म्याचे निःश्वसन आहेत, तर गीता ही परमात्म्याचे भाषित आहे. गीता आत्मबोध करून देण्यात स्वयंपूर्ण आहे. म्हणूनच ज्ञानदेवांनी आपल्या तत्त्वज्ञानाचे आणि स्वानुभूतींचे व ***पंथराज /क्रमयोग*** या योगमार्गांची अभिव्यक्ती करण्यासाठी गीतेचाच आश्रय घेतला, यात नवल ते काय! असो.

गीतेचा महासिद्धांत

आता भगवंत उपायविषयक निरूपण ***("..मी लाभें इयें उपायीं।.. ।।१८-१२२५।।" या ओवीपासून पुढे)*** परत का करत आहेत, तिकडे ज्ञानदेव वळतात. अर्जुनाच्या मनात या उपदेशाचे सार नीट ठसावे व त्याने ते नीट चित्तात जतन करावे, असा श्रीकृष्णांचा अंतःस्थ हेतू आहे. ज्ञानेश म्हणतातः

हें असो एणें शास्त्रेंश्वरें। माघां उपाय बहुवें विस्तारें।
सांघितला जैसा करें। घेवों एं आत्मा।।१८-१२३६।।
परि प्रथमश्रवणासवें। अर्जुना विपाएं हें फांवें।
हा भाओ सकणवें। धरूनि श्रीहरी।।१२३७।।
तैंचि प्रमेय एकहेल। शिष्यीं होआवेयां अढल।
सांघतसें मुकुल-। मुद्रां आतां।।१२३८।।

"गीता ही तर समस्त शास्त्रांचा ईश्वर आहे. आतापावेतो अत्यंत विस्तारपूर्वक जे मोक्षप्राप्तीचे साधन तिने हिरिरीने प्रतिपादिले आहे, ते एकदाच ऐकून अर्जुनाला कळेल का या कळकळीने श्रीकृष्ण या साधनेचे अंतरंगरहस्य पुनः संक्षेपाने सांगण्यास सिद्ध झाले आहेत. ***गीतेतील हा साधनाक्रम म्हणजे आत्म्याला करतळी घेता येईल, असा मोक्षोपाय आहे.*** हे साधनप्रमेय आपल्या शिष्याच्या अंतःकरणी दृढ बिंबावे, म्हणून श्रीहरी त्याचे वर्म थोडक्यात अर्जुनास सांगू इच्छित आहेत."

आणि प्रसंगें गीता। ठाओहीं हा संपतां।
म्हणौनि दावि आद्यंता। एकार्थत्व।।१८-१२३९।।
जैं ग्रंथाचां मध्यभागीं। नाना अधिकारप्रसंगीं।
निरूपण अनेगीं। सिद्धांतिं केलें।।१२४०।।
तऱ्हैं तेतुलेंहीं सिद्धांत। इयें शास्त्रीं प्रस्तुत।
हें पूर्वापर नेणत। कोण्हीं जैं मानिं।।१२४१।।

"गीतोपदेशाच्या समारोपाचा प्रसंग आता प्रस्तुत आहे. गीतेचा आरंभ जे प्रमेय सांगण्यासाठी केला होता, तेच पुनः गीतेच्या समारोपाच्या वेळी प्रकट करून गीता कशी आदि-अंतीं एकाच एका प्रमेयाचे प्रतिपादन करते, पहा! गीतेमध्ये प्रसंगोपात्त वेळोवेळी विविध उपसिद्धांतांचे संदर्भाकरता निरूपण केले आहे; वेगवेगळी तत्त्वज्ञाने निरूपिली आहेत; प्रकृतिधर्म व अधिकारीभेदानुसार विविध साधने व योगोपाय वर्णिले आहेत. अर्जुनाच्या शंकानिरसनाप्रीत्यर्थ व त्याला सम्यग्ज्ञान-विज्ञान सांगावे म्हणून भगवंतांनी अशी चर्चा विषयानुरूप केलेली आहे. पण यामागचा पूर्वापर संबंध न जाणता, ते सगळेच सिद्धांत, वा उपसिद्धांत, ती सगळी तत्त्वज्ञाने, ते सगळे साधनाक्रम अथवा योगप्रकार या ग्रंथी प्रतिपादिले आहेत, असे जर कोणी म्हणत असतील, तर त्यांनी तशी चूक करू नये."

तैं महासिद्धांताचां आंवाकां। सिद्धांतकक्षा अनेकां।
भिडऊनि आरंभु देखा। संपवितु असें।।१८-१२४२।।
एथ अविद्यानाशु हें स्थल। तेणें मोक्षोपादान फल।
ययां दोनिं केवल। साधन ज्ञान।।१२४३।।

"यासाठी गीतेतील जो मुख्य प्रतिपादनाचा विषय आहे, जे सत्य तत्त्वज्ञान आहे, जो खरा साधनाक्रम आहे, जो खरा योग आहे, त्या सर्वांचे समावेशन करणारा महासिद्धांत वा मूळ प्रमेय आता संक्षेपाने प्रस्तुत आहे. या महासिद्धांताच्या प्रतिपादनार्थ विचारात घेतलेल्या अनेक सिद्धांत-उपसिद्धांतांच्या कक्षा व मिती, त्यांचे परिमाण व प्रयोजन यांचा समन्वय करत, गीता आद्यंती सर्वत्र ज्या एकाच एका महासिद्धांतास प्रकट करते, तो ऐका! ***अविद्येचा निरास करणे व त्यापासून मोक्ष हे फल प्राप्त करून घेणे या दोन्हींसाठी ज्ञान हेच एक साधन आहे, हाच तो महासिद्धांत!*** हेच नाना प्रकारे या ग्रंथातून विस्तारपूर्वक निरूपिले आहे."

भगवंतांनी हा अभिप्राय अर्जुनाच्या मनी कसा ठसवला, ते आपणास ज्ञातच आहे. ***कर्ममार्गाद्वारे जाऊन ज्ञान प्राप्त करणे आणि अविद्यानाश व मोक्षसिद्धी मिळवणे असा तो मार्ग वा उपाय आपण क्रमयोगानिमित्त पाहिलाच आहे.***

"आत्मा जेणें हस्तगत। रत्न होएं"

गीतेतील या महासिद्धांताविषयी थोडी चर्चा आपण करणारच आहोत. पण तत्पूर्वी अर्जुनास गीतोपदेश पटला का आणि त्याला आत्मानुभूती कशी प्राप्त झाली, ते पाहणे प्रसंगोचित ठरेल. श्रीकृष्ण सांगतातः

हें गीता नामें विख्यात।सर्व वाङ्मयाचें मथित।
आत्मा जेणें। हस्तगत रत्न होएं।।१८-१३२३।।
ज्ञान आईसियां रूढीं। वेदांतैं जेयाचिं प्रौढी।
वानितां कीर्त्ती चोखडीं। पातलीं जगीं।।१३२४।।
बुद्ध्यादिक डोलसें। हें जेयांचें कां कवडसें।
मी सर्वद्रष्टाहीं दिसें। पाहला जयें।।१३२५।।
तैं हें गां आत्मज्ञान। मज गोप्याचेहीं गुप्त धन।
परि तूं म्हणौनि आन। केंविं करूं।।१३२६।।
ययां कारणें गां पांडवा। आम्हीं आपुलं हा गुह्य ठेवा।
तूझ दिधला कणवा। जाकलिलेंपणें।।१३२७।।

"अर्जुना! सर्व अक्षरवाङ्मयाचे मंथन करून काढलेले हे सार **गीता** या नामाने विख्यात आहे. या गीतेच्यामुळे आत्मरत्न हाती गवसते. साक्षात ज्ञानदात्री अशी वेदांतात जिची विमल कीर्ती आहे; ***वेदांतशिरोमणी*** अशी जिची जगात प्रसिद्धी आहे; बुद्ध्यादिक अतिसूक्ष्म ज्ञानेंद्रिये जिचे कवडसे आहेत; जिच्यामुळे मज सर्वद्रष्ट्याचेही दर्शन घडते; ते ***गीतानामक हे आत्मज्ञान आहे.*** ते मज गुह्यातिगुह्य अशा ईश्वराचेही गुप्त धन आहे."

"नीकें होएं तैं धनंजया। सांघितलें तूझ"

पुढे श्रीकृष्ण म्हणतातः

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु।।१८-६३।।

"ते हे गूढातिगूढ ज्ञान मी तुला आता सांगितले. या ज्ञानाचा पूर्णपणे नीट विचार करून तुला जे योग्य दिसेल, तसे कर."

याबाबत ज्ञानदेव काय म्हणतात, पाहाः

परि भुललीं वोरसें। माएं बोलें बालोद्देशें।
प्रीती ही परि तैसें। न करूंचि कीं।।१८-१३२८।।

"बालकावरील आपल्या प्रेमाने वेडावलेली माता त्याला जे आवडेल, गोड वाटेल, ते बोलते. माझे तुझ्यावरील प्रेमही तसेच आहे. पण माझे हे बोल मात्र तसे नाहीत बरे! ***अत्यंत यथार्थ, साक्षेपी आणि तुझे अंतिम कल्याण करणारे हे गुह्य ज्ञान मी तुला दिले आहे.*** ते तुला आवडो, न आवडो! पण तुझ्यावरील ममतेने व्याप्त झाल्याने ***हा माझा गुह्य ठेवा*** मी तुझ्या हाती सोपवला आहे."

एथ आकाश आणि गालिजें। अमृतांहीं साली फेडिजें।
कां दिव्याकरविं करविजें। दिव्य जैसें।।१३२९।।
जेयांचेनि अंगप्रकाशें। पातालींचां परमाणु दिसें।
तेयां सूर्यांहीं कां जैसें। अंजन सूदलें।।१३३०।।
तैसें सर्वज्ञेंहीं मियां। सर्वहीं निर्धारूनियां।
नीकें होएं तैं धनंजया। सांघितलें तूझ।।१३३१।।
आतां ययावरी। नीकें हें निर्धारीं।
निर्धारूनि करीं। आवडें तैसें।।१३३२।।

"आकाशाचे सूक्ष्मत्वही गाळून घ्यावे; अमृताचाही गाभा काढावा; दिव्याकडून दिव्य करवून घ्यावे; ज्याला स्वप्रकाशामुळे पाताळींचा परमाणूही पाहता येतो, त्या सूर्याच्याही नेत्री अंजन घालावे; त्याप्रमाणे मी जो सर्वज्ञ त्याने सर्व ज्ञान न्याहाळून, पारखून घेऊन, जे सत्य ज्ञान आहे ते निश्चित करून, हे धनंजया! तुला ते निरूपिले आहे! तू माझा आहेस! तुझी प्रतारणा मी कशी करू! म्हणून हे अगदी गुह्य असलेले ज्ञानही मी तुला सांगितले आहे. पण तरीही तू ते ज्ञान स्वतः पारख आणि सत्य काय ते ठरव! आणि मग तुला जे रुचेल, ते कर!"

श्रीकृष्णार्जुनाद्वैत::::
"इयें हृदयींचे तिएं हृदयीं घातिलें"

श्रीकृष्णांनी असे हे सर्वोत्तम सत्य अनंत ज्ञानभांडार अर्जुनासाठी मुक्त हस्ते उधळले. अर्जुनास ते पारखून घेऊन हवे ते करण्याचे स्वातंत्र्यही दिले. आपला प्रसाद त्याला दिला .मग अर्जुनापासून ***खरी आत्मानुभूती*** तरी ते कशी राखून ठेवू शकणार! त्यांना राहवलेच नाही. श्रीकृष्णांच्या त्या अवस्थेचे चित्रण करत ज्ञानेश म्हणतातः

आईसें सर्वरूपरूपसें। सर्वदृष्टिडोलसें।
सर्वदेशनिवासें। बोलिलें श्रीकृष्णें।।१८-१४१७।।
मग सांवला सकंकणु। बाहू पसरौनि दक्षिणु।
आलिंगिला स्वशरणु। भक्तराजु तो।।१४१८।।
न पवतां जेयांतैं। काखें सूनि बुद्धितैं।
बोलणें माघौतें। वोसरलें।।१४१९।।
आइसें *जें काईं एक। बोलां बुद्धिसिहीं अटक।*
तैं देयावेयां मिख। खेंवांचें केलें **।।१४२०।।**

"विश्वरूपाने विनटलेल्या, सर्वांतर्यामी वसणाऱ्या, सर्वज्ञानी, द्रष्टा अशा त्या श्यामसुंदर श्रीकृष्णाने हे घनगंभीर मधुर सुस्वर बोल अर्जुनास ऐकवले. मग आपला कंकणमंडित उजवा बाहू पुढे करून आपणास अनन्यशरण आलेल्या त्या भक्तराज अर्जुनास त्याने आलिंगिले. ज्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी बुद्धीस काखोटीला घालून वाणी त्याचे दर्शन न होताच परतते; वाचेच्या आणि बुद्धीच्याही अतीत असे जे काही आहे, ते देण्यासाठी देवांनी अर्जुनास क्षेमालिंगन देण्याचे मिष केले."

हृदयां हृदय एक जाहालें। इयें हृदयींचें तिएं हृदयीं घातिलें।
द्वैत न मोडितां केलें। आपणाआईसें अर्जुना।।१८-१४२१।।
दीपें दीपु लाविला। तैसा परिष्वंगु तो जाहाला।
द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थु **।।१४२२।।**
तेधवां सुखाचां मग तेयां। पुरु आला जो धनंजया।
तेथ वाडु तन्हैं बुडौनियां। ठेला देओ।।१४२३।।

"देवाचे आणि अर्जुनाचे हृदय एकरूप झाले; श्रीकृष्णांनी आपल्या हृदयीचा ठेवा अर्जुनाच्या हृदयात ओतला; द्वैताची घडी न मोडता अर्जुनास आपणासारखे करून सोडले; अर्जुनास अद्वैतानंद दिला! दीपाने दीप लावावा, तसा तो प्रसंग! द्वैत न सांडता श्रीकृष्णांनी अर्जुनास आपणासारखे केले! स्वरूपी मिळवून घेतले!!! तेव्हा अर्जुनाला सुखाचा जो महापूर आला, त्यात तो एवढा विश्वव्यापी परमात्मा, पण तोही बुडून गेला!"

सिंधू सिंधूतैं पावों जाएं। तैं पावणें ठाकें दुणां होएं।
वरि रिगें पुरवणिएं। आकाशहीं।।१८-१४२४।।
तैसें तेयां दोघांचें मिलणें। दोघां नावरें जाणावें कवणें।
किंबहुना नारायणें। विश्व कोंदिलें।।१४२५।।

"समुद्राला समुद्र मिळायला जातो, तेव्हा त्यांच्या मिलनाने पाणी तर दुप्पट होतेच; वर ते आकाशसुद्धा गिळून टाकते!! त्याप्रमाणे श्रीकृष्णार्जुनांचे ते मिलन होते. स्वस्वरूपाचा तो कल्लोळ इतका विलक्षण होता की तो त्यांच्यापैकी कोणासच आटोपेना; किंबहुना तो विश्वात भरून ओसंडून गेला! नारायणरूपाच्या त्या आविष्कारात समस्त विश्वच बुडून गेले! तो चित्प्रकाश विश्वात दाटून भरून राहिला!"

अर्जुनावरील प्रीतीखातर श्रीकृष्णांनी त्याला गीता तर उपदेशिलीच! पण स्वसंवेद्य अशा त्या परमात्म्याची त्यास अशी साक्षात अनुभूतीसुद्धा देऊन गीतेचे यथार्थत्व सिद्ध करून दाखविले. त्यानिमित्ताने जगालाही या गीताकौमुदीचा अलभ्य लाभ झाला.

"जालें पांडवाचेनि मिषें। जगदुद्धरण"

अर्जुनाच्या मिषाने जगाला गीता प्राप्त झाली.ज्ञानेश म्हणतातः

म्हणौनि *वेदाचिं सुसेव्यता। तैं हें मूर्त जाण गीता।*
श्रीकृष्णें पांडुसुता। उपदेशिली **।।१८-१४६६।।**
परि वत्साचेनि वोरसें। दुभतें होएं घरोद्देशें।
जाहालें पांडवाचेनि मिषें। जगदुद्धरण।।१४६७।।

"*श्रीकृष्णांनी अर्जुनास श्रीमद्भगवद्गीता उपदेशिली. वेद सुसेव्य रूपाने स्त्रीशूद्रादी सर्वांसाठी या गीतेच्या रूपाने मूर्त झाले आहेत. वेदांची मूर्तीच अशी ही गीता ज्ञानाचा सागरच आहे.* हा प्रबंध म्हणजे वेदांचा उदार अवतारच म्हणा ना! धेनू वत्सावरील प्रेमापोटी पान्हा देते. पण त्यानिमित्ताने घरातील आबालवृद्धांना दूधदुभते मिळते. त्याचप्रमाणे अर्जुनावरील प्रीतीसाठी श्रीकृष्णांनी ही गीता प्रकट केली, पण ती सर्व विश्वाला तारक ठरली आहे. अर्जुनानिमित्ते असा विश्वाचा उद्धार झाला आहे."

चातकाचिएं कणवें। मेघु पाणियेंसि धांवें।
तेथ चराचर आघवें। निवालें जेंविं।।१८-१४६८।।
कां अनन्यगति कमलां-। लागिं सूर्य एं वेलोवेलां।
कीं सुखियां होईजे डोलां। त्रिभुवनींचां।।१४६९।।
तैसें अर्जुनाचेनि व्याजें। गीता प्रकाशूनि श्रीराजें।
संसाराएवढें थोर ओझें। फेडिलें जगाचें।।१४७०।।

"चातकाच्या आर्ततेने कळवळून मेघ पाणी घेऊन शीघ्रातिशीघ्र धावून येतात. पण त्यानिमित्ताने अवघे जगतच शांत करतात. अनन्यगती कमलांसाठी सूर्य प्रतिदिनी उगवतो आणि त्यानिमित्ताने अखिल विश्वाचे नेत्र धन्य होतात; भूतमात्र सुखावतात. श्रीकृष्णांनीही अर्जुनानिमित्ताने ही गीता प्रकट करून विश्वावरचा जन्ममृत्यूरूपी प्रपंचसंभार उतरवला आहे; श्रांतांचे संसारताप हरण केले आहेत; जगावर मोठे उपकार केले आहेत."

सर्वशास्त्ररत्नदीप्ति। उजलितां हा त्रिजगतिं।
सूर्यु नोहें कमलापति-। वक्त्राकाशिंचा।।१८-१४७१।।
बाप कुल तैं पवित्र । जेथींचा पार्थु ययां ज्ञानां पात्र।
जेणें गीता केलें स्वतंत्र। आवारु जगां।।१४७२।।

"सर्व शास्त्ररत्नांची दीप्ती प्रकटवणारा तेजोमणीच असा हा श्रीहरीच्या वदनाकाशीचा गीताभास्कर आहे. जगासाठी या गीताशास्त्ररूपी अनिरुद्ध आनंदाचे आवार आपल्या अंगीच्या पात्रतेमुळे श्रीहरीस निर्मिण्यास लावणारा पार्थ आणि त्याचे कुल धन्य होत!!"

पार्थास पुनः द्वैतभानावर आणले

असो! आता मूळ कथाभागाकडे ज्ञानदेव वळत आहेत. अर्जुनास श्रीहरींनी जी अद्वैतभावस्थिती प्रत्ययास आणून दिली, त्यातच तो अजूनही मग्न आहे. ज्ञानेश म्हणतातः

हें असो मग तेणें। सद्गुरुश्रीकृष्णें।
पार्थाचें मिसलणें। आणिलें द्वैतां।।१८-१४७३।।
पाठीं *म्हणितसें पांडवा। शास्त्र हें मानलें कीं जीवां।*
***तेथ एरु म्हणें देवा। आपुलियां कृपा* ।।१४७४।।**

"असो. मग सद्गुरू श्रीकृष्णाने पार्थाची ती अद्वैतसमाधी भंगवून त्याला पुनः द्वैतात आणले. *ते मग त्याला विचारू लागले की "हे अर्जुना! तुझ्या मनाला हे गीताशास्त्र पटले का!" त्यावर तो उत्तरला की "देवा! आपल्या कृपेने हे गुह्यातिगुह्य रहस्यमय शास्त्र मला आकळता आले!* माझे भाग्य थोर आहे." श्रीकृष्णांना हे ऐकून संतोष झाला."

तऱ्हें निधान जोडावेयां। भाग्य घडें गां धनंजया।
परि जोडिलें भोगावेयां। विपाएं होएं।।१८-१४७५।।
पैं क्षीरसागराएवढें। अविरजी दुधाचें भांडें।
सुरां असुरां केवढें। मथितां जाहालें।।१४७६।।
तैं सायासहीं फलां आलें। जैं अमृतहीं डोलां देखिलें।
परि वरिली चुकलें। जतनें तैं।।१४७७।।
तेथ अमरत्वा वोगरिलें। तैं मरणाचिलागिं जाहालें।
भोगों नेणितां जोडिलें। आईसें आहें।।१४७८।।

"शिष्याला उपदेश समजला आहे. आता या शास्त्राची रीत समजावून द्यावी म्हणून ते म्हणाले, "हे धनंजया! अमूल्य ठेवा प्राप्त होण्यास खचितच भाग्य लागते. पण तो भोगण्याचेही भाग्यात असावे लागते. क्षीरसागर म्हणजे निरशा दुधाचे केवढे मोठे पात्र! त्याचे मंथन करणे सुरासुरांना किती कष्टाचे काम झाले असेल! असो. ते कष्टही फळाला आले अन त्यांना अमृताचीही प्राप्ती झाली. पण त्याचे जतन करतांना काय बरे झाले! त्यातून दैत्यांची तऱ्हा काय बरे झाली! अमरत्वाऐवजी त्यांच्या पदरी मृत्यूच पडला नाही का! निधी राखून ठेवण्याची आणि त्याच्या उपभोगाची रीत माहीत नसली की हे असेच व्हायचे!"

गीताशास्त्रसंप्रदाय::::

गीताशास्त्रजतनाचा संप्रदाय

नहुष स्वर्गाधिपति जाहाला। परि राहटीं भांबावला।
तो भुजंगत्व पावला। नेणसिं काईं।।१८-१४७९।।
म्हणोनि बहुत पुण्य तुवां। केलें तेणें धनंजया।
आजि शास्त्रराजां ययां। जालासिं विषयो।।१४८०।।
तऱ्हैं *याचि शास्त्राचेनि। संप्रदायें पांघुरौनि।*
***शास्त्रार्थु हा नीकेनि। अनुष्ठीं हो* ।।१४८१।।**

"पहा! नहुषाचे काय झाले! तो स्वर्गाधिपती झाला खरा! पण तेथे कसे वागावे, हे त्याला माहीत नव्हते. म्हणून त्याला भुजंगत्व प्राप्त झाले, हे काय तुला माहीत नाही! हे धनंजया! तू अपार पुण्य केलेस. त्याचे फल म्हणून आज तू या शास्त्रराज गीतेचा प्रेमाचा विषय झाला आहेस. पण हे गीताधन नीट सांभाळून ठेवता यावे यासाठी या शास्त्राचा जो ***संप्रदाय*** आहे, तो अंगिकारून त्याच्या शास्त्रोक्तीचे नीट रीतीने परिपालन कर बरे!"

एरविं अमृतमथना– ।सारिखें होईल अर्जुना।
जऱ्हैं रिघसिं अनुष्ठाना। संप्रदायेंविण।।१८-१४८२।।
गाय धड जोडें गोमटीं। तैं तैंचि पीवों एं किरीटी।
जें जाणिजे हातवटी। सांजवणीचि।।१४८३।।
तैसा *गुरु प्रसन्नु होएं। शिष्य विद्याहीं कीर लाहें।*
***परि तैं फलें संप्रदाएं। उपासिलियां* ।।१४८४।।**

म्हणौनि शास्त्रीं जो इयें। उचित संप्रदायो आहें।
तो आईक आतां बहुवें। आदरेंसिं।।१४८५।।

" जर ***संप्रदायाविना म्हणजे योग्य त्या पद्धतीविना*** या शास्त्रास तू अनुष्ठू पाहशील, तर त्या अमृतमंथनासारखाच प्रसंग प्राप्त नाही का होणार! धष्टपुष्ट गाय मिळाली, पण तिची धार काढण्याची हातवटी अवगत नसली, तर तिचे दूध प्यायला मिळेल का! तसेच आहे हे! गुरु प्रसन्न होऊन शिष्याला अमूप विद्या जरी मिळाली, तरी संप्रदायानुसार तिचे अनुष्ठान केले, तरच ती फळते, नाही का! यासाठी या शास्त्राचा जो उचित संप्रदाय आहे, त्याच्या अनुष्ठानाची जी पद्धती आहे, ती अत्यंत आदराने ऐक."

संप्रदाय म्हणजे काय

या श्लोकांबाबतच्या ओव्यामध्ये ज्ञानदेव ***संप्रदाय*** असा जो शब्द प्रयोगात आणत आहेत, तो केवळ गीता उपासण्याची व ते शास्त्र जतन करण्याची रीत सांगण्याप्रीत्यर्थ प्रयुक्त आहे. काही उत्साही गुरुसांप्रदायिक याचा उगीचच आपापला गुरुशिष्यसंप्रदाय, नाथसंप्रदायादिक, अमुक एका गुरूंचा संप्रदाय असा येथे अर्थ घेतात आणि "ज्ञानदेवांनीच नाही का असे संप्रदाय ज्ञानेश्वरीतून या ठिकाणी प्रमाणित केले" असे म्हणतात. त्याला काहीही अर्थ नाही.

येथे सरळसरळ ज्ञानदेव गीतेच्या शास्त्राबाबत उपासकाने घ्यावयाची जतनाची काळजी, गीता कोणाला प्रदान करावी, कोणाला ती देऊ नये, गीतेचा अधिकारी कोण आणि कोण नाही, एवढ्याच मर्यादित अर्थाने हा *संप्रदाय* शब्द उपयोजत आहेत. त्याचा प्रचलित संप्रदायांशी काहीही संबंध नाही. ***संप्रदाय हा शब्द येथे रीत /परंपरा/रूढी या अर्थाने येतो.*** आध्यात्मिक गुरुशिष्यसंप्रदायाची आवश्यकता इ.विषय पूर्णतया स्वतंत्र आणि यापेक्षा भिन्न आहेत. त्यांच्यासाठी कोणास ज्ञानेश्वरीचाच पुरावा हवा असल्यास तो येथे नाही; त्यांनी तो इतरत्र शोधावा, हे बरे! सुज्ञांस अधिक सांगणे न लगे!

गीतेच्या अनुष्ठानाची रीत

श्रीकृष्ण आता अर्जुनास गीतेच्या अनुष्ठानाची रीत सांगत आहेत. ते म्हणतातः

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।
न चाशुश्रुषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति।।१८-६७।।

"अर्जुना! मी हे परमगुह्य गीताशास्त्र तुझ्यापुढे प्रकट केले आहे. ज्याला तपश्चर्येचे सामर्थ्य नाही, ज्याची मजवर भक्ती नाही, जो माझा निंदक आहे किंवा ज्याला हे ऐकण्याची इच्छा नाही, अशा अश्रद्धेय मनुष्यास हे शास्त्र कदापिही सांगू नकोस."

य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः।।१८-६८।।
न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि।।१८-६९।।

"मात्र जो मनुष्य हे परमगुह्य भगवंताची सेवा करण्यासाठी माझ्या भक्तांना सांगेल, तो माझी सर्वोत्तम भक्ती लाभून मला निःसंशय प्राप्त होईल! त्याच्यापेक्षा माझे अधिक प्रिय कार्य करणारा दुसरा कोणीही नाही आणि या भूलोकी त्याच्यापेक्षा माझे अधिक प्रिय कोणीही असणार नाही!"

भक्त हा भगवंतांचा आत्मा आहे; त्याच्यापर्यंत आपले हे गूज पोहोचावे अशी त्यांची तळमळ आहे. त्यासाठी हा ***गीतासंप्रदाय*** चालला पाहिजे, या इच्छेने भगवंत सांगत आहेतः

तऱ्हैं तुवां हें जैं पार्था। गीताशास्त्र लाधलें आस्था।
तैं तपोहीना सर्वथा। सांगावें ना हो।।१८-१४८६।।
अथवा तापसुही जऱ्हैं जाहाला। परि गुरुभक्ती जो ढिला।
तो वेदीं अंत्यजु वालिला। तैसा वालीं।।१४८७।।
ना तऱ्हैं पुरोडाशु जैसा। न घापे वृद्ध तऱ्हैं वांयसां।
गीता नेदीं तैसा तापसां। गुरुभक्तिहीना।।१४८८।।

"हे पार्थ! तुला हे गीताशास्त्र श्रद्धेच्या बलाने प्राप्त झाले आहे. तपोहीनास ते कधीच सांगू नकोस. बरे तापसी असूनही जर तो गुरुभक्तीत उणा असेल, तर वेदांनी अंत्यंजांना जसे टाळले आहे, तसे तू त्याला वर्ज्य कर. ज्ञानवृद्धांना यज्ञीय पुरोडाश दिला जातो. पण कावळा वृद्ध आहे, म्हणून त्याला कोणी तो यज्ञभाग देतात का! त्याचप्रमाणे तपस्वी जरी झाला, पण तो गुरुभक्तीत ढिला असेल, तर त्याला हे शास्त्र देऊ नये."

कां तपहीं जऱ्हें जोडें देहीं। भजे गुरुदेवांचां ठाईं।
परि आकर्णनिं नाहीं। चाडहीं जऱ्हैं।।१८-१४८९।।
तऱ्हैं तो माघिल दोहीं आंगिं। उत्तम होएं कीर जगिं।
परि ययां श्रवणालागिं। योग्यु नोहें।।१४९०।।
मुक्ताफल भलतैसें। होंचिं परि मुख नसें।
तंव गुण प्रवेशें। तेथ काईं।।१४९१।।

"बरे! कोणी तपस्वीही असेल आणि गुरुदेवांनाही भजत असेल, पण त्याला जर हे शास्त्र ऐकण्याची आस्था नसेल, तर तप आणि गुरुभक्ती या दोन्ही अंगांनी तो जगात जरी श्रेष्ठ असला, तरीही तो गीताशास्त्रश्रवणास पात्र नाही, हे लक्षात असू दे. मोती कितीही सुंदर असला, पण त्याला वेज नसेल, तर त्याच्यात सोन्याची तार प्रवेश करील काय आणि त्याची मुक्तामाला कधी तरी होईल काय!"

सागरु गंभीरु होएं। हें कोण्ह ना म्हणत आहें।
परि वृष्टि वांयां जाएं। जाहालीं तेथ।।१८-१४९२।।
धालियां दिव्यान्न सुवावें। मग जैं वायां धाडावें।
तैं आर्त्ति कां न करावें। उदारपण।।१४९३।।
म्हणौनि योग्य भलतैसें। होतु परि चाड नसें।
तऱ्हैं झनैं वानिवसें। देसिं हें तेयां।।१४९४।।

"सागर गहन आणि गंभीर असतो. कितीही जलवृष्टी आपणात समावून घेतो. पण त्याच्यावर होणारी वृष्टी काय कामाची! क्षुधा शांत होऊन संतुष्ट झालेल्या मनुष्यास उंची पक्वान्ने वाढून ती वाया दवडण्यापेक्षा भुकेल्यास वाढून दानाचे पुण्य आणि औदार्य का न जोडावे! अर्थातच कोणी कितीही जरी मोठा असला, विद्वान असला,

गुणवान असला; परंतु त्याला जर गीताशास्त्राची चाड नसेल, तर त्याला चुकूनही हे शास्त्र देऊ नये."

श्रीकृष्णाविषयी परमपूज्य बुद्धी असावी

रूपाचा सुजाणु डोळां। वोडवूं एं काईं परिमळां।
जेथ जैं मानें तै फळां। तेथचि एं गां।।१८-१४९५।।
म्हणौनि तपी भक्ति। पाहावें तैं सुभद्रापति।
परि शास्त्रश्रवणीं अनासक्ती। वाळावेंचि तैं।।१४९६।।

"सौंदर्याचे खरे जाणकार नेत्र असतात. पण त्यांना परिमळाची काहीतरी चाड असते का! जेथे जे योग्य असेल, तेथे तेच वापरले पाहिजे ना! म्हणून हे सुभद्रापती! ***तपी आणि गुरुभक्त पाहूनच त्यांना गीता द्यावी. पण शास्त्रश्रवणी त्यांची आसक्ती नसेल, तर त्यांनाही टाळावे, हेच उत्तम!"***

ना तऱ्हें तपभक्ति। होऊनि श्रवणीं आर्ति।
आथी आईसिहीं आयति। देखसिं जऱ्हैं।।१८-१४९७।।
तऱ्हैं गीताशास्त्रनिर्मिता। जो मी सकललोकशास्ता।
तेयां मातें सामान्यता। बोलेल जो।।१४९८।।
माझां सज्जनेंसिं मातें। पैशून्याचेनि आव्हातें।
एक आहाति तेयांतैं। योग्य न म्हण।।१४९९।।

"बरे! तप, भक्ती व गीताश्रवणी आर्तता असणारे कोणी जरी तुला दिसले, तरी सकळ लोकांचा शास्ता आणि या गीताशास्त्राचा निर्माता जो मी आहे, त्या माझ्यावर जर त्यांची श्रद्धा नसेल, ते मला जर सामान्यासारखे लेखत असतील, मला आणि माझ्या भक्तांना-साधु-संतांना जर ते दुष्ट बुद्धीने अपशब्द वापरत असतील, तर तेही गीताशास्त्र श्रवणास निश्चितच योग्य नव्हेत."

तेयांचि एर आघविं। सामग्री आईसिं जाणाविं।
दीपेंविण ठाणदिवीं। रात्रींचि जैसिं।।१८-१५००।।
आंग गोरें आणि तरुणें। वरि लेईलें आहें लेणें।
परि एकलेनि प्राणें। सांडिलें जेंविं।।१५०१।।
सोनयाचें सुंदर। निर्वाललें होएं घर।
परि सर्पांगना द्वार। रुंधलें आहे।।१५०२।।
निफजे दिव्यान्न चोखट। परि माजिं असें कालकूट।
हें असो मैत्री कपट-। गर्भिणी जैसिं।।१५०३।।
तैसिं तपभक्तिमेधा। जेयाचिं जाण प्रबुद्धा।
जो माझियांचि कां निंदा। माझिचि करी।।१५०४।।

"माझ्याविषयी पूज्यबुद्धी नसेल, तर त्यांची अवघी सिद्धता म्हणजे काळोख्या रात्रीची दीपाविना असलेली ठाणवईच होय! हे बुद्धिमान अर्जुना! सुंदर तरुण गोऱ्या अंगाची स्त्री असावी, अलंकारांनी सुशोभितही असावी, पण निष्प्राण असावी किंवा सोन्याचे घर निर्मावे व पाहावे तर त्याचे द्वार नागिणीने अडवलेले असावे; उत्तमोत्तम दिव्यान्न पुढे यावे आणि त्याच्यात कालकूट मिसळलेले असावे; मैत्रीत कपट असावे; त्याप्रमाणे जो मनुष्य माझी किंवा माझ्या भक्तांची निंदा करतो, त्याच्या तप, बुद्धी व भक्तीचे असते."

ययांकारणें धनंजया। तो भक्तु मेधाविं तपियां।
तऱ्हैं नको बापां इयां। शास्त्रां आंतलों देओ।।१८-१५०५।।

"हे धनंजया! या कारणांस्तव तो मनुष्य गुरुभक्त, तपस्वी व मेधावी जरी असला, तरी या शास्त्रास त्याला हातही लावू देऊ नकोस!"

अभक्त कोण

हे गीताशास्त्र कोणाला देऊ नये, त्याचे असे स्पष्ट विवेचन येथे आहे. *गीताश्लोक क्र. १८-६७* यातील ***अभक्त*** या शब्दाचा अर्थ ***"जो गुरुभक्त नाही, तो"*** असा श्रीमच्छंकराचार्य करतात. ज्ञानेशही तोच अर्थ घेतात. येथे असा प्रश्न येतो की गुरू हाच साक्षात ईश्वर असतो, त्या अर्थी जो गुरुभक्त आहे, तो ईश्वराचाच भक्त असणार! मग त्याला हे शास्त्र का सांगू नये असा प्रश्न आहे.

यानंतरच्या १८-६८ या श्लोकात ईश्वराच्या भक्तास हे शास्त्र देण्याचे माहात्म्य सांगितले आहे. त्यालासुद्धा ज्ञानेशांनी तप, गुरुभक्ती, श्रवणेच्छा व ईश्वराचा अनिंदक असणे ही विशिष्ट पात्रता असणे आवश्यक समजले आहे. श्रीमच्छंकराचार्य मात्र म्हणतात की ***"भक्तेः पुनः ग्रहणात् भक्तिमात्रेण केवलेन शास्त्रसंप्रदाने पात्रं भवति इति गम्यते।"*** **- केवळ भगवद्भक्ती असण्यानेही मनुष्य या शास्त्रप्रदानास पात्र होतो.**

ईश्वर हा त्रिकालातीत गुरूच आहे. त्यामुळे त्याच्या भक्तांसाठी म्हणजे ईश्वरप्रणिधान करणाऱ्यांसाठी हे इतर निकष आचार्यमते अनावश्यक असतील किंवा भगवद्भक्तात तप, गुरुभक्ती, श्रवणेच्छा व ईश्वराचा अनिंदक असणे हे गुण आचार्यांनी कदाचित गृहीत धरले असतील आणि ज्ञानेश ते स्पष्ट सांगत असतील. तसेच ***गुरुभक्ती करणारा म्हणजे जे ईश्वरस्वरूप नाहीत अशा इतर गुरूंना भजणारा*** असा अर्थ या सर्व विधानांचा सुयोग्य उलगडा होण्यासाठी बहुधा घ्यावा लागेल. म्हणजे हे गीताश्लोक *(१८-६७ व ६८)* आपणास सुगम ठरतील, असे वाटते. असो.

गीताशास्त्राचा अधिकारी

या विश्लेषणानंतर गीताशास्त्राचा अधिकारी कोण, कोणास हे शास्त्र द्यावे, याबाबत ज्ञानेशांचे विवेचन पाहू या. ते म्हणतातः

काएं बहु बोलों निंदका। योग्य स्त्रष्ट्याहीसारिखा।
गीता हें कवतिका-। लागिंहीं नेदीं।।१८-१५०६।।
म्हणौनि तपाचां धनुर्द्धरा। तळीं दाटौनि गाडौरा।
वरि गुरुभक्तीचा पुरा। प्रासादु जो जाहाला।१५०७।।
आणि श्रवणेच्छेचां फुडां। दारवंटा सदा उघडा।
वरि कलशु चोखडा। अनिंदारत्नांचां।।१५०८।।
आईसां भक्तालयीं चोखटीं। गीतारत्नेश्वरु हा प्रतिष्ठीं।
मग माझियां संवसाटीं। तुकसि जगिं।।१५०९।।

"हे धनुर्धरा! अगदी ब्रह्मदेवाच्याही तोडीचा कोणी असला, पण तो जर माझा वा माझ्या भक्तांचा निंदक असला, तर त्याला गीतेचे नखही दिसू देऊ नकोस. असो. गीताप्रदान कोणाला व कसे करावे, ते ऐक. तपरूपी भक्कम पायावर गुरुभक्तीचा प्रासाद उभारलेल्या सुरेख अशा भक्तालयावर दीप्तिमान अनिंदारत्नांचा कळस चढवलेल्या निर्दोष अशा मंदिरात या सर्वश्रेष्ठ अशा गीतारत्नरूपी ईश्वराची प्राणप्रतिष्ठा करावी. असे करणारा या जगी माझीच योग्यता पावतो."

"भक्तां गीतेंसिं। भेंटी करी जो आदरेंसिं"

कां *जैं एकाक्षरपणेंसिं। त्रिमात्रकेचियां कुशीं।*
***प्रणवु होतां गर्भवासीं। सांकडला*।।१८-१५१०।।**
तो गीतेचियां बाहलीं। वेदबीज गेलें पाहालीं।
***कीं गायत्री फुलीं फलीं। श्लोकांचां आलीं*।।१५११।।**

"***अ, उ व म*** या त्रिमातृकारूपी; जागृति-स्वप्न-सुषुप्ति या त्रिक्अवस्थारूपी; उत्पत्ति-स्थिती-लय या त्रिक्स्थित्यंतरात जगद्रूपाने गर्भवासी झालेल्या प्रणवाची कुचंबणा - त्या ॐकार अक्षररूपी परब्रह्माची अवघडलेली अवस्था पाहून वेदांनी त्याची सोडवणूक केली. ***गीतारूपाने वेदबीजाचा विस्तारलेला वृक्ष झाला आणि तो गगनाहूनही वाड आहे.*** गायत्री हा मंत्रराजच या गीताश्लोकरूपी फुलाफळांनी बहरून आला आहे."

तैं *हें मंत्ररहस्य गीता। मेलविं जो माझियां भक्तां।*
अनन्यजीवना माता। बालकां जैसिं।।१८-१५१२।।
तैसा भक्तां गीतेसिं। भेंटी करी जो आदरेंसि।
***तो देहापाठीं मजसिं। एकचि होएं*।।१५१३।।**

"असा हा जो एकमेवाद्वितीय गीता हा मंत्र आहे, त्याचे रहस्य - हा वेदबीजाचा विस्तार - माझ्या भक्तांच्या अंतरंगी पोहोचवणारा, मातेवर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या बालकाची तिच्याशी गाठ घालून देणाऱ्याप्रमाणे माझ्या भक्तांची आस्थेने या गीतेशी भेट करून देणारा, या जगती सर्वश्रेष्ठ तर असतोच; पण तो देहांती मलाच येऊन मिळतो."

आणि देहाचेहीं लेणें। लेऊनि वेगळेंपणें।
असे तंव जीवेंप्राणें। तोचि पढिएं।।१८-१५१४।।
ज्ञानियां कर्मठां तापसां। ययां खूणेंचियां माणुसां-।
माजिं *तो एकु गां जैसा। पढिये मज*।।१५१५।।
तैसा भूतलीं आघवां। आन देखें पांडवा।
***जो गीता सांघें मेलावा। भक्तजनांचां*।।१५१६।।**
मज ईश्वराचेनि लोभें। हें गीता पढतां अक्षोभें।
***जो मंडन होएं सभें। संतांचियें*।।१५१७।।**

"आणि जेव्हा या इहलोकी तो देहरूपी अलंकाराने विनटलेला असतो, माझ्याहून वेगळा दिसतो, तेव्हाही तोच मला जीव की प्राण असतो. ज्ञानी, कर्मी व तपी हे सर्व माझे भक्त खरे! पण माझ्या भक्तजनांच्या मेळाव्यात गीता सांगणारा मनुष्य मला त्यांच्याहूनही अधिक प्रिय असतो. या भूतली तरी त्याच्याएवढा माझे प्रिय असणारा दुसरा कोणी दिसत नाही. मज ईश्वरावरील प्रेमाने जो या गीतेचे भक्तांपुढे असे पठण करतो, तो संतांच्या सभेचे भूषणच होय."

नवपल्लविं रोमांचितु। मंदानिलें कांपवितु।
आमोदजलें बोलवितु। फुलांचें डोलें।।१८-१५१८।।
कोकिलाकलरवाचेनि मिषें। सद्गद बोलवित जैसें।
वसंत कां प्रवेशें। मद्भक्तआरामीं।।१५१९।।
कां जन्माचें फल चकोरां। होतु चंद्रु एं अंबरां।
नाना नवघन मयूरां। वो देत पावें।।१५२०।।
तैसा सज्जनांचा मेलापिं। गीतापद्मरत्न उमपिं।
वर्षें जो माझां रूपीं। हेतु ठेऊनि।।१५२१।।
मग तेयाचेनि पाडें। पढियंतें मज फुडें।
नाहींचि गां मागेंपुढें। न्याहालितां।।१५२२।।
अर्जुना हा ठायेवरि। मी तेयांतैं सूयें जिव्हारीं।
जो गीतार्थाचें करी। परगुणें संतां।।१५२३।।

"ज्याप्रमाणे नूतन पालवीने वृक्षवनस्पतींना रोमांचित करत, मंद झुळकीने त्यांना डोलवत, त्यांच्या पुष्परूपी नेत्रात आनंदाश्रू आणत, कोकिळेच्या कंठातील कलरवास साकारित वसंतऋतु उद्यानास हर्षवत प्रकटतो; अथवा चकोरांच्या जन्माचे सार्थक करत चंद्रमा गगनी उदित होतो; नूतन मेघ जसे मयूरांच्या सादेला प्रतिसाद देत धावत येतात; त्याप्रमाणे आतुरलेल्या सज्जनांची गीतापदरत्नांच्या अमूप वर्षावाने तृप्ती करत त्यांच्या मेळाव्यात माझ्या प्राप्तिस्तव जो हे गीताशास्त्र सद्गदित कंठाने निरूपितो, त्याच्या तोडीचे मला कितीही पाहिले तरी दुसरे कोणी दिसत नाही. अर्जुना! ***जो संतांना अशी गीतार्थाची मेजवानी देतो, त्याला मी माझ्या अंतःकरणात स्थान देतो.*** असा भक्त मला प्रिय असतो!"

गीताश्रवणादींचे फल

नंतर गीताश्रवण-अध्ययन इ.चे फल सांगत श्रीकृष्ण म्हणतातः

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः।।१८-७०।।

"जो मनुष्य आमच्या दोघांच्या या धर्मपर संवादाचे अध्ययन करील, त्याने ज्ञानयज्ञाने माझे पूजन केले आहे, असे मी समजतो."

श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम्।।
।।१८-७१।।

"श्रद्धायुक्त व मजविषयी मत्सरबुद्धी न ठेवणारा जो मनुष्य याचे श्रवण करील, तोसुद्धा पुण्य कर्मे करणाऱ्यांस मिळणाऱ्या शुभ लोकांस प्राप्त होईल व मुक्त होईल."

या श्लोकांवर ज्ञानदेवांनी रचलेल्या ओव्या पाहाः

पैं माझियां तुझियां मिलणिं। वाढिन्नलीं जैं काहाणि।
मोक्षधर्म कां जिणिं। आलासें जेथें।।१८-१५२४।।

तो हा सकलार्थप्रदु। आम्हां दोघांचां संवादु
न करितां पाठभेदु। पाठेंचि जो पढें।।१५२५।।
तेणें ज्ञानानलें प्रदीप्तिं। मूल अविद्येचियां आहुतिं।
तोषविला होएं सुमति। परमात्मा मी।।१५२६।।

"श्रीकृष्ण पुढे म्हणतात, अर्जुना! आपणा दोघांमध्ये मोक्षधर्माचा निर्णायक असा हा जो सांगोपांग विचार प्रकट करणारा संवाद झाला आहे, ज्यायोगे सर्व कामना पूर्ण होतात, त्या या गीतेचे पदच्छेद इ.न करताही जो केवळ पठणपाठण करील, त्याने मज परमात्म्याचे ज्ञानाग्नीत मूल अविद्येची आहुती देऊन यजन करून मला अत्यंत तोषवले आहे, असे समज."

घेऊनि गीतार्थु उगाणा। ज्ञानिएं जैं विचक्षणा।
ठाकिति तैं गाणावाणा। गीतेचां तो लाहें।।१८-१५२७।।
गीतापाठकासिं असें। फल अर्थज्ञाचि सरिसें।
गीतामाउलीएं कीं नसें। जाणेंतान्हें।।१५२८।।

"गीतार्थाचा निर्णय करू पाहणाऱ्या विचक्षण ज्ञानी लोकांस जे पद प्राप्त होते, तेच त्या गीता गाणाऱ्यास आणि गीतेचे वर्णन करणाऱ्यांसही प्राप्त होते. गीतापाठकांसही गीतेचा अर्थ जाणणाऱ्यासारखेच फळ प्राप्त होते. गीतामाऊलीस तान्हे व जाणते मूल यांत काहीच भेदभाव करता येत नाही."

आणि सर्वमार्गिं निंदा। सांडूनियां आस्था पैं शुद्धां।
गीताश्रवणिं श्रद्धा। उभारी जो।।१८-१५२९।।
तेयाचां श्रवणपुटीं। गीतेचिं आखरें जंव पैठीं।
होतिना तंव उठाउठीं। पळेंचि पाप।।१५३०।।
अटवियेमाजिं जैसा। वह्नि रिघतां सहसां।
लंघिति कां दिशा। वनौकें तिएं।।१५३१।।
कां उदयाचलकुलीं। झलकतां अंशुमालीं।
तिमिरें अंतरालीं। हारपति।।१५३१।।
तैसां कानाचां महाद्वारीं। गीता गजर जेथ करी।
तेथ सृष्टिचिएं आदिवेरी। जाएंचि पाप।।१५३३।।

"असो. परमात्म्यास आणि या गीतोपदेशास जो कोणत्याही प्रकारे हेटाळीत नाही आणि विशुद्ध आस्थेने श्रद्धापूर्वक जो गीतेचे श्रवण करतो, त्याच्या कर्णद्वारात गीतेची अक्षरे शिरतात न शिरतात, तोच पाप पसार होते. अरण्यात वणवा लागताच तेथील प्राणिमात्र जिकडे वाट फुटेल तिकडे पळून जातात; किंवा उदयाचलाच्या राजींमध्ये सूर्य झळकू लागताच जसा अंधकार अवकाशात लुप्त होतो; तसाच ज्या वेळी कर्णांच्या महाद्वारी गीतेचा जप पडतो न पडतो तोच सृष्टीच्या आरंभापासूनचे हातून घडलेले सर्व पाप जळून जाते."

आईसि जन्मवेलीं। धुंवट होएं पुण्यरूप चोखट।
याहीवेरी अचाट। लाहें फल।।१८-१५३४।।
जो इयें गीतेचिं आखरें। जेतुलीं कां कर्णद्वारें।
रिघति तेतुलें होत पुरें। अश्वमेध कीं।।१५३५।।
म्हणौनि श्रवणें पापें जाति। आणि धर्म धरीं उन्नति।
तेणें स्वर्गराज्यसंपत्ति। लाहेंचि शेखिं।।१५३६।।
तो पैं मज यावयांलागिं। पहिलें पेणें करीं स्वर्गिं।
मग आवडें तंव भोगी। पाठीं मजचि मिळें।।१५३७।।
आईसिं गीता धनंजया। ऐकतयां आणि पढतयां।
फलें महानंदें मियां। बहु काएं बोलों।।१५३८।।

जन्मोजन्मरूपी वेल सतेज होऊन शुद्ध पुण्यपावन होते. याहूनही अचाट फळ मिळते, ते असे की या गीतेची जेवढी म्हणून अक्षरे कानी पडतात, तेवढे अश्वमेध केल्याचे पुण्य लाभते. गीतेच्या श्रवणाने पापे जाऊन धर्म घडतो. त्यायोगे मनुष्यास स्वर्ग प्राप्त होतो. स्वर्गसंपत्ती उपभोगत तो त्याला हवा तितका वेळ तेथे मुक्काम करतो. माझ्याकडे येण्यापूर्वी त्यास हे स्थान प्राप्त होते. त्यानंतर तो मला पावतो. अर्जुना! ही गीतामाऊली अशी ऐकणाऱ्यांस आणि पठण करणाऱ्यांस महदानंद देऊन कृतार्थ करते. एवढे अमाप फळ देणाऱ्या या गीतेविषयी मी अधिक ते काय सांगू!"

गीताफलनिरूपणाचा प्रघात

श्रीकृष्ण असे गीताफल सांगतात. गीतेच्या प्रत्येक प्रतीत ***गीतामाहात्म्य* व *गीताफल*** देण्याचा शिष्टसंमत प्रघात आहे. **गीतामाहात्म्य, न्यासादी आणि गीताफल** वाचल्याशिवाय गीतेचे पारायण सांग होत नाही, अशी विद्वज्जनांची श्रद्धा आहे. ज्ञानदेवही त्या शिष्टमतास मान देतात आणि वेळोवेळी गीतेचे माहात्म्य वर्णितात. आता तर गीतासंपूर्णाचा हा प्रसंग आहे. या वेळीही शिष्टसंप्रदायास अनुसरत त्यांनी गीताफल सांगून औचित्य साधले आहे. तसे पाहिले तर श्रीकृष्णांनीच आपल्या या *१८-७० व ७१* श्लोकांद्वारे हा शिष्टप्रघात रूढ करण्यास चालना दिलेली दिसते. असो.

गीतासंवादाची इतिश्री::::

अर्जुनाची संशयनिवृत्ती

गीता तर आता सांगून झाली आहे. अर्जुनाला साक्षात्कारही घडवून दिलेला आहे. त्याच्या सर्व शंकांचे पूर्णपणे निरसनही करून झालेले आहे. ***"कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः। यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।।२-७।।"*** या श्रीकृष्णार्जुनांच्या गीतासंवादातील परवलीच्या श्लोकाने गीतेतील खरे तर ज्ञाननिरूपण करण्याचा प्रसंग उद्भवला आहे.

मनाच्या एका संभ्रमित अवस्थेत अर्जुनाने ही विनंती श्रीकृष्णांना केली होती. ***धर्म-अधर्म*** यांविषयी त्याच्या संभ्रमित मनास मोहामुळे खरे काय ते कळेनासे झाले होते. तो संभ्रम दूर व्हावा म्हणून त्याने श्रीकृष्णांचे शिष्यत्व पत्करून त्यांचा गीतोपदेश ऐकला. आता तरी त्याचा संभ्रम दूर झाला आहे का, हे जाणून घ्यावे, म्हणून श्रीकृष्ण विचारतात कीः

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा।
कच्चिदज्ञानसम्मोहः प्रनष्टस्ते धनञ्जय।।१८-७२।।

"हे पार्थ! मी सांगितलेले हे शास्त्र तू एकाग्र चित्ताने श्रवण केलेस ना! तुझा अज्ञानजनित मोह व चित्ताचा मूढपणा आता गेला ना!"

ज्ञानेशांचे यावरील बोल ऐका:

ययांकारणें हें असो। परि जेयांलागिं शास्त्रातिसो।
केला तैं तंव तूझ पुसों। काज तूझें।।१८-१५३९।।
तऱ्हें सांग पां पांडवा। हा शास्त्रसिद्धांतु आघवा।
तूझ एकचित्तें फांवां। गेला आहे।।१५४०।।
आम्हीं जैसें जेयां रीतीं। उगणिलें कानांचां हातिं।
एरीं तैसेंचि तूझां चित्तिं। पैठें केलें कीं।।१५४१।।

श्रीकृष्ण विचारतात, ***"हे धनंजया! ज्या कारणासाठी हा शास्त्रप्रपंच केला, ते तुझे काम झाले का! अर्जुना! हा अवघा शास्त्रसिद्धांत तू एकाग्रचित्ताने ग्रहण केलास ना! मी ज्या रीतीने या गीताशास्त्राचा आलेख तुझ्या कानांवर पद्धतशीर घातला, तो कानांनी तुझ्या चित्तापर्यंत पोहोचवला ना!*** तुला **अज्ञानजन्य मोहा**ने संभ्रमित केले होते, तो आता गेला की अजूनही आहे!"

अथवा माझारीं। गेलें सांडिंविखुरीं।
किंवा उपेक्षेवरि। वालूनि सांडिलें।।१८-१५४२।।
जैसें आम्हीं सांघितलें। तैसेंचि हृदयीं पावलें।
तऱ्हें सांघ पां वहिलें। पुसैन तैं मी।।१५४३।।
हां गां *<u>स्वाज्ञानजनितें। माधिलें मोहें तूंतें।</u>*
<u>भुलविलें तो एथें। असें किं नाहीं</u> **।।१५४४।।**
हें बहु पुसां काईं। सांघें तूं आपुलां ठाईं।
कर्माकर्म काईं। देखतसिं।।१५४५।।

"मी सांगितलेले तुझ्याकडून उपेक्षेने टाकून तर दिले गेले नाही ना! माझ्या उपदेशाची हेळसांड तर तू करत नाहीस ना! मी जे जसे सांगितले, ते तसेच तुझ्या अंतःकरणापर्यंत पोहोचले ना! असे असेल तर मी काय विचारतो, ते त्वरित सांग बरे! किती म्हणून विचारावे! तू मला एवढेच सांग की ***तू आपण कर्म-अकर्म करणारे कर्ते आहोत, असे अजूनही समजतोस का!"***

अर्जुनाची स्थिती

पार्थु स्वानंदैकरसें। विरेल आईसा भेददशें।
आणिला एणें मिषें। प्रश्नाचेनि।।१८-१५४६।।
पूर्णब्रह्म जाहाला पार्थु। तऱ्हें फुडील साधावेयां कार्यार्थु।
मर्यादा श्रीकृष्णनाथु। उल्लंघो नेदीं।।१५४७।।

"श्रीकृष्णांनी प्रश्न विचारण्याचे निमित्त करून स्वानंदैक्यरसात विरून जाणाऱ्या अर्जुनास परत द्वैतावस्थेत आणले. तो पूर्णब्रह्म झाला होता. पण तसाच राहिला तर आपले इहलोकीचे ***"विनाशाय च दुष्कृताम्"*** हे कार्य पूर्णत्वास कसे जाईल, या चिंतेने श्रीकृष्ण अर्जुनास द्वैताची मर्यादा ओलांडलेल्या त्या ब्रह्मावस्थेत फार काळ राहू देईनात."

एरविं आपुलें करणें। सर्वज्ञ काईं तो नेणें।
परि केलें पुसणें। याचिलागिं।।१८-१५४८।।
करौनियां प्रश्न। नसधेंचिं अर्जुनपण।
आणूनियां जालें पूर्णपण। तैं बोलविं स्वयें।।१५४९।।

"नाही तर त्या सर्वज्ञास अर्जुनाला असा प्रश्न करण्याची काय आवश्यकता होती बरे! आपण केलेला उपदेश अर्जुनास फावला की नाही, हे काय श्रीकृष्ण जाणत नव्हता का! या प्रश्नानिमित्ताने अर्जुनाचे नाहीसे झालेले अर्जुनपण - त्याचा देहाहंकार - पुनः पूर्ववत करून त्याच्याकडून त्याला जी अवस्था प्राप्त झाली होती, तिचे वर्णन करण्यास श्रीकृष्णांनी भाग पाडले."

मग क्षीराब्धितैं सांडितु। गगनिं फुंजुमंडितु।
निवडें जैसा न निवडतु। पूर्णचंद्रु।।१८-१५५०।।
तैसा *<u>ब्रह्म मी हें विसुरें। तेथ जगचि ब्रह्मत्वें भरें।</u>*
***<u>हेंहीं सांडीं तऱ्हें विरें। ब्रह्मपणहीं</u>*।।१५५१।।**
<u>आईसा मोडितु मांडतु ब्रह्मों। तो दुःखें देहाचिएं सीमें।</u>
***<u>मी अर्जुनु एणें नामें। उभा ठेला</u>* ।।१५५२।।**

"क्षीरसमुद्रातून निघून नक्षत्रमंडित तारांगणात आपल्या कौमुदीसह विराजमान होणापूर्वी चंद्र जसा क्षीरसमुद्राशी अभिन्न असतो, तशी देहाहंभाव लोपून जगास ब्रह्मरूपाने पाहणाऱ्या अर्जुनाची ब्रह्माशी एकरूप स्थिती होती आणि क्षीरसमुद्रातून बाहेर पडल्यावरही चंद्राची क्षीरसागराशी असलेली जवळीक जशीच्या तशीच राहते - चंद्रास पाहून तो जसा त्याच्या पुनर्मिलनासाठी गगनी झेपावू पाहतो - त्याप्रमाणे श्रीकृष्णांच्या या प्रश्नाने अर्जुनपण पुनः ग्रहण करू जाणाऱ्या अर्जुनाची खरी अवस्था होती. ब्रह्मत्वाकडे ओढला जाणारा अर्जुन त्याच्या लाटांवर हिंदकळत अर्जुनपणाकडे येत होता. ***कधी ब्रह्म तर कधी अर्जुन*** असे स्पंद अनुभवणारा अर्जुन मोठ्या कष्टाने पुनः एकदा देहाच्या सीमेत अर्जुन म्हणून उभा राहिला."

"नष्टो मोह:"

मग कांपतां करतलीं। दडपूनि रोमावली।
पुलिका स्वेदजलीं। जिरऊनीयां।।१८-१५५३।।
प्राणक्षोभें डोलतयां। आंगां आंगचि टेंकयां।
सूनि स्तंभु चालयां। भुलौनियां।।१५५४।।
नेत्रयुगुलाचेनि वोतें। आनंदामृताचें भरितें।
वोसंडत माघौतें। काढूनियां।।१५५५।।
विविधा औत्सुक्यांचि दाटी। चीप आतति होति कंठीं।
तैं करूनियां पैठीं। हृदयामाजिं।।१५५६।।
वाचेचें वितुलणें। सांवरूनि प्राणें।
अक्रमाचें श्वसणें। ठेऊनि ठाईं।।१५५७।।

"अंगी आलेले रोमांच कंप पावणाऱ्या हातांनी त्याने दाबले; घर्मबिंदू जागच्या जागी जिरवून टाकले; प्राणांच्या क्षोभाने डोलणारे अंग कसेबसे

सावरत तो हालचाल विसरून खांबासारखा उभा ठाकला. त्याच्या नेत्रयुगुलांतून आनंदामृताच्या धारा ओसंडत होत्या. त्यांना महत्प्रयासाने आवर घालत, नाना प्रकारच्या उत्कंठतेमुळे दाटून आलेला कंठातील कढ अंत:करणात कसातरी जिरवून, विसकळीत वाचेवर कसेबसे नियंत्रण घालत, प्राणांना सावरत अनियमित होणाऱ्या श्वासोच्छ्वासांना स्थिर करत अर्जुन एकवार काहीतरी करून देहभान सावरू लागला"

आणि तो श्रीकृष्णांना म्हणू लागला:

<u>नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।</u>
<u>स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव</u>।।१८-७३।।

"हे अच्युता! मला झालेल्या मोहाबद्दल का तू काही विचारत आहेस! देवा! तुझ्या कृपेमुळे तो तर सपरिवार नष्ट पावला आहे; ***मला आत्मस्मृती लाधली आहे आणि मी सर्व शंकांचे निरसन होऊन निश्चिंत झालो आहे. तू जी आज्ञा मला करशील, ती प्रमाण मानून मी तुला जे हवे ते कर्म करीन!"***

पुढे तो म्हणतो:

मग अर्जुन म्हणे देवो। पुसताति आवडे मोहों।
तऱ्हें तो गेला जी ठावो। घेऊनि आपुला।।१८-१५५८।।
पासिं येऊनि दिनकरें। डोल्यांतें आंधारें।
पुसिजें हें काईं सरें। कोण्हें गांविं।।१५५९।।
तैसा तूं श्रीकृष्णराया। आमुचियां डोलेयां।
गोचर हेंचि काईंसयां। न पुरें तंव।।१५६०।।
परि लोभें मायेपासूनि। तैं सांघसिं तोंड भरूनि।
जैं काईसेनिहीं करूनि। जाणूं नैयें।।१५६१।।
आतां मोह असे कीं नैईं। हें आईसें जी पुससि काईं।
कृतकृत्य जाहालों पाहीं। तुझेंपणें।।१५६२।।

"हे श्रीकृष्णराया! मोहाबद्दल हे तू काय विचारतो आहेस! तो तर केव्हाचाच गेला! दिनकराने जवळ येऊन डोळ्यांना विचारावे की ***"तुम्हाला आता अंधार दिसतो आहे का,"*** तसेच तुझे हे अज्ञानाविषयी प्रश्न करणे आहे. तू तर साज्ञात ज्ञानसूर्यच! तू आमच्या डोळ्यांना गोचर झाल्यावर कशाची उणीव राहणार! आणि वर आईपेक्षाही जास्त ममतेने, जे कधीच जाणता येणारे नाही, तेसुद्धा तू तोंड भरभरून मला सांगतो आहेस. तुझ्या दर्शनानेच अज्ञान जेथे लोपते, तेथे तुझ्या या प्रश्नाचे काय बरे प्रयोजन! असो. पण तू आता विचारतोसच आहेस की मोह आता उरला की गेला, तर ऐक. ***तुझे स्वरूप पावून मी अगदी कृतकृत्य झालो आहे."***

गुंतलो होतो अर्जुनगुणें। तो मुक्त जाहालों तुझेंपणें।
आतां पुसणें सांगणें। दोनहीं नाहीं।।१८-१५६३।।
मी तूझेनि प्रसादें। लाधलेनि आत्मबोधें।
मोहाचें तेयां कांदें। उरोंचि नेदीं।।१५६४।।
आतां करणें कां न करणें। हें जेणें उठीं दुजेपणें।
तैं तूं वाचूनि नेणें। सर्वत्र गां।।१५६५।।
इयेंविषयीं माझ्यां ठाईं। संदेहाचें नुरेंचि काईं।
त्रिशुद्धि कर्म जेथ नाईं। तैं मी जाहालों।।१५६६।।

"अर्जुनपणाने मी या देहात गुंतलो होतो. पण आता मात्र तुझ्याशी एकरूपत्व पावून मी मुक्त झालो आहे. आता तू काय विचारावेस आणि मी काय सांगावे! आपणा दोघात पुढे संवाद करायचा तर ते द्वैत आता उरलेच कोठे! ***तुझ्या प्रसादाने आत्मबोध प्राप्त झाला आणि त्या मोहाचे कंद मी आता समूळ नष्ट केले आहेत. यापुढे कर्म काय, अकर्म काय, माझ्यसाठी सर्व काही तूच आहेस! सर्वत्र तूच भरून राहिला आहेस.*** याबाबत मला आता कोणताही संदेह उरला नाही. **कर्मच जेथे सरते, ती *नैष्कर्म्यावस्था* आता मीच झालो आहे,** हे त्रिवार सत्य मी जाणून चुकलो आहे."

"कर्तव्य गेलें निपटौनि"

तूझेनि मज मी पावौनि। कर्तव्य गेलें निपटौनि।
परि आज्ञा तुझीवांचौनि। आन नहीं प्रभो।।१८-१५६७।।
कां जैं दृश्य दृश्यातैं नाशिं। जैं दुजें द्वैतातैं ग्रासिं।
जैं एक परि सर्व देशिं। वसविं सदा।।१५६८।।
जेयाचेनि संबंधें बंधु फिटें। जेयाचियां आशा आंस तुटें।
जैं भेटलियां सर्व भेटें। आपणपांचि।।१५६९।।
तैं तूं गुरुलिंग जी माझें। जें एकलेपणींचें विरजें।
जेयालागिं वोलांडिजें। अद्वैतबोधु।।१५७०।।

"हे सद्गुरो! श्रीकृष्णा! तुझ्या कृपेने मी स्वस्वरूपास पावलो; मला कर्तव्य-अकर्तव्य काही उरलेले नाही. तेव्हा हे प्रभो! तुझी जी काही आज्ञा असेल ती मला प्रमाण आहे. तू तर माझी गुरुमूर्ती आहेस, जी दृश्यरूपात असूनही या दृश्यरूपास - या विश्वाला नाहीशी करते; जी दुजेपणाने राहूनही शिष्याचा द्वैतभाव गिळून टाकते; जी एकच वस्तू असूनही सर्व देशी सर्व काळी वसते; जिच्या संबंधामुळे बंध तुटून मुक्ती मिळते; जिच्या प्राप्तीच्या आशेने आशेचा निरास होतो; जी भेटताच सर्व काही मिळते; आपणास आपली भेट होते; ***जी एकत्वाची मर्यादा आहे; जिच्यासाठी अद्वैतबोधासही ओलांडून जावे लागते."***

आपणचि होऊनि ब्रह्म। सारिजे कृत्याकृत्यांचें काम।
मग कीजैं कां नि:सीम। सेवा जेयाचि।।१८-१५७१।।
गंगा सिंधु सेवूं गेलीं। पावतांचि समुद्रु जाहालीं।
तेंविं भक्तां सेल दिधलिं। निजपदाचिं।।१५७२।।
तो तूं माझा निरुपचारु। श्रीकृष्णा सेव्य सद्गुरु।
मा ब्रह्मतेचां उपकारु। हांचि कां मानिं।।१५७३।।
<u>जैं मज तुम्हां आड। होतें भेदाचें कवाड।</u>
<u>तैं फेडौनि केलें गोड। सेवासुख</u> **।।१५७४।।**
तऱ्हें आतां तूझिं आज्ञा। सकलदेवाधिदेवराज्ञा।
करीन देईं अनुज्ञा। भलतिएं विषयीं।।१५७५।।

"आपण ब्रह्मरूप व्हावे, कृत्याकृत्यांचे प्रयोजन उरू नये, हे सर्व गुरुमूर्तीची निःसीम सेवा घडावी यासाठीच असते ना! हे श्रीकृष्णा! तू मला स्वतःच्या पदाचा शेलका वाटा दिलास. गंगेने सागरास मिळून एकरूप व्हावे, तसे तू माझे केलेस. मला ब्रह्मरूपता देऊन, हे निरुपाधिका! सद्गुरो! माझ्यावर तू थोर उपकार केलेस. तुझ्या आणि माझ्यामध्ये जे भेदाचे प्रतिबंध होते, ते दूर सारून तू मला सेव्य झालास. ***तुझी सेवा करता येईल असा तू आता झाला आहेस. सेवेचे गोड सुख तू मला प्राप्त करून दिले आहेस. तू माझा स्वामी आहेस. मी तुझा सेवक आहे.*** हे सकळ देवाधिदेवांच्या राया! तू आता वाटेल ती आज्ञा कर आणि मला त्याप्रमाणे करण्यास अनुमती दे! तू सांगशील ते ते मी करीन!"

"देओ नाचें सुखें भुलला"

ययां अर्जुनाचियां बोलां। देओ नाचें सुखें भुलला।
म्हणें विश्वफलां जाहाला।
सफलां फल हां मज।।१८-१५७६।।
उणेनि उमचलां सुधाकरु। देखोनि आपुलां कुमरु।
मर्यादा क्षीरसागरु। विसरेचिना।।१५७७।।
आईसें संवादाचां बहुलां। लग्न दोघांचियां आंतुलां।
लागलें देखौनि जाहालां। निर्भरुं सञ्जयो।।१५७८।।

"अर्जुनाचे हे सुनिश्चयात्मक बोल ऐकून श्रीकृष्णांचे हृदय उचंबळून आले. परमसुखाने आनंदित होऊन ते नाचू लागले. ते म्हणू लागले की, ***"या विश्वाचे संपूर्ण साध्य असे जे साधनेचे फल, त्या मजलाही आज हे अर्जुनरूपी फळ प्राप्त झाले आहे."*** अर्जुन परिपूर्ण झाला याचा आनंद त्यांच्या हृदयी समावेना. आपला पुत्र जो चंद्र त्याने अंगीचे उणेपण टाकून पौर्णिमेच्या पूर्णत्वास अंगीकारलेले पाहून क्षीरसमुद्रही आपली मर्यादा विसरून गगनापर्यंत त्याला भेटावे या इच्छेने उचंबळून येत नाही का! तसेच श्रीकृष्णांचे पण झाले. पूर्णत्व पावलेला अर्जुन आणि पूर्ण पुरुषोत्तम श्रीकृष्ण एकरूप झाले. ***"हृदयां हृदय एक जाहालें"!*** **या गीतारूपी संवादाच्या बोहल्यावर कृष्णार्जुनांच्या अंतरीच्या ऐक्याचे लग्न लागले;** त्यांचे हे मीलन पाहून गीतानिवेदक संजयासही आनंदाने उचंबळून आले."

गीतासंवादाची ईतिश्री

अशा प्रकारे ***"सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ।।१-२१।।"*** या अर्जुनाच्या श्रीकृष्णांस उद्देशून म्हटलेल्या वाक्यापासून त्या उभतांचा जो गीतासंवाद सुरू झाला, त्याची या ***"करिष्ये वचनं तव।।१८-७३।।"*** या अभिवचनाने सांगता होते. ज्ञानदेवांनीही आपल्या हृदयंगम वाणीतून हा समाप्तीचा सोहोळा जसाच्या तसा रंगविला आहे. श्रीकृष्णार्जुनांची या संवादाअंती होणारी अवस्था त्यांनी ***लग्न*** या संकल्पनेत बसवून मोठे बहारदार काव्य केले आहे. चंद्र आणि क्षीरसमुद्राची उपमा कल्पून श्रीकृष्णार्जुनांची ती उत्कट भावावस्था त्यांनी समर्थपणे प्रक्षेपित केली आहे. गीतासंवादाचा असा मनोज्ञ समारोप केवळ ज्ञानदेवांची अलौकिक प्रतिभाच करू जाणे!

भीरुत्वास प्राप्त झालेल्या, शोकमोहाने ग्रस्त झालेल्या, युद्ध करण्यास असमर्थ झालेल्या, हातातील गांडीव धनुष्य गळून पडलेल्या, वैफल्याने विकल मन झालेल्या, तत्त्वज्ञानास पारख्या असलेल्या, धर्म-अधर्म, कर्म-अकर्म, पापपुण्य, नीती-अनीती, योग्य-अयोग्य या द्वंद्वांच्या संभ्रमात पडून किंकर्तव्यमूढ झालेल्या अप्रतिम धनुर्धर योद्ध्या अर्जुनाचे या गीतासंवादाने अंतरंगच पालटले; त्याला तत्त्वज्ञानाचा लाभ झाला. त्याच्या मनीची द्वंद्वे उपशमली. युद्धाचा पुनर्निश्चय झाला. गांडीव परत धारण करून त्याचा युयुत्सू टणत्कार शत्रूसैन्याच्या महासागरास आव्हान देत ऐकवण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले. कर्तव्य-अकर्तव्याचा निर्णय होऊन त्यानुसार वागण्याचा त्याचा सुनिश्चय झाला. एवढेच काय, पण अद्वैतावस्थेचा अलभ्य लाभही त्याला श्रीकृष्णकृपेने प्राप्त झाला.

समारोप

अशा रीतीने आपण आतापर्यंत गीतेतील प्रमुख विषय ज्ञानेश्वरीच्या आधारे संगतिक्रमाने अभ्यासले. संजयाचे अठराव्या अध्यायाअंतीचे उद्गार व त्यांवरील ज्ञानदेवांचे भाष्य यांच्यातून गीतेचा समारोपाचा भाग अजून पाहावयाचा आहे. तत्पूर्वी गेल्या तेरा स्कंधांतील एकूण छप्पन्न उन्मेषातील सर्व विचारांचे सिंहावलोकन करणे रास्त ठरेल. तर वळू या त्याकडे आणि शेवटच्या ***स्कंध क्र.१४:उत्तररंग*** याच्या प्रथम भागाकडे म्हणजे ***उन्मेष क्र.५७:सिंहावलोकन*** याकडे!

:::चतुर्दश स्कंध:::

::उत्तररंग::(५७-५८)

(पृ.क्र.१०९६ते ११३१)

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५७::

::सिंहावलोन ::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५७:

गीता:
१:१
२:११,४०,४७-५१,६९
३:१,३,५,४१,४९
४:१,३,७,२४
५:४,२७,२८
६:५,११,१६,१७
७:१-४,८-११,१८,१९, २९,३०
८:१-४
९:१६,१७,२०-२२,२६, २७, ३४
१०:२,४२
११:३,३२,५५
१२:८-१२,२०
१३:४-११,३४
१४:३,२६,२७
१५:६-१५,१९
१६:१-३
१८:६५
१८:६५,६७,७८

ज्ञानेश्वरी:
१:१७,२०-२२,२५
२:२६९,२७१
३:३६,६३,१५१,१८६-१८८
४:६५,६७
५:१६
६:१०६,१९२,२९१,३४२,३६३
७:४२,४३,९७,१३६,१३७
८:४६-५३,५९-६८
९:१,११२,११७,११८,१३०-१३५,१८८,२१०,२१२-२२८,२३९-२६२, ३०२,३३३,४४९,५१६
१०:७४,१०८-११०,३१७
११:२९१,७०८
१२:६०,७३,७५,८९,९०,१०४,१०५,१३७-१४३
१३:२४८,२४९,५०९,८५३,९२६,९८१-१००६
१४:१२७,२२३-२२५, ४०२,४०३
१५:२६७,३३४,५६८,५८३-५८७
१६:४
१७:६-८
१८:१७६,१७७,२२२,८८५-१२७३,१४१७-१४२५,१६३२, १६६६, १७९९, १८०७, १८२२

सोपानदेवी:९:४४

चां.पा.:१

पा.यो.सू.:
१:२३,३२,४१
४:२९

अमृ.
श्लोक:४
१:१,१८,१९,२७
९:६०

यो.ता.:२९

:::चतुर्दश स्कंध:::
::उत्तररंग::

::उन्मेष ५७::
::सिंहावलोन ::

पूर्वरंग::::

ज्ञानेश्वरांचा प्रसाद

गेल्याच ***उन्मेष क्र.५६*** मध्ये आपण ***गीतोपदेशाची सांगता*** पाहिली. श्रीकृष्णांनी केलेला गीतोपदेश आणि त्याचा अर्जुनावर झालेला अपेक्षित परिणाम आपण साद्यंत अवलोकिला, त्याचे प्रसंगोपात्त विश्लेषण केले आणि आपणास तो जसा समजावून घेता आला, तसा समजावून घेतला. हे बृहत्तम कार्य आतां संपन्न झाले आहे.

अर्जुनाचे निमित्त होऊन ही गीतामाऊली आपणा सर्वांस प्राप्त झाली. आतापावेतो तिने जगाचे कोटकल्याण केले आणि पुढेही तिचे हे सत्कार्य अविरतपणे चालू राहणार आहे. संस्कृतातील ही गीता तुम्हाआम्हा सर्वसामान्यांपर्यंत ज्ञानेश्वरांनी आणून पोहोचवली आहे, ती तिच्या सर्व प्रसादासह! ज्ञानेश्वरांच्या ओवीतील शब्द न शब्द, अक्षर न अक्षर गीतेइतकेच प्रासादिक आहेत.

गीतेतील ***तत्त्वज्ञान व योगविज्ञान*** यांचा श्रीकृष्णार्जुनसंवादमिषाने जगाला लाभ झाला आहे. हे सर्व त्यातील बारकाव्यांसह आणि प्रसंगविशेषी आपल्या उत्स्फूर्त स्पष्टीकरणासह मोठ्या काव्यात्म शैलीत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीतून आपल्यासाठी अत्यंत कळकळीने साकार केले आहे. त्या सर्वाचा रसास्वाद आपण विविध पैलूंचे निरीक्षण करत अभ्यासू, वैज्ञानिक आणि जिज्ञासू वृत्तीने घेत आलो आहोत.

आपली **गीता-ज्ञानेश्वरी**च्या परिशीलनाची ही कामना आता जवळजवळ पूर्ण होत आली आहे. वस्तुतः ही कामना खऱ्या अर्थाने कधीही पूर्ण होणारी नाही. पण आपल्या परिशीलनाच्या मर्यादा लक्षात घेऊन आता आपणास लवकरच या विषयास या वेळेपुरता पूर्णविराम देणे भाग आहे.

आता जो गीता-ज्ञानेश्वरीचा भाग आपणास अवलोकन करावयाचा उरला आहे, तो आहे संजयाच्या गीतासमाप्तीच्या उद्गारांचा व त्यांवरील ज्ञानदेवांच्या निरूपणाचा. मुख्य विषय मात्र आतापुरता तरी आपल्या हातावेगळा झाला आहे. तेव्हा शेष भागाकडे वळावयाचे आहे.

सिंहावलोकन

पण तत्पूर्वी आपण निरीक्षिलेल्या गीता-ज्ञानदेवीतील ***तत्त्वज्ञान व योग*** यांचा एक संक्षिप्त, पण जमेल तितका साक्षेपी आढावा घेऊ या. तसेच ज्ञानदेव ज्यास ***गीतेचा महासिद्धांत*** म्हणून गौरवतात *(ओवी क्र.१८-१२४२,१२४३)*, त्याची आणि गीतेतील एकमेवाद्वितीय ***पंथराज वा क्रमयोग*** या योगमार्गाची थोडी अधिक चर्चाही करू या.

त्यासाठी आपण आतापावेतो क्रमिलेल्या या **ज्ञानेश्वरी - गीता - पातञ्जलयोगसूत्रे - शाङ्करभाष्यादींच्या पथाचे *सिंहावलोकन*** करणे व त्यातच प्रसंगोपात्त वरील चर्चा व विचार करणे इष्ट ठरेल. तर आता तसेच करू या.

इतर तत्त्वज्ञानप्रणालींचे धावते आरेखन

प्रथम आपण या ग्रंथामागची लेखकाने निवेदिलेली भूमिका पाहिली. ग्रंथाचे प्रयोजन, प्रस्तुत लेखकाचा गीता-ज्ञानेश्वरीतील महत्त्वाच्या विषयांकडे बघण्याचा दृष्टिकोन, त्यांबाबत त्याने ग्रंथांतरी मांडलेली विविध प्रमेये,इ.गोष्टींचा त्यात विचार झाला. तसेच इतर तत्त्वज्ञानप्रणालींचे धावते आरेखन आपण पाहिले. त्यात द्वैत-अद्वैत इ.तत्त्वज्ञाने वा मते, बौद्ध-जैन दर्शने, षट्शास्त्रदर्शने इ.सैद्धांतिक भाग परिचयापुरता व तत्त्वज्ञानाच्या विषयपूर्तीकरता पाहिला. त्यानंतर आपण मूळ ग्रंथाकडे वळलो.

"ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१-१।।" या आत्मानुभूतीपर ओवीने ज्ञानेश्वर आपले ***ज्ञानेश्वरी*** वा ***भावार्थदीपिका*** हे गीताभाष्य सांगण्यास प्रवर्तले आहेत. भाष्यकार हा निव्वळ घनपंडित असून चालत नाही. हा आत्म्याचा प्रांत आहे. अनुभूती याचे सारसर्वस्व आहे. तेव्हा गीतेसारख्या प्रमाणग्रंथावर उत्कट अनुभूतिपूर्ण अभूतपूर्व असे भाष्य करू जाण्यास त्या सर्व गुणांनी मंडित असे तर ज्ञानेश्वर आहेतच; पण ते तर साक्षात चैतन्यचक्रवर्ती आहेत; स्वानंदसाम्राज्याचे अभिषिक्त सम्राट आहेत.

नवल नाही की त्यांच्या पुण्यपावन प्रासादिक अशा या ग्रंथाच्या एकेका ओवीत, एवं च काय, शब्दाशब्दात अन अक्षराअक्षरात सामान्यातिसामान्य जनांना उद्धरून नेण्याचे थोर सामर्थ्य आहे. म्हणूनच श्रीनामदेवांसारख्या संतश्रेष्ठांनीही ***"नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।।"*** असे म्हटले आहे. आपण याच प्रस्तावाने श्रीज्ञानेश्वरांस आणि श्रीज्ञानदेवीस नमन करून ***भावार्थदीपिकेचा प्रकाश*** अनुभवण्यास कसा प्रारंभ केला, ते जिज्ञासूंना स्मरतच असेल!

कृपा

आत्मसाक्षात्कार वा परमात्मोपलब्धी ज्याच्यावर आत्मराजाची, श्रीहरीची वा महापुरुषाची कृपा होते, त्यालाच साध्य आहे. त्याविना जे मानुष प्रयत्न केले जातात, ते ***आण्विक*** या सदरात मोडतात. परंतु प्रबल इच्छेने असे प्रयत्न करणाऱ्यास वैश्विक पातळीवर सुयोग्य प्रतिसाद लाभतो आणि तो महापुरुषांकडे व त्यांच्या विचारधनाकडे अवश्य वळतो.

याच पूर्वसंकेताने **आपणासही त्या आत्मराजाने *श्रीज्ञानदेव* या महापुरुषांकडे आणि *श्रीगीता-ज्ञानेश्वरी* या ग्रंथराजांकडे सोपवले** आणि त्यांच्या कृपावर्षावात तृप्त होत आपली ही आत्मयात्रा चालू आहे. अनायासेच श्रीज्ञानदेवादी महापुरुषांचा आणि साक्षात भगवान गोपालकृष्णांचा संश्रय मिळून आपण धन्य झालो!

महावाक्यरूपी *"ॐ नमो जी"*

ज्ञानदेवीच्या प्रथमारंभीची ओवी हे एक महावाक्यच कसे आहे, ते आपण पाहिले. ***"तत्त्वमसि";"अहं ब्रह्मास्मि";"सर्वं खल्विदं ब्रह्म";"अयमात्मा ब्रह्म"*** ही काही वेदसिद्ध महावाक्ये आहेत. त्यांचा मोठ्या चातुर्याने बोध करून देणाऱ्या ज्ञानदेवांच्या***"ॐ नमो जी आद्या।.. ।।१-१।।"*** या ओवीचा रसास्वाद आपण घेतला.

ग्रंथारंभीच असा महावाक्योपदेश करून आणि संपूर्ण ग्रंथांतरी तो आपणा सर्वांवर सातत्याने ठसवत आपणास आत्माभिमुखतेकडे वळवणारे ज्ञानेश किती थोर पुरुष आहेत, ते आपण त्यानिमित्ताने पाहिले. म्हणूनच त्यांना सगळे संतसज्जन ***साधकांची माऊली*** म्हणून गौरवतात. म्हणूनच***"ज्ञानदेवें रचिला पाया"*** असे वारकरीजन म्हणतात.

आपणही ज्ञानदेवांप्रति असाच प्रीतिभाव, बालकासारखी निर्व्याज अनन्यशरणबुद्धी ठेवली पाहिजे. अर्जुनाचा श्रीकृष्णांप्रति जो ***"शिष्यस्तेऽहं"*** असा भाव होता; वत्साचा धेनुप्रति जो भाव असतो, तसा भाव ठेवून ज्ञानेशांस शरण गेले पाहिजे. मग ती ज्ञानोबामाऊली आपणास***"सोऽहं"*** बोध करून देईल; आपले लळे पुरवील; ज्ञानेश्वरीचे गुह्य आपल्या अंतरी ओतील. हे सर्व आपणास आता अनुभवांतीही पटले आहेच! असो.

अवधान

त्यानंतर आपण अर्जुनाची वैफल्यग्रस्त, युद्धारंभी झालेली द्विधा मन:स्थिती पाहिली. श्रीकृष्णांकडून आपणास उचित काय ते कळावे, अशी इच्छा त्याने प्रकट केली आणि त्यासाठी हे गीतेचे प्रयोजन झाले! ज्ञानेश तीच गीता आपणापर्यंत आणून पोहोचवू पाहतात. त्यासाठी त्यांची एकच विनंती आहे. ती म्हणजे ***ते काय सांगतात, ते आपण नीट अवधान देऊन ऐकावे.***

तेवढे एक आपण केले आणि केवढ्या लाभाचे धनी झालोत पहा! ***"यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः"*** असे त्या लाभाचे वर्णन आपण पाहिले. हा लाभ पावणाऱ्या योगी - ज्ञानि -भक्तजनांची स्थिती कशी असते, तेही त्यानिमित्ताने आपण गीतेधारे सविस्तर पाहिले. असा लाभ होणारे किती दुर्मीळ असतात, ते ***"कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः।।७-३।।"*** या भगवद्वचनाद्वारे स्पष्टच आहे.

गीतेचा प्रतिपाद्य विषय

परंतु ज्यांना हा लाभ व्हावा अशी इच्छा आहे, त्यांनी गीता-ज्ञानदेवीची कास घट्ट धरून ठेवली पाहिजे. विशेषतः ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु. ..।।९-३४ व १८-६५।।"*** या गीताश्लोकांतून भगवंतांनी केलेला गीतासारभूत उपदेश तर त्यांनी आपल्या जीवनाचे मार्गदर्शक सूत्रच म्हणून ग्रहण केला पाहिजे.

ग्रंथांती***"यत्र योगेश्वरः कृष्णो ..।।१८-७८।।"*** या श्लोकानिमित्त ज्ञानेश विश्वातील सर्वांसाठी पसायदान मागतात. ***"किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिनिं लोकीं। भजिजो आदिपुरुखीं।अखंडित।।१८-१७९९।।"*** असे ते दान आहे. परमभक्तीचे हे अपूर्व दान आपल्या ओंजळीत ते या ग्रंथोपजीविकेच्या मिषाने टाकत आहेत.

सगुण साकार उपासत असतांना गीता आपणास अनायासेच निर्गुण निराकाराकडे घेऊन जाते, तेही आपण पाहिले. हाच गीतेचा प्रतिपाद्य विषय आहे, हेही आपल्या लक्षात आले आहेच!! या सूत्राचे अनुशीलन करणारा ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ, ज्ञान व ज्ञेय*** यांची अनुभूतिजन्य जाणीव ठेवून असतो. ***"ज्ञानम् ज्ञेयम् ज्ञानगम्यम्"*** अशा हृदिस्थ परमात्म्यास तो आपलेसे करून घेतो;त्याचे स्वरुप पावतो.

"अतींद्रिय परि भोगवीन। इंद्रियांकरविं"

अशा परमात्मस्वरूप पावणाऱ्या सिद्धांचे सविस्तर वर्णन आपण गीतेच्या आधारे पाहिले. अर्जुनास हीच स्थिती प्राप्त झाली; एवढेच काय, गीतासंवाद ऐकणाऱ्या संजयासही ती स्थिती सहजच प्राप्त झाली, एवढे गीतामहिमान आहे! हाच ठेवा ज्ञानेश्वरीद्वारे ज्ञानेश आपणापर्यंत आणून पोहोचवत आहेत. ***"भेदाचे कवाड"*** मोडून ***"गोड सेवासुख"*** त्यांनी आपणास मिळवून दिले आहे, ते त्यांच्या ज्ञानेश्वरीतून!

अद्वैतातील भक्तिसुखाची ही परमावधी आहे. गीतेचे नित्यनूतनत्व यातच आहे, भक्तांस देशकालातीत असे हे दान गीता आजतागायत देत आली आहे. गीतेचे तत्त्व आकळणे अत्यंत कठीण असूनही केवळ गुरुकृपेच्या बळावर ज्ञानेश त्यासाठी सिद्ध झाले आहेत.

आदिनाथ-उमा-मत्स्येंद्र-गोरक्ष-गहिनी यांची थोर संप्रदायपरंपरा त्यांच्यामागे यासाठी उभी आहे. निवृत्तिनाथांचा वरदहस्त त्यांच्या मस्तकी आहे. संस्कृताचे काठिण्य दूर सारून प्राकृत जनांना गीतार्थ कळावा म्हणून त्यांनी धर्मनिधाने असे सोपान गीतेच्या दुर्गम तीरांवर रचले आहेत. त्यांची आज्ञा आणि आशीर्वाद म्हणून कलिग्रस्त जीवांवर कृपा करण्यासाठी शांतरसाने वर्षाव करणारा हा ग्रंथ - **श्रीज्ञानदेवी** - ज्ञानेशांद्वारे प्रकट झाला आहे.

कोणीही येथे नाहावे आणि प्रयाग-माधव असे विश्वरूप पाहावे; संसारास तिलोदक द्यावे, अशी या ग्रंथराजाची थोरवी आहे. ***"परि अमृतातेंहीं पैजा जिंकें"*** या रसवत्तेच्या शब्दसंपत्तीची येथे उधळण केलेली आहे. ***"अतींद्रिय परि भोगवीन। इंद्रियांकरविं"*** असे सामर्थ्य ज्ञानदेव बाळगतात. सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथांनी ज्ञानेशांचे चाडे करून ***"बीज उवाईलें";*** ते त्यांच्या मुखातून बाहेर पडून संतांच्या चित्तास आकर्षून घेत असते.

"भजिजो आदिपुरुखीं अखंडित"

अनंत शब्दब्रह्मातून सातशे श्लोक समुद्रमंथन करून निघालेल्या रत्नांप्रमाणे प्रकटले, ती गीता! ***श्रीप्रभूची साक्षात वाङ्मयी मूर्तीच!*** वाच्य आणि वाचक श्रीकृष्णच असलेले हे शास्त्र! मोक्षाशिवाय दुसरे कमी प्रतीचे असे इतर फल ते देतच नाही.

ज्ञानेश गीतार्थाने विश्व भरून टाकत, जगाला जे हे ज्ञानेश्वरीरूप आनंदाचे विशाल आवार मांडतात, त्याचा तो पैस आपणास स्तिमित करणाराच आहे! त्याच्या आवारी प्रवेशून त्यांनी दाखवलेले परतत्त्व प्रत्यक्ष पाहण्याचे केवढे सुख आपणास मिळाले आहे, ते कसे वर्णन करता येईल!

केवढे हे औदार्य! आणि ज्या ग्रंथाधारे आपण जीविका चालवावी, तो हा ग्रंथराज ज्ञानदेवी तरी कसा! तर ***"परमहंसिं सरोवर। सेविजें जैं।।१८-१८०७।।"*** असा! हा ग्रंथ त्यांनी उदार होऊन आपल्याला बहाल केला आहे!

आपणास दिलेल्या या उपनिषदांचे सार आणि सर्व शास्त्रांचे माहेर असलेल्या ग्रंथांतरी आपण शिरलो ते ज्ञानेशांचे बोट धरून आणि त्यात बागडतांना ***"सोऽहं" तेहीं अस्तावलें"*** अशी ***"पूर्णमदः" स्वरूप अद्वयभक्ती*** आपण ज्ञानेशांच्या कृपेने या ग्रंथावलंबनाने केव्हा पावलो, ते आपल्या कधी लक्षातही आले नाही!

हीच भक्ती ***स्वसंवित्ति*** इ.नांवांनी ओळखली जाते. ज्ञानेश हिला ***परमभक्ती*** असे म्हणतात. जीवन्मुक्तिलक्षणे प्रकट करणाऱ्या या श्रेष्ठ अवस्थेचे दर्शनही आपण ज्ञानेश्वरीतून घेतले आहेच! क्रमयोगाद्वारे ती प्राप्त होते.

क्रमयोगचक्रवर्तीच्या मुकुटींचे चिद्रत्न म्हणजे साक्षात श्रीहरीच असतो! ***"क्रमयोगुबोधें। तेणें भक्तिचिह्नांगें। मी स्वानंदोदधि वेगें। ठाकिला गां।।१८-१२२२।।"*** अशी त्या क्रमयोगाची महत्ता आहे. ज्ञानेश्वरीचे हेच योगसूत्र आहे. गीतेतील खरा योग तो हाच! आपणही त्याचे दर्शन समग्ररूपाने घेतले आहे आणि आपला योगप्रवास आता पूर्ण झाला आहे. त्या मार्गाची स्मृतिचित्रे पाहणेही फार आनंदाचे आहे आणि तूर्त आपण तेच करत आहोत.

अद्वैताचे पसायदान

"भारताचां आंवाका" असा ***"यत्र योगेश्वरः कृष्णो ..।।१८-७८।।"*** हा श्लोक ***"चंदु तेथ चंद्रिका। शंभु तेथ अंबिका। ..।।१८-१६३२ ।।"*** या ज्ञानेशांच्या ओव्यांतून आपण सविस्तर पाहिला. अर्जुनास मग ***"सांवळा सुकंकणु। बाहू पसरौनि दक्षिणु। आलिंगिलां स्वशरणु। भक्तुराजु।।१८-१४१८।।"*** असे अद्वैताचे श्रीकृष्णहस्ते घडलेले ***पसायदान*** आपण अनुभवले. श्रीकृष्णांनी गीतेचे प्रयोजन ज्यासाठी केले होते, ते असे पूर्णत्वास नेले.

वेद ज्याचे निःश्वास आहेत, त्याने अशी ही गीता स्वमुखे सांगितली. ती गीतासुद्धा वेदांसारखीच ***कर्म, देवता व ज्ञान*** या त्रिकांडात्मक कशी आहे आणि तिच्या प्रत्येक अध्यायात कोणता विशेष आहे, त्याचे ज्ञानदेवांनी केलेले विवेचनही आपण अवलोकिलेच आहे.

ते म्हणतातः ***"एवं सकलसाङ्ख्यसिंधु। श्रीमद्भगवद्गीताप्रबंधु।"*** असा हा उदार वेदच आहे. वेदांचे कृपणत्व नसलेली ही गीता स्त्री-शूद्रादींनाही सेव्य आहे. ती प्रकट करणाऱ्या श्रीगोपालकृष्णांचे पित्याचे पुत्रावर असतात, त्याहूनही थोर उपकार आपणा सर्वांवर आहेत. हे जाणणाऱ्या अर्जुनाने म्हणूनच त्यांचे स्वरूपदर्शन घेतल्यानंतर ***"पितेव पुत्रस्य"*** असे उद्गार काढले आहेत.

विभूती

"त्वमेव माता च पिता त्वमेव" अशा त्या भगवंताचे दिव्य दर्शन आपण नंतर त्यांच्या विविध गीतोक्त विभूतींद्वारे घेतले. माता कोण, पिता कोण याची आपणास त्या वेळी खरी ओळख झाली. ती ओळख करून देणारी ज्ञानेशांची पहिली ओवी म्हणजे ***"ॐ नमो जी आद्या।"!***

ते दर्शन घेत असतांना भगवंताचे यज्ञस्वरूपही आपण पाहिले. ***"ब्रह्मार्पणं ब्रह्म हवि..।। ४ -२४।।"*** या श्लोकातून प्रकटलेला ब्रह्मयज्ञही आपण साङ्ग पाहिला. तसेच श्रद्धावान अंतःकरण व दोषरहित बुद्धी याही भगवंताच्या विभूतीच आहेत, हेही आपल्या निदर्शनास आले.

स्वधर्माची प्रशस्ती व त्यासाठी स्व.आदरणीय महाभाग श्री.लोकमान्य टिळकांनी केलेले ***गीतारहस्य***रूपी महत्कार्य व राष्ट्रकार्यही आपणास कळून आले. ***"स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।।२ -४०।।"*** हे वचन आपणास मार्गदर्शक जीवनसूत्रच आहे, हेही त्यानिमित्त आपल्या लक्षात आले.

***योगाचे पुनरुज्जीवन* हेच श्रीकृष्णांचे अवतारकार्य**

अशा धर्मास जेव्हा जेव्हा मंदावस्था प्राप्त होते, तेव्हा तेव्हा ***"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति ... ।।४ -७।।"*** यात सांगितल्याप्रमाणे भगवंतांचा अवतार होऊन धर्मास पुनश्च ऊर्जितावस्था येते. श्रीकृष्णावताराचे हेच प्रयोजन आहे. गीता हे त्यांचे साधन आहे. असे जे अवतार होतात, त्यांचे रहस्यही आपण जाणून घेतले.

मनु-ईक्ष्वाकू या परंपरेने भगवंतांपासून विवस्वानाद्वारे प्रसृत झालेल्या योगसाधनाचा कालांतराने नाश झाला. श्रीकृष्णावताराचे अत्यंत महत्त्वाचे प्रयोजन म्हणजे तो योग पुनरुज्जीवित करणे, हे होय. ते अर्जुनास गीता उपदेशून त्यांनी पूर्ण केले.

ईश्वरसाक्षात्काराचे दोन मार्ग असल्याचे ते सांगतातः ***"ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"*** अशा त्या दोन ***ज्ञान व कर्मनामक निष्ठा*** आहेत; उपासनापद्धती आहेत; योगमार्ग आहेत. ***ज्ञानयोग व कर्मयोग*** अशा नांवांच्या या दोन साधनांव्यतिरिक्त तिसरे कोणतेही साधन गीता सांगत नाही. पैकी ज्ञानयोगाचे अधिकारी साङ्ख्ययोगी दुर्मिळ असतात. शुकासारखा विरळाच कोणी असा ज्ञानयोगाचा अधिकारी असतो.

येर सर्व अबालवृद्ध, स्त्रीशूद्रादी केवळ कर्मयोगाचे पाईक होत. यांनाच गीता ***योगी* वा योगसाधक** असे म्हणते आणि तिसऱ्या अध्यायापासून जो गीतोपदेश आहे, तो प्रामुख्याने त्यांच्यासाठीच आहे. हाच ***क्रमयोग वा पंथराज*** या नावाने ज्ञानेश्वरीत सविस्तर वर्णिलेला आहे. हाच योग पुनरुत्थापित करणे हे कृष्णावताराचे सदाकरता चालू राहणारे मुख्य कार्य होते; इतर खलनिर्दालनादी कार्ये आनुषंगिक होत. ज्ञानेशही याच मुख्य योगोद्धाराच्या कार्याकरता अवतरले. संतांचेही हेच खरे अवतारकार्य असते.

गीतेचा योग

आत्म्याचे दर्शन करवणे हे संतांचे खरे कार्य आहे. आत्मा ही तर भगवंतांची श्रेष्ठातिश्रेष्ठ विभूती आहे. इंद्रिये, मन, बुद्धी इ.सर्वांच्या अतीत अशी ही आत्मविभूती आहे. ही दृश्यमान व्हावी; द्रष्टा-दृश्य-दर्शन ही त्रिपुटी लोप पावावी, यासाठी गीता योगमार्गाचा संदेश देते. कारण संसारी पुरुषाची काम व क्रोधांमुळे चलित अवस्था होते.

ज्ञानी जनांसही हे दुरासद शत्रू त्रस्त करतात. इंद्रिये हे त्यांचे आश्रयस्थान आहे. म्हणून त्यांचे नियमन केले की हे कामक्रोध रिपू परास्त होतात.

इंद्रियनियमन आणि मन-बुद्धि-अंत:करण यांचे नियमन करून आत्मप्राप्ती करून घेणे हा गीतेचा खरा योग आहे. त्यासाठी पंथराज आहे; क्रमयोग आहे; आत्मसंयमयोग आहे; ध्यानयोग आहे; भक्तियोग आहे; ज्ञानयोगही आहे; कर्मयोगही आहे; अशा या सर्वांचा मिळून गीतेचा योग खऱ्या अर्थी संपन्न होतो.

हा योग अभ्यासावा लागतो. त्यास म्हणूनच ***अभ्यासयोग*** असे पण म्हणतात. ***"तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।।३ - ४१।।"*** या श्रीकृष्णवचनापासून हा योग उक्त होतो. कामक्रोधांमुळे चित्त विचलित कसे होते, त्याचे सविस्तर वर्णन ज्ञानदेवांनी केले आहे. त्यातून सामान्यजनांना सोडवणे व त्यांना या योगमार्गास लावणे हे संतांचे अवतारकार्य आहे.

संत ही तर भगवंतांची चोखडी रूपडी! स्वसंवेद्य आत्म्याची अनुभूती देणे; ***पदपिंडाची गाठी*** जुळवून देणे, हे त्यांचे कौशल्य! सद्गुरू ते हेच संत! ज्ञानेशांचेही श्रीगुरुनिवृत्तिनाथ असेच आहेत. त्यांच्या कृपेचे वैभव सांगतांना ते म्हणतातः ***"मज हृदयीं सद्गुरु। जेणें तारिलों हा संसारपुरु।।१-२२।।"*** याच श्रीगुरुकृपेकरून ***"तें मियां नमिलें। आदिबीज।।१-२०।।"*** असे ते म्हणू शकले आहेत.

सद्गुरू

या गुरुकृपेच्या निदर्शक अशा ज्या आदिबीजाचा त्यांना साक्षात्कार घडला, त्याच्यावर श्रीगणेशाचे अक्षरवाङ्मयात्मक रूपक ते ज्ञानेश्वरीच्या आरंभी *ओवी क्र.१ ते २०*मधून कसे उभे करतात, तेही आपण सविस्तर पाहिले आहेच! ***द्वैताद्वैतविलक्षण*** असा तो श्रीगणेश आहे.

या मूळारंभीच्या ओव्यांतच ज्ञानेशांच्या चिद्विलासवादाचे बीज आहे. विश्वमोहिनी श्रीशारदा ही त्यांच्या या तत्त्वज्ञानाची अधिष्ठात्री देवता आहे. हीच ***कुंडलिनी जगदंबा*** हे आपणासारख्या विचक्षणांस मुद्दाम असे सांगायला नकोच! आत्मरूप श्रीगणेश, विश्वमोहिनी श्रीशारदा आणि सद्गुरूंना ग्रंथारंभी वंदन करून ज्ञानदेवांनी जे शिष्टसंमत औचित्य प्रकट केले आहे, त्याचेच पुनश्च दर्शन आपणास अमृतानुभवाथील पंचश्लोकांनिमित्त होते. तेथे श्रीगुरू आणि शिवशक्त्यद्वैत हे त्यांचे वंद्य होतात.

तत्त्वज्ञान मूर्त करून देणाऱ्या सद्गुरूंचे तर ज्ञानदेवांनी अपार वर्णन केले आहे. अध्यायाअध्यायागणिक त्यांनी सद्गुरूंविषयी जी भावांजली अर्पिली आहे, ती आपण सविस्तर पाहिली. ***"जाणतेन गुरु भजिजे। तेणें कृतकार्य होईजे।।१-२५।।"*** हा त्यांचा सर्वांना कळकळीचा उपदेश आहे. गुरुकृपेने त्यांचा हा ग्रंथ अवतरला आहे.

ज्या गीतेवर तो आविष्कार पावला आहे, ती आहे महाभारतात. गीतेचे आणि व्यासांचे महिमान ज्ञानदेवांनी स्पष्ट केले आहेच. पण त्यानिमित्ते अशा अप्रांतमति श्रीव्यासांच्या परमोत्कृष्ट गीतेवर ही टीका रचण्याचे सामर्थ्य त्यांना श्रीगुरू निवृत्तिनाथांनीच दिले आहे, अशी त्यांची श्रद्धाही ते स्पष्ट सागतात. ***"म्हणौनि मी प्रवर्त्तु लाहें। ग्रंथीं इयें।।"*** असे त्यांचे उद्गार लक्षणीय आहेत.

गीतेवरील भाष्य

गीतेवर भाष्य करणारे ज्ञानेश ती सातशे श्लोकांची ***"सप्तशति। मंत्रप्रतिपाद्य भगवति।।१८-१६६६।।"*** आहे, असे स्पष्ट करतात. विद्वानांमध्ये गीतेच्या निश्चित संहितेविषयी, तसेच पाठभेद, पदभेद, प्रक्षिप्त श्लोक व गीतेची मूळ श्लोकसंख्या, अर्थ इ.विषयी खंडीभर मतभिन्नता आहे. पण आपल्यापुरता तरी हा विषय या ज्ञानेशोक्तीद्वारे सुटला आहे. गीता ही सातशे श्लोकांचीच आहे, असे ज्ञानेशांनी म्हटले आहे.

जाताजाता ॲनी बेझंट व भगवानदास यांच्या गीतेचे वैशिष्ट्यही जिज्ञासूंच्या माहितीसाठी सांगितले पाहिजे. बरेच पाठभेद आणि गीतेतील कोणता शब्द कोणत्या श्लोकात आहे, याची सूची त्यांच्या गीताप्रतीत दिली आहे आणि ती अभ्यासकांना संदर्भासाठी खास उपयोगाचीआहे. असो.

सद्गुरुकृपेने आणि पूर्वसूरींमुळे ज्ञानदेवांना गीतेचा भावार्थ प्रकट करणारा हा ग्रंथ निर्मिता आला. नवव्या बिकट अध्यायावरही मुद्रा लावता आली. मोठमोठ्या थोरांचीही मती गीतेच्या प्रांतांत अचंबित होते. आचार्यादी मान्यवरांची मती गीतेपुढे कुंठित होते. अशा वेळी ते अशा कुंठितमति भाष्यकार- आचार्यादींना *(आचार्यातें)* वाट पुसत योग्य त्याठायी कसे पावले याचे आश्चर्य वाटते आपणासारख्या सामान्यांस!

त्यांना गीतार्थाची योग्य वाट दाखवणारे आचार्य कोण हा विद्वानांत मोठा विवादविषय झालेला आहे. ते आचार्य म्हणजे आद्यश्रीमच्छंकराचार्य की रामनुज, मध्व की इतर कोणी, असा हा वाद आहे. त्याचाही

यथामती आपण उलगडा केला आहे. खरे तर श्रीनिवृत्तिनाथ – त्यांचे सद्गुरू – हेच त्यांना गीतार्थाची वाट दाखवतात आणि **या ओवीत निर्दिष्ट केलेले भाष्यकार वा आचार्य दुसरेतिसरे इतर कोणीही नसून तेच त्यांचे *वाटाडे आचार्य म्हणजे गुरु होत.*** असो.

त्यानंतर आपण ज्ञानेशोक्त गीतामाहात्म्य पाहिले. गीता ही या जगी श्रीहरीची ***"मियां आत्मेनि पतिव्रता"*** अशी आहे. तिने आत्मज्ञान प्राप्त होते. **कर्मप्रासादावर ज्ञानरूपी कळस असतो. आत्मज्ञान होताच कर्म संपते. हा सगळा कर्ममार्ग *ईश्वरप्रणिधान - भक्ती* - या सहकाऱ्यासह आक्रमिला जातो. योगाशी ही भक्ती अभिन्न आहे**, हे सातवा अध्याय दाखवतो.

सद्गुरूंच्या कृपेने ही सर्व रहस्ये ज्ञानदेवांस अवगत होऊन आपल्यापर्यंत पोहोचवण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे, असे ते म्हणतात. बाराव्या अध्यायी तर ***सतरावियेचें स्तन्य*** देणारी माऊली असे ते श्रीगुरूंचे वर्णन करतात. गुरूच त्यांचे ***अक्षरगणेश,*** तेच त्यांचे ***आत्मगणेश,*** तीच त्यांचे योगसुखाचे सोहाळे दाखवणारी ***माऊली;*** तेच त्यांचे ***प्रज्ञाप्रभातसूर्य,*** तेच त्यांचा ***"मावळवितु विश्वाभासु। नवल उदैला चंडांशु";*** तेच त्यांचा ***चित्सूर्य;*** तेच त्यांचे ***जीवगणेंद्र!!*** चांगदेवांसाठी खाजे देणारे सद्गुरू तेही हेच!

गुरुऋण

अनेकानेक प्रकारे ज्ञानेश गुरुऋण फेडण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी मोठेमोठे संकल्प त्यांनी तेराव्या अध्यायी मांडले आहेत. त्यांनी केलेली अपरंपार गुरुसंस्तुतीही आपण पाहिली. अमृतानुभवातही त्यांनी गुरूंविषयी जे म्हटले आहे, तेही आपण पाहिले.

तेथे शेवटी नतमस्तक होऊन ते गुरूंचे ***अनाख्येय*** असे वर्णन करतात. ***अज, अव्यय, आनंदस्वरूप, अक्षर, अवर्णनीय*** असे हे निवृत्तिनाथ नावाचे त्यांचे गुरू आहेत; त्या गुरुशिष्यातली साक्षात गुरुरूपिणी, दयार्द्र चित्ताची अशी जी विद्या आहे, ती ***शाङ्करी*** म्हणून प्रसिद्ध आहे.

शिवशक्त्यद्वैतरूपी असे त्यांचे विश्व आहे; तेच या विश्वाचे आदी आहे; विश्वाच्या आदि-मध्यी-अंतीही तेच आहे आणि तेच नाही; तसेच नसूनही तेच भासते; अशी ज्ञानेशांची धारणा आहे, हे आपण अमृतानुभवातून पाहिले. यातच त्यांचा ***चिद्विलासवाद*** आहे. ***जीवन्मुक्ती* हेच त्यांचे ध्येय आहे.**

चिद्विलासाचे तत्त्वज्ञान

चिद्विलासवाद* म्हणजे जीव व शिव यांचा मूलतः असणारा अभेद कधीही न मोडताच ही जगत्क्रीडा अव्याहतपणे चालू आहे, हा सिद्धांत!** अमृतानुभवाचे श्लोक आणि सोळाव्या अध्यायातील **चिद्भ्रमरा**चे रूपक यांतून आपण ज्ञानदेवांचे हे चिद्विलासविषयक तत्त्वज्ञान आणि ते अनुभवण्याचा त्यांचा ***गुरुपदिष्ट, कुंडलिन्यधिष्ठित, लयात्मक, सगुणध्यानपर, गीतोक्त योगमार्ग यांचा पूर्वपरिचय करून घेतला, ते जिज्ञासूंना स्मरतच असेल!

सतराव्या अध्यायीही ते आपले हे द्वैताद्वैतविलक्षण तत्त्वज्ञान मांडत ***"प्रवृत्तिकर्णाचां चालीं। उठिला मदगंधानिलीं। पूजिजसिं नीलोत्पलीं। जीवभ्रमराचां। पाठीं निवृत्तिकर्णतालें। आहालीं तैं पूजा विधुलें। तेव्हलीं मिरविसिं मोकलें। आंगाचें लेणें।। वामांगीचां लास्यविलासु। तो हा जगद्रूपु आभासु। तो तांडवमिसें कलासु। दाविसिं तूं।।१७-६ ते ८।।"*** या खुणेच्या ओव्या रचतात. हाच भाव पहिल्या अध्यायी ***"द्वैताद्वैत तेचिं निकुंभ। सरिसें एकवटत इभ। मस्तकावेरीं।।१-१७।।"*** या ओवीत त्यांनी व्यक्तवला होता.

"स्वस्ति श्रीवटेशु। जो लपोनि जगदाभासु। दावीं मग ग्रासु। प्रगटला करी।।" ही चांगदेवपत्राची ओवी आणि ***"लिंगदेहकमलाचां। पोटीं वेंचतयां चिद्भ्रमराचां। बंदिमोक्षु जेयाचां। उदैलां होएं।।१६-४।।"*** या ओवीतून ***ज्ञानेशांचे तत्त्वज्ञान आणि योगमार्ग यांचे सूत्र*** सहज स्पष्ट होते. कसे तेही आपण पाहिलेच आहे.

याच चिद्विलासाच्या तत्त्वज्ञानाची खूण जागती ठेवण्यासाठी ज्ञानदेवांनी आपली ज्ञानेश्वरी आणि इतर अमृतानुभवादी ग्रंथ मागे सोडले आहेत आणि हेच तत्त्वज्ञान संजीवनसमाधी घेण्यामागचे प्रबळ कारण होते, असे म्हणता येते. सर्वच मायिक आहे, तर ग्रंथ कशाला, ते तत्त्वज्ञान कशाला, ती समाधी तरी कशाला आणि मुमुक्षूंसाठीच काय तर साऱ्या जगतासाठी ***पसायदान*** तरी त्यांनी का म्हणून मागावे! असो.

सहजसमाधीचे रहस्य

सद्गुरुकृपेने साधकास अवर्णनीय अशी महदानंदकंद अवस्था कशी प्राप्त होते, ते ज्ञानेश आपणास सखोल विवेचन करून सांगतात. ***कर्म-योग-ज्ञान व भक्ती* यांचा हा अभूतपूर्व संगम त्यांच्या ग्रंथात आहे.** त्यात मनसोक्त डुंबता यावे यासाठी ज्ञानेशांची कृपायाचना करत आपण त्यांच्या ग्रंथांतरीच्या सहजसमाधीच्या ठेव्याकडे कसे वळलो, ते जिज्ञासूंना अवश्य स्मरत असेल!!

ज्ञानदेवीचा संपूर्ण रसास्वाद घ्यावयाचा तर आपणास ***गीता-ज्ञानेश्वरीची योगशास्त्रविषयक भूमिका*** पाहणे अत्यंत महत्त्वाचे होते. श्रीज्ञानदेवांच्या कृपेने आपण सहजसमाधीचे दर्शन घेऊ शकलो; तिचे रहस्य आपणास अवगत झाले; आपणास त्या समाधीच्या गूढ गर्भगृहात जाण्याचा मार्ग गवसला; तेथे प्रवेशही मिळाला आणि आपण कृतार्थ झालो! गीतेतील ***महासिद्धांत*** त्याच्या अनेकानेक कक्षांसह, मिती आणि परिमाणासह ज्ञानाचा परमोत्कर्ष साधत आपणासमोर साकार झाला. ज्ञानेशांचे हे चिरंतन ऋण स्मरत स्मरत पुनः एकदा त्या सर्व सिद्धांतावर आणि योगप्रक्रियांवर एक धावता दृष्टिक्षेप टाकू या.

गीताटीका

श्रीगीता ही केवळ योगैकपर आहे. ***"श्रीमद्भगवद्गीतासूपनुषत्सु ... योगशास्त्रे"*** या प्रत्येक अध्यायीच्या मुद्रेने ***गीता ही ब्रह्मविद्या व योगशास्त्र* यांच्याशी संबंध असणारी आहे,** हे स्पष्ट होते.

गीतेच्या प्रत्येक अध्यायाची प्रचलित नावे, तसेच गीतेचे प्राचीन मान्यवर द्वैताद्वैतादी विविध मतांचे टीकाकार कोणकोण आहेत, ते आपण पाहिले. त्यानुसार गीतेचे द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, केवलाद्वैत, शुद्धाद्वैत, द्वैताद्वैत अशा अनेक पद्धतींनी अर्थ लावल्याचे दिसून येते. या विविध मतांचा परिचय आपणास ***ग्रंथामागील भूमिका*** या प्रकरणी झालेला आहेच.

आत्मबोधाची विद्या - श्रीगीता

गीता हा ***नरनारायण*** ऋषींचे अवतार जे अर्जुन व श्रीकृष्ण त्यांचा ***महाबोधपर संवाद*** असल्याने तो ***उपनिषद*** या संज्ञेस पात्र असून ब्रह्मविद्यांतर्गत कसा आहे, तसेच तो योगशास्त्राचा मेरुमणी कसा आहे, ते आपण पाहिले.***योगशास्त्र म्हणजे ब्रह्मस्वरूप पावण्याची, आत्मबोधाची विद्या होय.***

श्रेयसाची परमप्राप्ती त्वरित करून घ्यावी, असा गीता प्रत्येक अध्यायागणिक संदेश देते. जगाचा परम सद्गुरू अशा श्रीकृष्णाने ती मानवमात्राच्या कल्याणार्थ अर्जुनास शिष्य करून उद्बोधली, हे तर स्पष्टच आहे. श्रीहरी - गुरुकृपा हा या योगशास्त्राचा पाया आहे.

गीतामंदिर हे श्रीहरी पांडुरंगाचे हृदयमंदिर असे आहे. त्या गीताहृदयनिवासी श्रीकृष्णाचे दर्शन, त्याचा साक्षात्कार श्रीभवानी सप्तशृंगी जगदंबेच्या - कुंडलिनीमाउलीच्या अंकी विसावलेले ज्ञानराज ज्ञानेश्वरीद्वारे आपणास करून देतात; त्या साक्षात्कारास प्रत्यक्ष उपभोगून आपण धन्य झालो.

ज्ञानेश्वरांचे शब्दसामर्थ्य, त्यातील रसवत्ता, ब्रह्म उघडे भोगवण्याची त्यातील शक्ती, शब्दातीतास शब्दबद्ध करण्याचे त्यांचे चातुर्य, तत्त्वज्ञानाची अनुभूती देण्याची त्यांची क्षमता, अशा अनेकानेक गुणांचा परिपोष या ज्ञानेश्वरीत झाला आहे, ते आपण पाहिले.

ज्ञानेश्वरीच्या आदीचे गणेशरूपक, तन्निमित्त ज्ञानदेवांचा वेदोपनिषदादी अक्षरवाङ्मयाचा सव्यसाची व्यासंग, आद्यश्रीमच्छंकराचार्यांशी त्यांचे याबाबतचे समानधर्मत्व, ज्ञानदेवांच्या प्रगाढ अलौकिक प्रज्ञेचे त्यांनीच योगभ्रष्टाच्या वर्णनानिमित्त उकलून दाखवलेले गूढ, गीतेला धरूनच आपले विवेचन चालले असल्याबाबत त्यांनी दिलेला निर्वाळा, त्यांची आदिनाथ ते निवृत्तिनाथ ही गुरुपरंपरा व तिने रक्षिलेले समाधिधन ज्ञानेश्वरीद्वारे आपणा सर्वांस वाटण्याची त्यांची कळकळ, सातशे वर्षे झाली तरी ज्ञानेश्वरीचे सर्वत्रांस वाटणारे अगम्य आकर्षण इ.विषयही आपण पाहिले. तदनंतर आपण वळलो मुख्य विषयाकडे; तो म्हणजे योगासंबंधीचा भाग!!

उत्तररंग::::

गीता व पातञ्जलयोगसूत्रे

गीता व पातञ्जलयोगसूत्रे यांतील साम्यस्थले आपण पाहिली. यमनियमादींचे गीतोक्त वर्णन आपण पाहिले. अष्टांगांची मुख्य वैशिष्ट्ये गीतेतही कशी दिसून येतात, तेही आपण अवलोकिले. ज्ञानेश्वरांचे काय म्हणणे आहे, तेही आपण निरीक्षिले. त्यानिमित्त अमानित्वादी अष्टादश गुणांचे ज्ञानेश्वरकृत समग्र दर्शन आपण घेतले. समाधिविषयीचा पतञ्जलींचा विचार आपण गीतेशी ताडून पाहिला. ॐकार व परब्रह्माची उपासना यांचा परस्परसंबंध दोन्ही शास्त्रात तोच कसा आहे, तेही आपण पाहिले. ***ॐ या एकाक्षर ब्रह्माचे स्मरण करणे, हे ईश्वरप्रणिधान आहे.*** गीतेच्या सातव्या व सतराव्या अध्यायी याविषयी ठळक निर्देश आहेत.

ॐकारच आद्यतत्त्व ईश्वराचा वाचक आहे आणि त्याचा जप ईश्वराप्रत नेणारा आहे, हे रहस्य जाणणाऱ्या ज्ञानदेवांनी प्रथमारंभीची ओवी ॐकाराने प्रस्फुटित करत त्या आद्यास स्मरत, त्यास नमन केले आहे, हे आपणास ज्ञात झालेच आहे. ज्ञानेश्वर उगीच नाही गीतेस आणि अप्रत्यक्षरीत्या आपल्या ग्रंथास उद्देशून ***"आत्मा अवतरतें। मंत्रें इयें।।"*** अशी प्रशस्ती करत!!

योग साधण्यासाठी पतञ्जली चित्तवृत्तिनिरोधाचा पाया करतात, गीताही योगाने निरुद्ध झालेल्या चित्ताचाच आधार घेते. प्रारंभ ते शेवट येथपावेतो गीता व पातञ्जलसूत्रे यात प्रतिपादिलेला योगप्रकार समानच कसा आहे, ते आपण पाहिले. तसेच गीतेचा उपदेश श्रीकृष्णांनी स्वल्प काळात युद्धासारख्या ऐन प्रसंगी अशा योगयुक्त चित्तानेच पार्थास केला असल्यामुळे, ती विद्या ते त्याही प्रसंगी अर्जुनास क्षणार्धात समग्रपणे देऊ शकले, हेही आपणास समजून आले.

गीतेस ***काष्ठ समाधी*** अभिप्रेत नसून चालतीबोलती ***संजीवन समाधी*** हे तिचे लक्ष्य आहे, हे आपण जाणून घेतले व गीता व पतंजल्युक्त समाध्यवस्थांची तुलना करून, त्यांतील एकवाक्यताही आपण अनुभवली. पतञ्जलींची ***धर्ममेघ*** आणि गीतेची ***धर्म्यामृत*** ही समाधीची विशेषणे किती सारखी आहेत, हे कळून आपण अवाक झालो!! द्रष्टा-दर्शन-दृश्य या त्रिपुटीचा लोप करणारी ही अवस्था आहे.

या सर्व विचारांचे सार म्हणजे श्रीपतंजली योगाभ्यासाचे सूत्ररूपाने जे काही विवेचन करतात, तेच गीतेत सविस्तर उपदेशिले आहे. परंतु ईश्वरप्रणिधानास सुलभ मार्ग म्हणून प्रतिपादून गीता ***"ईश्वरप्रणिधानाद्वा।।१-२३।।"*** या पातञ्जलसूत्राचा परिपोष करते, हे आपण लक्षात घेतले.

पातंजलसूत्रांची योगशलाका उकलून गोपालकृष्णांनी त्यावर आपले उत्तम मत व्यक्त केले आणि त्यांनी **ईश्वरप्रणिधाना**तून ***कर्मयोग, भक्तियोग, ध्यानयोग व ज्ञानयोग*** यांचा आणि ज्ञानदेवांनी ***पंथराज -कुंडलिनीयोग वा क्रमयोग*** यांचा उगम त्याच मूळ सूत्रांतून कसा केला, ते आपण समग्र पाहिले. ***भक्ति***मार्गाचाही उगम येथेच आहे. ***"पातञ्जलसूत्रे -➤गीता -➤ज्ञानेश्वरी"*** असा उत्तरोत्तर सुस्पष्ट होत जाणारा आणि विस्तारपूर्वक सांगितलेला असा हा योगप्रवाह आहे.

तदनंतर आपण गीतेचे मानचित्र संक्षेपाने अध्यायागणिक पाहिले. स्वामी स्वरूपानंद ते कोणत्या दृष्टीने न्याहाळतात, ते त्यांच्या ***दैनंदिन ज्ञानेश्वरी***च्या निवडक १०१ ओव्यांतून दिसून येते. ज्ञानेश्वरीतील काही

विशेष ओव्यांतून आपल्यास अधिक सुयोग्य वाटणाऱ्या क्रमानुसार ते मानचित्र आपण पाहिले. ज्ञानेश्वरीचे सार अशा त्या ओव्या आहेत, असे म्हणण्याऐवजी आपण त्या ओव्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाची ओळख करून देणाऱ्या आहेत, असे समजू या!! या ओव्यांवरून मनाची बोटे फिरवत रहावे आणि हळूहळू ज्ञानदेवांच्या अंतरंगात उतरावे व ज्ञानेश्वरीच्या बृहत ओवीसंभारास अनुलक्षत गीताभ्यास अन योगाभ्यास करावा, इतकी या निवडक ओव्यांची थोर महती आहे!!!

गीतेचे प्रमुख योगसूत्र ईश्वरप्रणिधान

ईश्वरप्रणिधानाने समाधिप्राप्ती* हे गीता-ज्ञानेश्वरीचे प्रमुख योगसूत्र आहे.** त्रिपुटीचा लोप हे त्यांचे ध्येय आहे. ***अद्वयभक्तियोग तो हाच! कर्ममार्गाने याचे कर्मभक्ती वा कर्मयोग, योगमार्गाने कुंडलिनीयोग किंवा ध्यानयोग वा योगभक्ती, ज्ञानमार्गाने ज्ञानभक्ती किंवा ज्ञानयोग असे नामकरण करता यावे, इतके ***योग व भक्ती यांचे एकरूपत्व*** आहे.

गीता या योगाचे ***१)ज्ञानयोग व २) कर्मयोग*** असे दोन विभाग करते व ते ***१) साङ्ख्य व २) योगी*** यांच्याकरता आहेत, असे म्हणते. परंतु ते खरे तर ईश्वरप्रणिधानाच्या आवेगाच्या तीव्रतेनुसार शीघ्र व मंद अशा अधिकाऱ्यांनुरूपच आहेत, हे ज्ञानेशांनी आपणास ***"ओलखीसवेंचि पाविजे। तद्रूपता।।३-३६।।"*** या ओवीद्वारे सूचित केले आहे.

ज्ञानेशांचा योग: पंथराज

कर्मयोगमार्गाचेही **१) निर्गुण-निराकाराची उपास्ति व २) सगुण-साकाराची उपासना** असे दोन ध्येय्यविशिष्ट भेद होतात. पण गीता निराकारोपासना क्लिष्ट आहे असे म्हणत सगुणोपासनेचाच पुरस्कार करते. यावरूनच ज्ञानदेवांनी ***पंथराज*** ग्रथित केलाआहे. सहाव्या अध्यायी तो वर्णिला असून अठराव्या अध्यायी ***क्रमयोग*** म्हणून याच गीतोक्त मुख्य योगाचे त्यांनी साग्र विवेचन केले आहे.

त्यावरून ***कर्म, योग, भक्ती व ज्ञान*** यांचा सुरेख अद्वितीय संगम करणारा हाच ***क्रमयोग वा पंथराज*** गीता प्रशंसिते, हे कळून येते. ज्ञानेशांनी गीतेचा उपदिष्ट योग तो हाच, हेच प्रमेय प्रामुख्याने आपणापुढे सिद्ध केले आहे. ***गुरुपदिष्ट, कुंडलिनीसिद्ध, लयप्रधान, सामरस्यात्मक, सगुण ध्यानयोगपर*** असा हा योगच ***राजयोग*** वा ***महायोग*** होय, याची जिज्ञासूंनी पुरेपूर नोंद घेतली असेलच!!!

संतकृपा- गुरुकृपा - ईश्वरकृपा यांच्या पायावर हा योग उभारलेला आहे आणि त्याचे कर्मयोग, योग, ज्ञानयोग व भक्तियोग ही निव्वळ अंगे वा टप्पे होत!! ***"पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतींचा दंसु। परि दाऊनि गेला उद्देशु। महाविष्णु।।६-२९१।।"*** या परवलीच्या ओवीतून ज्ञानेशांचे या योगाच्या मुख्यत्वाविषयीचे प्रमाण ज्ञात झाले आहे! हा योग ***सोहोपा*** आहे, हे सांगणे न लगे!

नंतर आपण पातञ्जलयोगाच्या अष्टांगांचे ज्ञानेश्वरांनी गीतेनिमित्त कसे ठिकठिकाणी विवेचन केले आहे, त्या विषयाकडे वळलो. त्या वेळी परात्परगुरू श्रीगोरक्षनाथ यांनी या अष्टांगांचा आपल्या ***सिद्धसिद्धांतपद्धति*** या ग्रंथात कसा विचार केला आहे, ते पाहिले. अर्थात ज्ञानेश्वरीतील संबंधित विषयाची त्याच्याशी गुंफण घालतच!

"शुचौ देशे ..।।६-११।।" या श्लोकातील साधनास्थलाचे, आसनप्रक्रियेचे तसेच इतर अनेक सूक्ष्म तपशीलांचे साद्यंत असे विस्तृत विवेचन करत ज्ञानेशांनी पतंजलींचा **अष्टांगयोग**, गोरक्षनाथांचा याच योगांगांवरील ***सिद्धसिद्धांतपद्धती***तील विवेक, गीतेचे योगांगांवरील अंतरंगरहस्य अशी अनेकानेक योगविषयक उपयुक्त माहिती हातचे काहीही न राखता ज्ञानेश्वरीतून दिलेली असल्याचे आपण पाहिले.

पतंजलींची सूत्रे व भगवंतांची गीतोक्ती यांचा मेळ घालून आपल्या नाथसिद्धसंप्रदायाच्या अनुभवांती व परंपरेने चालत आलेले यौगिक विचारधन त्यांनी आपणापुढे प्रकट केलेले आहे. ते पाहत असता आपण **योगचक्रां**ची प्राथमिक माहिती करून घेतली.

मूलबंध, जालंधरबंध व वोढियाणा हे त्रिबंध, तसेच सुषुम्ना व इडा-पिंगला या प्रमुख योगनाड्या, प्राणायाम व प्रत्याहारक्रिया वा योगांगे, सद्गुरुकृपेचे या योगप्रक्रियेत असणारे अनिवार अनन्यसाधारण महत्त्व, कुंडलिनी व तिचे प्रबुद्धिकरण, योगाचे गंतव्य वा फल, प्रवृत्ति व निवृत्तीचा पंथराजातील मिलाप, आदिगुरू शंकरापासून प्रवाहित झालेला पंथराज, श्रीकृष्णांचे गीता सांगण्यामागील गूढ उद्दिष्ट असणारा पंथराज, योगमार्गाचे ज्ञानेशांना असणारे अप्रूप व त्याप्रीत्यर्थ त्यांनी प्रकटवलेले ***ज्ञानेश्वरी*** व ***अमृतानुभव*** हे ग्रंथ व त्यांची ***अभंगरचना,*** संजीवनसमाधी घेण्यामागील त्यांचा उद्देश इ.अनेक गोष्टी आपण पाहिल्या.

सर्वांच्या कल्याणार्थ त्यांनी पंथराज - हा क्रमयोग आपणापुढे सोपा मार्ग म्हणून ठेवला आहे आणि ***"कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"*** या भगवद्वचनाचे सार्थक केले आहे!! योगशास्त्र न रुचणाऱ्यांनी गीता-ज्ञानेश्वरीचे वरवरचे कितीही गोडवे गायले, तरी ते व्यर्थच नव्हेत काय! माउली अशांची गणना अज्ञानी म्हणूनच करते!!! भक्ती व योगशास्त्र यांना पूर्ण न जाणणारे अज्ञ म्हणूनच ***"योगयागविधी। एणें नोहें सिद्धि।।"*** या माउलींच्या अभंगाचा चुकीचा अर्थ लावून ज्ञानेश्वरी - गीता - योगशास्त्र यांना अतिक्रमून आपलेच अज्ञान प्रगाढ करतात!

पंथराजासाठी पात्रता

योगासाठी पूर्वप्राथमिक तयारी वा पात्रता कोणती याबाबत ज्ञानेशांनी ***"नांवेक विरक्तु। जाहाला देहधर्मीं नियतु। तऱ्हीं तोचि नव्हें वेवस्थितु। अधिकारियां।।६-३४२।।"*** या ओवीतून ***योग*** हा सर्वसामान्यांनी आचरावा असाच आहे, हे स्पष्ट करून भक्ती-भक्ती करून योग आणि भक्ती दोन्हीही न जाणणाऱ्यांच्या नेत्रात कसे अंजन घातले आहे, ते आपण पाहिले!! ***"युक्ताहार विहारस्य ...।।"*** व ***"नात्यश्नतस्तु योगोऽस्ति...।।६-१७ व १६।।"*** हे तर गीतेने योग साधण्यासाठी सर्वसामान्यांना प्रकाश देणारे दीपस्तंभच उभारले आहेत!! गौतमबुद्धांचेही विचार या विचारांशी कसे साधर्म्य दाखवतात, तेही आपण अगोदरच ***ग्रंथामागील भूमिका*** या सदरात त्यांच्या ***मध्यम***मार्गानिमित्त पाहिलेच!

यमनियम, आहारविहार, आचरण, आसन, प्रत्याहार व ***प्राणायाम*** या विविध योगविषयक अंगांचे परीक्षण आपण गोरक्षमत,

पतंजलींची योगसूत्रे, श्रीगीतेतील गोपालकृष्णांची उक्ती व श्रीज्ञानेश्वरांचे स्पष्टीकरण यांद्वारे केले.

योगाची पूर्वप्राथमिक तयारी::::

यमनियमादी आचरण व वृत्ती

त्यानंतर आपण वळलो ते याच योगांगांचे तपशिलवार विवेचन गीता व ज्ञानेश्वरीत ठिकठिकाणी विखुरले आहे, तिकडे! पूर्वी पाहिलेल्या गीतेच्या तेराव्या अध्यायाच्या सात ते अकरा या पाच श्लोकांतील **अमानित्वादी अष्टादशगुणसंपत्ती**च्या नामनिर्देशपर उल्लेखावर ज्ञानदेवांनी केलेले उणेपुरे सातशे ओव्यांचे यमनियमसूचक भाष्य त्यासाठी आपण विस्तारपूर्वक पाहिले. कारण हा तर योगाचा प्राथमिक व जिव्हाळ्याचा प्रांत आहे.

त्यानिमित्त या गुणांच्या विरोधी असणारे **अज्ञानवाचक गुण**ही आपण ज्ञानेशांच्या नजरेतून पाहिले आणि गोपालकृष्णांच्या ***"एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा।।१३-११।।"*** यात अभिप्रेत असलेल्या ज्ञानविरोधी गुणसमूहाचा ज्ञानेश्वरीत विस्तृतपणे रेखाटलेला अवनतीदर्शक आलेख पाहिला.

आपला आपणच उद्धार करावा व आपणच आपली अवनती करून घेतो, असे ***"उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।।६-५।।"*** हे गीतावचन किती समर्पक आहे, त्याचेच बृहत चित्रीकरण आपण ज्ञानेशांनी केलेल्या या ***ज्ञान*** व ***अज्ञान***गुणलक्षणांच्या व तदनंतर ***दैवी व आसुरी*** **संपदां**च्या वर्णनाद्वारे पाहतो. या सर्व वर्णनात व्यक्त झालेले प्रमुख विचार उजळणीसाठी नमूद करणे इष्ट आहे.

ज्ञानगुण

१) अमानित्व - आपले मोठेपण लोकांस दिसूच नये, इतकी ***निरहंकारिता*** म्हणजे हा गुण.

२अ) एकांतसेवन - हे त्याला आवडते. वृक्षवल्लींशी त्याचे सोयरेपणाचे नाते असते. याविरोधी गुण म्हणजे मानासाठी हावरेपणा आणि लोकाचाराची अति आवड असणे.

२ब) अदंभित्व - आपण केलेल्या शतपुण्यकृत्यांनाही प्रकट न करणे, अभ्यास न मिरवणे ही लक्षणे म्हणजे दंभराहित्य. अध्यात्मचर्चा करतांनाच असा मनुष्य आपली विद्वत्ता प्रकट होऊ देतो; अन्य अनात्म विषय- शास्त्रे यातील त्याची गती केवळ त्यालाच ठावे, असे तो वर्ततो.

३) अहिंसा - जैनादींचे अहिंसक वर्तन कसे अर्धवट आहे, हे सूचित करत सव्वाशेएक ओव्यांतून ज्ञानदेवांनी आपली ***अहिंसा*** या गुणाची व्याख्या स्पष्ट केली आहे. या विषयाचे त्यांना फार महत्त्व वाटते. विश्वबंधुत्वाचा अहिंसा ही पाया आहे. ***पूर्व***मीमांसेत निर्देशिलेल्या यज्ञयागादीतील आणि औषधींसाठी कराव्या लागणाऱ्या आयुर्वेदातील हिंसेलाच अहिंसा ठरवण्याचा वैदिकांचा व आयुर्वेदाचा विचार त्यांना बाष्कळ वाटला असल्यास नवल नाही.

सानुले जीव परमाणूंतही असतात, हे जाणून ***"कारुण्यामाजिं पाऊलें। लपवूनि चालें।।; तो वाट्ठ कृपेचि करितु। .. जीवातळीं आंथरितु। आपुला जीवु।।१३-२४८,२४९।।"*** या श्रेणीची ज्ञानदेवांची अहिंसा आहे!! ***कायिक, वाचिक व मानसिक*** अशा त्रिमितीत संचरणारी अहिंसा त्यांनी विशद केली आहे. अशा गुणास वागवणारा मनुष्य म्हणजे ज्ञानाचे मंदिरच होय, असे ते म्हणतात.

पतंजलींनीही अहिंसेस ***यम*** मानून त्याचे फल म्हणजे भूतमात्रांची साधकाप्रति निर्वैर वृत्ती होणे, हे सांगितले आहे. अशाला परमात्मा सहजच प्राप्त होतो, असे गीताही म्हणते, इतके या गुणाचे माहात्म्य आहे.

ज्ञानदेवांनीही श्रीकृष्णांचे हे मनोगत ओळखून ***अहिंसा*** या गुणावर एवढे विस्तृत विवेचन केलेले आहे. आपण ते सर्व पाहिले आहेच. इंद्रिये व मन यांचा घनिष्ट संबंधही त्यात दाखविला आहे. मन हे योगसिद्धीसाठी प्रमुख पायाभूत असल्याने, त्याचे महत्त्व ओळखण्यास आपणास ज्ञानदेवांचे साहाय्य होते, ते असे!

४) क्षांती - सुखदुःख समान असणे. द्वंद्वे सहजभावाने भोगणे, सर्वत्र समचित्त असणे, स्थितप्रज्ञता असणे, याचे नांव क्षांती!

५) आर्जव - मनाचे निर्मलत्व व सरलत्व, ऋजू वृत्ती, सुष्ट-दुष्ट असे भेद न करात सर्वांशी सहजसौजन्यपूर्वक वर्तणूक म्हणजे ***आर्जव.***

६) आचार्योपासना - गुरुसेवा हा तर ज्ञानदेवांचा अत्यंत प्रेमाचा विषय आहे. ***गुरु*** हा शब्दच त्यांना एका अलौकिक अवकाशात घेऊन जातो आणि ***ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी आणि अभंगरचना*** यांतून त्याविषयी अगणित विचार व्यक्त करवतो. याचा आपण विस्तारपूर्वक परामर्ष घेतला आहेच.

७) शुचित्व - पाण्याने हिरा जसा भिजत नाही, त्याप्रमाणे अंगी ***शुचित्व*** असणाऱ्या पुरुषाच्या मनोवृत्ती विकल्पांनी कधीच लिप्त होत नाहीत. आंतर व बाह्य पावित्र्य, कर्मे करतांना मनाचे असे निर्लेपपण, विषयात वर्तत असतांनाही विषयांचा चित्तास स्पर्शही न होणे, या श्रेष्ठतेचा हा गुण ज्ञानेशांनी वर्णिला आहे. ***अंतर्यामी ज्ञान व बाहेर कर्मसंन्यास*** *(जनकासारखा, कर्मे करूनही)* अशी या शुचित्वाची व्याप्ती आहे.

८) स्थैर्य - ***"स्थिरसुखमासनम्"*** यामागचे खरे रहस्य येथे प्रकटते. क्षीरसमुद्रातील लाटांचे तांडव जसे मंदराचलास कापवू शकत नाही, तसे विषयोर्मींनी कितीही ग्रासण्याचा प्रयत्न केला, तरीही मनोवृत्तींनी अखंड निष्कंप असे परमात्म्यात लीन असणे, या गुणास ज्ञानेश ***स्थैर्य*** म्हणून वाखाणतात. आचार्यांनीही त्यांच्या ***अपरोक्षानुभूति*** या प्रकरणग्रंथात अशा स्थितीसच ***सिद्धासन*** ही संज्ञा देऊन गौरवले आहे.

९) आत्मविनिग्रह - ***आत्म्याचा विशेष निग्रह किंवा आत्मसंयम, मनोनिग्रह, इंद्रियदमन म्हणजे आत्मविनिग्रह!*** पतंजलींच्या परिभाषेतील ***प्रत्याहार*** तो हाच! ज्ञानदेव तर या आत्मविनिग्रहाची मजल थेट ***"समाधीचें सेजेंपासिं। बांधुनि घालीं ध्यानेंसिं। चित्त चैतन्यसमरसिं। आंतुं रते।।१३-५०९।।"*** एथपावेतो नेऊन पोहोचवतांना आपण पाहिलेच आहे.

या गुणवर्णनाच्या निमित्ताने पंथराजाची सर्व योगांगे त्यांनी अवघ्या पाच-सहा ओव्यांतून निर्देशिली आहेत. आपण त्या सर्व गोष्टींचा विस्तृत मागोवा घेतला आणि त्याच वेळी ***यमनियम, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी*** या पतंजल्युक्त योगविशिष्ट अंगांचा त्या सर्वांशी मेळ घालून पाहिला.

सगुण व निर्गुण ध्यानविषय, गोरक्षमते प्रत्याहार, कुंडलिनीचे प्रबुद्धिकरण, गोरक्षमते धारणा, पतञ्जल्युक्त संयम, गोरक्षमते ध्यान व समाधि, विभूतिध्यान इ.विषय तन्निमित्त आपण चर्चिले. गीतेचा सगुण ध्यानावरील मुख्य भरही आपण तेव्हा पाहिला. श्रीशंकराचार्यांची या योगांगांवरील मते आपण त्या संदर्भात ***अपरोक्षानुभूति***द्वारे संपादली.

या सर्व विवेचनाद्वारे आपणास योगभूमीचे बरेचसे पूर्वप्राथमिक ज्ञान झाले. तसेच ***आत्मरत चित्त असणे,*** हेच ज्ञानदेवमते आत्मविनिग्रहाचे स्पष्ट रूप आहे, ही मौलिक गोष्ट आपल्या निदर्शनास आली.

१०) विषयवैराग्य - ऐहिक व पारलौकिक विषयोपभोगांविषयी पूर्ण विरक्ती असणे म्हणजे विषयवैराग्य! हे प्रत्याहाराचेच सहोदर भावंड आहे.

११) अनहंकारित्व - सर्व कर्मे करत असूनही कर्तेपणा व कर्मफल यांना न शिवणे, किंबहुना आपण देहात वास्तव्य करत आहोत, याचीही शुद्ध नसणे म्हणजे ***अनहंकारित्व*** वा ***निरहंकारिता.*** यानिमित्त आपण अहंकाराच्या सूक्ष्म पातळ्यांचीही माहिती करून घेतली. द्वैत व द्वैतातीत अवस्थांचा त्या संदर्भात आपण विचार केला.

१२) जन्ममृत्यु-जरादी दोषांपासून निवृत्ती - जवळजवळ ऐंशी ओव्यांतून ज्ञानेश या दोषांकडे लक्ष देऊन वेळीच सावध होऊन आत्मोद्धारास त्वरित प्रवृत्त होण्याचे सुचवतात. गौतमबुद्धांना हे दोष पाहून आलेल्या विरक्तीची आठवण व्हावी, इतके ज्ञानेशांचे वर्णन प्रभावी आहे.

१३) अनासक्ती - देह, दारा, पुत्र, वित्त, गृह, स्थावर-जंगम संपत्ती इ.सर्वांवर ममता नसणे म्हणजे अनासक्ती हा गुण होय.

१४) सुख व दुःख यांत समचित्तत्व असणे - हाही गुण ज्ञानेशांनी वर्णिला आहे, पण अत्यंत संक्षेपाने. कारण इतरत्र त्याचे गीतेद्वारे बरेच विवेचन केले आहे.

१५) अनन्यभक्ती - पतंजल्युक्त *ईश्वरप्रणिधान* हीच गीतेची अनन्यभक्ती. समाधिसिद्धी देणारी ही योगसाधना आहे. कायावाचामनेकरून भगवंतावाचून दुसरे काहीही चांगले नाही, हा निश्चय याचा पाया आहे. भगवंताशी अनन्य झाल्यावरही जो भक्त त्याची उपासना करतो, तो अद्वयभक्त म्हणजे मूर्तिमंत ज्ञानच होय, असे ज्ञानदेव म्हणतात.

१६) एकांतप्रियता - याचे सहाव्या अध्यायी बरेच वर्णन आहे. येथेही गिरी, वने व निर्मनुष्य स्थळे यांची आवड सूचित केली आहे.

१७) अध्यात्मज्ञानाची एकांतिक आवड - मन व बुद्धी केवळ अध्यात्माकडे लावणे, आत्मज्ञानाव्यतिरिक्त इतर सर्व विषय बाजूस सारणे, भवस्वर्गादींचा विचारही न करणे, यावर निर्धारपूर्वक ठाम असणे, असे या आवडीचे गमक आहे. तसेच ज्ञान होऊनही त्याचे ज्ञान नसणे, हे *(अमृतानुभवातील)* ***ज्ञानखंडणलक्षण*** तर ज्यात मूर्तच प्रकटते, असा हा गुण!

१८) परतत्त्वाचे आकलन *("तत्त्वज्ञानार्थदर्शनम्")* - बुद्धी परतत्त्वापर्यंत जाऊन पोहोचून ज्ञानाच्या उजेडात जे जे दिसते, ते ते परमात्मतत्त्वच आहे, असा निश्चय होणे. हाच खरा ज्ञानलाभ!

अज्ञानलक्षणे

ही ज्ञानगुणलक्षणे वर्णून झाल्यानंतर ज्ञानेशांनी तशीच सुस्पष्टपणे अज्ञानगुणलक्षणेही सांगितली आहेत. ती साहजिकच ज्ञानलक्षणविरोधी आहेत. त्यानिमित्त त्यांनी ***१) मानसन्मानाची हाव, २) दंभ, ३) हिंसक वृत्ती, ४) अक्षांती ,५) कुटिलता व ६) आचार्यद्रोह*** हे प्रमुख अज्ञानगुण प्रकट केले आहेत.

आचार्य या विषयानिमित्त आपण अमृतानुभवाचे ***"गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्या हि शाङ्करी। ..।।"*** व सोबतच्या तत्त्वज्ञानपर पंचश्लोकीचा तेव्हा परामर्ष तर घेतलाच, पण अमृतानुभवातील महत्त्वाच्या अशा गुरुसंस्तुतिपर व गुरू आणि परब्रह्माचे एकरूपत्व दाखवणाऱ्या ऐंशी ओव्यांचाही सुदीर्घ असा रसास्वादही चाखला.

नाथतत्त्वज्ञान व त्या अनुषंगाने ***ज्ञानदेवांचा चिद्विलासवाद*** यांचा उत्तम परिचयही तेव्हाच आपणास झाला. द्रष्टा-दृश्य-दर्शनातीत होऊन **श्रीगुरुकृपेने *चारही वाचाऋणे* फेडणारे ज्ञानेश** त्यानिमित्ते आपणास गुरू म्हणून लाभले! केवढे हे आपले भाग्य!!!

त्यानंतर आपण उर्वरित अज्ञानलक्षणे पाहिली, ती अशीः

७) अशुचित्व, ८) मनाची अस्थिरता व मनाचे चांचल्य, ९) आत्मविनिग्रहाचा अभाव वा असंयम, १०) विषयासक्ती वा अवैराग्य, ११) अहंकार, १२) जन्ममृत्यु-जरा इ.दोष न दिसणे - मनुष्यजन्माचे सार्थक करून घेण्याची बुद्धी नसणे, १३) देह, गृह, दारादीविषयक आसक्ती असणे, १४) इष्ट अनिष्टप्राप्तीने हेलावणे, १५) व्यभिचारी भक्ती - कामना धरून देवादिक पूजणे, १६) एकांतवासाची नावड व जनसंपर्काची आवड, १७) अध्यात्मज्ञानाची नावड व १८) परतत्त्वदर्शन व आकलन यांविषयीची अक्षमता.

अर्थातच गीतेच्या पदाची कोरही न सांडता ज्ञानदेवांनी ***"मूळध्वनिचिएं वाढी"*** स निमित्त होतहोतच हे विस्तृत विवेचन उभारले आहे आणि तशी ग्वाहीही आपणास त्यांनी *ओवी क्र.१३-८५३* मध्ये दिली आहे!!

दैवीगुणसंपदा

ज्ञान प्राप्त व्हावयाचे तर मुमुक्षूंना त्यायोग्य व्हायला हवे. तेराव्या अध्यायींचे ज्ञनगुण आपण पाहिले व नंतर सोळाव्या अध्यायी *श्लोक क्र.१६-१ ते ३* मधून वर्णिलेले ***दैवी संपदगुण***ही निरीक्षिले. त्याच वेळी आपण तद्विरोधी आसुरी गुणांचाही परिचय करून घेतला.

गीतेच्या नवव्या अध्यायीचे ***"राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिता: ।।९-१२।।"*** असे या विषयाचे सूतोवाच व त्यावरील ज्ञानेशांचे विवेचन आपण पाहून नंतर हे दैवीसंपद्गुण ज्ञानेशांच्या आधारे परीक्षिले. दैवी संपद धारण करणाऱ्यांच्या चित्तात ***"मी होऊनि असें क्षेत्रसंन्यासी ।।९-१८८।।"*** असे श्रीकृष्ण म्हणतात. ते **दैवीसंपद्गुण** असे आहेत:

१) अभय – निरहंकार वृत्ती झाल्यावर अद्वैतभावाने संसारात वावरतांना जन्ममृत्यूच्या भयाची वार्ताही नसणे, ते भय नष्ट होणे, म्हणजे अभय होय.

२) सत्त्वसंशुद्धी – मनाचे संकल्पविकल्प हे गुण टाकून बुद्धीने स्वस्वरूपी लीन होणे, हे या गुणाचे लक्षण आहे.

३) **"ज्ञानयोगव्यवस्थिती"**– ***"साङ्ख्ययोगौ पृथग्बाला: प्रवदन्ति न पण्डिता: ...।।५-४।।"*** यात **साङ्ख्यांचा ज्ञानयोग** व **कर्मयोग्यांचा *योग*** या दोन्ही निष्ठांचे एकरूपत्व दाखवले आहे. त्यातील कोणत्याही एका निष्ठेला चित्त वाहणे म्हणजे हा गुण!

४) दान – श्रांत जीवांना तोषवण्यासाठी जे काही देणे शक्य आहे, ते ते देणे यास ***दान*** म्हटले आहे. दानासंबंधी अधिक विवेचन सतराव्या अध्यायी येते.

५) दम – दम म्हणजे ***इंद्रियांचे दमन*** करणे. हा तर योगाचा मूळ टप्पा आहे, हे ***"तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ।।३-४१।।"*** या गीतावचनावरून स्पष्ट होते.

६) याग – यज्ञाचे स्वरूप आपण अगोदरच्या भागात पाहिले होते. ***द्रव्ययज्ञ, ज्ञानयज्ञ ते ब्रह्मयज्ञ*** असे विविध प्रकारचे यज्ञ गीतेने निर्देशिले आहेत. याज्ञिकांचे स्वर्गादी कामना धरून केलेले वर्तन भगवंतांनी अधिक्षेपिले आहे. **वर्णाश्रमाधिकारपरत्वे स्वकर्मे करावीत, पण कर्तृत्वाभिमान न धरता व ती फलाशेसह भगवंतांस अर्पण करणे, हाच खरा *यज्ञ* वा *याग* होय,** असे येथे ज्ञानदेव म्हणतात.

७)स्वाध्याय – श्रुतींनी प्रतिपादित केलेला ***ईश्वर गोचर व्हावा*** म्हणून त्यांचा निरंतर अभ्यास करणे, द्विजांनी ब्रह्मसूत्र अभ्यासणे , इतरांनी नाममंत्रादी व स्तोत्रादी जपणे, यास ज्ञानदेव ***स्वाध्याय*** म्हणतात. परतत्त्वदर्शनासाठी स्वाध्याय आवश्यकच आहे. पातञ्जलयोगसूत्रात त्याची नियमांमध्ये गणना होते.

८) तप – आत्मस्वरूप प्रकटावे म्हणून प्राण-इंद्रिये-शरीर यांची आटणी करणे यास ***तप*** असे म्हणतात.

९)आर्जव – सर्व प्राणिमात्रांप्रति सौजन्यभाव ठेवणे, हे ***आर्जव*** होय.

१०) अहिंसा – जगाला सुख व्हावे असे कायावाचामने वर्तणे ही ***अहिंसा*** होय. हिचा पतञ्जली यमात अंतर्भाव करतात.

११) सत्य – सत्य हा पतञ्जल्युक्त ***यम*** आहे. ज्ञानदेवमते ***सत्य*** या शब्दाचा अर्थ जरी सत्यभाषण असा असला, तरी आध्यात्मिक दृष्ट्या ***सत्य*** म्हणजे महात्म्यांच्या अंगी जे ***परतत्त्वाचे साक्षात दर्शन करून देण्यास समर्थ असणारे बोल*** असतात, ते धारण करण्याचा दैवी गुण होय.

१२) अक्रोध – क्षोभण्याची कितीही कारणे असली तरीही क्रोधोर्मी प्रकट न होणे म्हणजे ***अक्रोध*** होय. हा व ***क्षांती*** हे परस्परपूरक गुण होय. क्षांती म्हणजेच ऋजुता!

१३) त्याग – अहंकार त्यागल्याने अवघ्या संसाराचा त्याग होतो. हाच खरा ***त्याग*** होय. निरहंकारिता हा याचा पूरक गुण आहे.

१४) शांती – ***ज्ञेयास गिळून त्याच्यापाठोपाठ ज्ञाता व ज्ञानदेखील खरोखर नाहीसे होणे यास ज्ञानेश शांती असे म्हणतात.*** त्रिपुटीचा लोप म्हणजे शांती! ही जीवाशिवाच्या भेटीतून प्रकटते. ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।१२-१२।।"*** या गीतोक्तीतील ***शांति*** व तदनुरूप ***ज्ञान, ध्यान, अभ्यास व कर्मफलत्याग*** यांचा अर्थही शांतीच्या याच अर्थास अनुलक्षून करावा लागतो. कसा ते आपण सविस्तर पाहिलेच आहे. गीतेचा हा श्लोक स्पष्टपणे ***पंथराज*** या साधनासोपानाचा निर्देश करतो, तेही आपण ध्यानी घेतलेच आहे.

१५) अपैशून्य – अधमाचाही उत्तमाप्रमाणेच आपल्या दृष्टिक्षेपाने उद्धार करणे म्हणजे अपैशून्य होय. ***"जैं खलांचिं व्यंकटी सांडो"*** अशा कृपेचे अवतरण करणारा, त्यांचे दोष निर्देशितही न करता पतितांना पावन करतो.

१६) भूतदया – भूतदया हा सर्वेश्वराची प्राप्ती करून देणारा गुण आहे. सर्व भूतांप्रति कृपालूवृत्ती व करुणेचा भाव, त्यांचे दु:ख आपलेच भासणे, अशी ***महाविदेहावृत्ती*** हीच भूतदया होय.

१७) अलोलुपत्व – विषयांपासून आत्यंतिक निवृत्ती हेच अलोलुपत्व होय.

१८) मार्दव – खरे विश्वबंधुत्व म्हणजे मार्दव होय.

१९) ऱ्ही – म्हणजे जन्ममरणाची लाज! ***"जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम्।।१३-८।।"*** अशी बुद्धी म्हणजे ***ऱ्ही*** होय.

२०) अचापल्य – ज्ञानेश याचा अर्थ इंद्रियांचा प्रत्याहार करणे असा करतात.

२१) तेज – श्रुत्युक्त ***"क्षुरस्य धार:"*** अशा **शून्याच्या अवघड योगमार्गावरून वाटचाल करण्यास दक्ष असणे,** हे आध्यात्मिक तेज ज्ञानदेवांस या गुणाद्वारे अभिप्रेत आहे.

२२) क्षमा – सर्व दु:खे सहन करूनही आपल्या सहनशक्तीच्या गर्वाचा स्पर्शही न होणे, हीच खरी क्षमा होय.

२३) धृती – क्षोभजनक परिस्थितीतही धैर्याने शांत राहून ईश्वरप्राप्तीच्या मार्गापासून विचलित न होणे हा गुण म्हणजे धृती होय.

२४) शुचित्व – शरीराने व मनाने ***निष्काम आचरण*** व अंतरी परिपूर्ण ***आत्मानात्मविवेक*** ही शुचित्वाची अंगभूत लक्षणे होत.

२५) अद्रोह – सर्व भूतांच्या हितात रत असणे, हा गुण म्हणजे अद्रोह होय. त्याच्या अर्थाचा एक श्लेष असाही आहे की ***सर्वभूतहिते*** म्हणजे जे ***अव्यक्त निरालंब ब्रह्म*** *(ओवी क्र. १२-६०),* त्याच्याशी रत असणे.

२६) **अमानित्व** - कितीही मानमान्यता प्राप्त झाली, तरी निगर्वी असणे, हे या गुणाचे लक्षण होय.

याच सव्वीस गुणांच्या ज्योती उजळून श्रीगीता आपल्या पतीला - आत्मराजाला - ओवाळत असते, असे ज्ञानदेव म्हणतात.

आसुरी संपदा

त्यानंतर दैवीसंपदेस विरोधी असणारी आसुरी संपदा आपण पाहिली. त्यात ज्ञानेश पुढील गोष्टींचा समावेश करतातः

१) **दंभ** - स्वतःच्या धर्मकृत्यांचा डांगोरा पिटणे, यास दंभ असे म्हटले जाते.

२) **दर्प** - स्त्रिया, विद्या, धन, स्तुती, बहुमान, सुखोपभोग इ.च्या योगे मत्त होणे व इतरांस तुच्छ लेखणे, हा दर्प होय.

३) **अभिमान** - ईश्वरतत्त्वात लीन न होणे, ईश्वरास न मानणे, ईश्वरप्रणिधानाचा विरोध करणे यांचा अंतर्भाव अभिमान यात होतो.

४) **क्रोध** - मत्सरी वृत्तीस ज्ञानेश क्रोध असे म्हणतात.

५) **पारुष्य** - अंतर्बाह्य कठोर वृत्तीस पारुष्य अशी संज्ञा आहे.

६) **अज्ञान** - पापपुण्य, कर्म-अकर्म, विधि-निषेध यांना न जाणणे याला अज्ञान म्हटले आहे.

दैवी संपदा मोक्षदायक आहे, तर आसुरी संपदा बंधनकारक असते. आसुरांची बुद्धी भ्रष्ट असते आणि ते आपल्या धर्मघातक प्रवृत्तींचे तर्कनिष्ठ समर्थन करतात. त्यांचे मत नास्तिकतेस उचलून धरते व ईश्वर नाहीच, असा त्यांच्या बुद्धीने ठाम निश्चय केलेला असतो. कामोपभोग हेच ते परमसुख व जीवनहेतू मानतात. त्यासाठी अन्यायीरीत्या अर्थ संपादतात. आढ्यता तर त्यांच्या हाडीमांसी भिनलेली असते. अशा अनेक प्रकारे विभ्रांत चित्त झालेल्या आसुरांचे अपवित्र नरकात गमन होते.

गोपालकृष्णांनी गीतेच्या सोळाव्या अध्यायी हा विषय वर्णिला आहे. त्यास अनुसरत ज्ञानदेवांनी केलेले भाष्य आपण पाहिले. आसुरांचे यज्ञ म्हणजे पाखंडी क्रियाच होत. त्यांचे वर्तन सर्वांतर्यामी वसणाऱ्या परमात्म्याचा द्वेष व निंदा करणारे असते. अशा लोकांना गीताशास्त्र सांगू नये, असे ***"इदं ते नातपस्काय ... ।।१८-६७।।"*** या श्लोकातून श्रीकृष्णांनी स्पष्ट सांगितलेलेच आहे! त्यांचा उद्धार न होता, उलट भगवंत त्यांना अनंत कालासाठी आसुरी योनींमध्येच ढकलून देतात! ते अधमगती पावतात. ***काम, क्रोध व लोभ हे या आसुरी प्रवृत्तीचे मूळ आहे.*** ही नरकप्रवेशाची तीन द्वारेच होत, असे श्रीकृष्णांनी सांगितलेले आहे.

साधनापथ

काम-क्रोध-लोभ या त्रयीपासून मुक्त झालेला पुरुष खरे सुख पावतो. तो मोक्षमार्गावर चालू लागतो. तेथे सज्जनांची संगत व सच्छास्त्रप्राप्ती होऊन तो जन्ममृत्युरूपी दाट काननातून सुखरूप बाहेर पडतो. मग त्याला आत्मानंद वसलेले गुरुकृपारूपी नगर लागते. त्या नगरातच त्याला ***"भेटे माऊली आत्मा"!*** आणि या जन्ममृत्युरूपी संसाराचा त्याच्यामागील ससेमिरा संपतो, असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे! कामक्रोधादींना जो वश होतो त्याला ना धड ऐहिक सुख मिळते, ना पारलौकिक! म्हणून मनुष्याने सच्छास्त्र प्रमाण मानून त्यास अनुसरावे, असे गीता म्हणते.

ज्ञानदेवांचा चिद्विलासवाद

योगास पायाभूत असणाऱ्या ***यमनियम-आसन-प्रत्याहार*** यांचा आपण पूर्वपरिचय करून घेतला. त्यास अनुसरून पुढे सतराव्या अध्यायी आलेला त्रिगुणात्मक चर्येचा विषय आपण नंतर पाहिला. त्यासाठी ***त्रिगुणात्मिका प्रकृती*** व तदनुषंगाने ***विश्वव्यापार*** यांकडे प्रथम आपण वळलो. त्यासाठी गीतेचा सातवा अध्याय व त्यातील अष्टधा प्रकृती इ.चे विज्ञान आपण जाणून घेतले. ***१) पृथ्वी, २) आप, ३) अग्नी, ४) वायू, ५) आकाश, ६) मन, ७) बुद्धी व ८) अहंकार*** अशी अष्टधा प्रकृती असून तिला ***अपरा*** वा जड प्रकृती असे म्हणतात.

तिच्याहून वेगळी जी **जीवरूपा चेतन प्रकृती** तिला ***परा*** असे म्हटले आहे. पराप्रकृतीच हे जगत धारण करते. हे सर्व जगत परमात्माच आहे. त्याच्यावाचून जगात काहीही नही. ***"सूत्रे मणिगणा इव"*** असे हे जगत भगवंताठायी ओवलेले आहे. गीता *श्लोक क्र.७-१ ते ४* यांत विश्वाची संरचना, उत्पत्ति-स्थिति-लय, जीव व विश्व आणि परमात्मा यांचा परस्परसंबंध इ.सर्व गूढ स्पष्ट केलेले आहे.

आत्म्याठायी आत्मरूपाची सृष्टी असा चिद्विलासवाद येथे स्पष्ट आहे. ज्ञानदेवांचा ***विश्वात्मक देव*** याच स्वरूपाचा आहे. त्यांचा ***अमृतानुभव***ही याच अनुभूतीला व्यक्तवतो. ज्ञानदेवांच्या ***चिद्विलासवादी*** तत्त्वज्ञानाची स्फूर्तिदात्री गंगोत्री म्हणजे हीच *७-१ ते ४* चतुःश्लोकी आहे!!

ज्ञानेशांनी हा सगळा विषय अप्रतिमरीत्या सुस्पष्ट केला आहे. ते आपण अवलोकिलेच आहे. ***सूत्रात्मा व सृष्टी, विश्वात्मा व विश्व, प्रकृति व आत्मा*** यांचे भिन्नत्व नाही; ते केवळ एकच आहेत, असा सिद्धांत प्रस्थापित करणाऱ्या प्रज्ञावानांची - श्रीगोपालकृष्णांची व श्रीज्ञानेश्वरांची - महती आपण पामर किती गाणार! हे प्रमेय स्पष्ट करण्यासाठी सातव्या अध्यायीही श्रीकृष्णांनी आपल्या काही निवडक विभूती ***"रसोहमप्सु कौन्तेय ..।।७-८ ते ११।।"*** या चार श्लोकांतून व्यक्तवलेल्या आपण पाहिलेल्याच आहेत.

हे सर्व विशद करत भगवंत अर्जुनास म्हणतात, ***"आईसें अनादि जैं सहज। तैं मी गां विश्वबीज। हें हातातलीं तूझ। देईजत असे।। मग उघड करूनि पांडवा। जैं हें आणिसिल सांख्यांचियां गांवां। तैं तेयाचां उपेगु बरवा। देखसिल।।७-४२,४३।।"***

विश्वाचे सनातन आदिबीज परमात्माच आहे, हे श्रीकृष्ण मुद्दामच स्पष्ट सांगत आहेत. त्यामुळे आपल्या बुद्धीचा सर्व प्रकारच्या सैद्धांतिक विवादांचा भ्रम नाहीसा होईल आणि सांख्यांनी निरूपिलेला प्रकृति-पुरुषादी तत्त्वांचा सिद्धांत नीट परीक्षिता येईल, असा त्यामागे त्यांचा हेतू आहे, असे ज्ञानेश म्हणतात.

गीतारहस्य

त्रिगुणात्मिका माया व तिचे दुस्तरपण याबाबत सातव्या अध्यायातील श्लोकांवरील ज्ञानेशांचे ***मायानदी***च्या रूपकाद्वारे प्रकटलेले अप्रतिम भाष्यही आपण नंतर पाहिले. ***"एथ एकचि लीला तरलें। जैं सर्वभावें मज भजलें। तेयां ऐलिकडेंचि सरलें। मायाजल।।७-९७।।"*** ही त्यांची परवलीची साधनासंकेतदर्शक ओवी गीतेचे रहस्य सहजच सांगून जाते.

अर्जुनाचे सप्तप्रश्न

भगवंतांनी सातव्या अध्यायाअंती ***"मयि सूत्रगणा इव"*** हा विषय पुढे नेत ***"जरामरणमोक्षाय ... साधियज्ञं च ये विदुः। ... ते विदुर्युक्तचेतसः।।७-२९,३०।।"*** असे म्हणून अर्जुनाची जिज्ञासा चाळवली होती. त्यास अनुषंगित असा प्रश्न अर्जुन आठव्या अध्यायी विचारतो. तो म्हणजे ***"किं तद्ब्रह्म ...। .. नियतात्मभिः।।८-१,२।।"*** **ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ** या संज्ञांचे स्पष्टीकरण करावे असे त्याने श्रीकृष्णांना म्हटले.

त्यावर ***"अक्षरं ब्रह्म परमं ..। .. अधियज्ञोऽहमेवात्र .. वर।।८-३,४।।"*** असे स्पष्टीकरण श्रीकृष्णांनी अभिव्यक्त केले. त्यावर ज्ञानेशांचे विवरण आपण पाहिलेच आहे. ते म्हणतातः

१) ब्रह्म - सर्व विश्वात भरून राहिलेले सूक्ष्मातिसूक्ष्म तत्त्व, सर्व विश्वाची ज्यापासून उत्पत्ती झाली, समस्त विश्वात सतत असणारे व विश्वाचा प्रलय झाला तरी आपल्या मूळ स्थितीत विद्यमान राहणारे, विश्वात भरून राहूनही आपल्या सहज स्थितीला काहीही उणेपणा न येऊ देणारे, असे हे ब्रह्म वा परब्रह्म आहे.

२) अध्यात्म - परब्रह्माची नित्यता, अखंडता, चिदानंदैक्यरसता, अक्षरत्व, मूळ अव्यय स्थिती, तिला अध्यात्म अशी संज्ञा आहे.

३) कर्म - विश्वात्मा व विश्व यांचा जो परस्परसंबंध तो म्हणजे कर्म होय. शून्यातून ब्रह्मांडाचा पसारा होऊनही त्याचा कर्ता गोचर नाही; कारण काहीच नाही; तरीही हे जगद्रूपी कार्य आपोआपच निर्माण होऊन प्रसार पावते. अव्यक्तातून हा विश्वाकार निर्माण होतो; ही अनंत छटांनी, विविधतेने विनटलेली सृष्टी व तिच्यातील अगणित जीवराशी, चर-अचर, स्थावर-जंगम पदार्थ त्यात उत्पन्न होतात. अशी ही जी स्थिती - हा जो व्यापार, त्यास ***कर्म*** म्हणतात.

४) अधिभूत - ***क्षरभाव*** म्हणजे ***देह*** हे अधिभूत होय.

५) अधिदैव - **पुरुष** वा ***जीव*** म्हणजे उपभोक्ता तो अधिदैव होय.

६) अधियज्ञ - देहांतर्यामी राहणारा, सर्व उपाधींपासून अलिप्त असणारा ***आत्मा*** म्हणजे **अधियज्ञ** होय.

वास्तविक ***अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ हे एकच होत.*** द्वैताभासाने विश्व दिसत-भासत असले, तरी विश्व व विश्वात्मा यात अद्वैतच आहे, ही अमृतानुभवाची कल्पना ज्ञानेशांनी येथे परत मांडलेली आपण पाहिली. हीच अद्वैतकल्पना आपण योगासंदर्भात पतञ्जलींच्या ***"क्षीणवृत्तेरभिजातस्येव .. ।।१-४१।।पा.यो.सू.।।"*** या सूत्रातील समापत्तिविषयक स्फटिकशिलेच्या दृष्टांतातून पाहिली.

७) अंतकालची गती - यौगिकदृष्ट्या द्वैत मिटवून, या सर्वांचे - अधिभूतादींचे अधियज्ञाशी अद्वैत साधण्यासाठी, ज्ञानदेवांनी ज्ञानाग्नीस संतोषवून ज्ञानयज्ञ कसा संपन्न करावा, ती ***पंथराजयोगयुक्ती*** *८-४६ ते ५३ व ५१ ते ६८* या ओव्यांतून सांगितली, ती आपण पाहिली. हा यज्ञ अधियज्ञास प्रकटवतो. हे रहस्य हस्तगत केलेल्या पुरुषांस अंती मुक्ती प्राप्त होते. **योग्यांची अंतकालीची गती कशी असते,** या अर्जुनाच्या सातव्या प्रश्नाचे उत्तर यात भगवंत देतात.

यज्ञाचा विचार

या ***यज्ञ*** कल्पनेचा संबंध चौथ्या अध्यायातील यज्ञविषयाशीही कसा येतो, ते नंतर आपण विस्ताराने पाहिले. त्यातून ज्ञानाग्नीची ठिणगी अशी जी ***कुंडलिनी,*** ती कशी जागृत होते, ***"मोटकी औटवळणी"*** अशी ती सर्पिणी मग हा ज्ञानयज्ञ कसा संपन्न करते, तो भाग आपण संक्षेपाने पाहिला.

प्राणायामपर असे यज्ञप्रकार पाहतांना आचार्यांच्या ***योगतारावलि***तील ***केवलकुंभक, नादानुसंधान, बंधत्रयादी*** या भागाचीही योगाभ्यासाच्या दृष्टीने अधिक माहिती करून घेतली. साहजिकच तद्विषयक सहाव्या अध्यायी ज्ञानेश्वरीत वर्णिलेला भागही आपण पाहिला. ***सहजामनस्का*** ही आचार्यवर्णित ***योगतारावलि***तील अवस्थाच ज्ञानेश्वरांनी ***"उन्मनीचे लावण्य"*** व ***"जंव मनाचा पटु फाटे"*** या शब्दांतून व्यक्त केली आहे.

सर्व यज्ञ कर्मोद्भव आहेत. ***"न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्। ...।।३-५।।"*** असे गीता सांगते. कर्माशिवाय मनुष्याचा क्षणही जात नाही. म्हणून कर्मासच यज्ञरूप करावे, निष्काम कर्माने यज्ञरूप परमात्म्यास प्रसन्न करून घ्यावे, असा ***कर्मयज्ञ*** वा ***ब्रह्मयज्ञ*** संपन्न करण्यास श्रीकृष्ण उपदेशतात. त्यासाठी संतांची सेवा करावी व हा यज्ञ करण्याची वाट त्यांना विचारावी. त्यासाठी सश्रद्ध अंतःकरणाची आवश्यकता असते. हे यज्ञचक्र अवगत केले की मोक्ष हा ठेवलेलाच आहे! असो.

विश्वव्यापार

विश्वव्यापारविषयक विज्ञानाचा हा *सातव्या, आठव्या, नवव्या, तेराव्या व चौदाव्या* अध्यायी येणारा भाग आपण विस्तृतपणे पाहिला. त्यासाठी प्रथम तेराव्या अध्यायातील ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ*** या ज्ञानेशांनी अतिविस्तार केलेल्या गीतोक्त कल्पनेचा आपण साद्यंत पाठपुरावा केला. ***"ऋषिभिर्बहुधा गीतं ...।।१३-४।।"*** असा हा अनेक प्रकारे सर्व दार्शनिकांनी, विद्वानांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी चर्चिलेला व अनेक वादांस प्रसवलेला विषय आहे.

लो.टिळकांच्या गीतारहस्योक्त ***ब्रह्मांडाचा वंशवृक्ष*** या संकल्पनेचा परिचय करून घेऊन, त्याच्यातून ज्ञानदेवांच्या या विषयावरील विवेचनास अनुसरून आपण ***सुधारित वंशवृक्ष*** तयार केला. क्षेत्राचे ***"महाभूतान्यहङ्कारो ... ।।१३-५,६।।"*** यात वर्णिलेले छत्तीस विकारही आपण ज्ञानदेवांच्या आधारे सविस्तर पाहिले. या संदर्भात

आचार्यांची ***पंचीकरण*** ही संकल्पना व गोरक्षांचे ***सिद्धसिद्धांतपद्धति***द्वारे प्रकट केलेले मतही आपण परीक्षिले.

ज्ञान व ज्ञेय यांचा परिचयही आपण ज्ञानेश्वरीद्वारे करून घेतला. ***प्रकृति-पुरुष*** यांनाही आपण जाणून घेतले. ***आत्मा-अनात्मा*** हा विचारही आपण पाहिला. हा सर्व सुदीर्घ अभ्यास करण्याचे कारण असा ***"क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा। भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम्।।१३-३४।।"*** हा गीताश्लोक काय म्हणतो, तेही आपण समजावून घेतले. ***विज्ञानासहित ज्ञान देणे व ते आपण घ्यावे हा गीतेचा उद्देश स्पष्टच आहे***

ज्ञानेश्वरीची वैशिष्ट्ये

या तेराव्या अध्यायातूनच उद्भवलेला व चौदाव्या अध्यायी ***"मम योनिर्महद्ब्रह्म .. ।।१४-३।।"*** असा प्रवर्तलेला ***त्रिगुणात्मिका*** मायेचा विषय आपण चौदाव्या अध्यायाधारे पाहिला. ***"म्हणौनि जग परौतें। सारूनि पाहिजें मातें। तैसा नोहें ऊखितें। आघवें मीचि।।१४-१२७।।"*** हे चिद्विलास प्रकटवणारे वाक्य म्हणजे ज्ञानदेवांचे महावाक्यच म्हणा ना! तसा **हा चिद्विलासवाद *"ॐ नमो जी आद्या। .."* या पहिल्याच ओवीपासून प्रकटला आहे.**

ॐकाराच्या तीन मात्रांनी व्यक्त विश्व व अर्धमात्रेने अव्यक्त जाणले जाते. ***"द्वैताद्वैत तेंचि निकुंभ"*** असणारा ***गणराज*** हा आद्यतत्त्व तर आहेच, पण स्वसंवेद्यही आहे. सकल मतीचा प्रकाशक असणाऱ्या - सर्व जाणिवांचे प्रकाशन करणाऱ्या या अक्षरगणेशाच्या रूपाने हा ***चिद्विलास*** बागडतो. **ज्ञानदेवांनी मंडित केलेले हे *चिद्विलासाचे तत्त्वज्ञान* आणि त्यांची *गुरुपदिष्ट* अशी *कुंडलिन्यधिष्ठित योगप्रणाली* ही ज्ञानेश्वरी या ग्रंथाची ठळक वैशिष्ट्ये होत.** असो.

आपण सत्त्व, रज व तम या त्रिगुणांचा ज्ञानेश्वरीच्या चौदाव्या अध्यायातील विषय अभ्यासला. त्यातसुद्धा त्रिगुणांचे विश्वसर्जन आणि विश्वव्यापारातील स्थान आपण जाणून घेतले. ***सत्त्वगुणाची विवृद्धी* अंती कशी मोक्षदायक ठरते, तेही आपणास कळून आले. कर्मे करण्याचे हे एक सूत्रच त्यानिमित्त आपणास गवसले.**

तेराव्या अध्यायी पाचव्या व सहाव्या श्लोकांवर छत्तीस तत्त्वांच्या क्षेत्राचा जो परिपोष केला होता; साङ्ख्यांची प्रकृत्यादी चोवीस तत्त्वे व पंचविसावा पुरुष यांचे जे तत्त्वज्ञान आहे; काळवादी इ.ची जी विश्वोत्पत्तिविषयक महत्तत्त्वादिसंबंधीची तत्त्वज्ञाने आहेत; त्रिगुणातीत, जागृति-स्वप्न-सुषुप्तिव्यतिरिक्त जी तुर्या आहे; किंबहुना तुर्यातीत असे जे आहे; ते सर्वच, जे सर्वोत्तम आहे, त्यात विरून जातात, असे ***"पैं महदादि परिपाटीं। विचारूनि सेंवटीं। विचारासगट पोटीं। जिरौनि जाय।। छत्तिसां सदतिसावें। चोविसां पंचविसावें। दोनिं नुरौनि स्वभावें। चतुर्थ जैं।। आईसें जैं सर्वोत्तम। जालें असें तेयां सुगम।..।।१४-२२३,२२४,२२५।।"*** या ओव्यांतून ज्ञानदेवांनी सांगून सर्व विसंवादी भासणाऱ्या तत्त्वज्ञानांचा शेवट गोड केला आहे!!!

सर्व तत्त्वज्ञानांचा चिद्विलासात समन्वय करून ज्ञानेश आपला महासिद्धांत सिद्ध करतात, तो असा!

साक्षात्काराचे तत्त्वज्ञान म्हणजे गीता-ज्ञानेश्वरी

त्यानंतर गुणातीतावस्थेचे आपण चौदाव्या अध्यायातूनच घडलेले दर्शन घेत पुनीत झालो. ***"मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते। स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते।।१४-२६।।"*** अशी तेथे जीवन्मुक्तीची ***अव्यभिचारी भक्ती*** ची योगयुक्ती सांगितली आहे.

ज्या चिद्विलासाचे तत्त्वज्ञान ***महासिद्धांत*** म्हणून ज्ञानदेव सांगतात, त्यास अनुरूप असाच साक्षात्कार ही भक्ती करून देते. ***"वासुदेव: सर्वम् इति"*** हाच तो साक्षात्कार! हीच ती अनुभूती! ***"सगुणु निर्गुणु एकु गोविंदु रे।"*** या अभंगातून हीच अनुभूती ते वर्णितात! ***अमृतानुभव*** तर केवळ याच साक्षात्कारदर्शनासाठी प्रकट केला आहे! इतके महत्त्व या विषयाचे आहे!!

"परि माझें आराधन। ब्रह्मत्वीं होएं सोपान। एथ मी हन साधन गमेन हो।। तऱ्हैं झनैं झनैं आईसें। तूझां चित्ती पैसें। पैं ब्रह्म आन नसें। मी वांचौनि।।१४-४०२,४०३।।" या ओव्या आणि *१४-२६ व २७* या गीताश्लोकांवरील ***शाङ्करभाष्य*** यातील एकतानता या संदर्भात उल्लेखनीय आहे, तेही आपण पाहिले.

मुळात आपण यमनियम-आसनादी बहिरंग योगांगाच्या परीक्षणानिमित्त आणि ज्ञानेशांच्या चिद्विलासाच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून घेण्याच्या हेतूने ही वाटचाल आरंभली. पण अवचितच असे समाधीच्या मेरुशिखरी सतत येत गेलो आणि यातच ज्ञानदेवांच्या मार्गदर्शनाचे खरे रहस्य दिसून येते!!

गीतेचा हेतू

सोळाव्या अध्यायी श्रीकृष्णांनी निश्चित निर्णय केला की मनुष्याने कर्तव्य व अकर्तव्य कोणते हे जाणून शास्त्रास अनुसरून कर्मानुष्ठान करावे. अर्जुनास आता सतराव्या अध्यायी अशी शंका येते की शास्त्र जाणणे हे अत्यंत अवघड आहे. तर योग्यरीत्या कर्मनुष्ठान व्हावे तरी कसे! तेव्हा प्रथम श्रीकृष्णांनी मनुष्यमात्रांच्या जन्मोजन्मींच्या धर्म-अधर्मादी संस्कारवश प्रकट होणाऱ्या स्वभावानुरूप श्रद्धेचे **सात्त्विक, राजसिक आणि तामसिक** असे जे ***श्रद्धात्रय*** सांगितले ते आपण पाहिले.

तदनुसार त्यांच्या हातून घडणाऱ्या कर्मांची फले, तसेच त्यांचे आहारविहारादी आपण पाहिले. श्रद्धेनुसार ***यज्ञ-दान व तप*** यांचेही त्रिविध प्रकार कसे होतात, तेही आपण जाणून घेतले. त्यानंतर आपण ***कर्म, योग, ज्ञान व भक्ती*** या चतुष्ट्याचा गीतेत जो विचार केला आहे, त्याचा अनुबंध गीतेच्या अठराही अध्यायांचा संक्षिप्त विचार करत पाहिला.

***ज्ञान* आणि *योग* या दोन निष्ठा व त्यांचे आचरण,** तसेच त्याप्रीत्यर्थ आवश्यक तेवढे तत्त्वज्ञान व विज्ञान यांच्या निरूपणाचा हेतू ठेवून गीता रचली असल्याचे आपणास त्यावरून कळलेच आहे.

क्षराक्षरविचाराचा हेतू:वैराग्यभावना

त्यानंतर आपण विश्वव्यापाराचा उर्वरित भाग पाहण्यासाठी पंधराव्या अध्यायातील ***क्षर, अक्षर व उत्तमपुरुष*** विचाराकडे वळलो. त्यातील अश्वत्थाचा विचार हे स्पष्ट करतो की हे जग किती क्षणभंगुर आहे. त्या अव्यय भासणाऱ्या ***अश्वत्थाची संकल्पना*** आपण विविध वेदोपनिषदांच्या आधारे सविस्तर पाहिली.

माया आणि ब्रह्म यांचा परस्परसंबंधही आपण त्यानिमित्त ज्ञानेश्वरीद्वारे अभ्यासला. विश्वोत्पत्तिविषयक कल्पनाही तेव्हा प्रकट झाल्या. अश्वत्थविचाराद्वारे सविस्तर विवेचन करत ज्ञानदेव हा संसार किती क्षणैक आहे, हे मुमुक्षूंच्या मनावर स्पष्टपणे ठसवतात. त्यामुळे योगाभ्यास आणि अध्यात्मसाधनेसाठी अत्यावश्यक अशी प्रथम पायरी असणारे वैराग्य प्राप्त व्हावे आणि ज्ञानजिज्ञासा उत्पन्न व्हावी, हा हेतू त्यांच्यासमोर आहे. किंबहुना गीतेतील पंधराव्या अध्यायाचे हेच एक प्रयोजन आहे!

भवमूळाचे छेदन: ज्ञानखड्ग

अव्यय भासणाऱ्या अशा या अश्वत्थाचे म्हणजे भवमूळाचे छेदन करण्यास ज्ञानखड्गच हवे. ***आपण ब्रह्म आहोत*** या शुद्ध अद्वैतधारणेच्या सततच्या मननाच्या सामर्थ्याने ते सावधपणे पेलावे. ते खड्ग, ब्रह्म आणि साधक हे मननाच्या सामर्थ्याने जेव्हा एकरूप होतात, तेव्हा ज्याच्यावर घाव घालावयाचा तो अश्वत्थ दिसेलच कसा! तो त्या क्षणीच नष्ट होतो!

आणि ***"मग इदंतेसि वालिलें। जैं मीपणेंविण डाहारिलें। तैं रूप पाहीजे आपुलें। आपणचि।।१५-२६७।।"*** अशी आत्मावस्थित स्थिती प्राप्त होते; परमधाम प्राप्त होते! ***"यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम्।।१५-६।।"*** असे ते श्रीहरीचे निवासस्थान आहे! त्या परमेश्वराच्या धामाचे अप्रूप आपण तेव्हाच्या निरूपणातून पाहिलेच आहे.

जीवाचे स्वरूप

जीव हा परमात्म्यापेक्षा विभिन्न आहे की जीव व परमात्मा यांचे अनादिसिद्ध एकत्वच आहे हा तत्त्वज्ञानात बहुचर्चित ठरलेला विषय उकलवत ज्ञानेशांनी ***"तैसें ज्ञानाचिएं दिठीं। मजसिं अभिन्नचि किरीटी। एर भिन्नपणें तैं उठीं। अज्ञानास्तंव।।१५-३३४।।"*** असा निर्वाळा दिला आहे. ***"ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः.. ।।१५-७ ते ९।।";*** तसेच ***"उत्क्रामन्तं स्थितं वाऽपि... । ... नैनं पश्यन्त्यचेतसः।।"*** या *गीताश्लोक १५-१० व ११* यांवरील विवेचनातून ज्ञानेश हा जीवात्मा-परमात्मा यांचा संबंध व थोडक्यात ***क्षेत्रक्षेत्रज्ञविचार*** आपल्या चिद्विलासाच्या तत्त्वज्ञानाचा परिपोष करत पुनः स्पष्ट करतात.

सर्वत्र परमात्माच कसा भरला आहे, हे व्यक्त करत ***"विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्।।१०-४२।।"*** या उक्तीस स्मरत भगवंत पंधराव्या अध्यायी ***"यदादित्यगतं तेजो .. । .. सर्वस्य चाहं ..।।१५-१२ ते १५।।"*** या श्लोकांतून आपल्या विभूती परत विस्तारित करतात.

त्यावर अर्जुनास ***उपाधिरहित चैतन्य*** कसे असते, असा प्रश्न पडल्याचे ज्ञानेश म्हणतात आणि त्याची उकल व्हावी म्हणून गीतेतील ***क्षराक्षरोत्तमपुरुषविचार*** प्रस्तुत करतात. तो पाहतांना आपण या श्लोकांसंबंधित आचार्यभाष्याचा भागही पाहिला आणि यमनियमांपासून सुरू केलेल्या आणि नकळतच आसनस्थैर्य-प्राणायाम-प्रत्याहार या योगांगांतून समाधीकडे वळलेल्या आपल्या निरूपणाचे साद्यंत सूत्रही निरीक्षिले.

पंधरावा अध्याय व साधनचातुष्ट्याचा समन्वय

उत्तम पुरुष म्हणजे परमात्माच हे आपण जाणून घेतले आणि ***"स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत।।१५-१९।।"*** या श्लोकातील रहस्य असा गीतेचा साधनासंकेतही यथार्थ जाणून घेतला. तसेच हे गूढ असे गीताशास्त्र पंधराव्या अध्यायी सांगून झाले असल्याचा आचार्यांनी दिलेला संकेतही आपण पाहिला.

"आईसियांलागिं सर्व प्रकारीं। जैसा कल्लोळु अनन्य सागरीं। तैसा मातें अवधारीं। भजिन्नला जो।।१५-५६८।।" ही ओवी या रहस्याचे समारोपन करणारी आहे. **हीच पुरातन योगधारा होय, जी परमात्म्याने विवस्वानास उपदेशिली होती आणि मनु-इक्ष्वाकु अशी संक्रमित होत होत जनकादिंपर्यंत पोहोचली होती.**

"सेविलीं अमृतसरिता। ... ज्ञानचि कलसु वलघें तैसां। कर्मप्रासादां।। ... म्हणौनि ज्ञानियां पुरुखां। कृत्य करूं सरलें देखा।। ..।।१५-५८३ ते ५८७।।" या चार ओव्यांतून ज्ञानेश गीतेतील या योगाचें - कर्म, भक्ती, योग व ज्ञान या साधनचतुष्ट्याचे, मंदिराच्या रूपकाने समालोचन कसे करतात, ते आपण पाहिलेच आहे.

ज्ञानोत्तर कर्मे करावीत की कर्मसंन्यास करणे योग्य, या आचार्य, लोकमान्य इ.मान्यवरांनी बहुत चर्चिलेल्या विषयावर आपण ज्ञानेश्वरीच्या आधारे केलेले विवेचनही थोडक्यात पाहिले होते. ज्ञानोत्तर कर्मे करणे हेच गीतेस मान्य असल्याचे दिसून येते. त्याच समयी आपण ज्ञानदेवांनी अठराव्या अध्यायी प्रकटवलेली गीताध्यायसंगतिही पाहिली.

गीता-ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा भाग

मग आपण जीव-जगत-जगदीश्वर यांच्यासंबंधांवरील जे काही गीतेतील विविध अध्यायी केलेले विवरण आणि त्यावरील ज्ञानेश्वरांचे, आद्यश्रीशंकराचार्यांचे, लो.टिळकांचे इ.विचार पाहिले, त्यांचे सर्वसमावेशक असे विश्लेषण केले. त्याद्वारे या कल्पना आपणापर्यंत अधिक ठळक अशा रूपात पोहोचल्या.

तृतीयाध्यायी ***कर्म-वेद-ब्रह्म,*** सप्तमाध्यायी ***अपरा-परा-परमात्मा (मी)***, आठव्या अध्यायी ***कर्म, अधिभूत-अध्यात्म, अधिदैव-अधियज्ञ, ब्रह्म;*** तेराव्या अध्यायी ***क्षेत्र-क्षेत्रज्ञ-परमात्मा, अनात्मा (प्रकृति)-आत्मा, भूते-ब्रह्म;*** चौदाव्या अध्यायी ***महद्ब्रह्म-परमात्मा (मी)*** आणि पंधराव्या अध्यायी ***अश्वत्थ-परमपद, इंद्रिये-प्रकृति-***

ईश्वर, क्षरपुरुष-अक्षरपुरुष-उत्तमपुरुष; या विविधसंज्ञित स्तरातून ***जीव-जगत-ईश्वर यांचा संबंध*** विविध पारिभाषिक शब्दांतून व्यक्तवलेला आहे.

त्याचे आपण तीन स्तरात - निम्न, मध्यम व श्रेष्ठ अशा श्रेणीत-वर्गीकरण केले. त्याद्वारे जीव, जगत व ईश्वर यांना सानुरूप समान अशा तीन वर्गांत या सर्व संज्ञांचे समावेशन कसे केले जाऊ शकते, ते आपण पाहिले. या सर्व संज्ञांचा मेळ मग आपण उत्क्रांत केलेल्या ***विश्वाची उभारणी-संहारणी*** या तत्त्यातील वर्गीकरणाशी- ***१) ना प्रकृति ना विकृति, २) मूल प्रकृति व ३) प्रकृति-विकृति*** यांच्याशी घालून त्या तत्त्याचे आपल्या विश्लेषणातून प्रकट झालेले सुधारित चित्र अवलोकिले.

विविध साधनाउपक्रमांचा समन्वय

या सर्व विवेचनातून स्पष्ट होणारा ईश्वरात लय करण्याचा मार्गही आपण निरीक्षिला. त्या मार्गाच्या विविध मिती कोणत्या आहेत, त्याही आपण पाहिल्या.

१) आत्मतृप्ती, आत्मरती व आत्मसंतुष्टता, २) भगवंतास शरण जाणे, ३) अनन्यभक्तियोग, ४) क्षेत्रक्षेत्रज्ञज्ञान व भूतप्रकृतिमोक्षसाधन, ५) पुरुष व प्रकृतीचे तिच्या गुणांसहित ज्ञान, ६) विनाशी भूतांठायी समत्वाने स्थित असणाऱ्या परमात्म्यास ओळखणे, ७) प्रकृती कर्तृत्त्वशील आहे, ती कर्मे करवते व आत्मा अकर्ता आहे, याचे ज्ञान, ८) भूतप्रकृतिमोक्षज्ञान, ९) त्रिगुणांचे कर्तृत्व व आत्म्याचे अकर्तृत्व यांचे ज्ञान, १०) अव्यभिचारी भक्तियोग, ११) ज्ञान्यांस शरण जाणे व १२) संसारासक्ती सोडणे आणि पुरुषोत्तमास जाणून घेऊन त्याला ज्ञानपूर्वक सर्वभावेकरून भजणे, अशा विविध मितींचे हे साधन वा मार्ग आहे. त्यात ***१) ज्ञान, २) योग, ३) भक्ती व ४) निष्काम कर्म*** या चतुर्विध योगधारेचा कसा समन्वय होतो, तो ज्ञानेश्वरप्रणीत ***पंथराज*** या योगप्रणालीद्वारे आपण पाहिला.

कर्म व संन्यास

त्यानंतर आपण अठराव्या अध्यायी कर्मविश्लेषणात्मक जो भाग येतो, तिकडे वळलो. कारण कर्म हे सर्व साधनेचे आदी, मध्य व अंत असे आहे. तसेच ***कर्मसंन्यास*** या विषयाचाही ज्ञानेश काय निर्णय करतात, तेही आपण पाहिले.

प्रथमतः गीताश्लोकांतून या विषयाचा आपण संगतवार विचार केला. ***कर्म, त्याग व संन्यास*** या कल्पना त्यांद्वारे जाणून घेतल्यावर आपण याबाबतचे श्रीमच्छंकराचार्यांचे विचार पाहिले. त्या सर्वांचे मंथन करून ज्ञानदेवांनी जे नवनीत काढले आहे, ते म्हणजे ***"म्हणौनि कर्मफलु लागु। सांडौनो देहसंगु। कर्मे करावी हा चांगु। निरोपु माझां।।१८-१७६।।"***

तसेच श्रीगोपालकृष्णांची याबाबतची आज्ञा सांगत ते म्हणतातः ***"जो जिवु बंधें शिणला। सुटकें जाचें आपुलां। तेणें पुढुत पुढुति ययां बोलां। आन न कीजैं।।१८-१७७।।"*** **संन्यास** या बहुवादग्रस्त अशा विषयावरील ***"तैसा शरीराचेनि आभासें। नांदतु जंव असें। तंव कर्मत्यागाचें पिसें। काइसें तऱ्हैं।।१८-२२२।।"*** हा त्यांचा विचार निर्णायकच म्हटला जावा!

कर्मविचार

अधिष्ठान, कर्ता, करण, इंद्रियव्यापार व इंद्रियांच्या अधिष्ठात्या देवता अशी कर्मास पंचविध कारणे असतात, इ.कर्मविचार आपण पाहिला. सात्त्विक, राजस व तामस अशा गुणसंयोगामुळे होणारे त्रिविध प्रकार आपण पाहिले - ***कर्ता, कर्म, ज्ञान, बुद्धी, धृति, त्याग, सुख*** इ.चे हे त्रिविध आविष्कार पाहण्याचा खरा हेतू सत्त्वगुणाचा परिपोष कसा करावा, हाच होता. नंतर वर्णोचित कर्तव्यकर्मेही आपण जाणून घेतली.

कर्म व ईश्वरप्रणिधान

त्यानंतर आपण कर्मविषयक एक अत्यंत जिव्हाळ्याचा विषय सतराव्या गीताध्यायास अनुसरत चर्चिला. तो म्हणजे ***ॐ, तत् व सत्*** ही त्रिविध ब्रह्मनामे व त्यांचा निष्काम कर्मयोगासाठी विनियोग हा होय.

त्यानिमित्त आपण तृतीय अध्यायी वर्णिलेले यज्ञात्मक सृष्टिचक्र व त्यासाठी निष्काम कर्मानुष्ठाचे महत्त्वपूर्ण स्थान पाहिले. ***"जैं स्वकर्में निष्कामता। अनुसरलें पार्था। कैवल्यपर तत्त्वतां। पातलें जगीं।।३-१५१।।"*** अशी निष्काम स्वकर्मे आचरण्याची फलश्रुती ज्ञानेश्वर सांगतात. ती ***कर्मे ईश्वरप्रणिधानपूर्वक आचरावीत,*** असे सतराव्या अध्यायाचे सांगणे आहे.

त्यासाठी श्रद्धेचे माहात्म्यही तेथे सांगितले आहे. अश्रद्धबुद्धीने जे काही तप इ.केले जाते, ते असत् असते. त्याचे फळ ना इहलोकी मिळते, ना परलोकी!

चतुर्विध भक्त

श्रद्धापूर्वक ब्रह्मनामाचा विनियोग करणे हा *ईश्वरप्रणिधानपूर्वक अष्टांगयोग* अवलंबण्याचाच एक भाग होय. त्याबाबत व ***ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनेविषयी प्रामुख्याने विस्तारपूर्वक पाहावे, यास्तव आपण नंतर सप्तमाध्यायी वर्णिलेल्या चतुर्विध श्रेणीच्या भक्तवर्याकडे वळलो.

आर्त, अर्थार्थी व जिज्ञासू यांपेक्षा भगवंत ***ज्ञानी*** भक्तांची फार महती गातात. ***"उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।।७-१८।।"*** - "ज्ञानी माझा आत्माच आहे," असे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. ***"हे समस्तहीं श्रीवासुदेओ। आईसा प्रतितिरसाचा वोतला भाओ। म्हणौनि भक्तांमाजिं राओ। आणि ज्ञानियां तोचि।। जेयाचियां प्रतितीचा वाखौरा। पवाडु होएं चराचरां। तो महात्मा धनुर्द्धरां। दुर्लभु आथि।।७-१३६,१३७।।"*** या शब्दांत ज्ञानेश त्याच्या प्रतीतीची मिती आणि थोरवी सांगतात.

पंथराजाचे रहस्योद्घाटन

ईश्वरप्रणिधानाची सर्व लक्षणे, या साधनेच्या बृहत तपशीलासकट गीता प्रकट करते. ज्ञानदेव तर आपल्या सर्वंकष प्रज्ञेद्वारे

त्यावर विशाल भक्तिमंदिर उभारतात. त्याच्या पायीचे चिरे असणारी ***पातञ्जलयोगसूत्रे आणि योगअष्टांगे*** आपण जाणून घेतलीत आणि नंतर आपण उतरलो ते पायरीपायरीने त्या मंदिरातील भक्तितत्त्वाच्या गाभाऱ्यात!

नवमाध्याय - भक्तीचा गाभारा

राजविद्या-राजगुह्य सांगणाऱ्या नवम अध्यायाच्या - ज्ञानेश ज्यास मुद्रा लावायला बिहालें होते त्याच्या प्रथम पायरीवर पाऊल ठेवत आपण त्या गाभाऱ्यात - गीतेच्या गूढ गर्भगृहात, ज्ञानेशांची ***"सावलीही न संडितां"*** प्रवेशलो.

ज्ञानेशही त्या समयी आपणास प्रेमाने म्हणाले, ***"तन्हैं एकलें अवधान दीजें। मग सर्व सुखासिं पात्र होईजें। हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड आईका।।९-१।।"*** ज्ञानेशांच्या ओव्यांतील बोलांतून प्रकटलेल्या स्वर्गीय स्वरधुनींनी मोहित झालेलो आपण त्यांच्यामागोमाग त्या भक्तीच्या गाभाऱ्यातील सावळ्या घननीळ मेघश्याम श्रीकृष्णापावेतो केव्हा जाऊन पोहोचलो, ते कळलेसुद्धा नाही!!!

भक्त कोण

भगवंतमुखाने सांगितलेली ***भक्तलक्षणे*** आपण पाहिली. भक्त म्हणजे भगवंतावर श्रद्धा ठेवणारा - त्यांनी सांगितलेल्या राजविद्येवर श्रद्धा असणारा! त्याप्रमाणे आचरण करून ब्रह्मविद्या प्राप्त करू इच्छिणारा वा ती परमप्राप्ती करून घेतलेला! मोक्षप्राप्तीच्या सन्मार्गावर जो चालतो, तो भक्त! आपले आयुष्य मोक्षासाठी झोकांडून देतो, तो भक्त!

सर्वसाधारणपणे ईश्वराचे भजन-पूजन, यजन-याजन इ.करणाऱ्यास लौकिकार्थाने भक्त असे म्हटले जाते. पण केवळ मोक्षप्राप्तीसाठी - ईश्वरसाक्षात्कारासाठीच हे सर्व कर्म आचरणारा भक्तच गीतेस अभिप्रेत आहे. असा भक्त म्हणजे योग्याहून निराळा, कर्म निष्काम संपन्न करणाऱ्याहून वेगळा, ज्ञानिभक्तापेक्षा कोणी इतर, भक्त म्हणजे कोणी खुळा, बावळा, वेडपट, टाळा कुटणारा, व्रतवैकल्ये, उपासतापास करणारा, तीर्थयात्रादी करणारा इ.असे जे आपले समज आहेत, ते अशा गीतानिर्दिष्ट भक्तांसाठी गैरलागू आहेत!

गीतेतील भक्त हा असातसा कोणीतरी नसून तो विज्ञानासह ज्ञानाने परिपूर्ण असणारा, किंबहुना तसा नसला, तर तसा होण्याची आस्था बाळगणारा; मोक्षेच्छेने भगवंतांनी सांगितलेल्या योगमार्गाचे दक्षतापूर्वक आचरण करणारा; सश्रद्ध परंतु अंधश्रद्ध नव्हे असा; निष्काम कर्म केवळ भगवत्प्रीत्यर्थ करणारा; विहित कर्मे करणारा, कर्मांचा लौकिक संन्यास न करता, कर्मफले व त्यांची ईप्सा यांचा त्याग करणारा; भक्तीसाठी - ती प्राप्त व्हावी म्हणून ईश्वरनिष्ठ राहून योगास अनुसरणारा; असा, सर्वसामान्य जन ज्यांस ***भक्त*** असे म्हणतात, त्यांच्यापेक्षा विशेष असा आहे. ***तो ज्ञानी आहे, तो योगी आहे, तो कर्ममार्गी आहे आणि तो भक्त पण आहे!!***

गीतेतील राजयोग:अद्वैतभक्ती

अशी त्याची भक्ती सुफळ संपूर्ण व्हावी, तो मोक्षपदी आरूढावा, त्याला भगवंताचा साक्षात्कार व्हावा, म्हणून गीता ***कर्म, योग, ज्ञान व भक्ती*** या चारी प्रवाहांचा उत्कृष्ट समन्वय करणारा मार्ग प्रकट करते. **या चारही उपांगांसह असते ती *ज्ञानभक्ती* - ती *परानिष्ठा* - ती *अद्वैतभक्ती* - ती श्रेष्ठतम भक्ती गीता उपदेशिते.**

जो जो मोक्षेच्छू आहे, तो तो भक्त आहे आणि गीता त्याच्यासाठी या सर्व मार्गांना समावून घेत, या प्रत्येक अंगास आपले अभिन्न अंग करून घेणारा असा एकमेवाद्वितीय राजयोग प्रतिपादिते!! असो.

चिद्विलास व सगुणसाकाराची उपासना यांचे गमक

नवव्या अध्यायी भगवंतांनी व्यक्त केलेले ब्रह्माचे स्वरूप, ईश्वर, जगत, द्वैत-अद्वैत, जीवमात्र, चराचर विश्व, ***सोऽहं***वाद, ***"अहं ब्रह्मास्मि"***ची अनुभूती, माया वा प्रकृतीचे विवेचन इ.व त्यातून प्रकटणारे चिद्विलासाचे तत्त्वज्ञान आपण पाहिले.

सगुण साकारस्वरूपाच्या उपासनेचे महत्त्व आणि रहस्य आपणास तेव्हा आकळून आले. ज्ञानेशांनी या सर्वांवर आपले अनुभूतिगम्य असे अत्यंत महत्त्वपूर्ण विवेचन करून एतद्विषयक गीतार्थाची पंडित-विद्वज्जन- आचार्यादी महाभागांनी केलेली कोंडी कशी फोडली आणि या गीतारूपी ज्ञानसरितेस कसे विमुक्त केले, तेही आपण सहर्ष अवलोकिले!

भगवंतांचा ऐश्वर्ययोग

जीव-जगतव्यापार- प्रकृतीचे स्वरूप भगवंतांनी तेव्हा स्पष्ट केलेच आहे. ***"जैं लोकचेष्टां समस्तां। जैसा निमित्तिमात्र कां सविता। तैसा जगत्प्रभवीं पांडुसुता। हेतु मी जाणें।।... जैं माझां ठाईं भूतें। परि भूतीं मी नसें। अथवा भूतें ना माझां ठाईं। आणि भूतांमाझिं मी नाहीं। ययां खुणा तूं कंहिं। चुकों नको।।९-१३१ ते १३४।।"*** या शब्दांत ज्ञानेशांनी परमात्म्याचे या जीव-जगताशी असणारे संबंध स्पष्ट केले आहेत. यातच भगवंतांचा ***ऐश्वर्ययोग*** आहे.

"हा एकुचि अभिप्रावो पुढत पुढ्ती। काय सांघों बहुतां उपपत्तीं। तेथ एकहेल सुभद्रापति। एवढें जाण पां।।९-१३०।।" असे म्हणून गीतेच्या या गूढ राजविद्येवर - या भगवत्स्वरूप प्रकटनावर ते मोहर उमटवतात!

गीता-ज्ञानेश्वरीचे सारसर्वस्व

असे हे ईश्वरतत्त्व अति गूढ आहे. ते बुद्धीपलीकडील आहे. ते अनुभवण्यासाठी योगयुक्ती - ***अभ्यासयोग*** अवगत पाहिजे. ***"आतां इंद्रियां देऊनि कवाड। हृदयीं भोगीं।।९-१३५।।"*** या शब्दांत ज्ञानेश त्यासाठी आपणास भगवंतांनी चतुर्थाध्यायी ***"योगः प्रोक्तः पुरातनः। ..।।४-३।।"*** असे म्हणून निर्देशिलेल्या - ***"स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः। प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ।।५-२७।।"*** व ***"यतेन्द्रिय ... । .. मुक्त एव सः।।५-२८।।"***

या गीताश्लोकांनी पंचमाध्यायी प्रकटीकरणास प्रारंभ केलेल्या आणि सहाव्या अध्यायी ***पंथराज आणि अठराव्या अध्यायी क्रमयोग*** म्हणून ज्ञानेशांनी निरूपिलेल्या राजयोगाचा दंशु आपल्या हाती देऊन भगवंताचे **साचोकारपण** आपल्याला सापडवून देतात!

"लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता ...।।३-३।।" या भगवंतोक्तीतील योगाचे रहस्य त्यांनी असे आपणापाशी उघड केले आहे. योगाचे हे स्वरूप त्यांच्या ***"कृष्ण विष्णु हरि गोविंद। ययां नामाचें निखल प्रबंध। माजिं आत्मचर्चा विशद। उद्दंड गाती।।१-२१०।।"*** या ओवीतून अधिक स्पष्ट होते.

आपल्या या सर्व गीता-ज्ञानेश्वरीवरील अतिविस्तृत निरूपणामागे ज्ञानेशांनी दिलेली हीच योगाभ्यासाची प्रेरणा आहे, हे जिज्ञासूंस आता सांगायलाच हवे काय!

नवव्या अध्यायी ***"मग आणिक अर्जुना। .. गहन। ... माझें भजन। ..।।१-२१२ ते २१९।।"*** या ओव्यांतून **कुंडलिनीयोग;** ***"तऱ्हैं दोनिं पालववेरीं। .. हें गुरुवी भक्ती। ..।।१-२२० ते २२८।।"*** यांतून **भक्तियोग;** ***"आतां ज्ञानयज्ञें यजिति। तैं भक्त आईकें। ..।।१-२३१ ते २४८।।"*** यांतून **ज्ञानयोग** व १-२४१ ते २६४ यांतील अनुभूती वर्णनाद्वारे त्याचे विविध पैलू दर्शवत हा **गीतोक्त राजयोग वा ज्ञानेश्वरोक्त *पंथराज* वा *क्रमयोग*** आपणापुढे साकारला.

यानंतर भक्तांच्या या अनुभूतींचे वैश्विक स्वरूप प्रकट करत ***"अहं क्रतुरहं यज्ञः ..।।१-१६ व १७।।"*** या श्लोकांवरील ज्ञानेशांचे विवेचन आपण निरीक्षिले. त्या वेळी ***"पितामहस्य जगतो माता ..।।१-१७।।"*** या श्रीकृष्णोक्तीतील जगत्पिता व माता अशा ***शिवशक्ती*** या आदियुगुलास आपण **अमृतानुभवा**तून जाणून घेतले; त्यांची ही जगद्रूपी लीला अवलोकिली; ***"दों दांडीं एक श्रुती। दोहीं फुलीं एक द्रुति। दोहों दिवीं दीप्ती। एकचि जेंवि।। दों ओंठीं एकी गोठी। दों डोलां एकी दृष्टी। तेंवि दोघीं जिहीं सृष्टीं। एकचि जैं।।१- १८,१९ ।।अमृता.।।"*** अशी त्यांची परस्परसापेक्ष अभिन्नता आपण अनुभवली.

या तत्त्वज्ञानातून योगानुभूतीचे ***ज्ञानमार्ग व योगमार्ग*** हे कसे प्रकटतात, तेही आपण जाणून घेतले. **शिवापासून *"ज्ञानयोगेन साङ्ख्यानाम्"* व शक्तीपासून *कुंडलिनीविशिष्ट असा "कर्मयोगेन योगिनाम्"* हे योग प्रकट होतात,** हे दिसून येते.

"नभाचें शून्य गिळूनि। गुणत्रयांतैं नुरवूनि। तैं शून्य महाशून्य। श्रुतिवचनसंमत।।१३-१२६।।" या ज्ञानेशोक्तीचे रहस्य ***"सर्व शून्याचा निष्कर्षु। जियां बाईलां केला पुरुखु।..।।१-२७।।अमृता.।।"*** या ओवीसमूहाच्या संदर्भात आपणास गवसले. अमृतानुभवाचे ज्ञानेश्वरीतील ज्ञानेशोक्तीशी असलेले ***शिवशक्ति***विषयक साम्य आपणास ***"जैं अनंग पेंदा। .. किंबहुना होएं सर्व। पुरुषाचें हें।।१३-९८१ ते १००६।।"*** या ओव्यांतून विदित झाले.

"अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम्। तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये।।४।।अमृता.।।" अशी या प्रकृति-पुरुष, शिवशक्तियुगुलाची - जगताच्या आदि असणाऱ्या तत्त्वाची अद्वैतात्मक संपादणी करत ज्ञानेश ***"पितामहस्य जगतो माता ..।।१-१७।।"*** या भगवंतोक्तीशी तिचे सामरस्यात्मक अभिन्नत्व व्यक्तवतांना आपणास आढळतात, ते या अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरीतील आपण पाहिलेल्या संदर्भातून!! चिद्विलासवादावर अमृतानुभवाचे ***शिवशक्तिसमावेशन*** हे प्रथम प्रकरण असा प्रकाश टाकते.

अमृतानुभवाचा अधिकारी

या अमृतानुभवाच्या रहस्योद्घाटन प्रसंगी शिवशक्तीचे खरे स्वरूप ओळखणाऱ्या जिज्ञासूंची एक खूण *श्री.रंगनाथमहाराज परभणीकर* यांनी त्यांच्या ***अमृतानुभव*** या ग्रंथांतरी प्रकट केली आहे. ते म्हणतातः **"*अमृतानुभव* हा ग्रंथ सूक्ष्म दृष्टीच्या मुमुक्षूचा आहे. ज्याने सगुण साक्षात्कारापर्यंत उपासना केली आहे; ज्याने समाधीपर्यंत योगसाधना केली आहे, त्याने अमृतानुभव ऐकावा!"**

ईश्वरप्रणिधानासाठी ईश्वराचे स्वरूप जाणून घेण्यासाठी आपण प्रयत्न केले. साधकाने साक्षात्कार करून घ्यावा यासाठी हे सायास करणे आहे. *श्री.रावसाहेब सहस्त्रबुद्धे* म्हणत असत की **"सगुणात व निर्गुणात आपण असावे. इकडे पाहिले तर सगुण व तिकडे पाहिले तर निर्गुण - सगुणातून निर्गुणात अन निर्गुणातून सगुणात - बिंदूत सिंधू अन सिंधूत बिंदु अशी ही परमात्म्याची अनुभूती आहे."** ती आपणास प्राप्त व्हावी, या सद्हेतूचा हा प्रपंच आपण करत आहोत, हे जिज्ञासूंस सांगणे न लगे!

भगवंताचे अनुसंधान:प्रणव व ॐकारदर्शन

अमृतानुभव या ग्रंथाची संक्षिप्त रूपरेखा पाहून आपण ***ॐकार वा प्रणव*** या ईश्वरप्रणिधानाशी संबंधित असणाऱ्या महत्त्वाच्या संकल्पनेकडे वळलो. गीता, उपनिषदे व ज्ञानेश्वरी यांच्या माध्यमातून, तसेच पातञ्जलयोगसूत्रे यांच्या समन्वयातून आपणास ***"ॐ"* हा काय आहे**, ते कळून आले. ***मांडूक्य उपनिषद व कारिका*** ही तर याच ॐकाराच्या प्रकटनास वाहिलेली आहेत. ***ईश्वरवाचक प्रणव वा ॐकार याचे उपासनेतील अनन्यसाधारण महत्त्व आपण समजावून घेतले.***

या विषयावर अधिक प्रकाश टाकणाऱ्या ज्ञानदेवांच्या काही अभंगांचाही आपण परामर्ष घेतला. ***देहासच सर्वार्थाने ॐकारमय करून टाकणे हे उपासनेचे गंतव्य आहे - साक्षात्काराचा हाच मार्ग आहे.***

विभूतियोग: *"हें आंतबाहेरीं मियां कोंदिलें"*

नवव्या अध्यायाच्या अठराव्या आणि एकोणिसाव्या श्लोकांतील भगवंतांच्या इतर काही विभूतींचा परिचय करून घेऊन त्याचे स्वरूप अधिक खोलात शिरून पाहावे आणि भक्तीच्या अंतरंग गाभाऱ्यात खोलवर जावे, म्हणून आपण नंतर दहाव्या अध्यायाकडे, ज्याला ***विभूतियोग*** असे म्हटले जाते, त्याकडे वळलो, ते ज्ञानेशांच्या "***हें आंतबाहेरीं मियां कोंदिलें। जग निखिल माझेंचि वोंतिलें।।१-३०२।।"*** या ओवीच्या मागोमाग!

पंचम ते दशम अध्यायींची योगसूत्री

भगवंतांनी *दहाव्या* अध्यायी म्हटलेलेच आहे की ***"न मे विदु: सुरगणा: प्रभवं न महर्षय: ।।१०-२।।"*** - "देव व महर्षी हेही भगवत्स्वरूप जाणत नाहीत; त्यांचेही आदि असे हे परमतत्त्व आहे."

पण योगाचळाचा निमथा चढून जाणाऱ्या साधकास मात्र आपल्या स्वात्मप्रकाशात हे स्वरूप निखळ दिसू लागते. ज्ञानदेव म्हणतात: ***"स्वप्रकाशें चोखें। अजत्व माझें देखें। आपुलियें डोळें।।१०-७४।।"*** साधनेने प्राप्त झालेल्या अशा दिव्य चक्षूंविना परमात्मस्वरूपाची व्याप्ती दिसणे अवघडच आहे. अर्जुनासही तसे चक्षू जेव्हा श्रीकृष्णांनी प्रदान केले, तेव्हाच त्याला त्यांचे विश्वरूप दिसू शकले, असा भाग अकराव्या अध्यायी येतो.

योगोत्पन्न अशा ***सार्वज्ञतासिद्धी*** ने त्या विश्वरूपातील विभूतिदर्शन घडून येते. ***"मी माझियां विभुति। आणि विभूतीं व्यष्टिलियां व्यक्तीं। हें आघवें योगप्रतिति। एकचि मानीं।।१०-१०७।।"*** हे जाणून भगवंताशी एकरूप झालेला अभेदभावाने परमात्मभक्ती पावतो. **हाच भक्तियोग षष्ठीं सांगितला आहे असे सहाव्या अध्यायातील पंथराज संदर्भात ज्ञानेश म्हणतात व अध्याय सहा ते दहा यांतून आलेले योग व भक्ती यांविषयीचे विवेचन *"पंचमी गव्हरिलेल्या"* (गीता श्लोक क्र.५-२७ ते २९) योगतत्त्वाविषयीच आहे, हे स्पष्ट होते!**

योग्याने असा जो उपासनामार्ग अनुष्ठावयाचा आहे, त्यासाठी भगवंताच्या कोणत्या रूपाचे ध्यान करावे, ते जाणून घ्यावे म्हणून अर्जुन त्यांना आपल्या सर्व विभूती वर्णन करून सांगा असे म्हणतो.

योगगर्भ वा पंथराज

भगवंतही अर्जुनास तदनुसार आपल्या दिव्य विभूती कोणत्या त्यांचे स्वल्प वर्णन करतात. या विभूती ***ध्येय्य वा ध्यानविषय*** म्हणून घेता येतात. पतञ्जलींनी ***एकतत्त्वाभ्यास*** सांगितला आहे*(१-३२,पा.यो.सू.)*. त्यामुळे ध्यानातील विक्षेप दूर होतात. भगवंताच्या विभूतींवर ध्यान करणे, हा या अभ्यासाचा उत्तम भाग होय. कारण वस्तुतः ***गीतेचा व पातञ्जलयोगसूत्रांचाही ईश्वरप्रणिधान हा योगगर्भ होय.***

गीतेतील प्रतिपाद्य योगप्रणाली ***सगुणाधिष्ठित*** असल्याने या विभूतींचे तिच्यात फार श्रेष्ठ स्थान आहे. या विषयानिमित्त ***ज्ञान, कर्म, भक्ती व योग*** ही साधने एकेकटी आत्मसाक्षात्कार करून देण्यास पुरेशी नाहीत; त्या सर्वांचा अंतर्भाव करणारा ***पंथराज*** वा ***क्रमयोग*** च त्यासाठी का आचरावा लागतो, ते आपण जाणून घेतले.

"एकांशेन स्थितो जगत्"

भगवंतांच्या दिव्य विभूती सगळ्याच्या सगळ्या सांगता येत नाहीत. त्या अनंत आहेत. या जगतात ईश्वराचा केवळ एकच अंश आहे; उर्वरित सर्व ***"त्यत्तिष्ठत दशाङ्गुलम्"*** असा आहे, हेही आपण श्रीकृष्णमुखातून जाणून घेतले.

"आतां पैं माझेनि एकें अंशें। हें जग व्यापिलें असें। ययांलागिं भेद सांडूनि सरिसें। साम्यें भज।।१०-३१७।।" असा त्यांचा भक्तिसंदेश आहे!

कर्मसमुच्चय-प्रथम अध्याय

भक्तीचे विवेचन स्थगित ठेवून आपण नंतर ***कर्मसमुच्चय*** या नामाने ओळखता येणाऱ्या ***प्रथम ते पंचम*** या अध्यायात समाविष्ट असणाऱ्या गीतेच्या कर्मविषयक भागाकडे वळलो. प्रथम अध्यायातील धृतराष्ट्राच्या ***"धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ..।।१-१।।"*** या श्लोकापासून आपण सुरुवात केली.

अर्जुनाचे मोह पावणे, त्याला कर्माकर्माचा संभ्रम उत्पन्न होणे, त्याचा युद्ध न करण्याचा निश्चय या पार्श्वभूमीवर आपण गीतेच्या *दुसऱ्या* अध्यायाकडे वळलो.

द्वितीय अध्याय:गीतोपदेशाचा प्रारंभ

हतोत्साह झालेल्या अर्जुनास श्रीकृष्णांनी कर्तव्यप्राप्त युद्ध का केले पाहिजे, याची सामान्यबुद्धीस पटावीत अशी कारणे सांगितली. पण तेवढ्याने अर्जुनाचे समाधान झाले नाही. पाप-पुण्य, धर्म-अधर्म यांच्या भ्रांत कल्पना शोक, मोह, इ.अज्ञानवश करत तो युद्धविन्मुख होऊन राहिला.

त्या वेळी श्रीकृष्णांनी त्याच्यावर अनुग्रह करावा म्हणून ***"अशोच्यानन्वशोचस्त्वं ...।।२-११।।"*** या श्लोकाने गीतोपदेश सांगण्यास कशी सुरुवात केली, ते आपण पाहिले. साङ्ख्यबुद्धी वा ज्ञानमार्ग सांगून ते बुद्धियोगाकडे वळले. येथेच गीतेचा खरा योग म्हणजे ***कर्मयोग,*** जो योग्यांसाठी सांगितला आहे, तो निरूपिणे सुरू झाले.

नैष्कर्म्ययोग

जन्मचक्र उल्लंघून जाण्यास वेद उपयुक्त नाहीत. यासाठी श्रीकृष्ण अर्जुनास ***"निस्त्रैगुण्यो भवार्जुन"*** असा उपदेश करतात. वेदातील परमात्मदर्शनास उपयुक्त ठरणारा भाग तेवढा मात्र गीता स्वीकारते. कारण ***स्वर्गोपभोग हे वेदोक्त कर्मांचे फळ गीतेस स्वल्प वाटते. उलटपक्षी फलेच्छा त्यागून विहित कर्मे करावीत, यावर गीतेचा भर आहे.*** कर्मांचे जीवनातील अनन्यसाधारण स्थान आहे. ***"देखें जेतुलालें कर्म निफजें। तेतुलें आदिपुरुखीं अर्पिजें।।२-२७१।।"*** **ही गीतेची कर्मयोगयुक्ती आहे. गीता *कर्मनिवृत्ती* सांगत नाही, तर *नैष्कर्म्ययोग* सांगते.**

या विवेचनानिमित्त आपण गीतेतील योग आणि पतञ्जलींचा योग यांचा पुन: एकदा वेगळ्या दृष्टिकोनातून कसा मेळ होतो, ते पाहिले. तसेच गीतेने स्थितप्रज्ञाची जी लक्षणे सांगितली आहेत, त्यांचा ज्ञानेशवाणीतून परिचय करून घेतला. त्याच वेळी सर्वसामान्य जनांची मन:स्थिती कशी सैरभैर असते, तीही अर्जुनाच्या निमित्ते अवलोकिली.

"या निशा सर्वभूतानां ..।।२-६९।।" या श्लोकाचा खरा लाक्षणिक अर्थही आपण जाणून घेतला. अशा योगयुक्त पुरुषास अंतकाळ कसा सुखद असतो व तो मोक्ष पावतो, ते आपण

"जैं चिद्रूपीं मिलतां। देहांतीचि व्याकुलता। आड ठाको न शके चित्ता।..।।२-२६१।।" या ओवीतून जाणले.

ज्ञानकर्मसमुच्चय:तृतीय व चतुर्थ अध्याय

"कर्मण्येवाधिकारस्ते ..। .. योग: कर्मसु कौशलम्।। कर्मजं बुद्धियुक्ता .. ।।२-४७ ते ५१।।" हे चार श्लोक कर्मयोगाचा स्पष्ट आदेश देतात. पण आतापावेतोचा श्रीकृष्णांचा उपदेश अर्जुनास बुचकळ्यात टाकणारा वाटतो. प्राज्ञ भाष्यकारांप्रमाणेच **कर्म व ज्ञान यांचा समुच्चय होऊ शकत नाही, असे कथित मत त्याच्या मनात भिनल्यासारखे तो श्रीकृष्णांस*"ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन। तात्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव।।३-१।।"* हा प्रश्न विचारतो.** येथेच कर्मसमुच्चयविषयक तिसरा अध्याय सुरू होतो.

ज्ञानवानाचे नैष्कर्म्यच ***(कर्मनिवृत्ती)*** कर्म करणाऱ्या कर्मयोग्यांच्या आणि सामान्यांच्या तुलनेत श्रेष्ठ आहे, असे श्रीकृष्णांचे मत असल्याची अर्जुनाची झालेली गैरसमजूत ते दूर करतात. ते आपण पाहिले, तेव्हा या ज्ञान-कर्मसमुच्चयविषयक वादाचे कथित प्रणेते जे श्रीमदाद्यशंकराचार्य आहेत, त्यांचे म्हणणे काय आहे, ते आपण प्रथम जाणून घेतले.

आपल्या मते, शांकरभाष्य लावून पाहिले असता **गीतेने प्रवृत्तिलक्षणपर धर्म सांगितला आहे.** धर्म-अर्थ-काम या पुरुषार्थांना संपादन करत, पाप टाळून व पुण्याची अभिलाषा न धरता, सर्व कर्मे केवळ ***मोक्ष*** या चतुर्थ पुरुषार्थप्राप्तीसाठी करणे, असे त्याचे स्वरूप आहे. ब्रह्मात लीन होऊन संतुष्ट शांत चित्ताने राहणे, हे फळ त्याने प्राप्त होते. अशा **या धर्माशी चित्तशांतीचा अन्योन्य संबंध आहे. यातच योगधारेचा उगम आहे.*"अथ योगानुशासनम्।।१-१।।पा.यो.सू.।।"* व *"इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।।४-१।।"* ही वचने या योगधारेची गंगोत्री आहेत.**

श्रीमच्छंकराचार्यांच्या गीताभाष्यातील काहीसा अभिनिवेशयुक्त संन्यासाश्रमाचा आग्रह आपणास पटत नाही. तिसऱ्या गीताध्यायाच्या व त्यावरील ज्ञानदेवांच्या निरूपणाच्या आधारे गोपालकृष्णही मुमुक्षूस मोक्षप्राप्तीसाठी कषाय वस्त्रे परिधान करून सरसकट संन्यासाश्रम स्वीकारण्यास कधीच सांगत नाहीत, असेच आपणास दिसून आले.

विहित वर्णाश्रमधर्माचा एक भाग असा ***संन्यासाश्रम*** आहे आणि गीता त्याविरुद्ध नाही. पण कर्मत्यागरूपी - अकर्मक संन्यस्त वृत्ती तिला मान्य नाही. गीतेचे प्रतिपादन नैष्कर्म्यसिद्धीचे आहे; कर्मे सोडून देण्याचे नाही. कर्मे करण्याचे टाकणे, हे गीतोपदेशास विसंगत आहे. ***"तऱ्हैं उचितें कर्मे आघविं। तुवां आचरौनि मज अर्पावि। परि चित्तवृत्ति न्यसावि। आत्मरूपीं।।.. तुवां शरीरपरा नोहावें। कामनाजात सांडावें। मग अवसरोचित भोगावें। भोग सकल ।।३-१८६ ते १८८।।"*** असा मूलत: ***प्रवृत्तिलक्षणपर* मोक्षमार्ग** आचरावा, असेच ***श्रीकृष्णमत*** असल्याचे ज्ञानेश सांगतात!!

गीता व प्रवृत्ति-निवृत्तिलक्षणपर धर्म

भगवंतांचे हे मत मान्य न करणारे मूढ होत व ते कल्याणमार्ग सोडून दूर भटकत जातात; ***इंद्रियांना नीट वळण लावून वर्णाश्रमविहित कर्मे करणे याचा स्वधर्मात अंतर्भाव होतो; त्याव्यतिरिक्त तो परधर्म!*** त्याचे आचरण मोक्षहानिकारक ठरते, इ.भाग आपण *तृतीय* अध्यायाधारे पाहिला. **गीता जो योग सांगते, तो *प्रवृत्तिलक्षणपर* आणि *निवृत्तिलक्षणपर* अशा दोन्ही मोक्षमार्गांचा समन्वय साधणारा आहे.**

गीता जो योग सांगते, त्याचा***"म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा। तंव त्यागु न घडे कर्माचा। आईसियांहीं करूं म्हणति तेयांचां। आग्रहोचि उरें।।३-६३।।"*** या ओवीने ज्ञानेश यथोचित आदर करतात!! ***योग*** व ***साङ्ख्य*** यांचे असे सख्यत्व दाखवून मग आपण वळलो ते पुढील *चतुर्थ* अध्यायाकडे!

भक्ती, योग, ज्ञान व कर्म यांचा समन्वय

"तैसें यमनियमीं कडसिलें। .. मी तैंचि जाहलें।..।।४-६५।।";* "देखें मनुष्यजात सकल। हें स्वभावता भजनशील। जाहले असे केवल। *माझां ठाईं।।४-६७।।" इ.ओव्यांद्वारे भक्तीची योगाशी सांगड घालत ज्ञानदेव ***श्रद्धा, भक्ती व ज्ञान*** ही त्रयी योगासाठी आवश्यक असल्याचे सुचवितात. त्यात कर्माचा अंतर्भाव केला की हा योग पूर्ण होतो.

कर्म कोणते, अकर्म कोणते याचा शहाण्यासुरत्या मनुष्यासही संभ्रम होतो. त्यासाठी आपण शांकरभाष्य व ज्ञानेश्वरी यांतील विचार पाहिले. ज्ञानेश्वर या विषयावर सैद्धांतिक चर्चा न करता नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त झालेल्या आप्तकाम पुरुषाचे साधनोपयोगी असे वर्णन करणे पसंत करतात.

फलाशाविरहित कर्मे करणे त्यांस तेथे अभिप्रेत आहे आणि कर्माची योगाशी अशी सांगड घालत, ते मूळ योगविषयाचे गंतव्य साध्य करू पाहतात. त्यातूनच त्यांचे ***ज्ञानयज्ञ*** व ***ब्रह्मयज्ञ*** हे यज्ञांचे प्रमुख प्रकार प्रकटतात.

"जाणां नेणां सकलां। कर्मयोगु कीर प्रांजला"

आतापावेतो ऐकलेले कर्मसमुच्चयाचे वर्णन ऐकून अर्जुनास योग व ज्ञान यांतील काय श्रेयस्कर आहे, ते जाणून घ्यावे असे वाटले. खरे तर***गीतेचा रोख योगाश्रयपूर्वक कर्मांचा संन्यास करण्यावर आहे.*** ज्ञानीसुद्धा कर्मांनी बद्ध होत नाहीत. ते केवळ लोकसंग्रहार्थ उचित कर्मे करण्याचे टाकत नाहीत.

ज्ञान्यांना जरी कर्मकर्तव्य उरत नसले, तरी भगवंत जसे कर्म करत असतात, तशीच कर्मे तेही करत असतात. आणि ज्ञानदेव तर सामान्यांसाठी असे म्हणतात की***"तऱ्हैं जाणां नेणां सकलां। हा कर्मयोगु कीर प्रांजलां। जैसिं नाव स्त्रियां बालां। तोयतरणीं।।५-१६।।"*** निखळ ज्ञानमार्गाचा पाईक विरळाच - एखादा शुकासारखा! त्यामुळे गीता योगमार्गावरच भर देते.

"आनंदाचें डोहीं आनंद तरंग"

आप्तकाम योगी पुरुषाची अवस्था नंतर आपण पाहिली. जीवन्मुक्तांची जी लक्षणे पाचव्या अध्यायी प्रकट केली आहेत, त्यांचा आपण ज्ञानेश्वरीतून परिचय करून घेतला. जीवन्मुक्त हा परमात्माच असतो. *"**ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति**"* या श्रुतीचे रहस्य आपण ज्ञानेशमुखे जाणून घेतले.

सर्व प्राणिमात्रांचे कल्याण करण्यात जीवन्मुक्त रत असतो. तो शाश्वत शांती पावतो. अशा जीवन्मुक्ताची स्थिती अमृतानुभवाच्या ***ज्ञानखंडन*** व ***जीवन्मुक्तदशाकथन*** या प्रकरणांद्वारेही आपण जाणून घेतली. *"**योगज्ञानादि विश्राम। भूमिका हें।।९-६०।।अमृता.।।**"* अशी ही अवस्था असते. *"**आनंदाचें डोहीं आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचें।।**"* असे त्या अवस्थेस उद्देशून संत म्हणतात.

एवढे समजावून घेतल्यावर अर्जुनास योग जाणून घेण्याची इच्छा झाली. त्यावर पाचव्या अध्यायीच श्रीकृष्णांनी ***पंथराज योगरहस्य*** प्रकट सांगण्यास प्रारंभ केला. येथे आपण कर्मसमुच्चयाचा किचकटसा विषय संपवून तिकडे वळलो.

"अर्जुना हा अवधारीं। पंथराजु"

त्यासाठी आपण सुरुवातीपासून सहावा अध्याय पाहू लागलो. *"**अर्जुना हा अवधारीं। पंथराजु।।६-१५२।।**"* या ओवीपासून पंथराजाचा गूढ कुंडलिन्यधिष्ठित मार्ग सांगण्यास सुरुवात होते. पातञ्जलयोगातील सूत्रांनिमित्त त्याचा काही भाग आपण अगोदरच पाहिला होता.

उर्वरित गूढ भाग पाहतांना आपण पातञ्जलयोगाच्या समाधि, संयम, ऋतंभरा प्रज्ञा इ.कल्पना पंथराजाशी ताडून पाहिल्या. योगसिद्धींचा व त्या ज्या भूमीवर प्राप्त होतात, तिचा आपण परिचय करून घेतला. कुंडलिन्युत्थापनादी क्रियांचा पूर्वपरिचय आपण ज्ञानेशमुखे करून घेतला.

पंथराजातील गूढ क्रियांचे योगविज्ञान

पंथराजयोगातील गर्भगूढ क्रिया जाणकारांशिवाय कळणे शक्य नाही. त्यासाठी अनुभूतिप्राप्त ज्ञाता गुरू मिळाला पाहिजे किंवा ईशकृपा झाली पाहिजे. परंतु या क्रियांचे विज्ञान साधकांस जरी अवगत झाले नाही, तरीही एकदा कुंडलिन्युत्थापन झाले की त्या होतातच. अनभिज्ञ साधक एकदा का या मार्गाला लागला की योग्य मार्गदर्शनाअभावी तो त्या क्रियांच्या शरीर-मनावर उमटणाऱ्या लक्षणांमुळे बावचळून जाण्याची शक्यता फारच असते.

गुरुने जरी या योगपथाची दीक्षा दिली असली, तरी त्याचे संपूर्ण मार्गदर्शन न मिळाल्यास किंवा शिष्याचा योग पूर्णत्वास जाण्याआधीच गुरूचे देहावसान होणे इ.अकल्पित गोष्टींमुळे अशा योगसाधकांचे फार हाल होऊ शकतात. म्हणून त्या ***गूढ क्रियांचे योगविज्ञान सर्वच साधकांनी जमेल तसे जाणून घेतलेच पाहिजे.*** सर्व जिज्ञासू आणि साधकांना याविषयी सतर्क करणे आणि आवश्यक तितके ***कुंडलिनीयोगाचे विज्ञान*** त्यांच्या पदरी घालणे, हाही या प्रस्तुत ***योगदा श्रीज्ञानेश्वरी***नामक ग्रंथाचा एक प्रमुख हेतू आहे, हे सांगणे न लगे!

योगचर्चेची पूर्वप्राथमिक तयारी

त्यासाठी आपण ***पातञ्जलयोगसूत्रे, कुंडलिनी व षट्चक्रे, योगतारावली, सौंदर्यलहरी*** इ.प्रमुख योगसंबंधित विषयांची पूर्वप्राथमिक माहिती करून घेतली. योगशास्त्रातील गोरक्षमतही आपण पाहिले. नंतर पंथराजाचा एक संक्षिप्त चर्चात्मक असा आढावा आपण घेतला.

"योगासारिखें सोहोपें। आहें काईं"

एवढे विवेचन आपण या योगक्रियांविषयीच्या जिज्ञासक भूमिकेतून पाहिले. परंतु त्यावरून हा योग अवघड आहे, असा गैरसमज मात्र कोणी साधकाने करून घेऊ नये. अर्जुनासही तसेच वाटले होते. पण *"**एरवीं सोहोपें योगासारिखें। काईं आहें।।६-३६३।।**"* या शब्दांत त्याचा संशय श्रीकृष्णांनी फेडला आहे.

मग कठीण असा योग तो कोणता! त्याबाबत बाराव्या अध्यायाकडे आपणास वळावे लागते. अव्यक्तास ध्येय्य विषय वा चित्ताचा आलंबविषय म्हणून घेणे, हा योगप्रकार अतिदुर्घट असल्याचे त्यातून स्पष्ट झाले. *"**ययांलागिं पांगुला हेवा। नोहें वायूसिं पांडवा। तेविं देहवंतां जीवां। अव्यक्तीं गति।।१२-७३।।**"* या ओवीतून ज्ञानेश हेच सांगतात. हा क्लेशदायक योग भक्तिविना असतो, असेही त्यांच्या *"**जिहीं सकल भूतांचां हितीं। निरालंबीं अव्यक्तीं। पसरलियां आसक्ती। भक्तीविण।।१२-६०।।**"* या ओवीतून दिसून येते.

गूढ योगसंकेत व ज्ञानेशांचे वाङ्मय

याच संदर्भात ज्ञानेश पंथराजास ***भक्तिपंथ*** असेही नाम प्रदान करतात: *"**म्हणौनि एर तैं पांडवा। नेणतिचिं हें वेथा। जैं कां भक्तिपंथा। वोटंगलें।।१२-७५।।**"* एवढा योगविषयक खुलासा केल्यानंतर आपण ***योगविषयक चक्रे आणि कुंडलिनीप्रक्रिया*** इ.संबंधित उर्वरित गोष्टींकडे परत वळलो. ज्ञानेशांनी **ज्ञानेश्वरी व अभंग** यातून यांवर काय प्रकाश टाकला आहे, तो पाहणे व गूढ योगप्रक्रियांचे समन्वयन साधणे, असा हेतू त्यामागे होता.

तसेच ***योगानुभूती व तिचे अंतरंग पाहणे व गूढ योगसंकेत जाणून घेणे,*** असेही उद्देश ठेवून आपण ज्ञानेशांचे हे वाङ्मय आलोचिले. ***बिंदू*** ही संकल्पना आपण काहीशा खोलात जाऊन समजावून घेतली. पश्चिमपथाचे बृहत दर्शन आपण घेतले. ज्ञानेशांच्या योगपर अभंगांतून **प्रणव**ाचेही दर्शन आपण केले. **योगवासिष्ठ**ातील ***सप्तज्ञानभूमिका*** आपण पाहिल्या.

अद्वैतभक्तिमंदिराची नामदेवांची पायरी

योगाचे हे असे अपूर्व दर्शन घेऊन आपण वळलो अद्वैतातील भक्तीच्या दर्शनाकडे. ज्ञान-कर्म-योग या त्रयीचा भक्तीशी होणारा अपूर्व संगम ज्ञानेशांच्या वाणीतून ऐकावा, या मोठ्या उत्सुकतेने आपण गीतेच्या गर्भागाराच्या पायऱ्या उतरून आत प्रवेशावे, म्हणून या भक्तिमंदिराच्या नामदेवांच्या पायरीला नमन करून आपले पाऊल पुढे ठेवले.

अनन्यभक्तीची ही पायरी आहे ***राजविद्या-राजगुह्ययोग*** म्हणून विख्यात असलेल्या नवम अध्यायाची ! या विषयाचा काही भाग आपण पूर्वीच ईश्वरप्रणिधानाविषयी चर्चा करतांना पाहिला होता.

"पत्रं पुष्पं फलं तोयं"

पुढील भागात अभक्त व ज्ञानी भक्त यांच्याविषयी आपण माहिती करून घेतली. वेदज्ञातेसुद्धा परमात्म्यास न ओळखल्याने कसे अज्ञानवश स्वर्गसंसाराच्या भवभ्रमाच्या घोटाळ्यात अडकतात, ते आपण पाहिले. ***"... क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।।९-२०,२१।।"*** यासारखे दुर्भाग्य ते कोणते !

"अर्जुना वेदु जर्‍हैं जाहला। तर्‍हैं मातें नेणतां वांयां गेला। कणु सांडौनि उपणला। कोंडा जैसा ।।९-३३३।।" या ओवीत वैदिकांच्या आणि अज्ञान्यांच्या भक्तीचे वैगुण्य प्रदर्शित होते. ***"अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते। ..।।९-२२।।"*** हा श्लोक त्यावर उतारा अशी ***अनन्यभक्ती*** - **ईश्वरप्रणिधानयुक्त योग** प्रकटवतो.

भगवंतांव्यतिरिक्त इतर देवदैवतादी उपासनांचे फळ नश्वर असते. म्हणून खरी भक्ती कशी करावी, हे श्रीकृष्ण या अध्यायी प्रकट करतात. ***"पत्रं पुष्पं फलं तोयं .. । ..।।"*** व ***"यत्करोषि ..। ..।।९-२६,२७।।"*** इ.श्लोक या भक्तीचे मूलस्त्रोत होत. ***ईश्वरप्रणिधान*** हा कर्मयोगप्रणालीचा आधारस्तंभ आहे. ***अनन्यभक्ती***चे यांच्याशी अन्योन्यसंबंध आहेत.

भक्ताचा भक्तियोग हा कर्मयोग्याच्या कर्मयोगाहून आणि योग्याच्या योगयुक्तीपेक्षा वेगळा नाही, याची साक्ष आपल्याला हा नवम अध्याय देतो. ***ईश्वरप्रणिधानयुक्त योग*** हा या तिन्ही भक्ति-कर्म-योगयुक्तीचा गाभा आहे आणि ज्ञान त्यातील अवश्यंभावी भाग आहे.

मन्मना भव मद्भक्तो"

अशा योगयुक्तीने अनन्य होऊन परमात्म्यात रत होणाऱ्यांची स्थिती व गती आणि स्त्रीशूद्रांसही या योगाचे सुलभत्व ***"पैं पापयोनिही होतु कां। तैं श्रुताधीतही न होतु कां। परि मजसिं तुकतां तुकां। तुटी नाही।।९-४४९।।"*** या ओवीत ज्ञानेश प्रकट करतात. चोखामेळा, त्यांची पत्नी, बंका, कर्ममेळा, शेख महंमद इ.संतांची उदाहरणे हे भगवद्वचन प्रत्यक्षात स्पष्ट करतात.

योगाचे आणि भक्तीचे अनन्यत्व स्पष्ट करत करत सरतेशेवटी ज्ञानदेवांचे कळकळीचे बोल उमटतात, ते असे: ***"तर्‍हैं झडझडौनि वहिला नीग। इयें भक्तीचिएं वाटें लाग। जियां पावसिं अव्यंग। निजधाम माझें।।९-५१६।।"*** आणि पाठोपाठ निनादते ती परवलीची अशी गोपालकृष्णांची वाणी: ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः।।९-३४।।"***

थोड्याफार शाब्दिक फरकाने पण याच अर्थी गीतासमारोपाच्या प्रसंगीही भगवंत म्हणतात: ***"मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु। मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे।।१८-६५।।"*** या श्लोकांचे भक्तिरहस्य आपण समजावून घेतले. या श्लोकांवर सोपानदेव म्हणतात:

एणेंकरूनि मज पावसि। मी आत्मा आईसें जाणसिं। योगयुक्त होसि। मजपरायण।।४४।।सोपानदेवी।।

ज्ञानदेवही यावर म्हणतात: ***"तूं मन हें मीचि करीं। माझां भजनीं प्रेम धरीं। सर्वत्र नमस्कारी। मज एकांतैं।। माझेनि अनुसंधानें देख। संकल्पु जाळणें निःशेख। मद्याजी चोख। याचि नांव।।९-५१७,५१८।।"***

भक्तीच्या अंतरंगदीपाच्या प्रकाशात विश्वरूपदर्शन

भक्तीचा अंतरंगदीप असा कर्माच्या तेलवातीने, योगाच्या शलाकेने आणि ज्ञानाच्या ज्योतीने प्रज्वलित होतो. त्याची प्रकाशकिरणे अनंताच्या प्रवासाला निघतात. त्या भक्तिदीपाच्या उज्ज्वल प्रकाशात आपण नंतर भक्तीच्याही अंतरंगात उतरण्यास सिद्ध झालो. दहाव्या अध्यायातील काही भाग आपण त्यासाठी निरूपिला.

"एणें महायोगें। मज मीनलां मनाचेनि आंगें। .. म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगु। .. तैं सांधितलें षष्ठीं।।१०-१०८ ते ११०।।; तेयां चेईरें जाहलें ज्ञानाचें।..।।६-१०६।।; ययां ज्ञानभक्ती साहज। भक्तु एकवटला मज।..।।१८-११३०।।" इ.ओव्यांतून आपण भक्तीचा आस्वाद घेतला.

भक्तीने येणाऱ्या ***"वासुदेवः सर्वमिति।।७-१९।।"*** या अनुभूतीचे प्रत्यक्ष दर्शन घ्यावे म्हणून मग आपण वळलो ***विश्वरूपदर्शन*** या गीतेच्या अकराव्या अध्यायाकडे. ***"द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम।।११-३।।"*** या शब्दांत परमात्म्याचे हे विश्वात्मैक्यरूप पाहण्याची इच्छा अर्जुन प्रकट करतो.

त्याला प्रतिसाद असे ***विश्वरूप*** मग भगवंत प्रकट करतात. ते पाहून अर्जुन ब्रह्मानंदाने विभोर झाला. ***"तेथ ब्रह्मानंदाची जीवां। राणिव फांवली।।११-२५१।।"*** असे ज्ञानेश त्याचे वर्णन करतात.

विश्वरूपाची संकल्पना

विश्वरूपदर्शनयोगे श्रीकृष्णांनी अर्जुनास अद्वैत तत्त्वज्ञानाची *प्रत्यक्ष योगज अनुभूती* दिली. साक्षात्काराचे - आत्म्याच्या स्वसंवेद्यतेचे हे दर्शन होते. विश्वरूपाची संकल्पना कशी ठिकठिकाणी प्रकटली आहे, ते गीतेद्वारे, तसेच ***पुरुषसूक्त, मुंडकोपनिषद, ऋग्वेद-यजुर्वेदाच्या ऋचा, अथर्ववेद, ईशोपनिषद, कठोपनिषद, तैत्तिरियोपनिषद, बृहदारण्यकोपनिषद, श्वेताश्वतरोपनिषद, उच्छिष्टसूक्त*** इ.वैदिक वाङ्मयातून आपण नंतर ज्ञात करून घेतले.

तसेच गीतेत अर्जुनास झालेले ***विश्वरूपदर्शन*** केवळ ईश्वराच्या संहारभावाचे आहे, आंशिक आहे, असे पं.सातवळेकरांचे मतही आपण जाणून घेतले. ***"कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो।।११-३२।।"*** या गीतावचनातूनही हेच श्रीकृष्णमुखे स्पष्ट होते.

विश्वरूपाचे योगमाहात्म्य

अर्जुन मात्र जसजसा भानावर येऊ लागला, तसतशी त्याला या संहारभावी विश्वरूपाची धास्ती वाटू लागली व ते रूप आवरावे असे श्रीकृष्णास त्याने विनवले. विश्वरूपाच्या भयानकतेचे प्रयोजन

सांगून श्रीकृष्णांनी ते आवरले. पण अर्जुनाला विश्वरूपच कसे श्रेष्ठ आहे, त्याचाही त्यांनी उपदेश केला.

अर्जुनासही हे रूप अवलोकिल्याने श्रीकृष्णांची महत्ता कळून आली व त्याला केवळ एक मनुष्यमात्र समजून आपण त्याच्याशी तसे वागण्यात मोठी चूक केली असा पश्चात्तापही झाला. त्याने त्या कृतापराधांची श्रीकृष्णांकडे क्षमा प्रार्थिली, इ.आनुषंगिक भाग आपण पाहिलाच आहे. **योगशास्त्रदृष्ट्या विश्वरूपाची अनुभूती योग्यास *महाविदेहावृत्ती* प्राप्त झाल्यावर येते**, असे विश्लेषणही आपण केले.

सगुणास अर्पिलेली पुष्पांजली

अर्जुन विश्वरूप पाहून भयभीत झाला आणि त्याने श्रीकृष्णांनी परत आपले **सावळे, सुकुमार, हाती गदा व चक्र घेतलेले चतुर्भुज रूप**च प्रकट करावे, असा हट्ट धरला. शेवटी भगवंतांना त्याचे ते आवडते रूप घ्यावेच लागले. याच रूपाची भक्तांना अवीट गोडी असते. ते रूप ज्ञानदेवांच्या काही अभंगांतून आपण अवलोकिले.

सगुण ते निर्गुण* असे साक्षात्कार आज्ञाचक्रावरील *बिंदू ते महाशून्य* या प्रांतात होतात**, असा योगशास्त्रपर भाग आपण तन्निमित्त पाहिला. हा साक्षात्कार व्हावा अशी इच्छा असणाऱ्या साधकांस ***"मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः। निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव।।११-५५।।" हा परमात्म्याचा संदेश गीता पोहोचवते आणि विश्वरूपदर्शनाचा हा अकरावा अध्याय समाप्तीस जातो.

ज्ञानदेव म्हणतातः ***"भरौनि सद्भावाचि अञ्जुली। मियां वोंवियां फुलें मोकली। अर्पिलीं आंघ्रियुगुलीं। विश्वरूपाचां।।११-७०८।।"*** सताच्या ओंजळीत सुंदर ओव्यांची फुले घेऊन ज्ञानेश ती विश्वरूपाच्या पदकमलांवर वाहतात, ती अशी!

***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्"*: ज्ञानेशोक्त साधनाक्रमसमन्वय**

ईश्वरप्रणिधानाचे अवशिष्ट स्वरूप निरखावे म्हणून आपण पातञ्जलयोगसूत्रांचा आधार घेऊन बाराव्या अध्यायातील व्यक्तोपासनेकडे वळलो. शांकरभाष्यातूनही व्यक्तोपासनेवरील विचार आपण पाहिले. ***"म्हणौनि गां पांडवा। मूर्तिंचां मेळावा। करूनि त्यांचियां गांवां। धांवतु आलों।। नामाचियां सहस्त्रावेरीं। नावा इयां अवधारीं।.. ।।१२-८९,९०।।"*** या ओव्यांतून ईश्वरप्रणिधानाचे रूप स्पष्ट होते.

"मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।।१२-८।।" या श्लोकापासून <u>**ईश्वरप्रणिधान करण्याचे उपाय**</u> भगवंत सांगतात. ***"अथवा हें चित्त। मनबुद्धिसहित। माझां हातिं अचुंबित। न शकसिं देवों। तन्हैं गां आईसें करीं। ययां आठां पाहारांमाझारीं। <u>मोटकें निमिखभरी। देतु जाएं</u>।।१२-१०४,१०५।।"*** अशी युक्ती त्यासाठी ज्ञानेश सांगतात.

१२-८ ते ११ या सर्व श्लोकांचा परिपाक *१२-१२* हा गीताश्लोक संपुटित करतो, तो असा: ***"श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते। ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम्।।"*** या श्लोकाचा गीतेच्या साधनामार्गात मोठा सहभाग आहे. ***"अभ्यास –➤ज्ञान –➤ ध्यान –➤ कर्मफलत्याग –➤ शांती"*** असा उपासनेचा प्रवास होतो, हे आपण या श्लोकाच्या विस्तृत चर्चेअंती पाहिले.

त्या वेळी आपण श्रीमच्छंकराचार्यभगवान, श्री.लो.टिळक, पं.सातवळेकर आदी आदरणीय महाभागांच्या या गीताश्लोकाच्या अर्थावरील विवरणांस विचारात घेतले. परंतु अंती ज्ञानेशांच्या ओव्यांद्वारे स्पष्ट होणारा वरील अर्थच आपण ग्रहण केला. **श्री.बाबाजीमहाराज पंडित**ांनी त्यांच्या ***ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका*** या ग्रंथात, तसेच **श्री.बाबामहाराज आर्वीकर**ांनी त्यांच्या ***दिव्यामृतधारा*** या ग्रंथराजात हाच अर्थ ध्वनित केला आहे. *प्रभुपादस्वामी, श्री.देसाई, शंकरमहाराज खंदारकर* इ.मान्यवरांची मतेही त्या वेळी आपण पाहिली.

"ध्यानासिं खेंव। देति आघवेंचि भाव"

गीता *(१२-१२)* या श्लोकावरील ओव्या ***" पैं अभ्यासाचियां पाऊटीं। ठाकिजैं ज्ञान किरीटी। ... शांतीचा माजिवठा। ठाकिला तेणें।।१२-१३७ ते १४३।।"*** या ओव्यांचा अर्थ पाहतपाहत आपण ही वाटचाल केली. त्या वेळी या ओव्यांचा भावानुभव घेण्यासाठी आपण ***"सत्त्वपुरुषान्यताख्यातिमात्रस्य सर्वभावाधिष्ठातृत्वं सर्वज्ञातृत्वं च।।३-४९।।पा.यो.सू.।।"*** या पातञ्जलयोगसूत्राकडे वळलो.

सर्वभावाधिष्ठातृत्व* व *सर्वज्ञातृत्व या भूमिकांचा तेव्हा आपण साकल्याने विचार केला. ***"ध्यानासिं खेंव। देति आघवेंचि भाव।"*** या ज्ञानेशांच्या ओवीचा अर्थ आकळून यावा व त्यामागील शास्त्रशुद्ध भूमिका कळावी, असा त्यामागे उद्देश होता. ***आत्मस्फुरण (आत्मभावभावनम् -४-२५,पा.यो.सू.)*** म्हणजे काय ते तेव्हा आपण अवलोकिले. हाच भाव ज्ञानेशांची ही ओवी प्रस्फुटित करते. ***जीवन्मुक्तीची निदर्शक*** अशी ही ओवी आहे.

ईश्वर, ईश्वरप्रणिधान व गीता

गीतेच्या *१२-१२* या श्लोकी ***उपासनाकांड*** संपते. त्याप्रीत्यर्थ ज्या ***ईश्वरप्रणिधान*** या संकल्पनेवर हे कांड उभारले आहे, तिचा आपण साक्षेपाने विचार केला. गीतेतून ईश्वरविषयक कल्पनेचा विस्तार कसा केला आहे, पातञ्जलयोगसूत्रे याविषयी कोणते विचार मांडतात, त्याचा आपण परामर्श घेतला.

त्यानिमित्ताने <u>***गीता ही ईश्वर व ईश्वरप्रणिधान यांसच वाहून टाकली असल्याचे*** आपणा जिज्ञासूंच्या सहजच लक्षात आले</u>. त्यासाठी लो.टिळकांनी निर्देशिलेल्या मीमांसकांच्या ***ग्रंथाचे सत्त्व*** काढण्याच्या शास्त्रीय युक्त्या व ज्ञानेश्वरी यांचा फारच उपयोग झाला.

भक्तांची अंतकाळची स्थिती

नंतर आपण **ईश्वरप्रणिधान या विषयाचा शेष भाग** म्हणजे ***भक्तांची अंतकालची स्थिती*** पाहण्यासाठी *आठव्या* अध्यायाकडे वळलो. त्या वेळी पंथराजयोगसाधनेचा अंतकाळी योग्यांस कसा उपयोग होतो,

ते दिसून आले. शुक्ल व कृष्णगतींचे गीतोक्त विधानही आपण तेव्हा जाणून घेतले.

तत्संबंधित इतर वैदिक वाङ्मयाचा परिचय आपण करून घेतला आणि ***बाबाजीमहाराज*** या पुरातन योगसिद्धांच्या लाहिडीमहाशयपरंपरेने प्राप्त असा जो गीताविचार केला आहे, त्याचा पण आपण परिचय करून घेतला. त्यांचा योगविचार ज्ञानेशोक्तीशी किती समानधर्मा आहे, तेही आपण पाहिले.

संजीवन समाधी

योग्यांची निर्वाणस्थिती पाहून मग आपण **संत श्रीज्ञानेश्वरमाऊली**च्या **संजीवनसमाधी**चे एकवार दर्शन घेण्यासाठी तिकडे वळलो. श्रीनामदेवांच्या अभंगांद्वारे ते दर्शन आपण घेतले. श्रीसमर्थ रामदासस्वामींचे संतांच्या - पुण्यपुरुषांच्या - समाधीमागचे रहस्य उद्घोषित करणारे विचार आपण **श्रीमत् दासबोध**द्वारे पाहिले.

कुंडलिनीविशिष्ट योगाची काही चर्चाही तेव्हा आपण संदर्भानुसार विषयजिज्ञासा म्हणून केली. एकनाथांनी ज्ञानेशांच्या संजीवनसमाधीवर जी भावपुष्पांची अंजुली अर्पिली, तिचा आसमंतात दरवळणारा सुगंध - तो परिमळ - आपणही पावून तृप्त झालो!! ज्ञानेशांचा समाधिसोहोळा अनुभवून आपण धन्य झालो!!!

भक्त-भगवंत संबंध

योग-कर्म-भक्ति व ज्ञान यांचे परस्पर ऋणानुबंध एथपावेतो केलेल्या विवेचनाद्वारे आपण नीट जाणून घेतले. ***कर्मयोग, योग, भक्तियोग व ज्ञानयोग* हे परस्परसापेक्ष भिन्न नसून एकाच योगमार्गावरील वेगवेगळे टप्पे कसे आहेत, हे अंती गीता *श्लोक क्र.१२-१२* याद्वारे शिक्कामोर्तब करून आपण सविस्तर जाणून घेतले.**

याच योगास ज्ञानेश सहाव्या अध्यायी ***पंथराज*** या नावाने व अठराव्या अध्यायी ***क्रमयोग*** या नावाने गौरवतांना आपणास दिसतात. या योगासंबंधीचा उर्वरित एक भाग म्हणजे ***योगाची महती*** आणि ***भक्त-भगवंतसंबंध*** हा होय. तो आपण सहाव्या व बाराव्या अध्यायावरील ज्ञानेशांच्या निरूपणातून अवलोकिला.

तसेच त्या वेळी ***योगभ्रष्टास प्राप्त होणारी गती व स्थिती*** यांचीही माहिती करून घेतली. योगप्राप्ती कधीही नष्ट होत नाही. पुढील जन्मी मागील जन्मी केलेल्या अभ्यासापुढील अभ्यास करण्यासारखी अनुकूल परिस्थिती योगभ्रष्टास प्राप्त होते आणि मग योगाभ्यास पूर्णतेस जातो, असे गीता सांगते.

पूर्णकाम पुरुषाची अवस्था आपण सहाव्या अध्यायाद्वारे पाहिली. त्याच्यावर भगवंताची फार प्रीती असते. त्या भक्तवर्याची आणखी काही लक्षणे नंतर आपण बाराव्या अध्यायाद्वारे पाहिली. ***"यो मद्भक्तः स मे प्रियः।।"*** असे भगवंत वारंवार तेथे निक्षून सांगतात.

भक्तीची ही अमृतमय *धर्म्यधारा* आपण आकंठ पान केली. धर्ममेघ समाधी उपभोगली. श्रीकृष्णांचे ***"ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते। श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः।।१२-२०।।"*** हे वचन ऐकून आपण हर्षलो.

"भक्ति अमोलिक। दी मोरे सतगुरु"

अशा या परमप्रेमरूपा - अमृतस्वरूपा भक्तीच्या गंगौघात आपण मनसोक्त डुंबत भक्तीवरील ***नारद व शांडिल्यांची भक्तिसूत्रे*** अवलोकिली. ***गीतेची भक्ती व या भक्त्याचार्यांची भक्ती यांचे एकरूपत्व तेव्हा आपणास दिसून आले.*** भक्तीने जे अमोलिक रत्न प्राप्त होते, त्या रामरतनधनाचे - कृष्णकृपेचे - दर्शन घेण्यासाठी मग आपण वळलो ते श्रीज्ञानदेवांच्या **हरिपाठा**च्या अभंगांकडे. त्यांतूनही आपण योग व भक्तीचे एकरूपत्वच अनुभवले.

संत श्रीनिवृत्तिनाथ, श्रीतुकाराममहाराज, श्रीनामदेव आणि श्रीएकनाथ यांच्याही हरिपाठांचा संक्षिप्त परामर्ष आपण घेतला. त्याद्वारे या संतांनी सांगितलेले ईश्वरप्रणिधानाचे वर्म आपणास अवगत झाले. ते मनावर नीट ठसावे व आपली साधनापथावर सुखेनैव वाटचाल व्हावी, म्हणून आपण नंतर ज्ञानदेवांच्या भक्तिपर अभंगांची शिदोरी बांधून सोबत घेतली. ***"परि तूझा मुद्रांकित"*** असे होऊन, बापरखुमादेविवरास आपणास सांभाळून घेण्याच्या त्याच्या ब्रीदासाठी लोटांगण घालत आपण या भक्तिपथावर वोळंगलो!!

महाशून्याचा डोह

नंतर आपण **महाशून्या**च्या डोहात पुनः एकवार खोल बुडी द्यावी म्हणून ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील ***क्रमयोगरहस्या***कडे वळलो. त्याचे साद्यंत विवेचन आपण पाहिले. <u>***पंथराज* व *क्रमयोग* हे एकच कसे, तेही आपण पाहिले.**</u>

त्या वेळी यौगिकज्ञानाच्या परिपूर्णतेच्या दृष्टीने उर्वरित राहिलेला काही विचार आपण पाहिला. श्रीमच्छंकराचार्यांच्या ***सौंदर्यलहरी*** व ***योगतारावलि*** या अनुपम योगप्रकरणग्रंथांचा रसास्वाद घेतला, तसेच त्यांद्वारे पंथराजप्रक्रियांवर काही प्रकाशही टाकला. ***एकनाथी* भागवत**चाही काही आधार आपण त्यासाठी घेतला.

श्रीमच्छंकराचार्यभगवानांची योगपूर्तीची अतीव उत्कंठा त्यांच्या ***योगतारावलि*** या उत्कृष्ट रत्नस्वरूप ग्रंथांतून आपण पाहिली. ***"विचरतु मतिरेषा निर्विकल्पे समाधौ। कुचकलशयुगे वा कृष्णसारेक्षणानाम्।...।।२१।।यो.ता.।।"*** या त्यांच्या शब्दांतून प्रकट होणारे भाव पाहून आणि ज्ञानदेवांची तशीच ***तुर्येचे तारुण्य, उन्मनियेचें लावण्य*** अशी अवस्था आपणासही उपभोगण्यास मिळावी ही जीवींची आस धरणारे आपण हे सर्व जाणून घेतल्यावर क्षणैक मौनावलो! स्तब्ध झालो! त्या अलौकिक समध्यवस्थेचा आपणही अनुभव घेत धन्य झालो!!!

पंथराज व क्रमयोग

ओवी क्र.१८-१२४५ ते १२७३ यांतून ज्ञानेश जिज्ञासूंच्या समाधानासाठी संक्षेपाने पुनः एकवार ***क्रमयोग*** सांगतात. गीतेचे सार

म्हणून हे साधन या समाप्तीच्या अध्यायप्रसंगी ते सांगत आहेत. **हा जो सारांशरूपाने *क्रमयोग* सांगितला आहे, तो *कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग* व *(पातञ्जल + हठ + ध्यान)* या सर्व योगविशेषांचा समन्वय करून साकारतो. *पंथराज* म्हणून सहाव्या अध्यायी जो कुंडलिनीसंबंधित योगमार्ग दंशात्मक रूपाने ज्ञानेशांनी सांगितला आहे, तो हाच योग होय.**

मूळात हे सर्व योगप्रकार - कर्म-ज्ञानादी भिन्नभिन्न व स्वयंपूर्ण योग नसून ते केवळ योगाचे टप्पे आहेत; त्या प्रत्येकाचे विशिष्ट स्थान योगात आहे. साधकास मोक्षप्राप्तीसाठी हे सर्व टप्पे अवलंबावे लागतात, असे ज्ञानेशमते दिसून येते. *गीताश्लोक क्र.१२-१२* - ***"श्रेयो हि ज्ञान... ।।"*** यावरील ज्ञानेश्वरांचे निरूपण आणि इतर विवेचन पाहून आपण हे नीट जाणून घेतलेच आहे.

कर्मयोग व क्रमयोग यांचे एकत्व

आता अठराव्या अध्यायी ज्ञानेश ***"अभ्यास –➢ ज्ञान –➢ ध्यान –➢ कर्मफलत्याग –➢ शांती"*** हेच टप्पे थोडे विस्तारून जरा वेगळ्या प्रकारे सांगतात, ते असे: ***"कर्म –➢ स्वकर्म –➢ ज्ञान –➢ कर्मसंन्यास –➢ अनन्यबुद्धी –➢ ध्यान –➢ भक्ती –➢ मोक्ष."***

- ❖ ***(कर्म –➢ स्वकर्म)*** = हाच ***अभ्यास*** होय.
- ❖ ***(ज्ञान –➢ कर्मसंन्यास)*** = हे ***ज्ञान*** होय.
- ❖ ***(अनन्यबुद्धी –➢ ध्यान –➢ भक्ती)*** हा ***(पातञ्जल + हठ + ध्यान) योग + भक्ती*** असा टप्पा होय.

याप्रमाणे असे हे सर्व योगविशेष क्रमयोगात समाविष्ट होतात.

हाच गीतेतील ***"लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा ... ।।३-३।।"*** या गीताश्लोकात सांगितलेला सर्वसामान्य साधकांचा आणि योग्यांचा ***कर्मयोग*** होय. त्याचा अंतिम विचार या ***क्रमयोग***दर्शनप्रसंगी आपण केला. *१८-८८५ ते १२४४* या विस्तृत ओवीसंभारातून ज्ञानेश ***क्रमयोग*** सांगोपांग वर्णितात.

क्रमयोगरहस्य

"‥ तो क्रमयोगी ययां निष्ठां। मी होऊनि होएं पैठां। माझां रूपीं।। स्वकर्माचां चाखौलीं। मज पूजा करूनि भलीं। तेणें प्रसादें आकलीं। ज्ञाननिष्ठेतैं।।तैं ज्ञाननिष्ठा जेथ हातवसें। तेथ भक्ति माझीं उल्हसें। तियां मजसिं समरसें। सुखियां होएं।।१८-१२४६ ते १२४८।।" या ओव्यांतील ***कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग*** हे सर्व योगप्रभाग ज्ञानेशांनी सहाव्या अध्यायी ***आसनालागौनि*** जो कुंडलिनीप्रक्रियासमावेशक ***पंथराजयोग*** सांगितला आहे, त्याच्यावर उभे आहेत, हे या क्रमयोगरहस्याद्वारे आपणास नक्कीच समजून येते.

"द्वैत न मोडितां केले। आपणांआईसें"

श्रीकृष्ण या योगाचा अर्जुनास मोठ्या कळवळ्याने उपदेश करतात आणि ***"इमं विवस्वते योगं‥ ।।४-१।।"*** असा हा पुरातन योग जनकल्याणार्थ पुनश्च प्रकटवतात. हेच त्यांचे एक अत्यंत महत्त्वाचे अवतारकार्य होते. ***"तैं महासिद्धांताचा आंवाका। दाऊनि सिद्धांतकक्षा अनेका। भिडवूनि आरंभु देखा। संपवितु असें।।"*** असे ज्ञानदेव त्याबाबत म्हणतात.

"मग सांवला सकंकणु। बाहू पसरौनि दक्षिणु। ... द्वैत न मोडितां केलें। आपणांआईसें अर्जुना।। ... किंबहुना नारायणें विश्व कोंदलें।।१८-१४१७ ते १४२५।।" अशी त्या महासिद्धांताची साक्षात्काररूपी अनुभूती अर्जुनास देऊन भगवंतांनी तत्त्वज्ञान व योगशास्त्र यांचेच जणू दृढ आलिंगन घडवून आणले! तो प्रसंगच मोठा अदृष्टपूर्व!!

गीतेची फलश्रुती

नंतर आपण ***गीतेची फलश्रुती*** कोणती, ते पाहिले. ***"मी सर्वद्रष्टाही दिसें। पाहला जयें।।"*** - सर्वद्रष्ट्या भगवंताचेही दर्शन जी करवून देते, ती ही गीता असल्याचे ज्ञानेश म्हणतात.अशा या गीताशास्त्राचे अनुष्ठान, त्याचा संप्रदाय, ते कोणास सांगावे, इ.भाग आपण पाहिला.

गीतामाहात्म्य आपण अवलोकिले. भगवद्भक्तांपर्यंत गीता पोहोचवणाऱ्याइतका भगवंतांस कोणीच प्रिय नाही, इतकी गीतेची थोरवी आहे. गीतेचे अध्ययन करणारा त्यांचे ज्ञानयज्ञाने पूजन करतो, असे भगवंत मानतात.

हे ***गुह्यात गुह्य शास्त्र*** ऐकून अर्जुनाचा मोह नष्ट पावला व तो भगवंतांच्या उपदेशास अनुसरून युद्धास सज्ज झाला, असा कथाभागही नंतर आपण गीता-ज्ञानेश्वरीद्वारे पाहिला. अर्जुनासाठी योग आणि ज्ञान यांच्या उपलब्धीप्रमाणेच ही पण गीतेची फलश्रुतीच होय!! याप्रमाणे हे गत विषयांचे समालोचनात्मक सिंहावलोकन करून झाले.

गीतेतील महासिद्धांताचे ज्ञानेशकृत दर्शन

यानंतर आपण मागे सोडलेल्या एका महत्त्वाच्या विषयाकडे वळू या. तो म्हणजे ***गीतेतील महासिद्धांत!*** गीताभाष्याच्या उपसंहारप्रकरणी आचार्यांनी एक प्रश्न उपस्थित केला आहे. तो असाः **"गीताशास्त्राने निःश्रेयसप्राप्तीचे साधन निश्चित केले आहे, ते कोणते - ज्ञान, कर्म किंवा ही दोन्ही!"** बऱ्याच युक्तिवादानंतर त्यांनी ***ज्ञान*** हेच ते साधन असल्याचे सिद्ध केले आहे.

ज्ञानेश्वरांनी असला युक्तिवाद करण्याच्या भरीस न पडता सरळ म्हटले आहे की ***"अविद्येचा निरास करणे व त्यापासून मोक्ष हे फल प्राप्त करून देण्याचे ज्ञान हेच एक साधन आहे."*** हाच त्यांचा गीतेवरील महासिद्धांत आणि तो आचार्यांच्या वरील निष्कर्षाशी अंती मिळताजुळता आहे.

असे साधन म्हणून जे *ज्ञान* आहे, ते *परोक्षज्ञान* नव्हे, तर *अपरोक्षज्ञान* होय. भगवत्साक्षात्कार, परमात्मदर्शन हेच ते ज्ञान होय. त्याने अविद्येचा निरास होऊन मोक्ष प्राप्त होतो *(१८-१२४२,१२४३)*. हे सर्व घडून येण्यासाठी साधकास निश्चितच त्यांनी दाखवून दिलेल्या कर्मयोगमार्गाने वा **क्रमयोगा**ने अथवा आपण ज्यास

पंथराज म्हणतो, त्या मार्गाने जावे लागते, हा भागही आपण या सर्व विवेचनातून पाहिलाच आहे.

अर्थातच **आचार्यमताशी जरी त्यांचा हा *ज्ञान हेच साधन* हा अंतिम निष्कर्ष जुळत असला, तरी त्या ज्ञानप्राप्तीसाठी जो मार्ग आहे, तो योगाचाच! आणि गीता ज्यास *"कर्मयोगेन योगिनाम्।।३-३।।"* असे म्हणते त्याच योगाचा, हेही आता तरी जिज्ञासूंनी नीट लक्षात ठेवलेच पाहिजे.** असो.

जो मोक्ष अशा प्रकारे प्राप्त करावयाचा, त्या मोक्षाचे - परमपदाचे स्वरुप आपण पाहिलेच आहे. जीवन्मुक्ताची दशाही आपण ज्ञात करून घेतली आहेच. परमात्मसाक्षात्काराचे ***"वासुदेवः सर्वम् इति"*** हे सगुणापासून निर्गुणापर्यंतचे दर्शनही आपण घेऊन चुकलो आहोत. अविद्येचे वा अज्ञानाचे तम कसे असते, त्याचाही आपण परिचय करून घेतलाच होता.

अशा प्रकारे ज्ञानदेवांनी विवेचिलेल्या गीतेतील महासिद्धांताच्या सर्व कक्षा आपण पाहिल्या आहेत. त्यासाठी अनुभूती घेण्याच्या मार्गावरचे सर्व टप्पे आपण चालून आलो. ईश्वरप्रणिधानाचीच ही फलश्रुती आहे, हे आपणास निर्विवाद कळले आहे.

समारोप

गीताशास्त्र आणि त्यावरील ज्ञानदेवांचे निरूपण अनेकानेक मितींतून आतापर्यंत पाहून पूर्ण झालेच आहे! त्यापुढे आता या सविस्तर चर्चेस येथेच पूर्णविराम देऊ आणि गीतेच्या उपसंहारात्मक अशा संजयोद्गारांकडे वळू या. त्यासाठी आपण नियोजला आहे तो या बृहत ग्रंथराज ***योगदा श्रीज्ञानेश्वरी***च्या ***स्कंध क्र.१४:उत्तररंग*** यामधील अंतिम ***उन्मेष क्र.५८-गीतेचा उपसंहार***! तर वळू या त्याकडे!

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

::उन्मेष ५८::
::गीतेचा उपसंहार ::

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

उन्मेष ५८:
गीताः
१८:७४-७८
ज्ञानेश्वरीः
१८:१५७४-१५७६,१५७९-१५८६,१६०२-१६५८,१६६८-
१६८०,१६८६-१७२०, १७२३-१७४१,१७६६-१८१०

::उन्मेष ५८::
::गीतेचा उपसंहार ::

गीतेचा समारोप::::

गीतेचा उपसंहारात्मक भाग

मागील उन्मेषात सूचित केल्याप्रमाणे आतापावेतो आपण ज्ञानेश्वरीचे व तिच्याद्वारे गीतेतील योगाचे आणि तत्त्वज्ञानाचे आपले आलोचन पूर्ण केले आहे आणि आता आपण वळणार आहोत गीतेअंतीच्या संजयाच्या प्रतिक्रियात्मक उद्गारांकडे.

अर्जुन म्हणतो की ***"जैं मजतुम्हां आड। होतें भेदाचें कवाड। तैं फेडूनि केलें गोड। सेवासुख।। ..।।"*** या अर्जुनाच्या उद्गारांवर हर्षलेल्या देवाची अवस्था सांगतांना ***"ययां अर्जुनाचियां बोलां। देवो नाचें सुखें भुलला। ..।।१८-१५७४ ते१५७६।।"*** अशी ज्ञानदेवांची टिप्पणी आहे.

हे हृदयंगम दृश्य पाहणाऱ्या संजयाच्या नेत्रांचे पारणे फिटले. श्रीकृष्णार्जुनांचे असे ऐक्य झालेले पाहून तोही हर्षनिर्भर झाला. ज्ञानदेव त्या प्रसंगाचे वर्णन करतात, ते असेः

तेणें उचंबललेंपणें। संजय धृतराष्ट्रांतैं म्हणें।
जी कैसें बादरायणें। रक्षिलों दोघें।।१८-१५७९।।
आजि तुमतें अवधारा। नाहीं चर्मचक्षूही संसारां।
कीं ज्ञानदृष्टि वेवहारां। आणिलेति।।१५८०।।
आणि रथिंचिएं राहाटीं। घेईजो घोडेयांसाठी।
तेयां आम्हां ययां गोठी। गोचरां होतीं।।१५८१।।

उचंबळून आलेल्या अंतःकरणाने संजय धृतराष्ट्रास सांगू लागला की "अहो कुरुराज! व्यासमहर्षींनी आपणा दोघांचे यानिमित्ते कसे कल्याण केले आहे, पहा! अहो! तुम्हाला तर चर्मचक्षूही नाहीत; पण अशी ज्ञानदृष्टी देऊन त्यांनी तुम्हावर केवढे थोर उपकार केलेत. आणि माझी तर गोष्टच विचारू नका! साधा घोडे हाकणारा एक सामान्य सारथी मी! पण आपल्या दोघांनाही या श्रीकृष्णार्जुनसंवादरूपी गुह्यातिगुह्य रहस्य त्यांच्यामुळे श्रवण करण्यास लाभले!"

वरी झूंजाचें निर्वाण। मांडिलें असें दारुण।
दोहीं हारीं आपण। हारपिजें जैसें।।१८-१५८२।।
एवढा जिएं सांकडा। कैसा अनुग्रहो पैं गाढा।
जैं ब्रह्मानंदु उघडा। भोगवितसें।।१५८३।।

"भारतीय महायुद्धाचा हा प्रसंग! आणि युद्ध तर इतके निर्वाणीचे की कोणा एकाचा तरी समूळ उच्छेद होणार! आपला कुलक्षय होण्याचाहा भीषण प्रसंग समोर आहे. अशा समयी तो श्रीकृष्ण पार्थाला उघडउघड ब्रह्मानंदाचे सुख भोगण्यास देत आहे!"

आईसें संजय बोलिलां। परि एरु न द्रवें उगला।
चंद्रकिरणीं सिवतला। पाषाणु जैसा।।१८-१५८४।।
हें देखौनि तेयाचि दशा। मग करिचिना सरिसा।
परि सुखें जाहाला पिसा। बोलतसें।।१५८५।।
भुलविला हर्षवेगें। म्हणौनि धृतराष्ट्रा सांघें।
एरविं नोहें तेयाजोगें। हें कीर जाणें।।१५८६।।

"संजय असे बोलला, तरी त्या अंध धृतराष्ट्राचे हृदय किंचितही हेलावले नाही. चंद्र उगवल्यावर द्रवणारा चंद्रकांत मणी तो थोडाच होता! तो तर शुद्ध पाषाणच नव्हता का! त्याची ही तटस्थ अवस्था पाहून मग संजयाला पुढे त्याला काही त्या रोमहर्षक संवादाविषयी सांगावेसेच वाटे ना! पण कृष्णार्जुनसामरस्याच्या अवलोकनाने सुखावून गेलेला संजय पिसे लागल्यासारखा पुढे बोलू लागला."

संजयाचे उद्गार

धृतराष्ट्राची पात्रता नाही, हे तर तो जाणतच होता. तरीही हर्षवेग नावरून तो त्याला म्हणालाः

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः।
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम्।।१८-७४।।
व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम।
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम्।।
।।१८-७५।।

"हा असा वासुदेव आणि महात्मा पार्थ यांचा रोमहर्षक संवाद मी ऐकला. व्यासमहर्षींच्या प्रसादाने मला दिव्य दृष्टी मिळाली. त्यामुळे योगेश्वर अशा श्रीकृष्णांनी स्वतः प्रत्यक्ष आपल्या मुखाने जो हा परमगुह्य योग सांगितला, तो श्रवण करण्याचे भाग्य मला लाभले."

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिमम‌द्भुतम्।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः।।१८-७६।।
तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः।
विस्मयो मे महान् राजन्हृष्यामि च पुनः पुनः।।
।।१८-७७।।

"हे राजन! केशव व अर्जुन यांचा हा अद्भुत पुण्यप्रद संवाद परतपरत आठवतो व मला पुनःपुनः हर्ष होतो आहे. हे राजन! श्रीहरीचे त्या वेळचे ते अत्यंत अद्भुत रूपही मला परतपरत आठवते आणि त्याने विस्मित होऊन मला वारंवार हर्ष होतो."

संजयाची अद्वैतस्थिती

ज्ञानेश्वर म्हणतातः

आईसें म्हणे ना मोटकें। तंव हिरौनि सात्त्विकें।
आठव नेलां नेणों कें। संजयपणाचा।।१८-१६०२।।
रोमांच जंव फरके। तंव तंव आंग सुरकें।
स्तंभ स्वेदांतैं जिंकें। एकला कंपु।।१६०३।।

अद्वयानंद परिसें। दिठी रसमय जाहालीं असें।
तैं अश्रु नव्हति जैसें। द्रवत्वचि।।१६०४।।

"श्रीकृष्णार्जुनांचे अद्वैत पाहून आणि त्यांचा अद्वैताचा संवाद ऐकून संजयाचीही अगदी त्यांच्याचसारखी स्थिती झाली. तोही अद्वैतबोधात न्हाऊन निघाला. धृतराष्ट्रास तो ही कथा ऐकवतो न ऐकवतो, तोच सात्त्विकभावाचे भरते येऊन त्यात तो आपणास हरवून बसला; त्याला आपण संजय आहोत, याची आठवणही उरली नाही. त्याच्या अंगप्रत्यंगावर रोमांच उठू लागले. शरीरास कंप सुटून तो घर्मबिंदूंनी नखशिखांत डवरून गेला. अद्वयानंदाच्या परीसस्पर्शाने त्याची दृष्टी अमृतमय झाली.त्याच्या नेत्रांतून अश्रूंचा पाझरच फुटला."

नेणों काय न मायपोटीं। काय नेणों गुंफें कंठीं।
वागार्था पडत मिठी। उससाचियां।।१८-१६०५।।
किंबहुना सात्त्विकां आठां। चांचरु मांडितां उमेठा।
संजयो जाहालां चोहटां। संवादसुखाचां।।१६०६।।
तयां सुखाचि आइसिं जाती। जैं आपणचि धरी शांति।
मग पुढुति देहस्मृति। लाधलीं तेणें।।१६०७।।

"त्याची छाती भरून आली. कंठ दाटून आला. श्वासोच्छ्वास जोरजोरात होऊ लागला आणि हुंदके येऊ लागून त्याची वाचा पांगुळली. अष्टसात्त्विक भावांनी त्याची बोबडी वळून गेली. असा तो संजय जणू कृष्णार्जुनांनी जेथे संवाद केला, ते ठिकाणच आपण होऊन गेला. त्याला जे अमाप सुख लाभले, ते जात्याच शांतिप्रद असल्याने थोड्याच वेळात संजय शांत झाला आणि मग हळूहळू देहभानावर आला."

तेधवां बैसतेनि आनंदें। म्हणें जी जैं उपनिषदें।
नेणति तैं व्यासप्रसादें। आईकिलें मियां।।१८-१६०८।।
आईकितांचिं तैं गोठी। ब्रह्मत्वाचि पडिलीं मिठी।
मीतूंपणेंसिं दिठी। विरौनि गेलीं।।१६०९।।
हें आघवेंचि कां योग। जेयां ठाईं येति मार्ग।
तेयांचें वाक्य सवंग। केलें मज व्यासें।।१६१०।।

अंतर्यामी आनंदाने बहरलेला संजय मग धृतराष्ट्रास सांगू लागला की "हे राजन! उपनिषदांनासुद्धा जे आकळत नाही, ते व्यासमहर्षींच्या कृपाप्रसादाने मला कृष्णार्जुनांच्या त्या दिव्यातिदिव्य संभाषणातून ऐकण्यास मिळाले! त्यांच्या गोष्टी ऐकताच मला ब्रह्मत्वाने मिठी मारली आणि माझ्याठायीचा द्वैतभाव विरून गेला. व्यासांनी माझ्यासाठी काय केले पाहा! सगळे योगमार्ग ज्या ठिकाणास पावतात, त्या परमात्म्याचे बोलच मला सहज ऐकण्यास सापडवून दिले."

अहो अर्जुनाचेनि मिषें। आपणचि दुजें आईसें।
नटौनि आपणयां उद्देशें। बोलिलें जैं देव।।१८-१६११।।
तेथ कीं माझें श्रोत्र। पाटाचें जाहालें जी पात्र।
काएं वानूं स्वतंत्र। सामर्थ्य गुरूचें।।१६१२।।

"अर्जुन जणू दुसरा श्रीकृष्णच! त्याचे रूप घेऊन श्रीकृष्णांनी या गीतासंवादाची जी ही लीला रचली, त्या गीतासंवादाचा प्रवाह माझ्या श्रोत्ररूपी पात्रातूनच प्रकटवून दिला त्या व्यासांनी! त्या माझ्या सद्गुरू व्यासांचे सामर्थ्य केवढे अचाट आहे! मी त्याचे वर्णन कसे बरे करू शकेन!"

हें बोलतां विस्मित होएं। तेणेंचिं मोडावला ठाएं।
रत्नीं कीं रत्नकीलां एं। झांकोलिति जैसिं।।१८-१६१३।।
हिमवंतीचिं सरोवरें। चंद्रोदयें होतिं काश्मिरें।
मग सूर्यागमीं माघारें। द्रवत्वा एंतिं।।१६१४।।
तैसा शरीराचिआं स्मृति। तो संवादु संजय चित्तीं।
धरीं आणि पुढुति। तैंचि होएं।।१६१५।।

"संजय हे एवढे बोलतो न बोलतो, तोच श्रीकृष्णार्जुनसंवाद मनी स्मरताच तो परत विस्मित झाला. त्याची देहस्मृती पुनः एकवार हरपली. रत्नाचे तेज जसे रत्नास झाकोळून टाकते; किंवा हिमालयातील सरोवरे रात्रीच्या कडाक्याच्या थंडीत गोठून गेली की हिमवत होतात आणि चंद्रोदय होताच त्याच्या ज्योत्स्नेत स्फटिकवत दिसू लागतात, आणि सूर्योदयी पुनः द्रवरूप धारण करून मूळ स्थितीस पावतात, अगदी तसेच संजयाचे होऊ लागले. तो देहस्मृतीवर आला की परत त्याला तो दैवी संवाद आठवे आणि त्याबरोबर तो परत देहभान विसरे! हे असे वारंवार होऊ लागले."

"श्रीकृष्ण अर्जुन संगमी"

मग उठौनि म्हणें नृपा। श्रीहरीचियां विश्वरूपां।
देखिलियां उगां कां पां। असों लाहसिं।।१८-१६१६।।
न देखणेनि जैं दिसें। नाहीपणेंचि जैं असें।
विसरें आठवें तैं कैसें। चूकवूं आतां।।१६१७।।
देखौनि चमत्कारु। कीजैं तो नाहीं पैसारु।
मजहीं सगट महापुरू। नेत आहें।।१६१८।।
आईसा *श्रीकृष्णार्जुन-। संवादसंगमीं स्नान।*
***करूनि देतसें तिलदान। अहंतेचें* ।।१६१९।।**

मग संजय उठून उभा राहिला व म्हणाला, "हे राजा! श्रीहरीचे ते दिव्यातिदिव्य असे विश्वरूप पाहूनही तू असा उगाच का आहेस! जे न दिसल्यानेच पाहिले जाते; जे ***नास्ति*** रूपानेच असते; ज्याची विस्मृती असणे हेच खरे स्मरण असते; ते इतके उघडउघड दिसते आहे, तरी त्याला कोणी का बरे दुर्लक्षावे! आणि ते दिसले आहे म्हणून अचंबित व्हावे, तर तेवढा अवसरही मिळत नाही. राजा! ते विश्वरूप आपल्या महापुराच्या लोंढ्यात मलाही सर्वांसकट गिळंकृत करत आहे! श्रीकृष्णार्जुनसंगमात स्नान करून माझ्या अहंकाराचे तिलोदक मी सोडत आहे!"

तेथ अंवसरें आनंदें। अलौकिकही कांहीं स्फुंदें।
श्रीकृष्ण म्हणें सद्गदें। वेलोवेलां।१८-१६२०।।
ययां अवस्थांचि कांहीं। कौरवातैं परी नाहीं।
म्हणौनि रायें तैं काईं। कल्पावें जंव।।१६२१।।

तंव जाहाला सुखलाभु। आपणपां करौनि स्वयंभु।
बुझाविला अवष्टंभु। संजयें तेणें।।१६२२।।

"अनावर आनंद होऊन संजय वारंवार मोहरून येऊ लागला. दाटल्या कंठाने तो सारखा "*श्रीकृष्ण! श्रीकृष्ण!*" असे म्हणू लागला. पण त्या कुरूराजाच्या ध्यानी संजयाची ही अवस्था येणे कसे शक्य आहे! तो तर आपल्याच पुत्रमोहात गर्क झालेला आहे. आणि संजयासारखा भक्तच जी अवस्था भोगू जाणे, तिची त्या धृतराष्ट्राला कधीतरी कल्पना करवेल का! थोड्या वेळाने संजयाने अष्टसात्त्विकांचा तो लोट आपल्या अंगी मुरवला; आपला आवेग जिरवला आणि तो आनंद शांतपणे उपभोगू लागला."

धृतराष्ट्राचा विमूढ भाव

त्यावर धृतराष्ट्राची प्रतिक्रिया पाहाः

तेथ कोण्हीं एकीं अवसरीं। होआविं तैं करुनि दूरी।
राओ म्हणें संजया परी। कैसिं तूझिं गां।।१८-१६२३।।
तेणें तूंतैं व्यासें। बैसविलें कासयां उद्देशें।
अप्रसंगामाजिं आईसें। बोलसिं काईं।।१६२४।।

धृतराष्ट्र म्हणतोः "संजया! अरे काय ही तुझी बोलण्यावागण्याची तऱ्हा! तुला व्यासांनी येथे कशासाठी बसवले आहे! मला युद्धाचा वृत्तांत सांगण्यासाठी त्यांनी तुला येथे ठेवले आहे आणि तू तर तेवढेच टाळून अशी इतरच चर्पटपंजरी लावली आहेस!"

रानिंचें राऊळां नेलियां। दाहीं दिहा मानिं सुनियां।
कां रात्री होएं पाहलेयां। निशाचरां।।१८-१६२५।।
जो जेथिंचें गौरव नेणें। तेयांसिं तैं भिंगुलवाणें।
म्हणौनि अप्रसंगु तेणें। म्हणावा कीं।।१६२६।।

"रानातच वावरण्यात आयुष्य घालवलेल्या मनुष्यास राजवाड्यात ठेवले, तर त्याला दाही दिशा सुन्या वाटतात; निशाचरांना रात्र झाली कीच दिवस उजाडतो; धृतराष्ट्राचेही अगदी तसेच झाले. मर्कटांना रत्नहाराचे काय मोल! ज्याला एखाद्या गोष्टीचे अप्रूप कळत नसते, तो तिला कमीच लेखणार! धृतराष्ट्रानेही संजयाच्या गीतावक्तव्यास अप्रासंगिक ठरवले, त्यात काहीच नवल नाही."

म्हणें सांधैं प्रस्तुत। उदयलेसें जैं उत्कलित।
तैं कोण्हासिं बा रें जैत। देईल शेखिं।।१८-१६२७।।
एरविं विशेखें बहुतेक। आमुचें आईसें मानसिक।
जैं दुर्योधनाचें अधिक। प्रताप सदा।।१६२८।।
आणि एरांचेनि पाडें। दलहीं ययांचें देव्हडें।
म्हणौनि जैत फुडें। आणेल ना तैं।।१६२९।।
आम्हां तंव गमे आईसें। मा तूझें जोतिष कैसें।
तैं नेणों संजया असें। तैसें सांघ पां।।१६३०।।

तो पुढे म्हणालाः"संजया! अरे हे समोर जे युद्ध होऊ घातले आहे, त्यात शेवटी विजयश्री कोणाला माळ घालणार, ते सांग. मला तर असे वाटते की दुर्योधन महाप्रतापी आहे; तो सदैव विजयी होतो.आणि त्याचे सैन्यसुद्धा त्या पांडवांच्या दीडपट आहे. म्हणजे आता त्याचा विजय होणार, हे ठरलेलेच आहे. मला तर तशी अगदी खात्रीच आहे. पण संजया! तुझी या युद्धात कोणाचा जय होईल अशी अटकळ आहे, ती सांग. तुझ्या मनात काय विचार आहेत, ते मला काही अद्याप उमजले नाही."

संजयाचा गीतापूर्णाचा उद्गार

धृतराष्ट्राच्या या पृच्छेला संजय "***यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।१८-७८।।***" असे उत्तर देऊन त्याचा भ्रमनिरास करतो. येथे गीता संपूर्ण होते, हे तर सुप्रसिद्धच आहे.

ज्ञानेश्वरांनीही या वेळी संजयमुखी घातलेल्या ओव्या साहित्यालंकारासाठी फार विख्यात आहेत. "***चंद्रु तेथे चंद्रिका। शंभु तेथ अंबिका। संत तेथ विवेकां। असणें कीं जी।।... ।।१८-१६३१ ते १६५८।।***" या मुखड्याच्या त्या ओव्या अति रसाळ आहेत. आपण पूर्वीच त्यांचा रसास्वाद घेतलेला आहे. "***जेथ तो श्रीवल्लभु। जेथ भक्तकदंबु। तेथ सुख आणि लाभु। मंगलाचां।।१८-१६५८।।***" या ओवीने संजय आपला अभिप्राय व्यक्तवून या गीतासंवादावर पडदा पाडतो!

गीता व व्यास यांची महती::::

गीतामहती

कीं अविद्यातिमिररोखें। श्लोक सूर्यांतैं पैजां जिंकें।
आईसें प्रकाशिलें गीतामिखें। रायें श्रीकृष्णें।।१८-१६६८।।
कीं श्लोकाक्षरद्राक्षलता। मांडव जाहालीं आहें गीता।
संसारपथश्रांतां। विसांवेयां।।१६६९।।
कीं सभाग्यसंतभ्रमरीं। केलें तैं श्लोककल्हारीं।
श्रीकृष्णाख्यसरोवरीं। सासिन्नलीं हें।।१६७०।।

"गीतेच्या रूपाने अविद्येच्या काळोखावर धावून जाऊन तिला जिंकून प्रकाश उपजवणारे हे श्लोकरूपी सूर्यच श्रीकृष्णांनी प्रकट केले आहेत; श्रांत संसारपथिकांना विश्राम देण्यासाठी जणू हा गीताश्लोकरूपी अक्षरद्राक्षलतांचा मांडवच उभा केला आहे त्यांनी! श्रीकृष्णरूपी सरोवरात जोम धरून वाढलेल्या गीतारूपी वेलीवर ही श्लोकरूपी कमळे फुललेली आहेत. भाग्यवंत संतरूपी भ्रमर त्यांच्यावर गुंजारव करत आहेत."

कीं श्लोक नव्हति आन। गमे गीतेचे महिमान।
वाखाणितें बंदिजन। उद्दंड जैसें।।१८-१६७१।।
कीं श्लोकाचियां आवारां। सात शतें करूनि सुंदरा।
सर्वागम गीतापुरा। वसों आलें।।१६७२।।
कीं निजकांता आत्मयां। आवडीं गीता मिलावेयां।
श्लोक नव्हति बाहीयां। पसरु कां जो।।१६७३।।

"हे श्लोक नसून गीतेचे महिमान गाणारे जणू अनेक चारण भाट आहेत, म्हणा ना! किंवा गीतानगरीस या सातशे श्लोकांचा सुरेखसा कोट बांधून सर्व ***आगम*** या इथे वस्ती करून राहिले

आहेत जणू! अथवा आपल्या पतीस - आत्मराजास भेटण्यासाठी गीतेने मोठ्या प्रेमाने पसरलेल्या बाहुलता म्हणजे हे श्लोकच आहेत जणू!"

कीं गीताकमलींचे भृंग। हे गीतासागरतरंग।
कीं हरीचें तुरंग। गीतारथींचें।।१८-१६७४।।
कीं श्लोक सर्वतीर्थसंघातु। आला गीतेगंगेआंतु।
हें अर्जुनु सिंहस्थु। जाहालां म्हणौनि।।१६७५।।

"हे गीतेचे श्लोक म्हणजे गीतारूपी कमळावरील भृंगराजच आहेत जणू! किंवा गीतेच्या या सागरावर उठलेले ते तरंगच नाहीत का! श्रीहरीच्या गीतारथास जोडलेले हे जणू सातशे अश्वच आहेत! अर्जुनाच्या रूपाने अध्यात्मक्षेत्ररूपी सिंह राशीत श्रीकृष्णरूपी गुरूने प्रवेश केलेला पाहून या श्लोकांचा सकळतीर्थरूपी संघातच जणू या गीतागंगेत प्रवेशला आहे, असे मला वाटते."

कीं नोहें हें श्लोकश्रेणी। अचिंत्यचित्तचिंतामणी।
कीं निर्विकल्पां लावणी। कल्पतरूंचिं।।१८-१६७६।।
आईसियां शतें सात श्लोकां। तैं परी आगला एकएकां।
आतां कोण वेगलिकां। वानावा पां।।१६७७।।

ज्ञानदेव पुढे म्हणतात:"ही श्लोकपंक्ती म्हणजे जणू अचिंत्य तत्त्वाचा चित्तास साक्षात्कार घडवून देणारा चिंतामणिरत्नांचा हारच आहे! किंवा निर्विकल्प - निरंजन परब्रह्माची फळे देणारे कल्पवृक्षांचे उद्यानच जणू असे हे गीतेचे श्लोक आहेत. अशा निरुमप असलेल्या या गीताश्लोकांतील प्रत्येक श्लोक आपापल्या परीने आगळावेगळा आणि श्रेष्ठच आहे. तेव्हा त्यांतील सर्वश्रेष्ठ असा कोणता श्लोकराज आहे, ते कसे बरे ठरवावे! कोणत्याही एका श्लोकास वाखाणावे, हे तर या श्लोकांविषयी अगदी अप्रस्तुतच आहे!"

दीपा आगिलु मागिलु। सूर्य धाकुटा वडिलु।
अमृतसिंधु खोलु। उथलु काईंसां।।१८-१६७८।।

"दिव्याचा मागलीकडला प्रकाश आणि पुढलीकडला प्रकाश असा काही फरक जाणता येतो का! सूर्य दिवसभरात सकाळपासून संध्याकाळपर्यंत कमीजास्त तेजाने तळपतो; म्हणून सकाळसंध्याकाळचा सूर्य कनिष्ठ आणि मध्याह्नींचा सूर्य श्रेष्ठ असा भेदभाव कल्पितां येईल का! अमृतसिंधू खोल असो की उथळ असो, त्याचे माहात्म्य कमीजास्त असे कसे ठरवता येईल !"

तान्हीं आणि पारठीं। इयां कामधेनुतैं दिठीं।
सूनि जैसियां गोठी। कीजती ना।।१८-१६७९।।
तैसें पहिलें सरतें। श्लोक न म्हणावें गीतें।
जुनीं नवीं पारिजातें। आहाति काईं।।१६८०।।

"कामधेनू तान्ही आहे की मोठी आहे, असे म्हणून तिच्या गुणांत कमीजास्तपणा काढता येईल का! या गीतेच्या श्लोकांतही तसाच कोणताही भेद कल्पिता येत नाही. पारिजातकाच्या फुलांत नवी फुले व जुनी फुले असे काही असते का!"

कैसा विश्वाचियां कृपा। करूनि महदानंद सोहोपा।
अर्जुनव्याजें रूपां। आणिला देवें।।१८-१६८६।।
चकोराचेनि निमित्तें। तिन्हीं भुवनें संतप्तें।
निवविलीं कलावंतें। चंद्रें जेविं।।१६८७।।
कां गौतमाचेनि मिषें। कलीकालज्वरितादोषें।
पाणिढालु गिरीशें। गंगेचां केलां।।१६८८।।

"अखिल विश्वावर कृपा करण्यासाठी अर्जुनाचे मिष करून श्रीकृष्णांनी गीतेच्या रूपाने महानंद मिळवण्याचा सोपा मार्गच प्रकट केला आहे. चकोरासाठी म्हणून प्रकटलेल्या पूर्ण चंद्रम्याने संतप्त झालेल्या त्रिभुवनास निववलेच ना! गौतमाच्या प्रार्थनेस फल देण्यानिमित्त कलितापाने ग्रासलेल्या जीवांसाठी त्या गिरीश शंभूने पुण्यपावन गंगेस या लोकी प्रकट केली, तसेच आहे हे!."

एथें जीवें जन्हें नाहाल। तन्हें हेंचि कीर होआल।
ना तन्हें पाठमिषें तिंबाल। जिभचि जन्हैं।।१८-१६९०।।
तन्हें लोह एकें अंशे। झगटलियां परीसें।
एरींकडें आपैसें। सुवर्ण होएं।।१६९१।।

"या गीतागंगेत तुम्ही अंत:करणपूर्वक स्नान कराल, तर गीतारूपच पावाल! किंवा जरी पाठ करण्यानिमित्ताने आपली जीभ हिला लावाल, तरी तेच होईल. परीसास लोहाचा एका अंगाने जरी स्पर्श झाला, तरी त्याचे सगळेच अंग सुवर्णमय होऊन जाते ना, तसेच गीतास्पर्शाने जीवाचे होऊन जाते."

तैसिं पाठाचिं तैं वाटी। श्लोकपाद लावा ना जंव वोठीं।
तंव ब्रह्मत्वाचि पुष्टी। येईल आंगिं।।१८-१६९२।।
ना एणेंसिं तोंड वांकुडें। करौनि ठाकाल कानवडें।
तन्हैं कानींहीं घेतां पडें। तैंचिं लेख।।१६९३।।
जैं हें *श्रवणें पाठें अर्थें। गीता नेदी मोक्षाआरौतें।*
जैसा समर्थ दाता कोण्हातैं। नास्ति ना म्हणें।।१६९४।।

"गीताश्लोकाच्या एकाही पादाची वाटी तुम्ही जर मुखाला लावली, किंवा अगदी वेडेवाकडे तोंड करून कुशीवर पडल्यापडल्या जरी कानावाटे गीतेला आत येऊ दिलेत, तरीही तेच होते आणि अंगी ब्रह्मभावाची पुष्टता येते. कारण ही ***गीता श्रवणाद्वारे, पाठांतराने किंवा तिचा अर्थ जाणून घेण्याने, कोणत्याही प्रकाराने असले तरी मोक्षापेक्षा कमी असे काहीच देत नाही.*** समर्थ दाता कोणाला कशाहीसाठी कधी नकार देतो का!"

व्यासांचे विश्वावर थोर उपकार

कां अफाटां समीरणा। आपैतेपण शाहाणा।
केलें जैसें विंझणा। निर्मूनियां।।१८-१६९८।।
तैसें शब्दें जैं न लभें। तैं घडूनियां अनुष्टुभें।
स्त्रीशूद्रादि प्रतिभें। सामाविलें।।१६९९।।
स्वातिचिएं पाणिएं। न होति जन्हैं मोतिएं।
तन्हैं आंगिं सुंदराचिएं। कां शोभतें तैं।।१७००।।

"गीतेचे आणखीही एक आहे. मनुष्याने आपल्या चातुर्याने पंखे निर्मून बेफाट वाऱ्याला आपल्या स्वाधीन जसे करून घेतले आहे, त्याप्रमाणेच श्रीव्यासांनी जे शब्दातीत असे अनंत परब्रह्मस्वरूप आहे, ते अनुष्टुभ छंदात बद्ध करून स्त्रीशूद्रांच्यादेखील आटोक्यात येईल, इतके सुलभ केले आहे. स्वातीच्या पाण्याच्या थेंबाचे जर मोती झाले नसते, तर सुंदर स्त्रियांच्या अंगांवर ते कसे शोभवता आले असते!"

नादु वाद्यां न एंतां। तऱ्हैं कां गोचरु होतां।
फुलें न घेपतां। आमोदु केंविं।।१८-१७०१।
गोडी नहोति पक्वान्नें। तऱ्हें कां फावति रसनें।
दर्पणाविण नयनें। नयनु कां दिसें।।१७०२।।

"नादब्रह्म जर वाद्यांत समावले गेले नसते, तर ते कोणास कसे गोचर झाले असते! सुगंध जर फुलात भरून राहिला नसता, तर तो कसा घेता आला असता! गोड रसाने जर पक्वान्नांचा अंगीकार केला नसता, तर तो रसनेस कसा बरे उपभोगण्यास फावला असता! दर्पण नसता तर डोळ्यास दुसऱ्या डोळ्याची भेट आणि आपली स्वतःचीही भेट कधीतरी घडली असती का!"

दृष्टा गुरुमूर्त्ति। न रिघतां दृश्यपंथीं।
तऱ्हैं काह्या उपास्ति। आकलतां तो **।।१८-१७०३।।**
तैसें वस्तु जैं असंख्यात। तेया संख्या शतें सात।
न होति तऱ्हैं कोण्हा एथ। फावों शकतें।।१७०४।।

"द्रष्ट्याने जर सगुण रूप धारण केले नसते, तो जर सद्गुरुमूर्तीच्या विद्यमाने प्रकटला नसता, तर कोणत्या उपासनेने त्याला प्रसन्न करून घेऊन जाणून घेता आले असते बरे! त्याचप्रमाणे जी वस्तू असंख्यतेचेही मोजमाप जाणत नाही, अनंतत्वही जिच्यापुढे उणे आहे, ती जर या सातशे गीताश्लोकांमध्ये समावली नसती, तर ती कोणाला कशी लाभली असती, सांगा पाहू!"

मेघ सिंधूचें पाणी वाहें। परि जग तेयांतैंचि पाहें।
कां उमप तैं नोहें। ठाकतें कोण्हा।।१८-१७०५।।

"सिंधू अमाप खरा! पण मेघ त्याचे पाणी वाहून आणून लोकांपर्यंत पोहोचवतात, तेव्हाच तो त्यांना पावतो. सागरासारखी अफाट वस्तू लोकांच्या कक्षेत येणार कशी! त्यासाठी लोकांना खरा तर मेघांचाच आधार असतो आणि त्यालाच ते आपला उपकारकर्ता म्हणून ओळखतात; त्याचीच वाट पाहतात, नाही का!"

आणि वाचा जै न पवें। तैं हें श्लोक न होतें बरवें।
तऱ्हैं कानें मुखें फांवें। आईसें कां होतें।।१८-१७०६।।
म्हणौनि *व्यासाचां हा थोरुं। विश्वासिं जाहाला उपकारुं।*
श्रीकृष्णउक्तीं आकारुं। ग्रंथाचां केला **।।१७०७।।**

"तसेच जे वाचातीत असे परब्रह्म आहे, जे दृश्यातीत आहे, जे इंद्रियातीत आहे, ते जर हे सुंदर गीताश्लोक नसते, तर आपल्या कानामुखापावेतो कसे बरे पोहोचले असते! म्हणून श्रीव्यासदेवांचा विश्वावर हा मोठाच उपकार आहे की त्यांनी श्रीकृष्णोक्तीला असे सुंदर श्लोकांत गुंफून या गीताग्रंथाच्या रूपाने लोकांपुढे ठेवले."

"गीता ईश्वरु भोला"

श्रीव्यासांचे हे थोर उपकार स्मरत ज्ञानदेव त्यांनाच अनुसरले आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकत, त्यांनी गीतेवर आपल्या अतिसुंदर अशा ज्ञानदेवीस रचले! ते म्हणतातः

आणि तोचि हा *मी आतां। व्यासांचिं पदें पाहतां पाहतां।*
आणिला श्रवणपथा। मऱ्हाटियां **।।१८-१७०८।।**
व्यासादिकांचे उन्मेख। राहाटति जेथ साशंक।
तेथ मीही रंक एक। वाचाली करीं।।१७०९।।
परि ईश्वरु भोला। लें व्यासोक्तिकुसुममाला।
तऱ्हैं माझियां दूर्वादलां। ना न म्हणें कीं।।१७१०।।

"व्यासरचित गीतापदांचा मागोवा घेतघेत मीही तोच गीताग्रंथ आता मराठी भाषेतील श्रवणपथावर आणून सोडला आहे. व्यासादिक महामतींची प्रज्ञासुद्धा ज्या विषयात साशंकतेने वावरते, तेथे मज रंकाची अल्पबुद्धी ती केवढी! तरीही मी या ग्रंथावर माझ्या अज्ञबुद्धीने वाचाळपणा करत हा ग्रंथ मराठीतून निर्मिला आहे. पण गीता तर साक्षात भोळा असा शिवशंभूच आहे. व्यासोक्तिकुसुमांच्या माळा त्याने जशा कौतुकाने धारण केल्या, तेवढ्याच प्रेमळपणे तो माझ्या दूर्वादलांचाही स्वीकार करणार नाही का!"

आणि क्षीरसिंधूचियां तटां। पाणिया एंति गजघटा।
तेथ काएं मुरकटा। वारिजतसें।।१८-१७११।।
पांख फुटे पांखिरुं। नुडें तऱ्हैं नभींचिं थीरु।
गगन क्रमीं सत्वरुं। तो गरुडहीं तेथ।।१७१२।।
राजहंसाचें चालणें। भूतलीं जाहालें सिहाणें।
आणिक काएं कोण्हें। चालावेंचिना।।१७१३।।

"क्षीरसिंधूच्या काठी हत्तींचे बलाढ्य कळप पाणी पिण्यास जातात. म्हणून काय तो चिलटांना *"माझे पाणी पिऊ नका"* असे म्हणतो की काय! सत्वर गगनास आक्रमून जाणारा गरुड ज्या अवकाशात भराऱ्या घेतो, त्या अवकाशाने जर नुकतेच पंख फुटू लागलेल्या पाखराला *"माझ्यात उडू नकोस"* असे म्हटले, तर मग त्याने कोठे बरे उडण्याची खटपट करावी! राजहंसाची चाल भूतळी विख्यातच आहे. पण म्हणून काय कोणी इतरांनी चालूच नये काय!"

जी आपुलेनि अवकाशें। अगाध जल घेपें कलशें।
चूलीं चूलपण आइसें। भरुनि न निघें।।१७१४।।
दिवियेंचां आंगिं थोरी। परि तैं बहु तेज धरी।
वाती आपुलियां परी। आणिचि कीं ना।।१७१५।।
जी समुद्राचेनि पैसें। समुद्रीं आकाश आभासें।
थिल्लरीं थिल्लरां आईसें। बिंबेचि पैं।।१७१६।।

"कलश खूप जल साठवतो. पण चूळसुद्धा तिच्यापरी जल साठवतेच की नाही! दीप तर प्रसिद्धच आहे, कारण त्याचा खूप प्रकाश पडतो. पण छोटी दिवलीसुद्धा प्रकाशच देते ना! विशाल समुद्रात आकाशाचे प्रतिबिंब समुद्राएवढे पडते. पण ते छोट्याशा डबक्यातही आपले प्रतिबिंब उमटवू देतेच ना!"

तेंविं व्यासदिकु महामति। वावरों एंति इयें ग्रंथीं।
मा आम्हीं ठाकों एं युक्ति। न मिलें कीर।।१८-१७१७।।
जिएं सागरीं जलचरें। संचरति मंदराकारें।
तेथ देखों एरें शफरें। पोहों लाहति।।१७१८।।

अरुण आंगाजवळिकें। म्हणौनि सूर्यातें देखैं।
मा भूतलीचिं न देखैं।मुंगी काईं।।१७१९।।
ययालागिं आम्हां प्राकृतां। देशिकारें बंधें गीता।
म्हणणें हें अनुचितां। कारण नोहें।।१७२०।।

"त्याचप्रमाणे ज्या या गीताग्रंथी व्यासादिक महाप्राज्ञ वावरतात, तेथे आम्हा क्षुद्रांनी वावरू नये, या म्हणण्यात काय बरे अर्थ आहे! ज्या सागरात मंदराचळाच्या आकाराची जलचरे संचार करतात, त्यात पिटुकले मासेसुद्धा पोहतातच ना! अरुण नेहमी सूर्याजवळ असतो. म्हणून त्यालाच सूर्य दिसतो आणि भूतळीची मुंगी काही सूर्यदर्शनास मुकते, असे काही आहे का! यास्तव आम्हा सामान्यांना हा गीताग्रंथ या मराठी देशभाषेत बद्ध करता येणे कसे शक्य होईल, अशी शंका घेणे अनुचित आहे!!"

"श्रीगुरु आईसा दादुला"

वडिलांच्या मागोमाग त्यांच्या पावलावर पावले टाकत, बाळसुद्धा वडील जातात तेथे जाऊन पोहोचतेच ना! त्याचप्रमाणे व्यासांचा मागोवा घेतघेत आणि आचार्यांना वाट विचारत जाणारे ज्ञानेशही व्यास जेथे पोहोचले, तेथे का न पोहोचावेत! ज्ञानेश या सफल गीतामार्गक्रमणाचे श्रेय आपल्या सद्गुरूंना देत म्हणतात:

आणि पृथ्वि जेयाचियां क्षमा। नुबगें स्थावरजंगमां।
जेयाचेनि अमृतें चंद्रमा। निवविं जग।।१८-१७२३।।
जेयाचेनि आंगिक आंशिकें। तेज लाहौनि अर्कें।
आंधाराचें सावाईकें। लोटिजत असें।।१७२४।।
समुद्रां जेयाचें तोय। तोयां जेयाचें माधुर्य।
माधुर्यां सौंदर्य। जेयाचेनि।।१७२५।।
पवना जेयाचें बल। आकाश जेणें पघल।
ज्ञान जेणें उजाल। चक्रवर्त्ती।।१७२६।।
वेद जेणें सुभाष। सुख जेणें सोल्लास।
हें असों रूपस। विश्व जेणें।।१७२७।।
तो सर्वोपकारी समर्थु। सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु।
राहाटत असें मजहीं आंतु। रिघौनियां।।१७२८।।

"स्थावरजंगम भूतांना आपल्या अंगाखांद्यांवर लीलया वागविणाऱ्या धरित्रीने ज्याच्यापासून क्षमा हा गुण धारण केला; ज्याच्याकडून घेतलेल्या अमृताने चंद्रमा जगताला आपल्या स्नेहाळ ज्योत्स्नेने प्रशांत करतो; ज्याच्या अंगीच्या तेजाचा केवळ एक अंशमात्र प्राप्त होऊनही सूर्य अंधाराचे भीषण संकट दूर लोटतो; समुद्राचे तोय ज्याचेच आहे; जलास माधुर्य ज्याचे आहे; माधुर्यास सौंदर्य जो देतो; वायूस ज्याचेबळ लाभते; ज्याच्यायोगे आकाश अनंतत्व पावते; ज्याच्यामुळे ज्ञान प्रकाशते आणि तेज:पुंज होऊन आत्मानुभव चक्रवर्तीचे सिंहासन धारण करते; वेदांना ज्याच्यामुळे सुमंगल मधुर अशी सत्य वाणी प्राप्त झाली आहे; सुखास ज्याने उल्हास प्रदान केला आहे; हे असो! ज्याच्यामुळे विश्वाला रूप आले आहे, असा तो सर्वांवर उपकार करणारा समर्थ श्रीसद्गुरू निवृत्तिनाथ माझ्या अंतरी प्रवेशून विहार करत आहे."

आतां आयतिं गीता जगिं। मी सांघैं मऱ्हाटियां भंगिं।
एथ कें विस्मयालागिं। ठाओ आहे।।१८-१७२९।।
श्रीगुरुचेनि नांवें माती। डोंगरीं जेयापासिं होति।
तेणें कोलिएं त्रिजगति। एकवद केलीं।।१७३०।।
चंदनें वेधिलीं झाडें। जाहालीं चंदनाचेनि पाडें।
वशिष्ठें मांडिलीं कीं भांडें। भानूसिं काठी।।१७३१।।

"मी गीता मराठी ढंगाने मांडत आहे, ही त्या सद्गुरूंचीच लीला आहे. असे असल्याने माझ्या या गीताख्यानाच्या हातोटीचे आश्चर्य का वाटावे! एकलव्य या निषाद्पुत्राने द्रोणाचार्यांचा साधा एक पुतळा तयार करून त्यापासून संपूर्ण धनुर्वेद प्राप्त करून घेतला, हे सर्वच जाणतात. त्या पुतळ्यात गुरूच्या नांवाने निव्वळ माती भरली होती! तरीही त्या एकलव्याला त्रिभुवनात कीर्ती मिळाली! चंदनाचा केवळ सहवास प्राप्त झालेली झाडे तसाच सुवास देतात. वसिष्ठ ऋषींनी उभी केलेली काठीसुद्धा सूर्याएवढा प्रकाश देत होती."

मां मी तंव चित्ताथिला। आणि श्रीगुरु आईसा दादुला।
जो दिठिवेनि आपुलां। बैसविं पदीं।।१८-१७३२।।
आधींचि देखणी दिठी। वरी सूर्यु पुरविं पाठी।
तैं न दिसें आईसिं गोठी। केंहिं आहे।।१७३३।।

"समर्थांनी अंगीकार केल्यानेही या निर्जीव वस्तूंच्या अंगी केवढा प्रताप प्रकटला! मी तर सजीव आणि अंत:करणयुक्त असा आहे. माझ्या चित्तात हे समर्थ श्रीगुरू साक्षात वसत आहेत, जे कोणासही आपल्या पदी बसवून घेऊ शकतात. मनुष्य चांगला डोळस असावा. वर सूर्याचा प्रकाशही चांगला पडलेला असावा. त्या वेळी मग दिसणार नाही, अशी कोणती गोष्ट आहे!"

म्हणौनि माझें नीच नवें। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवें।
गुरुकृपा काय नोहें। ज्ञानदेओ म्हणें **।।१८-१७३४।।**
ययांकारणे मियां। गीतार्थ मऱ्हाटियां।
केला लोकां ययां। दिठीचां विषो।।१७३५।।

"माझ्यावर श्रीगुरूंची एवढी कृपा आहे, तेव्हा माझे श्वास न् श्वास, उच्छ्वास न् प्रश्वास, सगळेच्या सगळे नित्यनूतन उन्मेष पावत प्रबंधरूप का न व्हावेत! याच कारणामुळे माझ्या हातून हा लोकोत्तर असा गीतेवरील मराठी ग्रंथ प्रकटला आहे. त्यातील गीतार्थ हा लोकांच्या मोठ्या कौतुकाचा विषय होऊन गेला आहे, यात नवल ते कसले!" असे ते पुढे म्हणतात.

"गीतेविणही रंगु दाविं"

परि मऱ्हाटें बोल रंगें। कवलितां पैं गीतांगें।
तैं गायताचेनि पांगें। हेकाडता नोहें।।१८-१७३६।।
म्हणौनि गीता गावों म्हणे। पैं गाणिवें होति लेणें।
न मोकलें तऱ्हैं उणें। गीताही आणित।।१७३७।।

"माझे हे मराठमोळ्या भाषेतील बोल अमृतालाही जिंकणारे आहेत. त्यांनी गीतेची अंगे आपल्या रंगांत भिजवून चिंब केली आहेत. गीतार्थाला त्यांनी मिठी मारली आहे. ते गीतेस कोणत्याही प्रकारे

उणे आणणारे नाहीत.खरे तर गीतेसह ते समजून घेतले तर गीतार्थाला शोभा आणणारे हे बोल आहेत. आणि त्यांची रसवत्ता तर इतकी आहे की गीतेविना ते नुसतेच जरी कानी पडले तर गीतेलाही माधुर्यात मागे टाकतील असे ते आहेत."

सुंदर आंगिं लेणें सूयें। तैं तो मोकला शृंगार होएं।
ना लेईलें तऱ्हैं आहें। तैसें कें उचित।।१८-१७३८।।
कां मोतियांचिं जैसिं जाती। सोनयाहिं मानु देति।
ना तऱ्हैं मानवति। मोकलीं ना सडी।।१७३९।।

"सुंदर अंगावर दागिना घातला, तर तो सौंदर्य वाढवतो. आणि तो नुसताच जरी पाहिला, तरी शोभिवंत दिसतो. मोती पाहा! सोन्यात गुंफले, तर सोन्याचे मोठेपण वाढवतात आणि नुसतेच असले तरी सुंदरच दिसतात."

ना ना गुंफिली कां मोकलीं। उणीं न होति परिमलीं।
वसंतागमींचि वांटोली। मोगरीं जैसिं।।१८-१७४०।।
तैसा गाणिवेनें मिरविं। गीतेविणहीं रंगु दार्वि।
तो लाभाचां बंधु ओंवीं। केला मियां।।१७४१।।

"वसंताच्या आगमनाने प्रफुल्लित झालेली वाटोळी मोगऱ्याची फुले माळेत गुंफली तरी आणि नुसतीच ओंजळ भरून घेतली तरी तोच परिमळ देतात. तसा हा मी गीतेबरोबर मिरवणारा आणि गीतेवीणही आपल्या अंगीचे सौंदर्य प्रकट करणारा प्रबंध सर्वांना सुखकर होईल अशा ओव्यांत बद्ध केला आहे."

"मज संत जोडूनि तुम्ही"

ज्ञानदेवांना त्यांच्या गुरुपरंपरेने प्राप्त झालेले समाधिबोधाचे धन त्यांच्या सद्गुरूंनी ग्रंथबद्ध करण्यास प्रवर्तवले. आपणात असा ग्रंथ निर्मिण्याची क्षमता नाही, पण श्रीगुरूंनी आपणास पुढे करून हा ग्रंथ प्रकट केला आहे, अशी त्यांची खात्री आहे. त्यांचे निमित्त करून श्रीनिवृत्तिनाथांनी या ***ज्ञानदेवी*** नामक अपूर्व प्रबंधाद्वारे जगातील सर्वांना कल्याणाचा मार्ग दाखविला आहे, असे मानणारे ज्ञानेश म्हणतातः

तऱ्हैं पुरोहितगुणें। मी बोलिलों पुरें उणें।
तैं तुम्हीं माउलीपणें। उपसाहिजो जी।।१८-१७६६।।
शब्द कैसा घडिजें। प्रमेय कैसें पां चढिजें।
अलंकारु म्हणिजे। काएं तैं नेणें।।१७६७।।
<u>सायखडेयाचें बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चालें।</u>
<u>तैसा मातें दावित बोलें। स्वामी माझां</u>।।१७६८।।

गुरुप्रसादाने आपण हे करू शकलो हे मनी वागवणारे ज्ञानेश पुढे म्हणतात:"श्रीगुरूंचा प्रतिनिधी म्हणून मी जे काही बोललो,त्यात काही अधिकउणे असेल, तर ते तुम्ही संतसज्जन श्रोतेमाऊलींनी गोड करून घ्या, ही माझी विनवणी आहे. शब्द कसा उपयोजावा, प्रतिपादन कसे करावे, साहित्यालंकार कशाला म्हणतात, ते मला काहीच माहीत नाही. कळसूत्री बाहुले जसे सूत्रधाराच्या इशाऱ्यावर नाचते, तसाच मी पण माझा स्वामी बोलवेल, ते बोलत गेलो. श्रीगुरूंनीच निर्मिलेला हा ग्रंथ मी तुम्हापुढे आणला आहे. यात माझे कोणतेही कर्तृत्व नाही."

ययांलागिं मी गुणदोष-। विखीं क्षमाविना विशेष।
जैं मी संजात ग्रंथलों देख। आचार्ये किं।।१८-१७६९।।
आणि तुम्हां संतांचेनि सभे। जैं उणिवेंसि ठाकें उभें।
तैं पूर्ण नोहें तैं लाभें। तुम्हांसिचि कोपों।।१७७०।।
सिवतलियांहीं परीसें। लोहत्वाचिएं अवदसें।
न मुकिजें आईसें। तैं कोण्हा बोलुं।।१७७१।।
वोहलें हेंचि करावें। जैं गंगेचें आंग ठाकावें।
मगही गंगाचि नव्हें। तैं तो काई करीं।।१७७२।।
म्हणौनि भाग्ययोगें बहुवें। तुम्हां संतांचे मी पायें।
पातलों आतां कें लाहें। उणें जगीं।।१७७३।।

"म्हणून खरा तर त्यातील उणिवांविषयी माझा काही दोष नाही. आणि तुम्हा संतांच्यापुढे जे हे आख्यान केले, त्यात काही त्रुटी राहिली असल्यास कोणावर बरे कोपावे! परिसस्पर्श होऊनही लोहाअंगी हीनत्व उरले, तर तो दोष परिसाचाच नाही का! गंगेला मिळूनही वहाळओहळ गंगेत परिणत झाले नाहीत, तर तो दोष कोणाला द्यावा बरे! माझे भाग्यथोर की मी तुम्हा संतांच्या पायाशी आलो. आता मला काय उणे असणार सांगा बरे!"

अहो जी माझेनि स्वामी। मज संत जोडूनि तुम्हीं।
दिधलेनि तैं सर्वकामीं। परिपूर्ण जाहालों।।१८-१७७४।।
पाहां पां मातें तुम्हां सांगडें। माहेर तेणें सुरवाडें।
ग्रंथाचें हे अलियाडें। सिद्धी नेलें।।१७७५।।

"अहो महाराज! माझ्या स्वामींनी तुम्हा संतांची माझ्याशी भेट करवून दिली, तो त्यांचा मोठाच उपकार झाला. तुमच्यामुळे माझे सर्व मनोरथ पूर्णत्व पावले आहेत. मला तुमच्याएवढे समर्थ माहेर मिळाल्याने हा ग्रंथ निर्मिण्याचा माझा हट्ट पुरवला गेला!"

जी कनकाचें निखल। वोतूं येईल भूमंडल।
चिंतारत्नीं कुलाचल। निर्मूं एंतिं।।१८-१७७६।।
सातांहीं हो सागरांतैं। सोहोपें भरितां अमृतें।
दुवाड नोहें तारांतैं। चंद्रु करितां।।१७७७।।
कल्पतरूंचें आराम। लावितां नाहीं विषम।
परि गीतार्थाचें वर्म। निवडूं नैएं।।१७७८।।

"एकवेळ हे भूमंडळ निखळ सोन्याने ओतता येईल! चिंतामणी रत्नांचे मंदरादी पर्वत निर्मिता येतील! सप्त सागरही अमृताने भरता येतील! तारकांचे चंद्र करणे एकवेळ सोपे असेल! कल्पवृक्षांचे बाग फुलवणे कठीण नसेल! पण गीतार्थाचे मर्म सापडणे अति दुष्प्रायच आहे!"

तो मी एकु सर्वमुका। बोलौनि मऱ्हाटियां भाखा।
करीं डोलेंवरी लोकां। घेवों एं आईसें जैं।।१७७९।।
<u>हा ग्रंथसागरु एव्हढा। उतरौनि पैलिकडां।</u>
<u>कीर्तिविजयाचां धेंडा। नाचें जो कां</u> **।।१७८०।।**

गीतार्थाचां आवारुं। कलशेंसि महामेरुं।
रचूनि माजिं श्रीगुरु-। लिंग जैं पूजीं।।१७८१।।
गीता निष्कपट माएं। चुकौनि तान्हें जैं हिंडें वांयें।
तैं मातापूता भेटी होएं। हा धर्मु तुमचा।।१७८२।।
तुम्हां संतांचे केलें। आकलूनि जी मी बोलें।
ज्ञानदेओ म्हणें थेंकुलें। तैसें तैं नोहें।।१७८३।।

"आणि मजसारख्या मुक्याने एकट्याने तो गीतार्थ त्याचे मर्म जाणून लोकांचे डोळे दीपून जावेत, अशा प्रकारे या मराठी भाषेतून प्रकट केला आहे! हा ग्रंथसागर पार उतरून त्याच्या पैलतटावर जो हा माझ्या विजयाचा, माझ्या कीर्तीचा झेंडा फडकतो आहे; गीतार्थाचे हे आवार रचून त्याच्या आत श्रीगुरुलिंग स्थापून त्याची जी ही उपासना मी आरंभली आहे; ते सर्व तुमचे ऋण स्मरूनच मी बोलतो आहे. गीता ही माझी प्रेमळ माऊली! तिला चुकून मी तान्हे लेकरू जे रानीवनी दीनवाणे हिंडत होते, त्या आम्हा दोघा प्रेमळांची जी ही गाठभेट तुम्ही संतांनी घालून दिली आहे; तुम्ही मजवर केलेले उपकार आणि हे प्रेम काही सामान्य नाही!"

"धर्मकीर्त्तन हें सिद्धीं गेलें"

काएं बहुं बोलों सकलां। मेलविलों जन्मफलां।
ग्रंथसिद्धीचां सोहोला। दाविला जो हा **।।१८-१७८४।।**
मियां जैसजैसियां आशा। केला तुमचा भंरवंसा।
तैं पुरवूनि बहुंवसा। आणिलों सुखां।।१७८५।।
मजलागिं ग्रंथाचिं स्वामी। दुजी सृष्टी जैं हें केलीं तुम्हीं।
तैं पाहौनि हांसों आम्हीं। विश्वामित्रांतैहीं।।१७८६।।
जैं असौनि त्रिशंकुदोषें। धातयांहीं आणावें वोसें।
तैं नासतें कीजैं आईसें। निर्मावें नाहीं।।१७८७।।

"मी अधिक काय बोलू बरे! तुम्ही मज हातून या अभूतपूर्व अशा ग्रंथाची सिद्धी करून घेऊन जो हा अवर्णनीय प्रसंग घडवून आणलात, त्याने माझ्या जन्माचे सार्थक झाले! महाराज तुम्ही संतांनी मजसाठी या ग्रंथाची जी अलौकिक निर्मिती केली, ती पाहून प्रतिसृष्टी निर्मिणाऱ्या विश्वामित्राचेही आम्हास हसू येते. त्याने केवळ त्रिशंकू राजाच्या कल्याणासाठी, त्याच्या सदेह स्वर्गप्राप्तीत देवांनी अडथळा आणला, म्हणून केवळ स्वार्थमूलक हेतूने व ब्रह्मदेवास कमीपणा आणावा यासाठीती नाशवंत सृष्टी उत्पन्न केली होती."

शंभु उपमन्युचेनि मोहें। क्षीरसागरुही केला आहे।
एथ तोहीं उपमें नोहें। जैं विषगर्भ कीं।।१८-१७८८।।
अंधकारु निशाचरां। गिलितां सूर्यें चराचरां।
धांवा केला तन्हें खरा। ताऊनि कीं तो।।१७८९।।
तांतलियां जगाकारणें। चंद्रें वेंचिलें चांदिणें।
तेयां सदोखां केंविं म्हणें। सारखें हें।।१७९०।।

"उपमन्यूसाठी म्हणून त्याच्यावरील प्रेमाखातर शंभूमहादेवाने क्षीरसागर निर्मिला. पण त्याचीही उपमा तुमच्या या ग्रंथकर्तृत्वाला देता येत नाही. कारण त्या क्षीरसमुद्रापोटी कालकूट विष आहे! तुमचे तसे नव्हे! अंधकाररूपी राक्षस चराचराला ग्रासित आहे, ते पाहून सूर्याने त्वरा करून अखिल जगतास रक्षिले. पण त्याला आपला तापही दिला! त्याने तापवलेल्या विश्वास चंद्र आपल्या शीतल चांदण्याने निववतो खरा! पण त्याचीही उपमा देणे अयोग्य आहे. कारण तो दोषयुक्त आहे."

म्हणौनि तुम्हीं मज संतीं। ग्रंथरूप जो हा त्रिजगतिं।
उपयोग केला तो पुढुति। निरुपम जी।।१८-१७९१।।
किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्त्तन हें सिद्धीं गेलें।
एथ माझें जी उरलें। पाईकपण **।।१७९२।।**

" महाराज! मी तुमच्याकडून जी जी अपेक्षा केली होती, ती ती पुरवून तुम्ही माझा विश्वास खरा ठरवलात; हा ग्रंथ निर्मून मला अतिशय सुख प्राप्त करून दिलेत! तुम्ही मला या ग्रंथाची जी ही जोड करून दिलीत, तिला या त्रैलोक्यात तुलनाच नाही! हे महानुभाव! आपण केलेले हे धर्मकीर्तन सिद्धीस नेऊन आपण मजवर थोर उपकार केलेत. माझे यात कर्तृत्व ते केवळ एका तुमच्यासेवकाचेचआहे!"

ज्ञानेश्वरीचे संपूर्ण::::

पसायदान

स्वत:कडे धाकुटेपण घेत ज्ञानदेवांचा हा ***ज्ञानदेवी***नामक ग्रंथ असा सिद्ध होतो; त्यांचे हे धर्मसंकीर्तन असे अपूर्वाईने संपूर्ण होते! **ज्ञानदेवांनी श्रीमद्भगवद्गीतेवर *यथार्थ* प्रकटवणारी *ज्ञानदेवी*नामे ही एकमेवाद्वितीय अशी *भावार्थदीपिका* रचली; तिचे रसिक श्रोतेजनांना, संतांना आणि सज्जनांना निरूपण केले.**

हा ग्रंथ श्रीगुरुदेव निवृत्तिनाथ आणि संतमंडळी यांच्या आशीर्वादाने आणि कृपेने पूर्णत्वास गेला. विश्वात्म्याचे अनुसंधान सतत करतकरत ज्ञानेशांनी सर्व श्रोत्यांना भावमुग्ध करून सोडले. समस्त विश्वाचे कल्याण व्हावे, म्हणून हा ग्रंथ गहिनीनाथांनी आज्ञापिलेल्या त्यांच्या निवृत्तिनाथ या शिष्योत्तमांनी ज्ञानदेवांहातून प्रकटवला; हा वाग्यज्ञ त्यांच्याकडून करवून घेतला. त्या वाग्यज्ञाने विश्वात्म्याने तोषावे; त्या विश्वात्मक असा देवाने प्रसन्न व्हावे आणि समस्त भूतमात्रांवर कृपा करावी, असे ***पसायदान*** ज्ञानेशांनी मागितले आहे.

आतां विश्वात्मकें देवें। एणें वाग्यज्ञें तोखावें।
तोखौनि मज देयावें। पसायदान हें **।।१८-१७९३।।**

ग्रंथसिद्धीच्या या सोहोळ्याने आनंदी झालेले ज्ञानदेव या संपूर्णाच्या प्रसंगीही तुम्हाआम्हासारख्या त्यांच्या लेकरांना विसंबत नाहीत. आपणा सर्वांसाठी ते त्या विश्वेशाकडून, गुरुदेव श्रीनिवृत्तिनाथांकडून, ***पसायदान*** मागत म्हणताहेत:

जैं खलांचिं वेंकटी सांडों। तेयां सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें पडों। मैत्र जीवाचें।।१८-१७९४।।
दुरिताचें तिमिर जाओ। विश्वस्वधर्मसूर्यें पाहों।
जो जें वांछील तो तैं लाहों। प्राणिजात।।१७९५।।

परमात्म्यापासून विमुख, अज्ञानात रत असणारे ते खल होत. आपल्या या ग्रंथाद्वारे त्यांच्या अंगीचे हे दुर्गुण नष्ट व्हावेत, त्यांना ईश्वराची भक्ती लाभावी, त्यांचे अज्ञान दूर व्हावे, उत्तरोत्तर त्यांच्या हातून ईश्वराच्या अनुसंधानाचे सत्कर्म मोठ्या प्रेमाने घडून यावे, त्यांची बुद्धी परमात्मध्यानात चढत्या श्रेणीने रत व्हावी, अशी इच्छा ज्ञानेश प्रकट करतात.

सर्व भूते, सर्व जीव एकच आहेत; सर्वांतर्यामी तो प्रभू दयाघनच विनटलेला आहे; हा सर्वात्मक ईश्वराचा भाव त्यांच्याठायी प्रकट व्हावा, अद्वैताचा त्यांना बोध व्हावा; अज्ञानांधकार दूर व्हावा; विश्वात स्वधर्मरूपी - परमात्मपरायणतारूपी आत्मसूर्याचा प्रकाश पसरो; प्राणिजातांच्या सकळ सदिच्छा पूर्ण होवोत; त्यांना ईश्वरसाक्षात्कार होवो, असे ज्ञानेश सर्वांसाठी मागणे मागतात.

वर्षत सकल मंगलीं। ईश्वरनिष्ठांचिं मांदियाली।
अनवरत भूमंडलीं। भेटतु भूतां।।१८-१७९६।।
चलां कल्पतरूंचें आरव। चेतनाचिंतामणिंचें गांव।
बोलतें जैं आर्णव। पियूखाचें।।१७९७।।
चंद्रमें जैं अलांछन। मार्तंड जैं तापहीन।
तैं सर्वांहीं सदा सज्जन। सोएरें होतु।।१९८।।
किंबहुना सर्व सुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित **।।१७९९।।**

ईश्वरनिष्ठ संतांची या भूतळावर भूतमात्रांस अनवरत भेटी घडो; त्यांच्याकडून सर्वांचे सदा कल्याण होवो; कल्पतरूंची चालतीबोलती उद्याने, चैतन्यचिंतामणींची गावेच, अमृताचे वाक्सागरच, निर्दोष चंद्रमे, तापहीन मार्तंड, असे ते सज्जन सर्वांचे प्रेमाचे अन जीवाभावाचे सोयरे होवोत; आणि सर्वत्रांनी पूर्णत्वास पावून, सर्व प्रकारे सुखी होत, त्या आदिपुरुषास अखंडित भजावे, असे ***पसायदान*** ज्ञानेशांनी मागितले आहे.

आणि ग्रंथोपजीविएं। विशेखें लोकीं इयें।
दृष्टादृष्ट विजएं। होआवें जी।।१८-१८००।।
एथ म्हणे विश्वेशराओ। हा होईल दानपसाओ।
एणें वरें ज्ञानदेओ। सुखियां जाहाला।।१८०१।।

तसेच ज्यांची गीतेवर, त्यांच्या या निरूपणावर, अत्यंत श्रद्धा आहे, त्या सर्वांचे विशेषेकरून ***"याचि देहीं याचि डोळां"*** कल्याण व्हावे, जीवन्मुक्तीचा सोहोळा संपन्न व्हावा! अशी ज्ञानदेवांची आसही येथे प्रकट होते.

ज्ञानदेव त्यांच्या लेकरांचे - तुमचे आमचे, सर्व भूतमात्रांचे जे हे कल्याण करू इच्छितात, त्यासाठी जे हे ***पसायदान*** त्यांनी प्रार्थिले आहे, ते भरभरून त्यांच्या ओंजळीत घालत तो विश्वेशराया श्रीनिवृत्ती त्यांना म्हणतो, ***"हा होईल दानपसाओ!!!"***

हे ***पसायदान*** त्यांच्याकडून पावलेले ज्ञानदेव अति प्रसन्न होतात, सुखी होतात!!!

संपूर्णाच्या ओव्या

ग्रंथसमाप्तीच्या वेळी ग्रंथपूर्णत्वाच्या सोहोळ्याबरोबरच असा हा **पसायदान**ाचा सोहोळाही सुसंपन्न करणारे ज्ञानदेव ***"विश्वाची आर्ती"*** मनी प्रकटून ज्या कार्यार्थ या लोकी अवतरले, ते असे पूर्णत्वास गेले!! आता त्यांचे केवळ पाईकपण उरले आहे; आणि संपूर्णाच्या ओव्या साकारित ज्ञानेश ग्रथित करतातः

आईसें युगीं परी कलीं। आणि महाराष्ट्रमंडलीं।
श्रीगोदावरीचां कूलीं। दक्षिणिलीं।।१८-१८०२।।
त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र।
जेथ जगाचें जीवनसूत्र। श्रीमहालया असें।।१८०३।।

"कळीयुगात विशेष त्रस्त झालेल्या जीवांचा उद्धार करावा, म्हणून हा ग्रंथ प्रकट केला आहे. महाराष्ट्रदेशी गोदागंगेच्या दक्षिण तीरी अखिल त्रिभुवनातील एक पंचक्रोशीमात्र असे अति पवित्र स्थान आहे. तेथे ***श्रीमहालया*** म्हणजे मोहिनी अवतारातील श्रीविष्णूचे अधिष्ठान आहे. सर्व जीवांचा पालनकर्ता, जगताचा उद्धारक असा तो देवाधिदेव येथे वसतो."

यदुवंशविलासु। जो सकलकलानिवासु।
न्यायातें पोखीं क्षितिशु। श्रीरामचंद्र।।१८-१८०४।।
तेथ महेशान्वयसंभूतें। श्रीनिवृत्तिनाथसुतें।
केलें ज्ञानदेवें गीतें। देशीकार लेणें।।१८०५।।

"न्यायी भूपती श्रीरामचंद्र जो यदुवंशाचे भूषणच आहे, जो सकलकलांचे माहेरघर आहे, तो तेथे प्रजेचे पालनपोषण करत आहे. अशा या पुण्यपावन क्षेत्री **आदिनाथ** महेशाच्या परंपरेतील **श्रीनिवृत्तिनाथ** यांच्या या **ज्ञानदेव**नामे शिष्याने या ग्रंथरूपाने **श्रीगीता** या अति पवित्र ग्रंथावर देशीभाषारूप साज चढवला."

एवं श्रीभारताचां गांविं। भीष्मनाम प्रसिद्ध पर्वीं।
श्रीकृणार्जुनीं बरविं। गोठी जैं केलीं।।१८-१८०६।।
उपनिषदांचे सार। सर्व शास्त्रांचे माहेर।
परमहंसीं सरोवर। सेविजें जैं **।।१८०७।।**
तयें गीतेचां कलशु। संपूर्णु हा अष्टादशु।
म्हणे निवृत्तिदासु। ज्ञानदेओ।।१८०८।।

"महाभारताच्या भीष्मनामे प्रसिद्ध पर्वात श्रीकृष्ण व अर्जुन यांनी जो साक्षात्कारी आत्मसंवाद केला; जे उपनिषदांचे सार असे ज्ञानामृत आहे; सर्व शास्त्रांचे परमप्रिय असे माहेरघर आहे; परमहंस सेवितात, ते सरोवरच जे आहे; अशी विख्यात जी गीता आहे, तिच्यावरला हा अष्टादश अध्यायाच्या रूपे जो कलश आहे, त्यावरील आपले निरूपण आता संपूर्ण झाले आहे," असे निवृत्तिदास जे ज्ञानदेव, ते म्हणत आहेत. पुढे ते आश्वासितात कीः

पुढुति पुढुति पुढुति। इयां ग्रंथपुण्यसंपत्तीं।
सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजो **।।१८-१८०९।।**

"या ग्रंथातील पुण्यसंपत्ती लाभून सर्व प्राणिमात्रांनी सर्व सुखी होऊन संपूर्णत्वास जावे! जातच जावे! जातच जावे!!!"

शकें बारा शतें बारोत्तरें। तैं टीका केलीं ज्ञानेश्वरें।
सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु जाहाला ।।१८-१८१०।।

शके *१२१२ (इ.स.१२९०-९१)* मध्ये श्रीज्ञानदेवांनी ही गीतेवरील टीका रचली. सच्चिदानंदबाबा यांनी मोठ्या आदरपूर्वक त्या ग्रंथाचे लिखाण केले . असा हा ज्ञानदेवीनामक ग्रंथ सांप्रतच्या अहमदनगर जिल्ह्यातील नेवाशास सिद्ध झाला, असे सांप्रदायिक मानतात.

ज्ञानेशांची एकनाथांवर कृपा

जरी सच्चिदानंदबाबांनी ज्ञानदेवांचे निरूपण लिखित स्वरूपात ग्रथित केले होते, तरी कालमानेकरून त्या ग्रंथाच्या ज्या प्रती हस्तलिखित पद्धतीने नंतर निघत गेल्या, एका प्रतीवरून दुसरी प्रत असे करतकरत, लेखक-नक्कलकर्त्यांच्या चुकांमुळे ग्रंथात अनेक चुका होत गेल्या. तसेच काहींना त्यात आपल्या पदरच्या ओव्या घालण्याचा मोहही आवरता आलेला नसावा.

अशा वेगवेगळ्या कारणांनी ग्रंथाचे मूळ स्वरूप काही अंशी बदलले असल्याचे ज्ञानदेवांनंतर तीन एक शतकांनी झालेल्या श्रीसंत एकनाथमहाराजांच्या लक्षात आले. त्याच वेळी त्यांना ज्ञानदेवांचा स्वप्नदृष्टांतही झाला, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

आळंदी येथील ज्ञानदेवांची दुर्लक्षित अवस्थेतील समाधी शोधून काढून त्यांनी त्यांची अनन्यभावाने भेट घेतली. अजानवृक्षाच्या मुळीचे निमित्त करून नाथांना माऊलीने असे आपणाजवळ बोलावून घेतले; त्यांच्यावर कृपा केली.

श्रीएकनाथांनी त्यांच्या समाधिस्थानाचा जीर्णोद्धार केला असला पाहिजे. त्यांनी बांधलेली एक विहीर समाधीजवळ अद्यापही सुस्थितीत आहे. असो.

एकनाथांद्वारे ज्ञानेश्वरीसंशोधन

ज्ञानेश्वरीत वेगवेगळ्या कारणांनी होत गेलेल्या बदलांची, फेरफारांची व चुकांची नोंद घेऊन संशोधन करून नाथमहाराजांनी ज्ञानेश्वरीचे पूर्वस्वरूप सिद्ध केले आणि ग्रंथास त्याचे मूलस्वरूप प्राप्त करून दिले. अशा रीतीने त्यांना झालेल्या ज्ञानेशांच्या दृष्टांतास अनुसरून हे ग्रंथसंशोधनाचे महत्कार्य सिद्ध केल्यावर श्रीएकनाथ म्हणतातः

श्रीशके पंधराशें साहोत्तरीं। तारणनामसंवत्सरीं।
एकाजनार्दनें अत्यादरीं।गीता-ज्ञानेश्वरीप्रती शुद्ध केली।।१।।
ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध। परि पाठांतरीं शुद्ध अबद्ध।
तो शोधूनियां एवंविध। प्रतिशुद्ध सिद्ध ज्ञानेश्वरी।।२।।
नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका। जेयाचिं वाचतां गीतेचिं टीका।
ज्ञान होएं लोकां। अतिभाविका ग्रंथार्थियां।।३।।
बहुकालपर्वणी अति गोमटी। भाद्रपदमास कपिलाषष्टीं।
प्रतिष्ठानीं गोदातटीं। लेखनकामाठी संपूर्ण जाहाली।।४।।

"जनार्दनस्वामींचा शिष्य एकनाथ याने अत्यादरपूर्वक ही गीतेवरील ज्ञानेश्वरीची टीकाप्रत शुद्ध केली आहे. शके *१५०६(इ.स.१५८४)*, तारणनाम संवत्सरी, भाद्रपदमासी, फार काळाने प्राप्त झालेल्या कपिलाषष्ठीच्या पर्वणीकाळी, गोदागंगेच्या पवित्र तटावरील प्रतिष्ठान नगरी, हे प्रतशुद्धीचे कार्य पूर्णत्वास गेले."

"हा ज्ञानेश्वरी टीकाग्रंथ मूळचाच अतिशुद्ध आहे. पण पाठप्रपाठभेदांमुळे त्याचे स्वरूप काही शुद्ध, तर काहीसे अशुद्ध असे झाले होते. त्याचे संशोधन करून ही ज्ञानेश्वरीची मूळस्वरूपातील शुद्ध प्रतीइतकीच शुद्ध प्रत सिद्ध केली आहे. त्या निष्कलंक ज्ञानेश्वरांना वंदन असो! त्यांची ही गीताटीका वाचण्याने अतिभाविक आणि ग्रंथाच्या अर्थासाठी आतुरलेल्या लोकांना शुद्ध गोमटे ज्ञान प्राप्त होते!!" असे श्रीएकनाथ म्हणतात.

भावांजली::::

"तेथ देखों एरें शफरें। पोहों लाहति"

"ॐनमो जी आद्या।..." या प्रथमारंभीच्या ओवीपासून ***"सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजो।।"*** या संपूर्णाच्या ओवीपर्यंत ज्ञानेश्वरी सांगून झाली; लेखक श्रीसच्चिदानंदबाबा आणि ग्रंथशुद्धिकर्ते श्रीएकनाथमहाराज यांच्या टीपेवजा मोजक्या ओव्यांनी व्यक्ति-स्थल-कालनिर्देश झाला आणि या ग्रंथाचे जिज्ञासू बुद्धीने जे आकलन करण्यास आपण उद्युक्त झालो होतो, ते कार्यही यथामती यथाशक्ती पूर्ण झाले.

पण आपला हा शोध पुढे चालूच राहील. कारण आपल्या अल्पबुद्धीस **गीता-ज्ञानेश्वरी** या ग्रंथांचे संपूर्ण आकलन कधी होऊ शकेल काय! महाप्राज्ञ पंडित, तत्त्वचिंतक, ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अभ्यासक, योगी, महर्षी, पंथांचे मान्यवर अध्वर्यू अशा महाज्ञान्यांसही हे ग्रंथ आपले म्हणत नाहीत, तेथे आपली काय गत असणार!

परंतु ज्ञानदेव म्हणतात तसेच महासमुद्री मंदराएवढे जलचर वावरतात, तेथे शफरांनी पोहूच नये काय, ही उक्ती प्रमाण धरून आपणही या गीता-ज्ञानेश्वरीसागरात विहरलो! त्या विहाराचे आपापल्यायोग्य सुख आपल्या वाट्याला आले!

आपली जिज्ञासापूर्ती व पूर्वसूरींचे ऋण

गीता केवळ ***ब्रह्मविद्या*** सांगते. ***ब्रह्मविद्या* आणि त्यातले *योगशास्त्र* हेच गीतेचे प्रतिपाद्य विषय आहेत. गीतेत योगसाधनेचा कोणता प्रमुख उपाय श्रीकृष्णांनी सांगितला आहे, ते आपण ज्ञानेश्वरांद्वारे समजावून घेतले.**

***सगुणध्यानपर, गुरुपदिष्ट, कुंडलिनीसिद्ध, सामरस्यात्मक, लयप्रधान योग* हाच तो गीतेचा साधनामार्ग असल्याचे आपण जाणून घेतले. यासच ज्ञानेश पंथराज आणि क्रमयोग अशा संज्ञा देतात.** या साधनाक्रमाचा अथपासून इतिपर्यंत आपण पाठपुरावा केला.

त्यासाठी ज्ञानेशांचे ***चिद्विलासपर तत्त्वज्ञान*** आपण जाणून घेतले. ***पातञ्जलयोगसूत्रे, अमृतानुभव, ज्ञानेशांचे अभंग, चांगदेवपासष्टी, गीतेवरील शांकरभाष्य, योगतारावलि, अपरोक्षानुभूति, सौंदर्यलहरी, संतांचा पंचरत्नहरिपाठ, नारदभक्तिसूत्रे, शांडिल्य भक्तिसूत्रे, एकनाथी भागवत*** इत्यादी प्रमुख ग्रंथांप्रमाणेच ***गुरुगोरक्षनाथ*** यांचे ***सिद्धसिद्धांतपद्धति* व *गोरक्षशतक*, श्री.बाबामहाराज आर्वीकर यांचा *दिव्यामृतधारा* हा**

ग्रंथ, ां.वि.दा.सातवळेकर, स्वामी स्वरूपानंद, लो.टिळक, श्री.कोल्हटकर* आणि इतर अनेक मान्यवर आणि महानुभाव यांचे *गीता, ज्ञानेश्वरी व योगविषयक ग्रंथ यांचा या उपक्रमात वेचक संदर्भांसाठी फार उपयोग झाला. त्यांचे विचारधन आपण मुक्तहस्ते वेचले आणि आपले विचार समृद्ध केले.

आपल्या जिज्ञासापूर्तीसाठी त्यांचा मोठाच हातभार लागला आहे. आपण विवेचनाच्या ओघात त्यांतील कोणाचा चुकून अनवधानाने अधिक्षेप केला असेल, तर त्यांची क्षमा प्रार्थू या! कारण हे सर्व महाभाग आपणास अति आदरणीय व वंदनीय असेच आहेत.

या सर्व महाभागांचे कार्य लोकसंग्रहाचे आहे आणि त्याचा एक भाग म्हणून त्यांनी आपल्या विचारधनाचा वारसा तुम्हाआम्हासाठी आपल्याकडे सोपवला आहे. त्यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगणे, हेच आपल्या हाती आहे. आपण त्यांच्या उपकारांचे कधीतरी उतराई होऊ शकू काय! असो.

ज्ञानेशांचे आपल्यावरील मातृऋण

आपणास ज्ञानेश्वरमाउली ***गीता*** सांगत कडेखांद्यांवर घेऊन जात होती. आपण बालसुलभ हट्टाने खाली उतरून चालू लागलो. त्यांच्या पावलामागे पाऊल टाकत जाणारे आपण ते जेथे आपणास नेत आहेत, तेथे पोहोचणार नाही का! आणि समजा वाट चुकलो, थकलो, दमलो, भागलो, तर माउली ज्ञानदेव आपणास पुनः कडेवर घेऊन पुढे नेणार नाहीत का! ***ईश्वरप्रणिधान हा जो गीतेचा आत्मा आहे, तो आम्हाला गंवसणार नाही का! ज्ञानदेवांचे हे अपार मातृऋण आम्हा सर्वांवर आहे!***

"लेंकराचें हित। वाहें माउलीचें चित्त। आईसिं कळवळ्याचिं जाती। लाभाविण करी प्रीती। पोटीं भार वाहें। त्याचें सर्वस्वहीं साहें। तुका म्हणें माझें। तैसें तुम्हां संतां ओझें।।" असे संत श्रीतुकाराममहाराजम्हणतात, ते या संतमाउलीबद्दलच!!

"बोलिलीं लेंकुरें। वेंडीवांकुडी उत्तरें"

"कबीर कबीर क्या कहों। जाओ जमुनाके तीर। एक गँवालनके प्रेममें। बह गएं कोट कबीर।।" अशी भक्ती आम्हाला प्राप्त करून द्यावी, म्हणून त्या ***"ज्ञानियांचा राजा। गुरु महाराव"*** अशा ज्ञानोबामाउलीची हार्दिक प्रार्थना करू या! आणि -

आकल्पें आयुष्य। व्हावें तयां कुळां।
माझियां सकळां। हरीच्या दासां।।
कल्पनेचि बाधा। न हों कोणें काळिं।
ही संतमंडळी। सुखी असो।।
अहंकाराचां वारा। न लागों राजसा।
माझियां विष्णुदासां। भाविकांसिं।।
नामा म्हणें तयां। असावें कल्याण।
जयां मुखीं निधान। पांडुरंग।।

असा **संत श्रीनामदेवां**नी मागितलेला आशीर्वाद माउलीकडे आपणही मागू या!

संत ***श्रीकबीर*** म्हणतातः

मरते मरते जग मरा। मरना न जाना कोय।
ऐसा मरना कोई न मरा। जो फिर ना मरना होय।
मरना हैं दुईं भाँतीका। जो मरना जाने कोय।
रामदुवार (रामद्वार) जो मरे। फिर ना मरना होय।।

देवाच्या द्वारी मरण यावे, म्हणजे पुन:पुनः जन्ममरण मागे लागणार नाही, असे ते म्हणतात. आपलेही मागणे तेच असू द्यावे! त्यासाठी ***"देवाचियें द्वारीं। उभा क्षणभरीं।।"***चा हा खटाटोप आपण करत आहोत. तो सफळ करणे आहे शेवटी सद्गुरुमाउली श्रीज्ञानदेवांच्या हाती! आपण अधिक काय म्हणणार!

श्रीतुकाराम महाराज म्हणतात, तसेच आपण म्हणू या व इत्यलम्।

बोलिलीं लेंकुरें। वेडीवांकुडीं उत्तरें।
करा क्षमा अपराध। महाराज तुम्हीं सिद्ध।।१।।
नाहीं विचारिला। अधिकार म्यां आपुलां।
तुका म्हणें ज्ञानेश्वरा। राखा पायांपें किंकरां।।२।।

"तरी न्यून तैं पुरतें। अधिक तैं सरतें। करूनि घेयावें हें तुमतें। विनवितु असें।।" अशी आपली आळी ज्ञानेशांनी पुरवावी, ही प्रार्थना त्या माऊलीच्या चरणी समर्पित करू या! आणि त्यांच्याबरोबरच म्हणू याः

भरौनि सद्भावाचि अञ्जुली। मियां वोंवियां फुलें मोकलीं।
अर्पिलीं आंघ्रियुगुलीं। विश्वरूपाचां।।

।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।

।।सच्चिदानंदार्पणमस्तु।।

।। श्रीज्ञानदेवार्पणमस्तु।।

।।हरिः ॐ तत् सत्।।

जय जय रामकृष्णहरि। जय जय रामकृष्णहरी।।

विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल। विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल।।

योगदा श्रीज्ञानेश्वरी

संदर्भ व ग्रंथ सूची

श्रीज्ञानेश्वरी

श्री.सर्जेराव द.जाधवःइथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र (आळंदी देवाची ता.खेड, जि.पुणे) -१९७८
श्री.गोपाल नीलकंठ दांडेकरःभावार्थ ज्ञानेश्वरी -१९८४
सं.श्री.शंकर वामन दांडेकर (ह.भ.प.मामा दांडेकर):सार्थ ज्ञानेश्वरी- (अभ्यासोपयोगी प्रस्तावना, गीतेतील कथानके, श्लोकांची सूची, ओव्यांची वर्णानुक्रमणिका, विषयसूची, कठीण शब्दांचा कोश यांसह) -१९८६
:ज्ञानेश्वरी अध्याय १२वा -१९८९
सं.श्री.अरविंद केळकर व वि.मो.मंगरूळकरःज्ञानदेवी (उपन्यास, अन्वय, अर्थ, टीपा, परिशिष्टे व ओवीसूची यांसह) त्रिखंडात्मक -१९९४
ह.भ.प.श्री.शंकरमहाराज खंदारकरःज्ञानेश्वरी भावदर्शन -(२ भाग) - १९८५
श्री.मोरेश्वर बाबामहाराज आर्वीकरःदिव्यामृतधारा-(२खंड) –१९८३
श्री.साखरेमहाराजःसार्थ श्रीज्ञानेश्वरी -१९८९
वेदांतकेसरी श्री.बाबाजीमहाराज पंडितःश्रीज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका-(२खंड) -१९९१
श्री.स्वामी स्वरूपानंदःश्रीमत् अभंग ज्ञानेश्वरी -(२खंड)- १९८७
:ज्ञानेश्वरी नित्यपाठ-१९८०
वैद्य श्री.दत्तात्रय विष्णु जळूकरःस्वामी स्वरूपानंदसंपादित श्रीज्ञानेश्वरी नित्यपाठ (अभ्यास व विवरण)
Swami Umananda : Shri Jnaneshwari *As Understood(3 Volumes)*
श्रीमत स्वामी सत्यदेवानंद सरस्वती, क्षेत्र आळंदीः श्रीज्ञानेश्वरी (हस्तलिखित प्रत, चर्चा इ.सह) -१९७६
कै.अण्णा मोरेश्वर कुंटेःसटीप ज्ञानेश्वरी (अर्थ विवरणात्मक टिपांसह) -१९८५
श्री.श्री.भा.वेर्णेकरःसुबोध ज्ञानेश्वरी -१९७५
न्या.राम केशव रानडेःअमृतज्ञानेश्वरी (६भाग) -१९७८
श्री.रा.ना.चौधरीःगीता-ज्ञानेश्वरी नवनीत -१९८७
श्री.बाळकृष्ण अ.भिडेःसटीप ज्ञानेश्वरी -१९८३
सं.रमेश पंढरीनाथ जोशीःकंठी धरिला कृष्णमणी *(ह.भ.प. विश्वनाथबुवा जोशी यांची ज्ञानेश्वरीवरील रसाळ प्रवचने)* -१९९९
श्री.मं.शं.गोडबोलेःसार्थ ज्ञानेश्वरी -१९७७
श्री.मधुकर रामराव यार्दीःसुरस ज्ञानेश्वरी -१९९१
शाहीर श्री.शंकरराव निकमः"सांगतो ऐका ज्ञानेश्वरी" -१९८५
डॉ.श्री.विनायक रामचंद्र करंदीकरःज्ञानेश्वरीदर्शन -१९९२
श्री.रा.ना.वेलिंगकरःज्ञानेश्वरीचे शब्दभांडार -१९९६
डॉ.के.रा.जोशीःज्ञानेश्वरी सिद्धयोगदर्शन -१९७८
:श्रीनिरंजन रघुनाथ स्वामीमहाराज विरचित ज्ञानेश्वरी दृष्टांत परिभाषा टीका -१९८४
डॉ.श्री.बा.त्र्यं. शाळीग्रामःश्रीज्ञानेश्वरांचा पंथराज -१९७९
सं.अ.भा.मराठी साहित्य संमेलनःपसायदान-१९९६
श्री.श्री.रा.पारसनीस व गो.कृ.मोडकःश्रीज्ञानेश्वरी १६वा अध्याय -१९६९
स्वामी श्री.माधवनाथःज्ञानेश्वरी ज्ञानकिरणे (प्रवचने) -१९८५
श्री.रा.द.रानडेःज्ञानेश्वर वचनामृत -१९८६
श्री.ल.रा.पांगारकरःज्ञानेश्वरांची प्रभावळ *(वेचे-ज्ञानेश्वरी व संतांचे अभंग)* -१९२८
माधवनाथ महाराज, सं.डॉ.सुषमा वाटवेः"भावें अवलोकितां ज्ञानेश्वरी" *(पुष्प१)*-१९९७
श्री.न.चिं.केळकरःज्ञानेश्वरी सर्वस्व -१९७०
श्री.म.वा.धोंडःज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी -१९९१
श्री.विनोबाःज्ञानदेवी सप्तशती -१९८२
डॉ.श्री.शं.दा.पेंडसेःज्ञानदेव आणि नामदेव-महाराष्ट्राचा भागवतधर्म -१९९८
डॉ.श्री.रा.रा.गाडगीळःवैदिक यज्ञ, मध्ययुगीन तंत्रसाधना आणि ज्ञानेश्वरप्रणीत भक्तियोग-१९७९
श्री.शांताराम आठवलेःज्ञानदेवीची आराधना -१९७४
डॉ.श्री.मो.रा.गुण्येःज्ञानेश्वरीचे भावविश्व -१९९०
सं.श्री.वसंत रा.जोशीःज्ञानदेवचिंतन -१९७६
श्री.किसनमहाराज साखरेःसोऽहम् योग *अर्थात ज्ञानेश्वरीतील सोऽहम् विचारदर्शन* -१९८८
सं.श्री.रा.चिं.ढेरेःज्ञानदेव आणि ज्ञानदेवी *लेखसंग्रह* -१९९१
ज्ञानदेवी *लेखसंग्रह* -१९९१
श्री.रा.कृ.देवधरःज्ञानदेवीची गाथा -१९८३
डॉ.वि.रा.करंदीकर व डॉ.हे.वि.इनामदारः"एक तरी ओवी ज्ञानेशांची" -१९९२

डॉ.श्री.वि.रा.करंदीकरःज्ञानदेवांचा गीतासंवाद -१९९४
सौ.उषा माधवराव देशमुखःज्ञानेश्वरी *एक शोध*-१९९०
श्री.प्रह्लाद नरहर जोशीःदैनंदिन ज्ञानेश्वरी -१९९०
सं.तारा देसाईःश्रीभगवन्नामावली *(ज्ञानेश्वरीतील भगवन्नामांचा संग्रह)* -१९८४
स्वामी श्री.माधवनाथःपसायदान -१९८९
श्री.धुंडामहाराज देगलूरकरःपसायदान - *ज्ञानदेवांचे मागणे*
श्री.व.दि.कुलकर्णीःश्रीज्ञानेश्वर - *तत्त्वज्ञ संत आणि कवि*- १९९३
श्री.गो.र.रानडेःज्ञानेश्वरीची षट्दर्शने -१९८८
श्री.हे.वि.इनामदारःज्ञानेश्वरी दशरूपदर्शन - लेखसंग्रह -१९९०
श्री.ग.वि.तुळपुळेःज्ञानेश्वरी- *आत्मानंदाचे तत्त्वज्ञान*-१९६६
Ravin Thatte : The Genius of Dnyaneshwar -2007
Pub.Maharashtra Information Centre: Dnyaneshwari and Bhakti Movement-1994
स्वामी श्री. शिवतत्त्वानंदःश्रीज्ञानेश्वर - *तत्त्वदर्शी व कवि*- १९९१
श्री.ग.वा.कविश्वरःज्ञानेश्वरी विरुद्ध गीता -१९८०
डॉ.वा.पु.गिंडेःकलोळ अमृताचे -१९९०
श्री.किसनमहाराज साखरेःज्ञानेश्वरीतील योगत्रयी - कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग -१९९१
प्रा.रा.शं.वाळिंबेःज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती - १९८८

ज्ञानदेवांचे अभंग

श्री.प्र.न.जोशीःसार्थ श्रीज्ञानदेव अभंगगाथा -१९८९
श्री.नानामहाराज साखरेःश्रीज्ञानदेव गाथा -१९९०
वसुंधरा बनहट्टीःज्ञानदेवांच्या अभंगांतील शब्दकळा -१९९३
श्री.बा.त्र्यं.शाळीग्रामःश्रीज्ञानेश्वरमहाराजांची मुक्ताबाईस सनद -१९८६
विनोबाःज्ञानदेवांची भजने *(चिंतनिकेसह आणि चांगदेवचाळीशी)* -१९९०-
श्री बाबाजी महाराज पंडितःहरिपाठरहस्य -१९७६
ह.भ.प.श्री.धुंडामहाराज देगलूरकरःहरिपाठविवरण -१९८८
श्री.के.वि.बेलसरेःश्रीज्ञानदेवांचा सार्थ हरिपाठ -१९९३
श्री.वामनराव पैःज्ञानेशांचा संदेश -१९८६
श्री.विठ्ठल जिवाजी नाडकर्णीःसार्थ पंचरत्न हरिपाठ व सार्थ चांगदेवपासष्टी -१९८६
श्री.किसनमहाराज साखरेःश्रीज्ञानेश्वरी, श्री अमृतानुभव व श्रीचांगदेवपासष्टी भावपराग -१९८०
श्री.योगिराज मनोहर हरकरेःज्ञानदेव म्हणे *(ज्ञानदेवांच्या अभंगांतील गूढ साधनारहस्य)*-२०००

अमृतानुभव

सं.श्री.गंगाधर देवराव खानोलकरःश्रीशिवकल्याणकृत श्रीअमृतानुभवविवरण -नित्यानंदैक्यदीपिका -१९७१
सं.मुरलीधर धूत व श्री.ब्रिजलाल भुतडाः*स्वानंदसुखनिवासी श्रीरंगनाथमहाराज परभणीकरकथित* अमृतानुभवविवरण -१९८३
वै.विष्णुबुवा जोगमहाराजःसार्थ श्रीअमृतानुभव -१९७७
श्री.रा.ना.सराफःसार्थ अमृतानुभव -१९९०
डॉ.वि.रा.करंदीकरःज्ञानदेवांचा आत्मसंवाद -१९८५
श्री.शिरीष शांताराम कवडेःश्रीअमृतानुभव भूमिका -१९९९
श्री.बाबाजीमहाराज पंडितःअमृतानुभव कौमुदी *(श्रीगुलाबराव महाराजांच्या चौसष्टीसह)*-१९८६
श्री.मं.शं.गोडबोलेःअमृतानुभव -१९८३
ब्र.श्री.विनायक नारायण जोशीःसाखरे सांप्रदायिक शुद्ध सार्थ अमृतानुभव -१९९०
सं.ह.भ.प.श्री.दत्तराज देशपांडे;सार्थ अमृतानुभव व चांगदेवपासष्टी -१९८८
डॉ.श्री.द.देशमुखः*ब्र.भू.शंकरमहाराज खंदारकरकृत* अमृतानुभव भाष्य *(अर्थ आणि इति)* - २०००
श्री.वामन देशपांडेःसार्थ अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी

चांगदेवपासष्टी

स्वामी माधवनाथःस्वस्ति श्रीवटेशु *(श्रीचांगदेवपासष्टीवरील सुबोध विवरण)*-१९९१
सौ.अपर्णा गरुडःसुलभ चांगदेवपासष्टी
सं.डॉ.इंदू लिमयेःसार्थ चांगदेवपासष्टी
श्री.शिवाजी ना. भावेःचांगदेवपासष्टी - *एक अध्ययन*-१९९२
ह.भ.प.ब्र.भू.रंगनाथमहाराज परभणीकरःचांगदेवपासष्टी विवरण -१९८७
सं.वा.पु.गिंडेःश्रीज्ञानदेवांची चांगदेवपासष्टी - १९९२

श्रीमद्भगवद्गीता

श्रीहरिकृष्णदास गोयन्दकाःश्रीमद्भगवद्गीता शांकरभाष्य *(श्लोक, भाष्य और टिप्पणी)* - १९८८

संत श्रीसोपानदेव:श्रीसोपानदेवी-१९९०
स्वामी स्वरूपानंद:श्रीमत् भावार्थ गीता -१९८७
:श्रीमद्भगवद्गीता श्लोकार्थासहित -१९८९
Sri Ramanuja :Gita Bhasya *(trans.by Swami Adidevanand)* - 2007
श्री.जयदयाल गोयन्दका:श्रीमद्भगवद्गीता*(मूल पदच्छेद, अन्वय व सुगम टीपांसह)* -१९८६
पं.वि.दा.सातवळेकर:श्रीमद्भगवद्गीता - पुरुषार्थबोधिनी टीका -१९८७
श्री.नारायण गोविंद देसाई:गीतातत्त्वविवेक *(३खंड)*
स्वामी श्री.रामसुखदास:श्रीमद्भगवद्गीता साधक संजीवनी - १९८२
:गीताकी राजविद्या *(श्रीमद्भगवद्गीताके ७,८ और ९वें अध्यायों की विस्तृत व्याख्या)* -१९८५
:श्रीमद्भगवद्गीताका भक्तियोग -१९८४
:गीताका ध्यानयोग -१९८५
:गीता माधुर्य - १९९०
श्री.लो.बाळ गंगाधर टिळक:श्रीमद्भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र *(गीतेचे बहिरंग परीक्षण,मूळ संस्कृत श्लोक, मराठी भाषांतरे, अर्थनिर्णायक टीपा व पाश्चिमात्य मतांची तुलना वगैरेंसह)* -१९१५
श्री.बालशंकर देशपांडे:गीतारहस्याची अपूर्वता -१९९१
श्री.शैलेंद्र शर्मा:योगेश्वरी श्रीमद्भगवद्गीता *(एक यौगिक व्याख्या)* अनु.रश्मि जवळेकर - २००१
श्री.पांडुरंगशास्त्री आठवले:गीतामृतम् -१९९१
स्वामी विष्णुतीर्थ:गीतातत्त्वामृत -१९७०
स्वामी चिन्मयानंद:श्रीमद्भगवद्गीता १८ भाग -१९८५
:The Holy Gita - 1986
Sri Sri Paramhansa Yoganand :The Bhagvad Gita(2 volumes) - 2005
Swami Sivanand:The Bhagavad Gita -1969
Annie Besant and Bhagavandas:The Bhagavad Gita - 1997
Sri Aurobindo:Essays on The Gita - 2000
Dr.SarvapalliRadhakrishnan:The Bhagavadgita - 2002
Jatindra Mohan Chatterjee : Para veda *or* Pancadasi Gita *2parts* - 1936
श्री.गुरुदेव रानडे:ध्यानोपकारिणी गीता -२००४
श्री.कोपर्डेकर:ध्यानगीता -१९९०
:भगवद्गीता साक्षात्कारदर्शन - १९८६
श्री.श्रीमद् ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद:श्रीमद्भगवद्गीता जशी आहे तशी १९८६
डॉ.श्री.के.रा.जोशी:परार्थ सिद्धयोग श्रीमद्भगवद्गीता - २००४
श्री१००८परमहंस श्रीस्वामी आत्मविवेकानंदजी:श्रीमद्भगवद्गीता रहस्यटीका-१९८५(हिं)
Swami Swarupanand : Srimad Bhagvad Gita - 1989
श्री.के.वि.बेलसरे:श्रीमद्भगवद्गीता -१९८९
योगिराज मनोहर हरकरे -श्रीमत् भगवद्गीता -२०००
श्री.नागेश वासुदेव गुणाजी:सार्थ श्रीमद्भगवद्गीता मोरोपंती समआर्यासह - १९८२
श्री.रामचंद्र गोपाळ पाटील:श्रीमद्भगवदगीता *(शब्दच्छेद, शब्दार्थ, अन्वय व अर्थ यांसह)* -१९९२
श्री.शं.पां जोशी:गीतामाता *ओवीबद्ध*-१९८१
श्री.श्री.द.कुलकर्णी:सर्वसंग्राहक गीता -१९८२
श्री.नीलकंठ बाबुराव परुळेकर:गीतामृत -१९५६
पू.श्री.पांडुरंगशास्त्री आठवले:गीतेचे पंचप्राण -१९९८
:बिल्वदल स्थितप्रज्ञदर्शन -१९८५
:तुलसीदल -१९८६
श्री.अनंत दामोदर आठवले:आत्मसंयमयोग *(सहावा अध्याय)* -१९९२
:जीवनसाधना *(बारावा अध्याय)* - १९८९
गी.भू.श्री.रा.मो.धर्माधिकारी:गीतार्थसोपान
:छात्रगीता -१९८८
श्री.स.कृ.देवधर:श्रीमद्भगवद्गीताभाष्यम् *(२भाग)* -२००३
श्री.विनोबा:गीताई -१९९०
:गीताई चिंतनिका -१९८५
:गीता प्रवचने -१९९१
श्री.गो.रा.मोघे व दि.अ.घैसास:अठरा श्लोकी मराठी भगवद्गीता -१९९०
सं.श्री.रघुनाथ अनंत जकातदार:विवेक देहींच पाहावा -१९९४
डॉ.एस्.पी.वाटवे:गीता आणि निसर्गोपचार -१९८७
स्वामी स्वरूपानंद सरस्वती:श्रीमद् भगवद्गीता *(३भाग)* - २००२
Shrimad A.C.Bhaktivedant Prabhupad Swami:Bhagavad Gita As It is - 1982

पातञ्जल योगसूत्रे

श्रीस्वामी ओमानंद तीर्थ:पातञ्जलयोगप्रदीप -१९८७(हिं)
श्रीस्वामी विष्णुतीर्थजी महाराज:पातंजलयोगदर्शन -१९८१(हिं)

श्री.कृ.के.कोल्हटकर:भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातंजलयोगदर्शन -१९८६
श्री.नानाभाई सदानंद रेळे:पातंजल योगदर्शन -१८९७
श्री.पु.य.देशपांडे:खरा पातंजल योग -१९७९
श्री.शरद वेलणकर:प्राचीन योगविद्या -१९७६
ओशो:योगसूत्र - प्रज्ञा और समाधि -१९९१
डॉ.प.वि.वर्तक:पातंजलयोग - *विज्ञाननिष्ठ निरूपण* -१९८६
Swami Hariharanand Aranya:
trans.P.N.Mukerji:Yoga Philosophy of Patanjali:-1981
Swami Vivekanand : Raja Yoga *with Patanjali's aphorisms* -1982
श्री.हरिकृष्णदास गोयन्दका:पातंजलयोगदर्शन -१९८४ (हिं.)
सं.श्री.हरि जनार्दन दामले:पातञ्जलयोगसूत्राणि - १९८६

नारद भक्तिसूत्रे इ.

स्वामी चिन्मयानंद:नारद भक्तिसूत्रे -१९८६
मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबराव महाराज:नारदीय भक्तिसूत्रभाष्य अनु.प्रा.डॉ.गुणाकर पिंपळपुरे -१९८९
श्री.चं.वा.दांडेकर:श्रीनारदभक्तिसूत्रे -१९८७
श्री.हनुमानप्रसाद पोद्दार:देवर्षि नारद रचित भक्तिसूत्र *(प्रेमदर्शन)* -१९८५ (हिं)
:श्रीहरि गोपीप्रेम
श्री.भा.पं.बहिरट:भक्तिसाधना *(भक्तिविषयक ग्रंथांचा आढावा)* -१९८१
श्री.पांगारकर ल.रा.:नवविधा भक्ती -१९८७
CCMT : The Power of Prayer - 1987
डॉ.वा.ना.पंडित:भक्तितत्त्वविवेक -१९८९

योगशास्त्र

श्री.महादेव दा.भट व सखाराम र.अघारकर:*श्रीगोरक्षनाथकृत* सिद्धसिद्धांतपद्धति -१९७९
Swami Vishnu Tirth Maharaj:Devatma Shakti - 1980
Swami Shivom Tirth:A guide to Shaktipat -1985
:शक्तिपाथप्रदर्शीका अथवा कुंडलिनी सिद्धमहायोग *भाग १* - १९८६ (हिं)
Swami Sivanand:Kundalini Yoga - 1986
:Guru Tatwa - 1981
N.R.Narayana Aiyer:The Technique of Maha Yoga - 1996
Pandit Gopi Krishna:Kundalini - *path to Higher Consciousness* - 1976
:The Awakening of Kundalini - 1980
:Higher Consciousness *(The Evolutionary Thrust of Kundalini)* - 1984
Darrel Irving:Kundalini - *A Modern View : Serpent of Fire* - 2002
Dr.Dayaram Kanal(yogacharya):Kundalini Chakra Rahasya
Harish Johari:Leela *Game of Knowledge* -1984
Swami Sivanand:Tantra Yoga, Nada Yoga and Kriya YOGA 1986
Divine Life Society: Kundalini Yoga - 1986
Yoga Kundalini Upanishad - 1980
Sri Aurobindo & the Mother:Looking from Within - *A Seeker's Guide to Attitudes for Mastery and Inner Growth* - 2002
Sri Aurobindo:Bases of Yoga - 1973
:The Synthesis of Yoga - 1983
श्री स्वामी विष्णुतीर्थ महाराज:श्रीसाधनसंकेत *(महायोगसंबंधित)* -१९८४ (हिं)
:शिवसूत्रप्रबोधिनी -१९७६ (हिं)
:प्रत्यभिज्ञाहृदयम् - १९६८ (हिं)
:आत्मप्रबोध (भाग२) -१९७४ (हिं)
:प्राणतत्त्व -१९८५ (हिं)
:वैदिक योग परिचय -१९७८ (हिं)
:शक्तिपात पथ प्रदर्शिका अथवा कुंडलिनी सिद्धमहायोग -१९८६
श्री.वसंतराव मालपाठक:पिंडीं ते ब्रह्मांडीं अर्थात कुंडलिनीशक्ति व परमेश्वर साक्षात्कार -१९८१
स्वामी नित्यानंदतीर्थ:कुंडलिनी सिद्ध महायोग अर्थात शक्तिपातयोग - २००७
योगेंद्रविज्ञानी:महायोग विज्ञान -१९९७ (हिं)

श्री. श्रीमद् ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद:योगाची पूर्णता -१९८६
:श्रीकृष्णभावनामृत सर्वोत्तम योगपद्धति -१९८६ (हिं)
श्री स्वामी शिवानंद सरस्वती:प्राणायाम साधना - १९८४ (हिं)
:मन - रहस्य और निग्रह -१९८३ (हिं)
:अध्यात्मविद्या - १९८२ (हिं)
:योगाभ्यास का मूलाधार -१९८५ (हिं)
श्री.योगेंद्र विज्ञानी:महायोगविज्ञान - १९९७ (हिं)
श्री.स.कृ.देवधर:ॐकार किमया -१९८४
श्री.महादेव दामोदर भट:सोऽहं साधना -१९८१
श्री.वि.वि.लेले:कोणा एका योगसाधकाची डायरी *(स्वत:चे योगानुभव)*
श्री.न.खं.क्षीरसागर:आत्मशक्ति -१९८६
कल्याण गीताप्रेस:योगतत्त्वांक -१९९१ (हिं)
:साधनपथ - १९८४ (हिं)
श्री.श्री.शं.खानोलकर:योगविद्या -१९८४
श्री.वि.वि.गोखले:ध्यानविद्या - १९८२
प्र.श्रीगजानन बुक डेपो:प्राणायामसाधना व अद्भुत चमत्कार - १९८४
श्री.श्रीपाद विश्वनाथ जोशी:पंचस्तवी *(कर्ते अज्ञात काश्मिरी योगी)* -२०००
म.म.पं.श्री.गोपीनाथ कविराज:शक्ति का जागरण और कुंडलिनी -१९९०
:भारतीय संस्कृति और साधना *(द्वितीय खंड)* -१९७९ (हिं.)
:श्रीसाधना - १९९० (हिं)
:भारतीय साधना की धारा -१९८४ (हिं)
महात्मा श्री.ज्ञानविचारानंदजी:सत्यम् शिवम् सुंदरम् - २००० (हिं)
श्री स्वामी हंसस्वरूप:षट्चक्रनिरूपण - १९८० (हिं)
श्री.श्री.म.वैद्य:साधुसंतांचा देवयान पंथ - १९८८
:षट्चक्रदर्शन व भेदन -१९८८
डॉ.वि.म.भट:योगसिद्धी आणि ईश्वरसाक्षात्कार - २००७
श्री.के.वि.बेलसरे:भगवंताचे अनुसंधान - *साधनेचा प्राण* -१९९३
:भगवंताच्या नामाचे दिव्य संगीत - अनाहत नादश्रवण -१९९९
:ईश्वरभक्तिदर्शन अथवा प्रेमयोग -१९८७
:सहज समाधी -१९८५
श्री.चं.वा.दांडेकर:योगतारावलि -१९७९
गुरुदेव रा.द.रानडे:योगतारावलि -१९९७
श्री.प्र.न.जोशी:नाथपंथ (उदय व विस्तार) - १९७७
B.S.Goel : Third Eye and Kundalini -1986
डॉ.के.रा.जोशी:शक्तिपातयोगरहस्य *अर्थात सिद्धमहायोगशास्त्र* -१९७३
:शिवसंहिता *(महायोगी आदिनाथ श्रीमहादेव विरचित)* - १९७८
:योगशिखोपनिषद -१९९१
:योगबीज *(महायोगी गोरक्षनाथ विरचित)* - १९९५
:भावनोपनिषद - १९९१
:सिद्धसिद्धांतसंग्रह -१९७७
:अमरौघप्रबोध *(महायोगी गोरक्षनाथ विरचित)* -१९८२
:श्रीकुंडलिनीस्तुतिस्तोत्र *(आदिशक्ति महाभैरवी विरचित)* -१९९९
:मूळस्तंभ *(सिद्धांत अवधूत सकल सिद्धशिरोमणी आदिगुरू श्रीदत्तात्रेय विरचित)* - २००२
:अद्वयतारकोपनिषद - १९८४
:अमृतबिंदूपनिषद अथवा ब्रह्मबिंदूपनिषद -१९८५
:श्रीगुरुगीता -१९९९
:सौभाग्यलक्ष्म्युपनिषद - १९८६
:*श्रीक्षेमराज विरचित* शक्तिसूत्रे - १९८४
:योगतारावलि - १९९६
Swami Muktanand:Secret of The Siddhas - 1984
:Where Are You Going- 1983
:चित्शक्तिविलास
Swami Chinmayananda : Meditation and Life - 1980
: A Manual of Self Unfoldment - 1985
Swami Vivekanand:Bhakti Yoga - 1983
:Karma Yoga - 1984
Swami Abhedanand:How To Be A Yogi - 1985
Swami Buddhanand:The Mind and Its Control - 1971
Monks of the Ramkrishna order:Meditation
Dr. Paul Brunton:The Hidden Teaching Beyond Yoga - 1986
श्री.हंसराजस्वामी:लघुवाक्यवृत्ती - १८४९
श्री.विष्णु गणेश नेने:पंचीकरण -२००२
स्वामी शिवानंद सरस्वती, वरूड:ध्यानयोग रहस्य -१९८५
श्री.राजयोगी हिराजी महाराज:ब्रह्मसाक्षात्कार
श्री.जयदयाल गोयंदका:ज्ञानयोगका तत्त्व - १९८४
श्री.गोविंद मोरोबा कार्लेकर:हठ, लय, मंत्र आणि राजयोग -संपूर्ण योगविद्येचे रहस्य

डॉ.श्री.बालाजी तांबे:चक्र सुदर्शन - २००७
श्री.सतीश भालचंद्र वर्तक:साधकाचा उष:काल
श्री.गणेश नीलकंठ पुरंदरे:साधना - १९७८
डॉ.पं.श्रीपाद दामोदर सातवळेकर:योगसाधनेची तयारी - १९७२
योगिराज मनोहर हरकरे:सुलभ योगसाधना - २०००
प्र.गजानन बुक डेपो: *नवनाथ संप्रदायातील अतिशय गुप्त दुर्मिळ व अद्भुत भगवान गोरक्षनाथ लिखित* गोरक्षसंहिता
श्री.व.ग.देवकुळे:हठयोगप्रदीपिका
:घेरंडसंहिता - १९८५
स्वामी शिवोम् तीर्थ:कुंडलिनी सिद्धमहायोग -१९८४ (हिं)
:आह्लादिनी सिद्धमहायोग -१९८६(हिं)
:शक्तिपात प्रश्नोत्तरी - १९७४(हिं)
:साधन पथ - १९८५(हिं)
श्री स्वानंद सरस्वती:हठयोग प्रदीपिका *भगवान गोरक्षनाथ लिखित* -१९८६
:मंत्राने कुंडलिनीजागृती
श्री.श्रीमद् ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपादस्वामी:हरे कृष्ण *कलियुगातील साधना* -१९८९
Shri Yogendra : Hatha Yoga simplified - 1982
Yoga Sadhaka Group : Self Improvement - 1980
Swami Satyanand Saraswati:Kundalini Tantra - 1984
:Taming The Kundilini : 1982
Sir John Woodroffe:The Serpent Power -1986
:Sakti and Sakta - 1975
:Reflections on the Tantras - 1978
:Principles Of Tantra (Part I) With Siva Candra Vidyarnava Bhattacharya Mahodaya :Tantra Tatva of Sriyukta -1986
(Part II) With Sudhakar Chattopadhyaya:Tantra Tatva - 1986
श्री.बी.के.अय्यंगार:योग - एक कल्पतरू - १९९८
श्री.विश्वनाथ मुकर्जी:भारतके महान योगी *(६ खंड)* - १९८६
श्री.ज.वा.जोशी:साधनासंहिता(श्री.बाबामहाराज आर्वीकर लिखित) भावार्थदर्शन - १९९५

तंत्र व मंत्रशास्त्र

श्री १०८ जगद्गुरू श्रीशंकराचार्य श्रीयोगेश्वरानंदतीर्थ *(श्री.खरेशास्त्री)* सं.श्री.गो.प्र.भावे:मंत्रशास्त्र - १९८७
श्री.के.रा.जोशी:ज्ञानसंकलिनीतंत्र -१९७५
सं.विज्ञानमंदिर, ऋषिकेश:कुलार्णवतंत्र -१९८७
श्री.चंद्रहास जोशी:श्रीशिवस्वरोदयशास्त्र -१९९२
श्री.चं.वा.दांडेकर:श्रीललितासहस्त्रनामस्तोत्र -१९८५
डॉ.सौ.रजनी पत्की:लक्ष्मीतंत्रोक्त श्रीसूक्तप्रदीपिका -२०००
M.P.Pandit:Kundalini Yoga - 1979
Robert E.Svoboda:At the left hand of God-2000
:Kundalini Aghora II - 2001
:Aghora-III - 2001
R.Ananthkrishna Sastry:*Mantrasastra -* Lalita Sahasranaman *with Bhaskararaya's commentary* - 1976
श्री१००८ स्वामी विष्णुतीर्थ महाराज:सौदर्यलहरी *श्रीविद्यातत्त्व और कुंडलिनी रहस्य सहित* -१९७७(हिं)
श्री.कृ.भा.परांजपे:श्रीयंत्रसामर्थ्य आणि प्रत्यय - २००५
सौ.कमल बापट:सौंदर्यलहरी *पद्यरूप भावानुवाद* - १९८९
Swami Tapasyanand:Saundarya Lahari of Sri Shankaracharya - 1990

संतांचे अभंग व इतर रचना

श्री.शिरीष शांताराम कवडे: *सद्गुरू श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या तत्त्वपरंपरेतील लघुग्रंथसप्तक* :श्रीशुकाष्टक टीका, आज्ञापत्र, श्रीप्रकाश ग्रंथ,शांभवी कल्प नमन, तत्त्वमसि महावाक्य, पंचीकरण, उत्तरपंचविशी -१९९७
सं.कै.गोविंद काशिनाथ चांदोरकर:श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे योगवासिष्ठ - १९९२
श्रीमद् गोस्वामी तुलसीदास:श्रीरामचरितमानस *सं.हनुमानप्रसाद पोद्दार, गीताप्रेस* -१९९८ (हिं)
सं.गीताप्रेस:हिंदी संतोंके भजनसंग्रह -१९८४ (हिं)
श्री.रा.द.रानडे:संत वचनामृत - १९८६
:रामदास वचनामृत -१९८६
प्रा.के.वि.बेलसरे:सार्थ श्रीमत् दासबोध -१९९१
:दासबोधामृत - २००२
श्री.शंकर कृष्ण देव:श्रीदासबोधाची प्रस्तावना -१९९७
सं.कृ.वि.सोमणशास्त्री:सटीप दासबोध -१९८८
श्री.दि.अ.घैसास:श्रीदासबोध सार -१९८३
डॉ.तु.द.जोशी:शोध समर्थांचा -१९८७
डॉ.श्री.ना.धों.देशपांडे:सार्थ श्री मनाचे श्लोक -१९८२
श्री.प्र.ह.कुलकर्णी:मनोबोधामृत *सार्थ - श्री भाऊसाहेब उमदीकर यांच्या विवरणासह* -१९९०

प्रा.के.वि.बेलसरे:सार्थ मनाचे श्लोक -१९८८
सं.महाराष्ट्र शासन:श्री नामदेव गाथा -१९७०
अनु. श्री.कृ.ना आठल्ये,सं.श्री.रा.कृ.कामत:सार्थ श्री एकनाथी भागवत - १९८७
प्रा.के.वि.बेलसरे:भावार्थ भागवत - १९८९
संत श्री एकनाथ महाराज:श्री रुक्मिणीस्वयंवर -१९९९
डॉ.श्री.प्र.न.जोशी:सार्थ तुकाराम गाथा - १९६९
सं.डॉ.श्री.म.वि.गोखले:*आद्यकवि मुकुंदराज विरचित* विवेकसिंधु -१९७७
स्वामी स्वरूपानंद:श्रीमत् संजीवनी गाथा -१९४५
:स्वामी म्हणे *बोधवचने* -१९८७
:स्वरूप पत्र मंजूषा ओवीबद्ध पत्रे – १९८३
मधुराद्वैताचार्य श्री गुलाबराव महाराज:सुबोध हिंदुधर्म
श्री.विनायक लक्ष्मण भावे,सं.शं.गो.तुळपुळे :महाराष्ट्र सारस्वत *(२खंड)* -१९८२
श्री.यशवंत पाठक:*निरंजनाचे माहेर* -मुक्ताई जनाई वेणाई -१९९७
डॉ.हे.वि.इनामदार:अभंग नवनीत - २००७
Sri Aurobindo:Savitri - 1988
:The Secret of Yoga - 1985

संत चरित्रे व उपदेश इ.

ह.भ.प.ल.रा.पांगारकर:श्रीज्ञानेश्वर महाराज चरित्र आणि सार्थ विवेचन - १९१२
श्री.गोपाल नीलकंठ दांडेकर:मोगरा फुलला -१९८६
प्रा.श्री.र.रा. व सौ.वीणा र.गोसावी:श्रीसोपानदेव चरित्र - १९८७
अरुणा ढेरे:महाद्वार - *चोखामेळा चरित्र* -१९९०
श्री.मालू कवि विरचित:श्रीनवनाथ भक्तिसार -१९८९
सौ.तारा चौधरी:सुलभ नवनाथ कथासार -१९८१
श्री.चंद्रहास शेट्ये:अमोघ - *ऐक्याचा महान संदेश देणाऱ्या नवनाथांची स्मरणीय गाथा* - १९९०
सौ.मंगला वैष्णव:शिवदीन केसरीनाथ - *व्यक्ती आणि वाङ्मय* - १९८५
भगवान श्रीधरस्वामी:आर्य संस्कृति - १९९७
श्री.ज्ञानेश्वर तांदळे:श्री शंकर महाराज -*अद्भुत चरित्र व अलौकिक उपदेश* - १९८५
श्री.अनंत गजानन दातार:श्रीसमर्थ रामदास आणि याज्ञवल्क्य -१९८२
श्री.मारुतीबुवा रामदासी:प.प.भगवान श्रीधरस्वामी महाराज यांचे चरित्र - १९९३
श्री.रा.कृ.जोशी: स्वकरे चंदन घाशी - १९८६
: अद्वैत -*श्रीमत् शंकराचार्य जीवनगाथा* - १९८६
श्री.रा.य.परांजपे:स्वामी स्वरुपानंद *जीवनचरित्र आणि तत्त्वज्ञान* -१९८७
:स्वामी स्वरुपानंद *संक्षिप्त चरित्र* - १९८७
श्री.गो.रा.जोशी:पुण्य पाऊले पावसची - *श्रीमत् स्वामी स्वरुपानंद* - १९८७
स्वामी माधवनाथ, सं.डॉ.सुषमा वाटवे:स्वामी स्वरुपानंद जीवनदर्शन - १९९८
श्री.महादेव दामोदर भट:स्वामी स्वरुपानंद -*एक अलौकिक राजयोगी* - १९७६
सौ.मृणालिनी जोशी:अमृतसिद्धी
स्वामी सत्यदेवानंद सरस्वती:गीत स्वरुपायन - १९७०
श्री.महेंद्रनाथ गुप्त एम्:श्रीरामकृष्ण वचनामृत *(२भाग)* - १९९९
स्वामी सारदानंद:श्रीरामकृष्णलीला प्रसंग *(३भाग)* - १९८३
श्री.वि.रा.करंदीकर:रामकृष्ण आणि विवेकानंद - १९९१
Mahendranath Gupta (M):The Gospel of Sri Ramkrishna (2 vol.) - 1942
Prof.F.Max Muller:Ramakrishna Paramhansa *The Rational Mystic* - 2007
श्री.रमेश मुधोळकर:श्रीरामकृष्ण परमहंस - १९८७
डॉ.श्री.रा.य.परांजपे:श्रीरामकृष्ण चरित्र - १९९९
डॉ.श्री.के.भा.गव्हाणकर:शिरडीचे साईबाबा - २००६
:साईबाबा हाच चमत्कार - १९८९
श्री.म.ना.तथा भाई सावंत:शिर्डीचे साईबाबा - *जन्म आणि बालपण* - २००७
श्री.कमलाकर आनंदराव भोजने:श्रीगजानन महाराज भक्तिविजय - १९८६
श्री.शं.रा. देवळे:गजानन महाराज चरित्र - १९८६
श्री.वि.के.फडके:श्रीगजानन महाराज शेगाव-*चिंतन आणि चमत्कार* - १९८५
डॉ.श्री.अशोककुमार चटर्जी वाचस्पति, अनु.चं.अ.पाध्ये: पुराणपुरुष योगिराज श्रीश्यामाचरण लाहिडी - २००१
श्री.वसंत वि.पाठक:गोंदवल्याच्या परिसरात - २००६
श्री.श्रीकांत गावंडे:श्री गोंदवलेकर महाराजांच्या गोष्टी - १९७९
श्री.के.वि.बेलसरे:श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज चरित्र आणि वाङ्मय - १९८६
सं.श्री.गो.सी.गोखले:श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर प्रवचने - १९९१
श्री.वि.के.फडके:श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवले चिंतन आणि चमत्कार - १९८७

श्री.ग.वि.तुळपुळे व ना.द.हरिदास:*साधक बोध* - श्रीसद्गुरु भाऊसाहेब महाराज उमदीकर यांची शिकवण - १९९२

श्री. दासराम:शरणागति *श्री अंबुराव महाराज चरित्र* - १९९१

श्री.विजया आपटे शकुंतला रानडे:जैसी गंगा वाहे - १९९५

श्री.कृ.दा.संगोराम:श्रीगुरुदेव रानडे यांच्या पुण्य स्मृती - १९८५

पद्मश्री काकासाहेब कारखानीस:श्रीगुरुदेवांच्या आठवणी - १९९२

श्री.रामण्णा कुलकर्णी:श्रीगुरुदेव दर्शन - १९९२

श्री.दादासाहेब देशपांडे:*गुरुदेव रानडे* जीवन दर्शन - १९८६

श्री.व्यंकटेश गो.आपटे:फल्गु *आत्मानुभूति -योगगंगा निंबरगी संप्रदायाची* - १९८८

श्री.के.वि.बेलसरे:संतांचे आत्मचरित्र - १९८८

श्री.प्र.न.जोशी - संतसंग - १९७९

डॉ.श्री.हे.वि.इनामदार:संत नामदेव -*काव्य आणि संत परिवार* - १९८७

डॉ.दा.बा.भिंगारकर:संत कवियित्री जनाबाई -*चरित्र, काव्य आणि कामगिरी* - १९८९

श्री.नारायणदत्त रावल:साधन संपदा *श्री स्वामी विष्णुतीर्थ जी के जीवन की झाँकियाँ* - १९८४ (हिं)

पं.गोपीनाथ कविराज:साधुदर्शन एवं सत्प्रसंग - १९८४ (हिं)

स्वामी शिवोमतीर्थ:योगविभूति श्री १०८ श्री स्वामी शंकरपुरुषोत्तमतीर्थ - १९८०(हिं)

श्री शिवोम् प्रकाश ब्रह्मचारी:नारायणतीर्थ उपदेशामृत - १९८३(हिं)

श्री.रामनिवास शर्मा:योगेंद्रचरित -*शक्तिपात परंपरा* - १९७८(हिं)

चित्रकार डी.डी.रेगे:श्रीसद्गुरू जंगलीमहाराज - १९९४

प्राचार्य श्री.शिवाजीराव भोसले:मुक्तिगाथा महामानवाची - योगी अरविंद - १९८८

परमहंस योगानंद:योगी कथामृत - १९८७

स्वामी शिवानंद:शिवानंद आत्मकथा - १९८५

WHO:Maha Yoga of Bhagvan Sri Raman -1984

Santan Rodrigues:*The Householder* - Life of Shri Yogendra - 1982

श्री.पुरोहित स्वामी:मी एक संन्यासी - १९८७

श्री.के.वि.बेलसरे:साधकांसाठी संतकथा - १९८७

श्री.रा.चिं.ढेरे:श्रीस्वामी समर्थ -*श्री गोपाळबुवा केळकर यांनी लिहिलेली बखर* - १९८६

सं.श्री.दिगंबर द.जोशी:"भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे" - १९८८

स्वामीभक्त कै.गणेश बलाळ मुळेकर:श्री अक्कलकोट निवासी स्वामी महाराज यांचे चरित्र - १९८१

श्री.ल.म.जोशी:श्री सद्गुरू स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज *चरित्र व मार्गदर्शन* - १९७९

कै.श्री.लक्ष्मण गणेश बापट:*श्री सद्गुरू बीडकर महाराज यांचे विचार* विचार जागृति - १९७९

:श्री सद्गुरू रामानंद बीडकर महाराज चरित्र - १९८१

:*रावसाहेब सहस्त्रबुद्धे चरित्र* -रावसाहेब माझा मोतीदाणा - २००७

श्री.श्री.रा.देशपांडे:श्री सद्गुरू रावसाहेब सहस्त्रबुद्धे चरित्र - १९७८

श्री नरसी महेता चौरा संस्था:श्री नरसी महेता के जीवन प्रसंगों की झाँकी - १९९२ (हिं)

श्री.शिरीष शांताराम कवडे:म्हारॉ री गिरधर गोपाल-*श्री संत मीराबाईंच्या अभंगांचे मुक्त चिंतन* - १९९६

श्री.अरुण गोखले:अमृतकण-*ज्ञाननाथ रानडे सत्संग* - २०००

महिपति कविकृत:भक्तिविजय कथासा-*संतचरित्रे* - १९८९

सद्गुरू श्री.वामनराव पै:अमृत तुषार - १९८४

श्री श्रीमद् ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद:जन्ममृत्यूच्या पलीकडे - १९८६

:अन्य लोकांप्रत सुगम यात्रा - १९८६

CCMT:Sankara *the missionary* - 1978

श्री.हनुमानप्रसाद पोद्दार:भक्तसौरभ - १९८६

:अमृतकण - १९८४

श्री.नारायण हरि खरे:संत सांगाती - १९९९

श्री.पांडुरंगशास्त्री आठवले:ऋषिस्मरण - १९८७

अध्यात्मशास्त्र, प्रवचने व पारमार्थिक अनुभव

Swami Muktanand Paramahamsa :From the Finite to The Infinite - 1988 (2 vol.)

डॉ.श्री.म.वि.गोखले:श्रीयोगवासिष्ठ -*संपूर्ण ग्रंथाचे मराठी भाषांतर (३भाग)* - १९८१

डॉ.श्री.रा.प्र.पारनेरकर:*परिचय* - पूर्णवाद - १९९९

गीताप्रेस:देवीस्तोत्ररत्नाकर - २०००

श्री.मुनीलाल, गीता प्रेस:अध्यात्मरामायण *अनुवादसहित* - १९८९ (हिं)

:*श्रीशंकराचार्य विरचित* विवेकचूडमणि - १९८४ (हिं)

:*श्री आद्य शंकराचार्य विरचित* अपरोक्षानुभूति - १९९० (हिं)

स्वामी चिन्मयानंद:विवेकचूडामणि *(२भाग)* - १९८४

:श्रीमद् आद्य शंकराचार्य विरचित वाक्यवृत्ती - १९८६

:Introduction to Kashmir Shaivism - 1979

श्री समर्थ सद्गुरू सिद्धरामेश्वर महाराज पात्री:आत्मज्ञानाची गुरुकिल्ली - १९८६

श्री.अरुण गोडबोले:श्री दासबोध नित्यपाठ -२००२

:निवडक पदांवरील प्रवचने - २००३

श्री.मधुकर रामदास जोशी:नाथसंप्रदाय -१९८०

योगी ज्ञाननाथजी रानडे:"तो हा नाथसंकेतींचा दंशु" - १९९१

प्रा.डॉ.रा.द. तथा गुरुदेव रानडे:मराठी संतवाङ्मयातील परमार्थमार्ग -१९९३

:कन्नड संतवाङ्मयातील परमार्थमार्ग - १९९२

डॉ.म.वि.पाटणकर:*श्री गुरुदेव लिखित* हिंदी परमार्थसोपान *ग्रंथांतील निवडक पदांवरील प्रवचने*-२००३

श्री.ग.वि.तुळपुळे:*गुरुदेव रानडे* -साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान - २००४

:परमार्थपथ *श्रीसमर्थकृत मनाच्या श्लोकांच्या आधारे* - १९९२

:संतप्रणीत स्वरूप साक्षात्कार मार्ग -१९९०

श्री.प.प.सद्गुरू भगवान श्रीधर स्वामीजी:मोक्ष संदेश-*निःस्पृह साधकांना बहुमोल मार्गदर्शन* - १९९४

श्री स्वामी स्वरूपानंद:तीन प्रवचने - १९८७

प्रा.के.वि.बेलसरे:आत्माराम -*श्रीसमर्थ रामदासकृत* -२०००

:आनंद साधना -*एका साधकाचा साधनवृत्तांत* -१९८७

: स्वस्वरूप अनुसंधान अथवा अंतर्यात्रा-१९८६

:श्री महाराजांचे विचारसौंदर्य -१९८८

:मनाची शक्ति *साठवणूक आणि नागवणूक* -१९९१

:ईश्वरस्वरुप आणि साक्षात्कार -१९९०

:अध्यात्मदर्शन - १९९१

श्री.रा.कृ.कामत:नामजपाचे महत्त्व *भाग १* - १९८७

:*शब्दांकन प्रा.श्रीपाद बेलसरे* - चैतन्यसुधा - समाधानपर्व *श्री. बेलसरे महाराज* - २००४

न्यायरत्न धुंडिराज विनोद:धवलगिरी - १९६४

श्री.बेलसरे महाराज, सं.श्री.म.वि.केळकर:अध्यात्मसंवाद *भाग १* - २०००

अध्यात्मसंवाद *भाग २* - २०००

अध्यात्मसंवाद *भाग ३* - २०००

अध्यात्मसंवाद *भाग ४* - २०००

श्री.न.चिं.केळकर:तत्त्वज्ञान खंड - १९३८

प्रा.डॉ.श्री.ग.ना.जोशी:भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास -१९९४:

:खंड १ - वेद, उपनिषदे व भौतिकवाद

:खंड २ - बौद्धदर्शन

:खंड ३ - चार दर्शने

:खंड ४ - पूर्वमीमांसा व शांकरवेदांत

:खंड ५ - शंकरोत्तर वेदांत व शैव दर्शन

:खंड ६ - योगदर्शन व शाक्तमत

:खंड ७ - महाराष्ट्र संत

:खंड ८ - भक्तिसंप्रदाय व प्रमुख भारतीय संत

:खंड ९ - आधुनिक भारताचे तत्त्वज्ञान

:खंड १० - महाराष्ट्रातील प्रबोधनकार

:खंड ११ - आधुनिक भारतीय तत्त्वचिंतक

:खंड १२ - श्रीमद्भगवद्गीता *नीतिशास्त्र* व उल्लेख सूची

श्री १००८ स्वामी विष्णुतीर्थ जी महाराज:आत्मप्रबोध - १९८५ (हिं)

श्री. शिवोम् प्रकाश ब्रह्मचारी:गुरु परंपरा - १९८१

डॉ.भगवतिप्रसाद सिंह:मनीषीकी लोकयात्रा *म.म.पं.गोपीनाथ कविराज का जीवन दर्शन* - १९९१ (हिं)

:सिद्धयोग्यांच्या सहवासात *अनु.गणेश नीलकंठ पुरंदरे* - १९८९

कै.जी.के.प्रधान:"साद देती हिमशिखरे" *अनु.डॉ.रामचंद्र ज.जोशी* - १९८७

:अंतरीचा मागोवा *अनु.म.ना.झोळ* -१९९६

श्री.दिलीपकुमार रॉय:दैवी चमत्कार *आजही घडतात* - १९९९

श्री.गंगाराम रहाटे:स्वामी समर्थांच्या जीवनातील चमत्कार - २००७

श्री गजानन महाराज गुप्ते:आत्मसाक्षात्कार मार्ग प्रदीप -१९४४

श्री.द.ल.निरोखेकर:आत्मप्रभा - १९४७

सौ.मालती बाळ:कोणा एकाची साधनगाथा - १९८७

गोविंदसुत श्री.परशुराम गो.चिंचाळकर:आत्मानुसंधान -१९८५

ShriJ.Krishnamurti:Krishnamurti's Notebook -2003

Keith Dowman:Masters of Enchantment *The Lives and Legends of the Mahasiddhas*-1988

Sadhguru Jaggi Vasudeva:Mystic's Musings - 2004

Shri Vijayadev Yogendra:Shri Yogendra *The Householder Yogi* - 1977

Shri Yogendra:Yoga Essays - 1978

Sau.Deepa Kodikal : A Journey Within The Self - 1992

Dr. Paul Brunton:A Hermit In The Himalayas - 1980

:The Secret Path - 1985

Swami Yatiswaranand:Meditation and Spiritual Life - 1983
Swami Chinmayanand:*Adi Sankara's* Sadhana Panchakam - 1984
:*भगवान श्री शंकराचार्यविरचित* आत्मबोध - १९८२(हिं)
स्वामी श्री.विष्णुतीर्थ:अध्यात्म विकास - १९७२ (हिं)
डॉ.श्री.वा.ना.पंडित:अद्वैत भक्ति - १९८८
श्री.रा.कृ.जटार:स्वानंद साम्राज्य - १९८३
डॉ.श्री.हे.वि.इनामदार:श्रीज्ञानेश्वर आणि संतमंडळ - १९८०
डॉ.गंगाधर मोरजे:ज्ञानदेव -*वाद आणि आकलन* - १९९३
श्री.शिरीष शांताराम कवडे:"तैं शरीरभाव आटती" - *प्रवचने* -१९९९
स्वामी आत्मदेव अवधूत विरचित:आत्मगीता - १९८९ (हिं)
नामधारक श्री.वामनराव पै:अमृत मंथन - १९७९
स्वामी माधवनाथ महाराज:"हे गुरुशिष्याची गोठी" - १९९१
विमला ठकार:विमल वैजयंती - १९८९
:आधार पण आश्रय नव्हे - १९८८
:आत्मोल्लास - १९८९
श्री.बाळ सामंत:पुनर्जन्म -*एक शोध* - १९८७

वेदोपनिषदे

पद्मभूषण ब्रह्मर्षी पं.श्री.वि.दा.सातवळेकर:ऋग्वेद संहिता-१९८५
:सामवेद-अर्थ व स्पष्टीकरणासहित - १९८५
:अथर्ववेद संहिता - १९८४
म.म.विद्यानिधी डॉ.श्री.सिद्धेश्वरशास्त्री चित्राव:अथर्ववेदाचे मराठी भाषांतर -संहितेसह - १९७२
प्र.कल्याण, गीता प्रेस:शिक्षांक - १९८८ (हिं)
वे.शा.सं.विष्णुशास्त्री बापट:श्री याज्ञवल्क्यस्मृति *विज्ञानेश्वरांच्या मिताक्षरासह* - १९१२
पं.श्री.द.सातवळेकर:पुरुष सूक्त - १९७६
श्री.महादेव गंगाधरभट्ट बाक्रे:ऋग्वेदीय सार्थ संध्या - १९८३
प्र.जी.के.ब्रदर्स:अथ हिरण्यकेशीया कृष्णयजुर्वेदीय संध्या -२००४
श्री.वि.के.वैशंपायन:हिरण्यकेशीया कृष्णयजुर्वेदीय संध्या - २००४
श्री.पांडुरंगशास्त्री आठवले:त्रिकाल संध्या - १९७७
श्री.नारायणशास्त्री आंजर्लेकर:वयोवस्थाभिध शान्तिसमुच्चय - १९८३
गुरुदेव रानडे:उपनिषद्रहस्य - २००३
डॉ.सौ.रजनी पतकी:वेद उपनिषदे परिचय - २००७
डॉ.श्रीकृष्ण द.देशमुख:कठोपनिषद - १९८०
:माण्डूक्योपनिषद - १९८७
:अद्वैत मकरंद-*परमार्थातील पारिभाषिक शब्दांच्या अर्थासह* - १९९६
स्वामी चिन्मयानंद:माण्डूक्योपनिषद आणि कारिका - १९८६
Swami Madhavanand:Minor Upanishads-1992
Swami Swahanand:Chchandogya Upanishad -1956
Swami Sarvanand:Taittiriyopanisad
प्रा.के.वि.बेलसरे:उपनिषदांचा अभ्यास *दशोपनिषदे* - १९९५
स्वामी शिवतत्त्वानंद:केन उपनिषदाचे अंतरंग - १९८१
:ईश उपनिषदाचे अंतरंग - १९८०
:मुंडक उपनिषदाचे अंतरंग - १९८३
श्री.अ.दा.आठवले:उपनिषदकौमुदी *बृहदारण्यकोपनिषद* - १९८६
श्री.पांडुरंगशास्त्री आठवले:ईशावास्यम् - १९८३
श्री.हनुमानप्रसाद पोद्दार:उपनिषदों के चौदह रत्न - १९८६
श्री.शांताराम थत्ते:सार्थ अष्टावक्र गीता - १९७८
श्री.हरिकृष्णदास गोंदका:वेदांत दर्शन ब्रह्मसूत्र - १९८६ (हिं)
वै.विष्णुबुवा जोग महाराज:वेदांतविचार - १९७२ सं.श्री.द.वा.जोग
:*आचार्यभक्त बापटशास्त्री यांच्या ग्रंथांच्या आधारे* वैदिक शांकर अद्वैतमतानुवाद - १९५४
कै.पं.श्री.दा.सातवळेकर:वैदिक व्याख्यानमाला - २००४
संक्षेपक व अनु.श्री.रा.दि.दीक्षित:ज्ञानसुधा
डॉ.श्री.द.देशमुख:स्तोत्रावली *श्रीमत् आद्यशंकराचार्य विरचित (भाग १ व २)* - १९९४
प्रा.सु.ग.शेवडे:प्रकरण ग्रंथ श्रीमत् आद्यशंकराचार्यांचे - १९९५
डॉ.गंगा सहाय शर्मा:ऋग्वेद - २००६

गीताश्लोक व ज्ञानेश्वरीच्या ओव्या

उन्मेष १-१:

गीता श्लोक

२:७,७१

४:१०

६:२२,२८-३१

७:३,,१९

८:१४

९-२२,३४

१०:१०,११

११:३३,४७,५४,५५

१२:७,१३-२०

१३:१८,२३,३०,३४

१४:१९,२०,२३-२५

१५:५,६,१९

१६:२२

१८:३६,३७,४९-५८,६१,६२,६५,६६,७८

ज्ञानेश्वरी ओव्या

१:१,५६-७१

२:१-५,५५-८०

६-१४,२८-३०,३२-३६,४९२,४९३

७:१२०-१२२,

९:१,५३४

१०:४३,४५

११:९,१०

१३:११५३,११५४,११५८-११६१,१८००

१७:८४,८६

१८:९८१-९८३,१११-१११७,११२४-११३१,११३३,११४७,११४९,११५१-११५७,११६१-११६३,११६८, ११७१-११७४, ११७६-११८२,११८५-११८७,११९२-१२००,१२०४,१२०५,१२०९,१२१०,१२१९,१२२२,१२५८,१३२०-१३२२,१४१७-१४२०,१४२२-१४२५,१५७४,१५७५,१५९०-१६०१,१६३२-१६५९,१६६१, १६६२,१६६७,१६८०-१६८४,१६८९,१६९४,१६९५-१६९७,१७४४,१७४७,१७४९-१७६१,१७९९,१८०१,१८०७,१८०९

उन्मेष १-२:

गीताः

२:१६,१७,२०,२१,२४,२५,३१-३८,४०,५१

३:३,१४,१५,१९,२०,३०,३१,३५,३६-४०,४१,४२,

४:१,९,२४

११:४३,४४

ज्ञानेश्वरीः

१:१

३:२३२-२७१

४-४१-५९

११-५५९-५७८

१८-१४२६-१४६६,१७९३-१८०१

उन्मेष १-२:

गीताः

२-१६,१७,२०,२१,२४,२५,३१-३८,४०,५१

३:३,१४,१५,१९,२०,३०,३१,३५,३६-४०,४१,४२,

४-१,४-९,२४

११-४३,४४

ज्ञानेश्वरीः

१:१

३:२३२-२७१

४-४१-५९

११-५५९-५७८

१८-१४२६-१४६६,१७९३-१८०१

उन्मेष २:

गीताः

४:३३

११:३८

१३:१,७

१५:१५

ज्ञानेश्वरीः

१:१-५५,६६-८४

१०:१-१५,१७-२२

३:२७२,२७३

१०:२३-४०

१२:१-१९

१३:१-६,३६८-४६०,११५३-११६९

१५:५७०-५९२

१८:१६६१-१६६६

उन्मेष ३:

गीताः

२:७

१८:७८

ज्ञानेश्वरीः

१:१-३

२:५५-६३

६:३१९-३२८

१३:१-२

१४:१-३१

१५:१-२८

१६:१-३१

१७:१-२०

१८:१-२९,१३२३,१७९४-१८०१,१८०७-१८०९

चां.पा.१,६१-६५

अमृतानुभवः

पंचश्लोकीः१-५

१०:२८-३१

अभंगः२२१,५४४

उन्मेषः४:

उन्मेष ५

गीताः

१:१

ज्ञानेश्वरीः

१:१-२०

६:१६-२५,१८६,१८७,४५२-४५९

१२:२०७-२२९

१८:४४-४९,१६८२,१६८५, १६९४,१६९५,१७०७-१७०९,१७२०-१७२२,१७२७,१७२८,१७३४-१७६५,१७७९,१७८०,१७८४,१७९१-१७९३,१७९९-१८०१,१८०७,१८०९

उन्मेष ६:

गीताः

२:५३-५५,५६-६५,६७-६९,७१

३-७,१२,१३,३४,४१

४:१,६,१४,२१,२२,२९,३०

६:१०-१५,१८,२०,२१,२३-३०,३२

८:८,१३,२८

१०:१०,११

१२:१३-२०

१३:७-११

१८:५४,५५

ज्ञानेश्वरीः

६:३४२,३४५-३५२

अमृ.:९:९,१०

पा.यो.सू.:

१:२,३,२३-२९,४१-५१

२:२८,२९,३५,४४,४५,४६,४९,५२,५४,५५

३:१-३,११,३५,४९,५५

४:२९,३४

उन्मेष ७:
ज्ञानेश्वरी:
१:१,२,२८,५३,५८
२६५-
२६९,२७१,२७३,३३८-
३४१
२:१५९,१८७,१८८२१६,२२६,२२८,
३:७६,८०-८३,१४५,
१५२,१५५,१५६,१५८,१५९
१८८
४:१०४,१०५,१६५-१७२
५:४९,५०
६:४०८,४६०,४६१
७:५९,१३६
८:७९
९:४०,४१,४९,१७१,१७२,२०७,
२०८,२१०,३९५,३९६
४४५,४४६,४४९,
४५७,४५८,४६०,४७४,
५१७-५१९,
१०:११७
११:७०८
१२:१०४-
१०६,१०८,१०९,११३,
२१३,२१४
१३:४८५,११०३,११०४,
११०७,११०८,११११,११४३
१६:४४४
१७:४०१
१८:९०६,९११,९१७,४००,
१३२३,१४००,१४०५,१४१७,
१४६७,१५१२,१५१३,१७९३,
१७९४
उद्धृत:नित्यपाठ
ज्ञानेश्वरी:स्वामी स्वरूपानंद

उन्मेष:८
गीता:
३:२६
५:२७,२८
६:११,१६,१७,४४,४५
ज्ञानेश्वरी:
५:१५१-१६०
६:५३-६०,१५३-१६०,
१६३-१९१,१९२-
१९९,२०१-२०६-
२११,२९१,२९२,३१०,३२०-
३२३,३२८-३४३,३४५-
३५३
११:११०
१२:१५८-१६९,१७४
१३:८२५,८२६
१८:११३०-११३४,१२२१-
१२२३, १८०९
पा.यो.सू.:
२:१२,३९
३:१८
४:९
सि.सि.प.:
२:३२-३४

उन्मेष:९-१
गीता:
२:५४,५६,५७
११:५५
१२:१३,१४,१७-१९
१३:७-११
ज्ञानेश्वरी:
१३:१८४-३६७,४६१-
५०५,६५६-६६०
१८:१२४२-१२४४
पा.यो.सू.:
२:६५
अप:
११२,११३
उद्धृत:
पं.सातवळेकर:पुरुषार्थबोधिनी गीताटीका

उन्मेष:९-२
गीता:
२:६९
९:२२,३४
११:५४,५५
१२:२,६,७
१४:११,२६,२७

ज्ञानेश्वरी:
११:६७६,६८५,६८७,६८८,६९४
१३:५०६-५११,५३५-६४८
१४:३७१,३७७,३८०,३८२,३८६-
३८९,३९२,३९५,३९७,४०१-
४०७,६१५,६९७-६९९
पा.यो.सू.:
२:१४,३२,४५
३:१-४
सि.सि.प.:
२-३६-३९
अप.:
१०४,१०५,११४-
११६,११८-१२६
अमृ.:
८:१०,१२,१८,१९

उन्मेष:१०
ज्ञानेश्वरी:
१३:६४९-६५५,६६१-६७५

उन्मेष:११
अमृता.श्लोक:१:१-६
ओव्या:२:१-८०
३:३२

उन्मेष:१२
ज्ञानेश्वरी:
१३:६७७-६९०,६९२-८५८

उन्मेष १३:
गीता:
९:१२-१५
१५:१९,२०
१६:१-३
ज्ञानेश्वरी:
९:१७२-१९६
१६:४७-६७

उन्मेष १४:
गीता:
२:६६,७०,७१

३:२५
४:३९
५:१,४,५,१२
६:७,१४,१।५,२७
९:३१
१२:४,१२
१७:२०-२८
१८:५३,६२
ज्ञानेश्वरी:
३:१६९
११:९
१२:१४१-१४३
१६:६८-२१२
१८:१७९४-१७९९
सि.सि.प.:
६:६१

उन्मेह १५:
गीता:
१६:४-२४
१७:१
१८:५३,६७
ज्ञानेश्वरी:
१६:२१७-२६३,२६५-४७३

उन्मेष १६:
गीता:
७:१-१५
ज्ञानेश्वरी::
७:१-१०८
पा.यो.सू.:
१:२९-३२

उन्मेष १७:
गीता:
७:२९,३०
८:१-५
ज्ञानेश्वरी:
८:१-६८
पा.यो.सू.:
१:४१,४२

उन्मेष १८:
गीता:
३:१४,१५
४:२३-४२
६:२७
ज्ञानेश्वरी:
४:११५-१५२,१५६-२१०
६:१५४,२२३,२२६,२२७,२७४-२७९,२८३,२८७-२९१,३२०-३२८
पा.यो.सू.:
१:११,५१
२:२९,३२
३:४-६
यो.ता.:
४,८,१०

उन्मेष १९-१
गीता:
७:५
१३:१-६
ज्ञानेश्वरी:
७:१५,१६,१९-२१
१३:७-१४८

उद्धृत:
गीतारहस्योक्त तत्त्वांचा तक्ता (पृ.क्र.२८२)
गीतारहस्योक्त ब्रह्मांडाचा वंशवृक्ष(पृ.क्र.२८३)

उन्मेष::१९-२
गीता:
१३:१२-१८
ज्ञानेश्वरी:
१३:१५०-१८३,८६४-९५१
सि.सि.प.:
१,२,४-६,२७,३६,४९-५४
पंचीकरण

उन्मेष २०
गीता:
७:१४
१३:१९-२२

ज्ञानेश्वरी:
१३:९५२-१०२८
उद्धृत:(?)(पृ.क्र.३०८)
कोल्हटकर पा.यो.सू.

उन्मेष २१
गीता:
४:४०
६:५,६
१३:१,२२-३४
ज्ञानेश्वरी:
१३:१०२९-११६९

उन्मेष २२
गीता:
६:४१,४२
७:४
१४:१-१८
ज्ञानेश्वरी:
१:१,२
१४:२९,३५-२७८
१८:१२३९-१२४४

उन्मेष २३:
गीता:
१४:१-२९
ज्ञानेश्वरी:
१४:२७९-४१५

उन्मेष २४:
गीता:
१६:२३,२४
१७:१-२२
ज्ञानेश्वरी:
१३:१३१
१७:२१-३२५

उन्मेष २५
गीता:साररूप सर्व श्लोक

—उद्धृत —

उन्मेष ७:
ज्ञानेश्वरी:
उद्धृत:नित्यपाठ ज्ञानेश्वरी:स्वामी स्वरूपानंद

उन्मेष:९-१
उद्धृत:
पं.सातवळेकर:पुरुषार्थबोधिनी गीताटीका

उन्मेष २०
उद्धृत:(?)(पृ.क्र.३०८)
कोल्हटकर पा.यो.सू.

उन्मेष ४६:
उद्धृत:
त्रिकूटादी संज्ञांबाबत मत:डॉ.प्र.न.जोशी:सार्थ श्रीज्ञानदेव

उन्मेष ४८-२:
उद्धृत: पुरुषार्थबोधिनी टीका - पं.सातवळेकर:८८७

उन्मेष ४९:
उद्धृत:
कोल्हटकर::ईश्वरप्रणिधान-९२० सर्वदर्शनसंग्रहकार?), ९३६
लो.टिळक:गीतारहस्य:९२९
के.वि.बेलसरे:९३०
मामा दांडेकर:९३०
पं.वि.दा.सातवळेकर:९३०
बाबामहाराज पंडित:९३१
शंकरमहाराज खंदारकर:९३१
स्वामी चिन्मयानंद:९३२
देसाई:गीतातत्त्वविवेक:९३२
बाबामहाराज आर्वीकर:९३३-९३७
साखरेमहाराज:९३४

उन्मेष ५१:
उद्धृत:
परमहंसयोगानंद-गीता:९७०-९७१
शैलेंद्र शर्मा: योगेश्वरी श्रीमद्भगवद्गीता-एक यौगिक व्याख्या:९७६-९७९

उन्मेष ५२:
उद्धृत:शि.शां.कळवाडे: लघुग्रंथसप्तक:९८८-९८९

उन्मेष २६
गीताः
१५:१-६
ज्ञानेश्वरीः
१५:२९-३१६

उन्मेष २७:
गीताः
१०:४०-४२
१५:७-१४
ज्ञानेश्वरीः
१५:३१७-४२०

उन्मेष २८:
गीताः
८:१
९:२,३४
१५:१८-२०
१८:५४-५८,६१-७०
ज्ञानेश्वरीः
४:१६०-१६५
१५:४२१-५९८
१६:४१-५१
१८:१४३५-१४४९

उन्मेष २९:
गीताः
३:१४,१५,१७
ज्ञानेश्वरः
७:४-७,१२-१४
८:१-४,७,८,१४,१५,२०-२२,२८
१३:१-३,५,६,१२-२३,२६,२७,२९-३४,
१४:३-५,१९,२०,२६,२७
१५:१-११,१५-२०

उन्मेष ३०:
गीताः
२:११,३७,३९,४८
३:१,३-५
४:४१
५:१-६
६:१-४
१२:१२
१७:२८
१८:१-१२
ज्ञानेश्वरीः
१८:६०-७५,८७-२३२

उन्मेष ३१:
गीताः
४:१३-१८
१८:१२-१७
ज्ञानेश्वरीः
१८:२३३-५१६

उन्मेष ३२:
गीताः
१८:१९-३९
ज्ञानेश्वरीः
१८:५१७-८१२

उन्मेष ३३:
गीताः
३:८-१९
१७:२३-२८
१८:४०-४३
ज्ञानेश्वरीः
३:७७-८०,८४-१५१
१७:३२६-४३३
१८:८१३-८८४
पा.यो.सू.:
१:२३
२:१

उन्मेष ३४:
गीताः
७:१६-३०
ज्ञानेश्वरीः
७:१०८-११८,१२३-२१०

उन्मेष ३५:
गीताः
९:१-१५
ज्ञानेश्वरी::
९:१-१७१,१८८-२६४
१०:३०-३२
पा.यो.सू.:
१:२,१७-२९

उन्मेष ३६:
गीताः
९:१६,१७
ज्ञानेश्वरीः
९:२६६-२७७
१३:९२६,९८१-९८४,९८६९९९-१००६
अमृता.:
१:१-६४
पा.यो.सू.:
१:२३
२:१-४,९,१०,१३

उन्मेष ३७:
गीताः
५:२७
६:१०-१५,
७:८
८:८-१५
९:१७
१०:२५,३३
१७:२३,२४
ज्ञानेश्वरीः
६:१०९,२६८,२६९,२७४-२७६,३०२-३०८
७:३४
८:११४-११९
९:१८,१९,२७५,२७६
१२:३१,३२
१७:३२८-३३२,३३६-३३८,३४२,३४३,३५७-३५९,४०१,४०२

पा.यो.सू.:
१:२७,२८
अभंग:
७३५,७५५,७५९,७६१,७६६,६७९,
७८९,७९४,८३६

उन्मेष ३८:
गीता:
३:३
९:१८,१९,३४
१०:१-७,१२-४२
१७:१६
ज्ञानेश्वरी:
९:२७८-३०६
१०:४१,४२,४४,४६-११०,१४९-३३५
पा.यो.सू.:
१:२४,२७-३३
उद्धृत:(?)
बेलसरे -भगवद्गीता(पृ.६००)

उन्मेष ३९-१:
गीता:
१:१-४७
ज्ञानेश्वरी:
१:८५-२७५

उन्मेष ३९-२:
गीता:
२:१-३८,४७
४:१५
५:७
१३:३१
ज्ञानेश्वरी:
२:६-५४,८१-२२९

उन्मेष ४०:
गीता:
२:३९-७२
६:१२,२०,२३,२४,२६,३५,४५
१४:६
ज्ञानेश्वरी:
२:२३०-३३७,३४२-३७०
पा.यो.सू.:
१:१,३-१४

उन्मेष ४१:
गीता:
१:१०,११
२:४७,५५,७२
३:१-७,१८,२०-२४,२७-३५
५:१३
ज्ञानेश्वरी:
२:३६९,३७१-३७५
३:१-७५,१६०-१७४,१७६-२२९

उन्मेष ४२:
गीता:
४:१-४,७,१०-२२,२४,४१,४२
८:१-३,२८,२९
१३:१३
ज्ञानेश्वरी:
३:२३०,२३१,२७४-२७६
४:१-११,१३-४०,६०-८२,८५-
१०३,१०६-११४,२११-२२५
६:१५२-१५६
८:२८-२९

उन्मेष ४३:
गीता:
३:३
४:४१,४२
५:१-२६,२९
१३:१२
ज्ञानेश्वरी:
४:४१
५:१-१४९
१८:९७२,९८८,९९१
अमृता.:
८:१-१७
९:१-७०
पा.यो.सू.:
१:२४

उन्मेष ४४-१
गीता:
५:२७-२९
६:१-१०
ज्ञानेश्वरी:
५:१६२-१८०
६:१-१३,२६-२७,३७-५२,
६१-१५२,२११-२२३,२२८-२६८

उन्मेष ४४-२:
गीता:
२:६१,६४
५:१६
६:१६,१७१९-२०
७:६,७,१२,१६-१९
१०:२०
११:२५,३१,४४,४५
१४:६,११
१८:१६,१८,६२,
ज्ञानेश्वरी:
२:२७३
६:२४६-२९०,२९२-३३३
पा.यो.सू.:
१:२,१५,१७-२२,२९,३२-५१
३:१-२६,२९-५५
४:५

उन्मेष ४५-१:
ज्ञानेश्वरी:
६:५६,१५०-३२८
सि.सि.प.:
२:१-५,७-९
४:१८,२०,२५
पा.यो.सू.:
३:५५
४:१७,१८,२०,२५,३४
योगतारावली:१-३,५, ७,११-
१४,२१,२२
सौंदर्यलहरी:८-१०
हठयोगप्रदीपिका:१००,१०४,१०९,११३,४-
३-४,५,६,७

उन्मेष ४५-२:
गीता:
६:१७-१९
७:१,२
११:५५
१२:१-७
ज्ञानेश्वरी:
६:१४९-३२८, ३५४- ३६३
८:४८-५२
११:१०-३२
१२:४-७,२०-८०
१७:८
पा.यो.सू.:
१:३,२०-२८,३९,४०-४४,४५,४८,५१
२:१-१०,११,१७,२५-२७,४६
३:५,६,३४,३९,४०,४२-५४,
४:२५-३४
सि.सि.प.:
१:१
२:१,३
५:४-७,२९,३१-३३,३५,६३
सौदर्य.:१,९,३६-४१
घेरंडसंहिता:६:१-२२
हठयोगप्रदीपिका:
१:१,२
३:१२९
४:३४

उन्मेष ४६:
ज्ञानेश्वरी:
६:२२८,२३०,२४१,३१५
१२:४८
अभंग:
७३२-७३७,७४०-८०६,८०८,८०९,८११-८१६,८२०,८२३-८२७,८३०-८३२,८३६,८३७, ८३९-८४१,१०६०
ना.भ.सू.:३
उद्धृत:
त्रिकूटादी संज्ञांबाबत शून्यस्थान माहिती: पं.गोपीनाथ कविराज:मनीषी की लोकयात्रा-भगवतिप्रसाद सिंह-८००
शून्य संज्ञार्थ:तत्रैव:८१०

उन्मेष ४७-१
गीता:
९:१३,१४,२०-३३
ज्ञानेश्वरी:
९:३०२,३०५,३०६-४८९
१०:३१,३२
पा.यो.सू.:
१:२३

उन्मेष ४७-२
गीता:
६:३७,४०,४१
७:१८
९:२७,३४
१०:७-९
११:५४,५५
१८:६५,७१
ज्ञानेश्वरी:
९:३९६,४००,४९०-५३५
१०:१०४-१४८
१८:११२९-११३४
सोपानदेवी:
९:३८-४५
पा.यो.सू.:
१:२३

उन्मेष ४८-१
गीता:
७:१९
१०:१६,१७,४२
११:१-१३
१२:१
ज्ञानेश्वरी:
७:१३६
१०:१८९

उन्मेष ४८-२:
गीता:
२:२४
३:११
४:२४
६:२९
७:१९
९:२९
१०:४२
११:१४-३४,४०
ज्ञानेश्वरी:
११:२४५-३०५,३०७-४७८
पा.यो.सू.:
२:१२
३:४३

उद्धृत: पुरुषार्थबोधिनी टीका - पं.सातवळेकर:८८७

उन्मेष ४८-३:
गीता:
११:३५-४२,४५-५५
१२:१-६
ज्ञानेश्वरी:
११:४८२-५५८,५७९-७०८
१२:१-८०
अभंग:१,४,५,७,१७,१९-२४, ४४, ४७,२२२,३५१,५२९,५४४,८७५,९५९

उन्मेष ४९:
गीता:
४:२४
९:१०
१०:१०,११
११:५५
१२:१-१९
ज्ञानेश्वरी:
१२:३८-४०,५८-६०,७५-१४३
पा.यो.सू.:
१:२३-२९,५१
३:४४,४७,४९
४:२५

उद्धृत:
कोल्हटकर::ईश्वरप्रणिधान-९२०
सर्वदर्शनसंग्रहकार?), ९३६
लो.टिळक:गीतारहस्य:९२९
के.वि.बेलसरे:९३०
मामा दांडेकर:९३०
पं.वि.दा.सातवळेकर:९३०
बाबामहाराज पंडित:९३१
शंकरमहाराज खंदारकर:९३१
स्वामी चिन्मयानंद:९३२
देसाई:गीतातत्त्वविवेक:९३२
बाबामहाराज आर्वीकर:९३३-९३७
साखरेमहाराज:९३४

उन्मेष ५०:
गीता:
१:१,११,१४,१५,२८,३२,३४
२:७,११,१४,१६,१९-२५,२८,२९,४८,५०,५१,५४,६५,६९-७२
३:१,३,१५,१९,२२,२३,२७,२८,३१-३३,४२,४३
४:१,४-७,९,११,१३,१४, २४,३३-४१
५:५-७,१०,११,१४-२८
६:५,६,१०-४७
७:३,४,६-३०
८:१,३-१६,१६-२२
९:४-६,११-१३,१६-१९,२२-३४
१०:२,३,१५
११:२-५,९,११,१४,१५,२४, २५,३०,३१,३६,४१,४५-४७,५५
१२:१२-२०
१३:१३-३४
१४:१-२६
१५:१-५,७-२०
१६:१-४,२१-२४
१७:२३-२८
१८:१-४६,५०-७८
ज्ञानेश्वरी:
१:१,
२:२७३
५:५२५-५५७
११:६०९-६१५
१७:३५३-३८६,४०१-४०४
१८:१२०९-१२१३,१२१८१२३६-१२४४, १४४०-१४४७,१६३२-१६३७,१६५७,१८००
पा.यो.सू.:
१:२३-२९,३२,४७
२:३-१३,४५

उन्मेष ५१:
गीता:
४:१-३,८,१०,२४
५:२७-२९
६:१०-१५
७:१-३
८:५,७-२७
ज्ञानेश्वरी:
६:१५९,२४४
८:६९-२७०
अभंग:८२८,८२९,८३७
उद्धृत:
परमहंस योगानंद-गीता:९७०-९७१
शैलेंद्र शर्मा:योगेश्वरी श्रीमद्भगवद्गीता-एक यौगिक व्याख्या:९७६-९७९

उन्मेष ५२:
ज्ञानेश्वरी:
३:१५५
६:२५०,२५७,२६८,२९६,३२७
१८:१७५४
नामदेव गाथा:८९९,९०२,९०७,९०८,९६५-९६७,९६९,९७६,९८१,९८४,९८६,९८७,१००४,१०१०-१०१३,१०३१,१०३२,१०३६,१०५७,१०५८,१०६८,१०७३,१०७६,१०८०,१०९१,१०९२,११२९,११५५,११५७,११५८,११७३,११७४,११७७,
दासबोध:१०/७
सि.सि.प.::
२:२६-३०
उद्धृत:शि.शां.दाण्डेकर:
लघुग्रंथसप्तक:९८८-९८९
३:११,५५
४:३४

उन्मेष ५३:
गीता:
६:२०-४६
ज्ञानेश्वरी:
६:३३७,३३८,३६३-४५६, ४६२-४८१
७:१३६

उन्मेष ५४-२:
गीता:
२:२९,६२,६३
३:३७
४:१९,२०,३४
६:१०,२९
७:१६
९:३०,३२
१२:१२
१३:७-११
१६:१०,१८,२१
१८:५,१२,१३,६७
ज्ञानेश्वरी:
१:१७
६:१८६-१९१,२९३,३२१,४२०
१२:८९-९२,१५६,
१७:३४३,४०० -४०५
१८:१११३,१११४,१११७,११२४,११२५,११३०,११३२,११३३,११८१,११८२
ना.भ.सू.:२-१४,१६-३०,३३,३५-५८,६०-८३
शा.भ.सू.:१-५,७-८, १९, २०, ८२,८४,९०,९६,१००
पा.यो.सू.:

अभंग:६,७,११,१२,१५,७५, ७६, ८२,८५,९४,९७,९८, १०४, १०९, ११४,११६, ११७,१२३,१३१, १३३, १३६,१३८,१४३, १४५,१५०,१५८, १६२,१६८,१६९,१७१-१७३,१७५, १८८,१९०,१९४-१९६,२००, २०१,२०६,२०८,२१६, २१७,२१८, २२०, २२३, २२५, २३०,२३५, २४१,२४२,२४५-२५०, २५२, २५३, २५५,२५७, २५८, २६०,२६२, २६३, २६५, २६६, २६९, २७२,२७३, २७५-२७७, २८०,२८३,२८८, २९१, २९४, २९५, २९७,२९८, ३०२,३०३, ३१४, ३२४, ३२५, ३२९,३३३, ३३४, ३३६, ३४३, ३४४, ३६२,३७७,३८७, ४०५, ४१३, ४१७,४२०,४२२

हरिपाठ:ज्ञानदेव-४८-७४

निवृत्तिनाथ,एकनाथ,नामदेव, सोपानदेव,तुकाराम

उन्मेष ५५-१:

गीता:

४:२४-३०

१८:१,४५-५८

ज्ञानेश्वरी:

६:१५९,१९९,२००,२०८,२१०,२१४, २१५,२२१,२२३, २२५, २२७, २२८, २४०-२४३,२४६,२४७, २५९, २६८, २७२, २७४, २७६,२७८-२८१, २८८, ३०२-३०६, ३१०, ३१३, ३१५,३२०-३२२

१२:५,७

१८:३०-४३,५०,७६-८६,८८५-१२७७

सौंदर्यलहरी:१०३ श्लोक-९,१०,

योगतारावली:२-२९

मुक्ताई:अभंग:७,८,११,३२

ज्ञानेश:१०२०

एक.भागवत:१२:३००-३५२,१४:३९८-५४२,१५:१३०-१३६,२०:२५०-२६८

उन्मेष ५५-२:

गीता:

३:२,३

५:४-६,१६

७:७,१६

९:३४

१०:११

१२:१२

१८:५५,६५-७८

ज्ञानेश्वरी:

६:२९१-२९२

७:१०८-११२,१३६

१८:१०५०-११७५,११७७, ११८३,११८५-११९२, १२०१-१२२२,१२४४-१२७३,१३३३-१४१६

शां.भ.सू.:४,५,७,१६

उन्मेष ५६:

गीता:

१:२१

२:७,६९,

४:२४

५:२०

६:२१,३२

७:१७

८:११,२१,२८

९:३२

११:५४

१४:२७

१५:६

१७:२३

१८:४५,४९,५६,५८-७३

ज्ञानेश्वरी:

१८:११९२-११९९,१२२३-१२४३,१२७३-१३३२,१४१७-१४२५,१४६६-१५७८

उन्मेष ५७:

गीता:

१:१

२:११,४०,४७-५१६९

३:१,३,५,४१,४९

४:१,३,७,२४

५:४,२७,२८

६:५,११,१६,१७

७:१-४,८-११,१८,१९, २९,३०

८:१-४

९:१६,१७,२०-२२,२६, २७, ३४

१०:२,४२

११:३,३२,५५

१२:८-१२,२०

१३:४-११,३४

१४:३,२६,२७

१५:६-१५,१९

१६:१-३

१८:६५

१८:६५,६७,७८

ज्ञानेश्वरी:

१:१७,२०-२२,२५

२:२६९,२७१

३:३६,६३,१५१,१८६-१८८

४:६५,६७

५:१६

६:१०६,१९२,२९१,३४२,३६३

७:४२,४३,९।१३६,१३७

८:४६-५३,५९-६८

९:१,११२,११७,११८,१३०-१३५,१८८,२१०,२१२-२२८,२३९-२६२, ३०२,३३३,४४९,५१६

१०:७४,१०८-११०,३१७

११:२९१,७०८

१२:६०,७३,७५,८९,९०,१०४,१०५,१३७-१४३

१३:२४८,२४९,५०९,८५३,९२६,९८१-१००६

१४:१२७,२२३-२२५, ४०२,४०३

१५:२६७,३३४,५६८,५८३-५८७

१६:४

१७:६-८

१८:१७६,१७७,२२२,८८५-१२७३,१४१७-१४२५, १६३२, १६६६, १७९९, १८०७, १८२२

सोपानदेवी:९:४४

चां.पा.:१

पा.यो.सू.:

१:२३,३२,४१

४:२९

अमृ.:४

१:१,१८,१९,२७

९:६०

यो.ता.:२९

उन्मेष ५८:

गीता:

१८:७४-७८

ज्ञानेश्वरी:

१८:१५७४-१५७६,१५७९-१५८६,१६०२,१६५८,१६६८-१६८०,१६८६-१७२०, १७२३-१७४१,१७६६-१८१०

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

ले. विभाकर विठ्ठल लेले
बी-१, श्रीव्याघ्रेश्वरप्रसाद सहनिवास,
कस्तुरी प्लाझासमोर,
मानपाडा रोड,
डोंबिवली (पूर्व)
४२१२०१
——————————————
भ्रमणध्वनी:९८२०३००९०५
दूरभाष:०२५१-२४५६९३०

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ

ग्रंथलेखनारंभ - मे १९९१
मूळ ग्रंथलेखनसमाप्ती - ४/९/२००२
श्रावण कृ.१२ - स्वामी स्वरूपानंद पुण्यतिथी
उपशीर्षके इ.
४/९/२००२ ते २६/४/२००३
ग्रंथामागील भूमिका - १०/३/२००५
एका योग्याचे आत्मवृत्त (परिशिष्ट) - २८.२.२०११
टंकलेखनकाल
६/५/२००९ ते २२/७/२०१० (आषाढ शु.१२)
संपादनकाल
१/८/२०१० ते २५/५/२०११
ग्रंथसंपूर्ण:२६/५/२०११

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ



लेखकाचा परिचय

विभाकर लेले

(स्वामी योगेश्वरानंद)

बी. ई, बी. एस्सी, एलएल. बी.

अभियांत्रिकी व्यावसायिक सल्लागार

अनेक विषयांची आवड असलेले संशोधक

[गणित, खगोलशास्त्र, खगोलभौतिकीविज्ञान, विज्ञान, अभियांत्रिकी, जनुकशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि आण्विक विज्ञान]

मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषा अवगत आणि साहित्याची आवड

तत्वज्ञान, गूढवाद, योगविद्या, ज्ञान, भक्तिशास्त्र, तंत्रशास्त्रे, वेद आणि उपनिषदादी विषयांचे प्राच्यविद्यासंशोधक

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वरमाउलींचा सिद्धमहायोग [कुंडलिनी योग – पंथराज/क्रमयोग] आणि पातञ्जलयोगाचे अनुभवसिद्ध जाणकार तज्ज्ञ

गुरुसंप्रदाय आणि परंपरा

नाथसिद्धसंप्रदायाची मुख्य परंपरा: आदिनाथ उमादेवी – मत्स्येन्द्रनाथ गोरक्षनाथ – गहिनीनाथ – निवृत्तिनाथ संत ज्ञानेश्वर – सत्यामलनाथ –गैबीनाथ साध्वी माई गुप्तनाथ –उद्बोधनाथ केसरीनाथ – शिवदीननाथ नरहरिनाथ – महिपति – वासुदेवनाथ

ऋणानुबंधी

१. श्रीमत् गौडपादाचार्य – आचार्य शंकरभगवान –अद्वैतानंद – सत्यदेवानंद सरस्वति

२. सिद्ध संप्रदाय: श्रीनित्यानंद स्वामी – मुक्तानंद अवधूतानंद

ग्रंथप्रसिद्धी: मराठीतील १. **'योगदा श्रीज्ञानेश्वरी'** (मूळ ग्रंथ आणि त्याचे एकूण १२ भाग)

३. इंग्रजी ग्रंथ **'YOGA OF GITA EXPOUNDED BY SAINT DNYANESHWAR'- PARTS 1 TO 4**

(to be continued upto 12 Parts)

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।

तत्र श्रीर्विजयो भूतिध्रुवा नीतिर्मतिर्मम्।।

(१८-७८) श्रीगीता



हा ग्रंथ कोणाला अर्पण करू!

दिवंगत मातापिता -पत्नी / कन्या आणि पुत्र यांना त्यांच्या माझ्यावरच्या प्रेमाखातर आणि ग्रंथलेखनास परोपरीचे साहाय्य केल्याबद्दल,

की मित्र आणि सुहृदांना ज्यांना तो फार आवडला आहे; की मला गुरुवत असलेले आपले ग्रंथ जसे काही माझ्यासाठीच रचून ठेवलेले आहेत, अशा ग्रंथकारांना;

माझ्या सांप्रदायिक आणि परंपराप्राप्त श्रीसद्गुरूंना

की आणखी कोणा अनामिकांना!

या सर्वांच्याच हृदिस्थ असणाऱ्या

श्रीज्ञानेश्वरस्वरूप जनार्दन श्रीकृष्णपरमात्म्यालाच

योगदा श्रीज्ञानेश्वरी

हा माझा ग्रंथ त्याच्यावरल्या प्रेमाने आणि भक्तिभावाने माझ्या त्याच्याप्रतिच्या सेवेप्रीत्यर्थ

एक फूल ना फुलाची पाकळी या भावनेने त्याच्याच वचनावर आसंबून -

"पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।

तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः।।९-६।।गीता।।" -

मी सादर श्रद्धापूर्वक अर्पण करतो!!!

त्याने तो ग्रहण करावा अन् मला कृतार्थ करावे, हीच त्याच्या चरणी प्रार्थना!!!

किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी गेलें।

एथ माझें जी उरलें। पाईकपण ।।१८-१७९२।।

माउलींचा शरणागत

स्वामी योगेश्वरानंद

(विभाकर वि. लेले)

"त्वदीय वस्तू मे गोविन्द करोमि त्वदर्पणम्।।"

ॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐॐ



योगदा श्रीज्ञानेश्वरी

लेखकाचा परिचय

ग्रंथ : योगदा श्रीज्ञानेश्वरी

लेखकः स्वामी योगेश्वरानंद (गुरुदत्त नाम)

विभाकर वि. लेले (व्यावहारिक नाम)

शिक्षणः B.E.; B.Sc. (Pune-१९६६,१९६७)

LL.B. (Mumbai-१९८६)

व्यवसाय:अभियांत्रिकी क्षेत्रातील व्यवस्थापन,

Consultancy Services

अभ्यासू वृत्ती, मेहनती स्वभाव, शैक्षणिक क्षेत्रात सुयश, अनेकविध विषयांची आवड व त्यांचे चौफेर वाचन, ज्ञानग्रहण, मनन व चिंतन, विज्ञान, अभियांत्रिकी आणि कायदाविषयक तज्ज्ञ

गणित, खगोलशास्त्र, जैविक विज्ञान, मानववंशशास्त्र, जनुकशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशस्त्र, अणुविज्ञान, अभियांत्रिकी इत्यादी अनेक आधुनिक विज्ञानसंबंधित शखांत रस आणि गती

मराठीसह इंग्रजी व हिंदी भाषा अवगत आणि त्यातून विज्ञानाव्यतिरिक्त साहित्य, अध्यात्म, योगशस्त्र, उपासना व भक्ती, तंत्रशास्त्र, श्रुति-स्मृति-उपनिषदादी पौर्वात्य अक्षरवाङ्मय, गूढवाद (Mysticism & Theosophy) व तत्त्वज्ञान यांसह अनेक विषयांचे आकलन

पतञ्जली व ज्ञानेश्वरप्रणीत भारतीय योगशास्त्राचे सप्रायोगिक अभ्यासक आणि कुंडलिनी-सिद्धमहायोग या विषयाचे अभ्यासक आणि नाथसांप्रदायिक जाणकार

योगदा श्रीज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या लेखकाचा गुरुसंप्रदाय आणि परंपरा:

आदिनाथ-उमादेवी-गोरक्ष-गहिनी-निवृत्ति-ज्ञानदेव-सत्यामलनाथ-गुप्तनाथ-केसरीनाथ–शिवदीननाथ-वासुदेवानंदनाथ यांपासून गुरुक्रमाने प्राप्त झालेला नवनाथ सिद्ध संप्रदाय

गौडपादी परंपरेतील श्रीमत् आचार्य शंकरभगवत्पाद यांच्यापासून प्रसृत झालेली अद्वैतानंदजीमहाराज गठित सत्यदेवानंद सरस्वति परंपरा

नित्यानंद-मुक्तानंद अवधूतानंद संकल्पसिद्ध परंपरा

